Ajay I Choudhary[1]
Hislop College
Nagpur, India

Оригинални научни рад
UDK 24-5:305-055.2(540)

BUDDHIST IDENTITY: A CASE STUDY OF BUDDHIST WOMEN'S NARRATIVES IN NAGPUR CITY

Abstract

Indian women rarely observed as independent identity due to its caste hierachization. Thus a woman identity along with an identity of being lower caste simultaneously makes her a victim of a rigidly imbibed patriarchy and the caste system in our society. Lots of conversion had taken place to transform the life of human beings. But the investigative studies done on these kinds of religious conversions mostly focused on men and gave less importance on its impact on women identity. Among these conversions, Dr. Ambedkar's conversion to Buddhism had succeeded to a great extent in providing a new respectable identity to many. Yet the status of Buddhist women, among the Buddhist community, remained the most unexamined part of this conversion. Thus, this paper tries to examine whether the Buddhist identity succeeded to provide a sense of self respect and equal status to Buddhist women or what extent the Buddhist identity stood able to replace their stigmatized identity in public sphere by investigating the narrative provided by the Buddhist women about their own identity.

Keywords: Buddhism, Brahmanism, Mahar community, Buddhhist community, Bhddhist women, Buddhist identity, Hindu festivals, caste and identity politics

Introduction

It has been said that the history of ancient India is nothing but the conflict between Buddhism and Brahmanism. It means that Karl Marx's philosophy of conflict is still relevant to observed as a tool of social change. The social change occur in society at different level; firstly by targeting individual for change at limited sphere without touching system, secondly individual transformation in his behavior with specific context, example of religious movements. While other change could observed in the context of revolution or transformation in which people are not interested to work within system rather they feel that the system

1 E-mail: ajaychou@gmail.com

it's self has problems of values and morals that could not rectified at all and over through it applying any means. At the present scenario, the institution has become major centers for expecting social change in India either through political or social institution.

The social changes gradually started in India either to reform its society or to change the social system itself. Those who fail to rectify the notion of caste system within Hinduism like Dr. B.R.Ambedkar, Ayoti Tass, Laxmi Narsu have taken alternative step to reclaim the lost self respect and humanism which was existed in Buddhism. The leaders like him interpreted and explore lost dignity and pride of untouchable in Buddhism by presenting them the lost History from subaltern point of view. It has created the wave of consciousness and courage to question the faith in Hinduism. As a result of it, the Mahar and other untouchables Community embraced the Buddhism under the leadership of Dr. B. R. Ambedkar in 14th October, 1956. The reason behind of embracing Buddhism could locate into three folds that is Buddhism is an aboriginal religion of India and ex-untouchables as well as touchable were none other than Buddhists. Secondly, Buddhism is based on the rationality with scientific approach. In other words, Buddhism is not based on science rather science is based on Buddhism. Thirdly, Buddhism has universal principles which has been inculcated in Indian constitution that is liberty, equality and

fraternity with social justice. Thus, by quoting Richards Taylor's, it makes point that there is very much similarity between Constitution and Buddhism to express the religious and political life of the community (Vishwanathan; 1998: 228). It might be the vision of Ambedkar that this universal principle would be the solution to Indian caste based society. In the Indian caste based society, fraternity is more imperative step for cementing the different castes of Indian society. Therefore, in his posthumous writing of Buddha and His Dhamma, are carefully recognized to fall into symmetrical parts covering not only the conversion of sinful people like Brahmins, criminals and other fallen beings but also conversion of women and oppressed social classes (Vishwanathan; 1998: 229).

While embracing Buddhism, Ambedkar has given 22vows so that the common man of Buddhist community could follow the Buddhism at his/her simplest manner. He did not want any yardstick to become Buddhist or Buddhist monk. According to him, anyone who will follow the 22vows is the Buddhists. At the present circumstance, it has been said that due to Buddhism, the untouchable community like Mahar observed the drastic transformation in their life style. Now they are leading in every sector of life either political or social. In this regards, the acute riddle arise that at what extend the Buddhism has changed the life of Buddhist women. Whether the Buddhism has really created any impact on them or still they are treated with same caste mind as a lower or untouchable despite their formation of new entity. It is well known fact that this Mahar community embraced Buddhism to liberate themselves from Hindu social order but

they are struck with old caste identities and recognizing with new identity from different point of views.

The reason behind to examine the narrative is to explore the meaning carrying by the people about their life and grasp highly expressive cultural elements exist in narratives. It has stated that a narrative is beginning and ending a fact by distinguishing it from the rest of world and opposes it to real world (Mcquillan; 2000: 88). The individual experience has the meaning which could figure out from the past experiences. Therefore, providing the account of own stories is nothing but a reflection of own identity. In this process, an individual recognize him/herself in their narratives and we seek to comprehend human events, action and account to make sense in the form of narratives or stories (Venema Issac; 2000:117). It is not what happened to their life rather what meaning they carry while experiencing their lives. It is nothing but to subjectify the meaning while objectifying the reality. The meaning could be grasping through the conduct of human behavior or action because in every action there is intension and without intension the meaning is meaningless. For this, I have analyzed the narrative given by the Buddhist women about their understanding of new identity i.e. Buddhists identity.

Impact of Education on Buddhist Women

Many studies has been conducted on the neo-Buddhists community on their development and soci-economic progress but all this studies are centre around the male point view and unable to provide the accountability of women perception which is the major part of Buddhist community. It is mentioned that perception of Buddhist has changed after the conversion. According to this study, Buddhist women carrying two perception where one is conversant with and inspired by the Dr. Ambedkar's thought while other one totally unaware of this about it which is useful for understanding the issues of consolidation of organization and unity (Paswan; 2002: 202) which is similar to my study. Therefore, I have divided the Buddhists women into two parts; firstly to understand the Buddhist women who are following the Ambedkar's principles and secondly those who are still not acquaint with Ambedkar's philosophy of Buddhism. Hence, the historical intelligible of Buddhist conversion could be phenomenologizes by analyzing the narratives of Buddhist women. It focuses the objectification of meaning in the context of Buddhist conversion which would reflect the consciousness about the Buddhist conversion under the leadership of Ambedkar. It has been observed that Buddhist women perceived the Buddhist conversion in the arena of caste system and feel that worshipping Hindu God doesn't have place in their home and it has happened due to the education. The supriya, a married and Post graduate Student of Pali, explain explicitly about the progress in Buddhist women due to Buddhism and education. She said:

> *"There is change in Buddhist women due to emancipation from caste system and more opportunity of upward mobility to avail education. I got consciousness because of my father and some movies like Dr. Baba Saheb Ambedkar about the condition of my people".*

It means that conversion has benefited them and provided opportunity to advance them in the domain of education. Historically the women does not have place in education system. The code of Manu law has restricted the women to right to have education. It is well known aspect that education leads to think and ask to behave rationally. Prapti, working in Central Bank of India explains that it is the impact of constitutional rights which was denied by the Manu constitution. It has been observed that Buddhism has considered being caste due to caste certificate in which the neo- Buddhist has to mention their caste. Although, the caste is not at all exit theologically but might be practice by them:

> *"There is change in Buddhist women due to educational opportunity which was denied by the constitution of manusmirti but the present constitution has granted the equal rights and right to education to us. For me Buddhism is not caste and any one can follow it. It is very pity that Buddhist women doesn't know about the Buddhism and even devoid of having the knowledge about Buddhists conversion under the leadership of Dr.B.R.Ambedkar"*

There is no doubt that the education has changed their thinking and become conscious about their constitutional rights which has assisted to open the door of progress. There might be thinking of Dr. Ambedkar that education could lead to create casteless society. It could tantalize on the individual's perception that in what way it has been engaged whether to maintain the caste or annihilate the caste. The main impact of Buddhist conversion is education. For dish, a Civil Engineer, it has happened due to education.

> *"The education has changed the thinking process of Buddhist women especially the educated women but the uneducated women is still dependent on other and feel weak. Now educated women can inculcate the culture in the right direction and can play her major role in every direction of development like in economic, culture and social"*

The change in Buddhist women doesn't occur only due to Buddhist conversion. It could be seen merely the impact on the first or second generation of Buddhist community but the third generation become more enthusiastic after knowing about the Ambedkarism's ideological dimension of social change on the basis of universal principles that is liberty, equality and fraternity. The rationality of Buddhism dispenses the space to question the existing social order which is not allowing them to live with dignity. Hence, the Buddhist women after becoming conscious about their own history worked in the different Buddhist or Ambedkarite organization. The subhangi katekar administer the account that 'Buddhist women which are working in different Ambedkarite organization are

more independent and free to take their decision as compare to inactive Buddhists women.

> *I became conscious due to Buddhist organization and developed my personality. As a result of it, I am no more dependent on others and can take decision which is applicable to my consciousness. I have observed that women working for society are no more dependent on others at all.*

It is creditable that change in Buddhist women is due to accepting the Buddhist principles. The Buddhist principle of equality is inculcated in the thoughts of their family members. The educational consciousness has penetrated into the mind of Buddhist women due to Ambedkar's message of Educate, Agitate, and Organize. The message implies to individual consciousness in which an individual not only has to educate himself but also about the society. While educating himself, the individual would come across ideas which may not applicable to the concept of universal principles i.e. equality, liberty, and fraternity would agitate and after arriving on issues of humanism would lead to organizing the society. In the Buddhist community, the mutation in their life honorary to education but the others aspects has not materialized practically. It's shows that Buddhists community has given more emphasis on education. In this regards, the Kalpana Meshram, an Architect, explicit that Buddhist women lead in education due to the Ambedkar's message of Educate, Agitate and Organize.

> *Buddhist women are leading in education due to the Ambedkar message of Educate, Agitate and Organize. Education has created impact on our life. Even in poor family, women have given more important to education which is the main reason for transforming the life of Buddhist women. She has developed very speedily compare to other women (Non-Buddhist) of society.*

It is has been observed that in Buddhist community explicitly availing the space to question the traditional aspects of Buddhism like paritaran pat (rituals done before to enter in newly made house), superstition exist in Buddhism and Hinduism and also to patriarchal values. According to them, it is only religion which allows questioning every aspects of reality with rationality. Conversion to Buddhism has transit their life and able to shed the feeling of inferiority complex. In other words, the Usha Jambulkar, M.Sc (Zoology), B.Ed and working teacher, focus the broader aspects of conversion in the reference to caste system of Hindu religion.

> *We have gain the confidence and wipe out the inferiority complex being part of caste system after the conversion. I feel more confident and pride. I don't feel that I am inferior to any so called upper castes nor to men of our community. This change occurs in our life due to conversion and three words Educate, Agitate and Organize given by Ambedkar. As a result, it has developed the healthy atmosphere of education and struggle against unequal system of Indian society. Due to education and*

> *awareness, we are not getting into Hindu religion and nor involved into superstition. We have feeling of equality*

But the inquisition arises that change in Buddhist women could not locate complete transformation in their life. It has been said that Buddhism is based on practice and merely conversion is not enough to claim themselves as Buddhists until each individual of community would not follow the path of 22 vows given by Dr. Ambedkar.

After fifty decades of conversion, Mahar community usually recognized as Buddhist on government records but in practice it is difficult to categorize them as Buddhist. The reason behind it is a perplexity of inter relationship between Buddhism and Hinduism. Palavi Nandeshwar, Civil Engineer, has shifted the responsibility on educated people which has not played role for annihilating the caste system due to devoid of knowledge about Buddhism. Thus, they remain aloof from Buddhism and still attach with the notion of Hinduism.

> *This has happened because of unaware about the Buddhist history and don't know about the basic aspects of Buddhism. It is not clear to my community. I feel that role and responsibility of educated people to propagated Buddhism in right direction has not played properly. As a result of it, there is lot of puzzle among Buddhist community. If we get the awareness of Buddhism and spread it with right direction, I feel, our people would not feel hesitate and reluctant to reveal their Buddhist identity.*

Thus, the transfiguration in Buddhist women is abided with reference to leaving Hinduism. It has visualized that the definition of change has limited to worshiping and celebrating Hindu festivals. It clarify that Buddhist women are superstitious due to influence of Hinduism but those who followed and read Ambedkar has different picture of Indian history and Buddhism itself. The question of investigation has raised by the Buddhist women itself that there are people who worship both religion by keeping Hindu God and Goddess picture along with Ambedkar and Buddha's idol. If any would oppose this particular action would often replied on the name of orthodox Buddhist. This understanding raise the issue whether Buddhist are opposing the teaching of Buddha or not been trustworthy to Ambedkar itself.

Politics of Festivals

It is perceived that the Mahar community left all the Hindu god and goddess by adopting 22 vows given by Dr. Ambedkar in which it has mentioned that mahars would not celebrates and worship any Hindu God and Goddess and follows the panchsheel of Buddha. The idea and reason behind the conversion has passed out from grandfather or father to their children. This new generation and old generation have their own intelligible about this conversion. It occurs due to oppressive system of caste and for some it is to negate the religion of inequality

and establish the Buddhism on the basis of rationality.

After the fifty decades of conversion, the Buddhism has been perceived by the Buddhist community at different level. It is overtly observed two religious ideologies at equal platform by celebrating their festivals without differentiating them because of fusion exist in their relationship between Buddhism and Hinduism (Shastree; 1996:73-74). Thus, it is surprising to know that people of Buddhist community is popularly proceeding the both religious ideologies which is in very contradictory to each other. It is un-adjustable to represent the ideas of equality and inequality at the same platform. The Hindu festivals like diwali, dushhare, holi, etc are not only the symbolic representation of domination of Hindu culture but also perpetuate the principles of inequality on the name of equality principles which goes against the Buddhism and Phule-Ambedkar understanding. It is not that Buddhist are celebrating only Hindu festivals but also Buddhist festivals by keeping portrait of Buddha and Ambedkar. They celebrate Buddhist festivals like birthday of Ambedkar i.e. 14, April, ashokdushami (14^{th} october) and Buddha Pornima. Thus, it is enthusiastic to capture the perception of Buddhist women in domain of conversion and 22 vows. It has observed that people are following both traditions that are old and new at the same time by providing their own reasons. One of the respondents says that supriya speaks what Buddha and Babasaheb said teaching provided by her father. She speaks that how her Buddhist friends celebrate and invite her for Hindu festivals

> *My Buddhist friends celebrate all Hindu festivals like Navratra, gauri Puja, Diwali and all Hindu festivals. My father has told to follow what Baba Saheb and Buddha have said. I feel if it is not in my culture why I should follow. I don't have any restriction to follow Hindu culture and Ambedkar hasn't done only for SC's but he has done for all community. It is different things the people has not take cognizance of his contribution.*

The other side of viewpoint is that just negating the Hindu culture and tradition would not make themselves as a Buddhists. It has emphasized that the principles of Buddhism is based on practice and rationality. If it is follow, than it is complicated to claim as Buddhist. It always struck to non-Buddhists world that despite having guidance of Buddhism, why there is commonality between Buddhist people and Hindu People. For this, people belong to Phule-Ambedkarite ideology resist to celebrate festivals and follow the Hindu Culture but who are untouched to ideas of phule-Ambedkar are still roam around old tradition of Hinduism. It has been argued that converted Buddhist people in fact belong to Hinduism. Thus, it is not easy to separate them from their old identity. Hence, it makes to think that are the Buddhist community deceiving the Ambedkar and His teaching or inferiority complex make them to behave in such manner. Kirti, working girls in Panjab National Bank focus the broader aspects of Buddhist Community and question the action of Buddhist women itself.

> If we follow Buddhism, we can create separate identity which is yet to form….whatever the changes has taken place in the life of Buddhist women only due to the efforts of Baba saheb Ambedkar. If Babasaheb has said something we must have to follow because he has provided the reasons and rationality to understand it. He is Guru to us, if Guru's Guru (Buddha) is saying something, it must have logic. Now people are moving to that direction which has opposed by Ambedkar. His wish was that they should not follow Hindu religion based on caste system or superstition. He has studied in great Universities of the world and given us Buddhism after studying all religion. Even after this, people do not trust him, what a disappointment and shame to our community!!. If he could wish, he would have taken Mahayana or Hinyana but he has taken only Buddhism so that it could reach to common understanding of people. In spite of taking all facilitates, if people are not paying back to society and not following Buddhism, it means that they are deceiving Babasaheb…..they usually do the puja of Gautama Buddha and babsaheb but never do the puja in the direction of panchsheela and astan marg along with her children.

It is realized that youth of Buddhist community expecting the change within community in the direction of what Ambedkar said to them. The celebration of Buddhist festivals now has changed. It has been argued that the Buddhist celebration is not restricted to only dancing or just distributing sweets among the people but now the people at the contemporary epoch moving towards organizing such programmer in which an individual could enhance his/her capacity to know about Buddhism and thoughts against system of slavery. For it, Disha, an Civil Engineering unfold the changing activities taking place in Buddhist community and question just following Buddhism without thinking is not make any difference to other religion.

> Now days, Buddhist people organizing seminar, speeches and debates related to phule-Ambedkar and Buddhism which is new trend in our society. I feel that some years back people for the sake of going, they were going to vihars and doing vandana which was celebration for them. I have observed and seen last two years there is group discussion. Women's participation is always in large numbers at Buddhist celebration. Just following rituals of Buddhism is not but following Hinduism. If you are following Buddhists thoughts is Buddhist. If Buddhist are following both culture (Hinduism and Buddhism) cannot be said as Buddhist.

It is well known fact that Ambedkar has denied refugees to sangha as he said that present monk are not capable to conduct his behavior on the basis of morals and according to principles of Buddhism. There might be a reason that Buddhist community could not produce the Buddhist monk who could be conscious about Buddhist values and become the light of knowledge for Buddhist community. As a result of it, the Buddhist community become paralyzed due to lack of enlighten Buddhist monk which make them understand the modern principles of Buddhism on the basis of science. It is historical proved that the lack of Buddhist laity has become one of reason for the decline of Buddhism in ancient India. Even without the monk guidance people still celebrates Buddhist festivals according to their own knowledge. The respondent kalpana Meshram, an Architect, provide mix account of festivals they celebrate in their home which seems to disorientation in her perception.

> There is lack of awareness in those who perform Hindu rituals. It is because the Buddhist monk has not worked for the propagation of Buddhism. We don't celebrate any Hindu festivals which exist in my family. But sometime we prepare some sweets and fire crackers in our family. But I feel when I read and understand these things, gradually this type of celebration cease to celebrate. If we are not doing these things doesn't mean that we celebrate Hindu festivals……we just have to propagate our own religion without hurting anyone feeling. In short we should practice our religion rather one speaking about others.

The statement seems to be defensive regarding the celebration and distributing the sweets on the occasion of Hindu festivals. This is ergo it is unable to make remarks that whatever the notion they celebrate the Hindu festivals or participate, it is indirectly supporting the Hindu festivals only by saying that our notion of celebration is different to what Hindu perceived or celebrate it. The other phenomena exist in Buddhist community is that they endeavor to negate all Hindu tradition but celebrate anyone of the Hindu festivals by giving their own reason or general perception of society. Usha Jambulkar, M.Sc (Zoology) B.Ed expresses her comprehension and justification about celebration of Buddhist festivals in relation Hindu festivals.

> I don't know much about other festivals and the purpose of their celebration. I use to celebrate Diwali because of my children. I feel Diwali is festivals of everyone and because of it the feeling of sarvadharam sadbhav. I felt why we should not celebrate diwali during 14^{th} April or day of Dhamma Chakra Parivartan Din.

It seems that Buddhist people trying to replace the same tradition of Hindu festivals on the days of Buddhist festivals which is nothing but transferring

the Hindu tradition on the name Buddhist festivals of 14th April or 14 October. Although, the Buddhist community people denied the celebration of Hindu festivals or tradition of inequality exist in social system but at the same time they participate in close friends function or Hindu festivals. Being close friends, it is difficult to deny them and if they would agitate on such issues would spoil their social relationship and remain stuck forever. In return, Buddhist women would not call them for their Buddhist celebration. Vibha Gajbhiye, an financial Advisor of LIC, make visualize the pressure of their close surrounding and actively participate in social issues and regularly visit to dikshabhoomi of Nagpur.

> We go participate in Hindu festivals in very selective places like our close friends. They involve us in their family programmer with respect and speak very respectfully. I feel that as a friend there is nothing wrong to participate because they are our close friends. I have friends like Brahmins, Panjabi which won't call us on such occasion but other occasion like birthday or get-together we participate to maintain our relationship. We don't call any non Buddhist people as we don't make any sweets nor we called them in our house……we celebrate all Buddhist festivals and regularly visit dikshabhoomi and conduct medical camps for people who visit Dhamma Diksha Day.

The other aspects of Buddhist women's perception towards festivals of Hindu and Buddhism internalize it while communicating and inviting non Buddhist people in her religious festivals. The reason behind to celebrate Hindu festivals is rooted in their inferiority complex and frightens to question or denied their religious authority. It is surprising that Buddhist wants to maintain their relationship at their self respect but this phenomenon is not seen and applicable to know Buddhist people. It is not that Buddhist women never resist but at very minute way and sometimes have to follow their Hindu religious god and goddess for sake of their happiness or feel good factor. In this regards, respondent Dharmapala pakidey, Housewife, explicitly express the relationship between Buddhist and non Buddhist.

> We don't celebrate any Hindu festivals rather we celebrate Buddha jayanti, Ambedkar jayanti and Buddha Pornima. In our celebration, we call others community people like Brahmins, Maratha, Kunbi in our colony. Very few come like Brahmins but when they call us we won't go for any Hindu festivals. Sometimes I go for haldi Kunko (celebration of opening ceremonies) but unwillingly. They sometime ask us to take namaskar of their deity which I don't like and that's why I try to avoid their home visit on such occasion. I feel that bowing Hindu deity means we go to his/her refugees which I don't want to

> do it. They might be feeling bad but whenever they ask me why I don't come to their festivals!! I tell them that we have taken oath of not worshipping Hindu God and Goddess. They use to feel surprise of my act by saying that the Buddhist from my community follow Hinduism than why not you? I say that those who follow only Buddhism is Buddhist and those who don't follow are not Buddhist at all.

It is also internalized by the Buddhist women that whatever they are doing is going against the values of Buddhism and ambedkar's teaching. It might be matter of minority and majority. It has been captured that where the population in some areas of Nagpur is less compare to Non Buddhist people like Hindus, the experience of Buddhist people reflect the pressure and inferiority complex in their thoughts of performing tradition of Hindu culture. They agree that they are feeling contradiction while celebrating Hindu festivals which don't have place in their everyday life, despite having participation of upper caste and lower caste in every festival. The Sobha Suryawanshi, housewife, explain the same sight of thoughts while responding the perception of celebrating the Hindu and Buddhists festivals.

> We celebrate all festivals. We have to do it because we have to live with other castes people in their areas and to maintain our relation we have to do it which is not applicable to our consciousness. We call them in our festivals and we also go to their festivals. Sometime I feel it is contradictory to my consciousness but we involved with them in their festivals just as fun and they insist us to come and we have to go as don't have choice. I feel we haven't become Buddhist the way we want to become.

Other side of picture speaks with very positive hope and more concerned about her community. It seems that some Buddhist women do not bother about the relationship. The reasons behind is that they are having their own Buddhist community people in large number and other community people less in quantity. Sureka suryawansi produce positive hope of negating Hindu culture based on inequality and people would follow the Buddhism on the basis of rationality.

> Our religion is based on rationality and more emphasis on reason. If it is suitable to your logic, than you should follow it or leave it. It is based on science and one should practice it. The gradual change occurring in women, it is because of involvement of women in Buddhism. We celebrate our Ambedkar jayanti just like diwali. We accept the sweets of diwali occasion but never participate in their festivals. When our celebrations come we use to give sweets to other community in

> same way. If won't participate in Hindu religion festivals, it never disturbed my relation with other community members. I feel that if I would follow my religion properly, than my community people will also follow in the same way. Thus, there is need to create good example before my community.

It confirms that a Buddhist woman could maintain social relationship without compromising her Buddhist identity. Historically, the isolation and exclusion has resisted the different castes to communicate with each other. As a result of it, the cleavage in communication created confusion and misunderstanding in society. The present era has diluted the feeling of isolation and sharing the values of culture without disturbing social relation exist in society.

Politics of Equality and Patriarchy

Women of Buddhist community have acquired new identity as Buddhist after the conversion. At the time of conversion, Ambedkar has explained reasons behind of conversion and provided 22 vows which explain basic tenets of Buddhist philosophy for common man and women to follow it. It was Ambedkar understanding that without actively participation of women in any social movement would not make it successful. It has been said that women in Ambedkarite movement could contextualize into three aspects that is role in Ambedkarite movement which yet to studied in direction of their contribution in movement, participation and responsibility in movement, and economic empowerment of Dalit women (Paswan; 2002: 204). Thus, the question rose that men of Buddhist Buddhism is not only focus on rationality but also emphasis on universal principles essential for human being. If we analyzed the concept of equality in the context of Buddhist community, it has notice that Buddhists men are preferably less patriarch cal compare to other non Buddhist men. It has said that patriarchy in Buddhist men gradually getting wipe out due to Buddhist humanistic principles of equality. In what sense, the dominance and unequal power relation between men and women perpetuated is unexplored aspect of Buddhist community. The patriarchy prevents women in every sphere of life like decision making position, under representation in premier state institution and imposes violence on them. The story of patriarchy in Buddhist women's perception explains patriarchy differently. In this regards, Sarika, M.A in Pali literature situate patriarchy at liberal position and make an agreement that male wishes to give equal opportunity to female but resist their male ego.

> I feel men of Buddhist community are not much liberal but want to keep her under control. They think that giving more liberty would hurt their dominance and status. They want to give equality in walk of life but male ego resists them. But now days, some men are

> really giving the opportunity to their wife but the percentage of such persons are very less.

The above expression also unfold the understanding that liberal atmosphere also remain in the hand of male. In other words, sometime male become the deciding factors on the behalf of female. It means that concept of liberty has been understood by men but the same concept has narrow down for women which is nothing but patriarchy notion. The expectation and hope of Buddhist women has related to Buddhism itself and expecting that male approach would transform towards women when men would grasp Buddhism outlook towards women on the basis of equality. Kirti, working in Panjab National Bank, explain the two categories of men existing Buddhist community.

> In Buddhist community, the men are developed themselves speedily compare to women. It has happening because of long patriarchy values carrying by Buddhist men which is not part of Buddhism. It is not that all men are doing and behaving in domain of patriarchy but some are having liberal attitude and behavior towards the women. Those who don't have such approach due devoid of Buddhism and nor they Buddhists at least in the level of equality. In this context, we cannot Buddhist, if our women and girls are not enjoying the liberty, equality. The mentality is superficial where they speak and lecture on the liberation of women emancipation but practically they are not doing.

Thus, it is matter of validity attached to Buddhist men's on practice and theory. The theory of justice percolates in Buddhist community, on other hand they won't allow provide space to their women the way they acquire. This type of notion existed in Buddhist community because men are not enlighten nor conscious about the Buddhists or Dalit women's contribution in social movement against system of caste inequality. This approach created impact on the Buddhist community that they prefer to call Buddhist monk rather Buddhist female monk. The disha khandare, Civil Engineer, drew the attention towards discriminative process in the regards of Buddhists Monk.

> In dhamma, compare to Buddhists men, female Buddhist are much better and this is because of female actively participation in vihars and conducting programmer. I have seen female Bhikuni is less preferable to Buddhist community compare to male Bhikuni which show less respect to Buddhist female which is setback for Buddhist community's concept of equality. It can be overcome just making conscious about their contribution in social movement of emancipation from the caste slavery.

The discriminative process in Buddhist community has inter-related to marriages. It has been said that marriage usually prevents the liberty of women and make her to adjust in the framework of marriage. In this regards, she has to compromise with her wishes and decision often influence under the male dominance. In general sense, the liberalism of Buddhists men has forwarded by women in compare to other non Buddhists women. Vibha Gajbhiya, a financial Advisor LIC explains the how the Buddhist women after marriage get limitizes her wishes and compromise at certain level but at the same time reflect comparative account of Buddhist women and non Buddhist women.

> I have more space compare to other women. But in a very limited manner, I feel marriage is compromise where we have to squeeze our wishes but at the same time we get stronger support from our husband. I tell you Buddhist men are more liberal than other men. I have got lot of opportunity to develop my personality. Limitation mean to me, when I compare men with women in general we find that men never tolerate his wife being more intelligent or smarter than him. Sometime we have to show them that we are not less in capacity and intelligent than anyone including him also. You know when I say Buddhist men is liberal in the relation to Buddhism which I feel they may be understanding women position but unable to control his patriarchic cal mind….he may be understand and one day he will come to follow the concept of equality rooted in our religion.

If the women are not locating in place of equality, would create vacuum in modernistic values of liberty, equality and fraternity. Another respondent claims that those who haven't accept the basic thoughts of Buddha and Ambedkar is still in the clutches of patriarchy and follow its function to dominate women. According to Nandeshwar, she asserted that Buddhist identity could be developed only by negating the patriarchy system. It also mentioned that educated parents can internalize the seeds of equal opportunity to their next generation only by adopting Buddhists thesis.

> Ya we don't have space and I agree with it. It is very less percentage of people who have understood it. The reason is not accepting the Buddhists principles of equality, liberty and fraternity. The male dominance we can observe not only in him but also in other caste and religion and we are yet to reach to the level where men enjoy their liberty. I got the space due to my educated parents and they taught about it and make us to learn Buddhism at our home.

From it, an outer world of non Buddhist could make a reference that the emancipator project Buddhism is held up between those who are endeavoring to overcome from mental slavery of patriarchy and those who are unable to break boundaries of patriarchy system. At this line of thought, poonam pillawer, a lecture has projected phenomena of liberal scope for development of women at equal par of men. She provide us some element which makes to think that at extent patriarchy has been diluted and in some manner.

> I have full liberty at my home. I use to work outside and my husband takes care of all my domestic work including rearing the children. Even my husband parents don't have any objection for it and in reverse of it I always get encouragement from the side of my Husband.

Caste and Identity Politics

To understand the revolutionary step taken by Dr. Ambedkar against caste system and declaration of renouncing Hinduism, one has to take the journey of historical account of parallel religious ideology of Vedic religion and Buddhism. It is agony that exploration of Buddhism in ancient India has been taken from the Hindu's religions point of view. Thus, the conversion of untouchable community like Mahar into Buddhism is a process of revival of Buddhism which India has lost in the time of ancient India. After the conversion, it was expected that Buddhists as new identity would vanished the caste identity and liberate India from system of social stratification rooted in caste inequality. In other words, the realization came upon may be among the neo Buddhist that conversion of religion will not bring about their economic and social status of neo-Buddhist and fundamental change in the whole social system is necessary (Singh; 2008: 155). There is no doubt that Buddhist community has progressed in every sphere of life where they feel confident and proud to be Buddhists. Thus, it is imperative to explore whether the newly acquire identity is able to replace the stigmatize identity of caste within Buddhist community and in the perception of non Buddhist. The respondent of Buddhist community has mixed feeling about the caste discrimination within Buddhist community women in relationship non Buddhist women. It has been observed that Buddhist women feel secure in the surrounding Buddhist locality and rarely face any caste discrimination, while in non Buddhist locality; they have external pressure and perception of caste discrimination. It show that Buddhist community's perception relay numbers of household situated in which areas of Nagpur. Although, there is change in Buddhist community and perceived identity with more proudly with but caste identity has congruence with Buddhist identity from the perception of non-Buddhist. It could observe in the context of inter-caste marriages where it has been viewed that the notion of caste has been kept under the carpet of difference of culture and tradi-

tion in between Buddhist and non-Buddhists. In this regards, Neha, pursuing her graduation, explicitly admit that there is confusion whether discrimination is on the basis of caste or behavior and eating habits.

> It is not easy to speak anything about what they think about us but one thing is very clear that the perception of non-Buddhist has not changed. This I feel when we call them in our any programmes, they won't come nor they eat in our house. I feel that Buddhists identity has not able to replace caste identity in full manner from non Buddhist perception but I can say it is in process of making of identity. In villages, there is caste but in city I don't find through the naked eyes.

It is conceived notion of Buddhist women that there is might be chance that this perception has not changed due to celebration and following both tradition of Hindu and Buddhism by Buddhist women. One of respondent kajal (House wife and post graduate in Pali) and priya (Post graduate In Ambedkar thoughts, teacher in corporation school), has not faced caste discrimination because of having Buddhist surrounding around them.

> I have not seen that caste identity has wiped out being Buddhist. The reason may be that women follow both traditions of Hindu and Buddhist or because of surnames which we carry. In this way, women are neither Buddhist nor Hindus. I haven't come across any such type of experience of caste discrimination or being Buddhist might they (non- Buddhist) feel but non- Buddhist has not shown openly….. (Kajol)

> I remember that sometime we face discrimination at community level due to caste but I don't have experience of it as I kept my work perfect nor I have come in contact with Non Buddhist community as I hardly get to time to interact with other community people. Sometime I have observed that Buddhist community use to get discriminated only due to reservation…. (Priya)

Hence, it has to notify that identity use to perpetuate in public sphere from two ways that is perception within the community and perception from outside the community. Due to amalgamation of both religious identities, the Buddhist community is unable to achieve the level of respectful identity. As a result of it, the non-Buddhist in public domain or individual interaction remembered them old identity because of the resemblance in Buddhism and Hinduism. Thus, Sneha Nandeshwar, electronic engineering, preparing for Civil Services Exam, openly put unspoken view of upper castes or non Buddhist people.

> Yes, we are converted people and Buddhism has not become stronger the way Babasaheb Ambedkar

> was expecting from us…even from our personality, we hardly reflect our Buddhism and from our behavior or actions, we reflect Hinduism. This is because we feel that we are part of Hinduism and that's why other also perceives us in the same manner and other castes people make you realize that you're from lower caste. If we accept their notion and thought of caste identity, than we cannot progress in our life.

The new technique has obtained to overcome the caste discrimination and pursue the Buddhist identity by making excellence in every sphere so that no one should raise or question them on the basis of their caste identity. For some respondent, caste is not primarily factor rather how they are representing themselves in society and in their working places and their confidence would cease to speak about their stigmatized identity. But other studies focus that militant and literary movement cherished the value of inequality and increased consciousness in educated men and women that in spite of their efforts to change in their identity by conversion, there is not much recognition given to their redefined social position (Shastree; 1996: 102). The Alpana Meshram, working as Architect in her own company (Alpana Enterprizes), enforces to wash out the caste identity through intelligence.

> For me, it is very necessary to be competent or become complete women or by placing your views differ than rest of group of members, than I feel there would not be caste first…thus, it is depend how you present or represent yourself would definitely take the notice by the people. If you have something, the non Buddhist person would try to know about you. Even if they come to know about your caste, I don't think that they would speak something about caste before you.

It is usually said that inter-caste marriage is solution for caste system. Through it, there would be sharing of culture and tradition between different castes. It is hard to speak about the successfulness of inter-caste marriages because it has been observed that in inter caste marriage, any one of the individual has to subordinate to other one in order to maintain this sacred thread. It is reflected in Buddhist community that inter castes marriages often takes between bride from upper caste and bridegroom from lower caste. It has said that the upper castes bride always marry to economic status quo person of lower castes but it hardly happened in reverse order. The other aspect deals with taking the importance of women in the family by the Dalit communities where the marriage merely depended upon caste background of individual which is very significant for it. The study related marriages, many of Dalit community hide their caste background and very few reflect it without hesitation (Encyclopedia of Dalits in India; 2003:247). Its means that person having low economic status never

become option for upper caste bride. Hence, the pre-conceived notion of caste identity hides at the back of upper castes on the issues of marriage. For the Buddhist community, it is process of crippling the community by brahmanising him who could become emancipator of lower castes community and social movement. Thus, Prerna Jambulkar (M.Sc Zoology, B.Ed), working as teacher in junior Science College, and Swati More (M.A, B.ed), has talked about mentality of other community people in relation caste.

> The Hindu people come together with us and share food with us but somewhere they have caste in their mind that we are SC…..the reasons behind that they are not willing to give their girl for marriage to our community boy but love marriage is different thing. I never feel that other caste women would ask willing SC girl for her son marriage. The roti beti process has not happened as said by Dr. Ambedkar. The marriage can bring equality but other caste people are not ready for it. The Buddhist community following the sub caste notion while selecting bridegroom or bride is itself a anti Phule Ambedkarism …. (Prerna)

> We have come from Hindu religion therefore, we have caste identity. We use to identify and remembers us that we are converted people of 1956 conversion. Even though we have converted but still we are same in their eyes. I feel no one say anything before us but at the back of mind we feel caste. They follow mental untouchability. They don't take cognizance of our progress and development by saying O!! He/she is Mahar!! Doesn't know anything. The thing of themselves has not changed but it is not our problem, it is their mentality not ours!!.... (Swati)

Despite having Buddhist identity, the Buddhists people still in domain of inferiority complex due to unaware of about Buddhism. The other issues is prevail in Buddhist community that Buddhist identity could not percolate at the level of humanism due to inculcation of caste in government official document and find no difference between Hinduism and Buddhism. As a result of it, the Buddhist people hesitate to identify themselves in public sphere and reflect their constitutional identity. The respondent Indu Pillewar, Contributory Lecturer in College, post graduate, find contradiction between Buddhist identity and Schedule Caste.

> Even we have taken diksha but in our official document we find caste. I feel that we should write Buddhist rather than caste. I feel pity for it. In general sense, for outside world, we are Buddhist in our community while

enquiring in public we become Schedule caste but never say we are Buddhists. There are other Buddhist communities from lower castes except Mahar who don't reveal their identity in public just like Mahar. As result of it, there is perception that Mahar has not taken the Buddhism at all.

Conclusion

There is assorted feeling profoundly persist in the perception of Buddhist women in their own religious identity. Buddhist conversion is created separate identity on paper but could not able to conceptualize it in their practical behavior and action. The expectation of Ambedkar to create an Idealized society based on Buddhist values has yet to achieve, in which some Buddhist women endeavor to rectify deeds within the community by questioning their faith in Buddhism and loyalty towards Ambedkar thoughts on idealized society. It discerns that Buddhist community perpetuating the politics of identity within arena of patriarchy and festivals by locating the tool to examine identity of Buddhist. The generalized perception has occurred in the context of caste perception of non- Buddhist. Despite, fifty six years of development in the field of soci-economic and politics, it is scrutinize that caste of mind doesn't shown any transformation towards acquire new identity as Buddhist. It seems that Mahar caste as an identity has established the same symmetrical phenomena with new identity as Buddhist.

References

Issac Venema, Henery. 2000.*Identifying Selfhood : Imagination, Narratives and Hermeneutics in the thought of Paul Ricoeur,* Sunny Press.

Jevtic, Miroljub, Political science and religion, *Politics and Religion Journal,* Vol. 1, No. 1, 2007.

Jevtic Miroljub, Religion and Relations between Genders, *Politics and Religion Journal,* Vol. 2, No.1, 2008.

Mcquillan, Martin. 2000. *The Narrative Reader*. Routledge Publishing House.

Paswan, Sanjay. 2002. *Encyclopedia of Dalits in India: Women*, Vol.9. Gyan Publishing House.

______________. 2003. ___________________________: *Human Rights- A New Dimension in Dalit Problem,* Vol.14, Gyan Publishing House.

Shastree, Uttara. 1996. *Religious Converts in India: Socio-Political Study of Neo-Buddhist*, New Delhi: Mittal Publication.

Singh, N.K. 2008. *Contemporary Indian Buddhism: Tradition and Transformation*. New Delhi: Global Vision Publishing House.

Tewari Babita and Sanjay, The History of Indian Women: Hinduism at Crossroads with Gender, *Politics and Religion Journal,* Vol. 3, No.1, 2009.

Viswanathan, Gauri. 1998. *Outside the Fold: Conversion, Modernity and Belief.* Princeton University Press.

Аџај Чоундари

БУДИСТИЧКИ ИДЕНТИТЕТ: ПРИЧЕ О БУДИСТКИЊАМА У ГРАДУ НАГПУРУ - СТУДИЈА СЛУЧАЈА

Резиме

Жене у Индији су ретко посматране као независтан идентитет услед кастинског система. Због тога идентитет жене, заједно са идентитетом припадања нижим кастама, чине да оне буду жртве ригиног патријахата и кастинског система у нашем друштву. Десио се велики број конверзија не би ли се променио живот људских бића. Али истраживања рађена са фокусом на религијску конверзију су се у принципу концентрисала на мушкарце, са малим освртом на утицај на жене. Међу овим конверзијама, конверзија др Амбедкара у будизам је успела да пружи нови и поштован идентитет за многе. Али статус будистичке жене, у оквиру будистичке заједнице, је остао најнеистраженији део ове конверзије. Због тога ће овај рад покушати да истражи да ли је будистички идентитет успео да обезбеди облик самопоштовања и једнак статус за будисткиње и до којег је степена будистички идентитет успео да замени њихов жигосани идентитет у јавној сфери истражујући приче будисткиња о њиховом идентитету.

Кључне речи: будизам, браманизам, Махар заједница, будистичка заједница, будисткиња, будистички идентитет, хинду фестивали, касте и политика идентитета

Примљен: 17.10.2012.
Прихваћен:15.2.2013.

क्रांतिसूक्ते : राजर्षी छत्रपती शाहू

॥ राजर्षी शाहू छत्रपतींच्या भाषणांचा टिपा-टिप्पणीसह चिकित्सक अभ्यास ॥

संपादक
डॉ. एस्. एस्. भोसले

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

क्रांतिसूक्ते :
राजर्षी छत्रपती शाहू

। राजर्षी शाहू छत्रपतींच्या भाषणांचा टिपा-टिप्पणीसह चिकित्सक अभ्यास ।

संपादक

डॉ. एस्. एस्. भोसले

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई : ४०० ०३२

अनुक्रमणिका

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

- **प्रथम आवृत्ती :** १९७५
- **प्रकाशक :** कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर
- **सुधारित द्वितीय आवृत्ती :** नोव्हेंबर, १९९१
- **तृतीय आवृत्ती :** जुलै, २००६
- **प्रकाशक :**

  सचिव,
  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
  तिसरा मजला, १७२, ग्रंथसंग्रहालय मार्ग,
  दादर (पूर्व), मुंबई- ४०० ०१४.

© **प्रकाशकाधीन**

- **मुद्रक :**

  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३.
- **किंमत : रुपये १७५/-**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

अनुक्रमणिका

राजर्षी छत्रपती शाहू

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

निवेदन ८

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना ९

१. शिक्षण १५

२.समाज ३६

३.धर्म ५०

४. अर्थ ८१

५. मजूर ९३

६. हक्क १०५

७. विनंती ऐसाजे ११२

८. टिपा आणि टिप्पणी १२०

इंग्रजी भाषणे १४४



साधन :- कोल्हापूर संस्थान :- सर्व साधारण प्रशासन अहवाल १९२१-२२

अनुक्रमणिका

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

पुण्यश्लोक जिजामाता,

करवीर राज्य संस्थापिका
छत्रपती ताराबाई

आणि

ध्येयवादी सहधर्मचारिणी
सावित्रीबाई फुले

यांच्या स्मृतीस

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

अनुक्रमणिका

निवेदन

आधुनिक काळात महाराष्ट्राची जडणघडण करणाऱ्या महान नेत्यांमध्ये कोल्हापूरचे राजर्षी शा छत्रपती यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. एकोणिसाव्या शतकात महात्मा जोतीराव फुले यांनी स्वाभिमानाचे व समतेचे बी पेरुन जे झाड लावले त्याला खतपाणी घालून काळजीपूर्वक वाढविले ते शाहू छत्रपतींनी. या झाडाला कर्मवीर भाऊराव पाटील, केशवराव जेधे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तृत्वाच्या रुपाने पुढील काळात नवनवीन धुमारे फुटले शेकडो वर्षे जे ज्ञान, सत्ता, संपत्ती यापासून वचित राहिले त्यांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगता यावे, शिकता यावे आणि विकासाच्या वाटा खुल्या व्हाव्यात असा शाहू छत्रपतींनी आयुष्यभर ध्यास घेतला होता. राजकीय स्वराज्य मिळविण्याचा प्रश्न त्यांना गौण वाटला. सामाजिक व धार्मिक समतेची प्रस्थापना करण्याच्या प्रश्नाला त्यांनी नेहमीच अग्रक्रम दिला.

विविध संस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या समा-समारंभात कधी अध्यक्ष म्हणून तर कधी उद्‌घाटक किंवा मुख्य पाहुणे म्हणून शाहू महाराजांनी जी भाषणे केली त्याचे संग्रह अनेक वर्षापूर्वी प्रसिद्ध झाले होते. मात्र जसजसा काळ लोटतो तसतसे या भाषणांचे संदर्भ पुढील पिढ्यांना समजावून घेणे अवघड होत जाते. अशा स्थितीत कोणी ही भाषणे टिपा-टिप्पणीसह चिकित्सक वृत्तीने प्रसिद्ध केली तर नव्या पिढीच्या वाचकांची व अभ्यासकांची सोय होते. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळींचे एक साक्षेपी अभ्यासक डॉ. एस्. एस्. भोसले यांनी राजर्षी शाहू छत्रपतींच्या भाषणांचा टिपा-टिप्पणीसह केलेला हा चिकित्सक अभ्यास वाचकांना उपयुक्त वाटेल असा विश्वास वाटतो.

य. दि. फडके
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

मुंबई :
८ जानेवारी, १९९१

अनुक्रमणिका

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

खरे सांगायचे म्हणजे ही प्रस्तावना लिहिताना माझ्या मनाला फार संकोच वाटत आहे. थोर राष्ट्रपुरूष राजर्षी शाहू छत्रपती यांच्या भाषणांच्या संग्रहाला प्रस्तावनेची मुळी गरजच काय? या भाषणांतून व्यक्त झालेले त्यांचे विचार इतके स्पष्ट, इतके बोलके आणि इतके परखड आहेत की, त्यांचा परिचय इतर कुणीही करून देण्याची मुळी आवश्यकताच नाही आणि अशी आवश्यकता आहे असे घटकाभर गृहीत धरले तरी ती प्रस्तावना लिहायची कोणी? माझ्यासारख्या अकिंचित्कर व्यक्तीने? मनाला पटत नाही. थोर पुरूषांच्या कृतीचे गुणगान करायलाही थोर व्यक्तीच हव्यात. 'स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधी जन्मती?' असे मोरोपंतांनी म्हटले नाही का? आणि असे असूनही ही प्रस्तावना लिहिण्याला मी उद्युक्त झालो, हे माझे धार्ष्ट्य होय आणि त्यामुळेच मनाला फार संकोच वाटतो, हे प्रामाणिकपणे नमूद करणे अवश्य आहे.

श्री. बाळासाहेब माने यांनी ही प्रस्तावना लिहिण्याचा मला जवळजवळ आदेशच दिला. माझ्या पूर्वसंमतीची वाटही न पाहता, दोनचार दिवसात प्रस्तावना लिहून पाठविण्याची त्यांनी मला आज्ञा केली आणि तरीहा प्रस्तावना लिहिण्यासाठी मन तयार होत नव्हते. पण डॉ. एस्. एस्. भोसले यांनी संपादन केलेल्या राजर्षींच्या भाषणांचा हा संग्रह जेव्हा मी चाळू लागलो तेव्हा माझे लक्ष त्यातील पहिल्याच भाषणाकडे गेले. राजर्षींचे हे पहिले भाषण आहे असे नाही, तर या संग्रहात छापलेले ते पहिले भाषण आहे आणि ते राजर्षींनी अखिल भारतीय मराठा परिषदेच्या अकराव्या अधिवेशनप्रसंगी खामगाव येथे १९१७ च्या शेवटच्या महिन्यात केलेले आहे.

'खामगाव' हा तळटीपेतील शब्द वाचताच माझ्या पूर्वस्मृती जागृत झाल्या. माझे हायस्कूलचे शिक्षण खामगाव येथेच झालेले. या शिक्षणासाठी मी मलकापूर सोडून खामगाव येथे गेलो तो १९२२ च्या जुलैमध्ये, म्हणजे राजर्षींनी खामगाव शहराला भेट दिल्यानंतर साडेचार वर्षांनी. त्यांच्या भेटीला साडेचार वर्षे उलटलेली असली तरी त्यांच्या त्यावेळच्या भाषणाचे डिंडिम तेथे अजून वाजत होते. त्या भाषणातील क्रांतिसूक्तांचे पडसाद वातावरणात निनादत होते. बहुजन समाजातील अनेक पुढारी खेड्यापाड्यांतून फिरुन जोतिबा फुले व राजर्षी शाहू छत्रपती यांचा संदेश जनतेत पसरवीत होते. त्या निमित्ताने, राजर्षींच्याच शिकवणुकीखाली तयार झालेले श्री. पंढरीनाथ पाटील गावोगावी जलसे करीत होते. त्याचे निनाद आमच्या कानावर येत होते. या सर्व वातावरणाचे संस्कार माझ्या मनावर झाल्याशिवाय कसे राहतील? या संस्कारांमुळे मला एक नवीन दृष्टी आली. भोवताली घडणाऱ्या घटनांचा अर्थ एका विशिष्ट दृष्टीने लावण्याची जाण माझ्या मनात विकसित होऊ लागली.

याचे एक उदाहरण अजूनही स्पष्टपणे माझ्या डोळ्यासमोर आहे: मी व माझे सहाध्यायी खामगावच्या सरकारी शाळेच्या वसतिगृहात राहात होतो. या वसतिगृहाच्या आवारात मागील बाजूला भोजनालय होते. भोजनालयाच्या दोन्ही बाजूंना सारख्याच आकाराचे दोन हॉल होते व मधे स्वयंपाकघर होते. या हॉलमध्ये भोजनाला बसण्यासाठी विद्यार्थ्यांची विभागणी कशी केली असेल असे वाटते? स्वयंपाकघराच्या एका बाजूच्या हॉलमध्ये फक्त ब्राह्मण विद्यार्थी आणि दुसऱ्या बाजूच्या हॉलमध्ये बाकी सर्व, म्हणजे मराठे, कुणबी, तेली, इतकेच नव्हे तर मुसलमान सुद्धा! ब्राह्मण विद्यार्थी ज्या हॉलमध्ये बसत तो अर्धाअधिक रिकामाच असे, आणि इतर सर्व विद्यार्थ्यांना दुसऱ्या हॉलमध्ये बसण्याला पुरेशी जागाही नसे. त्यामुळे कित्येकदा पहिली पंगत झाल्यावर पाण्याने धुतलेल्या तेथील ओल्या जागेवरच आम्हाला बसावे लागे. साहजिकच

मनात प्रश्न असा उभा राही की, पहिल्या हॉलमध्ये जागा शिल्लक असूनही तेथे आम्हाला बसू का देत नाहीत? उत्तर स्पष्ट होते: ब्राह्मण विद्यार्थ्यांना आमचा विटाळ होईल ना? ब्राह्मण हे सर्व वर्णांचे गुरु. त्यांचा श्रेष्ठपणा जन्मजात. ही श्रेष्ठपणाची जाणीव पोसण्यासाठी त्यांना भोजनासाठी एक स्वतंत्र हॉल आणि तेथे इतरांना प्रवेशाची बंदी! मुख्याध्यापक हेच वसतिगृहाचे पर्यवेक्षक होते. तेही याच ब्राह्मण वर्गाचे. त्यांनीच ही व्यवस्था केलेली. हे सर्व पाहून मनाला पीळ पडत असे. वाटत असे की ब्राह्मणांच्या जन्मजात श्रेष्ठत्वाचा ठसा इतर जातीजमातींच्या विद्यार्थ्यांच्या मनावर बालपणापासून उमटण्यासाठीच तर ही व्यवस्था नसेल ना? पण हे सर्व विचार मनातल्या मनात. बोलून दाखविण्याची सोय नव्हती. नाहीतर वसतिगृहातील प्रवेशाला मुकावे लागले असते. तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागत होता. त्यातून एक उत्तम गोष्ट निर्माण झाली ती अशी की, भोजनासाठी दुसऱ्या हॉलमध्ये बसणाऱ्या आम्हा इतर विद्यार्थ्यांमध्ये विशेष जवळीक व आपुलकी निर्माण झाली. हा मराठा, तो कुणबी, तो तेली – असा भेदभाव आमच्यामध्ये राहिलांच नाही. सहभोजनामुळे जातीपातीची बंधने गळून पडून एका विशिष्ट पातळीवर एकात्मता कशी निर्माण होते, त्याचे ते प्रात्यक्षिक होते. वसतिगृहातील या व्यवस्थेचा हा एक महत्वाचा सुसंस्कार आपल्या मनावर घडला तरी ब्राह्मणासाठी स्वतंत्र हॉल असल्यामुळे आम्ही इतर सर्व ब्राह्मणेतर आहोत हीही भावना त्यामुळे मनात निर्माण झाली आणि रुजली हे सत्य होते. या भोजनव्यवस्थेकडे अशा दृष्टीने पाहाण्याची जाणीव माझ्या ठिकाणी निर्माण होण्यास, त्यावेळी खामगाव येथे येऊन गेलेले श्री. शाहू छत्रपती आणि त्यांच्या भाषणामुळे आसमंतात निर्माण झालेले वातावरणच कारण नाही काय? माझे मत घडविण्यात अप्रत्यक्षपणे राजर्षी कारणीभूत झाले असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. राजर्षींचे हे अप्रत्यक्ष ऋण फेडण्यासाठीच प्रस्तावना लेखनाचे हे धाष्ट्र्य मी करीत आहे.

प्रस्तुत संग्रहाचे संपादक डॉ. भोसले यांनी या संग्रहाला ‘क्रान्तिसूक्ते’ हे नाव दिले आहे ते यथार्थ होय. ‘क्रांती’ म्हटली म्हणजे आमच्यासमोर फक्त राजकीय क्रांतीचा विचार येतो. एका हातात रुधिराने लाल झालेल तळपते शस्त्र आणि दुसऱ्या हातात परकीय शत्रूचे छाटलेले मुंडके अशी आमची क्रांतीदेवतेविषयीची कल्पना आहे. सामाजिक उत्थापनाचा जणु त्यात समावेशच होत नाही. राजकीय आणि सामाजिक सुधारणा बरोबरच झाल्या पाहिजेत; “या सुधारणा स्वतंत्र नाहीत. या दोन सुधारणा राष्ट्रोन्नतीच्या गाड्याची दोन चाकेच होत; पण त्यात आधी मग पाहायचेच झाले तर आधी सामाजिक सुधारणा झाल्या पाहिजेत. शिक्षणाने व योग्यतेने सर्वात समानता निर्माण झाली पाहिजे, अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे, जातीजातीतील बंधने तुटली पाहिजेत, वर्णविषमतामूलक विषमता खणून काढली पाहिजे. असे झाले तरच आम्हाला स्वराज्याचे फायदे मिळतील.’ असे छत्रपतीनी ठासून सांगितले. राजकीय क्रांतीकडे जनतेला एकजुटीने नेऊ शकणारी सामाजिक क्रांती हीच खरी क्रांती होय, असा राजर्षींचा दृष्टीकोण त्यांच्या अनेक भाषणांतून स्पष्ट होतो. या क्रांतीची तुतारी प्रथम महात्मा फुले यांनी मुळामुठेच्या काठावर फुंकली. तिचे निनाद विरू लागण्यापूर्वीच पंचगंगा नदीच्या तीरावरून या क्रांतीचे रणशिंग राजर्षी छत्रपतीनी फुंकले. महात्मा जोतिबा फुले द्रष्टे पुरुष होते. त्यांच्या काळच्या पुढाऱ्यांना परकीय राजसत्तेत तेवढी गुलामगिरी दिसली. जोतिबांच्या तेजस्वी आणि अंतर्भेदी दृष्टीला मात्र राष्ट्राच्या सर्व थरांतील गुलामगिरीचे दर्शन झाले. सामाजिक, धार्मिक आणि एका दृष्टीने राजकीय गुलामगिरी देशावर कुणी आणि कशी लादली हे त्यांनी अचूक ओळखले. या गुलामगिरीवर त्यांनी सर्व बाजूंनी हल्ला चढविला याच्या मुळाशी त्यांची मानवतावादी दृष्टी होती. रंजल्यागांजल्यांचे दुःख नाहीसे करण्याची तळमळ होती, सर्वसामान्य जनतेच्या उद्धाराची पोटतिडिक होती. जोतिबांना जे ‘सत्य’ गवसले ते त्यांनी उर्ध्ववाहू करून कंठरवाने ओरडून सांगितले आणि ते सर्व बाबतीत आपल्या एकट्याच्या आणि अल्प साहाय्यकांच्या मदतीने अंमलातही आणले आपले अवतारकार्य करीत जोतिबांची पावले काळाकडे वाटचाल करू लागली त्याच वेळी या क्रांतीची पताका

अनुक्रमणिका

आपल्या खांद्यावर घेऊन राजर्षी छत्रपतींच्या रुपाने नव्या उत्साहाचा, नव्या कर्तृत्वाचा क्रांतीवीर उदयाला आला. आपल्या या क्रांतिकार्यासाठी त्याने ज्या तुताऱ्या फुंकल्या, जी रणशिंगे वाजविली, जे डंके पिटले त्याचे गगनभेदी आवाज या 'क्रांतिसूक्तां' त आजही आपणाला सापडतात.

पण याचा अर्थ राजर्षी शाहू छत्रपती म्हणजे जोतीबांचा प्रतिध्वनि होय, असा मात्र नव्हे. जोतिबा एक सर्वसाधारण ब्रिटिश प्रजाजन होते, तर राजर्षी हे ब्रिटिशांच्या राजवटीतील एका संस्थानाचे राजे होते. जोतीबांचे पुणे हे जसे ब्राह्मण्याचे माहेरघर होते तसेच कोल्हापूर हेही होते. धार्मिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात ब्राह्मण्याचा पगडा असल्यामुळे गरीब शेतकरी, मजूर, अस्पृश्य व इतर अब्राह्मण जनता यांचे शोषण होत असल्याचे जसे जोतीबांच्या नजरेला आले तसेच ते आपल्या संस्थानात होत असल्याचे राजर्षींच्या अनुभवाला आले. या ब्राह्मण्याचा अत्यंत कटु अनुभव त्यांना वेदोक्त प्रकरणामुळे आला. या ब्राह्मण्याची आग जोतीबांच्या वैयक्तिक जीवनाला जितकी होरपळत होती त्याच्या कितीतरी पटींनी अधिक प्रमाणात राजर्षींच्या जीवनाला तिचे चटके बसत होते. या आगीतून जोतीबांचे चातुर्वर्ण्यविरोधी समतेचे आणि मानवतेचे सत्यशोधक तत्त्वज्ञान जसे निर्माण झाले तसे राजर्षींचेही तत्त्वज्ञान निर्माण होणे अपरिहार्य होते राजर्षी संस्थानाधिपती होते. त्यामुळे आपले तत्त्वज्ञान आपल्या संस्थानांत अधिकाराच्या जोरावर अमलात आणणे जसे त्यांना शक्य होते तसे जोतिबांना नव्हते. जोतिबांच्या कार्याकडे, मनात जळफळ असतानाही मानवतावादी दृष्टिकोणातून पाहाणे शक्य होते. पण राजर्षींनी केलेल्या त्याच कार्याकडे त्यांची ब्राह्मण जनता, विशेषतः पुरोहित व नोकऱ्यातील अधिकारी वर्ग दडपशाहीच्या दृष्टिकोणातून पाहू लागली. आणि त्यांच्या या दृष्टिकोणाचा पुण्यातील तथाकथित राष्ट्रवादी पण सनातनी वृत्तपत्रांच्या नेत्यांनी पाठपुरावा केला व राजर्षी विरुद्ध टीकेचा प्रचंड गदारोळ निर्माण केला. त्याला बाणेदारपणाने सडेतोड उत्तरे देताना त्यांच्या वाणीतून क्रांतिकारक विचारांचे जे स्फुल्लिंग वेळोवेळी बाहेर पडले ते त्यांच्या भाषणांच्या या संग्रहात पानापानांवर आढळतील.

जोतिबांचा आणि राजर्षीचा तो काळ लक्षात घेतला म्हणजे या क्रान्तिसूक्तांचे महत्त्व कळून येईल. या पार्श्वभूमीवरच 'जर हल्लीची जातिव्यवस्थाच कायम राहिली तर ज्या रीतीने हल्ली सुराज्याचा अर्थ समजला जातो ते स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे होय'. 'जातिभेद मोडून समाजाचा पाया शुद्ध केल्याशिवाय आम्हाला सेल्फ गर्व्हमेंट दिले तरी नको', 'केवळ अल्पसंख्य उच्चवर्गीयांच्या हातातच सत्ता जाण्यात स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये. म्हणून निदान दहा वर्षेपर्यत तरी आम्हाला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्का असला पाहिजे.' इत्यादी सूक्तांचा विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे राजर्षी छत्रपती एक संस्थानिक होते आणि संस्थानाधिपती या नात्याने आपल्या मानवतेच्या व समानतेच्या तत्त्वज्ञानाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे त्यांना शक्य होते ही गोष्ट लक्षात ठेवूनच त्यांनी आपल्या भाषणांत, धूर्तपणे जागोजागी केलेल्या ब्रिटिश सम्राज्ञी आणि अधिकारी यांच्या स्तुतिस्तोत्रांचा अर्थ लावला पाहिजे. इतिहासाच्या आणि समाजशास्त्राच्या अभ्यासकांना हे निराळे सांगायची आवश्यकता नाही. राजर्षींच्या वाणीतून बाहेर पडलेली इतर अनेक सूक्ते त्यांच्या भाषणांच्या या संग्रहात आलेली आहेत. उदा : 'दुसऱ्याचे दुःख ते आपले दुःख व दुसऱ्याचे सुख तेच आपले सुख', 'ज्यांना राजकारण करणे आहे त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे वागविले पाहिजे', 'इंग्रजी शिक्षणापासून भारतीयांना तिसरा डोळा आला आहे', 'आपली उन्नती आपणच करुन घेतली पाहिजे. दुसरा आपल्याकरिता काही करील, अशी अपेक्षा करणे केव्हाही कमीपणाचे आहे,' 'जोपर्यत आमच्यामध्ये जातिजातीतील मतभेद आणि मत्सर जिवंत आहेत, तोपर्यंत आम्ही आपआपसात झगडत राहणार आणि आमच्या हितवृद्धीस अपाय करुन घणार', 'व्यक्तीच्या दृष्टीने धर्माची बाब महत्त्वाची असेल, पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये.', 'देशाची म्हणजे

देशबंधूंची सेवा करणे, जनी जनार्दन शोधणे व पाहणे हाच खरा धर्म आहे.', 'सर्वांना समानतेने वागविले पाहिजे. सर्वांना विद्यादान दिले पाहिजे व सर्वांचा धार्मिक हक्क समान समजला पाहिजे.' अशा अनेक सुभाषित सूक्तांची खाण म्हणजे राजर्षीच्या भाषणांचा हा संग्रह होय. यातील काही निवडक सुभाषिते विद्यालयातील भिंतीवर म्हणींच्या स्वरूपात लावण्यात आली तर विद्यार्थ्यांच्या मनावर त्याचा सुपरिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

राजकीय, धार्मिक आणि सामाजिक बाबतीतील राजर्षींच्या कर्तृत्वाची स्पष्ट व ठसठशित चित्रे या भाषणांतून दिसतात हे तर खरेच, पण त्यांच्या इतर कर्तृत्वाचीही काही रेखाचित्रे, पुसट स्वरुपात का होईनात, पण त्यात उमटलेली आढळतात. राजर्षींची दृष्टी अत्यंत व्यापक होती. आपल्या प्रजेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींकडे त्यांचे बारकाईने लक्ष होते. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाकडे जसे त्यांनी लक्ष दिले तसे, खेड्यापाड्यांतील गरीब विद्यार्थ्यांना हे शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून वसतिगृहांच्या निर्मितीलाही त्यांनी प्रोत्साहन दिले. असे करताना वसतिगृहात जातिनिरपेक्षतेने प्रवेश देण्याची सुरुवात करून छत्रपतींनी शिक्षणाचा प्रसार व सामाजिक समतेची स्थापना, या दोन्ही गोष्टी साधल्या. आपल्या संस्थानातील शासनयंत्रणेत मागासलेल्या वर्गासाठी शेकडा पन्नास टक्के जागा राखून ठेवून एका नव्या प्रशासकीय क्रांतीचे बीजारोपण केले. आपल्या क्रांतिकारक विचारांच्या व कार्याच्या प्रसारासाठी आवश्यक त्या शिक्षणशाळा काढून नेतृत्वाचे एक नवीन दर्शन घडविले. संस्थानातील प्रजेच्या हितासाठी आगगाडीचा रस्ता, धरण, गिरणी वगैरे निर्माण करून कोल्हापुरातील औद्योगिक व हरित क्रांतीचा पाया घातला. मजुरांची स्थिती लक्षात घेऊन त्यांचे संघ स्थापन होण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादली. महाराजांची भाषणे महाराष्ट्रात तर झालीच पण महाराष्ट्राबाहेर भावनगर, नवसारी, कानपूर, दिल्ली, हुबळी इत्यादी ठिकाणीही झाली. त्यावरून त्यांच्या कार्याचे व्यापक राष्ट्रीय स्वरूप लक्षात येते. राजर्षींच्या कर्तृत्वाची अशी अनेक चित्रे या भाषणसंग्रहातून आढळतात. भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर वर्तमानाचे सूक्ष्म निरीक्षण करून भविष्याचा अचूक वेध घणारे त्यांचे व्यक्तिमत्व अलौकिक होते. त्याचे दर्शन इथे घडते. 'कालो वा वारणं राज्ञः राजा वा कलकारणम्' असा प्रश्न राजर्षींच्या बाबतीत व्यर्थ आहे. काळाने, भोवतालच्या परिस्थितीत त्यांना घडविले हे तर खरेच, पण आपल्या कर्तृत्वाने त्यांनी नवीन काळही घडविला यात शंका नाही.

अशा थोर राष्ट्रपुरुषाच्या भाषणांचा हा संग्रह 'क्रान्तिसूक्ते' या नावाने प्रसिद्ध होत आहे ही आनंदाची गोष्ट होय. श्री शाहू छत्रपतींची काही भाषणे १९२० मध्ये, म्हणजे छत्रपतींच्या जीवनकालातच प्रसिद्ध झाली होती. बरीच वर्षे ती दुर्मिळ होती. राजर्षींच्या 'निर्वाणाला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत.' या निमित्ताने प्रा. श्याम ना. येडेकर यांनी ती पुन्हा संकलित व संपादित केली. या दरम्यान भ. ब. जाधव यांनीही 'राजर्षी शाहू महाराजांची भाषणे', आर्थिक झीज सोसून प्रकाशित केली आहेत. आता राजर्षींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्राचे लक्ष पुन्हा राजर्षीकडे वळले आहे. त्यात महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतलेला आहे हे विशेष होय. कोल्हापूर जिल्हा परिषद यांनी या कार्यात लक्ष घातले हे स्वाभाविक होय. कोल्हापूर ही राजर्षींची राजधानी. आजचे कोल्हापूर हे राजर्षी छत्रपतीनी घडविले आणि वाढविले आहे. तेथील जनतेने त्यांचे ते ऋण फेडण्यासाठी पुढे येणे योग्यच होय. प्रा. श्याम येडेकरांनी संकलित केलेल्या राजर्षींच्या भाषणांच्या संग्रहाच्या मुद्रणाला कोल्हापूर नगरपालिकेने बहुमोल आर्थिक साहाय्य दिले आहे. आणि आता जिल्हा परिषदेने तर राजर्षींच्या संबंधीच्या सहा ग्रंथांच्या प्रकाशनाचा संकल्प सोडला आहे. याबद्दल कोल्हापूर जिल्हा परिषदेचे आणि विशेषतः तिचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब माने यांचे मनःपूर्वक अभिनंदन करणे अवश्य आहे. जिल्हा परिषदेने "रस्ते, दवाखाने, शाळा, इमारती आदी समाजाच्या प्रगतीसाठी, सर्व तऱ्हेच्या भौतिक सुविधा उपलब्ध' करुन तर द्याव्यातच पण तिने वैचारिक व्यासपीठ निर्माण करुन

विचारमंथनातून समाजाची प्रगती साधावी व राष्ट्र संवर्धनासाठी प्रयत्नशील असावे," ही विशाल दृष्टी श्री. माने यांनी आपल्या पुरस्कारात व्यक्त केली आहे. त्यावरून श्री. शाहू छत्रपतींचे कोल्हापूर वैचारिक दृष्टीनेही कसे प्रगत झालेले आहे याची साक्ष पटते. त्यांच्या संकल्पित सहा ग्रंथांपैकी 'क्रान्तिसूक्तेः राजर्षी छत्रपती शाहू' हा एक ग्रंथ होय.

या ग्रंथाचे संपादनही डॉ. भोसले यांनी जाणीवपूर्वक केलेले आहे. श्री. शाहू छत्रपतींची कित्येक समयस्फूर्त भाषणे अनेक कारणांमुळे आज उपलब्ध नाहीत, याबद्दल त्यांनी व्यक्त केलेली खंत यथार्थ आहे. अजूनही छत्रपतींची काही भाषणे उपलब्ध होण्याची शक्यता त्यांनी बोलून दाखविली आहे, ती लक्षात घेऊन या कार्याचा कुणीतरी, एखाद्या व्यक्तीने वा संस्थेने पाठपुरावा करणे अवश्य वाटते. सुदैवाने कोल्हापूर येथे श्री शाहू संशोधन केंद्र स्थापन झालेले आहे. या संस्थेकडून अशा कार्याची अपेक्षा केल्यास ती चुकीची ठरु नये.

प्रस्तुत संग्रहात डॉ. भोसले यांनी राजर्षींची मराठी भाषणे तेवढी संगृहीत केली आहेत. राजर्षींच्या इंग्रजी भाषणांचा वेगळा संग्रह 'A Royal Philosopher Speaks' या सुरेख मथळ्याने सिद्ध झाला आहे. प्रा. भोसले यांनी 'क्रान्तिसूक्ते' मध्ये राजर्षींची मराठी भाषणे विषयवार विभागणी करून ती छापली आहेत. डॉ. भोसले यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेले 'टिपा आणि टिप्पणी' हे सदर आजच्या अभ्यासकांना फार उपयुक्त होईल. त्यावरून डॉ. भोसले यांच्या संपादनकुशलतेची उत्तम साक्ष पटते. या कार्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. राजर्षींच्या भाषणांचा असा हा सुंदर संग्रह सर्वांच्या आदरास पात्र होईल यात शंका नाही.

नागपूर

वि. भि कोलते

अनुक्रमणिका

संपादकीय

१९७५ साली, राजर्षी शाहू महाराजांची जन्मशताब्दी साजरी झाली. त्या निमित्ताने कोल्हापूर जिल्हा परिषदेने 'राजर्षी शाहू ग्रंथमाला' मधून पाच ग्रंथ प्रकाशित केले.

त्यामध्ये 'क्रान्तिसूक्तेः राजर्षी छत्रपती शाहू' व 'A Royal Philosopher Speaks' ही राजर्षी शाहूंच्या अनुक्रमे मराठी व इंग्रजी भाषणांची संपादने होती. पूर्वसूरीना वाट पुसत, अनपलब्ध भाषणं मिळवून टिपा-टिप्पणीसह ती मी संपादित केली होती. कोल्हापूर जिल्हा परिषदेचे त्यावेळचे अध्यक्ष श्री रा. शं. उर्फ बाळासाहेब माने यांची यामागे मुख्य प्रेरणा होती.

ह्या पुस्तकांची निकड सतत जाणवणारी राहिली.

'क्रान्तिसूक्ते' ची, मराठी / इंग्रजी एकत्रित भाषणे, संदर्भामध्ये अधिक भर, प्रदीर्घ प्रस्तावना इत्यादी स्वरूपात ही सुधारित आवृत्ती प्रकाशित होत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ही जबाबदारी उचलून यथाकाल पार पाडली.

एतद्‌विषयक काम करणारे कष्टाळू पूर्वसूरी, मंडळाचे आदरणीय अध्यक्ष डॉ. फडकेसर, मंडळाचे मान्यवर सदस्य, मंडळाचे निवृत्त सचिव श्री. सूर्यकान्त देशमुख, दिवंगत सचिव कै. पंढरीनाथ पाटील, सांप्रतचे सचिव श्री. चं. रा. वडे व कार्यालयीन कर्मचारी या सर्वांचा, त्यांच्या साहाय्य व सहकार्याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे.

औरंगाबाद

२५ फेब्रुवारी, ९१

एस्. एस्. भोसले

अनुक्रमणिका

१. शिक्षण

एक

शिक्षणः स्वराज्यासाठी !

**

राजर्षी शाहू महाराजानी शिक्षणाचे महत्त्व विशद करताना म्हटले आहे, “शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.” त्यानंतर भारतीय सामाजिक इतिहासाचा आढावा घेताना, “मनू आणि त्यांच्या मागून आलेल्या शास्त्रकारांनी कमी जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले”, असे त्यांनी निर्भयपणे सांगितले आहे.

राजर्षीच्या मते ‘स्वराज्या’ ऐवजी आपण प्रथम शिक्षण घेतले पाहिजे. “जोपर्यत हिंदुस्थान जातिबंधनांनी निगडित राहील, तोपर्यंत स्वराज्य स्थापनेपासून मिळणारे संपूर्ण फायदे त्यास घेता येणार नाहीत. म्हणून निरनिराळ्या समाजातील लोकांना शिक्षण देण्याची पद्धत मी काळजीने अनुसरीत आहे.” राजर्षींच्या या शैक्षणिक धोरणामुळे ते ‘स्वराज्यद्रोही’ आहेत असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला.

त्यास, ‘शिक्षण : स्वराज्यासाठी!’ या भाषणात राजर्षी शाहू महारजांनी चोख उत्तर

**

खामगाव : २७ डिसेंबर, १९१७
अ. भा. मराठा शिक्षण परिषदेचे अकरावे अधिवेशनः
शाहू महाराजांनी अध्यक्षपदावरून केलेले हे इंग्रजी भाषण, सरदार रावसाहेब सरनोबत यांनी मराठीत वाचून दाखविले. दिले आहे. छत्रपती शिवरायाप्रमाणेच आपणही चातुवर्ण्याच्या विरोधी आहोत, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. शेवटी ते सांगतातः “आमच्या थोर देशाच्या नैतिक आणि सांपत्तिक प्रगतीच्या कामी व सार्वजनिक हितासाठी निरनिराळ्या जातींचे एकीकरण करण्याचे आपण शक्य तितके प्रयत्न करू या. अशा स्थितीत मिळणाऱ्या स्वराज्याचा अर्थ मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे हा होय!” म्हणून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक आहे, असे राजर्षींचे, पाया तयार करून देणाऱ्या शिक्षणाचे तत्त्वज्ञान आहे.

**

एक

शिक्षण : स्वराज्यासाठी !

* * *

‘मराठा समाजा’ने आजच्या प्रसंगी हजर राहण्याबद्दल मजला मनोभावाने आमंत्रण केले, याचा मला अतिशय बहुमान वाटत आहे. मी येथे महाराजा या नात्याने आलो नाही, परंतु एक ‘मराठा’ असे समजूनच आलो आहे. आपण सर्व मजला आपल्यापैकीच एक मानाल अशी आशा आहे. आपण मला हवे तर शिपाईगडी म्हणा, अगर शेतकरी म्हणा किंवा जे काही रुचेल ते म्हणा. माझ्या कुलपरंपरेच्या वहिवाटीस अनुसरुन आपणापैकी रणशूर, मला शिपाईगडी मानतील, आणि शेतकरी असतील ते पाटील किंवा शेतकरी असे मानतील. कार्यबाहुल्यामुळे अगदी शेवटच्या घटकेपर्यन्त या परिषदेस हजर राहण्याचा मला निश्चय करता येईना. परंतु आपणा सर्वांना, येथे भेटण्याची बहुमोल संधी हातची दवडू नये, असा मी निश्चय केला. माझे वडिलोपार्जित गाव वेरूळ येथून जवळच आहे. येथेच माझ्या घराण्याचा पहिला उत्कर्ष म्हणजे पाटीलकी वतन आम्ही संपादिले. या वतनाबद्दल मला अद्याप अत्यंत आदर वाटत आहे, म्हणूनच मी माझ्या स्वतःच्या मंडळींमध्ये एक शेतकरी व पाटील या नात्याने आलो आहे. म्हणून माझा आनंद द्विगुणित होत आहे.

सद्‌गृहस्थहो, आमच्या समाजापैकी दोन सुप्रसिद्ध व्यक्तींचा उल्लेख कृतज्ञतापूर्वक करणे जरूर आहे! ते गृहस्थ म्हणजे श्री. खासेसाहेब पोवार व मि. खासेराव जाधव हे होत. त्यांच्याच अत्याग्रहामुळे मला येथे येणे भाग पडले आणि याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो. मि. खासेरावसाहेब यांची कर्तबगारी, स्वार्थत्याग आणि अनेक बाबतीत दिसून येणारी हुषारी, ही सुप्रसिद्ध आहेत. ती सांगण्याची जरूरी नाही. आमच्यामध्ये त्यांनी श्रेष्ठत्व मिळविले आहेच आणि जरी त्यांच्यामध्ये महत्त्वाकांक्षेचा अभाव आणि नशिबावर हवाला ठेवण्याची थोडीबहुत प्रवृत्ती हे दोन दोष असले तरी ते आज कोणत्या दर्जाला पोचले असते, याची कल्पना आपणच करावी. माझ्या मते ते आज हिंदुस्थानातील एक प्रमुख पुढारी आहेत आणि त्यांची कर्तबगारी, बुद्धिमत्ता आणि समाजातील दर्जा, याबद्दल मला त्यांचा हेवा वाटतो. श्री खासेसाहेब यांच्या अंगचा उत्साह आणि कर्तबगारी या दोन गुणांमुळे ते जेथे जातील तेथे त्यांची प्रशंसाच होईल. सरदार घराण्यातील लोकांमध्ये हे खरोखरच भूषण आहे, आणि त्यांचेबद्दल मला फारच अभिमान वाटत आहे. त्यांच्या योग्यतेचे आणि कर्तबगारीचे आणखी थोडेतरी राजपुत्र आमच्यामध्ये निपजावेत, अशी माझी इच्छा आहे.

शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्यांच्यामागून झालेल्या शास्त्रकारांनी, त्या त्या वेळच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले आणि खालच्या कमी जातीच्या लोकांना विद्यामंदिरांचे दरवाजे बंद करण्यात आले. त्यांचे स्वतःचे धर्मग्रंथ आणि वेद हे सुद्धा वाचण्याची त्यांना मनाई होती. हिंदुधर्माशिवाय इतर कोणत्याही धर्माने अशा आंधळ्या व दुखःकारक परिणाम करण्याबद्दल अग्रेसरत्व मिळविले नाही. गेल्या साठ वर्षांमध्ये म्हणजे इ. स. १८५७ सालानंतर प्रजावत्सल ब्रिटिश

अनुक्रमणिका

सरकारने सर्वांना सरसहा शिक्षणाची द्वारे खुली केली आहेत आणि त्यामुळे मला वाटते, आम्ही बरीच प्रगती केली आहे.

‘स्वराज्य हवे’ अशी ओरड चोहोकडे ऐकू येत आहे. आम्ही स्वराज्यास पात्र आहोत किंवा नाही, हाच एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. स्वराज्य आम्हास पाहिजे आहेच. त्या योगानेच आमच्या सैन्यात चैतन्य उत्पन्न होईल. सार्वभौम ब्रिटिश सरकारनेच, आमच्या मनात स्वराज्याची कल्पना पेरली आहे आणि जिंकलेल्या लोकांच्या प्रगतीला ते बिलकूल प्रतिकूल नाहीत. मनूप्रमाणे त्यांनी प्रगतीला अडथळा केला नाही याबद्दल आम्ही त्यांचे फार कृतज्ञ आहोत. इतकेच नव्हे, तर आमची प्रगती व्हावी म्हणून ते निरंतर उत्सुक असतात. स्वराज्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि व्यापक प्रश्नांचा सांगोपांगरीतीने विवेचन करण्याचा आजचा प्रसंग नाही. तथापि याबाबतीत लॉर्ड सिडनहॅमसाहेबाप्रमाणेच माझे मत आहे. ते माझे मित्र असून मी त्यांच्या गुणांचा चाहता आहे. लॉर्ड सिडनहॅम साहेबांचे असे मत आहे की; जोपर्यंत हिंदुस्थान जातिबंधनात निगडित राहील, तोपर्यंत स्वराज्य संस्थेपासून मिळणारे संपूर्ण फायदे त्यास घेता येणार नाहीत. त्यांना अशी भीती वाटते की, येथील सत्ता उच्चाळ वर्गाच्या हाती जाईल. विचारान्ती माझे मत झाले आहे की, आमची सध्याची जातिबंधने तोडून टाकण्याचा काळ येईलच येईल. आमच्या नैतिक आणि प्रगतीच्या हिताकडे लक्ष देऊनच वरील स्थिती यावी, अशी माझी इच्छा आहे. जोपर्यंत आमच्यामध्ये जातिजातीतील मतभेद आणि मत्सर जिवंत आहेत, तोपर्यंत आम्ही आपआपसात झगडत राहाणार आणि आमच्या हितवृद्धीस अपाय करून घेणार आमच्यातील अंतःस्थ कलह नाहीसे करण्यास आणि आम्हाला स्वराज्यास पात्र करून घेण्याकरिता ही अनर्थकारक जातिपद्धती झुगारून देणे आम्हाला अत्यंत आवश्यक आहे, हे आपल्या लक्षात आले असेलच.

‘क्षत्रियांच्या निर्मूलनाविषयीच्या पौराणिक कथेचा येथे निर्देश करणे अप्रासंगिक होणार नाही: मराठेः लोक आपल्यास क्षत्रिय म्हणवितात, हे आपणास माहीत आहेच. पांडवांच्या कालापासून ते लढवय्ये लोकांत प्रमुख आहेत. आमच्या क्षत्रिय कुळाचे निर्मूलन झाले आहे, असे आम्ही बिलकूल कबूल करीत नाही. आमचा सध्याचा अगणित समाजच या गोष्टीला खोटे ठरवितो. एकवेळ नव्हे, तर एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केल्याचा पौराणिक कथेचा अर्थ, निराळ्या तऱ्हेने लावता येईल. शेतकी आणि लढवय्येपणा हे दोन्ही गुण नेहमी एकत्र असतात आणि शेतकरी वर्गाला तिसऱ्या वर्गाच्या हलक्या पायरीला पोचविल्यामुळेच ही निर्मूलनाची कल्पना अस्तित्वात आली असावी आणि तिचे खंडन वेळीच न झाल्याने तिजवर विश्वास बसला असावा. अशा प्रकारच्या नेहमी आढळून येणाऱ्या ‘स्मृती’ तील लेखांवरून क्षत्रियांचा प्रचंड समुदाय नाहीसा झाला असावा, असे मानण्यात आले. त्यापुढील काळात, होऊन गेलेल्या लेखकांनी एक पाऊल पुढे टाकून क्षत्रियांना वैश्यांच्या पायरीवरून ढकलून देऊन थेट शूद्रांच्या पायरीस आणून पोचविले. हा सर्व पक्षपाती समाजाच्या चळवळीचा परिणाम आहे. जगाच्या इतर भागांत, उदाहरणार्थ; जपान देशात, जे काही घडून आले आहे; त्यावरूनही आमची जातिपद्धती मोडण्याची जरूर आहे, असे माझे ठाम मत आहे. अशाप्रकारचा अवश्य फेरफार घडवून आणणे हे आमचे ध्येय असावे. मराठा आणि ब्राह्मण यांनी मला या कामी पूर्ण पाठबळ दिल्याशिवाय, मला किंवा माझ्या दर्जाच्या कोणाही मनुष्याला यश येण्याची आशा करणे कधीतरी शक्य आहे काय?

हल्लीच्या स्थितीत, आमचे ध्येय साध्य करण्यासाठी जे कर्तव्य आम्हास करावयाचे, ते आमचा समाज सुशिक्षित करणे व त्यांची मने तयार करणे हे होय. ह्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाचा उलगडा करण्याचा हा फक्त एकच मार्ग आहे; म्हणूनच प्रत्येक समाजाने, आपल्या समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाकरिता

झटणे अगत्याचे आहे. निरनिराळ्या समाजांतील लोकांना, शिक्षण देण्याची पद्धत मी काळजीपूर्वक अनुसरीत आहे आणि माझ्या आयुष्याच्या पुढील काळात तीच पद्धत सुरू ठेवण्याची माझी इच्छा आहे. निरनिराळ्या जातींना स्वतःची उन्नती करून घेण्याच्या प्रयत्नास, मी प्रोत्साहन दिले आहे, हे कळविण्याची मला परवानगी असावी. मराठा जातीतील प्रमुख कुटुंबांना, मी याच दिशेने मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. पुन्हा जरूरीची गोष्ट ही की, जातिपद्धतीच्या शृंखला तोडून टाकण्याचे ध्येय साध्य करण्याकरिता आणि परस्परांची मने एक करणें असेल तर परशुरामास रामाने जिंकले, तो राम क्षत्रिय होता आणि परशुराम हा ब्राह्मण होता असल्या प्रकारच्या गतकालीन एतिहासिक गोष्टी आम्ही साफ विसरल्या पाहिजेत. जर असल्या गोष्टींची आठवण आम्ही सदोदित ठेवू लागलो, तर राम आणि परशुराम यांच्यासारखीच भांडणे आमच्यामध्ये चालू राहातील अशी मला खात्री आहे. हे जातिकलह कायमचे नाहीसे केले पाहिजेत. उच्च कुलामुळे अथवा वतनदारपणामुळे येणारा सामाजिक दर्जा जगात सर्व देशात व सुधारलेल्या समाजात प्रचलित आहेच. राष्ट्राची उभारणी करण्याच्या बाबतीत हा दर्जा कधीही आड आलेला नाही. जातिपद्धती इतकी ही गोष्ट वाईट नाही. जन्मसिद्ध हक्कांबरोबर कर्तव्यकर्मे व जबाबदारी यांची जोड असते.

सुधारणेच्या सर्व चळवळीत पुढाकार घेणे हे उच्चवर्णियांचे कर्तव्य आहे. जपान देशातील ‘सामुराई’ जातीने म्हणजे त्या राष्ट्रातील क्षत्रिय वर्णाने त्यांचे जाति निर्बन्ध मोडून टाकण्याच्या बाबतीत पुढाकार घेतला. सतराव्या शतकात होऊन गेलेल्या आमच्यातील थोर व पूज्य विभूती श्री छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपणापुढे ठेविलेले ध्येय आज विसाव्या शतकात आपण आपल्या नजरेपुढे ठेविले पाहिजे व त्यांचे अनुकरण केले पाहिजे. मला सांगण्यास दिलगिरी वाटते की, ‘मीमांसा संस्थे’ च्या स्थापनेपासून जुन्यापुराण्या व निरुपयोगी कल्पनांचे पुनरुज्जीवन होण्याचा संभव आहे. आपले पुढारी अर्वाचीन ध्येयाकडे लक्ष देण्याची जितकी जादा काळजी वाहातील तितके चांगले. थोर शिवाजी महाराजांनी, जे उदाहरण घालून दिले आहे, त्याकडे त्यांनी दुर्लक्ष करू नये. फलटणच्या निंबाळकर घराण्यापैकी एका पुरुषाने मुसलमानी धर्माची दीक्षा घेऊन एका मुसलमान स्त्रीशी लग्न केले होते. त्या पुरुषाला त्या थोर विभूतीने पुन्हा आपल्या जातीत घेतले आणि आपल्या परमपूज्य जिजाबाईसाहेब यांच्या संमतीने त्यांनी निंबाळकरांच्या मुलाशी आपल्या स्वतःच्या मुलीचा विवाह करून दिला.

खरोखरीच राष्ट्राची उभारणी, राष्ट्राची घटना, या दोन गोष्टींचे हे एक उदाहरण आहे. आपल्या देशातील या थोर विभूतीला बहुमान व अत्यादर दाखविण्याचा अेकच मार्ग म्हटले म्हणजे त्यांनी घालून दिलेला कित्ता गिरविणे व त्यांच्या मार्गाचे अवलंबन करणे, हा होय जितक्या लवकर आम्ही आमची जातिबंधने मोडून टाकू तितक्या लवकर आपली स्वराज्या बद्दलची लायकी वाढत जाईल. हे तत्त्व, ज्या दिवशी, आमचे मनात बिंबेल, तोच राष्ट्राचा सुदिन होय. जपान देशाने अेका तडाख्यात जातिबंधने नाहीशी केली, असे सांगतात आणि त्याचा परिणाम आपणास दिसतच आहे. त्या राष्ट्राची आजकाल जगातील अत्यंत बलाढ्य व प्रमुख राष्ट्रांमध्ये गणना होत आहे. ‘महात्मा’ शिवाजी महाराज आणि अकबर यांचा चाहता आहे. सर्व हिंदुस्थान देश एकवट करण्याइतकी त्यांची दूरवर दृष्टी व उदात्त ध्येय होते. या राष्ट्र विभूतींचे आम्ही अनुकरण केले पाहिजे. या सात्त्विक पुरुषांबद्दल बहुमान वाटत असल्यामुळे नुकत्याच उल्लेख केलेल्या चातुवर्ण्य व्यवस्थेच्या स्थापनेची चळवळ मला पसंत नाही आणि याच कारणासाठी सत्यशोधक समाज, ब्रह्मो समाज किंवा ज्या समाजाच्या योगाने निरनिराळ्या जातींमध्ये मत्सरभाव उत्पन्न केला जाईल अशा कोणत्याही समाजाशी मी संबंध ठेवू इच्छित नाही. या आमच्या थोर देशाच्या नैतिक आणि सामाजिक प्रगतीचे कामी आणि सार्वजनिक हितासाठी निरनिराळ्या जातींचे एकीकरण करण्याचे आपण शक्य तितके प्रयत्न करू या. जर हल्लीची जातिव्यवस्थाच कायम राहिली तर ज्या रीतीने हल्ली सुराज्याचा अर्थ समजला

जातो ते स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे हे होय. याचा अर्थ मी स्वराज्याच्या चळवळीच्याविरुद्ध आहे, असे समजावयाचे नाही; हे मी पुन्हा एकवार सांगतो. आम्हाला स्वराज्य पाहिजेच. जातिभेदापासून होणारे अनिष्ट परिणाम नाहीसे होईतोपर्यंत हल्लीच्या प्रसंगी आपणास ब्रिटिश सरकारचा आश्रय व मार्गदर्शकता यांची जरुरी आहे. केवळ अल्पसंख्यांक उच्चवर्गियांच्या हातातच सत्ता जाण्यात स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये म्हणून निदान दहा वर्षेपर्यंत तरी आम्हाला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळे आमचे हक्क काय आहेत याचे आम्हाला शिक्षण मिळेल. एकवार ते समजले म्हणजे प्रतिनिधीत्त्वाची जरूर राहणार नाही. जातवार प्रतिनिधी देण्याचा हक्क नसल्याने काय अवस्था होते याबाबत आमच्या म्युनिसिपालिटीचा शोचनीय अनुभव आम्हापुढे आहेच. या संस्थांतून कनिष्ठ जातींचे प्रतिनिधीत्व नावाचेच आहे, म्हणून अशातऱ्हेची चूक पुन्हा होऊ देऊ नये. यास्तव शिक्षणाचा प्रश्न आणि त्यांची निरनिराळी स्वरुपे याजकडे प्रथमतः आमचे लक्ष गेले पाहिजे. आम्ही शेतकरी किंवा सैनिक होऊन राहावे ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही. म्हणून व्यापार-धंदे व इतर उच्च प्रतीचे व्यवसाय यात आम्हास शिरण्याची जरूरी आहे. हल्ली आम्ही व्यापार व उदीम यात पडतच नाही. विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नती व्यापार व तत्संबंधीची चळवळ यावर अवलंबून आहे, खरोखरच व्यापार हा पाश्चिमात्य राष्ट्रांचा धर्मच झाला आहे. येथे धर्म म्हणजे 'बुद्धियुक्त स्वहित' साधणे असे मी समजतो. व्यापार करण्याचे साहस आम्ही केले नाही, तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील. व्यापारासंबंधीच्या चळवळीवर माझा पूर्ण विश्वास असल्यामुळे मी माझ्या दोघा मुलांना व आप्तांना व्यापारात घातले आहे आणि मला सांगण्यास समाधान वाटते की, त्यांनी तो धंदा मोठ्या आनंदाने स्वीकारला आहे. एवढेच नाही, तर त्यात ते चांगल्यारीतीने पुढे येत आहेत. शेतकीच्या व्यवसायामध्ये जरी आमच्यातील बहुतेक लोक गुंतले आहेत तथापि त्यातसुध्दा शिक्षणाची आम्हाला जरुर आहे. शिक्षणाची जरुरी नाही अशी कोणतीही चळवळ नाही.

आम्ही कसे खावे, श्वास कसा घ्यावा, हेही आम्हास शिकले पाहिजे हे सांगणे जर चमत्कारिक दिसते. तथापि ही गोष्ट खरी आहे. हल्लीच्या काळी शेतकी इतकी पद्धतशीर झाली आहे की, ज्याला त्यात यश मिळवावयाचे आहे, त्याला त्या विषयावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत व समजली पाहिजेत. सांप्रतच्या महायुध्दात मराठी लोकांनी आपल्या इतिहासप्रसिद्ध रणवीरांची कीर्ती कायम ठेविली आहे. त्याचप्रमाणे आपल्या राजकर्त्यांविषयी राजनिष्ठा दाखविली आहे. जरी आजची लोकसंख्या मोठी आहे, तरी आमच्या दुर्बलतेमुळे या राक्षसी लढाईत, साम्राजाच्या कामी, द्रव्यबळ क मनुष्यबळ यांची पुरेशी मदत करता आली नाही. तथापि या आणीबाणीच्या प्रसंगी आम्ही सरकारला, यथाशक्ती द्रव्यबळ, मनुष्यबळ, सैन्यबळ यांची मदत करण्याचा झटून प्रयत्न केला पाहिजे. अर्वाचीन युद्ध पद्धतीत, शिक्षणाची अत्यंत जरुरी आहे. प्रत्येक सैनिकास संग्रामशास्त्रावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत. या ठिकाणीसुध्दा शिक्षणाचा प्रश्न आपल्यापुढे येतो. जर मराठे लोकांना शिक्षण मिळेल, तर ते खात्रीने अधिक चांगले योद्धे होतील. हल्लीच्या लढाईच्या दिवसात, तोफखान्यावरील लोक उत्तम गणिती असले पाहिजेत. म्हणून हीच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगावी लागते आणि सर्व स्थितीचा विचार करता एकच तत्त्व निघते, ते हे की, प्रत्येक मराठा चांगला सुशिक्षित झाला पाहिजे. हल्लीच्या लढाईने आपणास साम्राज्याची सेवा करण्याची सुसंधी आणून दिली आहे. असली संधी पूर्वी कधीच आली नव्हती व पुढे कदाचित् येणार नाही. अर्थातच अशा प्रसंगी आपल्या सरकारला मदत करणे, हे सर्व जातींच्या व पंथांच्या लोकांचे कर्तव्य आहे असे मी समजतो आणि याप्रसंगी त्यांनी पुढे येऊन क्षात्रतेजाच्या परंपरेला शोभेल, असे वर्तन केले पाहिजे. यावेळी जर आम्ही कर्तव्यपराङ्मुख झालो तर त्याबद्दल आम्हाला नेहमी शोक करावा लागेल.

अनुक्रमणिका

माझ्या तेरा लाख जमाबंदीच्या व सहा लाख लोकवस्तीच्या संस्थानाने हल्लीच्या लढाईच्या प्रसंगी कोणती कामगिरी केली आहे व करावयाची योजिली आहे, हे आपणांपुढे ठेवण्यात मला आनंद वाटत आहे. आम्ही युद्धकर्जाकडे वीस लाखाहून जास्त रक्कम दिली आहे आणि इतर रीतीनेही दोन लाख रुपयापेक्षाही जास्त रक्कम पोचविली आहे. शिवाय आमच्याकडे लष्कर भरतीचे काम सोपविल्यापासून दरमहा सुमारे दोनशे रिक्रुट, म्हणजे नवे सैनिक, आम्ही पुरवीत आहोत. या महिन्याचा आकडा तीनशपर्यंत वाढेल हे कळविण्यास मला आनंद वाटत आहे. आत्मश्लाघेच्या प्रेरणेमुळे वरील सविस्तर हकीगत मी सांगत आहे, असे नसून माझे साम्राज्याबद्दलचे जे कर्तव्य आहे, तिकडे पूर्ण लक्ष देवून ते मी नम्रपणे करीत आहे; हे दाखविण्याकरिताच मी वरील गोष्टीचा उल्लेख करीत आहे. 'आधी करावे, मग बोलावे,' या तुकाराम महाराजांच्या वचनाला अनुसरून मी माझे कर्तव्य करीत आहे. म्हणून माझे तुम्हा सर्वांना असे सांगणे आहे की, सार्वभौम सरकारसंबंधी जे तुमचे कर्तव्य आहे, ते शक्य तितक्या उत्तम रीतीने पार पाडा.

आमच्या सामाजिक चालीरीतीत सुधारणा करणे, इत्यादी अनेक विषयांचा उल्लेख करण्याची माझी इच्छा होती. माझे मित्र खासेसाहेब पोवार हे या ठिकाणी आमच्यामध्ये आहेत, म्हणूनच मला आनंद वाटतो. गेल्या सालच्या, सातारा येथे भरलेल्या परिषदेचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी या प्रश्नाचे मुद्देसूदरीतीने व सविस्तरपणे विवेचन केले आहे की, त्यावेळी केलेला उपदेश इतका उत्तम आहे की, त्या वेळेस केलेल्या सर्व सूचना येईपर्यंत त्या उपदेशाचा पुनः पुन्हा कितीही वेळा उच्चार केला, तरी योग्यच होईल. ज्याअर्थी माझी मते त्यांच्या मताशी जुळतात, त्याअर्थी माझ्यावतीने या विषयावर बोलण्याबद्दल त्यांनाच सूचना करण्यापलिकडे मी काही अधिक करीत नाही.

आपली रजा घेण्यापूर्वी, माझ्या जातीच्या समाजामध्ये, हजर असण्याबद्दल व यंदाच्या बैठकीच्या अध्यक्षत्वाचा मान मला दिल्याबद्दल मी आपले पुन्हा एकवार आभार मानीत आहे. या सभेचे सर्व अधिवेशन संपेपर्यंत काही निकडीच्या कामामुळे मला हजर राहता येत नाही म्हणून दिलगिरी वाटत आहे. यापासून आपल्याला पुष्कळ निराशा उत्पन्न होईल याची मला जाणीव आहे, परंतु या अधिवेशनाच्या मधेच मी आपणास सोडून जात आहे याबद्दल मला किती वाईट वाटत आहे; याची कल्पना आपणास होणे शक्य नाही. हे जग तडजोडीचे आहे. आपल्या प्रगतीच्या चाललेल्या कामी मला खरोखर कळकळ वाटत आहे. हे दाखविण्याकरिता मला आपल्या सहवासात थोडातरी काळ घालवावा असे वाटत होते आणि जरी शरीराने मी आपल्यामध्ये हजर नसलो, तरी असल्या प्रसंगी मी मनाने हजर आहेच; या गोष्टीवर आपण मेहेरबानी करून विश्वास ठेवावा. ईश्वर आपल्या हल्लीच्या प्रयत्नात साहाय्य करील आणि आपल्या सुधारणेच्या मार्गात, आपणावर कोणतेही संकट न येवो, असे मी इच्छितो!

ज्या थोर सार्वभौम ब्रिटिश छत्राखाली अभिमानास्पद हक्क आपणांस प्राप्त झाला आहे. त्या राष्ट्राला सांप्रतच्या युद्धात विजयश्री माळ घालो अशी आपण सर्व, त्या परमकृपाळू परमेश्वराची मनोभावे प्रार्थना करू या!

***

अनुक्रमणिका

दोन

रिलिजस ब्युरॉक्रसी

***

नासिकच्या श्री उदाजी मराठा वसतिगृहामध्ये सर्व जातींच्या मुलांना प्रवेश दिल्यामुळे राजर्षी म्हणतात: “सर्व जातींच्या मुलांस या वसतीगृहाचे प्रवेशद्वार खुले ठेवण्यात चालकांनी आपल्या मनाचा थोरपणा व उज्ज्वल देशभक्ती दाखविली आहे. सर्व माणसे ईश्वराची लेकरे असल्याने त्यांचे परस्परांशी बंधुत्त्वाचे नाते आहें .... सर्व जातींच्या पुढाऱ्यांना माझे सांगणे आहे की, आपली दृष्टी दूरवर ठेवा. पायापुरते पाहू नका. जातिभेद मोडणें इष्ट आहे, जरूर आहे. जातिभेद देशोन्नतीच्या मार्गात अडथळा आहे.”

देशोन्नतीच्या मार्गातील हा महान अडथळा कशामुळे निर्माण झाला हे सांगताना राजर्षी सांगतात: “जातिभेदाचे कार्य जातिद्वेष हे आहे. जातिद्वेष हा हिंदुस्थानचा फार पुराणा रोग आहे. त्यासाठी जातिभेद मोडून आपण एक होऊ या”

राजर्षीचे हे मत असूनही ‘लोकसंग्रह’ च्या संपादकानी राजर्षीच जातिद्वेष वाढवितात असा आरोप केला. त्याला उत्तर देताना राजर्षी म्हणतात: “जपानातील सामुराई लोकांनी आपला जन्माने प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला म्हणून जपानमध्ये ऐक्य होऊन त्या देशाची उन्नती झाली आहे. त्याप्रमाणे ब्राह्मणांनी जातिमत्सर सोडल्या शिवाय आमच्या लोकांची उन्नती होणार नाही. सर्व जातींना हात देऊन त्यांना आपल्या बरोबर घेऊन सर्वाची स्थिती सुधारणे हे काम क्षत्रियांनी अवश्य केले पाहिजे.” राजर्षीनी याचसाठी कोल्हापुरात सर्व जातींच्या लोकासाठी, निरनिराळ्या वसतिगृहांच्या

***

नासिक : १५ एप्रिल, १९२०
श्री उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या पायाभरणी समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे या नात्याने शाहू महाराजांनी केलेले भाषण

द्वारे शैक्षणिक सुविधा प्राप्त करून दिल्या. त्यामुळे जातिद्वेष वाढण्याऐवजी कमी होण्यालाच मदत झाली.

राजर्षी शाहू महाराजावरील दुसरा आक्षेप म्हणजे, राजर्षी “आपल्या प्रजेस स्वराज्य देण्यास बिलकूल कबूल करीत नाहीत.” याला उत्तर देताना राजर्षी म्हणतात: “कोल्हापूर हे ‘विद्यार्थी वसतिगृहाची माता’ आहे. सर्व जातीचे लोक पुढे येऊन सामाजिक, औद्योगिक, शिक्षणविषयक, सरकारी नोकरी वगैरे सर्व बाबतीत आपली जबाबदारी पार पाडण्याचे सामर्थ्य त्यास येणे, याला मी ‘जातवार प्रतिनिधीत्व (Communal Representation) म्हणतो.” असे जातवार प्रतिनिधीत्व द्यावयाचे तर लोकही शिकले पाहिजेत. त्यांच्या मते, “माझी सर्व प्रजा मराठी तिसरी इयत्ता तरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राजकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आजच विश्रांती घेतली असती ... ... तेव्हा इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हातून सत्ता काढून घेऊन ती विद्यासंपन्न अशा अल्पसंख्यांक ब्राह्मण वर्गाच्या हाती देणे मला बिलकूल पसंत नाही.” तसे केले तर पुन्हा पेशवाई येईल ही भीती राजर्षीना वाटत होती. त्या संदर्भात ते म्हणतात:

अनुक्रमणिका

“खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर जे जड व जुलमी जू लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास “सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरूरी आहे असले शिक्षण कोल्हापूर संस्थानच्या रयतेस देण्यास प्रारंभ झाला आहे.” त्यामुळे समाजातील ‘सुशिक्षितांची ब्युरॉक्रसी’ – मक्तेदारी – मोडून काढता येईल; यावर राजर्षींची श्रद्धा आहे. त्यांच्या मते, “आधी राजकीय सुधारणा की आधी सामाजिक सुधारणा” हा वाद याच ब्युरॉक्रसीच्या प्रवृत्तीतून जन्मलेला आहे.

शेवटी ‘रिलिजस् ब्युरॉक्रसी’ मध्ये राजर्षी सांगतात, “मिळालेल्या स्वराज्याच्या हक्काची जबाबदारी ओळखून पुढारलेले लोक स्पर्शास्पर्शाचे बंड मोडून, इतर सुधारलेल्या लोकांप्रमाणे सर्व प्रजाजन आपले देशबांधव आहेत अशी जाणीव बाळगून निःपक्षपात बुद्धीने त्यांना विद्या देतील अशी मी आशा करतो.” सारांश, या देशाची उन्नती व्हावयाची असेल तर जातिभेदाचा अडथळा नष्ट करणारे शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे. ते त्यांच्यापर्यंत नेऊन पोचविले पाहिजे असे, राजर्षींच्या जीवनाचे कृतिशील ध्येय होते.

***

दोन

रिलिजस ब्युरॉक्रसी

***

माझ्या प्रिय मराठे बंधूनो, मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या पायाचा दगड बसविण्याच्या महत्त्वाच्या समारंभास मला बोलाविले याचा मला मोठा आनंद वाटत आहे. मी हे काम मोठ्या हौसेने करीत आहे.

ही संस्था मराठ्यांचे कैवारी व उदार दाते श्री. उदाजीराव पोवार महाराजसाहेब धार यांच्या औदार्याने व प्रेमाने उदयास आली. हे जे रोपटे येथे लावले गेले त्याला पाणी घालून व योग्य तऱ्हेने खत देवून त्याची वाढ करण्यास माळीही उत्तमच मिळाले. निरलस, स्वार्थपराङ्मुख, कर्तव्यनिष्ठ, सत्यावर अचल श्रद्धा असणारे, परोपकारी व आत्मीयता असणारे असे सेवक मिळाल्यावर कोणत्या संस्थेची वाढ होणार नाही? मराठ्यांचे पुढारीपण स्वीकारून त्या त्या कालास अनुरूप अशी नावाजण्यालायक कामगिरी आमच्यातील पाटीलवर्ग हमेशा करीत आला आहे, असे मराठ्यांचा इतिहास वरवर पाहाणाऱ्यास देखील दिसून येईल. मोठमोठ्या लढाया मारून, देश जिंकण्याच्या कामात ते कोणास हार गेले नाहीत. या सध्याच्या शांततेच्या काळातही हे मर्द अज्ञानरूपी लोकशत्रूशी झगडत आहेत. हे पाटील कुलभूषण कोण आहेत हे आपण जाणतच आहात. ते माझे मित्र रावबा थोरात पाटील, वणीकर व दादा मोरे पाटील, पिंपळगाव बसवंत हे आहेत. त्यांनी या संस्थेच्या उन्नतीकरिता किती झीज व कष्ट सोसले आहेत व स्वार्थत्याग केला आहे हे मजपेक्षा आपणास जास्त माहिती आहे. त्यांना साहाय्य करणारे आस्थेवाईक लोक पुष्कळच आहेत. त्या सर्वांची नावे सांगणे शक्य नाही. थोडी नावे सांगून बाकीच्यांची गाळणे उचित नाही. त्या सर्वांना त्यांच्या कामगिरीबद्दल मी शतशः धन्यवाद देतो.

वरच्या प्रपंचाची हेळसांड करून आपल्या मुलाला समाजसेवेस वाहू दिल्याबद्दल रा. भाऊसाहेब थोरात पाटील, वणी यांचेही समाजावर फार फार उपकार आहेत. जसे बीज तसा अंकुर. ‘मुलग्याने बापाला मागे टाकावे अशीच शहाण्या बापाची इच्छा असते. भाऊसाहेबांची इच्छा पूर्ण झाली म्हणून ते धन्य आहेत.

या बोर्डिंगचे धोरणही अनुकरणीय आहे. मराठा शिक्षण परिषदेच्या प्रसंगी मराठे लोकांच्या औदार्याने याची स्थापना झाली असताही सर्व जातींच्या मुलास याचे प्रवेशद्वार खुले ठेवण्यात चालकांनी आपल्या मनात थोरपणा व उज्ज्वल देशभक्ती दाखविली आहे. सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरे असल्याने त्यांचे परस्पराशी बंधुत्वाचे नाते आहे हे सत्यशोधक समाजाचे मुख्य तत्त्व प्रचारात आणून आपले मनोधैर्य व सत्यनिष्ठा स्पष्टपणे दाखविल्याबद्दल येथील चालकांची तारीफ करावी तितकी थोडीच. हे ‘कॉस्मापॉलिटन तत्त्व’ जितक्या संस्थांतून पसरेल तितके चांगले. त्या योगाने जातिभेद मंदावून ऐक्य होण्यास चांगले साहाय्य होते.

मी प्रथमतः अगदी कॉन्झर्व्हेटिव (Conservative) म्हणजे जुन्या मताचा कट्टा अभिमानी होतो. जातिभेद कायम राहिला पाहिजे व पाळला पाहिजे असे माझे मत असे. अशा दुराभिमानाने इतरांची उन्नती होण्याच्या मार्गात मी अडथळा करतो याची जाणीव मला नसे. दुसऱ्या जातीच्या लोकांनी भरविलेल्या सभेत जाऊन अध्यक्षस्थान स्वीकारणे म्हणजे आपला धर्म बुडविणे असे मला वाटे. आजही जाति परिषदांत अध्यक्ष होणे मला पसंत नाही. पण याचे कारण मात्र पूर्वीच्या कारणाहून फार भिन्न आहे. तेव्हा मी जात्याभिमान सोडतो

हे वाईट आहे असे मला वाटे. मी जाति परिषदांस उत्तेजन दिले तर जातिभेद तीव्र केल्याचे पाप माझ्या डोक्यावर येईल अशी मला आज भीती वाटते.

सर्व जातींच्या पुढाऱ्यांना माझे सांगणे आहे की, आपली दृष्टी दूरवर ठेवा. पायापुरतेच पाहू नका. जातीभेद मोडणे इष्ट आहे. जरूर आहे. जातिभेद पाळणे हे पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हा दूर करण्याचे प्रयत्न जोराने केले पाहिजेत. ही जाणीव पक्की ध्यानात ठेवून मग ह्या दिशेचा प्रयत्न म्हणून जाति परिषदा भरवा. जातिबंधन दृढ करणे, जातिभेद तीव्र होणे, हा परिणाम ह्या परिषदांचा होऊ नये ही खबरदारी घेतली पाहिजे.

जातिभेद हा स्वाभाविक आहे व तो पाळणे व राखणे समाजाच्या उन्नतीस आवश्यक आहे असे प्रतिपादन बऱ्याच वेळा उच्चा दर्जाच्या लोकांकडून करण्यात येते. आपला व आपल्या पुढील संततीचा उच्च दर्जा कायम राहावा व इतरांवर सत्ता गाजविण्यास मिळावी अशी तीव्र इच्छा या प्रतिपादनाच्या बुडाशी असते.

हिंदुस्थानात आहे या प्रकारचा जातिभेद पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याही दुसऱ्या देशात नाही. या विश्वात दुसऱ्या कोणत्याही ग्रहावर तरी तो सापडेल की नाही याविषयी संशयच आहे! हिंदुस्थानला जी गुलामगिरी आज हजारो वर्षे भोगावी लागत आहे. तिचे प्रधान कारण हा जातिभेद आहे. जातिभेदापासून नुकसानीपेक्षा फायदाच जास्त झाला आहे असे कोणास दाखविता येईल काय?

सर्व लोकांत जातीच्या रूपाने असे अनुल्लंघ्य भेद माजल्यावर त्यांच्यात एकी होणे फार कठीण; केवळ अशक्य आहे. काही थोडा वेळ स्वार्थ साधण्यासाठी हे भेद नजरेआड करण्याचा प्रयत्न होईल. पण यापासून फलनिष्पत्ती अगदी थोडी व तात्पुरतीच. सर्व देशभर भेद मानल्यावर एकी कशी होणार? ती मुळीच शक्य नाही. 'जातिभद असू द्या पण जातिद्वेष मात्र नको,' असे म्हणणारे पुष्कळ आहेत. हे मत प्रामाणिकपणाचे असल्यास त्यांच्या अज्ञानाची कीव केली पाहिजे. कारण जातिभेदाचे कार्य जातिद्वेष हे आहे. तेव्हा कार्य नाहीसे करण्यास कारणही काढून टाकले पाहिजे.

जातिद्वेष हा हिंदुस्थानचा फार पुराणा रोग आहे. परशुरामाने निःक्षत्रिय पृथ्वी केली, या म्हणण्यात जातिद्वेषाचे प्रतिबिंब पूर्णपणे पडलेले दिसेल. पेशव्यानी ब्राह्मणेतरांच्या घरावर गाढवाचे नांगर फिरविले याचेही कारण तेच. त्यांच्या शेंड्या व जानवी श्री शिवाजी महाराज व मराठे वीर यांनी रक्षण केली तेच ब्राह्मण, 'मराठे शूद्र आहेत'असे बिनदिक्कत प्रतिपादन करतात याचे कारण दुसरे कोणते? या जातिद्वेषाची उचलबांगडी करावयाची असेल तर जातिभेदच मोडला पाहिजे. जातिभेद मोडून आपण सर्व एक होऊ या.

माझ्यावर असा एक आरोप आहे की, मी जातिभेद नसावा अशा मताचा असूनही जाति मत्सर वाढवीत असतो. हा आरोप अगदी मिथ्या आहे. जातिमत्सर वाढविण्याचा माझा प्रयत्न मुळीच नाही. जात्याभिमानाच्या, शिवाजी महाराजांच्या किंवा धर्माच्या आड राहून मी गोळ्या मुळीच मारीत नसतो. अशा आडून गोळ्या मारण्याचा मी धिःक्कार करतो. माझ्या मागासलेल्या बंधू-भगिनींना गुलामगिरीत लोटू पाहातात त्यांचा मी धिःक्कार करतो. मागे पडलेल्यांना मी सारखे, म्हणजे एका जातीचे समजतो व त्यांना वर आणण्याचा प्रयत्न करतो. हे माझे पवित्र कर्तव्य आहे असे मी समजतो. असे मी न करीन तर मी कर्तव्यविन्मुख झालो असे माझे मन मला टोचील. या मागासलेल्या जातीला वर आणण्याचे प्रयत्न झाले

अनुक्रमणिका

नाहीत तर जातिभेदाचे कट्टे अभिमानी वीर तिला दडपून टाकल्याशिवाय राहाणार नाहीत; यासाठी मागासलेल्यांचा कैवार घेणे हे जातिद्वेष वाढविणे नव्हे हे उघड आहे.

जातिभेद मोडून, केवळ जन्माच्या सबबीवर दुसऱ्यास हीन मानण्याचे नाहीसे होईल व या रीतीने जातिद्वेषाचा नायनाट होईल, तो सुदिन असे मी समजेन! मी जातिभेद नसावा म्हणतो व जातिभेद मोडण्याचा जाहीररीतीने प्रयत्नही करतो. तथापि माझे सभोवतालचे लोकांतून जातिभेदाचे बंध मला तोडता येत नाहीत म्हणूनच मी तुमचा अध्यक्ष होण्यास खरोखरच योग्य नाही. मी असे काही मूर्ख लोक पाहातो की, ते आपल्या बंधुभगिनींना पशुपेक्षा व गोमयाहूनही नीच समजतात. पण सर्व लोकांचे आपण पुढारी आहो असे भासवून तुमचे चांगले करू अशा थापा देऊन फसविण्यात त्यांना शरम वाटत नाही.

जपानातील सामुराई लोकांनी आपला जन्माने प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला म्हणून जपानमध्ये ऐक्य होऊन त्या देशाची उन्नती झाली. त्याप्रमाणे ब्राह्मणांनी जातिमत्सर सोडल्याशिवाय आमच्या लोकांची उन्नती होणार नाही. सर्व जातींना हात देऊन त्यांना आपल्याबरोबर घेऊन सर्वांची स्थिती सुधारणे हे काम क्षत्रियांनी अवश्य केले पाहिजे. ते त्यांचे कर्तव्य आहे. ब्राह्मण लोकांना जन्मसिद्ध धार्मिक बाबतीत श्रेष्ठपणा आहे. त्याच्या जोरावर त्यांची एक ‘धार्मिक ब्युरॉक्रसी’च झाली आहे. ही ब्युरॉक्रसी मोडल्याशिवाय व सर्वास धार्मिक बाबतीत सारखे हक्क मिळाल्याशिवाय कधीही देशोद्धार होणार नाही यासाठी आमच्या लोकांनी ब्राह्मणांकडून पूजा करविणे व त्यांच्याकडून धर्मकृत्ये चालविणे, हे सोडले पाहिजे. तसेच त्यांच्याकडून धर्मग्रंथ किंवा कथा, पुराणे वगैरे ऐकण हेही सोडले पाहिजे. नाहीतर ब्राह्मणांच्या श्रेष्ठपणाच्या कथाच आमच्या लोकांच्या कानावर येणार. आमचेच पूर्वज राम-कृष्ण यांची पूजा, ब्राह्मण लोक करितात यावरून ब्राह्मणाचा दर्जा व जात आमच्यापेक्षा हलकी आहे हे उघड आहे. असे असूनही ते आम्हांस हीन लेखतात. तेव्हा त्यांना सोडून आमची कामे आम्हीच चालवावीत असे माझे ठाम मत आहे. मी इतके स्पष्टपणे बोलत आहे त्याबद्दल माफी असावी.

मी ब्राह्मणांवर प्रेम करीत असताही जर ते माझा द्वेष व तिरस्कार करतील तर मलाही जशास तसे वागावे लागेल. त्यांची माझ्याशी प्रेमाची वागणूक आढळून येईल तरच मी माझ्या घरच्या देवांची पूजा व इतर धर्मकृत्ये ब्राह्मणांकडून करवून घेण्याचे चालू ठेवीन. नाहीतर ब्राह्मण पुजाऱ्यांना बंद करून माझ्या घरच्या देवाची पूजा मी मराठे पुजाऱ्याकडून करवून घेईन. ते मला मनुष्य समजत असतील तरच त्यांच्याकडे पुजारीपणा ठेवीन आणि जर का ते मला जनावराप्रमाणे समजतील तर मी ठेवणार नाही.

ब्राह्मणांनी एकतर सामुराई लोकांप्रमाणे जातिमत्सर सोडले पाहिजेत तरच जपानी लोकांप्रमाणे देशाची उन्नती होईल, नाहीतर मुळीच होणार नाही. क्षत्रियांचे मात्र कर्तव्य आहे की, सर्व जातींना हात देऊन चालविणे. ब्राह्मणांची ‘रिलिजस ब्युराक्रसी (Religious Beauracracy) तुटून पडल्याशिवाय कधीही देशोद्धार होणार नाही. सबब ब्राह्मण पुजारी व ब्राह्मणांकडून धर्म ऐकण्याचे सोडले पाहिजे.

‘लोकसंग्रह’ चे एडिटर विद्वान् व माझ्यापेक्षा शहाणे आहेत. मी त्यांचा कित्ता घ्यावा हे बरोबर आहे. त्यांनी माझ्या भाषणाचा विपर्यास केला आहे. सर्व भाषण वाचून माझी योग्य चूक दाखवून, तसे त्यांनी माझ्या पदरात घातले असते तर त्यांचे ते कृत्य वंद्य व पूज्य मानले असते. त्यांचा ‘हम करेसो कायदा’ चालणार नाही. प्रेमाने प्रेम वाढते व द्वेषाने द्वेष वाढतो. प्रेमाने जनावरास वागविले तर ते जनावरदेखील उलटे प्रेम करते. मी स्पोर्टस्मन आहे. मी माझा चित्ता आफ्रिकेहून आणविला आहे आणि तो कोल्हापुरापासून दोनशे

मैलांवरील जंगलात सोडला. तेथून तो मालकास हुडकीत परत आला! जनावरे प्रेमाने वागविली तर इतके प्रेम दाखवितात, तोच चित्ता जुलूमाने वागविला असता तर पळून गेला असता, मनुष्याला चावला असता; हे आमच्या पुढाऱ्यांना कळू नये काय? इतरांना हीन किंवा अस्पृश्य म्हणण्यात त्यांचा काय मोठेपणा वाढणार आहे?

मुंबई, सोलापूर, अहमदाबाद, अमृतसर व लाहोर वगैरे ठिकाणी जे दंगे झाले त्यात सुशिक्षित पुढारी मागे राहून गरीब लोकांवर प्रसंग आला, याचे कारण त्यांचे अज्ञान. पुढाऱ्यांचा कावा त्यांना समजला नाही. लोकांस थोडे जरी शिक्षण असते तरी असे प्रकार झाले नसते!

महात्मा गांधी, डॉक्टर सत्यपाल व किचलू यांच्याविषयी माझी मोठी पूज्यबुद्धी आहे. हे दंगे त्यांनी मुद्दाम करविले असे म्हणण्याचे धार्ष्ट्य मी केव्हाही करणार नाही. त्यांच्या हाताखालच्या लोकांच्या चुका झाल्या व या चुकांचे शिंतोडे या थोर विभूतींवर उडाले एवढेच मी म्हणतो. 'राजकारण' कर्त्यासारख्या मजवर टीका करणाऱ्यास माझी विनंती आहे की, त्यांनी माझे समग्र भाषण देऊन, प्रत्येक पॅरेग्राफसमोर त्यावर आपली टीका असेल ती छापावी. असे केले म्हणजे लोकांस आपले मत देण्यास बरे पडेल. अर्धाअधिक मजकूर गाळून थोडेसे अवतरण घेतल्याने माझ्या सांगण्याचा विपर्यास होतो. राजकारण कर्त्यास अशी विनंती करणे हे मी मोठे धाडस करितो अशीही भीती वाटते. कारण मग त्यास विरूद्ध टीका करण्यास स्थळे कमीच मिळतील.

युरोपातील किंवा आमच्या देशातील थोर पुरुषांचे वर्तनभेद, त्या मोडण्याच्या आवश्यकतेची साक्ष देत आहे. ल्यूथर व श्री शिवाजी महाराज यांची चरित्रे आम्हास हेच शिकवितात.

श्री शिवाजी छत्रपतीनी तर मुसलमानांचे मराठे करून घेतले व देशकार्याकरिता महारमांगांचे रिसाले व तोफखाने तयार करून; स्पर्शास्पर्शाच्या विचारास जबरदस्त धक्का दिला.

आमचे खरे महात्मा बादशहा अकबर शहा हेच आहेत. ज्याने हिंदू-मुसलमानांची एकी घडवून आणली व खुद्द स्वतः जोधाबाई नावाच्या रजपूत स्त्रीशी लग्न करून तिला हिंदूच राहू दिले व सूर्याला अर्घ्य देण्याकरिता लाखो रुपये खर्च करून व्यवस्था केली, त्याची साक्ष हल्ली आग्रयाचा किल्ला देत आहे. जी गोष्ट विसाव्या शतकात अशक्य झाली आहे ती सतराव्या शतकात यवन बादशहाने शक्य केली होती.

इंग्रजी राज्याचे धोरण प्रजेस विद्या देणे हे आहे: इंग्रजी शिक्षणाची द्वारे सर्वांना खुली केली. महाराणी व्हिक्टोरिया व त्यांचे पुढील राजे यांच्या कारकीर्दीत सर्व जातींना विद्यामृतपानाची जशी संधी मिळाली तशी रामकृष्णाच्या काळीही कोणास मिळाली नाही. परंतु विद्यामृतपानाची मोकळीक सर्वांस झाली तरी या पोया बहुतांशी ब्राह्मणांच्या ताब्यात राहिल्याने हे अमृत ब्राह्मणेतरांपैकी फारच थोड्यांस मिळाले. बहुतेक फायदा ब्राह्मणांचाच जास्त झाला. यामुळे आता स्वराज्याच्या हक्काची मागणी करताना त्यांचीच ओरड जास्त आहे व स्वराज्याचे अधिकार मिळतील ते सर्व आमच्या ताब्यात राहावेत अशी त्यांची खटपट आहे. हे अधिकार त्यांच्या एकट्याच्या पदरात पडू नयेत, इतर जातीसही त्यात हिस्सा मिळावा असे प्रतिपादन करणारे लोक त्यास देशद्रोही, देशबुडवे दिसतात.जातवार प्रतिनिधीचा हक्क मागणाऱ्यांना अशा शेलक्या शिव्या व शाप देण्यात येत आहेत.

माझ्या चिमुकल्या राज्यातील प्रजाजनांनी एका बाबतीत तरी विशेष नाव कमावले आहे, हे मी अभिमानपूर्वक सांगतो. त्यांचे उदाहरण लोकांपुढे आल्याने हा कित्ता पुष्कळ ठिकाणी गिरविला गेला आहे. ब्रिटिश पार्लमेंटला 'मदर ऑफ पार्लमेंटस्' (Mother of Parliaments) असे मोठ्या अभिमानाने इंग्रजी व इतर लोक म्हणतात. त्याचप्रमाणे कोल्हापुरास 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस' (Mother of Boarding Houses) म्हणजे 'विद्यार्थी वसतिगृहांची माता' असे सार्थ यश मिळाले आहे. तेथे मराठा, जैन, लिंगायत, सारस्वत, मुसलमान, दैवज्ञ, पांचाळ, शिंपी, कायस्थ, प्रभु यांच्या मुलांकरिता विद्यार्थी वसतिगृहे आहेत. आर्यसमाज सर्वास सारखे लेखून गुरुकुल चालवीत आहे. शिवाय अस्पृश्य लोकांच्या विद्यार्थ्यांकरिता अशी संस्था काढून अस्पृश्यांचा अस्पृश्यपणा काढून टाकण्यामध्येही गरीब अशा कोल्हापुरच्या लोकांनी पुढाकार घेतला आहे. मागासलेल्या लोकांपैकी काही लोकांस वकिलीचीही परवानगी देण्यात आली आहे. समाजातील कृत्रिम उच्चनीच भाव नाहीसे करणे, तसेच स्त्रियांची योग्यता वाढविणे या संबंधाने समाजसुधारणेस साहाय्य करणारे असे प्रगतीपर कायदे करण्यातही कोल्हापुरचा पाय पुढेच आहे. या कामी मनःपूर्वक उत्साहाने मदत देणाऱ्या माझ्या लाडक्या प्रजेचे मी अभिनंदन करितो व त्यास धन्यवाद देतो!

सर्व जातीचे लोक पुढे येऊन सामाजिक, औद्योगिक, शिक्षणविषयक, सरकारी नोकरी वगैरे सर्व बाबतीत आपआपली जबाबदारी पुरी पाडण्याचे सामर्थ्य त्यास येणे याला मी 'जातवार प्रतिनिधित्व' (Communal Representation) म्हणतो. मागे पडलेल्यांना अशा प्रकारे पुढे येण्यास उत्तेजन देणे हे माझे कर्तव्य आहे असे मी मानतो. जनतेला व त्याचप्रमाणे हीन स्थितीतील लोकांस वर काढण्यास मी हातभार लावीत असतो. वयात आलेल्या व आपले हिताहित कळणाऱ्या मुलाकडे लक्ष देण्याची आईबापास जरूरी नसते. पण जी अज्ञान आहेत, ज्यांना चालता येत नाही, ज्यांना धड उभेही राहाता येत नाही त्यांची काळजी आईबापास घ्यावी लागते. कोणास हाताचा आधार द्यावा लागतो व कोणास उचलूनही घ्यावे लागते. असे करणारे आईबाप योग्य तऱ्हेने आपले कर्तव्य बजावितात असे होते. सर्व मुलांस सारखे वागवीत नसल्याने ते मुलामुलांत पक्षपात करतात असा त्यांच्यावर आरोप करणे हे अधमपणाचे होईल. हेच तत्त्व लक्षात घेऊन मी अगदी निकृष्ट स्थितीत असलेल्यांस जास्तीत जास्त उत्तेजन देत आहे. त्यांना नोकऱ्या सढळ हाताने दिल्या जात आहेत व वकिलीच्या सनदाही त्यांना देऊन त्यांचे शिक्षण, दर्जा व महत्त्व वाढविण्यात येत आहे. याप्रमाणे विद्यामृताचे झरेच त्या त्या जातींना दांखवून दिले असल्याने त्यांची उन्नती झपाट्याने होईल अशी मला मोठी आशा आहे ब्राह्मणेतरांनाही याच तत्त्वावर विशेष उत्तेजन मला द्यावे लागले. या माझ्या सरळ वर्तनास ब्राह्मणद्वेष असा खोटा दोष लावण्यात येत आहे. पण हा आरोप कदाचित् प्रामाणिकपणानेही करण्यात येत असेल!

अलिकडचे काही राजकारणी ब्राह्मण म्हणतात की, ब्राह्मणच आजपर्यंत पुढारीपणा घेत आले व आताही घेत आहेत. म्हणून त्याचा हेवा वाटून त्यांचे पाय मागे ओढण्याकरिता जातवार प्रतिनिधीसारख्या मागण्या केल्या जात आहेत. पण खरी स्थिती तशी नाही आमची ब्राह्मण बंधूस हीच विनंती आहे की, आपण या कामी फार पुढे गेलेले आहात् आपणास धावण्याची शक्ती आहे. आम्ही आता कोठे रांगत आहोत. थोडेथोडे पडतझडत उभ् राहण्याचा प्रयत्न करीत आहोत. आमचे श्रम वाचविण्याकरिता आमच्यावरील प्रेमामुळ आपण आम्हास उचलून नेण्यास तयार आहात. पण आपल्या प्रेमाचा व कळकळीचा परिणाम आमच्या नुकसानीचा होईल. आम्हाला आपण रांगू दिले नाही व पडतझडत उभे राहू दिले नाही तर आम्ही कायमचे पंगू होऊ. याकरिता आपण आमच्या रांगण्याचे व उभे राहण्याचे कौतुक करा व उत्तेजन द्या. प्रतिबंध करु नका. आमची धडपड आमच्या अंगी शक्ती येण्यासाठी आहे. आपल्या द्वेषामुळे आम्ही ती करितो ही समजूत चुकीची आहे, असे आम्ही आमचे पुढारी म्हणविणाऱ्यास नम्रपणे सांगतो.

अनुक्रमणिका

काही वर्तमानपत्रकारांचा माझ्यावर असा आरोप आहे की, मी माझ्या लोकांस स्वराज्य देण्यास बिलकूल कबूल नाही. हा आरोप अगदी खोटा असून तो माझ्याविषयी गैरसमज व्हावा म्हणून, माझ्या म्हणण्याचा विपर्यास करून मुद्दाम करण्यात येत आहे. याबद्दल मला फार दिलगिरी वाटते. ज्या भाषणासंबंधाने हा आरोप करण्यात येतो ते भाषण करताना मी म्हणालो होतो:

["बहुजनसमाजाचा शिक्षणाबाबतीतला दर्जा वाढून, वरिष्ठ वर्गाच्या बरोबरीने अंशतः तरी तो आल्याशिवाय सुधारणेच्या दिशेने माझ्या संस्थानच्या राज्यकारभारात लोकांस हक्क देण्याविषयीचा बदल करण्याला हात घालण्यास मी धजावणार नाही"] "But if I may be allowed to express an opinion at this stage, I would only say that I, for one, would hesitate to make any consitutional changes in my state in the direction of the Reforms until the general level of education among the masses has risen and is at lest, partially equalised with that of the higher classes."

यावरुन माझ्या म्हणण्याचा विपर्यास मुद्दाम कसा करण्यात आला हे आपल्या ध्यानी येईलच. मतदार संघास आपले हक्क समजून त्यांचा उपभोग घेण्याची पात्रता थोड्या बहुत अंशाने तरी त्यांच्या अंगी येण्यापूर्वी व लहानसहान जातीस देखील विद्येची गोडी लागण्यापूर्वी स्वराज्य देणे मला सुरक्षित वाटत नाही.

शेकडा ७० । ८० लोकांची तयारी नसताही असे अधिकार लोकांस दिले गेल्यास ते अल्पसंख्याकांच्या हातात पडतात व जातिभेदाने जखडलेल्या आमच्या देशात ते एकाच जातीच्या हाती जाऊन स्वार्थबुद्धीने त्यांना इतरांचे भयंकर नुकसान करण्यास संधी मिळते. आर्य व अनार्य यांच्यामागील इतिहास, त्याचप्रमाणे पेशवाईचा अलिकडील इतिहास या माझ्या म्हणण्यास भक्कम पुरावे देतील. स्वार्थाची साधने हाती आली म्हणजे चांगले लोकही वाईट व जुलूमी होतात. मग ज्यांनी आज पिढ्यान्पिढ्या इतरांस गुलामगिरीत खितपत ठेविले आहे व ज्यांची इच्छा तसेच वागण्याची रीत उघड उघड दिसत आहे; त्यांच्या हाती सर्व सत्ता जाऊ नये याविषयी खबरदारी घेण्याची केवढी आवश्यकता आहे हे सांगण्यास पाहिजे असे नाही. माझ्या भाषणाचा आशय असाच आहे. 'केसरी' वगैरे जहाल पत्रांचे धोरण व कावा कसा आहे हे आपणास माहीत आहेच.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याच्या अगोदर सध्या उपयोगात असलेली शाळागृहे विस्तृत व हवेशीर केली पाहिजेत व तिकडे खर्च करण्याची जास्त जरूरी आहे हे 'केसरी' चे प्रतिपादन कोणाही सरळ बुद्धीच्या माणसास चीड आणील. (No cake to a few until all are served with bread) हे इंग्लंडातील मजूर पक्षाचे धोरण आहे. पण येथे शेकडा ९० लोक उपाशी आहेत व दहा लोक खात आहेत. उपाशी लोकांना कोंड्याच्या भाकरीचीही सोय करण्याअगोदर या दहांच्या पोळीवर साजूक तूपे वाढा असा ओरडा करणाऱ्यांना रयतेची कळकळ कितपत आहे हे उघड होत आहे. लिंगायत, जैन वगैरे व्यापारी कौन्सिलात जाऊन काय तागडी धरावयाची आहे? शेतकऱ्यांनी काय तेथे नांगर चालवायचा आहे? असे कुत्सित विचार आपल्या पत्रात घालण्याची व सभेत बोलण्याची यांना लाज कशी वाटत नाही हे मला समजत नाही. इंग्रज अधिकाऱ्यांच्या हातून सत्ता काढून घेऊन ती विद्यासंपन्न अशा अल्पसंख्यांक ब्राह्मण वर्गाच्या हाती देणे मला बिलकूल पसंत नाही. परशुरामाच्या वेळेपासून आजपर्यंत इतिहास काय सांगतो? विद्येचा महिमा फक्त आपणाकडेच ठेऊन इतरांस विद्येपासून दूर ठेवण्याचा अखंड पद्धतशीर प्रयत्न सतत करून 'ब्राह्मण ब्युरॉक्रसी'ने या दक्षिणेत इतरांस गुलामाच्या स्थितीत कसे आणिले आहे ही गोष्ट विसरणे कठीण आहे.

अनुक्रमणिका

खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलूमी जू लादले आहे ते झुगारून देण्याची शक्ती समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरूरी आहे. असले शिक्षण मी माझ्या रयतेस देण्यास प्रारंभ केला आह. त्याकरिता सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करून तो जारीने अंमलात ठेविला आहे. यामुळे पुढील पिढी तरी लवकरच लिहिणारी / वाचणारी होईल अशी मला खात्री आहे.

प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे. तरी दुय्यम व उच्च शिक्षणाकडे माझे लक्ष कमी नाही. माझे संस्थान सातारा व बेळगाव या जिल्ह्यांपेक्षा लहान असताही आमच्याकडे सात हायस्कूले चालू आहेत. दोन लवकरच सुरू होतील. शिवाय युनिव्हर्सिटीचे पुरे शिक्षण देणारे एक कॉलेजही आहे.

माझ्या रयतेमध्ये प्राथमिक व उच्च शिक्षणाचा प्रचार करण्याची माझी इतकी जोराने खटपट चालली आहे; यावरून शक्य तितक्या लवकर रयतेस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे हे आपले ध्यानी येईलच. माझी सर्व प्रजा, मराठी तिसरी इयत्ता जरी शिकून तयार झाली असती तरी त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आजच विश्रांती घेतली असती. आज पिढ्यान्‌पिढ्या जी रक्कम माझे पूर्वज व मी खाजगी खर्चाकरिता घेत आहोत तितकीच रक्कम माझ्या प्रजेला विनंती करून त्यांच्याकडून घेऊन बाकीच्या उत्पन्नाची व्यवस्था माझ्या प्रजेच्या सुखाच्या व उन्नतीच्या प्रित्यर्थ खर्च करावी असे मी ठरविणार आहे.

आज राज्यकारभाराचे सर्व काम मलाच करावे लागत आहे. प्रजेवर फक्त कर देण्याची जबाबदारी आहे. पुढे कर देणे व योग्यतो खर्च करणे ही जबाबदारी रयतेवर पडल पण माझी प्रजा ही जबाबदारी घेण्यास अगोदर पूर्णपणे नसली तरी अंशतः तरी पात्र झाली पाहिजे. म्हणजे रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडातरी अंश मिळाला पाहिजे असे माझे मत आहे. रयतेमधील मोठा भाग अडाणी राहिला, थोडेसे लोक विद्याचारसंपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर ते या थोड्या लोकांच्या हाती पडणार व ‘स्वदेशी ब्युरॉक्रसी, तयार होणार. या ‘सुशिक्षित ब्युरॉक्रसी’ चा कारभार आमच्या ओळखीचा आहे. फार लांब कशाला, मराठ्यांचा इतिहास पहा. शाहू महाराजांची भूल होऊन पेशव्यास अधिकाधिक सत्ता बळकाविण्यास संधी मिळाली. याचा परिणाम छत्रपतींचा कारागृहवास हा झाला. जातिभेद तीव्र झाले जातिमत्सर वाढला व अस्पृश्यास तर गळ्यात गाडगे व कंबरेस फेसाटी बांधून फिरावे लागे. हा प्रसंग कुठेही पुनः येणे चांगले नाही. याकरिता अधिकारदान करण्यापूर्वी सर्व लोकांत विद्याप्रसार करण्याकडे अगोदर लक्ष देणे जरूर आहे.

मुलगा कर्ता झाल्यावर त्यावर संसाराचा भार टाकून विश्रांती घेण्याची आमची आर्यपद्धती आहे. त्याप्रमाणे माझ्या प्रजेची योग्यता वाढवून, त्यांच्या हाती सर्व कारभार सोपवून माझ्या खर्चापुरती एक ठरीव रक्कम पेन्शनदाखल घेऊन मी केव्हा मोकळा होईन असे मला झाले आहे. हा माझा हेतू जगदीश कृपेने लवकरच पूर्ण होवो.

माझ्या म्हणण्याचा विपर्यास होऊ नये म्हणून मी पुन्हा माझे म्हणणे स्पष्ट करितो. गाड्याची दोन्ही चाके चांगली व मजबूत पाहिजेत. त्याशिवाय गाडा बरोबर चालणार नाही. तसेच गाड्याचे जू ही मजबूत पाहिजे. इंग्रजी मुलखात सुधारणेच्या नवीन कायद्याने नोकरशाही व लोकशाही यांच्यामध्येच सत्ता विभागली गेली आहे. यामुळे नोकरशाहीच्या हातची सत्ता क्रमाक्रमाने लोकांकडे जाण्याची तजवीज करण्यात आली आहे. पण संस्थांनी मुलाखात ही पद्धती उपयोगी पडेल असे वाटत नाही. कारण तेथे सत्ता चार ठिकाणी विभागली जाणार: प्रजा, लोकशाही, राजा व ब्रिटिश गव्हर्नमेंट. अशी चार शकले राजसत्तेची करून क्रमाने

अनुक्रमणिका

अधिकार प्रजेकडे देणे सोयीचे नाही. त्यापासून पुष्कळ अडचणी उत्पन्न होतील. माझ्या रयतेस कर्तव्याची जाणीव पूर्णपणे आली म्हणजे एकदम सर्व राज्यकारभार त्यांच्याकडे सोपविण्यास मी केव्हाही तयार आहे. एवढी जबाबदारी ओळखण्याची पात्रता रयतेत येईपर्यन्त माझे मन फार साशंक राहील. प्रजेला पूर्ण हक्क दिले म्हणजे राजा फक्त नावाचा मार्गदर्शक. संस्थानची प्रजा ही ब्रिटिश सरकारास जबाबदार राहणार. अशी भिन्न परिस्थिती असल्याने खालसातील सुधारणांच्या योजना सर्वांशी लागू करणे धोक्याचे आहे. यासाठी ही सुधारणा घडवून आणण्यास उपाययोजना चांगली विचारपूर्वक झाली पाहिजे.

'आधी राजकीय सुधारणा की आधी सामाजिक सुधारणा' हा वाद समंजसपणाचा नाही. या सुधारणा स्वतंत्र नाहीत. एकात एक गुंतलेल्या आहेत. जणु काय या दोन सुधारणा राष्ट्रोन्नतीच्या गाड्याची दोन चाकेच आहेत! एकच चाक लावून गाडा सुरक्षित नेणे शहाणपणाचे होईल काय? या गोष्टी विचाराने सिद्ध आहेत. पाश्चात्य देशांचा अनुभवही हेच सांगतो. राजकीय सुधारणा अगोदर पाहिजेत. सामाजिक सुधारणेची तूर्त जरूरी नाही असे प्रतिपादन ऐकू येते तेव्हा तेथेच काहीतरी पाणी मुरत आहे असे समजावे. हे बोलणे कपटी काव्याचे असते.

वास्तविक पाहाता इंग्रज सरकारने प्रजेत शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करण्याचे काम आपल्या प्रत्यक्ष नजरेखाली घेऊन ते योग्यप्रकारे फैलावल्यावर मग स्वराज्याचे हक्क रयतेच्या स्वाधीन करणे हेच योग्य आहे. बरे असो. आजपर्यंत झाले ते झाले. आता तरी मिळालेल्या स्वराज्याच्या हक्काची जबाबदारी ओळखून पुढारलेले लोक स्पर्शास्पर्शाचे बंड मोडून, इतर सुधारलेल्या लोकांप्रमाणे सर्व प्रजाजन आपले देशबांधव आहेत अशी जाणीव बाळगून, निःपक्षपातबुद्धीने त्यांना विद्या देतील व माझे मित्र रावबा थोरातांचे उदाहरण गिरवितील अशी मी आशा करितो.

क्वीन व्हिक्टोरिया या ईश्वरअंशी राज्यकर्त्या होऊन गेल्या. त्यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थानची व सर्व ब्रिटिश साम्राज्याची फार भरभराट झाली. पुण्यकीर्ती जॉर्ज बादशहाची कारकीर्दही विशेष भरभराटीची होऊन सर्वांस उन्नती प्राप्त होऊन सुख लागेल अशी मला खात्री वाटत आहे.

शेवटी आजच्या प्रसंगी 'राजकारण' पत्राचे सुप्रसिद्ध संपादक रा. दामले, बी. ए; एलएलबी; यांचे मनःपूर्वक आभार मानितो. कारण त्यांनी माझ्या बऱ्याच चुका माझ्या नजरेस आणिल्या आहेत. अशाच माझ्या चुका त्यांनी वरचेवर काढाव्या व मला सुधारावे. ते माझ्यापेक्षा अनुभवाने व म्हणून वयानेही वृद्ध आहेत. शिक्षणात तरी त्यांची माझी तुलना होणेच शक्य नाही त्यांनी आपले आयुष्यच देशकार्यास वाहिले आहे. 'राजकारण' (Politics) हा तर त्यांच्या आवडीचा विषय. रात्रंदिवस या विषयाचा निदिध्यास. राजकारणी लोकांत यांचे हमेषचे वागणे. माझे सारे आयुष्य घोडे व जनावरे यांची पैदास करणै, शिकार खेळणे, मल्लविद्या व इतर शरीरवृद्धीचे खेळ यात गेले. राजकारणाचा अभ्यास माझ्या हातून झालेला नाही. दामले माझे गुरु होण्यास योग्य आहेत. त्यांनी माझ्या चुका वारंवार काढाव्यात व त्या दुरूस्त कराव्यात. त्यांनी मला भेटून युक्तिवादाने माझी खात्री करावी म्हणजे माझी वास्तविक सुधारणा होईल. माझी जी प्रामाणिक समजूत आहे किंवा होईल त्याप्रमाणे मी बोलतो व वागतो. याला पाहिजे तर दुराग्रह म्हणा. प्रत्येकाला भाषण स्वातंत्र्य, या दिवसात आहे अशी माझी समजूत आहे. त्याप्रमाणे मी वागत आहे. माझ्या कल्याणाची अशीच आस्था 'राजकारण' कर्ते व इतर देशभक्त यांनी बाळगावी अशी माझी त्यांस विनंती आहे.

***

अनुक्रमणिका

तीन

हत्तीचे बळ

***

राजर्षींनी कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. तसेच माध्यमिक व उच्च शिक्षणाचीही सोय केली. कोल्हापूर शहराच्या विविध भागांत, गटागटाने अनेक जातवार वसतिगृहे सुरू केली. त्यामुळे मत्सराने पेटलेल्या ब्राह्मण पुढाऱ्यांनी त्यांच्यावर अनेक आरोप तर केलेच शिवाय त्यांनी ब्राह्मणेतरांच्या कार्यापासून परावृत व्हावे म्हणून जॅक्सन, रँड यांच्याप्रमाणे अवस्था होईल अशा धमक्याही दिल्या.

‘हत्तीचे बळ’ मध्ये, प्रारंभीच या भ्याड प्रवृत्तीचा राजर्षींनी समाचार घेतला असून त्या संदर्भात ते म्हणतातः “तेव्हा ब्राह्मण लोकांनी चिडून, खोटी कारस्थाने रचून इंग्रज सरकारचा गैरसमज केला व त्यांस (साताऱ्याचे श्री प्रतापसिंह महाराज) गादीवरून दूर करविले. अशीच भीती मलाही ते आज घालीत आहेत, पण मी ईश्वरी व इंग्रजी न्यायावर व आपल्यासारख्या खऱ्या देशप्रेमी स्नेह्यांच्या सहानुभूतीवर विश्वास ठेऊन, स्वस्थ मनाने माझे कर्तव्य करीत राहीन. आपले काम आपण करून आपण लोकांनी – काय केले पाहिजे हे सांगताना राजर्षी म्हणतात, “अशा ब्राह्मणेतर सभा जागोजागी भरल्या पाहिजेत... प्यारे बंधू हो, एक व्हा, जोराचा यत्न करा व बौद्धिक गुलामगिरीतून सुटून जा. स्वतंत्रतेकरिता जीव द्या. काय वाटेल ते करा. परंतु तुम्हाला जे पशूप्रमाणे वागवितात त्यांच्यापासून स्वातंत्र्य मिळवा. बारीकसारीक भेद विसरून ....

***

हुबळी : २७ जुलै, १९२०
कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेच्या समारोपप्रसंगी शाहू महाराजांनी दिलेले भाषण

परमेश्वराच्या घरी जे रूजू आहे व शुभ आहे तेच कृत्य करा; अन्यायानें वागू नका. यासाठी सामाजिक व धार्मिक सुधारणांमध्ये मनोधैर्य धरा आणि एक राष्ट्र करा. मग तुमच्यात राजकीय सुधारणेस जोर येईल.”

ब्राह्मणेतरांना सर्वांगीण शिक्षणाच्या माध्यमातून ‘आत्मबळ’ देताना, सामान्यांच्या अंगामनामध्ये चेतावणी निर्माण करण्याची राजर्षींची अष्टावधानी सावधगिरी लक्षणीय आहे.

***

तीन

हत्तीचे बळ

***

काही वर्षापूर्वी काही ब्राह्मण पुढाऱ्यांनी लोकसेवेचा मोठा आव आणून प्राथमिक शिक्षण सरकारने दिले पाहिजे असा ओरडा केला. परंतु पुढे त्यांनी स्वतः काय केले? फक्त तोंडाची वाफ दवडली एवढेच! तेच दुसरे उदाहरण घ्या. आय. सी. एस्. ची परीक्षा हिंदुस्थानातही सुरु झाली पाहिजे अशी चळवळ सुरू केली, चालू ठेविली व कमिशन नेमून घेतले. परंतु आमच्या सुदैवाने त्यांत त्याना यश आले नाही. त्यातील इंगित आपण नीट ध्यानात घ्या. जर प्राथमिक शिक्षणाची खटपट ते मनापासून करते तर ज्याप्रमाणे आय. सी. एस्. परीक्षेकरिता फंड उभारला, त्याचप्रमाणे, प्राथमिक शिक्षणाकरिता फंड उभारून गावोगाव मास्तर पाठवून प्राथमिक शिक्षणास सुरुवात करणे त्यांना अशक्य होते काय? आय. सी. एस्. च्या खटपटीला व कॉलेज स्थापन करण्याला मात्र भरपूर पैसा मिळतो. पण प्राथमिक शिक्षणास मात्र या लोकांजवळ पैसा नाही. का? त्याच्या योगाने ब्राह्मणेतरांस फायदा झाला असता हेच त्यातील इंगित होय.

अनाथ बालिकाश्रमासारख्या संस्था सर्वांच्या पैशावर उभारल्या जातात. परंतु त्यांच्या नियमांचे निरीक्षण केल्यास मलई सर्व ब्राह्मणांच्याच पदरी पडते असे दिसून येते. त्यातील एकच नियम घ्या. ज्या जातीत पुनर्विवाहाची चाल नाही अशांच्या विधवांना फक्त या संस्थेमध्ये घेता येईल, असा तो नियम आहे. म्हणजे ब्राह्मण व मराठे अशा दोनच जाती राहिल्या. त्यात मराठ्यांत बहुतेक पडदा आहे. म्हणजे आश्रमाचा फायदा घेणारे फक्त ब्राह्मण राहिले. ब्राह्मणेतरांनी पैसे मात्र द्यावे. फायद्याची आशा धरू नये. अशा या ब्राह्मण—काव्यास फसू नका. आपले शिक्षण आपल्या हाती घ्या व उन्नतीच्या मार्गास झपाट्याने लागा.

ब्राह्मण व ब्राह्मणेतरांच्या वादास आता कोठे थोडे रूप घेऊ लागले आहे. वर्तमानपत्रात माझी नालस्ती सुरू झाली आहे. धाकधमकी दाखवून व त्यांच्या सभ्यतेला अनुरूप असे माझ्या व माझ्या घरच्या मंडळींविरुद्ध वर्तमानपत्रात रोज येत आहे. या उपरही जर मी भ्यालो नाही व अशा चळवळीतून अंग काढून घेतले नाही तर ज्याचा उपयोग त्यांनी जॅक्शन, रॅंड व जाधवराव यांजवर केला अशा अति नीच, भ्याड व सभ्यतेला न शोभण्याजोग्या त्यांच्या हत्याराची योजना माझ्याविरूद्ध केली जाईल अशीही मला ते भीती घालतात. परंतु असे भ्याड व मनुष्यजातीस लाजवणाऱ्या हत्याराचा उपयोग करून त्यांची मनीषा तरी ईश्वर तृप्त करो!

ब्राह्मणेतरांची उन्नती काही द्वेषी व उपद्व्यापी लोकांस इतकी असह्य होते की, त्या उन्नतीच्या मार्गात अडचणी आणाव्या अशी त्यांना इच्छा होते. आपली ब्राह्मणेतर परिषद करण्याचे ठरल्यावर हुबळी येथील बाजारास आग लागावी व गेल्या रात्रीच श्रीनंदीची मूर्ती भग्न व्हावी, या गोष्टी आमच्या मार्गात विघ्न आणण्याच्या उद्देशाने तर केल्या नसतील? अशा गोष्टींनी नाउमेद होण्याचे कारण नाही. आम्ही मुळीच नाउमेद होणार नाही. उलट आमचा उत्साह असाच वाढणार आहे. असले प्रयत्न आमच्यातील बंधुप्रेम वाढवितील यात मला तरी शंका वाटत नाही.

इंग्रजी राज्यापासून आमच्या उन्नतीचे द्वार कसे मोकळे झाले आहे हे पुनः पुन्हा सांगण्याची जरूरी नाही. श्री प्रतापसिंह महाराज छत्रपती हे पेशव्यांचे ताब्यात असता लहानपणी लिहिणे, वाचणे शिकण्याचीही त्यांना बंदी होती. तेव्हा त्यांच्या पूज्य व धोरणी आईने त्यास रात्री बारा वाजता उठवून ब्राह्मणेतर पंतोजीकडून

लिहिणे, वाचणे शिकविण्याचे काम केले. पुढे पेशवाई जाऊन इंग्रजाकडे राज्य आल्यावर आपले क्षत्रियत्वाचे हक्क परत मिळविण्याचे व ब्राह्मणांचे फाजील महत्त्व कमी करण्याचे काम त्यांनी हाती घेतले. तेव्हा ब्राह्मण लोकांनी चिडून, खोटी कारस्थाने रचून, इंग्रज सरकारचा गैरसमज केला व त्यास गादीवरून दूर करविले. तशीच भीती ते मला आज घालीत आहेत. पण मी ईश्वरी व इंग्रजी न्यायावर व आपल्यासारख्या देशप्रेमी स्नेह्यांच्या सहानुभूतीवर विश्वास ठेवून स्वस्थ मनाने माझे कर्तव्य करीत राहीन.

ब्राह्मण या शब्दाचे लक्षण 'स्मृती' ग्रंथातून दिलेले आढळते. त्या लक्षणाप्रमाणे ब्राह्मण ब्रकर्मरत असतो. पण असा एक तरी मनुष्य हल्ली ब्राह्मण म्हणविणाऱ्यांत मिळेल काय? शंका आहे. आता नुकतीच सांगितलेली मनुष्यपणाला लाज आणणारी नीच कृत्ये करणाऱ्यांस ब्राह्मण कसे म्हणता येईल? असे असल्याने हल्लीच्या काळात खऱ्या ब्राह्मणांच्या अस्तित्वाविषयीच संशय प्रकट केल्यास त्यात चुकले कोठे? नुकत्याच झालेल्या युद्धात आपला लोप झाला नाही असे क्षत्रियांनी सिद्ध केले आहे. वैश्य तर आपल्या व्यापाराने सधन होऊन उजळ मार्गाने फिरत आहेत. शूद्र बिचारे रात्रंदिवस सेवा करून आपली उपजीविका करीत आहेत. परंतु ब्राह्मणांनी मात्र कर्मलोप केल्यामुळे जुन्या वर्णव्यवस्थेप्रमाणे आपले अस्तित्व अजिबात लोप पावले आहे, असे कट्ट्या वर्णाश्रमाभिमान्यास देखील कबूल करावे लागेल.

आता आम्ही काय करावे हे थोडक्यात सांगतो : येथे भरल्या तशा ब्राह्मणेतरांच्या सभा जागोजागी भरल्या पाहिजेत. ब्राह्मणेतरांची चळवळ, यशस्वीपणाने कशी चालवावी हे आपणास मद्रासकडून शिकले पाहिजे. यासाठी मद्रासचे वक्ते आणू या. पुण्या व मुंबईस, त्यांनी केलेल्या कामाची जाणीव करून देऊ या. ते येतील अशी माझी खात्री आहे. ब्राह्मणेतरांच्या परिषदा भरवा. पुणे-मुंबई वगैरे ठिकाणी त्या लवकरच भरवा. मुंबई-पुणे येथील ब्राह्मणेतर या चळवळीच्या चिकाटीत मद्रासपेक्षा फारच मागे आहेत. तेथील ब्राह्मणेतरांच्या पुढाऱ्यांच्या शिक्षणापुढे आमचे पुढारी म्हणजे केवळ मुलांप्रमाणे शोभतील.

प्यारे ब्रंधूहो, "एक व्हा, जोराचा यत्न करा व बौद्धिक गुलामगिरीतून सुटून जा! स्वतंत्रतेकरिता जीव द्या, काय वाटेल ते करा. परंतु तुम्हाला जे पशूप्रमाणे वागवितात त्यांच्यापासून स्वतंत्रता मिळवा. बारीकसारीक भेद विसरून एक व्हा व जोराचा यत्न करा. परमेश्वाराच्या घरी जे रुजू आहे तेच कृत्य करा; अन्यायाने वागू नका. मद्रासच्या ब्राह्मणेतर लोकांच्या परिसाने आपणही सोने बनू या.'

सामाजिक सुधारणांमध्ये धैर्य व स्थैर्य दाखविले नाही तर राजकीय बाबतीत तरी आम्ही काय करू शकणार? आणि राजकीय बाबतीत आमचे अंगी स्थैर्य नसेल तर आमच्या राजनिष्ठेची काय किंमत? यासाठी सामाजिक व धार्मिक सुधारणांमध्ये मनोधैर्य धरा आणि एक राष्ट्र करा; मग तुसच्या राजकीय सुधारणांस जोर येईल व तुमची राजनिष्ठा उज्ज्वल होईल.

ब्राह्मण तुम्हांस भिववितील. तुमची व तुमच्या कुटुंबातील माणसांची निंदा करतील. त्यांचा प्रतिकार केला पाहिजे. मी नागपूरच्या एका भाषणात सांगितले आहे की, एखाद्या विवक्षित जातीचे लोक 'तुम्हाला मदत करतो' असे म्हणून पुढे येतील, त्यांच्यावर विश्वास ठेवू नका व स्वस्थ बसू नका. "जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला." हे ब्राह्मणेतर बंधूनो, पुष्कळ ब्राह्मण लोक सावधपणाचे ढोंग करून तुम्हास मदत करितो म्हणून पुढे येतील. परंतु त्यांच्यावर बिलकूल विश्वास ठेवु नका.

मी खामगाव येथील मराठा शिक्षण परिषदेत जातवार प्रतिनिधीची सवलत फक्त दहा वर्षे मागितली होती. ती मिळाली नाही. तरी नाउमेद होऊ नका. 'कम्युनल रिप्रेझेंटेशन'चे दान आता आम्हास नकोच आहे. 'We will firsr deserve and then desire.' 'कम्युनल रिप्रेझेंटेशन' दिले असते तर आम्ही थोड्या दिवसात लवकर पात्र झालो असतो. आमच्या ब्राह्मण बंधूबरोबर जोराने झगडून आमचे हक्क मिळविण्याचे कामी कष्ट सोसून, आम्ही चिकाटीने प्रयत्न केले पाहिजेत. पांडवांतील भीमसेनाची पाठ जमिनीस लागली म्हणजे त्यास शंभर हत्तींचे बळ येई असे सांगतात. यातील तात्पर्य तेवढे आपण घेऊ या. जितक्या जोराने आपणास प्रतिकार होईल, जितक्या अधिक अडचणी आपल्या मार्गात येतील तितक्या अधिक उत्साहाने, अधिक जोराने व अधिक ईर्षेने आपण आपल्या कार्यास लागू या व यश मिळवू या.

***

२.समाज

अनुक्रमणिका

चार

सोशल रिफॉर्म + एकी = स्वराज्य

* * *

विसाव्या शतकातील जीवनकलहातून मानवाला सुखाकडे नेणारे शिक्षण हे सर्वस्पर्शी साधन आहे ते वापरून, स्वावलंबनाने स्वतःच्या पायावर उभे राहाण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे असे 'सोशल रिफॉर्म + एकी = स्वराज्य' मध्ये राजर्षींनी सांगितले असून तशा प्रयत्नांबद्दल निराश्रित सोमवंशीय समाजाच्या चालकांचे त्यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे. त्यानुषंगाने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या अर्वाचीन युगातील मानवी मूल्यांचे महत्त्व विशद करताना, या जीवनमूल्यांसाठी झगडलेल्या व झगडत असलेल्या कार्यकर्त्यांच्या कार्याचा त्यांनी मोठ्या स्वाभिमानपूर्वक गौरव केला आहे.

अशा स्वरूपाच्या कार्यामुळे भारतातील उच्चनीचतेची, जातिभेदाची दरी बुजून समाज एकसंध बनतो यावर शाहू महाराजांनी भर दिला आहे. या देशातील बहुसंख्य जनता सुखी जीवनाची भागिदार करावयाची असेल तर आधी 'सोशल रिफॉर्म' होऊन आपली एकी झाली पाहिजे, म्हणजेच आम्हाला स्वराज्याचे संपूर्ण फायदे मिळतील; ही आपली भूमिका राजर्षींनी निश्चायपूर्वकतेने मांडली आहे. यातूनच खरा देशाभिमान जागृत होऊन जनहितवर्धक राष्ट्रवाद वाढीला लागण्यास मदत होईल असे महाराजांनी स्पष्ट केले आहे.

शेवटी, अशा ह्या नव्या पुरोगामी राष्ट्रवादाला अडसर टाकणाऱ्या प्रतिगामी शक्तींचाही राजर्षींनी समाचार घेतला आहे. काही पुणेरी पत्रकारांनी, राजर्षी विशिष्ट जातीच्या

* * *

नासिक : १६ एप्रिल, १९२०
निराश्रित सोमवंशीय समाजाच्या सभेतील शाहू महाराजांचे अध्यक्षीय भाषण

उन्नतीसाठीच प्रयत्न करतात असा संकुचिततेचा आरोप त्यांच्यावर केला होता. त्यालाही या भाषणात, राजर्षींनी अव्वल कोटीक्रमाने, जाहीरपणे सडेतोड उत्तर दिले आहे.

राजर्षी शाहूंच्या पुरोगामी आणि आधुनिक मानवतावादी जीवनदृष्टीचे इथे घडणारे दमदार दर्शन, म्हणजे समृद्ध सामाजिक तत्त्वज्ञानाचा सूत्रात्मक प्रबंध आहे.

* * *

अनुक्रमणिका

चार

सोशल रिफॉर्म + एकी = स्वराज्य

***

मित्रहो ! आजच्या ह्या सभेच्या प्रसंगी तुम्ही मला प्रेमाने आमंत्रण केले, याबद्दल मी तुमचा आभारी आहे. तुमची ही संस्था पाहून मला फार संतोष वाटतो.

हल्लीच्या तीव्र जीवनकलहाच्या काळात कोणताही समाज शिक्षणसंपन्न असेल तरच तो टिकाव धरू शकेल, ही गोष्ट तुमच्यातील पुढाऱ्यांना पटली आहे; याचा मला आनंद वाटतो. तुमच्यासारख्या हतभागी व विपन्न ज्ञातीला पुढे यावयाचे असेल तर त्याबद्दलचा प्रयत्न तुम्हांतील पुढाऱ्यांनीच केला पाहिजे. स्वावलंबन ही यशाची किल्ली आहे. या दृष्टीने, या संस्थेचे चालक जे तुम्हांपैकीच आहेत, त्यांचे अभिनंदन करावे तितके थोडेच! या प्रसंगी मोकळ्या मनाने, माझ्या अंतःकरणातील तुमच्या हिताचे विचार मला कळवावेसे वाटतात. प्रथमतः तुम्हाला माझे सांगणे हे आहे की, तुमच्या उद्धाराच्या सर्व आशांची मदार आमच्या ब्रिटिश साम्राज्याच्या चिरस्थायीपणावर अवलंबून आहे. समतेच्या तत्त्वाच्या जोरावर तुम्हाला झगडावयाचे आहे व समता, बंधुता व स्वातंत्र्य यांचे उगमस्थान ब्रिटिश राष्ट्र हे आहे. गेल्या महायुद्धाच्या आपत्तीचे परिणाम जगाला आता कडक रीतीने जाणवू लागले आहेत. अशा वेळी आमच्यावर जर ब्रिटिश साम्राज्याचे छत्र नसते तर आपल्या कोट्यवधी देशबंधूंना अन्नपाण्याशिवाय तडफडून मरण्याची पाळी आली असती. परंतु हल्ली या देशात एकही मनुष्य उपाशी मरत नाही. यावरून आमच्या साम्राज्याची महती किती वर्णन करावी? तरी या गोष्टी नेहमी डोळ्यांपुढे ठेवून तुम्ही ब्रिटिश साम्राज्याची अंतःकरणपूर्वक राजनिष्ठ व कृतज्ञ राहून लढाईच्या अथवा शांततेच्या काळात साम्राज्याचे हित पाहिले पाहिजे. त्यास हरएक बाजूने मदत करण्यास तयार राहिले पाहिजे.

आता, मी एका नेटिव्ह संस्थानचा राज्यकर्ता असल्याने ब्रिटिश मुलुखात येऊन मी भाषणे का करावी असा माझ्यासंबंधाने एक आक्षेप घेण्यात येतो. त्यास, एक तर मी राजा या नात्याने तुम्हात आलो नसून आपल्या कोट्यवधी देशबंधूंचा एक हितचिंतक व सेवक या नात्याने आलो आहे; म्हणून जर कोणी प्रेमाने माझे विचार मला विचारले तर ते न सांगणे हे सभ्यपणाचे होणार नाही; किंबहुना विचारणाऱ्यांचा मी त्यात उपमर्द केला असे होईल. शिवाय दुसरे असे की, नेटिव्ह संस्थाने ही साम्राज्याशी एकजीव झालेले त्याचे अवयव आहेत. साम्राज्यातील कोट्यवधी व्यक्तींचे साम्राज्याशी प्रजा या नात्याने किंवा सनदा, तहनामे इत्यादी द्वारांनी संबंध जोडलेले आहेत. अर्थात हा संबंध कोणताही असला तरी साम्राज्यातील आम्हा सर्वांचे हितसंबंध एकच आहेत. म्हणून साम्राज्याच्या व त्यातील प्रजाजनाच्या कल्याणाच्या गोष्टीत मन घालून त्यासंबंधी आपले विचार प्रदर्शित करणे यात वावगे असे काहीच नाही. किंबहुना तो माझा हक्कच आहे असे मी मानतो.

आमच्या धर्मात जातिभेदामुळे जो उच्चनीचपणा आलेला आहे तशा प्रकारचा जन्मजात भेदभाव जगाच्या पाठीवरील दुसऱ्या कोणत्याही धर्मात नाही. या जातिभेदाचे अत्यंत हिडीस स्वरूप जर कोठे असेल, तर इतर जातींकडून तुम्हाला ज्या रीतीने वागविण्यात येते त्या रीतीत दिसून येते. तुम्ही आमचे बंधू असता तुम्हाला अस्पृश्य म्हणून लेखून, मांजरे-डुकरे-कुत्रे यापेक्षाही तुम्हाला नीचपणाने वागविण्यात येते, ही किती लज्जेची गोष्ट आहे बरे? ही अस्पृश्यता अलिकडे केव्हातरी मध्येच घुसडून दिली असली पाहिजे कारण या नासिकसारख्या क्षेत्राच्या ठिकाणी अनादि कालापासून महार लोकांच्या स्नानाचे कुंड इतर जातींच्या

अनुक्रमणिका

कुंडामध्येच आहे. अर्थात त्या ठिकाणी स्पर्शास्पर्शाचा विधीनिषेध असणे शक्य नाही. असे असता हल्लीच्या व्यवहारात तुम्हाला आम्ही अस्पृश्य म्हणून दूर ठेवतो, ही किती शरमेची गोष्ट आहे! या प्रकारासंबंधाने समाजातील श्रेष्ठ जातींना जसजशी खंती वाटेल त्यामानाने त्यांच्या ठिकाणी खऱ्या स्वदेशाभिमानाचे बीजारोपण झाले असे होईल. सुशिक्षित जातीतून जेव्हा हा खरा स्वदेशाभिमान संचार करू लागेल तेव्हाच त्यांच्याकडून तुम्हाला टिकाऊ अशी काहीतरी मदत होईल.

माझ्या राज्याची अधिकारसूत्रे हाती आली तेव्हा कोल्हापुरात सर्वत्र एकाच सुशिक्षित जातीचे वर्चस्व होते. ऑफिसातून मागासलेल्या जातीचा एकही नोकर दिसत नव्हता; म्हणून त्यांचा दर्जा वाढविण्याकरिता मागासलेल्या सर्व जातींच्या लोकांना नोकरी देण्याचे धोरण मला ठेवावे लागले. त्यातील कित्येकांना वकिलीच्या सनदा दिल्या. त्यांच्या शिक्षणासाठी 'स्पेशल स्कॉलरशिप्स्' ठेवून त्यांना निरनिराळी बोर्डिंगेही करून दिली. माझ्या पंचवीस वर्षांच्या प्रयत्नाचे आता कुठे सुपरिणाम दिसू लागले आहेत. त्यांचे पाऊल आता इथे बरेच पुढे चालले आहे. त्यांची स्थिती आता नुकत्याच चालू लागलेल्या मुलासारखी आहे. तुमचा समाज मात्र अजून रांगण्याच्या स्थितीतही आलेला नाही; म्हणून आता तुम्हालाच वर काढण्याकडे माझे लक्ष वेधले आहे. हरएक प्रकारचे उत्तेजन तुम्हाला देण्याचे माझे धोरण आहे. तुमच्यासाठी, माझ्या राज्यात मी आतापर्यंत काय कार्य केले आहे, हे मी सांगत बसण्यापेक्षा माझ्या राज्यातील ज्ञातीबंधूच तुम्हाला ते सांगतील.

अलिकडे थोड्या दिवसाखाली माझ्या इलाख्यात तुमच्या ज्ञातिबंधूंची सभा झाली. त्या सभेस मी हजर होतो. त्यावेळी मी लहानसे भाषणही केले. ते भाषण वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाल्यानंतर पुण्यातील काही पत्रकारांनी आपला अमूल्य वेळ व जागा खर्च करून मजसारख्या अज्ञानाने केलेल्या भाषणावर टीका केली. ते योग्यच झाले, परंतु टीका करताना त्यांच्या हातून माझ्या भाषणाचा विपर्यास झालेला आहे. त्याचे कारण माझे मराठी भाषेवर असावे तसे प्रभुत्व (Command) नसल्याने कदाचित् माझ्या मनातील विचार मला बरोबर व्यक्त करता आले नसावेत. यामुळे विपर्यास करण्यास जागा मिळाली व 'ब्राह्मणजातीचे पाय मागे ओढण्यासाठी झालेल्या कटाचा मेरुमणी' असे मला म्हटले. मेरुमणी होण्याच्या योग्यतेचा मी नाही. माझ्या भाषणाचा आशय इतकाच होता की, जगाच्या पाठीवर हिंदू धर्माशिवाय कोणत्याही धर्मात जातिभेदभाव नाहीत. हिंदू धर्मात मात्र जातिभेदभाव आहेत. त्यामुळे मी कालच मराठ्यांच्या परिषदेत भाषण केल्याप्रमाणे, पूर्वी परशुरामाने पृथ्वी निःक्षत्रिय केली तरी ब्राह्मणी वर्चस्वाची पीछेहाट होऊन पुन्हा राम व कृष्ण हे क्षत्रिय देव्हाऱ्यात बसले. शाहू महाराजांच्या वंशजास पेशव्यांनी लुप्तप्राय केले, तरी पेशवाईच्या अस्ताबरोबर सातारच्या प्रतापसिंह महाराजांचा उदय झाला. प्राचीन काळापासून या उलाढाली होत असून त्यांच्या बुडाशी आमचा जातिभेदच आहे. अशा उलाढाली पुन्हा होणे इष्ट नाही. म्हणून मोठ्या जोराने मी सांगतो की, हा जातिभेद मोडून समाजाचा पाया शुद्ध केल्याशिवाय आम्हाला 'सेल्फ गव्हर्नमेंट' (Self Government) दिले तरी नको. कारण ते वरील अनुभवामुळे ढासळून पडणारच; म्हणून पुन्हा जोराने सांगतो की, माझे असे ठाम मत आहे की, आधी 'सोशल रिफॉर्म' (Social reform) होऊन आपली एकी झाली म्हणजेच आम्हाला स्वराज्याचे पूर्ण फायदे मिळतील. थोड्या दिवसापूर्वीच मुंबईत मी 'सेंट कोलंबस स्कॉच मिशन' मध्ये गेलो होतो. अमेरिकन मिशनचा व माझा फार दिवसांचा परिचय आहे. दोन्ही ठिकाणची माणसे म्हणजे मिस सदरलंड, डॉ. व्हेल व डॉ. वॉल्लेस हे सातासमुद्रापलिकडून इकडे आले असून, अन्नवस्त्रापलिकडे कोणतीही अपेक्षा न ठेवता केवल निष्काम व परोपकारबुद्धीने अहोरात्र आमच्या लोकांना विद्यादान व जीवनदान करीत आहेत. त्यांनी आमची मने न दुखवावी म्हणून, आपल्या संस्थेतून आमच्या खाण्यापिण्याची व्यवस्था आमच्या जातिधर्माप्रमाणे कडक ठेविलेली आहे. अशा उदाहरणाने ते आमच्या

मनाची व शरीराची जोपासना करीत आहेत. अर्थात मी तरी त्यांना 'अवतारी माणसे'च म्हणतो. आमच्यात गांधीसारख्या काही व्यक्ती अवतारी आहेत व त्यांच्याबद्दल माझ्या ठिकाणी पूज्यबुद्धी आहे; परंतु वरील मिशनरीप्रमाणे कोणताही भेदभाव न ठेवता निष्काम व निःस्वार्थ बुद्धीने 'समाजाची सेवा ती ईश्वराचीच सेवा' ही भावना मनात बाळगून रंजल्यागांजलेल्यांना वर आणण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या संस्था आमच्यात कितीशा आहेत? मिस्टर गांधींच्या संबंधाने माझ्या भाषणाचा एका एडिटरने विपर्यास केलेला आहे. मी वर सांगितलेच आहे की, गांधींच्या संबंधाने माझी अत्यंत पूज्यबुद्धी आहे. त्याचप्रमाणे श्रद्धानंद किंवा मिसेस् बिझांट ही माणसे अवतारी आहेत. तथापि त्यांच्या हातून चुका होणे अशक्य आहे हे मात्र मला कबूल नाही. या चुका कबूल न करण्याइतके ते हटवादी नाहीत. आपल्याकडून झालेल्या चुका मिस्टर गांधी, श्रद्धानंद वगैरे पुढाऱ्यांनी स्वतःच कबूल केल्या आहेत. अर्थात त्यासंबंधाने माझ्या भाषणात उल्लेख आला म्हणून खुद्द मिस्टर गांधीनाही राग येणार नाही. तथापि या पत्रकाराने माझ्यावर केलेल्या टीकेमुळे माझ्याबद्दल गांधींचा व सर्व जगाचा निष्कारण गैरसमज होणार आहे. मिस्टर गांधीसारखी पूज्य माणसे आमच्याकडे आहेत, पण त्यांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी आहे.

सर्व समाजाचा विचार करताना, समाजात सामान्यतः पुढारी म्हणून जे वावरतात त्यांचे शील, नीतिधैर्य वगैरे सद्‌गुण कोणत्या कसाचे आहेत हेच पाहिले पाहिजे. महाराष्ट्रात सुशिक्षित जातींपैकी बहुतेक पुढाऱ्यांच्या ठिकाणी पतित जातींच्या संबंधाने सहानुभूतीचा पूर आल्याचे कित्येकदा दिसते. परंतु त्यांच्याशी सहभोजनाद्वारे एकी करण्यासंबंधाने प्रत्यक्ष कृतीचा प्रसंग आला की, हे लोक आपल्या बायकामुलांची सबब पुढे करितात. परंतु थोड्या विचारान्ती ही सबब अगदी क्षुल्लक आहे, असे तेव्हाच दिसून येते. कारण अनादि कालापासून हिंदू स्त्रिया आपल्या नवऱ्याकरिता सती जाण्यासही मागेपुढे पाहात नाहीत, असे इतिहास सांगतो. मग असल्या सहभोजनासारख्या क्षुद्र बाबतीत आपल्या पत्नीचा अडथळा होतो, असे म्हणणे म्हणजे आपल्या सकल हिंदु कुलस्त्रियांचा उपमर्द करणे नव्हे काय? अर्थात अंगी नीतिधैर्य नसल्यामुळे किंवा ही गोष्ट मनापासूनच नको असून, देखावा करण्याची मात्र प्रबळ इच्छा असल्यामुळे ही बायकांची ढाल लपण्यासाठी पुढे येते, असे मानले पाहिजे. तेव्हा अशा नामर्द मनोवृत्तीच्या पुढाऱ्यांच्या सहानुभूतीचा तुम्हाला कितीसा उपयोग होणार? त्याचप्रमाणे परवा एका प्रसंगी निपाणी येथे एका विद्वान ब्राह्मण वक्त्याने 'आम्हास स्वराज्य मिळाले तर आपण अस्पृश्य मंडळींबरोबर सहभोजन करण्यास आज तयार आहोत' असे म्हटले. आता मानलेल्या अस्पृश्यांच्या ठिकाणी जर खऱ्या बंधुत्वाची भावना बाणलेली असेल, तर त्यांच्याशी भोजन करणे, यासारखी क्षुद्र गोष्ट करण्यास स्वराज्य मिळण्यासारखी प्रचंड अट कशाला पाहिजे? यावरून अस्पृश्यांसंबंधाने आपली बंधुभावना असल्याचे हे वरवर सांगतात, त्यांचा खरेपणा किती आहे हे स्पष्ट होते. तरी त्यांच्या मदतीवर विशेष भर न देता आपल्या ज्ञातिबंधूंना विद्यामृताचे जीवन देण्याला तुम्हीच कंबरा कसल्या पाहिजेत असे माझे तुम्हास कळकळीचे सांगणे आहे.

माझ्या राज्यात मागासलेल्या जातींना वर आणण्याबद्दल माझे जे प्रयत्न झाले आहेत, त्याबद्दल उच्च म्हणविणाऱ्या एका सुशिक्षित जातीचा माझ्यावर घुस्सा झालेला आहे. परंतु ज्याप्रमाणे एखादा डॉक्टर किंवा लेडी डॉक्टर ही अगदी अशक्त व दुबळ्या मुलाला अन्न व औषधे देऊन त्याची जोपासना सर्वांपेक्षा विशेष काळजीने करून, त्याला इतर मुलांच्या जोडीला आणून बसवितात त्याचप्रमाणे आम्ही अस्पृश्य मानलेल्या लोकांना वर आणले पाहिजे. पुण्यनगरीतील कित्येक लोकांनी माझ्यावर असा आरोप आणला आहे की, महाराज पंक्तिप्रपंच करून आपल्याच जातीला पुढे आणतात. मी असे निक्षून सांगतो की, ही गोष्ट निखालस खोटी आहे. श्री शिवछत्रपतींच्या नावाला किंवा त्यांच्या गादीला बट्टा लागेल असे नीच वर्तन माझ्याकडून होणार नाही. राज्याधिकारसूत्रे हाती आल्यानंतर मागासलेल्या जातींना वर आणण्याचे मी अनेक प्रयत्न

अनुक्रमणिका

केले. परंतु यावरून ब्राह्मणाचे ठिकाणी माझा द्वेषभाव आहे, असे मात्र मुळीच नाही. अनेक ब्राह्मण माझ्या पूर्ण विश्वासाचे अंमलदार व सल्लागार आहेत. अनेक ब्राह्मणांना मी इनामे वगैरे दिली आहेत व इतर जातीप्रमाणे त्यांच्या कल्याणाची इच्छा बाळगलेली आहे. या सर्व गोष्टी माझे ब्राह्मण प्रजाजनच या विद्वान् एडिटरांना सांगतील. सारांश, अशक्त मुलाला ताकद आणण्यासाठी, त्याची आई त्याची जशी काळजी बाळगते त्याचप्रमाणे माझे हे प्रयत्न आहेत.

माणगाव येथील माझ्या भाषणात माझ्या प्रजाजनांना लवकरच थोड्या प्रमाणावर स्वराज्य देण्याचा माझा विचार असल्याचा उल्लेख होता. यावर एका एडिटराने 'लौकरच म्हणजे किती वर्षात व थोड्या प्रमाणावर म्हणजे किती आणे, याचा खुलासा कोणी भविष्यवादी करील काय?' असा सवाल केला आहे. त्यावर माझे म्हणणे इतकेच आहे की, हा खुलासा ताबडतोब करता आला असता तर मला फार आनंद झाला असता; परंतु काल मराठ्यांच्या सभेत मी सांगितल्याप्रमाणे, ही बाब फार महत्त्वाची असून अनेक गोष्टींचा खुलासा करणे जरूर आहे व हे होण्यास काहीसा कालावधी होणे अपरिहार्य असल्याने वरील सवालाचा आताच खुलासा करता येत नाही; याबद्दल मला वाईट वाटते. तथापि, यावेळी असे विचारावेसे वाटते की, परवा सोलापूरच्या सभेत वक्त्यांनी हीन जातींवरील अस्पृश्यतेची आपत्ती मनात आणली तर ती तेव्हाच नाहीशी करता येईल असे सांगितले. त्यास हे 'तेव्हाच अजून का आले नाही व ते केव्हा येणार याचा खुलासा होईल काय?' त्याचप्रमाणे मागे एका प्रसंगी एका पुढाऱ्याने आपण 'चांभाराचा गणपती आपल्या गाडीत घेतला होता. व चांभाराच्या ठिकाणी व आपल्या ठिकाणी भेदभाव नाही' असे सांगितले होते. त्यास हा 'भेदभाव प्रसिद्धपणे टाकून देण्याचा दिवस का उगवला नाही? व तो केव्हा उगवणार?' या आमच्या प्रश्नांना काय उत्तर आहे? आता ही अस्पृश्यता हळूहळू समाज आपोआपच पुढाऱ्यांना मागे टाकून नाहीशी करू लागला आहे, हे खरे व त्याप्रमाणे माझ्या प्रजाजनांकडेही सहजगत्याच (Automatically) काही राज्यकारभार जाईल; अशी मला आशा आहे.

परवा सोलापुरास जहाल-मवाळांचा जो तंटा झाला त्याची हकीकत देताना एका पत्रकाराने 'पुण्याहून किंवा कोल्हापुरहून गेलेल्या तीन हजार रुपयांच्या थैलीचा' उल्लेख केला आहे. त्यास ही थैली माझ्याकडून नेली असे ध्वनित करण्याचा त्याचा उद्देश असेल तर त्यावर माझे इतकेच सांगणे आहे की, माझ्याकडून थैली गेली ही गोष्ट निखालस खोटी आहे. मागासलेल्यांच्या हिताची मला कळकळ आहे व त्यांनी योग्य कारणासाठी रक्कम मागितली तर मी ती दिलीही असती. पण मी रक्कम दिली नसता गुप्तपणे दिली असे ध्वनित करून मजवर भ्याडपणाचा नीच आरोप करण्यात त्या पत्रकाराला काय वाटले असेल ते असो.

याप्रमाणे आमच्या पत्रकारांचे माझ्यावर प्रेम आहे; तथापि मला जे वाटते ते मी करताना यांची पर्वा करीत नाही. मी अज्ञान आहे व त्यांच्या चौथ्या हिश्शानेही माझी विद्वत्ता नाही. तथापि मला जे वाटते ते मी मनोभावाने करतो. अर्थात इतरांच्या रागाची किंवा लोभाची पर्वा बाळगण्याचे मला तरी कारण नाही.

सरतेशेवटी माझे तुम्हाला इतकेच सांगणे आहे की, तुमचे हे पवित्र कार्य तुम्ही न डगमगता अखंड चालू ठेवा आणि परमेश्वर तुम्हाला या कार्याला पूर्ण यश देईल असा मला भरवसा वाटतो.

***

अनुक्रमणिका

पाच

डोळस नेतृत्त्वाची गरज

***

राजर्षींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या, मागासवर्गीय लोकांच्या दुःखाला वाचा फोडण्याच्या कार्याचा 'डोळस नेतृत्त्वाची गरज' मध्ये प्रारंभीच गौरव केला असून महाराष्ट्रातील मागासवर्गातील लोकांना जे गुलामगिरीचे कारुण्यपूर्ण जीवन जगावे लागते आहे, ते माणुसकीला कसे बेचिराख करणारे आहे याचे हृदयस्पर्शी चित्र उभे केले आहे.

महाराष्ट्राच्या कड्याकपारीतून स्वतंत्र जीवनाचा आनंद लुटणाऱ्या कोळी, रामोशी, मांग यासारख्या लोकांना ब्रिटिश अंमलातील कायद्याची बंधने असह्य होऊन त्यांनी प्रारंभी बंडे उभारली. त्यामुळे सरकारच्या रोषास पात्र ठरलेल्या आणि 'अस्पृश्य' समाजातील ह्या समाजघटकांना महाराष्ट्रातील सरंजामशाही वृत्तीच्या व स्वतःस भूदेव म्हणविणाऱ्या समाजाने, स्वतःच्या सुखचैनीच्या सेवेस जुंपण्यासाठी सरकारची री कशी ओढली जाते; त्यामुळे 'गुन्हेगार जमाती' ठरवून सरकारने त्यांच्यावर दररोज पोलिस ठाण्यावर 'हजेरी' देण्याचे बंधन कसे घातले; याची जाणीव राखून, राजर्षींनी आपल्या संस्थानातील अशा जमातींशी संपर्कच साधला असे नव्हे तर त्यांच्या एका पंक्तीला बसून भोजनही केले, त्यांच्यावरील बंधनाविषयी सरकारकडे मध्यस्थी करून ही बंधने रद्द करवून घेतली.

***

माणगाव : जिल्हा कोल्हापूर : २२ मार्च, १९२०
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली, महाराष्ट्रातील अस्पृश्यवर्गाच्या परिषदेत, राजर्षी शाहूनी प्रमुख वक्ते म्हणून केलेले भाषण

त्या संदर्भात, महाराजांनी आपण केलेल्या कार्याचा तपशिल सांगून त्यासाठी कोणकोणते उपाय योजले ते विनम्रपणे कथन केले आहेत. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेच्या चळवळींचा राजकारणाशी कसा संबंध पोचतो ते सांगून पाटीलकीचे ग्रामसंस्थेतील महत्त्वही राजर्षींनी विशद केले आहे. तसेच आपल्या संस्थानात आपण अस्पृश्यांसह सर्वांनाच 'कम्युनल रिप्रेझेन्टेशन' देणार असल्याचे सांगितले आहे.

हिंदुस्थानातील जीवघेणी गुलामगिरी नष्ट करण्यासाठी, "तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत.कृतीने जातिभेद मोडून आम्हास मनुष्याप्रमाणे वागवितील असे 'पुढारी' पाहिजेत," असे सांगताना 'डोळस नेतृत्त्वाची गरज' ही राजर्षींनी आवर्जून प्रतिपादिली आहे. अस्पृश्यांसाठी काय किंवा इतर कुणासाठी काय कुठलीही विधायक गोष्ट घडावयाची तर कृतिशील मानवतावादी पुढारीच हवे आहेत, गरीबांविषयी केवळ गहिवर घालणारे डामडौलाचे बोलूकाका पुढारी व्यर्थ होत, हे राजर्षींचे सांगणे सार्वकालिक चिरंतन सत्य आहे.

***

पाच

डोळस नेतृत्त्वाची गरज

***

आज माझे मित्र आंबेडकर यांनी या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले आहे. त्यांच्या भाषणाचा लाभ मिळावा म्हणून मी शिकारीतून बुद्धया येथे आलो आहे. मिस्टर आंबेडकर हे 'मूकनायक' पत्र काढतात व सर्व मागासलेल्या जातींचा परामर्श घेतात. याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

अस्पृश्य लोकांची हजेरी माफ करण्याची बुद्धी मला का झाली याचे कारण याप्रसंगी थोडक्यात सांगावे असे मला वाटते. हजेरी असल्यामुळे या गरीब लोकांवर गावकामगार व इतर ऑफिसर्सचा फार जुलूम होता. म्हणजे गावात बारा आणे मजुरीचा दर असला तरी गैरहजेरीची भीती घालून ह्या गरीब लोकांकडून अधिकारी फुकट काम करुन घेत. फार झाले तर त्यांच्या पोटाला म्हणून काहीतरी थोडेसे देत होते.

गुलामगिरीपेक्षासुद्धा, या विसाव्या शतकात अशी गुलामगिरी चालली आहे. ज्यांना ही हजेरी होती त्यांना, त्याप्रमाणे आपल्या जवळचे आप्तेष्ट, पै– पाहुणे कोणी आजारी पडल्यास त्यांना ताबडतोब भेटता येत नव्हते. कित्येक प्रसंगी भेट न होताच ते मरतही होते. मी प्रत्यक्ष असे पाहिले आहे की, कित्येक वेळा लहान आजारी मुलांच्या आयांना व बापांना वेळी-अवेळी जबरदस्तीने वेठीस धरून नेल्यामुळे ती लहान आजारी मुले, त्यांच्याकडे लक्ष देण्यास कोणीच नसल्याने त्यांचे आईबाप परत आल्यावर, ती मेलेली त्यांना सापडली आहेत. यापेक्षा जास्त जुलूम काय असावयाचा? त्याचप्रमाणे बलुतेदारांकडून वरिष्ठ दर्जाच्या लोकांनी कामे करून घ्यावयाची व मागाहून त्यांना काही देत नाही म्हणून सांगावयाचे असे प्रसंगही पुष्कळ येतात. कोणी जास्त तक्रार केली तर तुला हजेरीत घालीन अशी भीती घालतात.

पाटील, कुलकर्णी वगैरेंची घरे बांधण्याची कामे असल्यास गोरगरीब मराठे, सूर्यवंशी, सोमवंशी (अस्पृश्य लोक) वगैरे रयत लोकांकडून त्यांना धमकी घालून नियमांपेक्षा फाजील बलुते देवविण्यासही कामगार लोक कमी करीत नाहीत. गावात एखादी चोरी झाली म्हणजे तर या हजेरीवाल्या लोकांची दैना फारच होते. चांगल्यावाईट सर्व लोकांना धुडकविण्यात येऊन त्यांच्यावर अनेक तऱ्हेचे जुलूम होतात. गुन्ह्याचे मान पाहिले तर मी स्वतःच्या अनुभवावरून असे सांगू शकतो की, हजेरीच्या लोकांपेक्षा बिनहजेरीच्या लोकांतच गुन्हेगारांची संख्या जास्त आहे. मात्र बिनहजेरीच्या लोकांना हजेरी लावून बेशरम केल्याने त्यांची प्रवृत्ती पुन्हा गुन्हा करण्याकडे होते. एवढा हजेरीचा उपयोग होत होता. त्यांना अब्रूने व प्रतिष्ठेने वागविण्याचा फायदा काय? कोणत्याही स्थितीत हजेरी पाठीशी आहे व अब्रू कायमचीच आहे. मग त्यांनी चांगल्या रीतीने तरी का वागावे? असा त्यांच्या मनावर, हजेरीने परिणाम होत आहे. मी हजेरी बंद केल्यापासून गुन्ह्यांची संख्या कमी झाली आहे. कारण प्रत्येकास अब्रूने वागावे असे वाटते.

बलुतेदारांची भांडणे, मारामाऱ्याही बंद झाल्या आहेत. तलाठी नेमण्याची पद्धत सुरू होऊन जरी फार दिवस झाले नाहीत, तथापि त्यामुळेही गावातले तंटे व कोर्टकचेऱ्या (Litigations) बऱ्याच कमी झाल्या आहेत असे माझ्या नजरेस आले आहे.

अनुक्रमणिका

परंतु वेठबिगार मात्र मला कमी करता येईना. कारण हे सर्व लोक वतनाच्या मागे लागत आहेत. ते वतन तरी किती द्यावे? किती असावे? दोन आरे जमीन अगर पाठीभर धान्य यात कोणाचे पोट तर भरत नाही, परंतु अशा स्थितीने, वतनाच्या आशेने, गावी राहणे भाग पडल्याने पोट भरण्याकरिता चोऱ्या वगैरे गुन्हे करण्याशिवाय त्यांना दुसरा मार्गच उरला नाही. म्हणून मी सर्व बलुतेदारांस व महार वगैरे वतनदारांस अशी विनंती केली की, अशी लहानलहान वतने व बलुती यांच्यामागे तुम्ही लागू नका. ती सोडून द्या. विशेषेकरून महार लोकांना मी अशी विनंती केली की, तुम्ही साधारण माणशी दहा एकर जमीन वाट्याला येईल असे तुमच्या म्हारकीचे तुकडे करा. हे उत्पन्न तुमच्यातील जे वडील असतील त्यांच्याकडे, जसे पाटील, सनदी, शिलेदार यांच्याकडे चालते तसे चालवा; म्हणजे गावास फक्त आठ महार, शिलेदारांप्रमाणे अगर सनदी शिलेदारांप्रमाणे नेमा म्हणजे त्यामुळे गुलामगिरी नाहीशी होईल. त्यांना मी नवीन सनदा देण्याची तजवीज मोठ्या खुषीने करीन. असे झाल्याने बाकीच्या महार लोकांस गावात अगर बाहेरगावी कोणताही धंदा करण्यास मोकळीक होईल आणि सर्वांनीच अर्धपोटी राहायचेही टळेल. हे माझे म्हणणे करवीरच्या महारांनी कबूल केले आहे व त्यांचे अनुकरण सर्व करतील अशी माझी खात्री आहे. माझे प्रिय मित्र मिस्टर आंबेडकर मला या कामी मदत करतील अशी मला पूर्ण आशा आहे.

याप्रसंगी आमचे विख्यात विद्वान (Educated) मि. केशवराव व मागासलेल्यांकरिता झटणारे रावबहादूर बाबू कालीचरण वगैरे असते तर फारच मदत झाली असती. तसेच सर्व पाटील लोकही मला या कामात मदत करतील अशी माझी पूर्ण उमेद आहे. आमच्या येथील सुप्रसिद्ध व्यापारी रामभाऊ शिरगावकर यांचेही मला या कामी पाठबळ मिळेल अशी मला पूर्ण आशा आहे.

मी हजेरी बंद केली याबद्दल मला असेही प्रश्न झाले होते की, आजपर्यन्तच्या हजेरीचे लोक, निदान ब्रिटिश वगैरे परहद्दीत जातील तेव्हा तरी त्यांना त्यांच्या संबंधाने आगाऊ वर्दी मिळावी. तसे ता. ३०-५-१९११ रोजी, सातारा पोलिस सुपरिटेंडेंट यांचे लिहून आले होते; त्यावर अविनम्रपणे मी ता. ४-६-१९११ रोजी उत्तर दिले की, ज्याअर्थी मी हजेरी अजिबात माफ केली आहे त्याअर्थी आपल्या इच्छेस मान देण अशक्य झाले आहे. परंतु गुन्हेगार लोकांचे दाखले, मग ते स्पृश्य असोत वा अस्पृश्य असोत मी मोठ्या आनंदाने देत जाईन व खरोखर जे चांगलेपणाने वागणारे लोक आहेत, त्यांना जन्मभर गुन्हेगारांप्रमाणे वागविण्यास माझे अंतःकरण मला सांगत नाही. त्याप्रमाणे हजेरी बंद केली या गोष्टीची हकीकत आहे.

काही लोक तलाठी पद्धतीसंबंधाने माझ्यावर आक्षेप करितात की, जर वतनदार लोकच नोकरीत नको आहेत तर मग पाटील कशाला पाहिजेत? नाही! नाही! तसे नाही!!! पाटील कशाला पाहिजे याचीही कारणे आहेत. कोणीही अजाण, अशिक्षित माणूसही कबूल करेल की, खेडेगावात कोणीतरी जबाबदार असा कामगार असला पाहिजे. असे जर आहे, तर माझ्या मते तो पाटीलच पाहिजे. कारण की, एकतर कुलकर्णी वतनदाराप्रमाणे तो उपलाणी नाही. त्याची उत्पन्ने बादशाही सनदांची आहेत. त्यांनी गावे वसविली आहेत आणि दुसरे ज्या जातीचे लोक ज्या गावात जास्त प्रमाणात आहेत त्याच जातीचा पाटील बहुधा तेथे नेहमी असतो व कुलकर्ण्याच्या जातीचे लोक गावात हजारांत एकसुद्धा मिळणे दुर्मिळ. कुलकर्ण्याच्या मागे त्यांच्या जातीचे अधिकारीवर्ग वकीलशाही व नोकरशाही यांचा पाठिंबा असल्याने गावातील सर्व लोक त्याला भितात व गावच्या खऱ्या हिताच्या कोणत्याही गोष्टीकडे त्यांचे दुर्लक्षच असते. ज्या अधिकारी वर्गाचे त्यांना पाठबळ असते. त्यांना आवडेल तीच गोष्ट झपाटून करीत असतो व लोकांच्या हिताच्या व सुखाच्या गोष्टीकडे त्यांचे लक्ष नसल्यामुळे गावातून गरीब लोकांवर जुलूम करूनही त्या त्या गोष्टी त्याला कराव्या लागतात. परंतु पाटलाची स्थिती तशी नाही. निरुपाय झाल्याशिवाय पाटील लोक

तसे सहसा करीत नाहीत. कारण त्याच्या जातीचे लोक गावात जास्त असल्याने त्यांचेच हित पाहणे हे त्याला भाग पडते. मात्र एका गावात दोन पाटील असले म्हणजे दुही माजून त्यांच्यामध्ये तंटे उत्पन्न होतात व ते वाढविण्याकडे लबाड लोकांची प्रवृत्ती असते. ज्या गावास एक पाटील आहे तेथे गुन्ह्यांचे मान कमी असते. हा अनुभव आमच्या मुलकी अधिकारी वर्गास आहेच.

मी अस्पृश्य वर्गाकरिता जे अल्पस्वल्प यत्न केले आहेत, ते एका लहानशा पुस्तकरुपाने बाबुराव यादव यांनी प्रसिद्ध केले आहेत, त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. त्याचप्रमाणे या कामी सत्यशोधक समाज, आर्यसमाज व अमेरिकन मिशन मला मदत करीत आहेत. याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. परंतु कमनशिबाची गोष्ट ही की, आमचे सुशिक्षित पुढारी वर्गापैकी फारच थोड्या लोकांचे प्रयत्न याबाबतीत मनोभावे करून होत आहेत. तथापि हळूहळू आपले सर्व समाज या दुर्भागी लोकांच्या कल्याणासाठी जास्त झटत जातील अशी मला उमेद आहे.

आजच्या सभेचे अध्यक्ष मिस्टर आंबेडकर यांचे करणे मला नापसंत आहे. कारण महार, मांग, चांभार, ढोर हे खरोखर वैश्य जातीचे असून व विशेषतः महारलोक पूर्वी महारकी, सूत कातून व्यापार करीत असता त्यांना अस्पृश्य कोणी ठरविले कोण जाणे! असा वैश्याचा धंदा सोडून दस्यू म्हणजे नोकर आणि नोकर म्हणजे अतिशूद्र, आंबेडकरांनी का पत्करला आहे मला कळत नाही. तथापि मी येथे जमलेल्या सर्व लोकांस हीच विनंती करितो की, आतापर्यन्त आम्ही निकृष्ट अवस्थेस पोचण्याचे कारण आम्ही आमचा योग्य पुढारी योजून काढीत नाही. गोड बोलून नावलौकिक मिळविण्याच्या हेतूने, आमच्यापैकी काही अप्पलपोटी मंडळी अयोग्य पुढारी नेमून देऊन अज्ञानी लोकांना फसवितात. पशूपक्षीदेखील आपल्या जातीचा पुढारी करितात. पक्ष्यांत कधी चतुष्पादांचा पुढारी झाला नाही. चतुष्पादात कधीही पक्ष्यांचा पुढारी नसतो. गाय, बैल, मेंढरे यात मात्र धनगर त्यांचा पुढारी असतो. त्यामुळे शेवटी त्यांना कसाबखान्यात जावे लागते.

ज्यांच्याप्रमाणे हजारी एकसुद्धा नसून जे मागासलेल्यांना, खुद्द क्षत्रियांना (ज्यांनी त्यांचा मोंगलापासून बचाव केला व ज्यांचे पूर्वज रामकृष्ण सूर्यवंशी, सोमवंशी क्षत्रिय हे ज्यांच्या देव्हाऱ्यावर आहेत त्यांना) सुद्धा शूद्र, म्हणून गोमय काय विष्ठेपेक्षाही अस्पृश्य मानितात व स्पर्श झाला म्हणजे जे स्वतःची शुद्धी करून घेतात, असे पुढारी काय कामाचे? पाश्चिममात्य देशात अगर इतर कोणत्याही देशात असले पुढारी कोण कबूल करील?

पशुहून काय? गोमय किंवा विष्ठेहूनही कमी दर्जाचे, आपल्या बंधुभगिनींना व देशबांधवांना मानणाऱ्या लोकांनी पुढारी व्हावयाची इच्छा करणे कितीतरी बेशरमपणाची गोष्ट आहे! मला ज्यावेळी मुखत्यारी मिळाली त्यावेळी ब्राह्मणेतर एकही वकील अगर नोकर नव्हता. परंतु त्यांना वकिलीचे ज्ञानामृत पाजल्यापासून ते वाकबगार झाले आहेत. त्याचप्रमाणे अस्पृश्य मानिलेल्या लोकांना नोकऱ्या व 'स्पेशल केस' (Special Case) करून वकिलीच्या सनदा दिल्या आहेत. यात ते इतर लोकांप्रमाणे वाकबगार होतील अशी उमेद आहे. मी लवकरच लोकांना, 'सेल्फ गव्हर्नमेंट' थोड्या प्रमाणावर देणार आहे. त्याचा फायदा सर्वांना व विशेषतः अस्पृश्य मानिलेल्यांनाही सारखा मिळावा म्हणून 'कम्युनल रिप्रेझेन्टेशन' ही देणार आहे.

कित्येक म्हणतात की, राजकारणाचा व स्पृशास्पृश्यतेचा काय संबंध आहे? काही संबंध असल्यास आम्ही तसेही करू. पण मी म्हणतो, अस्पृश्यांना मनुष्याप्रमाणे वागविल्याशिवाय राजकारण कसे होणार? ज्यांना

अनुक्रमणिका

राजकारण करणे आहे, त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे म्हणजे इतर देशात वागवितात त्याप्रमाणे वागविले पाहिजे आणि तसे वागविल्याशिवाय देशकार्य कसे होणार? आणि असे जो वागवील त्यानेच देशकार्य केले असे म्हणता येईल, इतरांनी नाही.

हिंदुस्थानशिवाय इतर कोणत्याही देशात मनुष्यात जात नाही. परंतु दुदैवाने हिंदुस्थानात मात्र जातिभेद इतका तीव्र आहे की, मांजर, कुत्रे किंबहुना शेणापेक्षादेखील कमी, अशा प्रमाणे आम्ही आपल्या देशबांधवांस व भगिनीस वागवितो व अजूनही आम्ही गैरशिस्त पुढारी करितो. म्हणून गरीब लोक अहमदाबाद, अमृतसरसारखे ठिकाणी व मागे मुंबईस झालेल्या दंग्यासारख्या प्रसंगी बळी पडतात. तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत. कृतीने जातिभेद मोडून आम्हास मनुष्याप्रमाणे वागवितील असे पुढारी पाहिजेत. जरी मी आंबेडकरांची निंदाच करीत आलो, तरी त्यांच्या उदार मतांबद्दल स्तुतीही करणे जरूर आहे. आज त्यांना 'पंडित' ही पदवी देण्यास तरी काय हरकत आहे? विद्वानांत ते एक भूषणच आहेत. आर्यसमाज, बुद्धसमाज व ख्रिस्ती समाज यांनी, त्यांना आपल्यात आनंदाने घेतले असते. परंतु ते तुमचा उद्धार करण्याकरिता तिकडे गेले नाहीत. याबद्दल तुम्ही त्यांचे आभार मानले पाहिजेत. मीही मानतो.

***

अनुक्रमणिका

सहा

अंतिम राजकीय ध्येय

***

'विजयी मराठा' च्या २७ फेब्रुवारी, १९२२ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या 'अंतिम राजकीय ध्येय' या भाषणात राजर्षींनी म्हटले आहे: "आपण सर्वजण एकत्र येऊन आपल्या उन्नतीचे जे प्रयत्न चालविले आहेत, ही मोठीच अभिनंदनीय गोष्ट होय. हे प्रयत्न म्हणजे आपल्यामध्ये नवचैतन्य उत्पन्न झाल्याचे सूचक चिन्ह आहे हे आत्मोन्नतीचे प्रयत्न, सामाजिक हीन स्थितीतून मुक्त होण्याचे निकराचे युद्ध आहे. ते असेच नेटाने चालू ठेवले पाहिजे. केवळ पारंपारिक एकाच व्यवसायावर अवलंबून न राहता शिक्षण घेऊन वेगवेगळ्या उद्योगव्यवसायात उतरा, उच्चपदस्थ नोकऱ्यांत उतरा, आपणच आपला विकास करुन घ्यायला शिकले पाहिजे."

"इंग्रज राज्यकर्त्यांनी ज्या नवीन सुधारणा दिल्या त्याचेही अंतिम उद्दिष्ट स्वराज्य हे ठरवून त्यांनी आपणास राजकीय, सामाजिक, आर्थिक व नैतिक उन्नतीचे मार्ग उपलब्ध करुन दिले आहेत. त्यांच्यामुळेच आपल्यामध्ये नवजीवन उदयाला आले आहे. कोणत्याही देशातील सुचरित लोकांवरच त्या देशाचे राजकीय भवितव्य अवलंबून असते."

शेवटी शाहू महाराज म्हणतात: 'आपण आपल्या नैसर्गिक मानवी हक्कांना जपले पाहिजे. त्यासाठी आग्रहपूर्वक दृढपणे उभे राहिले पाहिजे. आपली प्रगती साधण्याचा, विसाव्या शतकातील मार्ग दंगेधोपे व बंडाळीचा नसून शाततेने व व्यवस्थित रीतीने आपला आपण विकास करून घेणे हा आहे."

कुणावरही न विसंबता, स्वतःच स्वतःच्या पायांवर उभे राहण्याचा स्वयंप्रेरणेचा मंत्र, शाहू महाराजांच्या अख्ख्या कार्याचा मूलमंत्र आहे.

***

दिल्ली : १६ फेब्रुवारी, १९२२
अ. भा. अस्पृश्यता परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनात अध्यक्षपदावरुन शाहू महाराजांनी दिलेले भाषण

सहा

अंतिम राजकीय ध्येय

***

मी आपली भाषा चांगल्या तऱ्हेने जाणत नाही, म्हणून मला ज्याप्रकारे; आपले विचार आपणापुढे मोडक्यातोडक्या भाषेत मांडता येतील त्याप्रमाणे मांडण्याची मी परवानगी घेतो.

आजचा मान खरे म्हटले असता आपणातील उत्साही व सुशिक्षित पुढारी मिस्टर आंबेडकर यांनाच मिळावयास पाहिजे. माझ्यापेक्षा ते जास्त सुशिक्षित आहेत व अभिमानी आहेत. त्यांनी आपल्या कल्याणाकरिता अविश्रांत श्रम केले आहेत. परंतु त्यांना आज आपल्यामध्ये हजर राहाता येणे शक्य नाही. कारण ते विलायतेस गेले आहेत. तेथे ते आपले हित अंतःकरणात ठेऊन इतर व्यवसाय करतील यात तिळमात्र शंका नाही.

प्रथमतः आपण सर्व आज या ठिकाणी परमपूज्य बादशहा पंचम जॉर्ज यांचे युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांचे स्वागत करण्याकरिता लांबलांबून आला आहात, याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. व तुम्हीही खात्री बाळगा की, तुम्हा सर्वांना पाहून युवराजानाही आपणासंबंधी आनंद व प्रेम वाटत आहे.

आज आपण सर्व एके ठिकाणी मिळून आपल्या उन्नतीचे प्रयत्न शांततेच्या मार्गाने करीत आहात ही मोठी अभिनंदनीय गोष्ट आहे. हे खरोखर आपणामध्ये नवीन चैतन्य उत्पन्न झाल्याचे सूचक आहे. ही चैतन्याची चळवळ, हे आत्मोन्नतीचे प्रयत्न हे, सामाजिक हीन स्थितीतून मुक्त होण्याचे निकराचे युद्ध आहे. असेच नेटाने ते चालू ठेवल्यास ईश्वर आपल्या प्रयत्नांस यश देईलच देईल.

आपण आपल्या एकाच पूर्वापार धंद्याला चिकटून न राहाता शिक्षण घेतले पाहिजे. आपण फौजेत तसेच कचेऱ्या व मोठमोठ्या जागा पटकाविल्या पाहिजेत. तसेच वकील, बॅरिस्टर, डॉक्टर, व्यापारी वगैरे स्वतंत्र धंद्यांत प्रवीणता मिळवून आपली उन्नती करून घेतली पाहिजे.

माझ्या लहानशा राज्यात आपले ज्ञातिबंधू हे सर्व व्यवसाय करीत असून तेथील म्युनिसिपल कमेटीचे चेअरमन हे आपणांपैकीच एक आहेत, ही गोष्ट नमूद करण्यास मी आपली परवानगी घेतो. ही कदाचित आत्मस्तुती केल्याचा आरोप मजवर येईल. परंतु त्याबद्दल आपण क्षमा कराल अशी विनंती आहे. कारण आपले लोक प्रयत्नान्ती काय करू शकतात एवढेच दाखविण्याकरिता आपणास मी हे सांगितले आहे. हेच युवराज ज्यावेळी पुनः बादशहा म्हणून आपणास भेट देण्यास येतील त्यावेळी तुम्हांपैकी पुष्कळजण फौजेत व कचेऱ्यांत मोठे ऑफिसर व स्वतंत्र धंद्यातील पुढारी या नात्याने त्यांचे स्वागत कराल अशी मला पूर्ण आशा आहे. आपले त्यांच्यावरील दृढ प्रेम त्यांना खात्रीने ओढून आणील.

आपणामध्ये जी जागृती झाली आहे, जे नवजीवन उत्पन्न झाले आहे, त्या सर्वांचे कारण ब्रिटिश राज्याचा उदय होय. ही गोष्ट आपण केव्हाही विसरता कामा नये. आपल्या दयाळू इंग्रज सरकारने आपणास ज्या नवीन सुधारणा दिल्या आहेत व आपले अंतिम राजकीय ध्येय (Progress in realisation of self Government) 'स्वराज्य' हे ठरवून, आपणासमोर जी आपली राजकीय, सामाजिक, आर्थिक व नैतिक

उन्नती करून घेण्याचा मार्ग खुला करून ठेविला आहे; त्याचा आपण शहाणपणाने पूर्ण उपयोग करून घ्याल अशी मला उमेद आहे.

कोणत्याही देशाची राजकीय भवितव्यता, त्यातील लोकांच्या सुचारित्र्यावर अवलंबून असते. याकरिता आपण सर्वांनी आपले शील सुधारण्याचा प्रयत्न करून आपणामध्ये, आपणास दिलेल्या हक्कांचा उपयोग करण्याची योग्यता आहे असे आपल्या वर्तनाने दाखविले पाहिजे. आपणास आपल्यापैकीच योग्य पुढारी मिळाले असून ते सरळ व शांततेच्या मार्गावर आहेत; हे पाहून मला आनंद होत आहे.

हिंदी राष्ट्रात उत्पन्न झालेल्या नव उत्साहाच्या भरात, आपण राष्ट्रास विसरलो नाही. हजारो वर्षांपासून आपणावर लादलेली अस्पृश्यतेची बेडी आस्तेआस्ते ढिली होत चालली आहे. ती लवकरच पूर्णपणे तुटून पडेल अशी माझी खात्री आहे. आपण आपल्या हक्कांस जपले पाहिजे. जेथे जेथे आपल्या सामाजिक व मानवी प्राण्यांना असणाऱ्या नैसर्गिक हक्कांचा प्रश्न येईल, तेथे तेथे आपण शहाणपणाने, प्रेमाने, परंतु दृढ आग्रहाने स्थिर राहिले पाहिजे. आपले हक्क बजाविले पाहिजेत. हे सर्व अत्यंत शहाणपणाने पार पाडण्यास आपण सरकारशी सहकार्य करून शांततेचे अवलंबन केले पाहिजे.

या विसाव्या शतकात आपली प्रगती करण्याचा मार्ग हा दंगेधोपे व बंडाळी करण्याचा नसून शांततेने व व्यवस्थित रीतीने आपला आपण विकास करून घेणे हा होय. हेच तत्त्व आता जगन्मान्य झाले आहे. वॉशिंग्टन व जिनोआ येथे भरणाऱ्या राष्ट्रीय परिषदेचे मुळाशी हेच तत्त्व आढळून येईल. त्याचाच आपणही स्वीकार केला पाहिजे.

आपण आपले पुढारी मि. भीमराव आंबेडकर यांचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून त्याप्रमाणे होण्याचा प्रयत्न करावा. मी आपला गुलाम आहे, मी आपला दास आहे. माझ्याकडून आपण सेवा करून घ्यावी हीच माझी विनंती आहे.

माझ्या अल्पमतीस अनुसरून माझे विचार थोडक्यात आपणापुढे मांडले आहेत. ते मांडण्याची संधी आपण मला दिली व माझे शब्द शांतपणे ऐकून घेतले; याबद्दल मी आपले आभार मानून, आपली रजा घेतो.

* * *

अनुक्रमणिका

३.धर्म

अनुक्रमणिका

सात

ब्रह्मकर्म कुठे आहे?

***

महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींना गती देणारे कोणीही असो, ते वरिष्ठ वर्गाच्या टीकेला बळी पडतात. म. फुले, लोकहितवादी, राजर्षी शाहू, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यापैकी प्रत्येकाला या दिव्यातून जावे लागले आहे. कुणीच चुकलेले नाही.

शाहू महाराजांच्या मते अशा टीकेतून आपल्यास स्फूर्ती मिळते, उत्साह वाढतो; मरगळ येत नाही. अर्थात हे टीकेचे नव्हे तर हाती घेतलेल्या कार्याचे चैतन्यदायी सामर्थ्य होय. त्यातून ब्राह्मणेतर कार्यकर्त्यांचे एक दलच राजर्षींनी निर्माण केले होते, झाले होते. आपल्या मुलांवर संस्थानच्या कारभाराची सर्व जबाबदारी सोपवून बहिष्कृत समाजाची सेवा करण्याची जाहीर प्रतिज्ञा शाहू महाराजांनी केली, ती ही प्रेरणा आणि पाठिंबा यामधूनच होय.

राजर्षींनी 'ब्रह्मकर्म कुठे आहे?' मध्ये डॉ. परांजपे यांच्या, "वर्णाश्रम धर्माप्रमाणे क्षत्रिय तर मुळीच नाहीत व बाकीचेही वर्ण नाहीत." या मताचा खरपूस समाचार घेऊन ब्राह्मण वर्णच कसा नाही हे बिनतोडपणे सिद्ध केले आहे. ब्रह्मकर्म करणाऱ्या ब्राह्मणांच्या सामर्थ्याने एखाद्याला भस्मसात करता येत. हे तेज त्यांच्याकडे

***

नागपूर : ३० मे, १९२०
अ. भा. बहिष्कृत समाज परिषदेच्या प्रतिनिधींच्या खास बैठकीत, अध्यक्ष या नात्याने शाहू महाराजांनी केलेले भाषण

असते तोच ब्राह्मण. पण आज ते तेज कुणातच नाही. म्हणून ते ब्राह्मण नव्हेत. ते वस्यूप्रमाणे नोकऱ्या करण्यात धन्यता मानतात. म्हणजे दुसऱ्याची सेवा-चाकरी करणारे ते शूद्रच ठरतात. उलट गेल्या महायुद्धात क्षत्रियांनी जो क्षात्रधर्म दाखविला त्यावरून ते क्षत्रिय ठरले आहेत, क्षत्रिय म्हणून वावरत आहेत. वैश्य व शूद्रही आपापले धंदे करतात पण ब्राह्मण वर्गाचे काय? सारांश, 'त्यांच्यात – ब्राह्मणात ब्रह्मतेज नाही' म्हणून ब्राह्मणाशिवाय तीन वर्णच फक्त अस्तित्वात आहेत, असे राजर्षींनी ठणकावून सांगितले आहे

'ब्रह्मकर्म कुठे आहे?' म्हणजे 'ब्राह्मण कुठे आहे? खरेच आहे काय?' असा हा प्रश्न असून त्यामधून शाहू महाराजांच्या बिनतोड तर्कशुद्ध विचारसरणीचा व चतुर बुद्धीमत्तेचा प्रत्यय येतो. राजर्षींची नवसमाज निर्मितीची जिद्द, त्यासाठी अपूर्व त्यागाची तयारी आणि प्रखर तत्त्वनिष्ठा ह्यांचाही संमेळ वृग्गोचर होतो.

***

अनुक्रमणिका

सात

ब्रह्मकर्म कुठे आहे?

***

मी आज आपला अध्यक्ष झालो व नेहमी आपला कैवार घेतो म्हणून एक विवक्षित जात नेहमी माझी टवाळी, निर्भत्सना करिते. लोकमत माझ्याविरुद्ध करण्यास चिथावून देते. परंतु अशा करण्याने मला उत्साह व उत्तेजन येते. जी वर्तमानपत्रे माझी निर्भत्सना करतात त्यांचे मी अभिनंदनच करतो. मला कितीही त्रास व उपहास सोसावा लागला तरी मी निमूटपणे सोसतो व तुमच्या सेवेस मी हाकेबरोबर हजर असतो. माझी नोकरी घेण्यास आपण कोणतीही शंका बाळगू नका.

मी व माझे प्रिय मित्र निंबाळकर, भोसले, बाबुराव यादव, कदम, दत्तोबा पेंटर, बेळगावचे पाटील यांनी आपल्या सेवेस सर्व झीज सोसून, आपले देह झिजविण्याबद्दल शपथा घेतल्या आहेत. आपल्या सर्वांच्या कृपेने माझा मुलगा कर्ता आहे, तो माझ्यामागे सर्व पाहाण्यासारखा आहे. तरी माझ्यावर एखाद्या ‘ऑलीगार्कीने’ आपल्या ‘ब्युरॉक्रसी’ चा अंमल जर स्थापित केला तर मी माझे सर्व राज्य आपल्या मुलावर सोपवून तुमच्या सेवेत राहाण्याची प्रतिज्ञा केली आहे. माझ्याकडून सेवा घ्याल अशी आशा आहे.

जो दुसऱ्यावरी विश्वासला ॥
त्याचा कार्यभाग बुडाला ॥
जो आपणचि कष्टत गेला ॥
तोचि जाण भला ॥

या नियमाप्रमाणे आपल्या हितसाधक बंधूंनी मदत केल्यास त्यांच्या मदतीचा मोठ्या जोराने निषेध करा.

आमचे मित्र डॉ. परांजपे असे म्हणाले की, “वर्णाश्रम धर्माप्रमाण क्षत्रियेतर मुळीच नाहीत व बाकीचेही वर्ण नाहीत.” परंतु ही गोष्ट मात्र मला मान्य नाही. ब्राह्मणांना ब्रह्मकर्म रोज करावे लागते व त्याचे सामर्थ्य, शापाने एखाद्यास भस्म करण्याचेही असते याप्रमाणे कोणतेही ब्रह्मतेज त्याच्या अंगी दिसत नाही. दस्यू व चांडाळाची वृत्ती हेही ते घेतात. नोकरीचा पेशा हे एक त्यांनी आपले चरण्याचे कुरण बनवून टाकले आहे. यावरुन हे ब्राह्मण मुळीच नाहीत. निदान या दक्षिणेत तरी हे खात्रीपूर्वक सांगता येईल.

पृथ्वीवर ब्रह्मतेज कोणातच नाही. त्याअर्थी पृथ्वीवर ब्राह्मणही कोणी नाही. वैश्य वैश्याचा धंदा करितात, (ते गीतेतल्या नियमाप्रमाणे वैश्य व शूद्र आहेत.) व शूद्र शूद्रांचा करितात. क्षात्रकर्म रोज करण्याचे कारण नसते. क्षात्रकर्म रोज करू लागल्यास सर्वच मरून जातील, परंतु क्षात्रकर्म दाखविण्याची वेळ दोनशे वर्षांतून दोन वेळच येते. त्याप्रमाणे महायुद्धात मराठ्यांनी क्षात्रकर्म दाखविले आहे. तेव्हा क्षत्रियांच्या अस्तित्वाबद्दल शंका उरत नाही. मात्र डॉ. परांजपे यांच्या म्हणण्याप्रमाणे ब्रह्मकर्म करणारे ब्राह्मण नसल्यामुळे दस्यू, नोकरपेशा करणेवाली अशी ही नवीनच जात बनली आहे. ब्राह्मणाशिवाय तीन वर्णच जिवंत आहेत हे सहजच लक्षात येईल.

***

अनुक्रमणिका

आठ

आमचा धर्म : आर्यधर्म

* * *

राजर्षी शाहू महाराज खऱ्याखुऱ्या वैदिक धर्माचे चाहते असून तोच खरा आर्यधर्म ही त्यांची श्रद्धा होती. त्यापोटी ते महर्षी दयानंद सरस्वतींच्या आर्यधर्माचे कार्य करण्यास तयार झाले. त्याप्रमाणे ते करीत राहिले.

'आमचा धर्म: आर्यधर्म' मध्ये प्रारंभीच वैदिक धर्माचे स्वरूप विकृत कसे झाले आहे ते सांगताना शाहू महाराज म्हणतातः "वेदप्रतिपादित खऱ्या आर्यधर्मावर अनेक पुटे चढल्याकारणाने त्याचे शुद्ध स्वरूप दिसेनासे झाले. ऋषीप्रणित ग्रंथांचा अभ्यास, लबाड व बनावटी भटजींच्या टीका, भाष्ये वगैरेंच्या आधाराने होऊ लागल्याने प्राचीन सिद्धान्त बरोबर समजेनात. त्यामुळे मनुष्याच्या बुद्धीस नीचपणाप्रत नेणारी हलक्या प्रकारची मूर्तिपूजा फार वाढली... ब्राह्मणत्व वास्तविक पाहाता गुणकर्मांवर अवलंबून असावयाचे ते जातीवर येऊन बसले. तीर्थांचे काल्पनिक महत्त्व वाढविण्यात आले. त्यासाठी गरूड-पुराण, फलज्योतिषशास्त्र यासारखे ग्रंथ तयार करून पैसे उपटण्याचे उद्योग निघाले. 'उपाध्याय सांगेल ती पूर्व दिशा व भट सांगेल ती अमावास्या,' या अवस्थेमुळे भट सांगेल तो आपला धर्म आहे व त्यानेच ईश्वर प्रसन्न होतो' अशी ब्राह्मणेतरांची समजूत झाली. या माजलेल्या भिक्षुकशाहीच्या कर्मकांडाचे दुष्परिणामही राजर्षींनी स्पष्ट केले आहेत.

राजर्षींच्या मते, 'बहुजनसमाजात खऱ्या ज्ञानाचा लोप झाल्याकारणाने देशाची मोठी हानी झाली आहे. ब्राह्मणत्व हे गुणक्रमाऐवजी जन्मावर आहे असे माण्यात येऊ

* * *

नवसारी : गुजरात राज्य : १४ डिसेंबर, १९१८
आर्यधर्म परिषदेच्या अकराव्या अधिवेशन प्रसंगी अध्यक्षपदावरून, शाहू महाराजांनी केलेले प्रास्ताविक भाषण

लागून, ब्राह्मण ही जात उत्पन्न झाल्यावर इतर वर्णही जन्मावर ठरले. अशा रीतीने जातिभेद फार वाढला. समाज विस्कळित झाला. परिणामी धार्मिक अवनतीबरोबर देशावर परकी लोकांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या. परतंत्रतेचे जू देशाच्या मानेवर कायमचे बसले. विद्या कमी कमी होत गेल्याने व्यापार, उद्योग, कलाकौशल्य सर्वांची अवनती सुरु होऊन देशाची फार दैना उडाली."

ही दैन्यावस्था दूर करण्याचे महर्षी दयानंद, बाबू केशवचंद्र सेन आणि म. फुले यांनी कोणकोणते व कसे प्रयत्न केले हे राजर्षींनी सांगितले आहे. ह्या प्रत्येकाचे मार्ग, त्यांच्या सभोवतालच्या परिस्थितीनुरुप कसे वेगळे होते; याचेही विवेचन केले आहे. त्यांच्या मते, "बाबू केशवचंद्र सेन यांचे विचार-कार्य पश्चिमेकडील युनिटेरियन चर्चप्रमाणे झाले, तर म. फुले यांनी, ब्राह्मणांच्या धार्मिक वर्चस्वावर हल्ला केल्याशिवाय ब्राह्मणेतरांची परावलंबी स्थिती दूर होणार नाही; म्हणून ब्राह्मण्यावर मर्मस्थानी प्रहार केले. हे सर्व प्रयत्न

आर्यधर्माभिमान्यांना पचले नाहीत, मात्र स्वामी दयानंद यांनी ‘वेदांचा अधिकार सर्व मनुष्यमात्रांस आहे’ हे तत्त्व कंठरवाने सांगितल्याने हजारोनी लोक त्यांचे अनुयायी बनले. तसेच त्यांनी ‘विद्येचा अधिकारही सर्वांना आहे.’ असे म्हणून लोकांना ज्ञानी करण्याचा सपाटा चालविला. त्यामुळे पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील आर्यवंशातही ऐक्यभाव वाढण्यास मदत झाली; असे ‘आमचा धर्म: आर्यधर्म’ मध्ये राजर्षींनी म्हटले आहे. इतकेच नव्हे तर अशा ‘ह्या उदार आर्यधर्माचा प्रसार झाल्याशिवाय परावलंबी वृत्तीतून हिंदुस्थानची सुटका होणार नाही, त्याला स्वतंत्र राष्ट्र म्हणून उभे राहाता येणार नाही; हेही स्पष्ट केले आहे.

***

आठ

आमचा धर्म : आर्यधर्म

***

आपल्या आर्यधर्म परिषदेच्या अकराव्या अधिवेशनाच्या आजच्या बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास आपण मला बोलाविले व प्रास्ताविक भाषण करण्याचा मान मला दिला याबद्दल मी आपला आभारी आहे. आर्यसमाजाचे काम माझ्या हातून विशेषसे झाले नसताही माझ्या अल्पशा कामाचे आपण अशा रितीने कौतुक केल्याने, माझा उत्साह दुप्पट झाला आहे. यापुढे हे काम माझ्या हातून जास्त प्रमाणावर होईल अशी मला उमेद आहे. आज अध्यक्ष होऊन आर्य समाजाची सार्वजनिक रीतीने सेवा करण्याची आपण जी संधी मला दिली आहे, त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो व ही सेवा गोड करून घ्यावी अशी विनंती करतो. तसेच विश्वव्यापी महायुद्धाचा शेवट होऊन आमच्या साम्राज्य सरकारास पूर्ण यश प्राप्त झाले, याप्रकारे न्यायाची बाजू यशस्वी झाली व आर्यभूवर येणारे संकट टळले; याबद्दल आपण जगदीश्वरास कोटी धन्यवाद देऊ या.

आमचा आर्यधर्म ज्या तत्त्वांच्या पायावर उभारला आहे तीच समतेची तत्त्वे या युद्धाने राजकीय बाबतीतही सर्वमान्य झाली आहेत. याविषयी जास्त उल्लेख मी पुढे करीन. महर्षी दयानंद व त्यांचे गुरु स्वामी विरजानंद यांनी जी ज्ञानज्योती या आर्यभूमीत पाजळली, तिच्याविषयी विचार केला असता या कामी ईशसंकेत स्पष्ट होत आहे. त्या वेळची या देशातील धर्मस्थिती फारच बिघडून गेलेली होती. वेद प्रतिपादित खऱ्या आर्यधर्मावर अनेक पुटे चढल्याकारणाने त्याचे शुद्ध स्वरूप दिसेनासे झाले. ऋषिप्रणित ग्रंथांचा अभ्यास, लबाड व बनावटी भटजींच्या टीका, भाष्ये वगैरेंच्या आधाराने होऊ लागल्याने प्राचीन सिद्धांत बरोबर समजेनात, मनुष्याच्या बुद्धीस नीचपणाप्रत नेणारी हलक्या प्रकारची मूर्तिपूजा फारच वाढली. ते पूजक आपणास पवित्र म्हणवून घेऊ लागले. ब्राह्मणत्व वास्तविक पाहाता गुणकर्मावर अवलंबून असावयाचे, ते जातीवर येऊन बसले. तीर्थांचे काल्पनिक महात्म्य वाढविण्यात आले, त्यामुळे तेथील नामधारी ब्राह्मणास विपुल मिष्टान्न मिळू लागून द्रव्यप्राप्तीही फार होऊ लागल्याने त्यांच्यात आळस व दुर्व्यसने वाढून, त्यांना विद्या शिकण्याचे अगत्य वाटेनासे झाले. मनुष्य उपजल्यापासून तो मरेपर्यंत त्याच्याकडून निरनिराळ्या रूपाने पैसे मिळविण्याकरिता व्रते, दाने, वगैरे विषयीचे ग्रंथ तयार केले गेले. इतकेच नव्हे तर मेल्यावरही मृतास पोचविण्याकरिता श्राद्ध, महाळ, दान वगैरे मिळावे याकरिता 'गरूड पुराणा' सारखे 'गारूडी' ग्रंथ तयार झाले, याप्रमाणे अज्ञान्यांच्या पैशावर ब्राह्मण म्हणविणाऱ्यांची खूप चंगळ उडाल्याने ब्राह्मणातील विद्या नष्ट होत चालली. आपले व आपल्या संततीचे व्यवस्थित चालले पाहिजे या बुद्धीने ब्राह्मणेतरांचीही विद्या त्यांच्याकडून बंद करण्यात आली. पुढे फलजोतिषशास्त्र वाढवून निरनिराळ्या ग्रहांची भीती घालून पैसे उपटण्याच्या युक्त्या निघाल्या. अमूक दिवस चांगला व अमूक वाईट, अमक्या दिवशी प्रवास करावा, लग्न उपनयन वगैरे अमूकच मुहूर्तावर व्हावे अशी थोतांडे काढून अनेक वेडगळ धर्मसमजुतींचा पगडा जनसमाजावर बसविला गेला. 'उपाध्याय सांगेल ती पूर्वदिशा व भट सांगेल ती अमावस्या' असे झाल्याने 'भट सांगेल तसे निमूटपणे वागणे हा आपला धर्म आहे व यानच ईश्वर प्रसन्न होतो व आपले कल्याण होते.' अशी ब्राह्मणेतरांची समजूत झाली व ते निव्वळ नंदीबैलाचे स्थितीत आले.

बहुजनसमाजात खऱ्या ज्ञानाचा लोप झाल्याकारणाने देशाची मोठी हानी झाली आहे. वर्णव्यवस्था गुणकर्मामुळेच स्थापन झाली व ती गुणकर्मावरच अवलंबून पाहिजे. पण ब्राह्मणत्व जन्मावर आहे असे

मानण्यात येऊ लागून ब्राह्मण ही जात उत्पन्न झाल्यावर; इतर वर्णांचाही संबंध जन्मावर यावा यात नवल नाही. अशा रीतीने जातिभेद फार वाढला. मूळच्या चार वर्णाच्या आता कमीतकमी चार हजार तरी जाती होऊन समाज विस्कळित झाला आहे. भेदापासून द्वेष उत्पन्न झाला व देशातील एकी नाहीशी झाली. याचा परिणाम केवळ धार्मिक अवनती होऊनच थांबला नाही. आर्यावर्तावर परकीय लोकांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या व घरच्या फटीमुळे बाहेरच्या शत्रूंना फार फावले. अशा कारणांनी परतंत्रेचे जू देशाच्या मानेवर हळूहळू कायम बसले. विद्या कमीकमी होत गेल्याने व्यापार, कलाकौशल्य, उदीमधंदा वगैरे सर्वास अवनती आली. एकंदर देशाची फार दैना उडाली.

परकी अंमलापासून सुटण्याचा प्रयत्न राजपूत क्षत्रियांनी चांगलाच केला होता. पण जातीभेदांनी पोखरलेल्या समाजस्थितीत तो यशस्वी झाला नाही यात नवल नाही. दुसरा मोठा आणि जास्त यशस्वी प्रयत्न मराठे लोकांनी केला. हे लोक सर्व देश जिंकतात की काय असे एकवेळ वाटू लागले; पण मराठ्यांची राजसत्ता हळूहळू पण पूर्णपण ब्राह्मणांच्या हाती गेल्याने ब्राह्मण-ब्राह्मणेतर हा भेद तीव्र होऊन मराठी राजसत्ता नाश पावली व सर्वांस समदृष्टीने न्याय देणारे, प्रजस विद्या देणे हे राजाचे पहिले कर्तव्य आहे हे जाणणारे असे इंग्रजी राज्य उदय पावले.

इंग्रजी राज्य स्थापन झाल्यावर इकडे ख्रिस्ती मिशनरी बरेच आले व त्यांनी इंग्रजी विद्या देण्यास व आपल्या धर्ममतांच्या उपदेशास सुरूवात केली. त्याचप्रमाणे इंग्रज सरकारातूनही विद्याखाते स्थापन होऊन लोकांमध्ये नवीन विचारांच्या प्रसारास सुरुवात झाली. या काळी धर्मसुधारक असे तीन पुरुष प्रमुखत्वाने उदयास आले; ते महर्षी स्वामी दयानंद, बाबू केशवचंद्र सेन व जोतीराव गोविंदराव फुले हे होत. या तिघांत बऱ्याच बाबतीत ध्यानात ठेवण्यासारखे साम्य आहे. पण तिघांची मते व कार्यक्रम, त्यांच्या विद्येच्या व परिस्थितीच्या योगाने भिन्न झाली आहेत.

महर्षी दयानंद स्वामी हे आपल्या गुर्जर प्रांतातील आहेत, याबद्दल आपणास अभिमान वाटणे साहजिक आहे. त्यांचे विद्यासंपादन मुख्यत्वेकरून उत्तर हिंदुस्थानात झाले व स्वामी विरजानंदही तिकडीलच. तेव्हा या प्रांतातील परिस्थितीचा परिणाम त्यांच्या कार्यक्रमावर होणे साहजिकच आहे.

बाबू केशवचंद्र हे बंगाल प्रांती उदयास आले. बंगाल प्रांती इंग्रजी अंमल सर्वाआधी सुरू झाल्याने, इंग्रजी विद्येचा प्रसार तिकडे जास्त झाला होता. यामुळे केशवचंद्र यांचे विचार पश्चिमेकडील 'युनिटेरियन चर्च' प्रमाणे (Uniterian Church) झाले, यात नवल नाही.

महाराष्ट्र देशातील जोतीराव फुले यांची परिस्थिती फारच निराळी होती. ते ब्राह्मणेतरांतीलच एक होते. त्यांना, ब्राह्मणी मताने विद्या शिकण्याचादेखील अधिकार नव्हता. त्यामुळे त्यांना मिळालेले धर्मज्ञान बहुशः ख्रिस्ती लोकांनी लिहिलेल्या ग्रंथांवरून व ब्राह्मणेतरांवर आपला जोराचा अंमल चालावा म्हणून ब्राह्मणांनी लिहिलेल्या काल्पनिक पोथ्यांवरून मिळाले होते. पण ते फार शोधक व विचारी असल्याने ब्राह्मणी कावा त्यांनी पूर्णपणे ओळखला. स्वामी दयानंद यास वेदविद्या व संस्कृत ज्ञानभांडार खुले झाले होते. आर्यधर्मातील उच्च तत्त्वे त्यांना पूर्णपणे कळली होती. सर्व धर्मांत आर्यधर्म कसा श्रेष्ठ आहे याची जाणीवही सर्व हिंदुस्थानात त्यांच्यापेक्षा जास्त कुणासही नव्हती; असे म्हटल्यास अतिशयोक्तीचा दोष मजकडे येईल असे मला वाटत नाही.

याप्रमाणे या तिघांची विद्या निरनिराळ्या प्रकारची होती. तशीच समाजस्थितीही भिन्न प्रकारची होती.

दक्षिण हिंदुस्थानसारखे, उत्तर हिंदुस्थानातही ब्राह्मणत्व जन्मावर येऊन बसले आहे. पण तेथे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चारही वर्ण अस्तित्वात आहेत; असे मानण्यात येत असल्याने ब्राह्मणाखेरीज बऱ्याच इतर लोकांस वेदाध्ययनाचा व इतर विद्यासंपादनाचा अधिकार आहे असे समजण्यात येते. दक्षिणेत तर 'कलौ अद्यंतपो स्थिति' यावर जोर देऊन क्षत्रिय व वैश्यांचा पूर्ण अभाव असे प्रतिपादण्यात ब्राह्मणवर्गास मोठा आवेश येत असतो. त्यामुळे इकडील ब्राह्मणेतर वर्गात वेदविद्या तर बंद झालीच पण त्यायोगाने इतर विद्येचीही जवळजवळ बंदी झाली अशा रीतीने दक्षिण हिंदुस्थानच्या परिस्थितीत फार मोठा फरक पडला आहे. तिकडे ब्राह्मणवर्गाचे वर्चस्व मुख्यत्वे धार्मिक बाबतीत आहे. बाकीच्या बाबतीत इतर वर्णाचे लोक परतंत्र नाहीत. यामुळे समाजाचे पारडे समतोल आहे. दक्षिणेत ब्राह्मणेतरांची विद्या बंद झाल्याने सर्वच बाबतीत ब्राह्मणांच्या हाती श्रेष्ठपणा गेला आहे. धार्मिक, राजकीय, सामाजिक, शिक्षणविषयक वगैरे सर्वत्र प्राबल्य ब्राह्मणांचे, यामुळे इतर स्थिती फार परावलंबी व केविलवाणी झाली आहे. ही 'ब्युरॉक्रसी' मोडण्याकरिता पुष्कळ प्रयत्न झाले. पण जोपर्यंत ब्राह्मणांच्या धार्मिक वर्चस्वावर प्रत्यक्षपणे हल्ला होऊन ते नाहीसे होत नाहीत तोपर्यंत ब्राह्मणेतरांची परावलंबी स्थिती दूर होणार नाही. हे मर्म जोतीराव फुले यांनी जाणून ब्राह्मणी सत्तेच्या अगदी मर्मस्थानी प्रहार करण्यास सुरुवात केली. जोतीराव यांच्या 'सत्यशोधक समाजा'चे मुख्य मत, ईश्वर व भक्त यांच्यामध्ये दलाल नको, हे आहे. याप्रमाणे ब्राह्मणी मध्यस्थांची जरूर न ठेवता प्रत्येकाने आपली धर्मकृत्ये स्वतः करावीत असा उपदेश त्यांनी सुरू केला. बहुजनसमाज ब्राह्मणी गुलामगिरीत व तज्जन्य अज्ञानात, हजारो वर्षे वाढलेला असल्याने सत्यशोधकांच्या कामात पुष्कळ अडथळा येत असतो. अर्थात् सुधारकांस अडचणीशी टक्कर देणे भागच पडत असते.

वेदाचा अधिकार मनुष्यमात्रांस आहे असे स्वामी दयानंदजी यांनी प्रतिपादन केले व वेदविद्या उत्तर हिंदुस्थानात वाढविली. हजारो, लाखो लोक आर्यसमाजास मिळून त्यांची गुरुकुले, पाठशाळा, कन्या महाविद्यालये, कॉलेजे वगैरे शिक्षण संस्था स्थापन झाल्या. वेदांचा अधिकार सर्वांस आहे असे प्रतिपादिल्याने मनुष्यजातीचे समानत्व पटू लागले. समाजात एकप्रकारचे उच्च प्रतीचे जीवन येऊ लागले व त्यांचे वर्धन चांगल्याप्रकारे होऊ लागले. स्वामी दयानंद यांच्या मताचा प्रसार उत्तर हिंदुस्थानात झपाट्याने झाला. पण नर्मदेच्या दक्षिणेस त्यांनाही जास्त विरोध होऊ लागला.

याचे कारण, मी आताच वर्णिलेल्या 'ब्राह्मण ब्युरॉक्रसी'चे सामर्थ्य हे आहे. पुणे मुक्कामी स्वामीजींचा मुक्काम असताना त्यांचे सुविचार परिप्लुत भाषणे ऐकल्यावर, 'आर्यसमाजी मत हे विष आहे' हे 'ब्राह्मण ब्युरॉक्रसी'स कळून आले व स्वामीजींच्या मिरवणुकीस विरोध करण्याकरिता म्हणून गर्दभानंद सरस्वतींची मिरवणूक काढण्याची हलकट कृती त्यांच्या डोक्यातून निघाली. इकडे ब्राह्मण वर्ग मूर्तीपूजेत अगदी गढलेला. त्यांना त्याशिवाय दुसरे काय सुचणार? आपल्या समाजाचे यथार्थ चित्र अशी गर्दभाची मूर्तीच त्यांनी स्वामीजींच्या पुढे आणून सर्वांस आपल्या खऱ्या योग्यतेची व स्वरूपाची जाणीव करून दिली. त्या ठिकाणी गोड शब्द किंवा युक्तिवाद उपयोगी नाही; असेच 'ब्राह्मण ब्युरॉक्रसी'स वागविले पाहिजे हे जोतीराव फुले व त्यांचे अनुयायी यांनी चांगले ओळखले होते. म्हणून जशास तसे अशा रीतीने ब्राह्मणाविरूद्ध उपदेशास सुरुवात केली. खऱ्या धर्मविद्येचा व धर्माचा प्रवेश या दक्षिण भूमीत व्हावयास पाहिजे असेल तर सत्यशोधक समाजासारख्यांनी ही भूमी त्या कार्यास योग्य अशी तयार केली पाहिजे. अशारीतीने जमिनीतील तण व खडक फोडून काढिले म्हणजे आर्यधर्माचे बीज चांगले रूजेल व वृद्धि पावून सर्वांस सुख होईल. ब्राह्मधर्म कोणताही एक ग्रंथ प्रमाण मानीत नाही. सर्व धर्मात असलेला चांगुलपणा

अनुक्रमणिका

मधुकर वृत्तीने घेऊन त्या धर्माची तत्त्वे ठरविण्यात आली आहेत. पण अशी विवेचकबुद्धी फार थोड्यांस असल्याने ही मते फारच थोड्या लोकांस पटणार. यामुळे ब्राह्मण मताचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होणे शक्य दिसत नाही.

आर्यसमाज वेदाच्या दृढ पायावर स्थापिलेला आहे. वेदाइतका जुना ग्रंथ कोणताही नाही. वेदाचे प्रमाणत्व या आर्यवर्तात बहुतेकांस कबूल आहे. वेदाविषयी पूज्यबुद्धी बहुतेकांच्या मनात आहे. वेदांचा अधिकार आपणास असावा असे पुष्कळास वाटते व यामुळे हे मत फार लवकर प्रसार पावते. या आर्यवर्तात आर्यधर्माचा प्रसार जास्त जास्त प्रमाणावर होत जाणार यात संशय नाही.

हा आर्यावर्त देश पूर्वी कधीही एक राष्ट्र नव्हता; पण हल्ली एकच इंग्रजी राज्यछत्र सर्वांवर असल्याकरणाने, राष्ट्रैक्याची भावना उत्पन्न होऊ लागली आहे. ती हळूहळू वाढतही जात आहे. ही कल्पना अशी वाढण्याच्या कामी आर्यसमाजाची कामगिरी वाखाणण्यासारखी आहे. आर्यसमाज हा या देशातील आर्यलोकांस, मग ते कोणत्याही जातींचे किंवा पंथांचे असोत, त्यास आपणात मिसळून घेतो. इतकेच नाही तर जे आर्यवंशाचे नाहीत, अशा लोकांसही आपणात मिसळून घेऊन आर्यांचे सर्व अधिकार, बेटी रोटी व्यवहारांसह त्यास देतो. मग युरोप खंडातील व अमेरिकेतील ट्युटानिक वंशाचे लोक जे आर्यवंशाचेच आहेत असे सर्व विद्वान कबूल करितात, त्यास घेण्यास तर तो कधीही पाऊल मागे घेणार नाही. पूर्वी आर्यवंशाचे लोक सर्व उत्तर ध्रुवाच्या प्रदेशात एकत्र राहात असत. पुढे तो प्रदेश सोडावा लागल्यावर त्यांच्या टोळ्या पूर्वेकडे व पश्चिमेकडे गेल्या. त्यातील पश्चिम आर्यांच्या वंशातील आता युरोपियन बलाढ्य राष्ट्रे आहेत. पूर्वेकडे आलेल्या आर्यांचे आम्ही आर्यावर्तवासी वंशज आहोत; तेव्हा आम्हास युरोपियन व त्यांचेच वंशज अमेरिकन हे परकी नाहीत. पश्चिमेकडील मोठमोठ्या वीरांनी, लॉर्ड किचनेर, जनरल फ्रेंच, मॉर्शल फॉक् वगैरेनी रणांगणावर लढून आपले क्षात्रतेज प्रत्ययास आणून दिले आहे. आपल्या मनाने ते क्षत्रिय आहेतच व त्यांची इच्छा असल्यास आपण त्यास आर्यधर्माची दीक्षाही द्याल. हजारो वर्षे आम्ही व पश्चिमेकडील आर्य लोक निराळे राहिल्याने त्यांच्या व आमच्या आचारविचारांत फार फरक पडला आहे. परंतु काही मूलभूत तत्त्वे त्यांच्यात व आमच्यात एकच आहेत. जातिभेद ते मानीत नाहीत. आमच्याही खऱ्या धर्मास तो भेद मान्य नाही. फक्त बनावटी ब्राह्मणी हिंदूधर्म हा स्पर्शास्पर्शास महत्त्व देत असून जातिमत्सर वाढवीत आहे खरा पण आर्यधर्म संग्राहक आहे. याच्या योगाने भिन्न भिन्न जातींचा, पंथांचा व धर्मांचा एकोपा होण्यास मदत होणार आहे.

युरोपात, अमेरिकेत व जपानात समानतेचे तत्त्व प्रचारात असल्याने, एकाच कुटुंबात भाऊ भाऊ, नवरा-बायको वगैरे भिन्न धर्माचे आढळतात. तसाच प्रकार नवरा आर्यसमाजी तर बायको इतर धर्माची किंवा बायको आर्यसमाजी तर नवरा इतर पंथाचा असेही एका कुटुंबात सलोख्याने सापडणे अशक्य नाही. कुटुंबातील भाऊ-भाऊ निराळ्या पंथाचे किंवा धर्माचे राहतील. प्रत्येकास आचार व विचार स्वातंत्र्य पाहिजे. आर्यसमाज ते देत आहे. ब्राह्मणी हिंदूधर्म तसे स्वातंत्र्य देत नाही म्हणून त्यांच्यापासून फूट वाढत असून आर्यधर्मापासून एकोपा वाढणार आहे. एकराष्ट्रीयत्वाच्या कामी याचा फार उपयोग आहे पण आमची नजर नुसत्या एका राष्ट्रीयत्वानेच कुंठित होता कामा नये. नुकत्याच संपलेल्या महायुद्धात प्रत्येक राष्ट्र आपल्या देशाच्या प्रेमानेच लढाईत शिरले. पण आता सर्वांची एक 'सोसायटी ऑफ नेशन्स' स्थापन करण्याचे विचार तिकडील थोर मुत्सद्यांच्या मनात घोळत आहेत. तसेच सामर्थ्य आर्यधर्माच्याही अंगी आहे. सर्वत्र आर्यधर्माचा घोष करण्याची आकांक्षा आपण धरणे योग्य नाही.

अनुक्रमणिका

आर्यधर्माचे हे महत्कार्य लक्षात आणूनच आमचे सिसोदेवंशीय उदेपूरचे महाराणा सज्जनसिंह व आमचे जोधपुरचे महाराज प्रतापसिंह यांनी या धर्ममतांच्या प्रचारार्थ चांगलीच खटपट केली आहे व ज्याला या देशाचे खरे कल्याण व्हावे असे वाटत असेल त्याने आपणाकडून होईल तितकी मदत या कामी केली पाहिजे. बनावटी ब्राह्मणी धर्माला सनातन असे मोठे नाव देऊन त्याचे महत्त्व, अज्ञानांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न वारंवार केलेला दिसून येतो. सनातन तत्त्वे म्हणजे वेदांनी प्रतिपादिलेली ती फार चांगली आहेत पण त्यास झाकून ठेवून धूर्त लोकांनी पुराणे व स्मृत्या यात फार घुसवाधुसव केली आहे. आपणास व आपल्या जातीच्या लोकास खूप चैन करण्यास मिळावी म्हणून पुराणांत व 'भारत' वगैरे ग्रंथातही अनीतीस उत्तेजन देणाऱ्या गोष्टी लिहून ठेवल्या आहेत. अशा ग्रंथास धर्मग्रंथ म्हणण्यास लाज वाटली पाहिजे. असले हे ग्रंथ अगर त्यातील वाईट भाग ऋषिप्रणित खात्रीने नाहीत. इंग्रजी राज्यात आमचे डोळे उघडण्याने आम्हास आता हे अनिष्ट प्रकार दिसून येत आहेत. आता आम्ही याचा तीव्रपणे निषेध करणे जरूर आहे.

दक्षिण हिंदुस्थानची धार्मिक व सामाजिक स्थिती कशी शोचनीय आहे, हे मी आपणास पूर्वीच सांगितले आहे. यात जास्त फूट पाडण्यास ब्राह्मण म्हणविणारे कसा प्रयत्न करीत असतात याचे माझेच उदाहरण सांगतो: राजा असल्याने आपण विष्णूचा अंश आहात म्हणून आपण क्षत्रिय आहात. आपल्या घरी आम्ही वेदोक्त कर्मे करण्यास तयार आहोत, असे धूर्त ब्राह्मण मला म्हणतात. या युक्तीने माझ्या ज्ञातिबंधूंत व माझ्यात फूट पाडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्याचप्रमाणे मराठे लोकातही निरनिराळी कारणे लावून अमूक श्रेष्ठ म्हणजे सच्छिल, अमूक कनिष्ठ असे सांगून ते फूट पाडीत असतात. यासाठी आर्यसमाजाचे प्रयत्न याच प्रांतात विशेष झाले पाहिजेत. बनावटी धर्मगुरुंचा सुळसुळाट नासिक, पंढरपूर या क्षेत्रांतच असतो. तेव्हा त्या त्या ठिकाणी आपल्या शाळा, गुरुकुले उपदेश मंदिरे झाली पाहिजेत व खऱ्या धर्माचे ज्ञान वाढविले पाहिजे. नामदार पटेल यांनी हिंदुस्थानच्या कायदे कौन्सिलात आणलेल्या बिलास पुष्टी देण्याचा ठराव आपल्या अधिवेशनात आपण आणणार आहात हे फार चांगले आहे. जातिभेदामुळे रोटीबेटी व्यवहारास फार अडचण येऊन समाजात फार फूट झाली आहे. राष्ट्रीय भावना वाढण्यास आपल्या समाजाचे कार्य किती उपयोगी आहे हे मी आताच सांगितले आहे. ना. पटेल यांचे बिलही याच दिशेने उपयोगी आहे.

जातीजातीत विवाहसंबंध होऊ लागल्याशिवाय जातिभेदाची तीव्रता कमी होणार नाही. या बिलास विरोध करण्याच्या कामी प्रत्येक प्रांतातील ब्राह्मण वर्गच पुढे येत आहे. त्यात त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. आपले बनावटी वर्चस्व नाहीसे होण्याची वेळ जितकी लांब टाकवेल तितकी टाकण्याची ही सारी धडपड आहे. बहुतेक सगळा ब्राह्मणेतर समाज या कामी या बिलास अनुकूल आहे. त्याप्रमाणे सभा भरुन ठिकठिकाणी ठराव होत आहेत. ना. भूपेन्द्रनाथ बसू यांनी पूर्वी अशाच प्रकारचे बिल आणले होते. त्यावेळी 'धर्म बुडेल' अशी ओरड या मतलबी लोकांनी केली होती. त्या बिलाच्या धर्तीवर लग्नासंबंधी कायदे इंदूर, बडोदा व कोल्हापूर या आर्यधर्मी राज्यांत पास झाले आहेत. पण तेथे धर्म बुडाल्याचे चिन्ह काहीच दिसून येत नाही. धर्म म्हणजे भटाची दक्षिणा, असा अर्थ असल्यास तिला मात्र धोका आहे. ही दक्षिणा सर्वस्वी बुडाल्यास देशाचे कल्याणच होईल.

माझे भाषण आपण शांतपणे ऐकून घेतलेत, माझा बहुमान केलात, त्याबद्दल आपले मी पुन्हा एकवार आभार मानतो. आर्यधर्माचे ज्ञान सर्वत्र प्रसार होऊन, त्या योगाने या देशाची चिरकाल टिकणारी उन्नती होवो व सर्व जगात शांती आणि आनंद फैलावो, अशी ईश्वराची प्रार्थना करुन मी आपले भाषण संपवितो.

***

अनुक्रमणिका

नऊ

ऋषींचे मिशन

* * *

सन १९१८ मध्ये नवसारी येथे भरलेल्या आर्यधर्म परिषदेच्या अकराव्या अधिवेशनप्रसंगी शाहू महाराजांनी अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणातील सर्वसाधारण आशयच, 'ऋषींचे मिशन' मध्ये स्थूलरूपाने आला आहे. तरीही त्यातून राजर्षींच्या आत्मनिष्ठेचे एक वेगळे दर्शन लाभते.

प्रारंभी ब्राह्मण्याचा कोणता दुष्परिणाम झाला आहे हे कथन करताना राजर्षी म्हणतात: "आज पराक्रम, विद्वत्ता, धर्मशीलता, उदारतावादी सद्‌गुण लुप्त झाले आहेत परिणामी, बालविवाह, बहुविवाह, मद्यपान, स्त्रियांना शिक्षणास मज्ञाव, वर्णाश्रमधर्माची अव्यवस्था वगैरे अनेक सामाजिक घातकी रूढींनी समाज निर्जीव करून टाकला आहे. गुरुवर्गाची चळवळ फोफावली आहे. 'अष्ट वर्षा भवेत् गौरी' हा अवैदिक पाठ सुरू झाल्याने या देशाचे राष्ट्रीयत्व जवळ जवळ नष्ट झाले आहे." हा कर्मकांडाचा प्रभाव व त्यांच्या मगरमिठीतून सामान्यांची सुटका करण्याचे झालेले प्रयत्न यांचे मूल्यमापन करताना, त्यामधील अपुरेपणाकडे लक्ष वेधताना राजर्षी सांगतात: "जरी सत्यशोधक समाजा'दी समाजांनी काहीशी सुधारणा केली आहे; तथापि ह्या संस्थांनी विशेष अधिक काही होऊ शकणार नाही. कारण त्या 'शठं प्रति शाठ्यं' या तत्त्वावर चालत आहेत." उलट आर्यसमाजच हे कार्य करू शकेल हे सांगताना ते म्हणतात: "देशाला जागृत करणारी रामबाण मात्रा वैदिक धर्मच आहे. कारण हिंदुस्थानच्या अंतःकरणात

* * *

भावनगर : सौराष्ट्र : गुजरात राज्य : ८ मार्च, १९२०
अ. भा. आर्यधर्म परिषदेच्या समारोपाच्यावेळी, शाहू महाराजांनी केलेले भाषण

वेदाभिमान वसत आहे व आर्यसमाज वेदानुकूल राहण्यातच आपला धर्म समजत आहे. आर्यसमाजाचा धर्म जगावर उपकार करण्याचा आहे... आर्यधर्म यच्चयावत मानव समाजाकरिता आहे." सर्व देशभर ह्या आर्यसमाजाचे कार्य सुरू व्हावे ही राजर्षींची अंतर्यामीची इच्छा आहे. म्हणून "लोकांची मानसिक सुधारणा व्हावी. ती सुधारणा विद्येच्याद्वाराच शक्य आहे. म्हणून विद्येची सूत्रे मी आर्यसमाजाच्या हाती देऊन टाकली आहेत." असे त्यांनी म्हटले आहे.

सर्वसामान्यांना शहाणे करून, त्यांचा अभ्युदय साधण्याच्या कामी उपयोगात आणण्याच्या साधनांवरील श्रद्धा आणि अंती साधावयाचे ऐक्य या संबंधातील शाहू महाराजांच्या भावना-विचारांमधील अद्वैत नितळ स्वरूपाचे आहे.

* * *

अनुक्रमणिका

नऊ

ऋषींचे मिशन

***

सज्जनहो! आपण जरा भारतवर्षाच्या गतेतिहासावर दृष्टिपात करू. हजार वर्षापूर्वीच्या व आताच्या भारत वर्षात जमीनअस्मानाचे अंतर पडले आहे. आज पराक्रम, विद्वता, धर्मशीलता, उदारतावादी सद्‌गुण लुप्त झाले आहेत. हजारो कुसंस्कार, चालीरिती यांनी भारतवर्ष ग्रासून गेलेला पाहून काही आश्चर्यही वाटत नाहीसे झाले आहे. बालविवाह, बहुविवाह, मद्यपान, स्त्रियांना शिक्षणास मज्जाव, वर्णाश्रमधर्माची अव्यवस्था वगैरे अनेक सामाजिक घातकी रूढींनी समाज निर्जीव करून टाकला आहे.

उदाहरणार्थ, वर्णव्यवस्था घ्या. संपूर्ण भारत विशेषतः महाराष्ट्रादी दक्षिण प्रांतांत ब्राह्मणेतर जातीची अवस्था अत्यंत शोचनीय आहे. ह्या जातींना पुढे सरसावण्यास व प्रगती करून घेण्यास संधीच दिली जात नाही. आज विसाव्या शतकात अस्पृश्य गणले जाणारेदेखील प्राणी आहेत. त्यांचा अपराध एवढाच आहे की, त्यांनी एखाद्या विशिष्ट जातीमध्ये जन्म घेतला नाही. आज भारतवर्षात ऐक्य, प्रेम व सहकार्य कोठेही पाहावयास मिळत नाही. याचे कारण आमची स्वतःचीच मूर्खता होय. भारतवर्षामध्येच अशी मनुष्ये वर्तमान आहेत की, ज्यांना आपल्या बंधूंची छायाही, आपल्यावर पडणे दुःसह होते. स्वतःचे स्वतःलाच उच्च समजणारे लोक मिथ्या जातिभिमानाच्या निशेत अगदी निमग्न होऊन राहिले आहेत व नीच म्हणविल्या जाणाऱ्या जातीवर मन मानेल तसे अत्याचर करून राहिले आहेत.

मनुष्याला त्याच्या योग्यतेनुसार उच्चनीच वर्ण देणे हा वैदिक आदर्श होता. मुनी लोकांनी,

‘धर्मचर्यया जधन्यो वर्णः पूर्व पूर्व वर्णमापद्यते जाति परिवृतौ ।
अधर्मचर्यया पूर्वी वर्ण : जधन्य वर्णमापद्यते जाति परिवृतौ ।’

असा उपदेश केला. त्याठिकाणी पौराणिक लोकांनी ‘ब्राह्मण न जाते: ब्राह्मण:’ अशी व्युत्पत्ती करून ब्राह्मणादी जन्मवाचक अर्थ करण्यास प्रारंभ केला. मनास येईल त्याप्रमाणे ग्रंथरचना सुरू केली. ‘स्त्री शूद्रो नाधीयताम्’ हा जणु काय वेदमंत्रच कंठस्थ करविला. याचा परिणाम असा झाला की, स्त्री व शूद्र यांना ज्ञानमार्ग बंद झाला. बराच काळ अशी स्थिती राहिल्यामुळे शूद्र स्वतःच अस्पृश्य समजून राहिले. मग काय? ब्राह्मणांचे साधले व त्यांनी ब्राह्मणत्वाचा मक्ता आपणाकडे घेतला.

ब्राह्मणाचे जीवन पारमार्थिक जीवन आहे. जेव्हापासून योग्यतेप्रमाणे उच्चनीचत्वाची पारख नष्ट झाली तेव्हापासून नामधारी गुरूवर्गाची खूप चंगळ उठली. जन्मापासून मृत्यूपर्यन्त तर ते लुटले, तर्पणादी लुटलेच परंतु त्यानंतरही श्राद्ध वगैरेंची अवडंबरे माजविली.

सज्जनवृद्ध! जेव्हा देशनौकेचे कर्णधार ब्राह्मण स्वार्थी बनले होते, तेव्हा ‘अष्ट वर्षा भवेतगौरी’ हा अवैदिक पाठ उच्च स्वराने म्हटला जात होता व राष्ट्रीयत्व जवळजवळ नष्ट झाले होते. आणीबाणीच्या समयी ह्याच काठेवाड प्रांतात, जेथे आपली ही परिषद भरली आहे त्या भावनगरसमीप, भौरवीगावी आपल्या स्वदेशाच्याच जागृतीसाठी नव्हे तर अखिल भूमंडळ जागृत करण्यासाठी महर्षी दयानंदांचा जन्म झाला.

त्यांनी तपश्चर्या केली. वेदाध्ययन केले, भारत खंडाच्या अवनत स्थितीचे परीक्षण केले आणि निःस्वार्थ बनून मतमतांतरांचा जो अग्नी भारतात प्रज्ज्वलित होता त्यामध्ये उडी ठोकली. पदभ्रष्ट ऋषी संतानास पुनः सन्मार्गावर आणून सोडले. चोहोकडे जागृती केली. लोकांनी त्यांना गालीप्रदान केले. त्यांच्यावर दगडधोंड्यांची वृष्टी केली व शक्य तितका त्यांचा तिरस्कार केला. परंतु या सर्व मानापमानाची मुळीच पर्वा न करता त्या महर्षी, तपस्वी, त्यागी दयानंदांनी वैदिक धर्माचा डंका वाजविलाच. नामधारी ब्राह्मणांच्या पोटशूळाला आरंभ झाला. त्यांनी दयानंद ऋषींची गती कुंठित करण्याचा होता नव्हता तो प्रयत्न केला, पण ईश्वरीय चाल कोणत्या शक्तीस कुंठित करणे शक्य होते? त्यांच्या केवळ दहा वर्षांच्या गर्जनेने पंजाब, संयुक्त प्रांत, राजपुताना, बंगाल, बिहारादी खडबडून जागे झाले. लाखो लोक त्यांचे अनुयायी बनले. उत्तर भारतवर्षातच काय; आज संपूर्ण भारत खंडात अवैदिकीय पाठाऐवजी 'ब्रह्मचर्येण कन्या वा युवानं विंदते पतिम 'शूद्रे' ब्राह्मणतामति ब्राह्मणो यति शूद्रताम्' हा वैदिक पाठ सुरू झाला.

आर्यसमाजाचे कार्य जगास विदितच आहे. स्पर्शास्पर्शतेचे काल्पनिक बंड मोडून समाजाने युद्धातही फार मदत दिली आहे. परदेशगमनाने मनुष्य पतित समजले जात असत तेच आता वांछनीय समजले जात आहेत. आर्यधर्म यच्चयावत मानव समाजाकरिता आहे. आनंदाची गोष्ट ही की, पुष्कळ युरोपियन स्त्री-पुरुषांनी या आर्यधर्माचा स्वीकार केला आहे; करीत आहेत. खरे म्हणाल तर, लॉर्ड किचनेर सर हेग, लॉर्ड फ्रेंच प्रभृतींची गणना पहिल्यापासूनच आर्यांमध्ये होऊ शकते. कारण की, या योद्ध्यांनी क्षत्रियोचित धर्माचे परिपालन केले आहे. माझ्या मते, हाच धर्म शासित-शास्त्यात प्रेमरज्जूने ऐक्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. मला पूर्ण भरवसा आहे की, आर्यधर्म विश्वव्यापी धर्म बनेल. याच धर्माचे अनुयायी प्रतापसिंह व सज्जनसिंह वगैरे नरेश आहेत; होते. ही अभिमानास्पद गोष्ट होय. आम्हालाही त्यांचेच अनुकरण केले पाहिजे. ही पण संतोषाची गोष्ट होय की, अद्यापिही जरी स्वार्थी लोक इतस्ततः हातपाय आपटतात, तथापि खरे ब्राह्मण व सुशिक्षित जनता ही सर्व आम्हाला अनुकूल आहे. परंतु दक्षिण प्रांतातही अद्याप पुष्कळसे कर्तव्य बाकी आहे. आर्यांचे हे कर्तव्य आहे की, या देशात भ्रातृभाव जागृत करावा.

जरी 'सत्यशोधक समाजा' दी समाजांनी काहीशी सुधारणा केली आहे; तथापि या संस्थांनी विशेष अधिक काही होऊ शकणार नाही. कारण त्या, 'शठं प्रति शाठ्यं' या तत्त्वावर चालत आहेत. परंतु देशाला जागृत करणारी रामबाण मात्रा वैदिक धर्मच आहे. कारण हिंदुमात्राच्या अंतःकरणात वेदाभिमान बसत आहे व आर्यसमाज वेदानुकूल राहण्यातच आपला धर्म समजत आहे. आर्यसमाजाचा धर्म जगावर उपकार करण्याचा आहे.

सज्जनहो! वैदिक धर्माचे महत्त्व अन्य मतांपेक्षा अधिक आहे हे समजूनच मी या धर्माचा स्वीकार केला आहे.

राजाराम कॉलेज, हायस्कूल, गुरुकुल, अनाथालय, सरदार बोर्डिंग वगैरे सर्व संस्था मी आर्य प्रसारक सभा, संयुक्त प्रांत हिच्या आधीन एवढ्याच उद्देशाने केल्या आहेत की, लोकांची मानसिक सुधारणा व्हावी. ही सुधारणा विद्येच्या द्वाराच शक्य आहे. म्हणून विद्येची सूत्रे मी आर्यसमाजाच्या हाती देऊन टाकली आहेत. मला जे शक्य झाले ते मी केले आहे. माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे की, माझ्या जोतिबा, पंढरपूर वगैरे क्षेत्रामध्येदेखील आपण गुरुकुले, हायस्कुले, समाज स्थापन करावेत. माझे कर्तव्य होते ते मी करून टाकले आहे. आता पुढील कर्तव्य सर्वस्वी तुमच्या हाती आहे. जर इतक्यावरही वैदिक धर्माचा प्रसार झाला नाही तर ह्यात आर्य प्रसारक व आपण हेच दोषी व्हाल. माझी इच्छा आहे की, थोडेसे सच्चे कर्मवीर माझ्याकडेही आपला समय लावतील.

अनुक्रमणिका

आर्यबंधूंनो! आपल्यामधून अद्याप कर्महीनता नाहीशी झाली नाही. ऋषींची प्रेरणा सुशिक्षित समुदायांमध्ये दृग्गोचर होत आहे. देशातील सर्व समाज, सभा, सोसायट्या वैदिक सिद्धान्तानुसार कर्तव्य बजावीत आहेत. 'यथेमां वाचं कल्याणि' ह्या वेदाज्ञेनुसार आर्यसमाजाने गुरुकुले, अनाथालये, कॉलेजे वगैरे संस्था काढून भेदभावरहित सर्व जातींच्यामध्ये वेदवाणीचा प्रचार केला आहे. तरीही आम्ही अद्यापि ऋषींचे शतांशाने कर्मवीर बनलो नाही. अकर्मण्यतेचा हा समय नव्हे, कर्मण्यता पाहिजे आहे. उदाहरणार्थ, पटेल बिल घ्या. त्यानुसार वागण्यास आपण प्रारंभ केला पाहिजे. वेदप्रतिपादित गुणकर्मानुसार आपण कृतीने वर्णव्यवस्था पाळीत आहो, हे सिद्ध करण्याची आता वेळ आली आहे.

मी आपला बराच वेळ घेतला. परंतु आपण लक्षपूर्वक उत्साह दाखवून माझे भाषण ऐकून घेतलेत, त्याबद्दल मी आपले पुनः अंतःकरणपूर्वक आभार मानून, शेवटी सर्वांस विनयपूर्वक सांगतो की, ऋषी दयानंदांच्या कार्याची आपल्या हृदयावर छाप पडली असेल तर याद राखा की, ह्या काठेवाड भूमीमध्ये बाळ मूलशंकराने कठीण प्रतिज्ञा करून गृहत्याग केला होता, तर आपणही या तीर्थस्थानाहून परत जाताना कठीण प्रतिज्ञा करावी की, वैदिक सिद्धान्त व विचार आम्ही कृतीत आणण्यासाठी यत्किंचितही कसूर करणार नाही. बंधूहो! अंती सत्याचा जय आहे हे लक्षात बाळगून 'ऋषींचे मिशन' प्रसृत करण्याचा प्रयत्न करा व कामास लागा. परमात्मा तुम्हास बळ देईल; कारण की, कर्मवीरांचा सहाय्यकर्ता तोच ईश्वर आहे.

***

अनुक्रमणिका

दहा

समाजसुधारणा कोण करू शकेल?

* * *

राजर्षी शाहू महाराजांनी 'समाजसुधारणा कोण करू शकेल?' मध्ये प्रारंभीच मोकळेपणाने आपल्यातील सुरूवातीचा संकुचित मनोवृत्तीचा दोष कबूल केला आहे, राजर्षी सांगतात: "काही वर्षांपूर्वी माझ्या कोत्या समजुतीने मी आपणांकडे बंधूप्रेमाने पाहात नव्हतो. आता माझी चूक मला समजून आली आहे. अस्पृश्य हा शब्द कोणाही माणसाला लावणे हे फार निंद्य आहे. तुम्ही अस्पृश्य नाही. तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुद्धिमान, जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी, जास्त स्वार्थत्यागी असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटकावयव आहात. आपण निदान बरोबरीची भावंडे आहोत. आपले हक्क समान आहेत. आम्ही सर्व हिंदी आहोत, बंधू आहोत. हिंदी प्रजानन कोणत्याही धर्माचे असोत, ते सर्व हिंदी आहेत. व्यक्तीच्या दृष्टीने धर्माची बाब महत्त्वाची असेल; पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये." भारतातील राष्ट्रीय ऐक्य वाढीला लावण्यासाठी राजर्षींनी प्रकट केलेली ही मानवतावादी राष्ट्रीय मनोवृत्ती-हा राष्ट्रीय विचार-सार्वकालिक आहे.

धर्माविषयी विवेचन करताना राजर्षी समानतेच्या तत्त्वाचा उद्‌घोष करतात. सांगतात: "देशाची म्हणजे देशबंधूंची सेवा करणे, 'जनी जनार्दन' शोधणे व पाहाणे हाच खरा धर्म आहे. याप्रमाणे विचार केल्यास धर्मभेदाच्या किंवा जातीभेदाच्या सबबीवर एकमेकांचा मत्सर करणे अगदी चुकीचे आहे म्हणून आमच्या सर्व देशबंधूंना मोठ्या प्रेमाने, आपल्या बरोबरीचे हक्क देऊन वागविले पाहिजे. सर्व प्रजाजनांस सारखे हक्क

* * *

नागपूर : ३० मे, १९२०
अ. भा. बहिष्कृत समाज परिषदेच्या अध्यक्षपदावरून, शाहू महाराजांनी दिलेले भाषण

आहेत. सर्वांना सारखे कायदे लागू केले पाहिजेत." त्या दृष्टीने अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आपण कोणकोणते प्रयत्न केले आहेत व केले पाहिजेत याचे त्यांनी मनोज्ञ विवेचन केले आहे. त्यांच्या मते सर्वात महत्त्वपूर्ण उपाय म्हणजे, "हा जातिभेद नाहीसा होण्यास भिन्न भिन्न जातींचे शरीरसंबंध विस्तृत प्रमाणावर होणे फार जरूर आहे." राजर्षींचे हे द्रष्टे विचार लोकप्रियता मिळविण्यासाठी नसून सच्च्या तळमळीचे द्योतक आहेत. आजही ते मार्गदर्शक आहेत.

'समाजसुधारणा कोण करू शकेल?' यासंबंधीचे, शाहू महाराजांचे विवेचन अनेकांची मख्खी जाणून, नेमके वर्मावर बोट ठेवणारे आहेत.

* * *

अनुक्रमणिका

दहा

समाजसुधारणा कोण करू शकेल?

* * *

माझी योग्यता नसता व माझ्या अनुमतीची जरुरी न ठेवता मोठ्या बंधूप्रेमाने व सत्तेने आपण मला आपला समजून, आजच्या कॉन्फरन्सचा अध्यक्ष नेमिले, याजबद्दल मला मोठा अभिमान वाटतो.

काही वर्षांपूर्वी माझ्या कोत्या समजुतीने मी आपणाकडे बंधूप्रेमाने पाहात नव्हतो. आता माझी चूक मला समजून आली आहे. यापुढे तुमच्यावर माझे बंधूसारखे प्रेम राहील अशी मला खात्री वाटते. हे उघडपणे सांगण्यास मला मोठा अभिमान वाटतो. वास्तविक पाहाता आजच्यासारख्या बहुमानास मी विद्येने योग्य नसता, आपण मला अध्यक्षाचा मान दिलात, याबद्दल मी आपला फार आभारी आहे.

आपले कार्य साधण्यासाठी दुसऱ्यास पाहिजे तितका मोठेपणा द्यावयाचा, त्याची मनधरणी करावयाची, मी तुमच्या उद्धारासाठी प्रयत्न करतो असे खोटेच सांगावयाचे, वगैरे प्रकारांनी लोकांस फसवून त्यांच्यावर आपली छाप बसवावयाची असे काही स्वार्थसाधू लोक आहेत. अशा लोकांसारखे वागून आपणाला तोंडघशी पाडून, माझा स्वार्थ साधण्याची दुर्बुद्धी ईश्वराने मला देऊ नये, अशी माझी त्याजवळ प्रार्थना आहे.

आज आपण येथे सर्व हिंदुस्थानातील अस्पृश्य वर्गांपैकी पुढारी मंडळी जमलेले आहात. अस्पृश्य हा शब्द कोणत्याही माणसाला लावणे फार निंद्य आहे. या शब्दाचा तुमच्या संबंधाने सर्व उपयोग करितात म्हणून मी त्याचा उपयोग केला आहे. तुम्ही अस्पृश्य नाही. तुम्हांस अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुद्धिमान, जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी, जास्त स्वार्थत्यागी असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटकावयव आहात. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. आपण निदान बरोबरची भावंडे आहोत, आपले हक्क समसमान तरी खास आहेतच; अशी भावना धरून आपणास पुढील कामास लागले पाहिजे. या सत्कार्यात जे लपंडाव करतात त्यांची लबाडी ओळखण्याइतकी समज हल्ली जनतेस खास आलेली आहे.

मला आज सर्वांत मागासलेल्या देशबंधूंनी कॉन्फरन्सचा अध्यक्ष होण्यास बोलाविले आहे. वास्तविक पाहाता मी कोणाचा पुढारी नाही व पुढारी होऊही इच्छित नाही. मला पुढारी समजून आपण माझ्यामागे कोणी येऊ लागल्यास, त्यास 'माझ्यामागे येऊ नका' असे नम्रता पूर्वक सांगतो. होईल तितका याबाबतीत प्रतिबंधही करितो. हा प्रतिबंध मी अगदी प्रथम पासूनच म्हणजे घराच्या बाहेर पडण्यापूर्वी माजघरात करितो. कारण तशी खबरदारी न घेतल्यास व त्यांना काही वेळ मागे येऊ दिल्यास त्यास तक्रार करण्यास जागा होईल. ते म्हणतील की, 'आम्ही इतका वेळ आपल्यामागे आलो असता आपण आताच आम्हांस का झिडकारता?' माझी मते व माझे आचरणही माझ्या स्वतः पुरतीच आहेत. माझ्या घरच्या मंडळींनी, आप्तेष्टांनी अगर मित्रांनीसुद्धा विचार न करता माझ्यामागून येऊ नये, अशी माझी इच्छा आहे. त्यांना याबाबतीत स्वयंनिर्णयाचे तत्त्व लावण्याची मी पूर्ण मोकळिक ठेविली आहे. माझी मते ज्यास पसंत असतील त्यांनी स्वतःचे इच्छेप्रमाणे स्वतंत्रपणे माझे अनुकरण करावे. त्यांना माझ्याकडून कोणत्याही प्रकारचे उत्तेजन अगर मदत मिळणार नाही.

आम्ही सर्व हिंदी आहोत, बंधू आहोत. हिंदी प्रजानन कोणत्याही वर्णाचे असोत, कोणत्याही धर्माचे असोत, ते सर्व हिंदी आहेत. व्यक्तीच्या दृष्टीने धर्माची बाब महत्त्वाची असेल पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये. यापुरती धर्मही बाब फारच कमी महत्त्वाची आहे, असे मला वाटते. 'धर्म' शब्दाची थोडक्यात व्याख्या देवाजवळ पोचण्याचा मार्ग अशी करता येईल. लंडन, मुंबई, कलकत्ता वगैरे मोठमोठ्या शहरास सर्व बाजूंनी रस्ते येऊन मिळतात. म्हणजे सर्व ठिकाणच्या लोकांचा उद्देश तो त्या त्या शहरी थोड्या वेळात व कमी श्रमाने पोचण्याचा असतो. त्याचप्रमाणे निरनिराळ्या देशात व परिस्थितीत उत्पन्न झालेल्या धर्माचाही उद्देश तोच आहे. यामुळे भिन्न भिन्न रस्त्यांनी मुख्य शहरास पोचणाऱ्या लोकांना एकमेकांचा द्वेष करण्याचे जसे कारण नसते, तसेच निरनिराळे धर्म पाळून ईश्वराजवळ पोचणाऱ्या लोकांनी तरी परस्परांचा द्वेष का करावा?

निरनिराळे धर्म स्थापन झाले त्यावेळची स्थिती काय असेल ती असो. पण आजच्या स्थितीस तरी अमूक एका धर्माचे आचरण करून, अमूक एक अमूक एका देवळाजवळ पोचलेला आहे असे प्रत्यक्ष दिसत नाही. तोपर्यंत माझा तेवढा धर्म चांगला व इतरांचा वाईट असा पोकळ अभिमान करण्याचा अधिकार कोणासही नाही हे उघड आहे.

'दया धरमका मूल है, नरक मूल अभिमान' यावरून पाहाता देशाची म्हणजे देशबंधूंची सेवा करणे, 'जनी जनार्दन' शोधणे व पहाणे हाच खरा धर्म आहे. याबाबतीत सर्व धर्मांचे ऐक्य आहे. परोपकार हा पुण्यमार्ग आहे व परपीडा हे पाप. असेच सर्व धर्म प्रतिपादन करितात. याप्रमाणे विचार केल्यास धर्मभेदाच्या सबबीवर एकमेकांचा मत्सर करणे अगदी चुकीचे आहे.

राज्य संपादन करण्याच्या महत्त्वाकांक्षेने, पूर्वी या देशात लढाया झाल्या. अकबर, शिवाजी महाराज वगैरे महात्म्यांच्या काळी धर्मद्वेषाने किंवा जातिद्वेषाने कोणी लढाया करीत नसत. अकबर बादशहाच्या पदरी मराठे, रजपूत, इतर हिंदू सरदार व लढवय्ये अनेक लोक होते. विजयनगरच्या राजाच्या पदरी किंवा श्री शिवाजी महाराज यांच्या सैन्यात मुसलमानांची संख्या कमी नव्हती. या सर्वांनी स्वधर्मीयांबरोबर किंवा स्वजातीयांबरोबर लढण्याच्या प्रसंगी देखील आपले इमान कायम राखिले. अशावेळी त्यांचा निमकहलालपणा व बंधूप्रेम चांगल्याप्रकारे दिसून येई.

खरा धर्म सर्व देशात एकच आहे; हे मी आपणास सांगितलेच आहे. त्याचप्रमाणे वागणाऱ्यांवर म्हणजे शुभकर्म करणाऱ्यांवर ईश्वर संतुष्ट असणार व त्यांना काही शिक्षा करणार नाही. पण आम्ही खरा धर्म सोडून म्हणजे 'जनी जनार्दन' न पाहाता बनावट उच्चनीचभाव उत्पन्न करून, त्याप्रमाणे ग्रंथ तयार करून त्यांच्या आधारावर आमच्या बंधूंना पशूपेक्षाही नीच मानण्याचे भयंकर पातक करीत असता, आम्ही भागवताचे हजारो सप्ताह बसविले, मोठमोठी अनुष्ठाने सुरू केली, नाना प्रकारची स्तुतिस्तोत्रे गायिली, कीर्तने-पुराणे यांची झोड उडविली किंवा भजने करून कानठळ्या बसेपर्यंत टाळ कुटले, क्षेत्राच्या अनवाणी यात्रा केल्या, देवाच्या मूर्तीस लोटांगणे घातली, तरी ईश्वर अशाने संतुष्ट होईल काय? तो संतुष्ट होणार नाही हे खास. इतकेच नाही, तर आमच्या पातकाबद्दल तो आम्हाला शिक्षा दिल्याशिवाय राहणार नाही, अशी आमची सद् सद्विवेकबुद्धी आम्हास खास सांगते. आमच्यावरची ईश्वराची अवकृपा दूर झाली पाहिजे. आम्ही आमच्या सर्व देशबंधूंना मोठ्या प्रेमाने, आपल्या बरोबरीचे हक्क देऊन वागविले पाहिजे.

अनुक्रमणिका

इंग्लिश राष्ट्राचे आमच्या देशावर व विशेषेकरून आमच्या अस्पृश्य मानलेल्या बंधूवर फार उपकार आहेत. त्या राष्ट्राने मनुधर्म शास्त्रासारखे एका जातीचे प्राबल्य स्थापन करणारे कायदे काढून टाकून, सर्व हिंदी प्रजेमध्ये समसमान हक्क निर्माण केले. ब्राह्मणास फाशी देऊ नये, त्यास लग्नकार्यात, अध्ययनात, वृत्तीत, दानधर्म, पूजाअर्चा वगैरे हरएक बाबतीत परमेश्वराच्या योग्यतेचे मानून दुसऱ्या सर्व जातीस तुच्छ, कस्पटासमान व ब्राह्मणाची सेवा करण्याकरिता निर्माण केलेले आहेत, अशा तऱ्हेच्या कायद्यात, रूढीत, आचारात व धर्मात प्रतिबंध घालून ठेवणे म्हणजे सद्सद्विवेकबुद्धीला, सर्व उच्च मनोभावनांना तिलांजली दिल्यासारखे आहे. हल्ली समानतेच्या दृष्टीने पाहाता, अशा रीतीची योजना कायदेपंडितांत करण्यास कोणासही लाज वाटेल. डोळे काढावे, डागावे, हे वेद वाचू नयेत, असे जे अमानुष कायदे एकेकाळी मनुने रूढ केले होते, ते हल्ली इंग्रज सरकारने नाहीसे केले आहेत. परंतु हल्ली असलेल्या हिंदू कायद्यातही पुष्कळ दुरुस्ती झाली पाहिजे. राष्ट्रीयत्वाची व समाजाची कल्पना वाढलेली आहे. मिश्रविवाह, परदेशगमन, जातिभेद, परधर्माविषयी सहिष्णुता वगैरे सर्व कल्पना जोराने पुढे येऊ लागल्या आहेत. त्या कल्पनांना पोषक असे कायदे पाहिजे आहेत. तसे नसल्यास समाजाचे गाडे अडून राहणार आहे.

सर्व प्रजेला सारखे हक्क आहेत, सर्वांना सारखे कायदे लागू केले पाहिजेत. त्यात जातिभेदावर कमीअधिक शिक्षा असा अन्याय होता कामा नये. हे समानतेचे तत्त्व इंग्रजांनी राज्यकारभारात प्रथम लागू केले. त्यांच्या मिशनरी लोकांनी शाळा काढून, अस्पृश्यांच्या मुलांस फार ममतेने वागविण्याचे उदाहरण सर्वांच्या अगोदर घालून दिले. अशा प्रकारे न्यायी युरोप खंडातील हॉलंड, बेल्जम वगैरे देश आपल्या ताब्यातील परदेशच्या लोकांना शिक्षण देऊन उन्नती करीत नाहीत, पण इंग्रज लोकांचे, या कामी फार लक्ष असल्यामुळे ते श्रेष्ठ पदवीचे आहेत. इतकेच नव्हे तर आमचे बरेच लोक 'स्वराज्य नको' म्हणत असताना इंग्रज लोक आपणहून ते आम्हास देत आहेत, हा त्यांचा केवढा थोरपणा आहे? सर्वांस समदृष्टीने पाहाणारे जे इंग्लिश साम्राज्य त्यांच्याशी आम्ही फार राजनिष्ठ राहिले पाहिजे; हे सांगण्यास नकोच. आमच्यावर त्यांचे फार फार उपकार आहेत.

गेल्या महायुद्धात मुसलमान, मराठे, जैन, महार, लिंगायत वगैरे सर्व जातींच्या बंधूंनी सरकारास मोठ्या हौसेने व उत्सुकतेने मदत केली; याचे तरी कारण काय? आपण सर्व हिंदी आहोत. हिंदी राष्ट्राचे कल्याण इंग्रजी राजसत्तेवर अवलंबून आहे, आमची भिन्न भिन्न धर्मतत्त्वे आमच्या बंधूप्रेमाच्या आड येऊ देता कामा नये, तर आम्ही आमच्या उपकारकर्त्यांची अडचण ओळखून आम्हास देता येईल तितकी मदत देणे हे आमचे कर्तव्य आहे, वगैरे उच्च भावनांनी आमचे सर्व लोक प्रेरित झाले; हेच ते कारण होय. याप्रमाणे आमच्या कृतज्ञतेची खात्री आम्ही. आमच्या ब्रिटिश बधूस पटवून दिली आहे. ईश्वरी इच्छेने हिदुस्थानच्या कल्याणाकरिताच आम्ही 'ब्रिटिश एम्पायर'चे (British Empire) अवयव झालो आहोत. आमचे हितसंबंध त्यांच्याशी एकजीव झाले आहेत.

इकडच्यापेक्षा मद्रासकडच्या आपल्या अस्पृश्य बंधूस सनातन धर्मवाल्याकडून फार त्रास होतो. तिकडचे ब्राह्मण सर्वच ब्राह्मणेतरांशी फारच अन्यायाने वागतात, इकडे महाराष्ट्रातही तशीच स्थिती आहे. मद्रास येथे ब्राह्मणेतर लोकांचा निराळा पक्ष स्थापन करून, त्यांच्यामध्ये आपल्या हक्कांची जाणीव उत्पन्न करणारे थोर मनाचे प. वा. डॉ. नायर यांना धन्यवाद देणे फार जरूर आहे. पंचमांचा उद्धार करण्याविषयी त्यांचा उद्योग मोठा होता. आपल्या घरात ते पंचमास खाजगी नोकर म्हणून ठेवीत.

या देशाची उन्नती लवकर किंवा उशिरा होणे, हे येथील जातिभेद ज्या प्रमाणात नाहीसा होईल; त्यावर अवलंबून आहे. हा जातिभेद नाहीसा होण्यास भिन्न भिन्न जातीचे शरीरसंबंध विस्तृत प्रमाणावर होणे फार जरुर आहे. रोटी व्यवहार जास्त प्रमाणावर आता होणार, त्याविरुद्ध कोणी कितीही धडपड केली तरी तिचा विशेष उपयोग होणार नाही. पण बेटीव्यवहाराची तशी गोष्ट नाही. असे विवाह होण्याकडे प्रवृत्ती होण्यास अगोदर कायदेशीर अडचणी दूर झाल्या पाहिजेत. म्हणजे असले विवाह कायदेशीर ठरले पाहिजेत. त्यापासूनच्या संततीस औरस संततीचे सर्व हक्क मिळाले पाहिजेत. नामदार मिस्टर पटेल यांनी वरिष्ठ कायदे कौन्सिलात प्रश्न आणला होता. तशा कायद्याची फार जरूरी आहे; पण असे विवाह होऊ लागल्यास ब्राह्मणांचे जन्मसिद्ध महत्त्वही कमी होणार. ब्राह्मणांवर हे एक मोठे संकट ओढवणार असल्याने ब्राह्मणी पत्रांनी त्या बिलाला मोठा कसून विरोध केला. ब्राह्मणी हिताकडे लक्ष दिले म्हणजे, हे त्यांचे करणे बरे दिसेल; पण देशहिताकडे यांनी अगदी दुर्लक्ष केले असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागते. भिन्न जातींचे स्त्रीपुरुष विवाहबंधनाशिवाय एकत्र राहून त्यांनी अनीतीचे वर्तन उघड उघड केल्यास या धर्माभिमान्यांस खपते पण तसा अनीतीचा संबंध ज्यास नको त्यांना, कायदेशीर विवाह करण्याच्या मार्गात मात्र यांचा अडथळा; असे हे सार्वजनिक नीतिमत्तेचे शत्रू आहेत.

याच प्रसंगी माझे मित्र मिस्टर अरुंडेल यांच्याविषयी दोन शब्द सांगितल्याशिवाय माझ्याने राहावत नाही. यांनी एका ब्राह्मण युवतीशी विवाह केला म्हणून, आमच्या सनातन धर्मवादी ब्राह्मण बंधूंची त्यांच्यावर फार खप्पा मर्जी झाली आहे. ते त्यास नानाप्रकारे दूषणही देत आहेत, वास्तविक पाहाता इंग्लंड व हिंदुस्थान यांचा ईश्वरी इच्छेने जुळत आलेला संबंध जास्त दृढ होण्यास अशा प्रकारचे विवाह फार आवश्यक आहेत. काम असेपर्यंत मात्र तुम्ही-आम्ही एक, अशा गप्पा मारणे व ते संपल्यावर ‘तुम्ही ते तुम्ही व आम्ही ते आम्ही’ असा आपमतलबीपणा मला बिलकूल पसंत नाही. लग्नकार्यात निरर्थक पैसा फार खर्च होतो, शिक्षणासारख्या उपयुक्त कामाकडे तो लागला पाहिजे, वगैरे गप्पा ते मारतील, पण रजिस्टर करून थोड्या खर्चात विवाह करण्याची मुभा मात्र त्यांना द्यावीशी वाटत नाही. रजिस्टर न झालेली, इकडच्या हिंदूपद्धतीने लग्ने करून गेलेल्या पुरुषाने विलायतेत किंवा फ्रान्समध्ये जाऊन उघडपणे तेथील पद्धतीप्रमाणे विवाह करावा; असे करण्याने कोणताही गुन्हा होत नाही, असा कायदा इंग्लंड वगैरे देशात आहे. अशा रीतीने अनेक तरुण पुरुषांनी विवाह करून तिकडे हिंदूपद्धतीने परिणिलेल्या आपल्या निरपराध बायकांस पती जिवंत असताच वैधव्याच्या गर्तेत लोटिले आहे. पण याची खंत आमच्या सनातन धर्मवाद्यांस वाटत नाही. इकडे विवाह रजिस्टर करण्याची सवड असती तर अशा तरुणांवर तिकडे दुसऱ्या बायका करण्यास कायद्याचा प्रतिबंध झाला असता. पण मग भिन्न जातींतील विवाहबंदी त्यांना उजळ माथ्याने करता आली नसती. म्हणून पटेल बिलाविरूद्ध यांची सगळी हाकाटी! भिन्न जातीच्या मुलीशी विवाह करून जी संतती होईल, तिला धर्माभिमानी पूर्वजांच्या व भाऊबंदांच्या मिळकतीचा वारसा देणे बरोबर नाही, अशी एक उपपत्ती ‘प्रगति’ कारांनी पुढे केली होती, पण ही तक्रार अगदी पोकळ व मतलबी आहे. आजच्या कायद्याप्रमाणे कोणी ख्रिश्चन झाल्यास किंवा मी हिंदू नाही अशी प्रतिज्ञा करून विवाह केल्यास त्याच्या संततीस जर वारसा येतो आणि ती गोष्ट ‘प्रगति’ कार व त्यांचे सनातनवादी उघड्या डोळ्यांनी पाहात आहेत, त्याविरूद्ध तक्रार करण्याची हिंमत त्याच्या अंगी नाही, तर त्यांनी भिन्न जातीच्या मुलीशी, हिंदू राहून लग्न करणाऱ्याविरुद्ध मात्र हाकाटी करणे, हे केवढे आश्चर्य! आपल्यासारख्या पतितांच्या उद्धारार्थ पटेल बिलासारख्या कायद्याची फार जरूरी आहे. म्हणून त्या दिशेने जे प्रयत्न करीत असतील त्यांचे आपण आभारी असले पाहिजे.

अनुक्रमणिका

दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दिसते, पण आपल्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाही, ही म्हण बऱ्याच वेळा अनुभवास येते. इंग्रज लोक हिंदुस्थानास लुटीत आहेत असे खोटेच भासवून इंग्लिश सरकारच्याविरुद्ध अराजकत्व उत्पन्न करण्याचे प्रयत्न उघड किंवा गुप्तरीतीने आज दहावीस वर्षे करणारे ब्राह्मण लोक आपल्या खोट्या ग्रंथांतील लबाड्या उघडकीस आणणाऱ्या संशोधकांचे जलसे बंद करावेत म्हणून सरकारकडे तारा करतात याची त्यांना लाज कशी वाटत नाही?

'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' असे श्री तुकोबाराय म्हणतात, हे म्हणणे मला परमवंद्य आहे; पण फसव्या लोकांचा मला तिटकारा आहे. माझ्या मनाप्रमाणे समाजसेवेचे पवित्र काम करीत असता, त्यात विघ्ने आणणारे बरेच लोक; आपण सर्वांचे पुढारी आहो, आपणास तुमच्याविषयी फार सहानुभूती आहे; असा बहाणा करून समाजास खाली ओढण्याची कुटिल नीती चालू ठेवित असतात. माझ्या नासिक येथील भाषणावर बरीच प्रतिकूल टीका प्रसिद्ध झाली आहे. ह्या टीकेचे मला मोठे कौतुक वाटते. कोल्हापूर संबंधात स्वतःला ज्यास काहीच माहिती नाही, आपली सर्व माहिती कर्णोपकर्णी आहे, अशी ज्यांनी सुरुवातीसच कबुली दिली आहे त्यांनी कोल्हापुरात, एखाद्या खटल्यासंबंधाने काय झाले आहे, काय चालले आहे, काय होणार आहे यासंबंधी माहिती काढण्याची तसदी न घेता तोंडास येईल ते वायफळ बोलावे, पुराव्याशिवाय वाटेल ते तर्क लढवावेत, ही गोष्ट किती शरमेची आहे बरे! या सर्वांचा अंतःस्थ हेतू म्हटला म्हणजे रूढ समाजरीतीस अगर प्रस्थापित विशिष्ट वर्गाच्या हक्कांस कोणी हात लावण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्यास भेडसावून टाकावे व विशिष्ट वर्गाचे वर्चस्व कायम राखावे एवढाच आहे. समाजास तुडविणारी अशी बेजबाबदार माणसे लोकांचे पुढारी म्हणून मिरवितात; अशा लोकांची मला तर कीवच येते.

या असल्या चालीच्या मंडळींच्या हातून समाजसुधारणा होणे शक्य नाही. कावळ्याला जसे क्षतच दिसावयाचे; तसे यांना जेथे तेथे वाईटच दिसते. उदाहरणार्थ, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना मी माझ्या संस्थानात वकिलीच्या सनदा दिल्या. त्यावरील टीका पहा. वैद्यकी, वकिली वगैरे धंदे आपलीच चरण्याची कुरणे आहेत व तशी ती राखली पाहिजेत, अशी काही विशिष्ट जातीची समजूत होऊन बसली आहे. उत्तम माणसांनीच सर्व कामे करावीत हे म्हणणे तात्त्विक दृष्टीने कोणासही कबूल करावे लागेल. मला राज्यकारभारात सर्व तत्त्वे परिस्थितीस अनुसरून थोडीबहुत बदलणे भाग पडते. इंग्रज सरकारने आरंभी शिक्षणाबाबतीत कितीतरी कमी दर्जाच्या हिंदी लोकांस कलेक्टर, जज्ज वगैरेसारख्या मोठाल्या जागा देऊन राज्यकारभाराचे काम शिकविले, त्याचप्रमाणे आरंभी वकिलीच्या सनदाही परीक्षेशिवाय, साधारण शिक्षणाच्या माणसास देण्यात येत असत. हल्लीही इंग्रज सरकारच्या राज्यात, परीक्षा पास झालेले लोक पुष्कळ मिळत असताही मुखत्यार वकिलीच्या सनदा परीक्षेशिवाय देण्यात येत आहेत. ज्या सनदा मी महार, मांग, चांभार, इत्यादी लोकांना दिल्या, त्याच जर ब्राह्मण, कायस्थ, सारस्वत अशा लोकांना दिल्या असत्या तर त्याबद्दल काही गवगवा झाला नसता. तशा दिल्या त्यावेळी झालाही नाही. पण आता तितक्या योग्यतेच्या मराठ्यास व अस्पृश्य माणसास दिल्यावर गवगवा केला जातो ही त्यांच्या उदार अंतःकरणाची साक्षच आहे! मॅट्रिक पास झालेले अगर इंग्रजी चांगले शिकलेले महार, मांग यांस वरिष्ठ दर्जाच्या धंद्यात आणताच ब्राह्मणी समाज खवळून गेला. तेच महार-मांग जर ख्रिश्चन झाले असते तर माझे कृत्य टीकेस प्राप्त झाले नसते. ज्या महार-मांगास मी वकिलीच्या सनदा दिल्या, त्यांच्यापेक्षा विद्येने व अकलेने फार कमी अशा, पुष्कळ वरिष्ठ जातीच्या लोकांस कित्येक देशी संस्थानांतून वकिलीच्या सनदा देण्यात येतात; त्याबद्दल मात्र समाजास काही कमीपणा वाटत नाही. सनदा दिल्यामुळे कोणाही व्यक्तीस वकिलपत्र अमक्यास दिलेच पाहिजे असे भाग पडत नाही. वाटेल तो वकिल वाटेल त्यांनी करावा, अशी मुभा असते. अशा वकिलीच्या सनदा देण्यात माझा हेतू एवढाच आहे की, जे धंदे अस्पृश्य वर्गास रूढीने, कायद्याने अगर

दडपशाहीने बंद झालेले आहेत, ते त्यास मोकळे करून द्यावेत. त्यांची स्थिती सुधारून, त्यांच्यात आपण इतर माणसांच्या बरोबरीचे आहोत असा आत्मविश्वास उत्पन्न करावा.

मी स्पोर्टसमन आहे. घोड्यासंबंधी माझा अनुभव आहे की, त्यास पाणी दाखविले तर तो पितो. दाखविले नाही तर तो पीत नाही. तसेच वकिली करण्याची संधी या लोकांस मिळाल्यास ते ती लवकरच उचलतील. तशी संधी न मिळाल्यास तसे काम करावे असे त्यास वाटणार नाही. मातंग, टंक, पराशर, वसिष्ठ, चोखामेळा हे जरी हलक्या मानलेल्या जातींमध्ये उत्पन्न झाले तरी ते आपल्या योग्यतेने पुढे आहेत. यावरून पाहता या जातीत योग्यता कमी असते असे मुळीच म्हणता येणार नाही. इंग्लंडमध्येदेखील थोड्याच वर्षांपूर्वी कायद्याच्या शिक्षणावर विशेष जोर न देता 'इन्स ऑफ कोर्ट' मध्ये (Inn's of court) जेवणाच्या संस्थेवर बॅरिस्टर होता येत असे. हिंदुस्थानातील मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास न झालेले लोक देखील याप्रकारे बॅरिस्टर होऊन येत. अशा लोकांना कायद्याची किंवा दुसऱ्या शिक्षणाची विशेषशी जरूरी नसे. पण हे 'टेबल बॅरिस्टर' त्या कोर्टात काम चालविण्याच्या योग्यतेचे समजले जात. अशा लोकांमधून सुद्धा नामांकित कायदेपंडित निपजले आहेत.

आता महार, मांग वगैरे हलक्या मानलेल्या जातींना मी वकिलीच्या सनदा देतो या योगाने उच्चवर्गीय लोकांचा अपमान होतो असे काही बड्या लोकांस वाटते. पण ही त्यांची चूक आहे. विद्या घेऊन, दोन तपे थांबून, नंतर समाज बरोबरीचे हक्क देईल किंवा नाही या विचारात बुचकळ्या खात पडण्यापेक्षा त्यास एकदम दास्यत्वापासून मुक्त करून आजपर्यंत जगातील इतर कोणत्याही ठिकाणी दृष्टोत्पतीस न येणाऱ्या समाजाच्या जुलूमाचा आणि निर्दयपणाचा अंत करावा. या योगानच खरे राष्ट्रकार्य होईल अशी माझी दृढ समजूत आहे. त्या मार्गानेच आपला कार्यभाग उरकला जाणार आहे. काळाकडे बोट दाखवून काही न करणाऱ्या समाजधुरंधरांनी अन्य मार्ग स्वीकारल्यास, त्यांचा त्यासच तो लखलाभ होवो!

जातिभेद नाहीसे झाले पाहिजेत हे हल्ली बऱ्याच लोकांस कबूल झाले आहे. हे खरेच आहे. परंतु प्रश्न एवढाच आहे की, त्या कामाची सुरुवात कोठून व्हावयाची? ज्या ज्या जातीच्या लोकांना हलके मानले जाते, त्यांनी जातिभेद मोडावा असे म्हणणे साहजिकच आहे. परंतु ह्या दिशेने त्यांनी कितीही प्रयत्न केले तरी, त्यांचा तादृश्य उपयोग होणार नाही. याकामी उच्च म्हणविणाऱ्या जातींकडूनच सुरुवात झाली पाहिजे. प्राचीन काळापासून वंशपरंपरागत उपभोगिलेले वर्चस्व त्यांनी सोडून देण्यास तयार झाले पाहिजे. या पवित्र स्वार्थत्यागाचा कित्ता त्यांनी सर्वांस घालून दिला पाहिजे. जपानातील जातिभेदाचा बिमोड होण्यास मोठे कारण उच्च वर्गाच्या 'सामुराई' लोकांनी सुरुवात केली हेच आहे. तसे झाले नसते तर जपानची स्थिती सुधारली नसती. जातिभेद मोडण्याचे प्रयत्न केवळ खालच्या वर्गाकडून सुरू झाल्यास त्याचे परिणाम अनर्थावह होण्याचा संभव आहे, तेच काम उच्च म्हणविणाऱ्या लोकांकडून प्रथम झाल्यास, हे स्वार्थत्यागाचे उदाहरण इतर सर्व जातींना बोधप्रद होईल. जोपर्यंत असे होत नाही तोपर्यंत, हल्लीच्या स्थितीचा उपयोग करून वैमनस्य न वाढविता प्रत्येक जातीने आपली सुधारणा करून घेण्याचे प्रयत्न सुरू ठवले पाहिजेत. खालील जातीत आपली सुधारणा करून आपला दर्जा वाढवून घेण्याचा व वरच्या पायऱ्यावर चढण्याचा प्रयत्न चालूच ठेविला पाहिजे. वरील जातींनीही जरूर तर काही पायऱ्या खाली येऊन, त्यांना हात देऊन; वर घेतले पाहिजे. असे झाले म्हणजे सुरळीतपणे व सलोख्याने, हे जातिभेद मोडण्याचे बिकट काम सिद्धीस जाण्याचा संभव आहे. आम्हासारख्या मराठ्यांनासुद्धा जात मोडून एकी करण्यास भाग पाडले पाहिजे. धर्मबंधनाच्या अडचणी कित्येक लोक पुढे आणतात. परंतु तशी स्थिती नाही. गेल्या युद्धात सुद्धा मेसापोटेमियामध्ये हिंदू मुसलमान खांद्याशी खांदा लावून लढले. या कामी त्यांना धर्माचा अडथळा झाला

नाही. फक्त आपण एकाच राष्ट्राचे भिन्न भिन्न भाग अगर एकाच देशाचे भिन्न भिन्न अवयव आहोत, या भावनेने सर्व लोक प्रेरित झाले होते; त्यामुळेच अखेर इंग्लिश राष्ट्राला यश मिळाले.

हिंदुस्थानचे रक्षण ब्रिटिश सरकारकडून अनेक वेळा झाले तेही याच तत्त्वावर. आपल्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांना ते कधीही विसंबत नाहीत. आपल्या धर्माच्या लोकांस एका बाजूस ठेवून त्यांच्यापासून आमचे संरक्षण करण्यास ब्रिटिश सरकारच कारण झाले. त्याप्रमाणे रशियन लोक जोरात असताना त्यांच्यापासून अगर अफगाण लोकांपासून हिंदुस्थानवर संकट येण्याचा संभव दिसला, तेव्हा देखील ब्रिटिश सरकारने आपल्या सेनेची आहुती देऊन आमचा बचाव करण्यास मागेपुढे पाहिले नाही. तेव्हा धर्माच्या योगाने दुही माजते, धर्म एकीच्या आड येतो, असे कधीही म्हणता येणार नाही.

शेवटी मी पुन्हा एकवार सांगतो की, माझी मते मी लोकांपुढे निर्भीडपणे ठेवतो; म्हणून लोकप्रियता मिळविण्याकरिता मला काही लोक ओंगळ शिव्या देतात. पण त्या हास्यास्पद होतात. सुजनांच्या निंदेस ते पात्र होतात; याचे मला वाईट वाटते. मी मागासलेल्या लोकांचा उद्धार करण्याचा प्रयत्न करतो. त्यांचा दर्जा समाजात वाढावा असे माझे प्रयत्न आहेत; पण त्याचा विपर्यास करून मजवर ब्रह्मद्वेषाचा आरोप करण्यात येतो तो कितपत खरा आहे, याचा विचार आपणच करावा. हे विचार-निर्णय करण्याचे काम मी आपल्यावरच सोपवितो.

आपण मला आज 'आपला' असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे शेवटपर्यंत प्रेम दृढ ठेवा मी देखील कितीही अडचणी आल्या, कितीही त्रास झाला, तरी त्याला न जुमानता उन्नतीच्या महत्कार्यास शक्य तेवढा हातभार लावण्यास कधीही माघार घेणार नाही; असे आश्वासन देऊन मी आपले भाषण संपवितो.

***

अनुक्रमणिका

अकरा

कर्तव्यकर्माचा धडा

* * *

राजर्षींनी ‘कर्तव्यकर्माचा धडा’ मध्ये, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे मूळ कशात आहे ते सांगून, त्यावर पडदा टाकण्यासाठी सार्वत्रिक शिक्षणाचा उपाय सुचविला आहे. धार्मिकदृष्ट्या सहिष्णुतेची भूमिका घेतल्याशिवाय राष्ट्र म्हणून आपणास जगता येणार नाही, असा विचारही त्यांनी पुढे ठेवला आहे.

शाहू महाराजांच्या मते “ब्राह्मणांनी विद्या रक्षण केली याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेतच. परंतु ही विद्या स्वतःपुरती मर्यादित ठेवण्याची त्यांनी फार मोठी चूक केली. हे सर्व घडले तेव्हा रानडे-गोखले-आगरकर यांच्यासारखे ब्राह्मण असते तर ते घडलेच नसते. सनातनी ब्राह्मणवर्गाने स्वतःस भूदेव समजून इतर वर्गास हीन लेखिले. परिणामी देशाची प्रगती खुंटली. एकी नष्ट झाली. यवनांचे फावले. ब्राह्मणांनी निर्माण केलेल्या वर्णाश्रमधर्मामुळे, जातीयवादामुळे, इंग्रजांचे राज्य या देशात स्थिरावले. मात्र इंग्रज राज्यकर्ते उदारबुद्धी होते. त्यांच्या उदार अशा शैक्षणिक व सामाजिक धोरणामुळे सनातनी ब्राह्मणशाहीच्या जोखडातून सामान्यांची सुटका झाली.” परिस्थितीच्या या वस्तुनिष्ठ मूल्यमापनामध्ये ‘काय झाले’ बैठकीवर ‘काय केले पाहिजे’ ते, विशद केले आहे. राजर्षी म्हणतात: “आता आपण जैन, लिंगायत, मराठे, ब्राह्मण, मुसलमान, ख्रिश्चन, दलित वगैरेनी बंधूप्रेमाने वागून सामाजिक ऐक्य व धार्मिक सहिष्णुता कृतीने

* * *

हुबळी : कर्नाटक राज्य : २७ जुलै, १९२०
कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून, शाहू महाराजांनी केलेले भाषण

घडवून आणली पाहिजे. त्यासाठी सर्वांनी शिक्षण घेऊन उदारबुद्धी धारण करायला हवी.” त्यादृष्टीने ब्राह्मणेतरांचे योग्य हक्क मागण्याचे काम पवित्र असून टीका, ओंगळ आरोप वगैरे सहन करूनही ते नेटाने पुढे रेटण्यात इतिहास घडविण्याचे सामर्थ्य आहे; असा राजर्षींचा स्फूर्तिप्रद आदेश आहे.

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे मूळ कशात आहे याचे दिग्दर्शन करताना सामाजिक सामंजस्याची व राष्ट्रीय ऐक्याची कळसूत्रे आमच्या विचार-आचारांमध्येच कशी रूजून राहिली आहेत; आणि हे रूजून असलेले उगवण्यासाठी काय केले पाहिजे, कोणती दक्षता घेतली पाहिजे, याचे छत्रपती शाहू राजांनी इथे केलेले मार्गदर्शन विशेष मोलाचे ठरते.

पुढे अस्तित्वात आलेल्या भारतीय संविधानातील मूलतत्त्वांचे आणि भारतासारख्या प्रचंड देशापुढे उभ्या ठाकणाऱ्या महाकाय प्रश्नोपप्रश्नांचे शाहू महाराजांना क्रांतदर्शन झाले होते असे, त्यांच्या ह्या सर्व विचारांचे आलोडन करताना वाटते; आणि मन स्तंभित होऊन जाते.

* * *

अनुक्रमणिका

अकरा

कर्तव्यकर्माचा धडा

* * *

मी आज या परिषदेचा अध्यक्ष होण्यास लायक व योग्यतेचा नसतांना, आपण मला आपलाच समजून हक्काने अध्यक्ष केले; याबद्दल मला कितीतरी अभिमान वाटत आहे. या इलाख्यात धारवाड, हुबळी वगैरे ठिकाणी मी विद्येकरिता माझे तरुणपण घालविले. या मुलूखात मी आज दुसऱ्यांदा आपल्या परिषदेचा अध्यक्ष; आपण केल्यामुळे आलो आहे.

या प्रसंगामुळे आम्हास सर त्यागराज चेट्टी यांच्यासारख्या महापुरुषाची प्राप्ती झाली आहे. मिस्टर चिकोडीसारख्या उत्साही गृहस्थांची जोड मिळाली आहे. मिस्टर मेणशिनकाई व मिस्टर कंबळी यांनी तर रात्रंदिवस मेहनत करून आपली परिषद यशस्वी केली आहे.

ब्राह्मणांनी विद्या रक्षण केली व विद्येची ज्योत राखिली; याबद्दल आम्ही त्यांचे कितीतरी अभिनंदन करावे. परंतु त्यावेळी नामदार रानडे, गोखले, आगरकर यांच्यासारखे उदारमतवादी असते तर, खरोखरच त्यांनी सर्वांना विद्यादान दिले असते व अप्पलपोटेपणाने दुसऱ्यांना विद्या शिकवू नये असा जो प्रकार चालू झाला, त्याला आळा पडला असता. म्हणून आज ब्राह्मणेतरांनी स्वतंत्र परिषद भरविण्याचा प्रसंगही आला नसता.

मी जात नको असे प्रतिपादन करतो परंतु वर्ग पाहिजेत असे माझे ठाम मत आहे. ब्राह्मणीधर्मात जात असल्यामुळ ब्राह्मण जातीने कुलवान ब्राह्मणेतर स्त्रीशी कसेही असभ्यतेचे वर्तन केले तरी त्यांचा कुलोद्धार होतो. उदाहरणार्थ, कृष्णस्त्रियांवर काही संकट आले असता दालभ्य ऋषीनी त्यांना व्रत करण्याबद्दल आदेश दिला. ते व्रत असे आहे: रविवारी हस्त, पुष्य व पुर्नवसू नक्षत्रावर स्त्रीने औषधीयुक्त उदकाने उत्तम प्रकारे स्नान करावे. नंतर विष्णूची ‘लिंगस्थानाय नमः कंदर्पविधयेनमः’ इत्यादी मंत्रपूर्वक पूजा करावी. नंतर अवयवांनी अव्यंग अशा ब्राह्मणास बोलावून, त्यास यथेच्छ पंचपक्वान्नांचे भोजन देऊन, हा साक्षात् कामदेव असे चित्तात मानून तो रतीसाठी जे जे इच्छील ते ते तिने करून, सर्वभावाने आपला देह, हास्ययुक्त भाषण करीत, त्यास अर्पण करावा पुढे हे व्रत घेतल्या दिवसांपासून जो ब्राह्मण रतिसुखासाठी रविवारी येईल त्याला सर्वभावेकरून अवश्य मानावे व तो गेल्यानंतर इतरांचा आश्रय करावा.
[मत्स्यपुराण : अध्याय ६९ : कलकत्ता प्रत
महाभारत : अध्याय दुसरा : अनुशासन पर्व]

महाभारतात गृहस्थाश्रम धर्म असा सांगितला आहे: एक ब्राह्मण ओघवती राणीकडे जाऊन तिला ‘मी अतिथी आहे, माझे मनोरथ पूर्ण कर. हा अतिथीधर्म आहे.’ असे सांगून तो तिचा उपभोग घेऊ लागला. इतक्यात तिच्या नवऱ्याने बाहेरून येऊन दारावर थाप मारली. तेव्हा ब्राह्मणाने आतून ओरडून सांगितले की, “हे अग्निपुत्रा सुदर्शना, मी ब्राह्मण तुझ्या येथे अतिथी आलो आहे. ही तुझी पत्नी अतिथीयोग्य अशा सत्काराने मला रतिसुख देऊन संतुष्ट करीत आहे.” त्यावर तो राजा हसून म्हणाला, “ माझी सर्व संपत्ती, बायको फार काय तर प्रत्यक्ष माझे प्राणही मी अतिथीला देईन अशी माझी प्रतिज्ञा आहे. गृहस्थाश्रमी याचा हा धर्मच आहे.”§

अनुक्रमणिका

कदाचित याजवर काही लोक असा आक्षेप घेतील की या जुन्या पुराणांतील कथा आहेत. त्या आता कशास उकरून काढता? परंतु त्याचे परिणाम आज तारखपर्यन्तही कसे जनतेस भोगावे लागत आहेत; हे पुढील उदाहरणावरून दिसून येईल: विक्रम संवत् १८५७ साली आषाढ महिन्यात अलाहाबाद येथे एका गृहस्थाने आपल्या मातेच्या अनुमतीने, पुराणांतील गोष्टीस अनुसरून आपल्या स्त्रीचे दान करून टाकले. तिच्या दंडास धरून उपाध्याय तिला आपल्या घरी नेऊ लागला. त्या गृहस्थाने आपल्या स्त्रीस परत मिळविण्याकरिता पाच हजार रुपये देऊ केले. पण व्यर्थ. शेवटी तंटा विकोपास गेला. ब्रिटिश मॅजिस्ट्रेटने असा निकाल दिला की, देणगी इंग्रजी कायद्याविरूद्ध असून उपाध्याय शिक्षेस पात्र आहे. त्यावेळच्या वृत्तपत्रात याची सविस्तर हकीकत दिसून येते. जर एक जात याप्रमाणे प्रबल नसती तर असे प्रसंग केव्हाच आले नसते! करिता जाती मोडून वर्गास महत्त्व देऊ या. जे आपणाशी सहकार्य करण्यास अगर सहानुभूती दाखविण्यास तयार नाहीत त्यांना विनवून पाहू या. बोधून पाहू या. सुविचार सांगून पाहू या. त्यांनी ते न मानल्यास त्यांचा द्वेष न करता आपण त्यांच्या वाटेस न जाण्याचे ठरवू या. परमेश्वर न्यायी आहे. त्यांच्या अवनतीच्या कृत्यांबद्दल त्यांना पश्चात्ताप झाला असे दिसून आल्यास व पुन्हा ते आपल्या वळणावर जाणार नाहीत अशी आपली खात्री झाल्यावर, त्यांना आपणात बंधूप्रेमाने मिसळून घेऊ या. ‘चातुर्वण्य मया सृष्टम् गुणकर्मविभागशः’ याचा आधार घेऊन श्रेष्ठपणा स्थापित करण्याचा प्रयत्न होत आहे, हे विस्ताराने दाखविण्याची जरूरी नाही. वसिष्ठ वगैरे ऋषी हलक्या कुळात उत्पन्न झाले असताही गुण व कर्म यांच्या योगानेच त्यांना ब्राह्मणत्व मिळाले आहे. हीच परंपरा आजपर्यंत चालत असती तर, सध्या दिसत असलेली समाजाची अवनती व दुही दिसलीच नसती!

नुकत्याच संपलेल्या मोठ्या युद्धात हल्ली जी आमची मदत राष्ट्राला झाली ती लोकसंख्येच्या मानाने योग्य झाली असे मला मुळीच वाटत नाही. मी रिक्रूटिंग बोर्डाचा मेंबर असल्याने ही गोष्ट मला खात्रीलायक माहीत आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर हा भेद नसता तर, लढाईत यापेक्षा जास्त मदत साम्राज्यास झाली असती. त्या योगाने राष्ट्रकार्यही मोठ्या जोराने झाले असते.

जैन व लिंगायत वगैरे मुळचे हिंदू असून नीतीने, बुद्धीने व शरीरसंपत्तीने मजबूत असल्याने, ब्राह्मणांनी अप्पलपोटेपणाने शिक्षणाचा मार्ग बंद केला. ते नाराज होऊन, त्या धर्मातून निघून, त्यांनी नवीन धर्म स्वीकारला. अशा रितीने ब्राह्मणी जू झुगारून देऊन ते स्वतंत्र झाले तरी ब्राह्मणेतर आपले आप्तेष्ट होत, भाऊबंद होत. हे, आपण स्वतंत्र झालो असतानाही न विसरता, आपल्यात व्यापारधंदा कसा वाढला, विद्यावृद्धी कशी झाली, सांपत्तिक स्थिती कशी सुधारली हे आपल्या गरीब मराठे व इतर ब्राह्मणेतर बंधूस समजावून सांगून, त्यांच्यात व्यापाराची व विद्याज्योतीची जागृती करावी. बंधूप्रेम वाढवावे. सुदैवाने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे झाल्यास, एकदोन पिढीतच आपली उन्नती होणार आहे. विटून गेलेल्यांना, कंटाळून गेलेल्यांना, जड जोखडाखाली त्रासून गेलेल्यांना विद्यादान व व्यापारी ज्ञानदान देऊन आमचे जैन, लिंगायत बंधू बंधूप्रीतीची वाढ करीत आहेत हे पाहून कितीतरी आनंद होत आहे. त्यांचे जसे आमच्यावर प्रेम आहे तसेच आमचेही त्यांच्यावर पूर्ण प्रेम आहे; हे आजच्यासारख्या प्रसंगाने वारंवार व्यक्त होत आलेच आहे. अशा प्रकारची सहकार्यता आमच्या कार्यास ज्याप्रमाणे, रानडे, गोखले, आगरकर वगैरे उदारमतवादी ब्राह्मणांकडून मिळत होती, जी ज्योती त्यांच्या निधनानंतर बहुतेक विझून गेल्यासारखी दिसत होती त्या ज्योतीचे पुनर्जीवन होऊन ती सहकार्यता पुन्हा एकवार आम्हास मिळू लागेल; असे आम्ही प्रयत्न करावेत.

'केसरी' कारांनी असे म्हटले आहे की, "सद्बुद्धीने बोलावयाचे तर ईश्वराचे मुख, बाहू उरू व पावले असा भेद न करता सर्व मनुष्यजात एकाच ईश्वरापासून निर्माण झाली आहे असेही म्हणता येईल. पण बोलणाऱ्याची बुद्धी सरळ नसली म्हणजे सैतानालाही बायबलात आधार सापडू शकतो." याबद्दल या पत्रकारांचे आम्ही अभिनंदनच करितो. आमचे म्हणणे तरी तेच आहे. परंतु 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले.' आजपर्यंत आम्ही एकाच ईश्वराची लेकरे आहोत, या समभावनेने, ब्राह्मण म्हणविणाऱ्यांनी ब्राह्मणेतरांना केव्हातरी वागविले आहे काय? वागविणे तर दूरच राहो, परंतु बोलणे सुद्धा आता सुचू लागले आहे हे कशाचे फळ आहे?

क्षत्रियांचे गुरु ब्राह्मणच होते असेही तेच पत्र म्हणते. वसिष्ठ ऋषींचा जन्म वेश्येपासून झाला आहे. त्यांनी आपल्या गुणकर्माने अधिकार संपादून ब्राह्मणपद मिळविले होते. ब्रह्माधिकारयुक्त ब्राह्मण हे आम्हास केव्हाही पूज्यच वाटतील. मग ते जन्मतः शूद्र असोत अगर अतिशूद्र असोत. महाभारत, भागवत वगैरे महापुराणे व इतर पुराणे ही सर्व ब्राह्मणांनीच लिहिली आहेत. त्यातील लिहिणाऱ्यांच्याविरुद्ध विधाने, ही लिहिणाऱ्यालाच बंधनकारक होतात. इतरांस विरूद्ध असलेली विधाने मात्र इतरांस बंधन होऊ शकणार नाहीत. हे पुराव्याचे कायद्यातील तत्त्व कायदेपंडित म्हणविणाऱ्यास शिकवावयास पाहिजे काय?

समाजाची नीतिमत्ता वाढणे हे सामाजिक सुधारणेचे एक महत्त्वाचे अंग आहे. वाईट रीतीभाती व धर्मभोळेपणा यांच्या योगाने आमच्यामध्ये मद्यपान, बालविवाह जुलूमाचे वैधव्य, देवास मुली वाहणे असे घातक प्रकार रूढ होऊन, त्यापासून शारीरिक, मानसिक व बौद्धिक अवनती झाली आहे. ही अवनती दूर करण्यास आपण उपाययोजना करावी. याबाबतीत शील बनविणे हेच मुख्य कर्तव्य आहे. शीलवान नागरिकाशिवाय राष्ट्र बनणे अगर उदयास येणे या गोष्टी शक्यच नाहीत. शारीरिक उन्नतीकडेही आपण लक्ष दिले पाहिजे. परंतु केवळ शारीरिक शौर्य, वीर्य कितीही अंगात असले तरी नीतिमत्तेची अवनती झाल्याबरोबर रोमसारखी बलाढ्य राष्ट्रेही कशी रसातळाला गेली हे आपण विसरता कामा नये.

गेल्या लढाईत ज्या विवक्षित हिंदू जातीची मदत फार झाली आहे, राजनिष्ठेकरिता व राष्ट्रकार्याकरिता जातिभेद व धर्मभेद विसरून ज्यांनी आपले कर्तव्यकर्म उज्ज्वलपणे पार पाडिले आहे; त्यांनी इतरांना हा एक कर्तव्यकर्माचा धडाच घालून दिला आहे. राष्ट्राची उन्नती व सार्वभौम सरकारशी राजनिष्ठा, हाच आपला धर्म समजून वागण्याचे श्रेष्ठ धारिष्ट्य दाखविण्याची संधी इंग्रज सरकारने गेल्या युद्धात आपणास दिली. याबद्दल त्यांचे खरोखरीच आपण फार आभार मानले पाहिजेत. त्यांच्या योगाने आपल्या धार्मिक, सामाजिक उत्क्रांतीस व उन्नतीस फारच मदत झाली आहे.

इंग्रज सरकारचे राज्य, १८५७ सालानंतर, या देशावर चिरस्थायी झाले. त्या वेळेपूर्वी, आम्ही जवळजवळ रानटी स्थितीतच होतो. रेल्वे नव्हत्या, तार ऑफिसे नव्हती, धर्मसहिष्णुता व नियमितपणा या गोष्टीस आम्ही पारखेच होतो. स्वराज्य मागण्याइतकी लायकी आपणास यावी, अशाप्रकारचे शिक्षण देऊन आमच्यात सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणली, ही गोष्ट आम्हास केव्हाही विसरता येणे शक्य नाही.

मुसलमान हे नेहमी मराठ्यांप्रमाणे क्षात्रकर्म करितात. त्यांच्या चालीरीतीही बहुतेक मराठ्यांप्रमाणेच आहेत. मराठ्यांच्या फौजेत मोठमोठे मुसलमान सरदार होते, त्याप्रमाणेच मुसलमानांच्या फौजेत मराठे सरदार होते. हल्ली इंग्रज सरकारच्या फौजेत मराठा व मुसलमान खांद्याला खादा लावून लढले आहेत,

तुर्कस्थानसारख्या मुसलमान राष्ट्रावर जय मिळविला आहे. टर्की, पर्शिया, अफगाणिस्थान वगैरे मुसलमान राष्ट्रांना रशियन अस्वलाच्या तावडीतून आजपर्यन्त वाचविण्याचे श्रेय इंग्लंडास दिले पाहिजे. १८७७ साली रशियाने कॉन्स्टॅंटिनोपल घेऊन तुर्कस्थानची युरोपातून उचलबांगडी करण्याचा घाट घातला होता. तो बहुतेक यशस्वीही झाला होता. इतक्यात, इंग्लंडने धाव घेऊन तुर्कस्थानचा त्यावेळी बचाव केला. त्याचप्रमाणे १८८० सालच्या सुमारास खलिफाचे संरक्षणही इंग्लंडनेच केले. ही गोष्ट विसरता कामा नये. हल्लीच्या लढाईत टर्कीचे रक्षण करावे, असे इंग्लंडास मुळापासूनच वाटत होते. परंतु टर्कीमधील जहाल पक्षाने जर्मनीशी संगनमत केल्यामुळे त्यांच्यावर मोठ्या नाखुषीने तरवार उपसणे इंग्लंडला अपरिहार्य झाले.

तुर्कास ते वैरी असताना व त्यांच्याबरोबर लढण्यात, हिंदुस्थानातील हिंदूमुसलमानांचे रक्त खर्ची पडले असताना त्यांना क्षमा करा असे म्हणणे ही निराळी गोष्ट आहे. परंतु त्यांना मित्र म्हणणे हे उचित होईल काय? औरंगजेब व शिवाजी यांच्यावेळी उभय पक्षात हिंदू व मुसलमान सरदार होते. त्यांनी राष्ट्रोन्नतीस विघातक अशा मागण्या कधी केल्या होत्या काय? मराठे व मुसलमान यांचा हा परंपरागत धर्म आहे. ‘ज्यांचे खावे मीठ, त्याशी रहावे नीट.’ अरब, तुर्क हे आमचे बंधू आहेत. त्यांना मूठभर अविचारी चळवळ्यांच्या सांगण्यावरून कडेलोट करुन टाकून देणे, तरी योग्य होईल काय? तथापि त्यांना दुश्मनाप्रमाणे न वागविता, मित्राप्रमाणे वागविण्यात येत आहे. हे, इंग्रज सरकार त्यांच्या हितानहिताचा विचार किती काळजीपूर्वक करीत आहे; त्यावरुन सिद्ध होत आहे. मुसलमानी धर्माच्या पवित्र स्थानाचे रक्षण करण्याची जबाबदारी इंग्लंडने आपणावर घातली. ते काम आतापर्यंत शक्य तितक्या चांगल्यारीतीने पार पाडले आहे.

अशाप्रकारचे इंग्लंड व हिंदुस्थान सरकारचे प्रयत्न सर्वास माहीत आहेतच. परंतु सर्व गोष्टी आपल्या मताप्रमाणे होत नाहीत म्हणून हिंदुस्थानच्या मुसलमानांस वाईट वाटणे साहजिक आहे. त्याबद्दल आमच्यासारख्या त्यांच्या, खऱ्या हितचिंतकास सहानुभूती फार वाटते. इंग्रज सरकारचे प्रयत्न कसे चालले आहेत हे माहीत असताही, त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी शंका घेऊन लोकांची मने कलुषित करण्याचे काम, काही मुसलमान व हिंदू पुढाऱ्यांनी चालविले आहे. ही मोठी खेदाची गोष्ट होय. त्याच्या योगाने बहुजन समाजाच्या मनात सरकारविषयी अप्रीती उत्पन्न होते व वाढते. हे मुळीच इष्ट नाही. हे सर्व ध्यानी आणूनच आमचे ‘हिज एक्झालेटेड हायनेस’ निजामसाहेब यांनी, या चळवळीपासून प्रजेस अलिप्त राहाण्यास बजाविले आहे. त्यांचे उदाहरण ब्रिटिश इंडियात व इतर ठिकाणी घेतील अशी मला उमेद आहे. निजाम, अरब, खुद्द तुर्क यांच्यापेक्षा आपल्या म्हणण्यास अधिक महत्त्व द्यावे असे असे बाकी राहिलेल्या मूठभर मुसलमानांस, अवनतीस पोचलेले व आपणास पुढारी म्हणवून घेणारे कसे दाखवू शकतील? मुसलमानांसारख्या बहुसंख्यांकांनी जर ही चळवळ केली तर हिंदुस्थानातील पुढाऱ्यांनी त्यांना मदत करणे योग्य होईल. परंतु मूठभर नाराज लोकांचा पुढाकार घेऊन, बेकायदेशीर बेसनदशीर चळवळीत सामील होऊन अवनतीला कारण होऊ नका. हिंदु मुसलमानांची पूर्वापार चालत आलेली व नुकत्याच झालेल्या महायुद्धात खांद्यास खांदा भिडवून एकदिलाने लढून घट्ट बसलेली सामाजिक घडी पुन्हा विस्कळित होऊ देऊ नका. सरकारबरोबर असहकारिता करणे म्हणजेच आपली उन्नती खुंटविणे आहे; समाजाचा मूळ पायाच खणून काढणे आहे. सरकार सुव्यवस्थित चालेल तेव्हाच आमची शारीरिक, धार्मिक व नैतिक उन्नती करून घेण्यास अवसर मिळेल. यासाठी देशाचे खरे हित ज्यांना करून घेण्याचे आहे ते अशा चळवळींपासून अलिप्त राहातील अशी मला उमेद आहे.

'चेम्सफर्ड मॉन्टेग्यू रिफॉर्म्स' प्रमाणे आज आम्हास स्वराज्य मिळत आहे. तेवढेही स्वराज्य कोणत्याही पूर्वीच्या कॉन्फरन्सपासून मिळाले नव्हते. याचा आम्ही दुरुपयोग न करता सदुपयोग करून आमच्या बादशहास दाखविले पाहिजे. ते चिरायु व्हावेत म्हणून परमेश्वराची प्रार्थना केली पाहिजे. आम्ही योग्य पुढारी नेमून दिले पाहिजेत. रिफॉर्म्स यशस्वी करून दाखविल्या पाहिजेत. जर अयोग्य व अविचारी पुढारी नेमले तर त्याच्या दुष्परिणामास आम्हीच जबाबदार होऊ, सरकार होणार नाही; हे लक्षात ठेविले पाहिजे. आपली सामाजिक व धार्मिक उन्नती करून घेतली पाहिजे. म्हणजे आमच्यामध्ये जे पुष्कळसे, जातिभेदामुळे पक्ष झाले आहेत ते मोडले पाहिजेत. सर्वांना समतेने वागविले पाहिजे. सर्वांना विद्यादान दिले पाहिजे, सर्वांचा धार्मिक हक्क समान समजला पाहिजे; वगैरे सुधारणा कशा केल्या पाहिजेत याचा विचार परिषदेने करावा. या कामात काही ब्राह्मण म्हणविणारेही मदत करतीलच, अशा आमच्या हितकर्त्यांचे आम्ही उपकार मानू आजची ही संधी न दवडता ब्राह्मणेतरांनीही आपापसांतील भेदभाव मोडून खऱ्या बंधूप्रेमाने सामाजिक ऐक्य व धार्मिक सहिष्णुता कृतीने घडवून आणली पाहिजे. अशा प्रकारची ही परिषद नवीनच आहे. यात काळाचा व द्रव्याचा व्यर्थ व्यय झाल्याचा आरोप आपणावर न येईल असे आपल्या कृतीने आपण दाखविले पाहिजे.

स्वराज्यदानामुळे हिंदुस्थानात निरनिराळ्या चळवळी सुरू झाल्या आहेत व होतील. त्यामुळे हिंदुस्थानास सध्या केवळ धार्मिक व सामाजिक नव्हे तर सर्वप्रकारे नाजूक परिस्थिती प्राप्त झाली आहे. आपल्या इलाख्याचे माजी गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांना पाच वर्षांची मुदत अपुरी आहे. म्हणून अशा जोखमीच्या प्रसंगी धुरीण असण्याकरिता मुदत वाढवून मागितली आहे. त्यांनीही मोठ्या उत्साहाने, कठीण प्रसंगात काम करून वाढविलेल्या मुदतीतही आपली शरीरसंपत्ती उत्तम राखून काम केले. काही लोकांचे जे असे म्हणणे आहे की, गव्हर्नरास हिंदुस्थानात पाच वर्षांपेक्षा जास्त मुदत ठेवल्यास, त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो; यास हरताळ लाविला. आमच्या इलाख्याचे हल्लीचे अधिपती सर जॉर्ज लॉईड हे तरूण, हिंदुस्थानास नवीन व येथील अनुभवही नसता, त्यांनी सत्याग्रह व संपासारख्या मोठ्या कठीण प्रसंगात शांत राहून, इतर इलाख्याप्रमाणे फौजेची मदत न घेता शांतता राखिली हे त्यास फारच भूषणावह आहे. आता तर त्यांना येथील परिस्थितीचे पूर्ण ज्ञान झाले आहे. नवीन होणाऱ्या कौन्सिलमुळे सामाजिक, धार्मिक व इतर बाबतीत पुष्कळ फरक होण्याचा संभव आहे. अशा उत्क्रांतीच्या वेळी आमचे गव्हर्नर आम्हास पाच वर्षे लाभल्यास आमचा भोग्यादय झाले असे म्हणण्यास काही प्रत्यवाय नाही. गव्हर्मेन्टमध्ये आतापासून त्या दृष्टीने आपण खटपट केली पाहिजे.

आपले ब्राह्मणेतरांचे योग्य हक्क मागण्याचे काम पवित्र आहे. भूतदयेने प्रेरित असल्याने धार्मिकही आहे. त्यास ईश्वरी आशीर्वाद खात्रीने आहे असे समजून आपण सर्व उत्साहाने कामास लागू या. मी आपणा सर्वांच्या सेवेस तत्पर आहे. आपणास परमात्मा पूर्ण यश लवकर देईलच देईल.

***

अनुक्रमणिका

बारा

मराठ्यांची परंपरा

* * *

छत्रपती शाहू महाराजांनी 'मराठ्यांची परंपरा' या आवाहनामध्ये, प्रारंभीच मराठा पलटणीने गाजविलेल्या पराक्रमाचे तोंड भरून कौतुक केले आहे. तसेच "आम्हापैकी कित्येकांना प्रत्यक्ष युद्धात भाग घेता आला नाही." म्हणून आमची निराशा होणे स्वाभाविक आहे, असे म्हणून आपल्या शिपाईगड्यांबरोबर आपण नाही याबद्दलची व्यथाही बोलून दाखविली आहे.

"आपण अशा संकटकाळीही मराठ्यांच्या परंपरेला जागून पराक्रमाची शर्थ केलीत, तसेच आपल्या महाभारतातील परंपरेला अनुसरून अशा प्रसंगी प्राण वाचविण्यासाठी मिळेल त्या अन्नावर, घोड्याच्या मांसावरही गुजराण करायला काहीच हरकत नाही. तुम्ही अधर्म करीत नाही हे खासच. तरी उपलब्ध असलेल्या अन्नावर तुम्ही जिवंत राहावे आणि आपले कर्तव्य बजावून तुमच्या पूर्वजांची कीर्ती निष्कलंक करावी." असे आवाहन करून, शेवटी राजर्षींनी मराठा पलटणींना, शिवरायांच्या आग्र्याहून सुटकेच्या चैतन्यप्रद प्रसंगाची आठवण करून दिली आहे. मराठ्यांच्या उर्जस्वल अस्मितेचे भान जागृत केले आहे.

एका बाजूला 'आपल्या' सारख्या शिपाईगड्यांविषयी काळजाला भिडणारी तळमळ आणि दुसऱ्या बाजूने मराठ्यांच्या परंपरेचा शिगोशिग अभिमान; यातून उपजलेल्या

* * *

कोल्हापूर : २३ मार्च, १९१६
'मराठ्यांची परंपरा' हे जाहीरपणे दिलेले भाषण नसून, पहिल्या महायुद्धाच्या वेळी, इराकमधील टायग्रस नदीवरील 'कुट. एल्. आभारा' या शहरी, वेढ्यात अडकून पडलेल्या काही मराठा पलटणींना, शाहू महाराजांनी केलेले हे पत्ररूप आवाहन आहे.

राजाच्या कर्तव्यावर, "या कठीण प्रसंगात तुम्ही सापडला नसून, मी सापडलो आहे; असे मी समजतो. मला या संकटाची पूर्ण जाणीव आहे. म्हणून तुम्ही परत आल्यावर तुमच्या लग्नकार्यात व इतर धार्मिक समारंभात तुम्हाला कोणतीच गैरसोय भोगावी लागणार नाही,असे देवाल स्मरून मी वचन देतो." हे छत्रपती शाहू महाराजांनी केलेले शिक्कामोर्तब प्रातःस्मरणीय आहे; राजाचे 'शिवकल्याण' स्वरूप प्रकट करणारे आहे.

* * *

अनुक्रमणिका

बारा

मराठ्यांची परंपरा

***

मराठा पलटणीतील माझे बांधव, अधिकारी लोक व शिपाई गडीहो,
सार्वभौम सरकार आपल्या दोस्तांसह गेली, सुमारे दोन वर्षे महायुद्धामध्ये गुंतले आहे. आपल्या शूर पूर्वजांच्या निष्कलंक यशाला साजेशी, धैर्याची व शौर्याची कामगिरी मराठ एकसारखे बजावीत असल्याचे ऐकून प्रत्येक मराठ्याला मोठा अभिमान वाटत आहे. आपणास माहीत असल्याप्रमाणे मी ब्रिटिश सेनेतील शूर मराठा पलटणीचा कर्नल असल्यामुळे, या पराक्रमाचे महत्त्व मला विशेष वाटते.

या महायुद्धामध्ये आम्हांपैकी कित्येकांना प्रत्यक्ष भाग घेता आला नाही; म्हणून आमची निराशा होणे स्वाभाविक आहे. तथापि आपल्या जीवनाची यत्किंचितही पर्वा न करिता मोठे हाल सोसून, साम्राज्याच्या कार्यासाठी आमचेच बांधव रात्रंदिवस झटत असल्याचे पाहून, प्रत्येकाला मोठे समाधान वाटत आहे. माझे मराठा बांधव निस्सीम निष्ठेने आपले पवित्र कर्तव्य बजावित असताना, ते मोठ्या संकटात सापडले आहेत व जातीच्या निर्बंधानुसार कोणते खाद्य व कोणते अखाद्य ठरवावयाचे, यासंबंधी एक प्रश्न उपस्थित झाला आहे, असे मला समजते. शत्रूच्या वेढ्यात ते सापडले असल्यामुळे, त्यांना दिवसानुदिवस अन्नाचा पुरवठा कमी पडत चालला आहे. सामुग्रीचा पुरवठा करण्यासाठी साम्राज्य सरकार आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत आहे. तरीदेखील वेढ्यात सापडलेल्या सैनिकांना सामुग्री पाठविणे दुरापास्त झाले आहे. अशाप्रसंगी प्राण वाचविण्यासाठी मिळालेल्या अन्नावर जगणे जरूर आहे. संकटाच्या प्रसंगी लोकांनी कसे वागावे हे ज्यात सांगितले आहे, अशा 'महाभारता' मध्ये हेच तत्त्व प्रतिपादन केले आहे. घोड्याच्या मांसाचा उपयोग करण्यास कोणतीच आडकाठी नाही, असे खुद्द आमच्या शास्त्रावरूनदेखील स्पष्ट होते.

प्राचीन काळी घडलेल्या महाअश्वमेघांची हकीकत तुम्हांपैकी प्रत्येकाला ठाऊक आहे. त्याकाळी घोड्याचे मांस खात असत, म्हणून शत्रूच्या कचाटीत सापडले असता त्याचा उपयोग करण्यास यत्किंचितही आडकाठी करणे शक्य नाही. मी माझ्या नातलगांसह व माझ्या जातीच्या इतर लोकांसह या युद्धात भाग घेऊन तुमच्या कष्टांचा व संकटांचा मोठ्या आनंदाने वाटेकरी आलो असतो. मग हा अन्नासंबंधीचा प्रश्न सहजच सुटला असता. परंतु दुर्दैवाने ही संधी प्राप्त होणे माझ्या नशिबी नाही. आता तुम्हाला येऊन मिळणेही अशक्य आहे, म्हणून माझे बांधव हो, माझी अत्यंत कळकळीची व अंतःकरणपूर्वक अशी प्रार्थना आहे की, याप्रसंगी छाती घट्ट करून, संकटसमयी शास्त्राने सांगितलेले कर्तव्य लक्षात आणून, उपलब्ध असलेल्या अन्नावर तुम्ही जिवंत राहावे आणि आपले कर्तव्य बजावून, तुमच्या पूर्वजांची कीर्ती निष्कलंक राखावी.

माझे थोर व पूज्य पूर्वज, मराठा साम्राज्याचे संस्थापक शिवाजी हे आपल्या अनुयायांसह दिल्लीत अटकेत असल्यावेळी, या महायोद्ध्याने या बिकट प्रसंगाला कसे तोंड दिले हे तुम्हाला माहीत आहेच. घोड्याच्या मांसाचा उपयोग करून, जातिनिर्बंध मोडल्याबद्दल तुम्हाला यत्किंचितही दूषण लागणार नाही. मी त्याबद्दल हमी देतो. माझ्या शब्दावर पूर्ण भरंवसा ठेवून आपण राहावे. या कठीण प्रसंगात तुम्ही सापडला नसून मी सापडलो आहे; असे मी समजतो. मला या संकटाची पूर्ण जाणीव आहे. म्हणून तुम्ही परत

आल्यावर तुमच्या लग्नकार्यांत व इतर धार्मिक समारंभात तुम्हाला कोणतीच गैरसोय भोगावी लागणार नाही, असे देवाला स्मरून वचन देतो.

या गोष्टीच्या सत्यतेबद्दल या विनंतीपत्रावर माझी सही व शिक्कामोर्तब करीत आहे. माझे शब्द निरर्थक होणार नाहीत व तुम्ही आपले प्राण वाचवाल आणि जातिविषयक नुसत्या अडचणी उपस्थित करून; आपल्या पवित्र कर्तव्याची हेळसांड करून, तुम्ही आपल्या पूर्वजांच्या चांगल्या नावलौकिकाला काळे फासणार नाही, अशी माझी खात्री आहे.

* * *

अनुक्रमणिका

४. अर्थ

तेरा

देशात ऐश्वर्य कसे वाढेल?

* * *

राजर्षी शाहूनी 'देशात ऐश्वर्य कसे वाढेल?' मध्ये भारताच्या आर्थिक उन्नतीचा अत्यंत महत्त्वपूर्ण असा विचार मांडला आहे. त्यांच्या मते, "सध्या जितक्या ज्ञातिसंस्था व धार्मिक सभा आहेत त्यांच्याकडे मी अनुकूल दृष्टीने पाहतो आहे. त्यांची भरभराट व्हावी अशी माझी मनापासून इच्छा आहे." अशा ह्या ज्ञातिसंस्थांमुळे लोक शहाणे होऊन आपापला उद्योग चांगला करतात. त्यामुळे त्यांची उन्नती होते; यावर राजर्षींची श्रद्धा आहे.

आर्यांच्या समाजव्यवस्थेची वेगळीक विशद करुन सांगताना, गुणकर्मावर आधारलेली मूळची समाजव्यवस्था जन्मावर कशी व कोणी ठरवली याचे विवेचन राजर्षींनी केले आहे. त्या दृष्टीने गुणवंत, बलवंत क्षत्रियांचीच समाजाला गरज आहे हे सांगताना ते म्हणतात: "नुसत्या जन्माने क्षत्रिय अगर ब्राह्मण झालेल्या लोकांचा आता कोणी आदर करणार नाहीत. आपण गुणकर्माने क्षत्रिय व्हा. आज क्षत्रियांनी कृषिकर्म हे प्रधान कर्म मानले पाहिजे. वैदिक काळातही वर्षातून एकदा चक्रवर्ती राजा व त्याचे मंत्रीही नांगर हाकीत असत. ज्या कृषिकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते ते कृषिकर्म हल के अथवा वाईट असे मी मुळीच मानीत नाही. कृषिकर्म करताना क्षात्रधर्माला बाध येतो असे नाही." भारतासारख्या कृषिप्रधान देशात, कृषिकर्म हाच क्षात्रधर्म होऊन बसलेला असताना; राजर्षींचा हा दूरगामी दृष्टीकोण त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देतो. हे द्रष्टेपण

* * *

कानपूर : उत्तर प्रदेश : १९ एप्रिल, १९१९
अ. भा. कुरमी क्षत्रियांच्या तेराव्या सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदावरुन, शाहू महाराजांनी केलेले भाषण

अचूक तितकेच वास्तव आहे. शास्त्रीयही आहे.

क्षत्रियांनी कृषिकर्म करणे आवश्यक असून भारतीयांचा तोच खराखुरा क्षात्रधर्म आहे. त्याची आबाळ उपयोगाची नाही, त्याशिवाय देशाला तरुणोपाय नाही. असा 'देशात ऐश्वर्य कसे वाढेल?' मध्ये, कृषिप्रधान औद्योगिक समृद्धीच्या दृष्टीकोणाचा शाहू महाराजांनी वस्तुपाठ सांगितला आहे.

* * *

अनुक्रमणिका

तेरा

देशात ऐश्वर्य कसे वाढेल?

***

मी तुमच्यापैकीच आहे. मला मजूर समजा अगर शेतकरी समजा. माझे वाडवडिल हाच धंदा करीत होते. जे काम माझे पूर्वज करीत होते तेच काम करणाऱ्या लोकांचा अध्यक्ष होण्याकरिता मला आज बोलाविले आहे, याबद्दल मला अत्यानंद होत आहे.

मी काही ज्ञानी नाही अगर लायकही नाही. माझ्यापेक्षा हुषार लोक पुष्कळ आहेत. माझ्या लायकीकडे लक्ष न देता मी केवळ शेतकरी व महान पराक्रमी शिवाजी महाराज व त्यांच्या स्नुषा ताराबाई महाराणीसाहेब यांच्या वंशातला आहे; म्हणून अध्यक्षाचा हा मोठा मान मला आपण दिला आहे. ज्यावेळी आपली आज्ञा मला झाली त्यावेळी मुंबईत मी तापाने अतिशय आजारी होतो. परंतु आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने मी लवकर बरा झालो. तथापि माझ्यापुढे डोंगरासारखी मोठी अशी एक अडचण आली. ती अडचण कोणती म्हणाल तर, हिंदीत भाषण करण्याची. तीन दिवसपर्यंत आगगाडीतच तिचा अभ्यास करून आपल्यापुढे भाषण करण्याचा मी निश्चय केला. माझी ही मातृभाषा नाही; शिवाय ही लिपीही मला अपरिचित असल्यामुळे आमचे परमपूज्य स्वामी परमानंदजी हे माझे भाषण वाचून दाखवितील. जे माझे नातलग आहेत व ज्यांना मी पित्यासमान व गुरुसमान लेखितो असे माझे परमपूज्य खासेराव जाधव हे येथपर्यन्त आलेले पाहून मला दुप्पट आनंद होत आहे. आपली सेवा करण्यास मला शक्ती देण्याबद्दल मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो. पुढे आपली आज्ञा होईल तशी सेवा करण्यास मी तयार आहे.

मी आणखी एका मुद्यावर बोलणार आहे. या विषयावर बोलण्याचे हे स्थळ नव्हे. परंतु आपल्या सभोवती काय चालले आहे तिकडे डोळेझाक करून चालणार नाही. आजकाल जो बखेडा चाललेला आहे, तो मला बिलकूल पसंत नाही. इंग्रज सरकारने आम्हाला विद्यादान दिले नसते तर हा झगडा कधीही चालला नसता. सरकारने विद्यारुपी दान आम्हाला द्यावे व त्याच्याऐवजी आम्ही सरकारला विष पाजावे, हे परस्पर विसंगत नव्हे का? ज्यांनी आम्हाला विद्यामृत पाजिले, ते आम्हाला पारतंत्र्यातून-त्या बेडीतून-खात्रीने मुक्त करतील. तुम्हाला जे काही पाहिजे आहे ते ज्याप्रमाणे मूल आईबापाजवळून मागून घेते, त्याप्रमाणे, म्हणजे प्रेमाने व जोराने सरकारजवळ मागा. ते सरकार खात्रीने देईल. माझी पूर्ण खात्री आहे की जसे प्रेमाने काम होते तसे ते सक्तीने कधीही होत नसते. माझ्या प्रकृतीला बरे नाही व येथील हवाही उष्ण असल्यामुळे मला बरे वाटत नाही. म्हणून मला कॉन्फरन्सकरिता तिन्ही दिवस हजर राहता येणार नाही. याबद्दल आपण मला क्षमा कराल अशी आपणांस दोन्ही हात जोडून विनंती करतो. तिचा स्वीकार कराल अशी मला आशा आहे. म्हणून म्हणतो:

“हे परमेश्वरा! आमच्या ब्राह्मणांमध्ये तेज धारण कर. आमच्या क्षत्रियांमध्ये तेज धारण कर. आमच्या वैश्यांमध्ये आणि शूद्रांमध्येही तेज धारण कर. माझ्या अंतःकरणामध्येही तुझ्या ज्योतीचा प्रकाश पाड, अशी माझी तुला प्रार्थना आहे.”

[रुचं नो धेहि ब्राह्मणेषु रुचं राजसु नस्कृधि ।
रुचं विश्येषु शूद्रे मयि धेहि रुचा रुचम् ॥४८॥]

अनुक्रमणिका

प्रिय बंधूनो, प्रथम मी असे विचारतो, आपल्या सभेचे अध्यक्षस्थान देण्याकरिता मला आपण एक हजार कोसावरून का आमंत्रण केले? काय आपल्या या प्रांतात माझ्यासारखा क्षत्रिय कोणीही नाही? आहेत. माझ्यापेक्षाही अधिक आहेत. त्यांच्यापैकी एखाद्यास न निवडता माझ्याकडे आपली दृष्टी का गेली? माझ्या हातून प्रजेची सेवा विशेषप्रकारे घडली म्हणून का मला हे आमंत्रण दिले? आपणास याचे कारण सांगण्यास संकोच वाटत असेल म्हणून मीच सांगतो. ज्या शिवछत्रपतींनी सिसोदिया क्षत्रिय वंशात जन्म घेऊन आपले सर्व आयुष्य पतिव्रतांचे रक्षण करण्यात, दीन प्रजेचे रक्षण करण्यात व आर्यधर्माचे रक्षण करण्यात खर्चिले; त्या क्षत्रियकुलावंतास श्री शिवाजी महाराज यांचे यशोचिन्ह आपल्या हृदयात प्रतिबिंबित झाले असले पाहिजे. अशा शिवाजी महाराजांच्या पुत्रपौत्रांपैकी मी एक आहे. म्हणून आपण मला हे अध्यक्षस्थान मुद्दाम आमंत्रण करून दिले असावे. यापेक्षा मला दुसरे कोणतेही कारण दिसत नाही. काहीही असो. आपण आपल्या जातीच्या सभेचे अध्यक्षस्थान देऊन जो माझा आदरसत्कार केला आहे. त्याबद्दल आपल्या सभेला तसेच तिच्या कार्यकर्त्यांना मी अंतःकरणापासून धन्यवाद देतो. मला जे काही बोलावयाचे आहे त्याचा आरंभ करतो. जर माझी मातृभाषा हिंदी असती तर आपल्याला आनंद झाला असता, तो होणार नाही; तरी माझे भाषण आपण शांतचित्ताने ऐकून घेऊन आपला उदारपणा दाखवाल अशी मला आशा आहे.

भारतवर्षातील प्रत्येक प्रांतात उन्नतीची चिन्हे दृष्टीस पडू लागली आहेत. ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. हिंदुस्थानच्या प्रत्येक प्रांतात दिवसानुदिवस जातिसभा व धार्मिक सभा अधिकाधिक होऊ लागल्या आहेत. सध्या जितक्या धार्मिक सभा अगर जातिसभा आहेत, त्याकडे मी अनुकूल दृष्टीने पाहात असून त्यांची भरभराट व्हावी अशी माझी मनापासून इच्छा आहे. कारण त्यांच्याद्वारे शिक्षण, समाजसुधारणा, धर्मप्रसार वगैरे कितीतरी परोपकाराच्या गोष्टी झाल्या आहेत, होत आहेत. पुढे सुद्धा या सभांचे ध्येय असेच उच्च राहिल्यास पुष्कळ उन्नती होईल अशी मला आशा वाटत आहे. या जागृतीचे कारण काय? याचा विचार केल्यास आपल्यास तीन महत्त्वाची कारणे दिसून येतील: पहिले व सर्वात श्रेष्ठ कारण म्हटले म्हणजे, ब्रिटिश गव्हर्मेंटचे शांततेचे राज्य होय. दुसरे, इंग्रजी शिक्षण. तिसरे, धार्मिक आचार्यांचा धर्मप्रसार. भारतवर्षीयांनी लक्षात ठेविले पाहिजे की, या न्यायशील ब्रिटिश गव्हर्मेंटपासून झालेल्या उपकारांचे विस्मरण होऊ न देता आपण सदैव राजनिष्ठ असले पाहिजे. त्याचप्रमाणे धार्मिक आचार्यांचेही उपकार विसरु नयेत. विशेषकरून ज्याने धार्मिक स्वराज्य देऊन प्रजेला धार्मिक दास्यापासून मुक्त केले आहे, त्या वैदिक धर्मोद्धारक महर्षी दयानंद सरस्वतीना विसरु नका.

इंग्रजी शिक्षणापासून भारतीयांना तिसरा डोळा आला आहे. हा केवढा मोठा फायदा आहे बरे! प्रथम आम्ही कोण होतो, आमची काय स्थिती होती, आता काय स्थिती आहे, पुढे आमची काय स्थिती होईल वगैरे गोष्टीचे ज्ञान होत आहे; ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. भारतवर्षात ज्या सभा, देश, जाती, धर्म, समाज, सुधारणादी कार्ये करीत आहेत त्या सर्वाबद्दल माझी अंतःकरणपूर्वक सहानुभूती आहे. या सर्वांच्या कार्यात मी मिसळून असतो व त्याच भावनेने मी आपल्या सभेत आलो आहे. आता विशेष काही न बोलता आपल्या मुख्य विषयाकडे वळतो. ज्या देशात आपण राहतो त्या देशाचे नाव आर्यावर्त असे आहे. याला आर्यावर्त म्हणण्याचे कारण असे की, प्रथम आर्य लोकांनी वसाहत केली. या देशाच्या रहिवाशाना आर्य म्हणत असत. आर्यांचे मूलस्थान तिबेट. (त्रिष्टित तिब्बात) आर्य प्रथम दोन वर्णाचे होते: एक, आर्यवर्ण. दुसरा, दस्यूवर्ण. हे सर्व एकाच आईबापांपासून जन्मलेले होते.

आर्यांच्या गुणकर्मांचा स्वीकार करून दस्यू लोकांना आर्य होता येत असे. आर्य लोक दस्यूचे गुणधर्म स्वीकारुन दस्यू बनत असत. आर्यांची सामाजिक कार्ये जसजशी वाढू लागली तसतशी ती करण्याकरिता

अनुक्रमणिका

चार वर्णाची स्थापना झाली. ‘निरूक्त’ मध्ये वर्ण शब्दाचा अर्थ असा दिला आहे: ‘वर्णो वृणोति’ [वर्णाचा स्वीकार करता येतो म्हणून अगर वर्णाच्या योग्यतेचे गुण प्राप्त करून घेऊन मनुष्य वर्णाचा स्वीकार करतो, शिवाय वर्णाचे परिवर्तनही होते. म्हणून त्याला ‘वर्ण’ असे म्हणतात. ‘निरूक्त’: आ: २ खंड ३:]

“धर्माचरणाने खालचा वर्ण वरच्या वर्णात जाऊ शकतो. तसेच वरचा वर्ण अधर्माचरणाने खालच्या वर्णाप्रत जातो. वैदिककाळापासून ते महाभारताच्या काळापर्यंत ही मर्यादा राहिली आहे.” [धर्म्मचर्य याजचप्पन्यो वर्णाः पूर्व पूर्व वर्णमापद्यते जातीपरिवृतौ।
अधर्म्मचुर्य्यया पूर्वो वर्णो जधन्यं वर्णमापद्यते ॥ जातीपरिवृतौ ॥ आपस्तम्ब
॥ २॥ ८॥ ७]

“वेदांचा सांगोपांग व समजून उपजून अभ्यास करणे, दुसऱ्यास शिकविणे; दुसरे यज्ञ आदीकरून कर्म स्वतः करणे व दुसऱ्याकडून करविणे; तिसरी गोष्ट, दान घेणे आणि देणे हे ब्राह्मकर्म” [ब्राह्म वर्णाचे कर्म (अध्यापनं अध्ययनं यजनं याजन तथा। दानं प्रतिग्रहश्चैव ब्राह्मणानामकल्पयत्।]

“शांती, मनोनिग्रह, तप, आतून व बाहेरून स्वच्छता, क्षमा, सरळपणा, ज्ञान, विज्ञान (ईश्वर, जीव, प्रकृती यांचे ज्ञान) आस्तिक्यभाव ही ब्राह्मणांची कर्मे होत.”
[शमो दमस्त पःशौचं क्षांतिरार्जवमेव च।
ज्ञानं विज्ञानामास्तिवयं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥]

“प्रजेचे रक्षण करणे, प्रजेच्या कल्याणाकरिता दान देणे, होम करणे, वेदांचे पठण करणे, युद्ध करणे, निर्भयपणे राहणे, धैर्यवान होणे, युद्धात चातुर्य, विषयात न रमणे, न फसणे, युद्धातून परत न फिरणे, प्रजेच्या रक्षणासाठी सर्वस्व अर्पण करणे, ईश्वरावर दृढ विश्वास ठेवणे हे क्षत्रियाचे स्वभाविक कर्तव्य होय.”
[प्रजनां रक्षणं दानमिज्याऽध्ययनमेव च।
विषयेष्व प्रसक्तिश्च क्षात्रकर्म स्वभावजम् ॥
शौर्य तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम्।
दानमिश्वरभावश्च क्षात्रकर्म स्वभावजम् ॥]

“जनावरे पाळणे व त्यांची वाढ करणे, दान देणे, यज्ञादी कर्म करणे, वेदांचे सांगोपांग अध्ययन करणे, देशावर जाऊन व्यापार करणे, सावकारी करणे, शेतकी करणे हे वैश्यांचे कर्तव्य आहे.”
[पशूनां रक्षणं दानमिज्याऽध्ययनमेव च।
वणिक् पथं कुसीदं च वैश्यस्य कृषिभेव च ॥]

“शिल्पकलेचे ज्ञान मिळविणे व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्या कामात मदत करणे हे शूद्राचे कर्तव्य होय.”
[परिचर्यात्मकं कर्म शद्रास्यापि स्वभावजम्।]

वैदिक काळात अशा तऱ्हेची स्वतंत्रता होती की, जो कोणी एखाद्या वर्णाचे कर्तव्य करी त्याला त्या वर्णात सामील करून घेतले जाई. वेद आदीकरून शास्त्रांचा अभ्यास करण्यास प्रत्येक स्त्रीपुरुषांस अधिकार होता. वैदिक काळात सर्व वर्गांचे लोक ऋषी झालेले आहेत. जोपर्यन्त स्त्रिया मंत्र जाणणाऱ्या होत्या तोपर्यन्त आर्यावर्त स्वर्गाप्रमाणे होता. ‘स्त्रियांनी व शूद्रांनी वेद वाचू नयेत’ अशा कल्पित श्रुतीचा आवाज आकाशातूनसुद्धा काढू देत नसत. त्यावेळी शूद्रांनी वेद ऐकले तर त्यांच्या कानात शिसे कढवून ओतले जात असे. ज्यावेळी वर्णव्यवस्था वंशपरंपरा रजिस्टर झाली तेव्हा एका वर्णाच्या मनुष्याला दुसऱ्या वर्णाचे काम करणे कठीण होऊ लागले आणि लोक आपल्या वर्णातील कर्तव्यापासून हळूहळू मुकू लागले. समाजाची घडी बिघडू लागली. शेवटी जी वर्णव्यवस्था गुणकर्मावर अवलंबून होती ती जन्मावर येऊन बसली.

याप्रकारचे नियम करून त्याविरूद्ध कोणाची ब्र काढण्याची छाती होऊ नये म्हणून ते स्मृतीमध्ये घुसवून दिले.

वर्णव्यवस्था जन्मावर आहे, म्हणजे आईबाप ब्राह्मण आहेत; त्यालाच ब्राह्मण म्हणावे. दुसऱ्या कोणालाही ब्राह्मण म्हणता कामा नये. तसेच ज्याचे आईबाप क्षत्रिय तोच क्षत्रिय. मग त्याच्या अंगी गुण असोत वा नसोत. ज्याचे आईबाप वैश्य, तोच वैश्य. ज्याचे आईबाप शूद्र तो शूद्र. मग त्याच्या अंगी कितीही प्रतीचे गुण असोत. जे जुने ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य गुणकर्मांवरून श्रेष्ठ होऊन जन्माचा अभिमान जसेजसे धरू लागले तसतसे नव्या मनुष्याला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य होता येईनासे झाले. या पद्धतीच्या योगाने हिंदूंची जी अधोगती झाली ती इतिहास वाचणाऱ्याला पूर्ण अवगत आहे. याच समयी चार वर्णांच्या पाच हजार जाती झाल्या. यामुळे हिंदूंचे सामाजिक बळ ऱ्हास पावू लागले. प्रत्येक जात दुसऱ्या जातीशी खाणेपिणे करीत नसून लग्नसंबंधही करीत नाही. एका जातीवर जुलूम होऊ लागला तर दुसरी जात डोळे उघडून पाहात राहाते. त्याबद्दल तिला थोडीही दया येत नाही. खरोखर मानवी प्राण्यांची एकच जात आहे. जातीचे लक्षण शास्त्रकारांनी असे लिहून ठेविले आहे:

“ज्यांच्यामध्ये समान भाव, समान आकृती व समान उत्पत्ती आहे त्यांची एक जात समजावी. याप्रमाणे व्याकरणशास्त्रामध्येही लिहून ठेविले आहे की, ज्यांची आकृती समान त्यांची जात एक. जसे मनुष्य, गाय, घोडा, हत्ती, पिंपळ, वगैरे.”
[समान प्रसवात्मिका जाती ॥ न्यायशास्त्रम्]

आमच्या हिंदू लोकांची समज अशी आहे की, हिंदुस्थानाखेरीज इतरत्र वर्णव्यवस्था नाही. हा आमचा भ्रम आहे. ऐतिहासिक जग याच्या उलट आहे. आमच्याप्रमाणे दुसरेही आर्य वंशज आहेत. आमच्याप्रमाणे इतर देशातही वर्णव्यवस्था आहे. मात्र आमच्यात व त्यांच्यात फरक हा आहे की, दुसऱ्या देशात वर्णव्यवस्था गुणकर्मावर अवलंबून आहे. पण आमच्या येथे ती जन्मावर अवलंबून आहे. त्यांच्या येथे वर्णांचे परिवर्तन याच जन्मात होते. पण आमच्या येथे जन्मजन्मान्तरीसुद्धा त्यांचे परिवर्तन होत नाही. हा सर्व रूढीचा महिमा आहे. वेदादीशास्त्र तरी याच्या उलट आहे. ‘मनुस्मृती’मध्ये असे लिहून ठेविले आहे की:

“क्षत्रियांच्या जातीमध्ये उपनयन संस्कारांचा लोप झाल्यामुळे व ब्राह्मणांमध्ये नुसत्या दर्शनाने मनुष्य वृषल होतो म्हणजे संस्कारहीन होतो. त्यांना काय नाव द्यावे?”
[शनकैस्तु क्रियालोपादिमा : क्षत्रियजातम : ॥
वृषलत्वं गता : लोके ब्राह्मणादर्शनेनच ॥ मनु : अध्याय: १० : २ लो. ४३॥]

पौण्ड्र, चौण्ड्र, द्रविड, कंबोज यवन, शक, पारद, पल्हव, चीना, किरात, दाद वगैरे ब्राह्मणादी वर्ण, क्रियेचा लोप झाल्यामुळे संस्कारहीन झालेले; दुसऱ्या देशात, दुसऱ्या जातीच्या नावाने वाखाणू लागले. पैकी काही म्लेंच्छ व काही आर्य भाषा बोलणारे होते. त्या सर्वांना दस्यू म्हणू लागले. केवळ अन्य जातींमध्ये वेदोक्ताचा संस्कार लोप पावला म्हणूनच नव्हे तर ब्राह्मणांच्या अज्ञानामुळे व अत्त्याचारी वर्तनामुळेही ही म्लेंच्छ जात उत्पन्न झाली.
[पौण्ड्रका श्चौन्ड्रद्रविडा : काम्बोजा : यवना : शका :।
पारदापल्हवाश्चीना : किराता दरदा : खशा : ॥
मुखबाहूरूपज्याना या लोके जातयो बहि :।
म्लेंच्छवाचश्चार्यवाच सर्वे ते दस्यव : स्मृत : ॥:]

अनुक्रमणिका

विष्णु पुराणाच्या चवथ्या अध्यायात असे लिहून ठेविले आहे की, त्रिशंकूच्या वंशात बाहू नावाचा राजा होऊन गेला. तो हैह्य, ताल, जंघादी क्षत्रियांना हार जाऊन आपल्या राणीसह अरण्यात गेला. पुढे काही दिवसांनी तो मरण पावला. तेव्हा त्याची राणी त्याच्याबरोबर सती जाऊ लागली. ती गर्भवती असल्याने ऋषीने तिला सती जाण्यास प्रतिबंध केला व म्हटले की, "हे राणी, तुझ्या पोटी एक पराक्रमी पुत्र होईल. तो सर्व क्षत्रियांचा नाश करील." राणी सती न जाता ऋषींच्या आश्रमात राहू लागली. त्या ऋषींचे नाव वसिष्ठ. पुढे तिला पुत्र झाला. त्याचे नाव सगर ठेवून ऋषीने त्यास क्षात्रविद्या शिकविली. सगर मोठा झाल्यावर सर्व हकीकत त्याला आईकडून समजली. तेव्हा क्षत्रियाबरोबर तो युद्ध करण्यास गेला व क्षत्रियांस जर्जर करून सोडले. त्यामुळे सर्व क्षत्रिय वसिष्ठास शरण गेले. तेव्हा ऋषी सगरास म्हणाला, "हे पुत्रा, आता ह्या क्षत्रियांना मारू नकोस. मी या क्षत्रियांना द्विजत्वापासून व धर्मापासून वेगळे केले आहे. त्यांना जिवंतपणीच मारून टाकीले आहे. हे आता जिवंत मुडदे आहेत." आणि सगराने, या क्षत्रियांच्या वंशाचे परिवर्तन करून टाकीले. कित्येकांची शेंडी काढून टाकून त्यांना 'यवन' हे नाव दिले. त्याचबरोबर वेद आदीक न शास्त्रांचा अभ्यास करण्याचा अधिकारही काढून गेतला. क्षत्रिय धर्मापासून त्यांना काढून टाकीले. अशाप्रकारे परशुरामाच्या अत्याचारानेही पुष्कळ क्षत्रिय क्षत्रियवर्णापासून पृथक् होऊन दुसऱ्या जाती बनल्या."

आमच्या या देशात हजारो जाती झाल्या. अशाचप्रकारे कोणत्या तरी समयी आपली ही जात क्षत्रियापासून पृथक् झाली असावी. याप्रमाणे जगामध्ये ऐतिहासिक काळी कित्येक वेळा परिवर्तन झाले व होत आहे. पुढेही होईल. हा नैसर्गिक नियमच आहे. महाभारताच्या काळापर्यंत, येथील क्षत्रियांचा विवाह दुसऱ्या देशातील क्षत्रियांबरोबर होत असे. 'महाभारत' ग्रंथावरून हे दिसून येण्यासारखे आहे. अर्जुनाचा विवाह उलुपीबरोबर, धृतराष्ट्राचा गांधारीबरोबर वगैरे झाले आहेत. महाभारताच्या पूर्वीही काही राजांचा विवाहसंबंध दुसऱ्या देशातील राजांबरोबर झाला आहे; असे इतिहासच सांगतो.

आता पुढे विशेष काही न सांगता आपल्या विषयाच्या संबंधाने दोन शब्द सांगावयाचे आहेत. जर तुम्ही अंतःकरणपूर्वक क्षात्रधर्म स्वीकारणार असला तर आपले मी अंतःकरणपूर्वक स्वागत करतो. तुम्ही क्षत्रिय झाला आहात. क्षत्रिय वर्णाचे गुणधर्म स्वीकार करा. आपल्या देशातील दुःखी प्रजेचे रक्षण करण्यास कंबर बांधा. आपल्यास क्षत्रिय होण्यास वेदादीशास्त्राकडून अधिकार आहे. परमेश्वराने आपल्याला साधनही करून दिले आहे. मला वाटते, प्रत्येक मनुष्य चारी वर्णाची योग्यता प्राप्त करून घेईल तेव्हा देशाची सुधारणा होईल. परंतु आपल्याला एक गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे ती ही की, हा विद्येचा समय आहे.

सर्वांच्या अंतःकरणामध्ये ज्ञानाचा प्रकाश पडला आहे. नुसत्या जन्माने क्षत्रिय अगर ब्राह्मण झालेल्या लोकांचा आता कोणीही आदर करणार नाही. आपण गुणकर्माने क्षत्रिय व्हा. नावाच्या क्षत्रियांच्या यादीत तुमच्या नावाची भर घालू नका. तसेच आम्ही क्षत्रिय होतो, अमूक वंशात आम्ही जन्मलो वगैरे वितंडवादात पडू नका. आपला कोणाशीही संबंध असो वा नसो, उन्नती करून घेण्यास हा मार्ग उत्तम नव्हे. सेन्सस रिपोर्टाचे अधिकारी व दुसरे कोणीही आपल्यास काहीही म्हणोत, त्याबद्दल मुळीच फिकीर करू नका. आपल्या जातीत वेदोक्त संस्कार, वेदोक्त कर्माचा प्रसार व सदाचाराची वाढ करा. आपल्या मुलांना शिक्षण द्या, असहाय्य व गरीब बांधवांना मदत करा.

कुरमी क्षत्रियांमध्ये विधवा विवाह प्रचलित असलेला पाहून मला मोठा आनंद होतो.

अनुक्रमणिका

आपली क्षत्रिय जात भ्रूणहत्या, व्यभिचारादी पापांपासून सुरक्षित राहील असा माझा विश्वास आहे. हा अपधर्म आहे. मनुष्य समाज निर्दोष राखण्याकरिता हे आहे. वेदादी शास्त्रांचे याला पाठबळ आहे. आमच्या गव्हर्मेंटनेही विधवा विवाहाचा कायदा पास केला आहे. ज्या जातीमध्ये या अपधर्माचा प्रचार नाही त्या जातीत भ्रूणहत्या, व्यभिचार आदी करून पाप घडत आहे. हजारो मुले प्रत्येक वर्षी मरत आहेत; ही किती दुःखाची गोष्ट आहे बरे!

भारतवासीय लोक उन्नतीची तीन मुख्य साधने समजतात. ती ही : पहिले, पडदा. दुसरे, विवाह निषेध आणि तिसरे, कोणाशीही मिसळून भोजन न करणे.

काय आश्चर्य आहे! कोल्हापूर राज्य संस्थापक महाराणी ताराबाई, महाराणी सती अहिल्याबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, महाराणी कमलाबाई आदी करुन क्षत्रिय स्त्रियांनी राज्याचा गाडा हाकलेला आहे. रणांगणावर जाऊन शत्रूबरोबर लढायाही मारलेल्या आहेत. हे सर्व काम पडद्यात राहून केवळ अशक्य होते. सध्याही पडद्याची चाल सर्व देशात नाही. महाराष्ट्र, मद्रास, गुजराथ वगैरे प्रांतांत पडदा बिलकूल नाही. दुसऱ्या प्रांतांमध्येही काही थोड्या जातींमध्येच पडदा आहे. पडद्यामुळे स्त्रियांमधील शूरतादी गुणांचा सर्वथा नाश होतो. आपला विवाह कृषिकर्मावर विशेषेकरून होतो. हे ऐकून मला मोठा आनंद होतो. कृषिकर्म इतके पवित्र आहे की वैदिक काळात, वर्षातून एकदा चक्रवर्ती राजा व त्याचे मंत्री हे कृषिकर्मांची उन्नती करण्याकरिता नांगर हाकीत असत. ज्याच्या योगाने भूमीमध्ये एक दाणा टाकून हजारो दाणे मिळतात व ज्या कृषिकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते; ते कृषिकर्म हलके अथवा वाईट असे मी मुळीच मानीत नाही. मी माझ्या युवराजाला कृषिविद्या शिकण्याकरिता विलायतेला व अलाहाबादला कृषी स्कूलमध्ये पाठविले होते. आपल्याला माहीत आहेच की कृषिकर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वतःला सुख होऊन सर्व मनुष्य जातीलाही सुख मिळते. कृषिकर्माशी पशुपालन व रक्षण यांचाही संबंध येतो. याकरिता पशुपालनासंबंधीही पुष्कळ काम करावयाचे आहे. दूध तूप वगैरेची समृद्धी देशांदेशामध्ये झाली पाहिजे. कृषिकर्म करताना क्षात्रतेजाला बाध येतो असे नाही. ज्यावर मनुष्यसमाजाची सुव्यवस्था व उन्नती अवलंबून आहे, ते कर्म करणारे नीच आहेत हे म्हणणे मुळीच पटत नाही.

युरोपात शेतकरी लोक प्रतिष्ठित समजले जातात. तेथील शेतकरी, राज्यातील उच्च दर्जाच्या नोकरीवर आहेत. तसेच तिकडे शिल्पकलेमधील लोकांची प्रतिष्ठा मोठी आहे. जो आज चांभार अथवा भंगी आहे त्यास नीच असे म्हणण्याचे साहस कोणाच्याही अंगी नाही. याचे कारण असे आहे की, शिल्पकला सर्वस्वी त्यांच्याच हातात असते. येथील लोक निर्धन व अज्ञानी असल्यामुळे इथल्या शिल्पकलेची सुधारणा कशी होईल? सुशिक्षित बी. ए.; एम. ए. झालेले लोक हे काम अशा भीतिपोटी घेत नाहीत की, आम्हाला शूद्र म्हणतील, आम्हाला नीच समजतील. अशाने देशात ऐश्वर्य कसे वाढेल? ऐश्वर्याशिवाय देशाची उन्नती कशी होईल?

हे परमेश्वरा! आमच्या देशातील लोकांना सुबुद्धी देऊन त्यांच्या अंतःकरणात ज्ञानाचा प्रकाश पाड. आम्ही सर्व माणसे आपले सद्‌गुणी चिरायु पुत्र होऊन बंधूप्रेमाने राहू. दुसऱ्याचे दुःख ते आपले दुःख व दुसऱ्याचे सुख तेच आपले सुख असा आमचा समज होऊ दे. सर्वजन मिळून शारीरिक, आत्मिक व सामाजिक उन्नती करून, संसाराला स्वर्गधाम बनवू या. शेवटी, कुरमी क्षत्रियांना धन्यवाद देऊन आपली मंगल कामना पूर्ण करावी व आपल्या जातीच्या सभेची दिवसेदिवस भरभराट होवो, अशी मी परेश्वराजवळ प्रार्थना करतो.

* * *

अनुक्रमणिका

चौदा

योग्य काम, योग्य दाम

***

स्वदेशाचा विकास कशावर अवलंबून आहे याचे मर्म राजर्षी शाहू महाराजांना चांगले उमजले होते. त्यांच्या मते, “देशाची उन्नती उद्योगधंद्यांच्या वाढीवर अवलंबून आहे; हे तत्त्व सर्वमान्य आहे. अशाप्रकारे उद्योगधंद्यास उत्तेजन मिळावे याविषयी मला मोठी आवड असून त्या दिशेने माझे प्रयत्न आपणास माहीतच आहेत.” भारतासारख्या कृषिप्रधान देशात कोणते उद्योगधंदे उभारता येतील याचा अंदाज घेताना राजर्षी म्हणतातः ‘हिंदुस्थान हा मुख्यत्वे करून शेतीचा देश आहे. पाश्चात्य राष्ट्रात भांडवलवाले आणि मजूर यांच्यात मोठी स्पर्धा चालू आहे. शेतीच्या प्रगतिअभावी लोक शहरांकडे धाव घेत आहेत. परिणामी खेडी ओस पडत आहेतच परंतु त्यामुळे शहरे व यांचे आरोग्यही बिघडून गेले आहे... या करिता देशाचे कल्याण ज्यांना करावयाचे आहे, त्यांनी प्रथमतः आपल्या शेतीच्या सुधारणेकडे आवश्यक लक्ष दिले पाहिजे...नांगर व विहिरींचे पाणी काढण्याची मोट यांची सुधारणा ही आजच्या प्रत्येक शेतकऱ्याचे हित करणारी आहे. सुधारलेले तंत्र-विज्ञान शिकण्याच्या दृष्टीने कारागीर व शेतकऱ्यांनी पुढे आले पाहिजे. देशाच्या उद्योगधंद्यांच्या वाढीवर आपली प्रगती अवलंबून आहे. शेतीवर चालणारे कारागिरीचे उद्योगधंदे हेच या दृष्टीने उपयुक्त साधन आहे.” ‘सहकारी कारखाने, सहकारी संस्था व सहकारी दुकाने काढा, त्यास हवी ती मदत देईन, असे आश्वासन देऊन राजर्षींनी सहकारी तत्त्वावरील औद्योगिकरणाच्या तत्त्वाचा उच्चार आणि कृतीने प्रचार केला आहे. त्या दिशेने देशात सर्वप्रथम यशस्वी प्रयोगही केला आहे.

***

कोल्हापूर : १५ ऑगस्ट, १९२०
पाचव्या आर्यक्षत्रिय परिषदेच्या अध्यक्षपदावरून, शाहू महाराजांचे झालेले भाषण

शाहू महाराज ‘लोकांचे राजे’ असल्याने ‘जनतेचा सहभाग’ प्रमुख मानत आले आहेत. साहजिकच आर्यक्षत्रिय परिषदेला जोडूनच ‘राजाराम इंडस्ट्रियल स्कूल बोर्डिंग’च्या, शोरुमच्या भरविण्यात आलेल्या प्रदर्शनाच्या संदर्भात, ‘योग्य काम, योग्य दाम’मध्ये राजर्षी सांगतातः “आपणास काय करिता येईल हे त्यावरून स्पष्टपणे दाखविण्यात आले आहे, आपणास खरे खरे स्वदेशीचे व्रत पाळावयाचे असेल तर कोणकोणते जिन्नस येथे करविता येतील याचाही बोध आपल्या प्रदर्शनापासून आमच्या स्वदेशभक्तांस मिळणार आहे.”

हरेक बाबतीत ‘हे तुझे आहे, तुझ्यासाठी आहे. तू त्यात सामील झाल्याखेरीज ते पुढे रेटणार नाही.’ अशी सामान्य माणसाच्या मनामध्ये भावना निर्माण करून, त्याच्यामधील सुप्त गुणांना अवकाश मिळवून देण्याकडे शाहू महाराजांचे असलेले लक्ष ‘लोकांचा राजा’ हे बिरुद सार्थ करणारे आहे.

***

चौदा

योग्य काम, योग्य दाम

* * *

आजच्या प्रसंगी अध्यक्षस्थान स्वीकारून, आपल्या कार्यास उत्तेजन देण्यास मला फार आनंद वाटत आहे.

आताच जी हकीकत आपल्या उद्देशासंबंधाने व कार्यासंबंधाने वाचण्यात आली ती अनेक प्रकारे मनोरंजक आणि बोधप्रद आहे. आपल्या जातीच्या लोकांचे हस्तकौशल्य सर्वश्रुत आहेच. ज्या ज्या प्रसंगी अशा कौशल्याची जरूरी लागते त्या त्या वेळी मला आपल्यातील कारागिरांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. माझ्या नित्याच्या व्यवहारातील बऱ्याच जिनसा आपल्या कारागिरांच्या हातच्या आहेत हे मी मोठ्या आनंदाने सांगतो. माझ्या रयतेत असे कुशल पुरूष आहेत याचा मोठा अभिमान वाटतो. आपल्या हस्तकौशल्याचे प्रदर्शनदेखील यादृष्टीने बोधप्रद आहे. आपणास काय करता येईल हे यावरून स्पष्टपणे दाखविले आहे. आपणास खरे खरे स्वदेशीचे व्रत पाळावयाचे असेल तर कोणकोणते जिन्नस येथे करविता येतील याचाही बोध आपल्या प्रदर्शनापासून, आमच्या स्वदेशभक्तांस मिळणार आहे. देशातील कलाकौशल्यास उत्तेजन मिळण्याकरिता असल्या प्रदर्शनाची किती आवश्यकता आहे हे पाश्चात्य राष्ट्रांनी आपणास दाखविले आहेच. कोणत्याही मोठ्या उत्सवाच्या किंवा समारंभाच्या प्रसंगी ते एक स्व-राष्ट्रीय प्रदर्शन भरवीत असतात. आपले हे प्रदर्शन, आपल्या लोकांस भूषणावह असून होतकरु कारागीरांस मार्गदर्शक होऊन राहील. त्याचप्रमाणे आपला माल घेणाऱ्या गिऱ्हाईकासही त्यापासून कोणता जिन्नस कोठे मिळेल हे कळून उपयोग होईल.

देशाची उन्नती उद्योगधंद्यांच्या वाढीवर अवलंबून आहे. हे तत्त्व सर्वमान्य आहे. अशाप्रकारे उद्योगधंद्यास उत्तेजन मिळावे याविषयी मला मोठी आवड असून त्या दिशेचे माझे प्रयत्न आपणास माहीत आहेतच.

हिंदुस्थान हा मुख्यत्वेकरून शेतकीचा देश आहे. यातील प्रजेचा मुख्य धंदा शेती हा आहे. शेकडा ८० टक्के लोक येथे शेतीवर उदरनिर्वाह करीत आहेत. येथील कारागिरांचे अंगी कलाकौशल्य श्रेष्ठ दर्जाचे आहे. त्याविषयी वाद नाही. परंतु हे कलाकौशल्य सांप्रतच्या यांत्रिक चढाओढीत टिकाव धरण्यासारखे नाही. सध्या पाश्चिमात्य राष्ट्रात भांडवलवाले व मजूर यांच्यामध्ये मोठी स्पर्धा लागली आहे. आजपर्यंत भांडवलवाल्यांचे दिवस होते. आता मजुरांनी आपला काळ आणला आहे. आपल्या मंडळ्या स्थापन करून सर्वांचे एकदिल केल्याने, आता त्यांना आपल्या मागण्या एकमुखाने मागता येतात व संघशक्तीच्या जोरावर त्या भांडवलवाल्यांकडून मान्य करविता येतात. पण आजही मजुरांची स्थिती तेथे फारशी स्पृहणीय नाही. अशाप्रकारच्या मजुरांचा पेशा हिंदुस्थानात यावा हे मला पसंत नाही. भांडवलवाल्यांच्या मर्जीवर व स्वार्थबुद्धीवर, न्यायबुद्धीवर नव्हे; हजारो माणसांचे जीवित अवलंबून राहावे ही स्थिती बरोबर नाही. याकरिता अशाप्रकारचे, पश्चिमेच्या धर्तीवर सर्वस्वी चालणारे कारखाने आमच्या देशात फारसे फायदेशीर होणार नाहीत. शेतकीत पुरेशी प्राप्ती नाही; पोट भरत नाही म्हणून मोठ्या शहरात मजुरी करण्यास जावे लागणारे लोक दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. या योगाने खेड्यातील वस्ती कमी पडून शहरात वस्ती फार दाट होत आहे. तेथील आरोग्य अगदी बिघडून गेले आहे. त्यामुळे खेड्यांतही रोगाचा प्रकार जास्त होत आहे. याकरिता देशाचे कल्याण ज्यांना करावयाचे आहे त्यांनी प्रथमतः आपल्या शेतीच्या सुधारणेकडे आवश्यक लक्ष दिले पाहिजे. इतर देशांच्या मानाने आमच्या शेतकीचे उत्पन्न सरासरीने पुष्कळच कमी आहे.

ते वाढविण्यास पुष्कळ जागा आहे. शेतीच्या उद्योगात जितक्या अधिक लोकांना नेहमी काम मिळेल तितके चांगले. यापेक्षा जास्त असलेली लोकसंख्या मजुरदारांच्या धंद्यात जावी. शेतकी सुधारणेस सुधारलेल्या औतांची फार जरूरी आहे. आपले लक्ष तिकडे आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. आपल्यासारख्या कुशल लोकांनी, या बाजूस विशेष लक्ष दिल्यास ही उणीव भरून येणारी आहे. नांगर व विहिरीचे पाणी काढण्याची मोट यांची सुधारणा ही आमच्या प्रत्येक शेतकऱ्याचे हित करणारी आहे. त्यादृष्टीने आपल्या प्रयत्नांचे अभिनंदन करतो. आपले प्रयत्न यशस्वी होण्याच्या कामी मजकडून योग्य ती मदत अवश्य मिळेल याविषयी शंका नको.

आपल्या जातीत विद्येचा प्रसार करण्याचा प्रयत्न करणे हे प्रत्येकाचे काम आहे, विद्यार्थी वसतिगृहे स्थापणे हे कोल्हापूरचे एक वैशिष्ट्य आहे. येथे विद्यार्थी वसतीगृहांची जितकी संख्या आहे तितकी दुसऱ्या ठिकाणी क्वचित्च असेल! आपला हा प्रयत्न फार चांगला आहे व तो सर्वांच्या वैभवास पात्र आहे.

कलाकौशल्याच्या शाळेसंबंधी फारसे सांगावयास नको. आपले कौशल्य आपल्या मुलांशिवाय दुसऱ्यास शिकवावयाचे नाही अशी घातुक प्रवृत्ती होती. तिच्यामुळे आपल्या कलांचा फार ऱ्हास झाला आहे. विद्येचे खरे रक्षण, ती गुप्त ठेवून रक्षण करावयाची ही चुकी ब्राह्मणबंधूंनी प्रथम केली. त्यांचे अनुकरण इतर लोकांनी केले. या चुकीमुळे ब्राह्मणांची विद्या निस्तेज झाली. ब्राह्मणेतर अज्ञान-अंधःकारात बुडाले. कारागिरांच्या विद्येचीही स्थिती तशीच झाली. त्यांची कला ऱ्हास पावली. आता आपण आपल्या जातीबाहेरील मुलांसही, आपल्या शिल्पशाळेत घेऊन आपल्या मुलांच्याबरोबर त्यास शिक्षण देण्यास तयार आहात ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. पूर्वीची चूक आपल्या लक्षात आलेली असून ती पुनः होऊ नये याविषयी आपण खबरदारी घेत आहात ही योग्य गोष्ट आहे.

जातिभेद हा, हिंदुस्थानास फार मोठा रोग आहे असे मी याप्रसंगी स्पष्ट बोलून दाखविले आहे. जातिभेद मोडण्याचे माझे प्रयत्न सतत चालू आहेत. असे असतानाही मी आपल्यासारख्या जातीविशिष्ट प्रयत्नास मदत देतो. हे माझे वर्तन माझ्या बोलण्याशी विसंगत आहे असे कोणीही म्हणेल; तेव्हा यासंबंधाने चार शब्द सांगणे गैर नाही. काही पर्यायापर्यन्त जातिभेद व जात्याभिमान सुटत नाही. मनुष्य आपल्या मुलांबाळांची विशेष काळजी घेतो. हे त्यांचे करणे गैर असे कोणी म्हणणार नाही. परंतु ज्याला आपल्या सबंध आयुष्यात आपल्या मुलाबाळांच्या हितापलिकडे काही दिसत नाही त्याला कोणीही दोष देईल. ज्या समाजात आपण वाढलो, त्या समाजाची उन्नती करण्याची जबाबदारी आपणावरही आहे, याची विस्मृती होऊ देता कामा नये. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, जात्याभिमान हा राष्ट्रकार्यास पोषक असावा. राष्ट्राचे हित नजरेआड करणारा नसावा.

आपल्या जातीचा जो थोडा इतिहास आपण सांगितला, त्यावरून प्रत्येकजण आपल्या हस्तकौशल्याने व राजा किंवा सरदार अशा व्यक्तींच्या आश्रयाने उदयास आला आहे असे दिसते. त्यामुळे त्यांचे कूळ उदयास आले असेल. या काळात बहुजनसमाजाच्या हाती सत्ता जात असल्याने ही आपली पुराणी पद्धत आता आपल्या उपयोगी पडणार नाही. सध्या राजाश्रयापेक्षा लोकाश्रयच विशेष श्रेयस्कर आहे. तसेच आता प्रत्येकाने निरनिराळे काम करण्याचे दिवस गेले. पुष्कळ लोकांनी आपली कुशलता, अक्कल, पैसा व अंगमेहनत एकत्र केली पाहिजे, म्हणजेच सहकार्य केले पाहिजे. पूर्वी फार तर एक कुटुंब एका ठिकाणी काम करी. येणारा नफा, त्या कुटुंबातील माणसास उपयोगी पडे. आता आपली ही कुटुंबाची व्याख्या पुष्कळ विस्तृत केली पाहिजे. १०।२०।५० कुटुंबे या उद्योगधंद्याकरिता एक झाली पाहिजेत. त्यांना त्यांच्या

अनुक्रमणिका

योग्यतेप्रमाणे वेतन मिळाले पाहिजे. होणारा नफाही वाटून मिळाला पाहिजे. यासाठी आपण सहकार्य करण्यास शिका. आपली सहकार पतपेढी काढा.

आपल्या शाळेची भरभराट व्हावी, त्याचप्रमाणे आपल्या उद्योगाची व कारखान्याचीही भरभराट व्हावी असे मी इच्छितो. या कामी सवलत व उत्तेजन देण्यास मी केव्हाही माघार घेणार नाही, याची आपण खात्री बाळगा.

***

अनुक्रमणिका

५. मजूर

पंधरा

हक्कांसाठी झगडा!

* * *

समाजाच्या सर्व स्तरातील मागासलेल्या लोकांना, खचलेल्या-पिचलेल्या अवघ्या दलितांना मार्गदर्शन करून, त्यांना उच्च स्थिती प्राप्त करून देणे हे शाहू महाराजांचे जीवितकार्य होते. कामगारवर्ग हा त्यापैकीच एक सामाजिक घटक, त्यांच्या उन्नतीसाठी मार्गदर्शन करताना ते म्हणतात: "लॉर्ड विलिंग्डनसाहेब व लेडी विलिंग्डनसाहेब यांच्या मनामध्ये सामान्यांविषयी जे प्रेम आहे, त्यामुळेच आज आपण येथे जमला आहात. तेव्हा त्यांच्या निर्भिड व स्पष्टवक्तेपणाप्रमाणे आपणही आपले विचार त्यांच्यापुढे मांडले पाहिजेत. मुंबई शहर हे व्यापार व उद्योगधंदा या बाबतीत सुप्रसिद्ध आहे. कारण "भांडवल व व्यवस्थापनचातुर्य यावरच व्यापार व उद्योगधंदा अवलंबून आहे अशी आजपर्यंतची समजूत आहे. भांडवलवाले लोकांची मजूरदार लोकांवर बेसुमार सत्ता चालते." म्हणून हिंदुस्थानातही 'मजूर संघ' बनवावेत असा राजर्षींनी आदेश दिला आहे. त्याप्रसंगी 'गवताच्या एकेका काडीची ताकद जास्त नसते पण अनेक काड्यांचा वेठ वळला तर त्याने हत्तीलाही बांधता येईल,' हे संघशक्तीचे, सांगितलेले महत्त्व विशेष स्वरूपाचे आहे. त्याहूनही विशेष हे आहे की, राजर्षी शाहू हे, ब्रिटिश साम्राज्यामधील एक मांडलिक संस्थानिक असूनही त्यांनी संघटना बांधणीचा, आदेश द्यावा. होऊ घातलेल्या क्रांतीची स्वप्ने- ज्यात स्वराज्यप्राप्तीची क्रांतीही अंतर्भूत आहे- सामान्य जनतेच्या कळवळ्याचे लेणे ल्यालेल्या, शाहू महाराजांनी सूचित केली आहेत; असेच नव्हे काय?

* * *

मुंबई : १० नोव्हेंबर, १९१८
परळ येथील कामगार मेळाव्याच्या अध्यक्षपदावरून, शाहू महाराजांनी केलेले भाषण

त्या दृष्टीने 'हक्कांसाठी झगडा' मध्ये कोणत्या विशेष योजना केल्या पाहिजेत याचे विवेचन करताना राजर्षी सांगतात: "इंग्लंडमध्ये मजूर संघाचे प्रतिनिधी पार्लमेंटमध्ये व प्रधानमंडळात शिरले असून ते आपल्या वर्गाच्या हिताचे रक्षण करीत आहेत. तेव्हा आपल्याकडील सर्वात मागासलेला वर्ग शेतकऱ्यांचा आहे. कारखान्यात मजुरी करणारे आपण सर्व शेतकरीच आहात. मजूरदार व इतर मागासलेले वर्ग यांच्या हिताचे संरक्षण करणे, या हिंदुस्थान देशातही जरूरीचे आहे. येथील पुढारलेल्या वर्गाकडून मागासलेल्यांच्या हितसंबंधांचे रक्षण होणे शक्य नाही. याकरिता जातवार किंवा वर्गवार मतदार संघातर्फे, त्यांच्यातील प्रतिनिधी निवडून आले पाहिजेत." राजर्षींनी कामगार शेतकऱ्यांना उद्देशून केलेले हे आवाहन प्रेरक आहे.

समाजजीवन, उत्तमोत्तम गोष्टींनी निरामय बनावे, समान संधी आणि समान न्याय प्राप्त होत जावा; ही राजर्षींची धडपड. 'हक्कांसाठी झगडा' मधील सर्वस्पर्शी उपाययोजनात ती दृष्टीस पडते.

* * *

पंधरा

हक्कांसाठी झगडा!

* * *

आजच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास आपण मला निमंत्रण केले आहे. हे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास मला विशेष आनंद व अभिमान वाटत आहे. कारण मी आपल्यांपैकीच एक आहे.

मागासलेल्या लोकांचा मार्गदर्शक होऊन त्यांना उच्च स्थिती प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करण्यात मला आनंद वाटतो. मी आपला पुढारी झालो तरी आपणाला केव्हाही भलत्या मार्गाने नेणार नाही. त्याविषयी खात्री असू द्या. आजच्यासारख्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास मला जितका आनंद वाटतो आहे, तितका आनंद एखाद्या पुढारलेल्या लोकांच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यात मला खास वाटला नसता! अशा लोकांच्या सभेचा अध्यक्ष मी होतही नाही; कारण ते आपल्या पायावर उभे रहाण्यास पूर्ण समर्थ आहेत. ते लोक कधी कधी मला बहुमान देण्याकरिता बोलावतात; तरी कधी मी ह्या कामास योग्य नाही असे समजून, मी त्यांची विनंती मान्य करीत नाही. कारण मजपेक्षा दुसरे लायक लोक पुष्कळ आहेत. त्यांनी हे काम करावे असे मी त्यांना सांगतो.

दर पाच वर्षांनी नवे गव्हर्नरसाहेब येतात व पूर्वीचे जातात. असे नेहमी होत असते. परंतु आपणासारख्या गरीब व अशिक्षित म्हणून मुक्या मजुरांची अशा प्रकारची प्रचंड सभा कोणत्याही गव्हर्नरसाहेबाने आजवर भरविली नव्हती. मग आजच अशी सभा भरत आहे त्याचे प्रयोजन काय? असा प्रश्न साहजिकपणे उपस्थित होतो. या प्रश्नाचे उत्तर माझे मित्र नारायणराव चंदावरकर यांनी नुकतेच दिले आहे. ते म्हणतात, “या (लॉर्ड विलिंग्डन) गव्हर्नरसाहेबाप्रमाणे दुसऱ्या कोणत्याही गव्हर्नरानी इतक्या आस्थेने व नेटाने, सर्वाच्या, विशेषेकरून गरीब लोकांच्या आयुष्यक्रमाशी संबंध ठेविला नव्हता.” अशिक्षित बहुजनसमाजा गव्हर्नरसाहेब मिसळत. त्याजविषयी भरवसा व प्रेम उत्पन्न केले होते.

लॉर्ड विलिंग्डनसाहेब आपणावर प्रेम करतास व आपणही त्यांच्यावर प्रेम करीत आहोत. ते, आपले प्रेम व त्यांच्याविषयी आपले ठायी असलेला आदर जाहीररीत्या व्यक्त करण्याकरिता आज रोजी आपण येथे जमलो आहोत.

नामदार गव्हर्नरसाहेब यांच्या पत्नी लेडी विलिग्डंन ह्याही आपल्या अंगच्या दया, परोपकार, दाक्षिण्य इत्यादी थोर सद्गुणांनी फार लोकप्रिय झाल्या आहेत. ‘हार्डिंग्ज हॉस्पिटल’ हे तर केवळ त्यांच्याच प्रयत्नांचे फल आहे. इतकेच नव्हे तर. नामदार गव्हर्नरसाहेबांना आपल्या कामात नावाजण्यासारखे यश मिळाले आहे; त्याचे बरेच श्रेय त्यांच्या अर्धांगीकडे आहे; ही गोष्ट उभयतांसही भूषणावह आहे. लेडी विलिंग्डन ह्या लॉर्ड ब्रेसी यांच्या कन्या होत, हे घराणे जुने नामांकित असून भूतदया, औदार्य इत्यादी उदात्त गुणांनी ते पुढे आलेले आहे. म्हणून लेडी विलिंग्डन यांच्यावरही हे अनुवंशिक संस्कार व्हावेत काही आश्चर्य नाही.

लॉर्ड विलिंग्डनसाहेब आज इतके लोकप्रिय झाले आहेत, त्यास केवळ त्यांच्या अंगचे गुण कारणीभूत आहेत. त्यांचे अंगभूत गुण विशेषप्रसंगी कसे दृष्टोत्पत्तीस आले व त्यांच्या कर्तबगारीची साक्ष कशी पटू

लागली, हे मी आपणास सांगितले पाहिजे असे नाही. गेल्या एप्रिल महिन्यात मुंबई येथे भरलेल्या 'वॉर कॉन्फरन्स' च्या वेळी त्यांनी जे भाषण व आचरण केले त्यावरून ते किती निर्भिड व स्पष्टवक्ते आहेत हे चांगले दिसून आले. आपले कर्तव्य बजाविण्यात ते आपल्या शरीराचीही पर्वा करीत नसत. गेल्या दोन वर्षांत शारीरिक व मानसिक त्रास सोसून, ते आपल्या इलाख्यात चोहोकडे फिरले व कर्तव्य म्हणून लढाईला शक्य ती मदत केली. हे प्रेमळ स्वभावाचे असल्यामुळे दररोज हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमी शिपायांची विचारपूस करीत.

ह्या कृतीचा रयतेवर कसा इष्ट परिणाम झाले हे युद्धकर्जांच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. पहिल्या युद्धकर्जात मुंबई इलाख्याने आघाडी मारली. दुसऱ्या युद्ध कर्जातही बंगाल इलाख्याच्या खाली जागा पटकाविली. आपल्या इलाख्यातील युद्ध कर्ज इतके यशस्वी होण्यास बहुतेक अंशी ना. गव्हर्नरसाहेब कारणीभूत आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्तीचा प्रकार आहे असे मला मुळीच वाटत नाही. खरी परिस्थिती अंतःकरणपूर्वक लोकांच्यासमोर मांडून पैसा जसा करण्याच्या वेळी लोकांत अस्वस्थता होऊ दिली नाही. मागासलेल्या लोकांकडून जी मदत मिळाली त्याजबद्दल त्यांनी कृतज्ञताच व्यक्त केली आहे.

परवाच कलकत्ता व मद्रास येथे बाजारलुटीचे जे दंगे झाले; असल्या प्रकारचे दंगे आपल्या इलाख्यात त्यानी आपल्या कर्तबगारीने होऊ दिले नाहीत. त्यांना Sporting ची विशेष आवड आहे. 'विलिंग्डन स्पोर्टस क्लब' ह्या संस्थेचे ते संस्थापक असून या संस्थेत आपणास त्यामध्ये मिसळू दिल्याने विशेष फायदा होणार आहे. Sporting ची त्यांना इतकी आवड आहे, तरी कर्तव्य बजावीत असता ते सर्व बाजूस ठेवीत असत. संस्थानिकांना स्वतंत्र राजाप्रमाणे वागविण्याची यांनी शक्य तितकी खटपट केली. त्यांच्यातील विशेष गुण म्हटला म्हणजे, मध्यरात्रीसुद्धा कोणी जरुरीच्या कामाकरिता यांच्याकडे गेला तरी त्यास मज्जाव नाही. ह्या सर्व गुणांमुळेच ते आम्हास आज हवेसे झाले आहेत.

मुंबई शहर हे व्यापार व उद्योगधंदा या बाबतीत सुप्रसिद्ध आहे. धनिकांचे भांडवल व कारखानदारांचे व्यवस्थापनचातुर्य यावरच हा व्यापार व उद्योगधंदा अवलंबून आहे अशी, आजपर्यंत इकडच्या प्रांती समजूत होती. पाश्चात्य देशात भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग आहेत. तिकडेही भांडवलदार लोकांची मजूरदार लोकांवर बेसुमार सत्ता चाले. पण आता मजूरदार लोकांनी आपले संघ बनविले आहेत. गवताच्या एकेका काडीची ताकद जास्त नसते पण अशा अनेक काड्यांचा वेठ वळला तर त्याने हत्तीलाही बांधता येते. मजूरदार लोकांना, विलायतेत मजुरी वाढवावी एवढ्याकरिताच झगडावे लागते. तेथील समाजामध्ये कोणत्याही दर्जास पोचण्यास जन्मसिद्ध अडचणी मुळीच नाहीत. त्यामुळे ते उच्च वर्गात सहजरीतीने मिसळतात तशी स्थिती आमच्या इकडे नाही. विलायतेत मजूरदार लोकांच्या संघांना बरेच महत्त्व आले आहे. पार्लमेंटसारख्या संस्थांत व प्रधानमंडळात त्या लोकांतीलच प्रतिनिधी शिरले असून ते आपल्या वर्गाच्या हिताचे योग्यरीतीने संरक्षण करीत आहेत.

आता आपल्या हिंदुस्थानातील स्थिती पाहू गेल्यास इकडे मुख्य मागासलेला वर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा आहे. मीही त्यापैकीच एक आहे. कारखान्यात मजूरी करणारे आपण सर्व शेतकरीच आहात; तेव्हा सर्वाविषयी एकत्र विचार करणे सोईचे आहे. मजूरदार व इतर मागासलेला वर्ग यांच्या हिताचे संरक्षण करणे, या हिंदुस्थान देशातही जरूरीचे आहे. जातिभेदामुळे हिंदू समाजाचे अत्यंत नुकसान झाले आहे असे माझे ठाम मत आहे.

अनुक्रमणिका

ख्रिश्चन, मुसलमान, बुद्धधर्मीय वगैरे लोक आमच्या मागासलेल्या समाजाशी प्रेमळपणाने व सहानुभूतीने वागतात. त्यामुळे हे लोक परधर्मिय असूनही आम्हास त्यांच्याविषयी जास्त आपलेपणा वाटतो. मजूरदारांचे इतर संबंध, भांडवलवाल्यांच्या इतर संबंधाशी विरोधी असल्यामुळे ह्या मंडळातील प्रतिनिधींकडून मजूरदार लोकांच्या हक्कांचे संरक्षण होत नव्हते, अशी स्थिती इंग्लंडात होती. तसलीच स्थिती येथेही आहे. पुढारलेल्या वर्गाकडून मागासलेल्यांच्या हितसंबंधांचे रक्षण होणे शक्य नाही. याकरिता जातवार किंवा वर्गवार मतदार संघातर्फे त्यांच्यातील प्रतिनिधी निवडून आले पाहिजेत. अशा विशेष योजना केल्या पाहिजेत; असे माझे पूर्वीपासून मत आहे. त्याप्रमाणे शक्तीनुसार मी खटपटही करीत असतो.

इंग्लंडात मजूरदारांनी आपल्या उन्नतीकरिता आपले संघ स्थापन करून स्वावलंबनाचे मार्ग स्वीकारले. त्याप्रमाणे आपण आपले सुव्यस्थित संघ तयार केले पाहिजेत. आपल्या मुलांबाळांस शिक्षण देऊन, आपले आरोग्य वाढविण्याचे प्रयत्न करून आपली उन्नती आपणच करून घेतली पाहिजे. दुसरा आपल्याकरिता काही करील, अशी अपेक्षा करणे केव्हाही कमीपणाचे आहे. ही गोष्ट अहर्निश लक्षात ठेवा. परधर्मापासून आपल्या धर्मावर आलेले संकट आपल्याच लोकांच्या मदतीने छत्रपती शिवाजी महाराजांनी निवारण केले. आजही आमच्या धार्मिक कामात, आर्थिक व अशाच हक्कांवर संकट, आमच्या देशाच्याच पुराणमताभिमानी लोकांकडून आले आहे, ते दूर करण्यास आपण सर्वांनी झगडले पाहिजे. हा झगडा पूर्वीसारखा तरवारीच्या साहाय्याने करावयाचा नाही. आता सर्वांस समदृष्टीने पाहणारे व दीनांची कळकळ बाळगणारे, इंग्रजी छत्र आपणावर आहे. त्यामुळेच आम्हाला थोडेबहुत समजू लागून, आपण एकत्र जमलो आहोत.

आमच्या शिक्षणाला पूर्वी इतक्या अडचणी होत्या की, खुद्द सातारच्या महाराजांना मध्यरात्री शिक्षण घ्यावे लागत असे. मग इतरांची ती काय कथा? परंतु तो काळ आता उरलेला नाही. आम्हास लिहिणे-वाचणे शिकण्यास असलेला प्रतिबंध नाहीसा झाला आहे. याचे कारण आपणा सर्वांकडे समदृष्टीने पाहणारे इंग्रजांचे एकछत्री राज्य हे होय. याकरिता आपण त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत. मोफत व सवलतीचे शिक्षण लवकरच सुरू होईल असे मला वाटत होते, परंतु मागासलेल्या जातीचे प्रतिनिधी कौन्सिलात असल्याशिवाय या प्रश्नांची उठावणी लवकरच सुरू होईल, असे दिसत नाही. याजकरिता शांततेच्या मार्गांनी आपण आपला उद्दिष्टहेतूसाध्य केला पाहिजे. ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटी न सोडता अव्याहत प्रयत्न हीच आमची ह्या झगड्यातील शस्त्रे आहेत.

मागासलेल्या लोकांच्या उन्नतीकरिता माझे कैलासवासी मित्र न्या. मू. रानडे व गोपाळराव गोखले यांनी पुष्कळ श्रम केले. मागासलेल्या लोकांत विद्येचा प्रसार होण्याकरिता विशेष प्रयत्न केले पाहिजेत, ही मूळ कल्पना रानडे-गोखले यांच्यापासूनच मला आली. आजच्या काळीदेखील ना. सर शंकरन नायर, ना. सर इब्राहिम रहिमतुल्ला, ना. पटेल, मि. गांधी, मद्रासचे डॉ. नायर, रा. ब. त्यागराज चेट्टी व या इलाख्यातील माझे मित्र रा. कोठारी, व्होरा, लठ्ठे, मुकुंदराव पाटील, तसेच येथील काही निवडक मंडळींनी स्वार्थत्यागपूर्वक समाजकार्यास वाहून घेऊन आपल्या ज्ञातिबांधवांची उन्नती करावी, असे माझे त्यांना आग्रहपूर्वक सांगणे आहे.

इंग्रज लोक कसे दिलदार आहेत, त्यांना रयतेच्या कल्याणाची व उन्नतीची किती कळकळ आहे याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आमचे गव्हर्नरसाहेब व त्यांच्या पत्नी, ही होत. त्याचप्रमाणे सर वुइलियम वेडरबर्न ह्यूम, सर जॉर्ज बर्डवूड वगैरे लोक आमच्या देशाकरिता कसे झटले हे मी आपणास सांगितले पाहिजे; असे नव्हे. हल्ली माझे परम मित्र व्हॅलेंटाईन चिरोल व लॉर्ड सिडनहॅम हे आपल्या मागासलेल्या वर्गाच्या

हिताकरिता निरपेक्षबुद्धीने प्रयत्न करीत आहेत. अशा प्रकारचे उदार मनाचे लोक आपणास सदा लाभल्यास आपली उन्नती झपाट्याने होईल त्यात संदेह नाही. ह्यासाठी लॉर्ड विलिंग्डन यांची कारकीर्द आपणावर आणखी पाच वर्षे असावी, अशी जी आपली मागणी आहे ती अगदी रास्त आहे. आपल्या आजपर्यंतच्या मागासलेल्या वर्गास आता वाचा फुटली आहे. आपण आपली गाऱ्हाणी आता सांगू लागलो आहोत. इंग्रज लोक हे मोठे बहुमताचे चाहते आहेत. नवीन येणाऱ्या गव्हर्नरसाहेबास मुंबई व मद्रास सारखेच पण येथे राहून लोकप्रिय झालेले गव्हर्नर येथेच राहू देणे हिताचे आहे. म्हणून आमची एवढ्या समाजाची मागणी आपले सरकार, शक्य तितकी मान्य करील अशी मला उमेद आहे.

हिंदुस्थानची राजनिष्ठा अढळ आहे, असे या लढाईने सर्व जगास स्पष्ट कळविले आहे. याप्रसंगी आपल्या देशातील मागासलेल्या लोकांकडूनच सरकारास फार उत्तम प्रकारची मदत झाली आहे. त्यांनी रणांगणावर शौर्य गाजवून आपले क्षात्रतेज जगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. असे असता भावी राज्यसुधारणेत अशा लोकांचे हक्क राखून ठेवण्याची तजवीज करण्यात आलेली नाही; ही खेदाची गोष्ट आहे. महायुद्धात ज्यांनी आपल्या बादशहाकरिता प्राणांचीही आहुती दिली त्यांच्या ज्ञातिबांधवांस सरकारने विसरु नये, एवढेच आमचे म्हणणे आहे. आता लढाई बहुतेक संपल्यासारखी आहे. ईश्वराने सत्पक्षास यश दिले असून, जुलूमी राजसत्तेचा नायनाट होण्याची वेळ जवळ आली आहे. बेल्जम, सर्व्हिया वगैरे लहान राष्ट्रांवरील जुलूम-जबरदस्ती नाहीशी करण्यास ज्याप्रमाणे इंग्रज सरकारने कंबर बांधली, त्याप्रमाणे त्यांना मागासलेल्यांच्या उन्नतीकरिताही काम करावयाचे आहे. त्यासाठी पुढारलेल्यांच्या मनाविरूद्ध बऱ्याच गोष्टी त्यांना कराव्याही लागतील जातवार प्रतिनिधीत्वाच्या नावासाठी माझे मित्र व या कामातील मार्गदर्शक लॉर्ड सिडनहॅमसारखे आपल्या सर्वांच्या पूर्ण परिचयाचे थोर व वजनदार गृहस्थ विलायतेस खटपट करीत आहेत. त्यांच्या या प्रयत्नांस यश येईल अशी मला उमेद आहे. मात्र, आपण याबाबतीत आपले कर्तव्य म्हणून शक्य तितक्या जोराचे प्रयत्न सुरु ठेविले पाहिजेत.

शेवटी बेल्जस व सर्व्हिया यांचेच उदाहरण मी आपणापुढे ठेवितो. जर्मनी, ऑस्ट्रिया या सारखी प्रबल राष्ट्रे चालून आली असताही व त्यांच्यापुढे आपला निभाव लागणार नाही अशी खात्री असतानाही त्यांनी हिंमतीने युद्ध सुरू केले. नावाजण्यासारखे पराक्रम करुन आपली योग्यताही जगास दाखविली. विपत्तीच्या काळी धीर सोडला नाही. यामुळे त्यास आता यश येत आहे. नसेच आपणही आपल्या हक्कांकरिता झगडत राहिले पाहिजे. ईश्वर सत्पक्षास यश देईल अशी खात्री बाळगा. आपल्या मागासलेल्या वर्गाकरिता कळकळ बाळगणारे लॉर्ड विलिंग्डनसाहेब ह्यांची सुखद कारकीर्द आणखी पाच वर्षे आम्हास लाभो, ती मिळविण्याकरिता आपण जे प्रयत्न करीत आहोत त्या यत्नाला यश मिळो; अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

सोळा

पहिला लोकसंघ

***

१० नोव्हेंबर, १९१८ च्या परळ येथील कामगार मेळाव्यात, शाहू महाराजांनी मजूर संघटनेचा मंत्र दिल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत, मुंबईच्या कामगारांनी 'पीपल्स युनियन' — लोकसंघाची-स्थापना केली. त्याचे उद्‌घाटन राजर्षींच्या हस्ते व्हावे हे उचितच होते.

याप्रसंगी केलेल्या भाषणात राजर्षींनी मजूर-संघाची निकड आवर्जून प्रतिपादली आहे. ते म्हणतात: "वास्तविक पाहता ज्याने त्याने आपले वाजवी हक्क तेवढेच सांभाळले. दुसऱ्याचे वाजवी हक्कांस विरोध केला नाही म्हणजे तंट्यास जागा राहत नाही." या मूलभूत विचारांभोवती हिंदुस्थानात वरिष्ठ वर्ग-ब्राह्मण वर्ग—कसा विषमता निर्माण करतो याचे चित्र रेखाटले आहे.

हिंदुस्थानातील ब्राह्मण व ब्राह्मणेतर पक्षातील अंतर कमी करणाऱ्या आर्यसमाजाच्या कार्याचे महत्त्व राजर्षींनी पुढे पटवून दिले आहे. त्यांच्या मते, सामाजिक समता आणि संघटना यासाठी सर्वांनी झटले पाहिजे. त्यासाठी, "ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटीने सतत प्रयत्न ही आमची शस्त्रे असली पाहिजेत. वयात आलेल्या प्रत्येक माणसाला मत देण्याचा अधिकार मिळाला म्हणजे बहुजनसमाजाच्या मताप्रमाणे कारभार चालला पाहिजे. येथेही इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ झाले पाहिजेत व सर्वांस आपले हक्क काय आहेत हे कळले पाहिजे. भांडवलवाल्यांत ब्राह्मण व वैश्य वृत्तीच्या

***

मुंबई : २४ नोव्हेंबर, १९१८
'पीपल्या युनियन' या कामगार संघटनेच्या स्थापनादिनी उद्‌घाटक म्हणून, शाहू महाराजांनी दिलेले भाषण

लोकांचा भरणा विशेष आहे. त्यांना दाबात ठेवल्याशिवाय मजुरांची उन्नती होणे कठीण आहे." १९१८ साली, 'पहिला लोकसंघ' मध्ये, राजर्षींनी श्रमजीवी लोकांना संघटित होण्याचा दिलेला महामंत्र, दूरवरचा न्याहाळ स्पष्ट करणारा आहे.

***

सोळा

पहिला लोकसंघ

***

गेल्या १० नोव्हेंबर रोजी, परळ येथे भरलेल्या प्रचंड सभेत मी आपणा सर्वांच्या मनात घोळत असलेलेच विचार बोलून दाखविले. पाश्चात्य देशात मजूरदार वगैरे लोकांचे संघ आहेत तसे संघ आपणही करावे व एकजुटीने आपली उन्नती करून घ्यावी, असे आपणास सांगितले. त्याप्रमाणे 'People's Union' म्हणजे 'लोकसंघ' या नावाची संस्था आपण काढली हे फार चांगले केले.

इंग्लंडात भांडवलदार व मजूरदार असे दोन प्रबल पक्ष आहेत. त्यांचे हितसंबंध परस्परविरोधी आहेत, अशी आजपर्यन्तची समजूत आहे. वास्तविक पाहाता ज्याने त्याने आपले वाजवी हक्क तेवढेच सांभाळले व दुसऱ्याच्या वाजवी हक्कांस विरोध केला नाही म्हणजे तंट्यास जागा राहात नाही. तशी बुद्धी वरिष्ठ लोकांस होईल, दाबून टाकलेल्यांना मान वर करण्यास संधी मिळेल, तो सुदिन होय! हा सुदिन लवकरच उगवेल अशी आशा वाटत आहे. हिंदुस्थानातही ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे पक्ष पडले आहेत. त्यांच्यातील विरोध दिवसेदिवस स्पष्ट होत आहे. ब्राह्मणेतर वर्ग बहुतांशी अज्ञानात गढला असल्याने त्याची अवनती झाली आहे. त्यास गुलामाची स्थिती आली आहे. त्यांच्या श्रमावर शारीरिक कष्ट न करणारे लोक पोसले जात आहेत व त्यास कधी कधी चिथावून भलत्या मार्गासही लावतात. अशा स्थितीतच पश्चिम दिशेकडील भांडवलवाल्या सत्तेचे तत्त्व इकडील कारखान्यात शिरल्याने गरीब मजुरांची स्थिती जास्तच कष्टमय झाली आहे. ही स्थिती सुधारण्यास संघटित प्रयत्न जोराने, स्वार्थत्यागपूर्वक केले पाहिजेत आपण तसे करीत आहात ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

मुंबई : १० नोव्हें, १९१८
परळ (मुंबई) येथे भरलेल्या कामगारांच्या जाहीर सभेत अध्यक्ष या नात्याने शाहू महाराजांनी केलेले प्रमुख भाषण

ब्राह्मणसभा, शंकरवाडी, 'मीमांसा विद्यालय' वगैरे आपल्याकरिताच स्वतंत्र संस्था, ब्राह्मणांनीच काढून इतरांस वगळले आहे. अशा रीतीने त्यांनी फुटीचा पाया घातला आहे. वास्तविक पाहाता सर्वांशी एकोप्याने वागून एकीचे व प्रेमाचे उदाहरण, सुशिक्षित आणि समंजस वर्गाने घालून दिले पाहिजे. पण ते तसे करीत नाहीत. ते काम आर्यसमाजाने हाती घेतले आहे. आर्य समाजाचा महशूर नरवीर सर प्रतापसिंह महाराज यांचा मी अनुयायी आहे. त्या मताच्या ग्रंथाचे वाचनही मी बरेच केले आहे. आर्यसमाजाची मते दयानंद सरस्वतींचीच आहेत. वेदातील अनादि तत्त्वे स्वामी दयानंद, नित्यानंद, माझे मित्र पंडित आत्माराम व स्वामी परमानंद वगैरे प्रज्ज्वलित करीत आहेत. धर्मोपदेशकांची व उपाध्यायांची जात बनवून जी नवीन नवीन तत्त्वे धर्मात घुसडली जात आहेत; त्याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच!

मी आर्यसमाज मताचा कसा झालो हे थोडक्यात सांगतो: क्षत्रियकुलवंतस महाप्रतापी महाराज प्रतापसिंह हे युद्धाच्या आरंभापासून फ्रान्समध्ये लढत आहेत. ते व मी एका स्टीमरने राज्यारोहण समारंभाकरिता विलायतेस गेलो, तेव्हा त्यांनी मला ही मते समजावून दिली. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी पंडित आत्माराम यांची गाठ पडली. तेव्हापासून मी अलिकडे या समाजाचा झालो. हल्लीचे कुचबिहारचे महाराज

ब्रह्मसमाजिष्ट आहेत. आर्यसमाज, ब्रह्मोसमाज, प्रार्थनासमाज हे का उत्पन्न झाले याचे थोडक्यात उत्तर, धर्मोपदेशक बनलेल्या जातीचे जुलमी जू झुगारून देण्याकरिता हे आहे. आपले संघ बनवून भांडवलवाल्यांचा जुलूम नाहीसा करणे जितके महत्त्वाचे आहे, त्यापेक्षाही हे बनावटी धार्मिक जू काढून टाकणे जास्त जरूरी आहे. याकरिताच मी आर्यसमाज चाहतो पण बनावटी धर्मवाले आर्यसमाजाला विरोध करतात. लॉर्ड किचनेर, लॉर्ड फ्रेंच वगैरे योद्धे मनाने आर्यक्षत्रिय-आर्यसमाजी-आहेत. त्यास आर्यधर्मी होता येईल. याप्रमाणे आर्यसमाज हा आम्ही व इंग्रज राष्ट्र यास ऐक्याने जोडणारी साखळी आहे. याचे मोठे उदाहरण महाराज प्रतापसिंह हे होत.

बरे असो. ब्राह्मण व ब्राह्मणेतर यामधील ही फूट लवकरच नाहीशी होईल व सर्वांचे ऐक्य होईल अशी मला मोठी आशा आहे. परंतु जोपर्यन्त त्यांच्या अशा स्वतंत्र संस्था चालू आहेत व त्यात इतरांचा प्रवेश होत नाही तोपर्यन्त आपणही आपली संस्था निराळीच चालविणे भाग आहे. याकरिता ब्राह्मणेतर लोकच आपल्या संघात घ्यावयाचे असा आपला नियम चालू स्थितीत गैर म्हणता येत नाही. आमच्याकडे आहे त्याप्रकारचा जातिभेद दुनियेत कोठेही सापडावयाचा नाही. कोणत्याही देशात उपाध्यायांची स्वतंत्र जात नाही. आमच्याकडेही वेदकाली ती नव्हती. पण अलिकडेच ती उत्पन्न झाली आहे. त्यायोगाने पुढारलेल्या थोड्या लोकांच्या हाती सर्व सत्ता जाऊन त्यांची एक ‘ऑलिगार्की’च झाली आहे. त्यामुळे बहुजनसमाजाला शक्य तितकी मदत होत नसून त्यांच्या हिताकडे व सुधारणांकडे दुर्लक्ष होत आहे. याकरिता आपल्या स्वावलंबनाचा मार्ग योग्य आहे. अशा या आपल्या संघामार्फत बोलाविलेल्या संस्थेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास मला फार आनंद वाटत आहे.

महायुद्धाचा शेवट झाला, दोस्त राष्ट्रास पूर्ण यश मिळाले; याबद्दल आनंद प्रदर्शनार्थ आजची सभा भरविली आहे. या लढाई संबंधाने चार शब्द सांगणे प्रसंगास अनुसरून आहे: ही लढाई ‘बळी तो कान पिळी’ हे तत्त्व स्थापित करण्याकरिता सुरु करण्यात आली. १८७० साली जर्मनीने फ्रान्सचा पूर्णपणे पराभव करून दोन प्रांत व लढाईचा खर्च म्हणून अब्ज रुपयांची संपत्ती हिसकावून घेतली. यामुळे जर्मनीची महत्त्वाकांक्षा जास्तच वाढली. युरोपात, सर्वात बलाढ्य असे ते राष्ट्र ठरले. तेथील राजकारणात त्याच्या मतास फार मान मिळू लागला. पण एवढ्यानेच जर्मनीची तृप्ती झाली नाही. युरोपातच नव्हे, तर सर्व जगात आपल्या इच्छेला मान वाकविली पाहिजे, आपल्या शब्दाशिवाय पानही हालता कामा नये, अशी दांडगी हाव जर्मनीस सुटली. ती सफल होण्याकरिता जर्मनीने ऑस्ट्रिया व इटलीसह तीन देशांचे एक कूट बनविले. यापासून आपणास फार धोका आहे असे जाणून रशिया व फ्रान्स यांनी एकमेकांचे रक्षण करण्याचा तह केला.

फ्रान्स कमकुवत झाला आहे, तेथील लोकसंख्या वाढत नाही तेव्हा त्यास पाहिजे तेव्हा दाबता येईल, अशी जर्मनीस खात्री होती. इंग्रजांना खाली कसे आणावे, याचा विचार जर्मन कैसरच्या व त्यांच्या मुत्सद्यांच्या डोक्यात सारखे घोळत असत. जर्मन प्रजेत इंग्रजाविषयी द्वेष उत्पन्न करण्याची अतोनात खटपट करून त्या कामी त्यांनी चांगलेच यश मिळविले. हे जाणून इंग्रजांनी फ्रेंचाबरोबर जास्त स्नेहसंबंध ठेविला. इंग्रजांची शक्ती, त्याच्या साम्राज्यावर आहे; तेव्हा त्या साम्राज्यातील महत्त्वाच्या भागास म्हणजे हिंदुस्थानास शह द्यावा व आपलेही मोठे साम्राज्य पसरावे याकरिता मेसापोटेमिया ताब्यात आला पाहिजे, असे जर्मनीने ठरविले. त्यासाठी तुर्कांच्या सुलतानास वळविण्याचे काम सुरू केले. तुर्क लोकांवर भुरळ टाकली. या कामी त्याला यश आले. पण जर्मनीचा खरा कावा दिसून आल्याने इटलीचे डोळे उघडले व हे महायुद्ध सुरू झाले. तेव्हा आपल्या दोस्ताविरुद्ध म्हणजे जर्मनी व ऑस्ट्रियाविरुद्ध इटली उठला. खोट्याचा अवलंब केल्याने मित्रही शत्रू होतात व खऱ्या पक्षाला शत्रूही मिळतो, ह्याची सत्यता अशा रीतीने

अनुक्रमणिका

पटते. मेसापोटेमिया ताब्यात राहण्याला बाल्कन द्वीपकल्पातील सर्व्हियाच्या राजाची मोठी आडकाठी होती. ह्याकरिता सर्व्हिया पादाक्रांत केला पाहिजे असे जर्मनीने ठरविले. ऑस्ट्रियाकडून कुरापत काढवून लढाईचे शिंग फुंकले.

लढाईचे धोरण कशाप्रकारे आहे, यात बाहेरून दाखविण्यात येतो त्यापेक्षा निराळा कावा कसा आहे हे समजून येण्यास अवकाश लागला नाही. रशिया व फ्रान्स यांची रग जिरविल्याशिवाय सर्व्हिया आपणास पचणार नाही, अशी जर्मनीची खात्री असल्यामुळे; या युद्धाची प्रथमपासूनच त्याने कडेकोट तयारी ठेविली होती व रशियाची जमवाजमव होईपर्यंत फ्रान्सला चीत केले पाहिजे, याकरिता त्या देशात लवकर शिरण्यासाठी, बेल्जममधून घुसण्याचे व वचनभंगाचे पापही शिरावर घेण्याचे पत्करिले. बेल्जमने नेहमी तटस्थ राहावे, युरोपच्या राजकारणात बिलकूल पडू नये, यासाठी त्या देशात कोणाच्याही फौजेने पाय घालू नये; असा सर्व राष्ट्रांनी करार केला होता. त्यात जर्मन व ऑस्ट्रिया हेही देश होते. पण गरज ही फायदा जाणत नाही, असे तत्त्व लढवून तहास कागदाचे चिटोरे ठरवून बेल्जममध्ये जर्मनी जबरदस्तीने घुसला; त्यामुळे बेल्जमच्या स्वातंत्र्य व आपल्या साम्राज्य रक्षणासाठी इंग्रजासही या युद्धात शिरावे लागले. जर्मनीचे हेतू किती दुष्ट आहेत, त्यापासून लहान लहान असंख्य राष्ट्रांचे स्वातंत्र्य कसे नष्ट होईल, शिवाय जर्मनीचे वर्तन किती जुलूमी व मदांधपणाचे आहे याची खात्री पटल्याने, अमेरिकाही मागाहून युद्धात सामील झाली. सव्वा चार वर्षे युद्ध चालले. पुष्कळ जयापजय झाले. पहिली चार वर्षे तर जर्मनी जिंकती व सत्यपक्षाला हार येते की काय, अशी भीती पडली. पण अखेर 'सत्यमेव जयते' या तत्त्वाचा खरेपणा जगाच्या निदर्शनास आला. जर्मनीचा पूर्ण पराभव होऊन त्याला दोस्त राष्ट्रांस शरण यावे लागले. त्याची तीन दोस्त राष्ट्रे तर पूर्वीच शरण आली होती. अशा रीतीने युद्धाचा शेवट होऊन सर्वांना आनंदी आनंद झाला आहे. तो व्यक्त करणे हे आपले आजचे मुख्य काम आहे.

या युद्धात हिंदुस्थान देशाने मोठी कामगिरी बजाविली आहे. सर्वतऱ्हेने साम्राज्य लष्करास मदत केली. समरांगणावर लढून शूरांनी आपले आणि आपल्या देशाचे नाव राखिले. आमच्या मराठे वीरांनीही थोर थोर पराक्रम केले. क्षत्रियांचा मुख्य धर्म लढण्याचा आहे. त्या कामी देश, परदेश अमक्याच्या हातचे खावे, तमक्याच्या हातचे खाऊ नये, अमूक खावे, अमूक खाऊ नये, अशाप्रकारच्या धर्माच्या नावाखाली लोकांवर घातलेले मूर्खपणाचे निर्बंध; याचा विचारदेखील करण्याची जरूरी नाही, असे जाणून त्याप्रमाणे त्यांनी वर्तन केले आहे. अशा रीतीने आपल्या खऱ्या धर्मास जागणारे वीरच आमच्यापेक्षा धर्मपालनाच्या कामात पुढे आहेत व त्याकरिता तेच जास्त शुद्ध आहेत हे लक्षात ठेवा. हे आमचे बंधू परत येतील तेव्हा, त्यांचा उत्तम आदरसत्कार करून आपण पवित्र होऊ या. धर्मरक्षणाच्या सबबीवर त्यांना प्रायश्चित देण्याचा किंवा ब्राह्मणांच्या अशुद्ध पायांचे तीर्थ या पवित्र लोकांस पाजण्याचा विचारदेखील आमच्या मनास शिवता कामा नये मेसापोटेमियाच्या रणांगणावर, खरे क्षत्रिय व शूद्र मानलेल्या लाखो लोकांनी केलेल्या पराक्रमाची वर्णने वाचून युद्धपराङ्मुख अशा पुढारलेल्या ब्राह्मण वैश्यादीकांना लाज वाटली पाहिजे. त्यांचे अनुकरण करून लढाईस न जाता नानातऱ्हेच्या सबबी सांगून, लोकांत गैरसमज व सरकारास अडचणी उत्पन्न करणाऱ्या लोकांस काय नाव द्यावे हे कळत नाही. आपल्या देशासाठी आणि राजासाठी आमच्या खऱ्या क्षत्रिय व मानलेल्या शूद्र शिपायांनी मोठे शूरत्व गाजविले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. क्षत्रिय कुळात जन्म घेतल्याने जे क्षत्रिय होतात त्यापेक्षा या रणगाजींची योग्यता मोठी असल्याने मी आपणा सर्वांतर्फे त्यास धन्यवाद देतो. त्यांना व त्यांच्या जातीच्या लोकांना कौन्सिलात जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क मिळू नये असा स्वार्थी प्रयत्न करणाऱ्या पुढारलेल्या वर्गांची मला फार कीव येते. आपमतलबी लोकांना दुसऱ्याचे न्याय हक्क देणे बरे वाटत नसेल तरी ईश्वराच्या व ईश्वरी अंशभूत जॉर्ज बादशहाच्या दरबारी हे

मान्य आहे. माझी तशी पूर्ण खात्री आहे. पुढारलेल्या 'ऑलिगार्की'च्या जुलूमी अंमलातून बहुसंख्यांक क्षत्रिय व शूद्रांस सोडवून, त्यांना त्यांचे योग्य अधिकार देऊन, त्यांच्या अंगच्या गुणांचे चीज करील असा मला भरवसा आहे. देशाकरिता व राजाकरिता प्राणांची पर्वा न करणारेच राजकीय हक्कांसाठी खरोखर लायक आहेत.

सर्व ठिकाणी डेमोक्रॅटिक मतांचा फैलाव जोराने होत असता आमच्या क्षत्रिय व शूद्रांनी पूर्वीसारखीच धार्मिक जुलूमाखाली मान वाकवावी हे शक्य नाही. माझे प्रिय मित्र व्होरा व कोठारी आणि येथील आपले पुढारी यांचे आपण ऐकल्यास आपले हितच होईल. व्होरा व कोठारी यांनी आपल्या कल्याणाकरिता पुष्कळ नुकसान सोसून दोन वर्तमानपत्रे चालविली आहेत. त्यास आपण आश्रय देऊन त्यातील सुबोध घेतला पाहिजे. फार पुरातन काळापासून आमच्या डोकीवर 'ऑलीगार्की' चा बसलेला बोजा ढकलून देण्याच्या कामी आम्हास माझे प्रिय गुरू लॉर्ड सिडनहॅमसाहेब व त्यांचे अनुयायी मदत करीत आहेत. हे त्यांचे प्रयत्न सफल आले नाहीत तर युद्धात केलेल्या पराक्रमाचा आम्हास उपयोग न होता 'ऑलिगार्की' च्या जुलूमाखाली आम्ही चिरडून जाऊ. हे जू मानेवर आहे तोपर्यंत आमची सुधारणा आम्हास करता येणार नाही.

सध्याची लढाई जर्मनीने आपली राजकीय सत्ता वाढविण्याकरिता सुरू केली. तिचा शेवट त्या राजसत्तेचा नाश होऊन प्रजासत्ता वाढविण्यात झाला आहे, अशा प्रकारची पण बिनरक्ताची लढाई आमच्या समाजात चालली आहे. सर्व जातीवर आपले धार्मिक व सामाजिक प्रभुत्व चालावे, ह्याकरिता राजकीय हक्कही आपल्याच पदरी पडावेत या हेतूने प्रेरित झालेली एक 'ब्युरॉक्रसी' आहे, तिच्या सत्तेपासून मुक्त व्हावे व सर्वांस माणुसकीचे हक्क मिळावेत असे मागणारा, अज्ञानात पडलेला बहुजनसमाज आहे. या समाजाच्या उन्नतीकरिता पुष्कळ महात्मे यत्न करीत आहेत. आर्यसमाज, ब्रह्मोसमाज, सत्यशोधक समाज वगैरे संस्था लोकांत समानतेचे तत्त पसरवीत आहेत. सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरे असल्यामुळे त्यांच्यामध्ये जन्मतःच उच्चनीच भाव आहेत असे मानणे पाप आहे, वगैरे उपदेश करून ते बहुजनसमाजास त्यांच्या हक्कांची जाणीव करून देत आहेत. अशा प्रकारची झटापट प्रत्येक देशात झाली आहे. येथेही ती नवीन नाही. अशा रीतीने झगडा चालविणे हे राष्ट्राच्या जिवंतपणाचे एक चिन्हच आहे. या लढाईत आपली शस्त्रे काय असावीत, हे मागील खेपेस सांगितलेच आहे.

ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटीने सतत प्रयत्न ही आमची शस्त्रे असली पाहिजेत. पाश्चात्य देशात भांडवलवाले व मजूर पक्षाच्या हाती राज्यकारभार बहुतांशी जाणे, असा परिणाम या युद्धाचा झाला आहे. रशिया व जर्मनी ही निरंकुश राजसत्तेची दोन मोठी पीठे होती. त्या ठिकाणी आता मजूर पक्षाच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताक राज्ये स्थापन होत आहेत. इंग्लंडातही मजूर पक्षाचा जोर आस्ते आस्ते वाढत आहे. हॉलंड वगैरे तटस्थ राष्ट्रांवरही या लाटेचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. वयात आलेल्या प्रत्येक माणसास मत देण्याचा अधिकार मिळाला. याचा अर्थ, बहुजनसमाजाच्या मताप्रमाणे कारभार चालणार, अल्पसंख्यांकांची सत्ता कमी होणार असा आहे. ते अटळ आहे. आपणासही असेच अधिकार मिळविले पाहिजेत. त्याकरिता स्वार्थत्यागपूर्वक सतत नेटाने प्रयत्न केले पाहिजेत.

आपण अडाणी व अशिक्षित आहोत, आपणाला सुव्यस्थित रीतीने काम करण्याची सवय लागणे जरूर आहे. त्यासाठी आपल्या पहिल्या शाळा म्हणजे चाळीचाळीतील किंवा कारखान्यांतील सहकारी पतपेढ्या होण्यास योग्य आहेत. त्या दिशेनेही आपण प्रयत्न करावेत. आपणांपैकी बरेच लोक गिरणीत कापड

विणण्याचे काम करतात. आपल्याच धंद्यातील लोकांनी सुमारे ६० वर्षापूर्वी राचडेल येथे सहकारी हुडकून काढून, दुकान सुरू केले. त्याचा परिणाम इंग्लंडच्या व जगाच्या प्रगतीवर झालेला आहे हे आपण विसरता कामा नये. अशा सर्वोपयोगी तत्त्वांचा अवलंब करून आपण त्याची वाढ केली म्हणजे आपणास हक्क मिळविण्यास सामर्थ्य येणार आहे.

येथे इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ झाले पाहिजेत व सर्वास हक्क काय आहेत, ते कळले पाहिजे. भांडवलवाल्यात ब्राह्मण व वैश्य वृत्तीच्या लोकांचा भरणा विशेष आहे. त्यांना दाबात ठेवल्याशिवाय मजुरांची उन्नती होणे कठीण आहे. मजूरदार या शब्दात कमीपणा नाही. मी कोल्हापूरच्या राजपदावर असताही शिपाई, शेतकरी किंवा मजुर म्हणवून घेण्यात मला अभिमान वाटतो. माझी जनक आई मुधोळकर घोरपडे घराण्यातील, दत्तक आई शिर्के घराण्यातील. दत्तक वडिल भोसले कुळातील; असे शेतकरी वर्गातीलच होते. हलक्या दर्जाचे व अशिक्षित लोकांशी सहवास ठेवणे बरे नाही, अशी पुष्कळांची समजूत आहे. मलाही तसा उपदेश होत असे. परंतु ज्या शेतकरी व मजूर वर्गांत माझे कूळ वाढले; त्यांच्याविषयी प्रेम व अगत्य हे जन्मसिद्ध असल्याने अशा शिकविण्याचा माझ्यावर परिणाम होणार नाही. कारण माझ्या हाडीमाशी शिपाईगिरी, शेतकरी यांचे रक्त खेळत आहे. म्हणून मला आपल्यात मिसळण्यास आनंद वाटतो. एका थोर इंग्रज साधु पुरुषाने म्हटले आहे की, ‘राजवाड्यापेक्षा गरीबांच्या झोपडीत सद्‌गुण जास्त सापडतात.’ माझाही अनुभव तसाच आहे. इमानीपणा, बंधूप्रेम, देशप्रीती, राजनिष्ठा, मत्सराचा अभाव असे अनेक सद्‌गुण मला आपल्याठायी दिसतात. म्हणून आपल्याविषयी माझ्या मनात फार पूज्यबुद्धी आहे. आपणही मला आपणांपैकीच एक समजावे असे आपणाकडे माझ मागणे आहे.

अशा प्रकारे या युद्धापासून आम्ही व आमचे हक्क बळकाविणाऱ्या लोकांनी बोध घेण्यासारखा आहे. या युद्धात मित्र संघास पूर्ण यश मिळाले, याबद्दल आपण ईश्वराचे आभार मानून; आमच्या सार्वभौम सरकारचे अभिनंदन करु या.

***

६. हक्क

सतरा

अधिकारदान थैली

***

शाहू महाराज हे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत मांडलिक संस्थानिक होते. या साम्राज्यापासून कितीही स्वतंत्रता घ्यायची म्हटले तरी शेवटी लगाम कुणाच्या हाती, याचे भान राखणे चातुर्याचे होते.

ब्रिटिश शासन कितीही सुधारणाप्रिय, पुरोगामी म्हटले तरी, हिंदुस्थानची जनता किंवा राजेरजवाडे यांना पुरेपूर विश्वास देऊन, त्यांचे राज्यशकट कार्यरत होते असे नव्हे. राज्यकर्त्याला ते शक्य आणि इष्टही नसते. पण किमान विश्वास टाकून, विश्वास संपादन करावा अशी वाजवी अपेक्षा ठेवली तर ती अनाठायी नसते.

१८६१ साली, ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानातल्या संस्थानिकांवर काही कडक बंधने जारी केली. बडोद्याचे सयाजीराव महाराज किंवा कोल्हापूरचे शाहू छत्रपती यांच्यासारख्यांवर तर ब्रिटिशांची करडी नजरच होती. साहजिकच ब्रिटिशानी लादलेली कडक बंधने, मुक्ततेने हातपाय हालवायला अडचणीची होती.

स्वाभाविकपणेच १८९४ मध्ये, छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानची राज्यसूत्रे हाती घेतल्यावर ही बंधने नाहीशी व्हावीत, किमानपक्षी शिथिल तरी व्हावीत असा प्रयत्न जारी राखला. १७ जून, १९०३ च्या ब्रिटिश खलित्यान्वये

***

कोल्हापूर : २ जानेवारी, १९०५
करवीर संस्थानचे मांडलिक जहागिरदार, सरदार व अन्य मंडळी यांच्या सभेत १७ जून, १९०३ च्या खलित्यान्वये कोल्हापूर संस्थानावर ब्रिटिश शासनाने लादलेल्या अटी शिथिल झाल्याच्या निमित्ताने शाहू महाराजांनी केले ‘दरबार भाषण’

‘अधिकारदान थैली’ ने-तशी थोडी मुक्तता लाभली. त्यानिमित्ताने, करवीर संस्थानचे मांडलिक जहागिरदार, सरदार वगैरे मंडळींच्या भरविण्यात आलेल्या सभेत, ‘अधिकारदान थैली’ च्या अनुषंगाने ‘सुनियंत्रित कारभाराविषयी’ उदारबुद्धीने महाराजांनी विचार प्रकट केले आहेत.

या ‘थैली’ मुळे, अधिकारक्षेत्राची थोडीफार व्याप्ती वाढल्याचा राजर्षींना आनंद झाला आहे. आपण राबवत असलेल्या धोरणांच्या कार्यवाहीच्या दृष्टीशी तो संलग्न आहे. ‘थैली’ ने प्रदान केलेली ‘मुक्तता’ राजर्षींना मोलाची वाटते,

राजर्षी शाहूंना फक्त आपल्या संस्थानातील प्रजेचे हित व्हावे किंवा त्यास आवश्यक व इष्ट त्या सोयीसवलतींचा फायदा व्हावा, एवढेच वाटत नव्हते. त्यासाठीच त्यांची कृती व उपक्रम नव्हते; तर अधिकारांचे संक्रमण व्हावे; मिळालेले अधिकार राबविण्यास लोक निर्भय बनावेत अशी त्यांची आकांक्षा होती. ब्रिटिशांकडून संस्थानिक जहागिरदारांना व त्यांच्याकडून प्रजेला म्हणजेच सबलांकडून दुर्बलांकडे

अनुक्रमणिका

सत्तेचे क्रमाने संक्रमण व्हावे एवढी शाहू महाराजांची विस्तृत व व्यापक दृष्टी होती. ‘अधिकारदान थैली’ त ही व्यापकता आहे.

* * *

अनुक्रमणिका

सतरा

अधिकारदान थैली

***

१९०३ सालच्या जून महिन्याच्या १७ तारखेच्या खलित्यान्वये ना. लॉर्ड नॉर्थकोट यांनी आमच्या मांडलिक जहागिरदारांविषयीचे अवशिष्ट सर्व अधिकार आम्हाला परत दिले. ही गोष्ट तुम्हांपैकी पुष्कळांना माहीतच आहे. यापूर्वी हे अधिकार पोलिटिकल एजंटना होते. परंतु आता क्रिमिनल प्रोसिजर कोडान्वये हायकोर्टाला जे फौजदारी अधिकार असतात, ते चालविण्याचा आमचा हक्क आहे. तथापि आमचे काही मांडलिक जहागिरदार विद्येने व बुद्धिमत्तेने 'अधिकारदान थैली' च्या अर्थव्याप्तीपेक्षा काहीशा अधिक, अधिकार स्वातंत्र्याला पात्र झाले आहेत; असे वाटल्यावरून त्यांच्याशी उदारबुद्धीने वागण्याचा आमचा इरादा आहे. म्हणून त्यांचे वरिष्ठ सरकार व त्यांच्या सत्तेचे उगमस्थान या नात्याने, 'अधिकारदान थैली'च्या आधारे त्यांना प्राप्त न झालेले सर्व अवशिष्ट अधिकार आम्हाला आहेत. तथापि त्यांना अधिकारसूत्र प्राप्त झाल्यापासून अपील अर्ज दाखल करून घेणे, त्यांच्या कोर्टांनी केलेल्या ठरावांची तपासणी करणे, अहवाल मागविणे, त्यांच्या खालच्या कोर्टातील न्यायाधीशांची नेमणूक करणे, त्यांच्या कोर्टातील कज्जांचे वर्ग करणे अशाप्रकारचे हक्क, जे कायद्याने कोर्टाला आहेत; त्याची अंमलबजावणी करण्याचे प्रसंग सहसा आजपर्यंत आमच्यावर आले नाहीत. ही गोष्ट लक्षात घेऊन व विशाळगड, बावडा, कागल (मोठी पाती) व इचलकरंजीचे जहागिरदार आपल्या बुद्धिमत्ता व उच्च शिक्षणाने, खालच्या कोर्टावर नेहमी बारीक नजर ठेवावी लागते, तीतून त्यांना काही अंशी मुक्त करण्यास पात्र झाले आहेत. अशा प्रकारची बारीक नजर न ठेवल्यापासून त्यांच्या हद्दीतील लोकांना अन्याय झाल्याचे दिसून आले नाही; या गोष्टीकडे लक्ष पुरवून, आमच्या सत्तेचा उपयोग करण्याचा प्रसंग न येईपर्यंत, ते आजपर्यंत अनुभवीत असलेली उपरीनिर्दिष्ट सवलत अशीच पुढे, त्यांच्यापुरती चाल ठेवण्याचा आमचा हेतू जाहीर करीत आहोत. त्यांच्या सुनियंत्रित कारभाराविषयी आम्ही जो हा विश्वास दाखवीत आहोत, त्यांचा ते दुरुपयोग करणार नाहीत, अशी आमची खात्री आहे. सन १८६२ च्या तहान्वये मांडलिक जहागिरदारांसंबंधी जे अधिकर दिले नव्हते, ते अधिकार आम्हास परत देऊन आमच्या संस्थानच्या सुधारलेल्या राज्यकारभाराचे गुण उदारबुद्धीने मुंबई सरकारने जाणले, त्याबद्दल आमच्या कृतज्ञतेच्या भावना, याप्रसंगी व्यक्त करण्यासही आम्हाला मोठा आनंद होतो. लॉर्ड नॉर्थकोर्टच्या शब्दातच सांगावयाचे म्हणजे, "कोल्हापूर संस्थानला पूर्वीचा दर्जा प्राप्त करून देण्याच्या कामी या गोष्टीने मोठी मजल मारली." असे आम्हीही समजतो.

***

अठरा

कृतज्ञतेचे वैभव

***

शाहू महाराजांनी ‘कृतज्ञतेचे वैभव’ मध्ये, व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याच्या अनावरणाच्या निमित्ताने, लोकाभिमुख शासन देऊ पहाणाऱ्या महाराणीच्या अधिसत्तेबद्दल कृतज्ञता प्रकट केली आहे. महाराजांसारख्या लोकाभिमुख शासन देणाऱ्या एका अधिपतीने सर्वसाधारण त्या प्रकारचे काम करणाऱ्या दुसऱ्या राज्यकर्त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी हे मनाच्या सुजनतेचे आणि संस्कृतीमधील भलेपणाचे लक्षण आहे.

शाहू महाराज ब्रिटिशांचे मांडलिक, साहजिकच ‘डावपेच’ म्हणून अशी कृतज्ञता व्यक्त केली आहे असे समजणे अयुक्त आहे. मूलतःच मनाच्या गाभ्यात गुंतलेल्या भलेपणाचे ते प्रतिक आहे.

यादृष्टीने, राजर्षींच्या “प्रजेच्या कल्याणाप्रित्यर्थ सुसंस्कृत राज्यपद्धतीची व निरलस परिश्रमाची जर कोठे संस्थानात स्पष्ट चिन्हे दिसत असतील...” या विधानामधील ‘निरलस परिश्रमाने, प्रजेच्या कल्याणार्थ उभी करावयाची सुसंस्कृत राज्यपद्धती.’ या शब्दसंहतीमधील गाभ्यासंबंधीची, महाराजांची ओढ स्पष्ट दिसते.

शाहू महाराज, ‘काय केले? काय करीत आहेत? आणि कुठे पोचायचे आहे?’ हे

***

मुंबई : २१ मार्च, १९०८
मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये, गव्हर्नर जॉर्ज क्लार्क यांच्या हस्ते झालेल्या व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी, शाहू महाराजांनी दिलेले प्रास्ताविक भाषण

प्रतिपादन करण्यासाठी हरेक संधीचा-मग ती लहानमोठी कोणतीही असो – लाभ उठवितात.

वक्तृत्वाला नव्हे तर कर्तृत्वाला बहर आणणारी राजर्षी शाहूंची ‘सरंजामी लोकशाही’ मुक्तपणे संधीची देवाणघेवाण करताना आढळते.

***

अनुक्रमणिका

अठरा

कृतज्ञतेचे वैभव

***

माजी सम्राज्ञीच्या ज्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी आज आपण माझ्या शब्दाला मान देऊन येथे जमला आहात, तो पुतळा सम्राज्ञीवरील माझ्या भक्तीचे व स्वामीनिष्ठेचे अत्यंत साधे असे चिन्ह आहे; हे मी सांगावयास पाहिजे असे नाही. हे अल्पसे स्मारक तयार होऊन बरेच दिवस झाले. परंतु त्याचा अनावरण समारंभ मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांच्या हातून व्हावा या हेतूने योग्य संधीची मी इतके दिवस वाट पाहात होतो. आपल्या पूर्वीचे गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन यांनी हे कार्य पार पाडण्याचे आम्हास अभिवचन दिले होते. परंतु इंग्लंडला त्यांचे एकाएकी प्रयाण झाल्यामुळे हा योग पुढे लोटणे भाग पडले. आपल्या येथील आगमनाचा फायदा घेऊन हे कार्य सिद्धीस नेताना मला मोठा आनंद होत आहे. माझ्या छोट्याशा संस्थानची नैतिक व आधिभौतिक प्रगती ही सम्राज्ञी सत्तारूढ होऊन एक वर्ष होते न होते तोच, चक्रवर्तीचे पूर्ण अधिकार उपभोगीत असलेले या संस्थानचे शेवटचे नृपती स्वर्गवासी झाले; अर्थातच त्यांच्या मृत्यूमुळे ब्रिटिशांची खास राजनीती प्रस्थापित झाली. त्यांच्यामागून आलेले नृपती अकाली कालवश झाल्यामुळे चवथे शिवाजी महाराज उर्फ बाबासाहेब महाराज यांच्या अल्पकालीन कारकीर्दीखेरीज करून, हे संस्थान सन १८९४ पर्यन्त ब्रिटिश नेतृत्वाखाली राहिले. यावर्षी माझ्या हाती अधिकारसूत्रे देण्यात आली. प्रजेच्या कल्याणाप्रित्यर्थ सुसंस्कृत राज्यपद्धतीची व निरलस परिश्रमाची जर कोठे संस्थानात स्पष्ट चिन्हे दिसत असतील तर त्याचे सर्व श्रेय कार्यक्षम ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली, वरील मुदतीत जे उत्कृष्ट कार्य झाले त्यालाच दिले पाहिजे. या कार्याची जाणीव मला व माझ्या प्रजाजनांना नाही, असे नाही.

सम्राज्ञीच्या कारकीर्दीच्या 'डायमंड ज्युबिली'च्या प्रसंगी दोन संस्था स्थापन झाल्या. या दोन संस्था म्हटल्या म्हणजे 'कोल्हापूर इन्फन्ट्री हॉस्पिटल' आणि 'महारोग्यांचा आश्रम' या होत. यांचे ध्येय, रुग्ण क्लेशनिवारण करणे हे होय. माजी सम्राज्ञीच्या अंगी विशेष प्रसिद्ध व कौतुकास्पद असा जर कोणता गुण असेल तर, तो गरीब व आर्त लोकांसंबंधी त्यांच्याठायी वसत असलेला कळवळा व त्यांचे दुःखनिवारण करण्यासाठी त्यांचा एकसारखा प्रयत्न हा होय. स्त्रीजनांतील दैवी अंशनिदर्शक असा स्त्रीजनोचित गुण म्हणजे कोमल हृदयत्व. त्यांचे या संस्था यथार्थ स्मारक आहेत. त्यांच्या निधनानंतर गरीब व कर्जबाजारी शेतकरी लोकांना मदत करण्यासाठी म्हणून माझ्या प्रजाजनांनी एक फंड गोळा केला. पुष्कळ कर्जबाजारी इस्टेटीना याचा फायदा मिळाला आहे. मराठ्यांकरिता म्हणून 'व्हिक्टोरिया बोर्डिंग इन्स्टिट्यूशन' नावाची संस्था त्यांच्याच स्मरणार्थ सुरू करण्यात आली. माझ्या प्रजाजनांतील मागासलेल्या वर्गापैकी, एका वर्गाचे हितसंवर्धन हे या संस्थेचे ध्येय आहे. येथे मराठ्यांची मुले, राजाराम हायस्कूल व कॉलेज यात अध्ययन करीत असताना त्याचे पालनपोषण केले जाते.

ही संस्था यशस्वी झाली आहे. या संस्थेच्याअभावी ज्यांच्या शिक्षणाची हेळसांड झाली असती, अशा पुष्कळ तरुण मराठ्यांचे लक्ष या संस्थेकडे वेधले. आतापर्यन्त जी यशप्राप्ती झाली आहे, तिचा या संस्थेला मोठा अभिमान वाटत आहे. सम्राज्ञीच्या ज्ञानविषयक वा सहृदयत्वद्योतक उदात्त गुणांविषयी मी व माझे प्रजाजन यांच्याठायी वसत असलेला आदर व्यक्त करण्यासाठी अशा प्रकारचे विविध मार्ग आम्ही स्वीकारले आहेत. आपल्या विस्तीर्ण साम्राज्यापेक्षा व सम्राटपदापेक्षाही अधिक मौल्यवान ठेवा म्हणून हे गुण आपल्या पश्चात् आपल्या संततीला त्या ठेवून गेल्या आहेत. आमचे पुण्यशील प्रभू बादशहा, [युवराज या नात्याने,

अनुक्रमणिका

हिंदुस्थानात झालेल्या आगमनाच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेली 'अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल' नावाची भव्य इमारत (सध्याचे छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पिटल] त्यांनी जगात 'शांतता-प्रस्थापक' असे सुंदर नाव यापूर्वीच कमाविले आहे. त्याचे पुत्र युवराज, हे आपल्या ठायी वसत असलेल्या हिंदी लोकांविषयीची खरी कळकळ व आपला मनोवेधक साधेपणा यामुळे, हिंदुस्थानातील अधिकारी वर्गास त्यांनी पाठविलेला प्रख्यात संदेश प्रत्येक हिंदी मनुष्याच्या अंतःकरणावर खोदण्यासारखा आहे. "हिंदुस्थानला आवश्यक अशी जर कोणती गोष्ट असेल तर ती सहानुभूती होय," असे युवराजांनी उद्गार काढले होते.

***

अनुक्रमणिका

७. विनंती ऐसाजे

एकोणीस

विनंती ऐसाजे

* * *

शाहू महाराजांना वेळोवेळी जनतेने प्रेमाने मानपत्रे दिली : त्यात आपल्या जीवाभावाच्या राजासंबंधी अत्यंत श्रद्धेची भावना होती तशीच ती, महाराज लोकांसाठी करीत असलेल्या हितवर्धक कार्यांची विनम्रभावे दिलेली पावतीही होती.

या निमित्ताने शाहू महाराजांना, आपण करीत असलेल्या कार्यामागची भूमिका वेळोवेळी स्पष्ट करण्यास संधी लाभली आहे. चातुर्याने ती त्यांनी घेतली आहे. शाहू महाराजांना दिल्या गेलेल्या मानपत्रांतूनही, क्वचित् असे काही मुद्दे उपस्थित केले गेले आहेत की, महाराजांना आपली भूमिका स्पष्टपणे मांडणे इष्ट वाटले आहे.

* * *

१. पुणे: सप्टेंबर, १८९४
'पुणे सार्वजनिक सभे'ने, हिराबागेतील मेजवानीनंतर दिलेल्या मानपत्रास, शाहू महाराजांनी केलेले उत्तरादाखल भाषण

२. कोल्हापूर : २ सप्टेंबर, १९०२
शाहू महाराज १९०२ मध्ये, पहिला परदेश दौरा आटोपून मायदेशी परतल्यावर कोल्हापूरकरांनी दिलेल्या मानपत्रास महाराजांनी दिलेले उत्तर

३. कोल्हापूर : सप्टेंबर, १९०२
शाहू महाराजांच्या परदेश दौऱ्याच्या निमित्ताने, 'राजारामीयन क्लब'ने दिलेल्या मानपत्रास शाहूमहाराजांनी दिलेले उत्तर

४. कोल्हापूर : सप्टेंबर, १९०२
शाहू महाराज इंग्लंडहून परत आल्यानंतर जनतेच्या वतीने देण्यात आलेल्या मानपत्र अर्पणप्रसंगी राजर्षींनी सत्कारास दिलेले उत्तर

अत्यंत सावध महाराजांनी, मानपत्रातील सूचकतेइतक्याच सावध परखडपणाने, जरूर त्या मुद्द्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. हितसंबंधियांचा हेतूपुरस्सर प्रचार ही, नित्याची बाब असली तरी तशा प्रचारास बळी पडणाऱ्या सर्वसाधारण जनतेच्या मनात किल्मिष उरता कामा नये, अती उभ्या राहाणाऱ्या कार्याच्या दृष्टीने त्यात हानी असते; म्हणून राजर्षींनी निःसंदिग्धपणे, अशा चोरवाटांना मोकळ्या मैदानात घेतले आहे.

अनुक्रमणिका

त्यादृष्टीने सार्वजनिक सभेच्या मानपत्रातील "आपल्या प्रजाजनांचे सौख्य व प्रगती हे आपले पहिले कर्तव्य आहे यात तिळमात्र शंका नाही. तथापि सामान्यपणे आपणा सर्वांच्या मातृभूमीचा व विशेषतः महाराष्ट्राच्या अभ्युदयासाठी प्रयत्न करणे हेही आपले कर्तव्य आहे. आपल्या संस्थानच्या प्रजाजनासंबंधाने असलेल्या आपल्या कर्तव्याच्या खालोखाल हे महत्त्वाचे कर्तव्य आहे." या हेत्वारोपी सदुपदेशाला महाराजांनी 'माझ्या प्रजाजनांच्या कल्याणाखेरीज अखिल महाराष्ट्रातील लोकांच्या कल्याणाची मी काळजी बाळगावी, असे आपण सांगण्याची मुळीच जरूरी नव्हती.' असे जोषाने उत्तर दिले आहे: आणि "दयाळू ब्रिटिश सरकारच्या अंमलाखाली सर्व घटकावयव इतके संलग्न झालेले आहेत की, सर्वांची सारखीच प्रगती झाल्याखेरीज एका विशिष्ट अवयवाची प्रगती होणे अशक्य आहे." असा, कुणीही न सांगता राजर्षी, स्वतः स्वयंप्रेरणेने आचरणात आणत असलेला सर्वसिद्ध सिद्धांत, संबंधितांनी समजून घ्यावा, म्हणून ते हे आवर्जून नमूद करीत आहेत.

त्याचप्रमाणे 'राजारामीयन क्लब' च्या मानपत्रातील, जातिपंथ-भेद भावरहित छद्मी उल्लेखाचा परामर्श घेताना महाराजांनी "ज्ञानाच्या सामान्य झऱ्याचे पाणी आम्ही पीत असल्यामुळे, उदय पावलेल्या नवीन शैक्षणिक भ्रातृत्वाच्या जोरावर जुने जातिभेद लय पावत आहेत, असे जे आपण म्हटले, ते मला अतिशय पटले." असे छद्मीपणाला निरूत्तर करणारे उद्‌गार काढले आहेत. त्यामधील 'ज्ञानाच्या सामान्य झऱ्याचे पाणी' व 'ते मला अतिशय पटले' यासारख्या विधानांतील 'सामान्य' आणि 'अतिशय' वरील जोर, राजर्षींच्या अचूक हेरण्याच्या दृष्टीचा प्रत्यय आणून देतो.

शाहू महाराज एकाचवेळी अनेक आघाड्यांवर लढत आहेत. त्यांना तसे लढणे जरूरच झाले आहे.

ब्रिटिश शासन, सनातनी हेकट वर्ग, भोळ्याभाबड्या अज्ञ जनतेचे अज्ञान-दारिद्र्य आणि मागासलेपणा अशा विविध पातळ्यांवर ही लढाई सुरू आहे. ती जिंकायची, संपूर्णांशाने जिंकायची असा महाराजांचा निर्धार आहे. त्यादृष्टीने समाजाच्या सर्व क्षेत्रातील श्रेष्ठत्वाच्या सामाजिक अपप्रवृत्तीविरूद्ध दंड थोपटून ते उभे आहेत. सामाजिक न्याय भूमिकेवर सामूहिक समाजजीवन आणण्यासाठी, जे जे चांगले, ते ते स्वीकारण्याची दृष्टी आहे. त्यात चिंतनाचा भाग अगोदरचा, पण क्रम मात्र कार्य आधी आणि त्याअंगाने चिंतनाचे प्रतिपादन असे घडले आहे.

त्या संदर्भात, सामान्यांबरोबरच, सामान्यांसाठी सापडेल तेथून चांगले उचलण्याची, त्याला प्रतिष्ठित करण्याची महाराजांची भूमिका खास रीतीची आहे. इंग्लंडहून परत आल्यावर जनतेने प्रेमाने दिलेल्या मानपत्राला उत्तर देताना, "इंग्लंडमधील सार्वजनिक भव्य इमारती, सुंदर पटांगणे व बागबगीचे, भूगत रेल्वे व बोगदे, भव्य पूल, मोठमोठे कारखाने, गर्जना करणाऱ्या आगगाड्या व वहाने" वगैरेसारख्या भौतिक गोष्टींच्या उल्लेखाबरोबरच इंग्रज माणसातील "कडक शिस्त, व्यवहारयोग्य गुण, चोख प्रामाणिकपणा, सत्याची व न्यायाची आवड, स्वार्थत्यागपूर्वक सार्वजनिक कार्य करण्याची हौस, पराकाष्ठेची चिकाटी व परक्या लोकांशी पराकाष्ठेचे दाक्षिण्य" ह्या राष्ट्रवर्धक सद्‌गुणांचा आवर्जून उल्लेख, तोही क्रमाने पहिला; यात 'राष्ट्राला काय हवे असते? 'ते कसे बांधायचे असते?' आणि, जे असते, घडते, त्यात चिरकालिक महत्त्व कशास असते?' यासंबंधीचा दूर पल्ल्याचा विचार आहे. समाजजीवन सर्व अंगांनी कसे फुलते आणि त्यासाठी काय करावे लागते, त्याचा हा इसार आहे.

‘विनंती ऐसाजे’ मधून जाणवते ते हे की, नदी वाहात असते. अवतीभोवतीच्या लोकांचे जीवन समृद्ध होत जाते. अमक्याचेच जीवन समृद्ध व्हावे आणि अमक्याचे होऊ नये असा काही नदीचा आग्रह नसतो. धरताही येत नाही. शाहू महाराजांचे जीवन, असेच अनेकांना फुलविण्यात तृप्त होते. म्हणूनच या ‘केशराच्या मळ्याला’, कृतार्थतेचे लेणे लाभले.

***

अनुक्रमणिका

एकोणीस

विनंती ऐसाजे

***

एक

पुणे सार्वजनिक सभा

माझ्या प्रजाजनांच्या कल्याणाखेरीज अखिल महाराष्ट्रातील लोकांच्या कल्याणाची मी काळजी बाळगावी, असे आपण सांगण्याची मुळीच जरूरी नव्हती. दयाळू ब्रिटिश सरकारच्या अंमलाखाली साम्राज्याचे सर्व घटकावयव इतके संलग्न झालेले आहेत की, सर्वांची सारखीच प्रगती झाल्याखेरीज एका विशिष्ट अवयवाची प्रगती होणे अशक्य आहे. शिवाय महाराष्ट्रातील लोकांना आजपर्यन्त ज्या सामान्य बंधनांनी एकमेकांशी जखडून टाकले आहे तीच बंधने त्यांच्यांत परस्पर सहानुभूती कायम राखतील, याबद्दल खात्री करण्यास पुरेशी आहेत.

दोन

कोल्हापूर मराठा सभा

या थोड्याशा अवधीत माझ्या मनावर जो कायमचा परिणाम झाला; त्यामुळे माझी ब्रिटिश सिंहासनाविषयी कृतज्ञता व सम्राट सातवे एडवर्ड यांच्याविषयीचे माझे प्रेम व निष्ठा द्विगुणित झाली आहेत. बादशहाशी प्रत्यक्ष मुलाखतीचा बहुमान मला मिळाला. बादशहाच्या दयाळू छत्राखाली सुखसमृद्धीची वृद्धी होऊन भाग्यवान इंग्लंडच्या अनुग्रहांचा फायदा अखिल ब्रिटिश साम्राज्याला मिळेल.

मराठ्यांची अलिकडे जी प्रगती होत आहे; तिचे मी मोठ्या उत्सुकतेने निरीक्षण केले. आपली बौद्धिक जागृती करून घेण्याची या जातींना जी स्तुत्य स्फूर्ती उत्पन्न झाली आहे. तिचेच ‘मराठा शिक्षण संस्था,’ हे एक नामी फळ आहे; यात शंका नाही. इतिहासामध्ये गतकालीन मराठ्यांची प्रतापशाली कृत्ये नमूद आहेत. तेव्हा सभ्य गृहस्थहो! तुम्ही आखलेल्या मार्गांनी जर धीमेपणाने प्रगती कराल तर तुम्हाला पुढे उत्तम दिवस प्राप्त होतील याची मी आपणास ग्वाही देतो.

तीन

राजारामीयन क्लब

ज्ञानाच्या सामान्य झऱ्याचे पाणी पीत असल्यामुळे, उदय पावलेल्या नवीन शैक्षणिक भ्रातृत्वाच्या जोरावर जुने जातिभेद लय पावत आहेत, असे जे आपण म्हटले; ते मला अतिशय पटले. शिक्षणाचे महत्त्व समजून घेऊन विस्तृत प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार झाल्याखेरीज, अशा प्रकारचे भेदभाव नष्ट होणार नाहीत. आणि हाच हेतू साध्य करण्यासाठी माझा सतत प्रयत्न आहे. निरनिराळ्या जातींच्या शैक्षणिक प्रगतीत जोपर्यन्त

अशा प्रकारचे महदन्तर आहे, तोपर्यंत पुष्कळ दिवसाचे भेदभाव नष्ट करण्याचे, सर्व औपचारिक प्रयत्न निष्फळ होणार; म्हणून त्या दिशेने मी ज्या उपायांचे अवलंबन केले आहे, त्याकडे अशा दृष्टीने आपण पहाल; अशी माझी खात्री आहे.

चार

कोल्हापूर जनता सभा

खरोखरच इंग्लंडमध्ये माझे स्वागत मोठ्या प्रेमाने करण्यात आले. इंग्लंडमध्ये मी ज्या ज्या ठिकाणी गेलो त्या त्या ठिकाणी माझ्याशी लोकांकडून जे एकसारखे व प्रेमाचे वर्तन झाले, त्याबद्दलची कृतज्ञता मला यथार्थपणे व्यक्त करता येत नाही; मला त्याची शंका वाटते. केंब्रिजच्या नामांकित विश्वविद्यालयाने व तत्सदृश सुप्रसिद्ध संस्थांनी माझा जो सन्मान केला, त्याची महती मला अतिशय वाटते. परंतु तुम्ही आपल्या मानपत्रात ज्यांना यथार्थ महत्त्वाचे स्थान दिले आहे, असे प्रख्यात मुत्सद्दी लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांनी माझा जो मोठा सत्कार केला; त्याचे महत्त्व मी अतिशय मानतो. या सत्काराचा मला खरोखरच मोठा अभिमान वाटतो.

ज्यांच्या मृत्यूमुळे सर्वांना हळहळ वाटली असे माझे प्रिय वडिल, कोल्हापूरचे माजी रीजंटसाहेब यांची शेवटची इच्छा, इंग्लंडला प्रयाण करून मला पूर्ण करता आली ही गोष्ट कोणत्याही प्रकारे कमी आल्हाददायक नाही. येथील पुष्कळशा सार्वजनिक संस्था मी प्रत्यक्ष पाहिल्या व तेथील सार्वजनिक व राजकीय सभांना हजर राहण्याची संधी मला मिळाली. या सर्व गोष्टीमुळे इंग्लिश लोकांविषयी मला अतिशय आदर व कौतुक वाटते. जेथे जेथे तुम्ही दृष्टी फेकाल तेथे तेथे कडक शिस्त, व्यवहारयोग्य गुण, चोख प्रामाणिकपणा, सत्याची व न्यायाची आवड, स्वार्थत्यागपूर्वक सार्वजनिक कार्य करण्याची हौस, पराकाष्ठेची चिकाटी व परक्या लोकांशी पराकाष्ठेचे दाक्षिण्य हे गुण दृष्टोत्पत्तीस आल्याखेरीज राहणार नाहीत. हे सद्‌गुण इंग्लिश गृहस्थांच्या सद्‌र्तनाचे आधारस्तंभ असून, इंग्लंडने जगात जे विलक्षण यश संपादिले आहे, त्याचे ते मर्मनिदर्शक होत.

इंग्लंडमधील सार्वजनिक भव्य इमारती, सुंदर पटांगणे व बागबगीचे, भूगत रेल्वे व बोगदे, भव्य पूल, मोठमोठे कारखाने, गर्जना करणाऱ्या आगगाड्या व वाहने, भव्य पदार्थसंग्रहालयात गोळा करून ठेवलेली संपत्ती व कित्येक शतकांच्या कुबेरांनी व हॉवर्ड विल्बर फोर्ससारख्या गृहस्थांनी संस्थापिलेल्या परोपकारी संस्थांनी राष्ट्राला मेहेरनजर केलेल्या कलाकुसरीचा व इतर विस्मयजनक गोष्टींचा संग्रह ही, या सद्‌गुणांची दृश्य रूपे होत. माझ्या मनावर जे परिणाम घडले व माझ्या मनात ज्या भावना उद्‌भूत झाल्या, त्यांचे वर्णन; या छोट्याशा उत्तरात मी अंशतः देखील करू शकत नाही. इंग्लंडमध्ये मला आणखी थोडे राहता आले असते तर बरे झाले असते असे मला वाटते. परंतु माझ्या संस्थानात डोकावू पाहणाऱ्या दुष्काळाच्या व प्लेगच्या भीतीने मला अधिक दिवस तेथे राहता आले नाही, तथापि या दोन्ही आपदा क्षणिक का होईना दूर झाल्या आहेत. हल्लीच्या आनंदाच्या प्रसंगास भविष्यकाळाच्या चिंतेचे गालबोट लागले नाही, हे मी मोठे भाग्य समजतो.

* * *

वीस

लोकसेवेचा शुभारंभ

* * *

राजर्षी शाहू महाराजांनी, आगगाडीच्या कामाच्या बांधणीच्या प्रारंभाच्या निमित्ताने, वयाच्या चौदाव्या वर्षी केलेल्या ‘लोकसेवेचा शुभारंभ’ या भाषणात त्यांची लोकसेवेची तळमळ स्पष्ट रीतीने व्यक्त झाली आहे.

राजर्षींच्या दृष्टीने, लोकांच्या कामाच्या संबंधातील, आगगाडीचे काम तडीस जाण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे; त्याचप्रमाणे लोकसमुदायांसमोर उभे राहून चार शब्द सांगणे हाही पहिलाच अनुभव आहे. त्यासंदर्भात ‘जे थोडेबहुत शब्द बोलण्यास मला सुचविले आहेत’ हे शाहू महाराजांचे सूचक उद्‌गार खूपच बोलके आहेत.

त्याचबरोबर ‘माझ्या अल्पवयात कोल्हापूरचे कल्याण करण्याकरिता हरएक कृत्य केले जाईल.’ हे राजर्षींनी गंभीरपणाने उच्चारलेले आश्वासन; राजर्षींना लाभलेले अल्पायुष्य आणि त्यामध्ये समाजजीवनाला गती देणारे, उभे केलेले पर्वतप्राय कार्य; हे सर्व; अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे.

* * *

कोल्हापूर : ३ मे, १८८८
कोल्हापूर राज्य रेल्वे बांधणीच्या शुभारंभ समारंभप्रसंगी, युवराज शाहूनी उद्‌घाटक म्हणून, केलेले पहिले भाषण

* * *

वीस

लोकसेवेचा शुभारंभ

* * *

सर्व लोकांच्या संबंधीचे काम करण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग असून या कामी आपण सर्व मला मेहरबानीने मदत करीत आहात, याबद्दल मी आपले आभार मानतो. याहून, अधिक करणे मला योग्य दिसत नाही. जे थोडेबहुत शब्द बोलण्यास मला सुचविले आहेत, त्याच्याबाहेर मजकडून अधिक काही होईल अशी आशा आपल्या मनात येणार नाही असे मी समजतो.

हे आगगाडीचे काम तडीस गेल्याने माझ्या राज्याच्या संपत्तीची साधने वाढण्याच्या कामी ह्याचा फायदेशीर परिणाम होईल. माझी अशी उमेद आहे की, साहजिकरीतीने घडून येणाऱ्या क्रमाप्रमाणे आजपासून तीन वर्षांच्या आत हा आगगाडीचा रस्ता सुरू करण्याचे काम माझ्या हातून होईल.

आपण सर्व, लोककल्याणास झटणारे इंग्रज सरकारच्या आश्रयाखाली आहोत आणि आपणास माहीत आहे की, माझ्या अल्प वयात कोल्हापुरचे कल्याण करण्याकरिता हरएक कृत्य केले जाईल. हा आगगाडीचा रस्ता हे एक त्यापैकी ठळक उदाहरण होय असे मी जाणतो.

* * *

अनुक्रमणिका

८. टिपा आणि टिप्पणी

अनुक्रमणिका

१

शिक्षण

* * *

एक

शिक्षण : स्वराज्यासाठी ! /३·११

या भाषणाचा प्रारंभ, राजर्षी शाहू छत्रपतीनी 'मिस्टर स्टॅन्डन, भगिनींनो व बंधूनो' असा केला आहे.

मि. स्टॅडन हे खामगाव विभागातील ब्रिटिश अधिकारी. परिषदेसाठी खामगाव येथे आवर्जून उपस्थित राहिले होते.

बहुजनसमाजाच्या शिक्षणाविषयी तळमळ असलेले एक युरोपियन सद्ग्रहस्थ म्हणून स्टॅन्डन यांची ख्याती होती.

वेरूळ : देवगिरी जवळील, भोसले कुलाच्या पाटीलकीच्या वतनाचे गाव. मालोजीराजे भोसले यांचा उदय येथेच झाला.

खासेसाहेब पवार : देवास (ज्युनियर) संस्थानचे महाराजा. १९१६ सालच्या मराठा शिक्षण परिषदेचे अध्यक्ष. मराठ्यांच्या शिक्षणाविषयी तळमळ असलेले एक संस्थानिक

छत्रपती शिवाजी व जातिनिर्मूलन : छत्रपती शिवाजी महाराज गो-ब्राह्मण प्रतिपालक तर खरेच; परंतु त्याहीपेक्षा त्यांचे महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे जातिनिर्मूलनासाठी त्यांनी केलेले प्रयत्नः फलटणच्या सरदार निंबाळकरांनी मुस्लिम धर्म स्वीकारला होता. छत्रपतीनी त्यांना पुन्हा हिंदू करून घेतले. खेरीज स्वतःची मुलगी देऊन त्यास सन्मानाने क्षत्रियकुलात प्रवेश दिला.

राजा अकबर : मोगल बादशहा. हिंदु-मुस्लिम ऐक्याचा प्रयत्न करणारा पहिला इस्लामी राज्यकर्ता. त्याने जोधाबाई नामक एका राजपूत स्त्रीशी लग्न केले. तिच्या इच्छेप्रमाणे तिला शेवटपर्यन्त हिंदूच राहू दिले. तिच्या सूर्यव्रतासाठी (अर्घ्य देणे) लाखो रूपये खर्च केले. शिवाजी आणि राजा अकबर यांचा आदर्श राजर्षी शाहूनी मनोभावे पाळला, वाढविला. राजर्षींनी सर्वज जातीशी रोटीसंबंध ठेवले. बेटीव्यवहाराचा पुरस्कार केला.

अनुक्रमणिका

दोन

रिलिजस ब्युरॉक्रसी /१२·२५

उदाजीराव पोवार : राजपूत घराणे. धारचे महाराजा. उदारमतवादी मराठा राजा. मराठ्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न. नाशिक येथील 'मराठा विद्यार्थी वसतिगृहा' साठी देणगी दिली. अशा अनेक शैक्षणिक संस्थांना व विद्यार्थ्यांना मदत केली.

रावसाहेब थोरात-पाटील : मूळ गाव वणी. नासिक येथील 'मराठा बोर्डिंग'चे संस्थापक : कार्यकर्ते. 'सत्यशोधक समाजा' चे पुढारी. अत्यंत निरलस, स्वार्थत्यागपूर्वक कार्य करणारे म्हणून ख्याती. सत्यप्रेमी, कर्तव्यनिष्ठ मराठा पाटील.

दादा मोरे-पाटील : मूळ गाव पिंपळगाव बसवंत (जिल्हा : नासिक), तेथील पाटीलकीचे वतन यांचेच आहे. मराठा बोर्डिंग्ज्चे कार्यकर्ते. 'सत्यशोधक समजा' पासून स्फूर्ती घेऊन काम.

'लोकसंग्रह' मासिकाचे एडिटर : पंत पराडकर, दा. वि. गोखले: राष्ट्रीय पक्षाचे नवे दैनिक, सन १९१९ मध्ये पुण्यात सुरू झाले. 'संदेश'मधील हल्ल्यांना तोंड देण्यासाठी उपयोग.

मार्टिन ल्युथर : ख्रिस्ती धर्मसुधारक. मध्ययुगात पोपच्या सत्तेविरूद्ध बंड करणारा समाजसुधारक. यांच्या प्रेरणेने 'ख्रिश्चन प्रॉटेस्टंट पंथा' ची निर्मिती झाली.

* * *

'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस्' (Mother of Boarding Houses) करवीर नगरीला राजर्षीनी लावलेले एक विशेषण. करवीर नगरी म्हणजे बोर्डिंग्ज्ची जननीच. येथे राजर्षीनी मराठा, जैन, लिंगायत, सारस्वत, मुसलमान, दैवज्ञ, पांचाळ, शिंपी, कायस्थ, प्रभू, हरिजन या सर्वांसाठी बोर्डिंगे सुरू करून दिली. इतकी 'बोर्डिंग्ज' त्यावेळी तरी भारतातील दुसऱ्या कोणत्याही एका शहरी नव्हती.

'मदर ऑफ पार्लमेन्ट्स्' (Mother of Parllaments) प्रमाणे कोल्हापूर नगरी 'मदर ऑफ बोर्डिग हाऊसेस' व्हावी हे शाहू छत्रपतींचे स्वप्न होते. त्यानी ते वास्तवात आणले.

'जातवार प्रतिनिधित्व' : (Communal Representation): सर्व जातीच्या लोकांची सुधारणा होऊन सामाजिक, राजकीय, औद्योगिक, शिक्षणविषयक व सरकारी नोकरी ह्या बाबतीत आपली जबाबदारी पार पाडण्याचे सामर्थ्य त्यांच्यात येण्यासाठी काही काळ विशेष सवलतींची राजर्षीनी मागणी केली. ते 'जातवार प्रतिनिधित्व' होय. यासाठी नेहमीच त्यांनी ब्रिटिश सरकारकडे हट्ट धरलेला आढळतो. आपल्या संस्थानात राजर्षीनी असे प्रतिनिधित्व देऊनही टाकले होते.

'केसरी' वगैरे जहाल पत्रे : पुण्यातील जहाल पक्षाच्या पुढाऱ्यांनी राजर्षी शाहूंच्या सामाजिक सुधारणांना सतत विरोध केला. त्यामध्ये 'केसरी', 'लोकसंग्रह' यांचा अग्रक्रम होता. तशीच कोल्हापूर-पुणे येथून निघणारी 'ग्रंथमाला' व 'समर्थ' ही पत्रेही राजर्षींच्या कार्यावर टीका करीत.

अनुक्रमणिका

'ब्राह्मण ब्युरॉक्रसी' : भारतातील ब्राह्मणवर्ग विशेषतः दक्षिणेतील महाराष्ट्र व मद्रास इलाख्यातील ब्राह्मणवर्ग बहुजन समाजावर धार्मिक वर्चस्व प्रस्थापित करून हजारो वर्षे सामान्य माणसांना लुबाडीत आला. ह्या ब्राह्मणी वर्चस्वाविरूद्ध बहुजनसमाजात जागृती करण्याचे लोकहितवादी, म. फुले, राजर्षी शाहू वगैरेनी प्रयत्न केले. परंतु सुशिक्षित ब्राह्मणी हुकूमशाहीने नेहमीच ह्या प्रयत्नांना हाणून पाडण्याचा प्रयत्न केला. राजर्षीनी त्यांच्या या वर्चस्वाला 'ब्राह्मण ब्युरॉक्रसी' असे संबोधले आहे. त्यामध्ये वर्षानुवर्षांचा अन्यायही अंतर्भूत आहे.

आधी राजकीय सुधारणा की आधी सामाजिक सुधारणा? : 'भारतीय असंतोषाचे जनक' लो. टिळक व सुधारकाग्रणी गो. ग. आगरकर यांच्या काळचा एक वाद. काय अगोदर व्हावे, काय अगोदर करावे? ते तसे करणे का इष्ट; त्यामुळे काय परिणाम होईल; इत्यादी रणतुंबळ चर्चेचा, महाराष्ट्रावर दूरगामी परिणाम करणारा वैचारिक असा हा वादविषय

राजर्षी शाहूंच्या मते, आधी राजकीय की आधी सामाजिक सुधारणा, हा वाद उचित नाही. "या सुधारणा स्वतंत्र नाहीत. या दोन सुधारणा राष्ट्रोन्नतीच्या गाड्याची दोन चाकेच होत. सामाजिक सुधारणेची तूर्त जरुरी नाही; असे प्रतिपादन ऐकू येते तेव्हा तेथे काही तरी पाणी मुरते आहे असे समजावे." याचा अर्थ ब्राह्मण हाच एकमेव सुशिक्षित वर्ग असल्याने सर्व राजकीय सत्तास्थाने त्यांच्याच हाती राहणार. म्हणून आधी राजकीय सुधारणांचा आग्रह असा सूर. पण दोन्ही रीतीच्या सुधारणा होणे इष्ट, त्या अभिन्न; अशी राजर्षीची दृष्टी. सुप्रसिद्ध विचारवंत श्री वसंत पळशीकर यांनी, या वादासंबंधी 'तो नेतृत्वाच्या उभारणीचा परिणाम होता' असे स. प्र. पत्रिकेतील आपल्या लेखात म्हटले आहे.

तीन

हत्तीचे बळ /२६·३१

हुबळी (कर्नाटक राज्य) येथे कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेचे अधिवेशन दोन दिवस चालले होते : २७ व २८ जुलै, १९२० पर्यंत.

आय् सी. एस्. ची परीक्षा : भारतातील सनदी नोकरांच्यासाठी ब्रिटिश सरकारने ठेवलेली परीक्षा. उत्तीर्ण असलेल्यांना सनदी नोकरीत प्रवेश मिळे. ही परीक्षा देण्यासाठी भारतीयांना इंग्लंडला जावे लागे. त्यामुळे सनदी नोकरीत फारच कमी भारतीयांना प्रवेश मिळे. आर्थिक वगैरे दृष्टीने त्रासही होई. म्हणून ही परीक्षा भारतातच व्हावी यासाठी बहुसंख्य ब्राह्मण सुशिक्षितांनी चळवळ उभारली होती. त्यासाठी मोठा फंडही उभारला होता. राजर्षीच्या मते, येथील सामान्य जनतेला साधे प्राथमिक शिक्षण मिळावे म्हणून कुणी बारीकसाही फंड उभारलेला नाही; हे असे का? या मागचा मतलब काय? — हा राजर्षीचा प्रश्न आहे.

सर जॅक्सन व रॅडसाहेब : ब्रिटिश सनदी नोकर, पैकी जॅक्सन यांचा कान्हेरे यांनी नासिक येथे व रॅड यांचा चाफेकर बंधूंनी पुणे येथे खून केला. राजर्षी शाहूंना, 'ब्राह्मण ब्युरॉक्रसी' च्या नेत्यांनी, 'रॅड व जॅक्सन यांच्यासारखीच तुमची अवस्था करू,' अशी धमकी दिली होती. या धमकीचे नेतृत्व प्रा. विजापूरकर यांजकडे होते. ('ग्रंथमाला': ऑक्टोबर, १९०१ व मे, १९०२)

हुबळी बाजारास आग : हुबळी येथे 'कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषद' भरली होती. (२७ जुलै, १९२०) राजर्षी शाहू या सभेचे अध्यक्ष होते. त्यावेळी रात्रीच हुबळीच्या बाजारास आग लावण्यात आली.
श्री नंदीची मूर्ती फोडली : हुबळीच्या कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेच्या वेळी तेथील नंदीची मूर्ती कोणीतरी फोडली.

या दोन्ही गोष्टींच्या पाठीमागे परिषदेस अडथळा आणणे हा हेतू होता; असा भावार्थ.

२

समाज

चार

सोशल रिफॉर्म + एकी = स्वराज्य /३३·४०

शाहू महाराजांचे वंशज (पहिले शाहू) : पेशव्यांनी साताऱ्याच्या छत्रपतींना वार्षिक तनखा देऊन, केवळ नामधारी राजा केले. या गादीवरील छत्रपती प्रतापसिंहाना तर शिक्षणही घेता येत नव्हते. त्यांच्या क्षत्रियत्वाबद्दलही वाद माजला.

सेंट कोलंबो स्कॉच मिशन : इंग्रजांनी, ख्रिस्ती धर्मप्रचारक अशा अनेक मिशन्सना भारताचे दार मोकळे केले होते. त्यात 'स्कॉटिश मिशन' व 'अमेरिकन मिशन' प्रसिद्ध होती. त्यापैकी कित्येकांनी येथे दवाखाने खोलले. लोकांना शिक्षण देणाऱ्या शाळाही सुरू करून भारतीय लोकांना सज्ञान केले. सेवा आणि धर्मप्रसारही केला. मुंबई, नगर, मिरज, वाई ह्या ठिकाणची त्यांची कार्ये प्रसिद्ध होत. डॉ. वॉल्नेस्, डॉ. व्हेल व मिस सदरलँड ही या मिशनमधील, निष्काम भावनेने लोकसेवा करणारी देव माणसे होत.

मिसेस बिझांट : डॉ. ॲनी बेझंट यांच्याकडेच थिऑसॉफिकल सोसायटीची सूत्रे होती. ह्या पाश्चात्य विदुषीने भारतीय जनतेची निष्काम बुद्धीने सेवा केली. भारतीय माणसातील अस्मिता जागृत केली.

पुण्यनगरीतील लोक : पुण्यातील 'स्वराज्यवादी' पक्षाचे ब्राह्मण पुढारी; यांच्याविषयीचा हा उल्लेख आहे. पुण्यातून निघणाऱ्या 'केसरी' पत्रात त्यावेळी राजर्षी शाहूंच्याविषयी बराच विपर्यस्त मजकूर छापून येई.

वेठ वेरळा : बलुतेदारांपैकी महार लोकांना सरकारी कामाबद्दल वतने देण्यात येत. त्या वतनातून तुटपुंजे उत्पन्न येई. अनेक पिढ्यांमध्ये ही वतने विभागल्याने त्यावर पोटही भरणे अशक्य असे. परंतु रूढी आणि काहीसे मोफत वतन याच्या लोभाने लोक त्याला चिटकून राहात. पण त्यामुळे लाचारी येई. आयुष्यातल्या उभारीच्या प्रेरणा आणि प्रवृत्ती नाश पावत. ही एक प्रकारची गुलामगिरीच होती.

पाच

डोळस नेतृत्वाची गरज /४१·४७

माणगाव : (महाराष्ट्र राज्य) येथे २२ मार्च, १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या महाराष्ट्रातील अस्पृश्यवर्गाच्या परिषदेत राजर्षी शाहूंनी, प्रमुख वक्ते म्हणून भाषण करताना, "शेवटी आंबेडकरांना माझी अशी विनंती आहे की, त्यांनी जाण्याच्या पूर्वी मेहरबानीने माझ्या

अनुक्रमणिका

रजपूतवाडीच्या कँपवर माझ्याबरोबर भोजनाला येण्याची तसदी घ्यावी." असे डॉ. आंबेडकरांना भोजनाचे, आग्रहाचे निमंत्रण दिले आहे.

मि. केशवराव : 'प्रबोधन' चे संपादक केशवराव ठाकरे. तिखट वाणी-लेखणीचे बहुजनसमाजातील सुधारणावादी विचारवंत. शिक्षणतज्ञ म्हणून राजर्षी त्यांचा सल्ला घेत असत. 'कोदंडाचा टणत्कार,' 'माझी जीवनगाथा' इत्यादी ग्रंथांचे कर्ते

रा. व कालिचरण : करवीर संस्थानातील एक दलित सेवक. मागासलेल्या लोकांबद्दल सहानुभूती बाळगणारे. त्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविणारे. राजर्षीचे एक सहकारी.

बाबुराव है. यादव : कोल्हापुरातील सामाजिक चळवळीत भाग घेणारे सद्‌गृहस्थ. त्यांनी राजर्षीच्या विविध विधायक प्रयत्नांना मनोभावे साथ दिली. 'बहुजनसमाजाची मुलूख मैदान' म्हणून ख्याती. राजर्षीच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यावर प्रकाश टाकणारे 'गरिबांचा कैवारी', या पुस्तकाचे लेखक

रजपूतवाडी : कोल्हापुरजवळील चार-पाच मैलांवरील एक ठिकाण. तेथ राजर्षींचा कँप असे. लोकांना भेटण्याची जागा. सोनतळी कँप हे दुसरे नाव

सहा

अंतिम राजकीय ध्येय /४८·५१

दिल्ली (भारत) येथे अ. भा. अस्पृश्यता परिषदेचे तिसरे अधिवेशन दि. १४, १५ व १६ फेब्रुवारी, १९२२ या तीन दिवशी भरले होते. पहिल्या दोन दिवशी श्री गवई यांची अध्यक्षस्थानी योजना होती. दि. १६ फेब्रुवारी रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी अध्यक्षस्थान भूषविले होते.

प्रिन्स ऑफ वेल्स : इंग्लंडच्या राजघराण्यातील बादशहा पंचम जॉर्ज यांचे सुपुत्र. दि. १३ ते १६ फेब्रुवारी, १९२२ रोजी दिल्ली येथे त्यांचे वास्तव्य होते. त्याचवेळी तेथे 'अखिल भारतीय अस्पृश्य परिषदे'चे ३ रे अधिवेशन भरले होते.

राष्ट्रीय परिषद : पहिले महायुद्ध संपल्यानंतर इंग्लंड, अमेरिका या बड्या राष्ट्रांनी पुढाकार घेऊन जगातील निरनिराळ्या स्वतंत्र देशातील विविध प्रश्नांचा विचार-विनियम करण्यासाठी, एक आंतरराष्ट्रीय परिषद स्थापन केली. तीच पुढे 'राष्ट्रसंघ' या नावाने प्रसिद्धी पावली.

३.

धर्म

सात

ब्रह्मकर्म कुठे आहे? /५४-५७

डॉ. परांजपे : ब्राह्मण पक्षाचे एक सुशिक्षित विद्वान. राजोपाध्यांची पूजा राजर्षीनी बंद केली तेव्हा 'राजर्षी शाहूच नव्हेत तर आज भरतखंडात कोणीही क्षत्रिय नाही' असे डॉ. परांजपे यांनी मत व्यक्त केले होते. राजर्षीनीच ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद माजविला, असेही त्यांचे आणखी एक मत होते.

मी व माझे प्रियमित्र निंबाळकर... वगैरे : कोल्हापूर संस्थानातील राजर्षीचे हे सर्व सहकारी होत. राजर्षीसह या सर्वांनी दलित समाजाची आजन्म सेवा करण्याच्या शपथ घेतलेल्या होत्या.

कीर्तिवानराव निंबाळकर : मूळ फलटणचे, पोलिसखात्यात नोकर, नोकरीचा राजीनामा देऊन सार्वजनिक कार्यास वाहून घेतले. महाराजांच्या प्रेरणेने 'श्री शिवाजी' नावाचे एक दैनिक त्यांनी पुण्यामध्ये काढले होते. केशवराव बागडे त्यांचे साहाय्यक होते.

'ऑलीगार्की' : सत्ताधाऱ्यांपैकी छोटा पण प्रभावी गट, कंपू. धालपाड हे या कंपूचे सर्वसाधारणपणे राजकारण, आरोप-प्रत्यारोप वगैरे ओघाने येतेच.

आठ

आमचा धर्म : आर्य धर्म /५८-६७

राजर्षी शाहूंनी 'आमचा धर्म : आर्य धर्म' चा प्रारंभ माझ्या 'आर्य बंधू हो!' या संबोधनाने केला आहे.

महर्षी दयानंद सरस्वती : भावनगर (गुजराथ) जवळील भैरवी या गावी जन्मलेले गुजराथी ब्राह्मण. गुरु विरजानंद यांच्याजवळ अनेक वैदिक ग्रंथांचा अभ्यास. 'वेदविद्येचा अधिकार सर्व मानवजातीस आहे,' या मताचे आधुनिक भारतातील महर्षी. वैदिक धर्मतत्त्वांचा प्रचार करण्यासाठी 'आर्यसमाजा'ची त्यांनी स्थापना केली. उत्तर भारतातील विविध प्रांतांप्रमाणे महाराष्ट्राचे प्रचार कार्यासाठी प्रयत्न. न्या. रानडे, म. फुले यांच्या प्रयत्नाने त्यांनी पुण्यास काही व्याख्याने दिली. ब्राह्मणी कर्मकांडप्रधान जीवनक्रमातून सामान्य माणसाची मुक्तता करून, दयानंद सरस्वतीनी खऱ्या अर्थाने धर्माचा प्रचार केला. त्यासाठी लोकांना शिक्षण मिळावे म्हणून अनेक शैक्षणिक संस्था सुरू केल्या.

गरूड पुराण : मृत माणसाविषयी करावयाच्या विविध यमनियमांचे शास्त्र सांगणारा पुराण ग्रंथ

बाबू केशवचंद्र सेन : (इ. स. १८३८-१८८४) थोर बंगाली समाजसुधारक. क्षत्रिय कुलातील गर्भश्रीमंत असूनही एकेश्वरीवादाचा पुरस्कार करून युरोपातील 'युनिटोरियन' पक्षाप्रमाणे त्यांनी सतत समतेचा पुरस्कार केला. दलितवर्गाच्या उद्धारासाठी 'ब्राह्मो समाजा'स आयुष्यभर वाहून घेतले. 'प्रार्थना समाज' स्थापनेस प्रेरणा दिली. सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून दयानंद सरस्वतीप्रमाणे अनेक शाळा सुरू केल्या. स्त्रीमुक्ती चळवळीचे पहिले पुढारी

म. जोतीराव फुले : (इ. स. १८२७-१८९०) पुण्यात म. फुले यांनी ब्राह्मणाविरुद्ध शस्त्र उपसले. अस्पृश्य व स्त्रीवर्गास शिक्षण देऊन त्यांना आत्मोन्नतीचा मार्ग मोकळ करून दिला. सर्व मानवजात एकाच विधात्याने

निर्माण केली असून सर्वजण समान आहेत, हा म. फुले यांचा कृतसिद्धांत होता. त्याचा प्रचार करण्यासाठी व ब्राह्मणाच्या जाचातून बहुजनसमाजाची सुटका करून देण्यासाठी 'सत्यशोधक समाज' (१८७३) स्थापन केला. म. फुले, जीवनभर पददलितांवरील अन्याय दूर करण्यासाठी झगडले. विषमतेविरूद्ध बंड करणारे, आधुनिक महाराष्ट्रातील पहिले सुधारक. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार.

'ब्राह्मणाचे कसब', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा असूड, 'इशारा, 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' इत्यादी पुस्तकांचे कर्ते

लॉर्ड किचनेर । जनरल फ्रेंच । मार्शल फ्रॉक : भारतीय क्षत्रियांप्रमाणे पराक्रम गाजविणारे इंग्रज लोक. म्हणून ते आर्यांचे वंशज होत, असे राजर्षींना वाटते. पूर्व-पश्चिम जगतात बंधू-भावाचे नाते निर्माण करण्यास ते पुरेसे आहे; असे शाहू छत्रपतींनी म्हटले आहे.

महाराणा सज्जनसिंह : राजपूत क्षत्रिय. उदयपूर संस्थानचे अधिपती. सिसोदिया वंशाचे राजघराणे, महाराष्ट्रातींल भोसले-मराठ्यांशी त्यांचा संबंध पोचतो. यांनी राजस्थानभर महर्षी दयानंद सरस्वती यांच्या 'आर्यसमाजा'चा प्रचार केला.

महाराजा प्रतापसिंह : रजपूत क्षत्रित जोधपूर संस्थानचे अधिपती. यांनी 'आर्य समाजा'च्या प्रचाराचे कार्यांस हातभार लावला.

ना. भूपेंद्र बसू । बंगाली सुधारणावादी गृहस्थ. कायदे कौन्सिलचे सदस्य. यांनी भारतीय हिंदू कोड बिलात सुधारणा सुचविणारे बिल वरिष्ठ कायदे कौन्सिलमध्ये आणले. त्याला पुरोहित वर्गाचा विरोध होता.

नऊ

ऋषींचे मिशन । ६८·७३

भावनगर : सौराष्ट्र (गुजरात राज्य) येथे, अ. भा. आर्यधर्म परिषदेचे अधिवेशन दि. ६, ७ व ८ मार्च, १९२० रोजी झाले. या अधिवेशनास परदेशाहून काही प्रतिनिधी आले होते.

अ. भा. आर्यधर्म परिषदेच्या इतिहासात सदरचे भाषण 'छत्रपतींचा समाजास दिव्य संदेश' म्हणून नोंद करण्यात आल्याचे आढळते.

आर्यप्रतिनिधी सभा : संयुक्त प्रांतात, आर्य समाजाने शैक्षणिक कार्य आणि शुद्ध आर्यधर्माचा प्रचार ही कार्ये अंगिकारली. त्यासाठी निरनिराळ्या ठिकाणच्या समाजाच्या सभासदांमध्ये समन्वय साधणे आवश्यक होते. यातून समाजाच्या सभासदांचे एक 'मध्यवर्ती कार्यकारी मंडळ' स्थापन केले. तीच 'आर्य प्रतिनिधी सभा' होय. राजर्षी शाहूंनी, करवीर येथील शैक्षणिक संस्था या प्रतिनिधी सभेकडे सुपूर्द केल्या होत्या.

जोतीबा क्षेत्र : कोल्हापूर संस्थानच्या पन्हाळा महालातील एक धार्मिक क्षेत्र, कोल्हापुरापासून १२ मैलावरील तीर्थक्षेत्र. शंकराचे स्थान. मराठ्यांचे कुलदैवत. राजर्षीचे कुलदैवत.

दहा

समाज सुधारणा कोण करू शकेल?/७४ ८५

नागपूर (महाराष्ट्र राज्य) येथे ३० मे, १९२० रोजी भरलेल्या अ. भा. बहिष्कृत समाज परिषदेच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शाहू महाराजांची योजना होती. राजर्षींच्या आगमनाच्या वेळी, त्यांची 'धेडोंका राजा' ची भूमिका ध्यानात घेऊन, भीतीने नागपूरकर भोसले व त्या विभागातील काही 'बोलूकाका पुढारी', काही निमित्ताने शहाराबाहेर गेल्याचे आढळले.

हा सगळा संदर्भ ध्यानात घेऊन, 'समाज सुधारणा कोण करू शकेल?' मध्ये राजर्षींनी बोलूकाका पुढाऱ्यासंबंधीचे विवेचन केले असावे. या विवेचनामागे केवळ बोलक्या पुढाऱ्यांच्या नित्याच्या चालचलणुकीसंबंधीचा भागही आहे, हे ध्यानात घेतले पाहिजे.

हिंदू कायदा : इंग्रजी अमदानीत 'हिंदू कोड बिल' या नावाचा एक कायदा सन १८६५ मध्ये करण्यात आला. या कायद्याने अनेक दुष्ट हिंदू रूढींना संरक्षण मिळाले.

प. वा. डॉ. नायर : मद्रास इलाख्यातील एक जुने सामाजिक कार्यकर्ते. त्यांनी ब्राह्मणेतर लोकांची एक संघटना निर्माण करून त्यांच्यात स्वहक्कांची जाणीव निर्माण करून दिली.

पंचम : मद्रासकडील पददलित व अस्पृश्य म्हणून सामाजिक हक्क नाकारलेली एक जमात. महाराष्ट्रातील अस्पृश्य वगैरे सारखी.

नामदार पटेल : वरिष्ठ कायदे कौन्सिलचे एक जागरूक सदस्य. यांनी सन १९२० मध्ये मिश्रविवाहापासून होणाऱ्या संततीला औरस संततीचे सर्व अधिकार देणारे एक बिल वरिष्ठ कायदे कौन्सिलमध्ये मांडले होते.

मि. अरूंडेल : ब्राह्मण युवतीशी आंतरजातीय विवाह करणारे एक सद्‌गृहस्थ. त्यामुळे ब्राह्मणवर्गाने त्यांचा खूपच छळ केला.

'प्रगति'कार : १९०८ सालापासून कोल्हापूर येथून हे वृत्तपत्र सुरू झाले. या पत्राने मिश्रविवाहोत्पन्न संततीस वारसा हक्काचे अधिकार देणे बरोबर नाही, असे मत मांडले होते.
'इन्स् ऑफ कोर्ट' : इंग्लंड मधील एक संघटना. ती 'बॅरिस्टर' ची पदवी देई. त्याची कसोटी म्हणजे जेवणांची संख्या. अशा तऱ्हेने बॅरिस्टर होणाऱ्यास 'टेबल बॅरिस्टर' किंवा 'डिनर बॅरिस्टर' असे म्हणत. अचूक उपहास शोधणारा एक शब्दप्रयोग.

सामुराई जमात : जपानमधील १९ व्या शतकातील एक वरिष्ठ जमात. ह्या जमातीने राष्ट्रीय ऐक्यासाठी आपले सर्व अधिकार स्वतः होऊनच कनिष्ठांना देऊन टाकले. इथल्या वरिष्ठ वर्णियांनी असा 'अधिकार त्याग' करून आदर्श पुढे ठेवावा, असे राजर्षींचे सांगण्यामागील सूत्र.

अनुक्रमणिका

अकरा

कर्तव्यकर्माचा धडा । ८६-९४

हुबळी (कर्नाटक राज्य) येथे, दि. २६ जुलै, १९२० रोजी भरलेल्या कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून केलेल्या 'कर्तव्यकर्माचा धडा' या भाषणाचा प्रारंभ राजर्षींनी 'सर त्यागराज चेट्टी, माझे प्यारे मर्द, भाई व भगिनींनो' अशा संबोधनाने केला आहे.

सर त्यागराज चेट्टी : 'कर्नाटक ब्राह्मणेतर परिषदे' चे कार्यकर्ते. जुलै, १९२० मध्ये हुबळी येथे 'कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषद' यांच्याच प्रयत्नाने संपन्न झाली.

मि. चिकोडी, मि. कंबळी, मि. गवई.,. वगैरे : कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेचे संघटक, त्यागराज चेट्टी यांचे सहकारी. दलित समाजाविषयी सहानुभूती असलेले कार्यकर्ते

नामदार रानडे-गोखले व आगरकर : महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे आद्य ब्राह्मण नेते. सामाजिक सुधारणा आधी व्हाव्या, अशा विचारसरणीचे उदारमतवादी, पुरोगामी लोकसेवक

दाल्भ्यक ऋषी : पद्मपुराणातील ६९व्या अध्यायात रविवारच्या व्रताची कथा आहे. या कथेतील रविवारच्या व्रताचे निरूपण करणारे ऋषी.

गृहस्थाश्रम व अलाहाबाद : पौराणिक कथातील संकेताप्रमाणे सन १९०१ मध्येही एका ब्राह्मण गृहस्थाने पत्नीचे दान केले. ही घटना महाभारतातील अनुशासनपर्वात आलेल्या स्त्रीदान करण्याच्या व्रतासारखीच आहे. यावरून ब्राह्मण्याचा पगडा हिंदूवर किती आहे हे स्पष्ट होते. हे सारे कर्मकांड, स्त्रीशूद्रादिकांना छळणाऱ्या ब्राह्मण्यातून निर्माण झालेले आहे; होते.

रिक्रूटिंग बोर्ड : ब्रिटिश सरकारने आपल्या फौजेत हिंदी लोकांना भरती करून घेण्यासाठी निर्माण केलेली संघटना. यात भारतीय प्रतिष्ठित व संस्थानिक, जे सरकार पक्षाचे असत त्यांना घेतले जाई. काही सरकारी अधिकारीही असत.

'केसरी' कार : लो. बाळ गंगाधर टिळक : त्यांच्या संपादकत्वाखाली 'केसरी' पत्र पुण्यातून निघे. ते दैनिक 'केसरी' म्हणून सध्या प्रसिद्ध आहे. 'केसरी'कार आणि राजर्षी शाहू यांच्यात तात्त्विक मतभेद होते. 'केसरी'च्या २२ व २९ ऑक्टोबर, १९०१ च्या अंकात याचे दृश्यरूप पाहावयास मिळते. 'लो. टिळक लेखसंग्रह:' भाग ४ : पृ. : ३१२-१६ मध्ये असे काही लेख संगृहित झाले आहेत. 'वेदोक्तादी प्रकरणां' वरून उभयतांमध्ये तात्त्विक वाद माजलेला होता.

बारा

मराठ्यांची परंपरा । ९८-९५

अनुक्रमणिका

शाहू छत्रपतींनी कूट एल आमारा येथील मराठा पलटणींना, “रसद तुटल्यामुळे घोड्याचे मांस खाऊन, याप्रसंगी छाती घट्ट करून, संकटसमयी शास्त्राने सांगितलेले कर्तव्य लक्षात आणून, उपलब्ध असलेल्या अन्नावर तुम्ही जिवंत राहावे आणि आपले कर्तव्य बजावून तुमच्या पूर्वजांची कीर्ती निष्कलंक राखावी.” अशी मराठा पलटणींना आज्ञा केली.

मराठा पलटणींनी, शाहू छत्रपतींची आज्ञा शिरसावंद्य मानली. पराक्रमाची शर्थ केली पण अन्नपाण्याच्या अभावी पराक्रम कारणी लागला नाही. शरण जावे लागले.

शाहू छत्रपतींनी हे आज्ञापत्र काढण्याचे कारण हे की, कूट एल आमारा मध्ये उद्‌भवलेली परिस्थिती व त्या परिस्थितीत मराठा पलटणींचा, ‘घोड्याचे मांसही खाऊ पण आमचे दैवत शाहू, छत्रपती यांची आज्ञा झाली तरच हे शक्य आहे,’ असा पडलेला आग्रह; साहाजिकच मुंबई सरकारने, शाहू महाराजाना तातडीने शिष्टाई करण्यासंबंधी एका खलित्याद्वारे विनंती केली. त्यानुसार शाहू छत्रपतीनी २३ मार्च, १९१६ रोजी मराठा पलटणींना, घोड्याचे मांस खाण्याबद्दल आणि पुढे त्यांच्या समाजजीवनात येणाऱ्या अडीअडचणींच्या निराकरणाबाबत घट्ट आश्वासन देणारा लखोटा धाडला, तेच ‘मराठ्यांची परंपरा’ हे प्रकट आवाहन होय.

मराठा राज्य संस्थापक श्री शिवाजी महाराज यांचे वारस शाहू छत्रपती यांच्यावर सर्वसाधारण सैनिकांची, एका बाजूने ही प्रगाढ श्रद्धा; शद्धासाठी जान कुर्बान करण्याची रित तर या सर्वसाधारणासाठी राजर्षी शाहू महाराजांच्या मनात बसत असलेली कृतज्ञबुद्धी, दुसऱ्या अंगाने निथळून जात आहे.

शाहू छत्रपती, लखोटा पाठविल्यानंतर दुसऱ्या दिवशी, २४ मार्च, १९१६ रोजी मुंबई सरकारला लिहिलेल्या पत्रात, मराठा पलटणी करीत असलेल्या संग्रामाच्या ‘जागी’ स्वतःला पाठविण्याची विनंती करताना लिहितात: “मी मराठा घराण्यात जन्मलो आहे. म्हणून या मोठ्या राष्ट्रीय युद्धाशी माझा काही तरी संबंध असावा असे मला वाटते. तेवढ्यातून बाहेर पडल्यानंतर त्यांना उत्तेजन देऊन उदाहरण घालून देणे, त्यांचा स्वयंपाक करणे, त्यांच्या सुखसोयी पाहणे इत्यादी प्रकारचे, मी ज्या कामाला योग्य आहे, असे आपणास वाटेल ते काम करण्यास कृपया मला पाठवावे.’

राजर्षी शाहूंचा सर्वसामान्यांशी समरस होण्याचा मनाचा स्थायीभाव, जनतेचा सहभाग मिळविण्याची संपर्करीती, त्यांनी उभारलेल्या चळवळींनी वेग का घेतला, त्याचे निदान करते. खेरीज राजर्षींच्या आज्ञापत्रामुळे सैनिकांनी अधिक काळ टिकावही धरला; हेही स्पष्ट होते. यावेळी, शाहू छत्रपतींनी, ‘वॉर रिलीफ फंडा’ला रु. २०,००० ची वर्गणी व लेडी विलिंग्डन यांनी उभारलेल्या स्त्रियांच्या फंडाला रु. ४,००० देणगीही दिली आहे.

महायुद्ध : पहिले महायुद्ध. १९१४ ते १९१८ अखेर हे युद्ध लढले गेले. टर्कीच्या संरक्षणाच्या निमित्ताने इंग्लंडला या युद्धात उतरावे लागले. टर्कीतील जहाल पक्षाने जर्मनीशी संधान बांधले होते. जर्मनी सर्व युरोपखंडात आपले वर्चस्व निर्माण करण्याचे मांडे रचत युद्धास सज्ज झाला होता.

महाअश्वमेघ : भारतात प्राचीनकाळी अश्वमेघ यज्ञ होत असत, त्यावरून घोड्याचे मांस खाण्याची चाल पूर्वी होती हे सिद्ध होते. अन्नाची गरज भासत असता घोड्याचे मांस खायला हरकत नाही, असा संदेश राजर्षींनी मराठा फलटणीस पाठविला.

अनुक्रमणिका

४.

अर्थ

तेरा

देशात ऐश्वर्य कसे वाढेल? /९९·११०

कानपूर (उत्तर प्रदेश) येथे, दि. १९, २० व २१ एप्रिल, १९१९ रोजी अ. भा. कुरमी क्षत्रियांची तेरावी सामाजिक परिषद, राजर्षी शाहूंच्या अध्यक्षतेखाली भरली होती.

राजर्षींनी 'देशात ऐश्वर्य कसे वाढेल?' या भाषणाचा प्रारंभ, 'प्रिय क्षत्रिय बंधु हो' या संबोधनाने केला आहे.

या परिषदेचे वैशिष्ट्य हे की, छ. शाहू महाराज यांना 'राजर्षी' ही सन्मान्य पदवी देण्याचा ठराव परिषदेत एकमताने पास करण्यात आला.

ताराबाई राणीसाहेब : शिवपुत्र राजाराम यांची पत्नी, महत्त्वाकांक्षी क्षत्रिय स्त्री. संभाजीच्या वधानंतर आपलाच मुलगा सातारच्या गादीवर यावा ही ताराबाई राणीसाहेबांची इच्छा होती. राजकारणपटू म्हणून ख्याती, कोल्हापुरच्या गादीचे स्वतंत्र अस्तित्व टिकविणारी धुरंधर स्त्री म्हणून प्रसिद्ध. याच करवीरच्या गादीवर राजर्षी शाहू हे दत्तक पुत्र म्हणून गादीवर आले.

खासेराव जाधव साहेब : बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांचे व्यक्तिगत अधिकारी. मराठ्यांच्या शिक्षणाविषयी धडपडणारे. त्यांच्या प्रयत्नाने अनेक मराठा मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळाली.

स्वामी परमानंद : मुंबई 'प्रार्थना समाजा'चे अध्यक्ष. धर्म व समाजसुधारक. 'सुबोधपत्रिके' चे नामवंत लेखक. म. फुले यांचे निकट स्नेही, नेमस्त राजकीय पक्षाचे पुरस्कर्ते. राजवाडे-भांडारकर यांचे चाहते. 'नेटिव्ह ओपिनियन' चे संपादक. दलित व कामगार वर्गाचे हितचिंतक.

विष्णु पुराण : एक पुराण ग्रंथ : त्रिशंकूच्या वंशातील बाहू राजाच्या पोटी जन्म घेतलेल्या 'सगरा'ने क्षत्रियांना जर्जर केले. वशिष्ठ ऋषीनी मध्यस्थी करून त्या सर्व क्षत्रियांना द्विजव्रत व धर्म यापासून वेगळे केले. अशी कथा अंतर्भूत असणारे पण क्षत्रियांचा कुलक्षय झाला आहे हे सांगणारे पुराण

परशुराम पुराण : जमदग्नी ऋषींचे पुत्र. शंकराच्या भक्तीने त्याने अग्नीसारखा सामर्थ्यशाली परशू मिळविला. त्यामुळे त्याच्या 'राम' मध्ये 'परशु' येऊन 'परशुराम' असे नामकरण झाले. त्याने सर्व पृथ्वी निःक्षत्रिय केली, अशी कथा सांगणारे पुराण.

कुरमी क्षत्रिय : बिहार प्रांतातील क्षत्रियांचे एक कूल. यांच्यात विधवाविवाहाची प्रथा आहे. सन १९१९ मध्ये राजर्षी शाहू कुरमी क्षत्रियांच्या अधिवेशनासाठी कानपूरला गेले होते.

अनुक्रमणिका

राजकर्त्या क्षत्रिय स्त्रिया :

१. महाराणी ताराबाई : कोल्हापूर २. महाराणी सती अहिल्याबाई : इंदूर : ग्वाल्हेर ३. राणी लक्ष्मीबाई : झाशी ४. राणी कमलाबाई : कोल्हापूर (?)

पडदा पद्धती : महाराष्ट्रातील खानदानी क्षत्रियांच्या कुलातील एक आचार पद्धती. स्त्रियांनी आपले तोंड व शरीर यावर कपड्याचे आवरण घेऊन बाहेर पडावयाचे. त्या वस्त्राला 'पडदा' म्हणतात. मुसलमानांच्यातही ही पद्धती आहे.

चौदा

योग्य काम, योग्य दाम /११० ११६

कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य) येथे, दि. १५ ऑगस्ट, १९२० रोजी आर्य क्षत्रिय परिषदेचे पाचवे अधिवेशन, राजर्षी शाहूंच्या अध्यक्षतेखाली भरले होते. या अधिवेशनास जोडून श्री राजाराम इंडस्ट्रियल स्कूल, बोर्डिंग हाऊस व शो रुम्स्‌चा उद्‌घाटन समारंभ असा जोड कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता.

या समारंभाचे स्वागताध्यक्ष रावसाहेब काशिनाथ नानाजी यादव, जिल्हा न्यायाधीश ग्वाल्हेर हे होते.

याप्रसंगी केलेल्या, स्वागतपर भाषणात रावसाहेब यादव यांनी, आर्य क्षत्रिय ज्ञानवर्धस समाजाच्या स्थापनेमागील हेतू व समाजाच्या सद्यःपरिस्थितीची माहिती निवेदन करताना म्हटले होते.

"...आर्यक्षत्रिय जातीमधील उत्तम कारागिर लोक बनविणे, शेतकीची व इतर लहान लहान अवश्य लागणाऱ्या वस्तू बनविण्याची यंत्रे करणे, व्यवहारांमध्ये नित्य लागणाऱ्या वस्तूंची निर्मिती करणे ...

...केवळ आर्य क्षत्रिय जातीच्याच नव्हे तर इतर कोणत्याही जातीच्या मुलांना; किंबहुना जन्मापासून या कलाकौशल्याचा संस्कार नसलेल्या महार-मांग वगैरे जातीपातींच्या मुलांना या संस्थेत मुक्त प्रवेश देण्यात येईल. त्यांना इतर गोष्टींची माहिती देऊन किमान एकातरी धंद्यात प्रवीण करण्याचा प्रयत्न राहील.

स्वागताध्यक्ष यादव यांनी समाजाच्या सद्यःस्थितीची माहिती देऊन पुढे नमूद केले आहे:

... ...राजर्षी शाहू महाराजांनी, समाजासाठी तीस हजार रुपयांपेक्षा जास्त किंमतीची पद्‌माळ्यानजीकची जागा दिली आहे...

शाहू छत्रपती 'मागासलेल्या लोकांना पुढे आणण्यासाठी' किती आटोकाट प्रयत्न करतात; त्याचा यादव यांनी या भाषणात प्रारंभीच निर्देश केला आहे.

त्यानंतर राजर्षींच्या भाषणात, रावसाहेब यादव यांच्या बहुतांशी सगळ्या मुद्द्यांचा मुद्देसूद परामर्श घेण्यात आला असून, त्यामध्ये 'देशाची उन्नती उद्योगधंद्यांच्या वाढीवर अवलंबून आहे,' हे मध्यवर्ती सूत्र आहे.

अनुक्रमणिका

प्रदर्शन : आर्य क्षत्रियांच्या ५ व्या परिषदेत मांडलेले प्रदर्शन. मराठा योद्ध्यांच्या सहवासाने क्षत्रिय मराठ्यांना अनेक हस्तकला व्यवसाय उपलब्ध झाले होते. घोड्यांची 'जिन' (खोगीर) तयार करणे हा एक त्यापैकीच व्यवसाय होय. राजर्षींनी जिनगर समाजासाठी प्रिन्स राजाराम औद्योगिक शाळा काढली होती. स्वतंत्र बोर्डिंग हाऊसही उघडले होते.

राजर्षी नेहमी नवनव्या उद्योगांच्या शोधात असलेले दिसतात. साधारणपणे सर्व व्यवसाय शेतीला पूरक व्हावेत अशी त्यांची दृष्टी दिसते. या दृष्टीने त्यांचा शेती संशोधनावर भर होता; तर सैद्धांतिक आणि प्रायोगिक दोन्ही दृष्टीनी कार्यवाही सुरू होती.

राजर्षींनी कॉफी-चहा, वेलदोडा वगैरेंची लागवड केली. दक्षिण भारतात कॉफी चहाचे पीक अधिक म्हणून जमीन, तिचे आकार, हवामान यांची पाहणी केली. तज्ज्ञांशी सल्लामसलत केली. कोल्हापूर भागात वर्षभर सतत पाऊस नसल्याने कॉफी-चहाच्या लागवडीचा प्रयोग अंशतः यशस्वी झाला. पन्हाळा बावडा भागातील पेडखळे व भुदरगड तालुक्यात कॉफीचा लागवड करण्यात आली. प्रारंभी २,००० रोपे लावली होती. १८९३-९४ मध्ये, या प्रयोगाला प्रारंभ झाला असून त्यासाली १४ एकरात कॉफीची लागवड केली गेली आहे. जास्तीत जास्त १६ आणि कमीत कमी ४ एकर १८ गुंठ्यातही लागवड आहे. उत्पादन जास्तीत जास्त ९१८ पौंड (१९१७-१९१८) व कमीत कमी ५० पौंड (१९२१·१९२२) झाल्याचे आढळते.

कॉफीप्रमाणेच चहाची लागवड जास्तीत जास्त ११·२ गुंठे (१९१८·१९१९) व कमीत कमी १ एकर २० गुंठ्यामध्ये (१९०७·०८) आहे. उत्पन्न जास्तीत जास्त ७६८ पौंड (१९१८-१९१९) व कमीतकमी २३ पौंड (१९०५-१९०६) दिसते.

बुंदांच्या झाडांच्या लागवडीचा प्रयोग तुरकवाडी येथे करण्यात आला असून कुंपणे, जंगल खात्याची हद्द निश्चित करण्याच्या दृष्टीने उपयोगी पडणाऱ्या कोरफडीची लागवडही झाली आहे. राळ तयार करण्यासाठी लागणाऱ्या 'गंजन' गवताची उपलब्धता पाहून, खानदेशाहून तंत्रज्ञ आणवून आपल्याकडील लोकांना प्रशिक्षण देऊन राळ करण्याचा प्रयोगहीं करण्यात आला आहे. शाहू छत्रपतीनी भुदरगड विभागात रेशिम, पन्हाळा व भुदरगड येथे वेलदोडे, ताग, रबर, अंबाडी, शिगोड, टॅपिओका, लाख, शिरोळ तालुक्यात कंबोडियन कापूस अशा लागवडींचे प्रयोग केले आहेत. अलिकडे टॅपिओका या पिष्टमय पदार्थाला खूपच महत्त्व आले असून त्यापासून साबुदाणा किंवा उच्चभ्रू मंडळींसाठी लागणारे अन्य पदार्थ करण्याकडे केला जातो. सोनतळी कँप येथे राजर्षींनी मध उत्पादनाचा दीडदोन वर्षे प्रयोगही करून पाहिला आहे; तर जिनिंग/विव्हिंग धंद्याबरोबरच रंगकामाकडेही लक्ष पुरविले आहे. त्यादृष्टीने रंगकामाचा कारखाना सुरु करता येईल की काय, याचा अदमास शाहू छत्रपती घेताना दिसतात. इचलकरंजीचा श्री व्यंकटेश रंगतंतू कारखाना ही त्याचीच सुरुवात होती. राधानगरी येथे लाकूड शुद्धीकरण कारखाना काढण्याचा प्रयोग हा आणखी एक प्रयोग होय. जवळजवळ दोन महिने हा प्रयोग सुरु होता. त्यामधील म्हैसूरच्या प्रदर्शनात पाठविलेल्या पदार्थांना चांदीचे पदकही मिळाले होते. अशा विविध उद्योगव्यवसायांना प्रोत्साहन देण्यामागे कलागुणांना वाव मिळावा, पूरक धंदे उपलब्ध व्हावेत व डोंगरपठारात असलेल्या साधारण जनतेला रोजगारही उपलब्ध व्हावा अशी शाहू छत्रपतींची दृष्टी होती. प्रदर्शनामागे एवढा आवाका होता.

५.

मजूर

पंधरा

हक्कांसाठी झगडा ! ११७-१२४

नारायणराव चंदावरकर : (इ. स. १८५५-१९२३) मुंबई विद्यापीठाचे कुलगूरु. मुंबई कायदे कौन्सिलचे अध्यक्ष. रानडे-भांडारकर यांची परंपरा चालविणारे मुंबई प्रार्थना समाजाचे अध्यक्ष. उत्कृष्ट उपासक व प्रचारक, नेमस्तांचे पुढारी. कर्मवीर वि. रा. शिंदे यांना 'भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी' स्थापण्याच्या कामी सहकार्य, राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष. 'इंदुप्रकाश' मधून अनेक लेख लिहून लोकजागृती केली. राजर्षी शाहूंचे हितचिंतक

लॉर्ड विलिंग्डन : मुंबई इलाख्याचे गव्हर्नर (१९१६-१९२०) पुढे मद्रासला बदली. गोरगरीब लोकांबद्दल सहानुभूती, सामान्य समाजात मिसळणारे अधिकारी, मुंबईचे 'हार्टिग हॉस्पिटल' यांच्याच श्रमाचे फळ होय. निर्भिड व स्पष्टवक्ते म्हणून प्रसिद्ध.

लेडी विलिंग्डन : लॉर्ड विलिंग्डन यांच्या सुविद्य पत्नी. लॉर्ड 'ब्रेव्हिस' या घराण्याचा परोपकाराचा वारसा लाभलेल्या विदुषी. त्यामुळे दया, परोपकार, दाक्षिण्य इ. गुणांचा ठेवा लाभलेला. सामाजिक सेवेत रस

ना. सर शंकरन् नायर : मद्रासचे पुढारी. मद्रासमधील 'जस्टिस पार्टी' चे नेते. भारतीय राजकारणात महत्त्वपूर्ण स्थान.

ना सर इब्राहिम रहिमतुल्ला : मुंबईच्या कायदे कौन्सिलचे अनेक वर्षे सदस्य,

वा. रा. कोठारी : प्रारंभ 'जागरूक' नावाचे पत्रक चालविले. नंतर 'प्रभात' दैनिकाचे संपादक. सत्यशोधक समाजाचे एक जुने कार्यकर्ते. शाहू महाराजांच्या कार्याला आवर्जून प्रसिद्धी देत. विरोधकांची अंतःकरणे कुरतडीत जाणारे झटपट व मार्मिक लेखन, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, कोठारींनी 'प्रभात मधून जागा ठेवला, जिंकला. मुळचे मोडनिंब (सोलापूर) येथील. पुढे पुण्यास स्थायिक.

आ. बा. लठ्ठे : अनेक पुस्तकांचे कर्ते. जैन समाजातील करवीर नगरीतील सद्गृहस्थ, जैन बोर्डिंगचे व्यवस्थापक. शिक्षक म्हणून कार्य करीत असताना सामाजिक कार्याकडे वळले. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते. यांनी राजर्षी शाहू यांचे इंग्रजी चरित्र लिहिले असून त्याचा मराठी अनुवादही प्रसिद्ध आहे. या चरित्रग्रंथास अनन्यसाधारण महत्त्व लाभण्याचे भाग्य. राजकारणात सक्रीय भाग. 'डांबर प्रकरणा' तील महत्त्वपूर्ण व्यक्ती.

मुकुंदराव ग. पाटील : 'सत्यशोधक चळवळी'तील थोर सेनानी व तिखट प्रचारक. तरवडी: जिल्हा अहमदनगर येथे वास्तव्य. म. फुले यांच्या कार्याला साहाय्य, कृ. पां. भालेकर यांचे पुत्र. गणपत पाटील

यांना दत्तक, भालेकर त्यांचे 'दीनमित्र' पुढे मुकुंदराव यांनी ५० वर्षे चालविले. कोल्हापूर येथील अखिल भारतीय सत्यशोधक परिषदेचे अध्यक्ष. राजर्षी शाहूंच्यावर टीका करणाऱ्या 'केसरी'ला 'दीनमित्र' मधून उत्तरे देत. खंदे पत्रकार, समाजसेवक म्हणून प्रसिद्ध. 'कुलकर्णी लीलामृत' वगैरे झोंबणाऱ्या पुस्तकांचे कर्ते, मुकुंदराव पाटील यांच्या मृत्यूपूर्वी वर्षभर अगोदर प्रस्तुत संपादक, त्यांना 'सत्यशोधक चळवळ: उद्‌गम, स्वरूप आणि विकास' या संशोधन प्रकल्पाच्या कामी भेटले होते. 'दीनमित्र' कार कॅन्सरने आजारी होते. दोन दिवसांच्या जमेल तशा चर्चेत मुकुंदराव पाटील एकदा म्हणाले होते, "चळवळ झाली, लोक मोठे झाले. उरला, मेला कोण? कोण पाहतो? फुकाचा कळवळा येतो. शालूभूषणांना 'पद्मभूषण' मिळते. आम्ही तरसतो." सत्यशोधकांच्या वाट्याला काय आले हा खरेच प्रश्न आहे.

सर विल्यम वेडरबर्न : 'हिंदुस्थानचे ब्रिटिश मित्र' म्हणून प्रसिद्ध. सन १८८९ च्या मुंबई व १९३० च्या अलाहाबाद काँग्रेसचे अध्यक्ष, काँग्रेसला द्रव्यसहाय्य व परिश्रम देणारा युरोपियन मित्र. उदारमतवादी, प्रगतिप्रिय म्हणून नाव कमावले. आले मुंबई हायकोर्टाचे रजिस्ट्रार म्हणून पण बनून मात्र गेले राजकारणी.

सर अ. ऑ ह्यूम : (१८२९-१९१२): भारतीय राष्ट्रसभेचे जनक, सनदी नोकर, लोककल्याणेच्छू, स्वातंत्र्याचे उद्‌गाते. थिऑसॉफिस्ट.

सर व्हॅलेंटाईन चिरोल : टिळक खटल्याने गाजलेले युरोपियन गृहस्थ. त्यांनी हिंदुस्थानविषयक ऐतिहासिक माहिती लिहिताना लो. टिळकांची बदनामी केली. त्यांच्यावर लो. टिळकानी खटला भरला. तो इंग्लंडमध्ये चालला. टिळकांच्या विरूद्ध निकाल लागला.

बेल्जम/सर्व्हिया : बाल्कन द्विपकल्पातील युरोपियन राष्ट्र. पहिल्या महायुद्धास ही राष्ट्रे जर्मनी व ऑस्ट्रेलिया यांच्याशी लढली.

रावसाहेब सरनोबत : राजर्षी शाहू यांचे निकटवर्ती व नातेवाईक

सोळा

पहिला लोकसंघ । १२५·१३४

परळ (मुंबई : महाराष्ट्र राज्य) येथे भरलेल्या कामगारांच्या जाहीरसभेचे अध्यक्ष या नात्याने कामगारांच्या पहिल्या लोकसंघाचे, २४ नोव्हें, १९१८ रोजी राजर्षी शाहूंनी उद्‌घाटन केले.

लोकसंघ : (People's Union) युरोपातील कामगार युनियनच्या धर्तीवर, भारतातील कामगार आणि शेतकऱ्यांच्या संघटना व्हाव्या असे आवाहन राजर्षी शाहू यांनी मुंबईतील कामगारांना केले होते. त्याप्रमाणे मुंबईतील कामगारांनी स्थापन केलेली ही एक संघटना होय.

पंडित आत्माराम : आर्य समाजाचे कार्यकर्ते. त्यांच्याकडून महाराष्ट्रात आर्य समाजाचे प्रचार कार्य. राजर्षी शाहू यांनी पंडित आत्माराम यांच्या साहाय्यामुळेच आर्य समाजाचे कार्य स्वतःच्या शिरावर घेतले,

ब्राह्मण सभा : शंकरवाडी : मीमांसा विद्यालय : ब्राह्मण समाजातील नेत्यांनी ब्राह्मण्याचे शिक्षण देण्यासाठी निर्माण केलेल्या वेगवेगळ्या संघटना. बहुजन समाजातील लोकांनाही अशी संघटना निर्माण करून आपल्या हक्कांविषयी जागरूक रहावे यासाठी शाहू महाराज प्रयत्नशील राहिले.

कैसर : जर्मन नेता. पहिल्या महायुद्धाचा सूत्रधार. मोठा महत्त्वाकांक्षी व मुत्सद्दी राजकारणी. त्याने ऑस्ट्रिया व इटलीशी संगनमत करून, युरोपखंड आपल्या मुठीत ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यातून महायुद्ध उद्‌भवले.

व्होरा : गुजराथी समाजसेवक. वा. रा. कोठारी यांचे सहकारी. यांनी 'जागरूक' पत्रातून काही लेख लिहून राजर्षी शाहूंच्या कार्याबद्दल प्रचार केला. ते स्वतःही काही काळ 'जागरूक' चे संपादक.

मजूर पक्ष : इंग्लंडमधील एक राजकीय पक्ष. सर्वसामान्य माणसाचे हित पाहाणे हे पक्षाचे ध्येय. त्यामुळे अनेक ब्रिटिश वसाहतींना स्वराज्याचे अधिकार मिळाले.

राचडेल : इंग्लंडमधील एक शहर. येथेच प्रथम सहकारी तत्त्वाचा जन्म झाला.

मुधोळकर घोरपडे : दक्षिण महाराष्ट्रातील एक मराठा सरदार घराणे. राजर्षी शाहू यांचे आजोळ याच मुधोळकरांच्या घराण्यातील.

कागलकर घाटगे : उत्तरेतून आलेले राजपूत घराणे. कागलचे जहागिरदार जयसिंगराव घाटगे यांना, मुधोळकर घोरपडे यांच्या घराण्यातील मुलगी देण्यात आली. तिच्याच पोटी राजर्षी शाहू यांचा जन्म झाला. राजर्षी शाहू यांची दत्तक आई राजे शिर्के यांच्याकडील होती.

६

हक्क

सतरा

‘अधिकारदान थैली’।१३५·१३८

‘अधिकारदान थैली’ मागे, १८६२ चा तहनामा आहे.

करवीरच्या मांडलिक जहागिरदारांशीही त्याचा संबंध येतो.

जहागिरदार, दरबारशी कुरघोडी करीत होते. बेपर्वाई वाढत होती. उदा. इचलकरंजीच्या घोरपड्यांचा, पेशव्यांच्या घराण्याशी रक्तसंबंध घडून आल्याने कोल्हापुरच्या दरबारशी ते सदैव वैरभावाने वागत. या वैरभावाच्या बेपर्वाईबरोबरच काहींचा जहागिरदारांच्या चळवळीत अप्रत्यक्ष-प्रत्यक्ष सहभाग राही. काही स्वतःचा दर्जा वाजवीपेक्षा जास्त आहे असे मानून कोल्हापूर दरबारशी मांडलिक या नात्याने वागण्याचे प्रसंग, शक्यतो टाळत. कर्नल रिव्हज्ने, जहागिरदारांच्या उद्दाम वृत्तीची काही उदाहरणे नमूद केल्याचे आढळते.

प्रा. आ. बा. लट्ठे ‘श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र’ : ‘काही किरकोळ बाबी’ : प्रकरण ३ : पृ. २२२·२३८ मध्ये सांगतात, : “... ...दरबारच्या मार्गातील हे काटे बोथट करून त्यांचा उपयोग राज्यकारभार सुयंत्रितपणे चालविण्याच्या कामी करता येत नसला तरी ते निदान जाचक होऊ नयेत, याकडे महाराजांचे सर्व लक्ष वेधले. त्यांना आंजारून-गोंजारून खूष ठेवण्याचा प्रयत्न महाराज कित्येक दिवसापर्यन्त करीत होते.” (पृ. २३२) पण ते सारे वायफळ ठरत होते. त्यादृष्टीने १८९४ मध्ये शाहू छत्रपती यांनी कोल्हापूर संस्थानची राज्यसूत्रे हाती घेतल्यावर, १८६२ च्या तहनाम्याने जारी असलेली कडक बंधने नाहीशी व्हावीत, किमानपक्षी शिथिल तरी व्हावीत; असा राजर्षींचा प्रारंभापासून प्रयत्न होता.

१८६२ च्या तहनाम्याची स्थूल रूपरेषा अशी होती:

१. कलम ७ अन्वये दरबारच्या कोर्टांनी फर्माविलेल्या फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी होण्यापूर्वी ब्रिटिश सरकारला ही गोष्ट जाहीर करावी.

२. कलम ८ अन्वये पोलिटिकल एजंटच्या काही जहागिरदारांनी शक्य तितके करून छत्रपतींच्या सरकाराशी सलोख्याने वागावेच खेरीज या सरदारांच्या हद्दीतील फाशीची शिक्षा अगर सात वर्षांपेक्षा अधिक मुदतीची कैद होण्यासारखे फौजदारी कज्जे सरकारला निवेदन करण्यासाठी पोलिटिकल एजंटपुढे चौकशीकरिता पाठवावेत.

या कलमान्वये अवशिष्ट बाबतीत जहागिरदारांवर अधिकार चालविण्याचा हक्क ब्रिटिश सरकारने आपल्यापाशी ठेवला होता. त्या व्यतिरिक्त दरबारच्या वहिवाटीवरुन चालत आलेल्या, दरबारच्या

स्वामित्वाच्या हक्कांना बाध नव्हता. पण श्लेष काढून अनेक मांडलिक जहागिरदार या हक्कांना बाधा आणित; खेरीज ब्रिटिश सरकारकडे असलेल्या अवशिष्ट अधिकारांमुळे शेफारुन जाऊन सुयंत्रित राज्यकारभारात अडथळेही आणीत. म्हणून हे अवशिष्ट अधिकार दरबारला परत मिळावेत, असा शाहू महाराजांचा प्रयत्न होता.

दरम्यान कलम ७ ने दरबारच्या अधिकाराला घालण्यात आलेला प्रतिबंध १८९७ सालच्या नं. १७५७ ने दूर करण्यात आला. कलम ८ च्या बाबतीतील परिश्रम, जून १९०३ मध्ये फलद्रूप झाले.

मुंबईचे त्यावेळचे गव्हर्नर लॉर्ड नॉर्थकोट यांनी राजर्षींच्याकडे धाडलेला सरकारचा ठराव पुढीलप्रमाणे होता: "आपला सुव्यवस्थित राज्यकारभार लक्षात आणून, १८६२ साली त्या काळच्या कोल्हापुरच्या महाराजाना मान्य असलेल्या तहनाम्यातील ८ व्या कलमान्वये, मांडलिक जहागिरदारांसंबंधी जे अवशिष्ट अधिकार मुंबई सरकारने आपल्यापाशी राखून ठेवले होते, त्या अधिकारांची अंमलबजावणी जोपर्यंत आपल्या कोर्टाच्या निःपक्षपातीपणाबद्दल व कार्यक्षमतेबद्दल सरकारला शंका राहाणार नाही तोपर्यन्त, न करण्याचा माझ्या सरकारने निश्चय केला आहे ... म्हणून खाली नमूद केलेल्या बाबीखेरीज मांडलिक जहागिरीसंबंधीचे अवशिष्ट अधिकार यापुढे महाराजांच्या कोर्टाना देण्यात येतील."

त्या बाबी अशा:

१. निर्णयासांठी आपल्या कोर्टात पाठवावेत म्हणून ज्या ज्या कज्ज्यासंबंधी पोलिटिकल एजंट लेखी विनंती करतील ते व मांडलिक जहागिरीतील अशा स्वरूपाचे परंतु सात वर्षापेक्षा अधिक कैदेची अगर फाशीची शिक्षा सांगण्यासारखे कज्जे पूर्वीप्रमाणे पोलिटिकल एजंटच्या कोर्टात चालतील; मात्र हे कज्जे महाराजांच्या कोर्टामार्फत कमिट होऊन यावयाचे आहेत.

२. मांडलिक जहागिरदार अधिकारारूढ होताना त्यांना जे अधिकार दिलेले असतात, त्यांच्यामध्ये ढवळाढवळ केल्याचा कोणत्याही प्रकारचा आरोप, 'अधिकारदान थैल्या' त नमूद असलेल्या गोष्टींविषयीं पूर्ण आदर ठेवून, महाराजांच्या कोर्टांनी आपणावर येऊ देता कामा नये.

या 'थैली' मुळे आपल्या अधिकारक्षेत्राची व्याप्ती रुंदावली. लोकाभिमुख धोरणे पार पाडण्यात साहाय्य लाभण्याच्या शक्यतेचा दिलासा मिळाला. आणि आपल्या विरुद्ध, संस्थानातील काही जहागिरदार आपले शक्तिसर्वस्व वेचत असताही ब्रिटिश शासनाकडून 'अधिकारदान थैली' ची प्राप्ती झाली, हे शाहू छत्रपतींना शुभचिन्ह वाटते.

जून, १९०३ मध्ये, 'अधिकारदान थैली' हाती आली असली तरी मांडलिक जहागिरदार वगैरे कडून उपस्थित करण्यात आलेल्या कटकटीचे निराकरण होईपर्यन्त १९०४ ची अखेरी उजाडली. त्यामुळे २ जाने, १९०५ मध्ये, बऱ्याच उशीरा दरबार भाषण' घडून आले आहे.

अठरा

कृतज्ञतेचे वैभव : १४३-१४६

मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्या हस्ते मुंबईच्या टाऊन हॉलमधील बागेत, एका सुंदर छत्रीखाली महाराणी व्हिक्टोरियाचा पुतळा बसविण्यात आला. त्या प्रसंगी कागलचे अधिपती बापूसाहेब महाराज जातीने समारंभाची व्यवस्था पाहत होते. समारंभास शाहू छत्रपतींच्या व्यतिरिक्त भावनगरचे ठाकूरसाहेब उपस्थित होते.

या प्रसंगी केलेल्या उत्तरादाखल भाषणात, सर जॉर्ज क्लार्क यांनी शाहू छत्रपतींच्या 'धोरणी आणि सहानुभूतीपरिपूर्ण' अंमलाची प्रशंसा केली असून म्हटले आहे: "...आपल्या धोरणी आणि सहानुभूतीपूर्ण अशा अंमलाखाली पुष्कळ बाजूंनी प्रजेची महत्त्वाची प्रगती झाली आहे. पाटबंधाऱ्याची एक मोठी योजना आपल्या मनात घोळत आहे, हे मला माहीत आहे. या योजनेमुळे आपल्या संस्थानच्या बऱ्याच भागातून गरीब शेतकऱ्यांना गोत्यात आणणाऱ्या अवर्षणाची भीती कायमची दूर होईल."

प्रो. हाप्किन यांनी प्रचारात आणलेल्या प्लेग-प्रतिबंधक इनॉक्युलेशनच्या बाबतीत, महाराष्ट्रातील काही पत्रकर्त्यांचा विरोधी प्रचार असूनही शाहू छत्रपतींनी स्वतः इनॉक्युलेट करून घेऊन आपल्या प्रजाजनांसमोर उदाहरण घालून दिल्याचा उल्लेखही सर जॉर्ज क्लार्क यांच्या भाषणात आहे.

'कृतज्ञतेचे वैभव' च्या अखेरीस, राजर्षींनी लवकरच निवृत्त होऊन मायदेशी परतणाऱ्या पोलिटिकल एजंट कर्नल फेरिस यांच्या कामगिरीचा मोठ्या कुशलतेने उल्लेख करून, त्यांचा यथोचित गौरव केला आहे.

७

विनंती ऐसाजे

एकोणीस

पुणे सार्वजनिक सभा : १४७-१५४

सभेने, छत्रपती शाहूना दिलेल्या मानपत्राचे वाचन ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी केले. छत्रपती शाहू या मानपत्रात, छत्रपतींच्या पुणे शहरातील आगमनाचा उल्लेख पुढील शब्दात करण्यात आला होता:

"आपल्या घराण्याच्या प्रख्यात संस्थापकाने मराठ्यांच्या राष्ट्रीयत्वाचा पाया घातल्यावर तो दृढ करण्याची पवित्र कामगिरी विधात्याने एकेकाळी पुण्यावर सोपविलेली होती. परंतु ही गोष्ट आता केवळ कथाविषय होऊन बसली आहे. मात्र कोल्हापुरची गादी म्हणजे मराठ्यांच्या पराक्रमाचे आज हयात असलेले दृश्य चिन्ह आहे असे सर्वांस वाटत असून गादीवर आरूढ होणाऱ्या छत्रपतीविषयी अखिल महाराष्ट्रातील लोकांना व प्रत्यक्ष त्यांच्या छत्राखाली नसलेल्या लोकांना देखील नेहमी पराकाष्ठेचे प्रेम व आदर वाटत राहील. म्हणून आपले स्वागत करीत असताना, ज्यांच्याशी गतकालाच्या बंधनानी आम्ही निगडित झालो आहोत व ज्यांच्याबरोबर कधीही न विसरण्यासारख्या आठवणी जागृत होऊन डोळ्यासमोर उभ्या राहतात, अशा एका विभूतीचे स्वागत आपण करीत आहोत, असे लोकांना वाटत आहे."

दोन

कोल्हापूर मराठा सभा:

या मानपत्र समारंभाच्या अगोदर राजर्षींची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली होती. कोल्हापुरच्या प्रजाजनांनी केवळ स्वयंस्फूर्तीने ती काढली होती. विरोधी 'समर्थ' पत्राने त्याबाबत अभिप्राय प्रकट करताना म्हटले आहे:

"रविवारचा सकाळचा काळ (२ सप्टें, १९०२) कोल्हापुरच्या प्रजाजनांना सार्वजनिक महोत्सवाचा झाला. स्टेशनवर व महाराजांच्या बड्या मिरवणुकीच्या रस्त्यावर जी चिक्कार गर्दी झाली होती ती पाहून महाराजांना व इतरांना राज्यारोहण दिनाचे स्मरण प्राप्त झाले असेल!"

मुरगूड जनता मानपत्र:

याखेरीज मुरगुडच्या (तालुका : कागल) जनतेने राजर्षी शाहूंना, दि. १६ फेब्रु. १९२२ रोजी दिलेले एक मानपत्र उपलब्ध आहे.

मुरगूडच्या यमगे गावी कागल जहागिरीचे अधिपती बापूसाहेब महाराज यांनी बांधलेल्या तलावाचे उद्घाटन शाहू छत्रपतींच्या शुभहस्ते झाले. त्याप्रसंगी मुरगूडच्या जनतेने राजर्षींना मानपत्र दिले आहे.

या मानपत्रास दिलेल्या उत्तरात, शाहू छत्रपतींनी, कागल अधिपती बापूसाहेब महाराज यांनी तलाव बांधून पाण्याची सोय केली, त्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. परमपूज्य जनक वडिल ती. आबासाहेब यांच्याबद्दल प्रास्ताविक भाषणात गौरवोद्‌गार काढल्याबद्दल कृतज्ञताही प्रकट केली आहे.

हा आनंद आणि कृतज्ञता प्रकट करीत असतानाच राजर्षींनी, आपले धाकटे बंधू श्रीमंत बापूसाहेब महाराज यांच्या सेवाबुद्धीचा आणि कल्पक दृष्टीचा मुक्तपणे गौरव करताना म्हटले आहे. "... परंतु खरोखर चि. बापूसाहेब हे जात्याच हुशार असल्याने आमच्या राज्यकारभारात त्यांचीच आम्हास इतकी मदत होत आहे की, त्यांचा बहुतेक सर्व वेळ त्यातच जात असल्याने तुमच्या स्थानिक बाबीकडे त्यांना द्यावे तितके लक्ष देता येत नसेल व त्यामुळे कदाचित् तुमचे जे थोडेबहुत नुकसान होत असेल त्याला मात्र आम्ही कारणीभूत होत असू असे म्हटल्यास वावगे होणार नाही."

श्रीमंत बापूसाहेब महाराज यांनी 'यमगे तलाव योजना' कार्यवाहीत आणून व्यापारवृद्धीस हातभार लावल्याचे सांगून त्यादृष्टीने 'सुबद्ध सूचना' करीत जावे असे, राजर्षींनी सुचविले आहे. त्यासंबंधात, दूरदृष्टीची सूचना करताना राजर्षीनी म्हटले आहे: "नवीन बांधलेल्या तलावातील पाण्याचा उपयोग त्याखाली असलेल्या बऱ्याचशा जमिनीत उसाचे पीक करण्याकडे होणार असल्याने त्यातून उत्पन्न होणाऱ्या या खोऱ्यात, आजूबाजूस बऱ्याच मोठ्या प्रमाणावर उत्पन्न होत असलेल्या गुळाची साखर बनविण्याचा कारखाना, येथेच सुरू करण्याचे कोणी व्यापाऱ्याने योजिल्यास त्यात त्यास यश येण्यासारखे आहे असे वाटते. या किंवा अशाच इतर दृष्टीनी व्यापाराच्या अभिवृद्धीबद्दल तुम्ही विचार करावा अशी आमची सूचना आहे."

वीस

लोकसेवेचा शुभारंभ : १५५-१५६

कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य) येथे, कोल्हापूर राज्य रेल्वे बांधणीच्या शुभारंभ समारंभप्रसंगी युवराज शाहूंनी केलेला भाषणाचा प्रारंभ 'कर्नल हंट, मित्र व प्रजाजन हो' अशा संबोधनाने आहे.

कोल्हापूर राज्य रेल्वेची ही लाईन कोल्हापूर ते मिरजपर्यंत जोडल्यात आल्याचे आढळते.

* * *

अनुक्रमणिका

इंग्रजी भाषणे

अनुक्रमणिका

Twenty one

Turning the first sod of the Kolhapur State Railway

* * *

Colonel Hunter, friends & Subjects

It would hardly be becoming of me to do more than thank on the present occasion for so kindly supporting me in this my first public function. You will not expect from me anything beyond the few words which it has been suggested to me to say.

The success of this Railway should have a beneficial in developing the resources of my state and I hope that in the ordinary course of events it will fall to my lot to open this line within less than three years from the present.

I am reminded that we are all under the benevolent protection of the British Government and that, as we already know, during my minority every thing will be done to further the welfare of Kolhapur, of which this Railway is a prominent instance,

* * *

On the occasion of the opening ceremony of the Kolhapur State Railway on 3rd May, 1888

Twenty two

Sports for success

***

Colonel Wodehouse, Ladies, and Gentlemen,

This is the first occasion on which I have had the pleasure of presiding at the annual prize giving at the Rajaram College, and it is a matter of much satisfaction to me that this year the date has fallen while I was at Kolhapur. The report on the past year's work, which we have just heard, read by Mr. Candy, the Principal, is a record, which, I am sure, does credit both to himself and the other able professors as well as to the students of the college. It is true that, as Mr. Candy points out, the results in the examination of the Candidates for the Previous and the Intermediate Examinations were disappointing when compared with what has been done in former years but examinations are a proverbially uncertain test, and taking the results as a whole the successes gained in the 1st B. A.; the Matriculation, and the School Final Examinations show that the Rajaram College and Kolhapur High School are fully maintaining their old and high reputation in the Bombay presidency. Particularly pleasing is it to notice that Kolhapur has taken two of the coveted University Scholarships Mr. S. V. Shevade, the Sir Le-Grand Jecob Scholarship and Mr. S. D. Devadhar, the 2nd Jagannath Shankarshet Scholarship for Sanskrit. I think here in Kolhapur we are all proud with some reason, of our school and college, and every student, who

***

At the Rajaram College; Kolhapur, on the occasion of Prize Distribution Ceremony of 3rd Aprill, 1893

distinguishes himself, should bear in mind that brings credit not only to himself, but to his town, and that pleasure in his success is shared in, not only by his immediate friends, but by many personal strangers who yet have the common tie of pride in the school and College, And it is not only University success that I mean. Let all remember, both the few who today won the prizes and the many who did not, that their achievements in future life, whatever the career be in which honour is won, will always be matter of pride and pleasure to their College and to those like myself, take interest in it. To return to the report I notice with interest Mr. Candy's remark, that encouragement is given to qualified students to enter independent lines of business, and not all to seek Government employment. It is a truth that every student here would admit, in theory, that the doors of the Public Service are over-crowded with candidates, whose competition injures themselves, and that India wants more of its educated

young men to devote themselves, to mercantile, professional, and industrial pursuits. As I say this is generaily admiited, but few yet apply the truth to their own cases. and indeed courage and enterprise are needed to strike out a new line and to leave the beaten tracks. I wish, therefore, all success to the to the four Kolhapur students who have had, we bear, the originality to go to Poona and enter the dairy farm business.

Turning now to the physical education, I am glad to see that Kolhapur is holding its own hitsertoo. The two victories of the cricket eleven over the Deccan College were events in which all Kolhapur took pride, and I hope that match will become an annual affair. As to rowing, I am sorry to hear that this sport is rather languishing after the very successful start made last year, and as it will never do to waste the advantage you have in the coaching of Mr. Candy, an old Cambridge Cox, I shall be very pleased to remove the first difficulty mentioned, and present two new sets of cars and I hope that you, the students of the School and the College, will do the rest and that intime annual race with an eight of the Deccan College may be one of the great events of the Kolhapur year. I must, however, strongly impress on you to practise the virtue of self-help, and which the State gladly meets the heavy first outlay on cricket ground and boats, remember, you are expected to provided for the upkeep of your own amusements, and if there is no such arrangement already, I would suggest to you the formation of a sport committee, of general subscription from each boy every term. In conclusion, a world of praise is due to those who have pleased us to-day with the well rendered recitations we have just heard, which show the result of much trouble both on their own part and on the part of those who taught them.

***

Twenty third

Opening of the Agricultural Horse & Cattle show

* * *

Your Excellency, Colonel Wodehouse, Ladies & Gentlemen,

Few words are necessary in proposing this, the toast of the evening, the health or his Excellency Lord Harris.

At this season of the year his Lordship has, I know, numerous engagements of every kind to keep him in Bombay, and though be never spares himself any trouble or fatigue to oblige others. I think it particularily kind of him to have overcome the difficulties, which I know existed, and to have visited Chinchli. For two years past the show has had to be abandoned, first on account of census, and then owing to the bad seasons; but I think we have made a lucky start again on this occasion, which has been favoured by the presence of his Lordship. Last but least, I must express my special thanks to her Excellency Lady Harris, who has a undertaken this long Journey and it is a very long one for a lady to accept my invitation. This is the first time, I hope it may not be the last, that I have had the honour of welcoming her Ladyship it my state, and when she knows how much pleasure her presence gives to myself and to all, I think she will feel some what Compensated for the trouble she has taken.

* * *

At a state banquet at chinchli in honour of his Excellency Lord Harris on the occasion of His Excellency's visit to that place at open the Agriculture Horse & cattle show on 4th feb, 1894

Twenty four

Education for all

***

Your Excellency, Sardars, Ladies and Gentlemen.

The pleasant duty of welcoming your Excellency on behalf of the Deccan Education Society has fallen on me, and I do it with the greatest pleasure.The sole aim and object of this body is the spread of knowledge, and it is very lucky that on your Excellency's arrival in this city your first act should be in connection with it. The secretary will presently read to you a detailed account of the origin and growth of society. I shall here only say that this institution is the outcome of the constant efforts of a few young men in the cause of education. The people of the Deccan know very well that society had to struggle with many difficulties, and they are also equally aware how it has got over them. The New English School and the Fergusson College have made education accessible to all classes of people. Every year many students from these institutions successfully pass the University tests and carry away its honours and prizes. But this is not, in my opinion a true measure of the real worths and merits of the society. What I admire most is noble example of self-sacrifice and zeal in a right cause. which the originators have set to the rising generations. The Society has secured the confidence and sympathies of men of every class and rank in our Presidency, and we need not go far in search of evidence for it. The handsome donations of Rs. 20,000 lately made by friend, Sir Bhagvatsinghjee whom we all miss on this occasion,

***

Presidential Address: Opening Ceremany of the new Building of the Fergusson college at the hands of Lord sandhurst on 28th march, 1958.

amply bear out my remark. In support of what I say, I may as well mention, the lively interest which principal selby, Dr. Bhandarkar and other members on the staff of the working body have been taking in it. Ever since the foundation of this Society successive Governors of this Presidency have been taking deep interest in its welfare, and the recent visit of Sir James Fergusion to these buildings even after his connection with this Presidency had ceased, sufficiently attest the fact. The Society takes no doubt, that your Excellency also will feel the same interest in it, and your presence here to-day may well be looked upon as the earnest of it. With these few words and thanking your Lordship on behalf of our Society for your kindness in complying with their request, I call upon the secretary to read the statement.

***

Twenty five

At the Empire Coronation Banquet

***

I am deeply sensible of the honour that has been done me in associating my name with the toast of the 'United Empire,' most especially since the toast has been proposed so kind by so distinguished a statesman as Mr. Chamberlain. But I feel that it is an honour which I can scarcely claim to deserve. The fact that this toast has been proposed by gentleman whose name is famous throughout the Empire and is a synonym for Imperial unity, might have suggested perhaps as more appropriate the association with the toast, on behalf of India, names which have been more closely connected than has unfortunately been the case with mine, with the defence of the Empire. As you are already aware my friends, the Maharaja of Gwalior, the Maharaja of Bikaner, and more particularly the Maharaja Sir Pratapsingh, have been more fortunate than myself in being able to come actively to the assistance of the Empire in times of trouble; and they could with better right have replied for India to the toast which has been so kindly proposed and so warmly received. But I can assure you that though the flesh has been week, that is to say the opportunities have been wanting, the sprit has been and is willing as, I trust, I may some day be able to prove. This, however, is the personal aspect of the question.

I should like, if I shall not detain you too long, to say why we, the Indain Cheifs and visitors, view with such peculiar gratification first our presence at this 'Empire Banquet' and secondly why we

***

On 11th July, 1902 at the Royal Colonial Institute, London

take it as such a great compliment to be associated with a toast which has been proposed by the Rt. Hon. Mr. Joseph Chamberlain. The Coronation of His Majesty which we may now hope will not belong deferred, has for the first time brought to England not only represent England's great Colonies, and though on other occasions in the pas there may have been gatherings in England of Colonial representatives from the King's Indain Empire, but the leading statesmen from as there have been gatherings of Indian Princes, to-night is perhaps the first occasion in the annals of the British Empire on which units, from both have meet together and felt at least we Indians feel that we all stand together as one indivisible body. This, I feel, has been already said, much more ably, to night, but I known that my

fellowchief's would feel I was not doing my duty, if I did not, however inadequately, echo it on their behalf.

***

Twenty six

Path of Progress

* * *

Colonel Ferris, Shet Manikchand, Jahagirdars, Sardars, Ladies and Gentlemen,

I thank you most sincerely Shet Manikchand, for the honour you have done me in asking me to poen this useful institute for Jain students.

The request has been made on behalf of the Southern Maratha Jain Association and I consider that the birth of Associations like this indicates unmistakably the directions of the powerful influences that have been working under the benign rule of the British Government. One of the beneficent results of that rule is the commencement of the emancipation of the backward classes from the intellectual and social problem to which they had been subjected from time immemorial and the tendencies that are the outcome of our contact with West are nowhere better illustrated than in such attempts of those communities to raise themselves. We see everywhere encouraging signs of an internal awakening of the masses. The Agricultural, the Industrial and the Commercial classes have all come to recognise the necessity of spreading of education among these communities and for that purpose have started associations in different parts of the country. In this small city, it is very gratifying to see the sister institutions of the Marathas and Jains established side by side and I trust that with mutual love and co-operation they will advance hand in hand on the path of progess.

* * *

Opening of the Jain Boarding, Kolhapur in 1905

I would certainly lay no great claim to any credit for their creation but I have always made it a point to hold out every encouragement to those classes and it is a genuine pleasure to me to mark their progress, and I trust I may be excused if I am included too look upon the results small as they are, with a feeling bordering on pride. I cannot, however, ignore that the success of such institutions is due also to the sympathetic support and encouragement, I have been receiving from Political officers like my friend Col. Ferris.

The Jains hve had a brilliant past. Their ancient architectural works here and in the Deccan bear ample testimony to their former greatness and civilisation. In the domain of literature also, the Jain Saints of old have played an important part. The doctroine of respect for animal life they have carried to a point that raises them almost to the level of divinity.

With such a past, the Jains are, I am sure, now that they have thrown away their lethargy, bound long to regain much of their lost glory.

I listened with great attention to your interesting address and felt particularly gratified by your remark. "from here we might send forth not only promising doctors, lawyers, engineers and Statesmen but talented merchants and skilful agriculturists who will carry forward in coming ages the hitherto interrupeted annals of ancient times with fresh vigour." That shows the goal of your ambition. I quite realise how, for the present, you like all backward classes, feel handicapped in the race of life and in your first efforts to raise yourselves, seek external help but I would hold up for imitation your most laudable resolved to do away with the gocart as soon as you are able to stand on your own legs and with all my heart, I wish you success in your endeavour to do so!

Gentlemen, I wan't detain you any further. I cannot, however conclude without offering my cordial congratulations to Shet Manikchand, his brothers Panachand and Navalchand and his nephew Shet Premchand for their generous help to the noble cause of educating their brethern in raising beautiful edifice which I have now very great pleasure, in declaring open. It is my devote wish that it may have a long and brilliant future.

* * *

अनुक्रमणिका

Twenty seven

Self-help for prosperity

***

Col. Ferris, Balasaheb, sardars, Ladies and Gentlemen,

I have listened with great interest to the brief history of the projected mill counted by Sardar Balasaheb Gaikwad.

He has referred to certain grants and concessions. I think rather he has made to much of them, I have done nothing extraordinary in giving those concessions and in other ways helping the enterprise, the first venture in my State for turning raw material on the spot in to manufactured articles.

No one can travel in to England and on the continent of Europe without taking mental note. During the coronation celebrations of our beloved King Emperor, I had opportunities of seeing in England and elsewhere the extraordinary progress made by the Industrial Arts and it often struck me that something on those lines might be done even in my little State. How best to utilize the resources of my small principality for the good of my people, was a question. I had been constantly revolving in my mind when to my agreeable surprise, I found one day that the matter was being earnestly taken up by the Sardars and moneyed Classes of this district. I rejoiced to think that the spririt of self-help was alive among my people and all that was needed to foster that spirit was to giv enterprise like the present helping hand. My brother Princess and Chiefs of other states have already got mills within their territories but some of those are state concerns. Personally,

***

At the Shahu chhatrapti Mills, Kolhapur on 27th sep. 1906

I am opposed to the energies of the already over worked machinery of the state being diverted to objects alien to its proper functions and my aim has been and will be to develop industries brought about by the co-operation of the people themselves and it has given me sincere pleasure to hear that the few concessions and the little help that I have been able to give, have done so much to further your project.

Let me assure you all, that this mill, the first in my state will always have fullest sympathy and support and any proposals that you may lay before me will receive my best consideration. I

quite sympathise with your determination not to let this concern go into the hands of great Millowners and Millionaries, but I am sure you recognise the heavy responsibility involved in this and I earnestly hope that you will spare no pains to make the interest of the shareholders, your direct and permanent concern and show the public at large by your success that merchanitle talents are not a monopoly of Bombay alone. Of course, in the beginning you will have difficulties, but encounter them like men. I need hardly assure you that you may always count upon my advice and hearty support, quite a sympathetic friend and adviser. You have selected this auspicious day for today's ceremony. In times gone by, on this sacred Dassara day we all paid grateful homage to all that helped us in winning fame and glory. We honoured the war horses and we honoured the arms of war. On this day the artisan worshipped his tools and the husbandman his plough, on this day the frontier was crossed and victory achieved.

The custom is still preserved and if now boundaries are not crossed in pursuit of material fame, let us make up our minds to cross them in search of more honourable glory of industrial development. We must remember, "Pleasure have your victories more renowned than war". Victory in these days has to be gained overapathy and ignorance and poverty. Let us fight unanxiously against those evils. That success may crown all your efforts, and this is my most cordial wish.

* * *

Twenty eight

Opening of
Col. Merewether Ground

***

Colonel Merewether, Ladies and Gentlemen,

It is nearly Twenty years, Colonel Merewether, that I have had the pleasure of knowing you. I quite rember the time when you were here as 2nd-in-commanded and used to encourage is in different sports. Our acquaintence then commenced has now ripened into friendship and as a small token of my regards for you and appreciation of your keen interest in all manly games and sports. I requested you a few weeks back kindly to allow this Cricket Pavilion to be named after you and your portrait to be placed therein You were good enough to grant the permission. The building. I am sorry, is not quite finished as I should have wished. But it has been my earnest desire that its opening ceremony should be performed at your hands and I hope you will kindly excuse me for asking you to do the function at this rather premature stage.

You have not been very long here as Resident and political Agent, S. M. States but during that short time, allow, me to say, you have rendeared yourself to every one by your courtesy and sympathy and the affairs of this part of the country have ben going on most smoothly and satisfactorily. You will of course of time return to us as permanent Resident and Political Agent and I trust that in the mean while you will continue to keep alive your interest in Kolhapur and S. M. C. States.

***

Opening of Col. Merewether Cricket Pavilion at Kolhapur in 1912

Gentlemen, I cannot allow this occasion to pass without again publicly referring to the dastardly attempt made on the life of His Highness the Viceroy at Delhi. The incident is fresh in the minds of you all and I make no doubt that you all join with me in detesting the culprit and his act and sympathise most heartily with Their Excellencies, I shall only add that something more than mere expression of such feelings is necessary. Government of course straining and will strain every nerve to trace and bring to book the offender but it is the duty of every one of us to heartily co-operate with them and do our very best not only to unearth the miscreanth but to put down and crush the spirit that is at the bottom of villainous act.

Colonel Merewether, I now request you to declare this Merewether Pavilion open.

***

Twenty Nine

Welcome to Lord Willingdon

* * *

Your Excellency, Colonel Wodehouse, Chiefs, Jahagirdars, Ladies and Gentlemen,

Before commencing proceedings of the cmemoney for which we are assembled here, viz. to unveil the statue busts of Their Majesties the late king Edward VII and Queen Alexandra, King George V and Queen Mary and their Royal Highnesses the Duke and Duchess of Connaught in humble taken of my loyality and devotion to the Sovereign and members of the Royal Family, I desire to accord a most cordial welcome to your Excellency, to my capital and express my deep gratitude to you for your visit, I feel proud that my state should be the first to receive the honour of your Excellency's visit. The present time, too, is most opportunety as the recent rains have banished all fears of scarcity and what, but for the timely rain-fall, would have been a bad year is now converted into one of abundance and prosperity, I am only sorry that lady Willingdon has been unable to accompany Your Excellancy. We all miss Her Ladyship very much on this occassion.

I would take this opportunity of publicly expressing my sense of gratefulness to Govt. for enhancing the prestige of my state by raising the status of the Political Agent here to that of the Resident and it is a source of sincere gratification to me that my friend Colonel Wodehouse should have been the first recipient of that honour. His

* * *

Welcome to Lord Willingdon, the Governor at Kolhapur on 23rd Nov. 1913

connection with my state dates from the time of my minority when his respected and beloved father the late Colonel Wodehouse was Political Agent. I have a lively rememberance of the affectionate and anxious care he bestowed on my education. I owe him a debt of gratitude as I also do to his son to whose sympathetic help I am indebted for the smooth progress of many a reform in my administration. In my educational policy and the great irrigation scheme I have taken in hand, his help and advice are most valuable to me.

Of the August Royal personages whose busts Your Excellency will soon be unveiling. I need say but little. Their noble deeds are to well-known to the world for me to recount them here. They will ever remain enshrined in our hearts, My subjects have already raised humble yet fitting memorial to our late gracious sovereign King Edward VII and the farmers in my state are

even now deriving benefit from the King Edward Agricultural institute. More, however, is still expected of it, and it is hoped as primary education advances the institution may become increasingly useful to the rayats of my state. The Cornation Darbar at Delhi was a unique event. It could never be effaced from the memory of those that had the good fortune to withness it and it was there that their Most Gracious Majesties King George V and Queen Mary won the hearts of people of their country by those divine attributes which the East is accuctomed to associate with royalties of their Royal Highnesses. The Duke and Duchess of Connaught I have an affectionate recollection, during their stay in this country their affability and courtesy did more than anything else to cement the ties of friendship between the ruling Chiefs of India and the members of the Royal family and it is my sincerest with that during Your Excellency's regime those ties my by God's grace be still more firmly kint together so as to rebound the honour of England and India and make for the peace and happiness of both countries.

I now respectfully request Your Excellency to unveil the busts.

***

Thirty

Welcome to Maharaja Tukojirao Holkar

***

Your Highness Maharajasaheb Holkar Bahadur of Indor, Sardars, ladies and gentlemen.

I have great pleasure on this occasion to express my feeling of gratification at the honour done me and my people by Your Highness by an intimate friend of mine and I had the pleasure of the cordial visit from him. I am to-day overcome by feeling of thankfulness for your presence among us by which Your Highness has helped to strengthen old ties. On the present occasion of Agricultural Exhibition which is the first of its kind which I am holding in my territory, I am extremely obliged to Your Highness for participating in the function and in presiding at the prize distribution.

The success of the Agricultural show is in no small measure due to the part Your Highness and the Maharaneesaheb have to heartily taken. During the short stay of Your Highness at Kolhapur, You and your worthy Maharanee have won the golden opinions of my subjects by the great interest taken by you in history of this State, its art, and its agriculture, by the intelligent questions which Your Hinghness asked when looking over exhibits. I have to heartily congratulate Your Highness for the intelligent interest and sympathy displayed by Her Highness Maharanee Indirabai and for her appreciation of our efforts in the cause of education and specially female education. Her highness,

***

On 27th April 1914. at Kolhapur

visit to our Girl's school and the women's Hospital and to the religious shrines in and near the capital, has given us great satisfaction. I cannot help complimenting Your Highness on Your Highness love of manly games such as wrestling and fencing and also shikaring where Your Highness distinguished yourself in pigsticking. The visit of Your Highness has given unbounded pleasure not only to the host, but to all his subjects as is well indicated by the immense crowds at the station and other places. I have once more to thank Your Highness and trust our friendship may strengthen with time and that I may have an early opportunity of welcoming Your Highness and the Maharaneesaheb and the prince Yuvaraj and the Princess.

***

Thrity one

For Truth, Justice & Liberty

* * *

The present is unique occasion unprecedented in the History of the world. The message sent to us by His Majesty, the King and the Premier convey a call to a most sacred duty. We are asked whole heartedly to help in organising the man power of India and developing and utilising its resources. So far as words go the response has been on the whole most cordial. However important the political questions that have been engaging the attention of the Indian Public may be, this is not a time to embarrass Govt. by pressing upon them the advisability of their instantaneous solution. The questions involved are of too complicated nature to be dealt with hurriedly and any attempt to rush them will only defeat its purpose and may infinitely prolong the end in view As one of my brother Princes pithily said 'What is it that we give and ask from Govt.?' He answered the question in a monosyllabic word 'Trust'. Who will not agree with him? It say therefore, let us trust Government: This is not a time to wrangle or to refer to what might have been done by Govt, or try to bring home to them the results of their past policy. Let the date past bury its dead. Let us now rally round the standard of Truth, Justice and Liberty which the allies are fighting for. Let all other considerations be shelved and let us concentrate our energies and have the whole brain power of India on the solution of one great question, who to help Govt. in winning war, how to collect and organise the great man power of our vast country, combatant and non-combatant and make the fullest use of its resources.

* * *

At the Delhi Conference in Oct. 1917

have already made to Govt. certain suggestions and I am placing them before this conference for consideration. May idea is that every where in India attempts should be made to raise selfcontained Battalions for Geographical units; after which they should be named. For my small state I have made a proposal for raising a battalion of combatant and making a depot of non-combatants and arranging for a treatment of the sick and wonnded and convalescent, to keep well trained recruits in reseurve for drafting them into the battalion, thus to keep a constant supply of combatants and non-combatants required for the army.

* * *

Thirty two

Agriculture : the basis of our economy and its problems

***

It is fortunate circumstance of the times that government is taking keen interest in the development of national industry of this great country. Interest of government in this respect can be traced to the middle of the 18th Century. India was considered and is a great source of raw products required for manufacturing purpose. Cotton had attracted the attention of Government. The crop is even now engaging the attention and government of India have only recently appointed touring commission to inquire into the extension of cotton cultivation and suggest ways and means to improve its staple.

On the present occasion I am happy to note that the interest of Government is not going to be centred round the supply of raw products for the manufacturing centres of England but it is going to be extended to the general development of agriculture and improvement in the condition of agriculturists. More than 80% of the population of this country is depended on the agriculture industry. In my state, practically the whole state depends for its prosperity on agriculture. We have hardly any other industry worth speaking of. My interest in agriculture, I may say, is of long standing and I have been making efforts to assist my people I have found with my experience that though these efforts are sustained, the results are not equal to these efforts. I can't say that the Indain cultivator does not know his business. In fact he is a best cultivator. If he is found to

***

On 8th, Nov. 1917 at the Agricultural Conference

stick to what outsiders may call crude methods those are the methods which suit his economic condition. He understands the possibilities but he handicapped.

To understand his real position, it is necessary to know the disabilities under which he has to work. These disabilities can be classified under four heads:

1. His ignorance i. e. his illiteracy.
2. His want of means to get cheap capital.
3. His smallness of holdings.

4. And want of organisation in the disposal of his produce.

His first disability is great, viz illiteracy. To get over it, the only way is the spread of the education among them. To achieve this object of predominant importance I have lately introduced in my state compulsory primary education. I should not fail to say that I have but made a beginning. It will take sometime to extend the measure to the whole state to my satisfaction. The only desparture I am anxious to make from the ordinary course is that, I want to give education to suit the condition of my people. In villages especially, the instruction will be limited to the three R's and practice in agriculture. I consider this precautionary provision is necessary. It is no good weaning the peoplesons of agriculturists from the occupation of their fathers. Education should create a pride for the ancestral industry and not contempt. A village school will generally be provided with a small farm to create pride for physical labour. Our boys should understand the dignity of labour.

For the second disability want to cheap capital. I am having co-operative societies established on the British model. I can't say that the present lines on which those societies are run the only best lines. We shall have to watch the progress. We have yet to get more experience before we make a departure.

With regard to the smallness of holdings, I am afraid, there is no easy solution within the means of the states. The law of inheritance comes in the way which enjoyes equal division among the heirs of the holders. We can only limit further sub-division of the survey number. This is a make shift, but it is worth attempting. The question is engaging the attention of the Bombay Government and United Provinces. I am watching the results. I shall be glad to follow the lead of British Government. Lately Dr. Harold Mann brought out an interesting book 'University Series' showing the deplorable condition of our Deccan agriculturists. It is sure to attract the scrious attention, not only of Government of Bombay but of the Supreme Government. There is one more way, by which this difficulty of the smallness of holdings can be minimised and this is encouragement to the emigration to East Africa, conquered from the Germans, which should never be returned. Some of the territory might be reserved for Indian soldiers, who have helped in so valiantly wresting it from the enemy, and if my suggestion be accepted, it will be a fitting reward for their loyalty and bravery also.

I hail with joy, therefore, that the question of agriculture and its development is before the Princess Conference.

* * *

Thirty Three

At the Princes' Chamber

***

I differ from the Patiala draft scheme about the composition of the Chamber, and enter my strong protest against it. It is a decided setback on the Bikaner Note. The scheme gives the eligibility for admission to the chamber of those Princes only who have unrestricted civil and criminal jurisdiction over their own subjects and the power to make their own laws. It further empowers the Chamber so constituted to 'add to it's number the rules of other States whose inclusion the Chamber may deem advisable.' I am aware that sentiment and want of a definite single criterion to fix the eligibility at, are defficulties which we have to meet. But if our claim is to speak for one third of the area and one fourth of the population of this country, it is impossible to see why Princes with sovereign powers only should be the masters of the situation. This is the reversion of the principle of representation. Is the committee aware as to at States it will have to exclude? It is an insult to the States so left out and I regret, I have to say that the suggested method of composition will unfortunately be the beginning of the end of the Chamber before it is formed. Is the Chamber intended to unite or create a split? It is rather strange to see that

1. Revenue
2. Population
3. Extent

***

In Feb. 1918 at Delhi

4. Honours
5. Acknowledged position
6. The respect in which certain States are held and
7. The time and the spirit in which we are living should not have weighed with the committee.

Does the committee want the chiefs who have no sovereign power to form another Chamber in opposition to the on proposed? I am sure they would not allow the Chamber, as proposed to be constitued by the scheme, to represent them. And why should they? The British Parliament can have within its four walls almost the same number of members as the Princes and Chiefs of India. They do meet together, and can deliberate upon and decide matters of

the highest importance to the whole of the world. The House of Lords does not make distinction between Dukes and Lords. The hereditary and created Peers do sit together. In contries which have State Government small and big states meet together, Prussia and other States can transact business together. I appeal most earnestly to my brother Princes and Chiefs to rise above sentiment and be equal to the occasion. We may have different number of votes for different States according to their status, importance, landrevenue etc., and may annex that list to the constitution of the Chamber, as is the case in Germany. We might give votes to groups of States on the basis of salutes, extent, population, powers etc, if a body of all the Princes is considered unwieldy. But complete exclusion of some is undersirable.

* * *

Thirty four

The Dream of National Army

***

I have not come down here to repeat what is already published in the papers; not to make a political speech. I am proud to say that speech making is not in my line. I have come here to say what we ought to do and what Govt. should do for us at this critical time.

We know that our enemy, the German has no conscience, no sentiment and I may even say no humanity. Keeping this in mind we had make every efforts that is in human power to conquer him. We must raise both men and money for this. The chief thing that is wanted however, is mutual love or mutual thrust between us and Government. We must love and trust Govt. and our love and trust, I am sure, will be amply rewarded.

This is not a time for us to wrangle and to make demands for higher military post or political rights or lay down conditions on which our whole hearted help will be given. We should claim the privileges by our feeds and win them by force of loyalty and love.

Time has no doubt come when we must compel Govt. to open a sandhurst in this presidency. But this should be done by the heroic

***

This is an appeal at the Bombay War Conference inJune, 1918 made by H. H. the Shahu Maharaj to the public to support the war. In the appel he has explained the need and form of the National Army. No doubt, in his mind the draem of India as an independent Nation was clear, and also he had thought of the means and ways of the building a true Nation.

Deeds of fighting races who have spilt and are spilling their lifeblood on the field of battle and are winning military honours. Why beg for such things when we have now got an opportunity of compelling Govt by feeds of loyalty and valour in the field? I for one would not ask for a commission before I am qualified for it. I would be more a nuisance than of red use fitting if commissions are given to native officers in the army who have made their mark on the field. What we want at present is action, not words. This is not a time for tongue or pen but for the sword.

Questions like raising a national army had better be postponed tiil after the war. Some wanted to raise a battalion of their caste to render some help to Govt. The object was certainly

laudable but they could hardly make up even a company. What then is good of talking of a national army now? There is ample time after the war to think of this and perhaps even more important things. It is our duty at this juncture to help Govt. heart and soul in collecting and organising man-power and in developing and economising our material resources. It is not a time to spend our money over palaces and theatres and I may even say over buildings and roads but every pie that can be spared must be devoted to war. Even the buildings and hospitals we possess should be handed over to the military authorities. This will no doubt entail some inconvenience and perhaps hardship on the civil population; but we have to bear in mind what the people of England are suffering and what sacrifices they are making; ours are nothing to theirs. We need not go so far when we have before us in our midst noble examples of self sacrifice and tireless work. I refer to what our President Lord Willingdon, and his energetic consort have suffered and have done. We have but to follow in their foot steps.

Let us not allow, therefore, our attention to be diverted by any thing from the main purpose viz. to win the war and I would seize this opportunity of appealing with all the earnestness, I can command to fighting races of India. They should remember that on them mainly depends the future of this country. It is for them to uphold her past military traditions and of glory and preserve untarnished her honour by deeds of valour and I feel confident they will not fail to do their part. I am equally confident that we are all agreed on one point that we must win the war and for that purpose every one of us is ready to make any sactifices, I have therefore, great pleasure in moving the following resolution which I am sure, you will accept.

That this conference authorises and requests His Excellency the Governor to convey the loyalty and dutiful response from the Presidency of Bombay to his Majesty's gracious message and an assurance of the determination of the Presidency to continue to do her duty to her utmost capacity in the great crisis through which the Empire is passing.

* * *

अनुक्रमणिका

Thirty five

The Home Rule Party

***

The so called Home Rule party is neither in touch with the masses nor have they sympathy for them. All they want is power for them selves. I do not at all like the idea of these extremists holding out a threat to Government at such a critical time. They say in effect that if their demand for Home Rule is not satisfied, they will not help Government in getiing recruits as if they can influence recruiting one way or the other. But the wonder is that, I am inclined to believe, Government is afraid of them. I am decidedly of opinion that they cannot raise a single recruit nor will they be able to prevent men from offering as recruits. The masses do not know these men. The Brahmins could not raise the promised number of men, though it was a very small number they could offer to give even from their own classes. Far from raising a battalion, I think they could not even get together a sufficient number for a Brahmin company. Such are the people of whom Government are now afraid. I am speaking rather plainly but I beg to be excused if I overstep the limit. The Non-brahmins are only just now awakening to their degraded condition and to the severity of the social and religious laws of Brahmins which had hitherto put them down. Naturally they are suspicious of that if power again went into their hands, attempts would be made to bring back to life the old Brahminical regime. Their religious heads are already trying to organise their forces on the modern and revive what they call Chaturvarnya the old four watertight compartments of castes among Hindus-Brahmins, Kshatriyas, Vaishya and Sudras. Naturally they are

***

In July, 1918 : (occasion and place not tracable)

afraid that under the levelling infiuence of the sympathetic rule of the British Government, castes may lose their rigidity and Non-Brahmins may rise in she Social scale and may try to come up with the Brahmins and claim equality. From their point of view, they are perhaps right. The British rule had certainly conferred this great blessing on the ignorant and down-trodden masses. They have just now begun to see and realise the past in its true colour and to know the causes of their present degraded condition. They certainly want the same kindly and sympathetic administration till they are, so far as literacy goes in some degree, atleast comparable to the Brahmins, They naturally with that great gulf between them and Bramins should lessen and should not at any rate be allowed to widen. With this end in view, I am trying to introduce free and compulsory education in my state.

***

Thirty Six

Lord Willingdon's Visit to Kolhapur

***

Your Excellency, Jahagirdars, Sardars, Ladies and Gentlemen,

It is close upon five years since I had the honour of welcoming Your Excellency on the occasion of your first visit to my capital. Times have since considerably altered. The peace and tranquility, which reigned in the world then, have given place to the brutal struggle that has involved all the civilised nations of the world, and diverted their attention from all peaceful pursuits. They have all joined together and are doing their utmost to terminate the war by the speedy victory for the cause of Allies. India, as forming an integral part, of the British empire, is called upon to do her Part, and we are proud that she has responded whole heartedly. But the critical moment has now arrived, when we must all redouble our efforts and give the final blow to Prussian militarism and, once for all, rid the world of the past. The clarion call to duty has now come from our most revered and beloved Kind Emperor, and it is to impress on us all here the urgency of that cause that Your Excellency, amidst Your heavy and important work, has found time to pay a flying visit to my state I offer my most hearty welcome to Your Lordship.

My little State, as Your Excellency is aware, has contributed its mite both in men and money towards the war, and I have learnt with pride that my men have not lagged behind in doing their duty on the field. My subjects, have on this occasion loyally come forward to their humble part in the sacred work of rescuing mankind from the

***

On 18th July, 1918 on the occasion of Lord Willingdon's first visit to Kolhapur

tyranny and barbarism of the Hums, and I feel confident that they will continue, with alacrity, to give their quota till the war ends in a decisive victory for the Atlies. The difficulties no doubt are daily increasing. Prices have gone up abnormally and so have wages. But we now, more than ever, to brush aside the purely pecuniary mercenary aspect of the work and be prepared to make sacrifices, in the higher interests of mankind, as champions of liberty, truth and justice.

I need hardly allude to the sacrifices that England and her Allies are making. In that country there is not a house without mourning. Even in our midst examples are not wanting. I should be exused, Your Excellency, for pointing to Your noble self. Notwithstanding the heavy toll the war has taken from your own family, sense of duty has impelled Your Excellency to continue in office and discharge its arduous duties. I should say the same of your energetic consort, Lady Willingdon, whose gracious presence we miss here today. I would also take the liberty of referring to yon, Col. Wodehous, from whose family the war has claimed half a dozen persons in wounded and lost, including your own dear brother. Such are sacrifices that are being made by all, irrespective of their rank and positions in life, and I sanguinely hope that the same spirit will animate my people and Kolhapur will not lag behind. I need hardly remind you that the wily enemy has his eye on India and his agency of intrigue is working not far from our North Westorn frontier. Your can now realise how close menace is threatening. I would, therefore, ask you all to always bear in mind that every rupee you contribute, and every man you send to the front, is a nail in the coffin of the enemy and takes us nearer the goal. My most earnest appeal, therefore, to you, my Sardars, Jahagirdars, and other subjects is that you should be prepared to face the evil boldly and courageously and to sacrifice to the last drop of your blood and to the last pie in your pocket in defence of your hearth and home.

Some pseudopatriots think that this is a proper time to make bargains and lay down conditions considering the deep debts we owe to the Brithsh Government have. I think no worst time could have been chosen. This is a time to repay, at least in part, that debt by giving wole hearted help, to strenghten mutual trust and mutual love and wield together in adamantine bonds, the ties that bind us to the Empire Government have but recently announced the constitutional reforms they propose to introduce. A hue and cry was raised that Government officials come in the way, but the proposed reforms have satisfied for the present all sober minded politicans and in my opinion they bear eloquent testimony to the generosity and sincerity of Government and their desire to see this country take her proper place in the sisterhood of nations, comprising that marvellous political organisation, the British Empire.

The scheme embraces also the Indian Princes and Native States and measures ared proposed to deal with them on more equitable and liberal lines. But they too have to realise that the liberalsing influences, that are at the root of the proposed reforms, will be felt everywhere and so will have to be prepared to welcome them in their State, It is now the duty of us all to make, not by words but by deeds, our appreciations to the beneficent actions taken by Government. This is the only right way to bring nearer the accomplishment of India's objective.

अनुक्रमणिका

Let me not Your Excellency, detain you long.Your visit is most timely and it will certainly heraten us to do the sacred work, we have to perform with all the energy and vigour we possess. I have faith in the Justice of Him that guides the destinies of the Universe and buoyed up by it, I trust, the day may not be distant, when the arms of the Allies will come out victorious form this deadly struggle for freedom, peace and tranquility be for ever restored the world.

In thanking you again most cordially for the honour done to me, I have to crave Your Excellency's indulgence for what may look like lack of enthusism on my part in the receiption accorded to you. Your Excellency knows the cause. I need hardly refer to the tragic domestic occurrence in my family which has cast a deep gloom over my whole State. Let me, however, assure, Your Lordship, that though the customary outward from and show are wanting, our welcome to your Excellency is none the less warm and hearty.

***

अनुक्रमणिका

Thirty seven

Foundations of social Justice

***

Your Excellencies, Colonel Harold, ladies and Gentlemen,

I should like to congratulate your Excellency on having brought with you the much waited rain. We have now a fuller water supply and the prospects are most hopeful. It is hope we may now have bumpers crops and a prosperous seasons and people will be happy and contented. Before proposing your Excellencies' toast, I trust, I shall be excused for referring to a most sad event, as it is uppermost in mind at present. I mean the sudden demise of my dearest friend His Highness Sir Bhausingh Maharaja of Bhavanagar. We have been friends since boyhood, when we were together receiving education under Mr. (Now Sir) Stuart M. Frazer, then our respected tutor and guardian. It is just a year since the loss of my young son was a heavy shock to me but the present shock is still heavier. What I feel most is that, I did not go to see my friend during his last moment, though I was called by him. No one thought that his end was so close. But it has pleased Heaven to take him away almost in the prime of his life. This is not the occasion to dwell on his various qualities of heart and head. Suffice to say that, his loss is not only a loss of Bhavanagar, but it is a loss also to the British Govt. and the void caused by it is not easy to fill. It is, therefore however, the will of providence to which we must humbly bow. In proposing to toast to your Excellencies, I take the opportunity of according my most cordial welcome to you to my capital, I have been looking forward to Your Excellencie's visit since

***

On the occasion of Dinner to the Governer Sir George and Lady Lord on 30th July, 1919

May last and felt very much disappointed when calls mare important prevented you from carrying out the programme of your intended tour, which had included a few days shoot in my jungles. But I could realise from subsequent event, how necessary was Your Excellency's presence then in Bombay. Indeed we shuddered to think what might have taken place but for Your Excellency's patience and for bearance and genuine sympathy for the people, which alone saved Bombay and I heartily congratulate Your Excellency on handling the situation with such tact and skill.

Your Excellency's visit at this time is most opportune. The signing of the Peace Treaty by the Germans has banished all fear of war, not only for the present, but let us hope for all time to

come. In bringing about this happy result Great Britain has played a noble part. It is worthy of her sons who have raised the vast British Empire, all members of it have shared the toils of war and India, including its Princes, have not lagged behind. My little State has continued its mite in men and money and naturally my subjects are jubilant at this time. At such a time of joy and rejoicing Your Excellencys' visit is most welcome. I should like to say a few words about what in my humble sphere. I have been trying to do to improve the lot of labouring and other backward classes that it has brought prominently in view. My principle has been to take care of the weak among the subjects more than that of the strong. Their condition has from the firs appealed to me personally, and it has been one aim of my administration to do level best, to cure the evil. With this end in view I have been labouring and for the last Twentyfive years I have been offering them special facilities to learn. When I assumed my powers, I found that they had no leaders. That was a great want-the evil of India is that each Caste looks after its own people-and they are indifferent to others. I, therefore, encouraged the different Castes; tailors, goldsmithes, Mohomedans and the depressed classes or untouchables as they are called, to have their own hostels. There the boys are looked after by superitendents of their own castes. They can study there free from the unhealthy influence of the great Delhi Darbar was taken advantage, and has its own influence of them. They treat all persons alike the rich and the poor, and those called high and low classes. I have of course to acknowledge the debt of gratitude, I owe to all Political Officers, of the British Govt. I have had to deal with, I may be permitted to make special mention here of the valuable help received from my old friend Col. Harold, whom I have the honour of the having as my Resident. I have a claim on him and he has been most helpful. I quite remember the old days when we went out riding and pigsticking all over my state. He knows this country and the people very well. I have however, one complaint to make against him, that whenever I go to see him, I find him at his desk and when I seek his advice he is fearlessly outspoken, and when I wrote to him letters which took me days to think about, I find that replies to them reach my hands within a few hours of the receipt by him. I afraid it is now too late in life for him to change.

I would not say much here about the reform scheme of Mr. Montague now before Parliament. It is sure to influence the Indian States. But if I may be allowed to express opinion at this stage, I would only say that I for one would hesitate to make any constitutional changes in any State in the direction of the reforms until the general level of education among masses has risen and is atleast partially equalised with that of the higher classes.

I fear, Your Excellency, I am detaining you too long, but cannot conclude without thanking Mrs. Harold most sincerely for all the trouble she has taken for me in looking to the comforts of the guests. Above all I have to express my feeling of deep gratitude to Lady Lloyd for the

honour she has done me in gracing this occasion by her presence. Ladies & Gentlemen, I now request you to drink to the health of our distinguished guests, Sir George & Lady Lloyd.

* * *

Thirty Eight

At the S. M. C. Chief's Conference

***

I have been always urguing, that all the Indian Rajas should be included in the council of Princess. The word 'chief' does not sound well in my ears. The obvious reason was that the word indicated tribal leadership which was not a proper designation for the Indian ruler who were in a slightly varying degree the Rajas or King of their own people. The inclusion of the Chiefs or Rajas would give strength to our cause and will enable us to put forth vigorously our difficulties before the Government. Ever since my return from Delhi I endeavoured my best that a Conference of this kind should be held to represent the claims of the smaller States to Government. I requested His Excellency, Sir George Lloyd to give us permission to hold such a Conference and His Excellency, very promptly and graciously replied to me stating that His Excellency's Government had no objection to the holding of such a Conference.

***

At the 22nd August, 1919 at Kolhapur

Thirty Nine

The Philosophy of Educationol Policy

***

My principle has been to take care of the weak among my subjects more than the strong. Their condition has from the first appealed to me personally, and it has been the one aim of my administration to do my level best to cure the evil. With this end in view, I have been labouring hard for the last twenty-five years. I have been offering them special facilities to learn. When I assumed my powers, I found that they had no leader. That was great want. The evil of India is that each caste looks after its own people and they are in different to others. I, therefore, encouraged the different castes such as Marathas, Lingayats, Jains, Tailors, Goldsmiths, Mohomedans and the Depressed Classes or 'Untouchables,' as they are called, to have their own hostels. There the boys are looked after by Superintendents of their own castes. They can study there free from the unhealthy influence of their homes. I have also opened a separate class for Patils. The occasion of the Great Delhi Darbar was taken advantage of and, in memory of it, this class was started to train village officers, and their sons for the duties of Patils and Talaties. These classes are proving more and more useful and the Talatis are working efficiently.

Different communities want different sorts of institutions. The Marathas would like to have a Sandhurst College, while the literary classes will desire to have an Arts College, but very few would care to go in for technical or industrial institutions. At present the money collected from all classes goes to support institutions

***

In 1919, during the visit of Sir George Lloyd, Govt. of Bombay to Kolhapur

for the benefit only of the intellectual classes. But I am for encouraging first such institutions as will be useful to all, and with this object. I have recently introduced the measure of free and compulsory education. That is essential for progress in every branch-industrial, Commercial, etc. Instead of applying their energy to institutions for secondary and higher educational bodies should I think, work hard for the spread of free primary education. It was my friend Lord Sydenham who agreed with and encouraged me in this measure. I am quite aware of the difficulties in the way of making primary education compulsory, but to make it free is not so very difficult.

***

Forty

To Sir S. M. Fraser

***

It is after a quarter of a century, Sir Stuart Fraser, that you have returned to Kolhapur and I welcome you most cordially. When I see Lady Fraser and yourself once more among us, happy recollections of the joyous time we had with you are brought back to me, and I feel as through that delightful period of boyhood had come back again. I consider myself very lucky indeed that you have been able to pay us a visit, short as it has been before your departure from India. It has given you an opportunity of seeing what fruit the pains you took with your pupil have borne. There is no doubt that Kolhapur has vastly changed since you saw it last. It is for you to judge in what direction the change has been.

During all this time it has been my earnest wish and constant endeavour to do everything in my power to educate the masses, to inspire them with a higher standard of life, to root out superstition and with it the causes that have led to the singularly artificial state of our society — the inqualities between man and man-that we see on all sides. The task is not easy nor the work light. The inertia of ages has to be overcome, and the old order of thing has to be changed out. What part I have played in bringing this about, at least partially, it is not for me to say. If I have succeeded in any small measure, the credit belongs to those who have heartily worked with me. Foremost among them is my beloved brother, Bapusahib, without whose help I do not know what I should have done. The social and religious reformer has also come to my aid, and I will not hesitate to

***

In Feb. 1920 at Kolhapur

acknowledge the great value of the work done by the Christian Missionaries in my state and especially by the American Mission. They have made men of the very dregs of society and have set a unique example of self-sacrifice and selfless devotion to duty. The object lesson cannot be lost on one who has eyes to see. This is not the place or time to go into details of the measures introduced by me to carry out the end in view. You have heard and seen enough to give you a fairly accurate idea of what is and has yet to be done. Before the latter the former is but a drop in the ocean. The great War has open our eyes.

The last four years have witnessed the fall of the most despotic autocradies in the world, and unless we in India profit by the lesson, worse evils may have to be faced by us, and that is

why I feel the crushing weight of the heavy work now before the Indian Ruling Prince, and I trust the moral fibre you have helped to develop in me may prove sufficiently strong to bear the strain.

* * *

Forty One

National & Rational Ideals of a Social Philosopher

***

I deem it an honour to be invited by my Maratha Brethren to lay the foundation stone of this Maratha Boarding. With equal enthusiasum do. I fulfill this very pleasant task. This tree has been planted as the result of the magnanimity of H. H. the Maharaja Powar of Dhar, the welknown patron of the Maratha cause. But I venture to say that it would not have flourished had it not been for the care of the gardener to whose charge it was committed. And why should an organization not flourish when it has secured the fostering care of workers who are not only selfless but who are self-sacrificing, dutiful and truth loving? The History of the Marathas amply bears out how the Patil class has done deeds appropriate to the times in and creditable to the community which they lead. In tose rough days of conquest, they have yielded to the none martial powers and in these days of peace they are carrying on their battle with ignorance the real enemy of the people. It is no mean credit to say that it is to such a reputable class that my friends Raoba Thorat of Vani and Dada More of Pimpalgaon Baswant belongs. The sacrifice and labour which these two gentlemen have undergone in the cause of this Boarding are too welknown to be toll. The list of sympathetic helpmates who have supported the cause also too long to be enumerated, I therefore, content myself only with expressing my respect for them and appreciation of their good work. However our Maratha Samaj, I take this opportunity to say, is far more indebted to Bhaoosaheb Thorat for his having permitted his son to be missonery in

***

On the occasion of Laying foundation stone of Maratha Boarding at Nasik on 15th April, 1920

the cause of his fellows even at the cost of neglect of his personal affairs. Verily as the seed is so is the plant. More than his our Bhaoosaheb is to be congratulated as the happy father who has realized in his case the natural desire of his kind that son should excel his father.

The policy of this Boarding, I am glad to say is worthy of imitation. Though it has sprung from the magnificient donations of the Marathas the time of the Maratha Educational conference it really speaks volumes for the patriotism and liberal mindedness of the organizers to find the Boarding kept open to students of all the castes. One can never succeed in adequately praising the efforts of those who come forward with full moral courage and with the true spirit

of satyagraha to practice the elementary principles preached by the *Sataya Shodhak samaj* that all people as the children of God are kith and kin. That this principle should spread as widely as possible is a consummation devotly to be wished; for none can doubt that it is a spread that will be greatly instrumental in bringing about unity by toning down angularities of the castes.

At one time, I confess, I was conservative and as an upholder of orthodoxy believed in the perpetuation of the caste system. The idea that thereby I was obstructing the progress of others never occurred to and I even felt it dangerous to my religion to preside over public meeting of other castes. Nor do I like even today to preside over public meetings of the particular castes. But the reason in the two castes are as distant as the poles. To preside over caste meetings was to me in early days an irreligious act. Now I do not like to preside over them because I fear that thereby I am committing the sin of strengthening the caste-feeling.

To the leaders of the different Communities; I have only one message to convey. Do not be short sighted. Have a vision of the future. To dissolve castes is a necessity. To uphold them is a sin. Castes are obstacles in the path of the Common advancement of us all and our duty therefore is to remove it with all the courage we can muster. Hold your caste-meetings but ignore not the point that they are only a means to an end. The end of our caste meeting is to end the castes. Let not then your caste-meetings help them to mend.

High class people never tire of stating that the caste system is not only natural but is also essential to the stability & progress of society. But it needs no intellectual effort to discover that those who thus argue are interested in keeping the social prestige of themselves and their progeny, that the caste system does not exist on any other planet of this universe may not be a safe statement to make but it can certainly be asserted without fear of challange on this earth. The age-worn slavery which this country has fallen a prey to, is the direct result of the age-worn caste system. He would indeed be a bold person who could say that the caste has made more than marred the fortunes of this country.

Unity is out of the question when then the people are divided into impervious compartments. For a time, to gain an object they may transcend their social boundaries and be one; but the cohesion cannot be lasting. There are some who argue that what is necessary to abolish is not the caste system but caste enmity. If such who argue in this vien are really unsophisticated we can only pity the poor understanding, for caste enmity is the effect of caste distinction. To avoid this effect the only remedy, I see is to remove the cause.

Caste enmity is an old disease corroding the life of the Indian people. Parashuram's act of annihilating the Khastriyas or the Peshwas' act of ploughing out the house-plots of the Non-Brahmins of the Brahmins calling the Maharaja Shivaji and the Maratha warriors, who secured to them their tails and treated as Sudras? To abolish caste-enmity we must first abolish the caste system. Let us then abolish it and be one.

I am often accused of formenting caste jealousy under the pretext of breaking the caste system. This is a baseless accusation. While charging any opponents, I do not entrench myself in pride of my caste, neither in the reversed name of Shivaji Maratha or in the sacred precints of religion, On the other hand such as entrench themselves in this way are to me contemptible. My only fault is that to such as have fallen out or rather thrown out from the common march of progress. I hold with love equal to what I bear to myself or to my community and lead them on their proper place in society with as much effort as I can make. I do this because my conscience dictates it to me as my duty. If the depressed are not elevated in time I am afraid they will be crushed under the grinding stone of castes. Does it not therefore follow that to support the depressed castes is not the same as encouraging enmity among castes?

It would be the happiest day of my life when we shall cease to reckon men low because of their birth. Disbelieving as I do in the caste system I have gone against in the public. But as my efforts have not succeeded in dislodging it from the anclent moorings it has found among those who are around me. I feel, I am ill-fitted to preside over this meeting. Many foolish people have I met who regard their follow men and women as low as the brutes. But what I am most surprised at is that-few among them are ashamed to call themselves their well wishers and leaders.

The unity of Japan was promoted when the *Samurai class* relinquished its dignity of birth. It is not time that the Brahmins of our country follow them? It is at least the duty of the Khastriyas to help all in their onward march of progess. The sanctimony of birth which elevates the Brahmins above the rest of us can no longer be celebrated. We must establish an equal start at birth for us all. To do a way with the differential advantage which the Brahimns enjoy, we must to longer call them to officiate in religious ceremonies. Nor should we listen to the professional Brahmins expounding the religious books or addressing his sermons; for they only serve to strengthen in us the feeling of reverence which is inculcated in us and which is our duty to eradicate. The fact that Rama and Krishna who are our ancestors are defied and worshipped by the Brahmins incontrovertibly proyes that Brahmins are lower in order than the Khastriya. Better it would certainly be is in view of such instances the Brahmins unlearned their apphistry. Leaving them however to themselves to rebel, pardon me for plain speaking, I

say we must never slaken the efforts. We are making to dethrone the Brahmins in order to entbrone the Indian nation.

If the Brahmins choose to beat me in return for the love I bear them it would be treachery to myself and to my cause not to pay them in their own coins. It is on condition of their good will to me that I am prepared to let the Brahmin's officiate in religious ceremonies performed in my household. Any breach of this condition will compel me in righteous indignation to replace the Brahmin priests by the Marathas. They will deserve my partronage so long as they treat me as man. They will forefiet it the moment I find that they treat me as a brute.

The editor of the *Lok-Sanghra* I confess, posses learning and wisdom in a proportion greater than I can lay claim to. That, therefore I should respect his learned authority is only proper. However I regret to say that he has misconstrued my position. It would have learning if on perusing my speech as a whole he had brought to my notice the errors I committed therein. But I can't agree to submit to his dication as to wherein lies the path of my duty. Love begets love, jealousy begets jealousy. Even unintelligent brutes return love for love, I am a sportsman and I can recall how my African tiger returned to me from where I had left it in the Jungle two hundred miles away from Kolhapur. But for my love would he have returned? If I had treated it unkindly he would have been glad to run away or would have recalled and done me barm. This is certainly not a very deep philosophy for the ordinary run of mankind much less for those who by virtue of their education claim for themselves the leadership of the people. But what feel of moral election it can create to call others low and untouchables is something which passes my comprehension and I may say the comprehension of all sensible people.

It was poor people who suffered in the riots that book place in Bombay, Sholapur, Ahmedabad, Amritsar and Lahore. Their educated leaders who mad catspaw of them were safe. The masses were too ignorant to understand the cunning of these leaders. I have too great a respect for Mahatma Gandhi, Dr. Satyapal and Kitehlu to say that they of purpose engineered these riots. The blame that is thrown at their doors is due primarily to the mistakes committed by their lieuteuants. I request my critics like the editor of *Rajkaran* that they should print the whole text of my speech and they deem worthy of comment. To print a few quotation from a speech detached from their context is to deliberately give a chance for misapprehension and misconstruction. Such a request may be too much for the editor of th *Rajkaran* for if he consents to adopt it as a rule for the future. I am afraid he will find very few occasion to comment upon.

The lives of great men in Europe or India bear testimony the necessity of abolishing the artificial distinction between man and man. The lives of Luthar or Shivaji convey to us the same lesson. Shivaji made Marathas, of Mohomedans and shocked out the sense of

untouchabilty by entertaining the Mahars and Mangs in artillery and cavalry. Badashaha Akbar the Great, was our true 'Mahatma'. He brought about unity between Hindus and Mohomedans by marrying Jodhabai a Rajput Hindu Princess. He allowed her to remain a Hindu and arranged for her offering secred water to the Sun at the cost of lakh of rupees. The fort of Agra bears testimony to this and shows that what is considered impossibls in the 20th Century was easily brought about in the 17th Century by a Mohomedan Emperor. With the object enlightening the masses, the British Government has kept the educational institutions open to peoples of all classes. We can find no parallel even in *Ramraj* to the immense opportunity which is given to us of taking education since the reign of Queen Victoria and Her decendents Notwithstanding this the ambrosia of learning is sedulously kept in the hands of the Brahmins, Naturally the Greatest clamour for Home Rule originates from the Brahmins and equally naturally do they call those who are clamouring for communal representation so that the devolution of political power be accompanied by its distribution, as the enemies of the country.

I am proud of my subjects having achived credit in one particular respect. Their example has been copied elsewhere. With a just sense of pride the British people call the British Parliament 'The mother of Parliaments.' In the same way Kolhapur has, I venture to say, deservedly come to be called the mother of Student's Boardings. There are Boardings of Marathas, Jains, Lingayats, Saraswats, Mohomedans, Daiwanya, Panchal, Shimpi and Kayasthas. There are institution such as those of the *Arya Samaj* working on the principle of equality and fraternity. To crown ail these is a Boarding of the untoucbables with a regular programme for removing untouchability, Some deserving members of the untouchables have been granted *sanads* to practice as Vakils. Kolhapur has only taken a lead in abolishing artificial distinction between man and man but has also taken a lead in equalizing the status of men and woman in our Societies. I cannot let this occasion pass without paying just tribute to my beloved subject.

To give all people a chance to advance in social, industrial, educational and administrative matters and learn to discharge their due share of responsibility is what I call communal representation. I deem it my duty to help and encourage those who have fallen behind and accordingly I do lend a helping band to those who are downtrodden. Parents do not see much necessity to look after such of their children who having become of age are able to take care of themselves. They pay more regard to such of their flock as are undeveloped and cannot stand on their own legs. To some of these only give their support and others they carry on their shoulders. This is apparently a case of dicrimination; but only fools can blame such parents. I do nothing more than copy such wise parents when I give greater facilities and greater encouragement to the backward and the depressed classes. I have liberally entertained them in State Service, given them *Sanads* to practice and having directed them to

the fountain of learning. I cherish hopes of their early salvation. I feel it an injustice to see my efforts in the cause of elevating the Non Brahmins interpreted to mean enmity to the Brahmins. Some Brahmins who are professional politicians argue that communal representation is near way of dragging back the Brahmins from their advanced position. This is plainly a mistake, we acknowledge the eminent place which our Brahmin friends have reached. What we urge on them is while you can run, we can hardly walk, for we have not yet learned to stand on our legs. To save us from the trouble of walking you are pleased to carry us on your shoulders. We thank you for this kindness; but pray consider that effect of your kindness would be to make us perpetually maimed. If yon do not let us learn to walk through trial and error we shall never learn to do so. Admire and encourage us while we are rising and falling in our efforts to walk but put not obstacles in our way. Our endevours are motivated by our desire to stand independently without a support. Therefore do not misunderstand us.

Another accusation levelled against me by some newspapers is that I am absolutely against giving any self-Government to my subjects. This is again a pure myth. In the speech on which this accusation based, "I said But if I may be allowed to express an opinion at this stage I would only say that I for one, would hesitate to make any Constitutional changes in the direction of the Reforms until the general level of education among the masses has risen and is atleast partially equalized with that of the higher classes" This does not lend any support to the accusation that I am opposed to giving Self-Government to my peoples. What I said was that I could not look upon the devoution of political power as safe before the voters of all the castes were educated enough to understand their civil rights.

In this country of ours where the reign of castes has a poweful sway on the mind of the people and where 70 to 80 p. c. are illprepared to understand exercise their rights and duties I venture to say that political power will fall into the hands of a single caste. How power in the hands of self-interested persons only serves to what theit natural desire to oppress others is aply borne out by history. The ancient struggles between the Aryas and the Anaryas or the more recent struggles under the *Peshawai* are evidence pointing in the same direction. If opportunity for self aggrandizement turns good men into bad ones how very necessary is to provide aganist political power falling into the hands of those whose trade has been to keep others in slavery and who have given sufficient indications of their desire to continue it. Such is the Spirit of what I said. You know too well the policy and the cunningness of the *Kesari* and its broad. The *Kesari's* argument to extend the school buildings and to make them airy before making education compulsory is sufficeint to irritate any honest person. No cake to a few until all are served with bread is the the principle of the English Labour Party. In India 90 are starving while 10 are feasting. Those who urge that ghee be provided to those who are feasting before any condiments are served to those who are feasting before any condiments are served to those who are straving strangely betray their anxiety for the masses. I fell to

understand how people are not ashemed to an express on to such damagable utterances in papers and in the public that Legislative Councils are no places for the Lingayat to exhibit his skill in weighing the balances or for the farmers to show his skill in ploughing.

I disapprove of the transfer of power from the hands of the British into the hands of snch a small community as the Brahmins. Do not be blind to our Social history. In fact it is difficult to forget how the Brahmins withhoiding education with which they enriched themselves from others struggled constitutionally to keep them in subjection. Free and compulsory primary education is the only invigorating tonic that will enable the lower classes to throw off this incubus of the past. I have commenced free and compulsory education in my state and I have no doubt that the next generation will be illiterate generation.

While I lay great stress on primary education I have not neglected higher and collegiate education. My state is smaller than such districts as Satara or Belgaum and yet there are seven high schools in existence and two more will commence their life very soon. At the top of this all there is a fulfiedged college.

You will no doubt understand that my efforts after education are motivated solely because I am most anxious to give sel-Government as early as possible to my subjects If all my subjects had reached the literacy test of vernacular third I would have very cheerfully handed over to them the responsibilities of Government and retired on pension sufficient to maintain myself. The whole burden of peace, order and good Government rests on my shoulders today. The subjects are responsible for the due payment of the revenues will belong to the subjects. But my subjects must be partially if not wholly fit to take such a responsibility. In other words I believe that the entire population must have reached the stage of primary education before a section of it is provided with advanced education. When the whole mass of the people are drenched in ignorance while only a small section of it is welleducted any devolution of political power will fall in the hands of the educated, such giving rise to home-made bureaucracy. The administration of such educated beauracrats is of our knowing. The Peshwas through the mistake of Shahu Maharaj got a chance to strengthen their position but the result of the Peshwa's rule was the imprisonment of Shahu and the fostering of caste-spirit. It was under the Peshwa's rule that the untoucbables had to walk with a pot tied to their neck and a sweeping broom attached to their lions, None can wish the return of such days and the best and only effectual way to prevent their return is to educate the people before granting them political power so that they may know how they use it and be prepared to guard against its misuse.

When the son is grown up to take charge of the household it is our old Aryan rule of life that the father should retire. In consonance with this ancient rule I mean to retire. on pension when

my subjects have grown fit to take care of themselves. I am hopeful that this consummation which I devoutly wish for will be realised before too long. Least what I have said my may be misconstrued, I hasten to make plain what I have been saying so far. I am of opinion that the two wheels as well the yoke of a cart must be strong and stable before we can expect it to run its course smoothly. By the new reform act the political power in British Districts will be divided between the civil service and the representatives of the people and it is provided that the power kept in the hands of the civil service will gradually pass in the hands of the representatives of the people. I am afraid such a diarchical systm of Government will be ill-suited to the conditions peculiar to the Native States. There the power will be divided between the Subjects, the civil services, the Ruler and British Government. It would not do to divide power among these and let it pass gradually into the hands of the people. I am desirous of entrusting my people with full and complete power as soon as they are advanced to understand its exercise. Till they grow up to this stage I feel great anxiety in handing over any political power for it may be monopolized by the few to the disadavntage of the many. When the subjects are in possession of complete self-Government the ruler can but be its guide. The subjects of the Native States will then be responsible to the British and not to the ruler. Such being the difference in the two situations it would be dangerous to copy wholesale the British plan of political reform for application to the Native States.

Whether political reform should preccde social reform is a dispute which is attended with more heat than light. The two are as closely connected as the wheels of a carriage. That you can never succeed in driving a carriage safely if it rests on one wheel only is a common sense In. fact, those who pleads for political reform only and pay no need to social reform or deny its urgency give sufficient reason to doubt their motives. It would not be a miss to call them carfty and cunning. It would have been better for the British to have fostered strenuous the spread of education among the masses before granting them self-Government. But while there is no use in crying over spilt milk, I urge those who claim themselves to be the leaders of the people to follow the noble example of my friend Raoba Thorat and utilize the political freedom to emancipate those of their Brethern whom they have held in subjection for untold generations.

The reign of Queen Victoria brought happiness and prosperity not only to the British Empire but also to British India. I am confident that the reign of our Emperor George V will not only bring us the days of greater prosperity and greater happiness but will also bring us the days when we shall find that every Indian is the equal of his fellow and that Indian society is so organized that worth and birth not is criterion of eminence and respect.

Before closing, I wish to offer my hearty thanks to Mr. Damle LL. B; the welknown editors of the *Rajkaran* for his having pointed out my errors of commission and omission. I entreat him

to be my instructor for he has age with the benefit of experience. I cheerfully grant him the palm in equcation and his zeal for the advancement of our country. Politics is his pet subject and his daily life is spent in the company of men who are trained politicians. On the other hand I have spent almost the entire span of my life in breading horses, in hunting and wrestling and other pursuits which mainly promote the physical welfare. Obviously, I am a stranger to politics. I entreat Mr. Damle to redirect my mind to the right path when I am found to be amiss. I follow in act and in thought my honest convictions, You may call them prejudices; but I venture to think that in these days we enjoy the right of free speech. I request the Editor of the *Rajkaran* and other lovers of our country that they should take an active interest in me and guide me to the proper path when I am really going wrong.

Fourty tow

Aboliation of Untouchability

***

Friends,

I am thankful to you for your kind invitation and I am extremely pleased to meet the society you have organised. It gives me considerable relief to find that the leaders of your Community have recognised in time that education alone will endow the communities which they lead with power to survive in these days when the struggle is so keen and so extensive. If you people, poor and oppressed, are to rise from your depressed conditions the work of elevation must be undertaken by leaders belonging to your communalities. Self-help is the key to success in all struggles. From this standpoint such of your leaders as do belong to yourselves cannot be too adquately congratulated.

On such an occassion, I feel it my duty to convey to you with a free and open mind my views about the ways that will ultimately lead to your betterment.

I cannot adequately impress upon you that the most important condition on which your social uplift depends is the stability of British Raj in India. The British Nation is the source of those elevating principles of equality, liberty and fraternity for which you have been carrying on your struggle against your own countrymen. Familiarity had made us unconscious of the importance of the British power in India, but the war has set us in right mood and we have now come to know what a vital condition the British people are in our well-being.

***

Address at the Depressed Community Conference at Nasik on 16th April, 1920

If there were no British power, millions of our countrymen would have starved as a result of our being dragged into the war. But the shield of the British power under which we have the good fortune to live protected us not only from foreign invasion but also from the pinch of want. Such is the protection we enjoy from it. You must therefore be loyal to it and not only wish well of it is all greatfulness but you must help it in peace as well as in war.

Being a ruler of a Native State, I am often reproached for speaking in British territories. My first submission is that I am not here as a ruler of State, but I am here as a friend and servant of the millions of my countrymen whose conditions will excite pity in any one who claim a

human heart. In that capacity if my countrymen approach me to solicit my views on any subject I think it would be a serious breach of decorum to be silent or withhold them. Secondly, the Native States are inalienably interwoven with the British territory. As subjects or as treaty-holders we are bound to the British Empire, and as such there are many interests that are common to us all. I am therefore of opinion that by interesting myself in problems affecting the interests of us all I am not singing. In fact, I regard it my duty to be so interested.

The social differences are based upon mere accident of birth. find no sanction from religion in any other country except ours. The ugly aspect which these social distinctions wear is most plainly reflected in the treatment which has been meted out to you by men of the higher castes. Is it not a digraceful thing that you who are our breatheren should be regarded as untouchables and should be treated in a way far less respected than cats, pigs and dogs? The principle of untouchability, I venture to think, is a recent addition to the religious scriptures which govern the life Hindus. For in this very place of pilgrimage where we are assembled today the bathing pond of the Mahars is situated in the midst of the ponds of the different communities. Of course it is impossible to observe untouchability in such a situation.

Notwithstanding this, is it not shameful that in ordinary life we should observe untouchability and deny you the benefits of full and complete social intercourse? It is only when the higher castes, in our Hindoo Sociey repent for this social crime that there will grow in them the true spirit of partism. It is them only that the educated classes guided by the spirit and love for their country that can be expected to tender you any permanent help.

At the time I was invested with ruling powers I found Kolhapur dominated by the educated people of a single caste. There was not a single educated persons in the civil service belonging to the backward classes. To raise their status I felt it but proper to adopt the policy of entertaining them in a liberal way in the civil service of the State. I gave deserving ones from them *sandas* to practise, instituted special Scholarships for their education and established boardings to help the students. The good results of my work along this line for the last 25 years are just appearing on the horizon. The backward classes other than the untouchables are advancing slowly but surely. Their position is akin to that of a child just learning to walk. But you people are like a child that has not yet learned to balance or stand. It is because of our helpless condition that my attention is directed towards you. My policy has been to encourage you and help you along all the walks of life. Your own class-fellows who are my subjects will tell you what I have been doing for your uplift in my own State.

The Poona papers have most mercilessly tortured the little speech I made at the Conference of your people recently held in my territory. That those who conduct these papers should waste their valuable space and time in commenting on a speech from such an uneducated

person like myself is indeed strange. But I am afraid they have misrepresented me. It may be that my inability to express myself clearly owing to want of command over the Marathi language may have given them occasion to misinterpret my views and to paint me as the pivot of a movement engineered to drag the Brahmin back. I disavow this credit given to me; for, I confess, I have no merits to occupy he pivotal position they are pleased to credit me with. However the main theme of what I said at the conference was to impress upon the audience the important point that no religion on the face of this earth sanctions such an institution as the castes except the Hindu Religion. On that account, as I said in the Marathi Conference, that we ought to abolish the castes, which has been the cause of many social struggles and will *Parasuram* killed all the *kashriyas* in the interest of the Brahmin but Rama and Krishna the representatives of the Kshatriya class have in their turn their worship on the Brahmin avatrs. Even though the Peshwa overshadowed Shahu Maharaja, the Maharaja Pratapsingh came to his own at the end of *Peshwai.* I am convinced such social upheavals were ultimately provoked by caste-feelings. My earnest advice has always been to build the structures of self-Government of foundations firmer than those of castes. I therefore repeat my convictions that self-Government without social union is undersirable and will be unstable.

A few days ago, I had an occasion to visit St. Columba Scotch Mission in Bombay and I am an old friend of the American Mission, Miss Sutherland. Dr. Whail and Dr. Wanlace have crossed the seven seas to give our people life and education from selfless motives caring for no more than the mere necessaries of life. To cause us no offence they have even adopted our ways of living and even our diet. Such strangers who are maturing our body and our mind are indeed holy persons. We do find a solitary instance of Mr. Gandhi who can match them. But how many institutions like the foreign missions can we boast of which are helping the cause of the oppressed and the diseased with a selfless motive working on the principle that 'to serve mankind is to serve God' Some papers have misrepresented me in what I have said about Mr. Gandhi, Swami Shradhanand, and Mr. Gandhi and Besant are indeed holy persons. But I believe that holy being like all human beings are not infallible. Mr. Gandhi I am sure will not be resentful for what I have said for he is candid enough to acknowledge his own error. However Mr. Gandhi is solitary instance of a personality that claims our tribute of love and respect. But when we take into account the leaders of ordinary caste it is but proper that before we own them we should examine their ethics and Maharashtra a flood of sympathy proceeding from the educated classes for the Depressed classes. But the same sympathisers never fail to make their woman folks their excuse for not doing such cementing acts of social intercourse as interdining. None however can believe that the women of India who practised Sait for the sake of their husbands will obstruct them in such a harmless act. In fact to blame the women of India as an obstacle to interdining is to do them great injustice. One is therefore thrown upon want of moral courage to practise the principle or secret opposition to the principle itself as the only excuse for not interdining. I therefore ask to ponder whether you

can gain materially from the lip sympathy from such cowardly leaders. It was one of such educated Bramhin leaders who the other day said at Nipani that he was prepared to interdine with the untouchables if that brought about self-Government, How much sympathy do you think he has for you who lays such a great condition for a trivial act such as dining with you? My sincere advice to you is not to depend for your salvation upon the good will of such pretenders but to take up the task of educating your men and women on your own shoulders. Our educated high class people feel indignant for the special efforts that are being made in my State for the elevation of all the backward classes. If all agree that there is some sense in the procedure of doctors and lady doctors to give more nourishings food to the weak and the sickly child so that he may come to be in a line with the robust. I don't see why I should be blamed for applying it is the case of the untouchables. Some Poonaties alleged that I have adopted this is discrimination as a convenient means for advancing the cause of my community. I deny it as a false allegation. I swear that I will never do anything disgraceful to the line established by the Maharaja Shivaji. My efforts for the elevation of the other communities is would be improper to interpret as a reflex of the jealousy of the Brahmins Many of my trustworthy officers and advisers are Brahmins. Many Brahmins enjoy *Inams* from me. I am sure my Brahmin subjects will testify that I have not neglected their interests.

In my speech at Mangaon I expressed my desire to give self Government to my people on a small scale in a shor time. An Editor has invited soothsayers to forecast specifications of time and scale of the self-Government I promised to my subjects. Most gladly would I have furnished the specifications asked for were it possible to do so. But as I said in the assembly of the Marathas, this is a complicated question of the multiplicity of interests and I regret, I cannot announce an early decision. The other day in the Provincial Confercnce held at Sholapur a speaker said that if the high class Hindus desire they can remove untouchability in no time. I should here like to raise a query as to why this easy affairs which can be done in no time is not done yet? Or can any one product the day of its consummation? A leader once extended his sympathy for the untouchables by stating that he had once made room in his carriage for the Ganapati of the shoemakers. I ask why he not thrown off his caste prejudices publicly so far? And when is he prepared to do so?

It augers well for the future that notwithstanding such leaders the Hindu Society is gradually loosing its faith in untouchability and my subjects will deserve self Government to the extent to which they show themselves prepared to treat one another with brotherly feeling.

While reporting the occurrences in the dispute of the extremists and the moderates the other day at Sholapur, an editor has referred to a purse of Rs. 3,000 sent from Poona or Kolhapur. In case, he ment thereby to suggest that I had sent the purse, it is a pure invention, Nothing will be gained by insinuating that I am a coward when I avow that I have sympathy for the

backward classes and would not take back to help them in a case the Justice of which I am well convinced.

Such is the affection which a section of the vernacular press bears me, I am uneducated and do not possess even a quarter of the learning possessed by these editors. However I do what I believe. Love or resentment matters me not.

In conclusion, I say to you, continue the sacred work you have undertaken without flinching and I feel sure that God will help you on to its ultimate triumph.

***

Fourty Three

Religion & Caste System

* * *

Mr. President of the Reception Committee and Gentlemen,

I feel extremly proud of myself when I find myself to be called to preside over this conference without having obtained my previous consent, I am glad to find you look upon me as one among yourselves though once upon a time I did not cherish much love for you but I recognised my error, believe me, gentlmen that I shall even continue to love you. I am afraid your choice of a President has fallen in a wrong person, for, I am really not learned enough to guide the destinies of this Conference. There are many self intereeted people, who make a false pose by perfering good will and love towards those for whose interest they are really indifferent merely for sake of aggrandizement. My only prayer therefore is that God may never grant me such a mean mind. Today we have before us the enlightened mind of the untouchable; I know you are not such. I have used that term simply because it is in vogue. You are not untouchable, on the other hand you are the members of the Indian Nation more intelligent, more selfsacrificing far more heroic and will disposed than those who have the never to address you as untouchable. We must work with the firm conviction that we are bretheren of the same status and that we have the same common rights which each of us must respect. Those who play a false represent nobody but myself and it is my hope that my relation or my

* * *

At the all India Depressed Classes Conference at Nagpur on 30 May, 1920

rough can no longer deceive the people home experience has taught to detect the true from false. Though I have been called to preside over this Conference, I say that I am not a leader of any community nor I desire to be such. On the other hand I dissuade those who follow me on the false belief that I am their leader. My thoughts and my acts friends should not imitate me without a proper consideration of the pros and cons. I allow them in such matters full scope for self-determination.

We, who are Indian fellow subjects, no matter to what caste or religion we belong, must never forget that we are all Indians. Religion may be a matter of some concern from the stand-point of individuals but it must never be a hitch in national affairs. The most commonly accepted definition of religion is that it is a path leading to the Almighty. But just as in most

metropolitian cities there are various roads that lead us to the same point, similarly the same common object in view. If the simile be true that religions are but different roads that lead us to the same goal one really wonders as way people who have the same object in view namely to see God should hate each other simply because owing to difference in circumstances they happened to choose the different path. About the circumstances from which originated these diverse religions one can only speculate. But since none can vouchsafe that he has reached God by following one particular religion it may be safely said that none has a right to plead dogmatically that his relgion is the only true religion and that the rest are false. Mercy is the true basis of religion. Selfcenterium leads on to degradation, says the Sage Kabir. Thus it follows, that the true religion consists in serving your fellows and to find god in man and respect him. On this all religions agree. All preach that doing good to others is vertue and doing ill to others is sin. When there is thus an agreement on the fundamentals among the different religions it is really an error that their followers should hate one anothers. There were many wars fought in this country but they were all motivated by ambition of secular dominion. The great Akbar or great Shivaji were fought not for the sake of religion or caste. Many Marathas, Rajputs and others Hindoo Officers and heroes flourished under the patronage of Akbar. Similarly the armies of Vijayanagar and Shivaji counted many Mohomadens. All of these never seceded from their integrity and honesty even when they were led to fight against their own kinsmen. I have above indicated the true essense of all religions, and I am convinced that a nation which acts up to it insures its progress. But we who have served from all true essence of religions and instead of respecting every human being as an image of God have declared a large portion of our common humanity lower than the brutes on the strength of the *Poendo Shaitras* can never expect the Almighty to help us on no matter who hard we struggle to propitiate him by prayers, by sermons, reading the Pooranas or going no pilgrimage barefooted or by falling prostrate to him. We cannot win him by such false means. On the other hand we are sure to incur his displeasure. The only way to ingraciate ourselves into his favour is to treat his children with equality and fraternity.

The establishment of British Government is a boon to India and specially to the untouchables therein. In place of the Laws of Manu which were intended to uphold the superiority of one particular caste we have today in India Legislative inactments which recognise the principle of equality before law. To promulgate that Brahmins should not be hanged and that in all religious ceremonies they should be treated equals of God and to declare that the rest of the low humanity is the only for service of the Brahmins is the negation of conscience. In fact, persons imbued with such notations can hardly be included in the category of statemen without feeling of shame. There were once in India laws, which prohibited a certain class of people from reading the Yedas, and those who did read them were meted out such cruel punishments as branding and burning their eyes. We must be thankful to the British Government for doing away with such inhuman laws. However there in much to be desired by

way of reform in the Hindoo law. the sense of nationality and the sense of progress have penetrated the Hindoo Society. Our nations about marriage, foreign travel, tolerance have taken a firm root in our minds. We, therefore need to give these notions a legal backing if we desire that the Hindoo community is to progress. The British Government declared equality of all before law and the British missionaries inaugurated the principles of fraternity by their kind treatment to the untouchables. The Government of Holland and Belgium are negligent of the interest of the people who are living under their suzerienty. On the other hand the British people are offering us self-Government even when there are many who oppose such grant. Obviously we must be thankful and loyal to the Empire which is guided by such nobel and highminded statemanship. This country owes a great debt of gratitude to the British people. It was a recognition of this fact that the Indian people without distinction of caste and creed mustered strong to help the British Raj in the recent war. I take it that it is Providence which has made us a part of the Empire.

The untouchables of Madras are mated out the most inhuman and cruel treatment by their co-religionist. That the madras Brahmins treat the non-Brahmins most unjustly is notorious. We must therefore be all gratefull to the late Dr. Nair for his efforts to saturate the non-Brahmins to the sense of self-respect and the sense of their rights. He worked hard for the elevation of the Panchmas and all his domestics belonged to that class. I cannot let this occasion pass without mentioning Sir Shankaran Nair who has always taken a very kindly interest in the elevation of the depressed classes.

I am of opinion that the slavation of this country depends upon the abolition of the caste system. It is therefore the prime need of the time that there should be inter-marriages on a large scale notwithstanding the opposition interdining. Before we can expect a wide spread of inter-marriages we must first of all change the law which at present declares the posing of such marriage illegitimate and deprive them of the right of inheritance. The Hon'able Mr. Patel's Bill in the Supreme Legislative Council was therefore a necessity. No doubt that the Bill would have resulted in lowering the dignity of the Brahmins. And the Bill therefore has been most violently opposed by the Brahmin Section of Press. From the standpoint of the Brahmin interest it is natural that they should oppose the Bill. But they ought to have realised that they were sacrificing the larger interest of the country. The orthodox party finds nothing wrong in living together of a man and womad as husband and wife. But they would object to the solemnization of the ties by religious ceremonies so that such acts may be elevated to the dignity of a moral act. By with holding the religious sanctions they have been unconsciously acting as the enemies of public morality. I cannot help citing by way of illustration the instance of my friend Mr. Arundale. His marriage with a Brahmin girl has brought on him the warth of the orthodox Brahmins. If we look at the event with an unprejudiced eye we shall have to say that the more of such incidences the better I do not like the self-seeking policy which leads us

to join others in so far as it leads to self aggrandisement, but which leads us to part company with those who were our former friends. There are many who complain that expensive marriage ceremonies drain off the purse of the people to channels away from such as are socially of the greatest importance namely Education. But these very same people will not consent, to have marriages sanctified by the most economical methods of registration. The unregistered Hindoo marriages are not legally recognized. This leaves a legal way to a married Indian to marry in England or in France according to the procedure prescribed by the laws of those countries. There are many who have availed themselves of this opportunity and have thrown their once devoted and dutiful wives into the abuse of shame and misery which is the lot of many an Indian widows But such a situation weighs nothing with the orthodox party. Registration of marriages would no doubt put a stop to these ignominious ways. But it is because registration would open a royal road to inter-marriages that we find the orthodox party lined against it. It is argued that it is improper that the progeny of mixed marriages should share with agnates or congnates superior in status or dignity. But this is a lame excuse. It is strange that those who bring this excuse forward are tolerant of the existing law which allows a Christian convert or a Hindoo who has married according to registration to share with other Hindoo coheirs. The Patel Bill will be agreed level for uplifting the down trodden communities of India. We must therefore be grateful to the supporter of the Bill.

That we can see a straw in the eyes of others but not mole in our owa is a proverb which we often experines in our life. The Brahmins Who for the last ten or twenty years are spreading treason in the Indian people by deluding them into the false belief that the British people are looting India feel no shame in writing the British Government for putting a stop to the activities of the *Satyshodhak Samaj* whose main object is to expose the falsities and crudities of the pooranas.

I heartily subscribe to the saying of the Sage Tukaram that we should respect him who practises what he teaches. Consequently, I have a positive dislike for deceitful people who while they outwardly make all shows of sympathy for you engaged in the mean occupation of retarding the noble work of your elevation My recent speach at Nasik has been subject of adverse critieism. Personalty, It amuses me. It is indeed shameful that people who say that they know nothing about Kolhapur affairs personally and that they have derived all the information by hearsay should say anything without weighing their words or give their own construction without submitting the evidence. Therefore I know that the main object of such unmeasuree bombast and stump oratory is to terrify every one into a submission to the established superior rights of a particular class. I, on my part, pity the upholders of such an oligarchy when they boast of themselves that they are the leaders and the well-wishers of the people at large. Such obsurants can never be expected to lead the movement of social reform. Crows can sec only the wounds. In like manner these obscurants only see what may

be called the cost of progress. I am criticised for giving Sanads to some befitting members of the untouchable communities to practise as Vakils. Some classes in india have inherited the notion that such occupations as the medical or legal atc. ere their exclusive preserve. There is no dispute as to the principle that there should be right man in the right place. But the principle must need be modified to suit changes in the times. Even the British Government in earlier times for the sake of giving political education offered to persons of lesser qualification the post of Collector or Judge. Even diplomas to practise were given without examination to persons possessing general knowledge. Even today we find in British India Attorneys, persons who have not passed regular examination even though the number of such as have passed is by no means scanty. If the diplomas which gave to the untouchables had been given to Brahmins, Kayasthas or Saraswatas it would have provoked no comment. In fact, it did not provoke any comment when the candidates belonged to latter communities. That a similar treatment to candidates from the Marathas or the untouchables should have caused such an uproar is a patent sign of the nobility of mind of my critics. The Brahmin community is considerably perturbed to find matriculated Mahars and Mangs forcing their entry into the higher occupation which were hitherto closed against them. They would have felt nothing wrong if the Mahars and Mangs had been Cbristation. Most of the Native States confer diplomas on candidates of higher communities who are much below the Mahars, Mangs, whom I turned Vakils in point of education. But I have never heard any one complaining such an act. My main object in giving these diplomas was to open the lega occupation to the untouchable community which by force of custom was hitherto closed against adverse circumstances. My experience as a sportsman tells me that a horse drinks only when he is shown the water. I argue by analogy that these backward classes must be shown the opportunity in order they may learn how to create an opportunity. I am convinced that these people are not devoid of natural ability. What they are in need of the opportunity? If proof be wanted ther is no paucity thereof. The eminence to which Matang Tuk, Parashar, Vasistha, Chokhamela were raised & other Sages who were born in low communities sufficiently bears out the above statement. Not long before we find even in advanced country like England people were granted the deploma of Barrister merely by dining a certain number of days in the inns of Court. Even men, non-matriculated Indian availed themselves of this opportunity. But these dinner Barristers were deemed fit to conduct cases in any court of law and it will be admitted that this class has produced many a noteworthy lawyers. Our high class people feel it distrespect to raise the status as I have done by giving diplomas to the members of the untouchable communities but this is a mistake. To wait for equality of treatment till their educational qualifications rasied connot be preferred to the policy of immediate action to end the heartless and thoughtless social tyranny which cannot be matched anywhere on this eartb. Immediatism is the only successful way, that is my firm belief. I do not wish to follow the ways of those reformers who would delay indefinitely any action in favour of social reform, because that gives offence to the olders folks. The enlightened mind of the country is agreed

on the evils of the caste system. The only question is who should begin the work of abolition of caste system?

It is usually argued that the work must be undertaken by the low caste people. But I am convinced that their efforts would not avail much. The work must be undertaken by those who are at the top of the social structure. Those who have enjoyed the social prestige by the mere sanctity of their birth for these untold ages must consent to give it up. This we find in *Samuri* of Japan doing to achieve the unity of Japan. Efforts for the abolition of the caste system if they are put forth by the lower caste are sure to be destructed. On the other hand if they proceed from the higher caste they are sure to be instructive. Unless this takes place the lower classes must continue their efforts to rise their position in the social system. If the lower classes raise above their status and if the higher classes descend a little to lend them a halping hand we can effect the abolition of the caste system without giving rise to hatred or calumny on either side Even the Marathas must be compelled to dissolve their caite for the sake of unity.

Religion can on longer be pleased as an obstacle in the way. It was in Mesopotamia that the Hindoos and Mohamedans fought shoulder to shoulder notwithstanding the religious differences. It is because that all people felt that they were the members of an Empire first and foremost that they were able to achieve victory in the recent war. It may be that our people have suffered at the hands of Christian powers. But we must never forget that the British people have protected us from evil ambition of their co-religionists, not to speak of the Afgans. It cannot be said that religion comes in the way of our unity.

There are many who abuse me because I openly declare my opinions. When their main object is to secure chief notoriety they beg themselves the laughing stock of responsible persons I endeavour to raise the status of all backward people. I leave it to you gentlemen to deeide for yourself whether it is proper to construe them as the counterpart of the harted of the Brahmins. I am glad that you will continue to love me till the end. I can assure you that no amount of adverse comment or circumstances will deter me in lending all the help I can render to the cause of your elevation for it is indeed the cause of all elevation. With this I close.

***

अनुक्रमणिका

Forty four

Your Excellency

***

Your Excellency, I need hardly say that it is with the closest attention that I have listened to the weighty words of advice in which You Excellency has done me the great honour of handing over to my charge the care of my State. In so doing, Your Excellency has allued to the chief events of recent minorities, which evidence the rapid progress made in Kolhapur during the past thirty years, and it is with sincere gratitude that I acknowledge the obligations under which I lie to the Govt. of Her Majesty the Queen Empress; obligations both for the care of my State and for the measures taken from my childhood to ensure my personal welfare.

Lokking to What has been done in the State, it is not too much to say that the Kolhapur of the present is a different place from the Kolhapur from the last generations, and having seen something of the greater part of India I venture to think that few chiefs have succeeded to a better ordered inheritance than I to-day. For this I tender my thanks to the various Political Agents appointed by Govt. who have surprised, and to my able Diwan, Khan Bahadur Meherjibhai Kuvarji, C. I. E. and the Council

***

Address dilivered by Shahu Chhatrapati replied to the Governor's address on State Ascendecy ceremony: 2 April, 1884

who have successfully carried on the administration during my miniority. Nor can I on occassion pass over in silence the debt that I owe to my lamented father, the late Regent of Kolhapur. And much I have to think Govt. for the watchful eye they have kept upon the progress of this State, not less much I acknowledge the direct and personal interest taken in my own bringing up by your Excellency. To this I owe it that for nearly five years I have had the great advantage of the guardianship of Mr. Fraser a Friend about whom I will here only say that my brother and I myself one him a lifelong debt for the able, conscientious & almost fatherly care which he has devoted to preparing us to fill worthily the positions in life that lie before us; that but for these abilities zeal, conscientious work, and uncommon tect I should not have been what I am, and it would not be too much to say that he has taken a fatherly care of my brother and myself. With regard to the future, it is with full sincerity that I declare my intention to show loyalty to Her Gracious Majesty the Queen Empress and to faithfully abide by the engagements, treaties, and sanads which regulate my relations to the Paramount Power.

Further as regards my People, while recognising all that has been already done and the favourable circumstances under which I began my rule, at the same time, I understand fully that I in Govt. there is no standing still, that a serious and soleman task lies before me, not only Preserve for my subjects the benefits already enjoy but to ensure further steady progress in the promotion of their walfare. It this task, I look with confidence to receive the loyal support of my feudatories and Jahagirdars, and while upholding their rights I trust to find them real Pillars of the state, as in early days their ancestors were to mine. Setting before myself a high standard, I shall endeavour to take advantage of the great opportunities which lie upon to me, and in beginning my duties. I am encouraged by the hope that from future Governors of Bombay I shall recelve the same countenance in manhood as I received during my minority from your Excellency & your predcessors & that the political Agents whose advice I shall welcome, will prove friends such as those I have so far known, like Mr Lee Warner, whose personal interest in me from the day of my father's death, down to the present has never agged, like the late Colonel Wodehouse, by no one more regretted than myself; and like Colonel Hunter, the present Political Agent at Kolhapur.

In conclusion, I beg that Your Excellncy will convey to His Excellency the Viceroy my best thanks for his kind message of congratulations.

***

Forty five

Shivaji Memorial

* * *

Your Royal Highness,

It is with feelings of greatest pride and gratitude that I welcome Your Royal Highness on behalf of the Maratha Community, a community which, backward as it may be education, has never been backward in its loyalty to the Throne and to the Empire. From the mythical times of Rama and even earltier the doors of learning were closed to us till the advent of the British Raj. We owe to your Royal House an everlasting gratitude for inaugurating a wise and liberal policy of throwing open to all alike the doors of knowledge and creating in us a sense of self-respect and a spirit of true citizenship which are the natural consequences of liberal edueation. We, Marathas owe a deep debt of gratitude to her late Majesty Queen Victoria, of revered memory, King Edward VII, the beloved of all, and to His Majesty King George whose constant and all understanding solicitude for the welfare of his subjects has given to the backward classes a feeling of security and well being to which they had been strangers for centuries, I may say since India was India.

We welcome your Royal Highness in a double capacity as the Heir apparent to the glorious British Throne, and as a brother soldier. The onething that a Maratha will never forget nor the

* * *

On 19th Nov. 1921 at Poona

historian will ever fail to do justice to is the fact that Your Royal Highness fought shoulder to shouldr with the Maratha soldiers. Theis is a unique which honour will ever remain fresh in our minds and in the memory of the generations to come.

Your Royal Highness can well imagine the intensity of feelings of reverence and pride with which Marathas cherish the memory of the great Shivaji who has immortalised the name Maratha in the pages of history and who has instilled into them the soldierly qualities which were manifested in the great World War, It was this great statesman who by introducing the system of eight ministers foreshadowed the system of Cabinet Government in India and it was he who first conceived the idea of this statesman and warrior who was also a bold relgious reformer and who combated bravely the prejudices of his times. With all his zeal for the Hindu Religion he had, kill the Great Akbar, the same toleration for all castes and creeds. As Your

Royal Highess is aware the Marathas have been warriors since the birth of the race. To this day the great Maratha ditch at Calcutta stands a silent witness to their prowess.

It was not, however until the Great War, with its acid test of the loyalty and the fighting values of the various peoples of the Empire, that the Maratha has come into his own, and we believe, that we have now the right to place in the Empire's battle line with the best and the bravest of the fighting races. It now rest with us to take full advantage of the educational opportunities and the equality which al peoples of whatever religion enjoy as their birth right under the paternal rule of our revered and beloved King-Emperor. And now we must leave no stone unturned to fit ourselves for our place not only in the field, but in the Council Chamber and to dedicate to the service of the Empire not only our sword but our pen.

We are deeply conscious of our debt to Your Royal Highness to all the trouble that you have taken to grace this occasion and trust you will convey to His Majesty the King Emperor on behalf of the Princes, the Chiefs and the people of the Maratha race our most heart-felt and undying sentiments of loyalty to his person, to the Throne and to the Empire.

And now, in conjunction with my brother Maratha Prince, a Prince who has kept alive the glorious traditions of his illustrious ancestor Mahadaji SCindia, who dictated the policy of the Marathas after Shivaji, I mean His Highness the Alijabahadur Maharaja of Gwalior to whose forethought and zealous care the present occasion owes much, I request Your Royal Highness to lay the foundation stone of the Memorial to my illustrious ancestor, Shivaji the Great.

***

Forty six

New Spirit for Peaceful Revolution

* * *

My dear brave brethren,

I do not know your language well. I will try to express myself as well as I can. I hope you will forgive my broken language.

The honour of occupying the chair and addressing you today really belongs to Mr. Ambedkar, who is found to be one from among you and is better educated than myself. Unfortunately he cannot be amongst us at this conference on accout of his absence in England. But I am sure, wherever he may be nothing can be nearer his heart than the interest of the suffering of fellow being of his community.

At the outset let me congratulate you all for coming over here from far leaving your homes and hearths for according a hearty welcome to his Royal Highness the Prince of Wales, the Heir to our most beloved King-Emperor George the Fifth, and be sure that His Royal Highness is delighted to see you and know you and bears a deep affection towards you all.

You are also to be congratulated upon, that you are all collected here to make a united effort for your progress in a peaceful way. It is

* * *

At the Third All India Conference of the Untouchable classes at Delhi on 16th Feb. 1922

really suggestive of the new spirit that has been created in you. If you continue incessantly this agitation of the new spirit, this effort of self progress, this tough fight for freeing yourself from the social degrading position. I feel quite sure that God will crown your efforts with suceess. I pray you not to stick to your hereditary professions along. You must make an emphatic struggle to educate yourselves and enter into the arm and the various other offices of seveal departmensts of Government. Not only that but you should follow the merchants; you should attain proficiency in all these lines and push yourselves forward.

In my tiny little Kingdom people from your community are occupuing such posts and are practising such professions, may one of them is also a Chairman of the City Municipal Committee. I might be accused of self-praise for saying this, but I beg to be excused

because mention this only to show what people from among you can attain if only they strive. When His Royal Highness the prince of Wales will come as our Emperor once again amongst us and fell quite sure that our affection will not fail to attract him, you will be able, I hope, to accord a hearty welcome as officers in the army and in the civil administration as well as leading members of independent professions. We must never forget that the cause of the new life and awakening amongst us is due to the liberal policy of the benihg British Government that gives equal opportunity to all to educate themselves and makes no distinction of caste and creed. Under the New Reforms Act, Many of you enjoy the privilege of voting I hope you will wisely take full advantage of the New Reforms that have been granted to us by our kind Government and of the channel that has been opened for us by settling our political goal to the progressive realisation of sell Government for uplifting ourselves politically, socially, enconomically and morally.

The political destiny of any country udepends pon the character of the people in that country, therefore superme attempts should be made for bullding up the character especially of our youths and prove ourselves deserving of the new rights that have been bestowed upon us. I feel delighted to notice that you have good leaders from among yourselves and that you are led along by a peaceful and right pathd towards the realization of your cherished goal.

In the enthusiasm of the new spirit that is seen in the Indian Nation let it be remembered to her credit that the Nation has not been forgotten by you. The ban of untouchability flung over you since ages is losing ground and I am sure day will soon dawn when the ban will only be a by-gone word, You must learn to keenly watch your rights Whenever you find your social rights are invaded you have to remain firm and guard your rights not in a spirit of fighting and hatred but in spirt of wisdom and love. In order to be able to do all this peacefully we must co-operate with Government and take their help whenever necessary.

In this 20th Century it has been an acknowledged principle of the word that the way of progress and prosperity is not bloodshed and revolution but a peaceful revolution. The International Conferences at Washington and Jineva are only expositions of this principle. Let us also then accept and follow the same principle.

You should all keep before you Mr. Bhimrao Ambedkar, Your great leader, as your ideal and try to follow him, to be like him.

Let me tell you, my humble services are at your disposal. My only prayer is you should allow me to serve you.

अनुक्रमणिका

I have humbly placed before you my thoughts in short, I am indebted to you for affording me an opportunity for doing so. Expressing my heartfelt thanks for patient hearing you gave me; I beg to remain.

***

Forty seven

A Front For Democratic Wave

* * *

We Princess of the S. M. C. and Satara Jahagirdars are geogrphically cut off from the rest of the Bombay presidency State. The Government of India is a long way off from our part of it. They are not likely to know much about us. They hardly know what seditious papers we have or what movements are started here against Government. They do not know who our leaders are, who is Kelkar or parnjape and in what points they agree or differ and how their views influence people or the masses and whether they have greater sway over the masses or the classes; nor is the Government of India familiar with the problems peculiar to the Maratha States. But why we want to go under the Government of India is that thereby. We have reason to believe our status is raised. This will appear from the difference in treatment given to the states on our side and those directly under the Government of India. In the present Chamber of Princess I see chiefs having a small Jahagirs Included among the members. Some of them cannot be compared in area, population or revenue to States on our sides, that have been excluded from membership. In the same way in the conferring of honours, we feel, we are not properly treated. The States even of much smaller importance under

* * *

The views of H. H. the Shahu, on the Changing Political Situation in India of his time, reveal his ideals of the movement for free united India. He had also felt the wave of Democracy.

Govt. of India enjoy hounours and titles which are denied to us. We have no opportunities of meeting together and making our grievance heard. In short when we are cut off from direct relationship with Government of India. We feel we are neglected.

Of course, I do not make a complaint but they are quoted just to invite the attention of Government to the appearent distinction they involve. This, we are inclined to think will not be the case if we also like the Princess in Central India or in United Provinces are in direct relations with the Government of India, In my humble opinion, this is a time when, if possible all Princess must unite and present a solid front to the democratic wave that is passing over the land or it may engulf them. So, at least groups that are geogrophically one should be allowed the privilege of meeting together or going in deputation and making themselves heard. If some princess and Chiefs from among the Maratha States are taken over by the Government of India to the exlusion of the rest it would be like cutting a body into two; it will then have no life either in one place or the other. Such a partition of the Maratha States would

be like the partition of Bengal. I think that Satara and S. M. C. Jahagirs are in no way of lower status then some of the Chiefs admitted to the membership of the Chamber. I hear some chiefs complaning of the admission of Jahagir among its members to their exlusion, They feel that they have done a great service to the Empire than the little State, and are in every way superior to them. And yet they are excluded from the honours which the smaller states are enjoying. They cannot understand why this is so.

* * *

राजर्षी शाहू :

श्री शाय जनतात्मने

***

शाहू छत्रपतींच्या भाषणांमधून त्याकाळचे संस्थान, देश आणि परदेश यांमधील विविध प्रश्नांची कल्पना येते. राजर्षींचा, त्या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोण ध्यानी येतो. अर्थात त्यात प्राधान्य संस्थांनी प्रश्नांना असणार हे उघडच आहे. या सर्वांमधून, राजर्षींचे अष्टावधानी सावधपण जाणवते. आपल्या देशात काय चालले आहे, त्याकडे राजर्षींचे लक्ष आहेच, खेरीज पाश्चात्य देशात काय डहुळले जाते आहे, त्याकडेही त्यांनी विशेषत्वाने लक्ष पुरविले आहे.

शाहू छत्रपती कृतिशूर असल्याने त्यांचा सर्वस्पर्शी विचार, एकूण बदलत्या जगाच्या संदर्भात त्यांनी आपल्या संस्थानामध्ये केलेल्या सर्वांगीण सुधारणांच्या पार्श्वभूमीवरच समजून घेतला पाहिजे. हा दूरवरचा भाग थोडा बाजूला राखला तरी त्यांच्या कृतीचे मर्म ओळखण्यासाठी इतर गोष्टींसह त्यांची प्रासंगिक भाषणेसुद्धा मोलाची आहेत. मात्र शाहू छत्रपतींची उपलब्ध भाषणे फार थोडी आहेत. १८८८ पासून १९२२ अखेर राजर्षींच्या भाषणांच्या नोंदी आढळतात. त्यामध्ये १९१६ ते १९२२ अखेरचा सात वर्षांचा कालखंड अधिक महत्त्वाचा आहे. या काळामध्ये भाषणेही अधिक आढळतात; खेरीज ती ज्या सभासंमेलनांतून केली आहेत, ती ठिकाणेही विशेष लक्ष्यवेधी आहेत. सर्वसाधारणपणे या काळातील भाषणे अ. भा. मराठा परिषद, अस्पृश्य वर्गाची परिषद, अ. भा. आर्यधर्म परिषद, ब्राह्मणेतर सामाजिक परिषद इत्यादी महत्त्वाच्या परिषदांमधून झालेली आहेत. स्थूलपणे सगळीच भाषणे त्रोटक, मध्येच कुठेतरी तुटल्यासारखी वाटत असली तरी मूलतः ती परिपक्व विचारांची निदर्शक आहेत; आणि नेमके विचार, आल्हाळ-पाल्हाळ न लावता, नेमक्या शब्दसंहतीने सांगण्याची हातोटी हा त्यामधला विशेष आहे. कुठेही उगीच लांबड नाही. फाफटपसारा नाही. शब्दजंजाळ नाही की आडूनआडून मारणे नाही. ‘रिलिजस ब्युरॉक्रसी’, ‘आमचा धर्मः आर्यधर्म’, ‘समाज सुधारणा कोण करू शकेल?’, ‘देशात ऐश्वर्य कसे वाढेल?, ‘हक्कांसाठी झगडा’ अशा काही राजर्षींच्या इतर भाषणांच्या मानाने दीर्घ भाषणांचा अपवाद करता; मारुतीच्या शेवटासारखी जड होणारी लांबणूक आणि दमणूक दोन्हीही नाहीत. मात्र परिपक्व विचारांबरोबर सखोल चिंतन, सामाजिक जीर्णशीर्णतेविरुद्ध प्रखर चीड, विकृती-विसंगतींच्या नष्टांशाच्या भावनेबरोबरच सामाजिक दैन्य-विषमता-दारिद्र्य याविरूद्ध हिरीरीची बंडखोरी आणि मानवाच्या संवर्धनाबरोबरच माणुसकीच्या गहिवराने प्रेरित झालेल्या अंतःकरणाचे नितळ दर्शन असे अनेक गुणपैलू या भाषणांतून नजरेस पडतात. त्यातून विचारशीलता आणि सृजनात्म्याची ओढ लक्षात येते. सृजनात्म्याची ओढ प्रत्यक्ष कार्यात प्रतिबिंबित झाल्याचेही आढळते.

एकूण भाषणांची बैठक :

शाहू छत्रपतींची मराठी । इंग्रजी मिळून एकूण पन्नास भाषणे उपलब्ध आहेत. त्यामध्ये तेरा भाषणे समान आहेत; दोहोंकडे सारखी आहेत. म्हणजे ती मराठीत असूनही इंग्रजीत आहेत किंवा इंग्रजीमधील मराठीत आहेत. याचा मतलब हा की, एकूण पन्नास भाषणांमधून तेरा वजा जाता, सदतीस भाषणे समोर येतात. संख्येच्या दृष्टीने राजर्षींची ही निखळ भाषणे होत.

राजर्षीनी पहिले भाषण ३ मे, १८८८ रोजी, कोल्हापूर राज्य रेल्वे बांधणीच्या शुभारंभ प्रसंगी उद्‌घाटनाच्या निमित्ताने केलेले असून शेवटचे १६ फेब्रुवारी, १९२२ चे अ. भा. अस्पृश्यता परिषदेच्या दिल्ली येथील तिसऱ्या अधिवेशनप्रसंगी अध्यक्षपदावरून केलेले भाषण आहे. म्हणजे शाहू छत्रपतीचे पहिले भाषण, राज्याधिकार स्वीकारण्यापूर्वी, वयाच्या चौदाव्या वर्षी केलेले आहे तर अखेरचे मृत्यूपूर्वी एकदोन महिन्यांपूर्वीचे आहे. त्यानंतरची मराठी व इंग्रजी भाषणे अनुक्रमे अशी आहेत:

१८८८ :१ । १,	१८९३ : — । १,	१८९४ : १ । १,	१८९५ : — । १,
१९०२ : ३ । १,	१९०५ : १ । १,	१९०६ : — । १,	१९०८ : १ । —,
१९१२ : — । १,	१९१३ : — । १,	१९१४ : — । १,	१९१६ : १ । —,
१९१७ : १ । २,	१९१८ : ३ । ३,	१९१९ : १ । —,	१९२० : ९ । ४,
१९२१ : — । १,	१९२२ : १ । १,		

या सर्वांचा विचार करता, शाहू छत्रपतींचा बराच कालखंड, जवळजवळ सतरा वर्षांचा (१८८९, १८९०, १८९१, १८९२, १८९६, १८९७, १८९८, १८९९, १९००, १९०१, १९०३, १९०४, १९०५, १९०९, १९१०, १९११ व १९१५) व्याख्यानाविना दिसतो. व्याख्यानाशिवाय याचा अर्थ, राजर्षींनी व्याख्याने दिली असण्याची शक्यता आहे पण ती आढळात येत नाहीत असा आहे. त्याच शक्यतेची संभाव्यता मोठी आहे.

राजर्षी शाहू सतत लोकसंपर्क ठेवणारे, 'मोठ्या दिलाचे लोकांचे राजे' होते. ब्रिटिशांचे मांडलिक संस्थानिक असले तरी स्वतःच्या गढीत बसून त्यांनी कारभार हाकला नाही. याचा अर्थ, अनेक समारंभात त्यांची उपस्थिती, त्यांची भाषणे झाली असणार, हे उघड आहे. पण उपलब्ध साधनांवरून १८८४ पासून १९२२ अखेरच्या अडुतीस वर्षांच्या काळातील, काटेकोरपणाने राज्यसूत्रे हाती घेतल्यापासून म्हणजे १८९४ पासून १९२२ अखेरपर्यंत २८ वर्षांच्या काळातील; इंग्रजी-मराठी सदतीस भाषणे उपलब्ध होतात. मधली कित्येक वर्षे कोरी दिसतात. या काळात समारंभ झाल्याच्या, शाहू छत्रपती उपस्थित असल्याच्या नोंदी आढळतात. पण भाषणे मात्र आढळत नाहीत. म्हणजे या कोऱ्या वर्षी, राजर्षी शाहू समारंभांना जाऊनही भाषणे उपलब्ध नाहीत असा त्याचा अर्थ आहे. अशा या भाषणांचे लेखन यथास्थित का झालेले नसावे? त्याचीही काही कारणे संभवतात:

एकतर शाहू महाराजांची बहुतांश भाषणे उत्स्फूर्त आहेत. सर्वसाधारण लोकांच्या समारंभात केलेली भाषणे तर निखालसपणे उत्स्फूर्त आहेत. साहजिकच ती टिपून टाचून ठेवण्याकडे लक्ष कमी गेलेले दिसते. दुसरे, शाहू राजाबद्दलची लोकांची आसक्ती इतकी मोठी आहे की आमच्या समारंभाला राजा आला; याचेच लोकांना अपरंपार कवतिक आहे. त्यामुळे आपल्याबरोबर आपल्या भावी पिढ्यांसाठीही काही करीत असलेल्या राजाचे विचार, किमानपक्षी 'त्यांच्या' साठी राखून ठेवण्याची जबाबदारी आपली आहे; याचे

समारंभाच्या संयोजकांना थोडेही भान नाही. त्यामुळे ऐकले, कानात साठवले, स्मरणात राहिले ते खरे; ही दृष्टी प्रभावी ठरली. तिसरे, समारंभाचा डामडौलही या शाश्वत बाजूकडे दुर्लक्ष करावयास कारण ठरला आहे. सर्वसामान्य मानवी स्वभावच तिथे प्रभावी बनला आहे. चौथे असे की, एकूण बहुजन समाजाची शैक्षणिक महत्ता इतकी थिटी की, राजा सांगतो आहे ते नोंद करून ठेवण्याची अनास्था अधिक राहिली आहे. पाचवेही एक कारण संभवते ते हे की, प्रसिद्धीची बहुतांश साधने विरोधकांच्या हातात. राजर्षींच्या ध्येधोरणांमुळे त्यात कडवटपणा आलेला. जी थोडी पाठिंबा देणारी साधने हातात ती प्रायः चळवळीच्या गदारोळात गढलेली. त्याचा परिणाम हे विचारधन दुर्लक्षित होण्यात झाले असावे असे दिसते.

त्यामुळे दिल्ली, कानपूर, नवसारी, नागपूर, भावनगर, हुबळी, मुंबई यांसारख्या मोठ्या शहरांतील परिषद/अधिवेशनांतून शाहू महाराजांनी केलेली भाषणे उपलब्ध आहेत. पण त्यापैकी काही ज्या स्वरूपात आहेत त्या स्वरूपात ती पूर्ण आहेत, शाहू महाराजांना सर्वांगानी प्रकट करणारी आहेत असे मात्र वाटत नाही. अन्य अनेक भाषणे तर तुकड्यातुकड्यांचीच वाटतात. त्यादृष्टीने, एकूण समाजाचेच हे एक मोठे नुकसान आहे; ते मानले पाहिजे.

शाहू छत्रपतींच्या दूरवर झालेल्या काही भाषणांची माहिती व पार्श्वभूमी पुढेमागे अधिक मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. कानपूर, नवसारी, दिल्ली, भावनगर यांसारख्या शहरांतून झालेल्या सभा-परिषदांतून राजर्षींनी केलेल्या भाषणांचे वृत्तांत, काही अधिक मुद्दे देऊन जाण्याची शक्यताही आहे. पण असे अधिक काही, पुढे अधिक देऊन जाणारे असले तरी सध्या हाती आहे त्याचेच साहाय्य घेणे एवढेच तूर्त शक्य आहे.

बहुढंगी रगेल व्यक्तिमत्त्व :

जे हाती आहे त्यामधून शाहू छत्रपतींच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी काही गोष्टी समजून येतातः

त्यामध्ये अरबूज समजल्या जाणाऱ्या शाहू छत्रपतींच्या व्यक्तिमत्त्वाला व्यासंगाची जोड होती, हा अग्रक्रमाचा पैलू होय. त्यामध्ये अरबूजपणाला, रांगडेपणाला धक्का आहे. वस्तुस्थिती अशी आढळते की, विद्वानांची कदर आणि उत्तमोत्तम ग्रंथकारांच्या ग्रंथांच्या परिशीलनाची राजर्षींना आस्था होती. इंग्रजी व संस्कृत भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. मराठी त्यांची मातृभाषाच होती. राजर्षींनी ब्रिटिश अधिकाऱ्यांशी केलेल्या इंग्रजी पत्रव्यवहारांवरून ओझरती नजर टाकली की, त्यांच्या इंग्रजीवरील प्रभुत्वाचे-त्यामधील खाचाखोचांसह असलेल्या प्राविण्याचे-सहज दर्शन होते. शाहू छत्रपतीनी 'देशी' शिक्षणाव्यतिरिक्त उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला जावे, असा ब्रिटिश शासनाकडून दबाव येतो. ज्या चार मुद्यांवर आग्रही राहून ब्रिटिश शासन शाहू छत्रपतीनी इंग्लंडला जावे असे म्हणते त्या संबंधात त्यांनी गव्हर्नर लॉर्ड हॅरिसला, धारवाडहून ७ जुलै, १८९२ रोजी पत्र लिहून खुलासा केला आहे. शाहू छत्रपतीनी अत्यंत प्रभावीपणे, कुठेही मन दुखावणार नाही किंवा इंग्लंडला जाण्याचे आपण मुद्दाम टाळत आहोत असा ग्रह होणार नाही अशा खुबीने, सध्या इंग्लंडला जाणे का इष्ट नाही हे त्यात पटवून दिले आहे. त्यामधील चातुर्य, इंग्रजी भाषेच्या लालित्यासह वेधक आहे. ज्या तलमरीतीने आणि सावधपणे हे होत. त्यामधील युक्तिवाद, सहजता आणि नाखुषीही खुबीने दाखविण्यामागची प्रगल्भता लक्षणीय आहे. संस्कृतबद्दलची आठवण तर प्रसिद्धच आहे. १९०२ मध्ये केंब्रिज विद्यापीठाने राजर्षींना एल् एल्. डी ची पदवी दिली. पदवी प्रदानाच्या वेळी विद्यापीठाच्या कुलगुरुंनी लॅटिनमध्ये भाषण केले. राजर्षींनी उत्स्फूर्तपणे त्यास संस्कृतमधून उत्तर दिले. मराठीबद्दल प्रश्नच नव्हता. शाहू छत्रपती नागर मराठी बोलू शकत होतेच पण अस्सल गावरान मऱ्हाटमोळ्या मऱ्हाठी

अनुक्रमणिका

शैलीचा ऐटबाज थाटही उडवित असल्याने 'रांगडा राजा', 'धेडगुजरी', 'संस्कृतीचा गंध नसलेला गावढळ माणूस' वगैरे वगैरे किताबही असंतुष्टांकडून बहाल केले जात होते. शाहू छत्रपतींची, यामागची भूमिक तद्‌विषयीच्या लोकशाही मनोवृत्तीमधून स्वच्छ होते. ती गोष्ट ही की, हा राजा प्रजेचा होता आणि जे जे प्रजेचे ते ते या राजाचे होते. राजा प्रजेविना वेगळा नव्हता आणि प्रजा 'राजा'च होती. गोष्ट एवढीच आहे; मात्र त्यामध्ये मोठा अर्थ आहे. तो परिवर्तनाकडे दृष्टी लावून आहे. रांगड्या भाषेचा व्यवहार जनतेशी केल्या जाणाऱ्या व्यवहाराच्या बाबतीत आहे, अधिकतर 'राजवाड्या' तील खासगत व्यवहारांशी निगडित आहे. अन्यत्र पाहून घ्यावा असा प्रगल्भ शैलीचा सुसंस्कृत व्यवहार आहे. त्याचे पुरावे शाहू छत्रपतींच्या भाषणांतून । पत्रव्यवहारांमधून सहज दृष्टीस पडतात.

शाहू छत्रपती सामान्यांचे प्रतिनिधीत्व करीत होते; साहजिकच जवळ त्याव्यतिरिक्त काही असूनही, सामान्यांच्या शैलीत वर्तन करावे ही राजर्षींची दृष्टी होती. कारण त्यामुळे सामान्यांशी अधिक जवळिक होणे शक्य होते; आणि हाती घेतलेल्या कार्याला उभारी मिळण्याची शक्यता होती. शाहू छत्रपतींनी ते साधले. मर्मस्थळे शोधून त्यावर स्वार होण्याची राजर्षींची हातोटी विलक्षण होती. त्यात सच्च्या नेतृत्वाचे उत्तम भान होते.

शाहू छत्रपती 'रांगडे' खरे, राकटही तसेच; पण कला, कलावंत, विद्वत्ता इत्यादी बाबतीतली त्यांची चहा ही, रांगड्या राकटपणाला छेदून पलिकडे जाणारी आहे. मॅक्समुलरपासून व्हीस डेव्हिसपर्यन्तच्या कित्येक पाश्चात्य संस्कृत पंडितांनी वैदिक वाङ्मयावर लिहिलेल्या संशोधनात्मक ग्रंथांचे त्यांनी गाढ अवलोकन केल्याचे दिसते. समाजशास्त्रावरील तत्कालीन उत्तमोत्तम ग्रंथांचे त्यांचे परिशिलन चिकित्सक होतेच, पण फ्रेजर यांनी 'मंदबुद्धी' म्हणून 'गौरव' केलेल्या राजर्षींचे-आपल्या या विद्यार्थ्याचे-पाठांतरही दांडगे होते. समाजशास्त्र किंवा अन्य ग्रंथ यामधील महत्त्वाच्या इंग्रजी ग्रंथांमधील पॅरेग्राफच्या पॅरेग्राफ राजर्षी उद्‌धृत करू शकत. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी त्याबद्दल राजर्षींचा गौरवही केला आहे. राजर्षींच्या या व्यासंगशीलतेबद्दल 'प्रबोधन' कार के. सी. ठाकरे यांनी 'भिक्षुकशाहीचे बंड' च्या लेखनाच्या वेळी आलेला अनुभव 'माझी जीवनकथा' (पृ. २५०) मध्ये तपशिलाने नमूद केला आहे. प्रबोधनकारांनी सांगितलेले हे एक उदाहरण झाले. अशी अनेक सापडतात. या साऱ्यांचा अर्थ हा आहे की, स्वतःला सुसंस्कृत म्हणविणाऱ्या उच्चभ्रू मंडळींच्या दृष्टीतून शाहू छत्रपती 'रांगडे' होते. तसे मानले जात होते; पसरविले जात होते. त्यामुळे जनमतानुसारही ते 'दाणगट' च होते. पण अंतर्यामीची गोष्ट अशी आहे की, शाहू छत्रपती सुसंस्कृत, अभिजात आणि परिवर्तनशील होते. व्यक्तिमत्त्व दुभंगलेले नव्हते पण एकाच गुणसमृद्ध व्यक्तिमत्वात अनेक परीची कित्येक व्यक्तिमत्वे सामावलेली होती. म्हणून केवळ वरच्यावर 'रांगडेपणा' तून काढले जाणारे व्यापक निष्कर्ष अयथार्थ ठरतात; गोत्र जुळत नाही.

त्याचा उलगडा असा की, शाहू छत्रपतींचा व्यासंग मोठा होता. निरीक्षण सूक्ष्म होते. अवलोकन दाट होते, कार्यशक्ती जबर होती, आकर्षणशक्ती दांडगी होती, ध्येयदृष्टी निश्चित होती. मुत्सद्दीपण अजोड होते. फक्त बहाणा वेगळा होता. राजा या नात्याने, लोकनेता या नात्याने, सारे आकाशासारखे उघडेवाघडे होते. राजर्षीजवळ कौशल्य होते. 'टॅक्ट' होती; पण छपाछपी, आडपडदा कुठेही नव्हता. पाटी कोरी होती. जीवनग्रंथाचे कुठलेही पान उघडावे, आणि न्याहाळावे, 'महाकाय' शाहू छत्रपती इतक्याच महाकाय कर्तृत्वाच्या, उरीपोटी भेटीने समाधान लाभावे; अशीच मुळी राजर्षींची प्रचंडता आहे. खरे तर, परिस्थितीच्या प्रचंड गुंतागुंतीने, मानवी हिशेबच पार खावून टाकावेत; धुळीला मिळवावेत; अशा कालौघात उभे राहून, शाहू छत्रपतींनी, मानवी संस्कृतीवर उगवलेली बांडगुळे तळामुळापासून कापून काढली.

अनुक्रमणिका

त्यामध्ये, लोककल्याणाच्या निखळ भावनेखेरीज वैयक्तिक काहीही नव्हते. सार्वत्रिक समाजक्रांतीखेरीज नव्हता द्वेष, नव्हता मत्सर, नव्हता राग; काहीच नव्हते. विषादपूर्ण काही असेलच तर ओघात घडून गेलेले, हेतुपूर्वक काहीच नाही. त्यामधील बरवेपण शाश्वत तर वाईटपण तात्कालिक आहे, असतेही. आनुषंगिक बाबींना मंत्रसामर्थ्याचे केंद्र मानून न्याय करण्याने न्याय होत नाही, अन्याय होतो. सर्वांगांनी समाधान लाभण्यासाठी लक्ष्यबिंदू नेमकेपणाने टिपाला लागतो. सोडून चालत नाही. राजर्षींबद्दलचे नव्हे तर सर्वच थोरांबद्दल ते व्हावे लागते. ही नोंद म्हणून विशेष महत्त्वाची.

शाहू छत्रपती 'मांडलिक संस्थानिक' असले तरी मुरब्बी मुत्सद्दी होते. सत्ता माणसाला उन्मत्त बनविते, भरड करते. सत्तेला चिकटलेले हे गुण असतात. राजर्षींनी त्याचा पिळा करून ते बाजूला ठेवले. जवळ बाळगते तर 'लोकांचे राजे' बनले नसते! कसे शक्य होते? मागच्या पुढच्या इतिहासाची पर्वे, विराट लाटांप्रमाणे हेलावत होती. सर्वसाधारण समाजाच्या दुर्दैन्याच्या दरीची प्रखर जाणीव मन कुरतडत होते. सर्वरीतीच्या गुलामगिरीला चूड लावून आर्यत्वपोषक आधुनिकतेचा पदर पकडण्याची ओढ होती. डोळ्याला कसलीच आंधुळणी झालेली नव्हती, पण ब्रिटिशांचे मांडलिक संस्थानिकत्व चिकटलेले असल्याने कार्य-कर्तृत्वास कित्येक मर्यादा होत्या.

शाहू छत्रपतींच्या कर्तृत्वाला मर्यादा नव्हत्या तरीही कर्तृत्व गाजविण्यासाठी जे अधिकार वापरावयाचे होते त्यांना जरूर मर्यादा होत्या. ब्रिटिशांशी सरळ सरळ संघर्ष वर्ज्य होता. सरळ संघर्षाने राज्यच लयाला जाण्याची भीती होती. आणि राज्यसत्तेचे अधिष्ठान वगळून लोकसेवेला बळ प्राप्त होणे कठीण होते. राजेपद स्वतःच्या ख्यालीखुशालीसाठी नव्हे तर लोकांच्या हितासाठी वापरावयाचे होते. हिंदुस्थानात, त्या काळी ख्यालीखुशाली अनेकजण करीतच होते. शाहू छत्रपतींनी तेच केले असते तर त्यामध्ये अधिक रग आली असती आणि असलेल्या व नसलेल्या दंतकथांना खऱ्याखुऱ्या कथांचे मखर चढविले गेले असते. त्याहून अधिक काहीच घडले नसते. पण राजर्षींना ते करावयाचे नव्हते. त्यांची ती दृष्टी नव्हती. त्यांना लोकांचे अंग आणि मन वाढविणारी ख्यालीखुशाली सांभाळावयाची होती, त्यांनी ती जोपासली. सामना ब्रिटिशांशी असल्याने मामला धीराचा आणि धीम्या वृत्तीचा होता. कसलीही आणि कुठलीही कुरापत काढून संस्थान गुंडाळणे ब्रिटिशांना अवघड नव्हते. राजेपद : लोकसेवेचे एक साधन; ते भोगावे, जनतेच्या नावावर भोगावे अशी वांछा नव्हती. राजर्षींच्या दृष्टीने राजेपद महत्त्वाचे नव्हतेच, नगण्यच होते; पण लोकसेवेसाठी ते टिकविणे जरूर होते. ते मुत्सद्दीपणाने टिकवून शाहू छत्रपतींनी लोकसेवेचा आदर्श निर्माण केला. त्याकामी 'ठंडा करके खाओ' आणि 'पडते घेऊन राखाओ' ही सूत्रे होती. येणाऱ्या आक्रमक हल्ल्यासाठी ते जरूर होते, राजर्षींनी ते हेतुपूर्वक राखले, जोपासले. त्यामध्ये ब्रिटिशांचा हालातोला बघून वागण्याचे धूर्तपण होते; मैत्रीही होती पण ब्रिटिश-निष्ठा नव्हती. शाहू छत्रपती सारखा अव्वल दर्जाचा राज्यकर्ता कोणत्या उच्च प्रतीचे मुत्सद्दीपण राखून असतो, त्याचे राजर्षींची ब्रिटिश-निष्ठा हे अव्वल प्रमाण होते निष्ठेचे हे बाहुले रानातील बुजगावण्यासारखे होते, खोटे होते; साहजिकच त्यावर आधारलेले शाहू छत्रपतींचे 'स्वराज्यद्रोही' पण तकलादू ठरते. आरोप-प्रत्यारोपांची बांधणी करताना पुराव्यांची पक्की बैठक गच्चपणे चिरेबंदी करावी लागते. राजर्षींच्या बाबतीत हे अभावाने घडले. मात्र काळाने राजर्षी नेमक्या वाटेवर होते हे सिद्ध केले आहे. अधिशहा ब्रिटिशांना सांभाळून शाहू छत्रपतींनी राजेपदाला ढळ लागू दिला नाही, त्यामुळे लोकसेवेची गती रोधली गेली नाही. शाहू छत्रपतींची लोकसेवेची आकांक्षा आणि रग ध्यानात घेता राजेपद नसताही कदाचित् ती घडू शकली असती पण राजेपदामुळे तिला जो जोश आणि गती आली ती त्या सिंहासनाविना मिळू शकली असती की नाही, याची शंका वाटते. जरतारीचा पदर कल्पनारम्य असतो, पण

कधी कधी तो चित्र स्पष्टही करतो. आणखी एक असे आहे : शाहू छत्रपती राजेपदासंबंधी सामान्य माणसांच्या मनात असलेल्या सर्वसाधारण आपुलकीच्या भावना मनात राखून सेवाकार्य करीत होते.

त्यामध्ये भावनांचा आदरेखून आदर होता, त्यातून प्रयत्नेकरून कार्य साधण्याची दृष्टी होती, आणि त्या भावनांना धक्का देऊन कार्याकडेच कसे पाहावे याचा प्रयत्नही होता; दोन्हीही होते. 'अगा जे नवलचि घडत आहे' अशा कुतूहलमिश्रित कौतुकात असलेल्या, काहीशा भांबावलेल्या, सर्वसामान्याला 'सह' नेण्याची क्रिया, राजेपदासकट राजर्षी अंगिकारीत होते. राजेपद असण्याने फायदाच होता. नसण्याने हातातील साधनसामग्रीचे दोर सैल पडणार होते. त्यामुळे, कदाचित शाहू छत्रपतींच्या विरोधकांची भूते फेर धरून नाचली असती आणि रगदार राजर्षी शाहूना विरक्तीचा झटका येऊन गेला असता! असे घडले नसतेच असे नाही. काय घडले असते ते कालाच्या उदरातच गुडूप होऊन राहिलेले असले तरी त्याची कल्पना करता येते. आधार आणि सामग्री सारीच संपल्यावर वितराग बनणे अस्वाभाविक नसते. शाहू छत्रपतींच्या बाबतीतही हे घडू शकले असते. पण राजर्षींची मुत्सद्देगिरी आणि ब्रिटिशांचा सरंजामशाहीतील उदारमतवाद यामुळे ते कठीण बनले. शाहू छत्रपती ब्रिटिशाहून मुत्सद्देगिरीत श्रेष्ठ ठरले. आणि त्यांच्याच आश्रयाने, त्यांनी लोकजागृतीचा जो आगडोंब उसळविला; त्यातून लोकांनी आपल्या उद्धारासकट स्वराज्याची चळवळ जवळ आणली. पारतंत्र्याला चूड लावली. शाहू छत्रपतीनी, कोल्हापूर संस्थानातील जनतेला स्वतःच्या उद्धाराचा शिकविलेला मंत्र हा 'पारतंत्र्य' फेकून देण्याचाच एक प्रकार होता. अमूक एक चांगले आणि अमूक एक बरे किंवा वाईट असे पारतंत्र्याबाबत काहीच नसते. पारतंत्र्य हे पारतंत्र्यच असते आणि दर एक ठिकाणी ते नडतच असते. राजर्षींनी, लोकांना बरोबर घेऊन, त्यांच्या 'सहभागा'ने स्वतःच्या संस्थानातील प्रजेच्या पारतंत्र्याला लावलेली चूड व्यापक अर्थाने देशाच्या पारतंत्र्यालाही लावलेली होती. पारतंत्र्य नावडणाऱ्याला इथून तिथून कुठलेच पारतंत्र्य आवडत नसते. राजर्षींच्या भाषणांतून/पत्रव्यवहारांतून हा अन्वयार्थ वाचता आला पाहिजे. केवळ झोडपण्याने, काणाडोळा करण्याने किंवा विकृत रचनेने हे वाचन करता येत नाही.

शाहू छत्रपतींचे सर्वंकष व्यक्तिमत्व, सर्वस्पर्शी विचार आणि दूरपरिणामी लोककार्य हे त्यांच्या राजेपदाच्या बैठकीतून, मुत्सद्देगिरीने उपजलेले देवदत्त कार्य आहे. इतिहासदत्त देणे आहे. जीवीच्या जिव्हाळ्याने फुललेला तो मार्गदर्शक इतिहास आहे. तो घडला, तो काळ एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाचा पूर्वार्ध होता. राजर्षी शाहूंचा जन्म २६ जुलै, १८७४ मधला. १७ मार्च, १८८४ मध्ये त्यांचे दत्तकविधान झाले आणि २ एप्रिल, १८९४ मध्ये त्यांनी राज्यसूत्रे हाती घेतली. ह्या सगळ्या घटना एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील आहेत. ६ मे, १९२२ साली मुंबईच्या 'पन्हाळा लॉज' मध्ये राजर्षींचे देहावसान झाले. ही अखेर, विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील आहे. शाहू छत्रपतींचा हा कालखंड स्थूलमानाने एकोणिसाव्या – विसाव्या शतकाच्या उत्तरार्ध-पूर्वार्धातील आहे. म्हणजे त्यापूर्वीच्या कालखंडात राजर्षींच्या कार्याचे बीज तर त्यानंतरच्या कालखंडावर राजर्षींच्या कार्याचे दीर्घसूत्री परिणाम आहेत. त्यासाठी थोडे मागे वळून पहावे लागते.

शाहूपूर्व काळाचे परिशिलन :

सन १८१८ मध्ये पेशवाई बुडाली, मराठी साम्राज्याची अखेर झाली. ब्रिटिश अधिसत्ता अप्रतिहतपणे राज्य करू लागली. मात्र पेशवाईचे परिणाम महाराष्ट्राला ग्रासून राहिलेले होते व आठवतही होते. "पेशवाईचे वर्णन करावयाचे झाले तर ते दंगेधोपे, लढाया, युद्धे, दानधर्म, हव्यकव्य ह्यांच्या दंगलीचा काळ असे

थोडक्यात करता येईल. भिक्षुक, शास्त्रीपंडित, हरिदास, पुराणिक ह्या सर्वांचे उच्च ग्रह एकादशस्थानी ह्या काळात आले होते असे वाटते. अन्नसंतर्पण, दाने, व्रतवैकल्ये, प्रायश्चित वगैरे प्रकार सारखे चालू होते. द्रव्याला स्पर्श न करणाऱ्या संन्याशांच्या समोरही द्रव्याच्या राशि पडत. आजार घालविण्याकरिता अनेक तोडगे करीत. दानधर्मापेक्षा तोडग्याचा उपाय हीन संस्कृतिदर्शक आहे. (तरीही) शिशाची यंत्रे आजारी मुलाच्या गळ्यात बांधली म्हणजे रोगपरिहार होतो अशी समजूत होती. ह्याखेरीज दारू व मांस अंगावरून ओवाळून टाकीत ... ... महामारीचे अनुष्ठान, प्रदक्षिणेचे अनुष्ठान, पर्जन्यासाठी अनुष्ठान अशी नाना प्रकारची अनुष्ठाने मोठ्या कष्टाने करण्यात येत ... गाईच्या गळ्यात दावे असताना तिचा प्राण जाऊ देणे ... नालबंध घोडा मरण पावणे ... हे पापदायक समजत ... (ते) पाप समजून प्रायश्चित घ्यावे लागे ... ज्योतिषावर विश्वास बराच होता. ...प्रत्येक कृत्य मुहूर्त पाहून होत असे ... सहस्रभोजने वारंवार होत. पण लक्षभोजनेही घालण्यात येत ... पेशव्यांची श्रावणमास दक्षणा सर्व हिंदुस्थानभर गाजत होती. (तर) मनुष्याची खरेदीविक्री पेशवाई अखेरपर्यत चालू होती...” असे श्री. ना. चाफेकर यानी ‘पेशवाईच्या सावलीत’ (पृ. ४६, ४९ व ५२) मध्ये नमूद करून ठेवले आहे; यावरून पेशवाईमध्ये सर्वसाधारण बाबींबाबत मोठी अंदाधुंदी होती आणि त्या अंदाधुंदीला धार्मिक कडा होती. त्यामुळे तीव्रताही वाढत होती. लो. टिळकांनीच निर्देश केलेल्याप्रमाणे असे हे, ‘ब्राह्मणी राज्य’ नष्ट झाले तरी त्याचे परिणाम मात्र राहिलेच. क्रिया झटपट होऊन जाते, पण दृश्य-अदृश्य परिणाम वातावरण धरून असतात. ते, तेवढीच प्रभावी क्रिया घडल्याखेरीज ‘झाड’ सोडत नाहीत. ‘झाड’ धरलेले आहे, उपाय थांबलेले नाहीत, धरणे सुटण्याची चिन्हे नाहीत; या पार्श्वभूमीवर शाहू छत्रपतींचा उदय झाला आहे.

पेशवाई संपुष्टात आल्यानंतरच्या पाऊणशे वर्षांच्या काळात हिंदुस्थान आणि महाराष्ट्र यामध्ये राजकीय संक्रमणाबरोबर सामाजिक संक्रमणही होऊ लागले होते. इंग्रजी भाषा, पाश्चात्य रीतिरिवाज आणि जीवनपद्धती, कायद्याचे अधिराज्य, एकसूत्री आणि एकतंत्री राज्यकारभार, दळणवळण व वाहतूक यांचा सर्वदूर वाढता प्रसार. त्यामुळे लाभलेली शांतता, मिळालेले स्वास्थ्य आणि विचारप्रक्रियेला व जीवनरीतीला मिळालेली गती इत्यादी गोष्टींमुळे भारतीय समाज ढवळून निघाला. ब्रिटिशामुळेच व्यक्तिस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, बुद्धीप्रामाण्य, ऐहिकतेचे सुखसंवर्धन इत्यादी कल्पना, तत्त्वज्ञानाच्या स्वरूपात भारतीय समाजाला पहिल्यांदाच परिचित झाल्या. त्यातूनच स्त्रीदास्य, त्याचे घटक: बालविवाह, जरठ कुमारी विवाह, विधवाविवाह, प्रेमविवाह, केशवपन वगैरे समस्यांविषयी विचारमंथन होऊ लागले. परिणामी शब्दप्रामाण्य, अंधश्रद्धा, अज्ञान, जीर्णशीर्ण रूढी यांना तडे जाऊ लागले. सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेला आस्ते कदम प्रारंभ झाला.

त्या दृष्टीने महाराष्ट्रातील तत्कालीन समाजसुधारणा, राजकीय मतप्रवाह आणि धार्मिक गुलामगिरी यासंबंधात विचार करता, ब्रिटिश सत्तेच्या अधिपत्यानंतर नव्या विचारांचा प्रादुर्भाव, त्यानंतर साधारणपणे चाळीस वर्षांनी झाल्याचे आढळते. बाळशास्त्री जांभेकरांच्या ‘दर्पण’ पाक्षिकाने नव्या विचारांच्या प्रभातकाळास प्रारंभ केला. जाने. १८३२ मध्ये ‘दर्पण’ हे इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांत मराठी वृत्तपत्र निघाले; ‘दर्पण’ आणि त्यानंतर १८४० मध्ये निघालेल्या ‘दिग्दर्शन’ नावाच्या मासिकाने मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला असे नव्हे तर स्वतंत्र विचारप्रक्रियेची मुहूर्तमेढही रोवली. ‘दर्पण’ चा हेतू, मत किंवा वृत्त देणे एवढाच नव्हता तर अनेक विद्यांचा अभ्यास, प्रसार आणि व्यासंग करणे हा होता. त्याचे परिणाम महाराष्ट्राच्या जीवनावर झाले. बाळशास्त्र्यांनी फक्त मराठी नियतकालिकांचाच पाया घातला नाही तर शेषाद्री नारायण या ख्रिस्ताळलेल्या विद्यार्थ्याचे शुद्धीकरण करून पुनः त्याला स्वधर्मात आणले. स्त्रीदास्याचा निषेध केला. विधवाविवाहाचा पुरस्कार केला. नियतकालिके, पतितपरावर्तन आणि

विधवाविवाह या, तीन शाखांत महाराष्ट्राने केलेल्या प्रगतीचे श्रेय, आद्यप्रवर्तक म्हणून जांभेकरांच्याकडे जाते; हे लक्षात घ्यायला हवे. पण जांभेकरांच्या संदर्भात विचार करताना वृत्तपत्राच्या अनुषंगानेच, विचार करण्याची प्रथा राखली गेल्याने, त्यांचे आद्य प्रवर्तन करणारे इतर कार्य दुर्लक्षिले जाते. २२ जून, १८४४ मध्ये दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी सुरत येथे 'मानवधर्म सभा' स्थापन केली. मुंबईला, १८४९ मध्ये, याच 'मानवधर्म सभे' ची 'परमहंस सभा' ही सुधारित आवृत्ती निघाली. दादोबा पांडुरंग हेच त्याचे निर्माते होते. साऱ्या सृष्टीचा निर्माता आणि नियंता एक ईश्वर आहे, मनुष्यमात्राची जाती व धर्म एकच आहे, विवेकाला अनुसरून कर्म करावे इत्यादी तत्त्वे, 'परमहंस सभे'ने स्वीकारली होती. बारीक सारीक असे प्रयत्न सुरू असताना जांभेकरांची 'दर्पण' ची परंपरा गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी पुढे चालविली. भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' पत्रामधून लोकहितवादीनी 'शतपत्रे' लिहिली. १८४८ मध्ये. रूढ अर्थाने, 'शतपत्रे' शंभर असल्याचे मानले गेले असले तरी मुळात ती एकशे आठ आहेत. पैकी १०१ व्या पत्रामध्ये 'शतपत्रांचा इत्यर्थ' लोकहितवादीनी समजाऊन सांगितला आहे. सामाजिक जाणिवेने प्रेरित होऊन, लोकहितवादीनी आपल्या चौफेर लेखनातून, समाजातील जातिभेद, बालविवाह, जरठकुमारी विवाह, नेटिव्ह अंमलदारांचा उद्दामपणा, अस्थानी व अपात्री दानधर्म, व्रतवैकल्यांचा धुमाकूळ, हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणे इंग्रजी राज्याच्या 'दैवी देणगी' मागची कल्पना, देव, दैव आणि दैववाद यामुळे भौतिक जीवन व धर्म यामध्ये झालेली गल्लत व आलेले गतानुगतिकत्व, यांत्रिक युग आणि नवविचारांचा अभाव यामुळे सर्जनाची मंदावलेली दृष्टी, हिंदु लोकांची द्रव्योपयोगाविषयीची समजूत, हिंदू लोकांचा व्यापार, विधिनिषेधरूपधर्माचे मूळ अशा अनेक विषयांवर त्यांनी प्रखरतेने लिहिले. त्याचबरोबर त्यांनी जातिनिरपेक्ष आणि वर्गनिरपेक्ष संसदीय लोकशाहीचा, तसेच स्त्रीशिक्षण व विधवाविवाह यांचा पुरस्कारही केला. आत्यंतिक तळमळीच्या उत्कट भावनेने लोकहितवादीनी हे केले. पण विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा देशाभिमान असा प्रायः 'भाषामय' होता त्याचप्रमाणे लोकहितवादींची वाणी आणि लेखणी जितकी तिखट आणि जहाल होती तितकीच वृत्ती आणि कृती पोचट आणि मवाळ होती. आचार-विचारात संगती असली की सांगण्याला कवचकुंडले प्राप्त होतात. विसंगती आली की कवचकुंडले हरवून बसलेल्या कर्णासारखी दीन अवस्था होते. लोकहितवादींच्या समाजजीवनविषयक लेखनाचे तसेच झाले. दरम्यान स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा तसेच शील, स्वातंत्र्य आणि स्वाभिमान या मूलतत्त्वांबाबत, कुठेही तडजोड न करणाऱ्या, पूर्वपरंपरेची अनिवार हौस बाळगणाऱ्या रसलोलुप वृत्तीच्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या विजीगीषु लेखनाच्या गौरवात आणि त्यांच्या विध्वंसकवृत्तीच्या टीकापद्धतीत विचारवंत इतके गुंतून पडले की, लोकहितवादींचे त्यांना भानच राहिले नाही. आधुनिक मराठीमधील सुडौल, पक्क, प्रौढ व प्रतिष्ठित निबंधाचे जनक विष्णुशास्त्री ठरविले जात असताना लोकहितवादी 'मराठी निबंधाचे आद्य जनक' ठरतात, हे टाळले गेले. पण उत्तम रसिक प्रचारक असलेल्या विष्णुशास्त्र्यांच्या सत्यप्रियवृत्तीला निर्भयतेची जोड मिळाल्याने त्यांच्या प्रतिपादनाला उर्जस्वलता आणि शैलीला आक्रमकता लाभलेली असली, बुद्धिप्रागल्भ्य, सद् वर्तनासंबंधीची आस्था आणि आपला देश व आपले लोक यांच्या हितबुद्धीची अनिवार कळकळ त्यांच्या स्वातंत्र्यवादी लेखनातून प्रकट होत असली तरी प्रगतिपर सुधारणांच्या सक्रियतेच्या दृष्टीने सोडाच पण केवळ प्रतिपादनाच्या दृष्टीनेही त्यांच्या विचारातील कोतेपणा किंवा व्यापक दृष्टीचा अभाव, हे प्रगतिपर समाजाला जीवनवर्धक ठरले नाहीत. चिंतनशील अभ्यासकापेक्षा हमेशा शूर लढवय्याच्या पवित्र्यात असलेल्या चिपळूणकरांच्या लेखनात विकारवशतेबरोबर उज्ज्वल आशावादाचे प्रोत्साहक दर्शन असले तरी सनातन, पारंपारिक मूल्यरक्षणाचे काम ते प्राणपणाने करतात हे विसरून चालत नाही.

म. जोतिबा फुले यांनी, हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच ठणकावून आणि दणकावून 'सार्वजनिक सत्यधर्म' सांगितला. सांगितला आणि आचरिला. म्हणून फुल्यांचे महत्त्व दुहेरी आहे. फुले एकांगी नाहीत,

अनुक्रमणिका

अनेकांगी आहेत; जोतिबांनी १८५४ मध्ये पहिली मुलींची शाळा उघडली. १८५५ मध्ये महार-मांगांच्या मुलांसाठी व कामगारांसाठी रात्रीची शाळा खोलली. १८६० मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले. आणि काशीबाई ह्या ब्राह्मण विधवेला झालेला मुलगा 'यशवंत' ह्यास दत्तक घेतला. जोतिबांनी १८६८ मध्ये स्वतःच्या घरातील हौद अस्पृश्यांना खुला केला. २४ सप्टेंबर, १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाजा' ची स्थापना करून १. ईश्वर एक आहे. २. त्याच्या भेटीसाठी 'दलाला'ची गरज नाही. आणि ३. जातीवरून नव्हे तर गुणांवरून माणसाची श्रेष्ठता मापली पाहिजे; अशी तीन सूत्रे सांगितली. उपनिषद्काळानंतर प्रचलित हिंदू ग्रंथाविरुद्ध एवढा लखलखित असा हा आविष्कार एकमेव होय. त्याआधारे फुल्यांनी सामाजिक विषमता अज्ञान, रूढी, अंधश्रद्धा याविरुद्ध बंड उभारले. 'सार्वजनिक सत्यधर्म', 'गुलामगिरी' 'शेतकऱ्याचा असूड' यासारख्या छोट्याखानी पण बहुगुणी ग्रंथांमध्ये फुल्यांच्या विचारांचे 'सार' समाविष्ट झाले आहे.

म. फुल्यांनी, शिक्षणविषयक 'झिरपणी सिद्धांता' ला विरोध केला. 'वरून खाली शिक्षण कसले देता? ते खालून वर गेले पाहिजे. सरकारने कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणाची आबाळ केली आहे,' असे ब्रिटिश शासनाला ठणकावून सांगणारे फुले यांच्याखेरीज, त्याकाळी अन्य कुणी प्रवक्ते नव्हते! समाजातल्या साऱ्या थरांतील हीनदीनांच्या उद्धाराची उत्कट तळमळ, समाजातल्या अवघड सुधारणांना निर्भयपणे हात घालण्याचे विलक्षण मनोधैर्य, त्यासाठी कोणताही धोका पत्करण्याची आणि त्याग करण्याची कडोविकडीची जिद्द, 'बोले तैसा चाले' ची निर्भयवृत्ती; निर्लोभ, निरहंकारी, अनृण बाळगण्याची प्रवृत्ती इत्यादी असामान्य गुणांमुळे, समाजक्रांतीचा अग्रणी आणि संघटक म्हणून महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासातील म. फुल्यांचे स्थान अढळ आहे. संतांच्या कळवळ्याने सामाजिक प्रगतीची सूत्रे मांडून, समाजाला आत्मबळ देणारे म. फुले सामाजिक शास्त्रज्ञ होते.

याच सुमारास पुण्यामध्ये न्या. महादेव गोविंद रानडे यांनी आपल्या सामाजिक कार्याला प्रारंभ केला. रानडे यांनी सुधारणेच्या क्षेत्रात महाराष्ट्राला पहिला मोठा विचार शिकविला तो हा की राजकारण, अर्थकारण, धर्मकारण व समाजकारण ही समाजाची भिन्न अंगे परस्परांशी अगदी संबद्ध अशी आहेत. समाजकारणात प्रतिगामी असलेला समाज राजकारणात पुरोगामी असेल हे असंभवनीय आहे. मानवनिष्ठा हीच न्यायमूर्तींची जीवननिष्ठा होती. त्यासाठी त्यांनी सर्वांगीण सुधारणेचा आणि प्रगतीचा पुरस्कार करून राष्ट्रीय सभा; सामाजिक परिषद, औद्योगिक परिषद ह्यांच्या स्थापनेमध्ये पुढाकार घेतला. परंतु समाजकारणात काय किंवा राजकारणात काय न्यायमूर्तींचा पिंड क्रांतिकारकाचा नव्हता. ते त्यांच्या उदारमतवादास व नेमस्तपणास अनुसरूनच होते. यानंतरची महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीची धार 'आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा या वादाने बोथट झाल्याचे दिसते. सामाजिक सुधारणा वादाची कास, 'देव न मानणारे देवमाणूस' गोपाळ गणेश आगरकर यांनी धरली तर लोकमान्य टिळकांनी राजकीय सुधारणावादाची पताका खांद्यावर घेतली. आगरकरांनी १८८८ मध्ये 'सुधारका' ची स्थापना करून स्त्रीशिक्षण, बालविवाह, प्रौढविवाह, प्रेमविवाह मिश्रविवाह, जातीय विषमता, चातुर्वर्ण्य इत्यादी सर्व विषयांवर इरेसरीने लिखाण केले. आगरकर बुद्धिवादी व अज्ञयेवादी होते. भौतिक व शारीरिक व्याधींनी विकल् होऊनही दमा, दारिद्र्य आणि समाजाचा ससेमिरा हात धुवून पाठीशी लागला असताही त्यांनी कडोविकडीच्या भावनेने विचारस्वातंत्र्याचा, व्यक्तिस्वातंत्र्याचा, ऐहिकतेच्या सुखसंवर्धनाचा आग्रहाने पुरस्कार केला. लोकमान्य टिळकांचा सामाजिक सुधारणेला विरोध नसला तरी राजकीय चळवळीच्या उत्साहामध्ये त्यांनी अनेकप्रसंगी प्रतिगामी भूमिका स्वीकारली. एवढेच नव्हे तर नसता वितंडवाद घालून सामाजिक सुधारणेच्या मार्गामध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने अडथळे निर्माण केले. वेदोक्त प्रकरणामधील लोकमान्यांची भूमिक अशीच, परिस्थितीच्या आकलनात न्यून राखणारी आहे,

जोतिबा फुल्यांच्या अगोदर आणि नंतर कार्य करणाऱ्या बाळशास्त्री जांभेकर, रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर, जगन्नाथ शंकरशेठ, लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, न्यायमूर्ती रानडे, आगरकर प्रभुती सुधारकाग्रणींमध्ये तर्खडकर व जगन्नाथ शंकरशेठ हेच काय ते ब्राह्मणेतर होते. दादोबा हे मूलतः तत्त्वचिंतक होते. समाजसुधारणेचे कार्य प्रत्यक्ष हाती घेण्याइतपत मानसिक धैर्य त्यांच्याकडे नव्हते. त्यांच्या सुधारणेची हालचाल परिचितांपुरतीच मर्यादित राहिली. दुसरे नेते जगन्नाथ शंकरशेठ. त्यांचे लक्ष्य मुख्यतः राजकीय सुधारणांकडेच होते. सुधारणा सर्वंकष होत्या हे वादातीत पण जगन्नाथ शंकरशेट यांच्याबाबत एक असे घडले आहे की, ते मुख्यतः मुंबईचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. मुंबईसाठी काम करणारा माणूस महाराष्ट्राचा असतो पण महाराष्ट्र त्याचा नसतो. कारणे कोणतीही असली तरी जगन्नाथ शंकरशेठ महाराष्ट्राला पूर्णतः परिचित होऊ शकले नाहीत, हे नाकारता येत नाही. खेरीज जगन्नाथ शंकरशेठ ज्या राजकीय सुधारणा करू पाहत होते, त्यातून कुणी बाहेर राहू शकत नव्हता तरी त्याचे क्षेत्र प्रामुख्याने शहरी भागाशीच अधिकतर निगडित होते. त्यामुळे जगन्नाथ शंकरशेट मुंबईचे झाले; मुंबईचेच राहिले. सुधारणांचे परिणाम मात्र विस्तृत पटावर दिसले.

एकूण दृष्टीक्षेप टाकता, महाराष्ट्रात नेतृत्वाची, विचारवंतांची आणि प्रतिभासंपन्न समाजसुधारकांची परंपरा अखंडपणे चालत आली आहे. आपापल्या परीने ती कार्य करीत राहिली आहे. प्रत्येक देशात सुधारक विचारवंत निर्माण होत असतातच पण त्यांची परंपरा असण्याचे भाग्य महाराष्ट्रासारख्या एखाद्या प्रांतालाच लाभते. हिंदुस्थान देशातील ब्रिटिशांच्या आगमनानंतर इतर अनेक गोष्टींबरोबर, सामाजिक प्रबोधनाची गतीही वाढली, हे सत्य आहे. सामाजिक प्रबोधनाचा गोवर्धन उचलण्यास अनेकांचा हातभार लागला. काम कठीण असूनही, लोकप्रियतेचे नसूनही अनेकांनी आपला हविर्भाग समर्पित केला. ती परंपरा आजअखेर अखंडितपणे चालू आहे.

भारतीय पार्श्वभूमीवर विचार :

ह्या पार्श्वभूमीवर शाहू छत्रपतींच्या काळाचा, त्यांच्या संस्थानाचा, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा विचार केव्हाही युक्तच ठरेल.

शाहू छत्रपती कागलकर घाटगे 'जहागिरदार' घराण्यातून करवीर छत्रपतींच्या घराण्यात दत्तक आले. दैवयोगाने राज्यपदी आरूढ होऊन शाहू छत्रपती झाले. एका बाजूने एका जहागिरदार घराण्यात जन्म घेतलेले उदार मनाचे यशवंतराव-शाहू - आबासाहेब घाटगे यांच्या सारख्या लोकहितदक्ष चाणाक्ष जहागिरदाराचे चिरंजीव 'छत्रपती' होतात आणि शिवशाहीचे अविस्मरणीय अवशेष वंशज ठरतात. तर दुसऱ्या बाजूने ताराबाई महाराणीसाहेबांसारख्या रणरागिणी धुरंधर स्त्रीने निर्माण केलेल्या आणि जिजाबाईसारख्या मुत्सद्दी महाराणी साहेबांच्या राजकारणाने समर्थ बनलेल्या कोल्हापूर राज्याचा वारसा त्यांना प्राप्त होतो; हा शुभयोग होय. 'बाहेरुन' आलेल्या 'आतल्या' शाहू छत्रपतीनी परंपरेचे अचूक भान ठेवून हा वारसा आणि ही परंपरा अधिक तेजस्वी बनविली. पुढे जाऊन शाहू महाराजांनी आधुनिक काळाला उचित असा दृष्टीकोन स्वीकारला व सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात प्रभावी कार्य केले. त्यानी कोल्हापूर राज्याला 'आधुनिक' बनविले आणि महाराष्ट्रात समतेचा विचार प्रसृत केला. कोल्हापूर रियासत 'सुपीक' बनविली.

अनुक्रमणिका

शाहू महाराज कोल्हापूर संस्थानच्या गादीवर आले, त्यापूर्वी कोल्हापूर राज्यावर पंचावन्न वर्षे 'अज्ञान राजवट' (Minority Regim) होती. शाहू छत्रपतींच्या १८९४ मधील राज्याधिकार प्राप्तीने ती संपली आणि कोल्हापूर राज्यात सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात एक नवे युग निर्माण झाले. एका आधुनिक उज्ज्वल कालखंडाची प्रभात झाली. संध्याकाळ संपून नव्या प्रभातकाळास प्रारंभ झाला.

राजर्षी शाहू महाराजांचा २६ जुलै, १८७४ मध्ये जन्म झाला त्याच साली विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'ने रसललोलुप वाङ्मयीन तोफा डागून मराठी माणसाची अस्मिता झळाळत ठेवली, राष्ट्रनिष्ठेचा डांगोरा पिटला आणि थोडेफार भान निसटून त्या बुरख्याआडून क्षत्रिय कुलातील समाजसुधारकांवर टीकेचा अग्निवर्षावही केला. राजकीय स्वातंत्र्यासाठी सामाजिक सुधारणेला शह मिळाला तरी चालेल अशा विचारसरणीचे हे युग होते; त्या युगाला कलाटणी देण्याचेच नव्हे तर राजकीय स्वातंत्र्याइतक्या सामाजिक सुधारणा सर्वश्रेष्ठ आहेत, अवश्यमेव आहेत, अशा धारणेचे बीजारोपण म. फुले-आगरकर आणि नंतर शाहू छत्रपतींनी केले. मोठ्या जिद्दीने, अस्मितापूर्ण भावनेने केले. 'क्षात्रधर्म हाच सर्वश्रेष्ठ धर्म होय,' ह्यातच सर्व धर्मांचा समावेश होतो, ही विचारसरणी त्यांनी कृतीने रुजविली. जनक पिते आबासाहेब घाटगे यांच्यासारख्या कर्तबगार पित्याचा विधायक वारसा शाहू राजाना लाभला. त्यांच्या सान्निध्यात त्यांनी राजकर्तव्यदक्षतेचे धडे गिरविले. 'प्रजेचे सुख ते राजाचे सुख. तिचे जीवन ते आपले. प्रजेव्यतिरिक्त राजाला अन्य जीवन नसते. राजाला फक्त कर्तव्ये असतात, हक्क नसतात म्हणून प्रजेचा उत्तरदायी राजा असतो', हे राजतत्त्वाचे बाळकडू शाहू महाराजांना बालपणापासूनच मिळत गेले. आणि त्यामुळेच शाहू महाराजांनी स्वकर्तृत्वाने राजधर्माचे श्रेष्ठत्व सिद्ध करून दाखविले. राजधर्माने मानवी जीवनातील सर्व धर्मांचा विकास साधता येतो हे, त्यांनी राष्ट्रवाद्यांना सज्जडपणे दाखवून दिले. कोल्हापूरच्या छत्रपतींच्या गादीचा वारसा आणि कर्तबगार, उदारमतवादी, मुत्सद्दी आबासाहेबांचा सहवास, शाहूसकट राजकुलातील मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत आबासाहेबांनी घेतलेली दक्षता, राजकोटच्या 'प्रिन्स कॉलेजा'त अत्यंत विश्वासू गोखले बंधूंच्या सहवासात देण्यात आलेले शिक्षण त्यामुळे पुढील जीवनात शाहूंच्या मनात उदारमतवादी लोकशाही राज्यपद्धतीचे बीजारोपण होण्यास मदत झाली. सर्वांच्या विकासासाठी अविरत उद्योग हा जो आबासाहेबांचा स्वभावविशेष तोच शाहू महाराजांनी अंगिकारला. सर्व राज्यकारभार पोलिटिकल एजंटच्या सल्ल्याने चालत असला तरी मोठ्या मुत्सद्दीपणाने त्यांनी त्यातूनही कार्यकर्तृत्वाचे स्तंभ उभारले. केवळ मराठा जातीसाठी नव्हे, केवळ ब्राह्मणेतरांसाठीच नव्हे तर जातपात कुठलीही असो, जो दलित-छलित-पतित असेल त्याच्या उद्धारासाठी विशिष्ट ध्येयनिष्ठेने मराठ देशातील एकजात अवघ्यांच्या प्रगतीची स्वप्ने पाहणारे शाहूराजे हे कार्यकर्त्यांचे नेते होते. सामाजिक सुधारणांसाठी राजकीय सत्तेचा वापर करून क्षात्रधर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे हे सिद्ध करणारे ते तत्त्वज्ञानी राजर्षी होते.

शाहूंचे स्वातंत्र्यपूर्तीचे राजकारण :

२ एप्रिल, १८८४ मध्ये वयाच्या विसाव्या वर्षी राजर्षी शाहूंना राज्याधिकार मिळाले. तसा हा काळ फार अल्प पण राज्याधिकार मिळता मिळताच १९०० ते १९०५ या काळात, वयाच्या सव्वीसाव्या वर्षी वेदोक्ताची आगडोंब उसळविणारी चळवळ उद्‌भवली. ताईमहाराज प्रकरण ह्या दरम्यानचेच. १८९८ ते १९०१ मधील. जानेवारी, १९२१ मध्ये वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षी क्षात्रजगद्‌गुरुपीठाची स्थापना केली. राज्याधिकार स्वीकारापासून (२ मे, १९२२) अखेरच्या एकूण अठ्ठेचाळीस वर्षांच्या काळात शाहू महाराजानी विविधस्पर्शी कामे केली. दुष्काळी कामे काढून शेतकऱ्याना तगाई, स्वस्त धान्याची दुकाने उपलब्ध करून देण्यापासून

(१८९७) तो वेदोक्त चळवळीचा रणसंग्राम लढविण्यापर्यंत (१९०० ते १९०५), निरनिराळ्या जातींमधील विद्यार्थ्यांसाठी समता वसतिगृहाची-बोर्डिंग्जची-निर्मिती करण्यापासून (१९०१ ते १९११) तो गोवध बंदी कायद्यापर्यंत (१९०१), मागासलेल्या जातीना नोकरीत पन्नास टक्के जागा राखीव ठेवण्याचा आदेश काढण्यापासून (२६ जुलै, १९०२) तो सहकारी तत्त्वावर 'छत्रपती शाहू मिल्सची' स्थापना करण्यापर्यंत (सप्टें, १९०६), कोल्हापूर येथे 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना करण्यापासून (१९११) तो 'कोल्हापूर राज्य सहकारी कायदा' मंजूर करण्यापर्यंत (१९१२), प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचा आदेश काढण्यापासून (१९१२) तो पाटलांच्या मुलांना शिकविण्यासाठी 'पाटील स्कूल्स' ची निर्मिती करण्यापर्यंत (१८१३), 'कोल्हापूर राज्य पुनर्विवाहाचा कायदा' मंजूर करण्यापासून (जुलै, १९१७) तो कुलकर्णी वतने, बलुते पद्धत, महारकी किंवा गुन्हेगारी पद्धत बंद करण्यापर्यंत (१९१८), 'शिवाजी क्षत्रिय वैदिक पाठशाळे'ची स्थापना करण्यापासून (६ जुलै, १९२०) तो 'क्षात्रजगद्गुरूपीठा'ची निर्मिती करण्यापर्यंत (जाने, १९२१) असे अनेक रीतीचे कार्य शाहू छत्रपतींनी उभारले: या साऱ्या कार्याचे पाच प्रकारात वर्गीकरण करता येते; ते असे:

१. लोकशिक्षणातून लोकजागृती
२. त्यासाठी, शिक्षण प्रसाराचे हत्यारासारखे उपयोजन
३. त्याकरिता सामाजिक सुधारणांचे कृतिशील उच्चारण
४. आणि आर्थिक विकासादी प्रकल्पांचे/उपायांचे नियोजन
५. त्यामधून स्वातंत्र्याचे जागरण

या दृष्टीतून, शाहू छत्रपतीनी हयातभर कार्य केले.

राजर्षीनी व्यापकपणे बहुजनांचे शिक्षण, स्त्रियांचे शिक्षण, अस्पृश्यांचा उद्धार, मागासलेल्यासकट बहुजनांना उद्योगधंद्यात व शासकीय नोकऱ्यांत प्रतिनिधित्व, अल्पसंख्यांकामध्ये सौहार्दभाव वगैरे गोष्टी जीवितांचे एकमेव कार्य या नात्याने केल्या. 'लोकसेवा' हा त्यातील मूलभूत भाग होता. त्यात विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे पूर्वसुरीपेक्षा हरिजन आणि आदिवासी यांच्या शिक्षणाकडे प्रथमतःच भरीवपणे लक्ष देण्यास प्रारंभ झाला होता. शाहू छत्रपती हे 'मराठा' सरदार; ब्रिटिशांचे मांडलिक सरदार या नात्याने त्यांना काही मर्यादा आहेत आणि मांडलिक म्हणून त्यांच्यावर काही बंधने होती. ह्या मर्यादा आणि ही बंधने स्वीकारून मराठा राजा लोकनेतृत्व करीत आहे. नेतृत्वाची परंपरा हे काही तसे मराठा मंडळींचे व्यवच्छेदक लक्षण नव्हे. लढणे, प्राणपणाने लढणे, सर्वस्वाचा होम करून लढणे ही मराठ्यांची परंपरा. हेवेदावे, मदमत्सर, पाय ओढणे, वगैरे त्यांचाच वारसा. हे सर्व टाकून, म्हणजेच बाजूला ठेवून लोकसेवेच्या आघाडीवर शाहू छत्रपती अखंड झुंजले. परिणामी काही विशेष गोष्टी घडल्या. 'शाहू छत्रपती हे 'मराठा' सरदार आणि सरदार हा सरंजामदार असतो, सरंजामदार हा प्रतिगामी आणि प्रतिगामी लोकशाहीवादी कधीच असत नाही.' असेही एक सांगितले जाते. पण हे खोटे ठरते. आणि शाहू छत्रपतींच्या कार्याचे मूल्यमापन केल्यास ते लोकशाही सूत्रांनाच जवळ येते, हे लक्षात येते.

शाहू छत्रपतींनी आजकालच्या लोकशाहीच्या संदर्भाने कार्याची उभारणी केली, असे म्हणणे किंवा ते 'हरित् क्रांतीचे जनक आहेत' वगैरे वगैरे चालू काळातील परवलीचे शब्द तारस्वराने उच्चारीत राहणे ही अतिव्याप्ती झाली. मात्र शाहू छत्रपतींनी निव्वळ तत्त्वज्ञान सांगितले नाही, तर कार्याच्या अनुषंगाने तत्त्वज्ञानाची उभारणी झाली आणि 'सरंजामदार हा लोकशाहीवादी होऊ शकत नाही' असा हट्टाग्रह बाळगून, इतिहास

नाकारू पाहणाऱ्या मंडळींचे तसे पानिपत झाले. लोकशाहीचे रुजणे न रुजणे हे देशातल्या दगडा-धोंड्यांवर, कडेकपारीवर थोडेच अवलंबून आहे? ते त्यामधील माणसांच्यां समृद्ध जाणिवेवर उभे आहे. राजर्षींच्या संदर्भात ही जाणीव समृद्ध असणे जरूर आहे.

शाहू छत्रपतींनी इतिहासाच्या सिद्धांताना कलाटणी देण्याचे काम केले. कार्याने आणि कार्यांमधील धोरणाने. ब्रिटिशांचे मांडलिकत्व सांभाळतानाही स्वदेशी वाण नोकरीधंद्यात रिचवून, बहुजनसमाजाच्या घडीसकट स्वतःबरोबर कोल्हापूर संस्थानचे बस्तान स्थिर करण्याचा शाहू छत्रपतींचा प्रयत्न होता. परिस्थितीच्या गर्तेत खितपत पडलेल्या ब्राह्मणेतरांना अस्मितापूर्वक जीवनाचा वेद, वेदोक्त चळवळीच्या माध्यमाने त्यांनी दिला. लोकोद्धाराच्या प्रक्रियेत सर्व समाज-येतील त्यास घेऊन; न येतील त्यास मागे ठेवून अंतर्भूत करण्याची दृष्टी दिली. 'मराठा', 'संस्थानिक', 'मांडलिक' व 'कोल्हापूर संस्थान' या चौखांबांच्या बाहेर असलेल्या, शाहू छत्रपतीच्या ठोक व्यक्तिमत्वातून ही अर्थपूर्णता आकाराला आली. या चौकटीतच शाहू छत्रपती राहते तर शाहू छत्रपती 'शाहू छत्रपती' या नात्याने दृष्टीसमोर न येता एक मांडलिक संस्थानिक एवढीच त्यांची संकुचित प्रतिमा बाकी राहिली असती. तेवढेच शक्य होते. एकूणच शाहू छत्रपतींचा लढा, म्हणजेच बहुजनेतरांचा लढा हा मानव्याच्या प्रतिष्ठापनेसाठी होता. माणसांमधून विरत जाणाऱ्या माणुसकीच्या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होता. असे लढे अधूनमधून करावे लागतात. त्यामुळे रूळावरुन घसरलेल्या समाजाच्या गाड्या मार्गावर येणे सोपे जाते. शाहू छत्रपतींचा लढा हा कुणा एका जातीपातीच्या प्रतिष्ठापनेसाठी नव्हता. प्रतिष्ठेसाठी नव्हता. तो माणसाच्या मूलभूत स्वातंत्र्याच्या मागणीचा लढा होता. वेदोक्ताच्या अधिकाराची मागणी काय किंवा व्यापक शिक्षण प्रसाराची दृष्टी काय, शेवटी चार्तुवर्ण्याच्या चौकटीतील हरवलेल्या अधिकारांच्या प्राप्तीचीच मागणी होती. आणि त्याची पूर्तता म्हणजे चार्तुवर्ण्याची मर्यादित मोडतोड होती. पण मर्यादितपणातही मूलभूतता होती हे विसरून चालत नाही. केवळ कुठल्या विशिष्ट विभागाला हक्क प्राप्त व्हावेत, म्हणजे सारे संपले एवढी ही संकुचित मागणी नव्हती. आव्हान होते ते सर्वकष वर्णाश्रमाधिष्ठित जातीय चौकटीलाच होते.

शाहू छत्रपतींनी दूरदृष्टीने, दूरगामी परिणाम करणाऱ्या कार्याची संस्थारुप पायाभरणी करण्याकडे सतत लक्ष दिले. केवळ मराठा किंवा अन्य एखादा समाजच नव्हे तर खऱ्या अर्थाने 'बहुजन समाज' नजरेसमोर राखून शास्त्रशुद्धदृष्टीने कार्य केले. या बहुजनसमाजात बहुजनांचा हितवाद एकवटलेला होता आणि तो जातपातपंथभेद या पलीकडचा होता. राजर्षींच्या कार्याचा हा मुळी दोराच होता. तो कुठेही तुटू नये आणि विविध घटकावयवांनी बनणारा एकसंघ समाज दुभंगू नये याची काळजी राजर्षीनी, समाजाला धक्के देत असतानाही घेतली. शाहू छत्रपतींना खरे तर स्वाऱ्याशिकारीमध्ये, ख्यालीखुशालीने आयुष्य बेतशिरपणे कंठता आले असते. अवघड काहीच नव्हते. पण ते होऊ शकले नाही. स्वतःला विसरुन जगणाऱ्या लोकसमूहामध्ये, जागृतीचे बी पेरुन त्यांना मानवी हक्कांच्या सनदेसाठी कार्यप्रवृत्त करणे हे राजर्षींचे अंगिकृत कार्य होते. त्यांनी ते स्वीकारले, 'प्रसंगी गादीचा त्यागही करीन पण हातातले कार्य टाकणार नाही.' असा राजर्षींचा बाणा त्यांच्या दृढ निर्धाराचे प्रतिक झाला. हा आत्मसमपर्णाचा आवेश शाहू छत्रपतींच्या असामान्यत्वाचे लक्षण होय. हे असामान्यत्व फक्त ब्रिटिश राज्यकर्त्यापुरतेच नव्हे तर सर्वसाधारण जनतेमधील हितसंबंधियांच्या रागालोभाच्या बाबतीतही दाखविले गेले. करायचे ते करणारच, सोडणार नाही; मग त्याचे परिणाम काय व्हायचे असतील ते व्होवोत, या जिद्दीने पेटलेल्या शाहू छत्रपतींनी परकियाबरोबर स्वकियांचाही रोष ओढवून घेण्याची तयारी केली. आणि स्वकियांचा रोष तर फारच बोचक व दाहक असतो. निर्ममतेने परकियांसमोर लढ्याच्या पवित्र्यात झटकन उभे राहता येते; तर ममता सोडता येत नाही हीच मुळी स्वकियांच्या बाबतीत अडचण असते. एका बाजुने ब्राह्मण समाज त्यातही सरंजामी

मनोवृत्तीचा ‘मराठा’ समाज आणि त्यामध्ये कुचंबणारे इतर अशी ही अडचण होती. वरवरचे दोष बदलता येतात पण मूळ प्रवृत्तीला वळण देणे जिकीरीचे असते. ‘हक्कदार ब्राह्मण’ समाज, ‘सरंजामदार मराठा’ समाज आमि त्यामध्ये कुचंबणारे इतर यामधील ‘हक्कदारी’ आणि ‘सरंजामदारी’ या दोन्ही, स्वकिय बांधवांच्या प्रवृत्ती बदलणे ही कठीण गोष्ट होती. कुठल्याही बाबीवरची स्वामित्वाची भावना काढून टाकणे ही अवघडच गोष्ट असते. शाहू छत्रपतींनी ते केले. सत्तेच्या पटावर असलेल्या आणि सत्तेच्या राजकारणात घुटमळलेल्या दोघांच्याही नाड्या राजर्षीनी सैल करण्याचे आणि सामान्यांपर्यंत सत्ता नेण्याचे काम केले. शाहू छत्रपतींचे हे असामान्यत्व होय.

राजर्षींचे स्वातंत्र्यवादी कार्य

राजर्षी शाहूंचा विचार करताना त्यांनी प्रामुख्याने सामाजिक स्वरूपाचे काम केले. सामाजिक क्रांती केली आणि सामाजिक काम हे राजकींय कामाहून गौण आहे, असे मानण्याकडे कल आहे. हा कल इतका प्रभावी आहे की, त्याव्यतिरिक्त त्यांचे काम, सामाजिक क्रांतीचा एक गौण भाग आहे, स्वाभाविकपणेच त्याचा वेगळा परामर्श घेण्याची गरज नाही; अशी सर्वसाधारण वृत्ती दिसते. याचा एक परिणाम असा घडला आहे की, शाहू महाराजांच्या फक्त सामाजिक कार्यकर्तृत्वावरच लक्ष केंद्रित झाले आहे. आणि तेवढ्या प्रमाणात इतरांकडे दुर्लक्ष आहे. त्यामुळे शाहू महाराज एकांगाने एकारलेले आहेत, बहुअंगांनी समृद्ध नाहीत, अशी भावना दिसते. त्यामुळे आणखी असे घडले आहे की, शाहू महाराजांच्या शिक्षण व समाज या विषयीच्या पैलूंचाच विचार प्रामुख्याने होत गेला; पण तेवढ्या प्रमाणात आर्थिक प्रश्न, सहकाराचे क्षेत्र, पाटबंधारे-दळणवळण, लागवडींचे नवनवीन प्रयोग, दुष्काळविषयक तात्पुरती आणि कायम स्वरुपाची उपाययोजना, कारभार यंत्रणा आणि कायदेकानू, नोकरवर्ग आणि शिस्त, मागास वर्ग आणि त्यांच्यासाठीच्या सोयीसवलती इत्यादी अनेक प्रयत्न-धडपडींबाबत व्हावा तसा विचार होणे कठीण झाले. तसा विचार फारसा झालाही नाही. साहजिकच शाहू महाराज हे थोर क्रांतिकारक आहेत, समाजपरिवर्तक आहेत; एवढ्या शब्दापुरताच शाहू छत्रपतींचा विचार मर्यादित राहिला. उच्चभ्रूंच्यादृष्टीने शाहू महाराज हा त्यांचा विषयच नव्हता, आजही अपवादानेच आहे; गर्जना करणाऱ्या ब्राह्मणेतरांच्या डोळ्यासमोर तो असला तरी त्या विषयाकडे ज्या डोळ्यांनी पाहणे आवश्यक ते डोळेच कालपरवापर्यंत, स्वतःला बहुजनसमाज म्हणविणाऱ्या समाजाकडे नव्हते. असे डोळे आता थोडेफार प्राप्त होत आहेत. आणि म्हणून शाहू छत्रपतींनी केलेली क्रांती ही फक्त सामाजिकच नव्हती तर ती धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीयही होती, हे हळूहळू मांडले जात आहे. मान्य होत आहे. इतिहास सापडू लागला आहे, अर्थ लागू लागला आहे, संशोधन होऊ लागले आहे; हे जाणीव प्रगल्भ होत चालल्याचे चिन्ह आहे.

शाहू महाराजांच्या क्रांतीचे स्वरूप दुहेरी होते: परकिय आणि स्वकिय अशी ही रूपे. परकियांशी लढाई त्यांच्यामधील चांगले स्वीकारण्याबाबत होती, त्याचबरोबर त्यांनी हिरावून घेतलेले हिंदुस्थान देशाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठीही होती. दुसऱ्या लढाईला मर्यादा होत्या. शाहू महाराजांचे कोल्हापूर संस्थान हे मांडलिक संस्थान असल्याने मांडलिकीच्या मर्यादेत राहून करता येणे शक्य ते करण्याचा यांचा अटाकोट प्रयत्न होता. शक्यतो ब्रिटिश सत्तेशी संबंध अत्यंत सलोख्याचे, गोडीगुलाबीचे असल्याचा बहाणा करून, त्यांच्या पोटात शिरून त्यांचा काटा काढण्याचा त्यात मुत्सद्दीपणा होता. मांडलिकीची मर्यादा सांभाळून शाहू छत्रपतींना नम्रपणे एवढेच करणे शक्य होते. अधिक काही करावयाचे म्हणजे मांडलिकींच्या रिकीबीवरील मांड निसटण्यासारखे होते. ही मांड सुटणे याचा अर्थ, आधाराचे दोर स्वतःच स्वतःच्या हाताने कापून घेऊन निराधार होणे— म्हणजेच त्या आधारावर करू घातलेल्या सर्वंकष क्रांतीला पाठमोरे

होणे! शाहू महाराजांना हे अभिप्रेत नाही. मांडलिकीमुळे येणारे दोषारोप आणि निंदानालस्ती पत्करूनही शाहू महाराज मांडलिकीमधून प्रकट होणारी 'निष्ठा' टाकू पाहत नाहीत; त्याचा अर्थ मुत्सद्दीपणा हे आहे. दुसरा काहीच नाही.

म्हणूनच शाहू महाराजांची परकियांशी लढाई नव्हती असे नाही. ती होती; म्हणून तर शाहू महाराजांच्या संस्थानावर आणि त्यांच्या व्यक्तिगत हालचालीवर-उदा. विषप्रयोग प्रकरण-ब्रिटिश सत्तेचे बारीक लक्ष होते. शाहू महाराज राज्याचा भोग घेऊन धाटेमोठे किती होतात हे पाहण्यासाठी काही एवढी ही टेहळनजर नव्हती; हे ध्यानात घ्यायला हवे. रूढ अर्थाने परकिय सत्तेशी उघड उघड दोन हात करणारा तेवढाच 'क्रांतिकारक' ठरविण्याची, 'बंडखोर' म्हटला जाण्याची सर्वसाधारण पद्धत अगदीच व्यर्थ म्हटली पाहिजे. लढा प्रकट आणि अप्रकट दोन्हीही रीतींचा असू शकतो. आणि ह्या दोन्ही रीतींमध्ये अमुक एक रीतीचा लढा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असे म्हणता येत नाही. तसे म्हणणे आणि समजणे किंवा समजून-उमजून म्हणणे हे समंजसपणाचे लक्षण नव्हे. लढा लहान किंवा मोठा, कसाही असला तरी तो लढाच असतो. त्याचे परिणाम आणि त्याचा प्रभाव, त्याची तीव्रता आणि व्यापकता यावर तो अवलंबून असतो. शाहू महाराजांनी ब्रिटिशाशी अप्रकट-प्रकट लढा दिला. पारतंत्र्यात खितपत पडलेल्या मानवी मनांच्या गुलाम देशाला मुक्त करण्यासाठी ब्रिटिश सत्तेशी आणि स्वकियांशी, दोघांशीही गनिमी काव्याने लढा दिला. एक अप्रकटपणे दिला, दुसरा प्रकटपणे. पहिल्याचे स्वरूप अत्यंत वेगळे-सुईच्या नेढ्यातून, डोळे किलकिले करून दोरा ओवावा तसे! दुसरे एकदम वेगळे-खुल्या मैदानात डफावर थाप पडल्यावर आसमंत साद-पडसादांनी दुमदुमून जावे तसे! पण दोन्ही लढे परस्परांस पूरक होते. परस्परावलंबी व परस्पराश्रयी होते. शाहू महाराजांनी स्वकियांशी केलेला लढा, सर्वच अर्थाने विराट होता. समाजाच्या सर्वकष पारतंत्र्यापासून मुक्तता हा ह्या लढ्याचा हेतू होता. आणि सर्वकष पारतंत्र्य म्हणजे किती रीतीचे पारतंत्र्य? आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, सर्वरीतींचे; सर्व प्रकारचे. आणि ह्या स्थूल प्रकाराच्या परी तरी किती? असंख्य, अगणित. स्त्रिया, पुरुष या सर्वांना सर्वत्र व्यापून उरणाऱ्या. समाजाच्या तळामुळात खोलवर रुजून जीवनरस शोषून घेऊन, समाजजीवनाचा चोथा करणाऱ्या. त्याला अटक म्हणून कसली ती नाहीच! 'गुलामगिरी' हाच ज्या समाजजीवनाचा जाहीरनामा, त्यास गुलामीच्या परिसीमेची देखील अटक नसते. दीनदलित वर्ग, त्याची अत्यंत शोचनीय अवस्था, शोषणाच्या विविध वाटा, अज्ञान-दारिद्र्य-विषमतेचे थैमान याविरुद्ध लढा हा स्वकियांशी उभारलेला होता. आणि स्वातंत्र्याच्या दिशेने मुक्त मने निर्माण करावीत हा त्याचा हेतू होता. म्हणजे त्यांची एक बाजू सामाजिकतेची तर दुसरी राजकीय होती. शाहू महाराजाना स्वातंत्र्याचा लढा-राजकीय लढा-उघड उघड उभारणे शक्य नव्हते. परिस्थिती आणि मुत्सद्दीपणा या दोहोंनीही या बंडाला अडसर टाकले होते. ते उल्लंघणे केवळ अशक्य होते. शाहू महाराजांना जे अशक्य होते ते शक्य होते, असे मानता येईल पण वस्तुस्थिती तशी नव्हती; हे लक्षात घ्यायला हवे. सूक्ष्म दृष्टीने पाहता, शाहू महाराजांच्या वरवर दिसणाऱ्या सामाजिक लढ्यात राजकीय लढा अंतर्भूत होता. शाहू महाराज मानवाच्या स्वातंत्र्याचे आवाहन करीत होते. मानवाचे स्वातंत्र्य हे सर्वात मोठे स्वातंत्र्य. त्या वेगळे दुसरे स्वातंत्र्य कुठे असते? ते मिळविणे आणि मिळविलेले टिकविणे हेच सर्वोच्च असते. त्यात देशासकट सगळी स्वातंत्र्ये येतात. शाहू महाराजांची व्यापक नजर इतरांप्रमाणे सामाजिक स्वातंत्र्याकडे कानाडोळा करून, राजकीय स्वातंत्र्याचीच फक्त बांग देत नसली तरी ऐकू येणारी बांग सर्वांगांनी हडबडून जागी करणारी आहे. हे विशेषत्वाने लक्षात घेतले पाहिजे. आणखी एक विशेषत्वाने ध्यानात आले पाहिजे ते हे की, परकियांपेक्षा स्वकियांशी द्यावयाचा लढा हा नेहमी अधिक अवघड असतो. आणि स्वकिय, अनेक जीर्णशीर्ण रूढीनी भेगाळलेला असला, फुटलेला-तुटलेला असला की, त्यास स्वातंत्र्योन्मुख करू पाहाणाऱ्याचे हाल कुत्रेही खात नाही. अविकसित समाजाची, समाजसुधारकाला, कुत्र्यानिपट वागविण्याची रीतच असते.

म्हणजे अवहेलना, उपेक्षा, आणि वंचना याखेरीच त्याच्या पदरी काहीच पडत नाही. लोकप्रियता सात हात दूर असते. दोन हातांनी भरभरून घेण्यासाठी स्वकिय आसुसलेले असले तरी काही न देण्यासाठीही उत्सुक असतात. परकिय सत्तेशी झुंज घेण्यात 'हिरोवर्शिप' असते, 'ग्लॅमर' असते. स्वकियांच्या घरच्या लढ्यात श्वासही अवघड होतो. म्हणून घरचा लढा अतिशय बिकट, खडतर आणि कठीण असतो. हा लढा देणाऱ्यांना फकिरी पत्करूनच उभे रहावे लागते. त्यामध्ये हयातीत काही बिरूदे लाभतील ही शक्यता कमी असते. मरणोत्तर गौरव आणि कौतुक हे स्वकियांशी लढ्याचे फलित असतेही. पण ते पुढे. शाहू छत्रपती राजे म्हणून काही गोष्टी चुकल्या, पण काही त्यांच्या वाट्याला आल्याच. त्या चुकल्या नाहीत.

अर्थात शाहू महाराजांना हे माहीत नव्हते असे नाही पण देशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न जितका महत्त्वाचा तितकाच त्या देशात वावरणाऱ्या ऐशी-नव्वद टक्के अशिक्षित लोकांना 'शहाणे' करून सोडण्याचा प्रश्नही तेवढाच महत्त्वाचा. यातील 'शहाणपण' म्हणजे देशाचे 'स्वातंत्र्य' जवळ येणे होय. शाहू महाराजांनी, या देशाच्या मूळ गड्ड्यालाच हात घालण्याचे लोकोत्तर कार्य केले; त्यात राष्ट्ररचनेची दृष्टी होती. एकात्मतेने राष्ट्र बांधले जाते ही भावना असल्याने तसे प्रयत्न होते. म्हणून वेळेचा आणि माणसांचा उपयोग करून घेण्यात, त्यायोगे समाजाला पुढे ढकलण्यात शाहू छत्रपती कार्यशील होते. जगाच्या वाहत्या वाऱ्यात, बहुजन समाजाने कोणती दिशा पकडली पाहिजे, कुठे मोहरा वळवून उभे असले पाहिजे, हे पुनः पुन्हा सांगण्यामधील कृतीमध्ये आणावे याविषयीच्या धडपडीमागील शाहू छत्रपतींचे द्रष्टेपण लक्षणीय आहे. परिस्थिती आणि नियती यांचे, शाहू छत्रपती हे इतिहासदत्त अपत्य होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्या अखिल ब्राह्मणेतर समाजासाठी शाहू छत्रपती काम करीत होते; त्यांच्या जीवनप्रश्नांशी निगडित सत्यशोधक समाजाचे वर्चस्व, बहुजन समाजाच्या मनावर होते. म. फुल्यांनी संस्थापिलेला सत्यशोधक समाज बहुजन समाजाच्या काळजाला हात घालून होता; आणि त्यांच्या व्यथा-कथांना ढवळून काढीत होता. शाहू छत्रपती सत्यशोधक समाजाचे कधी सभासद नव्हते. सत्यशोधक समाजाचे मूळ स्वरूप ब्राह्मणांचा द्वेष किंवा नष्टांश असा कधीच नव्हता, पण चळवळीच्या वावटळीत द्वेषाचा कहार उसळला गेला. हे अमान्य करण्यात इतिहासाला न्याय नाही. त्याचे बरेवाईट काही परिणामही झाले. हरेक चळवळीत हे घडतेच. सत्यशोधक समाजाच्या चळवळीत अगांतुकपणे शिरलेली द्वेषभावना शाहू छत्रपतीना नको होती. शाहू छत्रपतींनी सर्वसाधारणपणे सत्यशोधक समाजाचे कार्य केले असले तरी त्याचा प्रत्यक्ष संपर्क त्यांनी दूर राखला. याचा अर्थ, शाहू छत्रपतींना सत्यशोधक समाज अमान्य होता असा होत नाही. कार्य करताना सुद्धा काही पथ्ये पाळावी लागतात, चळवळीच्या ओघात कुपथ्य होऊ लागले तर ते टाळून पथ्ये सांभाळली जाणे जरूर असते, ही शाहू छत्रपतींची धारणा होती. राजर्षींनी कुणा एकाला आंधळेपणाने बांधून घेतले नाही; तर समाजकारणासाठी सर्वांचा यथोचित उपयोग करून घेतला. हे व्यवहारी धोरण होते. साहजिकच कार्यात राजर्षी शाहू सत्यशोधक समाजाचे, विचारात आर्यसमाजाचे आणि दृष्टीत ब्राह्मो समाजाचे होते. सर्वधर्मिय व सर्वज तीय विश्वकुटुंबाची राजर्षींची कल्पना किती समृद्ध होती ते यावरून लक्षात येते, आणि यथार्थ कर्तृत्वाचा निकषही समजून जातो.

शाहू छत्रपतींनी स्वीकारलेल्या विविधस्पर्शी ध्येय-धोरणांना सामाजिक जाणिवेच्या उत्कटतेबरोबरच आर्थिक विचारांचेही अधिष्ठान होते. केवळ उद्धाराचे ध्येय-धोरण, निखळ सामाजिक जाणिवा किंवा फक्त आर्थिक विचार ही एकेकशः अपुरीच असतात. एकमेकांमध्ये ती गुंततात तेव्हा त्यास फळे धरण्याची आशा करता येते. अर्थात राजर्षींचे लोकोद्धाराचे ध्येयधोरण, सामाजिक जाणिवांमधील आशयसंपन्नता ठळक रीतीने जाणदावी इतकी स्पष्ट आहे. राजर्षींनी शिक्षणकारण सांगितले आणि केले. समाजसुधारणेच्या चळवळीची सूत्रे मांडली आणि त्यानुसार सुधारणा घडवून आणल्या. त्या कशा घडून येतील याचा प्रयत्न

केला. राजकारण सांगितले नाही पण केले. आर्थिककारण मांडले नाही पण उभारुन दाखविले. या सगळ्या सांगण्या-करण्यातही एक संगतो आहे. सर्वत्र लोकांशी संबंध आहे, पण लोकांना जेवढे कळणे इष्ट आहे; तेवढ्यासंबंधीच आवर्जून बोलणे आहे. पण जे सांगितले नाही तरी चालू शकेल, सांगण्याने कदाचित गुंतागुंती होतील, कार्यनाश घडून येऊ शकेल अशा बाबीसंबंधीची चर्चा टाळण्याकडे कटाक्ष दिसतो. राजकारण, अर्थकारण हे त्याचेच मासले होत. पण अर्थकारणातील एक वैशिष्ट्यही ध्यानात वागविले पाहिजे. ते हे की, अर्थकारणाचा ग्रंथ न लिहिता किंवा न मांडता, राजर्षींनी आर्थिक क्षेत्रात आपली थोरवी सिद्ध करून दाखविली आहे. याबाबतीत काही स्थूल पण समग्र असा विचार राजर्षींनी केला होता असे दिसते; सर्व सुधारणांचा पाया माणसाचे मन आणि संस्कृतीच्या सर्वांगांवर परिणाम करणारे एक साधन म्हणजे अर्थ; शाहू महाराजांनी हे जाणले होते. हे जाणलेले त्यांनी प्रत्यक्षात आणले.

१९२२ च्या दरम्यान मोठ्या गणल्या गेलेल्या ४२ संस्थानांमध्ये कोल्हापूरचा समावेश होता. त्याचे क्षेत्रफळ सुमारे ३ हजार चौ. मैल व लोकसंख्या सुमारे ८·३ लक्ष होतो. तत्कालीन संस्थानात आकार, लोकसंख्या आणि उत्पन्न या दृष्टीने कोल्हापूर संस्थानचा अनुक्रमे चोवीसावा, तेरावा व सतरावा क्रमांक होता. याचा अर्थ, हिंदुस्थानच्या नकाशातील पिवळ्या ठिपक्यांत कोल्हापुरला उल्लेखनीय स्थान होतेच खेरीज कोल्हापूरने आणखीही एका दृष्टीने ते प्रस्थापित केले होते. हे प्रस्थापन 'इंपिरियल गॅझेटियर'मधील नोंदीच्या अनुषंगाने आहे. या गॅझेटियरमध्ये हिंदी संस्थानिकांच्या हक्क-जबाबदाऱ्या यांची नोंद करण्यात आली असून त्यामध्ये, परराष्ट्रीय कारभार संस्थानिकांतर्फे ब्रिटिश सरकारने पहावा आणि संस्थानिकाच्या अंतर्गत कारभार पाहण्याच्या संपूर्ण अधिकाराला साम्राज्य सरकारने पूर्ण मान द्यावा अशी व्यवस्था होती. या, 'अंतर्गत कारभार पाहण्याच्या संपूर्ण अधिकाराचा' जास्तीत जास्त उपयोग करण्यात कोल्हापूर संस्थान अग्रेसर होते. अर्थात संपूर्ण अधिकार सरळपणे गाजवता आले नाहीत, त्यासाठी युक्त्या-प्रयुक्त्यांचा अवलंब करावा लागला, हे ध्यानात घेतले की वरवर वाटणाऱ्या राजर्षींच्या साळढाळपणामागील 'बिलंदरपणा'चे कौतुक करण्याखेरीज गत्यंतर उरत नाही. शाहू छत्रपती या निखळ कौतुकाल पात्र ठरले आहेत.

शाहू महाराजांनी, १८९४ ते १९२२ या काळात कोल्हापूर संस्थानात, खाजगी खर्चाला काट देऊन पैसा पेरला. त्यातून लोकविकासाचा बहुस्पर्शी कार्यक्रम राबविला. कोल्हापुर संस्थानाचे मूळ स्वरूप कृषिप्रधान. ऊस हे महत्त्वाचे नगदी पीक तर भात हे महत्त्वाचे अन्नपीक. संस्थानातील साडेपाच-सहाशे चौरस मैलांच्या वनविभागात हिरडा व चंदन ही महत्त्वाची उत्पन्ने होती. नद्या विपुल, पाऊसमान बरे; त्यामुळे धरणे व बंधारे यास वाव होता. शेतकरी सावकारी पाशात असला तरी त्याच्या सुटकेला सर्वस्वी प्रतिकूल वातावरण नव्हते. आधुनिक तंत्र व दृष्टी यातून नव्या जगाच्या निर्मितीची संधी दुर्मिळ नव्हती. राजर्षींनी या साऱ्याची अटकळ बांधून कामांची उभारणी केली आणि शैक्षणिक; सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, मानसिक, धार्मिक, ऐतिहासिक या तटबंदीप्रमाणे आर्थिक तटबंदीही लावून धरली. तिचे तत्त्वज्ञान न सांगता तत्त्वाचार केला.

याचे प्रत्यंतर, शाहू छत्रपतींच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक वगैरे सर्व रीतीच्या धोरणात ठळकपणे दिसते. राजर्षींच्या आर्थिक धोरणाचे सूत्र 'समताधिष्ठित सामाजिक न्याय व समतोल आर्थिक विकास' हे त्यांच्या उदारमतवादी सार्वजनिक धोरणाशी सुसंगत होते. न्याय, शिस्त आणि समता ही त्यातील बीजभूत कल्पना होती. त्यासाठी तर शाहू छत्रपतींनी प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने 'पाटील स्कूल्स', 'वेठबिगार' आणि 'बलुतेदार' पद्धती (१९१७), समाजातल्या आर्थिक वगैरे दृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी ५० टक्के जागा राखीव (१९०२), 'महार व कुलकर्णी वतने' खालसा (१९१७), वगैरेबाबत

निर्णय घेतले. चौकट आर्थिक विकासाला पोषक नव्हती. अडथळे आणणारी होती. ती दुरुस्त करून घेणे जरुर होते. निरीक्षण, अनुभव, अवलोकन आणि प्रत्यक्ष व्यवहारातील अडचणी इत्यादी गोष्टींच्या प्रचितीने शाहू छत्रपतींना हे बदल अपरिहार्य वाटले. त्यांनी ते धडाक्याने केले. बदल 'सयाजीराव' पद्धतीने होतात. आणि 'शाहू' पद्धतीनेही होतात. राजर्षींच्या कार्यविस्ताराचे स्वरूप स्वयंभू आहे : शाहू छत्रपतींनी दुष्काळविमोचनाचे मोठे कार्य केले; स्वतःच्या कारकीर्दीत एकूण पाच वेळा पडलेल्या दुष्काळांवर (१८९६-९७, १८९९-१९०० १९०१-०२, ९०५-०६ व १९१८-१९) राजर्षींनी कायम स्वरूपाच्या उपाययोजनेची आखणी केली. त्यात तातडीच्या आणि दीर्घकाल अशा उपाययोजना होत्या. त्याचे स्थूलमानाने स्वरूप पुढीलप्रमाणे होते:

दुष्काळ पीडितांसाठी झोपड्या बांधल्या. आरोग्य केंद्रे उभारली. दुष्काळी काळात सरकारी जंगलातील कुरणावर गोरगरीब शेतकऱ्यांची गुरे मोफत पोसण्याची व्यवस्था केली. आर्थिक मदतीने नियंत्रित दरात धान्यवाटपाची सोय केली. आर्थिक विकासाच्या दृष्टीने हातकणंगले-वडगाव, कोल्हापूर-यगनबावडा, कापशी-गडहिंग्लज, गारगोटी-पाटगाव इत्यादी रस्त्यांची दुरुस्ती करुन वाहतूक व्यवस्था केली. पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्याच्या दृष्टीने कळंबा, रंकाळा, बहिरेश्वर इत्यादी जुन्या तलावांच्या दुरुस्तीचा कार्यक्रम हाती घेतला. शिरोळ, वडगाव, रुकडी, आळते, अतिग्रे, सातवे इत्यादी मोठ्या तलावांचे बांधकाम केले. शक्य तिथे नदीला छोटे बंधारे घालून पाण्याचा साठा करण्याचे आदेश देण्यात आले. नव्या विहिरी खणण्याचा, शेतकऱ्यांना कर्जे देण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. लक्ष्मी तलाव बांधण्याचे काम सुरु करण्यात आले. काळम्मावाडी धरणाचा प्रकल्प आखण्यात आला. हे दीर्घकालीन उपाय करण्यामागे लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे, शेतीला पाणीपुरवठ्याची सोय करणे व दुष्काळाचे दुर्भिक्ष्य नष्ट करणे हा हेतू होता. सर्वसामान्य लोक, शेती, शेतकरी, पाणीपुरवठा, उत्पादनवाढ, कृषिक्रांतीतून आर्थिक विकास, स्वावलंबी दृष्टीचे निर्माण आणि राष्ट्रविकास अशी छत्रपतींची एकूण वाटचालीतील दृष्टी होती. शेती विकास, शेती उत्पादन, आधुनिक पद्धतीने शेतीची मशागत, त्यावर आधारित औद्योगिक विकास असे एकूण सूत्र होते. सहकार त्यावरील एक उपाय होता. राजर्षींनी 'देशात ऐश्वर्य कसे वाढेल?' मध्ये म्हटले आहे, " ... ...कृषिकर्म वाईट अथवा हलके असे मी मुळींच मानीत नाही ... ... कृषिकर्मापासून दुहेरी उत्पन्न होते. स्वतःला सुख होऊन सर्व मानव जातीलाही सुख मिळते. कृषिकर्माबरोबर पशूपालन व रक्षण यांचाही संबंध येतो. याकरता आपल्याला पशूपालनासंबंधीही पुष्कळ काम करावयाचे आहे. दूध, तूप, वगैरची समृद्धी देशामध्ये झाली पाहिज." शाहू छत्रपती पुढे सांगतात, "श्रम, भांडवल व कौशल्य एकत्र करुन मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे मिळवायचे असतील तर सहकारी पतपेढ्या, सहकारी ग्राहक भांडारे व सहकारी उद्योगधंदेसुद्धा काढले पाहिजेत." आणि त्यासाठी राजर्षींनी दोन्ही बाहू उभारून 'योग्य काम, योग्य दाम'मध्ये सक्रिय आश्वासन दिले आहे, की, "कोल्हापूर संस्थान त्याकरिता वाटेल ती मदत द्यावयास तयार आहे." त्यादृष्टीने शाहू छत्रपतींनी आपल्या संस्थानाच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात शेती, सहकार, व्यापार, उद्योग, दळणवळण इत्यादी बाबींना अग्रहक्क दिला.

१८९५ व १९०७ मध्ये अनुक्रमे 'कोल्हापूरचे औद्योगिक सर्वेक्षण' व 'कोल्हापूर जल संपत्तीचे सर्वेक्षण' करुन घेण्यात आले असून पाश्चिमात्य औद्योगिक विकासाचे अंधानुकरण न करता भारतीय परिस्थितीला उपयुक्त ठरतील अशा लघु व विकेंद्रित उद्योगांचे धोरण अवलंबिलले आहे. `राजाराम इंडस्ट्रियल बोर्डिंग हाऊस'च्या उद्‌घाटन प्रसंगी शाहू महाराजानी सांगितले आहे, "आजपर्यन्त भांडवलवाल्यांचे दिवस होते. आता मजुरांनी आपला काळ आणला आहे ..... पण ... भांडवलवाल्यांच्या मर्जीवर व स्वार्थबुद्धीवर, न्यायबुद्धीवर नव्हे; हजारो माणसांचे जीवित अवलंबून रहावे ही स्थिती बरोबर नाही. याकरिता पश्चिमेच्या

धर्तीवर सर्वस्वी चालणारे कारखाने आमच्या देशात फारसे फायदेशीर होणार नाहीत." राजर्षींची विकेंद्रित उद्योगधंद्यांची दृष्टी लक्षणीय आहे. त्याचबरोबर धंद्यासाठी आवश्यक लागणाऱ्या तंत्रकौशल्याचे शिक्षण देण्यासाठी 'जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट' व 'राजाराम इंडस्ट्रियल स्कूल' या दोन तांत्रिक शिक्षण केंद्रांची निर्मिती करण्यात आली. १९०५-०६ मध्ये प्रथम खाजगी आणि नंतर सार्वजनिक 'श्री शाहू स्पिनिंग व वीव्हिंग मिल' सुरू करण्यात आली. औद्योगिक विकासासाठी जंगल संपत्तीचा उपयोग करून घेण्याच्या हेतूने राधानगरी येथे wood Distillation Factory स्थापण्यात आली. शाहूपुरी, जयसिंगपूर या व्यापारपेठा बनविण्यात आल्या. सुखी, आरोग्यसंपन्न व तृप्त नागरिक तयार व्हावा या हेतुने-मानवी मूल्यांच्या जोपासण्याच्या दृष्टीने – 'अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल', 'अहिल्याबाई देशी दवाखाना', 'होमिओपॅथिक दवाखाना', 'टी. बी. सॅनिटोरियम' इत्यादी आरोग्य केंद्रांची निर्मिती केली. नागरिकांच्या आरोग्यावर वार्षिक रु. ७५,००० खर्च होत राहिले. कामगारांना संघशक्तीचा आदेश दिला. 'पहिला लोक संघ' मध्ये संघटनानिर्मितीची प्रेरणा देताना राजर्षी शाहूनी म्हटले आहे, "ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटीने सतत प्रयत्न ही आमची शस्त्रे असली पाहिजेत. (यापुढे) बहुजनसमाजाच्या मताप्रमाणेच कारभार चालणार, अल्पसंख्याकांची सत्ता कमी होणारच. ते अटळ आहे. आपणासही असेच अधिकार मिळविले पाहिजेत. त्याकरिता स्वार्थत्याग पूर्वक सतत नेटाने प्रयत्न केले पाहिजेत ... ... येथे (म्हणजे हिंदुस्थान देशात) इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ झाले पाहिजेत व सर्वास आपले हक्क काय आहेत, हे कळले पाहिजेत. भांडवलवाल्यांत ब्राह्मण व वैश्य वृत्तीच्या लोकांचा भरणा विशेष आहे. त्यांना दाबात ठेवल्याशिवाय मजुरांची उन्नती होणे कठीण आहे. मजूरदार या शब्दात कमीपणा नाही. हक्क काय आहेत ते कळले पाहिजे. ते समजावून घ्या." असे आवर्जून सांगणारे शाहू छत्रपती जनतेची स्वातंत्र्याची मागणी केव्हा ना केव्हा तरी वर येणार हे जाणून होते. एवढे स्वातंत्र्य वगळून बाकी सगळे हक्क जनता मागेल, तेव्हा जनतेला 'स्वराज्य दान' करण्याच्या दृष्टीने मनात त्याबाबत काहीही विचार करण्याचे कारण नाही, एवढे का राजर्षी दूधखुळे थोडेच होते? त्या दिशेने त्यांची सक्रिय तयारीही दिसते. राजर्षींच्या ह्या नीतिमान दृष्टीचे; जनहितकारी हितबुद्धीचे लक्षण अनुकरणीय आहे.

शाहू छत्रपतींच्या आर्थिक गुंतवणुकीत शिक्षणविषयक मानवी गुंतवणुकीला विशेष महत्त्व आहे. 'शिक्षण स्वराज्यासाठी' मध्ये राजर्षींनी शिक्षणासंबंधी म्हटले आहे, 'शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झालेली नाही. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत." साहजिकच अवतीभोवतीच्या सर्वंकष सामाजिक, धार्मिक, आर्थिक विषमतेच्या, दारिद्र्याच्या, अज्ञानाच्या सर्वगामी युद्धातील शिक्षण हे प्रभावी हत्यार असल्याच्या प्रखर आणिवेने शाहू छत्रपतींनी ते परजले आहे. परजताना ज्यांना नाही त्यांना ते मिळवून देण्याची तरतूद राजर्षींनी केल्याचे आढळते. त्यासाठी शाहू महाराज तर सदैव 'दक्ष' स्थितीत होते. शाहू छत्रपतींची शिक्षणविषयक चळवळ तीन पायांवर उभी होती:

१. शिक्षणविषयक सोयीसवलती, शिक्षणासंस्थांची निर्मिती, शिक्षणसंस्थांना मदत, शिक्षणविषयक निरनिराळ्या उपक्रमांचे संयोजन इत्यादी उपलब्ध करून देणे;

२. विविध जातिजमातींसाठी विद्यार्थी वसतिगृहांची सोय करुन शिक्षणाच्या प्राप्तीचे मार्ग सुकर करणे, वसतिगृहयुक्त शिक्षणाला उत्तेजन देऊन जातिभेदासारखी कोळिष्टके झाडून काढणे; आणि

३. सामान्य माणसाच्या मनामध्ये शिक्षणाविषयी अभूतपूर्व ज्ञानलालसा निर्माण करून, त्याच्या अनेकविध मागासलेपणाला सुरंग लावणे;

म्हणजे शाहू छत्रपतींची शिक्षणविषयक चळवळ ही एकप्रकारची विराट मोहिमच होती. समाजाची जुनी व कालबाह्य झालेली घडी संपूर्णतया बदलण्यासाठी शाहू छत्रपतीनी शिक्षणाची दीर्घ पल्ल्याची वाटचाल आरंभिली. अस्पृश्योद्धाराचे विराट कार्य केले. भटी धर्मावर आघात करणारा वेदोक्ताचा लढा लढविला. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास शंभर वर्षांनी पुढे गेला.

कुठलाही समाज जादूच्या कांडीने बदलत नसतो, तर मन, श्रम आणि बुद्धी यासह प्रज्ञा, प्रतीती नि प्रबोध इत्यादींनी पालटत असतो; त्यासाठी उताविळ निखालस कुचकामाची असते. प्रबळ इच्छाशक्तीच्या रगेल शाहू छत्रपतीनी दमदारपणे सगळ्या चळवळी चालवल्या त्यामागे सर्वंकष विषमतेच्या दारिद्र्याच्या व अज्ञानाच्या सर्वगामी युद्धातील शिक्षण हे एक कार्य व तदविषयक प्रयत्न हे एक प्रबळ, प्रभावी आणि प्रखर हत्यार आहे, ही दृष्टी होय. त्यादृष्टीमुळे आधुनिक महाराष्ट्रातील अनेक संस्थोपसंस्थांची उभारणी झाली.

या सगळ्या संघर्षात राजर्षीनी एक विचार केला. तो हा की, ‘आपण पुढे कसे जाऊ?’ केवळ टीका करीत बसू तर उठण्याची असेल नसेल ती शक्तीही गमावून राहू. केवळ दुसऱ्याचे दोषच काकदृष्टीने टोकरत बसू तर असलेल्या थोड्याफार गुणांनाही गंज लागून निकामी ठरू. मिरासदारीच्या वल्गनाच करीत राहू तर मिरासदारांच्या दारातले श्वानच बनून बसू. प्रगतीसाठी नकारात्मक उपाय त्याज्यच असतात. काही मर्यादेपर्यंत ते फलदायी वाटले तरी ते तसे नसतात. त्यासाठी आपल्याला कोणते गुण हवे आहेत आणि त्याची वाढ कोणत्या रीतीने करणे शक्य व इष्ट आहे हे जाणणे जरुरीचे आहे. ते जाणून ते कसे निर्माण करता येतील, ह्याचा शोध आवश्यक आहे. शाहू छत्रपतीनी विविध चळवळींच्या संदर्भात ‘आपण पुढे कसे जाऊ?’ चा शोध घेतला; आणि पुढेच जाण्याची वाट चोखाळली. मागे त्यांनी पाहिलेच नाही. खरे तर, बहुसंख्य विचारवंताना प्रश्न ‘पोज्’ करण्यामध्ये रस असतो. पण प्रश्नांपेक्षा त्यांचे प्रयोग हे अधिक बोलके (Instructive) असतात. सिद्धांत । प्रश्न अपेक्षित काय आहे हे सांगतात. प्रयोग प्रत्यक्ष सिद्धीची मायाच सादर करतात; आपण मागे किंवा पुढे किती राहू-जाऊ याचा प्रत्यक्ष पाठ देतात. शाहू छत्रपतींनी असे प्रयोग केले. ‘He created an ideal, a type and a method which have profoundly influenced the nation and still prersist’ असे सर रिचर्ड लिव्हिंगस्टोनने ‘Some Tasks for Education’मध्ये आरनोल्ड बद्दल म्हटले आहे. शाहू छत्रपतींच्याबद्दलही तेच म्हणता येईल. राजर्षीनी परिणामस्वरूप शास्त्रे वापरून देशाला जागे ठेवले, सुसंस्कृत बनविले. सुसंस्कृत राष्ट्राचा अर्थ पोटभर जेवणारे, अद्यावत् घरादारांतून राहणारे, विपुल करमणुकीच्या साधनात मग्न असणारे राष्ट्र असा नव्हे. संस्कृतीचा संबंध मूल्यभावनेशी निगडीत असतो आणि मूल्य-भावना (senso of values) दैनंदिन व्यवहारातून-चारित्र्यामधून दर्शित व्हावी लागते. ती सर्व थरावरती पसरलेली असावी लागते. अन्यथा राष्ट्र अंध बनते. शाहू छत्रपतींनी राष्ट्राला डोळस करण्याचा, ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महाराष्ट्रात जागोजागी सामाजिक समतेच्या आणि क्रांतीच्या पुरोगामी विचारांची शक्तिशाली केंद्रे निर्माण झाली. मक्तेदारीकडून सार्वजनिकतेकडे प्रवाहत जाणाऱ्या शिक्षणाच्या गंगेने महाराष्ट्र-देशाचा चेहरामोहरा बदलून टाकला.

लोकशाही जीवनदृष्टीचे आधार

शाहू छत्रपतीनी शिक्षणप्रसार, कृषि औद्योगिक विकास आणि सामाजिक-धार्मिक सुधारणा या तीन प्रकल्पांमधून लोक जागृत आणि त्यांचेद्वारा सर्वांगीण स्वातंत्र्याचे जागरण केले. माणसांमाणसांमधील भेद कमी करणे आणि एकसंध समाजाची निर्मिती हा या प्रयत्नांमागींल मुख्य धागा होता. अस्पृश्योद्धार हे त्यातले एक साधन होते. तशी अस्पृश्यता ब्राह्मण-मराठे किंवा जैन-लिंगायत-मराठे यांच्यामध्ये होतीच पण

या सर्वांची मिळून महार-मांगासंबंधीची अस्पृश्यता कितीतरी तीव्र होती. चिवट आणि प्रखर होती. तिचे प्रकार, पद्धती आणि तीव्रता दाहक होती. त्यास शह देणाऱ्या म. फुले, महर्षी शिंदे, समाजभूषण बापूसाहेब माटे, डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी अशा अनेक ज्ञात-अज्ञात प्रहारकांमध्ये शाहू छत्रपतींचा अग्रहक्क विशेष स्वरूपाचा आहे. राजर्षीनीं अस्पृश्योद्धाराशी संबंधित प्रश्नांची चर्चा करताना 'रिलिजस ब्युरॉक्रसी' मध्ये म्हटले आहे : "सर्व जातीच्या पुढाऱ्यांना माझे सांगणे आहे की, आपली दृष्टी दूरवर ठेवा, पायापुरतेच पाहू नका. जातिभेद मोडणे इष्ट आहे. जरूर आहे. जातिभेद पाळणे हे पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गातील हा अडथळा आहे. हा दूर करण्याचे प्रयत्न जोराने केले पाहिजेत. ही जाणीव पक्की ध्यानात ठेवून मग ह्या दिशेचा प्रयत्न म्हणून जाती परिषदा भरवा जातिबंधन दृढ करणे, जातिभेद तीव्र होणे हा परिणाम ह्या परिषदांचा होऊ नये ही खबरदारी घेतली पाहिजे" या व्याख्यानामध्येच छत्रपतींनी 'जातिभेद हा स्वाभाविक आहे व तो पाळणे व रोखणे समाजाच्या उन्नतीस आवश्यक आहे' असे प्रतिपादन करणाऱ्या उच्च दर्जाच्या मंडळींचा आणि 'जातिभेद नसावा अशा मताचा असूनही जातिमत्सर वाढवीत असल्याच्या; स्वतःवर केल्या जाणाऱ्या मिथ्या आरोपाचा खरपूस समाचार घेतला आहे' आणि अस्पृश्यतेसारखा प्रश्न सोडविण्यासाठी उभयपक्षी काय केले पाहिजे म्हणजे परिस्थितीचा आणि प्रश्नांचा गुंता उकलू लागेल याचे दिग्दर्शन केले आहे. १५ एप्रिल, १९२० रोजी नासिकच्या श्री उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीची पायाभरणी समारंभाच्या निमित्ताने केलेल्या भाषणात, राजर्षींनी उपायांचे हे सूतोवाच केले असून त्यामधून वरिष्ठ-कनिष्ठ यांच्यामधील संघर्षाची भिंत कमी होण्याचा, ते निकट कसे येतील याचा, जगाच्या इतिहासाने अनुभव म्हणून जपून ठेवलेला मर्मबंध विशद केला आहे. राजर्षी सांगतात, "जपानातील सामुराई लोकांनी आपला जन्माने प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला म्हणून जपानमध्ये ऐक्य होऊन त्या देशाची उन्नती झाली. त्याप्रमाणे ब्राह्मणांनी जातिमत्सर सोडल्याशिवाय आमच्या लोकांची उन्नती होणार नाही. सर्व जातींना हात देऊन त्यांना आपल्याबरोबर घेऊन सर्वांची स्थिती सुधारणे हे काम क्षत्रियांनी अवश्य केले पाहिजे. ते त्यांचे कर्तव्य आहे. ब्राह्मण लोकांना जन्मसिद्ध धार्मिक बाबतीत श्रेष्ठपणा आहे. त्याच्या जोरावर त्यांची एक 'धार्मिक ब्युरॉक्रसी' च झाली आहे. ही ब्युरॉक्रसी मोडल्याशिवाय कधीही देशोद्धार होणार नाही." माजलेल्या वरिष्ठांनी कुचंबलेल्या कनिष्ठांना हक्कांचे प्रदान करण्याची आणि नडलेल्यांनी हवे तर स्वतःचा विकास स्वतः करून घ्यावा या वृत्तीची राजर्षींनी केलेली फोड 'राजकारण' करणाऱ्या संपादक दामले यांना कळली नसली तरी परिस्थितीशी असलेले त्यांचे अविच्छेद्य नाते संपत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ कै. धनंजयराव गाडगीळ आणि सृजनशील समाजवादी नेते एस्. एम्. जोशी यांनी तांत्रिकदृष्टीने 'स्वकिय' असलेल्या ब्राह्मण समाजाला अशीच सूचना केली होती. इतिहासाचे सूत्र असे हे वाहत असते. म्हणून ३० मे, १९२० रोजी अ. भा. बहिष्कृत समाज परिषदेच्या अध्यक्षपदावरून शाहू महाराजांनी दिलेल्या भाषणात पुनः एकवार बजावले आहे, "... ज्या जातीच्या लोकांना हलके मानले जाते, त्यांनी कितीही प्रयत्न केले तरी, त्यांचा तादृश उपयोग होणार नाही. याकामी उच्च म्हणविणाऱ्या जातींकडूनच सुरूवात झाली पाहिजे. प्राचीन काळापासून वंशपरंपरागत उपभोगिलेले वर्चस्व त्यांनी सोडून देण्यास तयार झाले पाहिजे. या पवित्र स्वार्थत्यागाचाच कित्ता त्यांनी सर्वास घालून दिला पाहिजे. जपानातील जातिभेदाचा बिमोड होण्यास मोठे कारण उच्च वर्गाच्या सामुराई लोकांनी सुरूवात केली हेच आहे. तसे झाले नसते तर जपानची स्थिती सुधारली नसती. जातिभेद मोडण्याचे प्रयत्न केवळ खालच्या वर्गाकडून सुरू झाल्यास त्याचे परिणाम अनर्थावह होण्याचा संभव आहे. तेच काम उच्च म्हणविणाऱ्या लोकांकडून प्रथम झाल्यास हे स्वार्थत्यागाचे उदाहरण इतर सर्व जातींना बोधप्रद होईल. जोपर्यंत असे होत नाही तोपर्यंत, हल्लींच्या स्थितीचा उपयोग करुन वैमनस्य न वाढविता प्रत्येक जातीने आपली सुधारणा करून, आपला दर्जा वाढवून घेण्याचा व वरच्या पायऱ्यावर चढण्याचे प्रयत्न चालूच ठेविले पाहिजेत. वरील जातींनाही जरूर तर काही पायऱ्या खाली येऊन त्यांना हात देवून; वर घेतले

पाहिजे. असे झाले म्हणजे सुरळीतपणे व सलोख्याने हे जातिभेद मोडण्याचे बिकट काम सिद्धीस जाण्याचा संभव आहे. आम्हासारख्या मराठ्यांनासुद्धा जात मोडून एकी करण्यास भाग पाडले पाहिजे." याचा अर्थ निश्चित धोरणाने माणूस मुक्त करण्याचा राजर्षीचा प्रयत्न होता. म. फुल्यांची ही दृष्टी होती. त्यात सत्यान्वेषण आणि आत्मपरीक्षण दोन्हीही होते. त्यातूनच शाहू छत्रपतींनी भिन्न भिन्न जातीचे शरीरसंबंध व्यापक प्रमाणावर व्हावेत असे सांगितले. रोटीव्यवहाराची आवश्यकता प्रतिपादिली. धार्मिक ग्रंथांचे पठण करणाऱ्या व्यावसायिक ब्राह्मण 'भटजी' ना बोलावण्याची गरज नसल्याचे आग्रहाने सांगितले. धार्मिक विधींसाठी अशा व्यावसायिक ब्रह्मवृंदांचे साहाय्य कशासाठी घ्यायचे असा प्रश्न केला. या सर्वामुळे श्रेष्ठत्वाची भावना जोपासली जाते आणि न्यूनत्वाच्या भावनेने माणूस खंगतो; असे शाहू छत्रपतींना वाटते. हे वाटणे नुसते वाटणे नाही तर तो सांस्कृतिक स्वातंत्र्याचा आणि सामाजिक लोकशाहीचा विचार आहे. त्यामध्ये, अविकसित आहेत त्यांना विकसित करण्याचा, ज्यांच्यासाठी समृद्धीच्या महाद्वाराची कवाडे नेहमीच बंद राहिली अशांच्यासाठी ती खुली करण्याचा सरळ तत्त्वाचार आहे, हीण काहीच नाही. टींका व्हावी किंवा टीकेच्या ज्वाळात सतत उभे केले जावे असे त्यात गैर काय आहे? त्यामुळे 'ब्राह्मणद्वेष' वगैरे खोटे दोष चिकटविण्याचे प्रयोजन तरी काय? राजकारणकर्त्यांनी ते करू नये, असे राजर्षींनी आग्रहपूर्वक सांगितले आहे. 'पुढारी म्हणविणाऱ्यास नम्रपणे' शाहू छत्रपती सांगतात: "आम्हाला आपण रांगू दिले नाही व पडतझडत उभेही राहू दिले नाही तर आम्ही कायमचे पंगू होऊ, याकरिता आपण आमच्या रांगण्याचे व उभे राहाण्याचे कौतुक करा व उत्तेजन द्या. प्रतिबंध करू नका. आमची धडपड आमच्या अंगी शक्ती येण्यासाठी आहे. आपल्या द्वेषामुळे आम्ही ती करितो; ही आपली समजूत चुकीची आहे." एक धट्टाकट्टा आणि एक आंधळापांगळा या दोघांची रेस होऊ शकत नाही. त्यासाठी दोघेही समबल किंवा समबलाच्या रेषेत असावे लागतात. थोडेफार समबल नसले तरी स्पर्धेची भावना; ईर्षेची वृत्ती आणि स्वाभिमानाची झलक इत्यादी गोष्टीतून भासणारी उणीव भरून काढू शकतात. पण जिथे तुलनेला वावच नाही तिथे स्पर्धेची शक्यता तरी कशी राहणार? समाज कसा उभा राहतो हे 'समाजशास्त्रज्ञ' छत्रपतीनी समाजशास्त्र येणाऱ्यांना शिकविले. हे शिकविणे सोपे नव्हते. ज्याला मुळातच येत नाही त्याला शिकविणे हे आपल्या कह्यात असते पण ज्यांना येते त्यांच्या दृष्टीने गोष्ट अवघड असते. अहंता, मानपान, श्रेष्ठकनिष्ठता असे कितीतरी ताण-तणाव त्यात गुंतून पडलेले असतात, आणि बारीकशा हेलकाव्यानेही त्यांना नको ते रंगरूप मिळण्याची शक्यता असते. पण शाहू छत्रपतींनी उच्चवर्णिय, ब्राह्मणेतर, अस्पृश्य साऱ्यांनाच प्रसंगी आंजारूनगोंजारून तर प्रसंगी ठणकावून, ह्या वाटा शोधल्या. ह्या वाटा शोधल्या त्या दीनदुबळ्यांना माणुसकीचे हक्क मिळवून देण्यासाठी. माणसाची प्रतिष्ठा त्याला पात्र व्हावी म्हणून. इतर अनेक गोष्टींप्रमाणेच जस्टिनियन व सालॉनप्रमाणे त्यानी कायद्यात सुधारणा केल्या. त्यामागची धारणा, 'थांबा आणि वाट पहा' अशी, नव्हती तर 'चाला आणि करून घ्या' अशी होती. सर्वत्र सामान्यांसाठी सावध योजकता होती. भारतासारख्या गरीब लोकांच्या संपन्न देशात अशी सावधानतेची नितान्त निकड असते. विकासशील देशातील सत्तेच्या महत्त्वाची जाणीव असलेल्या शाहू छत्रपतींच्या ठायी तिचा प्रकर्ष विशेषत्वाने मिळतो. त्यामुळेच त्यांना समाजाच्या अप्रकट दुःखाची चाहूल लागली. आणि त्यांच्या निवारण्याच्या उद्योगाला ते लागले. अनुल्लंघनीय अडचणींना सामोरे जाऊन त्यांनी अनेक गोष्टी इतिहासात नोंद व्हाव्यात अशा पद्धतींने हयातभर निभावून नेल्या.

राजर्षी शाहूनी सर्वसाधारण माणसाला संधी उपलब्ध करून देऊन 'संधीचे तत्त्वज्ञान' रुजविले. त्याद्वारे विराट जनसमूहाचे व्यापक शिक्षण करणारे, 'जेवला कोण, राहिला कोण' हे कळवळ्याने पाहणारे राजर्षी लोकोत्तर लोकाग्रणी होते. त्यामुळे राजर्षींनी व्यापार, क्रीडा, कला, शिक्षण इत्यादी समाजजीवनाच्या अनेक व्यवहारांत चैतन्य निर्माण केले. सामान्य माणसातून रुजलेले राजे-राजर्षी, सामान्य माणसाला

आपले हक्क, कर्तव्य आणि प्रतिष्ठा यासाठी सतत जागे ठेवण्यास कारण झाले. या त्यांच्या आणि त्यांच्या करवी जनसामान्यांत होणाऱ्या जनजागरणात राजर्षींच्या कार्यकर्तृत्वाची प्रेरणा आहे. या प्रेरणेत जीवन उभारणीची मूलभूत सूत्रे आहेत. त्यांचे दिग्दर्शन पल्लेदार नसेल, मात्र त्यावर कार्याने उभारलेले तत्त्वज्ञान अनेक गोष्टींची नोंद करणारे आहे; विज्ञाननिष्ठ दृष्टी, संघटना बांधणीचा विचार, संस्थात्मक जीवनाचा आधार अशा अनेक गोष्टींमुळे राजर्षी जनमानसात रुजून राहिले आहेत. केवळ वादळी व्यक्तिमत्त्वामुळे किंवा उदात्त-उत्कट कथांमुळे नव्हेत. राजर्षींचे ते एक अंग आहे, ही गोष्ट खरीच, पण इतिहास अशा अंगांचा 'गोष्टी' म्हणून उल्लेख करतो आणि त्यापलिकडे उसळून नव्या दिशेने क्षित्रिजे कोण कापीत गेला, कातीत गेला नि जागोजागी अवघ्या अनाथांसकट सर्वांगी जागविणारी 'ज्ञानदीप गृहे' कोण बसवित गेला, याचा निर्भीडपणे शोध घेतो. सत्याला साक्षी राखणारा इतिहासाचा ज्ञानरथ अशीच वाटचाल करीत असतो. राजर्षी शाहू, अशा वाटचालीतील एक पाईक आहेत. त्यामुळेच राज्यात काय सुधारणा करायच्या ते मनाशी निश्चित करून त्याचे मार्ग राजर्षींनी चाणाक्षपणे अंमलात आणले. त्यासाठी शब्दांचा वापर कमी केला, कृती-धृतीवर जोर दिला. काय करणे शक्य त्याचाच अंदाज घेतला आणि तेवढ्याचीच अचूक उचल केली. कार्यवाहीचे सूत्र पकडले. भरघोस आश्वासन, शब्दबंबाळ व्याख्याने, आश्वासनांचा अशोचनीय भंग, तरीही सभ्यतेचा बुरखा (आजच्या भ्रष्ट लोकशाहीची ही एक रीत!) अशा दुर्गूणांना राजर्षींनी चार हात दूर राखले. राजे म्हणून स्वतःच्याच उद्धाराचा वसा घेणे आणि जनतेची भूल-भुलावण करून तिला 'कोरडी' ठेवणे या दुर्गूणांना राजर्षींनी बाजूला टाकले आणि थेट जनतेशी दळणवळण साधले. त्यामुळे जनता आणि राजर्षी यात अंतराय उरला नाही. जनतेचे मन समाजवन घ्यावयाचे आहे, तिचे जीवन पहावयाचे आहे; तिच्यात आणि आपल्यात काही कसनुसेपण येते आहे, जनतेतील शांततेचा आणि प्रक्षोभाचा अर्थ जाणून घ्यावयाचा आहे, अशा एक का अनेक गोष्टी; राजर्षी त्यासाठी दलालाचे-मध्यस्थाचे-साहाय्य घेत नाहीत. सरळ उठतात आणि जनतेत उभे राहतात. कुठे जावून पाणी पितात, कुठे भाकरी खातात, कुणा म्हातारीची ओझ्याची बुट्टी उचलून तिच्या डोक्यावर देतात. हरिजनाला गिऱ्हाईक मिळावे म्हणून त्याच्या हॉटेलात चहा पितात. कुराण केवळ मुसलमानापुरतेच राहू नये, ते मराठी वाचकांनाही समजावे म्हणून त्याच्या भाषांतरावर २५,०० रुपये खर्च करतात, जनावरांची पैदास चांगली निपजावी म्हणून शेतकऱ्यामागे लकडा लावतात. राजर्षींचे मेहुणे-श्रीमंत खानविलकर-पट्टेवाल्याने आपल्या पायातील बूट काढले नाहीत म्हणून त्याला मारतात-पिटतात आणि नोकर, त्याचा अपमान वाटून महाराजांच्याकडे राजीनामा घेऊन येताच त्याच्या स्वाभिमानी वृत्तीबद्दल त्याला बढती देतात. काडप्पाच्या मठाच्या माळावर सशाच्या शिकारीसाठी निघाले असता भुकेल्या मोतद्दारास खाशा स्वारीसाठी आणलेले फराळाचे देतात आणि 'तुम्ही सर्वजण खाऊन मग या, तोपर्यंत आम्ही पुढे जातो' असे सांगतात, उलटलेली बग्गी सरळ करतात, कोचमनला दवाखान्यात नेतात, त्याच्या जखमा धुतल्या-पुसल्या जाईपर्यंत तिष्ठत राहतात. सोनतळीवरच्या पत्र्याच्या बंगल्यातील शेडमध्ये झोपतात. शिकारीतील माणसाइतकीच शिकारीतील घोडी, उंट, कुत्री या जनावरांचीही काळजी घेतात. तिकोट्याच्या जंगलात सित्या बेरडाकडचे कोरड्यास खातात. असे सारखे सुरू आहे. त्याला बंधन म्हणून कसेल नाही; गणती म्हणून कसली नाही. लोक शाहू महाराज 'राजे' आहेत हे विसरून गेले आहेत, आणि शाहू महाराजांनी आपले राजेपण टाकून लोकांना 'राजे' केले आहे. थेट दळणवळणाची ही पद्धत-मुक्त, विमुक्त पद्धत-राजर्षींच्या व्यक्तिमत्त्वाला सोनेरी किनार ठरली आहे. त्यामुळ घडले आहे ते असे की, शब्दाने काही पटवून देण्याचा प्रश्नच उपस्थित झालेला नाही. दुराग्रहांचे दंडकारण्य आणि मतभेदांचे मोहोळ कृतीनेच निपटले गेले आहे.

अनुक्रमणिका

'लोकशोधा'साठी 'डायरेक्ट अँप्रोच'

तसे हे दळणवळण हा 'डायरेक्ट ॲप्रोच'- दिसतो तितका सोपा नाही. यात उभयपक्षी काही घ्यावे-द्यावे लागते; त्यासाठी राजर्षीना राजेपण टाकावे लागले आहे. आपल्या थाटामाटाने नव्हे तर जनतेच्या अंगारंगाने वावरावे लागले आहे. 'अरे, मी तर तुमचाच; तुमच्यातलाच. तुम्ही मला आपला मानला नाही, समजला नाहीत तर मला कुणीच आपला मानणार नाही, समजणार नाही' असा धोशा जणू राजर्षीनी लावला आहे. राजेपणाच्या दबावाने दूर उभ्या राहणाऱ्या जनतेला त्यांनी आपल्याला 'आपले' म्हणायला लावले आहे. राजर्षीनी जनतेला आपले म्हटलेच आहे, तेव्हा तो प्रश्न नव्हता. पण जनतेने ते मानायला हवे होते. त्यात काही अडचणी होत्या; शिक्षणाचा अभाव, सामाजिक दर्जा, राजेपणाची भीती अशा अनेक अवघड बाबी त्यात होत्या. त्याची सोडवणूक राजर्षीनीच स्वतःच स्वतःच्या अनुभवाने केली आहे. त्यासाठी सामान्य जनतेतील संचार, राजेपणाची वस्त्रे बाजुला ठेवून केलेला 'भणंग' संचार-आणि जनतेच्या जीवनात घुसून त्याच्या बोलभाषेत केलेला व्यवहार इत्यादींचा राजर्षीनी सुरेख वापर केला. राजर्षी ज्ञानवंत होते. ते इंग्रजी, संस्कृत आणि मराठी उत्तम बोलत असत. सर्वसामान्य जनतेशी बेळगावी शुद्ध तुपातील बोलणे काय कामाचे? त्यामुळे अंतरच पडणार. राजर्षीनी व्यापक हिताच्या संदर्भात किरकोळ गोष्टीवर अंतर पडायला नको होते. त्यांना अंतरे बुजवीत एकसंघ समाज बांधायचा होता. अनपढ आणि अनगड समाजाचे भवितव्य उजळावयाचे होते म्हणून जे जे साधन आपल्या मतप्रचारासाठी उपयक्त होईल ते ते राजर्षीनी बेमालून कौशल्याने वापरण्याचा परिपाठ ठेवला. त्यामुळे दुरावा विरला; जवळिक उपजली. विश्वासाला विश्वास मिळाला. पायावर चक्र कोरलेल्या माणसाने लोकशाहीतील लोकदर्शनाचे-लोकशोधाचे-एक विलक्षण प्रकरण हातावेगळे केले आहे.

या रंगरुपात, शब्दप्रामाण्यापेक्षा कृतिप्रामाण्याला महत्त्व आहे हे स्पष्ट आहे. त्यासाठी खास आयोजन, विशेष प्रयत्न असे काही नाही. मात्र मनाशी दृढ निर्धार आहे, घट्ट समजूत आहे; त्या संदर्भात जाता जाता पण प्रकर्षाने आयोजन आहे.. अवतीभोवती अनेक मंडळी आहेत, पण त्यांना त्यांचा सुगावा नाही, पण राजर्षी काही घडवताहेत. त्यांच्या बोलाकृतीतून काही ना काही होते आहे, हे विशेष आहे. सर्वसाधारण व्यवहार शांत असला तरी राजर्षीचे सावध मन पेटते आहे. असे त्यांच्या जीवनातील बारीकसारीक घटना व त्या घटनांना आकार देण्याची राजर्षीची कुवत आग्रहाने दाखवितात. राजर्षीच्या मनात युद्धसदृश घटना घडताना दिसतात. त्यामध्ये विचार, आचार, प्रचार व कायदा यांचा संमेळ आहे. हा संमेळ धैर्य, चातुर्य, बुद्धी, न्याय, करुणा, आस्था, पारख मुत्सद्दीपणा आणि अष्टावधान इत्यादी मानवी जीवनातल्या उत्तम गुणांनी परिवेष्टित आहे. त्यात राजपुरुष आणि लोकनेता दोन्हीही अंतर्भूत होतात. महाराष्ट्राच्या धार्मिक नि सामाजिक इतिहासाच्या पुर्नघटनेत असे वैभव दुर्मिळ आहे; दुर्लभ आहे.

लोकसंपर्काच्या सहजरीती

लो. टिळकांनी 'गीतारहस्य' च्या अर्पण पत्रिकेत, भगवंताचा उल्लेख 'श्रीशाय जनतात्मने' या मार्मिक शब्दांनी केला आहे. त्याचा अर्थ, "श्रीचा म्हणजे सर्व संपत्तीचा ईश, पण तो जनतात्मा!" असा आहे. हा सुखी, संतृप्त आणि समृद्ध जनतात्म लोकशाही जीवनदृष्टीचा आधार आहे. लोकशाहीचे ते प्रमेय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी ते कृतीधृतीने उद्‌घोषिले. त्यानंतर सुमारे दोन शतकांनी त्याचे नेमके मर्म समजाऊन घेऊन ते आचरण्याची मनोबुद्धी आणि कसब राजर्षी शाहूंनी दाखविले. हा 'लोकधर्म' सामाजिक अभिसरणाचे गतिचक्र गतिमान ठेवतो.

अनुक्रमणिका

या साऱ्या धडपडीतून शाहू छत्रपतींच्या समाजप्रबोधनाच्या सर्वंकष क्रांतीचे एक रूप दिसते. लोकजागृतीतून लोकदडपण, त्यातून सामुदायिक संघटन, अपरिहार्य परिणाम स्वामित्वाचा त्याग आणि पुर्नस्थापना I नवनिर्माण, या दिशेने वाटचाल हे ते रुप होय. राजर्षींच्या अनुयायांना याचे कितपत आकलन झाले होते याविषयी इतिहास साशंक दिसतो, पण शाहू राजांनी त्या दिशेने कार्य केले असे इतिहास सांगतो.

राजर्षी शाहूंच्या भाषणांतून त्यांची वाहणारी व्यक्तिरेखा पाहिली असता छत्रपती क्रियावान पंडित होते. व्याख्यानांतून व्यक्त केलेला प्रत्येक विचार त्यांनी कृतीने सिद्ध केलेला आहे हे सहज दिसते, किंबहुना त्यांनी आधी कृती केली आणि मगच व्याख्याने दिली. कृतीने आणि उक्तीने आपले सामाजिक क्रांतिकारकत्व त्यांनी सर्वार्थाने सिद्ध केलेले आहे.

राजर्षींच्या या ‘क्रांतिसूक्ता’ स आजच्या स्वातंत्र्योत्तर काळातील संदर्भ काय, याचाही विचार केला पाहिजे. महाराजांनी ज्यासाठी निर्धाराने झुंज दिली त्या गोष्टी आज पूर्णांशाने साकार झालेल्या नसल्या तरी त्या दिशेने फार मोठी प्रगती झाले आहे हे नाकारता येणार नाही. बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार वेगाने होत आहे. त्यामधील अनेक कर्तृत्वसंपन्न व्यक्ती राजकारणापासून शिक्षणापर्यंतच्या सर्व क्षेत्रांत आपल्या कृतीधृतीने चमकत आहेत. तथापि आपला समाज एकरस आणि एकजीव व्हावा हे राजर्षींचे स्वप्न तेवढ्या प्रमाणात साकार व्हायचे आहे. वाट मोठी आहे; हिमतीने चाल जरूर आहे. राजकीय सत्तेवरून ‘ब्राह्मणी वर्चस्व’ कमी झाले असले तरी समाजाच्या प्रत्येक स्तरावर नवीन ब्राह्मण्याची प्रवृत्ती तोंड वर काढताना दिसत आहे. तीही तितकीच हेकट आहे. कुळीचा अभिमान संपलेला नसून वाढता आहे. महाराष्ट्रातील तीस लाख आदिवासींच्या प्रश्नाला आता कुठे तोंड फुटले आहे. किती अज्ञातांचे जीवन बरबाद होत आहे त्याला गणतीच नाही. पक्षोपक्षांचे व स्वतंत्र असे कितीतरी ज्ञात-अज्ञात कार्यकर्ते ठिकठिकाणी मोठ्या नेटाने लहानमोठ्या प्रश्नांची तड लावीत आहेत. बहुजन समाजाचे मोजके का असेनात पण लहानमोठे काही कार्यकर्ते हिमतीने राजकाज सांभाळीत आहेत. दुश्चिन्हे कमी नाहीत पण आशाही थोर आहे. राजर्षी शाहू छत्रपतीना अभिप्रेत असलेली सर्वकष क्रांती पूर्णत्वाने अजून व्हायची आहे. ‘श्रीशाय जनतात्मने’ ची प्रकर्षाने वानवा आहे. या साऱ्याचे तात्पर्य काय ते एवढेच आहे.

***

महापराक्रमी धर्मवीर छत्रपती
संभाजी राजे

महापराक्रमी स्वातंत्र्यवीर छत्रपती संभाजी राजे यांचा संक्षिप्त जीवनपट

१) **जन्म : १४ मे, १६५७** किल्ले पुरंदर, जि. पुणे, ज्येष्ठ शु.१२ शके १५७९, गुरुवार.

२) **वय २ वर्षे (दि.५ सप्टेंबर १६५९)** : मातोश्री सईबाई यांचे निधन

३) **वय ८ वर्षे (दि.१८ जून १६६५)** : पुरंदरच्या तहाप्रमाणे मिर्झाराजे जयसिंगाकडे ओलीस (जामीन). छत्रपती संभाजी राजे यांची निर्भयता व चातुर्य पाहून मिर्झाराजे यांनी त्यांना ५००० ची (पंचहजारी) मनसबदारी दिल्याने राजकारण प्रवेश केला.

४) **वय ९ वर्षे (२१ ऑगस्ट १६६६)** : औरंगजेबाच्या आग्रा कैदेतून ऐतिहासिक सुटका. आग्रा ते रायगड १३०० कि.मि. प्रवास. पाऊस, नद्या, नाले, डोंगर, दऱ्या, जंगले यातून वेशांतर करुन, कधी चालत तर कधी घोड्यावर असा खडतर प्रवास करीत ३ महिन्यांनी छत्रपती संभाजी राजे रायगडावर पोहचले.

५) **वय १४ वर्षे** : बुधभूषण सह तीन ग्रंथ लिहिले. एकून ९ भाषा शिकले. नीतिशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व युध्दशास्त्र यांचा अभ्यास व सराव केला. पुढे याच मेहनतीच्या बळावर छत्रपती संभाजीराजे प्रत्यक्ष राज्य कारभारात सहभागी होऊ लागले. विलक्षण हिमतीने छत्रपती शिवाजी राजांच्या नंतर केवळ ९ वर्षात छत्रपती संभाजीराजांनी जनतेच्या व सैन्याच्या साथीने स्वराज्याचा विस्तार पाचपट व खजिना तीनपट केला.

६) **वय १५ वर्षे (१६७२)** : खंबायत (गुजरात) प्रांतावर छत्रपती संभाजी

राजांच्या नेतृत्वाखाली सैन्याने स्वारी केली.

७) **वय वर्षे १७ (६ जून १६७४)** छत्रपती शिवाजी राजांचा राज्याभिषेक. छत्रपती संभाजी राजे यांचा युव राज्याभिषेक झाला व ते स्वराज्याचे युवराज झाले. युवराजांना मंत्रीपदासारखे अधिकार असत व त्यांना राज्य कारभार न्यायनिवाडे करता येत असत.

८) **वय १७ वर्षे (१७ जून १६७४)** : स्वराज्याच्या आई राजमाता जिजाबाई आऊसाहेब यांचे निधन झाले.

९) **सन १६७१ ते १६७४** : छत्रपती संभाजी राजांनी युवराज या नात्याने राज्य कारभार स्वतंत्रपणे सांभाळला.

१०) **वय १८ वर्षे (सन१६७५)** : छत्रपती संभाजी राजांच्या नेतृत्वाखाली मराठी लष्कराने दक्षिण हिंदुस्थानात, गोवळकोंडा, भागानगरी (हैद्राबाद), हुबळी, रायबाक पर्यंत प्रदेश जिंकला.

११) **वय २३ वर्षे (३ एप्रिल १६८०)** छत्रपती शिवाजी महाराज यांचे रायगडावर आकस्मिक निधन. त्यावेळी छत्रपती संभाजी राजे पन्हाळगडावर होते. पित्याच्या मृत्यूची बातमी त्यांना कळू दिली नाही, त्यामुळे अंत्यविधीस व दशक्रियेस ते उपस्थित नव्हते.

१२) **वय २३ वर्षे (१६ जानेवारी १६८१)** : छत्रपती संभाजी राजे यांचा पित्याच्या मृत्यूनंतर १० महिन्यांनी राज्याभिषेक करण्यात आला.

१३) राज्याभिषेकाच्या १५ व्या दिवशी मोघलांची वैभवशाली नगरी बुऱ्हानपूर (मध्यप्रदेश) येथे यशस्वी चढाई केली. ४००० सैन्यांसह सलग ५ दिवस ५ रात्र घोडदौड करीत धडक मारली. सुरतेवर हल्ल्याचा बहाणा करून शत्रूला चकवले.

१४) **वय २३ वर्षे (८ सप्टेंबर १६८१)** : औरंगजेब स्वतः पाच लाख फौजेसह स्वराज्यावर स्वारीसाठी निघाला. यात ३ लाख घोडदळ, २ लाख पायदळ, १ लाख इतर सैन्य, २२ सरदार, ३००० उमराव, औरंगजेबची २ मुलं व ४० नातू, ७० मोठ्या अवजड तोफा, ३०० लहान तोफा, प्रचंड युध्द सामग्री व दारुगोळा होता. या सर्वांना छ. संभाजी राजे व त्यांचे ८० हजार सैन्य पुरुन उरले.

१५) **वय २३ वर्षे ते ३२ वर्षे** : या ९ वर्षात छत्रपती संभाजी राजांनी १४५ लढाया केल्या. एकही वर्ष शांतता नाही कि विश्रांती नाही. विशेष म्हणजे सर्वच्या सर्व लढाया जिंकल्या. स्वराज्याचा उत्तरेत व दक्षिणेत मोठा विस्तार केला.

१६) **वय २५ वर्षे** : संपूर्ण मुंबई बेट विकत घेण्यासाठी इंग्रज गव्हर्नर केजविन यांच्याशी बोलणी केली. व्यवहार अंतिम टप्यात असताना पोर्तुगीज व जंजीरकर सिध्दी यांनी आडकाठी केली.

१७) पराक्रमी छत्रपती संभाजी राजांना ठार मारण्याचे काही स्वकिय व परकियांकडून कट रचन्यात आले होते.

१८) **वय ३२ वर्षे (दि. ३ फेब्रुवारी १६८९)** (सरदेसाई यांचा वाडा संगमेश्वर, जि. रत्नागीरी) : आपल्याच पाच फितूर बांडगुळांनी वतनाच्या लालसेने, दगा देऊन छत्रपती संभाजी राजांना औरंगजेबाला पकडून दिले. मोघलांच्या पाच लाख फौजेला व स्वतः औरंगजेबाला जमले नाही ते नीच काम या पाच गद्दारांनी केले. मराठ्यांचा छत्रपती मोघलांना जिवंत पकडून दिला. ज्याने आपल्या कारकिर्दीत स्वराज्याचा एकही किल्ला पडू दिला नाही आणि आरमारातील एकही जहाज बुडू दिले नाही, अशा अपराजित दिग्विजयी राजाचा घात झाला.

कैदेतील अतोनात हीन वागणूक, क्रूर शारीरिक व मानसिक छळ, संभाजी राजांचे अतुलनीय बलिदान

१) **३ फेब्रुवारी, १६८९ –** छत्रपती संभाजी राजे व कवी कलश यांना संगमेश्वर, जि. रत्नागीरी येथे घातपाताने पकडले.

२) **१४ फेब्रुवारी १६८९,** स्थळ – पेडगाव, बहादूरगड, ता. श्रीगोंदा, जि.अहमदनगर, येथे संभाजी राजांना घाणेरड्या उंटावर उलटे बसवून, विदुषकी कपडे घालून, गळ्यात कडब्याची पेंडी बांधून, मानेला लाकडी खोडा लावून, हात बांधून, मिरवणूक काढली. या मिरवणुकीत मोघल सैन्य त्यांना क्रुरपणे भाल्याने टोचत होते.

३) बहादुरगडावरून छत्रपती संभाजी राजांना वढू बुद्रुक – तुळापुर, ता. हवेली, जि. पुणे येथे आणले व उघड्या अंगाने साखळदंडांने अपमानास्पदपणे डांबून ठेवले. झोप उभ्याने डांबलेल्या अवस्थेत घ्यावी लागे. शिळे व निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जाई, त्यामुळे त्यांनी पुढे जेवणाचा त्याग केला.

४) छत्रपती संभाजी राजे यांची तिघांनी अमानुषपणे जबडा उघडून जीभ चिमट्याने धरून जोरात हिसडा देऊन बाहेर ओढली आणि धारधार कात्रीने मुळापासून कापली.

५) त्यानंतर लालबुंद सळ्या तेजस्वी डोळ्यात घातल्या व बुबुळे बाहेर काढली. राजांच्या डोळ्यात एवढे तेज होते कि, ज्या व्यक्तीने या शिक्षेचा

अंमल केला व बुबुळे हातावर घेतली, ती पाहून त्यास वेड लागले.

६) डोके बधीर व्हावे व काही ऐकू येऊ नये म्हणून संभाजी राजांच्या कानात अतिउष्ण द्रवरूप शिसे ओतले.

७) जनावराप्रमाणे अंगावरची कातडी सोलली जाई, त्यावर मिठाचे उष्ण पाणी सारखे टाकले जाई. त्यामुळे जखमा चिघळत व प्रचंड वेदना होत असत.

८) ११ मार्च १६८९, फाल्गुन अमावस्या, शके १६१०, गुढीपाढवा – प्रचंड हलाहाल करून झाल्यावर मग डोके छाटून एका भाल्यावर ठेवून तुळापूर, ता. हवेली, जि. पुणे येथे क्रुरपणे मिरवणूक काढली.

९) छत्रपती संभाजी राजांच्या मृत्यूनंतर त्यांचे हातपाय तोडले, शरीराचे अवयव वेगळे केले आणि परिसरात फेकून दिले. या अवयवांना कोणीही हात लावल्यास त्याला फाशी दिली जाईल असे फर्मान काढले.

१०) स्वराष्ट्र व स्वधर्म या भावनेतून अनंत क्लेशदायक यमयातनांशी छत्रपती संभाजी राजांनी झुंज दिली.

११) औरंगजेबाला जिरेटोप (किमौश) खाली टाकायला लावणारे छत्रपती संभाजी राजे त्यांचे कैदी होते आणि ते सुटणार नाही याची खात्री असताना असा छळ केल्याने, बादशहाच्या कोतेपनाचे आणि छत्रपती संभाजी राजांच्या मोठेपणाचे दर्शन घडून येते.

१२) जगातील कोणत्याही राजाचा असा अमानुष छळ झाला नाही. स्वराज्यासाठी, स्वतंत्र्यासाठी, रयतेसाठी, मातृभूमीसाठी क्रूर व हीन छळ संभाजी राजांनी हसत सहन केला.

१३) छत्रपती संभाजी राजे यांच्या या हौतात्म्यातून एका स्वातंत्र्य समराचा

उद्रेक झाला. राजरक्षण व धर्मरक्षण याचे यज्ञकुंड पेटले. त्यांच्या ज्वालात औरंगजेबाच्या धर्मयुध्दाची राख झाली.

१४) यामुळे पेटून उठलेल्या मराठ्यांनी औरंगजेबाला १५ वर्षे सळो की पळो करून सोडले आणि शेवटी महाराष्ट्रातच गाडले व हिंदुस्थानातील मोगल सत्तेचा शेवट केला.

१५) छत्रपती संभाजी राजांचे शौर्य व महान बलिदान केवळ महाराष्ट्रालाच नाही तर संपूर्ण हिंदुस्थानाला प्रचंड प्रेरणा देणारे आहे.

❑❑❑

छत्रपती संभाजी राजांनी ९ वर्षात १४५ हून अधिक लढाया केल्या, म्हणजे सरासरी वर्षाला १६ व महिन्याला सरासरी १ लाढाईस सामोरे जावे लागले.

१) सन १६८१ –

१. जानेवारी १६८१ – मराठ्यांनी बुऱ्हाणपूरवर (म.प्र.) हल्ला केला. हिंदुस्तानातील मोगलांच्या साम्राज्याचे दुसऱ्या क्रमांकाचे संपन्न शहर होते.

२. फेब्रुवारी १६८१ – बागलाण (नाशिक) भागात सैन्य संचलन. औरंगाबाद–औरंगजेबाच्या सैन्याची धुळधाण.

३. मार्च–एप्रिल १६८१ – नळदूर्ग किल्ल्यावर छत्रपतींच्या सैन्याने धाराशिव (उस्मानाबाद) येथे धडक मारली.

४. मे १६८१ – दमनच्या बाजूने आपली घोडी दामटली.

५. जुलै १६८१ – खांदेरी–उंदेरीवर आक्रमण.

६. ऑगस्ट १६८१ – स्वराज्याच्या सेनापतीने सिद्दीच्या जंजिऱ्या जवळच्या उंदेरी बेटावर (किल्ला) पुन्हा हल्ला केला.

७. ऑक्टोबर–नोव्हेंबर १६८१ – मराठ्यांचा एक सरदार ५००० सन्यासह अहमदनगरवर चालून गेला. मुलहेर, सालहेर.

८. डिसेंबर १६८१–छत्रपती संभाजी राजे यांचे सैन्य सोलापूरात घुसले.

२) **सन १६८२ –** वरील वर्ष १६८१ मधील चौफेर हल्यांप्रमाणेच वर्ष १६८२ नंतरही छत्रपती संभाजी राजे यांचे सरदार शत्रूवर तुटून पडले. रहिमतपूर शिरवळ (सातारा), सांगोला, मंगळवेढा, इ. मोगल प्रदेशात धुमाकुळ घातला.

३) **सन १६८३ –** कावेरी नदीच्या महापूरात रात्री घोडी दौडवून म्हैसूरवर मराठी झेंडा फडकवला. कल्याण–भिवंडी, रेवदंडा (रायगड)

४) **सन १६८४ (११ नोव्हेंबर) –** इंग्रजांवर वचक बसवून तह केला, लोहगड–उमरगा (धाराशिव) येथे लढाई केली.

५) **सन १६८५ –** प्रचंडगड रोहिडा (सातारा) किल्ला, कारवार (कर्नाटक) मराठ्यांनी धरणगाव लुटले. इंग्रजांची वखार जाळली.

६) **सन १६८६ –** विजापूर, गोवळकोंडा या दख्खनच्या मित्रांना मोठी मदत केली (१२००० घोडदळ व ५००० पायदळ पुरविले) – पुन्हा म्हैसुरवर आक्रमण करुन राजा चिक्कदेवराय यांना शरणागती पत्करण्यास भाग पाडले.

७) **सन १६८६ (मार्च) –** मिरज, सांगली, कोल्हापूर येथील मोठ्या मोगल तळावर सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी २०,००० सैन्यासह आक्रमण केले. मोगलांचा बेळगावपर्यंत पाठलाग केला व बेळगाव किल्ला जिंकला.

८) **सन १६८७ –** मराठ्यांनी कर्नाटकातील कावेरी पाक व चेतपेठ या किल्ल्यांवर हल्ले चढवले आणि पुढे चेपट्टण येथे पर्यंत मजल मारली. हरजी राजे यांनी अकार्ट कांजीवरम जिंकून मद्रासपर्यंत

धडक मारली. इंग्रजांचा किल्ला फोर्ट जॉर्ज याला वेढा दिला.

९) **सन १६८८ –** हरजीराजे यांनी पाँडेचरीला धडक मारली व पाँडेचरी जिंकली. पाँडेचरीच्या गर्व्हनरला व्यापारी सवलती दिल्या.

अशाप्रकारे सिन्नर, बागलाण (नाशिक), जालना, धारुर (बीड) रामनगर–पेडगाव–बहादूरगड (अहमदनगर), चौल–रेवदांडा (रायगड), भिवंडी–कल्याण (ठाणे), वऱ्हाड प्रांत (धुळे–जळगाव), मडगाव–म्हापुसा–साष्टी–जुवे–बारदेश (गोवा), भीमगड, विजापूर, धरणगाव, दिंडोरी किल्ला, पुन्हा अहमदनगर इ. भागात कधी छुपे तर कधी उघडपणे आक्रमण केले. यातील बऱ्याचशा आघाड्यांचे नेतृत्व स्वतः छत्रपती संभाजी राजे करत होते. उदा. जंजीऱ्यावरील आक्रमण – गोवा, म्हैसुर इ. वरील आक्रमणे.

तसेच छत्रपती संभाजी राजांनी चित्रदुर्ग, धर्मपुरी, म्हैसुर, जिंजी (कर्नाटक राज्य), त्रिचनापल्ली, मद्रासचा भाग, पाँडेचरी (तमिळनाडू), त्रिवेंद्रम (केरळ) इत्यादी दक्षिण भागातील २२ किल्ले स्वराज्यला जोडले.

❑❑❑

छत्रपती संभाजी राजे यांची राजकारण, रणनिती व युध्दनिती

१) छत्रपती संभाजी राजे यांनी जगातील पहिले बुलेटप्रुफ जॅकेट तयार करुन घेतले.

२) समुद्रात जगातील पहिला तरंगता तोफखाना उभारला.

३) जंजिरा किल्ला जिंकण्यासाठी १ कि.मी. लांब सेतू समुद्रात बांधला

४) पश्चिम किनारपट्टीवर गलबते तैनात केली. किनारपट्टीला बळकटी देण्यासाठी नवीन जलदुर्ग उभारले.

५) आदिलशहा व कुतुबशहाची एकजूट केली तसेच उत्तर प्रदेशापासून राजस्थान, कर्नाटक, तमिळनाडू पर्यंतच्या राजांना एकत्र येण्यासाठी प्रयत्न केले. शिवाय अरब सेनापती, जंगेखान यांच्यासह काही परदेशी राजांशीही संधान बांधले होते.

६) सिध्दी, पोर्तुगीज, डच व इंग्रज यांना त्यांच्या बिळात कोंडून ठेवले हाते. त्यांना तह करण्यास भाग पाडले. तहातील नियम, अटी व तरतुदी पाहिल्यास छत्रपती संभाजी राजांची दूरदृष्टी दिसून येते.

७) सन १६८१ फ्रेंचाकडून लांब पल्ल्याच्या तोफा खरेदी केल्या.

८) सागर किनाऱ्यावर कडक टेहळणी होती. एकट्या मुंबईच्या खाडीत त्यांची १०० गलबते होती. अलिबाग येथे ५००० सैन्यांचा तळ होता.

९) आरमार व सैन्य आधुनिक व सुसज्ज ठेवण्यासाठी परदेशी तंत्रज्ञान व प्रशिक्षण घेतले. मात्र त्याचबरोबर ते तंत्रज्ञान शिकुन स्वतःचे बारुद

खाणे तयार केले. कुडाळ व डिचोली येथे युद्धसामुग्री कारखाने उभारले.

१०) जखमी आजारी सैनिकावर प्रसंगी छत्रपती संभाजी राजे स्वतः उपचार करीत.

११) गोव्याच्या व्हाईसरॉय कौट दे आलव्होर याला दोन वेळा पराजित केले होते.

१२) भक्कम किल्ले – राजगड, पुरंदर, सिंहगड, पन्हाळा, रायगड हे किल्ले तर अगदी १०–११ वर्षे झुंजले असते तरी मोघलांना मिळाले नसते. एवढी भक्कम संरक्षण व्यवस्था छत्रपती संभाजी राजांनी तयार केली होती. आणि त्यामुळे औरंगजेबाने २६ वर्षे लढून देखील त्यांना महाराष्ट्र जिंकता आला नाही.

१३) मोघल फौजेवर प्लेग जंतू, जैविक अस्त्र यांचा त्याकाळी वापर केला होता.

१४) औरंगजेब बादशाहवर आत्मघातकी (फियादिन) पथकाचा हल्ला – पण बादशहाचे नशीब बलवत्तर होते म्हणून वाचला.

१५) मोघल सैन्यावर विष प्रयोग – मोघल सैन्याच्या मार्गावरील जलाशयांमध्ये मराठा सैन्य विष कालवत, उपासमार व्हावी म्हणून राणे पेटवत. सैन्याला अन्न व जनावरांना चारा मिळू नये अशी युद्ध निती व डावपेच करीत. छत्रपती संभाजी राजांचे हेच युद्धाचे धोरण (दगदभू धोरण) रशियाने दुसऱ्या महायुद्धात जर्मनीविरुद्ध वापरले.

१६) औरंगजेब स्वतःला इराणी समजत असे त्यामुळे मोठ्या आणि महत्वाच्या पदावर इराणी लोकांची नेमणूक केली होती. तो

भारतीय मुसलमानांना कमी लेखत असे, नेमका हाच मुद्दा पकडून छत्रपती संभाजी राजांनी मोगलात फुट पाडली. काही सरदार व औरंगजेब पुत्र अकबर हा छत्रपती संभाजी राजांना येऊन मिळाला. त्यांच्या मदतीने दिल्लीचे तख्त काबीज करण्याचे नियोजन राजांनी केले होते. त्यामुळे खवळलेला औरंगजेब स्वतः पाच लाख फौज घेऊन छत्रपती संभाजी राजांवर चालून आला.

❑❑❑

छत्रपती संभाजी राजांचे समाजकारण व अर्थकारण

१) धर्मांतरावर कायदेशीर बंदी घातली.

२) बालमजुरी व गुलामगिरी विरुध्द कडक कायदे केले.

३) छत्रपती संभाजी राजे प्रसंगी शेतकऱ्यांच्या शेतात त्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे अश्रू पुसत.

४) छत्रपती संभाजी राजांनी शेतकऱ्यांची कर्जे माफ केली.

५) जगात प्रथमच शेतीसाठी जलनियोजन केले

६) शेतकऱ्यांसाठी पीककर्ज योजना राबविली

७) गुरे चराई कर रद्द केला.

८) शत्रुच्या हल्यात व जाळपोळीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना नुकसान भरपाईसाठी स्वतंत्र मदत व पुनर्वसन विभाग निर्माण केला आणि कायम सहाय्याची सोय केली.

९) संत तुकाराम महाराजांची पालखी पंढरपुरास सुरु करुन, त्यांस संरक्षण देऊन, त्यासाठी तुकोबाचे पुत्र महादोबा यांच्या कडे आर्थिक तरतूद केली. देहू क्षेत्रास १९ ऑगस्ट १६८० च्या आदेशाने कायम उत्पन्नाची सोय केली.

१०) १. समर्थ रामदास स्वामींच्या (चाफळ, जि. सातारा) येथील मठ, आश्रम व राम मंदिरासाठी तेल, तूप, धन, धान्य, मीठ, दाळ, तांदूळ, सुपारी, कात, रोज ५०० विड्याची पाने (समर्थ रोज विडा खात असत) इ. सह रोख रकमेची तरतूद केली. दुधासाठी एक म्हैस, ती भाकड झाल्यावर दुसरी म्हैस देणे असा आदेश काढला.

२. मौनीबाबा गोसावी यांना दानपत्र देऊन वार्षिक उत्पन्नाची सोय केली.

३. मांडरदेव या देवस्थानास जमीन दान केली.

४. तुळजापूर कुलस्वामीनी भवानीमातेस मोठे दानपत्र व वार्षिक रोख रकमेची योजना केली.

११) उत्तम आर्थिक नियोजन, कडक शिस्तीचे प्रशासन व प्रबळ लष्कर या तिन्ही बाबतीत छत्रपती संभाजी राजे सरस होते. त्यामुळे त्यांच्या खजिन्यात विपुल संपत्ती, धान्य व युध्दसामग्री होती. म्हणूनच मुंबई बेट विकत घेण्यासाठी छत्रपती संभाजी राजांची इंग्रजांबरोबर अंतिम बोलणी झाली होती. परंतु पोतुर्गीज व जंजीरेकर सिद्धी यांनी व्यवहार होऊ दिला नाही.

१२) बालपरवेशी गृह : युद्धात हुतात्मा झालेल्या सैनिकांची मुले व निराधार विधवा यांचा सांभाळ करणारी सरकारी ठिकाणे सुरु केली. जगात अशी सोय करणारे संभाजी राजे हे पहिलेच राजे होते.

१३) शरीर संपत्ती जोपासण्यासाठी व्यायामशाळा व आखाडे चालू करून अर्थिक मदत दिली.

१४) जातीपेक्षा माती व वर्णापेक्षा इमानाला महत्त्व दिले.

१५) धर्मनिरपेक्ष राज्य केले. मंदिर, मस्जिद व चर्च बांधण्यासाठी अर्थिक तरतूद केली. सैन्यात अनेक मुस्लिम, ख्रिश्चन व इतरधर्मीय उच्च पदावर होते. जातीभेद मानला नाही. राजे कुणाच्याही पंक्तीला बसून जेवत असत. रायप्पा हा हरिजन संभाजी राजांचा खास दोस्त होता.

छत्रपती संभाजीराजे यांचे मुल्यमापन

छत्रपती संभाजी राजे यांच्या जाजवल्य स्वराज्यप्रेमाचे प्रखर राष्ट्रनिष्ठेचे आणि राजकिय, सामाजिक, आर्थिक कार्याचे मुल्यमापन देशविदेशीच्या विचारवंत, एतद्देशीय राजकारणी आणि तत्कालीन शत्रुपक्ष यांनी खालील प्रमाणे केले आहे.

१) इंग्रज – संभाजीने स्वराज्यात स्थिरता आणली आहे. तो फार मेहनती व सावध आहे. संभाजीबाबात आपण पुर्णपणे जागरुक असले पाहिजे.

२) फ्रेंच – संभाजीबद्दल जनतेत व सैन्यात प्रेम आहे. हुशार माणसे मिळविण्या इतपत संभाजी हुशार आहे.

३) निकोलाय मनुची – औरंगजेब स्वतः आलेला असतानाही संभाजी त्याच्या प्रदेशात चारही दिशांना लुटालुट करतो आहे. संभाजी हा बलाढ्य मोगल सेनेला क्षुद्र लेखतो.

४) औरंगजेबाचे छत्रपती संभाजी राजांना प्रशस्तीपत्र – माझ्या चार नादान पोरांपैकी एक जरी या संभासारखा (छत्रपती संभाजी राजांसारखा) पराक्रमी असता तर मला या वयात युद्धभूमीवर यावे लागले नसते. ''या अल्ला ये मै क्या देख रहा हुं, पुरी दुनिया में ऐसा लाल पैदा नही होगा. बडी मोगल सल्तनत को ऐसा एक वारीस मिलता तो पुरी दुनिया में मोगल राज कर देता.''

५) मार्च १६८९ – औरंगजेबाचा प्रस्ताव : उत्तरेकडील हवा तेवढा मुलूख घे आणि स्वराज्य मला दे हा प्रस्ताव धुडकावला. संभाजी राजांनी स्वराज्याचा एकही किल्ला देणार नाही असे स्पष्टपणे सांगितले.

६) उदेपुरी बेगतम (औरंगाजेबाची पत्नी) – छत्रपती संभाजी राजांच्या स्वराज्यात कोणत्याही स्त्रीची आब्रु लुटली जात नव्हती, अवहेलना होत नव्हती. अगदी शत्रूच्या सुद्धा. हे औरंगजेबाच्या पत्नीनेच म्हणले आहे आणि औरंगजेबास बोध घेण्यास सांगितले.

७) इंग्रज अधिकाऱ्यांनी व मोघल इतिहासकारांनी सुद्धा छत्रपती संभाजी राजांचे राजनितीज्ञ व कर्तृत्वसंपन्न, कुशल प्रशासक म्हणून कौतुक केले आहे.

८) दुर्गादास राठोड (प्रसिद्ध राजस्थानी सेनापती व राजकारणी) म्हणतात, छत्रपती संभाजी राजांसारखा प्रजाहितदक्ष राजा मी संपूर्ण हिंदुस्थानात पाहिला नाही.

९) ईश्वर दास नागर (औरंगजेब चरित्रकार) यांनी निर्भीडपणा, स्वाभिमान, देशप्रेम, धैर्य व त्याग हे गुण छत्रपती संभाजी राजांकडून घ्यावे असे स्पष्टपणे सांगितले आहे.

१०) गागा भट्ट (धार्मिक अभ्यासक) यांनी लिहिलेला 'समनयन' हा ग्रंथ छत्रपती संभाजी राजांना अर्पण केला होता.

११) नेताजी सुभाषचंद्र बोस लिहितात की, छत्रपती संभाजी राजे जर युरापात जन्माला आले असते तर तेथील प्रत्येक घरात राजांचे सोन्याचे पुतळे उभे करून लोकांनी देशप्रेम जागृत ठेवले असते.

१२) स्वातंत्र्यविर सावरकर – छत्रपती संभाजी राजे यांनी आपल्या अतुलनिय बलिदानाने छत्रपती शिवाजी महाराज यांची नैतीक व अध्यात्मिक संपत्ती अनेक पटीने उज्वल व बलशाली केली आहे.

१३) समर्थ रामदासांनी छत्रपती संभाजी राजांच्या तडाखेबंद

बहादुरीचे, यशस्वी युद्धनितीचे व दूरदृष्टीच्या राजकारणाचे मुक्तपणे कौतुक केले होते.

१४) सरसेनापती हंबीरराव माहिते (राजारामांचे सख्खे मामा) – रणांगणावरील संभाजी राजांचे तेज एक हजार कडव्या शिपायांबरोबरीचे असते. रायगडाच्या सिंहासनावर संभाजी सारखा देवाघरचा शिपाई राजा म्हणून आम्हाला हवा आहे.

१५) मराठी इतिहास संशोधक – छत्रपती संभाजी राजे यांची अंतःशक्ती प्रबळ, प्रभावी, प्रसन्न व प्रखर होती. त्यांची ताकद, साहस, धाडस, बेडरपना, चापल्य अचाट होते, तर बुध्दीही सुर्याप्रमाणे तेजःपुज होती.

१६) छत्रपती संभाजी राजे यांचे दग्धभू धोरण रशियन हुकमशहा स्टॅलीन याने दुसऱ्या महायुध्दात जर्मनीविरुध्द वापरले.

❑❑❑

महत्वाचे व लक्षात ठेवण्याजोगे

१) छत्रपती संभाजी राजे कैदेत असताना मियाँ खान या जेष्ठ सरदारची संभाजी राजांना खूप मदत झाली. लोखंडी तप्त सळ्या राजांच्या डोळ्यात न घालता स्वतःच्या पोटात घातल्या. संभाजी राजे यांच्यावर त्यांची किती श्रद्धा, प्रेम आणि स्वामीनिष्ठा होती हे दिसून येते.

२) स्वराज्यासाठी जगावे कसे हे शिवबांकडून शिकावे तर लढावे व मरावे कसे हे छत्रपती संभाजी राजांकडून शिकावे.

३) वरीलप्रमाणे जीवनपट पाहिल्यानंतर छत्रपती संभाजी राजे हे व्यसनी किंवा विलासी किंवा आळशी नसून कमालीचे साहसी, प्रचंड आक्रमक, अतिशय बुद्धीमान व वाघासारखे शूर होते हे स्पष्ट दिसते.

४) जर छत्रपती संभाजी राजे व्यसनी आणि विलासी असते तर शत्रूने केलेले विचित्र व अत्यंत वेदनादायी हालाहल त्यांनी सहन केले नसते आणि पराभव मान्य करून मोगलांचे मांडलिकत्व पत्करले असते. परंतु छत्रपती संभाजी राजे शेवटपर्यंत न झुकता ताठ मानेने तीव्र शिक्षा, मानहानी भोगत राहिले व स्वाभिमानाने मृत्युला सामोरे गेले.

५) छत्रपती संभाजी राजांनी तह करुन औरंगजेबसमोर मस्तक झुकवले असते तर आयुष्यभर त्यांना चैनीत व तुलनेने सुखात राहता आले असते, राजविलासी जीवन जगता आले असते. सध्याच्या भाषेत लाईफ एन्जॉय केली असती. प्रत्यक्ष लढाईला मैदानावर कमी जावे लागले असते आणि कुटुंबही सुरक्षित राहिले असते.

६) संभाजी राजांचे काळाची मती कुंठित करणारे हौतात्म्य, मराठी शुर सैनिकांची चिवटपणे झुंज देण्याची रणझुंजार वृत्ती, हिंदू पदपादशाहीचा अभिमान आणि हे श्रींचे राज्य निर्माण करणाऱ्या कल्याणकारी जाणत्या शिवछत्रपतींवरील अढळश्रद्धा यामुळे मराठी राज्यावर, महाराष्ट्रावर औरंगजेबास मोगल निशाण फडकविता आले नाही.

अशा या महापराक्रमी, तेजस्वी व परमस्वाभिमानी, प्रेरणासागर, छत्रपती संभाजी राजांबद्दल शालेय इतिहासात (इ. ३ री ते १०) कुठेही एक पूर्ण धडा सुद्धा नाही. इ. ७ वी च्या इतिहासाच्या पुस्तकात फक्त १५ ओळी असा अत्यंत थोडक्यात साधा उल्लेख आहे.

खरे देशप्रेम छत्रपती संभाजी राजांनी दाखवून दिले. तरुणात देशभक्ती, स्वाभिमान, त्याग, धाडस, प्रेरणा व राजकीय डावपेच रुजविण्यासाठी छत्रपती संभाजी राजांचे जीवन चरित्र आजच्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे. छत्रपती संभाजी राजे यांचे हे प्रेरणादायी चरित्र समाजापर्यंत विशेषतः तरुणांना समजण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढील प्रयत्न करावेत ही विनंती.

१) महाराष्ट्र राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व शाळांत ५ वी इयत्तेच्या इतिहासाच्या पुस्तकात संपूर्ण शैक्षणिक वर्षात फक्त छत्रपती संभाजी राजांचे चरित्र शिकवावे या बाबात आपण पाठपुरावा करावा.

२) इतर राज्यातील महान व्यक्ती (टिपू सुलतान, गुरु नानक, राणी लक्ष्मीबाई, महाराणा प्रताप, पृथ्वीराज चौहान, इ.) महाराष्ट्रातील शालेय अभ्यासात आहेत. त्याचप्रमाणे इतर राज्याच्या इतिहास अभ्यासात छत्रपती संभाजी राजांचे चरित्राचा समावेश करावा ही विनंती.

याच बरोबर आपणही अशा महापराक्रमी छत्रपती संभाजी राजांचे महाचरित्र अधिक लोकांपर्यंत पोहचवाल अशी अपेक्षा आहे.

आपला विनीत

अनिल महादेव भोसले

मो.: ०९९६९८८९९९९

ईमेल : anilbhosale812@gmail.com

कृपया आपल्या सूचना ईमेल कराव्यात ही विनंती



छावा

शिवाजी सावंत

कॉन्टिनेन्टल

प्रकाशक : ऋतुपर्ण अनिरुद्ध कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११०३०

मुद्रक : जंगम ऑफसेट प्रा. लि.
२५/१०, नांदेड फाटा, पुणे ४११०४१

अक्षरजुळणी : रेखा कुलकर्णी
शब्दरेखा टाईपसेटर्स
१२०४/१७, पुरंदरे रस्ता, शिवाजीनगर
पुणे ४११००४

मुखपृष्ठ : रवींद्र मिस्त्री
आतील रेखाटणे : भ. मा. परस्वाळे
आतील छायाचित्रे : जयसिंग पवार, मिलींद एकबोटे

छावा
प्रकाशन क्रमांक : ८३०
पुनर्मुद्रणाचे हक्क प्रकाशकाकडे
इतर सर्व हक्क
मृणालिनी सावंत यांचेकडे

प्रथमावृत्ती : १९७९
पुनर्मुद्रणे : १९८०, १९८१, १९८६, १९९३, १९९६, १९९८, १९९९
२०००, २००२, २००६, २००८, २०१०, २०११, २०१२

किंमत : ५०० रुपये

तसाच प्रसंग पडला तर मराठी राजमन
साक्षात् मृत्युलाही कसं सामोरे जाऊ शकतं
हे काळाला साक्षी ठेवून,
आपल्या असंख्य जललहरींचे नेत्र करून,
ज्यांनी तुळापुरी प्रत्यक्ष पाहिले
त्या 'इंद्रायणी आणि भीमा'
या लोकगंगांना ही 'राजकथा'
सश्रद्ध समर्पण!

भंडारा परडी

ती १९७२ सालची गुरुद्वादशी होती. 'छाव्या'च्या लिखाणाला प्रारंभ काण्यापूर्वी मी त्या सुप्रभाती स्नानादी विधी आटोपून पूजेला बसलो होतो. नुकताच सहकुटुंब तुळजापूरला जाऊन जगदंबेचं दर्शन घेऊन आलो असल्यामुळे मिटल्या डोळ्यांसमोर अष्टभुजा जगदंबेची मूर्ती तरळत होती. तिचं जगद्व्यापी रूप आकलून घेण्याची खटपट मनोमन चालली होती. हाती घ्यायच्या या कथावस्तूसाठी मन तिला कौलाचं फूल चढवीत होतं. अंगणातून संबळीच्या तडतडाटात बुडून आलेला उदोकार कानांवर पडला. अंगभर काटाच सरकला माझ्या! कोल्हापूरच्या या जागेत रहायला येऊन तीन वर्षे झाली होती. एकदाही कधी जगदंबेचा भुत्या दारी आलेला नव्हता. असा 'उदं गं अंबे उदं' गर्जला नव्हता. नेमका आजच त्याचा फेरा आला होता. मान वळवून मी त्याच्याकडं काही वेळ बघतच राहिलो; त्याला घरात बोलवून घेतलं. म्हणालो, "पोत पाजळ. जेवढी येत असतील तेवढी आईची नमनं म्हण." त्यानं माझ्या पत्नीकडं गोड्या तेलाची मागणी केली. ते मिळताच पोत शिलगवला आणि त्यानं नमन धरलं. त्याच्या जगदंबबोलांनी ती देवखोली कितीतरी वेळ घुमत राहिली. निरोप घेताना त्यानं आईचा भंडारा आणि दोन कवड्या माझ्या हाती दिल्या.

'शंभुकथा' बेतण्यासाठी— बांधण्यासाठी— महाराष्ट्राच्या बागलाणातील साल्हेरमुल्हेरपासून थेट गोव्यातील शिवोलीपर्यंत कित्येक गडकोट, शंभु-जीवनाशी निगडित ऐतिहासिक स्थळं, वस्तुसंग्रहालयं यांना मी भेटी दिल्या. शिव-शंभुकालाशी निगडित काय काय वाचलं ते माझं मलाच माहीत. अगोदरच शब्दांसारखं लेखकमनाला छळणारं दुसरं सत्य नाही. त्यातून ऐतिहासिक कथा हाती असली तर बघायलाच नको. मन घोड्यांच्या टापांना केव्हा बांधलं जातं ते कळतच नाही!

या कथेच्या निमित्ताने अनेकदा रायगडी गेलो. रात्रीच्या नीरव शांततेत हा पुरा गड पायांखाली घालणे यासारखा थरारक अनुभवच नाही दुसरा कुठलाही. खूप तळवटाचं व गूढ बोलतो रायगड रात्रीचा!

संभाजीराजांचे जन्मस्थळ पुरंदर! त्यांचे बालपण रमले व शिवाजीराजांच्या उभार हयातीतील रोमांचक घटना घडल्या तो राजगड, त्या पिता-पुत्रांच्या जीवनात शिरपेचाचा मान लाभलेला रायगड. औरंगजेबाच्या प्रमुख हालचाली घडल्या ते दक्षिणेतील औरंगाबाद आणि नगर, संभाजीराजांच्या जीवनात मर्मस्थळ ठरलेला पन्हाळा, मांडवीची खाडी, सज्जनगड, तुळापूर आणि जिथं संभाजीराजांच्या जीवनाला, 'शिवरूप' लाभलं ते वढू-तुळापूर अशी कैक मोठी व लहानसहान ठिकाणं मी प्रत्यक्षात पाहिली. मलाच न कळणाऱ्या भवानीभाषेत ती काय आणि केवढं माझ्याशी बोलून गेली ते सारं शब्दांत पकडून नाही सांगता येणार.

या कथेचा नायक आहे 'संभाजी.' विवाद्य! हात घालणाऱ्याला अनेक वळणांनी फरफटत नेणारा. कै. आचार्य अत्र्यांनी मुंबईच्या एका समारंभानंतर विचारल्याचं आठवतंय, "शिवाजीराव, या तुमच्या कलाकृतीत संभाजीला शिवाजीपेक्षा मोठा तर करणार नाही ना?" मी नम्रपणे आचार्यांना सांगितल्याचं आठवतंय, "माझ्या कथेचं नाव 'छावा' आहे आचार्य. त्याचे वडील सिंह होते हे नावातच स्पष्ट होत नाही काय?" ते सहज उत्तर देताना मनात मात्र विचार येऊन गेले होते: महाराष्ट्राच्या या 'छाव्याला' तत्कालीन लंडन दरबार 'Warlike Prince' संबोधून गेला असताना मराठी मनासमोर मात्र तो व्यसनी, लंपट, संतापी आणि अधिकार अविचारी असाच का आणि कसा उभा केला गेला? एका विचारानं मात्र मी हेलावूनच गेलो— 'संभाजीराजांचे चरित्र एका महामानवाच्या वाचनात यायलाच हवे होते. स्वामी विवेकानंदांच्या! ते या शिवपुत्राला अधिक योग्य व समर्थ न्याय खचितच देऊ शकले असते. जर संभाजीराजे खरेच व्यसनांध असते तर शेवटच्या कठोर सजेच्या प्रसंगी पारच ढासळले असते. कारण ती सजाच तेवढी क्रूर व अमानवी होती. खरी ऐतिहासिक कथा ऐतिहासिक संदर्भांच्या पायथ्यावरच उभी करावी लागते. ते संदर्भही निकोप, अलिप्त मनाने तपासलेले असावे लागतात. जिथं इतिहास मुका होतो तिथं तारतम्यानं त्याला सादवावं लागतं. त्या काळाचे रिवाज, बोली भाषा, वस्त्रे-प्रावरणे, वातावरण या सर्वांना रसरशीत, बोलता जिवंतपणा द्यावा लागतो. सर्वांहून अवघड असतात ती ऐतिहासिक मने. ती फुलपाखरांच्या पंखांगत असतात. हळुवार सावधपणे ती उकलावी लागतात.

या कथेतील, कुलेशांची 'कानोजी' भाषा त्यासाठीच वेगळी आहे. धर्मपीठ काशीच्या गागाभट्टांची बोली संस्कृतप्रचुर आहे. हंबीरराव, येसाजी, कोंडाजी, म्हालोजी, गणोजी-कान्होजी, आदींची 'मावळ-बोली' फव्वारती आहे. शिवाजी-संभाजीराजे, राजस्त्रिया, मंत्रिगण यांची भाषा उर्दू, फारशी, मावळी अशा सरमिसळीची व रोज वापरावीच लागत असल्यामुळे "दफ्तरी" झालेली आहे हे सुज्ञ वाचकांच्या सहज ध्यानी येईल. अशी कथावस्तू ही अनेक रसायनांच्या मिश्रणातूनच आकार घेत असते. 'हे कसे घडते?' असे विचारणे म्हणजे फूल कसे उमलते? असे वेलीला विचारण्यासारखेच आहे!

गेली दहा वर्षं मी विचारांच्या असंख्य झरोक्यांतून घेतलेलं शंभु-दर्शन सर्व प्रकारच्या उलटसुलट विचारांची चाळण लावून नंतरच मराठी वाचकांसमोर ठेवीत

आहे. शंभुकथेचा हा गोंधळ-चौक वाचकांसमोर घालताना लेखक म्हणून जाणवलेल्या दोन-तीन मुद्दयांचा प्रकर्षानं इथं उल्लेख केलाच पाहिजे. त्यांतील पहिला म्हणजे संभाजी हा केवळ साधा राजा नाही. तो कविमनाचा, अनेक उलघालींच्या प्रसंगांतून गेलेला, औरंगजेबाच्या रूपानं ज्याच्यासमोर विशालकाय संकट दत्त म्हणून पुढं उभं ठाकलं आहे असा आणि चिवट जीवनवाद सांगणारा राजा आहे. जिजाऊंची कन्याच जणू शोभावी अशा येसूबाई त्यांच्या जीवनात सहधर्मचारिणी म्हणून आल्या आहेत. खंडोजी, हंबीरराव, निळोपंत, येसाजी कंक, हरजीराजे, कोंडाजी, म्हलोजी, कुलेश, अशा मंडळींच्या प्रभावळीतील आणि तेजवंत शिवपुत्राचं हे व्यक्तित्व आहे. 'कुलुषा कब्जी आणि संभाजी' अशा मराठी साहित्यात बदनाम झालेल्या 'जोडगोळीवरचा' कलंक धुवून काढावा असा विडा उचलून काही मी ही कथा बांधलेली नाही! या कथेत 'कुलेश' असा शब्द खूप विचारांती योजला आहे. त्यांची फोड कवि + कुल + ईश = कविकुलेश अशीच देता येईल. 'कलुशा कब्जी' नव्हे! राजा शिवाजीपासून संताजी-धनाजीपर्यंत महाराष्ट्राच्या लोकजीवनात येऊन गेलेल्या अत्यंत महत्त्वाच्या अशा कालखंडाचा या कथेद्वारा वेध घेण्याचा एक प्रयत्न मी केलेला आहे. शनिवार दिनांक २८ एप्रिल १९७९ राजी 'छावा' प्रकाशित झाली किल्ले प्रतापगडावर. माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते. त्यांचा मी कायमचा ऋणी आहे.

ही कथा जसजशी बांधीत गेलो तसं तिच्यावरच्या प्रेमामुळं कै. ग. दि. माडगूळकर, शिव-शाहीर बाबसाहेब पुरंदरे, गो. नी. दांडेकर, नटवर्य चित्तरंजन कोल्हटकर, डॉ. पां. ना. कुलकर्णी आदी मंडळींनी वाचन-चर्चा या रूपाने जो उत्साह मला दिला त्याबद्दल मी त्यांचा सदैव आभारी व ऋणी आहे.

कॉन्टिनेन्टलचे अनंतराव कुलकर्णी यांच्याबद्दल काय लिहावे तेच समजत नाही. त्यांच्याच एका कवितेत लिहिल्याप्रमाणं त्यांचे माझे 'ऋणबंध' निश्चितच या जन्मीचे नाहीत. ऋणानुबंधाला कसले आभार आणि कुठला संकेत? तो मनोमन मानणे यातच सारं काही आलं.

जिच्या नावानं ही कथा सुरू झाली, त्या जगदंबेच्या चरणी ती भक्तीनं ठेवून म्हणतो – आता मात्र 'आई राजा उदं!'

दि. १ सप्टेंबर २०००
गणेशचतुर्थी
शके १९२२

शिवाजी सावंत
३, रामकृष्ण परमहंस गृहरचना,
सिंहगड रस्ता,
पर्वती, पुणे ४११ ०३०
दूरभाष : ४३३५६५५

छावा

१

पुजाऱ्यांनी भल्या पहाटे पूजा बांधलेल्या केदारेश्वराच्या राउळातील दगडी ठाणवया, करंजेल पिऊन वातीवरच्या ज्योती जागवू लागल्या. राउळाचा गाभारा त्यांनी उजळून टाकला.

पुरंधरच्या बालेकिल्ल्यातील राणीवशाच्या दरुणीमहालात मात्र रोजाना चालायचा तसा कुणबिणींचा कुजबुजता राबता आज सुरू झाला नव्हता. दरुणीमहालातील बाळंतिणीच्या अंधेरी दालनाचा दरवाजा अजून बंदच होता.

त्या मिटल्या दरवाज्यासमोर फरसबंदीवरून एक उतारवयाकडे झुकवा झालेले स्त्री-खानदान अस्वस्थपणे, चिंतागत जडावल्या येरझारा घेत होते. स्वतःच्या उतावळ्या मनाने दालनाचा दरवाजा उघडला आहे अशी कल्पना करून त्या स्त्री-खानदानाने कैक वेळा दरवाज्याला आपली चंद्रावळी शांत नजर दिली आणि हताश होऊन पायगतीच्या फरसबंदीला ती नजर पुन्हा जोडून कुणाला ऐकू जाणार नाही अशा बेताने स्वतःशीच ' आई जगदंबे, आई जगदंबे ' असे पुटपुटणे चालू ठेवले.

त्या होत्या जिजाऊसाहेब! शहाजीराजे भोसले यांच्या राणीसरकार! श्रीमान शिवाजीराजे भोसले यांच्या मातुश्री – आऊसाहेब! भोसले कुळीचा पवित्र-मंगल कुंकुमकरंड! जगदंबेला स्त्री-जातीच्या रूपात पडलेले सर्वांत गोमटे स्वप्न!

उत्तर रात्रीपासून जिजाऊ त्या मिटल्या दरवाज्यासमोर अशाच ये-जा करीत होत्या. त्यांच्या शेजारीच दहाबारा हातांचा पल्ला राखून पुरंधरचे किल्लेदार नेताजीराव पालकर एका दगडी जोत्यावर बसले होते. उकिडव्या बसलेल्या नेताजीरावांनी आपल्या गुडघ्यांना हातांचा वेढा भरला होता. रात्रभर ताटकळत खड्या असलेल्या नेताजीरावांना शेवटी आऊसाहेबांनीच एक जागी निवांत बसायला सांगितले आणि स्वतःला गडवाऱ्याच्या थंड झमकीबरोबर केव्हा डुलका लागला तेच मग नेताजीरावांना कळलं नाही! त्यांच्या डुईवरची कंगणीदार मावळी पगडी मात्र त्या डुलक्याला हुलकावणी देत मोठ्या तालेवारीने आपला तोल त्यांच्या गरगरीत शिरावर सिताब सावरीत होती. मर्दाची झोप नाहीतरी चटक्या अंगाचीच असते!

दरुणीमहालावरचा रोषणनाईक आला. जिजाऊंना बघताच अदबमुजरा घालून कोनाड्याकोनाड्यांत निसूर झालेल्या मशाली पटापट उतरून हलक्या कदमांनी निघून गेला.

दिवस चांगला दीड कासरा धावणी घेऊन वर चढला. महालाच्या महिरपीतून उतरलेल्या किरणांनी मध्यभागीच्या बिछायतीवर मनाजोगा ऐसपैस प्रकाश मांडला. मातुश्री जिजाऊ पुरत्या फिकरमंद झाल्या. चिंतागत फेऱ्या घेऊन त्यांच्या पायांना थकव्याचे कढ आले होते. त्याहून अधिक काळजीचे कढ त्यांच्या उरात दाटले होते.

एकाएकी दालनाचा दरवाजा कुसवात कुरकुरला. आऊसाहेब बिगीबिगी दरवाज्याच्या रोखाने पुढे सरशा झाल्या. उरातल्या सगळ्या 'आऊपणानं' त्यांच्या कानांत जमाव केला. अनेक सवाल डोळ्यांत खडे ठाकले.

दरवाजा पुरता उघडला गेला. मागून बसके, राजस रडणे धावणी घेत कानी आले. उघडल्या दरवाज्यात मध्यम वयाची कसबी सुईण – गोजाक्का कमरेत वाकून उभी होती. आपले अशुच ओले हात जिजाऊंच्या नजरेला पडू नयेत म्हणून मनगटे कमरेवर टेकवून तिने ते पाठीशी उफराटे फिरविले होते.

तापल्या दुधावर दाट साय जमून यावी तसे नितळ हसू तिच्या कुणबी मुखड्यावर खुलते झाले. जिजाऊंनी सवाल टाकण्यापूर्वीच तिने कपाळाचे गोंदलेले कातडे वर चढवीत दिललगाव कुणबी शब्दांच्या नुसत्या लाह्याच लाह्या फुलविल्या.

"झडू द्या तोपांची नवबत! बाळकिसन आलं... बाळकिसन!! बाळ-बाळतीन सम्दं सुकरूप..."

"आँऽऽ बाळराजंऽऽ" म्हणत नेताजीरावांनी जोत्यावरून खाली चटकी छलांगच घेतली! त्यांचा डुलका केव्हाच पसार झाला. मात्र सामने जिजाबाईंना बघताच दबकून डोक्यावरची पगडी त्यांनी अगोदर सिधी बसती केली. मासाहेबांना मुजरा घालीतच ते म्हणाले, "बुरजाबुरजांवरच्या भांड्यांस्नी बत्ती देतो आऊसाब! धाकलं धनी आलं! हू दे जगदंबेचा उदो!"

प्राजक्ताचे फुलभरले झाड डुलावे तशा जिजाबाई प्रसन्न प्रसन्न हसल्या. चतुर नेताजींनी तेवढीच संमती सिताब उचलली. आपली पाठवळ आऊसाहेबांना दिसणार नाही या बेताने मुजरा घालीत-घालीतच ते मागल्या पावली चार-पाच कदम मागे हटले. वळताना आपल्या भरदार मिश्यांच्या चिंचआकड्यावरून उजव्या हाताची दमजोर पालथी मूठ फिरविताना ते स्वत:शीच बोलल्यागत भुवया चढवीत पुटपुटले, "बाळराजंऽ! धाकलं धनीऽ ब्येस... लई ब्येस!" आणि एरव्ही घोड्यावर मांडबुलंद बैठक जमवून दौडणारे नेताजीराव लहान बच्च्यासारखे सिधे पायीच धावले– तोफखान्यावरच्या गोलंदाजांना गाठण्यासाठी!

त्यांच्या त्या पाठमोऱ्या धावपळीकडे बघताना जिजाऊ कपाळीच्या आडव्या

बोटांचा कुंकूपट्टा वर चढवीत स्वत:शीच हसल्या. डोकीवरच्या टोपपदरी नेसूचा भगवा जरीकाठ त्यांनी गोंदल्या हाताच्या कुलवंत चिमटीने उगीच सरसा केला!

"बाळकृष्ण! शिवबांचे बाळ! पहिले बाळराजे!" गोजाक्काच्या रसरशीत बोलांनी जिजाऊंच्या सोशिक मनावर लक्ष लक्ष मोरपिसे फिरली होती. आता त्या 'थोरल्या आऊ' झाल्या होत्या. त्यांच्या पापण्यांची तुळजाई पाती क्षणात दाटून आली. इतकी सालं गुदरली. शिवबाराजांच्या राणीवशात कन्यारत्नांचं उंच टिपेचं रडणं कैकवेळा घुमलं होतं... पण बाळकृष्णाचं बसकं रडणं आजवर कधी उठलं नव्हतं. म्हणूनच जिजाऊंचे डोळे पाणभरे झाले. कृतार्थतेने! मुलाच्या दर्शनाने 'आऊपण' धन्य होते, पण नातवाच्या दर्शनाने अवघे 'स्त्रीपण' धन्य होते!

स्वत:ला सावरीत जिजाऊंनी गोजाक्काला विचारले, "कुणासारखे गं दिसतात बाळराजे?"

"जितनित राजेसायबावानी!"

"राजेसाहेब!" जिजाऊंच्या डोळ्यांसमोर शिवाजीराजांची मूर्ती क्षणात उभी ठाकली. "घोड्याच्या पाठीवरून घामेजत धावणी धरून ते कुठल्या मुलखात असतील अंबा जाणे! राजे उपजले तेव्हा इकडची स्वारी अशीच उन्हातान्हात दौडीवर होती! आज शिवबाराजांच्या पोटी बाळराजे आले आणि राजेही तसेच दौडीवर! भोसल्यांच्या पुरुषांना मागल्या कबिल्याचा पायगोवा राहात नाही हेच खरं! हूं– जगदंब जगदंब! करीत जिजाऊंनी एक नि:श्वास सोडला. कितीतरी उदंड कढ त्या नि:श्वासात भरले होते.

राजे नाहीत, निदान त्यांची यादगीर म्हणून त्यांचे बाळराजे तरी डोळाभर बघावे म्हणून जिजाऊंनी दालनाच्या दगडी उंबरठ्यावर आपला सोनपुतळ पाय ठेवला.

आतल्या शिसवी मंचकावर सईबाईंच्या कुशीतून उफाळलेले रडणे भवतीच्या दगडी भिंतींवर रोमांच-रोमांच उठवीत होते! उंबरठ्यातच उभे राहून ते कानभर ऐकताच जिजाऊ भानावर आल्या. आपल्या उतावळ्या मनाचे त्यांचे त्यांनाच हसू आले. पाचवी झाल्याखेरीज बाळंतिणीच्या सोयर पडलेल्या दालनात नसते जायचे! त्या विचाराबरोबर क्षणभर त्या जखडबंद झाल्या. उंबरठ्यावर टाकला पाय त्यांनी तसाच मागे घेतला!

नेसूच्या निरीजवळ खोचलेली मोहराजड थैली त्यांनी खेचून हातात घेतली.

"सतका उतरा बाळराजांचा गोजाबाई." म्हणत त्यांनी वाकून ती थैली उंबरठ्याच्या आत ठेवली. शांत चालीने आणि भरल्या मनाने त्या आपल्या खाजगीच्या महालाकडे चालल्या. त्या वेळी किल्ले पुरंधरच्या चारी बाजूंचे बुलंद बुरुज आपले तोफांचे कंठ फोडून माथ्यावरच्या मावळी, निळ्या, वैशाखी आभाळाला खबर देत होते. "राजश्रियाविराजित, सकळगुणमंडित, भोसले कुलावतंस, श्रीमान शिवाजीराजे भोसले यांच्या थोरल्या राणीसरकार वज्रचुडेमंडित सईबाईसाहेब प्रसूत जाहल्या! पुत्ररत्न प्राप्त जाहले!"

आणि ती खबर ऐकून किल्ले पुरंधरवरच्या सगळ्या राउळांतले देव आपोआप 'सोयरात' पडत होते!

पुरंधरच्या सदरमहालात बैठकीवर बसून जिजाबाई खलित्यांचे मायने सांगत होत्या. समोर बसलेले बाळकृष्णपंत हणमंते ते मायने आणि मजकूर कागदावर उतरून घेत होते.

बाहेर अठरा कारखान्यांतील असामींना, पांढऱ्या गलमिश्यांचे गोमाजी नाईक पाणसंबळ, खांद्यावरच्या परातीतील साखर मुठोमुठींनी वाटत होते. कुणीतरी लगटीने गोमाजीबाबांच्याच तोंडात साखरमूठ भरली. तिचे निसटते कण गोमाजीबाबांच्या पांढऱ्याधोट मिशीत अडकले होते.

गोमाजींना डिवचण्यासाठी एक तरणा मावळा म्हणाला, "नाईक, लई लहानी मूठ हाय तुमची!"

त्याच्याकडे डोळे वटारून बघत गोमाजीबाबा गरजले, "म्होरं ये. परातच वततो तुज्या थोबाडात!" आणि गोमाजी स्वत:वरच खूष होऊन मान मागे टाकून कल्ले थरकवीत दिलखुलास हसले.

सदरमहालात खलित्यांच्या लाल फासबंदांच्या थैल्या तयार झाल्या. थैल्या ठेवलेल्या तबकाला जिजाबाईंनी उजव्या हाताचा दस्तुरी-स्पर्श केला.

सदरेच्या भिंतीशी उभ्या असलेल्या खबरगिरांच्या पथकातील एक एक खबरगीर सामोरा आला. आऊसाहेबांना मुजरा करून आणि बाळकृष्णपंतांच्या हातून आपापली थैली घेऊन बाहेर पडू लागला. फलटण, तळबीड, सिंदखेड, बंगळूर, चौक चौवाटा त्या थैल्या जाणार होत्या.

जिजाबाईंनी शेवटची थैली आपल्या हातात घेतली. त्यांच्या समोर मावळपट्ट्यातील नामांकित खबरगीर विश्वास—नानाजी मुसेखोरेकर उभा होता. त्याच्या हातात ती थैली देत जिजाबाई म्हणाल्या, "विश्वासराऊ, जातीनिशी ही थैली राजांना रुजू होईल असे कर. आमचा सांगावा सांग की – जरोर निघोन येणे. पुत्ररत्न उपजले!"

"जी." म्हणत विश्वासरावाने थैली धरला हात आपल्या माथ्याला लावून जिजाऊंना मुजरा भरला. विश्वासराव सदरमहालाबाहेर पडला.

धावणीची वाट बिनघोरी आहे की नाही हे टेहळण्यासाठी जासुदांचा नाईक बहिर्जी, राजांच्या घोडदळापुढे एका मजलेवर दौडत होता. सुपे जवळ आले. बहिर्जीच्या घारनजरेला एक स्वार सामनेच दौड घेत येताना दिसला. झटकन् बहिर्जीने आपल्या उजव्या तळहाताची झड कपाळावर चढविली. डोळे बारीक करीत त्या स्वाराचा कानोसा घेतला. त्याच्या घोड्यावरच्या मावळी जिनाची खूण चांगली पटताच टांच मारून, धूळ फेकीत आपला घोडा एकदम पुढे काढून दौडत्या टापेने क्षणात त्या स्वाराला गाठला.

बहिर्जीला बघताच समोरचा विश्वास पायउतार झाला.

"काय खबर आहे इस्वास?" मुजरा घालणाऱ्या विश्वासला बहिर्जीने लगोलग चाचपून पाहिलं.

"लई नामी खबर हे नाईक! धन्यास्नी बाळकिसन जालं! पुरंधरावरनं मासाबांची थैली घिऊन आलू न्हवं." विश्वासने आपला दाटला उत्साह तळपत्या डोळ्यांनी फोडला.

"धन्यांचं बाळकिसनऽऽऽ! कवा? भले रे माज्या भाद्दरा!" म्हणत बहिर्जीने मांड मोडून जिनावरून खाली चलाख-चटकी छलांग घेतली. आपण राजांच्या खबरगीर खात्याचे नाईक आहोत, विश्वास एक मामुली खबरगीर आहे हे विसरून बहिर्जीने सरसे होत विश्वासची थेट ऊरभेट घेतली. त्याचे खांदे थोपटले.

वळीव पावसाचा मारा होणार ही इशारत देणारा भन्नाट वारा सुटला होता. लगबगीनं बहिर्जीनं आपल्या घोड्याचा मोहरा माघारा वळविला. विश्वासला राजांच्या सामने रुजू करण्यासाठी तो विश्वाससह मागच्या मजलीकडे चौपट दौडू लागला.

राजांचे घोडदळ नजरटप्प्यात येताच त्या दोघांनी आपल्या जनावरांची धावणी कदमबाज केली. धिम्या चालीची घोडी घेऊन ते राजांच्या समोर आले. पायउतार होऊन दोघांनीही झटक्यात राजांना अदबमुजरे रुजू केले. राजांच्या पाठीवर, कायदे आखडलेले घोडदळाचे मावळे श्वास रोखून उभे होते. इकडे आभाळाच्या शिवारात वळीव पावसाच्या ढगांनी मेंढीकळपासारखा केव्हा जमाव धरला ते कुणालाही कळलेसुद्धा नाही.

राजे कुम्मैत जातीच्या तपकिरी, उमद्या जनावरावर मांडबुलंद बैठक जमवून बसलेले होते. घोड्याचे भगवे, रेशमी कायदे त्यांनी आपल्या अंगठीधारी सडक बोटांनी आखडून धरले होते. कपाळीचे दोन दलांचे आडवे शिवगंध, छातीकडे धारदार नाकाचा तरतरीत शेंडा, कानशिलाकडे निमुळते होत गेलेले, दोन्ही डोळ्यांत दोन सूर्य वागविणारे, लांबट डोळे, उभट शंखासारखी रंगसतेज मुद्रा, छातीच्या ठोकेदौडीशी कान लावून विसावलेली कंठातील चौसष्ट कवड्यांची आई भवानीची पावन माळ! असे ते 'राजयोगी' रूप होते. धावणीत घोड्यांच्या टापांखाली उसळलेली तांबडधूळ त्यांच्या पांढऱ्याशुभ्र टोपावर आणि काळ्याशार दाढीवर उतरून सार्थकी लागली होती.

बहिर्जीला बघताच राजांच्या रक्तजागल्या, रसरशीत ओठांतून काळजाची ठाव घेणारी, सोनेरी बोलांची चलाख कबुतरे क्षणात उडाली – "बोला नाईक, सिताब पाठमोरे वळाया कोण वजह? काही आफत ...?" राजांच्या उजव्या भुवईने वर चढत कमानी-बाक धरला.

"न्हाई धनी, ह्यो इस्वास पुरंधरावयनं मासाबांची थैली घिऊन आला. लई खुषीची खबर हाय. थोरल्या रानीसाबास्नी बाळकिसन जालं! धाकलं धनी आलं! कलच्या बेस्तरवारी!"

"अस्सं! जगदंब, जगदंब!" राजांच्या कपाळीचे शिवगंध, सईबाईंच्या सावळ्या मुद्रेच्या आठवणीने क्षणभर आक्रसले. नकळतच त्यांच्या हाताची सडक बोटे छातीवरच्या माळेतील सफेद कवड्यांवरून फिरली. दुसऱ्याच क्षणी आपल्या तळहाताचा भार जिनावर टाकीत राजे मांड मोडून घोडाउतार झाले. शांत पावली विश्वासजवळ जात त्यांनी काही न बोलता त्याचा खांदा हलुवार थोपटला आणि आपल्या डाव्या हातीचे सोनकडे झटकन् खेचून त्यांनी ते विश्वासला दिले.

मागच्या घोडदळातील माणकोजी, मुरारबाजी, येसाजी, तान्हाजी ही हरोलीच्या दौडीची मंडळी केव्हाच पायउतार झाली होती. त्यांना दौडीतले मावळे पगड्यांना झटके देत 'कसली खबर?' म्हणून विचारू लागले. ढगात उठलेल्या विजेचा प्रकाशलोट क्षणात मुलूखभर पसरतो तशी ती खबर घोडदळभर पसरली. ती ऐकताना न राहवून एका मावळ्याने नरड्याची घाटी फुलवीत, आभाळाकडे मान उडवीत किलकारी दिली– "आई भवानीचा उदो ऽ! हर ऽऽ हर ऽ हर ऽऽ महादेव!" सगळे घोडदळ ती किलकारी पुन्हा तशीच उचलताना रोमांचून उठले.

राजांनी मागे वळून हसत आपल्या जानकुर्बान मावळ्यांना एकदा नजर दिली. विश्वासने दिलेली थैली डोळे मिटून आपल्या कपाळीच्या शिवगंधावर टेकवून शेजारी असलेल्या निळोपंत बहुलकरांच्या हाती दिली.

निळोपंतांच्या तोंडून पत्रातील जिजाबाईंचे बोल खडे होऊ लागले– "... ज्येष्ठ शुध द्वादशेस, गुरुवारी दहाव्या घटिकेस थोरल्या सूनबाईंस पुत्ररत्न प्राप्त जाहले. जगदंबेच्या आशीर्वादे करोन आम्ही 'थोरल्या आऊ' जाहलो."

त्या बोलांनी राजांचे मन न्हाऊन निघाले. धावणीचा शिणोटा पार पसार झाला. निळोपंतांनी पत्र पुन्हा थैलीत घालून लाल गोंड्यांचा फासबंद आवळला आणि सप् सप् सप् करीत, टपटपीत पाणथेंबाची टिपरी घुमवीत वळिवाने आपली बेहोष मारगिरी सुरू केली. हां हां म्हणता राजांच्यासह सारे वेडावल्या आकाशाखाली निथळून निघाले! राजांच्या टोपावरची, दाढीवरची तांबडमाती वळिवानं पार पिटाळून लावली. तिची जागा पावसाच्या मोतीथेंबांनी घेतली!! वळीवधारांत न्हाऊन निघालेल्या राजांच्या छातीवरच्या जाम्याला कवड्यांची माळ चिकटली. अभिषेकपात्रातून वर्षणाऱ्या जलधारांखालचे नितळ शिवलिंग दिसावे तसे ते रूप होते. सह्याद्रीच्या शिवाचे–!

पुरंधरच्या परतीवरचा राजांचा शेवटचा मुक्काम पुण्याच्या लालमहालात पडला. या लालमहालाशी त्यांच्या कैक आठवणी जखडबंद झाल्या होत्या!

उमर कवळिकीची असताना याच लालमहालाच्या उंबरठ्यावरचे माथाभरले माप लवंडून सईबाई राजांच्या पत्नी म्हणून आल्या. त्या वेळी 'एवढं भलं मोठं माप यांना दिसलं कसं नाही?' याचं राजांना हसू आलं होतं! आज त्यांना आपल्या त्या विचाराचं हसू येत होतं.

रायगडावर सईबाईंच्या महालात ही लग्नातील आठवण चिराखदानांच्या मंद प्रकाशात राजांनी अनेक वेळा बोलून दाखवली होती.

त्या आठवणी मनात घोळवीत राजे लालमहालाच्या माळवदावर आले. हात जोडून त्यांनी उगवत्या सूर्याचे डोळाभर दर्शन घेतले. भवतीचे छोटेखानी पुणे न्याहाळले. केदारवेस, कुंभारवेस यांची तटबंदी धरलेले छोटेखानी पुणे दुरडीतल्या दह्याच्या लोटक्यासारखे दिसत होते! ते बघता बघता राजांना पंधरा सालांपूर्वीचा काळ आठवला. 'पंधरा वर्षांपूर्वी हे सगळं गावठाण तसनस झालं होतं. त्याचं सुरूपण सुकून गेलं होतं. या बेचिराख मातीला आऊसाहेबांनी बोलतं केलं. मासाहेबांचा हात पाठीवर घेऊन या बरड जहागिरीत सोन्याचा फाळ लावलेल्या नांगराच्या खुंटाळीला आम्ही हात घातला! इथंच आमच्या मनसुब्याला श्रीगणेशाचा शुभशकून सांगायला आम्हास गजाननाच्या मूर्तीनं दर्शन दिलं!'

त्या मूर्तीची आठवण येताच राजे विचारात हरवले– 'श्रींच्या गोमट्या राज्याची आणभाक आम्ही रायरेश्वरावर घेतली. हर मनसुब्यात येश देण्यास प्रत्यक्ष श्रीच समर्थ झाले. आजवर आऊसाहेबांच्या दोन चंद्रशांत डोळ्यांनी आमच्या मस्तकावर ममतेची बरसात केली. आता बाळराजांच्या रूपानं दोन हात आमच्या पाठीशी आले. सारी श्रींची कृपा!'

प्रसन्नशांत मनाने राजे महालात आले. चौरंगावर तबकात ठेवलेल्या केसरी टोपावर त्यांची नजर गेली. जवळ जाऊन त्या टोपाला आपल्या उजव्या हाताची बोटे भिडवून ती छातीला लावून राजांनी त्या टोपाला वंदन केले. दोन्ही हातांनी अलगद उचलून त्यांनी तो आपल्या मस्तकावर घेतला; आणि राजे महालाच्या सदरेवर आले. माणकोजींनी मुजरा घालून पुरंधरच्या धावणीसाठी घोडी तयार असल्याची वर्दी दिली.

तांबड्या कुम्मैत घोड्याला तबेल्यात ठाणबंद करून माणकोजींनी राजांची लाडकी, काळ्याभोर रंगाची 'कृष्णा' घोडी धावणीसाठी तयार ठेवली होती. तिच्या काळ्याभोर पाठीला हात लावून राजांनी तो मस्तकाला भिडविला. रिकिबीत पाय भरून झेपावत पक्की मांड घेतली; तेव्हा राजांच्या ओठांतून शब्द निसटले– "सरनौबत, विघ्नहर्त्याचं दर्शन घेऊन मगच पुढे कूच करू!"

"जी!" माणकोजींनी पगडी डोलवली.

माणकोजी, मुरारबाजी, तान्हाजी, संभाजी कावजी, सुभानजी, यांच्यासह राजे पुण्याच्या कसब्यातील गणेशदर्शनासाठी धिम्या चालीने निघाले.

गजाननाचे दर्शन घेऊन प्रसन्न झालेल्या खाशांनी घोड्यांना टाचा भरल्या. सारे पुरंधरच्या वाटेला लागले. नकळतच सगळ्या घोडेतुकडीच्या धावणीची गती नेहमीपेक्षा वाढली होती! राजे आपल्या 'बाळराजांचं' आणि त्यांचे साथीदार आपल्या 'धाकल्या धन्याचं' चित्र कल्पनेनेच स्वत:शी रेखाटीत होते!

पुरंधर नजरेत आला. राजांना सामोरे जाण्यासाठी गडपायथ्याशी उतरलेले किल्लेदार नेताजी पुढे आले. त्यांचा मुजरा आपलासा करीत राजे तांबड्या अस्तराच्या पालखीत बसले. झुपकेदार राजगोंड्याची वादी त्यांनी मुठीत पकडली. 'जय भवानी' असे पुटपुटत भोयांनी पालखीला खांदे दिले. भोई गड चढू लागले.

बालेकिल्ल्याच्या सरदरवाज्यातून पालखी जाताना दरवाज्यावरची नौबत दुमदुमली. ती थेट राणीवशाच्या महालात पोचली होती. भोयांनी पालखी ठाण केली. राजे बालेकिल्ल्याच्या पायऱ्या चढून आले. एकवार मागे वळून त्यांनी, भक्कम माचीचे हात पसरलेल्या पुरंधरावर टेहेळती नजर फिरवली. आणि झपाझप कदम उचलीत, झडणारे मुजरे आपलेसे करीत ते थेट दरुणीमहालाकडे चालले.

दरुणीमहालाच्या दालनाच्या दरवाज्यात उभ्या असलेल्या पहारेकऱ्याच्या हातात त्यांनी कमरेची जमदाड दिली. उंबरठ्याजवळ पायांतील बाकदार मोजड्या उतरल्या आणि समया तेवणाऱ्या शांत दालनात पाऊल टाकले. समोरच सईबाईंच्या मंचकाशेजारी उभ्या असलेल्या हसमुख आऊसाहेबांना पाहताच ते झटकन् कमरेत वाकले. त्यांच्या गळ्यातील कवड्यांची माळ ओळंबली. उजवा हात तीन वेळा फरसबंदीकडे नेत त्यांनी तो छातीला भिडवून मुजरा रुजू केला. जिजाऊ हसतच पाच पावलं पुढे आल्या. त्यांचे चरण शिवून राजांनी आपला उजवा हात स्वतःच्या मस्तकी लावला. जिजाबाईंनी त्यांच्या हातात एक मोहराजड थैली दिली.

"आम्हाला वाटलं, बाळांच्या बारशाचं तरी भान तुम्हाला मुलुखगिरीत राहतं की नाही कोण जाणे!" म्हणत जिजाबाईंनी हसत राजांच्या टोपावर आपला हात ठेवीत त्यांना वर उठविले. शांतपणे त्या सईबाईंच्या मंचकाजवळ गेल्या. "सूनबाईऽ!" म्हणून त्यांनी एक हळुवार साद घातली. सईबाईंनी जडावलेले डोळे उघडले. जिजाबाईंना पाहताच त्यांना नमस्कार करण्यासाठी त्या मंचकावर उठून बसण्याची कोशीस करू लागल्या. "राहू दे." म्हणत जिजाबाईंनी त्यांना बळेच शांत केले, आणि त्यांच्या कुशीतील दुपट्यात लपेटलेल्या, चळवळ्या बाळराजांना अलगद उचलताना जिजाबाई म्हणाल्या, "तुमची स्वारी गडावर आली. जागत्या राहा!"

मोहरांच्या थैलीचा सतका बाळराजांवरून उतरून राजांनी ती थैली एका तबकात ठेवली. हातांतील बाळराजे हसत जिजाबाईंनी राजांच्या हातात दिले. किंचित वाकून हलक्या हातांनी ते गोड ओझे आपल्याकडे घेताना नकळतच राजांची घारी नजर मंचकाकडे गेली. डोळ्यांना डोळे क्षणमात्र भिडले; क्षेमकुशल नजरेतच विचारले गेले.

हातातील धडपडणाऱ्या बाळजीवाकडे बघताना राजांच्या डोळ्यांतले भाव क्षणात बदलले. गनिमांवर एल्गारी चाल करताना आग वर्षविणारे त्यांचे निमुळते डोळे, हातांतील कोवळ्या जिवावर वात्सल्याची मूक बरसात करू लागले. बाळराजांच्या

बिटबिट्या सतेज डोळ्यांत पाहताना राजांचे भान हरपले होते. मंचकावरून सईबाई आणि शेजारी उभ्या असलेल्या जिजाबाई राजांच्या त्या रूपाकडे कौतुकभरल्या नजरेने पाहत होत्या. तीन पिढ्यांचा तो अतिशय बोलका मूक-संवाद फक्त शांतपणे जळण्याची ताकद असलेल्या भवतीच्या समयांनाच कळत होता!

नकळत जिजाबाईंची नजर दरवाज्याकडे गेली. तिथे उंबरठ्याबाहेर, उत्सुकलेल्या डोळ्यांची राजांची खास मंडळी दाटीवाटीने उभी होती. जिजाबाईंची नजर वळताच त्यांनी तिथूनच अदबमुजरे केले. त्या मंडळींत माणकोजी, सुभानजी, संभाजी कावजी, येसाजी, तान्हाजी, नूरखान बेग सारे मीठजागते ईमान होते. त्या सर्वांना आपले 'धाकले धनी' एकदा नदरं पडावेत असे वाटत होते. त्या मोहऱ्यानेच ते सारे उंबरठ्याबाहेर दाटले होते.

त्यांच्यावरची नजर उचलून राजांच्याकडे पाहत जिजाबाई हसत म्हणाल्या, "पहिला बाळ म्हणजे खाशी कौतुकाची बाब, नाही राजे?"

"अं! मतलब मासाहेब? आमच्या ध्यानी नाही आलं..." राजांची पुत्रमुखदर्शनाची समाधी भंगली.

"नाही – म्हणजे हमेश तुमच्या खांद्याला खांदा भिडवून तुमच्याबरोबर दौडणारी खाशी मंडळी दरवाज्यातच खोळंबलीत! त्यांनाही बाळराजांना पाहावंसं वाटतंय!" जिजाऊंच्या त्या बोलांनी राजे प्रसन्न हसले. आपल्या हातातील बाळराजांना जिजाबाईंच्या हाती देत त्यांनी मागे वळून साऱ्यांना दालनात येण्यासाठी हाताची इशारत केली. तशी सारी मंडळी दालनात आली. फक्त नूरखान बेग बाहेर राहिला. मुघलाने राजांच्या राणीवशात कसे कदम टाकायचे? त्याची अडचण राजांनी हेरली.

"खान, तुम्ही का थांबलात? बेशक आत या." राजांनीच त्याची कोंडी फोडली.

नूरखानही आत आला.

जिजाबाईंनी बाळराजांना माणकोजींच्या हाती दिले. भुवया चढवीत, डोकीवरची पगडी डोलवून त्यांनी बाळराजांना डोळाभर पाहून संभाजी कावजीच्या थोराड हातात दिले.

"हाऽ" करीत संभाजीने बाळराजांना आपल्या हातात अलगद घेतले तशा जिजाबाई म्हणाल्या –

"सांभाळून घे रे बाबा, उभं अरबी घोडं पोटाखाली मान घालून उचलणारा तू; अजून बाळराजांची मान नाही धरली!" सगळेजण त्या बोलांनी दिलखुलास हसले.

"छ्या! एवढं ग्वाड वजं कळत न्हाई व्हय मासाब..." म्हणत संभाजीने आपली बाजू सावरण्याचा प्रयत्न करीत बाळराजांना तान्हाजीच्या बळजोर हाती दिले. बाळराजांना हाती घेताना तान्हाजीच्या भरगच्च मिश्या ताठरल्या. तो संभाजीला म्हणाला,

" हां ऽ, तेवडं बोलू नगं ! मासाब म्हनत्यात त्ये खरं हाय. बरं का मासाब, जुन्नरच्या चालीत ह्यो नि मीच हुतो पागंतली घोडी भाईर काढाय. पागंवरलं धारकरी आमी कापून काढलं. म्या तेगीनं घोड्यांचं बंद कापलं. आमी सारी घोडी भाईर काढाया लागलो तर गल्मिांचं याक हत्यारबंद भिरं 'मारो ऽ मारो !' वरडत थेट चाल करून आलं. ह्यो म्हनला – 'तान्हाजीराव, निस्ता पट्टा घुमवत माज्याबराबर या. गमज्या दावतो.' आन चाल करून आलेल्या धारकऱ्यांवर ह्यो पठ्ठ्या पागंतलंच याक घोडं, त्येच्या पोटाखाली मान घालून उचलून 'हार ऽ हार ऽ म्हादेव' वरडत, थयथय नाचत धावला की ! ह्येचं भुतावानी ध्यान बघून त्ये बिचारं 'तोबा, तोबा' करीत पळालं. असा ह्यो संबाजी हाय !" तान्हाजीच्या रांगड्या विनोदाने राजांसह सगळे खुषदिल होऊन हसले.

नूरखान बेगने बाळराजांना पाहून काढलेले, " कैसा सुरूर बच्चा है ! " हे उद्गार त्या हास्यात कुणालाच ऐकू गेले नाहीत.

बाळराजांना पाहून सारेजण बाहेर पडले. राजांना आणि सईबाईंना मोकळे बोलता यावे म्हणून जिजाबाई तर केव्हाच आपल्या महालाकडे निघून गेल्या होत्या.

हातातील बाळराजांना सईबाईंच्या कुशीत ठेवून राजे मंचकाच्या कोपऱ्यावर टेकले. शब्दांना कशी चाल द्यावी हे दोघांनाही उकलत नव्हते. इतक्यात इंगळांवर ओवा घातलेली, धूर उसळती धुनी हातांत घेऊन एक कुणबीण दालनाच्या दरवाज्यात डोकावली. राजांना आत बघताच ती गडबडून गेली ! धुनीची पाटी सावरून डोकीवरचा पदर कसा सावरावा हेच तिला सुधरेना ! गोंधळून ती माघारा परतणार एवढ्यात राजांनीच तिला 'ये' असा हाताने विश्वास दिला !

आत येऊन भिंतीच्या कडेकडेने लगबगीने जात तिने सईबाईंच्या मंचकाखाली हातातील धुनीची लोखंडी पाटी सारली. गडबडीने डोकीवरचा पदर नीट केला, आणि तसे करताना उगाच आपल्या बांगड्यांचा आवाज मोठा झाला असे वाटून ती स्वत:शीच शरमली ! आल्या पावलीच ती भिंतीच्या कडेकडेने पटकन् दालनाबाहेर निसटली. तिने ठेवलेल्या धुनीतील ओव्याचा धुराचा उग्रमधुर वास राजांच्या आणि सईबाईंच्या नाकाला जाणवला. त्या वासाबरोबरच त्यांची नजर एकमेकांना भिडली. दोघेही शांतसुंदर हसले ! डोळेच उदंड बोलून गेले.

" तब्येतीस आराम ? " राजांनी विचारले.

काही न बोलता शांतपणे डोळे मिटून सईबाई हसल्या. ओव्याच्या तिखट धुराने बाळराजांनी खुसपुसायला सुरुवात केली.

" येतो आम्ही. " म्हणत राजे उठले आणि बाळाचे हात क्षणभर ओंजळीत दाबून दरवाज्याकडे चालू लागले. धुराने भरल्या दालनातून धीरपुरुष चालत होता.

त्यांच्या पाठमोऱ्या चालीकडे बघताना सईबाईंची तृप्त नजर त्यांच्या टोपातील

ऐटदारपणे डुलणाऱ्या मोतीलगावर स्थिरावली. त्या मोतीलगाबरोबर त्यांचे मनपाखरू डुलत होते. त्यांना सांगत होते– " तीन मुलींच्या पाठीवर हे बाळराजे झाले. त्यांना भरल्या डोळ्यांनी बघून परतणारी स्वारी आता केवढी पोक्त दिसते ! एरव्ही मुलूखभर धावणी करताना पाठीवर धूळलोट घेत दौडणारी स्वारी, आमच्या महालातून बाहेर पडताना मात्र पाठीवर ओव्याचा धूरलोट घेऊन चालली आहे ! कुंकूबळ असावं तर असं ! "

सईबाईंच्या महालातून बाहेर पडलेले राजे तसेच जिजाबाईंच्या महालात दाखल झाले.

" खबर मिळाल्यापासून बाळराजांसाठी एखादं साजरं नाव शोधण्याएवढी तरी फुरसद मिळाली की नाही राजे ? " राजांना आपल्या शेजारी बैठकीवर बसण्याची इशारत करीत जिजाबाईंनी जाब केला.

" नाही मासाहेब, आम्हाला तुमच्या खलित्यातील एकाच बाबीची सारखी याद लागली. " न बसता उभे राहूनच राजे अदबीने बोलत होते.

" कोणत्या ? "

" 'आम्ही थोरल्या आऊ झालो.' या तुमच्या बोलांची ! "

" म्हणजे बाळराजांसाठी आम्हीच नाव शोधलं पाहिजे म्हणा की ? आम्ही ते केव्हाच योजून आहोत. पण पहिला बाळ म्हणजे खाशी कौतुकाची बाब, नाही राजे ? " पुन्हा आऊसाहेबांनी तोच सवाल टाकला. त्या सवालाने त्यांच्या समोर उभे असलेले राजे आता मात्र पुरते जाया झाले. काय बोलावे ? कसा जाब द्यावा ?

" अं ऽ मतलब मासाहेब ? आमची काही गल्लत .... " राजे घोटाळले, अडखळले.

" तशी गल्लत नाही – पण गड चढून येताच कधी नव्हे ते पायांवर पाणी घ्यायच्या आधीच सिधे दरुणीमहालात आलात ! कसं ? " जिजाऊंनी हसून विचारले. राजांच्या धारदार नाकाजवळच्या निमुळत्या डोळ्यांवरच्या पापण्या त्या बोलांनी क्षणभर लवल्या ! दुसऱ्याच क्षणी मुजरा घालीत राजे वळले. त्यांच्या पाठमोऱ्या मूर्तीकडे बघणाऱ्या आऊसाहेबांची नजर, अवखळपणे हिंदकळणाऱ्या मोतीलगावर स्थिरावली. त्या मोतीलगावर पंख पसरून बसलेले त्यांचे मातृहृदय त्यांना सांगत होते – " एवढ्या दौडी घेतात, आता बाळराजांचे आबा झाले तरी राजांचं पोरपण काही नाही गेलं ! ते कधीच जाऊ नये ! फर्जंद असावेत तर असे ! " जिजाबाई त्या विचारांनी स्वत:शीच हसल्या. त्या वेळी राजे महालाबाहेरच्या चौकात घंगाळातील पाणी गडव्याने पायांवर घेत होते. त्यांच्या टोपाला लगटलेली मोतीलग मात्र स्थिर होती !

ज्येष्ठ वद्य अष्टमीचा सूर्य उगवतीचे मोर्चे फोडू लागला. फटफटीलाच सुरू झालेल्या बालेकिल्ल्याच्या नगारखान्यातील चौघड्याने आणि पिपाणीच्या सुरावटींनी पुरंधरचे अठरा कारखाने जागविले. हिरव्या आंबवतीच्या रसवंत आराशींनी गडाचे पत्थरी दरवाजेसुद्धा जिंदादिल केले! बालेकिल्ल्याच्या माथ्यावरचा भगवा जरीपटका आभाळाला थपडा देत पहाटवाऱ्यावर फडफडू लागला.

हालगी, लेझमींच्या तालावर वाजतगाजत बाळंतविडे गड चढू लागले. थैलीपोच झालेल्या नात्यागोत्यातील लागेबंद जनाना केव्हाच गडदाखल झाला होता. राजगडाहून राजांच्या राणीवशाचे मेणे तर पाचवीलाच गड चढून आले होते. सोयराबाई, पुतळाबाई, गुणवंताबाई, सकवारबाई, सगुणाबाई, लक्ष्मीबाई, काशीबाई या साती राण्यांनी प्रभातस्नान आटोपून भरजरी शालू परिधान केले.

दरुणीमहालातील सईबाईंचा महाल चिरागदानांच्या ज्योतींनी ऊरउजळता केला होता. सुगंधी पुष्पमालांनी त्या ज्योतींचा प्रकाश गंधित केला!

आज बाळराजांच्या बारशाचा सोहळा होता!

प्रभाकरभट राजोपाध्यांनी मुहूर्तासाठी घंगाळात घटिकापात्र सोडले. सईबाईंच्या महालात पुष्पमाला आणि जरीबतूने शृंगारलेल्या पाळण्याभोवती सवाष्णींनी रांगोळी रेखली. त्यांच्या खाली कणकीच्या तेवत्या दिवल्यांची पंचकडी मांडली.

चंद्रकळी शालू नेसलेल्या सईबाई, सोन्याची फुले मढविलेली धुंची घातलेल्या, जरीचे अंगडे ल्यालेल्या बाळराजांना घेऊन चांदीच्या फुलांच्या चंदनी पाटावर बसल्या. त्या पाटाभोवती रांगोळीचे नाजूक नकसकाम फिरले होते. पूर्वाभिमुख बसलेल्या, तृप्त डोळ्यांच्या आपल्या लेकुरवाळ्या सूनबाईकडे डोळाभर पाहत शेजारीच जिजाबाई उभ्या होत्या.

सोयराबाई, पुतळाबाई, काशीबाई अशा रक्ताच्या नात्यातील पाच सवाष्णी सईबाईंच्या सामोऱ्या आल्या. सईबाईंच्या मळवटभरल्या सावळ्या मुखाभोवती फेर धरू लागल्या. खणानारळानं भरलेली एक ओटी रिकामी करून दुसरी ओटी घ्यायलाही त्यानं फुरसद मिळत नव्हती. औक्षणाच्या ओवाळण्याची ती पंचारती खाली ठेवलीच जात नव्हती! बाळंतविड्यांची झिंबड उडाली होती.

बाहेरून प्रभाकरभटांची मुहूर्त भरत आल्याची वर्दी आली. महालातील गडबड वाढली. पाळण्याच्या एका बाजूला पुतळाबाई आणि दुसऱ्या बाजूला सोयराबाई उभ्या राहिल्या. पाळण्याशेजारी तबकात ठेवलेला, धुंची-अंगडं घातलेला दगडी वरवंट्याचा 'गोपा' पुतळाबाईंनी लाजून, हसत हसत उचलला. "गोपाळ घ्या!" म्हणत तो मधल्या पाळण्यावरून तीन वेळा सोयराबाईंच्या हाती दिला. पुन्हा तबकात ठेवला.

"नाव काय ठेवायचं?" कुणीतरी जाणती बोलली.

"बाळराजांचं नाव— संभाजीराजे ठेवा! त्यांच्या काकामहाराजांची ती यादगीर

आहे!" जिजाबाईंच्या पापणीकडा, ते नाव सांगताना आपल्या थोरल्या पुत्राच्या आठवणीने पाणावल्या.

पुतळाबाईंनी बाळराजांना सईबाईंच्या मांडीवरून अलगद उचलले. तीन वेळा पाळण्यावरून पलीकडच्या सोयराबाईंच्या हाती देताना त्या प्रसन्न हसत म्हणाल्या, "गोपाळ घ्या, गोविंद घ्या!"

पाळण्यातील तलम बिछायतीवर हळुवारपणे हातातील बाळराजांना ठेवून त्यांच्या छोटेखानी कानांजवळ आपले ओठ नेत पुतळाबाईंनी त्यांना त्याचे नाव सांगितले— "शंभूजी!" आणि ही बदतमिजी केल्याबद्दल पाठीवर पडलेले काशीबाई, गुणवंताबाईंचे गोड धपाटे हसत हसत सहन केले! शंभूसाठी सवाष्णी पाळणा गाऊ लागल्या. अभिषेकपात्र घंगाळात बुडाले. सईबाईंनी पुढं होत पाळणा पाठ लावून एकदा, पाठझोका दिला!

आणि नेताजीरावांनी बत्ती दिलेल्या पुरंधरच्या चारी बुरजांवरच्या तोफांच्या भांड्यांनी माथ्यावरच्या मृगार्त आभाळाला खबर दिली— "राजश्रियाविराजित, सकलगुणमंडित, भोसलेकुलावतंस, श्रीमान शिवाजीराजे भोसले यांच्या बाळराजांचे नामाभिधान जाहले! संभाजीराजे—शंभूजीराजे ऐसे शुभनाम ठेविले!"

आणि त्या खबरीने गडावरच्या राउळातील सगळे देव सोयरातून सुटले!

खाजगीच्या महालात मध्यभागी मांडलेल्या एका बैठकीवर गिर्दीला सुखावून जिजाबाई उत्सुक होऊन बसल्या होत्या. त्यांच्या उजव्या तर्फेला, एका सवत्या बैठकीवरच्या लोडाला शिवाजीराजे रेलले होते. महालाच्या भिंतीकडा धरून अंथरलेल्या बिछायतीवर माणकोजी, तान्हाजी, गोमाजीबाबा, नेताजीराव, बाळकृष्णपंत, प्रभाकरभट अशा खाशा मंडळींनी बैठक धरली होती.

महालाच्या मध्यभागी, जिजाबाईंना पुढा करून एका छोटेखानी दर्भासनावर सासवडचे ज्योतिषी हरभट बसले होते. त्यांच्यासमोर ठेवलेल्या लाकडी तिकाटण्यावरच्या पंचांगावर त्यांची एकटक नजर खिळली होती.

कपाळावरचे सुकले गंध फोडणाऱ्या आठ्या एक-दोनवार हरभटांनी उभ्या केल्या. हाताच्या बोटांची पेरे मोडून मनातल्या आकड्यांचा सरतपास घेतला. खांद्यावरच्या उपरण्याच्या नीट असलेल्या जरीकाठाचा जाबता पुन्हा एकदा ठीक बसवला. भुवया उंचावून त्यांनी आपल्या लांबसडक बोटांनी समोरच्या कलमदानातले पीस उचलले. काजळीच्या बुधलीत ते बुडवून, कुलदैवताचे स्मरण करून त्यांनी आपल्या पोथीवरच्या बदामी कागदावर सरासर कुंडलीपट मांडला. ग्रहांनी आपापली घरे घेतली!

"बोला शास्त्री, बाळराजांच्या ललाटीचा लेख ऐकण्याचा साऱ्यांचा मनशा पुरा होऊ दे." जिजाबाईंची उत्सुक नजर हरभटांनी आखलेल्या कुंडलीपटावर जखडली.

"जी. जगदंबेचं स्मरण करून आऊसाहेबांनी ग्रहयोग ऐकावा." हरभटांनी कुंडलीतील ग्रहांना आपल्या जिभेवर बसविले.

"बाळराजांच्या पायानं वैशाखीचा मार्तंड कुळात उपजला आहे. साक्षात रुद्र जन्माला आला आहे! रुद्र हिमालयावर राहतो तसाच उंच गडकोटांवर राहील. कुलाची कीर्ती उंच करेल. रुद्रासारखाच प्रलय-तांडव मांडेल! तसाच भोळाभाबडा, तापट आणि सरळ स्वभाव असेल, रुद्राला नसते तशीच यांना मृत्यूची दिक्कत असणार नाही! आणि —" हरभट क्षणभर घोटाळले. उगाच त्यांनी ठीक असलेले उपरणे पुन्हा ठीक केले.

"आणि काय? बोला शास्त्री." जिजाबाईंना त्यांच्या 'आणि' मधला संकोच जाणवला.

"क्षमा असावी – पुराणांतरी अनेक प्रसंगी रुद्र आप्तगणांकडून फसला तसाच योग या कुंडलीत दिसतो!" हरभटांच्या बोलांनी राजांसह सारे गंभीर झाले.

"अस्सं! ते काय आम्हीसुद्धा फसलोच की!" म्हणत हसून जिजाबाईंनी साऱ्यांच्या मनावरचा ताण कमी केला.

धिरावल्या हरभटांनी कुंडलीच्या कागदाची वळी करून ती थैलीबंद केली. कुलदेवतेसमोर ती ठेवून तिच्यावर बेलभंडार वाहण्याची सूचना प्रभाकरभट राजोपाध्यांना दिली. जिजाबाईंनी संभावनेची बिदागी म्हणून दिलेल्या मोहरांची थैली स्वीकारून ते राजांना आणि जिजाबाईंना मुजरा घालून महालाबाहेर पडले. बैठक उठली. राजे आपल्या महालात आले. मावळतीच्या डोंगराआड सूर्याने आपली छावणी टाकली. सासवडच्या पांढरीतून सोपानदेवांच्या समाधीवरचे, सांजआरतीच्या देवझांजांचे आणि घंटानादाचे निसटते सूर राजांच्या कानांवर पडत होते. एका लाकडी चौरंगावर तबकात ठेवलेल्या, दौडीत राजांच्या नेहमी बरोबर असणाऱ्या स्फटिक शिवलिंगावर त्यांची नजर गेली. त्या रंगसतेज शिवलिंगाजवळ जात त्यावर शेजारच्या परडीतील बेलाची त्रिदलं त्यांनी वाहिली. हात जोडून आपले निमुळते डोळे मिटले. त्यांच्या मिटल्या डोळ्यांसमोर पवित्रशांत शिवलिंग उभे होते. कानात हरभट ज्योतिषीबुवांचे बोल धावणी घेत होते – "पुराणांतरी अनेक प्रसंगी रुद्र आप्तगणांकडून फसला ना तसा योग या कुंडलीत दिसतो!" एक क्षणभर राजांची तंद्री लागली. "रुद्राचे सारे गुण घेऊन आलात – तशीच कोणतंही विष पचविण्याची ताकदही घेऊन आला असाल!! जगदंब, जगदंब!" असं पुटपुटत राजांनी डोळे उघडले. त्यांचे मन शांत होते!

बालेकिल्ल्याच्या चोवीस बुरुजांवर केलेल्या दिवल्यांच्या रोषणाईने आकाशातील नक्षत्रे पुरंधरावर उतरल्यासारखी वाटत होते!

पुतळाबाई भेटीला येत असल्याची वर्दी दासीनं सईबाईंना दिली. त्यांची शिणलेली नजर मधून मधून दरवाज्याकडे वळत होती. त्यांच्या कुशीत पदराखाली बाळराजांची दुधासाठी चुळबूळ चालली होती. सईबाईंनी पदराखाली हात नेला तशी ती चुळबूळ थांबली. हे बाळंतपण सईबाईंना मानवलं नाही. मंचकावरून उठताना डोळ्यांसमोर अंधारल्यागत वाटत होतं. चालताना पायांच्या पोटऱ्यांत गोळे उठत होते. बारशाच्या सोहळ्यातील सगळे कष्ट त्यांनी बाळराजांचे कौतुक म्हणूनच निकराने सहन केले होते.

कुणाशी तरी बोलत पुतळाबाई दरवाज्यातून आत आल्या. त्यांच्याबरोबर सखू, राणू, अंबा ह्या सईबाईंच्या एकमेकींच्या पाठींवरच्या तीन मुली होत्या. त्यांतील थोरल्या सखूबाई समजूतदार होत्या.

"थोरल्याबाई, आता कसं आहे तब्येतीचं?" पुतळाबाईंनी मंचकाजवळ येत सईबाईंना प्रेमाने विचारले.

"बाई, इथं पडून वरच्या तख्तपोशीकडं बघायचा कंटाळा आला. चार कदम चालावं म्हटलं तर पाय थारा देत नाहीत." सईबाईंच्या पापण्यांभोवतीची काळी वर्तुळे बघून पुतळाबाईंचे मन थरकले. काय बोलावं ते त्यांना सुचेना म्हणून शांत चालीने भिंतीकडे जात त्यांनी, सईबाईंच्या मंचकावर वाऱ्याचा मारा करणाऱ्या खिडकीचे दार बंद केले. चिराखदानातल्या ज्योती स्थिरावल्या.

"आऊ, आम्ही बाळराजांना घेऊ?" सईबाईंच्या मंचकाशेजारी उभ्या असलेल्या सखूबाईंनी विचारले.

"हां घ्या की." म्हणत सईबाई डाव्या कुशीवर वळल्या आणि बाळराजांना उचलून त्यांच्या हातात देण्यासाठी उठून बसू लागल्या. लगबगीने पुढे होत पुतळाबाईंनी मंचकावरच्या बाळराजांना सखूबाईंच्या हातात हळुवारपणे दिले. अर्धवट उठलेल्या सईबाईंच्या मानेखाली हात देऊन, त्यांना मंचकावर लेटते केले!

बाळराजांना घेऊन सखूबाई मंचकालगतच्या बिछायतीवर बसल्या राणूने आणि अंबाने डोळे मोठे करीत बाळराजांच्या गालांवर हात फिरविला. त्या तिघी बहिणी आपल्या भाऊराजाकडे बघण्यात स्वतःला हरवून गेल्या होत्या. सखूबाईंच्या मांडीवर आपले चिमुकले पाय उडवीत बाळराजे चिराखदानातल्या ज्योतीकडे टक लावून बघत होते. त्या चौघींकडे बघताना राजांच्या आठवणीत सईबाई हरवल्या होत्या आणि त्या साऱ्यांना प्रसन्न बघून पुतळाबाई सुखावल्या होत्या.

"प्रतापगडावयनं मोरूपंत आल्यात धनी. हुकूम व्हईल तर रुजू व्हावं म्हनत्यात." मुजरा घालीत किल्लेदार नेताजींनी, सदरमहालाच्या बैठकीवर लोडाला टेकलेल्या शिवाजीमहाराजांना खबर दिली.

"येऊ द्या पंतांना." राजांनी नेताजींना संमती दिली.

मोरोपंत सदरमहालात आले. त्यांनी राजांना मुजरा रुजू केला. केळीच्या मोन्यासारखे

ते उंच होते. त्यांचा रंग आणि भाव तसाच प्रसन्न होता.

"बोला पंत, प्रतापगडाच्या तटबांधणीचं काम पुरं झालं हे ऐकायला आम्ही उत्सुक आहोत."

"होय महाराज, जवळ जवळ सारं काम पुरं होत आलं. राहिलं ते जामदारखान्याची ताकद थोडी कमी पडली म्हणूनच – पण ते एवढा हिसाब धरावं असं नाही. आम्ही जातीनिशी रुजू झालो ते एक खाशी खबर स्वामींच्या कानांवर घालण्यासाठी."

"कोण खबर? बोला पंत." राजांच्या भुवया चढल्या.

"महाराज, गडाच्या तटबांधणीला मोठा शुभशकुन झाला. बांधकामात कारागिरांना एका स्वयंभू शिवलिंगानं दर्शन दिलं!" मोरोपंतांची मुद्रा, ते सांगताना उजळून गेली.

"जगदंब! पंत, मोठी योगायोगाची बाब आहे ही. बाळराजांचे नाव आम्ही 'शंभू' ठेवलं आणि गडाच्या बांधकामात स्वयंभू शिवलिंग सापडलं! बघू प्रतापगड आम्हांला श्रींच्या कार्यात कोणता शुभशकुन करतो ते! तुम्ही हात ओले करून घ्या. आम्ही जातीनिशी तुमच्याबरोबर प्रतापगडाकडं निघू, त्या शंभोच्या दर्शनासाठी!"

गडाच्या दरडीवरच्या निवडुंग आणि करवंदीच्या गर्दाव्यात, रंग बदललेले शेंदरी सरडे शीळ भरू लागले. त्यांना मृगाच्या पावसाचा सपळ लागला. मावळाच्या भातखाचरातील तरवे रानशेणींनी, चगाळ्यांनी आणि धाणेरीच्या काटक्यांनी जाळून, कुणब्यांनी बियाण्यासाठी भाजक्या भुईची कूस तयार केली!

राजे पुरंधरेश्वराचे दर्शन घेऊन आले. "आम्ही येत आहोत" अशी वर्दी त्यांनी सईबाईंना पाठविली. आज राजे पुरंधर उतरून प्रतापगडाकडे कूच करणार होते. त्या खबरीने सईबाईंच्या मनात काहूर माजले होते. उगाच त्यांचा हात एकसारखा बाळराजांवरून फिरत होता.

"आज आम्ही गड उतरणार." विचारात गुंतवा झालेल्या सईबाई राजांच्या बोलांनी भानावर आल्या. त्या अवस्थेतही त्यांच्या मनात, समोर राजे उभे असलेले पाहून विचार आला. "हे असंच रानवाऱ्यासारखं सपळ न देता येणं नि निघून जाणं!" कुणबिणीने मंचकाखाली ठेवलेल्या धुनीतल्या तिखट धुराने त्यांना ठसका लागला.

"तब्येतीस जपा. या गडावर वारा बळजोर. आता पडत्या पावसात तो बेगुमान होईल. गैरअंदाज खुल्यावर येऊ नका. बाळराजांना सांभाळा. ज्योतिषी म्हणतात ते रुद्र होऊन आलेत! रुद्र सांभाळणे कठीण!" राजांनी वाकून सईबाईंच्या कुशीतील शंभूबाळांना उचलले. काजळ भरल्या, तीट रेखाटल्या त्यांच्या बालमुखावर राजांची नजर स्थिरावली. ते स्वतःशीच मंद हसले. त्यांचे रक्तजागते, रसरशीत निमुळते ओठ बाळराजांच्या कपाळावर टेकले. शिवगंधाला घेऊन त्यांच्या कपाळाचे कातडे टोपाकडे किंचित वर सरकले. डोळे क्षणभर मिटले गेले. बाळशिवावर ओळंबून स्थिरावलेले ते

प्रसन्न शिवबल, सईबाई, धुराने लागणारे ठसके घशातच रोधून एकटक पाहत होत्या. त्यांचा सावळा चेहरा उजळला होता.

राजांनी डोळे उघडले. हातातील बाळराजांना सईबाईंच्याजवळ ठेवले. त्यांना बिलगते घेण्यासाठी पसरलेल्या सईबाईंच्या हातांतील नादभरल्या कंकणांचा स्पर्श राजांच्या सडक बोटांना झाला! दोघांच्याही मनात उदंड सूर किणकिणले!

"येऊ आम्ही?" म्हणत राजे सिधे दालनाबाहेर पडू लागले. सईबाईंना काहीच दिसत नव्हते. दालनात दाटलेल्या धुरामुळे की त्या तिखट धुराने डोळ्यांत उभ्या राहिलेल्या पाण्यामुळे ते त्यांचे त्यांनाच कळत नव्हते!

जिजाबाईंनी हातावर ठेवलेली दह्याची कवडी ओठाआड करून राजे मोरोपंत, माणकोजी, तान्हाजी, नूरखान यांच्यासह पुरंधर उतरले.

प्रतापगडाकडे राजे गेले. पाठोपाठ राजांचा राणीवसा राजगडाकडे पावता झाला. ओली बाळंतीण म्हणून सईबाईंना हा पावसाळा पुरंधरावरच काढावा लागणार होता. तीन महिने तरी त्यांना हलविता येणार नव्हते. म्हणून एकट्या पुतळाबाई पुरंधरावर मागे राहिल्या.

काळ्या मुंग्यांचे भिरे रांगा धरून, पावसाळ्यासाठी लागणाऱ्या रसदीचे पांढरे अन्नकण तोंडात घेऊन उंचाव्यावरच्या वारुळांकडे जाताना दिसू लागले. खाशा महालावरच्या झडी गड्यांनी बांधून घेतल्या. सर्पणाची जळाऊ लाकडे दगडी कोठारात आबादान झाली. पुरंधरच्या वाऱ्याने अलवार गारवा पांघरला!

आभाळाच्या मैदानात मिरगाने ढगांची आपली काळी भरदार घोडी उतरवली. सपासप चौखूर उधळून त्यांनी मावळी मुलखावर एल्गार केला! तापले कातळ निवांत झाले. गुरगुरणारे तांबडे पाणलोट उड्या घेत कऱ्हेला सामील झाले. कुणब्यांनी तयार केलेल्या भाजक्या भुईच्या कुशी, आभाळाचे दान घेऊन सुखावल्या! आता अवघ्या बारा मावळांवर चार-पाच महिने राज्य राहणार होते ते या ढगांचे आणि बेलगाम पावसाळी वाऱ्याचे!

कोंढाणा स्वराज्यात रुजू झाला खरे पण राजांचा एक भावगड मात्र झुरू लागला. पुरंधरावर सईबाईंची तबियत ढासळू लागली. जिजाबाईंनी महाडहून दुखणेपारखी गंगाधर वैद्यांना बलावू धाडून गडावर आणविले. गेले कित्येक रोज त्यांनी आपले वैद्यक डोळ्यांत तेल घालून राबविले होते. औषधी पाल्यांचे रस, काढे, मात्राप्रयोग, शेक हरएक उपाव करून ते थकले होते. त्यांना व्याधीचे निदान कळून चुकले होते. जिजाबाईंच्या खाजगीच्या महालात ते हातातील विविध गुणांच्या अष्टमात्रा चाळवीत खाली मान घालून उभे होते.

"वैद्यबुवा, आमच्या सूनबाई अंग धरत नाहीत. तुम्हीहून आम्हास काही बोलत नाही हा कोण मामला ? आम्हांस धीर निघत नाही." जिजाबाईंनी आपली व्यथा उघडी केली.

"आऊसाहेब, सारे उपाय हरले. शेक, काढे, मात्राप्रयोग, लेप कशामुळंच गुण नाही. वाऱ्याची झमकी येताच राणीसाहेबांच्या अंगावर काटा फुलतो. खिडक्या-दरवाजे बंद होताच ओठाला सोक पडतो. सरकारांचा सावळा मुखोडा फिका पडत चालला. मला तरी हे लक्षण ..." वैद्य कसे बोलावे हे न सुचून चाचपडले.

"कसलं ... कसलं वाटतं वैद्यबुवा ?" जिजाबाईंचा आवाज कातरला होता.

"हे... हे बाळंतव्याधीचं लक्षण आहे आऊसाहेब !" वैद्यांचा आवाज घोगरा झाला. मान अधिकच खाली गेली. हातातील अष्टमात्रा त्यांनी कसनुशा चाळविल्या.

"बाळंतव्याधी !" अंगावर वीज पडल्यासारख्या जिजाबाई सुन्न होऊन स्वत:शीच पुटपुटल्या. त्यांच्या अचल डोळ्यांसमोर दोन मुद्रा तरळत होत्या. एक पाठीवर मरण टाकून, कबिल्याकडे पाठमोरे होत मुलूखभर दौडणाऱ्या राजांची ... आणि दुसरी, ज्याला भूक लागल्यानंतर रडण्याशिवाय जन्म आणि मरण म्हणजे काय हे माहीत नसलेल्या बाळराजांची ! बाहेर पुरातन पुरंधर मात्र श्रावणातील ऊनपावसाचा खेळ मन लावून खेळतच होता. महालाबाहेर पडणाऱ्या विचारमग्न वैद्यांना आपल्या हातातील एक मात्रा निसटून खालच्या फरसबंदीवर केव्हा पडली हे लक्षातच आले नाही !! पडलेली ती मात्रा फार फार गुणकारी होती !!

राजांच्या तारिफेच्या राजकारणी मामल्यात एका व्याधीवर कोणतीच मात्रा लागू पडत नव्हती. ती व्याधी होती जंजिरेकर हबश्यांची ! दर्याची खोळ पांघरलेला जंजिऱ्याच्या बिकट बसकणीत बसलेला सिद्दी, मजलेत येईल तितुकी कोकणची किनारपट्टी तसनस करीत होता. दस्त होईल तेवढी कुणबी रियाया, दर्यावरून राजरोस लोटून नेऊन गुलाम करून त्यांचा दूरदेशी विक्रा मांडीत होता. आपल्या मुलखाला पारखे होताना आक्रोशणाऱ्या या देशीच्या आसामींच्या डोळ्यांतून कोसळलेल्या आसवांनी दर्याचे खारेपण निबर केले होते ! दर्याला त्याची खसखससुद्धा पर्वा नव्हती ! ती वाटायला सर्जा राजा पाहिजे होता. राजांनी हे सारे हेरले होते !

रघुनाथ बल्लाळ अत्र्यांना राजांनी जंजिऱ्याचा दर्या रंगविण्याचा विडा दिला. त्यांच्या कुमकेला मायनाक भंडारी, दर्यासारंग दौलतखान हे दर्याचे खासे फर्जंद नामजाद करून दिले.

अत्र्यांनी दंडाराजपुरीचा किनारा मारून जंजिऱ्याला मोर्चे घातले. अत्रे शर्तीने भांडले. दोन्हीकडचे कैक धारकरी पडले. पण जंजिरा दस्त झाला नाही. राजांनी सिद्द्यावर

काढलेली सासवडी मात्रा लागू पडली नाही. हा सल राजांना फार रुतला. सह्याद्रीच्या शिवाला अशा कैक सलांचे विष पचविणे पडतेच !

आता सईबाईंना पुरंधरावरून हलविणे भागच होते. बाळंतव्याधीने बाळराजांना सईबाईंच्या पदरापासून तोडले होते. मोठ्या निकराने वरच्या दुधावर जिजाबाईंनी शंभूबाळाचे रडणे थोपविले होते. काय करावे या विचाराने जिजाबाई पावसाळा सरण्याची वाट पाहत होत्या. कबिला राजगडाकडे आणण्याबद्दल राजांचा सांगावा आला होता. चांगला दिवस पाहून जिजाबाईंनी सईबाई, पुतळाबाई यांच्यासह पुरंधर सोडला. मेणे राजगडाच्या वाटेला लागले. बाळराजांना खांद्यावर घेऊन भोई भुई तुडवू लागले ! बाळशंभू राजगडाकडे चालले.

किल्ले राजगड ! गडांच्या राजाच्या बैठकीचा गरुडी-कडा ! सुवेळा माचीचा शेपटा पेलून, पद्मावती आणि संजीवनी माचीचे पंख पसरून उडत्या पवित्र्यात खडा असलेला आस्मानी पक्षी ! गणपती, पद्मावती, मारुती, काळेश्वरी, जान्हवी, ब्रह्मदेव या देवदेवतांच्या राउळांची शिखरे स्वर्गाच्या पायरीला भिडविणारी बारा मावळांतील उच्चासनी पंढरी ! राजांच्या मर्मबंधाच्या कैक यादगिरी जपून ठेवणारी कातळी कुप्पी !

किल्ले रायगड डोळ्यांच्या बाहुल्यांत आला. मेण्यांना सामोरे येण्यासाठी खासे राजे गडउतार झाले होते. त्यांच्याबरोबर शामराव रांझेकर, वासुदेवपंत हणमंते, प्रतापराव सिलीमकर, सिदोजी थोपटे अशी मंडळी होती.

पुढे होत आपली गर्दन झुकवून राजांनी आऊसाहेबांना मुजरा घातला. आपली निमुळती सडक बोटे त्यांच्या हाती देऊन त्यांना मेणाउतार व्हायला आधार दिला.

मागच्या मेण्यातून बाळराजांसह उतरलेल्या सईबाईंच्यावरून कुणीतरी कुणबीण जितं कोंबडं उतरत होती. सईबाईंच्या सुकल्या देहाकडे आणि घरंगळणाऱ्या कांकणांकडे पाहताना राजांना आपल्या काळजात मासळी सरकल्याचा भास झाला !

"सूनबाईंचा मेणा पद्मावतीवर जाऊ द्या. आम्ही तुमच्या संगती पायीच निघू राजे. पाय आणि मन दोन्ही मोकळे करणे आहे." जिजाबाई सईबाईंच्या मेण्याच्या भोयांकडे पाहत म्हणाल्या. सईबाई, पुतळाबाई पुन्हा मेण्यात बसल्या. त्यांचे मेणे गडाच्या वाटेला लागले. जिजाबाईंच्या सावलीवर नजर जोडीत राजे त्यांच्या मागून चालले. जिजाऊ बोलत होत्या. राजे फक्त ऐकत होते !

राजगडावरच्या खाजगीच्या महालात जिजाबाई बैठकीवर बसल्या होत्या. सईबाई सोडून राजांच्या सर्व राण्यांचा राणीवसा समोर उभा होता. भवती जळणाऱ्या चिराखदानांवर काजळी दाटल्याने ज्योती मंदावल्या होत्या. त्यांच्या वाती कुणीतरी सरशा करायला पाहिजे होत्या.

राजगडाचा सारा हालहवाल विचारून होताच जिजाबाईंनी मनातील हेत उभा केला.

"थोरल्या सूनबाईंना जडू नये ती व्याधी जडली. बाळराजांचा पदर त्यांना तोडावा लागला. शंभूबाळांना दुधास लावणे हा पेच आहे." जिजाबाई शांत शांत बोलल्या. राणीवसा खाली मान घालून त्याहून शांत उभा होता!

"धाकल्या सूनबाई, बोला काही मसलत सुचवा." जिजाबाईंनी सोयराबाईंच्या चंद्रकळी शालूवर आपली नजर जोडीत त्यांना विचारलं.

"आम्ही काय मसलत बोलावी? आऊसाहेब करतील ते कोण करणार?" सोयराबाईंनी पदर नीट केला. त्यांच्या शालूवरचे जरीबुट्टे लख्खकन् उजळले!

"ते तर आम्ही करूच. तुम्हास काही सुचलं तर ऐकावं हा आमचा मनशा." जिजाबाईंचा शांतपणा तसाच होता.

फक्त पुतळाबाईंनी एकदा नजर उचलली. त्यांना काहीतरी बोलायचे असावे पण समोरच्या काजळी दाटल्या ज्योतीवर नजर पडताच त्या थांबल्या. आपली नजर त्यांनी पायगती टाकली. असहायपणे! काही क्षण तसेच गेले. सुन्न शांततेत.

"या साऱ्याजणी!" जिजाबाईंनी साऱ्यांना जाण्याची इशारत केली.

"पुतळाबाई, तुमच्या स्वारीला आम्ही याद केल्याची वर्दी द्या! आणि थोरल्या सूनबाईंकडे एक जाड पोताचं कांबळं पाठवून द्या." पाठमोऱ्या पुतळाबाईंना जिजाबाई बोलल्या.

"जी." पुतळाबाई कसल्यातरी विचारभिंगरीतून भानावर येत म्हणाल्या आणि त्याही इतर राणीवशामागोमाग महालाबाहेर पडल्या.

बैठकीवरून उठून शांत पावली चालत जिजाबाईंनी चिराखदानांच्या तेलात डुबलेली पितळी सरशी उचलली. तिने ज्योतींवरच्या काजळ्या झटकल्या. वाती सरशा केल्या! तवान्या ज्योतींनी महालाचा अंतरंग उजळून टाकला.

वर्दी पावलेले राजे जिजाबाईंच्या महालात आले.

"या राजे, बाळराजांसाठी काही योजूनच आम्ही तुम्हाला याद फर्मावलं." जिजाबाई समोर उभ्या असलेल्या राजांना धीराने बोलल्या.

"आज्ञा आऊसाहेब."

"आम्हाला वाटतं बाळराजांसाठी एखादी 'दूधआई' जोडावी."

"जी!" राजांनी चमकून वर पाहिले. ती नजर दुखरी होती.

"घोटाळलात? त्याविना दुसरा मार्ग नाही." जिजाबाई समजावणीच्या बोलात बोलल्या.

"मासाहेब करतील ते सारं समजूनच. पण ..." राजांना काहीतरी बोलायचे होते.

"उद्याच आम्ही कापूरहोळास गाड्यांच्या धाराऊला बलावू धाडणार आहोत. हे ठरलं."

"जी." म्हणून राजे मुजरा करीत तसेच पाच कदम मागे हटले. ते महालाबाहेर पडत असताना मागून अतिशय ओथंबलेली साद आली. तिने राजांना उंबरठ्यातच जखडून टाकले.

"राजेऽ! तुमचं बोलणं तसंच मनी ठेवून चाललात! आम्ही ते जाणतो. शांतपणे ऐका. तुमच्या राणीवशाचा आम्ही बरीक कानोसा घेतला. तुमच्या एकाही राणीसाहेबांचा पदर बाळराजांना जवळ घेण्याएवढा मोठ्ठा नाही झाला! पण राजे, असले पेच उरात लपविता लपत नाहीत! आम्ही तुमच्या आऊसाहेब आहोत!"

राजांना मागे वळून बघवत नव्हते. जडावल्या पावलांनी त्यांनी समोरचा उंबरठा ओलांडला!

अवघ्या गुंजणमावळ खोऱ्यावर कुसळी गवताची कुरणे उठली होती. रानवाऱ्याबरोबर ती आपल्या लुसलुशा अंगावर लाटा उठवीत होती. त्या लाटा सरकत सरकत सभोवतीच्या खड्या चढणीच्या कड्यांच्या पायथ्याशी जाऊन मुरत होत्या.

आभाळात तरंगणाऱ्या एका घारीने कोंबड्यांच्या पिलांचा सासूद घेऊन खाली झेपावताना एक कर्कश शीळ भरली. कोंबडीने पंख फुलवून 'क्काक क्कॉक क्काक' करीत पिलांना झुडपात आसरा घ्यायची इशारत दिली. घारीची शीळ गुंजणमावळाभोवतीच्या कड्यांना थडकून परतली आणि गुंजवणीच्या खळखळाटात बुडून गेली!

झुंझारराव मरळांनी टाच दिलेला घोडा गुंजवणीच्या पाण्यावर एक फव्वारती पांढरी रेघ रेखून पार झाला. आऊसाहेबांचा सांगावा घेऊन झुंझारबा मरळ कापूरहोळाच्या गावठाणाकडे घोडा फेकू लागले. त्यांच्या पगडीखालून निसटलेले घामाचे ओघळ कानशिलावरच्या पांढऱ्या कल्ल्यांवर उतरले होते.

नसरापूर मागे पडले आणि एका मजलेतच झुंझारबांनी कापूरहोळाची वेस ओलांडली. गाड्यांच्या दगडी चिरेबंदी वाड्यासमोर पायउतार होऊन त्यांनी घोड्याच्या पाठीवर एक थाप दिली. पिंपरणीच्या झाडाला घोडे ठाण केले. कपाळावरचा घाम बोटांच्या पन्हाळीने भुईवर निचरून टाकला आणि वाड्याच्या भल्या मोठ्या दरवाज्यात उभे राहूनच त्यांनी मावळी लगावात साद घातली – "धाराक्का होऽऽ"

चौकसदरेजवळ बांधलेली करडे त्या सादीने खूर खटखटवीत धडपडून उठली. कोंबडी घुसपटली. त्या गलक्याने आत काटवटीत पीठ मळून भाकऱ्या थापणाऱ्या धाराऊला बाहेर कुणीतरी आल्याची वर्दी दिली! गाडग्यातल्या पाण्यात गोंदलेले हात बुचकळून लुगड्याच्या पदरावर त्याचे पाणी निपटीत धाराऊ वाड्याच्या दरवाज्यात आली. तिचा बांधा कुणबाऊ कसदार होता. कपाळी आडव्या कुंकवाची बोटे होती. उमर मध्यम असून तशी वाटत नव्हती. तबियत निखाऱ्यावर फुलल्या भाकरीगत डौलदार होती!

मळवटावरच्या कातड्यावरचे आडवे कुंकू वर चढवीत तिने विचारले, "साद घातली जनू! कोन झुंझारबा ? नि भाईच बरं हुबं ? येवा की आत."

"हां ऽ टेकाय योळ न्हाई. राजगडावरनं आऊसायबांचं बलावू घिऊन आलू." झुंझारबा धाराऊला बोलले.

"पर सम्दी शिवारात ग्येल्यात नी!"

"सम्द्यांचं क्काय क्काम हाय ? बलावू तुला हाये."

"मला ? नसंल जी. माजी पोरं हाईत राजाच्या लस्करात. त्येस्नी असंल."

"का कान फुटलं का क्काय माजं ? खुद आऊसायबांनीच सांगिटलं की धाराऊला म्होरं घालूनच घिऊन ये म्हून." झुंझारबांनी वाड्याच्या दगडी उंबऱ्यावर पाय आपटून पायताणावरची धूळ झटकली.

"आत्ता वं –" म्हणत धाराऊ बिगीबिगी आत गेली. परसातून तिनं कुणाच्या तरी पोराला शिवाराकडे पिटाळलं. मिळतील ती लुगडी, चोळ्या तिनं एका फडक्यात ठेवून त्यांचे बोचके आवळले.

रायाजी आणि अंतोजी हे धाराऊचे भरल्या माटाचे दोन तरणे मुलगे शिवारातून आले. त्यांच्या आयेने त्यांना सारा करीणा सांगितला. आपल्या अस्तुऱ्यांवर वाडा सोपवून ते दोघेही "का बरं बलावू आलं असंल ?" असा मनाशी विचार करीत पाठीवर ढाला बांधून तयार झाले. गूळपाणी घेऊन हुशार झालेल्या झुंझारबांनी ठाण केलेले घोडे सोडले. त्यांच्यामागून पायांतली चपली कुरकूर वाजवीत, काखेतून घसरणारे बोचके गोंदल्या हातांनी सावरीत धाराऊ चालू लागली. रायाजी आणि अंतोजी तिच्या दुतर्फा चालले. गाड्यांची धाराऊ राजगडाकडे निघाली.

पिकल्या भातखाचरांच्या बांधावर उतरलेले करडे कवडे डौलात माना फिरवत होते. त्यांनी टिपलेल्या भाताच्या गोट्यांनी त्यांचे गांजे फुगले होते.

कापूरहोळाच्या शिवेजवळची महादेवाच्या देवळाची घुमटी आली. तसे चालता चालताच थांबून, पायातील चपल्या खिनभर उतरून त्या घुमटीला हात जोडून धाराऊ आपल्याशीच बोलल्यासारखी पुटपुटली – "शंभू रं म्हादेवा ऽ!"

धाराऊ राजगडावर आल्याची वर्दी जिजाबाईंना मिळाली. त्यांनी तिला आपल्या महालात बोलावून घेतले. धाराऊने पुढे होत जिजाबाईंच्या पायांना हात लावून तीन वेळा नमस्कार केला.

"धाराबाई, एक जोखमीची कामगिरी तुझ्यावर सोपविण्याचा आमचा इरादा आहे. तुझी कूस इमानाची. तुझी मुलं राजांच्या शिबंदीत. म्हणून ही बात आमच्या मनी आली."

"सांगा जी. आमी पायाची माती." धाराऊ अदबीने म्हणाली.

"नाही! धाराऊ आता तू बाळराजांची 'दूधआऊ' होशील. आमच्या शिवबाराजांच्या शंभूबाळांना दूध पाजण्याची जोखीम आम्ही तुझ्यावर टाकावी म्हणतो. तुझा इरादा काय ?"

नुकत्याच दगावलेल्या आपल्या सहा महिन्यांच्या छोट्या लेकीच्या सयीनं धाराऊचे भाबडे डोळे पाणावले. आपण ऐकतो ते खरे आहे यावरच तिचा विश्वास बसेना. बसावा तरी कसा ?

"राजांच्या लेकाला माजं दूद ? आमी कुनबी, मरिबांची थटा व्हतीया जी ..." धाराऊ कळवळून बोलली.

"इमानी माणसांची थट्टा करण्याचं आम्हांस कधी साधत नाही. तुझा 'हो' ऐकायला आमचे कान आतुरलेत."

"जी." धाराऊने मान डोलविली.

जिजाबाईंनी आपल्या हातांनी धाराऊची खणा-नारळानं ओटी भरली. तिला घेऊन त्या सईबाईंच्या महालात आल्या आणि धीर देत म्हणाल्या,

"सूनबाई, ही धाराबाई. आजपासून बाळराजांच्या दुधाची आबाळ नाही व्हायची. हिच्या पदराखाली आणि तुमच्या नजरेखाली ते वाढतील!"

थरथरत्या कृश हातांनी सईबाईंनी आपल्या मांडीवरून बाळराजांना उचलले. धाराऊच्या गोंदल्या हातात त्यांना देताना न राहवून त्या म्हणाल्या, "आजपासून तुम्ही यांच्या मांसाहेब. आम्ही नावाच्या उरलो." सईबाईंचे डोळे भरून आले.

"तसं व का रानीसाव ? पापनीला पानी आनू नगा. ज्येनं आबाळ हुबं क्येलंय त्येनं पंखंबी दिल्यालीं असत्यात! राजांचा ह्यो दिवा माज्या जिवाच्या पदराखाली औक्षवंत हाय! ह्येची आबदा न्हाई करू द्यायची म्या!" धाराऊचे कनवाळू कुणबी काळीज बोलले.

त्यांचे बोलणे ऐकायला जिजाबाई महालात नव्हत्या! श्रींच्या कल्याणकारी राज्याची आणभाक शंभूमहादेवासमोर घेणाऱ्या एका राजाचा लसलसता अंकुर एका कुणबिणीच्या पदरात होता. धाराऊ नावाप्रमाणे शंभूबाळांच्या दुधाच्या 'धारेची' 'आऊ' बनली होती!! जगदंबेनेच त्या दोन जीवांची सांगड जोडून दिली होती!

राजगडावर आता भल्या पहाटेपासून हळूहळू उतरत असलेले दाट धुक्याचे बख्तर दिवस कासराभर वर चढला तरी हटत नव्हते. बालेकिल्ल्यातील जान्हवीच्या आणि ब्रह्मदेवाच्या देवळातील घंटानाद त्या धुक्यात मुरून जात होते.

धाराऊचे दूध आता शंभूबाळांना मानवले होते. त्यांनी बाळसे धरायला सुरुवात केली होती. राजांचा 'ल्योक' आपल्या पदराखाली पितो आहे या जाणिवेने कधी कधी धाराऊचा पान्ह्याचा ऊरलोट एवढा उफाळून येत होता की, बाळराजांचे पोट भरले तरी

तो ऊरबंद होत नव्हता. मग धाराऊ सारे वरकड दूध, एक थेंबही खाली न सांडता फडक्यात टिपून घेत होती. लगलगा सईबाईंच्या हमामखान्यात जाऊन ते फडके पाण्याने खळाळून धुऊन टाकत होती. तिची ती सारी धडपड बघून एकदा सईबाईंनी तिला विचारलेही, "धाराबाई, एवढ्या लगबगीनं हमामखान्यात का जाणं होतं तुमचं ?"

"सरकार, अंगच्या दुधाला मुंगी डसू ने! मुंगी डसली तर दूध कमी व्हतं नव्हं!" असा जाब धाराऊने मुखभर हसत दिला.

तो ऐकताना सईबाई मात्र खिन्नपणे स्वतःशीच हसल्या. "कसलीही मुंगी न डसताही दूध कमी होतं धाराबाई!" असे त्यांना बोलावेसे वाटले त्या वेळी. पण त्यांनी ते आपल्या ओठांतच ठेवले.

या कशाचीच कल्पना नसलेल्या शंभूराजांच्या अंगावर मात्र कुणबी घुंची, हातात त्याच घाटाच्या मनगट्या, बिंदल्या आणि पायात तांब्याचे वाळे धाराऊने चढविले होते. गळ्यात गंडादोरा आणि दंडात ताईत बांधून टाकला होता. तिच्या मावळी भाबड्या मनाला वाटत होतं की– 'राजांच्या या अंकुराला कुन्या पाप्याच्या बदनजरंची काळी मुंगी कंदी बी डसू ने!'

राजगडावरची चावरी थंडी सोसवेना म्हणून जिजाबाईंनी सईबाईंना गडपायथ्याच्या शिवापट्टणच्या महालात आणून ठेवले आणि खाशा जिजाबाई स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी प्रतापगडाकडे कूच झाल्या होत्या.

मकरसंक्रांतीपर्यंत आदिलशाहीच्या अंगावर काटा फुलविणारे शिवाजीराजे आता शिवापट्टणात आले होते. शिवापट्टण हे राजांच्या हुजुराती पागेचे ठाणे. मुलुखगिरीत दस्त झालेली घोडी महमद सैस ह्या नजरतैयार अरबी घोडेपारख्याच्या ताब्यात इथे रुजू व्हायची. महमदचे धिप्पाड मोतद्दार त्यांच्या चौकावर तापल्या लोखंडी साच्यांचे डाग द्यायचे. या डागांनी उठविलेल्या निशाणीच्या खुणेमुळे 'हे घोडं शिवाजीराजांचं' असं ओळखू यायचं. राजे शिवापट्टणात आले तेव्हा पागेत घोड्यांना डाग देणं चालू होतं. चौकावर डाग घेणारी घोडी विचित्र आवाजात विव्हळून खिंकाळत होती, कारण हे आवाज नेहमीच्या खिंकाळण्याचे नव्हते.

राजांनी महमद सैसला सदरेला बोलावून घेतले. पागेच्या निगराणीचा कुल जाबता कसा आहे याचा करीणा त्यांनी महमदला विचारला. "बोलो सैस, घोडोंका हाल क्या है ?"

"जी हुजूर. करीवन सब कुछ ठीक है! लेकिन कुछ 'ऐबी' घोडे पागामें शरीक हुए हैं! मेरी अर्जी हैं वे बेचे जाय!" महमदने जबाब दिला.

राजांच्या तुफान मुलुखगिरीत हाती लागलेल्या घोड्यांत खुराजवळ पांढऱ्या रंगाचे चट्टे असलेले काही 'ऐबी' म्हणजे अपशकुनी घोडे होते, ते विकून टाकावेत असा सलाह

सैसने पेश केला होता. राजे क्षणभर विचारात पडले. मग एकदम प्रसन्न होऊन बोलले, "नहीं सैस! हम घोडे नहीं बेच सकते! एक तो भी जानकार, समझकर ऐबी घोडा नहीं खरीदेगा! ऐसे ऐबी घोडे हमारे नये हश्मोंको सवारीकी आदत डालनेकी लिए रख देना!" राजांनी मार्ग सुचविला.

"जी हुजूर!" म्हणून सैस मागल्या पावली मागे हटू लागला. त्याची गर्दन वर येताच राजे छातीवरच्या माळेतील कवड्यांवरून हात फिरवीत सैसला म्हणाले, "और देखो सैस, भगवानकी बनायी कोई वस्त हम 'ऐबी' नही मानते!"

सदरकारभार उरकून राजे सईबाईंच्या महालात आले. महालात सखू, राणू, अंबा ह्या तिघी बहिणी शंभूबाळांशी खेळण्यात रमल्या होत्या. बाळराजे 'ता, ता' करीत त्या तिघींच्या मेळ्यात पालथे पडून एकदम पुढे झेपावत होते. त्या तिघींपैकी जिचा आवाज ऐकू येईल तिच्याकडे बघून खिदळत होते. मध्येच थांबून बिछायतीवरचे रंगीत बुट्टे आपल्या चिमुकल्या बोटांनी बिछायतीतून बाहेर उकलून काढण्याची कोशिस करीत होते. त्यांचा खेळ पाहून सुखावलेले राजे हसत हसत पुढे झाले. मुलींच्या रिंगणातून शंभूबाळांना त्यांनी वर उचलले. छातीशी जवळ केले.

राजांच्याकडे पाहणारे शंभूबाळ गोंधळून गेले. क्षणभर त्यांची नजर राजांच्या कानांत डुलणाऱ्या सोनेरी चौकड्यांकडे गेली. दुसऱ्या क्षणी त्यांनी राजांच्या हनुवटीकडे वळलेल्या दाढीतील काही बटा आपल्या मुठीत पकडल्या. आणि मूठ इकडे तिकडे दोन वेळा नाचविली. त्या नाचत्या मुठीबरोबर ताणल्या केसांच्या मुळांतून एक अननुभूत वेदनेची कळ राजांच्या हनुवटीतून साऱ्या अंगभर दौडली! कितीतरी दिवसांपासून अशी कळ आपणाला हवीहवीशी होती असे त्यांना वाटले. ते शंभूबाळाकडे दर्पणात पाहिल्यासारखे पाहू लागले! बाळराजांनी दाढी सोडली आणि राजांच्या कंठाजवळ बिलगलेल्या कवड्यांच्या माळेतील कवडी पकडताना ते 'ता, ता' म्हणून खिदळले. चिमटीतील कवडी तोंडात घालण्यासाठी धडपडू लागले.

"बहुत खूब, एकवार आमची पछान नाही धरली तरी चालेल पण आईच्या कवड्या कधीच विसरू नका!" राजे स्वतःशीच बोलल्यासारखे बोलले.

हळुवार हातांनी राजांनी सखूच्या हाती शंभूबाळांना दिले. देव्हाऱ्याजवळ हातांत निरांजने घेऊन उभ्या असलेल्या सईबाईंच्याकडे त्यांची नजर गेली. सईबाई मंद हसत होत्या! तबकातील निरांजनाच्या ज्योतींसारख्या त्यांना हसताना पाहून राजांना आश्चर्य वाटले. त्यांच्याजवळ जात राजांनी विचारले, "हसलातशा ?"

सईबाई पुन्हा मंदशा हसल्या. शंभूबाळांनी राजांची दाढी मुठीत पकडली त्याचे त्यांना हसू येत होते. आजवर कुणाचाही हात त्यांनी राजांच्या दाढीला भिडलेला पाहिला नव्हता. पण हे राजांना कसे सांगावे तेच त्यांना कळेना!

"स्वारीचं येणं होतं तेवढंच आमचं हसणं!" सईबाईंनी गनिमी कावा केला! राजांच्या कपाळी कुंकुमतिलक भरला. थरथरत्या हातांनी त्यांच्या मुद्रेभोवती तबकातील ज्योती फिरविल्या. सईबाईंना पाहताना राजांना जाणवून गेले की शंभूबाळांनी चांगले अंग धरले आहे तेवढेच सईबाईंनी आपले अंग टाकले आहे.

"बाळराजांचं उष्टावण होणं आहे. फलटणला दादासाहेबांना आवतन..." सईबाईंचे बोल अर्धवटच राहिले.

"ते होईल. तुम्ही आता प्रतापगडाकडे जाण्याची तयारी ठेवा. तिथली हवा तुम्हास मानवेल." राजांनी मनाच्या खोल कप्प्यातील सल बाहेर काढला.

सईबाई एकदम गंभीर झाल्या. त्यांचे डोळे भरून आल्यागत झाले. हातातील निरांजनाच्या प्रकाशात ते राजांना दिसू नयेत म्हणून वळून त्यांनी वाकून देव्हाऱ्यासमोरच्या चंदनी पाटावर औक्षणाचे तबक ठेवले.

राजांनी त्यांची कातरता हेरली. न राहवून ते भावभरल्या आवाजात म्हणाले, "सई, दिल टाकू नका!"

आणि आत्म्यावरही हात फिरवणाऱ्या त्या थबथबत्या शब्दांनी सईबाईंचा बांध फुटला! घशातून हमसून येणारे हुंदके रोधण्याचा पराकाष्ठेचा यत्न करूनही ते थांबत नव्हते. विचित्र कंठदाटल्या शब्दांत त्या बोलल्या, "आमचा भऽऽ रोऽसा नाही! बाळाऽच्या मासाहेऽब धाऽराऽऊ! त्यांऽना त्यांऽच्या दुधाऽसाठी स्वाऽरींनी काऽही तैनात लावून द्याऽवी!"

त्या बोलांनी राजे सुन्न झाले. त्यांना काही बोलवत नव्हते. जीवनातील काही सत्येच अशी असतात्की त्यावर माणसाच्या वाणीचे भाष्य अपुरे असते!

"येतो आम्ही." म्हणत राजे वळले. चारी मुले खेळात रमली होती.

महालाबाहेर पडलेल्या राजांच्या मनात सईबाईंच्या बोलांनी दौड धरली होती. "आता आमचा भऽरोऽसा नाही! भऽरोऽसा नाही!"

आणि कुठून तरी अगदी खोल दरीतून यावा तसा एक आवाज त्यांना ऐकू येऊ लागला, "सैतानकी बनायी सबसे 'ऐबी' वस्त 'मौत' है सैस!"

नेताजीराव, आबाजी महादेव, येसाजी कंक यांच्या संगती राजे राजगड चढू लागले. गडाच्या पालीदरवाज्यातून पालखी पार होताना नौबत दुडदुडली. तिच्या आवाजाने पद्मावती माचीवरच्या निशाणबारदारांना आपोआप इशारत मिळाली. त्यांनी लगबगीने निशाणचौथऱ्यावर भगव्या जरीपटक्याचा ध्वजदंड उभा केला.

पालखीत बसूनच राजांनी पद्मावती माचीवर आपली नजर जोडली होती. क्षणात त्यांना आभाळाच्या निळ्याशार टाक्यावर डुलणारा जरीपटक्याचा लहान भगवा राजहंस दिसू लागला! गडमाथ्यावरचा फडफडणारा जरीपटका बघताना नेहमीच आपल्या

छातीवरचा जामा काखेजवळ दाटत जातो असे राजांना वाटत आले होते. आत्ताही त्यांना तसेच वाटले. छातीजवळ उजव्या हाताची बोटे नेत त्यांनी गडमाचीवर डुलणाऱ्या भगव्या राजहंसाला पालखीतूनच वंदन केले.

गडावरच्या पद्मावती, संजीवनी आणि सुवेळा या तिन्ही माच्यांवरून गेले आठ दिवस नवनव्या असामी वाहत होत्या. राजांनी थैलीस्वार धाडून साऱ्या खाशांना राजगडावर पेश होण्याची फर्माने दिली होती.

कान्होजी जेधे, मोरोपंत पिंगळे, मानाजी भोसले, सोनोपंत डबीर, तान्हाजी मालुसरे, रघुनाथ बल्लाळ अत्रे, बाजी सर्जेराव, निळोपंत आणि रामचंद्रपंत बहुलकर, संभाजी कावजी, सुभानजी इंगळे सारी मंडळी जरोरीने गडदाखल झाली होती. आणि साऱ्यांना बलावू धाडण्यात राजांचा काय मनसुबा असावा याची खलबते करीत होती.

राजांची पालखी पद्मावती माचीवरच्या सदरमहालासमोर ठाण झाली. राजांना साऱ्यांनी अदबमुजरे घातले. ते मुजरे आपलेसे करताना राजांची उभट मुद्रा उजळून निघाली. दौडीत ठिकठिकाणी भेटणारी मंडळी आज इथं राजगडावर एका जमावाने दिसत होती.

सर्वांसह माचीच्या सदरमहालाकडे जात असतानाच राजांनी प्रमुख तटसरनौबत सिदोजी थोपट्यांना सदर दरबाराचा बेत सांगितला. वासुदेवपंत हणमंतेंना मरातबाच्या साजाची सरपोसबंद तबके सिद्ध करण्याची सूचना दिली.

श्रीसांबाचे आणि पद्मावतीदेवीचे दर्शन घेऊन आलेले राजे सदर बैठकीवर सुखावले. सर्व मंडळींना त्यांनी बसण्यासाठी हाताची इशारत केली. सदर बसली.

राजांनी पुजाऱ्याने पेश केलेल्या परडीतील भवानीचा भंडारा चिमटीत घेऊन ती चिमट 'जगदंब, जगदंब' म्हणत सदरेसमोर उधळली. दुसऱ्या चिमटीने भंडारा कपाळावरच्या शिवगंधावर घेतला. चिमटीची दोन्ही बोटे आपल्या गळ्याला टेकविली. भंडाऱ्याची भली थोरली परडी साऱ्या सदरभर फिरली. मानकऱ्यांनी आपले मळवट भंडाऱ्याने भरून घेतले. राजांनी आपल्या मनचा हेत खुला केला –

"एक तपापूर्वी रायरेश्वरावर आम्ही श्रींचे राज्यास आणभाकेने बांधील जालो. उमर कवळी असता, दिमतीला मूठभर असामी असता आम्ही अगस्तीचा मनशा बोलून गेलो! आजवर श्रीसांब येश देणार थोर जाले, एकट्याने बांधू म्हणता राहणीचे साधे घरटे बांधणेही साध्य नच होय! ये तो श्रींचे गोमट्या राज्याची बाबत! आमचे दोन हात कैसा नतीजा पावावेत? एक म्हणता दहा हात आमच्या पाठीशी आले. पोख्तांचे जाणते बोल आम्हास मार्गी लावते जाले. आऊसाहेबांचे मायेचे हात धीर-दिलासा आणि डोळे आशीर्वाद देत आले. आज आम्हास याद येते ती आमच्या दादोजींची, बाजी पासलकरांची!" क्षणभर राजांचा आवाज घोगरा झाला.

"तुम्ही साऱ्यांनी अंगेजणीने कस्त केली म्हणोन श्रींचे राज्याने अंग धरले. आज

चाळीस गडकोटांवर जरीपटका चढला! दहा हजारांवर पाऊलोक आणि तितुकाच घोडालोकांचा जमाव जमला. आम्हास साऱ्यांची कदर करणे आहे म्हणोन ही सदर आम्ही बोलावली! जैसी साध्य होय तैसी कदर आज आम्ही करतो आहोत. याहून तुमची जाणती कदर श्री आमचे हातून करवून घेणार. ये समयी कोणास आमचे हातून गैरमरातब जाहलियास श्रीसाठी मन मोठे केले पाहिजे. आम्हास आपले लेकरू मानिले पाहिजे. समस्तांनी लेकरास आसरा दिल्हा पाहिजे!!''

जंगमैदानावर कंठाची घाटी फुलवून 'हर हर महादेव' गर्जत गनिमावर तुटून पडणाऱ्या शिवाजीराजांचेच हे दुसरे रूप होते! ते पाहून सदरेवरच्या बाराबंद्यांतील रांगडी मने हेलावून गेली.

राजे बैठकीवर उभे राहिले. तलवारीच्या पात्यासारखे त्यांचे रक्तजागते बाकदार, सतेज नाक नजर खेचून घेत होते. राजांनी सदर बैठकीवर बसलेल्या नेताजीराव पालकरांना अभिमानाने साद घातली– ''नेताजीराव, आमच्या सामने या.''

नेताजीराव राजांच्या समोर आले. कमरेत वाकून त्यांनी राजांना मुजरा घातला. कारभाऱ्यांनी हाती धरलेल्या तबकावरचा सरपोस दूर केला. तबकात रत्नजडित मुठीची म्यानबंद तलवार, तुरेवाली कंगणीदार भगवी पगडी, शुभ्र बाराबंदी आणि मांडचोळणा होता. राजांनी तबकातील तलवार उचलली. तिच्या फासबंदाची गाठ नेताजीरावांच्या कमरेभोवती बांधीत ते तळपत्या डोळ्यांनी म्हणाले– ''सुभेदार नेताजी आजपासून श्रींच्या राज्याचे सरनौबत झाले.''

गहिवरलेले नेताजीराव राजांचे पाय शिवण्यासाठी वाकू लागले. झटकन त्यांचे खांदे आपल्या हातांनी थोपवीत राजांनी त्यांना वर घेतले. क्षणभर नेताजीरावांवर आपली सूर्यपेट नजर जोडून राजांनी प्रेमभराने त्यांना मिठी भरली!

निळो सोनदेवांना मुजुमदारीची, आबाजी महादेवांना सुरनिशीची वस्त्रे राजांनी अशीच बहाल केली. येसाजी कंकांना पायदळाचे सरनौबत म्हणून रत्नजडित तलवार बांधली. कुणाला चांदीचे तोडे, कुणाला कडे, कुणाला कट्यार, कुणाला तलवार अशी साऱ्यांच्या इमानी चाकरीची कदर राजांनी केली.

स्वत:साठी गुणवंत आणि भोवतीच्या मंडळींसाठी गुणपारखी असा तो राजा होता. तो साऱ्यांची कदर करीत होता, पण सदरेवरचा त्यांचा एक एक बोल ऐकूनच सारे धन्य झाले होते. त्याच्या एका एका बोलासाठी जान कुर्बान करण्याची सर्वांची कमरबंद तैय्यारी होती. कदर-दरबार सरला.

राजगडाच्या कारभाऱ्यांनी बैठकीवर बसलेल्या राजांच्या हाती त्यांच्या मुद्रेचा नुकताच सुघड बनविलेला नवा साचा दिला. राजांनी तो निरखायला सुरुवात केली. त्या अष्टकोनी मुद्रेवर उलट्या साचेबंदात कोरीव अक्षरे होती– ''प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता। शाहसूनो: शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते।''

ती चंद्रेखेची मुद्रा पाहताना राजांना सईबाईंची याद झाली. त्यांनी नवे मुजुमदार निळो सोनदेव यांना बैठकीजवळ बोलावून घेतले. दमगीर झाल्या आवाजात राजे त्यांना म्हणाले, ''मुजुमदार, आमच्या कबिल्याकडे कापूरहोळाच्या गाड्यांची धाराऊ आहे. तिला सालिना सव्वीस होन तैनात जोडून द्या! जातीनिशी तुम्ही ते होन पावते करीत चला.''

सदर उठली! राजे बैठकीवरून उठले आणि महालात गेले. आपल्या फर्जंद शंभूला दूधआई जोडून द्यावी लागली; त्या दूधआईला तैनात तोडून द्यावी लागली. या बाबींचा सल राजांच्या मनाला लागून राहिला.

आता शंभूबाळ एक एक पाय टाकीत चालू लागले होते. जिजाबाईंनी त्यांच्या उष्टावणासाठी फलटणला हारकारा धाडून बजाजी निंबाळकरांना निरोप दिला.

बजाजी शिवापट्टणात आले. शंभूबाळांचे ते मामा होते. बळजबरीने मुसलमान केलेल्या बजाजींना राजांनी पुन्हा शास्त्रपूत हिंदू करून घेतले होते. निंबाळकरांच्या महादजी या मुलाला सईबाईंची सखू ही थोरली मुलगी देऊन राजांनी त्यांना समाजात ठाव दिला होता. सखू लहान असल्यामुळे अजून माहेरीच होती. भाच्याचे उष्टावण आणि सुनेचे दर्शन ह्या दोन्ही हेतूंनी बजाजी शिवापट्टणात दाखल झाले.

ज्योतिष्याकडून जिजाबाईंनी चांगल्या दिवसाचा मुहूर्त काढला. त्या दिवशी चंदनी पाटावर बसून बजाजींनी शंभूबाळांना आपल्या उजव्या मांडीवर घेतले. शेजारी जिजाबाई, सईबाई, धाराऊ आणि सारा राणीवसा होता.

हातातील अंगठी काढून बजाजींनी चांदीच्या वाटीतील खिरीत ती बुडविली. आणि त्या अंगठीने आपल्या भाच्याला खीर चाटविली. शंभूबाळांना सईबाईंच्या हाती देऊन पाटावरून ते उठले. ती खीरमाखली अंगठी पाटावर मामाची भाच्याला उष्टावण्याची भेट म्हणून ठेवली. शंभूबाळ आता खाते झाले!

जिथे 'बाकीचा' हिसाबच नाही असे राजांच्या आणि सईबाईंच्या हयातीचे भोवरे एकमेकांभोवती आजवर फिरले होते! आता सईबाईंचा भोवरा भेलकांडायला लागला होता. त्यांच्या पायातील भिंगरी सरत आल्यागत झाली. सईबाईंची तबियत सुधारेना म्हणून राजांनी जिजाऊंच्या मसलतीने त्यांना हवाफेरासाठी प्रतापगडावर हलवायचे ठरविले. संगती खाशा जिजाबाई जाणार होत्या.

शंभूबाळ आता दीड वर्षांचे झाले होते. बोबड्या बोलात बोलू लागले होते. वाडाभर धावत होते. धाराऊचा त्यांना लळा लागला. तिचे काही कुणबाऊ शब्द त्यांनी मावळी लकबीसह उचलले. राजांना ते 'आबा' म्हणू लागले. सईबाईंना 'माँ आणि आऊ' म्हणत बिलगू लागले. राजांच्या आजानुबाहूचे– गुडघ्याखाली आलेल्या हाताचे बोट

पकडून पुढे पुढे धावताना राजांना ओढ देऊ लागले. शंभूबाळ हे राजांच्या विसाव्याचे छोटेखानी ठाणे झाले. ते डोळ्यांआड होऊ नयेत असे राजांना वाटत होते. पण सईबाईंना हलविण्याचा बेत ठरताच शंभूबाळाला पाठविणे भाग होते.

एके दिवशी कबिल्याचे मेणे तयार झाले. राजगडावरून राजे शिवापट्टणच्या महालात आले. देवदर्शन घेतलेल्या जिजाबाई, सईबाई, धाराऊ, शंभूबाळ आणि मुलींना घेऊन महालाबाहेर पडू लागल्या. राजांनी पुढे होत जिजाऊंचे पाय शिवले.

"आम्ही संगती आहोत. चिंता कराया कारण नाही." जिजाबाईंनी राजांना धीर दिला.

राजांनी धाराऊचे बोट पकडलेल्या शंभूबाळांच्या काखेत हात घालून त्यांना वर उचलून घेतले. त्यांच्या शिवगंध रेखलेल्या सतेज कपाळावर आपले ओठ टेकले. त्यांच्या चिमुकल्या पण निर्भीड डोळ्यांत आपले डोळे घालून त्यांना हसत विचारले,

"शंभूबाळ, चालत चालत प्रतापगड चढाल?"

"हां आबा, आमी पलत पलत गल चढू!" शंभूबाळ डोळे मोठे करून बोलले. राजांनी त्यांची पाठ थोपटीत त्यांना खाली उतरवले.

त्यांना आपल्याजवळ ओढून त्यांची हनुवटी वर उचलीत जिजाबाई बोलल्या, गंगेच्या शांत-विशाल पात्राने बिलगत्या खळाळ ओढ्याला बोलाव्या तशा! "बाळ शंभू, आबांच्या पायांवर डोई ठेवायची ना?"

बाळराजांनी होकाराची मान डोलावली. जिजाबाईंना सोडून राजांच्या पायाजवळच्या फरसबंदीवर आपले चिमुकले गुडघे आणि हात टेकून वरच्या आकाशाएवढ्या उंच आबांकडे पाहत ते म्हणाले, "आबा, आमी मुजला कलतो. जय भवानी!" आणि शंभूबाळांनी आपल्या कपाळावरचे शिवगंध राजांच्या पायांच्या सडक बोटांवर टेकविले. त्या स्पर्शाने राजांचे क्षणभर डोळे मिटले गेले.

कबिला मेण्यात बसला. भोयांनी भोईपट सावरीत मेणे उचलले. राजे कबिल्याबरोबर चार पावले चालत गेले. मग जखडबंद पावलांनी खिळलेले राजे एकटक नजरेने दूर जाणाऱ्या मेण्यांकडे पाहत राहिले. शंभूबाळांचे बोबडे बोल आठवताना ते स्वत:ला म्हणत होते– "केवढा अजाण आणि लाघवी पोर! तो माँसाहेबांना बिलगून उभा राहिलेला पाहताना आमचे 'असणे' आम्हीच हरवून गेलो आहोत असे आम्हांस वाटते!"

जावळी खोऱ्यातील प्रतापगड नजरटप्प्यात आला. गडाच्या पायऱ्या चढताना हातातील थोपे टेकीत भोयांनी मेणे सुखचाल केले.

गडाच्या तटबांधकामात दर्शन दिलेल्या स्वयंभू शिवलिंगाचे स्थान आले. मोरोपंतांनी त्या शिवलिंगावर आता डौलदार घुमटी उभारली होती. त्या घुमटीवर एक जाईचा वेल चौलग पसरला होता. जिजाबाई आणि सईबाई मेणाउतार झाल्या. शंभूबाळांना घेऊन धाराऊ उतरली. सारीजण दर्शनासाठी घुमटीत गेली. सईबाईंनी त्या स्वयंभूसमोर आपल्या शंभूला माथा टेकायला सांगितले.

शिवलिंगाचे दर्शन घेताना सईबाईंचे डोळे क्षणभर मिटले गेले. शब्द नसलेल्या ज्या भाषेत हिंदू कुलस्त्री देवमूर्तीशी बोलते त्या भाषेत त्या बोलल्या, "आमच्या स्वारींना उदंड येश द्या. आमच्या बाळांना जपा."

भावभरले डोळे उघडून समोरच्या शिवलिंगावरचे एक त्रिदळी बिल्वपत्र उचलून ते मळवटभरल्या कपाळाला लावताना कसा कुणास ठाऊक पण एक मजेदार विचार त्यांच्या मनात डोकावला, "हे त्रिदळ म्हणजे शंकर-पार्वती आणि त्यांचा बाळ गणपती असे खुणेचे तर नसेल!"

गडमाथ्यावर येताच सईबाईंना फार बरे वाटले. हा गड त्यांना आवडला. चौतर्फा निळसर-हिरवागार मुलूख आणि त्याला बिलगलेले पिवळे उन डोळासुख देणारे होते.

सामोरे येण्यासाठी आलेल्या मोरोपंत पेशवे आणि अर्जोजी यादव यांनी जिजाबाई आणि सईबाईंना अदबमुजरे घातले. प्रतापगडावर येणाऱ्या सईबाई ह्या भोसलेकुलीच्या पहिल्याच लेकुरवाळ्या राजस्त्री होत्या. मोरोपंतांनी त्यासाठी त्यांच्यावरून सुवासिनींकडून मोहोरांचा सतका उतरून घेतला.

सासवडच्या हरभट ज्योतिष्यांचा चालता बोलता प्रतापी रुद्र-शंभूबाळ प्रताप गडावर दाखल झाला!

हवेसाठी कधी कधी सईबाई आणि धाराऊ शंभूबाळांना घेऊन तटावरून फेरफटका करीत. गडाभोवतीची घनदाट गचपणाची हिरवी झाडी बघताना सईबाईंना जाणवून जाई, "केवढ्या औषधी वनस्पती ह्या झाडोऱ्यात लपल्या असतील! आम्हास मात्र एकही गुणकारी लाभत नाही! माणूस भरल्या समुद्रात असतं पण तहानेच्या समयास एक थेंबसुद्धा हाताशी येत नाही. तशीच ही गत!"

आताशा सईबाईंचे मन कुठल्याच एक बाबीवर स्थिरावत नव्हते. गडमाथ्यावरच्या आभाळात तरंगणाऱ्या पाकोळीने कारण नसता दिशा बदलून फिरकी घ्यावी तशी त्यांच्या मनाची गत झाली होती. जवळ जवळ येणारे काहीतरी ते सुचवू पाहत होते, दूर दूर जाणारे काहीतरी घट्ट पकडून ठेवण्याचा यत्न करीत होते.

धाराऊ आणि शंभूबाळ मात्र आता एकमेकांत रमले होते. बाळराजांना घेऊन गडावरच्या देवळांच्या घुमटीतील घंटा वाजवून दाखविणे ही तर धाराऊची रोजची एक कामगिरीच झाली होती. कधी कधी बाळराजे हात उंचावून आपणच घंटा वाजविण्याचा हट्ट घेत. कितीतरी वेळ मग शंभूबाळ घंटानादातच रमून जात.

हिवाळा हटला. रंगीत रानफुलांनी आपले तुरे वर काढले. वैद्याकडून हरतऱ्हेच्या

दवामात्रा जिजाऊ सईबाईंना देत होत्या. उगाळलेल्या मात्रा कणाकणाने झिजत होत्या. सईबाईही तशाच झिजत चालल्या. क्षणभर शंभूबाळांना उचलून घेतले तरी त्यांचे हात भरून येऊ लागले.

उन्हाळ्याच्या कोरड्या हवेने सईबाईंना थोडे बरे वाटले. पण अंग काही धरले नाही. गडावरची होळी उदासपणे पेटून विझली. मोरोपंत, अर्जोजी, वैद्य, जिजाबाई साऱ्यांना सईबाईंचे डोळादेखत विझणारे अंग पाहून उरात सलू लागले. जिजाबाईंनी व्रत-वैकल्ये, उपवास सुरू केले. अंगारे, धुपारे, लिंब-लोण सारे सईबाईंच्यापुढे हरत होते. उन्हाळा सरत आला. वळिवाचे ढग एकदोन वेळा आभाळाच्या पाठीवर आपले कडकडणारे कोरडे ओढून त्यांच्या डोळ्यांतून पाणी काढून गेले.

मृग जवळ आला. आभाळाचा ऊर दाटून आला. पावसाच्या सरींची पहिली टिपरी प्रतापगडावर तडतडली. गडवाऱ्याने गारठा कवटाळला. घोंघावत त्याने झाडांच्या पानभऱ्या फांद्यांना उलटपालटे करून टाकले. त्या वाऱ्याच्या थंडगार बोचऱ्या दौडी अंगावर उतरताच सईबाईंच्या दुबळ्या कायेवर सरसरून काटा तरारला. त्यांनी अंथरूण धरले! राजगडाकडे राजांना खबर पोच झाली.

सईबाईंनी सगळ्यांशी बोलणे टाकले. गडाच्या तटबंदीवर पाऊसधारा कोसळत होत्या, सईबाईंच्या मनात विचारलोट धावत होते. पाणथळावरील आपल्या लांबट घरट्याशी बया पक्षिणीने एकटेच किलबिलत बसावे तसे त्यांचे मन स्वतःत शिरून फक्त राजांच्या आठवणींशी बातचीत करू लागले. केवढ्या उदंड आठवणी! मोहरून टाकणाऱ्या, शरमायला लावणाऱ्या, अभिमानाने ऊर भरून काढणाऱ्या, हुरहूर लावून हैराण करणाऱ्या. धावणीच्या घोड्याने पाठीवरचा स्वार दूर न्यावा तशा दूर-दूर नेणाऱ्या. तटबंदीवरून डोकावताना गरगरावे तशा भोवंडायला लावणाऱ्या. द्द्याच्या कवड्यांसारख्या मधुर-गोड, चिराखदानातल्या ज्योतीसारख्या सतेज-सुंदर, दरुणीमहालातल्या तक्तपोशीसारख्या निसूर-निबर, घरभरणीच्या लवंडल्या मापासारख्या ओसंडत्या-उभार, हिंदकळणाऱ्या मोतीलगासारख्या अस्थिर-चंचल, भवानीच्या भंडाऱ्यासारख्या उदात्त-मंगल! आठवणीच आठवणी!!

संकटांना एकमेकांची सावली पकडत चालण्याची उपजतच खोड असावी! सईबाईंच्या दुखण्याने निकराचा जोर धरला आहे ही खबर राजांना कळली. पाठोपाठ राजांना जेर करून "चढे घोडियानिशी जिंदा या मुर्दा पेश करतो" अशी कसम खाल्लेला आदिलशाही खानखानान अफजल माहमदशाही फौजबंद होऊन विजापूरहून कूच झाल्याची खबरही त्यांना लागली.

बड्या बेगमेने एका जुम्मा रोजाला बड्या मसलतीसाठी खास दरबार भरविला. दरबारात सिद्दी हिलाल, रुस्तमजमा, अंकुशखान, मुसेखान, राजश्री मंबाजी भोसले,

बाजी घोरपडे, झुंझारराव घाटगे, पैलवानखान, अब्दुलसय्यद सारे नेकदिल जंगबहादूर हात बांधून उभे होते. बेगमेची आगपाखड खाली गर्दना टाकून शरमिंदे होऊन ते ऐकत होते. कोणीही तगडादिल रुस्तुम बेगमेला तसल्ली द्यायला पुढे सरसावत नव्हता. तिचा शाही घुस्सा शब्दाशब्दांना जाळून टाळीत उफाळला आणि चिडून ती गर्जली – "क्या इस दर्बारमें उस गद्दार दख्खनसे लोहा लेनेवाला कोई मर्द बाकी नहीं रहा? उस अजाजील बगावतखोरको अंजाम देनेवाला अकांने दौलत कोई भी नहीं? बोलो – इस दर्बारका मर्दाना चुडिया पेहन आया है क्या ... लानत – लानत है!"

बेगमेच्या निर्भर्त्सनेची ही भट्टी एका भटारियाला पेटवून गेली. कमरेच्या तेगीच्या मुठीवर हाताची मूठ आवळीत खानखानान – अफझलखान पुढे सरसावला. याखालचा तलम रुजामा तुडवीत तो विड्याच्या तबकाजवळ आला. खामोश दरबारावर नफरतीची सख्त नजर फेकीत बेगमेला बंदगी घालून त्याने झटक्यात विडा उचलला.

"मैं – मैं उस नाचिज कुफ्रको घोडेकी सवारी ना तोडतेही जिंदा या मुर्दा दर्बार पेश करता हूँ हुजूर! या अली मेहरबान!" त्याने विडा घेतलेला हात अस्मानाकडे उंचावीत घोगऱ्या सादात कसम खाल्ली!

"आफरीन ऽ! अलहम्द अल्लिल्लाह! सुभान ऽ ल्ला! मरहब्बा ऽ!" चारी बाजूंनी बेहोष चीत्कार दरबारियांत उठले. सगळ्यांना आपणच जणू अफजलखान असून तो विडा आपणच उचलला आहे असा गौर झाला. पण – पण तकदिरीने त्या विड्यात कुणाकुणाच्या मौतीची सुपारी पेरून ठेवली होती हे ना बेगमेला, ना अफजलला, ना दरबारीतील एकाही समशेरजंगाला माहीत होते!

खानाच्या खांद्यावर मरातबाची खिल्लत चढली. शिरावर किताबांची बरसात बरसली. दरबार बरखास्त झाला. 'जुम्मा' रोजाला एक मोठा मनसुबा खडा झाला. खुषीत दरबारी बाहेर पडले. त्यांना माहीत नव्हते या 'जुम्म्याच्या' पाठीमागे एक दख्खनी 'शनी' लागला आहे आणि त्याचे नाव 'सिवा' आहे!

वीस हजारांची हत्यारबंद कडवी फौज, ऐंशी-नव्वद मोठ्या तोफा, तीनशे लहान तोफांचे खटारे, हजारभर उंटांचा काफिला, साठ-सत्तर झुलते हत्ती असा दाबजोर लवाजमा खानाने बरोबर घेतला. निशाणाच्या हत्तीवर चाद-तारा चढवून अफजलखान माहमदशाही निघाला. एका सूर्याला ग्रासण्यासाठी! बतशिकनी करण्यासाठी! शिवाजीचा कुफ्र तोडण्यासाठी!

" 'अफजल' म्हणजे 'सर्वांत सुंदर', 'सबसे अच्छा'! खरंच तो केवढा अच्छा होता! फर्जंद शहाजीराजे भोसले यांच्या हातांत हातकड्या जखडून भरल्या विजापुरातून यानेच त्यांची शरमिंदी धिंड काढली होती! कनकगिरीच्या वेढ्यात शिवाजीराजांच्या दादामहाराजांना – संभाजीराजांना दगा देऊन यानेच मरणाच्या दारात नेऊन सोडले होते! कस्तुरीरंगाला मैत्रीच्या भेटीसाठी बोलावून धोक्याने यानेच त्याच्या चिंधड्या उडविल्या

होत्या! कल्याणीच्या वेढ्यात शहजादा औरंगजेबाला सहीसलामत सोडल्याबद्दल सेनापती खान-महमंदाला मक्का दरवाज्यात कत्ल करण्याचा डाव यानेच रचला होता! असा हा 'सबसे अच्छा' खान आता 'सबसे अच्छा काम' करायला निघाला. सह्याद्रीच्या गुहेत हात घालून एका सिंहाची आयाळ धरून बाहेर खेचण्याची कसम खाऊन!

खान कसाही चालून आला तरी त्याचा तळ वाईलाच ठाण होणार हे राजांनी हेरले. आता सईबाईंना प्रतापगडावर ठेवणे धोक्याचे होते. राजांनी जिजाबाईंना निरोप धाडला. सारा कबिला प्रतापगडावरून राजगडाच्या पायथ्याशी शिवापट्टणला हलविण्याचा मनसुबा कळविला.

सरत्या मृगाच्या सरी अंगावर घेतच भोयांनी जिजाबाई, सईबाई यांचे मेणे प्रतापगडावरून खाली उतरवले. एका मेण्यात दोन वर्षांचे शंभूबाळ आणि धाराऊ बसली होती. आता शंभूबाळ चांगले बोलते झाले होते. आपल्या चौकस सवालांनी ते धाराऊला हैराण करीत आले होते. "कपाळावरचं शिवगंध आडवंच का? धारकरी आपल्या डाव्या बाजूलाच तलवार का बांधतो? भाल्याच्या एका टोकालाच पाते का? घोड्याच्या टापांनाच नाल का ठोकायचे?" बिचाऱ्या धाराऊला त्यांच्या एकाही सवालाचा जाब देणे सुधरत नव्हते. तिच्या मुलांपैकी एकानेही तिला असे कधी एवढे हैराण केले नव्हते.

मेण्याचे आडपडदे हटवून शंभूबाळ जावळी खोऱ्यातले डोंगरशिखरांवरून कोसळणारे पांढेधोट पाणलोट पाहण्यात गर्क झाले होते. त्या कोसळत्या पाणलोटांची त्यांना गंमत वाटत होती. त्या पाणलोटांना कोणी रोखू धजत नव्हते! त्यांचे अंतरंग सफेद होते. त्यांची गर्जना खोरी घुमवून टाकणारी होती! झेप घेणे हाच त्यांचा गुण होता! शिवापट्टण हाकेच्या टप्प्यात आले. वेशीबाहेर महादेवाच्या देवळात मेणे ठाण झाले. राजांना शिवापट्टणच्या महालात वर्दी पोच झाली. पावसाची तुरळक सर निचरताच शिवाजीराजे घोड्यावर मांड घेऊन फिरंगोजी नरसाळा, नेताजी पालकर, संभाजी कावजी यांच्यासह जिजाबाईंना सामोरे जाण्यासाठी शिवालयात आले.

जिजाबाईंचे पाय शिवून राजांनी देवदर्शन घेतले. जिजाऊ नेहमीसारख्या हसत राजांशी बोलल्या नाहीत. त्यांनी फक्त सईबाईंच्या मेण्याकडे हाताच्या बोटांनी इशारत केली. जडावल्या पायांनी मेण्याजवळ जात राजांनी पडदा दूर सारला. आतल्या मऊ बिछायतीवर त्यांच्या कैक आठवणींचा फक्त एक तगत्या जीवाचा सावळा सांगाडा होता! मिटल्या डोळ्यांच्या झिजल्या सईबाईंना पाहताना राजांचे निमुळते सूर्यपेट डोळे थिजून पाणगार झाले. लालमहालात घरभरणीचे माप लवंडून आलेल्या पोरवयाच्या अजाण सईबाईंची मूर्ती त्यांच्या डोळ्यांसमोर खडी झाली. केवढी सालं गुदरली! किती वळणं मागं पडली! सई देवघरातील समईसारखी सतत तेवत राहिली! आमची सावली

पाहताना आपली याद सतत आम्हाला देत राहिली! मासाहेब कधी आम्हाला उपरोधानं बोलल्या तर ते ह्या आपल्या लेकीची कड घेऊन! प्रेमळ पत्नी, संयमी सून, राजस राणी, ममताळू माता, सोशिक स्त्री केवढ्या नात्यांत सई वावरली! उरातून आलेला धागा धरून कोळीण चालते तशी आमच्याशी जखडल्या नात्याचा धागा धरून चालत आली! आमच्या डोळ्यांनी पाहिलेले 'सई' हे सर्वांत सुंदर स्वप्न! सुंदर स्वप्न कधी झिजत नसतं – मग असं का झालं? का झालं?

असंख्य विचारांनी राजांचे मन भरून आले. तरळत्या डोळ्यांसमोरचा मेणा अंधुक व्हायला लागला. क्षणात ते मेण्यापासून मागे हटले. त्यांनी भोयांना इशारत केली. भोयांनी सईबाईंचा मेणा उचलला आणि ते दुडक्या चालीने शिवापट्टणाच्या महालाकडे चालू लागले.

धाराऊ शंभूबाळांसह जिजाबाईंच्या शेजारी उभी होती. त्यांच्याजवळ जात राजांनी शंभूबाळांना उचलून घेतले. शेजारीच उभ्या असलेल्या राणू आणि अंबा ह्या लहान मुली 'आबा' म्हणत राजांना बिलगल्या.

"आता सारा भार श्रीसांबावर राजे. सगळे उपाय हरले." जिजाबाई न राहवून राजांना बोलल्या.

"भार तर सारा श्रीसांबावरच आहे आऊसाहेब. पण उपाय हरून चालणार नाही. आदिलशाहीचा अफजल वीस हजारांची फौज घेऊन आम्हाला 'जिंदा या मुर्दा' दरबार पेश करण्याची शपथ खाऊन इकडे कूच झाला आहे ..." राजांचा आवाज घोगरला.

"अफजल ऽ! वीस हजारांची फौज ..." म्हणत जिजाबाई क्षणभर गप्पच झाल्या.

"पाऊस येतो तेव्हा केवढे पाणी पडते प्रतापगडावर आबा!" शंभूबाळांनी हात पसरून मध्येच खबर दिली!

"होय बाळराजे, पण ते सारे पाणी दर्या आपल्यात सामील करून घेतो!" राजांनी हसत उत्तर दिले.

"कुठे असतो तो दर्या?"

"तो फार दूरच्या टप्प्यावर असतो. तुम्ही प्रतापगडावरून इथे आलात त्याहून खूप दूर." राजांच्या मनात आता फक्त 'प्रतापगड' घोळू लागला!

तुळजापूरला राजांच्या कुलस्वामिनी जगदंबेच्या मंदिर-आवारात अभद्र घडवून, पंढरीच्या मऱ्हाठी मुलखाच्या लोकदैवताला इजा देऊन अफजलखान शिरवळला डेरेदाखल झाला. वाटेत मलवडीला बजाजी निंबाळकरांना त्याने दस्त केले, आणि "तू शिवाजीचा फितवेखोर आहेस, नमकहराम आहेस" असा त्यांच्यावर आरोप करून तोफेच्या भांड्याला जखडबंद करून त्यांची आपल्या तळात धिंड काढली.

राजांनी खानाच्या गोटातील नाईकजी पांढरे यांची मध्यस्थी घालून साठ हजार होनांवर

बजाजींची मुक्तता केली. खानाच्या हातचा आपल्या नातेसंबंधाचा कोलदांडा राजांनी मोकळा करून घेतला.

शिवाजी संतापून बारा मावळाच्या बसकणीतून सिधा चालून यावा यासाठी खानाने हे सारे डाव येतायेता टाकून पाहिले. पण ते नतिजा पावले नाहीत. राजांना एकाकी पाडण्यासाठी त्यांच्या गोटातील असामी फोडण्याचा धूर्त खोडा खानाने शेवटी आखला. कुणाला जरब देऊन, कुणाला लालूच लावून, कुणाला गोड बोलून त्याने आपल्या फौजीपंखाखाली घेण्यास सुरुवात केली.

गुंजणमावळचा देशमुख विठोजी सिलीमकर, उत्रोलीचे देशमुख खंडोजी आणि केदारजी खोपडे, म्हसवडचे माने, मसूरचे जगदाळे, मलवडीचे पांढरे, तान्हाजी कोकरे, रविराव ढोणे, धुलोजी शेडगे, काटे, धायगुडे, कैक मावळी पगड्या खानाच्या पायांखाली पायघड्या होऊन पडल्या. वाढत्या बळाने खान शिरवळाहून कूच झाला आणि वाईला येऊन ठाण झाला.

वाईच्या काशीराव या आदिलशाही दियानतरावाने खानाचे वेशीबाहेर येऊन स्वागत केले. कृष्णेच्या डोहात कालिया शिरला!

काशीरावाने संगमेश्वराच्या गोमाजी हेळवाककराला खानासमोर पेश केला. गोमाजी संगमेश्वरांच्या देशकुलकर्ण्याचा दिवाण होता. कुळकर्ण्याच्या वंशाला फक्त एकटी म्हातारी बाकी राहिली होती. तिचे वतन खानाच्या पाक हाताने आपल्या घशात टाकावे या पवित्र धार्मिक बेताने गोमाजी वाईयात्रेला आला होता!

खानाने त्याची अर्जी एक अट घालून मंजूर केली. गोमाजी हेळवाककराने खानाच्या परतीच्या वाटवर लागणाऱ्या नद्यांत तीनशे नावा पेरून ठेवायच्या. खानाने त्याबद्दल गोमाजीला संगमेश्वराचे देशकुळकर्णीपण द्यायचे!

खानाची येण्याची सोय देशमुख, सरदारांनी केलीच होती. जाण्याच्या सोयीचा विडा गोमाजीने उचलला! आता कम्बक्त काफर 'सेवा' बचावणे शक्य नव्हते. पण गोमाजीला आणि खुद्द खानालाही पत्ता नव्हता की खानाच्या 'परतीची वाट' वेगळीच होती!

आता राजांच्या बाजूने दोनच कदीम, पुराणे आणि बळजोर सरदार उभे होते – एक जावळी खोऱ्याचा बेलाग कड्यांचा मोर्चेबंद मुलूख – आणि दुसरा बारा मावळातील कुणालाही दस्त न होणारा पावसाळा!

खानाचा पाणलोट थोपविण्यासाठी पडत्या पावसात राजांना राजगड सोडणेच भाग होते. किल्लेश्वरीचे आणि भवानीचे दर्शन घेऊन राजे राजगडाची पद्मावती माची उतरू लागले. गडाच्या बंदिस्तीसाठी फिरंगोजी नरसाळा, गोमाजी पाणसंबळ, सिदोजी थोपटे ही मंडळी मागे राहणार होती. राजांच्या संगती आपल्या वतनावर पाणी सोडून आलेले

कान्होजी जेधे, नातेबंधातले बाबाजी भोसले, बाळाजी सिलीमकर, नेताजीराव पालकर, येसाजी, मोरोपंत, तान्हाजी, संभाजी कावजी, सुभानजी इंगळे वगैरे मंडळी असणार होती.

सारे गड उतरून शिवापट्टणात आले. राजे जिजाबाईंच्या दर्शनासाठी त्यांच्या हुजरातीच्या महालात गेले. जिजाबाई शंभूबाळांना काहीतरी समजावून सांगत होत्या. राजांना पाहताच त्या थांबल्या. शांतपणे चालत पुढे आल्या. त्यांचे पाय शिवून राजे बोलले, "मुलुखबंदीसाठी आम्ही निघतो आहोत मासाहेब. खान वाईला ठाण झाला. आम्ही प्रतापगड पकडावा म्हणतो."

"या. आता मागचा विचार धरू नका. दास्तानी असलेली मंडळी सोडू नका. सईबाई पडल्या नसत्या तर आम्हीसुद्धा खान बघण्यासाठी खासे आलो असतो! त्याचा एक हिसाब आमच्या मनी अजून बाकी आहे! जाताना सूनबाईंना भेटा." क्षणभर जिजाऊ थांबल्या.

"शंभूबाळ, आबांचे पाय शिवा." जिजाबाईंनी बाळराजांचा खांदा थोपटीत सांगितले.

शंभूबाळांनी राजांच्या पायांवर डोके टेकले. त्यांचे खांदे पकडून त्यांना उठवून जवळ घेत राजांनी त्यांची पाठ हळुवार थोपटली.

"'खान' म्हणजे काय आबासाहेब?" बाळराजांनी कपाळाला आठ्या घालीत विचारले. त्या अचानक प्रश्नाचे काय उत्तर द्यावे ते राजांना सुचेना.

"जो दुसऱ्याला खायला टपलेला असतो पण ज्याला कुणीच खात नाही त्याला 'खान' म्हणतात शंभूबाळ!" जिजाबाईंनी राजांच्याकडे बघत उत्तर देता देता बाळराजांना आपल्याजवळ घेतले.

"येतो आम्ही." राजे घोगऱ्या स्वरात बोलले.

"या. औक्षवंत व्हा." जिजाऊंनी उजवा हात वर उचलला.

"जय भवानी!" शंभूबाळांनी विसरून राहिलेला मुजऱ्याचा भाग पुरा केला.

सईबाईंचा निरोप घेण्यासाठी राजे त्यांच्या महालात आले. महालातल्या मंचकाभोवती काजळी दाटली. चिराखदाने जळत होती. हळुवार पावलांनी मंचकाजवळ जाऊन राजांनी सईबाईंच्याकडे पाहिले. त्या डोळे मिटून पडल्या होत्या. त्यांची सावळी चर्या चिराखदानांच्या मंद प्रकाशात फिकट-उदास दिसत होती.

"ऐकता, आम्ही निघालो." सईबाईंनी डोळे उघडावेत म्हणून राजे बोलले.

त्यांच्या बोलांनी गाढ ग्लानीतून जाग्या व्हाव्या तशा सईबाई जाग्या झाल्या. त्यांनी हसण्याची कोशीस केली. 'बाळ भेटले?' क्षीण आवाजात त्यांनी राजांना विचारले.

"हो भेटले. आऊसाहेबांच्या महाली आहेत." म्हणत राजे मंचकावर टेकले. त्यांनी

सईबाईंचा काष्ठवत् हात हळुवार आपल्या हातात घेतला. सईबाईंच्या हातातील सोन्याची कंकणे किणकिणत कोपराकडे घरंगळली. त्यांचा हलका हात हातात घेताना राजांचे मन जडशीळ झाले. दोघांचेही बोल जबानीत जिरून गेले. काय बोलायचे ? कसे बोलायचे ? भाषा सरली होती. नुसते कढ मात्र उरले होते. भोवती पेच दाटले होते!

"सईऽ" राजांनी घोगऱ्या स्वरात साद घालताना त्यांचा हात थोपटला. कोंडी फुटली. शब्दलाटा वाहू लागल्या.

"अंहं, असा दिल नाही टाकायचा. आमचा मार्ग आता ठरला! पायाशी कधी काही मागणं नाही केलं. हे पाय समोर असताना दुसरं काही मागायचं नाही सुधारलं. आता हे पायऽऽ नजरेसमोर राहतील असं दिसत नाही. म्हणून एक मागणं घालावंसं वाटतं." बोलता बोलता सईबाईंना खोकल्याची उबळ आली.

ती ओसरू देऊन राजे म्हणाले, "कचदिल होऊ नका. मनी असेल ते साफ साफ बोला. तुम्ही बऱ्या होणार!"

"बाळराजांना आम्ही जन्म दिला. पण ओठभर दूध देण्यास आमचं आऊपण थिटं पडलं. आमची जागा घेण्यास कुणबीण असून धाराऊ आली, म्हणून बोलावंसं वाटतं." सईबाई थांबल्या. क्षणभर त्यांनी पापण्या मिटल्या. त्यामागची काळी वर्तुळे राजांच्या उरात सलली.

"बोला सई. थांबू नका." राजांचा आवाज घोगरला.

"आमचे शंभूबाळ... एकला जीव. आज स्वारींच्या पदरात घातला! आता स्वारीच त्यांच्या आऊ आणि आबा! हे... हे एवढंच आमचं मागणं." सईबाईंनी भरले डोळे लपविण्यासाठी मान फिरवली. त्यांच्या मिटल्या डोळ्यांतून सुटलेले पाणथेंब मंचकावरच्या बिछायतीवर टपटप ओघळले!

"सई, आम्ही बाळराजांना तुमच्यासाठी बांधील आहोत. चिंता करू नका. येऊ आम्ही ?" म्हणत राजांनी सईबाईंचा हात बिछायतीवर हळुवार ठेवला. छातीवरच्या माळेतील कवड्या प्रचंड वजनदार झाल्याचा त्यांना भास झाला. पाठीवर धूळलोट घेऊन मुलखात दौडणारे राजे, सईबाईंच्या दालनातून पाठीवर त्यांच्या डोळ्यांतील पाणलोट घेऊन बाहेर पडले!

शिवापट्टण सोडून राजांनी पुरंधर, तोरणा, मोहनगड, वर्धनगड, तुंग तिकोना या गडांवरची जातीनिशी जाऊन कडेकोट मोर्चेबंदी उभी केली. कोसळत्या पावसात जावळीखोरे चौक्या-पहाऱ्यांनी आवळून बंदिस्त करून राजे खाशा मंडळींसह प्रतापगडावर आले.

बाहेर गुंजणमावळ, कानंदखोरे आणि वेळखंडखोरे या मावळी मुलखाची पट्टी सरत्या पावसात भराला आली होती. गुंजवणी आणि कानंदी नद्यांच्या लाल पात्रांची बोटे

सौभाग्यलेणे म्हणून तिने मळवटावर भरली होती. या मुलुखपट्टीला अहेव राहायचा खूप सोस! मळवट भरलेला असला की ती कैक मरणांना हसत हसत पदराच्या गाठीला बांधायला तैय्यार!

असेच एक मरण सईबाई राजगडावरच्या दरुणीमहालात आपल्या पदराशी बांधण्यात गुंतल्या होत्या. त्यांच्या मंचकाभोवती जिजाऊसाहेब, राजांचा साऱ्या राण्यांचा राणीवसा, धाराऊ व सखू, राणू, अंबा या सईबाईंच्या मुली आणि सव्वादोन वर्षांचे शंभूबाळ दाटले होते. शंभूबाळांचा छोटेखानी हात आपल्या कृश हातात घेऊन सईबाई डोळे मिटून पडून होत्या. त्यांच्या कपाळभर आडवे माखलेले सौभाग्यलेण्याचे कुंकू होते. ओठांत धाराऊने ठेवलेले गंगाजलात न्हालेले सावळे तुळशीपत्र होते. महालातील चिराखदाने काजळली होती. त्या उदासमंद प्रकाशात साऱ्यांच्या मुद्रा फिकरमंद दिसत होत्या. राजगडाच्या उभार माथ्यावरचे आभाळ काळवंडले होते. मिटल्या डोळ्यांच्या सईबाईंना या कशाकशाचे भान नव्हते. त्यांचे सोशिक, सावळे मन आज एक आगळाच खेळ खेळत होते. आजवर मनाचा हा असला खेळ त्यांनी कधी कधीच पाहिला नव्हता. 'सईच्या' असंख्य सावल्या पकडण्याचा ते प्रयत्न करीत होते! खेळ ऐन भराला आला होता. असंख्य सावल्या नाचत होत्या. सईबाईंचे भान हरपत चालले होते.

किती उदंड सावल्या! फलटणच्या मुधोजीबाबांच्या वाड्यातील परकरी सई, पुण्याच्या लालमहालात भोसल्यांची सूनबाई म्हणून आलेली बावरलेली सई, जिजाबाईंना 'आऊ' म्हणून बिलगताना अगदी सहज त्यांची लेक झालेली सई, सईच्या नकळतच 'सईबाई' झालेली सई, राजांच्या वाढत्या राणीवशाबरोबर 'थोरल्या आक्का' झालेली सई, सखूच्या लग्नात सासूबाई झालेली सई, राजांचे मंत्री, सुभेदार, सरनोबत यांनी 'राणीसरकार' म्हणून अदबमुजरे रुजू केलेली सई, राजांच्या पहिल्यावहिल्या बाळांची– शंभूची आऊ झालेली कृतार्थ सई. किती किती म्हणून सावल्या सईबाईंच्या मिटल्या डोळ्यांना दिसत होत्या. पण... पण त्यांतील एकसुद्धा त्यांच्या हाताशी काही येत नव्हती! 'आम्ही आमची सावलीच हरवून बसलो की काय ?' अशी त्यांना शंका आली. आपले सगळे 'सईपण' जिवाच्या निकराने एकवटून त्यांनी स्वत:ला कणाकणात चाचपून पाहिले. फक्त एक... एकच सावली त्यांच्या हाताशी लागत होती. पण... पण ती त्यांची नव्हती. ती होती राजांची– त्यांच्या स्वारीची! एका जागी क्षणभरसुद्धा न थांबणारी! सारखी धावणीची वारेजोड दौड घेणारी! सपळ न देता येणारी! येता येताच मोतीलगाचा ऐटदार तुरा हिंदोळवीत पाठमोरी होणारी! डोळ्यांनीच सारे सारे बोलणारी! त्यांचे सगळे 'सावळेपण' आपलेसे करणारी! 'जगदंब, जगदंब' पुटपुटणारी!

त्या सावलीचे शिवदर्शन होताच सईबाईंचे उरलेसुरले भानही हरपले. त्यांच्या मस्तकाची भिंगरी गरगर फिरू लागली. आठवणींची वर्तुळे त्यांच्या सावळ्या मनाच्या

सरोवरावर रेखू लागली. जिवाची दिवली थरथरू लागली. आठवणींचे माप लवंडले. राजांच्या छातीवर कधी माथा टेकताना त्यांच्या गळ्यातील कवड्यांच्या माळेचा झालेला रोमांचकारी स्पर्श! स्फटिक शिवलिंगाची पूजा बांधणाऱ्या राजांच्या – स्वारींचीच आपण पुढे होऊन पूजा बांधावी असा आलेला विचार! प्रतापगडावर शिवलिंगावरून उचललेल्या शंकर-पार्वती आणि त्यांचा बाळ गणपती यांच्या खुणेचे त्रिदली बिल्वपत्र! पोटरी फोडून नुकत्याच बाहेर आलेल्या कणसासारखे वाटणारे आमचे शंभूबाळ! त्या सगळ्या आठवणी पार पलीकडच्या वाटत होत्या आता.

त्या सावल्यांच्या आणि आठवणींच्या धुंदळीत त्यांना 'सई' मात्र कुठे कुठेच दिसेनाशी झाली. दिसू लागला तो कपाळभर भरलेला मेणमळला, दोनबोटी आडवा, रसरशीत मळवट! अहेवपणाचा! शिवकर सौभाग्याचा! त्या मळवटाचे आडवे कुंकू हळूहळू मोठे होऊ लागले! म्हणता म्हणता नगाऱ्याएवढे झाले. क्षणभर दुडदुडले! पुन्हा मोठे होत होत आभाळाएवढे झाले!! आता ते त्यांच्या कपाळी काही मावत नव्हते! सगळ्या सईबाई त्या आभाळाएवढ्या कुंकवात कुठच्या कुठे विरून गेल्या होत्या. ते कुंकू स्वत:शीच निळ्या बोलीत बोलू लागले. आपण बोललेले आपणच ध्यान देऊन ऐकू लागले –

"गडावरच्या दरुणीमहालात उंबरठ्याआड राहून आम्हास हवं तेव्हा स्वारींच्या पायांचं दर्शन घेणं होत नव्हतं म्हणून आम्ही हे रूप घेतलं! आता स्वारीचा घोडा आमच्या नजरटप्प्याआड कधीच नाही जाणार! दोन डोळ्यांनी खाशासंगती बोलणं मनभरं झालं नाही म्हणून आम्ही उभ्या आभाळाचे डोळे लेवून स्वारींना ऊरभर बघतो आहोत! आमचा एकला जीव – शंभूबाळ पदरी टाकले. आता स्वारीच त्यांच्या आबा आणि आऊ! कुंकवाला कसलं आऊपण! जमलं असतं तर शेवटचा म्हणून एकदा या कुंकवाचाच मळवट आम्ही स्वारीच्या पायधुळीनं भरून घेतला असता!!"

आपल्या आभाळाएवढ्या मळवटाच्या रसरशीत लाल कुंकवात पुरती पुरती न्हाऊन निघालेली सतेज अशी राजांची रसरशीत, तांबडी सावली फक्त सईबाईंना दिसू लागली!! "स्वारींचं हे असं रूप कधी नजरेला पडलंच नाही." आता सईबाईसाहेब एक क्षणभरही थांबू शकत नव्हत्या! वेळ झाला तर ती रूपवैभवी चैतन्यलाल सावली हातची निसटेल! त्या नुसत्या शंकेनेच त्या थरथरल्या. त्यांच्या कृश पायांत कसलेतरी उदंड बळ संचारले! त्या खड्या झाल्या! त्या सावलीचे पाय धरून ठेवण्यासाठी सईबाई भरल्या मळवटाने इतमामात चालल्या! त्यांच्या ओठांतील तुळशीपत्र त्यांना रोखण्यासाठी क्षणभर थरथरले, पण सईबाईसाहेब गेल्या! कायमच्या! पार पार पलीकडे!! राजांचे सावळे, सुंदर स्वप्न सरले!!!

सईबाईंचा निष्प्राण हात शंभूबाळांच्या हातातून निसटला! तो मायाळू, कृश हात मंचकावरच्या बिछायतीवर कसनुसा होऊन कोसळला! त्यांच्या ओठांतील हताश

तुळशीपत्र निसटून घरंगळत त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्रावर ओघळले. महालात एकच आक्रोश उठला. चिराखदानांच्या काजळल्या ज्योती ऊरफुटी थरथरल्या. भिंतीचे घडीव दगड शहारले.

"आऊ, आऊ ऽऽ" म्हणून भेदरट हाक घालीत शंभूबाळांनी सईबाईंचा पडला हात उचलून गद्‌गद हलविला. सगळा राणीवसा मंचकावर ओळांबून आक्रोशतो आहे हे पाहून भांबावलेले शंभूबाळ 'थोरल्या आऊ ऽ!' म्हणत जिजाबाईंना एकदम बिलगले. धाराऊने बाळराजांना महालाबाहेर काढले.

सरत्या पावसाला शिवाजीराजांचा भावगड ढासळला! एक मनाजोगा जमलेला मनसुबा वाहून गेला! मळवट भरल्या सईबाई नापरतीच्या मोहिमेला निघून गेल्या!!

सईबाईंनी राजगडावर देह ठेवला ही खबर ऐकताच पापण्या मिटून 'जगदंब, जगदंब' म्हणत अपार वेदनेने राजांनी छातीवर हात ठेवला. टाकोटाक ते प्रतापगडावरून राजगडी आले. त्यांच्या थोरल्या राणीच्या पेटत्या चितेबरोबर त्यांच्या एका सावळ्या, भावूक मनसुब्याची चिता जळत होती. सईबाईंच्या कैक रूपांच्या ज्वाला फरफरत होत्या. फर्जंद शिवाजीराजे भोसले त्यांच्या दाहाने होरपळून निघत होते.

तशा राजांच्या राणीवशात तर आणखी राणीसाहेब होत्या – पण सईबाईंत त्यांच्या मनाचा दिलगाव गुंतवा झाला होता. वीराला पहिल्याने कमरेला जडलेली तलवार आणि आपल्यासमोर बोहल्यावर चढलेली पहिली स्त्री विसरू म्हणता विसरता येत नाही! शब्दांना संकोच आणि डोळ्यांना संवाद अशी राजांची आणि सईबाईंची खानदानी मर्मजोड होती. भक्कम ऐटदार गडाला फेर धरून वळणदार माची असावी तसा तो राजस नातेबंध होता!

सईबाईंच्या जाण्याने राजगडावरचे देव नवरात्राच्या घटात बसण्याऐवजी सुतकात पडले, सालिना हसरा होणारा दसरा दुखरा झाला.

बजाजीमामांनी मायेने जावळ उतरलेल्या शंभूबाळांच्या मस्तकाचे सईबाईंच्यासाठी मुंडन झाले! त्यांची पोरवयाची चर्या त्यामुळे पोरकी दिसू लागली. ती पाहून गलबलून आलेल्या जिजाऊंनी त्यांना निर्धाराच्या मायेने जवळ घेतले. आता जिजाऊंनीच त्यांची 'आऊ' व्हायचे मनोमन ठरवून टाकले. भोसल्यांच्या तडा गेलेल्या साऱ्या तटबंदी सांधण्यासाठीच जिजाऊ त्या घराण्यात आल्या होत्या.

मुंडन झालेल्या बाळ शंभूंना जवळ घेऊन राजे आपल्या महालात मंचकावर बसले होते. त्यांचा एक हात शंभूच्या पाठीवरून आणि दुसरा हात छातीवरच्या माळेतील कवड्यांवरून फिरत होता. त्यांच्या मनाला एका बाजूने सईबाईंच्या आठवणींनी आणि दुसऱ्या बाजूने अफजलखानाच्या वाईतल्या तळाने वेढा टाकला होता.

"आबा, आऊ कुठे गेल्या ?" शंभूबाळांनी राजांना विचारले.

त्या सवालाने राजे थरथरले. त्यांच्याजवळ काही काही जाब नव्हता. अत्यंत मायेने ते आपल्या बाळराजांचा खांदा थोपटू लागले. त्यांच्या मनात हरभट ज्योतिषीबुवांचे बोल उसळी घेऊन उठले. 'पुराणांतरी रुद्र जसा आप्तगणाकडून फसला तसाच योग या कुंडलीत दिसतो !!'

शंभूकडे बघताना राजांच्या मनाची घालमेल झाली. एक विचित्र विचार त्यांना चाटून गेला, "उपजलात आणि धाराऊचे दूध तुमच्या वाट्यास आले! पण – पण हयातीच्या पहिल्या चालीलाच तुम्ही आप्तगणाकडून असे फसले जाल याचा अंदाज काही ज्योतिष्यांनाही आला नसेल!" राजे बाळशंभूंचा खांदा नुसता थोपटीत होते आणि नुसते थोपटीतच राहिले !!

मराठी दौलतीच्या उरावर अफजलखानाचे भय वाईत दबा धरून बसले होते. खानाने पांढऱ्यांना शिरवळात, खराट्यांना कऱ्हेच्या खोऱ्यात, जाधवांना सुपे परगण्यात, सिद्दी हिलालला पुणे प्रांतात आणि सैफखानाला तळकोकणात पेरून राजांना जखडबंद करून टाकण्याचा कावेबाज डाव टाकला होता. /

ही तमाम कोंडी अंगावर घेऊन राजगडावरच ठाण ठेवणे हिसाबी नव्हते. त्यासाठी खानाच्या वाईच्या तळाची बगल धरून दाटलेले जावळीचे कुबल खोरे राजांनी केव्हाच हेरून ठेवले होते. प्रसंग पडला तर त्या खोऱ्यातील प्रतापगडाच्या शिडीवरून मावळतीकडून त्यांना सिताब आणि सलामत कोकणपट्टीत उतरता येणे शक्य होते. रानसावजाची धडक त्याच्यापासून दूरच्या फासल्यावर राहून कधीच हुकविता येत नाही! त्यासाठी त्याच्या अंगलटीला घासूनच हूल भरावी लागते! राजांनी वाईजवळ प्रतापगडाकडेच कूच व्हायचा मनसुबा धरला.

या बेतात आता पालट झाला असता तर तो केवळ मासाहेबांच्यामुळे! नुकत्याच सूनबाई गेल्या असताना कुसव्याची एकुलती एक यादगीर असलेल्या राजांना निरोपाच्या दहीकवड्या जिजाबाई देतील काय ? काय कल्लोळ माजेल त्या माउलीच्या काळजात ? थांबविण्यासाठी त्यांनी मायेचा पायगोवा घातला तर ...!

ते सारेच टाळण्यासाठी, "राजगड सोडताना आऊसाहेब भेटीसाठी न येत तसे करावे" असा सल्ला खुद्द राजांनीच जिजाऊंच्या खाजगीच्या कारभाऱ्यांना दिला. तो देताना त्यांचा हात गळ्यातील माळेच्या कवड्यांवरून थरथरत फिरला. मनात विचारांच्या कवड्यांनी कितीतरी डाव टाकले... "आणि जर खानाच्या मोहिमेतून परतीची वाट आम्हास नाहीच दिसली तर !! तर – सईच्या जात्या पायांचे ठसे आम्हांस पुढच्या दौडीचा माग देतील! आणि मासाहेब आमच्या नावानं जगदंबेच्या भंडाऱ्याची **चिमट** शंभूबाळाच्या कपाळी भरून खाशा श्रींच्या राज्याची बेलरोटी उचलतील!

भवानीनं तेवढं बळ त्यांच्या चिमटीत भरलं आहे!

"पण आमचे शंभूबाळ तो भंडारा पेलतील ? मातेवेगळा पोरका दिसणारा अश्राप जीव तो! छेऽऽ! भोसला आणि पोरका ? होणं नाही. आमच्या महाराजसाहेबांना पोरपणीच घोड्यावर मांड घ्यावी लागली. आम्हीसुद्धा तसेच पुण्याच्या बरड जहागिरीत दाखल झालो. प्रसंग पडला तर त्याच वाटेवर शंभूबाळांनाही धावणी करावी लागेल. एकदा उपजताना 'जगदंब' म्हणून श्वास घेतला की, भोसल्यांना तो हयातभर इमानाची संगत करतो. मग पोरकंपण त्यांच्या वाटेला कधीच जात नाही!" राजांनी मन बांधले. ज्या पंखाखाली मायेच्या उबाऱ्यात त्यांचा जीव पोसला तेच पंख कठोर मनाने दूर करणे भाग होते. त्याशिवाय निळ्या आभाळात भरारती झेप घेताच येत नाही! श्रींच्या राज्याचे स्वप्न रेखताना मायेच्या नात्याचे सत्य डोळ्यांआड सारावेच लागते. राजांना खाजगीची नाती नसतात! नाती नसणे हेच त्यांचे दौलतीशी नाते असते. राजांनी दौलतीचे नाते निवडले.

राजगड सोडण्याचा दिवस उजाडला. राजांनी स्नान आटोपून शिवलिंगपूजा बांधली. आपला महाल सोडून ते सदर चौकाकडे चालू लागले. राणीवशाच्या महालात त्यांच्या जाण्याचा मोहरा धरून महिरपीआड उभ्या असलेल्या राण्या पटापट बाहेर येऊन त्यांची पायधूळ कपाळाला लावून संकोचून उभ्या राहिल्या. सईबाईंचा खाजगीचा महाल येताच राजांचे पाय त्याच्यासमोर क्षणभर घोटाळले. एकवार त्यांनी त्या रित्या महालावर नजर लावली – आणि भरल्या मनाने झपाझप ते सदरचौकात आले. नेताजी, येसाजी, संभाजी कावजी, सिदोजी थोपटे यांनी राजांना मुजरे घातले.

"सिदोजीराव, शंभूबाळ कुठं आहेत बघा." राजांनी आज्ञा केली.

"जी," म्हणत सिदाजीराव सदरेवरून धाराऊच्या दालनाकडे निघून गेले.

धाराऊ बाळराजांना घेऊन सिदोजीरावांच्या मागोमाग सदरेच्या उंबरठ्यापर्यंत आली. खासे राजे सदरेवर असताना बाईमाणसाने सदरेवर कसे जायचे म्हणून शंभूबाळांचा हात सोडून ती थांबली, पण ते कसले हट्टी! त्यांनी धाराऊचा हात पुन्हा धरून त्यांना सदरेवर ओढायला सुरुवात केली. तो काकणभरला, गोंदलेला हात पाहताच राजे म्हणाले, "या धाराबाई, बालराजे ऐकणार नाहीत!"

"जी," म्हणत धाराऊ सदरेवर आली. शंभूबाळांनी पुढे येत राजांच्या पायांवर मस्तक टेकले. त्यांच्या मुंडन केलेल्या मस्तकावरचा लहाना जिरेटोप घट्ट बसला होता. त्यावर एक हात ठेवून राजांनी त्यांना दुसऱ्या हाताने हळुवार वर उठविले. त्यांची हनुवटी तर्जनीने वर उचलून वाकून राजांनी त्यांच्या कपाळावरच्या शिवगंधावर आपले ओठ क्षणभर टेकविले. त्यांचे छोटे खांदे थोपटीत घोगऱ्या आवाजात राजे बोलले, "बाळशंभू, मासाहेबांना मुजरा करून आलात ?"

"जी. आबा, तुम्ही गड उतरलात की आम्ही आभाळात जाणार!" शंभूबाळांनी हात उंच करून आभाळ दाखविले.

"ते कशाला?"

"आमच्या आऊसाहेबांना मुजरा करायला! थोरल्या मासाहेब म्हणतात त्या वर गेल्यात!"

शंभूबाळांच्या बोलांनी सारी सदर चरकली. राजांचे डोळे सदरेच्या बगलेला असलेल्या जिजाऊंच्या महालावर जडले. उरात कल्लोळ माजला.

"धाराऊ, शंभूबाळांना घ्या." निर्धाराने राजांनी बाळराजांना तोडून धाराऊच्या हाती दिले.

"चला मंडळी." म्हणत राजे सदरचौकाबाहेर पडू लागले. निम्मीशिम्मी फरसबंदी ते चालून गेले असतील नसतील तोच रणशिंगाच्या ललकारीसारखी मायेच्या जरबेने थब्थबलेली साद सदरेच्या बाजूने त्यांच्या कानावर पडली, "शिवबा ऽ! आमची गाठभेटी न घेता चाललात! आम्हांस पाठमोरे झालात?"

पाठीवर थाप भरणाऱ्या, चंदी-खरारा करणाऱ्या घोडेपारख्याने मागून इशारतीची साद घालताच जातिवंत अरबी घोडा भरल्या कानाने मोहरा फिरवतो तसे राजे गर्रकन वळले! तरातरा चालत त्यांनी सदरपायऱ्या मागे टाकल्या. त्यांच्या केशरी टोपात जडलेली मोतीलग लडालड हिंदकळत होती. छातीवरच्या कवड्यांच्या माळेला हबके बसत होते. जिजाऊंच्या डोळ्यांना डोळा भिडविण्याचा त्यांना धीर होत नव्हता. तडक जाऊन त्यांनी आपल्या मासाहेबांच्या सात्त्विक गोऱ्या पायांवर आपले मस्तक विसावले.

त्यांचे खांदे मायेने पकडून त्यांना उठवीत जिजाऊ म्हणाल्या, "उठा, कोण म्हणतं आम्ही तुम्हांस रोखून धरणार? भोसल्यांचा कबिला कधीच कचदिल नव्हता. असणार नाही! सुखे जा. आमच्या शंभूबाळांचे– तुमच्या दादामहाराजांचे पुरते उसने घ्या. खानाचा खातमा करा आणि ध्यानात ठेवा आम्ही तुमच्या परतीच्या वाटेवर नजर जोडून आहे‍त. घ्या." म्हणत जिजाबाईंनी धाराऊकडे पाहिले. तिने दह्याची वाटी जिजाबाईंच्या हाती दिली. जिजाबाईंनी दह्याच्या घट्ट कवड्या राजांच्या गुलाबी तळह्यतावर ठेवल्या. त्या ओठांआड करून राजांनी क्षणभर जिजाबाईंच्या डोळ्यांत पाहिले. त्यांना वाटले भवानीची मूर्तीच मासाहेबांचे रूप घेऊन समोर खडी आहे!

"या. औक्षवंत व्हा. आई अंबा तुम्हास यश देणार थोर आहे!" जिजाऊंनी राजांना आपल्या मिठीत घेतले. कसल्यातरी अज्ञात विजेने आपल्या उराचा भाता ठासून भरला जातो आहे असे राजांना वाटले.

"येतो आम्ही!" म्हणत राजे मिठीतून मोकळे झाले.

"मासाहेब, शंभूबाळांना जपा. गोमाजीबाबा, फिरंगोजीबाबा, सिदोजीराव तुमच्या दिमतीला मागं ठेवतो आहोत. जय भवानी!"

शांत चालीने राजे आपल्या खाशा मंडळींसह सदरचौकाबाहेर पडले. राजगडाच्या बालेकिल्ल्यावरून निघून पद्मावती माचीवर बाहेर पडणाऱ्या भुयाराच्या तोंडावर आले. चार तगड्या मावळ्यांनी पुढे सरसावत त्या भुयारावरची भक्कम धोंड दूर हटवली. पेटत्या मशाली घेतलेले दोन मशालजी भुयारात उतरले. त्यांच्या पाठोपाठ छातीवर उजवा हात भिडवीत राजे उतरले. मशालींच्या प्रकाशात ते पद्मावती माचीकडे चालू लागले. त्यांच्या मनात कैक विचार दौड घेत होते– "आमच्या भोवती असंच भुयार आहे… खानाच्या बळजोर फौजेचं! असाच अंधार दबा धरून आहे… दगाबाज फितवेखोरांचा! एकच आधार आहे. मशालीचा. आई भवानीच्या आशीर्वादाचा!!"

भुयार पार झाले. राजे पद्मावती माचीवर आले. त्यांनी मागे राहणाऱ्या मंडळींना बारीकसारीक सूचना केल्या. माचीवरच्या पद्मावती देवीचे दर्शन घेतले. निवडक असामींसह ते माची सोडून पाली दरवाज्याने गडपायथ्याशी आले. एकदा त्यांनी राजगडावर नजर जोडली. घोड्याच्या जिनावर मांड घेऊन टाच मारली.

राजांची घोडेतुकडी प्रतापगडाचा रोख ठेवून दौडू लागली.

बालेकिल्ल्याच्या तटबंदीपाशी जिजाबाई शंभूबाळांना घेऊन उभ्या होत्या. त्यांना धूळ फेकीत दूर जाणाऱ्या जनावरांचे फक्त ठिपके दिसत होते.

रात्रभर जिजाबाई आपल्या महालातील मंचकावर पडून वरच्या दगडी तक्तपोशीकडे एकनजर बघत होत्या. भलभलते विचार त्यांना हैराण करीत होते. विचारांची ओढ असह्य झाली की, त्या आपल्या कुशीत सुख झालेल्या शंभूबाळांच्या पाठीवरून हात फिरवीत होत्या. त्यांचा धाकुटपणा जिजाऊंना पिळवटून काढीत होता. निरोप देताना त्या राजांना थोर दिलाने म्हणाल्या, "भोसल्यांचा कबिला कधीच कचदिल असणार नाही." पण आपल्या पदरी असलेल्या एकट्या राजांचा शंभू हा एकुलता एक अंकुर बघताना आता त्यांना वाटत होते की, "भोसल्यांच्या कबिल्याला इंगळास बाशिंग बांधूनच घरभरणीचे माप लोटून येणे पडते. पण… पण भोसल्यांच्या बाळवशाला हा कसला शाप? लहानपणी शिवबांच्या पाठीवर अशीच संकटांची घोडदौड पडली. आता त्यांच्या या अजाण पोरावर अशीच संकटे मोहरा धरून चाल घेताहेत.

'हे विचारतात खान म्हणजे काय? कोण आणि कशी यांची समजूत घालणार? आपल्या गेल्या आऊंना मुजरा रुजू करण्यासाठी हे थेट आभाळात जाण्याच्या गोष्टी बोलतात! कोण आणि कसं यांच्या ननाच्या घोड्याची ओठाळी धरून त्याचा थोपा करणार? धाराऊनं यांना दूध दिलं, आम्ही यांना माया देऊ, पण यांच्या मनच्या एकटेपणाला कोण आणि कशी धीरार्च जोडसंगत देणार? आमचे शिवबाराजे पित्याच्या प्रेमास पारखे झाले. हे मातेच्या ममतेस मुकले. आता तर यांचे आबाच पणास लागले. अफजलच्या मनचा हेतू घातकी आहे. शिवबांचं काही बरं ऽ ऽ…'

त्या नुसत्या शंकेनंच लेटल्या जिजाबाई सर्रकन थरारल्या. जिजाऊंना काही काही सुचत नव्हते. कशाचा कशास मेळ पडत नव्हता. त्यांचा थरथरता हात झोपल्या शंभूंच्या पाठीवरून फिरत होता. नुसताच फिरत होता.

राजगडावरच्या हमामखान्यात अंघोळ घालून पेहराव चढविलेल्या शंभूबाळांना धाराऊने जिजाऊंच्या महालात आणले. स्नानानंतर शंभूंच्या कपाळी रोज जिजाऊच शिवगंध रेखीत असत.

शंभूंनी पुढे होत जिजाऊंचे पाय शिवले. धाराऊने गंध-अष्टगंधाचे तबक जिजाबाईंच्या हाताला येईल असे सरसे करून धरले. जिजाऊंनी शंभूबाळांच्या कपाळावर आडव्या माटाचे शिवगंध रेखले. त्या तेवढ्या शिवगंधानेही मूळचे देखणे असलेले बाळराजांचे रूपडे अधिकच राजसगोमटे दिसू लागले. ते बघताना जिजाबाईंना राजांच्या उभट मुद्रेची आठवण झाली. त्या एकटक शंभूंच्या शिवगंधरेखल्या कपाळाकडे बघू लागल्या. हे असेच शिवगंध त्या शिवबाराजांच्या बाळपणी त्यांच्या कपाळी रेखीत आल्या होत्या. शंभूंच्या नितळ कपाळाकडे बघताना एक विचार त्यांच्या मनात डोकावला – 'गंध रेखले की शिवबाराजांची आणि या शंभूबाळांची मुद्रा शिवलिंगासारखी दिसते! पण ... पण शिवलिंगावर सततचा जलाभिषेक होणे पडते. आई अंबे, तुझ्या कृपेचा जलाभिषेक माझ्या या शिवलिंगांच्या मस्तकावरून क्षणभरसुद्धा ढळवू नकोस. तार. आम्हा साऱ्यांना या बाक्या संकटातून तार!'

जिजाऊंनी शंभूबाळांना उचलून आपल्या मांडीवर घेतले. त्यांच्या मांडीवर शंभू होते, डोळ्यांसमोर प्रतापगड होता आणि मनात होती राजांची मुद्रा आणि चिंता!

राजांनी पाठविलेला निकराचा थैलीस्वार राजगडावर आला. जिजाऊंचे खाजगीचे कारभारी खलित्याचा मजकूर वाचून दाखवू लागले... "अखंड सौभाग्यमंडित मातुश्री – आऊसाहेब प्रति त्रिकाल चरणी मस्तक ठेवून सिवबाराजे यांचे दंडवत उपरी विशेस – खान फौजेसमेत कोयनाखोरीत पारावर तळ देऊन आहे. उदईक खानासवे भेटीचा प्रसंग पडला आहे. आम्हास आशीर्वाद द्यावा. शंभूबाळांना जपावे."

जिजाबाई 'जगदंब, जगदंब' पुटपुटल्या. शंभूबाळांचा हात हाती धरून गडाच्या तटबंदीवर आल्या. प्रतापगडच्या रोखाने नजर जोडून त्या वेड्यासारख्या पाहू लागल्या. त्यांचे मन सुन्न झाले होते.

त्या काहीच बोलत नाहीत म्हणून बाळराजांनीच त्यांना विचारले, "आबा खानाच्या भेटीला गेलेत. मग ते त्याला घेऊनच का नाही येत इकडे?"

जिजाबाईंनी चमकून शंभूकडे पाहिले. "साखर पडो तुमच्या तोंडात" म्हणत जिजाबाई तटबंदीवरून महालाकडे परतल्या. मावळतीला कलतीला लागलेल्या सूर्याने आभाळाचा पोटला फोडला होता! क्षितिजकडा लाललाल झाली होती.

प्रतापगडाच्या पायथ्याशी जनीच्या टेंब्यावर खानाच्या भेटीसाठी ऐसपैस शामियाना आण्णाजी मलकऱ्यांनी उभा केला होता. षष्ठीच्या रात्री खानभेटीचा खल करण्यासाठी निवडक असामीसह राजांचे खलबत बसले. नेताजी पालकर, कान्होजी जेधे, मोरोपंत पिंगळे, येसाजी कंक, बाबाजी भोसले, बाळाजी सिलीमकर, पंताजी गोपीनाथ अशा असामींनी राजांच्याभोवती बैठकीचा फेर धरला. साऱ्यांचे मळवट भंडाऱ्याने भरले होते.

निर्धाराच्या सावध घोगऱ्या आवाजात राजांनी खलबताला तोंड फोडले –

"उदईक खानाचे भेटीसाठी आम्ही तिसऱ्या प्रहरी गड उतरणार आहोत. खानाच्या मनी आम्हास जिवे मारावे ऐसे कपट दबा धरून बैसले आहे.

ये समयी समस्तांनी एकदिलाने हिंमत बांधली तर कुल फौजेसह खान बुडतोच आहे. आम्ही नेमून देतो आहोत ती कामगिरी अवघे कान देऊन चित्ती धरा. कार्यी कुसूर करू नका.

मोरोपंत, तुमच्या पायदळानिशी तुम्ही पारघाटात किनेश्वराच्या खोऱ्यावर डोळ्यांत तेल ठेवून दब्यानं बसा.

कान्होजीबाबा, तुमच्या बांदलांचा जमाव आणि पासलकरांचे कोटबंद धारकरी घेऊन तुम्ही आण्णाजी दत्तोसमवेत खान येतो त्या वाटेभोवती अंगचोरीने जागा धर.

बाळाजी आणि हैबतराव, तुमचा हत्यारबंद मावळा खानाच्या पाराजवळच्या तळाला घेरून रातोरात गर्दाव्यात पेरा.

बाबाजीराजे, तुमचा पाऊलोक वाई-जावळीच्या बगलेस खानाच्या फौजेच्या पिछाडीला परतीच्या वाटा रोखण्यासाठी जागता ठेवा.

नेताजीराव, तुमचे खुरचलाख घोडदळ कुडसराच्या पठारावर जीनतैय्यार ठेवा. खानाचा वाईत ठाण झालेला चंदावलीच्या कुमकेचा तळ तुम्हास बुडविणे आहे.

तान्हाजी, कृष्णाजी कंक तुम्ही निवडक, चखोट पटेकरी संगती घेऊन भेटीच्या शामियान्याजवळच्या दरडीला धरून खणलेल्या चरात उतरा.

संभाजी कावजी, जिऊ महाला, कोंडाजी आणि येसाजीकाका, संभाजी करवर, काताजी इंगळे, विसाजी मुरुंबकर, सुराजी काटके, सिद्दी इब्राहीम आणि कृष्णाजी गायकवाड हे दहा धारकरी आमच्या संगती गड उतरतील.

जगदंबेच्या आशीर्वादे आम्ही खानास जीवे घेतला तर तटमाचीवर इशारतीसाठी तोफांच्या भांड्यांचे तीन बार होतील. कमनशिबाने आम्हास दगा झालाच तर इशारतीची पाच भांडी वाजतील.

आम्ही सलामत आलो ना आलो तरी साऱ्यांनी हिंमत धरोन कोयनाखोरीच्या कैचीत फसलेला खान कुल फौजेसह बुडवावा! ये कामी कुचराई करेल, शकअंदेश मनी धरेल त्यास मळवटीच्या जगदंबेच्या भंडाऱ्याची आण!

एक आम्ही जातो म्हणोन दिल टाकू नका. हे श्रींचे देवाधर्माचे राज्य उभे करणे आहे. त्यासाठी प्रसंग पडला तर कैक सिवाजीराजे खर्ची घालावे लागतील.

आम्ही सलामत आलो नाहीच तर आमच्या शंभूबाळांना सामोरे घाला. आमच्या ठायी त्यांना समजोन नेताजीरावांच्या पोख्त मसलतीने अवघे मिळोन श्रींच्या राज्यासाठी कस्त करा! आशीर्वादासाठी मासाहेबांचे हातबळ तुमच्या पाठीशी आहेच!"

जिजाऊंच्या आणि शंभूबाळांच्या आठवणीने राजांचा आवाज घोगरा झाला. काळीज भरून आले. प्रतापगडावरचे खलबत उठले. टेंभ्यांच्या मंद प्रकाशात राजांनी साऱ्यांची गळाभेट घेतली. नेताजीरावांनी पुढे होत खलबतखान्याच्या आतून तोंडावरच्या दगडी धोंडेवर कमरेच्या तलवारीच्या मुठीने तीन ठोके दिले. बाहेरून धोंड हटविण्यात आली. राजांनी मुजरे करून सारे जोडून दिलेल्या कामगिरीचा विचार करीत गड उतरू लागले. त्यांना धीर द्यायला कपाळावर फक्त भवानीचा भंडारा होता. आभाळातील षष्ठीची 'चंद्रकोर' पांढऱ्या-भुरक्या ढगांनी पार-पार झाकळून टाकली होती!!

राजे आपल्या खाजगीच्या महालात आले. तबकात टोप उतरून ते मंचकावरच्या बिछायतीवर आडवे झाले. शंकाकुशंकांनी त्यांच्या मनात फेर धरला. "खरोखरच खानानं या भेटीत काही दगा केला तर! ... आमच्या या नव राज्याचं काय होईल? मासाहेबांची कोण स्थिती होईल? आणि शंभूबाळ? आपल्या आऊंना मुजरा करण्यासाठी आभाळाची दौड घेण्याची भाषा करणारा तो पोर आमच्यासाठी आऊसाहेबांना हैराण हैराण करील! आमचा ठावठिकाणा धुंडण्यासाठी एकटाच गड उतरील. बाळशंभू, खरंच ... खरंच तुम्ही आप्तगणांकडून फसले जाण्यासाठीच तर नाही आलात?"

बाळराजांच्या आठवणीने राजांच्या डोळ्यांसमोर सईबाईंची सावळी मुद्रा उभी ठाकली. त्यांचे काळीजकैची घालणारे अखेरीचे बोल याद आले– "आमचे शंभूबाळ– एकला जीव! आज स्वारींच्या पदरी घातला!"

राजे पुरते बेचैन झाले. त्यांना काही काही सुचत नव्हते. कूस पालटली तरी विचार काही बदलत नव्हते. छातीवरच्या माळेतील कवड्या डोंगराएवढा आकार घेऊन छाती दडपून टाकताहेत असे वाटत होते.

"श्रींचे राज्य! देवाधर्माचे राज्य. त्यासाठी खर्ची पडलेले इमानबंद जीव! हयातीची होलपट हसतमुखाने सोशीत आलेल्या आऊसाहेब! जिंदगीच्या उंबरठ्यावरच निखाऱ्यांचा टोप मस्तकी बसलेले शंभूबाळ!!"

घायाळ– घायाळ झालेले राजे कसल्यातरी विचाराने टाच भरल्यासारखे तडक उठून मंचकावर बसले. महालाच्या दरवाज्यापर्यंत जाऊन त्यांनी पहारेकऱ्याला साद घातली– "कोण आहे?"

"जी" म्हणत पहारेकरी महालात आला आणि कमरेत वाकला.

"हिरोजीला याद फर्माव." राजांनी त्याला तसाच परतविला.

त्याने धावत जाऊन हिरोजीला वर्दी दिली.

हिरोजी फर्जंद राजांच्यासमोर मुजरा करून आदबीने उभा राहिला.

"हिरोजी, डोळ्यास डोळा लागत नाही. केदारेश्वराचं दर्शन घ्यावं म्हणतो. आमच्या संगती चल."

"जी" म्हणत हिरोजी महालाबाहेर पडला. पुढे जाऊन त्याने केदारेश्वराच्या पुजाऱ्याला उठविले.

राजांनी अंगाभोवती शाल लपेटून घेतली. टेंभे धरलेले दोन धारकरी, बेलपत्राचे तबक घेतलेला केदारेश्वराचा पुजारी आणि हिरोजी फर्जंद यांच्यासह राजे केदारेश्वराच्या दर्शनाला चालले.

मध्यरात्र जवळ आली होती. चंद्रकोरीने फेकलेले धूसर चांदणे गडावर उतरले होते. दूरवर खानाच्या गोटात पेटलेल्या आगट्या कोयनाखोरीत दिसत होत्या.

सारेजण केदारेश्वराच्या मंदिरासमोर आले. मंदिराच्या गाभाऱ्यात ठाणवयांच्या शांत प्रकाश-पहाऱ्यात शिवलिंग तळपत होते. राजांनी पायीच्या मोजड्या उतरल्या. मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी दरवाज्याच्या उंबरठ्याला हात लावण्यासाठी राजे खाली वाकले. त्या दगडी उंबरठ्यावर दोन्ही बाजूंना नऊ पाकळ्यांची दोन डौलदार धर्मचक्रे कोरली होती! त्या दोन धर्मचक्रांच्या थेट मधोमध येईल असे जबडा पसरलेल्या वाघाचे चैतन्यमय मुख कोरले होते!! राजे हरपल्या भानाने ते व्याघ्रमुख एकनजर पाहू लागले. आपल्या पाठकण्यात काहीतरी सळसळते आहे, उरात काहीतरी ठासून भरले जाते आहे असा त्यांना भास झाला! राजांच्या मस्तकाची पागा खुलली. क्षणभरात विचारांची कैक पांढरधोट घोडी धावणी धरून गेली.

व्याघ्रमुख! व्याघ्रासनी रणमर्दिनी जगदंबा! एक एक पंजा पुढं पुढं टाकीत येणारं, रोखल्या नजरेचं व्याघ्रवाहन! त्याच्या पाठीवर आरूढ झालेली, शस्त्रसंभार उगारलेली, आरक्त नेत्रांची, रणदेवता भवानी! वाघाच्या उगारलेल्या पंजाबरोबर गरगर फिरणारं धर्मचक्र!! व्याघ्रमुख, उगारलेला पंजा, शस्त्रं रोखलेली भवानी, गरगर फिरणारं धर्मचक्र आणि– आणि ते रोखण्यासाठी दातओठ खाऊन, बाह्या सरसावत येणारा खान! खान! खान!...

राजांची गर्दन क्षणात नागफण्यासारखी ताठ झाली! त्यांचे विस्फारलेले सूर्यपेट डोळे पुरते पेटून उठले! डोळ्यांसमोर वाघाचा उगारलेला पंजा नाचत होता.

झपाझप चालत राजे मंदिर-गाभाऱ्यात गेले. पुजाऱ्याने पुढे केलेल्या तबकातील बेलपत्रांची ओंजळ त्यांनी आकाशाने तारका उधळव्यात तशी शिवलिंगावर उधळली! हात जोडून डोळे मिटून ते गाभारा घुमवीत बोलले– "जय शंभोऽऽ हर हर! जय

भवानी!" राजांना कसला तरी ठेवणीचा कौल मिळाला होता! शिवलिंगावरचे अभिषेकपात्र एकसरीत जलवर्षाव करीतच होते!!

मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीचा दिवस बारा मावळांचा डोंगरमाथा चढून वर आला. जिजाऊंचे मन शंकांच्या कैक काळढगांनी भरून आले. राजगडावरच्या देवमहालात बसून त्या एक एक बेलपत्र समोरच्या शिवपिंडीवर वाहू लागल्या. त्यांच्या शेजारी बाळशंभू एका पाटावर बसले होते. भिंतीची कड धरून धाराऊ जिजाऊंच्यावर नजर ठेवून उभी होती.

दिवस चढतीला आला. मनच्या शंका बेलपत्रावर चढवून एक एक बिल्वदल शिवपिंडीवर वाहून वाहून जिजाबाई थकदिल झाल्या. बेलपत्रे सरतीला आली तरी त्यांच्या मनाचे टाके मात्र तसेच कुशंकांनी भरूनच राहिले! दिवस ऐन माथ्यावर आला आणि आपले हताश मस्तक जिजाऊंनी पिंडीभोवतीच्या शाळुंकेवर टेकविले. त्यांच्या चंद्रशांत डोळ्यांतून सरसरत पाणधारा उतरू लागल्या. उभे अंग थरथरू लागले. डोळ्यांतून ओघळत्या पाण्याबरोबर त्यांची वरकडची सगळी सगळी नाती वाहून गेली होती. उरला होता तो फक्त एकच लागेबंध– 'आऊपणाचा!' एकाच विचाराचा फासबंद त्यांचे प्राण त्यांच्या कुडीत कांडून टाकू लागला– "आता– आता माझे शिवबाराजे गड उतरून संकटाच्या कैचीत फसले तर नसतील!! रात्रभर तोफांचे आवाज झाले ते का?"

जिजाबाई मान वर करीत नाहीत, त्यांचे उभे अंग थरथरते आहे, कोंदटले हुंदके पिंडीला वेढून टाकताहेत हे पाहून शंभूबाळ भेदरले. त्यांनी पुढे होऊन जिजाऊंना गद्गद् हलवीत हाक घातली– "थोरल्या आऊ ऽ! थोरल्या आऊ ऽ!"

थोरल्या आऊंना काही काही ऐकू येत नव्हते. त्या उठल्या आणि भरल्या डोळ्यांनी, नेसूचा पायघोळ फरफटवीत तरातरा आपल्या महालाकडे निघून गेल्या.

हात पसरून त्यांच्या मागे धावणाऱ्या बाळशंभूंना धाराऊने पुढे होत थोपवून धरले. त्यांना संगती घेऊन ती आपल्या दालनाकडे निघून गेली.

जिजाऊंनी आपल्या महालाचा दरवाजा आतून आडबंद घालून बंद केला. त्या पुरत्या-पुरत्या एकट्या झाल्या. धाराऊच्या दालनात शंभूबाळ साफ गोंधळून गेले.

रात्रीचा पहिला प्रहर संपला आणि गडाच्या मिटलेल्या पाली दरवाज्याजवळ एक फकीर आला. त्याने बाहेरून दरवाज्यावर तळहाताची तीन वेळा थाप भरली. आतल्या देवडीवाल्याला ऐकू जाईल अशा बेताने तो जाड, घोगऱ्या आवाजात म्हणाला, "आईचा भुत्या! रानचा वारा!" तो परवलीचा बोल होता.

देवडीवाल्याने तो बोल कान देऊन ऐकला आणि दरवाज्याची दिंडी खुली केली.

फकीर घाईने आत घुसला. तरातरा चालत तो पद्मावती माचीवर आला. सिदोजी थोपट्यांनी फकिराला ओळखले. तो होता हुन्नरबाज खबरगीर विश्वास नानाजी मुसेखोरेकर! सिदोजी आणि विश्वास राजगडाच्या बालेकिल्ल्यावर आले. सिदोजींनी जिजाऊंना आपण येत असल्याची वर्दी दिली.

जिजाऊ आपल्या महालात शंभूबाळांना शेजारी घेऊन बसल्या होत्या. दिवसभराच्या चिंता तापाने त्यांचा चेहरा ओढला होता. चिराखदानांच्या प्रकाशात तो विचित्र दिसत होता. सिदोजी आणि विश्वास जिजाऊंच्या महालात गेले.

एका फकिराला सिदोजीसंगती पाहून जिजाऊ थरकल्या. त्या मंचकावरून तडक उठल्या. सिदोजीने व विश्वासने त्यांना अदबमुजरे केले. जिजाऊ क्षणभर गोंधळल्या. दुसऱ्याच क्षणी त्यांनी विश्वासला ओळखले. भीतीने थरथरत त्या खेचल्या आवाजात कसेबसे म्हणाल्या– विश्वा ऽ स! ..."

मुजऱ्यासाठी वाकलेला विश्वास ताठ खडा झाला. दूर धावणी घेऊन आलेल्या विश्वासच्या उसळत्या तोंडातून मावळी रांगडे बोल उसळले– "मासाब, त्वांड ग्वाड करा! जगदंबेनं तारलं समद्यास्नी. राजांनी चलाखीनं खान सफै फोडला! वाघनख्या चालवून धन्यांनी खानाचा पोटला भाईर काढला! संभाजी कावजीनं खानाचं गर्दन तेगीच्या एका फटक्यात धडागुणं क्येलं! खानाचं गर्दन प्रतापगडाच्या सदरंवर हाय! धड जनीच्या टेंब्यावर– गडाच्या पायथ्याला धूळ खात पडलंय! खानाचा पारावरचा बारा हजारांचा तळ जेधे-सिलींबकर, भोसले-पासलकरांनी येरगाटून टाकलाय! हातोहातीच्या हत्यारचालीला जावळीखोऱ्यात त्वांड फुटलंय! सरलष्करांची घोडी वाईच्या रोखानं दौड घेत गेल्यात! खान समद्या जमेतीनिशी पार बुडाला! आपली फत्ते झाली!!"

विश्वासचे बोल ऐकताना जिजाबाईंच्या डोळ्यांतून सरसर आनंदाचे अश्रू ओघळू लागले. मागे वळून शंभूच्या कानशिलाजवळ हाताची बोटे नेत ती जिजाऊंनी आपल्या कानशिलाजवळ आणून मोडली. शंभूंना उचलून घेत त्या विश्वासला म्हणाल्या, "विश्वास, सदरेवर चल. तुझ्या या खबरीची ख्दर आम्ही करणार आहोत."

उचलून घेतलेल्या बाळराजांना जिजाबाई न राहवून म्हणाल्या– "खान म्हणजे काय म्हणून विचारता! जो सर्वांना खायला टपलेला असतो पण ज्याला कुणीतरी त्याच्या सर्वांसह खाऊन जातो त्याला खान म्हणतात बाळराजे!" बाळशंभूंना ते काही उमगले नाही!

प्रतापगडावरून जिऊ महाला राजगडावर आला. वाकाच्या शिंकाळ्यात घातलेले थिजल्या, काळपट रक्तओघळांचे खानाचे शिर त्याने आपल्या संगती गडावर आणले होते. जिजाऊंनी नजरेखाली घालावे म्हणून जिऊने ते एका तबकात ठेवून ते तबक सरपोसाने झाकून टाकले. एका चौरंगावर ते तबक ठेवून तो चौरंग राजसदरेच्या

फरसबंदीवर मांडण्यात आला. गडावरचा सारा मावळलोक खान बघण्यासाठी बालेकिल्ल्याच्या सदरेवर लोटला होता.

डाव्या हाती शंभूंचा हात धरून जिजाबाई सदरदाखल झाल्या. साऱ्यांनी मुजरे झाडले. जिजाबाई शंभूसह सदरबैठकीवर बसत म्हणाल्या, "जिवा, दूरची धावणी घेतलीस. काही खाल्लंस?"

"न्हाई मासाब, प्वाट भरलंय माजं!" म्हणत जिवाने चौरंगावरच्या तबकाचा सरपोस दूर सारला. कमरेत वाकून जिवा बोलला, "ही भेट धन्यानी मासाहेबांच्या रुजवातीला धाडलिया!"

खानाचे रक्तओघळांत गोठलेले, डोळ्यांच्या कवड्या अर्धवट उघड्या टाकलेले, वासलेले शिर बघताच कपाळावरचे आडवे कुंकू ताणीत जिजाबाई बैठकीवरून तडक उठल्या. त्यांच्या नाकपुड्या विस्फारल्या गेल्या. श्वास चढा झाला. ओठ क्षणभर थरथरले.

"अफजलखान! जसं पेरावं तसंच उगवतं!" त्यांच्या ओठातून थरथरते बोल निसटले. या – याच खानाने गेली कैक वर्षे जिजाऊंच्या काळजाला मरणभयाच्या जळवा जोडून दिल्या होत्या.

क्षणभरातच जिजाऊंनी आपला संताप सावरला. पुन्हा बैठकीवर बसत त्यांनी आज्ञा केली, "सिदोजीराव, हे शिर पिंजऱ्यात घालून गडाच्या पाली दरवाज्यावरच्या कोनाड्यात ठेवा. आठरा कारखान्यांचे लोक त्याचं दर्शन घेतील. त्याची पूजा करून इतमामानानं त्याचं दफन करा. गनिम संपला – गनिमी संपली!"

जिजाबाईंच्या तर्फेला बसलेले शंभूबाळ डोळे ताणून केव्हाचे खानाच्या शिराकडे एकटक बघत होते. अनेक सवालांचे पलोते त्यांच्या मनात खडे झाले. "आबा या खानाच्या भेटीला गेले होते. याला हात-पाय काहीच नसता त्यांनी याची भेट कशी घेतली असेल?" थोरल्या आऊ म्हणाल्या – "जो दुसऱ्यास खायला टपतो पण ज्याला कुणीच खात नसतो तो खान! मग त्यांनी हे का नाही सांगितलं की ज्यास हातपाय नसतात ते नुसते मुंडके म्हणजे खान!! जो घोड्यावर मांड न घेता तबकावर बसतो तो खान!"

शेवटी न राहवून बाळराजांनी जिजाबाईंना विचारलेच, "धाराऊ म्हणत होती खान मोठ्ठा आहे. तर मग हा एवढाच कसा?" त्यांच्या अचानक सवालाने सारी सदर हसली. बाळराजे गोंधळून गेले. जिजाऊ त्यांचा खांदा थोपटीत शांतपणे म्हणाल्या, "तुमच्या आबांनी जमला तेवढा खान आणला. तुम्ही याहून मोठ्ठा आणा!"

शंभूबाळांना ही तोड मात्र मनोमन मानवली!

जिजाबाई आता राजांच्या परतीच्या वाटेवर नजर जोडून होत्या. अफजल गर्दीस

मिळविणारे शिवबाराजे त्यांना डोळाभर बघायचे होते. शंभूबाळांना आपल्या आबासाहेबांना कैक शंकासवाल विचारायचे होते. पण राजे राजगडाकडे परतले नाहीत.

खरा सेनापती एका यशाच्या दहशतीच्या पाठबळावर दुसरे अनेक विजय गाठीशी बांधीत जातो. राजांनी तोच बेत आखला. प्रतापगड सोडून ते वारेजोड घोडदळानिशी आदिलशाही मुलखावर उतरले. राजे दौडू लागले आणि त्यांच्या मांडेखालच्या घोड्याच्या टापांखाली विजयाच्या सलग मुद्रा उमटत चालल्या. खटाव, मायणी, रामपूर, कलेढोण, वाळवा, अष्टी, कऱ्हाड अशी ठाणी दास्तानी लावीत, नेर्ले, कामेरी, बत्तीस-शिराळा, पारगाव, कोडोलीमार्गे राजे पन्हाळ्यावर मुक्काम ठेवून कोल्हापुरात घुसले.

पुरता राजगड आता आनंदसागरात न्हाऊन निघाला. राजांच्या जिंकल्या मोहिमांच्या खबरांवर खबरा रोज गडदाखल होत होत्या. राजांच्या रूपात गडावर असणाऱ्या शंभूबाळांचे कौतुक राणीवशातील राण्यांत चढीला लागले.

एके दिवशी खासेमहालात साऱ्या राण्यांच्या वेढ्यात शंभूबाळ बसले होते. त्यांना सोयराबाईंनी सवाल केला, "बाळराजे, तुमच्या गळ्यातील कंठा आम्हास द्याल?"

"हो. कंठा देऊ, पण कवड्यांची माळ नाही देणार आम्ही!" बाळराजे उत्तरले.

"ते का?" सोयराबाईंनी विचारले.

"थोरल्या आऊ म्हणतात, 'आम्हा भोसल्यांचा खरा दागिना कवड्यांची माळ! गळ्याभोवती माळेच्या कवड्यांचा फेरा असला की, मनास खोडा पडत नाही. पाय वाकडा जात नाही!"

त्या उत्तराने सोयराबाई गंभीर झाल्या. पुतळाबाई मात्र हरखून गेल्या. त्यांनी शंभूबाळांच्या कानातील चौकड्यांजवळ हातांची बोटे लावून ती पुन्हा माघारी घेत आपल्या कानशिलाजवळ नेत कटकन मोडली!

चैत्राचे सरते दिवस आले. राजगड सोडून राजांना आता सहा महिने लोटले होते. जिजाबाई पावसाळ्यापूर्वी राजे परतणार या मोहऱ्याने वाट बघत होत्या आणि एक दिवस त्यांच्या खाजगीच्या कारभाऱ्यांनी त्यांना वर्दी दिली, "जासुदांचे नाईक बहिर्जी आले आहेत."

जिजाबाई शंभूबाळांचा हात धरून बहिर्जीला भेटण्यासाठी सदरेवर आल्या. जोहार केलेल्या बहिर्जी त्यांच्यासमोर गर्दन पाडून उभा होता. त्याची गर्दन वर उठत नव्हती. जबान कशी खुली करावी हे त्याला उमगत नव्हतं. शेवटी जिजाऊंनी जाणवणाऱ्या जरबेत त्याला विचारले, "नाईक, जबान बंद का? कोण मामला आहे? बोला. आमचा अंत पाहू नका."

आपले तोंड ओंजळीत झाकत बहिर्जी भरल्या भरड्या आवाजात कसेतरी बोलला,

"घात जाला मासाब! हबशी जव्हरच्या वेढ्यात महाराज पन्हाळगडावर फसलं! गनिमानं गडाला लई घट्ट घेर टाकलाय!"

"नाऽईऽक!" जिजाबाई कशातरीच ओरडल्या. त्यांचे अंग न् अंग ताठरले. त्यांच्या मातेच्या मनाला कितीतरी कुशंकांचा क्षणात वेढा पडला. नकळतच त्यांनी शेजारी बसलेल्या बाळराजांना जवळ बिलगते घेतले. त्यांचा थरथरता हात बाळराजांच्या पाठीवरून फिरू लागला. भिरभिरते मन पन्हाळगडाभोवती घिरट्या घेऊ लागले. काळजात कैक कढ दाटून आले. "किती मरणांना बगल देत आमच्या शिवबाराजांनी दौडावं? सुखाचा माग धरून किती संकटं जिंदगीभर त्यांच्यामागं हात धुऊन लागावीत? राजे! राजे! वेढ्यात तुम्हीच नाही तर आमचं सारं 'आऊपण' फसलंय! तुमच्या या शंभूबाळांचं 'फर्जंदपण' वेढ्यात फसलंय! उभी मराठी दौलत वेढ्यात फसलीय! काय करावं?"

काहीच न बोलता जिजाबाई सदरबैठकीवरून उठल्या आणि शंभूबाळांचा हात धरून जडावल्या पावलांनी आपल्या खाजगीच्या महालाकडे निघून गेल्या.

प्रसंगी त्या साऱ्यांना धीरदिलासा देत आल्या होत्या. पण खुद्द त्यांना धीर द्यायला जगदंबेशिवाय जाणतं दुसरं कोण होतं?

राजगडावरून जिजाऊंची तातडीची फर्माने बारा मावळात मुलुखभर सुटली. चाकण, पुरंधर, सिंहगड, वर्धनगड, प्रतापगड चहूबाजूंनी मराठी फौजा राजगडावर जमाव करू लागल्या. राजांच्या भोवती दाटलेल्या वेढ्याचा कसा उपराळा करावा हाच पेच साऱ्यांना पडला. सरनौबत नेताजी तर कर्नाटक मुलुखात गदग मुक्कामी होते.

जौहरने वेढा भरून पुरते दोन महिने लोटले. बाहेरचे चिटपाखरू आत घुसणार नाही आणि पन्हाळगडावरचा नाग-सोनचाफ्याचा दर्वळसुद्धा हूल भरून बाहेर निसटणार नाही असा बळकट – बाका वेढा सिद्दी जौहरने आवळला होता. पन्हाळ्याच्या मावळतीला सिद्दी मसूद, भाईखान, सादतखान, बाजी घोरपडे आणि उगवतीला फाजलखान, रुस्तुमेजमाँ, बडेखान, सर्जेराव घाटगे अशा सरदारांचे ताकदवर कडे पडले होते. या सर्वांवर आपली जागती हबशी नजर ठेवून जाड ओठांचा सलाबतखान सिद्दी जौहर रोज गडाभोवती फेरफटका देत होता. सह्याद्रीचा सिंह हबशी तरसांच्या आणि देशी लांडग्यांच्या कोंडाळ्यात अडकला होता!

नेताजींची वाट बघून थकदिल झालेल्या जिजाबाई खाशा पन्हाळ्याचा वेढा फोडायला तयार झाल्या! पडत्या पावसात घोड्यावर खोगिरे चढली. जिजाऊंनी कमरबंदाजवळ म्यानबंद तलवार जडवली. घोडा आणि पाऊलोकांना कूचासाठी तयारीच्या आज्ञा सुटल्या.

सदरेवर जिजाऊंसमोर जायची कुणालाच छाती होईना. त्यांच्या मागून घोटाळणाऱ्या

शंभूबाळांना ही कसली गडबड चालली आहे काही उमगत नव्हते. कधी नव्हे ते थोरल्या आऊंनी कमरेला हत्यार का लटकावलेय काही कळत नव्हते. शेवटी त्यांनी जिजाबाईंना विचारले, "वेढा म्हणजे काय थोरल्या आऊ? आम्ही येणार तुमच्या संगती वेढा फोडायला!" ते बालबोल ऐकताना जिजाऊंना तशा अवस्थेतही गलबलून आले. त्यांच्या पदरी आता एकटे शिवबाराजे राहिले होते. राजांच्या राणीवशात सईबाईंची यादगीर म्हणून बच्चा असा हा एकटाच शंभू होता. अफजलखानाच्या मोहिमेवर जाताना 'शंभूबाळांना जपा' असे सांगून जसे पाठमोरे झालेले राजे आजवर पुन्हा राजगडाकडे फिरकले नव्हते. 'बाळराजांना जपा' म्हणणारे राजेच पन्हाळ्यात अडकून पडले! त्यांचा हा अजाण पोर विचारतो आहे, "वेढा म्हणजे काय थोरल्या आऊ?"

दोन्ही हातांचा वेढा घालून शंभूबाळांना जवळ घ्यावे आणि, "ज्यामुळे चालत्या गाड्याला खीळ बसते आणि मागे राहिलेल्या आमच्यासारख्या कबिल्याच्या काळजाला पीळ पडतो त्याला वेढा म्हणतात बाळराजे!" असे जिजाऊंना म्हणावेसे वाटले, पण त्यांनी आपल्या नातवाला काही काही सांगितले नाही. बाळराजांच्याकडे बघताना मात्र जिजाबाईंना हरभट ज्योतिष्यांच्या भाकित-बोलांची याद आली, "आप्तगणांकडून फसला जाण्याचा योग दिसतो या कुंडलीत!" आणि उगाच जिजाबाईंना वाटले. "आता आपण गड उतरलो की तुम्हाला फसविणाऱ्या सर्वांत मोठ्या आप्तांपैकी आम्ही एक होऊ!" आता जिजाऊ कुणालाच काही सांगू शकत नव्हत्या. समय सांगण्याचा नव्हता, सरसावण्याचा होता. वेळ, घोळ घालण्यापेक्षा मेळ घालण्याची होती. "भोसल्यांचा कबिला कधीच कचदिल असणार नाही" हे सिद्ध करायला मासाहेब तयार झाल्या. राजांच्यासाठी असंख्य चिंतांची मरणे त्या जगल्या होत्या. आता एक जागते मरण मरायला त्या तयार झाल्या!

एकाएकी गडाच्या पालीदरवाज्यावरची नौबत दुडदुडली. पाठोपाठ वर्दी आली, "सरनोबत नेताजीराव पालकर सिद्दी हिलालासह गड चढून येताहेत!"

बाराबंदीवरून, कंगणीदार पगडीवरून पाणथेंब ओघळणारे नेताजी मुजरा करीत जिजाऊंच्या सामने पेश झाले. त्यांची गर्दन वर उठत नव्हती.

"या सरलष्कर, राजांच्या भोवतीचा वेढा फोडण्यासाठी आम्ही खाशा गड उतरणार आहोत. संगती कुमकेला आमचे शंभूबाळ घेणार आहोत! त्यापूर्वी तुमचीच वाट आम्ही बघतो आहोत. तेवढं कमरेचं हत्यार उतरून आमच्या हाती द्या! मराठ्यांच्या सरलष्करांच्या हातातील हत्यारात हत्तीचं बळ असतं असं आम्ही ऐकून आहोत! आमचे शिवबाराजे सोडवायला आम्हास ते उपयोगी पडेल!" कढभरल्या अवस्थेत जिजाबाई नेताजींना लागेलसे बोलल्या.

भिजल्या अंगाचे, भरल्या डोळ्यांचे नेताजी त्याने थरारले. घोगऱ्या सादात म्हणाले, "मासाब, गडलोट करा पर असं तोडू नका! हत्यारं तुमच्या हाती द्याया आमी काय

म्येल्या माऊलीचं दूद न्हाई प्यालो. वेढा पडला म्हून इमान न्हाई पडत. राजं सोडवू मगच पायधूळ घ्याया येऊ. येतो आम्ही.'' जिजाऊंना आणि बाळराजांना मुजरा करून नेताजी वळले.

त्यांना पाठमोरे बघतांना आपण फारच तोडून बोललो हे जाणवून जिजाऊ नेहमीच्या 'आऊबोलीत' म्हणाल्या, ''सरलष्कर, दमछाकीचा मुक्काम दोन दिवस घेऊन तवाने व्हा. मग जे करणं असेल ते करा.''

जे करणे शक्य होते ते सारे नेताजींनी कडव्या इमानानं केले. सिद्दी हिलाल संगती घेऊन ते पडत्या पावसात वेढ्याचा उपराळा करावा म्हणून पन्हाळगडच्या पायथ्याला जाऊन भिडले. पण सावध हबश्यांनी उपराळ्याचा छापा मोडून काढला. सिद्दी हिलाल कैद झाला. नेताजी पन्हाळ्याच्या पायथ्यापासून माघारा फिरले.

पाऊस पडतच होता. मावळी मने भिजत होती. मराठी मुलूख भिजत होता. उदंड दलदल दाटत होती. आता जिजाऊंचा, राजांचा, राज्याचा आणि शंभूबाळांचा साऱ्यांचा भार फक्त जगदंबेवर होता. ती जगाची 'अंबा.' संकटांना 'थांबा' म्हणण्याचे सामर्थ्य फक्त तिच्यातच होते. माणसे तिच्या हातातले नुसते पोत होते!

जिजाबाई राजगडावरून एकच करू शकत होत्या. शास्ताखान सिद्दी जौहरला मिळणार नाही यावर नजर ठेवण्याचे काम. त्यासाठी त्यांनी चाकणचे जुने, जाणते किल्लेदार फिरंगोजी नरसाळा यांना बलावू धाडले. फिरंगोजी राजगडावर आले.

मासाहेब त्यांना निकराच्या धीराने बोलल्या, ''फिरंगोजीबाबा, आमच्या तर इंगळास वोळंबे लागले. कोणती खबर येईल आणि कानात तापल्या शिसाचा रस ओतून जाईल सांगता येत नाही. तुम्ही जुने-कदिम किल्लेदार. चाकणला राहून तुम्ही शास्ताखानास आपल्या अंगावर घ्या. तसं झालं तर त्याचा मोहरा राजगडाकडं-पन्हाळगडाकडं वळणार नाही. बोला, तुम्हास काय वाटतं?''

''मासाब, लई सल्पी कामदारी नेमून दिलीसा. मला वाटलं पन्हाळ्याचा खोडा उखडायचा हाय. एल्गाराचा मनसुबा असंल.'' फिरंगोजी मनचे बोलले.

''नाही किल्लेदार, आता पन्हाळ्यावर चालू घेणं म्हणजे हकनाक हातची माणसं गमावून बसणं आहे. आम्हास ते नाही रुचत.'' जिजाऊंनी फिरंगोजींची समजूत काढली.

मासाहेबांचा निरोप घेऊन फिरंगोजी चाकणला जायला निघाले. त्यांना शंभूबाळांच्या लळ्याचा लगाव होता. राजे नव्हते म्हणून, ''मुजरा धाकलं राजं.'' म्हणत फिरंगोजींनी शंभूबाळांना मुजरा घातला. धावत जवळ येऊन फिरंगोजींच्या मांडीभोवती आपल्या हातांचा फेर टाकीत बाळराजे वर बघत म्हणाले, ''आम्ही तुम्हाला वेढा भरणार फिरंगोजीबाबा! नाहीतर घेऊन चला आम्हास चाकणला!''

त्यांचे मांडीभोवती वेढलेले हात अल्लादीने सोडवीत गंभीर झालेले फिरंगोजी

स्वत:शीच बोलल्यागत बोलले, ''तुम्हावानी न्हानपन समद्यांस्नीच लाभलं असतं तर लई ब्येस झालं असतं धाकलं धनी!''

जिजाबाईंच्या मनचे सारे थोरपण आता ढासळू लागले. जौहरच्या वेढ्याला पुरते सव्वाचार महिने लोटले होते. राजांनी राजगडाला पाठमोरे होऊन आता बक्कळ अकरा महिने मागे हटले होते! उभ्या गडावर चिंतेचा विचित्र ताण पसरला. जिजाऊंनी साऱ्यांशीच बोलणे टाकले. गडावर कोसळणाऱ्या पाऊसलोटाकडे स्वत:ला हरवून बघताना त्यांना वाटू लागले की, ''सारं आभाळ उरी फुटावं. हत्तीसोंडेनं पाणधारा धो धो कोसळाव्यात. राजांची काही बरीवाईट खबर कानांवर पडण्यापेक्षा हा उभा राजगड पाणलोटात विरघळून जावा!'' पण शंभूबाळांना समोर बघताना त्यांचे हे विचार कुठल्या कुठे धावणी घेत निघून जात होते.

धाराऊने जिजाबाईंच्या देवमहालात पूजेचा सरंजाम नेहमीच्या तबकात मांडून ते देव्हाऱ्यासमोरच्या पाटावर ठेवले. तिच्या शेजारी बाळराजे उभे होते. या देवमहालात आपले आबासाहेब कैक वेळा जिजाऊंच्या पायांचे दर्शन घ्यायला आलेले त्यांनी पाहिले होते. 'बरेच दिवस झाले, आबासाहेब दिसत नाहीत?' या विचाराने गोंधळलेल्या शंभूबाळांनी धाराऊला विचारले, ''धाराऊ, वेढा कसा असतो? कुठं राहतो?''

धाराऊने चमकून बाळराजांच्याकडे बघितले. ''मला काई ठावं न्हाई. असलं काहीबाही नगा इचारू.'' धाराऊ कळवळून बोलली.

पूजेचा सरंजाम बयाजवार लागला आहे की नाही याचा फेरतपास घेण्यासाठी तिने पाटावरच्या तबकाकडे बघितले. नैवेद्याच्या वाटीतील गूळखड्याला काळ्यामिट्ट मुंग्यांनी घेरून टाकलेले तिला दिसले! बाहेरच्या पावसाच्या पागोळ्यांनी हैराण झालेल्या मुंग्या देवमहालाच्या उबाऱ्याला आत आल्या होत्या.

वाटीतील तो मुंग्यांनी घेरभरला गूळखडा बघताना धाराऊला कसेतरीच वाटले. पुढे होऊन हातांनी साऱ्या काळ्यामिट्ट मुंग्या वारून तिने तो गूळखडा उचलला आणि दुसऱ्या वाटीत ठेवला!

शंभूबाळांचे बोट धरून त्यांना मासाहेबांचे दिवस दर्शन करविण्यासाठी ती जिजाबाईंच्या खासेमहालात आली. तेवढ्यात खबरगीर विश्वास नानाजी येताना दिसला. त्याचा चेहरा उजळ दिसत होता. मुजरा रुजू करून, छाती फुगवून त्याने जबानीचा मावळी गोट खुला केला, ''मासाब, कलच्या पुनवंच्या राती राजं जव्हरच्या वेढ्यातनं सलामत निसटलं!!

''विश्वाऽस! राजे सलामत सुटलेऽ? सांग– लवकर. सारा करिना सांग. कसे– कसे सुटले आमचे शिवबाराजे? कुठे आहेत? कधी येणार आमच्या सामने? सांग.'' जिजाबाई बैठकीवरून उठून विश्वासच्या समोर आल्या. त्यांचे डोळे थबथबले होते.

विश्वास भरल्या उराने सांगू लागला, " कलच्या पुनवंच्या राती राजं पन्हाळागडाच्या राजदिंडीनं सहाशे बांदलांनिशी गडउतार झालं. बांदलांनी राजास्नी एका पालकीत बसवून विशाळगडाच्या रोखानं अंधारात धाव घेतली. पर गनिमाला राजं निसटल्याचा सासूद लागला. जव्हरचा जावाई शिद्दी मसूद दीड हजारांचं घोडदळ घेऊन बांदलांच्या पाठलागावर पडला. रातभर चिखलराडीतनं– झाडझाडोऱ्यातनं बांदलांनी खांदे बदलत राजांची पालकी चौदा कोसांवर गजापूरच्या घोडखिंडीवर आणली. तवा भगाटलं हुतं. खिंडीजवळ मसूदचं हबशी ऐन पिछाडीला आल्यालं बघून हिरडसमावळच्या बाजी प्रभू देसपांड्यांनी शिबंदीच्या दोन फळ्या क्येल्या. एक राजांच्या संगट देऊन त्यांस्नी विशाळगडाच्या वाटंला लावलं. बाजी आन् त्येचा धाकला भाऊ फुलाजी दोघं तीनशे बांदलांनिशी घोडखिंडीचा थोपा कराय मागं ऱ्हायलं. खिंडीला भिडलेल्या हबश्यांबरोबर बाजी आणि बांदल सात प्रहर पट्टा खेळलं. राजं विशाळगडाच्या पायथ्याला आलं तर गडाला सुर्व्यांचा आणि पालवणकरांचा घेर पडल्याला हुता. राजांनी ' हरऽ हरऽ म्हादेव ' म्हणत तो घेर फोडून काढला. दोन वेढं फोडून राजं विशाळगडावर हाईत. उद्या हकडं येनार हाईत. पर –"

" काय झालं विश्वास ? बोल." जिजाबाईंना विश्वासचा खुलला आवाज बदललेला जाणवला.

" पर मासाब, घोडखिंडीवर हबश्यांचा थोपा करताना सारं तीनशे बांदल आन् बाजी आणि त्येंचा धाकला भाऊ फुलाजी कामी आलं !! उलट्या काळजाच्या हबश्यांनी साऱ्यांची प्रेतं घोड्याच्या टापांखाली चिखलात रगडत खिंड पार क्येली ! "

विश्वासची खबर ऐकताना मासाहेब स्वत:साठी बेखबर झाल्या. त्यांच्या डोळ्यांसमोर बाजींची मुद्रा उभी राहिली.

गजापूरची घोडखिंड पिंडदान करून शांत झाली होती. बांदल धुंदळ पेटवून स्वामिकार्यावर खर्ची पडले होते. हबशी तरसांच्या डोळ्यांत तांबडधूळ फेकून सह्याद्रीचा सिंह सुटला होता.

गजापूरची घोडखिंड बाजींच्या रणगाजीने ' गाजीपूरची खिंड ' झाली ! त्यांच्या शोभणाऱ्या नावाने ' बाजीपूरची खिंड ' झाली. बांदलांच्या नेकजात पवित्र आत्म्यांच्या साक्षीसाठी ' पावनखिंड ' झाली !!

राजगडाच्या पालीदरवाज्यावरची नौबत लयीत दुडदुडू लागली. विशाळगडाहून कूच झालेले राजे राजगड चढत होते. पुरत्या अकरा महिन्यांनंतर !

पद्मावती माचीचे तटसरनौबत सिदोजीराव राजांना सामोरे आले. त्यांच्यासह राजे बालेकिल्ला चढून आले. सदरचौकाकडे जात असताना त्यांच्या मनात फक्त जिजाऊ आणि शंभूबाळांचे विचार होते. जिजाऊंच्या दर्शनासाठी तर राजांचे आतुर डोळे

भिरभिरत होते. ते सदरचौकाच्या उंबरठ्याजवळ आले. धावत येत शंभूबाळांनी राजांच्या मांड्यांना आपल्या छोटेखानी हातांचा घेर टाकीत दिलगाव साद घातली, ' आबासाहेबऽ ! '

राजे उंबरठ्यातच घोटाळले. सिदोजीरावांच्याकडे बघत ते म्हणाले, " जौहरचा हत्यारबंद वेढा आम्ही सिताब फोडला पण ... या दोन हातांचा वेढा फोडणं कठीण सिदोजीराव ! " हसत हसतच राजांनी उचलून शंभूबाळांना आपल्या छातीवरच्या कवड्यांजवळ घेतले. त्यांच्या कपाळावर ओठ टेकवून त्यांची पाठ हळुवार थोपटीत पुन्हा उतरविले.

समोर जिजाबाई उभ्या होत्या. सूर्याला मावळतीला धाडून पहाटवेळी पुन्हा परत येताना पाहून धन्य होणाऱ्या उगवतीच्या आकाशासारख्या ! राजांनी सामने जात त्यांच्या सतेज सात्त्विक पायांवर आपल्या मस्तकीचे शिवगंध टेकविले. त्यांना उठवून मिठीत घेताना जिजाऊंचे आऊपण डोळ्यांत भरून आले. त्या दोघांना बिलगून शंभूबाळ उभे होते. अंगीच्या रक्ताचा वेढा त्या तिघांना तोडतो म्हटल्याने तोडता येणारा नव्हता !

हे असले ' राजेपण ' जगदंबेने राजांच्या ओंजळीच्या परडीत टाकले होते. हे असले ' आऊपण ' जिजाऊंनी आडव्या मळवटाबरोबर माथ्यावर घेतले होते. आणि हे असले ' बालपण ' शंभूबाळांचे बोट धरून त्यांना आपल्या संगती चालवीत होते !!

शास्ताखानाने वेढा टाकलेला चाकणचा संग्रामदुर्ग आपले नाव सार्थकी लावीत चांगले चौपन्न दिवस खानाशी भांडला. पंचावन्नाव्या दिवशी चाकणचे किल्लेदार फिरंगोजी हातांतील फिरंग खाली ठेवून संग्रामदुर्ग सोडून राजगडाच्या वाटेला लागले.

याच वेळी ' राजांचे दुखणे ' आता सरदारांच्या हातून निभत नाही म्हणून खासा आदिलशहाच जबर जमेतीनिशी विजापूरहून मराठी मुलखाच्या रोखाने कूच झाला ! पुन्हा आक्रमण ! पुन्हा घोडेधाड ! टापांखाली पुन्हा मुलुखतोड !

पण राजे राजगड सोडू शकत नव्हते. सईबाईंचे वर्षश्राद्ध तोंडावर आले होते. सईबाईंच्या आठवणीने बेचैन झालेल्या राजांनी वर्दी पाठवून शंभूबाळांना आपल्या महाली बोलावून घेतले. सईबाईंची सावळी मूर्ती मनात रेंगाळत असतानाच समोर उभ्या राहिलेल्या बाळराजांचे खांदे प्रेमभराने पकडीत राजे म्हणाले, " बाळ शंभू, वेढा म्हणजे काय म्हणून तुम्ही आऊसाहेबांना विचारलंत ! ते आम्ही सांगतो. जे जे सामने असलं की तोडता येत नाही, आणि नजरेआड झालं तरी ते आपगाला तोडायला राजी होत नाही त्याला – त्याला वेढा म्हणतात बाळराजे !! " राजांचा आवाज सईबाईंच्या स्मरणाने भरला होता. डोळे बाळराजांच्या डोळ्यांतील काळ्याशार बाहुल्यांत आपणाला हवे असलेले ' सावळेपण ' धुंडीत होते.

बाळराजे मात्र आपल्या आबासाहेबांच्याकडे एकनजर बघत निर्धाराने म्हणाले,

"नाही आबासाहेब! आम्हास वेढा म्हणजे काय ते चांगलं कळलंय आता! किल्ल्याबाहेर पडणाऱ्या राजाला मारायला नंगी हत्यारं घेऊन धारकरी टपलेले असतात त्याला – त्यालाच वेढा म्हणतात आबासाहेब!"

हे ऐकताना राजे गलबलले. त्यांनी शंभूबाळांना झटकन उचलून आपल्या मांडीवर घेतले आणि त्यांच्या पाठीवर हात फिरविताना राजांच्या मनात येऊन गेले की, "बाळराजे, वेढ्याचा मतलब कळून नाही भागत. त्याचा उपराळा करायची मखलाशी साधणं जमलं पाहिजे. कधी वेढ्यात सापडू नका. आम्ही तुमचे आबा आणि आऊ आहोत!!"

रायाजी आणि अंतोजी गाडे या धाराऊच्या मुलग्यांचा आता शंभूराजांशी बरेच घसटीचा प्रेमा जुळला होता. बाळराजांची उमर जशी वाढीला लागली होती तशी त्यांची 'भोसलाई नजर' आपोआपच तयार होत होती. नस्लबाज अरबी घोड्याच्या ऐटबाज शिंगराला वारेझोताचा कानोसा घेण्यासाठी कुणी कान टवकारायला शिकवावे लागत नाही. जिजाऊंचा महाल सोडला तर शंभूबाळांचा सारा समय अंतोजी-रायाजीच्या संगतीत जात होता. शिलेखाना, कलमखाना, दफ्तरखाना, जासूदखाना – गडावरच्या अठरा कारखान्यांचा कानुजाबता राजांनी कसा बसविला आहे हे शंभूबाळ रोजान्याच्या फेरफटक्यात जवळून बघत होते. दरजी महाल, चौबीना महाल, शेरी महाल, सौदागिरी महाल, अशा गडावरच्या बारा महालांतील मुरब्बी लोकांचा रिवाज त्यांच्या नजरेखाली येत होता. राजसदरेवर जिजाऊंच्या तर्फेला बसून गोतसभेने दिलेले कथल्यांचे न्यायनिवाडे ते ऐकत होते. 'धाकलं राजे' म्हणून लहानथोरांनी घातलेले अदब मुजरे रुजू करून घेत होते.

धाकुटपण पंतोजी – गुरुजींपेक्षा नजरेनेच उदंड शिकत असते. ज्यांच्या माथ्यावरचे मायेचे छत्र अजाणपणी हटले जाते त्यांना परिस्थितीच उदंड शिकवीत असते. आणि ज्यांच्या पदरी मरण जीनावर टाकून दौडणाऱ्या राजाच्या पोटचा बच्चा होण्याचे फर्जंदपण येते त्यांना अंगचे रक्तच उदंड शिकवून जाते!!

दिवाळीच्या दिवल्यांनी राजगड उजळून टाकला. शास्ताखानाचा खासा सरदार कहारतलबखान उंबरखिंडीतून खजिन्यासह कोकणात उतरणार असल्याची खबर राजांना मिळाली. त्यांनी जिजाऊंचा व शंभूबाळांचा निरोप घेऊन राजगड सोडला.

या वेळीच राजांचा सुभेदार तान्हाजी मालुसरे संगमेश्वरावर तळ टाकून होता. त्याच्या छावणीवर शृंगारपूरकर सूर्यराव सुर्वे आणि पाल्वणकर जसवंतराव यांच्या जोडसैन्याने रात्रीचा छापा घातला. ही खबर राजांना राजापुरात मिळाली. सुर्व्यांचा हिसाब पावता करण्यासाठी राजे हुजरातीच्या फौजेसह राजापुराहून शृंगारपूरच्या रोखाने परतले. त्यांच्या

परतीच्या सैन्यात एक कसबी कलमबाज दाखल झाला होता. त्याचे नाव – बाळाजी आवजी!

संगमेश्वर-पालीमार्गे राजे शृंगारपूरच्या पांढरीवर येऊन थडकले. गावातील सुर्व्यांच्या गढीतील अन्यायाचा गड्डा असलेले सिंहासन वगळले तर गाव मोठे राजस – देखणे होते! झाडांचा अंगहिरवा गर्दावा आणि आंबरायांचा रसवंत डौल यांनी गावाभवती फेर धरला होता. राजांचे खबरगीर चौटाप उधळीत शृंगारपुरात घुसले. त्यांनी खबर आणली की सूर्यराव सुर्वे डायाडौल होऊन गढी सोडून पळून गेला आहे. मात्र सुर्व्यांचा कारभारी दिवाण पिलाजीराव शिर्के मोठा तलवारबाज असून तो गढी लढविण्याच्या तयारीत आहे! माणूस इमानाचा आहे.

राजांचे घोडदळ 'हर हर महादेव' चा पाऊस पाडीत शृंगारपुरात घुसले. सुर्व्यांची गढी घेरली गेली. कमरेची भवानी उपसून राजे सुर्व्यांच्या गढीत शिरले. गढीतले सुर्व्यांचे सगळे धारकरी मावळ्यांनी दस्त करून त्यांच्या मुसक्या अगोदरच आवळल्या होत्या.

पायातील बाकदार मोजडीने सुर्व्यांचे भुंडे सिंहासन त्वेषाने ठोकरीत राजे म्हणाले, "बेइमानदारांच्या मसनदी मातीमोलाच्या असतात!"

ते दृश्य समोर पाहत असताना एका बळजोर, कल्लेदार माणसाची छाती वरखाली होत होती. ते होते सुर्व्यांचे दिवाण पिलाजीराव शिर्के!

दोरखंडांनी दस्त केलेल्या पिलाजीरावांना राजांच्या सामने पेश करीत तान्हाजी मालुसरे म्हणाले, "ह्ये बेईमानी धन्यांचे इमानी चाकर!"

शांत पावलांनी पिलाजींच्याकडे जात राजांनी आपल्या हातांनी त्यांच्या काढण्या उतरल्या. राजे तानाजीला म्हणाले, "चुकलात तान्हाजीराव, इमानी नजरेला धन्याच्या चालीची खोट कधीच दिसत नाही. दिसली तरी पटत नाही. म्हणूनच तर ते कुलवंत 'इमान' असतं!'"

मोकळे झालेले पिलाजीराव राजांच्या नजरेला निधड्या छातीने नजर भिडवून म्हणाले, "काढण्या कशापायी काढल्या? ज्या गादीला आमी मुजरं केलं तिला ठोकरून वर ही आमची नावाजणी कशापायी? त्यापरीस घोड्याच्या टापंला जखडून आमच्याच गावात काढा की आमची धूळधिंड!"

पिलाजीरावांच्या खांद्यावर आपल्या डाव्या हाताचा तळवा चढवून कपाळावरचे शिवगंध आक्रशीत राजे म्हणाले, "पिलाजीराव, तुम्हीही चुकलात! आम्ही पागेचा एवढा घोडा पोसला तो काही इमानदार माणसं त्याच्या टापांखाली रगडण्यासाठी नाही! इमानी जनावरांकडून इमानी माणसं रगडणाऱ्या राज्याची आणभाक आम्ही घेतलेली नाही! प्रसंग पडला तर आमच्या पागेचा घोडा इमानी माणसाच्या मांडेखालीच येईल!"

होईल ती मानहानी सोसायला मन बांधील झालेल्या पिलाजींना असले जिनगानी कुर्बान करून टाकावी असे बोल कधी ऐकायला मिळतील अशी अपेक्षाच नव्हती.

घोटाळलेले पिलाजीराव राजांच्याकडे डोळे भरून बघत होते. त्यांच्या मनी चाललेली घालमेल राजांनी जाणली. त्यांच्या खांद्यावर तळहाताची एक थाप देऊन राजे म्हणाले, "घाबरू नका पिलाजीराव, आम्ही तुम्हाला आमच्या चाकरीत दाखल होण्याची भीड घालणार नाही! तुमच्या नेकजात बर्तावावर आम्ही निहाल आहोत. पण सल्ला म्हणून मनची एक बात तुम्हाला जरूर बोलू. शिकल न लावलेलं हत्यार आणि मुजोर-बेइमान धन्याची चाकरी सारखीच असते! दोन्हीचा असूनसुद्धा काहीच हिसाब लागत नाही! सुव्यांची संगत करण्यापेक्षा सेतपोतावर जाऊन कुणबावा केला तरी तो गोमटाच आहे!"

"तान्हाजीराव, पिलाजींना बाइजत मोकळं करा." राजांनी आज्ञा करीत उजव्या हातातील भवानी म्यान केली.

पिलाजीरावांचे कल्ले थरथरले. झटकन वाकून राजांच्या मोजड्यांना हात लावीत ते म्हणाले, "राजं, आजवर तुम्हांबद्दल लई ऐकून हुतो. आज त्येचा पडताळा नजरेला आला. म्याहून पाय धरलं. तोडायचं असंल तर टाका तोडून."

त्यांना वर उठवून गळाभेट देत राजे म्हणाले, "पिलाजीराव, आमची जिंदगी तोडण्यासाठी नाही. हयातभर आम्ही माणसं जोडतच आलो. तोडणं सोपं असतं. जोडणंच मुश्किल आहे!"

पिलाजींनी राजांना आपल्या वाड्यावर पायधूळ झाडण्यासाठी विनवणीचे मागणे घातले. निवडक धारकरी घेऊन राजे पिलाजीरावांच्या वाड्यात आले. वाड्याच्या सदरचौकात दोन भावंडे खेळत होती. साऱ्यांना पाहून ती दबकली.

राजांनी पिलाजींना विचारले, "ही कुणाची घरशोभा पिलाजीराव?"

"जी. ती माजीच हाईत. ह्ये थोरलं गणोजीराव आन ही धाकली राजसबाई. सम्दी हिला 'राजाऊ' म्हनत्यात. आम्हीं जिऊ म्हन्तो." पिलाजींनी आपल्या मुलांची नावे सांगितली.

थोरला गणोजी तरतरीत दिसत होता पण तोरेबाज उभा होता. राजाऊ मात्र मोठी राजस आणि चलाख दिसत होती. तिच्या डोळ्यांत भीतीचा वारासुद्धा नव्हता. त्याहून राजांना तिला बघताक्षणीच जाणवले की तिचा तोंडावळा जिजाऊंच्या तोंडावळ्याशी बराच जुळता आहे!

पुढे जात राजांनी दोन्ही मुलांच्या खांद्यावर हात ठेवले. ते पिलाजींना म्हणाले, "तुमच्या या जोडीने आम्हास आमच्या बछड्यांची याद दिली!"

पिलाजीरावांनी राजांची इतमामाने सरबराई केली. शृंगारपूर आणि प्रभानवल्लीचा सुभा त्र्यंबक भास्करांना सांगून त्यांनी त्यांच्या दिमतीला पिलाजीराव शिर्के ठेवले. शृंगारपूर सोडण्यासाठी राजे गाववेशीवर आले. वेशीच्या तर्फेला कसलेतरी एक मंदिर होते.

"हे कसले देवस्थान?" राजांनी निरोप द्यायला आलेल्या पिलाजींना विचारले.

"ते आमच्या कुलदैवताचं – भावेश्वरीचं हाय." पिलाजी म्हणाले

"अस्सं! चला दर्शन घेऊ." म्हणत राजे पायउतार झाले. मंदिरात जाऊन त्यांनी भावेश्वरीचे दर्शन घेतले. बाहेर पडताना ते पिलाजींना म्हणाले, "तुमच्या या कुलदैवताचा संबंध आमच्या जगदंबेशी असावा! ही मूर्ती जगदंबेसारखीच दिसते!"

शृंगारपूर सोडून राजांच्या घोडेतुकडीने धिम्या चालीची धावणी धरली. राजांच्या मनात दोन गोष्टी धावणी घेत होत्या – एक 'राजाऊ उर्फ जिऊ', दुसरी भावेश्वरी!

राजे राजगडावर आले आणि मृगाने आपली झोड उठविली. गडावरच्या झाडी आवळण्यात आल्या. गड उतरंडीवरचा झाडझाडोरा पाणधारांत न्हाऊन निघू लागला. शंभूबाळांना संगती घेऊन राजे दफ्तरखान्याचा जाबता जातीनिशी नजरेखाली घालू लागले. लोहारमेटावर भाल्यांच्या इंगळांवर तावून निघणारी आणि घणठोक्यांखाली घडणारी तलवारींची पाती आपल्या सडक बोटांच्या मुठीत पकडून तोलून पाहू लागले. वरून पाऊसधारा कोसळत होत्या. राजांच्या मनात एका विचाराचा पाणलोट घोंघावत होता – लालमहालात शिरलेला हिरवा सर्प – शास्ताखान!

आषाढ हटला. श्रावणाचे सरते दिवस आले. ऊन-पाऊस एकमेकांच्या पाठलागावर पडले! वरून पावसाच्या तुरळक सरी खाली उतरत असतानाच राजगडाच्या पायथ्याजवळ "उदं ग अंबे – उदं!"च्या बेभान, रोमांचक किलकाऱ्या आभाळाकडे वर चढत होत्या! रणहलग्यांवर लेझमांचे ताफे नाचत खेळी करत होते. टाळी चापाच्या काठ्या संबळी घुमवीत होत्या. रणशिंगांच्या ललकाऱ्या पाऊस सरींवर काटा फुलवीत चीत्कारत धावत होत्या. भंडाऱ्याच्या मुठी उधळल्या जात होत्या. ऊर भक्तीच्या इरेसरीने भरून आले होते. उदेकार उसळत होते. "उदे ग अंबे उदं!"

मंबाजी नाईक भवानी जगदंबेची गंडकी शिळेची घडीव मूर्ती पालखीत स्थापून राजगडाच्या पाली दरवाज्याकडे येत होते. बुतशिकनी करणाऱ्या औरंगजेबाच्या हिरव्या मुलखातून भगवती जगदंबेची मूर्ती मंबाजींनी मराठी मुलखात सिताब आणली होती. मराठी मुलखात अवतरण्यापूर्वीच सरहद्दीवर भवानीसमोर बकरी पडली होती. रक्ताच्या पायघड्यांवरून जगदंबा श्रींच्या राज्यात प्रवेशली.

मुर्दाडांना मातीमोल करणारी! मर्दांच्या मनगटात निधडपणाचा चेवताव चढविणारी! जोषाला जय देणारी जयंती! कडव्या भक्तांना कृपाकडे बहाल करणारी भद्रकाली! महिषासुराचे मर्दन माजविलेली मत्तमर्दिनी! भंडासुराचे भंजन केलेली भगवती भवानी! बिड्डालाला बुडविलेली बलशाली बिहडिनी! न्यायी जगाला जागणारी - जगवणारी जयवंती जगत्जननी - भवानी राजांच्या राज्यात उतरली!!

शंभूबाळांसह गडपायथ्याशी आलेले राजे पालखीला सामोरे आले. मंबाजींनी

राजांचा आणि बाळराजांचा मळवट भंडाऱ्याने भरला. जगदंबेचे ते दोन्ही फर्जंद चालत पालखीजवळ आले. ठाण झालेल्या पालखीतील शस्त्रसंभार उगारलेली, पायाखाली महिषासूर रगडणारी, कृष्णवर्णाची, वज्रलेपी मूर्ती डोळाभर बघताच राजांनी 'जगदंब-जगदंब' म्हणत हात जोडून डोळे मिटले. पुढे होत राजांनी आणि शंभूने जगदंबेच्या पायाला हात लावून तो मस्तकाला भिडविला.

राजांनी देवभोयांना इशारत करून आईच्या पालखीला आपला रिवाजी खासा खांदा दिला. ते बघताच भोवतीचे उभे मावळजन भक्तिभावाने उसळून उठले. "उदं ग अंबे उदं!!, हर हर महादेव"चा मावळ्यांनी पाऊसच पाऊस पाडला!

पालखी राजगड चढून आली, जिजाबाईंनी आणि राणीवशातील पुतळाबाई, सोयराबाई, काशीबाई अशा सर्व राण्यांनी जगदंबेची खणानारळांनी ओटी भरली.

शुभमुहूर्तावर पालखी प्रतापगडाकडे जाण्यासाठी वाजतगाजत राजगड उतरू लागली.

जगदंबेची मिळेल तेवढी कृपासोबत साधण्यासाठी राजे शंभूबाळांसह पालखीबरोबर गडमाचीपर्यंत आले. गड उतरणारी पाठमोरी पालखी बघत असताना राजांना फार फार जाणवून गेले, "ह्या मूर्तीचं दर्शन घ्यायला आज सईबाई पाहिजे होत्या!"

शंभूबाळांच्या खांद्यावर हात ठेवून ते म्हणाले, "ही जगदंबा साऱ्या जगाची आई आहे. तुमची-आमची साऱ्यांची! तिला हात जोडा बाळराजे!"

राजे आणि शंभूबाळ यांनी हात जोडून डोळे मिटले. गडमाचीवर उन्हात मिसळत श्रावणसरी ते दृश्य बघत होत्या!

देवीच्या प्रतिष्ठापनेसाठी राजे कुटुंबकबिल्यासह प्रतापगडावर आले. मुहूर्ताचे पात्र 'घुईं घुईं' करीत घंगाळात डुबले आणि राजांनी 'जय जगदंब' म्हणत आईच्या मूर्तीला हात लावले.

मंदिराच्या सुघड गाभाऱ्यातील चौथऱ्यावर जगदंबेची 'उदं ग अंबे उदं' च्या गजरात सुप्रतिष्ठापना झाली. मूर्तीसमोर मानाची बकरी पडली. प्रतापगड चैतन्यजोषात उजळून निघाला. जावळी आणि कोयना खोरीतील अवघा मावळा लोक जगदंबेच्या दर्शनासाठी गडावर लोटला होता.

रात्री आईच्या गोंधळासाठी प्रतापगडाची सदर मावळ-माणसांनी खचाखच दाटून गेली. सदर चौकात तांदळाचा चौक आखून जगदंबेच्या मानकरी भुत्यांनी त्यावर श्रीफल ठेवले होते.

पीळदार पगडी, घोळदार डौर आणि चुणीदार चोळणा असा पेहराव घातलेले गोंधळी मळवट भरून तयार झाले. कुणाच्या गळ्यात संबळ होता. कुणाच्या हातात चवंडक, तुणतुणं. डोक्यावर करंजेल घेतलेले टेंभे सदरेच्या कोनाड्याकोनाड्यांत फरफरत होते. राजे सदरदाखल होण्याची सारे उत्सुकतेने वाट बघत होते.

पदराचा काठ तर्जनीने सावरता धरीत प्रथम जिजाबाई सदरेवर आल्या. त्यांच्या पाठोपाठ राजे आणि शंभूबाळ सदरदाखल झाले. समोर उभे असलेले मावळे पगड्या उंचावून आश्चर्याने राजांच्याकडे आणि बाळराजांच्याकडे बघू लागले. त्या दोघा पितापुत्रांनी जगदंबेच्या भुत्याचा वेष आज अंगावर धारण केला होता! ती रूपे मोठी गोमटी दिसत होती. त्यात राजेपण नव्हते. होते ते भाववेडे भक्तपण!

राजे बाळशंभूसह सदरबैठकीवर सुखावले.

गोंधळ्यांचा म्होरक्या सदरेसामने आला. मुजरा घालून म्हणाला, "आईचा मानाचा पोत पेटता करून आपुन त्यो नाचवाय पायजे धनी."

"जशी जगदंबेची आज्ञा." म्हणत राजे पायऱ्या उतरून चौकात आले. म्होरक्याने दिलेला, पाच पेडांत घट्ट वळलेला भवानीचा पोत त्यांनी आपल्या हातात घेऊन तो मस्तकाला लावला. गोंधळ्याने बगलेतल्या बुधल्यातील करंजेल पोतावर सोडले. त्याच्या हातातील टेंभ्यावर धरून राजांनी जगदंबेचा पोत पेटता केला! गोंधळ्याने आपल्या हातातील काठी राजांच्या हातात दिली. तिच्या ठेक्यावर पोत उजव्या हाताकडून उजवीकडेच कसा नाचवायचा याची राजांना टिगळ दिली. संबळ तडतडत घुमू लागला. चवंडक, तुणतुण्याने साथ धरली.

"आई - राजा - उदंऽऽ उदं!" म्हणत पायाखालच्या फरसबंदीवर डाव्या हातातील काठीचा ठेका धरून राजे जगज्जननीचा पोत नाचवू लागले.

पेटती ज्योत बघताना राजांचे डोळे कसल्यातरी दिव्य तेजाने पेटून उठले! डौराखालचे त्यांचे अंग सरसरत गरम झाले. त्या पोताच्या फरफरत्या ज्योतीतच त्यांना शामियान्यासकट हात पसरलेला अफजलखान दिसू लागला! राजांच्या बाकदार नाकाच्या शेंड्यावर घामाचे थेंब तरारले! पाठकण्यातून पांढरीधोट घोडी सुसाट धावताहेत असे त्यांना क्षणभर वाटले. "हे असंऽ असंच काहीतरी ज्या क्षणी आम्ही खानाला फोडला त्या क्षणी आम्हांस वाटलं होतं! या पेटत्या पोतासारखंच काहीतरी उसळतं – पेटतं आमच्या नसानसांत दबा धरून आहे!" क्षणात राजांना पोतात दिसणारा अफजल दूर हटला. त्यांच्या निमुळत्या डोळ्यांतील ज्योती आणि फरफरता पोत एकजोड झाले. विलक्षण तेजाने आता राजांचे डोळे चमकू लागले. ते बेभान झाले!

"आई - राजा - उदं उदंऽ!" म्हणत मिटल्या डोळ्यांनी राजे काठीच्या ठेक्यावर हातातील पोत फराफर नाचवीत स्वत:भोवती बेभान फेऱ्या घेऊ लागले.

सदरबैठकीवर बसलेल्या शंभूबाळांचा पाठकणा तो फरफरता पोत पाहताना आपोआपच ताठ झाला! राजांच्या हातात थयथयत फरफरणाऱ्या पोताच्या प्रकाशरेषेवर त्यांची निर्भीड नजर एकटक जोडली गेली. आबांचे हे असले रूप काही त्यांना कधीच बघायला मिळाले नव्हते.

पोत नाचवून दमगीर झालेले राजे थांबले. आता त्यांच्या छातीवरचा डौर घामाने चिंब डबडबला होता. पोतधरला हात थरथरत होता. पोताच्या तांबड्या-पिवळ्या प्रकाशात

राजांचे घामाने डवरलेले रूप नुकत्याच धुऊन काढलेल्या शिवलिंगासारखे दिसत होते. कपाळावरचा घाम तर्जनीने निचरता करून राजांनी एकदा पोताकडे पाहिले. मग सदरबैठकीकडे नजर जोडून म्हणाले, "बाळ शंभू, असे चौकात या!"

शंभूबाळ बैठकीवरून उठून राजांच्या सामने चौकात आले.

आपल्या हातातील पेटता पोत शंभूच्या हातात देत राजे त्यांचा छोटेखानी खांदा हळुवार थोपटीत म्हणाले, "तुम्हीही नाचवा आईचा पोत बाळराजे. आमच्यापेक्षा जोशानं!" सारी सदर डोळे टवकारून बघू लागली.

गोंधळ्याने पुन्हा करंजेल देऊन बाळराजांच्या हातातील पोत ज्योततवाना केला. राजांनी आपल्या हातातील काठी बाळराजांच्या हातात दिली! आणि राजे सदरपायऱ्या चढून जिजाऊंच्या शेजारी बैठकीवर विसावले.

शंभूने शेरनजरेने एकदा पोताच्या पेटत्या ज्योतीकडे बघितले. डाव्या हातातील काठी पायागतीच्या फरसबंदीवर आपटीत तो शिवबाळ गर्जला— "भवानी - राजा - उदं ऽ उदं ऽ!" आणि त्या बालरुद्राच्या हातातील पाचपेडी पेटता पोत फरफरत नाचू लागला. त्याला उजवीकडून उजवीकडेच जायचें बंधन उरले नाही!! सर्व बंध तोडून बाळराजे जोशाने मनाजोगा हातचा पोत नाचवू लागले! मिटल्या जागत्या डोळ्यांनी स्वत:भोवती ठेक्यात गरगर फिरू लागले.

त्यांच्या डोक्यावरची पगडी हिंदकळता हिंदकळता उडाली आणि फरसबंदीवर उतरली! केस मोकळे सुटलेले शंभो चौफेर थयथय नाचत पोत घुमवू लागले. त्यांचे रसरशीत ओठ रोमांचक उदेकार घुमवीत होते, "भवानी - राजा - उदं-उदं-उदं उदं!!" फरफरणाऱ्या पोताचे कडे बाळराजांच्या भोवती गरगरू लागले. संबळवाल्याने संबळीच्या टाळी चापांच्या काठ्या चढीला लावल्या.

बाळराजांचे ते बेभान रूप पाहून सदरबैठकीवर बसलेल्या जिजाऊंच्या हातांची बोटे नकळतच कानशिलाकडे चढली आणि कटाकट मोडली गेली!

थरकून उठलेल्या सदेरवरच्या एका मावळ्याने नरड्याची घाटी फुलवीत किलकारी दिली, "हर ऽऽ हर ऽऽ हर म्हादेव!" भवतीच्या साऱ्यांनीच ती उचलून धरली.

किलकारीच्या त्या मोठ्या आवाजाने बाळराजे थांबले. त्यांचा पोतधरला हात थरथरू लागला! अंगावरचा डौर घामाने डबडबून निघाला होता. आपण आता खाली कोसळू असे त्यांना वाटू लागले. त्यांनी जिजाऊंच्याकडे मूक नजर दिली. जिजाऊ लगबगीनं सदरपायऱ्या उतरून चौकात आल्या. त्यांनी बाळराजांचा पोत आपल्या हातात घेतला. क्षणभर त्याच्यावर नजर जोडून तो गोंधळ्याच्या हाती दिला. शंभूबाळांना सावरून धरीत जिजाऊ सदरबैठकीवर आल्या. शंभूबाळ थकल्या अंगाने राजांच्या उजव्या तर्फेला बसले. त्यांची मुद्रा अपार तेजाने कशी उजळून गेली होती. नकळतच राजांचा हात त्यांच्या पाठीवरच्या घामेजल्या डौरावरून फिरू लागला!

गोंधळ्यांचा म्होरक्या एक परडी हातात घेऊन सदेरजवळ राजांच्या सामने आला. परडीत कुंकू-हळदीचा गुंतवा केलेला लाल-पिवळा भंडारा होता. त्या भंडाऱ्यात माखून गेलेली चौसष्ट कवड्यांची माळ होती. गोंधळी कमरेत वाकून हातातली परडी पुढे करीत म्हणाला, "ह्यो आईचं वाण हाय धनी. आईचं भुत्येपन घेतलं की ही परडी कुलदेवतेच्या देव्हाऱ्यात पुजाय लागती. नवरात्रात आईची परडी पात्र घरं मागाय लागती!!"

"आम्ही आनंदानं जरूर मागू." म्हणत राजांनी पुढे होत जगदंबेचे वाण स्वीकारले! गोंधळी मागे हटत मांडलेल्या तांदळाच्या चौकात आला. कानावर हात ठेवून संबळ, तुणतुण्याच्या तालावर त्याने गोंधळाचे नमन सुरू केले—

"गजवदना, गणराया गौरी—
मज तारी हो सुखसजना—
समरण तुझे पायी पद्मागौरी
भुत्या विनवी हेरंबा मज तारी
गजवदना, गणराया, गौरी—"

नमन होताच गोंधळ्याने जगदंबेला बालेघाट पार करून गोंधळाला येण्यासाठी साकडे घालायला सुरुवात केली.

"या गोंधळासी माये लवकरी यावे!
अंबे लवकरी यावे
चौक भरिला कोसरी
लिंब, नारळ नानापरी
उदबत्या लावून चारी
महापूजा मांडिली साजरी—
या गोंधळासी माये लवकरी यावे!
कुठवर आई पाहू वाट?
माझ्या नेत्रा भरला ताट
लवकर सोडा बालेघाट
माये, लवकर चाला वाट—
या गोंधळासी माये लवकरी यावे!
संबळ, तुणतुण्याचा नाद
पोत पाजळला घालून साद
आपुन यावं देऊन दाद
अंबे, माये सोडून वाद
या गोंधळासी माये लवकर यावे!

गोंधळास आलेल्या आदिशक्ती जगदंबेचा महिमा वर्णन करताना गोंधळी पोत उजवा

उजवासा नाचवीत भान हरपून गेला. तो महिमा जिजाऊ, राजे, शंभूबाळ आणि सदरेवरचा हरेक मावळा असे सर्वच कानभर ऐकू लागले,

“आदिशक्तीचे कवतुक मोठे,
भुत्या मज केले!
पंचभुतांचा देह-पोत हा,
त्रिगुण गुणी वळला!
चैतन्याची ज्योत लावुनी,
प्रज्वलित केला!
चित्तस्नेहे प्राण वाहुनी,
ज्याला स्थिर केले!
आदिशक्तीचे कवतुक मोठे,
भुत्या मज केले!

उदर-परडी देऊन हाती,
ब्रह्मांडी फिरवी!
लक्ष चौऱ्याऐंशी घरची भिक्षा,
मागविली बरवी!
ज्या-ज्या घरी मी भिक्षा केली,
ते ते घर रुचले!
आदिशक्तीचे कवतुक मोठे,
भुत्या मज केले!

सकाम कर्मे कवड्या यांची,
माला मम कंठी!
कर्मफळाचा कुंकुम मळवट,
माझ्या लल्लाटी!
पीडा-बाधा शकुन सांगुनी,
लोकां भुलविले!
आदिशक्तीचे कवतुक मोठे,
भुत्या मज केले!!

गडावर रात्र चढीला लागली. सदरचौकात भवानीकथा चढीला लागली! राजांच्याबरोबर सदरेवर बसलेल्या साऱ्या मावळ्यांना कळून चुकलेले ‘भुत्येपण’ पुन्हा एकदा उजाळा घेऊन उठले की, “आई जगदंबेसमोर रात्री गोंधळ घालणं पडतं आणि गनिमांच्या मुलखात दिवसरात्र गोंधळ माजविणं पडतं!!”

सगळ्या मराठमनाला जाणवून जाणारी एक दुर्घटना या वेळी घडली. जुने हिमती आणि हिकमती सरनोबत माणकोजी दहातोंडे यांनी शिवापुरात आपला देह ठेवला. स्वराज्यातील एक पराक्रमलाल इमानी ‘माणिक’ हरपले.

राजांनी आपल्या कारभारव्यवस्थेत थोडा बदल केला. अधिकाराची घालमेल करणाऱ्या शामराव रांझेकरांचे पेशवेपद काढून ती जिम्मेदारी त्यांनी नरहरी आनंदरावांच्यावर सोपविली. वाकेनविसीची वस्त्रे आण्णाजी दत्तोंना बहाल केली.

राजांच्या कबिल्यात मात्र आणखी एक चोळीबांगडीचा मानकरी आला! सकवारबाई राणीसाहेबांना कन्यारत्न झाले. तिचे नाव कमळाबाई ठेवण्यात आले.

नवरात्राचा सोनसुगीचा हंगाम आला. खांडेनवमीला पूजल्या हत्यारांसमोर बकऱ्यांचे खांडे पडले. विजयादशमीची पहाट उगवतीची कूस फोडून गडदाखल होऊ लागली.

राजांनी आणि शंभूबाळांनी खासेमहालाच्या हमामखान्यात पहाट-स्नान आटोपले. अंगावर जगदंबेच्या भुत्येपणाची वस्त्रे पेहरून मस्तकावर डौलदार पगड्या चढविल्या. आबा आणि फर्जंद शंभू जिजाबाईंच्या महालात त्यांच्या दर्शनासाठी आले. दोघांनी जिजाऊंच्या पायावरची सोनधूळ मस्तकी घेतली. राजे प्रसन्नपणे म्हणाले, “आऊसाहेब, आज आम्ही गडावरच्या पाच उंबरठ्यांसमोर आईची परडी मागणार आहोत! आशीर्वाद द्यावा. कुणा-कुणाच्या उंबरठ्याचं दर्शन आम्ही करावं त्याचा सल्ला सांगावा.”

“राजे, जे पोख्त, कदीम असतील त्यांच्यासमोर आईच्या भुत्येपणाचे हात पसरा. थोरांचे पहाटदर्शन कार्यी लावणारं असतं!” जिजाबाई म्हणाल्या.

जिजाबाईंचा आशीर्वाद घेऊन राजे शंभूसह महालाबाहेर पडले.

आज राजांच्या संगती सरंजाम म्हणून कोणीच नव्हते. जगदंबेच्या वाटेवर कसला सरंजाम? ही वाट फक्त भोसल्यांची होती. एक तळपता भोसला दुसऱ्या उगवत्या भोसल्याला घेऊन चालला! एक धावतो पिढी दुसऱ्या चालत्या पिढीला घेऊन चालली! जगदंबेची परडी मागण्यासाठी! दोघांच्या हातातील परड्यात हळदी-कुंकवाचा दिलजमाव केलेला भंडारा होता. गळ्यात कवड्यांच्या माळा होत्या.

राजांचे ते रूप कैलास-पर्वतावरच्या जीवनविरक्त शिवासारखे दिसत होते! लाखो होनांची सोनरास ज्याच्या जामदारखान्यात दास्तानी पडली होती तो ‘शिवराज’ आज ‘योगिराज’ झाला होता! उमद्या अरबी घोड्यावरून धावणी घेणारा, सुवर्णमंडित पालखीतून गढचढी करणारा तो सह्याद्रीचा कुबेर, मावळी गोपगोपाळांच्या रांगड मनावर राज्य करणारा तो भोसलेकुळीचा ‘यादवराज’ जगदंबेचे भुत्येपण मिरवत पायी चालला होता! त्याच्याबरोबर त्याच्या अग्निवंत रक्ताचा वसा सांगणारा त्याचा फर्जंद शंभू चालला होता. उगवतीच्या सूर्याला विशाल आकाश संगती घेऊन चालते करते तसे ते दृश्य होते.

हरएक 'भोसला' जगदंबेचा जन्मानेच नामजाद 'भुत्या' असतो! हातात उदराची परडी देऊन ती त्याला जन्मरूपी चौऱ्याऐंशी लक्ष दारादारांत फिरवते! एका हातात परडी आणि दुसऱ्या हातात पट्टा देऊनच भवानी त्याला जन्माला घालते! ही परडी मागितली की अंबा ती इमानी चाकरांच्या प्रसादाने शिगोशीग भरून देते! मरण गाठीशी बांधणारे, आपल्या वाहनाच्या वाघासारखे बेडर काळीज देते! भोसल्याने भुत्या म्हणून भवानीची परडी मागण्यात कसले शरमिंदेपण?

राजगडावरच्या झाडापेडांवरच्या पक्षीलोकांचा जमाव किलबिलत जागा होऊन आभाळात झेपा घेऊ लागला. पहाटवाऱ्यावर नौबतीची दुडदुड स्वार झाली.

बालेकिल्ल्याच्या तर्फेला असलेल्या सोनोपंत डबिरांच्या वाड्यासमोर सडासंमार्जित अंगणात श्रींच्या राज्याचा आणभाक बांधील 'श्रीमंतयोगी' आपल्या बच्च्यासह उभा ठाकला! परडी सावरून राजांनी उदेकार केला – "आईचा ऽऽ उदे ऽऽ!"

शंभूबाळांनी तो उचलून धरला, "भवानीचा ऽऽ उदे ऽऽ!"

डबीरांच्या वाड्यावरच्या देवडीवाल्याने धावत जाऊन खासे राजे बाळराजांच्यासह आल्याची वर्दी सोनोपंतांना दिली. पंत लगबगीने वाड्याच्या हमचौकात आले. सामने राजांना बघून ते गडबडून गेले. अदबमुजरा घालून ते खालगर्दनीने कसेतरी म्हणाले, "आज्ञा झाली असती तर सेवक सदेवर रूजू झाला असता. राजांनी आत यावं."

"नाही पंत, आम्ही आज – या क्षणी राजे नाही. आईचे भक्त म्हणून तुमच्या जाणत्या उंबरठ्यासमोर परडी मागायला आलेले भुत्ये आहोत. आजची मर्यादा उंबरठ्यापर्यंतच! शिधा वाढा." राजांनी एक हात शंभूच्या खांद्यावर ठेवून दुसऱ्या हाताने परडी पुढे केली. शंभूंनी आपल्या दोन्ही हातांतील परडी पुढे सरशी केली.

सोनोपंतांचे मन ते बोल ऐकून भरून आले. त्यांनी पायगतीची नजर उठवून राजांच्यावर जोडली. समोरचे थोर 'शिवपण' आणि धाकुटे 'शंभूपण' बघताना त्यांच्या उतार डोळ्यांत पाणकळा तरळली. पंतांना क्षणभर वाटले तडक समोर जावे आणि राजांच्या अनवाणी पायाची सडक, रक्तजागती, सतेज बोटे त्यांवर मस्तक ठेवून डोळ्यांतील पाणकळ्याने साफ साफ धुऊन काढावीत.

पंतांनी वाड्यात जाऊन तांदूळभरले तबक आणले. ते दगडी उंबरठ्यावर ठेवून एक ओंजळ भरून घेतली. राजांच्या शांत मुद्रेकडे, तलवारीच्या पात्यासारख्या बाकदार नाकाकडे भरल्या नजरेने पाहत सोनोपंतांनी ओंजळ राजांच्या हातातील परडीत उतरविली. उगवतीला सूर्योदय झाला होता. आभाळ तळपत्या सूर्याच्या ओंजळीने सोनकिरणांचे वाण मावळमुलखाच्या परडीत घालू लागले होते!

पंतांनी वाकून शंभूबाळांची परडी ओंजळीने भरली. त्यांच्या मळवटावर परडीतील भंडाऱ्याची बोटे पुसत बाळराजे म्हणाले, "भवानी आईचा ऽऽ उदं!"

राजे आणि शंभूबाळ सोनोपंतांच्या वाड्याच्या अंगणातूनच परतले. त्या दोन भक्तांना

पाठमोरे बघताना पंतांचे डोळे एवढे भरून आले होते की, त्यांना त्यांच्या आकृती दिसतच नव्हत्या. दिसत होता तो फक्त गड उजळणारा प्रकाश!

नेताजीराव पालकर, मोरोपंत, येसाजी कंक, आण्णाजी दत्तो अशा ओळखी चार जाणत्यांच्या वाड्यांसमोर परडी मागून राजे आपल्या खाजगीच्या महालाकडे परतते होते. त्यांना शंभूबाळांसह भुत्याच्या वेषात परतताना पाहून उन्हात उजळून निघालेला, राजगडाला ऐटदार फेर भरलेली 'गडमाची' स्वत:लाच म्हणत होती – "आदिशक्तीचे हे कवतुक बघायला आज सईबाई पाहिजे होत्या!"

उन्हतापीचे दिवस आले. राजे वर्धनगडाकडे जायला निघाले. मासाहेब आणि शंभूबाळांचा निरोप घेऊन त्यांनी राजगड सोडला.

शंभूबाळांना आता घोड्याचा लळा लागला होता. रायाची आणि अंतोजी गाडे बाळराजांना स्वत:संगती घोड्याच्या पाठीवर घेऊन रपेटीचा सराव होण्यासाठी त्यांची मांड तयार करून घेत होते. महमद सैस हा घोडेपारखी अरब त्यांना घोड्याच्या लकबीची पछान करून देत होता. कायदे केव्हा आखडावेत, केव्हा ढिले टाकावेत याची जानकारी देत होता. राजांची कृष्णा, कबुतरी, तुरंग, विश्वास, बिजली ही घोडी शंभूबाळ आपल्या हातांनी कायदे ओढीत खेचून नेऊन ती पागेत ठाण करू लागले.

घोडा हे जनावर बाळराजांना प्यारे झाले. त्याच्या रंगचमक खुब्याजवळ थाप मारताच त्याच्या सतेज कातड्याची होणारी थरथर पाहून बाळराजांचे बालमन थरकून उठू लागले. वाऱ्याच्या झकमकीबरोबर टाकोटाक कान टवकारणारा घोडा, स्वाराने टाच भरताच आघाडीचे दोन्ही खूर उंच उठवून अंगभर खिंकाळणारा घोडा, गडउतार होताना सावध चालीने जपून एक एक खूर उचलून तोल सावरणारा चतुर घोडा, मान तिरकस वाकडी करून खाली घालत चौपाट सुसाट धावगी धरणारा घोडा, पागेत ठाणबंद असताना डोळे मिटून चंदी चघळत ध्यान धरणारा घोडा अशी घोड्यांची कितीतरी रूपे शंभूबाळांच्या राजमनावर टांकसाळीतल्या सोनेरी होनावर उमटणाऱ्या मुद्रेसारखी खोल रुजून बसली.

गोमाजीबाबा पानसंबळ 'धाकल्या राजांना' तलवारीची मूठ कशी पेलावी, हाती पट्टा कसा चढवावा, भालाफेकीचा धावता मोहरा अचूक कसा साधावा, पट्ट्याचा चौक फिरताना ढाल आडवी टाकून वार कसा तटवावा, विट्याचे पाते दूर फेकून लगीतच पुन्हा मागे कसे घ्यावे यांची जुजबी टिगळ देऊ लागले.

जिजाऊ आपल्या बाळराजांना रामायण-महाभारतातील भुजबळ, निधड्या असामींच्या कथा सांगू लागल्या. बाळराजांच्या चौकस सवालांना मायाभरले जाब देऊन त्याचे समाधान करू लागल्या. चक्रव्यूहात एकाकी लढत खेळणारा अभिमन्यू, उमर कवळी असता बळजोर कंसाच्या छातीवर मांड ठोकून बसणारा श्रीकृष्ण, बकासुराची पाठ तिंबून त्याला ताराज करणार हत्तीजोड ताकदीचा भीम, मत्स्यभेद करणारा धनुर्धारी

अर्जुन, धरतीने फितवा करून फसविलेले रथचक्र उठविण्याच्या खटपटीत असलेला कर्ण, पंख तुटेपर्यंत रावणाशी झुंज घेणारा इमानबंद जटायू, पादुकांचा प्रसाद घेऊन रामचंद्रांकडून परतलेला भरत, कैकयीच्या कारस्थानी मनसुब्याने अयोध्येच्या मुलखाला परागंदा झालेला राम, लक्ष्मण, सीता या साऱ्या असामी बाळशंभूच्या मनाच्या सदरेवर दाखल होत होत्या!

थंडीचे दिवस सरतीला लागले. राजे मोहिमेवरून राजगडावर येत असल्याची वर्दी आली. पेणभागात मिऱ्या डोंगराजवळ राजांची आणि शास्ताखानाचा सरदार नामदारखान याची गाठ पडली होती. लढाईच्या चकमकीत राजांचे कृष्णाजी बाबाजी हे सुभेदार कामी आले. वाघोजी तुपे जाया झाले होते.

त्यांचा विचार मनात घोळत असतानाच राजे राजगडावर आले.

आणि याच दरम्यान बरेच दिवस मनात घोळत असलेली एक पुरानी ख्वाइश औरंगजेबाने दिल्लीत बसून पुरी करून घेतली!

ग्वाल्हेरच्या अदबखान्यात असलेल्या आपल्या कैदी भावाला– मुरादला मुल्लामौलवींच्याकडून खुनी ठरवून त्याला कुराणे शरीफच्या कौलाने 'सजा-ए-मौत' बहाल केली. तुरुंगात खितपत पडलेल्या मुरादला दोन जल्लादांनी साखळदंडासकट बाहेर काढला. त्याच्यावर मौलवींनी अहमदाबादच्या 'अलि नकी' या इस्लामी बंद्यांचा खून लादला होता. दिल्लीचा 'बादशहा' होण्यासाठी गुजराथ-सुभा सोडून औरंगजेबाला सामील झालेला मुराद, 'खुनी' म्हणून ग्वाल्हेरच्या रयतेला साखळदंडासह दाखविण्यात आला! मयूर सिंहासनाचे स्वप्न पाहण्याचा मूर्खपणा करणाऱ्या मुरादला ग्वाल्हेरच्या 'कत्तलीच्या चबुतऱ्यावर' चढविण्यात आले.

बकरी-ईदचे बकरे जेवढ्या जाहीर शांतपणाने तोडण्यात येतें तेवढ्या ठंडपणाने औरंगजेबाच्या जल्लादांनी मुरादची गर्दन ग्वाल्हेरच्या भर चौकात धडावेगळी केली!!

'शहजादा' मुरादचे प्रेत 'बागींच्या' म्हणजे 'बंडखोरांच्या' कब्रस्तानात दफन करण्यात आले!

दाराला पूर्वीच दफा करण्यात आले होते, आता मुरादला मारण्यात आले; पण या नाचिज बाबींचा परिणाम 'अबुल मुझफ्फर मुहिउद्दिन मुहम्मद औरंगजेब बहादुर आलमगीर पातशहा गाझी!' ही किताब्त लावणाऱ्या औरंगजेबाच्या खाजगी जिंदगीवर व्हायचे काहीच कारण नव्हते. मुरादला कत्ल केल्यापासून तीन महिन्यांच्या आतच त्याने आपला बच्चा मुहम्मद अकबर याचा औरंगाबादेत शाही थाटात दावत घालून 'सुंता' साजरा केला!

'औरंग' म्हणजे 'सिंहासन'! 'जेब' म्हणजे त्याची 'शोभा वाढविणारा' हेच खरं!! आपल्या नावाचा असा और मतलब फक्त औरंगजेबाच्या खानदानी शाही

रक्तालाच सुचणारा होता! शिवाजीसारखे 'काफर' सिंहासनाला 'गादी' म्हणत होते. त्या गादीची शोभा वाढविणाऱ्या गुणाला 'इमान' म्हणत होते! असला 'गावंढळ' मतलब औरंगजेबाला मात्र मुळीच मान्य नव्हता!

राजगडावर कदरेच्या सदरेसाठी मोरोपंत, अण्णाजी दत्तो, निळो सोनदेव, नेताजीराव, येसाजी अशी मंडळी जमली होती. सदरबैठकीवर राजे, जिजाऊ आणि शंभू सुखावले. राजांनी हाताने इशारत करताच सारी मंडळी बिछायतीवर बसली.

भंडारा उधळून राजांनी मनसुबा खुला केला–

"आमच्या कारभाराच्या कानुजाबत्यात काही फेर करणे आहे. ही सदर आम्ही त्या कारणे बोलावली. शास्ताखान पुण्यात तळ टाकून दौलतीच्या उरावर असता कारभाराचा गाडा हरबाबीत सावधहुषार असणे हिसाबी आहे.

आम्ही ज्या ज्या असामींचा कसकानोसा मनी धरला आहे त्यांचा मरातब करून त्यांना सल्ला म्हणून मनची बात बोलू.

हे राज्य श्रींचे. आम्ही श्रींचे भुत्ये म्हणोन एका हाती पोत आणि दुसऱ्या हाती पट्टा घेतला आहे. जे अंगेजणीने अवघियांच्या पाठबळावर आम्ही पैदा केले ते आबादान करून त्याहून अधिक राज्याचा घेर कैसा वाढेल याची चिंता साऱ्यांनी करणे आहे.

ज्यांचा आम्ही आज मरातब करतो आहोत त्यांनी बरे ध्यानी धरावे की पाठीवर मायेची थाप भरली तर धावणीचे मुके जनावरसुद्धा इमानाची स्वारीसंगत देते! मायेचा एक बोल दिला तर आमचा मावळा उभं काळीज पायावर टाकण्यास रजाबंद होतो.

नवे राज्य उभे करणे कठीण. त्याहून जतन करणे महाकठीण आणि वाढीला लावणे तर महामुश्किल! हे देवाधर्माचे राज्य साऱ्यांनी तोलून धरिले पाहिजे! या राज्यासाठी जे जे कामी आले त्यांची याद जागती ठेवून त्यासाठी हिमतीने कस्त केली पाहिजे!

हाती सत्ता आली की माणूस बिघडणे बघतो. अधिक सत्ता आली की माणूस अधिक बिघडण्याचा खतरा असतो. अधिकार हे बंधन घालणाऱ्या लगामासारखे असतात. त्याचा कोणाही अश्रापाच्या पाठीवर ओढणेचा कोरडा होणे वाजवी नाही!

आम्ही तुमचे गुण पारखतो आहोत. तुम्ही आमच्या मावळलोकांचे गुण पारखले पाहिजेत! लहानथोर साऱ्यांनाच हातजोड देऊन, बसत्यास उठता, उठत्यास चालता आणि चालत्यास दौडता केला पाहिजे! अवघियांस कार्यी लावून जाणते राजकारण उभे केले पाहिजे!"

आबासाहेबांचे हे सारे बोल शंभूराजे एकचित्त होऊन ऐकत होते, मनी साठवीत होते. राजे बोलता बोलता उभे राहिले. त्यांनी आपल्या खाजगीच्या कारभाऱ्यावर नजर जोडून इशारत केली. एक मोठे तबक घेतलेल्या हुजऱ्यासह कारभारी राजांच्या तर्फेला पेश झाला.

मोरोपंत पिंगळ्यांच्यावर नजरेचा मोहरा धरून राजे बोलले– "मोरोपंत, सदरेसामने या!"

मोरोपंत लगबगीने उठले. उपरणे सावरीत ते राजांच्या समोर आले. मुजरा घालून, हात बांधीत, खालगर्दनीने अदबीत राजांच्या समोर उभे राहिले.

राजांनी हुजऱ्याच्या हातातील तबक तले जरीच्या नकसदार काठाचे सफेद उपरणे उचलले. मोरोपंतांच्या खांद्यावर ते चढवून सदरेकडे बघत राजे म्हणाले,

"आजपासून मोरेश्वर निळकंठ पिंगळे श्रींच्या राज्याचे पेशवे! आम्ही राज्यावर चालून येणारा गनिम आमच्या डोळ्यांनी पारखू आणि त्यास नतिजा देऊ. राज्यातील कारभार पंतांच्या जागरूक डोळ्यांनी बघू!"

मोरोपंत गहिवरून गेले. त्यांनी वाकून राजाच्या पायांना हात लावून तो आपल्या मस्तकाला टेकविला. त्यांना खांद्याली धरून वर उठवीत राजांनी त्यांच्या छातीला छाती भिडवीत त्यांची ऊरभेट घेतली. पंतांनी जिजाऊंना आणि शंभूबाळांना मुजरा घातला.

मोरोपंतांची मुजुमदारी राजांनी निळो सोनदेवांना दिली. आण्णाजी दत्तो प्रभुणीकर यांना सुरनिसीची वस्त्रे बहाल केली. 'पंडितराव' हे धर्मशास्त्र जाणणाऱ्या विद्वानासाठी नवे पद निर्माण करून ते रघुनाथभट्ट यांना दिले.

कदेरची ही सदर उठण्यापूर्वी राजांनी नेताजी पालकरांना सुपे भागात धामाधूम घालणाऱ्या नामदारखानाचा बंदोबस्त करण्याची कामगिरी जोडून दिली.

सदर उठली. "शास्ताखानास कोण हुन्नराने शास्त द्यावी" याचा विचार मनाशी झुंजवीत राजे आपल्या महालाकडे निघून गेले. जिजाऊंच्या संगती चालणारे शंभूराजे मात्र एकाच बाबीला मनात घोळवीत होते– "आबासाहेब केवढे साजरे बोलतात! बसल्यास उठता – उठल्यास चालता – आणि चालत्यास दौडता केला पाहिजे!!"

हुकुमाप्रमाणे नेताजीराव फौजबंद होऊन सुप्याजवळ नामदारखानाच्या फौजेवर तुटून पडले. हातघाईची चकमक उडाली. जोरावर असलेल्या खानाबरोबर नेताजींच्या शिबंदीचा निभाव लागला नाही. या चकमकीत खासे नेताजीच वर्मी जखमी झाले. त्यांनी माघार घेतली. नामदारखान आणि सरफराजखान नेताजींच्या पाठलागावर पडले, पण त्यांना हूल भरून नेताजी राजगडाच्या वाटेला लागले.

जाया झालेले नेताजी राजगडावर आले. राजांनी स्वत: त्यांच्या जखमा जातीने पाहिल्या. तबीबांना नेताजींच्या जखमा औषधी भरून आवळण्यास सांगून राजांनी नेताजींना विश्रांतीचा सल्ला दिला.

[illegible] सोबतच जाया झाल्यामुळे राजांचे हात आखडले. त्यातच पावसाला सुरुवात झाली. [illegible] आकाश मावळांवर कोसळू लागले. [illegible]गडावरच्या खासेमहालांच्या [illegible] पागोळ्या पाघळू लागल्या. लाल ओहोळ गड [illegible]रू लागले.

राजांनी या पावसाळ्यात वाकेनविसीची वस्त्रं गंगाजी-मंगाजी यांना बहाल केली.

पुरे पाच महिने धुडगूस घालून पावसाळा पळाला. बारा मावळांतून खबरा येऊ लागल्या. नामदारखानाने पुन्हा उचल खाल्ली होती. तो टप्प्यात येतील तो गावठाणं तसनस करीत चालला होता. रोहिडखोऱ्यातून कान्होजी जेध्यांचे चिरंजीव बाजी जेधे यांचे खानाच्या मुलुखमारीचे बयाजवार वर्णन करणारे पत्र आले.

त्याला उत्तर पाठविण्यासाठी राजे सदरेवर बसले होते. त्यांच्या शेजारी जिजाऊ आणि शंभू बसले होते. बाळाजी आवजी हे चिटणीस राजांच्या तोंडून फुलणाऱ्या मजकुराची फुले लेखणीने कागदावर रचीत होते. राजे एकसुरात मजकूर सांगू लागले.

"बनाम सर्जाराऊ जेधे देशमुख तपे रोहिडखोरे प्रति राजश्री सिवाजीराजे–

मोगल प्रस्तुत तुमच्या तपियात धावणीस येताती म्हणोन जासुदांनी समाचार आणिला आहे. तरी तुम्ही तमाम आपले तपियात गावाचा गाव ताकिदी करून माणसे लेकरेबाळे समेत तमाम रयेति लोकांसि घाटाखाले बाका जागा असेल तेथे पाठविणे! जेथे गनिमाचा आजार पहुचेना ऐशा जागीयासि पाठविणे...

गनीम दुरून नजरेस पडताच त्याचे धावणीची वाट चुकउनु पलोनु जाणे!"

बाळाजी आवजींनी पत्र पुरे केले. राजांचा दस्तुर घेऊन त्यावर शिक्कामोर्तब केले. पत्र थैलीत घालून तिचा फासबंद आवळला.

राजांच्या तोंडून पत्राचा मजकूर ऐकताना एका बोलाचे चांगलेच शिक्कामोर्तब शंभूबाळांच्या मनावर पक्के झाले होते. "गनीम दुरून नजरेस पडताच त्याचे धावणीची वाट चुकउनु पलोनु जाणे!"

सर्जेराव जेध्यांना रयतेच्या सुरक्षिततेसाठी 'पलोनु जाण्याचा सल्ला' जरी राजांनी दिला तरी स्वत:साठी मात्र शास्ताखानाच्या पुण्याच्या सव्वालाखी सैतानी गोटात 'घुसोनु जाण्याचा' बेत निवडला! आता घुसणेच भाग होते. भाग होते पण सोपे नव्हते! राजे रात्रंदिवस त्याचाच विचार करीत होते.

हुताशनी पौर्णिमेची रात्र राजगडावर थाळ्याएवढा अंगफुलता चंद्र घेऊन उभी राहिली. होळीच्या मानकऱ्यांनी कानंदखोरीत फिरून ऐनाचे चखोट-उंच झाड तोडून ते गडावर आणले. त्याची होळी आंब्याच्या डहाळ्यांनी सजवून ती होळीचौकात उभी केली. घरट्याघरट्यांत पोळीवर ताव मारलेले मावळे पगड्यांवर चांदणे घेत होळीचौकात जमाव करू लागले. पुनवेच्या फुलत्या चांदण्यात हलग्यांची कातडी तडतडत फुलू लागली.

चौकात जळाऊ लाकडांचा भला थोरला हुडवा रचला होता. खासे राजे चौकात येऊन त्या हुडव्याला जळता चूड लावून होळी पेटती करणार होते.

राजे खासा पेहराव करून फर्जंद शंभूसह जिजाऊंच्या महालात आले. जिजाऊंची पायधूळ घेऊन राजे बालेकिल्ल्यावरच्या होळीचौकाकडे चालले. त्यांच्या तर्फेने बाळाजी

आणि चिमणाजी नऱ्हेकर, मोरोपंत, नेताजी, फिरंगोजी, येसाजी, केदारजी जेधे, सिदोजी थोपटे अशी मंडळी चालली. शंभूबाळांचा हात राजांनी आपल्या डाव्या हातात धरला होता. तांबूलविड्याच्या पानावर पाठभर चुन्याची शिकल चढावी तसे गडमाथ्यावर दाट चांदणे पसरले होते! त्या चंदेरी पायघडीवरून सोन्याच्या दोन घडीव मूर्ती चालाव्यात तसे राजे आणि शंभू चालले होते.

सरंजामासह राजे होळीचौकात आले. हलग्यांची थरकती तडतड खामोश झाली. मावळ्यांचा चंदेरी गलका थांबला. राजांनी हातात पेटता चूड घेऊन क्षणभर नजर जोडली. त्या नजरेने तो पेटता चूड अधिकच धगधगला! 'जय जगदंब!' म्हणत हातचा चूड राजांनी होळीच्या रचलेल्या लाकडी हुडव्याला भिडवला.

मावळ्यांनी "हरऽहरऽम्हादेव!" च्या किलकाऱ्यांची होळीच होळी उभी केली! हुडवा पेटता झाला. तोंडाच्या हलग्यावर पालथ्या मनगटांच्या टिपऱ्या पडून चढ्या आवाजीत घुमल्या!!

खाशांसाठी उभारलेल्या चौथऱ्याच्या बैठकीवर राजे शंभूसह विसावले. होळीच्या तांबड्या पिवळ्या प्रकाशात, माथ्यावर ढळणाऱ्या चांदण्यांच्या अस्मानी चवरीमुळे ती दोन रूपे इंद्रपुरीच्या दरबारातील मानकऱ्यांसारखी दिसत होती!

पेटत्या हुडव्यात नारळाची मानकरी फळे फेकली गेली. पुरते जळण्यापूर्वी ते नारळ होळीच्या रसरसत्या निखाऱ्यातून अल्लाद बाहेर काढण्यासाठी धाडसी, जवान मावळ्यांनी होळीभोवती रिंगण धरले!

एकेकटा मावळा थेट धगीजवळ जात बेधडक फुलल्या निखाऱ्यांत हात घालू लागला. नारळ काही हाताशी येत नव्हता. घातल्या हातावरचे राकट केस मात्र राख होऊन धगीत मिसळत होते. होळी कुणाला जवळ घ्यायला तयार नव्हती. लाकडाच्या गाठी पेटता पेटता फाटकन ठणकत मध्येच फुटत होत्या. होळी आणि मावळे इरेसरीला पडले होते. होळी आपल्या उदरातील दान द्यायला तयार नव्हती. मावळे तिच्या निखाऱ्यांच्या आगपेटल्या गोटाला खणती लावून ते बाहेर काढण्यासाठी हट्टाला पेटले होते!

झेपावलेल्या एका सर्जा मावळ्याच्या हाताला निखाऱ्यातला नारळ एकदाचा लागला! नरड्याची घाटी फुलवून "जै भऽवानी!" गर्जत त्याने होळीच्या उसळत्या आगज्वाळेएवढी बेभान उंच उसळी घेतली. पाय भुईवर टेकताच हातातला नारळ दाणकन् भुईवर आपटत त्याने त्याच्या ठिकऱ्याच ठिकऱ्या उडविल्या. त्याचा तळवा नारळाच्या तापल्या करवंटीने पोळून निघाला होता. पण उरात पेटते काळीज असणारे पोळत्या तळव्याचा हिसाब धरीत नसतात!

"व्वारे वाघा, भले रे माज्या भाद्दरा!" म्हणत भवतीच्या मावळ्यांनी त्याला उचलून थेट खांद्यावरच घेतले. इतर होळकरांनी चौफेर उधळलेला, चटका देणाऱ्या

खोबराखंडांचा प्रसाद झोंबी खेळून हा हा म्हणता मट्टही केला. सिदोजीरावांनी त्या मावळ्याला राजांच्या सामने अभिमानाने पेश केले. बैठकीवरून उठून राजांनी त्याचे खांदे थोपटले. त्याच्या हातात होळीच्या मानाचे सोनकडे भरले. सोन्याच्या हातांनी सोन्याचे कडे भर चौकात भरून घेताना त्या मावळ्याला जिवाचे सोने झाल्यासारखे वाटले!

हुताशनीचा चंद्र पेटती होळी बघत चढतीला लागला. राजे सुख होण्यासाठी होळीचौकातून शंभूसह आपल्या महालाकडे परतू लागले. जाम्यावर कंठ्याचा लाल गोंडा रुळणाऱ्या त्यांच्या जिम्मेदार पाठीवर पांढरधोट चांदणे पसरले होते. मात्र राजांच्या मनात विचारांचा हुडवा पेटला होता! ते मनसुबा बांधीत होते.

"गनिमाची होळी पेटवून त्याच्या गोटाच्या आगभरल्या निखाऱ्यातून यशाचा नारळ अल्लाद बाहेर काढायचा असेल तर... तर आता रिंगणात उतरलेच पाहिजे. जळत्या निखाऱ्यात हात घातलाच पाहिजे!!"

त्यांचा हात धरून चालता चालताच शंभूबाळांनी त्यांना विचारले, "आबा, तुम्ही काढाल होळीच्या जळत्या हुडव्यातला नारळ?"

राजे हसले. टोप डोलवीत स्वत:शीच बोलल्यासारखे पुटपुटले, "कोशीश करू!"

रामनवमी आली. पहाटस्नान केलेले बाळराजे धाराऊसह जिजाबाईंचे पायदर्शन करून राणीवशातील साऱ्या आऊसाहेबांना मुजरा करायला चालले.

धाराऊबरोबर ते सोयराबाईंच्या महाली आले. पुढे होऊन झटकन् वाकून बाळराजांनी सोयराबाईंच्या पायांना उजव्या हाताची बोटे लावून ती पुन्हा आपल्या कपाळाला भिडविली. त्यांना खांदे धरून वर उठवीत सोयराबाई धाराऊकडे बघत म्हणाल्या, "केवढी अदब! खरंच बाळराजांचं नाव रामराजे ठेवायला पाहिजे होतं!"

मंचकावर बसून सोयराबाईंच्या हातून केशरदुधाचा पेला घेताना बाळराजांना जाणवून गेला तो सोयराबाईंचा सतेज केतकी वर्ण. ते मनोमन आपल्या मासाहेबांची – सईबाईंची मुद्रा उभी करू लागले. पण ती नीटपणे त्यांना काही उभी करता येईना! फक्त एक धूसर सावळेपण नजरेसमोर येत होते. "खरोखर कशा दिसत होत्या आमच्या मासाहेब?" असा विचार करीत त्यांनी दुधाचा पेला आपल्या रक्तसतेज ओठांना लावला. त्यांना दूध पिताना पाहून धाराऊच्या मनी येऊन गेले की, 'रामराजं' नाव न्हाई त्येच ब्येस हाय! नाव नसता एवडं वनवास मग असल्याव किती!"

दूध पिऊन पेला चौरंगावर ठेवत "येतो आम्ही" म्हणत महालाबाहेर पडणाऱ्या पाठमोऱ्या शंभूबाळांना बघताना सोयराबाईंच्या राजमनाला जाणवून गेले की, "आमच्या पदरी नाहीत तुमच्यासारखे बाळराजे, नाहीतर आम्ही नक्कीच त्यांचं नाव रामराजे ठेवलं असतं!"

सोयराबाईंच्या महालातून शंभूराजे धाराऊसह पुतळाबाईंच्या महाली आले. पुतळाबाई देव्हाऱ्यातील राममूर्तीवर फुले चढवून डोळे मिटून हरवल्यागत पाटावर

बसल्या होत्या. त्यांचे निवांतपण भंग होऊ नये म्हणून बाळराजे त्यांच्याकडे एकजोड बघत तसेच उभे राहिले. थोड्या वेळाने पुतळाबाईंनी डोळे उघडले. दोन्ही हात जोडून ते कपाळाला भिडविताना त्या काहीतरी पुटपुटल्या. पुढे होत पुतळाबाईंच्या सोनपुतळ पायांना हात लावावेत म्हणून बाळराजे म्हणाले, "आम्ही पायधूळ घेतो आहोत मासाहेब!"

"उठा." लगबगीने पाटावरून उठत पुतळाबाईंनी, पायांना हात लावण्यापूर्वीच बाळराजांना वर उठविले. त्यांच्या खांद्यावर हात ठेवून बरोबर चालत नेऊन त्यांना मंचकावर बसविले. देव्हाऱ्यासमोरचा सुंठसाखरेचा प्रसाद आणि एक फूल उचलून त्या बाळराजांच्याजवळ आल्या आणि म्हणाल्या, "घ्या. देवजन्माचा प्रसाद!" शंभूबाळांनी डाव्या तळहातावर उजवा हात घेऊन प्रसाद-फूल घेतले. दोन्ही हात तसेच वर चढवीत प्रसादावरचे फूल आपल्या कपाळावरच्या शिवगंधावर टेकविले. फूल डाव्या हाती घेऊन सुंठसाखर ओठांआड केली.

थोडा वेळ मंचकावर बसून महालभर नजर फिरविताना बाळराजांना वाटले की, "या महाली आले की देवाच्या राऊळात आल्यासारखं वाटतं!"

"येऊ आम्ही आऊसाहेब?" म्हणत बाळराजे मंचकावरून फरसबंदीवर उतरले.

"या." हसत पुतळाबाई म्हणाल्या. डाव्या मुठीत देवफूल घेऊन धाराऊसह महालाबाहेर पडणाऱ्या पाठमोऱ्या बाळराजांना बघताना पुतळाबाईंच्या वत्सल मनाला जाणवून गेलं की, "बाळराजे, तुम्ही समोर असलात वा नजरेआड असलात तरी हुबेहुब स्वारींची याद देता! आम्हास आपलेच वाटता!!"

चिमणाजी आणि बाळाजी नऱ्हेकर राजगड चढत होते. त्यांच्यापासून सर्जेराव जेधे, नेताजी, मोरोपंत, तान्हाजी यांनी घेर धरलेली राजांची पालखी गड चढून येत होती. पाली दरवाज्यावरची गडचढीची नौबत दुडदुडली. जिजाबाई बाळराजांना घेऊन बालेकिल्ल्याच्या दरवाज्याप्रर्यंत राजांना सामोरे जाण्यासाठी आल्या. रामनवमी होऊन पाच दिवस झाले होते.

कुणाच्या ध्यानीमनीही नसेल असा अजब हिमतीचा हुन्नर लढवून राजांनी शास्ताखानाचा कोलदांडा एकाच झटक्यात पुण्याच्या तळावरून उखडून काढला होता.

कोंढाणा सोडून राजे कात्रजच्या रानात गेले. त्यांनी पुण्याच्या उगवतीला नेताजी व मावळतीला मोरोपंत यांच्या घोडदळाच्या फौजफळ्या पेरल्या. चखोट, निवडक असे कुल शे-दीडशे पटेकरी संगती घेतले. वेष पालटून खासे राजे आणि त्यांचे धारकरी एका लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर रणहलग्यांच्या तालावर लेझीम खेळत पुण्यात शास्ताखानाच्या ऐन गोटात घुसले.

लालमहालाचा कानाकोपरा माहीत असलेल्या राजांचे बालपणीचे खेळगडी

चिमणाजी आणि बाळाजी बरोबर होते. रमजानच्या उपवासाने शास्ताखान आणि त्याचे खिदमतगार रात्री निसूर होणार हे राजांनी केव्हाच हेरून ठेवले होते. मध्यरात्रीनंतर एका खिडकीचे कुसव उकलून राजे, चिमणाजी आणि बाळाजी यांचे संगती पाठीवर नंगी हत्यारे पेटलेल्या मावळ्यांच्या फळ्या घेऊन लालमहालात घुसले. कापाकापीला तोंड फुटले. बेभान झालेले राजे दालनांमागून दालने मागे टाकीत शास्ताखानाने 'ख्वाबगाह' म्हणून निवडलेल्या दालनात घुसले. आणि टप्प्यात आलेला शास्ताखान एका वारातच जिवे घ्यावा म्हणून राजांनी डोळे विस्फारून हत्यार उचलून टाकोटाक वार केला, पण खानाने जिवाच्या आकांताने तेवढ्यात खिडकीतून छलांग घेतली. राजांनी केलेला वार खिडकीची महिरप पकडलेल्या खानाच्या हातावर सप्कन उतरला! त्याच्या तीन बोटांच्या बिन्नीच्या पेरांचे कंडके करून हत्याराचे पाते लाकडी महिरपीत रुतले! महिरप लाल करीत खानाच्या बोटांची पेरं फरसबंदीवर उतरली!

"या अल्ला ऽ!" म्हणून भयानक किंचाळत, ठिबकता हात झटकीत खान भिंतीच्या कडेकडेने वाकून पसार झाला. खानाचा बच्चा अब्दुल फत्ते या छाप्यात जिवे मारला गेला. जनानखान्यातील कैक रंगील्या बाहुल्या अंधारामुळे मावळ्यांनी गफलतीने कापून काढल्या. कही मावळे धारकरीही कामी आले. या धुंदळीची खबर भोवतीच्या गोटाला आता लागते आहे हे हेरून राजांनी साऱ्यांना परतीची इशारत केली.

"गनिम भाग गया ऽ! शैतानकी नस्ल ऽ पिछा करो ऽ! दीन ऽ दीन ऽ!" असे म्हणत राजांच्यासह मावळे धारकरीच लालमहालाच्या पिछाडीने बाहेर पडले! कोंढाण्याच्या रोखाने बेभान दौडू लागले.

पाठलागावर पडलेल्या गनिमाच्या घोडदळाला हूल देण्यासाठी काही बैलांच्या शिंगांना पेटते पलोते बांधून ते बैल राजांनी कात्रजघाटाच्या रोखाने पिटाळायला लावले! आणि राजे आडवाटेने कोंढाण्यावर सलामत पोचले.

लालमहालाच्या या छाप्याची हवी तशी छाप शास्ताखानावर पडली. तिसऱ्या दिवशीच पुण्याचा तळ जसवंतसिंगावर सोपवून शास्ताखानाने धास्त घेऊन पुणे सोडले. तीन वर्षे पुण्यात तळ टाकून, राजांचे दोन गड जिंकून, त्याबद्दल तीन बोटे गमावून, छाप्यानंतर तीनच दिवसांत खान पुण्याहून हलला!

बालेकिल्ला चढून आलेल्या राजांनी पुढे होत जिजाबाईंच्या पायांना हात लावला. शंभूबाळांनी पुढे होऊन राजांच्या आजानुबाहू हाताचे बोट पकडले. त्यांचा छोटेखानी हातपंजा आपल्या हातात घेत राजे हसून म्हणाले, "बाळराजे, आम्हास आख्खा नारळ नाही काढता आला हुडक्याबाहेर! फक्त शेंडीच हातास आली!"

शंभूबाळांच्या शिवगंधाला आठी पडली तसे राजांनी हसत त्यांची छोटी बोटे अत्यंत ममतेने हळुवार थोपटली!! आणि लालमहालातली शाहिस्तेखानाच्या हातची तीन बोटे कशी कापली याची हकीगत त्यांना सांगितली.

वैशाख आला. उन्हे तावणीला पडली. एका सकाळी बालेकिल्ल्यावरच्या पटांगण चौकात गोमाजीबाबा बाळराजांना काळ्या, घोटीव दगडी मल्लखांबावर दशरंग फिरकीचा सराव देत होते. कमरेला छोटेखानी भगवो जांग असलेल्या शंभूबाळांचे उघडे अंग पिकल्या लिंबाच्या वाणाने तळपत होते.

गोमाजींनी आधाराची हातजोड देऊन बाळराजांना मल्लखांबावर चढते केले. पिवळाधमक धामण-सर्प कळकीच्या सोटावर गरगरते चलाख वळसे भरत चढावा तसे शंभूबाळ दशरंग फिरत मल्लखांबाचा बुंधा पार करीत सरासर वरच्या टोकापर्यंत चढले. खांबाच्या गळपट्टीला दोन्ही मांड्यांची कैची घालून त्यांनी हुशारीने नजर वर केली. त्यांना समोर बालेकिल्ल्याच्या सदरमहालाबाहेर पडणारे राजे दिसले! त्यांच्यामागून दोरोजी, नेताजी, येसाजी, तान्हाजी अशी मंडळी बाहेर पडत होती.

टाकोटाक झेप टाकून झटाझट उतरते दशरंग फिरत शंभूबाळ छलांग घेऊन मल्लखांबावरून भुईवर उतरले. पाय टेकताच राजांच्या रोखाने थेट दौडत सुटले!

"अवं धाकलं राजं, दम खा!" म्हणून हात पसरीत मागून साद घालणाऱ्या गोमाजीबाबांकडे त्यांचे ध्यानच नव्हते.

बालेकिल्ल्याच्या सदरदरवाज्याजवळ आलेल्या राजांना बाळराजांनी धापावता ऊर घेऊन गाठले. उघड्या अंगाच्या सतेज शंभूबाळांना सामने बघताना राजांना क्षणभर वाटून गेले की, "आमचे काळीजच कुणीतरी सोनरसात बुडवून आपल्या सावळ्या हातांनी आमच्यासमोर पेश केलं आहे!!"

राजांच्या मांड्यांना मिठी भरत बाळराजे लाघवी आर्जवाने म्हणाले, "आम्ही येऊ तुमच्या संगती धावणीला आबासाहेब?"

राजांना पेच पडला. ते कोकणस्वारीवर जाण्यासाठी गड उतरणार होते. शंभूबाळांच्या काळ्या-कुरळ्या, दाट केसावळीतून आपली अंगठीधारी सडक बोटे मायेने फिरवीत राजे म्हणाले, "आम्ही जरूर नेऊ तुम्हास धावणीला. पण अजून थोडे जाणते व्हा. जा. गोमाजी खोळंबलेत. मेहनत घ्या."

राजांचे पाय शिवण्यासाठी शंभूबाळ झुकते झाले.

आपल्या महालाच्या गवाक्षातून त्या दोघा पितापुत्रांना तसे बघताना जिजाबाई स्वत:शीच म्हणाल्या, "आमच्या या वैभवास कधी कुणाची दृष्ट न लागो आई अंबे!"

आणि तेच दृश्य आपल्या महालातून बघताना सोयराबाई स्वत:शी म्हणत होत्या, "बाळराजांना अदब कसली ती नाहीच!! सिधे उघडे स्वारींच्या समोर गेले, पण लबाड, दिसतात मात्र गोमटे. स्वारींची नको ती याद देतात ऽ!" आणि शेवटच्या चटक्याने

सदरदरवाज्याबाहेर पडणाऱ्या राजांच्याकडे सोयराबाई स्वत:ला हरवून नुसत्या डोळाभर बघतच राहिल्या!!

दसऱ्याचे पानसोने लुटून होताच राजांनी आपले कर्माजी, बहिर्जी, विश्वास, महादेव असे खबरगीर औरंगजेबाच्या गुजरात-सुभ्यात बेमालूम पेरले. त्यांनी मावळतीच्या दर्याला धरून असलेल्या सुरत बंदराची सारी सोनसूरत आपल्या चखोट नजरेने हेरून खडान् खडा खबर राजांच्या कानांत अल्लाद आणून सोडली.

दर्याला धरून शाही सुरत विसावली होती. समुद्रमंथनातून बाहेर पडताच विसावलेल्या संपन्न लक्ष्मीसारखी! राजांनी मोठाच मातब्बर मनसुबा रचला. सुरत लुटीचा!!

त्यासाठी पुण्यात तळ टाकून पडलेला जसवंतसिंग एका बगलेला काढल्याशिवाय सुरतेची वाट बिनघोरी होणार नव्हती. राजांचे कोंढाण्यावरचे मावळे जसवंतसिंगाच्या पुण्यातील गोटावर दिवसरात्र धाडसी छापे घालू लागले. चिडलेल्या जसवंतसिंगाने फौजेनिशी पुणे सोडले आणि कोंढाण्यालाच वेढा भरला! सुरतेची वाट मोकळी झाली!

शास्ताखानावरच्या छाप्याने एक विचित्र अफवा सगळीकडे पसरलीच होती, "शिवाजीला एक चेटूक सायवळ झाले आहे! तो पाहिजे तेव्हा 'गायब' होतो आणि मन चाहेल तेव्हा आणि तिथे अचानक 'खडा' होतो!"

खरोखरच राजांना चेटूक वश झाले होते! सह्याद्रीच्या काळ्या कातळांचे आणि इमानबंद मावळ्यांच्या कसदार काळजांचे चेटूक राजांना वश झालेच होते!! त्यांच्या जोरावर राजे आता 'गायब' न होता फक्त 'प्रकटच' होणार होते. मन चाहेल तिथे!

राजे सुरतेच्या रोखाने कूच व्हायचा दिवस आला. चंद्रा दासीने समोर धरलेल्या दर्पणात पाहून सोयराबाईंनी आपल्या कपाळी मेणमळल्या कुंकवाची दोन आडवी बोटे रेखून घेतली. दर्पणात पडलेल्या आपल्या देखण्या बिंबाकडे त्या नजरजोड बघतच राहिल्या. त्यांच्या केतकी वर्णाला आणि सरळ लालबुंद नाककळीला ते कुंकू फारच गोजरे दिसत होते. दर्पणातील त्यांचे बिंबच त्यांना सांगत होते. "ही कुंकवाची दोन बोटं म्हणजे आम्ही आणि स्वारी यांची निशाणी आहे!" आपल्या या कल्पनेवर सोयराबाई स्वत:च खुषदिल झाल्या.

"खाशी स्वारी येत आहे." वर्दीवाल्या कुणबिणीने त्यांच्या महालात येऊन वर्दी दिली आणि ती आल्या पावली माघारी परतली. दर्पण धरलेली चंद्रा दासी चौरंगावर दर्पण ठेवून लगबगीने महालाबाहेर पडायला निघाली. इतक्यात राजांनी हसत महालात प्रवेश केला. जिजाबाईंचे दर्शन घेऊन, साऱ्यांचा निरोप घेऊन ते आले होते. सोनेरी

जरीबतूंच्या कोयऱ्या असलेला निळाशार जामा त्यांच्या अंगावर होता. मस्तकावरचा केशरी टोप त्यावर एकदम उठून दिसत होता.

भिंतीकडेला अदबीने सरकलेली दासी राजे आत येताच पदर सरसा करीत चटक्या पायांनी बाहेर निघून गेली. काही क्षण तसेच गेले. महालाच्या खिडकीवाटे येणारा कसलातरी अस्पष्ट कलकलाट तेवढा ऐकू येत होता.

राजे मंचकावर बसले. सोयराबाईंनी केशरदुधाचा पेला त्यांच्या हाती दिला. दुधाचा एक घोट घेऊन सोयराबाईंच्या देखण्या अंगलटीकडे बघत राजांनी त्यांना विचारले, "बाळीबाई कुठं गेल्या?" बाळीबाई ह्या सोयराबाईंच्या कन्या जिजाबाईंच्या महालाकडे गेल्या होत्या.

"त्या आमच्याकडे रमतात कुठं? मासाहेबांच्या महाली असतील त्या!" सोयराबाई राजांच्याकडे तिरक्या नजरेने पाहत बोलल्या. राजांनी त्यांचा हेत हेरला. दुधाचा प्याला रिता करून ते हसत मंचकावरून उठले. खिडकीच्या महिरपीकडे जाता जाता बोलले, "रमविलं की सारे रमतात!"

महिरपीतून राजांना समोर घोड्यांच्या रपेटीचे मैदान दिसत होते. तिथे दोन मोतद्दार, एका उंच उमद्या जनावरावर मांड घेतलेला महमद सैस आणि एका तट्टाचे कायदे हातात धरून उभे असलेले शंभूबाळ दिसत होते.

मैदानामधल्या दगडी जोत्यावर एक पिकले लिंबू ठेवले होते. सैसने आपल्या मांडेखालचा घोडा मैदानाच्या एका कडेला काढला. मोहरा फिरवून घोड्याचे मुस्कट जोत्याच्या रोखाने मोहरेबाज केले. क्षणभर थांबून त्याने एकदम घोड्याला बळजोर टाच भरली. जनावर जोत्याच्या रोखाने चौटाप दौडू लागले. राजांनी कुतूहलाने नजर रोखली.

जोत्याजवळ येताच सैसने धावत्या घोड्याचे कायदे आखडून चालबदलीची वेगळीच टाच दिली. घोडा ऊर उचलून वर उसळला. उशी घेऊन जोते पार करताना त्याने पिछाडीच्या खुराने जोत्यावरचे लिंबू बिनचूक उधळून लावले!!

राजे न राहवून उद्‌गारले, "भले सैस." सोयराबाई ते ऐकून कुतूहलाने राजांच्या शेजारी आल्या.

दोन-तीन वेळा महमद सैसने तशीच अचूक घोडाफेक केली आणि मग पायउतार होऊन तो शंभूबाळांच्या जवळ आला. अदबीने वाकत म्हणाला, "अब ले लो सवारी छोटे राजासाब!"

बाळराजांनी आपल्या हातांतील तट्टाचे कायदे पेलून रिकिबीत डावा पाय भरला. उजवा पाय मात्र चलाखीने वर घेऊन बैठक जमविणे त्यांना साधेना. सैसने आपल्या दोन्ही हातांची बोटे एकमेकांत गुंफून कैची तयार केली. तिचा आधार बाळराजांच्या उजव्या पायाखाली देताच त्यांनी झेप घेऊन तट्टाच्या पाठीवर मांड जमविली. राजे आणि सोयराबाई उत्सुकतेने बघू लागले.

बाळराजांनी तट्टू मैदानाच्या एका कडेला काढले. मोहरा फिरविला आणि टाच भरली. जोत्याच्या रोखाने तट्टू दौडू लागले. जोत्याजवळ येताच कायदे आखडून बाळराजांनी चालबदलीची टाच दिली. उशी घेऊन तट्टू जोत्यापार झाले ... पण – पण लिंबू उन्हात तळपत तसेच जोत्यावर राहिले!! राजे ते पाहताना शिवगंध आक्रशीत गंभीर झाले. पदर तोंडाला लावीत सोयराबाई खुदकन हसल्या!

दोन-तीन वेळा शंभूबाळांनी तट्टासह जोत्यापार झेप घेतली, पण लिंबू काही ढळले नाही! राजे हैराण झाले. अस्वस्थ झाले.

पुन्हा दौड घ्यायला चाललेल्या बाळराजांच्या तट्टाची ओठाळी पकडीत सैस मोठ्याने म्हणाला, "छोटे मालिक, छलांग जम गयी. अब आँख जानवर पर मत रखना. रखना निंबूपर! फेकिये जानवर."

बाळराजांनी नजर लिंबावर जखडती ठेवून तट्टू पुन्हा फेकले. जोते जवळ येताच त्यांनी हवी तेवढी टाच तट्टाला दिली. उशी घेऊन जोते पार करताना तट्टाने पिछाडीच्या खुरांनी झटक्यात लिंबू दूर उधळून टाकले!!

न राहवून एकदम टाळी देत राजे बोलून गेले. "बहोऽत खूब!" त्यांचा चेहरा उजळून गेला. सोयराबाई मात्र गंभीर झाल्या.

बाळराजांचे तट्टू जोत्याच्या पार झाले, पणऽ पण खूर भुईला टेकविताना फसले आणि बाळराजांच्यासकट कोलमडून कोसळले!!

"या अल्लाऽ!" म्हणत भेदरलेला सैस दौडला आणि त्याने प्रथम बाळराजांचे पाय रिकिबीतून खुले केले. त्यांच्या अंगावरचा जामा झटकत तो म्हणाला, "जब घोडा फिसलता है तो पहले रिकिबका पैर खुला करने मत भुलना छोटे मालिक! नही तो डरा हुआ जानवर खडा होकर सवार को घिसटता साथ लेकर दिलचाहा दौडता है!! भोत खतरनाक!"

"हे असंच बाळराजांचं कोसळणं आम्हास रोजच दिसतं!" सोयराबाई पडल्या आवाजात राजांना म्हणाल्या.

"कोसळले तरी उठतात! जोत्यापार अचूक जनावर फेकतात! आम्ही येतो. बाळराजांचा निरोप घेणं आहे." म्हणत राजे सोयराबाईंच्या महालातून तरातरा चालत बाहेर पडलेही!

नेताजी, तान्हाजी, येसाजी, कुडतोजी यांच्यासह खुरचलाख घोडदळ घेऊन राजे सुरतेच्या रोखाने कूच झाल्याला दीड महिना लोटला. नेहमीप्रमाणे स्नान, देवपूजा आटोपून घेतलेल्या जिजाबाई बाळराजांना बरोबर घेऊन सदरेकडे चालल्या. त्या पांढऱ्या सफेत वाणाचा नेसू नेसल्या होत्या. कपाळी ठसठशीत दाट कुंकवाची आडवी बोटे होती. थंडी सरतीला आली तरी धुक्याची बाराबंदी काही राजगडाने बदलली नव्हती!

सदरेवर येताच नेहमीप्रमाणे हसत जिजाबाई हाताच्या इशारतीने "बसा मंडळी" म्हणत आपण जाऊन बाळराजांच्यासह सदरबैठकीवर बसल्या.

त्यांनी 'बसा' म्हटले तरी सदरेवरचे कुणीच खाली बसले नाही! रोजच्यासारखी तळपत्या डोळ्यांनी राजांच्या पराक्रमाची एखादी खबर सांगायला एकही ताठ गर्दन वर उठली नाही. साऱ्यांचे हात समोर बांधले होते. ते बघताच जिजाबाई चरकल्या. त्यांच्या मनाच्या देवटाक्यावर क्षणात असंख्य कुशंकांचा पालापाचोळा उतरला. थरकत त्या बैठकीवरून उठल्या. कातरल्या सुरात बोलल्या, "मंडळी, खामोशी का? सांगा, आमच्या राजांची काही गैर खबर तरी–" जिजाबाईंना पुरते बोलवलेसुद्धा नाही.

ते ऐकून सदरकरी चळवळले. सिदोजी थोपट्यांनी कशीतरी मान वर करून सांगितले, "न्हाई, राजं ब्येस हाईत, सुरत लुटून परतीच्या वाटंला लागल्यात. परऽऽ" सिदोजींच्या रांगड्या मनाला पुढे काय नि कसे बोलावे तेच कळले नाही. त्यांनी पुन्हा गर्दन खाली टाकली. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले.

बैठकीवरून उठून बाळराजे जिजाऊंच्या जवळ आले. त्यांचा हात धरून बिलगते उभे राहिले.

"मग काय असेल ते पेश करा." जिजाबाई समाधानाने म्हणाल्या. पण सदरभरची भयानक शांतता तशीच राहिली. कुठलीच गर्दन वर उठेना. शेवटी मुजुमदार निळोपंत खालमानेने कसे तरी म्हणाले, "मासाहेब, बंगळूरहून बिगरपगडीचा थैलीस्वार आला आहे!"

"मतलब?" जिजाऊंच्या कपाळीचो आडवी कुंकुमबोटे क्षणात आक्रसली!!

"थोरले महाराज बेदनूर प्रांतात मोहिमेवर असताना होदिगेरीच्या रानात शिकारीला गेले, सावजाच्या पाठलागावर पडण्यासाठी महाराजांनी घोडा फेकला आणि ...." पंत घोटाळले.

"आणि ... आणि काय पंत?" जिजाबाई कळवळून कशातरीच बोलल्या.

'आणि महाराजांचा दौडता घोडा एका खळग्यात फसला! रिकिबीत पाय अडकलेल्या महाराजांची फरफट झाली. मासाहेब, थोरले महाराऽज. थोरले महाराऽज आम्हा साऱ्यांना सोडून गेऽले!!' निळोपंतांनी उसळलेला हुंदका तोंडावर उपरणे घेत दाबण्याचा यत्न केला. सदरेवरच्या पगड्यांखालच्या कैक डोळ्यांतून टपटपणारे अश्रू ओघळले आणि उरावरच्या बाराबंद्यांत विरू लागले.

अंगावर वीज पडल्यासारख्या जिजाबाई समोरच्या शून्यात क्षणभर बघतच राहिल्या. नगरखान्यावरची निशाणकाठी वादळी वाऱ्यात थरथरावी तशी त्यांची उभी अंगलट थर-थर-थर हलू लागली. त्यांची सगळी जाणच जशी काही सुन्न सुन्न झाली. उघड्या डोळ्यांसमोर उभी सदर गरगरू लागली! 'न भेटता, न बोलता अशी कशी स्वारी पाठमोरी झाली?' असे तिडिकेने म्हणत जिजाऊंनी शंभूबाळांच्या हातातला आपला

हात झटक्यात वर घेतला आणि त्याचा तळवा कपाळीच्या कुंकवावरून आडवा ओढताना त्यांच्या सोशिक मनाचे देवटाके पुरते पुरते फुटून गेले. कोसळत्या अश्रुधारा घेत, पांढऱ्या नेसूच्या, फटफटीत कपाळाच्या जिजाऊ, थरथरत्या अंगाने आपले तोंड ओंजळीत झाकीत आत निघून गेल्या.

सदरेवर एकटेच उभे असलेल्या बाळराजांच्या कानांत महमद सैसची घोडेपारखी जबान घुमून उठली, 'जब घोडा फिसलता है तो रिकीबका पैर खोलने मत भुलना! नहीं तो ...' आणि ओघळते डोळे घेऊन घायाळ झालेले शंभूबाळ जिजाऊंच्या महालाच्या रोखाने धावत सुटले!!

जी पावले सदा डोळ्यांआडच राहिली त्यांचा माग घेत जाण्याचा निर्धार जिजाबाईंनी केला. मातुश्री आऊसाहेब सती जाण्याची तयारी करू लागल्या! उभा राजगड गडबडून गेला. आपल्या खाजगीच्या कारभाऱ्याला जिजाबाईंनी सतीची सूपवाणे सिद्ध करण्याची आज्ञा दिली. राजांच्या राणीवशात कल्लोळ माजला. एकाही राणीत जिजाबाईंना रोखण्याची हिंमत नव्हती. आपल्या महालाच्या बंद दरवाज्याआड हिरवे नेसवाण अंगावर चढविलेल्या, हिरवा चुडा हातभर भरलेल्या, मळवटावर भरगच्च आडवे कुंकू घेतलेल्या जिजाबाई फरसबंदीवर बसल्या होत्या. मोकळ्या झालेल्या माठासारख्या! त्यांची नजर शून्यात हरवून गेली होती. राजे सुरत लुटून परतीच्या वाटेवर होते.

राजगडावर एकच स्त्रीमन जीवघेण्या अस्वस्थतेने पुरते पुरते सैरभैर झाले होते. पुतळाबाईंचे. शंभूबाळांना संगती घेऊन त्या जिजाबाईंच्या महालाच्या मिटल्या दरवाज्यासमोर आल्या आणि त्यांनी बाळराजांना हाताने इशारत केली.

'थोरल्या आऊसाहेबऽ' पुढे हेत मिटल्या दरवाज्यावर हाताने हलकेच थाप देत बाळराजांनी साद घातली.

'आम्ही आहोत– शंभूबाळ. दरवाजा खोलता?" शंभूबाळांनी दरवाज्याजवळ तोंड नेत जिजाऊंना दिललगाव बोलात विचारले. ते थोडा वेळ थांबले पण आतून दाद आली नाही.

'थोरल्या आऊऽ, दरवाजा खोला. नाहीतर डोकं आपटू आम्ही दरवाज्यावर! खोला, आऊऽ दरवाजा खोला.' बाळराजे दरवाज्यावर थडाथड थापा देऊ लागले.

जिजाबाई थरारल्या. 'खरंच बाळराजे दरवाज्यावर डोकं आपटायलाही अनमान करणार नाहीत!' या विचाराने त्यांचा सारा बांधला निर्धार डायाडौल झाला. कसंबसं उठतं होत त्यांनी दरवाजा खोलला. हिरव्यागर्द रानात वाट धुंडाळताना दमगीर झालेल्या आणि शेवटी थकल्या पायांनी एका खोल कड्याच्या तोंडावर आलेल्या गायीगत त्यांची स्थिती झाली होती!!

झटक्याने पुढे होत त्यांना मिठी घालत बाळराजांनी मान वर उचलली. त्यांच्या

टोपातील मोतीलग मागे ओळंबली. डोळ्यांतून मोती ओघळत असताना ते बोलले. बालभुत्याने जगदंबेला बोलावे तसे! 'तुम्ही – तुम्ही आम्हास सोडून जाणार थोरल्या आऊसाहेब? आम्ही – आम्ही येणार तुमच्या संगती!!'

ते ऐकताच जिजाबाईंचा ऊरबंद केलेला सारा कढ फुटून – उमळून आला. वाकून बाळराजांना मिठीत घेत जिजाऊ गद्गद हलत स्फुंदू लागल्या. त्यांच्या डोळ्यांतून उतरणारे अश्रुथेंब बाळराजांच्या टोपातील मोतीलगावरून ओघळत त्यांच्या जाम्यात मिसळू लागले.

"आऊसाहेब, आमचे आबासाहेब येईपर्यंत कुठंकुठंच जाऊ नका!" बाळराजांनी साकडे घातले. ओसरते हुंदके आवरताना जिजाबाईंनी मान डोलावली.

सती जायला निघालेल्या आऊसाहेबांना राजांची स्वारी येईपर्यंत रोखते करण्यात येश घेतलेल्या बाळराजांच्याकडे ममतेने बघत पुतळाबाईंनी आपल्या पापणीकडा पदराने पुसत्या केल्या!

सुरत लुटून राजे राजगडाच्या पायथ्याशी आले. सोने, चांदी, रत्ने, मोती त्यांच्या गोणी लादलेले विजयी घोडदळ त्यांच्या पाठीशी होते. पण नेहमीसारखे त्यांना सामोरे येण्यासाठी कुणीच गड उतरून आले नव्हते. राजांची उजवी भुवई कमानबाक घेत राजसंतापाने वर चढली.

घोड्यावरूनच त्यांनी आपली नजर उचलून राजगडाला जोडली. पद्मावतीच्या निशाण चौथऱ्यावरची निशाणकाठी भुंडी बघताना मात्र त्यांचा राजसंताप कुठच्या कुठे गेला. चढली भुवई क्षणात पडली. त्यांच्या विजयी मनाच्या उभार घोड्याला शंकांच्या असंख्य लगामांनी क्षणात जखडून टाकले. त्यांच्या धीराच्या, निधडेपणाच्या गोणी कुणीतरी आपल्या काळ्या केसाळ हातांनी क्षणात आवळून टाकल्या.

कपाळीचे शिवगंध आक्रशीत राजे पायउतार झाले. पालखीत बसून राजगड चढू लागले. पालखी पाली-दरवाज्यापार होताना कधी नव्हे ती गडचढीची नौबत खामोश झालेली त्यांना जाणवली. मनात कुशंकाच कुशंका घर करू लागल्या.

सारे महाल मागे टाकीत राजे जिजाबाईंच्या महालासमोर आले. सुरतेच्या कैक अन्यायी मुजोर धनिकांच्या वाड्याहुड्यांचे दरवाजे फोडत बेधडक आत घुसणाऱ्या राजांनी, जिजाऊंच्या महालाचा बंद दरवाजा लोटला. अत्यंत थरथरत्या हाताने!

आत फरसबंदीवरच्या बिछायतीवर सतीवेष घेतलेल्या जिजाबाई बसल्या होत्या. त्यांच्या दोन्ही तर्फेला पुतळाबाई आणि बाळराजे बसले होते.

दरवाज्याच्या कुरकुरीमुळे मान वर केलेल्या जिजाबाईंनी समोर राजे दिसताच उभ्या राजगडाचेही काळीज पिळवटून निघावे असा कंठ फोडला – 'शिवबा ऽऽ आमचं कपाळ फुटलं!! तुमचे महाराजसाहेब गे ऽ ले!!' भूकंपाने सर्वांदार सोशिक भुई थरथरते तशा जिजाबाई थरथरू लागल्या.

राजांना उभ्या अंगावर आपल्या शिसाचा रस ओतल्यासारखे झाले. दरवाज्यातच पाय जखडबंद झालेल्या राजांनी डोळे मिटत आपल्या बाकदार नाकाचा गड्डा उजव्या हाताच्या चिमटीत धरला. त्यांच्या मिटल्या डोळ्यांत शहाजीराजांची मूर्ती उभी ठाकली. तिचे पाय धूत त्यांच्या उरातले दुर्मिळ राजअश्रू दाढीवरून घसरून छातीवरच्या कवड्यांना जाब विचारीत जाम्यावर उतरू लागले. त्या वीरपुरुषाचे भोसलाई राजमन पाझरत होते. ओघळणारे अश्रुलोट महाराजसाहेब शहाजीराजांच्या नजरेआड झालेल्या पायांच्या ठशांचा माग घेत धावत होते. भरल्या नजरेने राजांनी जिजाऊंच्याकडे बघितले. अश्रूंच्या सफेद आडपडद्यातून त्यांना एक पुसट हिरवा उभा रंगपट्टा दिसू लागला! त्यांच्या उभ्या अंगावर सर्रकन काटाच उठला.

'कधी नव्हे ते हिरवे नेसवाण आऊसाहेब का नेसल्या?' हा शक उराच्या तळवटातून उसळून येताच, चारी पायांना दातेरी आकडेचाप लावलेला ताकदजोर हत्ती कळवळून उठावा तसे राजे कळवळून उठले. तर्जनीने आपल्या पापणीकडा झटकन् निपटत्या करीत राजे पुढे सरसे झाले. सूपवाणांकडे हात करीत त्यांनी जिजाबाईंना थरथरत विचारले, "मासाहेब, हे काय करताहात?"

"जिथं स्वारी तिथं आम्ही! आम्ही जाणार राजे – चितेच्या आगभरल्या मेण्यातून आम्ही तुमच्या महाराजसाहेबांच्या पायांशी जाणार!! आमच्या फुटक्या हातांनी आम्ही सतीवाणे देणार!" उभ्या हयातीत कधी बोलल्या नाहीत अशा जिजाऊ पिळवटून बोलल्या. निर्धाराने बोलल्या.

ते ऐकताना आपले सारे दौडते राजेपणच कुणीतरी उचलून चितेवर चढवीत आहे असे राजांना वाटले. पडल्या गडाच्या नगारखान्यावरचे निशाण उतरावे तसे राजांचे राजेपण क्षणात उतरले गेले. उरला फक्त जिजाऊंशी रक्तसंबंध आणि काळीज-गुंतवा असलेला 'फर्जंद शिवबा'! बंगरूळ सोडून मेण्यातून पुण्याच्या बरड जहागिरीत आऊसाहेबांच्या संगती आलेला, त्यांचा मायाभरला हात पाठीवर घेत पुण्यात नांगराच्या खुंटाळीला आपला हात घालणारा, त्यांच्या शिवसतेज हाताने आपल्या कपाळी शिवगंध रेखून घेणारा 'शिवबा'! केवळ शिवबा!

एरव्ही ताठ मानेने घोड्यावर मांड घेणारे राजे ढासळत्या मानेने आणि मनाने पुढे झाले. जिजाऊंच्या समोर गुडघे टेकून त्यांनी आपले शिवगंधी कपाळ झटकन् त्यांच्या मांडीवर टेकविले. गद्गद हलत, टोपावरच्या मोतीलगाला डावे-उजवे हिंदोळून टाकीत राजे स्फुंदून म्हणाले, "नका आऊसाहेब, आम्हास एकटे टाकून नका जाऊ! शंभूबाळांची हातजोड नका तोडू! आम्ही रायरेश्वरावर घेतलेली श्रींच्या राज्याची आण पुरी करणार आहोत. ते कोण बघणार? तुमच्या बाळराजांचे शंभूराजे झालेले कोण पाहणार? आजवर आशीर्वादांसाठी पायांना हात लावले. आज ही एवढीच भिक्षा मागण्यासाठी आम्ही तेच हात परडी म्हणून पसरतो आहोत!! आम्हास परते सारू नका!" राजांनी

गर्दन उचलली. ज्या हातांनी, पेटून उठलेल्या राजांनी कैकवेळा 'भवानी' उपसली होती त्याच हातांची ओंजळ जोडून राजांनी ती सरळ जिजाऊंच्या समोर पसरली! त्यांचे पाणथरलेले, सूर्यपेट निमुळते डोळे मासाहेबांच्या डोळ्यांना जोडले गेले. जिजाऊंच्या तुळजाई डोळ्यांतून सुटलेले अश्रू टपटपत राजांच्या ओंजळीत उतरू लागले. त्यांच्या उष्ण स्पर्शाबरोबर राजांना वाटत होते की, 'या हरएक अश्रुथेंबासाठी एक एक जिंदगी कुरवंडून टाकावी!!'

राजे असे पेश येतील हे ध्यानीमनी नसलेल्या जिजाबाईंचा बांधला निर्धार डायाडौल झाला. त्या घोटाळल्या. राजांनी पसरलेली ओंजळ आपल्या चुडाभरल्या हातांनी आवेगाने बंद करीत त्या म्हणाल्या, "नाही – राजे, हात पसरू नका! तुमच्या हातांची परडी आई अंबेनेच आपल्या हातांनी भरली असता – आम्ही तिच्यात काय घालावं? आम्ही – आम्ही थांबू... फुटल्या कपाळानेसुद्धा थांबू. या राज्यासाठी! तुमच्यासाठी! बाळराजांच्यासाठी! तुमच्या पाठीवर पडणाऱ्या संकटात आमच्या जाण्याने आम्ही आता भर नाही घालणार!" मासाहेबांनी डोळे पुसले आणि डाव्या हाताने सतीची वाणे परती सारली!!!

जिंकल्या गडाच्या नगारखान्यावरच्या चढत्या निशाणासारखे राजांचे मन उभारून आले! तरीही त्यांचे मन शहाजीराजांच्या आठवणीने तडफडत होते– चढत्या निशाणाच्या तडफडीसारखे!!

हे सगळे दाटल्या कंठाने खाली मान घालून ऐकणाऱ्या पुतळाबाई एकाच विचाराने जखडबंद झाल्या होत्या, 'सती जायला निघालेल्या मासाहेबांना आपले मन बांधताना कोण कष्ट झाले असतील!'

हे सारे भरल्या उराने समोर बघताना बाळराजांना दोन गोष्टी कळून चुकल्या होत्या की, 'आबासाहेबांचे डोळेही पाणावतात! आणि आम्ही मानतो– समजतो त्याहून थोरल्या आऊसाहेब केवढ्यातरी 'थोर–थोर' आहेत!!'

शहाजीराजे गेले ही खबर मावळमुलखात पसरताच राजांच्या भावकीतील मंडळी राजगडावर आली. त्यात शंभूबाळांचे मामा फलटणकर बजाजीराजे निंबाळकर आले होते. नातेबंधातल्या सर्व मंडळींसमोर राजांच्या मस्तकाचे मुंडन झाले. उतरल्या केशसंभाराच्या मस्तकाने आणि जडावल्या मनाने राजांनी शहाजीराजांची दिवसकर्मे शास्त्रयुक्त विधींनी पार पाडली.

ते विधी समोर बघताना शंभूबाळांची एकच एक कोशिस चालली होती. कधीच न बघितलेल्या आपल्या थोरल्या महाराजसाहेबांची मूर्ती कल्पनेने ते मनोमन रेखू बघत होते! पण ते साधत नव्हते! कितीही कोशिस केली तरी त्यांच्या मनासमोर मूर्ती उभी ठाकत होती ती आबासाहेबांचीच!

शेवटी एके दिवशी जिजाऊंच्या महाली त्यांची पायधूळ मस्तकी घ्यायला आलेल्या शंभूबाळांनी त्यांना विचारले, 'कसे... कसे दिसत होते आमचे थोरले महाराजसाहेब थोरल्या आऊ?'

भरल्या डोळ्यांनी बाळराजांकडे बघताना कधी नव्हे ते जिजाबाईंना आज प्रथम भावून गेले की, 'शंभूबाळांचा तोंडवळा थेट आमच्या स्वारीसारखाच आहे!! नाक-भुवयांची तशीच ठेवण, कपाळाची तशीच भरदार आडवी मांडण आणि आतबाहेर सारख्याच साफ असलेल्या, रानभेरी डोळ्यांच्या बाहुल्यांचे तसेच साफ दर्पण!'

बाळराजांना आवेगाने जवळ घेताना जिजाऊंना म्हणावेसे वाटले की, 'शंभूबाळ, तुम्ही थेट तुमच्या थोरल्या महाराजसाहेबांच्या सारखेच दिसता.' पण त्या काहीच बोलल्या नाहीत. प्रेमभराने त्यांनी बाळराजांचे खांदे पकडले आणि त्यांच्या नितळ डोळ्यांत बघताना जिजाबाईंना आपल्या हयातीच्या हरवलेल्या कैक पायवाटा त्यात दिसू लागल्या!!

बजाजीमामा फलटणला परतण्यापूर्वी मनची एक इच्छा राजांना बोलावी म्हणून त्यांच्या महाली भेटीसाठी आले. भेट-मुजरा रुजू करून ते राजांना म्हणाले, "आम्ही फलटणला परतावे म्हणतो राजे. इजाजत होईल तर संगती बाळराजांना घेऊ. त्यांना तेवढाच कुटुंबपालट होईल. कसं करता?"

बजाजींच्याकडे बघताना राजांना सईबाईंची आठवण झाली आणि जाणवून गेले की, 'शंभूबाळांनी आपले आजोळ पाहिलेच नाही. आम्ही आमच्या आजोळाला– सिंदखेडला पारखे झालो. बाळराजांचं तसंच व्हायला नको!' क्षणभर विचारात हरवल्यागत थांबून राजे बजाजींना म्हणाले, "जरूर घेऊन चला बाळराजांना बजाजी. पण मासाहेब काय म्हणतात ते बघा. गड सोडताना बरोबर धाराऊ आणि अंतोजी-रायाजीला घ्या. हत्यारबंद धारकऱ्यांची शिबंदी संगती ठेवा. तुम्ही घरची माणसं. तुमचा काळीजगुंतवा आम्ही जाणतो. पण बाळराजांना परते पाठवताना तुम्ही जातीनिशी बरोबर असा."

'त्याची फिकीर नसावी राजे. उरात रक्ताची जाग आणि डोळ्यांत तेल ठेवून खासे आम्ही हमेशा त्यांच्या बरोबर राहू.' राजांनी होकार दिल्याने बजाजींना फार समाधान वाटले. फलटणचा आपला कबिला शंभूबाळांना बघताच कसा खुषनिहाल होईल याचे चित्र मनाशी रेखीतच ते राजांच्या महालाबाहेर पडले.

जिजाबाईंची संमती मिळताच बाळराजांच्या जाण्याची सगळी तयारी झाली. शुभदिवशी वाटचालीची पालखी पद्मावती माचीवर सिद्ध झाली. जिजाऊंचा, राजांचा आणि राणीवशातील सगळ्या मासाहेबांचा निरोप आशीर्वाद घेतलेले बाळराजे राजगडाच्या सदरमहालाबाहेर पडले. त्यांच्याबरोबर धाराऊ आणि तिचे दोन मुलगे

अंतोजी-रायाजी चालले. बाळराजांना निरोपाची पायसोबत देण्यासाठी खुद्द राजे त्यांचा हात हातात धरून पद्मावती माचीपर्यंत आले.

राजांच्या पायांना हात लावून बाळराजांनी एकदा त्यांच्याकडे पाहिले.

" या. सांभाळून असा." बाळराजांचे खांदे थोपटीत राजे म्हणाले.

शंभूबाळ पालखीत बसले. पाठोपाठ धाराऊ पालखीत चढली. भोयांनी खांद्यावरचे भोईपट हातांनी ठाकेठीक करून पालखीला खांदे दिले. पालखी राजगड उतरू लागली. तिच्या दोन्ही तर्फेने हातात तळपते नंगे तेगे पेलून तरणेबांड रायाजी-अंतोजी चालले. शेकडो निवडक पटेकरी कमरेच्या हत्यारांच्या मुठीवर आपली दमदार बोटे रुतती धरून पालखीमागून चालले. आदिलशाही बाकदार किमॉश डोक्यावर असलेल्या बजाजीमामांनी राजांची छातीला छाती भिडवून भेट घेतली. डोळ्यांनीच राजांना ' फिकीर नसावी ' असा भरोसा दिला आणि तेही पालखीमागून चालले. पालखी नजरेआड होईपर्यंत राजे स्वतःला हरवल्यागत तिच्याकडे एकनजर बघतच राहिले. सईबाईंची आठवण देणाऱ्या बाळराजांच्या आजोळी चाललेल्या पालखीकडे बघताना राजे मनातील सईबाईंना म्हणत होते, ' आमच्या मुलखात आलेल्या जगदंबेच्या मूर्तीचं दर्शन घेणं तुम्हास घडलं नाही. कधी शंभूबाळांना घेऊन तुम्हास आपल्या माहेरगावी – फलटणला जाणं साधलं नाही. तुमच्या अंतसमयी तुमची आमची भेटी झाली नाही. नेहमी दूर देशी असलेले आमचे महाराजसाहेब असेच शिकारीचे निमित्त करून कायमचे दूर निघून गेले. सई माणसांचा हा गुंता उकल होण्यासारखा नाही. तरीही ' एकला जीव पदरी घातला ! ' म्हणून तुम्ही शंभूबाळांना आमच्या हवाली केलंत ! जेवढं साध्य होईल तेवढं आम्ही त्यांच्यासाठी करतो आहोत, करणार आहोत. पण – पण या दुनियेत आलेला हरएक जीव एकलाच असतो. स्वतःच्या आजोळास तो कायमचा पारखाच झालेला असतो ! '

किरणे कलतीला आली असताना फलटण नजरटप्प्यात आले. बजाजीराजांनी गाववेशीवरच भोयांना पालखी ठाण करण्याची आज्ञा दिली. एक स्वार पुढे धाडून चिरंजीव शंभूबाळ आल्याची वर्दी आपल्या वाड्याकडे पाठविली. निंबाळकरांचा निसूर असलेला वाडा ती खबर ऐकताच चैतन्याने जागून उठला.

बजाजींचे चिरंजीव महादजी, तुळोजी, कान्होजी आणि गोरखोजी खाजगीच्या कारभाऱ्यांना संगती घेऊन बाळराजांना सामोरे जाण्यासाठी गाववेशीवर आले. कारभाऱ्यांनी एक पायबांधलं जितं कोंबडं शंभूराजांच्यावरून उतरून दूर फेकून दिले. शंभूराजांनी आपल्या चारी मामेभावांची ऊरभेट घेतली.

आपले मामा बजाजीराजे आणि सारे मामेभाऊ यांच्यासमवेत बाळराजांनी बाणगंगा नदी ओलांडून फलटणात आपल्या मातुश्री-आऊसाहेबांच्या गावठाणात प्रवेश केला.

आपला घडीव दगडांचा, चिरेबंदी वाडा नजरेत येताच बजाजी हात उंचावता करीत म्हणाले, " बाळराजे, पाहिलात तुमच्या आऊसाहेबांचा वाडा ! "

मामांचे ते बोल ऐकताना आपला उजवा हात छातीवरच्या माळेतील कवड्यांना केव्हा नि कसा भिडला ते बाळराजांना कळलेच नाही !!

समोरच्या वाड्याची नजरेत साठवण करीत शंभूराजे साऱ्यांच्या बरोबर वाड्याच्या खिळेबंद, थोर दरवाज्यात आले. सुवासिनींनी आरती-तबके फिरवून त्यांची ओवाळण केली. सोनमोहरांचा सतका त्यांच्यावरून उतरला. पायीच्या मोजड्या उतरून शंभूबाळांनी आपल्या आऊसाहेबांच्या वाड्यात पाऊल टाकले. त्यांची भिरभिरती नजर वाड्याचा कानाकोपरा टिपत होती. आपल्या छोटेखानी उरात कोण प्रकारची घालमेल माजली आहे त्याची त्यांना नीटपणे उकल होत नव्हती.

" चला बाळराजे, प्रथम देवदर्शन करू." बजाजी देवमहालाच्या रोखाने हात करीत म्हणाले. मामांच्या मागून देवमहालात जाऊन शंभूराजांनी देवदर्शन केले. बजाजींनी आपल्या कबिल्यातील साऱ्या स्त्रियांना देवमहालात बोलावून घेतले.

निंबाळकरांच्या त्या कबिल्यातील प्रत्येक स्त्रीच्या पायांना हात लावून वर उठताना शंभूराजे प्रत्येक चेहरा बारकाव्याने निरखत होते. तो सारा कबिला उजळ रंगाचा होता !! बाळराजांच्या कपाळी आठ्या चढल्या. त्यांना हवा असलेला ' सावळा रंग ' कोठेच दिसत नव्हता. पाहिजे असलेल्या मनातील धूसर आठवणाऱ्या चेहऱ्याच्या माटाशी जुळता-मिळता असा कुणाचाच चेहरा-मोहरा नव्हता !

हरवलेले काहीतरी मनोमन शोधू पाहणारे बाळराजे रात्रीच्या भोजनानंतर सुख व्हायच्या महालात आले. त्यांच्या संगती धाराऊ होती. तिने मंचकावरची बिछायत हात फिरवून ठीक केली. बाळराजांनी उतरून दिलेला मस्तकीचा टोप तिने चौरंगावरच्या तबकात ठेवला. बाळराजे मंचकावर लेटते झाले. पायगतीला येऊन धाराऊ त्यांचे पाय हलक्या हातांनी चेपू लागली. त्यांच्या डोळ्यास डोळा लागला आहे असे वाटताच धाराऊने त्यांच्या अंगावर शाल पांघरली आणि ती फरसबंदीवर अंथरलेल्या बिछायतीवर आडवी झाली. महालाच्या अंतरंगावर चिराखदानांच्या ज्योतींनी आपल्या मंद प्रकाशाची पिवळसर शाल पांघरती केली होती.

आपल्या गोंदल्या हाताची वळी करून ती उशासारखी डोक्याखाली घेतलेल्या धाराऊचा श्वास लयीत सुरू झाला; पण ... पण मंचकावरचे बाळराजे तळमळत होते ! जागेपालटामुळे त्यांना झोप येत नव्हती. ते सारखे कूस पालटत होते. त्यांच्या अंगावरची शाल केव्हाच बाजूला पडली होती ! एकच एक विचाराचा बळजोर स्वार त्यांच्या मनाच्या तट्टावर मांड ठोकून बसला होता. चारी बाजूंनी तो कायदे आखडीत होता – लागणारी ओढ असह्य होत होती – ' कशा ... कशा दिसत होत्या आमच्या मांसाहेब ? ' त्या एकाच सवालाच्या कैक घोडेटापा होऊन दौडू लागल्या – " कशा – कशा दिसत

होत्या आऊसाहेब ? का - का आठवत नाही त्यांचा चेहरा ?'' पाण्याबाहेरच्या बाळमाशासारखे शंभूबाळ तळमळू लागले. त्यांच्या काळजाची धडधड वाढू लागली. एकाएकी त्यांना पलीकडच्या दालनाच्या रोखाने कसलीतरी खडखड स्पष्ट ऐकू येऊ लागली. त्या दालनाच्या खिडक्यांच्या चौकटीची दारे थडथडत होती. बाणगंगा नदीच्या रोखाने दौडत आलेला वारेझोत सूंकार घुमवीत निंबाळकरांच्या वाड्यात बेरोख घुसला होता !!

तो सूंकार आणि त्याला धरून उठणारी दारांची थडथड पडल्या पडल्या ऐकताना बाळराजांच्या डोळ्यांसमोर एकामागोमाग एक स्त्रीमुद्रा गरगरत फिरू लागल्या. जिजाऊ, पुतळाबाई, सोयराबाई, काशीबाई, बजाजींच्या कबिल्यातील मामीसाहेब, पण ... पण त्या साऱ्या मुद्रा सोनपुतळ वाणात उजळून निघालेल्या होत्या !! त्यांच्या तेजाने बाळराजे दिपून जात होते. आडोसा-आसरा घ्यायला त्यांना 'सावळेपण' पाहिजे होते ! मिटल्या डोळ्यांच्या हाताशी ते येत नव्हते म्हणून बाळराजांनी डोळे उघडले. सगळा महाल पिवळ्याधमक प्रकाशाने भरून गेला होता !

बाळराजांनी पुन्हा डोळे मिटले. त्यांच्या अंगचा जामा घामाने पुरता डबडबला होता. पलीकडच्या दालनातून वाढलेली थडथड आणि सूंकार येतच होते. घायाळ झालेले शंभूबाळ तळमळत होते. त्यांच्या अंगाखालची बिछायत सुरकुतली होती. 'आऊसाहेब ?' अशी मोठ्याने कंठ फोडून साद घालावी असे त्यांना वाटत होते. डोळे मिटून पालथे पडलेल्या त्यांच्या छातीखाली सापडलेल्या भवानीच्या माळेतील कवड्यांचे श्वाससुद्धा घुसमटत होते ! कोंडी-कोंडी दाटली होती. एकाएकी पाठीवर पडलेल्या हाताच्या स्पर्शाने ते केवढे तरी दचकले आणि खाडकन् मंचकावर उठून बसले. ती धाराऊ होती !! मूळची गौरवर्णी असली तरी हात, कपाळ, गळा गोंदलेला असल्यामुळे ती 'सावळीच' दिसत होती !! तिला समोर पाहताच शंभूबाळ थरथरत बोलून गेले, 'धाराऊऽ, आऊसाहेब !' त्यांच्या दाट कुरळ्या केसांतून ममतेने आपली कुणबी बोटे फिरवीत धाराऊ म्हणाली, 'भिऊ नगा, म्या हाय न्हवं !' आणि तिने बाळराजांचे मस्तक आपल्या छातीजवळ बिलगते घेतले.

पलीकडच्या दालनातील दारांची थडथड आता निसूर झाली होती. वारेझोताचा सूंकार आल्या पावली निघून गेला होता. ते पलीकडचे दालन निंबाळकरांच्या वाड्यातील 'बाळंतिणीचे दालन' होते ! कैक सालांपूर्वी त्याच दालनात सईबाईंचा जन्म झाला होता !! धाराऊला, शंभूबाळांना ते काही काही माहीत नव्हते. धाराऊ आपल्या पदराने बाळराजांच्या कपाळी दाटलेला घाम टिपू लागली.

अंधारात निसूर झालेल्या फलटणला घेर धरलेली बाणगंगा नदी निराधार किनाऱ्याला आसरा देत संथपणे वाहत होती !!

थोडे दिवस फलटणात मुक्काम करून बजाजीमामांच्यासह शंभूराजे राजगडावर परतले. या अवधीत कोंढाण्यावरून होणाऱ्या तोफमारीने हैराण झालेल्या जसवंतसिंगाने कोंढाण्याचा वेढा हलवून हताशपणे औरंगाबादेची वाट धरली होती.

राजगड सोडून खासे राजे अहमदनगर-औरंगाबादेपर्यंतचा मोगलाई मुलूख जेर करून राजगडावर परतले होते. सुरत लूट, जसवंतसिंगाची माघार, मोगलाई मुलखाची मावळ्यांनी केलेली मारझोड यांनी औरंगजेबाच्या दिल्ली-दरबारची हवा तापू लागली. आपल्या या हालचालीचा नतिजा म्हणून औरंगजेब आता कोण मनसुब्याने पावले टाकील याचा विचार करीत राजे आपल्या महाली खिडकीच्या चौकटीजवळ पाठीवर हात बांधून उभे होते. त्यांची नजर गुंजवणीच्या वळणदार पात्रावर जखडली होती. हाताची सडक बोटे चळवळ करीत एकमेकांत पुन्हापुन्हा गुंतली जात होती. बजाजी भेटीला येत असल्याची मिळालेली वर्दीसुद्धा ते विसरून गेले होते !

राजांच्या महाली आलेले बजाजी राजांना पाठमोरे पाहून क्षणभर घोटाळले. त्यांना आपल्या येण्याचा सासूद लागावा म्हणून अदबीने म्हणाले, "आम्ही परतावं म्हणतो राजे."

राजांच्या राजकारणी विचारांची धावणी तुटली. वळते होत ते बजाजींना म्हणाले, 'एवढ्या जरोरीनं निघणं करताहात बजाजी ?'

'जायला पाहिजे राजे. मृग तोंडावर आहे. जाण्यापूर्वी एक बाब कानावर घालावी म्हणून तसदी दिली.'

'तसदी कसली ? बोला.' राजे शांतपणे चालत बजाजींच्या जवळ आले.

'थोरले महाराज गेले ...' म्हणत क्षणभर बजाजी शहाजीराजांच्या आठवणीने गप्प झाले.

"होणारं चुकत नाही राजे. माणसाच्या हयातीचं माणसाच्या हातात काहीच राहत नाही. बाळराजांना फलटणात समोर बघताना आम्हाला कैकवेळा महाराजांची याद आली आणि एक गोष्ट मनाला भिडून गेली. आता बाळराजांचे हात पिवळे करायला पाहिजेत ! घरात मर्तिक घडलं असता एक वर्षाच्या आतच ते व्हायला पाहिजे. नाहीतर शास्त्राप्रमाणं तीन वर्षं काही शुभकार्याला हात नाही घालता यायचा !!"

बजाजींचे बोल ऐकताना राजांचे मन खोल तळवटातून घुसळून उठले. ते बजाजी बोलत नव्हते. सईबाईंच्यावरचा त्यांचा प्रेमा बोलत होता. राजांनी पडत्या काळात दिलेल्या थोर मनाच्या आधाराची जाण बोलत होती.

राजे क्षणभर बजाजींच्याकडे नुसते बघतच राहिले. 'शंभूबाळांचा विवाह !' ही नुसती कल्पना ऐकतानाही त्यांच्या राजकारणी देहातील 'आबासाहेब' मोहरून उठले होते. क्षणभर राजे औरंगजेब, त्याचे डाव, त्यावरचे प्रतिडाव हे सारे विसरूनच गेले ! त्यांच्या शिवसतेज डोळ्यांसमोर मुंडावळ्या बांधलेल्या शंभूबाळांची मूर्ती उभी ठाकली !

शांतपणे हसत राजे बजाजींना म्हणाले, "बरी बात काढलीत बजाजी. या निमित्तानं तरी आमच्या मासाहेबांचं दुःख थोडं हलकं होईल. गड उतरण्यापूर्वी तुम्हीच ही गोष्ट जातीनिशी त्यांच्या कानावर घाला."

ते ऐकताना बजाजीमामांचा चेहरा आनंदाने उजळून निघाला. समाधानाने ते निरोप घेऊन राजांच्या महालाबाहेर पडले. त्यांच्याकडे बघताना राजांच्या हाताची सडक बोटे अत्यंत हळुवारपणे छातीवरच्या जगदंबेच्या माळेतील कवड्यांवरून फिरू लागली. विचारात हरवलेल्या राजांच्या जागत्या, निमुळत्या डोळ्यांसमोर आंबराईचा रसवंत घेर असलेले शृंगारपूर उभे ठाकले! त्यांना दोनच मूर्ती दिसू लागल्या– -शृंगारपूरकर शिर्क्यांची कुलदेवता– भावेश्वरी आणि– आणि– पिलाजी शिर्क्यांची ईश्वरी भावांची राजस कन्या राजाऊ– जिऊ!!

राजांनी शृंगारपूरला थैलीस्वार पाठवून पिलाजी शिर्क्यांना गणोजी आणि राजाऊ यांच्यासह टाकोटाक येण्यासाठी बलावू धाडलं. पिलाजीराव आपला कबिला घेऊन दोन्ही मुलांच्यासह राजगडावर आले.

राजांनी वडिलधाऱ्या जाणत्यांच्या साक्षीने सदर बोलावली. सदरेच्या एका तर्फेला चिकाच्या पडद्याआड राजांचा राणीवसा बसला. भरल्या सदरेत जिजाबाईंच्या तर्फेस बसलेल्या राजांनी पिलाजीराव शिर्क्यांना शब्द टाकला, "आमचे महाराज साहेब गेले... त्यांना एक वर्ष होण्याच्या आत धर्मशास्त्राप्रमाणे आम्हास आमच्या बाळराजांचं शुभकार्य करणं आहे. तुमच्या घरची शोभा असलेल्या राजाऊंना आम्ही आमच्या सूनबाई म्हणून बघाव्या म्हणतो. त्यासाठी आम्ही सदरसाक्षीनं मागणं घालतो आहोत. तुमचा जो मनसुबा असेल तो साफ बोला."

राजांचे अदबशीर बोलणे ऐकून पिलाजींचे रांगडे काळीज भरून आले. एवढ्या जरोरीने राजांनी कशासाठी बलावू धाडले याचा त्यांना आता उलगडा झाला! पाणावल्या डोळ्यांनी पिलाजी जिजाबाई आणि राजे यांच्याकडे बघत बोलून गेले, "राजं, ही वळचनीची गंगा पार आड्याला न्यायची गोस्ट काडलीसा. तुमच्या पायाजवळ हुबं ऱ्हायाची लायकी न्हाई आमची! बाळराजांच्या साठनं लग्नाला पोर पायजे असा कवाबी हुकूम क्येला असतासा तर आनून पायावर घातली असती. या परास काय सोनं व्हनार हाय तिच्या जल्माचं?" पिलाजी, राजांचे थोरपण नजरेआड न करता, कळवळून मनचे बोलले होते.

"नाही पिलाजीराव, तुमच्या आमच्याच घरची काय पण कुणाच्याच घरची मुलगी हे 'घरधन' आहे. ते त्याच इतमामानं आणावं लागतं. तुमची मुलगी लग्नासाठी नव्हे तर आमच्या सूनबाई म्हणून आणण्यासाठी आम्ही शब्द टाकला आहे. तुमची गंगा वळचणीची नाही पिलाजीराव. ती इमानी रक्ताची स्वर्गाची गंगा आहे! म्हणूनच आमच्या

कबिल्याकडची आमची कन्या नानीबाई तुमच्या गणोजीरावांच्यासाठी पदरी घ्या असं मागणंही आम्ही आत्ताच घालतो आहोत! बोला. हा साटेलोट्याचा रिश्ता तुम्हास कसा वाटतो?" राजांनी हसून पिलाजींना सवाल केला.

जाणत्यांनी भरलेली सदर जाणत्या राजाकडे भारावून बघू लागली.

ध्यानीमनी नसलेला दुसरा धक्का बसलेल्या पिलाजींनी काही न बोलता 'जी' म्हणून पगडी डोलाविली.

वर्दी पाठवून शंभूराजे - गणोजी आणि राजाऊ - नानीबाई यांना सदरेवर बोलावून घेण्यात आले. त्या चौघांनी भरल्या सदरेला मुजरा नमस्कार रुजू केले.

सदरबैठकीवरून उठून राजे शांत चालीने छोट्या राजाऊजवळ आले. हुजऱ्याने समोर पेश केलेल्या तबकातील साखर मुठीत घेऊन त्यांनी खाली मान घातलेल्या राजाऊची हनुवटी डाव्या तर्जनीने वर करून क्षणभर तिच्याकडे पाहिले. राजाऊच्या डोळ्यांत समोरचे राजे मावत नव्हते! सदरेकडे बघत राजे म्हणाले, "शृंगारपूरकर पिलाजीराजे शिर्के यांची कन्या राजाऊ आमचे फर्जंद शंभूराजे यांच्यासाठी आम्ही सदरसाक्षीनं आणि मासाहेबांच्या आशीर्वादानं पक्की करतो आहोत." राजांनी मुठीतील साखर राजाऊच्या तोंडात भरली. उपाध्यायांनी पुढे केलेल्या तबकातील कुंकू घेऊन त्याची आडवी चिरी राजाऊच्या कपाळी रेखली आणि राणीवशाच्या रोखाने एक निसटती नजर चिकाच्या पडद्याकडे दिली. राजाऊने वाकून राजांचे पाय शिवले.

पडद्याआडच्या राणीवशात क्षणभर कुजबुज उठली. राजाऊच्या तोंडी साखर भरण्यासाठी कुणी जावे यासाठी नजरेनेच जाबसाल झाले. सदर खोळंबली होती. चिकाचा आडपडदा दूर सारून सोनपुतळ रंगाच्या आणि तशाच काळजाच्या पुतळाबाई पदर सरसा धरीत सदरेवर आल्या. मासाहेबांना नमस्कार करून त्यांनी पुढे होत राजाऊंच्या तोंडी साखर भरली. वाकून नमस्कार करणाऱ्या राजाऊला 'औक्षवंत व्हा!' असा तोंडभर आशीर्वाद दिला!

पिलाजींनी आपल्या पत्नीसह नानीबाईंच्या तोंडी साखर सोडून त्यांचा मळवट कुंकवाने भरला. भोसले-शिर्के रक्तसंबंध पक्का झाला.

दोन्ही मुली जिजाऊंना आणि सदरेला नमस्कार करून आत गेल्या. शंभूराजे आणि गणोजी जिजाऊंच्या शेजारी सदरबैठकीवर अदबीने बसले.

लग्नाच्या याद्या बाळाजी आवर्जीनी आपल्या गोमट्या हस्तलेखात पुऱ्या केल्या. कार्यासाठी मार्गशीर्षातील मुहूर्त धरावेत असे सर्वांच्या सल्ल्याने ठरविण्यात आले. सदरभर खारीक-खोबऱ्याचे वाटप झाले. भोसले-शिर्क्यांच्या रक्तसंबंधाचे साखरपुडे बांधले गेले. रात्री गडावर साखरपुड्याच्या सुग्रास जेवणाची पाने उठली.

पिलाजी शिर्के राजाऊसह शृंगारपुराकडे परतले. मृगाने आपल्या पाणथेंबाच्या अक्षता मावळ मुलखावर उधळायला सुरुवात केली! मळवट भरलेल्या लाल नद्या दर्याच्या दर्शनासाठी दौडू लागल्या! आता चार-पाच महिने राजांचा मुक्काम राजगडावरच पडणार होता. शंभूबाळांच्या शुभमंगलाची सारी तयारी राजे जातीनिशी करवून घेऊ लागले. पुतळाबाईंच्या उत्साहाला उधाण आले होते. धाराऊचे गोंदले हात कुठले काम पडू देत नव्हते. प्रत्येक कारखान्यात फेरफटका टाकून जिजाबाई हर चीज नजरेखालून घालीत होत्या.

जरीशेल्याच्या गाठीने जखडबंद झालेल्या राजाऊंना पाठीशी घेऊन शंभूराजे आबासाहेबांच्या आशीर्वादासाठी खाली वाकले. राजांच्या रक्तसतेज पायांच्या सडक बोटांना हात लावून तो शंभूराजांनी आपल्या टोपावरून मागे नेला. आपले मुंडावळ्या मंडित कपाळ शंभूराजांनी आबासाहेबांच्या पायावर टेकविले. त्या स्पर्शाने राजांचे उभे अंग मोहरून उठले. पायधूळ घेणाऱ्या बाळराजांच्या आणि सूनबाईंच्या मस्तकावर तळहात ठेवून राजे हलकेच पुटपुटले, "औक्षवंत व्हा! येशवंत व्हा!"

झुकते होऊन राजांनी त्या दोघांना हळुवार उठते केले. लग्नसाज घेतलेल्या, टोपाच्या वळीत निसटत्या अक्षता अडकलेल्या शंभूराजांच्याकडे राजे दर्पणात बघितल्यासारखे बघू लागले. त्यांच्या मनाच्या तळवटातून सईबाईंची सावळी मुद्रा उसळून वर आली. त्यांचे शेवटचे बोल राजांच्या कानात घुमून उठले, "आमचे शंभूबाळ ... एकला जीव — पदरी घातला ...!" आणि राजे क्षणभर स्वत:ला हरवल्यासारखे नवरदेव शंभूबाळांना बघतच राहिले. खाली मान घातलेल्या राजाऊंच्याकडे बघताना राजांच्या मनात विचार येऊन गेला, "सई, एकला जीव म्हणून बाळराजांना आमच्या हवाली करताना ना तुमच्या ध्यानीमनी आले ना आमच्या की, एकट्या जीवाचा पायमाग घेत आणखी ऋणानुबंध असलेले जीव यायचे असतात!! आता यांना मनभर उदंड आशीर्वाद द्या." जेवढ्या हलक्या हाताने ते छातीवरच्या कवड्यांना कुरवाळीत आले होते तेवढ्याच हलक्या हातांनी त्यांनी शंभूराजे आणि राजाऊ यांचे खांदे थोपटले!!

रात्री सजल्या घोड्यावरून दोन्ही नवरदेवांची वाजतगाजत वरात निघाली. रणहलग्यांच्या तालावर कसबी पट्टेकरी हात फिरवीत वरातीसमोर चौक करू लागले. लेझमाचे ताफे खेळी करत नाचत चालले. वधूवरांवर सोनमोहरांचा सतका उधळला जाऊ लागला. उखळ्यांचे बार दणदणू लागले.

मध्यरात्रीनंतर देवदर्शन करून वराती परतल्या. गृहप्रवेश करणाऱ्या शंभूराजांची वाट, हात पसरते करून सखूबाईंनी रोखून धरली! आपल्या बंधुराजांना त्यांनी रक्ताची आठवण ठेवण्यासाठी सवाल टाकला, "बोला, तुमची मुलगी आमच्या घरी द्याल?"

शंभूराजे गोंधळले! नेताजींनी त्यांच्या कानांशी तोंड नेऊन कुजबुजत त्यांना तोड सांगितली.

शंभूराजे हसत सखूबाईंना म्हणाले, "आली आमच्या घरी तर देऊ तुमच्या दारी!"

सखूबाईंनी वाट सोडली. शंभूराजांनी उंबरठा पार केला. त्यांच्यामागून खालच्या मानेने चालणाऱ्या राजाऊंनी डावा पाय पुढे सरसा करीत उंबरठ्यावरचे शीगभरले मावळी तांदळाचे माप लवंडते केले. भोसल्यांच्या उंबरठ्यात दाणेरास पसरली. सूनबाई म्हणून सुलक्षणी लक्ष्मीच्या पायांनी राजाऊंनी गृहप्रवेश केला.

कुलदेवतेचे दर्शन घेऊन वधू-वरांनी गणपतिपूजन केले. तांदूळ पसरलेले एक सुवर्णी तबक शंभूराजांच्या सामने आणण्यात आले. नव्या सूनबाईंचे नाव काय ठेवावे याची चर्चा झाली. जिजाबाईंच्या महालातून वर्दी आली की, "आमच्या नातसूनबाईंचं नाव 'यशोदा' ठेवा."

प्रभाकरभट्ट राजोपाध्यांनी शंभूराजांच्या बोटातील अंगठी उतरून ती त्यांच्याच हातांच्या चिमटीत दिली. आणि त्यांचा हात आपल्या हातात धरून तबकातील तांदूळाच्या समृद्ध पडद्यावर अंगठीने नाव रेखले 'यशोदा'.

सारे लग्नविधी आटोपलेले शंभूराजे आपल्या संगती राजाऊंना घेऊन जिजाबाईंच्या महाली दर्शनासाठी आले. जिजाबाईंच्या पाठीशी धाराऊ उभी होती.

भरल्या डोळ्यांनी जिजाऊ आपला लग्नसाज घेतलेल्या बाळराजांच्याकडे नजर जोड बघतच राहिल्या. पुढे होऊन शंभूबाळांनी थोरल्या आऊसाहेबांच्या पायांवर मस्तक टेकविले! राजाऊंनी आपल्या मळवटीचे आडवे कुंकू आईसाहेबांच्या पायांना भिडविले. बाळराजे आणि राजाऊंना वर उठते करून आवेगाने बिलगते घेताना जिजाऊंना आपल्या स्वारींची याद आली. राजाऊची हनुवटी वर उचलून जिजाबाई जबानभर मायेने म्हणाल्या, "येसूऽ". राजाऊंनी मान उचलून आऊसाहेबांच्याकडे बघितले. केवढीतरी अमाप माया त्यांना जिजाऊंच्या शांत डोळ्यांत दिसत होती.

बाळराजांच्या पाठीवरून हात फिरवीत जिजाबाई म्हणाल्या, "शंभूबाळ, धाराबाईचे पाय शिवा."

ते ऐकताना गलबलून गेलेली धाराऊ बोलून गेली, "माजं कशाला जी?"

तरीही पुढे होऊन बाळराजे-राजाऊंनी धाराऊच्या पायांना हात लावून तिला नमस्कार केला. त्यांना वर उठवून त्यांच्या कानशिलावरून बोटं फिरवून ती आपल्या कानशिलाजवळ नेत कटकन् मोडताना धाराऊने आशीर्वाद दिला. "ब्येस व्हावो माज्या वासरांनू!"

शिर्क्यांच्या राजस राजाऊ आता भोसल्यांच्या येशवंत 'यशोदा' झाल्या होत्या. जिजाऊसाहेबांनी मायेने 'येसू' म्हणून हाक घालताच 'यशोदेच्या' 'येसूबाई' झाल्या होत्या!

दर्शन घेऊन महालाबाहेर पडणाऱ्या शंभूराजांना डोळाभर बघताना शहाजी राजांच्या आठवणीने जिजाबाईंच्या मनी एक विचार येऊन गेलाच. 'बाळराजे, तुम्ही तुमच्या थोरल्या महाराजसाहेबांच्या सारखे दिसता. पण – पण ते जसे आपल्या कबिल्याला – आम्हाला पाठमोरे झाले तसे तुम्ही कधी पाठमोरे होऊ नका! आमच्या येसूबाईंना कधीच अंतर देऊ नका! गडावरच्या टाक्यात पोहणीस पडणे सोपे आहे – पण – पण संसाराच्या भवसागरात तरते राहणे कोण दमछाकीचे आहे! आई अंबा त्यासाठी तुमच्या हाती बळ देईल. श्रीसांब त्यासाठी तुम्हाला हिमतबंद करील!'

□ □ □

२

रिवाजाप्रमाणे लग्नानंतर आईचा गोंधळ घातला गेला. मंगल कार्याची धुंदळ सरली. कार्याला आलेली मावळे-मंडळी गावोगाव पांगली. भोसलेकुळीची 'ठेव' म्हणून पिवळ्या येसूबाईंना घेऊन पिलाजीराजे शिर्के शृंगारपुराकडे परतले.

पौष मासाची अमावास्या तोंडावर आली. या अमावास्येला 'सुर्व्याला गिऱ्हाण पडणार' अशी बोलवा मावळ-मुलखात उठली. प्रभाकरभटांनी पंचांग मांडून तिची खातरजमा करून घेतली. त्यांनी राजांना धर्मशास्त्राचा सल्ला दिला की, "तीर्थक्षेत्री जाऊन वस्त्रदान, धान्यदान, सुवर्णदान करून ग्रास पडणाऱ्या नारायणाची शांती करावी."

राजांनी त्यासाठी तीर्थक्षेत्र महाबळेश्वर मनी धरले. फार दिवस मनी असलेली एक इच्छा या निमित्ताने राजे पूर्ण करणार होते. आपल्या मातुश्री आऊसाहेबांची आणि चंदनखोडासारख्या, स्वराज्यासाठी झीज घेतलेल्या वृद्ध सोनोपंत डबिरांची राजे सुवर्णतुला जोखणार होते. त्यांच्या भारंभाराएवढे सोने दान करून सूर्याला ग्रासणाऱ्या राहू-केतूंना 'गिऱ्हाण-सोडीचं' साकडे घालणार होते!

राजांच्या आज्ञा सुटल्या. केसो नारायण सबनीस आणि मुजुमदार निळो सोनदेव यांनी सोनमोहरांचे पेटारे हत्यारबंद धारकऱ्यांच्या पहाऱ्यात महाबळेश्वराच्या वाटेला लावले. प्रतापगडावरचे अर्जोजी यादव महाबळेश्वराच्या शिवालयासमोर सुवर्णतुलेचा सज्जा उभारण्यासाठी पुढे गेले.

शुभयोगावर राजांनी जिजाऊसाहेब, बाळ शंभूराजे, पुतळाबाई, सोनोपंत डबीर आणि निवडक धारकरी यांच्यासह राजगड सोडला.

जिजाऊंना आणि सोनोपंतांना तुलादानाची कल्पना राजांनी दिली नव्हती.

हटत्या हिवाळ्याचे साजेरेपण अंगी मिरविणाऱ्या, गर्द, निळ्या वनराईत दडलेल्या तीर्थक्षेत्र महाबळेश्वरावर खासे मेणे ठाण झाले. हे स्थान 'शिवाचे' होते. निसर्गाने आपले अवघे 'शिवपण' इथे मुक्त हस्ताने उधळले होते.

राजांनी पुढे होत हातजोड देऊन मासाहेबांना मेणाउतार केले. पाठोपाठ पुतळाबाई, शंभूराजे मेण्यातून उतरले. सूर्य मावळतीला लागला होता. त्याच्या लांबट किरण फेकीत भोवतीचा परिसर देखणा दिसत होता. शंभूराजे भोवतीच्या मुलखाचे सुरूपण बघताच

हरखून गेले. त्यांच्या उरात कसलीतरी घालमेल उसळून उठू बघत होती. गरगर नजर फेकीत ते मिळेल तेवढे सारे डोळ्यांत सामावून घेऊ पाहत होते.

बाळराजांच्या छातीवरची कवड्यांची माळ लयीत पण वाढत्या चालीने वर खाली होऊ लागली. कानांतले सोनचौकडे डुलू लागले. ही कसली उलघाल आहे त्यांचे त्यांनाच उमगेना. जखडत्या नजरेने ते सभोवती नुसते बघतच होते! त्यांना काही तरी जाणवत होते, पण ते नीट पारखता येत नव्हते!

खांद्यावर पडलेल्या हाताने आणि 'शंभूबा ऽ ळ!' या सादेने ते भानावर आले. समोर आबासाहेब उभे होते. ते हसत म्हणाले, "एवढं रोखल्या नजरेनं काय बघता आहात बाळराजे? आम्ही दोन वेळा साद घातली. तुमचं ध्यान नव्हतं!"

शंभूराजे हसले. शिवलिंगाच्या त्या अवघ्या मुलखाच्या रोखाने हात फिरवीत म्हणाले, "आम्ही हे सारं बघत होतो महाराजसाहेब. हे डोंगर, हे आभाळ, पक्षी, झाडं आमच्याशी बोलू बघताहेत असं आम्हास वाटलं!"

राजे ते ऐकून गंभीर झाले. बाळराजांचा खांदा थोपटीत म्हणाले, "भाग्यवान आहात! झाडापेडांची बोलीभाषा कळायला योग्याचं किंवा कवीचं मन लागतं! फार थोड्यांना ते मिळतं!"

शंभूराजांनी आबासाहेबांच्या कपाळावरच्या आडव्या शिवगंधाकडे क्षणभर बघितले. राजे बाळराजांना घेऊन तुलादानाची सिद्धता नजरेखाली घालण्यासाठी सज्ज्याकडे चालले. महाबळेश्वरचा पुराणा डोंगरमाथा आपली कैक सालांची समाधी भंगवून त्या दोघांचे डोळाभर दर्शन घेत होता. त्याला एक 'शिवयोगी' आणि मऱ्हाटबोलीचा 'पहिला राजकवी' दिसत होता!!

सूर्यग्रहणाचा तळमळता दिवस उगवण्याच्या खटपटीला लागला. पहाटस्नान घेतलेले राजे, पुतळाबाई, मातुश्री आऊसाहेब, सोनोपंत डबीर आणि बाळराजे यांच्यासह सुवर्णतुलेसाठी सजलेल्या सज्ज्याजवळ आले.

पहाटमुहूर्तावर उपाध्यायांनी तुलेच्या अंगथोर, रुपेरी पारड्यांची सविध पूजा बांधली. मंत्रघोष उठू लागले.

जिजाबाईंच्या शिवचरणांना हात लावून राजे अदबीने म्हणाले, "मासाहेब, चलावं. तुलादानासाठी पारड्यात बैठक घ्यावी."

जिजाबाईंनी क्षणभर राजांच्या डोळ्यांत पाहिले आणि त्या गहिवरल्या शब्दाने बोलून गेल्या, "आमची तुला कशापायी जोखता राजे?"

त्यांच्या सतेज पायांवर जोडलेली नजर तशीच ठेवून राजे म्हणाले, "साक्षात सूर्यनारायणास पडणारं साकडं खुलं करण्यासाठी आपली नाही तर कुणाची तुला आम्ही जोखावी? मासाहेब आमची ही इच्छा आहे. चलावं."

राजांनी हात-आधार देत जिजाबाईंना तुलेजवळ आणले. आऊसाहेबांनी पारड्यावर

कुंकू-हळदीची चिमटी सोडली. 'जगदंबे' असे हलकेच पुटपुटत मासाहेबांनी रुपेरी पारड्यात आपले उजवे सोनपुतळ पाऊल ठेवले! पारडे सज्ज्याच्या फरसबंदीला चिकटले. सदेरेवर घ्यावी तशी बैठक मासाहेबांनी पारड्यात घेतली.

मंत्रघोषांच्या गजरात तुलादानास प्रारंभ झाला. ओंजळी ओंजळींनी राजे आणि पुतळाबाई, झळझळीत सोनमोहरा रित्या पारड्यात सोडू लागले.

थोरल्या मासाहेबांचे पारड्यात बैठक घेतलेले आगळे रूप पाहून बाळराजांना मनोमन वाटत होते, "थोरल्या आऊसाहेब अशाच एका पारड्यात बसून राहाव्यात! छातीवरची कवड्यांची माळ ओळंबती सोडीत झुकणारे आबासाहेब असेच मासाहेबांच्या जोडीने मोहरांच्या ओंजळी दुसऱ्या पारड्यात सोडीत राहावेत! भोवतीचा पक्ष्यांचा चिवचिवाट आणि मंत्रांचा पवित्र घोष असाच जागता राहावा!!"

मोहरा सोडीत असलेले पारडे हळहळू दबतीला लागले. मासाहेबांनी बैठक घेतलेले पारडे सज्ज्याची फरसबंदी सोडून आस्ते आस्ते चढतीला लागले. ते बघताना कृतार्थ झालेल्या राजांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू त्यांच्या दाढीवर केव्हा उतरले ते त्यांचे त्यांनाही कळले नाही. उगवती पार करून आलेला 'सूर्या' आपल्या कुलाची शान राखण्यासाठी आपल्या सोन-सतेज किरणांची ओंजळ मोहरांच्या पारड्यात सोडून मोकळा झाला! मातुश्री आऊसाहेबांची तुला सर्वार्थाने सिद्ध झाली.

देहझीज सोसलेल्या सोनोपंत डबिरांचीही सुवर्णतुला राजांनी नंतर जोखली.

राजांनी हस्तस्पर्श केलेली, जोखल्या तुलांच्या मोहरांची तबके दान म्हणून वाटली जात होती. ते दान स्वीकारून संतुष्ट झालेला लोकसमुदाय मुक्त कंठाने गर्जत होता —

"दे दा ऽ न सुटे गिऱ्हाण! दे दा ऽ न, सुटे गिऱ्हा ऽ ऽ ण!!"

तो संतोषल्या मनामनांचा घोष-गजर कानांवर घेत घेत राजे, शंभूबाळ आणि उपाध्याय यांच्यासह कृष्णा नदीच्या काठावर आले. मस्तकीचा टोप आणि अंगचा जामा त्यांनी एक तबकात उतरून ठेवला. कृष्णामाईच्या पात्राची पूजा करून कमरेला मांडचोळणा असलेले उघडे-सतेज राजे पात्रात उतरले. गळ्याच्या घाटीएवढ्या पाण्यात येताच त्यांनी आपले निमुळते डोळे मिटले. तो सूर्यवंशी पुरुषश्रेष्ठ, ग्रास पडू घातलेल्या सूर्याला, कृष्णेच्या नितळ पाण्याने भावओंजळी अर्पू लागला. कृष्णा-काठाला बसलेले शंभूराजे महाराजसाहेबांच्या सूर्यफुलासारख्या दिसणाऱ्या मस्तकाकडे एकनजर पाहत होते.

तुलादानाचा विधी आटोपला. खासे मेणे महाबळेश्वर सोडून उताराला लागले. जिजाबाईंच्या मेण्यातच बाळराजे बसले होते. जिजाऊ कसल्यातरी विचारात हरवल्यागत दिसत होत्या. काही बोलत नव्हत्या. त्यांनी बोलते व्हावे म्हणून शंभूराजांनी त्यांना विचारले, "थोरल्या आऊ, आपण आमच्याशी काहीच कसं बोलत नाही? आमचं काही चुकलं..."

"नाही शंभूबाळ, राजांनी आमची तुला जोखली आणि तेव्हापासून आम्हास तुमच्या थोरल्या महाराजसाहेबांनी जोखलेल्या एका तुलेची सारखी याद येते आहे!" जिजाबाई शहाजीराजांच्या आठवणीने कातर झाल्यागत बोलल्या. त्यांचे शांत, लांबट डोळे हरवल्यासारखे झाले.

"कसली तुला मासाहेब?"

"त्याला कैक सालं गुदरली. तुमचे थोरले महाराजसाहेब तेव्हा मोहिमेवर होते. स्वारीचा आणि आदिलशाही सरदार मुरार जगदेव यांचा तळ इंद्रायणी आणि भीमा यांच्या काठावर नांगरगावी पडला होता. मुरार जगदेवास आपल्या बैठकीच्या हत्तीच्या बच्च्याची तुला करण्याची इच्छा झाली. पण एवढा थोर बच्चा कसा जोखावा याची उकल मात्र काही केल्या त्यास होईना!"

"मग?" बाळराजांचे कुतूहल वाढले.

"तुमच्या थोरल्या महाराजसाहेबांनी पुढं होऊन त्याला तोड सांगितली. हत्तीचा बच्चा इंद्रायणी आणि भीमा यांच्या संगमातील डोहाच्या नावेत चढविण्यात आला. त्या वजनाने नाव जेवढी डुबली तेवढ्या जागेवर खूण करून घेतली. मग बच्चा उतरवून त्या खुणेपर्यंत नाव डुबेल एवढे दगड-धोंडे नावेत चढविले. आणि त्या दगडांच्या भाराइतकं सोनंनाणं दान करण्यात आलं! तेव्हापासून सारी रयत त्या नांगरगावास 'तुळापूर' म्हणू लागली."

शहाजीराजांचे चातुर्य आपल्या नातवाला सांगताना जिजाबाईंचा चेहरा उजळून निघाला होता. हत्तीच्या बच्च्याच्या तुलेची ती अजब कथा ऐकताना शंभूराजांच्या डोळ्यांसमोर एक दृश्य स्पष्ट खडे ठाकले. त्यांना मनोमनी ते फार आवडले. ते चित्र म्हणजे – "इंद्रायणी आणि भीमा या नद्यांचा संगम. त्या संगमाच्या डोहावर हिंदोळणारी भली थोरली नाव आणि त्या नावेत चढविलेला हत्तीचा भलामोठा बच्चा!"

महाबळेश्वराहून भोसलेमंडळ राजगडी आले. मालवणहून जलदुर्ग पुरा झाल्याची वर्दी आली होती. राजांच्या मनी कर्नाटक प्रांतावर आरमारी स्वारी करण्याचा मनसुबा घर करीत होता. पण ते राजगड सोडू शकत नव्हते. कारण शहाजीराजांचे वर्षश्राद्ध तोंडावर आले होते. प्रभाकरभटांना राजांनी वर्षश्राद्धाची सारी तयारी करण्यास सांगितले. प्रभाकरभटांनी गरुडपुराण आणि रामायणाच्या उत्तरकांडाप्रमाणे वर्षश्राद्धाची सारी तयारी केली.

स्नान करून पेहराव चढविलेले, मनात शहाजीराजांच्या ठसठशीत आणि ओझरत्या आठवणी घोळवणारे राजे शंभूबाळांना संगती घेऊन जिजाबाईंच्या खासेमहालात दर्शनासाठी आले. जिजाऊसाहेब फरसबंदीवरच्या बिछायतीवर बसल्या होत्या! उदास आणि अचल. स्वतःतच हरवून गेलेल्या. त्यांच्या मनी शहाजीराजांच्या तडफदार,

वारेजोड आठवणींनी दाटी केली होती. त्यांचे राजमन झाकाळून गेले होते. मन मनाशीच जाबसाल करीत होते. हाताशी काहीच आले नाही की सुन्न आणि निसूर होत होते.

राजांनी पुढे होत आऊसाहेबांचे पाय शिवले. जिजाऊसाहेबांनी आपली मान वर उठविली. त्यांचे डोळे भरून आले होते. दाटल्या कंठात शब्द अडकून पडले होते. समोर शंभूराजे बघताच त्यांचे दाटले मन तर गलबलून उठले.

पुढे होत थोरल्या आऊसाहेबांच्या पायांवर मस्तक ठेवण्यासाठी वाकणाऱ्या शंभूराजांचे, गडबडीने उठून खांदे पकडीत त्यांना दूर सारीत जिजाऊ स्वतःशीच बोलल्यागत म्हणाल्या – "नको ऽऽ बाळराजे, आज तरी नको!!"

खालच्या मानेने गोंधळलेले राजे पडल्या आवाजात म्हणाले, "पिंडदानासाठी आम्ही गड उतरतो आहोत मासाहेब ... कानंद नदीच्या तीरावर जात आहोत ..."

"या." म्हणत जिजाबाई पाठमोऱ्या झाल्या आणि महालाच्या गवाक्षाच्या रोखाने संथ चालू लागल्या.

त्यांच्या महालाच्या बाहेर पडणारे राजे शंभूबाळांच्या खांद्यावर एक हात ठेवून विचार करीत होते की, आज आऊसाहेबांनी बाळराजांना मुजऱ्यासाठी का झुकू दिले नाही? बाळराजांचे काही चुकले तर नाही ना? राजांना उत्तर सापडत नव्हते.

गवाक्षाच्या महिरपीतून दिसणाऱ्या कानंद नदीच्या वळणदार पात्राकडे बघत जिजाऊ मात्र आपल्या हरवलेल्या सौभाग्याच्या पायवाटा आठवीत स्वतःला म्हणत होत्या, "शंभूबाळ ऽ, तुम्ही – तुम्ही थेट तुमच्या थोरल्या महाराजसाहेबांच्यासारखे दिसता!! थेट आमच्या स्वारीसारखे!"

राजांनी शहाजीराजांच्या वर्षश्राद्धाचे पिंड कानंदीच्या धुकटलेल्या पात्रात विसर्जित केले. शेजारी उभ्या असलेल्या शंभूराजांना पिंड पात्रार्पण करण्याची नजरेनेच इशारत केली. जमलेल्या ब्रह्मवृंदाला गोदाने देण्यात आली आणि ते भोसलाई पितापुत्र कानंदीचा काठ सोडून राजगडाच्या पायथ्याच्या रोखाने पायीच परत निघाले.

"आबासाहेब, पिंड कशासाठी सोडायचे असतात नदीत?" शंभूराजांच्या अचानक प्रश्नाने राजांची विचारसाखळी तुटली. कपाळीचे शिवगंध आक्रशीत राजांनी बाळराजांच्याकडे पाहिले आणि ते बोलून गेले, "गेल्या पिढ्या त्याने उद्धरून जातात बाळराजे! त्यांनी घालून दिलेल्या वाटांची जिम्मेदारी उजळून निघते." राजांनी शांतपणाने बाळराजांचा खांदा थोपटला. बाळराजांना फारसे काही समजले नव्हते.

पालखी गड चढून पद्मावती माचीवर आली आणि तटसरनोबत सिदोजीरावांनी पायउतार होणाऱ्या राजांना मुजरा घालीत वर्दी दिली, "खबरगीर बहिर्जी नाईक आत्ताच गडदाखल झाले आहेत. पेश होण्याची आज्ञा मागतात." सिदोजींच्या वर्दीबरोबर राजांच्या कपाळी आठ्यांचे जाळे दाटले. धीरगंभीर आवाजात ते म्हणाले, "माचीच्या

सदरेवर पेश करा बहिर्जींना."

बाळराजांच्यासह राजे सदरमाचीकडे आले. सदरकऱ्यांचे मुजरे आपलेसे करीत राजे आणि शंभूराजे सदरबैठकीवर बसले. बसता बसताच हातखूण करून त्यांनी सदरकऱ्यांना निरोप दिला. एकेक सदरकरी मुजरा भरत बाहेर पडला. सदर रिकामी झाली. बहिर्जींना पेश करून सिदोजी थोपटेही सदरचौकाबाहेर पडले. राजांच्यासमोर खबरगिरांचा नाईक बहिर्जी मुजरा करून खाली मान घालून उभा होता.

"बोला नाईक..." राजांनी बहिर्जीला धीर दिला. शंभूबाळांच्या पायांवर नजर जोडून बहिर्जीने कापऱ्या आवाजात खबर पेश केली –

"धनी, जयसिंग मिरजा राजा तीस हजार स्वार, बराबर दिलेरखान, पाच हजार पठाण अशी मातबर फौज चालून येतीया. गनिमांचा तळ बुऱ्हाणपुरावर ठाण झालाय. जागजागच्या जमेती येऊन जयसिंगाच्या फौजेत दाखल व्हायला लागल्या!" बहिर्जींचा ऊर कोंदाटला.

ती खबर ऐकताच राजे सदरबैठकीवरून तडक उठले. त्यांच्या हाताची बोटे छातीवरच्या कवड्यांवरून सरासर फिरू लागली. मनात विचारांची घोडी धावू लागली.

आपल्या सालगिराला – वाढदिवसाला शिवाजीच्या मरणाची स्वप्ने पाहणाऱ्या औरंगजेबाने मिर्झा राजे जयसिंग या राजपूत सरदाराला राजांच्यावर नामजाद केले होते. एका राजपुताकडून दुसऱ्या राजपुताला उखडून काढण्याचा, काट्याने काटा काढू बघणारा राजकीय डाव औरंगजेबाने टाकला होता. हे काम बरोबर होते आहे की नाही यावर सख्त नजर ठेवण्यासाठी दिलेरखान पठाणाचा लोढणा मिर्झा राजाच्या गळ्यात अडकवून टाकला होता.

बहिर्जींची खबर ऐकून राजे क्षणभर सुन्न झाले खरे, पण लागलीच स्वतःला सावरून ते म्हणाले, "बहिर्जी, दूरची धावणी झाली. काही खाऊन घ्या. या." बहिर्जी मुजरा करून निघून गेला.

विचारात हरवलेले राजे संगती शंभूराजांना घेऊन पद्मावतीच्या सदरेमागून बालेकिल्ल्यावर बाहेर निघणाऱ्या भुयाराच्या तोंडाशी आले. भुयारावर पहारा देणाऱ्या धारकऱ्यांनी मुजरे करून भुयारावरची थोराड आडधोंड बाजूला हटती केली.

मेसाच्या वाकावर चकमकीच्या दगडाच्या ठिणग्या टाकून दोन मावळ्यांनी त्या वाकानं आगटी तयार केली. आगटीवर करंजेल सोडलेले पलोते त्यांनी पेटते केले. आणि राजांना भुयारवाट दाखविण्यासाठी ते मावळे भुयारात उतरले. त्यांया मागून राजे भुयारात उतरले. मागे तोंडाशी उभ्या असलेल्या शंभूराजांना त्यांनी आपला हात देऊन भुयारात घेतले!! पलोत्याच्या धूसरमंद प्रकाशात एकामागून एक उतरत्या दगडी पायऱ्या मागे पडू लागल्या.

राजे काही बोलत नव्हते. बाळराजे त्यांच्या पावलावर पाऊल टाकीत मागून येत होते. त्यांना हे भुयार संपणार केव्हा असे झाले होते. त्यांनी मागून चालता चालताच राजांना

विचारले, "महाराजसाहेब, हे भुयार संपणार केव्हा?" बाळराजांचा आवाज भोवतीच्या फरसबंदी घुमटात घुमून उठला, "महाराजसाहेब, हे भुयार संपणार केव्हाऽऽ?"

त्या घुमत्या आवाजाने राजे क्षणभर जागीच खिळल्यासारखे झाले. मागे न बघताच म्हणाले, "शंभूबाळ, आमच्या मागून चालते या!! भुयारं कधीच संपत नसतात. चाल कधीच थांबत नसते!!" राजांचे धीरगंभीर शिवबोल भोवतीच्या फरसबंदीच्या घुमटात तसेच घुमून उठले, "शंभूबाळ, आमच्या मागून चालते या!! ..." आणि राजे समोर तडक चालू लागले. त्यांच्या पायाबरहुकूम त्यांचा भोसलाई फर्जंद शंभो मागून चालू लागला!!

राजे कर्नाटक मोहिमेवर निघून गेले. नेहमीप्रमाणे. बाळराजांना सराव देण्यासाठी फरीगदक्याच्या मैदानात, कमर कसलेले गोमाजीबाबा पवित्रा धरून खडे ठाकले होते. शिरा तटतटल्यामुळे त्यांच्या पोटऱ्यांवर मांडचोळणा कचला होता. बुरणूस भरलेली, चामड्याची खोळ असलेली थाळीएवढी फरी त्यांनी डाव्या हाताने पुढे सरशी धरली होती. उजव्या हातातील दीड हात लांबीचा गदका नाचवीत ते समोर उभ्या असलेल्या शंभूराजांना म्हणाले, "हां, धरा म्हवरा धाकलं राजं. नदर माज्या पायावं आन गदक्यावर ठिवा." गोमाजींचे पांढरे कल्ले क्षणभर लकलकले. मोहरा धरलेले पाय चढाईसाठी जमिनीत रुपले.

फरीच्या परजात चढविलेली मूठ क्षणभर घट्ट आवळून शंभूराजांनी उजव्या हातातील गदका पेलला. डावा पाय आणि फरी धरलेला डावा हात पुढे टाकून कमरेला सावध बाक देत त्यांनी पवित्रा घेतला. गोमाजींनी पुढे केलेल्या गदक्याला आपला गदका भिडवीत ऐटबाज सलामी दिली.

"जय भवानी ऽ!" गर्जत गोमाजींनी चढाईसाठी गदका मागे घेतला. म्हाताऱ्याचे डोळे लकलकत फुलू लागले.

"जय भवानीऽ!" गर्जत शंभूराजांनी गोमाजींच्या वाराचा अंदाज घेण्यासाठी अंग चोरले. फरीगदक्याचा 'घाई' हा मारगिरीचा प्रकार सुरू झाला. गोमाजी लगीत चौक फिरू लागले. इशारत देऊन चढाईचे ठरीव वार टाकू लागले. गुबगुबीत फरी आडवी टाकून शंभूराजे ते वार तटवू लागले. त्यांचे चपळ शरीर नागफण्यासारखे डुलू लागले. त्या दोघांना भवानीच्या राजगडाचे भान उरले नव्हते. त्यांच्या तापल्या शरीरावर घामाचे थेंब उठू लागले. गदका फरीला भिडताच 'धपू, धपू' असे आवाज मैदानात उठू लागले.

'घाईच्या' चढाईत शंभूराजांनी गदका जराही अंगाला लावून घेतला नव्हता. गोमाजी त्यांच्या सावध नजरेवर मनोमन खूष होते. सरावाचा पहिला टप्पा संपला. 'होऽ!' म्हणत गोमाजींनी थांबण्याची इशारत केली. कपाळावर थबथबलेला घाम

तर्जनीच्या पन्हाळीने निचरा करीत ते म्हणाले, " वय जालं आता धाकलं राजं. अंग लगी घामेजतं! हां, घ्या बघू आता ' छूट '!"

गोमाजींनी ' छूट ' या चढाईचा पवित्रा घेतला! म्हाताऱ्याचे शरीर रानवाऱ्यासारखे झाले! वार करायला ते आता सापडणार नव्हते. आणि ते कसे चालून येणार हे समोरच्या खेळ्याला कळणार नव्हते! ' छूट ' हा चढाईचा प्रकारच ' बेछूट ' मारगिरीचा होता! गनिमाशी झुंज घेताना ' मारेन वा मरेन ' या निधडेपणाने लढावे तसे हे हात होते. आता इशारत करून वार टाकायचे नव्हते. मन चाहेल तसे शत्रूला हूल देऊन त्याच्या ढिल्या अंगावर वार उतरायचे होते. त्यांच्या ढिलेपणाची गय करायची नव्हती. शंभूराजांनी फरी आडवी धरून गदका पेलला. आपल्या हातातील गदका उगाच डावा उजवा झुलवीत गोमाजी चपळ पायांनी इकडे तिकडे फिरू लागले. बाळराजांची गदक्यावरची नजर ढळती करण्यासाठी अंग लवते करून ते हूल भरू लागले. शंभूराजे गदक्यावर जोडलेली नजर हलवायला तयार नव्हते. तेही चाल हेरत सावध झुलू लागले.

" बाळराजं, वार कारीगर व्हनार हां! हुशार असा." गोमाजी धीमेपणाने बोलले.

" नाही होणार!" नजर गोमाजींच्या हातातील गदक्यावरच जखडती ठेवून शंभूराजे निर्धाराने उत्तरले.

एकाएकी गोमाजींनी आपल्या हातातील गदका एकदम उंच उठविला आणि बाळराजांना गोंधळून टाकण्यासाठी नरड्याची घाटी फुलवीत ' हार हार ऽऽ म्हादेव!' अशी अंगावर काटा उठविणारी जोरदम किलकारी दिली. त्या किलकारीने शंभूराजे बिचकले! त्यांची फरी आडवी टाकायची चुकली! वार डोक्यावर होणार म्हणून त्यांनी फरी डोक्यापर्यंत वर उचलली! आणि काय होतंय हे कळायच्या आतच गोमाजींच्या गदक्याचा जबरदस्त वार त्यांच्या छातीखाली आदळला!! त्या कळीसरशी सणकलेले बाळराजे कळवळून उठले.

एकदम हातातील गदका फेकून देऊन धावत जाऊन गोमाजींनी वार केल्या जागेवर आपला तळवा दाबून धरला. त्यांच्या थरथरत्या पांढऱ्या मिश्यांतून शब्द आले, " तुम्हावं असा वार टाकताना जिवाला काय वाटतंया कसं सांगावं? पर बेहुशार ऱ्हाऊ नगा. हत्यार चालवायचं म्हंजी दिल तयार असाय लागतो. लढाईत ह्या परास लई मोटा गरादोळ उठतो. बाळराजं त्येनं कच खाकून ऱ्हाई भागायचं!" गोमाजींच्या इमानी डोळ्यांत पाणी उभे राहिले. त्यांचा हात बाजूला परता सारीत शंभूराजे कडवे बोलले, " आम्ही कच खाणार नाही!! घ्या मोहरा गोमाजीबाबा!"

पुन्हा ' छूट ' ची मारगिरी करण्यासाठी पवित्रे घेण्यात आले. शंभूराजे छातीवरची कळ विसरून गेले. त्यांच्या डोक्यात डावपेचांच्या विचारांची घोडी दौडत होती. समोर गोमाजीबाबा आहेत याचा त्यांना विसर पडला. त्यांना फक्त गोमाजींच्या हातातील गदका आणि त्यांचे पाय दिसू लागले.

सावध पाय टाकीत, गदका झुलवीत शंभूराजे गोमाजींना डावी-उजवी हूल देऊ लागले. समोरून त्यांच्यावर वार टाकणे अवघड आहे हे त्यांनी हेरले. ढिल्या अंगाने शंभूराजे क्षणभर डुलले आणि ' जय भवानीऽ ' अशी बेभान किलकारी भरून ते डोळ्याचे पाते लवायच्या आत दोन छलांगीतच गोमाजीबाबांच्या थेट पाठीवर गेले. ओठ दाताखाली दाबून धरून त्यांनी गोमाजींच्या उघड्या पिंढरीवर गदक्याचा जोरदार वार उतरविला! एक झरझरती कळ उठली. गोमाजींच्या पिंढरीकडून सर्रकन माथ्याकडे सरकली. आणि ओठांतून मात्र नकळत शब्द बाहेर पडले, " भले!" गोमाजींच्या पिंढरीतून कळ उठली होती आणि डोळ्यांत आनंदाचे अश्रू जमा झाले होते! गदका खाली टाकून ते बाळराजांच्या जवळ आले. कलकलत्या डोळ्यांनी त्यांच्याकडे बघून, त्यांचे खांदे मायेने थोपटीत म्हणाले, " आमची ही हाडं पार म्हातारी झाली बाळधनी, पर लई वार झेलल्यात आमी. चिवट झाल्यात आमची चमडी. तुटता तुटायची नाही!! तुमचं धा वार अंगावं पडलं तर धा दागिनं चढलं अंगावं बाळराजं!" गोमाजी भरल्या नजरेने आपल्या धाकट्या राजांच्याकडे बघत होते.

" गोमाजीबाबा ऽऽ!" एकाएकी मैदानाच्या दरवाज्याच्या रोखाने साद धावत आली. गाड्याचा अंतोजी धापावत येत होता. गोमाजींच्या मनात पाल चुकचुकली. काळजात मासळी सरकली. अंतोजीची सादर कातरी होती.

ऊर खालीवर होणाऱ्या, समोर उभ्या राहिलेल्या अंतोजीला त्यांनी हटकले, " का– काय जालं रं अंता?"

" मासायबांनी बाळराजांस्नी घिऊन यायला धाडलं. आपलं ... आपलं पंतकाका ग्येलं!!"

" आँऽ कोन?" म्हणून टाळा वासताना गोमाजीबाबांच्या गलमिश्या थरथरल्या. ते अंतोजीकडे डोळे फाडून बघतच राहिले.

" डबीरकाका!" अंतोजी खालच्या मानेने पडल्या आवाजात म्हणाला.

अंतोजीने आणलेली खबर ऐकताना शंभूराजे फरी गदक्याचे घाई, छूटचे हात पार विसरून गेले. त्यांच्या हातातील गदका केव्हा घरंगळून पडला ते त्यांचे त्यांनाच कळले नाही. त्यांच्या भावुक डोळ्यांसमोर महाबळेश्वराच्या माथ्यावरचा तुलेचा सज्जा उभा ठाकला होता. अंगथोर रुपेरी पारड्यात बसलेले थरथरत्या मानेचे सोनोपंत डबीर त्यांना दिसत होते! दुसऱ्या पारड्यात झुकते झालेले आबासाहेब खणखणत्या सोनमोहरा ओंजळी-ओंजळींनी सोडताना त्यांना दिसू लागले! पंतकाका बसलेले पारडे फरसबंदी सोडून आस्ते आस्ते वर उठताना दिसू लागले.

गोमाजीबाबांचे बोल शंभूराजांना, पारड्यात बसलेल्या डबीरकाकांच्या तोंडातून बाहेर पडल्यासारखा भास होत होता– " आम्ची ही हाडं पार म्हातारी जाली. पर लई– लई वार झेलल्यात आमी!"

राजे बसनूरस्वारीवर गेल्याला एक महिना लोटला. होळीपुनवेचा दिवस राजगडावर उजाडला! गडावरच्या मानकरी मावळ्यांनी कानंदखोरीत शोधतपास घेऊन ऐनाची सरळसोट, चखोट होळी तोडून ती वाजतगाजत गडावर आणली. होळी चौकात आंबवतीने नटलेली होळी खडी ठाकली.

पुनवेचा थाळ्याएवढा चंद्र बारा मावळाचे कातळकडे पार करून उगवतीबाहेर आला. झोपडाखोपटांत पोळी नि कटाच्या आमटीवर ताव मारलेले मावळे, मस्तकावर कंगणीदारं लाल पिळाच्या पगड्या चढवून होळीचौकात जमाव करू लागले. चौकात होळीचा लाकडी हुडवा रचण्यात आला होता. खाशा स्वाऱ्यांसाठी बैठकीचा चौथरा सिद्ध ठेवला होता. लोखंडी धावकड्यांना थरारून टाकीत रणहलग्यांची कातडी तडतडू लागली! ती रोमांचक तडतड गडावरून उतरून कानंदखोऱ्यात पसरून घुमू लागली. गडमाथ्यावर चांदण्याच्या दाट चंद्ररसाचे पाट वाहू लागले.

अंगी निळाशार जामा घेतलेले, मस्तकी केशरी टोप चढविलेले शंभूराजे कमरेला आवळलेल्या जमदाडीच्या मुठीवर डाव्या हाताचा तळवा रुतवीत जिजाऊसाहेबांच्या खासेमहालात आले. होळीचौकातून वर्दी आली होती– "खाशा स्वारीनं चूड दिल्याशिवाय होळी पेटती होणार नव्हती. होळीचे खेळे खोळंबले होते!"

जिजाबाईंच्या पायांना हात लावण्यासाठी शंभूराजे झुकते झाले. त्यांना उठते करीत जिजाबाई म्हणाल्या, "बाळराजे, जा हुडव्याला चूड देऊन या. होळकरी खोळंबलेत."

"मासाहेब ..." शंभूराजे काहीतरी बोलणार होते, पण संकोचले. शब्द ओठांत ठेवून थांबले.

"का काय झालं?" जिजाबाईंनी मायेने त्यांना विचारले.

"...!" शंभूराजे गप्पच होते.

"बोला. मनी असलेलं साफ करावं." जिजाऊंनी धीर दिला.

जिजाबाईंच्याकडे आदराने बघत शंभूराजे म्हणाले, "तुम्ही ... तुम्ही याल आमच्या संगती? होळीचा हुडवा पेटतो. जळत्या हुडव्यातून खेळे नारळ बाहेर काढतात. खूप मजा येते! याल?"

ते ऐकताना जिजाबाईंचा ऊर भरून आला. मनात विचारांची कारंजी उसळली. "आम्हाला कधी कुणी 'बरोबर या' असा आग्रह केला नाही! आम्ही जातो म्हणून ठरविलेल्या वाटेनं आम्हास जाता आलं नाही!"

जिजाबाईंना गप्पनिसूर बघून शंभूराजे वरमले. "चुकलं आमचं ..." म्हणत झुकता मुजरा करीत करीत मागल्या पावली पाच कदम मागे हटू लागले.

जिजाबाई म्हणाल्या, "थांबा आम्ही येतो आहोत!" आणि ते ऐकत असताना शंभूराजांच्या डोळ्यांत पुनवेचे दहीदाट चांदणे उतरले!

अंगाभोवती शालनामा लपेटून घेतलेल्या मासाहेब बरोबर शंभूराजांना घेऊन होळीचौकाकडे चालल्या. प्रतापगडची जगदंबाच आपल्या बालभुत्याला घेऊन चालावी तसे ते दृश्य दिसत होते! एक जाणता 'स्त्रीवसा' आपल्या नेणत्या 'बाळवशाला' घेऊन चालला होता.

"खाशा आऊसाहेबांची स्वारी बाळराजांच्यासह होळीचा मान राखण्यासाठी येते आहे." ही खबर वाऱ्यासारखी होळीचौकात पोहोचली होती. हरखून गेलेल्या मावळ्यांच्या जमावात चैतन्याचे कसे उधाण उठले. रणहलग्यांनी टिपेच्या सुरांची तडतड घुमवायला सुरुवात केली.

निळो सोनदेव, प्रतापराव सिलीमकर, झुंजारराव मरळ, गोमाजीबाबा, सिदोजी थोपटे, अंतोजी आणि रायाजी अशा सरंजामात जिजाऊ आणि शंभूराजे होळीचौकात आले. मावळ्यांचा चंदेरी कालवा थांबला. रणहलग्यांच्या टिपऱ्यांची तडतड निसूर झाली. आभाळातून झिरपणारे चांदणेही खिनभर थिरावले!

शंभूराजाच्यासह जिजाऊ चौथऱ्याच्या खाशा बैठकीवर सुखावल्या. चौकातल्या हुडव्याचा मानकरी हाती पेटता चूड घेऊन मुजरा करीत मासाहेबांच्या सामने आला. अदबीने म्हणाला, "होळीचा मानाचा चूड धाकल्या राजांनी हुडव्याला द्यायला पायजे मासाब."

जिजाऊंनी मान वळती करून शंभूराजांच्याकडे बघितले. शंभूराजे बैठकीवरून उठले. मासाहेबांच्या पायांना हात लावून ते चौकातल्या हुडव्याजवळ आले. मानकऱ्याने आपल्या हातातील चूड त्यांच्या हाती दिली. आपली नजर शंभूराजांनी हातातील चूडीच्या उसळत्या ज्वाळेवर क्षणभर रोखली. चूड अधिकच पेटून उठली!

'जय भवानी' गर्जत शंभूराजांनी होळीच्या लाकडी हुडव्याला चूड दिली. आगीची पाखरे आभाळाच्या रोखाने झेपावू लागली. हुडवा धडधडू लागला. तोंडाच्या हलग्यावर पालथ्या मनगटांच्या टिपऱ्या पडून घुमल्या! होळीने सूर धरला.

शंभूराजे बैठकीच्या चौथऱ्यावर येऊन बसले. नारळाची फळे पेटत्या हुडव्यात धडाधड फेकली जाऊ लागली. ती बाहेर काढण्यासाठी आगवेड्या, धाडशी मावळ्यांनी हुडव्याभोवती रिंगण धरले. एकेक निधडा हात बेधडक रसरसत्या निखाऱ्यात घुसू लागला. होरपळून मागे हटू लागला.

रोखल्या नजरेने जिजाबाई हुडव्याच्या चटचटत्या, लालपिवळ्या ज्वाळांकडे बघत होत्या. त्यांच्या मनात शिवाजीराजांचे विचार रिंगण धरून फिरत होते– "कुठं असतील राजे? काय करत असतील?"

"मासाहेब..." शंभूराजांच्या आवाजाने त्या भानावर आल्या.

"काय बाळराजे?"

"अशाच एका होळीसणाला आम्ही आबासाहेबांना विचारलं होतं ..."

"काय ?"

"आबा, तुम्ही काढाल काय हुडव्यातील नारळ बाहेर म्हणून ?"

"मग काय म्हणाले ते ?" जिजाबाईंनी उत्सुकतेने विचारले.

"म्हणाले – कोशिस करू !" शंभूराजांनी उत्तर दिले.

ते ऐकताना डोकीवरचा पदरकाठ ठीक करीत जिजाबाईंनी एक लांब निःश्वास सोडला. बाळराजांच्याकडे बघत त्या म्हणाल्या, "शंभूबाळ, प्रसंग ठाकलाच तर तुम्हासही आणि आम्हासही ती कोशिस करणे पडेल !"

होळी पुनवरात चांदणे पेरत गडावर चढत होती. मावळे निखाऱ्यातील नारळ फळे हुडव्यात हात घालून बाहेर काढीत होते. होळीच्या मानाची सोनकडी शंभूराजे मासाहेबांच्या साक्षीने मानकऱ्यांना बहाल करीत होते. त्यांना किंवा जिजाऊसाहेबांना काहीच कल्पना नव्हती की बसनूर लुटून, गोकर्ण महाबळेश्वरावर शिवलिंगाचे दर्शन घेऊन नेमके आजच राजे कारवार बंदरावर उतरले असतील.

कारवारात टोपीकर इंग्रजांच्या वखारी लुटण्याचा राजांचा मनसुबा होता, पण शेरखान हा आदिलशाही सरदार फौजेनिशी होळीच्याच दिवशी कारवारात घुसला होता. त्याने पाच हजार होनांची खंडणी राजांना देऊन कारवार वाचविले होते. त्यांच्याकडून आलेले खंडणीचे पाच हजार होन थैलीबंद करून कारवार सोडताना राजे सरलष्कर नेताजींना म्हणाले, "आज शेरखानाने आमच्या होळीची शिकार घालविली !!"

कर्नाटक प्रांतीची लूट घेऊन राजे कारवार, भीमगडमार्गे राजगडावर आले. गडावर येताच त्यांना खबर मिळाली की, औरंगाबादेत शाहजादा मुअज्जमची भेट घेऊन मिर्झाराजे जयसिंग आणि पठाण दिलेरखान पुण्याच्या रोखाने कूच झाले आहेत. पावसाळी नदी क्षणाक्षणाला फुगावी तशी मिर्झाराजांची फौज फुगून ऐंशी हजारांवर गेली आहे. जव्हारचा राजा, अफजलखानाचा मुलगा फाजलखान, जावळीकर मोरे, देसाई, दळवी ह्या राजांच्या शत्रूंना, मित्र मानून, त्यांच्या मिळतील तेवढ्या जमेती पोटात घेऊन, ऐंशी हजारांची हिरवी वावटळ चालून येत होती. ती येती प्रचंड लाट परतविणे शक्य नव्हते. थोपवून धरणे अशक्य होते आणि नुसते बघत राहणे तर केवळ असह्यच होते !

बारामावळाचे आघाडीचे गडकिल्ले आता बंदिस्त राखणे भाग होते. बालेकिल्ल्याच्या सदरेवर राजे चिटणीस बाळाजी आवजींना खलित्याचे मायने-मजकूर सांगू लागले. त्यांच्या उजव्या हाताच्या तर्फेला संभाजीराजे बसले होते. सदरबगल धरून मोरोपंत, कुडतोजी गुजर, येसाजी कंक, मानाजी भोसले, मुरारबाजी, नागोजी आणि बहिर्जी फर्जंद, निराजीपंत, आण्णाजी दत्तो अशा मंडळींनी बैठकीचा फेर धरला होता. कुणीच काही बोलत नव्हते. राजे मजकूर सांगू लागले. बाळाजींच्या हातचे शहामृगपीस कुरकुरू लागले – अक्षरांचे मोती उमटू लागले.

"प्रस्तुत जासुदांनी समाचार आणिला की मिरजा राजा जयसिंग रजपूत बरोबरी दिलेरखान पठाण ऐंशी हजार बाकी फौज घेवोन चालोन येतो आहे. तरी तुम्ही जेवढे जेवढे कदीम, जाणते असाल ते ते बरे सावध हुशारीने जागचे जागी असणे, पहारेकरी-मेटकरी जेवढे म्हणोन असाल ते रात्रीचा दिवस समजोन चखोट हत्यार बंद राहणे. दाणागोटा, गवतकाडी, बारुदगोळा यावरी बरे ध्यान राखणे. आम्ही खासे तुरंतच गडदाखल होत आहोत ..."

बाळाजींनी थैल्यांचे फासबंद आवळून त्या सिद्ध केल्या. राजांनी आपल्या प्रत्येक सरदाराला जरुरीच्या सूचना दिल्या. ते धीराने प्रत्येकाशी बोलत होते. पण त्यांच्या मुद्रेवरची चिंतेची काजळी प्रत्येकाला खोल कुठंतरी जाणवत होती. उभा राजगड जखडल्यागत झाला होता. महाराज सरदारांना देत असलेल्या सावध सूचना संभाजीराजे विस्मित मनाने ऐकत होते.

संभाजीराजांना घेऊन राजे सदरेवरून आपल्या महालात आले. मिर्झा राजा कोण प्रकारची चाल घेईल याचा विचार करण्यात ते हरवले होते. संध्याकाळची लांबट किरणे अजून बालेकिल्ल्यावर रेंगाळत होती. मंचकावर बसलेले बाळराजे अस्वस्थ फेऱ्या घेणाऱ्या राजांकडे एकनजर बघत होते. शेवटी न राहवून त्यांनी राजांना विचारले, "महाराजसाहेब, रजपूत म्हणजे काय ?"

राजांचे फेऱ्या घेणारे पाय तो प्रश्न ऐकताच जखडल्यासारखे झाले. तो प्रश्न राजांचे काळीज पार चिरत गेला होता. क्षणभर ते बाळराजांच्याकडे बघतच राहिले. मग धिम्या पावलांनी ते मंचकाजवळ आले. शंभूराजांच्या डोळ्यांत आपले डोळे खोल रुतवून दाटल्यासारख्या घोगरट आवाजात त्यांना म्हणाले, "रजपूत म्हणजे राजाचे पुत्र ! राजाचे फर्जंद ! राज्य करणारे. पण ही फार जुन्या काळची बाब झाली ! आता 'रजपूत' 'राजबंदे' झाले. नमकहिलाल चाकर झाले ! तुम्ही रजपूत आहात, आम्ही रजपूत आहोत आणि मिर्झा राजाही रजपूतच आहे !" आणि मग राजे कितीतरी वेळ शंभूराजांना रजपूत, राजपुताना, मिर्झा राजे, औरंगजेब, मोगलशाही याबद्दल बरेच काही सांगत राहिले. एक दीर्घ निःश्वास फेकता सोडून ते मंचकाजवळ गवाक्षाच्या महिरपीजवळ आले. महालाच्या रोषणनाईकाने अजून बैठकीत पेटते टेंभे चढविले नव्हते. राजांना उगाच आपली राजमुद्रा आठवली, "प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ..."

मंचक उतरून राजांच्या पाठीशी येऊन संभाजीराजे उभे राहिले. त्या दोघा पितापुत्रांना परशूचा आकार घेत डुबतीला लागलेले सूर्यबिंब दिसत होते. शंभूराजांच्या मनात विचार घोळत होते, "आम्ही रजपूत आहोत. मिर्झा राजाही रजपूतच ! कसा असेल तो मिर्झा राजा ? आबासाहेबांच्या सारखा ? छे ऽ ! मग महाराजसाहेब त्याच्यासाठी एवढे चिंतेत पडलेच नसते !!"

बाहेर ऊन तावत होते. उभा राजगड आत पोळून निघत होता. संभाजीराजांच्या महालात, आपल्या गोंदल्या हाताने माठातील थंडगार पाण्याचा पेला शंभूराजांच्या हाती देताना धाराऊ म्हणाली, “कायली व्हतीया जिवाची निस्ती!” आणि तिने आपल्या कपाळावर दाटी केलेला घाम डाव्या हाती पदर घेऊन निपटला. इतक्यात जिजाबाई महालात आल्या.

घाम पुसलेला अंगावरचा पदर धाराऊने लगबगीने ठाकेठीक केला. शंभूराजे आऊसाहेबांना बघताच कमरेत वाकले. पेला डाव्या हाती घेत त्यांनी मुजरा केला.

“घ्या” म्हणत जिजाऊंनी पुढे होत पेला त्यांच्या ओठांना भिडविला. पाणी पिताना बाळराजांना पापण्या क्षणभर मिटल्या गेल्या. जिजाऊंची नजर त्यांच्या कपाळीच्या दोनदळी शिवगंधावर गेली. सकाळी त्यांनीच ते बाळराजांच्या कपाळी रेखले होते. गडावर अनेक दासदासी होत्या, राजांचा सात राण्यांचा राणीवसा होता पण बाळराजांच्या कपाळी शिवगंध रेखण्याचे काम जिजाबाईंनी कुणाच्याही हाती आजवर जाऊ दिले नव्हते. त्यांचे ते समाधान होते. कसले होते? कसे होते? हे कुणालाही सांगता येणार नव्हते.

हातचा रिता पेला बाळराजांनी चौरंगावर ठेवला. जिजाबाई त्यांना काही बोलणार होत्या इतक्यात पाली दरवाज्यावरची गडचढीची दुडदुडणारी नौबत सर्वांच्या कानांवर आली. जिजाऊंचा चिंताक्रांत, आक्रसलेला चेहरा क्षणभर त्यामुळे उजळल्यागत झाला. “चला बाळ शंभू, राजे गड चढताहेत. सदरेवर जाऊ.”

जिजाबाईंनी बाळराजांचा हात आपल्या हाती घेतला आणि त्या सदरेच्या रोखाने चालू लागल्या.

तोरणा, प्रतापगड, चंदन-वंदन, रोहिडा, पुरंदर अशा बारा मावळांतील आपल्या साऱ्या किल्ल्यांची नाकेबंदी नजरेखाली घालून राजे राजगडाकडे परतत होते.

पद्मावती माचीवर राजांची पालखी ठाण झाली. माचीमागून निघणाऱ्या भुयारमार्गाने राजे बालेकिल्ला चढून वर आले. सदरप्रवेश करणाऱ्या राजांना जिजाबाई डोळे जोडून बघत होत्या. राजांचे कपाळ घामाने डबडबून गेले होते. दोनदळांचे शिवगंध त्यामुळे चौकाठाने ओघळले होते! ते बघताना जिजाबाईंच्या जिवाची नुसती काहिली होत होती!!

राजे राजगडावर आल्याला आठ दिवस लोटले नसतील तोच दिलेर-मिर्झाची प्रचंड शाही फौज मुळामुठेचे पाणी घुसळून टाकीत पुण्यात घुसली. गौर, हाडा, बुंदेला, राठोड, कछवाह, चंद्रावत अशा राजबंद्या राजपुतांच्या केशरी डेऱ्या-राहुट्यांची प्रतिबिंबे मुळामुठेच्या पाण्यावर तरंगत हिंदोळू लागली. दिलेरखानाच्या दिमतीखाली सगळ्या जातीचा ‘खान’ पुण्यात ठाण झाला. हत्ती, घोडे, उंट यांच्या कालव्याने प्रांत पुणे सुन्न

झाला. अब्दुल्लाखान, फत्तेलष्कर, महेली या अगडबंब तोफांची भांडी तोफखान्याचा प्रमुख मीर अतिशखान याने रांगेत आखून ठेवली.

पाठीकडे झुकते झालेले किमॉश डोक्यावर घेऊन, चुनीदार विजारीचे, डगल जाम्यावर झगमगीत जाकिटे चढविलेले दिलेरचे पठाणी आणि बहलिया हशम घोडे फेकीत पुण्यात धुमाकूळ घालू लागले. डोक्यावर केशरी साफे बांधलेले, हनुवट्यांजवळ दाढ्या पिळलेले मिर्झाराजांचे ‘कुँवर, सिंग आणि ठाकुर’ राजांच्या खबरा उचलण्यासाठी बारा मावळांत घुमू लागले.

आले! दिल्ली दरबारचे सगळ्यांत ताकदवर आक्रमण मराठी दौलतीवर चालून आले. प्रभू रामचंद्राच्या रघुकुलाचा वारसा सांगणारा मिर्झा राजा, राजांचे ‘श्री’चे राज्य तसनस करण्यासाठी स्वामिनिष्ठेच्या खिल्लती, काबे पांघरून आला. येताना तो रणचंडीचा कोटियज्ञ पेटवून आला होता. त्यात काही कमी पडायला नको म्हणून तो आता मराठी मुलखाची होळी पेटविणार होता. त्याची उमर साठ वर्षांची होती. साठीला बुद्धी नुसती नाठीच होत नाही तर खोटीसुद्धा होऊ शकते. कारण आजवर जे कधीच घडले नव्हते ते आता घडणार होते. मराठे-रजपूत एकमेकांवर उभे हत्यार धरणार होते! सूर्यवंशजाकडून लवकरच एक साक्षात सर्जा सूर्यच ग्रासला जाणार होता.

पुण्यात येताच मिर्झा राजाने तळाचा कबजा आपल्या हाती घेऊन राजा जसवंतसिंगाला रिहा केले. जसवंतसिंग दिल्लीच्या रोखाने कूच झाला.

आपल्या डेऱ्यात बसून हुक्क्याच्या नळीतून धुराचे फव्वारेच फव्वारे फेकीत दिलेरखान शिवाजीच्या कुठल्या किल्ल्यावर आग ओकावी या खयालात डुबून गेला होता. मुहम्मद तर्खान, रसूलबेग रोझमानी, कुवतखान, सैयद बुखारी, तुर्कताझखान, झबरदस्तखान, घैरत आणि मुजफ्फर, मीर अतिशखान हे शाही बंदे हात बांधून त्याच्या समोर खडे होते.

आपल्या आलिशान शामियान्यात खुशबूदार सरबताचे घोट घशाखाली सोडीत मिर्झा राजा शिवाजीवर किती ढंगाच्या चाली रचाव्यात याचा विचार करीत होता. उन्हाच्या तलखीने त्याचे पातळ ओठ पुन्हा पुन्हा सुकत होते. सरबत कामी येत नव्हते. अफजलखानाला ऊरभेटीत फोडणारा, शास्ताखानाची बोटे छाटणारा, शाही सुरतेची शान लुटणारा ‘सेवा’ त्याच्या डोळ्यांसमोरून हलत नव्हता.

मध्येच त्याच्या कपाळावरचा केशरी कुलटिळा आक्रसत होता. चढत्या उन्हाबरोबर त्याच्या जिवाची नुसती काहिली होत होती!!

नेहमीच्या पूजेतील स्फटिक शिवलिंगावर राजांनी आपल्या सडक बोटांनी बेलपत्रे वाहिली. क्षणभर आपल्या दळदार पापण्या मिटत त्यांनी हात जोडले. हे शिवलिंग कैकवेळा त्यांच्याशी न सांगता येणाऱ्या बोलीत, बोलत आले होते. काजळणाऱ्या

त्यांच्या मनाला हे स्फटिकस्वच्छ करीत आले होते. आज मात्र कधी नव्हे ती निळ्याशार कंठाची, भस्ममंडित अशी साक्षात शिवाची मुद्राच त्यांच्या मिटल्या डोळ्यांसमोर खडी ठाकली! तिचा दाट निळा कंठ बघताना राजांचे उभे राजेपणाचे भान थरकून उठले. त्यांनी डोळे उघडले. समोरचे स्वच्छ शिवलिंग अंगभर तळपतच होते.

शेजारी उभ्या असलेल्या संभाजीराजांना राजांनी नजरेने शिवलिंगावर बिल्वदले वाहण्याची इशारत केली. शंभूराजांनी तबकातील दोन बेलपत्रे स्फटिकसुंदर शिवलिंगावर वाहिली. राजांनी मिटले तसेच त्यांनी हात जोडून आपले डोळे मिटले. त्यांच्या मिटलेल्या छोटेखानी डोळ्यांसमोर मात्र महाबळेश्वरच्या माथ्यावर, कृष्णेच्या पात्रात गळाभर पाण्यात उतरलेल्या आबासाहेबांची – शिवपिंडीसारखी दिसणारी मुद्राच क्षणात उभी ठाकली!! ती दिसताच त्यांनी जोडलेले हात उचलून आपल्या कपाळाला नेऊन भिडवले.

"चला." राजे त्यांच्या खांद्यावर हात चढवीत म्हणाले आणि शंभूराजांच्यासह राजे जिजाबाईंच्या महालाकडे निघाले.

जिजाबाईंना वंदन करून ते त्यांच्या सोबतीने राजगडाच्या बालेकिल्ल्याच्या सदरेवर आले. सदरेवर सरलष्कर नेताजी, आनंदराव, कुडतोजी, येसाजी, मोरोपंत, निराजी रावजी, कर्माजी, आण्णाजी दत्तो, सिदोजी, रघुनाथपंत कोरडे अशी मंडळी हात बांधून उभी होती. कुणाचीच मान वर नव्हती.

अदबमुजरे झडले. राजे, जिजाबाई आणि बाळराजे सदरबैठकीवर बसले. वर्मी बाण लागलेले पाखरू, चीत्कारण्याची ताकद नसल्याने तसेच फडफडत जावे तसे काही क्षण गेले. एक सेवक जगदंबेच्या भंडाऱ्याची परडी घेऊन सदरेवर राजांच्यासमोर आला. काही न बोलता त्याने हातची परडी राजांच्यासमोर पेश केली.

भंडाऱ्याची पहिली चिमट सदरेच्या देवतेला उधळून राजांनी दुसरी चिमट आपल्या कपाळीच्या शिवगंधावर घेतली. भंडाऱ्याची परडी सदरभर फिरली. इमानी कपाळे भंडाऱ्याने भरली. राजांच्या हात-इशारतीवर सगळी मंडळी बसती झाली. भयाण शांतता पसरली.

कधी नव्हे एवढ्या जाणवणाऱ्या गंभीर आवाजात राजे बोलू लागले, "आम्हास ज्याची धास्ती होती ते समोर आले. औरंगशहाच्या मनी आमचे श्रींचे राज्य सलते. ते बुडवावे म्हणोन त्याने नामजाद केलेले दिलेर व मिर्झा पुण्यावर उतरले. मिर्झा राजाची चाल अजून खुली जहाली नाही. पण आम्ही ती जाणतो. आता त्याच्या जमेती कोंढाणा किंवा पुरंधराच्या रोखानं कूच करतील. औरंगशहास रजाबंद करण्यास मिर्झा राजा हरहुन्नरची कोशीस करेल. बोला मंडळी, तुमची जाणती मसलत बोला." राजे थांबले. बोलताना त्यांच्या तोंडी 'औरंगशहाचं' नाव येताच त्यांचे पेटून उठणारे डोळे आणि कातर आवाज संभाजीराजांना जाणवून गेला.

"रजपुताच्या गोटावर मारल्या समशेरीने चाल घेऊ या." कुडतोजी गुजर मान उठवून म्हणाले.

"तुमच्या निधड्या स्वभावाला धरून बोललात कुडतोजी! पण रजपूत एवढा गाफील नाही. मागच्या सरदारांच्या गफलती त्याच्याकडून होणार नाहीत. बादशहांच्या दोन दुया त्याने बघितल्या आहेत." राजे शांतपणे म्हणाले.

"मोगलाई मुलकात घुसून हूल देत त्येला अंगावं घेतला तर ..." नेताजींनी आपली थोराड पगडी डोलावीत मसलत पेश केली.

"मनचं बोललात नेताजी. आम्ही तीच कामगिरी तुम्हांस जोडून देणार आहोत. परिंड्याच्या परगण्यात तुम्ही फौजबंद होऊन उतरा. पण हा हुन्नरही किती नतिजा पावेल आम्हास शक आहे! मिर्झा राजे मुत्सद्दी आहे. धिमा आहे."

सगळे सदरकरी खामोश झाले. कुणालाच काही सुचत नव्हते. बराच वेळ राजे बोलत होते. मिर्झा राजाचा, पठाण दिलेरचा हुबेहूब परिचय करून देत होते. औरंगजेबाच्या चालबाज, धूर्त राजकारणी डावाची उकल करून सांगत होते. शेवटी ते म्हणाले, "आम्हांस औरंगजेबाच्या कडव्या चालीची खंत वाटत नाही. कीव वाटते ती मिर्झा राजाची. दिल्लीपती होण्याची त्याची योग्यता. तोच आज आमच्या पहाडखायांच्या मुलखात बादशहाचा नमकहिलाल चाकर म्हणोन उतरतो आहे. आता श्रींची इच्छा बलवत्तर. आमचा भार त्यांच्यावर." म्हणत राजे उठले.

मने जखडलेले सदरकरी उठले. त्यांच्यातील रघुनाथपंत कोरड्यांच्याकडे बघत राजे म्हणाले, "रघुनाथपंत, तुम्ही जरा आमच्या महाली भेटा."

राजांच्या पाठीवर झगमगणाऱ्या जाम्यावरच्या जरीबतूच्या ठसठशीत कोयरीवर डोळे जोडून जिजाबाईंच्या बरोबर चालताना संभाजीराजे कसल्यातरी विचारभिंगरीत अडकले होते. राजांच्या महालात येताच त्यांनी राजांना विचारले, "हा 'औरंगशा' असा कोण लागून गेला आहे की तुम्ही त्याच्याबद्दल इतकं बोलावं?"

त्यांच्या प्रश्नाने जिजाबाई आणि राजे चमकून एकमेकांकडे बघतच राहिले. आपल्या फर्जंदाला औरंगजेबाची खूणगाठ कशी द्यावी हे राजांना क्षणभर उमगलेच नाही! बाळराजांच्या जवळ येऊन त्यांच्या दोन्ही खांद्यांवर आपले तळहात चढवून, त्यांचे खांदे पक्के आवळून टाकीत, त्यांच्या कपाळीच्या शिवगंधाकडे बघत राजे म्हणाले, "तो दिल्ली तख्ताचा बादशहा आहे शंभूराजे! तो आम्हास कधीच दिसला नाही. तसा तो त्यांच्या बंद्या सरदारांखेरीज कुणासच दिसत नाही. पण त्याची करणी मात्र आम दुनियेला दिसते! त्याच्या सख्ख्या भावांना दिसली! खुद्द त्याच्या जन्मदात्या बापाला दिसली!" राजे बोलता बोलता थांबले.

"आम्ही त्या औरंगशहाला भेटून विचारावं म्हणतो ..." संभाजीराजांचे बोल पुरे झाले नाहीत. राजांनी त्यांच्या ओठांवर आपली तर्जनी ठेवीत झटकन त्यांची जबान

रोखली. " हां शंभूबाळ, सांब करो आणि तुमच्यावर तो प्रसंग कधीच न येवो ! " चौरंगावरील तबकात ठेवलेल्या स्फटिक शिवलिंगाकडे बघत राजे म्हणाले.

मिर्झा राजाने आपली चाल खुली केली. तीन पवित्र्यांत त्याचे सैन्य हलू लागले. सुप्यापासून जोडलेल्या पिछाडीच्या प्रत्येक ठाण्यावर तो हत्यारबंद, जागती शिबंदी पेरत आला होता. आपल्या प्रचंड फौजेचे गिधाडी पंख त्याने आता बारा मावळांत पसरले. खासा तो आणि दिलेरखान दोघे हुजरातीचे ताकदवर सैन्य घेऊन किल्ले पुरंधरच्या रोखाचे कूच झाले. मीर आतिशखान आणि निकोलो मनुची या गोऱ्या दरोग्यांच्या नजरेखाली खडखडाट करीत मिर्झा राजाचा तोफखाना पुरंधर जवळ करू लागला.

पेटली ! बारा मावळांची होळी ऐन तावल्या उन्हात पेटली. डोंगर-पायथ्यांना आसरा धरून उभी असलेली मौजी, खुर्द, बुद्रुके घोड्यांच्या दौडत्या टापांखाली रगडली जाऊ लागली. सर्पणाच्या रानशेणी आणि काटक्या गोळा करण्यासाठी बाहेर पडलेल्या तरण्याताठ्या कुणबी बायका, ' काफरकी दौलत – कमीनेकी औरत ! ' म्हणत चालत्या घोड्यांवर घेऊन, त्या हातपाय झाडीत किंचाळत असताना पळविल्या जाऊ लागल्या. त्यांच्या थरकत्या किंकाळ्या मावळाच्या दऱ्यांत गायब होऊ लागल्या. दावणीची जनावरे, नंग्या तेगींनी दावी छाटून तांड्यातांड्यांनी मोगली गोटांकडे हाकारली जाऊ लागली. शेपट्या उचलून, खूर झाडीत नवख्या मुलखाकडे फेसाटत धावताना ते अश्राप तांडे केविलवाणे हंबरू लागले. दिवसाढवळ्या पेटत्या मशाली घेऊन वाडीखेड्यांत घुसणारे पठाणी, तुर्की, मुगल, बहालिया हशम गंजी-घरट्यांना मशाली भिडवू लागले. वेठबिगार करून घेण्यासाठी पकडलेल्या कुणब्यांच्या पाठी कोरड्यांच्या फटक्यांखाली फुटू लागल्या. गावेच्या गावे लुटली, जाळली, रगडली जाऊ लागली.

काढण्या चढवून, ताणीव गावचैकात आणलेल्या मावळ्यांवर कोरडे ओढताना दिलेरचे हशम गर्दना मागे टाकीत खदखदा हसत विचारू लागले, " सुव्वरकी अवलाद, कहां है तुम्हारा सेवाजी ? " उभ्या मुलखाचे सुरूपण सुकत चालले. तावल्या उन्हात बारा मावळांवर अवकळा उतरू लागली. शाही फौजेचा घरघरता वरवंटा अश्रापांच्या मोडक्यातोडक्या संसारावर निर्दयपणे फिरू लागला. माणसे हकनाक मरू लागली.

राजेवाडी-सासवड मार्गाने पुढे सरकलेला, फौजबंद दिलेरखान पुरंधरच्या पायथ्याला भिडला. पाठोपाठ भुलेश्वरच्या खिंडीतून मिर्झा कऱ्हेपठारावर उतरला.

किल्ले पुरंधरला अफाट शाही फौजेचा घेर पडला ! कऱ्हा नदीच्या काठाला, ठोकलेल्या खुंट्यांना जखडलेल्या तणावांचा आधार घेत केशरी-करड्या रंगांच्या राहुट्या, डेरे, तंबू, शामियाने उठले. हत्ती, उंट चीत्कारू लागले.

पुरंधरच्या सदर दरवाज्याच्या बाजूला खासा दिलेर, किरतसिंग, मीर अतिशखान, इंद्रमण बुंदेला, उदयभान गौर, रसूलबेग, झबरदस्तखान यांनी आपल्या बर्कंदाज हशमांचे वळे उभे केले. मोर्चे रोखलेल्या तोफांच्या भांड्यांची तोंडे किल्ल्यावर बेसुमार आग ओकू लागली.

किल्ले पुरंधर हा जोडकिल्ला होता. पूर्वेच्या बाजूला रुद्रमाळ उर्फ वज्रगड हा छोटेखानी किल्ला होता. त्याला धरून पुरंधरच्या माच्या पसरल्या होत्या. मध्ये होती एक निरुंद खिंड – भैरवखिंड ! वज्रगडावर पुरंधरची सारी मदार होती. तो गडच मंदिराच्या पायरीसारखा होता. पायरी ओलांडली की पाऊल जसे मंदिरात तसे वज्रगड पडला, तर पाऊल किल्ले पुरंधरात !

आता जोड होती पुरंधरच्या पराक्रमाची आणि दिलेरच्या दंग्याची. गडावर रामोशी, महार, कोळी आणि कहार या धारकऱ्यांची दीड हजारांची शिबंदी होती. गडाला आधार होता त्यांच्या नेकीचा. आणि राजांनी स्वतः नेऊन रुजू केलेल्या, मारत्या समशेरीच्या, काळभैरव, पट्टेबाज मुरारबाजींचा !

राजगडाच्या पद्मावती माचीवर कबिल्याचे मेणे सिद्ध होते. जिजाबाई, सोयराबाई आणि राजे बालेकिल्ला उतरून पद्मावती माचीवर आले. बरोबर संभाजीराजे, सखूबाई, राणूबाई, अंबाबाई आणि नानीबाई असा राजांचा गोतावळा होता. आता राजांच्या घरचीच झालेली धाराऊ होती. मोरोपंत, आण्णाजी दत्तो, येसाजी, रघुनाथपंत, कुडतोजी, निराजी रावजी ही मंडळी मासाहेबांना निरोपाचे मुजरे घालायला माचीवर जमली होती. राजांच्या आग्रहाने जिजाबाई राजगड सोडून कोंढाण्याकडे सोयराबाईंच्यासह चालल्या होत्या. पुरंधराला चार मजलांवरच दुष्मन-फौज तळ टाकून असताना आता सगळ्यांनी एका जागी राहणे हिसाबी नव्हते. जिजाबाई गड सोडायला तयार नव्हत्या. राजांना आणि बाळराजांना, शत्रू तोंडावर असता एकाकी टाकून जायला राजी नव्हत्या. पण राजांनी हरतऱ्हेने त्यांची समजूत घालून त्यांना जाण्यास तयार केले होते. राजांनी पुढे होत मासाहेबांच्या पायांना हात लावले.

संभाजीराजांनी आऊसाहेबांच्या पायांवर कपाळ टेकविले. त्यांना उठवून जिजाबाई म्हणाल्या, " आम्ही निघालो बाळराजे. आता राजांच्या महाली झोपत जा ! "

ते उद्‌गार ऐकताना राजांचा ऊर गलबलून गेला. संभाजीराजांनी सोयराबाईंच्या पायांवर मस्तक टेकविले. पण सोयराबाईंचे त्यांच्याकडे लक्षच नव्हते ! त्या गड सोडण्यापूर्वी नजर जोडून फक्त मिळतील तेवढे ' राजे ' डोळ्यांत भरून घेण्यात गुंतल्या होत्या !! राजांची नजर समोर दिसणाऱ्या निशाण-चौथऱ्यावरच्या उंच निशाणकाठीवरच्या जरीपटक्यावर होती.

जिजाऊंच्या जात्या स्वारीला सगळ्यांचे नमस्कार-मुजरे झाले.

पुरंधरच्या वेढ्याला पंधरा दिवस लोटले. किल्ले पुरंधर प्राणबाजीने भांडत होता.

रात्री-बेरात्री गडावरचे मावळे तुकड्यातुकड्यांनी दिलेरच्या गोटावर एल्गार करीत चालून जात होते. सावध असलेला दिलेर निकराने छापे मोडून काढीत होता. हत्यारे चालविताना कामी आलेल्या धारकऱ्यांची प्रेते गडउतरंडीवर तशीच पडत होती. हाती

लागलेल्या प्रेतांच्या पायांना काढण्याचे फास आवळून, घोड्यांच्या टापेला बांधून त्यांची दिलेरच्या गोटासमोर फरफटती धूळधिंड निघत होती. कऱ्हेपठार पेटत्या तोफांच्या भांड्यांच्या दणक्याने दणाणून निघत होते. अस्मान धुराने काळवंडत होते. महार, कहार, कोळी, रामोशी मरत होते. मरता मरता झुंजत होते.

आपल्याच धिप्पाड पठाणी हशमांच्या घामेजल्या उघड्या पाठीवर कोरडे ओढीत 'फत्तेलष्कर', 'अब्दुल्लाखान', 'महेली' या अवजड तोफा दिलेर, मीर अतिशखान आणि निकोलो मनुची यांनी वज्रगडावर वर्मी आगमार करतील अशा उंचीच्या धमधम्यांवर आणल्या. त्या दणकत्या तीन नागिणींनी वज्रगडाला खिंडार पाडले. गडाला 'पान' लागले!

'दीन ऽऽ दीन ऽ!' आक्रोशत पठाणी, बहलिया, मोगल हशम उन्हाने तळपती नंगी हत्यारे पेलत सुलतानढवा करीत वज्रगडावर तुटून पडले. गडावरचे चालते, फिरते हत्यारे थांबले. वज्रगड पडला! 'श्रींच्या' कंठातील रुद्रमाळ तुटली. दिलेरचे पठाणी पाय पुरंधरच्या पायरीवर पडले! आता तो निकराने मंदिरात घुसणार होता. किल्ले पुरंधरात!!

'धनी, लई झटझुज घेतली पर अपेश पदरात आलं. आमाला त्वांड दावाय जागा नाही. आता होतर आमच्या गर्दना मारा, होतर कडेलोट करा. तेवढे मराण तरी 'किरत' म्हून मागं ऱ्हाईल!' वज्रगडचा किल्लेदार खालच्या मानेने राजांच्या समोर आपल्या उरातला कढ मोकळा करीत होता.

एक राजकारणी डावपेचाची चाल म्हणून वज्रगडच्या 'कैदी' म्हणून सापडलेल्या किल्लेदाराला आणि दोनएकशे मावळ्यांना मिर्झा राजाने हसत सोडून दिले होते.

राजे किल्लेदाराला काय सजा फर्मावतील याचा चिंतातुर मुद्रांनी अंदाज करीत निळो सोनदेव, कुडतोजी, मोरोपंत, आण्णाजी दत्तो ही मंडळी सदरजोत्यावर उभी होती. सदरबैठकीवर संभाजीराजांच्यासह बसलेले राजे किल्लेदाराचे पिळवटल्या कढाचे बोलणे ऐकून उठले. संथ चालत ते हमचौकात आले. किल्लेदाराच्या खांद्यावर आपल्या आजानुबाहूचा तळवा चढवीत म्हणाले, 'किल्लेदार, काय पारख केलीत तुम्ही आमची! आम्ही हारजीत मोलाची मानीत नाही! एवढी मूठभर शिबंदी घेऊन तुम्ही दर्यासारख्या गनिम-फौजेशी शर्थीनं झुंजलात! आज आमचे हात आखडते आहेत, नाहीतर तुम्हा साऱ्यांच्या पाठीवरच्या ढालीत आम्ही शिगोशीग मोहरा भरल्या असत्या!'

'मुजुमदार ऽ!' राजांनी मुजुमदार निळो सोनदेवांना याद फर्मावली.

'जी' म्हणत निळो सोनदेव लगबगीने हमचौकात आले.

'या असामींची मोजदाद करा. आमच्या लोकांचा जमेल तसा मरातब आम्हास करणे आहे! जेवढ्या आसामी असतील तेवढी शेला-पागोटी पेश करा.'

निळो सोनदेवांनी मावळ्यांची मोजदाद केली. शेला-पागोट्यांची तबके त्यांनी हमचौकात आणविली. आपल्या हाताने राजे प्रत्येक लढल्या मावळ्याला शेला-पागोटे बहाल करू लागले. सदरबैठकीवरून उठून संभाजीराजे हमचौकात आले. पुढे होत आपल्या आबासाहेबांची तकलीफ कमी व्हावी, म्हणून तबकातील एक एक पागोटे उचलून अदबीने ते राजांच्या हातात देऊ लागले.

आपल्या उरात खोल खोल लपवून घ्यावे असे एक जीवनसत्य संभाजीराजांना कळून चुकले होते – 'आयुष्यात हारजितीला काही मोल नसते! मोल असते ते झगडण्याला! निकराने, प्राणबाजीने शर्थीनं झुंजण्याला!!'

राजे प्रतापगडावर जाऊन जगदंबेचे दर्शन घेऊन आले. बेघर, बेआसरा झालेल्या, सर्वस्व लुटलेल्या, हताश मावळमाणसांची आता राजगडावर दाटीच दाटी झाली होती. बारा मावळांच्या चौकोन्यांतून हुसकलेल्या, उद्ध्वस्त झालेल्या लोकांचे रोज नवे नवे तांडे राजगड चढत होते. राजे जातीनिशी त्यांची विचारपूस करीत होते. अंबारखान्यातील धान्यपोती बाहेर काढण्याच्या आज्ञा देऊन आपल्या माणसांना पोटपाण्याला लावीत होते. पण त्यांच्या चेहऱ्यांवर पसरलेले काकाळपण ते पुसू शकत नव्हते. हा सल राजांच्या मनात खोलवर सलत होता.

नेहमीसारखे राजे, संभाजीराजांच्यासह बालेकिल्ला उतरून लोकांच्या भेटीगाठीसाठी पद्मावती माचीवर आले. गडाच्या सुवेळा, संजीवनी, पद्मावती या तिन्ही माच्यांवर मार खाल्लेल्या मावळ्या-कुणब्यांची दाटी झाली होती. किरणे मावळतीला आली होती. राजे पद्मावतीच्या सदरचौकाबाहेर पडले. त्यांच्या पाठीशी शंभूराजे होते.

राजे बधिरल्या मनाने चालत होते. माणसे पायांवर लोटांगणे घालू लागली. एकाएकी त्या कोंदाटल्या गर्दीतील हैबतबा पांढरे हा चार विसा वर्षांची उमर झालेला म्हातारा, राजांच्या मागून चालणाऱ्या शंभूराजांना बघून गलबलून गेला. त्याचे पांढरे कानकल्ले थरथरले. लटलटत्या हाताने भोवतीच्या कुणब्यांची गर्दी फोडीत तो पुढे झाला. शंभूराजांचा हात आपल्या सुरकुतल्या हाताने धरून तो कापऱ्या, कातर आवाजात म्हणाला, "थांब वाईच माज्या लेकरा ऽ! डोळं भरू दे माजं!"

त्याचे बोल ऐकून राजे थबकले. त्यांनी मागे वळून बघितले. म्हातारा हैबतबा आपल्या रखरखीत, थरथरत्या तळहाताचे पंजे संभाजीराजांच्या रसरशीत गालांवरून फिरवीत होता. ते फिरविताना त्याच्या म्हाताऱ्या पांढरट डोळ्यांतून उठलेली पाण्याची धार त्याच्या पांढऱ्या गलमिश्यांत उतरू लागली.

"काय झालं बाबा? डोळ्याला पाणी का?" राजांनी त्याला विचारले.

म्हाताऱ्या हैबतबाने चट्दिशी बाराबंदीच्या हातोप्याने आपले डोळे पुशीत जाब दिला, "कुटं काय ह्राय धनी? म्हातारपणानं डोळे पाझरत्यात वाईच!" हैबतबा आपला कढ राजांच्या समोर उघडायला राजी नव्हता.

" बाबा, आम्ही तुम्हास लेकरासारखे. जे सलले ते आम्हास बोलले पाहिजे." राजे म्हाताऱ्याच्या काळजात घुसले.

हैबतबाची सुरकुतली मान लटलट कापू लागली. त्याने निकराने ऊरबंद केलेला कढ डोळ्यांचे बांध फोडून पुन्हा बाहेर फुटला. लटलटत्या आवाजात तो म्हणाला, " काय सांगू राजा? काय र्‍या ऱ्हायली न्हाई. माजा एकुलता योक ल्योक येडा जाला. त्येची तरणीताठी बाईलऽऽ त्येच्या मुसक्या आवळून त्येला झाडाला बांधून त्येच्या म्होरं राकिसांनी आपल्या अंगाखाली की रं घेतली राजा! उटाय तराण नसताना घोड्यावं घालून त्ये भडवं घिऊन ग्येलं तिला! तवापून डोसकं चक्कारलं माज्या लेकाचं… त्येचं एकुलतं याक प्वॉर हुतं. त्ये खोपटाच्या दारात मरून पडल्यालं हुतं. शिवारातनं वाडीत आलो नि ह्यो इस्कोट दिसला नदरंला. या हातानं त्या पोराला मूठमाती दिली म्या राजा! … तुज्या या धाकल्या धन्याला बघताना त्या पोराची सय जाली!! एवड्याच उमरीचं हुतं ते! 'म्हलू' नाव हुतं त्येचं. आता न्हाई नदरं पडायचं! कशापायनं पोट जाळाय शिधा देतूस मला राजा? ही म्हातारी गर्दन तुज्या हात्यारानं उतरून दे फेकून टटावरनं! न्हाई… न्हाई सोसवत ह्यो नरक राजा!" म्हाताऱ्याने आपले तोंड ओंजळीत झाकले. पोरासारखा तो स्फुंदू लागला.

हैबतबाचं बोलणे ऐकताच राजांचे उभे अंगन् अंग ताठरले. डोळे संतापाच्या ठिणग्या फेकू लागले. पण– पण त्या म्हाताऱ्याचे सांत्वन करायला राजांना शब्द सापडेनात! छातीवरच्या कवड्या तटबंदीच्या दगडाएवढा आकार घेऊन जीव दबवून टाकताहेत असे त्यांना वाटले. म्हाताऱ्या हैबतबाच्या खांद्यावर हात ठेवताना राजांच्या डोळ्यांतून टपटपत पाणमोती कोसळले.

ते बघताच मात्र कमरेत वाकलेला जख्ख हैबतबा एकदम ताठ खडा झाला. पेटत्या डोळ्यांनी, डोक्यावरची, लाल पिळाची चक्री पगडी झुलवीत म्हणाला, " न्हाईऽ राजा, आण हाय या म्हाताऱ्या ध्याईची तुला, डोळ्यांत पानी आनू नगं! आमची कुणबाऊ जात घायपातावानी. योक म्येला तर धा उपाजतील! पर तू… तू जगदंबेच्या दंडातला ताईत हाईस ताईत! खातर हाय, ह्या समद्यास्नी तारशील तर त्यो तूच. मुजरा राजा." राजांना मुजरा करून हैबतबा समोरच्या गर्दीत घुसला. दिसेनासा झाला.

सुन्न सुन्न झालेले राजे संजीवनी माचीकडे पुढे न जाता तसेच माघारी फिरले.

रानराघू, भोरड्या, धनछडी या पक्ष्यांचे कितीतरी थवेचे थवे गडाच्या माच्यांवरून कलकलत, झेपावत गुंजणमावळाच्या रोखाने मावळतीला चालले होते. त्यांचा कलकलाट नेहमीसारखा बिनघोर नव्हता. भेदरट, कातरलेला होता. राजांना तो जाणवला. ते पक्षी दिलेरच्या तोफखान्यातील भांड्याच्या उडणाऱ्या भयानक दणक्याने भेदरून, कऱ्हेपठार सोडून गुंजणमावळाच्या आसऱ्याला चालले होते. नवख्या रानाशी जमवून घेताना त्यांचा कलकलाट बदलला होता!

राजांनी कर्माजीबरोबर मिर्झा राजाला थैली पाठविली होती. दोन किल्ले देऊ करून तहासाठी हात पुढे केले होते. आदिलशाहीच्या विजापूरवर चाल घेतल्यास मिर्झा राजाला ससैन्य मदत करू असे सुचविले होते. हरतऱ्हेचा डाव राजे रजपुतावर टाकू बघत होते. मध्यंतरी कुडतोजी गुजरांनी मिर्झा राजाच्या गोटात घुसून त्याच्यावर नंग्या हत्याराची चाल करून बघितली होती. पण कुडतोजी पकडले गेले होते. मिर्झा राजाने त्यांना एक घोडा व तलवार पेश करून मुद्दाम इतमामाने सोडून दिले होते. राजांना डिवचण्याची एकही संधी कावेबाज मिर्झा राजा वाया जाऊ देत नव्हता. पुरंधरच्या वेढ्यातील माणसे उचलून त्याने राजांचा मुलूख जाळण्या-लुटण्यासाठी फेकली होती. रात्री-बेरात्री ते घोडेस्वार मशाली नाचवीत थेट राजगडाच्या पायथ्याने दौडत होते.

मिर्झा राजांच्या गोटातून परत आलेल्या कर्माजीला बाळाजी आवर्जीनी राजांच्या समोर पेश केले. कर्माजीचा चेहरा पार पडला होता. मुजरा करून त्याने कमरेला लटकवलेली मिर्झा राजाची थैली राजांच्या हाती दिली. राजांनी ती बाळाजींच्या हाती दिली. बाळाजी चिटणीस मिर्झा राजाचे पत्र वाचू लागले –

" … आमची शाही फौज आसमानातील ताऱ्यांप्रमाणे असंख्य आहे. तुझा पहाडखायांचा मुलूख तिला अजिंक्य नाही. आमच्या घोड्याच्या टापांखाली कुठलाही मुलूख तसनस होऊन जाईल. जिवाची खैर असेल तर बादशाही चाकरी पत्करून शरण ये! असे न करशील तर आपल्याच हातानं तू आपली आणि आपल्या रियायांची खराबी करून घेशील!"

मिर्झा राजाला पाहिजे होती राजांची संपूर्ण शरणागत! ते पत्र ऐकत असताना राजे सुन्न, बधिर झाले.

" रजपुताच्या गोटात दोन फार खराब गोष्टी कानांवर पडल्या सरकार." समोर उभा असलेला कर्माजी म्हणाला.

" बोल … आता सगळं खराबच समोर वाढून ठेवलं आहे." राजे म्हणाले.

" पुरंधरच्या सफेदबुरुजासमोर दिलेरनं लाकडी धमधमे उभे करून तोफांची मारगिरी जारी केलीय. त्या धमधम्यावरून आलेला एक तोफगोळा सफेदबुरुजाच्या बारुद कोठारात पडला! कोठाराच्या भडक्यानं चिरेबंद सफेदबुरुज अस्मानात उडाला. त्यावरच्या ऐंशी धारकऱ्यांच्या, डोळ्याचं पातं लवायच्या आत नुसत्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडाल्या धनी! त्यांच्या तुटक्या हात-पायांचा पाऊसच पाऊस माचीवर कोसळला. किल्लेदारानं ते पडलेले हात-पायच गोळा करून सगळ्यांना एकदमच आगीनडाग दिला! आणि …"

" आणि काय कर्माजी? बोल. गड पडला काय?"

" नाही, गड नाही पण एक छातीचा गडी पडला! काल दिलेरनं गडावर पाच हजार

पठाणांनिशी सुलतानढवा केला. तो मोडून काढण्यासाठी सरदरवाजा उघडून सातशे रामोशी, महार धारकरी पाठीशी घेऊन मुरारबाजी त्यांच्यावर तुटून पडले. दोन्ही हातांत पट्टे चढवून मुरारबाजी विजेच्या लोळासारखे गडउतरंडीवरून दिलेरवर कोसळले. हातघाईची हत्यारमार झाली. "हाणा-मारा – हरहरऽऽ हर महादेव!" असं ओरडत मुरारराऊ चढत्या उन्हात तळपणारे पट्टे दोन्ही हातांनी फिरवीत होते. भरल्या शिवारातील कणसं कापावीत तसे पठाणी हशम कापून काढीत होते. फार जोरावर जंग झाला.

"एका टेकाडावर उभा असलेला दिलेरखान पठाण, आपल्या ओठांवर हाताची बोटं ठेवून मुरारराऊंच्या हातांतील तळपत्या पट्ट्यांचं कडं बघून म्हणाला, "या अल्ला ऽ, अरे तू कैसा सुरमा सिपाही खुदाने पैदा किया! आलिजाहके कदमोंपर आ मालेमाल कर देंगे!"

खिनभर पट्टे थांबवून, त्यांच्याकडं पेटल्या डोळ्यांनी बघत, घाम थबथबल्या मुद्रेचे मुरारराऊ तिरस्कारानं पचकन थुंकले! "ये तो सिवाजी राजियांच्या इनामबंद शिलेदार हाये! तुझा कौल घेतो की काय?" असं मोठ्यानं गर्जत ते सिधे दिलेरच्या रोखानंच हत्यार चालवीत पुढं चालून गेले.

"कुणीतरी फेकलेला एक सरसरता बाण आला आणि कचकन त्यांच्या गळ्यात आरपार रुतला. रक्ताची फव्वारती चिळकांडी उमळली. 'आई अंबे' म्हणून मुरारराऊ क्षणभर कळवळले. आणि – आणि गळ्यात रुतता बाण तसाच घेऊन हत्यार मारत तसेच दहा हात पठाणी गर्दीत पुढं घुसले. गळ्यातल्या बाणानं त्यांना 'हर हर महादेव' ओरडता आलं नाही.

"दहा हात पुढं घुसलेल्या मुरारबाजींनी निकरानं मिळतील तेवढे पठाण गडउतरंडीवर लोळविले आणि – आणि मुरारबाजी कोसळले. उतरंडीवर त्यांनी चार-पाच पलट्या घाल्ल्या. त्यामुळे गळ्यातला बाण भुईला थडकून जखम फुटली. उताणे पडलेले मुरारराऊ धेसपांड्ये गडावरच्या निशाणाकडं भरल्या डोळ्यांनी बघत साहेब-कामावर खर्ची पडले! किल्लेदारानं काल त्यांच्या देहाला गडावर अग्नी दिला. सरकार, मारत्या समशेरीचे, मुरारबाजी कामी आलें! आता पुरंधर टिकणं मुश्किल हाय." ती गैरखबर सांगताना कर्माजीच्याच डोळ्यांत पाणी उभे राहिले.

कर्माजीचे बोलणे ऐकताना संभाजीराजांच्या मनात दोन विचित्र गोष्टींची सरभेसळ झाली होती. म्हाताऱ्या हैबतबाची थरथरती मावळबोली त्यांच्या मनात फिरत होती – "राजा, तू– तू तर जगदंबेच्या दंडातल ताईत हाईस ताईत!" आणि त्यांच्या डोळ्यांसमोर मात्र उभे होते ते गळ्यात रुपता बाण घेऊन, पट्टे चालवीत पुढे जाणारे, "तुझा कौल घेतो की काये?" म्हणणारे रक्ताळलेले मुरारराऊ!

रघुनाथपंत कोरड्यांची पालखी राजगडाच्या पाली दरवाज्यातून बाहेर पडली. त्यांच्या

हातात राजांनी, मिर्झा राजाला दिलेली, 'संपूर्ण शरणागतीचा' खलिता असलेली लाल फासबंदाची थैली होती! पालखीला संरक्षण देत दहा हत्यारबंद धारकरी मिर्झाच्या गोटाकडे चालले. पंत हेजीब म्हणून राजांचा निर्वाणीचा खलिता घेऊन रजपुताच्या गोटाकडे चालले. राजे रजपुताशी शरणागतीचा सुलूख करताहेत ही बातमी वाऱ्यासारखी गडभर पसरली होती.

संभाजीराजांना 'सुलूख' म्हणजे काय तेच नीट कळेना! आपल्या महालातून ते राजांच्या महालाकडे आले. मिटला दरवाजा त्यांनी लोटून बघितला. तो बंद होता.

"महाराजसाहेबऽ!" संभाजीराजांनी साद घातली. दरवाजा जाब देत होता.

देण्याच्या मन:स्थितीत नव्हता. क्षणभर त्या मिटल्या दरवाज्यासमोर शंभूराजे घोटाळले आणि त्यांची पावले मासाहेब पुतळाबाईंच्या महालाकडे वळली.

आपल्या कपाळावर मेणमळल्या कुंकवाची ठसठशीत, दोन आडवी बोटं दर्पणात बघून रेखून घेतलेल्या पुतळाबाई, कुणबिणीने समोर धरलेल्या पोसाला ती बोटे पुसत होत्या. महालात येताच मुजरा करून संभाजीराजे पुतळाबाईंच्या जवळ आले. त्यांच्या ताज्या, ओल्या कुंकवाकडे बघत त्यांनी विचारले, "आऊसाहेब, सुलूख म्हणजे काय? का करायचा तो? कुणाशी करायचा? तुम्ही केला आहे कुणाशी सुलूख?" त्यांचे प्रश्न ऐकून पुतळाबाईंची चर्या, गडावरच्या त्या ताणलेल्या अवस्थेतही आरक्त झाली. त्यांना म्हणावेसे वाटले, "आम्ही केला आहे जन्मोजन्मीचा 'सुलूख' आमच्या कपाळीच्या कुंकवाशी! अंबेनं तो निभावण्याची ताकद आम्हास द्यावी."

पण त्या तसे काहीच बोलू शकल्या नाहीत. म्हणाल्या, "सुलूख म्हणजे तहकोंडीत फसल्या गेल्या माणसाची शरणागत!"

त्या शंभूराजांचे समाधान करू बघत होत्या. बाळराजे त्यांच्या ओल्या कुंकूपट्ट्याकडे बघत होते. त्या दोघांचे प्रतिबिंब बाजूच्या दर्पणात पडले होते. तो दर्पण स्वत:लाच म्हणत होता, "या धाकट्या मासाहेब आणि बाळराजे यांचा किती जन्मांचा सुलूख आहे हे त्यांचे त्यांनाही माहीत नसेल."

जिजाऊसाहेबांना सोबत म्हणून कोंढाण्यावर पोचते करून आलेल्या सोयराबाई आपल्या महालात होत्या. त्यांच्या कानावर मात्र यातले अजून काहीच आले नव्हते.

आज राजे गड उतरणार होते, रजपूत मिर्झा राजाच्या गोटात जाण्यासाठी! बिनशर्त शरणागत पत्करून बेहत्यार भेट घेण्यासाठी! आपल्या माणसांची आणि मुलखाची झाली त्याहीपेक्षा होणारी मसनवट रोखण्यासाठी!

आयाळ उतरविलेल्या सिंहाचे जसे असेल, सोंड छाटलेल्या राजहत्तीचे जसे असेल, वशिंड कापलेल्या अटकर पाड्याचे जसे असेल, तसेच हे जिणे होते. शरणागतीच्या मरणयातना कळायला राजाचे जातिवंत मनच असावे लागते. जिवापाड प्रेम केलेली कवड्यांची माळच छातीवर असावी लागते.

या तहाच्या कागदावर राजे शाईने दस्तखत करणार होते. पुढे ही शाईच प्रथम राजांना गिळणार होती आणि नंतर अवघी शिवशाही, तमाम मराठशाही डुबविणार होती! तह म्हणजे पहिल्याने माघार आणि शेवटाला सर्वनाश!

राजे कुणाशीच काही बोलत नव्हते. सर्व दरवाजे बंद असलेल्या, दाभणधार पावसाने निर्दयपणे झोडपून काढलेल्या गडासारखे त्यांचे मन सुन्न, बधिर होते.

निरोपाचे अदबमुजरे झडले. राजे संभाजीराजांच्या जवळ आले तसे त्यांच्या पायातील भगव्या, बाकदार मोजड्यांवर कपाळ टेकवून संभाजीराजे वर उठले.

दुष्काळी भुईकडे कोरड्या आकाशाने बघावे तसे राजे आपल्या फर्जंद शंभूकडे बघत होते! सईबाईंचा 'सावळा' चेहरा राजांच्या डोळ्यांसमोर तरळू लागला. तो बोलत होता – "आमचे शंभूबाळ, एकला जीव – स्वारींच्या पदरी घातला."

राजांच्या पिळवटल्या मनात विचार येऊन गेला, "सई, तुम्ही तुमचा एकला जीव आमच्या पदरी घातलात. मोठ्या भरोशानं आणि आज – आज आम्हीच आमचा आणि आमच्या साऱ्या मावळमाणसांचा जीव रजपुताच्या शेल्यात टाकायला चाललो आहोत!! सई, माणसाच्या हयातीचं त्याच्या हातात काही राहात नाही हेच खरं."

काही न बोलता राजांनी शंभूराजांच्या खांद्यावर आपला तळहात ठेवला, स्वत:लाच जडशीळ वाटणारा तो तळहात दोनदा त्यांच्या खांद्यावर कसनुसा थोपटला.

राजे पालखीत बसले. डावी उजवी हेल खात पालखी वर उठली. आनंदराव, रघुनाथपंत, निराजी रावजी, नागोजी-बहिर्जी फर्जंद, विश्वासराव, कृष्णाजी जोशी यांनी पालखीभोवती कडे केले. तळपती पाती हातात पेलत हत्यारबंद धारकरी चालू लागले. 'श्रींच्या राज्याची' शपथ घेणारा सर्जा सूर्य अंधाराशी तह करायला निघाला!

राजांच्या पालखीकडे संभाजीराजे एकनजर बघत होते. कधी नव्हते ते आज घडले होते. गड सोडताना महाराजसाहेब त्यांच्याशी काहीच बोलले नव्हते.

पालखी दूर जात होती. संभाजीराजांना महाबळेश्वरावर सूर्यग्रहणाच्या दिवशी राजांनी कृष्णाकाठी सांगितलेले बोल आठवत होते. "राहू केतू हे सूर्याच्याच भावकीतले पापग्रह त्याच्या धावणीची वाट रोखून धरतात. त्याची चालदौड मुष्किल मुष्किल करून सोडतात; बाळराजे! सूर्यासही ग्रास पडतो!"

मिर्झा राजाच्या गोटाकडे राजे निघून गेले. आता राजगडावर जिजाऊसाहेब नव्हत्या. राजे नव्हते. नकळतच संभाजीराजे पुतळाबाईंच्या महाली रेंगाळत होते.

पुतळाबाईंची एकचित्त देवपूजा, कुणबी दासदासींबरोबरसुद्धा माया-ओसंडते बोलणे, राणीवशातील इतर 'बाईसाहेबांची' अदब राखणे, सखू, राणू, अंबा, बाळीबाई ह्या आपल्या मुलीच आहेत अशी त्यांची देखभाल ठेवणे, थोडकेच पण खूप काळ लक्षात राहील असे घंटानादी बोलणे, आणि केवड्याच्या कणसाभोवती पीळ धरून बिलगलेल्या

असंख्य पात्यांपैकी एकाच पाकळीपात्याने, बाहेर डोकावून पिवळ्याधमक उन्हात अंगभर तळपावे तसे त्यांचे सतेज 'दिसणे' या साऱ्या बाबींचा शंभूराजांच्या मनावर एक खोल ठसा, त्यांना नकळतच उमटून गेला होता. मायाळू स्त्रीला आपल्या मायेची दवंडी पिटावी लागत नाही हेच खरे!"

आपल्या महालात गवाक्षाच्या महिरपीजवळ पुतळाबाई उभ्या होत्या. बाहेरच्या आभाळात दाटलेल्या अभ्रामध्ये आपली चिंतावली नजर त्या हरवून बसल्या होत्या. मध्येच भान येताच त्यांच्या डोळ्यांची टपोरी पाखरे फडफडत होती. दाटल्या आभाळाखालून सरसर धावत दूरवर होऊन पुन्हा माघारी फिरत होती.

त्यांनी पूजा बांधलेल्या अष्टभुजा जगदंबेकडे बघत संभाजीराजे त्यांच्या पाठीशी उभे होते. मध्येच वळून गवाक्षातून डोकावत होते. दूरवर दिसणाऱ्या गुंजवणी नदीची धुरकट वळणे बघत होते.

"सरकार, थोरल्या म्हालानं याद केलीय."' सोयराबाईंच्या खाजगीकडच्या चंद्रा या कुणबी दासीने महालात येऊन अदबीने वर्दी दिली.

ती ऐकताच पुतळाबाई मागे वळल्या. एकवार त्यांनी संभाजीराजांच्याकडे बघितले. पदरकाठ ठीक जमवून घेतला. चंद्रा कुणबीण आली तशी निघून गेली.

"चला बाळराजे, थोरल्या महालाची वर्दी आहे." म्हणत पुतळाबाईंनी जगदंबेच्या मूर्तीकडे नकळतच एकदा नजर दिली. आणि शंभूराजांच्या खांद्यावर आपला सुवर्णकंकणे भरलेला हात ठेवून त्या थोरल्या महालाकडे चालू लागल्या.

आपल्या महालात, निळ्याशार पदरपोताचा शालू नसलेल्या देखण्या सोयराबाई आपल्या कन्याराजे बाळीबाई ह्यांच्याशी काहीतरी बोलत होत्या. दगडबंद भिंती धरून दोन चार कुणबिणी अदबीने उभ्या होत्या.

महालाचा उंबरठा ओलांडताच पुढे होत शंभूराजांनी मासाहेब सोयराबाईंच्या पायांना हात लावले. सोयराबाईंनी त्यांना वर उठवून घेतले.

बाळीबाई ह्या सोयराबाईंच्या कन्याराजे पुतळाबाईंना बघताच धावत येऊन त्यांना बिलगल्या. त्यांचे दोन्ही दंड मायेने धरीत पुतळाबाईंनी सोयराबाईंना विचारले, "का वर्दी देणं झालं आम्हास? स्वारीची गोटातून काही खबर ..."

"बहिर्जी आणि नागोजी रजपुताच्या गोटातून आत्ताच गडावर आलेत. त्यासाठीच तर वर्दी दिली धाकल्या बाईंना."

"काय झालं ..." तहबंदाच्या आड असलेले पुतळाबाईंचे काळीज फडफडले.

"स्वारीनं मुलूख मान्य केला! पुरंधर, कोंढाणा, रोहिडा, माहुली, लोहगड असे तेवीस किल्ले आणि त्यांच्या तर्फेचा चार लक्ष होनांचा मुलूख रजपुतास देऊ केला! आता स्वारीकडं कुल बारा किल्ले आणि अवघा एक लक्ष होनांचा मुलूख राहील!"

"स्वारी कशी आहे?" पुतळाबाईंनी त्यांच्या लालसर सरळ नाककळीकडे बघत

शांतपणे विचारले.

"ठीक आहे. उद्या कोंढाणा रजपुताच्या माणसांच्या हवाली करून मासाहेबांच्यासह गडावर येत आहे." सोयराबाई तुटक बोलल्या. त्यांच्या बिब्बेवाणाच्या काळ्याशार डोळ्यांत कसली तरी चिंता तरळत होती. ती गडकिल्ल्यांची होती की राजांची ते कळत नव्हते!

सोयराबाईंच्या तोंडून जिजाबाई आणि राजे येणार हे ऐकताच संभाजीराजांचा चेहरा पोतासारखा उजळून गेला. पुतळाबाई आणि सोयराबाई यांच्याकडे बराच वेळ आलटूनपालटून बघताना शंभूराजे विचार करीत होते– "ह्या दोन्ही मासाहेब उजळ आहेत. पण मग एवढा फरक का वाटतो यांच्यात?"

त्या दोघी मासाहेबांचे बोलणे थांबलेले बघून शंभूराजांनी सोयराबाईंना विचारले, "मासाहेब, तुम्ही ... तुम्ही केला आहे कधी कुणाशी सुलूख?"

त्या प्रश्नाने पुतळाबाई चमकल्या. शंभूराजांच्याकडे बघतच राहिल्या.

सोयराबाईंचे बिब्बेवाणाचे काळेशार डोळे कसल्यातरी विचित्र तेजाने उजळल्यासारखे झाले. नाकाचा लालसर शेंडा थोडासा अधिक लालावला. त्या पटकन बोलून गेल्या– "नाही!! सुलूख आम्हास कधीच पसंत नव्हता! आता स्वारीनंच तो मान्य केल्यावर इलाज कुणाचा?"

थोरल्या बाईसाहेब काय बोलतील हे ऐकण्यासाठी पुतळाबाईंनी त्यांच्या कपाळाच्या कुंकमपट्ट्यावर नजर जोडली होती. त्यांचे बोलणे ऐकताच ती तिथून सुटली आणि सोयराबाईंच्या पायाच्या बोटांत घातलेल्या चंदेरी जोडव्यांवर येऊन पडली!

शंभूराजांना जवळ घेत सोयराबाई त्यांना म्हणाल्या, "तुमचं मात्र ठीक झालं. कसलाच सुलूख न करता रजपुतानं तुम्हास पंचहजारी मनसब देऊ केलीय! तुम्हाला ती घेण्यासाठी रजपुताच्या गोटात जावं लागणार एवढंच वाईट. चिंता वाटते तुमची. ही जिम्मेदारी तुम्ही कशी पेलणार?"

शंभूराजे काहीच उत्तरले नाहीत. कारण इतके किल्ले देऊन आबासाहेबांनी पंचहजारी मनसब का घेतली या गोंधळात शंभूराजे गुंतले होते.

सोयराबाईंचे बोलणे पुतळाबाईंना नीट कळलेच नाही. त्या सादिलवारीने बोलाव्या तशाच बोलल्या होत्या. नेहमीच बोलत होत्या. पदरकाठच्या जरतारी वीणेत गळ्यातले मंगळसूत्र अडकले की जसे वाटेल तसेच पुतळाबाईंना सोयराबाईंचे बोलणे ऐकताना नेहमी वाटत आले होते! काही न बोलताच मग त्या शंभूराजांना म्हणाल्या, "चला बाळराजे, कालेश्वरीचं दर्शन घेऊ."

पुतळाबाईसाहेबांनी कालेश्वरीला फूलपत्ती चढविली. तिच्या रुद्रमंगल रूपाकडे क्षणभर बघून डोळे मिटून हात जोडले– "आई, काळाचा किल्ला तुझ्या हाती असता कसला फितवा केलास हा? तहाचा विपरीत काळ आणलास! बाळराजांना पंचहजारी सरदारकीचं दान देववलंस!" मनोमन असे म्हणताना पुतळाबाईंचे जोडलेले हात

थरथरले. कपाळीच्या कुंकवाचा जोडपट्टा आक्रसला. कालेश्वरीचे दर्शन घेऊन पुतळाबाई आणि शंभूराजे परतले. दिवस मावळतीला कलाटणी घेत होता.

कऱ्हेपठारावर पुरंधरच्या पायथ्याशी मिर्झा राजाचा केशरी रंगाचा, आलिशान, रजपुती शामियाना उभा होता. त्याच्या झालरीदार कनाती वाऱ्याने फडफडत होत्या. समोर तोफामाऱ्याने काळवंडलेला पुरंधर खडा होता.

रजपुताच्या शामियान्यात हिंदुस्थानी तलम, नकसदार गालिच्यांची बैठक अंथरली होती. जरीबतूच्या झगझगीत खोळी घातलेले लोड मांडले होते. सोनेरी वेलबुट्टीचा एक उंच हुक्का नक्षीदार चौरंगावर ठेवला होता. त्याची पट्टेदार, काळीबाळी धूरनळी डाव्या हातात घेऊन मिर्झा राजा बैठकीच्या लोडाला रेलून बसला होता. एका कोपऱ्यात धूपदानातील कनोजी धूपाच्या धुराची वळी वर उठत होती.

मिर्झा राजासमोर खाली मान घातलेले राजे बैठकीवर मांडलेल्या शतरंजाच्या पटावरील, एकमेकांना लागून पसरलेल्या काळ्याबाळ्या चौकांकडे एकटक बघत बसले होते. ते चौक त्यांच्या जिवाची घालमेल निरखीत होते!

निकोलो मनुची हा गोरा साहेब आपल्या मांडीवर पिसे खोचलेली थोराड टोपी ठेवून तिथे आदबीने बसला होता. तो मिर्झा राजांच्या तोफखान्यावरचा अधिकारी होता. शतरंजच्या 'अक्लबाज' खेळात त्याला चांगलाच रस होता.

राजांच्या पापणीकडा लालावल्या होत्या. रात्रभर जागून त्यांनी मिर्झा राजाचा मुन्शी उदयराज आणि सूरतसिंग कछवाह यांच्याशी तहाच्या वाटाघाटी केल्या होत्या. उत्तररात्रीला मिर्झा राजाचा पाच कलमी तह मान्य करून त्यावर दस्तखत केले होते! शेल्यात हात बांधून मिर्झा राजांची खालमानेने भेट घेतली होती.

या तहाने राजांनी औरंगजेबाला तेवीस किल्ले आणि चार लक्ष होनांचा मुलूख देऊ केला होता. हुकूम होईल तेव्हा औरंगजेबाच्या दक्षिण सुभेदाराबरोबर फौजेनिशी मोहिमेवर जायचे मान्य केले होते. तहाची तामिली होईपर्यंत शंभूराजांना रजपुताच्या गोटात ओलीस म्हणून ठेवण्यासाठी आणून पोचविण्याचे पत्करले होते.

कस्तुरी हरवलेल्या मृगावर रानदवन्याचा उग्रट वास शोधीत फिरण्याची पाळी यावी तशी राजांची स्थिती झाली होती! या अवस्थेत हा शतरंजचा पट मांडण्यात आला होता. मिर्झा राजाने पेश केलेल्या तबकातील शतरंजाची सफेद मोहरी राजे आपल्या सडक बोटांनी पटावर मांडू लागले. हत्ती, घोडे, उंट, वजीर पटावर चढले.

वनगाईच्या काळ्या शिंगांची बनविलेली काळीशार प्यादी-मोहरी मिर्झा राजाने आपल्या गरगरीत बोटांनी पटावर मांडली.

दोन्ही बाजूंचे पट मांडून झाले तरी काही क्षण तसेच गेले. उत्तर हिंदुस्थानी बोलीत मिर्झा राजा संथपणे म्हणाला, "खोलिए चाल राजासाब."

त्याच्याकडे न बघताच राजे पटावर नजर ठेवून म्हणाले, " आप खोलिए राजाजी. हक और दर्जा आपका है ! "

" नहीं." मिर्झाने पुन्हा एकदा धुराची वळी खोलवर चूस करून बाजूला फेकली. कपाळावरचा केशरी टिळा चढवीत तो म्हणाला, " शतरंजका एक दस्तुरी रिवाज है ! सफेद प्यादे-फर्जी जनाना होते हैं ! और शतरंजमें पहली चाल रहती है जनाने की !! काले प्यादे-फर्जी मर्दाना होते हैं ! जवाब रहता है मर्दानेका ! " मिर्झा राजे स्वतःवरच खूष झाले. मांडीवर थाप देऊन, मनुचीकडं बघत गडगडून हसले.

राजांनी चमकून मिर्झा राजाकडे पाहिले. त्यांच्या छातीवरची कवड्यांची माळ थरकून उठली. डोळे आगठिणग्या फेकू लागले. पण ते काही बोलू शकत नव्हते.

ती नजर बघून मिर्झा राजा चरकला. डाव्या हातातील नळी बाजूला ठेवून तो लगबगीने म्हणाला, " बुरा ना समझो राजासाब. हमने सिर्फ रिवाज बताया ! आप चाहते हो तो हम खोलते हैं पहली चाल." मिर्झाने राजांच्या पटावरील सफेद प्याद्यांना आपल्याकडे घेण्यासाठी आपला हात पुढे केला.

त्याचा हात मध्येच थोपवून अपल्या पटावरचे एक प्यादे राजांनी पुढे सरकविले. खेळ सुरू झाला ! बराच वेळ खेळ चालला होता. राजांचे शतरंजात लक्ष नव्हते. पटाच्या चौकात त्यांना मिर्झा राजाने गिळलेले तेवीस गड दिसत होते ! त्या चौकांनी जखडून टाकलेले शंभूराजे दिसत होते ! रुजाम्यावर बसलेला निकोलो मनुची आपल्या लाल नाकावर दाटणारे घामाचे थेंब अधून मधून रुमालाने टिपत राजे आणि मिर्झा राजे यांची प्यादीमार टक लावून बघत होता. राजांच्या चाली त्याला विचित्र वाटत होत्या.

जनाना आणि मर्दाना कितीतरी प्यादी आता पटावरून हटली होती. एका तबकात एकमेकांना बिलगून खेळ बघत पडली होती ! खेळ शेवटच्या भरडाव टप्प्यात आला.

एकाएकी मिर्झा राजाने कौशल्याने आपला वजीर पुढे घेत सफेद राजाला शह दिला ! एक मोहरे आडवे घालून राजांनी तो शह मोडून काढला. खेळ हातघाईला आला. आता प्रत्येक मोहरे विचाराने हलवायला पाहिजे होते.

पुढे काढलेल्या वजिराच्या पाठबळात मिर्झा राजाने आपला तिरक्या चालीचा उंट हलविला ! राजांच्या सफेद राजाला पुन्हा शह पडला ! बराच विचार करून राजांनी अडीच घरे छलांग घेणारे, आपले दुडक्या चालीचे घोडे आडवे टाकून तो शह पुन्हा मोडून काढला ! त्या घोड्याने मिर्झा राजाच्या ' काळ्या ' राजाला शह घातला !

मनुची एकटक खेळ बघत होता. राजांची घोड्याची चाल त्याला एकदम आवडली. आपल्या टोपीच्या पिसांवरून हाताची बोटे सरासर फिरवीत तो, राजे आता आपले घोडे कसेकसे हलवतील याचा मनोमन अंदाज करू लागला. मिर्झाचा ' काळा ' राजा राजांच्या एकाच घोडेशहाने पुरा-पुरा कोंडून टाकलेला त्याला स्पष्ट दिसू लागला !

राजांनी पुढे टाकलेल्या घोड्याला सफे मारून काढण्यासाठी मिर्झा राजाने आपल्या वजिरावर हात ठेवला. ही एकच चाल खेळता येण्याजोगी उरली आहे असे त्याला वाटले. राजांनाही मिर्झा आता तीच खेळी खेळणार असे मनोमन वाटले. आपले घोडे आपण फुका बळी दिले अशी चुटपुट लागली.

धुराच्या वळ्यांचा एक दमदार झुरका खेचून, " आपका घोडा छलांग मारके हमारे राजापर बेमुर्वतीसे आ गया ! मगर हकनाक काम आया ! " असे म्हणत मिर्झा राजाने पांढरे घोडे पटावरून पटकन उचलले आणि त्याच्या चौकात आपला काळा वजीर पुढे सारला ! घोडे तबकात टाकले.

ते बघताना, इतका वेळ शांतपणे शतरंज बघणारा निकोलो मनुची मात्र न राहवून पटकन आपल्या टोपीकर भाषेत म्हणाला, " ओ ऽ नो ऽ इट कान्ट ! व्वो नहीं मॉर सकटा ! " मनुचीने, मिर्झा राजाने तबकात हटविलेले पांढरे घोडे पुन्हा उचलून होते त्या घरात बसविले ! मिर्झा राजाचा काळा वजीर मागे हटवून त्याच्या पूर्वीच्या घरात बसविला !

पटावर दूर एका कोपऱ्यावरच्या घरात असलेल्या राजांच्या पांढऱ्या उंटाकडे बोट दाखवीत मनुचीने मिर्झा राजाला पटवून दिले की, त्या उंटामुळे काळा वजीर जखडबंद झालेला आहे ! तो आपला चौक सोडून राजाला शहात टाकत घोड्यावर चाल घेऊच शकत नाही ! राजांच्या हातून घोडे असे फेकले गेले होते की, त्यांचा एका कोपऱ्यात असलेला राजावर डोळा ठेवणारा उंट आपोआप मोकळा झाला होता ! आपल्या तिरक्या मार्गाने मिर्झा राजाचा वजीर त्याने परस्पर जखडबंद करून दाबून टाकला होता !

आपल्या कमानबाक भुवया वर चढवीत मिर्झा राजा, राजांच्या त्या पांढऱ्या उंटाकडे क्षणभर डोळे ताणून बघतच राहिला !

मग निकोलो मनुची आणि राजांच्याकडे हताशपणे बघत आपल्या दोन्ही मांड्यांवर तळहातांची थाप देत मिर्झा राजे स्वतःशीच बोलल्यासारखा पुटपुटला, " बिलकुल दुरुस्त ! वो नहीं मर सकता !! "

राजांचा " घोडेशह " मिर्झा राजाला निखळून काढायला वावच उरला नव्हता ! हार मान्य करून त्यासाठी आपल्या काळ्या प्याद्यांचे तबक पालथे घालीत मिर्झा म्हणाला, " फतह आपकी हुई राजासाब. हमने शिकस्त ली ! " दस्तुर म्हणून मिर्झा राजाने आपल्या डाव्या हातातील पुष्कराजाची अंगठी उतरवली आणि ती राजांच्या पटावर ठेवली ! ती खेळातील ' फत्तेची ' रिवाजी शाही बक्षिशी होती.

लगबगीने ती उचलून पुन्हा मिर्झा राजाच्या हातात ठेवीत राजे म्हणाले, " हम हारजीत मामुली मानते हैं राजाजी ! इजाजत हो तो मनकी एक बात खोल देना चाहते हैं ! "

" हां. जरूर." मिर्झा राजाला राजे काय बोलणार याचा काहीच अंदाज येईना. त्याच्या कपाळावरचा केशरी टिळा नकळत आक्रसला.

तबकातील आणि पटावरच्या पांढऱ्यासफेद प्याद्यांकडे राजांनी क्षणभर नजर दिली. ते रंगसतेज उजळपण बघताना त्यांना आपल्या मासाहेबांची आठवण झाली.

क्षणात मिर्झा राजावर विट्यागत नजर रोखून त्यांच्या डोळ्यांत आपल्या बाकदार नाकाचा शेंडा खोल खोल रुतवीत नागफण्यागत ताठ मान ठेवून राजे शांतपणे म्हणाले, "राजाजी, मर्दाना कितना भी बढा हो, जनम लेता है जनाने की कोखमें!" आणि ते ऐकताना मिर्झा राजाच्या तोंडातली धुराची वळी घशात अडकली आणि हातातील हुक्कानळी त्याला नकळत घरंगळून बैठकीवर आडवी झाली!!

मिर्झा राजाच्या आग्रहावरून राजांनी पठाण दिलेरखानाची भेट घेतली. पुरंधरच्या आपल्या किल्लेदाराला गड खाली करून देण्याचा सांगावा धाडून राजे रजपुताच्या गोटातून यायला निघाले.

मागचा-पुढचा दोन्ही पायखूर पायबंदांनी जखडून टाकलेले घोडे एकटेच हिरव्या कुरणातून रखडत चालावे तशी गत रजपुताच्या गोटात राजांची झाली होती! दुरून बघणाऱ्याला ते घोडे उमदे वाटते, भरारीचे वाटते पण रखडत-रखडत चालताना त्याच्या शेपटीची होणारी चुळबूळ त्याची त्यालाच माहीत असते!

मिर्झा राजाने राजांच्याबरोबर पाठवायची आपली माणसे अगोदरच निवडून ठेवली होती. त्यांतील दोन असामी खाशा होत्या. एक खुद्द त्याचाच मुलगा कुँवर किरतसिंग आणि दुसरा उग्रसेन कछवाह! किरतसिंग राजांच्या संगतीने जातीनिशी जाऊन कोंढाण्याचा कबजा घेणार होता — आणि — आणि उग्रसेन कछवाह राजांच्याबरोबर थेट राजगडापर्यंत येऊन संभाजीराजांना ताब्यात घेऊन परतणार होता! तहाची तामिली होईपर्यंत, म्हणजे तेवीस गडकोट रीतसर मिर्झा राजाच्या ताब्यात पोचते होईपर्यंत संभाजीराजे रजपुताला 'श्रींच्या' राज्याचे जामीन राहणार होते!

हा सगळा बनलेला मनसुबा बिलाकसुर पार पाडावा म्हणून धूर्त आणि मुरब्बी असलेल्या मिर्झा राजाने मध्यरात्री आपल्या शामियान्यात कुँवर किरतसिंग आणि उग्रसेन कछवाह यांना बोलावून घेऊन दोघांना दोन महत्त्वाच्या सूचना देऊन टाकल्या होत्या. आपल्या बच्च्याला — कुँवर किरतला — त्याने बजावले, "कुँवर, सम्हलके रहना! वो सेवाजी है; पहाडका सेर!"

उग्रसेनला त्याने फारच सावधगिरीची इशारत देऊन ठेवली, "उग्रभान, ठीक परख लेना कि सेवाजी आपकाही कुँवर तुम्हारे हवाले कर रहा है! गाफील मत रहना! हो सकता है सेवाजी किसीका भी बच्चा तुम्हारे हवाले कर देगा!"

मिर्झा राजाने असा सगळा मोर्चेबंद डाव आखला होता. त्याने यज्ञ केलेली रणचंडी त्याला जवळ जवळ पावल्यासारखीच होती.

आपल्या शामियान्यात नकसदार तबकातील पानविडा उचलून मिर्झा राजाने राजांच्या

हातात दिला. शामियान्याच्या कनाती धरून केशरी साफे बांधलेले तरणेबांड किरत आणि उग्रसेन उभे होते.

मिर्झा राजाने राजांचा निरोप घेण्यापूर्वी पुन्हा एकदा मूळ विषयाला खुबीने हात घातला, "राजासाब, हम आपको बिदा दे रहे हैं लेकिन बिदा देना हमारा सुभाव नहीं! हमें अच्छा लगता है आगवानी करना! आप कुँवर शंभू को भेज देना। हम शाही ढंगसे उनकी आगवानी करेंगे!!"

तळहातात निरोपाचा विडा घेऊन राजे मिर्झा राजाच्या गोऱ्यापान चेहऱ्याकडे बघतच राहिले. त्यांना मिर्झाची कीव वाटत होती. त्याहून स्वत:ची वाटत होती त्यांच्या निर्विकार बघण्याने मिर्झा राजा गोंधळला. लगबगीने राजांच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, "डरना मत राजासाब! बेशक, बिनाहर्ज कुँवर को भेज देना! उनका बाल तक बांका नहीं होगा! इतबार करो! हम कसम उठाते हैं!" मिर्झाने शामियान्याच्या दरवाज्याकडे बघत सरदारी ढंगाची टाळी दिली. मुन्शी उदयराजाला बोलावून घेतले. त्याच्याकडून आपल्या पूजेतील शंकरावरची बेलपत्रे एका तबकातून आणून घेतली! त्यांतील दोन पाने उचलून ती राजांच्या हातातील शाही निरोपविड्यावर ठेवून मिर्झा राजा शांतपणे म्हणाला, "हम शिवजीकी कसम उठाते हैं, जबतक हम जिंदा हैं तबतक आपके कुँवरका यहाँ बाल भी बांका नहीं होगा!"

मिर्झाच्या शामियान्यातून राजे बाहेर पडले. सिद्ध ठेवलेल्या पालखीत चढले. आपल्या निवडक रजपूत धारकऱ्यांबरोबर किरतसिंग आणि उग्रसेन यांचे घोडदळ राजांच्या पालखीबरोबर कदमबाज चालीने चालू लागले.

कोंढाणा किरतसिंगाच्या हवाली करून राजवाड्यावर मासाहेबांच्यासह परतलेले राजे आपल्या महालात अस्वस्थ फेऱ्या घेत होते. महालीची चिराखदाने ऊरभर जळत होती.

जिजाबाईंच्या महालाकडून आलेली 'थाळ्याची' वर्दी त्यांनी 'भूक नाही' अशी फेरवर्दी पाठवून परतवली होती. जिजाऊंना तोंड दाखविण्याचे धाडस काही त्यांना होत नव्हते. रजपूत मराठी मुलखात आल्यापासून गाठवणीचा धागा तुटावा आणि कंठ्याचा एकएक मणी ओघळत जावा तसे राजांचे मन ओघळत आले होते. आता तर हे ओघळणे मध्यभागीच्या पदकापर्यंत येऊन ठेपले होते! प्रत्यक्ष फर्जंद संभाजी राजांना रजपुताच्या गोटात धाडावे लागणार होते! जामीन म्हणून!!

राजांच्या मनाच्या खलबतखान्यात एक ताजा आवाज मसलत देत घुमत होता, "एकला जीव पदरी घातला! स्वारीच त्यांच्या आऊ आणि आबा!!" त्या आवाजात मिर्झा राजाचे हिंदोस्तानी बोल मिसळत होते — "बेशक-बिनाहर्ज भेज देना आपके कुँवरको! हम कसम उठाते हैं ...."

राजकारण नात्याचा गुंतवा जाणत नसते. डोळ्यांवर पट्टी बांधून ते माणसाला एकाच

वेळी लुसलुसत्या हिरवळीवरून रणरणत्या वाळवंटात उतरवीत असते. राजांना रक्ताची नाती नसतात! असी तरी ती मनाच्या जामदारखान्यात 'मोहरबंद' करून ठेवावी लागतात!

राजे निर्णयाला आले होते, पण त्यांच्यासमोर एक पेच होता– ह्या निर्णयाची समज शंभूराजांना कशी पडावी? आऊसाहेबांना त्यासाठी हिंमतबंद कसे करावे? पुन: पुन्हा त्यांना वाटत होते की तडक जिजाऊंच्या महाली जावे, मनी दाटलेले मोकळ्या ओठी बोलावे. पण पाय महालाच्या उंबरठ्यातच अडखळत होते. हाताची बोटे छातीवरच्या कवड्यांवर चाळवली जात होती. चिंतावल्या मनाबरोबर पाय फेऱ्या घेत होते.

"आऊसाहेबांची खाशी स्वारी येतीया. संगती बाळधनी हाईत." राजांच्या महालावर पहारा देणाऱ्या धरकऱ्याने आत येऊन मुजरा देत वर्दी दिली. कायदे आखडलेले दौडते घोडे थांबावे तशा राजांच्या फेऱ्या गपकन् थांबल्या.

"थाळ्यास नाही आलात? गडकोटांची चिंता करता?" महालात शंभूराजांच्यासह आलेल्या जिजाऊ संथपणे राजांना म्हणाल्या. शंभूराजांनी पुढे होत आपल्या महाराजसाहेबांच्या पायांवर कपाळ ठेवले. त्यांना उठवून घेऊन राजे क्षणभर त्यांच्या कपाळावरच्या दोनदळी शिवगंधाकडे तसेच बघत राहिले. ते बघताना संभाजीराजांची कुंडली मांडणाऱ्या हरभट ज्योतिष्यांची जबान त्यांना आठवली– "साक्षात रुद्र पुराणांतरी रुद्र जन्मास आला आहे! उंच गडकोटावरल राहील... प्रलय माजवील... पण.... पण! जसा आप्तगणंकडून नाडला गेला तसाच योग या कुंडलीत दिसतो!!" त्या आठवणीने राजे घायाळ झाले. नको ते विचार त्यांच्या राजमनात घुसवा करून गेले–

"त्या रुद्र-शंकरास देवदेवतांच्या कल्याणासाठी विष पचविणे पडले. त्याचा कंठ काळानिळा पडला. पण देवदेवतांचे गळे सलामत राहिले. या श्रींच्या राज्यासाठी, या मावळमाणसांच्यासाठी तुम्हा-आम्हासही असे विष पचवावे लागेल. रुद्राने ते एकदा केले. तुम्हा-आम्हाला ते प्रसंग पडला तर कैकवेळा करावे लागेल. पंडित शिकवण देतात, राजा हा विष्णूचा अंश आहे, पण त्यांना ठावे नसते की राजा हा प्रथम शंकराचा अंश असतो आणि मग असलाच तर विष्णूचा! आम्ही त्यासाठीच 'शिवलिंग' पूजतो. शंभूराजे, रुद्राने रुद्रासारखेच राहावे! रुद्रासारखेच वर्तावे!"

राजांचे मन बांधील झाले. पुढे होत शांतपणे त्यांनी मासाहेबांच्या पायांना हात लावला. तो निर्धाराने मागे घेत आपल्या कपाळावरच्या शिवगंधाला भिडविला.

"राजे, कोंढाण्यापासून आम्ही बरीच बघतो आहोत. तुम्ही आम्हास टाळू बघताहात. रजपुतांशी तहाची गोष्ट घडली म्हणून बैचेन आहात. राजे, आम्हापासून काही लपविणे तुम्हाला साध्य होणार नाही. राज्य जाते म्हणून धीर जाता कामा नये. तास शाबूत असतील तर नदी नामशेष होत नाही!" अत्यंत मायेने जिजाबाई धीराच्या शब्दांत म्हणाल्या.

ते शब्दन् शब्द उरात साठवून घेताना खाली पडलेली राजांची मान आपसुकच वर उठली. तर्फेला असलेल्या संभाजीराजांच्या खांद्यावर आपल्या हाताचा निमुळता, गुलाबी तळवा चढवीत ते जिजाबाईंच्या तुळजाई-शांत डोळ्यांच्या आश्वासनावर विश्वासून म्हणाले, "खरं आहे मासाहेब, आम्हास तुम्हापासून काहीच लपविणं साध्य होणार नाही. चारी पायांत आकडेचाप बसविलेल्या हत्तीसारखी आमची रजपुताच्या गोटात गत झाली! यात काही कमी नको म्हणून रजपुतानं पाच कलमी तहातील शेवटच्या कलमाचा अंकुश आमच्या मर्मात टोचून ठेवला आहे. तुमच्या कानी तो कसा घालावा हेच आम्हास उमजत नाही." क्षणभर राजांनी संभाजीराजांच्यावर आपली नजर खिळविली. त्यांच्या खांद्यावरचा राजांचा हात नकळत त्यांच्या पाठीवर आला. काहीतरी बोलावे तसा उगाच फिरत राहिला!

"कसला अंकुश राजे? साफ साफ बोला." जिजाबाईंचे डोळे राजांच्या सर्वांगाभोवती तटबंदी बांधीत फिरले! मन शंकेखोर झाले.

बगलेला असलेल्या संभाजीराजांना आपल्या आणि मासाहेबांच्या मध्ये घेत त्यांना पोटाजवळ बिलगवून राजे घोगरट आवाजात म्हणाले, "रजपुताच्या तहाची तामिली होईपर्यंत– तेवीस गडकोट त्याच्या हवाली होईपर्यंत आम्हाला बाळराजांना त्याच्या गोटात धाडावं लागणार... ओलीस म्हणून!" राजांची नजर जिजाऊंच्या मुद्रेवरून घसरली आणि त्यांच्या पायांवर येऊन स्थिरावली.

"राजेऽऽ!" थरारलेल्या जिजाऊ राजांच्या बाकदार नाकाकडे बघत जवळ जवळ किंचाळल्याच. "काय– काय बोलताहात हे? हे– हे कलम तुम्ही मान्य करून आलात! 'फर्जंद' म्हणून ही तुमची एकुलती एक निशाणी हातात आहे हे विसरलात? तुमच्या इतबारासाठी रजपुताला 'ओलीसच' पाहिजे होता... तर... तर मग त्यासाठी आम्ही काय कमी होतो? नाहीतरी कपाळ फुटलं म्हणून चितेवर चढायला निघालेल्या आम्ही रजपुताचा ओलीस म्हणून पालखीत चढलो असतो!"

त्या बोलांनी गडबडून गेलेले राजे, व्याकुळल्या नजरेने मासाहेबांच्याकडे बघत लगबगीने म्हणाले, "गैरसमज– गैरसमज होतो आहे मासाहेब. ही अट मिर्झा राजानं घातली. आम्हाला ती मान्य करण्याशिवाय इलाज उरला नव्हता..."

"तेच– आम्हाला पुढं चालवून तुम्हाला ती बाजूला काढता आली असती. राज्याची स्वप्नं पुढच्या पिढ्यांत बघायची असतात. त्यासाठी टाकावी लागलीच तर जुनी पिढी खर्ची टाकावयाची असते. उद्या मिर्झाच्या तळात बाळराजांचं काही बरंवाईट झालं तर आम्ही कुणाच्या तोंडाकडं बघावं? उद्या आमचा म्हातारा श्वास सरला तर स्वर्गी आमच्या सूनबाईंना काय जाब द्यावा?" जिजाबाई राजांच्यावर रोखलेली नजर जरासुद्धा ढळवायला तयार नव्हत्या.

" मासाहेब, धीर सोडू नये. मिर्झा राजानं बेल उचलून शपथ घेतली आहे. बाळराजांच्या केसालासुद्धा धक्का लागणार नाही रजपुताच्या गोटात. मिर्झा जबानीचा सच्चा आहे. दगाच करायचा असता तर आम्ही त्याच्या भेटीला बेहत्यार गेलो तेव्हा त्यानं आम्हालाच तो केला असता. सगळीच माणसं हरामी नसतात मासाहेब."

मासाहेबांची अदब राखून राजे त्यांना आपली राजकीय चाल समजावून देण्याची कोशिस करत होते. पण संभाजीराजे ही जिजाऊंच्या सोशिक स्त्रीमनाची नाजूक नातेबंधाची जिव्हाळी होती. खूप बघितलेल्या आणि भोगलेल्या जिजाऊंचा 'संभाजीराजे' हा ठेवणीतला खास दागिना होता. शेलका साज होता. गळ्यातल्या तुटल्या मंगळसूत्राचा आघात त्यांनी कष्टाने पचविला होता. स्वारी-शिकारींच्या घाईगर्दीसाठी, आई भवानीचे 'श्रींचे' राज्य उभे करण्यासाठी त्यांनी आपल्या हातांनी राजांना मावळाच्या दऱ्यादरडीत फेकले होते. त्यांच्यातील कुलस्त्रीचे काळीज 'शंभूराजे' हा भोसलेकुळीचा रक्तपोत पदराखाली जपू बघत होते. म्हणूनच जे त्या राजांच्या बाबतीत निर्धाराने करीत आल्या होत्या, ते संभाजीराजांच्या बाबतीत करताना मात्र थरकून उठत होत्या. स्त्रीला पुत्र असतो त्याहून कितीतरी जवळचा नातू वाटतो.

" शत्रूचा भरोसा देताहात राजे. पण आम्हास कढ निघत नाही. चला बाळराजे." असे म्हणत जिजाबाई महालाबाहेर जाण्यासाठी वळल्या. त्यांच्या पाठमोऱ्या मूर्तीला मुजरा करून राजे म्हणाले, " बाळराजांना राहू द्या आमच्या महाली."

मागे न बघताच जिजाबाई म्हणाल्या, " जशी तुमची इच्छा." आणि त्या आपल्या महालाच्या रोखाने तडक चालू लागल्या.

मध्यरात्र टळत असली तरी राजे आपल्या महालात शंभूराजांशी बोलत होते. रजपुताच्या गोटात पाळायच्या रीतीभातीच्या गोष्टी सांगत होते.

" मिर्झा राजांना 'दादाजी' म्हणत चला. आमच्या ठिकाणीच त्यांना माना. कमी बोला. त्यांच्यासमोर मस्तकीचा टोप उतरू नका." अशा सूचनांवर सूचना त्यांनी संभाजीराजांना दिल्या. राजे बोलता बोलता मध्येच थांबत होते. सईबाईंच्या आणि मासाहेबांच्या आठवणींनी त्यांचे मन घुसळून येत होते.

संभाजीराजे त्यांचा प्रत्येक बोल ध्यान देऊन ऐकत होते. राजे बोलता बोलता थांबले की त्यांची दगडबंद भिंतीवर पडलेली केवढीतरी मोठी सावली ते आपले डोळे ताणून साठवून घेत होते. राजांचे दोन अस्सल राजकारणी ओठ संभाजीराजांच्या कानांत जीवनाचा विश्वास भरीत होते. त्यांना 'पहिल्या धावणीला' तयार करून घेत होते. त्यांच्या मनाची बांधणी साधीत होते.एकदा संभाजीराजांच्याकडे आणि एकदा एका मोठ्या चिराखदानाच्या झाडाकडे बघत राजे विचारमग्न झाले. ते झाड त्यांना सईबाईंच्यासारखेच वाटले! आपल्या ज्योतीचे असंख्य डोळे करून ते आपल्या 'एकल्या जीवाला' 'शंभूबाळांना' एकटक बघते आहे, असा विचित्र विचार राजांच्या मनात तरळून गेला.

आपली सावळ्या रंगाची सावली मागून चालती घेत राजे संभाजीराजांच्या अगदी जवळ आले. त्यांचा चेहरा आपल्या निमुळत्या बोटांच्या ओंजळीत घेऊन त्यांनी त्यांच्या डोळ्यांत क्षणभर एकटक रोखून पाहिले. लागलीच त्यांचे छोटेखानी खांदे आपल्या बळकट बोटांनी घट्ट आवळून धरीत त्यांनी केवढ्यातरी निर्धारी आवाजात त्यांना विचारले. दैवी संकल्पाने मानवी साधनाला विचारावे तसे, " खरं खरं सांगा. रजपुताच्या गोटात जायला तुमचं मन कच तर खात नाही ? ..."

" नाही ऽ ! " फरसबंदीवर पडलेल्या झळझळीत सोनमोहरेचा यावा तसा खणखणता जबाब आला!

" मग विचार कसला करताय ? काहीच बोलत नाही तुम्ही शंभूबाळ ? " राजांनी त्यांचे खांदे हलविल्यासारखे केले.

" त्या गोटात आमची एक अडचण होणार आबासाहेब ! " राजांच्या डोळ्यांना डोळे जोडून संभाजीराजे म्हणाले.

" कसली अडचण ? बोला." राजांच्या भुवयांनी अंदाज घेताना कमानबाक चढविला.

" इथं गडावर रोज अंघोळ करून पेहराव चढविल्यावर थोरल्या आऊसाहेब आमच्या कपाळी शिवगंध रेखतात. रजपुताच्या गोटात ते कपाळी कोण रेखणार ? "

काहीच अंदाज नसलेला तो प्रश्न ऐकून राजे थरकून उठले. न राहवून त्यांनी शंभूराजांचे मस्तक आपल्या छातीशी बिलगते घेतले. संभाजीराजांच्या कपाळीचे शिवगंध राजांच्या छातीवरील कवड्यांना भिडले!

ज्येष्ठाच्या पौर्णिमेचा दिवस उजाडल्यागत झाला! पावसाळी ढगांची शिबंदी आभाळात तळ टाकून पडल्यामुळे उजाडले तरी तसे वाटत नव्हते. आज संभाजीराजे नेताजीराव पालकरांच्या सोबतीने गड उतरणार होते. उग्रसेन शंभूराजांना घेऊन जाणार होता. सगळ्या गडावर एक विचित्र कोंदटलेपण पसरले होते.

पहाट-स्नान केलेल्या संभाजीराजांनी अंगावर खास ठेवणीतला पेहराव घेतला. जरीकोयरीचा निळाशार जामा आणि गडद केशरी टोप असा राजांच्यासारखा तो पेहराव होता. कमरेला छोटेखानी जमदाडीचे बंद आवळले होते.

दर्शनासाठी संभाजीराजे जिजाऊसाहेबांच्या महाली आले. तिथे पुतळाबाई आणि धाराऊ होत्या. संभाजीराजांनी त्या सर्वांना, पायांवर डोके ठेवून नमस्कार केले.

धाराऊने अदबीने धरलेल्या तबकातील गंध, अष्टगंधाने जिजाऊसाहेबांनी संभाजीराजांच्या कपाळी शिवगंधाची दळे रेखली. त्यांचे पिंडीसारखे मुख बघताना जिजाऊंचे मन मायेने भरून आले. त्यांना प्रेमभराने जवळ घेत त्या म्हणाल्या,

"बाळशंभू, गैरअंदाज कुठं काही खाऊ नका. नेताजी सांगतील ते ध्यान देऊन करा." जिजाऊंना पुढे कांही बोलवलेच नाही. धाराऊकडे बघत त्या म्हणाल्या, "धाराऊ, बाळराजांच्या न्याहरीचा थाळा जोडून आणा."

"जी." म्हणत ती निघून गेली.

जिजाऊ, पुतळाबाईंनी संभाजीरावांना देवमहालात आणले. देव्हाऱ्यात अष्टभुजा जगदंबेची हत्यारे पेललेली, डोळे विस्फारलेली, क्षात्रमंगल मूर्ती पायाखाली महिषासुर रगडीत उभी होती. तिच्या पायावर बेलभंडारा वाहून शंभूराजांनी तिला दंडवत घातला. जिजाऊंनी भंडाऱ्याची दोन बोटे संभाजीराजांच्या कपाळावरच्या शिवगंधावर आडवी ओढली आणि शंभूराजांना घेऊन त्या राजांच्या महालाकडे चालल्या. पुतळाबाई बाळराजांच्या न्याहारीची व्यवस्था लावण्यासाठी माघारी वळल्या.

राजे आपल्या महालात सरलष्कर नेताजी पालकरांना हरतऱ्हेच्या सूचना देत होते.

"जी" म्हणून आपली थोराड पगडी डोलवून नेताजी त्या ध्यान देऊन ऐकत होते. त्यांच्या हाताची मूठ कमरेच्या तलवारीच्या मुठीवर घट्ट आवळलेली होती.

"मासाहेब येताहेत." अशी वर्दी राजांना मिळाली. राजे आणि नेताजी आपले बोलणे तसेच सोडून महालाच्या उंबरठ्यापर्यंत आले.

जिजाऊ संभाजीराजांच्यासह राजांच्या महालात प्रवेशल्या. मुजरे झाले. संभाजीराजांनी राजांच्या पायावर डोके ठेवले. त्यांना उठवून जवळ घेत राजे म्हणाले, "बाळराजे, नेताजीकाका तुमच्या संगती येताहेत. काही लागलं-सवरलं तर त्यांना सांगा. मिर्झा राजांना 'दादाजी' म्हणत चला."

"जी." संभाजीराजांनी होकार भरला.

"नेताजीराव, बाळराजांची खुशाली-खबर आम्हास रोज पोचती करीत चला. सावलीसारखे तुम्ही त्यांच्या पाठीशी राहा." जिजाऊंनी नेताजींना आपली खास इच्छा सांगितली.

"मासाब, बाळधन्याच्या केसाला ढका लागला, तर त्येंच्या डुईवरच्या केसाएवढ्या मुंड्यांचा बेलफळागत सडा पडेल कऱ्हेपठारावर. तुम्ही निवांत असा." नेताजींनी ताठ मानेने जिजाबाईंना धीर दिला.

इतक्यात मोरोपंत महालात आले. त्यांनी राजांना आणि जिजाबाईंना मुजरा करून जबान खोलली, "स्वामी, रजपुताकडून आलेली हेजिब आसामी उग्रसेन कछवाह बाळराजांना नजराणा पेश करण्याची इजाजत मागते आहे."

राजे ते ऐकून क्षणभर विचारात पडले. वास्तविक नजराणा मिर्झा राजांच्या तळावर पेश व्हायचा! तो आधीच कसा काय पेश होतो आहे? की बाळराजांना आपल्याबद्दल जवळीक व धीर वाटावा यासाठी मिर्झा राजाने टाकलेली ही एक चाल आहे? त्यांना नीट अंदाज बांधता येईना. सावधपणा म्हणून त्यांनी मोरोपंतांना आज्ञा केली, "पंत, नजराणा पेशवे म्हणून तुम्हीच बाळराजांच्यासाठी स्वीकारा! त्या नजराण्याला साजेल असा फेरनजराणा आमच्या वतीनं तुम्ही त्याला बहाल करा."

"आज्ञा स्वामी." म्हणत मोरोपंत महालाबाहेर निघून गेले.

राजगडावर आलेल्या उग्रसेन कछवाहचा एक बेत साफ फसला होता. आपल्याला 'राणाजीने' नेमून दिलेली कामगिरी तो हुन्नर चालवून पार पाडू बघत होता. त्याला संभाजीराजांना बघायचे होते! "शिवाजीराजे कुणाच्याही कुँवरला राजवेष घालून 'आपला कुँवर' म्हणून तुझ्याबरोबर पाठवून देतील तरी सावध!" ही मिर्झा राजाने दिलेली सूचना तो विसरला नव्हता! पण गडावर आल्यापासून अद्याप त्याला एकदाही संभाजीराजांना बघायला मिळाले नव्हते. तो काळजीत होता.

राणीवशातील सगळ्या मासाहेबांची दर्शने संभाजीराजांनी घेतली. धाराऊने जोडलेल्या न्याहारीचा थाळा रिवाज म्हणून शिवला.

शंभूराजांच्या गडउताराची पालखी पद्मावती माचीवर सिद्ध ठेवण्यात आली होती. त्या पालखीभोवती नेताजींनी निवडलेले तगडे, हत्यारबंद धारकरी कडे करून उभे होते. त्या धारकऱ्यांत एका बाजूला उग्रसेन कछवाह आपल्या राजपुती हशमांसह उभा होता. केशरी साफे आणि पिळलेल्या दाढ्या यामुळे ते सारे वेगळे व उठून दिसत होते.

राजे, नेताजी, मोरोपंत, गंगाधरपंत, आनंदराव, येसाजी, प्रतापराव अशा खास मंडळींसह शंभूराजांनी बालेकिल्ला सोडला.

सारे बालेकिल्ल्यावरून पद्मावतीवर निघणाऱ्या भुयाराच्या तोंडाशी आले. नेताजींनी इशारत करताच भुयारावरची धोंड पहारेकऱ्यांनी हटविली.

नेताजी पुढे होत भुयारात उतरले. त्यांनी हातजोड देऊन संभाजीराजांना आत घेतले. पाठोपाठ राजे आणि सारी मंडळी भुयारात उतरली. आत येताच पुढे असलेले नेताजी मागे झाले. राजांच्या बरोबरीने संभाजीराजे भुयाराच्या उतरत्या पायऱ्या चालू लागले. निरोपासाठी आलेली मंडळी मागून चालू लागली.

भुयाराची वळणे मागे पडत होती. काही पायऱ्या मागे पडल्या आणि कसल्यातरी विचाराने चालते राजे एकदम थांबले! त्यांना शंभूराजांनी याच भुयारमार्गातून चालताना केव्हातरी विचारले होते, "महाराजसाहेब, हे भुयार संपणार तरी केव्हा?"

आज ती आठवण एका वेगळ्याच अर्थाने राजांना जाणवत होती. त्यांना संभाजीराजांना म्हणावेसे वाटत होते, "आता कुठं तुम्ही भुयारात पहिल्यानं उतरता आहात! अजून खूप चाल घ्यायची आहे. आई अंबेनं त्यासाठी तुम्हास उदंड हिंमत द्यावी." पण राजे काही बोलले नाहीत.

आपला हात त्यांनी संभाजीराजांच्या खांद्यावर चढविला आणि ते चालू लागले. पाठीमागून चालणारी मंडळी क्षणभर घोटाळ्यात पडली. त्यांना राजे असे अंमळ थांबले का ते कळले नाही. कधीच कळणार नव्हते!

सारी मंडळी पद्मावती माचीवर आली. नेताजींनी आपल्या धारकऱ्यांवर आपली चलाख नजर एकदा फिरवून घेतली. राजे आणि संभाजीराजे पालखीच्या रोखाने चालले. सगळी माची माणसांनी दाटून गेली होती.

"आम्हास न्याल काय धावणीला तुमच्या संगती महाराजसाहेब?" ही संभाजीराजांनी त्यांना अनेक वेळा घातलेली मागणी आठवली. आज तो योग येत होता! केवढ्या वेगळ्या अर्थानं! शंभूराजांना आपल्या हयातीची 'पहिली धावणी' एकट्यानेच घ्यावी लागत होती! राजांच्या काळजाचा सफेद घोडा थरकून उठला. कुठल्यातरी अज्ञात हाताने त्याच्या पाठीवर थाप भरली होती.

"रजपुताच्या गोटात बाळराजांच्या केसालासुद्धा धक्का लागणार नाही." अशी जिजाऊंची समजूत घालणाऱ्या राजांचा हात झटकन गळ्यातील चौसष्ट कवड्यांच्या माळेकडे गेला! आपल्या कंठातील माळ त्यांनी डोकीवरचा टोप चुकवीत हलकेच उतरली. तिचे दोन पेड करून त्यांनी ती संभाजीराजांच्या गळ्यात चढविली!

"सांभाळून असा." घोगऱ्या आवाजात बोलून त्यांनी आपल्या फर्जंदाच्या पाठीवरून हात फिरविला. भोवतीच्या गर्दीतून उग्रसेन कछवाह हे सारे बघत होता! शंभूराजांच्याकडे तो संशयी नजरेने बघत होता. राजांनी त्यांच्या गळ्यात कवड्यांची माळ चढविताच त्याने शेजारी उभ्या असलेल्या एका मावळ्याला विचारले, "वो क्या है? राजासाबने कुँवरके गलेमें क्या चढाया?"

मावळा त्याच्याकडे चमत्कारिक नजरेने बघत म्हणाला, "एवडंबी मालूम न्हाई न्हय? वो माळ है. आई भवानीकी!" आपल्या कानांना हात लावून नमाजाचा भाव उभा करीत त्याला समजावून देण्यासाठी तो मावळा म्हणाला, "तुमच्या खुदासारखी! बघो, किसकेभी गळ्यात वो माळ नहीं!" मावळ्याने विचारणारा म्लेंच्छ आहे हे जाणून आपल्या अजब भाषेत सांगितलेले उग्रसेनला बहुधा कळले असावे.

ही माळ देवीची आहे आणि ती इतर कुणाच्याच गळ्यात नाही, ह्याची खातरजमा होताच त्याचा तरतरीत रजपूत चेहरा उजळून गेला! पुढे होऊन त्याने पालखीत चढणाऱ्या संभाजीराजांना 'जय एकलिंगजी' म्हणत कुर्निसात केला.

संभाजीराजे पालखीत चढले. भोयांनी थोपे देऊन पट सरसे करीत पालखी वर उचलली. डावे-उजवे झोले खात पालखी माची सोडून पाली दरवाज्याकडे जाऊ लागली. राजांनी धरावा तसाच पालखीचा झुबकेदार राजगोंडा संभाजीराजांनी आपल्या मुठीत धरला होता. हातात नागवे हत्यार धरून नेताजी आपल्या एका हाताने पालखीची डंबरी धरून पालखीबरोबर दुडक्या चालीने चालू लागले.

जखडल्या पायाने राजे दूर जाणाऱ्या पालखीच्या लाल ठिपक्याकडे बघत होते. त्यांच्या मनात विचारांची अनेक हत्यारे एकमेकांवर आदळत होती —

"बरड असली तरी पुण्याची स्वतंत्र जहागिरी देऊन आमच्या महाराजसाहेबांनी बंगळूरहून आम्हास इकडं धाडलं. आणि — आणि आम्ही मात्र तुम्हास गनिमाची मनसब स्वीकारण्यासाठी तिकडं धाडतो आहोत!"

"उपजलात आणि धाराऊच्या वरच्या दुधावर अंग धरण्याची पाळी तुमच्यावर आली. आज राजकारणात उतरताहात आणि औरंगशाच्या उसन्या मनसबीचा स्वीकार तुम्हाला करावा लागतो आहे! ज्या तुमच्यासाठी आम्ही आमचा जीव गहाण टाकावा तेच तुम्ही आमच्यासाठी, या दौलतीसाठी जमान म्हणून जाताहात! खरंच शंभूराजे आप्तगणांकडून तुम्ही किती नाडले जाणार? सई, यांना आमच्या हवाली करताना तुम्ही म्हणालात की हे 'एकले जीव.' आमच्या त्या वेळी हे ध्यानी आलं नाही की राजा — 'एकला' कधीच नसतो!"

गड उतरंड उतरणारा पालखीचा लाल ठिपका बघताना — प्रतापगडावर भवानीचा पोत नाचविणारे संभाजीराजे राजांना आठवले. गोंधळ्याने जगदंबेचा महिमा गाताना उभे केलेले शब्द त्यांच्या कानांत घुमत फिरू लागले —

"उदर परडी देऊन हाती -
ब्रह्मांडी फिरवी.
लक्ष चौऱ्याऐंशी घरची भिक्षा-
मागविली बरवी.
ज्या ज्या घरी मी भिक्षा केली-
ते ते घर रुचले!
आदिशक्तीचे कवतुक मोठे-
भुल्या मज केले!!"

राजे स्वत:शीच पुटपुटले — "शंभूराजे, आपण आईचे भुत्ये आहोत. ती देईल तो जन्माचा पोत आपल्या हाती आहे. तिची इच्छा थोर आहे!"

राजे माचीवरून माघारी वळले.

सह्याद्रीच्या सिंहाचा छावा आपली गुहा सोडून पठारावर उतरत होता. पहिली राजकीय धावणी करण्यासाठी!

□ □ □

३

राजगडावरून निघालेली संभाजीराजांची स्वारी दिवस कलंडायला आला असताना मिर्झा राजाच्या तळाजवळ आली. भले मोठे पाण्याचे टाके तांबड्या कमळांनी फुलून जावे तसे उभे कन्हेपठार केशरी राहुटयांनी भरून गेले होते.

तळापासून हाकेच्या टप्प्यावर संभाजीराजांची पालखी ठाण करून किरतसिंगाने आपल्या 'राणाजींना' वर्दी पाठवली.

मिर्झा राजाचा पसरलेला प्रचंड तळ, हत्ती, उंटाचे चीत्कार, तोफगाड्यांचे खडखडाट या कशाकडेच संभाजीराजांचे लक्ष नव्हते. ते रोखल्या नजरेने समोर दिसणाऱ्या तोफमाऱ्याने काळवंडलेल्या पुरंधराकडे बघत होते. ते त्यांचं जन्मस्थळ होतं. कसलीतरी न कळणारी सळसळ त्यांच्या उदरात दाटली होती.

मिर्झा राजाचा मुन्शी उदयराज, इंद्रमण बुंदेला आणि काही रजपूत धारकरी संभाजीराजांच्या आगवानीसाठी सामोरे पेश आले. तळावर शहाजणे वाजू लागली.

नेताजींच्या सोबतीने संभाजीराजे मिर्झाच्या सर्वांत उंच उठून दिसणाऱ्या शामियान्याकडे चालले.

उभ्या हयातीत एवढ्या पोरवयाच्या पराक्रमाचे स्वागत करण्याचा प्रसंग कधी मिर्झा राजावर आला नव्हता. त्याला 'कुँवर' बद्दल कुतूहल होते.

मिर्झाच्या तळावरील रजपूत, पठाण, बहालिया धारकरी धावत येत दाटीने 'सेवा का बच्चा' बघत होते. नेताजींच्या पाठोपाठ संभाजीराजे मिर्झाच्या शामियान्यात प्रवेशले.

संभाजीराजांना बघताना मिर्झाच्या पातळ ओठांतून अस्पष्ट शब्द निसटले, "ओ ऽ ह सरण चंडी! बेहतरीन!" आपल्या कपाळावरच्या केशरी रजपुती टिळ्याची आठ्यांत घडी करून टाकत, भुवया चढवून मिर्झा राजे जयसिंग समोर बघतच राहिला. आकाशात लकलकणाऱ्या तेजवान विजेचा एक तरतरीत कोवळा कोंभ त्याला आपल्या शामियान्याच्या दारात उभा ठाकलेला दिसत होता! उग्रसेन कछवाहकडून हे शिवाजीराजांचे 'असली कुँवरच' आहेत याची शहानिशा करून घेण्याचे भान काही मिर्झा राजाला राहिले नाही!

"आइये कुँवर शंभूराजे!" म्हणत मिर्झा राजे हसत दोन चार कदम पुढे झाले. पुढे

होत "आम्ही मुजरा करतो आहोत दादाजी." म्हणत संभाजीराजांनी मिर्झा राजांच्या पायाला आपले हात भिडवले.

ते काय करताहेत हे पटकन न उमगलेला मिर्झा थोडे मागे हटत म्हणाला, "ये – ये – क्या कर रहे हो कुँवर?"

त्याच्याकडे निर्भय डोळ्यांनी बघत संभाजीराजे खणखणीत आवाजात म्हणाले, "गड सोडताना आमच्या महाराजसाहेबांनी आम्हास बजावलं आहे की, आपल्याला आम्ही 'दादाजी' म्हणावं. त्यांच्या ठिकाणी आपल्याला मानावं. आम्ही त्यांची आज्ञा पाळावी." गंगाधरपंतांनी पुढे होत त्याचा उत्तरी तर्जुमा सांगितला.

शिवाजीराजांनी आपल्यावर केवढी जिम्मेदारी टाकली आहे हे संभाजीराजांच्या तोंडून मिर्झा राजाला आता अचूक कळून चुकत होते! राजांचा, 'विश्वास टाकून माणूस बांधील करण्याचा' बेत संभाजीराजांच्या पहिल्या भेटीतच अचूक साधला गेला.

संभाजीराजांचा हात हातात घेत मिर्झा राजाने त्यांना अलिशान बैठकीवर नेऊन बसविले. शामियान्यात असलेला उग्रसेन, मिर्झा राजाची नजर त्याच्यावर जाताच मिर्झाराजाच्या जवळ आला. तसलीम करून म्हणाला, "राणाजी, एक बात..."

"बोलो उग्रभान, क्या है?" मिर्झाने विचारले.

झटकन मिर्झा राजाच्या कानांजवळ आपले तोंड नेत उग्रसेन हळूच त्याच्या कानात राजपुतानीत पुटपुटला, "ये कुँवर संभूही है! खुद राजासाबने अपने कुलदेवीकी माला इसके गलेमें चढाई है!" आणि हे सारे तो गळ्याभोवती हात फिरवून मिर्झा राजांना अभिनयाने पटवून देऊ लागला.

ते ऐकून मिर्झा राजे मान मागे टाकीत एकदम मोठ्याने हसले. सरकारी ढंगात बोलून गेले, "बेवकूफ हो उग्रभान ऽ! जाओ अपने डेरेमें!"

उग्रसेनाच्या त्या हालचालीमुळे संभाजीराजे आणि नेताजी थोडे बिचकले! एकमेकांना त्यांनी सावध नजर दिली.

नेताजींची भरीव बोटे नकळत कमरेच्या हत्याराच्या मुठीवर गपकन रुतली. शामियान्याच्या दरवाज्याकडे रोखल्या नजरेने बघताना नेताजींच्या ताणल्या छातीवरचा बाराबंदीचा एक बंद तटकन तुटला! त्यांना 'दग्याची' शंका आली. पण हे सारे उग्रसेनाच्या गैर हालचालीमुळे झाले होते.

मिर्झा राजाने आपल्या चलाख डोळ्यांनी नेताजी आणि संभाजीराजे कसल्या गैरसमजात आले आहेत हे हेरले. तो गडबडीने म्हणाला, "गल्लतफहमी न करना कुँवर! ये उग्रसेन तुम्हारे गलेकी मालाकी निशानी बनाकर तुमही राजासाब के असली कुँवर हो और कोई नहीं ये बता रहा था!"

ते ऐकताना कोंडल्या श्वासाचा दमदार निःश्वास टाकून हत्यारावरची मूठ ढिली टाकत

नेताजी म्हणाले, "चटका लागल्याबिगर कळत न्हाई 'इंगळ' कनचा आन् 'कोळसा' कनचा!" मिर्झा राजाला मात्र नेताजींची मावळबोली काही कळली नाही!

सगळ्या तळाभोवती पावसाळी सांज दाटून आली होती. पाखरांचे थवे आपल्या कोटरांच्या निवाऱ्याकडे परतून स्थिरावले होते. तळावरच्या रसोईखान्याच्या आगळ्या धुराचे लोळ फेकीत शिलगत होत्या. मिर्झा राजाच्या शामियान्याच्या दारात उभे असलेले संभाजीराजे नजर जोडून, पावसाळी ढगांनी वेढलेल्या धुरकट पुरंधरच्या माथ्याकडे बघण्यात स्वत:ला हरवून गेले होते. शामियान्याची कनात धरून नेताजींच्या निवडक धारकऱ्यांचे पथक हातांत नंगी हत्यारे पेलून सावध अंगाने खडे होते. त्यात स्वत: नेताजी संभाजीराजांच्यावर नजर ठेवून उभे होते.

सुरक्षितता आणि इतमाम म्हणून मिर्झा राजाने संभाजीराजांच्या मुक्कामाची सोय खुद्द आपल्या शामियान्यातच केली होती. त्यावर किरतसिंग आणि आपले खास विश्वासू रजपूत लढवय्ये जोडून दिले होते. शामियान्याच्या अंत:पुरात मिर्झा राजा रणचंडीची संध्यापूजा करण्यात गुंतला होता. कितीतरी वेळ संभाजीराजे पुरंधरचा धुरकटला माथा एकटक निरखीत राहिले. आता चांगलेच अंधेरून यायला लागले होते.

एकसारखी चुळबूळ करणारे नेताजी पुढे झाले. संभाजीराजांना मुजरा करून म्हणाले, "किन्नाटीचं आता बाळराजांनी आत चलावं! भाईर हुबं न्हाऊ नये."

कसलीतरी साखळी तुटल्यासारखे संभाजीराजे भानावर आले. नेताजींच्या थोराड पगडीकडे बघत म्हणाले, "नेताजीकाका, हा गड आम्हास जणू साद घालतोय! त्याच्यावरची नजर काढू नये असंच वाटतंय. छातीत खळबळ माजतेय."

पगडी डोलवीत नेताजी म्हणाले, "बराबर हाय बाळधनी. मानूस जिथं उपाजतं ती जागा त्येला सादच घालती! तुमी या गडावं उपजला. म्याच किल्लेदार हुतो त्या वक्ताला. मासायबांनी लई गर्दी उडवली हुती तुमचं पयलं बाळरडं ऐकून! आता ह्यो गड पठाणाच्या कबजात हाय, न्हाईतर दावला असता थोरल्या रानीसायबांचा म्हाल तुमास्नी एकडाव!" ते तगडे रांगडे मन हे बोलताना दाटले होते.

सगळी कोडी सुटल्यासारखे संभाजीराजांना क्षणभर वाटले. पण अशी कोडी कधीच सुटत नसतात! गुंतवा झालेल्या धाग्याच्या भेंडोळ्यातून नेमका शेव हाताशी येत नाही. संभाजीराजांचे मन आपल्या 'आऊसाहेबांचा' विचार करू लागले. किल्ले पुरंधर वरून कसा दिसत असेल अशी उत्सुकता त्यांच्या मनात येऊन गेली. ते दरवाज्यातून वळले. संथपणे शामियान्यातील तलम रुजामे तुडवीत गेले.

संभाजीराजांसह रात्रीचा खाना एका पंक्तीने उरकून शामियान्याच्या ख्वाबगारात मिर्झा राजे आपल्या मंचकावरच्या मऊ बिछायतीवर लेटले होते. मावळतीच्या बाजूला एका

शिसवी मंचकाच्या बिछायतीवर संभाजीराजे पडून होते. त्यांच्या अंगावरची शाल दूर हटून पायगतीला गोळामोळा होऊन पडली होती. आतली हिंदोस्थानी शमादाने मंद तेवत होती. ख्वाबगाराला लागून असलेल्या अंत:पुरात मिर्झा राजाने पुजलेल्या रणचंडीच्या मूर्तीसमोर तेवत होत्या.

शामियान्याच्या सगळ्या घेराभोवती मावळे धारकरी आणि रजपूत हशम यांचा छबिन्याचा जोड पहारा नागव्या तलवारी पेलून जागत्या डोळ्यांनी फिरत होता. आपल्या जाड मावळी पायताणांची कुरकूर उठवीत, हातात नंगी तेग धरून खासे नेताजी त्या पहाऱ्यावर नजर ठेवीत फिरत होते. तळावर जागजागी आगट्या पेटल्या होत्या. मधूनच त्यातील बाभळीच्या गाठी पेटता पेटता फाटकन् फुटत होत्या. त्यामुळे फवारलेल्या ठिणग्यांचा आगटीभोवती सडाच सडा पडत होता.

समोर टाकलेल्या गवताच्या पेंढ्या सोंडेने झटकून नीट मुंगीरहित करून मगच घशात सोडताना हत्तींच्या गळ्यांतील घंटाचे उठणारे घुमारे नाद तळावर प्रसरत होते. बैठक घेतलेले उंट माना ठेवून मिटल्या डोळ्यांनी रवंथ करीत होते. त्यांच्या ओठाळीतून फेसाच्या तारा तरंगत होत्या. लीद टाकलेली घोडी अखंड शेपट्या चाळवीत उभ्या उभ्या झिंगत होती. तळावर शांत रात्र उतरली होती.

आपल्या बिछायतीवर संभाजीराजे मात्र तळमळत होते. एकसारखी कूस पालटत होते. थोरल्या मासाहेबांचा मायेचा हात पाठीवर घेऊन बिनघोर झोपण्याची सवय असलेले संभाजीराजे बेचैन होते.

लेटल्या लेटल्या त्यांची घालमेल निरखणारा मिर्झा राजे आपल्या मंचकावरून उठला. किमॉश उतरून ठेवल्यामुळे त्याचे रुपेरी केस शमादानांच्या प्रकाशात लकलकले. संभाजीराजांच्या मंचकाजवळ येत त्याने आपला हिरेजडित अंगठ्या असलेला हात संभाजीराजांच्या पाठीवर ठेवला. त्या स्पर्शाने शंभूराजे दचकून उठले. मिर्झा राजाच्या पांढऱ्या सफेद केसांकडे बघू लागले.

"कुंवर, तुम्हे नींद नहीं आती! जगह बदल गयी कि नींद हजम होती है! आवो हमारे बिस्तरपर लेट जावो! डरो मत." मिर्झा राजाने त्यांचा हात धरून त्यांना मंचकावरून उतरते केले. हळुवारपणे आपल्या मंचकाजवळ आणले.

संभाजीराजे, मिर्झा राजांच्या मंचकावर बसले. समोर उभ्या असलेल्या धिप्पाड पण शांत मुद्रेच्या मिर्झा राजाकडे त्यांनी पाहिले. मिर्झाच्या छातीवर त्याच्या अलमपन्हा औरंगजेबाने त्याला बहाल केलेले हिरव्याकंच पाचूचे मोतीलगात गुंफलेले पदक चमकत होते. त्या पदकाकडे बघत संभाजीराजे क्षणभर गप्प झाले. मग मान उडवून त्यांनी विचारले, "दादाजी, आम्ही एक विचारू?"

"बेशक पूछों कुंवर संभू." मिर्झा शांतपणे म्हणाला.

"आमचे आबासाहेब म्हणाले की तुम्ही रजपूत आहात आणि आम्हीही रजपूत आहोत. मग – मग तुमच्या गळ्यात भवानीच्या कवड्यांची माळ का नाही ?"

त्या प्रश्नाने मिर्झा राजा हा दिल्ली दरबारचा थोर राजकारणी चरकला. त्याच्या डोळ्यांत एक दुखरी छटा तरळून गेली. आपल्या छातीवरच्या हिरव्या पदकावरून कसातरीच हात फिरवीत तो म्हणाला, "बहोत रात उतर आयी. सो जावो कुंवर।"

संभाजीराजांना लेटते करून मिर्झा राजाने त्यांच्या अंगावर शालनामा पांघरला. स्वत: मिर्झा राजा त्यांच्या शेजारी कलंडला. "चंडी, चंडी" असे पुटपुटत आपल्या हयातीच्या चुकलेल्या, मार खाल्लेल्या वाटा आठवू लागला.

कुसवे होऊन मिर्झा राजाने संभाजीराजांच्यावर नजर टाकली. त्यांचा श्वास बिनघोर लयीत लागला होता !

शामियान्यासमोरच्या पैस जागेत शाही इतमामात बैठकीचा चौथरा सजला होता. त्यावर राजपुती वाणाच्या तलम बिछायती अंथरल्या होत्या – जरीबतूची नकसदार कलाकुसर असलेल्या खोळी घातलेल्या गिर्द्या, लोड मांडले होते.

संभाजीराजांना नजराणा देऊन दिपवून टाकणासाठी तो चौथरा मिर्झा राजाने एका रात्रीत सिद्ध केला होता. चौथऱ्याच्या एका अंगाला सरपोसांनी झाकलेली पेहरावाची तबके घेऊन काही रजपूत धारकरी उभे होते. पिछाडीला अब्दागिऱ्यांची मोठी पिंपळपाने हातात धरून अब्दागिरे खडे होते. एका बाजूला शिंगे, तुताऱ्या, नगारे यांचा शहाजणांचा ताफा उभा होता. तळावरचा तमाम हशमलोक तो नजारा बघण्यासाठी जागा मिळेल तिथे दाटला होता.

ज्येष्ठ वद्य द्वितीयेचा दिवस कासराभर वर आला होता; पण पावसाळी कुंदपणामुळे तसे वाटत नव्हते. आपल्या शामियान्यातून मिर्झा राजा जयसिंग संभाजीराजांच्यासह बाहेर आला. रजपुताच्या अंगावर सोनेरी बुट्ट्यांचा हिरवाकंच मोगली जामा होता. खांद्यावरून फिरलेले गर्द निळे जरीकाठाचे उपरणे होते. पाचू मढविलेला, मागे झुकलेला, झुरझुरत्या सफेद पिसांचा तुर्रेबाज किमॉश त्याने मस्तकी चढविला होता. गळ्यात मोत्यांचे कंठे आणि हिरवे पदक होते.

संभाजीराजांनी जरीकोयऱ्यांच्या नकसकामाचा पांढरा सफेद जामा परिधान केला होता. राजांचा होता त्या माटाचाच, पिछाडीला ठेवणारा केसरी टोप त्यांनी मस्तकी चढविला होता. कमरेला गर्द जांभळा जरीशेला आवळला होता. चुणीदार मांडचोळण्याखाली पायात भगवे चढाव होते. मोत्याच्या कंठ्याबरोबर छातीवर कवड्यांची दुपेडी माळ आणि कपाळी दोनदळी शिवगंध होते. सर्व दरवाजे मिटलेल्या जगदंबेच्या शांतमंगल गाभाऱ्यातून समईचा एखादा कवडसा बाहेर झेपावून यावा तसे ते दिसत होते !

मिर्झा राजे संभाजीराजांच्यासह बैठकीच्या रोखाने चालू लागले. शिंगांच्या कातऱ्या ललकाऱ्या शहारत उठल्या. शहाजणे वाजू लागली.

आघाडीच्या खाशा स्वाऱ्यांमागून नेताजी, गंगाधरपंत, कर्माजी, किरतसिंग, रायसिंह राठोड, चतुर्भुज चौहान, रामसिंग हाडा, महमद तर्खान, तुर्कताझखान अशी मंडळी अदबीत चालली. मिर्झा राजाने संभाजीराजांना हात पेश करून बैठकीवर बसते केले. आपण स्वत: बैठक घेतली आणि किरतसिंग व उदयराज मुन्शी यांच्याकडे इशारतीची नजर दिली.

नजराण्याच्या पेहरावाचे तबक घेतलेला, एक एक रजपूत धारकरी पुढे होऊ लागला. मिर्झा राजासमोर अदबीने वाकून हातांतील तबक पुढे करीत तबकाला मिर्झाचा दस्तुरी-स्पर्श करून घेऊ लागला. तसेच पुढे होत ते तबक संभाजीराजांच्यासमोर धरू लागला. संभाजीराजे नजराणा आपला केल्याचे दस्तुरी-स्पर्श देऊ लागले.

एकाएकी पुरंधरच्या पायथ्याच्या रोखाने उठलेली घोड्यांच्या टापांची टपटप सर्वांना ऐकू आली. सर्वांच्या नजरा त्या आवाजाच्या रोखाने वळल्या. कैक काळजे धडधडली. झटकन् मिर्झा राजे बैठकीवरून उठले. आपल्या मुलाकडे बघत जाणवणाऱ्या करड्या आवाजात दबके बोलले – "किरत ऽ !"

"जी" म्हणत किरतसिंगाने कमरेच्या हत्यारावर मूठ रुतवली. एका घोड्याच्या पाठीवर चलाख झेप घेऊन किरतसिंगाने आवाजाच्या रोखाने घोडे पुढे काढले.

काही क्षण तसेच गेले. संभाजीराजे आणि नेताजी यांची नजरानजर केव्हाच होऊन गेली होती ! भोवतीच्या कुणालाही कळायच्या आत नेताजींचे तरबेज पट्टेबाज धारकरी संभाजीराजांच्या भोवती फेर धरून एकवटले गेले !

सगळ्यांचे डोळे किरतसिंग गेला त्या वाटेवर जोडले होते. टापा जवळ येऊ लागल्या. रामेट्याच्या, घाणेरीच्या, करवंदीच्या गर्द झुडपांना वळसा टाकत तीस एक स्वारांची घोडेतुकडी दौडत येत होती. त्या तुकडीच्या आघाडीला दोन उमदे घोडे खूर फेकत दौडत होते. ते स्वार होते किरतसिंग आणि पठाणांचा लष्करे सालार साक्षात दिलेरखान !

ते दौडते पथक चौथऱ्याजवळ आले. दिलेरखानाला बघताच मिर्झा राजाच्या कपाळावर एक बारीक आठी उठली. मांड मोडून दिलेरखान, सगळ्या तळावर क्षणात सरसरती नजर फिरवीत पायउतार झाला. खांद्यावरच्या हिरव्याकंच फुगीर खिल्लतीमुळे तो केवढातरी धिप्पाड दिसत होता.

मिर्झा राजासमोर येऊन त्याला तसलीम करीत निधड्या पठाणी बोलीत पुरंधरच्या रोखाने हात उडवीत, मिर्झाने काही विचारू नये म्हणून तोच म्हणाला, "गडपर रसद चढानी है। ऊपर दानातक पीछे नही छोडा है काफर मरहट्टोंने।"

त्यावर मिर्झा राजाला काहीच बोलता आले नाही. चेहऱ्यावर खोट्या हास्याची खिल्लत चढवीत तो दिलेरला म्हणाला, "आइये खाँसाब।"

संभाजीराजे बैठकीवरून दिलेरला निरखीत होते. त्याच्या भुवया जाड होत्या. खांद्याच्या गिर्दीत त्याची गर्दन घट्ट बसविल्यासारखी वाटत होती. डोळे भेदक होते. सगळी हयात दौडीत गेल्यामुळे त्याचा कोरल्या दाढीचा पठाणी चेहरा रासवट, निबर दिसत होता. अंगावरच्या खिल्लतीचे बंद त्याने डाव्या खांद्याजवळ गाठीत आवळले होते. डोक्यावरच्या पठाणी किमॉशात पाचूचे हिरवे पान मढविले होते.

मिर्झा राजाने दिलेरखानाचा संभाजीराजांना परिचय करून दिला. त्याला बैठकीवर आपल्या उजव्या हाताला बसवून घेतले.

उरलेली तबके पेश करून झाली. संभाजीराजांनी नेताजींच्याकडे पाहिले. नेताजींनी फेरनजराण्याची तबके घेतलेले मावळे पुढे घेतले. संभाजीराजांनी मिर्झा राजे व दिलेरखान यांना ती तबके बहाल करण्यासाठी त्या तबकांना दस्तुरी-स्पर्श दिले.

चौथऱ्यावरचे ते दृश्य मजेदार दिसत होते. दिल्ली दरबारचे दोन खंदे सेनापती आणि जगदंबेचा एक बाळभुत्या त्या बैठकीवर बसले होते.

किरतसिंगाला इशारत करून मिर्झा राजे हसत संभाजीरावांना म्हणाला, " और एक ऐसा तोहफा हम नजर करेंगे जिसे आप बहोत पसंद करोगे कुँवर। "

संभाजीराजांच्या भुवया, ते ऐकून वर चढल्या. दिलेरखानालाही मिर्झाच्या तोहफ्याचा अंदाज येईना. तळावर ठाण केलेल्या हत्तीतील एक जंगा हत्ती रुप्याचा नकसदार हौदा चढवून, झूल घालून सजविण्यात आला होता. किरतसिंगाने त्या हत्तीवर बैठक घेतलेल्या फीलवानाला इशारत देताच त्याने तो हत्ती चौथऱ्यासमोर आणला.

त्या सजल्या हत्तीकडे हात करीत मिर्झा राजा संभाजीराजांना म्हणाला, " ये शाही फीलखानेका हाथी ' अन्वर ' शहेनशाहने आपको नजर किया है कुँवर संभू। आप दरबारके सबसे पहले कम उम्र पंचहजारी सरदार हो। ".

फीलवानाने एकसारखा अंकुश टोचून " चल बेटे ' अन्वर ' सलामी दे। " अशी हत्तीशी बातचीत करून तो जंगा हत्ती पुढच्या थोराड गुडघ्यात खाली बसविला. बसल्या ' अन्वरने ' रणशिंगासारखी बाकदार सोंड उचलून मेहमानांना ऐटदार सलामी दिली आणि पुन्हा तो ताठ खडा होऊन सोंड झुलवीत, कान फडफडवीत डुलत उभा राहिला.

ते भरगच्च जनावर बघून संभाजीराजे नकळत बैठकीवरून उठले. नेताजींना इशारत करून त्यांनी जवळ बोलावून घेतले. त्यांच्या कानाशी आपले ओठ नेत काही तरी त्यांनी त्यांच्या कानात सांगितले.

" जी, " म्हणत नेताजींनी पगडी डोलावली. कमरेच्या हत्यारावर हाताची मूठ ठेवून नेताजी तळावरच्या फीलखान्याजवळच्या गंजीतून एक गवताची पेंढी घेऊन आले. अदबीने त्यांनी ती संभाजीराजांच्या हाती दिली.

ती पेंढी घेऊन धिम्या चालीने संभाजीराजे झुलत्या ' अन्वर ' जवळ आले. हातातील पेंढी उंचावून त्यांनी ती हत्तीच्या सोंडेच्या रोखाने धरली. अन्वरने आपली

भरदार सोंड हातासारखी पुढे करीत पेंढीला वेढा टाकला. त्याच्या गर्दनीवरचा फीलवान डोळे जोडून संभाजीराजांना बघत होता.

सोंडेत धरलेल्या पेंढीचा कट झटके देऊन हत्तीने उस्कटला व गवत सोंडेने झटकून साफ केले आणि आख्ख्या पेंढीचा थोराड घास त्याने सहज आपल्या घशात सोडला.

चौथऱ्याभोवतीचे सारे आसामी ते दृश्य टक लावून बघत होते. पठाण दिलेरखान ते बघताना खूष झाला होता. हसून नेताजींच्याकडे बघत संभाजीराजे पुन्हा येऊन बैठकीवर विसावले. संभाजीराजांच्या चालण्याबोलण्यावर, अदब रिवाजावर खूष असलेला मिर्झा राजे अभिमानाने म्हणाला, " हाथी पसंद आया कुँवर संभूराजे ? "

त्याच्याकडे आणि दिलेरखानाकडे एक नजर आलटून पालटून बघत संभाजीराजे म्हणाले, " ते बिचारे मूक जनावर ! कोणासही पसंत येईल. कितीही झाले तरी ते पेंढीचे गुरू ! "

मिर्झा राजाला शेवटचा चटका नीट कळला नाही; आणि कळला असता तरी काही उपयोग नव्हता ! तो त्याला कधीच वळला नसता !

एवढा वेळ ' काफर सेवाच्या ' बच्चाचे निडरपण गुमान बघणाऱ्या दिलेरखानाला संभाजीराजांची रांगडी थट्टा करण्याची लहर आली. आपल्या जाड भुवया किमॉशाकडे चढवीत त्याने खोचकपणे, झुलत्या अन्वरकडे हात उठवून विचारले, " इतना, बडा शाही हाथी कैसे उठाके ले जावोगे संबूराजे ? " दिलेरचे पठाणी डोळे लकलकले.

अंगावर आल्यासारखा अचानकच उठलेला त्याचा सवाल ऐकताना संभाजीराजांचा हात छातीवरच्या दुपेडी भवानीमाळेवर चढला. तरतरीत, बाकदार नाकशेंड्याची, शिवपिंडीसारखी दिसणारी आपल्या महाराजसाहेबांची पोतासारखी उजळ मुद्रा क्षणात त्यांच्या डोळ्यांसमोर खंडी ठाकली. दिलेरच्या पठाणी डोळ्यांत आपली मावळी, बेडर नजर विट्यासारखी फेकत नागफण्यात ताठ मान करून संभाजीराजे तासाच्या थाळीवर हातोड्याचे टोल पडावेत तशा ठणठणीत, कणीदार बोलात बोलले, " डुलत झुलत का होईना तुमचे हे जनावर चालते ! ते नेणे सोपे आहे ! पण– पण आमच्या महाराजासाहेबांनी दिलेले गडकोट चालत नाहीत !! ते नेणे कठीण आहे ! "

तो जाब ऐकून मिर्झा-दिलेर दोघेही थरारले.

" येतो आम्ही दादाजी. " म्हणत अन्वरच्या माहूताच्या रोखानं रिवाजी मोहराजड थैली फेकून संभाजीराजे बैठकीवरून उठले. नेताजीरावांना पुढे ठेवून शामियान्याच्या रोखाने चालूही लागले.

डोळे फिरलेला दिलेर त्यांच्याकडे बघतच राहिला. त्याला संभाजीराजे म्हणजे आगीची खिल्लत पांघरून चाललेला धगधगीत अंगार वाटला. त्याच्या जाड ओठांतून शब्द निसटले, " माशा ऽ ल्ला ! क्या तेज जुबाँ है ! इसकी उमर क्या होगी ? "

कऱ्हेपठारावर मावळचा पाऊसकळा कोसळू लागला. लाल पाण्याचे पाट कऱ्हेचे तास फोडून दुथडी पसरले. तळावर बुणग्यांनी गवताळू छपऱ्या उठविल्या. त्यात फुटल्या आभाळाखाली थरथरत निथळणारी घोडी आबादान झाली. पावसाच्या भरमार सरीनंतर राहुट्याच्या कनातींच्या झालरीवर थरथरत खोळांबलेले पाणथेंब वाऱ्याची सुंकारणारी झमकी येताच टपटपत खाली कोसळू लागले.

मिर्झा राजे जयसिंग आणि निकोली मनुची हा गोरा साहेब रजपुताच्या शामियान्यात शतरंज मांडून बसले होते! शामियान्याच्या दरवाज्यात नेताजी उभे होते. मिर्झा आणि गोरा साहेब शतरंजात रमून गेले होते. कुणीच काही बोलत नव्हते. मधूनच मिर्झा राजा हुक्क्याची नळी चूस करीत होता. बाहेर सरी कोसळत होत्या.

संभाजीराजे पटावरची पांढरी-काळी मोहरी निरखण्यात दंग झाले होते.

त्याच्याकडे बघत मिर्झा राजाने हसून त्यांना विचारले, “ क्या सोच रहे हो कुँवर ? खेलोगे चार हाथ ? ”

पटाकडे बघतच संभाजीराजे म्हणाले, “ नाही ! ”

“ क्यों ? राज्रासाब तो अच्छे लडाते हैं शतरंज ! सिखाया नहीं आपको ये खेल ? ” मिर्झा आडवा आला !

“ आम्हास हा खेळ नाही आवडत. तो अपुरा आहे.” मिर्झा राजाकडे संभाजीराजे शांतपणे बघत होते.

“ वो कैसे ? ” मिर्झाचा कपाळ-टिळा वर चढला.

“ या खेळात उंट आहे, हत्ती आहे, घोडा आहे, प्यादी, वजीर आहेत, राजा आहे. पण– पण कुठंच राजाचा फर्जंद नाही ! त्याच्या मासाहेब नाहीत. हा खेळ अपुरा आहे !! ”

मिर्झा राजाने चूस करण्यासाठी ओठापर्यंत नेलेली हुक्क्याची नळी ओठाला न लावताच खाली आणली ! तो संभाजीराजांकडे बघत कुणालाही कळणार नाही असे पुटपुटला – “ ये दिमाग है या दौडता घोडा ! ”

हयातभर शतरंज खेळलेल्या मिर्झा राजाच्या मनात, संभाजीराजांच्या मनात आला तसा विचार काही कधीच आला नव्हता !!

कृष्णाष्टमी तोंडावर आली. जिजाऊसाहेबांनी आपला ‘ बाळकृष्ण ’ राजगडावर दिसावा असा ध्यास धरला. त्यांनी राजांना रजपुतास पत्र लिहायला लावले. तहाप्रमाणे राजांनी आता जवळ जवळ ठरल्या सर्व गडांचा ताबा मिर्झा राजाच्या माणसांच्या हवाली केला होता. राजांचे पत्र मिर्झा राजाच्या गोटात दाखल झाले. मिर्झाचे हुकूम सुटले. संभाजीराजांना नजर केलेल्या ‘ अन्वर ’ हत्तीवर झूल, हौदा चढविण्यात आला. खासा किरतसिंग संभाजीराजांना अदब-सोबत करण्यासाठी निघणार होता.

नेताजी मावळी पथक पालखी जोडून सिद्ध झाले. पाठीवर ढाल आवळलेले धिप्पाड नेताजी सावलीसारखे संभाजीराजांच्या बरोबर होते.

मिर्झा राजाने नेताजींच्या बारीकसारीक हालचाली आपल्या तेज नजरेने टिपल्या होत्या. त्यांचे सावधपण, इमान त्यांनी नकळत हेरले होते.

खासा पेहराव अंगावर चढविलेले संभाजीराजे कमरेच्या हत्यारावर डाव्या हाताची मूठ चढवून मिर्झा राजाला मुजरा करण्यासाठी झुकले. त्याच्या गोऱ्यापान पायांना हात लावताना म्हणाले, “ आम्ही मुजरा करतो आहोत दादाजी. काही चुकलं असेल तर ते आमचं. आमच्या महाराजसाहेबांचं नव्हे ! येतो आम्ही.”

त्यांना वर उठवून जवळ घेताना राजकारणी मिर्झा भरून आला. एवढ्या कमती वयात एवढी बेडर नजर, असे काळजाची निशाणी साधणारे बोलणे, थोरांसमोरची अशी अदब त्याने आपल्या उभ्या हयातीत कधी बघितली नव्हती. कितीही केले तरी मिर्झा राजा रजपूत होता. साठ पावसाळे त्याने बघितले होते.

संभाजीराजांचे खांदे थोपटत तो स्वत:शीच बोलल्यासारखा म्हणाला, “ गल्लत किसका है, सही कौन है वो चंडी जानती है ! लेकिन आपको बिदा देते वक्त हमें हमारे मुल्कके राजस्थानका अरवली पहाड याद आ रहा है ! पैरोंमें जलता रेगिस्तान लेकर अरवली खडा है ... खडा है कुँवर ... ! मिर्झाला काय म्हणायचे होते ते संभाजीराजांना नीट कळलेच नाही. पण खांद्यावर थोपटले जाणारे त्याचे भरगच्च तळहात मायेने भरून आले आहेत हे त्यांनी जाणले.

मिर्झा राजाने चौरंगावरच्या तबकातील निरोप विडा उचलून संभाजीराजांच्या हातात ठेवला. संभाजीराजे त्या विड्याकडे बघू लागले. एका वाट चुकलेल्या, पराक्रमी, राजकारणी, रसिक आणि रजपुती हातातून त्यांना मिळत असलेला तो पहिला विडा होता. संभाजीराजांनी मूठ वळून तो विडा वेढून टाकला !

मिर्झा राजाच्या शामियान्यातून ते बाहेर पडू लागले. त्यांच्या टोपात हिंदकळणारे मोतीलग बघताना रजपूत मिर्झा राजाला कुठेतरी खोल खोल जाणवून गेले की – ‘ आपल्या हयातीची मोतीलग तुटून गेली आहे. आणि ते सगळे टपटपीत मोती राजस्थानाच्या तापलेल्या रेगिस्तानात कुठच्या कुठं केव्हाच विखरून गेले आहेत !’

मिर्झा राजाच्या शामियान्याच्या दरवाज्यात क्षणभर उभे राहून संभाजीराजांनी समोर दिसणाऱ्या पुरंधरचा माथा निरखला. याच गडावर ते उपजले होते. आता तो गड दिलेरखानाच्या ताब्यात होता. संभाजीराजांना नेताजींचे बोल आठवले, “ जिथं मानूस उपाजतं ती जागा साद घालती मानसाला !” त्यांच्या मुठीतील विडा नकळत आवळला गेला !

तरातरा चालत संभाजीराजे सज्ज ठेवलेल्या पालखीत चढले. नेताजी आणि किरतसिंगांनी पालखीच्या डंबरीच्या दोन्ही बाजवा घेतल्या. सोंड झुलवीत, कान फडफडवीत ‘ अन्वर ’ हत्ती पालखीच्या सामने धिमा चालू लागला.

राजगडच्या पाली दरवाज्याची गडचढीची नौबत दुडदुडली. संभाजीराजांची पालखी गड चढून पद्मावती माचीवर आली. त्यांची नजर भिरभिरत होती. आपल्या महाराजसाहेबांना धुंडीत होती. पण राजे या वेळी पद्मावतीवर आले नव्हते. येणार नव्हते. नेताजींनी पुढे होत संभाजीराजांना पद्मावतीच्या सदरेसमोरच्या हमचौकात आणले. सदरजोत्यावर जिजाऊसाहेब उभ्या होत्या. त्या बालेकिल्ला उतरून आपल्या बाळराजांना सामोरे जाण्यासाठी पद्मावतीवर आल्या होत्या.

किती दिवसांनी थोरल्या आऊसाहेबांचे दर्शन घडत होते! संभाजीराजांच्या पोटऱ्यांत भिंगरी उतरली. तरातर चालत हमचौकाची फरसबंदी मागे टाकून ते सदरजोत्याच्या पायऱ्या पार करीत जिजाऊसाहेबांना बिलगले. शब्द निसूर झाले होते. जबान जखडबंद झाली होती. त्यांची हनुवटी तर्जनीने वर उठवून जिजाऊ त्यांचा मुखडा बघण्याची खटपट करीत होत्या. डोळ्यांत उभ्या राहिलेल्या पाणपडद्याने जिजाऊंना तो मुखडा नीट दिसत नव्हता!

उंच कडेकपारीला पावसाळी बेलाग ढग बिलगावा तसे संभाजीराजे जिजाऊसाहेबांना बिलगले होते! शब्दांच्या धारा कोंदटल्या होत्या. मूकपणालाच बोलकेपणाचा अर्थ आला होता. भानावर येत संभाजीराजांनी जिजाऊंच्या पायावर वाकून डोके ठेवले. जिजाऊंनी वाकून संभाजीराजांना वर उठवून घेतले.

"महाराजसाहेब नाही आले थोरल्या आऊसाहेब?" जिजाऊंकडे बघत मान उठवून संभाजीराजांनी विचारले.

"नाही आले. ते महालाबाहेर पडत नाहीत. आम्हालाही टाळू बघतात. कुणाशी बोलत नाहीत. चला, त्यांच्याकडेच जायचं आहे."

जिजाऊंनी संभाजीराजांना बरोबर घेऊन पद्मावतीची सदर सोडली. नेताजी आणि सिदोजीराव त्यांना मुजरा करून त्यांच्या पुढे चालले.

सारी मंडळी पद्मावतीवरून बालेकिल्ल्यावर निघणाऱ्या भुयाराच्या तोंडाशी आली. भुयाराची धोंड हटली. चार टेंभेकरी हातात पेटते टेंभे घेऊन भुयारात उतरले. पाठोपाठ नेताजी-सिदोजी आत गेले.

नेताजींनी हात देऊन मासाहेबांना आणि संभाजीराजांना आत घेतले.

जिजाऊ संभाजीराजांच्यासह पुढे झाल्या. पलोत्यांच्या धूसरमंद प्रकाशात भुयाराच्या पायऱ्यांमागून पायऱ्या मागे पडू लागल्या.

संभाजीराजे आपल्या महाराजसाहेबांचा विचार करीत होते. रजपुताच्या गोटाला जाताना त्यांनी आपल्या हातांनी गळ्यात चढविलेल्या माळेवरून मधूनच हात फिरवीत होते. याच भुयारात आबासाहेबांनी सांगितलेले, कान भरून टाकणारे घुमते बोल त्यांना एकाएकी आठवले– "भुयारं कधीच संपत नसतात ऽऽ! चाल कधीच थांबत नसते ऽऽ!" चालते संभाजीराजे त्या आठवणीने एकदम थांबले. सगळीच मंडळी त्यांच्याबरोबर थांबली. भुयाराच्या दगडबंद घुमटावर संभाजीराजांची नजर गरगर फिरत होती. ते एकाएकी असे का थांबले कुणालाच कळले नाही.

"काय झालं शंभूबाळ?" त्यांच्या खांद्यावर मायेचा हात ठेवीत जिजाऊंनी सासूद घेत विचारले. जिजाऊंचा तो आवाज दगडबंद भुयारात घुमला... "काय झालं शंभूबाळ?"

तो कानभर ऐकताना संभाजीराजे थरकून उठले. असे– असेच घुमले होते आबासाहेबांचे बोल. न राहवून जिजाऊंकडे बघत त्यांनी उत्तर दिले, "काही नाही आऊसाहेब. आम्ही बघतो आहोत भुयार किती मागं पडलं ते!"

क्षणभर जिजाऊ त्यांच्याकडे बघतच राहिल्या. मग त्यांचा खांदा थोपटीत म्हणाल्या– "अशा वाटा चालताना पायमाग किती मागं पडला ते नसतं बघायचं! त्यानं मग दमगीर होतं. किती पायमाग मागं टाकायचा आहे यावरच आणि पुढं नजर द्यायची. त्यानं मन हिंमतबंद होतं. चला." जिजाऊंचे तुळजाई बोल भुयाराच्या कणाकणाला जागवीत परतत होते! ते कानभरून ऐकताना संभाजीराजांना जाणवून गेले. जे आबासाहेब म्हणाले होते ते आणि आत्ता आऊसाहेब म्हणताहेत ते एकच आहे! तेगीची धार पात्याच्या दोन्ही बाजूंना सारखीच असते तसे!

बालेकिल्ला चढून येताच जिजाऊ, संभाजीराजे, नेताजी थेट राजांच्या महालाकडे चालले. राजांना वर्दी पोच झाली होती.

जिजाऊंच्यासाठी राजे मनातले सगळे कढ, सल विसरून महालाच्या दारापर्यंत सामोरे आले होते. आपले महाराजसाहेब नजरेत येताच टाच भरलेल्या जनावरासारखे संभाजीराजे धावत सुटले. आणि क्षणात त्यांच्या हातांचा वेढा राजांच्या कमरेभोवती पडला.

राजांना काहीच बोलवत नव्हते. त्यांच्या हाताची सडक बोटे संभाजीराजांच्या पाठीवरून फिरू लागली. एकदम राजांच्यापासून थोडेसे दूर होत संभाजीराजांनी त्यांच्या पायीच्या बाकदार मोजड्यांवर नजर ठेवली. आपल्या गळ्यातील चौसष्ट कवड्यांची माळ टोप चुकवीत उतरून ओंजळीत घेतली आणि ओंजळ वर उचलून ते म्हणाले, "महाराजसाहेब आम्ही कमी बोललो. जरूर तेव्हाच बोललो!"

राजांनी त्यांच्या ओंजळीतील माळ उचलून ती आपल्या गळ्यात घातली. राजांचा ऊरताण कुठच्या कुठं निघून गेला. संभाजीराजांनी त्यांच्या पायावर डोके टेकले.

"जा, आईचं दर्शन करून या." देवमहालाच्या रोखाने हात करीत राजे म्हणाले.

जिजाऊसाहेब आणि संभाजीराजे गडाच्या देवमहालाच्या रोखाने चालू लागले. गडाच्या हर कारखान्यातील माणसे काहीतरी लटके निमित्त काढून तेथवर येत होती. संभाजीराजांना डोळाभर बघून, मुजरा करीत होती.

राणीवशाचे महाल जवळ आले. पुतळाबाईंच्या महालाच्या रोखाने धाराऊ पुढे आली. जिजाऊंना बघून क्षणभर ती घोटाळली. पण निर्धाराने पुढे होत संभाजीराजांच्या पुढ्यात आली. तिने काळसर रंगाची कोहीतरी वस्तू संभाजीराजांच्या टोपापासून पायापर्यंत तीन वेळा उतरली. तिला बघताच हसून संभाजीराजांनी तिच्या पायांना हात लावून नमस्कार केला. धाराऊ लगबगीने भिंतींच्या कडेकडेला होत दिसेनाशी झाली.

संभाजीराजे देवमहालात आले. जगदंबेसमोर त्यांनी आपले डोके टेकले.

त्या वेळी इकडे धाराऊने आपल्या गोंदल्या हाताने पाय बांधलेले काळे कोंबडे काही तरी पुटपुटत तटावर फेकून दिले!! भिरभिरले कोंबडे कसेतरी केकाटले! धाराऊने आपल्या हाताची बोटे तटाच्या घडीव दगडावर रुतवून काटकन मोडली! डावा पाय दाणकन भुईवर आपटला!

संभाजीराजांनी पुढे होत वाफ्यातील अष्टधान्यांचे कोंभ भरल्या मुठीने उपटून काढले. त्यांच्या मुळ्या धरून आलेली माती झटकून टाकली. समृद्धीचे शिवलक्षण असलेले ते रसवंत कोंभ त्यांनी आपल्या मस्तकीच्या टोपात खुपसले. भोसलेकुळीच्या रक्तरसरशीत कोंभाच्या मस्तकी ते अष्टधान्यांचे कोंभ शोभून दिसू लागले!

जगदंबेसमोर एका हारीत पूजलेल्या हत्यारावरील आपली म्यानबंद जमदाड संभाजीराजांनी वाकून उचलली. भगवे म्यान क्षणगर कपाळाला लावले. मुठीचा परजात हात चढवून त्या जमदाडीचे पाते सर्रकन बाहेर खेचले. हत्याराची झगझगीत शिकल डोळ्यांत भरून घेतली. आणि पाठीशी उभ्या असलेल्या जिजाऊसाहेबांना एकदा नजर दिली. जिजाऊ नुसत्याच प्रसन्न हसल्या.

आपोआप त्यांच्या उजव्या हातीचे हत्यार डाव्या हाती गेले. मान नागफण्यासारखी ताठ झाली. आपल्या उजव्या हाताचा अंगठा त्यांनी क्षणात हत्याराच्या लखलखीत धारेवरून सर्रकन ओढला! अंगठ्यावर रक्ताचे कोंभ तरारत उठले होते! रक्तमंडित आपला राजअंगठा संभाजीराजांनी जगदंबेच्या चरणांजवळ नेला. जगदंबेच्या पायाखाली रगडल्या जाणाऱ्या महिषासुराच्या मस्तकावर संभाजीराजाच्या उष्ण रक्ताचे दोन थेंब स्थिरावले. 'नवरात्रात' पूजलेले आपले हत्यार त्यांनी 'पाजून' घेतले! मग हाताच्या अंगठ्यावरच्या रक्ताचाच भंडारा करून संभाजीराजांनी त्याने कपाळावरच्या शिवगंधाचा मळवट भरून घेतला! हातातील पाते म्यानबंद करून जमदाडीचे भगवे फासबंद कमरेला आवळून घेतले. त्यांच्या त्या रुद्रमंगल क्षात्ररूपाकडे बघताच जिजाऊंचे नेत्र अभिमानाने उजळून निघाले.

"चला." संभाजीराजांच्या पाठवळीवर हात ठेवून जिजाऊ शांतपणे म्हणाल्या.

गडाच्या दसराचौकाकडे संभाजीराजे चालले. आज विजयादशमी होती. दसराचौकात मांडलेल्या आपट्याच्या डहाळ्यांभोवतीचा 'सोनआखाडा' खाशा स्वारीने आपल्या हत्याराने फोडायचा होता. तो पिढ्यान् पिढ्यांचा चालत आलेला रिवाज होता. दिवस सणाचा होता – आणि सण मानाचा होता. आजवर खुद्द राजेच दसऱ्याचा 'सोनआखाडा' आपल्या खाशा हाताने फोडत आले होते. पण या दसऱ्याला आपल्या सगळ्या सोनेरी स्वप्नांची हिरवीकंच निबर पाने झालेली आहेत असे राजांना खोलवर जाणवत होते. त्यांनीच मग संभाजीराजांना 'आखाडा' फोडण्याची आज्ञा दिली होती.

किरणांचे सोने उधळीत दिवस कलाटणीला आला होता. संभाजीराजे आणि जिजाऊसाहेब राजांच्या महाली आले.

मासाहेबांना महालात प्रवेशताना बघून राजांच्यासह साऱ्यांनी मुजरे रुजू केले. राजांचा चेहरा शांत होता, पण नजर दुखरी होती. ती बघताच जिजाऊ काळजात कुठेतरी खोलवर गलबलल्या. समोर उभे असलेले जबानबंद राजे, पानांची लूट झालेल्या आपट्याच्या झाडासारखे दिसत होते.

"बाळराजे आलेत तुमच्या दर्शनासाठी." स्वत:ला सावरीत जिजाऊ धिमेपणाने म्हणाल्या. त्या नेहमीच अशा बोलत आल्या होत्या. वणवा असला तरी ओठांत मधुर गारवा ठेवत.

संभाजीराजांच्या डोळ्यांत खोल बघत त्यांचा ठाव घेण्यासाठी राजांनी घोगरट सादात विचारले, "सारा रिवाज नीट ध्यानी घेतलात?"

"जी." संभाजीराजांच्या टोपावरचा कोंबतुरा डुलला.

"कसा फोडाल आखाडा?"

संभाजीराजांच्या डोळ्यांतले रंग पालटू लागले. समोर माणसांनी भरलेला दसराचौक त्यांना दिसू लागला! त्यांची जबान, लोहारमेटावर पाठीवर घण खाणारे तेगीचे लाल पाते लखलखीत ठिणग्या फेकते तशी ठिणग्या उठवू लागली! नजर आपल्या आबासाहेबांच्या बाकदार, धारी नाकाच्या शेंड्यावर ठेवून संभाजीराजे म्हणाले, "संजीवनी माचीवर दसराचौकात चिवाट्यांचा आखबंद चौक मांडलेला आहे. त्या चौकआखाड्यात सोन्याच्या डहाळ्या आहेत. माचीच्या शिवेवर आपट्याचं झाड आहे. त्याच्या बुंध्याजवळ नवरात्रात पूजलेली, घोंगड्यात बांधलेली हत्यारं आहेत. माचीचे तटसरनोबत ती हत्यारं दसराचौकात आणतील. आमच्या समोर पेश करतील. आम्ही त्या घोंगड्यास हाताचा दस्तुरी-स्पर्श करू. हत्याराचं घोंगडं चौकातील डहाळ्यांवर ठेवण्यात आलं की सरनोबत मानकरी म्हणून आम्हास चौक फोडण्याची अर्जी करतील. आम्ही आखाड्याजवळ जाऊ. बेलगंध वाहून आखाड्याची पूजा बांधू. आमच्या जमदाडीचे पाते म्यानखेच करू. ते कपाळी लावून आई भवानीचं नाव घेऊन हत्याराच्या एका वारात चिवाट्यांचा चौक चीत करू. हत्याराचं पातं मागं न घेता तसंच सामने चालवून

चौकातल्या सोन्याच्या डहाळ्यांना भिडवू. सोनं उष्टं करू! मग सारा गडलोक आखाड्यावर तुटून पडेल. सोनंलूट होईल!"

हे सांगत असताना संभाजीराजांची उजळलेली चर्या पाहून राजांच्या छातीवरचा जामा अभिमानाने काखेजवळ दाटून आला!

राजांनी जिजाऊंच्याकडे बघितले. मासाहेबांनीच आपल्या बाळराजांना रिवाजाचा हा बयाजवार करिणा समजून दिला होता.

"आखाडा फोडणाऱ्या असामीत ज्यांच्या हाती पूजलेल्या हत्यारांतील हत्यार मिळेल त्यांची नावनिशी वाजपूज करा. त्यांना मानाची कडी, मोहरा बहाल करा. या." राजांनी शेवटचा – महत्त्वाचा रिवाज संभाजीराजांच्या कानी घातला.

राजांची पायधूळ व आशीर्वाद घेऊन संभाजीराजे महालातून बाहेर पडले.

जरीनक्षींचे जाकीट घातलेला एक पठाणी हेजीब दोन हशमांना संगतीला घेऊन पाली दरवाज्याने गड चढून आला होता. संजीवनी माचीवरच्या दसऱ्याच्या गलगलाटाकडे नफरतीने बघत राजांच्यासाठी आणलेला खलिता त्याने बालेकिल्ल्यावर रवाना केला होता. बाळाजी चिटणीसांनी तो खलिता स्वीकारून राजांच्यासमोर दस्तुरी-स्पर्शासाठी अदबीने धरला. राजांनी त्याला स्पर्श करून खलिता वाचण्याची आज्ञा केली.

बाळाजी खलिता वाचू लागले –

"... तुम्हास जाहीर करण्यास संतोष वाटतो की, आम्ही अर्जी केल्याप्रमाणे तुमच्या वफादाराचा बादशहा सलामतनी स्वीकार केला आहे. इतकेच नाही, तर हप्त हजारी मन्सब, दोन लाख रुपये बक्षीस आणि निशाण-नौबत घेण्याची परवानगी तुमचे फर्जंद संभाजीराजे यांना देण्याचा हुकूम बादशहा सलामतनी रजामंद होऊन सोडला आहे. सबब हे पत्र पावताच फर्जंद संभाजीराजांना इकडे ताब्डतोब पाठवून द्यावे. म्हणजे हुकुमाप्रमाणे त्यांना या चीजवस्तू बक्ष करण्यात येतील ..."

बाळाजींनी वाचन पुरे केले. पुरंधरवरून दिलेरखान पठाणाने ते पत्र पाठविले होते. दसऱ्याचा मुहूर्त धरून त्याने आपला खास हेर्जीब राजांच्याकडे पाठविला होता.

संभाजीराजांना मोगली मनसब दिल्याचे 'शाही फर्मान' औरंगजेबाने दिल्लीहून जातीनिशी सांडणीस्वाराकडून पाठविले होते. ते फर्मान मिर्झा राजाच्या गोटाजवळ आले होते. जातीनिशी सामोरे जाऊन संभाजीराजांनी ते स्वीकारायला पाहिजे होते.

बाळाजींनी वाचून थैलीबंद केलेल्या पत्राकडे बघताना राजे कसल्यातरी विचारात गढून गेले. त्यांनी बाळाजींच्याकडून पत्र आपल्या हाती घेतले. थैलीतून पत्राची वळी बाहेर काढली. ती उलगडून पत्रावरून एक धावती नजर फिरविली. दिलेरच्या पत्रात कुठे चुकूनसुद्धा राजांच्यासाठी अदबीचा-आदराचा शब्दही दिसत नव्हता! राजांनी एक उतरता निःश्वास सोडला, पत्र पुन्हा थैलीबंद केले. इतक्यात जातीनिशी आखाडा फोडून आणलेले विजयादशमीचे सोने राजांना देण्यासाठी संभाजीराजांनी महालात प्रवेश केला आणि पुढे होत संभाजीराजांनी राजांच्या पायांवर डोके ठेवले.

राजांच्या ओंजळीत लुटीचे सोने देताना संभाजीराजे म्हणाले, "महाराजसाहेब, आम्ही बयाजवार, बिलाकसुर आखाडा फोडला! एका वारात चौक चीत केला."

राजांच्या हातातील दिलेरच्या पत्रथैलीवरच संभाजीराजांचे सोने होते! एकदा आपल्या ओंजळीकडे आणि एकदा समोरच्या आपल्या पुत्राकडे राजांनी बघितले.

राजे विचारांच्या तंद्रीतच होते.

"तुम्ही आखाडा फोडून सोने बाहेर काढलंत. आम्ही मात्र आमच्या हातानं आमचं सोनपान आखाड्यात लोटलं आहे! कधी कधी माणसाला अंदाज नसलेल्या सीमाही उल्लंघाव्या लागतात. जगरहाटीवेगळं सीमोल्लंघन करावं लागतं. धुमसणाऱ्या दिलेरनं अचूक वेळ साधली बाळराजे. हत्यारानं सोनं उष्टं केलंत – तसंच या मुहूर्तावर अक्कलहुषारीनं राजकारण उष्टं करा. आई जगदंबा त्यासाठी तुम्हाला आपल्या वाघाचं बळ देईल!" राजांनी ओंजळीतील सोनपाने आणि थैली तशीच बाळाजी आवजींच्या हाती दिली. आणि आपल्या हाताच्या बोटातील अंगठी उतरून संभाजीराजांच्या ओंजळीत ठेवली!!

दसऱ्याची सोनपाने सुकलीसुद्धा नाहीत तोच संभाजीराजांना पुन्हा राजगड सोडावा लागला. शाही फर्मान स्वीकारण्यासाठी!

राजांचा आणि मासाहेबांचा आशीर्वाद घेऊन संभाजीराजे रजपुतांच्या गोटाजवळ आले. सोबतीला दावलजी घाटगे, नेताजीराव, गंगाधरपंत आणि विश्वासू मंडळी होती.

किरतसिंगाने सामोरे येत त्यांची आगवानी केली. "आइये संभूराजे." म्हणत मिर्झा राजाने पुढे येत त्यांचा हात हातात घेऊन त्यांचे स्वागत केले. मिर्झाचा गौरवर्णी चेहरा उजळून गेला होता. दखखनेत कुणाला नाही अशी फत्ते त्याला मिळत होती.

मिर्झाने संभाजीराजांना आपल्या बैठकीवर बसवून घेतले. शामियान्यात असलेल्या बक्षी जानी बेग आणि तेजसिंह कछवाह यांचा परिचय करून दिला. राजांच्या तब्येतीची, राजकारणी रिवाज म्हणून विचारपूस केली. मोठ्या समाधानाने मिर्झाने हुक्क्याची नळी हाती घेऊन क्षणभर हुक्का चूस केला; आणि बक्षी जानी बेगकडे बघत म्हणाला, "बक्षी, फर्मान अपनानेका रस्मोरिवाज कुँवर संभूजीको समझा देना। कुसूर मत करना।"

बक्षी बेगने झटकन वाकून मिर्झाला तसलीम केली. "जी हुक्म राणाजी," म्हणत त्याने संभाजीराजांना निरखले. त्याला जाणवले की एवढ्या कमती उमरीचा दिल्ली दरबारात एकही सरदार नव्हता व अदब राखून फर्मान स्वीकारण्याची 'शाही पद्धत' त्याला समजावून सांगणे बक्षी बेगला अवघड वाटले.

थंडीचे दिवस असल्यामुळे गव्हाच्या गरम कांजीचे बदाम, पिस्ते सोडलेले कटोरे घेऊन एक खिदमतगार आत आला. मिर्झा राजासमोर कटोऱ्याचे तबक चौरंगावर ठेवून निघून गेला. मिर्झाने दोन कटोरे उचलले. त्यातील कांजी एकमेकांत ओतून पुन्हा कटोरे सारख्या शिगेचे केले. गरम वाफा वर उफाळल्या. त्यातील एक कटोरा संभाजीराजांच्या हाती देत मिर्झा म्हणाला, "लीजिये छोटे राजासाब।" संभाजीराजांनी कटोरा हाती घेतला. गरम कांजीचा एक सुखावह घुटका घेत मिर्झा राजा म्हणाला, "छोटे राजासाब, इस बक्षीके डेरेमें जाना। रिवाजकी हर बात ध्यान देकर सुनना। फर्मान अदबसे अपनाना। समझदार हो। सब ठीक होगा।"

कांजीचा घुटका घ्यावा म्हणून संभाजीराजांनी कटोरा ओठाला लावला होता. पण त्यांचा चटका बसल्यामुळे त्यांनी तो तसाच झटकन खाली घेतला! हातांतील कटोऱ्याकडे बघताना त्यांना आपल्या आबासाहेबांची आठवण झाली. त्यांनीही रिवाज सांगितला होता दसऱ्याच्या आखाड्याचा. कडी-मोहरा बहाल करण्याचा. मिर्झाही रिवाज सांगत होता. 'अदब राखण्याचा!'

"ठंडी होने दीजिये।" मिर्झा संभाजीराजांच्या कटोऱ्याकडे बघत, पुढे झुकून म्हणाला. मान उठवून त्याच्या डोळ्यांत क्षणभर रोखून बघताना संभाजीराजांना होळीच्या पेटत्या हुडव्यात बेधडक हात घालणारे, सोन्याच्या आखाड्यावर तुटून पडणारे आपले मावळे आठवले. त्यांचे अंग सरसरून आले. मिर्झावरचे डोळे तसेच ठेवून त्यांनी हातीचा कटोरा वर उठवून ओठाला लावला. कपाळावरचे शिवगंध जराही न ढळविता. पापणी न मोडता त्यांनी कटोऱ्यातील गरम कांजी घटाघटा पिऊन टाकली!

ताणल्या भुवयांनी त्यांच्याकडे बघत मिर्झाने आपल्या हातीचा कटोरा तसाच ठेवला. त्याच्या राजपुतानी मनात एक विचित्र विचार तरळून गेला. त्याला शिवाजीराजे समोर असताना धगधगीत अंगार वाटले होते. त्यांचा हा फर्जंद त्या अंगाराच्या जवळपासचा वाटत होता. पण कसा ते मात्र मिर्झाला नीट उमजेना. त्याच्या केशरी टिळ्याला कपाळभर आठ्या पडल्या.

सोपे होते पण मिर्झाला सापडले नव्हते. राजे धगधगीत अंगारासारखेच होते! न विझता अंगभर पेटणारे. त्यांचे फर्जंद संभाजीराजे त्या अंगाराचाच अंश होते. अंगाराने फेकलेल्या धगीच्या लोळासारखे! न चुकता चटका देणारे!

"बक्षी, छोटे राजासाबको अदबसे ले जाना अपने डेरेमें।" मिर्झाने स्वत:ला सावरीत जानी बेगला फर्मावले.

"जी हुजूर।" किरतसिंगाने डोईवरचा साफा डोलविला.

"जायिए संभूराजे।" मिर्झा राजाने संभाजीराजांना सुचविले.

बक्षी जानी बेग आणि किरतसिंग यांच्यामागून नेताजींच्यासह संभाजीराजे मिर्झा राजाच्या शामियान्यातून बाहेर पडले.

त्यांच्या समोर किल्ले पुरंधर दिसत होता. कानांत नेताजींचे बोल घुमत होते – "जिथं मानूस उपाजतं ती जागा साद घालती मानसाला!" त्यांना वाटत होते, दहादा कमरेत वाकून तसलीम करणारा हा कोरल्या दाढीचा बक्षी बेग, पिळल्या दाढीला पुन:पुन्हा पीळ देणारा हा किरतसिंग या सगळ्यांना इथेच सोडावे आणि थेट किल्ले पुरंधरची चढण चढून त्याचा माथा गाठावा! एकट्याने आणि पायी!

बक्षी बेगच्या छोट्या माटाचा, चांद-ताऱ्याचा डेरा आला. त्याचे पठाणी पहारेकरी हातातील हत्यारे कपाळाला लावीत कमरेत वाकले. बक्षी बेग, किरतसिंग यांच्या मागून संभाजीराजे आणि नेताजी त्या चाँद-ताऱ्याच्या डेऱ्यात शिरले! कुणाची नियती कुणाला कसल्या अभद्र दरवाज्यात केव्हा उभे करील ते सांगता येत नाही! किरतसिंगाने संभाजीराजांना आपल्या बैठकीवर बसविले. नेताजीराव त्यांच्यासमोर सावध नजरेने उभे राहिले.

पढविलेल्या पोपटासारखा बक्षी बेग फर्मानाचे रिवाज सांगू लागला.

हे असले काही संभाजीराजांनी कधीच ऐकले नव्हते. दिल्लीहून 'मुईउद्दीन मोहम्मद औरंगजेब अलमगीर पादशहा गाजीचे' त्यांना पंचहजारी सरदार करणारे शाही फर्मान सुटले होते! त्या फर्मानावर 'फर्मानी निशानी' म्हणून औरंगजेबाच्या खाशा हाताच्या पंजाचा, मेंदीच्या रसात बुडविलेला ठसा होता. फर्मानाचा सांडणीस्वार मजला मागे टाकीत औरंगबादमार्गे कऱ्हेपठाराजवळ, मिर्झाच्या तळापासून एका मजलेवर येऊन थांबला होता. मिर्झाने आपल्या तळाच्या उत्तरेच्या बाजूला त्या फर्मानासाठी 'फर्मानबाडी' उभी केली होती. ज्यात उभा उंट सहज मावू शकेल असा चौकोनी आकाराचा उंच शामियाना 'फर्मानासाठी' खडा करण्यात आला होता!

फर्मान घेऊन येणारा सांडणीस्वार आपला उंट थेट शामियान्यात आणून खडा करणार होता. ज्याने फर्मान स्वीकारायचे त्या दरबारच्या कदीम चाकराने पाठ न दाखविता त्या उंटासमोर पेश व्हायचे होते. तीन वेळा लवून तसलीम कुर्निस करायचा होता. मग सांडणीस्वार सवारीचा शाही उंट खाली बसविणार होता. चाकराने आपले गुडघे जमिनीवर टेकून त्या उंटाच्या बगलेला खाली मान घालून बसायचे होते. सांडणीस्वार त्याच्या डोक्यावर फर्मानाची थैली उंटावरूनच ठेवणार होता. ती हातांनी धरून उठत पाठ न दाखविता चाकराने तसेच दहा कदम मागे हटायचे होते. साक्षात् 'शहेनशाहे हिंदोस्ताँ' आपल्या सामने मौजूद आहेत या कल्पनेने चाकराने हे सारे रिवाज बिलाकुसूर पार पाडायचे होते! ही शाही चाकरी होती. तिचे हे शाही फर्मान होते! त्याचे हे रिवाज होते. आजवर मी-मी म्हणणाऱ्या कैक समशेरजंगांनी, तेगबहाद्दरांनी याच पद्धतीने तसले फर्मान स्वीकारले होते.

बक्षी बेगचा एक एक शब्द संभाजीराजांच्या जिवाची घालमेल करीत होता. आजवर

मासाहेब, राजे, आई जगदंबा आणि प्रेमाचे वडिलधारे यांच्याखेरीज कुणासमोरच त्यांनी कधीच गुडघे टेकले नव्हते! एका जनावरासमोर तर नाहीच नाही! मासाहेब, राजे आणि राणीवशातील आऊसाहेब यांच्या हाताशिवाय काहीच मस्तकावर घेतले नव्हते. किमान कसल्याही प्रसंगी कुठलाही 'कागदी चिठोरा' मस्तकी घेण्याची पाळी त्यांच्यावर आली नव्हती! संभाजीराजांचा श्वास घुसमटत होता. आपल्या जीवाची ज्योत कुणीतरी काळ्याकभिन्न चिमटीत पकडून चेचू पाहत आहे असे त्यांना वाटत होते. ते एकसारखे नेताजींच्याकडे बघत होते. त्यांची छाती वरखाली धुमसत होती. ते ताडकन म्हणाले, "ध्यानी आला फर्मानाचा रिवाज. येतो आम्ही."

किरतसिंग आणि बक्षी बेग यांना एक शब्दही न बोलू देता त्यांनी नेताजींना मानेने इशारत केली. ते तडक बक्षीच्या डेऱ्याबाहेर पडले! लगबगीने धावत नेताजी त्यांच्या पाठीशी आले.

"नेताजीकाका, दादाजींना सांगा – आमच्याने हे रिवाज पार पडणार नाहीत! आमच्या वतीने कुणीही ते फर्मान घेईल."

"पर धाकलं सरकार, राजांनी तहात ह्ये मानल्यालं हाय. त्येंचा शब्द खाली यील. रजपूत ह्ये न्हाई मानायचा." नेताजी त्यांच्या बरोबरीने चालताना त्यांची समजूत काढू बघत होते.

"नाही, नेताजीकाका, एका जनावरासमोर गुडघे टेकणं आम्हास साधणार नाही, थैली मस्तकी धरणं होणार नाही."

"माजं ऐकावं बाळधनी, ही चाल हाय. ह्यो रजपूत आमच्या मुलकातनं ढळायची राजे आन् आम्ही वाट बघतोय. समजुतीनं घ्यावं बाळराजं. न्हाईतर – न्हाईतर तुम्हापायी राजं आम्हाला बोल लावतील! ठपका आमच्यावर यील. फर्मान घ्यावं. तीन येळा करायचा मुजरा आई अंबेचा योक, मासाहेबांचा योक, आन् राजास्नी योक मानून करावा. गुडघं टेकावं त्ये पुरंधराकडं बघत थोरल्या रानीसाबास्नी टेकावं!" नेताजी कळवळ्याने बोलत होते.

ते ऐकून संभाजीराजे थांबले. नेताजींकडे रोखल्या नजरेने बघत गोफणगुंड्यासारखा वाटणारा प्रश्न त्यांनी विचारला, "तुम्ही – तुम्ही कराल हे सारं नेताजीकाका ?"

नेताजींची थोराड पगडीची मुंडी क्षणात खाली आली. बाळराजांना काय आणि कसे सांगावे ते त्यांना समजेना.

तसेच चालत संभाजीराजे मिर्झा राजाच्या शामियान्यात आले. त्याच्या डोळ्यांना डोळे लावून म्हणाले, "तुमचं फर्मान आमच्या वतीनं कुणीतरी घेईल. आम्ही ते घेणार नाही राणाजी!" कधी नव्हे तो 'राणाजी' हा शब्द त्यांच्या ओठांतून निसटला.

"क्यों ? क्या हो गया कुँवर ?" मिर्झाचा चेहरा चिंतातुर झाला. तो गपकन बैठकीवरून उठलाच.

"तुमच्या रिवाजात ते घेणं आम्हास जमणार नाही. आम्ही गुडघे टेकणार नाही!" संभाजीराजे मिर्झाला जाणवेल एवढ्या निर्धाराने म्हणाले.

"नहीं ऽ! ऐसा मत करना। फर्मानकी बेअदबी हमको – राजासाबको मुसीबतमें डालेगी।" मिर्झाच्या कपाळीचा केशरी टिळा एका जागी गोळा झाला! पोटात गोळा धरल्यासारखा तो बोलत बोलत संभाजीराजांच्या जवळ आला. त्यांच्या खांद्यावर हात ठेवताना तो क्षणभर गप्प झाला. त्यांना डोळाभर निरखून बघताना त्याच्या लालसर नाकपुडीतून एक दीर्घ निःश्वास सुटला. "आप किसको मानते हैं? राजासाबको ना ?" हुक्क्याचे संथ झुरके घ्यावेत तसे त्याने पडल्या आवाजात शांतपणाने विचारले.

"जी." संभाजीराजांनी होकाराचा टोप हलके डुलविला.

"राजासाबने क्या बताया है ? हमको 'दादाजी' बोलना। हमारी बात मानना। कहो कुँवर – आप हमें 'दादाजी' नहीं मानते ?" मिर्झा आपल्या खास राजकारणी मिठ्ठास पद्धतीने बोलला.

संभाजीराजे घोटाळले. हा तोच माणूस होता. ज्याने स्वतःच्या शामियान्यात आपली व्यवस्था केली. स्वतःच्या खास बिस्तऱ्यावर आपल्याला झोपू दिले, शाल पांघरली. इतमामाने एक हत्ती नजर केला. मोठ्या आदराने आणि अदबीने वागविले. हा आपला नव्हता पण स्वतःबद्दल कुणालाही आपलेपण वाटायला लावणारे कसब याच्या अंगी होते.

संभाजीराजे त्याला निरखीत होते. आपल्या छोटेखानी डोळ्यांत जोखू बघत होते.

एकाएकी तळावरची शहाजणे वाजू लागली. किरतसिंगाची वर्दी मिळालेला फर्मानाचा सांडणीस्वार फर्मानबाडीच्या रोखाने हिसके-हिंदोळे खात येत होता. त्या फर्मानाचे शहाजणांनी स्वागत होत होते. तळावरच्या पठाणी, रजपुती, उझबेकी हशमांनी नंगी हत्यारे नाकांसमोर पेलून फर्मानाच्या उंटाच्या वाटेवर दोन्ही बाजूंना शिस्त धरली. उखळीचे बार दणदणू लागले.

"चलिए संभूराजे। जूते यहींपर उतार दीजिए!" मिर्झाने आपला हात संभाजीराजांच्या पाठीवर हळुवार ठेवीत शब्दांची अत्तरी कुप्पी खोलली.

संभाजीराजांनी पायीच्या मोजड्या उतरल्या. मिर्झा राजा संभाजीराजांना घेऊन बाहेर पडला. राजा रायसिंह, किरतसिंह, तेजसिंह कछवाह, इंद्रमण बुंदेला, निकोलो मनुची, बादल-बख्त्यार, नेताजी, दावलजी, गंगाधरपंत अशा दोन्ही बाजूंकडील खाशा मंडळींनी त्यांच्या मागे फेर घेतला.

चालले! पंचहजारी मन्सबदारीचे शाही फर्मान स्वीकारण्यासाठी अनवाणी पायांनी संभाजीराजे फर्मानबाडीकडे चालले. त्यांच्या आयुष्यातील हा सगळ्यांत कठोर काळा दिवस होता.

समोर त्यांना काळवंडलेला पुरंधर दिसत होता. त्यांच्या काना-मनात राजांचे

धीरगंभीर शब्द घुमत होते – "औरंगजेब दिल्लीचा बादशहा आहे. त्याच्या सरदाराखेरीज तो कुणालाच दिसत नाही – त्याची करणी मात्र आम दुनियेला दिसते! त्याच्या भावांना दिसली. खुद्द त्याच्या बापाला दिसली! ..."

"... भुयारं कधीच संपत नसतात बाळराजे! चाल कधीच थांबत नसते!"

मासाहेबांची तुळजाई बोली त्यांना आपल्या पाठवळीवरून हातासारखी फिरत असल्याचा भास झाला – "अशा वाटा चालताना मागं कधीच नसतं बघायचं! ... कुणास ठाऊक. प्रसंग पडला तर तुम्हांस आणि आम्हासही ती कोशिस करणं पडेल! जळत्या हुडव्यात हात घालणं पडेल!"

संभाजीराजांच्या सुन्न झालेल्या कानांना घुमणाऱ्या संबळीची तडतड ऐकू येऊ लागली. तुणतुण्याची टणटण त्यात मिसळली होती. एक गोंधळी कानावर हात ठेवून जगदंबेचा महिमा गाताना त्यांना क्षणभर दिसला –

"उदर परडी देऊन हाती
ब्रह्मांडी फिरवी –
लक्ष चौऱ्याऐंशी घरची भिक्षा
मागविली बरवी!!"

स्वत:लाच पाठीवरून वाहून आणल्यासारखे संभाजीराजे मिर्झा राजाच्या सोबतीने फर्मानबाडीत आले. बाडीच्या चारी बाजवा खुल्या होत्या. सगळा तळ तो 'नजारा' बघण्यासाठी वाडीभोवती दाटला होता. पावसाळा नुकताच संपल्याने पायतळीची जमीन ओलसर होती. वाजतगाजत सांडणीस्वार फर्मानबाडीत आला.

तसलीम करून संभाजीराजांनी उंटाच्या बगलेला ओलसर भुईवर आपले गुडघे टेकले. मान खाली टाकली.

सांडणीस्वाराने धुळीने माखलेला शाही फर्मानाचा पिस्ताई रंगाचा उंट बसता केला. हातातील फर्मानाच्या वळीची फासबंद थैली स्वाराने वर उचलली. एखाद्या फकिराने बंद्याच्या शिरावर मोरपिसाचा जुडगा ज्या टेचात ठेवावा तशी ती थैली त्याने संभाजीराजांच्या केशरी टोपावर ठेवली! चढी आबाजी लावून त्याने शिरा फुगवीत सरावाची खडी ललकारी दिली –

"अबुल मुझफ्फर मोईउद्दीन मोहम्मद औरंगजेब बहादूर अलमगीर पादशहा गाझी ऽऽ, मालिके तख्ते ताऊस, शहेनशाहे हिंदोस्ताँसे फर्मानि दर्बार-संभूजी विन सेवाजी भोसला सुभे दख्खनको रजामंदीसे बक्ष ऽऽ! अदब-अदब!"

स्वाराच्या तोंडातून दरबारी शब्दांच्या लाह्या फुटत होत्या. तळावरच्या तोफा अंगाला झटके देत बारांचे आवाज उठवू लागल्या.

खाली मान घातलेल्या संभाजीराजांच्या सूर्यपेट डोळ्यांतून सरसरत ओघळलेले पाणमोती कवड्यांच्या माळेवरून निसटून खालच्या ओल्या जमिनीवर उतरू लागले!

त्यांच्या छातीचा भाता कोंडला होता. भवानीचा भंडारा सांडला होता! त्यांच्या कोवळ्या नियतीने क्रूर खेळ मांडला होता! त्यांना वाटत होते, उशी घेणाऱ्या घोड्यासारखे ताडकन् वर उडावे. मस्तकावरची थैली सरळ धुळीत फेकून द्यावी आणि वाट फुटेल तिकडे घोडगतीने धावत सुटावे.

"उठिये कुँवर" मिर्झाने वाकून त्यांच्या पाठीवर हात ठेवला. फर्मानासह त्यांना तसेच दहा कदम मागे हटते घेतले. संभाजीराजांनी मान वर उठवून फर्मान नेताजींच्या हाती दिले. त्यांच्याकडे बघताना नेताजींना आपल्या काळजात मासळी सरकल्याचा भास झाला! एवढ्या अवधीत बाळराजांची नजर केवढी दुखरी झाली होती! ती बघताना नेताजींची मान आपोआप खाली गेली. आणि त्या खाली गेलेल्या मानेबरोबर, बारा मावळांचा रानवारा पिणारे 'हर ऽ हर ऽ महादेव' चा जोष उठविताना इंगळासारखे पेटून उठणारे नेताजींचे डोळे क्षणात पाणथरून आले. त्यांना आपल्या 'धाकल्या राजाच्या' पांढऱ्या सफेद जाम्यावर गुडघे टेकल्यामुळे उठलेले मातीचे डाग दिसत होते! ते डाग जामा धुतला तरी कधीच जाणार नव्हते!!

मिर्झा राजाची पाठीवरची भुणभुण आता कमी झाली आहे या भरोशाने राजे सैन्यासह तळकोकणात गेले होते. त्यांना जाऊन पाच दिवस मागे हटले होते.

जिजाऊसाहेब सदेवरचे निवाड्याचे आणि खलित्याचे मजकूर मायने सांगण्याचे काम आटोपते घेत होत्या. त्यांचे मन आताशा कशातच लागत नव्हते.

"बाळाजी, थांबू या आता. येतो आम्ही." जिजाऊ सदरबैठकीवरून उठत चिटणिसांना म्हणाल्या. चिराखलागणीची वेळ होत आली होती.

"जशी आज्ञा" म्हणत बराच वेळ कुरूकुरू चालविलेले सफेद शहामृगपीस बाळाजींनी कलमदानात हलकेच ठेवले. ते लगबगीने उठून उभे राहिले.

तिकडे जिजाऊंच्या खासेमहालात नित्याप्रमाणे त्यांना दिवट्यांचे सलाम देण्यासाठी लक्ष्मीबाई, पुतळाबाई, सकवारबाई, गुणवंताबाई, काशीबाई असा जवळ जवळ सारा राणीवसा जमला होता. पुतळाबाईंच्या शेजारी संभाजीराजे उभे होते. त्यांच्या तर्फेने सखूबाई, राणूबाई, अंबाबाई अशा त्यांच्या बहिणी उभ्या होत्या. सारीजण जिजाऊंची वाट बघत होती. इतक्यात बुट्ट्याचा काळाशार शालू नेसलेल्या गौरवर्णी सोयराबाई तोलत्या धिम्या पावलांनी आपली कन्या बाळीबाईसह त्या महालात प्रवेशल्या. त्यांच्या मागे त्यांची खास दासी चंद्रा आणि दोन चार कुणबिणी होत्या. त्यांना बघताच सगळ्या राणीवशाने आपले 'उभे राहणे' झटकन् सावरले!

संभाजीराजांनी कमरेत वाकून त्यांना 'तिपेडी' अदबमुजरा केला.

सोयराबाई सिधे चालत पुतळाबाईंच्या जवळ आल्या.

पुतळाबाईंची मान अदबीने खाली गेली होती. नजर सोयराबाईंच्या पायांवर खिळली.

होती. त्या गोऱ्यापान पायांवरच्या कोरलेल्या आळत्याच्या नक्षीत क्षणात पुतळाबाईंचे मन गुरफटल्यागत झाले !

आपले बिब्बेवाणाचे डोळे संभाजीराजांच्यावर जोडून त्यांच्या खांद्यावर हात ठेवीत सोयराबाई पुतळाबाईंच्याकडे न बघताच म्हणाल्या, "बाकी धाकल्या बाई, फर्मानाची बाब बाळराजांच्यावर निभावली म्हणून निभावली ! खुद्द स्वारींनाच फर्मान घेणं पडले असते तर कोण बेअदबी झाली असती साऱ्यांची ! आमचे बाळराजे हुषारीचे, कुठलीच कसूर त्यांनी नाही केली !"

टाकली मान वर उठवून पुतळाबाईंनी एकवार सोयराबाईंच्याकडे बघितले. पायांवरची आळत्याची नक्षी त्यांच्या डोळ्यांत दिसल्यासारखे पुतळाबाईंना वाटले !

"या" म्हणत संभाजीराजांनी सोयराबाईंच्याजवळ उभ्या असलेल्या बाळीबाईंना हाताला धरून आपल्याजवळ घेतले.

"कोण प्रकारचं खलबत चाललं आहे बाळराजे थोरल्या बाईंशी ?" असे हसून म्हणत जिजाबाई महालात आल्या. त्यांच्या येण्याने महालाला जणू सुगंधी भरलेपण मिळाले ! कुणी काही बोलण्याच्या आत सोयराबाई पदर सावरीत बोलून गेल्या, "नाही, आम्हीच म्हणत होतो बाळराजांना..." सोयराबाईंच्या नाकाचा मुळात लालसर असलेला शेंडा लालावून आला.

मंचकावर शांत बैठक घेत जिजाऊंनी त्यांना विचारले, "काय म्हणत होतात ?"

"... की उमर लहान असताना त्यांना फर्मान घेणं पडलं !! त्यांनी म्हणूनच हुषारीनं ते निभावलं !" ते ऐकताना राणीवशातील सगळ्या राण्या एकमेकींच्या तोंडाकडे बघतच राहिल्या ! सोयराबाईंनी नक्षी क्षणात पालटून टाकली होती !

जिजाबाईंना, संभाजीराजांना, राणीवशाला कुणालाच राजगडावर कल्पना नव्हती की राजे तळकोकणात नव्हते ! ते मिर्झा राजाच्या गोटात, त्यांच्यासाठी दिलेल्या शामियान्यात, पिंजऱ्यात कोंडलेल्या वाघासारखे अस्वस्थ फेऱ्या घेत होते.

मिर्झा राजाने तळकोकणात तातडीचे पत्र धाडून राजांना कऱ्हेपठारावर आपल्या तळात बोलावून घेतले होते. राजांना कल्पना नसताना मिर्झाने खुद्द त्यांच्या नावाचे 'वफादारी' जाहीर करणारे पत्र परस्पर औरंगजेबाला पाठविले होते. औरंगजेबाने तातडीने खुद्द राजांच्या नावे 'फर्मान' पाठविले होते ! तळकोकणातून राजे तातडीने मिर्झाच्या गोटात आले होते. आणि छातीवर सह्याद्री ठेवून राजांनी बक्षी जानी बेगच्या 'शाही रिवाजाप्रमाणे' आज फर्मान स्वीकारले होते !!

फर्मानाच्या उंटाजवळ गुडघे टेकून 'शाहीथैली' खालच्या मानेने टोपावर घेताना राजांना संभाजीराजांनी सांगितलेला कढ आठवला होता. "जनावरासमोर गुडघे टेकून फर्मान घेताना जाम्यावर डाग पडतात ! ते जाता जात नाहीत !"

फर्मान घेऊन आलेले राजे त्या आठवणीने हैराण झाले होते. एकसारखे अस्वस्थ फेऱ्या शामियान्यात घेत होते. एकाएकी ते थांबले. त्यांच्या मनात विचार उठला– "शंभूराजे, फर्मान झेऊन तुम्ही आमच्या भेटीस आला. काही न बोलता आम्ही तुम्हाला पोटशी घेतलं. आज आम्हीही फर्मान घेऊन आलो. पण – पण आम्हाला पोटाशी घेणारं इथं कुणीच नाही !!"

परंतु आपले राजेपण मिर्झाच्या तळावर धुळीत टाकून राजांनी आणि संभाजीराजांनी आपल्या लोकांना जगण्याचा धीर दिला होता ! दुर्बलांच्या हक्काचे संरक्षण करणे हेच खरे 'राजेपण' ! राजांनी ते पाळले होते. फार – फार मोठी किंमत देऊन !

मिर्झा राजाच्या हिशेबी शिवाजीराजांचे 'श्रीचे राज्य' आता निकालात निघाले होते. सगळा राजस्थानी चिवटपणा पणाला लावून 'शिवाजी आणि संभाजी' हे दख्खनी मावळमणी त्याने उचलले होते. आपल्या निष्ठावंत हातांनी औरंगजेबाच्या जपाच्या तसबीहच्या माळेत ते गुंफण्यात आपण फत्ते घेतली या समाधानात मिर्झा राजे होता ! आता त्याची रेगिस्तानी पिंगट नजर विजापुराकडे आदिलशाहीच्या रोखाने वळली ! तो पुरा दख्खन पायाखाली रगडायला आला होता.

मिर्झा राजाने आपला खास हेजिब राजगडावर पाठवून राजांना आपल्या फौजेनिशी पुरंधराच्या तळावर दाखल होण्याचा निरोप पाठविला ! विजापुरावर चालून जाऊन शाही चाकरी बजावण्यासाठी ! त्यासाठी राजांना त्याने आपल्या तहात बांधून घेतले होते.

राजे रजपुताबरोबर विजापूरच्या रोखाने गेल्याला दोन महिने लोटले.

नेहमीसारख्या जिजाऊ सदरकाम आटोपते घेत होत्या. मान मोडून एकलगीने बाळाजी आवजी त्यांच्या शब्दांबरोबर शहामृगपीस चालवीत होते.

जिजाऊंनी शेवटचा खलिता सांगून संपविला. त्या थांबण्याची वाट बघत बाहेर थांबलेले मोरोपंत पेशवे सदरचौकात आले. छातीवरच्या उपरण्याला हात भिडवीत त्यांनी मासाहेबांना मुजरा केला.

"काय पंत ?" जिजाऊ त्यांच्याकडे बघत म्हणाल्या.

"शृंगारपुराहून एक वेद-पारंगत शास्त्री आलेत. केशवभट नावाचे. आईसाहेबांची भेट मागतात. आज्ञा होईल तर..." मोरोपंत अदबीने थांबले.

"पेश करा त्यांना पंत."

मोरोपंतांनी सदरदरवाज्याकडे बघितले. त्यांच्या इशाऱ्याची वाट बघत बाहेर खोळंबलेले केशवभट आत आले.

अंजिरी रंगाचा जरीकिनारीचा रुमाल त्यांनी मस्तकाला बांधला होता. तांबड्या काठाच्या धोतरावर लांब बाहीची स्वच्छ बाराबंदी होती. खांद्यावरून छातीकडे येत

पाठीशी वळलेला उपरण्याचा वेढा होता. रांगोळीने घासलेल्या पितळी देवमूर्तीसारखे शास्त्रीपणाचे तेज त्यांच्या मुद्रेवर होते.

केशवभटांनी कमरेत वाकत दोन्ही हात जोडून जिजाऊंना नमस्कार केला. आऊसाहेबांना बघण्याची फार दिवसांची त्यांची इच्छा असल्यामुळे त्यांनी आपल्या तेजस्वी डोळ्यांनी जिजाऊंना निरखून पाहिले.

"काय योजून येणं केलंत शास्त्रीबुवा?" जिजाऊंनी केशवभटांच्याकडे बघत शांतपणे विचारले.

त्या प्रश्नाने केशवभट पुन्हा कमरेत वाकले. म्हणाले, "थोडंसं शास्त्र जाणतो. रामायण, महाभारत, वेद-उपनिषद. पायीच्या सेवेचा योग येईल तर..."

"छान! आम्ही अशा आसामीच्या शोधातच आहोत. मोरोपंत, यांना आमच्या महाली पेश करा.. जगदंब!" जिजाऊंची चर्या प्रसन्न दिसत होती. त्या बैठकीवरून उठल्या. आपल्या महालाच्या रोखाने चालू लागल्या.

त्यांच्याकडे बघितले तर कुणालाही कळले असते की कसले तरी विचार त्यांच्या बरोबर चालत असावेत. पण ते राजांचे नव्हते. संभाजीराजांचे नव्हते. राजांच्या राणीवशाचे तर नव्हतेच. राज्याचेही नव्हते. जिजाऊ विचार करीत होत्या आपल्या नातसूनबाईंचा! येसूबाईंचा!

संभाजीराजांचे लग्न झाले आणि पिवळ्या अंगाने येसूबाई पिलाजीरावांच्या बरोबर शृंगारपूरला गेल्या होत्या. जाणतेपणीच त्या माहेरीच राहणार होत्या.

ते माहीत असूनही जिजाबाई स्वत:शी म्हणाल्या, "फार दिवस झाले. पोर डोळ्यांआड राहिली. एकदा बलावू धाडलं पाहिजे!"

पन्हाळाप्रांताहून निघालेला बहिर्जी नाईक चिराखलागणीच्या वेळेला राजगड चढून आला. बाले किल्ल्यावर येऊन त्याने जिजाऊसाहेबांना आपण आल्याची वर्दी पाठविली. त्या वेळी जिजाऊंच्या महाली मोरोपंत आणि केशवभट उभे होते. जिजाऊ संभाजीराजांच्यासह मंचकावर बसल्या होत्या.

केशवभटांची आस्थेने विचारपूस केल्यावर जिजाऊंनी त्यांना, संभाजीराजांना रामायण-महाभारत सांगण्याची मोलाची कामगिरी जोडून दिली.

बहिर्जी आल्याची वर्दी मिळाल्यामुळे जिजाऊंनी मोरोपंत आणि केशवभट यांना निरोप दिला.

रामोशी वेषातील, दुरची धावणी घेतलेला दमगीर बहिर्जी महालात आला. जोहार घालून त्याने मासाहेबांकडे बघितले.

"कोण मामल्याची खबर? बोला नाईक." विचारांचा गोंधळ उडाल्यामुळे घोटाळलेल्या बहिर्जीला जिजाऊंनी धीर दिला.

"इज्यापूरला लई जोराचा जंग झाला. धन्यास्नी आन् रजपुताला शर्जाखानाम्होरं शिकस्त घ्याया लागली."

"ते कानी आलंय आमच्या. विजापूरच्या सरलष्कर सर्जाखानानं पहाडाचं काळीज दाखविलं. एकेकाळी त्यानं चालून आलेल्या रजपूत, दिलेर, नेताजी आणि राजे या चार सेनापतींना निकरानं भांडून शिकस्त दिली. फार इमानाचा आणि ताकदीचा असला पाहिजे सर्जाखान. राजे विजापूर सोडून पन्हाळ्याकडं कूच झाल्याचं आम्ही ऐकून आहोत. काय झालं पन्हाळ्याचं?"

"जी. कंदी घडायचं न्हाई असं घडलं पन्हाळ्यावं आईसाहेब... आपला हजार पाऊलोक पन्हाळ्याच्या छाप्यात कामी आला! गड काई हाताला लागला नाई." बहिर्जीने मान खाली घातली.

"मतलब?" संभाजीराजांच्या कपाळी आठ्या चढल्या. सारे अंग ताठरले. हजार लोक एका छाप्यात खर्ची पडले होते!

"इज्यापूर सोडताना धन्यांनी फौजंच्या दोन फळ्या केल्या. एक सरलस्करांच्या दिमतीला दिली. दुसरी संगं घेऊन खासं राजं कालच्या षष्ठीला पन्हाळगडाला मध्यरातीचं भिडलं. नेताजीस्नी त्येनी षष्ठीची रात नेमून दिल्याली हुती. पर नेताजी वक्ताला गडाच्या पायथ्याला भिडलं न्हाईत! वाट बघून राजे हैरान झालं. रात टळतीला यायला लागली म्हून आपली फौज घिऊन गड चडाय लागलं पर गडकऱ्याला सासूद लागल्याला हुता. धुकटलेल्या तटाभवत्यानं आपलं धारकरी घेऊन त्यो दब्यानं बसला हुता. राजं टप्प्यात येताच त्यो मोहऱ्यानं चालून आला. चाऱ्यात हत्यारमार झाली! हजार माणूस उतरंडीला पडला! गर्दी करून राजं उरलेल्या लोकांनिशी विशाळगडाकडं सरकलं."

"मग राजे आता विशाळगडी आहेत तर आणि आमचे सरलष्कर कुठं आहेत?" जिजाबाईंना नेताजींचा करिणा काय ते कळेना.

"न्हाई मासाब, राजं फोंड्याच्या रोखानं कोकणात उतरल्यात. आन्..." बहिर्जीचा साद कातरला. नजर जिजाऊंच्या आणि बाळधन्याच्या पायांवर पडली.

"आणि काय नाईक?" जिजाऊंना आणि कुणी कामी तर आले नाही ना अशी शंका आली.

"कसं सांगावं मासाब! अशी खबर सांगण्यापरास जीब झडल्याली ब्येस."

"नाईक, जीभ झडली तरी सत्य झाकून राहणार थोडंच? बोला." जिजाऊंनी बहिर्जीला जखडून टाकला.

"विशालगडावयनं राजांनी सरलस्करास्नी खलिता धाडला. 'सरलस्कर असून समयास कैसे पावला नाहीत? दाखल होण्यास दिरंग केला. सबब तुम्हास बरतर्फ करतो आहोत' असा हुकूम दिला. त्यो वाचून नेताजी बिथारले. राजांच्यावर रागं झालं.

राजांस्नी पारखं होऊन इज्यापूरच्या दरबाराला फौजासुद्धा जाऊन मिळाले!!'' मुंडासे डुलवून बहिर्जी गद्गदल्या सुरात बोलला.

जिजाबाई डोळे ताणून बहिर्जीच्या धुळकटलेल्या मुंडाशाकडे बघतच राहिल्या.

बहिर्जीच्या अंगावरच्या घोंगडी काचोळ्यांकडे संभाजीराजे रोखून बघत होते.

त्यांच्या कानांत भरदार मिश्यांच्या, थोराड, तिंधारी पगडीच्या 'नेताजीकाकांनी' रजपुतांच्या गोटात सांगितलेले शब्द घुमू लागले– ''मानूस जिथं उपाजतं ती जागा मानसाला साद घालती बाळधनी!!''

संभाजीराजांना वाटले– ''बहिर्जीच्या अंगावरचं घोंगडी काचोळं मोठमोठं होत आहे! ते भलं मोठं काचोळं आपल्या हातात घेऊन 'नेताजीकाकांनी' ते जाळ्यासारखं फेकून सगळा पुरंधरकिल्ला त्यानं पार झाकून टाकला आहे!!'' त्या काचोळ्याखाली त्यांचेच शब्द गुदमरून तडफडताहेत– ''माणूस– जिथं उपाजतं ती जागा मानसाला साद घालती बाळधनी!!''

इकडे आम्र्यात संगमरवरी सफेद चिऱ्यांचा ताजमहाल असाच गुदमरून तडफडत होता! लाल किल्ल्यावरच्या मुसामाँ बुरुजालगतच्या मनोऱ्यातील शहाजहानची सात वर्षांची कैद संपली होती!

''ऐ अल्लाताल, मेरी आगेवाले जहानर्क हालत अच्छी कर. मुझे जहन्नमके दर्दे आगसे बचा ले'' अशी खुदाला कळवळून प्रार्थना करीत शहाजहानने आम्र्याच्या लाल किल्ल्यात शेवटची साँस टाकली. ही सारी उत्तरी वार्ता वाऱ्याबरोबर दक्षिणेकडे येऊन पोहोचली होती. ऐकणारे विस्मित होत होते.

शहाजहानची मुलगी जहानआरा, बेगमा– अकबराबादी महल आणि फत्तेपुरी महल त्याच्या बुढ्या, आंधळ्या आणि फाकळलेल्या निस्तेज प्रेतावर कोसळून फुटफुटून रडल्या.

शहाजहानचे सुरकुतलेले, म्हातारे, गोरे अंग फाकळून निघाले होते.

औरंगजेबाने त्याच्या खास विश्वासातल्या तबिबाला फितवून औषधी म्हणून विषारी तेलाने त्याच्याकरवी शहाजहानला मालिश करवून घेतले होते!

आपल्या बापाच्या मनाचा झाला तो दाह कमी वाटला म्हणून की काय औरंगजेबाने त्याच्या शरीराचाही आगडोंब पेटवून दिला होता!

'वृंदावन' या एका हिंदू वैद्याच्या औषधींनी शहाजहान त्या 'मालिशच्या मुसीबतीतून' कसातरी बचावला होता! पण त्याचे अंग फाकळून निघाले होते. त्यातून हाय खाल्लेला शहाजहान पुन्हा कधी उठलाच नाही.

''मला नरकाच्या आगीपासून वाचव'' म्हणून खुदाला विनविणाऱ्या शहाजहानला तशी संधी औरंगजेबाने ठेवलीच नव्हती! हरप्रकारच्या नरकयातना शहाजहानने कैदेतच भोगलेल्या होत्या. इमानी कुत्र्यासारख्या असलेल्या मुतमद नावाच्या आपल्या खोजाच्या हवाली औरंगजेबाने आपल्या बापाला सुपूर्द केले होते!

शहाजहानच्या आसवाबखान्याचा दरोगा ख्वाजा मामूर मेला तेव्हा मुतमदने आसवाबखान्याला चक्क मोहरा ठोकल्या! दुसरा दारोगा नेमला जाईपर्यंत, दिवसाला पाचपंचवीस जामे बदलणाऱ्या शहाजहानने अंगावरच्या एकाच जाम्यावर दिवस काढले!

या सगळ्यावर कडी केली होती औरंगजेबाने. दारा शिकोहच्या जनानखान्यातील, शहाजहानच्या आसऱ्याला असलेल्या गायिका, गणिका त्याने दिल्लीला आपल्या जनानखान्यासाठी पाठवून द्या असे पत्र आंधळ्या आब्बाजानला लिहिले होते!

हे सगळे भोगून शहाजहानने एका संध्याकाळी आपला देह लाल किल्ल्यात ठेवला.

हे सारे अघटित, नवीन होते.

ताजमहालाचा आरसपानी चिरान् चिरा कसा रेखीवपणे एकमेकावर उभा होता. पण– पण त्याच्या निर्मात्याचा– खुद्द शहाजहानच्या शरीराचा चिरान् चिरा फाकळून निघाला होता!! तो शांतपणे चंदनी शवपेटीत तसाच विश्रांती घेत होता!! शहेनशहाची काय आणि साध्या हशमाची काय हयातीची बाकी शेवटी शून्यच असते!!

फोंड्याहून माघार घेतलेले शिवाजीराजे मिर्झा राजाला विजापूरजवळच्या गोटात भेटून राजगडावर आले. या भेटीत मिर्झाने राजांच्या गळ्यात सगळ्यांत मोठा खोडा टाकला होता. औरंगजेबाच्या पन्नासाव्या वाढदिवसाचे निमित्त करून त्याने राजांना संभाजीराजांच्यासह आग्रा-दरबारात पेश करण्याचा सल्ला दिला!

हे वरचे कारण होते. मनातून मिर्झा चरकला होता. विजापूरला कुतुबशाहीने पन्नास हजार घोडदळाची मदत केली होती. राजांचा 'उजवा हात' नेताजी फुटून विजापूरला मिळाला होता. त्यात खुद्द राजेच विजापूरला सामील झाले तर आपली धडगत नाही या शंकेने मिर्झाने औरंगजेबाला पत्रे पाठविली. शिवाजीराजांना शंभूराजांच्यासह आग्रा दरबारी बोलावून घेण्याचा मनसुबा बनवून आणला.

'आला हजरत औरंगजेब रजामंद झाला तर राजांना त्या दरबारात दख्खनची सुभेदारी देईल' असा मिर्झाचा अंदाज होता. काही दिवस पडती घेऊन ती स्वीकारणे याशिवाय राजांना तूर्त मार्ग उरला नव्हता.

काही चांगले हाताशी लागेपर्यंत, हातात असलेले कमी चांगले न सोडणे हे राजकारणात शहाणपणाचे ठरते! राजांनी दरबारी जायचे मान्य केले होते.

आम्र्याला जाण्यापूर्वी सरलष्करपदाची मोकळी जागा योग्य असामीच्या हवाली करणे भाग होते. त्यासाठी राजांनी सदर बोलावली. सदरेत जाण्यापूर्वी राजांकडे संभाजीराजांनी भीतभीत नेताजींबद्दल चौकशी केली. आबासाहेबांनी असा निर्णय तडकाफडकी का व कसा घेतला याबद्दल संभाजीराजे हैराण होते.

राजांनी दिलेले उत्तर शंभूराजांना नीट आकलन करता आले नाही. फारसे पटलेही नाही. राजे म्हणाले होते, "ही फौजी शिस्त आहे. योग्य वेळी ध्यानी येईल."

भरल्या सदरेत राजे संभाजीराजांना घेऊन दाखल झाले. रिवाजाप्रमाणे भंडाऱ्याची परडी सदर-बैठकीत फिरली.

मुजुमदार निळोपंत, सरलष्करपदाचा पेहराव, लाल कंगणी पगडी, जरीनक्षीच्या म्यानाची तलवार असा साज असलेली सरपोसांनी झाकलेली तबके जोत्यावर सिद्ध ठेवून राजांच्या उजव्या तर्फेला उभे राहिले. नेताजींच्या कडू आठवणींची इंगळी राजांच्या काळजाला क्षणभर डसून गेली. सदरेत भयाण शांतता होती.

"मंडळी, आम्ही बादशहाच्या भेटीला उत्तरेत जाणार आहोत—!" राजांना एवढेच बोलताना भरून आल्यासारखे झाले. स्वत:ला सावरून ते एकलगीने म्हणाले,

"रिती पडलेली सरलष्करपणाची जिम्मेदारी आम्ही कुडतोजी गुजरांच्या खांद्यावर टाकण्याचे योजले आहे. कुडतोजी, असे सामने या."

कुडतोजी राजांच्या बैठकीसमोर आले. अदब मुजरा करून सावरत्या अंगाने उभे राहिले. राजे बैठकीवरून उठले. निळोपंतांनी पेश केलेल्या तबकातील शेला, चोळणा त्यांनी कुडतोजींच्या खांद्यावर चढविला. त्यांच्या कमरेला तलवारीचे बंद आवळले. कुडतोजींनी आपल्या डोकीवरची पगडी काढून हाती घेतली. राजांनी तुरेबाज लाल कंगणी पगडी उचलून ती कुडतोजींच्या मस्तकावर चढविली. सदरेकडे बघत राजे म्हणाले, "आजपासून कुडतोजी गुजर... आमच्या फौजेचे सरलष्कर! आम्ही त्यास 'प्रतापराव' ही खिताबत बहाल करतो आहोत." राजांनी कुडतोजींना ऊरभेट दिली. ती घेताना ना कुडतोजींना ना एकाही सदरकऱ्याला कळले की राजांच्या उरात कसले कढ दाटून आले आहेत. त्यांनी "कुडतोजी, आमच्या फौजेचे सरलष्कर" असे थांबून म्हटले होते. "श्रींच्या राज्याचे सरलष्कर" असे म्हटले नव्हते!

राजांचा शब्दन् शब्द कान देऊन ऐकण्याचा सराव झालेल्या संभाजीराजांना मात्र ते जाणवले. बैठकीवर बसल्या बसल्या ते कुडतोजींच्या डोक्यावरील, कंगणी पगडीतील तुऱ्याकडे बघत राहिले. त्यांच्या मनात विचारांचा तुरा डुलला— "नेताजीकाका झाले तसे तुम्ही आमच्या महाराजसाहेबांना पारखे होऊ नका! त्यांच्या मनावेगळी गोष्ट करू नका!"

सदर उठली. सदरकरी चौकाबाहेर पडू लागले. त्या सगळ्या सदरेला कल्पना नव्हती की औरंगजेब दिल्लीहून आग्र्यात आला होता. आपल्या मृत बापासाठी जियारत पढायला!

□ □ □

४

संभाजीराजांच्यासह राजे उत्तरेत जाणार ही खबर मुलूखभर पसरली.

आदिलशाही, कुतुबशाही, सिद्दी, इंग्रज, फिरंगी ह्यांच्या दरबारी मुत्सद्द्यांनी स्वत:शी खूणगाठ बांधली— "आता शिवाजी खरोखरच संपला! शिवाजीच्या रूपाने आता नवा 'मिर्झा राजे' तयार होईल!"

निवडक लोकांनिशी मावळात फिरून राजांनी आपल्या ताब्यातील गडकोटांची बंदिस्ती नजरेखाली घातली.

जिजाऊसाहेबांनी केशवभटांना खलिता देऊन पिलाजीरावांच्याकडे शृंगारपूरला धाडले. "आमच्या नातसूनबाईंना संगती घेऊन तुरंतीने गड जवळ करणे." असा सांगावा खलित्यात लिहिला होता.

राजांच्या सदरेवरचे नेक सल्लागार सुचेल तसा सल्ला राजांना देत होते. मासाहेब धीराच्या गोष्टी सांगत होत्या. पण—पण स्वत:शीच शंका यावी असा बिकट-बाका प्रसंग राजांच्यावर आला होता!

मोठ्या उमेदीने रायरेश्वरावर 'श्रींच्या' राज्याची आणभाक राजांनी घेतली होती. मावळमाणसांवर उधळून टाकावी म्हणून मोठ्या भक्तीने त्या वेळी भंडाऱ्याची मूठ भरून घेतली होती. आज त्या मुठीत सगळ्या स्वप्नांची झालेली माती बघून स्वत: राजेच सुन्न झाले होते.

राजांना या सगळ्याचाच जाब एकाच पायी विचारता येणार होता. आदिशक्ती जगदंबेच्या! जेव्हा जेव्हा विचार करकरून मेंदूचे टाके उसवू बघत होते तेव्हा तेव्हा राजे आपले मस्तकच त्या मेंदूनिशी नेऊन जगदंबेच्या चरणांवर ठेवीत होते. जिथे माणसाच्या मर्यादा संपतात तिथूनच आदिशक्तीचे सामर्थ्य सुरू होते!

संभाजीराजांना घेऊन राजे प्रतापगडी चालले. जगदंबेच्या दर्शनाला. बरोबर प्रतापराव, प्रभाकरभट, मोरोपंत, आनंदराव अशी मंडळी होती.

जावळी खोऱ्यातील प्रतापगडची चढण चढून पालखी पायथ्याशी आली. इथून 'जनीचा टेंबा' हे अफजलभेटीचे वळण स्पष्ट दिसत होते. त्या वळणावर पांढऱ्या पत्थराची, राजांनी बांधवून घेतलेली अफजलची कबर राजांना दिसली! केवढे तरी विचित्र दृश्य त्यांच्या डोळ्यांसमोर क्षणात तरळून गेले— त्या कबरीवर मिर्झा राजे उभा

होता! अफजलच्या वेषात! त्याच्या हातात केवढी तरी मोठी 'वाघनखे' होती! ती मुठीत बेमालूम छपवीत, हात उंचावून तो गोड हसत म्हणत होता, "आइये राजासाब, घबराइये मत!"

राजांच्या जिवाची घालमेल झाली. "जगदंब! जगदंब!" पुटपुटत राजांनी पालखीत शेजारी बसलेल्या संभाजीराजांच्या खांद्यावर हात ठेवला!

पालखी केदारेश्वराच्या मंदिरासमोर आली. शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी स्वाऱ्या पालखीउतार झाल्या. राजे, संभाजीराजे मंदिराच्या दगडी उंबरठ्याजवळ आले. वाकून राजांनी उंबरठ्याला बोटे भिडविली. आणि त्यावरील कोरलेले नक्षकाम बघताच राजे तसेच थांबले! तीच नऊ पाकळ्यांची धर्मचक्रे आणि तेच जबडा विस्तारलेले वाघाचे शिर राजांना दिसत होते!! कापराच्या वड्या पेटताना सरसरून याव्यात तसे राजांचे उभे अंग क्षणात सरसरून आले! जामा काखेत दाटून आला.

ताठ खडे होत राजांनी केदारेश्वराचा उंबरठा ओलांडला. आतल्या घुमटातील घंटेचा गाभा भरून टाकणारा टोल दिला. समोरच्या शिवलिंगासमोर गुडघे टेकून हात जोडले. डोळे मिटले. त्यांचे ओठ काहीतरी पुटपुटत होते. तो 'शिवाचा' 'शिवाशी' चाललेला 'शिवकर' असा गूढ संवाद होता! राजांनी डोळे उघडले. समोरच्या नितळ शिवलिंगावरचे एक बिल्वपत्र उचलले. राजांनी उचललेल्या त्या बिल्वपत्राला दोनच दळे होती! मधले दळ गायब झाले होते! हातीच्या बिल्वपत्राकडे एक नजर बघून राजांनी ते तसेच संभाजीराजांच्या हाती ठेवले!

पालखी गड चढून जगदंबेच्या मंदिरासमोर आली. हातपाय धुऊन राजे, संभाजीराजे जगदंबेच्या दर्शनासाठी मंदिरात प्रवेशले. अंगावर धावून आल्यासारखी दिसणारी, अष्टभुजा दुर्गा बघताच राजांनी गुडघे टेकले. हात जोडून मिटल्या डोळ्यांनी त्यांनी आपले मस्तक मूर्तीसमोर फरसबंदीवर टेकविले. त्यांच्या मिटल्या डोळ्यांसमोर असंख्य पाजळले पोत नाचत होते. त्यांच्या तालावर मन फिरत होते.

"आई, आमचे हात बांधील झाले. कोण प्रसंग आणलास? तुझ्या तांडवात लेकरू पायांखाली येते आहे! अंबे, डोळे उघड! दाही दिशा अंधेरल्या. पोत पाजळ!" राजांचे मन कालवून कळवळत होते. मस्तक वर घ्यावे असे त्यांना वाटत नव्हते.

त्यांच्या डाव्या बगलेला गुडघे टेकून बसलेले संभाजीराजे समोरच्या शस्त्रे उगारलेल्या, उग्रदर्शनी जगदंबेकडे आणि राजांच्याकडे आलटून पालटून बघत होते.

भवानी, आबासाहेब, मंदिर, पाजळलेले गोत, आपण सारे एक एक झालो आहोत असे संभाजीराजांना वाटत होते.

बऱ्याच वेळाने राजांनी मस्तक वर घेतले. त्यांचे डोळे पाणावले होते. उठून समोर गाभाऱ्यात जाऊन राजांनी आपले मस्तक जगदंबेच्या चरणांवर ठेवले. राजे, संभाजीराजे दर्शन करून मंदिराबाहेर पडले.

प्रतापगडाची तटबंदी, पहारे-मोर्चे नजरेखाली घालून दिवस उताराला लागताना राजांची पालखी गड उतरून पायथ्याशी आली.

जनीच्या टेंब्याचे वळण आले! राजांची नजर अफजलच्या कबरीवर गेली! पण आता त्यांचे मन शांत होते. क्षणभरात त्यांच्या मनासमोर एक विचित्र दृश्य तरळून गेले—त्या कबरीवर आता अफजल उभा होता! पण— पण त्याच्या अंगावरचा सगळा वेष राजपुती होता! मिर्झा राजासारखा!! मान मागे टाकून तो किंकाळत होता— "लवा, लवा दगा!"

राजांच्या कपाळावर स्पष्ट दिसणाऱ्या जखमेच्या व्रणाकडे बघत संभाजीराजांनी त्यांना विचारले, "महाराजसाहेब इथं— इथंच तुम्ही खान जिवे घेतला होता?" राजांच्या कपाळीचा तो व्रण सय्यद बंदाने टोपावर केलेल्या वारामुळे उमटला होता.

"होय इथंच शंभूराजे!" राजे शांतपणे म्हणाले.

पालखीचे भोई हातातील लाकडी थोपे मागेपुढे झुलवीत जनीच्या टेंब्याचे वळण मागे टाकीत होते. पालखीमागून प्रतापराव, मोरोपंत, आनंदराव घोड्यांचे कायदे आखडीत धिम्या चालीने उतरण उतरत होते.

संभाजीराजे डोळे जोडून अफजलच्या कबरीचे पांढरे पत्थर एकटक बघत होते.

उभे जावळीखोरे प्रतापगडाकडे बघत जगदंबेचा महिमा गात होते—

"आदिशक्तीचे कवतुक मोठे—
भुत्या मज केले! भुत्या मज केले!!"

राजगडावर संभाजीराजांच्या महालात मंचकावरच्या बैठकीवर एक पोरसवदा स्त्री-खानदान बसले होते. पुतळाबाईंच्या खाजगीकडच्या कुणबी दासीने त्याला त्या महालात आणून सोडले होते.

ती पोरवयी स्त्री महालभर आपली नजर फिरवीत होती. भिंतीला लटकलेली शस्त्रे कुतूहलाने बघत होती. चौरंगावर निरनिराळ्या तबकांत ठेवलेले सफेद, केशरी टोप निरखीत होती. मधूनच देव्हाऱ्यातील शिवलिंगाकडे बघत होती. "आम्हास या मर्दाना-महालात का आणून बसविले आहे?" असे स्वतःलाच तिने विचारले.

इतक्यात नौबत-नगाऱ्याचा दुडदुडणारा आवाज तिच्या कानी आला. त्या रोखाने खिडकीच्या झरोक्याकडे तिने पाहिले. देव्हाऱ्यातील समयांच्या ज्योती मंद वाऱ्याझोताने क्षणभर थरथरून गेल्या. त्या पोरवयी स्त्रीने आपले वरवंट्याचे नेसू ठीक करीत पायांतील तोड्यांकडे पाहिले.

जगदंबेचे दर्शन घेऊन आलेल्या राजांची व संभाजीराजांची पालखी राजगड चढून बालेकिल्ल्यावर आली.

जिजाऊसाहेबांचे दर्शन घेऊन दौडीने थकदिल झालेल्या संभाजीराजांनी आपल्या महालात पाऊल टाकले. कधी नव्हे ते महालात एकही दिसत दासी नव्हती.

मस्तकीचा टोप तबकात उतरण्यासाठी संभाजीराजे चालत चौरंगाजवळ आले. टोप उतरण्यासाठी त्यांनी हाताच्या बोटांचा झोला टोपाला भिडविला आणि त्यांची नजर मंचकाकडे गेली! चांदीचे चमकीले तोडे त्यांना दिसले!

मंचकावर कुणीतरी बसले होते! झटक्यात त्यांनी हात खाली घेतले. बसलेल्या व्यक्तीला निरखून पाहिले. ओळख पटत नव्हती. मान ताठ करीत त्यांनी मंचकाला सवाल केला, "कोण ... कोण बसले आहे आमच्या बैठकीवर?"

मंचकावरच्या स्त्री-खानदानाने गडबडून जाऊन मान वर करून संभाजीराजांकडे पाहिले! त्यांना बघताच ती स्त्री झटकन् खाली पायउतार झाली!

गदका खेळताना गोमाजीबाबा आडवी धरीत त्या फरीसारखी ती गोल मुद्रा आणि समयांच्या प्रकाशात क्षणभर उजळून गेलेल्या टपोऱ्या डोळ्यांच्या दोन शुक्रचांदण्या बघताच खाशी संभाजीराजांची स्वारीच गडबडून गेली!

चौरंगावरच्या टोपांकडे निरखून बघत त्यांनी अगोदर आपण आपल्याच महालात आलो आहोत याची नीट खातरजमा करून घेतली!

"तुम्ही?" म्हणत संभाजीराजे आले तसे झटकन् पाठमोरे झाले! आणि महालाबाहेर निघूनही गेले. धडधडत्या काळजाने ते स्त्री-खानदानही लगबगीने महालाबाहेर निसटले. बाहेर पडताच बराच वेळ पायाच्या नडगीला रुतून कचणारा तोडा वाकून त्याने अगोदर ढिला केला. "आता कुठं जावं?" या पेचाने ते गोंधळून गेले! त्या होत्या येसूबाई! आपल्या 'आबांच्या' बरोबर– पिलाजींच्या बरोबर– त्या राजगडी दाखल झाल्या होत्या!

फाल्गुन शुद्ध नवमीचा दिवस फटफटला. गडपाखरे रानचाऱ्याच्या मागाने कोटरे सोडून किलबिलत भरारली.

संभाजीराजांनी हमामखान्यात स्नान घेतले. लखलखीत जरी कोयऱ्यांचा निळाशार जामा, जरी किनाराची वेल फिरलेला, मोतीलगाचा सफेद टोप, बुट्ट्यांचा डाळिंबी मांडचोळणा, कमरेला शुभ्र शेला असा खासा पेहराव परिधान करून ते रायाजी आणि अंतोजी गाडे यांच्या सोबतीत जिजाऊंच्या महाली निघाले 'शिवगंध' रेखून घेण्यासाठी! महालात जिजाऊसाहेब, येईल त्या दासदासीला हरतऱ्हेचा हुकूम तत्परतेने देत उभ्या होत्या. मध्येच त्या थांबत होत्या. स्वत:ला पार हरवून देव्हाऱ्यात दिसणाऱ्या जगदंबेच्या मूर्तीकडे बघत होत्या.

त्यांच्या दोन्ही बाजूंना संभाजीराजांच्या बहिणी होत्या. दगडबंद भिंतीला धरून सावरल्या पदराच्या पुतळाबाई उभ्या होत्या. त्यांच्या बगलेला, हातांत एक तबक घेऊन धाराऊ अदब धरून खडी होती. त्या दोघींच्या मध्ये, कुणासच सहजी दिसू नये अशा बेताने येसूबाई अंगचोरीने उभ्या होत्या!

"येसू, अशा पुढे या." जिजाऊंनी येसूबाईंना साद घातली.

येसूबाई क्षणभर भांबावल्या. रेंगाळल्या. त्या शब्दांतील मायेने मग अदबीत पुढे झाल्या. आपल्या नणंदांच्यात जमवून घेत खालच्या मानेने त्यांच्यात मिसळून उभ्या राहिल्या. संभाजीराजे महालात प्रवेशले. पाठोपाठ रायाजी-अंतोजी आत आले. साऱ्यांनी जिजाऊ, पुतळाबाईंना अदबीचे त्रिवार मुजरे केले. मंद चालीत जिजाऊ पुढे आल्या. संभाजीराजांना बघताच त्यांच्या काळजात केवढेतरी कल्लोळ उमळून आले–

"केवढं-केवढं भोगलं यांनी या एवढ्याशा उमरीत? धाराऊनं यांना दुधास लावलं. दोन वर्षांचे असताना यांच्या आऊसाहेब यांना पारख्या झाल्या, रजपुतांच्या गोटात हे साऱ्यांसाठी ओलीस राहिले. गुडघे टेकून यांनी फर्मान घेतलं. आणि– आणि आज उत्तरेकडं चालले! कशी झेपणार यांना या गरमीच्या दिवसांत एवढी दूरची, परमुलखाची वाटचाल?" काटेभिवरीच्या वेलीने तुळशीचे रोपवैभव झाकाळून जावे तसे जिजाऊंचे मन भरून आले!

पुढे होत संभाजीराजांनी आऊसाहेबांच्या पायांवर डोके ठेवले. थोडा वेळ ते तसेच थांबले. त्यांच्या मनी येऊन गेले. "केवढा– केवढा फेर आहे मान टाकून फर्मान घेण्यात आणि– आणि आऊसाहेबांच्या पायांवर डोकं ठेवण्यात!"

"उठा ऽ" आऊसाहेबांचा आवाज घोगरला. झुकून वारेझुळकीने रानमोगऱ्याच्या कळ्यांचा सुगंध उचलावा तसे जिजाऊंनी त्यांना अलगद वर घेतले!

मागे न बघताच त्यांनी 'धाराऊ ऽ' अशी याद फर्मावली.

संभाजीराजांच्याकडे बघताना गंधाचे तबक पेश करायला विसरलेल्या धाराऊच्या हातातील तबक थडथडले.

"जी." म्हणत ती सावरून झटक्याने पुढे झाली. हातीचे तबक तिने आऊसाहेबांच्या समोर पेश केले. जिजाऊंनी तबकातील गंध-अष्टगंधाच्या कुप्या निरखल्या. संभाजीराजांनी कपाळ वर उठवून डोळे मिटले. जिजाऊंनी पितळी सरशी कुप्यात डुबविली. ज्या संकेताने, ज्या हळुवार हातकसबाने आदिशक्ती जगदंबेने आभाळाच्या नितळ निळ्या पटलावर सूय-चंद्र रेखले असतील तसे त्यांनी दोनदळी शिवगंध संभाजीराजांच्या नितळ कपाळी रेखले! आपणच रेखलेल्या त्या शिवगंधाकडे टक लावून बघताना जिजाऊंना कधी नव्हे तो एक अपूर्व कौल जाणवून गेला–

"आपण शिवभक्त शंभूराजे. सुखदु:खाचे हे दोन पट्टे शिवानेच आपल्या कपाळी रेखून टाकले आहेत! भार त्याचा आहे. पाठराखण करणारा तोच समर्थ आहे!"

जिजाऊंनी शांतपणे हातीची सरशी तबकात ठेवली.

"वर्दी आलीय. आता राजे येतील. त्यांच्या सोबतीनं जगदंबेचं, गडावरच्या देवदेवतांचे दर्शन करून या." जिजाबाई संभाजीराजांना जवळ घेत म्हणाल्या.

"जी." संभाजीराजांनी मान डोलावली.

"गोमाजीबाबा, सिदोजी, महमद सैस, केशवभट, साऱ्यांची गाठभेट घ्या. गड सोडण्यापूर्वी राणीवशाकडं मुजरे लावून या." जिजाबाई झरा झुळझुळावा तशा बोलत होत्या. संभाजीराजे ते ध्यान देऊन ऐकत होते.

"जा. पाय शिवा त्यांचे." जिजाऊंनी पुतळाबाईंच्या रोखाने हात करीत संभाजीराजांना इशारत दिली.

संभाजीराजे पुतळाबाईंच्यासमोर आले. वाकून त्यांनी पुतळाबाईंच्या पायांवर डोके ठेवले. त्या स्पर्शाने एक अंग फुलवती सरसरी पुतळाबाईंना जाणवली. डोळे पाणथर झाले. त्यांचे मन त्यांना सांगत होते –

"बाळराजे, आम्ही केला आहे 'सुलूख', पण तो एकट्या आमच्या कपाळीच्या 'कुंकवाशीच' नाही तर – तर तो तुमच्या कपाळीच्या 'शिवगंधाशीही' केला आहे!"

"उठा ऽ" पुतळाबाईंनी मायेने संभाजीराजांना उठवून घेतले. त्यांच्या हनुवटीची वाटी तर्जनीने वर घेत त्या म्हणाल्या, "दर्शनं आटोपली की आमच्या महाली या. आम्ही तुम्हास दंडात बांधण्यासाठी एक ताईत देणार आहोत!"

"जी" म्हणून संभाजीराजांनी धाराऊचे पाय शिवण्यासाठी पाऊल पुढे टाकले आणि पुतळाबाईंच्या मागे अंगचोरीने उभ्या असलेल्या येसूबाईंना बघताच ते पुन्हा झटकन् मागे हटले!

"हां शंभूबाळ, धाराऊची पायधूळ परती सारू नका!" जिजाऊंनी त्यांना पुरते वळू दिले नाही!

पुढे होत संभाजीराजांनी धाराऊचे पाय शिवले. हातांतील तबक थरथरत होते. घसा दाटून आला होता. सुरसुरते नाक वर ओढत तिने पदर डोळ्यांना लावून झटकन् आपली मान दगडबंदीकडे मागे वळविली. तिचा गद्गदला कुणबाऊ ऊर वर खाली लपापू लागला. कल्लोळ कल्लोळ माजला तिच्या काळजात.

"आऊ ऽ, आम्ही तुरंतीने सलामत परतू." संभाजीराजे तिच्याकडे बघत बोलले.

इतक्यात महालात राजे प्रवेशले. अंतोजी-रायाजीने त्यांना वाकून मुजरे घातले.

जिजाऊ, पुतळाबाई, संभाजीराजे, येसूबाई सारीच धाराऊकडे बघत होती. राजांना पाठमोरी होती.

"मासाहेब, आम्ही दर्शनाला निघतो आहोत." पाठमोऱ्या जिजाऊंना वाकून अदबमुजरा देत राजे शांत बोलले. विजेच्या एकाच लपकीने आभाळाचा घुमट लख्खकन उजळून जावा तसा राजांच्या बोलांनी तो आऊपणाचा महाल उजळून गेला.

साऱ्यांना जागीच सोडून जिजाऊ राजांच्या रोखाने शांत चालीत पुढे झाल्या. त्यांच्या स्थिरावल्या पायांसमोर राजांनी गुडघे टेकले. आपले रुंद कपाळ त्यांनी जिजाऊंच्या नितळ पायांवर टेकविले.

"उठा ऽ" राजांच्या खांद्यांना धरून वर उठविताना आऊसाहेब आपले आपणालाच फक्त ऐकू यावे तशा बोलल्या. राजांच्याकडे बघावे म्हणून त्यांनी नजर जोडली होती. पण डोळ्यांच्या पाणपडद्यातून त्यांना काही काही दिसत नव्हते. त्यांनी आवेगाने राजांना आपल्या मिठीत कवटाळून घेतले! शब्द जाया झाले. लटके पडले. मिठीत आपला अर्थ शोधीत विरघळून गेले. मूकपणे दोन्ही राजमने एकमेकांशी उदंड बोलून गेली!

संभाजीराजांना बरोबर घेऊन राजे महालाबाहेर पडले. गडावरच्या साऱ्या देवदेवतांची दर्शने झाली. शिवलिंगपूजा बांधण्यासाठी राजे आपल्या महाली निघून गेले.

गोमाजी, सिदोजी, निळोपंत अशा गडघसटीच्या असामींची भेट घेऊन संभाजीराजे आशीर्वादासाठी सोयराबाईंच्या महाली आले. सोयराबाई म्हणाल्या, "दिवस गरमीचे आहेत. चाल दूरची आहे. जपून असा, एवढी भेट झाली की स्वारी दख्खन-सुभा होणार आहे. तुम्ही मोठे सरदार होणार आहात! आम्हास चिंता वाटते – तुम्ही हे सारं पेलणार कसं?" म्हटले तर ते बोलणे सादिलवार होते. म्हटले तर काळीजमार होते!

"येतो आम्ही. आमच्या बाळीबाईंना जपा मासाहेब." सोयराबाईंच्या कन्या बाळीबाई यांच्याकडे बघत संभाजीराजे त्यांना म्हणाले. निरोप घेऊन बाहेर पडले.

पुतळाबाईंच्या महाली चार घास त्यांनी खाऊन घेतले. पुतळाबाईंनी त्यांच्या दंडात एक ताईत बांधला. प्रभाकरभट आणि केशवभट यांनी सदरजोत्यावर घंगाळात सोडलेले घटिका पात्र डुबतीला आले होते. प्रस्थानाचा मुहूर्त जवळ आला.

राजांनी निवडलेली रघुनाथपंत कोरडे, त्र्यंबकपंत डबीर, निराजीपंत, सर्जेराव जेधे, मदारी मेहतर, हिरोजी फर्जंद, दावलजी घाटगे, दत्ताजीपंत, राघो-मित्र, रामाजी माणकोजी अशी मंडळी हत्यारबंदीने बालेकिल्ल्याच्या सदरेवर एकवटली. मागे राहणारी मोरोपंत, आण्णाजी दत्तो, निळोपंत, येसाजी, तानाजी, आनंदराव अशी मंडळी निरोपाचे मुजरे द्यायला गोळा झाली.

राजांच्या महालात सदरेवर जाण्यासाठी राजे आणि संभाजीराजे सिद्ध झाले.

सखू, राणू, अंबा, बाळीबाई असा राजांचा कन्यावसा संगती घेऊन जिजाबाई राजांच्या महालात आल्या. साऱ्या कन्यावशाने राजांना नमस्कार केले.

येसूबाईंना घेऊन दाट कानकल्ल्यांचे थोराड पिलाजी महाली आले. राजांच्या आणि मासाहेबांच्या रोखाने हात करून त्यांनी येसूबाईंना नमस्कार करण्यासाठी खुणावले. येसूबाई पुढे झाल्या. मासाहेबांना आणि राजांना त्यांनी कुळअदबीने नमस्कार केले. त्यांना वर उठते करून घेत राजांनी त्यांची हनुवटी आपल्या रोखाने तर्जनीने वर घेतली. ते अदबशीर पोर-खानदान बघताना राजे आपण कसल्या पेचात आहोत हेही क्षणभर विसरून गेले. येसूबाईंच्या कानात बोलावे तसे अल्लादीने हळुवार म्हणाले, "सूनबाई, शृंगारपुरी परतण्याची घाई नका करू!"

"मासाहेब यांना ठेवून घ्या थोडे दिवस." राजांनी जिजाऊंच्याकडे बघत सांगितले. लाजलेल्या येसूबाईंनी आपली हनुवटी राजांच्या तर्जनीतून हळूच मागे घेतली आणि पटकन् मागे येत पिलाजींच्याजवळ उभ्या राहिल्या.

त्यांच्या खांद्यावर हळूच हात ठेवून, त्यांच्या कानाजवळ तोंड नेत पिलाजी त्यांना पुटपुटले, "इसारता कसं? आप्ल्या कुंकवाचं पाय न्हाई शिवलं तुम्ही?"

"हे काय आबा!" अशा अर्थाने आपले टपोरे डोळे आणखी टपोरे करून येसूबाईंनी पिलाजींच्याकडे फुरंगटून बघितले.

"जावा ऽ" दटावल्यासारख्या दबल्या आवाजात पिलाजी त्यांना म्हणाले.

नाइलाजाने येसूबाई पुढे झाल्या! कुणाकडेही न बघता संभाजीराजांच्या समोर आल्या. गडबडीने वाकून पायाखालच्या बिछायतीला हातांची बोटे लावून त्यांनी तीन वेळा नमस्कार केला.

संभाजीराजे जाणूनबुजून दुसरीकडे बघत होते! त्यांच्याकडे लक्ष नाही असे भासवीत होते. राजांनी संभाजीराजांची ती 'नजरचोरी' हेरली. त्यांच्या खांद्यावर एक हात चढवून दुसरा हात येूबाईंच्याकडे दाखवीत राजे म्हणाले, "निरोप घ्या. त्यांना सांगा – येतो आम्ही!"

संभाजीराजे गडबडले. राजांच्याकडे बघतच येसूबाईंना म्हणाले, "येतो आम्ही!"

राजांनी-संभाजीराजांनी जिजावाईंना मस्तक टेकून नमस्कार केले. येईल त्या प्रसंगाला तोंड द्यायला मनाने बांधील झालेल्या जिजाऊंनी त्यांच्या टोपांवर हात ठेवीत आशीर्वाद दिले, "औक्षवंत व्हा!"

संभाजीराजांनी पिलाजी आणि वडिलधाऱ्यांना नमस्कार केले. जिजाऊंच्या हातून दह्याच्या कवड्या उजव्या तळहाती घेऊन त्या ओठांआड केल्या.

अंतोजी गाडे एक सरपोसाने झाकलेले तबक घेऊन बाजूला उभा होता. त्याच्याकडे हात करून जिजाऊ राजांना म्हणाल्या, "ते तुमचं पूजेचं स्फटिक शिवलिंग आहे. तुमच्या बैठकीच्या पालखीत ते जवळ ठेवा."

"जी. मासाहेब, सांभाळून राहावं, हवेवरच्या खबरा येतील. त्यांनी कान हलके करू नयेत. येतो आम्ही." राजे संभाजीराजांना घेऊन महालाबाहेर पडले. त्यांच्या मागून जिजाऊ, पिलाजी, अंतोजी चालले. पायाच्या नडगीला कचणारा तोडा ढिला करण्यासाठी येसूबाई वाकल्या होत्या. त्यांचे कशाकडे लक्ष नव्हते.

सदरेकडे बाहेर पडणारे जोते आले. गडावरच्या देवमहालावरचा जगदंबेचा पोतराज हाती पाजळलेला पोत घेऊन राजांना सामोरा आला.

दोघा भुत्या-बालभुत्यांनी त्या पोतावरून आपले तळहात फिरविले. आईच्या कृपेचा उबारा मिळालेल्या आपल्या ओंजळी त्यांनी तोंडावरून फिरवून घेतल्या.

राजे-संभाजीराजे बालेकिल्ल्याच्या राबत्या सदरेवर आले. जगदंबेच्या पुजाऱ्याने पुढे होत हातातील परडीतील भंडाऱ्याने त्यांचे भरगच्च मळवट भरले. दोघा पितापुत्रांनी सदरदेवतेला गुडघे टेकून वंदन केले.

सदरचौकात जमा झालेला एक एक असामी पुढे होत, संगमरवरी मूर्तीसारख्या सदरजोत्यावर निश्चळ उभ्या राहिलेल्या जिजाऊसाहेबांच्या पायांवर डोके ठेवू लागला. त्यात असलेला मदारी मेहतरही आऊसाहेबांच्या समोर आला. क्षणभर घोटाळला. आणि झटकन् पुढे होत त्याने जिजाऊंच्या सोनरंगी चरणांवर सरळ आपले शिर ठेवले! जिजाऊंनी त्याला उठते केले.

राजे आणि संभाजीराजे राजगडाच्या बालेकिल्ल्याच्या सदरेसमोरील हमचौकातून बाहेर पडले. त्यांच्या मागून जमलेल्या मंडळींचा जमाव चालला.

बालेकिल्ल्याची तटबंदी ओलांडून मंडळी पद्मावती माचीवर बाहेर पडणाऱ्या भुयाराच्या तोंडाच्या रोखाने चालली. त्यातील राजे, संभाजीराजे वा कुणालाही माहीत नव्हते की सगळ्यांना बगल देऊन आलेली धाराऊ बालेकिल्ल्याच्या तटबंदीजवळ उभी होती! मिळतील तेवढे संभाजीराजे डोळ्यांत साठवून घेताना तिला आपले डोळे थिटे वाटत होते! क्षणात ते डोळेही भरून आले. त्यामुळे तिला दिसत होते तेही पाठमोरे संभाजीराजे दिसेनासे झाले!

संभाजीराजांच्यासह राजे शिवापट्टणात आले. त्यांना मुजरे घालीत प्रतापराव, बहिर्जी नाईक ही मंडळी सामोरी आली. तेजसिंह कछवाह आणि बक्षी बेग यांनी त्यांना तसलीम केली. राजांना आग्र्यापर्यंतचा मार्ग दाखविण्यासाठी बक्षी बेगला औरंगजेबाने दख्खनेत पाठविले होते.

कूच करण्याचा सारा सरंजाम प्रतापरावांनी शिवापट्टणात सिद्ध ठेवला होता. संजापदार झूल घातलेला, हौद्याचा निशाणी हत्ती, पागेतून सैसने निवडलेली, गरमीच्या मुलखाला टिकाव धरतील अशी जीन कसलेली घोडी, उंट, काबाडीचे बैल सारे सज्ज होते. राजे आणि संभाजीराजे यांच्यासाठी एक मोठी व एक लहानी पालखी ठाण केली होती. उंटाच्या पाठीवर वाकांच्या जाळ्यात थंड पाण्यासाठी चपटे गेळे चढविले होते. बगलेच्या हत्तिणींवर वाटेत लागणाऱ्या नद्या पार करण्यासाठी दोन छोटेखानी होड्या चढविल्या होत्या. अब्दागिरे, शिंगडे, निशाणबार्दार, ढालाईत, भालाईत, मुदपाके, वंजारी, वैदू, मशालजी सारी माणसे प्रतापरावांनी हुन्नरीची बघून निवडली होती.

साडेतीनशे धारकरी पगड्यांना पगड्या भिडवून हारीत उभे होते. त्यात पट्टेबाज, वीटेकरी, ढालाईत, तिरंदाज, बोथाटे असा हरप्रकारचे हत्यार चालविणारा इमानबंद मावळा होता. त्यांच्या भवत्याने विश्वास, कर्माजी, महादेव असे बहिर्जींचे खबरगीर आपल्या आणखी दहा खबरगिरांनिशी उभे होते.

राजांच्याबरोबर उत्तरेकडे जाणाऱ्या मंडळीने निवडक घोड्यांवर स्वार होऊन पालखीच्या भोवतीने वळे करून शिस्त धरली.

निरोप द्यायला आलेल्या मंडळींना राजांनी ऊरभेटी दिल्या.त्यात पिलाजी होते.राजांची भेट घेताना त्यांना कसलीतरी आठवण झाली.

"थोडं थांबावं राजं. याक ऱ्हाऊनच ग्येलं." म्हणत पिलाजींनी कमरेच्या शेल्याच्या शेवाची गाठ लगबगीने सोडली.तो अंगारा होता.

"ह्यो भावेसरीचा प्रसाद राजं."म्हणत पिलाजींनी आपली शृंगारपूरची कुलदेवता भावेश्वरीचा अंगारा राजांच्या आणि संभाजीराजांच्या कपाळी लावला.

राजगडाच्या पद्मावती माचीवर दिसणाऱ्या भगव्या जरीपटक्याच्या ठिपक्याकडे एकदा नजर देऊन राजे संभाजीराजांना म्हणाले, "चला शंभूराजे."

संभाजीराजे आपल्या पालखीत बसले. अंतोजीने शिवलिंगाचे तबक राजांच्या पालखीत ठेवले. कमरेच्या भवानी तलवारीच्या मुठीवर राजांनी डाव्या हाताची पकड भरली. उजव्या हाताच्या मुठीत पालखीचा झुबकेदार, भगवा राजगोंडा पकडला.

कूचाचा आखिरी चौघडा दुडदुडला. भोयांनी दोन्ही पालख्यांचे दांडे खांद्यावरच्या पटावर घेतले. बहिर्जींनी आपले खबरगिरांचे पथक एकदम बिन्नीला काढले. तो आपल्या रामोशी साथीदारांसह दोन मजला ठेवत दौडू लागला. पुढे जाऊन तो मुक्कामाचे तळ निवडून तिथे झेंडे रोवण्याचे काम करणार होता. त्या निशाणावर मुक्काम पडणार होते. निशाणी हत्तीवरच्या फीलवानाने हत्तीला अंकुशमार देऊन चाल दिली.

सर्जेराव जेधे, हिरोजी फर्जंद, मदारी मेहतर, दत्ताजी, रघुनाथपंत, निराजीपंत, त्र्यंबकपंत यांनी आपआपल्या जनावरांना हलक्या टाचा भरल्या.

चालला! दख्खनचा 'मावळा' काफल्यासह उत्तरेच्या 'शहेनशहाच्या' भेटीस चालला.आपला एकुलता एक तेजस्वी अंश फर्जंद संभाजीराजे यास बरोबर घेऊन! जोपर्यंत त्या पितापुत्राच्या कपाळी शिवगंधाचे पट्टे आणि भंडारा होता, छात्यांवर कवड्यांच्या माळा होत्या तोपर्यंत त्यांना अशाच वाटा चालाव्या लागणार होत्या.ध्यानीमनी नसलेल्या! त्यांच्या राजरक्ताची पुरेपूर कसोटी बघणाऱ्या!

मजल दरमजल करीत काफला चालला होता.दाट वनराईचा मावळमुलूख मागे पडू लागला. पहाटेचा थंडावा धरून वाटतोड सुरू झाली की दिवस तापायला लागताना बहिर्जींच्या पथकाने रोवलेल्या निशाणीच्या जागी येऊन मुक्कामाचे डेरे पडायचे.पुन्हा सांजगतीला चालणी सुरू व्हायची.

प्रवरेच्या काठचे नेवासे, गोदावरीतीराचे गंगापूर असे संतांच्या भूमीत मुक्कामाचे डेरे टाकीत नगर - औरंगाबादमार्गे काफला वेरूळजवळ आला. तेथे जवळच राजांच्या आजोबांनी - मालोजीरावांनी - भक्तिभावाने पूजलेला घृष्णेश्वर होता.बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक.

देवालयाच्या घुमटीसमोरच मुक्कामाचे डेरे पडले. राजांनी पुजाऱ्याकरवी घृष्णेश्वराला अभिषेक चढविला. दर्शन घेऊन राजे आणि संभाजीराजे घुमटीबाहेर आले. राजांच्या मनात, कधीही बघायला न मिळालेल्या आपल्या आजोबांच्या– मालोजीराजांच्या आठवणी दाटून आल्या होत्या.

एका विचित्र योगायोगाचे नवल त्यांना घुमटीबाहेर पडताना जाणवले. राजांना जसे आपले आजोबा मालोजीराजे बघण्याचे भाग्य कधी लाभले नव्हते तसेच संभाजीराजांना आपले आजोबा शहाजीराजे बघण्याचे भाग्य कधी मिळाले नव्हते!

घुमट सोडून राजे-संभाजीराजे आपल्या डेऱ्याकडे चालले. ते वेरूळचा देखणा मुलूख न्याहाळत होते. त्यांच्या पूर्वजांची ती जन्मभूमी होती. श्रमभूमी होती.

चालता चालता राजे थांबले. औरंगाबादच्या रोखाने कर्माजी हा त्यांचा खबरगीर घोडा फेकीत येताना त्यांना दिसला. राजांना बघून त्याने घोड्याची चौकी चाल वाढीला घातली. फेसाळलेले धपापते घोडे कायद्यांनी आखडून कर्माजी पायउतार झाला. एव्हाना राजे आपल्या डेऱ्यापर्यंत आले होते. त्यांच्याभोवती तेजसिंह कछवाह, बक्षी बेग, रघुनाथपंत, त्र्यंबकपंत अशी मंडळी उभी होती.

घामेजला कर्माजी पुढे आला. राजांना जोहार जोडून उभा राहिला.

"काय आहे कर्माजी ?" राजांनी त्याला जबानबंद बघून आपणच विचारले.

राजांच्या भोवतीच्या मंडळीकडे बघत कर्माजी म्हणाला, "तसं काई खासं न्हाईऽ! पर.."

राजांनी भोवती नजर फिरविली. सगळी मंडळी मुजरे, कुर्निस करून आपआपल्या डेऱ्याकडे चालू लागली. "बोल." राजांची उत्सुकता कर्माजीने चढाला घातली होती.

"म्हाराज, इदलशाहीच्या शर्जाखानानं मिरजा राजाची ससेहोलपट मांडलीया. तुळजापूर, नळदुर्ग, गुंजोटी असे तळ हलवीत रजपूत भीमेच्या खोऱ्यात निलंग्याला डेरे टाकून ठाण हाय. तिथं इज्यापूर सोडून नेताजी – नेताजी मिरजाच्या गोटाला मिळालं!"

कर्माजीची खबर ऐकून राजे सुन्न झाले. सोंगटीपटातील नरद भकत जावी तसे आता नेताजींचे आयुष्य भकत कुठे जाणार होते ते त्या घृष्णेश्वरालाच माहीत!

कर्माजीचे ते बोल ऐकताना मिर्झाच्या गोटात खुद्द मिर्झाला, "चटका लागल्याबिगार कळत न्हाई 'इंगळ' कनचा आन् 'कोळसा' कनचा" म्हणणारे ताणल्या छातीचे नेताजी संभाजीराजांना आठवले आणि एक विचित्र दृश्य त्यांच्या डोळ्यांसमोर उभे ठाकले– 'गिर्दीला रेलून मिर्झा राजे बैठकीवर बसले आहेत. त्यांच्या हातात हुक्क्याची काळीबाळी धूरनळी आहे! त्या हुक्क्याच्या पसरट रंजुकीत नेताजींना ठेवलेले आहे. निखाऱ्यासारखे दिसत आहेत ते. रजपूत जसजसा हुक्का चूस करीत आहे तसतसा रंजुकीतला निखारा निस्तेज होत काळवंडत चालला आहे. त्या अंगाराची राख राख होत आहे!!

रात्रीचा मुक्काम घृष्णेश्वराच्या कृपाछायेत झाला. पहाट फुटली. राजांनी आणि संभाजीराजांनी स्नान करून पेहराव चढविले. राजांची स्फटिक-शिवलिंगाची पूजा बांधून झाली. डेऱ्याबाहेर कोवळ्या उन्हाची नितळ सोनशिकल चढली होती. आपल्या मंडळींना दर्शन देण्यासाठी राजे आणि संभाजीराजे डेऱ्याबाहेर आले.

त्यांची इंतजारी करीत डेऱ्याबाहेर तेजसिंह कछवाह आणि बक्षी बेग उभे होते.त्यांनी राजांना आणि संभाजीराजांना तसलीम-कुर्निस केले. बक्षी बेगने अदबीने रिवाजाचे विचारले, " निंद कैसी रही राजासाब ? "

" हां. बिलकुल ठीक." राजांनी उत्तर दिले.

" राजासाब खुशी फर्मायेंगे तो एक अर्जी है." तेजसिंह कछवाह राजांना म्हणाला.

" हां. सुनाओ राणा." राजांनी त्याच्या केशरी साफ्याकडे बघत उत्तर दिले.

पूर्वेकडे दाटलेल्या गर्द वनराईकडे हात उठवून कछवाह म्हणाला. " उस पहाडीमें पत्थरोंकी बडी अच्छी खुदाई है. बहोत बढिया. राजासाब रजामंदी फर्माते हैं तो थोडी राह तेढी करे. एक दफा उसपर आँख डाले."

" अच्छा ! जरूर. हमें खुशी होगी." राजे त्या वनराईकडे बघत म्हणाले.

बक्षी बेग आणि कछवाह यांनी आठ-दहा घोडी निवडली. दोन माहितगार मशालजी तयार केले. राजे आणि संभाजीराजे यांनी अबलख घोड्यांवर मांड जमविली. सोबतीला बहिर्जी फर्जंद आणि मदारी मेहतर, सर्जेराव जेधे अशी मंडळी घेतली.

वनराईचा टप्पा मागे पडला आणि समोर दक्षिणोत्तर पसरलेला पहाडी डोंगर दिसू लागला. घोडी ठाण झाली. मशालजींनी चकमकीवर ठिणग्या पाडून वाळल्या गवताची आगटी केली. त्यावर करंजेलाच्या मशाली पेटवून घेतल्या.

आडव्या येणाऱ्या वालींच्या कमानी हातांनी बाजूला सारीत कछवाह आणि बेग आघाडीला झाले. राजे आणि संभाजीराजे टोपांना लागू बघणाऱ्या वेली चुकवीत वाकून त्यांच्या मागे चालले. समोर एक गुंफा आली. मशालजी त्या गुंफेत उतरले. मागून सारी मंडळी आत उतरली. कुठल्यातरी अज्ञात हातांनी मनात उभ्या ठाकल्या तशा असंख्य यक्ष, किन्नर, देव-देवता यांच्या मूर्ती कातळात साकार उभ्या केल्या होत्या. त्यांच्या छिन्नीचा एकही ठोका गफलतीनेसुद्धा चुकला नव्हता !

राजांच्यासह सारे अवाक् होऊन पत्थरांचे ते अत्यंत शांत पण अत्यंत बोलके, देखणे रूप जखडल्या नजरांनी बघत होते. साऱ्यांना काळाचे भान उरले नव्हते. आपण धरतीवर आहोत असे कुणालाच वाटत नव्हते. मानवाच्या कल्पनेतील साक्षात स्वर्ग तिथे अवतरला होता !

गुंफामागून गुंफा बघत राजे आणि संभाजीराजे 'कैलास लेणे' ह्या सोळाव्या गुंफेत आले. या गुंफेत किती शिलागिरांच्या पिढ्यांनी आपल्या कलेच्या प्रतिभेची मुक्त उधळण

केली होती अंबा जाणे ! दगडाचा एक टकासुद्धा त्यांनी आपल्या छिन्नीने बोलता करायचा बाकी ठेवला नव्हता. सारे विश्वसौंदर्य उभे केल्यानंतर ब्रह्म्याने त्याला जाता जाता लावलेली 'तीट' होती ती कैलासलेणे ! दृष्ट लागावी अशीच.

आपले सूर्यपेट डोळे जोडून राजे आणि संभाजीराजे ती दगडी शिल्पे पाहत चालले होते. आणि ती दगडी शिल्पे, आपले युगायुगांचे अर्धमिटले लांबट डोळे उघडून, जगदंबेने रेखलेली राजे आणि संभाजीराजे ही हर भोसलाई रक्तशिल्पे बघत होती ! किन्नराची एक मूर्ती बघण्यात, पुढे गेलेले राजे आणि हिरोजी आपणाला हरवून गेले होते. निश्चळ उभे होते – मागून त्यांच्या रोखाने येताना संभाजीराजांना पटकन जाणवून गेले – " हिरोजी आणि आबासाहेब यांच्या चेहऱ्यामोहऱ्यात कळणार नाही एवढं बेमालूम सारखेपण आहे ! "

सगळे शिल्पमूर्तींमधून ओसंडणाऱ्या जिवंत भावभावनांच्या कारंज्यात न्हात चालले होते. त्यांना शिल्पे नीट दिसावीत म्हणून मशालजींनी मशाली उंच धरल्या होत्या.

" महाराजसाहेब ऽ, ते बघा." एकाएकी संभाजीराजे गुंफेच्या छताकडे हात उठवून मान वर करीत म्हणाले.

भोवतीच्या नजरखेच मूर्ती बघणारे राजे थांबले. त्यांनी छताच्या रोखाने मान वर उठविली. छताकडे बघताना " जगदंब, जगदंब " म्हणत राजांनी छातीवरच्या माळेला हात भिडविला. मती गुंग करून टाकणारे छत होते ! एका सलग दगडाच्या त्या छताजवळ उलटे टांगून घेऊन शिलागिरांनी त्यावर असंख्य भावमुद्रा कोरल्या होत्या !!

" हम निहाल हो गये राणा ! " तेजसिंहाकडे न बघताच राजे म्हणाले.

कितीतरी वेळ राजे आणि संभाजीराजे छतशिल्प बघत होते.

संभाजीराजांच्या खांद्यावर हात ठेवीत राजांनी विचारले, " ही शिलागारी बघताना तुम्हांस काय वाटतं ? "

संभाजीराजांच्या छातीत, महाबळेश्वरावरचा निसर्ग बघताना माजली होती तसलीच खळबळ ही शिल्पे बघताना उठली होती. ते राजांच्या कपाळीच्या शिवगंधाकडे बघत म्हणाले, " ही 'दगडी-गीते' आहेत आबासाहेब. आम्हास ती रचणाऱ्या माणसांचा अंदाज येत नाही ! वाटतंय हे दगड आमच्याशी गाताहेत ! "

दगडात प्राण संचारलेल्या त्या गुंफेच्या आवारात फिरताना एका उडत्या पक्ष्याच्या पवित्र्यात असलेल्या यक्षाची एक मूर्ती बघताना राजांना नेताजींची आठवण आली !

विचाराचा एक पक्षी फडफडत त्यांच्या मनाच्या तटबंदीवरून उडाला, " इथं दगडात प्राण संचारले आहेत आणि – आणि आम्ही प्राण फुंकलेल्या जिवंत माणसाचा दगड झाला आहे ! श्रींची करणी अगम्य आहे ! "

राजे संभाजीराजांच्यासह गुंफेच्या गाभाऱ्याजवळ आले. गाभाऱ्यात कैलासपर्वतावर श्रीशंकर आरूढ झाले आहेत. त्यांच्या मांडीवर महादेवी पार्वती बसली आहे. असे देखणे

शिल्प होते. तो उभा कैलासच आपल्या आईसाठी उचलून नेण्याच्या खटपटीत असलेल्या रावणाच्या मुखावर कष्टी भाव सुंदर रीतीने उमटविलेले होते.

ते 'शिवरूप' बघताच राजांनी आणि संभाजीराजांनी हात जोडले. डोळे मिटले. थोड्या वेळाने डोळे उघडून ते शिवशिल्प बघू लागले. नकळतच राजांची नजर महादेवी पार्वतीच्या 'सावळ्या' शिल्पावर जखडली गेली आणि त्यांना पटकन जाणवून गेले की त्या शिल्पात 'शिवपुत्र' गणपतीची योजना कारागिरांनी केली नव्हती !!

संभाजीराजे मात्र, कैलास उठविणाच्या खटपटीत असलेल्या रावणाच्या मुद्रेवरचे कष्टी भाव निरखून बघत होते! त्यांच्या विचारांची लय वाढत होती — "कसा असेल रावण ? अफजलखानासारखा ? मिर्झा राजासारखा ? छे ! ऽऽ छे ! ऽऽ मग ? ... कसाही का असेना त्याला 'शिवाचा कैलास' काही उचलता आला नव्हता !!"

आवाराबाहेर पडता पडता संभाजीराजांना एका स्तंभावर एकमेकांच्या मिठीत विसावलेल्या एका प्रणयमग्न युगुलाचे शिल्प दिसले! त्यातले भाव त्यांना नीट आकळेनात! त्यातील स्त्रीच्या पायांत तोड्यासारखा अलंकार बघताना मात्र त्यांना आपल्या महालातील मंचकावर बसलेली एक आकृती आठवली आणि झटकन् ते त्या खांबासमोरून पुढे सरकले!

त्या वेळी त्यांना कल्पना नव्हती, पण राजगड उतरून एक मेणा शृंगारपूरच्या वाटेला लागला होता. त्याच्या बगलेने पिलाजी शिर्के धिम्या चालीच्या घोड्यावर बसून चालले होते. त्या मेण्यात येसूबाई होत्या. जिजाऊसाहेबांचा आशीर्वाद घेऊन त्या माहेरी शृंगारपुरी चालल्या होत्या.

बुऱ्हाणपूर, इंदौर, गवालेर अशी शहरे मागे टाकीत, गिरणा, तापी, नर्मदा, चंबळा ह्या नद्या पार करीत काफला यमुनेजवळ आला. आग्र्याची गिर्दनवाई नजर टप्प्यात आली. मशिदींचे सफेद घुमट, ताजमहालाचे आरसपानी मनोरे दिसू लागले.

आग्रा एका मजलेवर ठेवून काफला थांबला. बक्षी बेग आणि तेजसिंह कछवाह राजांना तसलीम करून आग्र्याच्या रोखाने, मिर्झा राजाचा वडील कुँवर रामसिंग ह्याला वर्दी द्यायला घोडे फेकीत निघून गेले.

मिर्झाने रामसिंगाला वारंवार पत्रे पाठवून राजांच्या सरबराईच्या बारीक-सारीक सूचना दिल्या होत्या. 'त्यांच्या केसालाही धक्का न लागेल' अशी कसम आपण घेतल्याचे मिर्झाने रामसिंगाला पुनःपुन्हा कळविले होते. पण रामसिंग राजांच्या स्वागतास येऊ शकला नाही.

तेजसिंह आणि बक्षी आणखी चार-सहा माणसांनिशी राजांच्या तळाकडे येताना दिसू लागले. त्यांतील रामसिंग कुठला ? याचा राजे अंदाज घेऊ लागले.

येणारे घोडापथक तळापासून थोड्या अंतरावर थांबले. राजपुती पद्धतीचा साफा

बांधलेला, खांद्यावर उपरणे टाकलेला, कपाळी टिळा असलेला एक मध्यमवयीन माणूस राजांच्या आणि संभाजीराजांच्या समोर आला. गर्दन झुकवून त्याने कुर्निसात केला. "कुँवरजीके तरफसे हम बडी खुशीसे मेहमान साहबानकी आगवानी करते हैं!" तो अदबीने म्हणाला.

"आपकी तारीफ ?" त्याचा कुर्निसात स्वीकारीत भुवई चढवून राजांनी त्याला विचारले. राजे गोंधळून गेले होते. आलेल्या असामीत रामसिंग नव्हता !

"चाकरको गिरधरलाल कहते हैं. कुँवरजीके हवेलीपर मुन्शीगिरी करता हूँ!" गिरधरलाल राजांच्या भगव्या मोजड्यांवर नजर जोडून उत्तरला.

मुन्शी! राजांच्या काळजात कसलीतरी कळ उठली. एक मामुली कारकून त्यांच्या स्वागतासाठी समोर उभा होता!

"कुँवर रामसिंग किधर है ?" राजांचा करडा आवाज साऱ्यांनाच जाणवला.

"गुस्ताखी माफ हो मालिक. कुँवरजी किलेमें आला हजरतके महेलपर पेहेरे लगा रहे हैं! वहाँसे नहीं छूट पायेंगे! आप चलिये!"

राजांनी सर्वांना जाणवेल असा निःश्वास सोडला.

औरंगजेबाच्या पन्नासाव्या सालगिराचा दिवस आग्रा शहरावर रोषण झाला. आपल्य उजळलेल्या मनोऱ्यांचे डोळे लाल किल्ल्याच्या रोखाने ताजमहालाने जोडले. सालगिर बघायला!!

मुलुखचंदाच्या सराईत राजांनी आणि संभाजीराजांनी स्नान करून खासे पेहराव घातले. राजे आपल्या डेऱ्यात स्फटिक शिवलिंगाच्या पूजेला बसले.

तिकडे लाल किल्ल्यात औरंगजेबाने आपल्या महालात 'सब्रकी नमाज' पढून घेतली होती. दिवस अर्धा कासरा वर आला तरी तो मक्केकडे तोंड करून कुराणाचे कलमे पढतच होता. संभाजीराजे सराईतून दिसणारे यमुनेचे पात्र बघत होते.

औरंगजेबाच्या महालाबाहेर रामसिंगाचा पहारा चालूच होता.

राजांचा सरंजाम सराईत सिद्ध झाला. अंगी जरीबुंदक्याचे सफेद झगमगीत जामे, डोक्यांवर लखलखीत केशरी टोप, त्याखाली द्विदली, रेखीव शिवगंध, गळ्यात कंठे-भवानीच्या माळा, कानांत सोनचौकडे असा वेष परिधान केलेले राजे-संभाजीराजे सिद्ध ठेवलेल्या सजल्या घोड्यांजवळ उभे होते. त्यांच्या भोवतीने त्र्यंबकपंत डबीर, रघुनाथपंत कोरडे, सर्जेराव जेधे, हिरोजी फर्जंद, मदारी मेहतर, राघो मित्र, दावलजी घाटगे अशी मंडळी ठेवणीचे आसवाब चढवून हारीने उभी होती.

राजे वाट बघत होते रामसिंगाची. तोच त्यांना दरबारी नेऊन पेश करणार होता. पण अद्याप रामसिंगाचा पत्ता नव्हता! त्याची प्रत्यक्ष भेट अद्याप झालीच नव्हती.

शेवटी मुन्शी गिरधरलाल सराईत आला. चेहऱ्यावरचे ओशाळेपण लपवीत राजांना

तसलीम करून तो म्हणाला, “ अभी तक राणाजी नहीं आये किलेपरसे ’ आप हवेलीपर चलिये राजासाब, मैने हारकारा भेजा है किलेपर. राणाजी आतेही होगे.” त्या रजपुती कारकुनाला समोरच्या ‘ दख्खनी मावळ्याची ’ ‘ किरत ’ ऐकून चांगलीच माहीत होती. तीन वेळा तो कमरेत वाकत होता. खांद्यावरचे उपरणे ठाकठीक करीत ‘ जी ’ म्हणत होता.

राजांच्या कपाळीचे शिवगंध आठ्यांत आक्रसून उठले. पण ते काही बोलले नाहीत. गिरधरलालच्या सोबतीने राजे आणि संभाजीराजे सरंजामासह आग्ऱ्यातील मिर्झा राजाच्या हवेलीजवळ आले. रजपुती माटाच्या गच्चीदार अशा त्या हवेलीसमोर राजांच्या मुक्कामाची सारी तयारी रामसिंगाने करवून घेतली होती. प्रशस्त आवारात लहान-मोठ्या राहुट्या, सायवान डेरे-शामियाने उठविले होते. राजांचा सरंजाम त्या आवारात ठाण झाला.

दिवस दीड कासरा वर आला. डाव्या हातात धूपदाने आणि उजव्या हातात मोरपिसाचे जुडगे घेतलेले फकिरांचे तांडे आग्ऱ्याच्या मोहल्ल्या-मोहल्ल्यांतून खैरात गोळा करून लाल किल्ल्याच्या तटाजवळ गोळा झाले. ठिकठिकाणी डेरे टाकलेले औरंगजेबाचे सरदार, अमीर, उमराव, सुभेदार वाजत गाजत सरंजामात लाल किल्ला जवळ करू लागले.

अस्वस्थ झालेले राजे संभाजीराजांना घेऊन शामियान्याच्या दारात रामसिंगाची वाट बघत उभे होते. त्या दोघांनाही कल्पना नव्हती की, समोरच्या मिर्झा राजाच्या हवेलीतून गच्चीला लागून असलेल्या दालनात चिकाच्या पडद्याआड मिर्झाचा आणि रामसिंगाचा ‘ जनाना ’ उभा होता. त्या जनान्यातील बायका मेहंदी रंगल्या बोटांनी एकमेकींना खुणा करून राजे आणि संभाजीराजे दाखवीत होत्या ! नाजूक कलकलाट करीत होत्या – “ शेरे दख्खन ‘ सेवा ’ और उसका बच्चा ‘ संभा ’ ! ”

दिवसाने दोन कासऱ्यांचा पल्ला मागे टाकला. लाल किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यावरचा नौबत-नगारा एकसारखा दुडदुडू लागला. सरदारामागून सरदार लाल किल्ल्यात प्रवेशू लागले. संगमरवरी खांबाचा ‘ दिवाण-इ-आम ’ चा देखणा, आईनेबंद दरबार तमाम झाला. कनोजी धूपाची वळी दरबारात उठू लागली.

जरीबुंदीचा हिरवाशार जामा अंगी घातलेला, डोक्यावर पिसांच्या तुऱ्याचा बाकदार किमॉश घेतलेला औरंगजेब आसवाबखान्यातून बाहेर पडला. त्याच्या कदमबरहुकूम फरास रुजाम्यांच्या तलम पायघड्या अंथरत चालले.

अल्काबांच्या खड्या ललकाऱ्या उठल्या – “ बा अदब ऽ बा मुलाहिजा ऽ तहे दिल होशीयाँ ऽऽ अबुल मुजफ्फर मुईउद्दीन मुहम्मद, औरंगजेब, बहादूर, अलमगीर बादशहा गाझी ऽ ऽ मालिके तख्ते ताऊस ऽ ऽ शहेनशाहे हिंदोस्ताँ ऽ ऽ तशरीफ ला रहे हैं ऽ ऽ होशीयाँ ऽ ! ” त्या ललकाऱ्या ऐकताना तोंडात तोबरे भरल्यासारखे रामसिंगाचे रजपुती मन घुसमटून गेले होते.

औरंगजेबाने ‘ दिवाण-इ-आमच्या ’ दरबारात कदम टाकताच, वाऱ्याच्या एकाच झोताबरोबर गवताळू कुरणाचा पट्टाचपट्टा लपकन लवावा तसा दरबारीयांचा जमाव ताजीम देण्यासाठी कमरेत लवला.

रामसिंगाने आपल्या हवेलीकडे स्वार धाडले. त्यांनी मुन्शी गिरधरलालसाठी निरोप आणला – “ दर्बार शुरू हुआ। राजासाबको ले आना। मैं आ रहा हूँ। ”

आता गिरधरवर नापसंदी दाखवायलाही राजांना वेळ नव्हता. राजे-संभाजीराजे शामियान्याबाहेर आले. राजांनी आपल्या उजव्या हाताची जोड देऊन संभाजीराजांना घोडाबैठक दिली. खुद्द राजांनी एका सजल्या कुम्मैत घोड्यावर मांड जमविली.

कुँवरसिंग, तेजसिंह, गिरधर, बक्षी बेग यांच्या सोबतीने राजे लाल किल्ल्याकडे चालले. त्यांच्यामागून त्यांचा सरंजाम चालला. राजांच्या आणि संभाजीराजांच्या तर्फेने अब्दागिरे अब्दागिऱ्या ढाळत होते. मार्गावर भेटणाऱ्या फकिरांना राजे आणि संभाजीराजे मुठींनी खैरात देत होते. आता आग्ऱ्याच्या हमरस्त्यावर दुसरा कुठलाच सरदार दरकदार जाणारा-येणारा नसल्यामुळे “ दख्खनी सेवा आ रहा है ! ” ही खबर भिंगरीसारखी गच्ची-हवेल्यांत पसरली. सगळे मर्दानी लाल किल्ल्यात रुजू झाल्यामुळे आग्ऱ्यातील बायका-बच्चे-बुढे गच्च्यांत-झरोक्यांत गोळा झाले होते.

औरंगजेबाने दुर्लक्षिले होते, रामसिंगाला इच्छा असून जमले नव्हते, पण इंतजाम ठेवून होणार नाही असे त्या ‘ थोरल्या आणि धाकल्या ’ मावळ्यांचे इतमामात आग्रा आणि शहाजहानची रियाया यांच्याकडून स्वागत होत होते !

तसा राजांचा सरंजाम ‘ बघण्यासारखा ’ मोठा मुळीच नव्हता. उलट तो नजरेत न येईल एवढा ‘ छोटा ’ होता. पण ‘ सेवा ’ या दोन अक्षरी नावाला आता असल्या सरंजामाची गरज राहिली नव्हती ! उभी झाडे फटाफट फोडत जाणारा ‘ वणवा ’ आणि उभ्या हिंदोस्ताँची दौड घेणारा मावळी ‘ रानवारा ’ हाच राजांचा ‘ सरंजाम ’ झाला होता !

‘ दहारआरा ’ बागेच्या रोखाने राजे-संभाजीराजे गिरधरसह चालले होते. ते ज्या ज्या हवेलीसमोरून पुढे सरकत होते त्या त्या हवेलीतील गच्ची-झरोक्यात काळ्या बुरख्यांच्या झडी, मेहंदीच्या गोऱ्या हातांनी उचलल्या जात होत्या ! त्या मागे टाकण्यासाठी वर चढलेले काही हात क्षणभरच तसेच थांबत होते ! “ या अल्ला ऽ, सुरूर ऽ, सूरते मर्द ऽ ! ” असे जनानी नाजूक चीत्कार बुरख्यांतून उठत होते !

राजे-संभाजीराजे आग्ऱ्याच्या रस्त्यांत खैरात वाटत चालले होते आणि लाल किल्ल्यात ‘ दिवाण-इ-आम ’ च्या दरबारात औरंगजेब नजराण्याची तबके स्वीकारीत होता ! एकाएकी राजांच्या सरंजामाच्या रस्त्याला येऊन मिळणाऱ्या आडवाटेने दोन रजपुती घोडाइतांनी आपली घोडी पुढे काढली. त्यांच्या पिकल्या दाढ्यांतून घामाच्या धारा उतरल्या होत्या. ते होते रामसिंगाचे चाकर डुंगरमल चौधरी आणि रामदास. राजांना आदब-कुर्निस करून त्यांनी आपली घोडी थेट गिरधरलालच्या घोड्याला भिडविली.

दबक्या आवाजात ते गिरधरशी राजपुती भाषेत काहीतरी बोलत होते. " राणाजी ... दर्बार ... रास्ता ... नूरगंज ... ' असे शब्द ऐकू येत होते.

" क्या है मुन्शी ? " राजांनी गिरधरलालचा अंदाज घेत विचारले.

" कुछ नही सरकार। राणाजी राह भूल गये। दूसरे रास्तेसे सिधे हवेलीपर पहुँच गये। उनका हुक्म है – आपको नूरगंज बगिचेके पास ले आनेका। " गिरधर उत्तरला.

किल्ल्यावरून मुखलिसखानासह निघालेल्या रामसिंगांची वाट चुकली होती ! तो एका वेगळ्याच वाटेने राजांना भेटण्यासाठी आपल्या हवेलीजवळ जाऊन पोचला होता.

दक्षिणेत भीमेच्या खोऱ्यात मंजिऱ्याला मुक्काम टाकून बसलेल्या मिर्झा राजाला आणि लाल किल्ल्यात ' तख्तेताऊस ' वर बसलेल्या औरंगजेबाला माहीत नव्हते की, कधी कधी अशा अनेकांच्या वाटा चुकतात ! मग कुणाच्या तरी चुकलेल्या वाटांबरोबर कुणाच्या तरी युगायुगांच्या वाटा बेमालूम जुळून जातात !!

गिरधर आणि कुँवरसिंग यांनी राजांचा सरंजाम नूरगंजबागेच्या रोखाने वळविला. सरंजामाने त्या वाटेवरची ' फिरोझबाग ' मागे टाकली आणि तिकडे लाल किल्ल्यात ' दिवाण-इ-आम ' चा दरबार बरखास्त झाला !

राजे-संभाजीराजे नूरगंज बागेजवळ येऊन थांबले. राजांना ' नजर ' म्हणून सात-आठ झूलबाज हत्तींचा तांडा बरोबर घेऊन रामसिंग मुखलिसखानासह घाईगर्दीने नूरगंज बागेजवळ आला.

कुँवरसिंगाने पुढे होत राजांचा रामसिंगाशी परिचय करून दिला. घोड्यावर मांड घेतलेल्या, गोऱ्यापान रामसिंगाचे कपाळ घामेजून आले होते. राजांचे तरतरीत बाके नाक बघताना त्या घामाचे टपोरे थेंब त्याच्या कपाळावर टपकन जमून आले. खांद्यावरच्या उपरण्याने त्याने अगोदर कपाळ टिपले. तेवढे करताना झालेल्या सगळ्या गफलती निवळून जातील अशी अदब राजांना कशी द्यावी याचा विचार करून घेतला.

" कायदे खेचून रामसिंगाने घेतल्या मांडेनिशी कदमबाज चालीत आपले जनावर थेट राजांच्या घोड्याजवळ आणले.

" राजासाब ऽ " एवढेच तो कसेबसे म्हणाला आणि त्याने ऊरभेट देण्यासाठी हात पसरले. राजांनी उभ्या घोड्यावरून रामसिंगाची ऊरभेट घेतली. आपल्या हयातीत राजांनी अशी भेट कधी कुणाला दिली नव्हती. संभाजीराजांना ती भेट जाणवली. त्यांनी मनोमन ठरवून टाकले, " रामसिंग ही इतमामाची असामी आहे."

रामसिंगाने आपला घोडा संभाजीराजांच्या घोड्याजवळ घेतला. संभाजीराजांच्या खांदेपट्टीवर हात चढवीत तो म्हणाला, " कुँवर संभूराजा ! "

सगळे हत्ती राजांच्या तळाच्या वाटेला लावून रामसिंग निघाला. दोन मावळे सरदार औरंगजेबाच्या दरबारी पेश करायला.

लाल किल्ल्याचा मुख्य दरवाजा आला. बराच वेळ निसूर बसलेले नौबतवाले राजे,

रामसिंग आणि संभाजीराजे यांच्याकडे चमत्कारिक नजरेने बघत आगवानीची नौबत झडवू लागले. या वेळी लाल किल्ल्यात औरंगजेबाचा ' दिवाण-इ-आम ' हा दुसरा दरबारही बरखास्त झाला होता !

राजे आणि संभाजीराजे गेरूच्या रंगाचा लाल किल्ला निरखत चालले. त्यांची घोडी रामसिंगाच्या मोतद्दारांनी आपल्या ताब्यात घेतली. नजराण्याची तबके घेतलेले मावळे पाठीशी घेऊन राजे संभाजीराजांच्यासह घुसलखान्याच्या दरबाराच्या रोखाने चालले. या वेळी औरंगजेब घुसलखान्याला लागून असलेल्या पेशाबगारात खापराच्या तुकड्याने ' इस्तिजा ' करीत होता !

' इस्तिजा ' नंतर हातपाय धुऊन औरंगजेबाने ' वजू ' केली. वाळामिश्रित थंडगार पाणी पिऊन तो घुसलखान्याच्या कोटबंद आसनाच्या आवारात प्रवेशला.

घुसलखान्याच्या प्रवेशद्वारात येताच रामसिंग थांबला. कमरेत वाकून त्याने राजांना विनंती केली – " जूते यही पर उतार दीजिये राजासाब। "

कपाळाला आठ्या घालीत राजांनी आपल्या भगव्या मोजड्या संगमरवरी फरसबंदीवर उतरल्या. त्यांच्या शेजारी संभाजीराजांनी आपल्या मोजड्या उतरून ठेवल्या.

रामसिंगाने आत वजीर जाफरखानाला वर्दी दिली.

जाफरखान सात-आठ हात उंचीच्या कोटबंद आवारात आसनावर गिर्दीला रेलून बसलेल्या औरंगजेबासमोर पेश झाला. वाकून छातीवर आडवा हात घेत त्याने वर्दी औरंगजेबाच्या कानी घातली, " आला हजरत ऽ, दख्खनसे ' सेवा ' भोसला फर्जंदके साथ आया है ! रामसिंग पेश आनेकी इजाजत माँगता है ! "

ती वर्दी ऐकताना गिर्दीला रेललेला औरंगजेब पुढे झाला. त्याच्या हाताच्या बोटाबरोबर फिरणारे माळेचे मणी क्षणभर थांबले. काही क्षण तसेच गेले.

झुकलेल्या वजीर जाफरखानाच्या पाठीवर अत्यंत शांत शब्दांची खिल्लत औरंगजेबाने फेकली. " इ जा ज त ऽ ! " एकदा घुसलखान्याच्या दरवाज्याला नजर देऊन औरंगजेब पुन्हा गिर्दीला रेलला, मणी फिरू लागले !

रामसिंगाला सामने ठेवून राजे दरबारात जायला निघाले. पुन्हा रामसिंग थांबला. आपल्या कमरेच्या शेल्यात खुपसलेला, मोगली नकसकामाचा, विणलेला दरबारी रुमाल त्याने अदबीने वाकत तो राजांच्या हाती देत म्हटले, " लीजिये."

भुवईला कमानबाक चढवीत राजांनी त्या रुमालाकडे बघत रामसिंगाला विचारले, " ये क्या है ? "

" एक दर्बारी रिवाज है राजासाब. नजराना पेश करते वक्त आला हजरतने आपसे कुछ पूछा तो यह रुमाल मुँहपर रखकर जबाब देना राजासाब ! ये रिवाज है ! "

राजे काहीच बोलले नाहीत. तो रुमाल त्यांनी उजव्या मुठीत आवळला.

रामसिंगासह राजे आणि संभाजीराजे घुसलखान्यात प्रवेशले. त्या दरबारात

शायिस्तेखान, बहादूरखान, अमीनखान, शेख मीर, झुल्फिकारखान, नजाबतखान, जसवंतसिंग असे औरंगजेबाचे कैक नेक बंदे दाटले होते.

उभ्या दरबारात, हिरवे, निळे, जांभळे सगळ्या रंगांचे किमॉश, जामे होते. फक्त राजांच्या आणि संभाजीराजांच्या मस्तकी केशरी टोप होते. ते उठून दिसू लागले.

रामसिंगाच्या सोबतीने आसनाजवळ जात राजांनी 'नजर' म्हणून एक हजार सोनमोहरा, दोन हजार रुपये व 'निसार' म्हणून पाच हजार रुपयांची तबके औरंगजेबाला पेश केली. दोघा पितापुत्रांनी शाही रिवाजाचे मुजरे केले.

त्या संपूर्ण दरबारात सर्वांत लहान असे नऊ वर्षे उमरीचे एकटे संभाजीराजेच होते.

'ज्यांची करणी आम दुनियेला दिसते.' असे आबासाहेब ज्याच्याबद्दल नेहमी म्हणत होते तो औरंगजेब संभाजीराजे निरखून बघत होते.

संगमरवरी कोटबंदाआड औरंगजेबाची सारे शरीर झाकून गेले होते. दरबाराला त्याचे फक्त गळ्यापासूनचे वरचे शिर दिसू शकत होते. फक्त शिर! जे सलामत ठेवण्यासाठी अनेकांची शिरे त्याने धडावेगळी करविली होती. ज्यात असलेला मेंदू चलाखीने चालवून, कुराणाची ढाल समोर धरीत त्याने आपली पीळबाज राजहवस पुरी करून घेतली होती!

संभाजीराजांना वाटले औरंगजेब काहीतरी बोलेल. पण तो काहीच बोलला नाही!

बक्षी आसदखानाने पुढे होत राजे आणि संभाजीराजे यांच्या हातात दरबारी मानाचे पानविडे दिले. रामसिंग मागल्या पावली जाऊन आपल्या अडीच हजारी सरदारांच्या रांगेत उभा राहिला होता. बक्षी आसदखानाने राजांना आणि संभाजीराजांना आणून पंचहजारी सरदारांच्या रांगेत उभे केले. ही रांग आसनापासून कितीतरी मागे होती. खिल्लत वाटपाचे काम सुरू झाले. औरंगजेबाचे शाहजादे, जाफरखान आणि जसवंतसिंग यांना खिल्लती देण्यात आल्या.

खिल्लत घेतलेला जसवंतसिंग मागच्या हटत्या कदमांनी मागे येत राजांच्या समोर उभा राहिला. आता शाही दरबार बरखास्त होणार होता!

"उन्हातान्हातून शेकडो मजला मागे टाकीत आम्ही येथवर का आलो? हा दरबार आहे की मजाक? हाच आमचा इतमाम?" पायाच्या नखापासून-मस्तकीच्या केसापर्यंत राजांच्या उभ्या अंगात रक्ताची एक अजब वीजलाट सरकून गेली!

"स्वागतासाठी मुन्शी येतो! आसनावर बसलेला अकडबाज औरंगजेब एका अक्षराने वाजपूस करीत नाही! ज्यांच्या पाठीवर आमच्या मावळ्यांनी घोडे फेकले त्यांच्या खांद्यावर खिल्लती चढतात!" अपमानाच्या कळा असह्य झालेल्या राजांची छाती वरखाली धपधपू लागली. तिला धरून असलेली कवड्यांची माळ लपलपू लागली! कपाळावरच्या उडत्या, उभ्या शिरेबरोबर शिवगंधाचे पट्टे खालीवर धडधडू लागले! पोत-पोत झाला राजांच्या उभ्या अंगाचा! थरथरता-उसळता! जाळता!

घुसलखान्याच्या संगमरवरी भिंतीवर रोमांच उठतील असे खणखणीत बोल राजांच्या तोंडातून बाहेर पडले– "राऽऽमऽसिंऽऽघ!" दरबारी शांततेला ते जाळीत गेले. राजांची उजवी भुवई घोड्याच्या नालेसारखी बाक घेत वर चढली होती.

मान सरळ मागे करून रामसिंगाच्या रांगेवर डोळे चालवीत राजे पुन्हा गर्जले, "राऽऽमऽसिंऽऽघ!"

हाती धरलेला आबासाहेबांचा हात थरथरत एकदम गरम झाला आहे हे संभाजीराजांना जाणवले. त्या बदलत्या स्पर्शाबरोबर न कळणारी सरसरी त्यांच्या अंगी सरकून गेली. ते दोन्ही हात थरथरू लागले. आडवे येणारे सरदार कसेतरी चुकवीत भेदरलेला रामसिंग राजांच्याजवळ आला.

समोरच्या पाठमोऱ्या सरदारांकडे हात करून पेटत्या डोळ्यांच्या राजांनी त्याला सवाल केला, "ये हमारे सामने कौन खडा है रामसिंग?"

"जी वो महाराजा जसवंतसिंग." रामसिंगाला राजांचे काय बिघडले ते कळेना. त्याच्या तोंडाला कोरड पडली.

"जसवंतसिंगऽ? हमारे मुल्कसे भागा जसवंतसिंग! इसके पीछे हमें खडा किया तुमने? नहीं! हम ये बर्दाश्त नहीं कर सकते!"

नकळत राजांचा हात संभाजीराजांच्या हातातून निसटला! आपण कुठे आहोत, कोण आहोत, कसलेच भान राजांना उरले नाही. त्यांच्या कानाची पाळी रसरसून लालेलाल झाली होती. डोळ्यांच्या आत गाजरी रंगाच्या रक्तशिरांचे जाळे उठले होते. थरथरत्या कानांच्या पाळ्यांबरोबर सोनचौकडे थरथरत होते. बाकदार नाकशेंड्यावर टपटपीत घामथेंब तरारले होते! केसरी टोपाखाली राजांच्या मुद्रेवर एक रसरशीत नारिंगी भोसलाई सूर्य उतरला होता!

कसलाही विचार न करता राजे सरळ आपल्या रांगेतून बाहेर आले. पेशवाटेवरच्या तलम रुजाम्यावर येताच त्यांनी औरंगजेबाच्या आसनाकडे तडक पाठ केली!

"महाराजसाहेबऽ!" म्हणत संभाजीराजे थरथरत सरदारांच्या रांगेतून त्यांच्याकडे धावले. राजांचे कान सुन्न-बधिर झाले होते. निमुळते डोळे गरागर फिरवीत फुसफसत निःश्वासत ते दरवाज्याच्या रोखाने झपाझप पावले टाकू लागले. त्यांना गाठण्यासाठी रामसिंग पाठमोरा उलटा धावू लागला!

कोरड्या तोंडातील टाळ्याला चिकटू बघणारी जीभ रामसिंगाचा जीव घुसमटवीत होती. आसनाकडे पाठ न करता तरातर पाच कदम मागे हटत, पुन्हा राजांच्याकडे बघत कसरत करून रामसिंगाने राजांना कसेतरी गाठले! त्यांचा हात हातात घेऊन तो गदगदा हलवीत दबक्या आवाजात रामसिंग म्हणाला, "सुनिये तो राजासाब!"

"कभी नहींऽ!" म्हणत राजांनी त्याचा हात सरळ झिडकारून टाकला! तसे करताना रामसिंगाने त्यांना दिलेला दरबारी रुमाल राजांच्या हातातून सुटला आणि खालच्या तलम रुजाम्यावर पडला.

भेदरलेले संभाजीराजे "महाराजसाहेब ऽ! महाराजसाहेब ऽ!" अशा सादा घालीत राजांच्या मागून पेशवाटेवरून धावत आले. त्यांच्या पायाखाली तो रुमाल सापडून मागे पडला! संभाजीराजांनी राजांचा हात धरला. ते दोघेही पितापुत्र दरबाराबाहेरच्या सदरजोत्यावर आले. क्षणभर थांबले.

मावळमुलखातील— पुरंधर, राजगड, प्रतापगड कुठल्याही गडवास्तूला कधीच बघायला मिळाले नव्हते असे विचित्र दृश्य त्या संगमरवरी सदरेला बघायला मिळत होते! वर राजसंतापाने थरथर कापणारे 'शिवाजीराजे' आणि खाली त्यांचा हात धरून भीतीने थरथर कापणारे 'संभाजीराजे' असे ते विचित्र दृश्य होते!

सदरेच्या बगलेला एक जिन्यासारखा भाग बघताच राजे तिकडे गेले. संभाजीराजांचा हात त्यांनी सोडून दिला. दोन्ही हातांनी डोके गच्च आवळून घेत राजे त्या पायरीवर बसले. त्यातील एका हाताची मूठ वळलेली होती. तीत दरबारी पानविडा होता. फसफसणारा श्वास त्यांचा त्यांनाच जाणवत होता!

दरबारात गडबड मचली होती. जाफरखानाकडून औरंगजेबाला कळले की, 'सेवा खिल्लत के लिये खपा हो गया।' त्याने मुलतिपखान, मुखलिसखान आणि आखिलखान यांना आज्ञा दिली, "सेवाला खिल्लत देऊन शांत करून आत आणा."

ते तिघेही बंदे राजांच्याजवळ आले. त्यांना खिल्लत घेण्याची विनंती करू लागले. त्याने राजे अधिकच भडकले. त्यांनी त्या तिघांना स्पष्ट इन्कार देत सांगितले, "पाहिजे तर तुमचा बादशहा माझा खून करू शकतो. पण मी आता पुन्हा दरबारात मुळीच येणार नाही!"

औरंगजेबाने रामसिंगाला बोलावून त्याला विचारले, "क्या हुआ रामसिंग? सेवा खपा क्यों हो गया?"

"हमारे मुल्क के गरमीसे उनकी तबियत बिघड गई है आला हजरत!" रामसिंगाने राजकारणी उत्तर दिले!

औरंगजेब हसून म्हणाला, "अपने मुकामपर उसे पहुँचा दो!"

"जी हुजूर" म्हणत रामसिंग बाहेर आला.

राजांच्या घामेजल्या हाताच्या मुठीत आवळलेला हिरवा पानविडा राजांनी फरसबंदीवर फेकून दिला. संभाजीराजांनी तर तो केव्हाच टाकून दिला होता.

थोडा वेळ जाताच राजांची थरथर थांबली. रामसिंग त्यांना घेऊन तळाकडे जायला निघाला.

"महाराजसाहेब, आपल्या मोजड्या." संभाजीराजांनी त्यांना आठवण करून दिली! कुणाची वाट न बघता संभाजीराजांनी राजांच्या भगव्या मोजड्या उचलल्या आणि त्यांच्यासमोर आणून ठेवल्या! राजांनी मोजड्यांत पाय भरले.

रामसिंगाच्या मोतद्दारांच्या ताब्यात दिलेली घोडी राजांनी आणि संभाजीराजांनी मांडेखाली घेतली. रामसिंगाच्या सोबतीने सगळा सरंजाम तळाकडे परत चालला. कुणीच काही बोलत नव्हते.

संभाजीराजे झाला प्रसंग आणि राजांचा चेहरा आठवून विचारात पडले होते – 'आई जगदंबा एकदा स्वप्नात आली तेव्हा आबासाहेबांचा चेहरा नेहमीपेक्षा वेगळा झाला होता! आजचा त्यांचा चेहरा तर फारच वेगळा होता! प्रत्यक्ष आऊसाहेबांनी तो बघितला असता तर त्याही भेदरल्या असत्या!'

राजे आणि संभाजीराजे लाल किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यातून बाहेर पडले. आपल्या मनोऱ्यांचे डोळे करून मुमताजची कबर असलेला ताजमहाल त्यांच्याकडे बघत होता. आज तो धन्य झाला होता. दारा, मुराद, सुजा या प्रत्यक्ष मुमताजच्या मुलांना जे जमले नव्हते, खुद्द शहाजहानला कधी साधले नव्हते, ते करून राजे लाल किल्ल्याबाहेर पडत होते!

औरंगजेबाच्या पन्नासाव्या सालगिराचा रोशन झालेला दिवस सांजावून आल्यामुळे निसूर होत होता!!

रामसिंगाच्या हवेलीत राजे आणि संभाजीराजे दिवाणी दालनात बैठकीवर बसले होते. समोर चेहऱ्यावर चिंतेची काजळी चढलेला रामसिंग उभा होता. रामसिंगाच्या चाकरांनी खुशबूदार सरबताचे पेले आणून मेहमानांच्या हातात दिले.

दरबारी राजांना योग्य जागी उभे करण्यात आले होते. खुद्द मिर्झा राजे जयसिंग आणि ताहिरखान जिथे उभे राहत ती जागा होती ती. हे सारे रामसिंग राजांना पटवून देऊ बघत होता. पण आता बाण सुटला होता.

"भाई, तुम फिक्र मत करना." राजांनी रामसिंगाला तसल्ली दिली. कधी नव्हे ते 'भाई' हा शब्द रामसिंगाला राजांनी जाणूनबुजून वापरला!

अर्धा घंटा हवेलीवर थांबून राजे आपल्या डेऱ्यात आले.

रामसिंगाने आपला कारभारी गोपीराम मेहता याच्याकडून राजांच्यासाठी सुकी फळफळावळ पाठविली. राजांनी त्याला सरोपा बक्ष केला. रामसिंगाच्या विश्वासातील बल्लूशाह आणि गिरधरलाल राजांच्या भेटीसाठी आले.

बल्लूशाह राजांचे पराक्रम ऐकून त्यांच्यावर खूष होता. तो अदबीने राजांना बादशहाशी दिलजमाई करण्याचा सल्ला देण्यासाठी आला होता. राजे सुखरूप दख्खनेत परतावेत असे त्याला मनापासून वाटत होते. बल्लूशाह आणि गिरधर निघून गेले. चिराखलागणीची वेळ झाली. राजे नेहमीप्रमाणे स्फटिक शिवलिंगाच्या पूजेला बसले.

तिकडे लाल किल्ल्यात आपल्या खाजगीच्या महालातील मजलसही औरंगजेबाने बरखास्त केली आणि तो 'मगरीबची नमाज' पढायला निघून गेला.

या मजलसीत औरंगजेबाचे खास सरदार जाफरखान, जसवंतसिंग, मुर्तुझाखान, शायिस्ताखान आणि त्याची बहीण जहानआरा यांनी आग्रहाने औरंगजेबाला ' बदतमीज ' सेवाला ' कत्ल करण्याचा सल्लाही ' देऊन टाकला!

औरंगजेबाला चीड आली होती ती राजांनी ' खिल्लत ' साफ नाकारल्याची. त्यांनी दरबारी कधी न येण्याचा नारा लावण्याची. पण तो बाहेरून शांत होता!

नमाज पढता पढता त्याने दोन गोष्टी स्वत:शी तय करून टाकल्या. ' सेवाला ' दरबारी पेश यायला भाग पाडायचे. खिल्लत पांघरायला लावायची. तसे झाले तर काबूलच्या मोहिमेवर त्याला नामजाद करून टाकायचे! तेथून तो सलामत परतणारच नाही! आणि हे सगळे नाहीच घडले तर – तर मुल्लामौलवींच्याकडून सेवाच्या बदतमिजीचा कथला तय करवून घ्यायचा. ते देतील ती सजा त्याला बहाल करायची! आणि ते कोणती सजा त्याला देतील याबद्दल औरंगजेब निश्चिंत होता!

औरंगजेबाने आग्र्याचा कोतवाल फौलादखान याला याद फर्मावली. तो परतीतराय नावाच्या हरकारा बरोबर घेऊन पेश झाला. औरंगजेबाने त्याला हुक्म सुनावला – " रामसिंगको बतावो कि सेवा को समझाकर कल दर्बार ले आना। "

फौलादखान आणि परतीतराय किल्ल्यावरून रामसिंगाच्या हवेलीवर आले. त्यांनी आपल्या आलिजाचा हुक्म रामसिंगाला सुनावला.

रामसिंग रात्रीची वेळ असताना राजांच्या डेऱ्यात आला. त्यांना घेऊन आपल्या हवेलीत तो परतला. बराच वेळ तो राजांना ' बादशहा सलामतची ' भेट घेणे किती आवश्यक आहे ते सांगत होता. राजे त्याचा निरोप घेऊन आपल्या डेऱ्यात आले.

सगळ्या आग्रा शहरभर सालगिऱ्याची रोषणाई पेटली होती. यमुनेच्या पात्रावर निरनिराळ्या प्रकारच्या दिव्यांच्या प्रतिबिंबांची बाग उठली होती.

राजांची बराच वेळ वाट बघून संभाजीराजे डेऱ्यातील मंचकावर आडवे झाले होते. त्यांनी काही खाल्ले नव्हते. राजांनाही काही खावेसे वाटत नव्हते.

राजांनी आपल्या डोकीवरचा टोप तबकात उतरून ठेवला. झोपलेल्या संभाजीराजांना बघताना त्यांना जाणवून गेले – " यांना नको होतं बरोबर आणायला! "

" जगदंब! जगदंब! " पुटपुटत राजे संभाजीराजांच्या शेजारी आडवे झाले. ते पितापुत्र काही न खाता यमुनाकिनारी आपल्या डेऱ्यात होते. राजांच्या डोळ्याला डोळा लागत नव्हता.

लाल किल्ल्यात आणि उभ्या आग्रा शहरात बिर्याणी सागुतीच्या दावती झडत होत्या. दर्बारी झालेल्या प्रकारची चर्चा करताना आग्रेकर म्हणत होते – " जो शाहजादा दाराका हुआ, मुराद-सुजाका हुआ वही दखखनी ' सेवाका ' होगा! "

दुसऱ्या दिवशी उन्हे कासराभर वर सरकली तरी राजे मंचकावरून उठले नाहीत. त्यांनी त्र्यंबकपंत, रघुनाथपंत, निराजी रावजी या आपल्या माणसांना बोलावून सांगितले, " आम्हास ज्वर धरला आहे! "

ती बातमी परस्पर रामसिंगाच्या कानावर गेली. त्याला माहीत होते की, ' राजासाबका बुखार बनावटी है. ' पण ' तुम्हाला बुखार कसा चढला? ' असे काही तो राजांना विचारू शकत नव्हता! त्याने मनोमन एवढाच अर्थ लावला की, ' शिवाजी आता कोणत्याही कारणासाठी दरबारी जाणार नाही! '

राजांनी रघुनाथपंत कोरड्यांच्याकडून रामसिंगाला निरोप पाठविला, " हम बीमारीसे मजबूर हैं। हमारे फर्जंद संभाजीराजाको दरबार ले जाना। "

आता मिळेल तो माणूस अक्कलहुषारीने पणाला लावल्याशिवाय राजे आग्र्यातून सुटूच शकत नव्हते.

सगळ्यांत मोठे हाल होते रामसिंगाचे! त्याला राजांची सुरक्षितता आणि औरंगजेबाचा विश्वास दोन्ही सांभाळणे भाग होते. सगळ्यांत मोठी कसोटी होती संभाजीराजांची! ते राजांच्याबरोबर आलेल्या सर्वांत कमती उमरीचे होते. परक्या मुलखात होते. आणि आता तर ते सारेच प्राणसंकटात होते.

आपल्या डेऱ्यात राजे संभाजीराजांना हरभातीच्या सावध सूचना देत होते. " ज्या रस्त्याने दरबारी जाणार आहात तो नीट पारखून ध्यानात ठेवत चला. येताना दुसऱ्या रस्त्याने येण्याची रामसिंगचाच्याला विन्ती करा! बादशहाने काही विचारले तर न कचरता जाब द्या. हिंदोस्तानी बोली जमेल तसे बोलत चला. संधी मिळेल त्या असामीची ओळख करून घ्या. "

त्यांना सूचना देताना मध्येच राजे थांबत होते. जिजाऊंचे बोल त्यांना आठवले की मन सुन्न होत होतं, " राज्यासाठी द्यावी लागली तर जुनी पिढी खर्ची द्यायची असते. पुढची स्वप्ने बघायची असतात ती नव्या पिढीने. "

संध्याकाळ होत आली. राजे मंचकावर आडवे झाले. रामसिंग संभाजीराजांना दरबारी नेण्यासाठी आला. झोपलेल्या राजांच्या पायांना आशीर्वादासाठी हात लावून संभाजीराजे म्हणाले, " येतो आम्ही महाराजसाहेब. "

" अं ऽ " राजे ठरल्याप्रमाणे कण्हले.

रामसिंग संभाजीराजांना घेऊन दरबारी निघाला. राजांचा सगळा नटलेला सरंजाम संभाजीराजांच्या पाठीशी उभा होता. सजलेल्या पांढऱ्याशुभ्र घोड्यावर संभाजीराजांनी मांड घेतली. रामसिंगाच्या घोड्याला घोडा भिडवून नऊ वर्षे वयाचे संभाजीराजे दिल्ली तख्ताच्या बादशहाच्या भेटीस चालले! एकटे. बाबरपासून औरंगजेबापर्यंत अनेक दरबार भरले होते – पण हा असला प्रसंग प्रथमच घडत होता.

रामसिंग आणि संभाजीराजे सरंजामासह लाल किल्ल्यात आले.

'दिवाण-इ-खास' चा मगरबी दरबार भरला होता. रामसिंग आपल्या शेजारी संभाजीराजांना घेऊन उभा राहिला.

अलकाबांच्या लंब्या ललकाऱ्या उठल्या. पाठोपाठ औरंगजेब दरबारात प्रवेशला. ताजीम देण्यासाठी सगळे दरबारिये कमरेत झुकले. संभाजीराजे दूरवर दिसणाऱ्या औरंगजेबाकडे बघत तसेच उभे राहिले. सगळेच झुकल्यामुळे संभाजीराजे उभे आहेत हे कुणाच्याही ध्यानी आले नाही!

वजीर जाफरखानाने सर्वांत प्रथम चौकशी केली ती रामसिंगाची!

रामसिंग संभाजीराजांना घेऊन आसनासमोर पेश झाला. कुर्निससाठी झुकलेल्या रामसिंगावर औरंगजेबाने सवालाचा कोरडा ओढला –

"क्यों – रामसिंग, 'सेवा' किधर है?"

"जी. हुजूर, उनकी तबियत बिगड गयी है। सख्त बुखार आया है उनको।" रामसिंग झुकूनच बोलला. कोटबंद उच्चासनात औरंगजेबाची मान अर्थपूर्ण डुलली.

"उन्होंने अपने फर्जंदको भेजा है अलिजा।" रामसिंग औरंगजेबाला येऊ बघणारा बुखार सावरण्याची कोशिश करीत म्हणाला.

औरंगजेबाचे टपटपीत डोळे संभाजीराजांवर खिळले. निर्धोकपणे त्याच्या डोळ्यांना डोळे लावीत संभाजीराजे भरल्या दरबारात उभे होते! त्या चार डोळ्यांत कमालीची तफावत होती. त्यातले दोन होते कृतकर्माची धूळ साचलेल्या दर्पणासारखे औरंजेबाचे; आणि दोन होते आतबाहेर स्फटिक-साफ संभाजीराजांचे!

संभाजीराजांना बघताच औरंगजेबाचा तिरकस स्वभाव जागा झाला. त्याने विचारले – "क्यों फर्जंद संभू, तुम्हें नहीं आय बुखार?"

अंगावर काहीही घेण्याची सवय नसलेले संभाजीराजे तळपत्या डोळ्यांनी उत्तरले, "नाही ऽ! आम्हास बुखार येत नाही! आमच्यामुळे इतरांस बुखार येतो!"

"क्या बोला वो?" औरंगजेबाने भुवया चढवीत रामसिंगाला विचारले.

संभाजीराजे काय बोलले ते रामसिंगालाही नीट कळले नव्हते! पण जाब देणे त्याला भाग होते. तो वाकून म्हणाला, "जी हुजूर. वे बोले – हमें बुखार नहीं है!"

"कैसी मासूमी है। जाफर, संभाको नजराना इनायत करो।" औरंगजेबाने वजिराला आज्ञा केली. संभाजीराजांना सरोपा, मोत्याचा कंठा आणि जडावाची कट्यार नजर करण्यात आली.

रामसिंगाच्या हवेलीत बैठकीच्या दिवाणी दालनात एका मोठ्या राजपुती घडावाच्या शिसवी चौरंगावर एका तबकात चकचकीत, काळेशार, शाळिग्रामी शिवलिंग ठेवण्यात आले होते. त्याजवळ दुसऱ्या तबकात पूजेचे साहित्य मांडण्यात आले होते. रामसिंग राजे-संभाजीराजे यांना बरोबर घेऊन तळावरून आपल्या हवेलीकडे निघाला.

खुद्द मिर्झाच्या आग्र्यातील हवेलीत येऊन आपणाला शिवलिंगाची पूजा बांधावी लागेल असे कधी राजांच्या स्वप्नातसुद्धा आले नसते. पण स्वप्न आणि सत्य नेहमीच एकमेकांना हूल देऊन एकमेकांवर कुरघोडी करीत असतात!

संभाजीराजे दरबारातून आल्याच्या दुसऱ्याच दिवशी औरंगजेबाने सिद्दी फौलादखानला हुकूम दिला, "सेवाको मुकामपरसे रणअंदाजखाँके कोठीपर ले जाव।"

राजांना रणअंदाजखानाच्या कोठीवर हलवून जशी दाराची केली तशी शिवाजीची बिनबोभाट कत्तल करण्यात येणार होती! रामसिंगाच्या हवेलीसमोरच्या खुल्या तळावर ते शक्य नव्हते. कशी कुणाला ठाऊक पण ही खबर रामसिंगाला लागली. तो तडक मीर बक्षी मुहम्मद अमीनखान याच्या हवेलीवर गेला. अमीनखान मित्र होता. उच्च पदावर होता. त्याच्याकरवी रामसिंगाने औरंगजेबाला कधी नव्हे तो निर्धारी निरोप पाठविला – "शिवाजीला ठार करण्यापूर्वी कबिल्यासह मला ठार करा!"

तो निरोप ऐकून धूर्त औरंगजेबाने ओळखले की, शिवाजीला कत्तल करण्याच्या आपल्या योजनेची बातमी फुटली आहे. समोर आलेल्या अमीनखानाचा फायदा घेऊन औरंगजेबाने रामसिंगालाच मध्ये अडकवून टाकण्याचा फासा टाकला.

"शिवाजी आग्र्यातून बाहेर जाणार नाही यासाठी तू ओलीस राहतोस काय?" असा निरोप रामसिंगाला औरंगजेबाने पाठविला!

राजांच्या प्राणावरचे जामीनकदब्यावर निभावते हे पाहून निःश्वास टाकून रामसिंगाने बक्षी अमीनखानाकडून जामीनकदबा दस्तखत करून पाठवून दिला. औरंगजेबाने तो मंजूर केला. रामसिंग राजांना रीतसर जामीन राहिला!

रामसिंगाने आपल्या प्राणावरचे संकट दूर करून स्वतःचे प्राण टांगून घेतले हे त्याच्या तोंडून ऐकताच राजे विचारमग्न झाले. त्यांनी रामसिंगाला विश्वास दिला, "आम्ही बेलफुलाची आणभाक घेऊन तुम्हास एतबार देऊ. निश्चिंत असणे."

महादेवाची पूजा बांधण्यासाठी राजे संभाजीराजांच्यासह रामसिंगाच्या हवेलीत आले. हवेलीच्या दिवाणी दालनात बल्लूशाह, गिरधरलाल. गोपीराम, तेजसिंह अशी रामसिंगाची मंडळी होती. राजांच्या बरोबर रघुनाथपंत, दत्तोजीपंत, त्र्यंबकपंत, निराजी अशा असामी होत्या. राजांनी चौरंगावरच्या शाळिग्रामी शिवलिंगाची पूजा बांधली. शिवपिंडीवरचे बेलफूल उचलून घेतले. आपल्या सडक बोटांनी ते रामसिंगाच्या हाती देत राजे म्हणाले, "हम शिवजीकी कसम उठाते हैं जबतक तुम हमारे लिये जमान हो, हम आगरा नहीं छोडेंगे."

राजांनी रामसिंगाची ऊरभेट घेतली. रामसिंग औरंगजेबाला जामीन राहिला. राजे रामसिंगाला आणेभाकेने बांधील झाले. एकाच वेळी राजे दोन कैदेत पडले! एक होती औरंगजेबाच्या राजकारणाची, दुसरी होती रामसिंगाच्या प्रेमाची!

तो सारा मामलाच अजब होता. वास्तविक आपल्या सुरक्षिततेसाठी राजांनी औरंगजेबाकडून रामसिंग जामीन मागावा तेथे राजांच्याकडून औरंगजेबाने जामीन घेतला! उल्टी चालली नाही तर ती मोगली सल्तनत कसली?

संभाजीराजे आणि रामसिंग आग्र्याचा फेरफटका करून परतत होते. त्यांच्या घोड्यांमागून दहा-बारा रजपूत घोडाईत चाल धरून होते. दिवस परतायला लागला होता. पथक 'कुम्हारबाडीच्या' वस्तीत घुसले. इथे कुंभाराच्या धाव्यांच्या घरांसमोर उभट-उंच रांजण, गेळे, माठ कुंभारांनी हारीनं मांडले होते. ते बघताच रामसिंगाने हात वर करून पथक थांबविले. मागे न बघताच त्याने हाका दिला, "दुंगरऽ!"

"जी." म्हणत दुंगरमल आघाडीला आला.

"उसमेंके माठ लेना. राजासाबके हशमोके लिये." रामसिंगाने एका कुंभाराच्या ओसरीकडे हात उठवीत त्याला आज्ञा दिली.

कुंभारी चाक फिरविणाऱ्या कुंभाराने 'शाही सवाऱ्या' बघून हातच्या काठीने फिरते चाक थोपविले. पुढे येत रामसिंगाला आणि संभाजीराजांना कुर्निस करून तो अदबीने म्हणाला, "क्या हुकूम है सरकार? कौनसी खिदमत करूँ?" त्याच्या डोक्यावर उत्तरी पागोटे होते. चिखल-मळले हात त्याने मावळी रामरामाच्या पद्धतीने जोडले.

"अच्छे माठ देना. इन मेहमान साहबानके लोगोंको देना है." रामसिंग संभाजीराजांच्याकडे हाताने दाखवीत म्हणाला.

कुंभाराने बारीक डोळे करून संभाजीराजांना निरखले. सहज म्हणून तो पुटपटला, "सवाऱ्या मावळी मुलखाच्या दिसत्यात!" कुंभाराची नजर संभाजीराजांच्या छातीवरील कवड्यांच्या माळेवरून फिरली.

कुंभाराची बोली ऐकताना संभाजीराजांची उजवी भुवई नकळत वर चढली. "असामी देशीची दिसते. मावळबोली बोलते." एक विचार त्यांच्या मनाच्या चाकावर फिरला! काहीतरी आकार घेऊ लागला.

कुंभाराने एक गोल खडा उचलून दुंगरमलला भाजीव माठ ठणाठण वाजवून दाखविले. संभाजीराजांच्या मनात कसलेतरी ठोके ठणठणून गेले.

हातांत पेलून, पारखून बघून दुंगरने चार माठ खरेदी केले. रामसिंगाने कमरेच्या शेल्यात खोचलेली दिनाराची थैली खेचून दुंगरच्या दिशेने घोड्यावरूनच फेकली.

ती झेलीत दुंगरने कुंभाराला माठाचे दिनार दिले. थैली आणून पुन्हा रामसिंगाच्या हातात दिली. एक एक उचलून कुंभाराने आणि दुंगरने माठ चार स्वारांच्या हातांत दिले. दुंगरने घोड्यावर झेप घेतली.

कुंभाराने वाकून पुन्हा, घोड्याचे कायदे खेचणाऱ्या रामसिंगाला तसलीम केली.

"चलिये कुँवर." रामसिंग संभाजीराजांना मानेच्या झटक्याबरोबर म्हणाला.

रामसिंगाने घोड्याला टाच देताच त्याच्या रजपूत घोडाईतांनीही टाचा दिल्या. पथक हलले. मुद्दाम कायदे आखडते धरून संभाजीराजांनी आपल्या घोड्याला लटकी टाच दिल्यासारखे केले! घोडे गोंधळले. पुढे जायचे का थांबायचे या अंदेशाने खूर मागेपुढे नाचवून जागीच थांबले! रामसिंग-दुंगर पथकासह पाच-दहा कदम पुढे गेल्याची संभाजीराजांनी खातरजमा करून घेतली. झटकन आपल्या गळ्यातील टपोऱ्या मोत्याचा कंठा उतरून हातात घेतला.

कुंभार संभाजीराजांच्या घोड्याकडे बघत दिनार मुठीत धरून थांबला होता.

संभाजीराजांनी हातातील कंठा कुंभाराच्या अंगावर फेकला! "आम्ही मावळाचे. भवानीचे भुत्ये! पारख ठेवा. येतो आम्ही. रामराम." संभाजीराजांनी घोड्याला, जबरी टाच दिली.

"रामराम जी." हे कुंभाराचे शब्द संभाजीराजांनी ऐकले नाहीत.

चकित पडलेल्या, कंठ्याकडे बघताना हरखून गेलेल्या कुंभाराने अंदाज लावला, "बच्चा मावळी सरदाराचा हाय!" कुंभार मूळचा मराठी मुलखाचा होता. हातच्या कसबाने त्याला उत्तरेत आग्र्यात आणून सोडले होते.

घटना आता दिवसरात्रीच्या पाठीवर गस्त घालीत फिरू लागल्या.

रामसिंगाला इतबार देण्यासाठी राजांनी त्यांच्या रजपुती धारकऱ्यांचा पहारा आपल्या तळावर बसवून घेतला.

संभाजीराजे आणि रामसिंग यांचा घरघसटीचा प्रेमा वाढत चालला. घडले तेच एवढे जबरी होते की, रामसिंग राजे आणि संभाजीराजे यांची डोळ्यांत तेल सोडून हिफाजत राखत होता. ह्या 'मेहमान स्वाऱ्या' सलामत आपल्या मुलखात परत कशा जातील याचीच रामसिंगाला फिकर लागली. तिला दोन कारणे होती: एक तर दिला शब्द पाळणे हे रजपुतांचे रक्त होते आणि दुसरे महत्त्वाचे कारण होते की, जर राजे आणि संभाजीराजे यांच्या जीवाला काही धोका झाला तर आपले दख्खनेत असलेले 'पिताजी' मावळ्यांच्या जानकुर्बान झडपीतून सुखरूप परत येतील की नाही याची रामसिंगाला काळजी पडली! जगदंबेनेच हे विचित्र त्रिशूळ आग्र्याच्या उरावर रोखून धरले होते! तिचा तरी काय इलाज होता? राजे - संभाजीराजे तर तिचे भुत्येच होते. पण खुद्द मिर्झा राजाही तिचा भक्तच होता! तिला सगळ्यांनाच दाद देणे भाग होते.

औरंगजेबाने राजांना काबूलवर स्वारीसाठी पाठविण्याचा बेत रामसिंगाला बोलून दाखविला. काहीतरी कारणामुळे पुढे तो बेत बारगळला.

राजांनी औरंगजेबाचा वजीर जाफरखान याची त्याच्या हवेलीत भेट घेऊन त्याला किंमती नजराणा दिला. बादशाही रदबदली करण्याचा राजांचा हा बेतही कारणी लागला नाही.

दख्खनेतून मिर्झा राजाची औरंगजेबाला पत्रे येत होती. शेवटी औरंगजेबाने कंटाळून मिर्झा राजाला पत्र पाठवले – " .. तुमने दखनी सेवाको कौन कौनसी बयत जबान दी है ? सिलसिला बयाजवार भेज देना ! "

राजांच्या हाती आता एकच चाल राहिली. औरंगजेबाला आपले कलमकसदार विनंती अर्ज पेश करणे !

अमीनखानमार्फत राजांनी औरंगजेबाला अर्ज पाठविला – " पुरंधरच्या तहातील माझे सर्व किल्ले जर मला परत दिले तर मी दोन कोटी रुपये दरबारी पेश करीन ! मला दख्खनेत जायला इजाजत मिळावी. माझे फर्जंद संभाजीराजे यांना मी आग्र्यातच ठेवून जाईन. बादशाह चाहतील तर मी कसम घेण्यास तयार आहे. बादशाह सलामतांची दख्खनेत आदिलशाही विजापुरावर मोहीम जारी आहे. तिथे जाण्याची मला इजाजत द्यावी. मी ती मोहीम फत्ते करून देईन ! वख्त पडल्यास त्या जंगात जान कुर्बान करून आलिजांपाशी माझी चाकरी रूजू करीन ! "

अमीनखानाने राजांचा अर्ज दरबारात वजीर जाफरखानाच्या हवाली केला. त्या दरबारात रामसिंगासह संभाजीराजे हजर होते. जाफरखानाने अर्ज जिले सुबहानी औरंगजेबाला पढून दाखविला.

हातची माळ थांबवून औरंगजेबाने अर्जातील शब्दन् शब्द कान देऊन ऐकला. त्याच्या स्वतःच्याच ध्यानी आले नाही पण तो ऐकताना त्याच्या हातातील माळेचे चार मणी नेहमीसारखे न फिरवता उलटे फिरून गेले होते !!

वाकलेल्या जाफरखानाच्या हातातील राजांच्या अर्जाच्या वळीकडे बघत औरंगजेब शांतपणे म्हणाला, " जाफर, देखो ' सेवा ' कितना इनायती है ! शाही सूरतके तीन कोट रुपिया हजम करके हमें दो कोट बक्ष दे रहा है !! " आणि तो काही तरी पुटपुटत तख्तावरून उठला. दरबार बरखास्त झाला.

संभाजीराजांच्यासह रामसिंग दरबाराबाहेर पडला. सगळे दरबारिये बाहेर पडले. मोकळ्या ' दिवाण-इ-खास ' मध्ये फक्त कनोजी धूपाची वळी तेवढी फिरत राहिली !

रामसिंग संभाजीराजांना घेऊन राजांच्या तळावर आला. आपल्या डेऱ्यात राजे रामसिंगाची वाट बघत होते. डेऱ्यात त्र्यंबकपंत, रघुनाथपंत, निराजी ही मंडळी होती. रामसिंग आणि संभाजीराजे डेऱ्यात प्रवेशले.

"क्या हुआ रामसिंग हमारे अर्जीका ? " राजांनी रामसिंगाला विचारले.

" कुछ राय नहीं दी आलिजाने आपके अर्जीपर राजासाब. हजरत सोचकर जरूर कुछ करेंगे, आप फिकर मत करना. "रामसिंग किती केले तरी रजपूत होता !

थोडा वेळ थांबून रामसिंग आपल्या माणसांसह आपल्या हवेलीकडे निघून गेला.

पाठीवर हात बांधून राजे डेऱ्यातच, नजर पायगतीला टाकून विचारांबरोबर फेऱ्या घेऊ लागले. संभाजीराजे मंचकावर बसून राजांची घालमेल बघताना अस्वस्थ झाले होते.

" रघुनाथपंत, बादशाह कोण चालीचा फैसला करील आमच्या अर्जाचा ? " राजांनी मध्येच थांबून कोरड्यांना विचारले.

" बाळराजांना ठेवून जाण्याचे कलम अर्जात घातले आहे. तेवढ्याचाच काही नतिजा निघेल असे वाटते, स्वामी. " कनातीजवळ उभे असलेले रघुनाथपंत म्हणाले. राजांनी ते ऐकताच संभाजीराजांच्याकडे बघितले. त्यांना मासाहेबांचे शब्द आठवले – " प्रसंग पडला तर समयी राज्यासाठी जुनी पिढी खर्ची द्यायची असते. राज्याची स्वप्ने बघायची असतात ती नव्या पिढीत ! "

संभाजीराजांच्या रोखाने राजे वळले. त्यांची समजूत पाडण्याच्या इराद्याने.

एकाएकी वळिवाच्या ढगांची आकाशाच्या नगाऱ्यावर टिपरी घुमते तशी क्षणाक्षणाला चढत्या आवाजाने जवळ येणारी असंख्य घोडटापांची टिपरी अचानक सर्वांच्या कानांवर आली ! राजे चमकले. संभाजीराजे ताडकन मंचकावरून उठले. दोघांच्याही टोपांतील मोतीलगी थरथरल्या !

डेऱ्याबाहेर असलेला रामसिंगाचा पहारेकरी नंग्या हत्यारानिशी घाबराघुबरा होत आत आला. त्याच्या पाठोपाठ बाहेर गेलेले, भेदरलेले रघुनाथपंत, त्र्यंबकपंत, निराजी तिघेही हत्यारे उपसून आत आले. सर्वांचे गुंतवा झालेले थरथरते विचित्र शब्द राजांच्या आणि संभाजीराजांच्या कानावर एकदम आदळले. " घात झाला धनी ऽ ! हबशी हत्यार चलाने आ रहे हैं. भा ऽ गो ! पळा ! भागो ! "

बाणासारख्या घुसणाऱ्या त्या शब्दांनी राजे गोंधळले. तबकात ठेवलेली ' भवानी ' उचलण्यासाठी त्यांनी पायझेप टाकली पण संभाजीराजांची आठवण येताच ती पुन्हा मागे घेतली ! एकदम संभाजीराजांना ओढून जवळ घेत राजांनी त्यांना आपल्या पोटाशी कवटाळले ! एक – एकच क्षण निघून गेला. पण – पण तेवढ्या अवधीत राजांच्या मनी विचारांची किती तरी हत्यारे एकमेकांवर आदळली. राजगड सोडल्यापासून दाबून ठेवलेले अपमानाचे, चिंतेचे, व्यथेचे कैक बांध फुटले.

' श्रींचे राज्य ... कामी आलेले इमानबंद जीव ... दह्याच्या कवड्या ... मासाहेब ... मिर्झा राजा ... फर्मानबाडी ... भंडाऱ्याची परडी ... उचलला गेलेला कैलास ... एकला जीव .... भुयार ... शिवलिंग – पेटता हुडवा ' विचित्र-विचित्र दृश्ये राजांच्या डोळ्यासमोर त्या क्षणात दाटवा धरून गेली. कैक हबशांचे निर्दय वार आपल्या आणि संभाजीराजांच्या आता अंगावर पडणार या कल्पनेने राजे अंगभर चरकले. सगळे डाव अपुरे असताना, परमुलखी, एका गाफील क्षणी एकुलत्या एक पुत्रासह कत्तलीचे केविलवाणे मरण ! सर्वस्वाची राख ! शतरंजचा हा फसलेला डाव ! नामुष्कीची शिकस्त !

राजांचे सूर्यपेट डोळे कडकडीत काळजीने दाटून आले. संभाजीराजांना पोटाशी एकजीव गच्च कवटाळून धरताना राजांच्या थरथरत्या ओठांतून मायेने थबथबून गेलेले घोगरे शब्द ओघळले, " लेऽक ऽ रा ऽ, घात झाला ! आम्ही फसलो ! "

तलवारीच्या पात्याला धार बिलगलेली असते तसे संभाजीराजे आपल्या आबासाहेबांना हातांच्या कवळ्याने बिलगले होते. मान उठवून राजांच्या चेहऱ्याकडे बघताना त्यांच्या छातीत असंख्य कालव वळवळून उठले.

"महाराजसाहेब ऽ!" म्हणत त्यांनी आपले तोंड राजांच्या जाम्यावर घुसळले. ते फर्जंद-आबा थरथरत होते. काळ्याभोर ढगांच्या तांडवात सापडलेल्या वीजरेघांसारखे!

क्षणात डेऱ्याभोवती बेफाम दौडत आलेल्या घोड्यांच्या टापांचा गराडा पडला. थांबत्या घोड्यांनी पुढचे खूर नाचवीत खूर उचलताना फोडलेल्या कातऱ्या खिंकाळ्या घुमल्या. पठोपाठ डेऱ्याचा झिरझिरीत पडदा एका राकट, केसाळ हाताने बेदरकार उडता फेकून दिला. पत्थरी रंगाचा, हनुवटीकडे पडलेल्या जाड ओठांचा आगऱ्याचा धिप्पाड, हबशी फौजदार सिद्दी फौलादखाँ डेऱ्यात घुसला.

आपल्या कमरेच्या रुंद पात्याच्या जमदाडीच्या मुठीवर जाड बोटांची पकड पक्की रुतवीत दरवाज्याजवळच तो थांबला. आपले भोकरांसारखे बटबटीत डोळे राजांच्यावर रोखून त्याने हनुवटीकडे पडलेला जाड ओठ खोलला, रुंद दात चमकले– "मेरे हथियारबंद हशमोंका पेहरा तुमपर लगा है। किसीको भी मिलना तुम्हें सख्त मना है। ये हुक्म है आलिजाका. खयाल रखना." त्याच्या जाड भुवया क्षणभर आक्रसून फिसकारल्या.

खांद्यावरच्या झगझगीत, हिरव्या खिल्लतीचा उजव्या कोपराने पिसारा फुलवून टाकीत, जबाबाची वाट न बघता फौलाद वळला. आणि मोहरमचा नाचता ताबूत पुढे जावा तसा झपाट्याने डेऱ्याबाहेर निघूनही गेला!

पाच हजार धिप्पाड, कडव्या हबशांच्या दाट चौक्या डेऱ्याभोवती पडल्या! तोफांची तोंडे डेऱ्यावर रोखून हबशांनी तोफगाड्यांची मांडणावळ केली.

जसा पन्हाळ्यावर पडला होता तसाच 'सिद्दीचा वेढा' पडला! मावळी सिंह आगऱ्याच्या हिरव्या कुरणात अडकला! राजे कैद झाले!

औरंगजेबाच्या हातातील जपाची माळ आणि राजांच्या छातीवरची भवानीची माळ आता एकमेकींच्या पाठीवर जागती 'गस्त' घालू लागल्या!!

राजे कैद झाले तरी संभाजीराजांना मात्र कैद पडली नव्हती. ते रामसिंगाची हवेली, आग्रा शहर, लालकिल्ला यात ये-जा करू शकत होते. औरंगजेबाला माहीत नव्हते त्याने ही केवढी गफलत करून ठेवली होती. धाकला असला तरी साप म्हणू नये आपला' हे तत्त्व औरंगजेब विसरला! आणि हे तर मावळी बचनाग! संधी मिळेल तेव्हा सळसळत फणा वर उठविणारे!

राजे आता वरून अगदी शांत दिसू लागले, पण आत त्यांचा 'मनाशी मनाचा' तुंबळ संवाद पडला होता. एकच एक ध्यास त्यांच्या सावध मनाने घेतला.

'संभाजीराजांच्यासह आलेल्या साऱ्या असामींनिशी या काळदाढेतून सलामत सुटका!' कोण हुन्नर चालवावा? कैसी चाल खेळावी? आणि राजांनी मनोमन भवानीचे नाव घेत शतरंजाची पहिली खेळी बाहेर काढली!

एका संध्याकाळी खाशा स्वाऱ्यांना 'दिवट्याची सलामी' द्यायला आलेल्या मावळ्यांना बघताच भुवया वर चढवीत राजांनी जरबेने विचारले, "कशास आलात? चालते व्हा! आमचे आणि बाळराजांचे होणे असेल ते होईल!" राजांनी शेजारी उभ्या असलेल्या संभाजीराजांना जवळ घेतले.

मावळे चरकले. तो शोरगुल ऐकून फौलादखाँ डेऱ्याजवळ आला! त्याला बघताच एकसारख्या फेऱ्या घेता घेता राजे मावळ्यांवर कडाडले, "काय सांगतो आम्ही? चालते व्हा! तुमचा विचार कराया आम्हास अवसर नाही. निघा येथून!"

राजांनी आपले मावळे गोंधळलेले बघून त्यांना 'परवलीची खूण' देण्यासाठी गळ्यातील माळ उचलून आपल्या कपाळी शिवगंधाला भिडवून सोडली! हुषार मावळ्यांनी हा 'बनाव' हेरला!

"पर आमी जावं कुठं?" खालच्या मानेने दावलजी घाटग्यांनी विचारले.

"कुठेही जा. देशी जा. निघा." राजे फेऱ्या घेतच राहिले.

"क्या हुआ?" सिद्दी फौलादखाँने आत येत राजांना विचारले.

"चाकरी करते हैं! कैदीकी चाकरी! खान, इन लोगोंका बौज हमपर किसलिये? जाने दो इन्हें। मैं आलिजाको अर्जी पेश करता हूँ। दे दो दस्तक इनको!"

राजांनी फौलादखाँमार्फत औरंगजेबाला आपली 'शिबंदी' परत पाठविण्यासाठी दस्तके देण्याविषयी अर्ज दिला!

बहिर्जीने आपले खबरगीर निरनिराळ्या वेषांत आग्र्यास पेरून टाकले. त्याचे नाव होते 'बहिर्जी' पण कुणालाही ऐकता येणार नाही असं 'खाशा गोटातील' ऐकण्याएवढे त्याचे कान 'तिखट' होते! नाव 'बहिर्जी' आणि कृती 'बहुरूपी' असा तो मामला होता!

"मला रामसिंगाच्या तळावरून हलवा." असा एक अर्ज राजांनी औरंगजेबाला केला.

"रामसिंग हमारा कदीम चाकर है। वही रहना।" असा जबाब औरंगजेबाने दिला.

"मला संसाराचा कंटाळा आला आहे. काशीस जाण्याची इजाजत मला आला हजरतनी द्यावी. संन्यास घेऊन तेथे राहण्याची माझी इच्छा आहे!" असाही एक अर्ज राजांनी औरंगजेबाला केला.

"'सेवा' अवलिया बनना चाहता है। ठीक है। उसे कहना इलाहाबादके किलेपर जाकर वो अवलिया बने रहे। हमारा सुभेदार बहादूरखान उसकी अच्छी हिफाजत रखेगा।" असा जबाब औरंगजेबाने त्या अर्जाला दिला!

राजांचा आणि औरंगजेबाचा ‘ शतरंज ’ एकमेकांचे मनसुबे मारण्यासाठी रंगू लागला. जे घडत होते, घडू घातले होते त्यांनी संभाजीराजांची जाण नकळतच आपोआप वाढत होती. आपण कसल्या पेचात आहोत हे त्यांनी हेरले. रामसिंगाशी ते अधिक अदबीने वागू लागले. वेळ मिळेल तेव्हा ‘ कुम्हारवाडीत ’ जाऊन कुंभाराची गाठभेट घेऊ लागले. नेहमीप्रमाणे एके दिवशी ते रामसिंगासह लाल किल्ल्यात आले. रामसिंगाला कळले की बादशहा सलामत ‘ पैलवानोंका जंग देख रहे हैं ! ’

संभाजीराजांना घेऊन रामसिंग कुस्तीच्या आखाड्याजवळ आला.

एका प्रशस्त गोलाकार मैदानात ताक आणि तेल घालून मळलेल्या लाल मातीचा हौदा होता. हौद्याभोवती फिरलेला भक्कम लकडकोट होता.

लकडकोटाला लागून मांडलेल्या एका आसनावर औरंगजेब बसला होता. त्याच्या मस्तकावर अब्दागिऱ्या, चवऱ्या ढळत होत्या. त्याच्या पाठीमागे काही सरदार उभे होते. आम्याच्या तळपत्या उन्हात हौद्यातील लाल माती चमकत होती. ती बघताना औरंगजेबाला वाटले, “ खुदातालने हर किस्म की मिट्टी पैदा की। लाल, काली, सफेद पर हारी मिट्टी कैसी नहीं पैदा की ? ” अस्वस्थ होऊन त्याने हातातील काश्मिरी गुलाबाचा गेंद नाकाला लावला आणि त्याला रामसिंग आणि संभाजीराजे दिसले !

हिरव्या जांगा कसलेले, पठाणी, हबशी, उझबेकी, तुर्की धिप्पाड मल्ल हौद्यात उतरत होते. औरंगजेबाला कुर्निस देऊन “ या ऽ मौलाली ऽ ” अशा गर्जना करीत एका पायावर नाचून हौद्याला फेरा घेत होते. सलामीची माती आपल्या जोडीदाराच्या हाती देत दणादण शड्डू ठोकत होते. त्यांच्याशी अंगझट्या देत होड घेत होते. त्यांची तजेलदार अंगे घामाने निथळून निघाली होती !

मल्लांची भरल्या कणसांसारखी दिसणारी पटबाज शरीरे निरखत संभाजीराजे रामसिंगासह लकडकोटाजवळ थांबले.

‘ आता एकदम जिले सुबहानीसमोर कसं जावं ’ या विचाराने रामसिंगही थांबला. दोघेही हौद्यातील रोमांचक दंगल बघण्यात गढून गेले.

“ रामसिंग ! ” बक्षी आसदखानाने त्यांच्याजवळ येत त्यांची तंद्री मोडली.

“ क्या है ? ” रामसिंगाला एवढ्या दिवसांत चारच समाधानाचे कुस्ती बघण्याचे क्षण मिळाले होते तेही निघून गेले !

“ आला हजरत पूछते हैं की सेवाका ये बच्चा कुश्ती खेलेगा क्या ? ” आसदखानाने रामसिंगाच्या गळ्यावर शब्दांची तलवारच सरळ आडवी धरली.

संभाजीराजांचा हात पटकन हातात घेऊन रामसिंग म्हणाला, “ बक्षी, उमर तो देखो इनकी. ”

बक्षी आसदखानाला कल्पना नसताना संभाजीराजे त्याला म्हणाले, “ हां ऽ जरूर खेळू आम्ही हौदा ! पण तो या चाकरी ठेवलेल्या मल्लांशी नाही. असले पैलवान आम्हास रोजाना मुजरे करतात ! आमच्या जोडीचा ‘ शाहजादा ’ उतरेल हौद्यात तर आम्हीही जांग चढवू ! ”

आसदखानाने संभाजीराजांची जबान औरंगजेबाच्या कानांवर घातली ! बसल्या आसनावरूनच औरंगजेबाने संभाजीराजांना निरखले.

“ आसद, उसको पैलवानकी ठंडाई देना। ” एवढेच औरंगजेब म्हणाला आणि “ आपले शहजादे कसे निपजतील ? ” या शंकेबरोबर तो आसनावरून उठला आणि नमाज पढायला आपल्या महालात निघून गेला !

राजगडावरच्या देवमहालात शाळिग्रामी शिवलिंगासमोर चंदनी पाटावर जिजाऊ बसल्या होत्या. म्हाताऱ्या पावसाने झोडपून काढलेल्या सुन्न, बधिर, काजळकाळ्या संध्याकाळीसारख्या !

“ बाळराजे आणि राजे आगरियात कैदी पडले. ” ही खबर कानांवर पडताच आपले काळीजच कुणीतरी देठास हात घालून ते खुडून दूर नेत आहे असे त्यांना वाटले. पारण्याच्या उपवाशी पोटी, थरथरत्या हाताने त्या एक एक बिल्वपत्र शिवपिंडीवर अर्पित होत्या. लक्ष बिल्वपत्रांचा संकल्प त्यांनी मनी बांधला होता.

शंभर-शंभर बेलपानांची तबके धाराऊ त्यांच्यापुढे गोंदल्या हाताने आणि काळवंडल्या मनाने सरकवीत होती. एका तबकातील बिल्वदले संपली की खुणेसाठी एक सोनेरी मोहर उचलून बाजूच्या ताम्हनात ठेवीत होती.

‘ शांतता ’ हा शब्द मनोमन उठविला तरी भंग पावेल एवढी भयाण शांतता देवमहाली पसरली होती ! लटकत्या नंदादीपातील करंजेल तेलाशी वातीचे भांडण झाले तर तेवढाच ‘ चर्रर ऽ ’ असा आवाज उठत होता. जिजाऊंच्या नसला तरी धाराऊच्या काळजाला तो चिरत जात होता !

शिवपिंडीशी आणि त्यामागे उभ्या असलेल्या उग्रदर्शनी जगदंबेच्या मूर्तीशी जिजाऊंनी मुक्या ओठी आणि उघड्या डोळी वितंड-भांडण मांडले होते !

एक एक बेलपत्राबरोबर आऊसाहेबांच्या मनाचा एक एक कप्पा उलगडत होता. शेकडो, हजारो कप्पे !

“ किती-किती फसगमत करावी तू आमची आई ! थोरले संभाजीराजे तू आमच्या ओटीतून कनकगिरीवर हिरावून नेलेस. होदिगेरीच्या रानात तू आमचं कुंकू पायतळी घेतलंस ! राजांना पुत्रलाभ झाला यासाठी समाधानानं आम्ही ओठ खोलले नाहीत तोच तू आमच्या थोरल्या सूनबाईंना जवळ केलंस ! आणि – आणि आज –

“ जे जे आम्हांस आवडावं ते ते तुझ्या डोळ्यांत भरतं ! मग – मग नेमक्या आम्हीच कशा नाही भरत तुझ्या डोळ्यांत ? की आमच्या फुटक्या कपाळानं आम्ही तुलाही

तोंडासमोर नकोशा झालो ? बोल आई, किती वेळ हातीचं त्रिशूल तू आमच्या कंठाशी आणून लावणार ? का मांडावी तुझी पूजा आम्हीं ? ''

"नाही हे थांबविणे आहे !! आमच्या राजांच्या-बाळराजांच्या केसास ढका लागला तर बरे समजेन असणे ! आम्ही तुझाही मुलाहिजा नाही धरणार !! ''

आग्र्याचा तावला मुलूख गदगदून आला. मृगाचा सरीबाज पाऊस लाल किल्ला, ताजमहाल, हवेल्या, कोठ्यांवर रपरपत कोसळू लागला.

पहारा देणे सोयीचे व्हावे म्हणून फौलादखानाने राजांना रामसिंगाच्या हवेलीला लागून असलेल्या दगडबंद कोठीत हलविले. खुल्या मैदानात शामियान्यात असलेले राजे अधिक बंदिस्त झाले. राजांच्या मनी विचारांचा पाऊसकाळा कोसळू लागला. सरींवर सरी, विचारांवर विचार धावणी धरू लागले.

आणि – आणि खुद्द आपल्याच माणसांना हबका बसावा असे साधेसुधे राजे ठरवून आजारी पडले ! आजारी माणसांस अधिक सावधानगीचे उपाव सुचतात !

पहाऱ्यावरच्या हबशांनी, "मरहट्टा बेमार हो गया" ही खुशीची खबर परस्पर फौलादाच्या जाड कानांत नेऊन सोडली ! राजांची पूछताछ करायला तो कोठीत आला.

"सुना है तुम्हारी तबियत बिगड गयी है ? '' जाड, काळ्या ओठांवरचे फौलादचे भोकरी डोळे लखलखले. पाय ओढत चुकार चाल धरणाऱ्या घोड्याकडे हबशी घोडेपारखी बघतो तसा फौलाद राजांना निरखू लागला !

तापल्या लोखंडी ठशाचा डाग खुब्यावर घेणारे घोडे कण्हते तसे राजे बेमालूम कण्हले ! उभ्या चर्येवर वेदनेचा भंडारा फासून घेत पलंगावरून आस्ते उठले ! तो कातळकठोर सह्याद्री छातवान गद्‌गदवून अमळ खोकला !!

"खाऽन, आम्हास आमचा भरोसा लागत नाही ! जिवाची घालमेल होते आहे ! आमच्यावर एक मेहरबानी करा. आमच्या पापांची आम्हांस फेड करू द्या ! आम्ही खैरियत करावी म्हणतो ! मेवामिठाईची, दिनारांची, साऱ्यांचीच ! '' धाप लागल्यागत करीत राजे थांबले. कपाळीचे शिवगंध त्यांनी आक्रसून टाकले. पलंगाच्या काठाळ्या दोन्ही तळहातांत गच्च धरल्या. खाली मान टाकून 'पापांचा' बोजा शिरावरून झटकण्यासाठी, आपली आपणालाच नफरत वाटते आहे अशी बेमालूम डावी-उजवी मान डोलविली ! खान डोळे ताणून बघतच राहिला.

शेजारी पलंगावर टेकलेले संभाजीराजे कापल्या नजरेने राजांना निरखू लागले !

"आम्हास खैरियत देण्याची इजाजत आलिजासाहेबांकडून मिळवून द्या खान. एवढी – एवढी मेहरबानगी करा आमच्यावर ! '' वेदना असह्य झाल्यासारखे भासवीत बुरुजाचा ढलपा हळूहळू ढासळत बांधकामातून खचावा तसे खचत, 'जगदंब, जगदंब' म्हणत, उसासे भरून राजे पलंगावर आडवे झाले !

राजांनी फौलाद भवानीच्या माळेने दस्त करून टाकला !

"जरूर... जरूर हम कोशीश करेंगे ! '' खानाचे जाड, निबर ओठ आयुष्यात प्रथमच थोडे नरमाईचे बोलले. खान कोठीबाहेर गेला.

संभाजीराजे लेटल्या राजांच्या कपाळाकडे बघत राहिले. मिटल्या डोळ्यांच्या राजांच्या कपाळी मध्येच आठ्या उठत होत्या.

औरंगजेबाने खुशमिजाजीने राजांना खैरियतीची परवानगी दिली ! आग्र्याच्या 'मेवामंडीतून' मध्यम माटाचे पेटारे मिठाईने भरून त्र्यंबकपंत आणि निराजीपंत ते 'दस्तुरी-स्पर्शासाठी' कोठीकडे पाठवू लागले.

फौलादाच्या धिप्पाड सिद्दी पहारेकऱ्यांना कधीच मालूम पडले नाही की रोजाना पेटारे नकळत मोठ्या माटाचे का होताहेत ?

उभ्या आग्रा शहरात राजांनी हातस्पर्श दिलेले मिठाईचे पेटारे मोकाट सुळसुळू लागले. त्यातील मिष्ठास मिठाई खाताना सराई-सराईतील फकीर आणि आग्रेकर आस्मानाकडे हातपंजे उठवून दुवा देऊ लागले – " खुद्द बेमारको सलामत रखे !! ''

बाहेर आग्र्याचे आस्मान पावसाळी ढगांनी झाकाळले होते. कोठीत राजांचे मन विचारांच्या असह्य काळढगांनी येरगटले होते. धारेला लागलेल्या नावेसारखे मध्येच त्यांचे मन सरासर राजगडापर्यंत झेपावत होते. जगदंबेसमोर बसलेली मासाहेबांची काळवंडलेली मुद्रा बघून पुन्हा माघारा हटत होते.

त्यांच्या पलंगावर पायगतीला बसलेले संभाजीराजे गोंधळल्या, बावऱ्या नजरेने राजांच्याकडे बघू लागले. 'खरंच महाराजसाहेब आजारी आहेत ?' क्षणात एक तर क्षणात दुसरी अशा शंकांत त्यांचे मन फटका खाऊ लागले.

राजांनी त्यांच्या मुद्रेवरचा शक-अंदेश हेरला... हळुवार उठून संभाजीराजांच्या कानांतील चौकड्यांजवळ ओठ नेत राजे पुटपुटले. सूर्यफुलाच्या पाकळीवर बिलगलेल्या धुक्याचे पहाटवेळच्या थंड वाऱ्याने दवबिंदू उमटावेत तसे राजांचे सावध मोतीबोल संभाजीराजांच्या कानांत उतरले, "काळीज टाकू नका ! आमची बिमारी बनावटी आहे ! इथून सुटणे आहे आम्हास, आणि तुम्हासही ! रामसिंगाच्याकडे येणाऱ्या हर असामीचा बोल न् बोल कान देऊन ऐकत चला ! कुंभाराच्या बाडीचा राबता तोडू नका ! सावध असा ! ''

"जगदंब, जगदंब.'' असे पुटपुटत, राजे कण्हत पुन्हा पलंगावर आडवे झाले.

संभाजीराजांनी त्यांच्या कपाळीच्या शिवगंधाकडे एकदा बघितले. आणि त्यांचे हात आपोआपच पुढे झाले. आपल्या हलक्या हातांनी ते राजांचे पाय चेपू लागले !

कोठीत विचित्र भावनेचा पडदा पसरला. राजे आजारी आहेत अशा चिंतेची खिल्लत संभाजीराजांनी आपल्या चेहऱ्यावर चढविली.

" दो पंडत आये हैं। अंदर पेश आना चाहते हैं। आलिजाने उनको इजाजत दी है। " कोठीच्या दरवाज्यावर पहारा देणारा रामसिंगाचा नाथावत हा धारकरी आत येऊन राजांना म्हणाला.

" भेज देना ऽ. " राजे पलंगावरून न उठताच म्हणाले.

नाथावत उत्तर हिंदोस्तानी, ब्राह्मणी पेहराव केलेल्या दोन इसमांना घेऊन कोठीत आला. त्यांतील एक होते कवींद्र परमानंद आणि दुसरे होते अलाहाबादचे कवी कुलेश.

त्यांना बघताच राजे पलंगावरून उठण्यासाठी हालचाल करू लागले.

राजांना नमस्कार करून झटकन पुढे येत परमानंद आदराने म्हणाले, " लेटते रहना स्वामिन्. "

राजांची कीर्ती ऐकून ते दोन्ही कवी त्यांच्या भेटीसाठी आग्र्यात आले होते. औरंगजेबाला त्यांनी राजांच्या भेटीसाठी परवानगी द्यावी असा अर्ज केला होता. औरंगजेबाने तो अर्ज मंजूर केला! एकाच हेतूने की, ' बिमार सेवाला ' हे ' पंडत ' आयुष्य नश्वर आहे हे काफरी पद्धतीने अधिक चांगले पटवू शकतील!

परमानंदांनी राजांना आपला परिचय करून दिला. राजे पलंगावर उठून बसले.

" ये कनोजके कविवर है कवि कुलेश. " परमानंदांनी कुलेशांच्याकडे हात करीत त्यांचाही राजांना परिचय करून दिला. आणि म्हणाले, " बडे सुभागसे आपके दर्शन हुए. "

संभाजीराजांच्या पाठीवर आपला हात ठेवीत राजे एक एक शब्द म्हणाले, " हमारे फर्जंद – संभाजीराजे. " संभाजीराजांनी दोघाही कवींना नमस्कार केले.

कवी कुलेशांना राजे आणि संभाजीराजे यांना एकत्र बघताना मनोमन वाटले की, ' कालीमाता दुर्गाभवानीने आपल्या त्रिशूळाने रेखलेले कुठल्यातरी अज्ञात काव्याचे हे दोन सर्ग आहेत! एक पुरा – दुसरा पुरा होऊ घातलेला! आज ते पुसून टाकण्यासाठी औरंगजेबाने आपला मेहंदीच्या रसात बरबटलेला हातपंजा यांच्यावर उगारला आहे. कोण करील या देखण्या काव्यांचे रक्षण ? ' शस्त्रधारी दुर्गेची मूर्ती डोळ्यांसमोर तरळलेले कवी कुलेश शेजारच्या परमानंदांना आणि खुद्द स्वत:लाही ऐकू येणार नाही असे नकळत पुटपुटले – " रक्ष-रक्ष दुर्गेशनंदिनी ! "

राजांनी दोघाही कवींशी स्थिर चित्ताने चर्चा केली. कविवर जायला निघाले. त्यांनी राजे आणि संभाजीराजांना उत्तरी पद्धतीने झुकून अदबीचे नमस्कार केले.

" हिरोजी, रामसिंगांना आमची इच्छा कळवा. आमच्या फीलखान्याचे सारे हत्ती कविराजांना नजर केले आहेत! " राजांनी हिरोजी फर्जंदला हुकूम फर्मावला.

" जी सरकार. " हिरोजीने राजांची आज्ञा झुकून उचलून धरली.

परमानंद आणि कवी कुलेश राजांच्याकडे बघतच राहिले. न राहवून परमानंद अदबीने म्हणाले, " स्वामिन्, हमें हाथियोंसे क्या लाभ ? "

" कविराज, आम्ही विरक्त झालो. ही सराई सोडावी म्हणतो! आपणच मार्ग दाखविला पाहिजे! हत्ती मार्गी लावले पाहिजेत! आमचा भार हलका केला पाहिजे! " राजे प्रत्येक बोल दुपेडी अर्थाने बोलले! परमानंद जे काय समजायचे ते समजून गेले.

" जैसी आपकी आग्या. " म्हणत परमानंद, कवी कुलेश आणि हिरोजी यांच्यासह कोठीबाहेर पडले. राजे पलंगावर आडवे झाले. संभाजीराजांनी त्यांच्या पायगतीचा शालनामा त्यांच्या अंगावर सरकाविला. त्यांच्या कानामनात राजांचे बोल फिरू लागले – " ही सराई सोडणे आहे. आमची बिमारी बनावटी आहे. कुंभाराच्या बाडीचा राबता सोडू नका. हत्ती मार्गी लावले पाहिजेत! "

संभाजीराजे आपल्या महाराजसाहेबांचा पाय हलक्या हातांनी चेपू लागले. कोठीत राजांचे ' आजारपण ' चढत्या अंगाने रंगू लागले!

" हा भार आता सोसत नाही. आई ऽ कोण सत्त्वपरीक्षा ही ? ते गनिमांचे कैदी झाले. आम्ही आमच्या देही कैद झालो. तुझ्या नावाचा ' उदो ' करीत आम्ही पाजळले पोत नाचविले. आणि तू... ? तू आमचे ' आऊपण ' भडकत्या दिवट्या भिडवून किती वार जाळू बघावे ? तू साऱ्या जगाची ' आऊ '. मग तुझ्या पायाशी ठाण मांडून बसलो तरी आम्ही पोरक्याच कशा ? घे, तू उधळलेला या जिवाचा भंडारा आता तुझ्याच आठी हातांनी तुझ्याकडे परता घे! नाही! हा भार आता सोसत नाही! " धुनीतील बाभळगाठ तडकत जळावी तशा जिजाऊ असह्य कढांनी आतून जळत होत्या. त्यांच्या हाती न लागणाऱ्या विचारांच्या ठिणग्या फुलून फुटत होत्या. मनाच्या अंगणात ' शिवरून ' पडत होत्या.

त्यांच्यासमोरची जगदंबा समया, नंदादीपाची किरणफेक अंगावर लपेटून शांत शांत उभी होती. ती हलत नव्हती. उभ्या जगातील माजलेले ' अभद्र ' प्राशून टाकण्यासाठी तिने विस्फारलेले थोर मोठे डोळे बघताच जिजाऊ बसल्या जागी थरथरल्या. त्यांच्या कातर झालेल्या देहाच्या-मनाच्या वृंदावनावर कुणीतरी आकाशाचे ताम्हन पालथे करून थंड-थंडगार पाणी शिंपल्यासारखे त्यांना वाटले! त्या शहारल्या. एक चमत्कारिक विचार त्यांचा पाय एका अशुच रिकिबीत जखडवून त्यांना फरफटवत दूर घेऊन गेला! जीव घायाळ करणारी होती ती फरफट. जगदंबेचे विशाल, फाकले नेत्र बघताना जिजाऊंना वाटले – ' नरमुंडाचा सोस असलेली तू! तू हे डोळे ताणून रोखले आहेस तेच माझ्या राजा-बाळराजांवर!!! ' बालेकिल्ल्याच्या तटबंदीवरून एखादी पितळी थाळी थडथडत, थरकत, थपडा खात पायथ्याशी उतरावी तसे जिजाऊंचे मन त्या चरकविणाऱ्या विचाराने कुठेतरी खोलाव्यात तडफडत कोसळत गेले!

" ना ऽ ही! हा भार आता सोसत नाही! " म्हणत कावऱ्या-बावऱ्या झालेल्या जिजाऊंनी असहायपणे देव्हाऱ्याच्या पायजोत्यावर आपला असहाय, उजाड माथा

टेकला! तोही जगदंबेसमोरच! धड म्यानात न जाणाऱ्या, धड बाहेर पडून हाती न येणाऱ्या, मध्येच अटकलेल्या तेगीच्या पात्यासारखी त्यांच्या मनाची अवस्था झाली. देव्हाऱ्याच्या पायजोत्यावर टेकलेल्या त्यांच्या उजाड माथ्याखालचे डोळे सरासर पाझरू लागले. प्रतापगडीच्या गोंधळ्याच्या हातातील पोत गडवाऱ्यावर थरथरतो तशा त्या अंगभर गदगदू लागल्या.

भेदरलेली धाराऊ लगबगीने पुढे झाली. तिला 'मासाबास्नी' कशी साद घालावी कळेना. रंजुकीत खिळा ठोकलेली तोफ नाकाम होते तशी रांगडी असली तरी गळा भरून आल्याने धाराऊ सुन्न झाली होती. तिने आपला, भरला गोंदला हात गद्गदत जिजाऊंच्या पाठीवर ठेवला! तिच्या डोळ्यांतून टपटप आलेले थेंब खाली पाटावर ठेवलेल्या ताम्हनात पडताहेत याचे तिला भान नव्हते. त्या ताम्हनात वाहिलेल्या बेलपत्रांची खूणगाठ, पटावी म्हणून तिनेच एक एक करून सोडलेल्या सोनमोहरा होत्या! आता ते ताम्हन भरले होते. त्या मोहरा धाराऊच्या मावळी अश्रूंनी धुतल्या जात होत्या. जिजाऊंना माहीत नव्हते, धाराऊला कळले नव्हते पण एक अतिशय भावपूर्ण चित्र त्या देवमहालाच्या दगडबंद भिंती भारल्या नजरेने बघत होत्या.

आपला गोंदला हात जिजाऊंच्या पाठीवर 'सांतवना' साठी ठेवलेली धाराऊ होती संभाजीराजांची 'दूधआई'! तिचा हात पाठीवर असलेल्या व माथा जगदंबेसमोर टेकलेल्या जिजाऊ होत्या— राजांच्या आऊसाहेब! आणि त्या दोघींच्या पाठीवर आपल्या विशाल डोळ्यांचे हात फिरवीत उभी होती जगदंबा — उभ्या मावळाची आई!!

'बेताला पक्का' असलेल्या औरंगजेबाने एक मनसुबा चिरेबंद करून टाकला! राजांच्या कत्तलीचा!! आग्रा शहरातील विठ्ठलदासाची हवेली आता बांधून पुरी होत आली होती. फौलादखाँकडून राजांना त्या हवेलीत हलवून दुसऱ्याच दिवशी त्या हवेलीत हबशी नंग्या हत्यारांनिशी घुसवायचे होते. जी काफर दारा शिकोहची झाली तीच गत 'दख्खनी काफर मरहट्ट्याची' होणार होती!

मग रामसिंगच्या गळ्यावर तो वीतभर रुंदीच्या पठाणी तेगीचे पाते धरून त्याला जाहीर करायला लावणार होता— "'बेमार सेवा' गुजर गया!!"

जसे फर्मान घेऊन आग्र्यातून 'शाही सवार' सुटले होते तसेच राजांची 'वस्त्रे' घेऊन सांडणीस्वार मग मजल दरमजल करीत दख्खनेच्या रोखाने सुटणार होते! खिल्लत पांघरलेला औरंगजेबाचा एखादा खास 'विश्वासू' सरदार त्यांच्याबरोबर घोडा फेकीत जाणार होता. एका उजाड माथ्याच्या 'म्हातारीसमोर' राजांच्या वस्त्रांचा थोर थाळा ठेवून म्हणणार होता— "आलिजाने दवादारूकी जारी कोशिस की! मगर बस ना चला! राजासाबऽ... राजासाब खुदाको प्यारे हो गये!!" आणि आपल्याच मकानातले कुणीतरी 'गेल्यासारखे' दाखवीत तो हात बांधून गर्दन 'मातमीच्या दुःखाने' खाली टाकणार होता! मग कधीच न जिरणाऱ्या आक्रोशाचा काटा राजगडाच्या तटबंदीच्या अंगावर फुलायला वेळ लागणार नव्हता!

मागे 'राखलेल्या' 'संबूला' मग 'शाहजादे, संबूराजे' असे हाकारत मुल्लामौलवींकडून मोगली रिवाज पढविणे फारसे अवघड नव्हते. कोवळी रोपटी हवी तशी बाक देऊन वळविता येतात!

दिल्लीच्या भोवती असलेली बगावतखोरांची दंगल मोडून काढताच, जन्माने मराठी असलेल्या आणि वृत्तीने मोगली झालेल्या 'सेवाच्या बच्चाला— संबूराजाला' बरोबर घेऊनच लाखभर प्याद्यांसह मग दख्खनेत उतरता आले असते— राजरोस!

खुद्द आपल्या बैठकीच्या 'शाही हत्तीवरच्या' हौद्यात 'संबूराजाला' बसवून घेऊन, ढोल-ताशांची तडतड उठवीत मराठी मुलखात औरंगजेबाला दवंडी पिटता आली असती— "तमाम मुफलिसोंको जाहीर होऽऽ बादशहा सलामत राजा सेवाजी की 'अमानत' लाये हैंऽऽ! अदब-अदब!!

औरंगजेबाच्या मनात बनलेला असा हा बीतपशील 'शाही' बेत होता!

औरंगजेबाने राजांच्या माणसांना आग्रा सोडण्यासाठी 'दस्तके' देऊन टाकली. त्याला मिळेल तेवढा शिवाजी आता एकाकी करायचा होता, आणि स्वतःच्या कबजात घ्यावयाचा होता. राजांची माणसे आग्र्याबाहेर पडली.

राजांनी रामसिंगामागे 'जामीनकीचा कतबा रद्द करून घ्या, आमच्यासाठी तुमची जान गुंतवू नका' असा लकडा लावला.

नाना लटपटी करून रामसिंगाने राजांच्यासाठी असलेली आपली जमानकी रद्द करून घेतली. औरंगजेबानेही तिची गरज उरली नाही हे पाहून ती रद्द केली. रामसिंग रीतसर मोकळा झाला!

'बिमारासाठी' 'दुवा' मागणारे मिठाईचे पेटारे ठरल्यावेळी कोठीत येत होते. राजे ते पेटारे मार्गी लावण्यासाठी कधी मदारी मेहतर तर कधी हिरोजी फर्जंद यांना कोठीबाहेर पाठवीत होते.

'बाळकृष्णासह' यादवनायक वसुदेव मथुरेतून, धोऽ धो कोसळणाऱ्या मुसळधारांचा सपकारा अंगावर घेत कंसाच्या कैदेतून सलामत सुटला तो 'कृष्णअष्टमीचा' दिवस मागे पडला. राजांच्या कृष्णभक्त मनाला त्या दिवसाने एक दिशा गूढपणे दाखवून दिली. "पण हे सारे जमावे कैसे? पेटाऱ्यात बसून? राजांच्या जागत्या, उघड्या डोळ्यांसमोर भवानीचे शेकडो पोत नाचू लागले. कात्रजचे बैल! दिवट्या! हूल! गनिमांस पेटारियांची हूल!" राजे विचारासरसे झटकन् पलंगावर उठून बसले! "हिरोजीऽ, सोस पडला! पाणी!" हिरोजीला राजांनी आज्ञा केली.

पाण्याचा गडवा घेऊन हिरोजी राजाच्यासमोर आला. त्याच्या हातून गडवा घेताना राजांची त्याच्यावर नजर गेली. आणि राजे हिरोजीकडे बघतच राहिले. दर्पणात बघितल्यासारखे! हिरोजी राजांचा अनौरस बंधू होता. त्याची शकल राजांशी मिळतीजुळती होती! हनुवटीभर राजांच्या सारखी निमुळती दाढी फिरली होती.

एक विचार राजांच्या मनाच्या चक्रावर चढला. भवानीने त्रिशूलाने चक्राला फिरका दिला! माठ घडू लागला. राजांचा एक बेत मनोमन पक्का झाला – "आमचा पेहराव अंगी चढवून हिरोजी आमच्याऐवजी या पलंगावर चढेल औरंगशाचा दर्बारी 'बिमार' म्हणून! आम्ही हिरोजीचा मावळ वेष अंगी चढवू. 'हिरोजी' म्हणून! पुढे? पुढे आई माग देईल तसे!"

"महाराज, पानी!" गडवा हाती घेऊन विचारात हरवलेल्या राजांना हिरोजीने पाणी पिण्याचा आठव करून दिला.

मान वर करून नरड्याची घाटी वरखाली दौडवीत राजे पाणी प्याले. गडवा हाती देताना हिरोजीला थंडपणे म्हणाले, "हिरोजी, आमचं चालणं-बोलणं, उठबशीचा लकब नीट पारखून ठेवणे! मोठा हुन्नर कार्यी लावणे आहे."

वाऱ्याच्या झुळकीबरोबर खिडकीचे दार कळेल न कळेल असे करकरते तसा हिरोजीच्या तोंडून अस्पष्ट होकार बाहेर पडला – "जी."

कमरेचा शेला उतरवून हिरोजीच्या हाती देत राजे म्हणाले, "आता पेटारे येतील. त्यातल्या एकात हा ठेवून द्या! त्याचा शेव झाकणाबाहेर दिसेल असा राखा. पेटाऱ्याबरोबर तुम्ही जातीनिशी जा. घडेल ते आमच्या कानी घाला."

"जी." हिरोजीला राजांचा अंदाज येईना!

ठरल्याप्रमाणे उत्तरी भोये पेटारे घेऊन आले. राजांनी झाकणे उघडलेल्या पेटाऱ्यातील मिठाईला दस्तुरी-स्पर्श केले.

हिरोजीने राजांचा शेला एका पेटाऱ्यात बाहेरून शेव दिसेल असा बेमालूम सरकविला! कमरेत झुकून राजांना अदबमुजरा घालीत हिरोजी पाच कदम मागे हटला. पेटाऱ्यांबरोबर कोठीबाहेर पडला. पेटाऱ्यांसह चालू लागला.

कोठीच्या तोंडावरचा एक पहारा चुकला. दुसरा मागे हटला आणि एका सिद्दी हशमाने शेल्याचा लोंबता शेव बघून आपले बटबटे डोळे ताणीत भोयांना दरडावले, "ठायरो ऽ! खोलो ये!" त्या पेटाऱ्याकडे तेगीचे टोक रोखीत तो म्हणाला.

भोयांनी तो पेटारा जमिनीला टेकविला. हिरोजीने झटकन पुढे होत पेटाऱ्याचे झाकण उघडले. हशमाने शेल्याचे टोक हातात धरून तो सर्रकन बाहेर खेचला ... "खाली करो ये सब." पेटाऱ्यातील सगळी मिठाई त्याने बाहेर काढायला लावली! एखाद्या 'लड्डूत' सेवा बसलेला नाही याची खातरजमा करून घेतली!!

राजांनी अंदाज बांधला तसेच घडले होते! सिद्दी पेटाऱ्यांची केव्हाही झडती घेतच होते. घेणार होते.

आम्यावर चढून आलेली श्रावणाची पावसाळी वद्य एकादशी कोंदटत परतीला लागली. दरबारातून बाहेर आलेल्या रामसिंगाचे घोडेपथक लाल किल्ल्याच्या बड्या

दरवाज्यातून बाहेर पडले. रामसिंगाचा चेहरा चिंतावला होता. वारंवार त्याच्या कपाळीचा राजपुती टिळा आक्रसत होता. त्याच्या बगलेला धरून एका जातवान घोड्यावर मांड घातलेले संभाजीराजे कायदे पेलत धिम्या चालीने दौडत होते. कुणीच काही बोलत नव्हते. मागे राजपुती घोडाईत धावणी धरून होते.

औरंगजेबाने खूब होशियारीने राजांच्या कत्तलीचा बेत आखला होता. पण फितवा केलेल्या लाल किल्ल्याच्या भिंतींनी तो रामसिंगाच्या कानी आज घातलाच.

उद्याच राजांना हलविण्यात येणार होते आणि परवाला – 'जुम्म्याच्या' 'पाक' दिवशी 'नापाक' राजांना या जगातून पाठविण्यात येणार होते 'जहन्नमच्या' दरबारातली खिल्लत घेण्यासाठी! पथकाची घोडी दुडकत दौडत होती. मानी रामसिंगाचा जीव मान फासात अडकल्यागत घुसमटत होता. घोड्याच्या खूर टापांचा आवाज त्याला विचित्र वाटू लागला.

"उद्या तुम्हाला हलविण्यात येणार. खबरदार असा." हा निरोप राजांना कोठीत पोचायला हवा होता. आज आणि मोठ्या सावधगिरीने. पण तो कसा पोचवावा? रामसिंगाला राजांना भेटण्याची दरबारने 'मनाई' घातली होती. कोठीत त्याला जाता येत नव्हते. निरोप पोचविण्यात कुसूर झाला तर नतिजा ठरलेला होता. माथ्यावरच्या रजपुती टिळ्यावर एक जन्मभराचा काळा डाग पडणार होता!

रामसिंगाची हवेली आली. मोतद्दारांनी झटकन पेश येत सवाऱ्याची घोडी ओठाळ्या धरत आपल्या ताब्यात घेतली.

मध्यभागी असलेल्या राजपुती बैठकीवर रामसिंगाने संभाजीराजांना बसविले. महालात अस्वस्थ येरझाऱ्या घेणाऱ्या रामसिंगाची मूठ मध्येच कमरेच्या तलवारीच्या मुठीवर गच्च बसत होती. बेचैन, हैराण झालेल्या रामसिंगाने छातवान रिते करीत एक लोंबता, असहाय निःश्वास सोडला.

संभाजीराजे रामसिंगचाच्याची घालमेल बघून बैठकीवरून उठले. त्याच्याजवळ जात म्हणाले, "चाचा, कोण प्रकारची तकलीफ?"

रामसिंग संभाजीराजांच्याकडे बघताना भरून आला. त्यांच्या खांद्यावर आपले हाततळवे चढवीत तो क्षणभर संभाजीराजांच्या डोळ्यांत बघत राहिला. त्यांच्या कपाळीचे दोन दळी शिवगंध बघताना रामसिंगाला कसलीतरी अजब मसलत स्फुरून गेली. "चंडी ऽ चंडी ऽ" ओठांतून शब्द सुटले त्याच्या.

संभाजीराजांचे खांदे घट्ट आवळून टाकीत तो म्हणाला, "कुँवर, चलो हमारे साथ!" संभाजीराजांना घेऊन तो थेट हवेलीच्या देवमहालात आला. देव्हाऱ्यात पूजल्या रणचंडीच्या मूर्तीसमोर त्याने झटकन गुडघे टेकले. माथा क्षणभर देवीसमोर टेकविला. झटकन उठून देवमहालाचे दार आडबंद टाकून बंद केले.

रणचंडीच्या पायांवरचे एक त्रिदली बेलपत्र उचलले. त्याची दुबाजूची दळे खुडून संभाजीराजांच्या हातात ते ठेवताना रामसिंगाचे डोळे भरून आले.

"कुँवर, बडे होशियारीसे सुनना. आज रात कोठीमें राजासाबको मिलना. कहना, कल तुम्हे कोठीसे हिलाया जायेगा. ये बेलपत्ता उन्हें देना. कहना, एक सिर्फ – एकही पत्ता बाकी रहा!!" गळा दाटून आल्याने रामसिंगाला अधिक बोलवले नाही. त्याने आवेगाने संभाजीराजांना पोटाशी बिलगते घेतले.

त्याला बिलगलेल्या संभाजीराजांच्या मनी कुठेतरी खोलवटातून आल्यासारखे शब्द घुमले – "रजपूत म्हणजे 'राजाचे पुत्र'! आम्ही रजपूत आहोत! तुम्ही रजपूत आहात. आणि – आणि रामसिंगही रजपूत आहे!!"

रामसिंगापासून विलग झालेल्या संभाजीराजांनी रामसिंगाच्या छातीकडे बघितले. त्या छातीवर मिर्झा राजाच्या छातीवर होते तसे 'हिरवे पदक' नव्हते!

रामसिंगाच्या हवेलीत खाना घेऊन राजांना भेटण्यासाठी संभाजीराजे कोठीत आले. महाराजसाहेबांची पायधूळ घेऊन त्यांनी कोठीभर आपली सावध नजर फिरवली. भिंतीला टेकून मदारी आणि हिरोजी उभे होते. कोनाड्यातील टेंभे आपल्या उरातील उजेड उधळीत अंधाराला दूर पिटाळून जळत होते.

"बसा." पलंगावर लेटल्या राजांनी हाताचा पंजा बिछायतीवर थोपटला.

संभाजीराजे अदबीने राजांच्या बिछायतीवर टेकले.

"दरबारी गेला होतात?" शांतपणे राजांनी विचारले.

"जी."

जळत्या टेंभ्यांना धरून पुन्हा शांतता पसरली. कोठीच्या दरवाज्यावरचे रजपूत आणि हबशी पहारेकरी हत्यारे पेलून आडफेर टाकीत नेहमीसारख्या येरझाऱ्या घेत होते. त्यांच्या कोठीत आलेल्या फिरत्या सावल्या राजे आणि संभाजीराजे यांना क्षणभर झाकाळून टाकीत होत्या. पुन्हा दूर जात होत्या.

"थाळा घेतलात?" राजांनी मायेने विचारले.

"जी." संभाजीराजांनी पुन्हा हुंकार भरला.

"महाराजसाहेब ऽ..." पायदळी वाहिलेल्या सोनचंपकाच्या अनवट कळ्याने आपला सुगंध देवमूर्तीच्या नाकाकडे उचलून धरावा तसे संभाजीराजांनी आपले बोल राजांच्या कानी घातले – "रामसिंगचाच्यांचा सांगावा आहे. तुम्हास उद्या बादशहा कोठीतून हलविणार! ही बेलपत्ती तुम्हास द्यायला सांगून भरल्या डोळ्यांनी चाचा म्हणाले, 'एक – सिर्फ एकही पत्ता बाकी है!'" संभाजीराजांनी ते एकदळी बेलपान राजांच्या हाती ठेवले.

दिवसभर भरधाव दौड घेऊन, रात्री पागेत ठाण झालेल्या, मिटल्या डोळ्यांनी उभ्या असलेल्या घोड्यांच्या हारीत ऐन मध्यरात्री एखादा भुजंग फणा उभवीत, फूत्कारीत घुसताच ती घोडी जशी खूर खटखटून उधळतील तसे राजांचे सारे दबले विचार क्षणात उफाळले! कोठी बदलणे म्हणजे कत्तल! केविलवाणे मरण!

झटकन कोपरावर भार देत राजे बगलेने अर्धवट उठले. संभाजीराजांचा दंड त्यांनी आवेगाने घट्ट धरला. त्यांच्याकडे भरल्या नजरेने एकटक बघताना राजांना एक बालभुत्या दिसू लागला. "भवानी राजा उदं ऽ ऽ" म्हणत विखुरलेल्या केसांनी काठीच्या ठेक्यावर पोत नाचविणारा. हरभट ज्योतिष्याचे भाकीत बोल राजांच्या कानांत दौडून गेले, "हा उंच गडकोटावर राहील! प्रलय माजवील!"

संभाजीराजांच्या चर्येत उतरलेल्या सईबाईंच्या खुणा राजांना गद्‌गदवून गेल्या – "एकला जीव पदरी घातला!"

राजांनी एक निश्चय मनी पक्का करून टाकला. चुनेगच्च मनसुबा! "आम्ही कोठीबाहेर सलामत पडलो तर बेहतरच आहे. तसे नाहीच घडले तर – तर हे बाळराजे तरी यवनाच्या दाढेतून सुटलेच पाहिजेत! गडकोटावर राहणेसाठी! प्रलय माजविणेसाठी!" बाहेरून शांत असलेले राजे म्हणाले – "आज तुम्ही कोठीतच झोपा."

संथपणे राजे पलंगावर लेटते झाले. बघणाऱ्याचा जीव घुसमटेल असे बराच वेळ खोकले. लटके! हिरोजीने पुढे येत थुंकीसाठी तस्त राजांच्यासमोर पेश धरले.

तस्तात थुंकून राजे म्हणाले, "हिरोजी, खानसाहेबांना निरोप द्या. बाळराजे आजची रात्र कोठीत झोपण्याचा हट्ट करताहेत. त्यांना इथं झोपू द्या म्हणावं."

"जी." तस्त पलंगाच्या खुराजवळ ठेवून हिरोजी बाहेर गेला. मदारीने एक मात्रा उगळायला सुरुवात केली.

हिरोजीने फौलादखानचा निरोप परत्या पावलांनी आणला –

"म्हाराज, खानसाब म्हनलं – बेशक, बेशक सोने दो बच्चेकू बापके साथ!"

रात्रीने चौक भरला. श्रींच्या राज्याचे पिढ्यांपिढ्यांचे भवितव्य ठरविणारा, अत्यंत सावध 'गोंधळ' कोठीत उभा राहिला! घटनांचा, हुन्नराचा, धैर्याचा, कसबाचा.

मनोमन आईचा 'उदो' करीत राजे, संभाजीराजे, हिरोजी, मदारी साऱ्यांनीच हा गोंधळ पार पाडायचा होता. यातील एक जरी 'चुकूर' झाला तरी जगदंबा आठी हातांत पोत घेऊन साऱ्यांनाच पुरते जाळून काढायला मुलाहिजा राखणार नव्हती! पाळणुकीला कठीण असलेले दैवत होते ते!

कपाळीच्या शिवगंधावर उजव्या हाताचे पालथे मनगट ठेवून राजे पलंगावर पडून होते. त्यांच्या एका बगलेला फरसबंदीवर हिरोजी बसला होता. पलंगावर पायाशेजारी संभाजीराजे बसले होते. राजांच्या तळपायांना तेलवण चोळण्याच्या निमित्ताने मदारी पायगतीला बसला होता. कोठीला उजेडाचा उबारा देत कोनाड्यात टेंभे जळत होते. डोळे मिटलेले राजे दबक्या आवाजात बोलू लागले, "'बाळराजे ऽ' असे जवळ या."

संभाजीराजे पुढे सरसे झाले.

"नीट ध्यान देऊन् आम्ही सांगतो ते ऐका. एकही बाब विसरू नका." राजे क्षणभर थांबले. मग एकलगीत बोलू लागले, "उद्या सकाळी तुम्ही कोठीबाहेर पडा. चाच्यांच्या हवेलीत जा. नेहमीप्रमाणे त्यांच्याबरोबर दरबारी जाऊन या. जाताना सर्जेरावांना बरोबर घ्या. पहिला दरबार उलगताच 'तब्येत ठीक नाही. आम्ही निघतो.' असे रामसिंगचाच्यांना सांगून सर्जेरावासह किल्ल्याबाहेर पडा. तुम्ही कुम्हारवाडीत देशीच्या कुंभाराच्या मेटावर थांबा. सर्जेरावांना दोन घोड्यांनिशी नूरगंजबागेजवळ तयार राहायला सांगा, आम्ही तुम्हांस उदईक कुम्हारवाडीत भेटू! तिसऱ्या प्रहरानंतर आम्ही आलो ना आलो तरी तुम्ही सर्जेरावांसह आग्र्याबाहेर कूच करा. त्यांच्याजवळ दस्तके आहेत ती दाखवून मथुरा जवळ करा. ते सांगतील तसे वागा. कमी बोला. आमच्यासाठी थांबू नका." राजे थांबले. त्यांच्या मिटल्या डोळ्यांसमोर कितीतरी चेहरे क्षणात गरगरत फिरून गेले – मासाहेब, पुतळाबाई, धाराऊ, येसूबाई! सावळ्या, पारख्या झालेल्या सईबाई!

सांगितले ते केवढे उमगले याचा सरतपास घेण्यासाठी राजांनी दोन वेळा सारे संभाजीराजांच्या तोंडून वदवून घेतले.

"आता. झोपा तुम्ही." राजांनी संभाजीराजांना सांगितले. मदारीने पुढे होत संभाजीराजांचा टोप हाती घेतला. नेऊन चौरंगावरच्या तबकात राजांच्या टोपाजवळ ठेवला. संभाजीराजे पलंगावर आडवे झाले. केस मोकळे सुटलेले संभाजीराजे बघताना राजांच्या छातीत असंख्य कालव वळवळले. त्यांनी बाळराजांचे मस्तक हळूच आपल्या मांडीवर घेतले. कुणी सांगावे – ही भेट शेवटचीही ठरली असती!

राजांची निमुळती – सडक बोटे संभाजीराजांच्या कुरळ, दाट केसांवरून फिरू लागली. मावळी आभाळ बालसूर्याच्या जावळातून बोटे फिरवीत होते!

फार दिवसांनी संभाजीराजांना अशी मायेची 'बिछायत' मिळाली होती. त्यांच्या पापण्या झापडू लागल्या. आपोआप मिटल्या.

टेंभ्याच्या उजेडात मांडीवर सुख झालेल्या संभाजीराजांना बघताना राजे कशात तरी हरवले. विचार करू लागले – 'खरेच भाग्यवान आहात. आम्हाला आठवत नाही कधी आमच्या महाराजसाहेबांची मांडी अशी उशी म्हणून मिळाल्याचे!'

राजांनी झोपल्या संभाजीराजांची मान हलकेच बिछायतीवर ठेवली. त्यांच्याशेजारी ते आडवे झाले. पलंगाजवळ एका घोंगडीवर हिरोजी, दंडाची वळी डुईखाली घेऊन कलंडला. मदारी पहारा दिल्यासारखा कोठीत फिरू लागला.

"हिरोजी ऽ" पडल्या पडल्या राजांनी दबकेच हाकारले.

"जी ऽ" फरसबंदी बोलली.

राजे पलंगावरून खाली कलंडलेल्या हिरोजीशी दबक्या आवाजात, तख्तपोशीकडे बघत बोलू लागले. सगळ्या जिवाचा कान करून हिरोजी नीट ऐकू लागला.

"आमच्या साऱ्या लकबी ध्यानी घेतल्या?" राजांनी विचारले.

"जी ऽ" हिरोजी हुंकारला.

"पहाटे लाल किल्ल्यावरची नौबत दुडदुडते? ती ऐकायला जागे राहा. त्या वेळी बादशहा फज्रची नमाज पढतो. रात्रीचे पहारे त्या वेळी गस्त देत पालटतात. त्या वेळी आमच्या जागी 'तुम्हास' बिमार म्हणून झोपायचे आहे! तुमचा चेहरा आमच्याशी मेळजुळीचा आहे. उद्या पहाटेपासून तुम्ही राजे. आम्ही हिरोजी. आमच्या जागी पलंगावर कोठीच्या दरवाज्याकडे पाठ करून कोरे झोपा. उदईक पेटाऱ्याबरोबर आम्ही हिरोजी म्हणून कोठीबाहेर पडू. संध्याकाळी तुम्ही पुन्हा तुमचा पेहराव चढवा. इथे असलेल्या लोड, गिर्द्या पलंगावर रचून त्यावर बेमालूम शालनामा पांघरा. त्या लोड-गिर्द्यांच्या धन्याचे पाय चेपा. संध्याकाळी नमाजाचे वख्ती पहारे बदलतात तेव्हा शिताफीने तुम्ही कोठीबाहेर पडा. जमेल तशी दौड घेऊन मुलूख गाठा. गाफील राहू नका. "इथे झोपल्यावर एकसारखी मिशीवर पालथी मूठ फिरवू नका!"

ताणल्या डोळ्यांच्या हिरोजीने सारे ऐकून घेतले. त्याची विचारचक्रे सुरू झाली. राजांच्याबद्दलचा आदरभाव बारावंदी तोडून बाहेर येईलसे त्याला वाटले.

"झोपा आता." पलंगाने फरसबंदीला सूचना केली. गोंधळाचे पहिले नमन पार पडले होते. लाल किल्ल्यात मऊ बिस्तऱ्यावर लेटलेला औरंगजेब अंगावर उबदार रजई पांघरून दोन्ही हातपंजे अस्मानाकडे उडवीत पुटपुटला – "खुदा आमेन! आमेन!"

कोंदटलेल्या, पावसाळी आकाशाची कूस फोडण्यासाठी श्रावण वद्य द्वादशीचा दिवस झट्या घेऊ लागला.

"दुडदुड ऽऽ धुमम्म् दुड – दुड – धुम्म्" लाल किल्ल्यावर नगारखान्यात 'सबरची' नौबत उठली. पहाटवाऱ्यावर स्वार होत ती राजांच्या कैदखान्याच्या कोठीत घुसली.

राजे निसबतीने जागेच होते! नौबत ऐकून त्यांनी आग्र्याच्या पहाटवाऱ्याच्या कानांत आपला सर्वांत आवडता व भरोशाचा मंत्र सोडला – "जगदंब, जगदंब ऽ!" माणसे असली तरी कुठल्याच देशीचे 'वारे' मात्र बेईमान नसतात! त्यांना एकदा सायवळ करून घेतले की त्यांच्या मागाने जीवनाची नौका निर्धोर हाकारता येते! क्षणभर राजांनी लेटल्या लेटल्या आपल्या कुळाचा 'वसा' असलेल्या छातीवरच्या कवड्यांच्या माळेवर हात चढविला. कवड्या भवितव्याला चकरा देणाऱ्या थोर गुणाच्या! राजांच्या बोटांची आणि त्यांची काही न बोलताच मसलत घडू लागली.

रजई हटवून ख्वाबगारातून बाहेर पडलेला औरंगजेब वजू करून, मक्केला मुखडा देत नमाजासाठी गुडघे टेकून कलमे पढू लागला – "अलहम्दुल्लिल्लाहेऽ"

"हिरोजी ऽ" राजांनी फरसबंदीला साद घातली. संकल्पाने साधनाला हाकारले.

" जीऽ " फरसबंदी रात्रभर जागीच होती! हिरोजी बांधल्या आवाजाने उत्तरला.

" मदारी " राजांनी ' मदार ' टाकलेल्या मदारीला सादवले.

" जी ऽ जागा हाय ! " जाब आला.

क्षणभर शांततेने आपली काळी घोंगडी सगळ्या कोठीभर पुन्हा पसरली.

" मदारी, दरवाज्याची जागा घे, कुणी कोठीच्या आत डोकावले तर इशारत भर ! "

" जी ऽ ! " मदारी उठला. कोठीचा दरवाजा आणि जाळीदार खिडकी यावर नजर ठेवीत पहारा देऊ लागला. करंजेल सरतीला आल्याने टेंभे सुमार झाले होते.

" हिरोजी, पडल्या पडल्या अंगीचा पेहराव उतरा." राजांनी उभा केलेला गोंधळ रंगू लागला.

पलंगावर पडूनच राजांनी आपला जामा, आतला तहबंद आणि मांडचोळणा उतरला. गळ्यातील कंठे, कवड्याची माळ, कानातील सोनचौकडे, अंगठ्या उतरवून एक एक करीत हिरोजीच्या हाती दिले. उजव्या हातातील सोनकडे काढण्याची राजे खटपट करू लागले. ते काही निघत नव्हते! हिरोजीने आपली बाराबंदी आणि चोळणा पलंगावर सरकविला. पडूनच राजांनी हिरोजीचे कपडे पेहरले. सडक बोटांच्या नखांनी कपाळीचे शिवगंध खरवडून काढले!

शेजारी सुख झालेल्या संभाजीराजांच्या पाठीवर एकदा मायेने हात फिरवला. राजांचा साज चढवून हिरोजी तयार झाला होता.

" हिरोजी, आम्ही उठतो. सिताबीनं आमची जागा घ्या. आम्ही तुमच्यासमोर दर्पण धरू. त्यात बघून कपाळी शिवगंध रेखून घ्या ! "

राजांनी अंगावरचा शालनामा हळूच दूर हटविला. राजे पलंगावरून खाली उतरले. क्षणात मन बांधून हिरोजी पलंगावर चढला. त्या हालचालीत झोपलेल्या संभाजीराजांनी हुस्कारा सोडीत कूस परती केली. हिरोजीने त्यांच्या पाठीवर ' मायेचा ' हात फिरवला!

हिरोजीचा पांढरा, सुताडी शेला राजांनी कमरेला आवळला. भिंतीकडे पुढा करून खालचा ओठ दाताखाली दाबून खटपटीने आपल्या उजव्या हातीचे ' सोनकडे ' बाहेर खेचले. पलंगाजवळ जात त्यांनी हिरोजीला त्याच्या हाती असलेले चांदीचे कडे उतरायला सांगितले. खुद्द आपल्या हातांनी राजांनी हिरोजीच्या हाती सोनकडे भरले. त्याचे चांदीचे कडे आपल्या मनगटात चढवून घेतले. राजांनी डोकीवर थोराड मावळी कंगणी पगडी चढविली.

ऊर भरून आलेला हिरोजी म्हणाला— " म्हाराजऽ, ... " राजांनी त्याला धीर दिला. " तुम्ही आता राजे आहात. संकोचू नका. आम्ही म्हणतो तसं एकदा ' जगदंब ' म्हणा."

हिरोजी क्षणभर घोटाळला. मग निर्धाराने तो छातीवरच्या माळेवर बोटे चढवीत, डोळे मिटून पुटपुटला, " जगदंब, जगदंब ! " हुबेहूब राजेच झोपले होते पलंगावर!

ते ऐकताना राजे कमरेत वाकले. फरसबंदीकडे त्रिवार हात नेत अदबमुजरा घालीत सहीसही हिरोजी त्यांनी पेश केला, " महाराज, मुजरा." वर उठून त्यांनी डाव्या हाताने बाराबंदीचा उजवा हातोपा चुण्या देत वर सारला. डावाही वर घेतला. हिरोजीसारखा! मिश्याखालून पालथी मूठ फिरविली. चांदीचे ओळंबते कडे वर सरकवून हातपोटरीत घट्ट बसविले!

बाहेर पहारे बदलले होते. आत राजे बदलले होते. आम्यात दिवस बदलत होता! पलंगावर हिरोजीशेजारी सुख झालेल्या संभाजीराजांना याची काहीच कल्पना नव्हती!

राजांनी हिरोजीसमोर दर्पण धरला. मदारीने शिवगंधाचे तबक धरले. हिरोजी आपल्या कपाळी दोनदळी शिवगंध रेखून घेऊ लागला.

सुखदु:खाचे दोन पट्टे ' शिवानेच ' त्या सर्वांच्या भाळी रेखले होते. आता तोच निभावून नेणारा समर्थ होता!

दिवस वर आला. संभाजीराजे उठले. मदारीने त्यांच्या हातात पाण्याचा गडवा दिला. संभाजीराजे तस्तात हात-तोंड धुऊ लागले. ते बघताना हिरोजीच्या वेषातील राजांना बराच वेळ मनात घोळत असलेल्या एका पेचावर तोड सुचली.

राजांना आपल्याच सोंगाचा बाहेरच्या पहारेकऱ्यांना " कोणेविशी शक—अंदेशा " येतो काय याचा सरतपास घ्यायचा होता. शंभूराजांचे बनावट ' हिरोजीवर ' ध्यान नव्हते. झटकन राजे पुढे झाले. त्यांनी वाकून तस्त उचलले! तस्त घेऊन ते ताठ मानेने कोठीबाहेर पडले. बाहेर ते रिकामे करून पुन्हा कोठीत आले. पहारे नंगी हत्यारे पेलून चालूच होते!

राजे कोठीच्या भिंतीला धरून ' अदबीने ' उभे राहिले. मदारीने संभाजीराजांना त्यांचा टोप, कमरेत वाकून अदब-पेश केला.

हिरोजी पलंगावर कोरे पडून होता.

" महाराजसाहेब," संभाजीराजे पलंगाजवळ जात म्हणाले.

" हां." पलंगावरचा हिरोजी हुंकारला. बेमालूम खोकल्याची उबळ उठवली.

" येतो आम्ही ! " संभाजीराजे म्हणाले आणि पाय शिवण्यासाठी पलंगाच्या पायथ्याकडे सरकले.

खोकत हिरोजीने झटकन पाय पोटाशी घेतले आणि तो धापावत— गडबडीने म्हणाला, " आम्ही सांगितलेलं नीट ध्यानी धरा. आता टाकोटाक बाहेर पडा. कुम्हारबाडीत आमची वाट बघा. तिसऱ्या प्रहरानंतर. औक्षवंत व्हा ! "

संभाजीराजांनी " जी " म्हणत तीन वेळा पलंगाला मुजरा केला आणि ते कोठीबाहेर पडू लागले.

न राहवून मावळी वेषातले राजे भिंत सोडून पुढे झाले. बाहेर पडणाऱ्या पाठमोऱ्या बालभुत्याकडे बघताना त्यांच्या मनात विचारांचे कल्लोळच कल्लोळ उठले, " ये राज्य

व्हावे हे श्रींचे मनी फार आहे. आपण सारे त्यास बांधील आहोत. येशवंत व्हा!" दरवाज्यातून दूर जाणारी संभाजीराजांची पाठमोरी मूर्ती राजे एकटक बघत होते.

मदारी हिरोजीच्या वेषातील राजांच्याकडे गलबलत्या काळजाने बघत राहिला. कारण छातीवर आता कवड्यांची माळ नाही याचे भान काही राजांना उरले नव्हते. ते आपल्या छातीवरच्या बाराबंदीवर हाताची चाचपती बोटे फिरविताना स्वत:ला विसरून गेले होते!

तिसरा प्रहर टळतीला गेला. कुम्हारवाडीत संभाजीराजे, त्र्यंबकपंत आणि निराजीपंत कुंभाराच्या मेटावर होते. घोंगडीवर बसलेले संभाजीराजे विचाराच्या पाठलागाने हैराण होत होते. आपसुख उठून बाहेर येत नूरगंजबागेकडून येणाऱ्या वाटेला डोळे लावीत होते. पुन्हा आत येऊन घोंगडीवर बैठक घेत होते.

संभाजीराजांची उलघाल वाढीला लागली. "... आणि – आणि महाराजसाहेब आलेच नाहीत तर! तर – तर जेधेकाकांच्या संगतीने आज आम्याबाहेर पडायचं. मथुरेच्या वाटेनं चाल धरायची. मथुरा! कुठं आहे? कशी आहे? तेथून जमेल तसं मुलखात जायचं. आणि थोरल्या मासाहेबांनी विचारलं, 'तुमचे आबासाहेब कुठं आहेत?' म्हणून तर? – मासाहेब! किती दिवस झाले, त्यांच्या हातून कपाळी शिवगंध नाही रेखून घ्यायला मिळालं! आणि धाराऊ? धाकल्या आऊसाहेब, रायाजी, अंतोजी, सैस, गोमाजीबाबा –" त्यांच्या मनाचे राजपान वाहतीला लागले.

"टप्ऽ टप्ऽ टप्ऽ" घोड्यांच्या निसटत्या टापा संभाजीराजांच्या कानी आल्या. त्यांच्या मनीचे विचार दूर उडाले. कमरेच्या हत्याराच्या मुठीवर पंजाची पकड चढवीत ते घोंगडीवरून ताडकन वर उठले. निराजीपंतांकडे एक नजर देत ते तरातर कुंभाराच्या मेटाबाहेर आले. बाहेर श्रावणाची एक तुटकी सर शिपकारत होती. तिच्या जाळीदार चंदेरी पडद्यातून संभाजीराजांना दोन स्वार दुडक्या गतीने येताना दिसले. दोन्ही घोडाइतांच्या डोक्यावर घेरेदार कंगणी पगड्या होत्या.

त्या स्वारांपैकी सर्जेराव जेधे पुढे झाले. सामोरे येत त्यांनी संभाजीराजांना मुजरा केला, "चला, टाकोटाक निगायचं हाय." ते दबकून बोलले.

"निघायचे?" क्षणभर संभाजीराजे गलबलले. महाराजसाहेबांशिवाय निघायचे? कुठे? कशासाठी?

सर्जेरावांच्या पिछाडीला असलेला घोडाईत पायउतार झाला होता. सर चुकविण्याचे 'निमित्त' करून त्याने थोडीशी मान झुकती ठेवली होती. त्या घोडाईताची सुराने, लगीने पावले पडत होती. पायीचे मावळी पायताण कुरकुरत होते.

त्या पावला-पावलांबरोबर संभाजीराजांचे अंग वैशाखीच्या तापट धगीने तटबंदीचा दगडी साज सरसरून यावा तसे मोहरून उठले. "हेऽ हेऽ महाराजसाहेऽबच!" मनाची रुजवात डोळ्यांनी पटवून देताच संभाजीराजे पायझेप टाकीत पुढे सरसे झाले.

राजे क्षणभर गडबडले. आश्चर्याने डोळ्यांना डोळे देणाऱ्या संभाजीराजांना त्यांनी स्वत:चे डोळे ताणते करून इशारा भरला. सावधगिरीचा! काही न बोलण्याचा! संभाजीराजे उमगावयाचे ते उमगले.

"निराजी, तुम्ही बालाजीच्या सराईत जा. तिथे मथुरेचे दोन कवी आहेत. त्यांना सांगा 'हत्ती' मथुरेच्या घाटावर येताहेत. नौका सिद्ध ठेवली पाहिजे!" राजांनी निराजींना कानमंत्र दिला.

मांड घेऊन निराजी सुटले. मात्र त्यांनी राजांना मुजरा केला नाही!

"त्र्यंबकपंत, फर्मावल्या वस्तू सिद्ध ठेवल्या?" राजांनी त्र्यंबकपंतांना विचारले. हातातील बोचके वर उचलून त्र्यंबकपंतांनी होकाराची मान डोलावली.

"आम्ही कुंभाराचा निरोप घेतो." संभाजीराजे सर्जेरावांकडे बघत राजांना म्हणाले.

"चला. आम्हीही येतो." राजे सर्वांसह कुंभाराच्या मेटात आले.

आपल्या मेटावर काय घडते आहे याची कुंभाराला थोडीसुद्धा कल्पना नव्हती. तो आपल्या कामात दंग होता.

"बाबा, आम्ही निघतो." संभाजीराजे त्याला म्हणाले.

तो पुढे आला. "भाईर बारीस हाय निऽ!" तो थोडे मावळी, थोडे उत्तरी बोलला.

शंभूराजांनी कंठीचा मोतीकंठा उतरला. ती संधी साधून राजे हळूच पुढे झाले. संभाजीराजांच्या कानाशी लागून पुटपुटले – "कंठा द्या – पण एक सांगा त्यास. आम्ही जाताच पहारेकरी येतील. त्यास आम्ही दक्षिणेकडे औरंगाबादेच्या रोखाने कूच झाल्याचे सांगणेस बोला!"

"बाबा, हे घ्या आणि आमच्यासाठी एक करा! संभाजीराजे कुंभाराला कंठा देत म्हणाले.

"काय सरकार?"

"आम्ही औरंगाबादेस जातो आहोत. मुलुखास. कुणी आमची वाजीपुशी केल्यास सांगणे. येतो आम्ही!"

"जी." कुंभार कंठ्याकडे बघत म्हणाला.

पुढे संभाजीराजांचा घोडा ठेवून राजे, सर्जेराव, त्र्यंबकपंत आग्र्यातून 'दक्षिणेकडे' बाहेर पडणाऱ्या वेशीजवळ आले. राजांच्या अंदाजाप्रमाणे पहाऱ्याच्या हशमांनी हे पथक हटकविले. सर्जेराव घोडा पुढे घेत हशमांजवळ गेले. त्यांनी कमरेच्या कशात ठेवलेली 'दस्तके' काढून दाखविली.

"कौनसी सवारी है?" तरीही एका हशमाने सर्जेरावांना तराटणी देत सवाल केला.

पुढे होत राजांनी शहरातील रामसिंगाच्या हवेलीकडे पगडीचा रोख ठेवून जाब दिला, "राणा रामसिंग की मेहमान सवारी! 'सेवा' दख्खनकी फर्जंद सवारी!"

मिर्झा राजाचा दरबारी असलेला वचक आठवून पहारेकऱ्यांनी दस्तके पाहून पथक सोडले! आता राजे 'दक्षिणेकडे' गेले ही भूमिका सर्वत्र उठणार होती.

सारे 'दक्षिणवेशीबाहेर' पडले. कुणीच काही बोलत नव्हते. आम्याला धरून श्रावणी सांज उतरत होती. राजांनी यमुनेच्या किनाऱ्याने 'उत्तरेकडे' हात उठविला. घोडी यमुनेच्या रोखाने दौडू लागली. यमुनाकाठ येताच घोडी थांबली. सगळे पायउतार झाले. त्र्यंबकपंतांनी बोचके सोडले. राजे आणि संभाजीराजे अंगीचे पेहराव उतरून भगव्या छाट्या चढवून संन्यासी झाले! यमुना हळहळत होती. चारी बाजूने सांजावून आल्यामुळे तिला हे दोन्ही 'भुत्ये-संन्यासी' काही बघायला मिळत नव्हते.

उतरलेल्या पेहरावाचे पुन्हा बोचके आवळून त्र्यंबकपंतांनी ते घोड्याच्या पाठीवर टाकले. सर्जेराव आणि ते आपल्या आणि राजांच्या व संभाजीराजांच्या घोड्यांच्या ओठाळ्या धरून यमुनाकाठची मऊ वाळू तुडवीत काठाने उत्तरेकडे चालले. त्यांच्यात आणि आपल्यात थोडा फासला ठेवून राजे आणि संभाजीराजे यमुनेच्या काठची ओलवती वाळू तुडवू लागले. त्यांच्या पायठशांनिशी यमुनेच्या साक्षीने आता भवितव्याचे महाभारत उभे ठाकणार होते! मथुरेच्या रोखाने नौका नेणारा घाट आला. राजांनी त्र्यंबकपंत आणि सर्जेराव यांची खांदाभेट घेतली.

घाटावर निराजी, कवींद्र परमानंद व कवी कुलेश यांच्यासह सिद्धच होते.

न दिसणाऱ्या यमुनेच्या पात्राला राजे-संभाजीराजे यांनी नमस्कार केले आणि ते नौकेत चढले. पाठोपाठ निराजी वर चढले. नावाड्यांनी वल्ही पेलली. अंधाराला चिरत नौका पात्र तोडू लागली. पात्राच्या मध्यावर येताच राजांनी खांद्यावर चढविलेल्या झोळीत हात घातला. सोनमोहरांची भरली मूठ बाहेर काढून ती संभाजीराजांच्या हातात देत ते म्हणाले, "यमुनामाईला अर्पण करा."

संभाजीराजांनी सोनमूठ यमुनेच्या कृष्णमुखात सोडली.

या वेळी औरंगजेबाची लाल किल्ल्यातील मगरीबीची नमाज संपली होती! तो खुदातालाला भरल्या आभाळाकडे पंजे उठवून दर्बारी 'पावती' देत होता – "अर्र हम्मा ऽ निर्रहिम्म!" खरोखरच तुझ्यासारखा 'दयाशील' तू एकटाच आहेस!!"

त्याच दयेचा फायदा घेऊन कोठीत पलंगावर गिर्द्या, लोड रचून, राजांचा तबकातील टोपसुद्धा उचलून त्या जागी सरपोसाने झाकलेली 'पाण्याची सुरई' चढवून हिरोजी सिताब कोठीबाहेर पडला होता! मदारीने 'औषधे' आणण्याच्या निमित्ताने केव्हाच कोठीला पाठ दाखविली होती! सारे पक्षी उडाले होते! उरली होती पिसे! निर्दय कैदेच्या आठवणीची.

आपल्या हवेलीच्या देवमहालात रणचंडीसमोर माथा टेकून एक मानी रजपूत तिला साकडे घालीत होता – "मेहमान सलामत रहे!" तो होता रामसिंग!

एक वास्तू आपल्या नावाला येणारा बट्टा टळला म्हणून यमुनेकडे बघत निःश्वास टाकीत होती – 'विठ्ठलदासाची हवेली!'

यमुनेवर लाटा उमटवीत नौका 'किनाऱ्याकडे' चालली होती.

बराच वेळ मनाच्या कोपऱ्यात घर करून राहिलेले एक आश्चर्य राजांनी शांतपणे उभे केले. त्यांनी संभाजीराजांना विचारले, "कुंभाराच्या घरासमोर हिरोजीच्या वेशातही तुम्ही आम्हास कसं पारखलं?" क्षणभर यमुनेच्या उचंबळ्या लाटांनी ही बाब ऐकायला आपली खळबळ रोखून धरली!

राजांच्या पायांवर नजर टाकीत संभाजीराजे अदबीने म्हणाले, "डोकीवर टोप असल्यासारखेच चालत होतात तुम्ही आबासाहेब!!"

मथुरेच्या ब्राह्मण वस्तीतील एका कौलारू घरात छाटीधारी संन्यासी आणि बालसंन्यासी शिरले. पाठीशी निराजी होते. हे घर मोरोपंत पिंगळ्यांचे मेहुणे कृष्णाजीपंत त्रिमल यांचे होते. निराजींनी त्यांचा तपास लावून राजांना त्या सुरक्षित जागी आणले होते.

कृष्णाजी आणि त्यांचे बंधू काशीराव व विसाजीपंत यांनी आपल्या थोर अतिथींचे उत्तरी दिलगाव पद्धतीने स्वागत केले. त्यांच्या मातोश्री लक्ष्मीबाईंनी रसोई शिजायला टाकली. पाकगृहात मथुराई पद्धतीच्या रसोईचा अन्नगंध दरवळू लागला.

घराच्या अतिथी सदरेवर अंथरलेल्या स्वच्छ बैठकीवर राजे आणि संभाजीराजे छाट्या धारण करून बसले होते. कुणाची नियती, कुणाला कुणाच्या दारात नि कसल्या रूपात उभे करील सांगता येत नाही! वास्तविक संन्यासी, योगी, बैरागी यांचे स्वागत राजांनी करावे. पण आज तेच खुद्द संन्यासी-वेषात दुसऱ्याच्या घरचे आतिथ्य घेत होते, आणि तेही एका मथुरेसारख्या तीर्थक्षेत्रातल्या ब्राह्मणाकडून!

राजे उसासले. छाटीधारी संभाजीराजांना ते निरखून बघू लागले. फार विचित्र विचारांची भगवी छाटी त्यांच्या मनाने पांघरली :

"राजा हा जन्मानेच संन्यासी असतो! सारे सोडून संन्यासी होणे सोपे, पण साऱ्यात असून संन्यासी राहणे कठीण. हे पडताळून बघायला आम्ही अनेक साधुसंतांचे पाय धरले. तुम्हाला मात्र या उमरीतच हे समजते आहे! असेच व्हावे तुम्ही. वृत्तीने राजे आणि मनाने संन्यासी!

त्रिमलांच्या घरची भोजने उरकली. राजांनी सर्व मंडळींशी खलबत केले. पुढच्या दौडीचा बेत आखून झाला. राजे आणि संभाजीराजे बिस्तऱ्यावर आडवे झाले. संन्याशाला बिलगत बालसंन्यासी सुख झाला.

तिकडे आम्यात कल्लोळ उसळला होता! "सेवा गैब हो गया" ही खबर हां हां म्हणता शहरभर पसरली होती. काल्पनिक धास्तीने औरंगजेबाने प्रथम आपल्या महालाभोवती हत्यारबंद हशमांचे पहारे आवळून टाकले!

"बेमुर्वत, निकलो यहींसे" म्हणत फौलादखाँची शेलक्या शिव्यांनी हजामत करून औरंगजेबाने त्याला महालाबाहेर हाकलला.

" वजीरे आझम्, सेवाने कितने रुपिये नजर-निसार पेश किये थे ? " औरंगजेबाने जाफरखानाला विचित्र कडवट सवाल टाकला.

" बाप बेटेने मिलकर करीबन डेढ हजार मुहर और पंध्रह हजार रुपिये नजर किये थे हुजूर." जाफरखानाने जामदारखान्याचा तपास घेऊन प्रत्युत्तर दिले.

" उसे दर्बार आने के लिये खर्चा कितना दिया था ? " औरंगजेबाच्या कपाळी आठ्यांचे जाळे चढले.

" एक लाख रुपिया आलिजा ! " जाफरखानाला सवालाचा रोख कळल्याने तो पडल्या आवाजात उत्तरला.

" नमकहराम, दगलबाज ! " हिशोबातली तूट पाहून अस्वस्थ औरंगजेब माळेचे मणी सरसरते ओढत पुटपुटला.

" इकडे काखेच्या झोळीत, लाख लाख रुपये किमतीचे हिरे, रत्ने, माणके दडवून राजे संभाजीराजांच्यासह मथुरेच्या वेशीबाहेर पडले होते. बैरागी, उदासी, भोले अशा निरनिराळ्या उत्तरी पंथांचे वेष राजांच्या माणसांनी चढविले होते. वेगवेगळे तांडे करून एकमेकांशी संबंध राखत ते चालले होते. बनारसच्या रोखाने ' चालीच्या वाटा दाखवायला स्वत: कृष्णाजी त्रिमल आणि कवी कुलेश बरोबर होते. कृष्णाजींचे बंधू काशीपंत आणि विसाजी संगती होते.

दिवसभर धर्मशाळेत मुक्काम आणि सांज व पहाट धरून वाटतोड असा प्रवास सुरू झाला. सरतीला आला तरी पावसाळा ठार हटला नव्हता. मार्गीच्या नद्यांची विशाल पात्रे धावणीची गती रोखीत होती.

सांज धरून एका धर्मशाळेत राजांचा मुक्काम पडला. कृष्णाजीपंतांनी धुनी पेटवली. तिच्या फेराने राजे संभाजीराजे, कृष्णाजी, कुलेश असे बैरागी बसले.

" सर्जेराव, किती पल्ला मागं पडला ? " राजांनी धुनीच्या उसळत्या ज्वालांकडे बघत भोल्याचा वेष घालून बसलेल्या सर्जेराव जेध्यांना विचारले.

" जी – असंल की धा कोसाचा." सर्जेरावांनी उत्तर दिले.

" एवढाच ? " राजांनी एक काटूक उचलून धुनीत घातले. आणि संभाजीराजांकडे बघितले. ते धुनीत फुललेल्या निखाऱ्यांवर डोळे जोडून विचारात हरवले होते – ज्वालांच्या चटचटीबरोबर त्यांचा सूर लागून राहिला होता.

मथुरा सोडून बनारसच्या रोखाने बैरागी-तांडा चालला होता. सारेजण चटकी पावले उचलीत होते. नकळत संभाजीराजे मागे पडत होते. बोलत पुढे गेलेले राजे मग एकदम थबकत होते, तांडा थांबत होता. सगळ्यांचा मेळजोड होऊन पुन्हा वाटतोड सुरू होत होती.

" थकलात ? " राजांनी प्रश्न करून संभाजीराजांची तंद्री तोडली.

" जी, नाही."

कसल्यातरी निर्धारी मनसुब्याने चालते राजे एकाएकी थांबले. त्यांच्या कपाळीचे भस्म-पट्टे आक्रसले. चर्या निर्धारी झाली.

घामाने डवरलेल्या, लालावलेल्या संभाजीराजांच्याकडे त्यांनी नजरजोड बघितले. जवळ जात त्यांनी त्यांच्या खांद्यावर आपला ' संन्यासी ' हात ठेवला !

" जरा येता ? " घोगरल्या आवाजात राजांनी पायवाटेच्या कडेला असलेल्या एका डेरेबाज झाडाकडे हाताने इशारत केली.

संभाजीराजांनी डोईवरचा साफा डोलविला. ते दोघेही पितापुत्र झाडाच्या घेराखाली आले. तांडा पायवाटेवर उभा राहिला. राजांच्या मनी काय आहे याचा कुणालाच अंदाज येईना.

" आमचं एक ऐकता ? " राजांचा हा आवाज नेहमीपेक्षा वेगळा होता.

" जी ! "

काही क्षण खोळांबले ! मनी बांधलेले संभाजीराजांच्या कानी घालताना आजवर राजांना कधीच शब्द धुंडाळावे लागले नव्हते. आज ते करणे पडले.

" पल्ला लांबचा आहे ... ' राजे थांबले. आपसुखच.

" जी."

" तुम्ही ऽ ... तुम्ही – थांबता ? " राजांनी संभाजीराजांचे दोन्ही खांदे हातपकडीने एकदम घट्ट आवळले. शब्दांपेक्षा ती पकडच खूप बोलकी वाटली संभाजीराजांना. ते दोघे पितापुत्र एकमेकांचे डोळे पाजळल्या पोतांसारखे एकमेकांस भिडवून एका क्षणात उदंड बोलून गेले. ज्योत ठिणगीला समजावून गेली. एकाच हातपकडीतून !

" जी, आज्ञा ! " कुठूनतरी आलेला तोफगोळा रिकाम्या तोफगाड्यावर आदळताना ठणकावा तसे संभाजीराजे निर्धारी बोलले.

ते ऐकताना राजांचे डोळे पाणथरून आले. चंदावलीचा फुलला स्वार, ऐन धुमाळीत हत्यारमार करीत हरोलीला यावा तसा एक विचार राजांच्या मनातील सगळे पेच दूर हटवीत वर आला – " खरंच आमचे काळीजच यांच्या रूपानं कुणी तरी सोनरसात डुबवून ते आम्हास आपल्या सावळ्या हातांनी पेश केलं आहे !! " राजांचे डोळे अभिमानाने पाणथरले होते !

" सावळे हात – एकला जीव ! " क्षणातच राजांचे पुरे भान सुन्न झाले.

" चला." संभाजीराजांच्या खांदावळीवर हात ठेवून राजे झाडाच्या घेराखालून तांड्याकडे चालले.

" कृष्णाजीपंत, बडे ध्यानसे सुनो." तांड्यात येताच राजे कृष्णाजीपंतांना जरा बाजूला घेऊन मन बांधून निर्धाराने बोलले.

" हां. स्वामिन्."

" हम आगे कूच करते हैं। हमारे फर्जंद, केसोपंत और कविजीके साथ पीछे लौटेंगे।

मथुरा! ये हमारी सबसे किमती अमानत आज तुम्हारे हाथमें है! मुल्कमें जाकर हम हमारे सरदार-हशम भेजेंगे दस्तुरी खत देकर. तब तक कुँवर तुम्हारे भाईके पास रहेंगे। अभीसे ये हमारे नहीं तुम्हारे बेटे हैं।'' राजे शांतपणे बोलले.

कृष्णाजी त्रिमलांना छातीवर मणभर वजनाचा पत्थर ठेवल्यागत वाटले.

''बोलो.'' राजांचे सलगी देणे सुरू झाले.

''हम गरीब ब्राह्मण. ये राजपुत्र. कुछ न होनवार बना तो हम कैसे मुँह दिखायेंगे आपको स्वामी?'' कृष्णाजी मनचे बोलले.

''कृष्णाजीपंत, न होनहार अब भी हो सकता है! हम इसका नामोश तुमपर कभी नहीं डालेंगे।'' राजांनी कृष्णाजीपंतांना धीर दिला. कृष्णाजी मसलतीत सामील झाले! त्यांनी केसोपंतांना तयार केले.

''तुम्ही केसोपंतांबरोबर परतीची चाल धरा. ते सांगतील तसे वागा. कुणी बरोबर घेतल्याखेरीज बाहेर फटका करू नका.'' राजे सावधगिरीच्या साऱ्या सूचना जडावल्या शब्दांनी संभाजीराजांना देऊ लागले. त्यांच्या ओठांतून निसटणारे बोल न् बोल संभाजीराजांनी कानांच्या पडद्या करून त्यात भंडाऱ्यासारखे साठवून घेतले!

''केसोपंत, तुम्हारे घरमें कौन कौन हैं?'' राजांनी त्रिमलांच्या घरचा अंदाज घेत विचारले.

''माँ है, भाई-बहने हैं। त्रिमल उत्तरले.

''तो आजसे ये तुम्हारे भांजे! ध्यान रखना.'' राजे धीराने बोलत होते.

संभाजीराजांच्या मनाचे सोनपान वाऱ्याच्या सपक्याबरोबर भेलकांडत कुठेतरी दूर जाऊ बघत होते. मोठ्या मुश्किलीने ते पकडून संभाजीराजे त्याला घट्ट धरून ठेवू बघत होते. दिंडीची पालखी बाहेर पडताना झांजा, मृदंग, टाळ, तास यांचा न कळणारा कल्लोळ उठावा तसा त्यांच्या मनात कल्लोळ उठला होता. अनेक चेहरे डोळ्यांसमोर तरळून धावत होते.

आणि तो क्षण आला. निरोपांचा! शिबडातील लोटक्यात दही होताना चहू अंगांनी विरजण साकवटत येते तसे राजांचे मन दाटून आले! आता धीरपुरुषाला आपल्या घशाच्या घाटीच्या रंजुकीत खिळा ठोकल्यागत वाटू लागले! शब्दांनी नकळतच चिलखते चढविली! भावनांचे बुरुज काळजावर खडे झाले!

राजांनी आपल्या काळजाच्या भोसलाई तुकड्याचे खांदे थरथरत्या हातांनी थोपटले. भवानीच्या दोन डोळ्यांसारखे ते पितापुत्र दिसत होते! दोन वाटणारे – पण जे काही बघा – भोगायचे असेल ते एकवटून भोगणारे! एकजोड झालेले!

राजांनी झोळीत हात घालून एक सोन्याची छोटेखानी शिवपिंडी बाहेर काढली. त्यांचे स्फटिक शिवलिंग हिरोजीबरोबर मागे राहिले होते म्हणून त्यांनी पूजेसाठी ही खरीदली होती. शिवपिंडी संभाजीराजांच्या ओंजळीत देत राजे म्हणाले, ''आता सूर्याचा आणि दिवट्याचा मुजरा हिला करत चला. कमी बोला. हिच्यावर भरोसा ठेवा.''

ओंजळीत बैरागी 'शिवाची', बैरागी आबासाहेबांनी दिलेली, सोनपिंडी घेऊन संभाजीराजे त्यांच्याकडे बघू लागले. तटबंदीच्या घडीव दगडावर धुक्याचे क्षणात पाणथेंब तरारून उठावेत तसे त्यांचे डोळे भरून आले. बाहुल्यांच्या पाखरांचे पंख चिंब झाले. उठलेले मोती गालांवरून ओघळत छातीवर कोसळले.

ओंजळीतील शिवपिंडी छातीला बिलगती धरून संभाजीराजांनी पुढे होत गुडघे भुईला टेकले. आपले बैरागी कपाळ त्या चक्रवर्ती संन्याशाच्या पायांवर टेकविले!

त्या स्पर्शाबरोबर राजांच्या उभ्या अंगी काटा उठवणारी एक सरसरती रक्तलाट सरकली. त्या लाटेने त्यांच्या डोळ्यांत भोसलाई मोती आणून सोडले! संन्याशाने आपल्या केसलांब पापण्या मिटून घेतल्या. संभाजीराजांच्या डोकीवरच्या साफ्यावर राजांचे आशीर्वाद पडले. अश्रूंच्या रूपाने!

''शंभूबाळ ऽ उठा.'' लगबगीने राजांनी त्यांना वर उठवून घेतले.

''महाराजसाहेब ऽ, आमचा ... मासाहेबांना, थोरल्या-धाकट्या आऊसाहेबांना, धाराऊला साऱ्यांना मुजरा सांगा!''

ते ऐकताना राजे गलबलले. कडकडाट करीत कुठल्यातरी देवळाच्या कळसावर कोसळताना विजेच्या लोळाने शेजारी असलेल्या डेरेदार वटवृक्षाला थरारून सोडावे तसे त्यांना एका विचाराने थरारून टाकले – ''आप्तगणांकडून नाडला जाण्याचा योग दिसतो या कुंडलीत!!'' राजांचा हात चटकन छातीवर गेला. पण आता तिथे कवड्यांची माळ नव्हती!

चारी पायांना दातेरी आकडेचाप लावलेल्या हत्तीसारखे राजे बैचैन, हैराण झाले. ''आणि – आणि हे सलामत परत आले नाहीत तर – तर मासाहेब आमचं तोंडही बघणार नाहीत कधी! सती जायला निघताना घातली तशी त्या वेळी त्यांची समजूत काही नाही घालता येणार!'' राजांच्या पोटात खड्डा पसरला. आतड्याच्या सणकेसरशी राजांनी समोरच्या शंभूराजांना पोटाशी घट्ट बिलगते घेतले. भिडली! परिस्थितीच्या वारेझोताने ती मावळी जरीपटक्याची दोन्ही टोके एकमेकांना भिडली! त्या मिठीत राजांचे 'राजेपण' आणि संभाजीराजांचे 'बाळराजेपण' गुदमरून गेले.

निर्धाराने राजांनी शंभूराजांना सोडले. आपला सर्वांत किंमती हिरा जपण्यासाठी केसोपंतांच्या हाती काही हिरे, माणके ठेवली.

शंभूराजांच्या मस्तकी हात ठेवून राजे अवसान घेत म्हणाले, ''औक्षवंत व्हा!''

''आम्ही पत्रे देऊन खबरगीर धाडू. ती पावताच टाकोटाक हुषारीने निघा. हे त्रिमलकाका सांगतील तसेच वागा. जपून असा. जय भवानी!'' राजांचे डोळे शांत होते.

''जय भवानी!'' राजांच्या धीरबोलांना संभाजीराजांनी तशाच धीराचे अंकुर फोडले! ''जय भवानी!!''

☐ ☐ ☐

५

कधी नव्हता तो भोसलेकुळीचा चौरंग झाला. मथुरेत संभाजीराजे, तीर्थक्षेत्रांच्या वाटेवर राजे, राजगडावर थकदिल जिजाऊसाहेब आणि माहेरी शृंगारपुरी येसूबाई!

संजाबाचा घेर डुईवर राखलेले, अंगच्या वस्त्रांच्या शेवांची मानेमागे गाठ आवळलेले, छातीवर आडवे यज्ञोपवीत चढविलेले, कपाळी गंधटिळा भरलेले शंभूराजे आता ओळखूदेखील येत नव्हते. ते मुंज न होताच बटू झाले होते!

केसोपंतांनी त्यांना उत्तरी आन्हिके, आचमन, संध्या या सगळ्यांचा सराव दिला. केसोपंतांच्या सुसंस्कृत घरी शंभूराजांना कानी पडणाऱ्या संस्कृत बोलीने भुरळ घातली. आकाशसुंदरीने शारदीय सांजवेळी पौर्णिमेच्या टपोऱ्या चंद्राचे फूल आपल्या निळ्या केसगुंफणीत माळावे तशी ही बोली होती! मधुरातली मधुर. ऐकताना अंगाभोवती पिवळाधमक शालनामा पांघरतो आहोत असे वाटायला लावणारी!

आपण नेहमी ऐकतो त्यासारखीच ही भाषा आहे. पण नेमकी कशासारखी हे संभाजीराजांना फार दिवस उकलत नव्हते.

एकदा ते विसाजीरावांबरोबर देवदर्शनासाठी हरिहरेश्वराच्या मंदिरात गेले. तिथे आरतीचा जयकार चालला होता. तो ऐकताना त्यांना मनचा पेच उकलून गेला! 'ही भाषा देशी आमचे गोंधळी, आईचा महिमा उभा करतात, तशीच आहे!'

मंदिरातून परतताना 'कंसका किल्ला' हे बेसाऊ ठिकाण आले. विसाजीपंत म्हणाले "देखना है किला?"

"जरूर" म्हणत संभाजीराजे 'कंसकिल्ला' या मथुरेतील सर्वांत उंच ठिकाणावर आले. समोर यमुनेचे डौलबाज वळण फिरलेले दिसत होते. पायांची वल्ही मारत तळवटातून उसवलेली कितीतरी कासवे पाण्याबाहेर मानांच्या काठ्या उठवीत होती. पुन्हा त्या काठ्या गायब होत होत्या.

'थोरल्या मासाहेब या यमुनाकाठी वाळूवर उभ्या राहिल्या तर कशा दिसतील?' एक वळण शंभूराजांच्या मनात सर्रकन फेर टाकून गेले.

ते यमुनेकडे डोळेजोड बघत राहिले.

त्यांना अंदाज नव्हता की याच यमुनेला पुढे मिळणाऱ्या गंगा आणि सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमावर राजांचा तांडा उभा असेल!

राजे प्रयागच्या त्रिवेणी संगमात स्नान करून घाटपायऱ्या चढून येताना त्यांना एका पारध्याने या वेळी रोखले होते!

हातातील पिसांचा जुडगा त्यांच्या समोर धरून तो म्हणाला, "बुवाजी, ये गरुडके पाँख हैं! मैनाकेके पहाडीके! हर काममे यश देनेवाले. ले जावो पांच!"

राजे त्या पारध्याकडे बघत भुवईची कमानबाक चढवून गेले. "हर काममें यश देनेवाले! गरुडके पाँख!" पारध्याच्या हातातली पिसे बघताना राजांना संभाजीराजांची आठवण झाली. "आता एकाच कामी यश पाहिजे. शंभूबाळ सुखरूप परतण्याच्या!"

राजांनी गरुडाची पाच पिसे आपल्या सडक बोटात घेतली! सर्जेरावांनी पारध्याला दिनार दिले. क्षणभर पिसांकडे बघून राजांनी ती काखेच्या झोळीत सोडली. राजांना अंदाज नव्हता की त्यांचा 'गरुडबच्चा' कंसकिल्ल्याच्या उंच ठिकाणावरून हरवल्या डोळ्यांनी यमुना बघतो आहे! आपला आणि मासाहेबांचाच विचार करतो आहे!

काळाने दिवसरात्रीचे काळेपांढरे 'गरुड-पाख' आपल्या टोपात खुपसले! दीड महिन्यांचा काळ मागे पडला. मजल, दरमजल मागे टाकीत राजे मराठी मुलखात सुखरूप पावते झाले. संन्यासी वेशात!

उतू घातलेल्या दुधासारखा राजगडाचा ऊर उचंबळून आला

गडपायथ्याशी येत असलेल्या राजांची वर्दी मोरोपंतांनी जिजाऊंच्या कानी घातली, "आईसाऽहेब, राजे... राजे सुखरूप पावते झाले. पायथ्याशी स्वाऱ्या येत आहेत— संन्यासी वेषात! पालखी सामोरी नेण्यासाठी आम्ही गड उतरतो आहोत. सारा गडलोक पायथ्याच्या रोखाने धावत सुटला आहे!" भावनांचा कल्लोळ झालेल्या मोरोपंतांचे डोळे आजवर दाटलेल्या चिंतेला वाट करून देताना आनंदाने वाहू लागले.

झुकलेल्या केवड्याच्या कणसासारख्या दिसणाऱ्या जिजाऊंचे मन उकळत्या पाण्यात खालवर घुसळण घेणाऱ्या तुळशीच्या पानागत मिरमिटले! मिरमिरटताना क्षीण आवाज उठला, "जगदंब! जगदंब!"

भरल्या डोळ्यांनी त्यांनी समोरची जगदंबा दिसते का ते पाहिले! ती दिसत नव्हती! जिजाऊ काळीजभर चरकल्या. "आई, मनाच्या पिळात आम्ही तुला नको ते बोललो. कोप करू नको. आम्ही लेकरू!" जिजाऊंनी दाटल्या नेत्रकडा निपटल्या. देव्हाऱ्याच्या पायजोत्यावर आपला सोशिक माथा टेकविला.

मोरोपंत आज्ञेसाठी खोळंबले होते याचे भान जिजाऊंना उरले नाही.

पायथ्याकडे ओढ घेणाऱ्या मनाला आवरणे असह्य झालेले मोरोपंत म्हणाले, "आम्ही निघावं आईसाहेब?"

त्यांना हात-इशारतीने जहळ बोलावून घेत जिजाऊ मुश्किलीने एक-एक शब्द म्हणाल्या, "पंतऽ, त्यांचा पेहराव घेऊन चला संगती! संन्याशाच्या वेशात आऊसमोर

येऊ नये म्हणतात! या.'' जिजाऊंनी धाराऊकडे बघितले. ती तबकात साठवण झालेल्या मोहरांकडे बघत होती.

पायथ्याशी कोण कोण आले आहे याची कल्पना नसलेले मोरोपंत राजांच्या आणि शंभूराजांच्या पेहरावांची तबके घेतलेल्या धारकऱ्यांसह पालखी घेऊन गड उतरले.

गडपायथ्याच्या वाडीतील नायकाच्या घरी राजे आपल्या बैरागी तांड्यानिशी घोंगडीवर बसले होते. घराबाहेर माणसांचा दाटवा झाला होता. उतावळे जीव कलकलत होते. संन्यासी ते ऐकून गलबलत होता.

मोरोपंत आले. त्यांनी दारी पालखी ठाण करून तबकधारी मावळ्यांनिशी नायकाच्या घरात प्रवेश केला. राजे समोर दिसताच मोरोपंत पुढे झाले. राजांचे बैरागी पाय शिवण्यासाठी ते झुकणार एवढ्यात घोंगडीवरून उठून राजांनी त्यांना उठवते घेतले, खांदाभेट दिली. दोघांचाही प्रेमा उचंबळून आला. केळीचा मोना पाझरावा तसे पंतांचे डोळे पाझरू लागले.

"राजांनी तातडीने चलावे. मासाहेब ..." मोरोपंतांचे शब्द घशातच घुटमळले. "निघण्यापूर्वी हा राजसाज अंगी धारण करावा. पुत्राने मातेसमोर संन्याशी वस्त्रात जाऊ नये असा शास्त्रबंध आहे." पंतांनी जिजाऊंचे वसा जपणारे मन राजांच्या कानी घातले.

राजांच्या कपाळीचे भस्म-पट्टे वर चढले. "हे ध्यानी नव्हते राहिले!" राजांनी भस्मपट्ट्यांना मनाचा पडसाद दिला. ते खाली उतरले.

तबकधाऱ्यांनी तबके आतल्या दालनात नेऊन ठेवली. राजे दालनात गेले. अंगीच्या छाटीला त्यांनी तीः उतरण्यासाठी हात घातला. लवभर त्यांचा घातला हात थबकला. मनावर विचारांची छाटी चढली – 'आम्ही ही छाटी उतरतो आहोत ... पण ... पण शंभूबाळांच्या अंगी ती आजही असेल! हे असे विचार, असे क्षण पाठलागावर पडले की वाटते अंगची छाटी कधी उतरूच नये! पुत्र संन्यासी वेषात, पिता राजपेहेरावात हा कसला खेळ! काय आहे आईच्या मनी?'

"जगदंब, जगदंब!" राजांनी छाटी उतरली. अंगी चढवावा म्हणून त्यांनी घोंगडीवर मांडलेल्या एका तबकातील जामा उचलला. आणि राजांच्या उभ्या अंगावर सरसरते बाभळीचे बनचे बनच फुलले! डोळे ताणून ते हातातील आखूड हातबाहीच्या जाम्याकडे बघतच राहिले! तो शंभूराजांचा होता!

त्याच्या एका दर्शनाने राजांचे 'राजेपण', 'संन्यासीपण' घुसळून दूर फेकून दिले. नको तो विचार राजांच्या 'आबा' म्हणविणाऱ्या मनात चौखुर घुसला – 'शंभूबाळ सलामत आले नाहीत तर?'

पेहराव करून, कपाळी शिवपट्टे भरून राजे दालनाबाहेर आले. बैरागी, मंत्रिगण यांच्या संगतीने नायकाच्या घराबाहेर आले. बाहेर दाटलेला मावळ-माणूस गर्दीने पुढे उसळला. पगड्या राजांच्या मोजड्यांवर टेकू लागल्या. इमानी नेत्रकडा ओल्या होऊ

लागल्या. बाराबंद्यांचे बंद तणाव देऊ लागले. माणसे 'हरवलेला राजा' डोळ्यांच्या म्यानात तलवारीगत आबादानीने साठवून घेऊ लागली.

त्या कल्लोळात एकट्या मोरोपंतांखेरीज, बैरागी सोडले तर, शंभूराजांचे भान कुणालाच आले नाही.

पेहरावाचे एक तबक तसेच परत आलेले पाहून मोरोपंत मनी चरकले होते.

आपल्या माणसांना राजदर्शन देऊन राजे पालखीत चढले. त्यांनी पालखीचा राजगोंडा हाती धरला. आणि एका पेचाने त्यांच्या मनाचा राजगोंडा करून मुठीत घट्ट धरला! "आता मासाहेब विचारतील – आमचे शंभूबाळ कुठे आहेत?"

आमची वाट पाहून शिणल्या-थकल्या त्यांच्या कानी काय घालावे? राजांच्या मनाला पालखीच्या चालीबरोबर हिसके हिंदोळे बसू लागले. मन सुन्न झाले ...

फारा दिवसांनी पाली दरवाज्यावरची नौबत दुडदुडली. राजे बालेकिल्ल्यावर आले. त्यांची मुद्रा निर्धारी दिसत होती. डोळे मासाहेबांना शोधण्यासाठी हरणाचे पायखूर लावून दौडत होते. सदरजोत्यावर जिजाऊ उभ्या होत्या. पाठीशी, उडू बघणारी डोळ्यांची मावळपाखरे गोंदल्या मनाने मुश्किलीने थोपती करून धाराऊ उभी होती.

खाशांच्या संगतीत राजे सदरचौकात प्रवेशले. समोर जिजाऊ उभ्या होत्या. आसवांची अगणित सफेद फुले जगदंबेच्या चरणांवर गाळून आता देहच तिथे टाकावा काय या विचाराने थरारलेल्या प्राजक्ताच्या कुलवंत झाडासारख्या! परिस्थितीच्या घोडेटापांनी निर्दयपणे तुडवून टाकलेल्या, मंदिराकडे जाणाऱ्या समर्पित पायवाटेसारख्या! भवानीने उधळलेला भंडारा मिठीत सामावून घ्यायला आसावलेल्या परडीसारख्या!

क्षणभर राजांचे पाय फरसबंदीला जागीच चिकटल्यागत झाले. दुसऱ्याच क्षणी भरतीच्या समुद्राचा उसळता भावकल्लोळ उरी घेऊन राजे झपाझप चालले. टोपाची मोतीलग हिंदकळली. तिचे डुलते फुलोर तेवढे जिजाऊंना कसेबसे दिसले. मग डोळ्यांवर आसवांची सफेद तावदाने सरसरून दाटत उतरली! त्या तावदानांतून एक धूसर सोनस्वप्न समोर येत होते. एक थरथरता तेजाळ पोत जवळ येत होता. बाकीचे काहीच दिसत नव्हते. दिसावेसे वाटत नव्हते.

राजांनी पायांवर ठेवलेल्या कपाळाच्या स्पर्शाने जिजाऊ उभ्या देही थरारून उठल्या. त्या थरथरीने त्यांच्या डोळी उतरलेली आसवांची तावदाने खळ्ळकन निखळली! जिजाऊसाहेबांचा तुळजाई सोशिक आत्मा नेत्रांच्या महाद्वारांनी पाझरू लागला! झुकते होऊन त्यांनी थरथरत्या हातांनी राजांना उठते केले. आणि पहाटवाऱ्याच्या झमकीत सुगंधाचा गुंतवा व्हावा तसे– यमुनेच्या पाणपाठीला सूर्यरस बिलगावा तसे– राजे जिजाऊंच्या मिठीत विसावले!

पुत्रपण भरून पावले. मोहरले. मातृपण मुके, मुके झाले! कृतार्थता कृतार्थ झाली!! चौकात दाटलेल्या हर आसामीला ते बघताना वाटले – आपणच 'आऊसाब' आहोत!

'राजे' आपल्याच हातमिठीत आहेत! फक्त एकच कुणबाऊ मनाने शंकेला सुपात घालून थडाथड पाखडायला सुरुवात केली. उडणारे भूस डोळ्यांत चरचरत शिरू लागले. धाराऊच्या! 'ल्येकरू कुटं हाय?' म्हणत तिचे भिरभिरते डोळे राजांच्या बरोबर आलेल्या बैरागी तांड्यांच्या काखेतील झोळ्या झटकू लागले! तटबंदीचे थोराड बुरूज उचलून ते कुणीतरी क्षणाक्षणाला आपल्या उरावर रचत आहे असे धाराऊला वाटले!

मिठीतल्या राजांच्या रोखाने एक – फक्त एकच शब्द जिजाऊंच्या दाटल्या कंठाला चकवा देऊन निसटला! जन्माष्टमीच्या दिवशी दुधाच्या धारेत न्हाऊन निघणाऱ्या श्रीकृष्णाच्या बैठ्या लंगडमूर्तीसारखा!! मायेने चिंब – चिंब थबथबलेला –

"शिव ऽ व ऽ बा!"

त्या सुटल्या शब्दाचे मायाळ थबथबीतपण जिजाऊंचे जिजाऊंनाच जाणवले! त्याने तर त्यांचे कान क्षणात सुन्न झाले, मन भिन्न झाले. त्या सुन्न भिन्नतेत सारे सारे भाव गुदमरून उठले. आणि क्षणातच आभाळीच्या निळाईत इथून तिथवर विजेची नागीण सळसळत जावी तशी जिजाऊंच्या भरल्या मनी शंकेची कातरी नागीण वळवळत गेली – "आमचे शंभूबाळ?"

कधी कधी आठी हातांनी पूजेच्या भरल्या साजाचे तबक परते सारणाऱ्या निग्रही भवानीगत जिजाऊंनी झटकन राजांना विलग केले! त्यांचे खांदे हाततळव्यात घट्ट धरून ठेवीत थरथरत विचारले, "राजे ऽ, आमचे शंभूबाळ कुठं आहेत?"

त्या बोलांतील मायेचा ओलावा धरून आलेली जरब ऐकताना राजे सुन्न झाले. निशाणकाठीवरून सरसरत खाली उतरणाऱ्या जरीपटक्यासारखे राजांनी डोळे जिजाऊंच्या पायावर टाकले!

राजांचे निसूरपण असह्य झालेल्या जिजाऊंनी आपल्या हाततळव्यातील त्यांचे खांदे गद्गद घुसळून टाकीत थरका फेरजाब केला – "बोला ऽ राजे ऽ बोला ऽ!" त्या लटलट्या शब्दांतच नको ती शंका उतरली होती.

आपल्या नाकाचा गड्डा हात-चिमटीत धरून, मिटल्या डोळ्यांनी, डुईचा टोप डावा-उजवा झटकीत, मोतीलग होलपटून टाकीत राजे घोगरल्या आवाजात म्हणाले,

"मासाहेब, – मासाहेब – आपल्या शंभूबाळां ऽ चा – काळ झाला! ते – ते गेले!!"

ते नको ते बोल उच्चारताना राजांच्या पोटात लक्कखन खड्डा पसरला. त्यांच्या मिटल्या डोळ्यांना दिसला एक 'सावळा हात!' 'जगदंबेच्या पोतावर दाटलेली काजळी माखून घेत तो हात पुढे येतो आहे. आमच्याच रोखाने!' हा विचार मनी येताच राजे काळीजभर गलबलले!

कानांवर थरथरते हात ठेवणाऱ्या जिजाऊंच्या तोंडून रणशिंगाच्या काळीजमार ललकारीसारखा एकच चीत्कार उठला – " शंभू बा ऽ ळ –!" उभी सदर गरगरली.

बैठकीचा पायचौथरा काढून घेताच जगदंबेची आवेशी मूर्तीसुद्धा खाली ढासळू लागावी तशा जिजाऊ ढासळू लागल्या! "ध्येवा रं माज्या!" म्हणत पायच ठार गेलेली धाराऊ तर धाडकन खालीच पडली. तिचे अंग गद्गद हलू लागले.

झटकन राजांनी पुढे होत जिजाऊंना सावरले. चौकातल्या पगड्या थरथरून डुलल्या. खाली माना टाकलेल्यांचे इमानी डोळे बाराबंद्या भिजवू लागले. क्षणात सदरेचा नूर पलटी घेत गद्गदला. देठ नसलेले फूल हाती असावे तसे झाले! राजे आले म्हणून हसावे की धाकटे राजे गेले म्हणून रडावे तेच कुणाला सुधरेना.

"आमचे ऐकता ... , मासाहेब!" राजे जिजाऊंना सावरीत देवमहालाच्या रोखाने चालवीत नेताना पुन:पुन्हा म्हणत होते. जिजाऊंना काहीच ऐकू येत नव्हते.

"पंत, धाराऊलाही पाठवून द्या." राजांनी देवमहालाची इशारत देत मोरोपंतांना सदर सोडताना आज्ञा केली.

देवमहालात आणून राजांनी जिजाऊंना प्रथम नीट बसते केले.

तोंडात पदराचा बोळा कोंबून फुटू बघणारा काळजाचा इस्कोट आवरीत धाराऊ देवमहालात आली. ती आत येताच राजांनी दाराला आडबंद टाकला. पूजल्या भवानीच्या पायांवरचे एक बिल्वदल उचलले. शांतपणे ते देव्हाऱ्याच्या पायजोत्यावर मस्तक टेकलेल्या जिजाऊंच्याजवळ आले.

"मासाहे ऽ ब!" राजांनी जिजाऊंच्या खांद्यावर हात ठेवीत शांत साद घातली.

"आमची शपथ आहे. मान वर घ्यावी. आम्ही सांगतो ते मन बांधून ऐकावे."

भरल्या डोळ्यांनी जिजाऊंनी मान वर घेतली. हातीचे बिल्वदल मासाहेबांच्या हातात देत तो 'श्रींच्या' राज्याचा संकल्प-पुरुष बांधल्या आवाजात म्हणाला,

मासाहेब ऽ काळीज टाकू नका! शंभूबाळ मथुरेत सुखरूप आहेत!! औरंगजेबाच्या चौकीपहाऱ्यातून ते सुखरूप सुटावेत म्हणूनच आम्ही ही चाल टाकली आहे! आमच्या जिभेवर आणि तुमच्या काळजावर धोंडा ठेवून! असे केले तरच शंभूराजे देशी सलामत परत येणार आहेत!!" राजे क्षणभर थांबले. भवानीच्या मूर्तीकडे शांत डोळ्यांनी बघत पडल्या आवाजात म्हणाले, "यासाठी कधी नव्हे ती आम्ही तुम्हास तापदरा दिली. पण हे समजून घेतले पाहिजे. थोर मनी आम्हास क्षमा केली पाहिजे!"

वेगवेगळ्या भावनांचा काना-उरात कालवा झालेल्या जिजाऊंना काय बोलावे कळेना. मान डोलावीत त्या कसेबसे म्हणाल्या, "शिवबा, तोंड काढता पण ती आम्हास नाही पेलवत. काही करा आणि शंभूबाळांना आमच्यासमोर जलद हजर करा!"

डोळे फाडून धाराऊ राजांच्याकडे बघत होती. तिला म्हणावेसे वाटले, "कसं, कसं म्हणायचं हो?" पण शब्द फुटला नाही. न बघितलेल्या कल्पनेच्या मथुरेत ती केव्हाच जाऊन पोचली होती!

घोड्यावरचे जिन काढून ठेवावे तसे राजांनी मन बाजूला सारले आणि राजगडावर शंभूराजांचे 'दिवस' घातले! सारा गडदेव सुतकात पडला. संभाजीराजांच्या मरणाची भूमका बारामावळात पसरली! वाडी-मजऱ्यांतील खोपटांची पाखी हळहळली.

राजांनी राजगडाहून धाडलेला थैलीस्वार शृंगारपूरच्या वेशीत घुसला. डुईची पगडी काढून तो पिलाजी शिर्क्यांच्या वाड्यात दिंडी पार करीत शिरला.

"टाकोटाक निघोन येणे. खाजगीने बोलणे आहे." एवढाच मजकूर राजांनी पिलाजींना लिहिला होता.

आता मथुरेला उत्तरी थंडीने फेर टाकला. यमुनेचे पात्र दाटीच्या धुक्याची रजई पांघरू लागले. दिवस राधाकृष्णाच्या मंदिराच्या कळसाएवढा चालून आला तरी ते दर्शन देत नव्हते. राजांनी मथुरा सोडून दोन महिने हटले होते. दसरा सजून सरला होता. संभाजीराजे वाट बघत होते थैली घेऊन येणाऱ्या खबरगिरांची.

"कोई आया है?" रोज ते स्नान, देवदर्शन करून परतताच कृष्णाजीपंतांच्या आईंना – लक्ष्मीबाईंना विचारीत होते. जसे दिवस चाल धरीत होते तशी त्रिमलांच्या मंडळीभोवती चिंता चढत होती. धुके दाटत होते.

एके दिवशी त्रिमलांच्या घरात, खांद्यांना पडशा टांगलेली, उत्तरी व्यापारी पद्धतीचा पोषाख केलेली दोन माणसे शिरली! त्यांच्याबरोबर आलेले हत्यारी धारकऱ्यांचे पथक मात्र मथुरेच्या वेशीबाहेरच थांबले होते.

शंभूराजे काशीपंतांसह नगरात गेले होते. घरी विसाजी आणि लक्ष्मीबाई होत्या. त्यांची खूणगाठ व्यापाऱ्यांना पटली.

आलेल्या एका व्यापाऱ्याने पडशीतून फासबंद थैली बाहेर काढून ती विसाजींच्या हाती दिली. डोकीच्या रुमालाच्या शेवास बांधलेली खडाधारी अंगठी त्यांच्या हातात ठेवली. नि तो म्हणाला, "आज्ञा है, ये भांजेको दिखाना!" व्यापारी त्रिमलांच्या सदरी बैठकीवर टेकले.

नगरातून आलेल्या शंभूराजांनी नेहमीसारखा विसाजींना उत्सुक सवाल केला – "कोई आया है?" त्यांचे बसल्या व्यापाऱ्यांकडे लक्ष नव्हते.

काही न बोलता विसाजींनी खडाधारी अंगठी संभाजीराजांच्या हातात ठेवली. तिच्या लखलखत्या खड्याने त्यांच्या डोळ्यांत लाख लाख सूर्य पेटविले! 'महाराजसाहेबांची अंगठी!' स्वत:ला हरवून ते एकरोखाने अंगठीकडे बघत राहिले. तिच्या किरणफेक उसळत्या खड्यातून असंख्य मुद्रा उमाळ्या घेत होत्या – "मासाहेब, महाराजसाहेब, साऱ्या आऊसाहेब, धाराऊ, गोमाजीबाबा, अंतोजी, रायाजी, केशव पंडित, महमद सैस –"

चमकून त्यांनी सदरेवर उभ्या असलेल्या व्यापाऱ्यांवर नजर दिली. ते दोघेही लपकन् कमरेत झुकले. मावळी मुजरे रुजू झाले. व्यापाऱ्यांच्या तोंडून परवलीचे बोल उठले, – "आईचा भंडारा! रानचा वारा!" ते राजांचे खबरगीर होते.

खडावा खटखटवीत शंभूराजे त्यांच्याजवळ आले. फारा दिवसांनी ऐकलेल्या मावळी बोलांनी त्यांचे काळीज ढवळले होते. त्यांनी परवलीला दाद दिली – "भवानीचा भंडारा! रानचा वारा!"

प्रवासी सामानांची बोचकी खांद्याला लावलेले काशीपंत मथुरा सोडून निघाले. 'तिरथ यात्रेला!' बरोबर 'बटु' वेषातील भांजे शंभूराजे होते. कुणाला शंका येऊ नये म्हणून मातोश्री लक्ष्मीबाईही बरोबर निघाल्या. खरेच त्यांना 'तीर्थयात्रा' करायची होती! राजे आणि संभाजीराजे घडविणाऱ्या 'माँजी जिजाऊ' त्या सर्व त्रिमल कुटुंबाला डोळाभर बघायच्या होत्या!

जडावल्या उराने संभाजीराजांनी यमुना आणि मथुरेचा निरोप घेतला. थिजवल्या थंडीला धरून 'त्रिमल कुटुंबाची' वाटतोड सुरू झाली.

त्याच्यावर 'नजर' ठेवून पुढेमागे करीत राजांचे खबरगीर आणि धारकरी मुक्काम टाकू लागले. त्यांच्याजवळ छुपी हत्यारे होती. कुणी फकिराचे, कुणी अत्तरियांचे, कुणी वैदूचे तर कुणी चक्क मोगली सरदारांचे वेश धारण केले होते. कोरल्या दाढ्या राखल्या होत्या.

'यात्रा' उत्तर सोडून मावळाच्या रोखाने सरकत होती. चालून चालून संभाजीराजांच्या पोटऱ्यांत मध्येच पेटके भरत होते. मग रात्रीच्या मुक्कामात लक्ष्मीबाई त्यांच्या पोटऱ्या तेल लावून सुमार करीत होत्या. दगडांची चूल मांडून साऱ्यांना खिचडी रांधून त्या घालत होत्या.

आता उज्जयनी जवळ येऊ घातली होती. यात्रेकरूंचा मुक्काम हवेली नावाच्या गावात धर्मशाळेत पडला.

काशीपंतांनी नदीवरून पाण्याचा गेळा भरून आणला. लक्ष्मीबाईंनी दगडी चुलवाणावर खिचडीचे पात्र चढविले. काशीपंत संभाजीराजांच्या पोटऱ्या मालिश देऊन सुमार करू लागले. कुणीच काही बोलत नव्हते. ठरल्यासारखी कामे घडत होती.

एकाएकी धर्मशाळेच्या रोखाने घोडेटापांची टपटप उधळत जवळ जवळ येऊ लागली. यात्रेकरूंनी एकमेकांना नजरा देऊन 'सावधपणाचा' इशारा भरला.

चार मोगली स्वारांचे घोडेपथक क्षणात धर्मशाळेसमोर येऊन थडकले. पायउतार हशमांनी कायदे घोड्यांच्या पाठीवर उडते फेकले. ते चौघेही तरातर चालत येऊ लागले. यात्रेकरूंची काळजे चरकली. आपण त्यांना बघितलेच नाही अशा थाटात सारे आपआपल्या जागी कामातच राहिले.

" ए कुफ्रकी नस्ल, कहाँसे आये हो ? " घोडाईतांच्या म्होरक्याने काशीपंतांवर डोळे वटारीत दरडावले.

" जी, मथुरासे. " केसो त्रिमल अजिजीने म्हणाले.

" कहां निकले ? "

" तिरथ यात्राको. रामेसर जा रहे हैं हुजूर. "

" ये कौन है ? " म्होरक्या नेमका संभाजीराजांच्या समोर येऊन उभा राहिला! म्होरक्याचे नाव हरहिकमतखाँ होते.

" ये मेरा भांजा है सरकार ! " काशीपंत उत्तरले.

" झूट ! सुव्वर, ये सेवा दख्खनीका बच्चा ' संभा ' है ! "

त्या शब्दांनी शंभूराजांची कानपाळी रसरसून आली ! काळजावर निखारा ठेवल्यागत झाले. संपला ! आता सारा मामलाच संपला ! शंभूराजांच्या सुमार झालेल्या पायपोटऱ्या पुन्हा दाटल्यागत झाल्या.

" सेवा ? कौन ' सेवा ' ? ये मेरा भांजा है ! " आपणाला ' शिवाजी ' कोण ते माहीतच नाही. आणि आपल्या भाच्याला आपण सोडणार नाही. अशा थाटात केसोपंत चढ्या आवाजात बोलले. त्यांनी झटकन शंभूराजांना जवळ घेतले.

" ये तेरा भांजा ! नाम क्या है इसका ? माँ किधर है इसकी ? " म्होरक्याने प्रश्नांचे आसूड ओढले.

" इसका नाम माधव है ! माँ गुजर गयी है इसकी ! " काशीपंत बहिणीच्या आठवणीने भरल्यासारखे बोलले !

" झूट ! बम्मन सिधे जुबाँ नहीं खुलेगी तेरी. " त्या हवालदाराने हातातील कोरडा फाडकन काशीपंतांच्या बगलेवर उतरविला. त्याच्या शेवाची चाटती जीभ संभाजीराजांच्या दंडावर वळ उठवून गेली ! यात्रेकरू कळवळले. ' शाही ' चापात अडकले.

" हम गरीब ब्राह्मण यात्रा जा रहे हैं ! सरकार रहम करो. " कळ विसरून केसोपंत छातीवरचे जानवे दाखवीत अंगचे सगळे कसब पणाला लावून कच खाणाऱ्या नियतीशी झगडू लागले. गयावया करू लागले.

" हरहिकमतखाँ, ये बम्बन हैं तो इसकी जुबाँ यूं खुलेगी ! इसे एकही थालेमें खाना लेने कहो अपने भांजेके साथ ! " स्वारांपैकी एकाने म्होरक्याला तिढा सुचविला.

" मरहब्बा ऽ. बिलकुल दुरुस्त ! " म्हणत त्या हवालदाराने काशीपंतांना फटकारले, " ऐ, बूतपरस्त, ये भांजा है तुम्हारा तो खाना खाओ इसके साथ एकही थालेमें ! ए बूढी, लगा दो थाला. " हिकमतखाँने हुक्म फर्मावला.

सारेच यात्रेकरू गडबडले. पेचात पडले. हे कैसे घडावे ?

" शास्त्रमें ये करना ... " केसोपंत काहीतरी बोलायला गेले.

" गया जहान्नुममें तेरा शास्तर ! थाला लगाव. " हिकमतखाँने त्यांना बोलूच दिले नाही.

काशीपंतांनी संभाजीराजांच्याकडे बघितले. त्यांना शंका आली. या वेळी हे राजरक्त उफाळेल. शंभूराजे काहीतरी घोटाळा करून ठेवतील. मग साऱ्यांचीच रवानगी उज्जैनच्या आबदारखान्यात होईल. जन्माला डाग बसेल. हुषारीने लक्ष्मीबाईंनी खिचडीचे तबक मांडले. त्यात मथुरेची मिठाई ठेवली.

घोंगडीच्या घड्या टाकून ताटाच्या एका तर्फेला केसोपंत बसले.

" बैठो बेटा. " म्हणत त्यांनी संभाजीराजांना दुसऱ्या तर्फेला अंथरलेल्या घडीवर बसण्याची हातखूण केली. माणसाच्या आयुष्यात काही काही प्रसंग क्षणातच त्याला फार मोलाचे शहाणपण द्यायला आलेले असतात !

शंभूराजे घडीवर बसले. त्यांनी आणि काशीपंतांनी चित्राहुती दिल्या. एक क्षण दोघांचे डोळे भिडले. दोघांनीही मने बांधली. डोळे फार बोलके असतात. कधी कधी ते जबानीपेक्षा अधिक व अचूक बोलतात !

भोजनपात्राला नमस्कार करून त्यांनी त्यात हात घातले. त्यातील एक हात होता यमुनेच्या पाण्याचे अर्घ्य देणाऱ्या ब्राह्मणाचा. दुसरा हात होता धरतीला रक्ताचे अर्घ्य देण्याचाच ज्याचा ' कुलवसा ' आहे अशा भोसल्याचा ! हा नियतीचा फेर होता. काशीपंत आणि शंभूराजे एका थाळ्यात जेवू लागले ! हिकमतखाँ आणि त्याचे हशम ते बघताना चरफडले.

" इसकी माँका — गल्लत खबर दी कम्बख्तोंने. " हिकमतखाँने खबर देणाऱ्यांचा उद्धार केला.

" ये चावल चबानेवाला गुलछब्बा सेवाका बच्चा कैसै हो सकता है ? चलो. " घोडेपथक धर्मशाळेबाहेर पडले. दौडत्या टापांनी आले तसे निघून गेले ! साऱ्या यात्रेकरूंनी नि:श्वास टाकले. धर्मशाळेत शांतता पसरली.

शंभूराजांच्याकडे अभिमानाने आणि कौतुकाने बघणाऱ्या काशीपंतांना मनोमन वाटले, " खरंच आपणाला इतका अवधानी, इतका समजदार असा एखादा भाचा असायला पाहिजे होता ! "

तबकातील अन्नात संभाजीराजांची बोटे मात्र चिवडती फिरत होती. कधी नव्हे ते त्यांना आज जाणवले होते — " आम्हास — असं सामोरं बसून कधी आबासाहेबांबरोबर एकच पात्री भोजन घेण्याची संधी लाभलीच नाही !! "

उत्तरी जन्मला — वाढलेला एक संस्कारशील ब्राह्मण आणि ' श्रींच्या ' राज्याच्या निर्मात्याचा एकमेव राजअंकुर एकमेकांसमोर बसले असताना, एका पात्री जेवत असताना असे वेगवेगळ्या विचारांनी जखडले होते.

कधी कधी नियती ' वाढून ठेवते ' ते ' ताट ' म्हणतात ते असे !!

सारे ताप, आयास भोगून 'त्रिमल कुटुंबाचा' यात्रेकरू जथा राजगडापासून एका मजलेवर आला. खबरगिरांनी ही बातमी बालेकिल्ल्यावर केव्हाच पोच केली.

जिजाऊंचे दर्शन घेऊन खासे राजे गड उतरून वाडीत पावथ्याशी आले शंभूराजांना सामोरे जावला. खरे म्हटले तर आपल्या काळजाचा 'सोनतुकडा' पुढच्या हातांनी पावता घ्यायला! बरोबर मोरोपंत, आण्णाजी, प्रतापराव, आनंदराव, केशवपंडित, कृष्णाजी, सैस, गोमाजीबाबा अशी निवडीची मंडळी होती. संभाजीराजांचा राजसाज घेतलेले तबकधारी होते. गड चढून जाण्यासाठी सिद्ध राखलेली सोनेरी वाघमुखी दांड्याची तांबड्या सखलादी अस्तराची पालखी ठाण झाली होती.

दूरवर काशीपंत आणि लक्ष्मीबाई यांच्या मधून येणाऱ्या संभाजीराजांना प्रथम राजगडाच्या संजीवनी माचीवरचा भगवा ठपका दिसला. त्याला छातीशी हात नेत त्यांनी मान दिला. राजगडाच्या दर्शनाबरोबर, ओढा कातरून जाणाऱ्या घोड्याच्या टापांबरोबर पाण्याच्या सफेद-साफ धारा उसळतात तसे त्यांचे सारे दबले विचार उसळले! आठवणी, चेहेरे, ठिकाणे यांचा मनात कालकल्लोळ माजून उठला.

"आम्ही फर्मान घेऊन परतलो तेव्हा महाराजसाहेब माचीवर आले नव्हते – आजही आले नसले तर!" बटुवेशातील शंभूराजे चालत होते. पायीच्या खडावा खटखटत होत्या. काळीज धडधडत होते. क्षण-क्षण असह्य झाला होता.

समुद्राच्या पाण्यावर उगवता सूर्य दिसतो तसे संभाजीराजांना भोवतीच्या कुरणात संपलेल्या पायवाटेच्या टोकाला कसलीतरी झगमग दिसली. क्षणभर चालते शंभूराजे गपकन् थांबले. किलकिले डोळे जोडून त्यांनी झगमगीचा अंदाज घेतला. नकळतच त्यांचा हात केसोपंतांच्या हातून सोडवला गेला. दूरवर राजांच्या टोपाची सोनजराबतूची उन्हाने नुसती झगमग तळपत होती! तिच्या दर्शनाबरोबर शंभूराजांच्या डोळ्यांत लाख लाख सूर्य काजवे होऊन उतरले! पोळ्यात दडून बसलेल्या मधमाश्यांची झुंड उसळावी तशी उरात रक्तलाटांची सळसळ उठली.

साथीच्या लक्ष्मीबाई-काशीपंतांना गोंधळून टाकीत संभाजीराजांनी हात उभवते करून सादवले – "महाराजसाऽहेब!" आणि ओठातून निसटलेले शब्द आपल्या अगोदर दौडताहेत हे कळून येताच ते तडक धावत सुटले. पायीच्या लटकत्या खडावा दूर उडाल्या! पावसाच्या भरमार सरींनी झोडपट्टी केलेले शिंगरू पागा समोर दिसताच शेपटी उभवून दौडत सुटावे तसे शंभूराजे धावू लागले! शक्य झाले असते तर वरच्या मावळी आभाळानेच ते 'भोसलाई राजफूल' आपल्या निळ्या हातांच्या मिठीत घेतले असते! त्याचा मनकल्लोळ शांत करण्यासाठी!

भोवतीच्या कुरणाला फुटलेला एक सोनअंकुर दुरून झेपावत सरासर पुढे येताना राजांना दिसला. शिवगंध आक्रशीत त्यांनी डोळे लहाने केले.

"शंभूबाऽळ! – दौडताहेत – पडले तर?" आठी हातांनी कुणीतरी पुढे लोटावे तसे राजे पुढे झेपावले. राजे तरातर सामोरे का चालताहेत हे भवतीच्यांना चटक्याने कळलेच नाही. आणि कळले तेव्हा सारेच राजांचे पायठसे वेचीत मागून पुढे ओढले गेले!

घामाने अभिषेकलेल्या, लालवती मुद्रेने शंभूराजे हात उभवून धावते येत होते. खांद्यावरून घसरू, ओघळू बघणारी झोळी मध्येच ते सावरीत होते. शक्य असते तर त्यांनी ती झोळी फेकून दिली असती!

झोळी सावरणारे धावते शंभूराजे बघताना राजे गलबलून उठले.

गडाच्या तटबंदीला भन्नाट, मावळी रानवारा सपकाऱ्याने येऊन भिडावा तसे, डोंगरमाथ्यावरून उड्या टाकीत आलेला खळाळ ओढा, नजर न ठरणाऱ्या फेसाळ नदीला भिडावा तसे, शिवगंधाच्या दोन्दळी पावनपट्टयाला भवानीचा दुबोटी, उसळ्या भंडारा भिडावा तसे – तस्सेच संभाजीराजे पायझेपांनी येऊन राजांना भिडले. श्वासाला दूर फेकलेला निःश्वास भिडला. तलवारीला शिकल मिळाली. राजसंन्याशाला बटुसंन्यासी मिळाला! दूरदृष्टीच्या जाणत्या थोरपणाला, शहाणे, सोशिक धाकुटपण मिळाले! आबासाहेबांना बाळराजे मिळाले!

राजांच्या कमरेला शंभूराजांची घट्ट हातमिठी पडली. आपले राजांच्या जाम्यात झाकले गेलेले तोंड ते डावे-उजवे घुसळून टाकीत होते. त्यामुळे कपाळीचा गंधटिळा विस्कटला जात होता – राजांच्या टोपाची मोतीलग हिंदोळत होती.

"मऽहाऽ–" शंभूराजे बोलू बघत होते – पण शब्दांच्याच दाटल्या घशात भाव घुसमटून घुटमळू लागले.

राजांचे सडक हाततळवे शंभूराजांच्या पाठीवरून फिरू लागले. मायेने? अभिमानाने? धन्यतेने? कसे! कसे ते त्या हातांना आणि त्या पाठीलाच ठाऊक!

त्या फिरत्या हातांनी शंभूराजांचा उतू घातलेला ऊर निवांत केला.

मान उठवून त्यांनी भरल्या डोळ्यांनी राजांच्याकडे पाहिले. ती – तीच उभट मुद्रा पिंडीसारखी. आठवणीसरशी संभाजीराजे राजांपासून मागे हटले. गुडघे टेकून त्यांनी राजांच्या पायांवर कपाळ टेकविले! उठून खांद्यांची झोळी पोटाकडे पुढे घेतली. तिच्यात हात घालून, राजांनी उत्तरी-निरोप घेताना दिलेली सोनपिंडी बाहेर काढली! पिंडी उन्हात झमकून सळसळली.

एक निसटती नजर राजांना देऊन हातची सोनपिंडी राजांच्या ओंजळीत ठेवीत ते अदबीने एवढेच म्हणाले, "आम्ही – आम्ही कमी बोललो!"

उन्हात झळकत्या ओंजळीतील पिंडीकडे बघताना राजांना वाटले – "यांनी – यांनी अधिक बोलले पाहिजे!!"

राजांना प्रयागला त्रिवेणीसंगमाच्या घाटपायऱ्यावर भेटलेला तो पारधी आठवला!

" हर काममें यश देनेवाले गरुडके पाँख!" समाधानाचा निःश्वास राजांच्या नाकपाळ्यांतून निसटला.

रायवळी आंब्यांच्या पानडेऱ्यात, भातगोटे खाऊन तृप्तावला कवडा भरल्या गांजानं घुमकी भरीतच होता- " कुट्र – कुट्र – कुटुर्र – कुटुर्र ! " पण – राजांना आता ती घुमकी ऐकूच येत नव्हती !!

संभाजीराजांनी बटुवेश उतरून राजवेश अंगी धारण केला. भोयांनी 'जय भवानी' गर्जत खांदे दिलेली पालखी राजगड चढू लागली. तिच्यात राजे आणि संभाजीराजे बसले होते. पालखीमागून मोरोपंत आपले मेहुणे कृष्णाजी, काशीपंत यांच्यासह गड चढू लागले. लक्ष्मीबाई मेण्यात बसल्या.

पाली दरवाजा येताच गडनौबत कधी नव्हे ती चढीच्या तारेने घुमून उठली. तिची दुडदूड ऐकून गडावरच्या बंदुका, उखळी, तोफांनी आपले 'धडाडधुम्म' कंठ फोडले. बारांची दणकी धडधड गुंजणमावळ खोऱ्यात घुमू लागली.

संजीवनी माचीवर पालखी ठाण झाली. राजे, शंभूराजे पायउतार झाले. एकचालीने चालू लागले. मागून भरल्या मनांची इमानी मंडळी चालली. माचीची माणसे झुंडीने पुढे येत 'पायदर्शने' घेऊ लागली.

बालेकिल्ल्यावर बाहेर निघणारे भुयार आले! धारकऱ्यांनी धोंड हटविली. राजे-संभाजीराजे भुयारात उतरले. टेंभ्याचा धूसरमंद प्रकाश पायऱ्यावर उतरला होता. चालता-चालताच दोघेही एका पायरीवर थांबले. एकमेकांना नजर भिडविताना ते शांत होते. भोसल्यांना भुयारीचे भय कधीच नसते!! वाटेवरच्या-किंवा जीवनाच्या वाटेवरच्या! कारण त्यांच्या भाळी भवानीचा भंडारा भरलेला असतो.

बालेकिल्ला आला. सदरचौकाच्या उंबरठ्यापर्यंत स्वाऱ्या आल्या. कुणालाच कल्पना नसताना आतून गोंदल्या हातात काळे कोंबडे घट्ट धरलेली धाराऊ एकाएकी पुढे आली! शंभूराजांना बघताच तिचा कुणबी प्रेमा उमळून आला. बोल निसटले, " आरं, माज्या ल्येकरा! कुटं हुतास ? कुटं रं हुतास यद्दोळ ? "

हातचे कोंबडे तिने शंभूराजांची डावी बगल धरून सरासर तीन वेळा उतरले. भेदरले कोंबडे कसेतरीच केकाटले. धाराऊने ते फडफडत्या पंखांनिशी दूर फेकून दिले.

" आऊ ऽ!" संभाजीराजांनी सर्वांसमक्ष तिच्या कुणबी पायांवर आपले राजकपाळ टेकले. पदराच्या ओच्यात नारळ घ्यावा तसे धाराऊने वाकून त्यांना पोटाशी घट्ट बिलगते घेतले. कधीतरी फार पूर्वी सईबाईसाहेबांना सांगावासा वाटलेला विचार धाराऊचे भाबडे मन पुन्हा एकवार गोंदून गेला – " राजाच्या या ल्येकराला कुन्या पाप्याच्या बदनजरंची मुंगी कंदी बी डसू ने!" धाराऊच्या डोळ्यांच्या मावळघागरी पाझरू लागल्या.

धाराऊला सोडून राजांना खेटून शंभूराजे सदरेच्या दगडी उंबरठ्यात उभे राहिले.

सुवासिनींनी त्यांच्या पायांवर शिगभरल्या घागरी रित्या केल्या. त्यांचे पाणी शंभूराजांच्या पायी चालून पडलेल्या भेगांत शिरून चरचरले! चेहऱ्याभोवती पाजळली निरांजने फिरली. संभाजीराजांचे भिरभिरे डोळे शोधीत होते मासाहेबांना. उंबरठा पार करून ते राजांच्यासह सदरचौकात आले. कधी नव्हे त्या जिजाऊ सदरचौकात येऊन उभ्या होत्या! तिथे उभे राहणेही त्यांना असह्य झाले. यमुनेच्या मायाळ पात्राने पलटी घेतली! थकल्या जिजाऊंच्या पायांत बळ उतरले. कपाळीचा कुलवंत पदर घरंगळा झाला आहे याचे भान त्यांना उरले नाही! त्या सामोऱ्या चालत आल्या. त्यांच्या रूपाने मावळी आऊपणाची एकवट मूर्तीच चालत आली!

राजांना सोडून पायझेप टाकीत शंभूराजे उसळले. क्षणात त्यांची जिजाऊंना बिलगती घट्ट हातमिठी पडली. सदरचौक दाटून आला.

" मासाहेब! मासाहे ऽ ब!" प्रत्येक शब्दानिशी शंभूराजांचा ऊर भरून येत होता. एका विचाराबरोबर तर त्यांचे भरले छातवान कसे गच्च गच्च दाटून आले– " मासाहेबांच्या अंगच्या नेसूलाही एक प्रकारचा भावमंगल वास येतो! जीवाचा कोंदवा करून टाकणारा! बुक्क्यात मिसळलेल्या भंडाऱ्यासारखा!!" आणि – आणि शंभूराजे आपले तोंड आवेगाने मासाहेबांच्या नेसूत नुसते घुसळू लागले!

आज आणि आत्ता जिजाऊंना कळून आले की 'आई भवानीला आठ हात का असतात!! तेही तिला थिटेच पडत असतील!' हातांचे थिटेपण जिजाऊ जबानीने भरून काढू लागल्या – " शंभूबाळ ऽ! शंभूबा ऽ ळ! शंभूबा ऽ ळ!! "

त्या थबथबत्या मिठीतही जिजाऊंच्या मनावर एका विचित्र विचाराची घोरपड बोचऱ्या नख्या रुपवीत सरासर निर्दयपणे चढून आली– " शंभूबाळांचा ... काळ झाला!!" जिजाऊ थरारल्या. सणसणत आलेला एक वर्मी तोफगोळा, दौडत्या घोड्याबरोबर फरफट होत चाललेली रिकीब, झिजून झिजून नव्हत्या झालेल्या औषधी मात्रा क्षणात त्यांच्या पाणथर डोळ्यांसमोर तरळून सरकल्या! त्यांनी त्यांचे थोरले पुत्र, खाशांची स्वारी आणि सूनबाई नेल्या होत्या!

जिवाभावाच्या माणसांचा 'काळ' होतो तेव्हा मागे राहणाऱ्यांच्या हयातीचा 'बरड-माळ' होतो हे त्यांनी भोगले होते. जिजाऊंनी शंभूराजांना एकदम हातांच्या आवेगी मिठीत कोंडून-कोंडून टाकले. त्यांच्या डोळ्यांतील 'थोरली-माया' शंभूराजांच्या टोपावर टपटपू लागली.

सदरेवरच्या हर-असामीला ते बघताना वाटले– " आपण – आपणच 'धाकले राजे' आहोत! ह्या 'थोरल्या-मायेखाली' न्हातो आहोत! "

भावनेचा कढ उलगताच जिजाऊंनी पदरकाठाने नेत्रकडा सावरल्या. शंभूराजांचा मोहरांच्या थैलीने सतका उतरून त्यांच्या खांदावळीवर हात चढवीत त्या शांतपणे म्हणाल्या – " चला! "

आभाळाच्या निळाईने विजेचा तेजवान झोत बिलगता घेऊन किनारी लावण्यासाठी चालावे तशा जिजाऊ चालल्या! देवमहालाच्या रोखाने. शंभूराजांना जगदंबेच्या औक्षवंत चरणांवर घालण्यासाठी!

सगळ्या सदरकऱ्यांनी त्यांच्या पाठमोऱ्या मूर्तींना मुजरे रुजू घातले.

देवीचे दर्शन घेऊन शंभूराजे पुतळाबाईंच्या महाली आले. त्यांना ओवाळण्यासाठी हाती घेतलेल्या आरतीच्या तबकाचे भान पुतळाबाईंना राहिले नाही. त्या शंभूराजांच्याकडे बघतच राहिल्या.

त्यांच्या सामोरे येत, त्यांची पायधूळ घेऊन शंभूराजे म्हणाले, "मासाहेब ऽ, ओवाळता?" तेच शब्द, ओढ्यासारखे उड्या घेत येणारे, तेच डोळे दर्पणासारखे साफ. पुतळाबाईंच्या हातातील तबक थरथरत फिरू लागले.

संभाजीराजांनी कमरेच्या शेल्यात खुपसलेला ताईत बाहेर काढला. तो आरतीच्या तबकात ठेवीत म्हणाले, "आम्ही सलामत आलो. येताना हा ताईत झोळीत ठेवीत होतो. झोळी खांद्यास असली की कसलीच धास्त वाटत नव्हती."

"गुणाचाच आहे तो!!" पुतळाबाईंच्या मनी तबकातील ताईत बघताना विचार उठला. पुतळाबाईंनी तबक चौरंगीवर ठेवले. आणि त्यांना काय वाटले कुणास ठाऊक त्यांनी पुन्हा तो ताईत उचलला! शंभूराजांच्या जवळ जात काहीच न बोलता तो त्यांच्या दंडात बांधला आणि त्यांना आवेगाने जवळ घेतले. पुतळाबाईंना शंभूराजांच्यात एक विचित्र मुद्रा दिसली. सईबाईंच्यासारखी – काळ्या धाग्यांनी विणलेली! सावळी!

तेथून दर्शनासाठी म्हणून शंभराजे सोयराबाईंच्या महाली आले. पायांवर कपाळ टेकवून त्यांनी मासाहेबांचे दर्शन घेतले. त्यांना वर उठवून घेत सोयराबाई म्हणाल्या, "स्वारींना म्हणवले तरी कसे तुमचा 'काळ' झाला म्हणून? उठा. औक्षवंत व्हा! गडावर तुमचे दिवस घातले साऱ्यांनी! मासाहेबांच्या कानी घातले पाहिजे. फेरभोजने घातल्याशिवाय हा दोष नाही हटायचा!"

संभाजीराजांच्या कपाळी आठ्या पडल्या. पडल्या नजरेने ते सोयराबाईंच्या पायांवर फिरलेली आळत्याची नक्षी उकलण्याचा यत्न करू लागले! तिचा शेव सापडत नव्हता. सापडणार नव्हता!

त्या रात्री जिजाऊंच्या महाली पलंगावर आडव्या झालेल्या शंभूराजांचे डोळे मिटले होते. थकव्याने झोप यायला पाहिजे होती. पण ते जागेच होते. त्यांच्या मनी प्रश्नांच्या खडावा खटखटू लागल्या. धूळ उडू लागली – "आमचा काळ झाला!' असे खुद्द महाराजसाहेबांनीच साऱ्यांना सांगितले! आमचे दिवस घातले गेले गडावर? का? असे का केले आबासाहेबांनी? यात – यातही त्यांचा काही मनसुबा असेल! नाहीतर – गड उतरून ते आमच्यासाठी का आले असते?" शंभूराजांच्या डोळ्यांवर झोप आपला शालनामा पांघरू लागली.

त्यांच्या पोटऱ्यांना तेलवण चोळणारी धाराऊ त्यांच्या मिटल्या पापण्यांकडे एकरोखाने बघत होती. मायेला फक्त एकच माहीत असते, सेवा करणे! मूकपणे!

मार्गशीर्षाच्या धुकाळ पौर्णिमेचा दिवस गुंजणमावळात चढीला लागला. स्नान घेतलेले टोपधारी शंभूराजे जिजाऊंच्या महाली आले.

पितळी सरशीने जिजाऊंनी त्यांच्या कपाळी दोनदळी शिवगंध रेखले. त्यांच्या संगतीने जिजाऊ सदरेच्या रोखाने चालल्या. त्यांच्या मागून, राजे-शंभूराजे उत्तरी असताना, जिजाऊंनी बिल्वपत्रे वाहताना खूणगाठेसाठी साठवण केलेल्या मोहरांची तबके घेऊन धारकरी चालले. आज ती तबके 'दान' म्हणून वाटली जाणार होती.

राजगडाची सदर मानकऱ्यांनी सजली होती. ही कदरेची सदर होती. मथुरेहून संभाजीराजांना सुखरूप देशी आणणाऱ्या कृष्णाजी, काशीपंत आणि लक्ष्मीबाई या त्रिमल त्रिवर्गांची कदर राजे सदरसाक्षीने करणार होते.

जिजाऊ आणि शंभूराजे सदरेवर प्रवेशले. बैठक घेतलेले राजे जिजाऊंना बघताच अदबीने चटकन उठले. सदर सुरू झाली. धारकऱ्यांनी मोहरांची तबके बैठकीच्या बगलेला हारीने मांडून ठेवली. भंडाऱ्याची परडी फिरली.

राजांनी बैठ्या-बैठ्या मुजुमदार निळोपंतांना नजर दिली.

पुढे येत निळोजीपंतांनी सदरेचे प्रयोजन खुले केले – "उत्तरी सरकारस्वारीवर बाका प्रसंग बेतला. हुन्नराने राजियांनी गलिमाचो कैद फोडली. देशी यावे म्हणोन बैराग्यांचे वेष धारण केले. पण मार्गी पेच उभा राहिला. धाकट्या राजियांना संगती घेवोन चाल धरणे मुश्किल झाले. म्हणोन सरकारस्वारीने धाकट्या राजियांना मथुरेस त्रिमलांच्या हाती स्वाधीन केले. त्रिमलांनी कस्त-कोशिस करोन – इमानइतबारे घरचा दागिना घरी पावता केला. त्याकारणे त्रिवर्ग-त्रिमलांचा मरातब करावा असे मनी धरोन स्वारींनी ही सदर बसती केली असे.

"ये सदरी मरातब म्हणोन – मशारनिल्हे काशी त्रिमल, मजकुर मथुरा यासी रुपये रोख पंचवीस हजार –" निळोपंत थांबले.

मोरोपंतांच्या शेजारी बसलेले काशी त्रिमल उठले. बैठकीजवळ अदबीने आले.

राजांनी आणि संभाजीराजांनी चंदेरी रुपयांनी शिगोशीग भरलेल्या तबकाला दस्तुरी-स्पर्श दिले. झुकून मुजरा देत काशीपंतांनी तबक हाती घेतले. त्यांचे हात आणि मन भरून आले. मथुरेत असताना ज्या भावभऱ्या डोळ्यांनी ते यमुनेच्या पात्राला बघत होते तसेच त्यांनी 'माँजी जिजाऊंना' जवळून डोळाभर बघितले. हातीचे तबक बाजूला ठेवून त्यांनी बैठकीवरच्या राजे-संभाजीराजे आणि माँजी जिजाऊ या त्रिदळी राजकुटुंबाला उत्तरी अदबीचा साष्टांग दंडवत रुजू केला.

उपरण्याचा जरीकाठ ठाकठीक करीत निळोपंत पुढे बोलले – "त्रिमलांच्या मातुश्री –

आईजी लक्ष्मीबाई मजकुर मथुरा यासी रुपये रोख पंचवीस हजार–!" निळोपंतांनी राणीवशाच्या बैठकीत चिकाच्या पड्याआड बसलेल्या लक्ष्मीबाईंना म्हणून पड्याला नजर दिली. पडदा सळसळला. लक्ष्मीबाई स्त्रीवशाच्या बैठकीतून बाहेर आल्या. जिजाऊंनी दस्तुरी हातस्पर्श दिलेले बंद्या चंदेरी रुपयांचे तबक लक्ष्मीबाईंनी आपल्या थरथरत्या हाती घेतले. पाणावल्या डोळ्यांनी त्या जवळून जिजाऊंना निरखू लागल्या. त्यांच्या हाती चंदेरी रुपयांचे शिगभरले तबक होते आणि समोर दिवसाढवळ्या सदरबैठकीवर उतरलेले दूधदाट चांदणे त्यांना दिसत होते!

तबक बाजूला ठेवून नमस्कारासाठी म्हणून लक्ष्मीबाई वाकायला गेल्या. "बाई, तुमचे आमच्यावर थोर उपकार! हा कोण प्रकार? शक्य असते तर आम्हीच स्वत: तुमची भरल्या फळाने ओटी भरली असती इथे. सदरसाक्षीने." जिजाऊ त्यांचे हात वरच्यावर उचलून घेत म्हणाल्या. या क्षणी आपले कपाळ उजाड आहे याची खंत जिजाऊंना कातरून गेली.

काशीपंत, कृष्णाजी, विसाजी यांना 'विश्वासराऊ' हे किताब देण्यात आले. पेहराव, पालखी, हत्ती, सरंजाम देऊन साऱ्यांचा गौरव करण्यात आला.

एकामागून एक दानाची तबके शंभूराजांच्या सामोरी येऊ लागली. नावनिशीवार त्यांचा उल्लेख होताच संभाजीराजे तबकांना दस्तुरी हातस्पर्श देऊ लागले.

उपवासाचे पारणे फेडून सदरेवर बसलेल्या जिजाऊ समाधानाने भरून आल्या होत्या. तबके सरतीला आली तशी संभाजीराजांच्या कपाळी निसटत्या आठ्या उठून गेल्या. राजांच्याकडे झुकते होत ते पुटपुटले– "महाराजसाहेब–"

"बोला." राजे समाधानाने फुलले होते.

"मरातबाचं एक तबक.... आम्च्याच्या वाटेनं जाऊ द्यावं!!"

"..." राजांनी भुवया चढल्या ठेवीत 'कशासाठी' असा काही न बोलताच सवाल केला.

नजर राजांच्या छातीवरच्या माळेवर टाकीत संभाजीराजे म्हणाले– "कुम्हारवाडीच्या कुंभारानं आम्हास घरोबा दिला. त्याच्यासाठी!!"

नकळतच राजांचा हात संभाजीराजांच्या पाठवळीवर चढला. जामा काखेला धरून दाटला. मोहरांनी भरलेले एक तबक आम्याच्या कुंभाराच्या नावाने बाजूला काढण्यात आले. राजांनी आपल्या खाजगीच्या कारभाऱ्यांना बैठकीवरून नजर दिली. कारभारी सरपोसाने तबक घेतलेला एक तबकधारी घेऊन राजांच्या सामोरे आले. त्यांनी मुजरा केला. तबकधाऱ्याने सरपोस हटता करून तबक राजांच्या समोर झुकते होऊन धरले. संभाजीराजांना तबकात सोनतारांत मढविलेले एक पदक दिसत होते! कसल्या तरी पिसांचे!

"हे काय?" त्यांनी राजांना विचारले.

"हे गरुडाचे पाँख. हरकामी यश देणारे!" राजे तबकातील पदकाकडे बघत उत्तरले. त्यांनी डोळ्यांनी तबकधाऱ्याला तबक जिजाऊंच्या समोर पेश धरण्याची इशारत केली. "मासाहेब, त्या पदकास हात द्यावा!" राजांनी जिजाऊंच्याकडे बघितले. जिजाऊंनी गरुडपिसांच्या मढविलेल्या पदकाला हातस्पर्श दिला. आत्ता पदक सर्वार्थाने 'हर काममें यश देनेवालें' झाले!

जिजाऊ राजांना काहीतरी विचारणार होत्या. एवढ्यात पाली दरवाज्यावरच्या नगारखान्यावरून उठलेली नौबतीची दुडदूड सदरेत घुसली!

राजे आणि जिजाऊ ती ऐकताना एकमेकांकडे बघून मंद हसले. का ते मात्र सदरेवर कुणालाच उमगले नाही.

सदर उठायला झाली. लगबगीने गडाचा पोतराज बैठकीसमोर आला. मुजरा घालून म्हणाला, "सरकार, आज पुनव हाय. आईच्या गोंधळाचा चौक भरायची आज्ञा चाकराला व्हावी. खाशांनी गोंधळाला रात्री मान द्यावा."

"जरूर" राजांनी पोतराजाला पानविडा आणि नारळ दिला. सदर उठली.

सांज धरूनच थाळ्याएवढे 'चंद्रफूल' आभाळसुंदरीने डुईत माळले! चांदण्याच्या रूपने त्या फुलाचा सुगंध राजगडावर पसरला.

सदरचौकात गोंधळ्यांनी तांदळाचा चौक भरला. रात्रीचा थाळा घेतलेले राजे, संभाजीराजे आणि जिजाऊ यांच्यासह सदरेच्या बैठकीवर गोंधळ ऐकायला बसले. सगळी सदर माणसांनी गच्च भरली होती.

चौकाचा सारा साज मांडून होताच गोंधळ्यांचा म्होरक्या सामोरा आला. डुईची लाल पगडी झुकवीत म्हणाला– "सरकार, उदे करायचा हुकूम व्हावा."

राजांनी त्याला हाताचा पंजा उठवून थोडा वेळ थांबायची खूण दिली. राजांच्या टोपात गरुडपिसाचे पदक मढले होते! ते तिरपे टाकीत राजे सदरेत येणाऱ्या अंत:पुराच्या दरवाज्याकडे बघू लागले. साऱ्या नजरा त्या रोखाने लागल्या.

त्या दरवाजाआड गोंदल्या हातांची, पदर सरसा करताना हालचाल झाली. काकणांचा किणकिणाट उठला. त्या किणकिणाटाशी बोलत काही क्षण गेले आणि पाठोपाठ गलमिश्या असलेल्या पिलाजींच्या आणि गोंदल्या मनाच्या धाराऊच्या मधून येसूबाई सदरेवर प्रवेशल्या! खालच्या मानेने! धडधडत्या उराने!

संभाजीराजांचा काळ झाला या उठलेल्या हुलीवर विश्वास टाकून पिलाजीराव संभाजीराजांचे जोडे सती जायला निघालेल्या येसूबाईंच्यासाठी मागायला आले होते. त्या वेळी त्यांची समजूत घालून राजांनी त्यांना शृंगारपुरी परते धाडले होते.

संभाजीराजे सुखरूप परतताच शृंगारपूरला राजांनी थैलीस्वार धाडला होता. पिलाजींना लिहिले होते– "पौर्णिमा धरोन सूनबाईनिशी निघोन येणे! येते वख्ती भावेश्वरीचा अंगारा घेवोन येणे! शंभूराजे सुखरूप गडी पावते जहाले!"

पिलाजींना सदरेवर येताना बघून संभाजीराजे अदबीने उठायला गेले – पण पुढे पुढे येणारे चमकते तोडे बघून ते पुन्हा खाली बसले! आपसुखच.

" या. सूनबाई." म्हणत राजे मात्र उठून तसेच पुढे गेले. त्यांनी येसूबाईंना हाती धरून आणले आणि मासाहेबांच्या बगलेने बैठकीवर इतमामाने बसविले. पिलाजी बसले. राजांनी समोर आलेल्या परडीतील भंडाऱ्याची चिमट उधळली. गोंधळ्यांना उदोची इशारत दिली. गोंधळ्यांनी पोत पाजळून नमन धरले:

" गजवदना – गणराया गौरी!" संबळ-तुणतुण्यांचे मेळसूर घुमू लागले. म्होरक्या गोंधळी नाचत्या पोतांवर कानाशी हात नेत जगदंबेचा महिमा उभा करू लागला –

" आदिशक्तीचे कवतुक मोठे – भुल्या मज केले!"

आम्याच्या प्रवासाने आणि ध्यानीमनी नसता समोर ठाकलेल्या एकाहून एक बाक्या प्रसंगाने संभाजीराजांची जाण आता चढीने वाढली होती.

राजांनी आपल्या ताब्यातील गडकोटांचा फेर टाकून गडकऱ्यांना दर्शन दिले. अण्णाजी दत्तोंच्या मदतीने मुलखाची ऐनजिनसी जमाबंदी बांधून घेतली. आपल्या लष्कराला नवा कानुजाबता घालून दिला. कडक नियम जारी केले.

'लष्कराने पाऊसकाळात चार मास आपल्या राहणीच्या मुलुखावर जावे. शेतीभातीची कसणूक करावी. दसरा धरून साहेबकामावरी रुजू व्हावे. आठ मास मुलुखगिरी करोन पोट भरणे ते भरावे. स्वारीत बायाबापड्यांनी बदअमल करू नये. मुलुखगिरीस जाताना व देशी परते येताना सरकारी चौकी पहाऱ्यावर जमेनिसास झाडा द्यावा. गैरवाका वर्तू नये. कानुजाबत्यास बाध आणील त्याचे हात जल्लादाकरवी कलम होतील.' असा लष्कराचा कडक जाबता राजांनी घालून दिला.

जमीनधाऱ्याबद्दल मलिकंबरला मागे टाकील असे धोरण राजांनी घालून दिले. गावचा देशमुख, देशपांडा, पाटील आणि चार जाणते, कदीम गावकरी अशा सात असामींनी मिळून जमिनीचा वकूब बघून प्रत ठरवावी. एकपिकी, दुपिकी अशी जमिनीची प्रतवारी लावावी. त्यामानाने सरकारी धारा बसवावा. जे रयतेस धारा नगद पैक्याचे रूपाने देणे निभत नसेल त्याजकडून ऐनजिनसी धान्यरूपाने धारा वसूल घ्यावा. नांगर, बैल, बियाणे जो वस्तभाव कसणुकीस लागेल तो सरकारफडातून कुणबियांस वख्ती द्यावा. हे पुढे टाकायच्या चालीसाठी असलेले धोरण होते. संभाजीराजांच्या समक्ष ते सारे घडत-बनत होते.

सदरेवर बसलेले राजे, आपला कुणबी आणि धारकरी यांच्यासंबंधी बोलताना केवढ्या मायेने भरून येतात हे शंभूराजे समक्षच बघत होते. कधीमधी त्यांच्या मनी विचार येत होता – " तसा फावला समय हाताशी आलाच तर महाराजसाहेब उठतील. आम्हास संगती घेऊन एखाद्या वाडीत जातील. अंगचा निमा-टोप-चोळणा उतरवून

ठेवतील आणि धोतराचा काचू मारून, मुंडं अंगी चढवून बैलजोडीचा माग धरीत नांगराच्या खुंटाळीला हात घालतील!! आम्हास म्हणतील – ' शंभूराजे, तो कोढता घ्या. आम्ही केलेल्या नांगरटीतील ढेकूळबाब सपाटीस लावा.' "

राजगडाची सदर मंत्रिगणांनी सजली. पेशवे मोरोपंतांनी आपल्यासमोर दर्पणासारखी, कापडी अस्तरावर चिकटवलेली खलित्याची उलघडती वळी धरली होती. त्यांनी डाव्या हाताच्या मुठीत पकडलेल्या थैलीच्या फासबंदाचा गोंडा लोंबून हिंदोळत होता. सदरबैठकीवर राजे, जिजाऊ आणि संभाजीराजे बसले होते. राणीवशाच्या दालनात पडद्याआड पुतळाबाई, सोयराबाई असा राणीवसा बसला होता. पुतळाबाईंच्या शेजारी खालच्या मानेने येसूबाईंनी बैठक घेतली. त्यांच्या मनी एका मजेदार विचाराने क्षणात घर केले. " या चिकाच्या पडद्यातून पलीकडच्या बैठकीवरचे टोप कसे दिसतील?" पण त्या मान वर घेण्याऐवजी अधिकच खाली ठेवून नुसत्या ऐकत होत्या. पिलाजी शृंगारपुरी निघून गेले होते. राजांच्या इच्छेने येसूबाई आता राजगडीच राहणार होत्या. सदरेवरची शांतता चिरीत बोल उठू लागले. मोरोपंत पेशवे हातीचा खलिता, राजांची नजर-इशारत मिळताच वाचू लागले. संथ, धिमे बोल येसूबाईंना पडद्यापलीकडून ऐकू येऊ लागले.

" मशहुरल अनाम, दाम दौलतहु शाहजादे मुअज्जम, सुभे दख्खन यासी – प्रति सिवाजीराजे दंडवत उपरी विशेस –

" प्रस्तुत ल्हेयावयास प्रयोजन की आम्ही आगरियाहून प्राणभयाने आमचे देशी निघोन आलो. आमचे फर्जंद शंभूराजेही जातगतीने देशी पावते जहाले. आला हजरत साहेबाची गाठीभेटी घेवोन निघणे ते काही घडले नाही! ते कोण कारणे हे तुम्ही जाणता. हर प्राणिमात्रास आपला जीव प्यार!

" हे गोस्टी जरी घडली तरी आम्ही हजरतसाहेबांचे बंदे चाकर! सेवेसी हरभातेने तत्पर आहोत. तुम्ही येविशी हजरतसाहेबांची समजूत पाडली पाहिजे! आमचे फर्जंद संभाजीराजे पादशाही लष्करी चाकरच असत! आमचे गडकोट दौलतबाब पादशहांचे चरणी अर्पणच आहे! हे समजोन फर्जंदास चाकरीस समय दिल्हा पाहिजे! मुलूख बनेल तो बनवून आणिला पाहिजे! बहुत काय ल्याहावे. जाणिजे."

औरंगजेबाने दक्षिणेची सुभेदारी जसवंतसिंगाकडून काढून आपला मुलगा मुअज्जम याची त्या जागी नामजादी केली होती. मुअज्जमला शिवाजीराजांशी दुष्मनगिरी नको होती. राजकारण म्हणून नव्हे, सुरक्षितता म्हणून! त्याला वाटत होते आपल्या कारस्थानी बापाने दक्षिणेत आपणाला शिवाजीच्या तोंडी घातले आहे. आणि समोर येईल त्या शाही तेगबहादूराचे शिवाजी 'तोंडीलावणे' कसे करतो हे तो बरे पारखून, समजून होता. राजांनाही आपला मुलूख उभा राहीपर्यंत मुगलशाहीची हातघाई नको होती. त्यांना दख्खनसुभा मुअज्जमशी तहाची बोलणी लावायची होती.

तो खलिता ऐकून जिजाऊ, मंत्रिगण आणि सदरकरी राजांच्याकडे बघतच राहिले. एवढे आग्ऱ्यातील प्राणसंकट टळले नाही तोच राजे संभाजीराजांना मध्यस्थी ठेवून दुसरी चाल खेळू चाहत होते. राजे शांत होते. त्यांनी बाळाजी आवजींना नजर दिली. बाळाजी बैठकीसमोर पेश आले. त्यांनी मुजरा रुजू घातला. राजांचे हेजिब म्हणून बाळाजी औरंगाबादेला जाणार होते.

मोरोपंतांनी खलित्याची वळी थैलीत सरकविली. झुकून थैली राजांच्या समोर धरली. राजांनी हातस्पर्श दिला. तो देताना त्यांच्या हातातील अंगठीवरचा पुखर खडा झळकून उठला. त्यातून उधळलेले किरण संभाजीराजांच्या चर्येवर लख्खन उतरले.

येसूबाईंनी मोठ्या धीराने पडद्याआड राणीवशात मान उठवली. कुणालाही कळणार नाही अशी. पलीकडच्या बैठकीवरचे झिरझिऱ्या पडद्यातून टोप बघण्यासाठी! पण त्यांना काहीच दिसू फावले नाही! वाकून थैली हाती घेणाऱ्या बाळाजींच्या आड टोप दडले होते!

"बाळाजी, सारे शांतपणे कार्यी लावा. हा सुलूख बनला पाहिजे." राजांनी बाळाजींना बोल दिले.

"आज्ञा स्वामी." स्वतःचाच हस्तलेख असलेला खलिता बाळाजींनी मोरोपंतांच्या हातून घेतला. औरंगाबादच्या रोखाने जाण्यासाठी बाळाजी झुकते मुजरे घालीत मागच्या पावलाने मागे हटू लागले.

"शंभूराजे, हा सुलूख मान्य झाला तर ... तर तुम्हास शहजाद्यांच्या भेटीसाठी जाणे पडेल. औरंगाबादेस. एकटे! जाल?" राजांनी शांतपणे विचारले.

"हां जरूर जाऊ. उत्तरेहून येताना तो मार्ग पुन्हा धरला नाही. वेरूळची लेणी बगलेस पडली. संधी मिळाली तर ती आणखी एकदा नजरेखाली घालू!" संभाजीराजांनी उत्तर दिले. राजांना त्याचा अंदाज नव्हता. त्यांनी जिजाऊंच्याकडे बघितले. जिजाऊ गंभीर होत्या.

वेरूळच्या आठवणीबरोबर संभाजीराजांना आपली नजर चिकाच्या पडद्याकडे का गेली तेच कळले नाही! पण त्यांनाही पलीकडचे काहीच दिसू फावले नाही. वाऱ्याच्या झोताने त्या पडद्याला फक्त नाजूक वळ्या उठलेल्या त्यांना दिसल्या. मन त्या वळ्यांना धरून वाट चालून गेले. औरंगाबादेची, वेरूळच्या लेण्यांची!!

"म्हाराज, नाईक आल्यात" महालीच्या खिदमतगाराने आत येत वर्दी दिली.

"पेश येऊ देत." राजांच्या पायफेऱ्या थांबल्या. शंभूराजेही जवळ येऊन राजांच्या शेजारी थांबले. बहिर्जी नाईक महाली पेश आला. मुजऱ्यासाठी झुकला. रामोशी मुंडाशांच्या दशा झुकताना डुलडुलल्या.

"धनी, मोगलाईत अडकलेलं रघुनाथपंत आन् त्रेंबकपंत सलामतीनं सुटलं. गड पायथ्यालगट आल्यात. पर पार दशा झाली त्येंची." बहिर्जी खिनभर थांबला.

राजांना आठवले:

'आम्ही आग्ऱ्यातून निसटलो पण रघुनाथपंत आणि त्र्यंबकपंत मागे राहिले आणि औरंगजेबाच्या चौकी पहाऱ्यांच्या जाळ्यात अडकले. फौलादखानानं त्यांना मरणयातना देऊन त्यांचे हाल हाल केले. कानावर आले. खरे तर ते मरायचेच, पण मुअज्जम मार्फतीने केलेली सुलुखाची बोलणी कामी पडली आणि औरंगजेबाने त्या दोघांना हाडामासांनिशी सोडून दिलं ... त्या अर्थी सुलूख होऊन तह होणार हे नक्की झाले ...'

"धनी, त्येस्नी पांघराय धडुती धाडाय पायजेत. पार रया ग्येलीया त्येंची. आन् ..." बहिर्जी अडखळला.

"बोला नाईक आणि काय?"

डुईचे मुंडासे डावे-उजवे होलपटून टाकणाऱ्या बहिर्जींचा गळा गच्च झाला – "न्हाई धनी, खबर पायवं घालाय जबान उचलत न्हाई."

संथ पावले टाकीत राजे बहिर्जींजवळ आले. त्यांचा आवाज बांधील झाला.

"नाईक, आम्ही कैदेत असता आमचे काही बरेवाईट झाले असते तरी ती खबर तुम्हास मासाहेबांच्या कानी घालावी लागलीच असती! खबरगीर आणि ज्योतिषी यांना खडे बोलावे लागते. बोला. कोण खबर?"

"म्हाराज ... दिल्लीच्या जुम्मा मसुदींत नेताजींचा सुंता जाला! नाव पालटलं. माहमद कुलीखान क्येलाय त्येंचा. नेताजो मुशिनमान जालं. त्येंचं कबिलं निसारखानानं मुलखातनं दस्त करून दिल्लीला धाडलं. त्येंस्नी बाटवून त्येंच्यासंगट मौलानांनी पुन्यान त्येंचं निकं लावलं." बहिर्जींचा रामोशी आत्मा नेताजींच्या कर्तबगार आठवणीने ढवळला. डोळ्यांतून इमानी पाण्याचे थेंब टपकले.

बहिर्जींच्या खांद्यावरचा राजांचा हात थरथरला. डोळे भरून आले. नेताजी! घोड्यांच्या टापांनिशी उसळत फिरणारा एक धगधगत्या आगीचा झंझावात! 'नेता' आज 'नव्हता' झाला! अंगाराचे कोळसे झाले.

बहिर्जी आणि राजे यांच्याकडे बघताना शंभूराजांची मूठ नकळत परजात जमदाडीवर घट्ट आवळली गेली होती. तापल्या शिशाचा रस ओतल्यागत कानपाळी रसरसून आली होती. डोळ्यांचे पेटते पोत झाले होते.

त्यांना दिसत होता तसबीहच्या माळेचा हात! आणि – आणि क्षणाक्षणाला त्यांची परजावरची मूठ घट्ट-घट्ट आवळली जात होती! नकळत!

राजे मुलखाची बंदिस्ती करीत होते. औरंगजेबाने राजांचा सुलूख मान्य केला. दख्खन सुभा मुअज्जम ऊर्फ शहाआलम मार्फत राजांना औरंगजेबाचा हस्बुल हुक्म आला. शंभूराजांच्यासाठी!

तहाप्रमाणे राजांचे प्रतिनिधी म्हणून शंभूराजांना शाही मन्सबदारी देण्यात येणार होती.

चार हजार स्वारांची ! वऱ्हाड, खानदेशीच्या जहागिरीचा पंधरा लक्ष होनांच्या मुलुखाचा मोकासा बहाल करण्यात येणार होता !

औरंगजेब धोरणी ! त्याने ही हत्तीची दाखवीत उंटाची चाल टाकली होती ! शांतपणे वाकडी !

जहागिरीचा मोकासा वऱ्हाड - खानदेशाचा. म्हणजे संभाजीराजांना मुक्काम औरंगाबादेतच टाकावा लागेल ! 'मन्सबदार' म्हणून शिवाजीचा बच्चा पुन्हा आपल्याकडे 'ओलीसच' राहील ! नाहीतर त्याला संभाजीराजांना, पुरंधरच्या तहात मिळालेल्या मावळमुलुखाचा मोकासा देता आला नसता का ? ते केले तर तो 'औरंगजेब' कसला ? राजांनी, 'मोरपिसाचा जुडगा' म्हणून आपल्या तोंडावर 'खाजकुयरीची पाने' फिरवू पाहतो आहे हे हेरले. त्यांनी दिल्ली - दरबारला स्पष्ट कळवून टाकले, "जहागिरीचा मोकासा घेणे तो आमचे फर्जंद संभाजीराजे अदबगर्जीनि घेतील. कारभार पाहणे तो प्रतापराव गुजर व निराजी रावजी मुतालिक रवेशीने पाहतील ! फर्जंद जहागिरीवरील मुक्कामास असत ते होणे नाही !!"

राजांच्या सगळ्या अटी मान्य झाल्या. औरंगाबादेहून मुअज्जमचे पत्र आले — "जहागिरीची वस्त्रं आणि फर्मान घेण्यासाठी शंभूराजांना औरंगाबादेला पाठवून द्यावे !"

राजांचे बर्हिजी, कर्माजी, विश्वास असे खबरगीर औरंगाबादेच्या रोखाने सुटले. मुअज्जमची माहिती काढायला. हे राजकारण फक्त राजेच खेळू जाणत होते. ते स्वत: असेच चालत आले होते. एक वेढा फोडावा, दुसऱ्यात आपणहून घुसावे ! एका गोटातून संभाजीराजांना त्यांनी काढून घेतले होते, दुसऱ्या गोटात ते त्यांना आपणहून पाठवायला तयार झाले होते ! या चालीचे यश मुअज्जमचा स्वभाव कसा आहे यावर अवलंबून होते. संभाजीराजांचे धैर्य केवढे आहे यावरही विसंबून होते.

खबरगिरांनी औरंगाबादेहून बातम्यांची कोरीव लेणी जशीच्या तशी उचलून आणली ! "मुअज्जम विलासी आहे, साजशिनगाराची त्यास गोडी आहे. राजांना तो मनोमन वचकून आहे. आपल्या बापाशी तो नेक नाही !"

विचार करून राजांनी निर्णय घेतला. संभाजीराजांना औरंगाबादेला धाडण्याचा. त्यांना विश्वास होता — शंभूराजे दरबारी रीतीभातीचे सारे ठीक करतील. खुद्द तेच जाऊन आले की, औरंगजेबाला कायमचा नसला तरी उडता भरोसा येईल !

या खानदेशी राजकारणाचा समय आला ऐन दिवाळीत. राजकारण सणवार, भावभावना काहीच जाणत नसते.

भरत्या थंडीला धरून नरक चतुर्दशीचा दिवस राजगडावर फटफटला.

आज औरंगाबादेच्या रोखाने प्रस्थान ठेवण्याचा मुहूर्त होता.

जिजाऊ, पुतळाबाई, धाराऊ, सोयराबाई साऱ्या आऊसाहेब यांचा शंभूराजांनी

आशीर्वाद घेतला. "येतो आम्ही" म्हणत येसूबाईंचा निरोप घेतला.

बालेकिल्ल्याच्या सदरचौकात गडउतारासाठी प्रतापराव, निराजी रावजी, रावजी सोमनाथ, प्रल्हाद निराजी, आनंदराव अशी निवडीची मंडळी सिद्ध होती.

जिजाऊ आणि राजे संभाजीराजांस्ह सदरचौकात आले. शंभूराजांनी जिजाऊंच्या पायांवर कपाळ ठेवले. "औक्षवंत व्हा ! कार्य सिद्ध होताच परतीला लागा." जिजाऊंनी त्यांना आशीर्वाद दिला.

राजांच्या संगतीत, बरोबर यायच्या मंडळीसह संभाजीराजे चालू लागले. संजीवनी माचीच्या रोखाने. माचीवर गडउताराची पालखी तयार होती.

माचीवर उतरणारे भुयार आले. त्यांच्या तोंडावरची धोंड हटली. राजे व शंभूराजे आत उतरले. मागून प्रतापराव, निराजीपंत, रावजी, आनंदराव, प्रल्हादपंत ही मंडळी उतरली. एकामागून एक पायऱ्या मागे पडू लागल्या. चालता चालता राजे कसल्यातरी विचाराने थांबले.

"तुम्हास आठवते वेरूळच्या कैलासलेण्याची गुंफा ?" राजांनी प्रश्न केला.

"जी." दोन्ही आवाजांचा फेरसाद भुयारात घुमला.

"काय आवडलं तुम्हास त्या शिल्पागारीत ?"

"कैलास पर्वताखाली दमगीर झालेला रावण !"

"..." भुवया चढवीत राजांनी संभाजीराजांना आश्चर्याने निरखले. "का ?"

"शिवाचा कैलास त्यास उचलता आलेला नाही ! एवढे बल असून." शांतपणे संभाजीराजांनी उत्तर दिले.

संजीवनी माची आली. संभाजीराजांनी राजांच्या भगव्या मोजड्यांवर आपला भंडारामंडित माथा ठेवला, त्यांना उठवून पोटाशी घेत राजे धीट धीमे बोलले — "संभाळून असा. आम्ही नसलो तरी प्रतापराव आहेत. त्यांच्या सल्ल्याने वागा. यशवंत व्हा. आम्ही तुमची वाट बघतो आहोत !"

शंभूराजे सजल्या पालखीत बसले. फुलार राजगोंडा त्यांनी मुठीत पकडला. रणशिंगाच्या कातऱ्या ललकाऱ्या उठल्या. अब्दागिरे, चोपदार, निशाणबारदार चालू लागले. आग्रा झाला — आता औरंगाबादेला !

मजल दरमजलीने सेनेसह संभाजीराजे औरंगाबादेला पोहोचले. शाहजाद्याच्या वतीने दिल्ली दरबारचा मातब्बर सरदार जसवंतसिंग याने सामोरे येत त्यांची आगवानी केली. जसवंतसिंगाच्या साक्षीने संभाजीराजांनी मन्सबदारीची वस्त्रे स्वीकारली. त्याला फेरनजराणा बहाल केला.

औरंगाबादेतील शाही महाली प्रतापराव, निराजीपंत, रावजी यांच्या सोबतीत जाऊन संभाजीराजांनी शहजादा शहाआलम याची भेट घेतली. तांबूस, गौरवर्णाचा शहाआलम शंभूराजांना बघून खुषदिल झाला. ओठातल्या ओठांत पुटपुटला — "इन्शाल्लाऽ ! कैसी

शेरे सुरत है!" त्याने एक झूलबाज हत्ती आणि रत्नजडावाची तलवार संभाजीराजांना दरबारी इतमामाने नजर केली. संभाजीराजांनी त्याला फेरनजराणे दिले. महालीच्या अलिशान बैठकीवर शहाआलमने संभाजीराजांना आपल्या शेजारी बसवून घेतले. खुद्द जसवंतसिंगाला असा मान कधी मिळाला नव्हता! तो हात बांधून समोर उभा होता.

शहजाद्याने संभाजीराजांच्या प्रवासाची आदराने चौकशी केली. राजांच्या तबियतीची पूछताछ केली.

निरोपाची वेळ आली. महालीच्या दरबारी आत्तरियाने पुढे येत अत्तरदाणीतील काबुली अत्तराचे फाये झुकून शहजाद्याच्या आणि संभाजीराजांच्या मनगटावर अदबीने फिरविले. एक खिदमतगार सोनेरी नक्षीदार तबकात टपोऱ्या गुलाबाचे रसरशीत गेंद घेऊन बैठकीसमोर पेश आला.

तबकातील एक फुलता गुलाबगेंद हाती घेऊन शहजाद्याने तो क्षणभर निरखला. संभाजीराजांच्या हातात तो देताना शहजादा शहाआलमच्या तोंडून नकळत लब्ज सुटले - "लीजिए, गुलाब भी खूबसूरत होता है छोटे राजासाब!"

प्रतापराव, प्रल्हाद निराजी, रावजी सोमनाथ अशा मंडळींना सोबतीला घेऊन संभाजीराजांनी घृष्णेश्वराचे दर्शन घेतले. मनी घर करून बसलेली वेरूळच्या पहाडी गुंफांतील कोरीव लेणी नजरेखाली घातली.

औरंगाबादेच्या दक्षिण वेशीला लागून मराठी सेनेचा तळ पडला होता. डेरे, शामियाने उठले होते. रोज संभाजीराजे प्रतापरावांनिशी नगराचा फेरफटका करून येत होते. औरंगाबाद ही मुगलशाही दखनेतील राजधानीच. तटबंदीतील शहर देखणे होते.

राजांनी निघताना सूचना केली होती – "मिळेल तेवढी नगराची वस्ती डोळ्यांखाली घाला!" शंभूराजे शहराचा फेरफटका करून परतले. प्रतापराव संगती होते.

तळावर येताच त्यांना निराजीपंतांनी वर्दी दिली – "शहजादे सरकार स्वारीस याद फर्मावतात. भेटीचे कारण समजू येत नाही."

संभाजीराजांनी ती वर्दी ऐकून प्रतापरावांच्याकडे सल्ल्यासाठी म्हणून पाहिले. प्रतापरावांच्या कपाळी आठ्या उठल्या. तरीही ते म्हणाले, "पाण्यात माशाचा शब्द झेलाय लागतो. धाकल्या राजांनी भेटीला जाऊन यावं."

संभाजीराजांनी प्रतापराव, निराजीपंत, रावजी सोमनाथ अशी मंडळी संगतीला घेतली आणि ते सरंजामाने शहजाद्याच्या भेटीसाठी शाही महालावर आले.

शहजाद्याच्या वजिराने सामोरे येत संभाजीराजांना आदराने बैठक महालात नेले.

"आईये!" म्हणत, दातकळ्या खुलवीत, देखण्या शहाआलमने बैठकीवरून उठून पुढे येत हाताला धरून संभाजीराजांना आपल्या बैठकीवर शेजारी बसवून घेतले. त्याचे खासे सरदार बगलेने अदबीत हात बांधून उभे होते.

संभाजीराजांवर सहज नजर ठेवता येईल असे प्रतापराव आणि त्यांचे मराठी सरदार उभे राहिले. इकडच्या - तिकडच्या गप्पा करून शहजाद्याने आपल्या मूळ हेतूला हात घातला. "कभी शिकार खेलते हो शंभूराजे?"

"नाही." शांतपणे संभाजीराजांनी उत्तर दिले.

"ताज्जुब है! राजासाबके फर्जंद और शिकार का षौक नहीं!" शहजाद्याने आपल्या रेखीव भुवया वर चढविल्या.

"आम्ही विचारले तर आमचे महाराजसाहेब शिकारीला ना नाही म्हणणार."

"तो फिर आज हमारे साथ चलिए शिकार खेलने. आज हम रामटेक के बनमें जा रहे हैं निशाना लगाने."

"नको. आम्हास येणे होणार नाही." संभाजीराजे सावध झाले.

"क्यों – डरते हो हमारे साथ चलने?" शहजाद्याने खोचक सवाल केला. संभाजीराजांनी प्रतापरावांच्याकडे बघितले. असा काही मामला या भेटीत पुढे येईल याचा प्रतापरावांना अंदाज नव्हता. त्यांना काय सल्ला खुणवावा कळेना.

"डरनेकी कुछ बात नहीं। हम आयेंगे शिकार खेलने!" मान ताठ ठेवीत संभाजीराजांनी शहजादा शहाआलमला क्षणात जाब दिला!!

"वाहव्वा! आफरीन – यही उम्मीद थी आपसे. आपके सवारीका सब इंतजाम होगा. आपके नेक लोग साथ लेना." प्रतापरावांच्या बघत शहजादा म्हणाला.

दुपार टळतीला लागल्यावर वेशीबाहेर पडण्याचा बेत ठरला. अत्तर-गुलाब झाले. संभाजीराजांनी शहजाद्याचा निरोप घेतला. ते तळावर आले.

आपल्या माणसांतील कसबी पटेकरी, तिरंदाज, भालाईत, रानात घोडा फेकणारे सराईत घोडाईत संभाजीराजांनी प्रतापरावांच्या मदतीने निवडले. आनंदराव, प्रतापराव, निराजी, रावजी ही हत्यारबाज मंडळी निवडक घोड्यांवर जीन कसून तयार झाली. संभाजीराजांनी अंगाला लागून लोखंडी-जाळीदार बख्तर चढविले. टोपाखाली शिरस्त्राण घेतले. सिद्ध होऊन ते दिल्या शब्दाप्रमाणे आपल्या शामियान्यात शहजाद्याची वाट बघत बैठकीवर बसले.

वर्दी आली. संभाजीराजे आपल्या निवडक लोकांनिशी तळाबाहेर पडले. शहजादा एका हत्तीवरच्या बंदिस्त हौद्यात बसला होता. तसलाच एक हत्ती, हौदा चढवून त्याने संभाजीराजांच्यासाठी बरोबर आणला होता.

शहजाद्याने हौद्यातूनच शेजारच्या हत्तीच्या माहुताला इशारत केली. माहुताने मोकळ्या हौद्याचा हत्ती अंकुशमार देऊन वळविला आणि संभाजीराजांच्या समोर आणला. पढाऊ हत्तीने सोंडेचे शिंग उठवून सवारीला देखणी सलामी दिली. झुलत झुलत बैठक घेतली. संभाजीराजांनी कमरेच्या शेल्यात खुपसलेली मोहरांची थैली खेचून माहुताच्या रोखाने वर फेकली. ती वरच्यावर झेलून माहुताने त्यांना कुर्निस केला.

हत्तीला शिडी लावण्यात आली. शस्त्रसज्ज संभाजीराजे शिडी पार करीत हौद्यात चढले. माहुताने हत्ती उठता करून शहजाद्याच्या हत्तीच्या बगलेला जोडून घेतला. प्रतापराव, रावजी, निराजी, आनंदराव आणि निवडलेल्या खेळ्यांनी संभाजीराजांच्या हत्तीला वळे दिले. शहजाद्याने हात उठवून हसत संभाजीराजांना अदब दिली. संभाजीराजांनी हात उठवून हसत त्याला फेर साद दिला.

शहाजणे कल्लोळून उठली. हत्ती, घोडे, निष्णात शिकारी खेळे, हाका घालणारे असा शिकारी-तांडा दक्षिणवेशीबाहेर पडला.

रामटेकचे रान येताच हत्ती थांबले. मागचे घोडाईत आणि हाकारे, खेळे पांगले. संभाजीराजांची माणसे त्यांच्या हत्तीला घेरून उभी राहिली.

आज शहजाद्याला 'शाही शिकार' कशी असते ती संभाजीराजांना दाखवायची होती. हाकारे, खेळे पांगलेले बघून शहजाद्याने इशारत केली. माहुतांनी हत्ती रानात घुसविले. प्रतापराव, आनंदराव ही मंडळी हत्तीमागून कदमबाज चालीने निघाली.

एका उंच टेकाडावर येऊन दोन्ही हत्ती थांबले. ही निशाणी मारा करायची मचाणी जागा होती. इथून समोर एक पठार दिसत होते. रानाच्या चारी बाजूंनी आलेल्या पाणंदीच्या वाटा त्या पठाराला येऊन मिळालेल्या होत्या.

शहजाद्याने हौद्यात बसूनच खांद्याचा उंच तिरकमठा हाती घेतला. त्याला बाक देऊन वाद पारखून घेतला. त्याच्या निवडक सरदारांनी कुणी तिरकमठे तर कुणी भाले सरसावले. मराठी भालाईतांनी ते बघून, आपले भाले पेलले. तिरंदाजांनी तिरकमठे सरसे धरले.

रामटेकचे रान चारी बाजूंनी कुदू लागले. कसलेतरी विचित्र आवाज काढून ते उभे रान क्षणात कण्हू लागले. हाकाऱ्यांनी चारी बाजूंनी हाका घातला होता.

रणशिंगाची एक कातरी ललकारी त्या सगळ्या कालव्याला कापीत उठली. सावजे मारगिरीच्या टप्प्यात आल्याची ती खूण होती.

नुसता प्रचंड कल्लोळ ऐकू येतो आहे असे काही क्षण गेले आणि पाठोपाठ पठारावर येऊन मिळालेल्या पाणंदीच्या चौबाजूच्या वाटांनी पांढऱ्या, कबऱ्या, बाळ्या अशा प्राणभयाने हंबरडा फोडत चौखुर उड्या टाकणाऱ्या उभवत्या शेपट्यांच्या वनगाईंचे कळपच्या कळप पठारात उतरले!! वनगाई! मराठी खेळे ते बघून चरकले. सामने हंबरत आलेल्या, भेदरलेल्या वनगाई गोंधळून एकमेकींना थडकल्या. शिंगांना शिंगे खटखटली. टेकाडावरून सटासट सुटलेल्या भाले, तीरांनी मिळेल तशी वर्मी फेक केल्याने कितीतरी वनगाई ऊर उढवून जीवजाता हंबरडा फोडत क्षणात पठारावर कोसळल्या. बचलेल्या भेदरून पुन्हा पाणंदीत घुसल्या. पडलेल्या जाया गाई आचके देत खूर झाडून शांत झाल्या.

समोर प्राणांतक हंबरडा फोडणाऱ्या वनगाई बघून आपल्या हौद्यात, संभाजीराजे

ताडकन वर उठले होते. त्यांच्या हातीचा तिरकमठा गाई बघताच गळून पडला. खूर झाडत पठारावर पडलेल्या वनगाई बघताना त्यांचा अस्वस्थ हात सरसरत कवड्यांच्या माळेवरून नुसता फिरत राहिला. त्यांनी आपले डोळे क्षणभर गच्च मिटून घेतले. कानात गाईंचा हंबरडा कसा दाटून बसला.

"सरलष्करऽ" ते प्रतापरावांच्या रोखाने केवढ्यातरी मोठ्याने ओरडले. घोडा टाकीत प्रतापराव हत्तीजवळ आले.

"शहजाद्यांना सांगा. आम्हास हा खेळ पसंत नाही. आम्ही निघतो." आणि त्यांनी माहुताला आज्ञा केली. "हाथी घुमाव!" माहुताने हत्तीचा मोहरा लगबगीने वळविला.

प्रतापरावांनी शहजाद्याला शंभूराजांचा निरोप सांगितला.

संभाजीराजांच्या परतलेल्या हत्तीला घेर टाकून मराठी घोडाईत, तिरंदाज, भालाईत चालले. कुणीच काही बोलत नव्हते.

संभाजीराजांनी हौद्यातूनच आपल्या तिरंदाजांनी खांद्याला टांगलेल्या भात्याभात्यांवर नजर टाकली. भरले भाते तसेच होते!

समोर वनगाई बघून एकाही मराठी शिकारखेळ्याने हत्यार चालविले नव्हते!

समाधानाने संभाजीराजांचा चेहरा त्या अवस्थेतही उजळून उठला. त्यांनी बगलेने दौडत्या प्रतापरावांना विचारले, "गुजरकाका, शिकार करायचीच झाली तर कसली करावी आम्ही?"

"जी धनी, रावसावजाची! रानडुकराची!" प्रतापराव हौद्याच्या रोखाने मान उठवीत म्हणाले. हत्ती चालविणाऱ्या बिचाऱ्या शाही माहुताला माहीत नव्हते की – "आपल्या हत्तीच्या पाठीवर एक मावळी सिंह बसला आहे! तोही आता शिकारच करणार होता – फक्त रानडुकरांचीच!"

आपले सबनीस म्हणून रावजी सोमनाथ आणि प्रल्हाद निराजी यांना औरंगाबादेत मागे ठेवून, राजांचे राजकारण मार्गी लावून संभाजीराजे राजगडी परतले,

याच वेळी राजांनी आदिलशाहीशी तह केला. विजापूर दरबाराने राजांना सालिना तीन लाख होनांची खंडणी देण्याचे मान्य केले. स्वराज्याच्या दोन आघाड्या बिनघोर झाल्या – मुगलशाही आणि आदिलशाही.

फिरंगाणातील गरीब रयत तर जिवाला कंटाळून गेली होती. तिथे फिरंग्यांनी सक्तीच्या धर्मांतराचा वरवंटा गावागावांवरून फिरवण्याचा सपाटा चालविला होता. विरोध करणाऱ्यांना गावचौकात आणून उभे जाळण्यात येत होते. शेकडो वर्षांचा गावठाव सोडून निराश्रित, त्राता नसलेली रयत कारवार, कोकणपट्टीत उतरत होती. देशमुख आणि फिरंगी लोकांचा माज टापांखाली रगडण्यासाठी खुद्द राजे फौजबंदीने कोकणपट्टीत उतरले!

त्यांना निरोप दिलेले संभाजीराजे आणि जिजाऊ खासेमहालात गिर्दीच्या बैठकीवर

बसले होते. समोर एका शिसवी चौरंगावर कपाळी आडवे गंधपट्टे घेतलेले केशव पंडित मांड-बैठक घेऊन बसले होते. त्यांच्यासमोर लाकडी तिकाटण्याच्या भगव्या बिछायतीवर रामायणाच्या स्कंधाची पोथी होती. त्या पोथीतील एक एक पान पंडित उचलीत होते. स्वच्छ उच्चारात, लयीत देववाणीतील श्लोक वाचीत होते. वाचल्या श्लोकांचा प्राकृत अर्थ सांगीत होते.

"रावणाचा अंत केलेले प्रभू रामचंद्र अयोध्येत सिंहासनाभिषिक्त झाले. आपल्या वीरांचा भेटवस्तू देऊन त्यांनी गौरव केला. भक्त हनुमंताला त्यांनी स्वकंठातील मोत्याचा हार प्रदान केला.

"तो घेऊन हनुमंत अयोध्येच्या नगरवेशीजवळ आला. एका उंच वटवृक्षावर चढून त्याने बैठक घेतली. रामप्रभूंनी दिलेल्या मोत्यांच्या हारातील एक एक मोती तो आपल्या सामर्थ्यवान दाढांखाली फोडू लागला! त्यात प्रभू राम आहेत का हे पाहण्यासाठी! एकाही मोत्यात त्यास 'रामचंद्र' दिसेनात! तो विव्हळ झाला! वृक्षाखाली मोत्यांची टरफले पसरली."

ऐकल्या कथाभागाने संभाजीराजांच्या मनाची नौका न कळणाऱ्या प्रकाशपात्रावरून सरसर धावू लागली —

"हरबाबीत 'राम' शोधला पाहिजे! जसे हनुमंताला आपल्या फोडल्या छातीत रामप्रभूंचे दर्शन झाले तसे आम्हास ... आम्हास महाराजसाहेबांचे होईल?"

"कसला विचार करता?" पाठीवर हात फिरवीत जिजाऊ मायेने म्हणाल्या.

उत्तरासाठी म्हणून संभाजीराजांनी त्यांच्या रोखाने मान उठविली. एवढ्यात गोमाजीबाबा महालात आले. झुकता मुजरा रुजू ठेवून म्हणाले, "आऊसाब, कोलापूर तर्फेचा पुनाळ गावठाणाचा योक असामी आलाय. केसरकरांच्या बीयाचा. जोत्याजी म्हनत्यात त्याला. मानूस कसबाचा हाय. चाकरीसाठनं आऊसाबांच्या पायाची भेट घ्यायची म्हन्तो."

"पेश करा त्यास." जिजाऊ शांतपणे म्हणाल्या. भरल्या माटाचा आणि मावळी थाटाचा तरणाबांडा जोत्याजी आत आला. चांदीच्या कड्यांचे मनगट फरसबंदीकडे नेत त्याने मुजरा घातला.

"कोण गाव?" जिजाऊंनी त्याला निरखीत विचारले.

"पुनाळ जी." जोत्याजी अदबीने उत्तरला.

"कोण कोण हत्यारांची चाल येते?"

"पट्टा, भाला, बोथाटी, गदका — सम्द्यांची सरकार."

"इमान कोण जातीचं?"

क्षणभर जोत्याजी घोटाळला. "आऊसाहेबांच्या पायाशी ल्येकराच्या जातीचं!"

जोत्याजीच्या जाबाने जिजाऊंचा चेहरा उजळला, आणि संभाजीराजे तर उत्तराने खूषदिल होऊन जोत्याजीच्या छातीवरच्या बारबंदीच्या गाठी मोजू लागले!

"गोमाजी, यास फडावर नेऊन बाळाजींची भेटी पाडा. रुजू करून घ्या." जिजाऊ गोमाजींना म्हणाल्या.

गोमाजी, जोत्याजी मुजरे घालून मागे हटू लागले. ते गर्दन वर करून वळणार एवढ्यात जिजाऊ जोत्याजीला थोपवीत पुन्हा म्हणाल्या, "पुनाळकर, मनास किंतू येऊ देऊ नकोस आम्ही इमान विचारलं म्हणून. एक वेळ राज्य मिळणं सोपं जातं पण — पण इमानी चाकर मिळणं ते घडत नाही. रामायण हाच दाखला देते!"

राजांनी मंत्रिगण आणि संभाजीराजे यांच्या साक्षीने सदर बसविली

वऱ्हाड, खानदेशात आपले मुतालिक म्हणून जाणाऱ्या प्रतापराव, निराजी, आनंदराव यांना संभाजीराजांनी वस्त्रे, श्रीफळ, विडा मरातबाने बहाल केला. त्या तिन्ही मावळी हत्यारबाजांनी संभाजीराजे आणि राजांना अदब मुजरे घातले.

प्रतापरावांची मराठी फौज राजगड उतरू लागली. तिच्या कूचासाठी पाली दरवाज्यावरची नौबत घुमू लागली. ती ऐकताना संभाजीराजांना वाटले — "आमची फौज सरलष्करानिशी आमच्या पाठीशी घेऊन दौडीवर जाण्याचा योग आम्हास केव्हा येणार?"

आता राजगडावर राणीवसा, मंत्रिगण, अठरा कारखाने, फड सर्व ठिकाणी संभाजीराजे मानले जात होते. राजांची 'चालतीबोलती सावली' म्हणून!

धाराऊचा आणि येसूबाईंचा तर आता गडावर काळीजमेळ जमून गेला. येसूबाई धाराऊला 'मामीसाहेब' म्हणत होत्या आणि मानीत होत्या. धाराऊ त्यांना 'सूनबाई' म्हणत होती आणि 'लेक' म्हणून मानीत होती. दररोज दिवस उगवताना 'सूर्याचा' आणि मावळताना 'दिवट्याचा' नमस्कार जिजाऊंना घालण्यासाठी ती येसूबाईंना खासेमहालात घेऊन येत होती.

सुरुवातीला बावरलेल्या येसूबाई — जिजाऊ, धाराऊ, पुतळाबाई, आणि राजे यांच्या धीर देणाऱ्या मायेच्या वागण्याने आता गडाला चांगल्या रुळल्या. फक्त एकाच महाली त्यांची जबान कशी जखडल्यागत होऊन जात होती. सोयराबाईंच्या. मासाहेबांचा नाही, आबासाहेबांचा नाही, कधी खुद्द 'त्या' हिंदोळत्या मोतीलगाच्या 'टोपाचा' नाही पण येसूबाईंना सोयराबाईंचा धाक वाटायचा! ह्या 'मामीसाहेब' येसूबाईंना, त्यांच्या झळझळीत गोरेपणामुळे, म्यानखेच करून उन्हात गडाच्या तटबंदीवर तळपत ठेवलेल्या हत्यारासारख्या वाटायच्या!

बोलता-बोलता सोयराबाईंच्या शेंडा नकळत लालावून येतो हे येसूबाईंच्या नजरेतून सुटले नव्हते! हातीच्या सुवर्ण-कंकणांचा नाद व्हावा म्हणून सोयराबाई पदर पुन्हा पुन्हा नीट करतात हेही येसूबाईंच्या ध्यानी आले होते. आणि दर्पणात मेणमळल्या कुंकवाची

कपाळी आडवी घेतलेली बोटे एकलगीत आलीत का नाहीत हे बघताना तर 'मामीसाहेबांना' कशाचेच भान उरत नाही हेही त्यांच्याच महाली उभे राहून येसूबाईंनी अनेकदा अनुभवले होते!

नेहमीसारखी धाराऊ येसूबाईंना घेऊन दिवटीचा नमस्कार घालण्यासाठी जिजाऊंच्या महाली आली. तिथे सगळा गोतावळाच आऊसाहेबांचे पाय शिवण्यासाठी जमला होता. त्यात संभाजीराजे होते. सारा राणीवसा होता.

राजे महाड-रायगडाकडे कूच झाले होते.

रोषणनाईकाने महालीची शमादाने पाजळली. देवमहाली अंबेचे दर्शन घेतलेल्या जिजाऊसाहेब कुणबिणींच्या सोबतीने महालात आल्या. त्यांनी शमादानांना हात जोडले. आता त्यांचे वय झाले होते. डुईभर पदर असल्याने कुणाला सहज दिसत नव्हती पण त्यांच्या केसावर चुनेवाणाची पांढरी शिकल उतरली होती. एक एक करता राणीवशातील बाईसाहेब जिजाऊ सामोरे येत नमस्कार घालू लागल्या. जिजाबाई जबानभर आशीर्वाद देऊ लागल्या.

संभाजीराजे पुढे झाले. त्यांनी जिजाऊंचे पाय शिवले. त्यांच्या पाठीशी रायजी, अंतोजी हे धाराऊचे मुलगे आणि जोत्याजी केसरकर अदबीने उभे होते.

"शंभूराजे, तुम्ही आता एकट्यानं नाही करायचा दिवट्यांचा रिवाज! येसूऽ, अशा जोडीला या आपल्या स्वारींच्या!" जिजाऊंनी धाराऊकडे हसत बघत येसूबाईंना साद घातली.

धाराऊच्या सोबतीने येसूबाई पुढे झाल्या. संभाजीराजांच्या डाव्या हाताशी जोड देऊन उभ्या राहिल्या. दोघांनीही वाकून जिजाऊंना दिवट्यांचा रिवाज दिला.

जिजाऊंच्या चर्येवर हास्य तरळले. भरल्या जिभेने त्या म्हणाल्या, "औक्षवान व्हा! जे करणं-भोगणं असेल ते जोड-साथीनं भोगा!"

येसूबाईंची हनुवटी तर्जनीने वर घेत जिजाऊंनी त्यांच्याकडे काही न बोलता नुसते बघितले. आणि त्यांना आज पहिल्याने जाणवले, "नातसूनबाईंचा चेहरा मोहरा त्यांच्या आबा - आऊसारखा शिर्क्यांच्या माटानं आहे, पण– पण डोळे आहेत साक्षात जगदंबेच्या डोळ्यांसारखे! टपोरे – दूरचे बघणारे!"

जिजाऊंनी साऱ्यांना निरोप दिला. एक एक करता राजांच्या गोतावळ्यातील आसामी जिजाऊंच्या महालाबाहेर पडू लागली. कधी नव्हे त्या सोयराबाई आपल्या चंद्रा दासीशी काहीतरी बोलत मागे रेंगाळल्या! महालाबाहेर पडू बघणाऱ्या येसूबाईंच्या जवळ येत त्यांना त्या हळुवार म्हणाल्या, "येता आमच्या महाली?"

येसूबाईंनी मान डोलावली – होकाराची. आणि त्या अदबीने सोयराबाईंच्या मागून चालल्या. धाराऊने गोंदल्या कपाळावर घड्या घालीत आपल्या 'लेकीची' पाठ धरली.

सोयराबाईंच्या मागून चालणाऱ्या येसूबाईंना बघून पुतळाबाईंना खिनभर वाटले–

"आपण स्वत:च जावं सूनबाईंना सोबत –" पण धाराऊला जाताना पाहून त्या बिनघोर झाल्या!

आपल्या महाली येताच सोयराबाईंनी येसूबाईंना मंचकावर बैठक घेण्याची इशारत केली आणि आपल्या चंद्रा दासीला खुणावत नजर दिली.

चंद्रा आपल्या दालनात गेली आणि एक नक्षीदार लकडपेटी घेऊन बाहेर आली. तिने ती पेटी आपल्या बाईसाहेबांच्या हाती दिली.

पेटी घेऊन सोयराबाई येसूबाईंच्याजवळ आल्या. त्यांनी पेटीचे झाकण उघडले आणि येसूबाईंच्या समोर पेटी धरीत त्या म्हणाल्या, "हे आमचे डाग आहेत तळबिडाहून माहेरकडून आलेले. तुम्हास वाटेल त्यावर हात ठेवा." पेटीत बाजूबंद, मोत्याचे सर, पैंजण्या, रजपुती घाटणीच्या बिंद्या, वाक्या, टिका होत्या. सोयराबाईंचे मूळ मोहिते घराणे राजपुतान्यातील. राजपुती रक्ताचे म्हणूनच त्यांचा वर्ण केतकगौर होता. त्यांना दागिन्यांचा षौक होता. पायांवर आळत्याची नक्षी होती.

येसूबाई बावरून त्यांच्याकडे नुसत्या बघत राहिल्या. मग आपसुखच त्यांची नजर धाराऊकडे वळली. 'काय करावे?' ते विचारण्यासाठी.

सोयराबाईंच्या नजरेतून ते सुटले नाही. त्या धाराऊला म्हणाल्या, "धाराबाई, सांगा सूनबाईंना हात ठेवायला. त्या संकोचल्यात."

"हो त्येच्यावर ठेवा हात सूनबाई. ह्यो आपलाच म्हाल हाय." धाराऊ येसूबाईंना म्हणाली. येसूबाईंनी पेटीतील डाग निरखले आणि एका कोयऱ्यांच्या बांधणीच्या टिकेवर हात ठेवला!

ते बघून सोयराबाई हसल्या. त्यात म्हटले तर कौतुकाची आणि शोधले तर कधीही न गवसणारी अशी कसली तरी एक छटा होती.

झटकन ती टिका पेटीतून उचलून सोयराबाईंनी पेटी चंद्राच्या हाती दिली. आणि खुद्द आपल्या हातांनी ती टिका येसूबाईंच्या गळ्यात घातली. तिची सरकती गुंडी झुकते होत ओढून ती टिका येसूबाईंच्या गळ्यात नीट बसती केली.

मग सोयराबाई राजांच्याबद्दल, आऊसाहेबांच्याबद्दल, माहेराबद्दल बराच वेळ बोलत राहिल्या. येसूबाई आणि धाराऊ नुसत्या ऐकत राहिल्या.

"आम्ही एकट्याच बोलतो आहोत. तुम्ही काहीच बोलत नाही सूनबाई!" सोयराबाईंनी मध्येच थांबून घेतल्या विषयाला बगल दिली. येसूबाईंनी मान उठवून त्यांच्याकडे नुसते पाहिले. पण त्या काहीच बोलल्या नाहीत.

"आम्ही तरी कशा वेड्या? आमच्या ध्यानीच येत नाही. तुम्ही संकोचता! तुमची बोली शृंगारपुरी – कोकणी – कुणबाऊ! अजून गडाची बोली तुमच्या तोंडी बसली नाही. म्हणूनच तुम्ही संकोचता!! तसे करू नका. बोलत चला." जे सांगायचे होते ते सोयराबाईंनी मायफळ गुळात घालून चारावे तसे सांगितले!

ते ऐकताना येसूबाईंना स्वत:ला कधी जाणवला नव्हता तो दोष जाणवला! आणि त्यांनी मनोमन क्षणात निर्धारही करून टाकला – "आपणास गडांची फडकरी बोली ध्यान देऊन ऐकली पाहिजे. जिभेवर बसती केली पाहिजे!"

सोयराबाई आता टिकेची गुंडी किती आवळती सरकवतील सांगता यायचे नाही हे हेरलेल्या धाराऊने येसूबाईंचा पालटलेला मुखडाहो जाणला. ती म्हणाली, "दोपारचा उपास सोडायचा हाय न्हवं? निगूया सूनबाई!"

ते ऐकून येसूबाई उठल्या. "येतो आम्ही." म्हणत त्यांनी सोयराबाईंना नमस्कार केला. त्यांना पाठमोऱ्या महालाबाहेर पडताना त्यांच्या पाठीवर रुळणाऱ्या टिकेच्या भगव्या गोंड्याकडे बघून सोयराबाई हसल्या. पुन्हा मघासारख्याच! त्यांना येसूबाईंचे हसू आले. "पेटीत एवढे रजपुती माटाचे मोत्याहिऱ्यांचे डाग असताना सूनबाईंनी हात ठेवला तोही कोकणी टिकेवरच!"

धाराऊला मात्र वाटले की मागे वळून आळत्याच्या नक्षीला सांगावे – "बोली कंची असती यापरीस मायेचा पीळ कंचा असतो त्येला लई धारण असती रानीसरकार!" पण ती काही बोलली नाही. येसूबाईंच्या पाठीवर रुळणारा गोंडा बघून ती पुटपुटली, "कुंकू-हळद सोडून तरी चढवायचा हुता डाग सूनबाईंच्या गळ्यात!!"

बालेकिल्ल्याच्या सदरचौकासमोरील पटांगणाच्या रोखाने उठलेले बारांचे एकलग आवाज ऐकून येसूबाई आपल्या महालाच्या खिडकीच्या झरोक्याशी येऊन उभ्या राहिल्या. हलक्या पायांनी धाराऊ त्यांच्या पाठीशी आली. दुपार टळतीला आली होती. दोघींना समोरच्या चौफेरी पटांगणात मधोमध पिंजराने पेंढा भरलेल्या एका रानसावजाची आकृती दिसली. ती लाकडी चौथऱ्यावर खालगर्दनीने धावत्या पवित्र्यात उभी केली होती. सावजाच्या मागच्या खुरांना लांबलचक दौर बांधला होता.

पेंढ्याच्या सावजापासून दूरवर संभाजीराजे दोन्ही पायपंजांवर बैठक घेऊन बसले होते. त्यांच्या भवत्याने गोमाजीबाबा, जोत्याजी, महमद सैस, अण्णाजी, वाकनीस, दत्ताजी त्रिमल, बाळाजी अशी मंडळी फेर धरून होती.

महमद सैसने बंदुकीच्या दारूची फेकी आणि छरे एका फिरंगी माटाच्या बंदुकीच्या नळीत सोडले. बुरणुसाच्या गोळ्यांचे बोते बोटाने दाबून नळीत खुपसले.

गोमाजींनी पुरुषभर उंचीची ठेचणीची लोखंडी सळी त्या नळीत खुपसून बार ठेचला. बंदुकीच्या लवंगीवर केपाची टाप बसती केली. हत्यार दोन्ही हातांनी तोलबंद करून पाहिले आणि झुकून ते संभाजीराजांच्या हाती दिले.

उजव्या खांद्याला बंदुकीच्या दस्त्याचा बूड बसता ठेवून संभाजीराजांनी दस्त्याला गाल भिडविला. नळीच्या तोंडावर असलेल्या नेमाच्या माशीकडे बघत एक डोळा मिटता करीत बार फेकीचा पवित्रा घेतला.

जोत्याजीच्या हातात कमरेचा शेला होता. त्याने सावचित्ताने 'धाकल्या राजांनी' पवित्रा धरल्याची खातर करून घेतली. हातातील शेला बावट्यासारखा उंच धरून जोत्याजीने तो खाली टाकला.

बावट्याची खूणगत मिळताच पटांगणातील खिदमतगारांनी दोऱ्या धरून चौथरा दौडवायला सुरुवात केली. पेंढा भरलेले सावज दौडू लागले! हातातील बंदुकीची मोहरेबाज नळी सरासर फिरती करीत संभाजीराजांनी बार टाकला. दस्त्याने त्यांचा खांदा झटकला. कानाजवळ धुराची बळी उठली. आणि तिकडे पटांगणात सावजाच्या आरपार शिरलेल्या छऱ्यांबरोबर पिंजराच्या गवतकाड्या उसळल्या.

जोत्याजी बावटा टाकू लागला. समोरच्या पटांगणात दौडणाऱ्या पेंढ्याच्या सावजाची चाळण चाळण होऊ लागली. बार टाकून टाकून संभाजीराजांचा खांदा आता ठणकायला लागला. दिवस सांजावत आला होता.

एकसुराने पाली दरवाज्यावर उठलेली नौबत साऱ्यांना ऐकू आली. त्यात शिंगाच्या ललकाऱ्या मिसळल्या होत्या. पवित्रा घेतलेली बैठक मोडून बंदुकीसह संभाजीराजे तसेच वर उठले आणि त्यांनी शेजारच्या बाळाजी चिटणीसांकडे बघितले.

दंडाराजपुरीवर सिद्दी फत्तेखानाच्या जंजिऱ्यावर चालून गेलेले राजे, फौजेसह गड चढत होते. धुळीचे उसळते लोळ मावळत्या लांबट किरणात पसरलेले संभाजीराजांना दिसले. महमद सैसच्या हातात बंदूक देत संभाजीराजे जिजाऊंच्या महालाच्या रोखाने चालले. त्यांना आता सराव पडला होता की गडावर आले की महाराजसाहेब तडक मासाहेबांच्या दर्शनासाठी रुजू होतात.

जिजाऊंच्या महाली संभाजीराजे आणि जिजाऊ राजांची वाट पाहत राहिले. दिवस टळला. गडाचे पलोते, शमादाने पाजळली तरी राजे येत नव्हते! त्यांच्याकडून कसली वर्दीही येत नव्हती. जिजाऊ अस्वस्थ झाल्या. संभाजीराजांना घेऊन त्या राजांच्या महाली आल्या. टोप उतरून ठेवलेले, विखुरल्या केसांचे राजे चिंतागत दिसत होते. त्यांनी जिजाऊंची पायधूळ घेतली. खांद्याला धरीत संभाजीराजांना जवळ घेतले. त्या स्पर्शाने संभाजीराजांचा बार टाकून झटके खाल्लेला खांदा ठणकून उठला. वेदनेची एक सणक खांद्यातून अंगभर सरकली.

"काय झालं राजे? आम्ही तुमची वाट पाहून शेवटी जातीनं आलो." जिजाऊंनी राजांच्या शिवगंधावर डोळे जोडले.

"हबशावर जंजिऱ्याच्या मोहिमेत शिकस्त घेतली आम्ही. हाती येणारा जंजिरा हुकला. सिद्दी फत्तेखान जलदुर्ग आमच्या हवाली करण्यास राजी झाला होता. पण – पण सिद्दी संबूल, कासम आणि खैरतखान या त्याच्या सरदारांनी त्यालाच मुसक्या आवळून आबदारखान्यात टाकला. बनला बेत हुकला." बोलते राजे थांबले.

"मग म्हणून एवढ्यासाठी आमच्या भेटीस येणं टाकलंत? राजे, हार कुणाला

चुकली ? देवादिकांनाही ती चुकली नाही."

चमकून राजांनी मान वर केली. खलिता वाचावा तशी जिजाऊंची नजर वाचली.

" मासाहेबांच्या कानी आलं तर सारं ? " घोगऱ्या सादात राजे म्हणाले.

" कशाबाबत म्हणता ? " जिजाऊंना राजांची दुखरी झालेली चर्या जाणवली.

" देवादिकांच्याबद्दल ? " राजांचे बोल जडावू लागले.

" बोला राजे. काय झाले ? " जिजाऊ संभाजीराजांच्यासह त्यांच्या पाठीशी आल्या.

" आमचे राजेपण व्यर्थ आहे मासाहेब. आपले पुत्र म्हणवून घेण्यास आम्ही शरमिंदे आहोत. जंजिऱ्याला घेर टाकून बसलो असता जो खबर ऐकली तिने आमचे सारे स्वप्नच कुठल्यातरी खाऱ्या लाटांच्या समुद्रतळाशी जाणार काय अशी धास्त वाटते आहे. आमची जबान उठत नाही ते सांग वयास." राजे थांबले.

" राजे " जिजाऊंचा हात राजांच्या पाठीवर चढला. त्या नुसत्या स्पर्शाने राजांना वाटले, तडक वळते व्हावे आणि आपले तोंड मासाहेबांच्या कुशीत ठेवावे.

" बोला. काय खबर मिळाली तुम्हास राजपुरीवर ? " जिजाऊ हलक्या शब्दांनी दिंडी उघडून राजांच्या मनाच्या दरवाज्यात घुसल्या.

" मासाहेब ऽ ... मासाहेब ऽ उभी उत्तर धूळदोस्त करण्यासाठी औरंगजेबानं हत्यार उचललं आहे. हिंदूंची पवित्र मंदिरं फोडली जाताहेत. शाही फौजेचा वरवंटा मंदिरांच्या कळसावरून फिरवला जातो आहे. मोगलांनी काशीला विश्वेश्वराचं देऊळ जाया केलं ! त्या जागी मशिदीचे पत्थर उभे केले. देवादिकांना हार येते. पण ती सोसण्यास माणसांना बळ नसते ! आम्ही शरमिंदे आहोत आपल्यासमोर उभे राहायला ! " राजांचे डोळे भरून आले. जिजाऊंचा हात त्यांच्या पाठीवरून नुसता फिरत राहिला.

जे राजांच्या तोंडून संभाजीराजांनी ऐकले ते ऐकताना त्यांच्या खांद्यातून बारफेकीमुळं उठणारा ठणका बंद झाला ! त्याची थोडी जागा सरकली आणि त्यांच्या काळजात ठणका उठला.

आग्र्याच्या लाल किल्ल्यावरचा तो पैलवानी लाल मातीचा हौदा त्यांना दिसू लागला ! कोणीतरी त्यांना विचारीत होतं - " हौदा खेलते हो संबूराजे ? "

बाळाजी आवजी चिटणीसांनी जातीने लगबगीने येऊन राजांच्या कानी वर्दी घातली, " स्वामी, प्रतापराव आणि रावजी आगे खबर नसता मोगलाईतून सेनेसह परतले ! गड चढून येताहेत."

राजे देवमहाली पूजेला बसले होते. त्यांनी समोरच्या ताम्हनात, हाती घेतलेले आचमनाचे पाणी तसेच सोडले – आणि " जगदंब." म्हणत ते प्रभाकरभट आणि केशव पंडिताकडे बघत चौरंगीवरून उठले !

हीच वर्दी जोत्याजी केसरकराने जिजाऊंच्या महाली येऊन त्यांच्या पायांवर घातली. जिजाऊ पुण्याहून बलाऊ धाडून आणलेल्या खोंड्याशी, सोयराबाईंच्या ' डोहाळजेवणाच्या वेळी ' लागणाऱ्या फुलांच्या मखराबद्दल बोलत होत्या.

वर्दी ऐकताच त्यांनी चालते बोलणे तसेच सोडले आणि त्या उठल्या.

जिजाऊंच्या महाली ' मखराचा साज कंचा ' ते ऐकायला आलेली सोयराबाईंची कुणबीण चंद्रा जिजाऊ महालाबाहेर पडेपर्यंत थांबली ! मग ती चटक्या पावलांनी सोयराबाईसाहेबांच्या महाली आली. पण आत धाराऊ आणि संभाजीराजांना बघून ती जागीच घोटाळ्यात पडली.

गर्भारपणाने सतेज दिसणाऱ्या सोयराबाई पलंगावर लेटून होत्या. दूरवर झरोक्यातून दिसणाऱ्या कालेश्वरीच्या मंदिराचा सोनकळस त्यांनी क्षणभर निरखला.

त्यांच्या पलंगाच्या काठाळीवर बसलेले संभाजीराजे विचारात गुंतून गेले. बरेच दिवस त्यांना या मासाहेबांच्या चालीबोलीत फेर पडलेला जाणवत होता.

फुलत्या कुशीत सोयराबाई संभाजीराजांशी. त्यांनाच न कळणाऱ्या मायेने वागत होत्या ! डोळ्यांआड असणारे राजांचे रूप त्यांना संभाजीराजांच्यात दिसत होते. त्यांचे मन तडफेच्या संभाजीराजांतून काहीतरी उचलू बघत होते !

चंद्राला आत येताना बघून सोयराबाईंनी विचारले, " ये. आज फुटता दिवस धरून कुणासाठी नौबत उठली ? "

चंद्रा संभाजीराजांकडे बघत गप्पच राहिली.

" बोल. ते आमचेच आहेत ! " सोयराबाई हसत म्हणाल्या.

गोंधळलेली चंद्रा बोलून गेली, " सरलस्कर परातलं न्हवं मोगलाईतनं ! " चंद्राचे बोल ऐकून संभाजीराजे काठाळीवरून उठले.

" आम्हास आज्ञा द्या मासाहेब . आम्ही येतो."

" या " सोयराबाईंनी पडल्या पडल्या हात उभविला.

धाराऊसह बाहेर पडणाऱ्या संभाजीराजांना सोयराबाई, ते आड होईपर्यंत निरखीत राहिल्या. मग पुन्हा त्यांनी मंदिराच्या उन्हात तळपत्या सोनकळसाला नजर दिली !

संभाजीराजे सदरेवर आले. राजे आणि जिजाऊंच्या समोर प्रतापराव व रावजी उभे होते. त्यांनी संभाजीराजांना येते बघून मुजरे दिले. काही क्षण तसेच गेले. मग प्रतापराव राजांना अर्धवट राहिलेला मोगलाईचा करिणा पेश करू लागले.

" ... एका रातीत सारा तळ आमी उठविला. ह्ये रावजी वऱ्हाडात हुतं. त्येस्नी खबरगीर धाडून आपला मुलूख गाटायची इयायली कराय सांगितलं.धनी, बादशानं लई आतल्या गाठीनं डाव टाकला हुता. आमची आन रावजींची उभी फौज दस्त व्हायची हुती ! पर शाजाद्यानं हात दिला ! खुद्द त्येनंच आपला वजीर धाडून आम्हाला कानगोष्टी केली – ' रातीत तळ सोडायची ! ' न्हाईतर ... " प्रतापराव थांबले.

औरंगजेबाने मराठी फौजा कैद करण्याचा शहाआलमला औरंगाबादेला हुकम सोडला होता. त्यांची आगाऊ कुणकूण लागलेल्या शहजाद्यानेच प्रतापरावांना हुकम हातात पडण्यापूर्वीच इशारत भरली होती!

प्रतापरावांचा वृत्तांत ऐकून राजे शेजारी बसलेल्या संभाजीराजांकडे बघत राहिले. एक दीर्घ हुस्कार त्यांच्या नाकपाळीतून सुटला. तो एकाच विचाराने – "आता फर्मान असो, भेट असो, जहागिरीची वस्त्रे असोत, मोगलांच्या छावणीत आमचे संभाजीराजे कधी – कधीच जाणार नाहीत! आम्ही त्यांना पाठवणार नाही!"

"राजश्रियाविराजित, अखंड सौभाग्यअलंकृत, वज्रचुडामंडित थोरल्या राणीसरकार सोयराबाईसाहेब प्रसूत जाहल्या. पुत्ररत्न प्राप्त जाहले."

चौवाटा पुत्रजन्माची वार्ता घेऊन थैलीस्वार सुटले. गडागडांवर साखरमुठी वाटण्यात आल्या. चौघडे, नगारे दुडदुडले. तोफांची भांडी फुटली. राजाच्या 'थोर' संसारातील नातेबंधाची मंडळी राजगड जवळ करू लागली. पाचवी झाली. सटवी येऊन जन्मल्या बाळाच्या भाळी आपल्या अज्ञात हातांनी 'भाकितलेख' रेखून गेली.

राजांचा सारा गोतावळा दरुणीमहालातील सोयराबाईंच्या दालनासमोर एकवटला. बाळराजाचे दर्शन घ्यायला. त्यात संभाजीराजे होते. येसूबाई पण धाराऊच्या सोबतीने होत्या. उपाध्यायांनी दिलेल्या शुभमुहूर्तावर 'दर्शन' घ्यायचे होते.

जमल्या गोतावळ्यात राजे येऊन दाखल झाले. सर्वांची उत्कंठा शिगेला पोचली.

घंगाळातील मुहूर्ताचे पात्र डुबले. दालनाचा दरवाजा कुरकुरला. जिजाऊंच्या पाठीशी होत सारे भोसलेमंडळ दालनात प्रवेशले.

सुईणीने दुपट्यात लपेटलेले बाळ सोयराबाईंच्या कुशीतून उचलले. हलक्या हातांनी हसत जिजाऊंच्या समोर धरले. जिजाऊंनी मोहरांचा सतका बाळाच्यावरून उतरला आणि आईचा भंडारा ओंजळीत घ्यावा तसे बाळराजे हळुवार आपल्या हाती घेतले! डोळाभर त्यांना पाहून भरल्या समाधानी मनाने जिजाऊंनी बाळ राजांच्या हाती दिले. ते देताना जिजाऊ म्हणाल्या, "मातृमुखी आहेत. पण – पण आम्ही ऐकून आहोत हे पालथे उपजले – !" जिजाऊंचा आवाज कातरा झाला होता.

भुवया चढत्या ठेवून, हातीच्या आपल्या देखण्या सोनरूपाकडे बघत राजे म्हणाले, "मासाहेब, चिंता करू नका. हे पालथे उपजले म्हणूनच उभी पादशाही हे पालथी घालतील!" राजांचे मर्मबोल संभाजीराजांना फार आवडले.

"घ्या." राजांनी बाळांना संभाजीराजांच्या समोर धरले. संभाजीराजांनी बाळराजांच्यावरून मोहरथैलीचा सतका आपल्या हातांनी उतरता केला.

हळुवार हातांनी संभाजीराजांनी बाळराजे आपल्या हाती घेतले. वेरूळच्या पहाडी लेण्यांकडे बघावे तसे ते हातीच्या बाळलेण्याकडे बघत राहिले. सोयराबाईंनी आकाशीचा चंद्र जसा खुडून आणून साऱ्यांच्या हाती दिला होता!

बाळराजांच्याकडे बघताना संभाजीराजांना वाटले, "नक्की... नक्कीच हे उभी पादशाही पालथी घालतील."

काही तरी मनी धरून राजे आता संभाजीराजांना अष्टौप्रहर स्वत:संगती घेऊ लागले. फडावरची कलमदानाची कामे कशी चालतात, पत्रावर दस्तुर कसा लावतात, शिक्कामोर्तब कसा करतात, कथला कोण पद्धतीने ऐकून घ्यावा, निवाडा मंत्रिगणांच्या मसलतीने सावचित्ताने कसा द्यावा, मर्दानगी करणाऱ्या हत्यार, कडे बक्षून त्याचा मरातब कैसा करावा, कुणबियास राजेपणाचा धीर दिलासा देऊन त्याला तवानगी येईल तसे असे वागवावे, परदरबारचा हेजिब आल्यास त्याकडून मनाचा मतलब अल्लाद कसा काढून घ्यावा, 'डावे जाणाऱ्यास' सलगी देऊन त्यास थोरपण कैसे बहाल करावे, हा सारा राज्यकारभारी कुलकरिणा स्वत: राजे संभाजीराजांच्या कानी घालू लागले.

आता फडावरच्या मंडळींशी संभाजीराजांचा निकटीचा संबंध येऊ लागला.

त्यातील कारकुनी पद्धतीची मोड बैठक घेणारे, हातीचे शहामृग पीस कुरूकुरू चालविताना हस्तलेख वळणदार यावा म्हणून मान तिरकी करणारे, काही खासे मतलबाचे लिहिण्यापूर्वी मध्येच थांबून वरच्या छतास डोळे देणारे चिटणीस बाळाजी आवजी.

आबासाहेबांनी 'पंत ऽ' अशी हलकीच साद घालताच "जी स्वामी ऽ" म्हणत लपकन कमरेत झुकणारे, केळीच्या मोन्यासारखे सतेज दिसणारे, कपाळीचा गंधटिळा हमेश एक आकारात ठेवणारे, कमरेच्या हत्यारावर हाताची बोटे चाळवीत असताना कुणीही "पंत ऽ" असे हाकारताच त्या बोटांची मूठ पक्की बसती करणारे, कमी घेरांच्या, गोल, डाळिंबी पगडीचे पेशवे मोरोपंत पिंगळे.

काही खाशी मसलत पेश करण्यापूर्वी "आमची पेश अर्जी ऐसी की" असे म्हणत छातीच्या दुबाजूंनी कमरेपर्यंत आलेल्या लालकाठी उपरण्याचे शेव मुठीत घट्ट धरणारे, पेडापेडांच्या गोल घेरबाज पगडीचे, मूळचे लहान डोळे हसताना मुळीच न दिसणारे सुरनीस आण्णाजी दत्तो.

आबासाहेब आता कोणतीही 'वस्त' रुजू करायला सांगतील म्हणून 'काढता पाय' तयारीत ठेवणारे, मोहरा, रुपये, डाग, वसूल असे हिशेबी शब्द योजणारे मुजुमदार निळो सोनदेव.

ही सारी मंडळी संभाजीराजांना राजांच्या एवढीच अदब देत होती. संभाजीराजांना त्यांच्याबद्दल, प्रसंगी त्यांची पायधूळ मस्तकी घ्यावी असा आदर वाटत होता. ही सर्व माणसे राजांच्या खास विश्वासातील होती. कर्तबगारीने, सचोटीने. इमानाने त्यांनी आपापली पदे कमावली होती.

पुरंधरचे फर्मान व ओलीसपण, आग्र्याची कैद व हुन्नरी सुटका, औरंगाबादेची शहाअलमची भेट, राजे आणि जिजाऊसाहेब यांचा सार्थ प्रेमा या संभाजीराजांच्या

हयातीतील घटना प्रत्यक्ष समोर पाहिल्यामुळे मंत्रिगण आणि फडकरी मंडळी मनोमन पुरते जाणून होते की – " उद्याच्या श्रींच्या राज्यात राजांचे पडणारे बिंब आहे ते संभाजीराजे ! दौलतीच्या वाढत्या बारदान्याचे भोसलाई कर्ते वारस आहेत ते संभाजीराजे ! "

सोयराबाईंच्या महाली संभाजीराजे फरसबंदीवर अंथरलेल्या बिछायतीवर मांड घेऊन बसले होते. त्यांच्या मांडीवर हात-पाय झाडीत खिळणारे रामराजे होते. भिंतीला धरून चंद्रा दासी उभी होती.

मंचकावर बसलेल्या सोयराबाई रामराजांच्या अंगड्यावर वेलबुट्टीच्या नक्षीचे विणकाम आपल्या खाशा हातांनी भरू लागल्या. टाका-टाका गुंतू लागला.

मध्येच थांबून सोयराबाई हसत संभाजीराजांनी घेतलेल्या बाळांच्याकडे बघत होत्या.

" तुम्हाला असे आमच्या सूनबाईंनी बघितले तर ? " हसून सोयराबाईंनी संभाजीराजांना विचारले.

" बघू देत. यांना फक्त त्यांनीच घ्यावं असा काय रिवाज आहे ! " संभाजीराजे रामराजांच्या लपलपत्या टाळूवरून हलका तळहात हलकेच फिरवीत म्हणाले. खिदळते रामराजे एकाएकी थांबले. त्यांनी संभाजीराजांच्या जाम्यावर सरसरती धार लावली.

" ही कोण बेअदब ! दादामहाराजांचा पेहराव खराब केलात ! " म्हणत सोयराबाई लगबगीने मंचकावरून खाली उतरल्या. चंद्रा चटकन पुढे झाली.

" असू देत ! " म्हणत संभाजीराजांनी दोघींनाही हात उठवता करून थोपविले.

रामराजे पुन्हा खिदळले. चंद्रा मागे हटली. सोयराबाई मंचकावर ठेवलेले अंगडे उचलायला वळल्या. एवढ्यात ... एवढ्यात धाराऊ आणि येसूबाई महालात प्रवेशल्या.

संभाजीराजांना बघून येसूबाई उंबरठ्यावर अडखळल्या ! ते ओळखून सोयराबाई त्यांना धीर देत म्हणाल्या, " या सूनबाई " ते ऐकताना संभाजीराजे गोंधळले ! त्यांनी मागे वळून पाहिले – आणि तसे पाहताना भिजला जामा चतुराईने मांडीखाली लपविता सारला ! ते बघून सोयराबाई हसल्या. येसूबाईंना म्हणाल्या, " बाळराजांना तुम्ही एकल्यानंच घ्यावं असा काही रिवाज नाही ... असं तुमची स्वारीच म्हणते ! "

" धाराऊऽ ! " संभाजीराजांनी बाजी अंगलटलेली बघून धाराऊला हाक घातली.

" आलू. " म्हणत धाराऊ चटक्याने पुढे झाली.

" यांना घ्या ! " म्हणत संभाजीराजांनी रामराजांना धाराऊच्या हाती दिले.

महालाबाहेर पडता-पडताच गडबडीने ते सोयराबाईंना कसेतरी म्हणाले – " येतो आम्ही. "

" या. " सोयराबाई समाधानाने जबानभर म्हणाल्या.

येसूबाईंना हाताला धरून आपल्या मंचकाकडे धीरे नेताना सोयराबाई न राहवून म्हणाल्या, " खरंच सूनबाई, तुम्ही भाग्यवान आहात ! "

रामराजांना मांडीवर डोलवीत असलेली धाराऊ भरल्या कानांनी आणि मनाने ते नुसते ऐकत राहिली !

तोंडावर आलेल्या दिवाळीसणासाठी राणीवशाकडे लागणाऱ्या अलंकारांची यादी बाळाजी आवजींनी आपल्या चिटणिसी बैठकीवर बसून तयार केली. जोखमीची असलेली ती यादी मुजुमदार निळोपंतांना स्वतःच्या हातांनी देण्यासाठी ते बैठकीवरून उठले. त्यांनी खांद्यावरचे उपरणे ठाकठीक केले. " मी ही यादी देऊन येतो मुजुमदारांना. तुम्ही इथंच थांबा. कुठं जाऊ नका. " बाळाजींनी आपल्याबरोबर फडावर आणलेल्या आपल्या आवजी व खंडोजी या दोन्ही मुलांना ताकीद दिली. पुढच्या मागच्या वयाच्या आवजी-खंडोजींनी माना डोलावल्या.

सदरबैठकीवर कुणीच नव्हते. चौकाच्या दरवाज्यावर दोन धारकरी पहारा देत होते. फरास, सरपोस घालणारे हुजरे अधूनमधून डोकावत होते. पण त्यापैकी कुणाचेही ध्यान आवजी व खंडोजी यांच्याकडे जायचे कारण नव्हते.

त्या दोन्ही चिटणीसपुत्रांनी एकमेकांकडे पाहिले. सारी सदर मोकळी होती. भिंतीवरच्या रेखल्या रामायण - भारतातील चित्रांकडे ते दोघे बघत राहिले. दोन चित्रांमधल्या मोकळ्या जागेत ढाल, तलवारी, भाले, तिरकमठे ऐटदार पद्धतीने मांडले होते. थोरल्या आवजींचे लक्ष बाळाजींच्या कलमदानावर गेले. त्याला काय वाटले कुणास ठाऊक, तो आपल्या भावाच्या कानात दबके म्हणाला, " खंडा, मी त्या पिसानं लेख काढून बघतो ! तू कुणी आलं तर लक्ष ठेव. "

" हां. जा तू. " खंडोजीने त्याला दुजोरा जोडला.

आवजी चिटणिसी बैठकीवर चढला. मोठ्या कुतूहलाने त्याने बैठक घेऊन कलमदानातील शहामृगपीस उचलले. थरथरत्या हाताने ते शाईच्या बुधलीत डुबविले. आवजी थरथरत्या हाताने चौरंगीवरच्या कागदावर लिहू लागला – " ॐ नमः शिवाय ! " खंडोजीने त्याला दुजोरा जोडला.

अंतःपुराच्या रोखाने आलेले संभाजीराजे सदरजोत्यावरून आपल्याकडे बघताहेत याचे त्या दोघांनाही भान नव्हते ! संभाजीराजांच्या पाठीशी उभ्या असलेल्या अंतोजी, रायाजी, जोत्याजी या मंडळींतील मग कुणीतरी दाटून खाकरले.

आवजीने आवाजाच्या रोखाने बघितले मात्र. तो ताडकन् वर उडाला ! त्याला मुजरा करायचे सुधारले नाही. हातीचे पीस घरंगळून हेलकावे खात केव्हा पडले हे त्याला कळलेच नाही.

बैठकीवरून खाली ताडकन् उडी मारावी आणि बेलाग दौडत सुटावे असे त्याला वाटले. तरतरीत नाकाचा, तांबूस गोरा, छोटेखानी डाळिंबी पगडी डोक्यावर असलेला खंडोजी मात्र क्षणापूर्वी भिंतीवरची चित्रे ज्या हरवल्या डोळ्यांनी निरखली तसा संभाजीराजांना निरखू लागला.

आपल्या पाठीच्या मंडळींना जागीच थोपवण्याची हातखूण देऊन संभाजीराजे चिटणिसी बैठकीच्या रोखाने शांतपणे चालत आले. बैठकीवरचा आवजी थरथरला. चतुर खंडोजीने मात्र झटकन् पुढे होत संभाजीराजांच्या पायांना हात लावला.

संभाजीराजांनी आवजीने लेख रेखलेला कागद हलक्या हाताने उचलला. डोळ्यांखाली घातला. त्यावरची "ॐ नम: शिवाय!" ही आवजीने रिवाज म्हणून काढलेली अक्षरे त्यांना वेगळ्याच अर्थाने जाणवली. त्याची चर्या ते वाचून फुलून उठली. बैठकीवर पडलेले शहामृगपीस संभाजीराजांनी उचलले. शाईच्या बुधलीत ते डुबविताना त्यांच्या तर्जनीवरचा पुष्कराज खडा झळकून उठला.

संभाजीराजांनी आवजीने रेखलेल्या मजकुराकडे ते रोखून बघू लागले. त्यांना राजांची आठवण झाली. यावेळी राजे सुरतेस मनचाहे धुमाकूळ घालीत होते. त्या मजकुराखाली पुन्हा संभाजीराजांनी शब्द उमटविले – "तुळजाभवानी प्रसन्न!"

संभाजीराजांनी हातीचे शहामृगपीस हलकेच कलमदानात ठेवीत आपला व आवजीचा हस्तलेख बारीक निरखला, आणि ते आवजीकडे बघत म्हणाले, "तुमचं हातवळण आमच्याहून गोमटं आहे! कोण तुम्ही? इथे का?"

आवजीचा जीव भांड्यात पडला, पण त्याला बोलणे साधेना! खंडोजी मात्र धिटाईने म्हणाला, "आम्ही चिटणिसांचे मूल! हे आवजी, आम्ही खंडोजी!"

"बसा. आवजी बैठक घ्या." संभाजीराजांनी आवजीला चिटणिसी बैठकीवर बसण्याची खूण केली. आवजी आता थिरावला! एवढ्यात बाळाजीच प्रवेशले. आवजीला चिटणिसी बैठकीवर बसलेले बघून त्यांनी गटकन आवंढा गिळला!

तुरूतुरू चालत ते आवजीला कानगोष्ट देण्यासाठी येऊ लागले. त्यांचा मनसुबा हेरून संभाजीराजे त्यांना हसून म्हणाले, "चिटणीसकाका, बघू द्या त्यांना! तुमचा आहे तसाच त्यांचा हात गोमटा आहे. हातीच्या पिसांचा त्यांना सराव द्या." आणि संभाजीराजे वळते होऊन थेट राजांच्यासारखे झपाझप चालत अंत:पुरात गेले.

त्यांच्या पाठीवरच्या जाम्यावरची जरीबतूची गिर्रेबाज कोयरी बघताना खंडोजीचे डोळे दिपले. त्याने कमरेत झुकून पाठमोऱ्या संभाजीराजांना मुजरा रुजू घातला!!

गडाच्या तोफखान्यावर स्वागती तोफा धडधडल्या. नगारे, शहाजणे, शिंगे कल्लोळून उठली. मोगली सुरत पुन्हा एकवार बेसुरत करून, वणी - दिंडोरीच्या रानात फौजबंद शाही सर्दार इखलास व दाऊदखान कुरेशी यांना पुरते खडे चारून, वऱ्हाडातील 'लाडांचे - करंजे' ही संपन्न व्यापारपेठ मावळी लाडाने लुटून, साल्येरीचे खुले जंग फत्ते करून, तिथल्या किल्ल्यावर जरीपटक्याचा भगवा टिळा मढवून, बागलाण, वऱ्हाड, खानदेश या मोगली मुलखाची मारतोड करून विजयी राजे परतले. जाताना मोकळ्या नेलेल्या किल्तानी बारदानांच्या पडशीसारख्या मोहोरबंद पिशव्या पाठीवर वाहून आणलेली घोडी दमछाक झाली होती. पूर्वी झाला त्याहून हा पराक्रम थोरच झाला.

पालखी घेऊन राजगड उतरून आलेले आपले सेवक प्रतापराव सिलींबकर, किल्लेदार सुभानजी बाळाजी, आण्णाजी, निळोपंत व मोहिमेतील रूपाजी, प्रतापराव गुजर, मोरोपंत, येसाजी यांच्या सोबतीत राजे गड चढून आले.

बालेकिल्ल्यांच्या सदरदरवाज्याशी येऊन जिजाऊसाहेब आणि संभाजीराजे यांनी राजांची आगवानी केली. संभाजीराजांना या वेळी राजांच्या मुद्रेवर एक आगळेच तेज आढळले.

राजांना राजगडी येऊन पंधरवडा हटला. आणली लूट प्रतवार ठरवून दास्तानी लावण्यात आली. जाया झालेले स्वार आणि घोडी तबिबांनी आपल्या ताब्यात घेऊन त्यांना दवादारू केली.

माघ वद्य एकादशीचा दिवस मावळ चढून आला. राजगडाची कदरेची सदर बसली. 'जखम दरबार' जमा झाला.

सदर बैठकीवर राजे, जिजाऊसाहेब, संभाजीराजे यांनी बैठक घेतली होती. भोवतीने मोरोपंत, आण्णाजी, बाळाजी, येसाजी, प्रतापराव, निळोपंत, निराजी रावजी, रघुनाथभट, दत्ताजी त्रिमल अदब धरून उभे राहिले.

चिकाच्या पडद्याआड सोयराबाई, पुतळाबाई, काशीबाई असा राणीवसा, सखूबाई, अंबाबाई, असा कन्यावसा, येसूबाई, धाराऊ जमा झाल्या होत्या.

रिवाजाप्रमाणे समोर आलेल्या भंडाऱ्याची चिमट राजांनी सदरदेवतेवर उधळली. समोर उभ्या असलेल्या जखम दरबारच्या मानकऱ्यांवर एकदा अभिमानाची नजर फिरवली आणि ती नजर तशीच चिटणीस बाळाजी आवजींना दिली.

बाळाजींनी 'जखम - दरबारचा' मायना खुला केला –

"मातु:श्री आऊसाहेबांचे कृपाप्रसादे करोन खासा सरकार स्वामींनी मोगलाई, बागलाण, वऱ्हाड, खानदेश, सुरत ऐशी भरपल्याची मोहिम घातली. शेलका पाऊलोक, घोडाई दिमतीस घेतला, मनी धरला तेव्हढा मनसुबा घडवून आणिला.

"ये स्वारीत मर्दानगी केले हातास, जाया झाले असामीस, कामी आले हत्यारगिरांचे वारसास मरातब द्यावा म्हणोन हा 'जखम - दरबार' बसता केला असे -

"ये सदरी मरातब म्हणोन मशारन्हिल्ले ..."

बाळाजी एक एक नाव वाचू लागले. राजे संबंधिताला कडे, मोहरा, तोडे, मानवस्त्रे बहाल करू लागले.

जखम-दरबार सरतीला आला. बाळाजी झुकून तसेच पाच कदम मागे हटले.

सारा जखम-दरबार राजांच्या कदरदानीने भारावून गेला होता. राजांच्या हातून मिळालेल्या वस्तूकडे बघताना अभिमानाने ऊर भरले होते. त्या समाधान अभिमानात काही क्षण गेले.

राजांनी जिजाऊंच्याकडे बघितले. एक निसटती लकेर जिजाऊंच्या ओठांमागे तरळली. चेहऱ्यावर आता दाटत आलेल्या सुरकुत्यांत ती मिसळून गेली.

राजे बैठकीवरून उठले आणि जमल्या दरबाराला आपल्या मनचा हेतू खुला करून सांगू लागले– "मंडळी, जखम-दरबार सरला आहे. आम्ही जातीने सांगतो आहोत त्यास प्रयोजन वेगळे." राजे थांबले. त्यांनी संभाजीराजांच्याकडे एकदा बघून घेतले. पुन्हा ते एकसुरी धीमे बोलू लागले. "उत्तरेहून रजपूत मिरजा राजा आला. त्याने वस्त्रे, हत्ती, नजर करून आमच्या फर्जंद संभाजीराजांना मनसबीचा मरातब दिला.

"आगरियात भरल्या दरबारी पादशाह औरंगने त्यांना रत्नजडावाची कट्यार बक्ष केली. औरंगाबादेस शहजादा शहाआलमने त्यांना हत्ती नजर करून मानाची वस्त्रे बहाल केली.

"फक्त आम्हास त्यांच्यासाठी काहीं देणे करणे ते आजपर्यंत म्हटले तरी साधले नाहीं! म्हणोन एक विचार बांधून मासाहेबांच्या आणि आपल्या साक्षीने आम्ही तो बोलणार आहोत.

"आजपासून आम्ही आमचे फर्जंद संभाजीराजे यांना सवत्या कारभार-कामावर नामजाद करणार आहोत! शिक्के, कट्यार, वस्त्रे बहाल करणार आहोत." राजांनी थांबून आपल्या खाजगीच्या कारभाऱ्यांना मध्येच अर्थपूर्ण नजर दिली.

"आजपासून संभाजीराजे दिल्या अधिकारात आपल्या नावे पत्रांवर शिक्के करतील. फर्मान, निवाडे, करार, खलिते यांवर दस्तुर लावतोल."

"आम्ही त्यांच्या दिमतीस वाकनिसीच्या मुतालकीसाठी मशारनिल्हे महादेव यमाजी यांना व चिटणिसी कामासाठी कारकून परशराम यांना जोडून देत आहोत. फडाचे कारभारी धारराव निंबाळकर यांनी हरकामी पडेल ती मदत करणे आहे. आजपासून संभाजीराजे शिक्काधारी, सवते कारभारी जाहले!"

राजांच्यासमोर त्यांच्या खाजगी कारभाऱ्याने शिक्के, कट्यार, वस्त्रे, म्यानबंद तलवार असलेले तबक धरले. तबकातील तलवार उचलीत राजे संभाजीराजांना म्हणाले, "असे दरबारा सामने या."

संभाजीराजे उठून अदबीने राजांच्याजवळ आले. चिकाच्या पडद्याआडून येसूबाई बघत राहिल्या. राजे उठून आपल्या हातांनी तलवारीचे भगवे वाद संभाजीराजांच्या कमरेला आवळीत असलेले त्यांना दिसले.

राजांनी मानवस्त्रे संभाजीराजांच्या खांद्यावर झडीने टाकली. तबकातील भंडारा घेऊन त्याची आडवी बोटे 'जगदंब' म्हणत संभाजीराजांच्या कपाळी असलेल्या शिवगंधावर ओढली.

संभाजीराजांनी त्यांना आणि जिजाऊंना नमस्काराचा रिवाज दिला.

एका हाती संभाजीराजांचा हात घेऊन दुसऱ्या हाताची जोड जिजाऊंना देऊन राजांनी त्यांना उठते केले. त्या दोघांच्या मधून संभाजीराजे चालू लागले.

त्या त्रिदळी भोसलेमंडळाला मुजरा करण्यासाठी मंत्रिगणांसह उभा जखम-दरबार कमरेत झुकला!

राणीवशात हरोलीच्या बैठकीवर बसलेल्या सोयराबाई मात्र चटक्याने उठल्या. इतर कुठल्याही बाईसाहेबांकडे न बघता त्या पाठीशी उभ्या असलेल्या चंद्रा दासीला म्हणाल्या, "चंद्रा, चल. आमचे बाळराजे महाली एकलेच आहेत!!"

आणि चंद्रा मागून येते आहे की नाही हे न बघताच त्या आपल्या महालाच्या रोखाने तरातरा चालूही लागल्या.

त्यांच्या चालण्याबरोबर फरफटत जाणारा नेसूचा जरीकाठी घोळ बघताना धाराऊंच्या कपाळीचे गोंदणे मात्र कळेल न कळेल असे लकलकले!

इमारत कारखान्याचे प्रमुख आबाजीपंत यांचा किल्ले रायगडहून निरोप आला– "जैसा सरकारस्वारीने मनी योजला तैसा गड घडीव केलाआहे. स्वामींनी पायधूळ झाडून शिलागारी नजरेखाली घालावी. काही उणे असल्यास करिणा सांगावा. चाकर सेवेत तत्पर असे."

राजांनी संभाजीराजे आणि निवडक लोक संगती घेऊन रायगडाची वाट धरली. इंद्रपुरीसारखा सजलेला किल्ले रायगड डोळ्यांखाली घातला. जेवढे राजांनी मनी धरले होते त्याहून दशगुणी, रूपवान गड कारागिरांनी सजविला होता. जसे चांदण्यारात्री स्वर्गीचे शिलावट गडमाथ्यावर अल्लाद उतरून घडीव दगडाची नजरखेच रांगोळी रेखून, पसार झाले होते!

सजला गड पाहून राजे संतुष्ट होऊन राजगडी परतले. त्यांनी राजज्योतिषी आणि कुलोपाध्याय प्रभाकर भट यांच्या मसलतीने राजगड सोडण्याचा आणि रायगडी प्रवेश करण्याचा मुहूर्त काढला. ही खबर आपगतीने गुंजणमावळभर पसरली. काळीजवेडी कुणबाऊ माणसे तांड्या तांड्यांनी राजगडावर येऊन भोसलेमंडळाचे दर्शन घेऊ लागली.

पुढे होऊ घातलेल्या धरणीकंपाची कशी कुणास ठाऊक पण मधमाश्यांना चाहूल लागते. मग कपारीला लटकलेल्या पोळ्यात ते सोडण्यापूर्वी त्यांची विचित्र चाळवाचाळव सुरू होते. तशी गडावरची सारी मने दाटल्या भावनेने भरून येऊ लागली.

हत्यारबंद धारकऱ्यांच्या पहाऱ्यात प्रथम जामदारखान्यातील जडजवाहिरांचे मोहोरबंद पेटारे हलले!

संभाजीराजांच्या मनाच्या जामदारखान्याची मोहोर मात्र कुणीतरी आपल्या अज्ञात हातांनी खोलली! आजवर खोलवटात जतून ठेवलेल्या आठवणींचे जडजवाहर बाहेर पडले! कधी पोहण्याच्या टाक्यावर, तर कधी रोवलेल्या मल्लखांबांसमोर, कधी काळेश्वरीच्या मंदिरगाभाऱ्यात, तर कधी होळीचौकात तर कधी संजीवनी व पद्मावती माचीवर ते कुणाला संगती न घेता एकटेच फेर टाकू लागले!

गडाच्या दफ्तरखान्याचे बांधीव गठ्ठे मावळ्यांनी डोकीवर वाहून गडपायथ्याशी नेले! संभाजीराजांच्या मनाच्या दफ्तरखान्यातील आठवणींचे कितीतरी हस्तलेख गडवाऱ्यावर

फरफरू लागले! कधी सदरेच्या हमचौकात, तर कधी संजीवनी माचीवर, बाहेर पडणाऱ्या भुयारी मार्गाच्या पायऱ्यांवर, कधी फडफडत्या जरीपटक्याला मिरवणाऱ्या निशाणचौथऱ्याच्या पायाशी, तर कधी दसराचौकाच्या खुल्या पटांगणात असे ते वेड्यासारखे मूक रेंगाळू लागले!

आसवाबखान्यातील जरीवस्त्रांची गाठोडी गडाच्या कुणबिणींनी आवळली. संभाजीराजांच्या अंतरीच्या आसवाबगारात घटनांची कितीतरी वस्त्रे सळसळून उठली! कधी थोरल्या मासाहेबांच्या खासेमहालात तर कधी आबासाहेबांच्या बैठकमहालात, कधी अष्टभुजा जगदंबेची मूर्ती उभी असलेल्या देवमहालात, तर कधी रंगीबेरंगी घटनांचे पडदे - आडपडदे सळसळताहेत असे वाटणाऱ्या दरुणीमहालात ते एकलेच पायफेर टाकू लागले!

शिलेखान्यातील भाले, तलवारी, कट्यारी, बोथाट्या, ढाला घोड्यांच्या पाठीवर टाकण्यात आल्या. अवजड तोफांची भांडी हत्तीवरून मार्गी लागली. संभाजीराजांच्या मनाच्या शिलेखान्यात विचारांची कितीतरी हत्यारे एकमेकांवर आदळू लागली –

'हा गड सोडणे आहे! जेव्हा मनाचा दाटवा झाला तेव्हा तेव्हा जिथल्या वाऱ्याशी कानगोष्टी केल्या, जिथल्या भिंतीभिंतीवर मासाहेब आणि महाराजसाहेब यांचे श्वास श्वास रुपून बसले आहेत, जिथल्या पाखरांचा झाडांच्या गचपणात उठलेला सांजकालवा मनी शिक्केमोर्तबासारखा ठसून बसला आहे, जेव्हा कोणीच जवळ नव्हते तेव्हा ज्याच्याशी मिटल्या ओठांनी आम्ही उदंड बोललो आहोत तो हा गड सोडणे आहे!''

प्रस्थानाचा ठरला दिवस कातळकड्याबाहेर उठला. संभाजीराजांनी नेहमीच्या हमामखान्यात शेवटचे स्नान घेतले. गडवा खाली ठेवताना त्यांना वाटले – 'या वाहत्या पाण्याबरोबरच खूप काही वाहून चालले आहे!'

अंगी राजसाज घेऊन ते जिजाऊंच्या महाली दर्शनासाठी आले.

त्या महाली मुसमुसणारी धाराऊ जिजाऊंना म्हणत होती – "मला जाऊ देवा आता कापूऱ्हळाला, मासाब. म्या कशाला येऊ संगट. ह्यो ठाव बरा हुता. कदी नडलं पडलं तर हितनं गावाकडं जाया सुदरत हुतं. त्यो गड कुठल्या पल्ल्यावर हाय कुनाला ठावं!"

जिजाऊ धाराऊला सोडायला तयार नव्हत्या. त्या परोपरीने तिची समजूत काढू बघत होत्या. धाराऊ ते ऐकत होती; पण कानाच्या पलीकडे ते तिच्या काळजापर्यंत पोचतच नव्हते. शेवटी संभाजीराजे पुढे झाले. धाराऊला एवढेच म्हणाले, "तुझ्या बरोबर आम्हीही येऊ कापूरहोळास!"

ते ऐकून मात्र धाराऊ चक्करली. "ल्येकरा, तुज्यामागनं मसणोटीत जाया दिकुल पाय मागं हटायचे न्हाईत माजं! लई गुंतवा झालाय रं माज्या वासरा तुज्यात!" म्हणत आखरीला धाराऊ साऱ्यांबरोबर रायगडी येण्यास राजी झाली.

संभाजीराजांना बरोबर घेऊन जिजाऊ सदरी बैठकीजवळ जायला निघाल्या. आपल्या महालातून बाहेर पडलेले राजेही येऊन त्यांना मिळाले.

ते भोसलाई त्रिदळ सदरेवर आले. मुंगी शिरणार नाही असे माणूस समोरच्या चौकात दाटले होते. माणसे होती पण आवाज नव्हता. शांत, सारे कसे शांत होते.

राजे, जिजाऊ, संभाजीराजे बैठकीवर बसले. परडी फिरविणारा मानकरी आला. राजांनी भंडाऱ्याची चिमट उचलून उधळली. ती उधळताना – "या सदरेवरची ही अखेरची चिमट आहे." या विचाराने त्यांची बोटे थरथरली.

पूर्वी रिवाज नव्हता तरीही परडीवाल्याने हातची परडी जिजाऊ आणि संभाजीराजांच्या समोर धरली. त्यांनी चिमटी भरून घेतल्या. आईच्या कृपेची उधळण केली. कण उधळले. मनामनातील दाटल्या भावनांचे. आजवरच्या भल्याबुऱ्या एकोप्याचे!

गडावरच्या एकजात झाडून साऱ्या असामींच्या हातावर ते तिघेही मोहरा, वस्त्रे, हत्यारे ठेवणार होते! ज्यांनी सेवा केली त्यांचा तो हक्क होता. राजासाठी तो रिवाज होता. मागील माणसास संतोषून जाणे!

सदरबैठकीवरून शेवटचे दान झाले. राणीवशात वर्दी गेली. अंगाभोवती शालनामे पांघरलेला राजांचा राणीवसा दरुणीमहालाबाहेर पडला. सिद्ध ठेवलेल्या मेण्यात खाशा स्वाऱ्या बसल्या. गड-उताराला लागल्या.

सर्वांत शेवटी जिजाऊ मेण्यात बसल्या. वळीव पावसाने आभाळ भरून यावे तसे त्यांचे मन भरून आले. बाहेर काहीच न दाखविता त्या पुटपुटल्या – "जगदंब, जगदंब." मेणे गड उतरू लागले. जिजाऊंच्या मेण्याबरोबर चालणाऱ्या धाराऊने वाकून चिमटभर माती वर घेतली. आपल्या सुताडी लुगड्याच्या शेवात बांधली.

मंत्रिगण, किल्लेदार सुभानजी, सिलिमकर यांच्या सोबतीत राजे आणि संभाजीराजे संजीवनी माचीवर बाहेर पडणाऱ्या भुयाराच्या रोखाने चालले. दरम्यान गडाची किल्लेदारी सिदोजी थोपट्यांकडून सुभानजी शिळिमकरांकडे आली होती.

समोर दूरवर सुवेळा माचीचे टोक दिसताच राजे थांबले. ते का ते कुणालाच कळले नाही. या – याच माचीवर झिजून शांत झालेल्या सईबाईंची चिता पेटून विझली होती. त्या आठवणीने राजांच्या नेत्रकडा ओल्या झाल्या. त्यांचा हात संभाजीराजांच्या खांद्यावर चढला.

आजवर अनेक वेळा पायांखाली टाकलेला तोच भुयारी मार्ग आला. धोंड हटली. राजे-संभाजीराजे आत उतरले. पायऱ्या मागे पडू लागल्या. काहीतरी योजून चालते राजे थांबले. त्यांनी संभाजीराजांना विचारले, "तुम्हास आठवतं, तुम्ही विचारलं होतं एकदा – हे भुयार संपणार तरी केव्हा?"

"जी. आठवतं. तुम्ही आम्हांला सांगून ठेवलं आहे महाराजसाहेब, भुयारं कधीच संपत नसतात. चाल कधी थांबत नसते!"

ते पितापुत्र संजीवनी माचीवर आले. उभी माची माणसांनी फुलली होती. गड-उतारासाठी सिदोजी थोपट्यांनी पालख्या सिद्ध ठेवल्या होत्या.

माचीच्या निशाणचौथऱ्याजवळ राजे आणि संभाजीराजे आले. माना उठवून त्यांनी जरीपटक्याला नजरा दिल्या. मोतीलगी ओळांबल्या.

राजे थोपट्यांना म्हणाले, "सिदोजी, आज आम्ही पालखीतून गड उतरणार नाही! साऱ्यांच्या पायसोबतीने आम्ही गड उतरू."

"जी." सिदोजींनी आज्ञा झेलली.

राजे-संभाजीराजे देवदर्शन करून संजीवनी माची सोडून पाली दरवाज्याची वाट तोडू लागले. देवमाशांच्या अवती-भवतीने, पाठमागाने शेकडो लहाने मासे ओढल्यागत जात असतात तशी गडमाणसे राजांच्याबरोबर चालू लागली.

पाली दरवाजा आला. दरवाज्यावरच्या नगारखान्यात गडउताराची नौबत झडू लागली. दरवाज्यात उभे राहून राजे-संभाजीराजांनी ती ऐकली. चौघड्यावर पडणाऱ्या काठीचा ठेका नेहमीसारखा एकसूर नव्हता! मध्येच कुठेतरी ठेका चुकार होत होता! राजे दरवाज्यापार होताच नौबतवाल्यांनी हातीच्या टिपऱ्या खाली ठेवल्या आणि तेही पायऱ्या उतरू लागले.

मावळमेळ्यात राजे-संभाजीराजे राजगडाच्या पायथ्याशी आले. राजांनी किल्लेदार सुभानजींच्या हातात श्रीफळ-विडा दिला. गडाकडे बघत ते म्हणाले, "किल्लेदार, माळी जैसा बगीचा राखतो तैसी गडाची निगा राखा. येतो आम्ही!" राजांनी गळ्यातील मोतीकंठा उतरून सुभानजींच्या हातात ठेवला.

राजांच्या पायांवर पगडीधारी डोके ठेवत लहान पोर पुटपुटावे तसा सुभानजी गद्गद् लागला. त्याला उठवून खांदाभेट देत राजे म्हणाले, "सुभानजी, सावरा, जगी जे जे प्रिय आहे त्याला एक ना एक दिवस पाठ दाखवावीच लागते."

राजे आणि संभाजीराजे यांनी समोरच्या खड्या कातळदेवाला हात जोडून नमस्कार केले. ते बघताना भोवतीची मावळी काळजे फुटली.

राजे सुरतेवर चालून गेले तेव्हा नव्हती, मिर्झा-अफजलच्या भेटीसाठी गेले तेव्हा नव्हती, आग्राभेटीसाठी कूच झाले तेव्हा नव्हती पण आज– आज माणसं डोळ्यांवाटे फुटली! दाटीवाटीने पुढे येत धन्यांच्या पायांवर पगड्या ठेवू लागली.

प्रतापरावांनी जीन कसून तयार ठेवलेल्या दोन पांढऱ्याशुभ्र घोड्यांजवळ राजे-संभाजीराजे आले. राजांनी हात देत संभाजीराजांना मांड जमवून दिली. पाठोपाठ राजांनी मांड घेतली. पाठमोऱ्या झालेल्या राजे-संभाजीराजांना कल्पना नव्हती की जबान असती तर उभा राजगडच कमरेत झुकून म्हणाला असता, "धनी, धाकलं धनी, वाईच थांबतिसा! पायधूळ माथ्यावं घ्यावी म्हन्तो म्या!"

आणि– आणि उडत्या गरुड पक्ष्याच्या पवित्र्यात असलेला राजगड सुवेळा आणि संजीवनी माचीचे पंख फडफडवून झेपावला असता– थेट आकाशात!!

चालला! तो चक्रवर्ती संन्यासी आपल्या कैक स्मृतींचे पायठसे राजगडावर ठेवून

चालला! त्याच्या जोडीने बालभुत्या चालला. आठवणींचे कितीतरी पाजळले पोत राजगडी पेटते ठेवून!

रायगड टप्प्यात आला. पायथ्याच्या पाचाड या गावठाणात आबाजीपंतांनी जिजाऊंच्यासाठी खणबंद वाडा उभा केला होता.

रायगडावर सुमूहर्ताने प्रवेश करण्यापूर्वी सगळ्या राजकुलाचा त्या वाड्यात मुक्काम पडला. पाचाड शिबंदीचे ठाणे होते. गडाला पडेल तो वस्तभाव पुरविण्यासाठी इथे व्यापारपेठ होती.

दुसरा दिवस उजाडला. पाचाडच्या या वाड्याच्या पैस सदरेवरून समोर रायगड दिसत होता. तळ्यातून बाहेर उठलेल्या कृष्णकमळासारखा. त्या पैस सदरेवर उभ्या राहून, मनोमन साद घालणाऱ्या रायगडाकडे जिजाऊ डोळे लहाने करून बघू लागल्या. त्यांच्या नेत्रकडा धरून कानशिलापर्यंत आक्रसलेल्या सुरकुत्या उठल्या. गड बघणाऱ्या खटाटोपात असल्याने त्यांच्या डोईचा पदरकाठ किंचितसा मागे हटला होता. त्यातून डोकावलेली त्यांची पांढरी केसवट राजांच्या नजरेतून सुटली नाही.

"मासाहेब, हा सामने दिसतो तो 'खुबलढा बुरुज!" त्यावर थेट दिसते ती मावळती माची!" राजांनी उजवी तर्जनी उठवून रोख दाखविला.

शेजारी उभे असलेले संभाजीराजे तो बुरुज व माची निरखू लागले.

"राजे, आमच्यासाठी हा सवता वाडा कशाला उभा केलात?" जिजाऊ समोर बघत म्हणाल्या.

राजे गंभीर झाले. जिजाऊंच्या उजाड माथ्याकडे बघताना त्यांचा आवाज धरल्यासारखा झाला. "मासाहेब, आम्ही काय करू शकतो आपल्यासाठी? आमचा तो वकूब नव्हे. शरीर सोलून त्याच्या मोजड्या आपल्या पायी आम्ही चढविल्या, तरी ते थिटे आहे. तुम्ही आम्हास कधी बोलला नाहीत; पण तुमच्या महालावरून जाताना आम्ही ऐकली आहे तुमच्या घशात घोटाळणारी दम्याची उसळ! मासाहेब, तुम्हाला गडावरची गार हवा नाही झेपणार. त्यासाठी हा वाडा आहे." राजे थांबले.

संभाजीराजे राजांच्याकडे बघत राहिले.

"आम्ही समोरचा बुरुज व माची का दाखविली ध्यानी नाही आलं मासाहेब?" राजांनी पुन्हा समोरच्या बुरुजाकडे बोट रोखत विचारले.

"नाही समजलो. काही खास?' जिजाऊंनी राजांच्या कपाळीचे शिवगंध निरखले.

"मासाहेब, तुम्ही या वाड्यात राहणार. आम्हास गडावरच राहणे भाग आहे. आपले दर्शन घेतल्याशिवाय आमच्या गळ्याखाली पाण्याचा घोटही उतरत नाही. म्हणून... म्हणून या वाड्याची बांधणी आम्ही इंदळकरला तिरकी, कोनी धरण्यास सांगितली. वरच्या त्या 'खूबलढा' बुरुजावरच्या माचीवर आम्ही उभे राहिलो की या सदरजोत्यावर

उभ्या असलेल्या आपल्या मूर्तीचे आम्हास दूरवरून का होईना दर्शन घडेल !! जग पूर्वेला सूर्योदय पाहते, आम्ही पश्चिमेला पाहू ! ''

राजे वेड्यासारखे माचीकडे बघत राहिले. डोळे पाण्याने भरून आलेल्या जिजाऊ राजांच्याकडे बघत राहिल्या. संभाजीराजांनी समोरच्या रायगडाचा उंचावा क्षणभर निरखला. पुन्हा राजांच्याकडे बघताना त्यांना वाटले– '' रायगड थिटा आहे ! महाराजसाहेबांच्या कमरेला बांधलेल्या धोप तेगीएवढा ! ''

ठरल्या मुहूर्ताला पालख्या आणि मेणे पाचाडच्या वाड्याबाहेर पडले. पहाटेचा गारवा धरून भोई रायगडची चढण चढू लागले.

झाडाझुडपात दडलेली वाटेवरची फुलबाग आली. मेणे-पालख्या ठाण झाल्या. सामोरा आलेल्या माळ्याचा मुजरा आपलासा करीत जिजाऊ, संभाजीराजे, राणीवसा, सर्वांसह राजे बगिच्यात आले. गुलाब, कर्दळ, मोगरा, मावळशेवंती, अबोली, अनंत अशा रंगीबेरंगी फुलांचा जमाव बागेत चारी बाजूला दाटला होता. त्यांचा मेळ पडलेला मजेदार सुगंध सगळीकडे पसरला होता. राजे एका गुलाबाच्या रोपट्याजवळ थांबले.

'' हा उत्तरी, मोगलाई वाण मासाहेब.'' असे म्हणत राजांनी एक फुलू घातलेला गुलाबकळा खुडला आणि जिजाऊंच्या हाती दिला. ते बघताना संभाजीराजांना औरंगाबादेतील शाहजाद्यांचे बोल आठवले, '' गुलाब भी खूबसूरत होता है ! ''

रिवाज म्हणून हाती घेतलेला गुलाबकळा जिजाऊंनी निरखला. कुणालाच न कळणारी अशी एक दुखरी भावछटा त्यांच्या सुरकुतल्या मुद्रेवर पसरली. त्यांना राजांना म्हणावेसे वाटले– '' फुलाचा हा वाण आम्ही बघितला आहे राजे ! खूप जवळून ! काटे असलेला सर्वांत देखणा वाण हाच ! ''

जिजाऊंनी आपल्या हातातील गुलाबकळा तसाच संभाजीराजांच्या हातात ठेवला. जणू ते फूल जवळ असणे हा संभाजीराजांचा हक्क होता ! वसा होता ! हाती फूल घेतलेल्या संभाजीराजांना बघताना जिजाऊंना मन पलटी खाऊन मागील काळात गेल्याचा भास झाला ! '' तेच साफ डोळे ! कपाळाची तशीच भरगच्च गादी ! ''

बाग नजरेखालून घालून स्वाऱ्या पुढची चढण चढू लागल्या. 'लहान दरवाजा' हा गडाचा पहिला दगडबंद दरवाजा आला. भोई थांबले. राजे-संभाजीराजे पालखीउतार झाले. अदबीने पुढे होत आबाजीपंतांनी राजांच्या हाती श्रीफळ दिले. राजांनी गडाच्या प्रथम दरवाज्याचा उंबरठा ओलांडण्यापूर्वी श्रीफळ वाढविले. भकले दुहाती फेकून दिली. हाताला धरून त्यांनी प्रथम जिजाऊंना उंबरठा ओलांडू दिला. मग ते आणि संभाजीराजे उंबरठ्यावर गेले. जिजाऊ गडाचा कमानबंद दरवाजा निरखू लागल्या ! जोड कमानीचा तो भक्कम दरवाजा बघून त्या सुखदिल झाल्या.

गडचढीचा पहिला टप्पा संपला. दुसरा सुरू झाला. आता भोयांच्या कपाळी घामाची थेंबावळ उठू लागली. मध्येच थांबून ते थोप्यांवर मेणे-पालख्या तोलून उभ्या-उभ्या आपली भरली छातवाने सुमार करून घेऊ लागले.

अंबारकोठ्या मागे पडल्या. पहिल्या चौकीची दगडी ओवरी मागे पडली. आणि– आणि उभा रायगड हा एक वास्तुपुरुष असून तो आपला जबडा ताणून उभा आहे असा भास निर्माण व्हावा तो ' महादरवाजा ' समोर आला.

राजांनी महादरवाज्याची पूजा बांधली. दोन भक्कम बुरुजांना धरून या दरवाज्याच्या दुहाती उंच नक्षीदार तटबंदी फिरली होती. वर नगारखान्याची व्यवस्था होती.

भोसलेमंडळ दरवाज्यापार होताना रायगडावरची पहिली नौबत झडली ! राजे, जिजाऊ, संभाजीराजे यांच्यावर सोनमोहरा उधळण्यात आल्या.

आता गडाची खडी चढण सुरू झाली. राजे-संभाजीराजे पालखीउतार होऊन जिजाऊ बसलेल्या मेण्याच्या दुतर्फा झाले. हत्ती टाके मागे पडले, समोर आभाळात घुसलेले द्वादशकोनी, पाचमजली मनोरे दिसू लागले. जसा रायगड आपले मनोऱ्यांचे दोन्ही भक्कम हात उभवून वरच्या आभाळाला मूकपणे साद घालीत होता !

गोल घेराचा गंगासागर तलाव आला. जिजाऊंचा मेणा थांबला.

एक हात राजांनी धरला आहे, दुसऱ्या हाताचा आधार संभाजीराजांनी घेतला आहे अशा थकल्या जिजाऊ गंगासागराच्या काठाशी आल्या.

जिजाऊ, राजे, संभाजीराजे गंगासागरात पडलेल्या आघाडी मनोऱ्यांचे देखणे प्रतिबिंब बघू लागले. हरवल्या डोळ्यांनी. गंगासागरात केवढ्या थोर गोष्टींचा जमाव झाला होता ! द्वादशकोनी उंच मनोरे. डोकावलेले भोसलाई त्रिदळ आणि वरचे निळेशार आभाळ ! त्या तिघांपैकी कुणालाच बोलावेसे वाटत नव्हते. एकाएकी ते आपोआप घडलेले देखणे पाणचित्र हिंदोळले आणि विलग झाले !

तलावाच्या काठावर ओळंबलेल्या आंब्याच्या एका फांदीवरून, बराच वेळ मोहरा धरून गोळ्यासारख्या बसलेल्या एका मुठीएवढ्या खंड्या पक्ष्याने उसळी घेत गंगासागरात सूर टाकला !! लाटाच लाटा उठल्या. संभाजीराजे त्या सुराने दचकले. त्यांनी पाण्याबाहेर उमाळी घेऊन उठलेल्या त्या लहान वाटणाऱ्या फडफडत्या पक्ष्याच्या चोचीत मासोळी पाहिली ! मग हट्टाने त्यांचे डोळे त्या पक्ष्यामागून दौडत गेले.

पुन्हा फांदीवर बसलेल्या खंड्याने मानेला दिलेला झटका संभाजीराजांना दिसला. मासोळीची एक तळपती रुपेरी तार उन्हात फेकलेली त्यांना दिसली न दिसली आणि ती क्षणात खंड्याच्या चोचीआड झाली ! मासोळी होत्याची नव्हती झाली !

खंड्याने शीळ भरली संतोषाने ! संभाजीराजे ती ऐकून अस्वस्थ झाले.

मनोऱ्यांनी सुरू केलेल्या बालेकिल्ल्याच्या सदरदरवाज्यात स्वाऱ्या आल्या. हिरोजी इंदळकराने पुढे येत राजांच्या हाती एक पायबांधले काळे कोंबडे दिले. राजांनी ते दरवाज्यावरून तीन वेळा उतरून दूर फेकून दिले !

असते ! चुन्या-दगडांनी घडलेल्या वास्तूलाही एक न दिसणारे ' बाळसे ' असते ! त्यालाही ' दृष्ट ' लागण्याचा संभव असतो ! त्यासाठी हा ' उतारा ' होता.

राजांनी बालेकिल्ल्याच्या दरवाज्याची पूजा बांधली. त्यावर मोहरा उधळल्या. आणि पृथ्वीवरल्या कुठल्याही गडाला ज्यांची पायधूळ मस्तकी घेताना धन्य वाटावे अशा जिजाऊंना मध्ये घेऊन राजे-संभाजीराजे यांनी रायगडच्या बालेकिल्ल्याच्या सदरदरवाज्याचा दगडी उंबरठा ओलांडला !!

स्वप्ननगरीचे दालन उलगडावे तसा पालखी दरवाजा पार करताच बालेकिल्ल्याचा ऐन शिलावटी भाग समोर आला.

एकास एक लागून असलेल्या सातमहालांच्या. माळवदे असलेल्या जोड चिरेबंद इमारती समोर हौत्या. त्यांतील कुठल्याही महालाच्या मजल्याला लागून पुढे झुकलेल्या माळवदात उभे राहिले तर, आतल्या चौकात दगडी पाटातून फिरविलेल्या पाण्यातील माशांची पाठशिवणीची अविरत खेळी सहज दिसावी अशी चतुर सोय केली होती.

त्या सात महालांची जोड-इमारत निरखीत संभाजीराजांनी राजांना विचारले, "हे कसले वाडे ?"

"हा राणीवसा आहे संभाजीराजे." उत्तर देताना राजांचा आवाज धरल्यासारखा झाला. त्यांना सईबाईंचा आठव आला. महाल सात होते. 'आठवा' म्हणण्यापेक्षा 'पहिला' महाल त्यात असायला पाहिजे होता – सईबाईंचा ! तो नव्हता. असूही शकत नव्हता. तसा तो होताही ! कुणाला न दिसेल असा. राजांच्या मनात ! सावळ्या स्मृतींच्या रूपात !

जिजाऊ, राजे-संभाजीराजे यांच्यासाठी बांधलेला 'खासेमहाल ऊर्फ राजवाडा' बघून राजे सिंहासनचौकात आले. ही राजदरबारची जागा होती. सिंहासन बैठकीपासून समोरच्या भव्य नगारखान्यापर्यंत पाच हाती पायपट्टा मोकळा सोडला होता. त्यावर रुजामे अंथरले होते. शानदार सिंहासन बैठक साऱ्यांनी डोळाभर बघितली. समोरच्या पायपट्ट्यावर मध्येच एक तलाव खोदून त्यात उसळत्या कारंज्यांची दिमाखदार योजना केली होती. त्या कारंज्याभोवती सारी राजमंडळी जमा झाली. हिरोजी इंदळकर कारंज्यातून पाणी कसे उसळी घेते याची जाणकारी सांगू लागला. संभाजीराजे एकरोखाने वर फवारणाऱ्या पाण्याच्या अगणित धारा बघताना हरवून गेले.

नगारखान्याची अस्मानात घुसलेली देखणी कारागिरी डोळ्यांखाली टाकीत राजे-संभाजीराजे-जिजाऊ दरबारासमोरच्या मोकळ्या पटांगणात आले.

जिजाऊंच्यासाठी पालखी जोडण्यात आली. मोरोपंत, आण्णाजी, बाळाजी, दत्ताजी, प्रतापराव, इंदळकर, आबाजीपंत, मुधोजी सरकवास, चांगोजी काटकर आणि राजे व संभाजीराजे यांनी पालखीभोवती फेर घेतला. सारा राणीवसा, येसूबाई, धाराऊ अशा स्त्रिया पालखीच्या पिछाडीला झाल्या. जिजाऊ दर्शनाला निघाल्या – गडदेवाच्या ! श्रीजगदीश्वराच्या !

होळीचा फेरघेराचा माळ येताच पालखी ठाण झाली. या माळावर होळीसणाचा हुडवा कसा शिलगणार याची माहिती आबाजीपंतांनी साऱ्यांना दिली.

मांड घेतलेल्या घोड्यावरून उभ्या उभ्याच स्वाराला खरेदी करता यावी अशी जोती राखलेली, दुतर्फा एका हारीत दुकाने असलेली व्यापारपेठ आली. अजून ती पेठ वसती झाली नव्हती. ती वसती करण्याचा मक्ता राजांच्याकडून घ्यावा म्हणून गड चढून आलेला नागाप्पा शेट्टी आपल्या चाकरांसह सामोरा आला. त्याने जिजाऊंच्या पालखीवर सोनमोहरा उधळल्या. त्यांची पायधूळ घेतली.

जगदीश्वराच्या मंदिराचा, उन्हात झळकता सोनकळस दिसू लागला. जिजाऊंची पालखी मंदिरासमोर ठाण झाली.

हातजोड देत राजांनी जिजाऊंना पालखीतून उतरून घेतले. उत्तराभिमुख असलेल्या गाभाऱ्यातील नितळ शिवलिंगासमोर, राजबेलाचे जन्माने वाहिलेले पान असावे तसे मध्ये जिजाऊ आणि दुहाती राजे, संभाजीराजे उभे राहिले.

तिघांनीही वाकून मंदिराच्या दगडी पायरीला हात लावले. आणि मंदिराच्या प्रथम चौकात प्रवेश केला. पाठोपाठ राणीवसा, मंत्रिगण आत आले.

गाभाऱ्यातील समयांच्या मंद प्रकाशात, अर्धवट फुलांनी झाकलेले. अभिषेकपात्राखाली जलधारा घेणारे शिवलिंग बघत राजे पुढे झाले.

डोकीवर असलेल्या घंटेचा टोल राजांनी दिला. सारे मंदिरआवार घंटानादाने भरून पावले. पुढे टाकावे म्हणून राजांनी पाऊल उचलले आणि फरसबंदीवर रेखलेल्या दगडी कासवाकडे बघताच ते तसेच मागे घेतले.

"पंत, आम्हा हिंदूंच्या मंदिरांत प्रवेशचौकातच या दगडी कासवाची योजना का केलेली असावी ? काही अंदाज ?" पाठीशी असलेल्या मोरोपंतांना राजांनी विचारले.

"जी" म्हणत पुढे आलेले मोरोपंत, संभाजीराजे, जिजाऊ सारेच कासवाकडे निरखून खाली बघू लागले. आणि पगडी डोलवीत मोरोपंत म्हणाले, "नाही स्वामी, तसा अंदाज नाही करता येत – पण हे पहिल्या कूर्मावताराचं प्रतीक असावं."

"आम्हास वेगळंच वाटत पंत. मंदिरी येणाऱ्या हर दर्शनभक्तास, 'काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे विकार या कासवाच्या पायांसारखे मागे सारून मोकळ्या मनाने गाभाऱ्यात या' याची सांग देण्यासाठी ही योजना असावी ! पण आम्हा दर्शनभक्तांचे, विसरगतीनं का होईना पाय पडतात ते या कासवाच्या पाठीवर !!" राजे भारल्यासारखे बोलत होते.

कासवाकडे बघताना संभाजीराजांना वाटले – 'एकदा का होईना कासवाचं रूप आमच्या वाट्याला यावं ! महाराजसाहेब आणि आऊसाहेब यांचे पाय पडावेत – आमच्या पाठीवर !!"

जगदीश्वराचे दर्शन होताच जिजाऊ राणीवशासह बालेकिल्ल्याकडे परतल्या. राजे संभाजीराजांना घेऊन गडाचा फेर टाकण्यासाठी पुढे निघाले.

काळा हौद, भवानी टोक, बारा टाकी, दारू कोठ्या, मंत्र्यांचे वाडे, कुशावर्त तलाव, शिरकाईचे देऊळ अशा लहानथोर साऱ्या जागा बघून राजे-संभाजीराजांच्यासह नगारखान्याच्या पायऱ्या चढून आले.

ही रायगडावरची सर्वांत उंच जागा! निशाणचौथऱ्याच्या काठीवर चढलेल्या भगव्या जरीपटक्याची फडफड साऱ्यांना स्पष्ट ऐकू येत होती.

"तो तोरणा–" उगवतीला तोंड धरून राजांनी संभाजीराजांना बोटाने मार्ग दाखविला. "तो – तो राजगड!"

"जी." संभाजीराजांनी साद भरला. दोघांचेही जरीनामे वाऱ्यावर फरफरू लागले. जिरेटोपातील लगी हिंदोळू लागल्या. कानांतील सोनचौकडे डुलू लागले.

दुसऱ्याच्या शे-दोनशे मेंढीकळपात चुकार होऊ बघणारे आपले मेंढरू जातिवंत धनगर ज्या नजरेने अचूक पारखून काढतो तसे सह्याद्रीच्या काळपट रांगांत मुरू बघणारे आपले गडकोट राजे तर्जनी फिरवीत संभाजीराजांना अचूक दाखवू लागले.

"तो सोनगड, तो चांभारगड, तो घोसाळा, हा लिंगाणा, हा कांगोरा, हा कोकणदिवा, तो तळेगड, शंभूराजे, हा रायगड जगदंबेचा सर्वांत थोर भुत्या आहे! भोवतीच्या या गडांच्या कवड्यांची माळ त्यानं कंठात चढविली आहे! त्या पायथ्याशी फिरलेल्या गांधारी आणि काळ या नद्यांच्या सफेद पाण्यानं त्यानं आईचा 'तांदूळचौक' भरला आहे! याच्या अंगाखांद्यावरून कोसळणारे पाट संबळ-तुणतुण्याचा ठेका धरून आहेत! जवळ असलेल्या उगवतीच्या सूर्याचा पोत करून तो हा हाती धरतो! या जरीपटक्याचा भगवा-भंडारा त्यानं माथी माखून घेतला आहे! असा हा रायगड आहे!" राजांनी हाताची बोटे छातीशी नेत त्या भुत्याला मान दिला.

शुभमुहूर्तावर राजांनी जिजाऊंच्या हातांनी जगदीश्वराला अभिषेक करविला. महिन्याभरातच रायगडाचा दफ्तरी जाबता बसला. गड नांदू लागला.

गडावरच्या थंड हवेत जिजाऊंचे दम्याचे दुखणे उचल खाऊ लागले. राजांच्या सल्ल्याने त्या गड उतरून पाचाडच्या वाड्यात राहायला आल्या. त्यांच्या सेवेसाठी पुतळाबाईही गड उतरल्या. महाडचे निष्णात वैद्य गंगाधरपंतांनाही सेवेसाठी पाचारण्यात आले.

पाचाडच्या वाड्याच्या कारभाऱ्याला सदरेशी बोलावून राजांनी एक सक्त आज्ञा केली – "एक फेर घेराची घंटा वाड्याच्या सदरी तुळईस बांधणे. त्यावर एक तासवाला नेमून देणे. रोज आऊसाहेबांची स्नानादी अन्हिके आटोपून त्या तुळशीपूजेसाठी सदरी येतील त्या समयास घंटेचे टोल ते एकसुरी देत जाणे! त्या इशारतीने आम्ही युवराज संभाजीराजांच्यासमवेत मावळमाचीवर दाखल होऊ. दुरून का होईना जे घडेल ते आऊसाहेबांचे चरणदर्शन करू. ये काम बिलाकसुरीने हररोज पार पाडीत जाणे!"

आता पाचाडवाडीत सकाळ धरून नित्यनेमाने घंटेचे टोल घुमू लागले. याने केवळ राजे-संभाजीराजे यांचीच सोय झाली नाही. पाचाडातील शिबंदीच्या शिलेदारांना, अठरा कारखान्यांतील, कष्टकऱ्यांना कळून चुकले की, घंटानाद घुमू लागताच जिजाऊसाहेब सदरेवर आलेल्या असतात!

असेच संभाजीराजांना बरोबर घेऊन राजे एकदा मावळमाचीवर आले. पाचाडच्या रोखाने उठलेले घंटेचे टोल वाऱ्यावर स्वार होऊन माचीकडे सरकले होते. दिवस कासराभर वर चढला होता. दगडबंद बुरुजावर उभे राहून राजे-संभाजीराजे पायथ्याच्या पाचाडच्या सदरेवर डोळे जोडून उभे होते.

चुन्याची बोटभर खडी रेघ दिसावी तशा जिजाऊ दूरवर सदरेवर दिसू लागल्या. त्या दिसताच दोघांनीही अदबमुजरे घातले. सदरेवरची रेख निश्चल खडी होती. बुरुजावरून पितापुत्र डोळ्यांचेच हात करून त्या रेषेच्या पायथ्याला भिडवून मोकळे झाले होते!

"युवराज ऽ," राजे काहीतरी योजून बोलू लागले.

"जी." संभाजीराजांनी त्यांची साद पडू दिली नाही.

"पायथ्याच्या वाड्याच्या सदरेवरून मासाहेब तुम्हा-आम्हास अचूक कशा काय ओळखतील?" राजांनी विचारले.

"अलबत ... अलबत ओळखतील मासाहेब अचूक. तुम्ही कुठले व आम्ही कुठले ते!" संभाजीराजे क्षणभर थांबले. राजांच्या पायांकडे नजर लावीत म्हणाले – "आपण केवढे थोर – आम्ही – आम्ही केवढे छोटे! मासाहेब चुकणार नाहीत!" संभाजीराजांनी उत्तर दिले.

निरोपासाठी आलेल्या गणोजी शिर्क्यांना संभाजीराजांनी खांदाभेट दिली. ती देताना त्यांना कुठंतरी खोलवर चालून गेले की, "एवढ्या पंधरा दिवसांच्या येथील मुक्कामात गणोजी ना आबासाहेबांशी, ना चमकत्या तोड्याशी, ना आमच्याशी कधी खुल्या जबानीने बोलले! कधी निसटते बोलण्याचा योग आलाच तर गणोजी शिर्के पापण्यांची चटाचट फडफड करतात! एखादा शब्द बोलून आमच्या आणि आबासाहेबांच्या हातातील सोन्याच्या कड्याकडे एकरोख बघत राहतात!"

एकदा तर संभाजीराजांना गणोजी तसे बघत असताना वाटले होते की, तसेच चालत त्यांच्याजवळ जावे आणि सर्वांसमक्ष आपल्या हातीचे कडे उतरून त्यांच्या हाती भरावे! पण ते रिवाजी दिसले नसते.

पिलाजी आपल्या मुला-सुनेनिशी निघून गेले.

संभाजीराजांचा ठरला दिनक्रम सुरू झाला. सुक्या तळ्याजवळ मोकळ्या मैदानात असलेल्या लोखंडी मल्लखांबावर ते एका सकाळी सरसर दशरंग फिरत होते. शेजारी

उभ्या असलेल्या गोमाजीबाबांची आता त्यांच्यावर नजर ठरत नव्हती. टाळा वासून ते नुसते बघत होते.

मल्लखांब लोखंडी असल्याने संभाजीराजांच्या अंगी उठलेल्या घामाने तो निथळून निघाला. त्याच्यावर हात ठरेनात आणि खांबाच्या टोपाकडे चढते गेलेले संभाजीराजे बाणासारखे पायथ्याकडे घसरतीला लागले, त्या घसरतीतच त्यांनी कसबाने अंग बाहेर झोकून दिले आणि पवित्रा घेत ते गोमाजींच्या पुढ्यात खडे ठाकले! घामाघूम झालेले! पण ओठभर हसणारे!

झटकन गोमाजींनी पुढे होत हातीची शाल त्यांच्या अंगाभोवती लपेटली, "म्हेनतीच्या घामेजल्या अंगावं वारा घेऊ ने, धाकलं धनी!" काहीतरी बोलायचे म्हणून गोमाजी बोलले खरे; पण मनोमन त्यांना उघडे संभाजीराजे बघताना वाटले होते की, "म्हातारी जाली म्हूण काय जालं, आमचीच नदार लागायची या सोनकांबंच्या मल्लखांबाला!"

मेहनत घेऊन आलेले संभाजीराजे पेहराव अंगी घेऊन, धाराऊने दिलेली दुधाची चरवी ओठांआड रिचवून वाड्याच्या सदरबैठकीवर आले. राजे महाडकडे कूच झाले होते. युवराजांना बघताच बसलेले बाळाजी चिटणीस अदबीने उठले. उभ्या असलेल्या आण्णाजींनी झटकन मुजरा घातला.

सदरेवर चारपाच कुणबाऊ माणसे आणि रायगडाच्या पायथ्याच्या वाडीचा गावखोत उभा होता. संभाजीराजांची त्यांच्यावर नजर पडताच ते सारेच कमरेत झुकले.

"कोण मंडळी ही?" बैठक घेत संभाजीराजांनी बाळाजींना विचारले.

"हे वाडीचे शिकारखेळे आहेत. त्यांच्याविरुद्ध गावखोतांची तकरीर आहे." बाळाजींनी उभे राहून उत्तर दिले.

"कसली तकरीर?" संभाजीराजांनी खोतांकडे बघत विचारले.

सारेच गप्प होते.

"का?" चिटणीस यांची तकरीर आम्हास ऐकविण्याजोगी नाही?"

"नाही. तसं नाही युवराज! पण हा कथला सादिलवार आहे. आम्ही त्यास निवाडा देऊ." एवढा वेळ गप्प बसलेले आण्णाजी नम्रपणे म्हणाले.

"जशी तुमची इच्छा!" संभाजीराजे हसून म्हणाले.

जमलेल्या शिकारखेळ्यांत मात्र चुळबूळ झाली. त्यांच्या म्होरक्या गुंजोटे कमरेत झुकून मुजरा देत म्हणाला, "सरकार गडावं न्हाईत तर आपुनच काय ती तड लावावी आमची धाकलं धनी."

"कसली तड! काय झालं? ना कचरता बोला आम्हास!" संभाजीराजांनी गुंजोट्याला धीर दिला.

"धनी, ह्येनी आगळ क्येलीय. तड लावायची ती आमची, ह्येंची नाय." गावखोताने सावधपणे तोंड उघडले.

"कसली आगळ?" संभाजीराजांनी खोताला नजर दिली.

"वाडीच्या वाघोऱ्याच्या रानात ह्येनी शिकार क्येली. मायंदळ जनावरं पाडली. पर सरकारातनं ठरवून दिल्याली शिकारीची तक्षीम आम्हाला न्हाई पावती क्येली! शिकार करून ह्ये वाटा द्याया लागतो म्हून रानातनं गुपचूप पशार जालं." खोताने तक्रीर पेश केली. ती मजेदार होती. शिकारखेळ्यांनी केल्या शिकारीचा ठरलेला वाटा गावखोताला दिला नव्हता!

"आण्णाजीपंत, या शिकारीबाबीचा कानू काय?" संभाजीराजांनी विचारले.

"खोत म्हणतात ते सही आहे युवराज. सरकारी फडातून खोतास तसे अधिकार देण्यात आले आहेत. गुंजोटे आणि त्यांचे शिकारखेळे दोषी आहेत." आण्णाजींनी बरहुकूम कानुजाबता सांगितला.

"यासी सजा काय?" संभाजीराजांना औरंगाबादेतील 'त्या' शिकारीचा प्रसंग आठवला.

"दंड! शिकाऱ्यांनी सरकारी फडात दंड जमा केला पाहिजे. त्यातील तक्षीम गावखोतास तोडून दिली जाईल. जेवढी जनावरं शिकाऱ्यांनी पाडली असतील त्या हर जनावरामागं चार शिवराई दंड जमा करणं भाग आहे!"

शिकारखेळे दंडाची भाषा ऐकताच चळवळले. खोताचा चेहरा जरा उजळ झाला.

"खोत, तुम्ही कधी शिकारीची खेळी खेळता?" खोताच्या ध्यानी-मनी नसलेला प्रश्न संभाजीराजांनी त्याला विचारला.

"जी. खेळतो की!"

"मग त्यातील तक्षीम कधी वाडीच्या शिबंदीच्या सुभेदारांच्या हवाली करता?"

न्हाई धनी." खोताचा आवाज पडका झाला.

"तुम्ही शिकार खेळता. तुम्हांस ठावे असेल. उठवल्या रानाला अमुकच एक जनावर भेटेल याचा अंदाज नाही देता येत. या जोखमीच्या खेळीत कधी वाघरासारखं जनावर खेळ्यावर चालून आलं; त्यानं तो जाया झाला तर त्याची हकीकत पुसता?"

"न्हाई धनी." खोत गडबडला.

"कुणी वाघराची शिकार पाडली तर त्याच्या पाठीवर गावखोत म्हणून शाबासकीचा हात देता की त्यातही तक्षीमच मागता?"

"..." या प्रश्नाला खोताजवळ उत्तरच नव्हते!

"वाघासारख्या जनावराला हा जाबता लागू नाही युवराज." आण्णाजींनी खोताला पाठीशी घालण्यासाठी अदबीने कायदा पुढे केला.

" तेच म्हणतो आम्ही आण्णाजीपंत. शिकारखेळीला असे काटेकोर कानू लागत नाहीत. जोखमीचे जनावर अंगावर आले तर घरी ठाव घेतलेले हे खोत काही करणार नाहीत. खायचे जनावर पडले तर वाटा मागण्यास चुकायचे नाहीत! आम्ही – आम्ही या शिकारखेळ्यांवरील दंड माफ केला आहे!! "

" पण – पण युवराज कानूप्रमाणे ... "

" आण्णाजी ऽ, आम्ही दंड माफ केला आहे. ही आज्ञा आहे! " संभाजीराजांचा आवाज करडा झाला. मान ताठ झाली.

" जी. " आण्णाजी लपकन कमरेत झुकले.

" खोत. जातीचा शिकारी ' वाटा ' म्हणून आलेली शिकार कधी खात नाही हे ध्यानी ठेवा. गुंजोटे, जातीचा शिकारी ज्यांना ज्यांना शिकार झाल्याचे कळले त्यांना ' वाटा ' तोडून दिल्याखेरीज रानातून गुपचूप पळून जात नाही हे विसरू नका. आण्णाजीपंत, आम्ही आज्ञा केली ते मनी लावून घेऊ नका. थोरपणी आम्हास क्षमा करा. औरंगाबादेच्या रानात आम्ही वनगाईंची शिकार होताना डोळ्यांदेखत पाहिली. त्या खेळ्यांना दंड करणे तुम्हा-आम्हा कुणालाच साध्य न होणारे! त्या वेळी वनगाई समोर बघून हातीची हत्यारे तशीच खाली नेणाऱ्या आमच्या खेळ्यांचा आम्हास कोण अभिमान वाटला! यांना दंड माफ करताना वाटत नाही एवढा आनंद आम्हाला त्या खेळ्यांना मरातबानं बक्षिसी बहाल करताना वाटला असता! "

" खोत, आम्ही जातीनिशी तुमच्या रानात उतरू! शिकार खेळण्यासाठी – रानडुक्करांची! त्या वेळी आमच्या सोबतीला असा. पुरं जनावर वाहून वाडीत न्या. तुम्ही शिकार खा. वाडीच्या गावकऱ्यांच्या तोंडी घाला! "

' जगदंब – जगदंब '! संभाजीराजे थेट राजांच्यासारखे पुटपुटले. छातीच्या कवड्यांच्या माळेवर हातबोटे फिरवीत बैठकीवरून उठले. जगदीश्वराच्या दर्शनासाठी म्हणून अंत:पुराकडे चालू लागले. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीला साऱ्यांनीच मुजरे घातले. आण्णाजीपंतांच्या हातातील उपरण्याचे शेव मुठीत घट्ट आवळले गेले होते. युवराजांच्या राजदर्शनाने ते दिपून गेले होते. पण कथलेकऱ्यांसमोर झालेल्या करड्या आज्ञेने ते मनोमन कुठेतरी खोलवर दुखावले गेले होते!

गडावर कोसळणाऱ्या अखंड धारा थांबून थोडासा भांगा मिळताच पाचाडच्या वाड्याच्या सदरेवर घंटा ठणठणून उठत होती. ती ऐकताच असतील तेथून जोड घेऊन राजे आणि संभाजीराजे मावळमाचीवर जात होते. पावसाळी कुंद आकाश, पसरलेले भुरके पाणतुषार यांनी शे-दोनशे हातांपलीकडचे काहीच दिसत नव्हते. गूढ, धुकट दरीतून नुसता ' ठण ठण ' असा आवाज ऐकू येई.

त्याच्या रोखाने मावळमाचीवर राजे-संभाजीराजे यांचे मुजरे होत. दोघेही न बोलता

समोरच्या धुकट गडतळाकडे बराच वेळ बघत राहत. पावसाची सर धरू लागली की हुजरे पुढे येत. त्यांच्यावर छत्रे धरीत.

आठ-दहा दिवस असे गेले. जिजाऊ दिसत नव्हत्या. हैराण झालेले संभाजीराजे मावळमाचीवर उभे असता राजांना म्हणाले, " आबासाहेब, या घंटेच्या टोलांनी आम्हास राहवत नाही. आम्ही पाचाडात उतरावं म्हणतो. "

राजांना मासाहेब आणि संभाजीराजे यांचा काळीजमेळ माहीत होता. समोरच्या धुकटलेल्या गडतळाच्या रोखाने बघत ते म्हणाले, " कधी कधी तुमचा आम्हाला हेवा वाटतो. मनी उठणारे तुम्ही साफ बोलून जाता. आम्हाला ते बोलता येत नाही. जरूर उतरा पाचाडात. चार दिवस वाड्यातच मासाहेबांची सोबत करा. पुन्हा गडावर या. तुम्हाला मोहिमेचे कामकाज समजून घेणे आहे. शिकारखेळ्यांचे कथले निवाडी लावणे सोपे आहे. याहून कठीण बाबी मार्गी लावणे मुष्किल आहे! " पार दूर बघत असल्यासारखे राजे न दिसणाऱ्या पाचाडावर डोळे लावून बोलले.

" आमचं काही चुकलं कथल्याच्या निवाड्यात महाराजसाहेब? " संभाजीराजांनी नजर टाकली.

" नाही. कथल्यात नाही चुकलं. सदरी रिवाजात मात्र म्हटलं तर गफलत झाली तुमची. कथलेकऱ्यांसमोर आण्णाजींना आज्ञा करायला नको होती तुम्ही! "

राजांनी पाचाडच्या रोखाने बोट उठविले आणि ते मनाचा खोल कप्पा त्या बोटावर ठेवून म्हणाले, " त्या सदरेवरचे डोळ्यांना काहीच दिसत नाही तरी तुम्ही जाणता, आम्ही जाणतो तिथे मासाहेब आत्ता उभ्या आहेत. का? श्रद्धा म्हणून. मासाहेबही सुमार झालेल्या डोळ्यांनीसुद्धा स्पष्ट बघत असतील तुम्हा-आम्हाला तेथून. का? माया आहे म्हणून. हे ध्यानी ठेवा. माणसं श्रद्धा आणि मायेपोटीच एकमेकांस जान लावून असतात. प्रसंगी तो द्यायलाही राजी होतात. "

ते धारेसारखे बोल संभाजीराजे ऐकत राहिले. त्यांना वाटले कोसळत्या आकाशासारखे हे बोल अखंड वर्षतच राहावेत.

" आमचं चुकलं. इथून जाताच आम्ही आण्णाजींची गाठी घेऊ. त्यांची क्षमा मागू. " संभाजीराजांचे उभारीचे मन राजांच्यासाठी आदराने भरून आले होते.

" नको. ती दुसरी चूक होईल! तुम्ही युवराज आहात. " राजे गडबडीने म्हणाले.

" ध्यानी ठेवा. राजांना चूक करता येत नाही! आणि केल्या चुकीला सफाईही देता येत नाही! चला. पाचाडात उतरण्याच्या तयारीला लागा. " राजांनी त्यांच्या खांद्यावर हात ठेवला.

जिजाऊंच्या दर्शनासाठी पडत्या पावसातून संभाजीराजे पाचाडात उतरले होते. अंगाबाहेर वाटावा असा शालू नेसलेल्या येसूबाई पुतळाबाईंच्या महालासमोरच्या

सफेलीत येऊन उभ्या राहिल्या होत्या. त्यांना समोरच्या चौकातील पाटात फिरविलेले पाणी दिसत होते. पावसाने ते आता गदळ झाले होते.

थोडा वेळ येसूबाई त्या पाटाकडे बघत राहिल्या. सातमहालातील पुतळाबाईंच्या महाली वावरताना घडलेले अनेक प्रसंग त्यांच्या मनात पाटासारखे फिरले. पाचाडात मासाहेबांच्या सोबतीला जाताना मामीसाहेब – पुतळाबाई त्यांना दोन-तीन वेळा बजावून गेल्या होत्या – "थोरल्या बाईसाहेबांचे नुसते ऐकत चला. त्यांना जाबसाल करू नका. धाराऊस पाठीशी ठेवूनच त्यांच्या भेटीस जाणे करा. हा महाल आमचा नव्हे. आता तुमचा आहे!"

रायगड चढताना गंगासागर तलाव बघताच येसूबाईंनी मनोमन ठरवून टाकले होते, "या तलावासारखे झाले पाहिजे. कानी पडेल ते ते पोटी ठेवले पाहिजे!"

त्या विचाराबरोबर येसूबाईंची नजर पाण्याच्या पाटावरून उठली आणि सफेलीच्या दगडी भिंतीला भिडली. तिच्या पायथ्याजवळून चाललेल्या मुंग्यांच्या रांगेतील थरथऱ्या देवमुंग्या त्यांच्या पायांवर चढल्या! त्यांनी फरसबंदीवर पाय झटकून त्या हटवल्या.

एकमागात अंगापेक्षा मोठे कसलेतरी पांढरे कण घेऊन धावणाऱ्या मुंग्यांच्या रांगेकडे येसूबाई एकरोख बघत राहिल्या. त्यांच्या पायांच्या हालचालीने झालेला थोडासा गैरमेळ मुंग्यांनी पुन्हा जमवून घेतला.

रामराजांशी बोबड्या बोलात बोलून सोयराबाईंच्या महालातून बाहेर पडलेले आबासाहेब आपल्या पाठीशी येऊन उभे आहेत याचे येसूबाईंना भान नव्हते!

राजेही त्या कष्टाळू, लहान्या जीवांची धडपड बघत तसेच थांबले होते.

"बघितलंत सूनबाई, एवढासा जीव पण वकुबापेक्षाही केवढा भार वाहून नेतो आहे!" राजे शांतपणे बोलले.

त्या आवाजाने येसूबाई मात्र गडबडल्या. झटकन त्या तळहातात पदराचा शेव घेऊन नमस्कारासाठी झुकू लागल्या. त्यांना थोपवून वर घेत राजे म्हणाले, "असू दे."

खालमानेने उभ्या असलेल्या येसूबाईंच्या कपाळीच्या मेणमळल्या आडव्या कुंकूबोटात राजांची नजर क्षणभर स्थिरावली. आणि कारण नसता त्या बोटांनी खोलवर रुजलेली सईबाईंची सय उमळून आली.

"यांना बघायला, यांच्या मस्तकी आशीर्वादाचा हात ठेवायला त्या हव्या होत्या." अनेक विचारांची मुंग्यासारखी एक रांग राजांच्या मनी चरत गेली. तिचा माग घेत गंभीर झालेले राजे संथ पावलांनी चालू लागले.

त्यांना तसे चालताना बघून येसूबाईंना आपल्या आबांचा – पिलाजींचा – आठव झाला. क्षणापूर्वी राजे म्हणाले तेच बोल प्रत्यक्ष आपले आबाच घोगऱ्या आवाजात आपल्या कानांत सांगताहेत असे येसूबाईंना वाटले – "एवढासा जीव पर वकुबापरास केवढा भार वाहून नेतोय!"

जगदीश्वराचे दर्शन घेऊन जोत्याजी केसरकरासह खासेमहालात परतलेल्या संभाजीराजांना खिदमतगाराने आत येऊन वर्दी दिली, "मुतालिक महादेव यमाजी भेटीची आज्ञा मागतात."

"पेश येऊ द्या." युवराजांनी त्याला इजाजत दिली.

प्रौढ वयाचे महादेव यमाजी उपरणे सावरीत महालात आले. पगडी झुकवीत त्यांनी मुजरा रुजू घातला. नजर युवराजांच्या पायांवर ठेवून ते म्हणाले, "थोरल्या स्वामींनी युवराजांना आपल्या सदरेशी याद फर्मावलं आहे."

महादेव यमाजींना पुढे ठेवून जोत्याजींसह संभाजीराजे तसेच महालाबाहेर पडले.

राजांच्या वाड्याची सदर आली. तिच्या दोन्ही तर्फांना मोरोपंत, आण्णाजी, दत्ताजी त्रिमल, बाळाजी हात बांधून अदब धरून उभे होते. राजांच्या पाठीशी विश्वासू हुजऱ्या खंडोजी दाभाडे कमरेच्या हत्यारांवर मूठ देऊन खडा होता. युवराजांना बघताच त्या साऱ्यांचे मुजरे झाले.

"या." संभाजीराजांना बघून राजे म्हणाले.

राजे बसलेल्या बैठकीच्या समोर येत युवराजांनी त्रिवार अदब मुजरा रुजू घातला.

"या." यांची ओळख करून घ्या." राजांनी समोर उभ्या असलेल्या भगव्या कफनीधारी, तेजस्वी गोसाव्याकडे हाताचा इशारा दिला.

राजांच्या बैठकीच्या खालगत पायरीत्रजा बिछायतीवर संभाजीराजे बसले.

"हे समर्थांचे शिष्य. दिवाकर गोसावी." राजांनी संन्याशाची ओळख दिली.

दंड, मनगटात रुद्राक्षांची टपटपीत कडी आवळलेले, दाढीधारी, सतेज दिवाकर गोसावी हातातील दंड तसाच धरून नमस्कारासाठी किंचित झुकले.

"आणि हे आमचे फर्जंद युवराज संभाजीराजे." राजांनी युवराजांच्या खांद्यावर हाताची बोटे ठेवीत दिवाकर गोसाव्यांना त्यांचा परिचय दिला.

"रघुकृपा!" दिवाकर पुटपुटले.

संभाजीराजांनी उठून त्यांना नमस्कार दिला.

"बोला दिवाकरपंत, काय धरून येणं झालं?" राजांनी गोसाव्यांच्या कपाळीचे भस्मपट्टे निरखले.

"गुरुदेवांचा मुक्काम कोडोली पारसगावात आहे. आपल्या भेटीची ते इच्छा करतात. आपल्यासाठी त्यांनी पत्र दिले आहे." दिवाकरांचा आवाज हनुमानाच्या मंदिरातील घाटेसारखा होता. त्यांनी खांद्याची झोळी पोटाशी घेत तिच्यातून पत्राची वळी बाहेर काढली. पुढे येत वाकून ती राजांच्या हाती दिली.

हाती घेतलेली वळी मिटत्या डोळ्यांनी राजांनी आपल्या कपाळीच्या शिवगंधाला भिडविली. ती वाचण्यास तशीच बाळाजींच्या हाती द्यावी म्हणून एकदा बाळाजींच्याकडे

नजर टाकली. आणि त्यांना काय वाटलं कुणास ठाऊक, ती मागे हटलेल्या दिवाकरांच्याच रोखाने पुन्हा धरीत राजे म्हणाले, "समर्थांचे बोल समर्थशिष्यांच्या तोंडून ऐकावे असं आम्हास वाटतं."

"जशी राम इच्छा!" म्हणत दिवाकर पुन्हा पुढे झाले. झुकून त्यांनी राजांच्या हातून पत्राची वळी आपल्या हाती घेतली. त्या पत्रात काय आहे ते खुद्द दिवाकर गोसाव्यांनाही माहीत नव्हते.

चौदा वर्षांपूर्वी एकदा राजगडावर दुसऱ्या एका समर्थ शिष्याची – भास्कर गोसाव्यांची – राजांशी भेट झाली होती. त्या भेटीत राजांनी त्यांना विचारले होते की, "तुमचे गुरू कोण? कुठले? कोठे राहतात?" भास्कर गोसाव्यांनी त्यांच्या गुरूंचा महिमा त्या वेळी सांगितला होता, पण त्याउपर राजकारणाच्या घाईगर्दीत राजांना समर्थांचा परामर्श घेणे जमले नव्हते. आज समर्थांनी आपणहून त्यांना पत्र धाडले होते. निर्हेतुक. राजांचे चढत्या शिगेचे पराक्रम ऐकून जे वाटले ते रसाळ रामबोलीत समर्थांनी पत्रात उतरविले होते.

"जय जय रघुवीर समर्थ" पत्र वाचण्यापूर्वी दिवाकरांनी नामस्मरण केले. तासावर ठणठणीत टोल उठावेत तसे दिवाकर गोसाव्यांच्या तोंडून समर्थांचे सूर्यबोल सर्वांच्या कानी पडू लागले :

"निश्चयाचा महामेरू। बहुतजनांस आधारू
अखंड स्थितीचा निर्धारू! श्रीमंत योगी॥
परोपकाराचिया राशी। उदंड घडती जयाशी
तयाचे गुणमहत्त्वाशी। तुळणा कैशी?
नरपति, हयपति। गजपति, गडपति
पुरंधर आणि शक्ति। पृष्ठभागी॥
येशवंत, कीर्तिवंत। सामर्थ्यवंत, वरदवंत
पुण्यवंत आणि जयवंत। जाणता राजा॥
आचारशील, विचारशील। दानशील, धर्मशील
सर्वज्ञपणे सुशील। सर्वांठायी॥
धीर, उदार, सुंदर। शूर क्रियेसी तत्पर
सावधपणेसी नृपवर। तुच्छ केले॥
तीर्थक्षेत्रे ती मोडिली। ब्राह्मणस्थाने बिघडली
सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला॥
देवधर्म, गोब्राह्मण। करावयासी रक्षण
हृदयस्थ झाला नारायण। प्रेरणा केली॥

उदंड पंडित, पुराणिक। कवीश्वर, याज्ञिक, वैदिक
धूर्त, तार्किक, सभानायक। तुमचे ठायी॥
या भूमंडळाचे ठायी। धर्म रक्षी ऐसा नाही।
महाराष्ट्र धर्म राहिला काही। तुम्हा करिता॥

गावोगाव भ्रमंती करताना डोळांदेखत लोकांचे नरकहाल बघणारे दिवाकर गोसावी भरून आले. त्यांच्या डोळ्यांतून झरलेली आसवे दाढीवर उतरली. वाचन खुंटले.

सारे कानांचे ओठ करून ते अमृतबोल प्राशीत होते. नाकाचा गड्डा चिमटीत धरून मिटल्या डोळ्यांनी राजे विचारात गेले होते – "कसे दिसत असतील समर्थ? हृदयस्थ झाला नारायण! श्रीमंत योगी! योग? केवढा दूरचा पल्ला! खर्ची पडलेला आमचा हर मोहरा योगी झाला! आम्ही त्यांच्या योगीपणाचा भार खांद्यावर घेऊन वाहतो आहोत! आम्ही भारवाहक! महाराष्ट्र धर्म! पृथ्वी आंदोळली!" जिथं तारे संपतात तिथं जाऊन राजे पोचले होते! खोल – खोल. दूर – दूर.

दिवाकरांच्या बोलाबोलांनी आजवर सापडत नव्हते ते सारे मनात अडखळलेले महाराजसाहेब संभाजीराजांना मूर्तिमंत गवसत होते – 'निश्चयाचा महामेरू!' महामेरू! केशवपंडितांनी रामायणाच्या पठणात सांगितलेला सर्वांत उंच पर्वत! या रायगडाहून दशगुणी उंच! तेवढा निश्चय! आम्याच्या दरबारात 'कभी नहीं' म्हणताना पेटून उठलेला! आम्ही प्रत्यक्ष पाहिलेला! निश्चयाचा महामेरू!

बहुतजनांस आधारू! 'आमच्या मावळ्यास हातजोड देऊन बसल्यास उठता, उठत्यास चालता आणि चालत्यास दौडता केला पाहिजे' म्हणणारा! – आधारू! म्हाताऱ्या हैबतबाच्या खांद्यावर हात ठेवीत – 'बाबा जे मनी आले ते आम्हास बोलले पाहिजे' म्हणणारा आधारू!

धीर, उदार, सुंदर! होय अतिसुंदर! एका रात्री आई जगदंबा स्वप्नात आली तेव्हा "जाऊ नको, थांब" म्हणत विस्कटल्या केसांनी, घामेजल्या, थरथरत्या चेहऱ्याने, फुलल्या डोळ्यांनी आम्हाला बघताना दिसलेला तो सुंदर चेहरा! "ल्येकरा घात झाला!" म्हणत आम्याच्या डेऱ्यात आम्हाला मिठीत घेताना दिसलेली ती सुंदर मुद्रा!

कीर्तिवंत, येशवंत, सामर्थ्यवंत, पुण्यवंत, वरदवंत, जयवंत – पाचाडच्या सदरेवरची घाट घणघणावी तसे ते रामबोल संभाजीराजांच्या कानामनात घुमू लागले. आचारशील, विचारशील, दानशील, धर्मशील, सुशील –

सावचित्त झालेले दिवाकर पुढे आणखी काही वाचणार तोच संभाजीराजे म्हणाले, "थांबावं! गोसावी, तो महाराष्ट्र धर्माचा काव्यबोल आणखी एकवार ऐकवा." संभाजीराजांच्यातील कवी आणि राजपुत्र दोन्हीही तवाने झाले होते.

"या भूमंडळाचे ठायी। धर्म रक्षी ऐसा नाही
महाराष्ट्र धर्म राहिला काही। तुम्हांकरिता।"

दिवाकर वाचू लागले. राजांचे मिटले डोळे तसेच होते. संभाजीराजांचे टवकार कान अधिक टवकार झाले.

“ आणखी काही धर्म चालती। श्रीमंत होऊन कित्येक असती
धन्य धन्य तुमची कीर्ति। विस्तारली॥
तुमचे देशी वास्तव्य केले। परंतु वर्तमान नाही घेतले
ऋणानुबंधे विस्मरण जाहले। बा काय नेणू ?
उदंड राजकारण तटले। तेथ चित्त विभागले
प्रसंग नसता लिहिले। क्षमा केली पाहिजे॥ ”

शेवटची ओवी कानी पडताच राजांनी खाडकन डोळे उघडले! क्षणभर त्यांना दिवाकराऐवजी समर्थच समोर आहेत की काय असा भास झाला!

संभाजीराजांचे डोळे मात्र आपोआप मिटले गेले होते. आपल्या आबासाहेबांची असंख्य गोमटी रूपे ते ऐकल्या शब्दांशी ताडून बघण्यात गढले होते.

बागलाण मारून परतलेली मोरोपंतांची फौज महाडात ठाण धरून होती. राजांनी पेशवे मोरोपंतांना रायगडी पाचारण केले.

पावसाळा तोंडाशी आला की मराठी घोडी पागेत लीद टाकीत चंदी चघळतात हा साऱ्याच शेजारी गनिमांचा अनुभव होता.

राजांना या गाफिलीचा पुरता लाभ उठवायचा होता.

मोरोपंतांची फत्तेबाज फौज, खासा युवराज संभाजीराजांच्या दिमतीला जोडून घोडी जव्हार-रामनगर या गुजरात सीमेवरच्या कोळी राज्यांवर उतरविण्याचा चुनेगच्च मनसुबा राजांनी बांधला!

संभाजीराजांची ही पहिली मोहीम! पावसाळा तोंडावर धरून! भोसल्यांचे ‘ राजेपण ’ असेच उन्हा-पावसात सुलाखून निघावे लागते.

सदरी दाखल झालेल्या मोरोपंतांना राजांनी बेत खुला केला, “ पंत, युवराजांच्या पाठीशी राहून तुमच्या फौजेनिशी जव्हार-रामनगर मारून चालविणे. खासा आम्ही मोहिमेत आहोत हा भाव युवराजांशी ठेवणे. नदी नाले आड येतील ते पार करावया नौका, हत्ती, पोहणीस कसबी कोळी, भोई दिमतीस घेणे. पाऊस जोर धरतो तरी हिमतीने मोहीम चालती ठेवणे. युवराजांची ही पहिली हत्यारी चाल, फत्तेमुबारकीने कार्यी लावणे.”

युवराज संभाजीराजे आणि मोरोपंत यांना राजांनी मानवस्त्रे बहाल केली. मोहिमेचा मोहरा जोडून दिला.

रायगडच्या देवमहालातील, अंगावर धावून आल्यागत दिसणाऱ्या आवेशी जगदंबेच्या मूर्तीवर संभाजीराजांनी बेलभरली ओंजळ उधळली. भंडाऱ्याची मूठ चरणांवर

सोडली. डोळे जोडून आईच्या पेटत्या डोळ्यांतील आग क्षणभर निरखली. आपसुखच संभाजीराजांचे गुडघे फरसबंदीवर टेकले. आपले टोपधारी मस्तक त्यांनी आदिशक्तीच्या समोर फरसबंदीला भिडविले.

त्यांच्या मिटल्या डोळ्यांना न कळणारे दृश्य दिसले— आईच्या आठी हातांचा मिळून एकच थोर हात झाला आहे! प्रतापगडी नाचविला त्याहून थोर— राव तान्हाजी पडले त्या रात्री कोंढाण्याच्या कड्यावर उसळला त्याहून केवढातरी थोर पोत खुद्द आईच त्या हाताने आमच्या हाती देते आहे! तो पेलता घेण्यासाठी आमचे हात लहाने वाटताहेत! त्याच्या दिपवत्या उजेडात आमचे आम्हीच दिसेनासे झालो आहोत!

“ उदं-उदं.” कळवळती भाक घालण्यासाठी त्यांचे ओठ पुटपुटले.

उठविले मस्तक त्यांनी पाठीशी उभ्या असलेल्या राजांच्या पायांवर ठेवले.

“ उठा, येशवंत असा. पडल्या मुक्कामावरून खबरगीर धाडा. पंतांच्या मसलतीने चला.” राजांनी त्यांचे खांदे-हात पकडीत घट्ट धरले. आज संभाजीराजे मोहिमशीर होण्यासाठी गड उतरणार होते. राजे जातीने महाडपर्यंत त्यांची सोबत करणार होते.

युवराजांनी आऊवशाकडे जाऊन आशीर्वाद घेतले. धाराऊच्या पुढे राहून तबक फिरविणाऱ्या येसूबाईंच्या तबकातील ज्योतीकडे बघून— “ निघतो आम्ही.” म्हणत निरोप घेतला.

ते शब्द ऐकताना येसूबाईंना वाटले— मान उठवावी आणि मिळाला तर टोपाखालचा शिवगंधाचा जोडपट्टा निसटत्या नजरेने बघून घ्यावा! पण ते घडले नाही.

त्यांच्या पाठीशी असलेल्या धाराऊने मनोमन कापूरव्होळाच्या ‘ म्हादेवाला ’ साकडे घातले— “ संबू म्हादेवा, ल्येकरू पयल्या डाव गर्दीत उतारतंय. येसूसरी कर त्येला! ”

संभाजीराजांनी धाराऊची पायधूळ मस्तकी घेतली. बालेकिल्ल्याच्या सदरी जोत्यावर सिद्ध असलेल्या मोरोपंत, रूपाजी भोसले, खंडोजी जगताप यांच्याशी राजे, रायाजी, अंतोजी, जोत्याजी यांच्या सोबतीने संभाजीराजांचा मेळ पडला.

साऱ्यांनी बेलफुले वाहून गडदेव जगदीश्वराचे दर्शन घेतले. मंडळी गडउताराला लागली. मनोरे, गंगासागर तलाव मागे पडला. गडमुखासारखा असलेला महादरवाजा समोर आला. खांद्याच्या इतमामासाठी त्यावरची नौबत दुडदुडू लागली.

लहाना दरवाजा आणि बगीचा मागे टाकीत सारे पाचाडच्या वाड्यात आले. सदरेवरची घंटा आणि आत जिजाऊसाहेब असल्याने तो वाडा मंदिरासारखाच झाला होता.

राजे, मोरोपंत सदरेवर थांबले. अंतोजी, रायाजीसह संभाजीराजे वाड्याच्या खासेमहालात गेले. तिथे जिजाऊ, पुतळाबाई त्यांची वाट बघत होत्या. युवराजांनी त्यांचे पाय शिवून धूळ घेतली. त्यांना घेऊन जिजाऊ, पुतळाबाई वाड्याच्या देवमहालात आल्या. देवीचे दर्शन झाले.

विचारात गेलेल्या जिजाऊ म्हणाल्या, "तुमच्या एवढ्याच उमरीचे असताना तुमचे महाराजसाहेब तोरण्याला भिडले होते. यश घेऊन आले होते. आम्हास भरोसा आहे तुम्ही तसेच कराल!"

पाचाडात थाळे झाले. राजे-संभाजीराजे वाड्याबाहेर जायला निघाले. सदरेवर येताच कुणीतरी खेचल्यासारखे संभाजीराजे तुळईला टांगलेल्या घंटेखाली आले. समोर दिसणाऱ्या कृष्णकमळासारख्या रायगडाच्या मावळतीला माचीला त्यांचे डोळे भिडले. तेथून दुरून का होईना आऊसाहेबांचे दर्शन घडत होते. आता परतेपर्यंत काही ते घडणार नव्हते. पाठीशी उभ्या असलेल्या जिजाऊंची मूरत त्यांनी गर्रकन समोर होऊन डोळ्यांत भरून घेतली.

"येतो आम्ही." त्यांनी जिजाऊंचा निरोप घेतला.

सारे पाचाडच्या वाड्याबाहेर पडले. बाहेर जिन कसून दौडीची घोडी मोतद्दारांनी धरली होती. त्यावर मांडा जमल्या. राजे-संभाजीराजे महाडच्या रोखाने दौडू लागले. आभाळात भुर्के ढग लटकून होते. गर्मीने अंगी घामाच्या धारा धरू लागल्या.

महाड हे लष्करी पागेचे ठाणे आले. पंतांच्या माणसांनी बांधलेली दहा हजार कडव्या स्वारांची फौज कूचासाठी सज्ज होती. तिच्या आघाडीला हौदा घातलेला जंगी हत्ती तयार होता.

उन्हे कलती घेईपर्यंत राजांनी महाडात बांधविलेल्या वाड्यात विसावा झाला.

दिवस प्रहरभर ठेवून फौजेतील चौघडे झडू लागले.

पाच हजार मांड घेतल्या घोडाईतांचे पथक मोरोपंतांनी हत्तीच्या पुढे काढले. आता हत्ती घोडदळ आणि पायदळ यांच्या मध्ये आला.

संभाजीराजांना घेऊन राजे महाडच्या वाड्याबाहेर पडले. मध्यभागीच्या हौदावान हत्तीजवळ आले. माहुताने अंकुशमार देऊन स्वारीचे ते थोर जनावर बसते केले.

राजांच्या सामने गुडघे टेकून आपले मस्तक त्यांच्या पायांवर ठेवताना संभाजीराजांना फरक कळला. शाही फर्मानाच्या धूळमाखल्या उंटासमोर गुडघे टेकण्यातील आणि सजल्या सेनेत महाराजसाहेबांसमोर गुडघे टेकण्यातील!

त्यांना उठवून छातीशी घेत राजे म्हणाले, "सांभाळून असा. कधीतरी होळीसणाला तुम्ही विचारलं होतंत – 'आबासाहेब, तुम्ही काढाल जळत्या हुडव्यातील नारळ बाहेर?'' आज आम्हीच विचारतो आहोत – तुम्ही तो काढाल काय?"

"जी. कोशिस करू." संभाजीराजांच्या तोंडून सहज जाब सुटला.

"या; जय भवानी!" राजांचे डोळे लखलखले.

"जय भवानी." संभाजीराजांनी त्या लखलखीला साद दिला.

हत्तीला शिडी लागली. ती पार करीत संभाजीराजे हौद्यात चढले. पाठोपाठ सेनेवर

नजर ठेवण्यासाठी मोरोपंत चढले. रूपाजी भोसले, रायाजी, अंतोजी गाडे, खंडोजी जगताप, मोरेश्वर नागनाथ यांनी हत्तीला आपल्या घोड्यांचे कडे टाकले.

निशाणबारदारांनी निशाणी काठ्या वर घेतल्या. शिंगाड्यांनी शिंगांच्या ललकाऱ्या घुमविल्या. चौघडे दुडदुडले. घोडदळाने कदमबाज चाल धरली.

चालला! शिवाचा वरदहस्त घेऊन शंभो चालला! त्याच्या पिछाडी-आघाडीने दहा हजार जानकुर्बान मावळा चालला.

युवराजांची चालती फौज नजरेआड होईपर्यंत राजे आपल्या माणसांनिशी ती बघत राहिले. कुणाच्या तोंडून ऐकलेले, केव्हा ऐकलेले ते राजांना नीट आठवेना – पण तेवढे त्यांना आठवले – "हे गडकोटावर राहतील, प्रलय-तांडव माजवतील!!"

□ □ □

६

मजल दरमजल मागे पडली. झाडीत अर्धवट दडलेले जव्हार नजरटप्प्यात आले.

हौद्यात पाठीशी बसलेले मोरोपंत संभाजीराजांच्या कानाशी झुकले. जव्हारच्या विक्रमशहाच्या, झाडीतून उठलेल्या वाड्याच्या कळसाकडे तर्जनी रोखत अदबीने पुटपुटले, " जव्हार-कोळीराजा विक्रमशहाची राजधानी!"

ते ऐकताच संभाजीराजे हौद्यातील बैठकीवरून ताडकन् उठले. वाड्याच्या कळसाचा त्यांनी रोख घेतला. त्यांच्या छातीत धडका घेत काहीतरी सरसरले. राजांची भुवई घेत होती तसा त्यांच्या उजव्या भुवईने कमानी बाक घेतला. क्षणात कमरेचे हत्यार उपसून त्यांनी त्याचे टोक जव्हारवर रोखत रणघोष दिला – " हर ऽ हर ऽ महादेव!"

त्या रणघोषाला आघाडी-पिछाडीकडून किलकाऱ्यांचे हजारो कोंब फुटले – " हर ऽ हर ऽ महादेव!"

खड्या ठाकलेल्या मोरोपंतांनी घोडदळाच्या अधिकाऱ्यांची नावे भराभर गर्जत आज्ञा फेकल्या – " वस्तीस चौतर्फेनं घोडाइतांचा घेर टाका. शाजणे, ढोलांचा कालवा उठवा. दोनांस एक असा घोडा आणि पाऊलेकांचा मेळ पाडा. बोला हर ऽ हर ऽ महादेव!"

सुरतेपासून अवघ्या पंचवीस कोसांवर असलेल्या जव्हारला संभाजीराजांच्या झडप्या घोडदळाने क्षणात येरगाटले.

वाटेत दस्त केलेले काळेकभिन्न लंगोटीबाज कोळी मराठ्यांनी धाक देऊन घोड्यांवर चढविले. त्यांना तोंडाशी ठेवून मराठ्यांची एक घोडेतुकडी जव्हारात दौडत घुसली.

पुढचे कोळी, कोळीभाषेत ओरडत दौडू लागले – " मराठे आले! खुद्द शिवाजीचा फर्जंद संभूराजे दाबजोर फौज घेऊन चालून येतो आहे! पळा!"

साऱ्या जव्हारभर आवयांचे रान उठले. आत घुसलेली दौडती घोडेतुकडी आपले काम करून दुसऱ्या बाजूने बाहेर पडली.

भरतीचा दर्याच चालून येतो आहे की काय हे भांबावल्या कोळ्यांना कळेना! हाहाकार उडाला. त्याचा फायदा उठवीत, भाले आणि ढाला-तेगी पेलून ' जय-भवानी ' गर्जत पाच हजारी मावळी-पायदळ चहूवाटांनी जव्हारात घुसले. हत्यारे भिडली.

कोळ्यांचा हाय खाल्लेला राजा विक्रमशहा, निवडक कोळी संगती घेऊन आपल्या

वाड्यातून बाहेर पडला. आपली प्रजा मराठ्यांच्या टापांखाली मरणाला सोडून तो दौडू लागला नासिकच्या रोखाने! मोगलांच्या पंखाखाली गुलशनाबादेत आसरा घ्यायला!

राजा पळाला! जव्हार बेवारस झाले. मनचाहा लुटीला तोंड फुटले. सोने, चांदी, मोती; अफाट संपत्ती लुटीला लागली.

गळ्यातील चंदेरी घाट घुमवीत संभाजीराजांचा हत्ती जव्हारात घुसला. त्यांना बघून चेतावलेले मावळे लुटीचे डाग चटक्या पावलांनी उचलून नगराबाहेर काढू लागले.

एक फेर टाकून संभाजीराजे जव्हारच्या मावळतीला झाले. डेरे, शामियानाच्या तणावा ताणल्या गेल्या. तळ सज्ज झाला.

मांडलेल्या चौथऱ्यासारख्या बैठकीवर संभाजीराजे बसले. याच खंबायती मुलुखफाट्यात एकदा नव्हे दोनदा राजांनी सुरत लुटली होती. तेथून केवळ पंचवीस कोसांवरचे ते आभाळ आज जव्हार लुटलेले बघत होते; शिवाजीराजांच्या पुत्राकडून!

सोने, रूपे, चांदी, मोती यांची रास प्रतवारीने संभाजीराजांच्या समोर मांडण्यात आली. सतरा लक्ष रुपयांच्या वस्तभावाची रास पडली.

लुटीला निकराचा विरोध करणारे, काढण्यांनी मुसक्या आवळलेले धिप्पाड कोळी कैदी संभाजीराजांच्यासमोर पेश करण्यात आले. बंदिस्त असले तरी मोठ्या गुर्मीत ते मिळेल ती सजा भोगायला मन बांधून तयार होते.

फत्ते-खुशीच्या, राजांना लिहिलेल्या, मोरोपंतांनी पुढे केलेल्या पत्रावर संभाजीराजांनी दस्तुराचे शिक्के केले. पत्रथैली खबरगिराच्या सुपूर्द करण्यात आली.

" युवराजांनी दस्त झाल्या कैद्यांच्या सजेचा करिणा द्यावा." कैद्यांच्या रोखाने हात करीत मोरोपंत अदबीने म्हणाले.

संभाजीराजांनी कैद्यांच्यावरून एकदा नजर फिरविली. काही झाले तरी ते आपल्या मुलुखाच्या आबादानीसाठी प्राणबाजीने झुंजले होते. संभाजीराजांचा हात छातीवरच्या कवड्यांना भिडला. कपाळीच्या शिवगंधाचे पट्टे आक्रसले. शांत, धीरगंभीरपणे ते म्हणाले, " पंत, यांतील जे आपल्या फौजेकडे चाकरीस राजी असतील तयांस रुजू करून घ्या. जे नसतील त्यांच्या काढण्या उतरून त्यांस इतमामाने परते पाठवून द्या."

" जी. जशी आज्ञा." मोरोपंत आश्चर्याने कमरेत झुकले. युवराजांची आज्ञा इतकी पोक्त पडेल याचा त्यांना कयास नव्हता.

जव्हारचा तळ हलला. मिळाली लूट पहाऱ्यात रायगडच्या वाटेला लावण्यात आली. युवराजांची फौज रामनगरवर मोहरा धरून पुढे सरकू लागली.

रामनगर दोन मजलांवर ठेवून मराठी सेनेचा तळ पडला. रामनगर तर सुरतेच्या दक्षिणेला अवघ्या पंधरा कोसांवर!

मसलत देण्यासाठी मोरोपंत युवराजांच्या डेऱ्यात आले. आत रायाजी, अंतोजी ही युवराजांची खास माणसे होती.

"युवराज, रामनगरवर चाल धरली तर सुरतेची मोगली ठाणी त्यांना कुमक करणार." मुजरा देत पंत म्हणाले.

"त्यासाठीच सुरत आपल्या धाकात राहील असे केले पाहिजे." संभाजीराजे त्याच विचाराला धरून बोलले.

"तो धाक बसण्यासाठी रामनगरवर जाण्यापूर्वी एकदा घोडदळ सुरतेच्या भवत्यानं दौडवून आणावं असं आम्हास वाटतं." मोरोपंतांनी मसलत पेश केली.

खंडोजी जगताप आणि रूपाजी भोसले यांना ती मनोमन पटली.

ती ऐकून संभाजीराजे विचारात गेले. पावसाळ्याचा नेम सांगण्यासारखा नसताना कुठल्याही कारणासाठी फौजेच्या दोन फळ्या पडणे कार्यी लावणारे नव्हते.

"आम्हाला वाटतं, सुरतेच्या सुभेदारास थेट खलिता धाडावा. त्याच्याकडेच खंडणीची मागणी करावी. जातीनिशी आबासाहेब या तळावर आहेत असा भास त्याला द्यावा. सुरतेत खबरगिर पेरून त्यांच्याकरवी अशीच भूमका उठवावी. सुरतकर आपल्या रक्षणासाठी जागीच अडकून पडतील." पंतांच्यासह सारेच युवराजांकडे बघतच राहिले. ही चाल बिनतोड होती. साऱ्यांनाच ती पटली.

"चार लक्ष रुपये खंडणीदाखल भरणा करा, नाहीतर शिवाजीराजे सैन्यासह सुरतेवर चालून येतील" असा जरबेचा खलिता पंतांनी सुरतेच्या सुभेदाराला धाडला. त्या थैलीस्वाराबरोबरच चलाख खबरे सुरतेत घुसले. सुरतेत हाहाकार उडाला!

ही वेळच रामनगरवर चालून जाण्याची होती. पण नासिक-बागलाणकडून विक्रमशहा आणि दिलेरखान आपल्या फौजेची प्रचंड जमवाजमव करीत असल्याच्या खबरा आल्या आणि त्यातच पावसाला सूर लागला.

रामनगरजवळ आलेल्या संभाजीराजांच्या फौजेने सुरक्षित जागेपर्यंत माघार घेतली. गुजराथी पावसात मावळी डेऱ्यांच्या कनाती भिजू लागल्या.

पावसाने पंधरवडा खेळविला. तापल्या घोड्यांची पाठवाने पाणधारांनी निवांत झाली. मोरोपंतांनी आणखी दोन पत्रे सुरतेच्या सुभेदाराला धाडून आपण खंबायतातच ठाण धरून आहोत याची जाण दिली!

पावसाने भांगा देताच मराठी फौजेने पुन्हा रामनगरचा मोहरा धरला. "मराठे आलेत!" हे ऐकून धास्त घेतलेला रामनगरचा सोमशहा केव्हाच पळाला होता! कबिल्यासह तो सुरतभागात गणदेवीजवळ चिखली येथे ठाण धरून होता.

राजा नसलेल्या जव्हारची जी झाली तीच गत रामनगरची झाली. पावसाने झोडपून काढलेले रामनगर संभाजीराजांच्या धारकऱ्यांनी लुटून काढले!

तिकडे सुरतेत, शिवाजीच्या सेनेचा थोपा करण्याचे निमित्त धरून औरंगजेबाचा अक्लमंद सुभेदार आपल्याच रयतेकडून पैसे उकळण्याची अजब तेगबाजी नेकीने पार पाडीत होता!

रामनगरच्या लुटीच्या गोणी मोहोरबंद करण्यात आल्या. पडल्या तळावर संभाजीराजांनी जखमदरबार भरविला. दोन्ही चालींत मर्दानगी केलेल्या असामींना तोडे, कडी, मोहरा, वस्त्रे बहाल करण्यात आली. देखण्या संभाजीराजांना प्रत्यक्ष तळावर बघून मावळे धारकरी अभिमानाने भरून येत होते. पेटत्या आगट्यांभोवती फेर टाकून शेक घेताना त्यांची युवराजांबद्दल भरल्या जबानीने बातचीत होत होती.

रूपाजी, रायाजी, अंतोजी आणि धाडसी शिकारखेळे बरोबर घेऊन संभाजीराजे रामनगरच्या रानात एकदा दिवसा शिकारीलाही उतरले. हाका घालून उठविलेल्या कळपातील काळी जनावरे त्यांनी हत्तीवरच्या हौद्यातून बंदुकीचे बार टाकून लोळविली. पडली रानसावजे काठ्यांना टांगून तळावर आणण्यात आली. गळाठलेल्या धारकऱ्यांना झणझणीत सागुतीचा तवाना भोग मिळाला!

सुरतेला झुलवीत ठेवून मराठी फौजेचा तळ रामनगर सोडून उठला. पश्चिम घाट चढून नासिक-त्र्यंबकच्या तोंडावर आला.

नासिकजवळ संभाजीराजांच्या विजयी फौजेच्या दोन फळ्या झाल्या. एक त्र्यंबकच्या रोखाने घुसली. दुसरी नासिकवर चालून गेली.

जव्हारचा विक्रमशहा आणि दिलेर यांचे जोडसैन्य ठाण्याच्या उत्तर प्रांतात असलेल्या मराठी फौजेवर चालून गेले होते. तिथे भयानक रणधुमाळी पेटली होती. अनेक मावळे कामी आले होते. पण मराठ्यांनी धारराव कोळी आणि विक्रमशहाचा मुलगा यांना दस्त करून त्यांना गर्दनमारीची सजा ठोकली होती.

नासिक (उर्फ गुलशनाबाद) हे ताकदवर मोगली ठाणे जाधवराव या मोगली चाकरीत असलेल्या राजांच्या मामेभावाच्या ताब्यात होते! संभाजीराजांचे ते मामेकाका.

मराठी फौजांनी गोदावरीला साक्षी ठेवून त्र्यंबक, नासिक ही दोन्ही ठाणी मारली.

काढण्या चढवून मुसक्या बांधलेले जाधवराव रूपाजी भोसल्यांनी नासिकच्या तळावर युवराजांच्या सामने पेश केले.

जोडल्या डोळ्यांनी संभाजीराजांनी मामेकाका जाधवराव सिंदखेडकर यांना निरखले. मासाहेबांचे हे मोगली पेहराव केलेले भाचे बघताना त्यांच्या छातीत कालवाकालव झाली. जिजाऊंच्या आठवणीने त्यांचा हात नमस्कारासाठी छातीकडे गेला. जाधवराव त्यामुळे गैरसमजात आले. त्यांना वाटले युवराजांच्या मनी रक्ताचे नाते जागे झाले! आणि त्यांनी आम्हालाच नमस्कार केला.

"रूपाजी, काकासाहेबांच्या काढण्या उतरा." संभाजीराजे थंडपणे म्हणाले. रूपाजी चमकला. क्षणभर घोटाळला.

"रूपा ऽ जी." बैठकीवरून आसूड फुटल्यागत जरब आली.

घाईघाईने रूपाजीने जाधवरावांच्या काढण्या फटाफट उतरल्या.

उजव्या तर्फेला असलेल्या मोरोपंतांकडे वळून संभाजीराजे म्हणाले, "पंत, काकासाहेबांना समज द्या. आम्ही युवराज आहोत. त्यांनी रिवाजी मुजरा दिलेला नाही! तो नीट देता यावा म्हणूनच त्यांच्या काढण्या उतरल्या आहेत."

"जी." मोरोपंत झुकले. दमदार पावलांनी ते जाधवरावांजवळ आले. त्यांनी समज दिली – "राव, तुम्ही कैदी आहात. युवराजांना रिवाजी मुजरा द्या."

जाधवराव चमकले. मान ताठ ठेवीत संभाजीराजांना पेटते डोळे देत ते म्हणाले, "कैद झाला म्हणून वाघ गवत खात नाही! पोर-फर्जदांना मुजरा द्यायचा जाधवांचा वसा नाही!"

"कोण वाघ?" फुलल्या डोळ्यांचे संभाजीराजे बैठकीवरून ताडकन उठले. तो चित्कार ऐकून रूपाजी, पंत, रायाजी – ही भोवतीची मंडळी अंगभर चरकली.

बेडर चालीने संभाजीराजे जाधवरावांच्या समोर आले. भाल्याचे पाते चालवावे तशी नजर मामेकाकांच्या डोळ्यांत चालवीत, फुलल्या नाकपुड्यांनी आसुडासारखे वाटावे असे शब्द त्यांनी त्यांच्या कानांवर ओढले – "वाघ गवत खात नाही – पण तो वसा पाळीव मांजरांनी बोलू नये! दर्शनाबरोबर आम्ही पाय धरावे असा तुमचा वकूब. पण – पण तुम्हांस काका म्हणण्याची आम्हास शरम वाटते! आऊसाहेबांचे भाचे तुम्ही! म्हणूनच मुजरा रुजू घातला पाहिजे! आम्हास नव्हे त्यांना! आम्हाला बघून त्यांची याद आली नाही तुम्हाला! तुम्हास बघून आम्हास मात्र ती आली! गुमाने मुजरा रुजू घाला त्या बैठकीला! ती आऊसाहेबांची आहे! नाहीतर ...!"

"नाहीतर काय?" भुवई चढवीत जाधवराव गुर्मीने बोलले.

"काय? जाधवांचा वसा बोलणारी तुमची जीभ हासडून या क्षणी तुमच्या हातात देण्याची आज्ञा देऊ आम्ही! पं ऽ त," संभाजीराजांची छाती लपापू लागली.

"राव ऽ, मुजरा घाला. बैठकीला आणि युवराजांना" संभाजीराजांचे घुसखोर मन ऐकून सुन्न झालेले मोरोपंत जाधवरावांचा खांदा हलवीत म्हणाले.

एक क्षण गेला – आणि तसलीम-कुर्निस करून मार खाल्लेल्या उभ्या हयातीच्या आठवणीने जाधवरावांचा ऊर गलबलला. डोळ्यांच्या कडा दाटल्या. श्वास चढीला पडला. पुढे होत जाधवरावांनी झटकन युवराजांच्या मोजड्यांना सरळ हात भिडविले. धरल्या आवाजाने मान डोलवीत ते म्हणाले, "आत्याबाईंचे पाय धरण्याची आमची लायकी नाही! खरे तर तुमचे सुद्धा!"

युवराजांचा नूर क्षणात पालटला. त्यांनी गडबडीने जाधवरावांना उठवून वर घेतले. आणि त्यांच्या डोळ्यांत खोलवर बघताना "हे आऊसाहेबांचे नातलग आहेत. भाचे आहेत. आमचे मामेकाका आहेत." या भानाने त्यांचे डोळे पाणावले; फर्जंदपण जागे झाले! झटकन वाकून त्यांनी जाधवरावांच्या पायांना आपले हात भिडविले.

नासिक-त्र्यंबकचे मोगली ठाणेदार जाधवराव श्रींच्या राज्यात सेवेसाठी रुजू झाले!

परतीच्या वाटेवरचे वणी-दिंडोरी हे ठाणे मारून, तिथल्या सिद्दी हिलाल या ठाणेदाराला स्वराज्याच्या चाकरीला वळवून संभाजीराजांची फौज रायगड जवळ करण्यासाठी मराठा मुलखात घुसली.

"युवराज येताहेत. स्वामींनी मनी धरल्या मनसुब्यात फत्ते घेऊन." असे पत्रस्वार पंतांनी आगे खबर देण्यासाठी रायगडाकडे पाठविले.

मार्गी लागणाऱ्या नद्यांत नौका घालून, तऱ्या सोडून मावळे मुलूख जवळ करू लागले. पावसाची मार आता सुमार होती. हत्तीवरच्या हौद्यात बसून युवराज पावसात निथळून निघालेला मुलूख न्याहळू लागले. बैठकीच्या जनावराच्या गळ्यातील थोराड चंदेरी घाट किणकिणत होती. पाठीमागे मोरोपंत आणि जाधवकाका बसले होते.

घंटेच्या किणकिणाटाला धरून संभाजीराजांची विचारधारा लागून राहिली. ऐकू येणारा किणकिणाट मोठा होत होत पाचाडच्या सदरेवरून उठणाऱ्या ठणठणाटाएवढा झाला. युवराजांना दूरवर चुन्याच्या बोटभर धारेसारखी कड्यावरून कोसळणारी धबधब्याची रेष दिसली – अशीच रेष रायगडाच्या मावळमाचीवरून पाचाडच्या सदरेवर ते बघत आले होते. पांढऱ्या नेसूच्या जिजाऊसाहेबांची!

दिवाकर गोसाव्यांचे काव्यबोल युवराजांच्या मनात फेर टाकून गेले. यशवंत, वरदवंत, पुण्यवंत, कीर्तिवंत.

"या भूमंडळाचे ठायी। धर्म रक्ष ऐसा नाही।
महाराष्ट्र धर्म राहिला काही। तुम्हाकरिता॥

संभाजीराजांच्या मनी कसलीतरी फडफड उठली. एका विचाराने सोंड उठवली – "आम्हास समर्थांसारखी रसाळ काव्यदेणगी लाभती तर!! तर आम्ही दुरून आऊसाहेबांच्या रूपाने दिसणाऱ्या त्या खड्या चुन्याच्या रेषेला ठीक शब्दांत पकडले असते!

"जगदीश्वराच्या चौकातील त्या दगडी कासवाचे रूप एकदा तरी आमच्या वाट्याला यावं! महाराजसाहेब आणि आऊसाहेबांची पायधूळ पाठीवर मस्तकावर घेण्यात आम्हास धन्य वाटेल!"

मजला मागून मजला हटल्या. युवराज आणि पंत विजयी सेनेसह पाचाडजवळ आले. पुढे वर्दी गेली. युवराजांच्या भेटीसाठी राजेही पाचाडात उतरले होते.

युवराज, पंत, जाधवकाका सारेच चालत पाचाडच्या वाड्यात आले. पुतळाबाईंनी सदरी उंबरठ्यातच भाताचे मुटके युवराजांच्या चेहऱ्याभोवती ओवाळून दूर भिरकावले. राजांच्यासह संभाजीराजे जिजाऊंच्या बैठकमहालात आले.

पाच पावले जिजाऊ पुढे आल्या. झुकू बघणाऱ्या युवराजांना त्यांनी थोपविले आणि जवळ घेत त्यांच्या कपाळीच्या शिवगंधावर आपले सुरकुतले ओठ टेकले! आणि म्हटले "असेच विजयवंत व्हा." त्यांनी युवराजांच्या पाठीवरून मायेने हात फिरविला.

"आऊसाहेब, आम्ही आपल्या भेटीसाठी एक खाशी आसामी आणल्येय. आज्ञा व्हावी." युवराज हसून म्हणाले.

"आम्ही साऱ्यांना भेटावे म्हणूनच या वाड्यात मुक्काम टाकून आहोत. बोलवा त्यांना." जिजाऊ म्हणाल्या.

युवराजांनी जोत्याजीला भुवईचा इशारा दिला. जोत्याजी जाधवकाकांना पाठीशी घेऊन बैठकमहालात आला. त्यांना बघताच जिजाऊंच्या सुरकुतल्या कपाळी आठ्यांची जाळी चढली. मन होलपटत मागील काळात गेले.

"काकासाहेब आता उपरतीत आहेत मासाहेब. त्यांचा मुजरा घ्यावा!" संभाजीराजांनी जिजाऊंची कातरता हेरली.

पुढे झालेल्या जाधवरावांनी जिजाऊंचे सरळ पाय धरले.

आपसांतील भांडणापोटी, चाकरीसाठी पत्करलेल्या लाचारीपोटी आपल्या माहेरची झालेली वाताहत जिजाऊंच्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत उभी राहिली. त्यांच्या पायपोट्यांत गोळे धरल्यासारखे झाले. मंचकाचा कठडा धरीत त्या काही न बोलता खाली बसल्या. लगबगीने राजे-संभाजीराजे त्यांच्या दुहाती झाले.

"यांना जाऊ द्या राजे." जिजाऊ थकल्या जबानीने मान डोलवीत म्हणाल्या. शरमिंदे जाधवराव खालमानेने बाहेर पडले. जिजाऊंचा मान राखण्यासाठी संभाजीराजे का पेटून उठले होते ते आता जाधवरावांना कळले!

पाचाडच्या वाड्यात थाळे घेऊन राजे-संभाजीराजे पंतांच्यासह रायगड चढून आले. युवराजांचा पहिला विजय गड चढून आला.

उन्हपावसाचा श्रावणी खेळ सुरू झाला. राजांच्या प्रवासी सामानाची बांधाबांध झाली. खंडोजी दाभाड्यांनी, नागफण्यांचे छत्र असलेले, राजांचे नित्यपूजेचे स्फटिक शिवलिंग हलक्या हातांनी एका लक्डपेटीत ठेवले.

"समर्थांचे दर्शन करून आम्ही परतीच्या पावलांनी निघू. तोवर रायगडाचा जाबता तुमच्या हाती आहे. साऱ्यांना सांभाळून असा." राजांनी वाड्याची सदर सोडताना युवराजांना सांगितले. आणि राजे समर्थांच्या भेटीसाठी चाफळ गढीत जायला निघाले,

"जी ..." काही तरी बोलणारे संभाजीराजे थबले.

"बोला."

"समर्थांना आमचा दंडवत सांगावा!"

"जरूर."

"आणि ..." पुन्हा युवराजांची जबान घोटाळली. "काय ? बोला."

"आमची – आमची प्रार्थना की समर्थांनी जसे आपले चित्र ओव्यांत उभे केले, तसे मासाहेबांचेही करावे! त्यांचे बोल रसाळ आहेत."

राजे हसले. मग एकदम गंभीर झाले. संभाजीराजांच्या भरल्या खांद्यावर तळहात चढवून ते क्षणभर तसेच थांबले. त्यांना म्हणावेसे वाटले– "अगदी हा हा ... हाच विचार समर्थांचे पत्र ऐकताना आमच्या भोवती फेर टाकून गेला!"

पण प्रकटपणे मात्र राजे म्हणाले, "युवराज, त्यांना शब्दांनी श्लोकात पकडणे सहजी साध्य न होणारे म्हणूनच समर्थ विचारपूर्वक थांबले असावेत. आम्ही आता निघतो आहोत. तुम्ही जातीने पाचाडच्या वाड्यावर नजर ठेवा. ओव्या ऐकण्यापेक्षा मनी वाटेल तेव्हा गड उतरून त्यांचे दर्शन घ्या. येतो आम्ही."

राजांच्या टोपातील मोतीलग डुलली. ते वळते झाले; मोरोपंत, आण्णाजी, प्रतापराव यांना संगती घेऊन चालू लागले. महादरवाज्यापर्यंत युवराजांनी त्यांना पायसोबत दिली.

परतताना त्यांना श्रावणी उन्हात अंगभर उजळून निघालेला गंगासागर तलाव दिसला. त्याचे ते सोनेरी-चंदेरी रूप बघताना संभाजीराजांना वाटले– "आबासाहेब या गंगासागरासारखेच आहेत! किती तरंग! किती रूपं!"

नागपंचमी दोन दिवसांवर आली म्हणून सोयराबाईंनी सणाच्या डागांची आणि उंची आसवाबांची यादी आपल्या खाजगी कारभाऱ्याला सांगून तयार केली. आणि हुजऱ्यामार्फत ती जामदारखान्याचे प्रमुख निळो सोनदेवांच्याकडे रवाना केली.

निळोपंतांची परतीची वर्दी आली, "यादीस युवराजांच्या शिक्केमोर्तबाचे फर्मान हवे! जामदारखान्याची मोहोर त्याखेरीज तोडता येत नाही!"

हुजऱ्याने ती कानांवर घातली मात्र, सोयराबाईंचा नाकशेंडा लालावून आला. डोळे फुलले. कानपाळी रसरसली. कारण नसता सोयराबाई हुजऱ्यावर घसरल्या.

"कुणास वर्दी धाडतात ही मुजुमदार? आम्हास? स्वारीखेरीज आम्ही कोणाचे शिक्के-फर्मान जुमानत नाही हे ते विसरले?"

दीड वर्षांच्या रामराजांना निमा-चोळणा चढवीत असलेल्या धाराऊचा ते बोल ऐकताना थरकाप झाला. रामराजांच्या कपाळी शिवगंधाचे पट्टे रेखून त्यांना घेऊनच ती महालाबाहेर पडली. बाहेर पडताना तिने निसटते ऐकले, "जा. मुजुमदारांना आम्ही याद फर्मावलीय म्हणावं." सोयराबाई हुजऱ्याला शब्दांनीच पिटाळीत होत्या.

रामराजांसह धाराऊ युवराजांच्या महाली आली. "दादाऽ दादाऽ" म्हणून झेपावणाऱ्या रामराजांना पुढे होत संभाजीराजांनी छातीशी घेतले. रामराजे खिदळू लागले. त्यांना थोपटे करण्यासाठी युवराज हसत म्हणाले, "हां. हां. सबुरीनं घ्या. पातशाही ऐवजी तुम्ही दादामहाराजांनाच पालथे घालता की काय?"

ते ऐकताना चरकलेल्या धाराऊने अगोदर हे ऐकायला आणखी कोणी आहे की काय यासाठी दरवाज्याकडे बघितले. न राहवून ती म्हणाली, "धाकलं, असं म्हणू नगा त्येस्नी! आदुगरच राईचा डोंगुर चडाय लागलाय! त्यात ह्ये नगो."

"का – काय झालं धाराऊ?" युवराजांनी गोंधळून विचारले.

धाराऊने ऐकलेला चटका त्यांच्या कानी घातला. क्षणभर युवराजांचा रामराजांच्या पाठीवरचा फिरता तळहात थांबला. गंधाचे पट्टे एकमेकांत गुंतले. मग दरवाज्याकडे बघत त्यांनी साद दिली – "मुताली ऽ क ?"

एक खिदमतगार आत आला. त्याला आज्ञा झाली. "जा. महादेव यमाजींना सांगी दे. मुजुमदारांना आम्ही याद केलीय म्हणावं !"

घेतल्या रामराजांना तसंच छातीशी धरून युवराज पायफेर टाकू लागले. "आता काय व्हनार ?" या विचाराने धसकलेली धाराऊ त्या दोघांकडे बघत गपसूर झाली.

महादेव यमाजींना पाठीशी ठेवीत निळोपंत महालात आले. सोयराबाईंनी त्यांची बिनामुलाहिजा झाडणी केली होती. झुकता मुजरा देतानाच न राहवून ते म्हणाले, "आम्ही चाकरांनी काय करावं युवराज ? सरकार स्वारींची आपल्या हुकुमाशिवाय डागकोठीच्या मोहरेस कोणी हात लावण्याची आज्ञा नाही."

"पंत, ती यादी आणा." संभाजीराजे शांतपणे म्हणाले. हलक्या हातांनी त्यांनी रामराजांना धाराऊकडे दिले.

निळोपंतांनी मागणीच्या डागांची यादी युवराजांच्या हाती दिली. तीवर नजरेचा फिरका टाकीत संभाजीराजे म्हणाले, "या आमच्या संगती."

धाराऊला म्हणावेसे वाटले, "जाऊ नगा धाकलं." पण तिची जबानच धरल्यागत झाली. निळोपंतांच्यासह संभाजीराजे डागाच्या कोठीजवळ आले. हत्यारी पहारे मुजरा देत मागे हटले. युवराजांचा आवाज निर्धारी होता. "पंत, मोहर खोला."

कारभाऱ्याकडून किल्ल्या घेत पंतांनी कोठीचा दरवाजा खोलला.

"आम्ही वाचतो ते ते डाग प्रतवारीतून तबकात उतरा." संभाजीराजे यादीबरहुकूम डाग वाचू लागले. चटक्या पावलांनी हलत, किल्ल्या चाळवीत निळोपंत एक एक डाग तबकात उतरू लागले. यादी संपली. पुढे होत युवराजांनी खोलल्या आलमारीतील मुठीत मिळतील ते सुवर्णालंकार तबकात उतरवले.

"या यादीबरहुकूम आसवाबांचे नग घेऊन तुम्ही खुद्द आऊसाहेबांच्या सेवेस या." वस्त्रांची दुसरी जोडयादी युवराजांनी निळोपंतांच्या हाती दिली.

जामदारखान्याचा पहारेकरी डागांचे तबक उचलायला पुढे आला. त्याला हातपंजा उठवून युवराजांनी थोपविले – आणि आपल्याच हातांनी ते तबक उचलले !

बांधील मनाने संभाजीराजे सोयराऊंच्या महालासमोर आले. त्यांना बघूनच एका धारकऱ्याने आत जाऊन तशी वर्दी दिली. ती ऐकून मनाशी काहीं ठरवून सोयराबाई आत पाठमोऱ्या झाल्या. तबक घेतलेले युवराज त्यांच्या महालात आले. चौरंगावर तबक ठेवून त्यांनी पाठमोऱ्या सोयराऊंना तिवार मुजरा दिला. काही क्षण तसेच गेले. दाटलेले, दडपलेले.

"सणाचे डाग-आसवाब आपल्या सेवेस रुजू करायला आम्ही जातीने आलो आहोत आऊसाहेब. त्यांचा स्वीकार व्हावा."

सोयराबाई काहीच बोलल्या नाहीत. त्यांच्या कपाळीच्या मेणकुंकवाच्या पट्ट्यांमध्ये घामाचे थेंबच थेंब जमून आले.

"आणखी एक अर्जी आहे. गडाचे चाकर आपले आहेत. आम्हीही आपले चाकरच आहोत. जे लागेल त्याची आज्ञा आम्हास द्यावी." ती जातीवंत अदब होती.

सोयराबाई आतल्या आत धुमसल्या. त्यांनी काही चाल घ्यावी असला कुठलाच वाव युवराजांनी त्यांना ठेवला नव्हता. तरीही त्या सोयराबाई होत्या ! पुढा तसाच ठेवीत त्यांनी तेढा सवाल केलाच, "सूनबाईंना लागले तर असेच आणून द्याल ?"

"नाही !" संभाजीराजांचा संथ जाब आला.

"मतलब ?"

"त्या कुणबी आहेत ! कुणब्यांना डागांची सवय नसते ! येतो आम्ही."

तिरक्या बोलांनी येसूबाईंना आपण कधीतरी 'कुणबी' म्हटल्याचे या वेळी आणि असे चालून येईल याचा सोयराबाईंना अंदाज नव्हता ! त्यांची चरफड झाली.

त्यांच्या महालातून बाहेर पडताना रामराजांच्या आठवणीने संभाजीराजांना म्हणावेसे वाटले, "आपणाला जामदारखान्याचे सोनडाग आवडतात. आम्हास म्हणाल तर आपला रामडाग खूप आवडतो !" पण ते काही बोलले नाहीत.

विचारांच्या फेरात ते तसेच चालत चालत मनोऱ्यापर्यंत आले. मनोऱ्याच्या पायऱ्यांनी चारी मजले खाली टाकीत ते शेवटच्या पाचव्या मजल्यावर आले.

"ठण ऽ ठण ऽ ठण ऽ" गडवाऱ्याने आणून सोडलेले सूर त्यांच्या कानात उतरले. पाचाडच्या सदरेवर जिजाऊ आल्याची खूण देणारी घंटा झडत होती !!

मावळमाचीवर जाऊन तिला मान देण्याएवढाही समय नव्हता. संभाजीराजांनी पाचव्या मजल्यावरूनच पाचाडच्या रोखाने तीनदा रिवाज दिला.

राजांचे बोल त्यांच्या मनात फिरले – "ध्यानी ठेवा. श्रद्धा आणि मायेपोटीच माणसे जान लावून असतात. प्रसंगी तो द्यायलाही राजी होतात ! श्रद्धा आणि माया !" एक दीर्घ निःश्वास त्यांच्या नाकपाळ्यांतून सुटला.

"केवढे ठाव घेणारे बोलतात आबासाहेब !" राजांची दाढीधारी, हसरी, सतेज मुद्रा त्यांच्या डोळ्यांसमोर क्षणात तरळली. आणि आठवले की आबासाहेब सांप्रत समर्थांच्या सान्निध्यात दंग असतील !

महाडच्या तलावातून आणलेले रक्तवर्णी, आकाशवर्णी, सफेद अशा वाणांचे कमळगड्डे रायाजी आणि अंतोजींकडून कुशावर्त तलावाकाठच्या चिखलात लावून झाले. तलावाकाठच्या करंजीच्या झाडाखाली सावली धरून संभाजीराजे उभे होते. त्यांनीच ते कमळगड्डे आणवले होते.

"देठांचे नाळ चिखलात ठेवून नानारंगी कमळांचे डुलते थाळे या कुशावर्तावर दाटतील तेव्हा कसा दिसेल हा तलाव ?" पोटऱ्यांवर चोळणा दाटलेले रायाजी, अंतोजी पायऱ्याच्या बाजूने तलावात उतरून चिखलमाखले हातपाय धुऊन बाहेर आले.

"रायाजी बघूया तुमचा हातगुण कसा निघतो ? बघू किती गड्डे जीतवन धरतात ते!" संभाजीराजे म्हणाले.

"धाकलं धनी, फुलांची ही जात लई चरनी धरनारी ! वाईच ठाव घावला की पसारती हां हां म्हन्ता. सम्दं टाकं येरगटून टाकतील ह्ये गड्डं !!" अंतोजी हसून म्हणाला.

"कसूर माप धाकलं धनी, सरकार याद करत्यात. हिंदुस्तानातलं कुनी दोन पावनं गड चढून आल्यात. ह्ये ऽ आडवं पट्टं हाईत कपाळावं गंदाचं." वाड्याच्या रोखाने आलेल्या जोत्याजी केसरकराने करंजीच्या झाडाखाली येऊन वर्दी दिली.

राजे चाफळहून येऊन दीड मास लोटला होता.

"चला." म्हणत संभाजीराजांनी माथ्यावरची सावली सोडली. जगदीश्वराचा सोनकळस दूरवर त्यांना उन्हाच्या तिरिपेत झगमगताना दिसला. त्याने फेकलेल्या प्रखर झोताने लवभर युवराजांचे डोळे अंधारल्यागत झाले. एक विचित्र विचार त्यांच्या मनात फेर टाकून गेला. "जगदीश्वराच्या चौकातील त्या दगडी कासवाला हयातीत कधी हा तळपता सोनकळस बघायला मिळणार नाही !"

"हिंदुस्थानी पाहुणे कोण असतील ?" विचार करीतच त्यांनी राजांच्या बैठक महालाचा उंबरठा ओलांडला. राजांना मुजऱ्याचा रिवाज दिला. कमरेच्या हत्यारावर हाताची डावी मूठ रुपवीत, राजांच्या बैठकीसमोर असलेल्या दोन्ही असामींना निरखीत ते पुढे झाले.

"या. यांना ओळखलंत ?" राजांनी त्यांना समोरच्या दोन्ही असामींच्या रोखाने हात करीत हसत हसत विचारले.

दोन्ही उत्तरी असामींनी युवराजांना हात जोडून, कमर झुकवीत मथुराई नमस्कार घातले. रुजाम्याची वळी उलगडावी तसा संभाजीराजांच्या मनी आठवणींचा पट खुलला. यमुनेचे गिरके वळण डोळ्यांसमोर तरळले. दोन्हींतील एका असामीच्या अंगी भगवी कफनी होती. दुसरीने उत्तरी डौर, जरीकिनारी धोतर-उपरणे, घेरदार पगडी असा पेहराव केला होता.

"हे... हे कविराज !" आठवणीसाठी कपाळीच्या शिवगंधाला मुडपीत संभाजीराजे म्हणाले, "आम्हास वाराणशीच्या वाटेवरून मथुरेपर्यंत सोबत करणारे कवी कलश !"

"कसूर माफ हो युवराज. कलश नहीं कवी कुलेश !" कवींनी हसून दुरुस्ती केली.

"आणि हे कोठीत भेटलेले कवी परमानंद." राजांनी कफनीधारी असामीची याद दिली.

"युवराज ही मंडळी म्हणताहेत, 'केवळ भेटीसाठी आलो आहोत. चार दोन दिवस राहून परतू.' त्यांना सांगा तुम्हाला काव्य केवढे प्यार आहे ते. आम्ही त्यांना येथे कायमचे ठेवून घेऊ म्हणतो." असे म्हणून राजे हसले.

"जी, आपला बेत बरोबर आहे. आमचाही त्यांना तसाच आग्रह आहे." युवराजांच्या या बोलण्यावर सारेच हसले.

"चंडी ऽ चंडी ऽ" हसण्याच्या शेवाला धरून कुलेश पुटपुटले !

शाळिग्रामी रंगाच्या एका तकतकीत घोड्यावर मांड जमवून भवानीटोकाच्या बाजूने संभाजीराजे फेर टाकीत होते. डाव्या हाताला लिंगाणा, उजव्या तर्फेला पोटला आणि समोर दूरवर त्यांना तोरणा-राजगडाची काळपट शिखरे दिसत होती.

"राजगड ! उडत्या गरुड पक्ष्याच्या पवित्र्यात माच्यांचे पंख पसरून असलेला गडराज !" त्या शिखराने त्यांची नजर पकडून ठेवली.

"दुड ऽ दुड ऽऽ दुड" रायगडावरच्या नगारखान्याचा नौबतडंका त्यांना ऐकू आला. पाठोपाठ तोफखान्यावरून फुटलेल्या भांड्यांचे बार दणदणले.

कायदे खेचून त्यांनी मांडाखालच्या जनावराला मोजडीची टाच दिली. काळेशार जनावर शेपटीचा फुलवा नाचवीत दौडू लागले. काळा हौद, जगदीश्वराचा कळस मागे पडला. दौडते जनावर खडखडाट करीत व्यापारपेठेत घुसले.

उंच जोत्यावर बसलेले नागाप्पा शेटीचे व्यापारी बसकणीवरून उठून, जोत्यांना घोडी भिडवून खरेदी करणारे धारकरी घोड्यांवरून खाली झेपा घेऊन धडाधड मुजरे करताहेत इकडे संभाजीराजांचे लक्ष नव्हते.

होळीमाळ मागे पडला. नगारखान्यातून घुसताना संभाजीराजांना कमानीवर कोरलेल्या, पंजा उगारल्या दगडी वाघाचे मानचिन्ह निसटते दिसले.

आत जाताच त्यांनी डाव्या रिकिबीवर भार देऊन जनावरावरून खाली झेप घेतली. हातीचे कायदे सामोरा आलेल्या मोतद्दाराच्या दिशेने फेकले. आणि ते झपाझप दरबारी चौकातील हजारी कारंजी पार करून गेले. तशी त्यांच्या जाम्याच्या पाठीवरची सोनजरीची वेलबुट्टी लखलखली.

दरबारी चौकाच्या बैठकीवर राजे माणसांच्या घेरात उभे होते. संभाजीराजांना बघताच त्यांनी एका मावळ्याच्या खांद्यावरील परातीतील साखरेची मूठ भरून घेतली.

राजे दगडी पायऱ्या उतरून येताहेत हे बघून संभाजीराजे झपाझप पुढे झाले. मुजऱ्यासाठी ते झुकणार हे बघून राजांनी त्यांना थोपविले.

"शंभूराजे, तोंडी साखर घ्या. पन्हाळा फते झाला ! बारा वर्षांनी आमचा मनसुबा तडीस लागला." राजांनी हसत मूठ युवराजांच्या ओठांशी नेली.

तोंडात रेंगाळणाऱ्या साखरेच्या चवीने संभाजीराजांच्या मनाच्या मठीत लपलेले

दिवाकर गोसाव्यांचे काव्यबोल भगवी कफनी चढवून वर आणले – "गडपति, गजपति, हयपति। पुरंधर आणि शक्ति। पृष्ठभागी।"

त्या दिवशी संध्याकाळी समाधानी राजे सोयराबाईंच्या महाली आले. बाईंनी चौरंगीवर साखरेचे भरले तबक कुणबिणीकडून ठेवून घेतले होते.

रामराजांना घेऊन त्या चौरंगीजवळच उभ्या होत्या. राजे जवळ येताच त्या रामराजांना म्हणाल्या, "जा, आबासाहेब काय देतात बघा तरी!"

रामराजांना आपल्याकडे घेऊन त्याच्या गालावर ओठ टेकीत राजे म्हणाले, "आम्ही काय देणार यांना? देणार श्री थोर आहे." राजांच्या दाढीच्या स्पर्शाने हुळहुळलेल्या गालांवर रामराजांनी तळहात फिरविला. तीन वर्षांचे रामराजे म्हणाले, "श्री म्हंजे काय आबा?"

हसत राजे म्हणाले, "ते आम्हास तरी पुरतं कुठं माहीत आहे! ते माहीत झालं की माणसाचा समर्थ होतो!"

आतल्या आत धुसफुसलेल्या सोयराबाईंच्या मनात राजांच्या छातीवरच्या कवड्यांच्या माळेकडे बघताना एक बटबटीत विचार फिरला, "तोंडी साखर पडायला मोठेपणाचं भाग्य लागतं!"

आणि मग त्या म्हणाल्या, "या. तुम्ही नको 'समर्थ' व्हायला."

सोयराबाईंनी रामराजांना राजांच्याकडून आपल्याकडे घेतले. दरबारी चौकात राजांनी संभाजीराजांच्या तोंडात हसत साखर भरलेली सोयराबाईंचा दरूबंकी बयाजी याने बघितले होते. बघितले तसे आपल्या बाईसाहेबांच्या कानी घालायला तो विसरला नव्हता!

बाहेर पडताना राजे विचार करू लागले. "तुम्ही नको समर्थ व्हायला!" राणीसाहेब असे का म्हणाल्या? पण त्यांना ते कळलेच नाही. कळणारही नव्हते!

चैत्री पाडव्याचा सण आला. चुना-कुंकवाची ओली बोटं फिरलेल्या, आंबवतीनं सजल्या, हिरव्या, रसवंत, तोरणकाठ्या गडाच्या घरट्या-घरट्यांसमोर उठल्या. त्यावरचे झळझळीत चंबू तळपू लागले. कोऱ्या खणांचे रंगीबेरंगी शेव आणि सफेद चाफ्यांच्या माळा गडवाऱ्यावर हिंदोळू लागल्या. कोंडाजी फर्जंद, आण्णाजी, मोत्याजी खळेकर आणि गणोजी कावळा यांनी हिकमतीनं दस्त केलेला पन्हाळा डोळ्यांत साठवून घ्यायला राजे आज रायगड सोडणार होते. संगतीला फौजेसुद्धा प्रतापराव दौडणार होते. रायगड युवराज संभाजीराजांच्या अखत्यारीत येणार होता.

सणाची म्हणून गोडाची पाने उठली. दुपारच्या विसाव्याची डावी कूस झाली.

उन्हे थोडी कलतीला लागली असताना राजे, संभाजीराजे व प्रतापराव यांच्यासह जगदीश्वराच्या दर्शनाला आले. दर्शन करून सारी मंडळी मंदिराबाहेर पडली. संभाजीराजे समोर दूरवर दिसणाऱ्या लिंगाण्याच्या डोंगररांगेकडे बघतच होते.

फांदीवर फांदी टक्करल्याने पडलेल्या ठिणगीमुळे असो, वा कुणब्यांनी पेटविलेल्या तरव्यातील किटण उडाल्यामुळे असो, लिंगाण्याच्या घसरंडीवर धडधडलेला वणवा मावळतीच्या किरणांत नजर खेचून घेत होता. जसा उभा लिंगाणा पिवळ्या-तांबडसर ज्वाळांचे भंडारामाखले हात आकाशाच्या रोखाने मूकपणे नाचवीत होता.

मंदिराच्या दगडी आवारकठड्याला हात टेकून युवराज तो आगीचा नाच पापणी न मोडता रोखल्या नजरेने घेत राहिले.

सडक बोटांचा एक गुलाबी हातपंजा त्यांच्या खांद्यावर चढला तशी त्यांची ती अग्निसमाधी डहुळली. त्यांनी मागे बघितले.

लिंगाण्याच्या घसरंडीला डोळे जोडलेले राजे केवढेतरी गंभीर दिसत होते.

"ही अमनधपक्यानं पेटल्याली रानची आगट लई वंगाळ धनी. कानांत रानवारा भिनल्याली पाखरं येलबाडून होच्यात घालून घेत्यात! हाकनाक पंख होरपळून घेत्यात!" प्रतापराव गुजर हत्यारावरची मूठ चाळवीत समोरच्या ज्वाळा बघत म्हणाले.

"दोष पाखरांचा नाही, पेटल्या वणव्याचा नाही, सरलष्कर. दोष त्या क्षणाचा आहे ज्या क्षणी या वणव्याला कारण होणाऱ्या दोन फांद्या टक्करल्या जातात! आणि कुठल्याही क्षणावर कुणाचीच हुकमत चालत नाही." राजांच्या ओठांतून सुटलेले बोल ऐकून संभाजीराजे भरून आले.

धाराऊला संगती घेऊन पाचाडात आलेल्या येसूबाई आठ दिवस जिजाऊंच्या संगती राहून पुन्हा गड चढू लागल्या. शाळूचे दिवस असल्याने झोंबरा वारा, चेहऱ्याभोवती पदराचा लपेटता फेर घेऊन त्या थोपवू बघत होत्या. त्या वाऱ्याला धरून, आईसाहेबांनी सांगितलेले जाणते विचार त्यांच्या मनी फिरू लागले.

वाताने धरलेल्या गुडघ्यांच्या सांध्यांना डुकराची चरबी चोळणाऱ्या येसूबाईंना जिजाऊ एकदा म्हणाल्या होत्या, "ही भोसल्यांची माणसं अशीच आखडल्या सांध्यासारखी आहेत नातसूनबाई! मुक्या मनानं मायेचं तेलवण चोळलं तरच झाली तर थोडी सुमार व्हायची!"

मेणादरवाज्याने बाहेर आलेल्या येसूबाई धाराऊसह खुल्या पठारावर आल्या होत्या. सातमहालाला लागून हे पठार आबाजीपंतांनी मुद्दाम खुले राखले होते. राजांच्या जनान्याला मेणादरवाजा पार करताच मोकळी हवा घेण्यासाठी या पठारावर येता येईल अशी ही सोय होती.

शिकारीसाठी संभाजीराजे पाचाडवाडीलगतच्या रानात खेळ्यांसह उतरले होते. राजे पन्हाळ्यावर होते.

मोकळ्या मनाने भोवतीचा फुललेला चैत्राचा परिसर न्याहाळत येसूबाई धाराऊशी मध्येच काहीतरी तुटक बोलत होत्या. लाल फुलांच्या तुऱ्यांनी पेटलेली पळसाची आणि पिवळ्या फुलांच्या घोसांनी लवलेली बाव्यांची झाडे भोवतीच्या कड्यांवर उठून दिसत

होती. वाऱ्याच्या झपत्काराने उडू बघणारा पदर येसूबाईंनी गळ्याजवळ घट्ट लपेटता धरून घेतला.

मावळतीला भिडलेले बिंब बघताना त्यांना न कळणारा भास झाला. पळसाच्या फूलतुऱ्यांचा लाल टोप त्या बिंबाने घातला आहे! कोकिळाची उठलेली थरथरती किलकारी धावत थेट त्या टोपाला जाऊन भिडली आहे! म्हणता म्हणता समोरचा ढालीसारखा सूर्य वितळून मावळतीवर पसरतो आहे! त्यांना वाटले, "इथं आमच्या तहबंदात! छातीवर! समोरचा सूर्य वितळतो आहे! हे असं काय होतं आहे?"

"धारा ऽ ऊ" येसूबाईंचे शब्द थरथरले आणि उभ्या येसूबाई पदराचा शेव तोंडात धरीत मटकन खालीच बसल्या!

क्षणभर धाराऊ झाल्या प्रकाराने चक्रली. मग तिचे डोळे लखलखले. तिचा गोंदला हात अपार मायेने येसूबाईंच्या पाठीवर आला. कुणबी जाणतेपण ओठांतून निसटले, "भिऊ नगासा. चला. ह्यो वारा असा अंगावर घेऊ नगा." येसूबाई थरथरत होत्या.

धाराऊने त्यांना उठवून घेतले. सावरते धरून त्यांना ती सातमहालाच्या रोखाने चालवू लागली. भवतीची चैत्री दुनिया उंबरठा ओलांडत होती. मावळतीच्या उन्हातं न्हात होती!!

आठ धापावल्या धारकऱ्यांनी, संभाजीराजांनी पाडलेल्या वाघाचे धूड रायगडावर चढवून आणले. ते बघायला गडाच्या साऱ्या कारखान्यांतील माणसे माळावर दाटली. दत्ताजी त्रिमल, बाळाजी आवजी, खुद्द राजे ते धूड बघायला निघाले.

माळावर दाटलेली माणसे दबके कुजबुजत युवराजांच्या धाडसाची भरल्या तोंडांनी तारीफ करीत होती. मेल्या वाघाच्या वासल्या टाळ्याभोवती माश्या घोंगावत होत्या. पिवळ्याजर्द रंगाला धरून त्या धिप्पाड जनावराच्या अंगावरचे काळे पट्टे झळझळत होते. शेपटीचा एरव्ही अखंड नाचता पोत थंड पडला होता. माणसे डोळे फाडून ते शांतावलेले 'रानकौतुक' बघत होती. त्यात बाळाजींचे खंडोजी आणि आवजी हे आता वधार झालेले मुलगेही होते. निराजीपंतांचा चिरंजीव प्रल्हाद होता.

राजे आले. माणसांची दाटली गर्दी डहुळली. मुजऱ्यांच्या झडी झडल्या. डाव्या हाती बंदुकीची नळी पेलत युवराज संभाजीराजांनी झुकून राजांना मुजऱ्याची अदब दिली. त्यांची छाती वाघाच्या धुडाकडे बघताना लव्हारी भात्यासारखी फुगून आली.

आडवे जनावर नजरेला पडले मात्र, कुणीतरी धरून खेचल्यासारखा राजांचा हात वर उठला. छातीवरच्या कवड्यांना बोटे भिडली. पापण्या क्षणभर मिटगत झाल्या. राजे काही – काही बोलले नाहीत.

"रान कसे उठले, ध्यानीमनी नसता हे जनावर डरकाळ्या देत कसे सामोरे आले, खेळ्यांची बाजारबुणगाई कशी झाली, घोड्यावर असता आपण वार कसा टाकला," हे संभाजीराजे अभिमानाने सांगत होते.

ते ऐकून राजे एवढेच म्हणाले, "टाकोटाक आमच्या भेटीस महाली रुजू व्हा!" राजांच्या पाठीवरची जरीकोयरी तळपली.

आले तसे राजे निघून गेले.

संभाजीराजे पालखी दरवाज्याने वाड्याकडे निघाले. ते बालेकिल्ल्याच्या चौकात आले. सातमहालात पुतळाबाईंच्या महालासमोरच्या सफेलीत केस उदवलेल्या येसूबाई धाराऊसमोर बसल्या होत्या. धाराऊ बोटांच्या फाळांनी त्यांच्या दाटल्या केसांच्या बटा फोडीत होती. खांद्याला बंदूक टांगलेली स्वारी बघताच येसूबाई उठल्या आणि सरळ आत गेल्या. काय झाले ते धाराऊला कळलेच नाही.

"सूनबाई, क्यासात वल तशीच न्हायली नी –" म्हणत धाराऊही त्यांच्या मागून आत गेली. मुद्रेवर काय उतरलेय ते येसूबाईंनी एकदा डोळाभर बघावे म्हणून धाराऊने हातमुठीचा दर्पण त्यांच्यासमोर धरला. पण – पण येसूबाईंना त्या दर्पणाला नजर देण्याचे धाडस होईना.

पेहराव केलेले संभाजीराजे आज्ञेप्रमाणे राजांच्या महाली रुजू झाले होते.

पाठीशी हात बांधलेले राजे झरोक्यातून बाहेर बघत विचारगत उभे होते. त्यांची बांधली बोटे चाळवली. गपकन एकमेकांत रुपली.

"युवराज, शिकार ही शूराची खेळी आहे. कधी मनी आले तर आम्हीही रान उठवितो." राजांचा आवाज बांधलेला झाला.

"पण – पण आपण अगोदर भोसले आहोत. मग शिकारी! तुम्ही केली तीच गफलत आम्हीही एकदा करून बसलो होतो. वाघ पाडण्याची! मासाहेबांनी आमचे डोळे उघडले. आपण जगदंबेचे भुत्ये आहोत. वाघ जगदंबेच्या बैठकीचे जनावर आहे याची भूल इत:पर कधी पडू देऊ नका!!"

"जी. हे – हे आमच्या ध्यानी आलं नाही." शरमिंद्या युवराजांनी गर्दन पाडली.

"तेच. आता येऊ द्या." राजांनी त्यांना सरकू दिले नाही.

"जी."

तो हलका हुंकार राजांना जाणवला. ते वळत सामोरे झाले. जवळ घेत त्यांनी संभाजीराजांचे दोन्ही खांदे आपल्या तळहातांच्या पकडीत गच्च धरले.

"गर्दन वर घ्या." राजांच्या रूपाने जसा उभा रायगडच बोलत होता!

युवराजांची गर्दन वर आली. स्फटिकसाफ डोळे राजांच्या निमुळत्या, गंधर्वी डोळ्यांना भिडले. त्या डोळ्यांतील रानभेरी निधडेपण राजांना जाणवले. आवडले. ते म्हणाले, "आम्हास तुमचं बळ पाहिजे – वाघ पाडणारं नव्हे – वाघ होऊन चालणारं!!"

राजांच्याकडे बघताना संभाजीराजांना भास झाला – "आम्ही पाडलेलं जनावर उठून बसलं आहे! त्यांच्या पाठीवर मांड घेऊनच आबासाहेब हे बोलताहेत!"

"या." राजांनी त्यांचे खांदे थोपटले.

झुकून मुजरा देत हटल्या मागच्या पावलांनी युवराज जायला निघाले. त्यांची अदब निरखीत राजे हसत म्हणाले, "गडाच्या बैतेदार चांभाराकरवी त्या जनावराचा पेंढा भरून घ्या. दरबारी चौकात भक्कम चौथऱ्यावर तो पेंढा बसता करा. तुमच्या धाडशी शिकारीची खूण म्हणून तसेच तुम्ही केलेल्या गफलतीची खूण म्हणून !!"

"जी."

"आबासाहेब काय आहेत ते कळणं अवघड आहे." महालाबाहेर पडताना संभाजीराजांच्या मनात या विचारांचा पेंढा पक्का भरून टाकला गेला !

"आम्ही देवदर्शनास निघतो आहोत. दोन दिवसांनी परतू." असे संभाजीराजांना सांगून राजे महालाकडे कूच झाले.

दुसऱ्याच दिवशी इंग्रजांचा मुंबई दरबारातील मराठ्यांचा वकील पिलाजी सुंदर गडावर आला. त्याने वर्दी आणली होती की, "ताम्रांच्या वतीने वकील म्हणून थॉमस नावाचा साहेब राजियांसी वाटाघाटी करण्यास आला आहे. राजे नाहीत तरी युवराजांची भेटी घेण्याची तो आज्ञा मागत आहे."

"साहेबास गडावर पेश येऊ द्या." संभाजीराजांनी पिलाजींना इजाजत दिली.

इंग्रजांच्या दरबारातील थॉमस निकल्स हा गोरा साहेब मुंबईहून निघून नागोठणे, पाली, सारसगड ह्या मार्गे पाचाडात पोचला होता. त्याच्याबरोबर सदतीस लोक आणि शामजी शेणवी नावाचा दुभाष्या होता.

आपल्या दरबारच्या दोन कामगिऱ्या पार पाडण्यासाठी थॉमससाहेब आला होता. नुकतीच प्रतापरावांच्या घोडधाडीने हुबळी येथील इंग्रजांची वखार खणत्या लावून लुटली गेली होती. तिची तसेच पूर्वीच्या लुटलेल्या राजापूरच्या वखारीची नुकसानभरपाई मराठ्यांकडून वसूल करणे, आणि मीठ व लाकूड या वस्तू मराठी मुलखातून मुंबईला नेण्याचे परवाने मिळविणे अशी ती व्यापारी हेताची कामे होती.

पिलाजीने गड उतरून युवराजांचा निरोप साहेबांच्या कानी घातला. रायगड आणि युवराज बघण्यासाठी उत्सुकलेला थॉमस बूट-पाटलूण चढवून तयारीला लागला. पण एकाएकी मातीचे गरगरते खांब उठविणाऱ्या वावटळींनी पाचाडला घेर टाकला आणि हां हां म्हणता वळीव पावसाची घनचक्कर रायगड-पाचाडावर कडकडत कोसळू लागली. साहेब पायथ्याला अडकून पडला.

दुसऱ्या दिवशी शामजी, पिलाजीसह थॉमससाहेब धापा टाकीत रायगड चढून आला. चिटणीस बाळाजींना त्याने वर्दी दिली. बाळाजींनी सामोरे येत साहेबाला राजांच्या वाड्याच्या सदरी बैठकीसमोर आणले.

"युवराज, ताम्रांचा हेजिब सदरी दाखल झाला आहे." बाळाजींनी संभाजीराजांच्या महालात येऊन मुजरा देत युवराजांना वर्दी दिली.

बाळाजी मनोमन थोडे साशंक होते. हा परदरबारचा वकील. बोलता बोलता युवराजांना आडवाटेला नेईल; मनाजोगे करून घेईल !

महालाबाहेर पडणाऱ्या युवराजांना बाळाजी अदबीने म्हणाले, "युवराज, स्वामी गडावर नाहीत. ही ताम्रांची जात. म्हणून अर्जी. जे बोलणे ते सावधगिरीने व्हावे."

"चिटणीस, आम्ही ऐकून आहोत, साहेब आम्हास बघायला गड चढून आला आहे. त्याला बघू द्या एकदा डोळाभर आम्हास." हसून संभाजीराजे म्हणाले.

बाळाजींच्यासह संभाजीराजे सदरी बैठकीवर आले. पिलाजी, शामजीने अदब मुजरे घातले. थॉमससाहेबाने डुईवरची, पांढऱ्याशुभ्र पिसांचा तुरा असलेली थोराड लाल टोपी उतरली. ती छातीशी धरीत मान व कमर झुकवून संभाजीराजांना टोपीकर अदब दिली. युवराजांनी बैठकीवर बसता बसता साहेबाला निरखीत शामजीला सवाल केला, "काय म्हणते तुमच्या साहेबांची तबियत ?"

"जी बरी आहे. मुंबई दरबारची अर्जी ते युवराजांना पेश करू इच्छितात." शामजीने मध्यस्थाचे काम सुरू केले.

गड चढून आलेल्या साहेबाचा चेहरा पिकल्या कोकम फळासारखा लालबुंद झाला होता. आपल्या निळसर घाऱ्या डोळ्यांनी तो समोरचे बेडर राजरूप निरखीत होता.

"आज्ञा." संभाजीराजांनी चौरंगीवरच्या तबकातील गुलाबकळा उचलून हुंगला. पाठीशी असलेल्या गिर्दीवर कोपर रोवीत ते रेलून बसले.

"आपल्या सरलष्करांच्या फौजांनी हुबळी येथील टोपीकरांची वखार फसगमतीनं लुटली. या दरबारचा आणि टोपीकरांचा कसलाच दावा नाही. करिता या लुटीची नुकसानभरपाई मिळावी अशी टोपीकरांची विनंती अर्जी आहे." शामजीची भाडोत्री जीभ साखरपेरणी करू लागली. युवराज आता काय बोलतात म्हणून बाळाजी, शामजी, पिलाजी साऱ्यांनी कान टवकारले.

"शेणवी, आमचे सरलष्कर तर पन्हाळाप्रांतात आहेत असे आम्ही ऐकून आहोत. त्यांनीच हुबळी लुटली हे सांगताना तुमची फसगंमत तर होत नाही ना ?" युवराजांनी शामजीला आडवाटेला नेले. "बोला, दुसरी काही अर्जी ?"

"जी. मराठी मुलखातून मीठ आणि लाकूड मुंबईस नेण्याची दस्तके मिळाली तर दोन्ही दरबारांचा व्यापारी संबंध जुळून येईल." शामजीने दुसरे सोंगटे बाहेर काढले.

"मीठ आणि लाकूड ह्या तर रोजच्या थाळ्याच्या गरजेच्या बाबी ! शेणवी, तुमच्या दोन्ही अर्जी निवाड्यास लावण्यासाठी खुद्द आमच्या महाराजसाहेबांची वाट तुम्ही बघितली पाहिजे. आम्ही तुमचे म्हणणे त्यांच्या कानी घालू. ते देवदर्शनास गेले आहेत. दोन दिवसांत परततील." संभाजीराजांनी हातीचा कळा तबकात ठेवून बाळाजींना उद्देशून म्हटले, "चिटणीस, साहेबांना निरोपाचे विडे द्या."

"जी" म्हणत बाळाजींनी विड्याचे तबक थॉमससाहेबांपुढे नेले.

बैठकीवरून उठताना संभाजीराजे पिलाजी सुंदर ह्या आपल्या वकिलाकडे बघत म्हणाले, "पिलाजी, तुम्ही जातीनं साहेबांना पाचाडच्या मुक्कामावर पोचते करा! गडावरची हवा त्यांच्या तब्येतीस मानवणार नाही!!"

"जी" पिलाजीने हुंकार भरला. संभाजीराजांनी बाळाजींच्याकडे हसून बघितले.

कमरेत झुकून थॉमस देत असलेल्या अदबीकडे पाठ करून, 'जगदंब, जगदंब' पुटपुटत संभाजीराजे निघून गेले.

दोन दिवसांनंतर पाचाडी परतलेल्या राजांना शामजीने परस्पर गाठले. गोऱ्या साहेबाची आणि त्यांची भेटीची वेळही ठरवून घेतली. ठरल्या वेळी पाचाडच्या वाड्याच्या सदरेवर थॉमस निकल्स शामजीसह राजांच्या भेटीला आला.

भेटीचे प्रयोजन सांगण्यासाठी शामजीने तोंड खोलले– "दोन दिवसांपूर्वी आम्ही गडावर चढून युवराजांच्या कानी सारे घातले आहे." शामजी राजांचा नूर बघण्यासाठी क्षणभर थांबला. ते ऐकताच मात्र बैठकीवरून उठून राजे शामजीला अत्यंत थंडपणे म्हणाले, "शेणवी, आजचा मुहूर्त आमच्या आणि साहेबांच्या भेटीस योग्य नाही! आम्ही त्यांची भेट उद्या घेऊ!"

राजांनी शामजीला मुहूर्ताचे कारण सांगितले, पण ते खरे नव्हते! शामजी आणि थॉमस गडावर युवराजांशी काय बोलले हे राजांना माहीत नव्हते. बोलण्यात गैरमेळ पडू नये यासाठी ते कळणे आवश्यक होते!

जसे संभाजीराजांच्या भेटीत काहीच पदरी पडले नाही, तसे त्या भेटीतही थॉमससाहेबाच्या हातात काहीही पडले नाही! 'शिव' आणि 'शंभो' यांच्या भेटी घेऊन मिठासाठी आलेला थॉमससाहेब आळणी तोंडाने मुंबईला परतला!

पावसाने रिकीब भरली. धारा उधळीत मावळी आभाळ गर्जू लागले. रायगडाच्या कड्यांवरून लाल पाण्याचे गर्जते धबधबे झेपा टाकू लागले. पाखरे कोठारात अडकून पडली. इरले डुईवर घेऊन हारकारा त्या पाणघाईत पाचाडहून निघून गडावर आला. त्याने खबर आणली, "गारठ्याने मासाबांचं सांदं धरल्यात. दम्यानं लई उचल खाल्लीया."

आबादान केलेल्या मारल्या वाघाच्या चरबीचे बुधले घेऊन संभाजीराजे पाचाडात उतरले. जिजाऊ पडूनच होत्या. वाड्यावरील माणसे त्यांच्या सेवेत दाखल होती. सारी देख चोख ठेवायला पुतळाबाई डोळ्यांत तेल घालून मंचकाजवळ उभ्या होत्या. तरीही युवराजांना बघून जिजाऊंना समाधान वाटले. न कळणारा धीर वाटला.

जिजाऊंसाठी म्हणून पाचाडात वस्तीत असलेले केशवपंडित दुपार टळल्यावर आले. त्यांनी दासबोधांची पोथी लाकडी अडंगीवर ठेवली. अनुग्रहाच्या भेटीत समर्थांनी दिलेला तो शब्द – मौक्तिकांचा ग्रंथराज जिजाऊंसाठी राजांनी पाचाडातच ठेवला होता. अंगभर तलम, भगवे उपरणे लपेटलेल्या केशवपंडितांनी नामस्मरण करीत दासबोधाला हात घातला. नुकतीच धूपाची वळी महालभर फिरली होती.

स्वच्छ, संथ वाणीने पंडित बोध वाचू लागले. जिजाऊ, संभाजीराजे, पुतळाबाई ध्यान देऊन ऐकत होते.

मृत्यूची हुकूमत केवढी बेलगाम आहे हे सांगताना समर्थांनी म्हटले होते –

"सरतां संचिताचे शेष। नाहीं क्षणाचा अवकाश।
भरतां न भरतां निमिष। जाणे लागे॥
मृत्यू न म्हणे हयपती। मृत्यू न म्हणे गजपती।
मृत्यू न म्हणे नरपती। विख्यात राजा॥

मृत्यूचा अनिरुद्ध दिग्विजय वर्णन करताना बैरागी समर्थांची रामवाणी कोदंडासारखी टणत्कारी झाली होती.

मृत्यू न म्हणे – हा झुंजार। संग्रामशूर वा क्रूर
न म्हणे – हा प्रतापी, उग्ररूपी, बलाढ्य वा धनाढ्य॥
न म्हणे – हा चक्रवर्ती, करामती वा भूपती
न म्हणे – हा मुद्राधारी, व्यापारी वा ब्राह्मण कर्मनिष्ठ॥
न म्हणे – हा संपन्न, व्युत्पन्न, धूर्त, बहुश्रुत वा पंडित
न जाणे – हा वेदज्ञ, शास्त्रज्ञ, सर्वज्ञ वा महाभला॥

केशवपंडितांचे बोल थरथरू लागले. मिटल्या डोळ्यांनी शांतपणे जिजाऊ ते टणत्कार ऐकत होत्या. त्यांचा हात संभाजीराजांच्या हाती होता.

धरल्या आवाजाने केशवपंडित पुढे वाचू लागले –

"गेले बहुत वैभवाचे। गेले बहुत आयुष्याचे।
गेले अगाध महिमेचे। मृत्युपंथे॥
गेले बहुतां बळांचे। गेले बहुतां काळांचे।
गेले बहुतं कुळांचे। कुळवंत राजे॥"

मृत्यूचे विकराल वर्णन करताना घनदाट अरण्यात शिरलेली समर्थांची वाणी भक्तिमार्गाचा आग्रह धरताना हिरव्यागार पठारावर आली –

"बहुतां जन्माचे सेवटी। जेणे चुके अटाटी
तो हा नरदेह भेटी। करी भगवती॥
देह परमार्थी लाविले। तरीच याचें सार्थक जाले
नाहीं तरी हे वेर्थचि गेले। नाना आघातें मृत्युपंथें॥
जीव जीवांत घालावा। आत्मा आत्म्यांत मिसळावा
राह राहो शोध घ्यावा। परांतराचा॥
जो जगदंतरें मिळाला। तो जगदंतरचि जाला
आरत्रीं परत्रीं तयाला। काय उणे ?

काया बहुत कष्टवावी। उत्कट कीर्ति उरवावी
चटक लावुनी सोडावी। कांहीं एक॥''

स्वत: जगल्या-भोगल्या अनुभवाचे गर्भसार बोधरूपाने सांगताना समर्थच निर्देह झाले होते. त्यांनी पुजल्या-भजल्या श्रीरामाच्या वर्णासारखे निळे आकाशबोल संभाजीराजे आणि जिजाऊंच्या कानी पडू लागले –

''बहुतां जन्माचे सेवट। नरदेह सांपडे अवचट
येथ वर्तावें चोखट। नीतिन्यायें।
कीर्ति पाहतां सुख नाहीं। सुख पाहतां कीर्ति नाहीं
केल्यावीण कांहींच नाहीं। कोठें तरी॥
उत्कट, भव्य तेंचि घ्यावें। मिळमिळीत अवघेंचि टाकावें
नि:स्पृहपणे विख्यात व्हावें। भूमंडळीं॥

एवढे काळीजवेधी शब्द उभे करून समर्थ शेवटी त्या शब्दांनाच म्हणत होते –

''सरली शब्दांची खटपट। आला ग्रंथाचा शेवट।
येथे सांगितले स्पष्ट। सद्‌गुरु भजन॥''

''जय जय रघुवीर समर्थ ऽ!'' केशवपंडितांनी समाप्तीची नांदी उठवली.

जिजाऊंचे थकले हात जोडले गेले. त्यांच्या मिटल्या डोळ्यांतून पाझरलेले अश्रू कुणालाच दिसले नाहीत.

ऐकलेला जीवनबोध संभाजीराजांच्या मस्तकात भणभणत राहिला –

''मृत्यु न म्हणे – चक्रवती, प्रतापी मुद्राधारी –
गेले बहुत कुळांचे। कुळवंत राजे॥
काया बहुत कष्टवावी। उत्कट कीर्ति उरवावी।
जीव-जीवात घालावा। आत्मा आत्म्यांत मिसळावा।
उत्कट भव्य तेंचि घ्यावें। मिळमिळीत अवघेंचि टाकावें।
बहुतां जन्माचे सेवट। नरदेह सापडे अवचट
येथ वर्तावें चोखट। नीतिन्यायें!''

आषाढी एकादशी उलटली. संभाजीराजे पाचाडीच होते. पावसाळी लाल पाणी घेऊन भरलेल्या गांधारी आणि काळ ह्या नद्या रायगडाला घेर टाकून फिरल्या होत्या.

नेहमीप्रमाणे संभाजीराजे जिजाऊंच्या धरल्या गुडघ्यांना चरबीचे मालिश हलक्या हातांनी देऊ लागले. जिजाऊ शांतपणे म्हणाल्या, ''बरेच दिवस झाले. तुम्हास काही एक बोलावं म्हणतो आम्ही, ऐकता?''

''जी.''

''थोरल्या बाईंचा आणि तुमचा मामुली निमित्तानं गैरमेळ पडतो असं आमच्या कानी

येतंय.'' जिजाऊ थांबल्या. शेजारच्या समईतील तेवत्या ज्योती त्यांनी उगाच क्षणभर आपल्या थकल्या नजरेने निरखल्या.

त्यांच्या गुडघ्यावरचे हात तसेच खाली नेऊन त्यांच्या पायांना भिडवीत संभाजीराजे घोगऱ्या आवाजात म्हणाले, ''आपल्या पायांची आणबेल मासाहेब. आम्ही त्यांना खूप मानतो. पुष्कळ अदब ठेवतो.''

''अदब हा जनान्याचा रिवाज. पुरुषांनी सोशिक असले पाहिजे. त्यांनी अदब सोडली तरी तुम्ही सोसणं सोडू नका. तुमच्या आऊ गेल्या तेव्हापासूनच हे तुमच्या पाठीशी लागलं आहे. वाढत्या उमरीनं ते वाढणार आहे. शक्य होतं तोवर आमचा हात तुमच्या पाठीशी राहिला. आता आम्ही थकलोत.'' दूर लावल्यासारखी जिजाऊंनी नजर महालाच्या तख्तपोशीला लावली. ती तशीच ठेवून त्या म्हणाल्या, ''हाताची पाची बोटं सारखी नसतात म्हणून काही त्यातील एखादे दूर करता येत नाही! असेल त्या वकुबानिशी अवघ्यांना बरोबर घेऊन चालणं पडतं. हे विसरू नका. एवढी थोर जगदंबा पण तिचेसुद्धा भुत्याखेरीज काही चालत नाही! लहान-थोर सारेच आपले आहेत. हेच आम्ही हयातभर आमच्या राजांना सांगत आलो. आज तेच तुम्हांस सांगतो आहो.''

''जी.'' संभाजीराजांनी ती माया उरात ठेवीत हुंकार भरला.

''जा. बाहेर झड सुमार झालीय काय बघून या.'' जिजाऊंनी दाटू लागलेला विषय कसबाने पालटला. संभाजीराजे महालातून निघून सदरेवर आले.

पुन्हा महालात जाऊन त्यांनी जिजाऊंना हात देत मंचकावरून खाली येऊ दिले. त्यांना सावरून धरून ते वाड्याच्या सदरी जोत्यावर घाटेजवळ आले. नेमला तासवाला मुजरा करीत पुढे झाला. घाट घणघणू लागली.

थोड्याच वेळात रायगडच्या मावळमाचीवर बार्दाराने धरलेल्या भगव्या जरीपटक्याचा ठिपका दिसू लागला. दूरवरच्या धुकट माचीवर राजे दाखल झाल्याची ती खूण होती. जिजाऊंना थकल्या डोळ्यांनी ती दिसू शकत नव्हती. म्हणून संभाजीराजे म्हणाले, ''मासाहेब, महाराजसाहेब माचीवर आले.''

ते ऐकताच राजांची उभट मुद्रा डोळ्यांसमोर तरळलेल्या जिजाऊंच्या ओठांतून सहजी शब्द सुटले – ''औक्षवंत व्हा!''

माचीकडे रोख धरत मुजरा देणाऱ्या संभाजीराजांच्या ते कानी पडले मात्र. त्यांना वाटले – ''जसं आबासाहेबांचं केलं आहे तसं मासाहेबांचं वर्णन केलं तर फक्त समर्थच करतील. इतरांचं ते सामर्थ्यच नव्हे!''

पावसाची नाळ तुटली. रायगडाचा घेर फुलाच्या हिरवाईने बहरून आला. जिजाऊंचा निरोप घेऊन संभाजीराजे गड चढून आले.

दरम्यान दोन घटनांची चक्रे फिरून गेली होती. उमराणीच्या खुल्या मैदानात कैचीत फसलेला विजापूरचा सेनापती अब्दुल करीम बहलोलखान यास जिवे सोडण्याची चूक

प्रतापरावांनी केली होती. आणि वाई प्रांतातील पांडवगड मराठ्यांच्या एका फौजफळीने झडप टाकून दस्त करण्याचा प्रयत्न केला होता.

दसरा उरकून राजे सातारा प्रांतात निघून गेले. चारच दिवसांत त्यांनी पांडवगड जिंकल्याची खबर रायगडावर आली. ती ऐकून संभाजीराजांनी रायगडावर साखर वाटली.

धाराऊने दिलेल्या हुलग्याच्या माडग्याचा कटोरा ओठांआड रिचवून संभाजीराजे आपल्या महालाबाहेर पडले. बाहेर पहाऱ्याला यादव नामाजी होता. त्याचा मुजरा आपलासा घेत युवराज त्याला म्हणाले, "यादवराव, आमच्या संगती या."

त्याच्यासह ते दरबारी चौकात आले. दक्षिणी जोत्यावर मांडलेल्या, पंजा उगारलेल्या, पेंढा भरल्या वाघावर त्यांची नजर गेली. ते जनावर आत्ताच झाडीतून बाहेर पडल्यागत जिवंत दिसत होते. "आपण अगोदर भोसले आहोत, मग शिकारी." राजांची बोली संभाजीराजांच्या मनात फिरली. कारण नसता तिला समर्थांचे बोल चिकटले– "काया बहुत कष्टवावी ! उत्कट कीर्ति उरवावी !"

यादव नामाजीसह जगदीश्वरदर्शन करून युवराज कुशावर्ताच्या टाक्याजवळ आले. कुणाचीही नजर जखडून पडावी असे नानारंगी कमळफुलांचे थाळे टाक्यावर उठले होते. गडाच्या मंद वाऱ्याने ते डुलत होते.

भारल्यासारखे संभाजीराजे कुशावर्ताकडे बघत राहिले. त्यांच्या मनी एका विचाराचे कमळफूल फुलून उठले– "मासाहेबांना फुलांचा खूप सोस. गडावर आणून हे टाके त्यांना एकदा दाखविलं पाहिजे."

"यादवराव, आत उतरा. वेगवेगळ्या वाणांचे नाळ खुडून आणा." युवराजांनी आज्ञा केली. पायताणे उतरवून यादव नामाजी टाक्यात उतरला. निळे, सफेद, लाल असे अर्धवट फुलले कमळनाळ घेऊन बाहेर आला.

ते निरखीत युवराज बालेकिल्ल्याकडे परतले. दरबारी चौकातील कारंजी-हौद आला. शतधारांनी उसळत्या फवाऱ्याकडे नजर टाकीत संभाजीराजे महालात आले.

त्यांना कल्पना नव्हती पण महालात धाराऊ आणि येसूबाई उभ्या होत्या. येसूबाईंनी रामराजांना वर छातीशी घेतले होते. युवराजांना बघताच धाराऊ आपले आपणालाच सांगितल्यागत म्हणाली, "तरकतच न्हात न्हाई. आईच्या पूजंची जुपी लावून द्याची न्हायलीच की बुवास्नी !" आणि ती महालातून बाहेर पडलीही.

"या." रामराजांना घेण्यासाठी कमळनाळांसह संभाजीराजांनी हात पसरले.

येसूबाईंच्या काखेतून त्यांना घेताना संभाजीराजांच्या बोटांचा स्पर्श येसूबाईंच्या अंगादंडाला झाला ! उभ्या अंगावर रसरशीत कमलफुले फुलल्याचा भास त्या स्पर्शाने येसूबाईंना झाला ! त्यांच्या पापण्या फडफडल्या. कपाळीच्या कुंकूबोटात घामाचे थेंब तरारून आले. मोठ्या धाडसाने त्यांनी समोरच्या टोपाखालच्या पाणीदार डोळ्यांना

आपले डोळे भिडविले. आणि क्षणात ते खालच्या फरसबंदीवर टाकले आणि लगबगीने त्या बाहेर जायला निघाल्या.

"थांबा !" कुणीतरी त्यांचे पाय जागीच खिळवून टाकले.

संभाजीराजे रामराजांसह पुढे आले. हातीचे कमळनाळ त्यांनी येसूबाईंच्या मुद्रेच्या केतकी कमळाकडे बघत पुढे धरले आणि म्हणाले, "घ्या. एकतर जगदीश्वराला नाहीतर तुम्हालाच हे द्यावेत असे ठरविले होते !"

धडधडत्या छातीने आणि थरथरत्या हाताने येसूबाईंनी ते रंगीबेरंगी फुले असलेले देठ हाती घेतले. ते घेताना पुन्हा झालेल्या बोटांच्या स्पर्शाने त्यांच्या पापण्यांचे अस्तर आणि पुन्हा कानांची पाळी रसरसून आली. डोळ्यांना डोळे भिडले.

भांबावलेल्या येसूबाई नेसूच्या शेवाने फरसबंदी झाडीत तरातर महालाबाहेर पडल्या !

थोड्याच वेळात धाराऊ महालात आली, दोघा बंधूंना एकत्र बघून हसली. युवराजांच्या हातात कमळे नाहीत हे बघून ती म्हणाली, "पूजेची जुपी लागली; पर देवीला कमळाचं दॅट ठिवायचं न्हाऊनच ग्येलं. आता कोण बापडीला ते आनून देनार !" आणि रामराजांना घेऊन धाराऊही हसत बाहेर पडली.

बंकापूर लुटून, कारवार तसनस करून, आनंदराव मकाजी यांना पन्हाळा प्रांती ठेवून राजे पुरत्या दोन महिन्यांनंतर रायगडी आले. ते आले नि एक वाईट आणि एक चांगली खबरही त्यांच्या पाठोपाठ गड चढून आली.

दौलतीचे कदीम चाकर मुजुमदार निळो सोनदेव वारले ही खबर वाईट होती.

आणि काशीचे गागाभट्ट राजे यांच्या भेटीला येत आहेत ही खबर चांगली होती.

राजांचे कुलोपाध्याय– नाशिकचे अनंतभट्ट कावळे यांनी खास माणूस पाठवून काशीच्या वेदशास्त्रसंपन्न विश्वेश्वरभट्ट उर्फ गागाभट्ट यांना क्षेत्री आणवले होते.

आचार्य गागाभट्टांना इतमामाने गडावर आणण्यासाठी राजांनी आण्णाजींना पालखी-सरंजामासह नाशिकला रवाना केले. आणि गागाभट्टांचे दर्शन जिजाऊंना घडावे म्हणून त्यांना पाचाडातून गडावर आणण्याची कामगिरी राजांनी संभाजीराजांना जोडून दिली.

गडचढीचे भोये आणि पडदेबंद मेणे घेऊन आज्ञेप्रमाणे संभाजीराजे पाचाडात उतरले. त्यांनी थकल्या जिजाऊंना हातजोड देत मेण्यात बसते केले. दुसऱ्या मेण्यात पुतळाबाई बसल्या. कबिला रायगडावर आला. पण आजारी काशीबाई मात्र तेवढ्या पाचाडातच राहिल्या. श्रीक्षेत्र काशीच्या धर्मपीठाचे श्रेष्ठ आचार्य रायगडावर येताहेत या जाणिवेने सर्वत्र चैतन्य पसरले. दाक्षिणात्यी मावळी स्वागताची तयारी खुद्द राजे-संभाजीराजे यांच्या देखरेखीखाली सिद्ध झाली.

महाडाहून अनंतभट्टांची गडावर वर्दी आली– "आपल्या निवडक शिष्यगणांसह आचार्य येताहेत."

राजे-संभाजीराजे जिजाऊंची पायधूळ घेऊन गड उतरायला लागले. त्यांच्या पालख्यांमागून मोरोपंत, आण्णाजी, दत्ताजी, येसाजी, निश्चलपुरी, कवी परमानंद, कवी कुलेश, प्रभाकरभट्ट, केशवपंडित अशी निवडीची मंडळी गड उतरू लागली.

पालखीच्या राजगोंड्याबरोबर संभाजीराजांचे मन हिंदोळू लागले – "कसे असतील आचार्य गागाभट्ट? समर्थांच्यासारखे? त्यांना तरी आम्ही कुठे पाहिलंय? काशी मथुरेहून काशीच्या वाटेवर असताना अम्हास परतावं लागलं. काशी राहून गेली! आणि आता बघून तरी काय उपयोग? तिथल्या विश्वेश्वराचं देऊळ औरंगजेबानं लुटलं. मंदिराच्या चिऱ्यांनी त्याच जागी म्हणे मशिद उठवली! औरंगजेब! भरल्या दरबारी बंदिस्त कठड्याआड बसणारा! आम्हास 'हौदा खेळता काय?' हे वजिरामार्फत विचारणारा!" पालखीच्या दांड्याच्या कुरकुरीतूनच शब्द बाहेर पडताहेत असा त्यांना भास झाला. "या भूमंडळाचे ठायी। धर्मरक्षी ऐसा नाही। महाराष्ट्रधर्म उरला कांही। तुम्हाकरिता!"

'महाराष्ट्रधर्म' नकळत एक हुस्कार त्यांच्या नाकपाळ्यांतून सुटला. पाचाडचा जिजाऊंचा वाडा मागे पडत होता. रस्त्याच्या दुहाती शस्त्रधारी मावळ्यांनी शिस्त धरलेली दिसू लागली. पखाले पालख्या जघून दूर हटू लागले.

आगवानीचा डेरा आला. पालख्या ठाण झाल्या. अंथरल्या पायघड्यांवरून राजे संभाजीराजे डेऱ्यात शिरले. आत मांडलेली बैठक राजांनी निरखली. लोड, गिर्द्या, बिछायती सारा इतमाम ठीक होता. बैठकीच्या बगलेला एक धारकरी सरपोसाने झाकले सुवर्णतबक खांद्यावर घेऊन उभा होता.

मोरोपंत, आण्णाजी, येसाजी, परमानंद, कुलेश साऱ्यांच्या चर्येवरून नजर फिरविताना राजांचे मन राजगडाच्या भुयारात शिरावे तसे खोलवर शिरले.

"केवढा पुण्यवंत योग हा! पाचारण करतो म्हटले तरी मधल्या गनिमांच्या मुलखाने साध्य होणार नाही ते काशी धर्मपीठाचे आचार्य आपल्या पावलांनी येताहेत."

महाडच्या रोखाने उठलेल्या शंखांच्या कल्लोळत्या निनादाने राजांची साखळी तुटली. प्रभाकरभट्टांनी आत येत वर्दी दिली. "वेदोनारायण श्री आलेऽ!"

राजे-संभाजीराजे जोडीने होत डेऱ्याबाहेर आले. मानेच्या शिरा फुलवीत, आभाळमार्गी तोंड धरून आचार्यांचा शिष्यगण बेहोष शंखनाद उठवीत होता. त्या पवित्र कल्लोळात नौबतडंक्याचा मर्दाना घोष मिसळला!

ठाण झाल्या पालखीजवळ लगबगीने जात राजांनी आचार्य गागाभट्टांना हात दिला. भगव्या बासनातून हळुवारपणे धर्मग्रंथ बाहेर घ्यावा तसे त्या भगव्या अस्तराच्या पाळखीतून राजांनी आचार्य श्रींना बाहेर घेतले!

मथुरेत चुकार झालेली 'काशी' संभाजीराजे निरखू लागले! मस्तकी लिंबू वाणाचा जरीकिनारी रुमाल, अंगभर लपेटलेली भगवी शाल, तिला धरून उत्तरीमाटाचे

डाळिंबकिनारी सफेद धोतर; सतेज पायांत लाकडी खडावा, कपाळी गंधाचे शैव पट्टे, तासाच्या थाळीसारखी गोल तोरंजनी वर्णाची मुद्रा, तेवते शांत डोळे.

गागाभट्टांच्या रूपाने हिंदू विद्वत्तेचा सूर्य मावळी स्वागताच्या चांदण्यात न्हात उभा होता! खेचल्यासारखे संभाजीराजे आचार्यांच्या डाव्या बगलेला झाले.

पायघड्या तुडवीत राजे आणि संभाजीराजे यांच्यामधून गागाभट्ट डेऱ्यात प्रवेशले.

मांडल्या बैठकीवर आचार्यांना आदराने बसवून राजांनी सुवर्णी तबकातील पानविड्यासह श्रीफळ त्यांच्या ओंजळीत दिले. मानाचे वस्त्र म्हणून शाल त्यावर ठेवली.

राजे आणि संभाजीराजे यांनी गुडघे टेकून आचार्यांना नमस्कार केला.

आचार्य तो स्वीकारण्यासाठी झुकते झाले. हात उभवीत, डोळे मिटून त्यांनी आशीर्वाद दिला, "जयोऽस्तु!"

राजे-संभाजीराजांच्या पायसोबतीत आचार्य रायगड चढून आले. जगदीश्वराचे दर्शन करून व्यापारपेठ, नगारखाना, दरबारी चौक बघत साऱ्यांसह ते राजांच्या खासेवाड्यात आले. बैठकमहालात राजे, जिजाऊ, संभाजीराजे, रामराजे यांच्यासाठी देखणी राजबैठक सिद्ध केली होती. तिच्यासमोर वेदोनारायणांच्यासाठी मृगाजिन घातलेले प्रशस्त आसन मांडले होते.

आचार्य आल्याची वर्दी अंतःपुरात जिजाऊंना पोच झाली. राजांच्या राण्या, मुली, येसूबाई, रामराजे असा गोतावळा पाठीशी घेत शुभ्र नेसूधारी जिजाऊ बैठकमहालाच्या उंबरठ्याजवळ आल्या. त्यांना बघताच आसनावरून उठलेले आचार्य गागाभट्ट चालत पुढे झाले. जिजाऊंच्या रूपाने बिजलीचं शुभ्र वस्त्र लेवून सोशिक मावळी आभाळच उंबरठ्यात उभे होते!

पापणी न मोडता त्यांच्याकडे बघत पुढे झालेल्या गागाभट्टांनी – "माँजी, प्रणाम." म्हणत झुकून थेट जिजाऊंच्या पायांना आपल्या हाताची बोटे भिडविली!

असे काही होईल ही कल्पना नसलेल्या जिजाऊ लगबगीने पाय मागे घेत म्हणाल्या "हे कोण करणं! आपण थोर-श्रेष्ठ आचार्य."

त्यांची भावना ओळखून गागाभट्टांनी खुलासा केला, "माँजी, गंगासे बढकर श्रेष्ठ हैं आपके चरण। हम आचार्य हैं पढत धर्मग्रंथोंके। आप साक्षात् धर्ममाता हैं।" गंगेच्या खळखळाटासारखे ते बोल होते. ते ऐकताना राजांच्या पापणीकडा दाटल्यागत झाल्या. संभाजीराजांची छाती भरून आली.

हाताची खूण देत आचार्यांनी जिजाऊंना बैठक घेण्याची विनंती केली. धीम्या धीम्या चालीने जात जिजाऊ मांडल्या बैठकीवर बसल्या.

राजांनी आचार्यांना मृगासनावर बसण्याची विनंती केली. आचार्यांनी बैठक घेतली. त्यांच्या चरणाखाली असलेल्या आसनावर प्रभाकरभट्टांनी ताम्हन ठेवले.

राजे, संभाजीराजे, रामराजे, राणीवसा, साऱ्यांनी आचार्यांची सविध पाद्यपूजा केली. बैठकीवरून उठलेल्या जिजाऊ पाद्यपूजेसाठीच पुढे येताहेत हे बघून गागाभट्ट राजांना म्हणाले, "नरेश, उन्हे फिरसे आसनस्थ कराइये। मातासे पुत्र की पाद्यपूजा पुत्र की आयु कम कर देती है। हमें जीवित रहना है– कमसे कम एक संकल्पित, धर्मकार्य पूर्ण करनेतक।"

आचार्यांची इच्छा सांगून राजांनी जिजाऊंना राजबैठकीवर उच्चासनी बसविले. त्यांच्या पायगतीला, दोन्ही तर्फांना संभाजीराजे, रामराजे घेऊन राजांनी बैठक घेतली. पाठीमागे राणीवसा उभा राहिला. भोवती मंत्रिगणांसह, निवडक असामी हात बांधून, अदब धरून– धर्मपीठ आणि धैर्यपीठ यांचा संवाद ऐकण्यासाठी उत्सुक झाल्या.

देवस्मरण केलेल्या वेदसंपन्न गागाभट्टांच्या विमल मुखातून बनारसी वाक्‌गंगा स्रवू लागली– "पुरुषोत्तम शिवाजीराजे, हम काशीक्षेत्रसे यहाँ दक्षिणदेश आये– मनमें एक धर्मसंकल्प लेकर। आपका यह किला हमने देखा, परमसंतोष। यहाँ सब है। परंतु एक नहीं। सिंहासन। नरेश, राजदंडके व्यतिरिक्त धर्मदंड व्यर्थ है। समस्त आर्यावर्तमें आज हिंदुओंका एक भी राजपीठ नहीं। सिंहासन नहीं जिसे देखकर हिंदुमस्तक गर्व करे। जीवनसंग्राम लडानेकी मनीषा करे। वहीं कारन है कि हिंदु स्वयं को निराश्रित, पराजित मान रहें हैं। नरश्रेष्ठ, अनुरक्षित धर्म धर्म नहीं रहता! ....

"आपका कीर्तिसुगंध श्रवण कर हमें प्रेरणा प्राप्त हुई राजा शिवाजी, समस्त आर्यावर्तका यह भार स्कंधोंपर तोलने आप केवल आपही योग्य हैं। ...

"उत्तरमें हमारे पवित्र देवालय नष्ट हो रहे हैं। देवदेवता विटंबित किये जा रहे हैं, म्लेंच्छों उदंड हाहाकार मचा दिया है। दुर्बल हिंदु प्रजानन बलात् धर्मांतरित किये जा रहे हैं।" आचार्यांचा धीरगंभीर आवाज धरत चालला.

"यही चलता रहा तो रामकृष्णकी यह पवित्र देवभूमि रौरव हो जायेगी। यही प्रयोजन है कि समस्त उत्तरवासियोंके प्रतिनिधिरूपमें भिक्षापात्र हाथ लिये हम आपके किलेके महाद्वारमें खडे हैं। धर्मरक्षक, हमें सिंहासन प्रदान करो। नरश्रेष्ठ, धर्मदंडको राजदंड प्रदान करो। राजा छत्रपति बनो। 'छत्र' प्रदान करो।" भावनावेगाने उचंबळलेल्या आचार्यांनी दोन्ही हात पसरले. उत्तर दक्षिणेला साकड-साद घालू लागली.

डोळे भरल्यामुळे जिजाऊंना समोरचे काहीच दिसेनासे झाले.

मिटल्या डोळ्यांच्या राजांचा हात छातीवरच्या कवड्यांवर फिरत राहिला. बोटांना स्पर्शणारी प्रत्येक कवडी त्यांच्या मिटल्या डोळ्यांसमोर खर्ची पडलेला चेहरा-चेहरा उभी करू लागली. बाजी, तान्हाजी, मुरार, सूर्याजी, रामजी! कैक. ते सारेच हात उठवून म्हणत होते– "राजे, आम्हांस छत्र द्या! मरणास मोल द्या!"

संभाजीराजांची पाणीदार नजर वेदभूषण गागाभट्टांच्या सतेज, निर्भय ओठांवर अडकून पडली होती. आचार्यांच्या रूपाने उभा रायगडच आपल्या कड्यांचे भक्कम ओठ उघडून कानाउरांत साठवावे असे काही सांगतो आहे असे त्यांना वाटले.

"राजदंडके व्यतिरिक्त धर्मदंड व्यर्थ है। असुरक्षित धर्म– धर्म नहीं रहता। देवालय नष्ट हो रहे हैं, देवदेवता विटंबित किये जा रहे हैं। दुर्बल प्रजानन बलात् धर्मांतरित किये जा रहे हैं।" ऐकल्या शब्दाशब्दाला त्यांच्या आतून कुणीतरी फेरसाद घालू लागले.

"मारिता मारिता मरावें। तेणे गतीस पावावें
फिरोनी येता भोगावें। महत्‌भाग्य॥"

गागाभट्टांची आज्ञा राजांनी शिरोधार्य मानली. झाल्या बैठकीचे बोलणे रायगडाच्या पाखरांनी आपल्या पंखांवर घेतले! आणि तीं फडफडत मावळभर उडाली!

"राजं गादीवं बसनार! मोट्टं बादश्या हुनार! जंगी दर्बार बशिवनार!" बारा मावळांच्या खोपटाखोपटाला भाबड्या प्रेमांचे रोमांच फुटले.

"म्हातारबाईनं लई वनवेस काढलं. आतं पारनं फिटंल तिच्या नदरंचं. ल्योक उपजावा तर अस्सा. न्हायतर आमची बी हाईतच... खायाला कार नि..." पाणोठ्या-पाणोठ्यांवर घागरी ठणठणू लागल्या.

या राज्याभिषेकात काही उणे राहायला नको म्हणून अनंतभट्ट कावळे पुन्हा नाशिकला गेले. त्यांनी तीर्थाची ब्रह्मसभा भरविली. सभेत दोन विवादाचे मुद्दे उपस्थित झाले. कलियुगात क्षत्रियलोप झाला आहे आणि राज्याभिषेकासाठी आवश्यक असलेला मुंज हा राजांचा विधी झालेला नाही. मात्र विवाह झाले आहेत!

गागाभट्टांनी शास्त्रपुराणांचे दाखले देऊन प्रायश्चित्ताने संस्कारलोप भरून काढता येतात हे नासिकसभेला पटवून दिले.

आपली वंशावळीची यादी आणण्यासाठी राजांनी बाळाजी चिटणीसांना राजपुतान्यात धाडले. मेवाड, उदेपूर, जयपूर अशी नगरे पालथी घालून बाळाजींनी यादी आणली. राजे सूर्यवंशी 'शिसोदिया' कुलातील रजपूत क्षत्रिय होते. राणा भीमसिंह, सज्जनसिंह, दिलीपसिंह, देवराजजी अशा सूर्यतेजी राजांच्या कुळातले!

सारे आडबंद दूर झाले. गागाभट्टांच्या सूचनांवर राज्याभिषेकाचे तपशील तयार होऊ लागले. ज्येष्ठ म्हणून पट्टराणीचा अभिषेक सोयराबाईंना आणि युवराज म्हणून राजांच्या हक्क-जबाबदाऱ्यांच्या वारसापदाचा अभिषेक संभाजीराजांना करण्याचा आदेश आचार्य गागाभट्टांनी दिला.

मावळ्यांची होऊ घातलेली राजधानी म्हणून रायगड सजावटीला निघाला.

दरबारी चौक, बालेकिल्ल्याचे खासेमहाल आईनेबंदीसाठी हिरोजी इंदलकर, आबाजी, अर्जोजी-गिर्जोजी यादव यांनी हाती घेतले.

शिलावट छिन्न्या घुमवू लागले. ठोका ठोका ताल धरू लागला– "राजा शिवछत्रपति!" सुतार, सोनार, लोहार, कहार, मांग, महार झाडून सारे आघाडीने कामावर पडले.

जवाहिरे, सराफ, अत्तार सौद्यासाठी उमेदीने रायगड चढू लागले. पागेची घोडी नालबंदीसाठी बाहेर पडली. प्रांत परगण्यांतून कबाडीच्या बैलांनी फेसाटत वाहून आणलेली धान्याची आणि मिठाची पोती अंबारखान्यात आबादान होऊ लागली.

गडावरच्या मंदिरातील मूर्ति-मूर्तींवर वज्रलेप चढू लागले. लाल फासबंदांच्या थैल्या कमरशेल्यात खुपसून थैलीस्वार गड उतरू लागले. वहिर्जी, कर्माजी, विश्वास यांची खबरगीर पथकं खांद्यावरची रामोशी कांबळी सावरत मुलूखभरच्या खबरा उचलू लागली. आठरा कारखाने गजबजून उठले. चांदीची कडी भरलेले मर्दाने हात आणि कोपरभर चुडा भरलेले जनानी हात, स्वतःला हरवून एक नामी मनसुबा उभा करण्यासाठी झटू लागले.

ओतकामात तरबेज असलेल्या रामजी दत्तोने राजांच्या हस्ते श्रीफळ वाढवून 'सिंहासन-घडाईच्या' कामाला हात घातला. रामजीला माहीत होते. तो एका 'मावळी रामचंद्राचे' राजआसन घडविणार आहे! बत्तीस मण भराचे! झळझळत्या बावनकशी सुवर्णाचे!

संभाजीराजे हत्तीटाक्याजवळ उभे होते. फार वर्षांपूर्वी बच्चा असताना दोरखंडांनी चोरदरवाज्याच्या बाजूने रायगडावर चढविलेला 'त्रिशूल' हा हत्ती आता भरात आला होता. टाक्यात पाण्याला पडलेला 'त्रिशूल' बाहेर घेण्याच्या खटपटीत माहूत पुरता दमगीर झाला! 'त्रिशूल' हट्टावर आला होता. टाक्याबाहेर पडायला राजी नव्हता. संभाजीराजे माहुताची घालमेल बघत हत्तीच्या विचारात गेले होते. शेजारी महादेव यमाजी आणि यादव नामाजी उभे होते.

सांजेचा नौबतडंका झडायला सुरुवात झाली न झाली तोच कुणीतरी रोखल्यासारखा डंका गपकन थांबला.

संभाजीराजांच्या कपाळी आठी जमली. दिठी समोर गेली. विझल्या वणव्याचा काळपट डाग अंगावर घेतलेला लिंगाणा त्यांना दिसला.

बालेकिल्ल्याच्या रोखाने चाललेल्या संभाजीराजांच्या कानी माहुताचे वैतागी शब्द पडले – "त्रिशूऽल, आरं हाटमोरेपन सोड! काय टाक्यातच रुतून बसनार हाईस का काय?"

महादेव यमाजी आणि यादव यांना पाठीशी घेत संभाजीराजे तरातर चालत पालखी दरवाज्याने बालेकिल्ल्यात आले. राजांच्या खासेवाड्याच्या सदरी पायऱ्या चढतानाच त्यांना जाणवले – 'काही तरी घडलंय.'

बैठकीसमोर खालच्या मानेने उभ्या असलेल्या राजांच्या सामने कर्माजी हा धूळमाखल्या कपड्याच्या आनंदरावाच्या फौजेचा खबरगीर उभा होता. बाजूला आण्णाजी, बाळाजी, मोरोपंत, येसाजी खडे होते. साऱ्यांच्या माना पडल्या होत्या.

मुजरा देऊ बघणाऱ्या संभाजीराजांना बघताच हातपंजा उठवून ते म्हणाले, "शंभूराजे, तो मुजरा तुमच्या गेल्या मुतालिकांना करा!"

ओढल्या पायांनी राजे युवराजांच्या जवळ आले. त्यांच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले, "संभाजीराजे, प्रतापरावांनी पंख जाळून घेतले! पठाण बहलोलच्या दहा हजारी फौजेच्या वणव्यात! तुमचे मुतालिक गेले! आमचे सरलष्कर गेले! आमच्यावर रुसून! हटमोरेपणानं! स्वतः संगती आमचे लढाऊ सहा बांके घेऊन!"

संभाजीराजांना आठवले, बहलोलला सलामत सोडल्याबद्दल राजांनी राजसंतापाने प्रतापरावांना पत्र लिहिले होते – "पठाणाशी सला काये निमित्त केला? गनिमास मारून गर्देस मिळवावे. नातर आम्हास तोंड दावो नये!"

सुटला बहलोल बेइमानपणे मराठी मुलखाला ताराज करीत सुटला होता. पुरे एक वर्ष प्रतापराव त्याच्या पाठलागावर होते. चुकीचा सल सुधारून काढण्याची संधी बघत होते. बहलोल बंदिस्त होता.

राजे 'तख्ती बसणार' ही खबर प्रतापरावांना लागली. आता रायगडी परतावे लागणार. पण बहलोल जिंदा ठेवून राजांना तोंड कैसे दावावे?

नेसरीजवळ कुप्याच्या खिंडीवर बहलोलचा दहा हजारी पठाणी तळ पडलाय, ही खबर प्रतापरावांना लागली. फौजेनिशी चालून जाऊन फत्ते होणार नव्हती. म्हणून प्रतापरावांनी आपल्या डेऱ्यात शेलके धारकरी याद केले. कुणाला ध्यानीमनी नसता प्रतापरावांनी त्यांना साकडे घातले – "आम्ही पठाणावर चालून जाणार! एकले! राजांस्नी आमचा दंडवत सांगा!"

सहा धारकऱ्यांनी कमरेची हत्यारे उपसत त्यांचा शब्द हट्टाने झेलला – "सरलष्कर, जितं तुमी तिथं आमी!" आणि महाशिवरात्रीच्या दिवशी घोड्यांवर मांड घेतलेले प्रतापराव नंगी तलवार हाती नाचवीत – "हरऽ हरऽ हर महादेव" गर्जत बेभान उधळले. सहा घोडाईत पाठीशी घेऊन!

ते वेडे सात पक्षी दहा हजारी फौजेवर झडप घालण्यासाठी गेले ते परतलेच नाहीत! सात कडकडत्या विजा पठाणी फौजेच्या दर्यात कोसळल्या नि विझल्या.

कर्माजीने सांगितलेला वृत्तान्त राजांच्या तोंडून ऐकताना संभाजीराजांच्या डोळ्यांसमोर प्रतापरावांची मर्दानी मुद्रा उभी ठाकली.

उधळत्या घोड्यावर मांड घेतलेले, हत्यार नाचवीत चवताळलेले प्रतापराव लिंगाण्याच्या पेटत्या वणव्यात घुसल्याचा भास संभाजीराजांना झाला!

घुसते प्रतापराव म्हणत होते – "अमनधपक्यानं पेटल्याली ही आगट लई वंगाळ धाकलं धनी! रानपाखरं त्येनं येलबाडून जात्यात! घालून घेत पंख जाळून घेत्यात!"

कारण नसताना माहुताचे ऐकलेले शब्द संभाजीराजांच्या मनात फिरले – "त्रिशूऽल, आरं हाटमोरेपन सोड!! टाक्यातच रुतून बसनार हाईस का काय?"

सजला रायगड प्रतापरावांच्या सुतकात आला. दाटल्या मनाने राजांनी प्रतापरावांचे मर्तिकविधी केले. सरलष्करपदाची मोकळी जागा मानवस्त्रासह हंसाजी मोहित्यांना दिली.

ती देताना 'हंबीरराव' ही खिताबत त्यांना बहाल केली.

हंसाजी सोयराबाईंचे बंधू. त्यामुळे त्यांची ही नामजादी सोयराबाईंना खोलवर सुखवून गेली. अडी-नडीला रक्ताची माणसे कामी पडतात. सत्ता हाती असलेल्या रक्तसंबंधाच्या माणसाचा तर मनाला उगाच मोठा आधार वाटत असतो.

सगळे प्राचीन ग्रंथ राबत्याला घेऊन गागाभट्टांनी तपशिलासह 'राज्याभिषेक प्रयोग' हा विधींचा ग्रंथ तयार केला.

पाचाडहून, काशीबाईंच्या दुखण्याने उचल खाल्ल्याची वर्दी गडावर आली.

राजे, संभाजीराजे, जिजाऊ, राणीवसा, येसूबाई, धाराऊ सगळा राजगोतावळा पाचाडात उतरला. अभिषेक होऊ घातलेल्या राजे-संभाजीराजांच्याकडे भरल्या नजरेने बघत, बोलायचे ते खूप ओठाआड तसेच ठेवून मूकपणे काशीबाई निघून गेल्या. पाचाडच्या दरुणीमहालात/आक्रोश उठला.

काशीबाईंचा निष्प्राण हात हाती घेऊन त्यांच्या कपाळीचा भरला आडवा मळवट बघताना राजांचे डोळे दाटून आले. एक मुका मनसुबा थंड झाला होता. होणाऱ्या राज्याभिषेकावर आभाळाच्या सांदीतून काही अशिव झिरपेल की काय या कातरभयाने ते थोपवायला घाईगर्दी करून काशीबाई निघून गेल्या!

पाचाडच्या माळावर पेटलेल्या चंदनी चितेकडे उदास नजरेने संभाजीराजे बघत होते. चितेच्या चटचट्या आवाजाबरोबर त्यांच्या शब्दाचे पक्षी पंख फडफडवीत राहिले –

"सरता संचिताचें शेष। नाहीं क्षणाचा अवकाश।
भरता न भरता निमिष। जाणे लागे।
मृत्यु न म्हणे मुद्राधारी। न म्हणे परनारी।
राजकन्या॥'

प्रतापरावांच्या होमानंतर एकच महिन्यात काशीबाईंची चिता पेटली. युवराज म्हणून राजटोप मस्तकी चढण्यापूर्वीच ज्येष्ठ पुत्र म्हणून संभाजीराजांचे जावळ मुंडन विधीने उतरले गेले! रायगड पुन्हा सुतकात आला!

काशीबाईंचे मर्तिकविधी पार पडले. संभाजीराजांच्यासह राजे प्रतापगडी जायला निघाले. कुळदेवता भवानीआईचे आशीर्वाद घेऊन, रामजी दत्तोने बांधलेले सव्वामणी सुवर्णछत्र तिच्या मस्तकी चढवायला – शिवथर घळीत उतरून समर्थांची पायधूळ घ्यायला.

दोघा पितापुत्रांनी जिजाऊंचा निरोप घेऊन निवडक शिबंदीनिशी रायगड सोडला.

फुलमाळांनी सजल्या पालखीत वस्त्राच्छादित सुवर्णछत्र ठेवण्यात आले होते. 'जय भवानी ऽ!' नांदी देत भोयांनी पालखीला खांदे दिले. जगावर छत्र धरणाऱ्या तुळजाभवानीवर छत्र चढविण्यासाठी तिचे भुत्ये चालले होते!

उन्हाळी मजला मागे पडल्या. घाट चढून छत्रतांडा जावळी खोऱ्यात घुसला.

जनीच्या टेंब्यावरची अफजल-कबर मागे टाकीत छत्रशिबंदी प्रतापगडावर आली. सोनमोहरा उधळून किल्लेदाराने राजे-युवराजांची आगवानी केली. भरल्या मळवटाने सुवासिनींनी निरांजने फिरविली.

छत्रस्थापनाचा मुहूर्त दुसऱ्या दिवशी होता. थाळे घेऊन दुपार टळतीला टाकून संभाजीराजांच्यासह राजे गडाच्या पाहणीला बाहेर पडले.

गडाच्या मोक्याच्या जागा बघून स्वाऱ्या 'अब्दुल-बुरुजावर' आल्या. दूरवर हंड्याएवढ्या दिसणाऱ्या अफजलच्या कबरीकडे बघत राजे गंभीर झाले.

"महाराजसाहेब, आपणास जिवे घेण्याचा विडा उचलून आलेल्या खानाचे दफन आपण इतमामाने केले. त्याची कबर बांधविली. ही कोण विचाराने?" अफजलच्या कबरीकडे बघत संभाजीराजांनी विचारले. राजांचा धरला विचार त्याने तुटला.

संभाजीराजांच्या भरगच्च कपाळीच्या गंधपट्ट्यावर, गालाकडे फिरलेल्या मिश्यांच्या काळभोर रेषांकडे बघत राजे म्हणाले, "आमचा झगडा करणीशी असतो, कर्त्याशी नाही. मरणाबरोबर गनिमी संपली असे आम्ही मानतो."

"पण गनिम तसे मानीत नाहीत! आपल्या गुजरकाकांचा पडला देह मिळाला नाही. त्यांचे दहन झाले नाही! कामी आलेल्या आपल्या माणसांची धडें छावणीच्या कुत्र्यांसमोर टाकली जातात. टाकली जातील! हे कसे?"

तो विचार बिनतोड होता. राजे त्याने क्षणभर सुन्न झाल्यागत झाले. मग शांतपणे म्हणाले, "मोगलाईत आणि आमच्या 'श्रीं'च्या राज्यात फरक आहे तो इथंच. आम्ही पाडली मंदिरं पुन्हा उठविली – उठवू. पण कुणाची धर्मस्थानं धूळदोस्त करावी तो विचार आमच्या मनात शिवत नाही. तुम्हास आता जसं वाटतं तसं एकेकाळी आम्हांसही वाटत होतं. पण मासाहेबांनी आमचा भ्रम दूर केला. विचार उदात्त केले."

जिजाऊंच्या आठवणीने दोघेही जबानबंद, निसूर झाले. भवानीच्या मंदिराच्या रोखाने सांजआरतीची तडतडणारी संबळ ऐकू येऊ लागली.

क्षणभर युवराजांना आपण रायगडाच्या मावळमाचीवरच उभे असल्यासारखे वाटले. हात छातीशी भिडले. भवानीच्या मंदिराकडे जाण्यासाठी ते राजांबरोबर अब्दुल-बुरुजाच्या पायऱ्या उतरू लागले.

ओघळत्या उपरण्याचे शेव मुठीत धरून आण्णाजी दत्तांनी रायगडाच्या सातमहालातील सोयराबाईंच्या महालाचा दगडी उंबरठा ओलांडला.

राणीसाहेबांना बघताच त्यांनी अदबीने झुकून मुजरा दिला.

"या सुरनीस, अभिषेकविधीचा तपशील सिद्ध झाला असे आम्ही ऐकतो." सोयराबाईंनी मुद्द्याला हात घातला.

रायगडावर राजे, युवराज नव्हते म्हणून मनातील एका पेचाची उकल करण्यासाठी आण्णाजींना सोयराबाईंनी चंद्राकडून महाली याद केले होते.

"जी. सर्व तपशील सिद्ध झालेत." आण्णाजींनी मान खाली ठेवून प्रश्नाचा जाब दिला. एवढ्यात महालाच्या अंत:पुरातून चंद्रा कुणबिणीच्या हाती हात दिलेले रामराजे बैठकी दालनात आले. त्यांना बघताच आण्णाजींनी त्यांना मुजरा दिला.

रामराजांना जवळ घेत सोयराबाईंनी त्यांच्या गळ्यातील ठीक असलेला मोतीकंठा उगाच पुन्हा ठीक केला. तसे करताना आण्णाजींना नेमक्या मुद्द्यावर कसे आणावे याचा विचार मनाशी बांधून घेतला. "मग त्या तपशिलात आमच्या बाळराजांच्यासाठी कसले विधी आहेत?" सोयराबाईंची जरबी नजर आण्णाजींच्या थोराड पगडीभवती फिरली आणि त्यांच्या कपाळीच्या गंधटिळ्यावर बसली.

आण्णाजींना द्यायला उत्तर नव्हते म्हणून ते खालमानेने गप्पच उभे राहिले.

"का? सुरनीस, यांच्यासाठी कोणतेच विधी नाहीत? तुम्ही गप्प का?" सोयराबाईंचा आवाज बांधील झाला.

"जी. आचार्यांनी सिद्ध केलेल्या अभिषेकप्रयोगात बाळराजांचा स्वतंत्र उल्लेख नाही!" आण्णाजी तोलून बोलले.

"मतलब? हे स्वारींचे कुणीच नाहीत? मग यांना मुजरे तरी कशाला?"

"गैरसमज होतोय राणीसाहेब. यात आमची काहीच कसूर नाही. खुद्द स्वामींनीच आचार्यांना अभिषेकविधी ठरविण्याचे सर्व अधिकार दिले आहेत."

"तेच आम्ही म्हणतो. आचार्यांना गडाची ओळख दोन दिवसांची. त्यांच्या कामात काही वाण राहिली तर ते बोलणार कोण? तुम्ही ती सुधारून घ्यायला नको काय?" आण्णाजींना फिरवून फिरवून सोयराबाईंनी नेमक्या तिवड्यावर आणले.

"जी. आम्ही हे बोलू. पण आचार्य ते मान्य करतीलच असा विश्वास कसा द्यावा?"

"तुम्ही बोला तर खरे."

"जी." आण्णाजींची पगडी मंद डुलली. सोयराबाईंना आणि रामराजांना मुजरा देत ते पिछाडीच्या कदमांनी महालाबाहेर पडले.

काही वेळाने सोयराबाईंची दासी चंद्रा, मंत्रिवाडीतील आण्णाजींच्या घरी जाऊन हळदीकुंकवाचे आमंत्रण देऊन आली.

सायंकाळी महाली आलेल्या आण्णाजींच्या कबिल्याची सोयराबाईंनी खण-शालूवर मोतीबंद नथ ठेवून ओटी भरली! आणि ती भरत असताना त्या हसून म्हणाल्या, "आपल्या माणसांचा असा राबता असला म्हणजे मनास बरं वाटतं!"

सरंजाम-शिबंदी पाठीशी घेत राजे-संभाजीराजांसह शिवथरघळीच्या वाटेला लागले.

ओढे, पाणंदी पार करताना जातवान घोड्यावर बैठक घेतलेल्या संभाजीराजांच्या मनी एकच एक विचार पुन:पुन्हा फेर टाकू लागला – "कसे – कसे दिसत असतील स्वामी समर्थ? सूर्यभक्त. रामसेवक संन्यासी. संन्यासी असून ठिणग्यांसारख्या शब्दांचा प्रपंच ओठांत नांदवणारे! केवढ्या मानतात मासाहेब त्यांना!"

लतावेलींनी मेट धरलेली शिवथरची घळ जवळ आली. उभे रानच कुदणीला पडलेय असे वाटावे तसा शंखांचा घुमरा आवाज ऐकू येऊ लागला.

राजांची आगेवर्दी गेल्याने साक्षात समर्थ, शिष्यांचा तांडा पाठीशी घेऊन स्वागतासाठी येत होते.

"जय ऽ जय ऽ रघुवीर समर्थ" या खड्या बोलामागोमाग समर्थ नजरेला पडताच राजे बोलून गेले – "शंभू ऽ खुद्द समर्थच येताहेत! आघाडीचे. उतार व्हा."

राजांनी रिकीब सोडली. मोजड्या उतरल्या. चटक्या पावलांनी तरातर पुढे होत त्यांनी समर्थांच्या पायांवर आपले मस्तक ठेवले. राजांच्या टोपावर आपल्या तळहाताचे छत्र धरीत समर्थांनी आशीर्वाद दिला. "रामरूप व्हा!"

राजे बगलेला झाले. पुढे होत संभाजीराजांनी आपले मस्तक समर्थांच्या चरणांवर ठेवले. कमळपाकळीसारख्या त्या चरणांचा स्पर्श संभाजीराजांना जाणवला. विचारांचे भुंगे घुमून उठले. "बहुता जन्मांचा शेवट! नरदेह सांपडे अवचट!"

"रघुदास व्हा!" जपमाळ अंगठ्याखाली तोलत समर्थांनी तळहात संभाजीराजांच्या टोपावर ठेवला.

उठून संभाजीराजांनी समर्थांच्या शांत, तेजवान मुद्रेवर नजर जोडली. पाऊसधारांत निथळलेला नि श्रावणी उन्हात उजळलेला रायगडाचा कातळकडा दिसावा तशी ती मुद्रा होती! निर्धारी, नितळ, शांत, काहीही साठवून घ्यायला राजी नसलेली, चारी पुरुषार्थ जिंकलेली, संन्यासी! गोसावी!

बघणाऱ्याला सर्वांगावर कमंडलूतील पाण्याचा शिडकावा होतो आहे असे वाटावे अशी रामरंगी नजर समर्थांनी संभाजीराजांच्यावर जोडली. कपाळीचे भस्मपट्टे किंचित वर घेत ते म्हणाले – "तुम्ही – युवराज .... संभाजीराजे. अं!"

"जी." संभाजीराजांच्या कानातील सोनचौकडा मंद डुलला.

"रघुकृपा." डोळे मिटते घेत समर्थ पुटपुटले.

"स्वामींनी पुढं येण्याची तसदी घेतली." राजे प्रेमभावाने म्हणाले.

"अवघा मुलूख पाठीशी घेऊन जाणाऱ्यांना पुढं होऊनच पावतं घ्यायला पाहिजे राजे! चला." समर्थांनी घळीच्या रोखाने हात उभारला.

दुतर्फा जगदंबेचे भुत्ये घेऊन तो गिरिकुहरात राहणारा रामभक्त चालू लागला. शंखांचे नाद उठले. त्यात राजांच्या सरंजामातील शिंगाड्याने काढलेली शिंगांची थरथरती ललकारी मिसळली. घळीतील दगडी गुहेत राजांचे बोल घुमले.

" स्वामींना रायगडी पाचारण करण्यासाठी आम्ही आलो आहोत."

चौथरावजा एका दगडी बैठकीवरच्या व्याघ्रांबरावर समर्थ बसले होते. शेजारी कमंडलू, थोपा आणि भगव्या बासनात बांधलेली ग्रंथसंपत्ती होती. पाठीशी पुरुषभर उंचीची उड्डाणी पवित्र्यातील शेंदूरमंडित हनुमंत-मूर्ती होती. तिच्याजवळ एक बळकट धनुष्य होते. त्याच्या पायथ्याशी भरल्या बाणांचा भाता होता.

समर्थांच्या समोर अंथरलेल्या घोंगडीवर राजे-संभाजीराजे पलख मांड्याची बैठक घेऊन बसले होते. मठाच्या धुनीतील धुराची मंद वळी गुहेत शिरून फिरत होती.

डोळे मिटून थोडा वेळ समर्थ हातची जपमाळ ओढीत राहिले. मग गुहेवरची धोंड हटावी तशा त्यांच्या पापण्या उघडल्या. ओठांतून आशय पाझरू लागला.

" तुमच्या राज्याभिषेकाची सुवार्ता कानी आली आहे राजे. त्यासाठीच क्षणापूर्वी डोळे मिटून आम्ही अयोध्येत जाऊन आलो! आम्हाला पाचारण करण्यासाठी तुम्ही येथवर आलात. आम्ही धन्य झालो. सिवबाराजे, आम्ही केव्हाचेच तुमच्यावर छत्र धरले आहे– आमच्या तप:सामर्थ्याचे! डोंगरदरीत राहणारे आम्ही गोसावी. आम्हाला लौकिकाचे बंध नाहीत. जनलज्जेसाठी लंगोटी आणि उदरपूजेसाठी झोळी आम्ही धारण केली आहे. नाहीतर तो भारच आहे! आम्हाला लौकिकात गुंतवू नका.

" तुम्हाला आम्ही साक्षात प्रभू रामचंद्रांचा अवतार मानतो. आम्ही सांगतो तो राजयोग समचित्त होऊन ध्यानी ठेवा. मनी किंतू न धरता सविध राज्याभिषेक करून घ्या. झाले नाही एवढे थोर कार्य तुम्हास करणे आहे."

डोळे मिटत समर्थ पुन्हा मनापलीकडच्या प्रकाशगुहेत शिरले.

" जी." घोंगडी थरथरली.

समर्थांच्या दाट दाढीमिश्यांनी मखर धरलेल्या ओठांतून शब्दाचा एक एक सूर्य टंकारत फुटू लागला. पिता-पुत्र कानांचे कमंडलू करून ते रामतीर्थ आपलेसे करू लागले. गुहा मंदिर गाभारा झाली. रामबाण शब्दांनी भरू लागली.

" जयास वाटे जिवाचे भय । त्याने क्षात्रधर्म करू नये ।
कांहीतरी करून उपाय । पोट भरावे ॥
नजर करार राखणे । कार्य पाहून खत्तल करणे ।
तेणे रणशुरांची अंत:करणें । चकित होतीं ॥
देखोनी व्याघ्राचा चपेटा । मेंढरे पळती नानावाटा ।
मस्त तो रेडा मोठा । काय करावा ?
उदंड मुंडे असावीं । सर्व ही एकत्र न करावीं ।
वेगळाली कामे द्यावीं । सावधपणे ॥
मोहरा पेटला अभिमाना । मग तो जीवास पाहेना ।
मोहरे मिळवून नाना । मग चपेटे मारी ॥

अमर्याद फितवेखोर । त्यांचा करावा संहार ।
शोधिला पाहिजे विचार । यथायोग्य ॥
मर्दे तकवा सोडूं नये । तेणे प्राप्त होतो जय ।
कार्य, प्रसंग, समय । ओळखावा ॥
दोन्ही दळें एकवटें । मिसळताती लखलखाटें ॥
युद्ध करावें खणखणाटें । सीमा सोडूनिया ॥
देवमात्र उच्छादिला । जित्यापरीस मृत्यु भला ।
आपला स्वधर्म बुडविला । असे समजावें ॥
महाराष्ट्र देश थोडका उरला । राजकारणें लोक शोधिला ।
अवकाश नाहीं जेवायाला । उदंड कामें ॥
लोक पारखून सोडावें । राजकारणे अभिमान झाडावें ।
पुन्हा मेळवून घ्यावे । दुरील दोरे ॥
देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुख बडवा की बडवावा । धर्मसंस्थापनेसाठी ॥
जय ऽ जय ऽ रघुवीर समर्थ ! "

रामनांदी उठवून समर्थांनी डोळे उघडले. बैठकीवरून उठून ते पाठीच्या हनुमंत-मूर्तीजवळ गेले. खांद्याएवढ्या उंचीचे धनुष्य प्रत्यक्ष त्यांच्या हातसरावाचे होते.

समर्थांचे बोल मनावर कोरून घेतलेले राजे-युवराज घोंगडीवर खडे झाले होते.

राजांच्यासमोर उभे होत समर्थ बैरागी आवाजात म्हणाले, " आशीर्वाद आम्ही तुम्हाला दिलेलाच आहे. हा आमचा कोदंड घ्या राजे! तुमच्या अभिषेकाला आमची ही गोसावी-भेट! आमच्याकडे देता येण्याजोगे एवढेच आहे. आणि या प्रसंगी ते योग्य आहे. घ्या. विजयवंत व्हा!"

हातांतील कोदंड समर्थांनी पुढे केला. राजांच्या पापणीकडा दाटून आल्या.

झुकते होत त्यांनी तो रामप्रसाद आदराने हाती घेतला. कोदंड डोळे मिटत कपाळीच्या शिवगंधाला भिडविला. तसाच तो संभाजीराजांच्या हाती दिला.

डोळे मिटून तो ' गोसावी-कोदंड ' कपाळीच्या शिवगंधाला भिडविताना समर्थांचा एक विचार बाणागत युवराजांच्या काळजात रुतून बसला – कधीही न हटण्यासाठी –

" जयास वाटे जिवाचें भय । त्याने क्षात्रधर्म करू नये । "

धनुष्य-भाता हाती घेऊन संभाजीराजे समर्थांना काही एक बोलू गेले. पुन्हा थांबले. त्यांनी राजांना नजर दिली.

" बोला. नि:संकोच बोला युवराज." समर्थांच्या नजरेतून ती घालमेल सुटली नाही.

" नाही – आम्ही म्हणणार होतो की –" संभाजीराजे अडखळले.

" सांगा. काय आहे ? " समर्थ हसले.

" स्वामींनी जसे महाराजसाहेबांचे रूप श्लोकांत उभे केले आहे तसे – तसे आमच्या मासाहेबांचेही केले तर आमचे कान धन्य होतील ! "

न पाहिलेल्या जिजाऊंच्या आठवणीने समर्थांना कधीतरी बाळपणी पाहिलेल्या आपल्या मातोश्रींची आठवण झाली ! निर्धाराने त्यांनी ती परतविली.

" युवराज, तुम्ही आणि राजे धन्य आहात. प्रतिदिनी त्यांच्या सहवासात आहात. आम्ही त्यांना पाहिले नाही ! केवळ ऐकले आहे ! आणि पाहिले तरीही त्यांचे रूप आम्ही शब्दांत उभे करू शकणार नाही. आम्ही शब्दांचा दासबोध घडविला. पण – पण त्यांनी हा समस्तास जिताजागता शिवबोध घडविला आहे ! " समर्थांनी राजांच्याकडे हात केला. " वाल्मिकींनी रामायण रचले पण त्यांनाही कौसल्यामातेचे रूप गवसलेले नाही. आम्ही ते कसे विसरू ? "

राजांनी झुकून समर्थांच्या चरणांना हात भिडविले.

संभाजीराजांनी द्रोणागिरिधारी बलदंड हनुमंत आपल्या नजरेत भरून घेतला.

त्या दिवशीचा मुक्काम घळीत टाकून दिवस फुटीला राजे-संभाजीराजे रायगडाकडे जायला निघाले. त्यांना पायसोबत द्यायला समर्थ घळीच्या कुंपणापर्यंत आले.

निरोपासाठी हात जोडणाऱ्या राजांच्या खांद्यावर जपमाळेचा हात चढवीत समर्थ नेहमीपेक्षा वेगळ्या कातऱ्या आवाजात म्हणाले, " राजे, एक स्मरणपूर्वक करा. आईसाहेबांना आमचा दंडवत सांगा ! आमच्या रूपाने आमचा दासबोध त्यांच्या सेवेला तत्पर आहे हे सांगा. या, रामरूप व्हा ! जय ऽ जय ऽ रघुवीर समर्थ ! "

समर्थांनी डोळे मिटले. त्यांना पाठमोरे झालेल्या संभाजीराजांचे मन कुठेतरीच जाऊन पोचले होते –

" एवढं थोरपण जन्मास घालणाऱ्या स्वामी समर्थांच्या आईसाहेब कशा असतील ? आमच्या मासाहेबांसारख्या ? " कुठे असतील त्या ? त्यांनी ऐकला असेल कधी दासबोध ? दासबोध ! केवढा अर्थ ! –

" सरतां संचिताचे शेष। नाहीं क्षणाचा अंवकाश।
भरतां न भरतां निमिष। जाणें लागे ! "

गाळ काढल्याने नितळ दिसणाऱ्या बारा टाक्यांतील पाणी निरखत संभाजीराजे उभे होते. त्यांच्या मनी समर्थांची मूर्ती आणि त्यांचे श्लोक फिरत होते.

एकाएकी बगलेच्या घाणेरीच्या झुडपाजवळून वाळल्या पानांची सरसर उठली. ठिपक्याठिपक्यांचा एक चपळ भुजंग वळवळत बाणागत सुसाटत होता. मध्येच ते ठिपकेदार चैतन्य थांबले. हातभर वर उठलेल्या त्या जनावराने पंजासारखी झळझळीत ठिपकेदार फणा फुलविली. जिभेच्या पालव्या चटाचट आतबाहेर घोळवल्या.

संभाजीराजांच्या पाठीशी असलेल्या रायाजीने हातचा भाला आडवा करून

त्याच्यावर रोखला. तो झटकन कडेधारी हाताने खाली दबवून टाकीत अंतोजी म्हणाला, " शंबु म्हादेवाचा अलंकार हाय त्यो. जाऊ देत आपल्या वाटेनं. "

रायाजी आठ्या घालीत थांबला. जनावर पुन्हा वळवळत झाडोऱ्याआड झाले.

संभाजीराजे रायाजीला काही म्हणणार होते तेवढ्यात कवी कुलेशांच्यासह आलेल्या महादेव यमाजींनी मुजऱ्याबरोबर वर्दी दिली – " जगदीश्वराच्या मंदिरओवरीत उत्तरेकडचा कुणी कवी उतरला आहे. युवराजांनी त्याची भेटी पाडावी असा स्वामींचा सांगावा आहे. "

" जशी आज्ञा. चला. " कवी कोण असावा असा स्वतःलाच प्रश्न करीत युवराजांनी बारा टाके सोडले. कुलेश आणि महादेव यमाजी यांच्यासह ते जगदीश्वराच्या चौक आवाराजवळ आले. झाडाच्या बुंध्याला ठाण केलेल्या पांढऱ्या शुभ्र घोडीला खरारा करीत एक माणूस काही गुणगुणत होता.

संभाजीराजे मंदिराच्या प्रथम चौकात आले. पायगतीला असलेल्या दगडी कासवाला बगल देऊन त्यांनी घंटेचा टोल दिला. तसेच चालत जाऊन मंदिरगाभाऱ्यातील बेलकमळांनी आच्छादिलेल्या, जलधारा अंगी घेणाऱ्या शिवपिंडीसमोर गुडघे टेकून पिंडीला मस्तक टेकविले. पुजाऱ्याने दिलेले तीर्थ पापण्यांना भिडवून ओठांआड केले.

बाहेर चौकाभोवती फिरलेल्या – ओवरी-ओवरीत शिरून कुलेश आणि महादेवपंत त्या कवीचा तलाश पाडू बघत होते. दक्षिणा आणि दानाच्या ओढीने आलेल्या उदासी, बैरागी, गोसाव्यांनी साऱ्या ओवऱ्या भरून गेल्या होत्या. त्यातच वेष पालटून राजांच्या जासूद खात्याचे खबरगीरही मिसळले होते ! त्यांनी महादेवपंतांना ओळखले. जवळ येत त्यांनी पंतांना दखल दिली.

एका खबरगिराने चौकाबाहेर येत महादेवपंतांना दबक्या आवाजात सांगितले, " ह्योच त्यो शाहीर. निकृतंच धनी ह्येचं पवाडं आतल्या चौकात ऐकून ग्येलं. लई खूष जालं. पर ह्या वागानं काय वळाकलं न्हाई त्येस्नी ! म्यॅबी ऐकलं पर ह्येची बोली काय साधली न्हाई मला ! " त्या गोसावी कफनी घातलेल्या खबऱ्याचे बोट घोडीला खरारा देणाऱ्या त्या ठेंगण्या माणसावर रोखले होते.

" प्रणाम कविराज. " पुढे होत कवी कुलेशांनी त्या माणसाचा खरारा थांबविला.

" जै जयंती. प्रणाम. " खरारावाला वर उठून हिंदोस्थानी भाषा कानी पडल्याच्या आश्चर्याने कुलेशांच्याकडे बघत म्हणाला.

त्याचा रंग पिकल्या आंब्यावर पडला होता. कपाळी कनोजी पगडी, अंगी उत्तरी सफेद बंदी निमा. लाल करवतकाठी धोती, कपाळी आडवे शैवगंध आणि तेजफेकी, अभिमानी डोळे असे त्याचे रूप होते.

हाताला बांधलेला बुरणुसी खराऱ्याचा वाद उकलीत त्याने विचारले – " क्षमा व्है ! आपका परिचय ? "

" हम कवी कुलेश. प्रयागनिवासी। आप ? "

" हौ. त्रिविक्रमपूरके त्रिपाठी ! भूषण त्रिपाठी ! "

" चंडी ऽ चंडी ऽ प्रणाम कविराज भूषण ! हमने आपकी कीरत सुनी है। आज दर्शन हुए। " कुलेशांनी समोरचे कनोजी काव्यतेज पारखीत पुन्हा नमस्कार केला.

झाडाच्या रोखाने येत्या संभाजीराजांना बघून कुलेश भूषणना समज मिळावी म्हणून पुटपुटले, " युवराज संभाजीराजे ! "

भूषण झुकून कनोजी नमस्कार देत, समोरून चालत येणारे क्षात्रतेज उतावळ्या डोळ्यांत भरून घेताना पुटपुटला- " जै जयंती ! सर्जा सिवाजी के सुपूत."

" कविराज, आमच्या आबासाहेबांच्या सांगण्यावरून आम्ही तुमच्या भेटीस आलो. कोण देश तुमचा ? नाव कोण ? " संभाजीराजांना भूषण आणि कुलेश यांच्या पगडीत सारखेपण दिसले.

भूषणने युवराजांना आपला परिचय देऊन विनंती केली, " युवराज, दूर देसनसे आवत्. हमको राजा सिवाजीके दरसन की क्रिपा होवै ! "

" जरूर. कवींनी करावे असेच त्यांचे दर्शन आहे. पण कवींनी प्रथम इथला मुक्काम हलवावा. आमच्या महाली चलावं." हसून युवराज म्हणाले.

" हाँजी." भूषणने त्यांचा आदर राखला.

रायाजीने भूषणच्या घोडीचे ठाण मोकळे करून ती आपल्या ताब्यात घेतली. अंतोजीसह आत जाऊन भूषण आपली पडशी-पथारी घेऊन बाहेर आला.

भूषण आणि कुलेश या दोन उत्तरी कवींच्यामधून संभाजीराजे बालेकिल्ल्याच्या रोखाने चालू लागले. मागून भूषणच्या 'केसर' घोडीचे कायदे-ओठाळी धरत रायाजी,अंतोजी चालू लागले. व्यापारपेठ आली तसे संभाजीराजांना मुजरे झडू लागले. कवी भूषण रायगडाचे राजवैभव डोळ्यांत जमवीत चालला होता.

नगारखान्याच्या दरवाज्याने सारे आत आले. एवढ्या उंचीवर फव्वारती कारंजी बघताना भूषण अचंब्याने क्षणभर रेंगाळला. सजावट ल्यालेल्या दरबारी चौकभर त्याची नजर फिरली.

आपल्या महाली प्रवेशताना संभाजीराजांनी आदराने भूषणचा हात आपल्या हाती घेतला आणि यादव नामाजी ह्या खिदमतगाराला काही आज्ञा खुणावली.

मध्यभागीच्या बैठकीवर त्यांनी भूषणला आपल्या शेजारी बसवून घेतले. कुलेश महादेवपंत भिंतीजवळ अदब धरून उभे राहिले. रायाजी-अंतोजीने भूषणची पडशी पथारी आतील दालनात नेली.

यादव चांदीच्या तबकात मांडलेले केशरी दुधाचे चंदेरी प्याले घेऊन पेश आला. त्यांतील एक प्याला उचलून भूषणच्या समोर धरून संभाजीराजे म्हणाले, " घ्या."

" हाँजी " आतिथ्याने भरून आलेला कवी भूषण म्हणाला.

" आम्हास काव्याचा छंद आहे. कवी भेटले की बाणगंगेत स्नान झाल्यासारखे वाटते आम्हाला ! " दुधाचा घोट घेऊन संभाजीराजे म्हणाले.

" हाँजी " भूषण मनोमन एका बाबीचा ताळा बांधीत होता – " ये सिवाजीके सपूत हैं. तो साक्षात सिवाजी कैसे होंगे ? "

" कविराज, तुमची बोली कोणची ? "

" जी. व्रज बोली है हमारी. आम्या हो तो इसकी कुछ खुमार पेश करेंगे."

" जरूर. जरूर. आमचे कान धन्य होतील." युवराज हसून म्हणाले.

काहीतरी पाहिजे असल्यासारखी भूषणची नजर महालभर भिरभिरली. दालनात जाणाऱ्या दरवाज्यावर खिळली.

" काय झाले कविराज ? काय शोधता ? "

क्षणभर कवी घोटाळला. मग हलक्य आवाजात म्हणाला – " हमारी दिमडी ! अंदर गयी ! "

संभाजीराजांनी ते ऐकून रायाजीला नजर दिली. रायाजी आतल्या दालनात गेला. भूषणची पडशी घेऊन पुन्हा पेश आला. बैठकीवरून उतरून भूषणने पडशीतील दिमडी, शेला घेतला.

बैठकमहालाच्या मध्यभागी येत त्याने शेल्याने कमर कसली. संभाजीराजांना दरबारी थाटाचा मुजरा दिला. डोळे मिटून दिमडीवर दोन तीन लयदार थापा दिल्या. अंगी वीज उतरल्यासारखा भूषणचा आवाज पलटी घेऊन शाहिरी झाला.

"सर्जा सेवाजी के सपूत – युवराज संभूराजे सुनिये सर्जाकी कीरत ! " भूषणने दिमडीच्या फडफडीने बैठकमहाल थरकवून सोडला. डोळे मिटून त्याने जयंती-जगदंबेचे मंगलस्तवन धरले –

" जै जयंती, जै आदि सकति, जै कालि कपर्दिनि –
जै मधु कैटभ छलनी, देवि जै महिष बिमर्दिनी "

कविभूषण स्तवनाच्या तालाबरोबर जयंतीच्या दरबारात पोचला ! त्याचे वीज पिऊन आलेले कडकडीत व्रजबोल तोफांची भांडी फुटावीत तसे फुटू लागले –

" इंद्र जिमि जंभपर, वाढव सुअंभ पर, रावन सदंभ पर –
रघुकुल राज है।
पौन बारिबाह पर, संभु रतिनाह पर, ज्यो सहस्रबाह पर,
राम द्विजराज है।
दावा द्रुमदंड पर, चीता मृगझुंडपर, भूषन बितुंड पर,
जैसे मृगराज है।
तेज तम अंस पर, कन्ह जिमि कंस पर, त्यों मलिच्छ बंस पर,
सेर सिवराज है ! "
सर्जा सिवराज है ! "

"व्वा ऽ! कविराज! धन्य धन्य आहे तुमची! आम्हास समर्थांची आठवण दिलीत!" हात उठवून भूषणला मोकळी दाद देताना संभाजीराजांच्या मनात समर्थांचे श्लोक फिरले –

"निश्चयाचा महामेरू। बहुत जनांस आधारू।
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी॥"

बराच वेळ दिमडीच्या तालबद्ध थडथडीवर कवी भूषणाने आपल्या शेलक्या बांधण्या संभाजीराजांना ऐकविल्या. त्यांच्या नाचत्या पोतासारख्या शब्दरचना ऐकून मोहरून उठलेल्या संभाजीराजांनी बैठक सोडली. भूषणजवळ जात आपल्या गळ्यातील मोतीकंठा त्याच्या गळ्यात चढवीत ते म्हणाले, "कविराज, तुमचा एक एक बोल ओंजळीनं मोती उधळावेत असा आहे. आम्ही खूषनिहाल झालो. नागफण्यासारखी आहे तुमची रचना!"

"मुतालिक, कवींचा इतमाम राखा." संभाजीराजांनी महादेवांना समज दिली. कुलेश आणि महादेवपंत भूषणना घेऊन गेले. संभाजीराजांच्या मनात भूषणचा एक शब्द निवळीसारखा फिरत राहिला – "सर्जा! सर्जा!"

"चला." पूजेचा पेहराव घेऊन सिद्ध झालेल्या संभाजीराजांना राजे म्हणाले. शेजारी उभ्या असलेल्या रामराजांच्या खांद्यावर युवराजांनी हात ठेवला. परातीत शिजला भात घेऊन प्रभाकरभट्ट आणि अनंतभट्ट यांनी तो उभ्या रायगडाच्या घेराभवत्याने शिवरून 'अशुचशांतीचा' विधी पार पाडला होता.

राज्याभिषेकाच्या प्राथमिक विधीला आज सुरुवात होणार होती. मुंगीराशीने माणूस गडावर दाटले होते. फलटण, तळबीड, शृंगारपूर, चौक, सिंदखेड, भुईंज, पाली, राजांचे चौबाजूचे रक्तसंबंधी गोतावळे गड चढून आले होते.

बांदल, जेधे, शिर्के, मालुसरे पासलकर, शिलींबकर, कंक, जाधव, दहातोंडे, सरदार भोसले सारे शिबंदी सरंजामानिशी गडावर दाखल झाले होते. टोपीकरांच्या मुंबई दरबारचा वकील हेन्री ऑक्झिडनही गड चढून आला होता.

जागा मिळेल तिथे डेरे, राहुट्या, शामियाने, चांदण्या तणावांच्या आधाराने उठल्या होत्या. तोरणे बांधलेला नगारखाना, महादरवाजा, वालेकिल्ला आंबवतीच्या आरासींनी नटला होता. ठिकठिकाणी झाडांच्या घेरांखाली जांभळीचे ठाळे टाकलेले मुदपाकी मंडप उठले होते. त्यांत रचलेल्या चुलवणांवर चढलेल्या हंड्यांखालून धुराचे लोळ उसळून वर झेपावत होते. त्यांच्या घाईगर्दीतून, नगारखान्यावरून उठलेला चौघडा नौबतीचा डंका मुष्किलीने वाट काढत गडभर पसरला होता. त्याचा माग घेत सनयांचे चपळ सूर सारीकडे पसरले होते. नगारखान्याच्या निशाणकाठीवर नेहमीपेक्षा केवढातरी मोठा दिसणारा भगवा वरच्या निळ्याशार मावळी आभाळाचा डफ करून त्यावर फडफडती थाप देत

होता! गडावरच्या मंदिरामंदिरांवरची छोटेखानी, तिकोनी भगवी निशाणे माना डोलावून त्याची झील धरून होती!

हुजुराती पागेतील घोड्यांच्या आघाडीच्या उजव्या पायांत चांदीचे तोडे भरून त्यांच्या पाठीवर नक्षीदार लोंबत्या झुली चढविल्या होत्या. उठती धूळ शांत व्हावी म्हणून पखालीवाले रस्त्यारस्त्यांवर पखालीतून पाण्याचा शिडकारा करीत होते.

गंगा, सिंधू, जमुना आदी सप्तनद्यांचे तसेच पूर्व, पश्चिम आणि दक्षिण सागरांचे पवित्र अभिषेक जल आबदारखान्यातील चौरंगावर आणि सुवर्णाच्या, मृत्तिकांच्या कलशांत भरून ठेवले होते. रामराजे, युवराज संभाजीराजे आणि गागाभट्ट यांच्यासह पूजेची वस्त्रे ल्यालेले राजे आपल्या महालातून बाहेर पडले. त्यांच्या पाठीशी अष्टप्रधान, येसाजी कंक, आनंदराव, फिरंगोजी, पिलाजी शिर्के. रूपाजी, सर्जेराव असे आघाडीचे सरदार चालू लागले. कवी भूषण, कुलेश, परमानंद, निश्चलपुरी चालू लागले. गोमाजी, खंडोजी, रायाजी-अंतोजी यांचे मावळी इमान चालू लागले. 'श्रींच्या' कल्याणकारी राज्याचे भाग्य चालू लागले!

जिजाऊंचा आशीर्वाद घेऊन सारे रामजी दत्तोच्या रत्नशाळेतील ओतकामाच्या कारखान्यात आले. सुवासिनी आणि कुणबी दासी पाठीशी घेत सोयराबाई आल्या.

कारखान्याच्या चौकात भगवा सरपोस घालून झाकलेले सिंहासन होते. त्याच्या दक्षिण बाजूला सोन्याची घडीव गणेशमूर्ती होती. आज त्यांच्या पूजनाचा व स्थापनेचा विधी होता. त्याबरोबरच समर्थांनी दिलेल्या कोदंडाचे पूजन होते.

पुढे होत रामजीने हलक्या हाताने सरपोस हटविला. असंख्य मावळ्यांचे सांडले रक्तच जणू सोन्याचे झळकते रूप लेवून अंगी पडणारी किरणे परतविताना म्हणत होते, "आम्ही कुनाला अंगझटी घेतले नाही! त्यो मान फक्त धन्याचा हाय!"

"जगदंब! जगदंब!" सिंहासनाच्या नुसत्या दर्शनानेच राजांचा हात छातीशी गेला. सिंहासनाच्या वाघमुखी हातबैठकी बघताना संभाजीराजांना राजांचे बोल आठवले – "आपण प्रथम भोसले आहोत, मग शिकारी! वाघ हे जगदंबेच्या बैठकीचं जनावर आहे."

राजे-सोयराबाई, संभाजीराजे चंदनी पाटावर बसले. गागाभट्टांनी अथर्वशीर्षातील गणेशस्तोत्राचा उद्घोष केला, "ॐ गं गणपतये नम:! त्वमेव कर्ता, त्वमेव ...."

गणेश आणि सिंहासन पूजन झाले. मानाचे बकरे पडले. कोदंडाची पूजा झाली. सुवर्णफुलांची उधळण झाली.

"आईए. सिंहासनको हस्तस्पर्श दीजिए." गागाभट्टांनी राजमंडळाला विनंती केली. राजे-सोयराबाई पुढे झाले. रामराजे ते सारे बघत बगलेला उभे होते.

"या बैठकीस हात देऊया." संभाजीराजांनी मायेने रामराजांचा हात आपल्या हाती घेत त्यांना सिंहासनाजवळ घेतले.

"बोला हर ऽ हर ऽ हर ऽ महादेव!" भोवतीच्या मावळ नरड्यांच्या घाटी फुटल्या. राजमंडळाने सिंहासनाला मानाचा हस्तस्पर्श दिला.

हंबीरराव, आनंदराव, मोरोपंत, आण्णाजी, रामचंद्रपंत, येसाजी सारे पुढे झाले. "जय भवानी" गर्जत त्यांनी शूचिर्भूत झालेले सुवर्णसिंहासन फुलांच्या माळांनी सजलेल्या रथासारख्या गाड्यावर चढविले. त्या गाड्याला सजलेले पाच पांढरेशुभ्र घोडे जोडण्यात आले होते. राजांनी झुकून गणेशाची सुवर्णमूर्ती उचलली आणि छातीजवळ कवड्यांच्या माळेवर धरली. संभाजीराजांनी कोदंड उचलला.

रणहलग्यांच्या रोमांचक काठ्या तडतडल्या. लेझीम तोड्यांनी लय पकडली "छळळ् खण खण छळळ्." उखळी, बंदुकांचे बार दणाणले. शिस्त धरलेल्या हुजराती फौजेच्या धारकऱ्यांच्या हातांतील पाती उन्हात झगमगू लागली. गुलालाच्या मुठी उधळल्या. फुलांच्या ओंजळी उसळल्या. शिंगे ललकारली.

चालले. मानाचे सिंहासन मराठ्यांच्या मसनदीकडे मरातबाने चालले. रत्नशाळेकडून दरबारीचौकाकडे चालले. जिजाऊंनी मनी जागविलेले तुळजाई स्वप्न जिवंत होऊन चालू लागले! जंगमैदानावर घाईगर्दी करून धारातीर्थी देह ठेवताना – "राजास्नी आमचा जुहार दंडवत सांगा" म्हणणाऱ्या कैक आकाशवीरांचे सार्थक चालले! समर्थांचे आनंदवनभुवन चालले! असंख्य मायमाउलींचे कुंकूबळ चालले! हिंदूंच्या शतकानुशतके गाडल्या गेलेल्या आशांचे ऐरावती बळ चालले! 'श्री' चे कल्याणकारी राज्य चालले!

सिंहासनाच्या गाड्याची पिछाडी धरून गणेशमूर्ती हाती घेतलेले राजे, पंचारती घेतलेल्या सोयराबाई, समर्थांचा कोदंड घेतलेले संभाजीराजे आणि त्यांचे बोट हातात धरलेले रामराजे असे सारे त्या सिंहासनाशी रक्ताने बांधील असलेले राजमंडळ चालले.

वाजत-गाजत नगारखान्याच्या दरवाज्याने रथगाडा दरबारचौकात आला. सिंहासनाच्या चौथऱ्याची सारी मखरे सुवर्णात घडली होती. अष्टखांब, मेघडंबरी, मत्स्यमोर्चेल, न्यायतुला असा देखणा साज झळकत होता. त्या चौथऱ्याची मधली जागा या खाशा सिंहासनासाठी मोकळी राखण्यात आली होती. राजांनी गणेशमूर्ती संभाजीराजांच्या हाती दिली.

रथगाडा चौथऱ्याजवळ आला. गागाभट्ट राजमंडळासह चौथऱ्यावर चढले. हत्तीच्या पायाखालच्या शुभ मृत्तिकेने भरलेले तबक घेऊन प्रभाकरभट्ट चौथरा चढले.

सुवर्णी खिळा ठेवलेले तबक घेऊन रामजी दत्तो चौथरा चढले. चौथऱ्यावर शिडी चढविण्यात आली. रामजींच्या हातातील तबकातून गागाभट्टांनी सुवर्णी खिळा उचलला. मंत्रोच्चार करीत त्यांनी तो निरखला आणि राजांच्या हाती दिला.

राजे खिळा घेऊन शिडीजवळ आले. हंबीरराव, येसाजी, आनंदराव यांनी शिडी तोलून धरली. कोढता आणि खिळा घेतलेले राजे शिडीच्या पायऱ्या मागे टाकीत मेघडंबरीच्या थेट छताला भिडले. साऱ्या माना 'वर' उचलल्या गेल्या!

हातीचा सुवर्णी खिळा राजांनी मेघडंबरीच्या छताला राखलेल्या छिद्रात ठोकला. 'सुवर्णमेख' बसली. राजे खाली आले. शिडी हटली. सिंहासनाखाली 'हस्तिमृत्तिका' प्रदान करण्याचा विधी सुरू झाला. मंत्राचा घोष उठू लागला.

गागाभट्टांनी प्रभाकरभट्टांच्या हातातील हत्तीच्या पायाखालच्या मृत्तिकेने भरलेले तबक आपल्या हाती घेतले. मुठीने त्यातील माती राजांच्या ओंजळीत सोडली.

चौथऱ्यावर मोकळ्या राखलेल्या, सिंहासनाखाली येणाऱ्या चौकात ती शिवरून टाकण्याची इशारत केली. राजांनी मृत्तिकेची ओंजळ चौकात शिवरली. सोयराबाई पुढे झाल्या. त्यांच्या हाती गागाभट्टांनी हस्तिमृत्तिका दिली. त्यांनी आपली सवाष्ण ओंजळ चौकात सोडली. संभाजीराजांनी गणेशमूर्ती व कोदंड प्रभाकरभट्टांच्या हाती दिला. पुढे होत आचार्यांनी दिलेली मृत्तिका चौकात सोडून ते मागे झाले.

गागाभट्ट तबक ठेवण्यासाठी म्हणून वळू लागले. एवढ्यात आपल्या शेजारी असलेल्या रामराजांची ओंजळ आपल्या हातांनी जोडून सोयराबाईंनी ती आचार्यांच्या समोर धरली! आचार्य क्षणभर घोटाळले. मग त्यांनी मृत्तिका रामराजांच्या ओंजळीत ठेवली. त्यांचे हात तसेच चौकाकडे नेत सोयराबाई म्हणाल्या – "हां. सोडा ओंजळ चौकात!" हत्तीच्या पायांखाली रगडलेली माती पडू लागली – सिंहासन चौथऱ्याच्या बैठक-चौकात!

अभिषेकपूर्व विधींना सुरुवात करण्यापूर्वी सोयराबाई आणि संभाजीराजांना घेऊन राजे जिजाऊंच्या महाली आले. फलाहार आणि दुग्धपान असे व्रत पाळल्यामुळे त्या तिघांच्याही डोळ्यांत तेज उतरले होते. आपल्या महाली मध्यभागी गिर्द्यालोडांची बैठक टाकून जिजाऊसाहेब बसल्या होत्या. गेले पंधरा दिवस त्या तकवा नव्हता तरी आल्या गेल्या माणसाची आस्थेनं विचारपूस करीत अशाच बसल्या होत्या.

राजे-संभाजीराजांना बघून त्या बैठकीवरून उठण्याच्या खटपटीला पडल्या. ते बघून पुढे झेपावलेल्या संभाजीराजांनी त्यांना बळेच बसते केले.

राजे-युवराज जोडीने त्यांना नमस्कार करण्यासाठी वाकले.

बसल्या बैठकीवरून जिजाऊंनी त्या दोघांचे मुखडे छातीशी बिलगते घेतले. त्यांचे शब्द थकले होते. सुरकुतले होते. म्हातारे झाले होते. ते घशातच अडकले.

"हे बघायला आमची स्वारी आज असायला पाहिजे होती!"

शहाजीराजांच्या नुसत्या आठवणीबरोबर जिजाऊंचे डोळे भरून आले.

सुरकुत्यांच्या पाटांतून आत्म्याचे पाणी वाहू लागले. एवढे दृष्ट लागण्यासारखे विधी गडावर होताहेत पण – पण त्यांतील एकही आम्हास बघता येत नाही. येणार नाही! कपाळ उजाडल्यामुळे! पोटी तहानेचा जाळ असता – समुद्रात पाण्याने वेढलेले असूनही पिण्यासाठी एक थेंबही हाताशी येऊ नये तशीच ही गत आहे! आम्ही साऱ्यात आहोत आणि कशातही नाही! 'जगदंब, जगदंब!' आपल्या भरून येणाऱ्या मनावर जिजाऊंनी तुळशीपत्र ठेवले. आणि म्हटले, "औक्षवंत व्हा!"

जिजाऊंनी राजे-संभाजीराजांना शिगभरल्या जबाबीने आशीर्वाद दिला.

"सौभाग्यवंत व्हा!" थरथरत्या हाताने सोयराबाईंना आशीर्वाद दिला.

"मासाहेब, आता माणसांचा राबता तोडा. आराम घ्या." राजे काळीजपिळाने म्हणाले.

"राबता तुटणार कसा? आम्ही राजमाता होणार आहोत. आता तर राबता वाढीला पडेल. आम्हीहून लोकांचा राबता कधीच तोडणार नाही राजे!" निग्रही जिजाऊ आग्रहाने म्हणाल्या.

"येतो आम्ही." संभाजीराजे आणि सोयराबाई यांच्यासह राजे त्या 'थोरल्या मायेच्या' महालाबाहेर पडले.

जगदीश्वरावर दुग्धाभिषेक करून ते तिघेही दरबारचौकातील प्रशस्त महावेदीवर आले. प्रमुख विधींना सुरुवात झाली. गागाभट्ट, बाळंभट्ट, अनंतभट्ट आणि तीर्थोतीर्थीचे विख्यात शास्त्रवेत्ते त्यांना विधिकर्मे सांगू लागले.

स्वस्तिवाचन, ऋत्विजपूजन, वसोद्धारपूजन, मातृकापूजन, दुर्गपूजन, नांदीश्राद्ध, नारायणपूजन, आज्यहोम – एकेका विधीची तपशिलांनिशी सांगता होऊ लागली.

राजे, युवराज आणि सोयराबाई यांच्या राजहस्तांनी निरनिराळ्या होमकुंडांत बेल, वट, औदुंबर, पिंपळ, आम्र यांच्या समिधा पडू लागल्या. दूध, तूप, दही, मध यांचे हवन होऊ लागले. या विधींतील सर्वांत मौजेचा विधी आला राजांच्या मौंजीबंधनाचा! त्यासाठी राजे चंदनी पाटावर बैतेदार न्हाव्यासमोर बसले – डुईवर संजाब कोरून घेण्यासाठी!

बलदंड राजे 'बटु' झाले. राणीवसा, कन्यावसा असताना, फर्जंद-सूनबाई असताना राजांचे सविध मौंजीबंधन झाले! छातीवर यज्ञोपवीत चढले. अवघ्या मुलखाला नवा जन्म देणारे राजे 'द्विज' झाले!

मौंजीबंधनाने रद्दबातल झालेले राजांचे पूर्वील विवाह शास्त्रसंमत करून घेण्यासाठी त्यांचे पुन्हा सोयराबाई, सकवारबाई, पुतळाबाई आदी राण्यांशी समंत्रक विवाह झाले. राजांनी गागाभट्टांना मनची एक इच्छा बोलून दाखविली – "आम्ही सूर्यवंशी करिता आम्हास सवितृ मंत्राचे पुरश्चरण द्यावे."

गागाभट्टांना ती पटली. सवितृहोमासाठी यज्ञकुंड सज्ज करण्यात आला. हा होम स्त्रियांना लाभत नसल्याने या विधीतून सोयराबाईंना वगळण्यात आले.

उगवतीला पुढा करून राजे आणि संभाजीराजे यज्ञकुंडाजवळ बसले त्यांच्या भोसलाई हातांनी त्यांचे आदिदैवत सूर्यनारायणाच्या नावे कुंडात चंपक, चंदन, बिल्वकाष्ठांच्या समिधा पडू लागल्या. हवन उरकून ते दोघेही सूर्यवंशी पितापुत्र उभे ठाकले. गंगा, सिंधु, जमुना आदी सप्त नद्या जल त्यांच्या ओंजळीतून अर्घ्य म्हणून मावळी सूर्याला अर्पण होऊ लागले.

मिटल्या डोळ्यांनी सवितृ-मंत्राचा उद्घोष ते गायत्री छंदात करू लागले – "ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात्!"

"भूलोकाला आणि स्वर्लोकाला उजळणारे ते सूर्याचे दिव्य तेज आम्ही सदैव चिंतितो. ते दिव्य तेज आमची बुद्धी उजळून टाको."

शांतिहोमांच्या पवित्र मंत्रघोषांनी बालेकिल्ल्याची तटबंदी चौथडी भरून वाहू लागली. विनायक, नक्षत्र, इंद्र, ग्रह पुरंधर या होमांचे यज्ञकुंड धडधडले. हवनासाठी जाळून घेणाऱ्या दूध, तुपाच्या पौष्टिक वासाने महावेदी दाटून गेली.

महावेदीच्या मध्यभागी थोराड, रुपेरी पारड्यांची पुष्पमालांनी सजलेली तुला एका भक्कम खांबाला उभी करण्यात आली होती. तिचे पूजन झाले.

राजांच्या तुलादानविधीला प्रारंभ झाला. उजव्या बाजूच्या पारड्यात उजवा पाय प्रथम ठेवून राजांनी वीरबैठक घेतली. गागाभट्ट, बाळभट्ट, अनंतभट्ट ओंजळी-ओंजळींनी तबकातील झळझळीत सोनमोहरा तुलेच्या डाव्या पारड्यात सोडू लागले. भोसलाई सोनसूर्य वर घेण्यासाठी सोने झटू लागले.

रोखल्या नजरेने संभाजीराजे पारड्याकडे बघत होते. "या उभ्या रायगडाला सोनरूप देऊन तो डाव्या पारड्यात उचलून ठेवला तरी आबासाहेबांचं पारडं फरसबंदी सोडून उठू नये!" असे त्यांना वाटत होते.

राजांनी वीरासनी बैठक घेतलेले पारडे फरसबंदी सोडून उचलले गेले.

राजांची सुवर्णतुला झाली. मंत्रांचा घोषच घोष उठला. सतरा हजार तोलल्या मोहरा तबकात उतरून त्यावर गागाभट्टांनी मंत्रित फुले ठेवली.

चांदी, तांबे, कापूर, शिसे, फळे, मध, मसाले, साखर अशा राजांच्या आणखी पंधरा तुला राजबैठकीत जोखण्यात आल्या.

"युवराज, आइए. पुष्प चढाइए तुलादेवतापर." गागांनी संभाजीराजांच्या हाती फुलांची ओंजळ ठेवली.

फुले वाहून संभाजीराजांनी तुलेवर हळदीकुंकू सोडून तिला वंदन करीत उजवा पाय उजव्या पारड्यात ठेवून वीरबैठक घेतली. मंत्रांचे घोष उठू लागले.

गागाभट्ट, बाळंभट्ट, प्रभाकरभट्ट सोनमोहरांच्या ओंजळी डाव्या पारड्यात सोडू लागले. त्यातून खणखणत पारड्यात उतरणाऱ्या मोहरा बघताना विचाराची एक ओंजळ कुठूनतरी संभाजीराजांच्या मनाच्या पारड्यात सोडली गेली –

"आमच्या मासाहेब इथं येतील आणि 'शंभूबाळ' म्हणत शिवलिंगाला नेहमी वाहतात त्यांतील एकच बिल्वपान त्या पारड्यात सोडून आमच्याकडं बघतील तर आमचं पारडं हां हां म्हणता आभाळाला जाऊन थडकेल!!"

संभाजीराजांनी वीरबैठक घेतलेले पारडे फरसबंदी सोडू लागले. पीतवर्णी वस्त्र अंगभर

लपेटून शेजारी उभ्या असलेल्या राजांना ते बघताना वाटले– "मोहरांच्या पारड्यातील मोहर न् मोहर रंग पालटते आहे. पिवळ्याधमक मोहरा सावळ्यासावळ्या होताहेत !!"

मंत्रोच्चाराचा उद्घोष करणाऱ्या गागाभट्टांना, सावळ्या मोहरा बघणाऱ्या राजांना, बिल्वपानाच्या विचारात गेलेल्या संभाजीराजांना कुणालाच कल्पना नव्हती की पारड्यात बसलेल्या, टोप नसलेल्या सोनेरी कमळाला एक स्त्रीमन आपल्या डोळ्यांच्या तराजूत तोलून धरू बघत होते! सोनेरी बुट्ट्यांचा शालू नेसलेल्या, कपाळी कुंकूपट्टे असलेल्या, नाकात नथ ल्यालेल्या येसूबाईंचे! आपल्या अंगावरचे सगळे सुवर्णालंकार त्यांनी आपल्याच डाव्या डोळ्याच्या पारड्यात टाकून बघितले! मनाचे सोनकमळ त्यावर टाकून बघितले. उजव्या डोळ्यात बैठक घेतलेला हटवादी, बेडर, बांडा, केशरी टोप काही रेसभर हलायला तयार नव्हता!

कावऱ्या-बावऱ्या येसूबाईंनी आपल्यावर कुणाचे ध्यान तरी नाही ना म्हणून डावे, उजवे बावरून बघितले. त्यांच्या शेजारी उभी असलेली धाराऊ हसत त्यांना म्हणाली, "नथंची सवं न्हाई तुमास्नी सूनबाई, म्हून ती काच देतीया!" ते ऐकताना येसूबाईंच्या गाली पळसच पळस फुलारले. संभाजीराजे पारड्यातून खाली आले.

"महाराज्ञि, आइए." आचार्यांनी सोयराबाईंच्या हाती फुले दिली.

तुलेची पूजा करून पारड्यात उजवे पाऊल ठेवताना सोयराबाईंना आचार्य गागाभट्टांना म्हणावेसे वाटले, "करताच आहात आमची तुला तर आमच्या रामराजांना संगती घेऊ द्या! त्यांच्याखेरीज आमची एकलीची तुला कसली करताहात?" पण हस्तिमृत्तिका रामराजांच्या हाती देताना जाणवेल असे घोटाळलेले आचार्य आठवून मग काही न बोलताच त्यांनी एकट्यांनीच पारड्यात बैठक घेतली.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीची पहाट किरणांच्या मोहरा वेचीत फुटू घातली. रात्र तीन घटका उरली होती. शतकांची झोप झाडून एक सोनस्वप्न उराशी घेऊन किल्ले रायगड जागा होत होता. पन्नास हजारांवर माणसांनी गडावर दाटवा केला होता. दुडदुडणाऱ्या नौबतीने रायगडावर डंक्याचे छत्र धरले होते.

पहाटस्नान घेऊन शूचिर्भूत झालेले राजे आणि संभाजीराजे जोडीने लोकमाता जिजाऊंच्या पायांचे दर्शन घेण्यासाठी त्यांच्या खासेमहालात आले. त्यांना आशीर्वाद देऊन जवळ घेताना जिजाऊंच्या थकल्या मनी विचारांचे काहूर कल्लोळले–

"केवढं मागं पडलं! काय घडलं आणि काय नाही? आईच्या कृपेनंच साऱ्या बाक्यातून निभावलं. तिच्यामुळेच आजचा दिवस उजाडला. हे बघायला आज आमची स्वारी पाहिजे होती. राजांचे दादामहाराज पाहिजे होते. आमच्या थोरल्या सूनबाई पाहिजे होत्या." दमा दाटलेल्या जिजाऊंच्या छातीत शहाजीराजे आणि सूनबाई यांच्या आठवणीने कळ दाटली.

उबळ, उबळ उसळू लागली. निर्धारी स्वभावाच्या जिजाऊ, राजे-संभाजीराजे जवळ

असल्याने ती निकराने रोधू बघत होत्या. त्यांचा श्वास कोंडणीला पडला. घशात खवखव उठली. आजवर 'दम धरणं' त्यांनी साधले होते. पण– पण आता दमा रोखणे त्यांना साधेना. उभ्या जिजाऊ खोकू लागल्या.

त्यांच्या दोन्ही बगलांना हात देऊन राजे-संभाजीराजे शब्दांनी त्यांचा दमा रोधू बघू लागले.

"मासाहेब."

"आऊसाहेब."

ते दोघेही पितापुत्र आपला राज्याभिषेकही क्षणभर विसरले! धाराऊ, पुतळाबाई जिजाऊंच्या पाठीशी झाल्या. साऱ्यांनी सावरून त्यांना मंचकावर बसते केले. साऱ्यांचा जीव कळवळला. आचार्यांची वर्दी घेऊन बाळंभट्ट महालात आले. त्यांना बघताच जिजाऊ म्हणाल्या, "राजे-युवराज, या तुम्ही. आचार्यांची सांगी आली. आता तुम्ही आमचे नाही! सिंहासनाचे! पंडित खोळंबलेत."

संभाजीराजांनी पुतळाबाई, धाराऊ यांची पायधूळ घेतली. दोघेही महावेदीकडे जायला निघाले. मुजरा देत मागच्या कदमांनी मागे हटून वळण्यापूर्वी संभाजीराजांना मान वर करताच पदराने डोळ्यांच्या कडा टिपणाऱ्या जिजाऊ दिसल्या. त्यांचे पाय फरबंदीला जखडल्यागत झाले.

"चला." राजांचा घोगरा साद त्यांच्या कानी आला. ते वळते झाले. चालू लागले. जगदीश्वर आणि भवानीपूजनासाठी.

"धाप लागल्यानं पाणी दाटतंय." पाठीशी गप्प गप्प उभ्या असलेल्या धाराऊला जिजाऊ म्हणाल्या. तसे म्हणताना जिजाऊंना कळलेच नाही की धाराऊच्या डोळ्यांतही पाणी दाटलेच होते! कसलीही धाप नसताना!

महावेदीचा उभा मंडप ब्रह्मवेत्ते, पंडित, शास्त्री यांनी दाटून गेला होता. मंडपाच्या मध्यभागी, अष्टदिशांना आम्रपत्रे आणि श्रीफले मस्तकी घेतलेले सुवर्णाचे, रुप्याचे, तांब्याचे, मृत्तिकेचे कुंभ स्थापित केले होते. त्यांत दूध, दही, तूप, मध आदी पंचामृत आणि पाणी मंत्रित करून भरले होते. त्या सर्व कुंभांच्या कंठांना फेर टाकून कुंकूहळदीत न्हालेल्या शुभ्र धाग्यांनी ते अष्टकुंभ एकजीव करून एक नेटका अभिषेकचौक सिद्ध केला होता. चौकाच्या दक्षिण दिशेला औदुंबराची प्रशस्त आसंदी उभी केली होती. राजे, युवराज, सोयराबाई यांनी अभिषेकासाठी स्थानापन्न होण्याची ती बैठक होती. औदुंबराच्या पवित्र समिधांची.

तिच्यासमोर कढीव तुपाने शीग भरलेली काशाची मोठी परात रांगोळी फिरलेल्या चंदनी चौरंगावर मांडली होती. तिच्या उजव्या तर्फेने तूप भरलेला सुवर्णकलश, दूध भरलेला रौप्यकलश, दही भरलेला ताम्रकलश, मध भरलेला मृत्तिकाकलश, मोतीलगाचे

नक्षदार छत्र, मयूरपिसांचा अब्दागिरी पंखा, भगवे वाद लोंबणारा सोनेरी मोर्चेल असा अभिषेकी सरंजाम हारीने लावून ठेवला होता.

राजमंडळाच्या समंत्रक स्नानासाठी चौकाच्या मध्यभागी दोन स्नानचौक उभे केले होते. एक खुला. राजे व संभाजीराजांसाठी. दुसरा आडपडदे टाकलेला. सोयराबाईंच्यासाठी. स्नानांचे सांडीव पाणी अभिषेकचौकाबाहेर काढण्यासाठी विटांचे पाट त्यांच्या भवतीने फिरविले होते. मंडपांचे पूजन करून मंत्रघोषांच्या गजरात राजे-संभाजीराजे-सोयराबाई हे राजमंडळ मंडपात आले.

गणेशपूजनाने अभिषेकाविधीला सुरुवात झाली. कुंकू-हळदीच्या चिमटी सोडून राजमंडळ दक्षिण पाऊल धाग्यापार ठेवीत अभिषेकचौकात आले. त्यांच्या पाठोपाठ गागाभट्ट, बाळंभट्ट आदी मंत्रवेत्ते आले. मोरोपंत, हंबीरराव, आण्णाजी, रामचंद्रपंत, त्र्यंबकपंत, दत्ताजी त्रिमल, निराजीपंत आणि रघुनाथपंडित हे मंत्रिगण आले.

समंत्रक स्नानानंतर राजे-युवराज यांचे मृत्तिका आणि पंचामृतस्नान झाले. मंत्रांचा घोष चढीला पडला. मंडपभर जागा मिळेल तिथे माणूस दाटले होते.

मंत्रिगण पाठीशी घेत राजे आसंदीजवळ आले. आसंदीची सविध पूजा झाली. पायाचा स्पर्श होणार नाही अशी दक्षता घेत राजे आसंदी आरूढ झाले. पाठोपाठ सोयराबाई आणि संभाजीराजे चढले.

अभिषेकांच्या मांडल्या सरंजामातील छत्र आण्णाजींनी उचलले, अब्दागिरी मोरपंखा त्र्यंबकपंतांनी घेतला, सुवर्णी मोर्चेल दत्ताजींनी हाती पेलला. तिघेही आसंदीच्या पाठीशी झाले. सुवर्णकुंभ घेतलेले मोरोपंत, रौप्यकुंभ उचललेले हंबीरराव, ताम्रकुंभ तोललेले रामचंद्रपंत, मृत्तिकाकुंभ सावरलेले रघुनाथपंडित आणि सुवर्णी हिरे-रत्नजडित राजदंड पेललेले न्यायाधीश निराजीपंत आसंदीच्या दुतर्फा झाले.

भंडारा वाहिलेली सोन्याची ओंजळ पूर्वेच्या दिशेने उधळून आचार्य गागाभट्टांनी खड्या आवाजात अभिषेकाची रोमांचक, पावन नांदी दिली –

"ॐ गणपतये नम: ! कुलदेवतोभ्यो नम: !"

मोरोपंतांनी हातीचा तूपभरला सुवर्णकुंभ बाळंभट्टांच्या हाती दिला. राजे, संभाजीराजे, सोयराबाई यांच्या राजमस्तकांवर अभिषेक होऊ लागला. ते तिघेही निथळू लागले. तूप, दूध, दही, मध अशा सत्त्वरसांत गंगा, सिंधू, यमुना अशा लोकनद्यांच्या पावन जलात, पश्चिम, पूर्व आणि दक्षिणेस गर्जत, उसळणाऱ्या मर्दान्या सागरांच्या अशरण जलात ते निथळू लागले आणि त्यांच्या बरोबरच जगदंबेचा थोर भुत्या रायगडही निथळू लागला, जमलेल्या पन्नास हजारांवर उराउरांतून ओसंडणाऱ्या स्वातंत्र्यलाटांत. नगारखान्यावरचा सोनकिनारी जरीपटका निथळू लागला, वरच्या आकाशातून पाझरणाऱ्या आजवर कामी आलेल्या हजारो मावळवीरांच्या आनंदआसवांत जिजाऊंचे 'म्हातारपण' निथळू लागले, कृतार्थतेच्या, जीव कोंडणाऱ्या दम्यात! जगदंबेचे

'आईपण' निथळू लागले भुत्यांच्या 'कवतुक महिम्यात'. झोपडीखोपटांत अंग टाकणाऱ्या, शिंगांची तान कानी पडताच एका हाताने पाठीशी ढाल बांधून घेत दुसऱ्या हाताने आपल्या खोपटावर चिलमीवरचा निखारा तसाच उचलून ठेवून 'जय भवा ऽ नी' गर्जत घोड्यावर मांड घेणाऱ्या हर मावळी धारकऱ्यांचे 'मर्दपण' निथळू लागले, "आता मराठा गादी जाली!" या रांगड्या अभिमानात!

अभिषेकसंपन्न झालेल्या राजमंडळाने उंची राजपेहराव परिधान केले. काशाच्या परातीतील कढीव तुपाच्या दर्पणात मुखदर्शन घेतले. शस्त्रपूजा करून राजे, युवराजांनी अंगी शस्त्रे धारण केली. समर्थांचा कोदंड खांद्यावर घेताना राजांच्या मनात त्यांनी दिलेला बोध टंकारला – "मराठा तितुका मेळवावा! महाराष्ट्रधर्म वाढवावा! देवद्रोही तितुके कुत्ते! मारून घालावे परते! अवघा हलकल्लोळ करावा!"

युवराज संभाजीराजांना संगती घेऊन राजे गागाभट्टांमागून चालले दरबारीचौकाकडे. सिंहासनाच्या रोखाने. त्यांच्यामागून मंत्रिगण, शास्त्री, जमलेले बिन्नीचे सरदार चालले. दूरवर डोंगररांगांआड नवा उष:काल भवितव्याची वाट चालला.

राजे, युवराज, सोयराबाई दरबारीचौकांत आले. मुंगी रिघायला वाव मिळणार नाही असे माणूस चौकात दाटले होते. छताला धरून चौबाजूंना ओळंबलेले झालदार पडदे झळकत होते! पुष्पमालांनी सारा दरबार शिणगारला होता. साऱ्यांचे डोळे जखडले होते, राजमंडळावर. टाचा उंचावून माणसे धडपडत होती. राजदर्शनासाठी.

राजे, सोयराबाई, युवराज सिंहासनाच्या चौथऱ्यासमोर आले. प्रथम पायरीला लागूनच एका चौरंगावर चांदीचे घंगाळ होते. त्यात ताम्र मुहूर्तपात्र सोडले होते.

आचार्यांनी दिलेले श्रीफळ चौथऱ्याच्या प्रथम पायरीजवळ वाढवून राजांनी भकले दुहाती फेकली. सिंहासनाची सविध पूजा बांधली. पोतराजाने समोर धरलेल्या परडीतील भंडाऱ्याची मूठ उधळली.

"जगदंब, जगदंब" कुणालाही ऐकू येणार नाही असे स्मरण करीत राजांनी सोनपत्र्याने मढविलेल्या चौथऱ्याच्या पायरीवर उजवा पाय ठेवला. राजे चौथरा चढू लागले. त्यांच्या पायमागाला धरून सोयराबाई, संभाजीराजे चौथरा चढले.

मोतीलगाच्या छत्राला धरून असलेल्या, व्याघ्रदंडी हिरे-रत्नजडित, प्रशस्त, सुवर्णसिंहासनाला छातीशी हात भिडवीत राजांनी वंदन केले. पाय न लावता, उगवता पुढा धरून त्यांनी सिंहासनावर वीरबैठक घेतली.

सिंहासनासमोरच्या चरणासनाला लागून असलेल्या उजव्या सोनेरी पायरीवर संभाजीराजांनी बैठक घेतली. डाव्या तर्फेला असलेल्या पडदेबंद राणीवशात सोयराबाईंनी बैठक घेतली. अष्टप्रधान मानाप्रमाणे एक एक सुवर्णस्तंभ धरून खडे झाले. अब्दागिरे, मुर्झबदार, चवरीवाले, पंखावाले यांनी आपआपल्या जागा घेतल्या.

आचार्य गागाभट्टांनी राजे-युवराज यांच्या मस्तकीचे टोप उतरून मोकळ्या तबकात

ठेवले. दुसऱ्या तबकात असलेला राजांचा अभिमंत्रित शुभ्रवर्णी टोप आचार्यांनी हाती घेतला. मंत्रसाद उठू लागले. मुहूर्तपात्र घंगाळात डुबताना आचार्यांनी राजटोप राजांच्या मस्तकी स्थापित केला. दुसरा केशरी टोप संभाजीराजांच्या मस्तकी चढविला. रायगडाचा बुलंद तोफखाना दणाणू लागला. उखळी, बंदुकांच्या फेरी झडू लागल्या. चौघडे, नगारे, शाजणे यांचा राजडंका घुमू लागला.

गुर्झबदाराने हातचा गुर्झब उचलून धरीत ठणठणीत अल्काब दिला –

"राजश्रियाविराजित, सकळगुणमंडित, क्षत्रियकुलावतंस, सिंहासनाधीश्वर गोब्राह्मण-प्रतिपालक, हिंदुपदपातशहा ऽ श्रीमन् महाराज छत्रपति शिवाजीमहाराज कीऽऽ... !"

"जय ऽ! जय ऽ जय ऽ!" उभ्या दरबाराने तो अल्काब वरच्यावर तोलून धरला. त्या कल्लोळाने चौथऱ्यावरची सुवर्णी न्यायतुलाही थरथरली. आपल्या दोन्ही पारड्यांत नाचण्याएवढीही तफावत नाही ना याची खातरजमा करून घेत स्थिर झाली!

कानी पडलेला जयकार संभाजीराजांच्या अंगी टपटपून उठला. त्यांना वाटले उठावे आणि घाटी फुलवीत आपणही त्याला दाद द्यावी!

उगवतीवर आलेल्या सूर्याची किरणे थेट चौथऱ्याला मुजरा द्यायला रुजू झाली! सुवर्णी सिंहासन झळाळून उठले. नेहमीच्या सरावाने संभाजीराजे बसल्या बैठकीवरूनच दूरवर दिसणाऱ्या सूर्याचे दर्शन घेण्यात दंगले.

त्यांचे ते सूर्यदर्शन भंगले. कारण त्यांच्या अवती-भोवती रोमांचक खणखणाट करीत सोनमोहरा कोसळत होत्या! सिंहासनमंडित राजांना प्रधानमंत्री मोरोपंत ओंजळींनी 'सुवर्णस्नान' घालीत होते. राजांच्या मस्तकावरून उड्या घेत उतरलेल्या मोहरांचा, पायगतीला बसलेल्या संभाजीराजांच्या भोवती सडाच सडा पडू लागला.

एकलगीने भरजरी नजराण्यांची शेकडो तबके सिंहासनासमोर पेश येऊ लागली. दरबारी गर्दीतून वाट काढीत टोपीकरांचा गोरा साहेब हेन्री ऑक्झेंडन सिंहासनासमोर आला.

डोकीवरची साहेबी टोपी उतरून राजे-युवराजांना कमरेत झुकून अदब देताना तो टोपीकर बोलीत पुटपुटला – "युवर एक्सलन्सी राजा सेवाजी में पॉवर हिज मर्सी टू ॲक्सेप्ट धि गिफ्टस ऑफ कंपनी!"

त्याच्या तबकधाऱ्यांनी आणलेल्या नजराण्यात राजांच्यासाठी एक हिरेजडित शिरपेच, दोन किमती मोती आणि दोन हिरेजडित सलकड्या होत्या. संभाजीराजांच्यासाठी दोन हिरेमंडित सलकड्या आणि भरजरी हिऱ्यांची एक कंठी होती.

नजराण्याचा विधी आटोपला. महादानी देकार सुरू झाला. जमल्या ब्राह्मणांना, गोसावी, उत्पात, वासुदेव, भुत्ये, पोतराज, बैतेदार, फकीर, बैराग्यांना राजे-युवराज दान करू लागले, दान घेणारे भरल्या तोंडाने दुवा-आशीर्वाद देऊ लागले – "तथास्तु. भोलानाथ सुखी ठेवील. खुदा सलामत रखे."

देकार सरला. दरबारी कलाकारांनी पवाडे, नृत्य, भजन यांच्या शेलक्या चिजा पेश केल्या. सर्वांत शेवटी ब्रजकवी भूषण कमरशेला आवळून सिंहासनाच्या सामोरा आला. त्याची बिजलीवर मांड घेतलेली दिमडी थडथडू लागली. कानावर हात घेत त्याने राजांच्या कुलदेवाचे नमन धरले.

"जै जयंती जै आदि सकति –
जै चमुंड जै मुंड भंडासुर खंडिनी।
जै सुक्त, जै रक्तबीज बिड्डाल बिहंडिनी॥"

ते नमन ऐकताना राजांचा हात छातीवरच्या कवड्यांना भिडला. डोळे मिटलेल्या संभाजीराजांना साक्षात अष्टभुजा दिसू लागली. दिमडी छळकत थडाडू लागली –

"दशरथ जू के राम, मैं वसुदेव के गोपाल।
सोई प्रगटे साहि के, श्री सिवराज भुपाल॥
सिव हि औरंग जिति सकै, और न राजा राव।
हत्थि मत्थ पर सिंह बिनु, और न घालै घाव॥
औरन को जो जनम है, सो याको यक रोज।
औरन को राज है सो, सिर सरजा को मौज॥"

भरल्या दरबारातून भूषणच्या ढंगदार शिवगौरवाला सहज दादी येऊ लागल्या. डोळे मिटलेला भूषण हात छताकडे उडवीत शब्दाचे पोतचे पोत नाचवू लागला –

"जीवन मैं नर लोग बडो, कवि भूषन भाषत पैज अडो है।
है नर लोगन मैं राज बडो, सब राजनमें सिवराज बडो है॥
को दाता ? को रन चढो ? को जग पालनहार ?
कवि भूषन उत्तर दिखो, सिव नृप हरि अवतार॥"

युवराजपण विसरून संभाजीराजे हात उठवून कवी भूषणच्या तेजरसी, रोमांचक रचनेला दाद देऊ लागले. चौकात मागे पाण्याची कारंजी उसळत होती. पुढे शब्दांची कारंजी उसळू लागली – राजांचे यश वर्णन करताना बेभान भूषण स्वत:ला विसरला.

"तेरे तेज है सरजा दिनकरसो –
दिनकर है तेरो तेज के निकर सो॥
तेरो जस है सरजा हिमकर सो –
हिमकर है तेरो जस के अकर सो॥
कुंद कहाँ, पयवृंद कहाँ, अरू चंद कहाँ –
सरजा जस आगे ?
बाज कहाँ, मृगराज कहाँ, गजराज कहाँ
तेरो साहस के आगे ?"

" व्वा ऽ ! " भले." संभाजीराजांच्यातील कविमन दाद देऊन गेले. भूषण थांबला. घामाघूम झालेल्या भूषणसमोर सरपोसाने झाकलेले मोहरांचे तबक आले.

राजे सिंहासनावरून उठले. संभाजीराजे सोनपायरीवर खडे झाले. सोयराबाईंनी राणीवसा सोडला. राजमंडळ गडदेव जगदीश्वराच्या दर्शनासाठी निघाले.

" श्रीमान् छत्रपति शिवाजीमहाराज की ऽ ऽ "

" जय ऽ जय ऽ जय ! " जयकारांनी भोवतीचे झिरझिरे पडदे सळसळून उठले.

राजमंडाळाच्या कदमा-कदमाबरोबर दुहातीची शेकडो इमानी मस्तके झुकू लागली. महामुजरे झडू लागले.

नगारखान्यासमोर राजयात्रेचा सरंजाम सिद्ध झाला होता. गळ्यात सोनेरी घाट किणकिणवीत, कानांच्या झापा फडफडविणारा, सोंड, गंडनाळ यावर रंगी नक्षी फिरलेला, उजव्या पायात चांदीचा तोडा भरलेला, पाठीवरच्या भरजरी झुलीवर देखणी, किरणांत झळझळती सोनअंबारी घेतलेला 'त्रिशूल' हत्ती 'राजऐरावत' म्हणून अलमस्तपणाने झुलत होता. त्याच्यासमोर पांढराशुभ्र, जातवान घोडा, आयाळीवर पिसांचा मोर्चेल मिरवीत, अंगी तलम झूल घेऊन, गळ्यात सोनकोयऱ्याची माळ आणि उजव्या पायात सोनतोडा मिरवीत लाभाचा 'राजअश्व' म्हणून उभा होता. नंग्या तलवारी हाती पेलून निवडीच्या पेहरावातील दरबारी मानकऱ्यांनी दुहाती शिस्त धरली होती. अब्दागिरे, निशाणबार्दार, चवरीवाले, गुर्झबे यांनी ऐरावताला कडे टाकले होते. माहुताने इशारा देत राजऐरावत बसता केला. त्याला शिडी लावण्यात आली. उजव्या हाती सुवर्णी अंकुश घेऊन फीलवान म्हणून सरलष्कर हंबीरराव प्रथम राजऐरावतावर आरूढ झाले. पाठोपाठ राजे व बाकीचे राजमंडळ ऐरावतावरील सोनअंबारीत स्थानापन्न झाले. सोनमोर्चेल घेऊन चढलेले मोरोपंत त्यांच्या पाठोशी वीरबैठकीत बसले.

हंबीररावांनी ऐरावताला अंकुशमार देऊन खडे केले. सुवर्णी फुले, गुलाल, पुष्पे ऐरावतावर उधळली जाऊ लागली. राजयात्रा निघाली. कुबेरी थाटात. लेझमाचे तांडे खेळीला पडले. रणहलग्या, ताशे तडतडू लागले. तोड्यांच्या बंदुका आणि जडशीळ उखळ्या दणाणू लागल्या. दांडपट्टे, फरीगदगा, बोथाट्या यांचे खेळगडी अंबारीतल्या राजमंडळाला आपले कसब दावण्यासाठी समोरच्या खेळगड्यावर इरेसरीने घालून घेऊ लागले. गुर्झबदार राजअल्काब देऊ लागले –

" राजश्रिया विराजित... सकळ गुणमंडित..." दाटल्या कंगणी पगड्यांचा लालदर्या सरकू लागला. त्या सरकत्या दर्यावर अंबारीच्या रूपाने वर आलेला, मावळी अभिमानाचा सूर्य बघून उगवतीला कासराभर वर चढलेला आभाळीचा सूर्यही क्षणभर थरथरला! लपकन कमरेत झुकला!! 'शिव' आणि 'शंभो' शंकराच्या दर्शनाला निघाले. राजयात्रा जगदीश्वराच्या मंदिरासमोर आली.

एका बाजूला महाराणी सोयराबाई, दुसऱ्या बाजूला युवराज संभाजीराजे घेऊन महाराज जगदीश्वराच्या चौकआवारात आले.

देवदर्शन करून राजयात्रा बालेकिल्ल्याकडे परतली. राजमंडळ जिजाऊंच्या खासेमहालाकडे निघाले. राजमातेच्या दर्शनासाठी.

" छत्रपती महाराज येताहेत." वर्दी ऐकताना जिजाऊंचे सुरकुतलेले अंग रोमांचून थरारले. त्यांच्या बैठकीच्या भवत्याने पुतळाबाई, धाराऊ, येसूबाई उभ्या होत्या.

जिजाऊंच्या पायांवर डोके ठेवण्यासाठी छत्रपती शिवाजीमहाराजांनी गुडघे टेकले. त्यांच्या बगलेने संभाजीराजांनी गुडघे टेकले. रायगडाएवढ्या उंच थोरल्या मायेसमोर त्यांनी मस्तक झुकविली. जिजाऊंच्या मिटल्या डोळ्यांतून सुटेलेले थेंब सुरकुत्यांना न जुमानता घरंगळले. महाराजांच्या राजटोपावर उतरले. झालेला अभिषेक पावन झाला!

जिजाऊ आशीर्वादासाठी बोलू बघत होत्या. शब्द फुटेना. उभे अंग थरथरू लागले. आठवणींच्या हजारो सुरकुत्या त्यांच्या ममी उलगडल्या होत्या. मन असंख्य विचारांच्या कल्लोळात होलपटू बघत होते. त्यांच्या पायांवर डोके ठेवून महाराज तसेच काही क्षण थांबले. कसल्यातरी निर्धारी विचाराने महाराजांनी मान वर घेतली. भरल्या डोळ्यांमुळे त्यांना जिजाऊ दिसतच नव्हत्या. महाराजांच्या दोन्ही हातांचे झोले मस्तकीच्या राजटोपाला भिडले. कुणाला कल्पना नसताना त्यांनी तो कीर्तिधवल राजटोप उतरून सरळ जिजाऊंच्या पायांवर ठेवला! आणि तो ठेवताना त्यांचे उभे अंग गद्गदू लागले.

" शिवबा ऽ ! " डोळे पदराने निपटून टाकीत जिजाऊसाहेबांनी लगबगीने तो टोप उचलला. महाराजांच्या मस्तकी पुन्हा चढवून त्यांना उठवून मिठीत घेताना कसल्याही आशीर्वादाऐवजी पुन्हा त्या एवढंच म्हणू शकल्या, " शि ऽ व ऽ बा ! "

जिजाऊंचा थरथरता हात महाराजांच्या पाठीवरच्या जरीकोयरीवर, उपरण्यावर फिरत राहिला. बाहेरून अत्यंत मूक वाटणारी पण आतून पार गलबलून आलेली ती राजमातेची आणि श्रीमंत योग्याची मिठी दोघांनाच नीटपणे कळू शकत होती. महाराजांनी खांद्याला लावलेल्या समर्थांच्या बैरागी कोदंडाला– आणि– आणि महाराज-जिजाऊंनी अंगाखांद्यावर खेळवून ऐन भरीत आणलेल्या संभाजीराजांना !!

राज्याभिषेकाचे उत्तरविधी आटोपले. आचार्य गागाभट्टांना सव्वालक्ष होनांची दक्षणा देऊन, पहाऱ्यासाठी हत्यारबंद शिबंदी त्यांच्या दिमतीला जोडून महाराजांनी त्यांची गौरवी बोळवण केली.

राजमाता जिजाऊसाहेबांच्या महालीचा राबता वाढला. जेधे, बांदल, कंक, सिलिंबकर यांच्या जमेतीतील पगडीधारी मस्तके जिजाऊंच्या पायांना भिडू लागली.

" आऊसाहेब, येताव. तब्येतीला धरा. लई तापदरा करू नगासा आता. पाऊस धरायं लागलाय. आमास्नी जाय पायजे. शेतीवाडी हाय. निगताव. गारठ्याला दम्याचं दुखणं दुनावतया. हतं ऱ्हावू नगासा. खालतं पाचाडात जावा कसं." नितळ, भाबड्या, मावळी प्रेमभावनांच्या अभिषेकानं चिंब होऊन लोकमाता जिजाऊ निथळू लागल्या.

जमले मावळमाणूस चौवाटा पांगले. गड उलगला. मृगाची काळी छपरी आभाळाला धरून आली. पावसाळी चावरा वारा रायगडावर सूंकारत पिसाट घोंघावू लागला. झाडांचे डेरे पलट्या खाऊ लागले. बांधल्या झड्या उधळल्या. निकराने बसून असलेल्या जिजाऊंनी बिछायतीवर अंग टाकले. दम्याच्या धुसकाऱ्यात त्यांच्या घशातील "जगदंब" घुसमटू लागला. कांबळ्याच्या दोन दोन घड्या टाकल्या तरी अंगभर काटा उठू लागला. त्यांना गडावरून पाचाडात हलविणे भाग होते.

पडदेबंद मेणे जोडण्यात आले. हातजोड देत, शाल पांघरलेल्या जिजाऊंना महाराज आणि संभाजीराजे यांनी खासेमहालाबाहेर घेतले. पुतळाबाई, धाराऊ, येसूबाई, सोयराबाई, रामराजे – सारा गोतावळा त्यांच्या भवती दाटला होता.

"राजे. आम्हास जरा दरबारीचौकात नेता?" जिजाऊंच्या तोंडून शब्द आले.

"जी." महाराज व युवराज यांचा दुहाती आधार घेत जिजाऊ चालू लागल्या. जागजागी अभिषेकाच्या खुणा मिरविणारा, सजला दरबारी महाल आला.

पूर्वाभिमुख, सुवर्णमंडित, रत्नजडावाच्या बत्तीसमणी सिंहासनासमोर उभ्या राहिलेल्या जिजाऊंचे उभे अंग थरथरले. डोळे भरून आले. म्हाताऱ्या उरात भावनांचा कल्लोळ दाटला. सिंहासनावरच्या मोतीलगाच्या छत्राकडे बघत जिजाऊ घोगरट आवाजात म्हणाल्या, "चला. राजे, तुमच्यावर छत्र आलं ...."

बालेकिल्ल्याच्या पालखीदरवाज्याने जिजाऊंचा मेणा मनोऱ्याबाहेर पडला. त्याच्या दोन्ही तर्फांना महाराज आणि संभाजीराजे पायी चालू लागले. पाठीमागून जनान्याचे सात-आठ मेणे चालले ... जिजाऊ रायगड सोडून निघाल्या. मेण्याची काठाळी धरून चालताना संभाजीराजांच्या मनी विचार उठू लागले. "ही गडउताराची वाट कधीच सरू नये! पलीकडे महाराज, अलीकडे आम्ही. मेण्यात मासाहेब. ही चालणी अशीच राहावी! भोयी थकले तर त्यांच्या हातीचे थोपे आम्ही घेऊ, महाराज घेतील. मासाहेबांना धक्के बसणार नाहीत अशी तोलती चाल धरू!

"कधीतरी महाराज मासाहेबांना म्हणाले होते – 'आम्ही आपला मान काय करावा? तो आमचा वकूब नव्हे. शरीर सोलून त्याच्या मोजड्या आपल्या पायी चढविल्या तरी ते थिटेच आहे.' मासाहेब खोकू लागल्या की आमचाच जीव घोटाळणीला पडतो. खंत वाटते. त्यांचा दमा आम्हास घेता येत नाही.

"आता अभिषेक संपला. हा पावसाळा आम्ही पाचाडातच राहू मासाहेबांच्या पायांजवळ. आम्ही रचलेली काव्ये त्यांना ऐकवू. त्यांच्या धरल्या सांध्यांना मालिश देऊ. दम्याची उबळ तुटताच त्यांच्यासमोर तस्त धरू. धाप लागलेली असली तरीही त्या हसतच म्हणतील, 'हं. ऐकवा तुमची गीतं. आमच्या शिवबानं कधी गीतं रचली नाहीत. तेवढी वाण शंभूराजे तुम्ही भरून काढलीत.' मग आम्ही त्यांच्यावरच रचलेले गीत सर्वांत शेवटी वाचू. ते ऐकताना डोळे मिटते घेत पुटपुटतील, 'जगदंब, जगदंब!' बिछायतीवर हात थोपटीत आम्हास बोलावून जवळ बसवून घेतील. तोंडाने त्या काहीच बोलणार

नाहीत; पण आमच्या पाठीवरून फिरणारा त्यांचा हात उदंड बोलेल! बोलतच राहील!"

पाचाडच्या दरुणीमहालातील समया मंद तेवत होत्या. शिसवी मंचकावर जिजाऊ पडून होत्या. खालती सहाणेवर औषधीमात्रा उगाळणाऱ्या धाराऊच्या हातांतील किणकिणणाऱ्या काकणाबरोबर जिजाऊंच्या मनाने विचित्र सूर धरला होता.

"आमच्या थोरल्या सूनबाईंच्या सेवेत अशाच औषधीमात्रा झिजल्या! मात्रा घेऊन घेऊन त्या कंटाळत. तेव्हा आम्ही त्यांना मायेच्या रागाची जरब देऊन त्या घ्यायला लावीत होतो. तेव्हा जाणवलं नाही की शेवटी शेवटी मात्राही नकोशा होतात. आज ही सारीजणं आमचं ऐकत नाहीत. आम्हास त्या घ्यायला लावतात."

"या." दरुणीमहालाचा उंबरठा ओलांडणाऱ्या सोयराबाईंना बघून जिजाऊ क्षीण बोलल्या. त्यांनीच वर्दी पाठवून सोयराबाईंना बोलावून घेतले होते.

बाहेर सदरी जोत्यावर महाराज आणि युवराज महाडहून आलेल्या वैद्यांचा सल्ला ऐकताना चिंतातुर बसले होते. त्यांच्या ओढल्या चेहऱ्याकडे बघत तुळईची घाट निश्चल टांगती होती. मध्येच वाऱ्याचा झपकारा येत होता. त्याने घाटेतील टोल थरारत होता. तिकडे कुणाचेच ध्यान नव्हते. सोयराबाईंनी मंचकावर झुकून पदर तळहाती घेत तीन वेळा जिजाऊंना नमस्कार केला. त्यामुळे उठलेल्या त्यांच्या सुवर्णी कंकणांच्या किणकिणाटाचा माग घेत काही क्षण शांततेत तसेच गेले.

"सूनबाई, काही एक मनचं तुमच्या कानी घालावं म्हणून आम्ही तुम्हाला याद केलंय." जिजाऊंना धाप लागल्यागत वाटले. त्यांनी नजर वरच्या तख्तपोशीत जोडली होती. हात छातीवर होते. सोयराबाईंच्या कपाळीचे कुंकूपट्टे आक्रसले. जीव कानांत गोळा झाला. नाकाची नथ काच देतेय असे त्यांना वाटले.

"सूनबाई, आता अधिकाचं सांगायला आम्ही राहू याचा भरवसा नाही!" ते ऐकताना सहाणेवर फिरणारे धाराऊचे हात कलम झाल्यासारखे गपकन थांबले.

"जे सांगतो आहोत ते शेवटचं. ते तुमच्या कानी घातल्याखेरीज आम्ही मरणास मोकळ्या नाही! सूनबाई, आता तुम्हास एक नाही तीन फर्जंद आहेत हे नीट ध्यानी घ्या! राजे, शंभूराजे आणि रामराजे!" दमा जिजाऊंशी भांडू लागला. त्या त्याला खानदानी ज़रब देत जागी बसवू लागल्या. धाराऊचे हात थांबले. कान टवकार झाले.

"बाई, भोसल्यांचे पुरुष हाती लागणं मुश्किल. तुमच्या हातांत तीन आहेत! त्यांना सांभाळून घ्या. हा वाढला पसारा, याहून अधिक वाढवा. शंभूराजांना तर सर्वांहून अधिक जपा. त्यांच्या आऊ गेल्या नि आम्हीच त्यांच्या आऊ झालो. आता आम्हा दोघींचा भार तुमच्यावर आहे. धाराऊऽ" कोरड पडल्याने जिजाऊंनी धाराऊला हाक दिली. त्यांना काय पाहिजे हे ओळखून धाराऊ पाण्याचा गडवा, वाटी घेत चटक्याने पुढे झाली. पाणी घशाखाली जाताच जिजाऊंना कितीतरी हुषार वाटले.

"तुम्ही महाराणी झालात. आम्ही भरून पावलो. आता महामाता व्हा. त्यासाठी

येईल ते आपलं घेण्यासाठी पदर मोठा करा. आईला मानअपमान मानून नाही चालत. ते बळ येण्यासाठी जगदंबेची आण भाका. आमची याद ठेवा न ठेवा, पण जगदंबेला कधी विसरू नका. आम्हास भरोसा आहे पडल्या न पडल्याला ती तुम्हास मार्ग दाखवील. हे एवढंच सांगणं. या तुम्ही.'' जिजाऊंनी डोळे मिटते घेतले.

सोयराबाईंची नथ ओळांबली. सुवर्णी कंकणे किणकिणली. नमस्कार करून त्या महालाबाहेर पडू लागल्या.

'' हां. घेवा मासाहेब.'' धाराऊने उगाळली मात्रा बोटाने राजमाता जिजाऊंना चाटवली. महालाबाहेर पडणाऱ्या राणीसाहेबांच्या शालूवरचे झळझळणारे जरीबुट्टे जिजाऊंना दिसत होते. मंचकाच्या उशाकडे जिजाऊंना दिसणार नाही अशी उभी राहिलेली धाराऊ न राहवून म्हणाली, '' मासाब, तुमी बऱ्या व्हनार. मग असं कशापायी बोलता ते! आम्ही हाव की साऱ्यांस्नी!'' आणि घशातून फुटणारा हुंदका जिजाऊंनी ऐकू नये म्हणून तिने आपल्या पदराचा बोळा तोंडात कोंबून घेतला.

मृगाची पाणझडप पाचाडावर पडली. सावित्री, काळ, गांधारी नद्या लाल पाण्याने भरून आल्या. टपटपती थेंबावळ झाडांच्या पानापानांवरून उतरू लागली.

जिजाऊंचे पाय चेपीत बसलेल्या येसूबाई त्यांच्या डोळ्यांवरची झापड केव्हा हटतेय याची टक लावून वाट बघत होत्या.

'' येसू.'' मासाहेबांच्या हलक्या सादेने त्यांची तंद्री मोडली.

'' जी.'' म्हणत येसूबाई उठल्या. चौरंगीवरचे पंचपात्र उचलून जिजाऊंच्या जवळ गेल्या. '' तीर्थ घ्या मासाहेब आईचं.'' येसूबाईंनी पळी जिजाऊंच्या ओठांशी नेली.

जिजाऊंनी तीर्थ घेतले. '' येसू, इथल्या सदरीजोत्यावर आम्ही उभ्या राहिलो की गडाच्या मावळमाचीवर तुम्हीही असाल काय असा विचार मनी यायचा!''

'' हां मासाहेब, स्वारी मनोऱ्याच्या पाचव्या मजल्यावर आहेसं बघून आम्ही एकदा मावळमाचीवर आपल्या दर्शनास येण्याचं धाडस केलं होतं. आबासाहेब गडावर नव्हते.''

येसूबाईंचे उत्तर ऐकून जिजाऊ क्षीण हसल्या. '' तुम्ही तसं घेतलेलं ते पहिलं नि शेवटचं दर्शन आहे आमचं!'' असे जिजाऊंना म्हणावेसे वाटले. पण त्या बोलण्याने येसूबाईंचा चेहरा किती दुखरा होईल याची कल्पना असल्याने त्या म्हणाल्या, '' नातसूनबाई, तुम्हाला काही सांगणं कधी साधलंच नाही. आमच्या स्वारीनं खूप सालांपूर्वी एक तुला केली होती. नांगरगावी. इंद्रायणी आणि भीमेच्या संगमावर. हत्तीचा बच्चा नावेत चढवून.'' उबळ आल्याने जिजाऊ आपोआप थांबल्या.

येसूबाई पदर सावरीत मंचकावरून उठल्या. कारण त्यांच्या स्वारीसह महाराज महालात आले. त्यांच्या पाठीशी राजवैद्य नि मोरोपंत होते. जिजाऊंना येसूबाईंना सांगायची होती ती हत्तीच्या तुलेची कथा त्यामुळे त्यांच्या ओठांत तशीच राहिली!

संभाजीराजांचे बोट धरून चालत येणारे रामराजे, जिजाऊ थकल्या नजरेनेच पण कौतुकाने बघू लागल्या. त्या मनोमन म्हणाल्याही – '' असेच रहा. रामभरतासारखे!''

'' राजे, यांना कशाला त्रास देता?'' वैद्यांकडे बघत जिजाऊंनी विचारले.

'' आईचं करताना मुलाला त्रास कसला?'' वैद्यांनी त्यांना धीर द्यायचा यत्न केला. मंचकावर टेकून महाराजांनी जिजाऊंचा हात हाती घेतला.

दुसऱ्या बाजूला उभ्या असलेल्या संभाजीराजे आणि रामराजांनी मंचकावर बसावे म्हणून जिजाऊंनी हात थोपटून खूण दिली. संभाजीराजांनी उचलून रामराजांना मंचकावर ठेवले. जिजाऊंचा थरथरता हात रामराजांच्या पाठीवरून फिरू लागला. शांत आवाजात त्या म्हणाल्या, '' बाळराजे, दादामहाराजांचे धरले बोट सोडू नका.''

'' मासाहेब, कसं वाटतंय?'' जिजाऊ आपणाला टाळू बघताहेत हे जाणून महाराजांनी विचारले.

'' आता काय वाटायचं राजे? आम्ही वाटण्याच्या पलीकडे गेलोत. या साऱ्यांना नजरभर बघून बरं वाटतं.'' जिजाऊंचा आवाज साऱ्यांनाच परका वाटला.

'' राजे, एक वाटतं.'' जिजाऊंचा आवाज साऱ्यांनाच परका वाटला.

'' आज्ञा मासाहेब.'' महाराजांनी त्यांचा हात मायेने थोपटला.

'' आम्हास – आम्हास आईचा गोंधळ ऐकावा वाटतो!''

महाराज चरकल्या नजरेने त्यांच्याकडे बघतच राहिले. मग त्यांनी मोरोपंतांना नजर दिली. तिचा इशारा ओळखून पंत गोंधळ्यांना निरोप धाडण्यासाठी बाहेर पडले. औषधी पोतडी खोलून वैद्यांनी नाना प्रकारच्या मात्रा जोडल्या.

रात्री वाड्यात गोंधळाचा चौक मांडण्यात आला. आपल्या हाताने जिजाऊंनी जमल्या गोंधळ्यांना पानविडा आणि वस्त्रे दिली. ती पाजळून गोंधळ्यांनी नमन धरले. त्यांचा म्होरक्या उदासवाण्या आवाजीत आईचा महिमा गाऊ लागला.

'' उदर परडी देऊन हाती – ब्रह्मांडी फिरवी.
लक्ष चौऱ्याऐंशी घरची भीक्षा – मागविली बरवी –
ज्या ज्या घरी मी भीक्षा केली – ते ते घर रुचले!
आदिशक्तीचे कवतुक मोठे – भुत्या मज केले.''

ते ऐकताना जिजाऊंचे पाय चेपणाऱ्या संभाजीराजांचे डोळे झरझरू लागले. राजांच्या गळ्यात दम्यासारखी दाटण झाली. जिजाऊ मात्र डोळे मिटून शांत पडून होत्या. बाहेर वाड्यात कोसळणाऱ्या पावसाच्या गजरात संबळ-तुणतुण्याचे सूरसाद क्षीण होत विरून जात होते.

ज्येष्ठ वद्य नवमीची काळरात्र पाचाडच्या वाड्याभोवती घिरट्या घालू लागली. बाहेर पावसाची रपरप धुडगूस घालीत होती. आत दरुणीमहालात मायेच्या मंचकाभोवती

जमलेली मने चिंतेने काळंजली होती. आऊसाहेबांच्या हट्टी दम्यासमोर मात्रा हरल्या होत्या, काढे कंटाळले होते, वनस्पती वरमल्या होत्या.

खोकून खोकून फासळी फासळी खिळखिळी झालेल्या जिजाऊंचा डोळा लागला होता. त्यांची झोपमोड होईल म्हणून हाती धरलेला त्यांचा हात तसाच ठेवून संभाजीराजे बसले होते. त्यांच्या शेजारीच महाराज आणि रामराजे टेकले होते.

मोरोपंत, आण्णाजी, चांगोजी, हंबीरराव, अंतोजी, रायाजी साऱ्या जिव्हाळ्याच्या माणसांचे मंचकाला कडे पडले होते. मंचकाच्या उशालगतीला पुतळाबाई, येसूबाई, धाराऊ, सोयराबाई असा स्त्रीवसा चिंतावल्या डोळ्यांनी उभा होता.

बाहेर घोंघावणाऱ्या पावसाळी वाऱ्यांचा झपकारा मधूनच महालात घुसला. चिराखदाने आणि समयांच्या ज्योती त्याने अंगभर थरथरल्या. त्यांच्या थरथरत्या उजेडाबरोबर आतले मनन् मन नको त्या शंकेने चरकून उठले.

मधरात्रीचा सुमार झाला. "राजे ऽ" मंचकावरून दमादाटली क्षीण साद आली.

"जी." महाराज पुढे झुकले.

"तीर्थ द्या. गंगेचं." दमा निर्धारी झाला. "तुळशीपत्रही आणा."

महाराज उठले. देव्हाऱ्यात ठेवलेली गंगाजलाची तीर्थकुपी आणि तुळशीपत्र घेऊन पुन्हा मंचकाजवळ आले. पळीने त्यांनी गंगोदक मासाहेबांच्या ओठांत सोडले. त्यांच्या हातीचे सोनकडे थरथरले. मासाहेबांच्या ओठांत तुळशीपत्र देताना उभा रायगडच उचलून कुणीतरी आपल्या छातीवर ठेवला आहे असे त्यांना वाटले.

मासाहेबांच्या सेवेत सर्वांत शेवटी रुजू होऊन गंगाजल आणि तुळशीपत्र पावन झाले! "शिवबा, जवळ या." तुळशीपत्राआडून सावळे, निर्बंध बोल आले.

महाराज पुढे झाले.

"हात द्या." कधी नव्हे ते, मानी स्त्री-खानदान राजांच्याकडे मागणे घालीत होते. महाराजांनी सोनकड्याचा हात जिजाऊंच्या कंकणे घरंगळणाऱ्या हाती दिला.

"शिवबा, आम्ही तुमच्याकडे कधी काही मागणं टाकलं नाही. आज टाकतो आहोत. आम्हास आण द्या."

"मासाहेब – आज्ञा व्हावी –" राजांची छाती दाटून आली.

"शिवबा ऽ, शिवबा, आमच्या शंभूराजांच्या आऊ आता तुम्ही व्हा! आम्ही वचनात आहोत थोरल्या सूनबाईंच्या. ते तडीस लाव."

ते ऐकताना संभाजीराजांच्या मनाचा बांध-बांध फुटला. हाती धरलेला जिजाऊंचा हात गदगदून हलवून ते मुसमुसत म्हणाले, "आऊसाहेब तुम्ही … तुम्ही हव्यात आम्हाला, आमच्या महाराजसाहेबांना."

"शंभूराजे, शांत व्हा. तो ऋणबंध सरला. एक नीट ऐका. तुम्ही – तुम्ही आमच्या स्वारीसारखेच दिसता. पण – पण ते जसे आम्हास पारखे झाले तसे तुम्ही कधी येसूबाईंना होऊ नका!"

"राजे, आम्ही सारं बघितलं. फक्त एक राहून गेलं. आमच्या रामराजांचे हात पिवळे झालेलं बघण्याचं! ते करा. आणि – आणि जीवावरच्या साकड्यात आता स्वत:ला कधी गुंतवून घेऊ नका. तुमच्यासाठी जगदंबेच्या पायाशी धरणं धरायला आता कुणी उरलं नाही ऽ!"

ते ऐकताना नाकगड्डा चिमटीत धरलेल्या राजांचा टोप डावा-उजवा हिंदकळला. त्यांच्या पोटात पोकळीचा खड्डा पसरला. शब्द थरथरले – "मा ऽ सा ऽ हे ऽ ब!"

"राजे, केशवपंडितांना बोलवा. आम्हास समर्थांचा बोध ऐकवा!"

बाहेर पाचाडभर ऐन मध्यरात्र हट्टी धरणे धरून बसली. मेटामेटावरचे पहारेकरी एकमेकांच्या हाती बदलत्या पहाऱ्यांचे भाले देताना गस्त घालू लागले – "मेटकरी हुश्या ऽ र!" वाड्याच्या छतावर मावळी पाऊस दाभणधारेनं कोसळतच होता.

केशवपंडितांनी अडंगीच्या बैठकीवर दासबोध मांडून चौरंगावर बैठक घेतली. त्यांना बोध दिसावा म्हणून धाराऊने अडंगीजवळ तेवती समई ठेवली.

केशवपंडितांच्या तोंडून समर्थांचे बैरागी शब्द थरथरत बाहेर पडू लागले –

"सरतां संचिताचे शेष। नाहीं क्षणाचा अवकाश।
भरतां न भरतां निमिष। जाणे लागे॥
गेले बहुतां बळांचे। गेले बहुतां काळाचे।
गेले बहुतां कुळांचे। कुळवंत राजे॥
बहुतां जन्माचा सेवट। नरदेह सांपडे अवचट।
येथ वर्तावे चौखट। नीतिन्यायें॥
काया बहुत कष्टवावी। उत्कट कीर्ति उरवावी।
चटक लावुनी सोडावी। काहीं एक॥"

पंडितांची जबान थरथरू लागली. शब्दाशब्दांबरोबर भवतीची मने थिजू लागली. चिराखदानांच्या ज्योती थरथरू लागल्या.

"जीव जीवांत घालावा। आत्मा आत्म्यांत मिसळावा।
राह राहो शोध घ्यावा ऽ। परांतराचा॥

केशवपंडितांचा हात कापू लागला. डोळ्यांच्या कडा दाटून आल्या. एक एक शब्द त्यांच्या दाटल्या गळ्यातून घोगरत बाहेर पडू लागला –

"सर ऽ ली शब्दाची खटप ऽ ट।
आ ऽ ला ग्रंथाचा ऽ शेवट ऽ।
येथ सां ऽ गितले ऽ स्पष्ट। सद्गुरु भजन॥"

"पंडि ऽ त, नको ऽ, वाचू नका ऽ …"

संभाजीराजांच्या या कळवळत्या बोलांनी केशवपंडितांच्या पापण्यांवर थरारलेले अश्रूंचे थेंब हातीच्या पानावर टपटपले! त्यांना वाचवेना. कुणालाच काही बोलवेना.

ना छत्रपती शिवाजीमहाराजांना, ना युवराज संभाजीराजांना, महालातील कुणालाच कल्पना नव्हती की मिटल्या डोळ्यांच्या जिजाऊंनी आत्मा केव्हाच आत्म्यात घातला होता. देहभान हरपलेल्या, माणसांच्या जगापार गेलेल्या, लोकमाता जिजाऊसाहेबांच्या जीवज्योतीला प्रकाशच प्रकाश दिसत होता – शेवटचा प्रकाश.

होय! साक्षात अष्टभुजा, शस्त्रधारी, वाघावर आरूढ झालेली जगदंबाच त्यांच्या रोखाने येत होती! वाजत-गाजत, तिच्या समोर डोर-चोळणा घातलेला, छातीवर कवड्यांच्या माळाच माळा मिरविणारा, भंडाऱ्याने मळवट भरलेला, हाती पोत नाचविणारा भुत्यांचा सरंजामी तांडाच तांडा " उदं ऽ उदं ऽ " गर्जत येत होता!

ती 'भवानी यात्रा' थेट जिजाऊंच्या समोर येऊन थांबली. वाद्यांचा गलका विरला. वाघावर बसल्या जगदंबेने जिजाऊंच्या रोखाने आठी हात पसरले! भुत्यांनी बेहोष उदोकार दिला – " उदं ऽ उदं ऽ ".

देहाच्या सिंहासनावरून खंबीर जिजाऊ उठल्या! त्यांनी भगवा पदरकाठ ठाकेठीक केला. जगदंबेच्या डोळ्यांना डोळे जोडून बरेच दिवस मनाच्या खोलवटात रुजून बसलेला एक जाब तिला त्यांनी खानदानी बोलीत विचारून घेतला –

" आम्हास वाटलं होतं तुम्हीच याल! पण वाटलं नव्हतं, तुम्ही अशा याल! वाटलं होतं तुम्ही येताना आपल्या संगती एक जीनकसला घोडा घेऊन याल! त्याच्या रिकिबीत आमचाही पाय भरून फरफट करीत आम्हास तुमच्या दरबारी घेऊन जाल! जसं होदिगेरीच्या रानातून तुम्ही आमच्या स्वारींची शिकार करून त्यांना घेऊन गेला होतात तशा ... ! पण!! चला. आम्ही सिद्ध आहोत! "

राजे, संभाजीराजांसकट साऱ्यांना जिजाऊंच्या ओठांतून 'जगदंब! जगदंब!' असे शब्द बाहेर पडताहेत असा भास झाला.

डुईवर सप्तनद्यांचे पवित्र जल घेतलेले छत्रधारी, अभिषिक्त राजे खऱ्या अर्थाने पोरके झाले! छत्रधारी छत्रहीन! राजांच्या डुईवरचे आऊपणाचे छत्र गेले ... आणि आणि ... संभाजीराजांच्या? जिजाऊंचा निष्प्राण झालेला, थंडगार हात गद्‌गदा हलवीत, उभ्या चेहऱ्याला इंगळ्याच इंगळ्या डसाव्यात तसे आक्रसल्या चर्येने, महाराजांच्याकडे भरल्या डोळ्यांनी बघत, संभाजीराजांनी मध्यरात्रीचे पाषाणकठोर काळीजही तडकेल असा हंबरडा फोडला— " आबा ऽ, आमच्या आऊसाहेब गेऽल्या! "

पाठच्या भिंतीवर थडाथड गोंदले कपाळ बडवीत " मासा ऽ ब, मासा ऽ ब " म्हणत पाय गेलेली धाराऊ मटकन खालीच बसली. उठलेल्या आक्रोशाने शमादानांच्या ज्योतीन् ज्योती थरथरल्या. जिजाऊंच्या निष्प्राण देहावर दुअंगाने डोके धुसळीत महाराज नि संभाजीराजे स्फुंदू लागले.

बाहेर पाचाडभर फत्तेबाज मध्यरात्र सरत होती. थेंबाथेंबाने गळत होते!

□ □ □

७

आषाढ सरला आणि श्रावणी उन्हपावसाची पाठशिवणी सुरू झाली.

कोकलताश जाफरजंगाची बहादूरगड येथील गढी हुन्नराने लुटून, महाराज एक कोटीची लूट दास्तानी लावून परतीच्या वाटेवर होते.

संभाजीराजे आपल्या महालात विचारांबरोबर पायफेर टाकीत होते. त्यांच्या मनात जिजाऊंच्या अनेक आठवणींची न सरणारी पाठशिवणी पडली होती.

यादव नामाजी हा एकेकाळचा संभाजीराजांचा खाजगीकडचा खिदमतगार महाली पेश आला. मुजरा भरत त्याने वर्दी दिली – " कर्यात मावळाचं मुतालिक शंकराजी भवर आल्यात धाकलं धनी. भेटीची आज्ञा मागत्यात." त्या वर्दीने मनातील आठवणींची झिरपण तुटल्याने संभाजीराजांच्या कपाळी निसटत्या आठ्या तरळून गेल्या. आपलं युवराजपण बांधून घेत त्यांनी आज्ञा दिली, " पेश येऊ द्या त्यांना."

अदबीनं मुजरा भरत, बाहेर उभा असलेला शंकराजी आत आला. भेटीचा हेत खुला करत म्हणाला, " कर्यात मावळाचं देशकुलकर्ण दरबारी हातरोख्याकारणं नडून आहे युवराज. महाराजांची स्वारी गडावर नाही ... "

" कोण अडचण आहे हातरोख्यास? " संभाजीराजांनी शंकराजीच्या पगडीभर नजरेचा फेर टाकीत विचारले.

यादव नामाजी मध्येच बोलला, " कर्यात मावळाचं मिरासी कुलकर्नी रंगभट ठकार वारलं. शंकराजी मुतालिक म्हून त्येंच्या फडात चाकरीस हाईत. रंगभटास्नी कुनी वारस ऱ्हायला न्हाई. मुतालिक म्हून त्येंच्या येव्हाराची सम्दी शंकराजीस्नी म्हाईती हाय. त्यासाठनं त्येंची अर्जी हाय की ... " बोलता बोलता तो थांबला.

" काय अर्जी आहे? " संभाजीराजांनी शांतपणे विचारले.

" कर्यात मावळाच्या देशकुलकर्णपणाचा मिरासी हातरोखा आमच्या नावे करून मिळाला तर चाकरास अधिकारानं स्वामींची सेवा करता येईल."

यादव नामाजी पुढे झाला. त्याने शंकराजीच्या हातातील कागदांच्या वळ्यांची थैली आपल्या हाती घेतली. संभाजीराजांच्यासमोर येऊन थैलीतील कागद बाहेर काढून शंकराजी हे रंगभटाचे मुतालिक आहेत. बेवारस कुलकर्ण त्यांच्या नावे करणे आवश्यक आहे हे युवराजांना पटवून दिले.

"यादव नामदेऊ, तुम्ही चिटणिसांना आमचा निरोप द्या. हातरोखे करून दस्तुरासाठी आमच्याकडे पाठवून देणेस सांगा. शंकराजी, कोणत्याही भातेनं कुलकर्णीपणाचं काम नडू देऊ नका."

"जी." शंकराजी आणि यादव संभाजीराजांना मुजरे देत बाहेर पडले.

संध्याकाळपर्यंत हातरोखे तयार झाले. संभाजीराजांनी ते वाचून त्यावर दस्तूर देणारी निशाणी लावली. रंगभट ठकारांचा मुतालिक शंकराजी भवर कर्यात मावळाचा कुलकर्णी म्हणून रायगड उतरला.

जिजाऊंच्या बैठकीला नेहमीच्या दिवट्यांचा रिवाज द्यायला, महाराणी सोयराबाई, संभाजीराजे, येसूबाई, पुतळाबाई, रामराजे असे सारे राजकुळ जमले होते. सारे महाराजांची वाट बघत होते.

कल्याण-भिवंडीवर मोगलांनी केलेल्या जाळपोळ, लुटालुटीचा करिणा घेण्यात राजांना यायला थोडा वेळ लागला होता. राजे महालात लगबगीने प्रवेशले.

रिवाज नसताना आज त्यांच्याबरोबर सरपोसाने झाकले तबक घेतलेल्या हुजऱ्यासह मोरोपंत पेशवेही महालात आले.

साऱ्यांनी बैठकीला दिवट्याचा मान दिला. राणीवशात सावरत्या पदराने उभ्या असलेल्या येसूबाईंच्याकडे बघत राजे बांधील म्हणाले, "सूनबाई, अशा पुढे या."

येसूबाईंच्या कपाळीचे कुंकूपट्टे चळवळले. ठीक पदर, महाराजांच्या आदरासाठी त्यांनी पुन्हा एकवार ठीक केला आणि त्या बैठकीजवळ पुढेशा झाल्या.

"तुम्हास बघितले की, आम्हाला मासाहेबांची याद येते सूनबाई!" मोकळ्या बैठकीकडे बघत महाराज म्हणाले. "म्हणून त्यांना साक्षी ठेवून एक जबाबदारी आम्ही तुमच्यावर टाकावी म्हणतो. आपली कराल?"

"जी." नजर खाली ठेवून येसूबाईंनी हुंकार भरला.

"आमची शिक्के-कट्यार आजपासून आम्ही तुमच्या सुपूर्द करतो आहोत! ध्यानी ठेवा. या शिक्के-कट्यारीवर शेकडोंचे प्राण विसंबून आहेत. त्यांचा भार पेलण्यासाठी मासाहेबांचे आशीर्वाद मागून घ्या. तुम्हास यश येईल."

महालातील साऱ्यांच्या नजरा भावेश्वरीसारख्या उभ्या असलेल्या येसूबाईंच्यावर खिळल्या. येसूबाईंचे मन आबासाहेबांच्या विश्वासाला आपण पात्र आहोत हे ऐकताना दाटून आले. "आबा ऽ ..." त्यांच्या गळ्यातील सादही अर्धवट राहिली.

"बोलू नका. घ्या." मोरोपंतांनी सरपोस हटविलेल्या, हुजऱ्याने सामोरे धरलेल्या शिक्के-कट्यारीच्या तबकाकडे हातरोख देत महाराज म्हणाले.

भाबड्या येसूबाई भांबवल्या. 'श्रींच्या', आऊसाहेबांच्या राज्याचे ते मानदान कसे आपलेसे करावे या विचाराने गोंधळल्या.

साऱ्यांची अपेक्षा होती येसूबाई त्या तबकाला रिवाजाप्रमाणे हातस्पर्श घेऊन ते आपले केल्याची खूण देतील. पण – पण – तबकातील किरमिजी म्यानातील कट्यार आणि शिक्क्याच्या चंदेरी करंडाकडे बघत त्यांनी सरळ आपला काषायकाठी पदरच पसरता धरला! ते आकाशी राजदान स्वीकारायला जसा धरतीनेच पदर पसरावा.

त्याने हुजऱ्या गोंधळला.

"येसू ऽ", भारावलेल्या राजांच्या तोंडून शब्द सुटले. खेचल्यासारखे पुढे होत राजांनी करंड कट्यार उचलली. येसूबाईंच्या समर्थ पदरात ती स्वत: सोडताना राज्यांच्या तोंडून बोल सुटले. थेट जिजाऊंच्यासारखे – "विजयवंत व्हा!"

येसूबाईंनी बैठकीला तीनवार नमस्कार केला. मग महाराजांना, साऱ्या मामीसाहेबांसह आपल्या स्वारीला नमस्कार केला. समाधानाने महाराज निघून गेले. राजकुल महालाबाहेर पडले.

तेथून आपल्या महालात फुंफाटत आलेल्या सोयराबाईंनी अगोदर कमरेला दाटलेला सोनपट्टा आकड्यातून उकलला. चंद्रा दासीच्या हाती तो देताना हुस्कारा सोडीत त्या तिला, की स्वत:लाच म्हणाल्या ते त्यांचे त्यांनाच माहीत. पण उद्गारल्या, "शिक्के-कट्यार!"

आपल्या वाड्याच्या सदरेवर महाराज बसले होते. सदरीबैठकीसमोर मोरोपंत, आण्णाजी, बाळाजी ही मंडळी होती.

"निराजीपंतांची तब्येत ढासळल्याची खबर आहे. आप्ल्या गावी ते अंथरूण धरून आहेत." मोरोपंतांनी वृत्तान्त कानी घातला. तो ऐकून राजे चिंतागत झाले.

"बाळाजी, निराजीपंतांच्या गावी हारकारा धाडून त्यांच्या तब्येतीची वाजीपुशी घ्या. दवादारूची हयगय न होईल तसे करणेस लिहा." महाराजांनी चिटणिसांना सांगितले. एकीकडे जिजाऊंची आठवण, दुसरीकडे डिवचलेल्या बहादुरखानाच्या मराठी मुलखातील हालचाली, प्रतापगडावर पडलेली वीज अशा विचित्र विचारांची त्यांच्या मनात भेसळ झाली होती.

"धनी, कर्यातीकडचे कुनी बाईमानूस गडावं आल्यंय. सरकारांच्या गाठीची अर्जी करतंय." महाराजांचा खाजगी खिद्मतगार खंडोजी दाभाडे याने वर्दी दिली.

"घेऊन या त्यांना." म्हणत महाराजांनी समोरच्या मंडळींवर नजर फिरवली. तिचा इशारा ओळखून सारे सदरेबाहेर पडले.

तांबडे आलवण नेसलेल्या एका उजाड कपाळाच्या उतार ब्राह्मण स्त्रीला खंडोजीने पेश केले. आपले वैधव्य, जे सांगायचे ते सांगणे विसरून क्षणभर बाई महाराजांना डोळाभर बघतच राहिली.

"बाई, आपण कोण? कोण वजेनं येणं केलंत? पाचाडातून वर्दी दिली असतीत तर आम्ही मेणा पाठविला असता." महाराजांनी आस्थेने विचारपूस केली.

" आम्ही कर्यात मावळाच्या देशकुलकर्ण्याकडच्या ! जानकीबाई. सौभाग्य गेलं नि उघड्या पडलो. स्वामींच्या पायांशी न्यायाची दाद मागण्यासाठी येथवर आलो."

" बोला. बेअंदेश साफ बोला बाई." राजमुद्रा निर्धारी झाली. पाठीशी गिर्दीला रेललेले महाराज ते ऐकताच गिर्दी सोडून पुढे झाले. जानकीबाईला ते ऐकून धीर आला. कसे सांगावे याची बांधणी करण्यासाठी ती क्षणभर घोटाळली.

" आमचे मालक स्वामींच्या चाकरीत होते. देशकुलकर्णी म्हणून. त्यांच्या फडात मुतालिक म्हणून चाकरीस असलेला शंकराजी भवर आमच्या ध्यानीमनी नसता एकाएकी मिरासी देशकुलकर्णी झाला आहे! आम्हास जुमानीसा झाला आहे. आम्हास मावळ सोडण्याचा दपटशा देतो आहे. खुद्द दरबारानेच त्याला हातरोखा दिल्याचं ऐकल्यानं आमची जबानच बंद झाली. स्वामी, आम्ही फुटक्या कपाळानं कुठं जावं याचा रोखाही देऊन टाकावा!" असह्य कुचंबणेने बाईचे डोळे भरून आले.

" शांत व्हा बाई. तुम्ही आमच्या आऊसाहेबांसारख्या आहात! तुम्हास न्याय मिळेल. आमचे ते कर्तव्य आहे. एक सांगाल? हातरोखा कुणाचा आहे?"

पेचात आल्यागत जानकीबाई घोटाळली. जाब न देता खालच्या मानेने तशीच उभी राहिली.

" बोला बाई. ना कचरता सांगा. हातरोखा कुणाचा आहे?" राजांच्या डोळ्यांसमोर साऱ्या मंत्र्यांचे चेहरे क्षणभर तरळले.

" जी. आम्ही ऐकून आहोत. रोखा – रोखा युवराजांनी दिला आहे!" जानकीबाई धीराने बोलली.

" बाई ऽ!" दातांखाली जीभ सापडावी तसा महाराजांचा आवाज कातरला. नाकपाळी फुलून उठली. क्षणापूर्वी निराजीपंतांच्या तब्येतीची आच लागल्याने मायेची चिंता व्यक्त करणाऱ्या छत्रपतींचे अंग राजसंतापाने सौम्य थरथरू लागले.

" युवराजांना याद करा खंडोजी." राजांनी जरबी आज्ञा केली.

चरकलेला खंडोजी लपकन कमरेत झुकला. मुजऱ्याच्या हातावरच त्याने महाराजांचे शब्द झेलले! " जी." चटक्या पावलाने तो बाहेर पडला.

आपल्या महालात संभाजीराजे उमाजीपंडित आणि केशवपंडित यांच्याबरोबर अनुपुराण, मत्स्यपुराण, रामायण, महाभारत या ग्रंथांविषयी चर्चा करीत होते. खंडोजीच्या वर्दीने ती थांबली. मनात पुराणग्रंथांतील देखणे संदर्भ रेंगाळत असलेले पुढे कोणत्या महाभारताचा थाळा वाढून ठेवला आहे याचा अंदाज नसलेले, भरल्या दमदार छातीचे संभाजीराजे हसतच सदरेवर रुजू झाले.

" यांना ओळखलंत?" त्यांना मुजराही भरू न देता जानकीबाईकडे बोट रोखत महाराजांनी विचारले. संभाजीराजांचे हसणे त्या बदलत्या आवाजाने आणि राजांच्या नुसत्या दर्शनाने ओठातच मुरले. त्यांनी जानकीबाईवर नजरफेर टाकला.

" जी. नाही." पडेल आवाजात त्यांनी उत्तर दिले.

" ह्या जानकीबाई. कर्यात मावळच्या देशकुलकर्ण्यांच्या विधवा!" महाराजांचा एक एक शब्द आसूड फुटल्यागत संभाजीराजांना वाटला. शंकराजी भवर आणि यादव नामाजीचे चेहरे डोळ्यांपुढे तरळले. श्वास नकळत चढीला पडला. छाती लपापू लागली.

" बाई, तुम्ही या. निर्धास्त असा. आम्ही तुमच्या हक्कांना अभय दिले आहे. खंडोजी, यांना आऊसाहेबांच्या महाली घेऊन चला. त्यांचा इतमाम ठेवा." कल्याणकारी राजेपण आपुलकीने म्हणाले. खंडोजी बाईंना घेऊन गेला.

खाली मान घातलेल्या संभाजीराजांना महाराजांनी थेट जबानीवर घेतले.

" या बाईंना परते सारून तुम्ही मुतालिकास कुलकर्णपणाचा हातरोखा दिलात?"

" जी." मान वर उठत नव्हती.

" कोण हेतानं?"

" यादव नामाजीनं आमचा गैरमेळ करून दिला. रंगनाथभटांना कुणी वारस नाही. असा."

" खामो ऽ श, आणि तुम्ही त्यावर विश्वास ठेवलात! आम्ही तुम्हाला एकवार सांगितलं आहे – राजांना चुका करता येत नाहीत. आणि केल्या चुकांची सफाईही देता येत नाही. विसरलात? उद्या आम्ही स्वारीवर असता आमचे काही बरेवाईट झाले असाही कुणी तुमचा गैरमेळ पाडेल! ठेवाल विश्वास?" शब्दन् शब्द जनहिताच्या पिळाने बांधलेला होता. बिनतोड होता.

झटका बसावा तशी संभाजीराजांनी गर्दन वर झाली, त्यांना आबासाहेब दिसत नव्हते. कारण त्यांचे डोळे पाणपडद्याने झाळाकून टाकले होते. ओठ थरथरत होते.

" चुकलो ऽ – चुकलो आम्ही." मुष्किलीने एक एक घोगरा शब्द त्यांच्या घशातून बाहेर पडला.

" ठण ऽ ठण ऽ ठण ऽ!" तासवाल्याने ठरल्या रिवाजाप्रमाणे पाचाडच्या सदरेवर दिलेले घाटेचे टोल सदरीमहालात घुसू लागले.

ह्या टोलांच्या रूपाने जणू जिजाऊसाहेबच सदरेवर प्रवेशत होत्या! संभाजीराजांच्या पाठीवर हात ठेवून, पदर चिमटीने सावरीत म्हणत होत्या, " राजे ऽ, आम्ही कधी काही मागणं टाकलं नाही! आज एक टाकतो आहोत. आमच्या शंभूराजांच्या आऊ आता तुम्ही व्हा! आम्ही थोरल्या सूनबाईंच्या शब्दांत आहोत!"

टोला-टोलाबरोबर महाराज आणि संभाजीराजे दोघांच्याही अंगभर काटा फुलला होता. दोन घडीव मूर्तीसारखे ते एकमेकांकडे अचळ बघतच राहिले.

छत्रपतिमहाराज बैठक सोडून चालत संभाजीराजांच्या जवळ आले. त्यांचा खांदा हळुवार थोपटीत म्हणाले, " चला. माचीवर जाणे आहे!" आणि ते दोघेही भुत्ये चालू लागले माचीकडे. बाळाजींनी संध्याकाळी राजांच्या दस्तुरासाठी आणलेल्या कर्यात

मावळाच्या सुभेदाराला लिहिलेल्या फर्मानात मजकूर होता –

" ... तेथील कुलकर्ण जानकी कोम रंगभट ठकार हिचेच मिरासी असे. शंकराजी भवर याने नेला हातरोखा रद्दबातल समजोन तो रोखून धरणे. शंकराजी मुतालिकच असे ! त्याजकडून बाईस कोणेविशी दपटशा नव होय तसे करणे."

त्या फर्मानाची एक प्रत घेऊन जानकीबाई नगारखान्याच्या जरीपटक्याकडे समाधानाने बघत रायगड उतरू लागली.

न्यायाधीश निराजीपंतांनी आपला देह ठेवला होता. त्यांच्या सेवेची कदर राखावी म्हणून महाराजांनी भरल्या दरबाराच्या साक्षीने त्यांचे चिरंजीव प्रल्हाद निराजी यांना मानवस्त्रांसह न्यायाधीशपद दिले. प्रल्हादपंत उमरीचे आणि तसेच उमदे होते. तरतरीत होते. मंत्रिगणातील ते सर्वांत तरुण मंत्री होते.

दरबारी कामकाज आटोपताच एकदा त्यांनी जमल्या अष्टप्रधानांना प्रस्ताव टाकला – " जैसी आमची जाहली तैसी युवराजांची मुंज होणे अगत्य आहे. धर्मशास्त्राच्या गोष्टी एकदा राहून गेल्या की राहूनच जातात. पुढे नड देतात." महाराज अनुभवाचे बोल बोलत होते.

अष्टप्रधानांनी तो प्रस्ताव उचलून धरला. महाराजांनी अनंतभट्ट आणि प्रभाकर भट्ट यांना मुहूर्त-शोधनाचे काम जोडून दिले. गडावर संभाजीराजांच्या मुंजीचे वारे खेळू लागले. जाणत्यांना कळून चुकले की, दरबारात महाराजांच्या पायरीशी बैठक घेणारे युवराज, उद्या महाराजांच्या पश्चात बत्तीसमणी सिंहासनावर बसणार. खुद्द महाराजांनीच हे आता निर्विवाद स्वीकारले होते ! पुढे राज्याभिषेकात युवराजांना अडचण येऊ नये म्हणूनच महाराजांनी हा मौंजीबंधनाचा निर्णय घेतला होता. तो ऐकताना दरबारी पडदेबंद राणीवशात बसलेल्या सोयराबाई मात्र तडक उठून आपल्या महालाकडे निघून गेल्या होत्या हे दरबारात, बाहेर कुणालाच कळले नव्हते.

विचारांवर विचार पाठीशी लागलेल्या सोयराबाई मनचा बेत महाराजांच्या कानी कसा घालावा या पेचात होत्या. एकदा त्यांना वाटले – " आण्णाजींना बोलावून घ्यावं." पण अशा कामी आण्णाजी कुचकामी ठरतात याचा अनुभव त्यांनी घेतला होता. म्हणून खूप विचारांती त्यांनी मनोमन निर्णय घेतला. " आम्हीच जे वाटते ते जातीने स्वारींच्या कानी घालू ! "

मुंजविधीची निमंत्रणे रवाना केलेले महाराज नेहमीप्रमाणे सोयराबाईंच्या महाली आले.

रामराजांना जवळ घेत हसून म्हणाले, " तिकडं आम्ही तुमच्या दादामहाराजांच्या मुंजीची निमंत्रणं धाडतो आहोत आणि तुम्ही इथं महाली काय करताहात ? "

अनायासे निघालेला विषय पकडून सोयराबाई हसत महाराजांना म्हणाल्या,

" आम्हास स्वारीचं कोडं काही उकलत नाही ! एकच बाब दोन वेळा कशाला करायची ती ? "

काहीच न कळलेल्या महाराजांच्या कपाळीचे गंधपट्टे वर चढले.

" अभिषेक ते दोन वेळा झाले. स्वारी आता मुंजीही दोन वेळा करणारसं दिसतंय."

" मतलब ? "

" युवराजांची आणि बाळराजांची मुंज एकदमच झाली तर साऱ्यांचीच धावाधाव वाचेल असं आम्हास वाटतं ! " हसून रामराजांच्याकडे बघत सोयराबाई म्हणाल्या.

" यांची मुंज ? हे अजून लहान आहेत. कर्तबगारी जरा उमटू द्या आमच्या बाळराजांची, मग धडाक्यानं करू आम्ही यांचं मौंजीबंधन. काय बाळराजे ? " हसून रामराजांची पाठ मायेने थोपटीत महाराज म्हणाले, ते ऐकताना राणीसाहेबांचा नाकशेंडा लालावून आलाय हे काही महाराजांच्या ध्यानी आले नाही.

पण कोंडी असह्य झालेल्या सोयराबाईंची वाफ मुखावाटे फुंफाटत बाहेर पडली, " कुलकर्णं तिसऱ्यालाच सुपूर्द करणारे आपले युवराज आहेत खरे कर्तबगार ! "

" खामोऽश ! " महाराजांच्या जरबेने रामराजे दचकले. त्यांना जवळ घेत राजांनी सोयराबाईंना समज दिली. " त्यांच्या फडकरी कामात दखल द्याया तुम्हास समंध नाही. त्यांची कर्तबगारी पारखणारे आम्ही खूब आहोत ! " दुसऱ्या क्षणी रामराजांच्या खांद्यावर आपला हातपंजा चढवीत राजे शांतपणे त्यांना म्हणाले, " चला."

जात्या रामराजांच्याकडे बघणाऱ्या सोयराबाई भीतीने नुसत्या लटलट कापत होत्या ! " बाळराजे, थांबा " असे त्यांना म्हणायचे होते पण ते ओठांबाहेर उमटलेच नाही.

माघ वद्य पंचमीला संभाजीराजांचे मौंजीबंधन इतमामाने रायगडावर पार पडले. संभाजीराजे युवराज म्हणून फडाच्या कामात दक्षतेने लक्ष घालू लागले. हिवाळा हटला आणि पुरंधर प्रांताचा गोपाळशेट वाणी शेट्येपणाचा एक तंटा घेऊन रायगडावर आला. त्यांच्या कथल्याचा निवाडा देण्याचे काम महाराजांनी संभाजी राजांना जोडून दिले. त्यांची पारख घ्यावी म्हणून.

कथल्याची बैठक राजांच्या वाड्याच्या सदरेवर बसली. संभाजीराजे न्यायदान कसे करतात यावर देख ठेवण्यासाठी महाराज जातीने त्यांच्या शेजारी बसले.

कथल्याच्या सुनावणीला प्रारंभ झाला. वादी-प्रतिवादींचे म्हणणे संभाजीराजांनी ऐकून घेतले. साक्षी ऐकल्या. कागद नजरेखाली घातले. परंपरेच्या वारसाहक्काने पुरंधरचे शेट्येपण गोपाळशेटच्या बाजूने पडत होते.

संभाजीराजे कथल्याच्या महजराचा मजकूर मुतालिक महादेव यमाजींना सांगू लागले. महाराजांनी ते ध्यान देऊन, काही न बोलता ऐकला.

शब्दन् शब्द त्यांच्याच जबानीतून बाहेर पडल्यागत संभाजीराजे सांगत होते.

महजर पूर्ण झाला. महादेवपंतांकडून तो एकवार वाचून घेऊन संभाजीराजांनी त्याला दस्तूर दिला. तबकात ठेवलेली महजराच्या कागदाची थैली जोत्याजी केसरकराने गोपाळशेटच्या समोर धरली.

संभाजीराजांना मुजरा करून गोपाळशेटने ती थैली उचलली आणि आपल्या कपाळाला लावली. हात बांधून तो युवराजांच्यासमोर अदबीने उभा राहिला.

मनोमन खूष झालेल्या महाराजांनी गोपाळशेटला जाण दिली– "कथला तुमच्यासारखा झाला गोपाळवाणी, आता निवाडापट्टी तुम्ही रूजू केली पाहिजे! युवराजांना पाच होन आणि सरकारी फडात सव्वाशे होनांची सेरणी भरणा करून मगच गड उतरा!"

"जी. धनी." म्हणत डोकीचा रुमाल डोलावून महाराजांना मुजरा करून गोपाळवाणी सदरेबाहेर पडला.

महाराजांनी संभाजीराजांच्याकडे बघून हसत त्यांना, महजर पसंत असल्याची बैठकीतील इतर कुणालाही कळू येणार नाही अशी राजस पोच दिली!

आण्णाजी दत्तो व दत्ताजी त्रिमल यांना फोंड्याची मोहीम नुकतीच जोडून दिली होती.

महाराजांनी आणखी दोन बजोर मोहिमा लगेचच खोलल्या. एक संभाजीराजांच्यासाठी आदिलशाही मुलूख मारीत थेट कुतुबशाहीच्या भागानगरपर्यंत भिडणारी. आणि दुसरी स्वत: आपल्यासाठी राजापूर कुडाळमार्गे फोंड्यावर चाल घेणारी.

संभाजीराजांच्या फौजेची पाचाडात बांधणी झाली. वीस हजार घोडाईत या धावणीत युवराजांच्या घोड्याच्या टापांचा माग धरीत दौडणार होते.

साऱ्या राजकुळाचा निरोप घेतलेले संभाजीराजे महाराजांच्यासह जगदीश्वराचे दर्शन करून रायगड उतरले. पाचाडात जिजाऊंच्या वाड्याला धरून उत्तरेस आता त्यांची चिरेबंद समाधी उभी झाली होती. तिच्या पादुकांवर बेलफुलांची ओंजळ आणि भंडाऱ्याची मूठ वाहून संभाजीराजांनी पायरीला माथा भिडविला.

"फते घेऊन या." महाराजांनी त्यांना उठवून घेतले. दर्पणात बघितल्यासारखे ते एकमेकांकडे बघू लागले.

आनंद मकाजी, रूपाजी भोसला, ज्योत्याजी, अंतोजी, कोंडाजी फर्जंद यांच्यामागून वीस हजार घोडाईत दौडू लागले.

ही मोहीम पन्हाळ्यावरून मिरजेवर उतरून आदिलशाहीला ताराज करीत, हूल देत कुत्बशाहीच्या भागानगर या राजधानीवर अचानक चाल घेण्याच्या मनसुब्याने खोललेली होती. फौजेनिशी संभाजीराजे तीन दरवाज्याने पन्हाळ्याची चढण चढून आले. किल्लेदार त्र्यंबकपंतांनी त्यांची आगवानी केली.

बालेकिल्ल्याचा पायरीदार राजमार्ग सरताच समोरच शंभूमहादेवाचे छोटेखानी मंदिर होते. ते येताच त्र्यंबकपंत म्हणाले, "युवराजांनी दर्शन करून मगच खासेवाडा चढावा." त्र्यंबकपंतांच्या पाठीशी होत संभाजीराजे मंदिराच्या घुमटीत वाकून शिरले.

शालिग्रामी रंगाचे, बेलपुष्पे वाहिलेले शिवलिंग नंदादीपांच्या प्रकाशात झळकत होते. त्याच्यावर नजर जखडून पडलेले त्र्यंबकपंत ओढल्यासारखे पूर्वील काळात गेले होते. ते म्हणाले, "युवराज, ती रात्र आम्ही विसरू शकत नाही. गडास जौहरचं चाळीस हजार हबशांनिशी घेराचं ताकदवर कडं पडलं होतं. वेढा चार महिने जारी होता. शेवटी महाराजांनी हबशांशी सुलुखाची बोलणी लावून जीव धोक्यात घालण्याचा निर्णय केला. तीनशे निवडक बांदल आणि बाजी देशपांडे यांना संगती घेऊन पडत्या पावसात रात्रीचा गड उतरण्यापूर्वी महाराज या घुमटीत पिंडीच्या दर्शनास आले. आम्ही, बाजी, फुलाजी संगती होतो. या पिंडीच्या शाळुंकेला माथा टेकविलेले महाराज, फरसबंदीवर गुडघे टेकून कितीतरी वेळ तसेच बसले होते. महाराजांचं ते ध्यानमग्न रूप, ही पिंडी आणि ती रात्र आम्ही विसरू शकत नाही."

ते ऐकून भावभऱ्या मनाने संभाजीराजांनी गुडघे टेकून डोळे मिटत त्या शिवपिंडीच्या शाळुंकेला आपल्या कपाळीचे शिवगंध भिडविले.

"युवराज, ही पिंडी रंगरूपी आहे." त्र्यंबकपंतांनी तिचे खासेपण सांगितले. ते न कळल्याने संभाजीराजांनी विचारले, "मतलब?"

"हाताच्या ओंजळीनं ही पिंडी झाकून थोड्या अवकाशानं ओंजळ हटविली की ही शालिग्रामी पिंडी प्रथम सफेद दिसते! मग जांभळा, चंदेरी, गर्द निळा असे रंग दाखवीत पुन्हा शालिग्रामी होते!"

"जगदंब, जगदंब! खरं सांगता पंत?" संभाजीराजांचे डोळे विस्फारले.

"युवराजांनी पडताळाच घेऊन बघावा." त्र्यंबकपंतांनी पिंडीवरची बेलफुले हलकेच शाळुंकेवर उतरवली.

पुढे होत संभाजीराजांनी आपल्या अंगठीधारी, भरीव, बोटांची ओंजळ पिंडीवर पांघरली. त्र्यंबकपंतांनी कोनाड्यातील पेटता पलोता पिंडीजवळ धरला.

थोड्या वेळाने संभाजीराजांनी ओंजळ हलकेच मागे घेतली. पंतांनी पलिता पिंडीला लगत केला. रंगरूपी शिवपिंडी हातस्पर्श झाला तेवढ्याच भागापुरती सफेद झाली. मग मजेदार रंगच्छटा एकामागोमाग एक पालटू लागली. त्या बघताना उजवी भुवई चढलेल्या संभाजीराजांच्या डोळ्यांतले रंगही पालटू लागले. त्यांचे मन श्रद्धेने भरून आले. पिंडी पूर्ववत शालिग्रामी झाली. युवराजांनी हात जोडून पुन्हा एकदा तिला नमस्कार केला. डोळे मिटले. त्यांच्या मनी आले "अशी-अशीच दिसते महाराजसाहेबांची मुद्रा. शिवपिंडीसारखी. भावानुरूप रंग पालटणारी! रंगरूपी भावमुद्रा!!"

पन्हाळ्याचा सोमेश्वर तलाव, सज्जा कोठी, अंबारखाने, बुरजाबुरजांवरचे तोफमोर्चे

पाहून संभाजीराजे सुखदिल झाले. दोन दिवस मुक्काम टाकून, त्र्यंबकपंतांचा निरोप घेऊन चौदरवाज्याने सेनेसह ते पन्हाळा उतरले. मिरजेचा रोख ठेवून युवराजांचे घोडदळ दौडू लागले. बत्तीस शिराळामार्गे मिरज हे आदिलशाहीचे मातकोटाने बंदिस्त असे छावणीचे सुसज्ज ठाणे होते. ते अंगावर न घेता भवतीचा मुलूख ताराज करीत संभाजीराजांची शिलेबंद फौज आदिलशाहीत घुसली. अथणी, एटग्गी असे तळ टाकीत घोडाइतांच्या झडप्या तुकड्या लूट गोळा करीत भागानगराकडे दौडू लागल्या. गोवळकोंड्याच्या भागानगर या राजधानीच्या शिवेवर संभाजीराजांची वारा प्यालेली वीस हजारी फौज खडी ठाकली. कुत्बशाहीचा राजा तानाशहा याला असे काही होईल याची स्वप्नातसुद्धा कल्पना नव्हती.

"मरगठे आयेऽ भागोऽ!" भागानगरात कल्लोळ उठला. भयचूर रियाया गोवळकोंड्याच्या तटबंदीवर किल्ल्याच्या आसऱ्याला जाण्यासाठी धावू लागली.

"चौतर्फेचा मुलूख तसनसीस लावाऽ. बोलाऽ हरऽ हरऽ हरऽ महादेव" हाती म्यानवेच, तळपती, नंगी धोप तलवार घेतलेले संभाजीराजे गर्जले.

भागानगरची दक्षिणवेस धरून युवराजांचा कनातीदार शामियाना उठला. घामाच्या धारा लागलेले संभाजीराजे दौडत्या तुकड्यांवर देखरेखीचा फेर टाकून त्या शामियान्याच्या जवळ आले. पायउतार होऊन त्यांनी कायदे मोतद्दाराच्या रोखाने फेकले. पाठीशी आनंदराव, रूपाजी, जोत्याजी ही मंडळी होती.

"आनंदराव, कुत्बशहास हेजिब धाडून समज द्या. मनचाही खंडणी वसूल झाल्याखेरीज घोड्याचा खूर पीछे हटणार नाही!" बैठक घेत युवराजांनी आज्ञा केली.

"जी." पगडीला झोल देत आनंदराव कमरेत वाकला. त्याने आजवर नेताजी, प्रतापराव, हंबीरराव असे वावटळ उठवीत दौडणारे सोबती बघितले होते; पण युवराज संभाजीराजांच्या रसरसत्या रूपावर, त्यांच्या तडफेवर धारकरी केवढे जीव लावून आहेत याचा प्रत्यक्ष अनुभव या मोहिमेत तो घेत होता.

आनंदरावाने गोवळकोंड्याच्या किल्ल्यावर हेजिब धाडला.

तानाशहाने लुटीची मसलतीची मजलीस भरविली. महाराजांच्या राज्याभिषेकाची. बहादूरगडच्या लुटीची वर्णने ऐकलेल्या त्याच्या सल्लागारांनी खंडणी रुजू करण्याचा सल्ला बादशहाला दिला. त्याचा वजीर मादण्णापंत बोलणी करण्यासाठी किल्ला उतरून संभाजीराजांच्या तळावर आला. संभाजीराजांनी त्याची भेट घेतली.

दोन हजार होन खंडणीची तबके गोवळकोंड्याच्या किल्ल्यावरून मराठ्यांच्या तळावर उतरली. धास्त घेतलेल्या भागानगरातील डच वखारवाल्यांनी एक हजार फ्लोरिन्स मराठी तळावर रुजू केले! ते दास्तानी लावून संभाजीराजांनी आपल्या फौजेचा मोहरा माघारी फिरविला. पुन्हा आदिलशाहीच्या रोखाने. पण खबरगिरांनी बातमी आणली, "पठाण बहलोलखान फौजबंदीने चालून येतो आहे."

त्याला अंगावर न घेता हूल देऊन संभाजीराजांनी आदिलशाहीची हुबळीची मातब्बर व्यापारपेठ लुटली. आणि नंतर रायबागचे ठाणे मारून युवराजांची फौज, लुटीच्या मोहरबंद थैल्या घोड्यांच्या पाठीवर लादून पन्हाळ्याच्या रोखाने दौडू लागली.

युवराज विजयी सेनेसह पन्हाळगड चढू लागले. त्यांच्या स्वागतासाठी नौबत झडत होती. पन्हाळा चढून येताच संभाजीराजांनी गडावरच्या शिलेबंद धारकऱ्यांच्या पहाऱ्यात मिळाली लूट प्रथम रायगडच्या वाटेला लावली. सोबत सोयराबाईंना रिवाजी खलिता धाडला. जखमदरबार बसवून मोहिमेत मर्दानगी केलेल्या धारकऱ्यांना कडी, वस्त्रे, हत्यारे बक्षून त्यांची कदर केली.

फोंड्याच्या वेढ्यात असलेल्या महाराजांना बयाजवारीने खलिता धाडला गेला, "... साहेबी जोडून दिली मोहीम फते पाववून पन्हाळगडी मुक्कामास आहोत. चरणांच्या दर्शनाची इच्छा बाळगून आहोत."

पन्हाळगडच्या बालेकिल्ल्याच्या सदरेवर संभाजीराजे कारकून परशुरामपंताला मजकूर मायने सांगत बसले होते. बगल धरून आनंदराव उभे होते.

एवढ्यात किल्लेदार त्र्यंबकपंतांनी सदरेवर येऊन वर्दी दिली, "युवराज, कऱ्हेपठारातील चांबळी गावचे इनामदार बंधू आले आहेत. निळाजी, शंकराजी, विसाजी व त्रिंबकजी असे चौघे आहेत. भेटीस रुजू होण्याची आज्ञा मागतात."

"पंत, पेश येऊ द्या त्यांना." संभाजीराजांनी परवानगी दिली.

चांबळीकर इनामदार बंधू सदरेवर आले. मुजरे भरून एक हारीने उभे राहिले.

"कोण हेतानं येणं केलंत चांबळीकर?" संभाजीराजांनी त्यांची विचारपूस केली.

"एका बाबीची दाद मागण्यास आलोत आम्ही रायगडाहून." थोरले निळाजी विषयाकडे वळले.

"कसली दाद? काय झाले? सांगा." संभाजीराजांची नजर एकसरीने चौघांच्या पगड्यांवरून फिरली.

"स्वामींनी सिंहासनाची पट्टी मिरासदारांवर घातली आहे. इनामदार पट्टीस माफ केले असत. तरी पुण्याचा राघो भास्कर हवालदार आम्हावर पट्टी घालीत आहे. आम्ही इनामदार असता. आणि तीही पंचवीस टक्क्यांनी! आम्ही इनामदार आहोत, आम्हाला सिंहासनपट्टी माफ आहे असे सांगितले तरी जुमानत नाही. धाक देतो. युवराज, हे निवारले पाहिजे. आम्हास न्याय मिळाला पाहिजे."

"तुम्ही इनामदार आहात यासी लेखी पुरावा?" संभाराजांनी सावधपणे विचारले. निळाजी पुढे झाला. त्याने आपल्या इनामाच्या वतनपत्रांची थैली संभाजीराजांच्या पायांशी ठेवली. वतनपत्रे वाचून संभाजीराजे चांबळीकरांना म्हणाले, "ठीक आहे. तुम्ही निर्धास्त असा. सिंहासनपट्टी तुम्हावर नाही घातली जाणार. तुम्हास ती माफच असे."

"आनंदराव, प्रांत पुण्याचे सुभेदार कोण ?" संभाजीराजांनी विचारले.

"जी. राघो बल्लाळ अत्रे." आनंदरावांनी झुकते होत माहिती दिली.

"परशुरामपंत, मजकूर घ्या." संभाजीराजे सांगू लागले. चांबळीकर त्र्यंबकपंत, आनंदराव ऐकू लागले.

परशुरामपंतांच्या हातचे शहामृगपीस कुरकुरू लागले– "मशारूल अनाम राघो बल्लाळ, सुभेदार प्रांत पुणे – प्रति युवराज संभाजीराजे उपरी दंडवत विशेस –

पुणा येथे कास टका इनाम येक आहे. त्यासी मिरासपटी देणे म्हणोन राघोभास्करे होनु पंचवीस लाविले आहेत म्हणोन कळो आले. तरी महालास मिरासपटी घातली आहे तेथे इनामदारास हिसाबाने घ्यावे ऐसा तह केला आहे. त्यास जे महाली मिरासपटीच घातली नाही तेथे इनामदारास पैके मागणे कोण गोस्टी ? त्याहीमध्ये निळकंठराऊ यास पटी मागणे उचित नाही. तरी तुम्ही राघो भास्करास एक कागद ल्हेवून देणे आणि त्यांचे वाटे नव जाये ऐसी गोस्टी करणे. मशारनिल्हे निळकंठराऊ याचे इनामास पेशजीही तसवीस लागली नाही आणि हाली राघो भास्कर पटी मागतो. याबद्दल तुम्ही त्यास बहुत वेजेने लिहून त्याचे वाटे नव जाणे, त्यांचा बोभाट हुजूर करणे नव ये ऐसी गोस्टी करणे बहुत काय लिहिणे ? जाणिजे."

परशुरामपंतांनी याच आशयाचे दुसरे पत्र हवालदार राघो भास्करसाठी लिहून तयार केले. दोन्ही पत्रे वाचून घेऊन संभाजीराजांनी त्यावर दस्तूर दिले.

त्र्यंबकपंतांनी पत्रांच्या वळ्या निळाजीच्या हाती दिल्या.

"चांबळीकर, ती पत्रे रायगडी पेशवे मोरोपंतांना रुजू करून त्यांची मुद्रा त्यावर घ्या. तुम्ही जातीनिशी जाऊन सुभेदार राघो बल्लाळांच्या हाती ती द्या." संभाजीराजांनी निळाजीला सूचना केली.

"जी हुजूर. थोर उपकार झाले." चारी बंधू कमरेत झुकले.

"ते कर्तव्य आहे आमचे. या तुम्ही." संभाजीराजांनी निळाजीला दुरुस्त केले. चांबळीकर सदरेबाहेर पडले. त्यांच्यावरची मिरासपट्टी रद्द झाली.

फोंड्याहून महाराजांचा खलिता आला– "फौजबंदीने टाकोटाक फोंडियास निघोन येणे. संगती त्र्यंबकपंतास आणणे."

दम घेऊन तवाना झालेल्या फौजेची बांधणी करून संभाजीराजे त्र्यंबकपंतासह तीन दरवाज्याने पन्हाळगड उतरले. कोकणपट्टीचा रोख ठेवून दौडू लागले.

राजापूर, खारेपाटण, कणकवली, कुडाळ अशा मजला टाकीत फौजेनिशी संभाजीराजे फोंड्याच्या वेशीवर आले. आगेवर्दी रवाना झाली.

फोंड्याचा कोटबंद किल्ला उतरून आण्णाजो, धर्माजी नागनाथ अशा असामींसह महाराज त्यांच्या स्वागतासाठी खिळेबंद दरवाज्यात आले. मोहिमेच्या ऐन उन्हाळ्यातील धावणीने संभाजीराजांची मुद्रा खरपूस गव्हाळ दिसत होती.

महाराजांना बघून त्यांचे पाय शिवण्यासाठी तरातर चालत येणाऱ्या संभाजीराजांना महाराजांनी झुकू दिले नाही. तसेच वर घेत छातीला छाती भिडवून म्हटले,

"आम्ही तुम्हास खास वजेनं बोलावून घेतलं आहे. चला. सावचित्तानं बोलू." दोघेही किल्ल्यात निघून गेले.

मोठ्या हिकमतीने महाराजांनी महमद इखलास या आदिलशाही किल्लेदाराचा पाडाव करून फोंडा दस्त केला होता. त्याची धास्त घेतलेले गोवेकर फिरंगी हालचाल करणार हे नक्की होते. फोंडा मराठ्यांचा हातात असणे फिरंग्यांना धोक्याचे होते.

विश्रांती घेऊन बैठकीत बसलेल्या संभाजीराजांना महाराजांनी बेत खोलून सांगितला– "आम्ही कारवार प्रांतावर चाल घेणार आहोत. तुम्ही तुमच्या तवान्या फौजेनिशी ही मोहीम तुमच्या हाताखाली करून चालविणे. फिरंगी या कोटावर खूब डोळा ठेवून आहे. त्यास त्याच्या मुलखात मुसंडी घेत जरबेत राखणे."

"जी. आज्ञा." महाराजांनी आपल्यावर दुसरी जोखीम टाकली या अभिमानाने संभाजीराजांचे डोळे फुलून उठले. "इकडील तर्फेची चिंता जराही न करावी. आम्ही साहेबकामास हुषारीने रुजू आहोत." संभाजीराजांनी महाराजांना विश्वास दिला.

फोंड्यावर त्र्यंबक पंडितांची सुभेदार म्हणून नामजादी करून, मोहीम संभाजीराजांच्या खांद्यावर सोपवून महाराजांनी फोंडा सोडला. अंकोला, शिवेश्वर, काद्रा, कारवार ह्या आदिलशाही पट्ट्याची मारतोड करण्यासाठी.

संभाजीराजांनी गोव्याचा फिरंगी विजरई लुईस् द मेंदोस् ई अल्बुकेर्कि यास जरब देणारा खलिता धाडला– "प्रांत फोंडियाचे तर्फेने येणारे हेमाडबासे, अंत्रूज, बाळी, काणकोण, अष्टागार, चंद्रवाडी, कोपे, सांगे मिळोन साठ गाव ते तातडीने खाली करणे! नातर मराठी फौजा फिरंगी मुलखात घुसोन चालवतील!"

विजरईने या खलित्यास दाद दिली नाही म्हणून त्र्यंबकपंत, धर्माजी नागनाथ, आनंदराव यांच्यासह संभाजीराजे पाठीशी घोडदळ घेऊन फोंड्याच्या किल्ल्याबाहेर पडले. अंत्रूज मार्गाने फिरंगी मुलखात घुसले. लूट, मुलुखमारीला तोंड फुटले.

विजरईला या साऱ्याचा अंदाज होताच. त्याने आपल्या मुलखाची दरोबस्त बांधणी केली होती. ठाण्या-ठाण्याला कडवा विरोध घेऊ लागला. त्यातच पावसाला सुरुवात झाली. संभाजीराजांनी फौजा मागे घेण्याचा निर्णय घेतला. ते सैन्यासह फोंड्याच्या किल्ल्यात येऊन ठाण झाले. महाराजांच्या पुढील आज्ञेची वाट बघू लागले.

आदिलशाहीची मारझोड करून महाराज रायगडावर परतले होते. त्यांचा खलिता आला– "फोंड्यास किल्लेदार म्हणोन धर्माजी नागनाथ याची नामजादी केली असे. त्र्यंबक पंडितास पन्हाळियास धाडून तेथील कोटाची बंदिस्ती करून तुम्ही रायेगड जवळ करणे. पावसास तोंड लागले आहे."

महाराजांनी दिलेल्या आज्ञेबरहुकूम गोष्टींची पूर्तता करून संभाजीराजांनी धर्माजीचा

निरोप घेतला. आनंदरावांसह ते पावसाच्या सरी अंगावर घेत दौडू लागले, रायगड जवळ करण्यासाठी. पुरत्या अडीच महिन्यांनंतर! या परतीच्या वाटेवरही संभाजीराजांनी अंकोल्याचा आणि सरूप नाइकाचा मुलूख घोडदळी झडपा टाकून मारला.

लेख पुरा झाला. संभाजीराजांनी मुद्रा कागदाकडं बघताना आगळ्या तेजाने उजळून निघाली. हातचे पीस त्यांनी हलकेच कलमदानात ठेवून दिले. काजळी शाई टिपण्यासाठी मऊशार वाळूची चिमट कागदभर पसरून दिली. टिचकी देऊन कागदावरची वाळू झटकली.

"धाराऊ, जरा आमच्या कबिल्यास याद करता!" आपल्याच नादात असलेले संभाजीराजे कागदाकडे बघत म्हणाले.

धाराऊ आपल्याशीच हसली. पदर नेटका करीत बाहेर निघून गेली.

थोड्या वेळाने येसूबाई आत आल्या. त्यांच्याकडे हसून बघत संभाजीराजे म्हणाले, "ओळखा बघू कशासाठी आम्ही तुम्हास वर्दी दिली असेल?"

डागाच्या यादीची आठवण मनात रेंगाळत असलेल्या येसूबाई आपल्या स्वारीची हसरी चर्या बघून गोंधळून गेल्या.

"नाही? ऐका तर. आम्ही एका काव्याची बांधणी केली आहे!" कागदाकडे बघताना संभाजीराजांचे डोळे तळपू लागले. मनाची शंका दूर पळालेल्या येसूबाईंच्या डोळ्यांत क्षणात अभिमानी कौतुक उतरले.

"वाचू आम्ही?"

पदराच्या मखरातील येसूबाईंची होकारी मुद्रा डुलली. डोळे तेजाळले.

संभाजीराजे वाचू लागले. ते एका स्त्रीचे पायाच्या नखापासून शिखापर्यंत केलेले हिंदोस्तानी भाषेतील काव्यमय वर्णन होते! नखशिखा!

ते ऐकताना कावऱ्या बावऱ्या झालेल्या येसूबाई महालात कुणी येईल काय म्हणून एकसारख्या दरवाज्याकडे बघू लागल्या.

काव्य वाचून येसूबाईंच्याकडे बघत संभाजीराजांनी विचारले, "काय? आवडलं?"

काहीही उत्तर न देता मान खाली घालून येसूबाई उभ्या होत्या! संकोचलेल्या, शरमलेल्या.

त्या कसल्या गैरसमजात आल्या आहेत हे कळल्याने त्यांचे कावरेपण ताणीत संभाजीराजे हसून म्हणाले, "तुम्हास कसं आवडणार हे? हे काही तुमचं वर्णन नाही!"

"येऊ आम्ही?" येसूबाईंना आता उभे राहणेच आवघड झाले.

"या." युवराजांची मुद्रा हसली. मिश्यांची बारीक रेघ तणावली.

येसूबाई जायला निघालेल्या बघून त्यांच्या शालूवरच्या जरीकळ्यांवर नजर जोडून संभाजीराजांनी काव्याचा विषय सांगितला.

"पण जाताना ऐकून जा. गोकुळात कृष्णाकाठी वेड्या झालेल्या राधेचं वर्णन आहे हे!! नखशिखा! आम्हास भरोसा आहे. तुम्हालाही राधा अशीच दिसत असेल, चांदणवेलीसारखी! तलवारधारेसारखी!" संभाजीराजे मनेमोकळे हसले.

पाय घोटाळलेल्या येसूबाईंना ते ऐकताना वळून म्हणावेसे वाटले, "अगोदरच सांगणं झालं नाही ते!"

रायाजी आणि अंतोजीला पाठीशी घेत संभाजीराजे बालेकिल्ल्याबाहेर पडले जगदीश्वरीचे दर्शन घ्यायला. श्रावणमासाचा तो अनेक वर्षे चालत आलेला रिवाज होता. पहाटवेळच्या जगदीश्वराच्या दर्शनाचा.

उभा रायगड दिवसफुटीच्या धूसर प्रकाशात एखाद्या गंभीर स्वप्ननगरीसारखा दिसत होता. झाडापेरावरची गडपाखरं अज्ञाताला साद घालीत कलकलत होती, फडफडत होती. दूरवर डोंगरकडा काळपट रेघा ओढीत साऱ्या भवतालाने फिरत्या होत्या.

जगदीश्वराचा मंदिर आवार येताच आघाडीच्या दगडी उंबरठ्याला हात भिडविण्यासाठी संभाजीराजे झुकले. त्यांच्या गळ्यातील आईची कवड्यांची माळ झोल घेत ओळांबली. मनात थोरल्या आऊंची आठवण उभी राहिली– "रायगड सोडून हा गड चढून आलो तेव्हा मासाहेब होत्या. या मंदिराचा हाच उंबरठा आम्ही त्यांच्या सोबतीनं पहिल्यानं ओलांडला. आज हे सारं आहे. त्याच फक्त नाहीत. नाहीत तरी कशा? त्या इथंच तर आहेत. सूर्य डोंगराआड असला तरी त्याचा हा धुकट उजेड कसा सगळीकडं पसरून राहिला आहे तशा!"

विचारांच्या लाटांबरोबर ते चौकआवारातील दगडी कासवाजवळ आले. फरसबंदीला, अंगाखाली झाकलेल्या पायांची पकड रुपवीत ते कासव त्यांना मूकपणे सांगून गेले, "मंदिरात येणाऱ्या हर दर्शनभक्तास 'मनाचे विकार आमच्या पायांसारखे मागे सारून या' याची सांग देण्यासाठी आमची योजना केली गेली आहे."

त्या कासवाच्या दर्शनाने संभाजीराजांचे मन नितळ झाले.

अत्यंत श्रद्धेनं त्यांनी माथ्यावरचा घंटेचा घुमरा टोल दिला. सुरांची थरथरती लाट रायगडच्या माथ्यावर सळसळत सरकली.

गाभाऱ्यातील शिवपिंडीवर नजर खिळलेले संभाजीराजे पिंडीला बेलफुले वाहण्यासाठी धीमी पावले टाकीत पुढे चालू लागले.

अचानक समोरची पिंडी अदृश्य झाली! गाभाऱ्याच्या घुमटीतून पहाटपूजा उरकलेली, एका हाती खांद्यावर सरंजामाचे तबक आणि दुसऱ्या हाती रिकामी परडी घेतलेली, शुभ्र वस्त्रधारी, सत्त्वदेखणी एक सुवासिनी बाहेर पडत होती! डोंगरकडांआडून

फुटणाऱ्या श्रावणी पहाटेसारखी ! जशी महाराजांच्या पूजेची स्फटिक शिवपिंडीच राधेचे निरामय स्त्रीरूप घेऊन गाभाऱ्याबाहेर येत होती ! नखशिखा !!

तिच्या दर्शनाबरोबरच संभाजीराजांचा हात छातीच्या माळेला भिडला. ओठांतून बोल सुटले – "जगदंब ! जगदंब !"

कपाळी कुंकवाचा रेखीव टिळा, दोन्ही हातांत भरलेले हिरवे सवाष्ण चुडे, गळ्यात काळ्याशार मण्यांचा पावनसूत्राचा पोत, टीका, बोरमाळ असे सुवर्णालंकार, पायी चांदीची जोडवी आणि नाकात मोतीबंद नथ अशी ती स्त्री संभाजीराजांच्या कपाळीचे शिवगंध व भरजरी टोप बघताच झटकन नजर पायगतीला टाकून, एका कडेकडेने तरातर निघून गेली. पहाटवाऱ्याच्या दौडत्या, गतिमान, झमकीसारखी ! चांदणवेल डोळ्यांआड आली. "नखशिखा ! नखशिखा !" एक विचित्र नौबत संभाजीराजांच्या कविमनात दुड्दुडू लागली.

तिच्या प्रत्येक पावलाबरोबर नजर खिळून गेलेले संभाजीराजे जगदीश्वराला पाठमोरे होत ती गेलेल्या दिशेने सुन्न होत नजरजोड बघतच राहिले. विचारांचा हलकल्लोळ माजला होता त्यांच्या कविमनात "नखशिखा ! नखशिखा ! इथं ! जिवंत ! रायगडावर ?"

रायाजी आणि अंतोजी ताणल्या डोळ्यांनी संभाजीराजांचे कधी न पाहिलेले जरासुद्धा न कळू येणारे ते रूप गोंधळून बघतच राहिले.

संभाजीराजांनी बेतलेल्या नखशिखेतील राधेसारखे रूप लाभलेली ती स्त्री सुरनीस आण्णाजींच्या नात्यातील होती. माहेरपणासाठी रायगडी आली होती. तिच्या सोज्वळ रूपाला आणि संस्कारसंपन्न मनाला साजेल असेच तिचे नाव होते – गोदावरी !

महाराणी सोयराबाईंनी सुवासिनींना आमंत्रणे दिलेले वाड्यावरचे श्रावणी शुक्रवाराचे हळदी-कुंकू संपले. भरल्या ओटीने एक एक बाई महाराणींच्या महालाबाहेर पडली. त्यात ब्राह्मणवाडीतील इतर स्त्रियांच्याबरोबर आलेली गोदावरीही होती.

सातमहालासमोरील सदरी जोते ओलांडून त्या सर्व स्त्रिया पाण्याचे पाट फिरविलेल्या दर्शनी चौकात आल्या. आघाडी मनोऱ्याच्या पाचव्या मजल्यावरून उन्हसावटाच्या पालटत्या खेळात रंगलेला गंगासागर तलाव निरखण्यात संभाजीराजांचे कविमन रमले होते. मनोऱ्याच्या पैस हौद्यात चक्कर टाकताना त्यांना चौकातील स्त्रियांच्या घोळक्यात असलेल्या गोदावरीचे दर्शन झाले. त्यांची नजर चौकाने क्षणभर पकडूनच ठेवली. त्यांच्या रसिक मनाचा शांत गंगासागर डहुळला. लाटाच लाटा उठल्या. "नखशिखा ! ही कोण ? कुठली ? गडावर कशी ?" दुसऱ्याच क्षणी ते मनोऱ्याचे मळसूत्री जिने सरासर उतरू लागले. पायरी-पायरी मागे पडू लागली. मजल्यागणिक मुजरे झडू लागले. पाची मजले उतरून संभाजीराजे दर्शनी चौकात आले. तिथे कुणीच नव्हते ! चारी बाजूंच्या वाडे-महालांच्या दारांवरचे पहारेकरी मात्र त्यांना बघून भाल्याचे दंड पेलून ताठ झाले.

कुठूनतरी जनानी कलकलाट येत होता. समर्थांनी पाठवून दिलेल्या मारुतीच्या मूर्तीची महाराजांनी बालेकिल्ल्यातच घुमटी बांधून प्रतिष्ठापना केली होती. साऱ्या स्त्रिया त्या घुमटीत गेल्या होत्या. संभाजीराजे चौकातील पाण्याच्या पाटात फिरणाऱ्या माशांचा खेळ बघत राहिले. एक एक स्त्री त्या घुमटीबाहेर पडू लागली. गोदावरीही बाहेर आली. संभाजीराजांना तिच्याशी बोलायचे होते. काही विचारायचे होते. पण हे घडावे कसे ? रिवाजी बसावे कसे ?

झटकन् ते घुमटीच्या रोखाने पुढे झाले. त्यांना बघून साऱ्या स्त्रिया आदबीने घुमटीच्या एका बाजूला सरकत्या झाल्या. पायरीला हातस्पर्श देऊन संभाजीराजे मारुतीच्या घुमटीची पायरी चढले नि थांबले. मोतीलगाला झोल देत त्यांनी मान वळवून गोदावरीवर नजर टाकली. साऱ्या स्त्रिया खालमानेने उभ्या होत्या.

"तुम्ही – तुम्ही कोण ? इथं कशा ?" संभाजीराजांनी गोदावरीला म्हणून सवाल केला. पाण्याची सर घेताना गाय खाली ठेवते तशी तिची मान खालीच होती. कुणीतरी तिला खोपरटीच दिली. भांबावलेल्या गोदावरीने मान उठवली. संभाजीराजांच्या पाणतेजी डोळ्यांना डोळे भिडताच आपली नजर तिने त्यांच्या पायांवर टाकली.

भोसलाई, खानदानी तोल न सोडता संभाजीराजांनी पुन्हा विचारले, "तुम्ही कोण ? इथं कशा ?"

"जी. आम्ही सुरनिसांकडच्या. गोदावरी. इथं घरपणासाठी आलोत." धडधडत्या उराने गोदावरीने जाब देत त्यांचा मान राखला. चांदणवेल नखापासून शिखापर्यंत थरथरली. हसून संभाजीराजे तसेच समोरच्या घुमटीत शिरले. क्षणात दिसेनासे झाले.

शुभ्र कबुतरांचा थवाच थवा क्षणात डोळ्यांसमोरून गेला असे गोदावरीला वाटले.

स्त्रियांचा घोळका दबके कुजबुजत बालेकिल्ल्याबाहेर पडला. युवराजांनी फक्त गोदावरीचीच विचारणा कशी काय केली याचे त्या आश्चर्य खुले करीत होत्या. त्यांच्या बोलण्यात काहीही वावगे नव्हते तरीसुद्धा शरमून गोदावरी मूकपणे साऱ्याजणींच्या मागून रेंगाळत चालली.

ना तिला, ना घुमटीत शेंदरी हनुमान मूर्तीचे दर्शन घेणाऱ्या संभाजीराजांना कळले, की झाला सर्व प्रकार आपल्या महालाच्या सफेलीत उभ्या राहिलेल्या महाराणी सोयराबाईंनी पाहिला असेल ! आणि शांतपणे आपल्या महालात शिरताना चिमटीतला पदरकाठ पुढे खेचीत त्या स्वत:शीच म्हणाल्या असतील – "ही सुद्धा कर्तबगारी आहे तर आमच्या युवराजसाहेबांजवळ !"

आता सोयराबाईंनी मात्र विचित्र पावले टाकायला सुरुवात केली. त्यांच्या प्रत्येक पावलाबरोबर उभ्या राजघराण्याच्या भवितव्याची नक्षी कुणालाही उकलता येणार नाही अशी किचकट गुंतत चाललीय याची त्यांना कल्पनाही नव्हती.

त्यांनी सणवार, धर्मविधी, यांची निमित्ते करून अण्णाजींच्या घरी गोदावरीला आमंत्रणे धाडायला सुरुवात केली. राजवाड्यावरची महाराणींची म्हणून ती परती सारणे गोदावरीला शक्य होईना. वाड्यावर येणाऱ्या गोदावरीच्या हालचालींवर सोयराबाईंच्या दासी व खाजगीचे चाकर डोळ्यांत तेल घालून नजर ठेवू लागले. एक जनानी मनसुबा अंग धरू लागला.

आपल्या सरळघोप, रांगड्या स्वभावाप्रमाणे संभाजीराजे गोदावरीशी प्रसंगाप्रसंगाने बोलत होते. त्यात आतबाहेर असे काहीच नव्हते. हत्तीने चालताना कुत्र्याच्या भुंकीकडे लक्ष देऊ नये हे जेवढे खरे असते, तेवढेच त्याने आपल्या पायांखाली मुंग्यांचे वारुळ येणार नाही याचेही ध्यान ठेवणे जरुरीचे असते! नाहीतर चवताळलेली एखादी लाल मुंगी सोंडेंचाच राजमार्ग करून कानाकडे सरकते. जीव घेणाऱ्या मर्मस्थावर डंख देऊन जाते! पेचपाच गावी नसलेल्या संभाजीराजांच्या हे ध्यानी येत नव्हते. माणसाने उमदे असणे हे जेवढे मोलाचे आहे त्याहून सावध असणे हे अधिक मोलाचे आहे.

सोयराबाईंच्या रूपाने राजवाड्याच्या भिंतीच आता राजघराण्याची अब्रू गिळायला बसल्या. सूड ही भावनाच भयानक आहे. स्त्रीच्या मनी ठाण झालेला सूड हा तर अति-भयानक असतो. आणि राजस्त्रीच्या मनात दबा धरून राहिलेला सूड तर निर्णायकी विध्वंसकच असतो.

सोयराबाईंच्या महालातून विषारी अफवांचा द्रव आस्ते आस्ते पाझरू लागला. गडभर पसरू लागला. त्याच्या पाटांतून जरीपटका, भवानीचा भंडारा, शिवगंध वाहतीला लागणार होती. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जिजाऊंनी असंख्यांचा घाम, रक्त आणि आपले अश्रू देऊन जोपासून वाढविलेले 'श्री' च्या राज्याचे गोमटे रोपटेच जाया होणार होते!

रायगडावर काय चालले आहे याची काहीच कल्पना नसलेले आण्णाजी, प्रांत फोंड्याहून निघून रायगडावर आले. फोंड्याचा कोट भक्कम करून दुबार बांधणीचे काम महाराजांनी त्यांना जोडून दिले होते. त्याचा तपशील आण्णाजींना महाराजांपुढे रुजू करायचा होता. आण्णाजी गडावर आले आणि त्यांना थोड्याच वेळात कळून चुकले की, चौकीपहाऱ्यावरचे, फडाच्या कारखान्यातले लोक आपणाला बघून एकमेकांच्या कानांशी लागतात. दबके कुजबुजतात. विचित्र नजरेने आपल्याकडे बघतात. तशातच ध्यानीमनी नसता त्यांना राणीसाहेब सोयराबाईची वर्दी आली. मनात शंकाकुशंकांचा, न कळणाऱ्या भीतीचा कल्लोळ घेऊनच आण्णाजी सरकारस्वारींच्या महाली पेश आले.

"सुरनीस, तुमचा मुजरा घेताना आम्हास शरमिंदं वाटतं. पण आम्ही तरी काय करावं? आपल्याच दातांनी आपलीच जीभ नाही तोडता येत!" मुजरा करणाऱ्या आण्णाजींची उत्सुकता आणि गोंधळ वाढेल एवढ्या शांतपणे सोयराबाई स्वतःकडे दोष घेत म्हणाल्या.

नेहमी हातांच्या मुठीत असणारे उपरण्याचे शेव आण्णाजींच्या हातून नकळतच सुटले.

"आमचा काही कसूर असेल तर सरकारस्वारीनं आम्हास सांगावा. आम्हाला काही कळेना झालं आहे. गडावरचे लोक आमच्याकडं विचित्र नजरेनं बघताहेत." अण्णाजींच्यातील जातिवंत राजकारणी तेवढ्याच धीरगंभीरपणे बोलला.

"सुरनीस, तुम्ही चिऱ्यावर चिरा रचून फोंड्याचा कोट भक्कम करून आलात. पण त्यासाठी आम्ही आणि स्वारी तुम्हास काय बक्षिसी देणार? अपमान, मानहानी! तुम्ही कोट बांधलात, आमचा ढासळला आहे. पण तुम्ही घरचे आहात. हे सारं समजून घेतलं पाहिजे." सोयराबाई सरळ काहीही न सांगता आण्णाजींना मोठेपण देत काठाकाठाने फिरल्या.

"क्षमा असावी. पण काय घडलं ते अद्याप आमच्या धीट ध्यानी आलं नाही. आम्ही पायीचे सेवक आहोत. जे असेल त्याची आज्ञा व्हावी."

"आण्णाजीपंत, आमचा होनच खोटा निघाला! जे ऐकून तुम्हाला दुःख होईल त्याहून या बाबीचीच आम्हाला अधिक शरम वाटते. तुम्ही मोठ्या मनी युवराजांना क्षमा केली पाहिजे! त्यांनी गुन्हा थोर केला आहे. तरीसुद्धा ते तुमचेच आहेत. तुमच्या घरी घरपणासाठी आलेल्या सवाष्णीवर– गोदावरीवर– त्यांची नजर गेली. सारा गड या बाबीची चर्चा करतो आहे..." क्षणभर सोयराबाई थांबल्या. त्यांनी आण्णाजींची प्रतिक्रिया हेरण्यासाठी त्यांच्यावर नजर टाकली. आण्णाजींच्या कपाळीचा गंधटिळा पेटती उदबत्ती टेकविल्यागत आक्रसून एकवट झाला होता. डोळे विस्फारले होते. उपरण्याचे शेव त्यांनी मुठीत गच्च पकडून ठेवले होते.

"सुरनीस, हे अकरीत तुमच्या कानी घालताना आम्हास कोण यातना होताहेत हे तुम्हाला कळलं असेल. तरीही धीर सोडू नका. याची वाच्यता तुम्हीहून कुठं करू नका. गोदावरी गड सोडण्याच्या गोष्टी करते असे आमच्या कानी आलं आहे. ते चूक होईल. त्यानं तिच्याबद्दलच्या गैरसमजांना वाव मिळेल. स्वारींना यातील काहीच माहीत नाही. त्यांच्यासमोर जाऊन हे बोलण्यास कुणाचीही जीभ उचलत नाही. खुद्द आम्हालाही तो धीर येत नाही!" सोयराबाई ठरवून थांबल्या.

"शहानिशा करून आम्हीच हे स्वामींच्या कानांवर घालू!" सुन्न झालेले आण्णाजी निर्धाराने म्हणाले. खाली मान घालून "येतो आम्ही." म्हणत हटत्या पावलांनी महालाबाहेर पडू लागले.

बाडीतील आपल्या घरी परतलेल्या आण्णाजींनी प्रथम गोदावरीला जनानी दालनात बोलावून ठीक जबानीवर घेतले. "तुझ्या मिं युवराजांच्या गाठीभेटी झाल्या?" पगडीचा लाल रंग आण्णाजींच्या डोळ्यांत उतरला.

गोदावरीने खाली घातलेली मान डोलावली. तिच्या डोळ्यांवाटे धारा सरसरू लागल्या.

"शरम नाही वाटत?" आण्णाजी तिच्यावर जबानीची वीज ओढत कडाडले.

" माझं ऐकावं. मला ... " भरल्या डोळ्यांत जीव गोळा करून गोदावरी बोलायला गेली.

" चू ऽ प, गळ्यातल्या मंगळसूत्राची तरी लाज धरायची होतीस तू? खबरदार या उंबऱ्याबाहेर कदम पडलं तर." तिच्याकडे बघणे असह्य झालेले आण्णाजी तरातर दालनाबाहेर पडले. गद्गदलेली गोदावरी गुदमरू लागली. दालनाच्या दगडी भिंतीवर तिने अहेव कपाळ दोनचारदा असह्य कोंडीने आपटले. त्यावरचा टिळा विस्कटू लागला. 'नखशिखा' दालनात बंदिस्त झाली. चांदणवेल काळ्या ढगांनी येरगटून गेली.

रायगड जनानी मनसुब्यात दस्त झाला.

आता गडावरच्या लोकांना गोदावरी दिसेनाशी झाली. 'युवराजांनीच तिला गडावरून हलविली आहे. आपला कसूर झाकण्यासाठी त्यांनी हे विपरीत केलं आहे.' अशा विचित्र अफवा गडावर पसरल्या. सोयराबाईंचा चाकरनामा त्यासाठी पद्धतशीर खपू लागला. महाराणींच्या महाली आण्णाजींची ये-जा वाढली. गोंधळलेल्या आण्णाजींना काय करावे ते सुचत नव्हते. सोयराबाई गोदावरीला भरीला घालण्याची मसलत नाना ढंगांनी त्यांच्या गळी उतरवू बघत होत्या.

थोरल्या महाली आपल्यासंबंधी काहीतरी प्राणघातक शिजते आहे याचा युवराजांना सुगावा लागला. त्यांनी आपले खबरगीर आण्णाजींच्या घराभोवती आणि 'थोरल्या महालावर' पेरून टाकले.

एकच एक विचार संभाजीराजांना स्वस्थ बसू देईना. " आता बाई आण्णाजींच्या घरी राहणे धोक्याचे आहे. आमच्या व तिच्या दृष्टीनेही. तिला कैचीत पकडले जाणार आहे. तिला आण्णाजी आणि थोरला महाल यांपासून वेगळे केले पाहिजे. पण हे घडावे कसे ? भरल्या घरातून एका विवाहित स्त्रीला ताब्यात घ्यावे कसे ? "

बेचैन, हैराण झालेले संभाजीराजे आपल्या महाली अस्वस्थ पायफेर टाकीत होते. मधेच थांबून दगडबंद छताकडे बघताना काही सुचेनासे झाले की धीर येण्यासाठी 'जगदंब, जगदंब' असे पुटपुटत होते. विचित्र कोंडीने महालात ते आणि ब्राह्मणवाडीत गोदावरी जखडली होती. कुठल्याही क्षणाला ही बाब छत्रपती महाराजांच्या कानी पडणार होती. मासाहेब सोयराबाई काय योजून आण्णाजींच्या भेटी घेताहेत हे कळत नव्हते. ताण दाटत होता. पेच सुटत नव्हता.

सोयराबाईंनी गोदावरीला वर्दी धाडून बोलावून घेतले होते. आता काय पिकणार ? जगदंबाच जाणली तर जाणू शकणार होती.

" धाकलं सरकार, थोरल्या म्हालाकडची चंद्रा कुणबीण सुरनिसाच्या वाड्यावर ग्येलिया. वाड्यावरनं मेणा निघालाय. मेण्यात बसल्याली बाई बालेकिल्ल्याकडं थोरल्या म्हालातच यायला निघालिया." खबरगिराने महालात येऊन पेश केलेली खबर ऐकताना युवराजांचे मन असंख्य शंकांनी ढवळून निघाले.

जखमी वाघासारखे संभाजीराजे पाठीशी हात बांधून फेऱ्या टाकू लागले. काही काही सुचत नव्हते. बाब अंदाजापार चाललीय. त्यांना वाटले, तडक उठावे नि मासाहेबांसमोर उभे राहून याचा जाब विचारावा.

आलेला खबरगीर पुढच्या आज्ञेची वाट बघत खोळंबलाय याचेही त्यांना भान राहिले नाही. स्वत:शीच काहीतरी योजून बाहेर पडताना त्यांनी खबरगिराला आज्ञा केली — " जा, थोरल्या महालाची मिळेल ती खबर टाकोटाकीनं आमच्या कानी पडली पाहिजे. गफलतीस माफी नाही." मुजरा टाकीत खबरगीर निघून गेला. निर्धारी, बांधल्या मुद्रेने संभाजीराजे देवमहालाच्या रोखाने चालू लागले.

त्यांना येताना बघून देवमहालाचा सरंजामी पोतराज कमरेत झुकत सामोरा आला. त्याच्याकडे ढुंकूनही न बघता कठोर, जरबी आवाजात युवराज म्हणाले, " आम्हास देवमहाल एकान्ती पाहिजे. आईस साकडे घालणे आहे. निघून जा." आखीवर हत्तीच्या सोंडेचा, कल्पना नसता तडाखा बसताच माहुताची व्हावी तशी सुन्न आणि कठोर अशी धाकल्या सरकारांची मुद्रा बघून पोतराज चरकला, मुकाट बाहेर निघून गेला.

खेचल्यासारखे, दगडी पुतळ्यागत संभाजीराजे चालले. नंदादीपाच्या उजेडाचा भंडारा अंगभर फासून, डोळे विस्फारून, अंगावर चालून आल्यासारख्या दिसणाऱ्या अष्टभुजा भवानीच्या डोळ्यांशी त्यांचे निर्धारी, सुन्न डोळे जोडले गेले. त्या जगज्जननीच्या सर्वसंहारक आगतेजी डोळ्यांचे त्यांना तिळभरही भय वाटत नव्हते. कसल्यातरी न कळणाऱ्या नात्याच्या अधिकाराने त्यांचे मन तिच्याशीच हट्टावर आले होते. तडक जाऊन तिचे आठी हात गद्गदा हलवावेत, तिला विचारावे, " एवढे अहोरात्र तुझ्याभवती पाजळले पोत नाचत असताना तुला काहीच कसं नजरेला येत नाही ! "

समोरच्या तुळजेचे रोखलेले डोळे त्यांना पालटताना दिसू लागले. क्षणात ते कमळकळ्यांसारखे दिसू लागले. एकरोख, अचल नजरेने संभाजीराजे — धाकटे छत्रपती त्या डोळ्यांना निरखू लागले.

" आ ऽ ऊ ऽ साहेब ऽ ! " मनाच्या खोलवटातून एक अनावर उमाळा उसळून आला. जगदंबेचे त्रिकाल साक्षी डोळे त्यांना थोरल्या आऊसाहेबांच्या डोळ्यांसारखे दिसत होते ! त्यांचे सुन्नपण विरघळू लागले. मनाची कवाडे खडाखड उघडू लागली.

" त्यांनी अदब सोडली तरी तुम्ही सोसणं सोडू नका ! " कुठूनतरी राजेबोलाचे एक मोरपीस गरगरत त्यांच्या रोखाने आले. जिजाऊंच्या बोलीभाषेत.

कावरेबावरे होत त्यांनी देवमहालभर मान फिरविली. पोत, पालखी, पलंग, परडी आईच्या सरंजामाच्या चारी बाजूंच्या वस्तूच जशा नाचत म्हणत होत्या — " त्यांनी अदब सोडली तरी तुम्ही सोसणं सोडू नका ! "

युवराजांचे राजस मन होलपटू लागले. सगळे अंतरंग गद्गदून आले — " आऊसाहेब, तुम्ही — तुम्हीच पाहिजे होतात आज ! कसं सोसावं ? काय करावं ? तुम्हालाच विचारलं

असतं. नाही ऽ बाकी सारे सोसले असते आम्ही. हे ताकदीबाहेर आहे आऊसाहेब. त्यांचं समाधानच होणार आहे हे कळतं तर थोरल्या महालाच्या मासाहेबांसमोर हाती पोत घेऊन आमचं शिवगंध आम्ही त्यावर धरून दावलं असतं! आऊ, आम्ही कैचीत फसलोय. या जगदंबेच्या साक्षीनं सुचतंय तेच करणार आहोत. विश्वास ठेवा, तुमच्या पायाची आण आम्हास आहे. आम्ही निधडेपणी जे करू ते ती आण स्मरूनच." संभाजीराजांनी डोळे मिटले. आता त्यांचे मन स्थिर, शांत झाले होते. छातीचा भाता निश्चयी विश्वासाने तुडुंबला होता. त्यांनी तबकातील बेलफुलांची ओंजळ अष्टभुजेच्या चरणी वाहिली. परडीतील भंडाऱ्याची मूठ तिच्या उग्रमंगल रूपावर उधळली. मळवट भरून घेत, तिला पाठ न दाखविता मागच्या पावलांनी झुकते होत ते देवमहालाबाहेर पडले. आता जे काही त्यांनी मनी बांधले होते त्याला गडावर कोणीच रोख देऊ शकत नव्हते.

आपले कारभारी महादेव यमाजी यांना युवराजांनी बोलावून घेतले. त्यांना दोन सूचना केल्या– "आमच्या हुजराती फौजेकडचे दहाबारा शिलेबंद धारकरी जरोरीनं आमच्यासमोर रुजू करा. हुषारीचे पटाईत आणि घोडाईत शेलके निवडून धाडा. तुम्ही खुद्द जातीनं गड उतरून पाचाडवाडीत एक जीनकसली घोडदळी तुकडी सिद्ध ठेवा. तुमच्या पाठीनंच आम्ही गड उतरून येणार आहोत."

महादेव यमाजी 'जी' म्हणत झुकत युवराजांच्या महालाबाहेर पडले.

एका खिदमतगाराने लोखंडी जाळीचे बख्तर तबकातून उचलून संभाजीराजांच्या पाठीशी होत त्यांच्या कसदार, भरल्या अंगावर चढविले. दुसऱ्याने केसरी वाणाचा झगझगत्या जरीकामाचा जामा त्यावर बसविला. मनगटी पोहच्या आवळल्या. ढालीचा भक्कम थाळा युवराजांच्या पाठीला भिडवून तिचे वाद छातीशी करत संभाजीराजांच्या हाती दिले. त्या वादांची पक्की गाठ युवराजांनी छातीवर आवळली! कमरेला शेला कसला. डोकीचा सफेद जिरेटोप उतरून तबकात ठेवला. तबकातील केसरी टोप उचलून मस्तकी धारण करताना त्यांच्या हातातील सोनकडे मागेपुढे झाले. सरळधोप, जडशीळ तलवारीचे म्यान त्यांनी कमरेला आवळले. उंच गडकोटावर जन्मलेला तो साक्षात रुद्र सिद्ध झाला. येईल त्या वादळाला तोंड द्यायला. उंचावर राहणाऱ्यांना केव्हाही वादळाला तोंड द्यायला सिद्धच असावे लागते!

साज चढवून मोकळे झालेले खिदमतगार चार पावले पाठीशी होत अदब धरून क्षणभर रेंगाळले. युवराज संभाजीराजांनी त्यांना जाण्याचा इशारा भरण्यासाठी हातपंजा उठविला. ते जायला निघाले. त्यांतला एक पळभर अडखळला. त्याला आपल्या धाकल्या छत्रपतींना सांगावेसे वाटले– "मळवटीच्या आईच्या भंडाऱ्याचा इस्कोट झाल्यागत दिसतोय धाकलं धनी. जरा दरपानाला दरशान दिऊन जावं जाताना!" पण ते प्रत्यक्षात बोलण्याची त्याची छाती काही झाली नाही.

एकटे-एकटे संभाजीराजे विचारांची भिंगरी फोडायला चकरा टाकू लागले. महादेव यमाजींनी पाठविलेल्या शिलेदार धारकऱ्यांची तुकडी मुजरा भरत पेश झाली. ते तगडे जवान बघताना युवराजांचा चेहरा उजळून निघाला. भागानगरपर्यंतच्या दौडीतले ते मर्दाने होते. बांधल्या, शांत आवाजात संभाजीराजे त्यांना मनाचा हेत-ब्येत सांगू लागले. धारकरी ते कान देऊन ऐकू लागले.

थोरल्या महालावर देख ठेवणारा खबरगीर आला. खबर देत म्हणाला, "म्हाल शाप बंदिस्त झालाय धनी. खबर उचलाय वाव न्हाई. काय करायचं म्होरं?"

क्षणभर संभाजीराजे स्तब्ध झाले. मग ठरवून म्हणाले, "आता खबरीची गरज नाही. बाई बाहेर पडली की पापणी मिटायच्या आत आम्हाला वर्दी दे."

रायगड वरून शांत होता. नगारखान्यावरचा जरीपटका मावळवाऱ्यावर लहरत होता. क्षण क्षण कुणालाही कल्पना येणार नाही अशा अज्ञाताची भली भक्कम कवाडे खोलत होता. युवराजांचा मनसुबा कानी पडलेले त्यांचे निधडे, हुकमाचे बंदे धारकरी बाहेर पडले. फुटकळ झाले. एक एक करत नगारखान्याच्या भव्य दरवाज्याजवळ येऊन पांगून जागा धरून राहिले.

तिकडे सात महालांपैकी थोरल्या महालाच्या दरवाज्यातून संगमरवरी मूर्तीसारखी दिसणारी गोदावरी आण्णाजींच्या मागून बाहेर पडली. डागण्या दिल्यावर होईल तशी तिची मुद्रा व्याकुळ दिसत होती. आपले निष्पाप मन ती ना आण्णाजींना ना राणीसाहेबांना पटवू शकली होती. तिला दोषी ठरवूनच अभयासाठी पाठीशी घालण्याचा थोरपणा फारा कौशल्याने सोयराबाईंनी केला होता. तिला आता महाराजांची परवानगी घेऊन आण्णाजी त्यांच्या भेटीला नेणार होते. ती काहीच बोलणार नव्हती. बोलणार होते आण्णाजी. ती फक्त मान डुलवणार होती.

गोदावरीला मेण्यात बसलेली बघून आण्णाजी फडाच्या रोखाने निघून गेले. मेणा नगारखान्याच्या रोखाने चालू लागला. त्याच्या दुहाताने आण्णाजींचे दोन धारकरी हाती नंग्या तेगी पेलत चालले. भोयांनी दुडकी चाल धरली.

मेण्याची वर्दी मिळालेले संभाजीराजे आपल्या महालाबाहेर पडले. त्यांची मुद्रा ताठर, कठोर होती. जसा त्यांच्या राजचर्येचा भाजता पोतच तयार झाला होता. झडणाऱ्या मुजऱ्यांकडे त्यांचे ध्यान नव्हते. झपाझप चालत ते नगारखान्याच्या भव्य दरवाज्याजवळ आले. त्यांची धारकरी माणसे त्यांना बघून कमरेत झुकली. रानचे तरस एकवट होतात तशी एकवट झाली.

हातीचे थोपे मागेपुढे झुकवीत भोयांनी गोदावरीचा मेणा नगरखान्याच्या दरवाज्याबाहेर घेतला मात्र, चहूबाजूंनी त्याला संभाजीराजांच्या धारकऱ्यांचे भक्कम कडे पडले. हातपंजा उठवून इशारतीची आज्ञा देणाऱ्या साक्षात संभाजीराजांनाच सामने बघून भोयी थांबले. मेणा थोप्यावर पेलता ठेवून त्यांनी अगोदर मुजरे भरले.

मेण्याच्या पडदेबंद खिडकीजवळ होत धाकटे छत्रपती संभाजीराजे राजबोलीत, अधिकारी भाषेत म्हणाले, "आम्ही युवराज बोलतो आहोत बाई. तुम्हाला आम्ही आमच्या ताब्यात घेतलं आहे!! डर-भय बाळगू नका. तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही – आम्हास आमच्या थोरल्या आऊसाहेबांची आण आहे."

आण्णाजींच्या धारकऱ्यांना तिकडे केव्हाच बगलेला काढण्यात आले होते.

"उठाव!" त्या एकाच जरबी शब्दाने भोयांना घाम फुटला. थोपे अलग करून त्यांनी त्या जागी खांदे दिले. ज्या रोखाने युवराजांची तर्जनी उठली होती त्या आघाडी मनोऱ्याकडे मोहरा करून त्यांनी मुकाट दुडकी चाल धरली.

बेभान संभाजीराजे आघाडीला झाले. नंग्या तेगीच्या वळ्यात चाललेला तो मेणा रायगडाची व्यापारपेठ उजव्या तर्फेला तशीच सोडून मनोऱ्याकडे निघाला. भेटणारी चुकार माणसे, मेण्यात बालेकिल्ल्याकडची खाशी स्वारी असावी म्हणून त्याला मुजरे देऊ लागली. महादरवाजा मागे पडला. संभाजीराजांचे धारकरी भोयांना एकही पाऊल लटका पडू देत नव्हते. लहाना दरवाजा पार करून मेणा पाचाडात उतरला. वाडीच्या वेशीवरच ठाण झाला. महादेवपंतांनी सिद्ध ठेवलेले घोडाइतांचे पथक युवराजांची वाटच बघत होते. त्यांनी घोडी हारीने पुढे घेतली. त्यातल्या चुनेवाणाच्या एका घोड्याचे कायदे संभाजीराजांनी आपल्या हाती घेतले. जनावर मेण्याजवळ आणले.

"बाई, मेणाउतार व्हा." पडद्याकडे बघून युवराजांनी आज्ञा केली. म्यानातून धारी तलवार बाहेर पडावी तशी गोदावरी बाहेर आली. तिची मान वरच उठत नव्हती. तोफेचे भांडे फुटते तसे काळीज फुटून जातेय की काय असे तिला वाटत होते. सारी जाण सुन्न झाली होती तिची.

"बैठक घ्या." घोड्याच्या रोखाने संभाजीराजांनी हात उठविला.

अंगावर वीज पडल्यागत गोदावरी थरारली. हे तिला जमणारे नव्हते. कसे सांगावे तेही तिला कळेना. तिची अडचण लक्षात येताच संभाजीराजे घोटाळले. एवढ्या निर्धाराने पार पडलेल्या मनसुब्यावर पाणी पडणार म्हणून चरकले. लागलीच काही योजून त्यांनी मनोमन निर्णय घेतला. डोळ्यांचे पाते लवायच्या आत त्यांनी त्या चुनेवाणी घोड्यावर झेप घेतली. कायद्यांना झटका देताच ते उमदे जनावर ऊर उचलून पुढचे खूर अधांतरी करीत खिंकाळले. गोदावरीला वळसा घालून संभाजीराजांनी तिला घोड्याच्या उजव्या तर्फेला टाकली. तिच्या ध्यानीमनी नसता एका बलदंड भुत्याच्या निर्भाव हाताची पकड तिच्या कमरेभवती पडली. दुसऱ्याच क्षणी ती संभाजीराजांच्या घोड्यावर खेचली गेली. जनावराला वर्मी कळ यावी अशी टाच बसली. घोडा दौडू लागला. त्याचा माग धरून घोडाइतांचे पथक उधळले. धूळलोट उसळले. वादळी वाऱ्यालाही मागे टाकेल असा तो वेताळाचा नायक, रायगडाचा रुद्र दौडू लागला. लिंगाणा किल्ल्याच्या रोखाने.

रायगडचा जोडकिल्ला असलेल्या लिंगाण्याचा पायथा आला. बाईला लिंगाण्यावर आणण्यात आले. आपल्या इमानी धारकऱ्यांच्या चौकीपहाऱ्यात तिला एका कोठीत

बंदिस्त ठेवून तिचा निरोप घेताना संभाजीराजांना भरून आले. तिच्या तोंडाकडे बघण्याचा धीर त्यांना झाला नाही.

केवड्याच्या झळाळ पात्यासारख्या दिसणाऱ्या तिच्या पायांच्या पंजावर नजर ठेवून ते म्हणाले, "तुम्हाला इथं आणलं म्हणून आम्ही दिलगीर आहोत. आमच्यासाठी दुसरा इलाज बाकी राहिला नाही. तुम्ही आमच्या 'कैदी' आहात. आमच्या महाराजसाहेबांसमोर तुम्हाला आणि आम्हालाही उभे राहावे लागेल. तेव्हा आई जगदंबा आणि जगदीश्वर कौल देईल तसे करा. कुणाच्याही भीड-भरीला तुम्ही बळी पडणार नाही असा आमचा विश्वास आहे. आम्ही युवराज आहोत तरीही आमच्या हातून तुमची ही जनानी कैदी घडली यासाठी तुमचे शरमिंदे आहोत. शक्य झाल्यास त्यासाठी आम्हाला माफ करा. येतो आम्ही."

जे समजून केले त्यासाठी खंत, पश्चात्ताप करण्याचे कारण नाही असे ठाम ठरवूनच युवराज संभाजीराजे लिंगाणा उतरू लागले.

इकडे रायगडावर हाहाकार उठला होता. एवढे धीराचे आण्णाजी पण पायांखालची वाळू सरकल्यासारखे ते हवालदिल झाले. लज्जेने तोंडाशी उपरण्याचा शेव धरून ते आपल्या वाड्याकडून महाराजांच्या खासेवाड्याकडे चालले. त्यांनी मनोमन कसला तरी निर्णय केला होता. ज्या गडावर ते इतकी वर्षे इतमामाने राहिले होते तोच त्यांना क्षणात परका वाटू लागला.

"स्वामी, आम्हास सेवेतून मुक्त करून निरोपाचे विडे द्यावेत." राजांच्या कानी मनचा सल घालताना खालमानेच्या आण्णाजींच्या डोळ्यांतून आसवे टपटपली. खालच्या रुजाम्यात ती एकजीव झाली. सारा महाल एकान्ती होता. आण्णाजी कसल्या अग्नीने पोळून बोलताहेत तेच छत्रपती महाराजांना कळेना.

"मतलब?" महाराजांची नजर आण्णाजींच्या पगडीवर फिरली.

"स्वामीऽ स्वामीऽ" आण्णाजींना बोलवेना. लहान मुलासारखे ते जागच्या जागीच गद्‌गद् लागले. आपले तोंड ओंजळीतल्या उपरण्याने त्यांनी झाकून घेतले.

छत्रपती ते बघताना चरकले. बैठक सोडून उठले. चमत्कारिक साद त्यांच्या तोंडून बाहेर उमटली – "सुरनीऽस." आजवर आण्णाजींचे हरपलेले मंत्रिपणाचे भान जागे झाले. त्यांनी आपला हुंदका मुश्किलीने रोखता केला.

शांत, संथ चालीत महाराज आण्णाजींच्या जवळ आले. तेवढ्या वेळात त्यांनी काय बोलावे हे योजून घेतले होते. आण्णाजींच्या खांद्यावर गुलाबी हात-तळवा चढवीत महाराजांनी विचारले, "आण्णाजी, माणसं आम्हाला कंटाळतात. पारखी होतात. नेताजी झाले, प्रतापराव झाले, संभाजी कावजी झाला. आम्हाला त्यांच्या मनीचे सल कधीच कळू शकले नाहीत. तुम्ही ती संधी तरी आम्हाला देताहेत. बोला, आण्णाजीपंत,

आमचा काय कसूर घडतो म्हणून सावलीसारखी असलेली माणसं आम्हाला पारखी होतात. आम्हाला एकदा ते कळू द्या तरी!''

त्या प्रत्येक बोलाने आण्णाजींनी मुश्किलीने रोखलेला उमाळा पुन्हा वर खेचला गेला. जी नजर नेहमी स्वामींच्या भगव्या मोजड्यांवर जोडलेली असायची ती एकाएकी वर उचलली गेली. ते आपले सारे कढ क्षणभर विसरून गेले. पगडी डोलवीत आण्णाजी राजांच्या स्फटिक शिवलिंगासारख्या सत्त्वतेजी मुद्रेकडे बघतच राहिले.

"नाही. स्वामी कसूर आपला नाही. कुणाचाच नाही. असलाच तर तो आमच्या कमनशिबाचा आहे. आम्हाला निरोप द्यावा.'' आण्णाजींनी झुकून छत्रपतींच्या मोजड्यांना हाताची बोटे भिडविली.

"तुमच्या तोंडीची कमनशिबाची ही भाषा ऐकायला मासाहेब पाहिजे होत्या आण्णाजी.'' जिजाऊंच्या आठवणीने राजे विचारगत होत थांबले. त्यांनी धीराने भोगलेले आणि परतविलेले नशिबाचे फेरे राजांना आठवले.

"आण्णाजी, जायचंच ठरविणाऱ्याला आई भवानीही रोखू शकत नाही. फक्त त्याचे सही कारण आम्हास सांगून जा. काय झाले म्हणून हा डाव अर्धामुर्धा सोडून तुम्ही मोहरा पालटताहात? बोला.'' छत्रपतींनी आण्णाजींचे खांदे आवेगाने हलविले.

"स्वामी ऽ, जीभ उठत नाही आमची. परब्रह्माचे आम्ही खाल्लेले चार घास आपल्या कृपेमुळेच मिळाले आहेत. त्याची जाण सुटत नाही. आमची कसलीच तक्रार नाही. कुणाचाच कसलाही कसूर नाही.'' आण्णाजींना बोलणे सुधरेना.

"तक्रार नाही म्हणता म्हणजेच तक्रार गंभीर आहे. कसूर नाही म्हणता मतलब कसूर जबर आहे. सुरनीस, आम्ही छत्रपती या नात्यानं तुम्हास आज्ञा करतो आहोत – तुम्ही चाकरीची मुक्ती का मागता ते कुलदैवताच्या साक्षीनं आम्हास साफ साफ सांगावं.'' राजांचा आवाज बदलत बदलत दरबारी झाला.

रस्सीखेचीला पडलेले आण्णाजी घुटमळले. कसलातरी प्रचंड विश्वास त्या 'सुरनीस' या शब्दातून त्यांना मिळून गेला. डोळे शेवाने टिपत, उपरण्याचे काठ दोन्ही मुठींत घट्ट पकडून आण्णाजी सिद्ध झालेल्या निर्धारी स्वरात म्हणाले, "आमचं सर्वस्व लुटलं गेलं आहे महाराज. त्यासाठीच आम्हाला चाकरीतून मुक्तता मिळावी.''

"साफ बोला. काय झालं? कुणी लुटलं तुमचं सर्वस्व?'' छत्रपती सावध झाले.

"महाराज, महाराज, क्षमा असावी – युवराजांनी!!''

"आ ऽ ण्णा ऽ जी!'' पोताचा चटका बसावा तसे राजे चरकले.

"काय – काय केलं युवराजांनी आण्णाजी?'' कयास नसलेली वाट धरण्यासाठी राजांचे मन धडपडू लागले.

"क्षमा असावी स्वामी. त्यांनी केलं आहे ते आपल्यासमोर बोलतानाही आम्हाला शरम वाटते. आम्ही अभय मागतो.''

"अभय दिलं आण्णाजीपंत. सांगा युवराजांनी काय केलं?'' छत्रपतींची मुद्रा बांधली जाऊ लागली. कपाळपट्टीवर जाणवण्यासारखी शीर उमटून आली.

"महाराज, खुद्द आमच्या घरची, घरपणासाठी आलेली नात्याची सुवासिन युवराजांनी गडाबाहेर काढली. आम्हाला कुणालाच तोंड दाखवायला जागा नाही. आम्ही सर्वस्वी लुटले गेलो आहोत. हे पाय सोडणं जड जातं. तरी आम्हाला निरोप द्यावा.'' आण्णाजी खाली राजांच्या पायांशी गुडघे टेकून बोलतच होते. त्यातील एकही शब्द छत्रपतींच्या मनापर्यंत पोचत नव्हता.

"सुवासिन गडाबाहेर काढली'' हे ऐकताच राजांचे उभे अंग संतापाने थरथरले. श्वास चढीला पडला. नाकाच्या वळत्या शेंड्यावर घामाचे तुषार गोळा झाले. प्रचंड खंत आणि अनावर संताप यांच्या कोंडीत सापडलेला त्यांचा रक्ताचा कण अन् कण थरथरत होता.

त्या लोखंड लाल, संतप्त राजमुद्रेवरून शब्दांच्या ठिणग्या उसळल्या, "आण्णाजी, हेच कारण असेल तर गडच काय कदाचित हे जगही सोडावं लागेल. पण ते तुम्हाला नव्हे – संभाजीराजे भोसल्यांना! श्रींच्या नावे चाललेल्या दरबारी तुम्हास काटेकोरीनं न्याय मिळेल. विश्वास ठेवा.'' छत्रपती अंत:पुराकडे एकान्तवासासाठी चालले.

मुजऱ्यासाठी झुकलेल्या आण्णाजींच्या कानी समोरून चाललेल्या राजपुरुषाच्या टोपाच्या हिंदोळत्या मोतीलगातून ओघळत आल्यासारखे बोल मात्र बाहेर पडल्याशिवाय राहिले नाहीत – "तुम्ही मात्र राजांना पारखण्यात आता केलीत तशी गफलत पुन्हा कधी न करणे!''

घामाघूम झालेले संभाजीराजे रायगड चढून आले. त्यांना आठवत होते तेव्हापासून असा प्रसंग त्यांच्यावर कधीच आला नव्हता. गडाच्या कारखानदारीतील माणसे त्यांना बघून नेहमीसारखी कमरेत झुकत नव्हती. त्यांतील कितीतरी नजरा चक्क तिरस्काराने भरलेल्या दिसत होत्या. कितीतरी अनुकंपेने भिजलेल्या होत्या. पण कुठेच आदराचा भाव त्यांना दिसेना. रायगडाहून नेहमी ठेंगणे वाटणारे आकाश त्यांना आता आपल्या टोपाला भिडल्यासारखे भिवळू बघत होते. त्या उभ्या, नांदत्या, राबत्या गडावर एकाच गोष्टीने त्यांचे मन पुन्हा बांधून टाकले. नगारखान्यावरचा जरीपटका नागसर्पी वेटोळी फेकत लहरत होता त्यामुळे.

जेवढ्या तडफेने रायगड उतरून ते लिंगाण्याकडे दौडले होते तेवढीच आता त्यांची पावले मणामणाचे साखळदंड जखडल्यासारखी जडशीळ पडू लागली. एकाच विचाराने की – "आज पहिल्याने आम्हाला आमच्या वर्तणुकीबद्दल महाराजसाहेबांसमोर सफाई द्यावी लागणार.''

होय. ते आपणहून महाराजांच्या खासेवाड्याकडेच चालले होते. त्यांच्या कानी घडले ते सारे घालण्यासाठी. ते देतील ती आज्ञा मानण्यासाठी.

सातमहालातील सोयराबाईंच्या 'थोरल्या महालावर' अत्यंत जळजळीत नजर टाकून ते खासेवाड्याकडे वळले. त्यांच्या संगती कुणी नव्हते. त्यांना आपले एकटेपण कधी नव्हे ते जाणवले.

महाराजांच्या खासेमहालाचा दरवाजा ते ओलांडू लागले तेव्हा खंडोजी दाभाड्याने त्यांना मुजरा देत आपली जबाबदारी पार पाडली– "खाशांचा हुकूम हाय. म्हालाचा राबता समद्यास्नी बंद हाय!" संभाजीराजांनी त्याने आडवा घातलेला भाला त्याच्याकडे न बघताच मनगटी तडाख्याने बाजूला सारला.

ज्या न कळणाऱ्या नात्याने ते देवमहालात जगदंबेशी हट्टाला पडले होते तसल्याच नात्याने ते आपल्या आबासाहेबांशी हट्टाला पडणार होते. आज मोठ्या धैर्याने मासाहेब सोयराऊंच्या पायगुंतवा करणाऱ्या वागणुकीचा पाढा ते आपल्या छत्रपती पित्यासमोर वाचणार होते. इतके दिवस रोधलेला बांध आज फुटणार होता.

मिर्झा रजपुतांच्या गोटात ओलीस राहणारे, मथुरेत एकटेच मागे राहताना मागे न कचरणारे, भागानगरपर्यंत दौड घेणारे युवराज संभाजीराजे आज आपल्या आबासाहेबांच्या पायांवर डोके ठेवून म्हणणार होते– "तुम्हीच आमच्या आऊ आणि आबा आहात. आता रायगडी राहणे नको वाटते. आम्हाला स्वारीसाठीच बरोबरच ठेवून चालवावे. आमचे युवराजपद पायी टाकले आहे. ते आमच्या रामराजांना देऊन त्यांना दरबारी महालात सोनपायरीवर बसते करावे. आम्यात ज्या मोजड्या आम्ही उचलून आपल्यासमोर ठेवल्या त्याच आम्हाला बक्षाव्या. आम्हाला त्याच सर्वांहून मोलाच्या आहेत. एकच मागणं मागावं म्हणतो आम्ही. आम्हाला समजून घेणारे गडावर कुणीच नाही. यासाठी जसे निरोप घेताना मथुरेत आम्हाला पोटाशी धरलंत तसंच धरावं. आमचं मन जाणणाऱ्या थोरल्या आऊसाहेब आम्हाला कानभर हिताच्या गोष्टी सांगून गेल्या आहेत. फक्त आपला हात आमच्या पाठीशी सदैव असावा."

"महाराजसाहेऽब." वाड्याच्या अंत:पुराच्या बंद दरवाज्यावर संभाजीराजांच्या कडेधारी हाताची थाप पडली,

दरवाजा उघडला नाही. उघडणार नव्हता. उघडू शकत नव्हता! आत स्वराज्याच्या कामी आजवर खर्ची पडलेल्या असंख्य जिवाशी बांधील राजेपण ठरवून बंदिस्त झाले होते. छत्रपती महाराज प्रथम छत्रपती होते. नंतर पिता, पती, भाऊ होते. राजांना रक्ताची नाती नसतात. राजआसंदी चढतानाच ती त्यांना मोहोरबंद करून ठेवावी लागतात. त्या बंद दरवाज्यासमोर संभाजीराजांचे डोळे भरून आले. कुणी आम्हाला मुजरा केला नाही. आम्हास कुणी आपलासे करणार नाही!

"ठणऽ ठणऽ ठणऽ!" जगदीश्वराच्या चौकआवारातील सांजआरतीसाठी झडणाऱ्या घंटांचा नाद खासेवाड्यात घुसला. बंद दरवाज्याबाहेर संभाजीराजांना आणि आत मंचकावर सचिंत बसलेल्या महाराजांना कैलासवासी मातुश्री जिजाऊसाहेबांची

आठवण रोखता आली नाही. एकमेकांना दिसले, कळले नाही पण त्यांच्या हाताची बोटे जाऊन छातीला भिडली होती. आत महाराजांच्या मनी विचार उठून गेला– "मासाहेब, आमच्यावरचा हा प्रसंग बघायला आज तुम्ही नाहीत ते एकपरीनं ठीक आहे. तुमच्यानं मुलाकडून नातवाचा निवाडा बघवला नसता!"

बाहेर संभाजीराजांच्या मनी विचाराने काहूर केले– "थोरल्या आऊ, तुम्ही आज हव्या होतात. सारे दरवाजे बंद असताना आम्ही तुमच्याच पायांशी आलो असतो. तुमच्या 'शंभूबाळ' या एकाच सादेनं कैक रायगड उरावर पेलण्याचं बळ आम्हाला लाभलं असतं!" युवराज संभाजीराजे त्या दरवाज्यासमोरून परतले. त्या क्षणाबरोबरच मराठी मसनदीचे भाग्य परतले. भोसले कुळीची राजस नाती परतली. सत्यच सत्याला पाठमोरे होऊन, नियतीच्या फसगतीबरोबर माघारी परतले.

आपल्या महालात आलेल्या आरोपित संभाजीराजांवर महाराजांचे हत्यारबंद चौकी पहारे बसले. त्यांच्या भेटीसाठी आलेल्या पुतळाबाईंना आणि येसूबाईंनाही त्यांची भेट घेणे शक्य झाले नाही. काळवट रात्र पाचाड खोरीला घेर टाकत उतरली. तिने तीन जीव वेगवेगळ्या मन:स्थितीत बंदिस्त झालेले बघितले. लिंगाण्यावर गोदावरी संभाजीराजांच्या धारकऱ्यांच्या कैदेत, रायगडावर संभाजीराजे महाराजांच्या नजरबंदीत आणि खुद्द छत्रपती महाराज असह्य राजेपणाच्या, कुणालाही दिसू, उमगू न शकणाऱ्या जीवघेण्या बंदिवासात!

रायगडाच्या हयातीतील दुसरा काळा दिवस उजाडला. राजमाता जिजाऊ गेल्या तो पहिला आणि हा दुसरा. आज भरल्या दरबारी आरोपित संभाजीराजांची सिंहासनाधिष्ठित छत्रपतींसमोर सुनावणी होणार होती. आकृति-सावलीसारखे असलेले ते पितापुत्र येईल त्या सत्याला निडरपणे सामोरे जाणार होते.

महाराजांची भेट घ्यावी म्हणून पुतळाबाई, सरलष्कर हंबीरराव, येसूबाई यांनी आकांती खटपट केली होती, पण त्यांना यश आले नाही.

"युवराजांना तोफेच्या तोंडी दिले जाणार." या वार्तेने माणूस न् माणूस भयकातर झाले होते. रात्र रात्र विचारांनी होलपट केलेले संभाजीराजे 'प्राणांती सजा' झालीच तर त्यासाठी मन बांधून सिद्ध झाले होते.

हवालदिल माणसांची रीघ दरबारी महालाकडे लागली. कुणीच काही बोलत नव्हते. म्हणता म्हणता दरबारी चौक मानकऱ्यांनी भरून गेला.

राजपेहराव धारण केलेले महाराज देवमहाली शांत चित्ताने आई भवानीच्या मूर्तीसमोर उभे होते. मूकपणे डोळ्यांनीच तिच्याशी त्यांचे उदंड बोलणे झाले. बेलफुलांची ओंजळ तिच्या संन्यस्त चरणांवर अर्पून तो मराठ्यांचा योगी राजा देवमहालाबाहेर पडला. एक एक धीमे राजपद सिंहासनाकडे जाण्यासाठी पडू लागले. उचलत्या प्रत्येक पावलाबरोबर एक एका नात्याचा, तोडायला अवघड जाणारा बंध आपोआप गळून पडू लागला.

एकाएकी त्या योगी चरणांना सर्वांत जिव्हाळ्याच्या जनानी नात्याच्या वज्रचुड्यांची आर्त हाकेबरोबरच मिठी पडली – " आबाऽ".

महाराज देवमहालाबाहेर पडण्याची वाट बघत बाहेरच्या दगडबंद भिंतीला लागून राजस्नुषा येसूबाई उभ्या होत्या. तेवढे मोजकेच क्षण त्यांना युगासारखे फरफटून घेऊन गेले होते. असह्य कढाने, पित्याची माया देणाऱ्या महाराजांच्या पायांना त्यांनी मिठी घातली होती. आपल्या सौभाग्याचे दान घेण्यासाठी.

वरच्या आभाळाएवढ्या राजपुरुषाचे बांधून घेतलेले मनही पळभर डळमळले. उसळू बघणारा भावउमाळा रोधण्यासाठी छत्रपतींनी क्षणभर डोळे मिटून घेतले. त्यांचेच बोल नको त्या क्षणी त्यांच्या सेवेला रुजू झाले – " सूनबाई, तुम्हास बघितले की आम्हाला आमच्या आऊसाहेबांची याद येते ! "

ज्या पदरात महाराजांनी स्वहस्ते जोखमीची शिक्केकट्यार सोडली होती, तोच पदर पसरून सूनबाईंनी देवीच्या दरवाज्यात त्यांना गाठले होते. त्यांच्या रूपाने जशा मासाहेबच काही बोलू बघत होत्या. त्या विचाराने राजे शिवाजी कळवळले. तसेच पुढे जाण्यासाठी ओढ घेणारे त्यांचे मन अडखळले.

" सूनबाईऽ" छत्रपतींचा कडेधारी थरथरता हात येसूबाईंच्या पाठीवर गेला. त्या स्पर्शातील थरथरीने येसूबाई अंगभर हमसल्या.

" उठा. शांत व्हा." राजांनी त्यांना उठते केले. बोलावे म्हटले तरीही येसूबाईंच्या गळ्यातून शब्द फुटेना. जे सांगायचे होते ते त्यांचे हमसणेच सांगत होते.

" आमचं ऐका. शांत व्हा." बोलातील जाणते धैर्य मरणाच्या दारातील दुबळ्या जिवालाही निर्धारी करणारे होते.

" खरंच तुम्हाला बघितलं की मासाहेबांचीच याद येते ! तुम्ही तशाच आहात. या क्षणी गडावर आम्हाला समजून घेणाऱ्या एकट्या तुम्ही – तुम्हीच आहात." क्षणभराची स्तब्धता आपोआप उतरली.

" येसू, मासाहेबांना भुलू नका. याहून बिकट प्रसंगातून त्या कैकवार गेल्या, पण त्यांचा पदरकाठ नाही चळला. कुळाला साजेल असे तेवढे थोर धैर्य गडावर फक्त तुमच्यातच आहे. विश्वास ठेवा. तुमच्या सौभाग्याला हात घालण्याचं कर्म जगदंबेनं आमच्या हातून घडविलंच तर ... तर पुन्हा म्हणून आम्ही त्या सिंहासनावर दिसणार नाही ! हयातभर तुमच्या सेवेसाठी रुजू होऊ. तुम्हाला मासाहेब मानूनच !

" आता आमच्या हातून काही घडू नये यासाठी त्या जगदंबेला साकडं घाला. आम्ही ते घालून आलो आहोत.

" मुली, डोळे पूस. तुला-आम्हाला डोळे आहेत ते जगदंबेचे ! ते पाझरून नाही चालत. येतो आम्ही." शांतपणे येसूबाईंचे खांदे हळुवार थोपटून महाराज चालले. तेवढ्याच शांत पावली येसूबाई देवमुहालात चालल्या. या क्षणी त्यांना कुणीही पाठमोरे पाहिले असते तर जिजाऊ गेल्या आहेत हे त्याला खरेच वाटले नसते !

तिकडे दरबारच्या राणीवशात महाराणी सोयराबाई येऊन दाखल झाल्या होत्या. काहीतरी योजून त्यांनी आज रामराजांना संगती आणले होते. त्यांच्याखेरीज सात महालाकडली कुणीही जनानी असामी त्या राणीवशात आली नव्हती.

सिंहासन चौथऱ्यावरील सोनखांब धरून मोरोपंत, दत्ताजी, प्रल्हादपंत, हंबीरराव, रघुनाथ पंडित आदी सात मंत्री खडे होते. फक्त सुरनीस आण्णाजी दत्तोंचा खांब रिकामा होता. फिर्यादी असल्याने आज ते त्या जागी उभे राहू शकत नव्हते. समोरच्या दरबारी चौकात ते खालच्या मानेने उभे होते. चौथऱ्याच्या उजव्या तर्फेला असलेली सुवर्णी दंडावरच्या मत्स्यमोर्चेलावर मढविलेला भला-मोठा, ढंगदार, सोनेरी मासा, माणकाचा लालबुंद डोळा रोखून भरल्या दरबारावर देख देत होता.

चौकातील हजारी कारंज्याचे पाणी उसळी घेऊन जरीबतूसारख्या तारांचा फुलोरा फुलवीत, पुन्हा भवतीच्या हौद्यात कोसळत होते. छताकडून झोल टाकीत वळलेले, जागजागीचे झिरझिरे पडदे गडवाऱ्याने शहारत होते. पूर्वाभिमुख सुवर्णी सिंहासनाच्या हातदांडीत मुरून बसलेले सिंह खुल्या जबड्यांमुळे ते ' सिंहासन ' आहे हे पटवीत होते. त्यावरच्या छत्राच्या घेराला ओळंबलेल्या सुवर्णी झुरमुळ्या मंद लडलडत होत्या.

नेहमीच्या शिरस्त्याची शिंगाची कातरी ललकारी सरसरत दरबारी महालभर फिरली. तिला धरून नगारखान्यावरची नौबत दुडदुडली.

सोनेरी गुर्झब घेतलेला गुर्झबारदार सिंहासन चौथऱ्यावर आला. गुर्झबी दांडा आपटत त्याने अल्काबाची हरळ दिली – " राजश्रियाविराजित, सकळगुणमंडित, क्षत्रिय-कुलावतंसऽऽ गोब्राह्मणप्रतिपालक, हिंदुपद पादशहा, श्रीमान छत्रपतीऽऽ शिवाजीमहाराऽजऽऽ ! "

हाच अल्काब तिवार झाला. ' अदबऽ अदबऽ ' म्हणत गुर्झबारदाराने जहालीची अंतिम समज भरल्या दरबाराला दिली. त्याने दिलेल्या सोनेरी फरसबंदावरच्या ठोक्याने न्यायतुलेची पारडी कळणार नाहीत अशी शहारली. एकमेकांचा श्वास ऐकू पडावा असे काही क्षण दाटत, थबकत गेले. पाठोपाठ मैनाक पर्वताच्या शिखरावर पक्षिराज गरुड चढलेला दिसावा तसे त्या झळझळीत सोनेरी चौथऱ्यावर छत्रपती महाराज दिसू लागले. त्यांच्या दर्शनाबरोबर उभा दरबार लपकन कमरेत झुकला. आपल्या दरबारी प्रजेला आशीर्वादासाठी म्हणून महाराजांनी हात उठविला. राणीवशातून सोयराबाईंनी पाठविलेले रामराजे चौथऱ्यावर येऊन आपणाला मुजरा करताहेत हे महाराजांना कळलेच नाही. जेव्हा कळले तेव्हा क्षणभर ते घोटाळलेच. मान न वळविता म्हणाले, " पंत, बाळराजांना तुमच्या तर्फेस उभे करून घ्या ! "

" जी " मोरोपंत पुढे झाले. त्यांनी रामराजांना आपला हात देत आपल्या शेजारी घेतले. ते बघताना झिरझिऱ्या पडद्याआडच्या सोयराबाईंच्या मानेला राणीवशात झटका बसला. युवराजांच्या मोकळ्या पडलेल्या सोनपायरीच्या जागेवर स्वारी बाळराजांना हसत बसती करील असा त्यांचा गैरअंदाज होता !

महाराजांनी सिंहासनाला वंदना दिली. त्याला पायांचा स्पर्श होणार नाही याची दक्षता घेत छत्रपती सिंहासनारूढ झाले. बाकदार भगव्या मोजडीचा उजवा पाय चरणासनावर विराजला. हातपंजा उठवून महाराजांनी दरबारी कामाकाजाला सुरुवात करण्याची आज्ञा मंत्रिगणांना दिली. दोन्ही बाजूंनी शुभ्र फुलोऱ्याच्या चवऱ्या सिंहासनावर मंद ढळू लागल्या.

आज एकदम आघाडीलाच युवराज आरोपित म्हणून दरबारसामने येऊ नयेत अशी इच्छा असलेल्या सरलष्कर हंबीररावांनी, कोरे होत झुकून आपल्या फौजेकडच्या काही मागण्या पेश केल्या. हात उठवून छत्रपतींनी त्यांना 'मंजुरी' दिली. चौथऱ्यासमोरच्या हौद्यासारख्या बैठकीत बसलेल्या चिटणीस बाळाजींनी शहामृग पीस फिरवीत त्याची नोंद करून घेतली.

कुठल्यातरी दरबाराकडून गडावर आलेल्या नजराण्याची दोन तबके पेशवे मोरोपंतांनी 'आपली करण्याची' विनंती छत्रपतींना केली. त्यांतील एक तबक रिवाजाप्रमाणे युवराज संभाजीराजांना आलेले होते! महाराजांनी आपले तबक हस्तस्पर्श देऊन स्वीकारले. युवराजांचे तबक, ते बैठक घेत होते त्या जागी तसेच ठेवण्यात आले. वेळ जात होता. ते ध्यानी येताच महाराजांनी न्यायाधीश प्रल्हादपंतांना समज दिली, "न्यायाधीश, तुमच्या तर्फेचे कामकाज दरबारी रुजू करा."

प्रल्हादपंत 'आज्ञा' म्हणत झुकले. उभार दरबार धनुष्याची कमान ताणली जावी तसा ताणावर पडला. "आरोपित युवराजांना पेश करा." प्रल्हादपंतांनी आपल्या न्यायखात्याच्या धारकऱ्यांच्या सुभेदाराकडे बघत आज्ञा केली.

राणीवशाच्या बगलेकडून दरबारात येणाऱ्या बालेकिल्ल्याच्या मार्गावर सगळ्या मानकऱ्यांचे डोळे जखडून पडले. क्षणाक्षणाने आतली असंख्य काळजे थडथडली.

चहूबाजूंनी दहा हत्यारबंद धारकऱ्यांनी घेर टाकलेले आरोपित युवराज संभाजीराजे भोसले 'श्रीं'च्या न्यायकठोर सिंहासनामसोर आणले जात होते. अंगी केसरी जामा, मस्तकी तसाच झगझगता टोप, कपाळी रेखलेले शिवगंधाचे ठसठशीत पट्टे, छातीवर रुळलेली चौसष्ट कवड्यांची माळ, कमरेला ठिपकेदार किरमिजी मांडचोळणा, दोन्ही हातांची मनगटे निळ्या शेल्यात बांधलेले संभाजीराजे दरबारात येत होते.

त्यांची पुष्ट गर्दन ताठ होती. डोळे कसल्यातरी निर्धारी तेजाने तळपत होते. अनवाणी पाय खालच्या पायघडीवर भक्कम पडत होते. गुहेतून बाहेर पडलेल्या ऐन भरीच्या छाव्याचे ते निडर रूप होते!

त्यांना तसे बघताना दरबारी मानकऱ्यांतील कित्येकांचे ओठ रिवाज विसरून चुकचुकले. त्यांच्या फौजेकडच्या काही मानकऱ्यांनी त्याही स्थितीत त्यांना अदब मुजरे रुजू घातले. धारकऱ्यांनी आरोपिताला सिंहासनाच्या थेट सामने उभे करून नंगी पाती कपाळाला भिडवीत हटत आपआपल्या जागा घेतल्या.

मराठ्यांच्या जागी राजासमोर त्याचा रूपपराक्रमी फर्जंद आरोपित म्हणून उभा ठाकला! जिजाऊंच्या सिऊबा राजांसमोर त्यांचे 'शंभूबाळ' गुन्हेगार म्हणून पेश झाले! भवानीच्या थोरल्या पातीच्या भुत्यासमोर धाकल्या पातीचा भुत्या 'चुकार' म्हणून खडा झाला! आज आबासाहेबांसमोर त्यांचे शंभूराजे हे असे जगदंबेने उभे केले. छत्रपती महाराजांसमोर तो मानी युवराज दोषी म्हणून पेश झाला! आकृतीसमोर सावलीच न्यायदानासाठी खडी ठाकली. विशाल आभाळासमोर उगवतीचा सर्जा सूर्यच आरोपित म्हणून खडा ठाकला!!

सोडला तर श्वासानेही भंगेल अशी शांतता दरबारभर पसरली. आणि क्षणातच आर्त जिव्हाळ्याच्या सादेने ढवळून निघाली. "दादामहाराऽज!" सिंहासन चौथऱ्यावर मोरोपंतांच्या बगलेला उभे असलेले पाच वर्ष उमरीचे रामराजे भयचकित झाले होते!

पिळवटल्या काळजाने आणि भरल्या डोळ्यांनी संभाजीराजांचा भरदार ऊर दाटून आला. जाम्याच्या वादांची छातीवरची गाठ उचलली गेली. त्यांना वाटले – "असंच तरातर चालत पुढं जावं. बाळ महाराजांना पायऱ्या उतरवून छातीशी कवळावं. उचलून, मांडलेल्या तबकाशेजारी आपल्या नेहमीच्या जागी बसवावं."

"पंत, बाळराजांना त्यांच्या महाली पावते करा." महाराजांनी मोरोपंतांना समज दिली. लगबगीने पुढे होत मोरोपंतांनी रामराजांना पिछाडीच्या मार्गाने बाहेर काढले. महाराजांच्या खाजगी कारभाऱ्यांच्या हवाली त्यांना सुपूर्त करून मोरोपंत पुन्हा आपल्या पंतप्रधानी स्तंभाजवळ येऊन हात बांधून उभे राहिले.

आपल्या जागेवर ठेवलेल्या नजराण्याच्या तबकावर नजर खिळलेल्या संभाजीराजांना एका विचाराने सुन्नपण आले – 'त्या जागी बैठक घेताना कधी ध्यानीमनीही आलं नाही की केव्हातरी हे असंही इथं उभं राहावं लागेल!'

दाटली शांतता कशी फोडावी हे न सुधारल्याने प्रल्हादपंत गोंधळले होते.

"न्यायाधीश, आरोपितास समज द्या. दरबारचा रिवाजी मुजरा रुजू झालेला नाही!" छत्रपतींची मान नागफण्यागत ताठ झाली. आवाज जरबी कठोर झाला.

ते बोल कानी पडलेले संभाजीराजे क्षणभर इकडे तिकडे बघत कावरेबावरे झाले. पंतांनी समज देण्यापूर्वीच हात बांधले असल्याने कमरेत झुकूनच त्यांनी अदब-मुजरा घातला. महाराजांची गर्दन ते बघताना सुमार झाली. त्यांनी बगलेला पडलेला विषय पटावर घेतला.

"आरोपितावरचे आरोपपत्र दरबारास पेश करा न्यायाधीश."

"जी. आज्ञा." प्रल्हादपंत, न्यायाधीश नात्याने आरोपपत्र वाचू लागले –

"आरोपित रा. रा. संभाजीराजे बिन – बिन ..." प्रल्हादपंत महाराजांसमोर त्यांचा नावनिशीने उल्लेख कसा करावा या पेचाने अडखळले!

"वाचा." सिंहासनाने त्यांच्या जिभेचा खोडा काढून टाकला.

"आरोपित रा. रा. संभाजीराजे बिन सिवाजीराजे भोसले, उमर वर्ष अठरा, हाली राहणार किले रायगड." प्रल्हादपंत वाचू लागले –

"तुम्हावरी फिर्यादी रा. रा. अनाजीपंत बिन दत्तोजी प्रभुणीकर सुरनीस – किले रायेगड, उमर वर्षे अजमासे पन्नास, हाली राहणार किले रायेगड यांची वहिमी फिर्याद ऐसी जे –" सर्वांत कटू काम करण्यापूर्वी प्रल्हादपंतांनी एकदा श्वास घेतला. उपरण्याने घाम टिपला.

"तुम्ही फिर्यादीचे नात्यातील कबिल्याकडील घरपणासाठी आलेल्या गोदावरी नामे करून असलेल्या सवाष्ण स्त्रीचे बळमर्दीने किल्ले रायेगडावरून हरण केले आहे. सदरील स्त्री हाली तुमचे कबजात म्हणून किल्ले लिंगाण्यावर असे." प्रल्हादपंत थांबले.

"पेश केली फिर्याद तुम्हास मंजूर ?" महाराजांनी आण्णाजींना विचारले.

"जी." मुजरा देत आण्णाजी खालच्या मानेने म्हणाले.

"आरोपित संभाजीराजे, तुम्हास आरोप मंजूर ?" महाराजांचे डोळे रोखले होते. त्यांना आजवर दरबारात कोणी कधी दिली नव्हती अशी भेट नजर आज संभाजीराजांनी दिली.

"नाही ऽ ! आम्हास आरोप साफ नामंजूर आहे !" युवराजांच्या तोंडून तासासारखे ठणठणीत बोल उठले.

"मतलब ? बाई तुमच्या कबजात नाही ?" महाराज क्षणभर गोंधळले.

"जी. आहे !" आज संभाजीराजांनी गर्दन खाली होतच नव्हती.

"मग आरोप नामंजूर काय म्हणून ?" ती बावनकशी राजपात्रे एकमेकांना थडकू लागली. ठोस शब्दांच्या ठिणग्या उडू लागल्या.

"बाई आमच्या 'कबजात' नाही – 'कैदेत' आहे ! आम्ही तिचे 'हरण' केलेले नाही. तिला राजरोस आमच्या कैदेत घेतले आहे." संथपणे जाब आला.

"कोण हेतानं ? कोण अधिकारात ?" विचारांचा गुंतवा अनावर झाल्याने महाराजांनी वळलेली मूठ राजआसनाच्या हातदांडीवर उतरविली.

"मतलबी माणसांचा तिला आमच्याविरुद्ध भरीला घालण्याचा मनसुबा होता म्हणून – आमच्याशी संबंधित असलेली बाब भलत्या थराला जाणार होती. म्हणून युवराजांच्या अधिकारात आम्ही बाईला कैदेत घेतले आहे. छत्रपती महाराजांचे फर्जंद या नात्याने. भोसल्यांना प्रसंगी प्राणाचे मोल देऊन इज्जत जपावी लागते हे स्मरून, संभाजीराजे भोसले या नात्याने आम्ही बाईला कैदेत घेतले आहे."

सारा दरबार ते बेडर, जळजळीत बोल ऐकताना चक्रावून गेला. सगळीकडे चुळबूळ माजली.

"कोण मतलबी माणसं ? कसला मनसुबा ?" महाराजांच्या मूळशोधी सवालाने दरबार चिडीचाप झाला. साऱ्यांचे जीव कानांत एकवट झाले.

संभाजीराजांची पेटती नजर एकवार राणीवशाच्या झिरझिऱ्या पडद्यावर फिरली. रामराजे, आणि थोरल्या आऊसाहेब यांच्या आठवणीने घशाशी आलेले शब्द घोटाळले. असह्य शांतता दाटून पडली.

"आम्ही विचारतो – कोण माणसं तुमच्या खिलाफ बाईस भरीला घालू बघणारी ? कसला मनसुबा होता त्यांचा ?" महाराजांची जरब वाढली.

आता पहिल्याने संभाजीराजांची गर्दन खाली झुकली. मान डोलवीत ते म्हणाले, "नाही – महाराज आम्ही त्यांचे नाव या दरबारी इथं घेऊ शकत नाही !"

"मग तुमची सफाई खडी होऊ शकत नाही." तेवढाच निर्धारी प्रतिबोल सिंहासनावरून उठला. सुटू घातलेला कथला पुन्हा गुंतत चालला.

"महाराज, क्षमा असावी. या फिर्यादीचे सुनावणीचे कामी खुद्द बाईलाच दरबारी पेश होण्याची आज्ञा व्हावी. अभय देऊन तिच्या तोंडूनच खऱ्याखोट्याची शहानिशा व्हावी असं आम्हास वाटतं." सरलष्कर हंबीररावांनी ऐन क्षणी युवराजांच्या मनी घोळणारी सफाई रुजू घातली.

राणीवशाच्या पडद्याआडून दोन जळजळीत डोळे आपल्याकडे तिरस्काराने रोखले गेले आहेत हे काही हंबीररावांना कळले नाही !

"नाही ऽ बाई माणसाला भरल्या दरबारी पेश होण्याची आज्ञा करणे आम्हास रास्त दिसत नाही." आण्णाजी दत्तो प्रथमच बोलले. लगबगीने बोलले.

"आण्णाजी, आरोपित म्हणून खुद्द युवराज या भरल्या दरबारी आणण्यात आले आहेत हे तुम्ही विसरताहात !" छत्रपतींनी त्यांना दुरुस्त केले.

"पंत, बाईला अभय देऊन दरबारी पेश होण्याची समज द्या. जातीनं तुम्ही हे काम हाती घ्या." महाराजांनी पेशवे मोरोपंतांना आज्ञा केली.

"जी." ती उचलली गेली.

"आरोपित संभाजीराजे, तुमचे निर्दोषपण दरबाराला जाहीर होईपर्यंत कमरेची युवराजपणाची तलवार आणि भोसले-कुळाची शान असलेली कवड्यांची माळ अंगी वागविण्याचा तुम्हास कोण अधिकार आहे ?" महाराजांच्या रसरशीत सवालाने दरबार थरकला.

संभाजीराजांचे बांधले हात झटका बसावा तसे कवड्यांच्या माळेला जाऊन भिडले. डोळ्यांत कातरपणा गोळा झाला. आता मात्र ते पिळवटून म्हणाले "ना ऽ ही ! आमची वाटल्यास गर्दन उतरली जावी !"

"खामो ऽ श !" छत्रपती ताडकन सिंहासनावरून खडे झाले. दरबार चरकला. काय घडेल ते आता कुणालाच सांगता येणार नव्हते.

युवराजांची हजारो इंगळ्या डसल्यासारखी मुद्रा बघताना फक्त एकाच निधड्या छातीच्या वीराला येईल ते संकट पेलण्याची तयारी ठेवून जबान खोलावीशी वाटली. सरलष्कर हंबीरराव मोहित्यांना.

" महाराज, क्षमा असावी. युवराजांचे दोषीपण सिद्ध झाल्याखेरीज ती माळ साक्षात जगदंबेलाही त्यांच्या अंगावरून उतरविता येणार नाही ! आम्हाला विश्वास आहे ते सिद्ध झालं तर माळ उतरण्यापूर्वी युवराज बोलल्याप्रमाणं गर्दनच उतरवून ठेवतील ! "

महाराजांची नजर झुकलेल्या हंबीररावांच्या इमानी पाठीवरून फिरली. त्यांनी दरबार उलगल्याची इशारत देण्यासाठी हातपंजा उठविला. सगळे मानकरी कमरेत झुकले. संभाजीराजेही झुकले. त्यांनी मान वर केली तेव्हा चौथऱ्यावर महाराज नव्हते. एक एक करीत जाणाऱ्या मंत्र्यांपैकी हंबीररावांच्या पाठीवर त्यांची नजर कृतज्ञपणे जखडून गेली. राणीवशाच्या पडद्यावर थरथरत्या वळ्या उठून जात होत्या. तिकडे देवमहालात जगदंबेच्या मूर्तीसमोर माथा टेकलेल्या सूनबाई येसूबाईंच्या पाठीवरून पुतळाबाईंचा थरथरता हात सांत्वनासाठी अजूनही फिरतच होता !

गोदावरीला आणण्यासाठी लिंगाण्यावर गेलेले मोरोपंत रिकाम्या हातांनी आणि खिन्न जड मनाने परतले. जिथून कुणीच आणि कधीच परतू शकत नाही अशा दरबारात गोदावरी जाऊन पोचली होती !

चौबाजूंनी अंगावर धावून आल्यासारख्या मनातल्या वादळी विचारांनी गोदावरी कातर, हैराण झाली होती. तिचे देखणे, नाजूक स्त्रीपण विजेसारखे कठोर, चपळ झाले होते. आपले तोंड कुणालाही दाखवूच नये हा विचार एका निर्धारी क्षणाला तिने बांधून घेतला. निसर्ग-विधीचे निमित्त करून ती संभाजीराजांच्या धारकऱ्यांच्या कड्यातून कोठीबाहेर पडली, लिंगाण्याच्या एका उंच कातळटोकावर उभे राहून तिने आपल्या श्वेत नेसूचा पदर खोचला. हात जोडून, डोळे मिटत कुलदेवतेचे स्मरण केले. डोळे उघडून खाली बघताना तिला खालची निळीकाळी, खोल खाई जगदीश्वराच्या शांत पिंडीसारखी वाटली. आपल्या देहाचे बिल्वदल त्यावर अर्पावे या अनावर आवेगानिशी तिने आपला नखापासून शिखापर्यंत, पवित्र असलेला परंतु असंख्य मानसिक यातनांनी घायाळ झालेला देह समोर झोकून दिला.

तिच्या विखुरल्या देहाचे मिळतील ते अवशेष भिल्लांना दरीत उतरवून मोरोपंतांनी वर काढले. तिचे प्रेत लिंगाण्याच्या पायथ्याशी वस्त्राने झाकून ... ही काळीजतोड खबर महाराजांच्या कानी कशी घालावी या विचारात मोरोपंत परतले होते.

त्यांनी आणलेल्या वार्तेने अवघा रायगड विचित्र, दाटल्या शोकसागरात बुडाला. कुणालाही ती वार्ता ऐकताना काही बोलता येईना. गोदावरीने आपल्या कृतीने साऱ्यांचीच जबान बंद करून टाकली होती. संभाजीराजांच्यावरचे चौकीपहारे उठविण्यात आले. मोरोपंत, हंबीरराव, प्रल्हादपंत यांच्या सोबतीत छत्रपती आपल्या वाड्याबाहेर पडले. भोयांनी सामोरी आणलेली पालखी त्यांनी हात-इशारा देऊन नाकारली. गड उतरण्यासाठी ते पायीच चालले.

पाचाडात उतरताच महाराजांनी पागेकडची घोडी जीन कसून सिद्ध ठेवण्याची सैसला आज्ञा केली. चालत जाऊन प्रथम जिजाऊसाहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

सैसने सिद्ध केलेल्या घोड्यावर मांड घेतलेले छत्रपती महाराज लिंगाण्याच्या रोखाने दौडू लागले. त्यांच्या मागून त्याचे सोबती मंत्री आणि निवडक धारकरी दौडू लागले. साऱ्यांसह महाराज वस्त्राच्छादित गोदावरीच्या प्रेताजवळ आले. मोरोपंतांनी आगेवर्दी दिल्याप्रमाणे लिंगाण्याच्या पायथ्याला चिता रचण्यात आली होती.

धारकऱ्यांनी गोदावरीचे प्रेत चितेवर ठेवले. चितेला चूड देण्यात आला. महाराज चितेवर चढलेल्या सतीकडे रोखल्या नजरेने बघतच राहिले.

" पंत, या सतीचे वृंदावन सिद्ध करण्यास आबाजी महादेवांना सांगा." छत्रपतींनी मोरोपंतांना सांगितले. वळते होत इतरांना कळायला अवघड असलेला तो राजा जनावरावर मांड जमवून दुडक्या चालीने दौडू लागला.

रायगडाच्या भवानी टोकावर उभे असलेले संभाजीराजे लिंगाण्याच्या पायथ्याशी दिसणाऱ्या जळत्या चितेकडे सुन्नपणे बघत होते. ती दूरवर दिसणारी पेटती चिता त्यांच्या काळजाला कातरत होती. एक चांदणवेलीसारखी सतेज स्त्रीच, हातात पूजेचे तबक घेऊन चालत येत होती. ती निर्भय, प्रकाशरूप स्त्री थेट युवराज संभाजीराजांच्या समोर येऊन थांबली. युवराजांच्या मोजड्यांवर रोखलेली तिची नजर वर उठत नव्हती. अंगावर सौभाग्यवाण असलेल्या त्या सतीच्या तोंडून बोल आले– " खूप सोसावं लागलं युवराजांना आमच्यासाठी. शक्य असल्यास त्यांनी आम्हाला माफ करावं ! "

डोळे विस्फारलेल्या संभाजीराजांचे ओठ स्वत:लाच समजावल्यासारखे पुटपुटत होते – " नखशिखा ! नखशिखा !! "

गोदावरी गेली. कधीही न पुसता येणारा एक सल युवराजांना देऊन. ती गेली आणि सोयराबाईंच्याबद्दल संभाजीराजांच्या मनी केळणीसारखी एक आढी बसली. प्रसंग पडल्यास या मासाहेब कोणत्या थराला जाऊ शकतात याचा जीवघेणा अनुभव त्यांना येऊन चुकला. घडल्या घटनांनी वर्मी दुखावलेल्या युवराजांना कसे जवळ घ्यावे हा पेच महाराजांना पडला. गोदावरीच्या निमित्ताने आपल्या इमानाच्या निष्ठा आण्णाजींना राणीसाहेबांच्या पायी टाकाव्या लागल्या होत्या. आता त्या परतू शकत नव्हत्या.

झाल्या प्रकाराचा विचार करून-करून श्रांत झालेले संभाजीराजे ख्वाबगारात मंचकावर लेटले होते. त्यांचा डोळा लागला होता. पायगतीला बसून येसूबाई त्यांचे पाय चेपीत होत्या. निळ्याभोर आकाशात क्षितिजकड फोडून काळ्या ढगांची एक लांबट झड उतरावी तशी सुख झालेल्या संभाजीराजांच्या सतेज कपाळावर झोपेतच आठी उमटली. तिला धरून सगळी चर्या डाग दिल्यागत आक्रसून आली. लयीच्या श्वासात फेर पडला. चंद्रकांत मणी पाझरून यावा तशी घामथेंबांनी सगळी चर्या फुलून आली आणि

येसूबाईंचा भीतीने थरकाप उडावा असे कुणाला तरी आकांतानं थोपवायला चालल्यासारखे– "थांबाऽ! थांबाऽऽ!" असे ओरडत, संभाजीराजे झोपेतच फेकल्या गोफणीसारखे ताडकन उठले. सारे अंग थरथरत होते त्यांचे.

पोसाने त्यांची चर्या पुसता पुसता येसूबाईंनी थरकत्या जिव्हाळ्याने विचारले, "कोण धास्तीचं ओरडणं झालं हे ..."

काहीच जाब न देता युवराजांनी विचार वारण्यासाठी मानेला एक झटका दिला. त्यांना स्वप्न पडले होते! दिवसा-ढवळ्या. भयानक.

येसूबाईंनी दिलेला पाण्याचा पेला त्यांनी ओठांआठ केला. त्यांना सावचित झालेले बघून येसूबाई हलकेच बोलल्या, "बाहेर सदरी दालनात कविराज खोळंबलेत."

मानेवरचे केस तसेच रुळते सोडून संभाजीराजे सदरी दालनात आले. त्यांना बघताच कवी कुलेश आणि एका हिंदोस्थानी असामीने लवून मुजरा केला.

"युवराज, ये दुर्गा काली के भगत हैं– उधो योगदेव." कविराजांनी आल्या असामींची पछान करून दिली. कवी कुलेश आपल्या हिंदोस्थानी भाषेतच बोलत होते.

उधो योगदेव कमरेत लवला. त्याच्या कपाळी गंधाचे आडवे शैव पट्टे होते. अंगी उत्तरी पेहराव होता. गोऱ्यापान उद्धव योगदेवाची गोल चर्या सतेज डोळ्यांमुळे निर्धारी दिसत होती.

"स्वीकार कीजिये युवराज, मैय्या कालीका भस्मप्रसाद." असे म्हणत योग देवाने कमरेला लटकावलेल्या कशातून काढलेली भस्माची पुरचुंडी आणि प्रसादाचा द्रोण युवराजांच्या ओंजळीत ठेवला.

"दुर्गा भवानीच्या कृपेनंच आम्ही सलामत निभावलो. पुढंही तारणार तीच थोर आहे." या मनी उठलेल्या विचाराबरोबर संभाजीराजांनी ती ओंजळ तशीच उचलून कपाळाला भिडविली.

"युवराज, आज्ञा हो तो एक बात पेश करना चाहते हैं." कुलेशांचा आवाज पालटला होता.

"जरूर. बेशक बोलावं कविराजांनी." मथुरेतील त्यांच्या मदतीची जाण संभाजीराजे विसरले नव्हते.

"युवराज, जो हुवा है, भवानी के इच्छासे। आप उसको भूल जाईये। बहुत श्रेष्ठ हैं आपके महाराज। सुभाग है आपका, आप उनके पुत्र हैं। आप कवि हैं। हम कैसे बताए कि कवित्व ब्रह्माका प्रसाद है। क्षमा और संयमन ही उसका सुभाव है।" त्यांच्या मनात खूप काही बोलण्यासारखे होते. पण आपण उत्तरेकडील आहोत. कुठेतरी मांडणीच्या गोंधळात अदब सुटेल या विचाराने ते थांबले.

"कविराज, आबासाहेबांच्यावर आमचा कसलाच रोष नाही. त्यांना क्षमा करण्याचा आमचा वकुब नाही, मासाहेबांना मात्र आम्ही ती करू शकत नाही. तुम्ही आमच्याकडं कवी म्हणून बघता. पण आम्ही आमच्याकडं प्रथम युवराज आणि नंतर कवी म्हणून बघतो." बोलता बोलता संभाजीराजे थांबले.

कवी कुलेशांना मराठी बोली अंदाजाने समजत होती. बोलता मात्र येत नव्हती. समोरच्या देखण्या, तेजस्वी राजपुत्राने त्यांना आपल्या बेडर वागण्याने मथुरेतच जिंकले होते. जेवढी होईल ती सेवा या दख्खनी पितापुत्रांची निष्ठेने करावी या हेतूनेच ते मराठी मुलखात आले होते.

"आप विश्राम कीजिये। हम आग्या लेते हैं।" अप्रिय विषय अधिक चाळवला जाऊ नये या हेतूने कवी कुलेश म्हणाले. झुकता मुजरा देत, हटत्या पावलांनी योगदेवासह दालनाबाहेर पडले.

"या कवी कुलेशांना बघितलं की मथुरेची आठवण होते. केवढा समय पिछाडीला पडला!" सुस्कारा देत संभाजीराजे अंत:पुराकडे वळले.

"घ्येवा." आत येताच एक गोंदल्या मायेचा हात त्यांच्या समोर आला. विचारांची तंद्री तुटली. दुर्गेचा प्रसाद असलेली ओंजळ संभाजीराजांनी तशी पुढे केली. त्या ओंजळीत एका कुणबाऊ हातून गूळ-खोबऱ्याचा प्रसाद पडला. ती धाराऊ होती! तिनेही आपल्या गावच्या कापूरव्होळाच्या शंभू-महादेवाला कसला तरी नवस घातला होता. आणि आज तिने तो फेडून टाकला होता!

ढाशा वाऱ्याने गडावर जोर धरला. जगदीश्वर, शिर्काई मंदिरावरची तिकोणी निशाणे त्याने उधळून लावली. खास बनावटीचा असलेला जरीपटकाही त्याच्या मारगिरीला टिकणार नाही म्हणून नगारखान्यावरून उतरण्यात आला.

या वाऱ्याने छत्रपतींना कणकण भरली. महाराज आजारी पडले. ढासा खोकला आणि ज्वराची कणकण यांनी त्यांना मंचकावर लेटणे भाग पडले. राजवैद्य औषधी मात्रा देण्यासाठी त्यांच्या सेवेत खपू लागले.

महाराणी या नात्याने आणि सेवेच्या निमित्ताने छत्रपतींचा महाल सोयराबाईंनी आपल्या ताब्यात घेतला. अहोरात्र त्यांचाच महालात राबता पडला.

पुतळाबाई, सकवारबाई, येसूबाई, धाराऊ कुणीच महाराजांच्या महालात वास्तपुस्त करण्यापलीकडे थांबू शकत नव्हते.

दुपार धरून लेटल्या महाराजांचा डोळा लागला होता. त्यांना भेटीसाठी जीव कासावीस झालेले संभाजीराजे निर्धारी मनाने त्यांच्या महालाच्या दारात आले.

पहाऱ्यावरचे धारकरी त्यांना बघताच पाती कपाळाला भिडवून झुकत मागे हटले. भिंती धरून असलेल्या कुणबिणींनी पदर नेटके केले.

महाराजांच्या उशाशी बसलेल्या सोयराबाईंनी युवराजांवर नजर टाकली मात्र त्यांच्या कपाळीचे कुंकुचिरे एक जागी गोळा झाले. त्या उठल्या नि मानेचा काटा जराही न मोडता

खड्या चालीने बाहेर पडू लागल्या. युवराजांच्या अंगावरून बाहेर जातानाही त्यांनी मानेला वळते करून त्यांच्यावर दृष्टी टाकण्याचे कष्ट दिले नाहीत!

त्या समोरून जाताना, मन निर्भाव असलेल्या युवराजांचे शरीर मात्र कमरेत झुकलेच! त्याचे त्यांनाच मग आश्चर्य वाटले. महाराज सुख झालेत हे बघून संभाजीराजे दरवाज्यातूनच मागे परतायला निघाले. त्यांची निसटती नजर आबासाहेबांनी पांघरलेल्या शालनाम्यावरून फिरली. महाराजांचे पाय, कूस पालटताना त्याबाहेर उघडे पडले होते. त्या दर्शनाने त्यांना जखडून ठेवले. शांत पावलांनी ते महालात आले. आपल्या महाराजसाहेबांच्या पायांना हाताची बोटे भिडवून ती त्यांनी टोपाकडे नेली. मंचकावर ते पायगतीला बसून राहिले. कुणबिणी एक एक करता बाहेर पडल्या.

ढाशा वाऱ्याची एक चुकार झमकी महालात शिरली. लेटल्या छत्रपतींच्या विरळच पण सडक, काळ्याशार दाढीची चवरी ढाळून गेली!

ते बघताना संभाजीराजांच्या अंतरंगातून आठवणीचे एक पान भिरभिरत आले. कधीतरी धाराऊने त्यांना कौतुकाने सांगितले होते– "धाकलं, बालपनी तुमी लई चलवळं हुतासा. धन्याच्या दाढीसंगं झट्या घेतल्यात कैकदा तुमी."

संभाजीराजे नजर जोडून आबासाहेबांच्या डोळे मिटलेल्या शांत मुद्रेकडे बघू लागले.

"दरबारी सिंहासनावर बसून 'तुम्हास आरोप मंजूर?' असे विचारणारी, आम्यात 'कभी नहीं' म्हणून दाराबाहेर पडताना बेभान झालेली, 'ही मराठ्यांची मसनद आहे. ती कुणाच्याही फर्मानी तुकड्यास जुमानत नाही. कुणासमोरही गुडघे टेकण्यास आमचे युवराज येणार नाहीत. चालते व्हा!' असे बहादुरच्या वकिलाला झाडताना रसरसून उठलेली, 'आमचे सरलष्कर, तुमचे मुतालिक गेले' अशी गुजरकाकांची खबर सांगताना व्याकुळ झालेली, 'मासाहेब, आम्ही पोरके झालो!' म्हणत गेल्या आऊसाहेबांच्या छातीशी बिलगताना गदगदून आलेली, 'फते घेऊन या,' असे म्हणत भागानगरच्या स्वारीसाठी आम्हाला निरोप देताना अभिमानाने फुलून आलेली, पन्हाळगडावरच्या रंगरूपी पिंडीसारखी एरव्ही दिसणारी ही मुद्रा आता केवढी शांत आहे!" संभाजीराजे महाराजांच्या धारदार नाकाकडे नि निमुळत्या डोळ्यांकडे बघतच राहिले.

"बहुत श्रेष्ठ हैं आपके महाराज." कविवाणी त्यांच्या कानामनांत फिरत राहिली. थोरल्या महालाची चंद्रा दासी दोन वेळा चक्कर टाकून गेली.

बऱ्याच वेळाने महाराजांना जाग आली. पापण्यांच्या किलकिल्या कवाडांतून संभाजीराजांचा झगझगीत टोप दिसताच "तुम्ही ऽ?" म्हणत राजे नीट बसतेच झाले. उन्हाच्या तिरिपेवर तेगीचे पाते झळझळावे तशी त्यांची मुद्रा भरून पावलेल्या समाधानाने उजळली होती.

त्यांना उठते बघून तत्परतेने मंचक सोडलेले युवराज कमरेत झुकले.

"असू द्या. बसा तुम्ही – आम्हाला विश्वास होता तुम्ही याल म्हणून. हा खोकला त्यासाठीच आम्ही उपकारी मानला होता." बोलताना महाराजांना ढास लागली. ती निवारणे हाती नसतानाही आतओढीने संभाजीराजे व्याकुळपणे पुढेसे झाले.

ढास सुमार झाली. तिने महाराजांची मुद्रा लालावून टाकली होती.

"शंभूऽ, आम्हाला तुमच्या बेडरपणाचं अप्रूप वाटतं. तुमच्या वयात, तुमचं बेडरपण आमच्या अंगी असतं तर आईच्या पाठबळानं, केलं याहून आम्ही अधिक काही केलं असतं." मागील काळात गेल्यागत महाराज थांबले.

थोड्या अवकाशाने म्हणाले, "पण भलत्या ठिकाणी पणाला घातलं की अशा बेडरपणातून काय निघतं हे आता ध्यानी ठेवा. एका सतीच्या आहुतीला तुम्ही बांधलेले आहात. कशानंही त्याची फेड होऊ शकत नाही. कुणाच्याही नामी-बदनामीपेक्षा तिचा जीव मोलाचा होता." छत्रपतींचा गळा उबळीने खवखवला. ढासेवर ढास सुरू झाली. ते खोकणे संभाजीराजांना चारी बाजूंनी जखडून बांधत चालले, पिळत चालले.

"आम्हाला खंत एकाच गोष्टीची वाटते. जे मनी खुपते ते तुम्ही आम्हाला खुले बोलत नाही. आमची धास्त घेता. सारे मानतात तसेच तुम्हीही आम्हाला छत्रपती मानता. विसरता, आम्ही तुमचे आबा आहोत." कसल्यातरी यातनेने राजे कळवळून थांबले होते.

"आमच्या जागी असता तर कळलं असतं, की छत्रपतींना मनाचं लोखंड करून प्रथम निखाऱ्यावर आणि मग ऐरणीवर घालणं पडतं! विचार करा. एक भरल्या चुड्याची स्त्री हकनाक बळी गेल्यावर, हयात असत्या तर मासाहेबांच्यासमोर कुठल्या तोंडानं तुम्ही वा आम्ही उभे राहिलो असतो. शंभू, त्यांच्या स्मरणासाठी झडणाऱ्या घाटेचा नाद कधीच परता सारू नका. एक वेळ आम्हास विसरलात तरी चालेल – पण त्यांना – त्यांना मात्र कधीच विसरू नका." छत्रपतींनी डोळे मिटले होते.

"आबाऽ" मंचकावर कपाळ टेकलेले, गोदावरीच्या सलाने मनोमन जळणारे संभाजीराजे गद्गदत होते. छत्रपतींनी त्यांच्या काळजाला अचूक हात घातला होता.

"शांत व्हा. शंभूऽ, सबूर." महाराजांचा कडेधारी हात युवराजांच्या खांद्यावरून थापटता, समजावता फिरत राहिला. आभाळ सूर्याला शांतवू बघत होते!

"तबीब आले. उठा." राजांनी त्यांना समज दिली. मात्रा देण्यासाठी आलेल्या तबिबाकडे हसत बघत महाराज म्हणाले, "याऽ, आता आम्हास मात्रेची जरूर आहे असं वाटत नाही. ढास सुमार झाली आहे." ते म्हणताना येणारी उबळ महाराजांनी मुश्किलीने घशाच्या घाटीतच थोपविली. ते करताना त्यांच्या चर्येवरच्या नसेनसेवर पडणारा ताण संभाजीराजांना स्पष्ट जाणवत होता. मनात कुठेतरी कविवाणी दौड घालीतच होती – "बहुत श्रेष्ठ हैं आपके महाराज।"

महाराजांचा खोकला कबजात आला. तबिबांनी त्यांना हवापालटाचा सल्ला दिला. सातारा किल्ल्यावर विश्रांतीसाठी जाण्याचा छत्रपतींनी निर्णय केला.

त्यांच्या प्रवासाची गडावर तयारी सुरू झाली. आता थंडी हटत आली होती.

कवी कुलेश, केशवपंडित, उधो योगदेव यांच्याशी धर्मशास्त्र, पुराणग्रंथ, राजकारण यावर चर्चा करणाऱ्या संभाजीराजांना महाराजांच्या खासेवाड्याकडून वर्दी आली.

"काय निमित्तानं वर्दी आली असावी?" याचा विचार स्वत:शी घोळवीतच संभाजीराजे खासेवाड्याच्या बैठकी दालनात आले.

महाराजांना आदराने मुजरा करताना त्यांची नजर दालनात हात बांधून उभ्या असलेल्या पगडीधारी आसामीवर पडली.

"युवराज, हे पंडित उमाजीपंत. आम्ही त्यांना मुद्दाम बोलावून घेतलं आहे." महाराजांनी पगडीधारी आसामीकडे हात दिला.

पंडित संभाजीराजांना म्हणून झुकले.

"आम्ही साताऱ्यास निघालो आहोत. तुमचा वेळ केशवपंडित व त्यांच्या सोबतीत कारणी लागेल. हे थोर शास्त्रजाणते आहेत. ग्रंथांचा वकूब आहे यांना. तुमचं काव्यशास्त्र यांच्या संगतीनं वाढीस लागेल असा भरोसा आहे आम्हास." महाराजांनी घडल्या प्रकाराचा बितपशील करिणा हस्तगत केला होता. राणीसाहेबांना शंभूराजांचे युवराजपद खोलवर रुपते आहे. त्या ह्यांना कैचीत पकडण्यासाठी पावले टाकताहेत हे छत्रपतींना कळून चुकले होते.

"जशी आज्ञा." संभाजीराजांनी एव्हाना उमाजी पंडितांना नीट न्याहाळून टाकले होते.

"चलावं पंडित." दालनाबाहेर पडताना युवराज म्हणाले. जायला निघाले.

"ऐकता?" महाराजांचा निसटता जिव्हाळ्याचा बोल आला.

"जी."

"नखशिखा हे राधेवरचं काव्य तुम्ही बांधलंत असं आम्ही ऐकून आहोत. आम्हास ते ऐकविलं नाहीत! आता या दोन्ही पंडितांच्या संगतीत आम्हास ऐकण्यासारखं काही बांधून दाखवा!"

गोरेमोरे झालेले संभाजीराजे "जी" म्हणत अगोदर त्यांच्या नजरेपार गेले!

महाराज साताऱ्याला निघून गेले. रायगड सोयराबाईंच्या कबजात आला. संभाजीराजे पंडितांच्या सहवासात शास्त्र-पुराणांच्या अभ्यासात गढून गेले.

पंधरवडा लोटला. साताऱ्याहून निघालेला एक हारकारा धापावत रायगड चढून आला. त्याने आणलेल्या थैलीपत्राने सारा गड चिंतेच्या काजळीने कळंजून गेला.

महाराजांच्या तब्येतीला जोखमीचा आजार पोचला होता. खाल्ले अन्न उलटून पडत होते. मस्तकशूळ चढला होता. अंगी ज्वर धरला होता.

'पत्रदेखत जरोरीने अवघियांनी निघोन येणे.' असा निकडीचा खलिता कारभाऱ्यांनी साऱ्या गोतावळ्याला लिहिला होता. चिंताचूर संभाजीराजे पुतळाबाईंच्या महाली होते. प्रवासी सामानाच्या संदुका दासदासी निसबतीने भरत होत्या. येसूबाई त्यांना दबक्या जबानीने सूचना देत आतबाहेर करत होत्या.

कापडाने झाकलेले एक लोटके येसूबाईंच्या हाती देत, काळजीची जाळी चेहऱ्यावर चढलेल्या पुतळाबाई म्हणाल्या, "हे मेण्यात घ्या. संदुकेत टिकायचं नाही."

"हे काय?" अशा अर्थाने येसूबाईंनी भुवया चढविल्या.

"ती आंब आहे. उलट्यावर गुणकारी आहे असं सारी म्हणतात." पुतळाबाईंनी त्यांना, आपले मन केव्हाच साताऱ्यावर पोचलेय हे पटवून दिले.

येसूबाईंनी ते लोटके एका कोनाड्यात आबादानीने ठेवले.

सारी जिवाच्या ओढणीने बेचैन असताना थोरल्या महालाकडून कुणबीण आली. तिने आपल्या सरकारस्वारींची इच्छा पुतळाबाईंच्या कानी घातली, "साऱ्यांनी न्याहरीचा अवसर धरून गड उतरून पुढे होणे. स्वारी टळत्या उन्हावर मागून गड उतरणार आहे." ते ऐकताना काही न बोलता पुतळाबाईंनी संभाजीराजे आणि येसूबाईंच्याकडे नुसते बघितले. इथे कुणाचा इलाज चालत नव्हता.

न्याहरीची वाट न बघता मेणे सिद्ध करण्याची आज्ञा संभाजीराजांनी भोयांना दिली.

देवमहाली त्या तिघांनी जगदंबेचे दर्शन घेतले. पुतळाबाई, येसूबाई मेण्यात बसल्या. संभाजीराजे पुतळाबाईंच्या मेण्याच्या बगलेला झाले. बेगारांनी संदुका डोक्यावर घेतल्या. हुजराती शिलेबंद धारकऱ्यांनी शिस्त धरली. मेणे गड उतरू लागले.

हिंदकळू नये म्हणून येसूबाईंनी आंबेचे लोटके अल्लाद ओंजळीत धरले होते. त्यांचे मन मात्र हिंदकळतच होते. आबासाहेबांची अनेक रूपे लाटेसारखी त्यातून क्षणभर तरळून जात होती – "एवढासा जीव पण केवढा भार वाहून नेतो सूनबाई!" एकदा मुंग्यांच्या रांगेकडे बघत ते म्हणाले होते. "तुम्हा-आम्हाला डोळे लाभलेत ते जगदंबेचे! ते पाझरून नाहीं चालत." येसूबाईंचे डोळे दाटत चालले.

बाहेर पुतळाबाईंच्या मेण्याच्या डंबरीला एक हाताची पकड रुपवून एक एक पावलाने मनोरे, गंगासागर, महादरवाजा मागे टाकणाऱ्या संभाजीराजांना, महाराजांचा एकच विचार हात धुऊन पाठलागावर पडताना हैराण करीत होता – "आमच्या जागी तुम्ही असतात तर कळलं असतं, छत्रपतींना मनाचं लोखंड करून प्रथम निखाऱ्यावर आणि मग ऐरणीवर घालणं पडतं!"

पाचाड आले. मनच्या शंकाकुशंका वारण्यासाठी साऱ्यांनी जिजाऊंच्या समाधीची धूळ मस्तकी घेतली. बेगारांनी संदुका काबाडीच्या बैलांच्या पाठीवर लादल्या. शिलेबंद

धारकऱ्यांची पथके वाढविण्यात आली. किरमिजी वाणाच्या जनावरांवर संभाजीराजांनी मांड घातली. भोयांनी कदमबाज चाल धरली.

जीवघेण्या व्याधीने घायाळ असलेल्या 'शिवाच्या' दर्शनासाठी, ते रक्तजोडीने बांधलेले त्रिदळी, भोसलाई बिल्वदळ वरंद घाटाच्या रोखाने चालू लागले.

साताऱ्याच्या किल्ल्यावरच्या, झरोक्याची दारे लावलेल्या, पडदे सोडून अंधारी केलेल्या दालनात मंचकावरचे महाराज जिवाची लाही करणाऱ्या यातनेने तळमळत होते. आले माणूस छत्रपतींना ओळखू पडावे म्हणून मंद तेवणाऱ्या दोन ठाणक्या त्या दालनाच्या कोनाड्यात उदास दिसत होत्या.

महाराजांच्या पायगतीला पुतळाबाई त्यांचे पाय, चेप देऊन सुमार करताना खोलवर हरवल्या होत्या. हाती लोटके घेतलेल्या येसूबाई मंचकाची काठाळी धरून त्याच शिवचरणांवर नजर लावून उभ्या होत्या. त्यांना पाटीशी अशा, महाराणी सोयराबाईसाहेब खड्या होत्या. पदरबंद मुद्रेवरचे त्यांचे डोळे एका जागी ठरता ठरत नव्हते. भवतीच्या अंधाऱ्या उजेडात त्यांची चलबिचल कुणाच्याही नजरेला येत नव्हती. महाराजांच्या उशालगत बसलेल्या संभाजीराजांच्या हातात असलेला छत्रपतींचा हात, उन्हात तापलेल्या तोफेच्या पाठवानासारखा उनजाळ लागत होता.

"शंभूऽऽ" कण्हते छत्रपती तळमळले. त्यांच्या हाताच्या पकडीत संभाजीराजांचा हात घट्ट घट्ट आवळला गेला. ती पकडच सांगत होती त्यांना काहीतरी बोलायचे आहे.

"जीऽ" हलकी साद देत संभाजीराजे झुकले. त्यांच्या गळ्यातील कवड्यांची माळ महाराजांच्या छातीला हिंदोळत भिडली. तिच्या स्पर्शाने राजांच्या खोल गेलेल्या डोळ्यांत पुन्हा बांधले गेलेले अवसान संभाजीराजांना धुकट उजेडात दिसू शकले नाही.

"कसं वाटतंय आबासाहेब ?"

मानेखालच्या गिर्दीवर महाराजांचे मस्तक दोन वेळा असह्यपणे नुसते डावे-उजवे फिरले. उडालेल्या डोळ्यांनी महाराज संभाजीराजांच्या, धुकट उजेडातही लखलखणाऱ्या डोळ्यांकडे नुसते बघतच राहिले. सेवेत असलेले शिवरामशास्त्री वैद्य दालनात आले. शिंपल्यातून त्यांनी कसलीतरी उगाळलेली मात्रा आणली होती.

"स्वामीऽ" डोळे मिटलेल्या महाराजांना वैद्यांनी मंचकाजवळ येत केवढीतरी मायेची, कातरलेली साद घातली. महाराजांनी डोळे उघडले.

"मात्रा." संभाजीराजांनी महाराजांना उठते करावे म्हणून त्यांच्याकडे बघत वैद्यांनी शिंपला पुढे केला.

मानेखाली हात देत संभाजीराजांनी आबासाहेबांना हळुवार वर घेत बसते केले.

शिंपला ओठांशी नेत वैद्यांनी बोटाने महाराजांना मात्रा चाटविली.

पुतळाबाईंनी तत्परतेने पोसाने राजांचे ओठ टिपले. काही क्षण गेले. मात्रा पोटात जाताच वळीव वाऱ्याने ढगांची घुसळण करावी तसे होऊन राजांची आतडी ढवळून निघाली. त्यांचे दोन्ही हात लांब पसरते झाले. नरड्याची घाटी लकलकली.

घाबरे झालेले वैद्य, महाराजांना हातांचा आधार देत म्हणाले, "तस्त."

महाराजांच्या तोंडासमोर पुतळाबाईंनी मंचकाखालचे तस्त उचलून धरले मात्र— दिली मात्रा, आतल्या कफासह उलटून पडली ! महाराजांना खळखळून उलटी झाली. वैद्यांचा हात महाराजांच्या पाठीवरून फिरू लागला.

"स्वामींना लेटते करा." वैद्यांनी राजांच्या बगलेत हात दिला. संभाजीराजांनी मानेखाली हात देऊन आबासाहेबांना पुन्हा झोपते केले.

"शिव, शिव" मनाच्या विचाराशी मेळ घालण्यासाठी हाताची बोटे चाळवीत वैद्य ओढल्या पायांनी दालनाबाहेर पडले.

मोहोळ भरल्यासारखे एका क्षणातच संभाजीराजांच्या मनात असंख्य विचार येऊ लागले. मंचक सोडून ते उठले. वैद्यांच्या मागाने दालनाबाहेर पडले. साफ होणारी सहाण शास्त्रीबुवा निरखीत होते.

"शास्त्रीबुवा, आम्हास धीर निघत नाही. महाराजसाहेबांच्याकडे बघवत नाही. कोण जातीची ही व्याधी ?" संभाजीराजांनी विचारले.

"आम्ही उपचारांची शिकस्त करतो आहोत. युवराज, आता मात्र आमच्या मर्यादा आम्हाला जाणवताहेत." मूळ प्रश्नाला बगल देत वैद्य गंभीरपणे म्हणाले.

"पण झालं आहे काय तब्येतीस ? आणखी कुणाला तुमच्या मदतीसाठी बोलावून घ्यायचं आहे काय ?"

"आमची हरकत नाही त्याला. पण तब्येत आता जोखिमेत आहे." वैद्यांचा कपाळीचा गंधटिळा आक्रसला.

"मतलब ?" सर्वांगाला इंगळ्या डसल्यासारखे संभाजीराजे दबके चीत्कारले.

"युवराज ... युवराज, तुम्हाला कसं सांगावं. आमचं आम्हाला सुधरत नाही."

"बुवा, काय करणं आहे आम्हास सांगा. आम्ही ... आम्ही आमचा प्राण देऊन आबासाहेबांना वाचवू." पुढे झालेल्या संभाजीराजांनी वैद्यांचे हात आपल्या हाती घेऊन आवेगी हलविले.

"त्यानं उतारा मिळता तर आम्हीच आमचा देह स्वामींच्या पायी ठेवला असता युवराज !" वैद्य शांतपणे बोलले.

"मग काय केलं पाहिजे. सांगा शास्त्रीबुवा."

वैद्यांनी मान खाली घातली, "माणसांना करता येण्यासारखं एकच आहे."

"काय ?"

"कुलदेवता भवानीची भाक." वैद्यांचेच डोळे भरून आले.

"बुवा ऽ"

"युवराज, महाराजांची व्याधी ऐकायला दगडाचे मन आणि लोखंडाचं काळीज करावं लागेल ? करता ?"

संभाजीराजांची चर्या असंख्य शंकांच्या गळांनी ताणून टाकली.

"जनार्दन ऽ" वैद्यांनी पडशीत सहाण भरणाऱ्या शिष्याला साद घातली.

"जी !" म्हणत तो पुढे आला.

"स्वामींच्या दालनातून तस्त घेऊन ये." वैद्यांनी त्याला सांगितलं.

जनार्दन बाहेर पडला. थोड्याच वेळात तस्त घेऊन परतला. ते हाती घेत वैद्यबुवा झरोक्याशी आले. "युवराज, ही स्वामींच्या तोंडून उलटून पडलेली मात्रा बघा !"

संभाजीराजे थरकत्या पावलांनी झरोक्याजवळ गेले. तस्तात बघताना त्यांना पिवळट-जांभळट कफ मात्रेचा लगदा दिसला. त्यांच्या डोळ्यांतले रंग ते बघताना पालटले.

"बुवा ऽ ! संभाजीराजांच्या तोंडून दबला भयकातर चीत्कार उठला.

"होय युवराज, स्वामींना अभक्ष्य प्रयोग झाला आहे ! विषबाधा घडली आहे !!"

"विचित्र आहे ही व्याधी. कोठ्यातलं अन्न न पचता जागीच गाठी होऊन पडलं आहे. कोठ्यातील अन्न उलटून यावं म्हणून आम्ही शिकस्त केली. ते साधत नाही. त्याचं आतल्या आत पाणी करावं म्हणून दिलेली मात्रा आत पोचत नाही." आपल्याशीच बोलल्यासारखे वैद्य शून्यात बघत बोलले.

कवी भूषणचा सर्जा सूर्य– छत्रपती राजा शिवाजी, मृत्यूच्या ग्रहण-वेधांनी घेरला गेला ! किल्ले साताऱ्यावर जमा झालेली माणसे चिंतेच्या काढण्यांत आवळून पडली.

रात्रीच्या दुसऱ्या प्रहराचे तासाचे टोल घुमून उठले. भोवतीच्या अंधाराला सामील झाले. किल्ल्याच्या पायथ्याच्या दरवाज्यावरचा, पहाऱ्याचा देवडीवाला चटक्या पावलांनी बालेकिल्ल्याच्या तटाआत आला. छत्रपतींच्या दालनावर देख देत फेर टाकणाऱ्या धारकऱ्यांशी काही कुजबुजला. भाल्याचा दंड पेलत तसाच आत गेला.

छत्रपतींचा मंचक धरून संभाजीराजे, पुतळाबाई, येसूबाई, हंबीरराव, शिवराम वैद्य सारी मंडळी हवालदिल, चिंतागत खडी होती. महाराजांचा डोळा झापडेला पडला होता. त्यांच्या पापण्यांवर डोळे लावून सोयराबाई उभ्या होत्या. "धाकलं धनी, गडाखालतं देवडीवं रामदासबुवांचं कुणी बैरागी स्वामी आल्यात. थोरल्या धन्यास्नी ह्याच पावली भेटवा म्हनत्यात. काई ऐकाय तयार न्हाईत." देवडीवाल्याने हलक्या सादी वर्दी दिली. संभाजीराजांनी हंबीरमामांना नुसती नजर दिली. तिचा मतलब जाणून हंबीरराव "चल" म्हणत देवडीवाल्यासह दालनाबाहेर पडले.

किल्ल्याच्या पायथ्याशी दिंडी दरवाज्याबाहेर गर्दन घालून हंबीररावांनी बाहेरची असामी पलोत्याच्या धूसर उजेडात पारखली. बाहेर अंधाराला चिरत धनुष्याच्या टणत्कारासारखा रामबोल उठला– " 'जय ऽ जय ऽ रघुवी ऽ र समर्थ !"

घातले पाऊल तसेच पुढे घेऊन हंबीरराव दिंडीबाहेर आले.

बाहेर समर्थशिष्य, तपस्वी कल्याणस्वामी उभे होते ! बेंबीपर्यंत रुळणारी काळी, दाट दाढी. कपाळावर टाळूमागे बांधलेल्या केसांची टोके जटा होऊन मानेभोवती उतरलेली. दंड, मनगट, गळ्यात रुद्राक्षमाळा. कपाळी भस्माचे पट्टे. हाती कमंडलू व लाकडी थोपा. ढालीसारखी गोल, तेजस्वी मुद्रा. काखेला बैरागी झोळी.

"सेनापती, समर्थांची आज्ञा आहे. समय न दवडता आम्हाला प्रथम छत्रपतींच्या समोर घेऊन चला."

"चलावं !" हंबीररावांनी स्वामींना दिंडीचा माग दिला.

खटखटत्या खडावा छत्रपतींच्या दालनाच्या दगडी उंबरठ्याजवळ उतरल्या गेल्या. कल्याणस्वामी दालनात प्रवेशले. त्यांच्या दर्शनाबरोबर मंचकाभोवतीचा राजगोतावळा पुढे झाला. संभाजीराजांचे हात बैरागी चरणांना भिडले. राजस्त्रियांनी तळहाती पदरशेव धरून कंकणांचा आवाज उठवीत त्या संन्यस्त चरणांना तिपेडी नमस्कार घातले. कुणीच काही बोलत नव्हते. साऱ्यांच्या हालचालीत एकच आर्तता होती– "स्वामी ऽ, आमच्या महाराजांना वाचवा."

मंचकावर लेटलेल्या क्षात्रतेजावर नजर खिळून पडलेले कल्याणस्वामी देवदूताच्या पावलाने मंचकाजवळ आले. काठाळीजवळ बसत त्यांनी आपला कमलपाकळीसारखा तळहात छत्रपतींच्या कपाळावर ठेवला आणि जशी जिजाऊंनी घातली असती तशी माया भरली, हलकीच साद घातली– "सिऊबाराजे !"

चेतनेचे गरुडपीस लेटल्या क्षात्रतेजावर फिरले ! महाराजांनी पापण्या उघडल्या. काळ्याशार, दाटल्या ढगांतून पुनवेचा चंद्र दिसावा तसे कल्याणस्वामी दृष्टीस पडताच त्याही स्थितीत ते संस्कारसंपन्न क्षात्रतेज पायधूळ घेण्यासाठी उठण्याची धडपड करू लागले.

"राजे ऽ, नमस्कार पावला. लेटून राहा." कल्याणस्वामींनी त्यांना उठू दिले नाही.

"शिंपला आणि दूध घ्या." कल्याणस्वामी स्वत:शीच बोलल्यासारखे बोलले. काखेची झोळी त्यांनी पुढे घेतली. पळसपानांच्या दोन पुरचुंड्या तिच्यातून बाहेर काढल्या.

"दिली मात्रा टिकत नाही. उलटून पडते. तब्येत जोखमीत आहे. स्वामींना ... स्वामींना." पुरचुंड्या बघून न राहवल्याने बोलणाऱ्या शिवराम वैद्यांना पुढे बोलवेना.

"ते आम्ही जाणतो. गुरुदेवांनी त्यासाठीच आम्हाला हे भस्म आणि चूर्ण देऊन पाठविलं आहे."

दुधात खललेले चूर्ण कल्याणस्वामींनी 'जय ऽ जय ऽ रघुवीर समर्थ' म्हणत

छत्रपतींच्या ओठांपार दिले.

डोळे मिटलेल्या, क्षीण चर्येच्या छत्रपतींच्या नरड्याची घाटी क्षणभर लकलकली. ते बघताना संभाजीराजांच्या उरात वेदनेची एक मासोळी सळसळत गेली.

गुहेतून यावेत तसे छत्रपतींच्या तोंडून क्षीण रामबोल आले– "जय ऽ जय ऽ रघुवी ऽ र समर्थ !!"

कुणाचाही आधार न घेता शरीर पेलत महाराज शांतपणे लेटते झाले. वैद्यांनी सुस्कारा सोडला. देवमहालीच्या भवानीच्या मूर्तीकडे बघावे तसे संभाजीराजे कल्याणस्वामींच्या दाढीधारी, सतेज, बैरागी मुद्रेकडे बघतच राहिले. 'थोरला महाल' काढल्या पायांनी हळूच त्या दालनाबाहेर पडत होता !

"शंभू ऽ" पहाटवेळेच्या गारव्याला धरून शांत साद आली. रात्रभर जागत डोळे धरून मंचकाच्या काठाळीवर बसलेल्या संभाजीराजांचा, गारव्यावर बसल्या बसल्या डोळा लागला होता. त्या सादेने संभाजीराजांची झापड पिटाळून लावली.

"महाराजसाहेब कसं वाटतं ?" एका शब्दातच कितीतरी सवाल दडून होते.

"खूब आराम आहे आम्हास." छत्रपतींच्या उभट, पिवळसर चर्येवर कुठंतरी कळेल न कळेल अशी विश्वासाची लकेर होती.

"स्वामी कुठं आहेत ?"

"जी. आहेत. एका कोठीत पेटत्या धुनीसमोर ते रात्रभर ध्यान धरून बैठक घेऊन आहेत. वर्दी देऊ ?" समाधानाने संभाजीराजांची चर्या उजळली होती. बाहेर झाडापेडांवर पक्ष्यांचा कलकलाट उठला होता.

"नको. आत्ताच नको. त्यांचं ध्यान पुरतं झालं की मात्र लगेच द्या. सांगा, आम्हाला चरणदर्शनाशिवाय चैन नाही."

"जी !" संभाजीराजे हमामखान्याच्या रोखाने बाहेर पडले. मुद्रा खंगाळून कल्याणस्वामींच्या कोठीसमोर त्यांचे ध्यान पूर्ण होण्याची वाट बघत फेर टाकीत राहिले.

दिवस अर्धा कासरा चढून आला. कोठीतून रामबोल उठले. कल्याणस्वामींच्या दर्शनासाठी संभाजीराजांचेच मन ओढीला लागले होते. ते कोठीआत आले.

"स्वामी ऽ" कल्याणस्वामींच्या पायांवर कपाळ ठेवताना संभाजीराजांच्या तोंडून शब्द फुटेना.

"युवराज, छत्रपतींची हवाल ?" त्यांना हलकेच वर घेत स्वामींनी विचारले.

"खूप आराम पडला आहे तब्येतीस. महाराजसाहेब आमच्याशी बोलले. आपल्या दर्शनासाठी बेचैन आहेत."

"चला. युवराज, या क्षणी तुम्ही धरला आहे तोच विचार छत्रपतींनीही मागे धरला होता. वैराग्याचा ! गुरुदेवांनी तेव्हा त्यांना हिताचा बोध दिला. तेच आम्ही तुम्हाला सांगू. राजधर्म तुमचा धर्म आहे. संकटाशीच त्याची सांगड असते. तुम्हीही बैरागीच आहात– जगदंबेचे. तुम्हाला– तुमच्या महाराजांना मारू म्हणणाऱ्याचे हात दोन आहेत. राखणाऱ्या जगन्मातेचे हात आठ आहेत हे विसरू नका. चला." मनकवड्यासारखे स्वामी बोलून गेले. कोठीबाहेर चालू लागले.

त्यांनी पाठीशी बांधलेल्या व्याघ्रचर्मावरचे पट्टे न्याहाळत मनातील शंका, उबग निपटून गेलेले संभाजीराजे आपसुख चालले. समोरच्या व्याघ्रचर्माने त्यांच्या मनी फेर टाकला– "महाराजसाहेबांची काय, आणि आमची काय हयात ही या व्याघ्रचर्मासारखीच ! सुखदुःखाचे काळे-बाळे पट्टे."

कल्याणस्वामींनी महाराजांना आशीर्वाद दिले. वैद्यांच्या हाती व्याधी उताराची चूर्ण-मात्रा ठेवून ते सर्वांचा निरोप घेऊन गड उतरू लागले.

त्यांना रिवाजी सोबत देण्यासाठी संभाजीराजे त्यांच्याबरोबर महादरवाज्यापर्यंत येऊन थांबले.

"युवराज, या तुम्ही." संभाजीराजांचे भरीचे खांदे थोपटून कल्याणस्वामींची चक्रवर्ती पावले पुढे चालू लागली. त्यांची आकृती डोळ्यांआड होईपर्यंत युवराज दरवाज्यातच जखडल्या पायांनी खिळून खडे होते. त्यांच्या मनाच्या कोठीत मात्र त्यांना घुमता रामबोल ऐकू येत होता– 'तुम्हीही बैरागीच आहात– जगदंबेचे !!'

पंधरवडा परतला. महाराजांचे अंग धरू लागले. हलके अन्न पोटात ठरू लागले. एव्हाना पश्चिम दर्यावरून टोपीकरांचे खलिते वखारी-वखारींना जहाजांतून खूषखबर देत होते– "बंडखोर शिवाजी साताऱ्याच्या किल्ल्यावर विषबाधेने मृत्युमुखी पडला ! तरीही आपण बिनघोर झालो असे नाही ! त्याचा मुलगा संभाजी राज्यपदी चढला आहे ! बापासारखाच तो तापदायक आहे ! असे म्हटले जाते की, त्यानेच आपल्या बापाला विष देऊन मारविले आहे !!"

मोगली ठाण्यांवरचे सांडणीस्वार सुरत, बुऱ्हाणपूरच्या रोखाने खलित्यांच्या थैल्या कमरेला बांधून खुषीचे हिसके हिंदोळे घेत दौडत होते. खलित्यांतील मजकूर होता– "काफराना सेवा जहरी आफतसे दफा हो गया। उसके कमीने बच्चेनेही उसको जहर पिला दिया। रहमदिल खुदातालानेही कम्बख्तको ये खयाल दिया।"

या अफवा होत्या हे सांगायला ज्योतिष्याची गरज नव्हती. पण त्या वाऱ्यावर पिकलेल्या अफवा नव्हत्या. साताऱ्याच्या किल्ल्यावरूनच त्या रीतसर उठल्या होत्या !

महाराजांना दिवट्याचा मुजरा द्यायला संभाजीराजे त्यांच्या दालनी आले. आता महाराज दालनातच हिंडू-फिरू लागले होते.

युवराजांनी महाराजांना रिवाज दिला. धूपदान घेतलेला धूपजी दालनात आला. धूप देऊन निघून गेला.

" महाराजसाहेब ... " संभाजीराजांच्या बोलण्याने पाठीशी हात गुंफवून संथ येरझारा घेणारे छत्रपती थांबले.

" बोला."

युवराजांनी धारकऱ्यांच्या पुतळ्यावरून निसटती नजर फिरवली. महाराजांनी ते हेरून हलकी टाळी दिली. पहारेकऱ्यांचा हवालदार ती टाळी पकडत पुढे आला. मुजरे भरून आज्ञेसाठी उभा राहिला.

" आम्हास एकांत पाहिजे हवालदार." राजांना हे बोलताना आपल्या अंगीचा जामा काखेजवळ ढगळ पडला आहे हे फार जाणवले. पळभर ते अस्वस्थ झाले.

पुतळे हलले. एक एक करता पहाऱ्याचा झाडून सारा धारकरी दालनाबाहेर पडला.

" इकडील राबता आता फेर वर्दी मिळेपर्यंत बंद ठेवा. दरवाजा लोटून घ्या." सर्वांत मागून बाहेर पडणाऱ्या हवालदाराला समज मिळाली.

दालन एकांती झाले. तणावाचे काही क्षण कुचमले.

" बोला." राजबोलांनी शांततेला टाच भरली. तरीही युवराज गुमान होते. 'कसं बोलावं' हे त्यांना साधेना. मग सवयीचा सहज बोल उमटला – " आबासाहेब ऽ "

" हं!"

" आबासाहेब, आपणाला सावधानगीची इशारत द्यायला आम्ही आलोत. राहवलं नाही म्हणून –"

" कसली सावधानगी ? " छत्रपती शिवपिंडीसारखे शांत होते.

" आम्हास तुम्ही हवे आहात आबासाहेब. आपल्या ... आपल्या जीविताची आम्हाला धास्त वाटते. व्याधी ... व्याधी."

" शंभू ऽ, व्याधी साधी नव्हती. आम्ही जाणतो ! त्यामागची खलबतंही आम्ही बरे समजून आहोत. दातांखाली फसली म्हणून जीभ तोडता येत नाही. म्हणूनच आम्ही कोंडमारा घेत सबूर आहोत. सावधानगी आम्हास तर घेतली पाहिजेच, पण आमच्याहून तुम्हाला ती अधिक घेणे आहे !"

संभाजीराजांचे डोळे राजांच्या डोळ्यांतील बाहुल्यांशी केवढेतरी बोलून गेले.

" तुम्ही जाणता तुमच्याबद्दल काय बोललं जातं आहे ते ? " रुणाईतच पण तो आवाज करडा होता.

" जी. काय काय बोललं जातं ? " छत्रपती काय सांगणार या अंदाजानेच संभाजीराजांच्या अंगी काटा सरकला. डोळे दाटून आले. आवाज बोंदरला.

" तुम्ही – तुम्हीच आम्हाला अभक्ष्य प्रयोग करविला आहे !" उतरत्या निशाणासारखे थंड बोल राजांच्या तोंडून आले. पाठोपाठ केवढातरी लोंबकळता सुस्कारा सुटला.

" आ ऽ बा !" पाठीवर भिजवलेल्या आसुडाचा फटका फुटावा तसे संभाजीराजे कळवळले. मस्तकी मुंग्याच मुंग्या धरल्या. कानांच्या पाळ्यांत, घशात, छातीभर उकळत्या शिशयाच्या रसाचे पाट फिरले. पोतासारखा तो भवानीचा भुत्या अंगभर थरथरला. दुसऱ्याच क्षणी संभाजीराजांच्या हातांची मिठी महाराजांच्या पायांना पडली. उभे अंग गदगदून आले. तोंडी बुरणुसाचे बोते मारलेल्या तोफनळीसारखा घसा कोंडून पडला. 'आबा' हा साधा शब्दही बाहेर सुटण्याच्या धडपडीत कोंडमरला. राजआसवे राजांच्या चक्रवर्ती पायांवर टपटपली. ते उमदे राजमन घुसमटून घुसमटून गेले. वरचे सोशिक आभाळ ओळंबले. खुद्द महाराज छत्रपतींचाच आवाज भरून आला. युवराजांच्या पाठीवरून कडेधारी हाताची थरथरती बोटे फिरविताना महाराजांनाही काय बोलावे ते सुचले नाही. एक सावळा आणि एक केतकी वर्णाचा चेहरा सरसरत सामोरा आल्याचा भास झाला. सईबाईंची आणि मासाहेबांची आठवण त्यांच्या रुणाईत शरीराला थरकवून गेली. मनाच्या तळघरात पडलेले जुन्या हत्यारांसारखे बोल थडथडत वर आले – " साक्षात रुद्र जन्मास आला आहे. गडकोटावर राहील, पण ... पण आप्तगणांकडूनच फसगत होण्याचा योग दिसतो या कुंडलीत !"

" शंभू ऽ उठा, सबूर व्हा." युवराजांना थोपटत महाराजांनी वर घेतले.

" आम्हास नजर द्या." महाराजांचे बांधले बोल दालनास थरकवून गेले.

महाराजसाहेबांच्या डोळ्यांना डोळे भिडले मात्र. संभाजीराजांना राजे, मथुरेहून परत आलेल्या शंभूबाळाला छातीशी घेण्यास उतावीळ होऊन राजगडाच्या पायथ्याशी आलेल्या आबासाहेबांसारखे वाटले. संभाजीराजे गद्गदत म्हणाले, " महा ऽ राज, आता ... आता तुम्हीच आपल्या हाती – हाती आम्हास प्याला द्यावा ... विषाचा ! या ... या ... आरोपाला मात्र ... आमच्याजवळ ... सफाई नाही ! यापेक्षा मरणे कमी जाचाचे ..."

आवेगाने युवराजांना छातीशी बिलगते घेत महाराज लगबगीने घोगरट म्हणाले – " जगदंब, जगदंब. शंभू ऽ, सबूर व्हा. ना तुम्ही ना आम्ही मरणासाठी मोकळे आहोत. शांत व्हा." महाराजांचे हातच बोलके झाले. युवराजांना समजावणी देत नुसते थोपटत राहिले. नेताजींच्या बरोबर रजपुतांच्या गोटात, कऱ्हेपठारवर ओलीस राहायला जाणारे, लहानखुरेच पण निडर संभाजीराजे, आग्रा दरबाराबाहेर भावभऱ्या डोळ्यांनी बघत, मोजड्या आणून समोर ठेवणारे संभाजीराजे, संन्यासी छाटी अंगी चढवून भस्माचे पट्टे कपाळी घेतलेले, मथुरेत एकटेच मागे राहणारे संभाजीराजे, प्रतापगडी आईचा पोत मिटल्या डोळ्यांनी बेभान नाचविणारे संभाजीराजे, भरल्या दरबारी डोळ्यांना डोळे देत, ताठ मानेने " आम्हास आरोप सा ऽ फ नामंजूर आहेत." म्हणणारे संभाजीराजे अशी युवराजांची अनेक रूपे छत्रपतींच्या मनी एकमागाने नुसती घोळत राहिली.

" तुम्हाला माहीत नाही, आम्ही तुमच्यासाठी केवढी उमेद बाळगून आहोत."

सबुरीला पडलेल्या संभाजीराजांच्या मस्तकीचा केशरी टोप न्याहाळत महाराज पुन्हा पायफेर टाकू लागले. त्यांच्या ओठी घोळणारे बोल तसेच तुटले. सईबाईंच्या आठवणीने पायफेर थांबला.

"तुमच्या – तुमच्या मासाहेबांना आम्ही शब्द दिला आहे. आम्ही तुमचे आबा आहोत पण – पण आऊ होताना आमचे हात धिटे पडताहेत. आमच्या मासाहेब गेल्या नि तुमच्या पाठीचा जिवाभावाचा आधार गेला. म्हणूनच तुम्हाला खूप सावधानगीनं असलं पाहिजे." न कळणाऱ्या रितेपणाची शांतताच शांतता पसरली.

"तुमच्याविशी कोणेप्रकारचा शक आमच्या मनी स्वप्नातही येणं शक्य नाही. तुमचा स्वभाव आम्ही जाणतो. म्हणूनच आज तुमचीच आम्हाला अधिक चिंता वाटते. युवराज, माथ्यावरचं छप्परच दगा देत कोसळू लागलं तर तक्रार करावी ती कुणाबद्दल? सारं समजून असा. हुशार असा. जा. निर्धोकपणं थाळा घ्या. घाबरू नका, आम्हास खूप आराम आहे. आईची आणि समर्थांची कृपा घेऊन आम्ही उदंड जगणार आहोत. या तुम्ही." छत्रपतींनी आपल्या राजअंशाचा खांदा हलकेच थोपटला. शांत, भरल्या चित्ताने संभाजीराजे दालनाबाहेर पडले.

विचारगत महाराज मंचकावर विसावले. दाट चिंतेची जाळी त्यांच्या चर्येवर चढली. चैन पडेना. पुन्हा उठून ते एका चौरंगावर ठेवलेल्या नेहमीच्या पूजेतील स्फटिक शिवलिंगाजवळ आले. त्याच्या दर्शनाबरोबर एका विचित्र धीराच्या विचाराने त्यांचे मन ताठर, निर्धारी झाले.

पोसाने झाकलेला छत्रपतींचा थाळा खांद्यावर घेऊन, दुसऱ्या हाती पाण्याचा गडवा घेतलेला थाळेवाला आला. एका चौरंगावर थाळा ठेवून त्याने पोस हटविला. वाफांची मंद वळी उठली.

थाळेवाल्याने प्रत्येक पदार्थ महाराजांना समक्ष चाखून दाखविला. पाण्याचा घोट घशाआड घेतला. काहीच न बोलता मुजरा देत तो मागे हटत दालनाबाहेर पडला.

तस्त तांब्या घेऊन दुसरा एक खिदमतगार मागोमाग आत पेश झाला. महाराजांनी तस्तात हात धुतले, पोसाला पुसले. चौरंगालगत मांडलेल्या चंदनी पाटावर एक पायाची घडी घालीत महाराज थाळ्याला बसले.

तस्तवाला बाहेर पडला. जाताना त्याने दालनाचा दरवाजा हलकेच ओढून घेतला.

पितरांचा अन्नांश तबकाबाहेर चौरंगाच्या काठाळीवर ठेवून पाण्याने मंडल टाकीत महाराजांनी चित्राहुती दिली. अन्नमंत्र पुटपुटत मिटल्या डोळ्यांनी दोन आचमने ओठांआड घेतली. तसे करताना त्यांच्या मनाला एक निसटतो चुटपुट चाटून गेली. "ध्यानी राहिलं नाही मनाच्या घोळात. युवराजांना थाळ्यासाठी आज इथंच सोबतीला घ्यायला पाहिजे होतं."

दालनाचा दरवाजा कुरकुरला म्हणून महाराजांनी तिकडे नजर दिली. दरवाज्यात

महाराणी सोयराबाईसाहेब उभ्या होत्या! त्यांच्या दर्शनाबरोबर महाराजांची नजर समोरच्या तबकावर फिरली. कसलातरी विचार एका क्षणात बांधून झाला.

सोयराबाई क्षणभर घोटाळल्या. काहीतरी विचाराने परतायला निघाल्या.

"याऽ" महाराजांनी त्यांना परतू दिले नाही.

त्या आवाजातील संथपणाने धीर आलेल्या सोयराबाई ओठांच्या मुळातून कळेल न कळेलशी लकेर उठवीत नेहमीच्या दिमाखी कदमबाज चालीने आत आल्या.

"स्वारीनं एकांगी थाळा घेण्याचा निर्णय केला हेच ठीक झालं." चौरंगाजवळ उभ्या राहात त्या म्हणाल्या.

"होय. आता आमचा भरोसा आम्हालाच! काय बोललं जातंय ऐकलं नाही तुम्ही?" महाराज नेहमीसारखे बोलत तबकातील वाडगे चौरंगावर ठेवू लागले.

"राणीसाहेब, किती दिवस झाले... तुम्ही आम्ही संगतीनं थाळ्यास नाही बसलो!" शांतपणे महाराज बोलले. दरवाज्याकडे बघत त्यांनी साद दिली. "कोण आहे तिकडे?"

महाराजांचे उष्टे तबक उचलायला बाहेर खडा असलेला थाळेवाला "जी." म्हणत लगबगीने आत आला.

"जा. राणीसाहेबांचा थाळा लावून आण. चौरंग मांड." त्याला आज्ञा मिळाली.

आपल्या पायावरची आळत्याची नक्षी मोठी होत होत आपणालाच गुरफटून टाकत करकचून आवळते आहे या विचाराने सोयराबाई सुन्न झाल्या.

"राणीसाहेब, आमच्या रामराजांना नाही आणलंत तुम्ही आमच्या भेटीसाठी?" त्यांना तिसरीकडेच नेत कसलीही चलबिचल न दाखविता छत्रपतींनी विचारले.

"त्यांना प्रवास झेपत नाही." सोयराबाईंना काहीतरी उत्तर देणे भागच होते.

आज्ञेप्रमाणे थाळेवाला थाळा घेऊन आला. चौरंग मांडून त्याने त्यावर तबक, गडवा ठेवला. रिवाजाप्रमाणे तो बाहेर पडला.

"या." चौरंगाकडे हात देत महाराज सोयराबाईंच्या कडे न बघताच म्हणाले.

आळत्याच्या नक्षीचे पाय क्षणभर चळवळले! अंगीचा जरीकिनारी तहबंद आतून घामाने डवरून आला. समोरच्या राजस्त्रीच्या तोंडून फाटके, बोंदरलेले कसनुसे शब्द आले– "स्वारीला सांगणं विसरूनच गेलो आम्ही! आम्ही नवस बोललो आहोत. उपवास आहे आमचा!"

डोळ्यांतून ठिणग्याच ठिणग्या उसळणारे महाराज तबकावर नजर ठेवून शांतपणे म्हणाले, "अस्सं? मग आम्ही घेऊ?"

"जी."

"कसला नवस बोललात?"

" स्वारीला आराम पडावा म्हणून वाघजाईला साकडं घातलं होतं आम्ही. धास्त वाटते स्वारीच्या जिवाची आम्हाला. सावधानगीची इशारत द्यायला आलोत आम्ही."

" कसली सावधानगी ? "

" युवराज ... युवराज दिसतात तेवढे सिधे नाहीत ! "

" खामोऽश ! " थरथर कापणारे महाराज समोरचे तबक परते सारत ताडकन पाटावरून उठले. " शरम नाही येत जबान वाऱ्यावर सोडायला ? "

संतापाने मस्तक भिनलेल्या छत्रपतींना थरथरीमुळे नीट बोलताही येईना. सोयराबाईंना अंगावर उकळत्या तेलाचा शिडकावा झाल्याचा भास झाला. त्याही थरथरू लागल्या. कधीच न अनुभवलेल्या भीतीने !

" कुणासमोर, कुणाबद्दल, कोण ढंगानं जबान ढिली सुटते आहे याचं भान ठेवा. तुम्ही मानता तसे युवराज पोरके नाहीत. दगाफटका करणारे, कपटी नाहीत. हुषारीनं तुम्ही खेळू बघता ती चाल जनानी आहे. एक ना एक दिवस ती तुमच्याच अंगावर फेरचाल करील. आण्णाजींच्या घरची सुवासिन हकनाक कशी बळी गेली हे तुम्ही विसरला असला तरी आम्ही नाही ! युवराजांच्या निवाड्याच्या दिवशी तुम्ही रामराजांना राजसदरेवर आमच्यासमोर का घातलंत तेही आम्ही खूब समजून आहोत. याहीपेक्षा तुमची मजल कुठवर जाऊ धजते हे आमच्यापेक्षा तुम्हीच मनोमन खूप जाणता ! " पुढचे बोलणे जड झाल्याने महाराज थांबले.

खालमानेच्या सोयराबाईंच्या डोळ्यांतून उनजाळ धारा वाहू लागल्या. पायावरची आळत्याची नक्षी दिसेनाशी झाली. संतापाच्या शिगेला पोचलेले छत्रपती, आजवर रोखण्यास असह्य झालेले त्यांच्या करणीचे माप जळजळीत शब्दांत त्यांच्या पदरी घालू लागले. " तुम्ही शंभूराजांना सवते मानता, पाण्यात बघता. तुम्ही विसरता सावत्रपणाच्या वागण्यानं घडलेलं रामायण. ही दौलत ना आमची आहे, ना युवराजांची, ना रामराजांची – कैक जिवांनी प्राण खर्ची घालून ती उठविली आहे. आई भवानीच्या नावानं आम्ही, बाळराजे, युवराज सारेच भोसले तिचे भुत्ये आहोत. तोच वारसा आहे साऱ्यांचा. दौलतीच्या लोभानं तुमचा तोल ढळत चालला आहे. युवराजांना बदनाम करणाऱ्या चाली तुम्ही बांधताहात. आम्हास त्या ध्यानी येणार नाहीत असा सोयीचा समज करून घेताहात तुम्ही ! " महाराज स्वत:शीच हसले. कसेतरीच. त्यांनाच जीव कोंडणारी विचित्र शांतता क्षणभर दाटली. ती असह्य झाल्याने महाराज पायफेर टाकीत स्फटिक शिवलिंगाच्या चौरंगाजवळ आले. बेलफुलांतून अर्धवट दिसणाऱ्या त्या स्फटिक पिंडीच्या दर्शनांबरोबर शुभ्रसफेद कबूतर फडफडत निळ्या आकाशात झेपावावे तशी मासाहेब जिजाऊंची आठवण त्यांच्या मनाच्या खोलवटातून उसळली. डोळे पिंडीवर जखडून पडले. मन दाटून आले.

सोयराबाईंना पाठमोरे झालेल्या महाराजांच्या तोंडून पिळवट, घोगरट शब्द सुटले –

" आमच्या मासाहेब गेल्या ... वाटलं होतं त्यांची जागा तुम्ही झेपेल तेवढी भरून काढाल. साऱ्यांना माया, दिलासा देऊन ! तुम्ही त्यांचे अधिकार घेतलेत. त्यांच्याएवढा मायेचा मोठा पदर घेणं तुम्हाला कधी साधलं नाही. किमान तुम्ही राणीसाहेब आहात याचा तरी विसर पडू देऊ नका. आम्ही छत्रपती आहोत. साऱ्यांचे पालक. तुम्ही महाराणी आहात. या कर्तव्याच्या अर्ध्या भागीदार. पालन करणं होत नसेल तर गुमान धरा. नसत्या घालमेली पैदा करून घरच्या बाबीत गैरमेळ पाडू नका. या उप्परही तुमचे हट्ट, हेका सुटणार नसेल तर– तर महाराणी म्हणूनसुद्धा तुमचा मुलाहिजा धरणं आम्हास शक्य होणार नाही. या तुम्ही ..." महाराजांची अस्वस्थ बोटे माळेतील कवड्या चटाचटा चाळवू लागली. सोयराबाईंच्या रूपाने त्यांच्या पाठीशी एक थिजला, सुन्न पुतळा उभा होता. त्याला शेवटची निर्धारी समज मिळाली.

" उद्या उगवतीबरोबर तुमचे मेणे रायगडाची वाट धरतील. इथं तुमची आता मुळीच गरज नाही. आम्ही तशी आज्ञा हंबीररावांना देऊन ठेवली आहे. तुम्ही गैरमेळाचं कसं बोलता – साक्षात आमच्यासमोर – तेही जाताना ऐकून जा. वाघजाईचा नवस तुम्ही, समर्थकृपेने आम्ही उतारावर पडलो तेव्हाच फेडला आहे ! उपवास दुसरा कशाचा तरी असेल. तुम्हीच विचार करून कसला ते ठरवा ! "

सोयराबाईंना आता उभे राहणेच कठीण झाले होते. पिंढऱ्यात गोळे धरल्यासारखे त्यांना वाटू लागले. पदराच्या शेवाचा बोळा तोंडात दाबून त्या बाहेर जायला निघाल्या. त्यांच्या कंकणाच्या हालचालीबरोबर वळते झालेल्या छत्रपतींनी त्यांना " थांबाऽ " अशी जरब देत दालनाच्या उंबरठ्यातच रोखून ठेवले.

कोनाड्यात अंगभर जळणारा पलोताच जसा त्यांनी शब्दांच्या रूपाने निर्वाणीचा म्हणून दौलतीच्या पाठमोऱ्या उभ्या असलेल्या महाराणींच्या कानांत ठाशीवपणे पिळून टाकला – " नीट कान खोलून ऐका – युवराज संभाजीराजांनी दिलाच तर विषाचा पेला आम्ही – आम्ही भरल्या दरबाराच्या साक्षीनं, मंत्रिगणांसमक्ष आनंदानं दरबारी महालात सिंहासनावर बसूनसुद्धा घेऊ ... कारण – कारण त्या सिंहासनासाठी नऊ वर्षांची उमर असताना ते रजपुतांच्या गोटात ओलीस राहिलेले आहेत. अंगी कफनी चढवून मथुरेहून या मुलखापर्यंत एकटे वणवण भटकलेले आहेत !! "

महाराजांचा निरोप घेतलेले संभाजीराजे किल्ले सातारा उतरून रायगडाच्या रोखाने चालू लागले. येसूबाई, पुतळाबाई यांचे मेणे धरून हत्यारबंद धारकरी चटके पाय उचलीत होते. विचारात असलेल्या संभाजीराजांची मुद्रा बांधल्यासारखी झाली होती. कितीही निर्धार केला तरी संभाजीराजांच्या डोळ्यांसमोरून मासाहेब सोयराबाई हटत नव्हत्या. त्यांना हटकणे जमेनासे होताच ते कसल्यातरी आवेगाने हातातील कायद्यांना दमजोर खेच देत होते. तोंडातील दातेरी, लोखंडी लगामपट्टी कचताच स्वारीचे जनावर कळवळ्याने

फुरफुरत होते. आणि विचारामागून विचार संभाजीराजांच्या पाठीवर स्वार होऊन नको तेव्हा कायदे खेचून नको तिथे काच देत होते. वर्मी कळ बसावी असे टाचा भरीत होते ... मन फरफटीला लागले होते –

"का – का घडावं असं? कुणाचा कसूर नडतो आहे? अशा का वागतात मासाहेब? आम्ही त्यांचे कुणीच नव्हेत? आमचं राहू द्या. खुद्द आबासाहेबांची काय खातर करताहेत त्या? कुठं जाणार आहे त्यांची हवस? रामराजे आम्हाला कधीच परके वाटले नाहीत. या कधीच आपल्या वाटल्या नाहोत. का घडावं असं? महाराजसाहेबांना विष-प्रयोग होतो? त्याचा वहीम आमच्यावर घेतला जातो? काय चाललं आहे, तेच समजत नाही. आता इतर कुणाची नाही पण ... पण आमचीच आम्हाला धास्त वाटते! वाटतं आम्हीच काहीतरी वावगं करून बसू! वाटतं मासाहेबांच्या सामने उभं राहून, मनी घोळतं सारं साफ सांगून टाकावं. आमच्या युवराजपदासाठीच त्या बेचैन असतील तर ते रामराजांना बहाल करून मोकळं व्हावं ...

"थोरल्या आऊसाहेबांच्या आठवणीनं काळीज गलबलतं. केवढा धीर देणारा असायचा त्यांचा एक एक बोल! या वेळी त्या हयात असत्या तर? छे! त्या असत्या तर महाराजसाहेबांच्या जिवाशी असा क्रूर खेळ करण्याची मजलच झाली नसती कुणाची. आमच्यावर वहीम बोलताना तर दहा वेळा विचार करावा लागला असता कुठल्याही लटक्या जिभेला!

"... छी! आम्ही ... आम्ही अभक्ष्यप्रयोग केला म्हणे महाराजसाहेबांना! यापेक्षा दरबारी आमचा निवाडा झाला त्याच वेळी आम्हाला कडेलोटाची वा तोफेच्या तोंडी जाण्याची सजा मिळाली तर बेस होतं! हे असं ध्यानीमनी नसलेलं ऐकण्याची पाळी आमच्यावर ना येती. मासाहेब – मासाहेब, नको त्या कारणासाठी काळजाचा लचका तोडला आहे तुम्ही आमच्या. माणसाच्या सोसण्यालाही मर्यादा असतात. आम्हाला नवल वाटतं ते आबासाहेबांचं. एवढं झालं पण एक ब्रसुद्धा त्यांच्या तोंडून फुटला नाही. सोसण्याचं कुठलं बळ कमावलं आहे त्यांनी? की काहीच बोलता येऊ नये तशी त्यांची गत झाली आहे? आम्हाला भरल्या दरबारी निवाड्यासाठी उभं करण्यात आलं तसं – तसं मासाहेबांना उभं करण्यात येईल? नाही! नाही. आम्हीसुद्धा त्यांच्यावरचा वहीम दरबारात वरमानेनं बोलू शकलो नाही! आबासाहेब हे करू शकतच नाहीत. कसला खोडा पडला हा.

"... या आजारात महाराजसाहेबांचं काही बरंवाईट होतं तर! छेऽ छेऽ!"

मनचे हे अशिव मनातून बाहेर पिटाळण्यासाठी संभाजीराजे कळवळून स्वत:शीच पुटपुटले, "जगदंब, जगदंब" मांडीखालच्या जनावराला टाच भरली गेली. जनावर उधळले, दौडत दौडत बरेच पुढे गेले.

तांडा बराच दूर मागे राहिला हे ध्यानी येताच संभाजीराजांनी घोड्याला आवर घातला आणि त्याला धिमे करीत करीत स्वत:ला तांड्याशी जमवून घेतलं. पुतळाबाईंच्या मेण्याजवळून जनावर येताच त्यांना पुन्हा धोर गवसल्यासारखे झाले. त्यांच्या मनाचा विस्कटलेला तांदूळ चौक पुन्हा नीट मांडला जाऊ लागला. त्यांना वाटले, तांडा अमळ रोखावा. मासाहेब पुतळाबाईंशी मनभर बोलून घ्यावे. मन हलके करावे, पण तसे काही त्यांनी केले नाही. सातारा उतरताना त्यांना एक गोष्ट जाणवली होती. प्रत्यक्ष महाराज त्यांना निरोप देण्यासाठी बालेकिल्ल्याच्या सदरेपर्यंत आले होते तरीही किल्ल्यावरची बरीच माणसे त्यांच्याकडे विचित्र नजरेने रोखून बघत होती! तिरस्काराने भरलेले अनेक डोळे त्यांच्या उरात बाणासारखे घुसून त्यांना जणू बदनाम करीत होते. श्रींच्या छत्रपतींना, प्रत्यक्ष जन्मदात्याला, विषबाधा करण्याचे पाप त्यांनी केले आहे. असा आरोप-क्षेप त्या नजरांतून होत होता.

बधिर मनाची कोंडी-खंत गळून पडू लागली आणि हळू हळू त्याची जागा संताप-सूड यांच्या केळणीने बांधली जाऊ लागली. मार्गावरील झाडाझुडपांत त्यांना सोयराबाईच दिसू लागल्या. पण – पण त्यांच्या जरीकिनारी पदराआड कवळ्या उमरीचे रामराजे हात उभवून 'दादा महाराज' अशी साद घालताहेत असा भास होताच त्यांचे याही मोर्च्यावर बांधलेले मन ढासळू लागले. कोंडीच कोंडी पडली.

विचाराने सैरभैर झालेले संभाजीराजे काहीच न सुचल्याने नुकतेच पुटपुटू लागले ... जगदंब! जगदंब!"

पाचाडात जिजाऊंच्या समाधीचे दर्शन घेताना संभाजीराजांचा उर दाटून आला. रायगड चढून जावे असे त्यांना वाटेना. पाचाडच्या वाड्यातच पुतळाबाई, येसूबाई यांच्यासह चार दिवस त्यांनी मुक्काम टाकला.

ते आल्याची वर्दी गडावर पोच झाली होती, पण त्यांच्या हालहवालासाठी फडाकडील कुणीच गड उतरले नाही. नाही म्हणायला कवी कुलेश तेवढे त्यांची भेट घेऊन गेले. चार दिवसांनंतर कबिल्यासह संभाजीराजे रायगड चढून आले. वैराने पाठीवर लादून आणल्यासारखी साताऱ्याची अफवा इथे रायगडावरही पसरली होती. भेटणारी कारखानदारी माणसे संभाजीराजांकडे विचित्र घृणेच्या नजरेने बघत होती. त्यांनी बघितले आहे असे वाटले तर जुलमाने केल्यासारखे मुजरा करीत होती.

पंधरा दिवस झाले. रायगडी आलेले संभाजीराजे दोन वेळा जिजाऊंच्या बैठकीला मुजरा देण्यासाठी आणि जगदीश्वराच्या दर्शनासाठी काय ते तेवढेच आपल्या वाड्याबाहेर पडत होते. त्यांचा सारा वेळ आपल्या वाड्यात केशव पंडित, उमाजी पंडित, उधो जोगदेव, कवी कुलेश यांच्याशी पुराणग्रंथांवर चर्चा करण्यात जात होता. तोच त्यांना दिलासा वाटत होता.

त्यांच्या वाड्यात आत-बाहेर करणारी धाराऊ त्यांना सडे बघून एकदा धीराने म्हणाली, "धाकलं ..."

"बोला." तिच्या कपाळावरच्या गोंदणावर नजर ठेवीत संभाजीराजे म्हणाले.

त्यांच्या तेजवान डोळ्यांकडे आणि मानेभोवती रुळून पडलेल्या केसांच्या कुरळ्या, दाट घेराकडे बघताना धाराऊ काय विचारायचे आहे तेच विसरली. तिचे अलीकडे असेच होत होते. ऐन भरीचे, महाराजांच्या वाणावर उतरलेले 'धाकले' बघताना तिला खऱ्याखुऱ्या धाकल्यांची तिने बघितलेली कैक बालरूपे आठवायची.

धाराऊला गुमान थांबलेली बघून संभाजीराजांच्या मुद्रेची चलबिचल झाली. तिला पाठमोरे होत संभाजीराजे स्वत:शी बोलल्यासारखे घोगरट म्हणाले– "धाराऊ, आम्ही जाणतो, तुम्हाला काय विचारायचं आहे ते! आम्ही ... आम्हीच महाराजसाहेबांना ... अभक्ष्य ...

झटकन धाराऊ पुढे झाली. आपली तर्जनी ओठांवर ठेवून तिने संभाजीराजांना रोखून ठेवले. क्षणात तिचे डोळे डबडबून आले. "धाकलं– म्या तुम्हास्नी दूद पाजलंय. ते दगा-फटका करणारं बेमान न्हाई. त्यासाठनं न्हाई म्या जीभ उचालली. गडावं येऊन पंदरोडा जाला. सूनबाईंची तुमी बरं-वाईट म्हून सब्दानं दखल घेतल्याली न्हाई. काय वाटत असंल त्येस्नी ? धाकल्या रानीसाबास्नी भेटत न्हाई तुम्ही. काय करावं त्येनी ?"

जे सांधायला प्रसंगी जिजाऊही थकल्या असत्या ते धाराऊ आपल्या गावरान मायेपोटी सांधू बघत होती.

"धाराऊ, आम्हांस कुणालाच भेटावंसं वाटत नाही."

"असं म्हून कसं चालंल ? तुमची वाट बघून बघून थकल्याल्या धाकल्या रानीसाब इकडंच याया निगाल्यात. संगं बाळ म्हाराजबी हाईत."

पुतळाबाई येताहेत हे जाणवताच संभाजीराजे विचारात गेले. राणीवशाकडचा हा एक जागा त्यांच्या भरोशाचा होता. काही बोलावे असे हे एकच ठिकाण होते.

धाराऊ निघून गेली. थोड्याच वेळात राजारामांचा हात हाती धरलेल्या मासाहेब पुतळाबाई बैठकी दालनात आल्या. त्यांना तसे बघताना संभाजीराजांना वाटले– "खरोखरच बाळराजे यांच्याच पोटी उपजायला पाहिजे होते!"

महाराजांच्यासाठी आंबेचे लोटके बरोबर घेऊन साताऱ्याला जायला निघणाऱ्या पुतळाबाई दिसताच खेचल्यासारखे संभाजीराजे पुढे झाले. त्यांचे पाय शिवून त्यांनी रामराजांचा त्यांच्या हातातील हात हलकेच आपल्या हातात घेतला.

"युवराज ..." बोलणे कसे फोडावे या विचाराने पुतळाबाई थांबल्या.

"जी !"

"आमच्यावर नाराजी धरलीत तर ती आम्ही समजू शकतो. पण ... पण सूनबाईंचा काय दोष ? त्या गडावर आहेत याचंही भान तुम्ही ठेवत नाही. हा कोण रिवाज ?"

"मासाहेब ... आमचे सारेच रिवाज चुकले आहेत. एका सुवासिनीचं बळमर्दीनं हरण करणारे आम्ही ... जन्मदात्याला अभक्ष्य देणारे आम्ही. कुठल्या ... कुठल्या तोंडानं त्यांच्यासमोर जाऊ शकतो ? रोज दर्पणी बघून आमच्या नावानं कपाळी पट्टे घेताना त्यांना काय वाटत असेल तेच आम्हाला समजेनासं होतं!" संभाजीराजे कुठंतरीच एकरोख बघत ताठर झाले.

"युवराज–" पुतळाबाईंनी शब्दाचाच हात करून जसा त्यांच्या खांद्यावर अलगद ठेवला. "पुरुषांना असं आपलं आपणालाच तोडून बोलायची मोकळीक तरी असते. आम्हा बायकांना तीही नसते! तुम्ही युवराज आहात. तुम्हीच काळीज टाकून स्वत:ला कोंडून घेऊ लागलात तर बाई म्हणून जन्मानंच कोंडलेल्या सूनबाईंनी काय करावं ? बाब लागून राहिली आहे ही त्यांच्या मनास."

"दादा महाराज ..." एवढा वेळ ऐकत असलेले रामराजे संभाजीराजांच्या हाताला झोल देत काही बोलायला गेले. ते येसूबाईंच्याबद्दल काही बोलणार या कल्पनेने त्यांना दाद देत संभाजीराजे प्रेमाने म्हणाले,

"काय बाळ महाराज ?"

"तुम्ही ... तुम्ही महाराजसाहेबांना तेवढं विष दिलंत ... आल्यापासून आम्हास मात्र एकदाही नाही दिलंत ! आम्ही आबासाहेबांची वाट बघतो आहोत. तुम्ही ... तुम्ही नाही दिलंत तरी ते नक्कीच देतील आम्हाला विष !!"

ते ऐकताना संभाजीराजांची कानपाळी रसरसून सुन्न झाली. रामराजांच्या हातातला त्यांचा हात विचित्र थरथरला. पटकन् त्यांना उचलून घेऊन त्यांच्या गालावर ओठ ठेवताना संभाजीराजांना त्यांचा चेहराही दिसेनासा झाला.

त्या दोघांना तसे बघणे असह्य झालेल्या पुतळाबाई मंद, जडशीळ पावलांनी दालनाच्या झरोक्याशी गेल्या. बाहेर दिसणाऱ्या हनुमानाच्या देवळाच्या घुमटीकडे बघत राहिल्या. हे सारे सावरायला आपले हात थिटे आहेत या जाणिवेने खिन्न झालेल्या पुतळाबाईंना महाराजांची आठवण झाली. "हे बांधायला फक्त स्वारीच समर्थ आहे." या एकाच आशेच्या धाग्याला धरून त्यांचे मन स्वत:ची समजूत घालू बघायला लागले. डोळे घुमटीवर जखडले. मन राजांच्या मागाने भटकत राहिले.

सातमहालातील पुतळाबाईंच्या वाड्यातील बैठकी दालनात येसूबाई उभ्या होत्या. त्यांच्यासमोरून संभाजीराजांची स्वारी लगीने येरझारा टाकीत होती. मध्येच थांबत होती. साऱ्या दालनभर दोघांनाही जाणवेल अशी शांतता दाटून पडली होती. कुणी बोलावे यासाठी जसा कौलच लागला होता.

"कानी पडणाऱ्या बार्बीनी तुम्ही आमच्यासाठी शरमिंद्या असाल." संभाजीराजांनी स्वभावाप्रमाणे सरळ विषयाला हात घातला.

चमकून येसूबाईंनी वर बघितले. आपल्या स्वारीच्या चर्येत पडलेला केवढातरी फेर त्यांना जाणवला. मनाला खोलवर चटका चाटून गेला. "आम्ही सारं ऐकून आहोत. अभिमान वाटतो अशा स्वारींच्या पायाची सेवा करण्याचा मान आम्हास मिळाला याचा!" येसूबाईंचा आवाज बांधलेला, ठसठशीत झाला.

"मतलब ?" गोंधळलेल्या संभाजीराजांचे हात पाठीशी झाले.

"निवाड्याच्या पेचप्रसंगीही स्वारीनं वहीम बोलण्यासाठी मासाहेबांचं नाव ओठाबाहेर दरबारी सुटू दिलं नाही. आबासाहेबांच्या साताऱ्यावरच्या आजारपणात आलेला आरोप ऐकूनही बाळमहाराजांना स्वारीनं तुसडेपणानं तोडून दिलं नाही. आता आम्हास कळून येत आहे..." कुठतरी दूरवर पाहिल्यासारख्या येसूबाई थांबल्या.

"काय ?"

"आण्णाजींच्या घरच्या सुवासिनीनं लिंगाण्यावरून आपली कुडी का झोकून दिली असेल ते!"

"का ? का दिली असेल ?" त्या आठवणींनी संभाजीराजांचा आवाज कातरला.

"तिनंच काय प्रसंगी आम्हीसुद्धा कुडी झोकून द्यावी असाच स्वारीचा स्वभाव आहे! भरल्या दरबारी स्वारीबद्दल काही वेडे-बिद्रे ऐकण्यापेक्षा आणि एखादा गैरबाका शब्द उच्चारावा लागण्यापेक्षा त्या धीराच्या स्त्रीनं मरण पत्करलं. जे तिला कळलं ते घरच्यांना कळू नये याचीच खंत वाटते आम्हास!"

त्या शब्दाशब्दाने संभाजीराजांच्या मनी घालमेल उठली. येसूबाईंच्याबद्दल त्यांनी बांधलेला अंदाज साफ चुकीचा ठरला! त्या चुकीचाही एक न कळणारा आनंद त्यांना खोलवर स्पर्शून गेला. हलकेच पुढे होत त्यांनी मान खाली घातलेल्या येसूबाईंच्या हनुवटीखाली मूठ दिली. त्या टेकणीने त्यांचा मुखडा वर घेत ते म्हणाले, "आम्हालाही आता कळतंय. आबासाहेबांनी शिक्के-कट्यार तुमच्या सुपूर्द का केली ते!"

गोऱ्यामोऱ्या झालेल्या येसूबाईंनी मागे होत हनुवटी खुली करून घेतली.

"तुम्ही शतरंजची खेळी छान खेळता. आम्ही त्या पटाकडे बघताना तक्रार करीत होतो. आठवतं ?" संभाजीराजांनी विचारले.

"कसली तक्रार ?" येसूबाईंना माग मिळेना.

"त्या पटात मासाहेब, युवराज अशी मोहरी नाहीत ही. आज वाटतं तो खेळीचा पट आहे तसाच ठीक आहे!" सुस्कारा सोडत संभाजीराजे झरोक्याशी चालत गेले. बाहेर बघत पाठीशी असलेल्या येसूबाईंना म्हणाले, "तुम्ही, आबासाहेब पटावरची शतरंजखेळी सावधानगीनं खेळता. पण... पण तुमचं कसब थाऱ्यालाही टिकणार नाही असा शतरंजचा खेळगडी आजवर आमच्या ध्यानी आला नव्हता."

"कोण ?" गोंधळलेल्या येसूबाईंनी त्यांच्याकडे बघत विचारले.

"थोरल्या महालीच्या मासाहेब!" झरोक्याजवळून थंडगार बोल आले.

"तुम्ही पटावरचा शतरंज खेळता. त्या नात्यांचा शतरंज खेळतात. एवढ्या खुबीनं चाल टाकतात की, शह बसणाऱ्याचा जीवच घुसमटून जातो! त्यांच्या पटात मोहऱ्यांना तोटा नाही. शह कुणाला घालावा याचं बंधन नाही."

त्यावर काय बोलावे तेच येसूबाईंना सुचेना. एवढ्यात संभाजीराजांचे कारभारी महादेव यमाजींची वर्दी घेऊन एक कुणबीण आत आली.

युवराज पाठमोरे बघून तिने ती येसूबाईंच्या कानी घातली– "साताऱ्यावरनं दत्ताजीपंत आल्यात. धाकल्या सरकारांची भेट मागत्यात."

"येतो आम्ही." म्हणत संभाजीराजे महालाबाहेर पडले.

महाराजांच्या वाड्याच्या दर्शनी सदरेवर मंत्री दत्ताजीपंत युवराजांची वाट बघत खोळंबून होते. संभाजीराजांना येताना बघून दत्ताजीपंतांनी त्यांना मुजरा घातला.

"दत्ताजीपंत, तब्येत कशी आहे महाराजसाहेबांची ?" संभाजीराजांनी त्यांचा मुजरा घेता घेताच विचारले.

"जी. व्यंकटेशकृपेने महाराज खुशाल आहेत. नुकताच पालीला जाऊन त्यांनी पाटिलकीच्या एका कथल्याचा मजहर दिला. आम्ही संगती होतो. आता सरकार स्वारी साताऱ्यावर आहे. कर्नाटक प्रांतातून आलेल्या रघुनाथपंत हणमंत्यांशी कसल्यातरी मोठ्या मनसुब्यानं स्वामींची खलबतं चालू आहेत."

ते ऐकताना संभाजीराजांची चर्या समाधानाने उजळून निघाली.

"युवराज, आपल्यासाठी स्वामींनी खास खलिता देऊन आम्हास धाडलं आहे. आपल्याच हाती तो जातीनं देण्याची आम्हास ताकीद आहे." दत्ताजीपंतांनी कमरेच्या शेल्यात खोवलेली थैली काढून झुकते होत ती युवराजांच्या हाती दिली.

थैली घेऊन कपाळाला लावून संभाजीराजांनी फासबंद उकलला. आतली पत्रवळी बाहेर काढून उलगडती धरली. वळीतील शब्दा-शब्दांबरोबर संभाजीराजांची मुद्रा सोनथाळ्यासारखी झळझळत चालली.

"श्रींचे आशीर्वादे करोन आम्ही सर्वरूपे सुखरूप आहोत. खलिता देऊन दत्ताजीपंत खास हेतानं पाठविले असत. त्यास दिमतीस घेवोन तुम्ही खासा फौजबंदीने विजापुरी मुलखावर मिरज, अथणी तर्फेने घुसोन चालविणे. जोखीम न घेता वरच्या टापांनी मुलुखमारीचा बेत ठेवणे."

विजापूर दरबारी चाललेल्या वजीर खवासखान आणि सरदार बहलोलखान यांच्या बेदिलीचा फायदा उठवायचा बेत महाराजांनी आखला होता. ही मोहीम त्यांनी संभाजीराजांना जोडून दिली होती.

"दत्ताजीपंत, आजचा दिवस तुम्ही विश्रांती घ्या, तुम्हा-आम्हाला निघणे आहे. मिरजेच्या रोखाने." बाकीचे सारेच युवराज विसरून गेले.

"जी! स्वामींनी ती कल्पना दिली आहे आम्हाला. आम्ही पाचाडात उतरून बांधणी

करावी म्हणतो. येताना सातारहून थोडी शिबंदी आम्ही आणली आहे."

"ठीक आहे. आमच्या पंगतीला थाळ्याला असा आज. तुमच्या संगतीनंच गड उतरू आम्ही." मुजरा देऊन दत्ताजींनी सदर सोडली. संभाजीराजांच्या मुठीत पत्रवळी होती. मनात विचार होते मोहिमेचे!

पाचाडच्या वेशीवर दहा हजार शिलेबंद धारकऱ्यांची फौज खडी ठाकली. तिच्या आघाडीला जीनवंत घोड्यांवर मांड जमविलेले संभाजीराजे, दत्ताजीपंत, रूपाजी भोसले, कोंडाजी फर्जंद असा खासा मर्दाना सिद्ध झाला. चौघडे झडले.

हातपंजा उठवून, मागे न बघता संभाजीराजांनी आणि पाऊलोकांनी 'हर ऽ हर ऽ महादेव' ची गगनभेदी झील उठवली. कर्माजीने रामोशी घोडाइतांचे, खबरगिरांचे पथक दौडीचा मार्ग बिनघोर आहे की नाही याची टेहळणी देण्यासाठी पुढे उधळले.

चालून निघाले! युवराज संभाजीराजे आदिलशाहीच्या रोखाने मुलूख-तोडीसाठी चालून निघाले. आता त्यांचे मन शांत होते. महाराजांनी सोपविलेल्या जोखमीने नाचे सूर्यफूल उमलले होते.

मिरज बगलेला ठेवून आदिलशाहीची लहान-मोठी खेडी तसनस करीत संभाजीराजांची वारा प्यालेली फौज अथणी या मातबर व्यापारपेठेच्या वेशीवर येऊन थडकली! मावळ्यांनी अथणीला चौक भरला. आदिलशाही रियाया भयहैराण होऊन सैरावैरा धावू लागली.

"पेठ लुटीस घाला ऽ. बोला हर ऽ हर ऽ महादेव!" जंगाच्या आवेशाने मुद्रा फुलून उठलेल्या संभाजीराजांनी तेगीचे नंगे पाते अथणीवर रोखून घोष दिला.

व्यापारपेठ लुटीला पडली. लकलकत्या मुंग्यांनी चहूबाजूंनी झटून भला मोठा भुजंग वारुळाबाहेर काढावा तशी एक लाखाची लुटीची रास मावळी तुकड्यांनी संभाजीराजांच्या समोर घातली. युवराजांच्या आज्ञेप्रमाणं दत्ताजीपंतांनी या फत्तेची महाराजांना खबर देणारा खलिता सिद्ध केला. मिळाली लूट डागबंद करून रायगडाच्या वाटेला लावण्यात संभाजीराजांना मुजरा भरून खबरगीर कर्माजी फौजेतून फुटला. त्याने पन्हाळ्याची वाट धरली.

महाराज साताऱ्याहून पन्हाळगडी दाखल झाले होते.

धरल्या हत्याराने आदिलशाही मुलूख ताराज करून विजयी संभाजीराजे रायगडी परतले. फौजफळी तोडून घेतलेले दत्ताजीपंत बेळगाव प्रांतावर उतरले. महाराज अद्याप पन्हाळगडावरच होते.

आदिलशाहीच्या वारेजोड मोहिमेतील यशाने युवराज म्हणून ढासळतीला लागलेले संभाजीराजांचे स्थान रायगडी पुन्हा बांधले जाऊ लागले.

आता दिवस गर्मीत पडले. संभाजीराजांना सिद्धान्त-कौमुदी, मुक्तावली, रघुवंश, अमरकोश या ग्रंथांत आगळाच मानसिक आनंद मिळू लागला. केशव पंडित, उमाजी पंडित, कवी कुलेश, उधो योगदेव यांच्या संगतीत त्यांच्या घटका रमू लागल्या. अशाच एका बैठकीत चर्चेसाठी विषय निघाला काव्यग्रंथातील नायिकांचा.

"पंडित, काव्यशास्त्रानं किती भेद सांगितले आहेत नायिकांचे?" हारीने शिस्त धरून उभ्या राहिलेल्या मंडळीतील केशव पंडितांना संभाजीराजांनी सवाल घातला.

"जी. नायिकांचे तीन प्रमुख भेद कल्पिले आहेत काव्यशास्त्रानं. स्वीया, परकीय व सामान्या." केशव पंडितांनी काही वाचले होते त्यावरून ते तत्परतेने म्हणाले.

"लक्षणं काय त्यांची?" उत्सुकतेनं संभाजीराजांनी विचारले.

"स्वीया म्हणजे स्वस्त्री, परकीया म्हणजे परस्त्री, सामान्या म्हणजे गणिका. काव्यशास्त्रानं यांतील स्वीया हा नायिकाप्रकार मोलाचा मानला आहे. त्याचे तृतीय भेद कल्पिले आहेत."

"कोणते?"

"मुग्धा, मध्यमा व प्रगल्भा असे. मुग्धा म्हणजे जिने यौवनात नुकतेच पदार्पण केले आहे. जिचा क्रोध सौम्य आहे, प्रणयात शालीन असून जिला विशेष स्त्रीसुलभ लज्जा असते ती नायिका. मध्यमा म्हणजे जिचे यौवन विकसित आहे, प्रणयात जी कुशल असून संभाषणात चतुर आहे ती. प्रसंगानुरूप लज्जेचा लपंडाव खेळणारी नायिका. प्रगल्भा म्हणजे कमी लज्जा असलेली, प्रणयात तरबेज, संभाषणाचे मोहजाल टाकणारी नायिका." भेद सांगून केशव पंडित अभिमानाने कमरेत झुकते झाले.

"व्वा!" संभाजीराजांनी मनखुलास दाद दिली. कसल्यातरी विचारात गेल्यासारखे ते हातीचे गुलाबफूल चाळवू लागले. नायिकांचे हे संभाषण इथेच संपणारसे साऱ्यांना वाटले.

"युवराज, आंग्या हो ता स्वीया नायिकाके सौंदर्यशास्त्रमें माने गये अष्ट उपभेद हम चरणोंमें सादर करेंगे!" कुणालाही कल्पना नसताना कवी कुलेश बोलून गेले.

ते ऐकताना केशव पंडितांच्या कपाळी कळेल न कळेलशी आठी उमटून गेली.

"जरूर ... जरूर. कविराज." संभाजीराजांनी हातातील फुलाला फिरका दिला.

खांद्यावरून सरकलेले उवरभारती उपरणे ठाकठीक करीत कवी कुलेश किंचित झुकते झाले. त्यांच्या मस्तकीच्या गुलाबी, कनोजी पगडीला धरून ओळंबलेल्या जरीवस्त्र झुरमळ्या डुलल्या. "युवराज, सौंदर्यशास्त्र, स्वीया नायिकाके अवस्थानुसार अष्ट उपभेद मानता है– खंडिता, अभिसारिका, स्वाधीनपतिका, विप्रलब्धा, वासकसज्जा, कलहांतरिता, प्रोषितभर्तृका और विरहोत्कंठा!"

"वाहव्वा! बहोत खूब, कविराज, लक्षणं सांगा या अष्टनायिकांची." मुद्रा उजळलेल्या संभाजीराजांची नजर कवी कुलेशांच्यावर जखडून पडली.

"जी!" म्हणत कवी कुलेश पुढे म्हणाले, "स्वपति अन्य स्त्रीपर मोहित देखकर ईर्षासे कोपिष्ट होनेवाली नायिकाको 'खंडिता' मानते हैं। जिसपर पतिका सर्वाधिक प्रेमयोग जुडता है उस नायिकाको 'स्वाधीनपतिका' जानते हैं। संकेतस्थानपर आनेका अभिवचन देकर वह नायकसे पूरा न होनेके कारण जो स्वयं को अपमानित मानती है वह नायिका है 'विप्रलब्धा!'"

कवी कुलेशांच्या बोला-बोलांबरोबर केशव पंडित आणि उमाजी पंडित यांना त्यांची त्यांनाच न कळणारी घालमेल उरात उठली. संभाजीराजांच्यासमोर त्यांना ती नीट प्रकटही करता येईना. किती झाले तरी कुलेश 'उत्तरी' होते. या मुलखात उपरे होते. युवराजांची दाद पकडत खुललेल्या कुलेशांना या कशाचेच भान नव्हते.

ते बोलतच होते – "आज अपना पति आनेवाला है इस अपेक्षासे शृंगारमंडित होकर प्रतीक्षा करनेवाली नायिकाको काव्यशास्त्र 'वासकसज्जा' मानता है। पति अनुनय करते समय उसको दुरुत्तर करके प्रथम अवमानित करनेवाली और उपरांत सखी के सामने पश्चात्ताप प्रकट करनेवाली नायिकाको 'कलहांतरिता' कहा जाता है। जिसका पती दूर देशके सफरमें जानेके कारण उसका दर्शन दुरापास्त है यह जानकर भी जो व्याकुल होती है उस नायिकामें 'प्रोषितभर्तृका' का भाव देखता है शास्त्र। और निश्चयसे आज पतिका दर्शन होनेवाला है इस अपेक्षासे प्रतीक्षा करती है, और पती जल्द न आनेके कारण जो विरह-व्याकुळ हो उठती है उस नायिकाका 'विरहोत्कंठा' नाम ख्यात है शास्त्रमें। युवराज, काव्यशास्त्रमें इन अष्टनायिका के रूपमें बहुत स्त्रीरूप प्रकट हुए हैं।"

आता सगळी बैठक आपोआपच कुलेशांच्या कब्जात गेली होती.

"शाब्बास कविराज," अशी दर्दी दाद देत बैठकीवरून उठलेले संभाजीराजे कुलेशांच्या जवळ आले आणि त्यांनी आपल्या छातीवर रुळणारा मोतीकंठा उतरून तो कवी कुलेशांच्या हातात ठेवला. "कविराज, या अष्टनायिकांचे स्वभावी भेद आम्ही काव्यात बांधावे म्हणतो." स्वतःशी बोलल्यासारखे संभाजीराजे म्हणाले.

"जी. संकल्प पूरा करनेमें चंडी युवराजको आशीर्वाद दे." कुलेशांची मान, राजकदर स्वीकारताना झुकली ती तशीच होती.

रायाजीने आणून ठेवलेल्या तबकातील विड्यांना संभाजीराजांनी हातस्पर्श दिला. सर्वांना निरोपाचे विडे देण्यात आले.

'नायिकाभेद' या काव्याच्या बांधणीत संभाजीराजे गुंतले. उन्हे तापू लागली.

एक दिवस उन्हे टळतीला लागली असताना अचानक महादरवाज्यावरची नौबत झडली. पाठोपाठ परशरामपंत या संभाजीराजांच्या कारकुनांनी येऊन युवराजांना वर्दी दिली, "सिंदखेडहून जाधवराव आलेत. संगती मधल्या आक्कासाहेब गड चढून आल्या आहेत."

जाधवांकडे दिलेल्या संभाजीराजांच्या भगिनी राणूबाई आणि रुस्तुमराव जाधव लवाजम्यासह येऊन पालखी दरवाज्यात थांबले होते.

परशरामपंतांना हाताशी घेत संभाजीराजे त्यांच्या आगवानीसाठी पालखी दरवाज्यात आले. त्यांना बघताच रुस्तुमराव पुढे झाले. खांदाभेट पडली. मेण्यातून उतरलेल्या राणूबाईंचे दर्शन होताच संभाजीराजे हसत पुढे झाले. त्यांची पायधूळ घेता घेता म्हणाले, "आक्कासाहेब, थैली, खलिता नसता अचानक येणं झालं. आम्हास गड उतरून पाचाडी तुम्हास सामोरं येता आलं नाही."

"आगेवर्दी न देता माहेरी येण्यात कसलं सुख असतं ते तुम्हाला कसं कळणार बाळमहाराज." हसत राणूबाई म्हणाल्या. हातांची ओंजळ पसरून त्यांनी संभाजीराजांचा मुखडा प्रेमाने आपल्याकडे घेत त्यांच्या कपाळावर आपले ओठ टेकले.

राणूबाई शकुनाच्या पावलांनीच जशा रायगडी आल्या होत्या. कारण त्या आल्या नि चारच दिवसांत पन्हाळ्याहून निघालेला हरकारा रायगडावर आला. त्याने बातमी आणली – 'छत्रपती महाराज खासा येत आहेत!'

महाराजांची आगवानी करण्यासाठी आपल्या दिमतीच्या माणसांनिशी संभाजीराजे पाचाडात उतरले. दुसऱ्या दिवशी दुपार धरून प्रथम रामोशांचे टेहळे पथक पाचाडात शिरले. वळिवाचा माग देणारी गर्मी वाढली होती. वारा पडून होता.

तिसऱ्या प्रहराला पडला वारा एकाएकी अंगी आल्यासारखा घुमू लागला. धुळीचे खांब उठवू लागला. त्यातून घोडी फेकीत मोरोपंत, रघुनाथपंत, जनार्दनपंत, हंबीरराव, येसाजी, आनंदराव अशा असामींना पाठीशी घेतलेले महाराज पाचाडाच्या वेशीत घुसले. शिंगांच्या ललकाऱ्या उठल्या.

संभाजीराजांना सामोरे बघून महाराज पायउतार झाले. जहाली करीत मोतद्दारांनी आघाडीच्या घोड्यांचे कायदे पकडत जनावरे स्वारांपासून तोडली.

चौबाजूंनी बेलाग वाऱ्याने चौक भरला होता. फरफरत्या जाम्याचे भान नसलेले संभाजीराजे उधळलेल्या धुळीला बाजूस सारून नेमकी आपल्या महाराजसाहेबांची पायधूळ घेण्यासाठी पुढे झाले. ही फारा दिवसांवेरीची भेट होती.

संभाजीराजांना झुकू न देताच वरच्यावर घेत महाराजांनी ऊरभेट तिली. उजव्या हाताशी उभ्या असलेल्या रघुनाथपंत व जनार्दनपंत हणमंत्यांच्याकडे बघत महाराज म्हणाले, "यांना पारखलंत?"

"जी ..." संभाजीराजे घोटाळले.

ओळख पडत नव्हती. हे पाहून महाराज म्हणाले, "हे तुमच्या काकामहाराजांचे – एकोजीराजांचे – कर्नाटक-सुभा रघुनाथपंत हणमंते. त्यांना पारखे होऊन थोर मसलतीसाठी आमच्या भेटीस आलेत." डोळ्यांत शिरू बघणारे धूलिकण थोपविण्यासाठी पापण्या आक्रसत महाराज म्हणाले, "आणि हे त्यांचे बंधू जनार्दनपंत."

मस्तकी कर्नाटकी माटाची पगडी असलेल्या, भरदार रघुनाथपंतांनी व जनार्दनपंतांनी "जय व्यंकटेश. मुजरा युवराज" म्हणत हसून संभाजीराजांना अदब दिली.

"आबासाहेब, वारा उठलाय. वळिवाची मार धरणार. लवकर निघावं." संभाजीराजांनी आजारातून उठलेले महाराज भिजू नयेत म्हणून जहाली केली.

"चला." एका बाजूला रघुनाथपंत, जनार्दनपंत व दुसऱ्या हाताशी संभाजीराजे असे महाराज पाचाडच्या वाड्याचा रोख ठेवून चालू लागले. पाणथेंबांची चटचटती टपटप झाडांच्या पानावळीवर उठू लागली. तिच्याशी आणि घोंगावत्या वाऱ्याशी लग लागून राहिलेले महाराज चालता चालता म्हणाले, "शंभूराजे, या रघुनाथपंतांच्यासारखी माणसं दूर देशाहून येऊन राज्याच्या भल्याची मसलत रुजू घालतात ते बघितलं की सार्थक वाटतं आम्ही करतो त्या दौडीचं."

संभाजीराजांनी आत्यंतिक आदराने रघुनाथपंतांना न्याहाळले.

"महाराजसाहेब, सिंदखेडच्या आक्कासाहेब गडावर आल्या आहेत. संगती रुस्तमजी आहेत." संभाजीराजांनी वार्ता महाराजांच्या कानी घातली.

चालते महाराज ते ऐकताना थांबल्यासारखे झाले. राणूबाईंचा चेहरा त्यांच्या डोळ्यांसमोर तरळला. "कशा आहेत राणूबाई?" महाराजांनी विचारले.

"ब्येस दिसल्या." नात्यांचा जिव्हाळा शब्दांची मोरपिसे करून गेला.

सारे वाड्यावर आले. आणि थोड्याच अवकाशात सगळी पाचाडखोरी वळिवाच्या तडतड्या धारांनी कबजात घेतली. विजा कडकडू लागल्या. झाड-झाडोरा कुदणीला पडला. दिवस जसा डुबल्यासारखाच झाला. दुसऱ्या दिवशी सारे निथळलेला रायगड चढून आले. गडावरच्या इमारतींना झड्या आवळण्याचे काम चालू होते. गवताने गंजीखाने आणि धान्यडागांनी अंबारखाने आबादान केले जात होते.

स्फटिक शिवलिंगाची पूजा बांधून होताच महाराजांनी रुस्तुमजींना भेटीचे बलावू दिले. काहीतरी योजून आलेले रुस्तुमजी छत्रपतींच्या भेटीस रुजू झाले.

महाराजांनी त्यांचा, नात्यागोत्याचा हालहवाल पुसून घेतला. रुस्तुमजी अदबीने एका एका सवालाला बयाजवारीने जाब देत होते, पण ते काहीतरी मनचे बोलण्यासाठी भांगा शोधताहेत हे महाराजांनी ताडले. रुस्तुमजींना बोलते करण्यासाठी महाराजांनी जवळीक देत विचारले, "आम्ही आपले एकलेच हाल-हवाल विचारतो आहोत तुमची रुस्तुमजी! तुम्हास नाही वाटत आमच्या क्षेमकुशलाची वाजीपुजी करावी असे?"

रुस्तुमजी गोंधळून चमकले. नुसतेच "जीऽ" म्हणून घुटमळले.

त्यांच्याकडे हसून बघत महाराजांनी त्यांना बोलण्यासाठी धीर दिला... "बोलाऽ"

"जी – आम्ही एक मनसुबा धरून आलो आहेत."

"ते आम्ही केव्हाच जाणून आहोत. मूळ बोला."

काही क्षण शिवपिंडीवर घुटमळणाऱ्या अभिषेकजलाच्या थेंबासारखे घुटमळले.

"आम्ही... आम्ही युवराजांच्यासाठी सोयरिकीचे बोलणे लावण्यासाठी आलो आहोत!" रुस्तुमजींनी मन खोलले.

"रुस्तुमराव, मनसुबा ठीक आहे. तुमच्याशी फेर रक्तसंबंध येणे हे आम्हालाही रुजते पण तुमच्या या शब्दाचा निर्णय आम्ही उदईक देऊ. कसे?" येसूबाई आणि संभाजीराजे यांचा सासूद घेऊन मगच जाधवरावांना काय ते सांगावे असा निर्णय महाराजांनी मनोमन केला होता.

"जी. आमची घाई नाही." महाराजांचा 'उदईक' म्हणजे आशेला जागा या आनंदाने रुस्तुमराव बोलून गेले.

धाराऊने लगबगीने येऊन पुतळाबाईंच्या महाली असलेल्या येसूबाईंना खास वर्दी दिली – "थोरलं धनी येत्याहेत! तुमच्या भ्येटीसाटनं."

येसूबाईंना ते ऐकताना खरेच वाटले नाही. त्या हसून म्हणाल्या, "केवढी भलती थट्टा करता आऊ!"

"शंबू म्हादेवाची आन. धन्यांनी मला बलाऊन घिऊन सांगिटलं." नरड्याच्या घाटीवर चिमट ठेवीत धाराऊने वर्दीची शहानिशा दिली. येसूबाईंची मग मात्र तारांबळ उडाली. कपाळीचे कुंकूचिरे नेटके आहेत की नाहीत हे दर्पणात बघून घेतले पाहिजे या विचाराने त्या आतल्या दरुणी-दालनात जायला निघाल्या. जाताना त्यांना धाराऊने शपथ घेण्यासाठी भाबडेपणी बोललेला "शंबू" हा शब्द आठवून हसू आल्याशिवाय राहिले नाही!

महाली आलेल्या महाराजांना, जरीशालूचा पदरकाठ हाती धरून तिवार नमस्कार करताना येसूबाईंना "आबासाहेब आमच्या भेटीसाठी कसे?" हे कोडेच उकलेना.

"सौभाग्यवंत व्हा." असा त्यांना आशीर्वाद देणाऱ्या महाराजांनी त्या गोंधळल्या आहेत हे जाणले होते. त्यांना अधिक कोड्यात न ठेवता महाराजांनी आपल्या येण्याच्या कारणाला खुबीने तोंड फोडले – "तुम्हास आठवतं सूनबाई, आम्ही तुम्हाला शिक्केकट्यार सुपूर्द केली ते?"

काहीच अंदाज न लागलेल्या येसूबाईंची होकारी मान डुलली.

"आता गडावर सिंदखेडहून रुस्तुमजी आलेत – ते मात्र तुम्हास नुसतीच कट्यार सुपूर्द करू म्हणतात! आपली कराल?" महाराज हसत म्हणाले.

ते बोलणेच असे होते की, काही कळले नाही तरी येसूबाईंच्या तोंडून आदरापोटी "जी." ही होकारी साद सुटली.

"खरंच तुम्हाला बघितलं की आम्हाला आऊसाहेबांची याद येते!" पुन्हा येसूबाईंना न कळणारे महाराज बोलून गेले. त्याला मात्र सखोल कारण होते. त्यांचे त्यांनाच कळणारे.

"रुस्तुमजींनी युवराजांसाठी सोयरिकीचा शब्द आम्हाला टाकला आहे. त्यास तुमची संमती असेल तरच आम्ही त्यांना निर्णय देणार आहोत. बोला. ही जोखीम आपली कराल ? सावत्रपणाचा गुंता केवढा दाटणीला पडतो हे जाणता तुम्ही." बोलते महाराज सोयराबाईंच्या कटू आठवणीने थांबले.

उकरली जाणार नव्हतो तरी दगडी फरसबंदी पायाच्या अंगठ्याने उकरू बघणाऱ्या येसूबाईंची कानपाळी रसरसली. "गडाचा पायथा धरून वाहणाऱ्या काळनदीच्या पात्रावरून एक भला मोठा केसरी टोप वाहतीला लागला आहे. हात पसरून थोपवावं म्हटलं तरी आमचे हातच तेथवर पोचत नाहीत!" या विचाराने येसूबाई क्षणभर भांबावल्या. साक्षात थोरल्या मासाहेबच जणू शेजारी उभ्या राहून आपल्या खांद्यावर हळुवार हात ठेवीत बोलताहेत तसे त्यांना वाटले, "ही भोसल्यांची माणसं पदरी घेणं म्हणजे साक्षात जगदंबेचा पोतच पदरी घेणं आहे! त्यासाठी तिच्याकडूनच आभाळाएवढा पदर घ्या मागून!"

येसूबाईंना गुमान बघून महाराजांना वाटले, त्यांना ते सारे पसंत नसावे. "येतो आम्ही." म्हणत ते जायला वळलेही.

"आबासाहेबांनी आमचं नाही ऐकलं. सिंदखेडकरांनी टाकल्या शब्दास आम्ही मनखुषीनं राजी आहोत." अभिषेक घेणाऱ्या भवानीच्या ओठांवरून दुधाचे थेंब टपकावेत तसे येसूबाईंच्या तोंडून शांत बोल सुटले.

जात्या महाराजांचे पाय, ते ऐकताना अडखळल्यासारखे झाले. वळून त्यांना येसूबाईंना पुन्हा म्हणावेसे वाटले, "तुम्हास बघितलं की आम्हाला आऊसाहेबांचीच याद येते. कारण ... कारण त्याही अशाच होत्या. आमच्या महाराजसाहेबांनी बेंगळुरी दुसरा ठाव केला. मातोश्री तुकाबाईसाहेबांशी. पण ... पण आमच्या मासाहेब कधी शब्दानंसुद्धा त्यांच्याबद्दल तकरारीनं आमच्याकडे बोलल्या नाहीत."

महालाबाहेर पडणाऱ्या, पित्याचीच माया देणाऱ्या महाराजांना येसूबाईंना सांगावंसं वाटत होतं, "आबासाहेब, सिंदखेडकरांनी शब्द टाकलेली कट्यार सोन्याची की कसली त्याचं आम्हास काही नाही. पण ... पण ... आपण पदरी घालू कराल तर ... तर तावते निखारेही आम्ही हसत आपलेसे करू! आभाळाएवढा पदर करून!"

साहेबवाड्यावर आलेल्या महाराजांनी लगोलग संभाजीराजांना सदरेवर बोलावून घेतले. जसे येसूबाईंना विचारले तसे मात्र त्यांनी संभाजीराजांना नाही विचारले.

समोर अदब धरून उभ्या असलेल्या संभाजीराजांना बघताना मथुरेत भगवी छाटी घातलेल्या बाळसंन्याशाचे रूप त्यांच्या मनात तरळून गेले. स्वतःलाच समजावीत ते मनोमन बोलून गेले. "केवढे वाढीवर पडले हे! किती बघितलं यांनी! इच्छा नसता पडल्या पेचाची उकल करण्यासाठी यांना कैकवार भरीला घालणं पडलं. जोवर मासाहेब होत्या तोवर यांना भरीला घालताना त्या मायेपोटी विरोध करीत आल्या."

"राजे" महाराजांनी कसे बोलावे ते बांधून घेत तोंड फोडले, "तुम्ही काव्य बांधता, आम्ही मात्र एक चालतेबोलते काव्य तुम्हास बक्षावे म्हणतो!" महाराज थांबले.

"...." संभाजीराजे गोंधळात पडले.

"कवींना जसे हाताशी एकास दुसरे कलम लागते तसे हयातीला एकास दुसरे जिवाचे माणूसही लागते! रुस्तुमजींनी तुमच्यासाठी सोयरीक आणली आहे. आम्ही जाधवांशी फेर घरोबा बांधावा म्हणतो."

"पण ..." लेण्यातील, पायी 'नूपुर' असलेली स्त्रीमूर्ती आणि थाळ्यासारखा गौरवर्णी मुखडा समोर उभा ठाकलेले संभाजीराजे येसूबाईंच्या आठवणीने चाचरले.

"कळलं आम्हास! सूनबाईंना भेटूनच आलो आहोत आम्ही. त्या राजी आहेत. तुमचं बोला." संभाजीराजे जखडबंद झाले. त्यांना काय बोलावे सुधरेना.

"म्हणजे तुम्ही याला राजी नाही असंच मानावं आम्ही?" महाराजांनी त्यांना पुरतेच खोड्यात घातले.

"नाही ... तसं आम्हाला नव्हतं म्हणायचं."

"तुम्ही काहीच म्हटलेलं नाही, मतलब ?"

"महाराजसाहेब करतील ते आम्हास आज्ञाप्रमाण आहे!"

"'आज्ञाप्रमाण' म्हणजे आमची आज्ञा झाली तसं तुम्हाला हे मान्य आहे असं होतं. आम्ही तुम्हाला आज्ञा केली नाही!" राजांना निकोप होकार संभाजीराजांच्या तोंडून वदवून घ्यायचा होता. संभाजीराजांनी तो दिला.

"जी. आम्ही मनखुषीनं राजी आहोत!"

साहेबसदर सोडून बाहेर पडणाऱ्या संभाजीराजांना एका विचाराने चुकल्यासारखे वाटले, "छेऽ, या बाबीचा तरी सल्ला पुसायला आज खरोखर थोरल्या आऊसाहेब पाहिजे होत्या!" आणि पाचाडच्या सदरेवरची घाट निसूर होती तरी त्यांना उगाच तिचे टोल कानी पडल्यासारखेच वाटले!

महाराजांचा निरोप घेतलेले रुस्तुमजी रायगड सोडून आपल्या वतनावर निघाले. राणूबाई रायगडीच राहिल्या. पंधरवडा परतला आणि हत्यारबंद धारकऱ्यांनी भवती शिस्त धरलेला एक मेणा संगती घेऊन रुस्तुमजी रायगडावर परतले.

संभाजीराजांच्या दुसऱ्या विवाहासाठी साखरपुड्याची बैठक खासेवाड्यावर बसली. जाधवरावांनी आणलेली मुलगी जरीकळीचा शालू लेवून बैठकीसमोर पेश आली. बसल्या जाणत्यांना रिवाजाचा तिपेडी नमस्कार घालून ती अदबीने उभी राहिली.

भोसल्यांचा जनाना तिचे देखणेपण बघतच राहिला. पुतळाबाई, सगुणाबाई, सकवारबाई सातमहालाकडची सगळी खाशी मंडळी त्या बैठकीत होती. नव्हत्या फक्त सोयराबाईसाहेब! त्यांचे अंग एकाएकी कशाने तरी धरले होते!

येसूबाईंना तर समोरची 'सोनकट्यार' निरखताना वाटले, "जी आम्हास काही लागी पडत नाहीत ती स्वारींची कवनं यांना नक्कीच समजतील! आबासाहेब म्हणाले तशाच आहेत या ... कट्यारीगत! सोनकट्यारीगत. पण ..."

समोर उभ्या असलेल्या, होऊ घातलेल्या आपल्या हिस्सेकरी स्त्रीमधील एकच बाब येसूबाईंना खटकली. जशी थोरल्या आत्यासाहेबांच्या गोऱ्यापान पायांवर असते तशीच रेखलेली आळत्याची नक्षी याही पायांवर दिसत होती! गुंतवळ असलेली!

"सारं पार पडताच जेव्हा या आमच्या भेटीस येतील तेव्हा कसं सांगावं यांना ... ही आळत्याची नक्ष तेवढी नका रेखत जाऊ पायांवर!" या विचारात येसूबाई गेल्या.

मुलगी बैठकीला एकमुखी पसंत पडली. तिच्या हनुवटीखाली तर्जनी देऊन 'मुली' म्हणत महाराजांनी तिचा मुखडा उचलता घेतला. आणि म्हटले,

मासाहेबांच्या आणि बसल्या सदरेच्या साक्षीनं ही सिंदखेडकर जाधवांची कन्या आम्ही आमचे फर्जंद युवराज संभाजीराजे यांच्यासाठी सोयरिकीस पक्की केली असे."

पुतळाबाईंनी त्या मुलीचा मळवट भरला. साखरपुडा पक्का झाला. धर्मखात्याकडच्या राजोपाध्यांनी पंचांगाचा मेळ घालून अक्षय तृतीयेचा मुहूर्त शोधून काढला.

ठरल्या दिवशी, गोरज मुहूर्त धरून शाही इतमामात विवाह-समारंभ पार पडला. नव्या सूनबाईंचे नाव ठेवण्यात आले दुर्गाबाई. अष्टनायिकांवरचे काव्य बांधू बघणाऱ्या संभाजीराजांच्या जीवनात दुसऱ्या नायिकेने प्रवेश केला!

संभाजीराजांचा 'नायिकाभेद' काव्यखंड बांधून पुरा झाला. त्या काव्याचे श्लोक मनी घोळणारे युवराज महाली आले. समोर येसूबाईंना बघताच अष्टनायिकांचे वर्णन करणारे उभे काव्य त्यांच्या मनी फेर टाकून गेले. येसूबाई दरुणी-दालनाच्या रोखाने जायला निघालेल्या बघून "थांबा" म्हणत संभाजीराजांनी त्यांना रोखते केले. एकामागून एक अशा काव्यातील अष्टनायिका त्यांच्या डोळ्यांसमोर तरळून गेल्या. रोखल्या नजरेने ते येसूबाईंच्याकडे नुसते बघत राहिले. साऱ्या नायिका एकत्र केल्या तरी त्यांची सांगड त्यांना येसूबाईंशी काही घालता येईना!

स्वारी अशी जोडल्या डोळ्यांनी काही न बोलता नुसतीच काय बघते आहे ते येसूबाईंना कळेना. त्या लाजून गेल्या होत्या.

"आम्ही एक काव्य बांधलं आहे. अष्टनायिकांचे भेद सांगणारं 'नायिकाभेद' नावाचं. त्या अष्टप्रकारांपैकी कुठल्यात तुम्ही बसता हे ताडून बघत होतो आम्ही." संभाजीराजांनी त्यांना अधिकच गोंधळात टाकले.

पुढचे ऐकायला येसूबाईंची कानपाळी लालावली. टप्पोऱ्या डोळ्यांवरच्या पापण्यांच्या चवऱ्या नुसत्याच फडफडल्या. संभाजीराजे हसले आणि म्हणाले,

"पण ... पण आम्ही बांधलेल्या नायिकांच्या कुठल्याच प्रकारात तुम्ही नाही बसत. तुम्ही सामने आला की वाटतं पाजळता पोतच आला आहे! अशी 'पोतनायिका' ना केशव पंडितांना, ना कवी कुलेशांना, ना आम्हाला काव्यशास्त्रात आढळली!"

ते ऐकताना येसूबाई अंगभर मोहरल्या. आता त्यांना समोर उभे राहणेच अवघड पडले. दरुणी दालनाच्या दिशेने त्या लगबगीने निघून गेल्या.

स्वत:वरच खुषीला पडलेले संभाजीराजे एकटेच महाली फेर टाकीत राहिले.

फुलपरडी घेतली धाराऊ आली. संभाजीराजांना बघून हसत म्हणाली, "धाकलं, तुमी हतं हाईसा व्हय! तकडं खंडूजीनं धुंडोळा मांडलाय न्हवं. धन्यानी याद क्येलंया तुमास्नी."

तिचे बोलणे ऐकताना संभाजीराजे तिच्या कपाळभरचे गोंदणाचे हिरवे व्रण निरखत हसले. धाराऊला ते हसणे नेहमीचे वाटले ... पण ते तसे नव्हते.

'धाराऊची ही कुणबाऊ बोली कशी गावरान मायेनं भरलेली आहे. हिला बोलताना बघितलं की, भाताचं हिरवंगार चोंडकंच मावळवाऱ्यावर सळसळतं आहे असं वाटतं! कोशिस केली तरी आम्हाला नाही असं बोलता येणार!' या विचाराने ते हसले होते. महादरवाज्यात भाताचे मुटके ओवाळून टाकणारी, 'ध्येवा' म्हणत गूळखोबऱ्याचा प्रसाद हातावर ठेवणारी, बोलण्यापूर्वी 'धाकलं' म्हणून खिनभर खोळंबणारी अशी धाराऊची अनेक रूपे मनाशी घोळवीत संभाजीराजे महाराजांच्या साहेबवाड्याच्या बैठकी दालनात रुजू झाले. अदब देऊन महाराज काय बोलतील याचा अजमास घेत खडे राहिले.

"तुमचा जनाना वाढला. जोखीम वाढली हे रास्त. पण दिवसाच्या दोन वेळच्या मुजऱ्याखेरीज आमच्या भेटीस तुम्ही आला नाहीत युवराज!" महाराजांनी त्यांना बोलते करण्यासाठी मोर्चा धरला.

"जी ... आम्ही ..."

"कसल्या बेतात होतात?"

"आम्ही ... आम्ही एका काव्याच्या बांधणीत होतो."

"अस्सं? ठीक केलंत तुम्ही. कसलं काव्य बांधलंत? रामायणावरचं? महाभारतावरचं?"

"..." गडबडलेल्या संभाजीराजांनी गुमान धरला.

"सबूर झालात? आम्हास काव्य बांधता येत नाही. पण विश्वास ठेवा जाणता येतं!" क्वचित पसरणारी हास्याची मिस्किल लकेर महाराजांच्या ओठांवर पसरली.

"तसं नाही आबासाहेब ..." मान डुलवीत संभाजीराजांनी जहाली केली.

"मग?" महाराजांनी छोट्या शब्दानेसुद्धा मूळ धरले.

"आम्ही ... आम्ही अष्टनायिकांचे स्वभावीभेद सांगणारं काव्य बांधलं आहे. 'नायिकाभेद' म्हणून."

" अष्टनायिका ? स्वभावी भेद ! " ते शब्द कानांवर पडताच महाराज मनाने कुठेतरी दूरवर गेल्यासारखे झाले. काही न बोलता पाठीशी हात गुंफून फेर टाकू लागले. एक निळे-सावळे मोरपीस त्यांच्या मनात फडफडले ! वळिवाच्या सुंसाट वाऱ्याच्या धारेत साप्डल्यासारखे फरफटत म्हणता म्हणता पार डोंगरकडापल्याड निघूनही गेले. त्यांचा त्यांनाच जाणवावासा एक हलका सुस्कारा सुटला. छातीवरच्या माळेशी गूढ कुजबुजून तोही मुरून गेला ... ' यांचा दुसरा बाशिंग योग बघताना केवढ्या सुखदिल झाल्या असता तुम्ही ! हे काव्य बांधतात ... आम्हाला ते साधत नाही. हे काही न बोलता पण नजरेच्या एका फेकीनं तुम्ही आम्हाला सुनावलं असतंत ! ' सईबाईंच्या आठवणीने महाराजांची पाठीशी बांधलेली गुंफणीतील बोटे चाळवली गेली.

आपला काव्याचा विषय महाराजांना पसंत पडला नसावा या गैरसमजाने संभाजीराजे मात्र शरमिंदे झाले ! खालच्या मानेने बोलून गेले, " चुकलं आमचं, हा विषय बांधण्यात ! " संभाजीराजांची नजर फेर टाकणाऱ्या महाराजांच्या अनवाण्या पायांबरोबर लटकत राहिली.

ते फिरते थोर पाय थांबले. संभाजीराजांच्या जवळ आले. आजानुबाहूचा तळहात हळुवार युवराजांच्या खांद्यावर चढला.

" शंभूऽ, केवढे भाग्यवान आहात तुम्ही ! काव्य केवळ जाणता येऊन काय कामाचं ? ते बांधताच आलं पाहिजे ! काही चुकलं नाही तुमचं. जगदंबेनं ही देणगी तुम्हास बहाल केली आहे. ती कारणी लावून गागाभट्टांनी केलं तसं कारभारी करण्याच्या चोखपणाचं वर्णन करणारं काव्य बांधून घ्या."

कळायला कठीण असलेल्या आपल्या महाराजसाहेबांच्या डोळ्यांत अभिमानी नजरेने झेप घेऊन संभाजीराजांनी त्यांचा ठाव घेण्याचा यत्न केला. त्यांना ते डोळे गंगासागरासारखे वाटले. त्यात गंगेचे साफपण होते. सागराचा बेमर्याद पसारा होता.

काही तरी शोधत असल्यासारख्या महाराजांच्या पापण्या आक्रसल्या. बाहुल्यांचे तेजाळ पुखर त्यातूनही उठून दिसत होते. " तुम्हास आठवतं ? " महाराजांचा आवाज पालटत घोगरट झाला होता.

" काय ? "

" समर्थांनी आम्हास लिहिलेलं पत्र ऐकून तुम्ही एक मागणं आमच्याकडं घातलं होतंत. आऊसाहेबांच्या संबंधानं असं काही लिहावयास आम्ही समर्थांना सांगावं म्हणून. साक्षात समर्थांपाशीही तुम्ही शिवथर घळीच्या भेटीत या भातेनं मागणं घातलं होतंत शंभूऽ ..."

" जी."

" तुम्ही ... तुम्हीच का नाही आऊसाहेबांच्यावर एखादं साजरं काव्य बांधीत ? "

" आबाऽ " संभाजीराजांनी अस्फुट साद घालीत नजर त्यांच्या पायांवर टाकली.

" काय झालं ? " त्यांच्या मुद्रवरचे पालटलेले भाव बघताना महाराज चरकले.

" आम्ही ती कोशिस कैकवार करून बघितली. हाती पीस धरून आऊसाहेबांचं रूप आठवू लागलो की आमच्या देहामनाचंच पीस होऊन जातं. ' शंभूऽ शंभूऽ ' एवढेच साद घातल्यासारखे बोल कानी घुमत राहतात. मग समोरच्या कागदावर आमच्या हातून फक्त ' जगदंब, जगदंब ' एवढेच शब्द एकसरीनं लिहिले जातात. ते– तेच आम्हाला काव्यासारखे वाटू लागतात. पिसाची चाल खुंटून पडते."

' ठणऽ ठणऽ ठणऽ ' पाचाडच्या सदरेवर घाटवाल्याने ठरल्या रिवाजाप्रमाणे उठविलेले टोल वाऱ्यावर स्वार होऊन रायगडाच्या निळ्या चढणीवर नातेबंधनाचे गूढ काव्य रेखीत महालात येऊन घुसले !

" युवराज, जैसे स्वीया नायिकाके अष्टभेद काव्यशास्त्रमें मानते हैं, वैसे नायकके भी चार स्वभावी भेद विख्यात हैं." संभाजीराजांनी घातलेल्या सवालाला कवी कुलेश उत्तर देत होते.

संभाजीराजे आणि कवी कुलेश यांचे काव्यावरचे संभाषण पावसाळी वातावरण धरून रंगात आले होते. युवराजवाड्याची सदर धरून. खंडोजी बल्लाळ, रायाजी, अंतोजी अशी मंडळी खडी होती.

महाराज आपल्या साहेबवाड्यात रघुनाथपंत हणमंते, हंबीरराव, आण्णाजी, दत्ताजीपंत, येसाजी यांच्याशी कसल्यातरी खलबतात बसले होते.

" नायकांचे कोणते चार स्वभावी भेद मानतं शास्त्र कविराज ? " उत्सुकल्या संभाजीराजांनी कुलेशांना विचारले.

" धीरललित, धीरोदात्त, धीरप्रशांत और धीरोद्धत ऐसे चार भेद हैं युवराज। कलाप्रिय, मृदु सुभाववाले, सौदर्यप्रिय वीर पुरुषको ' धीरललित ' नायक माना जाता है। क्षमाशील, बलवान, दानशूर और अपने गुणोंका अभिमान कभी प्रकट नही करनेवाले शूर पुरुषोत्तमको ' धीरोदात्त ' कहते हैं। पुण्यवान, संयमी, सात्त्विक, चारित्र्यसंपन्न, दयावान, समस्त लोगोंको आश्रयस्थान लगनेवाला, इंद्रपराक्रमी पुरुषश्रेष्ठ ' धीरप्रशांत ' नामसे विख्यात है। मायावी बोलनेवाला, चंचल सुभावका, अभिमानी, आत्मगौरवकी भाषा करनेवाला, प्रचंड सामर्थ्यशाली पुरुष ' धीरोद्धत ' माना जाता है शास्त्रमें। " कवी कुलेश बोलत राहिले.

संभाजीराजांनी कानांवर पडलेल्या ' धीरप्रशांत ' नायकाची लक्षणे महाराजांच्याशी मनोमन ताडून बघितली. त्यांना समाधान वाटले.

' धीरोद्धत ' या इतर तिन्ही नायकांहून भिन्न प्रकारावर ते काही बोलायला लागणार एवढ्यात पाऊसधारांची सरसर तोडीत असलेला अस्पष्ट कालवा त्यांच्या कानी पडला. कसलीतरी धावाधाव चालली होती. गडाच्या आठरा कारखान्यांतील माणूस पालखी दरवाज्याच्या रोखाने चटक्या पावलाने निघालेले होते. दबके ... कुजबुजते अस्पष्ट बोल संभाजीराजांच्या कानांवर पडू लागले.

"कवा ? पार भिजल्यात ... वळखाय न्हाई येत. काय दशा जाली ही !"

कुणालाच काही बोध होईना. बाहेर बालेकिल्लाभर कसलीतरी गडबड माजली होती. "काय झाले ?" संभाजीराजांच्या कपाळी विचाराने आठ्या चढल्या. पाठोपाठ कारभारी महादेव यमाजी उपरणे सावरीत लगबगीने सदर बैठकीत घुसले.

"सरकार, सरलष्कर गड चढून आलेत." सांगायचे ते नीट बांधता न आल्याने मुजरा देत ते अर्थबोध न होणारे काही बोलून गेले.

"मतलब ?" संभाजीराजांनी त्यांना येसाजी, हंबीरराव गडावरच आहेत याची जाण देण्यासाठी दुरुस्त केले.

"आपले सरलष्कर नव्हे स्वामी... त्यांचे... मोगलाईकडचे. ने... नेताजीराव...!"

"कारभारीऽ! काय म्हणता ? नेताजीकाका ? गडावर ?" विस्फारल्या डोळ्यांनी झटका बसल्यासारखे संभाजीराजे बैठकीवरून ताडकन् उठले.

रजपूत मिर्झाराजाचा शामियाना, काळ्याबाळ्या धूनळीचा मोगली हुक्का, रंजुकी निखारा, किल्ले पुरंधर, कितीतरी गोष्टी संभाजीराजांच्या मनात क्षणभरात सरसरून गेल्या. दूरवर पेटलेल्या तोफांचे क्षीण-सुमार बार ऐकू यावेत तसे त्यांचे त्यांनाच न कळणारे, कुठे, कधी ऐकले न आठवणारे बोल ढवळून काढू लागले. "मानूस जिथं उपजतं ती जागा साद घालती मानसाला धाकलं राजं!"

युवराजवाड्याची सदर सोडून संभाजीराजे थेट पालखी दरवाज्याच्या रोखाने चालू लागले. जमली मंडळी त्यांच्या मागाने आपसुख खेचल्यासारखी चालली.

एव्हाना महमद कुलीखान ऊर्फ नेताजी पालकर आणखी दोन असामींसह बालेकिल्ल्याच्या हमचौकात आला होता. त्या तिघांच्याही अंगावर मोगली पेहराव होते. पावसाच्या मारगिरीने ते चिंब पेहराव त्यांच्या अंगांना चिकटले होते.

महमद कुलीखानाने खालगर्दनीने, गुपचूपपणे गड चढून येण्याचा प्रयत्न केला होता. पण पूर्वील मर्दान्या सरलष्कर नेताजी पालकरांना आपली 'चाल' पालटता आली नव्हती. गडावरच्या जाणत्यांनी त्यांना महादरवाज्यातच ओळखले होते. पावसाळी वाऱ्यासारखी ती बातमी सपकारा टाकीत गडभर पसरली होती.

हमचौकातील चौतर्फाच्या इमारतींच्या सदरी माणसांनी हां हां म्हणता दाटून गेल्या. पावसाची तुटकी सर, पडलेल्या गर्दनीवरच्या मोगली किमॉशावर घेत महमद कुलीखान दोन असामींच्यामध्ये हमचौकात उभा होता. अंगावर पडणाऱ्या पाणधारांनी त्याच्या उरातील डोंब विझवण्याऐवजी भडकून उठत होता. कोरल्या दाढीवरून घरंगळणाऱ्या पाणथेंबात त्याच्या डोळ्यांतून सुटलेले कडकडीत अश्रुथेंब मिसळत होते. फरसबंदीवर पडून सभोवती फिरविलेल्या पाटातील गढूळ पाण्यात सामील होत होते. एवढी माणसे गर्दी करून चौअंगाने दाटली होती. पण ... पण एकाचीही छाती नव्हती, 'कुलीखान' झालेल्या नेताजींशी शब्दानं बोलण्याची.

एकेकाळी राजगडाचा शिरपेच असलेला नेताजी, कुलीखान म्हणून पायपोसासारखा भिजत बालेकिल्ल्याच्या हमचौकात उभा होता. त्याला बघून जमले एकजात माणूस हळहळत होते.

महमदाच्या दोन्ही हातांशी असलेल्या दोघा असामींपैकी एकट्याने त्याच्या कानाशी होत काहीतरी त्याला सांगितले. आणि ते दोघे त्याला एकटा सोडून महाराजांच्या वाड्याच्या रोखाने चालू लागले. ते दोघे वाईचे कुलकर्णी होते. महाराजांच्या खबरगीर पथकातील निष्णात खबरगीर होते. मराठी मुलूख सोडून नेताजीचा काबूल-कंदाहारपर्यंत त्यांनी शिताफीने पाठलाग केला होता. वेळोवेळी, मुसलमान झालेल्या नेताजीवर टेहळ ठेवून त्याच्या खबरा महाराजांना त्यांनी पावत्या केल्या होत्या.

काबूल-कंदाहारच्या, औरंगजेबाने नेमून दिलेल्या मोहिमेत असताना कुलीखान शरम, खंत, अवमान यांनी पेटून उठला होता. त्याने मोगली तळ सोडून पळून जाण्याचा यत्न केला, पण त्याला पकडण्यात आले. आणि काढण्या घालून लाहोरला रवाना करण्यात आले. लाहोरच्या सुभेदाराने 'कमिने' म्हणत हबशाकरवी या महमदाच्या पाठीवर भर चौकात कोरडे उतरविले होते!

मुसलमान झालेला हा मराठ्यांचा सरलष्कर रोज रात्री डेऱ्यात पाठ टेकताना सवयीने की स्वत:ला धीर येण्यासाठी पण 'शिवऽ शिवऽ' म्हणत होता! त्या 'शिव शिव' बरोबर त्याला एक बाकदार नाक, आणि दोन तेजाळ डोळे समोर दिसत होते. रात्र रात्र तो बिछायतीवर तळमळून काढत होता. ह्या साऱ्या खबरा या वाईच्या कुलकर्ण्यांनी महाराजांना दिल्या होत्या. महाराजांच्या सूचनेप्रमाणे आग्र्याजवळ हे कुलकर्णी कुलीखानासमोर प्रकट झाले होते. "महाराज थोर मनाचे. सारे पोटी घालतील. जाऊन पाया मिठी घातली पाहिजे. लावले रोप जपले पाहिजे. त्यावर हत्यार धरणे शहाणपणाचे नाही." असे कुलीखानाला नाना प्रकारे समजावून, पुढे घालून ते वाईचे कुलकर्णी रायगडी घेऊन आले होते. हे योग्य वेळी घडले होते. कारण औरंगजेबाने कुलीखानालाच दख्खनेवर चाल घेण्याचा हुक्म दिला होता. मोठा अकलेचा विचार करून **महमद** खान रायगडी आला होता. पुरत्या दहा वर्षांनंतर!

सदरकरी असामी पाठीशी घेतलेले, झपाझप चालणारे संभाजीराजे हमचौकाच्या बगलेला असलेल्या दगडी कठड्यावर आले. भोवतीच्या साऱ्या पगड्या मुजऱ्यासाठी झुकल्या पण त्यांचे लक्ष कुणाकडेच नव्हते. हमचौकात उभ्या राहिलेल्या नेताजींना बघताच त्यांचेच पाय साखळदंड पडल्यासारखे खिळून गेले.

"धाकल्या मासाहेबांचे हे नातलग! काय झालं हे! मर्दान्याची माती! हे नेताजीकाका ? छेऽ, मरणसुद्धा यापरीस गोमटं दिसलं असतं!" संभाजीराजांच्या काळजात कालवाकालव माजली.

"मानूस जिथं उपाजतं ती जागा साद घालती मानसाला." विचाराबरोबर

संभाजीराजांच्या नेत्रकडा दाटल्या. त्यांनी महादेव यमाजींना आज्ञा केली, "कारभारी, आसवाबाचे एक तबक सिद्ध करा."

आसवाब कुणासाठी असावेत हे महादेव यमाजींनी हेरले. "जी" म्हणत ते मागल्या पावली तबक आणण्यासाठी परतले.

संथ चालीने संभाजीराजे महमद कुलीखानाच्या सामने आले. गर्दन खाली टाकलेल्या कुलीखानाला फक्त त्यांच्या पायीच्या बाकदार; भगव्या मोजड्या तेवढ्या दिसल्या. साक्षात महाराजच समोर आहेत या गैरसमजाने तो अंगभर थरारला! त्याच्या डुयीचा मोगली किमॉश क्षणभर डावा, उजवा डुलला. पाणथेंब उडाले.

गद्‌गदता उमाळा उरात कोंडत महमद कुलीखान पायमिठी घालण्यासाठी पुढे झाला! झटकन् झुकून संभाजीराजांनी त्याचे हात वरच्या वर झेलले. त्यांच्या तोंडून नकळत हलके शब्द सुटले, "नेताऽजी काऽका!"

चमकलेल्या कुलीखानाने मान वर घेतली. लवभर त्याची कोरलेली दाढी थरथरली. "हे कोण?" आणि फरीसारखी गोल, पुष्ट मुद्रा व तेच पोतासारखे, आगफेकी, तेजाळ डोळे बघून महमदाने ओळखले – "हे धाकलंऽ राजं! हे उपाजले त्या वक्ती किल्ले पुरंधराचे किल्लेदार हुतो आमी! धावत्या पायांनी जाऊन तोफखान्याकडच्या गोलंदाजांना बत्ती द्याया सांगितली हुती आमी – तवा... तवा मासाब हुत्या! मासाऽ ब...? आता त्ये पाय दिसायचं न्हाईत! काय झालं हे? रजपुताच्या गोटात या धाकल्या राजांच्या पाठीशी गेलो हुतो. केवढी निधडी छाती यांची! नंग्या हत्यारानं यांच्या डेऱ्यावर पहारा देत रात्र जागविताना कऱ्हेप्ठारावर मनात काहीबाही यायचं. हे मात्र बिनघोर सुख झाल्यालं असायचं डेऱ्यात.

"यांचं... यांचं पायसुद्धा धरायची लायकी न्हाई आमची. कशापायी गड चढून आलो ह्यो विटाळ घालायला? परतावं." गलगललेला महमद वळता व्हायला निघाला.

संभाजीराजांनी झटकन् त्याचा हात हातात घेतला आणि त्याला नुसती नजर दिली. धरल्या हाताने त्याला संगती घेऊन ते शांतपणे पायऱ्या चढून कठड्यावर आले. जमलेल्या मावळमाणसांच्या बाराबंद्यांचा ताण ते बघताना सुमार झाला.

महादेव यमाजींनी आणलेल्या तबकाकडे हातरोख देत संभाजीराजे कुलीखानाला म्हणाले, "अगोदर पेहराव बदलून घ्या. बिनघोर असा."

कुलीखानाला आपल्या असामींच्या सुपूर्द करून संभाजीराजे सातमहालाच्या रोखाने चालू लागले. रायाजी त्यांच्या पाठीशी झाला. सातमहालातील सगुणाबाईसाहेबांच्या महालासमोर ते आल्याची वर्दी रायाजीने आत पोच केली.

"नेताजीकाका आले." ही वार्ता मासाहेबांच्या कानी घालण्यासाठी संभाजीराजे महालात प्रवेशले. गडावर कसलीतरी गडबड चालली आहे एवढाच अंदाज लागलेल्या सगुणाबाई समोर उभ्या होत्या.

युवराजांनी त्यांना नेहमीची अदब दिली. आणि आता त्यांना कळून चुकले की, घडले ते मासाहेबांच्या कानी घालताना शब्द साथ देत नाहीत.

"मासाहेब, ते आलेत." संभाजीराजांना बांधणी साधेना. आजवर त्यांनी वा सगुणाबाईंनी जाणीवपूर्वक कधी नेताजींचा विषय बोलण्यात आणला नव्हता.

"कोण?" सगुणाबाईंच्या कपाळीचे कुंकूपट्टे वर चढले.

"महम... नेताजीकाकाऽ!" घसरते बोलणे संभाजीराजांनी सावरले.

"काय म्हणता!" प्राजक्ताचे फुलार झाड खुलून दिसावे तशी सगुणाबाईंची गोल चर्या उजळून उठली. पण क्षणभरच. दुसऱ्याच क्षणी त्या राजस्त्रीच्या चर्येवर असंख्य वेदनांचे जाळेच जाळे दाटून आले. ते संभाजीराजांनी बघू नये म्हणून त्या त्यांना पाठमोऱ्या झाल्या. नेताजीराव सगुणाबाईंचे सख्खे काका होते.

"येतो आम्ही." संभाजीराजांनाही काय नि कसे बोलावे ते सुचले नाही.

सगुणाबाईंच्या महालाबाहेर पडणाऱ्या संभाजीराजांच्या मनात कवी कुलेशांनी सांगितलेल्या त्या चतुर्थ नायकांपैकी 'धीरोद्धत' नायकाची लक्षणे कारण नसता डोकावून गेली. "चंचल स्वभावाच्या, आत्मगौरवी, मायावी पण सामर्थ्यशाली पुरुषाला 'धीरोद्धत नायक' मानतं काव्यशास्त्र!"

वाईकर कुलकर्ण्यांनी महमद कुलीखानास छत्रपती महाराजांच्यासमोर रुजू घातले. मोठ्या मनी महाराजांनी मराठ्यांच्या वाट चुकल्या सरलष्कराला धर्माच्या गोतावळ्यात घेण्याचा निर्णय केला. आपल्या मंत्रिमंडळाची त्याला संमती घेतली.

नासिकला थैलीस्वार धाडून अनंतभट्टांना पाचारण करण्यात आलं. त्यांनी व गडाचे राजोपाध्ये प्रभाकर भट्ट यांनी शुद्धीकरणाचा मुहूर्त काढला. आषाढ वद्य चतुर्थीचा. धर्मकल्पनांना जबरदस्त कलाटणी देणारा हा भारतवर्षातील पहिला विधी होता. जबरीने धर्मांतरित केलेल्या हिंदुधर्मीयांना अजवर परतीच्या वाटा बंदच होत्या. रायगडाच्या सुवर्णी सिंहासनाला साक्ष ठेवून छत्रपती महाराज शास्त्रोक्त पद्धतीने त्या खुल्या करून देणार होते! साऱ्या गडभर या विधीचीच चर्चा चालू झाली.

लोहार मेटावरचे लोहार मात्र 'शाऽशू' करीत घण उतरवून हत्यारांची शेकडो पाती घडवीत होते. त्यावर नजर टाकण्याचा शब्द महाराजांनी संभाजीराजांना टाकला होता. कोंडाजी फर्जंद, रूपाजी भोसला, खंडोजी बल्लाळ, रायाजी, अंतोजी ही मंडळी आता युवराजांच्या दिमतीला असल्यासारखी झाली होती. त्यांना पाठीशी घेऊन संभाजीराजे लोहार कारखान्यावर आले. इथे दहा-दहाच्या हारीने आमनेसामने असे थोराड भाते फुरफुरत पेटले होते. निखाऱ्यावरची लालेलाल पाती सांडशीने उचलून कारागीर लोहार, घणकऱ्याला नुसत्या हुंकाराने घण कसा अचूक उतरावा याची लग देत होते. घडलेल्या, पाणी द्यायच्या, काळसर, निळपट हत्यारांच्या बनावटीप्रमाणे धोप, फिरंग, बाकी, पठाणी अशा कलमवार राशी घालण्यात आल्या होत्या.

संभाजीराजांना बघताच कामात गढलेले, घामेघूम लोहार घण-सांडस थोपवून अदब द्यायला धडपडू लागले. हातपंजा उठवून त्यांना नुसत्या इशारतीवर काम चालू ठेवायला सुचवीत संभाजीराजे कलमवार घातलेल्या हत्यारांच्या राशीजवळ आले. झुकून प्रत्येक राशीतील एक एक हत्यार उचलून, मूठ भरून पेलून बघत ते कोंडाजी, खंडोजी, रूपाजी यांच्या हाती देऊ लागले.

"या घडल्या हत्यारांना आपणाला कोण कमरेशी वागवील याची काहीही कल्पना नाही. कुणाची शिरे यांच्या उतरत्या वारांना धूळदोस्त होतील याचा यांना अंदाज नाही. या धूळदोस्त होणाऱ्या शिरांमुळंच कुणाच्या शिरी मानाचे पेच चढतील याचा यांना कयास नाही. जीव लावून यांना घडविणाऱ्या या लोहारांना ही हत्यारे चालविता येत नाहीत! यांचं काय होणार हे त्यांनाही ठाऊक नाही. केवढ्या गुंतवळीचा आहे हा हयातीचा शतरंज?" हाती घेतलेल्या फिरंग-माटाच्या हत्याराकडे, विचारात गेलेले संभाजीराजे नुसते बघतच राहिले.

"धाकलं धनी, ह्यो योक माट पारखून बघावा." कारखान्याच्या प्रमुखाने दगडोजीने – एक बांकी संभाजीराजांच्या समोर धरली. हातची फिरंग रायाजीकडे देत हसत संभाजीराजांनी ती बांकी बोटाच्या पकडीत घेत निरखली.

"भात्यावं घातलं तवा ह्ये हत्यार डोळ्याखाली पडाय पायजे हुतं धनी. पार गंजल्यालं हुतं. हत्ती टाक्यातनं कुणीतरी ह्ये गाळ उपसताना भाईर काढलं अन् शिलेखान्यात भरना क्येलं. शिकल पार झडल्याली, पात्याला कुचमून ह्ये पार तांबारून ग्येलं हुतं. आता न्हाई वळखाय येत!" दगडोजी आपली करामत सांगताना अभिमानाने फुलून आला होता.

संभाजीराजांना मात्र हातातील बांकीने नेताजीरावांची सय करून दिली होती! त्या बांकीला धरून, दुहातीच्या कैक ऐरणींवरून घण घेताना उसळणाऱ्या ठिणग्या त्यांचे डोळे पकडू बघू लागल्या. मनात विचारांच्या ठिणग्यांचा शिवरता सडा पसरू लागला. "आमचे महाराजसाहेब केवढे थोर, कसबी लोहार! त्यांच्या मनाचा ठाव आम्हास नाही. कुणालाच लागत नाही. लागायचा नाही. हाती सांडस नाही, समोर पेटता भाता नाही, दिमतीला घणकरी नाही – पण माणसांचा गंज ते नुसत्या जबानीने निपटून काढतात! आम्हास वाटले होते ते नेताजीकाकांना नुसते पदरी घेतील, पण – पण त्यांनी त्यांच्या शुद्धीकरणाचा निर्णय केला. मुलूखभर त्याची आमंत्रणं धाडली. हे केवळ माणसांचा गंज काढणे नव्हे. हे तांबरलेल्या उभ्या धर्माचाच गंज निपटणे आहे. ते तेच करू जाणत, हे असले आगीशी झट्या घेणारे लोहारकाम!" अभिमानाने संभाजीराजांचे डोळे उजळले.

"बाबा, फार देखणं आहे हे काम!" म्हणत संभाजीराजांनी बांकी दगडोजीच्या हाती दिली.

वद्य पक्षातील असला तरी नेताजींना शुद्ध करणारा चतुर्थीचा क्रांतिकारक दिवस उगवून आला. पावसाळा होता तरी आमंत्रण पावलेला खासा लोक गडदाखल झाला होता. होमकुंड मांडलेल्या दरबारी चौकात पूर्वाभिमुख बैठकीवर छत्रपती महाराज स्थानापन्न झाले. त्यांची पायगत धरून उभारलेल्या बैठकीवर डाव्या हाताशी रामराजांना घेऊन संभाजीराजे बसले. त्या राजबैठकींना धरून दुतर्फा मोरोपंत, हंबीरराव, आण्णाजी, प्रल्हादपंत, निराजीपंत, दत्ताजीपंत अशा अष्टप्रधानांनी शिस्त धरली. सवत्या उठविलेल्या राणीवशात पडद्याआड सोयराबाई, पुतळाबाई, सगुणाबाई, येसूबाई, धाराऊ, दुर्गाबाई असा जनाना दाखल झाला.

मंत्रघोषाच्या गजरात शुद्धीकरणाला सुरुवात झाली. आधल्या दिवसभर उपोषण करून नेताजींनी चित्तशुद्धी केली होती. प्रभाकरभट्टांनी त्यांना दरबारीचौकात आणले. मांडल्या पाटावर बसविले. गडाच्या बैतेदार न्हाव्याने त्यांची कोरली दाढी उतरविली. डुईचे मुंडण करून शेंडीचा संजाबी घेर राखला. नेताजींनी स्नान केले. प्रायश्चित्त घेतले. पंचकुंभांत भरलेले समंत्रक जल मंत्रांच्या उद्घोषात अनंतभट्ट आणि प्रभाकरभट्ट नेताजींच्या मस्तकावर शिपकारू लागले. उभ्या अंगावरची कसलीतरी चिकटून बसलेली अमंगल कात त्या प्रत्येक शिपकाऱ्याबरोबर झडून पडते आहे अशी विचित्र भावना नेताजींच्या मनी उठू लागली. भरला दरबारी चौक त्या अपूर्व विधीकडे भारावल्या नजरेने बघू लागला. महाराज बैठकीवरून उठले. चौरंगीवर उभ्या असलेल्या नेताजींच्या समोर आले. हातातील जानव्याचा गोफ त्यांनी नेताजींच्या छातीला उजवा धरून गळ्यात चढविला. त्या जानव्याच्या स्पर्शाने त्याहून अधिक ते चढविताना होणाऱ्या महाराजांच्या बोटांच्या निसटत्या स्पर्शाने नेताजींच्या अंगी काटा सरकून आला. मराठ्यांचा भ्रष्ट सरलष्कर त्या काट्याबरोबर पावन झाला.

एक एक करीत महाराजांनी तबकातील पेहरावांची घडी नेताजींच्या खांद्यावर टाकली. ऊरभर गलबलून गेलेल्या नेताजींनी हमसा रोखत, सर्वदेखत महाराजांच्या पायांना भावभरी मिठी घातली. त्या मिठीनं खुद्द छत्रपतीच काही क्षण सुन्न झाले. हळुवार झुकत नेताजींना त्यांनी वर घेतले.

अजून... अजून नेताजींची गर्दन काही वर उठत नव्हती! सर्वांना जाहीर झाले की नेताजी शुद्ध झाले. पुन्हा हिंदू झाले. पण... पण खुद्द नेताजींनाच आपण अद्याप साफ शुद्ध झालो असे वाटत नव्हते!

"धनी ऽ" भावनावेगाने अतिशय घोगरट झालेले शब्द कसेबसे त्यांच्या तोंडून सुटले. त्या एकाच शब्दाने महाराजांच्या काळजातही खोलवर खळबळ माजली.

"बोला." महाराजांची नजर नेताजींच्या मुंडनी मस्तकावर फिरली.

"धनी ऽ, एक मागणं हाय पायाशी." नेताजींना उरातला कढ खोलताना कष्ट पडत होते.

" बोला. मोकळ्या मनी बोला."

" आमास्नी ... आमास्नी ..."

" काय पाहिजे ? "

" धनी ऽ एकडाव ... एकडाव ' नेताजी ' म्हून साद घालावी ! जीव घुटमळलाय ती साद ऐकाय ! "

महाराजांची गर्दन गुर्झबी दांड्यासारखी ताठ झाली. नेताजींचे खांदे पकडीत घट्ट धरून महाराज म्हणाले, " आता ... आत्ता तुम्हास कळून आलं, नावाची नाम्ना कोण असते ती ! गर्दन वर घ्या. नेताजीराव तुम्ही आमचे आहात ! "

कुठल्यातरी समंत्रक जलाने नव्हे तर महाराजांच्या ओठांतून सुटणाऱ्या नामोच्चारावर आपण साफ ' शुद्ध ' होऊ असे मानणाऱ्या नेताजींची आसुसलेली कानपाळी महाराजांच्या तोंडून आलेली ती साद ऐकताना रसरसून आली. अनेक भावनांच्या उमाळ्याने त्यांनी आपले तोंड ओंजळीत झाकण्याची धडपड केली. त्यांना ती संधी न देताच महाराजांनी कडकडून ऊरभेट दिली. स्वत:ला हरवून, बसल्या बैठकीवरून बघणाऱ्या संभाजीराजांच्या मनी ती ऊरभेट खोल खोलवर रुजली.

दुपारी या विधीनिमित्त पंगत मांडण्यात आली. महाराज आणि संभाजीराजे यांच्यामध्ये नेताजीरावांना इतमामाने पाटावर बसविण्यात आले.

कधी नव्हे ते या पंगतीला वाढण्यासाठी पुतळाबाई व सगुणाबाई दिसत होत्या.

महाराजांनी पंगतभर नजरफेर टाकीत " घ्या मंडळी " म्हणत इशारा दिला.

तबकातील वाडगे एक एक करून चौरंगावर उतरविणाऱ्या महाराजांचे नकळत सारे अनुकरण करत होते. फक्त विचारात गेलेल्या नेताजींनी, मोगली गोटातील सवयीप्रमाणे भातात थेट हात घालून कालवायला सुरुवात केली होती !

महाराजांनी खलबताला तोंड फोडले. जमली मंडळी जीवाचे कान करून ऐकू लागली. शिवबोलाचे हयातभर उरात जपून ठेवावे असे मोती संभाजीराजांच्या कानांच्या शिंपल्यावर उतरू लागले – " समस्त मंडळींस बलावू धाडून भेटीस पाचारण केले ते एक थोर मसलत मनी ठेवून. हे राज्य वाढीस पडले पाहिजे. आजवर इदलशाहीकडून आम्हावर मातबरीच्या चाली आल्या. फतेखान आला. अफजल आला, जौहर आला. आम्हांस होत्याचे नव्हते होते की काय असे होऊन गेले. आईच्या प्रसादेकरून आम्ही साऱ्यातून सलामत निभावून गेलो.

" आज इदलशाही सुमार झाली आहे. घरबखेड्यानं पार पोखरून निघाली आहे. समयास हत्यार धरून तिचा साधेल तेवढा मुलूख तोडून चालविण्याचे योजिले आहे. गनिमाच्या घरट्याच्या उंबऱ्यावर नंगे हत्यार धरल्याखेरीज आपले घरटे सुक्षेम राहावे ते होत नाही. करिता तुंगभद्रेपासून धरून कावेरीपावेतो करून इदलशाही मारण्याचा मनसुबा

धरला आहे. त्यासाठी कुत्बशाहीशी दोस्ताना बांधला आहे. मोगलाईशी सुलूख साधला आहे.

" – विजयादशमीचा मुहूर्त धरून, शिलेबंदीनं आम्ही खासा प्रांत कर्नाटकावर मोहिमशीर होणार आहोत. आजवर दिली तशी समस्तांनी ह्या मसलतीस इमानानं मनगटजोड दिली पाहिजे. हे राज्य थोर व्हावं ये ' श्रींचे ' मनी फार आहे. तुम्ही-आम्ही सारे तिचे भुत्ये. हिंमत बांधून उचल घेतली तर फत्ते देणार ती समर्थ आहे."

महाराज तळपत्या डोळ्यांनी बोलत राहिले. मोहिमेचा तपशील त्यांनी खलबताच्या कानी घातला. हंबरराव, येसाजी, आनंदराव यांना पटाईत, भालाईत, घोडाईत यांना पारखून निवडण्याचे काम जोडून दिले.

आपल्या गैरहजेरीत रायगड आणि मागील राज्याचा जाबता सांगण्यासाठी महाराज मोरोपंतांना म्हणाले, " प्रधान पेशवे, आम्ही मोहिमेत राहू तो पावेतो रायगड धरून मागील साहेबसुभा युवराज संभाजीराजांच्या देखरेखीखाली राहील. तुम्ही, आण्णाजी, चांगोजी साऱ्यांनी त्यांच्या मसलतीने विलायती रक्षून असावे. काही संकटकाळ आल्यास निभावून न्यावा."

" जी. आज्ञा." मोरोपंतांनी हुंकार दिला. पण ... पण आण्णाजींना हा जाबता मनोमन पसंत पडला नाही ! महाराजांनी आपल्या जबानीच्या वैभवाने खलबत एवढे बांधून आणले होते की, प्रकटपणे आण्णाजींना कुरबुरीचा शब्द काढण्याची हिंमतही झाली नाही. महाराजांनी आपल्यावर टाकलेली रायगडाची जोखीम कसकशी त्यांच्या पश्चात सांभाळून न्यावी या विचारात संभाजीराजे गेले.

सर्वांना निरोपाचे विडे देण्यात आले. खलबत उठले.

" शंभू, आम्ही एक सांगावं म्हणतो. बरे समजुतीनं घ्याल ? " मुद्दाम बोलावून घेतलेल्या संभाजीराजांना महाराजांनी शब्द घातला.

" जी. आज्ञा व्हावी." महाराज कशासंबंधी बोलताहेत त्याचा संभाजीराजांना काही माग आला नाही.

" रायगड तुमच्या अखत्यारीखाली राहावा हे राणीसाहेबांना मानवत नाही. तुम्ही जाणता त्यांचा स्वभाव. आमच्या माघारी त्या नाही तर माहेरी तळबीडास जाण्याच्या गोष्टी करताहेत. हे दिसावं तर चखोट दिसत नाही. त्यांना आता आणखी काही सांगावं त्यास आमचं मनच घेत नाही. प्रयत्नांचे दोन दिवस फुकट गेले. समयास घेणे ते तुम्हीच समजाव्यानं घ्यावं. घ्याल ? " बोलन् बोल कसा अंतरीच्या व्यथेने पिळवटला होता.

" राणीसाहेब ! " त्या एका शब्दानेच संभाजीराजांचे मन घुसमटू लागले. संतापाने भरीची दमदार छाती नकळत वरखाली लवलवू लागली ... " आमचे सोडा, पण खुद्द महाराजसाहेबांच्या वाटेवर त्या केवढे फासके पेरून ठेवतात ! किरण साधून केवढ्या

२८

नेमक्या वक्तास! काय बिघडवले आहे आम्ही त्यांचे! निमित्त आमचे होते, घायाळ होतात महाराजसाहेब! साऱ्यांना वाटते हे आम्हीच करतो. आम्ही बेदिल आहोत. ना आम्हाला त्यांना खुलेपणी जाब विचारता येतो ना आबासाहेबांना त्यांच्याबाबतचा शब्द सांगता येतो. कसले युवराजपद हे? तोंडी तोबरा, पाठीवर कोरडा असे कुठवर सोसावे? का सोसावे? हे युवराजपद आम्हीहून मागितले नाही. वडील म्हणून जन्माला आलो त्याने हे रिवाजाने चालत आले. मासाहेबांच्या नजरेत ते खुपते. आण्णाजींना हाताशी धरून त्या पायाच्या अंगठ्याने अशा गाठी घालतात की भल्याभल्यांना त्या हातांनी उकलू नयेत! यास त्या राजकारण म्हणतात. त्यांच्या जनानी राजकारणात आमच्या मनाचा पायपोस होतो. आबासाहेबांची कोंडणारी फरफट पडते. कशासाठी मुलाहिजा धरतात या राणीसाहेबांचा आबासाहेब?"

"गुमान झालात?" संभाजीराजांना गप्पच बघून महाराज थंडपणे म्हणाले.

"जी. आबासाहेब देतील तो कौल आम्हास प्रसाद आहे." महाराजांना या ऐन वेळी कसलीच यातना देऊ नयेसे त्यांना वाटले.

"आम्हाला विश्वास होता, तुम्ही हेच बोलाल. दसरा धरून आम्ही गड सोडणार आहोत. तुम्ही आमच्या संगतीच मांड घ्या. मुलुखाच्या सदरीपावेतो आम्हाला सोबत द्या. मग शृंगारपुरी पिलाजींच्याकडे ठाण व्हा. तिकडील प्रभानवल्लीचा आणि पन्हाळातर्फेचा सुभा आम्ही तुमच्या अखत्यारीत देणार आहोत. तो हरभातेनं आबादान रक्षून असा. केशव पंडित, उमाजीपंत तुमच्या दिमतीला राहतील. फडाच्या राबत्यासाठी विश्वनाथ, खंडोजी बल्लाळ, परशरामपंत, महादेव यमाजी यांना संगती घ्या. पंडितांच्या सोबतीत तुम्हाला लाभलेल्या काव्यशक्तीच्या प्रसादाला चाल द्या." बोलते महाराज येसूबाई आणि शिर्क्यांची कुलदेवता भावेश्वरीच्या आठवणीने थांबले.

"एक अर्जी आहे. आज्ञा होईल तर पायाशी रुजू घालू." संभाजीराजांनी निर्धार बांधला.

"बोला." महाराजांचे डोळे त्यांच्या छातीवरच्या माळेवर जोडून पडले.

"या स्वारीत आम्ही जातीनिशी महाराजसाहेबांच्या पाठीशी राहावे म्हणतो. रायगड आणि मागील जाबता एकसरीनं मासाहेबांच्या दस्तुरीखाली राहू द्यावा. आम्हीच आबासाहेबांच्या जोडीनं आलो तर सारे सवालच निकाली जातील."

ते ऐकताना महाराज हसले. "शंभू, हे मागणं तुम्ही घालणार हे केव्हाच आम्ही ताडून आहोत. हे राजकारण आहे. ते मनाच्या उमाळीवर नाही चालत. एकदा आग्र्यात तुम्ही-आम्ही असे फसलो. हे गाठीशी असता पुन्हा तोच ढंग ठेवावा हे रास्त नाही. पूर्ण विचारांती आम्ही तुम्हाला प्रभानवल्लीचा सुभा सांगितला आहे. आमचे ऐका. तो आपला करून चालवा."

"जी. आज्ञा. फक्त एक व्हावं. आम्हास सुपूर्द केलेल्या सुभ्यात मंत्रिगणांनी नजर-देख घालू नये."

"तुमची इच्छा असेल तर तेही होईल. पण त्यांच्या ठायी कोणेविशी आकस धरून तुमचे भागणारे नाही. आज-उद्या याच लोकांच्या पाठबळानं तुम्हाला हर कदम टाकावं लागणार. डावे जाणाऱ्यास हिकमतीनं वळतं करावं लागतं. एक नेताजी पारखे झाले तर कोण घोर पडला आम्हास!"

"आमच्या मनी कुणाबद्दल आकस नाही महाराजसाहेब. डावे जाणाऱ्यांना आम्ही पड खाऊन वळतं केलंही अस्तं, पण नको तेव्हा पायी खोडे घालणाऱ्यांना काय करावं? सुख झालेल्यास जागं करता येतं, बतावणी घेणाऱ्यांचं काय करावं? आता थोर मनसुब्यानं आबासाहेब मोहिमशीर होताहेत. मागील विचार त्यांनी करू नये. साहेबी दिली आज्ञा आम्हास शिरोधार्य आहे."

"युवराज, वडिली दिली दौलत कोण पुरुषार्थाची? आम्हालाही साहेबी पुण्याच्या बरड जहागिरीवर नामजाद केले. आम्ही त्यांचे काही मानले नाही. आम्ही मुलुखापरीस माणसे बांधीत गेलो. मोरोपंत, आण्णाजी ही माणसे वकुबाची. तुम्हास त्यांची मर्जी धरता येत नाही. त्यांना तुमची हिंमतबाजी लागी पडत नाही. जीव टांगणीला पडतो तो आमचा. दर्याच्या बसकणीत जंजिरेकर हबशी दबा धरून आहे. आम्ही मुलुखापार बघून तो कोकण फाट्यांचा दावा साधेल काय? आज ना उद्या औरंगची हवस आमच्या राज्यावर चाल धरेल त्याचं काय? केवढी थोर राजकारणं कार्यी घालायची आहेत! त्यासाठी माणूस-माणूस तेवढा एकवटून जुंपणं आहे. समर्थांनी दिलेला बोध हमेशा आमच्या कानी गुंजी घालतो. 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा.' तुम्हीही तो भुलू नये. ध्यानी ठेवावं की राजियांनासुद्धा प्रसंगी दोन घरे मागची चाल ठेवावी लागते, दौलतीचा शतरंज जोखमीनंच खेळावा लागतो.

"हे राज्य आमचं नाही, तुमचं नाही, राणीसाहेबांचं नाही. हे श्रींचं – आईचं राज्य आहे. इमानाचे कैक जीव आजवर त्यासाठी खर्ची पडले आहेत. भोसला तेवढा या राज्याचा नेक भुत्या आहे. याचं भान सुटलं की तेढ पडते. राणीसाहेबांना तो पोच नाही. तुम्हीतरी तो सोडू नये. त्यांच्या मनी लालस पैदा झाली आहे. रामराजांना पुढं घालून त्या काही करू बघतात. आम्ही ते खूब पारखून आहोत. त्या गफलत करतात, आम्ही त्यांना काय मानतो त्याविशी. राणीसाहेब रामराजांच्या मासाहेब यापेक्षा आम्ही त्यांना 'महाराणी' मानतो. या राज्याच्या रियायाच्या 'आऊ' मानतो. हसावं की रडावं या पेचाच्या त्यांच्या चाली काळजास घरे धरतात. मुलाहिजा न धरता त्यांना काही सजा फर्मावावी तर दर्पणात देखून आपल्याच हाती आपल्या मुखास काजळी फासावी तसे होईल!

"दौलतीसाठी मिर्झा-रजपुताच्या गोटात ओलीस राहण्याचा भार आम्ही तुमच्यावर टाकला. उत्तरेस अंगी कफनी चढवाक्यास लावून एकले मथुरेस काळदाढेत दिवस काढण्याचा भार आम्ही तुम्हावर टाकला. आणि आज... आजही भार तुम्हावरचं

टाकतो आहोत! आम्ही हे सुखासुखी नाही करत. भोसल्यांच्या पुरुषांना भार पेलण्यासाठीच जगदंबेच्या उदरी जन्म मिळतो. इतर कुणापेक्षाही तुम्ही आणि रामराजे आमचे आहात. ते पोर लहान उमरीचे, तुम्ही भरीचे. हे सारं समजून घ्या."

काळाचे पडदे फाडणारे ते श्रीमंत योग्याचे शिवबोल संभाजीराजांच्या मनी पीळ पाडून गेले. झटकन पुढे होत त्यांनी महाराजांचे पाय धरले. दाटल्या जवान कंठातून बोल सुटले, "आबासाहेब, ही धूळ मस्तकी धरून आम्ही शपथपूर्वक सांगतो, या राज्याचा कवडीइतकाही लोभ तो आमच्या मनी नाही. सर्वांहून हे पाय आम्हास मोलाचे आहेत. आपण सांगाल तसंच होईल."

"शंभू ऽ" वर घेतलेल्या बांड्या भोसल्याला छातीशी बिलगून घेताना महाराजांच्या तोंडून एवढीच हलकी साद सुटली. रायगडाच्या नगारखान्यावरचा जरीपटका मावळ वाऱ्याला थपडा देत सळसळत होता. मध्येच त्याची नोकदार टोके फडकन् वळत होती. नजर ठरणार नाही अशा उंचाव्यावरून थेट कर्नाटकच्या रोखाने मोहरा धरीत होती.

दिग्विजयी दसरा उजाडला. नौरात्री घटात बसलेली भवानी उठली. दूधधारांचा तिला अभिषेक झाला. समृद्धीची थळी तिच्या पायाशी दाटली.

संभाजीराजे, मंत्रिगण, जमलेला निवडीचा सरदार लोक यांनी घेर टाकलेल्या पालखीतून दिवस फुटीवर महाराज रायगड उतरून पाचाडात आले.

महाराजांच्या माघारी पाचाडच्या वाड्यात राहण्याचा निर्णय केलेल्या पुतळाबाईंनी दोघा पितापुत्रांच्या तळहातावर दह्याच्या कवड्या ठेवल्या.

रघुनाथपंत, जनार्दनपंत हणमंते, हंबीरराव, येसाजी, सर्जेराव जेधे, धनाजी जाधव, दत्ताजी त्रिमल, सूर्याजी मालुसरा, संताजी घोरपडे, नेताजी पालकर, नागोजी जेधे, विठोजी चव्हाण, मानाजी मोरे, सोमाजी बंकी, बाळाजी आवजी, बाबाजी ढमढेरे, आण्णाजी, मोरोपंत असा निवडीचा मर्दाना पाठीशी घेत महाराज संभाजीराजांसह पाचाडच्या वाड्याबाहेर पडले. वाड्याच्या सदरेवर टांगलेली नि:स्पंद घंटा त्यांना मूकपणे आशीर्वाद देत होती.

"हर ऽ हर ऽ म्हादेव!" घाटीघाटीतून किलकाऱ्यांचे लोळ उसळले. त्यात पेटल्या तोफभांड्यांचे दणदणते वार मिसळले. आघाडीला असलेले नाईक बहिर्जीचे टेहळं पथक मार्गी उधळलं.

तीस हजारांचा सेनासागर भोसले पितापुत्रांच्या पाठमागाने पुढे सरकू लागला. रणशिंगे शहारली. चौघडे दुडदुडू लागले. चालला! श्रींचा भुत्या नव्या दिशा फोडायला चालला. चिपळूणच्या रोखाने. स्वारी कर्नाटकवर!

मजल दरमजलीने चिपळूण हे भार्गवस्थान टप्प्यात आले. महाराज व संभाजीराजांनी जोडीने तीर्थाचे दर्शन घेतले. अभिषेक झाला. दाने वाटली.

चिपळूण सोडून सेनासागर शृंगारपूरच्या वाटेला लागला. गर्द आंबराईने वेढलेल्या शृंगारपूरच्या वेशीवर पिलाजी शिर्के, गणोजीसह पालखी घेऊन महाराजांच्या आगवानीला आले. ऊरभेटी झाल्या. रक्ताच्या गोतावळ्यासह महाराज व संभाजीराजे शृंगारपुरात प्रवेशले.

सूर्यराव सुर्वे शृंगारपूरच्या वतनावरून परागंदा झाल्यापासून त्याचा राहता वाडा, 'कारभारी वाडा' झाला होता. त्याच वाड्यात महाराजांचा मुक्काम पडला.

रात्री सावचित्ताच्या समयाला महाराजांनी पिलाजींच्याकडे संभाजीराजांच्याबाबत विषय काढला. प्रभानवल्लीचा सुभा सांभाळण्यासाठी युवराज शृंगारपूरला ठाण होणार हे त्यांच्या कानी घातले. हरभातेने युवराजांना जोड द्यावी असा शब्द टाकला. पिलाजींनी आनंदाने तो उचलला. आपले जावई गणोजी, कन्या राजकुवरबाई यांचे क्षेमकुशल महाराजांनी विचारले. रात्रीचे थाळे शिर्के-भोसले असे जोडीपंक्तीने झाले.

दुसऱ्या दिवशी पहाट धरून महाराजांनी वाडा सोडला. संभाजीराजांच्यासह ते भावेश्वरीच्या दर्शनाला आले. शिर्क्यांच्या कुलदेवतेचे आशीर्वाद घेऊन पिलाजींना खांदाभेट देऊन महाराजांनी शृंगारपूर सोडले. पितापुत्र आंबाघाटाच्या रोखाने चालले. उन्हे चढू लागली. मोरोपंत, अण्णाजी रायगडाकडे परतले.

आंबाघाटाची चढण सामने येताच महाराजांनी 'विजयचे' कायदे आखडले व पायउतार झाले. संभाजीराजांनी मांड मोडली. पिछाडीचा सेनासागर थोपला.

"राजे, परता आता. आम्ही निघतो." महाराजांचा तळहात संभाजीराजांच्या खांद्यावर चढला. काही क्षण बेजबान तसेच घुटमळून गेले. निरोपाची वेळ आली होती.

"महाराजसाहेब सांभाळून असावं. दर मुक्कामावरून आम्हास खबर कळवावी. मागील चिंता धरू नये."

"शंभू ऽ, आम्ही चिंता करणार कोण? साऱ्याची चिंता वाहणारी आई थोर आहे. आम्ही सांगितलं ते कार्यी घाला. सूनबाईंसह कबिल्यानिशी येऊन शृंगारपुरी ठाण व्हा. आम्ही परतू ते पिलाजींच्या तोंडून त्यांच्या जावयांची तरफदारी ऐकावयास. येतो आम्ही. जय भवानी!"

दोन बुलंद ऊर क्षणात एकमेकांना भिडले. सोनचौकडे हिंदोळले. टोपांतील मोतीलगी लडलडल्या. शब्द कोंडून गेले. डोळेच बोलके झाले. मिठी सुटली. 'शिवशंभो' विलग झाले. महाराजांनी झटकन जनावरावर झेप घेतली.

खंडोजी, रायाजी, अंतोजी अशा आपल्या धारकऱ्यांसह संभाजीराजे बगलेला झाले. दिग्विजयी सेनासागर घाटाच्या चढणीला लागला.

संभाजीराजे चढण चढणाऱ्या 'विजय' घोड्यांकडे जोडल्या नजरेने बघत राहिले. उगाच त्यांना उत्तरेत निरोप देऊन पाठमोरे झालेले कफनीधारी महाराज आठवले! कानात बोल घुमले – "साऱ्यांची चिंता वाहणारी आई थोर आहे!"

जेव्हा ते शृंगारपुरात घुसले तेव्हा किन्नाट धरून आले होते. शिर्क्यांच्या पागेकडचा निवडक घोडा महाराजांच्या दिमतीला रुजू झाला होता. शिर्क्यांच्या पागेचा सैस उरलेल्या घोड्यांतील एक पथक घेऊन ते पागेत ठाण करायला मोतद्दारांसह चालला होता. सैस आणि मोतद्दार संभाजीराजांना बघून अदबीनं कमरेत झुकले. घोडेपथक थांबले. संभाजीराजांची नजर त्या पथकावरून फिरली.

आघाडीच्या खुरावर पांढऱ्या रंगाचे चांदवे असलेले ते उभे पथक 'ऐबी' होते. गैरशकुनी होते! ते बघताना संभाजीराजे मनोमन चरकले!

शृंगारपुरी दोन दिवस मुक्काम करून संभाजीराजांनी पिलाजीमामा, गणोजीराजे यांचा निरोप घेतला. ते रायगडावर आले. रायगड आता राहुजी सोमनाथ यांच्या कारभाराखाली होता. पुतळाबाई पाचाडच्या वाड्यात येऊन राहिल्या होत्या. सातमहालातील आपला महाल त्यांनी येसूबाई आणि दुर्गाबाई यांच्या सेवेत जोडून दिला होता. सिंदखेडच्या राणूअक्का अद्याप गडावरच होत्या. त्यांना सोयराबाईंची कुठलीच चाल पसंत नव्हती. आपल्या भावाला, संभाजीराजांना शक्य ते सगळे पाठबळ देण्यासाठीच त्या माहेरी राहिल्या होत्या.

सुभे प्रभानवल्लीचा फड शृंगारपुरात बसविण्यासाठी संभाजीराजांनी माणसं पारखून निवडायला सुरुवात केली होती. या कामी त्यांना कवी कुलेशांची मसलत मिळू लागली.

केशव पंडित, उमाजी पंडित, विश्वनाथ ही माणसे बरोबर ठेवण्याचा सल्ला महाराजांनीच दिला होता. परशुरामपंत, खंडोजी बल्लाळ, महादेव यमाजी यांच्याशिवाय तर फडांचे पान हलू शकत नव्हते. संभाजीराजांनी या सर्वांना शृंगारपुरी जाण्याची आज्ञा दिली. सुभ्याचा फड हलला. संभाजीराजांचा निरोप घेऊन कवी कुलेशांनी, उधो योगदेवसह रायगड सोडला. कामंदकीय नीतिसार, विष्णुपुराण, मत्स्यपुराण, रामायण, महाभारत असे ग्रंथ बांधलेली बासने ब्रेगारांच्या डुयांवर देऊन केशव पंडितांनी, उमाजीपंतांसह शृंगारपुराची वाट धरली. रायगड सोडण्याचा दिवस जवळ येऊ लागला. महाराज परतेपर्यंत शृंगारपूरला मुक्काम धरावा लागणार म्हणून संभाजीराजे रामराजांना सतत आपल्याजवळ ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. सोयराबाईंना ते काही मानवत नव्हते.

वाटचालीला पहारा देणाऱ्या शिबंदीचे धारकरी संभाजीराजांनी निवडले. शृंगारपूरला आपण कबिल्यानिशी येत असल्याचा खलिता पुढे पिलाजीमामांना पाठविला. जगदीश्वराच्या शिवपिंडीवर अभिषेक चढविला.

'आम्ही रायगड सोडणार' हे कानी घालावे म्हणून राणूअक्कांची भेट घेण्यासाठी ते सातमहालांतील पुतळाबाईंच्या महाली आले. या महालात आता येसूबाई, दुर्गाबाई, राणूआक्का अशा मेळजुळीनं राहत होत्या.

राणूअक्कांना अदब देऊन संभाजीराजांनी विषय काढला. "आक्कासाहेब, आम्ही आबासाहेबांच्या इच्छेप्रमाणे कबिल्यानिशी शृंगारपुरी जाणार आहोत."

राणूअक्कांनी ते शांतपणे ऐकून घेतले. थोड्यावेळाने त्या निर्धारी राजस आवाजात म्हणाल्या, "आम्ही ते समजून आहोत. आम्ही जातीनं तुमच्या संगती यायचं ठरविलं आहे!"

"आम्ही नाही समजलो." गोंधळलेल्या संभाजीराजांनी चमकून विचारले.

"बाळमहाराज, इथं आल्यापासून मिटल्या जबानीनं आणि उघड्या डोळ्यांनी आम्ही सारं बघतो आहोत. दूर असता आमच्या कानी जे जे पडत होतं ते एवढ्या वाकड्या वाटेचं असेल असं आम्हास खरं पटत नव्हतं. मासाहेबांच्या डोळ्यांस तुम्ही खुपता. जे घडलं आहे ते काहीच नव्हे एवढे घडणार आहे, आम्ही बरीक ते ताडलं आहे. साऱ्यांनी तुम्हास 'पोरकं' मानलं आहे. आता ... आता आम्हीच तुमच्या पाठीशी सावलीसारख्या राहणार आहोत. जे कोणी तुमच्या पायी खोडे घालू बघतील त्यांना जाब विचारणार आहोत. बाळमहाराज, तुमची इच्छा असो नसो आम्ही शृंगारपुरी येणार आहोत!"

भारल्या नजरेनं संभाजीराजे अक्कासाहेबांच्याकडे बघतच राहिले. मनाच्या वर्मी जागेवर बोट ठेवणाऱ्या राणूअक्कांच्याबद्दल त्यांचा रक्ताचा उमाळा दाटून डोळ्यांत आला. काय बोलावं त्यांना सुचेना.

"गुमान झालात? बोला." अक्कासाहेबांनी विषय सोडला नाही.

"जशी आपली इच्छा अक्कासाहेब." संभाजीराजांनी त्यांना संमती दिली.

ठरल्या दिवशी सातमहालासमोरच्या चौकात तीन पडदेबंद मेणे तयार झाले. येसूबाई, दुर्गाबाई आणि राणूअक्का यांच्यासाठी! पालखी दरवाज्याने ते बाहेर पडले.

युवराजांनी राहुजी सोमनाथांचा निरोप घेतला. सोयराबाईंनी कितीही थोपविण्याचा प्रयत्न केला तरी हट्ट धरलेले रामराजे आण्णाजी आणि मोरोपंत यांच्या बरोबरीने आघाडी मनोऱ्यापर्यंत आलेच. त्यांच्या कपाळावर ओठ टेकवून त्यांची पाठ थोपटीत संभाजीराजे त्यांना म्हणाले, जसे महाराज आंबाघाटाच्या पायथ्याशी खुद्द त्यांनाच म्हणाले होते तसे, "बाळराजे, परता आता. येतो आम्ही."

"दादामहाराज ..." काहीतरी बोलण्यासाठी रामराजे घोटाळले.

"बोला." संभाजीराजांनी त्यांचा खांदा हळुवार थोपटला.

"आम्ही ... आम्ही येऊ?" रामराजांचे डोळे केवढ्यातरी अपेक्षेने भरून आले होते.

त्यांच्या खांद्यावरचा संभाजीराजांचा हात आपोआप मागे हटला. एकसरीने त्यांनी आण्णाजी, मोरोपंत, राहुजी यांच्यावर नजर फिरविली. सर्वांच्या माना खाली होत्या. संभाजीराजांना तो प्रसंग आठवला. राजगडावरचा. ते रजपुताच्या गोटात ओलीस जायला निघाले तेव्हाचा. तेव्हा निरोप द्यायला आलेल्या महाराजांनी ध्यानीमनी नसता एकाएकी आपल्या छातीवरची माळ उतरवून दुपेडी करीत त्यांच्या गळ्यात चढविली होती!

कसल्यातरी निर्धाराने, तळपत्या डोळ्यांनी संभाजीराजांनी आपल्या छातीवरच्या आईच्या कवड्यांच्या माळेला हात घातला. हलकेच ती उतरविली आणि तिचा दुपेडी फेर रामराजांच्या गळ्यात चढवीत ते म्हणाले, " आम्ही नसलो तरी ही आमची निशाणी ठेवा. येतो आम्ही. पाचाडच्या सदरेवर थोरल्या आऊंची घाट वाजते. तिला नेमाने मावळमाचीवर जाऊन मान देत चला ! जय भवानी ! "

कुणाकडेही न बघता संभाजीराजे तडक रायगडच्या आघाडी मनोऱ्यांना पाठमोरे झाले. सहज म्हणून त्यांची नजर गंगासागर टाक्यावर फिरली. त्यावर ओळंबलेल्या आंब्याच्या वाकड्या फांदीवर अंग मुरवून बसलेला एक खंड्या पक्षी त्यांना दिसला. नुकतंच काहीतरी मटकावल्यासारखा तो आपली लांब चोच साफ करीत होता !

गडाच्या उताराला लागलेल्या राजमेण्यांच्या मागून मावळी पायताणांची कुरकुर उठवीत, काखोटीचे गाठोडे सावरीत चाललेल्या धाराऊचे पायतणांच्या कुरकुरीशी मेळ पडलेले मन स्वत:लाच विचारीत होते, " असं कशापायी हुतंया हे समदं ? "

शृंगारपुरात सुर्व्यांच्या वाड्यावर संभाजीराजांचा प्रभानवल्ली सुभ्याचा फड बसला. सुभ्याच्या अखत्यारीतले सरदार-दरकदार सरंजामानिशी युवराजांच्या भेटीसाठी शृंगारपुरात येऊ लागले. हिवाळ्याच्या दाटल्या धुक्यात शृंगारपूर गजबजू लागले.

पुरात संभाजीराजांनी धनुर्विद्येचा सराव घ्यायला सुरुवात केली. पुराच्या चौतर्फानि गर्द राने दाटलेली होती. त्यात जागोजागी केंबळी झोपड्यांच्या वाड्या करून राहिलेले धनगर रानात ' वाघरू ' उठल्याची, ' काळ्या जनावरांनी ' विधूस मांडल्याची खबर पुरात आणू लागले.

गणोजी, खंडोजी बल्लाळ, रायाजी, अंतोजी असे पट्टीचे शिकारखेळे घेऊन संभाजीराजे रान काढू लागले. त्यांनी पाडलेली जनावरे बघायला पंचक्रोशीतल्या वाड्या-मजऱ्यांतील माणसे पुरात येऊ लागली. तीर-कमान आणि ठेचणीच्या बंदुकीची निशाणमार यावर संभाजीराजांचा बेजोड हात बसला.

एका शुभमुहूर्ती कुलदेवता भवानीला अभिषेक चढवून तिच्या आशीर्वादाने संभाजीराजांनी ' बुधभूषणम् ' या काव्यग्रंथाला हात घातला. या काव्यग्रंथात विष्णुधर्मोत्तर पुराण, कामंदकीय नीतिसार, मत्स्यपुराण, महाभारत आदी ग्रंथांतील श्लोक निवडून देवदेवतांची स्तुती, राजनीती, प्रकीर्णनीती या विषयांवर चर्चा करायची होती. संभाजीराजांचा हा तर आवडीचा विषय होता.

वाड्याच्या बैठकी दालनात लाकडी अडंग्यांवर समोर पुराणग्रंथ मांडून बैठक घेतलेल्या केशव पंडित, उमाजी पंडित, कवी कुलेश यांच्याशी संभाजीराजांची काव्यशास्त्राची बैठक बसली. धूपदानातून उठत, फिरक्या घेत दालनाच्या छताकडे झेपावणाऱ्या धुराच्या वळ्यांवर अचल नजर जोडलेले संभाजीराजे कशात तरी हरवल्यासारखे विचारगत झाले. हलकेच त्यांच्या पापण्यांची कवाडे मिटली गेली. आता

चर्या आगळीच शांत-सुंदर दिसू लागली. विघ्नहर्त्या श्रीगजाननाची भाक करणारे बोल त्यांच्या ओठांतून सहज उमटू लागले. उजव्या हाताशी बसलेले परशरामपंत ते बोल शहामृगपिसाच्या टोकाने पकडून कागदावर रचू लागले.

" देवदानवकृतस्तुतिभागं हेलया विजितदापतनागम् ।
भक्तविघ्नहनने धृतरत्नं तं नमामि भवबालकरत्नम् ॥

– देवदानवांच्या स्तुतीने संतुष्ट झालेल्या, दुष्टांचे गर्वहरण करणाऱ्या, भक्तांची विघ्ने वारणाऱ्या, रत्ने धारण करणाऱ्या, ' शिवाच्या ' पुत्रा गणेशा, तुला माझे नमन असो ! "

गणेशस्तवन केलेल्या शंभूराजांना आपल्या थोरल्या महाराजसाहेबांचे – शहाजीराजांचे स्मरण झाले. त्यांचे हुबेहूब वर्णन करणारे घडीव, गीर्वाण बोल युवराजांच्या ओठांतून सुटू लागले –

" भृशत् बलान्वयसिंधुसुधाकर: प्रथितकीर्त उदारपराक्रम: ।
अभवत् अर्थकलासु विशारदो जगति शाहनृप: क्षितिवासव: ॥

– सिंधुसुधाकरासारखे प्रचंड बलशाली, कीर्तिवान, उदार, पराक्रमी व अर्थकलांमध्ये विशारद असे राजे शहाजी होऊन गेले ! "

भोवतीचे पंडित कानांचे शिंपले टवकारून गिर्दीला रेललेल्या, मिटल्या डोळ्यांच्या संभाजीराजांना एकटक निरखू लागले. पाणवठ्यावरून बगळ्यांची सफेद रांगच रांग तरंगत जावी तसे काही क्षण शांतपणे तरंगत गेले.

आता मिटल्या डोळ्यांसमोर संभाजीराजांना आपल्या आबासाहेबांची अनेक रूपे, स्वरूपे तलवारीच्या फिरत्या, तळपत्या पात्यासारखी दिसू लागली –

आग्र्याच्या भरल्या दरबारातून तख्ताला पाठ दावीत तरातर बाहेर पडणारे, तोफगोळ्यासारखे आबासाहेब, सिंहासनासमोर तडक खडे होत बहादूरच्या मोगलाई वकिलाला ' चालते व्हा ' ची नगारखान्याकडे बोटाचा रोख देत जरब देणारे आबासाहेब, ' नावाची नाम्ना तुम्हास आत्ता कळली नेताजीराव ' म्हणत पालकरकाकांना अपार मायेनं ऊरभेट देणारे महाराजसाहेब, थोरल्या आऊंच्या छत्रीवर सोनपाने वाहून गुडघे टेकीत पायरीला नम्रभावे कपाळ भिडविणारे आबासाहेब, साताऱ्याच्या किल्ल्यावर बिछायतीला लेटून घायाळ झालेले असहाय आबासाहेब, ' वडिली जोडून दिली दौलत कोण पुरुषार्थाची ? ' असे शांतपणे सुनविणारे – ' जन्माने भोसला तेवढा आईचा नेक भुत्या ' म्हणत आम्हास छातवानाला बिलगते घेणारे आबासाहेब –

ती रूपे एकमेकांत मिसळू लागली. डोळ्यांत मावेनाशी झाली. महाराजांचे वर्णन करणारे नेमके शब्द संभाजीराजांना गवसेनासे झाले. नाकगड्डा चिमटीत धरताना त्यांच्या कपाळी आठ्याच आठ्या फुलल्या. त्यांना नकळतच गर्दनीला झोल मिळाला. झोलाने त्यांच्या टोपातील मोतीबंद लडी डुलल्या. आणि त्यावरून फडफडत झेपावल्यासारखे वाटावे असे शब्दांचे सोनेरी पक्षी उडाले –

" यस्य अनेक वसुंधरा परिवृट् प्रोत्तुंग चूडामणेः।
पुत्रत्वं समुपागतः ' शिव ' इति ख्यातः पुराणे विभुः ॥

– त्या शहाजीराजांना महामूर मुलुखाचे धनी असलेले, लोकांना डोंगरासारखे उत्तुंग म्होरके वाटणारे, पुराणातील पुरुषश्रेष्ठ शिवासारखे राजे शिवाजी हे पुत्रश्रेष्ठ झाले!"

" कलिकालभुजंगम अवलीढं, निखिलं धर्ममवेक्ष्य विक्लव यः।
जगतः पतिरंशतोवतापः स शिवच्छत्रपतिर्जयत्येजयः ॥

– त्या कलिकालाच्या भुजंगाला पचविलेल्या, अखिल धर्माची हीनावस्था बघून विव्हळ झालेल्या, स्वामी म्हणून जगताचे ताप हरण करण्यासाठीच अवतरलेल्या शिवछत्रपतींचा जयजयकार असो!

'जयत्यजेयः' संभाजीराजे दोन तीनदा स्वतःशीच पुटपुटले. सफेत 'विजय' घोड्यावर मांड जमवून आंबा घाटाची चढण चढणारे, सरासर डोळ्यांआड होणारे महाराज त्यांना दिसू लागले. उभ्या आंबा घाटाची दरडच घुमत गर्जताना त्यांना ऐकू येऊ लागली – " आम्ही चिंता करणारे कोण ? चिंता वाहणारी आई थोर आहे!" आपल्या कुलाचा वसा आठवत संभाजीराजांचे मन स्वतःवर येऊन ठाण झाले. महाबळेश्वरच्या गोमुखातून पाण्याची धार लागावी तसे त्यांच्या तोंडून काव्यबोल पाझरू लागले –

" तस्यात्मजः शंभुरिति प्रसिद्धः समस्तसामंतशिरोवतंसः।
यः काव्यसाहित्यपुराणगीतकोदण्डविद्यार्णवपारगामी ॥
विविच्य शास्त्राणि पुरातनानामादाय तेभ्यः खलु सोयमर्थम्।
करोति सद्ग्रंथममुं नृपालः स शंभुवर्मा बुधभूषणाख्यम् ॥

– त्या शिवाजीराजांचा – भोवतीच्या साऱ्या राजेलोकांना शिरोभूषण वाटणारा, काव्य, साहित्य, पुराण, संगीत, धनुर्विद्या यांचे ज्ञान घेतलेला मी पुत्र – 'शंभुराजे' या नावाने प्रसिद्ध आहे. पुराणग्रंथांचे विवेचन करून, त्यातील अर्थपूर्ण भाग निवडून मी शंभुवर्मा ह्य 'बुधभूषणम्' नावाचा सद्ग्रंथ रचीत आहे!"

आपला काव्यग्रंथ रसिकांनी कसा वाचावा याचा करिणा देताना तर संभाजीराजांची गोल, पुष्ट, मर्दानी चर्या उजळून निघाली. खानदानी अदबीचा भंडारा त्या चर्येवर शालनाम्यासारखा पसरला –

" विविच्य सन्तः कृतिमस्मदीयां गृह्णन्तु सद् असद्च्च त्यजन्तु।
क्षीरावियुक्तं परिहृत्य नीरं क्षीरं भजन्ते खलु राजहंसाः ॥

– दुधात मिसळलेले पाणी वगळून राजहंस फक्त दूधच सेवन करतात तसे विद्वान, सज्जन सत्य तेवढेच आपलेसे करून असत्य वगळून टाकतात!"

डुयीची पगडी डोलवीत परशरामपंतांनी युवराजांनी सांगितलेला, रसिकांना उद्देशून असलेला श्लोक कागदावर उतरविला. त्याखाली दुरेघी ओढली. मऊ वाळूची चिमट हलकेच कागदावरच शिवरली. ग्रंथाचा पहिला सर्ग समाप्त झाला होता.

संभाजीराजांनी डोळे उघडले. बैठकीतल्या पंडितांतील कवी कुलेश त्यांच्यावर केव्हाचे डोळे जोडून नुसते एकटक बघत होते. ते भारावून ऊठले. कमरेत झुकत त्यांनी अगोदर संभाजीराजांना अदब दिली.

" युवराज, उत्तरसे इस मुल्क आये पर कोई युवराज ऐसे ढंग की काव्यरचना करता है ऐसे न हमने देखा न सुना!" कुलेश भारावून बोलले.

" शुक्रगुजार कविराज, तशरीफ घ्या. आता आमच्या कुलदेवता आई भवानीची स्तुती बांधणे साधते का ते पाहावे म्हणतो आम्ही." हाताच्या इशारतीने संभाजीराजांनी कुलेशांना बसते केले.

त्या बैठकीदालनात पिलाजी येऊन भिंतीकड धरून उभे आहेत याचे कुणालाच भान नव्हते! मिटल्या डोळ्यांनी संभाजीराजे देवबोलीत काही सांगताहेत हे बघून अभिमानाने फुललेले पिलाजी काही न बोलता ती बैठक तसेच बघत राहिले होते.

" जगदंबः जगदंब!" संभाजीराजांनी डोळे मिटते घेतले. उजव्या हाताची बोटे नव्याने धारण केलेल्या छातीच्या माळेवरून फिरू लागली. पाजळते पोत नाचू लागले, भंडाऱ्याच्या मुठी उधळू लागल्या. कानभरून संबळ तुणतुणी घुमू लागलं, 'उदं ग अंबे उदं!' उदोकार थरकू लागले. शस्त्रं उगारलेली, रक्तनेत्री, व्याघ्रवाहनी जगदंबा संभाजीराजांच्या डोळ्यांसमोर खडी ठाकली! भवानीची स्तुती करणारे देववाणीतले बोल त्यांच्या ओठांतून उधळू लागले. आईने बैठक घेतलेला, काळ्याबाळ्या पट्ट्यांचा मानकरी वाघ त्यांना झळझळीत संगमरवरासारखा पांढरा दिसू लागला. त्यांच्या ओठांतून सुटणाऱ्या शब्दांना जशी सोनकळाच आली –

" स्फटिकरचितपीठे शामलांगी भवानी –
स्फटिकासारख्या धवल आसनावर विराजमान झालेली ही शामलांगी भवानी आहे."

" विलसत भालतिलका– कपाळी रक्तटिळा शोभणाऱ्या, पुर्णेन्दुहृद्यवदनां– पुनवेच्या चंद्रासारखा मनोहर मुखडा असलेल्या, सवर्तुलस्तनद्वंद्वम्– कलशस्तनी, पद्मनेत्रविराजिताम्– कमलनेत्रं, शंभुकान्ता तेजस्वी कांती लाभलेल्या, निम्ननाभिं– खोलगट नाभीच्या, कृशमध्यां–चिवळ कंबर असलेल्या, विलसद्रक्तवसनां रक्तकांची परिवृताम्– रक्तरंगी नेसू व चोळी ल्यालेल्या, चंद्रचूडरमणीस्तुतिमेणानां– धरणीश शंभू रचितामतिभक्त्या, त्या चंद्रचूडरमणी भवानीची मी राजा शंभू भक्तिभावे स्तुति गातो!"

" वा! व्वा!" कवी कुलेशांनी न राहवून भरघोस दाद दिली. पिलाजींचे फुलले डोळे तर संभाजीराजांच्या मुखड्यावर जखडूनच पडले होते.

संभाजीराजांनी डोळे उघडले. बैठकी दालनाच्या उंबरठ्यात त्यांना खोळंबलेली धाराऊ दिसली. ती परतण्याच्या बेतात आहे हे ताडून इतर कुणाशीच काही न बोलता युवराजांनी तिची दखल घेतली – बोला आऊ, काय आज्ञा आहे ?"

कसे बोलावे या पेचात धाराऊ खिनभर घुटमळली. मग निर्धाराने म्हणाली, " ह्ये द्येवाधर्माचं काय चाललया त्ये हुं दे! थाळं लावल्यात त्येवडं कानावं घालायचं हुतं!"

हसत संभाजीराजे बैठकीवरून उठले. उठता उठता त्यांच्या मनी विचार आला, "आम्ही काव्य बांधतो ती देवबोली उजवी की या धाराऊची कुणबाऊ, निखळ मावळबोली उजवी ?"

ठेवणीचे जरी आसवाब लेवून येसूबाई, दुर्गाबाई आणि राणूअक्का सिद्ध झाल्या. आज मकर संक्रांत होती. सरंजामानिशी जाऊन गावदेवता भावेश्वरीची ओटी सवाष्ण हातांनी भरायची होती.

पहाट धरून संभाजीराजांनी मल्लखांबाचे दशरंग, चक्रीचे नागपिळ्यासारखे हात करून घेतले. अंघोळ घेऊन, दुधाची गिंडी रिचवून रात्री देव्हाऱ्यात ठेवलेली भवानीची माळ त्यांनी गळ्यात धारण केली. रायाजीने समोर धरलेल्या दर्पणात बघून सरशीने कपाळी शिवगंधाचे पट्टे रेखून घेताना त्यांना जिजाऊंचे बोल आठवले. शिवानंच हे सुखदु:खाचे जोडपट्टे तुमच्या कपाळी रेखले आहेत."

सदरेवर येऊन युवराजांनी सुभ्याच्या रयतेला दर्शन दिले. संक्रमणाचा दिवस असल्याने वडिलधाऱ्यांचे दर्शन घ्यावे म्हणून ते राणूअक्कांच्या भेटीसाठी दरुणीमहालात आले. आपल्या स्वारीला येताना बघून येसूबाई पदरकाठ तोलीत सावरत्या झाल्या. दुर्गाबाई तर शरमून अंत:पुराकडे जायला निघाल्या.

"बाई, थांबावं." येसूबाईंनी त्यांना रोखते केले.

आत आलेल्या संभाजीराजांनी राणूअक्कांना हसत अदब दिली. सहज नजर जाता त्यांना एका पाटावर चांदीच्या ताटात मांडलेला, गूळ तिळांनी बांधलेला मगर दिसला. देवीसमोर तो आज पुजायचा होता. मुहूर्त धरून त्याला फोडून तोच तिळगूळ वाटायचा होता. पाटाजवळ जात संभाजीराजे तो पिवळाधमक मगर निरखीत राहिले.

"बाळामहाराज, तीरकमान, शिकार, ग्रंथपुराण यातून तुम्हाला कबिल्याकडच्या या 'तीळ-गुळाची' याद राहते की नाही आम्हाला अंदेश होता!" राणूअक्का खालमानेने उभ्या असलेल्या येसूबाई व दुर्गाबाई यांच्याकडे बघत हसून म्हणाल्या.

मगरावरची नजर तशीच ठेवीत ते म्हणाले, "आमचं या मगरासारखंच आहे अक्कासाहेब! मनानं धरली ती बाब सोडवत नाही आम्हाला. आम्ही महाराजसाहेबांना काव्य बांधून दाखवणार आहोत."

"आम्हास त्यातील काऽही कळत नाही! आज आम्ही तुमची बंदुकीची निशाणमार बघावी म्हणतो. दावाल?" येसूबाई, दुर्गाबाईंच्याकडे बघतच आक्कासाहेब हे म्हणाल्या. संभाजीराजे सबागतीने बोलून गेले— "जी आज्ञा. आज संध्याकाळी भावेश्वरीच्या आवारातल्या पिंपळावर श्रीफळं बांधण्यात येतात. बार टाकून ती छेदायची असतात. आम्ही संध्याकाळी निशाणमार दावू. आपण ती बघायला यावं." संभाजीराजांनी राणूअक्कांना नजर दिली. तशीच ती येसूबाई व दुर्गाबाईंच्यावर फिरविली. तिचा अर्थ होता— 'यांनाही आणावं येताना!' राणूअक्कांना तो कळला. त्या नुसत्याच

हसल्या. मघापासून त्यांना जे म्हणायचे होते ते आत्ता कुठे त्यांच्या 'बाळमहाराजांच्या' दखलेत आले होते.

"येतो आम्ही!" संभाजीराजे महालाबाहेर पडले.

एका कुणबिणीने मगर ठेवलेल्या चांदीच्या थाळ्यावर सरपोस घालून तो उचलून खांद्यावर घेतला. हाती कुंकवाचे करंडे घेतलेल्या राणूअक्का, येसूबाई, दुर्गाबाई पाठीशी कुणबिणींचा तांडा घेऊन वाड्याबाहेर पडल्या.

संध्याकाळी पुराच्या वेशीवर असलेल्या भावेश्वरीच्या आवारात तोड्याच्या बंदुकीचे बार दणदणू लागले. वीर पवित्रा घेतलेले संभाजीराजे बंदुकीचा दस्ता उजव्या खांद्याला आवळून, डावा डोळा मिटत पिंपळावरच्या श्रीफळांवर बार टाकू लागले.

एकसरीने त्यांनी श्रीफळांचा पंचोत्रा फोडला. फळांच्या कवच्याच्या ठिकऱ्या पाराखाली उतरल्या. श्रीफळांतील पाण्याने पिंपळपाने न्हाऊन निघाली. आणि ते बघताना बैठकीवर बसलेल्या येसूबाई व दुर्गाबाईंची मनेही एका आगळ्याच भावनेने न्हाऊन निघाली! किंक्रांतीचा सण असल्यामुळे आज शिर्क्यांच्या वाड्यावर संध्याकाळी मानाचे बकरे पडणार होते.

पुरातील पिलाजींच्या वाड्यात संभाजीराजांची 'बुधभूषणम्'ची दुसरी काव्यशास्त्र बैठक बसली. आज 'राजनीतीची' बांधणी करायची होती. ग्रंथाचा हा तर गाभा होता.

धूपदानातून गंधमंगल वळी उठू लागली. दालनभर गरगरत फिरू लागली. शांतता पसरली.

परशरामपंतांनी कापडी अस्तर असलेल्या कोऱ्या कागदावर हस्तलेख लिहिला—

'। द्वितीयोऽध्याय:।'

राजनीति:

"पंडित, 'राजा' म्हणून जो म्हणतात त्यास कोण कोण लक्षणांची जोड लागते?" उमाजी पंडितांना संभाजीराजांनी सवाल घातला.

"जी" समोरच्या अडंगीवरच्या कामंदकीय नीतिसाराची पाने उलटी टाकीत काही वेळाने उमाजी म्हणाले, "क्रोध, लोभ, भय, द्रोह यांचे स्तंभन केलेला, वृद्धांच्या हितोपदेशांनी संपन्न झालेला, स्वत: संपादन केलेल्या गुणांचा असा राजा असावा."

हारीने समोर मांडलेल्या अडंग्यांवरच्या ग्रंथची पाने संभाजीराजे उलटी घालू लागले.

परशरामपंतांच्या कानातील भिकबाळीकडे बघत संभाजीराजे राजलक्षणांचे प्राजक्तकळे काव्यवेदीवर उधळू लागले—

मेघावी, मतिमान, दक्ष:, क्षमावान, ऋजु—

बुद्धिमान, सावध, क्षमाशील, मृदु अंत:करणाचा."

धर्मात्मा अपि न असूयक: —

धर्मशील पण असूया नसलेला

स्मरणत्युपकृतं, वृद्धोपसेवी य: –

केलेले उपकार जाणणारा, वडिलधाऱ्यांचे अनुसरण करणारा."

शूरो न व्यसनी- शूर असूनही व्यसनी नसलेला!"

अविसंवादी, दीर्घदर्शी, जितक्रोधो, जितेन्द्रिय:।

विसंवादी बुद्धी नसलेला, दूरदृष्टीचा, क्रोध जिंकलेला आणि इंद्रियांवर कब्जा मिळविलेला असा राजा असावा.

"कविराज, अशा राजाचा राज्यकारभार कोण भातेचा असावा? हा विष्णुपुराणातील श्लोक केवढा गोमटा आहे!" मध्येच थांबून संभाजीराजांनी कुलेशांना नजर दिली. स्वत:ला आवडलेला श्लोक ते वाचू लागले –

"नातिदण्डो न निर्दण्ड –

अतिकायदेबाज़ नसलेला व कायदा एकदम ढिलाही न टाकणारा.

व्यवहारे सम: प्राप्ते पुत्रेण रिपुणा सह।

गनिम असो व साक्षात् स्वत:चा पुत्र असो, व्यवहारात दोघांशी समतोल असणारा!"

त्या श्लोकाबरोबर महाराजांच्या आठवणीने संभाजीराजांची मुद्रा अभिमानाने कशी फुलून उठली. भारल्यासारखे ते राजलक्षणे पुढे सांगू लागले –

"लोकाधार:, दुष्परिग्रह: –

- तो रयतेला आधार देणारा आणि दुष्टांचे निर्दालन करणारा असावा!"

"वाहवा!"

"छान!"

"उत्तम!"

कुलेश, केशव पंडित, उमाजीपंत साऱ्यांनीच त्या मर्मी राजलक्षणांना एकदम दाद दिली. मुद्रेचा पुनवेचा चंद्रथाळा झालेले, स्वकुलाच्या अभिमानाने डोळे तेजाळलेले संभाजीराजे पुढची राजलक्षणे सांगणार तोच त्या दालनात पिलाजीमामा प्रवेशले.

"युवराज, भाईर सदरेला सुभ्याचा कुणबाऊ रयतावा दरसनासाटनं खोळंबलाय. त्येंची कायतरी फिर्यादी अर्जी हाय." ही बैठक लवकर उठणार नाही हे हेरून पिलाजींनी हे धाडस केले होते. जमल्या बैठकीची साखळी तुटली.

"आम्ही सदरेला येतो आहोत. वर्दी द्या त्यांना मामासाहेब." संभाजीराजे स्वत:शीच हसले. आणि 'लोकाधार:' कळेल न कळेलसे पुटपुटले.

"पंडित, आम्ही आलो." संभाजीराजांनी ऐन रंगाला आलेली काव्यबैठक सोडली व ते सदरेच्या रोखाने चालू लागले. बाहेर उभे असलेले रायाजी, अंतोजी व खंडोजी

बल्लाळ त्यांच्या पाठीशी झाले. सदरेवर आलेल्या युवराजांना, मुंडी पागोटी घातलेल्या, लंगोट्याधारी धा-वीस कुणब्यांनी मुजरे दिले. संभाजीराजे सदरी बैठकीवर बसले. खंडोजी, रायाजी व अंतोजी त्यांच्या दुतर्फा अदब धरून उभे राहिले.

जमले कुणबी काही बोलतील म्हणून संभाजीराजांनी त्याच्यावर नजरफेर टाकला.

त्या सगळ्यांच्या माना खाली होत्या. कसल्यातरी काळ्या, दाट कांबळीखाली ते मातीत खपणारे जीव डालल्यासारखे दिसत होते. संभाजीराजांनी खंडोजी बल्लाळला नजर दिली. तिचा रोख पकडीत खंडोजी पुढे झाला. कुणब्यांना म्हणाला – "कुणीतरी म्होरकं होऊन बोला. जी असेल ती फिर्यादी रुजू घाला."

त्या जमावातील, कानकल्ले चुन्यासारखे सफेत झालेल्या एका म्हाताऱ्याने काळीज बांधून जबान खोलली, "पर आमास्नी न्याव मिळंल का कसं?"

"बोला तरी." खंडोजीने त्यालाच चुचकारला.

"सरकार, आमी धरनी मायंची ल्येकरं, आपुन आमचं बाप. औंदा माय कोपली. शिवारं धरली न्हाईत. सरकारचा धारा गुदरायचा त्ये निभत न्हाई. गावकामदाराला हातापाया सांगिटलं. त्यो कानाला हाताचं टाळं लावून रिक्यामी जाला. गडावं ह्ये पायाशी घालावं म्हून य्येलो. पंत, सुरनिसांची भेट घ्येतली. त्ये म्हनलं, 'ह्यो सरकारी धारा हाय. होतर सूट-सवलत मागा. पर त्यो गुदराय पायजे.' मायबाप, काय न्हाई आमाकडं! धारा गुदरायचा तर दाव्याच्या गुराढोराचा इक्रा कराय पायजे. ढोरं आमा कुनब्यास्नी ल्येकरांगत. काय करावं धनी? ईस कोसाचा पल्ला टाकून आलो. मायबाप, म्हाराजांच्या माघारी आमास्नी ठाव द्यावा. धारा औंदा माफ करावा." डोळ्यांच्या कडांना पाणी धरलेला म्हातारा कमरेत झुकला.

"लोकाधार:! लोकाधार:!!" कुणीतरी संभाजीराजांच्या मनात आठी हातांनी भंडाऱ्याच्या मुठी उधळू लागले. त्यांची कविमुद्रा पालटत पालटत निर्धारी राजमुद्रा झाली. ऐकणाऱ्याला दरारा बसावा असे निश्चयी बोल त्यांच्या ओठांतून सुटले –

"खंडोजी, या समस्तांस आम्ही कुल धारा माफ केला असे! असे जे जे कोणी असत त्यांसही तो माफच असे! यासाठी रोखे सिद्ध ठेवा. दस्तुरांसाठी आम्हास रुजू करा. खासे हारकारे निवडून ते टाकोटाक गावचे गाव जातील तसे करा."

"जी. आज्ञा." खंडोजीने झुकत ती लोकाधारी आज्ञा वरच्यावर झेलली.

"बाबा, या तुम्ही आता. तुमचा धारा तुम्हांस माफ आहे. काही अडले-नडले तर अनमान न करता आम्हास भेटा. आमचे दरवाजे तुम्हासाठी खुले आहेत."

संभाजीराजे उठले. भरून पावलेले सगळे कुणबी कमरेत झुकले. आता त्यांच्या पाठीवर चिंतेची काळी कांबळी नव्हती!

पुन्हा बैठकी दालनाच्या रोखाने चाललेल्या संभाजीराजांच्या डोळ्यांसमोर सुरनीस

आण्णाजींची चर्या मात्र एकसारखी नाचत राहिली. "हा माणूस आम्हास खूप नड देणार!" शंकेचा झेपावता खंड्या पक्षी उडाला. त्यांच्या मनाच्या गंगासागरात डुबला. मासोळी मटकावून आपली लांब चोच साफ करीत नियतीच्या आंब्याच्या झाडावर जाऊन बसला.

संभाजीराजे पुन्हा पंडितांच्या मेळ्यात येऊन बसले. हातातील गुलाबकळी त्यांनी ब्रिछायतीवर दूर ठेवून दिली. डहुळलेल्या मनाच्या अवस्थेतच त्यांनी, तिष्ठत बसलेल्या परशरामपंतांना मत्स्यपुराणातील निवडीचा श्लोक सांगितला–

"यद्यपि अल्पतरं कर्मं तदपि एकेन दुष्करम्।
पुरुषेण सहायेन किमु राज्यं महोदयम्॥

–लहान का असेना पण अवघड कर्म करणाऱ्या पुरुषांच्या साहाय्याने कोणते राज्य मोठे होणार नाही?"

अनेक भावनांची जाळी चेहऱ्यावर पसरलेल्या संभाजीराजांना, त्यामुळे आणि गोंधळून गेलेल्या बैठकीतल्या पंडितांना कुणालाच कल्पना नव्हती की या वेळी छत्रपती महाराज शहाजणांच्या गजरात, तोफ भांड्याच्या कल्लोळात, झुलबाज, आणि नाना अलंकारांनी सजलेला निशाणाचा हत्ती समोर ठेवून, पांढऱ्याशुभ्र विजय घोड्यावर मांड जमवून, पश्चिम वेशीतून भागानगरात प्रवेशत होते. त्यांच्या पाठीशी हजारोंचा मावळी फौजफाटा चालला होता. तानाशहाची कुत्बशाही रय्यत हवेल्यांच्या सफेल्यांत येऊन दाटीवाटीने मराठ्यांच्या सर्जा राजाचे दर्शन डोळाभर घेत होती.

शृंगारपुरात 'बुधभूषणम्‌चा' द्वितीय अध्याय संपत होता, भागानगरात महाराजांच्या हयातीचा 'शिवभूषणम्‌चा' शेवटचा अध्याय सुरू होत होता!

'मिश्रकनीति' हा बुधभूषणम्‌चा तिसरा अध्याय बांधून झाला. बैठक उठू घातली. सारे पंडित संभाजीराजांना अदब देऊन जायला निघाले, पण केशव पंडितांच्या मनी काहीतरी हेत घोळत असल्याने ते खोळंबले.

"बोला केशव पंडित, काय बाब आहे?" पंडितांना काहीतरी बोलायचे आहे हे ताडून संभाजीराजांनी विचारले.

"एक... एक अर्जी आहे युवराजांच्या चरणी. आज्ञा होईल तर पेश करू." केशवपंडित अडखळत म्हणाले.

"बोला."

"पुरात कालिमातेचे एक शिवयोगी भक्त आहेत. युवराजांच्या दर्शनाची ते इच्छा करतात. आज्ञा झाली तर..."

"बेशक. पंडित, घेऊन या त्यांना एकवार." संभाजीराजांनी संमती दिली.

एके दिवशी मग पंडित कालिभक्त शिवयोगी व त्यांचे शिष्य गणेशभट्ट जांभेकर यांना घेऊन वाड्यावर आले. शिवयोग्यांनी अंगी कफनी धारण केली होती. रुद्राक्षमाळेने जटेचा संभार बांधला होता. दंडावर, कपाळावर भस्माचे पट्टे फिरविले होते.

केशवपंडितांनी शिवयोग्यांना संभाजीराजांच्या बैठकी दालनात पेश करताच युवराजांनी पुढे होत कालिभक्ताचे पाय शिवले.

"जय भद्रकालीऽ" म्हणत शिवयोग्यांनी संभाजीराजांच्या टोपावर आशीर्वादाचा हात ठेवला. योग्यांच्या हाताला धरून संभाजीराजांनी त्यांच्यासाठी खास मांडलेल्या व्याघ्राजिनाच्या बैठकीवर त्यांना आदराने बसते केले.

"युवराज, एक संकल्प मनी आहे." मिटल्या डोळ्यांचे योगी आभाळ कब्जात घेण्याच्या बोलीत बोलले.

"जी. आज्ञा व्हावी." संभाजीराजांनी त्यांना नम्रभावे दाद दिली.

"या राजवास्तूत माता भद्रकालीची प्रतिष्ठापना व्हावी. तुमच्या वीर हातांनी तिला भोग मिळावा."

"जी. आज्ञा प्रमाण." संभाजीराजांनी शिवयोग्यांसमोर गर्दन झुकती केली.

संतुष्ट झालेले शिवयोगी व गणेशभट्ट निरोप घेऊन वाड्यातून बाहेर पडले.

शिवयोग्यांच्या वाड्यावर कालीच्या प्रतिष्ठापनेची जोरदार तयारी सुरू झाली. पिलाजीमामा, गणोजीराजे व खासा संभाजीराजे यांनी देख देऊन प्रतिष्ठापनेचा सारा सरंजाम सिद्ध केला. पुरातील कसबी शिल्पवटाने कृष्णवर्णी कातळ पारखून, अंगावर धावून आल्यासारखी वाटावी अशी भद्रकालीची पुरुषभर उंचीची मूर्ती खोदली.

शिवयोग्यांनी शोधलेल्या सुमुहूर्तावर महाकालीची ती मूर्ती वाजतगाजत वाड्यावर आणण्यात आली. तिला रक्तरंगी आसवाब चढविण्यात आले होते.

राणूअक्का, येसूबाई, दुर्गाबाई, राजकुवरबाई यांनी आपल्या भरल्या चुड्यांच्या हातांनी भद्रेची ओटी भरली.

शिवयोग्यांनी एका तबकात ठेवलेली नंगी तेग उचलून ती संभाजीराजांच्या हाती दिली. भद्रेच्या डोळ्यांना डोळे जोडलेले संभाजीराजे भारावल्यासारखे धीम्या कदमी पुढे झाले. मातेसमोर गुडघे टेकीत त्यांनी आपले कपाळ क्षणभर फरसबंदीला भिडविले. मग माथा वर घेत हातीची तेग कपाळाला लावली. हत्यार डाव्या हाती पेलून 'जय भद्रकाली' अशी भाक फोडून त्यांनी उजव्या हाताचा अंगठा हत्याराच्या पाणीदार शिकलेवरून सरकन ओढला. भोसलाई गरम रक्ताची धार अंगठ्यावरून उमळली. आपल्या राजरक्ताचा तवाना भोग भद्रेला देण्यासाठी युवराजांनी ठिबकता अंगठा तसाच तिच्या चरणांजवळ नेला. दुर्गाभद्रेची प्रतिष्ठापना झाली!

रायगडावर मात्र वेगळेच शिजले गेले होते. महाराणी सोयराबाईच्या खासेमहालातून बाहेर पडलेल्या आण्णाजी दत्तोंनी एक थैलीबंद खलिता विश्वासू खबरगिराच्या हवाली केला होता. खलित्यापोटी मजकूर होता– "महसुलाचे उसुलाबाबत युवराज कारण नसता घालमेली करतात. रयतेस सरसकटीने धारा माफ केलिया सरकारी खजिना आबादान रक्षावा ते कैसे व्हावे ?"

या कशाची कल्पना नसलेले छत्रपती महाराज तिकडे भागानगरात तानाशहाशी मनाजोगे राजकारण बांधून, मुलुखमारीसाठी त्यांच्याकडून हवा तसा सुलूख करवून घेऊन, भागानगराबाहेर पडले होते. आदिलशाहीवर चालून जाण्यासाठी. दूरवर नजर पोचणारी महाभद्रा दुर्गाकाली मात्र आपल्या विस्फारल्या डोळ्यांनी हे सारे शांतपणे बघत होती !!

शृंगारपुरात संभाजीराजांनी भक्तिभावाने 'कालीची' प्रतिष्ठापना केली होती. रायगडावर मात्र सुरनीस आण्णाजी दत्तो आणि महाराणी सोयराबाईसाहेब यांच्या मनी 'कलीची' प्रतिष्ठापना चालू होती !!

□ □ □

८

गावदेवता भावेश्वरीच्या मंदिरासमोरच्या आवारात अवघे शृंगारपूर लोटले होते. देवीला सामोरा येईल असा संभाजीराजांसाठी बिछायती, गिर्द्या मांडलेला बैठकीचा चौथरा सिद्ध केला होता. त्यावर गिर्दीला रेलून संभाजीराजे बसले होते. त्यांचा माग धरून पाठीशी पिलाजीमामा, गणोजीराजे, कान्होजीराजे असा शिर्क्यांचा मर्दाना बसला होता. डाव्या बगलेला धरून केशव पंडित, उमाजीपंत, कवी कुलेश, उधो योगदेव, महादेव यमाजी, परशरामपंत, खंडोजी, अंतोजी, रायाजी एकटाकीने खडे होते. उजव्या बगलेला मांडलेल्या जनानी बैठकीवर येसूबाईंच्या आईसाहेब, येसूबाई, राजकुवरबाई, राणूअक्का, दुर्गाबाई असा भोसले-शिर्क्यांचा जोड-जनाना बसला होता. त्यांच्या पाठीमागे खांद्यावर तबक तोलून धरलेली, आजवर घडलेले 'मायंदाळ' मनात रेंगाळत असलेली धाराऊ उभी होती.

भावेश्वरीच्यासमोर येईल असा, आंबवर्त आणि श्रीफळांनी सजलेला होळीचा सावरीचा स्तंभ चांदणे अंगावर घेत उभा होता. त्याला धरून आवाराच्या मध्यभागी येईल असा लाकडांचा भला मोठ्ठा हुडवा रचण्यात आला होता. हातशेणी रचून त्यातील लाकडे पुरती झाकून टाकली होती.

"धाकलं धनीऽ सणाच्या दिसाचा मान करावा. होळीला चूड द्यावा." होळीसणाचा मानकरी, शृंगारपूरचा गावगुरव संभाजीराजांच्यासमोर येऊन आर्जवाने म्हणाला. हातातील मशालीचा चूड त्याने उंच उठवला.

युवराज संभाजीराजे बैठकीवरून उठले. पायीच्या राजमोजड्या त्यांनी हलकेच उतरल्या. गुरवाच्या हातातील चूड आपल्या हाती घेतला.

"जय भऽवानी" पुण्यस्मरणाची भाक फोडून त्यांनी हुडव्याला पेटता चूड दिला. हुडवा पेटला. दूधरंगी चांदण्यात ज्वाळांचे पिवळे, तांबडे पक्षी उड्या घेऊ लागले. होळी शिलगली. धगधगलेल्या होळीच्या आगीशी झट घेण्यासाठी होळकरी खेळे सिद्ध झाले. संभाजीराजे हुडव्याला पाठ न दावता हटत्या कदमांनी बैठकीवर बसले. गुरवानं पेटत्या हुडव्याला फेर घालीत चारी अंगानी श्रीफळे रसरसत्या निखाऱ्यात फेकली. बेभान झालेले होळकर खेळे आगीभोवती घिरट्या घालू लागले. मरणाला कनवटीला लावणारे हात

एका मागोमाग एक असे फुलल्या, तडकत्या निखाऱ्यात मानाचे श्रीफळ शोधण्यासाठी बेगुमान घुसू लागले.

जमले शृंगारपूर डोळ्यांत जीव आणून होळकरांची खटपट बघत होते. अर्धी घटका हटली तरी मानाचे फळ आगीच्या कड्यातून काही बाहेर निघत नव्हते. कित्येकांचे हात पोळून निघाले होते. फेकलेल्या श्रीफळांचे कोळसे झाले म्हणून "आई, त्येकरांचा अपराद पोटात घे गं माये!" म्हणत भेदरल्या गुरवाने दुसरी श्रीफळे धडाधड हुडव्यात फेकली. खेळ्यांची दमगीर झालेली पहिली फळी हटली. दुसरी पुढे झाली, भोवतीचे श्वास रोखणीला पडले. नव्या दमाच्या होळकरांची सणाच्या आगीशी हातघाई जुंपली. आता चंद्र कलू लागला. मध्यरात्र टळून गेली. होळकरांच्या तीन फळ्या येऊन आगीशी झुंज घेऊन हटल्या होत्या. मानाचे फळ काही निखाऱ्याबाहेर निघत नव्हते. होळीसण कुचमला. बावरलेले शृंगारपूरकर भेदरून आपापसांत कुजबुजू लागले.

बैठकीवर बसलेले संभाजीराजे गिर्दी सोडून ताठपणे बसले होते. त्यांची कठोर नजर हुडव्यातील निखाऱ्यांना आता जरब भरू लागली.

रायाजी, अंतोजी यांच्यामागून गावकुसाची अब्रू राखण्यासाठी गणोजीराजे शिर्केसुद्धा हुडव्याभवती चकरा टाकून खाली हाताने परतले.

संभाजीराजांनी एकदा जमल्या सणकऱ्यांवर नजर टाकली. सगळ्यांच्या माना खाली होत्या. हुडवा धडधडतच होता. युवराजांच्या मस्तकात ठिणग्याच ठिणग्या उधळू लागल्या. "भृंशत् बलान्वयसिंधुसुधाकरः । सिंधुसुधाकरासारखे प्रचंड बलशाली असे राजे शहाजी होऊन गेले!"

"यस्य अनेक वसुंधरा परिवृत् प्रोत्तुंग चुडामणेः ।
पुत्रत्वं समुपागतः 'शिव' इति ख्यातः पुराणे विभुः ॥

त्या शहाजीराजांना महामूर मुलखाचे धनी असलेले, लोकांना डोंगरासारखे म्होरके वाटणारे, पुराणातील पुरुषश्रेष्ठ शिवासारखे असे राजे शिवाजी हे पुत्रश्रेष्ठ झाले!"

"तस्यात्मजः शंभुरिति — त्यांचा पुत्र मी 'शंभूराजे' या नावाने मशहूर आहे. 'तस्मात्मजः —' त्यांचा पुत्र."

संभाजीराजे बैठकीवरून ताडकन् उठले! कलू घातलेला चंद्र पुन्हा स्थिरावला! थरकलेले चांदणे थिजले. खाली गेलेल्या कैक माना वर उठल्या. आता भावेश्वरीसमोरचा पेटता हुडवाच जसा संभाजीराजांच्या डोळ्यांत उतरला होता.

"आम्ही — आम्हीच काढू मानाचे फळ हुडव्याबाहेर! आशीर्वाद द्यावा." झपाझप चालत संभाजीराजे ऐन हुडव्याजवळ आले. बेभान स्थितीत त्यांनी अग्निकुंडाला एक चक्कर टाकली.

"जय भवाऽनी!" सर्वांच्या अंगावर काटा सरकावा अशी राजघाटीतून साद फुटली. दुसऱ्याच क्षणी त्या शिवाच्या पुत्राचा — रुद्राचा हात फुलल्या निखाऱ्यात घुसला.

धगीने मनगटाभोवती बांधलेली पोहची होरपळून निघाली. राजपुत्र आणि अग्नी यांची इरेसरीची झुंज पडली! धगीचा अंदाज घेत संभाजीराजे हुडव्यात हात चालवू लागले. होरपळणारा हात अधिकच ईर्षेने चालू लागला. आणि बघता बघता तळहात पोळून टाकणारा काळपट ठिपका त्या राजहाताने निखाऱ्याबाहेर खेचला! पापणी लवण्याच्या आत तो "जय भवाऽनी" च्या गजराबरोबर फरसबंदीवर आपटण्यात आला. ठिकऱ्या ठिकऱ्या उसळल्या मानाच्या श्रीफळाच्या!

"आई भावेसरी गं माते!" म्हणत गुरवाने आपले अंग गावदेवीसमोर सरळ दंडवतात झोकून दिले.

"जय भवानीचा" आवारभर जल्लोषता कल्लोळ झाला. कवी कुलेश, खंडोजी बल्लाळ, रायाजी, अंतोजी सारेच युवराज संभाजीराजांचा हात धरण्यासाठी पुढे धावले. त्यांपैकी एकाच्याही हातात हात न देता संभाजीराजांनी तो पाठीशी तसाच घेतला आणि — आणि आपल्या पेटत्या डोळ्यांनी एकदा जनानी बैठकीवर नजर टाकली. येसूबाईंसह सारा जनानाच तडक उठून खडा होता.

येसूबाई दिसताच संभाजीराजे सारा आगडोंब विसरून पुनवेच्याही चांदण्यालाही लाजवील असे मंद हसले, पण — पण ते येसूबाईंना दिसू शकले नाही. कारण त्यांच्या डोळ्यांवर आसवांचे झिरझिरे आडपडदे उतरले होते!

शिकारीसाठी रान काढण्याच्या मनसुब्याने आज संभाजीराजांनी हाके रानात धाडले होते. रायाजी, अंतोजी व खंडोजी असे खेळे संगती घेण्याचे योजले होते.

तेल दिलेली तोड्याची धुराटी बंदूक सदरेवर संभाजीराजांच्या येसूबाईंनी मलमपट्टी बांधलेल्या पोळल्या हाती देत खंडोजी म्हणाला, "फार नामी शिस्त आहे हत्याराची युवराज."

फिरंगी माटाची ती धुराटी हाती घेत संभाजीराजांनी खांद्याला भिडवली. नळीच्या डोक्यावरच्या माशीवर, डावा डोळा मिटत शिस्त बघितली. धरल्या शिस्तीत येसूबाईंनी उन्हाला लावलेला जरीकळीचा बुंदेदार शालू समोर आला! त्यावरच्या एका झगझगत्या बुंदीवर नळीची शिस्त रोखत संभाजीराजे स्वतःशीच हसले.

"ठीक आहे खंडोजी. तुम्ही तयारीला लागा. उन्हं कलतीला लागली की निघणार आम्ही." हातीची धुराटी तशीच पेलत संभाजीराजे वाड्यात शिरले. शिकारीला निघण्यापूर्वी एकदा येसूबाईंच्या कानी घालावे या विचाराने. तिसरा प्रहर सरतीला आला होता. वाड्याच्या सफेलीत येसूबाई आणि दुर्गाबाई उभ्या होत्या. संभाजीराजांना येताना बघून त्या सावरल्या.

"आम्ही आता रान काढायला निघणार आहोत." म्हटले तर येसूबाईंना, म्हटले तर दुर्गाबाईंना असे संभाजीराजे बोलले.

काही वेळ तसाच शांततेत गेला. आपल्या पदरकोटाचा पंखा करून तो हलकेच आपल्या गळ्याभोवती वारीत येसूबाई म्हणाल्या, " आज वळिवाचा माग दिसतोय!" त्यांना म्हणायचे होते, " आज स्वारीनं नाही गेलं तर नाही का चालणार ?"

" वळीव अंगावर घेत, घोडा फेकीत रान काढण्यातच शिकारीचा खरा मजा." तेवढ्यात पिलाजींचे कारभारी सफेलीत आले. झुकत त्यांनी वर्दी दिली– " कुणी एक हारकारा आला आहे. खासा युवराजसाहेबांना भेटण्याची अर्जी करतो आहे."

मनात अनेक प्रश्नांचे मोहोळ उठलेले संभाजीराजे काही न बोलता कारभाऱ्यांच्या पाठीशी झाले. येसूबाई आणि दुर्गाबाई आपल्या स्वारीच्या पाठमोऱ्या मूर्तीकडे बघतच राहिल्या. " येतो आम्ही " असे म्हटल्याखेरीज स्वारी अशी कधीच निघून नाही गेली आजवर, असा विचार नाहीतरी येसूबाईंच्य मनी आला.

संभाजीराजांनी घोडाईताला सदरेवर पेश करण्याची आज्ञा कारभाऱ्यांना दिली.

घोडाईत शिर्क्यांच्या सदरेसमोर आला. त्याने झुकून तसलीम दिली.

" क्या है ? " संभाजीराजांच्या तोंडून जरबी बोल उठले.

" गुस्ताखी मुऑफ हुजूर. आपको खलबतखानेमें मिलनेका मुझे हुक्म है।" घोडाईत शांतपणे म्हणाला.

संभाजीराजांनी डावी उजवी गर्दन फिरविली. सदरेवर असलेले कारभारी, परशरामपंत, खंडोजी साऱ्यांनी तिची इशारत पकडीत सदर सोडली.

" बोलो. यही हमारा खलबतखाना है." संभाजीराजे निर्धाराने समोरच्या घोडाईताला निरखत म्हणाले.

जरीबुंदी तहबंद लखलखला. हमशाने त्या तहबंदाआड लपविलेला खलित्याचा फासबंद थैला बाहेर खेचला. हलक्या पावलांनी पुढे येत त्याने झुकून तो संभाजीराजांच्या हाती दिला. तो खलिता औरंगजेबाच्या दख्खन स्वारीवर नामजाद सरलष्कर दिलेरखानाचा होता! अकलूज प्रांतातील तळावरून धाडलेला. आपल्या गोटात येऊन मिळण्याचे आवाहन करणारा!!

त्यातील मजकूर वाचताना संभाजीराजांच्या मस्तकात मुंग्याच मुंग्या धरल्या. हात थरथरला. " साक्षात मोगली गोटात : दक्षिणेचा मुलूख मारण्यासाठी ? कैसे व्हावे हे ?" युवराजांच्या नाकपाळ्या फुलल्या. श्वास चढीला पडला.

एका बंद दरवाज्याला नजर रोखत संभाजीराजांनी दणदणती टाळी दिली. परशरामपंत आत आले. " पंत, कलमदान आणि खलित्यासाठी वळी घ्या."

" जी." परशरामपंतांनी आपल्या चिटणिसी बैठकीजवळचे कलमदान उचलले. खलित्यासाठी एक कोरी वळी युवराजांच्या हाती दिली. समोर कलमदान ठेवले.

" या तुम्ही ! " परशरामपंतांना इशारत मिळाली. ते निघून गेले.

आधारासाठी वळीखाली गोल गिर्दी घेऊन संभाजीराजांनी पीस कलमदानात

डुबविले. क्षणभर ते तसेच राहू दिले. तेवढ्यात मजकुराचा मेळ मनाशी बांधून घेतला. कापडी अस्तराच्या वळीवर खास राजहाताने अक्षरे उमटू लागली.

" मशहुरल अनाम, दाम दौलतहु, लष्करे सालार दिलेरखान सुभे दख्खन बजानीब रा. रा. युवराज शंभू उपरी विशेष–

खान मजकुरी दिल्हे खत पावले. ये समयास आमचे महाराजसाहेब मोहिमशीर होवोन मुलुखाबाहेर असत. मागील दौलतीची हरएक जिम्मेदारी त्यांनी आम्हावर सुपूर्द केली असे. बरी गत हेरून खलिता धाडिला! पण आम्हास आण-ईमान आमच्या बापजाद्यांचे. तुम्हाकडे येऊ हे कैसे मनी धरता ? ते होणे नाही ! जाणिजे."

तळपत्या, समाधानी डोळ्यांनी संभाजीराजांनी खलिता एकदा नजरेखाली घातला. वाळूची चिमट त्यावर शिवरली. आलेल्या फासबंद थैलीतच त्याची वळी सरकवली. बसल्या बैठकीवरूनच ती थैली समोरच्या मोगली घोडाईताच्या रोखाने फेकली. त्या इमानी कुत्र्याने ती झेलली. तसलीम देऊन तो सदरेबाहेर पडला.

संभाजीराजे बैठकीवरून उठले. सदरेमागे भिंतीला रेलून ठेवलेली धुराटी त्यांनी उचलली. मनातील शिकारीचा जोश आता पार ओसरला होता.

दार उघडताच खंडोजीने त्यांना मुजरा दिला. त्याच्या हाती धुराटी देत युवराज म्हणाले, " खंडोजी, आम्ही शिकारीचा बेत रद्द केला आहे. हाक्यांना वर्दी द्या."

खंडोजी चमकून आपल्या धाकल्या धन्याकडे बघतच राहिला.

वळिवाच्या बेलाग धारांनी टिपण धरले. शिर्क्यांच्या वाड्यातून मोगली घोडाईत तशा धारांतही बाहेर पडला. दिंडीबाहेर ठाण केलेल्या घोड्याचे कायदे त्याने सोडविले. घोडे पावसाला बिचकून जागचे हलेना. त्याच्या खुब्यावर मनगटाचा तमाचा लगावत स्वाराने त्याला शिवी हासडली – " इसकी मा ऽ का!"

मोगली घोडाईत मांड जमवून उगवतीच्या रोखाने दौडू लागला. मागे शृंगारपुरात वळिवाची मारझोड ठेवून!

त्याच्या पाठोपाठ शिर्क्यांच्या वाड्यातून एक मावळी घोडाईतही बाहेर पडला. पुढच्या स्वाराच्या घोड्याच्या टापांबरहुकूम तोही दौडू लागला. तो होता विश्वनाथ! महाराजांनी शृंगारपुरावर नेमलेला खास विश्वासू चाकर! वारा, पाऊस, विजा कशाचीही पर्वा न करता ' विश्वनाथ ' मोगली घोडाईत कुठल्या गोटातून आला होता याचा माग घेणार होता. परस्पर रायगडी जाऊन त्याची खबर सुरनीस आण्णाजींच्या कानी घालणार होता.

दरुणीदालनातील झरोक्यातून बाहेरच्या निसर्गाचे कोपलेले रूप बघणाऱ्या येसूबाई पाठीशी उभ्या असलेल्या दुर्गाबाईंना म्हणाल्या– " आम्ही सुचवून बघितलं स्वारींना आज वळिवाचा माग दिसतो म्हणून. या पावसात विजांचा भरोसा नसतो. पण इकडून ऐकणं व्हायचं नाही. स्वारी हमखास बाहेर पडणार! तेही पोळलेला हात घेऊन!"

"युवराज, एक सोचनेकी खबर है। विश्वनाथ शृंगारपूरसे गुम हो गया। कहाँ गया ठिकाना नही." कवी कुलेश कमरेत झुकत संभाजीराजांना म्हणाले.

बैठकी दालनात आसनावर बसलेले संभाजीराजे ते ऐकताच चटका बसावा तसे उठले. त्यांच्या हातीचे सोनचंपकाचे फूल फिरका घेऊ लागले.

"कोण आहे?" एक राजजरबी आवाज दालनाच्या दरवाज्याच्या रोखाने उठला. दरवाज्यावर हत्यारी पहारा देणारा आत पेश झाला.

"खंडोजींना याद फर्माव." त्याला आज्ञा मिळाली. संभाजीराजे पुन्हा विचारगत फेऱ्या घेऊ लागले. कवी कुलेश बुचकळ्यांत पडले.

थोड्या वेळातच खंडोजी बल्लाळ दालनात आला.

"आज्ञा स्वामी." म्हणत त्याने मुजरा दिला.

"खंडोजी, रायाजी आणि अंतोजीस टाकोटाकीनं आमच्या सामने पेश करा. दोन खातरजमेचे घोडाईत पारखून सिद्ध ठेवा. एक जोखमीचं काम करणं आहे."

"जी." खंडोजी आला तसा निघून गेला.

"कविराज, तुम्हास आठवतो तो श्लोक आम्ही आग्रहानं 'बुधभूषणम्' मध्ये घ्यावयास लावलेला. महाभारतातला. जैसा मनुष्य इतरांशी वागतो तैसेच त्याला अवघे वागवितात. ते धर्मास धरूनच आहे. फसवेपणास फसवेपणाच मारक ठरतो. सच्चेपणाला सच्चेपणच सायवळ होते, असे सांगणारा!"

कवी कुलेशांनी होकाराची मान डोलवली आणि तो श्लोकच युवराजांना पेश केला –

"यस्मिन्यथा वर्तते यो मनुष्यस्तस्मिंस्तथा वर्तितव्यं स धर्मः।
मायाचारो मायया बाधितव्यः साध्वाचारः साधुना प्रत्युपेयः॥"

"व्वा ऽ! कविराज, आम्ही तेच करावे म्हणतो." संभाजीराजे बोल बोलत कुलेशांच्या समोर आले. आपल्या हातीचे चंपकफूल त्यांनी कुलेशांच्या हाती ठेवले.

"या तुम्ही कविराज." कसल्यातरी मनसुब्याने संभाजीराजे म्हणाले.

"जो आग्या." कुलेश बाहेर पडले.

विश्वनाथ, आण्णाजी दत्तो आणि मातुश्री सोयराबाईसाहेब यांच्या चर्या आलटून पालटून संभाजीराजांच्या मनासमोर फेर धरू लागल्या. "जैसा मनुष्य इतरांशी वागतो तैसेच त्याला अवघे वागवितात!" युवराजांच्या मनी काहीतरी बांधून पक्के झाले.

"मुजरा धाकलं धनी." रायाजी, अंतोजीची दुधाच्या इमानाची जोडी समोर बघताच संभाजीराजे खेचल्यासारखे दरवाज्यापर्यंत त्यांच्या रोखाने आपणहून गेले. दोघांच्याही खांद्यावर झटकन हाततळवे चढवून प्रथम त्यांनी दोघांना खिनभर निरखले. धाराऊची ती बांडी पोरे त्यांना रामराजांसारखी रक्ताचीच वाटली.

"दरवाजा लोटून घ्या." पहाऱ्यावरच्या धारकऱ्यांना संभाजीराजांनी समज दिली.

"रायाजी, अंतोजी आम्हास वळिवाचे ढग घेर टाकणार! रायगडी काहीतरी शिजू घातलं आहे. तुम्ही दोघे पाठीचे. याच पावली गडाकडं कूच करा. खंडोजी तुमच्या दिमतीस निवडीचे घोडाईत देतील ते घ्या. सुरनीस आण्णाजी आणि मासाहेबांच्यावर घारीची नजर ठेवा!! आमच्या बाबतीनं काही कानी आलं तर टाकोटाकीने आम्हास माग द्या. इथून निघताना कापूरहोळास शेतकामाची जोडणी लावणेस जातो आहोत अशी हूल ठेवा. धाराऊला याची समज द्या. निघा तुम्ही." संभाजीराजांनी दोघा भावंडांचे खांदे थोपटले. ऊरभेट दिली. दोघेही गाडेबंधू काही न बोलता पण सारे मनोमन उमगून बाहेर पडले.

त्या दिवशी दुपार टळतीला लागली तसे शिर्क्यांच्या वाड्यातून चार घोडाईत बाहेर पडले. भावेश्वरीचे देऊळ मागे टाकून शृंगारपूरची वेस येईपर्यंत ते यात्रेला चालल्यासारखे सादिलवार चालीने चालले. वेस मागे पडताच मात्र त्यांची जनावरे चौटाप उधळली. रायगडाच्या रोखाने!

रायगड आता घरच्याच डाव प्रतिडावावर पडला. नियतीच्या इच्छेने! प्रतापगडची आणि तुळजापूरची अष्टभुजा 'श्री' हे सारे शांतपणे बघत होती.

दक्षिणेतून छत्रपती महाराजांच्या मोहिमेच्या फत्ते घेणाऱ्या खबरींमागून खबरी शृंगारपुरात येऊ लागल्या –

"किल्लेदार नसिर मुहमदास वळते करून छत्रपतींनी जिंजी मारली. सोमोत्तर पेरुमल्लम् येथे ज्या मंदिरांच्या मशिदी झाल्या होत्या त्यांचे महाराजसाहेबांनी पुन्हा मंदिरात शिवपरिवर्तन केले. तेथे शिवपिंडी स्थापन केल्या. महाराज वेलोर, तिरुवाडीवर चालून गेले. वालदूर व तेवेनापट्टमचे किल्ले महाराजांनी मारले."

येणारी हर खबर घेऊन शृंगारपुरात पिलाजींच्या वाड्यावरची नौबत पडत्या पावसात झडझडू लागली. ती ऐकताना शिवारातले गारठलेले कुणबी हातची मशागत खिनभर थांबवून, एकमेकांना नजरांचे इशारे देत, हरळ्या देत 'भवानी भावेसरी उदं गं उदं!' म्हणत पुन्हा अंगी नवा ताव घेत जोमाने मातीशी झटत होते.

येणाऱ्या खबरीचा वकूब बघून संभाजीराजे सदरेवर खबरगीराला होनांची थैली, सोनकडे, घोडा, हत्यार, पेहराव तळपत्या डोळ्यांनी बक्ष करीत होते. लागलीच सदरी बैठक सोडून अंत:पुरात जाऊन ती ती खबर जातीनिशी राणूअक्का, येसूबाई, दुर्गाबाई यांच्या कानी घालीत होते. प्रत्येक वेळी झरोक्यातून दक्षिणेच्या रोखाने स्वत:ला हरवून बघताना मात्र त्यांच्या मनी विचार उठत होता – "महाराजसाहेब, या मोहिमेत आम्ही आपल्या दिमतीतच पाहिजे होतो." बाहेर कोसळणाऱ्या पाणसरी त्यांच्या मनात महाराजांच्या कैक आठवणी जागवीत होत्या. अस्वस्थ होऊन सुस्कारा टाकीत ते अंत:पुर

सोडून बैठकमहालात येत होते. पंडित मंडळींच्या संगतीत अष्टदश पुराणांवर चर्चा करीत होते. कालीमातेची पूजा बांधीत होते.

पावसाने आता चांगलेच अंग धरले. एके दिवशी आपल्या डावे उजवे असे दोघां पार भिजलेल्या मावळगड्यांना संभाजीराजांच्या महाली रुजू करून खंडोजी बल्लाळ बाहेर पडला. ते रायगडाहून परतलेले अंतोजी व रायाजी होते. पगड्यांच्या कडांवरून टपटपते पाणथेंब महालाच्या उंची रुजाम्यावर निथळवीत अंतोजी-रायाजीने युवराजांना अदब दिली. त्यांना बघताच रायगडचा करिना ऐकायला अधीर झालेले संभाजीराजे त्यांच्याजवळ आले. "बोला." राजाज्ञा सुटली.

"धनी, गडावं सात म्हालांत बॉट शिरकवाय वाव न्हाई असा बंदोबस्त हाय. सुरनिसांच्या दफ्तरावर हत्यारबंद पहारा जारी ठेवलाय. त्येंची थोरल्या म्हालाकडं ये-जा वाडलीया." अंतोजीने हाती लागले होते तेवढे पेश केले.

"गडांवयनं भल्या फाटेचं हारकारे खलितं घिऊन थोरल्या धन्यांच्याकडं कांदडी मुलुखात कूच होत्यात." रायाजीने आपल्या भावाची जोड देत त्यात भर घातली.

"वाड्यावं काय चाललंया माग येत न्हाई पर ... पर ..." बोलता बोलता अंतोजी थांबला.

"पर काय? बोल अंता." संभाजीराजांनी त्याला धीर दिला.

"गडावं चाकरमान्यांत बोलवा उटलीया की ..."

"कसली बोलवा?" संभाजीराजांनी त्याचा खांदा हाताच्या पकडीत आवळला.

"तुमी ... धाकलं धनी तुमी म्हनं गलिम दिलेलच्या गोटात जाणार!" अंतोजीने गर्दन पाडली.

"अंतोजी!" दोघाही गारठलेल्या गाडेबंधूंच्या अंगावर काटा उठविणारी जरबी गर्जना संभाजीराजांच्या संतप्त ओठांतून फुटली. जखमी वाघासारखे ते महालात असह्य कोंडीने फेऱ्या घेऊ लागले. अंतोजी-रायाजीला "या तुम्ही" असे म्हणण्याचेही भान त्यांना राहिले नाही.

पावसाळा परतला. धुक्याची शिबंदी घेऊन थंडीने शृंगारपुरावर तळ टाकला. दसरा धरून, सारवलेल्या खळ्यांवर तिवडे उभारून कुणब्यांनी मळण्या साधल्या. भात, नागली, साव्याचा दाणागोटा कणगुल्यांत आबादान झाला. नंदीबैलवाले 'गुब ऽ गुब ऽ'चा ढोलसाद घुमवीत वाडी-मजऱ्यांतून फिरू लागले. मोरपिसांच्या उंच टोप्या घालून घाटा वाजवीत, वासुदेव भल्या पहाटेचं सुभ्यातील रयतेला जागवीत फिरू लागले. शाळूचे दिवस हटून दिवाळसण मागे पडला. दिवस कासराभर वर चढला तरी दहा हातांवरचे दिसत नसावे असे धुक्याचे वट करायचा जोर धरला.

पिलाजींच्या वाड्यावरची सांजनौबत झडून भवतीच्या रानकाळ्या झांझटात विरली. एका चांदीच्या तबकात हुलग्याच्या गरम गरम माडग्याचा वाडगा घेऊन येसूबाई आपल्या स्वारींच्या सुखमहालात आल्या. तबक चौरंगीवर ठेवताना त्यांच्या सोनपुतळ हातीचा चुडा किणकिणला. अंगीचा जरीबुंदी, चंद्रकळी शालू महालातील शमादानांच्या उजेडात झगमगला. अंगाभोवती शालनामा लपेटून घेतलेले, केस मानेवर रुळणारे संभाजीराजे येसूबाईंच्याजवळ आले. काही न बोलता येसूबाईंनी माडग्याचा वाडगा उचलून स्वारींच्या हाती दिला.

काव्यपंक्तीसारख्या गोमट्या दिसणाऱ्या येसूबाईंना संभाजीराजे निरखीतच राहिले.

खालच्या मानेने येसूबाई पायतळीच्या फरशीवर पसरलेला उजेड पायाच्या अंगठ्याने उकरण्याची कोशिस करीत होत्या. भरून पावलेल्या रानावरचे फडफडते पतंग त्या महालात मुजोरीने घुसून शमादानांच्या ज्योतींवर घालून घेत होते. ती उबदार शांतता फोडीत मग येसूबाईच म्हणाल्या, "हातचं माडगं खोळंबून राहिलंय!"

"नुसतं माडगंच का? आम्हीही खोळंबून राहिलोय!" मर्दानी मंद हसत संभाजीराजांनी वाडगा ओठांना लावीत एक भुरका घेतला. समाधान पावल्यानं येसूबाईंनी त्यांच्याकडे एक कोनी नजर टाकली. संभाजीराजांच्या मिशीत हुलग्याचा कण अडकून पडलेला बघून त्यांनी पटकन नजर खाली टाकून पदराचा शेव लगबगीनं आपले हसू दाबण्यासाठी ओठांत दिला.

माडगं चाखत संभाजीराजे महालात फेर धरू लागले. कसल्यातरी ओढीनं ते येसूबाईंच्या सामोरे आले. हातचा वाडगा पुढे करीत म्हणाले, "घ्या. तुम्ही दिलेलं माडगं केवढं जमलंय चाखून बघा!"

संकोचून येसूबाई तशाच उभ्या राहिल्या होत्या.

"घ्या. आमच्या ओठांनी याला काही खारटपणा नाही आलेला!" संभाजीराजे खळाळून हसले. झटका बसावा तसा हात पुढे करीत येसूबाईंनी वाडगा आपल्या हाती घेतला आणि तीर्थाचा घोट घ्यावा तसा एकाच दमात वाडगा रिता करून, चांदीच्या तबकात तो ठेवला. तबक उचलून त्या तरातर चालत महालातून पापणी लवायच्या आत बाहेरही पडल्या!

स्वत:वरच खूषनिहाल झालेल्या संभाजीराजांनी अंगावरचा शालनामा एकदा झटकून पुन्हा लपेटून घेतला आणि ते बैठकी दालनात आले. त्यांना बघताच काही तरी लिहीत बसलेले कवी कुलेश अदबीने उठले.

"काय लिहिता कविराज?"

"संस्कृत की कुछ समस्यापूर्ति हिंदोस्तानीमें हल करनेका यत्न कर रहा था स्वामी."

संभाजीराजे बैठकीवर बसण्यासाठी चालू लागले. त्या दालनाच्या दगडबंद भिंतीला लागून काही हारे मांडले होते. ते तोंडल्यांनी भरलेले हारे कुणब्यांनी वाड्यावर पाठविले होते. मुदपाकाकडे पाठविण्यासाठी ते एकसरीने मांडून बगलेला ठेवले होते. सहज म्हणून

संभाजीराजांनी त्यातील एक टपोरे, पिकू घातलेले तोंडले उचलले व ते बैठकीवर जाऊन बसले.

"कविराज, एक समस्यापूर्ती सोडवाल ?" संभाजीराजांनी हसत विचारले.

"जी. यत्न करेंगे." कविराज हात बांधून उभेच होते.

"या फळास 'तोंडलं' का म्हणतात ?"

कुलेशांनी ते फळ थोडा वेळ निरखले. त्यावर विचार केला नि जाब दिला, "हिंदोस्तानी मे इस को 'बिंबफल' कहते हैं स्वामी। सूर्य के बिंबसमान यह पका हुआ फल लाल दिखाई देता है।"

मान डोलवीत संभाजीराजे म्हणाले, "नाही कविराज, आम्हास वेगळेच वाटते. सांगू कधीतरी." हसत हसत संभाजीराजे बैठकीवरून उठले. तोंडले मुठीत ठेवूनच थाळा घेण्यासाठी निघून गेले.

थंडीला कवेत घेऊन दाट चांदणे वाड्यावर उतरले. मध्यरात्रीचे प्रहरटोल पडून गेले. शाल पांघरलेल्या संभाजीराजांचा डोळ्यास डोळा लागला नव्हता. महालात फेऱ्या घेऊन ते त्रस्त झाले होते. शमादानाखाली कितीतरी पतंग पंख जाळून घेऊन, निवांत पडले होते. काहीतरी मनी बांधल्यासारखे संभाजीराजे सुखमहालातून बाहेर पडले. त्यांची पावले दरुणीमहालाच्या रोखाने चालू लागली. पहाऱ्यावरचे गडी त्यांना देत असलेल्या मुजऱ्यांवर त्यांचे लक्ष नव्हते.

नेमकी त्यांची पावले येसूबाईंच्या सुखमहालासमोर थांबली. पहाऱ्यावरची अर्धवट पेंगुळलेली कुणबीण त्यांना बघताच धडपडत उठली. पदर सावरू लागली.

"आत वर्दी दे. आम्ही आलोत." कसल्यातरी आकाशी विजेने संभाजीराजांचे डोळे वर्ख देऊन काढले होते.

"जी." कुणबीण पाकोळीगत आत सटकली. क्षणभरातच परत फिरली. म्हणाली, "जाम्याच हाईत."

संभाजीराजे महालात आले. दरवाज्याला आडबंद पडला. गज पावलांनी बांडे संभाजीराजे भोसले येसूबाई उभ्या असलेल्या मंचकाजवळ आले. थेट मंचकावर बसले. त्यांच्या छातीवरची कवड्यांची वरखाली लपापणारी माळ त्यांनी उतरली. चौरंगावरच्या तबकात ठेवली नि मंचकाची काठाळी धरून उभ्या असलेल्या येसूबाईंना नजर दिली. खाली मान घालून, चंद्रकळी शालूचा मुखभर पदर पेलून उभ्या असलेल्या येसूबाई अष्टमीची चंद्रकोर भवानीच्या भंडाऱ्याच्या परडीत डुबवून काढल्यावर दिसेल तशा दिसत होत्या! आपली स्वारी कधी नव्हे ते मध्यरात्र टळल्यावर थेट आपल्याच महाली आली आहे हे त्यांना खरेच पटत नव्हते. त्या पार गोंधळून गेल्या होत्या.

धडधडती शांतता काही काळ कुचमून गेली. मग घोगरट बोलीत संभाजीराजे म्हणाले, "आमचं एक काम कराल ?"

"जी." खानदानी पदर नाजूक हलला.

"काम सादिलवार नाही." राजरक्ताने पेच टाकला.

"आम्ही सारी कोशिस करू." जाब आला.

"हे एवढं 'तोंडलं' आम्हास तोडून पाहिजे."

संभाजीराजांनी मुठीत धरलेले पाडाचे लालावलेले तोंडले येसूबाईंच्या समोर धरले.

"हं ऽ" स्वारी आपली थट्टा तर करीत नाही ना अशी शंका येसूबाईंना आली. त्या हसत हसत म्हणाल्या, "फा ऽ र जोखमीचं काम खरं. पण आम्ही ते हमखास करू."

"बघा. शब्द परताल!" संभाजीराजांचे डोळे लखलखले.

"तो भावेश्वरीच्या लेकरांचा रिवाज नाही." येसूबाईंनी कडवी आण दिली.

"ठीक आहे. तोडा हे तोंडलं. मात्र अट एकच आहे. हातानं वा हत्यारानं नाही तोडायचं हे. फार नाजूक आहे ते. उत्तरेकडं 'बिंबफळ' आणि आपल्याकडं 'जनाना फळ' म्हणतात याला." संभाजीराजे हसले.

"अलबत. या फळास हवे कशाला हात आणि हत्यार?" येसूबाई फसगतीने सहज बोलून गेल्या.

"आम्हास वाटलंच होतं. तुम्ही नाही कधी माघार घेणार! अं?" म्हणत संभाजीराजे हसले. "बघू या भावेश्वरीच्या लेकरांचा निर्धार!" म्हणत संभाजीराजांनी हातातील तोंडले चटकन आपल्या दातांच्या पकडीत घट्ट धरले नि हुंकार दिला. "हं!" तरीही त्यांचा कावा येसूबाईंच्या ध्यानी काही आला नाही. भाबडेपणी त्या पुढे झाल्या. पटकन् त्यांचे हात चाळवले. मग चुटपुटतच पुन्हा स्थिरावले. त्या पार गोंधळल्या. 'तोंडले' एवढे साधे. कसे तोडावे काहीच उमगेना! त्यांच्या चर्येवर अनेक भावनांची रंगपंचमी सजली.

दातीचे फळ बाहेर घेत संभाजीराजे खळाळून हसले. म्हणाले, "आम्ही नव्हतो म्हणालो काम सादिलवार नाही म्हणून!"

येसूबाई त्या बोलांनी खोलवर डिवचल्या गेल्या. शरमल्या. शमादानाच्या ज्योतीकडे बघत तोंडले कसे तोडावे या विचारात पडल्या. ज्योतीवर घालून घेणारे पतंग फडफडताना त्यांना दिसले. त्यांच्या काळजात कसलीतरी खोलवर धडपड उठली. अंगभर रोमांचक काटा उठला. 'केवढा चावटपणा करायचा तो.' अशा अर्थाची एक कृतककोपाची नजर त्यांनी संभाजीराजांच्या फरीसारख्या खोल, पुष्ट मुद्रेवर टाकली. त्यांचे उभे अंग मोरपिसांचे झाले. डोळे निर्धारी, तेजवान झाले.

दातांत फळ पुन्हा धरून संभाजीराजे डोळ्यांनी हसत होते. येसूबाईंचा चंद्रावळी, गोल मुखडा हळूहळू तोंडल्याकडे सरकू लागला. एका आगळ्या जगात जाताना त्या कुलस्त्रीचे डोळे अंगभूत लज्जाभावाने आपोआप मिटते झाले. येसूबाईंच्या कुंदकळी दातांची पकड तोंडल्यावर पडली. त्या छळवादी फळाचा आवेशाने येसूबाईंनी लचका तोडला.

गुंजलाल रसरशीत रस चार राजओठांवर पाझरला. लाजून चूर चूर झालेली रात्र शृंगारपुरावर चढत चालली!!

दिवसांनी रात्रीशी हातजमाई करून थंडीला पिटाळून लावले. पौषाचे दिवस आले. पंडित मंडळींच्या संगतीत काव्यशास्त्र, राजकारण, धारावसुली यावरची चर्चा संपवून संभाजीराजे खबरा घेण्यासाठी सदरेवर आले. त्यांना अदब देत परशरामपंत खडे झाले. खंडोजी बल्लाळ, रायाजी, अंतोजी यांनी सदरेच्या बगला धरल्या.

"बोला चिटणीस." सदरी बैठकीवर आसन घेत संभाजीराजांनी सवाल घातला.

"रांगणा, विशाळगड, तर्फ कोल्हापूर असा पन्हाळा सुभ्याचा बहुतेक सारा धारा जमाबंद झाला आहे युवराज. पावसाच्या महामूर झडीनं मावळतीच्या मुलखातील काही शिवारं धुपणीला लागलीत. ते कुणबी तेवढे धारामाफीची अर्जी करताहेत." परशरामपंतांनी दफ्तरी करिना पेश केला.

"त्या मुलखाचा देख करून, शहानिशा घेऊन त्यांना धारा माफ करा." संभाजीराजांनी निवाडा दिला.

"कर्नाटक देशाहून हे खबरगीर रुजू झाले आहेत. त्यांनी थोरल्या स्वामींच्या फत्तेच्या खबरा आणल्या आहेत." परशरामपंतांनी खबरगिरांकडं नजर दिली.

गिर्दीला रेललेले संभाजीराजे पुढेसे झाले.

"सरकार, थोरल्या धन्यांनी होदिगेरीच्या रानात कै. स्वामींच्या समाधीचे दर्शन घेतले. दानधर्म केला." एका खबरगिराने पुढे होत मुजरा भरला.

"भृशत् बलान्वय सिंधुसुधाकरः– सिंधुसागरसारखे बलशाली असलेले राजे शहाजी." संभाजीराजांच्या मनी 'बुधभूषणम्' फेर टाकून गेला. एका दगडी छत्रीसमोर गुडघे टेकून छत्रीला माथ भिडविलेले आबासाहेब त्यांना दिसू लागले. "आम्ही या मोहिमेत आपल्या दिमतीला असतो तर आबासाहेब, आम्हासही आमचा माथा त्या छत्रीसमोर नमता करण्याचं भाग्य लाभलं असतं." एक दुखरा निःश्वास सदरेवर उमटून विरला.

"कोलार, अरणी, तोरगळ, गदग असा मुलूख मारून थोरलं धनी बेलवाडीला भिडलं. वाडीच्या गढीची राखण मल्लमा देसायणीनं नेटानं करण्याची शिकस्त केली. ईश्वर प्रभुदेसायाच्या या विधवा अस्तुरीनं एक हप्त्यांवर आपल्या फौजेसंगं मुकाबला दिला. आखरी सखुजीराव या आपल्या सरदारानं गढीवर कबजा केला. पर..." दुसरा खबरगीर बोलता बोलता अडखळला.

"पर काय?" संभाजीराजांची उत्सुकता ताणावर पडली.

"पर सखुजी घसारला. त्येनं रांडमुंड बाईची बेइज्जत करायची खटपट केली. थोरल्या धन्यांनी सम्द्या तळाम्होरं त्येचं तावल्या सांडशीनं डोळं जाळण्याची सजा फर्मावली."

ते ऐकताना साऱ्या सदरेवर शांतता पसरली.

"बेलवाडी मल्लम्माला म्हाराजांच्या म्होरं पेश करण्यात आलं. तिच्या काखेत तिचं एकुलतं याक पॉर हुतं. बाई धीराची हुती. थेट म्हाराजांच्या बैठकीपत्तूर पुढं झाली. म्हाराजांच्या मांडीवर काखेतलं पॉर ठिवून पिळानं म्हणाली– 'गढी जिंकलासा, ह्यो गढीचा वारस बी सांबाळा आता. आम्हाला काढण्या घालून टाक कोठीत.' त्ये ऐकताना म्हाराजांचं डोळं पाझरलं. मांडीवरच्या पोराला थोपटीत धनी म्हणालं, 'बाई, तुम्ही थोर आहात. आम्हास भैनीसारख्या आहात. ही गढी आम्ही तुम्हास चोळीखणासाठी बहाल करतो आहोत!' म्हाराजांनी मल्लम्माची सुटका केली." खबरगिराचा आवाज धरल्यासारखा झाला.

"जगदंब! जगदंब! चिटणीस, भाग्यवान... भाग्यवान आहे तो बच्चा, ज्याला आबासाहेबांच्या मांडीवर बसण्याचा मान मिळाला. या खबरगिरास पेहराव बक्ष करा." संभाजीराजांनी खबरगिरांची कदर केली. ते निघून गेले. संभाजीराजे बैठक सोडण्यासाठी उठू लागले, एवढ्यात चिटणीस पडल्या आवाजात म्हणाले, "कुणी एक थैलीस्वार आला आहे मोगलाईतून. भेट मागतो खाशांची."

संभाजीराजांच्या कपाळी आठ्या धरल्या. डोळ्यांत नाराजी उतरली. तरीही ते शांतपणे म्हणाले, "पेश करा"

मोगली पेहराव धारण केलेला हारकारा सदरेस दाखल झाला. तसलीम देत म्हणाला, "हुजूर आपको खलबतखानामें मिलनेका हुक्म है मुझे."

"खामोऽश, वाटेल त्या वरकडास खलबतात भेटत नसतो आम्ही. कोण काम आहे? जबान पेश कर." संभाजीराजांचे डोळे ठिणगू लागले.

"जी." लटलटत्या हारकाऱ्याने तहबंदाआडचा हिरव्या मखमली थैलीचा खलिता पुढे होत संभाजीराज्यांच्या पायाजवळ ठेवला. थैलीची गाठ उकलून संभाजीराजांनी खलित्याची वळी बाहेर घेतली. मजकुरावरून नजर दौडू लागली. तोच मायना– "मशहुरल अनाम, दामदौलतहु जंगेबहाद्दर शाहजादा संभू–" तोच मजकूर– "आम्हास येऊन सामील व्हावे! मरातब होईल!" दिलेरखानाकडून आलेला. झटका बसावा तसे संभाजीराजे बैठकीवरून उठले. निखारा फेकावा तसा तो खलिता त्यांनी हारकाऱ्याच्या अंगावर फेकला. विजेचा कोरडा फुटावा तसे राजबोल सदरेवर उठले, "समजतो काय तुझा खान आम्हास? मागील खलित्यास जाब दिला. या खलित्यास हाच जाब. बेइज्जत होण्याआत चालता हो इथून."

झपाझप चालत संभाजीराजांनी सदर सोडली. तसेच आपल्या महालात आले. अस्वस्थपणे फेर टाकू लागले. बराच वेळ त्यांना आपल्या महालात झरोक्यालगत येसूबाई आहेत हे ध्यानीही आले नाही. जेव्हा आले तेव्हा ते त्यांच्या रोखाने पुढे झाले. "केव्हापासूनच्या उभ्या आहात?" त्यांनी हलकेच विचारले.

"बराच वखत झाला. पण स्वारी आज नाराज दिसते."

हिरवागर्द शालू, तसलीच चोळी, हिरवे चुडे अशा साजात हळदवाणाची नव्हाळीची छटा अंगभर चढलेल्या येसूबाई वेगळ्याच दिसत होत्या.

"कशासाठी केला आहे हा रानशृंगार आज ?" संभाजीराजांनी हसत विचारले.

"भलतंच. हा रानशृंगार नाही. ही 'चोरचोळी' आहे. आमच्या आऊंनी केलेली."

"मतलब ?" संभाजीराजांना 'चोरचोळीचा' मतलब कळला नाही.

"कुणाही परक्या स्त्रीला न कळविता आई आपल्या लेकीला चोरून लुगडं चोळी एकांतात देते तिला 'चोरचोळी' म्हणतात." येसूबाई हसून वळल्या झाल्या. तसे वळताना त्यांच्या जडावलेल्या हालचालीने संभाजीराजांच्या ध्यानात सारा प्रकार आला.

शृंगारपूरच्या नदीकाठावरच्या मठात शिवयोगी व्याघ्रचर्म अंथरलेल्या उच्चासनावर बसले होते. त्यांच्या पायाशी एका पायरीवर संभाजीराजे बसले होते. त्यांच्या दुहाती केशवभट व गणेशभट जांभेकर उभे होते. मठाच्या कोन्यात ठेवलेल्या दगडी धूपदानातून धुराची उग्रमंगल वळी उठत होती.

"युवराज, तुम्ही पुरात कालीची प्रतिष्ठापना केलीत. रोज भद्रेची पूजाअर्चाही होते. पण ही रणमर्दिनी. तिची यथायोग्य शांत झाली पाहिजे." शिवयोगी धीरगंभीर आवाजात बोलले.

"आज्ञा व्हावी. स्वामी आम्ही कालिमातेची सांगाल त्या रिवाजानं शांत करू."

"युवराज, पुरुष कितीही पराक्रमी असो त्याला ईश्वरी शक्तीचं पाठबळ लागतं. तुम्ही भद्रेसमोर 'कलशाभिषेक' करून भाक घालावी. त्याने तुम्हाला तंत्रसिद्धी मिळेल. पोटी येणाऱ्या अपत्याचं अभद्र टळेल." शिवयोगी जपमाळ ओढीत राहिले.

"जशी आज्ञा स्वामी. पण तंत्रसिद्धीचा मतलब नाही समजलो आम्ही."

"तोच नीट समजून घ्या. त्या भावनेनंच अभिषेक करा. तंत्रसिद्धी म्हणजे कर्ता पुरुष म्हणून परिवाराच्या पालनासाठी साध्य केलेलं पुण्य. कालिमातेच्या विधींमध्ये यासाठी कलशाभिषेक सांगितला आहे. आम्हाला वाटतं तुम्ही हा सविध कलशाभिषेक करावा."

"जी." संभाजीराजे विचारगत झाले. थोड्या वेळाने म्हणाले, "स्वामींनी कलशाभिषेकाचा तपशील व मुहूर्त केशवभट आणि गणेशभट यांना द्यावा."

"युवराज कलशाभिषेक करणार" साऱ्या सुभ्यात ही वार्ता पसरली. तशीच ती रायगडी जाऊन पोचली. ती ऐकून सुरनीस आण्णाजी दत्तो सोयराबाईंच्यासमोर रुजू झाले. त्यांनी कलशाभिषेकाबद्दल आपला अंदाज महाराणींच्यापुढे पेश केला –

"आम्हास या अभिषेकात भला हेत दिसत नाही ! शृंगारपुरी जासूद पाठवून वेळीच याचा माग घेणं हिताचं होईल." त्या सल्ल्यानुसार सोयराबाईंची चक्रे फिरू लागली. रायगडचे नजरबाज गोंधळी, बैराग्याचे वेष घेऊन संभाजीराजांच्या सुभ्यात उतरले.

पौष शुद्ध एकादशी तोंडावर ठेवून संभाजीराजांनी उपोषण केले. अभिषेकाचा दिवस उजाडला. वाड्यावर चौघडा दुडदुडू लागला.

शिवयोग्याच्या पौरोहित्याखाली कलशाभिषेकाला सुरुवात झाली. वाजतगाजत भावेश्वरीच्या मंदिरातून कलश वाड्यावर आला. उंबरठ्यावर कलशासामने बळीची बकरी पडली. कालिमातेच्या मूर्तीसमोर तांदळाच्या चौकावर कलशाची स्थापना करण्यात आली. खांद्याभोवती रक्तवर्णी उपरणे पांघरलेले, तसलेच कटिवस्त्र नेसलेले संभाजीराजे कालीला समोर धरून कलशाजवळ एका पाटावर बसले. चौरंगावर बसलेले शिवयोगी अभिषेकाचे विधी त्यांना सांगू लागले. केशवभट आणि गणेशभट यांनी राजकुळाच्या जन्मू घातलेल्या अपत्यांचे अरिष्टनिवारणार्थ मंत्रघोष धरला. प्रसन्नपणे संभाजीराजे आम्र आणि कुशाच्या पल्लवांनी पवित्र नद्यांचे जल, मधुरस, दूध याचे कलशावर सिंचन करू लागले.

"युवराज, आता शेवटचा अभिषेक करा." शिवयोग्यांनी संभाजीराजांना सांगितले.

"कोणता ?" अशा आशयाने संभाजीराजांनी त्यांना नजर दिली.

"तुमच्या पावन राजरक्ताचा !" शिवयोग्यांनी गणेशभटांकडे पाहिले. गणेशभटांनी नागवी तलवार ठेवलेले एक तबक उचलून संभाजीराजांसमोर धरले.

"म्हणा. जय भद्रकाऽली. आणि तुमच्या अंगठ्याचे राजरक्त कलशावर सिंचा." शिवयोग्यांनी डोळे मिटले आणि स्वत:च मंत्रघोष सुरू केला.

"जय भद्रकाऽली." संभाजीराजांनी हत्याराला उजवा अंगठा देऊन ठिबकत्या गरम राजरक्ताचा अभिषेक केला. हात जोडून डोळे मिटले. त्यांच्यासमोर साक्षात भद्रेची मूर्ती उभी ठाकली. जीव लावून तिला ते डोळाभर निरखू लागले.

कलशाभिषेकाचा विधी संपला. चिपळूण, संगमेश्वर, करवीर अशा देवस्थानांतून आलेल्या ब्राह्मणांना दानधर्म करण्यात आला. गोदाने झाली.

या विधीने संभाजीराजांच्या पोटी जन्मास येणाऱ्या भोसल्यांच्या अंकुराचे अरिष्ट टळणार होते ... पण याच विधीने खुद्द युवराज संभाजीराजांवर अंदाज नसलेले अरिष्ट येऊन कोसळणार होते ! कारण रायगडची अखंड उतरंड उतरून एक थैली स्वार कानडी मुलखाकडे निघाला होता. त्याच्या कमरशेल्यात खोवलेल्या थैलीत एक गुप्त खलिता होता. महाराणी सोयराबाईंनी दिलेला. त्या खलित्याचा मजकूर होता –

"आता विशेष करोन लिहणे ते युवराजांबद्दल. शृंगारपुरी त्यांनी आपणास 'कलशाभिषेक' 'करवून' घेतला. यास्तव की, 'आपले पुण्यवान जन्मदाते शक्य त्या टाकोटाकीने स्वर्गवासी व्हावे ! ! मुलुखाचे कुल राज्यपद ते आम्हासच मिळावे' ! !

मृग तोंडावर आला तसे शृंगारपुरावर चैतन्याची कशी झड उठली. सुभ्यात वार्ता आली होती. "कर्नाटकसुभा रघुनाथपंत हणमंते यांच्या देखरेखीखाली सुपूर्द करून छत्रपती महाराज मुलखाकडे परतीच्या वाटेला लागले. दिग्विजयी छत्रपती येताहेत. पावणेदोन वर्षांनंतर. जिंजीपासून गदग-तोरगळपर्यंतचे नवे राज्य उठवून."

ही वार्ता ऐकताच केवढ्यातरी अनावर उत्साहाने संभाजीराजे वाड्याच्या सदरेला आले. कारभारी परशरामपंत, खंडोजी यांना त्यांनी याद फर्मावले. भराभर त्यांच्या तोंडून आज्ञा सुटू लागल्या. "कारभारी, पुराच्या दक्षिणेला आंबवतीची वेस उठवा. तिथं चौघडा-नगाऱ्याची सिद्धता राखा. परशरामपंत, आबासाहेबांच्या परतीच्या तळाच्या रोखानं थैलीस्वार धाडा. लिहा – आम्ही आगवानीसाठी, पायधूळ घेण्यासाठी शृंगारपुरी वाटेला डोळे लावून आहोत. खंडोजी, निवडीचे घोडाईत हुजुराती पेहराव देऊन सिद्ध ठेवा. त्यांना आमच्या पाठीने दौडायचे आहे. तुम्ही आमच्या सोबतच राहा. कुचराई करू नका. खासे आबासाहेब परतीला लागलेत."

महाराजांच्या परतीचा संभाजीराजांनी अंदाजाने धरलेला दिवस फुटला. पुराच्या दक्षिणेला, श्रीफळाचे तोरण हिंदोळणारी, आंबवतीची वेस उजळून निघाली. तिच्या बगलांना चौघडा, नगारा सिद्ध होता. घरट्या घरट्यासमोर, रयताऊ कुणब्यांनी गुढ्या चढविल्या. भावेश्वरीच्या कळसावर तिकोनी भगवी पताका फडकू लागली. वाड्यावर राणूआक्का, येसूबाई, दुर्गाबाई यांनी ठेवणीचे ठाण काढून साज केला. फारा दिवसांनी आज धाराऊनेही टोपपदरी लुगड्याची घडी अंगावर मोडली. केसरी टोप मस्तकी शोभणारे, जरीबतूचा जामा छातीवर दाटलेले, ठिबक्यांचा मांडचोळणा चढविलेले संभाजीराजे राणूअक्कांचे, येसूबाईंच्या आईसाहेबांचे दर्शन करून वाड्याबाहेर पडले. खंडोजीने दौडीची जनावरे व सरंजामी घोडाईत सिद्ध ठेवले होते.

"जय भवानी." असे पुटपुटत संभाजीराजांनी घोड्यावर मांड जमविली. त्यांच्या मागे पिलाजी, गणोजीराजे आणि खंडोजी यांनी जनावरांवर बैठकी घेतल्या. त्यांच्या पिछाडीला उमाजी पंडित, केशवभट, कवी कुलेश असा पंडितमेळा स्वार झाला. सर्वांमागे शंभर एक हुजराती घोडाईतांनी शिस्त धरली.

संभाजीराजांनी इशारत देताच सर्व पथकांच्या आघाडीला असलेली, फुलमाळांनी सजलेली पालखी भोयांनी उचलली. छत्रपतींना बैठक देण्यासाठी ती नेण्यात येत होती. पथक चालले. संभाजीराजे आपल्या दिग्विजयी पित्याच्या स्वागतासाठी पुराची वेस ओलांडून कोसभर पुढे चालले. त्यांच्या छातीवरची माळ घोडचालीबरोबर हिंदोळू लागली. मन अनेक आठवणींवर हिन्कळू लागले. पावणे दोन वर्षांची उन्हा-पावसातील मोहीम. आबासाहेब थकले असतील. पण तरीही ते हसत म्हणतील, 'कशाला सामोरे यायची तक़लीफ घेतलीत? तुम्ही का परके आहात? कशा आहेत आमच्या सूनबाई?' सर्वांसामने आम्ही कसा जाब देणार? मग ते मामासाहेबांना विचारतील. 'कशी आहे

आमची कन्या?' हा शब्दाशब्दांतील फरक. आबासाहेब बोलत असले की बोलतेच राहावेत असे वाटते.

वेस मागे पडली. एक कोसाचा पल्ला आला. पालखी थांबली. पथक थांबले. सर्व मंडळी पायउतार झाली. घोडाईतांनी म्यानातील तलवारी बाहेर खेचल्या. खंडोजीने कमरशेल्यात छत्रपतींच्यावर उधळण करण्यासाठी सोनमोहरांची थैली घेतली होती. तिच्यावर हात ठेवून त्याने स्वारांची हारीने शिस्त लावून घेतली. आंबा घाटाने शृंगारपुरात उतरणाऱ्या वाटेकडे पथकातील डोळा डोळा लागला.

प्रहर टळला. सूर्य कासरे मागे टाकीत अभाळात चढू लागला. पालखीचे आवरण सणाणून तापले. फुलमाळा सुकल्या. डोळे, डोळे थकले. वर्दी घेण्यासाठी घाटात पेरलेल्या खबरगिरांपैकी एक दौडत येताना दिसू लागला. आशा पालवल्या. स्वार पथकाजवळ आला. संभाजीराजांनी लगबगीने त्याला चाचपला – "कुठवर आले?"

"धनी, आपला थैलीस्वार मागनं येतुया."

सारे थैलीस्वाराची वाट बघू लागले. आता दुपार टळली होती. मने कुचमली होती. बऱ्याच वेळाने कदमबाज चालीने घोडा रेटणारा थैलीस्वार नजरेत आला. त्याला बघताच संभाजीराजांनी आपल्या घोड्यावर झेप घेतली. पुढे होत त्याला गाठले. "कुठवर आलेत महाराजसाहेब?" संभाजीराजांनी उतावीळ सवाल घातला.

कसाबसा थैलीस्वार पायउतार झाला. मुजरा देत त्याने मान डोलावली. कमरेची थैली संभाजीराजांच्या हाती दिली. गडबडीने संभाजीराजांनी थैली खोलली. तीत खलिता होता!

"मतलब?" संभाजीराजांच्या कपाळी आठ्याच आठ्या धरल्या.

"धन्यांची ... धन्यांची भेट जाली न्हाई. त्ये ... त्ये सामानगड, कोल्लापूर, सातारा मार्गानं ... पुन्याच्या वाटंला लागल्यात!"

"पुण्याच्या वाटेस!" संभाजीराजांची मुद्रा क्षणात बदलली.

"आबासाहेब आम्हास विसरले? की रागावले आमच्यावर? की रायगडी काही घडले?" शंकांनी संभाजीराजांचे काळीज थडथडू लागले.

"चला, परतू या." एक चांदीच्या कड्याचा वृद्ध हात संभाजीराजांच्या खांद्यावर चढला. आजवरची अदब बाजूला ठेवून आपल्या जावयाची व्यथा जाणलेला तो हात पिलाजींचा होता.

पथक परतले, आता आंबवतीच्या वेशीवर सांजेची काळी झांझट उतरली होती. त्यामुळे तोरण नीट दिसू येत नव्हते. कुणब्यांनी चढविल्या गुढ्या खाली घेतल्या.

कुणाशीच काही न बोलता संभाजीराजे आपल्या महालात आले. त्यांच्यामागून कधी नव्हे ते आज गणोजीराजे येताहेत हे त्यांच्या ध्यानी आले नाहो. महालात शमादाने जळत होती. संभाजीराजांनी डुयीचा टोप चौरंगीवरच्या तबकात उतरला.

"युवराज..." गणोजींच्या आवाजाने संभाजीराजे दचकले. तरीही स्वत:ला सावरीत म्हणाले, "बोला."

"युवराज, खरोखरच तुम्ही नावाप्रमाणे शंकरासारखे सांब-भोळे आहात."

"मतलब ?" संभाजीराजांचे मानेवर रुळणारे केस डोलले. त्यांनी गणोजींच्यावर नजर रोखली.

"आम्ही सांगतो काय झाले आहे तें. छत्रपतींनी ही वाट का टाळली ते. तुम्ही कलशाभिषेक केलात तो छत्रपतींचे काही बरेवाईट व्हावे म्हणून अशी बोलवा रायगडावर उठली आहे. स्वत:ला राज्यपद मिळावं म्हणून युवराजांनी कलशाभिषेक केलाय, असे गडावर बोलले जाते आहे!"

"गणो ऽ जी, बस्स करा हे." दोन्ही कानांवर तळहात ठेवून संभाजीराजे केवढे तरी थरकते ओरडले.

"सांभाळून असा एवढंच सांगतो आम्ही." गणोजी निघून गेले.

संभाजीराजांचे रक्तबंबाळ काळीज तडफडू लागले. आण्णाजी दत्तो आणि मासाहेब सोयराबाई यांच्या मुद्रा त्यांच्या डोळ्यांसमोरून हटता हटेनात.

"काय झालं ?" येसूबाई आत येऊन बराच वेळ झाला होता.

त्यांना काहीच न बोलता संभाजीराजे झरोक्याशी आले. बाहेरचा मिट्ट काळोख निरखू लागले. त्या काळोखातून शुभ्र नेसूची आकृती – थेट आऊंसारखी दिसणारी आपल्या रोखाने येते आहे असा त्यांना भास झाला. ते पुटपुटले, "बरं झालं आज तुम्ही हयात नाही ते!"

पाठीशी उभ्या असलेल्या येसूबाईंच्याकडे वळून संभाजीराजांनी छातीवरची कवड्यांची माळ उतरली. ती येसूबाईंच्या हातावर ठेवीत ते केवढ्यातरी पडल्या आवाजात म्हणाले, "हा मोलाचा डाग वागवायला आम्ही काबिल ठरू की नाही भय वाटतं! तुम्हीच तो अधिक सांभाळाल!"

दिवसभर थकल्या, सजल्या शृंगारपुराला काळोखी रात्र कवेत घेऊ लागली! खिन्न संभाजीराजांची पावले दुर्गाबाईंच्या सुखमहालाकडे चालली.

रायगडावर छत्रपतींच्या खासेवाड्याच्या सदरेला खलबत बसले होते. बाहेर आर्द्राच्या धारा कोसळत होत्या. दक्षिण दिग्विजय करून रायगडी परतलेले छत्रपती साऱ्या कारखान्यांचा शांतपणे करिना घेत होते.

सदरेत मोरोपंत पिंगळे, आण्णाजी दत्तो, रावजी सोमनाथ, प्रल्हाद निराजी, बाळाजी आवजी, गंगाधरपंत हणमंते, हंबीरराव मोहिते, अशी शेलकी मंडळी होती.

"महाराज, पंतांनी नासिक, त्र्यंबकचा मुलूख लुटीला घातला." आण्णाजी दत्तोंनी मोरोपंतांची कामगिरी रुजू केली. बाळाजी आवजींनी फिरंगी, कुत्बशाही, टोपीकर यांच्या दरबारांतून आलेल्या निवडक पत्रांचा तपशील पेश केला.

प्रल्हाद निराजींनी निकाली काढलेल्या महत्त्वाच्या कथल्यांचा वृत्तान्त दिला.

राजपागा, खजिना, शिलेखाना अशा चर्चेतून खलबत धारावसुलीवर आले. धारावसुली आण्णाजींच्या अखत्यारीत होती. त्यांनी या खात्याचा करिना देताना युवराज संभाजीराजांच्याबाबत तक्रार नोंदविली, "महाराज, युवराज धारावसुलीत हस्तक्षेप करतात. आम्ही त्याची वेळीच स्वामींना कल्पना दिली आहे."

"कोण भातेचा हस्तक्षेप करतात युवराज ?" महाराजांनी शांतपणे आण्णाजींना विचारले.

"रयतेस मनमानी सूट देतात." आण्णाजी उत्तरले.

"आपणहून रयतेकडं जाऊन सूट देतात की रयत जाते त्यांच्याकडे सूट मागण्यास ?" छत्रपतींनी घेर टाकला.

"रयतच जाते त्यांच्याकडे."

महाराज हसले. आण्णाजींची चूक त्यांना न दुखविता त्यांच्या पदरी घालण्यासाठी गोमट्या बोलीत म्हणाले,

"आण्णाजी, धारावसुलीचे खाते तुमच्याकडे. रयतेच्या काही अडीअडचणी असतील तर तिनं तुमच्याकडे यायला पाहिजे! ती युवराजांकडं का जाते ध्यानी नाही येत आमच्या!"

आण्णाजी चमकले. गुमान झाले. मग महाराजच त्यांना सावरीत म्हणाले, "आण्णाजी, रयत आपली देव. तीच आम्हास लढते हात पुरविते. आमचे अंबारखाने धनधान्यांनी भरते. गनिमांच्या घोडधावेत टापांखाली रगडली जाते ती तीच. तिची सुखदु:खे तुम्ही-आम्हीच जाणली पाहिजेत. प्रसंगी तिला धीर, दिलासा दिला पाहिजे. युवराजांनी तसं केलं असेल तर त्यात गैरवाका असं आम्हास काहीच वाटत नाही. आम्ही जातीनं घेऊ त्याचा माग."

"जी एक परीनं ते ठीकच आहे. पण दिलेरसारख्या प्रत्यक्ष गनिमाशी जेव्हा युवराज खलित्यांची हातमिळवणी करतात; साक्षात स्वामींच्या जिवाचं बरंवाईट व्हावं म्हणून शाक्तपंथीयांच्या भरीला पडून कलशाभिषेक करतात तेव्हा आम्हाला शंका येते. स्वामिनिष्ठा म्हणून वेळीच हे नजरेस आणणं आमचं कर्तव्य मानतो आम्ही."

आण्णाजींनी मनाच्या तळवटातले काजळकाळे सफाईच्या भाषेत बाहेर काढले.

ते ऐकताना महाराजही गंभीर झाले. काय बोलावे त्यांना सुचेना. सारे खलबत चळबळले.

"याची शहानिशा करून घेतलीत तुम्ही आण्णाजी ?" छत्रपतींचे सावधपण बोलले.

"जी. आमच्यावर स्वामींनी सोपविलेल्या कार्यात आम्ही कुचराई कशी करावी ?" सदरेवर शांतताच शांतता पसरली. कुणाला काय बोलावे कळेना. अशात मोठ्या धीराने हंबीररावांनी आपली मसलत पेश केली, "आण्णाजींनी केल्याली शानिशा गैर न्हाई असायची. पर आम्हास्नी वाटतं एकडाव धन्यानी युवराजास्नीच सामने याद बोलवावं. ज्ये असंल नसंल त्याचा साफ जाब विचारावा."

खलबतातील कितीतरी जणांना ही मसलत मनोमन पटली. तशा मानाही डुलल्या. पण छत्रपतीच म्हणाले, "हंबीरराव, तुमचं म्हणणं पटतं आम्हास. पण – पण तुम्हाला वाटतं जर खरोखरच असं असेल तर युवराज आमच्यासमोर ते मान्य करतील ? आणि तसं नसेल तर आम्हीच हे विचारतो आहोत याचा कोण कयास बांधतील ते ? जवळची माणसं आमच्या शब्दांचा गैरमतलब लावून कशी बिथरतात हे नेताजींच्या आणि प्रतापरावांच्या बाबतीत पारखलं आहे आम्ही. दोनदा पोळलेले हात तिसऱ्यांदा पोळून घ्यावेत ? तेही युवराजांच्याबाबत ? कैसे व्हावे ?" छत्रपती अस्वस्थ झाले. कुणीच काही बोलेनात तसे तेच म्हणाले, "आम्हास कलशाभिषेकाचं कोणतंच भय नाही वाटत. तसा मिर्झा राजा रजपूतही आपल्या कुलदेवी चंडीला लक्षाभिषेक करूनच आम्हास नेस्तनाबूत करण्यासाठी आला होता. आमच्या जिवाचं जे बरंवाईट होणं असेल ते कुणाच्या इच्छेनं नाही. ते साक्षात जगदंबेच्या इच्छेनंच होईल. पण आम्हास धास्त वाटते ती या राज्याच्या बरेवाईटाची. युवराजांच्या मनी सिंहासनाची हवस उठली असेल आणि ते दिलेरसारख्या कडव्या पठाणी गनिमाशी हातजोड करीत असतील याची खातरजमा झाली तर आम्हास रक्ताचं नातं परतं सारून त्यांचा बंदोबस्त कठोरपणे करावा लागेल! त्यापूर्वी त्यांना एक संधी देण्याचं आमचे मनी आहे. आजवर आईनं कौल दिला तसं करीत आलो. तसंच करू." छत्रपती थांबले. त्यांचा निर्धार बघून आण्णाजींचे डोळे लखलखले. सदर उठली. मानकरी खासेवाड्याबाहेर पडले. आण्णाजी दत्तो कारभाऱ्याबरोबर आपल्या वाड्याकडे निघाले. झडते मुजरे ते स्वीकारीत होते पण त्यांचे मुजऱ्यांत लक्ष नव्हते. मनोमन ते एकाच गोष्टीचा अंदाज घेत होते. "महाराज युवराजांना एक संधी देणार ती कोणती असावी ? काय बेत असावा छत्रपतींचा ?"

सृष्टी उन्हाच्या सोनेरी श्रीफळाने आणि तांदुळदाण्यांनी श्रावणश्रीची ओटी भरू लागली. येसूबाईंचे डोहाळजेवण झाले. या विधीला येसूबाईंना ओटी भरण्यासाठी रायगडाहून साजपेहरावाची दोन तबके आली. एक छत्रपतींचे आणि दुसरे पुतळाबाईसाहेबांचे. पुतळाबाईंनी निरोप धाडला होता – "येण्याची खूप हौस असता येणे होत नाही. मनी किंतू धरू नये. तब्बेतीस राखून असावे."

धाराऊ आता येसूबाईंना सोडून हलेनाशी झाली. तळहातावरच्या फोडासारखी जपू लागली. श्रीकृष्णजन्माष्टमी मागे पडली श्रावण वद्य एकादशीचा दिवस उमटला. शिर्क्यांच्या वाड्यातील बाळंतिणीच्या दालनात बालबोल फुटला.

"कन्यारतन आलं. भावेसरी पावली." सुइणीने सुवार्ता ऐकवली.

येसूबाई 'मासाहेब' झाल्या! संभाजीराजे 'आबा' झाले! राजकुळातील लाभाचे पहिले नातमुख जन्मास आले. वाड्यावर नगारा, चौघडा दुडदुडू लागला. उखळीचे बार उठले. 'आजोबा' झालेले पिलाजी वाड्याच्या सदरेवर बैठक घेऊन परातीतील साखर रयताव्याला वाटताना हसत म्हणाले, "आम्ही म्हातारं झालो बाबांनू! नातवंड आलं."

संभाजीराजांना ही खबर कळताच त्यांच्या मनाची गत लागली – "आज थोरल्या आऊ असत्या तर किती लगबगीनं त्या आमच्याकडे आल्या असत्या! कशा कशा प्रकारे बोलून त्यांनी आम्हास सामने खडे राहणं कठीण करून सोडलं असतं! आणि आमच्या मासाहेब ... त्यांचा तर चेहराही नीट नाही याद होत. त्या सावळ्या होत्या म्हणे. धाराऊ उजळ आहे. तिची सावली बघताना तीच आम्हास मासाहेब वाटली. आम्ही 'आबा' झालो! केवढं मनाची घालमेल करणारं हे सत्य! सत्य की स्वप्न ? आमचे आबासाहेब 'आजोबा' झाले. आजोबा! थकले असतील आबासाहेब दख्खनेच्या मोहिमेनं. ही खबर ऐकून त्यांना कोण खुशी होईल. टाकोटाकीनं ते नातमुख बघण्यास पुरात येतील. आम्ही त्यांचे चरण बघू. किती दिवस झाले त्यांचे दर्शन नाही. जिवाची उलघाल इथे कुणास बोलावी ? कशी ?"

"काय आज्ञा आहे युवराजांची ?" रुजू झालेले परशरामपंत अदबीने बोलले.

"पंत, फलटण, सिंदखेड, रायगड असे चौवाटा थैलीस्वार धाडा. आम्हास कन्यारत्न झाल्याचं कळवा. रायगडी आबासाहेबांना लिहा – 'आपण आजोबा झालात. आपलं दर्शन घेण्यास आपली नात वाट बघते आहे."

बारशाचा दिवस उजाडला. पिलाजींच्या वाड्याला आज कौतुकाचे, उत्साहाचे कसे भरते आले होते. वाड्यातील लहानथोर माणूस नवे नेसून नटले होते. पिपाणी, नगाऱ्याची झुंज जुंपली होती. वाजतगाजत चारी वाटांनी गोतावळ्यांचे बाळंतविडे वाडा चढू लागले. सदरी बैठकीवर बसलेले संभाजीराजे भट-भिक्षुक, गोसावी, बैरागी यांना दाने देऊ लागले.

मुलीला पाळण्यात घालण्याचा मुहूर्त जवळ येऊ लागला तसे संभाजीराजे बेचैन झाले. एवढ्यात खंडोजीने धावत येऊन वर्दी दिली – "रायगडचा बाळंतविडा आला!"

संभाजीराजांचे डोळे लखलखले. "आबासाहेब आलेऽ! सामोरे गेले पाहिजे." ते बैठकीवरून उठले. आज्ञा सुटली. "खंडोजी, सामोरे गेले पाहिजे. सिद्धता करा."

खंडोजीने युवराज कसल्या गैरसमजात आलेत हे ताडले. मान खाली घेत तो म्हणाला, "थोरले स्वामी नाहीत आले ..."

"ठकऽ ठकऽ ठक" संभाजीराजांच्या काळजाला शंकेचा सुतारपक्षी टोचा मारू लागला. चर्या उतरली. "नाही आले ?" त्यांच्या तोंडून न कळणारे शब्द सुटले.

रायगडचा बाळंतविडा वाजतगाजत वाड्यात घुसला. तो घेऊन येणाऱ्या स्वारांनी संभाजीराजांना मुजरे दिले. सरपोसांनी झाकलेली बाळबाळंतिणीच्या मानाची दोन तबके त्या स्वारांनी सदरेवर ठेवली. रायगडचा निरोप झुकत्या मानेने राजपुत्राला पेश केला, "धन्यांची तब्येत खराब हाय. ह्ये बाळंतविडे दिल्यात. सांगावा हाय नाव 'भवानीबाई' ठेवावं."

संभाजीराजे सुन्न झाले. ते सदरेवरून उठले. महालाच्या रोखाने चालू लागले.

मुहूर्त साधून घटिकापात्र घंगाळात डुबले. राजकुवरबाईंनी आपल्या भाचीला पाळण्यात घालून तिच्या कानात तिचे नाव सांगितले– "भवानी! भवानी!! भवानी!!!"

राजकुवरबाईंनी पाळण्याला पाठ लावून झोला दिला. त्या झोल्यावर 'भवानी' चा पाळणा हिंदोळू लागला! या समारंभात दुर्गाबाई दिसत नव्हत्या. वांत्यांनी बेजार झाल्याने त्या आपल्या महाली लेटून होत्या.

दसरा मागे पडला. या खेपेला सोनआखाड्यावर हत्यारमार करायला संभाजीराजे दसरामाळावर गेले नाहीत. कुणाशीच काही न बोलता ते दिवस न् दिवस आपल्याच महाली एकले राहू लागले. त्यांचा आपल्याच मनाशी मनाचा संवाद जुंपला. त्याची उकल त्यांना होईना. गुंतवा झालेल्या मानी राजमनाचा शेव काही केल्या हाताशी येईना. असह्य, भयाण एकलकोंडेपणाने त्यांच्याभवती घेर टाकला. वाड्यावर सासुरवाडीचे शिर्केमंडळ होते; रक्ताच्या नात्याच्या राणूअक्का होत्या; अग्नीच्या साक्षीने पाठीशी आलेल्या येसूबाई, दुर्गाबाई या अर्धांगी होत्या; खंडोजी, रायाजी, अंतोजी असे इमानाचे सोबती होते; उमाजीपंत, केशवपंडित, कवी कुलेश असे शास्त्रपारंगत पंडित होते; पिलाजींच्यासारखे जाणते थोरपण होते पण – पण यांपैकी कोणीच त्यांना 'आपले' आहे याचा भरोसा काही येईना! नुकत्याच जन्मलेल्या कन्यारत्नाचे कौतुकही त्यांच्या लेखी ओसरले. मन अंनावर फरफटीला लागले. शंकांचे पलोते नाचवू लागले– "असं का व्हावं? आम्ही खातरजमेनं हाती घेतलेल्या सोन्याची मातीच का व्हावी? जर साक्षात आबासाहेबांच्या मनीच आमच्या बाबीनं काही अंदेश आला असेल तर वरकड सारं असून नसल्यासारखं! आमच्याविशी त्यांच्या मनी कसलं कुट्ट काळं आणि कुणी कुणी घातलं आहे? का? मासाहेबांचं असं आम्ही काय वाईट चिंतलं आहे? कोण जातीची तापदरा आम्ही आण्णाजींना दिली आहे?

"कर्नाटक स्वारीवर जाताना महाराजसाहेब आम्हाला पुरात ठाण करून जातात. त्यांच्या दिग्विजयाला गालबोट लागू नये म्हणून मनावर धोंड ठेवून आम्ही ते शिरसावंद्य मानतो. परतीच्या वाटेवर महाराजसाहेबांना आम्हास भेटावंसं वाटत नाही. आमच्या पोटी जन्मास आलेल्या आपल्या नातवंडाचं मुखदर्शन घेण्यास ते आले नाहीत. काय चाललं आहे हे? कुठल्या कसुराची ही आम्हाला शिक्षा आहे? आम्ही थोरले म्हणून जन्मास आलो हा कसूर? आम्हाला युवराजपदाचा अभिषेक झाला हा आमचा कसूर? की नकळत्या वयात आमच्या मासाहेब गेल्या आणि ऐन हव्या होत्या त्या समयाला थोरल्या आऊ गेल्या हा आमचा कसूर?

"आबासाहेबांचा आमच्याविशी गैरमेळ पडला आहे खास. आमच्या वतीनं रायगडी तो कोण निपटणार? कोण सफाई देणार? आम्हालाच जातीनिशी का बोलावणं होत नाही रायगडाकडून? की आम्ही हयातभर शृंगारपुरी सासऱ्यांच्या वाड्यातच पावणेर झोडत राहावं अशी इच्छा आहे आबासाहेबांची? पावणे दोन साले झाली आम्ही इथं आहोत. आता इथं राहणं नको वाटतं, पण जावं तरी कुठं? कसं?" त्यांना काही सुधारेनासे झाले!!

"युवराज, गडाहून थैलीस्वार दाखल झाला आहे. थैली खाशी म्हणून सदरेला खोळंबून आहे." महाली आलेल्या परशरामपंतांनी वर्दी दिली.

"थैलीस्वार! गडावरचा! आबासाहेबांनी नक्कीच याद फर्मावलं असणार." क्षणापूर्वीची संभाजीराजांच्या चर्येवरची काळजी नाहीनिपट झाली. झपाझप चालत ते सदरेला आले. सदरेच्या चाकरमान्याने झडते मुजरे दिले. रायगडाहून आलेला थैलीस्वार अदबीने पुढे झाला. त्याने कमरेची भगवी थैली युवराजांच्या हाती दिली. संभाजीराजांनी क्षणैक मस्तकाला भिडवून, लगबगीने थैलीचा फासबंद उकलला. वळी बाहेर घेतली. खुलल्या खलित्यावरचे शब्द टिपू लागले–

"श्रीयासह विराजित, अखंड लक्ष्मी अलंकृत, युवराज शंभूराजे प्रति अनेक उदंड आशीर्वाद उपरी विशेष.

वज्रचुडेमंडित सौ. सूनबाईस कन्यारत्न जाहले. वृत्त ऐकोन परम संतोष जाहला. आता विशेष करोन लिहिणे ते पत्र देखत जरोरीने सज्जनगडी कूच होणे. समर्थचरणी रुजू होवोन चित्तास शांती लाभेल तसे करणे. समर्थ देतील तो बोध सावधपणे मनी धरणे. मनी भलेबुरे जे असेल ते समर्थचरणी ठेवणे. विशेष काय लिहिणे. जाणिजे."

खलित्यातील शब्दाशब्दांनिशी संभाजीराजांच्या डाव्या भिवईला कमानबाक चढत गेला. टपोरे डोळे आक्रसले. छातीचा जामा काखेत दाटून आला, मनात विचारांची, शंकांची धुमाळीच धुमाळी माजली– "म्हणजे आबासाहेबांच्या मनी आमच्या बाबीनं अंदेश आला खास! आम्ही सज्जनगडी समर्थचरणी जावं! समर्थ देतील तो बोध ऐकावा. कशासाठी? मनी भलेबुरे असेल ते निपटण्यासाठी. असं काय भलंबुरं आणलं आम्ही मनी? इथं ठाण होऊन सुभा सांभाळला हे? अडल्या रयतेला धारा माफी केली हे? की अपत्याच्या अरिष्टनिवारणार्थ कलशाभिषेक केला हे? आबासाहेब, आबासाहेब कसली आज्ञा दिलीत आम्हास ही? आम्हाला बोध नको आहे, हवं आहे आपल्या चरणाचं दर्शन. थोरल्या आऊंच्या छत्रीचं दर्शन. का जावं आम्ही सज्जनगडास? कशासाठी?"

हाती खलिता घेऊनच संभाजीराजांनी सदर सोडली. ते तसेच येसूबाईंच्या दालनी आले. हातातील खलित्याची वळी उठवीत म्हणाले, "ऐकलंत. गडाहून आबासाहेबांचा खलिता आला आहे. आम्हास सज्जनगडी रुजू होण्याची आज्ञा आहे. समर्थचरणी मनचं भलंबुरं ठेवण्यासाठी. का जावं आम्ही ?"

येसूबाईंनी कुशीत घेतलेल्या दोन महिन्यांच्या भवानीचा पदर हलकेच तोडला. हसत त्या म्हणाल्या, "एवढं संतापण्यासारखं काय आहे त्यात? सज्जनगड पावन स्थान. आमचं ऐकावं. आज्ञेप्रमाणं सज्जनगडी कूच ठेवावं. आम्ही या अशा गुंतून पडलो, नाहीतर आम्हीही आलो असतो समर्थदर्शनास."

त्यांच्या शांत उत्तराने संभाजीराजे चकित झाले. स्वत:शीच विचारगत होत पाठीशी हात बांधून फेर घेऊ लागले. थोड्या वेळाने दालनाबाहेर पडण्यापूर्वी संथ शांत शब्दांत म्हणाले, "ठीक आहे. जाऊ आम्ही सज्जनगडास."

सज्जनगडी जाण्याचा दिवस फुटला. खंडोजीने निवडलेले तीनशे घोडाईत वाड्यासमोर हत्यारबंदीने सिद्ध झाले. झिरमिऱ्या आडपडद्यांचा एक मेणा भोयांनी तयार ठेवला. समर्थांचे दर्शन घेण्यासाठी राणूअक्का आणि दुर्गाबाई संभाजीराजांबरोबर निघणार होत्या. भरल्या दुर्गाबाई आता रसरशीत दिसत होत्या.

पायधूळ मस्तकी धरून संभाजीराजांनी पिलाजीमामा आणि मामीसाहेबांचा निरोप घेतला. येसूबाईंचा निरोप घेण्यासाठी ते त्यांच्या दालनात आले. लेटल्या येसूबाई त्यांना बघताच उठून मंचकावर बसत्या झाल्या. पाळण्यात छोटी 'भवानी' शांत सुख झाली होती. पाळण्याची काठाळी धरून धाराऊ खडी होती.

"येतो आम्ही, सांभाळून असा." संभाजीराजे येसूबाईंची नजर चुकवीत भरल्या आवाजात म्हणाले. पाळण्याजवळ जात त्यांनी झोपल्या भवानीच्या गालावर ओठ टेकले. भवानी क्षणभर चाळवली. पुन्हा शांत झोपी गेली. धाराऊने पाळण्याला हलका झोका दिला.

"स्वारी अजून घुश्श्यात आहे. पण सज्जनगडाच्या दर्शनाने तो कमी होईल. परतेल तेव्हा स्वारी एखादं काव्यही बांधून परतेल!" संभाजीराजांना खुश करण्यासाठी येसूबाई म्हणाल्या.

नेहमीसारखा हसरा प्रतिसाद संभाजीराजांनी त्यांना दिला नाही. दुखऱ्या काळजातून पडेल बोल आले – "काव्य आता आम्हाला कायमचं पारखं झालं आहे!"

पळभर असह्य शांतता दालनांत दाटून पडली. मग येसूबाई म्हणाल्या, "स्वारी समर्थदर्शनास जाते आहे. आमचाही दंडवत सांगावा समर्थांना. बुवांनी काही कठोर सांगितलं तरी त्याचा किंतू मनी धरू नये. आम्हाला विश्वास आहे. भावेश्वरीच्या कृपेनं सारं काही ठाकेठीक होईल."

ते ऐकताना संभाजीराजे स्वत:शीच कसनुसे हसले. धाराऊला म्हणाले, "येतो आम्ही आऊ, यांना जपा."

"येताना भवानीबाईंसाठी समर्थांच्या हातचा मंतरलेला गंडादोरा आणायचा आहे. विसरणं होईल नाहीतर." येसूबाई पाळण्याकडे बघत कौतुकाने म्हणाल्या. बाळंतपणाचे वसबी तेज त्यांच्या चर्येवरून नुसते ओसंडत होते. मंचकाला तळहाताची टेकण देत त्या उठल्या. कोनाड्याजवळ गेल्या. एक लाकडी पेटी त्यांनी कोनाड्यातून उचलली. ती खोलून त्यातील कवड्यांची भरगच्च माळ बाहेर घेतली. संथपणे त्या संभाजीराजांच्या जवळ आल्या. हातची माळ ओंजळीने त्यांच्यासमोर धरीत म्हणाल्या, "हा डाग फार मोलाचा. त्याखेरीज स्वारींची छाती भुंडी दिसते. हा डाग सांभाळण्याचा आमचा वकूब नाही! घ्यावा. आमच्या धाकल्या बाईंना जपावं."

संभाजीराजे आपल्या सखीला निरखत राहिले. त्यांच्या ओंजळीतून उचलून त्यांनी ती भवानीमाला छातीवर चढविली. येसूबाईंनी पदरशेव हातात धरून आपल्या कुंकूबळाला तीन वेळा सौभाग्य-नमस्कार केला. त्यांच्या हातीचे हिरवे चुडे खणखणले.

"येतो आम्ही!" संभाजीराजे वळते झाले. तसे होताना त्याच्या भुजेचा भवानीच्या पाळण्याला धक्का बसला. त्या तेवढ्या धक्क्यानेही भवानीबाईंची झोप उडाली. पाय झाडून त्यांनी सूर लावला! संभाजीराजे, येसूबाई, धाराऊ एकमेकांकडे बघतच राहिले. धाराऊने 'पुढे' होत पाळण्यातील शंभुकन्या उचलली. थोपटून शांत केली.

मागे न बघता संभाजीराजांनी दालन सोडले. सगळ्यांचा निरोप घेतलेल्या राणूअक्का व दुर्गाबाई वाड्यासमोरच्या मेण्यात चढल्या. संभाजीराजांनी एका सफेद घोड्यावर मांड जमविली. त्यांना निरोप देण्यासाठी पिलाजी, गणोजी, पंडितमेळा, खंडोजी, अंतोजी-रायाजी पुराच्या उत्तर वेशीपावेतो चालले. संभाजीराजांनी वाटेत लागणाऱ्या शिर्क्यांच्या कुलदेवतेचे, भावेश्वरीचे पायउतार होऊन दर्शन घेतले. उत्तर वेस आली. पिलाजींना खांदाभेट देताना संभाजीराजे म्हणाले, "तुम्ही आहात, मागील चिंता नाही."

"बिनधोक असा. भेट घेऊन परता. आम्ही वाट बघतोय." पिलाजी मायेने उत्तरले. सगळ्यांचा निरोप घेऊन संभाजीराजांनी शृंगारपूर सोडले. घोडे पथक मेण्याभोवती कडे धरून कोयनाघाटीच्या रोखाने संथ चालू लागले.

सांजवेळ धरून सज्जनगड नजरटप्प्यात आला. गडाच्या पायथ्याशी संभाजीराजांच्या आगवानीसाठी किल्लेदार जिजोजी काटकर सरंजामाने मौजूद होता. त्याने पुढे होत आगवानी केली. जिजोजीला पाठीशी घेत संभाजीराजे राणूअक्का, दुर्गाबाईंसह समर्थांच्या सज्जनगडाच्या पायऱ्या चढू लागले. प्रत्येक पायरी मागे टाकताना त्यांच्या मनाची एक

गत लागली. फारा दिवसांपूर्वी शिवथर घळीत समर्थांची भेट झाली होती. तो दिवस त्यांना आठवला. समर्थांची दाढीधारी सतेज चर्या डोळ्यांसामने खडी ठाकली. तासाच्या टोलांसारखी त्यांची बोली कानांत घुमू लागली. "आम्ही बैरागी, तुमच्या राज्याभिषेकास देण्याजोगी भेट आमच्याजवळ नाही. आम्हाला प्राणप्रिय असलेला हा कोदंड आम्ही तुम्हाला देतो आहोत!" समर्थ आबासाहेबांना त्यासमयी भारल्या बोलीत बोलले होते.

थोरल्या आऊ पाचाडात ज्या रात्री आम्हास सोडून गेल्या, त्या रात्री त्यांनी शेवटची इच्छा आबासाहेबांना सांगितली – "समर्थांचा बोध ऐकावा वाटतो." समईच्या उजेडात केशव पंडितांनी जात्या थोरल्या आऊंना बोध ऐकविला – "जीव जिवात घालावा – आत्मा आत्म्यात मिसळावा – राह राहो परांतरीचा – गेले बहुता बळांचे बळवंत राजे – बहुता कुळांचे कुळवंत राजे – सरली शब्दांची खटपट – आला ग्रंथाचा शेवट!" थोरल्या मासाहेब गेल्या. उरल्या फक्त आठवणी.

संभाजीराजे गडावर आले. ते आल्याची खबर मठभर पसरली. मठाच्या प्रवेशद्वारात मोजड्या उतरून संभाजीराजांनी पायांवर पाणी घेतले. राणूअक्का, दुर्गाबाई यांच्या सोबतीने समर्थशिष्यांनी भरलेल्या मंडपातून जात हनुमानमूर्तीचे दर्शन घेतले. जवळच उभ्या असलेल्या समर्थशिष्य कल्याणस्वामींच्या पायावर मस्तक ठेवीत ते म्हणाले, "स्वामींची कृपा असावी."

"जय जय रघुवीर समर्थ" म्हणत कल्याणस्वामींनी झुकते होत युवराजांना खांदे धरून उठते केले. राणूअक्का आणि दुर्गाबाई यांनी कल्याणस्वामींना भरल्या पदरांच्या ओंजळीने नमस्कार घातले.

"युवराज, आम्ही तीर्थप्रसाद घेऊन येतो आहोत. तोवर तुम्ही मठओवरीत विश्राम घ्या." कल्याणस्वामी ममतेने म्हणाले.

संभाजीराजे "जी." म्हणाले आणि ओवरीच्या रोखाने चालू लागले. मंडपातील समर्थशिष्य डोळाभरून युवराजांना निरखू लागले.

ओवरीत अंथरलेल्या बिछायतीवर युवराजांनी बैठक घेतली. राणूअक्का व दुर्गाबाई समर्थशिष्यिणींच्या सोबत माजघरात गेल्या.

थोड्या वेळाने हाती ओल्या डाळीच्या प्रसादाचा द्रोण व तीर्थाची झारी घेऊन कल्याणस्वामी ओवरीवर आले. हसतमुखाने युवराजांना म्हणाले, "घ्या श्रींचा प्रसाद." क्षणभर रेंगाळत संभाजीराजे त्यांना म्हणाले, "प्रथम ... प्रथम समर्थदर्शन करू आणि मग ..."

शांत हसत कल्याणस्वामी उत्तरले, "गुरुदेव गडावर नाहीत! परिक्रमेसाठी बाहेर पडलेत! घ्या." त्यांनी ओल्या डाळीचा प्रसाद संभाजीराजांच्या ओंजळीत ठेवला. तो ओठांआड करण्याचे युवराजांना भानच राहिले नाही.

"घ्या." कल्याणस्वामींनी त्यांना भान दिले. युवराजांनी प्रसाद आपलासा केला. तीर्थ ओठांआड घेतले.

त्या रात्री युवराजांनी मठाचा थाळा घेतला नाही. जागा पालटल्याने असेल पण त्यांना दिलेल्या कोठीत मंचकावर ते एकसारखे कूस पालटत तळमळत होते.

सज्जनगडच्या कातळबंदीवर हाततळवे टेकून रायगडच्या रोखाने नजर जडवलेले संभाजीराजे पुरते अस्वस्थ झाले. इथे येऊन एक हप्ता लोटला होता. बेचैनीने युवराजांनी कातळबंदी सोडली. चार धारकऱ्यांत पाठीशी अदब धरून खडे असलेल्या किल्लेदार जिजोजीला ते गंभीर बोलांत म्हणाले, "गडकरी, रायगडी खलिता द्या. समर्थ इथं नसल्याचं लिहा. आम्ही पुढील आज्ञेची वाट बघतो आहोत ते कळवा."

"जी." जिजोजीने युवराजाज्ञा उचलली. त्याला पाठीशी घेत संभाजीराजे गडाच्या सदरेच्या रोखाने चालू लागले.

हत्यारी पहाऱ्याने युवराजांना मुजरा दिला. जिजोजीने एका धारकऱ्यामार्फत चिटणिसाला बलावू दिले. चिटणीस रुदरेला रुजू झाला. रायगडी धाडण्याचा खलिता मोरपिसाने रेखू लागला.

"धाकलं धनी, गोसावी सदानंद भेटीची अर्जी करत्यात. पेश घालावं?" बैठकीवर बसलेल्या युवराजांना मुजरा देत जिजोजीने वर्दी दिली.

संभाजीराजांच्या कपाळी आठी धरली. हाततळवा रेललेल्या गिर्दीवर क्षणभर फिरला. संथपणे ते म्हणाले, येऊ द्या त्यांना."

सदानंद गोसावी सदरेत आले. नांदी देत त्यांनी युवराजांना नमस्कार दिला. खांद्याची झोळी नेटकी करीत हातची कुबडी उडवीत ते म्हणाले, "युवराज, आमची एक फिर्याद आहे!"

रेललेले संभाजीराजे गिर्दी सोडून पुढेसे झाले. कफनीधारी सदानंद गोसाव्यांवर नजरफेक टाकताना त्यांना म्हणावेसे वाटले, "बुवा, फिर्याद तर आमचीही आहे. कुणासामने ती पेश करावी? एक फिर्यादी दुसऱ्या फिर्यादीस कसला निवाडा देणार?" तरी स्वत:ला सावरीत गोसाव्यांना दिलासा देत ते म्हणाले, "बोला."

"आमचा इनाम सध्या दिवाणातून मना केला आहे. तो आम्हास सोडवून देण्याची कृपा व्हावी." सदानंद गोसावी निर्धाराने बोलले.

ते ऐकताना संभाजीराजांना समर्थांची आठवण झाली. राज्याभिषेकाचे आमंत्रण निरिच्छपणे बाजूला सारणारे समर्थ! त्यांचे हे शिष्य सदानंद गोसावी! गोसाव्यांनासुद्धा इनामाची आच लागते! शेवटी आभाळाशी झुंज घेत वाढतात ती साग, ऐनाची झाडे, कुरणातील गवत नव्हे! समर्थ एकलेच 'समर्थ.'

"कुणी मना केले इनाम ?" संभाजीराजांनी फिर्यादीची दाद घेत सवाल घातला.

"सुरनिसांनी !" सदानंद गोसावी उत्तरले.

ते ऐकताना संभाजीराजे पाऽर बेचैन झाले. नियतीच्या फसगमतीचा माग घेत विचारगत झाले. तरी स्वत:ला तोलत धीमेपणे म्हणाले, "ती त्यांच्या अखत्यारीचीच बाब आहे गोसावी. आम्ही कळवू त्यांना तुमची फिर्याद. या तुम्ही."

सदानंद गोसावी नांदी उठवून सदरेतून गेले. संभाजीराजांनी चिटणीसाला इशारत केली, "आणखी एक खलिता रायगडी द्या. सुरनिसांना. लिहा– 'सदानंद गोसावी यांचा इनाम सांप्रत मना केला आहे. चालता केला पाहिजे म्हणतो. हा मामला आम्हास दखल नाही. तुम्हास कळेल ते पारिपत्य केले पाहिजे."

दोन्ही खलिते सिद्ध झाले. संभाजीराजांनी त्यावर दस्तुराची मोहर केली. हारकारा खलिते घेऊन सदरेबाहेर पडला.

सदर सोडून उठताना संभाजीराजांना फार फार जाणवले की, "सदानंद गोसावी यांच्या निमित्ताने सुरनीस आण्णाजींना आम्ही खलिता लिहिला आहे. तो वाचताना खुद्द त्यांनाही अंदेश येईल की ही भाषा युवराजांची नाही ! ही दफ्तरी भाषा आहे. खाशांची नाही. तूर्त आम्ही खासे नाही, उरलो आहोत केवळ दफ्तरी !"

पौष मासाचा शुक्लपक्ष आला. आकाशीची चंद्रकोर कलेकलेनं बळावू लागली. भरल्या सज्जनगडावर युवराज सभांजीराजे देहामनाने एकले पडू लागले. एकच एक विचार त्यांच्या मनी ठाण धरून बसला, "हा गड सोडणे आहे. पण ते कुठं ? पुन्हा शृंगारपुरी ? छे ! कुठंही जावं !"

एका सांजेला ते देवदर्शन करून आपल्या दालनाकडे परतत होते. पाठीशी जिजोजी आणि मोजके धारकरी होते. समर्थमठासमोर ते आले. सूर्य डुबायला घातला होता. एकाएकी चालते संभाजीराजे पायी साखळदंड पडल्यासारखे थबकले. "कावऽ कावऽ कावऽ" मठासमोरच्या दगडी पारातून उठलेल्या डेरेदार पिंपळवृक्षावर मोजता येणार नाही असे कावळ्यांचे जथेच्या जथे उतरत होते. क्षणभर युवराजांना भास झाला की आपल्या मनाचाच हिरवाकंच पिंपळवृक्ष झाला आहे! काळेकुट्ट, कर्कश रेकणारे खंडोगणती कावळे त्या वृक्षावर पंख झाडीत उतरताहेत! ते कल्लोळते कावळे कर्कशताहेत "हा गड सोडणे आहे ! जावं... जावं कुठंही ! लवकुशांनी घोडा रोखला, एकाच बळावर कारण ते राजअंकुर होते. त्यांचा जन्म वनात, झाडझाडोऱ्यांत राहण्यासाठी नव्हता. जावं कुठंही !" वेड्यासारखे, सुन्न संभाजीराजे त्या काळ्या पक्ष्यांचा पिंपळवृक्षावरचा सुलतानढवा पापणी न पाडता बघतच राहिले. बाहेर पुरते सांजावले तेव्हा युवराज आपल्या दालनात आले. चिराखदानांनी दालनाचे अंतरंग कसे उजळून निघाले होते !

बेचैनीने ते दालनात फेर टाकू लागले. बाहेर पहारा देणारा धारकरी आत आला. अदब देत म्हणाला, "मठाचं गोसावी आल्यात."

पायफेर थांबवून संभाजीराजांनी त्याला फर्मावले, "पेश येऊ द्या."

कल्याणस्वामींचा निरोप घेऊन एक मठशिष्य दालनात आला. नांदी देत त्याने निरोप सांगितला, "स्वामींची युवराजांना सांगी आहे."

"बोला."

"दोन दिवसांनी पर्वणीचा योग आहे. क्षेत्र माहुलीवर कृष्णा-वेण्णा संगमात स्नान करून राजहस्तानं दानधर्म करणं पुण्यकर्म आहे."

समोरच्या मठशिष्याचा आवाजही युवराजांना काळ्या पक्ष्यासारखा भासला– 'पर्वणीऽ !' त्यातच त्यांचा स्वत:चा कर्कश निश्चय मिसळला. "हा गड सोडणे आहे ! कुठंही जावं !" आत कालवा होता तरी संभाजीराजे बाहेरून शांतपणे त्या शिष्याला म्हणाले, "स्वामींना सांगा आम्ही ही 'पर्वणी' साधू ! या."

मठशिष्य समाधानाने निघून गेला. नकळत जाताना संभाजीराजांच्या मनाचा मठ ढवळून गेला. पाठीशी हात बांधून ते जखमी जनावरासारखे दालनात पायफेर टाकू लागले. आपलीच असंख्य रूपे सावल्यांचा आकार घेऊन त्यांच्याभोवती फेर धरून गोंधळ घालू लागली. कोंडी, सोसणे, अगतिकता यांची संबळ, तुणतुणी झडू लागली. मनाची पट्टा, तेग, विटा, भाला अशी हत्यारे बनून एकमेकांशी तंडू लागली. त्या धुंदळीत त्यांचे मानाचे 'युवराजपण' पायदळी चिंबू, चिरडू लागले–

"थोरल्या आऊ गेल्या त्या दिवशीच आमचं 'युवराजपण' पोरकं झालं. महाराणी झालेल्या मासाहेबांना आमचं युवराजपद रुपलं. त्यांच्या करणीमुळंच आम्ही भरल्या दरबारी आरोपित म्हणून पेश झालो. एका ब्राह्मणी सुवासिनीच्या आत्महत्येस कारणीभूत झालोत. आम्हीच आबासाहेबांना अभक्ष्य चारलं हा काळीज चिरणारा आळ मासाहेबांनी आमच्या माथी मारण्याचा घाट घातला. रामराजांना आमच्यापासून तोडण्याची एकही संधी त्यांनी कधीही दवडली नाही. कर्नाटक स्वारीला कूच होताना आबासाहेबांसमोर आम्हाला रायगडहून शृंगारपुरी धाडण्याचा हट्ट धरला तोही त्यांनीच. आम्ही अडल्या रयतेला धारामाफी करतो याचा गैरमतलब आण्णाजींना हाताशी धरून त्यांनीच आबासाहेबांच्या कानी घातला. आम्ही कलशाभिषेक केला तो कुठल्या हेतूनं, त्याची खबर कर्नाटकी गेली ती कसल्या बेंगरुळ रूपानं ? काय काय नि कसं कसं घडलं आहे हे ?

"रजपूत मिर्झाच्या गोटात ओलीस म्हणून जाणारे आम्ही, शाहजादा मुअज्जमच्या भेटीस औरंगाबादेस जाणारे आम्ही, थोरांच्या जोडीनं मथुरेत अंगी कफनी चढविणारे आम्ही आज काय भरून पावलो आहोत ?

"परतीच्या वाटेवर आबासाहेब शृंगारपुरी आले नाहीत. आपल्या भरल्या कुशीच्या लाडक्या सुनेला दर्शन, आशीर्वाद द्यावेसं त्यांना वाटलं नाही ते आमच्यामुळं! भवानीबाईंच्या मस्तकी आपला हात आजोबा म्हणून ठेवावा असं महाराजसाहेबांना नक्कीच वाटलं असेल पण तेही त्यांनी रोखलं ते आमच्यामुळं. आम्ही राजेपणाची लालसा धरतो आहोत असा त्यांचा गैरमेळ रायगडावरच्या जाणत्या महाराणी आणि सुरनिसांनी केल्यानंच त्यांनी आम्हाला सज्जनगडचा मार्ग दाखवला.

"आम्ही आबासाहेबांना समोर नकोसे झालो? त्यांनाही आमच्या बाबीनं हेच वाटतं? मग भारभूत असलेली ही युवराजपदाची वस्त्रं अंगी कशासाठी वागवावीत आम्ही? किती दिवस सोसावं हे? का?" ठणकत्या काळजाने ते मंचकावर बसले. मस्तकाचा माठ तडकेल म्हणून तळहातांनी तो गच्च दाबून त्यांनी डोळे मिटते घेतले.

'घणऽ घणऽ घण' पाचाडच्या सदरेवरच्या घाटेतून उठलेले नाद त्यांच्या मस्तकाच्या घुमटीत निनादू लागले. बोटभर उंचीची एक आकृती सदरेवर खडी दिसू लागली. म्हणता म्हणता ती विती हातांनी मोठी होत रायगडाच्या आघाडी मनोऱ्याएवढी उदंड उंच झाली. त्या होत्या थोरल्या आऊसाहेब! त्यांच्या ओठांतून ममतेची साद घुमली, "बाळ शंभूऽ!" एक केतकी रंगाचा थरथरता मायाळू हात युवराजांच्या रोखाने पाठ थोपटण्यासाठी पुढे सरकू लागला. युवराजांच्या उभ्या अंगभर त्या हाताला निरखताना विजाच विजा सळसळून गेल्या. देह क्षणभर थरारून ताठरला. सारे अंग घामाने कसे चिंब डवरून आले. असह्यपणे त्यांनी भोवतालच्या पोकळीला 'थोरल्या आऊऽ' अशी साद घालीत भयाने थरकापून डोळे उघडले. दालनातील मंद-उजळ उजेड आपल्याकडे बघून हसतो आहे असा संभाजीराजांना भास झाला. सैरभैर होऊन त्यांनी मंचक सोडला. मनाशी पडलेली मनाची चावरमिठी काही केल्या निखळत नव्हती.

"थोरल्या आऊ, तुम्ही गेल्यानंतर या हयातीत जमेला आल्या फक्त युवराज्ञी येसूऽ!" त्यांचे ओठ पुटपुटले. कुशीत बालजीव घेऊन मंचकी लेटलेल्या येसूबाई त्यांच्या डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या. मिटल्या डोळ्यांनीच त्या म्हणत होत्या, "भावेश्वरीच्या कृपेने सारं ठाकेठीक होईल."

कुठलंतरी एक धारदार राजमन संभाजीराजांच्या तोंडून त्यांना जाब देऊन गेले–

"होळीसणाला आम्ही पेटत्या हुडव्यात हात चालवून मानाचं श्रीफळ बाहेर खेचलं. तुमच्या केवळ दर्शनानंच पोळल्या हाताच्या वेदना आम्ही क्षणात भुलून गेलो. पण... पण आज आमच्या मानी मनाचंच श्रीफळ भडकत्या वणव्यात होरपळत आहे! कोणी ते बाहेर खेचावं असं आम्हालाच वाटेनासं झालं आहे. कारण नसता ठोकरा खात बदनाम झालेला आमचा मुखडा आता आम्हाला कुणालाच दावू नयेसा वाटतो! युवराज्ञी, तुम्हालासुद्धाऽ!"

येसूबाईंच्या आठवणीबरोबर कधीतरी त्यांच्याशी बोलताना त्यांनी ऐकविलेला 'चोरचोळी' हा बोल युवराजांच्या मनातून उसळून उठला. हिरव्या रंगाची 'चोरचोळी' कुणालाही माग न देता केलेली! हिरवा पिंपळवृक्ष! काही तरी चमत्कारिक विचारांची घाणी त्यांच्या मनात फिरून गेली. पेटता बोळा भिरभिरत येऊन दारूच्या कोठारावर आदळावा तशी मनाच्या तळवटातून हिरव्या रंगाची फासबंद थैली त्यांच्या धुमसत्या मनाच्या तोंडाशी आली. वर चांद असलेले हिरवे निशाण दृष्टीसमोर फडफडले. वळवळता भुजंगसर्प बाहेर पडावा तशी थैलीतील खलित्याची वळी बाहेर पडली. शब्दांचे फूत्कार टाकू लागली.

"मशहुरल अनाम, दाम दौलतहु, जंगेबहाद्दर शाहजादा संभूऽ... इस मुकामपर आगवानी के लिये तुम्हारी राहे ताक रहे है!!" त्या फूत्कारांनी क्षणभर संभाजीराजांच्या पिंढऱ्यात घट्ट गोळे धरले. घशाला सोक देणारी कोरड पडली. डोळ्यांसमोर काजवेच काजवे चमकले. झपाझप चालत त्यांनी चौरंगीवरच्या गडव्यातील पाणी घटाघट घशाखाली सोडले. कपाळीचा घाम पोसाने निपटला. कऱ्हेपठारावर रजपूत मिर्झाच्या गोटात एकवार बघितलेला दिलेरखान पठाण त्यांनी आठवून बघितला. आता त्यांची चर्या पार पालटून गेली होती. मनाच्या धारा बोथट झाल्या होत्या.

"सारे दोर तुटले आहेत! उरलेले आम्ही तोडणार आहोत! खुद्द आमच्या हातांनी!" स्वतःलाच समजावीत ते पुटपुटले. "होय! आम्ही पठाण दिलेरच्या गोटात जाणेचा निर्णय केला आहे!! तिथे आम्ही कुणाचे पुत्र, पती, बंधू, युवराज असणार नाही! जे काही असू ते मनगटाच्या हिंमतीचा अधिकार सांगणारे फक्त संभाजीराजे भोसले!"

गादीवर ओळंबून युवराज संभाजीराजे भोसले खलित्याच्या वळीवर स्वहस्ते मोगल सरलष्कर पठाण दिलेरखान यास मजकूर लिहू लागले– "मशहुरल अनाम, दामदौलतहु, लष्करेसालार दिलेरखान सुभे दख्खन यांसी रा. रा. संभाजीराजे भोसले यांची विज्ञापना उपरी विशेस,

"आम्ही श्रीक्षेत्र माहुलीहून कूच करून खान मजकुरांचे भेटीस जातीनिशी येत आहोत!!! दरोबस्त आगवानी करून आमचा मरातब करावा. तपशीलाने समक्ष भेटीगाठीत बोलू. जाणिजे."

बाहेर सज्जनगडाचे रात्रमेटाचे मेटकरी एकमेकांना सावधपणाच्या हरळ्या देत होते. "मेटकरी होऽ हुश्शाऽर!" मठमंडपात पथाऱ्यांवर अंग टाकणारे समर्थशिष्य एकजोडीने म्हणत होते–

"जयाचे तया चुकले प्राप्त नाही।
गुणे गोविले जाहले दुःख देही।

विधी निर्मिता लिहितो सर्व भाळी।
परि लिहितो कोण त्याचे कपाळी।

पौष शुद्ध दशमीचा दिवस वर उठला. पक्ष शुक्लाचा असला तरी तो मराठी दौलतीतला सर्वांत काळाकुट्ट दिवस घेऊन आला होता. संभाजीराजांनी निवडलेले दोनएकशे धारकरी दानधर्माच्या होनांचे पेटारे घेऊन सज्जनगड उतरले.

नेहमीचा युवराजी पेहराव संभाजीराजांनी उतरून ठेवला. सादिलवार आसवाब अंगी धारण केले. छातीवर कवड्यांची माळ चाढवावी की नको या विचाराने त्यांनी ती हातात चाळवली. "कुठंही असलो तरी आम्ही भोसलेच आहोत. आता आईशिवाय पाठराखण ती कोण करणार?" असे पुटपुटत त्यांनी भवानीमाला छातीवर घेतली.

"तुम्ही क्षेत्र माहुलीवर स्नानास जाताहात म्हणे?" दालनात आलेल्या राणूअक्कांच्या बोलण्याने संभाजीराजांची तंद्री तुटली. त्यांनी शिवगंध तडीला नेत अक्कांना दाद दिली – "जी."

"आम्ही यावं म्हणतो संगमस्नानाला." राणूअक्कांनी हसत इच्छा व्यक्त केली.

"संभाजीराजांची कपाळपट्टी आक्रसली. ते अक्कांच्याकडे बघतच राहिले. त्यांना काय सांगावे ते युवराजांना कळेना. थोड्या अवकाशाने ते बांधील बोलत म्हणाले, "जशी आज्ञा. मेणा जोडायला सांगतो आम्ही. तयारी करावी."

"आम्ही म्हणजे आम्ही एकल्या नाही येणार. दुर्गाबाईंना घेणार आहोत संगती!" प्रसन्न हसत राणूअक्का बोलल्या.

"जशी मर्जी." संभाजीराजांना बोलायला जागाच उरली नव्हती.

मेणा सिद्ध झाला. संभाजीराजांनी मठात जाऊन हनुमानदर्शन घेतले. कल्याणस्वामींच्या चरणांवर आपल्या कपाळीचे शिवगंध टेकवीत ते म्हणाले, "स्वामींचा कृपाप्रसाद असावा."

"जय जय रघुवीर समर्थ." नित्यनांदी उठवीत कल्याणस्वामींनी युवराजांना वर घेतले. प्रसन्न हसत त्यांच्या ओंजळीवर झारीतील तीर्थ सोडले.

संभाजीराजांनी दूरवर रायगडच्या रोखाने एकदा कातर नजर दिली. मठासमोरचा पाराचा पिंपळ निरखला आणि त्यांनी भोयांना राणूअक्का व दुर्गाबाईंचा मेणा उठवायला इशारत दिली. जिजोजी काटकर आणि धारकऱ्यांचे पथक पाठीमागे घेत मेणा आघाडीला ठेवून युवराज संभाजीराजे भोसले सज्जन-समर्थांचा परळीगड उतरू लागले! गडाची एक एक पायरी उतरताना संभाजीराजे आपल्या आजवरच्या हयातीचीही एक एक पायरी उतरू लागले. प्रत्येक पायरीनिशी त्यांच्या मनाला वारंवार वाटू लागले. "जावं? की परतावं? कशासाठी? काय उरलं आहे पिछाडीला?"

"आम्ही पठाणाच्या गोटात दाखल झाल्याचं कळल्यावर आबासाहेबांना काय वाटेल? ... छेऽ! परतावं आणि पुढं? ... शृंगारपुरी पिलाजीमामांचा पावणेर झोडीत बसावं? ... पंडितांच्या संगतीत काव्याच्या पंक्तींशी हुज्जत घालावी? ... छे! हे होणे नाही! त्रिकाल होणे नाही! आम्ही केला आहे तोच निर्णय पक्का आहे.

"आम्ही गेल्याचं समजताच अवघी मराठी दौलत थरकून उठेल. दोन असामींना मात्र दूधभात खावासा वाटेल. दौलतीच्या जाणत्या, कदीम महाराणीसाहेबांना आणि अक्कलहुषार, इमानदार सुरनीस आण्णाजींना!

"भ्रम आहे हा की आमच्या पारखे होण्याने मराठी दौलत थरकून उठेल हा! रयतेला राजा लागतो. फक्त राजा ... आबासाहेबांच्या पश्चात तो रामराजांच्या रूपानं उभा राहील. आम्ही – आमचं राज्य – राजा शंभूचं राज्य – मनगटाच्या बळावर उठवू. तिथं आम्हाला कुणी जाबसाल करणार नाही. आबासाहेबांना कुठं होतं स्वतःचं राज्य! त्यांचे शब्द अजूनही आठवतात. ते म्हणाले होते, 'युवराज, वडिली दिली दौलत कोण पुरुषार्थाची?' त्यांचेच आम्ही फर्जंद आहोत. पुरुषार्थ दावायला अनायसा संधी आली आहे. दोनदा निग्रहाने बाजूला सारली पण अदृष्टाचा खेळ काही निराळा दिसतोय. त्यासाठी या क्षणी दिलेरशिवाय दुसरी जोड नाही. आम्ही धरली वाट बिकट आहे पण – खुंटल्या, खोळंबल्या वाटेपेक्षा ती बरी नाही काय?

"आमच्या जाण्यानं युवराज्ञींना काय वाटेल? शरमतील त्या आमच्या नावाचे कुंकूपट्टे कपाळी घेताना. होय; शरमतील. पण मस्तकी युवराजपणाचा नामधारी जिरेटोपाचा भार घेणं त्या कुंकूपट्ट्यापेक्षा शतपटीनं कठीण आहे.

"आज आम्हाला रोखण्याचं सामर्थ्य एकाच जिवात होतं. थोरल्या आऊसाहेबांत! पण त्या असत्या तर ही आफतच ना येती आमच्यावर!

"... आबासाहेब, कधी नव्हे तो सवाल उठतो आहे आमच्या मनी आज. आमच्या जागी आपण असता तर? महाराणींच्या करणीची स्त्री आमच्या वयात आपणाला मासाहेब म्हणून भेटती तर? आपण साफ साफ अशा मासाहेबांना तोंडावर बजावलं असतं की, 'आपण महाराणी असलात तरी आम्ही युवराज आहोत! उद्याचे राजे आहोत! अदब राखून बोला!'

"धावत्या नदीला मागे पडणाऱ्या घाटबुरुजांचा शोक करता येत नाही. पुढे येणाऱ्या दरी-दरडींची धास्त बाळगून चालत नाही. आता आम्हाला साथ-जोड आहे ती कमरेच्या हत्याराची. अंगच्या रक्ताची. आम्हीही राजअंकुरच आहोत. वसबीखाली कुचमत वाढण्यासाठी आमचा जन्म नाही. आबासाहेब आमच्या थोरल्या महाराजसाहेबांपासून दूर झाले. दूर राहूनच मोठे झाले. आम्हीही आमच्या आबासाहेबांपासून दूर जाणार आहोत ... शक्य आहे असं दूर जाणं? छेऽ! आम्ही

कुठंही असलो तरी मनानं त्यांना क्षणभरही विसरूच शकत नाही ... पण ... या दौलतीत आता क्षणभरही राहू शकत नाही. जाणे आहे. जिकडे पुढा होईल तिकडचा मुलूख थोडा करीत जाणे आहे. मथुरेत आबासाहेबांनी आम्हास मागं ठेवलं. आज आम्ही त्यांना मागं ठेवणार आहोत. होय, राजकारण म्हणून आबासाहेबांनी आम्ही उत्तरेत असता 'राजगडावर आमच्या बाळराजांना काळ झाला!' अशी अफवा पसरविली. ती खरी पटावी म्हणून आम्ही हयात असताही आमच्या नावचे राजगडावर दिवस घातले! आज आम्हीच आमच्या करणीनं सांगतो आहोत, 'आबासाहेब, तुमच्या लेखी आमचा काळच झाला आहे असे समजोन खरेखुरे दिवस घालावेत! आम्ही आपल्या पोटी उपजलो हे विसरून जावं!' आमचं यात कसलंही राजकारण नाही. आहे ती मनची सच्ची भावना ...

"आज पाय मागे खेचतात ते फक्त धाराऊ तुझ्या यादीनं! आमच्यावर मायेशिवाय आजवर तू दुसरं काहीच केलं नाहीस. आज आम्ही खरे बेइमान होतो आहोत ते फक्त तुला!! पण आम्ही तरी काय करावं? तुझ्या दुधावर वाढलं ते आमच्या अंगचं भोसल्यांचं रक्त! आज या भोसल्यांच्या रक्तानं गाड्यांच्या दुधाला शिकस्त दिली आहे. मानी मनानं मायाळू मनावर फत्ते घेतली आहे. एकच वाटतं आहे. तुझ्या रायाजी-अंतोजीसारखे आम्हीही शंभूजी गाडे म्हणून तुझ्या पोटी उपजतो तर! तर एक मावळा म्हणून आबासाहेबांच्या कसोटीस खातरीनं उतरलो असतो. शक्य झालं तर या शंभू भोसल्याचं कुचमलेपण तू आपल्या कुणबाऊ पदरी घे!"

दौडत्या घोड्याच्या टापेला दोरखंडाने जखडलेल्या सजेच्या कैद्याची व्हावी तशी संभाजीराजांच्या मनाची फरपट सज्जनगडाची पायरी पायरी उतरताना झाली. पायथा येताच सर्वांना थांबण्याचा इशारत देत एकदा गर्दन उठवून त्यांनी आभाळात घुसलेल्या सज्जनगडाचे दर्शन केले. कपाळी दाटलेला घाम शेल्याने निपटला.

"चला ऽ" भोयांना आज्ञा मिळाली. पथक चालू लागले. पौषाचे उन्ह तावू लागले.

कृष्णा-वेण्णा संगमाचे तीर्थस्थान श्रीक्षेत्र माहुली आले. संगमाचा दगडबंद प्रशस्त घाट माणसांनी फुलला होता. एका झाडाच्या घेऱ्याखाली गारव्यात पथक डेऱ्यात थांबले. युवराज संगमस्नानाला आल्याची वार्ता घाटावर पसरली. घाटाचा उत्तरभाग माणसांनी आपणहून राजकुळासाठी मोकळा करून दिला. एका बगलेला जिजोजीने झडपा टाकून जनानखान्यासाठी स्नानाची बंदिस्त जागा सिद्ध केली होती.

संभाजीराजांनी अंगीचा पेहराव व टोप उतरला. कमरेला जांग कसली. अंग उघडे पडू नये म्हणून एक शालनामा लपेटून घेत ते डेऱ्याबाहेर पडले आणि घाटाच्या पायऱ्या उतरू लागले. संगमावर पूर्वीच येऊन पोचलेल्या शिबंदीच्या मावळ्यांचे त्यांना मुजरे झडू लागले. पाण्यात भिजलेल्या शेवटच्या पायरीपर्यंत ते आले. अंगीचा शालनामा झटकन त्यांनी दूर हटविला. मागच्या सेवकाच्या हाती दिला. पौषाच्या उन्हात त्यांच्या पिळदार अंगकाठीचा सोनखांब क्षणभर लखलखला. उभा घाट तो नजारा डोळे जोडून बघत होता. क्षणभरातच तो सोनखांब कृष्णावेण्णेच्या पांढरट निळ्या पाण्यात झेपावला. युवराज पोहणीला पडले. पाण्याचा स्पर्शाबरोबर त्यांच्या मनातील विचारांचे वादळ वाहतीला लागले. सपासप हात मारत युवराजांनी दोन कासऱ्यांचा चौक फिरून घेतला.

झडपांआड बंदिस्त हमाम्यात राणूअक्का आणि दुर्गाबाई यांनी तीर्थस्नान घेतले. संभाजीराजे संगमाबाहेर आले. निथळत्या अंगाने त्यांनी एकदा सूर्यदर्शन केले. पायरीवरचा शालनामा पुन्हा लपेटून घेतला. झेपा टाकीत दोन दोन पायऱ्या पार करीत ते पुन्हा डेऱ्यात आले. अंग कोरडे करून त्यांनी पेहराव धारण केला.

कृष्णा-वेण्णेची हळदी-कुंकवाने पूजा करून, खणानारळांनी त्या नद्यांच्या ओट्या भरून राणूअक्का व दुर्गाबाई डेऱ्यात आल्या.

जिजोजीने डेऱ्यासमोर युवराजी बैठक मांडली होती. दानासाठी सोनमोहरा, धान्ये, वस्त्रे यांची सरपोसबंद तबके त्या बैठकीलगत सिद्ध ठेवली होती.

युवराज डेऱ्याबाहेर आले. त्यांच्यामागून आक्कासाहेब आणि दुर्गाबाई आल्या. युवराजांनी बैठक घेतली. जनाना आपल्या बैठकीवर बसला. दानसत्राला प्रारंभ झाला.

शांत, समाधानी चर्येने, हसत्या मुखाने युवराज पर्वणीची दाने देऊ लागले. भट, भिक्षुक, गोसावी, बैरागी, पिंगळे, वासुदेव हाती दान पडताच युवराजांना तोंडभर आशीर्वाद देऊ लागले, जमल्या स्त्रियांना राजजनान्याने खणनारळ दान केले.

"जिजोजी, घाटावर फेर टाका. दानाचे कुणी बाकी राहिले काय माग घ्या." संभाजीराजांनी गडकऱ्यांना फर्मावले.

"जी" म्हणत जिजोजी घाटाचा माग घ्यायला गेला. तेवढ्यात संभाजीराजांनी आपल्या निवडल्या धारकऱ्यांच्या म्होरक्यांना समोर घेतले, कुणलाच न कळणारी आज्ञा त्यांना दिली, "प्रथम आपली सारी जनावरं नावांतून संगमापार घ्या. पेटारे, सारी शिबंदी पैलतीराला सोडा. जल्दी करा ऽ!"

"जी" म्होरक्यांनी झुकून ती आज्ञा उचलली. ते कामाला लागले.

"च्यार दोन गोसावी बाकी हाईत. पर त्ये म्हंत्यात आमी गोसावी. आमास्नी दान नगं. होतर शिधा देवावा." जिजोजीने घाटाचा माग दिला.

"ठीक आहे. त्यांना शिधा द्या." संभाजीराजांनी बैठक सोडली. ते घाटावर आले. संगम पार करणाऱ्या नौका निरखू लागले. जनावरे, शिबंदी, सामानाचे पेटारे पैलतीराला पोचल्याची खातरजमा त्यांनी करून घेतली. आता चार-पाच नौका खाशांची वाट बघत संगमाच्या ऐलतीरावर हिंदोळत उभ्या होत्या.

संभाजीराजे डेऱ्यात आले. राणूअक्कांना म्हणाले, "अक्कासाहेब, जरा संगमावर येता ?"

"चला." काहीच अंदाज नसलेल्या राणूअक्का बोलून गेल्या.

संभाजीराजे राणूअक्का, दुर्गाबाई यांच्या संगतीने घाट उतरू लागले. त्यांच्या मागून 'शिबंदी पैलतीराला का ग्येलीय ?' या घोटाळ्यात अडकलेला जिजोजी अदब धरून चालला. संगमतीर आला. नावाड्यांनी नौकांतूनच युवराजांना मुजरे दिले. ते आपले करण्याचे भानही संभाजीराजांना उरले नव्हते.

राणूअक्कांना ध्यानीमनी नसता संभाजीराजांनी वाकून त्यांच्या पायांना हाताची बोटे भिडविली. "आम्ही येतो आहोत! आपण परतावं सज्जनगडी यांना घेऊन!"

"मतलब ?" चमकत अक्कासाहेबांनी विचारले.

"आम्ही – आम्ही, पठाण दिलेरच्या गोटात जाण्याचा निर्णय पक्का केला आहे!" गोळीबंद जाब आला.

"बाळमहा ऽ राज!" अंगावर वीज पडल्यागत राणूअक्का चीत्कारल्या. जिजोजींच्या डोळ्यांसमोर दिवसाढवळ्या काजवे उमटले. दुर्गाबाईंनी कधी नव्हे ते मान उठवून आपल्या स्वारीला नजरेनेच जाब विचारला.

वाऱ्याच्या फराट्याने मुखाभोवतीचा पदर उडून गेल्याचे भान राणूअक्कांना उरले नाही. नजर आपल्या पाठच्या बंधुराजावर जोडीत त्यांनी विचारले, "काय – काय बोलताहात हे ? आबांचा काही विचार केलात ?"

"जी. केला आहे. आता आम्ही कुणाचं काही लागत नाही. रायगडी, शृंगारपुरी, परळीवर कुठंच आम्ही जखडून पडणार नाही. कुणापुढंही कशासाठीही हात पसरणार नाही. आमचा निर्णय पक्का आहे. आपण माघारी परतण्यास मुखत्यार आहात. जाताना आम्हाला ऐकवून जावं की, 'तुमच्यासारखा भाऊ पाठीशी असण्यापरीस पाठ सुनी असती तरी बरं होतं!' ते ऐकण्याचीही आम्ही तयारी केली आहे."

ते ऐकताना राणूअक्का सुन्न सुन्न झाल्या. मान डोलवीत म्हणाल्या, "बाळमहाराज, कसं बोलता हे ? यासाठी आम्ही तुम्हास साथ दिली ? जे तुमच्या वाटेत आडवे आले त्यांना आडवे करण्याची धमक दाखविण्याऐवजी तुम्ही त्यांना पाठ दावता ? तुमच्या जाण्यानं फावेल ते त्यांचे. विचार केलाय तुम्ही ? या भरल्या ओटीच्या बाईचं काय होईल तुमच्या माघारी ?" दुर्गाबाईंकडे हात करीत राणूबाईंने विचारले.

"आम्ही विचार केलाय. कुणाचं काय फावेल, काय होईल याच्याशी आम्हाला आता मतलब नाही! आम्ही येतो. आपण परतावं."

राणूअक्कांना पाठवान दावीत संभाजीराजे झेप घेऊन नौकेत चढले. "चला" त्यांनी

नावाड्यांना फर्मावले. संगमाच्या लाटांवर डुलत नौका सरसरू लागली. कासराभर आत घुसली.

"बाळमहा ऽ राज. थांबा." अक्कांची कातरी साद कृष्णा-वेण्णेच्या अंगावर काटे उमटवून गेली. पळभर नौका जागीच थांबली. संभाजीराजांनी नावाड्याला ती वळती घेण्याची इशारत दिली. नौका किनाऱ्याला भिडताच संभाजीराजांनी अक्कांना सवाल घातला, "काय बोला ? आम्हास वखत नाही."

"आम्ही – आम्ही येतो आहोत तुम्हा संगती!!" मायेच्या चिंब काळजाचे घोगरे बोल घाटावरून उठले. कळवळत्या नजरेने तीच साद दुर्गाबाईंनी आपल्या कुंकवाला घातली.

"तुम्ही ? देवदर्शनाला नाही जात कुठं आम्ही अक्कासाहेब. कशाला पायी खोडा घालता ?

"बाळमहाराज, एकवार आम्ही स्वत:ला पारखे होऊ पण तुम्हाला एकलं सोडणं नाही जमणार आता आम्हाला. आम्ही निर्णय केला आहे, जिथं तुम्ही असाल तिथं तुमची पाठराखण करण्याचा. आम्हाला संगती घ्या. आजवर काही मागणं घातलं नाही. पण आज आई भवानीची आण घालून हे मागणं करतो आहोत आम्ही. आम्हाला संगती घ्या."

सगळी जाणच ताठरल्यागत संभाजीराजे जोडल्या नजरेने अक्कासाहेबांना बघत राहिले. इथे बोलणेच खुंटले होते. शब्दांना व्याधी झाली होती.

"ठीक आहे. जशी आपली मर्जी. चलावं." नौकेतून उतरून संभाजीराजांनी हात जोड देत अक्कांना नौकेत चढविले. पाठोपाठ दुर्गाबाईंना हातजोड दिली. घाट सुना-रिता करीत ते एकमेकांशी जन्माने जोडले गेलेले ते तीन जीव नावेत झेपावले.

"नगा, धाकलं धनी असं कायबाय नगा करूसा!" छत्रपतींच्या जागत्या इमानाचा किल्लेदार जिजोजी काटकर काळजाच्या देठातून कळवळत म्हणाला.

"किल्लेदार, घाटावरच्या बार्दांना सज्जनगडी पावता करा."

"धनी ऽ..."

"दिल्या आज्ञेची तामिली करा. तुमच्या महाराजांना सांगा – आम्ही परतू ते हा सह्याद्रीचा डोंगरदरा जिंकण्यासाठीच!" भरकटल्या क्षणाला संभाजीराजांच्या तोंडून तेजाबासारखे जळजळीत बोल कृष्णा-वेण्णेच्या पावन अंगावर टपकले. नौका अज्ञाताचा संगम पार करीत सरसरू लागली. अंगावर वीज पडल्यागत किल्लेदार जिजोजी काटकर तिच्या जाण्यामुळे उठणारी पाण्याची वळी गुमान बघतच राहिला. त्याच्या नजरेत ती काही मावता मावत नव्हती.

पैलतीर येताच सज्ज शिबंदीतील तीन जातवान घोड्यावर संभाजीराजांनी राणूअक्का दुर्गाबाईंसह मांड घेतली. युवराज संभाजीराजे भोसल्यांचा तांडा मोगली तळाचा म्होरक्या धरत चालला. चालला - भगवा जरीपटका हिरव्या निशाणीच्या छायेत! शिवाचा पुत्र अशिवाकडे! एकला नव्हे. सोबत छत्रपतींची कन्या आणि छत्रपतींची गर्भवती सून घेऊन.

युवराज संभाजीराजे भोसले छत्रपतींना पारखे झाले!

स्वतःसाठी खऱ्या अर्थाने पूर्णपणे पोरके पोरके झाले!!

□ □ □

१

सुप्याचा मोगली तळ मागे पडला. तीनशे मावळी घोडेस्वारांची जमात उन्हातून निथळत चालली होती. पेडगावच्या बहादुरगडावर ठाण झालेल्या दिलेर पठाणाला संभाजीराजांनी हारकारे पाठवून आपण येत असल्याची वर्दी दिली होती.

तीन हजार घोडेस्वारांची दिमत देऊन दिलेरखानाने इखलासखान मियाना व खैरतखान या आपल्या सरदारांना बहादुरगडावरून संभाजीराजांना घेण्यासाठी धाडले होते. इखलास आणि संभाजीराजे यांची सुपे-पेडगाव मार्गावर भेट झाली. मावळी-मोगली जोडफौज पेडगावच्या वाटेला लागली.

पेडगावच्या वेशीवर खासा दिलेरखान सरंजामाने संभाजीराजांची राह ताकत उभाच होता. पूर्वी रजपूत मिर्झाने 'शिवाला' सुलुखाला येणे भाग पाडले होते. तहाच्या अटी पूर्ण होईतो 'संभाला' आपल्या गोटात ओलीस घेतले होते. त्या वेळी कऱ्हेपठारावर रजपुताने या संभाला एक शाही हत्ती नजर केला होता. मजाक म्हणून त्या वेळी फर्जंद संभाला केल्या गेलेल्या सवालाचा जाब याच पठाणाने ऐकला होता. सवाल होता, "इतना बडा शाही हाथी कैसे साथ ले जावोगे संभूराजे?" शिवाच्या या कडव्या बच्च्याने मोठ्या गरूराने त्या वेळी जाब दिला होता– "डुलत झुलत का होईना तुमचे हे जनावर चालते, ते नेणे सोपे आहे– पण आमच्या महाराजसाहेबांनी दिलेले गडकोट चालत नाहीत ते नेणे कठीण आहे!"

पठाण आज या आठवणीने स्वत:शीच हसला. त्याच्या मनी विचार आला– "जंगे-दिल शाहजादे, गड, किले नही चलते! उन्हे उठाना मुष्किल है, पर– पर आदमी तो चलता है। उसे उठाना आसान है।"

संभाजीराजे इखलाससह पेडगावच्या वेशीवर येताच मोगली तळावर शाजणे, नगारे झडले. खांद्यावरची हिरवी जरीबंदी खिल्लत नेटकी करीत, दोन्ही हात पसरून हसतच 'आइये ऽ संभूराजे, आइये.'' म्हणत दिलेरखान संभाजीराजांना सामोरा गेला. पठाणी छाताडाला भोसलाई छातवान भिडले. उभा तळ ते अकरीत बघायला वेशीवर लोटला होता. हाताला धरून पठाणाने संभाजीराजांना आपल्या सालारी डेऱ्यात आणले.

मेणे जोडून संभाजीराजांचा जनाना हत्यारबंद पहाऱ्यात बहादुरगडाकडे रवाना केला गेला.

दुसऱ्या दिवशी तळावर नजराणा पेश करण्यासाठी दिमाखदार बैठक उठविण्यात आली. शाही बिछायती पांघरून ती सजविण्यात आली होती.

आपले इखलासखान, इरजखान असे सरदार दिलेरने न विसरता हजर ठेवले होते. त्यांच्या साक्षीने संभाजीराजांना मोगली दख्खनसालार दिलेरने आलमगिराने दिल्लीहून पाठविलेला झुलबाज हत्ती, तीन अरबी घोडे, हिरव्या म्यानाची तलवार, चौघडा आणि शाही आसवाबांचा नजराणा पेश केला. सात हजार स्वार आणि सात हजार जातांची वऱ्हाड-खानदेशीची मन्सब संभाजीराजांना शाही दरबाराने बहाल केल्याचे फर्मान जमल्या सरदार-दरकदारांना घोषित करण्यात आले. दिल्या मन्सबीतील हाताखाली येणाऱ्या फौजदार, हवालदार नायकांची दिलेरने संभाजीराजांना ओळख करून दिली.

जे फर्मान औरंगजेबाने मागे संभाजीराजांसाठी म्हणून पाठविले होते आणि जे शिवाजी महाराजांनी धिक्कारून ठोकरून परत पाठविले होते ते आज संभाजीराजांनी विचित्र मन:स्थितीच्या आहारी जाऊन स्वीकारले होते.

मराठी दौलतीत 'युवराज' म्हणून मावळ्यांचे मुजरे आपलेसे करणारे संभाजीराजे आता औरंगजेबाचा 'शाही मन्सबदार शंभूखान' म्हणून हशमांचे कुर्निस आपलेसे करू लागले! उमद्या बांड्या भोसल्यांच्या हयातीतील काळ्याकुट्ट पर्वाला सुरुवात झाली.

पणजोबा मालोजीराजे, आजोबा शहाजीराजे, आबासाहेब शिवाजीराजे या भोसल्यांच्या कुळदेठातील कुणीही कधी ना कधी तरी हे काळेकुट्ट पर्व भोसल्याभोगल्याविना सुटलेले नव्हते. संभाजीराजांना दिला जाणारा नजराणा आणि मन्सबदारी बघून एकच असामी अस्वस्थ, बेचैन झाली होती. बजाजीराजे निंबाळकरांचे पुत्र, छत्रपतींचे जावई, संभाजीराजांचे एका नात्याने मामेभाऊ आणि दुसऱ्या नात्याने दाजीसाहेब महादजी निंबाळकर.

नजराण्याच्या बैठकीवरून संभाजीराजे आपल्या डेऱ्यात आले. पाठोपाठ त्यांना पहाऱ्याच्या हशमाने वर्दी दिली. "शालक फलटणवाले निंबालकर पेश आ रहे हैं।"

मस्तकी तिकोनी, जरीबंद पगडी असलेले, अंगावर खिल्लत चढविलेले, महादजी डेऱ्यात आले. वयाने ज्येष्ठ असले तरी मानाची अदब राखत त्यांनी संभाजीराजांना तसलीम दिली.

"आम्ही जातीने भेटीस आले आहोत. युवराजांशी काही बोलावं म्हणून." महादजींनी विषयास हात घातला.

"बोला."

"राजे काय करून बसलात हे?" कसे बोलावे ते महादजींना सुधरले नाही.

"मतलब?"

"कशाला आलात या खातेऱ्यात?"

संभाजीराजांनी महादजींना निरखत कडवा सवाल केला.

"अंगी शाही खिल्लत पांघरून तुम्ही आम्हाला हे विचारावं? तुम्ही का इथं हत्यार राबविताहात?"

"आमचा सल काय तो कुणाला कळायचा नाही कधी. पहाडासारखे वडिलधारे पाठीशी असता ही आडवाट तुम्ही मात्र धरायला नको होती राजे."

"बस्स! दाजीसाहेब, राजवाटा खुंटल्या की आडवाटेशिवाय काही करता येत नाही. आमचा सलही कुणाला कधीच नाही कळणार. कळला तरी उकलणार नाही."

"अजून शांत विचार करा राजे. वेळ गेली नाही. तुम्ही परतावं असं आम्हाला वाटतं. अभिषेक झालेल्या युवराजांनी राहावं अशी ही जागा नाही."

"आम्ही विचार केला आहे. आम्हाला युवराज म्हणू नका." भयाण शांतता डेऱ्यात कुचमून पडली

"या निर्णयानं पस्तवाल एवढंच सांगतो आम्ही. येतो आम्ही." महादजी आले तसे जायला निघाले. डेऱ्याबाहेर पडणाऱ्या त्यांच्या कानी बोल पडले,

"आमच्या अक्कासाहेबांना नमस्कार सांगा. युवराज म्हणून नव्हे. पाठचे दुर्भागी भाऊ म्हणून!" सखूबाईंच्या आठवणीने संभाजीराजे पिळवटले.

महादजी डेऱ्याबाहेर पडले. या मेहुण्यांच्या भेटीगाठीची खबर दिलेरला लागली होती. महादजी आपल्या गोटातील डेऱ्यात जातात न जातात तोच पठाणी हत्यारबंद हशमांचा त्या डेऱ्याभोवती घेर पडला. महादजी नजरबंद झाले!

दिलेरखानाचे ग्रह आता बळाला लागले. विजापूर दरबारात वजीर सिद्दी मसूद आणि सेनापती सर्जाखान यांची तेढ पडली. एकेकाळी मिर्झा राजा, दिलेरखान, शिवाजीराजे, नेताजी पालकर या चार ताकदवार सेनापतींच्या स्वारीत विजापूरचे रक्षण करणारा सर्जाखान विजापूर पारखा होऊन थेट दिलेरला येऊन मिळाला! दख्खनेचा एक शाहजादा आणि एक सरलष्कर मिळताच दिलेरचे पारडे जड झाले.

औरंगाबादला असलेल्या मुअज्जम ऊर्फ शहाआलम या दख्खनसुभा औरंगपुत्राला दिलेरची ही वरताण काही मानवणारी नव्हती! दिलेर आता विजापूर गिळण्याचं स्वप्न बघत होता. त्याला हे श्रेय मिळू नये म्हणून शहाआलम त्याला मराठ्यांवर चाल करण्याचा अनाहूत सल्ला देत होता. दोघांचे पराकोटीचे मतभेद झडत होते.

संभाजीराजांसह दिलेरने बहादूरगड सोडला आणि अकलूजला तळ दिला. हे ठाणे आदिलशाही व मराठशाहीवर चाल घेण्यासाठी मोक्याचे होते. दिलेर विजापूरवर चालून येणार या भयाने वजीर मसूदखानाने छत्रपती शिवाजीराजांशी बोलणी लावली. राजांनी मसूदला मदतीचा हात देण्याचे अभय लिहून पाठविले. यात दोन हेतू होते. विजापूर दिलेरच्या मोगली घशात जाऊ देणे हिताचे नव्हते आणि दुसरे म्हणजे साधेल त्या प्रयत्नाने संभाजीराजांना दिलेरच्या गोटातून उचलायचे होते.

सरलष्कर हंबीरराव आणि आनंदराव यांच्या म्होरकेपणाखाली मराठी फौजांच्या दोन फळ्या आदिलशाहीत उतरल्या. या फौजांतील जासूद प्राण धोक्यात झोकून दिलेरच्या तळावर संभाजीराजांना भेटले होते. पण युवराज हट्टाला पेटले होते. काही ऐकायला तयार नव्हते. जासूद हताश परतले होते.

आदिलशाहीत आता तीन शक्तींचा तिढा पडला होता. अकलूजला दिलेर, संभाजीराजे आणि सर्जाखान; विजापूरला चिंताग्रस्त मसूदखान व आदिलशाही आणि युवराज परत मिळण्यासाठी, जमेल तेवढा आदिलशाही मुलूख मराठशाहीला जोडण्यासाठी दौडणाऱ्या मराठी फौजा.

अकलूजच्या तळावर आपल्या डेऱ्यात संभाजीराजे अस्वस्थ फेऱ्या घेत होते. त्यांचे मन बहादूरगडात गुंतले होते. आठवणींची गुंतवण उकलीत होते.

"काय असतं एकेकाचं भाग्य! युवराज्ञीबरोबर आम्ही शृंगारपुरात राहिलो. त्यांचं कौतुक, सोपस्कार त्यांच्या माहेरी झाले आणि यंना..." दुर्गाबाईंच्या आठवणीने संभाजीराजे पिळवटले.

"युवराज्ञी, तुम्ही नेहमी म्हणत आलात– आम्ही बाशिंग बांधले आहे ते रानवाऱ्याशी! खरं आहे ते. पण ते तुमच्या बाबीने नव्हे, तुमच्या धाकल्या बाईंच्या बाबीनं! शृंगारपूर सोडताना तुम्ही म्हणालात, धाकल्या बाईंना जपावं. जिथं आमचीच उधळण झाली तिथं त्यांना कुणी जपावं?" अंगच्या कपड्यांनी पेट घेतलेला माणूस धावावा तसे संभाजीराजांचे मन सैरभैर धावू लागले.

"अक्कासाहेब, कसला खोडा घातलात हा तुम्ही! मुलखात असत्या तर आमच्या युवराज्ञींनी यांना तळहाताच्या फोडासारखं जपलं असतं."

विचारांचा पाठलाग टाळावा म्हणून संभाजीराजे डेऱ्याबाहेर आले.

बहादुरगडाहून निघालेले दोन घोडेस्वार तळात घुसले होते. जनावरे उधळीत ते थेट संभाजीराजांच्या गोटात आले. पायउतार होऊन तसलीम देत त्यातील एकाने कमरेची थैली संभाजीराजांना देताना म्हटले, "बधाई हो! फर्जंद हुआ!"

"फर्जंद! सच?" भोसलाई डोळे क्षणभर लखलखले. पुन्हा ठाव न लागणाऱ्या खंतेत डुंबून गेले. घोडेस्वाराच्या हातावर अंगठी पडली. थैली न खोलताच चुकली पावले डेऱ्याकडे वळली.

वऱ्हाड खानदेशाच्या मन्सबदाराच्या गोटातून तळभर 'शक्कर' वाटली जाऊ लागली. श्रींच्या राज्याच्या पहिल्या नातवाच्या जन्माची साखर पठाण-हशमांचे ओठ गोड करू लागली!

जन्मणाऱ्यानेही कुठे उपजायचे हे ठरवायला पाहिजे! नाहीतर होणाऱ्या परवडीला जिम्मेदार तोच ठरतो. या फर्जंदांचे बहादुरगडी नाव ठेवण्यात आले 'मदनसिंह'!

दिलेरशी रदबदली करून संभाजीराजांनी महादजींची नजरबंदी उठवून घेतली. मोगलांच्या फौजा आता एकवट होऊ लागल्या. रसद, वैरणकाडी दास्तानी लावण्यासाठी मोगलांचे काबाडीच्या बैलांचे तांडे माळशिरस, इंदापूर, बारामती या भागात चकरा टाकू लागले. अशाच एका तांड्याशी भूपाळगडावर मावळ्यांची गाठ पडली. 'तू-मी' ची बाचाबाची झाली. मोगली हशमांनी ती न चुकता दिलेरच्या कानी घातली– "भूपालगढके काफर मरहट्टे रसद इकठ्ठा करनेमें हर्कत लेते हैं, टोककर दम भरते हैं।"

झाले! दिलेर निमित्तालाच टेकला होता. माकड मशालीचीच वाट बघत होते. एकतर याच निमित्ताने हातचे संभाजीराजे दिलेरला पारखून घ्यायला मिळणार होते. "सेवा का लडका शाही मन्सबदार सचमुच हुआ है या ये बापबेटेकी छुपी चाल है?" आणि मराठी फौजांचा विजापुरी मुलखावर पडलेला दबाव असा मराठ्यांना तिरका तडाखा दिल्याखेरीज हटणार नव्हता. दिलेर दख्खनेत काही उरुसाला आला नव्हता.

वैशाख शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी अकलूजच्या तळावर दिलेरने जमलेल्या फौजांना हमल्याचा इशारा दिला. फौजा पथकापथकांनी शिस्त घेत तळ सोडू लागल्या. तोफखान्याचे गाडे खडखडत निघाले. किल्ले भूपाळगडाच्या रोखाने.

खासा दिलेर संभाजीराजांच्या डेऱ्यात आला. हसत म्हणाला, "संभूराजे. चलिये। आपके मर्द हाथोंका शगुन आजमाना है। भोपालगढपर कब्जा बिठाना है। औरंगाबादमें शाहजादा मुअज्जम आपपर शक लेता है। उसे अपनी करामत दिखानेका मौका आया है।"

भूपाळगडाचे नाव ऐकताच संभाजीराजे चाचरले, "पण खानसाहेब..."

गद्‌गदा हसत दिलेर तडफेने म्हणाला, "सही है राजे। आपका हिचकिचाना रास्त है। हम आपको सिर्फ फर्मा नहीं रहे हैं। खुद सवारी भरके आपके साथ आ रहे हैं। जंगमें अपना पराया कुछ नहीं। आपको हमारे साथ आना है। अपनी फौज को तैय्यारी फर्माओ।" गर्जत्या झंझावातासारखा दिलेर डेऱ्याबाहेर पडलाही.

संभाजीराजांचे आपल्या फौजेला फर्मान सुटले. चौघड्यांच्या तालावर शिस्त घेत वऱ्हाड खानदेशची मोगली फौज कूचाला सिद्ध झाली.

हौदा लादलेल्या एका हत्तीवर पठाण दिलेरखान आणि संभाजीराजे भोसले एकत्र बसले. हत्ती फौजेच्या आघाडीला झाला. दिलेरने हत्यार म्यानाबाहेर घेत ते उंचावले. पाठच्या सेनेने त्याची इशारत पकडून मोठी दाद दिली– "धीऽन, धीऽन!"

भरकटलेली नौका पाणझोताच्या थपडा खात भेलकांडत जावी तसे वाट चुकलेले संभाजीराजे पाठीशी मोगली फौज ठेवून, साथीला पठाण सेनापती घेऊन भूपाळगडावर चालून निघाले! शिवाजीराजांच्या 'श्रींच्या' राज्यावर त्यांचेच पुत्र संभाजीराजे चालून निघाले! भूपाळगडाच्या पंचक्रोशीतील भेदरलेली मराठी रयत गडाच्या आसऱ्याला धावून गेली. गडाचे दरवाजे बंद झाले. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा तव्यासारख्या

छातीत सुपाएवढे काळीज घेऊन बुरुजाबुरुजावरचे मोर्चे बांधून झुंजीला सिद्ध झाला. नरसाळा राजांचा कदीम आणि इमानाचा माणूस होता. बाल संभाजीराजांना त्याने अंगाखांद्यावर खेळविले होते. आज तेच अंगावर चालून येत होते.

रात्रभर फिरंगोजीचा डोळ्यास डोळा लागला नाही. तटावर येऊन गडपायथ्याला भिडलेल्या छावणीवर नजर टाकताना नरसाळ्याचे काळीज तुटत होते.

"बाळराजं, काय क्येलंसा ह्ये ?" हा त्याच्या मनी उठणारा सल पायथ्याच्या संभाजीराजांच्या कानापर्यंत पोचत नव्हता. पोचला तरी उपयोग नव्हता !

वैशाख शुद्ध द्वितीयेचा दिवस फटफटला नाही तोच दिलेरच्या तोफखान्याचा गोळा भूपाळगडावर फुटला. जंगाला तोंड पडले. फिरंगोजीचे धारकरी किल्ल्यावरून बाण, दगडधोंड्यांची फेक करू लागले. दिवस वर चढू लागला. मोगली तोफखाना गडावर आग ओकीत होता. हशमांच्या फळ्या तटाशी लगट करू बघत होत्या. पेटला फिरंगोजी गोफगीगत गडावर भिरभिरत कुठंही भांगा पडू देत नव्हता.

पुरंधरसारखा बळकट किल्ला नमविणारा जिद्दीचा दिलेर भूपाळगडासमोर मात्र दमगीर झाला. दुपार धरून वैशाखी उन्ह सणकू लागले. तसे दिलेरने गोलंदाजांना बत्ती रोखण्याची आज्ञा दिली. मांजऱ्याचे पठार शांत झाले.

कपाळावरचा घाम निपटत दिलेर आपल्या डेऱ्यात आला. खानसाम्याने समोर ठेवलेल्या थाळ्यातील रोट-सागुतीच्या कटोऱ्यात डुबवीत त्याने आज्ञा केली, "संभूराजाको बुलाव. गढ जरूर पडेगा. आजही !"

संभाजीराजे दिलेरच्या डेऱ्यात आले. पहाटेपासून काहीच झाले नाही अशा थाटात दिलेर त्यांना म्हणाला, "राजासाब, आप सम्हालोगे घेरेकी आघाडी ?"

"हाँ. जरूर." संभाजीराजांनी होकार दिला.

"देखिये गढ ताकदवर है। कचदिल मत होना।"

संभाजीराजे त्याला दाद म्हणून नुसते हसले.

दुपार टळतीला लागताच दिलेरने आपला ठेवणीचा, हातचा डाव काढला. आपला हत्ती त्याने संभाजीराजांना दिला. त्या हत्तीच्या पाठीवरचा हौदा हटविण्यात आला होता. संभाजीराजांसाठी त्यावर गिर्दीची सांडणी-बैठक बसविली होती.

आपल्या फोजेसह संभाजीराजे आघाडीला झाले. गडावरच्या इमानी तिरंदाजांनी तीरकमठे रोखून फौज टप्प्यात घेण्यासाठी पवित्रे धरले. बंदुकबारदारांनी नळ्या पेलून शिस्त घेतली. तट बुरुजावर फेर टाकणाऱ्या फिरंगोजीला हत्तीवरचे संभाजीराजे दिसले मात्र त्याने आपल्या माणसांना ओरडून इशारत दिली – "गड्यांनो, घात जाला. पठाणानं डाव साधला. बाळ धनी म्होरं काडलं ! हात आवरा !"

माया कर्तव्याला आडवी आली. लढतीचे रूप पालटले. संभाजीराजांची फौज थेट गडाच्या तटाला भिडली. फिरंगोजीने तटाला दोर लावून गडावर पांढरे निशाण धरले. एक दोरबाज तटावरून खाली उतरला. त्याने फिरंगोजीचा सांगावा संभाजीराजांसमोर ठेवला – तुम्हावर हत्यार धरणं आमचं काम न्हाई ! आलासा तसं निघून जावं."

संभाजीराजे त्या दोरबाजावर गर्जले, "किल्लेदारास सांग, नरसाळा, आम्ही गड घेतल्याखेरीज हटणार नाही ! एक आम्ही तरी पडू नाहीतर गड तरी पडेल !"

दोरबाजचा निरोप ऐकून फिरंगोजी पेचात पडला. लढत द्यावी तर संभाजीराजांच्यावर हत्यार धरावे लागणार. न द्यावी तर गड सोडावा लागणार !

फिरंगोजीने गडावर सबनीस विठ्ठल भालेरावांशी मसलत केली, "काय करावं ?"

संभाजीराजांकडून साऱ्यांना अभय घेऊन गड खाली करून द्यावा, अशी मसलत पडली. तटावरचे पांढरे निशाण डावे उजवे डुलू लागले. ते बघताच मोगली तळावर शाजणे, नगारे झडले. फत्तेच्या तोफा फुटल्या. अभय घेतलेल्या फिरंगोजीने, विठ्ठल भालेरावांसह येऊन गडाचा दरवाजा खोलून मान खाली टाकली. त्याला संभाजीराजांकडे बघावेसे वाटत नव्हते.

आपली मावळी शिबंदी घेऊन फिरंगोजीने खालमानेने विठ्ठलरावांसह भूपाळगड सोडला. गडावर चांदताऱ्याचे हिरवे निशाण चढले. संभाजीराजे गडाच्या बालेकिल्ल्यावर गेले. दिलेर पायथ्याला पठारावरच्या तळावर राहिला.

रात्र उतरली. मांजऱ्याच्या पठारावरच्या मोगली तळावरचे टेंभे शिलगले. आगट्या पेटल्या. दिलेरच्या डेऱ्यासमोर दोरखंडांनी दावणीला जनावरांसारखी जखडलेली सातशे मराठी रयत माणसे खालमुंडीने खडी होती. त्यांच्याभोवती हत्यारबंद पहारा जारीने उभा होता. भेदरून भूपाळगडच्या आसऱ्याला आलेली ती कुणबाऊ माणसे गड पडताच वाऱ्यावर उघडी पडली होती. पठाण ठरवील ते त्यांचे भवितव्य होते.

इस्पहानी मद्यावर रस्सा-रोटी रिचवलेला दिलेर डेऱ्याबाहेर आला. कैदखान्याच्या प्रमुखाने त्याला कुर्निस देत विचारले, "इनका क्या करना हजूर ?"

दिलेरने साऱ्या तांड्यावर नजरफेर टाकीत एक उदार हुक्म फर्मावला, "काफरोंका एक एक हाथ कलम कर दो !!"

मांजऱ्याच्या पठारावर जल्लादांचा जथा हाती वीतभर रुंदीचा धारदार सपाता घेऊन लाकडी खोडावर दाबून धरलेले काफरांचे हात कलम करताना खवचटपणे विचारीत होता – "कौनसे हाथसे पत्थर गिराये ? कमीने." दमलेला जल्लाद सापता दुसऱ्याच्या हातात नेताना तिरस्काराने म्हणत होता – "कितनी पैदाइश है कम्बख्तोंकी ! तटपरसे फेंक देते तो हमें इतनी तकलीफ तो नही होती !"

पठारावर किंकाळ्यांमागून किंकाळ्या उठत होत्या. भूपाळगडच्या बालेकिल्ल्यांवरून त्या ऐकता येणार नव्हत्या. त्या किंकाळ्यांना कुणी वाली नव्हता. कसा असावा ?

भूपाळगडच्या कुमकेसाठी महाराजांनी सोळा हजारांची सेना पाठविली. पण ती समयास पावली नाही. गडावरचे बदललेले निशाण बघून मावळी सेना परतली. दिलेरखानाने गडाच्या माऱ्याच्या मोक्याच्या जागा बेचिराख करून टाकल्या.

पावसाळा तोंडावर आला होता. गडाची बंदिस्ती करून दिलेर आणि संभाजीराजे बहादुरगडाकडे निघाले. मराठी रयतेचे हात कलम करण्याचा हुकूम खानाने दिला ही बाब संभाजीमहाराजांना मनात सलत होती. स्वस्थ बसू देत नव्हती.

बैठकीच्या हत्तीवर हौद्यात त्यांनी खानाला सांगितले, "बेकसूर माणसांचे हात कलम करण्याचा हुकूम दिलात. हे बरे नाही केलेत."

खान बेपर्वाईने म्हणाला, "शुक्र गुजारो राजे, हमने उन्हें मौतके घाट नहीं उतार दिये! हमारा कितना हशम काम आया जानते हो; ये नाचिज मिट्टीका ढेर कब्ज करने के लिये?"

चाप बसविल्यागत संभाजीराजांची जबान खुंटली. काळजात मात्र काहीतरी सलत राहिले. बहादूरगड आला. आपल्या फौजेला दास्तानी लावून संभाजीराजे कबिल्याच्या दालनात आले. राणूअक्का आणि दुर्गाबाई काहीतरी बोलत होत्या. त्या बोलणे तोडून थांबल्या. सलवार-कमीज घातलेल्या, तलम ओढण्या चेहऱ्याभोवती ओढलेल्या सेवेच्या दासी दालनाबाहेर गेल्या.

संभाजीराजांनी पुढे होत राणूअक्कांचे पाय शिवले. त्यांना काहीच दाद न देता अक्कांनी तोंड फिरविले. त्यांनी ओठभर लपेटून घेतलेल्या पदराआडून थरकते शब्द उमटले, "गड जिंकून आलात. तुमची आरती कशी उतरावी उमगत नाही आम्हास!"

खाली मान घातलेल्या दुर्गाबाईंच्या हाती चुरला जाणारा पदरही हेच सांगत होता.

संभाजीराजे सुन्न झाले. स्वतःच्या शरमेने त्यांची भरदार चर्या काळवंडली. गर्दन झुकली. "अक्कासाहेब, आमचं ऐकावं ..."

"काय ऐकावं?" तुम्ही दौलतीचा गड पाडलात हे ऐकून आबांना काय वाटेल? यासाठी ही वाट धरलीत? माहुलीवर आम्हाला पेचात टाकलंत. भूपाळगडावर फिरंगोजींना पेचात घातलंत! शृंगारपुरात येसूबाईंना हे ऐकून काय वाटत असेल? रायगडी आबासाहेबांची काय गत झाली असेल? आम्ही तुमच्यावर जीव लावला. त्याचा मतलब तुम्ही मनमाने वागण्यास मुखत्यार व्हावं असा नाही! बाळमहाराज, आम्हाला हे मानवणार नाही!"

"चुकलं आमचं." संभाजीराजांना दालनात उभे राहवेना. ते बाहेर पडले.

आभाळ दाटून आले. पावसाने झड धरली. तबीबांनी जखमी, बीमार घोडे उपचारासाठी ताब्यात घेतले. पावसाचा माग धरून मराठी फौजांनी आदिलशाही मुलखातून हटत आपल्या सीमांवर तळ टाकले.

पडत्या पावसात दिलेरच्या मनी एक बडा मनसुबा घर करू लागला. तशात औरंगाबादेहून शहाआलमचा त्याला फर्मानी खलिता आला. दिलेरने खलबतासाठी साथीदारांची बैठक बोलावली. सर्जाखान, संभाजीराजे, इखलासखान, खैरतखान, इरजखान यांची बहादुरगडाच्या सदरी महालात बैठक बसली.

"औरंगाबादसे शाहजादेका संदेसा आया है." दिलेरने खलबताला तोंड फोडले.

"किले पन्हालेपर चाल रखनेका हुक्म है इस बारीशमें!" बैठकीचा अंदाज घेत खान थांबला. सर्जाखान आणि संभाजीराजे यांनी एकमेकांना नजर दिली.

"ये निरा पागलपन है सालार. मरहट्टोंने अपनी रसदें बंद कर दी हैं।" सर्जाखान स्पष्ट बोलला. त्याला सिद्दी मसुद या विजापुरी वजिराचा हिसाब पावता करण्यासाठी विजापूरची मोहीम पाहिजे होती.

संभाजीराजांनी सर्जाखानाची मसलत आपल्या मतलबाने उचलून धरली. "यापुढे मराठी मुलखावर चाल घेणे आम्हास जमणार नाही. पाहिजे तर हत्यार आणि मनसबीची वस्त्रे उतरून ठेवण्यास आम्ही तयार आहोत."

"लेकिन ये शाही हुक्म है? उसे बगलमें कैसे रख सकते है?" दिलेर दोन दोन शक्तींना टाळू शकत नव्हता. जमून आलेला किस्मतीचा शतरंज उधळू शकत नव्हता. "सालार, औरंगाबादको थैला भेज दो। लिख दो विजापूर कमजोर है। चाल उसपर जारी रखना मतलब की बात है। शाहजादेका जवाब आनेसे पहलेही हम निकलेंगे।" सर्जाखानाने आपला हेत उघड केला.

सावध दिलेरने पारखले की ताणावर पडली तर ही बैठक आता तुटणार. त्याने विजापूर स्वारीचा निर्णय घेतला. बैठकीला निरोपाचे विडे देण्यात आले.

पावसाचा गुमान न धरता संभाजीराजे, दिलेर, सर्जाखान यांच्या फौजा ज़िने कसून तयार झाल्या.

निरोप घ्यावा म्हणून संभाजीराजे राणूअक्कांच्या भेटीस आले. पण अक्कांनी आता मागे न राहण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्धाराने संभाजीराजांना म्हणाल्या, "आम्ही आता स्वारीशिकारी असली तरी तुमच्यासोबतच राहण्याचं ठाणलं आहे. भावनेपोटी तुम्ही काहीतरी करून बसता. नंतर ते निपटणं नाही साधत. आम्ही तुमच्यासंगती येणार."

"जशी आज्ञा." संभाजीराजांना बोलायला वावच उरला नव्हता.

पाच महिन्यांच्या मदनसिंहाला उराशी कवटाळतं घेत, दुर्गाबाई राणूअक्कांच्यासह मेण्यात बसल्या. दिलेर, संभाजीराजे, सर्जाखान यांची जोडफौज विजापुरावर चालून निघाली.

घोलगडाजवळ नौकांतून भिवरा नदी पार करून सैन्याने धूळखेडला तळ टाकला. दिवस श्रावणाचे असल्याने उन्ह पावसाची सफेद-काळी पाठशिवणी रंगाला पडली.

"पंडित, तुम्ही एवढी धीराची म्हणणारी माणसं हातपाय गाळून स्वस्थ आहात मग आम्ही काय करावं? जे कानी पडतं ते सोसवेना म्हणून तुम्हाला याद फर्मावलं आहे. आमची तर पापणीला पापणी भिडेना." येसूबाईंच्या मनाची कोंडी शब्दलोटाने उमळून

येत होती. शृंगारपूरच्या पिलाजींच्या वाड्यातील जनानीदालनात कवी कुलेश, केशव पंडित, उमाजीपंत, परशराम, रायाजी, अंतोजी सारे गर्दना पाडून युवराज्ञीसमोर खडे होते.

"स्वारी आम्हाला पारखी झाली. जाऊ नये त्या गोटात गेली. जाताना आमच्या दिवाणसाहेब आणि धाकल्या बाईंना घेऊन गेली. आमच्या मुलखावर चालून आली. भूपाळगड घेतला. आता आणखी कशाची वाट बघणार आहोत सारे? आता तर धाकल्या बाईंना मुलगा झाला आहे. त्यांना कुठवर फरफटीला सोडणार आहोत आपण? स्वारीपेक्षा त्या दोघींची काळजी आमचं काळीज तोडते आहे. कुलवंतांच्या घरचा जनाना जळत्या पदरानं मोगली गोटात दिवस काढतो आहे. कुणाला नसली तरी याची खंत आम्हाला हररोज घास उचलताना छळते आहे."

येसूबाईंचे शब्द ठिणग्या होऊन साऱ्यांच्या कानांवर कोसळले. एवढे थोर तत्त्वज्ञ पण सारे आतून पिळवटून निघाले.

"आमी जिवाची आण लावू पर धन्यास्नी घेतल्याबगार न्हाई परतणार इथं." अंतोजीने येसूबाईंना धीर दिला.

"कसं साधणार ते अंतोजी?"

"काय वाट्टंल त्ये हुंद्या. आमी खानाच्या गोटात घुसनार." रायाजीने निर्धार सांगितला.

"आणि तुम्हीही आम्हाला पारखे होणार!" येसूबाई उसासल्या.

"युवराज्ञी, महाराजांनी हरप्रकारचे यत्न केलेत युवराजांचा समज पाडण्यासाठी. यश येत नाही. आम्ही खलिता सिद्ध करतो आहोत. आपण स्वदस्तुराची मोहर त्यावर करावी. झाला पालट तर भावेश्वरीची कृपा." परशरामपंतांनी मसलत दिली.

"नाही झाला तर आम्हाला पालटावं लागेल. जनावरावर मांड घेऊन स्वारीला शोधण्यासाठी आम्हाला निघावं लागेल! साफ लिहा हे." मनच्या कढाने हात उठवीत येसूबाई म्हणाल्या आणि त्यांनी साऱ्यांना निरोप दिला.

एक एक पाऊल हलले. दालन रिकामे झाले. क्षणभर येसूबाईंना आपण पुरत्या निराधार, रित्या झालो आहोत पोरक्या आहोत असेच वाटले.

रायगडावर आघाडी मनोऱ्यालगत असलेल्या दगडबंद खालबतखान्यात छत्रपतींची मसलतही अशीच कुचमली होती. चिंताक्रांत चर्येचे महाराज गिर्दीला रेलून बैठकीवर बसले होते. भोवती हंबीरराव, मोरोपंत, आण्णाजी, आनंदराव, प्रल्हादपंत अशी मंडळी होती. छत्रपतींचा चेहरा ओढल्यागत सुमार दिसत होता. कानशिलावरच्या कल्लेदार जुलफात पांढऱ्या केसांच्या चुकार तारा डोकावत होत्या.

"दिलेर विजापूरच्या रोखानं कूच झालाय हंबीरराव. विजापूर तेवढं गिळून मारावं असं त्यांच्या मनी फार जुनं आहे. त्यास खीळ घालणे आहे." महाराज थांबले. त्यांना

वाटले की– "पूर्वी त्याला आमचा घात करायचा होता. ते साधलं नाही. आमच्या युवराजांना दास्तानी लावून मात्र त्यानं तो साधला आहे." पण हे बोलणे त्यांनी निकराने मनातच मुरविले.

"जी. त्येचा झेंडू एकडाव फुटाय पायजेच. धाकल्यास्नी पंखाखाली घेऊनच त्यो दौडतोय." हंबीररावांनी आडवाटेने संभाजीराजांची चिंता प्रकट केली.

"त्यात त्याची काय चूक आहे सरलष्कर? आम्ही त्याच्या जागी असतो तर हेच केलं असतं. खोललं कवाड बघून कुडाण्यात घुसला नाही तर तो राजकारणी कसला?"

"पर हे कवाड कुठंतरी वढून घ्याय पायजे." हंबीररावांनी चिकाटी सोडली नाही.

"त्याची काऽही तड लागणार नाही हंबीरराव. आम्ही हरकोशिस राबविली आहे युवराजांसाठी. येश येत नाही. आमच्या समजावणीनं युवराजांचे डोळे उघडणार नाहीत. उघडले तर ते खानाकडून खाल्लेल्या ठोकरीनंच उघडतील. आम्हाला युवराजांचं भय वाटत नाही. वाटते आहे ती चिंता निराळीच!"

"आम्ही न्हाई समाजलो."

"हंबीरराव, युवराज दिलेरच्या पंजाखाली आहेत तोपर्यंत ते सुखरूप आहेत. कुठल्याही मिषानं औरंगजेबानं त्यांना बोलावलं तर मात्र त्यांची खैर नाही! आमच्या नेताजींचं काय झालं? खुद्द आमचं काय होणार होतं?" छत्रपती पुरते अस्वस्थ झाले.

राणूबाई आणि दुर्गाबाई यांच्या आठवणीने नाकगड्डा चिमटीत पकडीत त्यांनी डोळे मिटते घेतले. त्या मिटत्या डोळ्यांसमोर क्षणातच वृद्ध जिजाऊ उभ्या ठाकल्या. त्यांच्या थरथरत्या ओठांतून बोल उमटले, "भोसल्यांच्या कबिल्याला पदरी निखारे घेऊनच मळवट भरावा लागतो!"

एक सावळे पान फडफडत आले. त्याची फडफड उठली–

"एकला जीव पदरी घातला. आता स्वारीच यांचे आबा आणि आऊ!" मान डुलवीत छत्रपतींनी डोळे उघडले. मनची घालमेल बगलेला सारीत ते निश्चयाने बोलले, "मोरोपंत, तुम्ही फौजबंदीनं विजापूरच्या रोखानं कूच व्हा. बारा हजार स्वार दिमतीला घ्या. तुम्ही वरंदाघाटाची मोगलाई टापखाली जरबेत ठेवा. प्रल्हादपंत सिद्दी मसूदला लिहा– इदलशाही राखणं ते आमचं कर्तव्यच आहे." समोरच्या तबकातील विडे छत्रपतींनी साऱ्या मानकऱ्यांना दिले. खलबत उठले. हंबीररावांनी पुढे होत तलवारीच्या मुठीचा ठोका आतून दारावरच्या धोंडेला दिला. धोंड हटली. मानकरी बाहेर पडले. न राहवून मागे रेंगाळलेले हंबीरराव महाराजांना कळवळून म्हणाले, "महाराज, एक बोलावं वाटतं."

"बोला."

"धन्याची तब्येत सुमार दिसतेय. गडावर आराम करावा. आम्ही हाव दिलेरचा देठ मोडाय."

"आराम! हंबीरराव, आता आम्हाला आराम एकदाच मिळणार! अखेरचा." तापल्या शिसाच्या रसासारखे बोल हंबीररावांच्या कानी पडले.

खलबतातून बाहेर पडलेल्या आण्णाजींची पावले सातमहालाकडे वळली. महाराणी सोयराबाईंच्या समोर पेश होत त्यांनी तपशील दिला, "स्वामी युवराजांच्यासाठी जातीनं आदिलशाहीत उतरताहेत!"

ते ऐकून सोयराबाई कडवटपणे बोलून गेल्या – "अजून स्वारींचा मायेचा कढ उतू जातोय म्हणायचा तर! ते मुसलमान झाले तरी गडावर आणून त्यांचंही शुद्धीकरण पालकरांच्यासारखं करायला कमी व्हायचं नाही!"

त्या बोलांनी खुद्द आण्णाजीच चमकले. विषयाला अंतर पडावे म्हणून त्यांनी ऐकलेली एक खबर महाराणींच्या कानी घातली – "युवराजांना – युवराजांना मोगली गोटात पुत्रप्राप्ती झाली आहे. मदनसिंह नाव ठेवलं आहे."

राजपदराला झटका देत गडाच्या थोरदिल महाराणींनी स्वत:ला साजेल असाच ठसका दिला – "नीट ऐकलं नसेल नाव आण्णाजी तुम्ही, 'मदनखान' असेल नाव!"

ते ऐकून आण्णाजींनी हातच्या उपरण्याची गपकन गाठच भरली!

संभाजीराजांचा तळ दिलेरसह धूळखेडहून हलला. आदिलशाहीचे मंगळवेढे मारून विजापूरकडे सरकू लागला. हलसंगी या गावी येऊन ठाण झाला. याच वेळी मोरोपंतांच्या निसबतीने बारा हजार मावळा आदिलशाहीत उतरला. विजापूरची 'कुमक' करण्यासाठी मराठ्यांनी फळी धरली. पाठोपाठ खुद्द शिवाजीराजे हंबीरराव आणि आनंदराव यांना साथीला घेऊन सोळा हजारांच्या दिमतीने आदिलशाहीत उतरले.

धास्त खाऊन सिद्दी मसूदने दिलेरशी लावलेली बोलणी फिसकटली. विजापूर गिळण्यासाठी हट्टाला पेटलेले दिलेर आणि सर्जाखान हलसंगीहून निघून बहमनहळ्ळीला ठाण झाले. मागे राहिलेल्या संभाजीराजांवर दिलेरने रसद पोचविण्याची जोखीम टाकली होती.

मजलांनी घोडे फेकीत छत्रपती महाराज थेट विजापुराजवळ शिवापूर या गावी पोचले होते. आपले वकील मसूदकडे धाडून, 'सैन्यासह आपणाला विजापूरच्या किल्ल्यांत घ्यावे' असा निरोप छत्रपतींनी मसूदला दिला. मदूसच्या सल्लागारांनी त्याला सावध केले – "पठाण बाजू रहेगा। मरहठ्ठेही किला कब्ज कर बैठेंगे!" मसूदने शिवाजीराजांना परतीचा निरोप दिला – "आप चार पाँचसौ हशम लेकर विजापूर आ सकते हैं!"

महाराजांना ही अट परवडण्यासारखी नव्हती. खरे तर दिलेरला टांगता ठेवून महाराजांनाच विजापूर दाबायचे होते; पण मसूद सावध झाला होता. महाराजांनी त्याला द्यायच्या मदतीचा मुखवटा फेकून दिला! मोरोपंतांना महाराजांनी फर्मावले,

"आदिलशाही लुटीला घाला. साधेल तितुका मुलूख दास्तानी लावा."

मराठी फौजेच्या दोन फळ्या महाराजांनी केल्या. हंबीरराव, आनंदराव आपल्यासोबत घेऊन ते खासे धरणगाव, जालना असा म्होरा ठेवीत मोमलाईत उतरले. मोरोपंतांची सेना आदिलशाही लुटीत, जाळत निघाली.

धान्याचे बोद, वैरणीचे बैलगाडे अशी रसद घेतली ती दिलेरला पावती करण्यासाठी आपल्या फौजेसह संभाजीराजे कबिला घेऊन हलसंगीहून निघाले. इंदी, तोरगल मार्गावर अचानक त्यांची साबाजी घाटगे या आदिलशाही सरदाराशी गाठ पडली. दिलेरची रसद तोडण्यासाठी साबाजी संभाजीराजांवर चालून आला. आमनेसामने हत्यारघाई जुंपली. कागलकर साबाजी घाटगे आणि संभाजीराजे दोघेही मराठा सरदार! पण एक आदिलशाहीकडून आणि दुसरे मोगलाईकडून एकमेकांवर हत्यार चालवू लागले! या चकमकीत साबाजी जायबंदी झाला. काढत्या पायाने शिबंदीसह आला तसा निघून गेला. रसदीचे तांडे घेऊन संभाजीराजे बहमनहळ्ळीला पोचले.

पावसाची बुरबुर हटण्याची दिलेर वाट बघत होता. चौवाटांनी त्याच्या फौजा एकवट होत होत्या. विजापूरला सर्जाखान, संभाजीराजे यांच्या मदतीने सुलतानी तडाखा देण्याची तो स्वप्ने बघत होता. मराठ्यांच्या आणि त्यांच्या सरदारांच्या जागजागी चकमकी उडत होत्या. एवढ्यात दिलेरला धसका देणारी पहिली खबर मोगलाईतून आली – "धरणगाव लुटा गया!"

पावसाळा हटला. थंडीने तळ धरला. बहमनहळ्ळीच्या ठाण्यावर संभाजीराजे जनानी डेऱ्यात एका खाटल्यावर शालनामा पांघरून बसले होते. चिराखदानावर त्यांची नजर जखडून पडली होती. सारा तळ रात्रीच्या कुशीत शांत झाला होता. रात्रपहाऱ्याचे पठाण दूरवर देत असलेली गस्त चुकारपणे मध्येच कानी येत हेती. राणूअक्कांचा डेरा लगतच होता. त्यात मदनसिंहाला शेजारी घेऊन अक्कासाहेब सुख झाल्या होत्या. संभाजीराजांच्या मनात येसूबाईंची आठवण झिरपू लागली. त्यांची अनेक रूपे चिराखदानाच्या ज्योतीत संभाजीराजांना भास देऊ लागली. स्वत:ला विसरून ते एकटक ज्योती निरखण्यात दंग झाले.

थंडीने दाटलेले धुके फोडीत दिलेरच्या पठाणी फौजा विजापुरावर निघाल्या. आघाडीला दिलेर, संभाजीराजे, सर्जाखान ढालगजावरच्या हौदात बसले होते.

राणूअक्का आणि दुर्गाबाई पठाणी जनान्याच्या तांड्यातील मेण्यांतून चालल्या होत्या. त्या तांड्याला हत्यारबंद पठाणांचा कडेकोट पहारा होता.

मोगली फौजा विजापूरपासून पाच कोसांच्या पल्ल्यावर येऊन ठाण झाल्या. मराठे झडपा घालून त्यांचे लचके तोडण्याचा प्रयत्न करीत होते. विजापुरात हलकल्लोळ माजला. आदिलशाही आता डुबणार! पठाण विजापूर मरणाला घालणार!

थंड्या मिजाजाने दिलेर विजापूर कसे घेरावे याचा बेत आखू लागला. औरंगाबादेहून

शहाआलमचे त्याला एकटाकीने खलिते येत होते – "सेवा मोगलाईत घुसला आहे. सैन्यबंदीनं टाकोटाक ह्याला परतवून विलायत राखावी."

दिलेर आला खलिता मांडीखाली दाबत होता. त्याला हातातोंडाशी आलेला विजापूरचा घास सोडायचा नव्हता.

अखेरचा म्हणून दिलेरने विजापूरच्या वजीराला – मसूदला खलिता धाडला. त्याच्या उत्तराची वाट बघत मोगली फौजा केव्हाही विजापुरावर तुटून पडायला खड्या ठाकल्या.

दिलेर खुशीत होता. विजापूर गाडून तो औरंगजेबाला सिद्ध करून देणार होता की दख्खन सुभेदारी हा फक्त माझा एकट्याचा हक्क आहे. शाहजाद्याला परत उत्तरेत नामजाद करावे.

पण त्याच्या या सुखस्वप्नावर शिवाजीराजांनी मावळी पाणी ओतले! औरंगाबादेला पाच मजला इतक्या लगत असलेले जालना हे मोगलांचे अव्वल मातब्बर ठाणे राजांनी दिवसाढवळ्या लुटले. जालना जळाला! शहाआलमने दिल्ली दरबारला खलिता धाडून याचे खापर दिलेरच्या माथ्यावर फोडले.

दिल्लीहून निघालेले, दिलेरची खरड करणारे फर्मान तळावर आले! मजकूर होता "काफरको रोको. पीछे हटो."

हातातील फर्मानाचा चुरगळा करीत नाराज दिलेर चरफडला – "सब सत्यानाश कर दिया इस शहाजादेने और सेवाने!"

बंदिस्तीने तळ दिलेल्या फौजेला दिलेरचे हुकूम सुटले – "उखाड दो डेरे-शामियाने. मिरज का मोर्चा लगावो. आदिलशाही मुल्क तबाह कर दो!"

चिडलेल्या पठाणांच्या फळ्या मिरजेचा रोख धरून जाळपोळ, लुटालूट करीत निघाल्या. हरावलीला होते इखलास, ईरज आणि खैरत.

दिलेर, संभाजीराजे, सर्जाखान यांच्या चौखुर उधळत्या घोड्यांच्या टापांखाली गावेच्या गावे बेचिराख होऊ लागली. माखनापूर, जालगिरी, होनवाड, तेलंग लुटले गेले. प्रत्येक गावात दिलेर आणि सर्जाखान वाली नसलेल्या हिंदू प्रजेचे तांडे दोरखंडांच्या दावणीला बांधून त्यांची धिंड काढू लागले. विटंबना करू लागले. ती समोर बघताना संभाजीराजे आतल्या आत घुसमटू लागले. सगळ्या वाटाच रोखल्यामुळे स्वत:वरच चिडू-चरफडू लागले. मागून पठाणांच्या जनाना तांड्यातून येणाऱ्या अक्कासाहेब हे सारे बघून संतापाने नुसत्या होरपळत होत्या. भोवती 'आपलं म्हणावं' असे कुणीच नसल्याने उरातली आग उरातच थोपवीत होत्या.

तिकोटा हे गाव आले. दिलेरच्या बेभान हशमांनी घरट्याघरट्यांत घुसून लूटमार केली. उभा गाव दिवसाढवळ्या धडाडून पेटला. आजवर ओलांडली नव्हती ती हद्द सर्जाखानाच्या हशमांनी ओलांडली. बेघर, बेआसरा झालेल्या हिंदू रयतेच्या बायाबापड्यांच्या अब्रूवर घाला घातला. "लौंडी, रंडी." म्हणत बायकांना अंगाखाली

घेण्यासाठी पठाण, मोगल हशम त्यांच्यामागून वखवखल्या जनावरांसारखे गावातून सैराट धावू लागले. जिवाच्या आकांताने "वाचवाऽ वाचवाऽ!" असा हंबरडा फोडत तीनएकशे बायांनी विहिरी-आडांत आपले असहाय बेवारशी देह झोकून दिले. आभाळाला तडा गेला. अश्रूंचे, रक्ताचे रूप घेऊन सूर्यरस पाझरू लागला!

लुटीची, अत्याचाराची, दौडीची मस्ती चढलेले दिलेर, सर्जा तिकोट्याहून तडक अथणीला निघून गेले. आपली फौज पाठीशी घेत अथणीचा रोख धरत दौडणाऱ्या संभाजीराजांचे मस्तक संतापाने थडथडत होते. घणावर घण बसत होते. मांडेखालचे घोडे त्यांच्या बसणाऱ्या जबरदस्त टाचेने कळवळून खिंकाळत चौटाप उधळत होते.

समोर अथणी आली. पेटली! हातपंजा उठवून संभाजीराजांनी पाठची सेना थोपती केली. पेटत्या अथणीची आग त्यांच्या डोळ्यांत उतरू लागली. देहा-मनात, मस्तकात पाझरू लागली. धमन्यांचे भोसलाई रक्त पेटवू लागली. मागे न वळताच एकेकाचे नाव घेत आपल्या फौजेचे सरदार त्यांनी पुढे पेश घेतले. सर्वांवर जळजळीत नजरफेर टाकीत जबानीचा करडा कोरडा ओढला –

"खबरदार किसने गावमें कदम रखा तो! कलम कर दिया जायेगा। सेना यही रोख दो।"

वकुबाचे पंचवीस एक धारकरी निवडून बाजूला घेत संभाजीराजे गर्जले, "हमारे पीछे आव." आणि कायदे झाडीत, घोडा फेकीत अथणीत घुसले. पेटत्या अथणीच्या पेठांतून पेटता भोसला तीरासारखा चालला. हे रूप, हा आवेश वेगळा होता.

सारा गाव बेचिराख करून एका झाडाच्या घेराखाली दिलेर, सर्जा, इखलास घोड्यांवर मांड घेऊन उभे होते. त्यांच्यासमोर लुटीची प्रतवारी लावण्यात काही पठाण गढले होते. कलकलत होते. उधळते संभाजीराजे थेट दिलेरसामने आले. गोंधळलेले, धपापणारे जनावर कायद्यांनी थोपवीत पायउतार झाले.

"आईये राजेऽ" पठाणही हसत पायउतार झाला.

"खाऽन, ये क्या चला है?" संभाजीराजांचा पालटलेला जरब भरणारा आवाज साऱ्यांनाच जाणवला. सर्जा, इखलासही पायउतार झाले.

"मतलब?" भुवया चढवीत दिलेर गुरगुरला.

"आमच्या डोळ्यांदेखत आमच्या रयतेची ही कुत्ते मौत? औरतींची बेइज्जत?"

"किसकी रय्यत? तुम्हारी?" गर्दन मागे टाकीत पठाण खदखदून हसला.

"पठाऽण! आम्ही जाब विचारतो आहोत." संभाजीराजांच्या फटक्याने दिलेरचे बेगुमान हसणे थिजले.

"जाब? हमें आदत है जाब पूछनेकी, सुननेकी नहीं! हैसियत सम्हालो." पठाणाची गर्दन नागफण्यागत ताठ झाली.

"कसली हैसियत? तुमच्या पठाणी जनान्याची अशी बेइज्जत केली तर ..."

"रा ऽ जे, जुबान सम्हालो. ये काफरोंका जनाना नहीं है। पठानोंके मर्द हाथ हत्यार उठाकर जान की बाजी लगाते हैं जनानेपर! तुम मामुली सप्तहजारी मन्सबदार हो, हम सालारे दख्खन हैं! तुम्हारा कबिला हमारे जनानेमें हैं। होष रख्खो!"

"खा ऽ मोश!" कमरेच्या हत्याराची मूठ उपसत, संतापाने थरथर कापणारे संभाजीराजे थेट दिलेरवर धावले. फासळ्या फासटून दिलेरने त्यांच्या काळजालाच हात घातला होता.

"होष रख्खो! सँवारो!" म्हणत सर्जाखानाने चलाखीने पुढे होत संभाजीराजांचे मनगट पकडले. एव्हाना इखलास, खैरत, ईरज यांची पठाणी हत्यारे म्यानाबाहेर सरकली होती. हाताच्या इशारतीवर दिलेरने ती खाली पाडली.

थंड, दमदार बोलीत दिलेर संभाजीराजांना म्हणाला, "सुना था तुम्हारे आबाजानने आग्रामें शहेनशाहको तेजमिजाजका तरीका दिखाया था. भरे शाही दर्बारमें. वाकई तुम उसके सही फर्जंद लगते हो!"

प्रत्यक्ष दिलेरच्या तोंडून आबासाहेबांचे वर्णन ऐकताना अंगावर वीज पडावी तसे संभाजीराजे शहारले! मनाचे बांध फुटत चालले. अपमान, संताप, स्वतःचीच चीड, खंत, आणि अगतिकता भोसल्यांच्या डोळ्यांत साकळून आली. पठाणांसमोर उभे राहणे मुष्किल झाले. फिरका घेत संभाजीराजे वळले.

चित्ता उडावा तशी झेप टाकीत जनावरावर स्वार झाले. खूर झाडीत जनावर उधळले.

त्यांचा पाठलाग घ्यावा म्हणून इखलास, खैरत, ईरज यांनी पटापट घोड्यांवर उड्या घेतल्या, त्यांना रोखत दिलेर ठंडेपणाने म्हणाला, "जवाँ है, मर्द है, जब गवाता है। ठंडा हो जायेगा।"

सांज धरून दिलेर सर्जाच्या फौजा ऐनापुराकडे कूच झाल्या. अथणीलगतच्या डोंगरपायथ्याला संभाजीराजांचा तळ पडला. खिदमतगारांनी उठविलेल्या डेऱ्यात संभाजीराजे बेचैन फेऱ्या घेत होते. राख झालेली अथणी अंधारात डुबत होती.

विचारच विचार माणसांचे रूप घेऊन हातच्या कोरड्यांनी संभाजीराजांना निर्दयपणे फटकारून काढू लागले —

"तुम एक मामुली मन्सबदार हो! किसकी रय्यत? ये काफरोंका जनाना नहीं है...! दिलेर — दिलेर — कोण, कुठला, कुठल्या मुलखाचा? ... मांजऱ्याच्या तळावर कलम झालेले, वळवळणारे शेकडो हात! ... तिकोट्याच्या विहिरी-आडांत फुगून तरंगणारी शेकडो अश्राप जनानी प्रेतं! ... जळून राख होणारी घरटी-झोपडी! ... कळवळून हंबरडा फोडणाऱ्या, 'मेलो, वाचवा!' म्हणून ऊर पिटणाऱ्या दशदिशा! ... युवराज — युवराज, कशाला आलात या खातेऱ्यात? मायेनं विचारणारी तिकोणी पगडी... पस्तवाल एके दिवशी! ... तुम एक मामुली मन्सबदार हो! ... होष रख्खो — तुम्हारा कबिला हमारे जनानेमें है! गड जिंकून आलात. तुमची आरती कशी उतरावी उमजत

नाही आम्हास! ...भावनेपोटी काहीतरी करून बसता तुम्ही. मग ते निपटणं नाही साधत ... अक्कासा ऽ हेब ...

"तुम्हावर हत्यार धरणं आमचं काम न्हाई." या मायेच्या बोलांना दिलेला बेगुमान जाब ... 'नरसाळा, ... गड घेतल्याखेरीज हटणार नाही आम्ही!'

"... नको — नको ही मन्सब! ही जखडून टाकणारी खिल्लत! निघावं. येथून आणि कुठं जावं? मुलखात — आमच्या — तिथं कुणी तुम्ही 'मामुली' आहात म्हणणार नाही. जावं — पण कुठल्या तोंडानं? या अपेशी हातांनी पिछाडीचे सारे दोर तर आम्हीच तोडून टाकले ... त्या थोर पुरुषाला निरोप दिला ... 'परतू ते तुमचा सह्याद्री जिंकण्यासाठी!'

"... सह्याद्री जिंकू म्हणणाऱ्याला कधीच मिळत नसतो. शरण आलेल्याला कधीच परता सारीत नसतो. त्याला तरी कुठल्या तोंडानं शरण जावं? आज हयातीची पुरती पुरती शिकस्त घेतली आम्ही. काय — काय करून बसलो हे आम्ही?" सुन्न, बधिर झालेले, ठणकते मस्तक तळहातांनी गच्च आवळीत संभाजीराजे खाटल्यावर बसले. चारी पायांत दातेरी गोमचाप करकचून बसलेला हत्ती जागीच कोंडून पडावा, यातनांनी तळमळत राहावा तसे त्यांचे वाट चुकलेले राजमन कोंडून कोंडून पडले.

"युवराज ..." डेऱ्याच्या दारातून कातर साद आली.

मान उठवून संभाजीराजांनी बघितले. मेहुणे महादजी निंबाळकर दारात उभे होते.

"या वेळी तुम्ही इथून जा. आम्हास मेहेरबानीनं एकले सोडा. आमच्या जखमांवर मीठ फासू नका." संभाजीराजे तिडिकेने बोलले.

महादजी दबक्या आवाजात म्हणाले, "आता तुम्हाला आम्ही एकले सोडूच शकत नाही. मीठ फासण्यासाठी नाही, तुम्हाला मिठाची आण देण्यासाठी आलो आहोत आम्ही."

"मतलब?"

होता तोही आवाज दबका-घोगरा करीत महादजी जवळ आले. "युवराज, तुमचा घात झाला आहे! पठाणाला दिल्ली दरबारचा हुकूम आला आहे. तुम्हाला जेरबंद करून दिल्लीला पाठविण्यात येणार आहे!! तुमच्या झगड्याचं निमित्त करून केव्हाही पठाण तुमच्या दंडात काढण्या घालायला कमी करणार नाही. दिमाग शांत ठेवा. जे करायचं ते सावधानगीनं आणि तातडीनं करा. रातोरात हा तळ सोडा. कुठंही जा. सावध असा. निघतो आम्ही." महादजी जायला निघाले.

"दाजीसाहेब!" कळवळून संभाजीराजांनी त्यांना दबकी साद घातली. "आम्ही तुम्हाला टाकून बोललो. शर्मिंदे आहोत आम्ही."

"ते मनात ठेवू नका. सावध असा." महादजी बाहेरच्या अंधारात गडप झाले.

आता आम्यातील कोठडीतल्या आबासाहेबांचे सावध शहाणपण स्मरत विचारांचे दुसरेच चक्र संभाजीराजांच्या मनात फिरू लागले. एकसारखे डेऱ्याच्या दारात येऊन ते

मागून येणाऱ्या अक्कासाहेब आणि दुर्गाबाईंच्या मेण्याचा माग घेऊ लागले. खानसाम्याने डेऱ्यात आणून ठेवलेला थाळा तसाच चौरंगीवर पडला होता. काहीतरी सुचल्याने संभाजीराजांनी बाहेरच्या पठाणी पहारेकऱ्याला याद फर्मावले, "नायक, तुम्हारे हशमोंको आराम दो. दुसरा पेहरा हम फर्मायेंगे."

"जी." नायकाने डेऱ्याभोवतीचे थंडीत पहारा देणारे पठाण आरामाला सोडले.

सज्जनगडावरून सोबत आलेल्या मावळ्यांतील माणसे निवडून संभाजीराजांनी त्यांना आपल्या डेऱ्यावर पहारा जोडून दिला. थंडीने बेजार झालेले पठाण जागजागी आगट्या पेटवून घोळक्यांनी त्यावर हात शेकीत बसले.

रात्रीचा पहिला प्रहर परतला. धापावल्या भोयांनी अक्कासाहेब आणि दुर्गाबाईंचे मेणे संभाजीराजांच्या डेऱ्यासमोर आणून थोपे देत थांबविले. अक्कासाहेब आणि सहा महिन्यांचा मदनसिंह छातीशी घेतलेल्या दुर्गाबाई मेणाउतार झाल्या.

मावळी पहारा देत असलेल्या मुजऱ्यांची दाद न घेता तरातर चालत अक्कासाहेब डेऱ्यात घुसल्या.

शालनामा पांघरलेले, केस विस्कटलेले संभाजीराजे खाटल्यावर जागत बसले होते.

विजेचा कोरडा फुटावा तसे डेऱ्यात जरबी बोल उमटले, "बाळ म ऽ हाराज, शरम वाटते तुमच्या करणीची आम्हास!"

"अक्कासाहेब – तुम्हीं?"

"होय आम्हीच. तुम्हाला निकडीचं बजावण्यासाठी आलो आहोत आम्ही उरीफुटी. तुमच्या फौजेच्या तिकोट्यावरचा पराक्रम डोळ्यांनी बघून आलोत. आम्हाला नाही जमणार तुमच्या असल्या पराक्रमाची साथ करणं!" थंडी होती तरी संतापाने अक्कासाहेब नुसत्या थरथरत होत्या.

चेहरा ओढलेले संभाजीराजे त्यांच्याजवळ आले. पडल्या गर्दनीने म्हणाले, "तो पराक्रम सर्जाखानाचा आहे अक्का ऽ, आम्ही पुरते फसलो आहोत! घात झाला आहे आमचा. ही एकच रात्र आमच्या हाताशी आहे."

क्षणात अक्कासाहेबांचा संताप चिंतेत पालटला.

"मतलब? आम्ही नाही समजलो तुम्ही काय म्हणता ते."

"कुठल्याही क्षणी दिलेर आम्हाला जेरबंद करून दिल्लीला धाडू शकतो. त्याला बादशहाचा तसा लेखी हुकूम आला आहे."

"बाळमहा ऽ रज." भयाने अक्कासाहेबांना नीट चीत्कारताही आले नाही.

"शांत व्हा.आम्हाला आमच्या करणीचं बक्षीस पावलं तर त्याचं काहीच वाटणार नाही. चिंता आहे ती तुमची. तुम्ही सुखरूप या तळाबाहेर निघणं आहे. दिवस फुटायच्या आत." अक्कासाहेब सुन्न झाल्या. पाठीशी उभ्या असलेल्या लेकुरवाळ्या दुर्गाबाईंकडे बघत कळवळ्याने म्हणाल्या, "काय करून बसला आहात हे तुम्ही बाळमहाराज?"

"तुम्ही वाटचाल केलीय, आराम घ्या. आम्ही आहोत." संभाजीराजे कसल्यातरी धीराने म्हणाले. नाळेच्या त्या तिघांना घेरून टाकणारी, काळजांना जाणवणारी भयाण शांतता डेऱ्यात पसरली.

अक्कासाहेब, दुर्गाबाई खाटल्यावर टेकल्या. दुर्गाबाईंनी झोपल्या मदनाला लेटता केला. तिघेही विचारांच्या डोहात बुडत चालले. काय करावे सुचत नव्हते. रात्र काळपावलांनी पुढे पुढे सरकत होती. हताश डोळे एकमेकांना निरखत होते. पुन्हा कुठेतरी जाऊन स्थिरावत होते. मध्यरात्रीचा समय झाला. बाहेर पहारा देणारा एक धारकरी डेऱ्यात आला. वर्दी देत म्हणाला, "धनी, मुलखाचा हारकारा हाय. पाठवू?"

"पाठव."

अर्जोजी यादवांच्या गोटातील एक जासूद संभाजीराजांच्यासमोर पेश झाला. तिबार मुजरा देत त्याने काही न बोलता दोन खलिते पेश केले. एक होता छत्रपती शिवाजीमहाराजांचा – आणि दुसरा होता त्यांच्या सूनबाई येसूबाईसाहेबांचा!

छत्रपतींनी लिहिले होते – "मोगलाईत, इदलशाहीत वा कुत्बशाहीत तुमच्या मनाजोगते ते कधीच घडणार नाही. देखत पत्र स्वार होऊन दौलतीत निघोन यावे. आम्ही तुमचा साजेल तैसाच मरातब करू! कसलाही शकअंदेशा मनी ठेवो नये."

येसूबाईंनी लिहिले होते – "जे ऐकतो आहोत ते सोसण्यापलीकडे जहाले! इकडे यावे. ते घडले नाही तर आम्हासच चढे घोड्यानिशी स्वारीच्या दर्शनास यावे लागेल! आपला नाही तो नाही, संगती असलेल्या जनान्याचा खयाल बरा धरावा."

"कुणाचे?" जवळ आलेल्या अक्कासाहेबांनी दबके विचारले.

शालनाम्याने पापणीकडा टिपत खलितेच संभाजीराजांनी त्यांच्या हाती दिले. "मुलखाचे. आबासाहेबांचा आणि युवराज्ञींचा. परत यावे म्हणून."

पाझरलेले युवराज बघून जासुदाची आशा पालवली. धाडसाने त्याने जबान खोलली, "धनी, आमी चाकर मान्सं. पर जीव ऱ्हात न्हाई. म्हाराजांचा अंत बगू नगासा. गाववेशीवर आपला जमाव ठाण हाय. निगायचं म्हटलंसा तर..."

"तेच करणार आहोत आम्ही. याच पावली जमावात जा. सांगावा दे आमचा. दिवसफुटीला कबिल्यानिशी आमची वाट बघा म्हणावं. सावधानगीनं निघ."

"व्हय जी." जासुदाचे कान भरून पावले होते. तो लगबगीने बाहेर पडला.

रात्र चढू लागली. बाहेरच्या पहाऱ्याला संभाजीराजांनी सूचना दिली. "मावळा तेवढा एक जाग तय्यार ठेवा. आम्ही निघा म्हणताच दौडायचे आहे."

अंगावरचा शालनामा संभाजीराजांनी उतरून ठेवला. मनसबीची वस्त्रे काढून डेऱ्याच्या कोनाड्यात फेकून दिली. सादिलवार कपडे अंगी चढविले.

डेऱ्याच्या अंत:पुराकडे बोट दावीत ते अक्कासाहेबांना म्हणाले –, "आतल्या

पेटाऱ्यातला मर्दाना पेहराव अंगी घ्या अक्कासाहेब. या वेशात तळाबाहेर निघणे नाही साधणार."

अक्कासाहेब, दुर्गाबाई अंत:पुरात गेल्या. अंगचा जनानी साज उतरून त्यांनी मर्दाना पेहराव चढविला.

एकवार डेऱ्याबाहेर येत संभाजीराजांनी अंदाज घेतला. तीन-एकशे मावळा हळुहळू एकजाग होऊन डेऱ्याभोवती जमला होता. त्यातले दहा-बारा हुन्नरबाज पटाईत पुढे घेण्यात आले. त्यांना इशारत मिळाली. "आम्ही निघताच आमची पिछाडी धरून या. वरकड सारे इथेच थांबा. वर्दी मिळताच तळ सोडायच्या तयारीनं."

उत्तररात्र सुरू झाली. बोचरा पहाटवारा सुटला. जागजागी राहुट्यांत पठाण शांत सुख झाले.

छातीवरच्या भवानीमाळेला हातस्पर्श देऊन संभाजीराजे पुटपुटले – जगदंब!"

"चला." डेऱ्यातून तीन मर्दाने बाहेर पडले. त्यातील एकाच्या छातीशी दुपेटे होते. निवडल्या धारकऱ्यांनी तळाचा मेणा उचलला. झपझप चालणाऱ्या संभाजीराजांचे पायठसे वेचीत दोन मर्दाने तळाबाहेर पडले. गाववेशीवरचे देऊळ आले.

यादवांच्या जमावाचा म्होरक्या लगबगीने सामोरा आला. मुजरा देत म्हणाला, "निघायचं?"

"सबूर." संभाजीराजांनी मेणेवाल्यांना पुढे घेतले.

"अक्कासाहेब, बसा आत." मेण्याचा आडपडदा हटला.

मर्दानी वेशांतल्या अक्कासाहेब आणि दुर्गाबाई पुढे आल्या. संभाजीराजांनी वाकून राणूअक्कांच्या पायांना हाताची बोटे भिडविली. "बाळ महाराज!" आवेगाने राणूअक्कांनी त्यांना उठवून छातीशी बिलगते घेतले. "सांभाळून या." अक्कांचा आवाज धरला होता. झोपल्या मदनच्या गालावर ओठ टेकत संभाजीराजे दुर्गाबाईंना म्हणाले, "जपून असा."

मर्दाना वेशांतल्या दोन्ही राजस्त्रिया मेण्यात बसल्या. धारकऱ्यांनी मेणा उठविला. हत्यारबंदांनी त्याभोवती चटकन घेर धरला. मेणा पन्हाळ्याच्या रोखाने धावू लागला.

पहाटेच्या अंधुक प्रकाशात अस्पष्ट होत जाणारा तो मेणा संभाजीराजे कितीतरी वेळ एकटक निरखत राहिले. तळावर वर्दी गेली. जमले मावळे सशांच्या पावलांनी तळावरून उडाले. पाठीशी तीन-एकशे मावळा घेऊन पहाटेचा गारठा फोडत संभाजीराजे थेट विजापूरच्या रोखाने निघाले. होय विजापूरच्याच!

छत्रपती शिवाजी महाराजांच्या समोर उभे राहायला त्यांना तोंड नव्हते! त्यासाठी सिद्दी मसूदची मध्यस्थी घेऊन मगच ते दौलतीत परतणार होते!

धाब्याच्या घरट्यांनी दुहाती शिस्त धरलेले विजापूर समोर येताच संभाजीराजांनी वेशीवरच आपल्या पाठची घोडाईत शिबंदी थोपती केली. दोन दिवस अविश्रांत उडत्या खुरांची ही दौड सतत चालली होती.

जमावातील विश्वासाचा एक जासूद पुढे घेऊन, त्याच्या हातावर आपल्या बोटातील निशाणी अंगठी उतरून ठेवीत युवराज त्याला म्हणाले, "ही परवल किल्ल्याच्या पहाऱ्याला दाखव. वजीर मसूदखानासामने पेश होऊन आमचा सांगावा सांग – आम्ही जातीनिशी आलोत. खास निमित्ताने भेटीची इच्छा करतो आहोत."

"जी." जासूद मूठ भरून घोडा फेकीत विजापुरात घुसला.

समोर दिसणारे विजापूर निरखताना संभाजीराजांना आपल्या थोरल्या महाराजसाहेबांची – शहाजीराजांची आठवण झाली. त्यांची सरती वर्षं याच शाहीत गेली होती. कधीच त्यांचे रूप डोळ्यांत भरून घेता आले नव्हते. पुरात गेलेला जासूद मसूदखानाची भेट घेऊन परतीचा निरोप घेऊन आला. वजीराने दहा-वीस हत्यारबंद हशम त्याच्या संगती देऊन निरोप धाडला होता – "जल्दी आना."

आपल्या शिबंदीसह संभाजीराजे विजापुराच्या किल्ल्याकडे निघाले. घडीव दगडांच्या भक्कम तटबंदीने किल्ला बंदिस्त होता. तटाच्या बुरुजाबुरुजावर हाती नंग्या तेगी झळकवीत हबशी धारकरी पहारा देत फिरत होते.

सिद्दी मसूदला वर्दी गेली. आपल्या मसलतगारांसह युवराजांना तो सामोरा आला. काळीशार दाढी हनुवटीभवती फिरलेल्या फरीसारखा भरगच्च, सतेज चर्येच्या संभाजीराजांचे रूप निरखतच मसूदने शिवाजीराजे कसे असतील याचा अंदाज बांधला!

"आईये शाहजादे." म्हणात मसूदने संभाजीराजांना खांदाभेट दिली. हाताला धरून बैठकीमहालात आणून त्याने युवराजांना इतमामाने बैठकीवर बसविले.

"वजीर, आमचा आणि पठाणाचा बेबनाव झाला आहे. आम्ही मोगलाई सोडली आहे." संभाजीराजांनी विषयाला हात घातला.

"सुना है राजे. यही वजह है तुम्हें जल्दी किलेमें लाया है. एक मसलत हम पेश करते हैं, सुनेंगे आप?"

"जरूर." संभाजीराजांनी मसूदचा चेहरा, अंदाज घेत निरखला.

"जल्दसे जल्द आप अपने आब्बाजानके पास लौटिये! हमें खबर है, खाँ दिलेरखानका हेजिब अब्दुल रझ्झाक फौजबंद होकर विजापूर आ रहा है, आपको कब्जेमें लेनेके लिए। यहाँ रहना आपको खतरेका है। आपको यहाँ रखना हमारे तख्तको धोखा है, सोचिये."

ज्याचा मुलूख शिवाजीराजांनी नुकताच लुटला होता, प्रत्यक्ष संभाजीराजे, दिलेर, सर्जा यांनी रगडला होता, तो सिद्दी मसूद दूरच्या अक्कलहुशारीने मसलत घालत होता.

संभाजीराजांना ठेवून घेऊन तो दिलेर आणि शिवाजीराजे या दोघा मातब्बरांना

विजापूरवर हल्ला करू द्यायची संधी व कारण द्यायला तयार नव्हता. तसेच हाताशी आलेल्या संभाजीराजांना घाताने जेरबंद करून त्या दोघांचा संताप आदिलशाहीवर ओढवून घ्यायलाही तो राजी नव्हता. समोर बसलेले संभाजीराजे त्याला 'सोनेरी कट्यारी' सारखेच वाटले असावे! देखणे, धारदार तरीही उराशी न लावता येणारे!

मसूदची मसलत ऐकून संभाजीराजे विचारगत झाले. समय गमावला तर अब्दुल रज्झाकशी चकमक द्यावी लागणार. सगळ्या वाटा कोंडल्या होत्या. सिद्दी मसूदच्या मार्फतीने महाराजांशी बोलणी लावण्याइतकाही वेळ हाताशी उरला नव्हता. काय करावे सुचत नव्हते. कसलातरी निर्धार बांधत संभाजीराजे बैठकीवरून उठत म्हणाले, "ठीक आहे वजीर. आम्हास विडे द्या."

समाधानाची एक नकळती लकेर मसूदच्या दाढीवर तरळून गेली. पुढे होत संभाजीराजांचा हात हातात घेत तो म्हणाला, "ये शाही मेहल है शाहजादे। आपके इतमाममें यहाँ कसूर नहीं होगा।" मसूदने आपल्या कारभाऱ्याला टाळी दिली.

पेश आलेल्या कारभाऱ्याच्या कानात काही अस्पष्ट कुजबूज केली. 'जी' म्हणत कारभारी बाहेर पडला.

थोड्या वेळातच महालात सरपोसबंद तबके घेतलेले खिदमतगार आले. त्यांच्याकडे बघत मसूद म्हणाला, "ये नजराना है, राजा सिवाजीके फर्जंदके खिदमतमें। हमारे हशमभी साथ रहेंगे आपके।"

पोशाख, बिछायती, सरंजामाच्या त्या आदिलशाही तबकांचा स्वीकार केल्याबद्दल त्यांना हातस्पर्श देताना संभाजीराजांची जबानच खिळली– कारण परतीचा म्हणून वजीराला द्यायला त्यांच्याजवळ कसलाही नजराणाच नव्हता! कारण आता तर ते सप्तहजारी मोगली मन्सबदारही नव्हते! सिद्दी मसूदचा निरोप घेऊन संभाजीराजे किल्ल्याबाहेर पडले. पन्हाळ्याचा रोख ठेवून हजार-दीडहजारांच्या शिबंदीनिशी दौडू लागले.

मांडाखाली दौडणाऱ्या जनावरांच्या खुरांच्या खडखडीत युवराज संभाजीराजे भोसले यांचे राजमन जागजागी अडखळू लागले. मराठ्यांच्या दौलतीतून फुटून निघणे सोपे नव्हते. पण त्याहून कठीण होते ते दौलतीत परतणे. दौडत्या संभाजीराजांना विचारांचे कायदे थडाथड फटकारून फोडून काढू लागले –

"कोणती सजा फर्मावतील आबासाहेब आता आम्हांस? अरबी जनावरांच्या खुरांनी जखडून फरफट करण्याची, साखळदंड जडवून हयातभर कैदखान्यात डांबण्याची, हातपाय कलम करण्याची, टकमक टोकावरून दरीदरडीत लोटून देण्याची, की तोफेच्या तोंडी देऊन आमच्या विचाराएवढेच देहाचे तुकडे उडविण्याची? की राजगजाच्या पायी चितचुराडा करण्याची?

"कोणतीही सजा सामोरी येवो आम्ही बांधल्या मनानं ती प्रसाद म्हणून कपाळी

लावू. मोगली खिल्लत चढवून विटाळलेला हा देह झालाच तर त्या सजेनंच पावन होईल. इच्छा एकच आहे. कसलीही सजा फर्मावण्यासाठी का होईना महाराजसाहेब एकदा सामोरे यावेत. तीन साल पारखे झालेले त्यांचे चरण एकवार आम्हाला मनसोक्त डोळ्यांत भरून घ्यायचे आहेत.

"हातून झाल्या गैरवाका बर्तावाची कसलीही सफाई आम्हाला द्यायची नाही. आसावल्या कानांनी महाराजसाहेबांच्या तोंडून उमटलेली 'शंभूबाळ' ही साद फक्त एकवार ऐकण्यासाठी जिवाची तगमग होते आहे.

"या एकाच हेतूनं आम्ही पन्हाळा जवळ करतो आहोत. बाकी साऱ्या उमेदी थिजल्या आहेत. 'शंभू' या नावातील शिवपणाला आपल्या अपेशी हातांनी आम्ही काळिमा फासला आहे. या बेगुमान पावलांनी आमची बांडी हयात वाहतीला लावली आहे. जे नेताजींनी, प्रतापरावांनी दिलं नाही ते काळजाचा देठ कुरतडणारे चिवट दुःख, पुत्र असून, आम्ही महाराजसाहेबांना दिले आहे. अभय मागण्याचा कुठलाही अधिकार आम्हाजवळ नाही. बाकी तो विचारही मन ला शिवत नाही.

"पण... पण या अशा आम्हाला महाराजसाहेब भेटतील? आमचं करंटं तोंड बघतील? की – की इथंही आमचं कमनशीब सवयीप्रमाणं बाजी मारणार?

"नाही! आम्ही कुणाचे मन्सबदार नाही, युवराज नाही. आहोत एक माणूस. एक भोसला. मिटल्या ओठी, पडल्या गर्दनीनं का होईना आमच्या जन्मदात्याचं एकवेळ दर्शन घेण्याचा आमचा अधिकार आहे. प्राणबाजीनं आम्ही तो कमवू. महाराजसाहेब नाही भेटले तर आम्ही आतल्या आत घुसमटून संपून जाऊ!"

पेटत्या वणव्यात झळींनी, धूर लोटांनी जीव कोंडलेला शार्दूल गरगरा फिरत भांगा, शोधण्यासाठी धडपडावा तसे ते राजमन धडपडू लागले. सुन्न, बधिर झालेल्या संभाजीराजांच्या ताकदवर खोटा खाऊन मांडाखालचे जनावर फेसाटले.

गर्द झाडीने घेर टाकलेल्या किल्ले पन्हाळ्याचा पायथा आला. शिबंदी थोपवून संभाजीराजांनी एका धारकऱ्यामार्फत किल्ल्यावर वर्दी दिली.

उभा पन्हाळगड थरारून उठला. "युवराज परतले!" ही वार्ता वाऱ्यावर स्वार होऊन गडभर पसरली. माणसांच्या झुंडीच्या झुंडी चौ-दरवाज्यांच्या रोखाने धावू लागल्या.

किल्लेदार विठ्ठल त्रिंबक महाडकर संगती हवालदार बहिर्जी इंगळे, हिरोजी फर्जंद, कृष्णाजी व सोमाजी बंकी अशी मंडळी घेऊन चौ-दरवाज्यांकडे निघाले.

विठ्ठलपंतांनी पायथ्याला निरोप धाडला – "अनमान करो नये. वर फौजेसुद्धा निघोन यावे."

संभाजीराजे आपल्या शिबंदीसह पन्हाळ्याची चढण चढू लागले. चार दगडबंद कमानींनी बंदिस्त असा पन्हाळ्याचा चौ-दरवाजा आला.

रायगडी जेव्हा नेताजी पालकर परतले तेव्हा गडाची माणसे गोंधळली नसतील तेवढी पन्हाळगडाची माणसे संभाजीराजांकडे गोंधळून बघत होती.

विठ्ठलपंत पुढे झाले. क्षणभर मुजरा द्यावा की कसे या विचाराने गोंधळले. पुन्हा निर्धाराने मन बांधून त्यांनी "युवराजांचे स्वागत आहे." म्हणत तिबार मुजरा घातला. तो बघितल्यानंतर जमल्या जमावाला भान आले. एक एक हात मुजरा झडवू लागला. समोर उभा असलेला हिरोजी फर्जंद मात्र गुमान होता. किल्लेदारांच्या पाठीशी होत संभाजीराजे बालेकिल्ल्याकडे चालले. एरव्ही खाशांच्या आगमनाबरोबर झडणारी नौबत आज पन्हाळ्यावर झडली नव्हती.

बालेकिल्ल्याचा बैठकी महाल आला. मोजड्या उतरून संभाजीराजे महालात आले. संथ बोलीत विठ्ठलपंतांना म्हणाले, "किल्लेदार, रायगडी खलिता द्या. लिहा – आम्ही कबिल्यासह पन्हाळगडी पावलो आहोत."

ते ऐकताना आतापर्यंत वर असलेली विठ्ठलपंतांची गर्दन पडली. त्यांनी कसलाच प्रतिसाद दिला नाही. ते जाणवलेले संभाजीराजे आवाज तोलीत पुन्हा म्हणाले, "आम्ही सांगितलं ते ऐकलंत ? खलिता टाकोटाक जाऊ द्या."

"जी. पण ..." विठ्ठलपंतांचा आवाज पार पडला होता.

"पण काय ?"

"कसं बोलावं ? जबान उचलत नाही युवराज, आम्ही छत्रपतींचे चाकर. राजकुळाची भलीबुरी खबर खाशांच्या कानी घालताना आतड्यांची तोड होते."

"मतलब ? साफ बोला पंत."

"युवराज आपला – आपला कबिला – दिलेरच्या पठाणांना मागं हस्तगत झाला !! अक्कासाहेब आणि धाकट्या युवराज्ञी दस्त झाल्या !! घडू नये ते वाईट घडलं आहे."

"पं ऽ त !" सापाच्या आक्रसत्या वेटोळ्यांसारखे संभाजीराजांच्या पिंढऱ्यात गोळे भरले. डोळ्यांसमोर काजवेच लखलखले. बालेकिल्ल्यासह उभा पन्हाळगड, नदीच्या पात्रातील गरगरत्या पणतीसारखा त्यांच्याभोवती फिरू लागला. त्या गरगरीतूनच लाटाच लाटा उसळू लागल्या, "बाळमहाराज, काय करून बसलात हे ?"

"आम्हाला एकले सोडा." म्हणत संभाजीराजांनी विठ्ठलपंतांकडे पाठ केली.

पंत बाहेर पडताच उभे राहणे मुष्किल झालेले संभाजीराजे महालाच्या मंचकावर कोसळले. त्यांच्या मिटल्या डोळ्यांसमोरून पठाण दिलेरखान हलेना. हाती कोरडा घेऊन, गर्दन मागे टाकीत तो खदखदा हसत संभाजीराजे भोसले या मोगली मन्सबदारावर निर्दय कोरडे ओढीत गर्जत होता – "होष रखखो, तुम्हारा कबिला हमारे जनानेमें है !"

"अक्कासाहेब ... अक्कासाहेब." भोसलाई आतडे आतल्या आत तुटू लागले.

"थोरल्या बाईंची आठवण झाली की जीव टांगणीला पडतो." म्हणणाऱ्या, मदनसिंहाला छातीशी कवटाळलेल्या, दुर्गाबाई हाती माडग्याचा वाडगा घेऊन विचारू

लागल्या – "हे असं पठाणांच्या संगतीत कुठवर फिरावं ? कशासाठी ?"

गलबलून गेलेल्या संभाजीराजांचे ओठ दाताच्या पकडीत जाताना असहाय पुटपुटले – "आबासाहेब, आमच्या करणीची सजाही तुमच्या अगोदर पठाणानंच आम्हास द्यावी !"

रायगडाच्या देवमहालात छत्रपती शिवाजीमहाराजांनी बिल्वदलाची ओंजळ स्फटिक शिवलिंगाला भावभक्तीनं वाहिली. भंडाऱ्याची चिमट भवानीमूर्तीच्या चरणांवर सोडून, हात जोडून 'जगदंब' म्हणत डोळे मिटते घेतले. संभाजीराजे पन्हाळगडावर पावते झाल्याला पंधरवडा लोटला होता. आज छत्रपती त्यांच्या भेटीसाठी रायगड उतरणार होते. महाराजांची चर्या ओढल्यागत, चिंताग्रस्त दिसत होती.

युवराजांची अनेक रूपे त्यांच्या मिटल्या डोळ्यांसमोर सरकून गेली. 'महाराजसाहेब, तुम्ही काढाल हुडव्यातील फळ बाहेर ?' असं विचारणारा, अंगी डौर, चोळणा चढवून आईचा पाजळता पोत बेभानपणे नाचविणारा, रजपुताच्या गोटात ओलीस राहणारा, मथुरेत एकला पिछाडीला राहताना 'तुम्हाला साजेल असंच आम्ही वागू' म्हणणारा, आरोपित म्हणून भरल्या दरबारी पेश होताना – 'आम्ही बाईला कैदेत टाकलं आहे, संभाजीराजे भोसले म्हणून !' असं निधडं बोलणारा, गेल्या आऊंच्या देहावर, उरीफुटी स्फुंदत आसवांचा वर्षाव करणारा. केवढा पालटला ! का ? कशासाठी ?

"याची कोंडी झाली ? कुणामुळं ? आमच्यामुळं ? राणीसाहेबांमुळं ? राणीसाहेब – आमच्या आऊसाहेबांना माणसं घडविताना हाताला अपयश कधीच आलं नाही. पण – पण या राणीसाहेबांबाबत त्यांचंही काही नाही चाललं ! दर्याभर फिरून कोरड्याच राहिलेल्या मासोळीगत ह्या ! मायेनं माया वाढते; तेढीनं तेढ हे कधी शिकल्याच नाहीत ...

"युवराज तरी किती तेजमस्तक ! आपली कोंडी झाली असं ते मानतात. आम्हाला तर कोंडीचासुद्धा विचार करायला थांबण्याएवढी उसंत कधी मिळाली नाही. आपल्या माणसांवर राग करण्यासाठी कधी वखत गवसला नाही. आम्हाला नकळतच आम्ही हयातीच्या उताराला लागलो. कुणाला सांगावं हे ? कसं ?"

अस्वस्थ झालेले छत्रपती देवमहालाबाहेर पडले. आपल्या खासेवाड्याच्या बैठकी दालनात आले. एक कुणबीण पेश आली. "राणीसरकार येत्यात," अशी वर्दी देऊन निघून गेली. छत्रपतींच्या कपाळी, ती वर्दी ऐकताना आठ्या धरल्या. गड उतरायचा समय झाला होता.

"स्वारी पन्हाळ्यास कूच होतेय असं ऐकलं. राहवलं नाही म्हणून आलोत आम्ही." दालनात आलेल्या सोयराबाई लटके पण देखणे हसत म्हणाल्या.

"हं."

"पन्हाळ्यावर जरा सबुरीनं घ्यावं हे सांगायला आलोत आम्ही!" सोयराबाई ठरवून थांबल्या.

महाराजांनी चमकून त्यांना निरखले.

पण त्यांना अधिक कोड्यात न ठेवता सोयराबाईंनी नक्षी फिरवली.

"स्वारींचा स्वभाव करडा. काय म्हणता काहीतरी होईल ही धास्त वाटते. रांझेकर पाटलानं बदअंमल केला म्हणून त्याचे हातपाय कलम करण्याचा स्वारीनं हुकूम फर्मावला! खंडोजी खोपड्यानं चुगल केली तर त्याचेही हातपाय कलम करविणं झालं! भूपाळगड सोडून आल्याबद्दल फिरंगोजींना तोफेच्या तोंडी देणार होती स्वारी! हा कसूर तर केवढा! साक्षात गनिमाला सामील होण्याचा. तेही अभिषिक्त युवराज असून! या कसुराला स्वारी माफ करणार नाही. भलतीच सजा फर्मावून बसेल याचं भय वाटतं आम्हास! जरा सबुरीनं घ्यावं असं सांगितल्याखेरीज राहवत नाही आम्हाला!"

सोयराबाईंचा प्रत्येक शब्द तिरका होता. 'साध्या गुन्ह्यांना करडी सजा फर्मावणारे छत्रपती या करड्या गुन्ह्याला आता काय सजा देणार आहेत ते आम्ही बघणारच आहोत!' असा खोचक सवालच त्या बोलण्याआड लपला होता. महाराजांच्या लक्षात ती खोच तात्काळ आली. नजर सोयराबाईंवर रोखून टाकीत छत्रपती शांतपणे म्हणाले –, "युवराजांच्या जागी रामराजे असते तर आज काही तुम्ही आम्हाला गड उतरू दिला नसतात! राणीसाहेब, कारभारी मामल्यात आम्ही जनान्याचा सल्ला कधी घेत नसतो. आम्हाला योग्य वाटेल तीच सजा आम्ही युवराजांना देऊ. यावं तुम्ही." महाराजांनी सोयराबाईंना जवळ जवळ हाकलूनच लावले.

हंबीरराव, सूर्याजी मालुसरे, जोत्याजी केसरकर अशी शेलकी मंडळी पाठीशी घेत छत्रपती रायगड उतरले. पायथ्याशी असलेल्या जिजाऊंच्या छत्रीचे दर्शन करून ते पाचाडच्या वाड्यात आले. वाड्यासमोर सजली पालखी सिद्ध ठेवून पन्हाळ्याला वरंदघाटाने जाणारे धारकरी तयार होते. सातारा, बत्तीस शिराळा, मलकापूर अशा मार्गे छत्रपती पन्हाळा जवळ करणार होते.

जिजाऊ गेल्यापासून पुतळाबाईसाहेब पाचाडच्या वाड्यातच राहत होत्या. त्यांची भेट घेण्यासाठी महाराज दरुणीमहालात आले.

"आम्ही पन्हाळ्याला निघतो आहोत." महाराज संथपणे पुतळाबाईंना म्हणाले.

"जी. त्यासाठीच स्वारींच्या पायांची डोळे लावून आम्ही वाट बघतो आहोत."

पुतळाबाईंच्या डोळ्यांत गोळा झालेली कातरता महाराजांना जाणवली. त्यांच्या ध्यानीमनी नसता पुतळाबाई एकदम पुढं झाल्या. महाराजांच्या पायांवर आपल्या दोन्ही तळहातांचं पालाण घालीत भरल्या कंठाने म्हणाल्या, "आजवर या पायांशी कसलं मागणं नाही घातलं. आज घालतो आहोत. चुकलं तरी लेकरू आपलं आहे. पदरी घ्यावं, स्वारीनं युवराजांना अभय द्यावं. समजूत पाडावी."

महाराजांना क्षणभर वाटले सईबाईच जिते रूप घेऊन पायांशी साकडे घालून बसल्या आहेत. त्यांचा कंठ त्या सावळ्या आठवणीने दाटून आला.

"उठा." त्यांनी पुतळाबाईंना भान दिले.

"आम्ही ज्याचं त्याला सारं देत आलो आहोत ... देणारही आहोत. फक्त, फक्त तुम्हाला देण्यासारखं आम्हाजवळ काही नाही." पुतळाबाईंचा विनापत्य वत्सलपणा छत्रपतींना जिव्हारी चाटून गेला होता. त्यांचा निरोप घेऊन ते वाड्याबाहेर पडले. सदरेवर मासाहेबांची वर्दी देणारी, तुळईला टांगलेली निसूर घाट एकवार त्यांनी नजरेत सामावून घेतली आणि ते पालखीत बसले. पालखी पन्हाळ्याच्या वाटेला लागली.

पन्हाळ्याच्या चौ-दरवाज्यावर आगवानीची नौबत दुडदुडली. शिंगांच्या ललकाऱ्या उठल्या. ठाण झाल्या पालखीतून पायउतार झालेल्या छत्रपतींच्या स्वारीला किल्लेदार विठ्ठलपंत सामोरे आले. महाराजांनी जमल्या असामींवर नजरफेक टाकीत युवराजांचा माग घेतला. ते कुठं दिसत नव्हते.

"पंत, युवराज – ?"

"सज्जाकोठीत आहेत." किल्लेदारांनी तपशील दिला.

"चला." समाधानाचा सुस्कारा टाकीत महाराज हंबीरराव, हिरोजी फर्जंद, सोमाजी बंकी, जोत्याजी केसरकर यांच्या मेळाने बालेकिल्ल्याकडे चालले.

तलावाकाठच्या सोमेश्वराचे दर्शन करून स्वाऱ्या बालेकिल्ल्यात आल्या. विठ्ठलपंतांसह महाराजांनी रंगरूपी शिवपिंडीचे दर्शन घेऊन गडाच्या खासेवाड्यात प्रवेश केला. दिवस चांगला वर आला होता तरी धुक्याचा भुरकट थर गडभर पसरला होता ...

वाड्याच्या सदरी बैठकीवर बसलेल्या छत्रपतींनी किल्लेदाराकडून गडाचा करिना घेतला. कोल्हापूर प्रांताचे अधिकारी जनार्दनपंत आणि कोकणसुभा रावजी पंडित यांना पन्हाळ्याला बोलावून घेण्याच्या सूचना त्यांना दिल्या.

सादिलवारीचे सारे आटोपताच महाराजांनी मतलबाच्या विषयाला हात घातला, "पंत, युवराजांना वर्दी द्या. आम्ही सज्जाकोठीवर जाणार आहोत." महाराजांनी हेरले होते की शरमिंदे संभाजीराजे आपणहून कधीच समोर येणार नाहीत.

"जी." म्हणत विठ्ठलपंतांनी वर्दीची व्यवस्था लावली.

"हंबीरराव कुठं दिसत नाहीत." छत्रपतींनी सदरेतल्या मंडळींवर नजर फिरवीत विचारले.

"सरलष्कर सज्जाकोठीवर गेलेत." पंतांनी तपशील दिला.

त्या तशा स्थितीतही महाराजांच्या मनात विचार चाटून गेला – "हंबीरराव महाराणींचे सख्खे बंधू. त्या युवराजांना बघता येईल तेवढे पाण्यात बघतात. हंबीरराव मात्र युवराजांना सावरू बघतात."

"चला." म्हणत छत्रपतींनी सदरी बैठक सोडली. पायीच ते सज्जाकोठीकडे चालले. गडाची तटबंदी धरून असलेली उंचावरची सज्जाकोठी आली. महाराजांना समोर पाहून, लगबगीने सज्जाकोठीबाहेर पडलेले हंबीरराव मुजऱ्यासाठी कमरेत झुकले.

"हंबीरराव, तुम्ही रुजू घातलेली मसलत आज घडते आहे. आम्ही युवराजांना भेटतो आहोत."

"जी. धन्याम्होरं आमचा वकुब न्हाई, पर हाताशी आलेलं युवराजांचं नामी हत्यार हिकमतीनं वळतं करून घ्यावं असं वाटतयं आम्हास. ते पस्तावल्यात. स्वामींच्या हातात हाय त्येंची जिंदगी."

महाराज पडेल हसले. त्यांना हंबीररावांना म्हणावेसे वाटले– "जिथं आमचीच जिंदगी आमच्या हातात नाही, तिथं त्यांची आमच्या हाती राखणार आम्ही कोण?" पण ते काही बोलले नाहीत. हाताच्या इशारतीवर विठ्ठलपंतांना कोठीच्या पायथ्याला थोपवून छत्रपती सज्जाकोठीत एकल्यानेच शिरले.

कोठीच्या निरुंद दगडी जिन्याने वर चढताना महाराजांना वाटले– "हा जिना कधी संपूच नये. श्वासाला खळ पडे पावेतो असेच चालावे. एकले!"

वरच्या मजल्यावरचे खुले, बैठकी दालन आले. त्या दालनाच्या झरोक्यातून दूरवर दिसणाऱ्या पठारी मुलखात नजर गमावलेले संभाजीराजे आत उभे होते. ते नजरेस पडताच महाराजांचे पाय जागीच खिळले. जाम्याआड काळजात खळबळ माजली. पुऱ्या तीन सालांनंतर ही पितापुत्रांची भेट होती! ऐन उभारीचा सागवान वृक्ष चवरीच्या काटेरी वेलीने येरगटून टाकावा तसे संभाजीराजे दिसत होते.

आज पहिल्यानेच छत्रपती शिवाजीमहाराजांना फार फार जाणवले की, आपण मस्तकी छत्र धारण करणारे राजे नसून अंतरीचे गडकोट गमावलेले एक बाप आहोत!

मिर्झा राजासमोर नि:शस्त्र उभे राहून मान खाली टाकताना वाटली नव्हती एवढी पिळवटणारी खंत त्यांना समोरचे खाली मान घातलेले संभाजीराजे बघताना वाटली.

कसल्यातरी विचाराने नि:श्वास टाकीत संभाजीराजांनी झरोका सोडला. दालनाच्या दारात उभे असलेले महाराजसाहेब बघताच त्यांच्या काळजात मासळी फडफडली. "हे आबासाहेब आहेत? केवढे– केवढे थकलेले!" क्षणातच गलबलून गेलेले त्यांचे काळीज पाणावून डोळ्यांत एकवटले. झटकन पुढे होत त्यांनी महाराजसाहेबांच्या चरणांवर आपला माथा ठेवला.

त्या स्पर्शाने क्षणभर महाराजांनी डोळे मिटले. ढळू बघणारे मन तोलीत, ते नेहमीसारखे संभाजीराजांना वर न घेता निर्भाव कोरडे बोलले, "उठा."

महाराज दालनात आले. हात पाठीशी बांधून काही वेळ सुन्न मनाने नुसताच पायफेर टाकीत राहिले. नेहमी नाचिज वेळ ना गमावता नेमक्या विषयाला सहज हात घालणाऱ्या छत्रपतींना आज काय नि कसे बोलावे तेच कळेना. मनात एवढ्या विचार-आठवणींची धुंदल जुंपली होती की, दालनात संभाजीराजे आहेत हेही ते क्षणभर विसरले!

दगड भिंतीलगत शरमिंदे संभाजीराजे पडल्या गर्दनीने उभे होते. आबासाहेबांची तळमळती घालमेल त्यांना असह्य होऊ लागली.

छत्रपतींची फिरती पावले स्थिरावली. तासाच्या टोलांसारखे बोल दालनात घुमले– "जिंकलात सह्याद्री? उठविलेत तुमचे आपले राज्य? झाले तुमच्या मनाजोगे मोगलाईत?

"या दौलतीचे युवराज असून, उद्याचे छत्रपती असून पठाणाच्या गोटात दाखल झालात! जे हात मुजऱ्यांसाठी आमच्यासमोर झुकले ते मांजऱ्याच्या पठारावर कलम झालेले कोडगेपणानं बघितलेत! पठाणांच्या नि तुमच्या धास्तीनं तिकोट्याच्या विहिरी-आडांत तीनशे अश्राप बायाबापड्यांनी आपल्या कुड्या झोकून दिल्या. खुद्द तुमचा कबिला पठाणानं दस्त केला. शरम– शरम वाटते तुमची आम्हास! एवढीशी पापणीसुद्धा वरकड कस्पट डोळ्यांत घेत नाही. तुम्ही तर युवराज असून, कमरेला हत्यार वागविणारे पुरुष असून कसली शिकस्त घेतलीत ही ऐन उमेदीत! केवढे मनसुबे बांधून होतो आम्ही तुमच्या बाबीनं! फार फार गफलत केलीत तुम्ही. हे राज्य आमचे एकल्याचे मानण्यात. हे राज्य देवा-धर्माचे, गोरगरीब रयतेचे राज्य आहे. ती भोसल्यांची खाजगी मिरास नाही. तुम्ही आमचे पुत्र आहात ते नंतर, प्रथम आहात ते रयतेचे युवराज. तुमचा आमचा वारसा आहे तो छातीवरच्या आईच्या माळेचा. रायगडीच्या सिंहासनाचा नव्हे. तुम्ही-आम्ही पहिले सेनापती आणि शेवटचे धारकरी आहेत. केवळ राजे नव्हे.

"मराठ्यांचे युवराज असून मोगली गोटात दाखल होताना, फौजबंदीनं दौलतीच्या भूपाळगडावर चालून येताना, पित्यासमान फिरंगोजींना बेगुमान टाकून बोलताना तुमच्या मनाला एवढीसुद्धा शरम शिवली नाही! बरे ध्यानी ठेवा– "अगोदर मरतात ती मनं आणि मग मरतात ती माणसं!" संतापाने युवराजांची खरड घेताना छत्रपतींना ठसका लागला. छातीवर तळहात फिरवून तो सुमार करणाऱ्या आबासाहेबांना बघताना संभाजीराजांचे काळीज देठासह पिळवटले. शब्द म्हणता शब्दसुद्धा त्यांच्या तोंडून फुटेना. आबासाहेबांचा घुसमटविणारा तडफडाट समोर गुमान बघवेना.

"सवतं राज्य कमवायला गेलात आणि कबिला गमावून आलात! परक्या घरचं कुलधन असलेल्या आमच्या राणूबाईंना हरवून आलात! ज्या राजाला आपल्या घरच्या कुलस्त्रीचं रक्षण करता येत नाही तो नामधारी छत्रपती प्रजा काय सांभाळणार, असा सवाल उद्या कुणी केलाच तर कुठल्या तोंडानं आम्ही त्याला आता काय जाब देणार? रजपुतानं मुलूख जाळून आम्हाला शरणागत पत्करायला लावली. त्यातूनही आम्ही बाहेर पडलो. पण आमच्या साऱ्या उमेदींना जाळ लावून जी शरणागत तुम्ही आम्हाला पत्करायला लावली आहे, तिच्यातून आम्ही कधीच बाहेर पडणार नाही. बरे तर बरे.

दिलेरच्या तावडीत सापडून तुमची रवानगी दिल्लीला झाली नाही! नाहीतर नेताजींसारखी तुमचीही गत झालेली बघताना अभक्ष्य सेवनावाचून दुसरं काय उरतं आमच्यासाठी? जबान खुंटल्यागत गुमान का झालात? जाब द्या. आम्ही तुम्हाला विचारतो आहोत.'' महाराज थेट संभाजीराजांच्या पुढेच येऊन उभे ठाकले. खाली मान टाकलेल्या संभाजीराजांच्या आत्म्याचा कढ आसवांच्या रूपाने दाढीवरून घरंगळत रुजाम्यावर टपटप कोसळला.

''जंजिऱ्यावर मांड ठोकून, कोकणपट्टी मारायला टपलेल्या सिद्दीला जरब देता येत नाही याची जरा खंत ठेवा. समुद्रपट्टीला टोपीकर आमचा खांदेरीबेटावरचा जलदुर्ग उठवू देत नाही याची चिंता करा. आज उद्या प्रत्यक्ष औरंगजेब फौजेसुद्धा दख्खनेत उतरणार याचा अंदाज ठेवा. आदिलशाही, कुत्बशाही आणि हे श्रींचे राज्य धूळदोस्त करण्यासाठी सर्व ताकदीनिशी तो जंग जंग पछाडणार याचा विचार करा. त्यासाठी पहिल्यानं मावळा व्हा– माणूस व्हा! आम्हाला तडकाफडकी पारखं होणं सोपं आहे. काल आणील त्या कसोटीला सामोरं होणं सोपं नाही.

''ज्यांना आम्ही दुसऱ्या आऊसाहेबांच्या रूपात बघतो त्या सूनबाईंनी– येसूबाईंनी तुमचा कसला अभिमान बाळगावा? पोटी आलेल्या तुमच्या वारसांनी कसला वसा ताठ गर्दनीनं उद्या सांगावा? काय बघून आमच्या मावळ-धारकऱ्यांनी तुमच्यासाठी-राज्यासाठी जिवांची कुरवंडी करावी?

''मानापमानाचा फार मुलाहिजा धरता, पण विसरता की देवादिकांनाही अवमान सोसावे लागले, वनवास भोगावे लागले. तुम्हाला दिसतं सिंहासन– पण त्यावर विखुरलेले काटे नाही दिसत. इतरांतील ऐब तुम्ही नेमका हेरता पण स्वत:ठायी असलेला ऐब तुम्हाला कधी उमगत नाही. राजाला भावनेला सायवळ असून भागत नाही हे भुलता तुम्ही.'' छत्रपतींचा आवाज थरथरू लागला. तापल्या शिसाच्या रसात डुबून उठलेले जळजळीत बोल संभाजीराजांच्या मनातले माजलेले तण मुळासकट जाळून काढू लागले.

''प्रधानमंडळातील आण्णाजींसारख्या असामींशी तुमचं पटत नाही. महाराणींशी तुमचं जमत नाही. आण्णाजी राज्याचे कदीम चाकर आहेत. त्यांना वळतं करून घेणं तुम्हाला साधत नाही. आम्ही तर मुरारबाजी, बाजीप्रभूंसारखी हत्यार उठवून चालून आलेली शत्रू गोटातील माणसं वळवून कार्यी लावली. तुम्ही ते कसं साधणार?

''अफजलभेटीचा, आग्राकोठीतील कैदेचा आमच्यासारखा प्रसंग तुमच्यावर गुदरला तर कसं निभावणार आहात तुम्ही?

''आमची नाही ती नाही, ज्या थोर स्त्रीनं तुम्हाला लहानाचं मोठं केलं त्या गेल्या आऊसाहेबांची तरी आण राखा. बरं आहे आज त्या हयात नाहीत ते! नाहीतर त्यांच्या कुशीत सुख होणारे तुम्ही, आमच्या कुशीत कट्यार चालवून पठाणाला मिळालात ही खबर ऐकूनच त्या शांत ...''

''नको! आबासाहेब नको'' मनाचा चोळामोळा झालेले संभाजीराजे क्षणातच आबासाहेबांच्या पायांना मिठी भरून हमसा-हमशी स्फुंदू लागले. त्यांच्या दाटल्या कंठातून शब्दांचे पश्चात्तापदग्ध मोती टपटपले.

''आम्ही– आम्ही चुकलो. आम्हाला युवराजपद नको. जोड आहे ती या पायांची. आम्ही दूधभात खाऊन या पायांशी राहू. शरमिंदे आहोत आम्ही. मन चाहेल ती सजा आम्हास फर्मावावी पण– पण शब्दाचा एकही वार आम्हाला आता सोसवणार नाही. आबा ऽ– आबा ऽ!''

नाकगड्डा चिमटीत धरलेल्या, डोळे गच्च मिटलेल्या छत्रपतींच्या मनाच्या घुमटीत कसलीतरी अज्ञात नौबत झडझडली– ''एकला जीव पदरी घातला. आता स्वारीच यांच्या आऊ आणि आबा!'' सईबाईंच्या सावळ्या स्मृतीने छत्रपतींनी लोंबता दीर्घ नि:श्वास टाकला.

''चुकलं तरी लेकरू आपलंच आहे. पदरी घ्यावं. अभय द्यावं.'' पुतळाबाईंच्या बोलांनी महाराजांना घेर घातला.

''हाताशी आलेलं युवराजांचं नामी हत्यार वळतं करून घ्यावं. पस्तावल्यात ते.'' सरलष्कर हंबीररावांची मावळबोली मुजरा करून गेली.

''आबासाहेब, तुम्ही काढाल हुडव्यातील फळ बाहेर?'' एक अजाण पोर हात उठवून विचारीत होता.

आज तो स्वत:च चुकल्या वाटांच्या, पश्चात्तापाच्या वणव्यात होरपळत होता. शिवाजीराजांचे मानी छत्रपतीपण विरघळले. राजसंतापाची जागा आता अपार अपार अशा करुणेने घेतली. निमुळत्या नेत्रकडा पाणावून आल्या. लपकन झुकून छत्रपतींनी आपल्या पोटच्या गोळ्याचे खांदे तळहातांच्या घट्ट पकडीत घेत संभाजीराजांना उठते केले. आपली पाणथर नजर आपल्या फर्जंदाच्या पाझरत्या डोळ्यांत खोलवर रुतवून क्षणैक डोळ्यांनीच त्याला उदंड काही सांगितले. दुसऱ्याच क्षणी चिंब, घोगरट बोल त्या सर्जा राजाच्या ओठांतून अडखळत बाहेर पडले– ''लेकरा ऽ, कुठं गेला होतास? असा कसा रे चुकलास?''

रात्रभर पारखा झालेला सूर्यगोल, दिवसफुटीला उगवतीने हात पसरून आवेगाने कुशीत घ्यावा, तसे छत्रपती शिवाजीमहाराजांनी शंभूराजांना आवेगाने छातवानाला घट्ट बिलगते घेतले. पिळाची दोन भोसलाई छाताडे एकमेकांना खूप काही सांगून गेली. अभिषेक घेतलेल्या छत्रपतींच्या नेत्रांतले पावन तीर्थ संभाजीराजांच्या टोपावर उतरले.

पन्हाळा त्या पावन मनोमीलनाने कृतार्थ झाला!

□ □ □

१०

पन्हाळ्याच्या बालेकिल्ल्यातील खाशा सदरेत महाराज बैठकीवर बसले होते. त्यांची पायगत मांडलेल्या बिछायतीवर संभाजीराजांनी बैठक घेतली होती. किल्लेदार विठ्ठलपंत, हंबीरराव, हिरोजी फर्जंद, सोनाजी व कृष्णाजी बंकी, बहिर्जी इंगळे, बाबाजी ढमढेरे, सूर्याजी विचारे अशी मंडळी अदब धरून सदरेत उभी होती. कोल्हापूरहून आलेले जनार्दनपंत सुमंत आणि कोकणसुभ्याचे सुभेदार रावजी पंडित; आपणाला छत्रपतींनी का पाचारण केले असावे या विचारात एका बगलेला खडे होते. त्यांच्या शेजारी उमाजी पंडित होते.

"जनार्दनपंत, असे पुढे या." महाराजांनी जनार्दनपंतांना फर्मावले.

"जी." म्हणत हात जोडून पंत बैठकीसामने आले.

"युवराज, हे कोल्हापूर तर्फेचे अधिकारी. आजपासून प्रांत पन्हाळा राखून तुम्ही इथे राहायचे आहे. हे कोकणसुभा रावजी पंडितही तुमच्या दिमतीत राहतील."

छत्रपतींनी रावजींच्याकडे हात उठविला.

"आज्ञा स्वामी." म्हणत रावजींनी बैठकीला नमस्कार दिला.

"स्वामी, एक पेच आहे. आज्ञा होईल तर..." रावजींनी आपल्या सुभ्याचा मुद्दा पेश केला.

"बोला, काय आहे?"

"राजापूर बंदरात टोपीकरांची काही गलबतं नांगर टाकून आहेत. त्यावरून कुणीच बंदरात उतरत नाही. गलबतंही हाकारीत नाहीत. काय करावं ? येरगटावी ?"

"बोला युवराज, तुमच्या अखत्यारीतल्या या मामल्याला तुम्हीच तोड सांगा कोकणसुभ्यांना!" महाराजांनी हसत संभाजीराजांना पुढे घातले.

संभाजीराजे क्षणभर विचारगत झाले. रावजींना निरखत त्यांनी सवाल घातला, "गलबतं कुणाची आहेत ? फिरंग्यांची, गोऱ्यांची, डचांची की फ्रेंचांची ? काही अंदाज ?"

"जी. फ्रेंचांची आहेत." रावजींनी तपशील दिला.

"मग त्यांच्या गलबतांवर आपले खलाशी पाठवून ते व्यापारासाठी आले असतील तर दोस्ताना राखावा. ते आम्हाला हत्यारे पुरवितात."

"बिलकुल ठीक." महाराज समाधानाने हसले.

"युवराज, तुम्ही कोकणपट्टीच्या आरमारावर या रावजींच्या मदतीनं देख ठेवा." छत्रपतींची चर्या प्रसन्न होती.

"हे सोनाजी बंकी, बाबाजी, तुमचे कवी गुरू उमाजी पंडित पन्हाळगडीच तुमच्या तर्फेने राहतील. आमचा फेरहुकूम होईतो हा पन्हाळाप्रांत रखून असा. दिलेर-सर्जा या भागाचा केव्हाही मोहरा धरतील त्याचा अंदाज ठेवा."

सदरेतील प्रत्येक असामी ध्यान ठेवून महाराजांचा प्रत्येक बोल ऐकत होती. सर्वांनाच जाणवत होते की, छत्रपतींचा आवाज नेहमीसारखा तडफेचा नाही. त्यांची चर्या सुमार आहे. गालापासून नाकाचा फेर वर उचलल्यागत दिसतो आहे.

"विठ्ठलपंत, मंडळींना विडे द्या. युवराज, चला शिवलिंगाचे दर्शन करून येऊ." महाराज बैठकीवरून उठले.

संभाजीराजांना बरोबर घेत महाराज बालेकिल्ल्याबाहेर पडले. मागून येणाऱ्या विठ्ठलपंत, हंबीरराव, रावजी यांना त्यांनी हातइशाऱ्याने दरवाज्यातच थोपते केले.

सांजावत आल्याने गडाच्या जांभूळ, वड, पिंपळ, आंबा, चाफ्यांच्या गर्दाव्यात कलकलणारे पक्ष्यांचे थवे उतरत होते. नगारखान्यावरून उठलेली सांजनौबतीची दुडदुड पन्हाळ्याच्या रानावर उतरून थिरावत होती. पाठीशी कोणीच घेतले नाही त्याअर्थी आबासाहेब काही मनचे बोलणार आहेत याचा संभाजीराजांना केव्हाच सासूद आला. पण ते काय बोलणार आहेत याचा थांग मात्र काही त्यांना येईना.

शिवालयाची घुमटी आली. पुजाऱ्याने स्वाऱ्यांना नमस्कार केला. घुमटीपर्यंत येईतो तिथे पुजारी असणार याचा विचार छत्रपतींना स्पर्शला नव्हता. क्षणात त्याला कसा हटवावा हे त्यांनी बांधूनही टाकले.

"पुजारी, सोमेश्वर टाक्यावरच्या पिंडीच्या दर्शनास आम्ही येणार आहोत. किल्लेदारांना याची वर्दी द्या. तुम्ही टाक्यावरच्या देवळात आमची वाट बघा."

"जी." म्हणत पुजारी बालेकिल्ल्याच्या रोखाने लगबगीने निघून गेला. पितापुत्रांनी पायीच्या मोजड्या उतरल्या.

मावळतीला चाललेल्या तापदेवाला छातीशी हात नेऊन महाराजांनी वंदन केले. एकदा तो नारिंगी, पिवळा तेजोगोल डोळाभर बघून घेतला.

"आत या." असे संभाजीराजांना म्हणत छत्रपती घुमटीच्या दगडी चौकटीला टोप थटणार नाही याची दक्षता घेत वाकून घुमटीत प्रवेशले. त्यांच्या मागून संभाजीराजे घुमटीत आले. बेलफुलांनी आच्छादलेली रंगरूपी पिंडी ठाणक्यांच्या मंद प्रकाशात अभिषेकपात्रातील एकलग थेंबावळ अंगावर घेत होती. पितापुत्रांनी गुडघे टेकून तिच्यासमोर माथे नमविले. वर होत हात जोडून नमस्कार घातले.

"शंभू, ही रंगरूपी पिंड आहे. आम्हाला सांगत आलेली की, माणसाच्या

हयातीलाही कैक रंग असतात. सुखदुःखांचे.'' पिंडीवर नजर जोडीत महाराज क्षणभर थांबले.

'' हिला साक्ष ठेवून आम्ही काय सांगतो आहोत ते सावध चित्तानं ऐका. ही पिंड खालच्या शाळुंकेत एकजीव झाली आहे म्हणूनच साजून दिसते. तुम्ही आणि रामराजे आम्हाला असेच वाटता. तुम्हा दोघांना आम्ही वेगळं कधीच बघितलं नाही. दोन डोळ्यांसारखे आहात तुम्ही उभयता आम्हाला आणि आमच्या रयतेलाही. ते अजाण आहेत, तुम्ही भरीचे आहात.

'' आता अधिक काल आमचा भरोसा नाही. म्हणूनच जे स्वप्नीसुद्धा आम्ही कधी मनी आणलं नसतं ते करणार आहोत. तुमच्या आणि राणीसाहेबांच्या मनाचा मेळ कधी पडणार नाही. जे त्यांच्या रागापोटी तुम्ही केलंत ते आमच्या माघारी उद्या केलंत तर समजून घेणारं कुणीच असणार नाही. यासाठी ... यासाठी या श्रींच्या राज्याची आम्ही वाटणी करणार आहोत!''

'' आबासाहेऽब, आम्ही आणभाकेनं वचन देतो, आम्हाला काही-काही नको. हवे आहात फक्त तुम्ही. हे असं निरवानिरवीचं का बोलताहात? आम्ही आपला शब्द आता कधीच पडू देणार नाही. कुठंही असलो तरी सावलीसारखे रामराजांच्या पाठीशीच असू. आपली तब्येत बघितल्यापासून मात्र आमचं मन उडालं आहे. काही सुचत नाही.''

'' ते जाऊ. तब्येतीकडं बघण्याएवढा वखत आम्हाजवळ नाही. तुम्ही नको म्हटल्यानं दौलतीची जिम्मेदारी टळत नाही. युवराजपदाचा अभिषेक झाला आहे तुम्हाला. खरे तर साऱ्या राज्याचे वारस तुम्हीच आहात. पण महाराणी तुम्हाला ते लाभू देणार नाहीत. जे करून बसला आहात त्यानं तुमचा इतबार प्रधानमंडळाला येणार नाही. यासाठी कर्नाटक फाट्याचं तुंगभद्रेपासून कावेरीपावेतो जिंजीचं राज्य आम्ही तुमच्या अखत्यारीखाली देणार आहोत. गोदावरीपासून तुंगभद्रेपावेतो उत्तरेकडील रायगडाचं राज्य रामराजांना सुपूर्द करणार आहोत. ते जाणते होईपर्यंत प्रधानमंडळ या राज्यावर देख ठेवील. या निर्णयानं तुमची आणि महाराणींची मतभेदांची कारणं निकाली पडतील. दृष्टीआड सृष्टी भली असते. बोला, यावर काय इरादा आहे तुमचा?''

'' आबासाहेब, आमचे बोल मोल हरवून बसलेत. आम्ही सच्चेपणी आपल्या चरणांच्या शपथेवर कळवळून सांगतो आहोत. दौलतीचा काडीइतकाही विचार तो आमच्या मनी नाही. आम्ही रामराजांना परके मानीत नाही. आम्हाला आपणास दिल्या यातनांची खंत हयातभर पुरेशी आहे. आपण स्वत:ला जपावं. एकट्या आम्हालाच नाही तर असंख्यांना आपण पित्याच्या ठायी आहात. आमचं एकच मागणं आहे ...''

'' सांगा.''

'' आपण ठरवून कुठंतरी निवांत स्थानी आराम घ्यावा. रायगडी आपणाला तो मिळणार नाही.''

'' राजे, आता आम्हाला रायगडाशिवाय कोण आराम देणार? आमच्या आऊसाहेबांची छत्री तिथं गडपायथ्याला आहे. आता अधिक काळ तुम्हाला आमची चिंता नाही करावी लागणार! आम्हाला पन्हाळा सोडताना चिंता वाटते आहे ती तुमची – एक ऐकाल?''

'' आज्ञा व्हावी.'' संभाजीराजांनी महाराजांवर डोळे जोडले. एरव्ही महाराज बोलत असले की बोलतेच राहावे असे त्यांना वाटायचे पण का कुणास ठाऊक आज आबासाहेबांनी अधिक बोलूच नये असे त्यांना वाटत होते. त्यांच्या बोलण्याला गहिऱ्या दुःखाची, मनाची कातर करणारी गूढ छटा होती म्हणून.

'' शंभूबाऽळ, आमचं हे सांगणं कधी झोपेतसुद्धा विसरू नका. एका मातब्बर गनिमाच्या – औरंगच्या तडाख्यातून तुम्ही दोनवार सहीसलामत सुटला आहात, पुन्हा चुकूनसुद्धा त्याच्या तावडीत फसण्याची गफलत कधी करू नका. आता आम्ही सांगेतो पन्हाळा प्रांत सोडू नका. आई जगदंब तुमचं भलं करणार थोर आहे. चला.''

संभाजीराजे घुमटीबाहेर पडण्यासाठी पुढे झाले. त्यांना हात आडवा टाकून रोखत महाराज शांतपणे म्हणाले, '' शिवपिंडीची अर्धप्रदक्षिणा विसरलात! घ्या ती.''

अर्धप्रदक्षिणा घालून होताच शिवाजी महाराजांनी ओणवे होत रंगरूपी पिंडीवरील एक बिल्वदल हलकेच उचलले आणि ते संभाजीराजांच्या तळहातावर ठेवीत ते म्हणाले –

'' तुम्ही उपजलात तेव्हा तुमची कुंडली मांडणाऱ्या ज्योतिष्यानं भाकित केलं होतं – तुम्ही साक्षात रुद्राचे अवतार आहात. उंच गडकोटावर राहाल. प्रलय मांजवाल – पण ... पण –''

'' पण काय महाराजसाहेब?''

'' पण रुद्र जसा आप्तगणांकडून फसला, तसाच योग तुमच्या कुंडलीत आहे!''

'' तुम्ही दोन वर्षांचे असताना एकदा आप्तगणांकडून फसलात. तुमच्या मासाहेबांकडून! युवराज झालात आणि फसलात तुमच्या थोरल्या आऊंकडून! कुणी सांगावं आम्हीही तुम्हाला फसवू! कडी सर्जा फर्मावू! आम्हाला विश्वास आहे तुम्ही रुद्र आहात, ती धीरानं पचवाल!''

आबासाहेब केवढे गूढ बोलले ते संभाजीराजांना किती कळले कोण जाणे!

ते पितापुत्र शिवालयाबाहेर पडले. तेव्हा उभा पन्हाळगड धुक्याच्या पटलाने पार वेढून टाकला गेला होता!

गडउतारासाठी भोयांनी चौ-दरवाज्यात पालखी सिद्ध केली. महाराज आज पन्हाळगड उतरून कोयनाघाटीने, सातारामार्गे सज्जनगडी जाणार होते. संतसमर्थ रामदासांच्या भेटीसाठी. संभाजीराजे, विठ्ठलपंत, हंबीरराव, रावजी, हिरोजी, उमाजीपंत अशा मंडळींच्या मेळ्यासह छत्रपतींनी बालेकिल्ला सोडला. रंगरूपी पिंड, सोमेश्वर तलाव, कोकण दरवाजा, सादोबाचे तळे, अशा आपल्या लाडक्या पन्हाळगडावरील स्थानांचे दर्शन घेत प्रशस्त चौ-दरवाज्यात आले. पुढे होत संभाजीराजांनी आबासाहेबांच्या भगव्या राजमोजड्यांना, पायधूळ घेण्यासाठी हात भिडविला.

त्यांना वर घेत महाराजांनी गाढ ऊरभेट दिली. काही न बोलता त्यांची पाठ हलकेच थोपटली. "येतो आम्ही शंभूराजे. जपून असा. जय भवानी!" श्रीमंत योगी शांतपणे बोलला.

"आबासाहेब, तब्येतीकडं ध्यान असावं. जय भवानी!!" न राहवून संभाजीराजे बोलले.

त्यांचे बोलणे तसेच सोडून निरोपासाठी आलेल्या आसामींकडे बघत छत्रपतींनी कधी नव्हे ते सर्वांना हात जोडले.– "येतो आम्ही! जय भवानी!"

छत्रपती सर्वांना पाठमोरे होत पालखीत बसायला निघाले. त्यांच्या पाठमोऱ्या मूर्तीला मुजरे देण्यासाठी जमली छातवाने आदराने झुकली. इमानी हात हेलावले.

पन्हाळ्याच्या बेलाग ढाशा वाऱ्याचा एक ताकदवर झपकारा अवचित आला. पालखीत बसणाऱ्या छत्रपतींच्या अंगचा जामा त्यानं हवेत फरफरला. डुईच्या राजटोपात मढविलेल्या गरुडपिसांच्या पदकातील एक पीस त्या झपकाऱ्याने उखडून काढले. हवेत भेलकांडत ते शुभशकुनी पीस गडाच्या दरडीकडे जाताना बघून संभाजीराजे चरकले, छातीवरच्या माळेला बोटे भिडवून डोळे मिटत कातर पुटपुटले, "जगदंब जगदंब!"

भोयांनी श्रीमंत योग्याची पालखी उठवली. दृष्टीआडची सृष्टी भली करीत संभाजीराजांचे थोर, जाणते आबासाहेब, समर्थांचे निश्चयाचे महामेरू, बहुत जनांसी आधारू, श्रीमंत-शिवयोगी पन्हाळगड उतरू लागले. माघी पौर्णिमा तोंडावर आल्यामुळं वाडी रत्नागिरीच्या यात्रेला चाललेले भक्तमंडळ वाटेत भेटले. हातच्या उंच शासनकाठ्या तोलत त्यांनी उठविलेला 'जोतिबाच्या नावानं चांगभलं!' हा जयकार ऐकून राजे हात जोडून पालखीतूनच पुटपुटले– 'समस्तांचं चांगभलं कर खंडेराया!" पालखीला घेर धरत, घोड्यांवर मांड जमविलेले हंबीरराव, हिरोजी फर्जंद कदमबाज दौडीवर चालले. चौ-दरवाज्यातील जमली मंडळी परतली तरीसुद्धा पालखी डोळ्यांआड होईतो संभाजीराजे जखडल्या पायाने उभेच होते.

त्यांच्यात मन गुंतलेले उमाजी पंडित त्यांच्या पाठीशी खडे होते. त्यांना बघताच संभाजीराजे म्हणाले, "पंडित, चला. तुमच्याशी काही बोलायचं आहे."

उमाजीपंतांसह संभाजीराजे सज्जाकोठीवर आले. पंडितांना बैठकीवर बसण्याची इशारत करून त्यांनी विचारले, "तुम्ही शृंगारपूरची काही खबरबात दिली नाही आम्हाला पंडित."

पंडित गप्पच राहिले.

"आमच्या भवानीबाई कशा आहेत?"

"सुखरूप आहेत–"

"आणि युवराज्ञी?"

पंडित पुन्हा गुमान झाले. काय बोलावे त्यांना कळेना.

"बोला."

"युवराजांचा धाकटा कबिला पठाणांना दस्त झाल्याचं ऐकून त्यांनी हाय खाल्लेय. कुणालाच त्यांचं दर्शन घडत नाही.

"आपणहून बंदिवासच पत्करलाय त्यांनी." उमाजीपंतांची मान वर उठत नव्हती. कोठीच्या झरोक्यातून दिसणाऱ्या, ठाव न लागणाऱ्या पठारी प्रदेशभर संभाजीराजांचे डोळे भिरभिरत राहिले!

रायगडाच्या खासे महाली भरलेली सदर आता संपली होती. मोरोपंत, अण्णाजी, हंबीरराव, बाळाजी, येसाजी यांना महाराजांनी निरोपाचे विडे देवविले होते. मात्र बाळाजींना बजावले होते, "बाळाजी, तुम्ही जरा आम्हाला महाली भेटा."

सदरकरी बाहेर पडले तरी रेंगाळलेले हंबीरराव महाराजांजवळ आले.

"काय आहे सरलष्कर?"

"आम्ही बोलून लागी पडत न्हाई. पर बोलल्याबगार राहवत न्हाई. धन्यानी औरंगबादशाची काडीची फिकीर धरू नये. असलं धा बादशा चालून येऊ द्यात. मुलूख पिळाचा हाय. पर आम्हाला चिंता हाय ती खाशांच्या तब्येतीची. ह्ये राखाय पायजे धनी."

महाराज निर्विकार नजरेने हंबीररावांकडे बघत राहिले. त्यांच्या काळजाचा कंद, तो प्रेमा पाहून फुटू बघत होता. तरी स्वतःला आतल्या आत सावरीत महाराज हसत थंडपणे म्हणाले, "हंबीरराव, तुम्ही सरलष्करच आहात काय अशी शंका आणू नका. आमच्या मनी आईच्या कृपेने आम्ही ठीक आहोत. करताहात तर चिंता दुसरी करा." महाराजांनी कसबाने हंबीररावांना आपल्यावरून दुसरीकडे वळविले.

"कसली?" रांगडे सरलष्कर सबागती विचारात पडले.

"युवराजांची!" तुमचा ओढा त्यांच्याकडं आहे. बाक्या प्रसंगी आमच्यापेक्षा तुम्हीच त्यांना बिनतोडीचं सांगाल. त्यांच्यावर स्तत लक्ष असू द्या तुमचं."

"जी. धन्यानी त्येंच्याबाबत बिनघोर असावं. या पायांची आण." का कुणास ठाऊक हंबीररावांना पुढे होऊन महाराजांची पायधूळ घ्यावीसे वाटले. सरसे होत त्यांनी छत्रपतींच्या पायांना हात भिडविला. त्यांना काहीच न बोलता महाराजांनी डोळे मिटत तो स्पर्श अनुभवला. हंबीरराव बाहेर पडले.

छत्रपती सदर सोडून आपल्या महाली आले. आता एकांतात मात्र त्यांना अंगची कसर पुन्हा जाणवू लागली. दारावरच्या पहारेकऱ्याने आत येत वर्दी दिली, "चिटणीस आल्यात."

"येऊ दे त्यांना." महाराज फेर घेऊ लागले. बाळाजी आवजी महालात रुजू झाले.

"बाळाजी, पन्हाळगडी युवराजांना खलिता द्या. लिहा. रामराजांच्या शुभकार्यास तुम्हाला पाचारण केलं नाही. त्याचं काही मनी धरू नका. भेटीत त्या बाबीनं तपशिलात बोलू. सांप्रत खबर आहे की, अलमगीर दख्खनेत उतरणार. त्याचा थोपा करण्यासाठी तुमची शिबंदी कसल्या जिनानं सिद्ध असू द्या. वेळीच आम्ही तुम्हाला याद फर्मावू. आमच्या संगती ठेवू."

"जी." बाळाजींनी मजकूर ध्यानपूर्वक ऐकून मान डोलवली.

"खलिता तयार करून दस्तुरासाठी आमच्याकडे धाडा. आजच्या आज तो पन्हाळगडी जाईल तसे करा." छत्रपतींनी हात उठवून बाळाजींकडे पाठ केली. कसल्यातरी खोल विचाराने ते महालाचे छत निरखत संथ पायफेर घेऊ लागले.

सज्जाकोठीच्या बैठकी दालनात बसलेले संभाजीराजे बैठक सोडून ताडकन उठले होते. त्यांच्या मस्तकात झिणझिणत्या मुंग्यांचे वारुळ फुटले होते. समोर पाचाडहून आलेले हुजूरपागेचे दोन हारकारे खालच्या मानेने खडे होते. त्यांतील एकाने पाचाडहून आणलेला पुतळाबाईंचा 'गोटाचा खासा सांगावा' संभाजीराजांच्या कानी घातला होता – "रायगडाचे सर्व दरवाजे, कुणाच्या ध्यानीमनी नसता एकाएकी बंदिस्त झाले आहेत! गडाचा राबता थांबला आहे. डाव उडत्या काळजानं आम्ही पाचाडी आहोत. स्वारी अंथरुणाला खिळल्याचं कानी आहे. गडावर कसली तरी घालमेल पडली आहे. काय करावं सुचेना झालं आहे."

समजल्या सांगाव्याने काय करावे ते संभाजीराजांना सुचेना. याच पावली कोठी उतरावी, मांड जमवून जनावर रायगडाच्या रोखाने फेकावे या विचाराने त्यांच्या मनी अनावर उचल खाल्ली. पण तिला महाराजांच्या शब्दांनीच पायखीळ घातली – "आता आम्ही सांगेतो प्रांत पन्हाळा सोडू नका."

"एका शब्दानं वा हालचालीनंही आबासाहेबांना आता दुखविणं होणार नाही."

द्विधा मनाने संभाजीराजे येरझारू लागले. पन्हाळा सोडताना कष्टी झालेली महाराजांची मुद्रा त्यांच्या डोळ्यांसमोर ठाकली.

"रायाजी-अंतोजी, तुम्ही दौडत्या टापांनी रायगड जवळ करा. जे काही कानी पडेल ते टाकोटाकीनं आम्हाला पावते करा." निरोपाचा हातइशारा देत संभाजीराजे एकांत झाले.

सुरतेपासून जिंजी पेड्डापोलमपर्यंत दौड घेणारे महाराज बंदिस्त गडामुळे रयतेपासून, मावळ्यांपासून तुटले होते. गडावरचा महाल महाराणींनी आपल्या देखरेखीखाली घेऊन गडावरच्या माणसांनीही आपल्या धन्यांना भेटणे मुष्किल केले होते.

सांजवेळ असल्याने 'दिवट्याचा मुजरा' देण्यासाठी सोयराबाई रामराजांना घेऊन छत्रपतींच्या महालात आल्या. महालावर आता खंडोजी नाईक, कान्होजी भांडवलकर, गणोजी कावळा अशा खास सोयराबाईंच्या माणसांचा हत्यारबंद पहारा बसला होता. खुद्द पहारा देणाऱ्या दरखदारांनाही कल्पना नव्हती की महाराणींच्या मनी काही काळेबेरे उगवले आहे!

सोयराबाईंनी झरोक्याचे कवाड मिटले. हलक्या पावलांनी त्या मंचकाजवळ आल्या.

"राणीसाहेब, आमचं एक काम कराल?" राजे म्हणाले.

"हे काय विचारणं? सांगावं, जरूर करू." सोयराबाईंनी काय सांगणे होणार ते ऐकायला कानांत महाराणीपण एकवट केले.

"उद्याच हारकारे गडाखाली धाडा. पन्हाळ्याहून युवराजांना बोलावून घ्या. पाचाडच्या धाकट्या राणीसाहेबांना गडावर घेऊन या. बाळाजींना सांगा – आमच्या शरीरी व्यथा झाल्याची खबर हंबीरराव, मोरोपंत, आण्णाजी यांना खलिते देऊन कळवा. आम्हाला साऱ्यांशी बोलायचं आहे." एवढ्या बोलण्यानेही छत्रपतींना थकल्यागत वाटले.

"एवढंच ना. आम्ही जरूर करू ते. स्वारीनं निवांतपणा घ्यावा. बाळाजींनाच इकडं पेश पाठवून देतो आम्ही."

सोयराबाई रामराजांना घेऊन महालाबाहेर पडल्या. छत्रपती चिराखदानांच्या ज्योतींवर डोळे लावून विचारगत झाले.

"विठ्ठलपंत, रायगडचा काही खलिता..." चिंतावल्या संभाजीराजांनी पन्हाळगडाचा देख घेण्यासाठी फेर टाकताना किल्लेदारांना विचारले.

"काही नाही युवराज. आम्ही त्याचीच वाट बघतो आहोत." विठ्ठलपंतांनी पगडी डुलवीत जाब दिला.

समोर कोकण दरवाजा आला होता. त्याच्या दगडबंद पायऱ्या चढण्यापूर्वी

संभाजीराजे थांबले. "पंडित, काय वाटतं तुम्हाला ? आबासाहेब आम्हाला रायगडी का याद फर्मावीत नाहीत ? की बंदिस्त झाल्या गडावरून खालीही कुणी उतरत नाही ?" संभाजीराजांनी पाठीशी असलेल्या उमाजीपंतांना विचारले.

बहिर्जी इंगळे आणि कृष्णाजी बंकी यांच्याशी काहीतरी बोलत असलेले उमाजीपंत "जी." म्हणत पुढे झाले. अदबीने म्हणाले, "आम्हाला नाही तसं वाटत युवराज. गडावर बाळाजी चिटणीस आहेत. ते डाक देण्यात कुचराई नाही करायचे. कदाचित स्वामींना आरामही पडला असेल एव्हाना. माणसं चिंतातूर होतात म्हणून छत्रपतींनीच खलिते दिले नसतील."

"तसं असेल तर साखर पडो तुमच्या तोंडात. पण मनासारखा खेळ्या जगात दुसरा नाही. नको त्या शंकांचा खेळ खेळतो तो. आम्हाला रायगडाशिवाय दुसरं काही सुचत नाही. त्यांची खुशाली कानी पडेतो आम्हाला चैन नाही." जडावल्या पायांनी संभाजीराजे कोकणदरवाज्याची एक एक पायरी चढत माळवदावर आले.

"विठ्ठलपंत, शृंगारपुराहून आमच्या चिटणीस परशरामपंतांना बोलावून घ्या." काहीतरी मनी योजून संभाजीराजांनी आज्ञा केली.

"तसं लिखाणाचं काही कामकाज असल्यास गडाचे चिटणीस आहेत. तेव्हा ..." मनोमन चमकल्या विठ्ठलपंतांनी घोळ धरला.

"आम्ही सांगतो तेवढंच करा. दोन दिवसांत परशरामपंत गडावर आमच्यासमोर रुजू झाले पाहिजेत." करडी नजर विठ्ठलपंतांवर रोखली गेली. तिला नजर देणे विठ्ठलपंतांना पेलले नाही. "जी." म्हणत त्यांनी सुटका करून घेतली.

"पंडित, आमचे रायाजी-अंतोजी परतेपर्यंत आम्ही असेच टांगते राहणार." माळवदाच्या दगडी तटावर तळहात टेकीत संभाजीराजांनी न दिसणाऱ्या रायगडाच्या रोखाने नजर जोडली.

"युवराजांनी धीर धरावा. भावेश्वरीच्या प्रसादानं सर्व ठीक होईल." उमाजी पंडितांच्या तोंडून भावेश्वरीचे नाव निघताच संभाजीराजांना शृंगारपूरचा वाडाच समोरच्या क्षितिजकडेत दिसू लागला. एका विलक्षण विचाराची चिरती कळ त्यांच्या काळजात सरकली – "शृंगारपुरात आपणहून, बंदिवास पत्करलेल्या आमच्या युवराज्ञी, बंदिस्त रायगडावर आजारी पडलेले आबासाहेब, नगरच्या किल्ल्यात कोंडून पडलेल्या आमच्या अक्कासाहेब आणि दुर्गाबाई... आणि इथं कुणासाठीही काहीच न करता येणारे, आबासाहेबांच्या शब्दांनी जखडलेले, साऱ्यांच्या चिंतेनं कोंडलेले ... बंदिवान झालेले आम्ही ... काय स्थिती ही ! तोडावा – या क्षणी आबासाहेबांचा शब्द तोडावा. पन्हाळा सोडून थेट रायगड गाठावा. ते बोलतील ते ऐकण्यासाठी का होईना त्यांचं दर्शन घ्यावं. नाही ऽ नको. आमच्या दर्शनानं आबासाहेबांना आराम पडण्याऐवजी वेदनाच होतील. काहींच्या कपाळी आम्हाला बघताना आठ्या चढतील. बघवणार नाहीत त्या आम्हाला."

तिकडे रायगडावर छत्रपतींनी जबानीवर घेतलेल्या बाळाजी आवजींनाही आपल्या स्वामींच्या कपाळी धरलेल्या आठ्या बघवेनात. ज्वर चढलेले, डोळे लालावलेले महाराज त्यांना विचारत होते – "ही चिटणिसी केलीत हयातभर ? आम्ही तुम्हाला युवराजांना, मोरोपंतांना, सरलष्करांना खलिते देण्यास बजावले होते. अंगी ज्वर असता मायने-मजकूर सांगितले होते. एकाही खलित्याचा जाब येत नाही याचा मतलब काय ? ही माणसे मुजोर झाली की तुम्ही चुकार झालात ?"

गोंधळलेल्या, भयकातर बाळाजींनी आपल्या कुळदैवताची शपथ घेत जाब दिला, "स्वामींनी विश्वास धरावा. आम्ही खुद्द आमच्या हातानं खलिते सिद्ध करून स्वारांना सुपूर्द केले आहेत. सर्व त्या सूचना जातीनं दिल्या आहेत."

"मग जाब का येत नाही कुणाचा ? कुणी भेटीला का येत नाही आमच्या ?"

गोंधळलेल्या चिटणीसांना या प्रश्नाचे उत्तर देता येत नव्हते. देता येणारच नव्हते.

सोयराबाईंनी आपली माणसे गडाचा चित्तदरवाजा, पालखी दरवाजा, नाणे दरवाजा सर्व दरवाज्यांवर पेरून ठेवली होती. थैलीस्वारांकडचे खलिते त्यांनी मध्येच दस्त केले होते. फक्त स्वार गडाखाली उतरले होते. आपापल्या गावाकडे निघून गेले होते. कारण ते सारे तळबीड भागातील महाराणींच्या माहेरचे होते.

बाळाजी आवजींनी सिद्ध केलेले खलिते थैल्यांनिशी तसेच सातमहालात महाराणींच्या महाली टाळेबंद झाले होते !

बाळाजींना बगलेला टाकण्यासाठी पुढे येत मानभावीपणे सोयराबाई म्हणाल्या, "यात बिचाऱ्या चिटणीसांचा कसूर तो काय ? स्वारी कशी उमेद धरतेय की पन्हाळ्याहून जाब येईल वा युवराज जातीनं येतील इथं ? एवढी कदर असती तर साऱ्यांना पारखं होऊन ते गनिमाच्या गोटात जातेच कशाला ? पेशव्यांना-सरलष्करांना तर स्वारीनंच मोहीमशीर धाडलंय. त्यांचा तळ कुठं पडलाय कसं सांगणार ? येतील ते. धीर धरावा. आपले बाळराजेही विचारताहेत 'आमचे दादामहाराज कुठं आहेत म्हणून.' काय सांगायचं यांना ?" सोयराबाईंनी रामराजांना जवळ घेत छत्रपतींच्या पुढे केले.

आडव्या आलेल्या महाराणींना तिवड्यावर घेण्यासाठी महाराजांनी प्रश्न केला, "पाचाडच्या राणीसाहेब तर कुठं मोहिमेवर नाही गेल्या ? का त्याही गनिमाच्या गोटात दाखल झाल्या ? तुम्हाला त्यांना बोलावून घ्यायला सांगितलं होतं आम्ही."

"आम्ही माणसं पाठविली होती पाचाडात. स्वारी अंथरुणावर आहे याची धाकट्या बाईंनी एवढी हाय घेतल्येय की त्यांनीच अंथरूण धरलं आहे !" सोयराबाई शब्दही न पाडता चक्क खोटं बोलल्या. नाकगड्डा चिमटीच्या पकडीत घेत, हताश छत्रपती 'जगदंब, जगदंब' असे पुटपुटत मंचकावर लेटले.

रायगडावर एक भयानक कारस्थान शिजू लागले. त्याच्या सूत्रधार झाल्या महाराणीपदाच्या अखत्यारीत गड ताब्यात घेतलेल्या प्रत्यक्ष महाराणी सोयराबाईसाहेब !

लक्ष्य झाले महाराज आणि संभाजीराजे. हेतू झाला रायगडचे सुवर्णी सिंहासन. मोरोपंत, आण्णाजी, बाळाजी ही तालेवार सेवाभावाची माणसे आता बाहुली होणार होती.

मनामनांचा मेळ पाडून, अपार कष्ट उपसून, कैक जिवाभावाचे लाख मोलाचे मोहरे खर्ची घालून, प्राणबाजीने छत्रपतींनी जमविलेला मराठी दौलतीचा शतरंज, पटासकट उधळण्यासाठी सोयराबाईंनी आपला पाताळयंत्री हात चालविता केला होता. महाराणीपदाच्या अधिकारात !!

खानसाम्यानं सज्जाकोठीत समोरच्या चौरंगावर ठेवलेला जेवणाचा थाळा, महाराजांच्या आठवणीमुळे तसाच परता सारीत संभाजीराजे उठले. गेले दोन दिवस ते असेच थाळे दूर सारीत आले होते.

कोठीत उभ्या असलेल्या रायाजी-अंतोजीने त्यांच्याकडे कळवळून बघितले. त्या गाडेबंधूंनी पाचाडात चार दिवस तळ ठोकून रायगडावरची खबर उचलण्यासाठी जंग-जंग पछाडले होते. वारा-उजेड आणि रानपाखरे यांशिवाय गडावर कुणाचाही शिरकाव होत नव्हता! महाराजांना बघण्यासाठी नागपूरहून आलेले साबाजी भोसलेही पाचाडात अडकून पडले होते.

"चिटणीस, आम्हास काही कळेनासं झालं आहे. आबासाहेबांनी गडाचे दरवाजे बंद करण्याची आज्ञा का फर्मावावी ? आम्ही – आम्ही रायगडी येऊ अशी धास्त वाटत असावी त्यांना." शृंगारपूरहून आलेल्या चिटणीस परशरामपंतांना संभाजीराजे चिंतेने म्हणाले.

"आम्हाला नाही वाटत स्वामींनी ही आज्ञा केली असेलसे."

"इतर कुणाची शामत आहे राजधानीचे राबते दरवाजे बंद करण्याची ?"

"बोलू नये. पण – पण महाराणी हे करू शकतील." पूर्ण विचाराने परशरामपंतांनी अंदाज दिला.

"काय म्हणता तुम्ही ? महाराजसाहेब जातीनं गडावर असता त्या हे करतील ?"

"स्वामी पडून आहेत."

"तरी ते स्वामी आहेत. आम्ही जाणतो आबासाहेबांना."

"पण युवराज, विसरणं होतंय, स्वामी – स्वामी असले तरी महाराणी – महाराणी आहेत !"

"छे ऽ ! पंत, आज जिवाला नाकळती हुरहूर ग्रासून टाकते आहे. हनुमान-जयंती आहे. चला, रामभक्ताचं दर्शन करू."

सैरभैर झालेले संभाजीराजे परशरामपंतांना पाठीशी घेत सज्जाकोठी उतरले. बालेकिल्ल्याच्या उत्तरेस असलेल्या, महाराजांनी प्रतिष्ठापना केलेल्या हनुमानाच्या घुमटीजवळ आले. शेंदराचा तवाना लेप दिलेली आतील मूर्ती बघताच त्यांना वाटले –

"त्या पावन लेपावर तळहात फिरवून त्यानं मळवट भरून घ्यावा. उड्डाणी पवित्र्यात असलेल्या वायुपुत्राला विचारावं. आजचा दिवस तुझा. आज आकाशी घेण्याऐवजी रायगडी उड्डाण घेशील काय ? आमच्या आबासाहेबांच्या तब्येतीस आराम पडल्याची परती खबर आणशील काय ?"

मनच्या कढाने वायुपुत्राशी मूकपणाने तळमळून बोलणाऱ्या संभाजीराजांना काही सुद्धा कल्पना नव्हती की तिकडे चैत्री पुनव असूनही उभ्या रायगडाला अवसेचा काळाकुट्ट काळलेप चढत होता ! गेले दोन दिवस गडाच्या मुदपाकखान्याची चुलवाणेही पेटली नव्हती.

□ □ □

११

आज पहाट धरूनच पन्हाळगडावर, खबर कोसळली होती. रायगडाने दाबून ठेवण्याचा कडेकोट कट बांधला होता तरी पाचाडहून पुतळाबाईंमार्फत आणि कऱ्हाड प्रांतातील तळबीडच्या तळावरून हंबीररावांमार्फत ती पन्हाळगडावर पोचली होती.

पुतळाबाईंनी खासा हारकारा धाडून कळविले होते, "आज ऐन माध्यान्ही आवस झाली. आमचे कुंकूबळ थकले. तुम्हा-आम्हाला उघडे टाकून स्वारी सुख झाली. गडावर गैरमेळ पडला आहे. अंतकाली स्वारींना मंत्राग्नी तोही पावला नाही. बुध फिरल्याने भडाग्नीवर सांगता झाली आहे! प्रसंग बाका आहे. धीर रक्षून असणे. जे करणे ते सावध चित्ती विचाराने करणे. माणसे पुरी पारखून जवळ धरणे. आम्ही तुमच्या वाटेला डोळे जोडून आहोत. आई जगदंबेच्या इच्छेवर अन्य जोर नाही. उदंड बोलणे आहे ते भेटीत."

हंबीररावांनी कळविले होते, "धनी दौलतीला पारखे झाले. आम्ही रायगडी कूच करतो आहोत. काळीज टाकू नगा. आम्ही पाठीशी आहोत."

जिव्हाळ्याच्या माणसांनी 'धीर टाकू नको' म्हटले तरी धीर खचावा असाच प्रसंग आला होता. चालते-बोलते, हसऱ्या मुखाचे आबासाहेब आता या जगात नाहीत हे सत्य मानायला संभाजीराजांचे मनच घेईना. कितीही हापसले तरी दर्याकाठच्या वाळूतील खड्ड्यांचे पाणी हटता हटत नाही, तशा न हटणाऱ्या आठवणीच आठवणी त्यांच्या मनात दाटून येऊ लागल्या. एखाद्या प्रसंगी, सर्व बाजवांनी आयुष्याचे केवळ फोलपणच माणसाला जाणवते. तसेच ते संभाजीराजांना जागवू लागले. नियतीचा सर्वांत जबर तडाखा खाल्लेले संभाजीराजांचे बंबाळ मन चौवाटांनी सैराट धावू लागले. शोक, खंत, विरह, असहाय्यता, संताप, उपेक्षा, अवमान, उद्वेग या विचित्र भावनांचे अनावर कढ उकळू लागले.

"गेले ऽ – आबासाहेब गेले ऽ! न भेटता-बोलता, आमचीच हाय खाल्ली त्यांनी. पहाडासारखा पुरुष आमच्याच करणीनं काळीजदेठात खचला. आम्हाला सर्वांत कडी सजा फर्मावून गेला ... आबासाहेब, आप्तगण असून फसवून गेलात! का! कसे?"

"शरम – शरम वाटते तुमची आम्हाला' असं कडवं सुनावण्यासाठी तरी एकवार दर्शन द्यायचं होतंत आम्हास!

"गडाचे दरवाजे बंद करणाऱ्या शहाण्यासुरत्यांनो, गडावर पालाण घालायला तेवढंच

कसं रे विसरलात? जौहरचा वेढा फोडणारे, आग्रा कोठीतून निसटलेले आबासाहेब वरच्यावर हूल देतील हे ध्यानी कसं आलं नाही तुमच्या? कसली पुण्याई गाठीशी बांधलीत ही?

"आता कुणाच्या तोंडून शंभूराजे – लेकरा' अशी चिंब मायाभरली साद आम्ही ऐकावी? साक्षात अष्टभुजा भवानीच समोर उभी करणारा 'जगदंब' हा आईचा बोल आता कुणाच्या तोंडून आमच्या कानी पडावा? कुणाची पायधूळ आम्ही मस्तकी धरावी? त्या मावळमाचीवर कुणासोबत उभं राहून पाचाडच्या सदरेचं दर्शन घ्यावं? कशासाठी आता आम्ही रायगडाचं तोंड बघावं? सिंहासनासाठी? त्या दगडधोंड्याच्या दौलतीसाठी? छे ऽ होणं नाही!

"कसली माणसं वावरताहेत रायगडावर? ज्या आबासाहेबांनी मावळ्यांना 'हर हर महादेव' हा मरणाचा महामंत्र दिला त्यांना अंती मंत्राग्नीही दिला नाहीत! अरे, तुम्ही दिलेला भडाग्नी इथं आमच्या उरात भडकतो आहे! आलो तर त्यासाठीच येणार आहोत आम्ही रायगडी – हिसाब-पावता करायला.

"मराठी दौलतीचे छत्रपती म्हणजे पोरखेळ वाटला की काय तुम्हाला? त्यांना खुशाल प्याद्या-फर्जांनी कोंडून टाकावं? तो इमानदार रायगड ढसढसला असेल तुमच्या साऱ्या करण्या बघून!

"आम्ही आबासाहेबांच्यावर रोष धरला होता तो साफ साफ होता. उघड होता सूर्यप्रकाशाएवढा. पडत्या क्षणांनी आम्हाला वाहतीला लावलं तरी थोर दिलानं त्या जाणत्या पुरुषानं आम्हाला छातीशी लावलं. त्यांना दिल्या यातनांच्या पश्चात्तापातून आम्ही बाहेर पडतो न पडतो तोच आमचं, आमचं समजून घेणारं एकटं स्थान असलेले आबासाहेबच आमच्यापासून छिनावलेत! शोकाच्या दरीत फेकलंत आम्हाला? कसं फेडाल हे? त्याचाही एक नमुना दावला पाहिजे कम्बख्त असतील त्यांना! कशासाठी आलो आम्ही युवराज म्हणून जन्माला? दाबल्या तोंडी बुक्क्यांचे तडाखे खाण्यासाठी? हे असे जन्मदात्याला शेवटच्या क्षणी पारखे होण्यासाठी?

"थोरल्या आऊ, तुम्ही असतात तर, आमचं पोरकं तोंड तरी आम्ही तुमच्या कुशीत ठेवलं असतं. पण – पण त्या असत्या तर त्यांनाच या प्रसंगी थोपटून शांत करण्याचा प्रसंग येता आमच्यावर! नाही ऽ! आमच्या थोरल्या आऊसाहेब गेलेल्या नाहीत! दगडी काळजाचा मृत्यूही त्यांना नेऊ शकत नाही! आम्ही स्पष्ट ऐकतो आहोत त्यांचे बोल – 'शंभूबा ऽ ळ, युवराज, शांत व्हा! धीर ठेवा.' त्यांचे आकाशी हात आमच्या पाठीवरून फिरताहेत. प्रत्यक्ष आबासाहेबच आपल्या हातांनी आपली लाडकी भवानी तलवार आमच्या कमरेत आवळताहेत! थोरल्या आऊ हसल्या मुखी सरशीनं आमच्या कपाळी शिवगंध रेखताहेत! तळहाती दह्याच्या कवड्या ठेवताहेत! नाही ऽ आम्ही शोक करणार नाही. पोरकं मानणार नाही स्वत:ला. त्या असंख्यांची कुरवंडी करून उठविलेल्या

'श्री'च्या राज्याला उघडं पडू देणार नाही. ही दौलत कोत्या, कारस्थानी हातांखाली कदापिही जाऊ देणार नाही. पाचाडच्या मासाहेब, आम्ही सावध झालो आहोत. आबासाहेबांचा भगवा जरीपटका आम्ही घेतला आहे खांद्यावर! आता आण आहे ती त्यांची आणि भवानीची.

"जी काळीज तोडणारी जीवघेणी खंत आम्ही आबासाहेबांना दिली तिची भरसक भरपाई करणार आहोत आम्ही. प्रसंगी कुडी ठेवण्याची सजा पत्करूनही! कसला सिद्दी, कुठला टोपीकर आणि काय जातीचा औरंग आहे, ते बघणारच आहोत आम्ही!"

छातीवरच्या कवड्यांची माळ संभाजीराजांच्या मुठीत एकदम घट्ट आवळली गेली.

खंबीर मनाने, शांत हाताने त्यांनी सुखदालनाचा आडबंद परतवून दरवाजा खोलला. नवा रानवारा झपकाऱ्याने आत आला. बाहेरची हवालदिल माणसे युवराजांच्या सुजवट झाल्या डोळ्यांकडे बघतच राहिली. आता त्या डोळ्यांचा माग तसा सहजासहजी कुणालाच येणार नव्हता. रायगडावर लुप्त झालेले शिवपण त्या डोळ्यांच्या खोलवटीत अल्लाद पावलांनी उतरले होते!

"चिटणीस, चंद्रास खळं धरतं ते केवळ महापुरुषालाच आपत्तिकारक नसतं. ते त्याच्या स्वप्नालाही घेर पडणार याचं सूचक असतं!" समोरच्या परशरामपंतांना संभाजीराजे विचारात टाकीत म्हणाले.

"रायाजी-अंतोजी, आज गडाची सांजनौबत ऐकलीत तुम्ही?"

"न्हाई." गोंधळला जाब आला.

"मतलब किल्लेदार विठ्ठलपंतांना महाराजांची खबर पावली आहे! तरीही ते आम्हाला भेटून ती कानी घालीत नाहीत! नजर ठेवा त्यांच्यावर."

संभाजीराजांकडे सारे बघतच राहिले. बालेकिल्ल्यात या वेळी विठ्ठलपंत रायगडाहून आलेल्या हिरोजी फर्जंद आणि सोमाजी बंकी यांच्याशी कानगोष्टी करण्यात गढले होते! सोयराबाईंनी रायगडाचा बंदोबस्त कान्होजी भांडवलकर आणि शहाजी भोसला सरनोबत यांच्या हाती दिला होता. जामदारखाने, दफ्तरखान्यांना आपल्या मोहरा ठोकल्या होत्या. हिरोजी फर्जंद आणि सोमाजी बंकी यांना पुढील व्यवस्थेसाठी विठ्ठलपंतांना पोचवायचा कानमंत्र देऊन दिंडीदरवाज्याने रायगडाहून पन्हाळ्याकडे पिटाळले होते.

शतरंज खेळीला पडला – पन्हाळ्याकडून संभाजीराजांचा आणि रायगडाहून सर्व सूत्रे आपल्या हाती घेतलेल्या महाराणी सोयराबाई आणि त्यांचे हस्तक यांचा!

महाराजांचे रक्षासंवर्धन झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी कोकणपट्टीतून आलेले आण्णाजी दत्तो रायगड चढून आले. सांत्वनासाठी महाराणींची भेट घ्यायला ते सातमहाली त्यांच्यासमोर रुजू झाले. रिवाजांची बोलणी होताच सोयराबाईंनी मतलबाला हात घातला – "स्वारी गेली. पुढील निर्गत काय याची धास्त पडली आहे आम्हास."

"त्यासाठीच आम्ही एकधावेनं राणीसरकारांच्या सेवेत तातडीनं रुजू झालो आहोत. आपण सांगाल त्याचाच पाठपुरावा करू आम्ही. धीर ठेवावा." आण्णाजी मान लववीत म्हणाले.

"तुमचा इतबार आहे आम्हाला. पण इतरांचं काय? आता पन्हाळा केव्हाही उचल खाईल. मोरोपंत, प्रल्हाद निराजी, राहुजी आणि महत्त्वाचे ते सरलष्कर त्यांचं काय?"

"सरलष्कर सरकारांचे बंधूच आहेत. ते रामराजांच्या पाठीशी मामासाहेब म्हणून उभे राहतील असा आम्हाला विश्वास वाटतो. इतरांची आम्ही समजूत पाडू. युवराज रायगडी स्वामी म्हणून येण्यात धोका आहे. जे करणं असेल ते तातडीनं आणि गुप्तपणं करावं लागेल. बाळराजांना मंचकारोहण करून कारभारी सूत्रे महाराणींनी आपल्या हाती घेतल्याखेरीज राज्याची बरी निर्गत लागणार नाही. या वेळी आपण खंबीरपणं धीर बांधून असावं."

"आम्ही खंबीरच आहोत. तुम्ही अवघ्यांसह बाळराजांच्या पाठीशी असा म्हणजे झालं."

"कुलदैवताच्या आणभाकेनं आम्ही ते करू. निर्धास्त असावं."

सोयराबाईंच्या राजगळाला आण्णाजी हा हिकमतीचा व प्रधानमंडळातील सर्वांत सुळसुळता मासा लागला. हा मासा जाळ्यात फसणारा नव्हता. आपल्या अजब अक्कलहुशारीने जाळे विणणारा होता! छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र असता, युवराज असता संभाजीराजांना बगलेला टाकून रामराजांची गादीवर स्थापना करण्याचा घाट आण्णाजींनी का घालावा? त्याला अनेक कारणे होती. एकतर आपल्या घरची गोदावरी ही स्त्री संभाजीराजांच्यामुळेच नाहक खर्ची पडली हा ठाम सल त्यांच्या मनातून हलता हलत नव्हता. तसाच धारावसुलीच्या आपल्या तर्फेच्या अधिकारात युवराजांनी वेळोवेळी हस्तक्षेप केल्याचा त्यांना राग होता. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संभाजीराजांच्या हाताखाली सुरनिशी चालू राहील की नाही, चालू राहिली तरी पुऱ्या अधिकाराने राबविता येईल की नाही, ती कायम हाती टिकेल की नाही याची त्यांना शाश्वती नव्हती. रामराजे स्वामी होण्यात मात्र तेच महाराणीचे प्रमुख सल्लागार राहणार असण्याची शक्यता होती.

सोयराबाई तर संभाजीराजांच्या मागे महाराजांच्या राज्याभिषेकापासूनच हात धुऊन लागल्या होत्या. शत्रूचा शत्रू तो मित्र या न्यायाने सोयराबाई आणि सुरनीस आण्णाजी दत्तो यांची हातमिळवणी ओघानेच झाली.

संध्याकाळी नासिक-त्र्यंबक भागातून आलेले पेशवे मोरोपंत रायगडावर आले. तेही महाराणींच्या भेटीसाठी सातमहालात रुजू झाले. महाराजांविना सुना-सुना वाटणारा बालेकिल्ला बघून त्यांच्या मनात कालवाकालव दाटली होती. सांत्वनाचे चार शब्दही त्यांना महाराणींना सांगवेनात. तोंडावर उपरणे घेत ते लहान मुलासारखे कोंदटते गद्गदले.

त्यांचा उमासा सुमार होताच सोयराबाई त्यांना म्हणाल्या, "तुम्हीच असा धीर टाकलात तर आम्ही कुणाकडं बघावं पंत? या बाळराजांना कोण देणार पाठबळ? आम्ही तर उजाडच झालो. काय करावं समजेना झालं आहे!" सोयराबाईंच्या शब्दाशब्दानेच मोरोपंतांच्या पोटात रायगड चढतानाच पडलेला खड्डा दुणावत चालला. डोळे टिपून मान लववीत ते बांधील बोलले, "खाशांनी काळीज टाकू नये. आम्ही पाठीशी आहोत."

"तोच आधार आहे. तुमच्याकडून हीच उमेद राखून आहोत आम्ही. आण्णाजींची भेट घ्या. जे करणं ते त्यांच्या तुमच्या एक विचारे करा. आम्ही काय सांगणार?" जे सांगायचं होते ते सांगूनही सोयराबाई नामानिराळ्या झाल्या!

'एकविचार' पूर्वीच झाला होता. सोयराबाई आणि आण्णाजींचा! प्रधानमंत्री असलेल्या मोरोपंतांना त्यात कसबाने सामील करून घेतल्याशिवाय एकही पाऊल पुढे टाकता येणार नव्हते. शेवटी मोरोपंत दौलतीचे शिक्केधारी पंतप्रधान होते.

उदास–उदास रायगडावर खिन्न काळी रात्र उतरली. ती उजळायला असमर्थ असलेले टेंभे शिलगले. मंत्रिवाडीतील आण्णाजींच्या वाड्यात मोरोपंत आणि आण्णाजींचा मध्यरात्रीपर्यंत खल चालला. दुमन झालेले मोरोपंत पक्क्या निर्णयाला येत नव्हते. आण्णाजी आपल्या बुद्धीचे सारे कसब पणाला लावून रामराजांचा पक्ष त्यांच्या गळी उतरवीत होते. मोरोपंतांनी जरी ठाम निर्णय अद्याप दिला नव्हता तरी त्यांचाही कल अम्मळ रामराजांकडे झुकला होता.

वद्य पंचमीच्या दिवसफुटीला रात्रभर पाचाडात मुक्काम केलेले हंबीरराव रायगड चढू लागले. ते पुतळाबाईंची भेट घ्यायला विसरले नव्हते. महाराज आजारी पडल्यापासून काय काय नि कसे घडत गेले याचा तोंडवळा त्या भेटीत हंबीररावांना उमगला होता. महाराज गेल्याचे जेवढे दुःख त्यांना वाटले होते तेवढेच महाराणींची बुद्धी पालटल्याचे. त्यांच्या मागाने इमानाची माणसे परतत असल्याचे त्यांना वाटले.

गडावर येताच हंबीरराव महाराणींच्या भेटीसाठी सातमहालाच्या दरुणीदालनात दाखल झाले. त्यांना बघताच श्वेतवस्त्रधारी सोयराबाई फुटफुटून रडल्या. महाराजांच्या आठवणीनं हंबीररावांचे डोळेही पाघळू लागले. एवढा पहाडदिल नेटाक गडी पण धन्यांच्या आठवानं लहान बच्चागत हुंदकला. रामराजांना जवळ घेत सोयराबाई घोगरे म्हणाल्या, "आमचं एक राहू द्या. तुमच्या या भाच्यांना– बाळराजांना कुणी धीर द्यावा? बरं झालं तुम्ही गडावर आलात ते. आमचा घोर थोडा तरी मिटेल आता, नाहीतर एवढ्या दौलतीची जोखीम कुणाच्या बळावर पत्करावी यांनी?" सोयराबाईंनी हंबीररावांना कसबानं चाचपून बघितले.

छत्रपतींचे श्राद्धकर्म होण्याअगोदरच महाराणी दौलतीचा विषय काढतील असे काही हंबीररावांना वाटले नव्हते. त्यांनाही गडावरच्या माणसांना खूप विचारायचे होते. "गडाचे दरवाजे बंद का होते? धनी पडून असताना आम्हाला साधी खबर ती का नाही

मिळाली? छत्रपतींना शेवटचा अग्निदाह भडाग्नीनं कसा काय दिला सर्वांनी?" पण हे विचारण्याची ही वेळ नव्हती हे हंबीररावांना जगल्या हयातीने शिकविले होते.

रामराजांना जवळ घेत त्यांचे खांदे थोपटीत हंबीरराव सोयराबाईंना समन्वयाचे भान देण्यासाठी म्हणाले, "ह्ये आणि युवराज म्हंजे धन्यांच्या दोन डोळ्यांगत हाईत. त्येस्नी बलवून घेऊ पन्हाळ्यावरनं. काय करायचं ते युवराज, पेशवे, सुरनीस, न्यायाधीश, येसाजी काका, तुम्ही आम्ही मिळून करू. धनी म्येल्याचं बगून चौतर्फांचा गलिम आता उचल खानार. धन्यांचं शास्त्र-धर्माचं हुंद्या सम्दं. मग ठरवू सम्दं."

सोयराबाईंनी रायगडावर बसून चार पावसाळे काढले असले तरी हंबीररावांनी मरण पाठीशी टाकून दौलतीसाठी वणवण मुलूखभर दौडत चार उन्हाळे सोसले होते! ते इमानाचे आणि बिनतोडीचे बोलले होते.

त्यांच्या मनसुब्याची दिशा ध्यानी येताच सोयराबाई सावरत सावध झाल्या. आपल्या बेतात हंबीरराव सामील होणार नाहीत हे त्यांनी ताडले. उलट हंबीरराव, हाताशी लागणारी आण्णाजी, मोरोपंत ही माणसे फोडतील या शंकेनेच त्यांच्या मनी फणा उठविला. हंबीररावांना रायगडावरून टाकोटाक दूर कसे उचलावे हा विचार घोळत असताना सोयराबाई वरवर म्हणाल्या, "आम्ही तुमच्या सल्ल्याबाहेर नाही. जे काणं असेल ते तुमच्या मसलतीनंच करू. बाळराजे, मामासाहेबांचे पाय शिवता?" सोयराबाईंनी हंबीररावांच्या मनातील रक्ताचे नाते, शेवटचा यत्न म्हणून तपासून बघितले.

पाय शिवण्यासाठी वाकू बघणाऱ्या रामराजांना वरच थोपवीत हंबीरराव म्हणाले, "नगं. ह्ये काय करता भलतंच! तुमी बाळराजं म्हून धन्यापोटी उपाजला तवाच चाकर जालो आमी तुमचं. खासगतीचं नातं तवाच सरलं. आमचा मुजरा घ्यायचा तुमी." आणि महाराणी-रामराजांना मुजरा देऊन हंबीरराव बाहेर जायला निघाले. त्यांच्या धिप्पाड पाठीवर सोयराबाईंची जळजळीत नजर पलित्यासारखी फिरली. तिने रक्ताच्या नात्याचे अंकुर जाळून टाकले. बांधल्या बेतातून सोयराबाईंनी हंबीररावांचे नाव स्वहस्ते फुली मारून पुसून टाकले.

वर्दी पाठवून त्यांनी प्रथम आण्णाजींना बोलावून घेतले आणि आपल्या सुरेल राजबोलीत त्यांना कानमंत्र दिला, "सरलष्कर पाठीशी उभे राहतील; ते होणार नाही. त्यांना आम्ही श्राद्धकर्म झालं की कऱ्हाडप्रांती कूच होण्याचा हुकूम देणार आहोत. त्यांच्यापासून बरं सावध असणं."

आण्णाजी ते ऐकताना चिंताग्रस्त झाले. पाठीशी सेनाबळ असलेल्या हंबीररावांची सरलष्कर म्हणून ताकद ते जाणून होते. तरी त्यांना विश्वास वाटला की एकदा रामराजांचा मंचकारोहण पार पडला की हंबीरराव आडवे जाणार नाहीत. त्या जोरावरच ते सोयराबाईंना म्हणाले, "आम्ही हरकोशिस करू त्यांना वळते करण्यासाठी. महाराणींनी निर्धास्त असावं. विधी होताच ते कऱ्हाडप्रांती गुंतले राहतील असं मात्र करावं!"

आण्णाजींनी मसलतीतल्या असामींना गाठून हंबीररावांचा कल सामील होण्याकडे नाही हे कानी घातले. मोरोपंत, प्रल्हाद निराजी, राहुजी सारे हंबीररावांशी भेटीगाठीत जेवढ्यास तेवढे आणि जपून बोलू लागले.

चैत्र वद्य द्वादशीला महाराजांचे श्राद्धकर्म सुरू झाले. साबाजी व परसोजी भोसले यांच्या मदतीने रामराजांच्या हस्ते छत्रपतींना पिंडदान देण्यासाठी राजोपाध्ये काळ्या हौदावर तिष्ठले होते. भवतीच्या करंज्यांच्या झाडांवर काळे पक्षी दाटदाटून कलकलाट करीत होते; पण पिंडस्पर्श घेण्यासाठी एकही उतरत नव्हता!

श्राद्धविधीच्या दुसऱ्याच दिवशी पहिल्या प्रहराला हंबीररावांना सातमहालाची वर्दी आली. ते महाराणींसमोर दाखल झाले तेव्हा तिथे येसाजी कंक, आनंदराव, मोरोपंत, आण्णाजी, प्रल्हादपंत होते. हंबीररावांचा मुजरा घेत सोयराबाई नेहमीच्या सदरी भाषेत म्हणाल्या, "या सरलष्कर, सारे तुमचीच वाट बघताहेत."

"जी."

"काही मनसुब्यानं याद केलं तुम्हाला. तुम्ही म्हणाला त्या विचारानं आम्ही बेचैन आहोत. आता गनिम चौतर्फेनं उचल खायची भीती वाढली आहे. तुम्ही जेवढे कदीम आहात ते आपआपल्या मुलखावर ठाण घेणं. आनंदराव, रूपाजी, तुम्ही सातारातर्फ जवळ करा. येसाजी, तुम्ही दहा हजारांची फौज पाचाडात एकजाग ठेवा. सरलष्कर, तुम्ही टाकीनं कऱ्हाडप्रांतावर उतरून आपला जमाव सिद्ध ठेवा. पंत, आण्णाजी, तुम्ही आपापले मुलूख जवळ करा." महाराणींचे हुकूम झेलीत "जी" म्हणत पगड्या सरासर झुकल्या.

वर होत हंबीरराव मान खोलण्यासाठी म्हणाले, "... पर इथली निर्गत कशानं कशी करायची हाय? बारदाना मोट्टा. सम्दं फुडं ध्यान देऊन व्हाय पायजे."

"ते तुम्हा साऱ्यांच्या मसलतीनं निवांत करू. या क्षणी गरज आहे ती मुलूख राखण्याची. आजच निघावं साऱ्यांनी."

"जी." हंबीररावांसह सारे हुंकारले. सोयराबाईंनी बैठक सोडली. सर्वांना विडे देण्यात आले. ही सदर हंबीरराव, आनंदराव यांना रायगडावरून बाहेर काढण्यासाठीच होती. आण्णाजी आणि मोरोपंत मागेच राहणार होते.

रायगड उतरलेले हंबीरराव कऱ्हाडच्या आणि आनंदराव साताऱ्याच्या रोखाने एकमेळाने निघाले. हंबीररावांच्या बरोबर 'एकविचाराची जाणती मसलतही' रायगडापासून दूर दूर निघाली. मागे उरली कट-कारस्थाने!

पन्हाळगडावर आबांचे श्राद्धकर्म घातलेल्या संभाजीराजांनी सोमेश्वर तलावाकाठी मांडलेल्या पिंडासमोर हात जोडून म्हटलं, "आबा, चुकलंमाकलं आमचं आहे. तुमचं आम्ही काही राहू देणार नाही." मनोमन हे म्हटले जाताच सभोवारच्या झाडांच्या घेरावरून कावळेच कावळे झेपावले. पिंड स्पर्श होतो न होतो तोच तो फस्तही झाला.

अंत्यकर्म संपताच काय होऊ घातले आहे याची स्पष्ट कल्पना असलेले संभाजीराजे भराभर सूत्रे हलवू लागले. सज्जाकोठीत समोर बसलेल्या परशमरामपंतांना त्यांनी कोकणसुभा रावजी पंडित यांना द्यायच्या खलित्याच्या मजकूर सांगितला. "रा. रा. रावजी पंडित, कोकणसुभा तर्फ राजापूर यांसी अनेक दंडवत उपरी विशेस तर्फ राजापूरकडील दिवाणी जमली रसद, दाणागोटा टाकोटाकीने इकडे पन्हाळगडी पावता होईल ते करावे. देखत पत्र जातीनिशी जमेतीसह पन्हाळ्यास हुजूर भेटीस यावे."

परशरामपंतांनी वाळू शिवरून ओली शाई टिपत खलिता बाजूस ठेवला. दुसरी वळी मेजावर उलघडती धरली.

कोठीच्या पायथ्याशी जमल्या मावळ्यांचा अस्पष्ट कलकलाट वर ऐकू येत होता. त्याच्याशी मेळ घालीत पायफेर धरून संभाजीराजे मजकूर सांगू लागले.

"राजश्रिया विराजित, सेनाधुरंधर, सकल गुणालंकृत सरलष्कर मामासाहेब मोहिते यांचे चरणांसी – युवराज शंभूराजे यांचे अनेक दंडवत उपरी विशेस –

"रायगडी तीर्थरूप आबासाहेबांचा काळ होवोन पंधरा दिवस लोटले. इकडे पन्हाळ्यास त्यांचे धर्मशास्त्राचे करणे ते आम्ही कार्यी लावले आहे. कानी आल्या खबरांवरून रायगडी माणसांचा बनाव घडतो आहे. प्रधानमंडळ अवघे एकमसलत जहाले आहे. महाराणी मासाहेब त्यास हातास धरून खलबतात आहेत. रामराजे यास मंचकारोहण करू म्हणतात. आम्हाला परके-एकले पाडू बघतात. जिवास धोका होईल असा अंदेश पैदा जहाला आहे. तुम्हाखेरीज पाठीराखा अन्य नाही. तुम्ही पूर्वील, आबासाहेबांपासोन इमानाचे. आम्ही ज्येष्ठ असता, दौलतीस गनिमांचा घेर असता आम्हास बगलेस टाकणे हा कोण मामला? कुलदैवताच्या आणभाकेने इमान बरे रक्षून असणे. आम्हास जोड देणे. जे साहेबी केले असते तैसेच करून चालविणे. तुम्ही आम्हास त्यांच्या ठायीच आहात. बहुत काय लिहिणे? जाणिजे."

शृंगारपूरच्या पिलाजीमामांनाही – "समय बाका आहे. सुभे प्रभानवल्लीची जमाव शिबंदी एकजाग करून बरे सिद्ध असणे." असा खलिता तयार झाला.

महाराज गेल्याची वार्ता ऐकून कोल्हापूर, राजापूर, मलकापूर, रांगणा, वारणखोरे, सामानगड, विशाळगड अशा भागातून रोज मावळ्यांचे तांडे युवराजांना मुजरा देण्यासाठी पन्हाळगड चढत होते.

त्यांचा ओघ बघून सावध झालेला हिरोजी फर्जंद कोकणपट्टीत निसटला होता.

जमल्या मावळ्यांतील निवडक माणसे उचलून संभाजीराजांनी किल्लेदार विठ्ठलपंत, बहिर्जी इंगळा, सोमाजी व कृष्णाजी बंकी यांच्यावर हत्यारबंद चौकीपहारे चढवून पन्हाळा पटात घेतला होता.

अक्षय्य तृतीयेच्या आदली रात्र 'उद्या काय घडणार?' याची चिंता करीत उतरली.

पन्हाळ्यावर काय घडले आहे याचा काहीच मागमूस नसलेले कटवाल्यांचे खलबत

दरुणीदालनात बसले. दालनाच्या बंद दरवाज्यावर कान्होजी भांडवलकरांच्या हत्यारबंद धारकऱ्यांचा कडेकोट पहारा फिरू लागला. आत महाराणी सोयराबाई बसलेल्या. बैठकीसमोर आण्णाजी दत्तो, मोरोपंत, प्रल्हाद निराजी, राहुजी सोमनाथ हे मंत्रिगण, हवालदार कान्होजी भांडवलकर, जासुदांचा नाईक खंडोजी, गणोजी कावळा, शहाजी भोसला असे कटवाले फेराने उभे होते.

"उदईक अक्षय्य तृतीया आहे. दिवस मुहूर्ताचा आहे. बाळराजांच्या मंचकारोहणास योग्य आहे." आण्णाजींनी सलामीची आघाडी खोलली.

ज्यांच्यासाठी हे तालेवारांचे खलबत बसले होते ते रामराजे आपल्या सुखदालनात शांत झोपी गेले होते.

"पण आण्णाजी, या मसलतीत सरलष्कर असते तर बरं होतं." मोरोपंतांनी चिंता व्यक्त केली.

"आता नसले तरी राज्याभिषेकास ते येतील असे पाचारण करू." दूरची स्वप्ने बघणाऱ्या सोयराबाई खलबत फुटू द्यायला तयार नव्हत्या.

"युवराज ज्येष्ठ आहेत. उद्या त्यांच्या ज्येष्ठपणाचं कारण पुढं करून कुणी अदावत घेतली तर काय करणार आपण? खुद्द हंबीररावच त्या विचाराचे दिसतात." मोरोपंत पुढे जे जे आडवे येणार असे वाटत होते ते ते, बोलू लागले.

"युवराज ज्येष्ठ असतील पण प्रत्यक्ष स्वामी हयात असता ते दिलेरला सामील होतात मग त्यांच्या पश्चात मस्तकी छत्र आल्यावर ते काय करतील याचा भरवसा कुणी द्यावा? स्वभाव तेज, लहरी आहे त्यांचा! कारभारी मामला आणि माणसं यांचा मेळ पाडणं नाही साधणार त्यांना." आण्णाजी जाळे विणू लागले.

"पण बाळराजे अजाण आहेत. दौलतीचा व्याप मोठा आहे." प्रल्हाद निराजी न्यायबुद्धीने बोलले.

शिवाय गनिमांचा चारी तर्फांना घेर आहे. राहुजींनी त्यांचा सूर उचलून धरला.

"बाळराजे अजाण आहेत हे तर साफच आहे. त्यांच्या नावे सिक्कामोर्तब करतील त्या महाराणीसाहेब तर जाणत्या आहेत. कैलासवासी स्वामींनी हे राज्य अजाण वयातच उभे केले तेही जाणत्या आऊसाहेबांच्या बळावर!" आण्णाजींनी सोयराबाईंचा पाट जिजाऊंच्या पंक्तीला मांडला!

"पण कैलासवासी स्वामींची अंतिम इच्छा काय होती ते स्पष्ट झाल्याशिवाय आपण करतो आहोत त्याला रयतेची मान्यता कशी लाभावी?" मोरोपंतांनी मुळाला हात घातला.

"आमच्या बाळराजांच्या लग्नकार्याला स्वारीनं पन्हाळगडी आवतन धाडलं नाही यातच त्यांची इच्छा दिसत नाही काय?" सोयराबाईंनी सुरेख पलटी मारली.

"खलिते धाडूनही युवराज रायगडी पडल्या छत्रपतींना भेटायला येत नाहीत यात त्यांचाही इरादा स्पष्ट होत नाही काय?" आण्णाजींनी त्या पलटीला जोड दिली.

"पण युवराजांनाच इथं बोलावून घेतलं आणि त्यांच्यासमोर हे मांडलं तर– कुणी सांगावं ते समजुतीनं घेतीलही!" मोरोपंत हे बोलताना चाचरले पण बोलले.

"काय बोलता तुम्ही पेशवे? त्यांना इथं इतमामानं आणणं हे आपल्या हाती निखारे ओढून घेणं आहे अंगावर! तसं घडणारच असेल तर... तर आम्ही सुरनिसीची वस्त्रं उतरून या सेवेतून मुक्त होऊ!" आण्णाजींनी हातचा बाहेर काढला.

"आणि आम्हीही आमचं महाराणीपद रायगडीच ठेवून थेट तळबीडची वाट धरू." सोयराबाईंनी त्या हातच्यात आपला बिनतोड एक मिसळला.

"स्पष्ट सांगतो आम्ही, युवराज गादीवर येण्यास पात्र नाहीत. ते स्वामी होण्यात दौलतीला धोका आहे. आम्ही स्वामींचं अन्न भक्षण केलं आहे. त्यांच्या दौलतीला गोता देण्याचं पाप आम्ही करणार नाही. रामराजे स्वामी होण्यातच राज्याचं हित आहे." आण्णाजींनी, डळमळीत मोरोपंतांना, विणल्या जाळ्यात पुरते गुंडाळले.

तरीही मोरोपंतांनी मोलाची शंका बोलून दाखविली, "हे पटतं आम्हास; पण पन्हाळगडी राहून युवराज हे स्वस्थपणं बघतील, याला मान तुकवतील असं कसं धरून चालता तुम्ही आण्णाजी?"

"वास्तविक फितव्यानं गनिमाला सामील होणाऱ्यांना स्वारीनं माफ कसं फर्मावलं याचंच कोडं वाटतं आम्हाला!" युवराज वारस तर नाहीतच पण ते 'शिक्षापात्र गुन्हेगार' आहेत हे सोयराबाईंनी आडवळणाने सुचविले.

"पंत, जे मायेपोटी स्वामी करू शकले नाहीत तेच आपणाला कठोरपणानं करावं लागणार आहे. तुमची आमची भेट होती तर जे स्वामींनी सर्वप्रथम करण्याची आज्ञा आपणाला दिली असती तेच करावं लागणार आहे." धडक घालण्यापूर्वी गवा रेडा पायखुरांनी माती उकरतो तसे आण्णाजींनी शब्द उकरून काढले.

"म्हणजे? आम्ही नाही समजलो तुम्ही काय म्हणता ते सुरनीस?" मोरोपंत गोंधळून म्हणाले.

"रामराजांना मंचकारोहण करताच फौजबंदीनं पन्हाळा घेरून युवराजांना जेरबंद करून महाराणींसमोर आणावं लागेल! त्याच करतील त्यांचा काय तो आखरी निवाडा." आण्णाजींच्या मनात साठून साठून घट्ट झालेले गरळ बाहेर पडले.

"सुरनी ऽ स –" मोरोपंत अंगभर थरारत चीत्कारले.

"होय. आम्ही पुन्हा तेच म्हणतो. युवराजांना जेरबंद करूनच आणावं लागेल. पंत, एका म्यानात दोन हत्यारं राबत नसतात. रामराजांना गादीवर बसवून युवराजांना खुलं सोडू म्हणाल तर ते तुम्हा-आम्हाला काय खुद्द रामराजांनाही सुखाची झोप लागू देणार नाहीत! सर्वांत अधिक धोका त्यांना आणि महाराणींना पोचेल. आम्ही चांगलं जाणतो युवराजांना." आण्णाजींच्या बोलण्याने मोरोपंतांसह सारे सुन्न झाले. खलबताच्या एकाच टप्प्याचा विचार सर्वांनी केला होता. आण्णाजींच्या तोंडून त्याचा दुसरा टप्पा खुला होताच सारे चमकले. गंभीर झाले.

"स्वामींच्या दौलतीच्या बऱ्या निर्गतासाठी रामराजांना मंचकारोहण करणं जसं महत्त्वाचं आहे तसं हेही अटळ म्हणून करावं लागणार आहे. धमक नसेल तर या फंदात न पडता दौलतीचं भवितव्य दैवावर सोपवून आपआपल्या वतनावर जावं सर्वांनी." आण्णाजींनी कौशल्याने सर्वांना कर्तव्याची जाण दिली.

मोरोपंतांना आता कळून चुकले की आपण दलदलीच्या पाणंदीचा निम्म्यावर फासला काटला आहे! इथून परतणे शक्य नव्हते. कारण जे 'युवराजांना बंदिस्त करू' म्हणतात ते पेशव्यांना प्रसंगी अंधारकोठडीच दाखवायला कमी कसे करतील? हे सोडून युवराजांकडे जावे तर ते बदनाम! एकच मार्ग उरेल, वस्त्रे उतरून मुक्त होणे. या बिकट प्रसंगी कै. स्वामींचे राज्य टाकून मुक्त होणे हे कसले इमान ठरेल? मोरोपंत पार गोंधळले. दलदलीची पाणंद चालण्यावाचून मार्गच नव्हता. खूप विचार करून ते बोलले, "ठीक आहे आण्णाजी! आम्ही सहमत आहोत या मसलतीला." ते ऐकताना सोयराबाईंचा चेहरा झळझळून उजळला.

मोरोपंतांच्या संमतीमुळेच बुंध्यामागून फांद्या उतराव्यात तसे प्रल्हाद निराजी, राहुजी, कान्होजी सारे या धाडशी कटाला हातजोड द्यायला तयार झाले.

जमल्या असामींचा इतबार घेण्यसाठी महाराणींच्या वतीने भवानीच्या पवित्र भंडाऱ्याची परडी फिरली! मळवट भरले गेले. कटाचे खलबत उलगले. बाहेर पडणाऱ्या कान्होजी भांडवलकरला महाराणी म्हणाल्या, "कान्होजी, बाळाजींना आम्ही तातडीनं याद केल्याचं सांगा.

"जी."

थोड्या वेळातच चिटणीस बाळाजी महाराणींच्या समोर कलमी सेवेस रुजू झाले.

"चिटणीस, आम्ही सांगतो त्या भातेनं खलिते सिद्ध करून उद्या दिवसफुटीला पन्हाळगड आणि कोल्हापूर तर्फेला आमचे विश्वासू जासूद खंडोजी नाईक आणि गणोजी कावळा यांच्या मार्फतीनंच टाकोटाक रवाना करा."

"जी." महाराणी काय मजकुराचे खलिते सांगणार याचा बाळाजींना ठाव आला नव्हता.

पन्हाळ्याला किल्लेदार विठ्ठलपंत, हवालदार बहिर्जी इंगळा, हिरोजी फर्जंद आणि सोमाजी बंकी यांना लिहा –

"येथील मसलत एक प्रकारची आहे. युवराजांस कैद करून बहुत सावधपणे असणे! स्वारी गेल्याचं वर्तमान फुटो देवो नये!"

"कोल्हापुरी जनार्दनपंत सुमंत आणि पाराजीपंत पेडगावकर यांस लिहा –

"पन्हाळ्याच्या मसलतीस विठ्ठलपंतांना कुमक करून बंदोबस्तानं असणे."

"एक खलिता दौलतीच्या युवराजांनाही द्या."

"युवराजांच्या खलित्यात मजकूर घाला – "स्वारीच्या तब्येतीस वाखा आहे. लवकरच आरोग्य होईल! भल्याबुऱ्या अफवा उठताहेत त्यावर विसंबू नये! चिंता करो

नये!" सोयराबाईंचे हे आगळे दिव्य रूप बाळाजी आवजी विस्फारल्या डोळ्यांनी बघतच राहिले! त्यांच्या तोंडून शब्द फुटेना.

"चिटणीस, आम्ही तुम्हाला सांगतो आहोत, खलिते तयार करून तुमच्या शिक्केदस्तुरीने ते आमच्याकडे आणून द्या." सोयराबाईंचा आवाज जरबी झाला.

बाळाजींनी मान खाली घातली. कसल्यातरी निर्धाराने ते म्हणाले, "आम्ही राज्याचे दरखदार. युवराज ज्येष्ठ खाविंद असता असे खलिते या हाते आम्ही कसे लिहावे? क्षमा असावी. आमच्यानं हे होणार नाही."

"काय म्हणालात? तुमच्या दस्तुराशिवाय खलिते मानले जात नाहीत म्हणून तुमचा मुलाहिजा. विसरलात आम्ही महाराणी आहोत."

"गैरसमज नसावा. घरी पुत्र आवजी आहेत त्यांना शिक्क्यांनिशी पाठवून देतो. जी घेणे असेल ती सेवा त्यांच्याकडून सरकारांनी घ्यावी. आम्हाला यात गुंतवू नये एवढीच प्रार्थना."

सोयराबाई चडफडल्या पण त्यांना चिटणिशी शिक्के हवे होते. कुणाच्याही धोंड्याने का होईना आंबा पडायला पाहिजे होता.

"द्या त्यांना पाठवून तातडीनं. या तुम्ही!" त्यांनी बाळाजींना आज्ञा केली. बाळाजी निघून गेले, आणि त्यांचे पुत्र हजर झाले.

महाराणींनी सांगितल्याबरहुकूम आवजीने खलिते तयार करून, थैलीबंद करून ते त्यांच्या हवाली सुपूर्द केले. आवजी काम संपवून निघून जाताच वर्दी देऊन सोयराबाईंनी खंडोजी नाईक आणि गणोजी कावळा या आपल्या विश्वासू चाकरांना बोलावून घेतले. त्यांच्या हाती ते खलिते देऊन सावधपणाच्या सर्व तपशिलवार सूचना त्यांना दिल्या.

खंडोजी-गणोजी बनावट खलिते घेऊन सातमहालाबाहेर पडले. आता रायगड रातकिड्यांचा अविरत कर्कश करकरीत मुरत चालला!

कोकण दरवाजा, चौदरवाजा, राजदिंडी, चारी वाटांनी रसदीचे गोण लादलेले काबाडीचे बैल फेसाटत पन्हाळा चढत होते. कोठीवान त्या गोणींच्या थप्प्या गंगा-यमुना या अंधारकोठड्यांत रचण्यात गढले होते. तट धरून कुणबी गवताच्या गंजा उठवीत होते. लोहामेटावरच्या भाल्यांसमोर फुलल्या निखाऱ्यांवर लोखंडी कांबी लाल होत होत्या. हुजूरपागेला तबीब जनावरांना झाडपाल्यांच्या रसांचे उपचार देत होते. बंदिस्त होत चाललेल्या पन्हाळ्याचा फटका टाकून संभाजीराजे रायाजी-अंतोजीसह माळवदावर आले. दूरवर दिसणाऱ्या जोतिबाच्या डोंगराचे शिखर त्यांनी निरखले. खाली दिसणाऱ्या नागमोडी गाडीवाटेला नजर दिली. कालच्या अक्षय्य तृतीयेची लग्नकार्ये उरकून सवारी बैलगाड्या परतत होत्या. जोतिबाच्या डोंगराच्या रोखानं हात जोडत संभाजीराजे पुटपुटले, "मल्हारीचं चांगभलं!" मावळतीला कललेल्या सूर्यानं डोंगरी कड्यांच्या सावल्या पठारी मुलुखावर उतरविल्या होत्या.

एकाएकी संभाजीराजे माळवदाच्या कठड्याकडे पुढे सरकले. डोळे आक्रसत चौ-दरवाज्यात शिरणाऱ्या वळणदार वाटेकडे एकटक निरखून बघू लागले. त्यांची उजवी भिवई कमानी बाक घेत वर चढली. दोन घोडेस्वार चौ-दरवाज्याकडे सरकत होते. जिनांवरूनच संभाजीराजांनी ताडले की घोडी पाचाडच्या हुजूरपागेची आहेत!

सर्रकन् वळते होत कोठीचा जिना जवळ करण्यासाठी झेपावत ते म्हणाले, "रायाजी-अंतोजी, आमच्या मागानं या." दोन दोन पायऱ्या मागे टाकीत ते कोठी उतरलेही. मोतद्दाराला हात इशाऱ्यानं त्यांनी जनावर पागेबाहेर घ्यायला सांगितले. तो जनावर घेऊन येताच लगबगीने त्याच्या हातचे कायदे आपल्या हाती घेत एका झेपेतच युवराजांनी मांड घेऊन घोड्याला टाच भरली. आघाडीच्या टापा उचलून घोडे खिंकाळले आणि बाणासारखे चौ-दरवाज्याच्या रोखाने सुटले. गोंधळलेले रायाजी-अंतोजी त्यांच्या टापांवर पाठोपाठ दौडू लागले.

चौ-दरवाजा येताच कायदे फेकून संभाजीराजांनी जनावर सोडले. दरवान देत असलेल्या मुजऱ्याकडे त्यांचे ध्यान नव्हते. समोरच्या वाटेला डोळे भिडले होते.

वळण तोडून घोडेस्वार चौ-दरवाज्यात आले. समोर प्रत्यक्ष संभाजीराजेच खडे असलेले बघताना त्यांच्या काळजाचे पाणी पाणी झाले. पोटात खड्डाच पडला त्यांच्या. कायदे धरले हात ताठरले. पायउतार होण्याचेही भान त्यांना राहिले नाही.

ते सोयराबाईंचे, रायगडाहून निघालेले विश्वासू जासूद खंडोजी नाईक आणि गणोजी कावळा हे होते! दोघेही लटलट कापू लागले.

"कुठून आलात?" चौ-दरवाज्यातून कोरडा फुटला.

कसेतरी पायउतार होत मुजरा भरताना खंडोजी म्हणाला, "जी. कोल्हापुरास्नं."

"मतलब?" घोड्यांची जिने नीट निरखीत संभाजीराजे गर्जले.

"जी. न्हाई. रायगडास्नं कोल्हापूरला. कोल्हापुरास्नं इथं." प्रसंग ओळखून गणोजीने खंडोजीचे बोलणे दुरुस्त केले.

संभाजीराजांनी टोप घातला होता तरी त्यांचे मुंडण झाले मस्तक ओळखू येत होते. ते दृष्टीस पडताच खंडोजी-गणोजी चरकले.

"रायगडाची कोण खबर आणली आहे?" संभाजीराजांच्या सवालाला जाब न देता खंडोजी-गणोजी एकमेकांकडे टकमक बघू लागले. थरथर कापू लागले.

"असे बघताय काय? बोला सिताब."

भेदरल्या जासुदांची जबान खुलेना. काय करावे ते त्यांना सुचेना.

"राया ऽ जी, या हरामजाद्यांची फटक्याखाली चामडी लोळवा. आत्ता खुलेल यांची जबान."

त्या शब्दांनीच खंडोजी-गणोजीच्या उभ्या अंगभर काटा धरला.

"नगं. नगं धनी, आमास्नी अबय द्यावं." म्हणत खंडोजीनं संभाजीराजांच्या पायांवर सरळ लोळण घातली. त्यांच्या मागोमाग गणोजीही आडवा झाला.

"उठा ऽ, तुमच्या केसासही धक्का लागणार नाही. पण काय घडलं आहे ते बरं तपशिलानं आम्हास सांगा."

खंडोजीनं बाराबंदीआड छातीशी लपविलेली किल्लेदार, हवालदारांना द्यायची थैली थरथरत संभाजीराजांच्या पायाशी ठेवली! गणोजीने आपल्याजवळची युवराजांसाठी असलेली दुसरी थैली तिच्या शेजारी ठेवली. दोन्ही जासूद ओंजळीत मुखडे खुपसून हमसू लागले. खंडोजीने ठेवलेली थैली उचलून खलित्याची वळी बाहेर घेऊन संभाजीराजे वाचू लागले. शब्दाशब्दांगणिक त्यांच्या नाकपुड्या फुलत चालल्या. छातीचा भाता वरखाली होऊ लागला. डोळ्यांतून संतापाच्या ठिणग्याच ठिणग्या उधळू लागल्या.

"युवराजांस कैद करून बहुत सावधपणे असणे!" हा मजकूर वाचताच खलित्याची गपकन मूठ भरत ते रायाजी-अंतोजीही भेदरून जावेत असे गर्जले, "कुणाची माय व्याली आहे आम्हास कैद करण्यास? ही मजा ऽ ल..."

दुसऱ्या खलित्यातील– "लवकरच आरोग्य होईल." हा मजकूर वाचताना तर महाराजांच्या आठवणीने त्यांचे ओठ थरथरले. डोळे डबडबले. तो पुण्यपुरुष जाऊन पंधरवडा लोटला तरी ही निस्संग माणसे स्वार्थासाठी त्याला 'आरोग्य होईल' म्हणताहेत! "आबासाहेब, काय वाटणीला यायचं बाकी राहिलंय तुमच्या?" संताप, उबग, कीव, शोक अशा भावनांच्या लाटाच लाटा संभाजीराजांच्या मनात उसळून धिंगाणा घालू लागल्या. आपण युवराज आहोत, चौ-दरवाज्यात उभे आहोत हे न विसरून आवंढा गिळून संभाजीराजांनी आज्ञा फर्मावली, "अंतोजी, त्या किल्लेदार, हवालदार सोमाजीला घेऊन या इथं. रायाजी, आमच्या परशमरापंतांना जरा बोलावून घ्या. जयद्रथांना जरा सूर्य दावावा म्हणतो आम्ही."

"कोल्हापुरी का गेला होता तुम्ही?" युवराजांनी प्रत्येक बाब तपासून घेण्यासाठी समोरच्या खंडोजी-गणोजीला विचारले.

"असलंच खलितं जनार्दनपंत आन् पेडगावकरांस्नी पोच करून आलो आमी." खंडोजीनं सत्य ते रुजू घातले. ते ऐकताना संभाजीराजांच्या समोर सुमंत जनार्दनपंत आणि पाराजीपंत पेडगावकरांच्या मुद्रा फिरून गेल्या.

बालेकिल्ल्याच्या रोखाने धारकऱ्यांच्या घेरात घालून अंतोजी– विठ्ठलपंत महाडकर, बहिर्जी इंगळा, सोमाजी बंकी, त्याचा मुलगा बापूजी, सूर्याजी काळे यांना घेऊन आला.

सज्जाकोठीच्या मार्गानं रायाजी– परशमरापंत आणि उमाजीपंतांसह आला. सर्वांच्या चर्येवर आश्चर्य स्पष्ट दिसून येत होते.

"या किल्लेदार, हवालदार. तुमच्या इमानदारीचा मरातब करण्यासाठी खोळंबलोत आम्ही इथं." संभाजीराजे खोचून बोलले. आपल्या हातच्या थैल्या चिटणिसांच्या हाती देत म्हणाले, "पंत, हे रायगडाहून महाराणींच्या मार्फतीनं चिटणिसी शिक्क्याचे आलेले खलिते, या आमच्या दिमतीच्या चाकरांना जरा वाचून दाखवा!"

हवालदार, किल्लेदारांना आलेला खलिता खाकरून परशमरापंतांनी मोठ्याने मायन्यासह वाचला.

अगोदरच गर्दनी खाली पडलेली, कटाची हस्तक माणसे तो ऐकताना सुन्न झाली.

विठ्ठलपंतांच्यासमोर येऊन दोन्ही मनगटे वर उठवून धरत संभाजीराजे कडवट, तिरके म्हणाले, "करता कैद आम्हास? चढवता काढण्या आमच्या हाती?"

अपार शरमेने मान डुलविणाऱ्या विठ्ठलपंतांच्या डोळ्यांतून आसवे टपकली.

विजेचा कडकडाट सरकत जावा तसे मनस्वी संतापाने संभाजीराजे धारकऱ्यांना आज्ञा देताना गर्जले, "या नमकहराम दगलबाजांना घेऊन जा आमच्या समोरून! काढण्या चढवून कोठीत फेकून द्या या सर्वांना!" धारकरी घेऊन चाललेली, ताबुतासारखी दिसणारी ती पाठमोरी माणसे बघताना रागाचा झेंडू फुटावा तसे संभाजीराजे थरथरू लागले. कुणाची जोड न घेताच एकटे सज्जाकोठीकडे चालले.

थोड्या अवकाशातच दीड हजार घोडेस्वारांची तुकडी दौडत पन्हाळ्याच्या चौ-दरवाज्यातून बाहेर पडली. ती कोल्हापूरला चालली होती. सुमंत आणि पेडगावकरांचाही साजेल असा मरातब करण्यासाठी!

तिकडे रायगडावर रामराजांचा मंचकारोहण अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावरच सविध पार पडला होता. त्यांना 'छत्रपती' म्हणून घोषित केलेली आण्णाजी, मोरोपंत, प्रल्हाद निराजी आणि महाराणी ही मंडळी पन्हाळगडावरून 'संभाजीराजे कैद झाल्याची' खबर केव्हा येते याची आतुरतेने वाट बघत होती!!

पन्हाळ्यावर जे घडले त्याचा वृत्तान्त कळताच रायगड हादरला. फासे परतत होते. आता क्षणही वाया दवडायला तयार नसलेले आण्णाजी, मोरोपंत, प्रल्हाद निराजी यांच्यासह महाराणींच्या भेटीस आले. कटावाचा सर्वांत विरूप टप्पा पुढे आला.

"पन्हाळा हातचा सुटला. युवराजांना कब्ज झाला. तिथलं माणूसबळ दिवसागणिक वाढत आहे. ती थळी फुटल्याखेरीज आपण निभावणार नाही. आता आम्हीच पन्हाळ्याच्या रोखाने कूच झाल्याशिवाय तड लागणार नाही!" अद्याप चिवट आण्णाजींचा विश्वास ढळला नव्हता.

"तेच म्हणतो आम्ही. तुम्ही, मोरोपंत, प्रल्हाद निराजी पाचाडच्या जमाव उचलून लगोलग पन्हाळ्यास घेर टाका. एवढाही विलंब आणि कसूर झाला तर समस्तास घातक आहे." सोयराबाईंच्या विश्वासाची जात तर राजेशाही होती.

"आम्ही कऱ्हाडतर्फेनं निघावं म्हणतो. हर हिकमतीनं सरलष्करांना गाठीशी बांधल्याशिवाय पन्हाळा दस्त होणार नाहो." कसे झाले तरी आण्णाजींनी राजकारणाच्या डोहात चार हात मारलेले होते.

"सरकारस्वारीनं सरलष्करांसाठी खलिता द्यावा आमच्या सोबत. तो कारणी पडेल." मोरोपंतांनी सुचविले.

"तुम्ही आणि आण्णाजी त्यांची मोठी उमेद धरता. आम्ही खलिता देतो, पण तो कारणी लागेल असं नाही वाटत आम्हास! सरलष्कर या वेळी गप्प बसले तरी आपल्या भाच्यावर मोठी मेहर केली त्यांनी, असंच आम्ही मानू! आमचा विश्वास आहे तो तुमच्या उभयतांच्या हिमती हिकमतीवर." सोयराबाईंना हंबीररावांचा वाण चांगला माहीत होता. कशी असली तरी त्या आणि हंबीरराव एकाच मुशीची चिवट माती होती!

"येतो आम्ही." आण्णाजी, मोरोपंत, प्रल्हाद निराजी, राहुजी महाराणींना मुजरा देत लवले.

"या. तुम्हास येश देणार आई जगदंब थोर आहे!" हात उठवून, जिजाऊंच्या थाटात सोयराबाईंनी आशीर्वाद दिला!

हंबीररावांना द्यायचा खलिता घेऊन कटवाले रायगड उतरून पाचाडात आले. दहा हजारांचे हत्यारबंद, तगडे घोडदळ साथीला घेत पाचाडाबाहेर पडले.

निघाले! छत्रपतींच्या कैलासवासाला एक महिना होण्यापूर्वीच त्यांनी उठविलेल्या राज्याचे अपार स्वामीभक्त सुरनीस, पेशवे, न्यायाधीश एकमेळाने फौजबंदीने निघाले. आपल्याच साक्षीने युवराजपणाचा अभिषेक केलेल्या संभाजीराजांना जेरबंदीने दस्त करून आणण्यासाठी! मराठी दौलतीच्या डाव्या हाताने हत्यार उचलले, आपलाच उजवा हात कलम करण्यासाठी! पन्हाळ्याकडे निघालेल्या घोडदळाच्या टापांखालून उसळणारी धूळ उतरली – पाचाडातील थोरल्या आऊंच्या छत्रीवर आणि महाराजांच्या लाडक्या रायगडावर! मजला मारीत आण्णाजी मोरोपंतांची फौज कऱ्हाडवर आली. गावठाणाचा माळ धरून फौजेचा तळ पडला. आण्णाजी, मोरोपंतांसाठी डेरे उठले. वैशाखी उन्ह प्रांत कऱ्हाडवर रणरणू लागले.

या तळाच्या शेजारीच दहा कोसांच्या पल्ल्यावर सरलष्कर हंबीररावांचे गाव होते. तळबीड. तिथे मराठी सेनेच्या हरावलीच्या पंधरा हजार बांड्या मावळ्यांनिशी हंबीरराव ठाण देऊन होते. रायगडाहून आण्णाजी-मोरोपंत पन्हाळ्याच्या रोखाने निघालेत याची कुणकुण लागलेल्या हंबीररावांनी, सातारातर्फेच्या आनंदराव निंबाळकर, रूपाजी भोसले. महादजी मापोलकर यांना त्यांच्या जमावांसह तळबिडास बोलावून घेऊन बळकटी केली होती. याचा काहीच माग नसलेल्या आण्णाजींनी एक विश्वासू हारकारा उचलून त्याच्यामार्फत महाराणींचा खलिता हंबीररावांसाठी तळबिडाकडे धाडला. आणि हंबीरराव भेटीला येतील या वेड्या आशेवर ते हारकाऱ्याची वाट बघू लागले.

खलिता हाती पडताच हंबीररावांनी आपल्या राहत्या वाड्याच्या खलबतीखणात आपल्या सल्लागारांची बैठक बसविली. अंथरल्या घोंगड्यावर आनंदराव, रूपाजी, महादजी गुजर, हंबीररावांचे बंधू शंकराजी आणि हरीफराव फेराने हंबीररावांभोवती बसले. हंबीररावांच्या चिटणिसाने खलित्याचा मजकूर बैठकीला वाचून दाखविला – "पेशवे, सुरनीस देतील त्या मसलतीस जोड घालोन असणे. फौजेसुद्धा त्यांच्या पाठीशी

राहोन आम्हास, बाळराजांस रक्षून चालविणे. तुम्ही घरचेच आहात. पुढे तुमचे बरे उर्जित होईल. जाणिजे."

मजकूर ऐकून कुणीच काही बोलेना तसे हंबीरराव म्हणाले, "चला – आता तरी याद जाली म्हणायची रानीसायबास्नी आमची! बाळराजं मंचकावर चडलं त्यात अडगळ नगं म्हून गडावरनं काडलं त्येनी आमास्नी. तवा म्हणाल्या, 'तुमच्या मसलतीनं सारं निवांत करू!' आता हुकूम हाय पंत-सुरनिसांच्या मसलतीला जावा! काय करायचं, बोला बगू?" हंबीररावांनी माणसं चाचपली.

"कराडात काय मसलत निगती बगाय काय हरकत हाय?" आनंदरावांनी सुचविले.

ते ऐकून मिश्यांच्या कंगोलांखाली पालथी मूठ देत हंबीरराव आणखी कुणी काही बोलतेय काय याचा सासूद घेत राहिले.

"आता कसं बी जालं तरी रामराजं गादीयर चढल्यात. रानीसायबांचा हुकूम त्यो त्येंचाच मानाय पायजे की. नाही म्हटले तरी शंकराजी मोहित्यांनी आपल्या बहिणीची तळी आडमार्गानं उचललीच.

"बाकी थोरल्यास्नी पार बगलंला टाकलं सम्द्यांनी ह्ये काय बरं क्येलं न्हाई." महादजी मापोलकर बोलला.

ही भाबडी, मैदानावरची माणसं; अशीच बुजल्या खोंडागत कुठे नको तिकडे जाणार हे हंबीररावांनी ताडले. खाकरून भरड्या बोलीत ते म्हणाले, "आरं बाब्यांनू, ही फौज काय जोतिबाच्या यातरंला चालली न्हाई! ती घिऊन अन्नाजी-मोरुपंत पन्नाळ्याकडं निगाल्यात – युवराजास्नी काडण्या चढवून जेरबंद कराय! हाईसा कुटं?"

ते ऐकताना कित्येकांचे टाळे वासले, गर्दना ताठ झाल्या. असे विपरीत ऐकायची सवय नव्हती कुणाला. बैठक पार येलबडून गेली. कुणीतरी म्हणाले, "छ्या ऽ, ह्ये म्हंजी लईच जालं."

हंबीरराव त्याला तोडत म्हणाले, "जालं न्हाई. पर हुयाचं हाय! आपून व्हायचं का यात सामील? ध्याई पडली तरी धन्याचं भलं चिंतनारी जात आपली. हुयाचं का खाल्ल्या मिठाला बेमान? कसं बी असलं तरी युवराज थोरलं हाईत. धर्मानं गादीचं वारस हाईत! रामराजं आमच्या रगताचं असलं – तरी धाकलं हाईत. त्येंचा न्हाई लागत हक्क गादीला. कसं जावं मसलतीला आमी?"

"नगच त्ये." दोन चार आवाज एकदम उठले.

"निस्तं नगं म्हून ह्ये मिटत न्हाई. आमी सोता तर न्हाईच पर कुनाला बी काडन्या चढवू देनार न्हाई आमच्या युवराजांच्या हातात. ह्यो इस्कोट आवराय पायजे आपुन कुठंतरी."

"कसा आवारनार त्यो?" रूपाजीला काही सुचेनासे झाले.

"अन्नाजी-मोरुपंतांस्नी बलवू या हाकडं. च्यार गोष्टी सांगूया समजुतीच्या." जाणते हंबीरराव तोड काढीत म्हणाले. सर्वांनी त्या मसलतीला संमती दिली.

हंबीररावांच्या चिटणिसांनी आण्णाजींच्या हारकऱ्यामार्फतच परतीचा निरोप दिला– "आपण उभयता भेटीस येणे. बैठकीत हिताची ती मसलत तपशिलाने करू."

तो निरोप ऐकून मोरोपंत आण्णाजींना म्हणाले, "आम्ही हेच म्हणत होतो पूर्वीपासून. जाऊ या आपण सरलष्करांच्या भेटीस."

आण्णाजी ते खोडून काढीत म्हणाले, "चुकताहात पंत. आपणाला जोड द्यायची तर सरलष्कर जमावानिशी येते आपल्या तळावर. तळबिडात जाण्याचा धोका या क्षणी पत्करणं शहाणपणाचं ठरणार नाही. आम्हाला विश्वास होता, ते महाराणींचं नातं मानतील याचा. राजाज्ञेला मान देतील याचा. आता त्यांच्यावर विसंबून चालणार नाही. आपली पावलं आपणच उचलली पाहिजेत."

मोरोपंत गंभीर झाले. आपण कसल्या दुष्ट चक्रात रीतसर गुरफटत चाललो आहोत याची कल्पना येताच त्यांचे मन खिन्न झाले.

"या वेळी आपण युवराजांशी तहाची बोलणी करावी असं वाटतं आम्हाला." पहिल्यापासूनच अनिच्छेने आण्णाजींशी हातमिळवणी केलेले प्रल्हादपंत म्हणाले,

"तह? आणि तो या क्षणी? युवराज तो मानतील असं वाटतं काय तुम्हास?" आण्णाजींनी त्यांनाही खोडून काढले.

ते ऐकून "आम्ही येतो जरा." म्हणत प्रल्हादपंत आण्णाजींच्या डेऱ्यातून बाहेर पडले आणि आपल्या डेऱ्यात आले. खरोखरच त्यांनी तहाचे पत्र सिद्ध केले आणि आपल्या दिमतीच्या माणसांमार्फत पन्हाळ्याला पाठवूनही दिले.

संध्याकाळ उतरायला झाली. आण्णाजी-मोरोपंतांची वाट बघून हंबीरराव तळबिडात कंटाळले. आपली एवढीही मुर्वत हरघडी खांद्याला लावून असणाऱ्या सुरनीस-पेशव्यांनी ठेवू नये याची त्यांना मनस्वी चीड आली. मनोमन काहीतरी पक्के ठरवून त्यांनी आनंदराव, रूपाजी, महादजी आणि आपले बंधू शंकराजी व हरीफजी यांना एकजाग करून हुकूम फर्मावला, "चटक्या जनावरांवर मांडा घ्या – आन् कऱ्हाडच्या फौजेत घुसा. मिळतील तेवढी मान्सं फोडून तळबिडाच्या वाटेला लावा! निगा."

रात्र धरून हंबीररावाची माणसे आण्णाजी-मोरोपंतांच्या फौजेत घुसली. लागेबांधे लावून एक एक गोट फोडून तळबिडाकडे धाडू लागली.

ती खबर लागताच आण्णाजी बिथरले. मोरोपंतांसह रात्रीचे घोड्यांवरून तळाचा फेर टाकीत माणसे थोपविण्यासाठी फिरू लागले. हंबीरराव माणसे फोडताहेत याचा अर्थ काय तो आण्णाजी अचूक उमगले. फौज दुबळी करून सरलष्कर चालून येणार ती

अधिक दुबळी होण्याची वाट न बघता त्यांच्यावरच चालून जाणे भाग आहे.

रात्रभर आण्णाजी-मोरोपंतांनी विचार करून निर्णय घेतला — हंबीररावांवर चालून जाण्याचा! आता कट बहकत चालला. दिवसुटीबरोबर आण्णाजी-मोरोपंतांनी हाती असलेल्या फौजेनिशी तळबिडावर हल्ला चढविलाही!

हंबीरराव तयारच होते. त्यांचे सेनाबळही भक्कम होते. हां ऽ हां ऽ म्हणता पंधरा हजार मावळ्यांनी, फौजेसकट आण्णाजी-मोरोपंतांना घेर टाकला. प्रसंग परतला आहे हे ओळखून पंतांनी हातातील हत्यार टाकले. ते बघून आण्णाजींचाही हात लटका झाला.

शेलक्या माणसांच्या मेळासह हंबीरराव खासे येऊन थेट आण्णाजी-मोरोपंतांना भिडले. मांड न मोडता घोड्यावरूनच झुकून हाताचा झोला तिवार कपाळाकडे नेत कडवेपणाने म्हणाले, "पंत-सुरनीस, मुजरा... मुजरा हाय तुमच्या इमानदारीला आन् श्यानपणाला! आरं, ज्या हातानं शेलं-पागुटी घ्यावीत, त्या हातात काडन्या चडवाय निगाला! छत्र धरावं त्या डुईवर हत्यार धराय निगाला! धन्यास्नी जाऊन म्हयना बी झाला न्हाई — तर त्येंच्या पोटच्या गोळ्याला घेरायला निगाला! त्ये असतं तर — तर जाली असती काय ही छाती तुम्ची?" हंबीररावांच्या डोळ्यांतून ठिणग्याच ठिणग्या उधळल्या. त्या खाली माना घातलेल्या पंत-सुरनिसांच्या पगड्यांवर उतरल्या.

"आनंदराव, रूपाजी, काडन्या बसल्या म्हंजी मानसाला कसं मेल्यागत शरमिंद वाटतं ह्ये कळू द्या ह्येस्नी! दोरखंडांनी दस्त करा ह्येस्नी! कसला रं दिस दावला ह्येंनी!" स्वत:वरसुद्धा खट्टा झालेल्या हंबीररावांनी जनावराला तिडिकेची टाच भरली, ते तळबीडच्या रोखाने उधळले. पाठोपाठ चाळीस-पन्नास टापा उधळल्या. आण्णाजी-मोरोपंतांसह, प्रल्हाद निराजी आणि राहुजी सोमनाथ कैद झाले!

ज्या हाताने मुजरा केला होता त्याच हाताने मोरोपंतांना काढण्या चढविताना एक धारकरी गलबलून म्हणाला, "असं कसं फसलिसा या फंदात?" आणि ते ऐकताना मोरोपंतांच्या नेत्रकडा थरथरणारी आसवे टप-टप टपकली आणि कऱ्हाडच्या भुईत मिसळली.

युवराज पन्हाळगडावर होते, रामराजे रायगडावर होते आणि मराठी दौलतीच्या छत्रपतिपदाचा निवाडा कऱ्हाडच्या माळावर लागत होता — हंबीररावांच्या हातांनी!

कैलासवासी स्वामी तर नेहमी म्हणतच आले होते — "श्रींची इच्छा!" तेच खरे. दुसरे काय?

पन्हाळ्याच्या चौ-दरवाज्यात हंबीररावांच्या आगवानीसाठी सामोरे आलेले संभाजीराजे उभे होते. त्यांच्या पाठीशी कापशीहून आलेले म्हलोजी घोरपडे, त्यांचे पुत्र संताजी, बहिर्जी, कोकणसुभा रावजी पंडित, उमाजी पंडित, परशरामपंत, रायाजी-अंतोजी अशा आसामी होत्या.

आनंदराव, शंकराजी, रूपाजी अशा माणसांच्या मेळ्यातून कदमबाज जनावरावरून येणारे, घेरमुद्रेचे, तगडे हंबीरराव दृष्टीस पडताच संभाजीराजांच्या काळजात खळबळ माजली. अशी खळबळ फक्त आबासाहेबांच्या दर्शनाच्या वेळीच आजवर उठत आली होती. खेचल्यासारखे संभाजीराजे दहा-बारा कदम सरासर पुढे झाले. त्यांना बघताच हंबीररावांनीही घोड्याची चाल तेज केली. जवळ येताच झेपेनेच मांड मोडून ते पायउतार झाले.

मुजरा देण्यासाठी ते झुकू बघताहेत हे पाहताच संभाजीराजे गलबलले. झटकन त्यांचे हात आपल्या हातात तोलून, त्यांना रोखून वर घेत, नजरेला नजर देऊन थरथरल्या ओठी संभाजीराजे घोगरट बोलले, "मामासाहे ऽ ब!" — आणि दुसऱ्याच क्षणी भोसल्यांचे छाताड मोहित्यांच्या छातवानाला बिलगले. हंबीररावांच्या इमानदारीने भरून गेलेल्या संभाजीराजांचे डोळे दाटले. हलक्या हाताने हंबीररावांनी त्यांचा खांदा थोपटला. चार महिन्यांपूर्वी आबासाहेबांनी असेच थोपटले होते हे जाणवताच फार दिवसांनी आज प्रथमच संभाजीराजांना वाटले — 'आम्ही एकले नाही!'

माणूसमेळ चौ-दरवाज्यात शिरताच कितीतरी दिवसांनी प्रथमच पन्हाळ्यावर आज नौबत दुडदुडली. हंबीररावांची प्रचंड सेना कटवाल्या कैद्यांना घेऊन पन्हाळ्यात शिरली. सात वर्षांपूर्वी हाच पन्हाळा कोंडाजी फर्जंदाच्या मदतीने जिंकून, गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर जिंकला गड बघण्यासाठी येणाऱ्या थोरल्या छत्रपतींवर, याच चौ-दरवाज्यात आण्णाजींनी ओंजळीने सोनफुले उधळली होती! त्याच दरवाज्यातून हाती काढण्या घेऊन आण्णाजी पन्हाळा चढले! माणसाची बुद्धी फिरली की दिवस परततात हेच खरे!

रंगरूपी पिंडीचे दर्शन घेऊन हंबीररावांसह संभाजीराजे बालेकिल्ल्यात आले. मोहितेमामांना आदराने सदरी बैठकीवर बसवीत म्हणाले, "मामासाहेब, पुढील निर्गत कशी करायची? तुमच्या सल्ल्याशिवाय आम्ही काही करणार नाही."

कैद्यांचे तोंड बघणे संभाजीराजे टाळताहेत हे ताडलेले हंबीरराव म्हणाले, "त्ये म्होरं ठरवायचं हायच की! पर दस्त केल्याली ती जोखीम त्येवडी घ्या बगू ताब्यात!"

संभाजीराजे अस्वस्थ झाले. नको तो विषय सामोरा येत होता.

"आम्हास त्यांचे तोंड बघणेही नको वाटते तुमच्या दर्शनानंतर!" संभाजीराजे कडवट बोलले.

"असं म्हनून कसं चालंल? करनाऱ्यांस्नी न्हाई तर बोलणाऱ्यास्नी शरमून कसं भागेल? रूपाजी, पेश घाला त्या इमानदारांस्नी." हंबीररावांनी रूपाजीला फर्मावले.

चार चार धारकऱ्यांनी घेर घातलेले, काढणीबंद आण्णाजी, मोरोपंत, प्रल्हादपंत, राहुजी संभाजीराजांच्यासमोर पेश आणण्यात आले. सर्वांच्या गर्दनी खाली होत्या.

आघाडीला असलेले आण्णाजी दृष्टीस पडताच संभाजीराजे ताडकन उठते झाले. त्यांच्या अंगभर लाह्याच लाह्या फुटल्या. कानशिले संतापत लालेलाल झाली.

डोळ्यांच्या कडांत रक्त उतरू लागले. कपाळावरची शीर थडथडत तट्ट फुलून उठली. विस्फारल्या नाकपुड्यांखालचे ओठ थरथरले. मनात असूनही अनावर संतापाने त्यांना धड बोलवेना. आण्णाजी समोर आलेलेही त्यांना सोसवले नाही. सर्रकन् वळून त्यांना पाठमोरे होत ते गर्जले, "जाऽ, पुन्हा यांना आमच्या सामोरंही आणू नका कधी. आमच्या साऱ्या उमेदीवर यांनीच निखारे ठेवले आहेत. सिताब उचला यांना इथून आणि द्या फेकून कोठडीत!" संतापाने अंगभर थरथर कापणाऱ्या संभाजीराजांकडे हंबीरराव बघतच राहिले. कधी काही वावगे समोर आले की संतापणारे थोरले धनीही बघितले होते त्यांनी. पण हा माटच वेगळा वाटला हंबीररावांना!

धारकरी कैद्यांना घेऊन जायला निघाले. त्यात मोरोपंत आहेत याचे भान होताच संभाजीराजे म्हणाले, "थांबा!"

कैद्यांसकट सर्वांच्या अंगावर ते ऐकताना काटा सरकला.

संथ चालीने मोरोपंतांच्यासमोर येऊन संभाजीराजे पडेल बोलले, "तुम्ही... तुम्हीसुद्धा आम्हाला दस्त करण्यासाठी यावं पंत! काय पारख केलीत आमची? सांगावा धाडला असता तर आम्ही आपणहून आलो असतो बांधल्या हातांनी तुमच्या भेटीसाठी! सावलीसारखे आबासाहेबांच्या पाठीशी राहून कसली प्रधानकी निभावलीत ही त्यांच्या माघारी? खुद्द आम्ही दस्त झालो असतो तरी वाटलं नसतं एवढं दु:ख दौलतीचे पेशवे जेरबंद झालेले समोर बघताना वाटतं आहे आम्हास!" संतापापेक्षा खंतच संभाजीराजांच्या मनी दाटली.

शरमेने, अपार पश्चात्तापाने मोरोपंतांची घेरदार पगडी डुलली. दंडात काढण्या चढल्या तेव्हाच मनाने संपलेला तो मानी पुरुष काही काही बोलेना. गैरवाका करणीचा पश्चात्ताप वाटण्यासाठी लागणारे जातिवंत मन त्यांच्याकडे अद्याप शाबूत होते! मन पिळवटणाऱ्या भावना त्यांच्या डोळ्यांतून अश्रुरूपाने टपटपू लागल्या.

"ज्यांनी पायाच्या अंगठ्यानं मारलेली गाठ भल्या भल्यांना हातानंही कधी उकलायची नाही त्या या सुरनिसांच्या नादी कसे लागलात पंत?"

संभाजीराजे आण्णाजींच्या समोर आले. त्यांच्या स्थूल देहयष्टीवर नजरेचा पलिता फिरवीत कडाडले, "गर्दन का उठत नाही वर सुरनीस आण्णाजी दत्तो तुमची? की खालमानेनं पायालगतच्या, उभ्या राहिलेल्या भुईविरुद्धही कटाचे बेतच रचताहात? बोला. खूप जुने बरे मनी धरता तुम्ही! काय करणार होतात आम्हास जेरबंदीनं रायगडी नेऊन! देणार होतात टकमकीवरून लोटून की तोफेच्या तोंडी? जाब द्या." राजबोलाचा कोरडा कडकडला.

आता मरणाशिवाय दुसरे काहीच सामोरे येणार नाही याची खूणगाठ बांधलेले आण्णाजी अंतिम धैर्याने म्हणाले, "तो आमचा अधिकार नाही. आम्ही स्वामींच्याच वारसांना मंचकारोहण केलं आहे. दौलतीच्या हिताच्या दृष्टीनं ते योग्यच आहे असं या

क्षणीही आमचं मत आहे. दस्त झालो तरी जे केलं त्याचा आम्हाला पश्चात्ताप वाटत नाही! प्रत्यक्ष स्वामी असते तर त्यांनीही हेच केलं असतं."

"खामोऽष, पश्चात्ताप वाटायलाही शरमणारं मन लागतं! तो तुमचा भाग नाही. आम्ही बाळराजांना का मंचकारोहण केलं ते विचारलं नाही. आबासाहेबांनी काय केलं असतं ते तुमच्या तोंडून ऐकण्याची बिलकुल इच्छा नाही आमची. आम्ही ते बरं उमगतो! त्यांनी काही लहानास, दस्त केल्या थोरल्यांचा नजराणा देऊ केला नसता तुमच्यासारखा! शरम कशी येत नाही तुम्हाला केल्या बेमुर्वतीची?"

टोकदार शब्द आण्णाजींच्या काळजाला भिडले. गर्दन उठवून ते कडवटपणे म्हणाले, "का वाटावी शरम आम्हाला? आम्ही काही चोरी-बळजोरी केली नाही की दौलतीशी फितवा करण्यासाठी गनिमाच्या गोटात गेलो नाही!"

"अन्नाऽजी!" बैठकीवर बसलेले हंबीरराव उडत्या सुरुंगासारखे उसळले. आण्णाजींच्या समोर थरथरत तडकले, "जबान संबाळत्येय का उतरून देऊ हातात?" फिसकारल्या कंगोली मिश्यांचे भयावह हंबीरराव बघून आण्णाजींनी मान टाकली.

मुळासकट नाळच उपटून काढल्यागत वाटलेल्या संभाजीराजांच्या मिटल्या डोळ्यांच्या कडा ओलावून आल्या होत्या. उभे राहणे असह्य झाल्याने ते तरातर सदर सोडून अंत:पुराकडे गेलेही.

"घिऊन जा यास्नी – आन् टाका कोठीत." अजूनही थरथरणारे हंबीरराव गर्जले आणि त्यांनीही सदर सोडली. धारकरी कैद्यांना कोठीकडे घेऊन गेले. पन्हाळ्यावरचे वैशाखी उन्ह तावतच चालले!

पन्हाळ्याच्या दफ्तरखान्यातून मावळ्यांचे तांडे खुशीने आपआपल्या गोटांकडे परतू लागले. प्रत्येकाला दोन दोन महिन्यांचा पगार आगाऊ आदा करण्याची आज्ञा संभाजीराजांनी दिली होती.

चिटणिसी बैठकीवर बसलेल्या परशरामपंतांना युवराजांनी शृंगारपुरी पिलाजीमामांना द्यायच्या पत्राचा मजकूर सांगितला – "मिळेल तो मावळा जमा करून रायगडतर्फेच्या खबरदारीस निघणे. वाटेत पूर्वील चौक्या उठवून सर्व किल्ल्यांवर आपल्या चौक्या बसविणे." हंबीरराव, रावजी, म्हलोजीबाबा सारे सावधपणे ते ऐकत होते.

आता पन्हाळा संभाजीराजांचे भक्कम बंदिस्त ठाणे झाले होते. आसपासचे सुभेदार, हवालदार पन्हाळा चढून 'राजा' म्हणून संभाजीराजांना रोज पेश होऊन मुजरा देत होते.

"स्वामी, टोपीकर आपल्या बक्षिसांची निकड लावून आहेत. काय करावं?" राजापूरहून आलेल्या रावजी पंडितांनी वखारवाल्या इंग्रजांची कुरकूर संभाजीराजांच्या कानी घातली. पूर्वी महाराजांनी राजापूरच्या वखारी लुटल्या होत्या त्याची नुकसानी 'बक्षिसाच्या रूपात' सुरतेला ठाणं झालेल्या इंग्रजांना दिली जात होती.

"रावजी, त्यांना कळवा, तूर्त आम्हास फुरसत नाही. सवडीनं पूर्वील हिसाब पाहून निकाल देऊ."

"जी"

"तुम्ही फार मोलाची कामगिरी केली आहे रावजी. राजापूरपासून कारबारपावेतोची दिवाणी रसद तुम्ही तातडीनं पन्हाळ्याला पाठविली. तिचा मोठा आधार आहे आम्हाला."

"गोव्याच्या विजरईचा कै. स्वामींच्याबाबत सांत्वनपर खलिता आला आहे." परशरामपंतांनी खलिता वाचून दाखविला.

"पंत, त्यांना परतीच्या जाबात लिहा– दुर्दैवे करून आमच्या आबासाहेबांचा कैलासवास झाला आहे. आम्ही कुल एखत्यार आहोत, तुमचे पूर्वीप्रमाणे चालवू. तो खलिता रामजी नाईक ठाकूर याच्या मार्फतीनं फिरंगी दरबाराला पाठवून द्या."

"जी" चिटणीस गोव्याच्या विजरई अंतोनिओ पायस-द-सांदे याला खलिता रेखू लागले.

"मामासाहेब, रायगडची खबर आली आहे." संभाजीराजे शेजारी बसलेल्या हंबीररावांना म्हणाले.

"कसली बरं?"

"गडावर येसाजी कंकानी नायकवडीच्या मदतीनं काही आसामी परस्पर दस्त केल्या आहेत. त्यात कान्होजी भांडवलकर, शहाजी भोसला आणि मोरोपंतांचे चिरंजीव निळोपंत आहेत."

"ब्येस क्येलं कंकांनीं," हंबीरराव समाधानाने म्हणाले.

"आता रायगडी कूच होण्यापूर्वी एक मनसुबा पुरा करावा म्हणतो आम्ही." संभाजीराजांनी हसत हंबीररांना गोंधळात टाकले.

"हुकूम व्हावा. जी असलं ती जोखीम पत्करू आम्ही." हंबीरराव विचारागत झाले.

"बघा तर खरं." म्हणत संभाजीराजांनी कारभाऱ्यांना नजर-इशारा दिला.

हाती सरपोसबंद तबके घेतलेले खिदमतगार एकामागून एक असे येऊन बैठकीलगत तबके ठेवून निघून गेले. त्यातील पुढे ठेवलेल्या सर्वांत मोठ्या तबकावरचा सरपोस संभाजीराजांनी हटविला. त्या तबकाला हातस्पर्श देत ते कारभाऱ्यांना म्हणाले, "द्या त्यांना." त्या तबकात जरीपगडी, शेला, तलवार असा साज होता.

"काय करतासा हो?" म्हणत हंबीरराव लगबगीने उठले.

"घ्या. मामासाहेब, शक्य असतं तर चौ-दरवाज्यापासून पायथ्यापर्यंत लाल फरासी अंथरल्या असत्या आम्ही तुमच्या वाटेवर!" संभाजीराजांनी त्यांना बोलूच दिले नाही. कारभाऱ्यांनी समोर धरलेल्या तबकाला हंबीरराव हात लावत म्हणाले, "ह्यो मनसुबा हुता व्हय?"

संभाजीराजांनी हातस्पर्श दिलेले दुसरे तबक कारभाऱ्यांनी म्हलोजी घोरपड्यांसमोर धरले. "म्हलोजीबाबा, आजपासून पन्हाळ्याची सरनौबती तुमच्या अखत्यारीत देत आहोत आम्ही. विश्वास आहे तुम्ही ती संताजी, बहिर्जीच्या मदतीनं संभाळाल."

"जी." म्हलोजी आणि त्यांचे पुत्र संताजी-बहिर्जी मुजरा देत लवले.

हत्यारे, पेहराव, कडी, तोडे देऊन संभाजीराजांनी रावजी पंडित, आनंदराव, रूपाजी, जोत्याजी-अंतोजी सर्वांचा इतमामी मरातब केला. पन्हाळ्यावर नवे किल्लेदार हवालदार नामजाद केले. ते बघताना सर्वांना वाटले की आपण रायगडावरच आहोत!

"चला. फौजेची दरफ्ती नजरेखाली घालू." सर्वांना बरोबर घेत संभाजीराजांनी सदर सोडली. सगळा पन्हाळगड आता मावळ्यांनी फुलून उठला होता.

एका एका गोटाची दरफ्ती बारकाव्यानं नजरेखाली घालीत खाशा मेळाने संभाजीराजे चालले. त्यांना हात खाली घ्यायला वाव मिळू नये असे अदबमुजरे झडू लागले. मावळतीच्या तटाने चालत ते सर्वांसह कोकणदरवाज्यावर आले. दूरवर दिसणारे मसाईचे पठार काळवटून आले होते. झाडे कुदणीला पडली होती. वावटळीने उठविलेले धुळीचे खांब गरगरताना दिसू लागले. "हां ऽ हां म्हणता काळ्या ढगांची छपरी कोकण दरवाज्यावर चालून आली. पावसाचे टपटपीत शिंतोडे उतरू लागले. डोळे आक्रसून आभाळ निरखत हंबीरराव म्हणाले, "वळीव धरलाय. निगावं."

"मामासाहेब, मृगापूर्वी पन्हाळा सोडला पाहिजे. आता फौजबंदी मनाजोगी झाली आहे."

"त्येच म्हन्तो आमी. एकदा आबाळ धरलं की जागचं हालू देणार न्हाई." संभाजीराजांमागून पायऱ्या उतरणाऱ्या हंबीररावांनी सल्ला दिला. आभाळाची कैद तोडून वळिवाची झड तडतडत कोकणदरवाज्यावर कोसळू लागली.

"म्हलोजीबाबा, गड राखून सावधानगीनं असा. आम्ही निरोप देताच कोठीचे कैदी हत्यारी पहाऱ्यात बंदोबस्तीनं रायगडी पाठवा. येतो आम्ही." संभाजीराजांनी म्हलोजींना खांदाभेट दिली.

पन्हाळ्याच्या चौदरवाज्यावर नगारे चौघड्यांची झड उठली, शिंगाच्या ललकाऱ्या फुटल्या. हात छताशी नेत राजांनी पन्हाळ्याला मान दिला आणि एका झेपेतच रिकीब भरून 'चंद्रावत' नावाच्या जनावरावर मांड जमविली. चंद्रावत नावासारखाच होता. –चंद्ररंगी – सफेद. वीस हजार जानकुर्बान, बांडा मावळा पाठीशी घेत राजे हंबीररावांसह चौदरवाज्याबाहेर पडले. कदमबाज चलीवर गड उतरू लागले. रायगडाचा रोख मनी ठेवून आज पुऱ्या साडेतीन सालांनंतर ते रायगडाकडे निघाले होते! काय काय घडले होते आणि नव्हते या साडेतीन वर्षांत?"

गेल्या आबासाहेबांचे काळीजवेधी बोल राजांच्या मनी तरारून उठले–

" जंजिऱ्यावर हबशी मांड ठेवून, खंदेरीवर टोपीकर जलदुर्ग उठवू देत नाही, आज ना उद्या औरंगजेबाची हवस दख्खनेत उतरणार याची जरा चिंता ठेवा. त्यासाठी मावळा व्हा!"

"हे असं लांबच्या पल्ल्याचं बोलणं आम्ही दोनच मुखांतून ऐकलं. एक आबासाहेबांच्या आणि दुसरं थोरल्या आऊंच्या."

"कुठं आहेत ते? गेले? नाही ... !"

कानशिलाशी भिडणाऱ्या गडवाऱ्यातूनच त्यांना शब्द ऐकू येताहेतसे वाटले

"तुम्हास येश देणार आई थोर आहे!"

"जी. आम्ही मावळाच झालो आहोत आता." एका अनामिक बळाने संभाजीराजांचा ऊर ठासून भरला. हातपंजा उठवून त्यांनी भर दमाची टाच दिली. चंद्रावत खिंकाळत चौटापांवर उधळला. वारणा नदी पार करून, बत्तीसशिराळामार्गे संभाजीराजांची फौज कऱ्हाड प्रांतावर आली. पहिला तळ पडला. डेरे, शामियाने उठले. मुदपाकासाठी खानसाम्यांनी दगडी चुलवाणे उठवून आगट्या शिलगावल्या. त्यावर चढलेली भगुणी रटरटू लागली.

तळाचा देख टाकून परतणाऱ्या संभाजीराजांना हंबीरराव कुणबाऊ मायेने म्हणाले, "युवराज, एक अर्जी हाय. म्हटलीसा तर घालू पायाशी."

"मामासाहेब, असं दफ्तरी का बोलता? सांगा की कोण अर्जी आहे."

"आमी चाकर मान्सं. पायरी सोडून भागत न्हाई. इथनं एका मजलंवर आमचं गावठान हाय. मर्जी व्हईल तर कुलदेवीचं – वागेश्वरीचं दर्शन करावं. गरिबाघरी हात वलं करावंत."

हंबीररावांचा गावरान प्रेमा बघून संभाजीराजे गहिवरून आले. त्यांच्यासमोर येत म्हणाले, "माफ करा मामासाहेब, आम्हीच आमच्या सरलष्करांच्या कुलदेवतेचं दर्शन करण्याची इच्छा करायला पाहिजे होती. तसं मनीही आलं होतं – पण ... तळबीड हे महाराणी मातोश्रींचं माहेर असल्यानं संकोच केला पण ... आम्ही जरूर येऊ आपल्या घरी हात ओले करण्यास."

हंबीररावांची चर्या उजळली. ते तयारीसाठी पुढे निघून गेले.

संध्याकाळ धरून पन्नास एक घोडा तळबीडच्या वाटेला लागला. संभाजीराजांनी हंबीररावांच्या वडिलांच्या – धारोजीच्या छत्रीसमोर माथा टेकून मगच मोहित्यांच्या वाड्यात प्रवेश केला. देवघरातील कुलदेवी – वाघेश्वरीचे दर्शन घेतले. देवीला चोळीखणाचा साज दिला. रात्री हंबीररावांच्या माजघरी खणात संभाजीराजांना घेर धरलेल्या हंबीरराव, आनंदराव, रूपाजी, शंकराजी यांची पंगत बसली.

पहाट धरून सारे तळबिडाहून निघून तळावर आले. दहा-बारा निवडीचे मावळे उचलून संभाजीराजे स्नानासाठी कृष्णा-कोयनेच्या संगमावर गेले.

संगमावरून तळावरच्या आपल्या डेऱ्यासमोर येताच पायउतार होत त्यांनी कायदे मोतद्दाराच्या हाती फेकले. डेऱ्यात जाऊ बघणाऱ्या संभाजीराजांना नमस्कार करीत एक कफनीधारी गोसावी सामोरा येत म्हणाला, "युवराजांच्या भेटीसाठी आम्ही गोसावी मल्हारबाबांच्या मठातून कोरटीहून आलोत."

"बोला. मल्हारबुवांबाबत ऐकून आहोत आम्ही. कसे आहेत ते?"

"सुखरूप आहेत. बाबांचा युवराजांना खासा सांगावा आहे."

"कसला?"

"बाबांच्या मठाचा मारूल तर्फेचा नाडोली गाव अग्रहार असता दिवाणात अनामत झाला आहे. त्यामुळे मठाची आबदा होत आहे. तेव्हा ..."

"का अनामत झाला आहे अग्रहारी गाव?" संभाजीराजांनी तपशील जाणण्यासाठी सवाल केला.

"कै. स्वामींचे, 'ही रीत कारभारात नाही यास्तव गाव अनामत केला आहे' असे आज्ञापत्र आले होते बाबांना."

"काय म्हणता तुम्ही? आबासाहेब तर धर्मस्थळांचे सारे बरे चालवून होते. गोसावी, यात काही घालमेल आहे. तुम्ही थांबा थोडे, आम्ही जातीनंच येऊ बुवांच्या दर्शनास! मठाची व्यवस्था लावून देऊ. निर्धास्त असा." संभाजीराजांनी हात उठवून मठशिष्याला निरोप दिला.

दुपारचे थाळे होताच तळ उठला. फौज पुढच्या मुक्कामाला कूच होऊ लागली. हत्यारी शिबंदी घेऊन हंबीररावांसह संभाजीराजे कोरटीच्या वाटेला लागले. पुढच्या मुक्कामावर फौजेला मिळणार असे सांगून वनराईने वेढलेले मौजे कोरटी हे गावठाण आले. ओढ्याचा काठ धरून बसलेला मल्हारबुवांचा मठ नजरेस पडताच हात छातीशी नेत संभाजीराजांनी मांड मोडली. पायी वाट चालू लागले.

चिवाट्यांच्या बंदिस्त कुडाण्याने घेर टाकलेल्या मठाच्या कवाडात दाढी - जटाधारी शांत प्रसन्न मुद्रेचे मल्हारबुवा शिष्यगणांसह उभे होते. त्यांच्या नितळ पायांवर, आपला माथा ठेवीत संभाजीराजे म्हणाले, "बुवांचा प्रसाद असावा."

"उठा युवराऽज ..." छत्रपतींच्या आठवणीने तो बैरागीही भरून आलला होता. त्याने आपला थरथरता हात युवराजांच्या टोपावर ठेवला. बाबांच्या पाठीशी होत संभाजीराजे मठात गेले. बैरागीबुवांच्या चरणांशी बसले.

"युवराज, छत्रपती गेले. आम्ही बैरागी. जन्मणाऱ्याला एक ना एक दिवस जाणं पडतं हे सत्य असूनही छत्रपतींच्या जाण्यानं कष्टी होतो. तुम्ही तर त्यांचे पुत्रच आहात. तुमचं दुःख आम्ही जाणू शकतो. पण विचार धरा – जित्या जिवांना कर्तव्याची जाण देण्यासाठीच सृष्टीनं मृत्यूची योजना अनादी कालापासून मांडली आहे. छत्रपतींच्यासारखे जीव तर ही जाण पिढ्यान् पिढ्यांना देण्यासाठीच जन्म घेत असतात. त्यांचा वसा

सांभाळा. मुलूख राखा. माणसं जपा. छत्रपतींच्याहून मोठं कार्य उठविण्यासाठी मनबांधणी करा.'' जसा मठाशेजारून वाहणारा ओढाच गोसावीबाबांच्या वाणीतून खळखळत होता.

खूप दिवसांनंतर कानी पडणारे ते बैरागी बोल ऐकून संभाजीराजे मन:शांतीने भरून आले. म्हणाले, ''बुवा, आम्ही आमची असेल ती कुवत पणास लावू मुलूख राखण्यासाठी, माणसं जपण्यासाठी. पण— पण आबासाहेबांनी केलं आहे तितकं आमच्या हातून होणार नाही. आम्ही त्यांचे पुत्र आहोत. आमचा वकूब आम्हास माहीत आहे. आपले आशीर्वाद आमच्या पाठीशी असावेत.''

मल्हारबुवांशी जिव्हाळ्याची चर्चा करून संभाजीराजांनी कोरटीचा मठ सोडला. त्यांचे मन समाधान पावले होते. दुडक्या चालीने दौड घेत असताना ते हंबीररावांना म्हणाले, ''मामासाहेब, कऱ्हाडतर्फेच्या देशाधिकारी भानाजी गोपाळांना पत्र देण्यास सांगा चिटणिसांना —

''आम्ही गोसावीबुवांचे दर्शन घेतलं. संभाषण प्रसंग झाला आहे. बुवा सदाव्रती, प्रामाणिक ईश्वरभक्त आहेत. मौजे नाडोली गाव त्यांचे मठास अग्रहार करून चालविणे. उजूर व हरकत न घेणे.''

''जी.'' हंबीररावांनाही तो निर्णय ऐकून समाधान वाटले होते. 'चंद्रावत' फौज गाठण्यासाठी आडव्या वाटेने वाईच्या रोखाने दौडत होता!

संभाजीराजांचा मेळ पडताच फौजेचा तळ एक मुक्काम करून वाईहून हलला. महाबळेश्वरमार्गे, रडतोंडीच्या घाटाने प्रतापगडच्या खोरीवर आला.

कुलदेवता भवानीचे स्थान असलेल्या प्रतापगडचे शिखर दिसताच मान लवती करून संभाजीराजांनी त्याला वंदन दिले. वरकड फौज घाटमाथ्यावरच ठेवून हंबीरराव, रूपाजी, महादजी, रायाजी-अंतोजी अशा शेलक्या मर्दान्यासह, पाचशे धारकरी घेऊन ते खोरीत उतरले. भवानीची पायधूळ घेण्यासाठी प्रतापगडच्या वाटेला लागले.

प्रतापगडच्या पायथ्याशी असलेली, जनीच्या टेंब्यावरची अफझलची ठसठशीत कबर दिसताच संभाजीराजांच्या हातचे कायदे आखडले गेले. चुनेरंगी कबरीवर नजर खिळलेले युवराज हंबीररावांना म्हणाले, ''मामासाहेब, आबासाहेबांच्या हातून मरण लाभलेला खानही भाग्यवानच! आपल्या दरबाराची चाकरी करीत तो इतरत्र कुठेही कामी येता तर त्याची एवढी भरीव नामोनिशाणी मागे ना उरती!''

''जी युवराज, आमी एवढं लगत दिमतीला हुतो थोरल्या धन्यांच्या पर— पर आमास्नीबी कदी माग घावला न्हाई त्येंचा. मान्सं काय, पावसाळी आळंब्यागत येत्यात आन् जात्यात. पर धनी त्ये धनीच!'' महाराजांच्या आठवणीने हंबीररावांचा आवाज धरल्यासारखा झाला.

आगवानीसाठी आलेल्या प्रतापगडाच्या किल्लेदारासमवेत रचीव पायऱ्या चढत संभाजीराजे गडमाथ्यावर आले. केदारेश्वराचे दर्शन घेऊन बालेकिल्ल्याकडे जाताना

किल्लेदाराला म्हणाले, ''आईच्या पूजेची सिद्धता करा. आम्ही थोडा समय आहोत इथं. पुढं निवांतपणी येणार आहेत.''

''जी'' म्हणत किल्लेदार भवानीच्या पुजाऱ्याला गाठण्यासाठी निघून गेला.

दुपारचा प्रहर टळला होता. हात-पाय क्षाळलेले संभाजीराजे बालेकिल्ल्यातून बाहेर आले. तटबंदीच्या लगत होत एकटेच उत्तरेच्या रायगडाच्या रोखाने बघत उभे राहिले.

''देवळाकडं चलायचं न्हवं? जुपी जाल्येय सम्दी पूजंची.'' हंबीररावांनी सांगितले.

''चला''

सरलष्करांसह युवराज भवानीच्या मंदिरात आले. स्वहस्ते देवीची पूजा बांधून तीर्थ-प्रसाद घेतला. गडावर एक फेर टाकून भरल्या मळवटाने ते सर्वांसह प्रतापगड उतरले. आता मनाला ओढ होती फक्त रायगडाची.

पारघाटातील फौजेला मिळून संभाजीराजे महाडावर उतरले आणि मृगाच्या पावसाने घसघसती झड धरली. वीस हजारांचा माणूसमेळ पार धारांखाली झोडपून निघू लागला. फौज खिळून पडली.

''युवराज आले ऽ!'' खबर कडकडत्या विजांनी रायगडावर पावती केली!

गडागडांची चौकीबंदी करून आलेले पिलाजीमामा यांच्यासह संभाजीराजांच्या सैन्याला मिळाले. मृगाने भांगा देताच हंबीरराव, पिलाजीमामा यांच्यासह संभाजीराजांच्या फौजेने पगड्यांवरचे पाणशिंतोडे झटकले. हत्यारबंद मावळ्यांचा पाणलोट रायगडाकडे निघाला. पाचाडची वेस येताच रणशिंग, नगारे, चौघडे यांची झिंबड उसळली. आला तर कटवाल्यांच्या हस्तकांशी इथंच मुकाबल्याचा प्रसंग येणार होता.

कमरेची म्यानबंद तेग उपसून आघाडीला असलेल्या संभाजीराजांनी तो हात तसाच उंच उठविताच पाठच्या मावळी लोटातून, मृगाने भरले आभाळही थरकून जावे असा रणघोष उसळला — ''हर हर ऽ म्हादेव!''

प्रचंड वृक्ष डांगलत, चीत्कारत येणाऱ्या हत्तीसमोर, कुऱ्या उठवीत कोल्ह्यांचा तांडा यावा तसा मालसावंत हा सरदार पाचाडाच्या वेशीवर आपल्या मेळासह संभाजीराजांना आडवा आला. डोळ्यांत पळस उतरलेले संभाजीराजे घोडा फेकीत खासा पुढे झाले. खुद्द मालसावंतालाच त्यांनी अंगावर घेतला.

तलवारीच्या चार चौकातच संभाजीराजांनी त्याला घोड्यावरून खालच्या चिखलात उतरविला! आडणा निखळला. बांधे फुटताच पाण्याचा मुसंडा उधळावा तशी युवराज सरलष्करांची फौज पाचाडात घुसली.

''मामासाहेब, तुम्ही असेच गड चढून येसाजीकाकांना मिळा. पुन्या गडाची चौकीबंदी करा.'' चढ्या घोड्यावरूनच तेगीचे टोक रायगडाकडे रोखून संभाजीराजांनी पिलाजीमामांना आज्ञा दिली. आपला जमाव घेऊन पिलाजी रायगड चढू लागले.

हंबीरराव, आनंदराव यांच्या सोबतीने संभाजीराजे थोरल्या आऊंच्या छत्रीजवळ आले. मांड मोडून त्यांनी मोजड्या उतरल्या. अंगावरची वस्त्रे भिजलेले युवराज, मृगधारांनी भिजलेल्या छत्रीसमोर आले. आपला माथा त्या छत्रीच्या पायरीवर ठेवलेल्या संभाजीराजांना तो वर उचलावासा वाटेना. "भुरक्या पाणसरींचेच हात करून थोरल्या आऊसाहेब ते आमच्या पाठीवरून तर फिरवीत नाहीत ना!" या विचाराने तर युवराजांचा उमदा देह थरथरला. मोठ्या निकराने त्या चिंब पायरीवरचा माथा त्यांनी वर घेतला. तसे पायीच संभाजीराजे खासेवाड्याकडे निघाले. मासाहेब पुतळाबाईंचे दर्शन घेण्यासाठी!

वाड्याची सदर येताच तुळईला टांगल्या घाटेखाली येऊन ते सुन्न मनाने उभे राहिले. एखादा पुतळाच चालतो आहे असे वाटावे तसे जड पावली आतल्या दरुणीदालनाकडे निघाले. दालनाचा दगडी उंबरठा ओलांडताना त्यांनी मन बांधून घेतले. आत पुतळाबाई, एका झरोक्याशी पाठमोऱ्या उभ्या होत्या. पांढऱ्या वस्त्रामुळे त्या जिजाऊंच्यासारख्या दिसत होत्या.

"मासाहे ऽ ब, आम्ही आलोत ..." दालन शहारले.

जशा होत्या तशाच पुतळाबाई मुखावर ओंजळ चढवीत उभ्या अंगी गद्‌गदू लागल्या. नावाप्रमाणेच उजळ असलेला तो जीव अनिवार शोकाने घशा काळजात भरून आला. "आपलं उजाड कपाळ एवढ्या वर्षांनंतर भेटणाऱ्या युवराजांना कसं दाखवावं?" या एकाच कोंडीने पुतळाबाई घुसमटल्या होत्या! तशाच उभ्या होत्या.

पावलागणिक टपकणाऱ्या आसवांचे भान नसलेले संभाजीराजे पुढे होत पुतळाबाईंच्या जवळ जाऊन कळवळून म्हणाले, "आम्ही – आम्ही आलोत मासाहे ऽ ब."

पदराने डोळे निपटीत पुतळाबाई वळल्या. त्यांचा केतकरंगी फटफटीत मळवट बघताना कुणीतरी तेगीचे धारदार टोकच आपल्या छातीवरून आडवे ओढल्यासारखे संभाजीराजांना वाटले. क्षणापूर्वी बांधलेले मन त्यांच्या कब्जातून निसटले. "आबासाहेब आपल्याबरोबर केवढं मोलाचं काहीतरी घेऊन गेलेत!" या विचाराने तर ते उजाडपणाच्या भावनेने शहारलेच!

मस्तक चरणांवर ठेवण्यासाठी वाकू बघणाऱ्या संभाजीराजांना थोपवून मिठीत घेत पुतळाबाई उमसल्या, "असं कसं झालं हे युवराज! स्वारी तुम्हा-आम्हाला न भेटता गेली! ह्यात वाया झाली! आता जीव थकला!" त्या ममतेच्या मिठीत संभाजीराजांना वाटले, "आम्ही – आम्ही तुमच्या पोटीच उपजतो तर ..."

कसल्यातरी विचाराने शोकावेग आवरल्या पुतळाबाईंनी धरल्या खांद्यांनी संभाजीराजांना तसेच समोर घेतले. गर्दन खाली घातलेल्या युवराजांना त्या बांधील बोलल्या, "मान वर घ्या."

संभाजीराजांनी मासाहेबांच्या नजरेला नजर दिली. क्षणापूर्वी वरच्या आभाळासारखी दाटून आलेली मासाहेबांची नजर आता पार निवळली होती. त्यांच्या डोळ्यांत जसे दोन सूर्यच उतरले होते.

"आम्हास 'मासाहेब' म्हणता. एक मागणं ऐकता आमचं?" त्या आवाजाला थेट महाराजांची झाक आली होती.

"जी. मागणं का, आज्ञा व्हावी." तसली पोच नसलेले संभाजीराजे अदबीने बोलून गेले.

"तर मग ही आमची पहिली आणि शेवटची आज्ञाच माना. आईच्या माळेवर हात ठेवून सांगा ती पाळू म्हणून."

"जी, पाळू."

"शंभूबा ऽ ळ, स्वारी गेली आता – आता जिणं संपवावं म्हणतो आम्ही!! आम्ही स्वारीच्या मोजड्यांची दौलत उराशी घेऊन अग्नी भक्षण करणार! सती जाणार! सिद्धता करा." दालनाच्या पोकळीत नजर रोवलेल्या पुतळाबाई मूर्तीसारख्या दिसू लागल्या. प्रतापगडाच्या मंदिरातील! निश्चल, निर्धारी.

उतरत्या निशाणासारखे ढासळलेले संभाजीराजे त्यांच्या पायाभोवती मिठी घालत हताश स्फुंदताना म्हणाले, "काय बोललात हे मासाहेब! कसली आज्ञा केलीत ही आम्हाला!" त्यांच्या खांद्यावर हात ठेवलेल्या वरच्या मूर्तीला यातला एकही शब्द काही ऐकू जात नव्हता.

"गडाचा बंदोबस्त झाला आहे. टाकीनं निघून यावं." येसाजी कंक आणि पिलाजीमामा यांचा निरोप मिळताच पाचाड सोडून संभाजीराजे हंबीररावांसह रायगड चढू लागले. त्यांच्या मागून पाच हजार मावळा गडचढीला लागला.

चित् दरवाज्यासमोर येताच संभाजीराजे थबकले. "जेव्हा इथून निघालो तेव्हा बरोबर महाराजसाहेब होते आणि आज ..." थरथरल्या हाताने त्यांनी दरवाज्याच्या उंबरठ्याला स्पर्श करून आत पाय ठेवला.

हंबीररावांनी इशारत केलेले भोई पावसाच्या सरी तरू लागताच रिकामी पालखी घेऊन युवराजांना गाठीत होते. हातपंजा डोलवून ती नाकारत संभाजीराजे दरडीच्या झाडाखाली आसरा घेत होते. सरी सुमार होताच पुन्हा गडचढीला लागत होते. पाठचा मावळा घोंगड्यांच्या खोळी पांघरून पावसाला दाद न देता गड चढत होता. लहाना दरवाजा मागे पडला. रायगडाचे आघाडी मनोरे दिसू लागले.

काठभरल्या गंगासागरावर नजर टाकून संभाजीराजे मनोऱ्यात आले. तिथे गडाच्या अठरा कारखान्यांतील माणसेच माणसे दाटीने उभी होती. त्यातून पांढऱ्या गलमिश्यांचे येसाजी कंक पुढे आले. ते मुजऱ्यासाठी झुकणार एवढ्यात झेपेने पुढे होत संभाजीराजे

त्यांचे पाय शिवता शिवता म्हणाले, "येसाजीकाका, तुम्ही आशीर्वाद द्यायचा आम्हाला!" त्यांना वर घेत कंकांनी छातीशी लावले. गहिवरला म्हातारा म्हणाला, "किती योळ लावलीसा ह्यो! पाऽर त्या येली गडाची. बरं तर बरं आलासा! ज्येवडं कोलांट्या मारनारं हुतं त्येस्नी अडकवून टाकलंया. ह्यो गड अदुगर ताब्यात घ्या अन् नेटाकं जुपीला लावा बगू."

"लावा बघू नाही येसाजीकाका, लावूया म्हणा. आम्ही एकटे काय करणार?"

आबाजी सोनदेव, येसाजी कंक, हंबीरराव, पिलाजीमामा, आनंदराव, रूपाजी, मदारी, चांगोजी काटकर, जोत्याजी केसरकर अशा हिमतीच्या माणसांनी मेळ धरलेले संभाजीराजे गडदेव जगदीश्वराच्या दर्शनाला चालले.

"युवराज गडावर आले!" ही खबर मिळालेली माणसे झुंडीने येऊन दुतर्फा उभी राहिली होती. वरून पावसाच्या सरी आणि भोवतीने माणसांचे झडते मुजरे आपलेसे करीत संभाजीराजे जगदीश्वराच्या मंदिरद्वारात आले. शिवपिंडीचे दर्शन करून होळीमाळाने ते महादरवाज्यात येताच पुऱ्या तीन महिन्यांनंतर आज रायगडचा नगारखाना पहिल्याने दुडदुडला!

समोर सिंहासन होते – श्रींचे, रिकामे होते, धन्याशिवाय पोरके दिसत होते.

एक एक पाऊल टाकत, कुणाच्यातरी मागून चालल्यासारखे संभाजीराजे सिंहासन चौकात आले. याच दरबारी ते हात बांधून 'आरोपित' म्हणून पेश आले होते. त्याच जागी ते क्षणभर खिळल्यासारखे झाले. "आबासाहेब, आज – आजही आम्ही बांधल्या हातांनी इथे उभे राहू! आरोपित म्हणून. तेव्हा घेतली नाही ती सजा आज घेऊ, ताठ गर्दनीनं. 'पण – पण – तुमची सफाई खडी होत नाही!' असं या सिंहासनावरून एकवार तरी ऐकवाल आम्हास?" सैरभैर झालेल्या संभाजीराजांची नजर चौकभर भिरभिरली. झिरझिरीत आडपडदे, कनाती फक्त वाऱ्यावर सळसळत होत्या.

तसेच चालत ते सिंहासनाला मिळणाऱ्या सोनपायऱ्या चढू लागले. हंबीरराव, आनंदराव, येसाजी, मदारी सारी माणसे दम रोखून त्यांच्याकडे बघतच राहिली. आजवर दरबारी मार्गाने त्या पायऱ्या अशा कधीच कुणीही चढले नव्हते.

जिथे युवराज म्हणून संभाजीराजे बैठक घेत होते ती पायरी येताच ते थांबले. आपलेच बसते रूप त्यांना दिसून गेले.

पुढे होत ते थेट सिंहासनासमोरच उभे राहिले. दरबारी चौकातील माणसे अस्वस्थ झाली. एकमेकांकडे भांबावून टकमक बघू लागली. त्यांना वाटले युवराज असेच गैरिवाजी सिंहासनावर बसणार की काय! त्यांनी श्वास रोखले.

सोनेरी असल्यामुळेच समोरचे भुंडे सिंहासन पार उदास दिसत होते, त्याच्या बगलेचे जबडे खोललेले सिंह निष्प्राण भासत होते. वरचे छत्र डळमळते वाटत होते.

या क्षणी संभाजीराजांना खोलवर जाणवले, "खरोखरच आता या जगात आबासाहेब नाहीत!"

संभाजीराजांनी कमरेच्या हत्याराचा रेशमबंद उकलला. म्यान कपाळावर लावून आपली तलवार त्या चरणासनावर ठेवली. गुडघे टेकून महाराजांच्या पायांवर ठेवावा तसाच आपला माथा त्या चरणासनावर ठेवला! जीव भरून आला त्यांचा.

मिटल्या डोळ्याने मूकपणे ते म्हणत होते. "महाराजसाहेब, आता तुमच्या हाताचं नाही पण पायधुळीचं बळ आम्हाला द्या. आम्ही एकटे आहोत!"

माणसांनी भरला दरबारी चौक ते हृदय हेलावणारे दृश्य बघत होता. त्यातील कैकांनी आपल्या मनांनीच समोरच्या सिंहासनावर संभाजीराजांना बसवूनही टाकले.

हेच संभाजीराजे कधी काळी दिलेरच्या गोटात गेले होते हे कटू सत्य त्या माणसांनी मनाच्या तळात पार गाडून टाकले आणि युवराजांना पदरी घेणाऱ्या शिवछत्रपतींचेच आपण रयत - चाकर आहोत हे सिद्ध करण्याचे ठरवून टाकले. त्यांना त्या उंचावरच्या भव्य सिंहासनावर बसणारा समर्थ राजा हवा होता. संभाजीराजांसारखा भर उमेदीचा, तगडा, लढाऊ, कदरदार आणि सर्वांत अधिक म्हणजे गेल्या छत्रपतींच्या प्रेमाखातर, शान-मान राखण्यासाठी प्रसंगी जिवाचा सुरुंग उडवायला सिद्ध असणारा. त्या सिंहासनाचा डौल राखणारा. मनातील शिवछत्रपती ज्याच्या रूपात बघता येतील असा – त्यांच्याच रक्ताचा. संभाजीराजांनी मनाच्या उमाळीने, आपला अनेक प्रसंगांशी टकरत आलेला माथा चरणासनावर टेकला होता तो आपल्या मनःशांतीसाठी. त्याने जमल्या माणसांची मने अन् मने मात्र कब्ज झाली. तीन महिने सुना असलेल्या त्या चौकात आज श्वास भरत होता. चौकाला जाग येत होती.

मावळलोकांना आजारी महाराजांचे मनभरे दर्शन घडले नव्हते. मंचकारोहण केलेल्या रामराजांचे मुख दिसले नव्हते, पण आज त्यांच्याच मेळातून आलेला राजपुरुष त्यांना सिंहासनाजवळ हवा तसा बघायला मिळत होता.

सोयराबाई आणि त्यांच्या हस्तकांना अवांतर सारे समजले होते, फक्त महत्त्वाचे एकच उमजले नव्हते, राजा हा प्रजेसाठी असतो. भाराभार खलबते करीत बसण्यासाठी नसतो. शेकडो भावभरे डोळे आपल्यावरच खिळले आहेत याचे काहीच भान नसलेले संभाजीराजे सिंहासन चौथऱ्यामागून महाराजांच्या खासेवाड्याकडे जाणाऱ्या मार्गाने चालत निघाले.

महाराज बसत ती खासेवाड्याची सदर आली. बैठकीवरचा छत्रपतींचा जामा, टोप, चोळणा, हत्यारे हा तबकात मांडलेला साज ते बघतच राहिले. त्यांना वाटले क्षणात त्या साजातून चालतेबोलते आबासाहेबच खडे होतील. हात खांदाभेटीसाठी पसरते करताना म्हणतील – "लेकरा, कुठं गेला होतास?"

त्या बैठकीला अदब देऊन जरा अंतर ठेवून संभाजीराजे सदरेत बसले.

दरबारी चौकातील माणसे एक एक करीत पालखी दरवाज्याने सदरेला रुजू झाली. त्यांतील चांगोजी काटकराला युवराजांनी फर्मावले, "चांगोजी, नजराण्याचं एक साजतबक सिद्ध करा."

"जी." चांगोजी निघून गेला,

"कोण कोण आसामी दस्त केलीत केलीत तुम्ही?" येसाजीकाकांकडे आणि मामासाहेबांकडे बघत युवराजांनी विचारले.

"बापूजी माळी, सूर्याजी निमकर, भांडवलकर आन् घाटगे." पिलाजीमामांनी तपशील दिला.

"घरांवर चौक्या चढवून बाळाजी चिटणीस, त्येंचा मुलगा आवजी आन् फर्जंदचा हिरोजी बी बंद केलाय." येसाजी म्हणाले.

"ठीक आहे. कंककाका, तुम्ही चलाखीची जहाली केलीत. नाहीतर..."

"लई कट्टाळलाव आमी ह्येंच्या तिरक्या चालीला. गडाचं दरवाजं बंद काय करत्यात. धन्याभवती पारा काय चडवित्यात. एवढा मानूस हाय आमच्या दिमतीला पर सबूद इच्चारला न्हाई कुनी आमास्नी कशानं कसं करावं म्हून."

"तुम्ही अडचणीचे होता त्यांना काका. नेकीची अडगळ वाटली त्यांना." संभाजीराजे चांगोजीची वाट बघत होते.

जामदारी दालनाकडून चांगोजी तबक घेतलेल्या खिदमतगारासह आलेला बघताच संभाजीराजे हंबीररावांना म्हणाले, "चला. मामासाहेब, आमच्या संगती या."

सदर सोडून ते बाहेर पडले. सातमहालाच्या रोखाने चालू लागले. मागून हंबीरराव, चांगोजी आणि तबकधारी चालले.

युवराज येताहेत हे बघून सातमहालाच्या कुणबिणींत कालवा उठला.

महाराणी सोयराबाईंच्या महालाचा दरवाजा तर करकरत बंदच झाला! त्या बंद दरवाज्यासमोर आलेल्या संभाजीराजांनी हंबीररावांकडे बघितले. त्या नजरेचा मतलब पकडत हंबीरराव पुढे आले.

"दरवाजा खोला ऽ!" हंबीररावांच्या थापेबरोबर दरवाज्यावर आदळलेल्या त्यांच्या मनगटीच्या चंदेरी कड्याचा 'खट' असा आवाज उठला. मग थापांमागून थापा दरवाज्यावर पडल्या.

आत कसली तरी कुजबूज चालली होती. दरवाज्याबाहेर निसटते शब्द येत होते—

"... आमची आण आहे. जाऊ नका ऽ!

"सोडा ऽ सोडा आम्हाला ऽ!"

बऱ्याच वेळाने दरवाजा खोलला गेला. समोर रामराजे उभे होते! त्यांची चर्या रडवेली, तांबूस दिसत होती. जशी आजवर घातली होती तशीच त्यांनी साद घातली,

"दादामहा ऽ राज!"

झापा घेत संभाजीराजे त्यांच्याजवळ गेले. पाय शिवण्यासाठी वाकणाऱ्या रामराजांना "बाळराजे ऽ!" म्हणत आवेगानं त्यांनी जवळ घेतले. त्यांना थोपवून ते म्हणाले, "घाबरू नका. मान वर घ्या!"

डबडबल्या डोळ्यांनी आपल्या धिप्पाड दादामहाराजांकडे बघत दबल्या कोंडल्या रामराजांच्या तोंडून कुचमले बोल होलपटत बाहेर आले, "तुम्ही – तुम्ही आमच्या मांसाहेबांना ... मारणार?"

ते ऐकून अंगभर काटा सरकलेल्या संभाजीराजांनी पराकोटीच्या दुःखावेगाने रामराजांचे मस्तक एकदम पोटाशी घट्ट धरले. नको ते ऐकल्याने त्यांचा उभा देह ताठरला होता. रामराजांच्या पाठीवर फिरणारा त्यांचा हात सांगत होता, "कशाही असल्या तरी त्या मासाहेब आहेत आमच्या. तुम्ही आमच्याहून थोरले असता तर – तर आज त्यांच्या समाधानासाठी आम्हीच जेरबंदीने पेश झाले असतो त्यांना!"

रामराजे हसत होते. त्यांना थोपटून शांत करीत संभाजीराजे म्हणाले, "सबूर व्हा. शांत व्हा. आपल्या दादामहाराजांचा तो नजराणा स्वीकारा."

रामराजांनी तबकाला हात दिला. डोळे टिपणाऱ्या हंबीरमामांचे पाय शिवले.

रामराजांना बरोबर घेऊन संभाजीराजे सकवारबाईंच्या महालाच्या रोखाने चालू लागले. आपल्या महाली अंतःपुरात देव्हाऱ्यातील कुलदेवता वाघेश्वरीसमोर मस्तक टेकलेल्या सोयराबाई अंगभर गद्गदत होत्या. त्यांना वाघेश्वरी कळली नव्हती आणि संभाजीराजेच काय पण रामराजेही समजले नव्हते!

"ठण ऽ ठण ठण" पहाटवाऱ्याबरोबर कानी येणारे नाद संभाजीराजे ध्यानपूर्वक ऐकू लागले. मधूनच त्या नादांत पक्ष्यांचा कालवा मिसळत होता. जगदीश्वराच्या मंदिरात काकड आरती फिरत होती. छातीशी हात नेत तिला युवराजांनी मान दिला.

हाततळव्याचे दर्शन घेऊन शालनामा हटवून त्यांनी मंचक सोडला.

खासेवाड्याच्या सुखदालनात ते रात्री बराच वेळ तळमळले होते. उत्तररात्रीला केव्हातरी त्यांचा डोळा लागला असावा. हे आठवताच त्यांनी पहाऱ्याला साद घातली, "कोण आहे?"

एक धारकरी पेश आला. हात-तोंड क्षाळण्यासाठी हमाम्याकडे जाताना त्याला आज्ञा मिळाली, "जरा चांगोजींना पेश पाठव."

थोड्या वेळात पोसाने हात-तोंड पुसणाऱ्या युवराजांसमोर चांगोजी पेश झाला.

"एवढ्या फाटंचं का याद करावं?" या विचाराने तो बावचळला होता.

"चांगोजी, पाचाडच्या सदरेवर मासाहेबांच्या रिवाजाची घाट वाजते की नाही?" चांगोजीची उरलीसुरली झोप पार उडाली!

"जी." तो चाचरला.

"गोंधळलात का?"

"थोरलं धनी आज्यारी पडलं आन् तो रिवाज कवा बंद पडला ध्यानी आलं न्हाई कुनाच्या!" चांगोजीने खरे ते पेश केले.

"व्वा ऽ! म्हणजे इथवर मजल गेली होती म्हणायची! काटकर, कुलाचारांचे रिवाज असे सुखासुखी बंद पडत नसतात. ती वाजतो असली की थोरल्या मासाहेबच या पंचक्रोशीत वावरताहेत असं वाटतं, आजच पाचाड़ात उतरा आणि तो रिवाज चालता होईल ते करा."

"जी." चांगोजी लवून जायला निघाला.

"आणि जाताना हत्यारी पहाऱ्यांचा एक मेणा घेऊन या."

"जी." चांगोजी निघून गेला. संभाजीराजे झरोक्यातून पाचाडच्या रोखाने बघत राहिले. पावसाच्या सरी कोसळत होत्या. लांबचे का ऽ ही दिसत नव्हते.

तबकातून वाफारणारे काही तरी घेऊन एक कुणबीण आत आली. तबक चौरंगीवर ठेवून म्हणाली, "भाईर शिर्केमामा हाईत."

"पाठवून दे त्यांना." संभाजीराजांनी तबकातील कटोरा उचलला. ते हुलग्याचं माडगं होतं! दारात पिलाजीमामा उभे होते. हातचा कटोरा तसाच खाली ठेवून संभाजीराजे "या." म्हणत पुढे झाले. मामांचे पाय शिवताना त्यांचे मन येसूबाईंच्या आठवणीने भरले होते.

"युवराज, तुमच्या कबिल्याचं कसं करायचं? पोर पा ऽ र हडबडल्येय तब्येतीकडनं. सव्वा वरीस जाले तुमचं दर्शन न्हाई तिला." पिलाजींचा आवाज घोगरला.

"मामासाहेब, आमच्या कपाळरेषेबरोबर आमचे पाय फिरताहेत. साडेतीन वर्षांनी आज ते रायगडाला लागताहेत हे बघताच तुम्ही. शृंगारपुरी माणसं पाठवून बोलावून घ्या युवराज्ञींना. केशवपंडित, उधो योगदेव आणि कवी कुलेशांनाही येण्याचे निरोप द्या."

"जी" पिलाजींच्या चर्येवर फार दिवसांनी हसे तरळले.

"त्ये का ठेवलासा? घ्या की." तबकातील कटोऱ्याकडे हात दाखवीत पिलाजीमामा मायेने म्हणाले.

"जी... ते" संभाजीराजांना कसे आणि काय बोलावे सुचले नाही.

"येतो आम्ही. आजच पुराकडं मान्सं धाडतो." पिलाजी निघून गेले.

कटोऱ्यातून उठणाऱ्या वाफांकडे संभाजीराजे बघत राहिले. एक कोवळा चेहरा त्यांना दिसू लागला. भवानीबाईंचा. "केवढ्या झाल्या असतील त्या? आणि युवराज्ञी? मामा म्हणाले तब्येतीचं त्यांच्या. होय येसू, खरं आहे तुम्ही म्हणता ते की, 'आम्ही आमचं बाशिंग रानवाऱ्याशी बांधलं आहे.' तुम्ही एकल्यानंच नाही. तुमच्या धाकल्या बाईंनीही! तुम्ही निदान आपल्या घरी तरी आहात, त्या...?" नगरच्या किल्ल्यात कैदेत असलेल्या दुर्गाबाईंच्या आणि मदनसिंहाच्या आठवणीने संभाजीराजांची घालमेल झाली. हात पाठीशी गुंफीत ते भयाण एकटेपणाच्या जाणिवेने अस्वस्थ फेर घेऊ लागले. तबकातील माडगे तसेच निवत चालले.

स्नान घेऊन, देवमहालातील भवानीचे दर्शन करून संभाजीराजे वाड्याच्या सदरेला आले. जमले सदरकरी त्यांना अदब देत कमरेत लवले. युवराजांनी बैठक घेतली.

"मोगलाईतून औरंगाबादेकडील खबर आहे. आज्ञा होईल तर–" राघो स्वानंद दफ्तरदार बोलले.

संभाजीराजांनी मंजुरीचा हात उठविला. खबर सदरकरी ध्यान देऊन ऐकू लागले.

"दिल्ली दरबारनं दख्खनसुभा शहाआलमं यास परत बोलावून घेऊनं त्यांच्या जागी खान जहान बहादूर कोकलताश याला नामजाद केले आहे. औरंगाबादेत उतरलेला खान फौजबंदी करीत आहे."

कपाळी अठी धरलेले संभाजीराजे चिंताक्रांत झाले. महाराजांच्या निधनाचा समय धरून हा अर्थपूर्ण बदल होत होता. शहाआलमनं सुभेदार असताना कधी औरंगाबाद सोडले नव्हते.

"दफ्तरदार, मोगलाईच्या तोंडावरच्या किल्लेदारांना या बदलाची पत्रे द्या. ठाणी कडेकोट बांधून सावधानगीनं राहण्यास लिहा."

"जी." राघो स्वानंद लवले.

"मामासाहेब, पन्हाळ्याला जासूद पाठवून म्हलोजींना कैदी रवाना करण्याचा निरोप धाडा." संभाजीराजांनी हंबीररावांना सांगितले.

"जी. जामदारखाना, दफ्तरखाना, जवाहिरखाना समद्यास्नी मोहरा हाईत. त्या तुटल्याशिवाय गड राबता होत न्हाई." हंबीररावांनी कारभारी लोकांची कुचंबणा मांडली.

गडाची ही सुद्धा नाकेबंदी झालेली ऐकताना संभाजीराजे क्षणभर कष्टी झाले. मग निर्धारपूर्वक म्हणाले, "सरलष्कर, तुम्हीच कारखान्यांच्या प्रमुखांच्या साक्षीनं मोहरा तोडून टाका. साऱ्या बारदान्याची तपशीलवार यादी सिद्ध करायला सांगा प्रमुखांना, आणि आबाजी, तुम्ही सुरनिसी दफ्तर हाती घ्या."

"एक तक्रारी अर्ज आहे स्वामी." राघो स्वानंदनी दुसरा मामला पुढे घातला.

"कुणाचा?"

"बैलहोंगल तर्फेच्या मुरगोडचे देसाई माणकू रुद्राप्पा यांचा."

"काय म्हणतात माणकोजी? आम्ही त्यांना पन्हाळ्याहून लिहिले होते की, खंडणीचा तह महाराजसाहेबांनी केला आहे तन्नाच चालवू म्हणून."

"त्याबद्दल नाही त्यांची तक्रार. माणकोजी खंडणी वसूल करून बेळगावतर्फेच्या कटोरगडाच्या इमारतींच्या देखरेखीसाठी व तनख्यासाठी देतात. सध्या आपले अधिकारी विठ्ठल हरी त्या भागातून खंडणी म्हणून मध्येच पैसा वसूल करताहेत. त्यामुळे कटोरगडच्या भरण्यात तूट पडत आहे." राघोपंतांनी तपशील दिला.

"दफ्तरदार, त्या विठ्ठल हरींला करडी समज द्या – 'पैशाच्या वराता करण्यास तुम्हास काही एक समंध नाही! पुन्हा मुरगोड तर्फेला उसूल घेतल्यास मुलाहिजा नाही.' तसेच माणकोजींना लिहा – 'कटोरगडचा भरणा पूर्वीप्रमाणे करणे. तूट – तसदी न देणे.'"

"जी."

सदरेवरची माणसे संभाजीराजांचे सावध, तातडीचे आणि अचूक निर्णय ऐकून मनोमन समाधानी होत होती.

"पाचाडच्या मासायबांचा मेणा मनोऱ्यापाशी आलाय." चांगोजीने पाठविलेल्या धारकऱ्याने पेश येत वर्दी दिली. संभाजीराजे बैठक सोडून उठले. माणूसमेळाने आघाडी मनोऱ्याकडे चालले.

त्यांना बघताच ठाण झाल्या मेण्यातून पुतळाबाई बाहेर आल्या. संभाजीराजांनी त्यांची पायधूळ घेतली. हंबीरराव, राघोपंत, येसाजी, आनंदराव साऱ्यांनी मुजरे भरले!

"चलावं मासाहेब." संभाजीराजांनी सातमहालाकडे जाणाऱ्या पालखी दरवाज्याकडे हातरोख दिला. जिंदगीचे सारे सारे गंगासागरात अर्पण केल्यासारख्या पुतळाबाई चालत होत्या. सकवारबाईंच्या महाली येताच त्या म्हणाल्या, "युवराज, जरा राजोपाध्यांना बोलावून घ्या. स्वारींचे धर्मशास्त्राप्रमाणे करायचे जे जे राहून गेले आहे ते त्यांच्या सल्ल्याने आम्ही करणार आहोत." त्यांचा आवाज आभाळातून उतरल्यासारखा वाटत होता.

संभाजीराजांनी बाळंभट राजोपाध्यांना वर्दी दिली.

"शास्त्रीबुवा," सकवारबाईंच्या महाली ते रुजू झाल्यावर पुतळाबाईंनी त्यांना प्रश्न केला. "स्वारींचे कोण कोण विधी राहून गेले?"

"स्वामींचे अंत्यसंस्कार 'भडाग्नीने' झाले आहेत. त्यांची शास्त्रशुद्ध मुंज झाली होती. संस्कार शास्त्रयुक्त 'मंत्राग्नीने' व्हायला पाहिजे होते."

"तुम्ही असतानाही ते झाले नाहीत. काय समजावं आम्ही?" पुतळाबाईंच्या डोळ्यांत सात्त्विक संतापाची झाक चमकली.

चरकलेले राजोपाध्ये घाईने म्हणाले, "आम्ही असण्याचा प्रश्न नव्हता मासाहेब. स्वामींच्या संस्कारांना ज्येष्ठ म्हणून मंत्राग्नीसाठी युवराजांची आवश्यकता होती."

"मग आता काय करता येईल? शास्त्रार्थ काय सांगतो?" चुटपूट लागलेल्या संभाजीराजांनी विचारले.

"अजूनही शास्त्रसंमत विधी करता येतील स्वामींचे."

"कसे?" कुठेतरी खोलवर समाधान लाभलेल्या संभाजीराजांनी विचारले.

"स्वामींची काष्ठप्रतिमा सिद्ध करून, युवराजांच्या हस्ते तिला मंत्राग्नी देऊन पिंडदान करावं लागेल." संभाजीराजे आणि पुतळाबाई एकमेकांकडे बघतच राहिले.

"ठीक आहे शास्त्रीबुवा, तुम्ही शास्त्राप्रमाणे सिद्धता करा." पुतळाबाई निर्धाराने म्हणाल्या.

"जी." राजोपाध्ये जायला निघाले.

"आणि हे बघा, आमच्यासाठी एक मुहूर्त शोधा. आम्ही ... अग्निभक्षण करणार आहोत!"

"मासाहेऽब ..." संभाजीराजे कळवळून काही बोलणार तोच हात उठवून तो डोलवीत पुतळाबाई म्हणाल्या, "हं – युवराज, तुम्ही वचन दिलंय आम्हाला, आता पायगोव्याचं काही बोलू नका." शांतपणे पुतळाबाई अंत:पुराकडे निघूनही गेल्या.

कोंडल्या घशाने, त्यांचो पाठमोरी मूर्ती बघणाऱ्या शंभूराजांना कळून चुकले, "आबासाहेब, तुमच्या जवानीचंही बळ आमच्या ठायी नाही! अशाच जायला निघालेल्या थोरल्या आऊंना तुम्ही रोखून धरलंत. आम्ही!"

संभाजीराजे सुन्नपणे आपल्या महाली फेर घेत होते.

"धनी ऽ" आत आलेला रायाजी बोलता बोलता रुकला.

"काय?"

"पुरास्नं आल्याली सरकारस्वारी गड चढत्येय!"

संभाजीराजे खिळल्यासारखे झाले. आठवणींचा गंगासागर खळबळला. येसूबाईंची रूपेच रूपे क्षणभरात डोळ्यांपुढून सरकून गेली.

"चल." त्याच पावली संभाजीराजे आघाडी मनोऱ्याकडे निघाले. मनोऱ्याच्या दुसऱ्या मजल्यावरून नाणेदरवाज्यातून येणाऱ्या वाटेला त्यांचे डोळे खिळून पडले.

केशव पंडित, उधो योगदेव, चांगोजी, कवी कुलेश, पिलाजी यांनी धरल्या मेळातून एक पडदाबंद मेणा मनोऱ्याच्या पायथ्याशी ठाण झाला. त्यातून दीड वर्षाच्या भवानीबाईंना छातीशी बिलगतं घेतलेली धाराऊ प्रथम उतरली. भवानीबाई उंचनिंच मनोऱ्याकडे टुकूटुकू बघत होत्या.

मनोऱ्याच्या दगडबंद उंबरठ्याला हात लावून तो मळवटाशी नेत येसूबाई बालेकिल्ल्यात आल्या. संभाजीराजांनी मनोरा सोडला.

येसूबाई सातमहालाकडे गेल्या. मासाहेब पुतळाबाई, सकवारबाई आणि होय – सोयराबाईंचीही पायधूळ मळवटी घेण्यासाठी!

भवानीबाईंना घेतलेली धाराऊ संभाजीराजांच्या महाली आली. तिच्या काखेतून भवानीबाईंना आपल्या भुजेवर घेत संभाजीराजांनी म्हातारीच्या पावलाला हात लावताच ती फुटली. ओढींना राजांना जवळ घेत, त्यांच्या चर्येवरून आपली थरथरती बोटे फिरवून ती कानाशिलाशी मोडत म्हणाली, "किती सोकलास रं ऽ माझ्या ल्येका! कशानं काय काय घडलं म्हनावं ह्ये!"

भवानीबाईंच्या गालावर ओठ टेकणाऱ्या संभाजीराजांना बघून तर तिचे डोळे पाघळू लागले.

"दादामहाराज!" दरवाज्याच्या रोखाने प्रेमभरी साद आली. रामराजांच्या खांद्यावर हात ठेवलेल्या येसूबाई येत होत्या. उगवतीचा सूर्य संगती घेऊन येणाऱ्या वासंतिक पहाटेसारख्या! शांत, नि:शब्द, धीरगंभीर. त्यांच्या चालीत थेट जिजाऊंचे वळण आले

होते, डोळ्यांत पुतळाबाईंचा निर्धार. आपल्या स्वारींच्या जवळ येताच पदर ओंजळीत भरून त्यांनी वाकून त्रिवार नमस्कार केला.

"येसू ऽ..." हा एकच, अनंत भावनांच्या भाराखाली वाकलेला, घोगरट शब्द संभाजीराजांच्या तोंडून कसातरी बाहेर पडू शकला.

तो ऐकताच हातचा पदर ओठाशी नेत, तोंड डाव्या दंडाला भिडवलेल्या येसूबाई निशाणकाठीसारख्या उभ्याउभ्याच देहभर थरथरू लागल्या. केवढे, केवढे बोलायचे असून एक – एकही शब्द दोघांच्याही तोंडून बाहेर फुटत नव्हता. संभाजीराजांचा हात भवानीबाईंच्या पाठीवरून नुसताच फिरत राहिला – मन कुठंतरीच!

धरल्या आभाळाआडून आषाढी एकादशीचा दिवस कुचमत वर चढला. पंचक्रोशीतील माणसं जथ्यांनी रायगड चढू लागली. एवढे माणूस गड चढत होते पण कुणीच कुणाशी काही शब्दाने बोलत नव्हते.

भल्या पहाटेच स्नान घेऊन जगदीश्वराचे, देवमहालीच्या भवानीचे दर्शन करून आलेल्या पुतळाबाई सातमहालाच्या सदरी ओट्यावर मांडलेल्या बैठकीवर बसल्या होत्या. त्यांच्या अंगी हिरव्याकंच शालूचा सौभाग्यनेसू, गळ्यात काळ्या मण्यांचा पोत आणि कपाळी मेणमळल्या दाट कुंकवाच्या मळवटाची आडवी बोटे स्पष्ट दिसत होती. त्यांच्या पाठीशी येसूबाई, सकवारबाई, धाराऊ असा जनाना उभा होता. समोर खालच्या मानेने संभाजीराजे, रामराजे, पिलाजीमामा, हंबीरराव, येसाजी, आनंदराव, केशव पंडित अशी मंडळी खडी होती. शेजारच्या घंगाळात सोडलेल्या तांब्याच्या घटिकापात्रावर मधूनच नजर टाकीत बाळंभट राजोपाध्ये मंत्रघोष करीत होते. नासिक-त्र्यंबकहून आलेल्या ब्रह्मवृंदांच्या घोषात तो मिसळत होता. हारीने मांडलेल्या सुपे, दुरड्या, तबके यांतील एक एक वाण उचलून येसूबाई पुतळाबाईंच्या हाती देत होत्या. भरल्या चुड्याने पुतळाबाई 'सतीची वाणं' वाटत होत्या. वाण घेणारी सुवासीन आपल्या भरल्या मळवटाचा माथा मासाहेब पुतळाबाईंच्या विमल चरणांवर ठेवीत होती. तिला राजमुखातून आशीर्वाद मिळत होता– "औक्षवंत व्हा! सौभाग्यवंत व्हा!" सुवासिनींनी माथे टेकल्याने पुतळाबाईंचे पाय कुंकूमय झाले होते. नजर ठरणार नाही असे अपार अपार तेज त्यांच्या चर्येवरून फाकले होते.

राजोपाध्यांनी एक सुवर्णतबक त्यांच्यासमोर ठेवले. त्यात छत्रपती महाराजांच्या पायांची सेवा करून अंगभर पावन झालेल्या, जरीनकस असलेल्या, भगव्या मोजड्या होत्या. पुतळाबाईंनी समोर स्वारीच उभी असावी तसे त्या मोजड्यांवर गंध, हळदकुंकू, अक्षता वाहिल्या. राजोपाध्यांनी दिलेली दूधरंगी फुलांची ओंजळ अर्पण केली, हातच्या तबकातील तेवत्या पंचनिरांजनांनी आणि डोळ्यांत तेवत्या दोन भावनिरांजनांनी समोरच्या अमोल दौलतीला ओवाळताना त्यांना वाटले या मोजड्यांवर क्षणात खुद्द

स्वारीच उभी राहील! हसतमुखाने म्हणेल, "पुतळा, किती वखत करता? इथं चंद्रसूर्यांची, तारकानक्षत्रांची एवढी निरांजनं तेवून आहेत – पण – पण तुमच्याखेरीज ती पूर्ण नाहीत. लवकर या!"

"मासाहेब, हात जोडावेत. जलसिंचन होत आहे." बाळंभट राजोपाध्ये मंत्र थांबवून घोगरट म्हणाले.

पुतळाबाईंनी हात जोडून डोळे मिटले. मंत्रघोषात पवित्र नद्यांचे शीतल जलसिंचन त्यांच्या मस्तकावर होऊ लागले. घटिकापात्र अर्धेअधिक डुबलेले बघून राजोपाध्ये म्हणाले, "चलावं..." चौघा मावळ्यांनी घटिकापात्राचे घंगाळ उचलले.

पुतळाबाई उठल्या. त्यांच्या पायांना मिठी भरत येसूबाई मुसमुसत म्हणाल्या – "मासाहे ऽब!"

त्यांच्या डुयीच्या पदरावर हातपंजा ठेवीत निर्विकार पुतळाबाईंनी आशीर्वाद दिला, "सौभाग्यवंत व्हा! आमच्या युवराजांना – बाळराजांना सांभाळा. स्वारींचा गडमाणूस सांभाळा."

सातमहालाच्या सरत्या जोत्यावर असलेला दगडी खांब आला – 'सतीचा खांब!' रजपुती रिवाजाप्रमाणे सातमहालाबरोबरच कारागिरांनी तो उठविला होता. आज पहिल्याने त्याची पूजा होणार होती. पुतळाबाईंनी खांबाला गंध-फुले वाहिली. या खांबाचा परंपरेने चालत आलेला एक रिवाज होता. सती जाणाऱ्या राजस्त्रीने निर्धारपूर्वक आपल्या मळवटीचे कुंकुमलेणे एकदा का त्याला स्वहस्ते मढविले की तिची वाट फक्त चितेची. मग मागे फिरणे नाही.

तो उभा खांब पुतळाबाईंनी एकदा डोळाभर बघून घेतला. आपल्या माँथ्याचा मळवट त्याच्या माथ्यावर देण्यासाठी उठलेला त्यांचा चुडेसंपन्न हात क्षणभर रुकला. संभाजीराजांच्यात गुंतवा झालेले त्यांचे मन आक्रोशून उठू बघत होते. मोठ्या निकराने त्याला थोपवून पुन्हा स्थिरचित्त झालेल्या पुतळाबाईंनी मेणात मन मिसळलेला आपला पावन मळवट वर्षनू वर्षं वाट बघणाऱ्या त्या मानकरी खांबाला दिला!

जलाभिषेकाने ओलेत्या झालेल्या पुतळाबाईंनी आपल्या कर्पूरगौर हातांची ओंजळ सिद्ध केली. राजोपाध्यांनी त्या ओंजळीत त्यांच्या स्वामींच्या भगव्या मोजड्या ठेवल्या.

चालल्या! पावलागणिक नात्यागोत्याचे मागील पाश रायगडाला बहाल करून मासाहेब पुतळाबाई चालल्या. मोजड्या हाती घेऊन. अग्निमूर्ती आपल्या पतीची वाट आपलीशी करण्यासाठी चालली! तेजाची अमर सोबत करण्यासाठी जातिवंत तेज चालले! गलबलून गेलेल्या संभाजीराजांच्या हातून रामराजांचा हात केव्हा गळून पडला ते त्यांचे त्यांनाच कळले नाही. चालणे अशक्य झालेली त्यांची सुंद पावले परतून खासेवाड्यांकडे वळली. चक्क माघारी!

"आऊसाहेब, मासाब" म्हणत माणसेच माणसे पुतळाबाईंच्या पायांवर धडाधड

लोटांगणे घेऊ लागली. कशाचेही भान नसलेल्या पुतळाबाई, आभाळ तुडवीत जाणाऱ्या विजेसारख्या काळ्या हौदावर आल्या. उभा हौदचौक माणसांनी फुलून गेला होता. काखोट्यात मुंडासी, पगड्या घेतलेली माणसे सतीला मान देण्यासाठी दाटली होती.

हौदाच्या मध्यभागी रचलेल्या उंच चंदनी चितेजवळ पुतळाबाई थांबल्या. चढण्यासाठी त्या चितेला चहूबाजूंनी शिड्या भिडविल्या होत्या. घटिकापात्र काठापर्यंत डुबलेले पाहून राजोपाध्यांनी ब्रह्मवृंदांना मंत्रघोष सुमार करण्याची इशारत दिली. सतीजवळ येत ते हात जोडून म्हणाले, "मासाहेब, मुहूर्तघटिका भरत आली. चूड कुणा हस्ते घेणार ?"

"युवराजांच्या." चितेवरची नजर न ढळविता निर्धारी बोल आले.

मान डोलवीत राजोपाध्ये दाटल्या कंठाने म्हणाले, "क्षमा असावी. युवराज आले नाहीत इथं!"

"मतलब ? त्यांना वर्दी द्या. सांगा – तुम्ही युवराज असलात तरी आम्ही राणीसाहेब आहोत! आमची आज्ञा आहे. येऊन चूड द्या आम्हास!" त्यांच्या डोळ्यांत जगदंबेचे पाजळलेले पोत जणू उतरले होते.

"जी." राजोपाध्यांनी आज्ञा पावती करायला माणूस पिटाळला. त्याने पेश येऊन संभाजीराजांना ती आज्ञा शब्दाबरहुकूम सांगितली.

डोळे निपटून, बांधील मनाने आज्ञाधारक संभाजीराजे काळ्या हौदावर रुजू झाले. पुतळाबाईंच्या पायांवर आपले मस्तक ठेवीत म्हणाले, "आम्ही आलोत मासाहेब!"

"औक्षवंत व्हा! विजयवंत व्हा!" पुतळाबाईंनी शेवटचा आशीर्वाद दिला.

"आम्हास चूड द्या."

"जी."

"येतो आम्ही! बाळराजांना-सूनबाईंना सांभाळा! कधी प्रसंग आलाच तर आमचे हे रूप ध्यानी ठेवा! पुत्र आहात तुम्ही आमचे. जगदंब!" ओलेत्या, भरल्या मळवटाच्या पुतळाबाई शांतपणे शिडीच्या पायऱ्या चढून चितेवर गेल्या. पूर्वाभिमुख होत त्यांनी सतीबैठक घेतली. महाराजांच्या मोजड्या क्षणभर मस्तकी भिडवून त्यांनी समोर ठेवल्या. कुलदेवीचं स्मरण करीत डोळे मिटले. पुन्हा कधीच न उघडण्याच्या निर्धारानं!

चहूबाजूंनी चढत्या माणसांनी सतीचा देह चंदनकाष्ठांनी गळ्यापर्यंत रचला. मणामणाचे पाषाण छातीवर तोलीत संभाजीराजे शिडीची एक एक पायरी चढून गेले.

रचल्या काष्ठांतून स्थिर ओंजळ फक्त दिसत होती.

उमाळा फुटू नये म्हणून ओठ दातांखाली दाबत मागून आलेल्या राजोपाध्यांनी उचलून धरलेल्या तबकातील कर्पूरवड्यांची मूठ संभाजीराजांनी भरली. पाझरत्या डोळ्यांनी ती मूठ सतीच्या ओंजळीत सोडली. तिला तेवते निरांजन भिडविले. मुठीमागून मुठी त्या

ओंजळीत पडू लागल्या. सतीला रक्ताच्या हातून चूड मिळाला!! पेटत्या चंदनकाष्ठांतून अग्निपक्षी आभाळाकडे झेपावू लागले.

शेवटची भरली मूठ तशीच घेऊन सुन्न संभाजीराजे शिडी उतरले. कुणाकडेही न बघता थेट बालेकिल्ल्याकडे खालमानेने चालू लागले. सतीला मानाची सलामी देणाऱ्या तोफांच्या बारांनी रायगडाच्या कानठळ्या बसू लागल्या. महाराज गेले त्या दिवशीच रायगडाने डोळे मिटून घेतले होते – आज त्याचे कानही जायबंदी होत होते.

सातमहालाच्या जोत्याशी आलेल्या शंभूराजांनी अपार वेदनेने सुन्न झालेला आपला माथा सतीच्या खांबाला असहायपणे टेकविला. त्यावरच्या ओल्या कुंकवाचा शिवगंधाला स्पर्श होताच मात्र त्यांच्या अंगावर सर्रकन काटाच फिरला. भरल्या मुठीतल्या कर्पूरवड्या खाली विखरून पडल्या. आत्तापर्यंत निकराने दाबून ठेवलेला उमाळा उसळून आला. मुक्यापणीच, चूड लागलेले मन आक्रंदले – "मासाहेऽब, मासाहेऽब!" बराच वेळ ते त्या खांबाला माथा टेकवून तसेच कितीतरी वेळ सुन्न उभे राहिले.

"स्वारीनंच असं काळीज टाकलं तर इतरांनी काय करावं?" त्यांच्या पाठीशी येसूबाई केव्हा येऊन उभ्या राहिल्या होत्या तेही त्यांना कळले नव्हते.

खांबावरचा माथा उठवून पायतळीच्या कापूरवड्या बघताना संभाजीराजांच्या तोंडून बोल आले, "नाहीऽ येसू, तुम्ही आमच्या पत्नी असलात तरी आमचा सल तुम्हाला उमगायचा नाही. ज्या हातानं रायगड सोडताना आजवर आम्ही दह्याच्या कवड्या घेत आलो होतो त्याच हातावर कापराच्या वड्या सोडून आलो आज आम्ही!! मोठे अभागी आहेत आमचे हे हात! आम्हाला एकले सोडा." आपला गुन्हेगार वाटणारा तळवा निरखीत ते आपल्या महालाकडे चालू लागले.

जाताजाता त्यांची नजर सोयराबाईंच्या महालावर पडली. त्याचे झरोके, दरवाजे बंद बघून एक खोलवर कळ त्यांच्या काळजात फिरली. "आबासाहेबांच्या पायांपासून दूर राहिलेल्या मासाहेब त्यांच्या मोजड्या घेऊन चितेवर चढतात आणि त्यांच्या शेजारी बसून महाराणीपदाचा अभिषेक घेणाऱ्या या मात्र महाली बसतात! सतीला अखेरचा मान द्यायलाही त्या काळ्या हौदावर येत नाहीत! काय आहे हा जगदंबेचा खेळ!" त्यांच्या या सवालाचे उत्तर जगदंबेकडेही नव्हते.

उपोषणाचे व्रत मोडून आषाढी एकादशीचा दिवस पुतळाबाईंचा घास घेऊन मावळत होता.

अजाण रामराजांना कुणीही हाताशी धरून काही उलघाल करू नये म्हणून संभाजीराजांनी थोरल्या महालावर चौकीपहारे बसविले. नेमक्या याच बाबीने सोयराबाई खोलवर दुखावल्या गेल्या. कुणी भेटीस आले की म्हणू लागल्या, "आम्ही महाराणी

नाही. कैदी आहोत.''

याची कुणकुण कानी आलेल्या संभाजीराजांनी येसाजी दाभाड्यांना बोलावून घेतले. येसाजी रामराजांच्या खासगी तैनातीचे महाराणींचे विश्वासू सरदार होते. त्यांना समजावून देण्यासाठी युवराज म्हणाले, ''येसाजी, थोरल्या महाली चौकी पहारा बसविला आहे तो सुखासुखी नाही. तो निर्णय घेताना आम्हाला काय वाटलं ते आमचं आम्ही जाणतो. बाळराजे पोर उमरीचे आहेत. तुम्हास पूर्वीलप्रमाणे त्यांच्या तैनातीतच आम्ही ठेवत आहोत. त्यांच्या भल्यावर नजर ठेवून असा.''

''जी. आम्ही त्यांना कुणा बुऱ्यांच्या हाती लागू देणार नाही.'' येसाजी निघून गेले.

थोड्याच वेळात हंबीरराव, कवी कुलेश, केशव पंडित, उधो योगदेव आणि खंडोजी बल्लाळ महाली पेश झाले. मुजरा देणाऱ्या खंडोजींना बघताच शंभूराजांच्या कपाळी आठी धरली. तिचा मतलब ध्यानी आलेले खंडोजी मान लवती करून तातडीने म्हणाले, ''स्वामींचा गैरसमज नसावा. आम्ही आमच्या चिटणीस बंधूंच्या वा वडिलांच्या रदबदलीसाठी नाही आलो! प्रसंग बाका आहे. चाकर सेवेस चरणी तत्पर आहे हे सांगण्यासाठी आलोत आम्ही.'' बाळाजी खंडोजींचे वडील होते.

ते निर्धारी बोल ऐकून संभाजीराजांचे डोळे उजळले. खंडोजींसमोर येऊन आपला हात त्यांच्या खांद्यावर चढवीत ते म्हणाले, ''हीच उमेद होती आमची तुमच्याकडून खंडोजी! तुम्ही आम्ही साऱ्यांनीच खूप शिकण्यासारखं आहे या मामासाहेबांच्याकडून. नातीगोती दौलतीच्या सेवेआड येता कामा नयेत.'' संभाजीराजांनी हंबीररावांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

ते बोलणे तसेच उचलत हंबीररावांनी आपल्या आणि गडावरच्या लोकांच्या मनसुब्याकडे फिरविले, ''निस्ती नातीगोतीच का, काय बी सामने आलं तरी थोरल्या धन्यांच्या ह्या दौलतीची आबदा हुता कामा न्हाई. तुमीच आता निवाडा कराय पायजे काय त्यो.''

''कसला म्हणता सरलष्कर?'' शंभूराजांना त्यांचा अंदाज लागला नाही.

''धन्याविना मुलूक असा किती दिस ऱ्हायाचा? कारबारी शिक्का हाती घ्याया पायजे तुमास्नी.'' हंबीररावांची असंख्यांची इच्छा आणि कारभाराची अडचण पेश घातली.

''सेनापति ठीक सलाह देते हैं। जबतक युवराज मंचकारोहण नहीं करते कारोबार कैसे चलेगा?'' कवी कुलेशांनी तिला जोड दिली.

अर्थातच हा प्रश्न सर्वांत महत्त्वाचा होता. अजाण रामराजांच्या हाती कारभाराची सूत्रे देणे शक्य नव्हते. त्यांना हाताशी धरून सोयराबाई काय करतील याचा नेम नव्हता. तसेच महाराजांच्या आसनासमोर नतमस्तक होणे सोपे होते पण त्यावर आरूढ होणे सोपे नाही हे संभाजीराजे जाणून होते. गंभीर होत ते म्हणाले, ''आम्हाला विचार करू द्या यावर. उधो योगदेव, सध्या प्रधानकीचे दफ्तर खोळंबून आहे. तुम्ही ते हाती घेऊन राबते करा.''

''जी.'' उधो योगदेव हात जोडत लवले.

''मामासाहेब, आता पन्हाळ्याहून कैद असामी येतील. त्यांच्या निवाड्याची मसलत काय?'' संभाजीराजे आपल्या मनच्या विषयावर आले.

''तपास घेऊन युवराजांनी आपल्या मर्जीनुसार निवाडा करावा त्यंचा.''

''आम्ही तपास घेतला आहे. या घालमेलीत प्रल्हाद निराजी आणि राहुजी हकनाक गोवले गेलेत. याची खातरजमा झाली आहे आमची. त्या उभयतांना मुक्त करावे म्हणतो आम्ही.''

''जशी मर्जी.'' हंबीररावांना कुठेतरी हायसे वाटले.

''चला कवीजी, जगदीश्वराचे दर्शन घेऊन येऊ.''

कवी कुलेश आणि केशव पंडित यांना बरोबर घेऊन राजे बालेकिल्ल्याबाहेर पडले. साऱ्या गडभर श्रावणी उन्हाची उबदार, पिवळी किरणे उतरली होती. त्यात पावसाने निथळली हिरवाई चमकत होती.

''पुराचे शिवयोगी आणि त्यांचा मठ कसा आहे?'' संभाजीराजांनी विचारले.

''जी. ठीक आहे सगळं. गणेशभट्ट जांभेकर मठाचे बरे चालवून आहेत.'' केशव पंडितांनी शृंगारपूरच्या शिवयोग्यांचे कुशल दिले.

जगदीश्वराचे मंदिर आले. मोजड्या उतरून कवीजी आणि पंडितांना पाठीशी घेत संभाजीराजे मंदिरचौकात आले. मान वर करून त्यांनी घंटानाद दिला आणि पुढे जाण्यासाठी पाऊल उचलले. ते फरसबंदीच्या दगडी कासवावर पडणार होते ते सावरून बाजूला ठेवीत त्याच्याकडे एकजोड बघताना राजे एकदम विचारगत झाले.

''पंडित, या दगडी कासवाची मंदिरात काय हेतूने स्थापना केली जाते?''

''ते कूर्मावताराचं प्रतीक असावं स्वामी.'' केशव पंडितांनी जाब दिला.

अगदी हेच उत्तर, आबासाहेबांना एकदा मोरोपंतांनी दिलं होतं. त्या वेळी स्वतःला वाटणारा या कासवाचा वेगळाच मतलब आबासाहेबांनी सांगितला होता.

''पंडित, कवीजी, आम्ही या हमचौकातील दगडी कासवासारखे आहोत! आमचे आबासाहेब त्या समोरच्या गाभाऱ्यातील देवमूर्तीसारखे आहेत! हे कासव कधीच गाभाऱ्यात जाऊ शकत नाही. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांचे नमस्कार रुजू होतात ते गाभाऱ्यातील मूर्तीच्या चरणांशी – तेच योग्य. आणि – आणि जाणते-अजाणतेपणी का असेना पाय पडतात ते या कासवाच्या पाठीवर!''

ते ऐकून केशव पंडित आणि कवीजी पुरते अस्वस्थ झाले. अर्थ न लावता येणारी गहरी वेदनाच वेदना राजांच्या डोळ्यांत दाटून आलेली त्यांना स्पष्ट दिसू लागली.

त्या कासवाला डोळ्यांत भरून घेत राजे कातर म्हणाले, ''आम्हाला खंत पाठीवर पडणाऱ्या पायांची कधीच वाटली नाही! नमस्कार घेण्याचा तर आमचा वकूब नाही!

खंत एकाच बाबीची वाटते, या कासवाची नजर गाभाऱ्यातील त्या मूर्तीच्या चरणाशी अहोरात्र खिळून पडलेली असते हे जाणणारा या उभ्या दौलतीत एकही जाणकार नसावा! आम्ही आबासाहेबांना काय मानतो हे पारखण्याची एकाचीही कुवत नसावी!'' एक लोंबता, दीर्घ निःश्वास हमचौकात विरला.

''चला.'' म्हणत संभाजीराजे गाभाऱ्यापाशी गेले. पिंडीवर बेलफुले वाहून तीर्थ घेऊन मंदिराबाहेर पडले. युवराज खासेवाड्यात येताच सदरेवरच्या गिरजोजी आणि अर्जोजी या यादव बंधूंनी त्यांना मुजरा दिला.

''केव्हा आलात गिरजोजी?''

''हा असाच गड चढतोय आमी. नगरची खबर उचलली त्ये निगालोच.''

''कोण खबर आहे? बोला.''

गिरजोजी जरा घुटमळला. मग तुटक-तुटक टप्याने त्याने खबर पेश घातली— ''नगरच्या कोठीत ... धाकल्या युवराज्ञीस्नी ...''

अंगभर शहारलेले संभाजीराजे ताडकन उठत म्हणाले, ''काय झालं त्यांचं?''

''जी. तसा फटका-दगा न्हाई. मुलगा जालाय!''

कवीजी आणि पंडित यांच्याकडे संभाजीराजे बघतच राहिले. त्यांची नजरच जणू विचारीत होती— ''सांगा. आम्ही त्या दगडी कासवासारखेच नाही काय? किती पाय पडावेत या पाठीवर? आम्ही इकडे मंचकारोहणाची चर्चा करतो आहोत आणि आमचा अंकुर — आबासाहेबांचा नातू — तिकडे मोगली कैदेत नगरच्या कोठीत जन्म घेतो आहे.''

शास्त्री-पंडितांनी मुक्रर केलेला, ललितापंचमीचा मंचकारोहण दिवस उजाडला. विचारपूर्वक शंभूराजांनी मंचकारोहण करण्याचा निर्णय घेतला होता. सविध मंगलस्नान घेतलेले संभाजीराजे अब्दागिरे, गुर्झबारदार, शास्त्रीपंडित यांच्या मेळाव्यातून खाशा मार्गाने सिंहासनचौथऱ्यावर येताच मानकऱ्यांनी दाटला दरबार, वाऱ्यावर लवत्या कुरणासारखा मुजऱ्यासाठी झुकला.

आज प्रधानमंडळाच्या मानकरी सोनस्तंभाजवळ कुणीही उभे नव्हते, कारण हा राज्याभिषेक नव्हता. मंचकारूढ होऊन राज्यसूत्रे आपल्या हाती स्वीकारल्याचा तो केवळ एक रिवाजी विधी होता. मुहूर्तवेळी मंत्रघोषांच्या गजरात, सिंहासनाला नम्रभावे वंदन करून, त्याला चुकूनही पदस्पर्श होणार नाही याची दक्षता घेत संभाजीराजे राजआसंदीवर आरूढ झाले.

क्षणमात्र त्यांचे त्यांनाच कळेना की आपल्या छातवानांकडे ठोके चढीला का पडावेत? उरात न कळणारी, पूर्वी कधी न अनुभवलेली प्रचंड खळबळ का माजावी? कानशिले सणसणून का यावीत? पाठीच्या कण्यातून भवानीचा पाजळला पोत सरासर फिरतो आहे असे का वाटावे? गर्दन नागफण्यासारखी ताठ का व्हावी?

नेहमी आगेमागे वावरणारी, समोरच्या दरबारी चौकातील तीच हंबीरराव, आनंदराव, येसाजीकाका, केशव पंडित, कवीजी, राघोपंत, खंडोजी ही माणसे त्यांना त्या राजसिंहासनावर बसताच एकदम आगळी वेगळी वाटू लागली. आपल्या शरीराचे हात, पाय न्याहाळावेत तसेच ते दरबारातील मानकरी न्याहाळू लागले. वडीलधारे असले तरी हंबीरराव, येसाजी कंक ही माणसे त्यांना आता भवानीबाईसारखी अपत्यवत वाटू लागली! या आसनावरून म्हणूनच त्यांना कळून आले की, हंबीरराव बोलताना वारंवार ओठांवरच्या मिश्याखाली पालथी मूठ देतात! येसाजी कंकांचे पांढरेशुभ्र कानकल्ले, मनचे बोलण्यापूर्वी थरथरतात! कवी कुलेश बोलताना मध्येच आपल्या हातांची सडक बोटे न्याहाळतात! खंडोजींची बाराबंदी छातीवर तुटेल एवढ्या तणावात असते! केशव पंडितांच्या कपाळीचा ठसठशीत गंधटिळा आठ्यांच्या घड्यांवर दुमडत जातो! रायाजी-अंतोजी बोलताना कधी गर्दनच वर घेत नाहीत!

सिंहासनाच्या सायवळ हाताला असलेला समतोल सोनतराजू दृष्टीस पडताच शंभूराजांना आपलेच समोरच्या दरबारात पेश झालेले आरोपित रूप क्षणभर दिसले! आज या क्षणी त्यांना पुरते कळून चुकले की, ''केवळ आबासाहेब या आसनावर होते म्हणून आम्ही सलामत सुटलो त्या वेळी!''

सगळे विचार त्या तराजूच्या पारड्यांत समतोल सोडून संभाजीराजांनी आपल्या दक्षिण हाताचा पंजा शांतपणे उठविला. समोर आलेल्या शिक्के करंडाच्या आणि कट्यारीच्या तबकाला 'राजा' म्हणून स्वीकृतीचा हातस्पर्श दिला. राजदंडाचा मंत्र होईपर्यंत सोनेरी मत्स्यमोर्चेल हाती धरला.

दरबारी मानकऱ्यांच्या मरातबी वस्त्रतबकांना ते हातस्पर्श देऊ लागले.

रायगडच्या सलामी तोफांची कडकडती बत्ती भोवतीच्या टोपीकर, सिद्दी, फिरंगी, मोगल, कुतुब आणि इदल शाह्यांना जणू गर्जून सांगू लागली, ''मराठी दौलतीचा 'शिव' गेला तरी त्या आसनावर आता 'रुद्र' आला आहे!''

''सरलष्कर, दख्खनसुभा कोकलखानानं आपले दात दावायला सुरुवात केली. अहिवंतगडावर अचानक हमला घातला त्यानं. आजच गडाच्या शामजी केशव दफ्तरदारांचा माणूस खानदेशातून आला.'' शिलेखाना, अंबारखाना, दारू कोठारे यांवर नजर टाकून परतणारे राजे हंबीररावांना म्हणाले.

''गडाचं काही ...'' सेनापती चिंताक्रांत झाले.

''नाही. काही नाही झालं. गड पायरोव्यानं आहे. आपल्या किल्लेदारांनी निकरानं खान परतविला. शामजींना पत्र देऊन किल्लेदारांना मानवस्त्रं पाठवायला पाहिजेत मामासाहेब.''

''जी. दर्याकडची खंदेरीबेटावरनं एक वंगाळ खबर आल्येय धनी.''

"सिद्याच्या मग्रूरीचीच असणार."

"जी. आपला लई मोलाचा सारंग गेला. मायनाक भंडाऱ्याचा ल्योक. तीनशे असामी घेऊन ग्येल्या पंधरवड्यापूर्वी शिद्याच्या उंदेरी बेटावरल्या जलकोटावर रातीचा त्येनं छापा घातला. काळोख गुडूप, जागा नवखी या गुणं छापा फसला त्येचा. च्यार विसा माणूस आन् मायनाकाचा ल्योक ह्येंची शिरं काटून माजोर शिद्दी मुंबयला घेऊन गेला." ती धडावेगळी शिरेच समोर उभी राहिल्याने हंबीररावांची घाटी दाटली.

ती वार्ता ऐकून शंभूराजे सुन्न झाले. हाती आल्या तपशिलावरून त्यांना खंदेरी बेटावरच्या जलकोटाचे महत्त्व कळून चुकले होते. खंदेरी आणि उंदेरी ही मुंबईच्या घेरातील जवळ जवळ असलेली मोक्याची बेटे होती. मोठ्या परिश्रमाने खंदेरी बेट कब्ज करून महाराजांनी त्यावर जलकोटाचे बांधकाम सुरू केले होते. जे महत्त्व दक्षिण कोकणात मालवणच्या सिंधुदुर्गाला होते तेच खंदेरीला उत्तर किनारपट्टीत होते. या जलकोटामुळे मुंबई या मोक्याच्या दर्याठाणकावर जरब ठेवता येणार होती. हे खंदेरी तीन दर्यासत्तांच्या डोळ्यांत खुपत होते. जंजिऱ्याचा सिद्दी कासम, सुरतेचा मोगल सुभेदार आणि मुंबईचे टोपीकर. उंदेरी घशात घालण्याचा या तीनही सत्तांनी प्रयत्न केला होता. त्यात सिद्दी कासम कामयाब झाला होता. त्याने सुरतेच्या मोगली सुभेदाराशी संधान साधून, "मी इथं आहे म्हणजे तुम्हीच आहात." या ढंगाने पावले टाकली होती. त्या सुभेदारांच्या मदतीनेच सिद्दी मुंबईच्या टोपीकरांनाही हवा तसा वाकवीत होता. दर्यावर चाचेगिरी करून, मराठी किनारपट्टीचा मुलूख जाळून-लुटून पाहिजे तेव्हा मुंबईचा आसरा घेत होता. टोपीकरांनाही पाव्हण्याच्या काठीने साप मारायचा होता! जसा टोपीकर, मोगल, सिद्दी यांना खंदेरीचा जलदुर्ग सलत होता तशी मराठी दौलतीलाही उंदेरीवरची सिद्द्याची बसकण संधी साधेल तेव्हा बुडवायची होती. हे दर्या पटात घेण्यासाठी जुंपलेले खारट भांडण होते! चिवट सिद्दी, खवचट इंग्रज यांचे तिखट मराठ्यांशी जुंपलेले!

"सरलष्कर, मायनाकांना एक सांत्वनाचं पत्र द्या. त्यांना लिहा, "तुमचे मूल गेले ते दौलतीच्या शिवपिंडीवरचे फूल गेले. आम्ही तुमचं बरे चालवू." सिद्द्याच्या विचाराने राजे गुमान झाले.

"त्यो हबशी मंजे दौलतीच्या पदराला कुरतडनारा उंदीरच हाय. मिळंल त्ये चाबालत्योय अन् जंजिऱ्याच्या बिळात लपत्येय. एकडाव नक्षा उतराय पायजे त्येचा." हंबीरराव चिडीने बोलले.

"होय मामासाहेब, आबासाहेबांना खूप तापदरा दिल्यात त्यानं हे आम्ही जाणून आहोत. एकदा मायनाक, दौलतखान, कान्होजी, गोविंदजी काटे या सारंगांना बोलावून घेणार आहोत आम्ही. सिद्द्याची बसकण उखडल्याखेरीज दर्यासही कौल देता होणार नाही." बोलत बोलत महादरवाज्यात आलेल्या राजांना मुजरा देत चांगोजीने वर्दी पेश केली. "पन्हाळ्याचं कैदी आल्यात गडावर."

हंबीररावांकडे बघत राजे विचारगत झाले. काहीतरी मनोमन ठरवून त्यांनी आज्ञा केली, "चांगोजी, त्यातील प्रल्हाद निराजी आणि राहुजींना मोकळे करून आमच्या भेटीला पाठवा."

"जी ..." पुढे काही ऐकायला मिळेल या आशेने चांगोजी रेंगाळला.

"निघा!" राजांनी मामला तिथेच तोडला. आतून त्यांचे मन मोरोपंतांसाठी व्याकुळले, पण राजओठांनी ती व्याकुळता परतवून लावली.

खासेवाड्याच्या सदरेवर आलेल्या राजांना राघो स्वानंद सामोरे आले. त्यांच्या हातात बऱ्याच कागदी वळ्या होत्या.

"सर्व कारखान्यांच्या मत्तेची फेरिस्तं सिद्ध आहेत स्वामी. फक्त रत्नशाळेची मोहर जोखमीची असल्यानं खाशांच्या साक्षीनं तुटावी असं सर्वांचं मत आहे." राघोपंत वळ्या चाळवीत म्हणाले.

"ठीक आहे. दफ्तरदार, आम्ही जातीनं सगळ्या कारखान्यांचा हिसाब-तपास घेऊ. सर्वांना समज द्या तशी."

राघोपंत थोडे घुटमळले; पण जाण्यापूर्वी कानी घालावं म्हणून तुटक म्हणाले, "राजापूरहून टोपीकरांचे हेजिब आलेत आपल्या बक्षिसाची मागणी घालण्यासाठी."

संभाजीराजांची चर्या पालटली. आवाज करडा झाला. राघोपंतांना समज मिळाली, "त्यांना स्पष्ट सांगा. तो पदराखाली घातलेला सिद्दी अगोदर हाकला मुंबईहून आणि मग या बक्षिसी मागायला! आमच्या सामनेसुद्धा आणू नका त्यांना."

"जी." वळ्या सावरत राघोपंत हलले. त्यांच्या कानी जाता जाता इषारा पडला, "निरोपाचे विडे देऊन त्यांना गडावरून काढा. अधिक थांबवू नका."

राजे हंबीररावांना काही बोलणार एवढ्यात पहाऱ्याची वर्दी आली, "परलादपंत आल्यात."

"येऊ द्या आत." हातपंजा उठवून मंजुरी देताना राजांची चर्या अनेक आठवणींनी वेढून गेली. आत आलेले प्रल्हादपंत आणि राहुजी तिवार मुजरा घालून खालगर्दनीने उभे राहिले. विचित्र शांतता दाटून आली.

बैठक सोडून प्रल्हादपंतांच्या समोर शांतपणे येत शंभूराजे म्हणाले, "घाबरू नका न्यायाधीश. आम्ही तुमच्यावरील आरोपपत्र नाही वाचून दावणार! आबासाहेब गेल्यापासून तुम्ही पन्हाळ्याच्या रोखानं कूच होईपर्यंतच्या तुमच्या हालचालींचा बरा तपास घेतला आहे आम्ही. तुमचं खूप उशिरा आलेलं तहाचं पत्रही पावलं आम्हाला पन्हाळ्यावर. तुम्ही न्यायाधीश आहात. आमच्या मनचं न्यायाधीशाचं रूप तुम्हापुढे ठेवण्यासाठी पेश घेतलंय आम्ही तुम्हास. काही सुनावण्यासाठी नाही." राजआसंदीवर बसल्यावेळी उतरले होते तसेच तेज संभाजीराजांच्या डोळ्यांत भरून आले. प्रल्हादपंतांना ढवळून काढणारे राजबोल त्यांच्या ओठांतून बाहेर पडले—

"राजमुद्रा धारण करणारे आबासाहेब गेले असता कट करून आम्हाला दस्त करण्यासाठी सुरनीस-पेशवे चालून आले, त्या वेळी आम्हाला खरा आधार द्यायला हवा होता तो तुम्ही! तुम्ही न्यायाधीश होता. न्यायाला कौल देणारे, अन्यायाला जाब विचारणारे. तुमचं कर्तव्य या सरलष्कर मोहितेमामांनी बजावलं! आम्हाला न्याय मिळाला तो त्यांच्या हस्ते – मैदानावर!

"मुलखात जसे डोंगरकडे तसे राज्यात न्यायाधीश असे आम्ही मानतो. आल्या लाटेवर झाडे-पेडे डुलली तर आम्ही समजू शकतो. पण – पण डोंगरकडेच डळमळू लागले तर आधार सुटल्यानं आभाळ कोसळेल याची धास्त वाटते पंत!

"न्यायाधीश, एकवार न्यायाला कौल देणं साधलं नाही तरी चालेल, पण किमानपक्षी नकळतसुद्धा त्याच्या हस्ते अन्यायाची जोड कधी होता कामा नये." प्रल्हादपंत, राहुजी, हंबीरराव सर्वांनाच वाटले प्रत्यक्ष महाराजच तर समोर उभे राहून बोलत नाहीत ना?

आपल्याच विचारांत, पाठीशी हात बांधून फेर घेणाऱ्या संभाजीराजांनी आपलं मन मोकळे केले – "पंत, ध्यानी ठेवा. प्रत्येक आसामीला तीन मासाहेब असतात. एक जन्म देणारी नाळेची. दुसरी पोषण करून शेवटी ठाव देणारी पायतळीची धरती आणि तिसरी त्याच्या जगत्या हयातीवर मिटल्या डोळ्यांनी जागती नजर ठेवणारी न्यायमाऊली.

"पहिलीचे डोळे ममतेनं भरलेले असतात, तिला ऐब-दोष दिसत नाही. दुसरीला डोळेच नसतात. तिसरीला असलेले डोळे बंद करून घ्यावे लागतात. का? तर हाती धरलेल्या न्यायतराजूच्या पारड्यांत माप घालताना भावनेपोटी काही गफलत होऊ नये म्हणून. पंत, तुम्ही न्यायाधीश असून डोळ्यांवरची पट्टी खोललीत! तुमची नजर जाया झाली. हातचा तराजू सोडून तुम्ही सिधे त्याच्या एका पारड्यात जाऊन बसलात! बसलेले सारे तडाखे मनाआड घालून आही तुम्हाला इतमामानं त्या पारड्याबाहेर घेत आहोत. तुमचा न्यायतराजू तुमच्या हाती देत आहोत. तो सांभाळा. पुन्हा अशी गफलत आम्हास मानवणार नाही. न्यायाधीशांनाच आरोपित म्हणून बघताना काय वाटतं हे सांगवत नाही. पुन्हा असा प्रसंग आमच्यावर नका आणू."

प्रल्हादपंतांच्या नेत्रकडा ओलावून आल्या होत्या. हात जोडून, पगडी डोलवीत ते भरल्या मनी म्हणाले, "स्वामी, क्षमा असावी. आम्हास पश्चात्ताप वाटतो झाल्या गैर बर्तावाचा .... " त्यांना पुढे बोलवेना.

प्रल्हादपंत, तुम्ही न्यायाधीश आहात याचीच ती निशाणी आहे. उद्यापासून तुमच्या अखत्यारीची सूत्रे ताब्यात घेऊन राबती करा!"

"राहुजी, तुम्ही गडाचे सरकारकामावरचे सुभेदार आहात. राजे कोण आहेत याची दखल घेण्यापरिस राजधानी गोमटी कशी राहील याची दखल घेत चला! तुम्हीही तुमच्या सुभेदारी कामावर रुजू व्हा."

"जी" राहुजी आणि प्रल्हादपंत मुजरा देऊन जायला निघाले. कैलासवासी

स्वामींच्या काळात असा प्रसंग कधी प्रल्हादपंतांवर आला नव्हता! तो आला असता तर... गलबलून गेलेले प्रल्हादपंत तसेच परतले आणि तरातरा चालत संभाजीराजांचे पाय शिवण्यासाठी लवू लागले.

झटकन मागे हटत राजांनी त्यांना थोपविले. वर घेत त्यांना खांदाभेट देताना ते म्हणाले, "पंत, खूप जोखीम आहे तुम्हा-आम्हावर. आमच्या पाठीशी असा."

समाधानाने प्रल्हाद निराजी निघून गेले. भारल्या हंबीररावांनीही निरोप घेतला.

विचारगत राजे अंतःपुरातील दरुणीमहालात आले. तिथे येसूबाईंनी दुहाती तोलून धरलेल्या भवानीबाईंच्या डुयीवर धाराऊ सोनफुले मढविलेली कुंची चढवीत होती.

"आऽबा, आऽबा" करून झेपावणाऱ्या भवानीबाईंना राजांच्या हाती देताना येसूबाई म्हणाल्या, "स्वारींना कळलं असेल धाकल्या बाईंना मुलगा झाला आहे."

दुर्गाबाईंच्या आठवणीने ते दोन्ही जीव व्याकुळ झाले.

फेरिस्तवार खास कारखान्यांच्या मालमत्तेच्या हिसाब जातीनं घेण्यासाठी राजे खासेवाड्याबाहेर पडले. त्यांच्या सोबत प्रल्हाद निराजी, हंबीरराव, येसाजी, रघुनाथ नारायण, कवी कुलेश, राहुजी, आबाजी सोनदेव, चांगोजी अशी मंडळी निघाली.

पावसाने भिजल्या दगडी इमारतींवरून श्रावणी उन्हं उतरल्याने पांढरट वाफा तरंगून येत होत्या. दूरवर पाचाडात झडणाऱ्या घाटेचे नाद कानी पडताच छातीशी हात नेत राजांशी घाटेला मान दिला. त्यांच्या हाती एक नकसदार लाकडी संदूक होती. रत्नशाळा आली. राजांच्या साक्षीने मोहर तोडण्यात आली. फेरिस्त वाचले जाऊ लागले. कारकून बारदान्याचे माप करू लागले –

पाचशे रती हिरे, दोनशे रती माणके, एक हजार तोळे मोत्ये. एक एक कलम पडताळून आलमगारीत बंदिस्त होऊ लागले, फेरिस्त पूर्ण झाले.

फेरमोहोर देण्यासाठी रत्नशाळाप्रमुख बहिर्जी घाटगे आलमाऱ्या बंद करू लागले.

"थांबा बहिर्जी, हा सर्वांत मोलाचा डाग आत ठेवून द्या. त्याशिवाय रत्नशाळा पूर्ण नाही होत." हातातील संदूक खोलून आबासाहेब नेहमी छातीवर वागवीत ती भवानीची कवडीमाला शंभूराजांनी बाहेर घेत कपाळाला भिडवून पुन्हा आत ठेवली. हिरे, माणके, मोत्यांना शोभा आणण्यासाठी संदूक आलमारीत चढली.

राजे गडाच्या राबत्या जामदारखान्यात आले. कारकून नऊ कोट रुपये किमतीची चलनी नाणी वजनावर मापू लागले. त्यात पाच लक्ष रुपयांचे केवळ सोन्याचे होनच होते. अनघड सोने नऊ खंडी, चांदी अडीच खंडी. सर्व कलमांचे वजन झाले. होनांच्या सोनेरी ढिगाकडे नजर टाकीत राजांनी राघोपंतांना आज्ञा केली, "दफ्तरदार, सालीना दहा हजार होन प्रतापगडी आणि वीस हजार होन तुळजापुरी आई भवानीच्या सेवेस रुजू होतील असे करा!"

ज्याच्या बळावर दौलत उभी राहते त्या शिलेखान्यात राजे सर्वांसह आले. वाकाच्या तोड्यांनी पाचुंद्यात बांधलेल्या कलमांचे मोजमाप होऊ लागले– "तीस हजार एकधारी तेगी, पन्नास हजार दुधारी, चाळीस हजार भाले, साठ हजार ढाली, चाळीस हजार धनुष्ये आणि आठरा लक्ष बाण" असे हत्यार साठवणाला होते.

धारांवर झळझळणाऱ्या त्या शस्त्रराशींकडे बघताना राजे गंभीर झाले. त्या राशी आबासाहेबांची दूरदृष्टी सांगत होत्या. साठवणाला हत्यारे होती. ती वागविणारे हात उभे करायचे होते. उद्याच्या काळाला सामोरे जाण्यासाठी छत्रपतींनी केलेली ती सिद्धता होती.

"सरलष्कर, कंककाका, पावसाळा उलगताच तवान्या सैन्याची सिंचणी करून ही हत्यारे राबती करायची आहेत. सर्व तर्फांच्या सुभेदार-हवालदारांना याची समज द्या." हे बोलताना राजांचे डोळेही धारी बनले होते.

ज्या कारखान्याच्या जोरावर सैन्ये दौडतात तो अंबारखाना आला. इथे दगडबंद कोठ्यांत धान्यांच्या गोण्यांच्या थप्प्या रचल्या होत्या. उंदीर-घुशींच्या बंदोबस्तासाठी जागोजागी चाप टाकले होते.

थप्प्या रचलेल्या कोठ्यांतून फिरताना अंबारखान्याचा प्रमुख तपशील देऊ लागला. "ही भातकोठी. सतरा हजार खंडी दास्तान आहे. जिरे दोन हजार खंडी आहे."

डाळी, कडधान्ये, साखर, तंबाखू यांची कोठारे बघत जाणाऱ्या राजांना आबासाहेबांचे शब्द आठवले, "तुम्ही-आम्ही पहिले सेनापती आणि शेवटचे धारकरी आहोत. मावळा व्हा!"

आसवाबखान्याचे दालन आले. कलमवार विभाग दाखविताना प्रमुख सांगू लागला– "यात जालना-अहमदाबादी एकलक्ष तागे कापड आहे. यात चार हजार पांढरी व एक हजार बऱ्हाणपुरी ठाणे, यात तीन हजार तागे सादिलवार आणि चार हजार तागे पैठणी कापड आहे."

ती सारी संपत्ती नजरेखाली घालून, गंजीखान्यात साखळदंडांनी जखडलेले झुलते हत्ती बघून परतणाऱ्या संभाजीराजांच्या मनात आले, "ही गजान्त लक्ष्मी महाराजसाहेबांनी दास्तानी केली ती का? आपल्यासाठी? नाही. ते जाणून होते की, सर्वांत मोलाची संपत्ती आहे माणूस! इथला माणूस ताठ गर्दनीनं जगावा. आपले कुलाचार त्याला निर्वेध करता यावेत. यासाठीच त्यांनी आपल्या हयातीचा भंडारा उधळला."

आपल्याच विचारतंद्रीत चालणाऱ्या राजांना रघुनाथ नारायण अदबीने म्हणाले, "कुडाळच्या देशाधिकारी गणोरामांचे पत्र आले आहे स्वामी."

"काय म्हणून?"

"तेथील योगी नामदेवभट्ट बाकरे यांचा काळ झाला. मागे वारस मुलगा आहे. त्यांचे चालविले पाहिजे म्हणतात गणोराम."

चालते राजे थांबले आणि म्हणाले, "पंत, बाकरेबुवांच्या मुलाला घोडे आणि

नजराणा पाठवून द्या. त्यांचे चालेल अशी मोईन करून दानपत्र सिद्ध करा. आमच्या दस्तुराने कुडाळी पाठवून द्या. आबाजी, तुम्ही ते दानपत्र नजरेखाली घालून त्यावर मोर्तब करा."

"जी." रघुनाथपंतांना ते ऐकताना समाधान वाटले.

काहीतरी आठवल्याने राजांनी दुसरीही एक सूचना रघुनाथपंतांना केली– "पुण्याहून सुभेदार दामाजी रघुनाथांचा माणूस येऊन गेला आहे पंत. देहूच्या तुकारामबुवांचे चिरंजीव महादोबांचा आणि त्यांचा भेटप्रसंग झाला आहे. महादोबांनाही एक खंडी ज्वारी आणि एक पातशाही होनाचे वर्षासन जोडून द्या."

"आज्ञा स्वामी." राजे धर्मस्थळे आणि संत, योग्यांवर बारकाव्याने लक्ष देताहेत हे बघून सर्व मंडळी समाधान पावली होती.

संध्याकाळी राजसदरेवर आलेल्या संभाजीराजांना दाभोळचे सुभेदार वेंकाजी निमदेव यांचे कारभारी मुजरा देत पेश आले. त्यांच्या पाठीशी एक तबकधारी होता.

"आम्ही दाभोळहून आलोत धनी. सुभ्यावर झाल्या मोत्याच्या वृष्टीचा नमुना, आज्ञेप्रमाणं साहेबस्वारींना दाखविण्यासाठी आणला आहे." कारभारी म्हणाले.

कारभाऱ्यांनी तबकधाऱ्याच्या हातातील तबकावरचा सरपोस हटविला. राजांनी ओंजळभर मोत्ये तबकातून उचलली. ती निरखीत ते कवी कुलेशांना म्हणाले, "केवढा चमत्कार आहे कवीजी, आभाळातूनसुद्धा कधी कधी असे देखणे काव्य उतरते धरतीवर!"

"जी. मानो आकाशसुंदरीका मोतीकंठा उतर आया है!" कवीजी ते दूधवर्णी सौंदर्य निरखीत म्हणाले.

"कविराज, धरतीसाठी विरहव्याकुळ आकाशपुरुषाच्या डोळ्यांतून सुटलेले हे अश्रू आहेत असं म्हटलं तर?" संभाजीराजांना ओंजळीतल्या मोत्यांत दुर्गाबाईंची मुद्रा तरळल्यागत वाटले.

"स्वामी, बाकऱ्यांचे दानपत्र सिद्ध झाले आहे. संमतीचे शिक्कामोर्तब द्यावे." रघुनाथपंतांनी दानपत्र सामोरे धरल्याने संभाजीराजांनी ओंजळीतील मोती तबकात सोडले. लेखणी हाती घेऊन दानपत्र वाचले आणि त्याच्या अग्रभागी स्वहस्ते अक्षरमोती उमटविले–

"मतं मे श्रीशिवराजपुत्रस्य श्रीशंभुराज॥
छत्रपतेः यदत्रोपरिलिखितं॥ छ. श्री॥"

"खान जहानबहादूर जाफरजंग कोकलताश दख्खनसुभा प्रति राजे शंभु उपरी विशेस–" प्रल्हादपंतांनी मायना रेखला. अहिवंतगडावरून शिकस्त खाल्ल्यानंतर बागलाणातील किल्ले साल्हेरला परीघ घालून बसलेल्या खानाला जाणाऱ्या जरबी खलित्याचा मजकूर राजे संतप्त मुद्रेने सांगू लागले–

"सांप्रत तुम्ही बागलाणप्रांती घातला फौजी हैधोस इकडे पावला आहे! एवढा पाऊसकाळच काय तो उलगण्याची आम्ही वाट बघतो आहोत. खुल्या मैदानी तुमच्या हत्यारांचे पाणी जोखण्यास खासा आम्हीच बागलाणात उतरणार आहोत. बरे समजोन असणे!"

प्रल्हादपंतांनी, रेखल्या मजकुरावर वाळू शिवरून खलितावळी थैलीत सरकवली.

"फिरंगाणातून विजरईचा खलिता आहे स्वामी. आपले डिचोलीचे सुभेदार मोरो दादाजींनी केला तह मोडल्याची तक्रार आहे विजरईची." प्रल्हादपंतांनी राजांच्या कानी घातले.

"काय केले मोरो दादाजींनी?"

"बार्देश प्रांती सिओलिम भागात छापा घालून काही असामी दस्त केल्या आहेत सुभेदारांनी. डिचोलीतून जडजवाहीर घेऊन जाणारा एक फिरंगी व्यापारीही कैद केला आहे त्यांनी."

विचारगत राजे फेर घेऊ लागले. कै. महाराजांनी फिरंग्यांशी तह केला होता. त्यात एकमेकांच्या मुलखावर हमला करू नये अशी एक अट होती. तसेच परस्परांच्या प्रदेशात निर्वेध व्यापार चालावा असा सुलूख होता.

"पंत, मोरो दादाजींना दस्त असामी तातडीने सोडण्यास लिहा. फिरून आपल्या तर्फेनं तहाचा भंग होईल अशी हरकत न करण्याची समज द्या त्यांना."

"जी." एकाच वेळी कोकलखानाला जरब देणारे आणि आपल्या चुकल्या अधिकाऱ्याला समज देणारे राजे बघून प्रल्हादपंतांची मान डुलली.

"कुडाळचं सुबेदार आल्यात." पहाऱ्याने वर्दी आणली. हातपंजा उठवून राजांनी तिला मंजुरी दिली.

कुडाळचे देशाधिकारी गणोराम पेश आले.

"केव्हा आलात गणोराम?" राजांनी त्यांचे कुशल घेतले.

"आत्ताच गड चढलो स्वामी. एक खास बाब कानी घालण्यासाठी आलोत."

"बोला." राजांनी त्यांच्या पगडीभर नजर फिरविली.

"पाटगावी मौनीबुवा राहतात आमच्या सुभ्यात. थोर ईश्वरपुरुष आहेत. थोरल्या स्वामींनी कर्नाटकस्वारीच्या समयी त्यांचे दर्शन घेतले होते. स्वामी त्यांच्या बाबीने काही करणार ...."

"सुभेदार, ऐकून आहोत आम्ही मौनीबुवांबद्दल. जरूर त्यांचे ऊर्जित चालवू." राजांनी गणोरामांना विश्वास दिला. संतुष्ट होऊन ते मुजरा देऊन बाहेर पडले.

"पंत, मौनीबुवांच्या मठाला वाजंत्री व भोई यासाठी सालीना निशाणी होन एकशे पंचवीस मुक्रर केल्याचे कागदपत्र तयार करा. बुवांना दिवाणी वजावाटा माफ केला आहे

असे त्यात लिहा. ही देणगी मठशिष्य तुरुतगिरी आहेत त्यांच्याच हवाली पावती होईल असे बघा." राजांनी प्रल्हादपंतांना लागलीच निर्णय दिला.

"राजे शिर्के आन् महाडिक गड चढत्याहाईत." आत आल्या अंतोजीने वर्दी दिली. मनाची दफ्तरी कामे तशीच सोडून राजे प्रल्हाद निराजींना म्हणाले, "चला, सामोरे जाऊ." प्रल्हाद निराजी, अंतोजी आणि काही धारकरी यांसह शंभूराजे बालेकिल्ल्यातून आघाडी मनोऱ्यात आले.

कमरेच्या हत्यारांवर मुठी ठेवलेले गणोजीराजे, हरजीराजे व अमळोजीराजे महाडिक शिबंदीच्या मेळाने येताना बघून शंभूराजे पुढे झाले. सर्वांना खांदाभेट देऊन त्यांचे कुशल घेतले. हरजीराजे संभाजीराजांचे मेहुणे होते. राजांच्या थोरल्या भगिनी अंबिकाबाई त्यांना दिल्या होत्या. दोन्ही बाजूंना गणोजीराजे व हरजीराजे असे दोन मेहुणे घेत संभाजीराजे सातमहालाकडे वळले.

मेहुणेमंडळ येसूबाईंच्या महाली आले. त्यांना भेटून, सकवारबाईंचे दर्शन करून साऱ्या आसामी राजांच्या खासेवाड्यातील बैठकी दालनात आल्या.

पाहुणे आल्याची खबर लागलेले हंबीरराव, येसाजी कंक, आनंदराव, रूपाजी, जोत्याजी केसरकर, तुकोजी पालकर, त्र्यंबक बाजी यांच्यासह त्यांच्या भेटीला आले.

सादिलवारीचे क्षेमकुशल झाल्यावर हरजीरावांनी मुद्द्याचा प्रश्न उभा केला, "राजांच्या मंचकारोहणावरच पुढील कारभार चालणार आहे की काय सरलष्कर?"

"आमी त्येच म्हन्तोय. पाच म्हयनं जालं गादी रिकामी हाय." हंबीररावांनी त्यांना दुजोरा दिला.

"राजे, तुम्ही अभिषेक करवून घेणार आहात की नाही?" हरजीरावांनी रोकडा सवाल केला.

"त्याशिवाय काही महत्त्वाच्या बाबी निकाली लागत नाहीत." गणोजीराजे काय अर्थाने बोलले ते कुणालाही कळले नाही.

"आम्ही तुम्हा सर्वांच्या भावना जाणतो. अभिषेकही घेणार आहोत आम्ही. त्यासाठी लागणारी सिद्धता मात्र पावसाळा परतल्याशिवाय होणार नाही. हा आमचा अभिषेक नाही. महाराजसाहेबांच्या गादीच्या अखत्यारीचा आहे. त्याच इतमामानं तो करावा लागेल. भोवतीचे दरबार त्यावर नजर लावून आहेत. घाईचे हे कार्य नव्हे." संभाजीराजांनी शांतपणे सर्वांना उत्तर दिले. सर्वांना ते पुरेसे झाले.

थाळ्याची वर्दी आल्याने सर्वांसह राजे उठले. दालनाबाहेर येताच त्यांची वाट बघत उभा असलेला बांधकामाचा अखत्यारी प्रमुख हिरोजी इंदुलकर लवून म्हणाला, "आमास्नी बरं याद क्येलं व्हतं धन्यानी."

त्याला बघताच राजांची चर्या पालटत कष्टी झाली. आपला हाततळवा निरखीत ते पडेल म्हणाले, "हिरोजी, महादरवाज्यासमने निकोप जागा निवडून सती गेल्या

मासाहेबांचं वृंदावन उठवा. त्या नाहीत, त्यांचं वृंदावन तरी येता जाता नजरेस पडेल आमच्या.'' पुतळाबाईंच्या आठवणीने सर्वांचेच चेहरे म्लान झाले.

संध्याकाळी हरजीराजे, अमळोजी, गणोजी यांच्यासह गडाचा घेर टाकून जगदीश्वराच्या मंदिरात प्रवेशताना संभाजीराजे हरजींना म्हणाले, '' एक मोठी जिम्मेदारी टाकणार आहोत आम्ही तुमच्यावर राजे. विश्वास आहे तुम्ही ती पार पाडाल.''

'' जी. आम्ही घरचेच आहोत. पडेल ती जोखीम आपली मानू.'' हरजींनी त्यांना विश्वास दिला.

पिंडीवरचे एक बिल्वदल उचलून राजांनी ते हरजींच्या हाती दिले. महाडिकांनी आण म्हणून ते ' जिम्मेदारी काय ' ते कळले नसताही आपले केले.

ते बोलणे ऐकून उत्सुक झालेल्या गणोजींची मात्र निराशा झाली.

गडावर रात्र उतरली. सुखदालनात मंचकावर लेटलेल्या राजांच्या पायांशी बसून त्यांचे पाय चुरणाऱ्या येसूबाई मध्येच थांबल्या. पदर नेटका करताना त्यांच्या हातीचा चुडा किणकिणला. बांधील बोलात त्या म्हणाल्या, '' एक ऐकणं होईल का ? ''

'' सांगा.''

'' आजवर कधी काही बोललो नाही. पण एक मागणं आहे पायांशी.'' येसूबाईंचा आवाज बघता बघता जडावला.

कपाळावर घेतलेली भुज हटकून संभाजीराजे बसते होत म्हणाले, '' असं काय बोलता येसू ? मनी असेल ते साफ सांगा. तुम्ही साधी मागणी घातली होती– भवानींच्यासाठी गंडादोरा आणण्याची. तो आम्ही आणलाच नाही. आणले ते गंडांतर.'' राजांचा आवाज दुखरा झाला.

'' असं बोलू नये. आलं होतं त्यातून निभावलंय भावेश्वरीच्या कृपेनं. पुढचा विचार करता काही पायांशी ठेवावं म्हणतो आम्ही.''

'' बिनधोक सांगा येसू. कितीही अवघड असलं तरी तुमची इच्छा पूर्ण करू.''

ते ऐकताना येसूबाईंची चर्या उजळली. आपोआपच त्यांचे हात राजांचे पाय चुरू लागले. कसे बोलावे या विचारात त्या थोड्या घोटाळल्या. मग अंधाऱ्या रात्रीला आधार देण्यासाठी लाख लाख चांदण्या लुकलुकाव्या तसे त्यांच्या तोंडून बोल उमटले,

'' आता दस्त केल्या असामींवरचे चौकीपहारे उठवावे स्वारींनं ! आबासाहेबांच्या हाता-पाठीशी हयातभर वावरलेली ती माणसं आहेत. चुकली तरी आपलीच आहेत. स्वारींनं त्यांना अभय द्यावं. पदरी घ्यावं.''

'' येसू ! '' नको तो विषय, जिव्हाळ्याच्या ओठांतून आलेला ऐकून राजे संभ्रमित झाले.

'' आबासाहेब असते तर त्यांचे पाय धरूनही आम्ही हेच मागणं घातलं असतं. अशी हुन्नराची माणसं घडवितो म्हटल्यानं घडविता येत नाहीत. पुरात उफाळली आणि नुकसान

करून गेली म्हणून वेशीवरून काही नदी उठवून लावता येत नाही. आपली माणसं चुकली तर सांगायचं कुणाला ? दाद मागायची कुणाकडं ? ही माणसं वडीलधारी आहेत, मोठ्या अनुभवाची आहेत. मोठ्यांच्या चुकाही मोठ्याच असतात म्हणूनच त्यांना क्षमा करायलाही मन मोठं करावं लागतं. स्वारीनं ते दाखवावं. खुद्द स्वारींच्या बाबतीनं आबासाहेबांनी असं दाखवलं आहे.'' महाराजांच्या आठवणीने येसूबाईंचा गळा दाटून आला.

आपल्यासमोर प्रत्यक्ष थोरल्या आऊ म्हणजे पाचाडच्या मासाहेब बसल्या आहेत असा भ्रम राजांना चाटून गेला. आपल्या प्रिय पत्नीचा हात मायेने आपल्या हाती घेत तो हलके थोपटून राजे म्हणाले, '' आम्ही निर्णयासाठी चाचपडत होतो येसू. तुम्ही आम्हाला भलं बळ दिलंत. तुमच्या इच्छेप्रमाणं होईल.''

'' ते तातडीनं व्हावं. पेशवे... पेशवे ज्वराच्या व्याधीनं कोठीत अंथरुणाला खिळलेत.'' येसूबाईंचा आवाज कातरला.

'' काय म्हणता तुम्ही ? '' स्वत:लाच विचारला वाटावा असा प्रश्न राजांच्या तोंडून सुटला. येसूबाईंच्याकडे, खुद्द राजांच्याकडेही त्याचे उत्तर नव्हते.

'' जगदंब, जगदंब ! '' म्हणत अस्वस्थ **राजे** लेटले. येसूबाई त्यांचे पाय चुरू लागल्या. चिराखदाने कुचमत तेवू लागली.

हरजीराजे आणि गणोजीराजे यांनीही आग्रह धरला, '' साहेब सिंहासनाधीश होणार आणि प्रधानमंडळाच्या घरी चौक्या हे विहित नाही.''

राजांनी चांगोजीला याद फर्मावून हुकूम दिला, '' दस्त असामींवरचे चौकीपहारे काढून घ्या. आणि – आणि पेशव्यांच्या वाड्यावर राजवैद्यांना पहिले पाठवून द्या.''

आज्ञेप्रमाणे आण्णाजी, पंत, हिरोजी, बाळाजी यांच्यावरचे पहारे उठले. कोल्हापूर, पन्हाळगडची कैद माणसेही मुक्त करण्याचे हुकूम देण्यात आले.

औषधांची पडशी घेतलेले राजवैद्य मंत्रीवाडीतील मोरोपंतांच्या वाड्यात आले. ज्वराने सणसणलेल्या मोरोपंतांनी त्यांना बघताच हात डोलवून, काही न बोलताच उपचार घेण्यास साफ नकार दिला. दोन दिवस झाले. दौलतीचे कदीम चाकर पेशवे आपल्या धन्यासारखेच झेंडू फुटल्या ज्वराने संभ्रमात गेले.

त्यांच्या मंचकाभोवती त्यांचे पुत्र निळोपंत, आण्णाजी, प्रल्हादपंत, राहुजी, राघो स्वानंद आणि हंबीरराव ही हवालदिल माणसे दाटली. आता पंतांचा भरोसा नव्हता. सर्वांनाच वाटत होते की या अंतकाळी राजे पेशव्यांना भेटावे. पण तसे राजांपुढे ठेवण्याची कुणाचीही हिंमत नव्हती.

एकाएकी पंतांभोवती दाटल्या असामींत खसपस माजली. पंतांना आवरण्यासाठी निळोपंत आणि त्यांचे खासगी कारभारी तेवढेच मंचकाजवळ राहिले. बाकी सारे मागे हटले. दालनात कुजबुज उठली, '' युवराज्ञी येताहेत ! ''

आपले खाजगीचे कारभारी आणि कुणबिणींच्या घेरातून प्रत्यक्ष छत्रपतींच्या स्नुषा युवराज्ञी येसूबाईसाहेब आज पहिल्याने मंत्रीवाडीची पायरी चढत होत्या.

दालनात प्रवेशणाऱ्या येसूबाई, भ्रमात गेलेल्या मोरोपंतांना जिजाऊच वाटल्या. "मासाहे ऽ ब!" क्षीणपणे त्यांचे ओठ हलले. तशा स्थितीतही ते मुजरा देण्यासाठी खटपटीने उठू बघू लागले.

झटकन पुढे झालेल्या येसूबाईंच्या तोंडून शब्द उमटला, "पं ऽ तकाका!"

पंतांना तो ऐकू गेलाच नाही. त्यामागची वेदना भोवतीच्या सर्वांना चाटून गेली.

"स्वारी तुमच्या भेटीस येते आहे पंतकाका." येसूबाईंना अधिक बोलवेना. समोरचे पेशवे बघून, 'अंतकाळी आबासाहेबांची स्थिती कशी झाली असेल?' या विचाराने डोळे भरून आल्याने तर त्यांना पंतही दिसेनासे झाले.

भोवतीची माणसे मुजरे देण्यासाठी लवली आहेत हे बघून पदरकाठाने डोळे निपटीत येसूबाईंनी मागे बघितले. हरजीराजांसह संभाजीराजे दालनात येत होते. मंचकावर लेटल्या पंतांवर खिळलेली त्यांची नजर विचित्र दिसत होती. आघाडी मनोऱ्याच्या दगडी खांबांना घेरून बसलेली काळपट छटा तीत काठोकाठ भरून आली होती. त्यांच्या मस्तकीचा जिरेटोप दिसताच पंतांचे डोळे लखलखत तळातून ढवळून निघाले. दालनभर फिरणाऱ्या त्यांच्या नजरेला प्रत्येक चेहरा टोपधारी छत्रपतींसारखाच दिसू लागला! ओठ एकसर पुटपुटू लागले — "जी स्वामी ऽ ..." हात उशाशी वारंवार जाऊ लागला.

"पं ऽ त!" संभाजीराजांच्या तोंडून घोगरी धरली साद उमटली. फक्त येसूबाईंनाच तेवढेच जाणवले की अशी साद स्वारी क्वचितच आणि तीसुद्धा आबासाहेब वा थोरल्या आऊंना घालीत होती. भावशून्य नजरेने पंत संभाजीराजांकडे बघू लागले. त्यांचे ओठ जे बोलत होते त्याचा भोवतीच्या जगाशी काही एक संबंध नव्हता. तो गेल्या छत्रपतींशी होता. कुणालाच त्याची उकल होत नव्हती.

"या दोन वस्तू आम्ही आणल्या आहेत स्वामी ऽ ... मागील सर्व सुखरूप आहे. सेवेस सादर होण्यास विलंब झाला. क्षमा असावी ..." मध्येच डोळे मिटलेले पंत हात उशाशी नेत चाचपू लागले. संभाजीराजांनी नजरेनेच, "उशाशी काय आहे?" हे कळावे यासाठी निळोपंतांना विचारले.

निळोपंतांनी जन्मदात्याच्या उशाखालून दोन वस्तू काढून राजांसमोर उलगडून धरल्या. त्यातील एका करंडात पेशव्यांच्या शिक्के मुद्रा होत्या. आणि दुसऱ्या एका छोट्या डबीत एक मोतीबंद भिकबाळी होती!

मुद्रा-शिक्क्यांचा अर्थ संभाजीराजांसह सर्वांना लागत होता. पण भिकबाळीचा अर्थ भ्रमचित्त झालेल्या मोरोपंतांशिवाय कुणालाच कळणार नव्हता.

दुसऱ्या सुरतस्वारीनंतर रायगडी परतलेल्या थोरल्या महाराजांसमोर पंत एके दिवशी रुजू झाले होते. त्यांनी कानात घातलेली भिकबाळी महाराजांच्या लक्षात आली. ती बघून काही न बोलताच ते फक्त हसले होते.

महाराजांचा काही गैरसमज होऊ नये म्हणून मोरोपंतांनी तातडीने खुलासा केला, "उत्तरेतून मथुरेच्या पाहुणेमंडळीकडून आलेला डाग आहे हा स्वामी."

"तुम्हाला शोभून दिसतो पंत. आमचा काही गैरसमज नाही तुम्हाबाबत, पण —"

"पण काय महाराज?" उत्सुक पेशव्यांनी प्रश्न केला होता.

"पंत, आमचे हात केवढे थिटे आहेत! दोन वार आमच्या संगती सुरतेपावेतो दौडणाऱ्या प्रत्येक धारकऱ्याला अशी देखणी बाळी आम्हाला बक्ष करता आली असती तर ..." महाराजांची ती झेप बघून मोरोपंत त्या वेळी अवाक् झाले होते.

दुसऱ्या दिवशी ते महाराजांना पेश झाले तेच कानीची देखणी बाळी उतरून ठेवून! ते बघताना महाराजांची नजर व्यथित झाली होती.

कर्नाटक स्वारीहून परतताना महाराजांनी रघुनाथपंत हणमंत्यांना सांगून खास दख्खनी माटाची मोतीबंद बाळी घडवून घेतली होती. अंत:काळी पंतांच्या भेटीसाठी व्याकुळलेल्या छत्रपतींनी शेवटी ती चांगोजीच्या हाती देऊन आज्ञा केली होती, "हे पंतांना द्या! छत्रपतींची ती अमोल प्रेमखूण बघताना मोरोपंत ढसढसा रडले होते. ती बाळी त्यांनी कधीच कानात चढविली नव्हती. नेहमी कुलदेवतेच्या अंगाऱ्यासारखी कमरबंदात जतून ठेवली होती. भ्रमात जाण्यापूर्वी त्यांनी निळोपंतांना बोलावून घेऊन सांगितले होते, "आमच्याबरोबर आमचे हे शिक्के आणि ही देणगी दोन्ही डाग स्मरणपूर्वक दहन करा!"

खिन्नपणे संभाजीराजे मंत्रीवाडीतून बाहेर पडले. संध्याकाळी वाडीत कल्लोळ उठला. मोरोपंतांची जीवनयात्रा संपली होती. मराठी दौलतीच्या कानातील जुनी, जाणती बाळी गळून पडली होती!

बोलावून घेतलेल्या प्रल्हाद निराजींना संभाजीराजांनी संथपणे आज्ञा केली, "पेशव्यांचे विधिकर्म होताच त्यांचे चिरंजीव निळोपंतांकडे पेशवाईची वस्त्रे आणि शिक्केकरंड पाठवा!" आणि काही न बोलता जडावल्या पावली ते येसूबाईंच्या कानी हा निर्णय घालण्यासाठी दरुणीमहालाकडे निघून गेले.

"प्रल्हादपंत, सर्व तर्फांच्या सुभे, सरसुभे, सरनोबतांना पत्र द्या. दसरा उरकताच जमावबंदीनं सिताब रायगड जवळ करण्यास लिहा, अखत्यारीखालचा मुलूख, गडकोटास आवश्यक तेवढीच शिबंदी मागे राखून, दास्तानीच्या वरकड सर्व जातस्वारांनिशी सारा लढाऊ खासा बोलावून घ्या. या कामी कुसूर-उजूर कुणासही माफ नाही हे साफ लिहा." कसल्यातरी खोलवरच्या विचारात डुबलेल्या शंभूराजांच्या चर्येवर करडे तेज उतरले होते.

सिंहासनसदरेला जमली मंडळी त्यांचा प्रत्येक बोल ध्यान देऊन ऐकत होती. अंगावर पडणारी जबाबदारी कार्यी कशी लावावी याचे आडाखे बांधीत होती.

सरलष्कर, नाईक बहिर्जी, विश्वास मुसेखोरेकर, कर्माजी, महादेव जासूदखात्याचा निवडक तेवढा सारा असामी गडी पेश घ्या.

ती आज्ञा ऐकताच हंबीररावांची कळी खुलली. ते मनोमन काय ते समजल्याने म्हणाले, "एका हप्त्यात जासुद हुबी ऱ्हातील धन्यांच्या म्होरं."

"केशवपंडित, तुम्ही चिटणिसांच्या मदतीनं उत्तरेत काशीला गागाभट्टांकडे दूत धाडून त्यांना, 'तुमच्या हस्ते आम्ही अभिषेक घेण्याची इच्छा करतो. मागे आबासाहेबांचे केले तसे हे कार्य संपन्न करावे.' असे कळवा. नासिकच्या अनंतभट्ट कावळ्यांनाही असेच आवतन द्या."

सदरेला राजांच्या मनसुब्यांची चाल उकलत चालली.

"संताजी, यमाजी, बारामावळ, तळकोकणात उतरून तुम्ही साधेल तेवढी सैन्यसिंचणी कार्यी लावा. राघोपंत, चिमणगावकर, राजापूरच्या देवाजी विठ्ठल, दाभोळच्या वेंकाजी निमदेव, डिचोलीच्या मोरो दादाजी आणि चेऊलच्या तिमाजी व्यंकटेश या समुद्रपट्टीच्या सुभेदारांना हारकारे धाडून राजापूर, नागोठाणे, दाभोळ, थळ ही ठाणी जमाबंद करण्याची सूचना द्या." भर घेराचे जाळे पसरते फेकण्यापूर्वी पाण्याचा अंदाज घेताना कसबी कोळ्याच्या चर्येवर उठावेत तसे भाव राजांच्या चर्येवर पसरले. आपल्याच विचारात डुबलेले राजे बैठक सोडून समोरच्या एक एका माणसासामने उभे राहत चालले. प्रत्येकाला ती एक मूक समजच होती, "आम्ही काय सांगतो ते शब्दाबरहुकूम पार पाडा."

"प्रल्हादपंत, कार्तिकमास धरून सारंग दौलतखान, मायनाक, कान्होजी आंग्रे यांना आमच्या भेटीस येण्यास कळवा."

आबाजी सोनदेवांना समोर बघताच राजांना, भेटून गेलेल्या समर्थशिष्य दिवाकर गोसाव्यांची आठवण झाली. त्यांच्या आवाजात एकदम सर्वांना जाणवेल असे मार्दव उतरले. "आबाजी, समर्थशिष्य दिवाकर गोसावी भेटून गेलेत आम्हाला. या घालमेलीत समर्थांच्या मठांना सनदा तवान्या करून देणं ते राहिलं आहे."

"जी."

"तुम्ही जावळीच्या काशी रंगनाथ, सातारातर्फेच्या कोनेर रंगनाथ, वाईच्या येसाजी मल्हार या सुभेदारांना चाफळ, शिंगणवाडी, सज्जनगड आणि महाबळेश्वराच्या मठांच्या, महाराजसाहेबांनी दिल्या सनदा तशाच पुढे चालत्या करण्यास लिहा."

"जी."

रघुनाथपंत हणमंते समोर येताच मात्र नेहमी त्यांच्या दर्शनाने प्रसन्न होणाऱ्या राजांच्या कपाळी आठी धरून आली. आपला काहीच माग न देता ते त्यांना म्हणाले, "रघुनाथपंत, तुम्ही कर्नाटक प्रांती तातडीने कूच व्हा."

"जी ?" हणमंते चमकले. पण आवाज सुमार ठेवून हसत राजांनी त्यांना न बोलू

देताच बगल दिली, "तुमच्यासारख्या मुरब्बी, जाणत्या असामीशिवाय दूरवरचा एवढा मोठा सुभा कोण राखणार पंत ?"

"जशी आज्ञा." रघुनाथपंतांनी कुणालाही न कळेल असा हलका निःश्वास सोडला.

त्यांना वाटले तरी राजांनी तो टिपला होता. झाल्या कटात रघुनाथपंत हणमंत्यांनीही हातमिळवणी केलेली होती ! आता उशिरा त्याचे धागे राजांच्या हाताशी आले होते. रघुनाथपंत कर्नाटकात पोचताच त्यांच्या हाती काढण्या चढणार होत्या !

राजांनी सर्वांना निरोपाचे विडे दिले. सर्वांबरोबर बाहेर जाणाऱ्या कवी कुलेशांना ते काही हेताने म्हणाले, "तुम्ही थोडे थांबा कविराज."

संभाजीराजांची ही सूचना अगदी सादिलवार होती पण ती ऐकताना कित्येकांच्या मनात, "कानामागून आला आणि हा कानोजा भलताच तिखट झाला." अशी कुलेशांबद्दल मळमळ उठली असेल हे काही राजांच्या ध्यानी आले नाही !

कुलेशांसह राजे दरुणीमहालात येसूबाईंच्या भेटीला आले. 'गडावर नजर ठेवण्याची' सूचना त्यांनी सदरेवर कुणाला केली नव्हती ती युवराज्ञींना केली !

आपला बेत त्यांना खुला करीत राजे म्हणाले, "आम्ही या कविराजांना बरोबर घेऊन केळशीला अवलिया याकुतबाबांच्या दर्शनाला जाणार आहोत. आबासाहेबांनी बाबांना केळशीला आणून स्थापन केले आहे. त्यांच्या सोबतीत आम्हाला बरे समाधान मिळेल. काही दिवस राहावं म्हणतो तिथं आम्ही."

"जी. निर्धास्त जावं." खरे तर येसूबाईंना नुकत्याच पुराकडे गेलेल्या आपल्या दादासाहेबांशी — गणोजींशी झालेली चर्चा राजांच्या कानी घालायची होती; पण बरोबर कवीजी असल्याने त्यांनी ती तशीच ओठांआड ठेवली.

संध्याकाळी निवडीचे पन्नास एक धारकरी सोबत घेऊन संभाजीराजे कुलेशांसह गड उतरले. पोटरीला आलेली भातखाचरे न्याहाळत केळशीच्या वाटेला लागले.

•

केळशीला पाच दिवस मुक्काम करून याकुतबाबांच्या दर्शनाने आणि त्यांच्या हितोपदेशाने प्रसन्न झालेले संभाजीराजे रायगडी परतले. इंदुलकराने उठविलेल्या 'सतीच्या वृंदावनाचे आणि महाराजांच्या छत्रीचे' दर्शन त्यांनी घेतले.

आता पावसाळा उलगला होता. शिवारात भातांना लोंब्या पडल्या होत्या. पिवळ्या आश्विनी उन्हावर पोपटी राने तळपू लागली. झाडांच्या निथळल्या, निळपट डेऱ्यांत कवडे, कुक्कुडकोंबे घुमू लागले. भोरड्यांचे भरारते थवे रानावर उतरू लागले. पावसाळाभर गारठलेले मुठीएवढे काळे खेकडे बिळांच्या तोंडाशी येऊन मनसोक्त उन्हं पिऊ लागले.

नवरात्र आले. पडल्या खांड्यांचे रक्त प्यालेली धारी हत्यारे मर्द हातांनी कमरांना आवळली. दसरा सजवून चौवाटांनी मावळी फौजा पाचाडात एकवटल्या. पाऊण लाख लढाऊ मावळा तळाला जमला.

मानाजी मोरे, तुकोजी पालकर, संताजी-बहिर्जी घोरपडे, येसाजी कंक व त्यांचा बांडा मुलगा कृष्णाजी, धनाजी जाधव, केसो त्रिमल, नागोजी बल्लाळ, सर्जेराव जेधे, विठोजी चव्हाण, संताजी जगताप, दादाजी व भिमाजी काकडे, नारो त्र्यंबक, येसाजी मल्हार, नारोजी भोसला, नेमाजी गायकवाड, दादाजी नरसप्रभू असा बाका मर्दांना रायगड चढून आला.

मोगलाई, बागलाण, जव्हारपट्टी, वऱ्हाड अशा भागांत राजांनी फेकलेले बहिर्जी, विश्वास, कर्माजी हे चलाख खबरगीर सरलष्करांच्या इशारतीसरशी रायगडावर परतले होते.

सिंहासन सदरेला बड्या मसलतीची बैठक भरली. हंबीरराव, प्रल्हादपंत, आनंदराव, रूपाजी, निळोपंत, कवी कुलेश यांच्या मेळाने संभाजीराजे सदरेला येताच जमल्या बाक्यांनी अदबी रिवाज दिला. रिवाजी भंडारा-परडी फिरली.

राजांनी आस्थेने जमल्या सुभेदार, जुमलेदार, सरनोबतांचे प्रथम कुशल घेतले. सदरी आसामींवर नजरफेक टाकताना त्यांचा ऊर भक्कम विश्वासाने भरून आला. बारीकसारीक तपशिलांचा मनाशी मेळ घालताना त्यांचा हात छातीवरच्या माळेवरून फिरला. मोहिमेचा तडफदार मनसुबा खुला करीत ते तोलाच्या वजनदार बोलीत म्हणाले, "तुम्ही अवघे मैदानी कामाचे बाके तितके जमावासुद्धा आलात. संतोष झाला. श्रींच्या इच्छेने हे राज्य आबासाहेबांनी उभविले. त्याच बळावर ते वाढीस घालणे आहे. आबासाहेब गेले असे मनी आणू नका. ते तुम्हा आम्हातच आहेत. आम्ही आहोत ती त्यांची पायधूळ! अवघे बरी हिंमत बांधोन हत्यार धरता तर चौतोंडावरचा गनीम जेर होतोच आहे. तुम्हा साऱ्यांच्या जोरबळावर तीन आघाड्यांची भक्कम मोहीम खोलण्याचा बडा मनसुबा धरून आहोत आम्ही. येश देणार आई जगदंबा थोर आहे." राजे मोहिमेचा तपशील देण्यापूर्वी क्षणभर थांबले. सदरकऱ्यांना थोरले स्वामीच स्मरले.

"रूपाजी, तुम्ही मानाजी, संताजींच्या मेळाने सात हजारांची दिमत घेऊन नासिक भागात उतरा. साल्हेरचे हंसाजी आणि त्रिंबकगडाची, सोनगडाची ठाणी तुमच्या कुमकेला राहतील. तुमची फौज गाठीशी आहे. तिला केव्हाही उगवतीला वऱ्हाड-खानदेशच्या आणि मावळतीला जव्हार-किनारपट्टीला जोड देण्यासाठी दुतर्फा दौडावं लागेल या बेतात असा. हूल मात्र सुरतेवर चालून येणार अशी बेमालूम ठेवा."

"जी." रूपाजी भोसल्यांनी जोखीम उचलली. मळवट भरला.

"निळोपंत, तुम्ही जव्हार, मनोर, गणेशगाव हा फाटा धरून रूपाजींची बगल राखा. दादाजी प्रभू, तुकोजी, सुधागडपासून कल्याण पावेतो लक्ष ठेवून किनारपट्टीचा सिद्दी उचल खाऊ म्हणेल त्यास दाबून तुम्ही जरबेत ठेवा. म्हलोजी, तुम्ही कऱ्हाडचे वेंकोजी रुद्र, साताऱ्याचे अंबाजी मोरदेव यांची जोड ठेवून मिरजेच्या आदिलशाही ठाण्यावर लक्ष ठेवा."

"जी." आज्ञा झुलत्या हातांनी वरच्यावर तोलल्या गेल्या. साऱ्यांनी भंडाराबोटं कपाळी घेतली.

"सरलष्कर, तुम्ही आनंदराव, केसो त्रिमल, नागोजी बल्लाळ, धनाजी अशा तुमच्या निवडीच्या असामींनिशी तीस हजार जात स्वार पाठीशी घेऊन वऱ्हाड-खानदेश चटक्या छाप्यांनी टापांखाली घ्या. औरंगाबादेवर चालून जाण्याची सतत हूल ठेवा. वऱ्हाड राखण्यासाठी मोगली फौजा बऱ्हाणपूर सोडतील तेच मारून चालवायचे आहे! आम्ही जातीनं बागलाणात उतरू. तुमच्या जोडीनं थेट बऱ्हाणपूर टापेत घेऊ!"

सर्व सदरकऱ्यांना मानवस्त्रे आणि निरोपाचे विडे देण्यात आले, पुन्हा परडी फिरली.

बऱ्हाणपूर! मोगली सत्तेने 'दख्खन दरवाजा' मानलेले मातब्बर ठाणे! छत्रपतींनी सुरतेची 'बेसुरत' केलीच होती, आता त्यांचे पुत्र बऱ्हाणपूरचे 'विराणपूर' करण्यासाठी पक्के खडे ठाकले!

बहिर्जी, कर्माजी जासूदपेरणीसाठी वऱ्हाडाकडे कूच झाले. विश्वास बागलाणात उतरला.

जनावरांची नालबंदी करून, रसद घेतलेल्या मराठी फौजा बयाजीनं सिद्ध झाल्या. रायगड उतरून राजे पाचाडात आले. मोहिमशीर सरदारांना ऊरभेट देऊन त्यांनी निरोप दिले. हंबीररावांना उरी भेटताना ते म्हणाले, "वऱ्हाड जरबेत घेताच आम्हाला हारकारा धाडा. आम्ही तुमच्या खबरेला डोळे लावून आहोत."

"जी." लाल मुंग्यांचे वारूळ फुटावे तशा मराठी फौजा पाचाडाबाहेर पडल्या. फुटल्या. दौलतीचे खंबीर सेनापती हंबीर वऱ्हाड-खानदेशवर चालून निघाले.

आता गडावर अभिषेकाची तयारी सुरू झाली. दरबारी चौक, गडमंदिरे रंगोटीसाठी रंगाऱ्यांनी हाती घेतली. अंबारखान्याच्या धान्यगोणी वाळवण, पाखड-निवड यासाठी बाहेर पडल्या. नासिकच्या ब्रह्मवृंदांना घेऊन अभिषेक-जले आणण्यासाठी बाळंभट्ट राजोपाध्ये गड उतरले. शिष्यांच्या तांड्यासह उत्तरदेशाकडे रवाना झाले.

आठ दिवस उलटले आणि कर्नाटक प्रांतातून खबर आली. "जिंजीला रघुनाथपंत हणमंते पोचले आहेत."

ती ऐकून बैठकीतल्या हरजींना राजे म्हणाले, "हे हणमंते आपले बंधू कोल्हापूरसुभा जनार्दनपंत यांच्या मदतीने आम्हाला पन्हाळ्यावर दस्त करू बघत होते राजे. आम्ही तुम्हावर सोपवावी म्हणतो ती जोखीम हीच आहे कर्नाटकसुभ्याची. तुमच्यासारखा घरचा माणूस नामजाद करावा म्हणतो आम्ही कर्नाटकावर. हणमंते काढणीबंद होणार आहेत."

हरजी "जी" म्हणाले. पण कसल्यातरी विचारात गेले. आपला खुला सल्ला देत म्हणाले, "आम्ही सोपवाल ती कामगिरी आपली मानू. पण रघुनाथपंत मुजुमदार ते दफ्तर मोलाचे. ते असे अखत्याराविना ठेवून कसे भागावे?"

राजांनी हसून निळोपंतांकडे बघत त्यांना नजरेनेच काहीसे फर्मावले. ते उचलत

निळोपंत बाहेर गेले. राजे हरजींना म्हणाले, "मुजमूच्या दफ्तराची आम्ही व्यवस्था केली आहे. तुम्हालाही ती पसंद पडावी."

हरजींना त्यांचा अंदाज येईना.

थोड्याच वेळात निळोपंत, आण्णाजी दत्तो व बाळाजी आवजी यांच्यासह राजांसमोर पेश झाले.

आण्णाजींची मान काही वर उठत नव्हती. बाळाजींना तर "आता काय आज्ञा होईल ?" या चिंतेने पार घेरून टाकलें होते.

"आण्णाजी," राजे त्यांच्यासमोर येत थांबले. "गर्दन वर घ्या आण्णाजी. आमच्या दौलतीच्या मुजुमदारांची मान नेहमी ताठ असावीसे वाटते आम्हाला !"

आपण स्वप्नात आहोत की भ्रमात असेच क्षणभर आण्णाजींना वाटले. बोलावे म्हटले तरी त्यांना काही बोलवेना.

"तुमचा स्वभाव हिशेबी आण्णाजी. तुम्ही मुजमूला योग्य आहात. इथे कुणबाऊ रयतेला धारामाफीचा संबंध नाही. आम्ही हस्तक्षेप करण्याचा सवाल नाही. तुमचा वकूब जाणून मुजमूची अखत्यारी आम्ही तुम्हाला इतमामाने बहाल करतो आहोत. तुम्हावर आमचा कसलाही रोष-आकस नाही. तुम्ही आबासाहेबांच्या सुरनीसांना शोभेल असेच बोललात." डोळ्यांत दुखरेपण दाटलेले राजे क्षणभर थांबले.

"आम्हाला भली जाण दिलीत आम्ही केल्या गैर वर्तनाची. पठाणीगोटात गेल्याची. ती चूक निस्तरायला आम्ही आणभाकेनं बांधले आहोत. तुम्ही आबासाहेबांच्या हाताखाली धाराबंदी नमुन्याची बांधलीत. आता त्यांच्या मुजुमदारीचं दफ्तर मेळात घ्या. आमचा विश्वास आहे तुम्ही निष्ठेनं सारं कराल."

"जी." मरणाची तयारी केलेल्या आण्णाजींना मरातब देणाऱ्या राजांसमोर काय बोलावे तेच कळेना.

"एक मात्र ध्यानी ठेवा आण्णाजी. मुजमूचा संबंध संपत्तीच्या हिशोबाशी आहे. आमच्या आणि बाळराजांच्या नातेसंबंधाचा हिशेब तो नाही कधी होऊ शकत ! तेवढं सांभाळून असा."

राजे तसेच बाळाजींच्या समोर आले. कारण नसता त्यांचे मन खंडोजी आणि चिटणिसांची जोड ताडून गेले. "चिटणीस, तुमची देखणी लिखावट पारखून तुम्हास आबासाहेबांनी हाताशी घेतलं. तुम्हीही मगदुरानं दौलतीची कलमी सेवा केलीत. तुम्ही जुने, वडिलधारे. आमच्या बाबीनं पन्हाळ्यास जाणारा गुप्तखलिता रेखण्यास नकार दिलात तुम्ही. पण चिरंजीव आवजींना चिटणिसी शिक्के-मुद्रा देऊन त्याच कामासाठी मासाहेबांकडं धाडलं तुम्ही. तीन तऱ्हेच्या गफलती झाल्या यात तुमच्या चिटणीस. तुम्ही शिक्के-मुद्रा दुसऱ्या हाती दिल्या ही एक. जे स्वत:ला पटलं नाही ते चिरंजीवांना पटावं ही उमेद धरलीत ही आणि ना नकार ना होकार अशी तोड काढल्याच्या समाधानी भ्रमात राहिलात ही."

"चिटणीस, राज्याला दोन बाबी मोलाच्या : कलम आणि कट्यार. यांची परस्परांस जोड असेल तरच दौलत नांदती राहते. वाढती-चढती होते. राजांना हत्यार दुसऱ्या हाती देऊन मैदान मारता येत नाही. चिटणिसांना कलम दुसऱ्या हाती देऊन दफ्तरी कारभार कधी राखता येत नाही ! तुमच्या हाती कलम आहे ते एक जबरी हत्यार. स्वत:लाच ते कारीगर होणार नाही याची दक्षता घेऊन हाताळा ! तुमची चिटणिसी आम्ही तुम्हाला सन्मानपूर्वक सुपूर्द करतो आहोत ! ती त्याच जोखमीनं सांभाळा."

"जी. आज्ञा." बाळाजींना केल्या सेवेत हे असे काही कधी थोरल्या स्वामींकडून ऐकायचा प्रसंग आला नव्हता.

हरजींची मुद्रा समाधानाच्या तृप्तीनं उजळून निघाली. चिटणीस, मुजुमदार निघून गेले.

दाटून आलेल्या शांततेचा भंग करीत निळोपंत म्हणाले, "कऱ्हेपठाराच्या मोरेश्वर गोसाव्यांची फिर्यादी तक्रार आली आहे स्वामी."

"कसली ?"

"फौजेच्या असामी आपल्या माणसांना आणि शेतीवाडीला तजवीज देतात असं म्हणणं आहे गोसावीबुवांचं."

राजांची चर्या किंचित कडवी-कठोर झाली. त्यांनी तपास घेण्यासाठी विचारले, "पठाराला नामजाद हवालदारी कुणाची पंत ?"

"जिवाजी नारायणांची."

"त्या जिवाजींना करडी समज द्या. गोसावीबुवांच्या माणसांस, सेतापोतास, गुराढोरास काडीचीही तजवीज न देणे. फिरून बोभाटा आला तर एवढी ती गय धरली जाणार नाही !"

सोलापूरच्या किल्ल्यावरून हलविल्या जाणाऱ्या पंचवीस तोफा त्या भागातील मावळ्यांनी हस्तगत केल्याच्या बातमीची राजांना आठवण झाली. ते म्हणाले, "निळोपंत, सरलष्करांचा हारकारा येईल त्यावर ध्यान ठेवा. आम्ही सोलापूर-सांगोला भागात उतरणार आहोत."

निळोपंत नासिकहून आलेले अनंतभट्ट, केशव पंडित, उमाजीपंत, कवीजी यांच्यासह राजांच्या भेटीला आले. हातातील पसरत्या पंचांगावर एकदा अखेरची नजर टाकून अनंतभट्ट म्हणाले, "येत्या माघ शुद्ध सप्तमीचा दिवस सर्व दृष्टींनी अभिषेकास शुभदायी आहे स्वामी. पंचमीपासून विधींना प्रारंभ करता येईल."

"ठीक आहे. निळोपंत, या मुहूर्ताची आवतनं सिद्ध करा."

"जी. फोंडा प्रांतातून भीमगडच्या हवालदार नागोजी इंगळ्याकडून एक शिफारस आली आहे स्वामी." निळोपंतांनी दफ्तरी काम पेश घातले.

"कशाबद्दल आहे पंत ?"

"भीमागडच्या तर्फेला नागोजी नाईक सरदेसाई राहतात. त्यांनी तांब्रांच्या हमल्यातून गडाभवतीच्या खेड्यांची मर्दानगीने राखण केली आहे, त्यासाठी अंतरुज भागातील हेमाडबारसे, चंद्रवाडी गावठाणाची सरदेशमुखी त्यांना मेहर व्हावी अशी शिफारस आहे भीमगडच्या हवालदारांची."

"पंत, त्या हमल्याचा सारा करिना हस्तगत करा. फोंड्याचे मुद्राधारी धर्माजी नागनाथ यांच्या सल्ल्याने जासुदांकरवी खातरजमा घेऊन मगच दस्तके करून द्या सरदेसायांना."

"आज्ञा स्वामी." निळोपंत मुजरा देऊन सर्वांसह निघून गेले. मोकळ्या बैठकीमहालात राजे पायफेर घेऊ लागले. पावलागणिक आठवणीची काटेफणी मनाचे ओरखाडे काढू लागली : लिंगाण्यावरून दरडीत कुडी झोकून दिलेली गोदावरी, चितेवर चढलेल्या निर्धारी मासाहेब, नगरच्या कोठीत कोंडून पडलेल्या दुर्गा... स्त्रीजीवन! केवढ्या कठोर परीक्षेला जुंपलेले!"

राजांचे मन ठिबकू लागले. पीळ पडत जाणाऱ्या वेदनेला कडव्या संतापाचे रूप येत चालले. एकच एक थाप मनावर थडथडत आदळू लागली – "नगर – नगर!"

इतक्यात "दिवाकर गोसावी आल्यात." ही पहाऱ्याने वर्दी आणली. राजांचा पायफेर थांबला. मंजुरीसाठी हात आपोआप वर झाला.

दानाध्यक्ष मोरेश्वर पंडितराव, कफनीधारी दिवाकर गोसाव्यांसह आत आले. राजांनी गोसाव्यांचे कुशल घेतले आणि समर्थांबद्दल विचारले, "समर्थांचा मुक्काम कोठे आहे गोसावी? कसे आहेत ते?"

"सद्गुरु सज्जनगडी आहेत. थोरले छत्रपती गेल्यापासून वृत्ती उदास आहे." दिवाकर गोसाव्यांनी उत्तर दिले.

"गोसावी, तुम्ही जाताहात. तुमच्या सांगती आमचे राघो अनंत येतील समर्थांच्या दर्शनासाठी. बुवांना आमचा दंडवत सांगा. आम्ही माघ शुद्ध सप्तमीला अभिषेक घेतो आहोत. समर्थांचा कृपाहस्त आम्हाला लाभावा. आशीर्वाद देऊन आम्हांस धन्य करावे. आता त्यांच्याखेरीज आशीर्वाद घ्यावा असे कुणी नाही आम्हाला." राजांची चर्या कष्टी झाली. दिवाकरांनाही ती जाणवली. त्यासाठीच ते आग्रहाने म्हणाले, "राजे, तुम्ही जातीनं आलात सज्जनगडी तर..."

"तेच योजून होतो आम्ही. पण आता आम्हाला केव्हाही गड सोडून वऱ्हाडात उतरावं लागेल. समर्थांना हे सांगा. राघो अनंतांना जाताना बरोबर घेऊन जा. पंडितराव, राघोपंतांबरोबर समर्थांना आमंत्रण देण्याची व्यवस्था करा. बुवांना मानवस्त्रे व देवास पोषाख, जवाहिर पाठवा."

नमस्कार करून बाहेर पडणाऱ्या कफनीधारी पाठमोऱ्या दिवाकरांना बघताना एका विचित्र, किचकट विचाराने राजांना घेर टाकला – "बोहलं सोडून समर्थ लग्नमंडपातून निसटले. तप:साधना करून त्यांनी अनेक मठ उठविले. शिष्यगण तयार केला. दासबोध ग्रंथ सिद्ध केला. संसारी जगाबाबत निरिच्छ झालेल्या त्या थोर संतांना कधी मागे पडल्या आपल्या ठरल्या पत्नीची आठवण झाली असेल काय?"

त्या विचाराने पुन्हा दुर्गाबाईंची मुद्रा राजांच्यासमोर उभी ठाकली! या मर्माच्या जखमेला नगरवर चालून जाण्याशिवाय दुसरी तोडच नव्हती.

दोन दिवस उलटले. वऱ्हाडातून हंबीररावांचा हारकारा चांगली खबर घेऊन आला – "वऱ्हाड मांडाखाली धरला आहे. साहेबस्वारीनं निघोन यावं."

येसूबाईंचा निरोप घेऊन संभाजीराजे, खंडोजी बल्लाळ, कृष्णाजी कंक, जानराव, हिंमतराव अशा निवडक सरदारांनिशी गड उतरून पाचाडात आले. पागेचा दहा हजार जीनबंद घोडा बाहेर पडला. उधळत्या टापांचे गर्जते भिरे निघाले.

भोर, पुणे, चाकण, खेड, नारायणगाव, संगमनेर, अहिवंतगड अशा मजला टाकीत, भीमा, घोड, प्रवरा, गोदावरी अशा नद्यांचे पाणी घोड्यांना दावीत राजे बागलाणात उतरले. इथे रूपाजी भोसल्यांच्या जासुदांनी बऱ्हाणपूरची उचललेली खबर मिळाली – "केवळ पाचशेच्या आसपास हत्यारी बऱ्हाणपूरच्या कोटाला आहे. वरकड लढाऊ वऱ्हाडात उतरला आहे."

राजांनी आपल्या फौजेला तवानगीसाठी तळाची आज्ञा दिली. आणि हंबीररावांना निरोप पाठविला, "आता वऱ्हाड सोडा. धरणगाव-चोपडा असा खानदेश जवळ करा."

हंबीरराव हुकुमाची तामिली करीत, हूल देत वऱ्हाडाबाहेर पडले. बहादूरखानाला धुमाकूळ घालणारे मराठे यकायक कुठे गायब झाले त्याचा माग आला नाही. त्याने औरंगाबाद बळकट करून सुटकेचा सुस्कारा सोडला.

जालना, देऊळगाव, फर्दापूर, एरंडोल अशा ठाण्यांना जरब देत हंबीरराव फौजबंदीने धरणगाव-चोपडा भागात उतरले. बागलाणातून निघालेल्या संभाजीराजांनी त्यांचा मेळ घेतला. वऱ्हाडात मागे पेरलेली दहा हजारांची फौज वगळताही आता मराठी फौज तीस हजारांच्या दमात झाली. तो सेनालोळ थेट बऱ्हाणपुरावर चालून निघाला. बऱ्हाणपूर म्हणजे पंचपक्वान्नांचा, मेहमानाची वाट बघत असलेला, वाढून ठेवलेला शाही थाळाच होता! मध्ये तटबंदी असा भातमुदीसारखा बालेकिल्ला, त्याभवती उघड्यांवरचे संपन्न व्यापारीपेठांचे सतरा पुरे! गोडधोडाच्या पदार्थांसारखे.

या दख्खन दरवाज्याचा मोगली सुभेदार होता खानजमान. रिवाजाप्रमाणे खानसाहेब या समयी ठाण्याला मौजूद नव्हते! त्याचा नायब काकडखान्यात हजर होता. जिझिया वसूल करण्याचे फक्कड काम हा काकड करीत असे. आजवर केला वसूल सव्याज फेरभरणा करण्याची नौबत काकडवर आली होती. मराठी फौजेने बऱ्हाणपूरला येरगाटा टाकला. थंडीने अगोदरच काकडलेला काकडखान त्या थरकविणाऱ्या कल्लोळाने एरता

काकडून गेला. त्याने सोईचा मार्ग काढला. येतील तेवढी माणसं बालेकिल्ल्यात घेऊन तटाचे दरवाजे बंद करून टाकले! बाहेरचे मालवान व्यापारी पुरे चक्क मरणावर सोडले. हंबीरराव, नागोजी, केसो त्रिमल यांनी ते ताब्यात घेतले.

नबाबपुरा, खुर्रमपुरा, शहागंज, शहाजहानपुरा, हसनपुरा सर्व पुऱ्यांचे सराफी आणि व्यापारी कट्टे लुटीला पडले. सोने, चांदी, मोत्ये, नगदी नाणी यांची कलमवार रास राजांच्या सामने बाजारचौकात ओतण्यात येऊ लागली. मोजदाद करून जागच्या जागी ती गोणीबंद करून त्यावर मोहरा चढविल्या जाऊ लागल्या.

काही मावळे बालेकिल्ल्याच्या तटाला शिड्या जोडून वर चढण्याची खटपट करीत होते. भक्कम, उंच तटामुळे ते साधत नव्हते. बिजलीसारखे जनावर फेकीत हंबीरराव शहराभोवती फेर घेत बाक्यांना चेतना देत होते.

वरचा माल हस्तगत करण्यात पहिला दिवस गेला. पुढचे दोन दिवस खणत्या लावून 'भूमिगत' धन बाहेर खेचण्यात आले. तीन दिवस ब्ऱ्हाणपूरभवती व्यापारी पुरे पेटत होते. लक्षावधी गोणीबंद लूट मावळ्यांनी दख्खन दरवाज्याबाहेर काढली होती.

तीन दिवस संभाजीराजे आणि हंबीरराव त्या हमल्यावर जागती नजर ठेवून भिरभिरत होते. एवढ्यात जासुदाकडून खबर आली, "औरंगाबादेचा बहादूरखान बळकट फौजेनिशी बाहेर पडला आहे. ब्ऱ्हाणपूरची कुमक करण्यासाठी येतो आहे."

ज्या रानवाऱ्याच्या झडपेने मावळे आले होते त्याच चलाखीने प्रचंड लुटीसह त्यांनी जळके ब्ऱ्हाणपूर बहादूरसाठी सोडले. किंमती कापड, काचसामान अशा अनेक वस्तू वाहनाची सोय नसल्याने तशाच मागे सोडण्यात आल्या.

फौजेच्या दोन फळ्या करण्यात आल्या. लुटीचे डाग घेतलेली फौज पाठीशी घेत संभाजीराजे चोपडा-धरणगाव मार्गे पुन्हा बागलाणाकडे वळले. हंबीरराव, नागोजी व केसो त्रिमल पुन्हा पलटी मारून वऱ्हाडात घुसले.

बागलाणातील साल्हेरीवर एक मुक्काम करून संभाजीराजांनी तिथल्या सरहद्दीवरचे गाजियापूर हे ठाणेही मारले. अगणित संपत्ती घेऊन अहिवंतगड, रामसेज, पट्टागड असे मुक्काम टाकीत राजे रायगडाकडे निघाले.

ब्ऱ्हाणपूरच्या या धामधुमीत गुंतलेल्या राजांना मागे रायगडावर घडलेल्या एका छोट्या घटनेची दखल असायचे कारण नव्हते. राजांनी मुजुमदारी सुपूर्द केलेल्या आण्णाजींना सोयराबाईंनी 'समाचारासाठी' आपल्या महाली पेश घेतले होते.

त्यांना निरोप देताना सोयराबाई अगदी सहजपणे म्हणाल्या होत्या, "आण्णाजी, मुजुमदारीत भरून पावलेले दिसता तुम्ही!" असे सुखासुखी आणि महाराणी असून, प्रत्यक्ष रायगडावर चौकीबंद जीवन पचवायला सोयराबाई काही दुर्गाबाई नव्हत्या!

राजे रायगडी परतले आणि दोन नाराज करणारे वृत्तांत त्यांना ऐकायला मिळाले. केशव पंडितांनी त्यांच्या कानी घातले, "काशीचे गागाभट्ट अभिषेक सोहळ्यास येऊ शकत नाहीत. आपण सिद्ध केल्या विधींनुसार अभिषेक समारंभ संपन्न करून घ्यावा. पाठवून दिलेल्या धर्मग्रंथांचा स्वीकार करावा, असे गागाभट्टांनी कळविले आहे."

गागांनी 'समनयन' नावाचा धर्मशास्त्रावरील एक ग्रंथ राजांना पाठवून दिला होता. दुसरा वृत्तांत होता सज्जनगडी समर्थांना भेटून आलेल्या राघो अनंतांनी आणलेला. समर्थांनी निरोप दिला होता, "येणे होत नाही. आम्ही छत्रपतींना दिला कोदंड धारण करून सिंहासनारूढ व्हावे."

निरिच्छ समर्थ महाराजांच्या अभिषेक समारंभालाही आले नव्हते. पंडित गागा तर दूरस्थच होते. आमंत्रणे गेली होती. गडावर दुसऱ्या महाभिषेकाची तयारी जारीला लागली. बारा महाल, आठरा कारखान्यांची सजावट-रंगोटी सुरू झाली.

रामजी दत्तो या कारागिराने घडविलेल्या सुवर्णी मानछत्राच्या पालखीसह संभाजीराजे कवी कुलेश, खंडोजी, उमाजी पंडित यांना घेऊन रायगड उतरले. कुलदेवता भवानीला ते छत्र अर्पून, तिची महापूजा बांधण्यासाठी प्रतापगडी आले.

षोडशोपचारांत भवानीची पूजा बांधून, तिला मानछत्र अर्पण करून राजांनी मिटल्या डोळी, जोडल्या हातांनी पाठराख्या जगदंबेला आशीर्वाद मागितला, "सिंहासन थोर आहे. आम्ही लहान आहोत. तुमच्या आशीर्वादानंच ही जिम्मेदारी निभणार आहे. आबासाहेबांना होते तसे आमच्या पाठीशी कुणी नाही. आहात त्या तुम्ही एकल्या. आम्हास परडीत घ्यावे. हाती येश भरावे. भुत्येपण रक्षून चालवावे."

रात्री प्रतापगडावर आईच्या मानाचा गोंधळ मांडून, थोरल्या स्वामींच्या रोजपूजेच्या स्फटिक शिवलिंगावर सविध अभिषेक करवून, एक मुक्काम करून राजे रायगडी परतले. आता गडाला माणसांची अखंड रीघ लागली. वासुदेव, पिंगळे, बैरागी, फकीर, गोसावी, फक्कड बिदागीच्या आशेनं गड चढून आले. त्र्यंबक, नासिक, कऱ्हाड, करवीर, आळंदी अशा तीर्थक्षेत्रांचे ब्राह्मण रायगडावर आले.

डेरे, शामियाने, कमानी, राहुट्या यांनी गडमाथा फुलून गेला. सिंदखेड, फल्टण, शृंगारपूर, जिंजी, तळबीड अशा राजकुळाच्या रक्तसंबंधांच्या स्थळांहून आलेल्या पाहुण्यांनी रायगडाच्या इमारती गजबजून गेल्या.

वऱ्हाड-खानदेश, नागोजी व केसो त्रिमलांच्या हाती सोपवून हंबीरराव, आनंदराव निंबाळकरांसह आले, बागलाणातून रूपाजी भोसले, संताजी गायकवाड, मानाजी मोरे आले. कोल्हापूरसुभा डबीर जनार्दनपंत हणमंते, म्हलोजी घोरपडे, संताजी-बहिर्जी घोरपडे, सरदार विचारे आले. कोकणपट्टीतून दादाजी रघुनाथ, मोरो दादाजी, सारंग दौलतखान, कान्होजी गोविंदजी काटे, मायनाक आले. मावळातून गोपाळ रायाजी, मालोजी इतबारराव, कंक, बांदल, सिलिमकर, सर्जेराव जेधे आले. हरजीराजे,

अचलोजीराजे महाडीक, गणोजी-कान्होजीराजे शिर्के, पिलाजीमामा यांच्यासह येसूबाईंच्या मातोश्री आल्या.

समर्थशिष्य दिवाकर, चिंचवड, पाटगाव, मारुळ, कुरटे येथील मठांचे संतशिष्य आले. तुळजापूर, प्रतापगड, माहूर येथील देवीच्या मंदिरांच्या गायिका आल्या. देशोदेशींचे भाट, चारण, शाहीर, गायक, नर्तक, कवी आले. पन्नास हजारांवर माणूस राशीने गडाला दाटले. जागजागी मुदपाकाचे मंडप उठले. चुलवणांवर अन्नांचे हंडे रटरटू लागले. रायगडाला यात्रास्थानाचे स्वरूप आले. गडाच्या चित, लहाना, महादरवाजा, जगदीश्वर, शिर्काई, हनुमंत या मंदिरद्वारांना सुवर्णी पत्र्याने वेष्टित श्रीफलांची तोरणे लटकली. मंदिरमाथे तिकोनी भगव्या पताका मिरवू लागले. महादरवाज्याच्या नगारखान्यावर निशाणकाठी धरत आभाळात चढलेला, थोराड, भगवा, जरीनकशीचा दौलतध्वज मावळवाऱ्यावर सळसळू लागला.

माघ शुद्ध पंचमीचा मंगळवार मंगलकलश घेऊन उमटला. विधींना प्रारंभ झाला. स्नान घेऊन ठेवणीचे तलम राजआसवाब परिधान केलेले संभाजीराजे, येसूबाईंसह पेशवे निळोपंत पिंगळे, सुरनीस आबाजी सोनदेव, मुजुमदार आण्णाजी दत्तो, न्यायाधीश प्रल्हाद निराजी, सेनापती हंबीरराव व येसाजी कंक, डबीर जनार्दनपंत हणमंते, दानाध्यक्ष मोरेश्वर पंडितराव, वाकनीस रामचंद्र दत्तो त्रिमल अशा प्रधानमंडळाच्या मेळाने बालेकिल्ल्याबाहेर पडले. त्यांच्यापुढे बाळंभट्ट राजोपाध्ये, अनंतभट्ट कावळे आणि व्युत्पन्न ब्रह्मवृंद चालला. कवी कुलेश, केशव पंडित, उमाजीपंत चालले.

वृद्धत्वाने थकल्या धाराऊला सोबत घेऊन येसूबाई मेण्यात बसल्या. त्या मेण्यामागून अनवाणी पावलांनी संभाजीराजे सर्वांसह आघाडी मनोऱ्याबाहेर पडले. हजारो माणसे त्यांचे दर्शन घेत होती. राजमंडळ रायगड उतरून पाचाडात आले.

सर्व आसामी थोरल्या मातोश्रींच्या छत्रीकडे चालल्या. राजोपाध्ये, अध्वर्यू अनंतभट्ट यांनी मासाहेबांच्या छत्रीची सविध महापूजा बांधली. जिजाऊंच्या पदचिन्हांवर संभाजीराजे-येसूबाईंनी बेलफुलांच्या ओंजळी वाहिल्या. जोडीने छत्रीच्या पायरीला माथे टेकले. ती राजमने अनंत भावनांनी भरून आली.

ती दगडबंद छत्री अभिषेकी जोडप्याला मूक आशीर्वाद देत होती, "औक्षवान व्हा, विजयी व्हा. फुलवंत, फळवंत व्हा!"

जिजाऊंचे आशीर्वाद घेऊन राजमंडळ पुन्हा गडावर आले. जगदीश्वराजवळ हिरोजी इंदुलकराने उठविलेल्या महाराजसाहेबांच्या छत्रीची महापूजा बांधण्यात आली. अभिषेकी जोडप्याने आबासाहेबांच्या पदचिन्हांवर बेलभंडारा वाहून त्यांच्या समोर नम्रभावे माथे नमविले. ती चक्रवर्ती पदचिन्हे मूक, धीरगंभीर आशीर्वाद देत होती — "धैर्यवान व्हा! पहिले सेवक आणि सर्वांत शेवटी तुम्ही राजे आहात हे ध्यानी ठेवा. आयुष्यमान व्हा."

सतीच्या वृंदावनाचे, गडदेव जगदीश्वराचे व शिर्काईचे दर्शन घेऊन संभाजीराजे बालेकिल्ल्यात परतले. आता शांतिहोमांना प्रारंभ झाला. पहिला होम होता विघ्नहर्त्या विनायकाच्या शांतीचा. राजजोडप्याने गणेशमूर्तीचे सविध पूजन केले. एकवीस उंची वस्त्रे, अलंकार गणेशाला अर्पण करण्यात आले. एकवीस पक्वान्नांचा भोग गणनायकाला देण्यात आला. अथर्वशीर्षाच्या पवित्रमंगल मंत्रघोषांनी बालेकिल्ला भरून निघू लागला — "ॐ नमस्ते गणपतये। त्वमेव केवलं कर्तासि, त्वमेव केवलं धर्तासि, त्वमेव केवलं हर्तासि, त्वं ब्रह्मासि। त्वं गुणत्रयातीतः त्वं कालत्रयातीतः। गं गणपतये नमः।

विनायकशांतीनंतर पुरंधरशांती, ऐंद्रशांती, देवकशांती, मृत्युंजय असे शांतिहोम करण्यात आले. होमकुंडात अर्पिल्या जाणाऱ्या दूध, तूप, मध, काष्ठसमिधा यांच्या दरवळाने गडमाथा, शुचित, प्रेरक झाला.

अनिष्टांचे सांत्वन करून, इष्टांना आवाहन करीत पंचमीचा, होमहवनांचा दिवस डुबला. षष्ठीचा दानधर्माचा दिवस वर उठला. आज बुधवार होता. बालेकिल्ल्याच्या हमचौकात एका चौथऱ्यावर प्रशस्त पारड्यांची तुला सिद्ध करण्यात आली होती. ती पुष्पमाला आणि आंबवती, श्रीफलांनी सुशोभित करण्यात आली होती. तिचे पूजन करण्यात आले.

घंगाळातील घटिकापात्र डुबतीला लागले. तुलासंपन्न होण्याचा मुहूर्त आला. संभाजीराजांनी मोजड्या उतरल्या आणि ते तुळेला हळदीकुंकू वाहून चौथऱ्यावर चढले. राजोपाध्यांनी त्यांना तुळेच्या दक्षिण पारड्यात बैठक घेण्यासाठी हातइशारा दिला. पवित्र मंत्रघोष उठू लागला. राजे दक्षिण पारड्याजवळ आले. काय वाटले कुणास ठाऊक पण त्यांनी छातीवरची कवडीमाला उतरून ती राजोपाध्यांच्या हाती दिली, आणि मगच पारड्यात पाय ठेवून वीर बैठक घेतली. वाम पारडे खणखणत्या सोनमोहरांनी भरताच दक्षिणपारड्याने भुई सोडली. महाबळेश्वरावर झालेले थोरल्या मासाहेबांचे राज्याभिषेक समयी झालेली आबासाहेबांची दोन्ही तुलादाने राजांना आठवली.

सुवर्णतुला झाली. मग चांदी, पितळ, तांबे, लोखंड, साखर, अठरा धान्ये, कापूस, नारळ, मीठ, गूळ, सुपारी, मसाले, तेले यांनी राजांच्या भारंभार तुला संपन्न करण्यात आल्या. महाराणी होऊ घातलेल्या येसूबाईंच्याही तुला जोखण्यात आल्या.

एक तुला धाराऊचीही करण्यात आली.

राजजोडप्याने तुला झाल्या वस्तूंना हस्तस्पर्श दिले. दानाध्यक्ष मोरेश्वर पंडितरावांच्या देखरेखीखाली त्या वस्तू भट, भिक्षुक, गोसावी, फकीर, बैरागी यांना दान करण्यात आल्या. वस्त्रे, धान्ये, मोहरा, गाई यांची दाने झाली. षष्ठीचा दिवस दानाने संतुष्ट झाल्या जीवांचे आशीर्वाद आपलेसे करीत डुबला.

माघ शुद्ध सप्तमीची पहाट रायगडावर फटफटू लागली. आज गुरुवार होता. महाअभिषेकाचा दिवस! गडइमारतींची अंगणे सुवासिनींनी सडे सिंचून रांगोळ्यांनी

चितारली. दिवल्यांच्या रोषणाईने व्यापारपेठ, बालेकिल्ला, जगदीश्वर, शिर्काईचे मंदिर असा सारा गडमाथा लखलखून निघाला. पहाट धरूनच अभिषेकविधींना प्रारंभ झाला. नगारखान्यावरून उठणारी नौबत, नगारा-चौघड्यांची मंद दुडदुड पहाटवाऱ्याच्या गारव्यात मुरू लागली. उपोषणाच्या व्रतात असलेले संभाजीराजे व येसूबाई हे राजजोडपे सरंजामी मेळाने बालेकिल्ल्याच्या खासेवाड्याबाहेर पडले. मंत्रित धाग्यांनी फेर घालून सिद्ध केलेला सुवर्णकलशांचा अभिषेकचौक आला.

त्या आखीव अभिषेकचौकाच्या पूर्वदिशेला सुवर्णी घृतकलश घेऊन मुख्यप्रधान निळोपंत पिंगळे, पश्चिमेला दह्याचा ताम्रकलश तोलून अमात्य आण्णाजी दत्तो, उत्तरेला मधाचा सुवर्णकलश घेऊन दानाध्यक्ष मोरेश्वर पंडितराव, दक्षिणेला दुधाचा रौप्यकलश घेतलेले सेनापती हंबीरराव, ईशान्येला प्रतीकरूप सोनेरी न्यायतराजू तोलून धरलेले न्यायाधीश प्रल्हाद निराजी, आग्नेयीला मोतीलगाचे छत्र उंचावून धरलेले सचिव आबाजी सोनदेव, नैऋत्येला सुवर्णमुठीचा पंखा घेतलेले सुमंत जनार्दनपंत हणमंते आणि वायव्येला सोनमोर्चेल हाती धारण केलेले मंत्री रामचंद्र दत्ताजी त्रिमल असे अष्टदिशापालांसारखे अष्टप्रधान हारीने उभे राहिले. त्यांच्या सोबत बाळाजी आवजी, कवी कुलेश, केशवभट्ट, उमाजीपंत, येसाजी कंक अशा असामी उभ्या राहिल्या.

चौकात मांडल्या दक्षिण सोनचौरंगावर संभाजीराजे व वाम सोनचौरंगावर येसूबाई पूर्वाभिमुख बसल्या. ब्राह्मण अभिषेकमंत्रांचा अखंड उद्घोष करू लागले. मुहूर्त धरून राजजोडप्याला प्रथम पंचामृताचे स्नान घालण्यात आले. दूध, तूप, दही, मध अशा समृद्धि-रसांचे स्नानानंतर मंत्रभारित असे सप्तनद्यांचे पवित्र शुद्धोदक संभाजीराजे आणि येसूबाईंच्या मस्तकावर मंत्रघोषांच्या उद्गायनात सिंचले जाऊ लागले.

अभिषेक होताच काश्याच्या परातीतील कढीव तूपरसात राजमुद्रांनी आपले मुखदर्शन घेतले.

तिकडे सिंहासनचौक माणसांनी नुसता गजबजून गेला होता. राजदर्शनासाठी आतुरली प्रजा दरबारीचौकात दाटीवाटीने उभी होती.

संभाजीराजे खासेवाड्यात आले. येसूबाई आपल्या महाली निघून गेल्या. राजे सिंहासनावर आरूढ होताना परिधान करण्याचा खासा पेहराव चढवून सिद्ध झाले. नमस्कार करून त्यांनी पुष्पमालांनी मंडित कोदंड खांद्यावर चढविला. बाणयुक्त भाता त्यांच्या पाठीशी येईल असा बांधण्यात आला. कमरेला भवानी चढली.

जोत्याजी केसरकराने समोर धरल्या दर्पणात निरखताना त्यांना आपलेच रूप आगळे वाटू लागले. मस्तकी गर्द केशरी टोप, अंगी चुणीबाह्यांचा, जरी कोयऱ्यांचा, श्वेतवर्णी, तलम जामा, त्यावरून फिरलेले जरीकिनारी, पीतांबरासारखे उपरणे, कंठात रत्नजडित हार व मोतीकंठे, त्यांना घेर टाकलेली भवानीमाला, कानी चौकडे, कपाळी शिवगंध, कमरेला आवळलेला तलम-गर्द निळा शेला, ठिबक्यांचा चुणीदार मांडचोळणा,

खांद्यावर कोदंड, कमरेला भवानी तलवार, दाट दाढीमिश्यांची, कमानी भुवयांची, पुखरतेजी डोळ्यांची, फरीमाटाची, पुष्ट मुद्रा दर्पणातून त्यांनाच शांतपणे म्हणत होती – "संभाजीराजे भोसले, आम्हास नीट पारखून ठेवा! आम्ही मराठी दौलतीचे अभिषिक्त छत्रपती आहोत. शककर्त्यांचे वारस आहोत, तुमच्या आमच्या नात्याची कधी चुकूनसुद्धा गफलत होऊ देऊ नका!" आजवर कधीच न उमटलेला आगळाच राजगंभीर भाव संभाजीराजांच्या मुद्रेवर तरारून आला.

गर्द जांभळा, सोनबुट्ट्यांचा शालू ल्यालेल्या, सुवर्णी कमरबंद कसलेल्या, मोतीबंद नथ नाकी शोभणाऱ्या, आडवे कुंकुपट्टे कपाळी धारण केलेल्या येसूबाई खासेवाड्यात येत होत्या. त्यासुद्धा संभाजीराजांना नेहमीच्या श्रीसखी येसूबाई वाटेचनात!!

आघाडीला आब्दागिरे, गुर्झबारदार, चवरीवाले, अलकाबे ठेवून, अष्टप्रधान, ब्रह्मवृंद यांच्यासह संभाजीराजे आणि येसूबाई खासेवाड्यातून सिहासनचौथऱ्याला मिळणाऱ्या राजमार्गाने चालले.

अष्टप्रधानांनी सिंहासनाचे आपापले मानकरी सोनखांब घेतले. येसूबाई आडपडद्यांच्या राणीवशात गेल्या. सिंहासनारोहणाचा सुमुहूर्त होताच राजोपाध्ये व अनंतभट यांनी 'राजआसन आपले करावे' अशा अर्थाने राजांना हात केला.

कोदंडधारी संभाजीराजे दक्षिण पाऊल पुढे घेत, राजआसंदीला पदस्पर्श होणार नाही अशा दक्षतेने त्या पूर्वाभिमुख, सुवर्णी सिंहासनावर आरूढ झाले. मंत्रघोषांनी सिंहासनचौथरा न्हाऊन निघू लागला. पेशवे निळोपंत ओंजळीत सोनमोहरा घेऊन राजदंडधारी स्वामींना सुवर्णस्नान घालू लागले. अनंतभट्टांनी मोतीलग छत्राला हातस्पर्श दिला. संभाजीराजांनी छत्रपतिपदाचा स्वीकार केल्याची ग्वाही देण्यासाठी हातपंजा उठविताच मानकऱ्यांनी दाटला दरबार रिवाजासाठी लवला.

गुर्झबारदारांनी हातीचे सुवर्णी, गुर्झबी दंड उचलून तिबार आपटत खड्या आवाजीत अलकाबी ललकाऱ्या दिल्या.

"राजश्रियाविराजित, सकल राजलक्ष्मीअलंकृत, गोब्राह्मणप्रतिपालक, हिंदुपदपादशहा, श्रीमन्महाराज संभाजीराजे – निग्गा ऽऽ ह – निग्गाह अदब!"

तोफांची भांडी, बंदुका, उखळ्या कडकडत 'निग्गाह ठेवत, अदब राखत' मराठी दौलतीच्या दुसऱ्या छत्रपतींना मानमुजरा देऊ लागल्या.

दरबारचौकात देशोदेशीच्या चारण, भाट, शाहीर, कवींनी 'शंभुस्तुतीच्या' कवनांचे एकामागून एक फड धरले. पंडित जीवनतत्त्वावर वादविवाद लढवू लागले, नर्तिका दरबारीमुद्रेचे नृत्याविष्कार करू लागल्या. सारा सिंहासनचौक कसा संमिश्र कोलाहलाने भरून गेला.

न्यायाधीश प्रल्हादपंतांनी राजमुद्रेचे सुवर्णतबक महाराजांच्यासमोर धरले. त्याला महाराजांनी हात लावून ती मुद्रा आपली केली. त्या मुद्रेवर कोरीव शब्दलेख होता –

" श्री शंभोः शिवजातस्य मुद्रा द्यौरिव जायते।
यदंक सेविनो लेखा वर्तते कस्य नोपरी ॥ "

महाराजांनी अष्टप्रधानांना मानवस्त्रांची भरगच्च तबके बहाल केली. कवी कुलेशांना राजआसनासमोर पाचारून त्यांच्या खांद्यावर मानवस्त्रे ठेवीत महाराजांनी त्यांना किताबत मेहर केली – " छंदोगामात्य."

महाराजांनी हातस्पर्श दिलेले एक मानतबक राणीवशातील महाराणी येसूबाईंच्याकडे सेवेला रुजू होण्यासाठी चालले. त्या तबकात येसूबाईंची महाराणी म्हणून, पत्नी म्हणून, जीवनसोबतीण म्हणून कदर करणारी अखत्यारी मुद्रा होती. त्या मुद्रेवर कोरीव शब्दलेख होता, " श्री सखी राज्ञि जयति ॥ "

महाराजांनी जमल्या कलावंतांना कदर म्हणून वस्त्रे, होन, अलंकार बहाल केले. जमल्या रयतेला प्रत्येकी तीन होन देण्यात आले.

कुतुबशाही, आदिलशाही, फिरंगी, टोपीकर, वलंदेज, डींगमार दरबारातून आलेल्या वकिलांनी महाराजांना नजराणे पेश केले. त्यांना फेर नजराणे देण्यात आले.

छत्रपती संभाजीमहाराज रायगडच्या सुवर्णी सिंहासनावरून उगवतीला डोंगरकडांवर उठून दिसणारे सूर्य निरखू लागले. त्या बिंबात जशी मुद्रेची अक्षरे सोनवर्णात फेर धरत होती –

" श्री शंभोः शिवजातस्य – शिवपुत्र शंभुराजाची ही मुद्रा, द्यौरिव जायते – तेजस्वी राजमुद्रा शोभून दिसते आहे. यदंक सेविनो लेखा – राजअंकित अशा या मुद्रेची अधिकारसत्ता, वर्तते कस्य नोपरी ? कोणावर चालत नाही ? "

राजइतमामात हा दुसरा महाअभिषेक रायगडावर संपन्न होत होता; पण या अभिषेकावर मूक बहिष्कार ठेवलेल्या सोयराबाई रामराजांसह आपल्या महाली होत्या. रामराजांना कसलाही विधी करू देण्यास त्यांनी स्वच्छ नकार दिला होता.

सिंहासनी बसल्या संभाजीराजांसमोर सूर्यरूपाने टळटळीत सवाल खडा होता. " जलाभिषेक घेतलेला आपला माथा आशीर्वादासाठी ठेवावा तो कुणाच्या वडीलधाऱ्या चरणांवर ? "

आठ दिवस उलटले. उत्तरेतून आल्या दोन वृत्तांचा विचार महाराज आपल्या मनाशी एकटेच पडताळून बघत होते. राजस्थानात सुभेदार असलेल्या औरंगजेबाच्या चौथ्या पुत्राने – अकबराने बगावत करून स्वतःला ' स्वतंत्र बादशहा ' म्हणून घोषित केले होते. त्याला या कामी मदत केल्याचा आरोप ठेवून औरंगने आपली कुवार मुलगी झेबुन्निसा हिला सलिमगडाच्या कोठीत कैद करून टाकले होते.

महाराजांचे कविजी बोलत असलेल्या विषयाकडे ध्यान नव्हते. महाराजांसमोर कविजींच्या जोडीने प्रल्हाद निराजी व केशवभट्ट खडे होते. जोत्याजी केसरकर वर्दी घेऊन

बैठकी महालात आला. " समर्थशिष्य दिवाकर गोसावी आल्यात. बुवांचा काही खलिता हाय त्यांच्यासंगं."

" घेऊन या त्यांना." महाराजांच्या हातचे गुलाबपुष्प थिरावले.

जोत्याजी दिवाकर गोसाव्यांना घेऊन आत आला. गोसाव्यांनी नांदी देत झोळीतील थैली बाहेर काढली व ती महाराजांच्या हाती दिली. ती आदराने कपाळी लावून प्रल्हाद निराजींच्या रोखाने धरत महाराज म्हणाले, " न्यायाधीश, वाचा. समर्थांचा आशीर्वाद काय आहे ऐकू द्या आम्हाला."

प्रल्हादपंतांनी पुढे होत थैली स्वीकारली. आतील खलितावळी बाहेर घेऊन कपाळी लावल्यानंतर न्यायाधीश स्पष्टोच्चारात समर्थांचे गोसावीबोल वाचू लागले –

" अखंड सावधान असावें। दुश्चित्त कदापि नसावें।
तजवीजा करीत बैसावें। एकांत स्थळीं ॥
कांहीं उग्रस्थितीं सांडावी। कांहीं सौम्यता धरावी।
चिंता लागावी पराची। अंतर्यामीं ॥
मागील अपराध क्षमावें। कारभारी हातीं धरावे।
सुखीं करूनि धाडावे। कामावरी ॥ "

वाचते प्रल्हादपंत क्षणभर थांबले. ओठांवरून जीभ फिरवीत त्यांनी एकदा भराचा दम प्रथम घेतला. सावधपणे ते एक एक शब्द पुन्हा वाचू लागले. गिर्दी सोडून पुढे झालेले महाराज मिटल्या डोळ्यांनी ते संन्यस्त शब्द एकचित्ताने ऐकू लागले.

" पाटांतील तुंब निघेना। तरी मग पाणीच चालेना।
तैसें जनांच्या मना। कळलें पाहिजे ॥
जनांचा प्रवाहो चालिला। म्हणिजे कार्यभाग आटोपला।
जन ठाईं ठाईं तुंबला। म्हणिजे खोटें ॥
श्रेष्ठीं जें जें मेळविलें। त्यासाठी भांडत बैसले।
तरी मग जाणावें फावले। गनीमासी ॥
ऐसें सहसा करूं नये। दोघा भांडण तिसऱ्या जय।
धीर धरूनि महत्कार्य। समजोन करावें ॥
राजी राखतां जग। मग कार्याची लगबग।
ऐसें जाणोनि सांग। समाधानें करावी ॥
आरंभीच पडिली धास्ती। म्हणिजे कार्यभाग होय नास्ती।
याकारणें समस्ती। बुधी शोधावी ॥
सकळ लोक एक करावे। गनिमा लाटून काढावे।
येणें करितें कीर्ति धांवे। दिगंतरी ॥

आधीं गाजवावे तडाखे। तरी मग भूमंडळां धाके।
ऐसें न होतां धके। राज्यासी होती॥
समय प्रसंग ओळखावा। राग निपटून सांडावा।
आला तरी कळो नेदावा। जनांमध्ये॥
राज्यामध्ये सकळ लोक। सल्गी देउनी करावे एक।
लोकाच्या मनामध्ये धाक। उपजो चि नये॥
बहुत लोक मेळवावे। एक विचारे भरावे।
कष्ट करूनि घसरावे। म्लेंछावरी॥
आहे तितुके जतन करावे। पुढे आणीक मेळवावे।
मऱ्हाष्ट्रराज्य चि करावे। जिकडे तिकडे॥
लोकीं हि हीमती धरावी। शर्तीची तलवार करावी।
चढती वाढती पदवी। पावाल येणे॥ ''

प्रल्हादपंतांनी उपरण्याने मुद्रेवरचा घाम निपटून घेतला. त्यांचे भावगंभीर झालेले डोळे ते अर्थमय शब्दमोती टिपू लागले. समर्थांच्या चिंब भावनेने, श्रीरामाच्या तीर्थात डुबून आलेले बोल महालाच्या दगडबंद भिंतींनाही पाणवू लागलें –

'' शिवराजासी आठवावे। जीवित्व तृणसमान करावे।
येहलोक परलोकीं तरावे। कीर्तिरूपे॥
शिवराजाचे आठवावे रूप। शिवराजाचा आठवावा साक्षेप।
शिवराजाचा आठवावा प्रताप। भूमंडळीं॥
शिवराजाचे कैसे बोलणे। शिवराजाचे कैसे चालणे।
शिवराजाची सलगी देणे। कैसी असे॥
सकळ सुखाचा त्याग। करूनि साधिजे तो योग।
राज्य साधावया लगबग। तैसी करावी॥
त्याहून करावे विशेष। तरीच म्हणावे पुरुष।
या उपरी आतां विशेष। काय ल्याहावे॥ ''

महाराजांच्या नेत्रकडा पाणावून आल्या होत्या. भोवतीच्या कुणालाही त्या दिसू शकत नव्हत्या. हात उठवून महाराजांनी तो पत्रबोध पंतांना पुन्हा वाचायला लावला.

त्या शब्दाशब्दाने आपल्या आयुष्यातील एका चुकल्या दैवयोगाची सर्वांत खोलवर कळ महाराजांना छेदून गेली. तडफडते मन मूकपणे म्हणून गेले, '' समर्थ, सज्जनगडी तुमची आमची भेट होती तर हयातीतील सर्वांत मोठा काळिमा चुकला असता आमचा ! ''

'' 'काही उग्रस्थिती सांडावी – काही सौम्यता धरावी' खरेच आम्ही उग्र आहोत ? की सर्वांना तसे वाटतो ? समर्थांनाही ? त्यांची तरी काय चूक ? जे कानी पडले त्याला धरूनच त्यांनी स्पष्ट बोध दिला. आम्ही कटाच्या असामी दस्त केल्या हे सत्य आहे. समर्थांनाच का रामराजांनाही नाही का वाटले की, आम्ही महाराणी मासाहेबांवर हत्यार धरू म्हणून ? रायगडाहून पन्हाळ्याला काय मजकुराचे खलिते गेले होते हे समर्थांना कसे कळावे ? आम्ही दस्त झालो असतो तर ... तर हा खलिता लिहिण्याचा योगच समर्थांना नसता आला !

'' 'मागील अपराध क्षमावे, कारभारी हातीं धरावे' समर्थ, आम्ही हे केलेच आहे. हाती धरले कारभारी आमचे हात बळकट करतात की लुळे पाडतात हे सिद्ध व्हायचे आहे. त्याचीही वाट बघू आम्ही.

'' 'पाटांतील तुंब' उखडून काढण्यासाठी आम्ही हात घातलेच आहेत. आमचे दोन हात त्यासाठी नाही पुरे पडणार हे आम्ही जाणतो. ते हात हयातभर पाण्यातील तुंब काढण्यासाठी, पाणी खेळते राखण्यासाठी आम्हाला राबवावे लागले तरी त्यासाठी मनाची बांधणी करून सिद्ध आहोत आम्ही. संत-महंत, लढवय्ये, कलमबाज सर्वांना राजी राखण्यासाठी हरकोशिस करतो आहोत. भोवती टपल्या गनिमांच्या बाबतीत सावधच आहोत आम्ही. एक खरे आहे, वावगे काही सोसवत नाही आमच्या वृत्तीला. आला राग सर्वांसमक्ष साफ बोलू दाखवतो आम्ही.

'' हे महाराष्ट्र राज्य जिकडे तिकडे करण्यासाठी आयुष्याचा पट मांडून आम्ही खडे आहोत. आम्ही स्वत:ला छत्रपती मानीत नाही. या राज्याचे सेवकच मानतो.

'' आबासाहेबांचे रूप, बोलणे, चालणे, राज्यकारभाराची लगबग तर अहोरात्र आमच्या धमन्यांतून रक्तमार्गी फिरते आहे. असा एक दिवस उमटत नाही ज्या दिवशी आमच्या मनश्चक्षूंना त्यांचे, थोरल्या आऊंचे, सती गेल्या मासाहेबांचे दर्शन होत नाही. आम्ही शक्य ते ते करू. पण केवढेही केले तरी आबासाहेबांहून 'विशेष' ते होणे नाही. आम्हालाच काय कुणासही ते शक्य नाही. आम्ही आबासाहेब नाही. केवळ त्यांच्या रक्ताची एक सावली आहोत! सावली आकृती कशी व्हावी ? आबासाहेबांनी बरड जहागिरीतून हे राज्य उठविले. ते यश त्यांच्या नावाला साजेसे. आम्ही हे राज्य राखण्या-वाढविण्यात यशस्वी ठरलो तरी स्वत:ला धन्य मानू. प्रसंगी त्यासाठी खर्ची पडलो तर मालुसरेकाका, बाजी मुरारराव, गुजरकाका यांच्यासारखे कृतार्थ होऊ.

'' समर्थ, आपल्यासारखे 'दुसरे समर्थ' आपण सिद्ध केल्या अकरा मारुतींना, आपल्या शिष्यगणांतून बघायला मिळतील काय ? हे तरी कुणी व कसे सांगावे ? सृष्टीला आपल्यासारखी, आबासाहेबांसारखी गोमटी स्वप्ने रोजाना नाही पडत. तुमच्या पिढीने घालून दिल्या पायवाटेनं आखरी श्वासापावेतो चालण्याचं भाग्यही काही कमी मोलाचं नाही. आपले आशीर्वाद आम्हाला शिरसावंद्य आहेत.''

विचारच विचार दाटून आल्याने महाराज बैठक सोडून उठले. '' प्रल्हादपंत, गोसावीबुवांची व्यवस्था निसबतीनं बघा.'' न्यायाधीशांना सांगून त्यांनी त्यांच्याकडून

समर्थांचा मौल्यवान आशीर्वादी खलिता आपल्याकडे घेतला. काही न बोलता ते अंत:पुराकडे चालले. आत पिलाजीमामा, गणोजी-कान्होजीराजे व येसूबाई होत्या.

महाराजांना बघून पिलाजीमामा म्हणाले, "आता निगावं म्हन्तो आमी पुराकडं."

"का ? कंटाळलात गडाला ?" महाराज त्यांना हसत म्हणाले.

"तसं न्हाई, आता अबिषेक जाला. संगती कबिल्याची जोखीम ... तवा."

"आमच्या बाबीचा तेवढा निवाडा द्यावा महाराजांनी म्हणजे कागदपत्रं घेऊनच निघू आम्ही." गणोजीराजांनी येसूबाईंशी चालत्या चर्चेचा मुद्दा पटावर घेतला.

"कसला निवाडा म्हणता राजे ?" महाराजांची कपाळपट्टी वर चढली.

"थोरल्या स्वामींनी शिरकाणाचं वतन आमच्या नावे मोईन करून देण्याचं वचन दिलं होतं तुमच्या-आमच्या साट्यालोट्याच्या लग्नकार्यात !" गणोजींनी मतलब सांगितला.

"काय सांगता तुम्ही राजे ? आबासाहेब तर नवे वतन देण्याविरुद्ध काटेकोर होते." महाराजांची मुद्रा गंभीर झाली.

"तुमच्या सूनबाईंना मुलगा झाला की पुराचे वतन तुमच्या नावे करू म्हणाले होते थोरले धनी. आपल्या कन्यावारसाला चोळीखणासाठी ही मोईन करून द्यावी असा इरादा होता स्वामींचा. आता गणोजींना मुलगा झालाय तवा ..." पिलाजींनी जुना करिना सांगितला.

"मामासाहेब, गणोजी आहेत तसेच महादजी, हरजीराजेही जावई आहेत आबासाहेबांचे. सर्वांनी असाच वतनासाठी शब्द घातला तर ? तुम्ही घरचे आहात. हे समजून घ्या. गणोजी-कान्होजींना आम्ही दौलतीच्या सेवेत त्यांना साजेशी जागा देऊ. नव्या वतनाचा आग्रह नका धरू. त्यानं आणखी कटकटी उभ्या राहणार."

"महाराणींचा काय सल्ला आहे ?" येसूबाई रक्ताच्या नात्याने कौल देतील या भ्रमाने गणोजीराजांनी त्यांना बोलते करण्यासाठी सवाल केला.

"स्वारींचा निवाडा रास्त वाटतो आम्हास ! नव्या वतनाचा आग्रह आणि तोही घरच्यांनी या वख्ती धरणे रिवाजी नाही. आबासाहेब आज असते तर त्यांनीही आज हाच निवाडा दिला असता." येसूबाईंच्या उत्तराने गणोजीराजे चरफडले. कडवटपणे बोलून गेले, "म्हणजे भोसल्यांनी दिला शब्द तोडला असंच मानायचं काय आम्ही ?"

"शिर्केऽ !" संभाजीराजांच्या डोळ्यांतील भाव पालटले. हातच्या समर्थखलित्यातील शब्द मनात फिरले, "राग निपटून सोडावा ! आला तरी कळो न द्यावा ! जनांमधीं !" मोठ्या निकराने त्यांनी स्वत:ला सावरले.

"आम्ही समजलो काय ते ! निघतो आम्ही. आबा, चला. आता इथं पाणीसुद्धा घ्यायला थांबायचं नाही आम्हाला."

गणोजीराजे तडक बाहेरही पडले. मागोमाग पिलाजीमामा आणि कान्होजी मुकाट बाहेर पडले.

येसूबाई आणि महाराज खिन्नपणे ते गेलेल्या रित्या दरवाज्याकडे बघत राहिले.

"समर्थ, पाटाचा तुंबा कसा निघावा ? पाणी कैसे खेळते राहावे ? वाशांनाच घर परके वाटले तर ते तरी कैसे नांदावे ?" सुन्नपणे संभाजीराजे हातच्या खलित्याकडे बघत राहिले. त्यांना काही सुचेना !

"एक अर्जी आहे. आज्ञा होईल तर ..." पेहरावसिद्ध महाराजांच्या हाती म्यानबंद कट्यार देताना येसूबाई म्हणाल्या.

"बोला, काय आज्ञा आहे ?" महाराजांनी हसत येसूबाईंचाच शब्द फिरविला.

"सारं निर्वेध पार पडलं. आता पाचाडी एक राजमंदिर उठावं वाटतं. वाडीला मंदिर नाही."

येसूबाईंना दिल्या राजमुद्रेचा लेख महाराजांच्या मनी फिरला– "श्री सखी राज्ञि जयति."

दरवानाला याद फर्मावून त्यांनी हिरोजी इंदूलकराला बोलावून घेतले. त्याला आज्ञा देण्यात आली, "हिरोजी, पाचाडी चखोट जागा पारखून राजमंदिराचा पाया घ्या. बांधकाम निवडीच्या घडीव दगडांचे धरा."

"जी." हिरोजी मनोमन मंदिराचा आराखडा रेखतच बाहेर पडला.

बाहेर उभ्या असलेल्या जोत्याजी, अंतोजी-रायाजी यांच्या मेळाने महाराज खासेवाड्याच्या सदरेला आले. सदरेला अष्टप्रधान, कविजी, हरजीराजे, शामजी नाईक अशी मंडळी होती. महाराजांनी सर्वांचे कुशल घेतले, हंबीरराव आणि आनंदराव वऱ्हाड-खानदेशात चौथाई वसुली आणि मुलुखगिरीला निघून गेले होते.

"डिचोलीच्या मोरो दादाजींचा माणूस आला आहे. फिरंग्यांनी आपल्याशी सर्व प्रकारचे संबंध तोडले आहेत असा निरोप आहे त्यांचा." निळोपंतांनी महत्त्वाची बाब महाराजांच्या कानी घातली.

"मोरो दादाजींनी त्यांची माणसे व तो व्यापारी खुला केला की नाही पंत ?"

महाराजांनी फिरंग्यांशी मतभेद येणाऱ्या प्रश्नाचे मूळ धरले.

"जी. नाही. त्यामुळंच विजरई नाराज झाला आहे."

"मतलब ? आम्ही सुभेदारांना ती माणसं मोकळी करण्यास सांगितलं होतं. मोरो दादाजी सुभ्याचे पूर्ण अखत्यार मानतात की काय, स्वत:ला ? त्यांना लिहा, आम्ही जातीनं डिचोलीला येणार आहोत !"

"जी. फिरंगी दरबारात एक महत्त्वाचा बदल झाला आहे स्वामी. पूर्वीचा विजरई अंतोनिओ बदलून त्याच्या जागी कोंदि द आलव्होरची नेमणूक झाली आहे. अद्याप नवा विजरई गोव्यात आला नाही."

"आपले रायाजी पंडित आहेत गोव्यात. त्यांना नवा विजरई येताच खबर द्यायला कळवा." आज ना उद्या फिरंग्यांशी, हबश्यांशी झगडा द्यावाच लागणार. त्यासाठी कुडाळ, डिचोली भागात आताषीचे कारखाने उभे केल्याशिवाय तड लागणार नाही हा विचार महाराजांच्या मनात घोळत असतानाच निळोपंतांनी वृत्तांत दिला.

"बादशहानं सुरतेत आपल्या मुसलमानी रयतेवरही कर बसविला आहे. बऱ्हाणपुरावर इरजखानाची सुभेदार म्हणून नामजादी केली आहे महाराज."

त्या वृत्ताने महाराज गंभीर झाले. बऱ्हाणपूरहून राजस्थानात असलेल्या औरंगजेबाला झाल्या लुटीचे खलिते गेले होते. जुम्मा रोजाची नमाजसुद्धा बंद पडते की काय अशी शंका बऱ्हाणपूरकरांनी बादशाहासलामतला कळविली होती. त्या शहराभवती तटबांधणीचे हुकूम औरंगजेबाने जारी केले होते. आपल्या बंडखोर मुलाचा – अकबराचा काटा काढण्यासाठी औरंगजेब राजस्थानात गुंतून पडला असला तरी तो स्वस्थ बसणार नव्हता.

"पंत, मोगलाईच्या तोंडावरच्या किल्लेदारांना ठाणी रसदबंद करून सावधानगीने राहण्यास कळवा. सगळ्या तर्फांच्या सुभेदारांना फौजेची नौसंचणी जारी करायला लिहा. वऱ्हाड-खानदेश मिळेल तेवढा लुटीत घेण्याची सरलष्करांना सूचना द्या. आबासाहेबांचे श्राद्धकर्म होताच आम्ही पन्हाळा, राजापूरकडे येत असल्याचं लिहा." चारी तोंडावरच्या गनिमी फळ्यांचा विचार महाराजांच्या मनात फेर धरू लागला.

"चेऊलच्या सुभेदार तिमाजी व्यंकटेशांचा निरोप आहे स्वामी." निळोजीपंतांनी हबश्यांच्या आगाळिकीला हात घातला,

"काय म्हणतात तिमाजी ?" महाराजांचे शिवगंध आठी घेत आक्रसले.

"आपली मुंबईकडे जाणारी दोन गलबते आणि त्यावरची चार माणसे सिद्द्यानं दर्यावर दस्त केली होती. तिमाजींनी मुंबईच्या टोपीकरांना 'ही बाब आम्ही रायगडी कळवू. स्वामी गय करणार नाहीत.' अशी जरब देताच टोपीकरांनी ती गलबते व माणसे सिद्द्याकडून हस्तगत करून आबाजींच्या मध्यस्थीनं आपल्या हवाली केली आहेत."

ते ऐकताना महाराजांची मुद्रा संमिश्र भावनांनी भरून आली. सिद्द्याच्या माजोरीचा संताप, टोपीकरांचे बदलते लागी धोरण, तिमाजींची तत्परता, आवजी पंडितांची यशस्वी होत असलेली हेजिबी अशा अनेक छटा त्यात होत्या.

"पेशवे, चिमाजींना संतोषाचे पत्र द्या. आवजींना मुंबईतील हबश्यांच्या हालचालीवर बारीक ध्यान ठेवण्यास लिहा." महाराजांच्या डोळ्यांसमोर वेंगुर्ला, मालवणपासून मुंबईपर्यंतचा दर्याकिनारा उभा ठाकला. त्यावरची टोपीकर, हबशी, फिरंगी टपून बसलेली, तीन चालींची तीन पाणसावजे मनात घर करू लागली. या तीन दर्यासत्तांचा मेळ पडू देणे राज्याला हिताचे नव्हते. त्यासाठी जबाबी तोड म्हणून किनाऱ्यावर जलकोट उठविणे, अरबांशी मैत्र ठेवणे, किनारपट्टी धरून आताषीचे कारखाने बांधणे हेच उपाय होते. हबश्यांच्या चाचेगिरीला तोंड देण्यासाठी अरबी चाचे राखून ठेवणे भाग होते. त्यासाठी महाराजांनी आखणी सांगितली, "पंत, राजापुरापासून खंदेरीपावेतो असलेली दर्याठाणी माणूसमेळानं बळकट ठेवण्याचा सारंगांना निरोप द्या. जमेल तेवढा दोस्ताना अरब दर्यावर्दीशी राखून चालवण्यास सांगा."

महाराजांनी बैठक सोडली. हरजीराजांसह ते सदरेबाहेर पडले. बाहेर काही कुणबाऊ माणसे खोळंबून होती. त्यांच्याकडे हात करीत चांगोजीने त्यांना पुढे घातले, "ह्ये प्रचंडगडाचं कोळी, मेटकरी हाईत. भेटीसाटनं आल्यात धन्यांच्या."

कांबळी काचोळ्या आणि लंगोट्या घातलेली ती माणसे काकाळीने मुजरा देत वाकली. महाराजांची शोधक नजर त्या माणसांभवती फिरली.

"बोला बाबा, का गड चढून आलात ?"

बावरून त्या कोळ्या-मेटकऱ्यांनी नुसते एकमेकांकडे बघितले.

"बिनधास्त बोला. का आलात ?" छत्रपतींनी त्यांना उबदार धीर दिला.

धाडस धरून त्यांच्यापैकी एक म्हणाला, "आमापैकी काही गडाच्या चाकरीला हाईत. आमा गरिबांवर गाईंची वणी ज्यारी क्येलिया, घरपट्टी बसलिया. गुराढोराबगार हाय काय आमांकडं धनी ? त्येवढी वणी उटवावी धनी, आमावयली." पुढे होत त्याने छत्रपतींचे एकदम पायच धरले.

"उठा." महाराजांनी त्याच्या खांद्याला आधार देत अगोदर त्याला उठते केले. कसलातरी निर्धार त्यांच्या चर्येवर दाटून आला.

"चांगोजी, जरा दफ्तरदार चिमणगावकरांना पेश घ्या." राजाज्ञा सुटली.

दफ्तरात जाऊन चांगोजी चिमणगावकरांना घेऊन आला. महाराजांनी त्यांना जागीच निवाडा फर्मावला, "दफ्तरदार, प्रचंडगडाच्या मुद्राधारी रघोजी अहिररावांना तातडीनं हुकूम द्या. या कोळी-मेटकऱ्यांवरची गाईची वणी माफ केल्याचं लिहा. गडाला जे हवालदार, नाईकवडी, रजपूत आहेत तेवढ्यांना दोन म्हशींची वणीही माफ असल्याचे कळवा. वरकड म्हशींची वणी घेत जाणे. या लोकांना घरपट्टी बार आहे याचीही समज द्या त्यांना."

"जी." दफ्तरदारांनी राजाज्ञा ध्यानपूर्वक ऐकली.

"बाबांनो, आज गडाला मुक्काम करा. चांगोजी, यांची थाळ्याची व्यवस्था बघा." महाराजांच्या पाठमोऱ्या आकृतीला ती संतुष्ट झालेली गरीब माणसे कुणबाऊ कृतज्ञतेने मुजरा देत होती. महाराजांच्या मनी समर्थखलित्याचे वचन घोळत होते – "राजी राखता जग। मग कार्यभागाची लगबग। ...सकळ लोक एक करावे। गनिमा निपटून सांडावे।"

चैत्री पुनव आली. रायगड उतरून आलेले महाराज कमरेच्या केवळ पितांबरानिशी उघड्या पाठीने काळ नदीच्या पात्रात उभे राहिले. एक सालापूर्वी काळ झालेल्या आबासाहेबांच्या आत्म्याला वर्षश्राद्धाचे तर्पण ते भरल्या ओंजळीने देऊ लागले.

नदीकाठावर बाळंभट्ट, कविजी, उधो योगदेव, केशव उमाजी पंडित उभे होते.

महाराजांच्या मनाच्या पात्रात आठवणींची एक एक ओंजळ उतरू लागली – "एक साल मागे पडले. आबासाहेब गेले असे अजून मन घेत नाही. पण ते सत्य आहे. जाताना

ते जमल्या असामींना म्हणाले, ‘ये तो मृत्युलेक. कितेक आले तितुके गेले.’ तो तर रिवाजच आहे. पण हा मृत्युलोक पावन होतो तो आबासाहेबांसारख्यांच्या येण्याने. पोरका होतो तो त्यांच्या जाण्याने. आपल्या शब्दाखातर माणसें जिवांचे तर्पण करून धन्य होताहेत हे बघण्याचे भाग्य किती लोकांना मिळते? आबासाहेबांना ते मिळाले. ते शिवनेरीवर उपजले आणि त्यांनी रायगडी देह ठेवला. पन्नास वर्षांची हयात; पण केवढा मोहरा पालटून टाकला त्या सायवळ हातांनी माणसांमुलुखाचा! किती शोध घ्यावा, आबासाहेब कोण होते उमगत नाही. ही खरी जिंदगी, जिला खरे तर सद्‌गतीसाठी तर्पणाचीही गरज नाही.

“आबासाहेब, आमच्या भटकल्या क्षणांनी आम्ही पठाणी गोटाच्या गोत्यात गेलो. त्यानं ज्या यातना तुम्हाला झाल्या त्याची भरपाई उभी हयात आम्ही असे तर्पण करीत उभेच राहिलो तरी होणार नाही. किती उपटला तरी हा सल काही मनातून हलता हलत नाही. आपणाला अर्घ्य देण्याची खरे तर आमची योग्यता नाही. जे पाचाडच्या मासाहेबांनी केले, पेशवे मोरोपंतांनी केले ते खरे समर्पण! तुम्ही उठविलेल्या या दौलतीत आमची हाव नाही. आम्ही हाती राजमुद्रा घेतली आहे ती लागल्या कलंकाला साफ धुवून काढण्यासाठी. अंगी खेळणारे तुमचे रक्तबीज शाबीत करण्यासाठी! आमच्या पायांत हिंमत आणि हातांत येश भरा. थोर मनी आम्हास आशीर्वाद द्या. जे चुकलेमाकले आहे ते पदरी घ्या.”

श्राद्धविधी करून महाराज रायगड चढले. निळोपंतांना वर्दी देऊन त्यांनी सिंहासनसदर भरविण्याची आज्ञा केली. या सदरेला हरजीराजे, शामजी नाईक पुंडे, दादाजी व भिमाजी काकडे, जैताजी काटकर यांना मानविडे देऊन पाचारण करण्यात आले.

भरल्या सदरेला साक्ष ठेवून महाराजांनी हरजीराजांना म्यानबंद तलवार, अलंकार, वस्त्रे व शिरपेचाचे तबक बहाल केले. त्यांच्या खांद्यावर हात ठेवून नजर त्यांच्या नजरेत विश्वासाने रोवीत महाराज म्हणाले, “राजे, आम्ही प्रांत कर्नाटकाची कारभारी एखत्यारी तुम्हा हाती सुपूर्द करतो आहोत. प्रांताला बेंगलूर, जिंजी, होसकोट, कोलार, वेलूर, दोड्डबाळापूर, चिक्कबाळापूर असा मुलूख आहे. भोवती मदुरा, म्हैसूर, हुक्केरी, रामनाड अशा नायकांचा प्रदेश आहे. तंजावरी एकोजी काका आहेत. त्यांची जोड घेऊन प्रांत वाढीला लागेल यासाठी कोशिश करा. प्रांत कर्नाटक ही दौलतीची गाठीची फळी आहे. भोवतीच्या नायक राज्यांवर आब-जरब ठेवून ती बळकट राखा. तुमच्या दिमतीला शामजी, जैताजी आणि काकडेबंधू देत आहोत. तुम्ही आहात म्हणजे आम्हीच कर्नाटकात आहोत असे आम्ही मानतो. प्रसंगी आम्हाला हारकारा द्या. आम्ही जातीनं तुमची कुमक करू. आजच गड उतरा. आई जगदंब तुम्हास येश देणार भली आहे.” महाराजांनी प्रेमभराने हरजींना ऊरभेट दिली. हरजींनी छत्रपतींना विश्वास दिला, “आम्ही स्वामिकार्यात काडीची ती कसूर करणार नाही. छत्रपतींनी निर्धास्त असावे.”

शामजी, जैताजी, दादाजी व भीमाजी यांचाही मानवस्त्रे देऊन मरातब करण्यात आला. हरजीराजांसह महाराज रायगड उतरून पाचाडात आले. पंधरा हजारांची दिमत व निवडीची माणसे घेऊन हरजींनी पाचाड सोडले. मराठी राज्याचे ‘कारभारी एखत्यार’ म्हणून हरजीराजे महाडीक कर्नाटकाच्या रोखाने चालले.

पाचाडच्या वेशीबाहेर पडणाऱ्या हरजींच्या फौजेकडे बघणाऱ्या महाराजांच्या मनात मुद्रा तरळून गेली ती मेहुणे गणोजीराजांची! एक मेहुणे जोखीम घेऊन दूरवरच्या प्रांतात चालले होते. दुसरे वतनासाठी नाराज होऊन न भेटता-बोलता पाठ फिरवून शृंगारपुरी निघून गेले होते.

गडावर परतल्या महाराजांना वाकनीस रामचंद्र दत्ताजी आणि कारभारी शिवाजी सुरो पेश आले. रामचंद्रपंतांनी वाईच्या एका दत्तकविधानातील सरकारी शेरणीच्या भरण्याची बाब महाराजांच्या कानी घातली. “वाईला केशवजी नाईक म्हणून आहेत महाराज. वारस नाही म्हणून त्यांच्या स्त्रीने – पिलाईने त्यांच्या भावाचा – गंगाजींचा मुलगा दत्तक घेतला आहे. थोरल्या स्वामींच्या संमतीनेच हे दत्तकविधान झालेले आहे. या विधानासाठी केशवजींनी सरकारी शेरणी म्हणून पाच हजार होनांचा भरणा दफ्तरी करावा असा कौल थोरल्या स्वामींनी दिला होता. पैकी दोन हजार होन केशवजींनी भरणा केले आहेत. बाकी निघणाऱ्या तीन हजारांसाठी ते हप्ते जोडून मागताहेत.”

“केशवजी असामी कसा?” महाराजांनी अंदाज घेत विचारले.

“माणूस शब्दाला जागणारा आहे. हप्ते दिले तर होन होन पावता करील.” शिवाजी सुरोंनी इतबार दिला.

“मग त्यास हप्ते बांधून द्या.” महाराजांनी लागलीच निवाडा दिला. रामचंद्रपंत आणि शिवाजी सुरो समाधानाने मुजरा देत निघून गेले.

“मुजुमदार आल्यात भाईर.” खिदमतीच्या जोत्याजीने वर्दी दिली.

“येऊ द्या त्यांना.” महाराजांना आण्णाजी का यावेत याचा माग आला नाही. आत आलेले आण्णाजी मुजरा देऊन कसल्या तरी विचाराने तसेच उभे राहिले.

“बोला आण्णाजी, काय आहे?”

एवढे सडेतोड बोलीचे आण्णाजी तरीही घुटमळलेच. ते बोलायला भांगा शोधताहेत हे ताडून महाराजांनी त्यांना दिलासा दिला,

“आण्णाजी, काही खास बाब असली तरी निःसंकोच सांगा.”

“जी संगमेश्वराचं देशकुलकर्ण वारसाविना पडून आहे. स्वामींनी आमची कदर करण्याचं मनी घेतलं तर...” आण्णाजींना मनोमन महाराजांची धास्त वाटत होती हा प्रस्ताव ठेवताना.

छत्रपतींच्या मनात समर्थांचा बोध फिरून गेला –

“कारभारी हाती धरावे। सुखी करून सोडावे। कामाकडे॥”

"तुम्ही खातरजमा करून घेतलीत कुलकर्णं वारसाविना आहे याची आण्णाजी ?"

"जी."

"मग आम्ही तुम्हाला संगमेश्वरचं देशकुलकर्णं दिलं मुजुमदार! तुमच्यासारखा कारभारी लाभतो आहे त्या कुलकर्णाला हे संगमेश्वराचं भाग्य आहे आण्णाजी!" महाराज प्रसन्न आणि मनमोकळे बोलले.

भरून पावलेले आण्णाजी लगबगीने लवले. निरोप घेऊन बाहेर पडले.

"जासुदाचं नाईक बहिर्जी आल्यात." पहाऱ्याने खास वर्दी आणली. ती ऐकताना महाराजांच्या मनातले विचारचक्र क्षणभर थांबले. त्यांनी संमती दिली.

थोड्याच वेळात बहिर्जी आत आला. अंगच्या मोगली पेहरावाने आणि हनुवटीवर चढविलेल्या नकली, कोरीव दाढीने तो चटकन ओळखू येत नव्हता. त्या वेषातच त्याने जोहार दिला.

त्याला घेऊन महाराज एका बंदिस्त कोठीत गेले. आग्रा, बऱ्हाणपूर, बागलाण असा फटका टाकून, ससाण्याच्या डोळ्यांनी आणि चित्त्याच्या कानांनी खबर उचललेला बहिर्जी दबके म्हणाला, "धनी रजपुतांच्या फाट्याची खाशी खबर हाय. बादशहाने आपल्या पोराला हातोहात चकवा दिला. अजमेरच्या तळावर. शहजादा अकबर रजपुतांचा म्योळ घिऊन बापावर चालून ग्येला. पर निभला न्हाई. बादशहानं त्येच्याच नावाची बनावट पत्रं क्येली. 'तू रजपुतास्नी घेरं टाकून माझ्या सामने आनलास. भली खिदमत क्येलीस, तू नी म्या मिळून ह्ये रजपूत काटून काढूया!' अशा लागीची ती पत्रं हुती. बादशाने ती रजपूत सरदारांच्या नेमकी हातात जातील अशी खबरदारी घ्येतली. तसंच झालं. ती दस्त पत्रं वाचून रजपूत बिथारलं. रातोरात अकबराचा तळ टाकून पांगापांग झालं. साठ हजार हुतं त्या जागेला ईस हजारबी हशम टिकला न्हाई ऐन वख्ताला. हाय खाल्ल्याला अकबर रानोमाळ पळत्योय. बोलवा हाय त्यो आपल्या मुलकात सरकावा."

बहिर्जीचा शब्दन् शब्द ध्यान देऊन ऐकलेले महाराज विचारात गेले. त्यांनी महत्त्वाचा प्रश्न बहिर्जीला घातला, "बादशहाची चाल काय आहे नाईक पुढं ?"

"तिकडं मोगलाईत हवा हाय त्यो दख्खनेत उतरनार म्हून. बऱ्हानपूर, औरंगाबादेत जोराची तयारी हाय त्येच्या येण्याची."

महाराजांची चिंताक्रांत नजर बहिर्जीच्या कोरीव दाढीभर फिरली.

"ठीक आहे. नाईक, तुम्ही चार दिवस विसावा घेऊन निघा, निवडीचा तेवढा खबरगीर बऱ्हाणपूर, औरंगाबादेत पेरा. जे मिळेल ते टाकोटाक आम्हास पावते करीत चला." बाप, भावानंतर आता मुलाच्या पाठीशी लागलेल्या औरंगजेबाचा विचार करीतच महाराज कोठीबाहेर पडले.

चांगोजीला बोलावून त्यांनी एक आज्ञा केली. तिचा हेतू होता आता गड सर्व बाबींनी निर्मळ नांदता राहावा. "चांगोजी, मासाहेबांच्या थोरल्या महालावरील चौकीपहारे आता काढून घ्या. महाल खुला ठेवा." महाराजांच्या ध्यानीमनीही नव्हते की या आज्ञेतून केवढे रामायण पुढे उभे राहणार आहे!

नर्मदेच्या उत्तरेस महेश्वरला आलेल्या औरंगपुत्र अकबराने महाराजांना लिहिलेल्या फारशी पत्राचा मराठी तर्जुमा प्रल्हाद निराजींनी कवी कुलेशांच्या मदतीने सिद्ध केला. त्यांच्यासह प्रल्हादपंत महाराजांच्या भेटीस आले.

"शहजाद्यांकडून आल्या पत्राचा तर्जुमा तयार झाला आहे महाराज." प्रल्हादपंतांनी हातची तर्जुमावळी पुढेशी केली.

"वाचा प्रल्हादपंत, शहजादा अकबराचा मनसुबा." महाराजांनी त्यांना फर्मावले. प्रल्हाद निराजी तर्जुमा वाचू लागले.

"महाराजांचे अग्रणी शंभुराजे यासी — माझ्या अमर्याद कृपेची आशा ठेवून जाणावे की, सर्व हिंदूंचा नायनाट करणे हाच माझे आबाजान अलमगीरांचा राज्याच्या प्रारंभापासून हेत होता व आहेही. त्यांचा हा हेत महाराजा जसवंतसिंगाच्या मृत्यूनंतर सर्वांस उघडपणे कळून चुकला आहे. याच उद्दिष्टासाठी अलमगीराने उदेपूरच्या राणा राजसिंगावरही हमला केला.

"ज्याअर्थी सर्व माणसे खुदातालाची लेकरे असून तोच सर्वांचा रक्षणकर्ता आहे, त्याअर्थी ज्याची हिंद हीच मायभूमी आहे अशा इथल्या जमीनदारांचा, रयतेचा हिंदुस्थानच्या पातशहाने नाश करणे सर्वस्वी अयोग्य आहे. अलमगीर ही साधी मर्यादा सोडून वागत आहे.

"हिंदच्या लोकांचा असाच नाश होऊ दिला तर माझ्या खानदानाला एक दिवस हिंदुस्थानच्या पादशाहीलाच मुकावे लागेल. मी माझे खाजगी चाकर घेऊन अलमगीरावर खपा होऊन, शहाजहानाबाद, लाहोर, एल्गाड, बागलाण असा प्रवास करून भैसवाडजवळ नर्मदा ओलांडून आलो आहे. रजपूत सरदार दुर्गादास राठोड माझ्याबरोबरच आहेत. देवाच्या कृपेने जेव्हा दिल्लीचे तख्त माझ्या हाती येईल तेव्हा मी नामधारी बादशहा असेन, सर्व राज्य तुमचेच होईल. तुमच्या व माझ्याबाबत अलमगीराच्या मनात असलेल्या शत्रुत्वाचा पूर्ण विचार करून आपण दोघांनी एकच ध्येय गाठण्यासाठी जुटीने यत्न करण्याचा निश्चय करू या.

"जग कधीच एकाच परिस्थितीत राहत नाही. कमावलेले नाव आणि सत्कार्य मात्र चिरकाल टिकते. योद्ध्यापासून एवढीच काय ती उमेद असते. तुमचे शौर्य व जबर धडाडी यांचा विचार करून मी तुमच्या राज्यात प्रवेश करण्याचे ठरविले आहे. अधिक लिहावे असे नाही. शहाण्याला फक्त इशाराही पुरेसा असतो."

प्रत्यक्ष पुत्राने रेखलेले ते आपल्या बापाचे – बादशहाचे चित्र मोठे बोलके होते. ते ऐकून महाराज विचारमग्न झाले. एकेकाळी ते स्वत: विजापूर दरबारच्या मसूदखानाला 'सोनेरी कट्यारीसारखे' वाटले होते. आज त्यांना आपल्या राज्यात येणारा शहजादा अकबर तसाच वाटू लागला. तो औरंगपुत्र होता. साधा देवडीवालासुद्धा चिलमीवर ठेवायचा इंगळ हाताला चटके बसणार नाहीत असा घोळवीत उचलतो. हा तर शाही निखारा होता! त्याला उपेक्षून चालणार नव्हते तसेच त्याला अवाजवी महत्त्व देऊनही उपयोगी नव्हते. अकबर आपली मार खाल्लेली किस्मत आणि पळती पावले घेऊन येत होता.

"कविजी, तुमचा काय सल्ला आहे या शहजाद्याबाबत?"

"बादशहाका पुत्र है अकबर। जितना हो, उसका लाभ उठाना चाहिये स्वामी।" कुलेशांनी मसलत दिली.

"चुकताहात कविजी, काव्यात यतिभंगासाठी येणाऱ्या अडगर मात्रेसारखा आहे हा शहजादा! आम्ही त्याला अधिक महत्त्व देणार नाही. तो जेवढा फायद्याचा ठरण्याची शक्यता आहे तेवढाच नुकसानीत घालणारा ठरू शकतो. त्याचा पुरा अंदाज पडेपर्यंत त्याच्या या पत्राला दाद देऊ नका प्रल्हादपंत. त्याच्या वाटेवर चलाख जासूद पेरा." महाराजांनी निर्णय घेतला.

मुंबईच्या टोपीकर दरबारातून आलेल्या आवर्जीसह निळोपंत महाराजांच्या भेटीसाठी आले. आवर्जींनी गोऱ्या दरबाराने महाराजांना दिलेला दीडशे रुपये किमतीचा नजराणा पेश केला. त्याला हात देऊन महाराजांनी आवर्जींकडून हेजिबीचा तपशील घेत विचारले, "टोपीकर हबश्याला राखून आहेत की त्याला फटकारतात?"

"आम्ही गेल्यापासून एक महिन्यातच साहेबाने आपले गॅरी व थारवीन हे वकील जंजिऱ्यावर हबश्यांशी बोलणी करायला पाठविले. नागोठाणे, आपटे, पेण भागात चालणारी हबश्यांची लूटमार थांबली पाहिजे. नाहीतर मुंबई बंदर त्यांना मना होईल अशी जरब गोऱ्यांनी सिद्दयाला भरली आहे. टोपीकर हबश्यांशी काटेकोर वागत आहेत. आम्ही महाराजांचा निरोप गोऱ्या साहेबाच्या कानी घातला. त्यामुळं इंग्रजांनी हबश्यांना धारेवर धरलं आहे."

"आता हबशी कुठं आहे?" समाधानी चर्येने महाराजांनी विचारले.

"गलबती तांड्यासह तो सुरत बंदराकडे गेला आहे." आवर्जींनी मुंबईत राहून सिद्दयाच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवले होते.

"ठीक आहे." म्हणत महाराज बैठकीवरून उठू लागले. बरेच दिवस मनात घोळत असलेला एक विषय कुलेशांनी चालता केला. "महाराज का अभिषेक समारोह हुआ लेकिन युवराज्याभिषेक पुत्र के कारण रह गया, इसलिये …"

"काय मनी आहे तुमच्या छंदोगामात्य?" महाराजांना त्यांना काय सुचवायचे आहे ते कळले नाही.

"एक पुत्रकामेष्टी यज्ञ संपन्न किया जाय तो…" कविजींनी जिव्हाळ्याच्या विषयाला तोंड फोडले.

महाराजांनी हसत त्याला दाद दिली. "तुम्ही खरेच छंदोगामात्य शोभता कविराज. जीवन हेही अनेक छंदांनी आकार घेणारे एक काव्यच आहे. यज्ञ हा त्याचाच भाग असेल तर तो तरी का बाजूला ठेवावा? कारभाऱ्याच्या मदतीने तुम्ही त्याची तयारी करा." छत्रपतींनी बैठक सोडली.

"कविराज, चला जरा मावळमाचीवरून मासाहेबांच्या सदरेचं दर्शन घेऊन येऊ." जाता जाता त्यांनी कुलेशांना फर्मावले.

कविजी, जोत्याजी यांच्यासह महाराज मावळमाचीकडे चालले. महाराजांनी पाठीमागून येणाऱ्या कवी कुलेशांचे एका बाबीकडे ध्यान वेधले. "छंदोगामात्य, आम्ही तुम्हाला कविजी म्हणतो तसे आमच्या मात्रळमाणसांना जमत नाही. ते तुम्हाला 'कबजी' म्हणतात. कुलेश म्हणायला अवघड पडतं म्हणून 'कलुशा' म्हणतात. तुम्ही नाराज तर नाही यावर?" हे सांगताना छत्रपतींना आपला उल्लेख मोगल, आदिल, कुत्बशाही व टोपीकर, फिरंगी दरबारांत "संभा" असा केला जातो हेही आठवले.

"हम नाराज नहीं स्वामी!" कवी कुलेश हसत उत्तरले.

माचीवरून पाचाडच्या सदरेचे दर्शन घेणाऱ्या महाराजांच्या मनात एकच शब्द घंटानादासारखा घुमत होता – "पुत्रकामेष्टी यज्ञ."

"दोन पुत्र कैदेत असताना हा यज्ञ करायचा! आम्ही या कवींना म्हणालो, जीवन हे काव्य आहे पण ते साधं काव्य नसून एक खंडकाव्य असतं. ओठांवर हसू वागवीत, अंतरंगातील अग्निखाया कुणाच्याही दृष्टीस पडणार नाहीत याची खबरदारी घेतच ते वाचावं – अनुभवावं लागतं!"

रायगडावर विधियुक्त पुत्रकामेष्टी यज्ञ पार पडला. आता त्र्यंबकला पोचलेल्या अकबराला पालीच्या सुधागडावर नेण्याची जोखीम राजांनी चिटणीस बाळाजी आवजी व बहिर्जी भोसले यांच्यावर सोपवली. आणि डिचोली भागात उतरण्यासाठी रायगड सोडला. समवेत खंडोजी बल्लाळ, येसाजी गंभीरराव, कविजी वगैरेंना घेतले. पोलादपूर महाडमार्गे कोयनाघाट चढून, जावळीचे देशाधिकारी काशी रंगनाथ, मलकापूरचे देशाधिकारी बापूजी त्रिंबक यांची जोड घेत महाराज पन्हाळ्यावर आले. जवळ जवळ एक सालानंतर ते पन्हाळ्यावर येत होते.

माळवद उतरून सदरेला आल्या छत्रपतींना मुजरा देत खंडोजींनी कानी घातले, "दमण भागात आपल्या शिबंदीनं फिरंग्यांची काही घरं जाळली आणि काही असामी कलम केल्या आहेत महाराज. बार्देश भागात फिरंग्यांनी पंधरवड्यापूर्वी आपला एक गाव पेटवून गावचौकीत लाकडं रचून दिवसाढवळ्या आपली माणसं जाळली होती त्याचा जाब दिला गेला दमणभागात."

छत्रपती काही बोलणार तो पन्हाळ्याचे सरनौबत म्हलोजीबाबा आत आले. लवून म्हणाले, "वलंदेजी सायब आलाय. भेटावं म्हन्तोय धन्यास्नी."

महाराजांनी म्हलोजींना संमतिदर्शक हात दिला. घोळदार किरमिजी अंगरखा घातलेला, दोन्ही बगलांना झुरमुळ्यांसारखी झालर असलेली पायघोळ विजार चढविलेला, उंचापुरा, गोरापान डच वकील लेफेबेर दुभाष्यासह आत आला. महाराजांसमोर रुजाम्यावर गुडघे टेकून त्याने मान लवविताना डोकीवरची पांढरेशुभ्र पीस खोचलेली घेरदार टोपी उतरली. ती उजव्या बाजूला हवेत डोलवून अभिवादन केले. तो पाँडेचरीहून आला होता. त्याच्या दुभाष्याने डच दरबारची अर्जी छत्रपतींना पेश केली.

"महाराज, डच दरबारची विनंती आहे. त्यांना पांदेचरी भागात व्यापारासाठी सवलती आणि तांब्याची नाणी पाडण्यास परवानगी देण्याची मेहर व्हावी."

आबासाहेबांच्या वेळेपासूनच डचांचे संबंध दौलतीशी जिव्हाळ्याचे होते. महाराजांनी दुभाष्याला अभय देतानाच एक अट घातली, "आम्ही ही अर्जी मंजूर करू; पण एका शर्तीवर. डचांनी आम्हास बंदुका व तोफा देण्याची व्यवस्था केली पाहिजे."

दुभाष्याने लेफेबेरला छत्रपतींची अट सांगितली. ती ऐकून त्याने अदबीने होकारार्थी मान डोलावली. महाराजांनी ती बाब कविजींच्यावर सोपवून डच वकिलाला सन्मानपूर्वक निरोपाचे विडे दिले.

दुपारचा थाळा घेऊन छत्रपतींनी गडाच्या चिटणीसांना बोलावून पुढे राजापूर, कुडाळ, डिचोली भागात द्यावयाच्या खलित्यांचे मजकूर सांगितले. पन्हाळ्यावर आपण सुखरूप पोचल्याचे रायगडी येसूबाईंना कळविण्याचीही सूचना त्यांनी चिटणीसांना केली. चिटणीस निघून गेले. महालात महाराज एकटेच फेर घेऊ लागले. आत येऊन उभ्या राहिलेल्या म्हलोजींच्याकडे त्यांचे ध्यान गेले नाही. म्हलोजी बाहेर जावे की कसे या विचाराने चुळबुळले आणि आल्या पावली बाहेर जायलाही निघाले. पण त्या हालचालीने महाराजांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. त्यांना थोपविण्यासाठी छत्रपतींनी विचारले, "काय आहे म्हलोजीबाबा ? निघालात ते ?"

"तसं खासं काय न्हाई – पर." म्हलोजी चाचरले.

"काय आहे ? बोला. संकोचू नका."

"योक धनगर आलाय. धाकलू म्हन्त्यात त्याला. किती सांगितलं तरी मनावर घ्याय तयार न्हाई. खाशांची भॅट पायजेच म्हणतोय."

"कशासाठी ?"

"काय तरी देनगी द्यायची हाय त्येला धन्यास्नी म्हनं !"

"आम्हाला ? नीट तपास घ्या त्याचा. त्याला देणगी पाहिजे असेल म्हलोजीबाबा."

"धा येळा इच्चारलं. त्यो द्याची हाय म्हून धोसरा घेऊन बसलाय."

"घेऊन या त्याला." महाराजांचे कुतूहल चाळवले. खांद्यावर कांबळे टाकलेल्या, अंगात दशांच्या बंदांनी काचोळे आवळलेल्या. डुयीला लाली धनगरी मुंडासे गुंडाळलेल्या, कंबरेच्या लाकडी खोबणीत धारदार विळा खोवलेल्या, लंगोटीबाज धाकलू धनगरासह म्हलोजी आत आले. म्हलोजींनी महाराजांना मुजरा देण्यासाठी परोपरीने त्याला खुणावले. फाकड्या धाकलूच्या मुंडाशात ते काही केल्या शिरले नाही !

महाराजांनी त्या रांगड्या धनगराला विचारले, "कोण बाबा तुम्ही ? कुठून आलात ? कोण काम ?"

खांद्यावरचे घोंगडे कडेधारी हाताने नेटाक करीत त्याने उत्तर दिले. फव्वाऱ्याच्या धनगरी बोलीत – "धाकलू जी म्या. धन्गर – धन्गर. म्हसाईच्या दरडीचा. न्हाज्या कोहोन ?" निर्भय धाकलूने महाराजांनाच विचारले, "राजा कोण ?"

छत्रपतींना समोरचा धनगर अरबी घोड्यासारखा ऐटदार वाटला. त्याला धीर यावा म्हणून ते म्हणाले, "आम्हीच न्हाजे !"

"बिन्हुबाचं चांगभलं !" धनगराने त्या नांदीनेच आपल्या रिवाजाप्रमाणे मुजरा दिला. थेट दंडवत घालून.

"ही भॅट हाय न्हाजा, धन्गराची." वर उठताच धाकलूने लंगोटीच्या शेवटाची गाठ उकलून चुनखडीसारखा एक पांढराधोट तुकडा काढला आणि तो महाराजांच्या पायांशी ठेवला.

ओणावून तो उचलून निरखत महाराजांनी विचारले, "काय आहे हे धाकलोबा ?"

"खवूल हाय त्यो. जित्या खवल्या मांजराच्या पाटीवयनं टोकनुन कहाडलाय !"

"आम्हाला कशाला दिलात हा ?"

"लई गुणकारी खवूल त्यो. तसा म्हिळत न्हाई. खवल्या मांजर जिता घावला तर त्येच्या पाटीला चुना थापून रातभर त्येला डालाया लागतो. सक्काळाला त्येचा योकच खवूल असा मेंढराच्या लवीगत पांडराशिफुर हूतो का ? त्योच टोकनून कहाडायचा. रानची दवलत हाय ती न्हाजा. गाडगंभर सोनं दिलं का न्हाई म्हिळायची."

"पण उपयोग काय याचा ?" महाराजांचे कुतूहल आता शिगेला पडले.

"इखबाधंला लई पलट्या असतो त्यो खवूल ! त्येची अंगठी वळ अन् लाव बोटाला. आसपास इखार आला की अंगठी रंग पाल्टून शिफुर हाय ती हिरवीन्हिळी पडती. तुज्या थाळ्याचा राखनदारच म्हन की त्यो खवूल." रानचा राजा असल्यासारखा धनगर छत्रपतींशी एकेरीच बोलत होता.

हातातला खवूल डोळाभर निरखताना महाराजांची चर्या कशी उजळून निघाली. तसेच पुढे येत धाकलूच्या खांद्यावर हात चढवून तो हलकेच थोपटून महाराज म्हणाले, "धाकलोबा, फार फार मोलाची देणगी दिलीत तुम्ही आम्हाला. बोला. काय बक्षिसी देऊ आम्ही तुम्हाला ? मागाल ते मिळंल. जमीन, जनावर, धान्य, हत्यार, वस्त्रं, सोनं."

रानझरा खळखळून जावा तसे धाकलूचे डोळे कसल्यातरी अपार निर्मळ तेजाने झळझळले. मुंडासे डोलवीत तो म्हणाला, "न्हाजा, तू बिन्हुबा आमचा! खंयाला हात टेवलास का घ्याई पावली माजी. काय नगं द्येवा. चांगभलं." उभा धनगर पुन्हा सरळ आडवा झाला आणि त्याने आपले मुंडासे छत्रपतींच्या पायांवर ठेवले. दंडवत घातला. त्याला उठवून ऊरभेट देणाऱ्या महाराजांचा ऊर भरून आला.

रानझुळकीसारखा आला तसा धाकलू महालाबाहेर पडला आणि मसाईच्या दरडीच्या वाटेला लागला.

हातातील खवूल निरखणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांना थोडीसुद्धा कल्पना नव्हती की, रायगडी सोयराबाईंच्या महालातून कानमंत्र घेऊन बाहेर पडलेल्या आण्णाजींनी मंत्रीवाडीतील आपल्या वाड्यात एका गुप्त कारस्थानाची खलबती बैठक बसविली होती. राघो वासुदेव, बापू माळी, सूर्या निकम, हिरोजी फर्जंद, आण्णाजींचे बंधू सोमाजी दत्तो, त्र्यंबकहून परतलेले चिटणीस बाळाजी आवजी अशी मंडळी दबक्या आवाजात आण्णाजींशी बातचीत करीत होती. एक काळेकुट्ट कारस्थान एकांती रचले जात होते.

सुधागडहून सुभेदार जिवाजी हरींचा माणूस निरोप घेऊन आला, "शहजादा अकबर पालीजवळ धोंडश्याला पोचला आहे. महाराजांच्या भेटीचा आग्रह धरून आहे. त्यांच्याजवळ चारशेच्या आसपास घोडा, दोनएकशे उंट आणि मामुली हशमांची शिबंदी आहे. तो रसदीची मागणी घालत आहे. काय करावं हुकूम व्हावा."

महाराजांनी निळोपंतांना पत्र पाठवून रायगडाहून हिरोजी फर्जंद यास पन्हाळ्याला बोलावून घेतले. हिरोजी आग्रा दरबार बघून आलेला जाणता असामी म्हणून अकबराकडे धाडण्यासाठी महाराजांनी त्याची निवड केली होती.

हिरोजी मनचा मागमूस न देता कान पाडून महाराजांना पेश झाला. त्याला आज्ञा देण्यात आली, "फर्जंद, तुम्ही वकुबाचे म्हणून आम्ही तुम्हाला शहजाद्याच्या भेटीसाठी पालीला पाठवीत आहोत. जाताना एक हजार रुपये, रत्न-हिरेजडित मोतीकंठा आणि हिरे मढविलेला तुरा शहजाद्याला नजराणा म्हणून घेऊन जा. जिवाजींना शहजाद्याला रसद देण्यास सांगा. एक खलिता आम्ही सिद्ध केला आहे तो कविजींच्याकडून घ्या. आपला आब ठेवून शहजाद्याची भेट घ्या."

"जी." हिरोजीच्या मनात काळे शिवार पोटरीला आले होते तरीही अदबमुजरा देत तो कमरेत लवला.

शहजाद्याला द्यायच्या नजराणा-तबकाला हात लावणाऱ्या छत्रपतींच्या उजव्या हाताच्या तर्जनीत खवली-अंगठी चढली आहे हे हिरोजीच्या ध्यानी यायचे कारण नव्हते! हिरोजी मुजरा देऊन बाहेर पडला, महाराजांच्या भेटीसाठी बत्तीस शिराळ्याचे कृष्णाजी भास्कर आले. त्यांनी विनंत घातली, "शिराळा भागात सैन्यसंचणी जारी आहे. साहेबस्वारीने एकदा त्यावर नजर टाकावी."

संध्याकाळ धरून महाराज कृष्णाजी भास्कर, बापूजी त्रिंबक, खंडोजी, कविजी यांच्यासह पन्हाळा उतरून शिराळापेट्याच्या वाटेला कूच झाले. वारणा ओलांडून त्यांनी शिराळा गाठला. भुईकोटासमोरच्या मैदानात संचणी होणाऱ्या मावळजवानांची भेट घेतली. एक दिवस शिराळ्यात मुक्काम करून छत्रपती सर्वांसह मलकापूरला आले.

बापूजी त्रिंबकांच्या वाड्यात सदरेला मांडलेल्या बैठकीवर महाराज बसले होते. त्यांना बापूजींनी, 'तुलाजी देसाई निकम भेटीला आल्याची' वर्दी दिली.

तुलाजींचा चेहरा त्रासिक, चिंताक्रांत दिसत होता. महाराजांना मुजरा घालून तो चिडीने बोलला, "धनी, आमी आपल्या सावलीला हाव का मोगलाईत?"

"काय आहे देसाई? नीट सांगा." महाराजांनी त्याला सुमार केला.

"आमाकडं बिळाशी तर्फेच्या बारा गावाच्या देशमुखीचा भोगवटा हाय. तो शिराळा पेट्याला जोडून असता बळेच वारणखोऱ्याला जोडून आमास्नी गोत्यात घातलंया स्वामी."

"कुणी?" छत्रपतींची चर्या ताठर झाली.

"वारणखोऱ्याचं देशमुख सोमाजी बांदलांनी."

"काय म्हणतात हे देसाई? एका तर्फेचा बारा गाव तोडून दुसऱ्या पेट्याला घेतला आहे बांदलांनी?" महाराजांनी बापूजी व कृष्णाजी, यांच्याकडे वळून विचारले.

"जी. निकमांचा गाव शिराळा पेट्याचा हे खरं आहे." कृष्णाजी भास्करांनी इतबार दिला.

"आम्ही बांदलांना हे अन्यायाचं आहे, करू नका म्हणून सांगून थकलो. ते जुमानत नाहीत महाराज." बापूजी बोलले.

महाराजांची चर्या लालावून आली. त्यांनी कडक शब्दांत तुलाजीच्या खटल्याचा निवाडा दिला. ज्यात बांदलला 'भिक्षा नको कुत्रं आवरा' म्हणण्याचीच पाळी यावी. छत्रपती बापूजी त्रिंबक आणि कृष्णाजी भास्करांना म्हणाले, "आम्ही तुमच्या नावे आज्ञापत्रे देऊ. या देसायांचे बारा गाव शिराळा पेट्यालाच जोडून चालवा. दुसऱ्याच्या स्थावराला मनचाहा हात घालणाऱ्या सोमाजी बांदलांना कळू द्या की, तसे झाले की कशी कोंडमार होते. कविजी, बांदलाची वारणखोरीची देशमुखी सरकारी दिवाणात अमानत झाल्याचा हुकूम द्या!"

तुलाजी देसाईच्या चेहऱ्यावर समाधान पसरले. बापूजी, कृष्णाजी, कविजी साऱ्यांनाच समजून चुकले की, महाराज केवळ न्यायालाच कौल देण्यात तत्पर नाहीत, तर अन्यायाला खोडा घालण्यातही तयार आहेत!

मलकापूरहून पन्हाळ्याला येऊन महाराजांनी दोन दिवस मुक्काम केला. म्हलोजींचा निरोप घेऊन, जावळी, मलकापूरच्या सुभेदारांना सुभ्यावर परत पाठवून, महाराजांनी कोकण दरवाजा उतरत, पन्हाळा सोडला. राजापूर, कुडाळ जवळ करण्यासाठी ते

खंडोजी, येसाजी गंभीर, कविजी यांच्यासह दौडू लागले. हिरोजी मात्र कुणाकुणाच्या एकांती भेटी-गाठी घेत चार दिवस पन्हाळ्यावरच रेंगाळला.

राजापूरला सुभेदार देवाजी विठ्ठलांच्या मध्यस्थीने इंग्रजांच्या वखारीचे आताषीचे जाणकार उचलून महाराज कुडाळमार्गे डिचोलीला आले.

फिरंगी दरबारचा वकील नारायण शेणवी महाराजांच्या भेटीस आला. त्याने नजराणा पेश करून डिचोलीच्या मोरो दादाजींबद्दल तक्रार महाराजांच्या कानी घातली, " सुभेदार फिरंगी दरबारशी जमवून घेत नाहीत."

महाराजांनी मोरो दादाजींना कडक समज दिली, " सुभ्याला आताषीचे कारखाने उठवायचे आहेत. फिरंग्यांशी सुलूख राखल्याशिवाय ते चालते कसे होणार ? कारखान्यास लागणारा सोरा, गंधक कारवारातून दर्यामार्गे येणार. तो फिरंगी मुलखातूनच घेतला पाहिजे. तुम्ही त्यांच्याशी चांगले संबंध राखले तर ठीकच आहे, ना तर तुमची सुभेदारी सूत्रेच आम्हाला काढून घ्यावी लागतील"

नारायण शेणव्याने आणखी एक महत्त्वाची बाब महाराजांना पेश केली, " छत्रपतींच्या पत्राप्रमाणे पन्हाळ्याहून आलेला वकील रामजी ठाकूर कैद केला आहे. नव्या वकिलाची नामजादी व्हावी." रामजी पहिल्या कटाचा हस्तक असल्याने त्याला कैद करण्याबद्दल महाराजांनी फिरंग्यांना लिहिले होते.

छत्रपती क्षणैक विचारात पडले. काही ठरवून त्यांनी शेणव्याला निर्णय दिला, " येसाजी गंभीर येतील तुमच्याबरोबर आमचे दरबारी वकील म्हणून."

महाराजांनी विजरईला द्यायचा नजराणा आणि कारवारभागातून येणारा गंधक, सोरा दर्यामार्गे सोडण्याची विनंती करणारा खलिता देऊन येसाजी गंभीरांना गोव्याकडे पाठविले. कारखान्यांसाठी सोयीच्या जागांची पाहणी केली. कुडाळचे धर्माजी नागनाथ आणि मोरो दादाजींचा निरोप घेऊन महाराजांनी डिचोली सोडली. पुन्हा पन्हाळ्याचा रोख ठेवून दौडणाऱ्या छत्रपतींना एक गोष्ट खोलवर जाणवली होती, कुडाळचे खेमसावंत आणि फोंड्याचे दळवी हे दोघे काही भेटीला आले नव्हते.

पन्हाळ्याच्या पुसाटी-बुरुजावरून मावळतीला दूरवर दिसणाऱ्या कोकणपट्टीत छत्रपतींची नजर गुंतून पडली होती. मृगाचे नक्षत्र कोरडे गेल्याने अजून आभाळ स्वच्छ होते. नुकताच नागोठाण्याला हारकारा धाडून महाराजांनी आरमाराच्या खाशा सारंगांना आणि दर्यावर्दींना नागोठाण्यात एकजाग येण्याचा हुकूम दिला होता.

पश्चिमेच्या आभाळकडेवर उधळलेली केशरी, नारिंगी, गुलाबी, रुपेरी ढगांची रंगपंचमी निरखणाऱ्या महाराजांच्या मनात एकच शब्द थडथडू लागला. ' जंजिरा – जंजिरा ! ' सांजावून आले. कासारी नदीचा पट्टा दिसेनासा होताच महाराजांनी बुरुज सोडला.

तर्जनीतील अंगठीशी बोटे चाळवीत चालणाऱ्या महाराजांना बरोबर असलेल्या म्हलोजी, खंडोजी, कविजी यांचे कुणाचेच भान नव्हते. चौवाटांनी उड्या घेत आलेले पाणलोट एकाच कुंडात कोसळावेत तसे विचारच विचार त्यांच्या मनात एकवटून आले. " बापावर हत्यार चालवायला निघालेला, फसगत होऊन दख्खनेत उतरलेला अकबर. त्याच्या मागानं येऊ घातलेला औरंग. कधीतरी निसटता बघितलेला औरंग आणि कधीही न बघितलेला गोव्याचा विजरई, जंजिऱ्याचा हबशी, भागानगरचा कुत्बशहा, विजापूरचा बालराजा शिकंदर, मुंबईचा टोपीकर. हा सर्वांचा खासगतीचा खेळ आहे ! की अज्ञात शक्तीने मांडलेला हा भव्य असा शतरंजी पट आहे ? का खेळतो आहोत आम्ही तो ? दिला असता आमचा हा डाव रामराजे, मासाहेब, आण्णाजींच्या हाती आणि या पन्हाळ्यावर सुभा मोडून खात निवांत बसलो असतो तर काय बिघडते ? का वाटते हा खेळ खेळावा ? कुठली शक्ती आम्हाला रेटून या मैदानावर उतरविते आहे ? की आमचा जन्मच यासाठी आहे ?

" तो धनगर आम्हाला ' बिरोबा ' म्हणाला, बऱ्हाणपूरची बातमी ऐकलेला बादशहा ' सैतान ' म्हणाला असेल ! सती गेलेल्या मासाहेब आम्हाला ' पुत्र आहात ' म्हणाल्या. रायगडच्या मासाहेब आम्हाला शत्रू मानतात ! अकबराला आम्ही धडाडीचे वाटलो, समर्थांना उग्र !

" लिंगाण्यावरून कुडी फेकलेल्या गोदावरीला काय वाटले असेल आमच्याबद्दल ? भ्रमात गेलेल्या मोरोपंतांना काय वाटले असेल ? अंती भेटीसाठी तळमळलेल्या आबासाहेबांना काय वाटले असेल ? आणि – आणि नगरच्या कोठीत दिवस मोजणाऱ्या आमच्या स्त्रीला काय वाटले असेल ?" सुन्न मनाने महाराज पन्हाळ्याच्या बालेकिल्ल्यात परतले.

दुसऱ्या दिवशीच नागोठाण्याहून फेरजाब आला, " निवडीच्या सारंग, दर्यावर्दीचा जमाव झाला आहे."

पन्हाळा सोडून महाराज अणुस्कुरा घाटाने कोकणपट्टीत उतरून नागोठाण्याला आले.

सुभेदारवाड्यात दर्याकिनारीची ' पणाची मसलत ' भरली. या मसलतीला दादाजी प्रभू, मायनाक, दौलतखान, गोविंदजी आंग्रे, कोंडाजी व जागोजी फर्जंद, संताजी पवळा, महमद कावजी, नागोजी वाघमारे, सुंदरजी बाजी असा मर्दांना दर्यावर्दी जमला होता. सर्वांवर नजरेचा वल्हा फिरवीत महाराजांनी पण सांगितला, " हबश्यांचा जंजिरा, उंदेरी म्हणजे दर्यादौलतीच्या पायीचा साखळदंड ! तुम्ही सारे ते दर्याचे बच्चे. एवढे हिंमतीचे सारे असता हा साखळदंड निखळत नाही हा कोण मामला ? जोवर जंजिरा पडत नाही तोवर तुम्ही-आम्ही आबासाहेबांच्या आत्म्याला शांती देत नाही. तुम्हा सर्वांच्या साक्षीनं आम्ही दर्याचा पण मांडतो आहोत. जो कुणी बाका जंजिरा, उंदेरी पटात घेईल त्यास दोन शेर सोने, शिरपेच आणि पालखीचा मान देऊन आम्ही त्याचा मरातब करून चालवू."

छत्रपतींची आव्हानी नजर सर्वांवर फिरली. प्रत्येकाला मानविडा देण्यात आला. तीन हजार आरमारी चाकरांना सहा महिन्यांचा पगार आगाऊ आदा करण्यात आला. नागोठाणे, पेण, आपटे भागात एक फटका टाकून महाराज पन्हाळ्याला परतले. दोन दिवस झाले. नित्याप्रमाणे सोमेश्वराचे, रंगरूपी पिंडीचे दर्शन घेतलेले छत्रपती बालेकिल्ल्यात आले. बागलाण, गोवा, मुंबई, खानदेशात जाणाऱ्या खलित्यांचे मजकूर चिटणिसांना सांगितले.

माध्यान्हकाळ झाला. थाळ्याची वर्दी असल्याने महाराज सदर सोडून उठले. बाहेर आर्द्राच्या ढगांनी आभाळाला दाट छपरी धरली होती.

तस्तावर धरलेल्या छत्रपतींच्या हातावर तस्त्याने पाणधार धरली. पोसाने हात टिपत माजदालनात मांडलेल्या चौरंगावर महाराज बसले. बाहेर हत्यारी पहारा फिरत होता. खंडोजी आणि म्हलोजीबाबा जंजिऱ्याच्या पणाची बातचीत करीत खडे होते. माळवदाच्या दगडी कठड्याला रेलून कवी कुलेश ढगभरले आभाळ न्याहाळत होते.

एक खिदमतगार पोसबंद तबक घेऊन माजदालनात आला. भोजनाचे तबक छत्रपतींच्या मांडलेल्या चौरंगीवर ठेवून पोस हटविताना त्याचा हात नाकळेलसा थरथरला. भातमुदीला घेर धरलेल्या वाडग्यांतून गरम वाफा उठल्या. महाराजांनी एक एका वाडग्यावर बोट ठेवून पदार्थांची नावे विचारली. खिदमतगाराने अदबीने पदार्थ सांगितले. नको असलेले वाडगे महाराजांनी तबकातून उचलून बगलेला ठेवले. तरीही तबकात राहिलेल्या चार वाडग्यांवर खिदमतगाराची बारीक नजर खिळून होती.

तबक मनाजोगे बघून महाराजांनी खिदमतगाराला निरोपाचा हात उठविला.

प्रत्येक पदार्थांतील अंशभाग घेऊन तो तबकाबाहेर ठेवून महाराजांनी गडव्यातील पाणधार तबकाभोवती फिरवून चित्राहुती दिली. परब्रह्म अन्नाला डोळे मिटून नित्याचा नमस्कार करून त्यांनी बाही मागे घेत तबकात हात घातला.

मूद फोडून तीव्र कालवणाचा वाडगा रिता करून छत्रपती भात कालवू लागले. मनात असंख्य विचार फिरत होते त्यांच्या.

घास घेण्यापूर्वी सहज त्यांची नजर तबकातील हातावर गेली. वावटळीने, दाटले ढग सरासर पिटाळले जावेत तसे त्यांच्या मनी घोळणारे राजकारणाचे विचार कुठच्या कुठं पसार झाले. आक्रसल्या डोळ्यांनी महाराजांनी तर्जनीवरची रंग पालटून हिरवट-निळी पडलेली मूळची पांढरी शुभ्र खवली-अंगठी निरखली! त्यांची उजवी भुवई कमानी बाक घेत वर चढली. डोळे विस्फारले गेले. नाकपुड्या फुलल्या. अंगभर सरसरत फिरणाऱ्या रक्ताबरोबर कानपाळी लालेलाल झाली. कपाळावरची उभी शीर टपटपून थडथडू लागली. हात एकदा तबकाबाहेर घेऊन त्यांनी खातरजमा केली. तबकापासून दूर होताच अंगठी पांढरट होत होती. हात आत जाताच पुन्हा हिरवट-निळी पडत होती.

त्या रंगबदलत्या अंगठीबरोबरच छत्रपतींच्या डोळ्यांतले रंगही सरासर पालटू लागले! झेंडू फुटल्या राजसंतापाने त्यांचे उभे अंग थरथरू लागले. कपाळावर घामथेंब तरारून उठले. हात झटकून, तबक तसेच पुढे लोटून उठता उठता, बाहेरच्या माणसांचे थरकून पाणी व्हावे असे छत्रपती कडाडले, "म्हलो ऽ जी, त्या नमकहरामास चारा हा थाळा! घेऊन या त्याला आमच्या सामने!"

भेदरलेले म्हलोजी, खंडोजी, कारभारी त्रिंबकजी, पहारेकरी आत धावले. येडबडलेल्यांना काय झाले तेच कळेना. फणा उभारलेल्या जहाल, विषारी नागसर्पाकडे बघावे तसे थाळ्याकडे बघणाऱ्या महाराजांचे ओठ थरथरू लागले. संतापाने त्यांच्या तोंडून शब्द फुटेना. नजर थाळ्यावरून हटेना.

म्हलोजी, खंडोजी, कविजी थाळ्याकडे आणि महाराजांकडे गोंधळून आलटून-पालटून बघतच राहिले.

"ज्यानं थाळा लावला त्या हरामखोरास आणा अगोदर आमच्यासमोर. दगलबाज ..." तोफेचे भांडे तडतडावे तशी राजाज्ञा सुटली.

पहाऱ्याच्या धारकऱ्यांनी मुदपाकात जाऊन भाल्याची टोके पाठीला लावून त्या खिदमतगाराला छत्रपतींच्या समोर पेश घातला. बोचके बांधून तो गड सोडायच्या तयारीतच होता.

"त्यातले चार घास बाहेर नेऊन कुत्र्यासमोर ठेवा." थाळ्यावर बोट रोखून महाराजांनी पहाऱ्याच्या हवालदाराला सुनावले. हवालदाराने 'जी' म्हणत चौरंगावरच्या तबकातले थोडे अन्न वाडग्यात घेऊन ते बाहेर नेऊन चुचकारत एका कुत्र्यासमोर घातले.

खिदमतगार नुसता लटलट कापत होता. छत्रपती त्याच्यासमोर आले, "ते अन्न पचवायची शामत आमच्या आतड्यात नाही. तुझ्यात दिसते! चल आटप. ते घेऊन टाक सर्वांसामने!" महाराजांनी तबकाकडे बोट रोखले. त्यांच्या डोळ्यांतून कशा नुसत्या ठिणग्याच ठिणग्या उडत होत्या.

"नगं धनी ऽ नगं." सर्वांच्या अंगावर काटा सरकावा असे कळवळून ओरडत खिदमतगार महाराजांच्या पायांवर स्फुंदत कोसळला.

"खामो ऽ श!" छत्रपतींचे रोखले बोट काही तसूभर हलले नाही. खिदमतगार गद्गदत महाराजांच्या पायांना बिलगला. त्याला ठोकरून महाराजांनी धारकऱ्यांना आज्ञा दिली – "घाला ते अमृत याच्या नरड्यात."

पाठीच्या भाल्याची पाती चारी बाजूंनी कचाकच रुपताच खिदमतगार मुकाट उठला. डोळ्यांतून टपटपणाऱ्या आसवांत मळूनच त्याने छत्रपतींना पेश केलेल्या थाळ्यातील अन्न गुमान गिळले! दालनातील सर्वांचेच डोळे त्याच्यावर खिळले होते. जे समोर चालले होते ते ताणल्या डोळ्यांनी बघण्याखेरीज कुणाच्याच हाती काही नव्हते.

खिदमतगाराचे डोळे काही वेळातच पांढरे होत गरगर उलटे फिरू लागले. तोंडाला फेसाची तार आली. अंग काळेनिळे पडू लागले. बसला होता तो कलंडून थेट आडवा

होऊन आचके देऊ लागला. ते बाहेर प्राणांतिक यातनेने केकाटणाऱ्या कुत्र्याच्या विव्हळण्यात मिसळू लागले.

लगबगीने पुढे होत त्याची बाराबंदी मुठीने घट्ट पकडत म्हलोजींनी त्याला गदगदा हलवून विचारले, "आरं, कुनाच्या भरीला पडून क्येलास हे वंगाळ? बोल. आरं बोल." त्याच्या ओठांतून फक्त फेसाची तार घरंगळली.

"तोडला असता तरी तो बोलला नसता म्हलोजीबाबा. पुरा विचार करूनच तो उतरला होता यात."

एकामागून एक असे पहिल्या कटातील असामींचे चेहरे महाराजांसमोर फिरून गेले.

एक यातनाभरला नि:श्वास टाकून दालन सोडताना महाराजांनी हवालदाराला आज्ञा केली, "बाहेरचे कुत्रे फेकून देऊ नका, खोलीचा खड्डा घेऊन ते गाडा. विखारी आहे ते. या इमानी चाकराला अंधारबावेवर डाग द्या."

माळवदाच्या रोखाने चाललेल्या महाराजांच्या डोळ्यांपुढून धाकलू धनगराची मूर्ती हलता हलत नव्हती. कानात समर्थांच्या खलित्याचे वचन घुमत होते– "अखंड सावधान असावे!"

छत्रपतींच्यावरचा विषप्रयोगाचा कट फसला होता! आर्द्राच्या कोसळत्या धारांचे गढूळ पाणलोट होत पन्हाळ्याच्या चारी कड्यांवरून कोसळत होते.

विषप्रयोगाच्या कटाची पाळेमुळे शोधण्यासाठी छत्रपतींनी पन्हाळ्यावर जंग जंग कसून तपास घेतला. काहीच हाताशी आले नाही. पुराव्यानिशी कुणावरही अदावत घेता येत नव्हती. येऊन टळल्या प्राणघाती प्रसंगाने मात्र महाराजांना जिव्हारी वेदना झाली होती.

बसला पाऊस सुमार होण्याची महाराज वाट बघत होते. शक्य तितक्या लवकर रायगडी जाणे आवश्यक होते. तिथे अफवांचे पीक उठू देता कामा नव्हते.

बालेकिल्ल्याच्या दुसऱ्या मजल्यावर एका दालनात, बाहेर कोसळणाऱ्या आर्द्राच्या धारा बघत महाराज झरोक्याशी उभे होते. 'संशय' हा मनाचा सर्वांत छळवादी देणेकरी असतो. तो सशाच्या पावलांनी मनात शिरतो आणि हत्तीच्या पावलांनी थैमान घालू लागतो. मन शंकेखोर झाले की माणसाला स्वत:ची सावलीसुद्धा मारेकरी वाटू लागते.

वारंवार साकळून येणारा संशय महाराज निकराने परतविण्याचा प्रयत्न करीत होते. फार कठीण जात होते ते. संशयाला येण्याची वाट माहीत असते, जाण्याची दाखवावी लागते. एकतर त्याला शरण जावे लागते, नाहीतर मुळावर त्याला निपटूनच काढावे लागते. तडजोड, सुलूख नाही करता येत त्याच्याशी. त्याला शरण जाण्यात माणूसपणच हरवून बसण्याचा धोका असतो; आणि त्याला निपटून काढण्यास लागतो बळकट पुरावा. शंकाकुशंकांनी महाराज पुरते बेचैन, हैराण झाले. बाहेर कोसळणाऱ्या आर्द्राधारा त्यांच्या मनाला धुऊन नेऊ लागल्या. काही मार्ग गवसेना.

"धनी, धोंडश्यास्नं शाजाद्याची दोन मान्सं आल्यात. मुशीनमान हाईत. खासगीनं भ्येटायची इच्छायली धरलीया त्येनी." म्हलोजींनी छत्रपतींची विचारधारा तोडली.

महाराजांची चर्या त्रासिक झाली. अकबराची माणसे म्हणजे कसली तरी मागणी असणार. त्यांना वाटले नकारच द्यावा म्हलोजींना; पण पडत्या पावसातून माणसे आलीत या एकाच विचाराने महाराज म्हणाले, "घेऊन या त्यांना."

शहजाद्याच्या खास मर्जीचा सरदार मिर्झा यहुद्दीन शुजाई आणि वकील अब्दुल हमीद यांना घेऊन म्हलोजी आले. त्यांना आत पेश घालून म्हलोजी बाहेरच उभे राहिले.

"अस्सलामें सलाम.' मिर्झा शुजाई आणि अब्दुल महाराजांना तसलीम देत लवले. हात उठवून त्यांना दाद देत महाराज म्हणाले, "बोलो, क्या है?"

दोघांनीही दालनभर नजर फिरवून कुणी नाही याची खात्री करून घेतली.

"राजाजी की खैर हो। हम शहेनशाहके खिदमतमें आये हैं।" अकबराचा उल्लेख 'शहेनशाह' असाच शुजाईने केला.

"ठीक." महाराजांनी त्याला अधिक महत्त्व दिले नाही.

"आला हजरत की तर्फसे राजाजीको खलिता है खलबत का।" शुजाईने अब्दुलकडे बघितले. अब्दुलने खिल्लतीआडची हिरवीचार थैली बाहेर घेतली. पुढे होत ती महाराजांच्या हाती दिली. फासबंद उकलून महाराजांनी आतल्या तीन वळ्या बाहेर घेतल्या. वेगळ्या माटामुळे अकबराच्या मोगली पत्राची वळी ओळखू येत होती. महाराजांनी ती खोलली. आत मोडी लिखावटीचा मजकूर होता.

"महाराजांचे आग्रणी संभाजीराजे यासी– मी आपल्या भेटीसाठी उत्सुक आहे. सोबत आपल्या राजधानीहून आलेली काही अस्सल पत्रे आहेत. ती शांतपणे वाचून त्याचा निवाडा करावा. आमच्याबद्दल इतबार धरावा."

कोड्यात पडलेल्या छत्रपतींनी दुसरी वळी खोलली. रायगडाच्या दफ्तरी शिक्कामोर्तबाचे ते पत्र चिटणीस बाळाजींनी गोमट्या हस्तलेखात रेखले होते. शहजादा अकबराला! सोयराबाईंच्या नावे.

त्याचा मजकूर वाचताना महाराजांच्या मस्तकास मुंग्याच मुंग्या धरल्या. दोन्ही पत्रे त्यांनी सरासर वाचून काढली. हाती तावले निखारेच असावेत तसे ते त्या पत्रांकडे बघतच राहिले. ती पत्रे नव्हतीच– मराठी दौलतीला बेमान झाल्या कोत्या, कारस्थानी मराठी मनांचा तो फितूर जाहीरनामाच होता!

महाराज रायगडावर नाहीत हा भांगा साधून सोयराबाई, आण्णाजी, बाळाजी, हिरोजी, सोमाजी आदी मंडळींनी, कुणालाही त्यांची कीव वाटावी असे कपटी कारस्थान शिजविले होते. कसले? तर– "संभाजीराजांना जिवे मारून अकबराच्या पक्षाला मिळण्याचे! प्रसंगी त्यासाठी अकबराला मराठी मुलूखपट्टा तोडून देण्याचे!" त्या पत्रात कटप्रमुखांचा नावानिशी स्पष्ट उल्लेख होता. तो लिहून आजवर केल्या कलमी सेवेवर

बाळाजींनी स्वहस्ते पाणी फिरविले होते. आम्यात थोरल्या महाराजांच्या बदली कोठीत वेष पालटून झोपलेल्या हिरोजी फर्जंदानेच ती पत्रे पोचविण्याचे थोर स्वामीकार्य केले होते. छत्रपतींनी एकवार सलामत सोडलेल्या थोर, जाणत्या, वडिलधाऱ्या असामींनी आपण सर्पकुळीचे वारस आहोत हे शाबीत केले होते! माणसे माणसेच उरली नव्हती. त्यांचे पाय उलटे फिरले होते. महाराजांच्या हातातील खलितावळ्या राजक्रोधाने थरथरू लागल्या. डोळ्यांत रक्त उतरले. मोठ्या निकराने संताप रोखत त्यांनी, "हम देखते हैं।" म्हणत अकबराच्या माणसांना निरोप दिला.

सारा बालेकिल्ला आपल्याभोवती फिरतो आहे असेच त्यांना वाटले. कटाची दिशा बघून तर त्यांच्या अंगाची लाही फुलली होती. विषप्रयोग हा पूर्वार्ध होता. अकबराला मिळणे हा उत्तरार्ध. पहिला काळाकुट्ट आणि दुसरा त्याचीच थेट सावली!

"कोण आहे?" छत्रपतींनी दरडावून पहारा याद घेतला.

"कलमी सरंजामासह त्रिंबकजींना पाठव." आज्ञा सुटली.

खासगी कारभारी त्रिंबकजी महाराजांसमोर रुजू झाले. ज़खमी संतप्त मनाने महाराजांनी त्यांना हुकूम केले, "चिटणीस, आजच्या आज कुडाळ-डिचोलीच्या धर्माजी, मोरो दादाजींना आज्ञा द्या. दिसेल तिथे त्या मुजुमदार आण्णाजीला जेरबंद करून आमच्यासमोर पेश घाला! सुधागडला जिवाजी हरींना पत्र द्या. रायगडी निळोपंतांना कळवा, बाळाजी आवजी, सोमाजी दत्तो यांना दस्त करून थोरल्या महालावर चौक्या जारी करा."

सगळीकडे हुकूम सुटले. अकबराच्या माणसाबरोबर संतोषाचा खलिता पाठवून 'आम्ही भेटीस येऊ' असा त्याला निरोप देऊन दोन दिवसांनी छत्रपतींनी पन्हाळा सोडला. कोसळत्या पावसाचा गुमान न धरता, आडव्या येणाऱ्या नद्या, होड्यांनी ओलांडण्याचा निर्धार केलेले महाराज रायगडाकडे चालले.

रायगडी आलेल्या महाराजांना कळून चुकले की, आज्ञा नसता आण्णाजी डिचोली प्रांतात का गेले आहेत. कटापासून नामानिराळे दाखवण्याचा धूर्त डाव होता तो आण्णाजींचा. अकबराला त्र्यंबकहून पालीला आणण्यासाठी महाराजांनी धाडलेले बाळाजी तर त्याच्याशी संधान बांधूनच परतले होते. रायगडावर दहा-वीस असामी हाताशी धरून सोयराबाई, आण्णाजी, पालीत अकबराशी संधान बांधणारे बाळाजी, सोमाजी दत्तो व बाळाजींचे पुत्र आवजी आणि फिरता हिरोजी अशी ही बनावाची साखळी होती. तिचे धागे, 'कर्नाटकसुभा' शामजी नाईकाला देण्याची लालूच दाखवून, मंडळींनी कर्नाटकापर्यंत नेऊन भिडविले होते!

या वेळी छत्रपतींना सर्वांत मोठी गरज भासली ती हंबीररावांची. ते गडावर नव्हते. कट खंदून काढल्याशिवाय महाराजांना स्वस्थता लाभणार नव्हती.

प्रल्हाद निराजी, आवजी, खंडोजी बल्लाळ यांच्यासह पेशवे निळोपंत महाराजांच्या भेटीसाठी आले. त्यांनी उंदेरीचा वृत्तांत दिला, "चार दिवसांपूर्वी आपल्या सारंगांनी पहाट धरून उंदेरीवर निकराचा एल्गार केला महाराज, आठ घंटा तुंबळ झटापट झाली दर्यावर; पण यश नाही आले सारंगांना. हबश्यानं निकरानं हमला हटविला. आपला बराच दर्यावर्दी कामी आला आहे."

ते ऐकताना महाराजांची चर्या व्यथित झाली. काही चांगली खबर कानी पडावी असा काळच नव्हता. महाराज आवजींच्या जवळ आले. आवजींना तपासून घेण्यासाठी त्यांच्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाले, "एक सल्ला द्याल आवजी?"

"जी." आवजींना छत्रपतींचा रोख कळला नाही.

"आम्हावर अभक्ष्याचा प्राणघाती प्रयोग करून अकबराशी संधान बांधण्याचा बनाव झाला आहे. तो पुराव्यानिशी शाबीत झाला तर संबंधितांना काय शासन करावं आम्ही?" आवजी अंगभर थरारले.

"देहदंड!" खंडोजींनी संतापून मध्येच रोकडा सल्ला दिला. त्यांना कल्पना नव्हती की आपले वडील त्यांपैकीच एक असतील!

काही न बोलता महाराजांनी खंडोजींचा खांदा हलकेच थोपटला आणि वर्माचा सवाल केला, "आमच्या राणीसाहेब, सरलष्कर हंबीरराव असले त्यात तर?"

"ते – ते कसं शक्य आहे महाराज?" खंडोजी पाऽर गोंधळून म्हणाले.

"सर्व शक्य आहे खंडोजी! सूर्यास वाळवी डसण्याचे दिवस आलेत! तुमचा सल्ला विचार करून सांगा आम्हास."

खंडोजींना वाटले स्वामींना आपलीच तर शंका आली नसेल! ते बांधीव म्हणाले, "कुणीही असो – प्रत्यक्ष आम्ही असलो तरी अशा गुन्ह्याला शिक्षा देहदंडच!"

खंडोजी महाराजांच्या कसोटीला पूर्ण उतरले होते.

"तुमचा काय सल्ला आहे निळोपंत आणि न्यायाधीश!" महाराजांनी प्रल्हादपंतांना जाणीवपूर्वक 'न्यायाधीश' म्हटले.

"खंडोजी म्हणतात ते रास्त आहे." पेशवे, न्यायाधीश, खंडोजी सर्वांनाच कळून चुकले की ज्यांचे हात या प्रकरणात गोवले आहेत त्यांची आता मुळीच गय व्हायची नाही.

"ठीक आहे. खंडोजी, जरा रामराजांचे कारभारी येसाजी दाभाड्यांना याद करा आमच्याकडे."

निळोपंत, प्रल्हाद निराजींना वाटले रामराजेच यात सर्वांत पहिले घेतले जाणार!

सर्वांना निरोप दिलेले महाराज पाठीशी हातांची गुंफण चाळवीत फेर घेऊ लागले. पावलागणिक विचारांची जाळी गुरफटून येऊ लागली– "भय वाटते आम्हाला मरणाचे? नाही. मग ही काळजाचा देठ चिंबून टाकणारी कसली वेदना? ही वेदना

मृत्यूच्या भयाची नाही. मरणापेक्षाही भयानक असते ते नेकीचे मरण! निष्ठा, नेकी मेली की उरते काय? ही वेदना त्याची आहे.

"राजा एकला असतो. त्याच्या मस्तकीचे छत्र तोलणारे हात अनेक असतात. तेच फिरले तर? ... मग जाणावें फावले। गनिमासी॥ समर्थ, परके गनिम हत्यार भिडवून थेट भुईला मिळविता येतात. पण अस्तनीतले गनिम मन:शांतीची माती करून टाकतात."

येसाजी दाभाडे आले. त्यांची चर्या भेदरलेली दिसत होती. त्यांना बघताच महाराज म्हणाले, "येसाजी, जरा आमच्याबरोबर या."

गोंधळल्या येसाजींना कळेना कुठे जायचे आहे. तरीही 'जी' म्हणत ते महाराजांच्या मागून चालू लागले.

पुढे वर्दी न देताच छत्रपती संभाजीमहाराज थोरल्या महालाकडे चालले! जे आजवर निकराने टाळले होते त्याचा एकदाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी.

सोयराबाईंच्या महालाच्या दरवाज्यावर बसलेल्या चौकीच्या पहाऱ्याचे धारकरी देत असलेल्या मुजऱ्यावर ध्यान नसलेले महाराज थोरल्या महालात प्रवेशले. त्यांना बघून कुणबिणी फाणाफाण झाल्या. महाराज एकचालीत तसेच आतल्या दालनात गेले. त्यांना बघताच रामराजे पुढे येताना गोंधळून म्हणाले, "महाराजसाहेब!"

त्यांना जवळ घेत त्यांचे खांदे थोपटताना महाराजांनी त्यांना हलकेच दुरुस्त केले, "दादामहाराज म्हणा आम्हाला!" विचित्र शांतता दालनात दाटून आली.

छत्रपतींना बघून सुखदालनाकडे जायला निघालेल्या सोयराबाईंचे पाय "थांबा!" या एकाच जरबी शब्दाबरोबर थबकले. त्या शब्दांत हुकमत होती. दरारा होता. आज सोयराबाईंना मानमुजरा मिळाला नाही.

"खूप सोसले आम्ही. आता आपण स्वस्थ बसाल तर बडी मेहर होईल आमच्यावर. एवढेच सांगण्यासाठी आलोत." छत्रपतींनी मासाहेबांना कोपरापासून स्पष्ट हात जोडले.

"आम्ही बदनाम होत नाही, दस्त होत नाही, विषबाधा आम्हाला लागू पडत नाही हे शाबीत झालं आहे आता!" असह्य कढाने अस्वस्थ झालेले महाराज थांबले.

"आमच्या – आमच्या मरणातच आपलं समाधान असेल, दौलतीचं हित असेल तर – तर द्या आम्हाला जहराचा प्याला या बाळराजांच्या साक्षीनं, आम्ही तो मुकाट गिळू!"

आयुष्यात असे काही कधीच न ऐकलेले समोरचे स्त्री-खानदान खळबळून गेले. निर्धारी, फेकून देणारे जनानी बोल ताडकन् उठले, "येसाजी, मराठ्यांचे छत्रपती, पुराव्याशिवाय प्याद्यांनाही अदावतीत घेत नाहीत. जनाना असामीला तर नाहीच नाही हे जरा समजुतीनं सांगा."

"खामोऽश! मासाहेब म्हणून पडीनं बोललो याचा अर्थ भलताच घेऊ नका. तुमच्या हातानं पावन झालेली पत्रं शहजाद्यानंच दिलीत आम्हाला पाठवून. इच्छा असेल तर दाखवू तो दर्पण."

"या रामराजांच्या मातोश्री, आबासाहेबांच्या नावचे कुंकू कपाळी घेतलेल्या म्हणूनच तुम्हाला अखेरची समज द्यायला आलोत आम्ही. भडकलेली आहे हवस तुमची. आवरा ती." संतापाने महाराजांना धड बोलताही येईना.

शेपटीवर पाय पडल्या नागिणीसारखी समोरची कडवी राजस्त्री खवळून उठली. फणा फुत्कारला, "येसाजी, आम्हास उणं-वावगं बोलावया समंध नाही. समज द्या तुमच्या छत्रपतींना. आम्ही आरोपित आहोत याची खातरजमाच असेल तर मनचाही सजा देण्यास ते मुखत्यार आहेत!"

ते ऐकताना महाराज सुन्न झाले. भेदरलेले रामराजे त्यांना बिलगले होते. त्यांचे हात हलकेच उकलून छत्रपती दालन सोडताना कडवे बोलले, "येसाजी, मासाहेबांना सजा फर्मावण्याएवढे नादान छत्रपती मराठ्यांच्या गादीवर कधीच येणार नाहीत हे सांगा एकेकाळच्या महाराणींना. भोसल्यांच्या कुळीचा राणीवसा सजासुद्धा मागत नाही – घेत असतो! काही अक्षम्य गैरवर्ताव झाला आहे असं वाटतच असेल तर महाराणी मुखत्यार आहेत आपली सजा आपण घ्यायला!" मनाची पाऽर घालमेल झालेले महाराज तरातर बाहेरही पडले.

गडावर श्रावणी रात्र उतरली. थाळा झालेले महाराज सुखदालनात उभे होते. जरीबुंदीचा पिवळाजर्द शालू नेसलेल्या येसूबाई आत आल्या. त्यांना बघताच कटवाल्यांचा विचार मनी घोळणाऱ्या महाराजांना वाटले, "यांच्या शब्दातच मागणं घालावं यांच्याकडं की या बनावाच्या निवाड्यात ... तुम्ही तेवढा आता आपला शब्द नका खर्ची घालू ... यांनी शब्द घातला तर तोडणं कठीण होईल ... आणि आता तर या मुद्राधारी महाराणी आहेत."

"एक ऐकणं होईल?" येसूबाईंनी शांतता फोडली.

"त्याआधी आम्हीच काही मागावं म्हणतो." महाराज सावध झाले.

"ऐकणं व्हावं. पन्हाळ्याच्या बनावाची सारी हकीकत आलीय आमच्या कानी. आमचं त्याबाबत एकच म्हणणं आहे ..."

"राणीसाहेब ..."

"की पुरती शहानिशा होताच गुन्हेगारांस स्वारीनं योग्य वाटेल ती सजाच फर्मावावी! कुणाबाबतही हात राखू नयेत आता. पुरात उफाळणारी नदी समजू शकते; पण मोहरा वळवून गावात घुसणारी विनाशकारी नाही! तिला बांध घालून वेळीच तोडावं लागतं."

त्या बोलण्याने खरे तर महाराज दिपले होते. पण वरवर तसे न दाखविता त्यांनी 'श्रीसखीचा' सूर तसाच पुढे धरला. "आणि राजे गणोजी असले यात तर?"

महाराज अंदाज घेताहेत हे पुरते ओळखलेल्या येसूबाईंनी तडफेची आण दिली, "तो निवाडा स्वारीनं आमच्यावरच सोपवून बघावा!"

प्रसन्न झालेल्या महाराजांनी डुईचा टोप उतरून तो येसूबाईंच्या हाती दिला. तो तबकात ठेवण्यासाठी महाराणी चौरंगीकडे जाऊ लागल्या.

त्यांना बगलेने बघताना महाराजांना संस्कृत काव्यातील 'स्वकीया' नायिका आठवली. येसूबाई टोप ठेवण्यासाठी ओणावल्या. त्यांच्या शालूवरच्या बुंद्या चिराखदानी उजेडात झळझळून लखलखल्या. महाराजांना वाटले– "अवतीभवती तारकांची महिरप घेतलेली वीजवेलच ओळंबली आहे की काय ?"

टोप ठेवून वर होणाऱ्या त्या वीजवेलीला छत्रपतींच्या बळकट बाहूंची आकाशी कव केव्हा पडली तेच कळले नाही! 'श्रीसखी' क्षणभर उभ्या देही थरारली. मग श्रावणी उन्हाची उबदार तिरीप रायगडाच्या उंच, भक्कम मनोऱ्यांच्या बाहूंत शिरून विसावावी तशी त्या मर्दानी कवेत मिटल्या डोळी विसावली!

गोव्याहून येसाजी गंभीराचा माणूस आला. येसाजींनी कळविले होते, "डिचोलीच्या मोरो दादाजींवर फिरंगी दरबार सक्त नाराज आहे. त्यांनी फिरंग्यांची दोन शिबाडे डिचोलीत बेहिसाबी अडकवून ठेवली आहेत."

महाराजांनी निळोपंतांना याद घेऊन निर्णय दिला, "पंत, आता मोरो दादाजींना बडतर्फीचा हुकूम द्या. त्यांच्या जागी विनायक उमाजींची नामजादी करा."

"जी. सुधागडच्या जिवाजी हरींच्या निरोपाचं काय करायचं महाराज ? शहजादा अकबर आपल्या अखत्यारीखाली सैन्यसंचणी करतो आहे." निळोजीपंतांनी अकबराच्या हालचालीकडे छत्रपतींचे लक्ष वेधले.

"पंत, त्यासाठी तर या नेताजीकाकांना बोलावून घेतले आहे आज." काहीतरी मनी बांधून महाराजांनी सूचना केली.

नेताजी बरेच दिवस उत्तरेत राहिले होते याचा विचार धरून महाराज त्यांना म्हणाले. "काका, तुम्ही वीस हजार होनांचा खजिना घेऊन निवडक धारकऱ्यांच्या शिबंदीनं पालीला जा. शहजाद्यांची भेट घेऊन त्याला स्पष्ट समज द्या. मुलखात राहणे असेल तर सैन्यसंचणी करता येणार नाही. जसे तुम्ही आपल्या मुलखाचे शहेनशाह मानता तसे या राज्याचे आम्ही आहोत. तुम्ही रिवाज सोडू नये, आम्ही पाहुणचार सोडणार नाही. लागल्यास त्याला होनाचं पाठबळ द्या. माणसांचं नाही."

"जी. आम्ही शहजाद्यांवर बारीक नजर ठेवू." नेताजींनी जोखीम उचलली. महाराजांनी त्यांना निरोप दिला.

काही बोलू इच्छिणारे निळोपंत घोटाळले आहेत हे ताडून महाराजांनी त्यांना बोलते केले, "सांगा निळोपंत, अडखळू नका."

पंतांनी क्षणैक ओठांवरून जीभ फिरविली अडखळतच त्यांनी वृत्तान्त दिला, "जिवाजी हरींचा दुसराही एक निरोप आहे स्वामी."

"कसला ?"

"मुजुमदार आण्णाजीपंत, चिटणीस बाळाजीपंत, चिरंजीव आवजी, सोमाजी दत्तो अशा आसामींना जेरबंद करून पालीजवळच्या परळीच्या ठाण्यात आणलं आहे!"

खाडकन उठते होत महाराज म्हणाले, "या– याच खबरीची वाट बघत होतो आम्ही. पेशवे, कशाला उल्लेख केलात त्यांचा मुजुमदार आणि चिटणीस म्हणून! कशासाठी जोडलेत 'पंत' हे आदरवचन त्यांच्या नावामागं ? त्या जोखमीच्या पदांचा त्यांनी आपल्याच करणीनं काला करून टाकला आहे. जिवाजी हरींना कळवा आम्ही जातीनं येतो आहोत परळीला!"

"जी." निळोपंत लगबगीने लवले. त्यांना कळून चुकले आता परळीची खैर नाही.

येसाजी कंक आणि चांगोजी यांना सोबत घेऊन महाराज बालेकिल्ल्याबाहेर पडले. त्यांची पावले कैदखान्याच्या कोठीकडे वळली. कोठडीत बापू माळी, सूर्या निकम, राघो वासुदेव अशी कटाची वीस हस्तक माणसे काढणीबंद होती. त्यांपैकी एकाचीही मान छत्रपतींच्यासमोर वर झाली नाही.

त्या सर्वांवर नजर फिरवीत महाराज धारी बोलले, "बघून घ्या एकदा आम्हास डोळे फाडून. पिशाच्च नाही हे आमचे. खुद्द आम्ही आहोत! तुमच्या स्वामिकार्याचा मरातब करण्यासाठी जगदंबेने जिवे राखले आहे आम्हाला. येसाजोकाका, आम्ही हुकूम देऊ तसाच बिलाकसुर मरातब करा यांचा." महाराजांनी पाठ फिरवली.

अखत्यारी येसूबाई आणि निळोपंतांच्या हाती सोपवून दोन दिवसांनी महाराजांनी रायगड सोडला. त्यांच्याबरोबर जोत्याजी, रायाजी-अंतोजी आणि निवडीचा फक्त पाचशे मावळा होता. दिवस श्रावणाचे होते. परळीकडे चालल्या महाराजांच्या मनात उन्हपावसाची आल्टीपल्टी धरली, "या वेळी आबासाहेब असते आमच्या जागी, तर त्यांनी काय केलं असतं ? बदअंमल केला म्हणून रांझेकर पाटलाचे हात कलम करविणारे, चुगल केली म्हणून उत्रोलीकर खंडोजी खोपड्याचा हातपाय उतरविणारे, बाजी घोरपडे, चंद्रराव मोरे यांना नेस्तनाबूत करणारे, मोहितेमामांच्या दंडात काढण्या चढविणारे, गुजरकाकांना, 'खान गर्देस मिळवावा नातर तोंड दावू नये' असा हुकूम देणारे, नेताजींना बडतर्फ करणारे, चिंचवडच्या मोरयाबाबांना, 'तुमची बिरुदे आम्हास द्या, आमची तुम्ही घ्या' असे स्पष्ट बजावणारे, एकोजीकाकांना, 'धाकटे ते धाकटे, बुद्धीही धाकुटी दाखविली' असा ठपका ठेवणारे आणि– आणि प्रत्यक्ष आम्हाला आरोपित म्हणून दरबारी पेश घेणारे आबासाहेब कसे वागले असते त्या क्षणी ?" आजवर कधीच न अनुभवलेले आगळेच राजबळ त्यांच्या मनी थळी करून आले.

परळी आली. सामोरे आलेल्या जिवाजींच्यासह महाराज परळीच्या सरकारवाड्यात आले.

दुपारचा थाळा आणि विश्रांती होताच तिसऱ्या प्रहराला जिवाजींना छत्रपतींची आज्ञा झाली, "दस्त असामी पेश आणा."

परळीच्या सरकारवाड्याच्या सदरेला काढणीबंद आण्णाजी, बाळाजी, आवजी, हिरोजी, सोमाजी असे खासे महाराजांसमोर आणण्यात आले. सर्वांच्या चर्या काळ्याठिक्कर पडल्या होत्या. त्यांना बघताच अपार खंत आणि अनिवार संतापाने मन भरून आलेले महाराज बैठकीवरून उठले. आण्णाजींकडे तर त्यांना बघावेसेही वाटेना.

" केवढ्या उलट्या काळजाचा आणि आतल्या गाठीचा हा माणूस! मुजुमदार म्हणून ज्या हातांनी मुजरा करीत होता त्याच हातांनी पाठीत खंजीर खुपसण्याचा कट रचीत होता. हे बाळाजी! ज्या कलमानं आमच्या अभिषेकाची आमंत्रणं रेखली त्याच कलमानं अकब्बराला पत्रं देणारे! आणि हा हिरोजी. आबासाहेबांच्या खाटल्यावर झोपून त्यांना आग्र्याच्या कोठीबाहेर काढणारा आणि आम्हाला मात्र सरणावर झोपवायला निघालेला! ही तीच माणसे आहेत की त्यांची विद्रूप भुते? "

पिळवटल्या छत्रपतींच्या तोंडून चिरणारे करडे बोल उठले, " इमानदार चाकरांनो, नीट बघा. आम्ही जिवंत आहोत! आणि आहोत तेही मराठ्यांचे छत्रपती – शहजादा अकबर नव्हे! एकवार माफ करून, विश्वासाच्या जागा पुन्हा तुमच्या हाती दिल्या त्याचे बरे पांग फेडलेत! शरम वाटते तुम्हाला 'चाकर' म्हणण्याचीसुद्धा! " छत्रपतींचे ओठ थरथरले.

" बोला. कुठली सजा घ्यायला सिद्ध आहात सारे केल्या कर्तुबाची? " कोरडा फुटावा तसा महाराजांनी रोकडा सवाल केला.

खालमुंडीने सारेच चिडीचाप झाले. तीं कोडग्या शांततेची कोंडी महाराजांना असह्य झाली.

आण्णाजींच्याजवळ जाऊन त्यांना गदगदा हलवीत छत्रपती कडाडले, " जबान झडली काय? बोल. आणखी कुठलं देशकुलकर्णं बहाल करावं तुला या बहादुरीबद्दल? "

आण्णाजी ढवळून निघाले तरी मान टाकून गुमान बसले.

" प्रसंग साधून बरी धरते दातकुडी? बोल – कुठली सजा द्यावी? " महाराजांचे डोळे आण्णाजींवर निखारे पाखडू लागले.

निर्धार बांधलेले आण्णाजी मान वर घेत थंडपणे म्हणाले, " जी महाराणींना दिली जाईल ती! त्यांची आज्ञा पाळण्याचाच काय तो गुन्हा झाला आहे आमच्याकडून. "

" खामोऽश ... " आण्णाजींच्या बिनतोड वर्मी जाबाने क्षणभर कोंडमारलेले छत्रपती संतापाने नुसते थरथर कापू लागले. त्यांच्या अधिकाराचा टवकाच उडविला होता आण्णाजींनी. त्यांना नीट समजावूनच द्यायला पाहिजे होते की, " जगाला 'महाराणी' असलेल्या त्या आम्हाला 'मासाहेब' आहेत! छत्रपती नुसते राजमुद्रा धारण करत नसतात तर कुलवसा म्हणून भवानीची माळही छातीवर वागवितात! "

" जिवाजी, जरा वेत घ्या. " राजबोलाच्या ठिणग्या त्या सदरेवर उधळल्या.

नूर ओळखून " जी " म्हणत जिवाजी आत गेले. वावभर लांबीची आंगठ्याइतकी जाडीची वेताची छडी महाराजांच्या हाती देत थिजल्या मनाने बगलेला ते भयभीत उभे राहिले. भोवतीचा पहारा गांगरून पुतळ्यागत झाला.

भयानक शांतता सदरेला पळभर कुचमून पडली. उभे अंग संतापाने सरसरलेले महाराज गर्जले, " हा वेत उभा धरला की दंड म्हटला जातो, आडवा केला की लाठी होतो. जसा बघावा तसा दिसतो. तशाच रायगडावर आहेत त्या तुला महाराणी, आम्हास मासाहेब. आम्ही त्यांना सजा करू शकत नाही. तुला सोडू शकत नाही. हरामखोऽर! " स्सप करीत वेत आण्णाजींवर उतरला!! आणि मग " नादान. ही हरामजादगी? दगाबाज, मुजोर. " असे प्रत्येक वेताबरोबर कडाडत सात-आठ वेत आण्णाजींवर सपापत उतरले. त्या प्रत्येक माराबरोबर आण्णाजी विव्हळत वेडेवाकडे झाले.

कपाळ घामाने डबडबलेल्या महाराजांनी थरथरत्या हातचा वेत फेकताना कठोर कठोर आज्ञा केली, " जिवाजी, या साऱ्यांना घोड्यांवर लादून रायगडास पाठवा. निळोपंतांना हुकूम द्या – यांची यांच्या हस्तकांसह दावण बांधून गडावर धिंड काढा. दवंडी पिटून या खाशांना सर्वांसामने हत्तीच्या पायी देण्यास सांगा! यांच्या हस्तकांना टकमक टोक दाखवा. घेऊन जा यांना. " फरफरता पोतच जसा छत्रपतींच्या रूपाने सदरेवरून अदृश्यही झाला.

आठ दिवस किनारपट्टीत देख टाकून, पन्हाळ्यावर जाऊन सोलापूर, पेडगाव, औरंगाबाद भागात पेरावयाच्या सैन्याची म्हलोजीच्या मदतीने बांधणी करून महाराज रायगडी परतले. त्यांनी दिल्या आज्ञेप्रमाणे खंडेराव पानसंबळ आणि खंडोजींच्यासह निळोपंत पेश आले.

कटवाल्यांना सजा देऊन पंधरा दिवस झाले होते. महाराजांसह कुणाच्याच हाती काही नसावे असे विचित्र वातावरण गडावर पसरले होते.

थिजल्या मनाच्या, खालच्या मानेने समोर उभ्या असलेल्या खंडोजीच्याजवळ छत्रपती आले. शांत धीरगंभीर बोल खंडोजींच्या कानी पडले, " कधी कधी वाटतं हा अंगचा राजपेहराव उतरून ठेवावा. याच्या भाराखाली मन, आत्मा कोंडून जातो. उतरून तो द्यावा तरी कुणा हाती या दबीनं आम्ही सुंद होतो. आबासाहेबांकडून आलेला हा पेहराव आम्हाला उतरविता येत नाही. चिटणिसी रक्त अंगी नांदवीत असलेल्या तुम्हीही हातचे कलम बगलेला ठेवता कामा नाही. तुम्हा-आम्हाला नाती नाहीत. आहे ते नाते एकच. सिंहासनाच्या सेवेचं. आम्ही-तुम्हाला चिटणिसी अखत्यार देणार आहोत. तुमचा इरादा? "

हे असे काही ऐकायला मिळेल, समोर येईल याचे भान नसलेल्या खंडोजींचे डोळे डबडबले. ही त्यांची सर्वांत मोठी कसोटी होती. नियतीने समोर ठेवलेली. इमान

देण्याची. खंडोजींनी क्षणाचाही विलंब केला नाही. वाकून महाराजांच्या पायांना हात भिडवीत ते घोगरे म्हणाले, "आम्ही स्वामींच्या पायाचे, सिंहासनाच्या पायरीचे सेवक आहोत. कलमी सेवा इतबारे करू."

त्यांना वर घेताना समाधानाने भरलेल्या महाराजांच्याही नेत्रकडा ओलावल्या.

ते खंडेरावांना म्हणाले, "पानसंबळ, तुम्ही गोमाजींचे वारस. त्यांनी थोरल्या आऊंची सेवा केली म्हणजे सर्वांचीच सेवा केली. मुजुमदारीची जिम्मेदारी आम्ही तुम्हावर सोपवीत आहोत." खंडोजी आणि खंडेरावांना मानवस्त्रे देऊन, भरल्या दरबारी त्यांना शिक्के-मुद्रा बहाल करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला. त्याने समाधान पावलेल्या निळोपंतांना मात्र जागीच आज्ञा ऐकावी लागली, "पंत, जिंजीला हरजींना तातडीचा हुकूम द्या. त्या शामजी नाईक पुंड्याला दस्त करण्याचा."

निळोपंत मान लववून सर्वांसह निघून गेले. बाहेर दाटल्या आश्विनी आभाळासारखे महाराजांचे मन वेढून आले, "केवढं कठोर हे राजव्रत! ज्याचं पालन करताना खुल्या ओठी कुणालाही मना तळची खळबळ सांगता येऊ नये! कसल्या यातना झाल्या असतील आण्णाजी-बाळाजींना हत्ती पायी चित्‌चुराडा होताना! बघवल्या असत्या त्या उघड्या डोळी समोर? खरंच का फर्मावू शकलो नाही कुठलीही सजा आम्ही मासाहेबांना? आम्ही कठोर? दुबळे? किंकर्तव्य? की सर्वांपासून अलिप्त? किती माग घ्यावा या अलिप्तपणाचा, ठाव लागत नाही. कुणालाही तो बोलून दाखविता येत नाही. आमच्यातले छत्रपती त्या अलिप्तपणातच अहोरात्र वास करतात. आमच्या साऱ्या शक्ती राबवून घेतात. त्यांच्यामागून फरफटत जाते ते आमच्यातले माणसाचे मन. आम्ही– आम्ही असतो बाळाजी-आण्णाजींच्या जागी तर!" माणसाने छत्रपतींना सवाल केला. संभाजीराजातला माणूस आणि छत्रपती यांचे द्वंद्व काही काळ तसेच चालू राहिले.

त्या माणसाला आपलाच राजपेहरावधारी देह हत्तीच्या प्रचंड पायाखाली चुराडा होतो आहे असे भयानक कल्पनाचित्र दिसू लागले. छत्रपतींना त्या देहातून रक्तचिळकांड्याऐवजी दिसू लागल्या अंगभर भिनल्या विषाच्या चिळकांड्या!

त्या देहातील माणूस– आक्रोशू बघत होता. त्याच देहातील छत्रपतींनी त्यांचे तोंड हाताने दाबून बंद करून टाकलेले दिसत होते.

दीर्घ निःश्वास टाकून महाराजांनी ते चित्रच मनातून झटकून टाकले.

नवरात्राचे दिवस आले. पाचाडात होम, कुळधर्म करून दसरा पार पडताच महाराजांनी रायगड सोडला. निवडक असामींनिशी ते पन्हाळ्याकडे गेले. त्यांच्या मनी एका भक्कम मोहिमेची आखणी होत होती. पावसाळा हटताच तिला हात घालायचा होता. पन्हाळगड चढताना त्यांना वाटले– "या गडाशी आपलं कसलं तरी गूढ नातं आहे. आबासाहेबांची अखेरची भेट इथंच झाली. रचलेले दोन्ही कट कोसळले ते आम्ही या गडावरच असतानाच. पाखराच्या कोटरागत जिवाभावाचा हा गड वाटतो.

धुक्याने घेर टाकल्या पन्हाळ्यावर आठवडा लोटला आणि बाहेरचे धुके मनात साकळून यावे अशी खबर महाराजांच्या कानांवर पडली. मोगलाईत चकरा टाकणाऱ्या विश्वासने ती उचलली होती. सर्वांत भयानक खबर. कसली? एक प्रचंड हिरवा ढग चालून येतो आहे– "औरंगजेब अजमेरहून दख्खनस्वारीवर कूच झाला आहे!! तीन लक्ष पावलोक, तेवढेच घोडाईत आणि प्रचंड तोफखाना घेऊन. तेरा कोटींचा खजिना दास्तानी ठेवून. त्याच्या संगती आहेत शहजादा मुअज्जम, कामबक्ष, नातू बेदारबख्त व मुहजुद्दीन. बक्षी रुहुल्लाखान, असदखान, रणमस्तानखान, एतिकादखान, शहाबुद्दीनखान, महमद अमीन, हसनअलीखान, लुत्फुल्लाखान, मातबरखान, बहादुर, मुरादखान, तबियतखान, राव दलपत बुंदेला असा निवडीच्या सरदारांचा ताफा त्याच्याबरोबर चालून येतो आहे. बऱ्हाणपूर, औरंगाबादेची ठाणी आगवानीसाठी गजबजून गेली आहेत."

तो क्षण ऐन तोंडावर आला ज्याची अटकळ कैलासवासी स्वामींनी केव्हाच बांधली होती. आता सर्वांसमोर एकच होते. अटीतटीचा जंग-झगडा. पंचवीस वर्षांनंतर दख्खनेकडे वळलेल्या एका पाताळयंत्री, पाशवी शत्रूबरोबर. जबर महत्त्वाकांक्षा आपल्या तसबीहच्या माळेत गुंफून अलमगिराने दक्षिणेचा मोहरा ठेवला होता. कन्याकुमारीपासून काबूलपर्यंत सल्तनतीचे जाळे फेकण्याची महत्त्वाकांक्षा! जिच्या हातात होते शस्त्र, मांडेखाली घोडे, उंट, हत्ती आणि मनात निवडीचे कपट, क्रौर्य! जिची ढाल होती धर्म, मागे होती सार्वभौमत्वाची हवस. जिचा प्यारा रंग होता हिरवा. निशाणी होती चांद-तारा आणि नारा होता, 'दीन, दीन.'

या येत्या संकटाला तोंड देण्यासाठी दक्षिणियांची फळी बांधण्याचे आवाहन करणारे खलिते विश्वासू हारकऱ्यांमार्फत कुतुबशाही आणि आदिलशाही दरबाराला धाडण्यात आले. पन्हाळ्यास बांधाबांध करून गड सोडावा या विचारात असलेल्या महाराजांच्या कानांवर आश्विन वद्य द्वादशीला मन थिजवून टाकणारी दुसरी वार्ता येऊन आदळली.

येसूबाईंनी पाठविलेल्या जोत्याजीने पन्हाळगड चढून खालच्या मानेने महाराजांना वृत्तान्त दिला, "थोरल्या म्हालाच्या मासाब गेल्या! इख घोटून त्येंनी सोताचा घात करून घेतला!!"

आश्विन वद्य प्रतिपदेच्या दिवशी रायगडाच्या थोरल्या महालाच्या दरुणीदालनाचा दरवाजा, दिवस कासऱ्याने वर चढला तरी खुललाच नव्हता. भेदरून गेल्या कुणबिणींनी दरवाज्यावर थापा देऊन शेवटी महाराणींच्या खाजगी कारभाऱ्यांना बोलावून घेतले. त्यांनी रामराजांसह येऊन हाका-थापा दिल्या. दरवाजा खुलला नाही. शेवटी येसूबाई त्या बंद दरवाज्यासमोर आल्या. त्यांनाही दाद मिळाली नाही. नाइलाजाने दरवाजा उखडून काढण्याचा हुकूम शेवटी त्यांना द्यावा लागला.

आतले दृश्य जमल्या माणसांच्या अंगावर काटा सरकविणारे होते. एक देखणी,

मध्यम वयस्क, राजमानिनी मंचकावर शांत पहुडली होती. तिच्यांशी इमान देणारी एक विषकुंपी चौरंगीवर तशीच आडवी पडली होती. भोसलेकुळीच्या करारी जनान्याचे एक पर्व शांत झाले होते. डोळ्यांत आसवे आणि बगलेला रामराजे घेऊन, मासाहेबांच्या पायांवर डोके टेकवून येसूबाई तिथून बाहेर पडल्या होत्या. कडव्या सोयराबाईंनी, मांडले पट हरताच, कुणालाही कल्पना येणार नाही असा वेगळा पट मांडून स्वत:च सजा घेतली होती. शरणागत नव्हे! पुतळाबाई बाहेरून जळत अंतर्धान पावल्या होत्या. सोयराबाई आतून जळत!

सुन्न झालेल्या महाराजांच्या डोळ्यांतून दाढीवर उतरणारे अश्रू म्हणत होते, ''तुम्ही स्वत:शीसुद्धा कुणाला अंदाज न येणारा बनावच केलात! आबासाहेब समजू शकले नाहीत तुम्हाला तिथं आम्ही काय समजावं? ही असली सजा घेऊन तुम्ही कधीही न मिटणारा वळ उठविला आहे आमच्या काळजावर. तुम्ही म्हणाला नाहीत – 'आमचे हे रूप ध्यानी ठेवा.' पण आम्ही कधीच ते विसरू शकत नाही. जसे सती गेल्या मासाहेबांच्या पोटी आम्ही उपजतो तर बरे होते, तसेच तुमच्या पोटी उपजतो तर केवढे सवाल मिटते! तुमचे, आमचे, आबासाहेबांचे, सर्वांचेच ....''

□ □ □



१२

छत्रपती खिन्न उदासपणे आपल्या महाली पायफेर घेत होते. गड सोयराबाईंच्या सुतकात होता. आल्यापासून महाराजांची येसूबाईंशी भेट झाली नव्हती. खरे तर त्यांना कुणालाच भेटावेसे वाटत नव्हते. रायगडावर येताच ते भेटले होते फक्त एकट्या रामराजांना. त्या भेटीची आठवण त्यांचा एकसारखा पाठपुरावा करीत होती. नकळतच पण केवढे जिव्हारीचे बोलले होते अजाण रामराजे आपल्या दादामहाराजांना!

छत्रपती दृष्टीस पडताच बाळ रामराजे त्यांना भेदरलेली मिठी कडकडून भरत म्हणाले होते, "आम्हाला हत्तीच्या पायी देऊ नका महाराज! आमची सजा आम्ही घेऊ– आमच्या मासाहेबांसारखी!"

ते ऐकताना काळजाच्या ठिकऱ्या उडालेले छत्रपती गदगदून आले होते. आपल्या बंधूंना थोपटून शांत करतानाच त्यांनी निर्णय घेतला होता– "वयाला न पेलणारे काहीसुद्धा यांच्या कानी पडता कामा नये. त्यासाठी येसाजी दाभाड्यांच्या जोडीला अधिक विश्वासाची माणसे जोडली पाहिजेत. यांना जपले पाहिजे."

त्याच विचाराने निवडीची माणसे महाराजांनी थोरल्या महालाला जोडून दिली होती. गैरवकुबाची, वरकड असा कुणीच असामी रामराजांभवती असणार नाही याची दक्षता घेतली होती.

आळंबी उठावीत तशी या निर्णयाची प्रतिक्रिया मात्र गडावर विचित्रच उमटली होती– "रामराजे नजरबंद करण्यात आले आहेत!" महाराजांना याची कल्पनाही नव्हती. औरंगच्या चालीचा अंदाज बांधीत ते पायफेर घेत होते. मध्येच थबकत होते.

"रानीसाब येत्यात." बाहेरच्या पहाऱ्याने आत येत त्यांची साखळी तोडली.

येसूबाई आत आल्या. महाराज त्यांच्या रोखाने जरा पुढे झाले. डोळ्यांना भिडल्या डोळ्यांतून एकच वेदना सरकून गेली– सोयराबाईंची.

"आम्ही ऐकतो आहोत ते सही आहे?" श्रीसखीचा तडक सवाल उठला.

"कसलं म्हणता?" छत्रपती तो नूर बघूनच गोंधळले.

"रामराजांना स्वारीनं नजरबंद केलं आहे? तेही मासाहेबांचं सुतक फिटायच्या आत?" जसे भावेश्वरीनेच छत्रपतींच्यावर डोळे रोखले होते.

"का ऽ य म्हणालात?" एक अस्फुट बोल घरंगळला. डाग दिल्यासारखी

महाराजांची मुद्रा व्याकुळ झाली. येसूबाईंना पाठमोरे होत त्यांच्या एवढाच देठाचा प्रश्न छत्रपतींनी केला, "आणि तुम्ही – तुम्ही त्यावर विश्वास ठेवलात ?"

आतापर्यंत निर्धाराने वर असलेली येसूबाईंची मान खाली गेली. शब्द उमटले, "चुकलं आमचं." अंगावर येतेशी वाटणारी शांतता त्या दोन राजमनांत कोंदटली.

"आम्ही थोरल्या महालाला खास विश्वासाची माणसं जोडली आहेत हे खरं आहे. रामराजे नजरबंद नाहीत – विश्वासबंद आहेत. वऱ्हाडातून हंबीरराव येण्याची वाट बघतो आहोत आम्ही. बाळराजांची सोयरीक त्यांच्या मुलीशी जोडून देण्याच्या इराद्यानं!! जे बालपणी आम्ही भोगलं ते त्यांना झेपणार नाही हे जाणतो आम्ही." महाराज तसेच चालत थेट आतल्या दालनात गेलेही. त्यांच्या जात्या पावलांकडे बघणाऱ्या येसूबाईंना कळून चुकले – "कितीही मनी आणलं तरी रानवाऱ्याचा माग काही नाही घेता येत! त्याच्या संगती दौडणं एवढंच काय ते उरतं हाती!"

गडाचे सुतक उठले. फार दिवस मनात रुपणारा एक सल उखडून काढण्यासाठी छत्रपतींनी येसाजी कंकांसह रायगड सोडला. ते पाचाडात आले. पाचाडात पंधरा हजार घोडालोक जिनबंदीने खडा ठाकला होता. कंकांचा दहा हजार पावलोक तोफखान्यासह आधीच आगेकूच झाला होता.

गिर्जोजी यादव, विनायक उमाजी, खंडेराव पाणसंबळ, बाजीराव जेधे, येसाजी कंक अशा शेलक्या मंडळींबरोबर महाराजांनी जमल्या फौजेवर एकदा देख टाकून घेतला. सर्वांसह जिजाऊंच्या छत्रीचे दर्शन घेऊन आघाडीला असलेल्या 'चंद्रावत' जनावरावर मांड जमविली. कूचाचे डंके-नगारे झडले. निशाणी काठ्या वर उठल्या.

छत्रपतींनी हात उठवून इशारत देताच पाठचा घोडालोक टापांवर पडला. खास महाराज चालून निघाले. स्वारी नगरवर! कैदेत कोंडून पडल्या दुर्गाबाई-राणूआक्कांची मुक्तता करण्याच्या धाडसी मनसुब्याने.

पुणे, कोरेगाव असे तळ टाकीत, कुकडी नदी पार करून घोडदळाने पावलोकांचा मेळ घेतला. पारनेरला जरब देऊन पंचवीस हजारांच्या माणूसबळाने संतप्त छत्रपती अहमदनगरच्या शिवेत घुसले.

भुईकोटाचा मोगली किल्लेदार असलेल्या मुकीमखानाने चलाखीने कोटाचा महादरवाजा बंद करून घेतला. कोटाभवती फिरलेले अर्धाकासरा रुंदीचे आणि तीन पुरुष उंचीचे खंदक तर पाण्याने तुडुंब भरलेलेच होते. मुकीमखान अल्लाद झाला.

खंदकामुळे मावळ्यांना तटाला भिडता येईना. सारे बळ ओतून महादरवाजा फोडण्याखेरीज मार्ग उरला नाही. तीन दिवस मराठ्यांनी नगरच्या कोटाला पान लावण्यासाठी जंग जंग केले. रोजाना धारेवर पडणाऱ्या माणसांची संख्या वाढत चालली. कोट अलगदच राहिला. पार खट्टा झालेल्या छत्रपतींनी तिसऱ्या दिवशी संध्याकाळी फौजेला परतीचा इशारा दिला. अपार खंत घेऊन नगरवेशीबाहेर पडणाऱ्या महाराजांची गर्दन खाली गेली. चर्या म्लान झाली. गजाआडच्या दुर्गाबाई-राणूआक्कांच्या मूर्ती डोळ्यांसमोरून हटता हटेनात. मनात आबासाहेबांचे बोल थडथडू लागले, "सह्याद्री जिंकायला निघालात आणि कबिला गमावून आलात. शरम – शरम वाटते तुमची आम्हाला."

शिकस्त खाल्लेले मानी शंभुमन स्वत:लाच धारेवर धरत म्हणत होते, "आबासाहेब, तुम्हाला वाटलीच असेल. पण आज आमची आम्हालाच शरम वाटते आहे. स्वत:बाबत!"

कोठीतल्या दुर्गाबाई, राणूआक्का यांची खबर उचलण्यासाठी गिरजोजी यादवाला नामजाद करून, आणि येसाजी कंकांना नगरभागात राहण्याची आज्ञा देऊन विषण्ण महाराज रायगडी परतले. थप्पड खाल्ल्यासारखे. नगरची मोहीम पार फसली.

कार्तिकी थंडीवर राने दहिवरू लागली. शहजादा अकबर मराठी मुलखात येऊन सहा महिने लोटले होते. त्याची भेट घेण्याचा निर्णय घेतलेल्या छत्रपतींनी कवी कुलेशांना बोलावून घेऊन मनसुबा दिला, "कविजी, सुधागडला जिवाजी हरींना कळवा, आम्ही शहजाद्याच्या भेटीस येतो आहोत. एकांत भेटीचा इंतजाम आखून ठेवणे."

"जी." ही लांबणीला पडलेली भेट होणार याचे कुलेशांना समाधान वाटले.

आता अकबराला भेटणे भाग होते. चालून येणाऱ्या औरंगला शत्रू मानणारी मिळेल ती लहान-थोर ताकद एकवट करायची होती. खरोखरच अकबर बापाविरुद्ध बंड करून उठला आहे काय हे पारखून घ्यायचे होते.

कार्तिकाचा शुद्ध पक्ष धरून कविजी, प्रल्हाद निराजी यांच्यासह निवडक शिबंदी घेऊन छत्रपती रायगड उतरले. निजामपूर, रोहा अशा मजला ठेवत पालीच्या शिवेवर आले. शिवेवर आपल्या माणसांनिशी जिवाजी हरी रुजू होते. डुयीला केशरी साफा बांधलेला, मध्यम वयाचा, ठसठशीत अंगलटीचा एक तगडा रजपूत मर्दानाही आगवानीसाठी खडा असलेला महाराजांना दिसला. तो डोळे जोडून मराठ्यांच्या छत्रपतींना निरखत होता.

पायउतार झालेले महाराज जिवाजींची अदब घेत पुढे झाले. त्या रजपूत सुरम्यावर नजर खिळलेले महाराज त्याच्यासमोर येताच त्याने नम्रभावे गुडघे टेकून, गर्दन झुकवून रजपुती रिवाज दिला. जिवाजींनी तत्परतेने त्याची ओळख पटती केली, "हे दुर्गादास राठोड! शहजाद्यांचा दोस्ताना राखण्यासाठी दक्षिणेत आलेत."

"जय एकलिंगजी, पादशहा सलामत मुल्क मऱ्हाट के खिदमतमें तसलीम." दुर्गादास पुन्हा मानेत लवला. छत्रपतींनी झुकून आदराने राठोडला वर घेत ऊरभेट दिली. सर्वांसह राजस्वारी सुधागडच्या खासेवाड्यात आली.

थाळे आणि विश्राम होताच कलत्या दुपारीला कविजी, नेताजी पालकर, प्रल्हादपंत अशा असामींनिशी महाराज बैठकीच्या दालनात आले. जिवाजींनी दालनाचा सरंजाम उंची लोड, गिर्द्या, रुजामे टाकून देखणा केला होता. छत्रपतींनी बैठक घेतली.

शहजादा अकबर पाली भागातील कसबा धोंडश्याला एका साध्या कौलारू घरात तळ देऊन होता. त्याची माणसे उघड्या माळावर राहुट्या टाकून होती. जिवाजी अकबराला आणण्यासाठी त्याच्या तळावर गेले होते.

"कविजी, आज तिथी कोणती ?" महाराजांनी पाठीशी उभ्या असलेल्या कुलेशांना विचारले.

"जी. कार्तिक शुद्ध त्रयोदशी." कवींनी पूर्तता केली. महाराजांनी बैठकीवरच्या तबकातील एक गुलाबी गेंद उचलला. त्याला चिमटीत फिरका देत कसल्यातरी विचाराने ते गिर्दीला रेलले.

तीन सालांपूर्वीचे असेच थंडीचे दिवस त्यांना आठवले. "तो माहुलीचा संगमघाट... सरसरत चाललेल्या नौका... पठाणी तळ... तगडा, बेगुमान दिलेर! भटकल्या क्षणांवर वाया गेलेलं आणि कधीच न पुसता येणारा काळिमा घेऊन आलेलं पुरतं एक साल!"

"आता भेटीस येणारा अकबर आणि त्या वेळचे आम्ही यात तफावत काय? अकबर आपल्या जन्मदात्याविरुद्ध बंड करून आला आहे. आमचं होतं आबासाहेबांविरुद्ध बंड ? अकबराला दिल्लीच्या तख्ताची आस जडली आहे. आम्हाला होती रायगडाच्या सिंहासनाची ? नाही – नाही. मग कोणाविरुद्ध होतं आमचं बंड ? तो तर आमचंच आमच्याविरुद्ध पुकारला उठाव होता. गाफील, अविचारी.

"तो समजून घेण्याची कुवत होती आबासाहेबांच्यात म्हणूनच तर आम्ही परतलो. नाहीतर ? हा अकबर परतेल आपल्या जन्मदात्याकडं कधी मनात आलं तरी ? घेईल औरंग त्याला आपल्या छातीशी पित्याच्या मायेनं ? आणि हा तरी काय करील आपल्या बापाचं जर याच्या मनासारखे फासे पडून दिल्लीतख्त याच्या हाताशी आलं तर ? आमच्या स्वप्नात तरी कधी आबासाहेबांबद्दल वेडंवाकडं आलं होतं ? ही – हीच ती तफावत आहे. मोगली राजकुळ रक्तापेक्षा तख्त मोलाचं मानतं आणि मराठी राजकुळ रक्ताचं तख्तच मोलाचं मानतं !"

जिवाजी लगबगीने दालनात आले. तिवार मुजरा भरत दरवाज्याकडे हातरोख देऊन म्हणाले, "शहजादा अकबर येताहेत."

छत्रपती बैठकीवरून उठले. जरीकोयऱ्यांच्या नक्षीचा सफेद, तलम जामा अंगी घेतलेला, पाचूपदकाचा हिरवाकंच मोगली, बसका किमॉश मस्तकी चढविलेला, चुणीदार तलम तुमान पेहनलेला तरणाबांड शहजादा अकबर आत प्रवेशला. त्याच्या छातीवर छत्रपतींनीच नजर केलेला मोतीकंठा होता. कोरल्या दाढीची चर्या काटेफड्याच्या बोंडागत लालबुंद होती.

नकळत क्षणभर दरवाज्यातच खिळून पडल्या अकबराने नजर एकवटून समोरचे मर्दपण निरखले – बऱ्हाणपूर दफा करणारे ! एकच विचार त्याच्या मनात सरकून गेला – "ये इतने तो इनके आब्बाजान कैसे ...?"

शाही हास्य खुलवीत, हात पसरते घेऊन शहजादा अकबर तरातर पुढे आला. छत्रपतींनी त्याला खांदाभेट दिली. त्याचा हात हाती घेत इतमामाने त्याला बैठकीवर आणून बसविले. मिर्झा यहुद्दिन शुजाई, वकील अब्दुल हमीद, दुर्गादास राठोड ही शहजाद्याची विश्वासू माणसे त्याच्या बगलेला अदबीने उभी राहिली.

परस्परांनी एकमेकांना नजराण्यांचा रिवाज केला. छत्रपती आपल्या हातचा गुलाबगेंद अकबराच्या हाती देत म्हणाले, "हा तुमच्या देशीचा गेंद. आमचा पहिला मेहमान. आम्हास आवडतो !"

राजे काव्य बांधतात हे ऐकून असलेला शहजादा दिलखुलास हसत उत्तरला, "बहुत खूब शायरी मिसाल है ये आपका राजासाब। हम भी अच्छे लगेंगे आपको।" दिला गेंद त्याने चटकन नाकाशी नेला.

एकांत घेण्यासाठी आपल्या माणसांना महाराजांनी हात उठवून इशारत दिली. ठरल्याप्रमाणे कवी कुलेशांखेरीज सर्व बाहेर पडले. अकबरानेही दुर्गादास राठोडाखेरीज आपल्या माणसांना निरोप दिला. छत्रपतींनी सावधपणे भेटीच्या विषयाला हात घातला, "आमच्या देशीचे हे दख्खनी हवामान मानवेल तुम्हास शहजादे ?"

"शाही हवासे ये जरदेंकी हवा कम खतरनाक है राजासाब !" रोख ओळखून आपल्या बापाबद्दलची सूचक नापसंती अकबराने नोंदवली. एकमेकांचा अंदाज घेत मने खुली होऊ लागली.

"आमच्याविरुद्ध बांधल्या बनावाचे कागदपत्र थेट आम्हाला धाडून थोर काम केलं आहे तुम्ही शहजादे." महाराज अकबराचे ते कृत्य विसरूच शकत नव्हते.

"वो इनकी करामत है।" अकबराने दुर्गादासाकडे हात केला. तगडा राठोड नम्रपणे लवला.

"आम्ही नाही समजलो." महाराज दुर्गादासाकडे बघत बोलले.

"वो इनकी नेक सलाह थी राजासाब – बडे इमानदार हैं दुर्गाजी. इनकी मसलत थी खलिते आपको पेश करनेकी।" पहिल्या नजरभेटीतच दुर्गादासाबद्दल महाराजांचे मत चांगले झाले होते ते वाढले. आपल्या सेवकाबद्दल गौरवाचे बोल काढणाऱ्या अकबराबद्दलही ते अनुकूल होत चालले.

"पुढचा मनसुबा काय तुमचा शहजादे ?" छत्रपतींनी मूळ धरले.

असंख्य चावऱ्या आठवणींनी अकबराची लालगौर चर्या वेढून आली. जन्मदात्याविषयीचे तिखट, कडवे बोल त्याच्या जबानीतून सुटले, "आलमगीर हिंदोस्ताँको दफा कर देगा राजासाब। ये कोई तरीका है सल्तनका कि रियाया हैरान हो ?

जिजिया, बुतशिकनी, जुल्म और कत्ल! कैसे रहेगा हिंदोस्तॉंका भरोसा शाही खानदानपर? अलमगीर अपने आपको और शाही खानदानको खतरेमें डाल रहा है। ये रोकना है, जानकी कीमतपर।'' तो बोलला ते सत्य होते पण कितीतरी अवघड! आपल्या बापाचे दोष अकबराला अचूक कळले होते पण त्याच्या अफाट ताकदीचा अंदाज शहजादा समजण्यास अपात्र होता.

''सही आहे तुमचं शहजादे, पण अलमगिराच्या फौजीबळाचा खयाल ठेवला पाहिजे. ज्याच्यापुढं तुमचे दादाजी बादशहा शहाजहान, चाचा दारा, मुराद शिकस्त झाले त्याच्याशी हा जंग आहे. त्यासाठी काही मसलत?'' शांतपणे महाराजांनी अकबराला, त्याच्या रक्ताची अलमगिराने लावलेली वासलात कौशल्याने कानी घालून सुरावर घेतले. अकबर दाराचा जावई होता आणि त्याच्या विचारांवर बरीचशी दाराचीच छाप होती. सरळधोप चाल बोलीभाषेला ठीक असली तरी राजकारणाला ती लागी नसते! औरंगजेबासारख्या पाताळयंत्री व शूर प्रतिस्पर्ध्याबाबत तर ती कधीच नसते. छत्रपती ते जाणून होते. आम्र्याची कोठी ते काही विसरू शकत नव्हते.

अकबराने छातीवरचा मोतीकंठा क्षणभर चाळवला. औरंगजेबाला शिकस्त देण्याची मनची मसलत त्याने खोलली, ''बिल्कुल दुरुस्त है आपका खयाल राजासाब। अब अलमगीर दख्खनपर चल आ रहा है। हम उत्तर में राजस्तान लौटना सोचते हैं। हिंदोस्ताँमें अलमगीरकी होड लेनेकी ताकद दोही मुल्कोंमें है– रजपूत और मरहट्टोंके। जयपूरका राजा, मिर्झा राजे जयसिंगका कुँवर रामसिंग अलमगीरपर खफा है। जो दगा अलमगीरने मिर्झा जयसिंगको देकर जहर खिलवाकर उसे कत्ल किया उसका बदला रामसिंग चाहता है। हमें उम्मीद है दुर्गाजी और रामसिंगकी मददसे हम रजपुतोंको इकठ्ठा बाँधेंगे। पर्शियाके शाहको भी हाथ देनेके लिये लिखा है हमने ...

''राजासाब, इस वक्त आप जोड देते होंगे तो अलमगीरका नामोनिशाँ मिटा देंगे हम।'' अकबर उजळत्या डोळ्यांनी मुद्द्यावर आला.

''आम्ही जोड करावी ती कसली?'' महाराज शांतच बोलले.

''चुना पचीस हजार मरहट्टा हशम साथ देनेकी। यही वक्त है हमारा जंग अजमानेका।'' अकबराचे कान महाराजांचा होकार ऐकायला आसावले. मोठ्या आशेने तो राजांच्या डोळ्यांत बघू लागला.

छत्रपतींची नजर दुर्गादास राठोडकडे वळली. अकबरापेक्षाही कानी आल्या माहितीवरून महाराजांचा दुर्गादासावर अधिक भर होता. हा राठोड संगतीला होता म्हणून तर अकबर अजून जिवंत होता!

''दुर्गाजी, तुमचा विचार?'' छत्रपतींना राठोडाच्या नेकीचा विश्वास होता म्हणून त्यांनी सवाल केला.

''जी. अलमगीर पहला हथियार मरहट्टोंपर धरेगा राजासाब। आदिलशाही और कुत्बशाही सल्तनतके मांडलिक हैं। मरहट्टे नहीं। अब दक्खन लडाना आपके खंदेपर है।

चाल अलमगीरकी और जबाब आपका ऐसाही ढंग रखना चाहिये। पहले अलमगीरको फौजके साथ दक्खनमें झुलाना होगा। वही मौका होगा उत्तरमें रजपुतोंके छलांगका। सोचकर आप फैसला रखना राजासाब।'' मुरब्बी दुर्गादास महाराजांच्या मनातलेच बोलला.

''बिल्कुल दुरुस्त दुर्गाजी. शहजादे, दुर्गाजींची मसलत आम्हास पटते. औरंगजेब दक्षिणेत गुंतला तरच तुमच्या उठावाला आम्ही माणूसबळ पुरवू शकू. मातब्बर गनिम ऐन तोंडावर असता गाठीची फौज आम्ही कुठेच दूर गुंतवू शकत नाही.'' छत्रपतींनी अकबराला निर्णय दिला.

खट्टा झालेल्या अकबराच्या हातच्या चुरल्या गेंदाच्या पाकळ्या बैठकीवर केव्हा उतरल्या हे त्याच्या लक्षात आले नव्हते तरी महाराजांनी ते टिपले होते.

आवाजात समजुतीची हल्लक भरून महाराज अकबराचा हात थोपटीत म्हणाले, ''शहजादे, तुमचा सल आम्ही जाणतो. पण मनाच्या जहालीने राजकारणे चालत नाहीत. तुम्ही आमचे मेहमान आहात, आमच्या राज्यात सुखरूप आहात. विश्वास ठेवावा. मौका येताच तुमचे मनसुबे कार्यी लागतील, धीर ठेवा. जयपूरच्या राजा रामसिंगांना आम्ही लिहू. तुम्हीही लिहा. तुमच्या भेटीचा निवाडा समयच देईल.''

''ठीक है राजासाब। हम रुकते हैं, लेकिन खयाल रखना। जबतक हम आपके मुल्कमें हैं चैनकी नींद नही देगा अलमगीर आपको।''

ते ऐकताना महाराजांना म्हणावेसे वाटले– ''आजवर ती कधीच लाभलेली नाही आम्हास.'' वरकरणी हसत ते म्हणाले मात्र, ''प्रत्यक्ष आपल्या फर्जंदाची नींद हराम करणाऱ्याचा आमच्याबाबतचा तेवढा अधिकार मानतो आम्ही शहजादे!''

निरोपाचे विडे आले. ते घेऊन बैठकीवरून उठणाऱ्या शहजाद्याच्या हाती समोरच्या तबकातील एक तवाना गुलाबगेंद पुन्हा देत महाराज नुसते हसले.

न राहवून अकबराने भावभऱ्या डोळ्यांनी छत्रपतींच्या खांद्यांना खांदे भिडविले. आपल्या माणसांसह तो आपल्या तळाकडे निघाला. पाच पावलांची रिवाजी सोबत त्याला करून महाराज थांबले. पाठमोऱ्या अकबराची जाती पावले बघताना त्यांच्या मनात विचार एकवटून आले– ''किती वनवास आला आहे या पावलांच्या वाट्याला. औरंग! कसल्या मुशीचा हा असामी? हा कसला नातेसंबंध?'' गुंतत चाललेल्या मनाला तोडून समोरच्या कुलेशांना ते म्हणाले, ''कविजी, तुम्ही शहजाद्याच्या सोबतीत इथंच राहा. त्याच्यावर नजर ठेवा. राजकारण म्हणून नाही तरी भांबावून तो भलतीच उचल खाण्याची शक्यता आहे. यास सावरले पाहिजे.''

''जी.'' कुलेशांनी राजाज्ञा झेलली.

महाराज विचारांवर फेर घेऊ लागले. त्यांच्या आणि धोंडशाला चाललेल्या अकबराच्या मनात टिपरी झडत होती ती एकच– अलमगीर!

आणि नेमक्या याच दिवशी, शाही सवारीच्या सजल्या हत्तीवर अंबारीत बसून झडती शाजणे, नौबती डंक्यांच्या उसळत्या गजरात, प्रचंड फौज पाठीशी घेऊन औरंगजेब बऱ्हाणपूरच्या वेशीत प्रवेशत होता! त्याची घारी नजर हौद्यातूनच बऱ्हाणपुराभोवतीची तटबंदी नीट उठली आहे की नाही याचा तलाश घेत होती! खैरात मिळालेले फकीर, मुल्ला, मौलवी त्याला हात उठवून तोंडभर दुवा देत होते!

पालीहून रायगडी आलेले महाराज, गडाच्या दक्षिण बाजूला असलेल्या दारू कोठारासमोर मांडलेली तोफांची भांडी निरखीत निळोपंतांना म्हणाले, "फरांसिसांच्या वकिलानं दिला शब्द पाळला पेशवे?"

"जी. आताषीचा बारदानाही त्यांनी पावता केला आहे." निळोपंतांनी अधिकाचा तपशील दिला. पन्हाळ्यावर भेटलेल्या फ्रेंच वकील लेफेबेरने आपल्या दरबारी शिफारस करून तोफा व दारूगोळा रायगडी पाठविण्याची व्यवस्था केली होती.

"मुहूर्त बघून या भांड्यांचं पूजन करून घ्या पंत." कसल्यातरी विचारात गढलेल्या महाराजांनी, घोड्याचे थोपटावे तसे गाड्यावरच्या एका तोफेचे पाटवान थोपटले. दारू कोठाराची बंदिस्ती नजरेखाली घालून ते निळोपंत, जोत्याजी केसरकर, येसाजी कंक यांच्यासह बालेकिल्ल्याकडे निघाले. निळोपंतांनी एक महत्त्वाचा निरोप त्यांच्या कानी घातला, "कर्नाटकातून हरजीराजांचा हारकारा आला आहे. प्रांताच्या कारभारासाठी हरजींना पावलोपावली रघुनाथपंत हणमंत्यांना सल्ला विचारण्याचा प्रसंग येतो, हणमंते कोठीबंद असल्यानं..." निळोपंत अर्ध्यावरच थांबले.

छत्रपती रुकले. त्यांनी विचारले, "काय उपाय आहे यावर हरजींचा पंत?"

लगबगीने पेशव्यांनी हरजींचा बेत छत्रपतींच्या समोर ठेवला, "ते म्हणतात– हणमंत्यांकडील दफ्तरी कागदपत्र ते सर्व जप्तीनं हस्तगत करण्याचा हुकूम व्हावा."

महाराज विचारात पडले. रघुनाथपंतांचा कर्नाटकाचा कारभार चोख होता. फक्त कटाच्या घालमेलीच्या वेळी त्यांनी काही धरसोडी दाखविली होती. तसे केल्याने नतीजा काय पावतो एवढे कळण्याएवढी शिक्षा त्यांना झालीही होती. निर्णय देत महाराज म्हणाले, "पंत, हरजीराजांना कळवा, रघुनाथपंतास मुक्त करून कर्नाटकाच्या मुजमूची अखत्यारी त्यांसच पुन्हा सुपूर्द करावी! कागदपत्रं बोलतात ते त्यांच्या कलमबाज धन्याच्या इशारतीवर! ते तसेच बोलते करून चालवावे. माणसे चुकतात पण दुरुस्त करून घेणाऱ्यानं चुकून नाही चालत."

अपेक्षा नसलेला निर्णय ऐकून निळोपंतांनी नेटके असलेले उपरणे पुन्हा नीट करीत रुकार भरला, "जी."

"कंककाका, हंबीरराव केव्हासे फिरतात वऱ्हाडातून माघारी? आम्ही वाट बघतोय त्यांची." रामराजांच्या लग्नाच्या विचाराने छत्रपतींनी येसाजींचा माग घेतला.

"जी. परतीच्या वाटंवर हाईत सरलस्कर. चार आठ दिवसांत गड चडावंत त्ये."

झडते मुजरे स्वीकारीत महाराज खासेवाड्याच्या सदरेला आले. तिथे खंडोजी, प्रल्हादपंत, खंडेराव पानसंबळ आणि बांदल मावळातून आलेला, दिपाई बांदल या बाईचा नातू शंकराजी अशा असामी होत्या.

शंकराजी खास वजेने छत्रपतींना भेटण्यासाठीच आला होता. तो कमरेत लवून बैठकीवर बसलेल्या साहेबस्वारींना म्हणाला, "सरकार, आमच्या आज्जीला थोरल्या धन्यानी दिल्याली मौजे पऱ्हेरची देनगी काही लाभत न्हाई. चोळीलुगड्याची देन हाय ती. पानी सोडावं का आमी त्येच्यावं?" त्रासल्या चर्येने त्याने हातातील कागदपत्रांची थैली, पुढे होत महाराजांच्या पायांजवळ ठेवली. मान खाली घातली.

शंकराजी दिपाई बांदलाचा नातू होता. त्याच्या बापाने – रायाजीने, थोरल्या स्वामींनी जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांवरच्या दोन वेळा केलेल्या चालीत मोलाची कामगिरी केली होती. त्यासाठी मेहर होऊन मौजे पऱ्हेरचे इनाम दिपाईला चोळी-लुगडे म्हणून खुद्द आबासाहेबांनी बहाल केले होते.

शंकराजीने पायांशी ठेवलेल्या थैलीवर टाकलेली नजर तशीच उचलून महाराजांनी खंडोजींना दिली. तत्परतेने पुढे होत त्यांनी थैली उचलली. आतील कागदपत्र बाहेर घेऊन ते पडताळू लागले.

"बांदल, सुमार असा. आबासाहेबांनी दिला शब्द पाळू आम्ही." महाराजांनी शंकराजीला धीर दिला. अंदाजासाठी चिटणीस खंडोजींच्याकडे बघितले.

"या अस्सल सनदा आहेत स्वामी, थोरल्या स्वामींच्या शिक्के दस्तुराच्या." खंडोजींनी रुजवात दिली. महाराजांनी शांतपणे शंकराजीला विचारले,

"कसली तकलीफ आहे तुम्हांस बांदल?"

"जी. मावळाचं कारभारी गोपाळ रायाजी ह्यो कागद मानाय तयार न्हाईत! नवं आन म्हंत्यात." शंकराजीने अडचण सांगितली.

"काऽय?" महाराजांची भिवई चढली. खंडोजींना तात्काळ आज्ञा मिळाली, "चिटणीस, गोपाळ रायाजींना कलमी समज द्या. बांदल आम्हास जातीनं भेटले. कागदांची रुजवात दिली आहे. कै. स्वामींनी मौजे पऱ्हेर दिपाईस चोळीलुगडे म्हणून इनाम दिल्हे आहे. ते अवलाद अफलाद तसेच चालविणे. ताज्या सनदेची उजूर न करीत जाणे. फिरून काडीचा बोभाट येईल तो जमेस नाही!"

मान डोलवून खंडोजींनी रुकार भरला. शंकराजीची चर्या, मिळशल्या न्यायाने उजळून आली. "धन्यांची म्हेरबानगी" म्हणत तो मुजरा देऊन निघून गेला.

"महाराज, बऱ्हाणपूरला ठाण झाल्या गनिमानं नांग्या पसरायला सुरुवात केली आहे." महत्त्वाची बाब पुढे घेत प्रल्हादपंत क्षणभर थांबले.

कानी पडेल ते ऐकायला सिद्ध असलेल्या महाराजांनी त्यांच्यावर नजर जोडली.

"चौदा हजार स्वारांच्या दिमतीनं बऱ्हाणपुराहून कूच झालेला हसनअलीखान तळकोकणचा रोख धरून मजलांनी येतो आहे. संगती त्याचा मजला हुसेन आहे." सांगितल्या चालीवर महाराजांचे ऐकण्यासाठी प्रल्हादपंत थांबले. विचारात गढलेले स्वामी बघून दुसरी वार्ता बोलावी की नको या विचारात ते पडले.

"बोला प्रल्हादपंत, आम्ही सारे समजून आहोत. नासिकपट्ट्यात शाबदीखान मुल्हेरला पोचला आहे. मुल्हेरच्या किल्लेदार देवीसिंहाचा जोर घेऊन तो आमच्या साल्हेरीला भिडला आहे. आमचे रूपाजी त्याला हुलकावण्या देत हररोज त्याच्यावर छापे घालताहेत." बोलता बोलता महाराज बैठकीवरून उठले. शून्यात पक्की रोवल्यागत दिसणारी त्यांची नजर जसे समोरचे साल्हेर-मुल्हेरच बघत असल्यासारखी दिसू लागली.

येसाजी, निळोपंत, पानसंबळ, आवजी, प्रल्हादपंत सारेजण त्यांच्या या आगळ्या मुद्रेकडे बघतच राहिले. क्षणार्धात त्या मुद्रेवरच्या शोधक डोळ्यांतले भाव पालटले. मान डुलवीत स्वत:शीच बोलल्यासारखे महाराज बोलले, "औरंग याहून पसरत्या नांग्यांनी येणार हे हेरून आहोत आम्ही पंत, चिटणीस. आम्ही पुन्हा चाल घेऊ, या रास्त हिशेबानं त्यानं नगरचं ठाणं शहजादा आज्जम, मुन्वर आणि किलिचखान यांची कुमक देऊन भक्कम केलं आहे. औरंग येतो आहे तो राजरोस. वाजत-गाजत, हमला पुकारून पण…" डोळ्यांत चीड उतरलेले छत्रपती अस्वस्थपणे थांबले. कसलातरी पेच उकलण्यासाठी स्वत:त गुंतल्यागत झाले. भोवतीच्या आसामी समोर नसल्यासारखे एकलेच पायफेर घेऊ लागले.

ते बघून न राहवलेले खंडेराव अदबीने म्हणाले, "काही अडचण, जोखीम असेल तर हुकूम व्हावा धन्यांचा."

खूप खोलवर मन टोकरत गेलेले महाराज, ते ऐकून भान घेत म्हणाले, "खंडेराव, कोंडाजी फर्जंद कुठं आहेत सध्यास ?"

"कल्याण-भिवंडी भागात ते तुकाजी पालकरांच्या दिमतीत आहेत स्वामी."प्रल्हादपंतांनी तत्परतेने पूर्तता केली.

"प्रल्हादपंत, त्यांना तातडीनं रायगडी पेश घ्या. आमच्या भेटीस पाठवा." छत्रपतींनी एकांत घेण्यासाठी हात उठविला. या वेळी 'कोंडाजींचीच याद का व्हावी ?' हा विचार मनाशी घोळवीत प्रत्येक आसामी बाहेर पडली.

गडाच्या आघाडी मनोऱ्यालगत असलेल्या शिळाबंद खलबतखान्याच्या कोनाड्यातील टेंभे ढणढणत होते. त्यांच्या तांबूस, पिवळ्या उजेडात तीन मुद्रा उजळून निघाल्या होत्या. बाहेर थंडीने गारठलेली रात्र गड धरून पसरली होती.

"सरलष्कर, हबशी हाताबाहेर गेला आहे." बैठकीवर बसले महाराज हंबीररावांना चिंतेने म्हणाले. त्यांच्यासमोर वीरमांडा घेऊन, वऱ्हाडातून आलेले हंबीरराव आणि

कल्याण प्रांतातून आलेले कोंडाजी फर्जंद बसले होते. कानांत प्राण आणून ते आपल्या धन्याचा सल ऐकत होते.

"उभा 'आपटा' गाव जाळून गेला हबशी. नागोठाण्यात आपल्या कैद रयतेची नाकं छाटण्याएवढा माज भरला आहे त्यास. जंजिरा दर्यादोस्त झाल्याखेरीज आम्हास चैन नाही…" कोनाड्यातील पेटते टेंभेच जसे महाराजांच्या डोळ्यांत उतरले.

ते ऐकताना मिश्यांचे कंगोल ताठरलेले हंबीरराव चटक्या चिडीने म्हणाले, "आज्ञा करावी धनी. याच पावली भिडताव आम्ही जंजिऱ्याला… वऱ्हाडाची क्येली ती गत जंजिऱ्याची केल्याबिगार त्वांड दावाय येतच न्हाई आमी."

"नाही मामासाहेब, या दर्याच्या पाणसावजासाठी आम्ही तुम्हाला मोगलाईच्या तोंडावरून नाही काढू शकत या ऐन समयी. त्यासाठीच कोंडाजींना याद घेतलंय आम्ही." छत्रपतींची नजर कोंडाजींवर खिळली.

डोळ्यांसमोर जंजिरा तरळत असलेले कोंडाजी 'जी' म्हणत बसल्या जागीच सरसावले.

"कोंडाजी, तुम्ही खास हुन्नराचे. आबासाहेबांच्या सेवेत कुल साठ असामींनिशी अजब चाल ठेवून पन्हाळा पाडलात तुम्ही. हे काम त्याहून जोखमीचं. पन्हाळा डोंगरी किल्ला. हा जलकोट. दर्याच्या लाटा हबश्याच्या बसकणीत बोट शिरकू देत नाहीत." महाराज थांबले. त्यांचे डोळे कोंडाजींच्या कंगणी पगडीभर फिरले.

पेटत्या टेंभ्यातली फुटती ठिणगी उसळून उठावी तसे कोंडाजी एकाएकी मांड मोडीत उठले. तिबारीचा मुजरा भरत दबक्या, खरखरीत बोलीत ठाशीने म्हणाले, "घ्येटला ह्यो पानकोटाचा इडा आमी, खंडुबांच्या आनभाकीनं धनी. ह्या कोंडाजीचं पाय हबश्याच्या बसकटीवर पडलं म्हून खातर धरावी. दारवंच्या कोटाराबराबर जंजिऱ्याचा भंडारा दर्यावर उदळूनच पायधूळ घ्याया येवू आमी." तळपत्या डोळ्यांच्या कोंडाजींनी झटकन लवून महाराजांच्या पायांना हात भिडवला.

"शाब्बास, भले फर्जंद. आमची हीच उमेद होती तुमच्याकडून."

कोंडाजींना मानवस्त्रं बहाल करण्यात आली. खलबतातून उठताना हंबीरराव, कोंडाजींना जाणता सल्ला देत म्हणाले, "जो काय मानूस चालीत घ्यायचा त्यो इमान-इस्वासाचा उचला. दर्याच्या पान्यावर हात मारतील असं ताट पवणीचं गडी निवडा."

कोंडाजी त्या मायेला दाद देत गर्दन हुलवून नुसते हसले. खलबत उठले.

हटत्या शिळेतून बाहेर पडताच थंडीच्या झपकाऱ्याने महाराज खलबताच्या दारातच थांबले. त्यांच्या मनचे हबश्याचे विचार क्षणभर तुटल्यासारखे झाले. त्यांची जागा घरगुती नात्याने घेतली. शिळेबाहेर आलेल्या हंबीररावांना ते लगावाच्या बोलीत म्हणाले, "मामासाहेब, तुमच्याकडं आहे ती आमची कामगिरी जरा वेगळी."

"बोलावं की–" दाद भरताना हंबीररावांच्या मिश्यांखालून, वाफारा सुटला. कोंडाजी त्यांना अवसर देण्यासाठी निघून गेले.

"मामासाहेब, मासाहेब गेल्या. नको त्या वाटेनं. आमचे रामराजे उघडे पडले. त्यांचे हात पिवळे करावेत हे योजून त्यासाठीच तुमची वाट बघत होतो आम्ही."

सोयराबाईंच्या आठवणीने हंबीररावांचे मनही धरल्यासारखे झाले. ते काहीच बोलले नाहीत तसे छत्रपती थांबत म्हणाले, "बोलला नाहीत तुम्ही ..."

"काय बोलावं धनी? असं का क्येलं त्येनी न्हाई उमगत. बाळराजांस्नी भ्येटलाव आमी तर बिलगून म्हनलं त्ये ..." हंबीरराव ते चित्रच डोळ्यांसमोर ठाकल्याने पुढे बोलूच शकले नाहीत.

"काय ... काय म्हणाले ते?" महाराजांचा आवाज चिंबला होता.

"ह्येच की आमास्नी नजरकैदेत टाकू नका म्हून सांगा दादाम्हराजांस्नी!" बऱ्हाणपूर, वऱ्हाड मारणाऱ्या निधड्या हंबीररावांच्या गळ्याची घाटी दाटून आली, थंडीने गोठल्यासारखी. न उलगडणारी विचित्र कोंडी त्या दोन वीर मनांवर पसरली.

समोर सात-आठ पावलांवर उभ्या असलेल्या मशालजींच्या रोखाने तरातर चालत छत्रपतींनी त्याच्या हातची मशाल आपल्याकडे घेतली. तसेच हंबीररावांसमोर येत फरफरती मशाल आपल्या मुद्रेजवळ नेत दुखऱ्या कळवळीने ते म्हणाले, "बघा, मामासाहेब, आमची नजर बंधूंना जरबेत ठेवणारी दिसते की मायेत ठेवणारी?"

हंबीरराव गडबडून गेले. आपल्या धन्याचा तडक स्वभाव त्यांना माहीत होता. मनात असते तर रामराजांना त्यांनी थेट कैदेतच टाकले असते. आणि त्या बाबीने कुणाचीही रदबदली ऐकूनसुद्धा घेतली नसती.

मशालीच्या फरफरीत मिसळत छत्रपतींचा घोगरा साद हंबीररावांच्या कानी आला, "असते तर आबासाहेबांनी जे केलं असतं तेच आम्ही करणार आहोत आमच्या रामराजांसाठी. त्यासाठीच तुमच्याकडं एक मागणं घालतो आहोत आम्ही मामासाहेब."

'मागणं', हा शब्द ऐकताच हंबीरराव चपापले. आता समोर काय येणार यासाठी ते माग घेऊ लागले.

"मासाहेबांच्या वागण्यानं जेव्हा जेव्हा काय करावं हा प्रसंग आला आमच्यासमोर, तेव्हा तुम्हीच पाठराखणीला धीरानं उभे राहिलात. छत्रपती म्हणून नव्हे तर, रामराजांचे दादामहाराज म्हणून आम्ही मागणं घालतो आहोत. मामा ऽ, तुमची मुलगी भोसल्यांच्या कबिल्यात आणावी म्हणतो आम्ही. बाळराजांसाठी!"

हे असे काही समोर येईल याचे भान नसलेले हंबीरराव समोरच्या धन्याकडे बघतच राहिले. 'कधीकाळी सरलष्करीची मानवस्त्रे खांद्यावर ठेवणारे थोरले तर समोर उभे नाहीत?' असाच त्यांना भास झाला.

त्यांना गुमानच बघून महाराजांनी झटकन भाषा पालटत आवाहन घेतले, "शब्द द्या आम्हास सरलष्कर!"

"जी. दिली आमची घरसोबा बाळराजांचं कुंकू लेवाय. आन वागजाईची." कुलदेवतेची साक्ष ठेवत शब्द देऊन हंबीरराव महाराजांचे पाय शिवण्यासाठी लवू लागले. त्यांना तसेच थोपवून खांद्याशी लावीत महाराज म्हणाले, "तुम्ही रामराजांचे सासरे झालात तरी आमच्यासाठी मामा आहात तसेच असा."

सजल्या रायगडावर रामराजांचे लग्नकार्य थाटात संपन्न झाले. वाजतगाजत हंबीररावांची कन्या ताराऊ भरल्या शिगेचे माप लवंडून भोसल्यांच्या घरात आली. नव्या वधूचे नाव जरी 'सीताबाई' ठेवण्यात आले तरी सर्वजण तिला माहेरच्या नावाने 'ताराऊ' च म्हणू लागले.

या शुभकार्याची सांगता झाली नाही तोच महाराज वाट बघत होते ती खबर रायगडावर पोचली. जंजिरा भागात टेहळ घेत फिरणारा विश्वास मुसेखोरेकर छत्रपतींना रुजू होत जोहार देऊन म्हणाला, "कोंडाजी फरजन हबश्याच्या जलकोटात घुसलं म्हाराज! संगट पन्नास एक डुया हाईत. लई क्रसबाच्या चालीनं राजरोस भिडल्यात कोंडाजींची मान्सं जंजिऱ्याला. थेट चाकरीच धरलीया त्येनी हबश्याची! कुनी पाचरूट म्हून, कुनी व्हडकी दुरुस्त करनारं सुतार म्हून, कुनी चुन्याच्या घान्या फिरवनारं घानारी म्हून जंजिऱ्यावर पाऊल ठिवलंय."

ते ऐकताना चर्येवर समाधान पसरलेले छत्रपती पुटपुटले, "आमच्या ताराऊंचा गोमटा पायगुण आहे हा."

जोहार देत विश्वास रामोशी निघून गेला. जंजिऱ्याबाबत निर्धास्त झालेल्या छत्रपतींनी काही बेताने पेशवे निळोपंतांना याद घेतले.

"पंत, आमच्या कबिल्याची गडउतारीची व्यवस्था तुम्ही जातीनिशी बघा. गांगोलीला जायचं म्हणतात त्या." समोर पेश झाल्या पेशव्यांना महाराज म्हणाले.

बाळंतपणासाठी गांगोलीच्या निवांत वाड्यावर जाण्याचे येसूबाईंच्या मनाने घेतले होते. खरेतर निवांतपणापेक्षा त्यांना माहेरच्या शृंगारपूरची भावेश्वरी जवळपास येणार हा दिलासा यात होता. कारण खुद्द शृंगारपुरी जाणे त्यांना शक्यच नव्हते!

"जी." म्हणत निळोपंतांनी छत्रपतींच्या आज्ञेला दुजोरा दिला. काही बोलण्यासाठी निळोपंत खोळंबलेत हे ताडलेले महाराज त्यांना चाल देण्यासाठी म्हणाले, "बोला. काय आहे?"

"महाराज, नगरहून शहजादा आज्जमनं हसनखानास सैन्यबंदीनं धाडला आहे. आपण घाटबंदी केल्याचं हेरून, कोकणवर येण्याचा बेत पालटून हसनखान सासवडखोरीकडं सरकला आहे. आपल्या पुरंदरतर्फेच्या मन्सबदार शेख इब्राहिमशी बोलणी लावून त्याला फितव्यानं फोडण्याचा प्रयत्न चालला आहे खानाचा!"

महाराज अस्वस्थ झाले. तरीही शांतपणे म्हणाले, "पंत, इभ्रामभोवती आपले विश्वासाचे खबरगीर पेरा."

"जी. पुण्याजवळचा पेठ शिवापूरचा कसबाही बहादुरखानानं लुटला आहे स्वामी." निळोपंतांनी दुसरी कटू बाबही महाराजांच्या कानी घातली.

"ठीक आहे. पेशवे, पुण्याच्या सरसुभा दामाजी रघुनाथांना तातडीनं हारकारा द्या. गनीम जोरावारीनं टापांखाली घेणार आहे प्रांत पुणे. त्यास अहोरात्र फिरते राहण्यास लिहा. दोन मोगली कुमकांचा मेळ पडणार नाही याची खबरदारी घेण्याची समज द्या."

"जी." निळोपंतांना आपल्या स्वामींचे थंडे, शांत निर्णय घोटाळ्यात टाकीत होते.

"स्वामी, फिरंगी विजरई ताव्हेरानं कोळवलवर कोट बांधून पुरा केला. थोरल्या स्वामींची या कोळवलवर फार नजर होती."

महाराज विचारात गेले. फिरंग्यांचा नवा विजरई आपली कर्तबगारी लिस्बनला आपल्या बड्या दरबारला रुजू करण्यासाठी उचल घेणार हे साफ झाले होते.

"पंत, आपल्या कारवारतर्फेच्या सुभेदारास असेल त्या कुमकेनिशी अंजदीव बेटावर चाल घेण्यास हुकूम द्या. अंजदीव दस्त झाले पाहिजे. फिरंगी त्यावरही डोळा ठेवून आहे हे कळवा त्यास."

पंतांच्या ध्यानीमनी नसलेला कोलदांडा छत्रपतींनी फिरंग्यांविरुद्ध खोलला.

त्याने समाधान पावलेल्या निळोपंतांनी टोपीकरांची एक बाब पुढे घेतली, "मुंबईचे टोपीकर एका वजेनं नाराज झालेत स्वामी."

"कोण वजेनं ?"

"नागोठाण्यात गैरअंमल करणाऱ्या हबश्यांना मदत करता असा आरोप ठेवून आपल्या सुंदरजी बाजींनी गोऱ्यांची दोन गलबतं नागोठाण्याच्या बंदरात अडकवून ठेवली आहेत. त्यासाठी टोपीकर घायकुत करताहेत."

"निळोपंत, एका समयास चौबाजूंचा गनिम पेटता ठेवणे लागीचे नाही. सुंदरजींना कळवा, जरब देऊन टोपीकरांची गलबतं खुली करणे."

"जी. कुतुबशाही दरबारकडून एक नजराणा आला आहे स्वामी. चार लाख पगोड्यांच्या तबकाचा."

महाराज हसून निळोपंतांना म्हणाले, "तो नजराणा नाही पंत, ती मदत आहे. आम्ही अलमगिराविरुद्ध खडे ठाकावे यासाठी आलेली! आमच्या अभिषेकसमयीही एवढी रक्कम नव्हती आली कुतुबशाहीकडून. पाहुण्याच्या काठीनं साप मारणं हे तर राजकारणच आहे! शहाला पोच देऊन कळवा. दिला दोस्ताना पावला. समयास आम्हाला माणूसबळ लागेल. दख्खन पैशानं नव्हे तर माणूसमेळानं राखणं आहे."

चार दिवस उलटले. मुहूर्ताच्या ठरल्या दिवशी, भल्या पहाटे कुणबिणींच्या तांड्यात सरंजामाने जाऊन येसूबाई गडदेवी शिर्काईची ओटी भरून आल्या.

मांगोलीला जाणारे पडदाबंद मेणे सातमहालासमोरच्या हमचौकात हत्यारबंद धारकऱ्यांच्या घेरात सिद्ध झाले होते.

सकवारबाईंची पायधूळ घेऊन येसूबाई रामराजे व ताराऊ यांच्यासह आपल्या स्वारींच्या दर्शनासाठी बैठकी दालनात आल्या. त्यांच्या संगती आता पार थकलेली, कुर्यावरची केसावळ साफ चुनेरंगी झालेली, भोसलेकुळीची सावली म्हणूनच जिंदगी जगलेली धाराऊ होती. रूपा नावाची एक खास कुणबीणही होती. येसूबाईंना बघताच महाराज पाच पावली पुढे झाले. हाती नेसूचा पदरशेव भरून, सुवर्णकंकणांचा किणकिणाट उठवीत महाराणींनी आपल्या कुंकुबळाला तिवार नमस्कार केला. मुजरा करू बघणाऱ्या रामराजांना जवळ घेत, समोरच्या खालगर्दनी येसूबाईंशी कसे बोलावे याचा छत्रपती मनाशी मेळ घालू लागले. त्यांना एवढेच म्हणायचे होते, "तब्येतीस सांभाळून असा."

पण येसूबाईच म्हणाल्या, "येऊ आम्ही ? स्वारीनं तब्येतीस सांभाळून असावं !"

"जी." कधी नव्हे तो अदबरिवाजी बोल महाराजांच्या तोंडून सुटला. आणि ते बोलून गेले, "आम्ही येतो आहोत मनोऱ्यापावेतो पायसोबतीला." विचारांच्या घालमेलीत राहिलेला नमस्कार धाराऊला द्यावा म्हणून तिच्या पायाला हात लावण्यासाठी महाराज झुकले. त्यांच्या टोपावर हात ठेवीत म्हातारी म्हणाली, "असू दे रं माज्या लेकरा! तुज्या पोटाला थोरलंच येनार हाईत !"

ते ऐकताना कानशिले सरसरलेल्या येसूबाई पाठमोरे होत बाहेरही पडल्या.

शिबंदीने वेढलेले मेणे पालखी दरवाज्याने आघाडी मनोऱ्याजवळ आले. क्षणभर थांबले आणि गड उतरण्यासाठी चालू लागले. छत्रपतींच्या मनात विचार उठला. "आता एकल्या जाताहात. याल तेव्हा ?"

"धनी ऽ..." रायगडाच्या खासेवाड्याच्या सदरेला छत्रपतींच्या समोर रुजू झालेल्या, घामाने डबडबलेल्या नाईक बहिर्जीच्या तोंडून शब्द फुटता फुटत नव्हता. क्वचितच दिसणारी बहिर्जीची विचित्र मुद्रा बघूनच महाराजांच्या सेवेत असलेली निळोपंत, प्रल्हादपंत, आवजी, मोरेश्वर व केशव पंडित अशी खाशी मंडळीही हटत्या पावली मुजरा देत सदरेबाहेर पडली. सदर एकांती झाली.

रामोशी मुंडासे डुलवीत बहिर्जीची पाणावली नजर खिनभर धन्यावर खिळली. देठ मोडल्यागत क्षणात त्यांच्या पायांवर घरंगळली.

"नाईक ..." चरकल्या मनी समोरून राजबोल उठले.

डोळ्यांसमोर काहीतरी काळजाची तोड करणारे प्रत्यक्ष बघतच असल्यासारखी

बहिर्जीची गर्दन पुन्हा डुलली. डोळ्यांवाटे दोनचार थेंब टपटपले. खांद्यावरून ओघळते कांबळे, त्याला धनी समोर असताही सावरावेसे वाटले नाही.

"नाईऽक काय झालं ?" बैठकीवरून तडक उठत छत्रपतींनी विचारले.

बहिर्जीचे ओठ थरथरले. सदर चिरत इमानी रामोशीबोल कुचमतच बाहेर पडले.

"घात झाला धनी — आपलं कोंडाजी म्येलं, धनी!!" उमळत्या कढाने रामोशी नरड्याची घाटी गुदमरली.

अंगभर थरकलेले छत्रपती कळवळले. "नाऽईक — हे असं कसं ? काय झालं नाईक ?"

मनच्या कढाला थोपा देत दौलतीचा नेक खबरगीर बोलू लागला, "महाराज, टेहळ घेत कोंडाजी हबश्याच्या कोटावर सावधानगीनं वावरत हुतं. पर आपल्याच मान्सानं गळा कापला सम्द्यांचा. सरकार फितवा झाला."

"कुणी केला ?" शोकाच्या जागी छत्रपतींच्या मनी संताप उसळला.

"हरामजाद्या कुमाजी देसायानं !" बहिर्जीचा आवाज आता सुटा झाला. ते ऐकताना छत्रपती अस्वस्थ-हैराण झाले.

"बेमान देसाई हबश्याच्या कानाला लागला. कोंडाजी स्वांग घिऊन आल्यात. दारवंच्या कोठाराला, संधी साधून बत्ती द्याय टपल्यात. याचा माग कुमाजीनंच हबश्याला दिला. रातोरात सम्द्या मान्सांसकट कोंडाजीस्नी त्येनं दस्त क्येलं. रातभर कोरड्यांचा त्येनं मारा देऊन बोलतं करायची कोशिस क्येली. कांदडीतच बोलत कोंडाजी काही बधलं न्हाईत. एक असामी काही डरला वा फुटला न्हाई त्येंचा."

त्याही स्थितीत एक खोलवर समाधानाची छटा महाराजांच्या मनभर पसरली.

श्वास घेत नाइकाने कोंडाजींचा धीरोदात्त शेवट आपल्या धन्याच्या कानी घातला.

"कोंडाजी बघत न्हाई ह्ये ऐकून चिडल्याला खुद्द शिद्दी खैरात फाटचं त्यास्नी बघाय आला. कोंडाजीम्होरं येत त्येंच्या तोंडावं थुकत म्हनला — 'कुत्ते, तेरा सर काटके खंबेपर लटकायेंगे। बता दे व्हांसे अपने मालिकको — जंजिरेपर बदनजर रखनेवालेका ये हाल होता है!'"

"हबश्याने सम्द्यांच्या डुया मारण्याचा हुकूम आपल्या जल्लादांस्नी दिला."

शोक, संताप, खंत यांनी छत्रपतींचे मन कोंदटून आले. झावळलेले डोळे सुन्न एकटक झाले.

"धनी, मर्दावानी कोंडाजी मौतीला सामोरं ग्येलं. उगवतीबरोबर कोंडाजींची गर्दन पहिल्यानं लाकडी खोड्यावर, चार हबश्यांनी दाबून झुकावली. जल्लादानं धारेचा सपाता उचलला. आन् ... आन् या वक्ताला मात्र जिवाच्या नेटानं उसळी घेत कोंडाजी ताठ खडं जालं. जंजिऱ्यावर पाऊल ठिवल्यापास्नं पहिल्यानंच मावळीत ठाशीनं गराजलं — 'आरं, व्हय आमी राजाची मान्सं हाव. मरनाला चाळ करून बांदल्यात रं आमी पायांस्नी! ह्यो लाकडी खोडा तेवढा वळता करून रायगडाकडं फुडा करून ठेवा रं!'"

बहिर्जीला कोंडाजींची ती मुद्राच जणू दिसत असल्याने पुढे बोलवेना. गलबलून गेलेल्या छत्रपतींच्या नेत्रकडा दाटून आल्या. हात छातीवरच्या संन्यासी भवानीमाळेवर चढला.

एकाएकी बहिर्जीची खाली पडलेली नजर झटका घेत वर उठली. छत्रपतींच्या डोळ्यांना थेट भिडली. थबथबते बोल त्याच्या तोंडून सुटून समोरच्या राजपावलांवर पडले. "धनीऽ, कोंडाजींची मावळी काही हबश्यांनी कळंना. तसं हात झटकून कोंडाजींनी आपल्या हातांनीच खोडा होता तसा फिरवून रायगडाकडं फुडा करून घेतला! मान खोड्यावर ठिवायच्या अदुगर गडाला — धन्यास्नी मुजरा देत कोंडाजी म्हनलं, 'आमच्या रगताचा भंडारा उधाळला म्हाराज जलकोटावं! कसुराची माफी असावी. चाकराची सय ठेवावी ... जै भवानी ...'

"सरकार, उगवतीबराबर कोंडाजीसकट पन्नास असामींच्या मुंड्या दर्यात उठविलेल्या खांबावं हबश्यांनी लटकावल्यात. दर्याच्या वाऱ्यावर हिंकाळत त्या मिटल्या डोळ्यांनी ह्यो गडच बघतं हुत्या शेवटच्या वक्ताला!"

छत्रपतींनी डोळे मिटले होते. त्यांच्या छातीवरच्या माळेवर त्यांच्या राजआत्म्याचा कढ टपटप टपकत होता. पडले कांबळे उचलून बधिर बहिर्जी सदरेबाहेर गेला.

बाहेर पसरत्या दाट थंडीच्या अंगीही काटा उमटावा असे रायगडाच्या सिंहासनसदरेला घेरून टेंभे पेटून उठले होते. पुऱ्या सिंहासनचौकाला जागत्या हत्यारी पहाऱ्याचे कडे पडले होते. जगदीश्वराच्या सांजआरतीचे नाद, नुकतेच गडाला थोपटून भवतीच्या दऱ्यांत विसाव्याला उतरले होते.

सिंहासनसदरेत दर्यापट्टीतून एकवट झालेला सारंग आणि लढाऊ म्होरका वीरमांडांवर बसला होता. त्यात महाडचे सरसुभा दादाजी रघुनाथ देशपांडे, त्यांचे बंधू विसाजी रघुनाथ, मायनाक भंडारी, दौलतखान, गोविंदजी जाधव, उदाजी पडवळ, गोविंद कान्हो, सुभाना खराडे, भिवजी गुजर, माणकोजी अशा असामी होत्या. सिद्याला पारखे होऊन मराठी दौलतीच्या चाकरीत, कुराण-किताब उचलून आणभाकेवर आलेले सिद्दी संबूळ व सिद्दी मिस्री तर बैठकीत आघाडीला होते. सर्वांच्याच मनात एक खारट सल साकळून आल्याने कुणीच काही बोलत नव्हते.

सदरी मसलतीत रिवाजाची 'भंडारा-परडी' फिरली. दौलतीच्या सिद्दी सारंगांनीसुद्धा तिची बोटे गळपट्टीवर घेतली.

उगवतीला पुढा धरून असलेल्या हुजूर बैठकीवर छत्रपती बसले होते. त्यांच्या चर्येवरून त्यांच्या 'मनात घुसळणारा दर्या' मात्र कुणालाही पारखता आला नसता. इतकी ती शांत होती. छत्रपतींच्या दुहाती निळोपंत, दत्ताजी त्रिमल, खंडेराव, पालीहून आलेले कवी कुलेश, प्रल्हादपंत, येसाजी कंक अशी खास माणसे उभी होती.

निळोपंतांनी मसलतीचे तोंड फोडले, "कोण वजेनं साहेबस्वारीनं सर्वांस याद घेतलं

हे सारे जाणता. औरंगाबाद, नगरप्रांत धरून दिल्लीश्वर उतरला आहे. समुद्रमार्गे त्याचा हस्तक याकुतखान दंडाराजपुरीवर आला आहे. एकीकडून जंजिऱ्याचा हबशी व याकुत आणि दुसरीकडून स्वत: आपण अशी कैची टाकून दौलतीची गळचेपी करण्याचा मनसुबी डाव गनिम बांधून आहे. त्याच बळावर जंजिरा उचल खातो आहे. हबशी खैरत बेहद्द जुलुमावर गेला आहे. त्यास ठिकाणावर आणणं ही मसलत आहे.'' निळोपंत क्षणैक थांबले.

आपल्या जवान पोराचे शिर काढून नेलेल्या खैरतचा काटा मनात रुपत असलेला, 'पालखी' नावाचे गलबत बहाल करून थोरल्या छत्रपतींनी नावाजलेला मायनाक भंडारी एल्गाराचे बोलला, ''ह्ये लई झालं. असं टांगतं किती दिस ऱ्हायचं? आमी, दवलतखान, संबळखान. आंगरं मिळून आरमारी फाट्याच्या एकवटीने जंजिऱ्याला धडका द्यावा म्हनताव.''

''नांदगाव, मुरुड, मांडला अशी पायदळाची फळी करून होड्यांवाटे जंजिऱ्याच्या खाडीतून चाल घ्यायची आम्ही शिकस्त करू.'' मायनाकला दादाजी रघुनाथांनी उचलून धरले. सर्वांनी त्या दोन्ही जाणत्यांना डुया डुलवून, हात उठवून जोड दिली.

छत्रपती काही बोलत नव्हते! त्यांच्या डोळ्यांसमोर उभी होती पन्हाळ्याची सज्जा-कोठी! शेवटच्या भेटीत आबासाहेबांनी काढलेले शब्द त्यांच्या काळजाला तोडत होते– ''जंजिऱ्यावर सिद्दी पाय देऊन आहे याची चिंता बाळगा. मावळा व्हा!''

महाराज काहीच बोलत नाहीत हे ध्यानी आल्याने गोंधळलेले मसलतकरी चिडीचाप झाले. मसलत कुचमली. छत्रपतींचे मौन सोसवेनासे झालेला म्हातारा मायनाक पोटतिडकीच्या धाडसाने म्हणाला, ''धनी, कशागुणं चिंता एवढी? आमी हाय की. इडं द्या आमास्नी. ह्यो सुलतानढवाच बडीवताव दर्यावर.''

त्या मायेने, मनाच्या एका टोकावर जाऊन थडकून आलेल्या छत्रपतींनी एकदा भंडाऱ्याकडे नजर दिली. बैठक सोडत ते खडे झाले. म्हणाले, ''भंडारीकाका, आम्ही ... खुद्द आम्ही भिडणार आहोत जंजिऱ्याच्या हबश्याला!!''

चटका बसावा तशा समोरच्या कैक पगड्या वर उठल्या. सिद्दी संबूळ-मिस्त्रींच्या तोंडून शब्द सुटला– ''इन्शाल्लाऽ!'' खांद्यावरचे कांबळे हातफेरांत कवटाळून बगलेला उभ्या असलेल्या नाईक बहिर्जीचे रामोस मुंडासे अभिमानाने डुलले.

डोळ्यांत रुद्र उतरलेल्या छत्रपतींच्या, स्वत:शीच बोलल्यासारख्या आज्ञा सुटू लागल्या– ''प्रल्हादपंत, अरबी आरमाराचा दोस्ताना घेण्यासाठी नेकीचे हारकारे टाकीनं गड उतरून किनारा गाठतील ते करा. अरबांना त्यांच्यासंगती साजेसे नजराणे द्या. निळोपंत, तुमच्या दिमतीची फौज घेऊन तुम्ही कल्याण प्रांतानं फळी धरणं आहे. येसाजीकाका, गड, पाचाड महाडतर्फेच्या तोफा गोलंदाजांसुद्धा एकजाग करून तुम्ही जातीनं त्या दर्याच्या काटेला लावा.

''आमचा हरएक नेक सारंग आज पाहुणचार घेऊन उद्याच गड उतरेल. आपल्या दिमतीचा आरमार लोक घेऊन, शिड्या, दोरबाज, बंदुकबारदार यांच्या बंदिस्तीनं आमच्या हुकमाची वाट बघत दर्यावर सिद्ध राहील.

''दादाजीप्रभू, तुम्ही विसाजी, अंत्याजीनं सोबतीनं महाडात भवतीची फौजशिबंदी साधून आमची वाट बघाल. निळोपंत, साऱ्यांना विडे-वस्त्रे द्या.'' महाराजांनी हात उठवून बैठक घेतली. मान घेऊन मसलतकरी बाहेर पडले.

छत्रपतींनी थोपवून घेतलेले मायनाक भंडारी, कवी कुलेश, बहिर्जी एवढ्याच आसामी आता उरल्या. ''नाईक, रायगड, जंजिरा, कल्याण या भागात तुमचे शेलके खबरगीर दौडते ठेवा.'' बहिर्जीला आज्ञा मिळाली.

तो आपले जाळे कसे पेरायचे याचा बेत आखत निघून गेला.

''कविजी, तुम्ही शहजादा अकबराला धोंडश्याला खलिता धाडून या मोहिमेत त्यास आमच्या सोबत येण्यास लिहा. यानिमित्ताने त्याचे खरेखोटेपण शाबित होईल. मैदानी कसब पारखता येईल.'' छत्रपतींनी कुलेशांनाही निरोप दिला.

आता सोबतीत मागे राहिलेल्या एकट्या मायनाकाला महाराज हसत म्हणाले, ''चला भंडारीकाका, आपण आज संगतीने थाळा घेऊ!''

मायनाकाच्या सोबतीने महाराज मुदीच्या दालनात आले. छत्रपतींच्या चौरंगीसमोर मांडल्या पाटावर बसायला म्हातारा भंडारी संकोचला. त्याला घरोबा देत महाराज म्हणाले, ''सारंग संकोचू नका. तुम्ही घरचे. पाट घ्या.'' मायनाक अदबीने आपल्या सरकारांसमोर बसला. थाळे आले. चित्राहुती देऊन छत्रपतींनी घास घेतला. मायनाक मात्र पार गोंधळला होता. एकट्या आपणालाच आज धन्यांनी का बगलेला काढावे यांचा पेच काही उकलत नव्हता त्याला.

मायनाकाचा पहिला घास घशाखाली उतरला आणि पाठोपाठ त्याच्या कानांवर बोल पडले, ''भंडारीकाका, तुम्ही दर्याच्या नाळेचे. त्याच्या हर लाटेची लग तुम्हास पारखीची. हबश्याच्या बसकटीची दुबल जागा कोण? जलकोटाला पान मारील त्या खाडीचा बाण, तपसील काय?''

म्हाताऱ्या भंडाऱ्याच्या पांढरमिश्या थरकल्या. आत्ता त्याच्या डुयीत दिवा लागला! पाटावरच सावरून बसत तो म्हणाला, ''जी. कोट लई बंदीचा हाय. भवत्यानं भरीचा तट फिरलाय. खाडीची वाट हीच हबश्याची दुबल जागा हाय. खाडी असेल तीस-चाळीस वाव लांब आन् चौफेरानं आठ एकशे वाव रुंद. खाडी ही दुबल जागा हाय ह्ये हेरून हबश्यांनी आपली तोफांची भांडी खाडीचा म्होरा लावूनच मांडल्यात.''

प्रत्येक घासाबरोबर महाराज भंडाऱ्याला काही विचारीत होते. मायनाक जंजिऱ्याच्या भवतालची जानकारी खडान् खडा समोर ठेवीत होता.

रायगडावर दाटत चालली रात्र एकच पाणस्वप्न बघत होती. जंजिरा! जंजिरा!!

खवळत्या पश्चिम दर्याच्या लाटाच लाटा पाठोपाठीने सरकत जंजिऱ्याच्या खाडीच्या किनाऱ्यावर आदळून, फेसाळत फुटत होत्या. खाडीचा किनारा धरून वीस हजार मावळी लढाऊ लोकांच्या लाटाच लाटा तळ बांधण्यात गढल्या होत्या!

रायगडाहून निघालेले छत्रपती महाडला दादाजी व विसाजी नरसप्रभूंची जोड घेऊन सुधागडावर शहजादा अकबर व दुर्गादास यांचा मेळ जमवून वीस हजारांच्या मातबर फौजेनिशी येऊन जंजिऱ्याला अटीतटीने भिडले होते.

बांधल्या जाणाऱ्या तळाची उठावणी नजरेखाली घालून, येसाजींनी रोखल्या तोफांचे मोर्चे पारखून छत्रपती खाडीच्या तोंडावर आले. त्यांच्या संगती शहजादा अकबर, दुर्गादास, दादोजी व विसाजी, कवी कुलेश, येसाजी अशा असामी होत्या. उद्या पेटणाऱ्या जलयुद्धाचा माग घेत सांजेचा सूर्य दूरवर मावळकोटावर लोंबकळत होता. क्षणभर त्याला निरखलेली छत्रपतींची रुद्रनजर पाणघेरात दूरवर दिसणाऱ्या जंजिऱ्यावर खिळून पडली.

"हा हच तो मुजोर अड्डा आहे. मायनाकांच्या मुलाचे, आमच्या कोंडाजींचे आणि कैकांचे शिर उपटून नेणारा. आमची किनारपट्टीची गोरगरीब रयत होडक्यात घालून पसार करणारा. दूरदेशी हबसाणात त्यांचा गुलाम म्हणून विक्रा मांडणारा. आबासाहेबांची झोप हराम करणारा खारट सल इथंच दबा धरून आहे." केवढेतरी त्यांच्या मनी थडथडत सरकू लागले. छत्रपतींची शोधक नजर खाडीभर सरसर फिरली. काही एक मनी बांधून पक्के झाले. खवळत्या दर्याला आणि डुबत्या सूर्याला, मान देऊन ते तळाकडे परतले.

त्याच वेळी जंजिऱ्याच्या तटावर येऊन सिद्दी खैरात व सिद्दी कासम किनाऱ्यावर रेंगाळणाऱ्या मावळी फौजेचे जाळे विस्फारल्या बुबुळांनी बघत होते. त्यांचे ओघळले, जाड ओठ उठता वर उठत नव्हते! मनोमन पुरती हाय खाल्लेले हबशी वर उसन्या धैर्याने आपल्या माणसांना काही हुकूम फर्मावीत होते.

सांजावले आणि 'उद्या काय' असा सवाल घालीतच हिवाळी अंधाराने मराठी तळ, जंजिरा आणि पश्चिम दर्या आपल्या पोटात घेतला.

फुटत्या पहाटेला सादवीत मराठी नगारे, चौघडे, शहाजणे, शिंगे यांची कल्लोळती झड उसळली. झडते मुजरे आपलेसे करीत दादाजी व विसाजी प्रभू, येसाजी कंक, कुलेश, शहजादा व दुर्गादास अशा शेलक्यांच्या मेळातून महाराज जंजिराखाडीच्या तोंडावर आले. जलकोटाचा मोहरा धरून मांडल्या तोफांच्या गोलंदाजांनी छत्रपतींच्या साक्षीने भांड्यांना मानाचे कोंबडे दिले.

उगवत्या सूर्याची सोनेरी कोर फुटली तसे एक खंबीर, निग्रही राजबोट जंजिऱ्यावर त्रिशूलासारखे रोखले गेले! तळपत्या डोळ्याखालचे थरथरते, संतप्त ओठ आज्ञा देत कडाडले – "सरलष्कर ऽ, द्या भांड्यास बत्ती! लोटा विसक्या दर्याच्या पाठीवर!"

"हर हर म्हाद्येव! जय भवानी!" चा रणगजर तडाडला आणि किनारा दणाणून टाकीत तोफांची पाच भांडी झटका देत फुटली. सव्वाशेरी वजनाचे तोफगोळे जंजिऱ्याच्या तटावर दणाणत आदळले. वीस वीस होडक्यांचे तांडे 'विसक्यांनी' एका मागोमाग एक असे दर्याच्या लाटांवर हिंदकळत पुढे सरसावले. ते पट्टीचे पोहणारे दोरबाज, शिडीबाज, बंदूकबारदार यांनी भरले होते. हुकमाप्रमाणे समुद्रावर कडे करून आलेली मायनाक, दौलतखान, आंग्रे यांची लढाऊ गलबते जंजिरा जवळ करण्यासाठी झेपावली. दिमतीला अरबांची आरमारी फ़ळीही बगला धरून सुटली.

पेटले! एक कुचमलेले पाणभांडण निकराने पेटले. सावध सिद्दयाने याकुतखानाच्या मोगली गलबतांचा समुद्रावर थोपा केला. खाडीतून हबशी खलाशी भरलेली होडकी फेकली. जंजिऱ्यावरच्या तोफांतून सुटलेले गोळे किनाऱ्याजवळ येऊन आदळू लागले. दिवस चढू लागला तशा मराठी तोफा चवताळून आगच आग पाखडू लागल्या. छत्रपती जातीने गोलंदाजांना चेतावणी देत होते. थकले गोलंदाज हटवून तवाने भांड्यांना भिडवीत होते. रानचित्त्यासारखे खाडीच्या तोंडावर भिरभिरत होडक्यांचे तांडे दर्यावर लोटीत होते. जंजिऱ्यावरून येऊन आदळणाऱ्या गोळ्यांनी फेकलेल्या पाण्याच्या झपकाऱ्यात महाराज, शहजादा भिजून चिंब झाले. मध्यान्ह चढली तशा तोफा थांबल्या. तळाला थाळ्याचा हुकूम मिळाला.

मोठ्या उत्सुकतेने छत्रपती खाडीला डोळे लावून उभे होते. पाण्याच्या तळपत्या लाटांवरून काही काळे ठिपके त्यांना हिंदोळत येताना दिसले. ती उलटी झाली होडकी होती. रिकामी! काही मराठी - काही हबशी. पाठोपाठ काही घायाळ झाले. धारकरी पाण्यावर हात मारीत किनाऱ्याला कसेबसे येऊन थडकले.

त्यांच्या अंगावरचा जखमा खाऱ्या पाण्याने चरचरत होत्या. तळावरचा लढाऊ लोक त्यांना खांद्यावरून वाहून उपचारासाठी राहुट्यांत नेत होता. थाळ्याचे भान नसलेले छत्रपती जातीने जखमींची विचारपूस करीत राहुट्यांतून फिरून आले. सिद्दी कडव्या झुंजीला तयार झाला आहे हे त्यांना कळून चुकले.

दिवसभर आताषीचे गाडे, तोफा ठेचून ठेचून रिकामे झाले. पाण्यावर लोटलेली होडकी, काही मध्येच खाडीच्या उदरात गडप झाली. काही या किनाऱ्याला, काही जंजिऱ्याच्या तटाला, पालथी होत भिडली. तोफांनी जंजिऱ्याच्या तटाचे टवके उडवून सिद्याला जरब बसविली. दोन्ही बाजूंचे कित्येक धारकरी पाण्यात गडप झाले.

दिवस मावळला. पुरा मराठी तळ जागा होता. जंजिऱ्यावर हत्यारी हबशी हशम डोळ्यांत तेल घालून, नंग्या तेगी पेलून तटभर फिरत होते. मध्ये असंख्य जीवांचा बळी घेतलेली खाडी लयीवर गर्जत, घुमत होती.

दुसरा, तिसरा, चौथा असे बारा दिवस सतत मराठी तोफांची दणदणती गोळामार जंजिऱ्यावर गरगरत आदळत राहिली. भेदरलेले समुद्रपक्षी खाडीचा परिसर सोडून दूर

गेले. जंजिऱ्याचा तट आता पार उद्ध्वस्त झाला होता. किनारपट्टीवरच्या टोपीकर, फिरंगी वखारींनी तर मुंबई, सुरत, गोवा अशा आपल्या बड्या दरबारांना खलिते धाडले — "सिद्दी खैरतची आता खैर नाही. राजा संभू जंजिरा दर्यात डुबविल्याखेरीज माघारी परतत नाही!"

मराठी तळावर जखमींची संख्या वाढत होती. पाण्यावरून तरंगत आल्या वीर प्रेतांना आगीनडाग दिला जात होता. जंजिरा आता एकाच जबर धडकेचा धनी होता. समुद्रावर मराठी हबशी गलबते चवताळून एकमेकांना आग ओकत झोंबत होती. धोका दिसताच दूर हटत होती. पुन्हा भिडत होती.

पंधरावा दिवस फटफटून उठला. नेहमीसारखे बख्तरधारी छत्रपती शहजाद्यासह शामियान्याबाहेर पडले. आज त्यांची चर्या मात्र वेगळी दिसत होती. स्वतःत डुबल्यासारखी. रात्रभर त्यांचा डोळ्यास डोळा जमला नव्हता. शेलक्यांसह ते खाडीच्या तोंडावर आले. बगलेला उभ्या असलेल्या निवडीच्या मावळी धारकऱ्यांनी त्यांना रिवाजी मुजरा दिला. धन्याची आज्ञा होताच, ते मागचे सर्व मागे टाकून होडक्यांत चढणार होते. त्या सर्वांवर छत्रपतींची जिम्मेदार नजर एकदा फिरली.

"दादाजी, दर्याची ओहट केव्हापासून धरते?" छत्रपतींनी सवाल टाकला. सवाल गोंधळात टाकणारा होता.

"कालपासूनच ओहोटीला सुरुवात झाली महाराज." दादाजी उत्तरले.

"जगदंब!"

भोवतीचे सरदार, ज्याच्याशी झुंज मांडली तो प्रत्यक्ष हबशी, कशाचेच भान नसल्यागत महाराज आता फक्त खाडीलाच निरखू लागले. दोरखंडांनी आवरून धरली होडक्यांची विसकी लाटांवर डुचमळत होती. एक धारदार नजर खाडीच्या पाळामुळांचा माग घेत स्थिरावली होती. त्या मागचे सेनापती मन विचारात गेले होते.

"महाराज, गडी सोडायचा हुकूम व्हावा." येसाजी कंक अदबीने म्हणाले.

"नाही! कंककाका, ही होडक्यांची विसकी पाण्यावरून दूर हटवा. भुईला घ्या ती." कुणालाही न कळणारा हुकूम छत्रपतींच्या तोंडून सुटला.

"जी ऽ!" येसाजी चमकले.

"जल्दी करा. होडकी हटवा!" हुकूम दुबारीने पक्का झाला.

असंख्य हात होड्यांना भिडले. त्या किनाऱ्यावर घेण्यात आल्या. खाडी खुली झाली. लाटाळत गर्जू लागली. सगळी खाडीच पिऊन टाकायला निघाल्यासारखे छत्रपतींचे डोळे आता लखलखीत दिसू लागले! आपल्याच विचारात त्यांनी खाडीचा पुरा काठ धरून एक सरसरता फेर टाकला. फरफटल्यासारखे दादाजी-विसाजी येसाजी आपल्या धन्यामागून धावले. ते पार गोंधळून गेले होते. स्वामी हे असे आकरीत दिसताहेत, करताहेत ते का, कुणालाही काही उमगत नव्हते.

एकाएकी सर्वांनाच चक्रावून टाकतील असे पहाडी, हिंमतवान, हुकमी शंभुबोल साक्षात दर्याच्याही पोटात गोळा उठवीत बाहेर पडले — "ही खाडी भांगा देते तर जंजिरा आता पडतोच आहे! सरलष्कर, दादाजी-विसाजी, तळाचा हरएक धारकरी मेहनतीस जुंपा. दगडगोट, लाकूडगाठी, कापडगोणी जे मिळेल त्याने भरतीपूर्वी ही खाडीच रिचवून टाका!! जंजिरा पाडणेच आहे. आबासाहेबांस त्याविना शांती नाही, आम्हास चैन नाही."

दोघेही एकमेकांना हाडवैऱ्यासारखे निरखीत होते. खाडी काठावरच्या खारट राजमर्दाला आणि काठावरचा पुरुषी दर्या समोरच्या खवळत्या खाडीला! ते ठाशीव स्वामीबोल तापल्या शिसरसासारखे कानांत उतरल्याने भिन्न झालेले शेकडो डोळे समोरच्या खाडीच्या लाटा लाटा पिंजू लागले. छत्रपतींची पुष्ट, ताठर गर्दन एकदम झटका घेत घुमली. मागे पसरल्या हजारो इमानदार डुयांवर, निखारे पाखडत पसरावेत तसे बोल आज्ञा देत उधळले, "बुजवून टाका ही खाडी!!"

पुराणात कधी काळी प्रभू रामचंद्रांचे नाव घेऊन तगड्या सेनापती जांबुवंताने अशीच आज्ञा दिली होती. आपल्या हजारो वानरसेनेला. आज आपल्या आबासाहेबांचे नाव ओठांआड ठेवून अशीच आज्ञा दर्याकाठाला पेटून उठली होती. शंभुओठांतून! हजारो मावळ्यांच्या लाटाच लाटा तो चित्तथरारक हुकूम ऐकून लपापला. कुणीतरी बेभानीने सर्वांचे पाठकणे शहारून उठतील अशी रणआरोळी फोडली, "हर ऽ हर ऽ म्हादेव!" हजारो नरड्यांच्या घाट्यांनी लकलकत ती वरच्यावर उचलली. मांडचोळणे पिंढऱ्यापिंढऱ्यांवर तटतटून आले. बाराबंद्या छाताडांवर कचल्या.

हां हां म्हणता मावळी फौजेने रांगा धरल्या. या देशीच्या मातीच्या पाठीवर आजवर शेकडो यज्ञ झडले-घडले होते. हा एकमात्रच आगळा होता. साक्षात पाणयज्ञ! थोरल्यांनी दर्याच्या छाताडावर जलकोट उठविला होता — सिंधुदुर्ग; धाकल्यांनी दर्या हटविण्याचा पण मांडला! या यज्ञात आहुत्या पडल्याच होत्या — असंख्यात मावळ्यांच्या देहांच्या. समिधा वाहण्यासाठी हजारो हात आता सिद्ध झाले — दगड, विटा, लाकूड, फाटी मिळेल ते खाडीच्या वासल्या जबड्यात लोटण्यासाठी मावळी तुकड्यांनी शिस्त धरली.

'हे असे काही बघा-ऐकायलाही न मिळालेले फक्त दोनच जीव' ताज्जुब करीत, भुवया चढवून ती प्रचंड हालचाल नुसते बघतच राहिले — एक शहजादा अकबर आणि त्याचा नेक सल्लागार दुर्गादास! पंधरावा दिवस मावळला.

आता मात्र रणधीर मावळा खाडीला इरेसरीने भिडला. सतत दहा दिवस शेकडो मण वजनांची चीजवस्तू पाण्यात अखंड कोसळली होती. खाडीचे पाणी आता किनाऱ्याचा बांध फोडून हाताहातांनी चौवाटा पसरू लागले.

एवढे दिवस एकाएकी बंद झालेल्या तोफा बघून मरहट्ट्यांची चाल काय याचा

अंदाज पकडण्यासाठी सिद्दी खैरात व कासम जंजिऱ्याच्या तटावर येऊन किनारा निरखू लागले. त्यांना काहीच उमगेना.

पंचविसावी सांज कलतीला आली आणि सिद्दी खैरातच्या खोपडीत मशाल लागली! "या खुदा ऽ, तो ऽ बा!" इंगळी डसल्यागत तो चित्कारला. कासमच्या निबर कानाशी आपले जाड पडेल ओठ भिडवीत काहीतरी हबशीत कुजबुजला.

त्या रात्री जंजिरा आपल्या हबशी हशमांच्या भरोशावर सोडून, हाय खाल्लेल्या सिद्दी खैरात-कासमनी एका होडीतून चक्क जंजिरा सोडला! दर्यात दूरवर असलेल्या एका खडकाळ टेकडीवर जाऊन ते ठाण झाले.

सव्विसावा दिवस फुटला; पण मावळी तळाला याचा काहीच माग नव्हता. उरफोड करीत हजारो हातांनी; पायांत पकडलेला खाडीचा भुजंग उचलून फेकण्यासाठी शिकस्त केली. पाणी आता शरण येत चालले. खाडी बंगलांनी पसरू लागली! 'फत्ते आणि फत्तेच' तोंडावर दिसू लागली.

दिवस सत्ताविसावा उमटला. आज तर छत्रपती पुरते निग्रही, हट्टीच दिसत होते. अंगावरचा मळका जामा फेकावा तसे आज ते खाडीला पुरते हटविणारच होते. मग कोंडला मर्दांना, हत्यारे पेलत जंजिऱ्यावर थेट सुलतानढवाच बडविणार होता! हा 'सल' निखळणार होता – कायमचा!

हजारो हात दगडगोटे, लाकूडगाठी, गोणी तोलून लयीत दर्यात फेकू लागले. खाडी भांगा देत फाकत चालली. समुद्रवाळूवर आपली भक्कम पावलं रोवून महाराज उभे होते. डावे उजवे अकबर, दुर्गादास, येसाजी खडे होते.

दुपार झाली. छत्रपतींनी हात उभवून राबत्या माणसांना थाळ्याची इशारत दिली. दमली, थकली माणसे मुजरे भरीत थाळ्यांसाठी थांबली.

क्षणभर छत्रपतींनाही वाटले, "आज शहजाद्यांसंगती मनभरा घास घ्यावा, जंजिरा आता पडतोच आहे."

ते शामियान्यात आले. खाशांची मुदीची तबके चौरंगीवर मांडली होती. डुयीचा टोप समाधानाने उतरून छत्रपतींनी तो दस्तानी तबकात ठेवला. तस्तात हात क्षाळून ते अकबरासह मांडल्या चौरंगीवर येऊन बसले. म्हणाले, "शहजादे, तुम्ही आमचे खासे मेहमान! स्वारीशिकारीत असल्याने तुम्हास साजेसा खाना या समयी आम्ही देऊ शकत नाही. नाराज तर नाहीत ना तुम्ही!"

जे समोर चालले होते ते मावळ्यांचे 'दर्याभांडण' बघून पार दडपून गेलेला औरंगपुत्र अकबर पहिल्याने कसनुसे हसला. शेजारी बसलेल्या दुर्गादास राठोडाकडे हेतुपूर्ण बघत म्हणाला, "राजासाब, आप खाते हैं क्या बिलकुल नाचिज है। करते जो हैं वो खास दख्खनी मरहट्टी!"

छत्रपती त्यांवर मनापासून हसले. एकदा समोर दिसणाऱ्या खाडीला आपली

अभिमानी नजर देऊन त्यांनी थाळ्याला चित्राहुती दिली. समाधानाने ओठांआड घेण्यासाठी ते अन्नवस्त कालवू लागले – इतक्यात – इतक्यात खुद्द येसाजी कंकच लगबगीने शामियान्यात शिरले. त्यांची चर्या पार पडेल – मार खाल्लेली दिसत होती. नरड्याची घाटी आवंढा घोटल्यागत हलवीत ते अदब देत घोगरले, "धनी ऽ ऽ, गडावयनं रामचंद्रपंत आल्यात – लई –"

छत्रपतींच्या हातातील घास तबकातच घोटाळला.

"को ऽ ण ? पंत ?"

"जी."

"आत घ्या." महाराजांनी तबक तसेच पुढे सारले. रामचंद्रपंत आत आले. नमस्कारासाठी त्यांनी जोडलेले हात थरथरले. क्षणातच पंतांनी डुयीवरची पगडी उतरून घेतली! चरकलेले छत्रपती झटका बसावा तसे उठले. चिंबले, थरथरले शंभूबोल शामियाना शहारून टाकत कळवळले – "पं ऽ त! काय झालं ?"

खालगर्दनीत उभ्या असलेल्या पंतांच्या डोळ्यांतून हातच्या पगडीवर थेंब टपटपले. तुटक, धरले, छत्रपतींचे काळीजचिरे घोगरे बोल शामियान्यात घुसमटले, "स्वा ऽ मी! माघ वद्य नवमीस ... समर्थांनी ... समर्थांनी सज्जनगडी पूर्णावतार केला!!"

ते ऐकताना शंभुनेत्र गपकन मिटले. समर्थांची सतेज, सात्त्विक रूपेच रूपे त्यांच्यासमोर गरगरली. कानांत, दर्याच्या घरघरीत मिसळून आल्यागत नांदीचे गोसावी बोल घुमू लागले –

"जय जय रघुवी ऽ ऽ र समर्थ!
अखंड सावधान असावें ...
मराठा तितुका मेळवावा – महाराष्ट्र धर्म वाढवावा ...
पाटांतील तुंब निघेना – तरी मग पाणीच चालेना ऽ ऽ
सकळ लोक येक करावे – गनिमा निपटून काढावे!
आहे तितुकें जतन करावें – पुढे आणीक मेळवावे!
शिवराजाचे आठवावे रूप – साक्षेप-प्रताप!
जीवित तृणासमान मानावें – कीर्तिरूपी तरावें!
त्याहून करावें विशेष – तरीच म्हणवावे 'पुरुष'!
याउपरि आता विशेष – काय ल्याहावें ?"

दर्याच्या लाटांच्या तडाख्यांनी मशार मातीचा किनारा सुन्न व्हावा तसे छत्रपतींचे मन सुन्न झाले. त्यातच छत्रपतींच्या कानांवर रामचंद्रपंतांचे चिंतातुर बोल पडले –

"स्वामी ऽ, आम्ही हुकूम घेण्यास आलो आहोत. कल्याण-भिवंडीचा मुलूख हसनअली खानानं मातबर फौजेनिशी घेरला आहे. संगती लोधीखान आहे. आम्ही कोण चालीनं जावं ?"

समर्थांच्या जाण्याच्या दुःखाला डोळ्यांआड ठेवीत छत्रपतींना समर्थ निर्णय घ्यावा लागला. त्याच दिवशी जंजिरा मोहीम दादाजी व विसाजी रघुनाथप्रभूंच्या खांद्यांवर सोपवून तळ सोडताना महाराज त्यांना म्हणाले, "आम्ही नाही असे मानू नका. समयास पडेल ते मोल देऊन जंजिरा कब्ज केल्याची खबर द्यायला या." छत्रपतींनी दोघाही प्रभूंना खांदाभेट दिली. रामचंद्रपंतांना समर्थांची साजेशी समाधी सिद्ध करण्यास सज्जनगडी पाठवून – येसाजी कंकांसंगती छत्रपती गांगोलीचा रोख धरून निघाले. शहजादा अकबर दुर्गादासाला घेऊन शहानपुराकडे कूच झाला. पाठमोऱ्या छत्रपतींना बघताना जंजिरा आणि खाडी या दोघांनीही निःश्वास टाकला!!

गांगोलीचे गावठाण टप्प्यात आले. आगे वर्दी नसता छत्रपती अचानक येताहेत हे ऐकलेला येसूबाईंचा राहता वाडा खडबडून उठला. गांगोलीचे नामजाद सरसुभे महाराजांच्या आगवानीसाठी गाववेशीवर आले. येसाजीकाकांसह धारकऱ्यांच्या मेळाने महाराज गांगोलीत प्रवेशले.

मुजरे घेत गांगोलीच्या वाड्यात पाऊल टाकताच छत्रपतींना 'आऽबाऽ' म्हणत छोटी भवानीबाई बिलगली. तिला भुजेवर घेतलेले महाराज सर्वांशी नुसते सादिलवार बोलत होते. त्यांचे मन कशात तरी गुंतले आहे हे सहजी उमगत होते.

हातापायांवर पाणी घेऊन, वर्दी देऊन महाराज जनानामहालात आले. आत येसूबाई, धाराऊ आणि रूपा होती. महाराजांना बघताच रूपा महालाबाहेर झाली. आता कंबरेत वाकलेली धाराऊ, आधारासाठी कंबरेला हाताची टेकण देत पुढे आली. महाराजांनी तिची पायधूळ कपाळी घेता घेता विचारले, "कशी तब्येत आऊ?"

"किती रोजानं मुखोटा दिसला ल्येकरा! रोज दर्याकडची गोष्ट कानावं पडायची. काळजाचा ठाव उडायचा." म्हातारीने आपली खुशाली न सांगताच खुबीने राजांची चिंता बोलून दाखविली. तिच्या थकल्या खांद्यावर हाततळवा ठेवून छत्रपतींनी काही न बोलताच तो हळुवार थोपटला. समोर उभ्या असलेल्या येसूबाईंकडे नजर देत महाराज म्हणाले, "खबर कळली का? ..."

"जी. हसनखान तळकोकणाला ठाण झालाय. पुरंदरतर्फेला शहजादा आज्जम भिडला आहे. पण स्वारी अशी अचानक ..."

"येसू... येसू–, सज्जनगडी समर्थांनी ह्यातीचा रामदासबोध ग्रंथ पुरा केला! कालच्या माघ वद्य नवमीस ..."

"काऽय!" क्षणभर येसूबाईंची मान चमकून वर उठली. समोरची दुखरी चर्या बघताच अपार वेदनेने पुन्हा खाली गेली. ते ऐकताना 'देवा रं खंडुबा' म्हणत म्हाताऱ्या धाराऊने कपाळाला बोटे लावली आणि ती तशीच बाहेर पडली.

पाठीशी हात गुंफून संथ फेर टाकणारे छत्रपती आणि सुन्न उभ्या असलेल्या येसूबाई

असेच काही क्षण कुचमले. मग निर्धारपूर्वक छत्रपती म्हणाले, "आमचं एक मागणं आहे तुम्हाकडं. तुमच्याखेरीज ते कुणीच पुरतं करणारं नाही."

"जी मागणं काय म्हणावं? असेल ते सांगावं. करू आम्ही."

"थोरल्या मासाहेब गेल्यापासून समर्थांचा बोध पाचाडच्या देवमहालात नुसताच पूजला जातो आहे. गंध-फुलं वाहून, बासनात बांधून देवघरात ठेवला जातो आहे. येसू, तुम्ही तो आता मुहूर्त पाहून, पूजनासह बाहेर घ्या. जशा थोरल्या आऊसाहेब करीत तसं त्याचं रोजाना रायगडी पठण करून घ्या. कराल एवढं?"

"जी. जेव्हा शृंगारपुराहून पाचाडी आम्ही आलो तेव्हा थोरल्या आऊंच्या बैठकीचं दर्शन घेतानाच हे आम्हाला वाटलं होतं. वाटलं होतं पदराची झोळी करून त्यात ही त्यांची आठवण जपून घ्यावी आणि मगच गड चढावा. पण आम्ही मन रोखलं... आजवर."

"का?" चकित झालेले छत्रपती बोलून गेले.

"तेव्हा आऊंच्या देवमहालातून आम्ही बोध बाहेर घेतला असता तर... तर आमचा भाव न पारखता गडावर आवई उठायला वेळ लागला नसता की – 'नातसून आपला हक्क आडून शाबीत करते आहे!'"

त्या एवढ्या खोलीच्या बोलाने भारलेले छत्रपती येसूबाईंच्या जवळ आले. त्यांच्या हनुवटीखाली तर्जनीची आकडी धरून ती उठवीत म्हणाले, "आबासाहेबांनी तुम्हाला शिक्केकट्यार दिली. श्री सखी अशी मुद्रा आम्ही तुम्हास भरल्या दरबारी अभिषेकसमयी दिली, थोरल्या आऊ तुम्हास हा बोध देऊन गेल्या आहेत. हे सारं सांभाळण्याचं बळ जगदंबेनं तुम्हाला द्यावं."

येसूबाईंची पापणी ते ऐकताना उठता वर उठत नव्हती.

दोन दिवस गांगोलीला मुक्काम ठेवून येसूबाईंची सर्व व्यवस्था जातीनिशी नजरेखाली घालून महाराजांनी कबिल्याचा निरोप घेतला. याच वेळी हंबीरराव पन्हाळा भागात पंधरा हजार घोडा व पाच हजारांच्या पावलोकांच्या बळावर शहाजादा अज्जमच्या तळावर चालून गेले. फिरोजखान, किलीचखान, हसनअली, अनुपसिंग व अनिरुद्ध हाडा यांच्याशी त्यांची तुंबळ झुंबड पडली. किलीचखान बंदुकीच्या बाराने जाया झाला.

रायगडाच्या खासेवाड्याच्या सदरीबैठकीत छत्रपती कारभारी-तपशील घेत होते.

"कब्ज केल्या अंजदीव बेटावर कोट बांधण्याकामी पुढील हुकूम व्हावा स्वामी." पेशवे निळोपंतांनी तातडीचे काम पुढे घेतले.

"पेशवे, अर्जोजी यादवांना म्हणावं, बेटावरच्या कोटाचा बांधकाम तपशील सिद्ध करून आम्हास दाखवा. कोटघडाईला लागणारा चुना, विटा, शिसे यांचा वारदाना हरयत्ने पैदा करून पावता करण्यास कारवारच्या सुभेदारास लिहा. दर्यावर देख ठेवणारे

जलकोट केवढ्या भक्कमीचे पाहिजेत याचा मासला आबासाहेबांनी सिंधुदुर्ग उठवून ठेवलेला आहे. आणि ... "

"हुकूम व्हावा महाराज." पेशवे लवले.

"आणि जंजिऱ्यावर नुकतेच आम्ही पारखले आहे, जलकोट दर्याला कशी पालाण घालतो. त्यासाठीच एलफंटा बेटावरचा कोट पुढे चढविण्यासाठी अरब सारंगांशी जमेल तेवढा दोस्ताना ठेवणे आहे. हे लक्षात घ्या."

"रामनगर प्रांताचा एक खोडा फिरंगी दरबारानं उभा केला आहे स्वामी. आपण प्रांत कब्ज केला पण तिथल्या नायक राण्याला देत होता तशी चौथाई, आपल्या दौलतीला द्यायला फिरंगी राजी नाही." खंडोजींनी दफ्तरी अडचण पेश केली.

"मतलब ?"

"स्वामी फिरंगी दरबारचा खलिता आहे की, रामनगर तर्फेचे तुम्ही पुरते मालक व्हा. मगच मागणी घाला चौथाईची !"

ते ऐकताना महाराज बैठकीवरून उठलेच. त्यांच्या तोंडून जळजळीत बोल फुटले, "या फिरंग्यास एकदा दावावेच लागणार चिटणीस की, मुलूख आमचा आहे. त्याची चौथाई तर नकोच पण त्याची बसकणही नको या मुलुखात ! चौल भागात तो शिद्द्याला पाठीशी घालतो, त्यास कोट बांधण्यास मुभा देतो. खुद्द आड राहून जुना गनीम थेट आमच्या उरावर आणतो. चौलच्या सुभेदार बहिरो त्रिमलांकडे माणसं पाठवून हबश्याच्या उठत्या कोटावर बारीक नजर ठेवण्याची समज द्या."

"मुंबईच्या टोपीकरांनी आपल्या मागणीवर हत्यारे आणि दारूगोळा पावता केला आहे महाराज." त्या दरबारच्या वकील प्रल्हाद निराजींनी आपला करिना ठेवला.

"ठीक. प्रल्हादपंत, टोपीकर काय, हबशी-फिरंगी काय, नाक दाबल्याविना तोंड खोलणारे नव्हत. आतल्या अंगाने ते एकमेकांस हातजोड देतात. आम्ही भिडलो की नाक मुठीत धरून ' आम्ही तुमचेच ' म्हणून वायले होतात!" महाराजांच्या मनात काय चालले असेल याचा मारा जमल्या मंत्रिगणांना येऊन चुकला.

"लोधीखानासह हसनअली तळकोकणातून नाशिककडे सरकला स्वामी. तुकोजी पालकर आणि रूपाजी भोसले यांच्या शिबंद्यांनी चांदवडच्या खिंडीत त्यांच्या गाफील फौजेवर छाने घातले. खासा हसनखान जखमी झाला. बुंदेला रजपूत, महासिंह, जाधवराव असे खानाच्या दिमतीने बाकेही जाया झाले. लोधीखानाचा मुलगा मोहम्मद कामी आला." निळोपंतांनी उमेदीची खबर दिली.

"पंत, तुकोजी, रूपाजींना असतील तेथे मानाची वस्त्रे पोच करा. निरोप द्या – याहून मर्दानगीची उमेद आम्ही तुम्हा उभयतांकडून धरली आहे." महाराजांनी समाधानाने बैठक घेतली.

"कऱ्हाडहून वऱ्हाडात गेल्या हंबीररावांनी अकोला, कारंजा पटात घेतले आहे

सरकार. मलकापूर भागात खंडणी वसुलीची सुगी पिकली आहे. त्याने चिडल्या रहुल्लाखानाशी त्यांच्या हल्यावारी चकमकी झडताहेत. नांदेड भागात इरजखाँ आणि अब्दुलबेग यांच्याशी सरलष्करांची हातघाई झाली. हूल देत सरलष्कर वऱ्हाडभर धुमाकूळ घालताहेत." निळोपंतांनी हंबीररावांची रणगाजी महाराजांच्या कानी घातली. ऐकताना छत्रपतींच्या मनात उमेद उभरून आली. वऱ्हाडालगत बऱ्हाणपूरला तळ ठेवून बसल्या औरंगची मनात दाटून आलेली चिंता तोडत महाराज पेशव्यांना म्हणाले, "पंत, दोन दिवसांत आम्ही गड उतरणार आहोत, गांगोलीकडं कूच होण्यासाठी. तिकडील देशाधिकाऱ्याला तोफांची भांडी सिद्ध ठेवण्यास लिहा. आमचा जाण्याचा इंतजाम ठेवा. या." हात उठवून महाराजांनी बैठक तोडली.

बरोबर आणल्या येसाजी कंकांना जंजिऱ्याच्या मोहिमेला कुमक करण्यासाठी तिकडे जाण्याचा निरोप देऊन दोन दिवसांनी त्यांनी रायगड सोडला. महाराज गांगोलीकडे पुन्हा का चाललेत कुणालाच कळले नाही.

याच वेळी बऱ्हाणपुरातील आपल्या शाही वाड्यात बोलवून घेतलेल्या, वऱ्हाडवर नामजाद सरदार इरजखानाला पटावर घेत, हातची तसबीहची माळ नाराजीनं उडवीत औरंगजेब त्याची शाही खरड करताना म्हणत होता– "मुगलाईमें मरहट्टे दिनदहाडे पेशकश उसूल लेते हैं। तुम खिल्लते पेहनकर खाली मार खाते हो! कैसा करते हो बंदोबस्त ? लईम कही के!"

"धडाड् धुम्म ऽऽ!" गांगोलीच्या वेशीबाहेरच्या माळरानावर पावणेचार मण वजनांचे गोळे फेकताना, गाड्यावर जखडलेल्या चार तोफा झटका घेत मागे हटू बघत होत्या. जखडलेले भक्कम साखळबंद त्यांना रोखून धरत होते.

गांगोलीत आलेल्या छत्रपतींनी कुडाळ आणि डिचोलीच्या कारखान्यांतून आताषी दारूचे नमुने मागवून घेतले होते. ते कसे काम देतात याचा सरतपास महाराज जातीने बघत होते. नमुने मनाजोगते झालेले बघून संतुष्ट झालेले महाराज गांगोलीच्या सरसुभ्यांना म्हणाले, "कौल जगदंबेचा. सरसुभे, समाधान आहे आम्हास की, मुलखात आताषी बनविण्याचे आबासाहेबांचे स्वप्न आम्ही पुरे करू शकलो. आता या तोफा गांगोलीतच ठेवा – कबिला आहे आमचा इथं."

"जी." सरसुभ्यासह महाराज गांगोलीच्या वाड्यात आले. चिटणीसांकरवी त्यांनी कुडाळ, डिचोलीला, "आम्ही कारखाने नजरेखाली घालण्यास येत आहोत." अशी पत्रे पाठविली. सदरी काम उरकून दुसऱ्याच दिवशी त्यांनी येसूबाई धाराऊंचा निरोप घेऊन कुडाळचा मोहरा धरला.

मणावारी आताषी दारू बनविणारे कारखाने बघून, तिथल्या दळवी, सावंत, सुभेदार अशा कसबी कारागिरांची नावनिशी वाजपूस करून, छत्रपती कुडाळ-डिचोलीहून कोयना

घाटीने साताऱ्यावर उतरले. संगती पाच हजार घोडा-लोक होता. तो साताऱ्यातच ठेवून जोत्याजी केसरकर, रायाजी अंतोजी आणि कुडाळहून मिळालेले कवी कुलेश अशा निवडक असामींसह महाराज सज्जनगडाच्या पायऱ्या चढू लागले.

पायरीपायरीला त्यांच्या मनात आठवणींचे पान पसू लागले. " 'सज्जनगडी समर्थांच्या सेवेत दाखल व्हा.' असे लिहिणारे महाराजसाहेब. शेवटच्या घटकेला, समर्थांचा बोध ऐकावा वाटतो म्हणणाऱ्या थोरल्या आऊ, 'याहून विशेष ते करावे' असे आम्हास तळमळून लिहिणारे समर्थ! धर्मकारणातून राजकारण सांधू बघणारे समर्थ. राजकरणातून धर्मकारण घडवू बघणारे आबासाहेब, दोन्ही कारणांतून उभ्या मराठी दौलतीचं, सुखदुःखाला बांधलेलं एकच घरकुल नांदतं करणाऱ्या थोरल्या आऊ! मरणावर मांड जमविणारी केवढ्या कुवतीची ही माणसं!"

समर्थांची समाधी बांधून त्यावर चंदनी ओट्यात समर्थ-पादुका जडविण्याचे काम केलेले रामचंद्रपंत सामोरे आले. कल्याणस्वामी, दिवाकर गोसावी, रामचंद्रपंत यांच्या सोबतीने महाराजांनी गडावरच्या समर्थ समाधीचे दर्शन घेतले. समाधीच्या पादुकांना माथा भिडवला. मठाच्या अडी-नडी ऐकून घेतल्या. कल्याणस्वामींनी दिला तीर्थप्रसाद ओठाआड करून महाराज सज्जनगड उतरले. कवी कुलेशांना कोकणात जाण्यासाठी निरोप देऊन रायगडाच्या वाटेला लागले.

गडावर येताच मोरेश्वर पंडितरावांना याद घेऊन त्यांनी आज्ञा केली, "पंडितराव, सज्जनगडी समर्थांच्या रावळाची व्यवस्था दरोबस्त होईल ते करा. चाफळ मठाच्या रामनवमीच्या यात्रेस वस्त्र, धान्य, गल्ला यांची सालिनाची मोईन करून द्या."

"स्वा ऽ मी ऽ" आत आल्या निळोपंतांनी खाशांची तंद्रा मोडली.

"बोला पेशवे."

"अलाहाबादहून उत्तरेकडची कुणी असामी आली आहे. गंगाराम म्हणून. खाशांची भेट मागते आहे."

महाराज काही बोलणार एवढ्यात पहाऱ्याने वर्दी आणली, "जासुदांचं नाईक आल्यात." महाराजांनी मानेनेच तिला होकार दिला. मोगली हशमाचा वेश पेहनलेला बहिर्जी जुहार देत आत आला.

"बादशा औरंगाबादच्या ठाण्यावर उतारला धनी!! कालच्या नवमीला. कुतुब आन् इदलशाहीचं मातबर सर्दार त्येला भेटून ग्येलं. विजापूरच्या बाळ बादशाला त्येनं नऊ लाखाचा गल्ला पाठविलाय – फौजांची गाठ बांधाय. विज्यापूरचा शेनापती सर्जाखान दिकुन औरंगाबादला येऊन ग्येला."

बसल्या महाराजांचा पाठकणा ताठ झाला. बैठकीवरून उठत हात पाठीशी बांधून ते फेर घेऊ लागले. खबर देऊन आला बहिर्जी बाहेर पडला.

कानी पडल्या वार्तेने चिंताचूर झालेले निळोपंत 'येतो स्वामी' म्हणत लवून जायला निघाले.

"निळोपंत, कोण असामी भेटीस आली म्हटलंत? पेश घ्या."

गंगारामने नजराणा म्हणून आणलेली सरपोसबंद, सुवर्ण होनांची तबके प्रथम आली. नंतर भेटीला आलेल्या हिंदोस्तानी सरदार गंगारामला पंतांनी आत आणले.

गंगाराम क्षणैक भारल्यागत समोरचे राजबिंडे सुरूपण बघत राहिला. लागलीच स्वतःला सावरीत दोन्ही हात जोडून म्हणाला, "जय सियाराम की महा नरेश." महाराजांनी रिवाजासाठी हात जोडले.

"बोलो." महाराजांनी मूळ धरले.

"कुछ मनसुबा लिये आया हूँ महाराज। पहले उत्तरमें बहादूरखानके फौजमें था। तंग आ गया हूँ। कैसा अनाचार, मंदिर, ग्रामोंका विध्वंस! औरतोंका कुत्तेहाल!"

"मनसुबा बोलो." महाराज सावध झाले.

"बादशहा दख्खनमें उतरा है। निश्चय है उत्तरमें बंगाल-बिहारके मुल्कमें बगावत करने का। जान की कीमतपर।"

महाराज विचारात गेले. कुणी सांगावे उत्तरेत रजपूत, जाट आणि गंगारामसारख्या अनेक असंतुष्टांनी उठाव केला तर उत्तरी राखण्यासाठी दक्षिणेतून औरंग उठेलही.

"कुलदेवता कौन तुम्हारा?" महाराजांच्या तेजवंत, रोखल्या डोळ्यांतले भाव गंगारामला उमगलेच नाहीत. त्या डोळ्यांत तो खेचल्यासारखा झाला.

"जी. वाराणसीके काशीविश्वेश्वर शिवजी।"

"पंत, स्फटिक घ्या." ध्यानीमनी नसलेली आज्ञा एकदम निळोपंतांना मिळाली. ते देवमहालाकडे निघून गेले आणि थोड्याच वेळात एक सुवर्ण तबक घेऊन परत आत आले. पुढे होत महाराजांनी ते तबक आपल्या हाती घेतले. गंगारामसमोर येत ते तबक उठवून, डोळे गंगारामच्या डोळ्यांत रोवूनच टाकीत महाराज खणखणीत भोसलाई बोलीत म्हणाले, "इसपर हाथ रखके कसम उठाव ईमानकी।"

गंगारामने एकदा तबकाकडे बघितले. झटकन आपला उजवा हात तबकात ठेवून एक बिल्वदल उचलून कपाळाला भिडवीत तो इतबार देत बोलला – "जान के साथ हाथ टूटेगा – ईमान नहीं।"

महाराजांची नजर, उत्तरी वेष धारण केल्या गंगारामच्या तगड्या देहभर सरसर फिरली. मनोमन कसलातरी माग घेऊन गेली. "हमारे बडे महाराजका दैवत है ये।" हातचे तबक किंचित वर घेताना बांधून टाकणारे बोल त्यांच्या तोंडून शांतपणे निघाले.

"परम भाग्य!" आता तर गंगाराम तबकातल्या झळाळ शिवलिंगाकडेच बघू लागला. ते थोरल्या महाराजांचे नित्य पूजेचे स्फटिक शिवलिंग होते!

हातचे तबक निळोपंतांकडे देत महाराज गंगारामला म्हणाले, "ठीक है। हम फैसला देंगे।" त्यांनी निरोपाचा हात उठविला.

गंगाराम-निळोपंत रिवाज देऊन जायला निघाले.

"पेशवे, यांना दोन दिवस गडावर ठेवून घ्या. सारी व्यवस्था नीट ठेवा यांची 'जातीनं.'" महाराजांनी 'जातीनं' या शब्दावर दिलेला जोर निळोपंतांनी हेरला!

प्रल्हादपंतांशी खल केलेले निळोपंत निर्धाराने महाराजांच्या भेटीस आले. मानेवर केसावळ रुळती पडलेल्या, छातीशी भुजा बांधलेल्या, पाठमोऱ्या छत्रपतींना पेशव्यांनी मुजरा भरला.

"कर्नाटकातून हरजीराजांचा सांडणीस्वार आला आहे खलिता घेऊन स्वामी." निळोपंत म्हणाले.

"मोठ्या शर्थीचं राजकारण केलं हरजीराजांनी कर्नाटकात. म्हैसूरच्या सरलष्कर कुमारय्यानं मदुरेचा नायक चोक्कनायक याच्या राजधानीवर– त्रिचेनापल्लीवर जोरावारीचा हमला केला. तिथल्या कोटाला घेर टाकला. भेदरून चोक्कानाथानं हरजीराजांची आणि जिंजीच्या काकासाहेबांची मदत मागितली. हरजींनी जहाली करून जैतजी काटकर आणि दादाजी काकडे यांच्या मेळानं त्रिचेनापल्ली गाठली. म्हैसूरच्या कुमारय्याला तर दस्त केलाच पण मदुरेचाही मारता येईल तेवढा मुलूख मारला."

महाराज संथ वळले. जागरणाने, अखंड विचाराने त्यांची चर्या ओढलेली स्पष्ट दिसून येत होती. धीमी पावले टाकीत ते निळोपंतांजवळ आले. "पंत, राजांना संतोषाचा खलिता द्या. तुम्ही आमच्या संगती चला." म्हणत त्यांनी पहाऱ्याला नजर दिली. तिचा मतलब पकडत पहारेकरी आत आला. आतल्या दालनात जाऊन त्याने टोपाचे तबक आणून, झुकते होत महाराजांसमोर धरले. महाराजांनी टोप मस्तकी घेतला. खासेवाड्याच्या सदरेवर ते आले. पायऱ्या उतरून आघाडी मनोऱ्याच्या रोखाने चालू लागले. पाठी निळोपंत होते. मराठी फौजफळ्यांच्या वऱ्हाडातील हालचाली महाराजांच्या कानी घालत ते म्हणाले, "नागोजी बल्लाळांनी बारा हजारांच्या दिमतीनं बेदरला घेरा घातला तिथं मुकर्रमखानाशी त्याची हातघाई झाली. त्याला हूल देऊन नागोजी मेहेकर, सोलापूरची ठाणी मारून त्या भागात फिरते आहेत."

"हंबीरमामांची कोण खबर आहे?" महाराजांनी विचारले.

"जी. किल्ले कासमजवळच त्यांची आणि इरजखानाची चकमक झडली. इरजखानाच्या कुमकेला मुकर्रमखान आला तसं बगल देत सरलष्कर थेट अकोल्यापावेतो भिडलेत वऱ्हाडात."

"जगदंब!" महाराज मनोऱ्याच्या मावळतीवरून पाचाडात दिसणाऱ्या थोरल्या आऊंच्या वाड्याकडे एकटक बघत होते. तिथली रिवाजाची घंटा ठणठणत होती.

संध्याकाळी ठरल्याप्रमाणे निळोपंत, गंगाराम हिंदोस्थानीला घेऊन महाराजांसमोर सिंहासनसदरेला रुजू झाले. दुहाती मुजुमदार खंडेराव पानसंबळ आणि सुरनीस रामचंद्र नीलकंठ उभे होते. चिटणिसी बैठकीवर खंडोजी बाळाजी बसले होते.

गंगाराम विस्फारल्या डोळ्यांनी सिंहासन बघत आत आला. त्याने रिवाज दिला. महाराज सदरी बैठकीवरून उठून उभे राहिले– "मुजूमदार, हिंदोस्थानीस मरातबाची वस्त्रे द्या." त्यांनी खंडेरावांकडे बघितले. खंडेरावांच्या शेजारी उभा असलेला तबकधारी पुढे झाला. महाराजांनी तबकाला हात लावला. गंगारामने त्या तबकाला हात लावून ते स्वीकारते केले. दरबार नसल्यामुळे सिंहासन रिकामे होते. गर्दन उठवून एकदा ते निरखीत महाराज गंगारामला बोलले, "चुना दस हजार हशम दे रहे हैं हम तुम्हारे दिमतमें हिंदोस्थानी। मुल्क पराया है। हशमोंकी हिफाजत रखना। जगदंब, फत्ते रखेगी।" हात उठवून महाराजांनी बैठक घेतली.

"जै सियाराम की, क्रीपा महाराज." चमकत्या डोळ्यांचा गंगाराम कमरेच्या तेगीच्या मुठीवर हात भरत कमरेत झुकला. तसाच हटत्या कदमांनी मागे गेला.

महाराजांनी उत्तरेत उठाव करायला त्याला सैन्यबळ द्यायचा निर्णय घेतला होता.

"खंडोजी, उत्तरेत मथुरेच्या त्रिमलांना, अंबरला राजा रामसिंगांना गंगारामची जोड करण्याची पत्रं सिद्ध करून पाठवा."

"दादाजी आलेत." गंगारामला निरोप देऊन आल्या निळोपंतांनी दादाजींचा नाजूक मुद्दा समोर ठेवला.

"पेश घ्या." आज्ञा मिळाली.

तगड्या छातीचे, धिप्पाड दादाजी रघुनाथ मुजरा देत आत आले.

"बोला दादाजी, जंजिऱ्याच्या घेराचा करिना का कुचमला आहे?"

"जी. आम्हाकडून काही कुचराई झाली नाही – होणार नाही." दादाजी निर्धारी दिसत होते.

"मग का पडत नाही जलकोट? चार महिने झाले घेर पडून." बसले महाराज जरबी होत खडेच झाले.

"जी. सरकारकून म्हणावी तशी जोड देत नाहीत आम्हास."

"मतलब?"

"कवी कुलेशांनी, मोहीम फत्ते झाली तर स्वामींना शिफारस करून आम्हास सुरनिशी बक्ष करण्याचं वचन दिलं होतं. मोहिमेत फत्ते झाली तर याहून मरातब करतील स्वामी याचा भरोसा आहे आम्हास. पण ही मोहीम त्यासाठी नाही लावली जोराला आम्ही महाराज." दादाजी शांत होते.

"तुम्ही गैरहिशेबी राजापूरवाडीवर का गेलात चालून? खजिन्याची हकनाक उधळण कोण मनसुब्यानं केलीत?" छत्रपतींची जबान करडी झाली.

"महाराऽज..." दादाजी अडखळले.

"जाणता याचा नतिजा? सरकारकुनांचे रोजाना खलिते येताहेत तुमच्या उधळणीचे. बोला, काय सफाई आहे तुम्हाकडं?"

"महाराज ... कसं बोलावं – पण आम्ही चार चाकर म्हंजे आपली सावली. सफाई म्हणून नव्हे सल म्हणून पेश ठेवू. पण फक्त आपल्यासमोर – एकांती." दादाजींनी महाराजांभोवती उभ्या असलेल्या मातब्बरांवर नजर फिरविली. त्यांची चर्या काळवंडली.

हात उठवून छत्रपतींनी खंडोजी, खंडेराव, रामचंद्रपंत, निळोपंत यांना इशारत दिली. सिंहासनसदर एकांती झाली. "बोला" म्हणून महाराज विचारमग्न झाले.

"काय बोलावं स्वामी ? हबश्यांनी आमच्यावर डूक धरून आमचा आपटा गाव दिवसा-ढवळ्या लुटला. शरम वाटते ... आम्ही मोहिमेत गुंतलेले हेरून हरामखोरांनी काळजाचा लचकाच तोडलाय आमच्या." दादाजींनी आपला भरीचा मुखडा एकाएकी ओंजळीत लपता घेतला तसे महाराज चरकले.

"दादा ऽ जी, सुमार व्हा. साफ सांगा – काय झालं ? "

"स्वा ऽ मी, आमच्याच घरची अस्तुरी उचलून नेली हरामजाद्यांनी !! त्या चिडीपायीच घालून घेतलं आम्ही वाडीवर. एक डाव नव्हे – अनेकवार. कधी तरी गाठ पडेल त्याची, हिशोब पावता करता येईल म्हणून. आगळ झालीय खरी स्वामी. या सिंहासनचौकातच गर्दन मारावी आमची. आपल्याच हातानं !" संताप, शोक, असहायता अशा विचित्र भावनांनी दादाजींचा उभा देह थरथरू लागला.

चमत्कारिक नजरेने महाराज दादाजींकडे नुसते बघतच राहिले. त्यांना दादाजी दिसेनासेच झाले. त्यांच्या जागी दिसू लागले खुद्द स्वतः श्रीमन्महाराज संभाजीराजे ! भवतीचा उभा सिंहासनचौक पोटतिडिकीने आक्रोशू लागला – "दुर्गा ऽ, दुर्गा ऽ !"

बाळंभट्ट, अनंतभट्ट, मोरेश्वर पंडितराव यांच्या देखरेखीखाली रायगडावर कै. आबासाहेबांचे दुसरे वर्षश्राद्ध विधिपूर्वक पार पाडले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी महाराज रायगड उतरून पाचाडात आले. पाचाडपागेचा दहा हजार घोडा शिस्त धरून मैदानावर उभा होता. निवडीचे घोडाईत त्यांचे कायदे पेलून खडे होते. संताजी जगताप, जानराव जानोजी, हिंमतराव अशा बोलावून घेतल्या बाक्या सरदारांच्या मेळाने छत्रपतींनी कुमावत घोड्यावर मांड घेतली. इशारतीचा हात उठविला. शहाजणांच्या, रणहलग्यांच्या कडकडाटात घोडदळाचे भिरे टापांवर पडले.

वरंद घाट पार करून पुण्याला पहिला मुक्काम पडला. पुण्याचे सरसुभे दामाजी रघुनाथ छत्रपतींच्या भेटीस आले. त्यांच्याकडून पुरंधर-सासवडची खबर उचलून कोरेगाव, श्रीगोंदे, अष्टी, पाथर्डी मार्गे महाराज तीन दिवसांतच जालन्याच्या वेशीवर ठाकले ! जालना-औरंगाबादेच्या ऐन मोगली ठाण्यापासून पन्नास कोसांवरचे गावठाण. इथे नासिक-बागलाणातून उतरलेले रूपाजी भोसले आणि नागोजी गोरे मराठी फौजेला मिळाले. जालन्याला दौडत्या टापांचा घेर पडला. भेदरलेले जालनेकर निवाऱ्यासाठी खान जान महमद या दरवेश्याच्या मशिदीत घुसले. महमदाने मशिद बंद करून घेतली. जालना लुटीवर पडला.

घोडा फेकत आलेले रूपाजी, वेशीवरच्या महाराजांसमोर कायदे आखडीत रुकले. फव्वारीच्या मावळीत म्हणाले – "रयतावा, जात-हशम सम्दं मसुदीत घुसल्यात. फकीर दरवाजा खोलीत न्हाई. धनी, काय करावं ?"

"त्यास समज द्या. धर्माच्या स्थानास धका लावायची इच्छा नाही आमची. पाठीशी घातली माणसं गुमान बाहेर खुली करावी त्यानं." रूपाजींनी तसाच घोडा फेकत खान महमद दरवेश्याला आरडून ओरडून समज दिली. आतून काहीच प्रतिसाद येत नव्हता. ते कानावर पडताच महाराज संतापून कडाडले – "फकीर असून राजकारण खेळतो ! त्यास धडा दावा. दार उघडून बाहेर खेचा गनिम ! फकिरास-स्थानास इजा-धका बसता कामा नये."

मावळी फळ्यांनी खान-महमदाच्या बगलेत घुसलेली जालनेकर मंडळी अल्लाद बाहेर काढली, काढणीबंद करून वेशीवरच्या साहेबस्वारीसमोर जथ्याने नेण्याच्या कामाला मावळी धारकरी लागले. इतक्यात ... शिंगाड्यांची धोक्याची चाल देणारी इशारत झडू लागली. एकदा शाही हजामत झालेला इरजखान – जालन्याची कुमक करायला येत असल्याची खबर आली होती. दस्त असामी तशाच टाकून मराठे आले तसे म्हणता-म्हणता उडाले !

औरंगाबादेतल्या शाही वाड्यातील दरबारात याच वेळी आलमगीर नासिकहून बोलावून घेतल्या हसनअलीखानाच्या खांद्यावर हिरवीकंच खिल्लत टाकत त्याला म्हणाला, "उन्नीस हजार इशम दिये हैं अब तुम्हारी दीमतमें। देखना है तुम्हारा करिश्मा !"

रूपाजी मानाजी बागलाणकडे सरकले. महाराज रायगडावर परतले. जालन्याच्या चपेटीने औरंगजेब पार खवळून उठला होता. आपले हात सर्वांत प्रथम मराठी मुलखात पसरायचे हे तर त्याने दक्षिणेत उतरतानाच मनोमन ठाणून टाकले होते. औरंगाबादेचा जाबता नीट बसताच त्याच्या जहाल कारवाईला तोंड फुटले. औरंगाबादेत भरल्या बड्या दरबारात अलमगिराचा वजीर असदखानाने, आलमपन्हांची इच्छा दरबारला जाहीर केली – "आका अली खान शहाबुद्दीनको खास मोहीमपर नामजाद करते हैं। खान, हरहिम्मत तरकीबसे जमींदोस्त करना है मरहट्टोंका किले रामसेज।"

"खै ऽ र आलमपन्हा." म्हणून कमरेत झुकून बादशहाला तसलीम देत शाबदीखानाने नामजादी पत्करली.

वीस हजारांची फौज, निवडीचा पठाण-तुर्क हशम, तोफखान्याचे गाडे पाठीशी ठेवून, औरंगाबादेच्या मशिदीत तीन वेळा नमाज पढून दलपत बुंदेल्याला बरोबर घेऊन खान निघाला – किल्ले रामसेजवर !

जुंपले ! ज्याची अटकळ केवळ महाराजांनीच नव्हे तर त्यांच्या लहान-थोर सरदार साथीदारांनी केव्हाच बांधली होती ते कडवे भांडण जुंपले.

रायगडावर या वेळी नको त्या दोन वार्ता येऊन थडकल्या होत्या. अंजदीव बेटावर जलकोट उठविण्यासाठी उतरलेल्या मराठ्यांवर फिरंग्यांचा कॅप्टन पेरा अचानक चालून आला होता. तोफांचा भडिमार करून त्याने मराठ्यांना बेटावरून हुसकून लावले होते, आणि एक मंदिर धूळदोस्त करून त्यावर उंच उंच चौकोनी कळसाचे चर्च उभे केले होते.

तसाच राजांचा खेडचा जमीनदार चिमणाजी, मतलबी हेतूने मुगलांना मिळाला होता आणि हणमंतगडाचा दस्त केला. मुगली किल्लेदार सैद निजावत मराठ्यांच्या कैदेतून पळाला होता.

रायगडाच्या चिटणिसी दफ्तरातील बैठकीवर चिटणीस खंडोजी कलमी सेवेवर बसले होते. विचारांच्या ल्यीवर दोन्ही तळहात एकमेकांशी घुसळीत, फेऱ्या घेत घेत महाराज त्यांना खलित्याचा मजकूर सांगत होते :

"रजपूत कुलावतंस, सूर्यवंशी अंबर नराधिपराजे रामसिंघ प्रति हिंदुपदपादशहा, क्षत्रिय कुलावतंस राजा शंभु यांची विज्ञापना उपरी विशेस – मायना रेखून वाळू शिवरून खंडोजींनी कान टवकारले. धीरोदात्त राजबोल त्यांच्या कानांवर पडू लागले. तसे कागदावर उमटू लागले. 'सांप्रत उत्तराधिप-आलमगीर खडी फौज, खजानासुद्धा मुलखात भिडला. त्याजवर गैरमर्ज होऊन देशी आल्या शहजादा अकबरास आसरा दिल्हा आहे. त्याशी भेट-खल जहाला. यासमयी तुम्ही उत्तरेत जोर धरता तर दिल्लीस शहाजाद्यास तक्तनशीन करण्याचा मनसुबा आहे. इराणच्या शहास शहजाद्याने जोड देण्याचे कलमी कळविले आहे. शहजादा दिल्ली तख्तास येतो तर दगडापरिस वीट मऊच आहे. जरोरीने तुमचा मनसुबा पावता होईल तसे करावे ...'' खंडोजींनी सिद्ध केल्या पत्रावर राजांनी दस्तुर दिला.

दफ्तरखान्यातून बाहेर पडल्या छत्रपतींना अदब देत जोत्याजी केसरकर बोलला –
"नाशिक फाट्याला गणेशगावच्या खिंडीत रूपाजी-मानाजींनी शाबदीखानाला येरगाटला. जोरावारीची चकमक झडली. खान रामशेजच्या रोखानं कूच झाला."

"आम्ही जगदीश्वराच्या दर्शनास जातो आहोत. तिकडेच पाठवून दे पेशव्यांस लगोलगीनं." महाराज चालतच बोलले. उजवे झाले. जगदीश्वराच्या रावळात आले. त्यांना सामोरे येत पुजाऱ्याने तबकातील बिल्वदले आणि सफेद फुलांची ओंजळ भरून ती छत्रपतींच्या हाती ठेवली. गाभाऱ्यात जाऊन ती ओंजळ शिवपिंडीवर वाहून महाराजांनी गुडघे टेकून आपले मस्तक शाळुंकेवर ठेवले. बाहेरच्या चौकात कुणीतरी दिलेला घाटेचा टोल कानी पडताच त्यांच्या मनात शिवबोल घुमून उठले – "आज ना उद्या औरंग दक्खनेत उतरणार याची जाण ठेवा – मावळा व्हा त्यासाठी!"

मस्तक उठवून त्यांनी पिंडीवरचे एक बिल्वदल अलगद उचलले. ते कपाळी भिडवून कमरेच्या शेल्यात ठेवून दिले. गाभाऱ्याबाहेर येताच त्यांना निळोपंत सामोरे आले. महाराज म्हणाले, "आत जाऊन दर्शन घेऊन या. बोलणे आहे."

निळोपंत दर्शन घेऊन आले. विचारगत महाराज त्यांना शिवालयाच्या चौकातच म्हणाले, "नासिक तर्फेला किल्ले मुल्हेरवर मोगली किल्लेदार कोण आहे पंत?"

"जी, रजपूत राजा देवीसिंह."

"ठीक. आपल्या साल्हेरीच्या किल्लेदार परसोजीस पायरोवीनं हुशार राहण्याचा निरोप द्या. रामसेजला घेर पडतो बघून तो साल्हेरीहून रामसेजला कुमक करू बघेल. हातचा साल्हेरीच गोत्यात येईल."

"जी. आजच हारकारा गड उतरेल." निळोपंत पुढे काही बोलू बघणार एवढ्यात एकाएकी गडाची नौबत दुडदुडू लागली. महाराजांचे कपाळ आक्रसले.

"हरजी आले की काय पंत?" नौबतीच्या रोखाने बघत महाराज बोलून गेले.

क्षणातच रावळासमोरच्या वळणाच्या रोखाने धावत्या पायांची धपधप उठली. छातवान वर खाली झपापणारा, उजळत्या नजरेचा रायाजी रावळासमोर आला. पायीची पायताणे तिथंच भिरकटत तो चटक्याने चौकातच घुसला. लगबगीने बोलला, "खंडूबाचं चांऽग भलं धनीऽ! गडाला बाळ किसन आलं! रानीसाबास्नी गांगुलीत बाळराजं झालं."

वळून शिवपिंडीला सरसे होत भरल्या मनाने पापण्या मिटून, जोडल्या हातांची जुडी कपाळीच्या शिवगंधावर टेकविताना राजओठांतून कुलवंत बोल उमटले –
"जगदंऽब!"

गांगोलीचा खासेवाडा आंबवतीच्या आराशीने सजला होता. सदरबगलेला पिपाणीच्या सुरावटीत मुरलेला चौघडा दुमदुमत होता. आघाडी दरवाज्यावर दुहाती रसवंत पानांच्या सघड केळींचे उंचेपुरे खुंट उभे होते. कमानी चौकटीला सुवर्णपत्रा मढविलेल्या श्रीफळाचे तोरण लटकले होते. सिंदखेड, फलटण, कागल, कर्नाटक अशा चौफेरीने आल्या आप्तेष्ट-पाहुण्यांनी वाडा गजबजला होता.

बारशाचा वद्य त्रयोदशीचा दिवस उमटला. आज शंकराचा शिवकर वार होता – सोमवार. कधी नव्हते एवढे माणूस गांगोलीला दाटले होते. खासेवाड्याच्या सदरी मांडलेल्या गिर्द्या, रुजाम्यांच्या बैठकीवर ठेवणीचा पेहराव अंगी घेतलेले महाराज बसले होते. सरश्या हाताला रामराजे होते. रायगडचा सेवेकरी मंत्रिगण दुहाती अदबीने खडा होता. वाड्यात प्रवेशत्या हर पाहुण्या-आप्तेष्टाची, सरदार-दरकदाराची नाववार वर्दी महाराजांसमोर येत होती. तालेवारीची असामी येताच महाराज बैठक सोडत होते. सामोरे जाऊन खांदाभेट देत होते. गाववेशीवर मांडल्या तोफांची भांडी ठरावीक अंतराने दडदडत फुटत होती. आत देवमहालात सुवासिनींनी 'दगडी-गोपा' पाळण्याखालून वरून फिरवून घेतला. सजल्याताराऊंनी हात देऊन बाळ पाळण्यात घातले. आपल्या पाठीची टेकण देत पाळण्याला तिवार झोका दिला. बाळांच्या कानाशी आपले ओठ भिडवीत त्यांना नाव सांगितलं ... 'शिवाजीराजे!'

रणहलग्या, शहाजणे, नगारा यांची झडझडच उसळली. तोफांची भांडी कडकडली. साखरमुठी वाटल्या जाऊ लागल्या. उभी गांगोली धुंदावली. सदरेवरचे राजहात वस्त्रे, धान्य, धन यांची दाने वाटण्यात झटू लागले. दिवस मावळला तरी वाड्याची वर्दळ आवरेना. शेवटी आतली धाराऊच कमरेवर हात ठेवून बाहेर आली. राजांकडे बघत म्हणाली, "आतं आमच्या नातवाचा मुखोटा बगताईसा का कसं ?"

"ते राहूनच गेलं!" म्हणत हसून राजे उठले. त्यांच्या मनचेच धाराऊ कवडेपणाने बोलली होती. सदर सोडून आत बाळंतिणीच्या दालनाकडे चालताना त्यांनी रायाजीला हेताची नजर दिली. रायगडावरून आणल्या बाळबाळंतिणीच्या मानकरी राजसाजाचे सरपोसबंद तबक घेऊन रायाजी त्यांच्या पाठीशी झाला.

महाराज येसूबाईंच्या दालनात प्रवेशले. येसूबाई मंचकावरून उठत्या झाल्या. बाळराजे सुख झाले होते तरीही त्यांना अलगद उचलून त्यांनी महाराजांच्या हाती दिले. शंभुनेत्र 'शिवमुख' निरखू लागले. स्वतःला हरवून गेले. त्या दोघांना तसे बघताना भरून पावलेल्या येसूबाईंच्या मनी आबासाहेबांची आणि थोरल्या आऊंची सय दाटून आली. त्यांची काजळभरली पापणी फडफडली. ओलावली. निकराने ते आठवणीचे कातरपान परतून त्या म्हणाल्या, "नाव आबासाहेबांचंच ठेवलंय यांना."

"होय ऐकलं आम्ही ते. आपल्या हयातीत आबासाहेबांनी अ‍ाभाळीच्या तारका खेचून आणाव्यात तशा शेकड्यांनी फत्ते घेतल्या, यांना जन्माचं नक्षत्र लाभतंय 'शततारका.' आबांच्यासारखंच यांनी येश घ्यावं." हातच्या बाळराजांना येसूबाईंच्या हाती देत महाराज म्हणाले. त्यांनी रायाजीला नजर दिली. मानकरी साज तबक घेऊन तो येसूबाईंच्यासमोर आला. येसूबाईंनी बाळराजे मंचकावर ठेवले. तबकाला रिवाजी हातस्पर्श घेऊन रायाजी बाहेर जायला निघाला.

"थांब रायाजी." महाराजांनी पुढे होत त्याच्या हातातील तबकावर ठेवलेला नाजूक नक्शीचा करंड उचलला. रायाजी निघून गेला. हातचा करंड येसूबाईंच्या हाती ठेवीत राजे म्हणाले, "तुमच्यासाठी खास मोलाची भेट आहे ही."

तो 'लाकडी' करंड बघून, नाही म्हटले तरी येसूबाईंना हसू फुटलेच.

"हसलातशा ?" महाराज त्या गैरस्मजात गेल्या असतील ते ताडून म्हणाले.

"काही नाही – आवडला आम्हास!" मन दडवीत स्त्री-जबान बोलली.

"ते 'लाकडी' आहे ते वरचं दास्तान. तुमच्यासाठी कुंकवाचा करंड आत आहे!" महाराजांनी खोचक सफाई केली.

येसूबाईंनी उतावळीने दास्तान खोलले. आत झळझळत्या सोन्याची एक मोठी अंगठी होती! मासोळीच्या वाणाची तिची घडाई होती. मासोळीच्या दोन्ही डोळ्यांच्या जागी दोन माणिकखडे जडविले होते. ती अंगठी पाहून येसूबाई पुन्हा हसत म्हणाल्या, "ही सोनाराची गफलत म्हणावी की चेटूक! करंडाची अंगठी झाली आहे!"

महाराजांनी काही न बोलता दासतानातून ती अंगठी उचलली. शमादानाच्या उजेडात तिचे माणिकखडे लखलखले. तिला बगलेकडून चिमटीत पकडून महाराजांनी चिमट परतली. मासोळीच्या पसरट पाठवानाचे टवळे खुले झाले. पोटातील मेणमळल्या कुंकवाचा रंग माणिकखड्यागत झळाळला! येसूबाईंनी ते पाहून झटकन पायीच्या जोडव्यांवर नजर टाकली!

"पसंत करंड श्रीसखींना ?" येसूबाईंच्या जाबाची वाटही न बघता, त्यांचा डावा हात आपल्या हाती घेऊन राजांनी त्यांच्या करंगळीत ती अंगठी भरूनही टाकली. येसूबाईंनी तिच्या खुल्या टवळ्याला बोट भिडवून कणभर कुंकू कपाळी लेवते घेत मुक्यानेच करंडाला पसंती दिली!

दुसऱ्या दिवशीच दुपारला धाराऊ राजांच्या भेटीस आली. डुयीवरच्या टोपपदराचा काठ चिमटीने मागे सारीत म्हणाली, "याक मागनं हाय पुता, ऐकशील ?"

तिची पायधूळ घेऊन तिला हातजोड देत बैठकी दालनाच्या मध्यभागी आणताना महाराज म्हणाले, "आऊ, एवढे परके झालो आम्ही ? मागण्याची का, हक्काची बोली नाही ?"

"हाय तर. म्हूनच जीव घुटमाळतोय. आता या म्हातारीचं ऐक."

"तुम्ही बोला. ते ते होईल." महाराजांना काहीच अंदाज नव्हता.

"आता ठकलाव. ध्याई उताराला लागली. जीव गावाकडं वड घेतोय. जाऊ दे मला कापूरव्हाळाकडं!" कमरेत वाकलेली म्हातारी कसल्यातरी नेटाने ताठ खडी झाली. तिची नजर राजांच्या मुखडाभर फिरली.

"आऽऊ..." म्हणत महाराजांनी तोंड फिरविले.

"सपनात न्हवतं एवढं बगू-भोगून झालं की माज्या राजा. कापूरव्हाळाच्या गाड्यांच्या कोन्याचा साळुता म्या. तुमा लोकांच्या पायाच्या धुळीची दिकुन सर नव्हती या ध्याईची. लई मया करलीसा म्हातारीवर."

काळीज खळबळून टाकणारे ते निकोप कुणबाऊ बोल राजांना झेपेनासे झाले. वळून धाराऊजवळ झटकन येत तिच्या सुरकुतल्या ओठांवर आपला हाततळवा ठेवून महाराज म्हणाले, "आण आहे आऊ खंडोबाची. एक शब्द बोलू नको असा." आज पहिल्याने राजे धाराऊला एकेरी बोलले.

"याकच आस न्यायलीती ल्येकरा, सूनबाईच्या पदराखाली नातवाला निता बगायची. खंडुबानं फेडली ती." म्हातारीने मायेने राजांचा हात हातात घेतला.

"एवढ्या कंटाळलात आम्हाला आऊ ? तुम्ही दिसलात की थोरल्या आऊंची वाण आम्ही सोसू शकत आलो. तुम्ही नका आम्हाला अशा पारख्या होऊन जाऊ!"

"ल्हान हाईस! कसं कळावं तुला काय वाटतं म्हाताऱ्या जीवाला ते. ज्या जागंला जिंदगी गुदारली, पोरंबाळं झाली त्या जागंला जीव ठेवण्यासारखं सारथीक न्हाई दुसरं

जल्माचं. एवढी आस पुरव. जाऊ दे मला व्हाळाकडं.'' पावसाळी सांज दिसावी तशी म्हातारी दिसत होती. तिचे बोलणे सोसवेना झालेले महाराज काही न बोलता तसेच बाहेर पडले. आता तिला रोखता येणे कुणालाच शक्य नव्हते.

कापूरहोळाकडे जाणारा धाराऊचा मेणा तयार झाला. त्याच्या दुहाती हत्याऱ्यांच्या मेळाने रायाजी-अंतोजी उभे होते. साज पेहराव, सोनेरी होन यांनी महाराजांनी म्हातारीचा मरातब केला. येसूबाईंनी धाराऊच्या पायांवर डोके ठेवून उठताच तिला गलबलती मिठीच भरली. थकला हात त्यांच्या पाठीवर मायेने फिरवीत धाराऊने त्यांचा आवेग ओसरू दिला. शिवपिंडीवर दुधाची धार उतरावी तसे तिचे काळीजमिठीचे बोल येसूबाईंच्या कानावर पडले, ''उगं माज्या बये. लई तुटसील आतनं. हुब्या मुल्कातनं ढीगावारी आलं बाळंतइडं पर शिणगारपुरास्नं न्हाई योक आला!'' ते ऐकताच ढवळल्या गेल्या येसूबाईंनी गदगदून तोंड ओंजळीत घेतले. त्यांना गपकन उराशी घेत पाचाडवाड्याची वाजती घाट याद यावी असे धाराऊ बोलली– ''दुकं पागळू नको ल्येकी, बाईच्या जातीला आबाळाची झळ आन् भुईचं काटं धोंडं आपलं म्हणंतच चालाय लागतं. सास्वांची सय ठीव.'' म्हातारीने पाळण्याकडे जात आतल्या बाळराजांना उचलून बिलगते घेतले. त्यांचे पटापट मुके घेतले. पुन्हा त्यांना आत ठेवले. छत्रपतींनी कापूरहोळाच्या धाराऊ गाडे– छे भोसले झालेल्या म्हातारीच्या पायांवर शिवगंधी कपाळ ठेवले !!

मेणा निघाला. नजरेआड जाईतो त्या मेण्याकडे बघणाऱ्या हिंदुपदपादशहा छत्रपती संभाजीराजांच्या मनात एकच एक विचार भिरमटत राहिला– ''तुम्ही पाजलं ते दूध आणि दिली ती माया अंगच्या रक्ताचा थेंब थेंब चढविला तुमच्या पायावर तरी नाही फेड व्हायची त्याची!''

गंगोलीहून रायगडी आलेले महाराज एकाच विचारात होते– किल्ले रामसेजच्या. स्फटिकाची, भवानीची पूजा बांधून महाराज वाड्याच्या सदरी बैठकीवर आले. जमल्यांनी ताजीम दिली. फिरंगी दरबारच्या वकिलाबरोबर आलेले येसाजी पुढे होत पेश झाले. ''फिरंगी दरबारचा नजराणा आणि खलिता आहे महाराज. बाळराजांच्या जन्माची खबर ऐकून धाडलाय.'' वकिलाकडे हातरोख देत येसाजी बोलले. फिरंगी वकिलाने आणला नजराणा पेश केला. महाराजांनी त्याला हात दिला.

''खलिता काय मजकुराचा ?'' त्यांनी येसाजींना विचारले.

''जी. आताषीच्या आपल्या कारखान्यांस्नी बारदाना आणायची परवानगी दिलेय. हबश्यासंगे फटकून राह्यचा इतबार दिलाय.''

महाराज सहेतुक हसले. फिरंगी वकिलाला फेरनजराणा देऊन त्याची बोळवण करण्यात आली.

''बादशहानं चाल दिलेला रुहुल्लाखान नगरच्या रोखानं कूच झाला स्वामी.'' निळोपंतांच्या तोंडून पहिली बडी खबर राजांच्या कानी आली.

दौलतीला पडल्या शत्रूंच्या चौफेर घेराचे चित्र महाराजांना दिसू लागले. एकाएकी त्यांना आम्याच्या कोठीत फसगतीने अडकलेल्या आबासाहेबांची आणि स्वतःची याद झाली. मराठी विलायतींना नख लावण्यासाठी औरंगजेब भुई आस्मान एक करणार याचे भान असल्यानेच त्यांनी बगलेचा सवाल निळोपंतांना घातला.

''टोपीकरांची लढाऊ गलबतं आताशा आपल्या दर्यात घुसताहेत. त्यांना मुंबईत कोंडण्यासाठी आपले सिद्दी संबूळ, मिस्त्री काय करताहेत पंत ?''

''त्यांच्यावर छाप्यामागून छापे घालून संबूळ-मिस्त्रींनी त्यांना मुंबईत हटविलं आहे.''

''पंत, औरंग नुसता भुईवरून नाही, दर्याच्या मार्गानं हबशी, टोपीकर, फिरंग्यांना हातास धरून चाल घेणार. तीन फळ्यांनी आपणास दर्या झुंजता ठेवून, भुईवर मिळेल त्या कुबल जागेला गाठून औरंग ठेचायचा आहे.''

''दर्याच्या तीन फळ्या!'' प्रल्हादपंतांच्या तोंडून बोल आले.

''चौल-गोव्याचा फिरंगी जरबेत दाबेल ती दाभोळ, कुडाळ, डिचोलीची आंगरे, काटे, दर्यासारंग यांची एक फळी. जंजिऱ्यात कोंडला हबशी पटात ठेवील ती नागोठाणे, आपटे, दंडाराजपुरीची मायनाक, दादाजी प्रभू, पावला-पडवळ, काटे यांची दुसरी फळी आणि मुंबईच्या टोपीकराला, जरब देत दर्यात फिरती जिवाजी विनायक, सुंदरजी बाजी, संबूळ-मिस्त्री यांची तिसरी फळी.'' महाराजांच्या डोळ्यांसमोर औरंग चोरवाटेने शिरू बघणाऱ्या दर्याची आघाडी तरळत राहिली. समोरचे सर्वचजण डोळ्यांत जीव आणि कानात मन आणून छत्रपतींची चाल ऐकत होते.

''पंत, आता येसाजीकाकांना दंडाराजपुरीचा पावलोक काढता घेण्यास कळवा. त्यांची गरज आहे इथं चालून येत्या गनिमाच्या तोंडावर.'' राजबोटे कंठातल्या मोत्याच्या माळेत पिरगळती फिरू लागली.

''जी. कुतुबशाहीच्या दरबारात बादशानं मुहम्मद शिकोदी याला वकील म्हणून नजराण्यासह पाठविल्याची वार्ता आहे महाराज. गोवळकोंडेकरांनी त्याची आगत्रानी करून अडीच लाखांची पेशकशही त्याला नजर केली आहे.'' निळोपंत औरंगच्या एक एक चालीचा माग देऊ लागले.

''साफ आहे पंत, जे दरबार औरंगच्या आगवानीसाठी तो औरंगाबादेला पोचताच खास सरदार पाठवितात ती कुतुबशाही काय किंवा आदिलशाही काय भ्रमात आहेत. धर्माच्या गुणानं, चालून आल्या शत्रूच्या मनातली माणुसकी जागेल अशा वेड्या आशेवर आहेत दोन्ही दरबार!''

''आज्ञा होईल तर बोलावं काय स्वामी ?'' हात जोडून प्रल्हादपंत म्हणाले.

''बेशक.'' महाराजांनी त्यांना डोळेजोड दिली.

''दक्षिणेच्या लहान-थोर ताकदींचा मेळ घालून त्रिदली दाबजोर फळी उठवावी असं राजकारण होतं कै. स्वामींचं. त्यासाठी ...''

"रुकलात प्रल्हादपंत ? तुम्हास काय वाटतं ? कोण राजकारण खेळते जर असते तर महाराजसाहेब आज ? करते रजपूत मिर्झाशी केला तसा सलूख औरंगशी ? आणि मानता तो औरंग ? वावटळी उठवीत आल्या ढाश्या वाऱ्यासामने जाणार नाही दक्खनेचा एकही दरबार हाती दिवली घेऊन पंत ! आदिल-कुतुबशाही आमच्याशी वरचा दोस्ताना दाबीत त्याच्यासमोर नांगीच टाकणार. मिळेल तिथं त्यास जोड देऊन टोपीकर, हबशी, फिरंगी आपल्या दर्याच्या बसकणी जतणार. ही – ही हातघाई आहे फक्त आम्हास झगडावी लागणारी. मिळालीच तर जोड मिळणार केवळ अरबी आरमाराची." सर्वांना महाराज कितीतरी वेगळे, निर्धारी दिसत होते.

पाचाडपागेला निवडीचा घोडा जय्यत करण्याची आज्ञा सैसांना देऊन दफ्तरी आलेल्या छत्रपतींना पंडितराव मोरेश्वर सामोरे आले. हातची कागदी वळी उठवीत म्हणाले, "समर्थमठात सज्जनगडी शिष्यगणांत शिगेची घालमेल पडली आहे स्वामी."

"मठात ?" ते ऐकतानासुद्धा महाराजांना कसेतरीच वाटले.

"जी. समर्थांनी आपल्या पश्चात सर्व मठाची देखरेख दिवाकर गोसाव्यांनी बघावी अशी इच्छा केली होती. सज्जनगडाच्या स्वामी समुदायाची व्यवस्था मात्र भानजी आणि रामाजी गोसाव्यांनी बघावी अशी आज्ञा केली होती. दिवाकर त्याप्रमाणे वागत होते. पण मध्येच उद्धव गोसाव्यांनी कटकटी खड्या केल्यात. सज्जनगडाच्या आपल्या किल्लेदार जिजोजी काटकरांनी त्यांच्या बगलेत जाऊन करू नये ते केलंय महाराज."

"जिजोजींनी ? काय करणीचं ?" महाराज तो घोळ नीट ऐकू लागले.

"जिजोजींनी भानजी आणि रामजींची द्रव्य-पात्रे व मठवस्त्रे आपल्या अधिकारात उद्धव गोसाव्यांना दिलीत स्वामी !"

"काये मजालीनं ?" महाराजांच्या डोळ्यांत संतापाची तिडीक उतरली. "पंडितराव, काटकरास आज्ञापत्र द्या – अवतार पूर्ण करण्याअगोदर स्वामींनी केली तीच आज्ञा ! द्रव्यलोभास्तव उद्धव गोसावी कटकट करतात. त्यास भानजी-रामजीची मठवस्त्रे छिनावून देण्याचं तुम्हास प्रयोजन काय ? द्रव्य, वस्त्र, जसेच्या तसे मागते भानजी रामजींचे स्वाधीन करणे ! दिवाकर गोसावी समक्षात बोलतील ते करून चालवू. समर्थशिष्यांच्या या घालमेलीत पडावयास तुम्हास प्रयोजन नाही !" मोरेश्वर आज्ञापत्र सिद्ध करायला निघून गेले. महाराजांच्या मनात मात्र विचार फिरून गेला, "समर्थांची 'जय जय रघुवीर' ही गोसावी नांदी पुरती विरली नाही तोच ही तऱ्हा ! पेरते हात कितीही पुण्यवान असले तरी बियाणेच गणंग लागावे त्यास काय ?"

जंजिरा वेढ्यातून आले येसाजी कंक, हिंमतराव, नारुजी त्रिंबक यांच्या मेळाने महाराज रायगड उतरले. दिवस उनतापीचे होते. मृग तोंडावर धरून महाराजांनी घोडदळासह पाचाड सोडले. खेड, चाकण, अशा मजला टाकत ते नासिकपट्यात

पट्टागडाजवळ उतरले. इथं रामसेजला कुमक द्यायला मुजफ्फरखान, रणमस्तखान, मुर्हमसिंह याचा भरीचा तळ पसरला होता. त्यावर मराठी घोडदळाने एल्गार धरला.

महाराज औंढा-पट्टागडाच्या भागात आल्याची खबर लागलेले रूपाजी-भानाजी निवड्या घोडाइतांसह एका सकाळी महाराजांच्या तळावर हजर झाले.

भेटीस आल्या रूपाजींना आवेगी ऊरभेट देताना महाराज म्हणाले, "नावास साजेशी रूपवान मर्दानगी केलीत-करताहात. रूपाजी आम्ही संतुष्ट आहोत."

"ह्यास्नी 'रूपा मोजदा' म्हंजे 'सैतानाचा ल्योकच' म्हनत्यात उभ्या गनीम तळावर !" मानाजी हसत रूपाजींकडे बघून म्हणाले.

"सही आहे मानाजी, सैतानांच्या चालीला सावाचा जाब देऊन नाही भागत !" महाराजांनीही हसून रूपाजींची सफाई आपणच दिली. रूपाजी-मानाजींचा मरातब करून त्यांच्या सोबतीनेच त्रिंबकगड, बागलाण असा टापू महाराजांनी स्वत:च्या नजरेखाली घातला. रामसेजची राखण करणारे फिरते तळ पारखून घेतले. नवी कुमक, हत्यारे, आताषी, रसद यांची जोड देण्याचा धीरदिलासा रूपाजींना देऊन महाराज रायगडाकडे परतले. जो अंदाज महाराजांनी केला होता तीच चाल खेळत औरंगजेबाने या मृगापूर्वी चार दिशांना चार नख्या पसरल्या !

मीर मुहम्मद मोमिन या सरदाराच्या पिछाडीला सहा हजारांचा तुरुक हशम देऊन त्याला सुरत बंदराच्या रोखाने पिटाळला.

गोव्याला फिरंगी विजरईकडे खासा हेजिब पाठविला. त्याच्या बरोबर असलेल्या शाही खलित्याचा मजकूर होता – "काफर संभाला मदत तर करू नयेच पण त्याच्या खिलाफ लागेल ती मदत फिरंगी दरबारनं मागावी. तुरंत पोच होईल !"

सर्वांहून विषारी नख होते रुहुल्लाखानाला नगरच्या तळाकडे पाठविलेल्या पत्रात. रुहुल्लाखानाला आलमगिराचा नेक हुक्म होता – "मिळेल ते मराठी देशमुख, हवालदार, जुमलेदार, किल्लेदार, मन्सब, खिल्लत बक्ष करून शाही चाकरीत तुरंत रुजू करावा !"

औरंगाबादेच्या भरल्या शाही दरबारात तर अनिरोधसिंह आणि किशोरसिंह अशा कडव्या रजपुतांची दिम्मत देऊन संभाजीराजांवर खासा नामजाद केल्या आपल्या बच्च्याला – अज्जमशहाला. शाही दुवा देण्यासाठी तख्त सोडून औरंग फराशीवरच उतरला. अज्जमच्या तलम जाम्याचे टोक उचलून ते चुंबत सर्वांना साफ ऐकू जाईलसं पुटपुटला – 'अलहम्दुलिल्लाह !'

आल्या काळाला निर्धाराने तोंड देण्यासाठी पावसाळ्याचे पाठबळ घेऊन प्रांतोप्रांती तवानी सैन्यसंचणी करणे आवश्यक होते. चिटणीस खंडोजी, दफ्तरदार चिमणगावकरांच्या मदतीने त्यासाठी तपशिलाची पत्रे सिद्ध करून महाराजांच्या

दस्तुरासाठी आणीत होते. दाभोळचे गंगाजी दादाजी, पुण्याचे दामाजी रघुनाथ, सातान्याचे अंबाजी मोरदेव, कऱ्हाडचे वेंकोजी रुद्र, फोंड्याचे धर्माजी नागनाथ अशा चौतर्फाचे सरसुभे मजऱ्या, वाडीत जातीने जाऊन पत्राबरहुकूम बांडे गडी एकवट करीत होते.

उत्तरेत औरंग नाही म्हणून बंड करून उठलेल्या सुलतान ताराला चाचपून बघण्यासाठीही एक खलिता, खंडोजींना एकांती घेऊन महाराजांनी सिद्ध करावयास सांगितला.

पावसाळा तोंडी आल्याने वऱ्हाडातून हंबीरराव, कोकणातून कवी कुलेश, सोलापुराहून आनंदराव रायगडी परतले होते. दर्यावर भांडण मांडून मराठी आरमाराने इंग्रजी गलबते लुटली होती. पेण भागात सिद्दी कासमवर नजर ठेवीत ऐंशीएक गलबते मायनाक आणि सिद्दी संबूळच्या दिमतीत फेसाळत्या दर्यात ठाण धरून होती. दादाजी रघुनाथांचा जंजिऱ्याचा घेर बळकटीने अद्याप उभाच होता. थळभागात जलकोट खंदेरीचे रक्षण करीत पाच हजारांचे आरमार डोळ्यांत तेल घालून होते.

मृगाने शिगेची झड धरली. रामसेजच्या पायथ्याला शाबदीखानाला कुमक करायला बादशहाने धाडलेल्या खानबहादुर कोकल्ताश, कासमखान, दलपत, करणसिंह यांच्या फौजा नाशिकात तळबंद झाल्या.

दफ्तरखान्याच्या झरोक्यातून दिसणाऱ्या पावसांच्या रेघा निरखीत महाराज खंडोजींना आदिलशाही आणि कुतुबशाही दरबारला जायच्या पत्रांचे मजकूर सांगत होते. त्याची साखळी तोडत पहाऱ्याची वर्दी आली – "बहिर्जी आल्यात." महाराज दरवाज्याकडे बघत रुकले. पावसात पुरा भिजला, घोंगडी लपेटलेला बहिर्जी जुहार भरताना गडथंडीने काकडला. नेटाने दाताची थड थोपवीत म्हणाला, "अवरंगाबादंचा खबरी माग खुटला धनी. लई कसबाचं धा जासूद गनिमाच्या तावडीत फसलं. कोतवाली चबुतऱ्यावर औरंगाबादंत सम्द्यांच्या डुया मारल्या हराम्यांनी!"

दहा खबरगीर म्हणजे चालते-बोलते दहा कोटच! हेलावून गेल्या महाराजांना जासुदांच्या नायकाला धीरा सांत्वनाचे काय बोलावे तेच कळेना. तसेच चालत ते बहिर्जीसमोर आले. त्याच्या खांद्यावर चढल्या राजहातापाठोपाठ त्याच्या कानी फक्त तुटक राजबोल पडले, "पेहराव बदलून धुनीची धग घ्या पहिल्यानं बहिर्जी..."

गडाच्या लोहारमेटावर आता हत्यारांच्या घडाईच्या ठिणग्या रातध्याऊ उसळत होत्या. फिरत्या चक्रावर शिकलगार त्यांना पाणी देत होते. बहिर्जी गड चढून दोन दिवस झाले नाहीत तोच रामसेजभागातून संभाजी जगतापांनी पाठविलेला हारकारा रायगडावर आला. त्याने बहिर्जीहून काळीजतोडीची खबर खालच्या मानेने महाराजांसमोर ठेवली – "रजपूत फत्तेसिंगाच्या तळावर घातल्या छाप्यात रूपाजी भोसलं जाया झाल्यात! जखमा बांधून त्रिंबकगडाच्या तळात पडून हाईत!" ते ऐकताना महाराजांना आपलाच उजवा हात जाया झाल्यासारखे वाटले.

कर्नाटकातून हरजीराजांनी पाठविलेला जैतजी काटकर रायगड चढून आला. मुजुमदार खंडेराव पानसंबळ त्याला घेऊन महाराजांना पेश झाले. कर्नाटकप्रांती या दरम्यान खूप उलथापालथी झाल्या होत्या. हरजीराजे हिकमतीने कर्नाटकचे राज्य वाढीस लावीत होते.

"कबजी येत्यात," कुलेशांचा कारभारी आत येऊन वर्दी ठेवून गेला. कनोजी माटाची गुलाबी पगडी धारण केलेले कुलेश नमस्कार करीत दालनात आले.

"शहजाद्याची काही हालचाल कविजी कोकणात?" ते येताच राजांनी त्यांना मुद्द्यावर घेतले.

"जी. उत्तरमें राजा रामसिंग को लिखा हैं शहजादाने।"

"आम्हीही लिहिले आहे. जाबाजी वाट बघतो आहोत. पण कविजी, जो वकुब मिर्झाराजात होता तो नाही दिसत आम्हास त्याच्या कुँवरात."

"जी. मिर्झा आदमी मैदान का, रामसिंग कोठीका।"

कितीतरी वेळ महाराज कविजींशी राजकारणावर बोलत राहिले. जायला निघताना कुलेशांनी चौलतर्फेची एक बाब महाराजांच्या कानांवर घातली – "चौलमें जिवाजी विनायकने फिरंगोंका एक जहाज दस्त किया है। खंबायतके बेपारी रामचंद्रदास का माल है उसमें। जहाज उसका नहीं। फिरंगी जहाज मांगते हैं।"

"ठीक आहे. पण त्या मागणीत आमचा अरबांशी असलेला दर्यादोस्ताना आपणास पसंत नाही हे लिहिणारे फिरंगी कोण?" महाराजांचा नूर बघून काही न बोलताच कवींनी निरोप घेतला!

तो मामला तोडून टाकण्यासाठी याद घेतल्या पेशवे निळोपंतांना मात्र महाराजांनी आज्ञा केली, "चौलात दस्त केले गलबत फिरंग्यास सुपूर्द करण्याचा जिवाजींना हुकूम द्या. आणि निवडीची माणसं तुकडीनं चौलाच्या कोटाभोवती पेरा!"

पहिला कळला पण दुसऱ्या हुकमाची अटकळ निळोपंतांना काही लागली नाही.

महाराज नुसते फेर घेत राहिले. जंजिऱ्याचा सल निखळत नव्हता. दिसावा पण हात घालता येऊ नये असा जंजिरा खोबणीत बसला होता. रामसेज तर घेरात पडला होता.

"रामसेजची काय खबर पंत?" महाराज आपल्याच विचारात होते.

"शाबदी-कासमखानांनी पावसाळा असताही कोटाला पान लावण्यासाठी तीन वेळा जबर उचल खाल्ली. आपल्या किल्लेदारानं तिन्ही हमले फेकून दिले स्वामी."

"पंत, गडउपराळा करण्यासाठी एक हजाराची घोडेपथकं आजच रामसेजच्या वाटेला लावा."

"जी. दोनशे मण आताषीच्या गोणी घेऊन सलाबतखान रामसेजच्या कुमकेला गेल्यानंच शत्रू उचल खातोय."

"कुडाळच्या गणोरामांना, डिचालीच्या मोरो दादाजींना जमेल तितकी आताषी

साठा रामसेजच्या कुमकेसाठी त्रिंबकगडाला केसो त्रिमलांकडं पावता करण्यास तातडीनं कळवा.''

कुलस्त्रीने हातचा कुंकूकरंड न सोडण्यासाठी जंग जंग पछाडावे तसे रामसेजसाठी महाराज जिद्दीला पेटले होते. रामसेजचा किल्लेदार तर हमल्याचा सासूद लागताच गडावरून जडशीळ दगड-धोंडे, ओल्या लाकूड गाठी उतरंडी धरून लोटत होता. आभाळातून पाऊस, गडावरून ही मारगिरी याने शाबदीखान पुरता हैराण झाला होता. गडतट धरून त्याने लावलेले सुरुंग उधळून त्याखाली त्यांचीच माणसे गाडली गेली होती. 'रामसेज' उड्डाणातल्या रामभक्त 'हनुमंताच्या' पवित्र्यात ताठ खडाच होता!

□ □ □

१३

''हबशी, हबशी, हबशी!'' संतप्त, बेचैन छत्रपती आवळेल्या मुठीने स्वत:शीच झगडत होते. कवी कुलेश, प्रल्हादपंत, निळोपंत, खंडेराव अशी भोवतीची मंडळीही, दादाजींनी दंडाराजपुरीहून पाठविल्या हारकाऱ्याची जबान ऐकताना सुन्न झाली होती. सिद्दी खैरतने दिवसाढवळ्या नागोठाणे बंदरात घुसखोरी करून रयताव्याची भर चौकात नाके छाटली होती!

''जंजिरा घेरातून येसाजी कंकांचा पावलोक काढता घेतल्यानंच हबशी असा मोकाट सुटलाय.'' प्रल्हादपंत जंजिरा-वेढा बळकट करण्याच्या सल्ल्याने म्हणाले.

महाराज विचारात पडले. घेरामुळेच खजिन्यावरचा ताण वाढत होता.

''निळोपंत, दादाजींना कलमी हुकूम द्या– जलकोटच्या फौजा काढत्या घेऊन महाडात ठाण व्हा म्हणावं. दौलतखान, मायनाक, जिवाजींना आपआपले दर्यातळ, गलबतं, माणूससुद्धा हमेश जागते ठेवण्यास कळवा.'' महाराजांनी निवाडा दिला.

ज्या जोरावर हबशी खोड्याने वागत होता तो तिढाच सरळ करावा म्हणून निळोपंतांना शेवटची सूचना मिळाली, ''त्या पावलांनी तुम्ही चालता ती आम्ही बरी पारखून आहोत याची सख्त ताकीद द्या चौल गोव्याच्या फिरंग्यास आणि मुंबईच्या टोपीकरास.''

''कोल्हापुरास्नं हंबीररावांचा निरोप हाय. मिरज ठाण्यावर आदिलशाहीचा सालार शर्जाखान वीस हजारांच्या बळानं उतरलाय. त्याचा बेत कळत न्हाई.'' खंडेराव पानसंबळ चिंतेने बोलले.

''पेशवे, मामांना कळवा, या बाक्या समयी आदिलशाहीशी दोस्ताना रक्षून चालविणं आहे. तुम्ही पाऊस उलगेतो पन्हाळा, कोल्हापूर, कऱ्हाडचा मुलूख हुशार ठेवून असणं. अज्जमशाहास दबीत ठेवणं.''

''बालकुंडाच्या घाटीनं रामसेजवर कासमखानानं हमला केला. किल्लेदारानं दगड बरसवून तो फिरविला आहे. बातमी मिळतेय बादशहानं कासीमखानाला उत्तरेकडून आणि राणोजीला दक्षिणेकडून तळकोकणात उतरायचा हुकूम दिलाय.'' निळोपंतांनी शाही कडवी चाल समोर ठेवली.

''पंत, जेवढा उतरतो तेवढा औरंगचा हशम आम्हास तळकोकणातच पाहिजे. जी हसमखानाची केली तीच गत करतील आमचे तुकोजी-रूपाजी-मानाजी त्यांची.''

औरंगची हर चाल बारकाव्याने ऐकूनही महाराजांच्या मनाचा टवकासुद्धा कचरत, कातरत नव्हता. कसलेतरी न उकलते बळ त्या मनात जसे दिवसागणिक ठासले जात होते.

"आपल्या कैदेतला कंकडकिल्ल्याचा ठाणेदार शहा अलिलखान पळून बहादूरखानाच्या तळावर नाशकात गेल्याची खबर आहे." खंडोजी म्हणाले.

महाराजांची नाकपाळी ते ऐकताना किंचित रुंदावली. नाकगड्डा आक्रसला. "चिटणीस, दस्त कैदी पळून जातात ते कसबानं तुरी देऊन नव्हे. तोबरा देऊन! हर किल्लेदारास कलम द्या. असा बोभाट येतो तर गय-मुलाहिजा नाही."

महाराज बोलून गेले पण मनात दूरवर कुठेतरी टिटवी केकाटून गेली– "शिर्के-निंबाळकरांसारखे आप्त राजरोस पळून जाताहेत त्यांचं करणार काय छत्रपती असून आम्ही?" तो काळोखच दूर सारत फक्त कुलेशांना थांबण्यास सांगून महाराजांनी सर्वांस निरोप दिला.

"कविराज, शहजादा अकबरास आगे वर्दी द्या. आम्ही त्याशी खल-बात करण्यास खास येत आहोत." थांबविल्या कुलेशांना राजाज्ञा मिळाली.

"जी." कुलेशांनी रुकार भरला. त्यांच्या मनी काही बोलायचे होते. कारण त्यांना एकट्यांनाच एकांती घेतल्याचे पाहून बाहेर गेल्या अनेकांच्या चेहऱ्यावर उमटलेली नाराजी त्यांना स्पष्ट जाणवली होती. पण विचारगत महाराज बघून ते मन मारून राहिले. मंत्रीबाडीतील एकही मंत्री त्यांच्या घरी, आमंत्रण देऊनसुद्धा भोजनास येत नव्हता. त्यांचे महाराजांच्या आसपास वावरणे अनेकांना पसंत नव्हते.

दोन दिवसांतच श्रावणसरींना न जुमानता महाराजांनी कवी कुलेशांसह रायगड सोडला. महाडघाटीने महाबळेश्वरची चढण उतरून ते चिपळूण, संगमेश्वर, खेळणा अशा मजला टाकत राजापूरला अकबराच्या तळावर आले. संगती मोजका घोडाईत होता. डेऱ्याच्या तोंडावर आल्या दुर्गादास राठोडसह अकबराने महाराजांची आगवानी करून त्यांना इतमामाने आत नेऊन बैठकीवर बसविले. ही अकबराशी दुसरी भेट होती. महाराजांसाठी आल्या खिजी नजराण्याला हात देऊन त्यांनी तो स्वीकारला. बैठकीला तोंड फुटले–

"राजासाब, तंग आये। शेर होकर घास खाना बडी तोहमत की सजा।" अकबर पिळवटून बोलला.

"तेच म्हणतो आम्ही. शेरास खाना रान पालथं घालून धुंडावा लागतो. इथं कोंडून नाही तड लागणार तुमची." महाराजं म्हणाले.

"राय क्या आपकी राजासाब?" कोकणात राहून दिल्लीतख्ताचे स्वप्न अद्याप अकबराच्या डोळ्यांत तरळत होते. महाराजांना अकबर फक्त वापरायचा होता.

"तुमचा सल्ला दुर्गाजी?" महाराजांनी राठोडला मध्ये घेतला.

"जी. अब औरंग दख्खनमें फसा है। नहीं हिलेगा। राजासाब, हम शहजादाके साथ राजस्थान लौटेंगे। रजपूत इकठ्ठा बांधेंगे।"

"रास्त. आम्ही काय करावं या मसलतीत?" महाराजांनी मिश्याकल्ल्यांचा राठोड नीट निरखला. त्यांना वाटले तो सैन्याच्या कुमकेची गळ घालणार.

"सिर्फ हमारे जानेका इंतजाम।" महाराज सैन्यबळ देऊच शकत नाहीत हे ताडूनच राठोड शहाणपणाने बोलला.

"मतलब? एवढा जाग जाग शत्रूचा तळ पडला असता तुम्ही जाणार शहजाद्यांना घेऊन उत्तरेत? जाणता? दिसेल तिथं शहजाद्यांना दस्त करून दाखल करण्याची फर्माने सुटलीत औरंगाबादेहून!"

"वो क्या खाक करेगा दस्त हमको? हम उसके ही बच्चे हैं। दर्यासे उड जायेंगे हम। देंगे हाथ आप हमको?" चिडीने अकबर निर्धारी बोलला.

महाराजांनी सहेतुक कुलेशांकडे बघितले. निर्णय दिला. "ठीक आहे. आम्ही करू बंदोबस्त हत्यारी पहारा आणि तुम्हास सैन्य देण्याचा. दुर्गाजी, जगदंब तुम्हास फत्ते देईल."

महाराज उठले. अकबराचा निरोप घेऊन त्यांनी राजापूर सोडले.

रायगडाच्या खासेदालनात महाराज कवी कुलेशासंगती शहजादा अकबराला काय चाल द्यावी यावर बातचीत करत होते. दालनावर खास सेवक पुरुषा व जोत्याजी केसरकर पहारा देत होते. थंडी गडभर उतरल्याने छत्रपतींनी खांद्याभोवती शालनामा लपेटता घेतला होता. "कविराज, शहजाद्याचा माग तलास घेतलात तुम्ही? राजो आहे तो हिंदोस्थानात गुजराथेला जायला? कुवत आहेत त्याची रजपुतांच्या मदतीनं हिंदोस्थान बांधण्याची?" औरंगजेबाला काटशह देण्याच्या विचारात गढलेल्या महाराजांच्या तोंडून सवालाच्या पाठलागात सवाल सुटले. त्यांचा बेत मोठा होता. उमेदीच्या दुर्गादास राठोडांना त्यांनी त्यासाठीच बोलावणे धाडले होते. त्याला दहा हजार फौजेचे पाठबळ द्यावे व अकबरासह गुजराथेत पाठवावे. त्याने अंबरचा रजपूत राजा रामसिंग याची जोड घेऊन थेट दस्तच करावे. उत्तरेस परतणाऱ्या औरंगला आणि दगडापरीस वीट सुमार या न्यायाने अकबराला दिल्लीला तख्तनशिन करावे.

"हमने बातचीत की है शहजादासे। चाहे जो करने तैयार है शहजादा। शाही असामी है अकबर। उसका लाभ उठाना चाहिये।" कुलेश म्हणाले.

"त्याला हत्यारी हशमांचं बळ देऊन मुलखाबाहेर काढणे हेच लागीचं. आपल्या फौजेवर बारीक ध्यान ठेवील अशी हुन्नराची आसामी बघतो आहोत त्यासाठी आम्ही."

आता कुलेशही अकबराच्या बाबीने विचारगत झाले. कनोजी पद्धतीचा, कमरेत वाकून महाराजांना नमस्कार करून बाहेर पडले. एकले महाराज पायफेर घेऊ लागले. त्यांना ठायी ठायी आणि जिकडे तिकडे औरंगमुद्रा दिसू लागल्या.

"पेशवं आल्यात." पुरुषा नावाच्या खिदमतगाराने महाराजांना भान दिले.

"स्वामी, दोन खाशा असामी गड चढून आल्या आहेत. मिरज-अकोलातर्फेने सरलष्करांनी पाठविलेले धनाजी जाधव आणि शहजाद्यांकडून आलेले दुर्गादास." पेशे आत येताच म्हणाले.

"ठीक. त्यांना जोडीनंच पेश घ्या सकाळी. खूब हेताची बात करणं आहे त्यांच्याशी. तुम्ही जातीनं उत्तरा कल्याण प्रांतात कुमकेनिशी."

"जी. महाराज ..." बोलते निळोपंत कसे बोलावे या विचाराने अडखळले.

"रुकलात पेशवे – बोला –"

"सिद्दी कासमनं दस्त करून मुंबईला नेलेल्या आपल्या सारंगांपैकी – जे-जे धर्मांतराला राजी नव्हते त्यांची कत्तल केली. आणि ..."

"काय ... काय झालं बोला पेशवे!"

"आपले जाया झालेले सारंग – सिद्दी मिस्त्री मुंबईत गेल्याची खबर आहे!"

कलमी सेवेवर बसल्या खंडोजींना छत्रपतींनी, राजा रामसिंगाला जाणाऱ्या खलित्यांचा, मजकूर सांगितला – "दख्खनेत आला शहजादा, दुर्गादाससंगती फौजबंदीनं गुजराथ प्रांती अहमदाबादमार्गे धाडतो आहोत. आमचा तोडीचा सालार त्यांची जोड करील. तुम्ही जाणते आहात. अवघे एकवटून हिंदोस्थानात बादशहास काटशह घालावा. वडिलधाऱ्यांनी मुगलांच्या केल्या मागील सेवेचे का चीज झाले हे ध्यानी धरून पोख्त विचार ठेवून चालवावे ... फिरलाच औरंग परतीने उत्तरेत तर त्यास दस्त करण्याची उमेद राखावी ..." या मतलबाचा तो खलिता होता.

खंडोजींनी रेखल्या खलित्यावर वाळूची चिमट शिवरली.

"चिटणीस, खलिता धाडसाच्या, नेक जासुदाहाती द्या. खूप दूर जाणार तो." खलितावळीकडं बघत राजे म्हणाले.

आबाजी सोनदेव वारल्यामुळं दरबार भरवून रामचंद्र निळकंठ भादणेकरांना, महाराजांनी सुरनिशी मानवस्त्रे व शिक्के दिले. कुडाळापासून तुंगभद्रा नदीपर्यंतचा प्रांत त्यांच्या ताब्यात दिला. आबासाहेबांच्या हयातीत ही जोखमीची जागा आण्णाजी दत्तो यांच्याकडे होती. ज्यांच्यामुळे महाराजांना न विसरता येणारी तापदराच झाली होती. महाराजांना आता फार जाणवू लागलं की खंडोजी बल्लाळ मैदानी वकुबाचे असूनही कलमात अडकून पडलेत. त्यांनाही साजेशी मैदानी कामगिरी दिलीच पाहिजे. कलम सांभाळत त्यांनी हत्यारही चालविले पाहिजे.

खंडोजी, किल्लेदार, चांगोजी, कुलेश, रायाजी, अंतोजी यांच्या मेळाने गड उतरून महाराज पाचाडपागेसमोर आले. तिथे धनाजी-दुर्गादास त्यांना सामोरे आले. पागेसामने वीस हजारांचा घोडा व पावलोक हारीने शिस्त लावून उभा होता. राजांनी त्यांना रिवाजी निरोप दिला आणि ते पाचाडसदरेवर आले.

चौतर्फांनी आलेले खबरगीर पेश झाले. माणसांनी पाचाडसदर भरली होती. राजे अंथरल्या सदरबैठकीवरच्या गिर्दीला रेलले. आंबट, गोड-तिखट, खारट पदार्थांनी भरला थाळा समोर यावा तशा सरमिसळीच्या खबरा राजांच्या कानांवर पडू लागल्या.

"पुरंदरच्या पायथ्याला बादशहाचा नातू मुइजुद्दीनसंगं झालेल्या झोंबाझोंबीत माणकोजी बल्लाळ कामी आले धनी!" खबरगीर अडखळत म्हणाला.

ते ऐकताच खंडोजी बल्लाळांची गर्दन तर झटका घेत वरच आली. पुन्हा अदबीने ती खाली घेताना पापणीकडा दहिवरल्या त्यांच्या. माणकोजी त्यांचे बंधू होते. महाराजही सुन्न झाले. खंडोजीच्या जवळ येत त्यांच्या खांद्यावर तळहात थोपटताना घोगरट आवाजात म्हणाले – "आमच्या टोपातलं माणिक आणि तुमच्या तर हातातलं कलमच गळलं. खंडोजी, तुम्हाला काय सांगावं आम्ही – धीरानं सुमार व्हा म्हणून?"

गडाच्या पायथ्याला बिरवाडीच्या नदीकाठाला धरून, अर्जोजी यादव, आण्णाजी मलकरे, हिरोजी इंदुलकर यांनी दिमाखदार शामियाना उठविला. हा शामियाना होता कर्नाटक प्रांतातून राजांच्या भेटीसाठी येणाऱ्या रघुनाथपंत हणमंत्यांसाठी. कर्नाटक आणि मराठी मुलूख यांची ही भेट होती. रघुनाथपंत निवडक असामींनिशी एका मजलेवर ठाण झाले होते.

भेटीचा दिवस उजाडला. महाराज येताच बिरवाडीचा पुरा तळ सळसळून उठला. भोवतालची माणसं डोळ्यांत प्राण आणून काय घडणार म्हणून बघू लागली. सर्वांना माहीत होतं की, कर्नाटकात रघुनाथपंतांना काढणीबंद करण्याचा हुकूम राजांनी हरजींना दिला होता. गडभर आवई पसरली होती की रघुनाथपंतांनी लांबीचा खलिता पाठवून, 'खाशा भेटीसाठी येत आहोत' असे कळविले होते. त्यामुळे उलटसुलट अफवाच अफवा पसरल्या होत्या.

महाराज तळावर येताच शहाजणांची, तुताऱ्यांची कातरी लय घुमली. रघुनाथपंत जिंजीहून आल्या माणसांतून एकलेच पुढेसे झाले. ते नजरेस पडताच महाराजांच्या मनातले आठवणींचे वारुळ फुटले. तरातर चालत ते रघुनाथपंतांच्या सामने आले. आलेले रघुनाथपंत रिवाजासाठी कमरेत झुकून मुजरा द्यायला तळहात कपाळी भिडवू लागले. झटकन पुढे होत महाराजांनी तो आपल्या ओंजळीत धरून वर घेतला. खुद्द तेच वाकून रघुनाथपंतांच्या पायांना भिडविण्यासाठी आपला हात पुढे घेऊ लागले! आशीर्वाद द्यावा असेही आता कुणी नव्हते. रघुनाथपंत मागे हटले. उठवून राजांना त्यांनी वर घेतले. दोघांच्याही डोळ्यांच्या बाहुल्या खिनभर एकमेकींना भिडल्या. खूप खोलवरचा मतलब जाणवला दोघांनाही. रघुनाथपंतांना छत्रपतींनी थेट ऊरभेट दिली. पंतांनी कितीतरी मायेने त्यांचे पाठवान थोपटले. पोख्त, जाणत्या वृद्धपणाला उभार-उमदे राजेपण भिडले. महाराजांनी हाताला धरून रघुनाथपंतांना भेटीच्या शामियान्यात घेतले. आत मजालसीच्या बैठकी अंथरल्या होत्या. राजांसाठी आणि पंतांसाठी गिर्दीची खास

बैठक मधोमध येईल अशी मांडली होती. त्यावर राजे, पंत बसले. तिला अदब ठेवून सारे खासे आपआपल्या बैठकीवर बसले.

रघुनाथपंतांनी कर्नाटकातून आणलेली चाळीस लाख होनांची तबके छत्रपतींना पेश केली. महाराजांनी त्यांना स्पर्श दिला. निळोपंतांना नजर दिली. पेशवे निळोपंतांनी रघुनाथपंतांसाठी आणलेली मानवस्त्रे, ढाल-तलवार यांची तबके पुढे घेतली. पंतांनी ती आपलीशी केली. जगदंबेची भंडारा-परडी मजालभर फिरली. तिची बोटे कपाळावर चढली. राजांनी रघुनाथपंतांना विचारले, "पंत, कर्नाटकाचा हालहवाल?"

"सुक्षेम. हरजीराजे नेटा-बळानं प्रांत रक्षून आहेत. कसल्याही भातेनं चिंता नसावी. जमल्यास खाशांनीच टाकावा एकदा फेर कर्नाटकात."

"हरजीराजे तुमच्याशी कसे?" घडल्या – न टाळता आलेल्या प्रसंगांनी राजमन वेढून आले.

"जी. घरोब्यानं आहेत राजे आमच्याशी. वडिलांठायी मानतात आम्हास. त्यासाठिच आलोत आम्ही – काही मनच्या हेतानं. हयात गेली हत्यार पेलून, जिवाभावानं इजाजत होईल तर – तर काही बोलावं म्हणतो." खूप पाहिलं, सोसलेली, आपली निडर वृद्ध नज़र पंतांनी राजनेत्रांवर जाम रुपवली. भरली मजालस ती बघताना चुळबुळली.

"पंत, मनमोकळं बोला. निःसंकोच बोला. आता कुणाला मसलतीचं – मनाचं विचारावं असं वडिलधारं कुणी नाही. आबासाहेब, थोरल्या आऊ, समर्थ सारे जगदंबेला प्यार झालेत." सगळी मजालस महाराजांच्या कोंडीने, आपल्या अंगावर पडल्या जोखमीच्या जाणिवेने गंभीर झाली.

बोलण्यापूर्वी पंत क्षणैक थांबले. मनाची बांधणी तर त्यांनी आपल्या तळावरच केली होती – शब्दांची जुळणी करणे अवघड जात होते. कुठलाही उणा-अधिक शब्द तोंडून जाऊ नये यासाठी कोशिस होती. भंडाऱ्याची बोटे फिरलेल्या छत्रपतींच्या मुद्रेकडे बघत, पंत बोलू लागले – मनातले, रांगडे, स्पष्ट-साफ, निडर –

"थोरले महाराज जाऊन काही बहुत दिवस झाले नाहीत. तो मुलूख उजाड का होत चालले? पुंड-पाळेगार, फितवाखोर बळावत चालले हे कोण मजालीनं?" महाराजांच्या मनातील नेहमी सतावणारा सवालच पंत करीत होते. अंतर्यामी घुसळून निघालेले राजे वरवर शांत होते. मन पार तळवटापर्यंत उतरले त्यांचे.

"दिमतीचे सरदार, मंत्री बेदिल, अन्यायी झाले. त्यास मारणे रास्तच होते तर रायगडी घेऊन एकांती मारायचे. ते सोडून सर्वांसामने का मारिले?" पंतांनी विचारले.

आता मजालस पुरी बेचैन झाली. कातर झाली. कैकांना वाटले महाराज आता तडक बैठकीवरून उठतील. कुणी सांगावे, या क्षणी पंतांना दस्त करण्याची आज्ञाही देतील!

मजालसीत हंबीरराव होते. तेही रघुनाथपंतांच्या वकुबा-अधिकाराचे होते. त्यांना राहवले नाही. ते म्हणाले, "पंत, गेले ते काय चालीनं याची शानिशा झालीय सम्दी. कै. थोरल्या महाराजांनी बेलवडीवर भरल्या तळासामने सखुजी गायकवाडाचं डोळं का काढलंतं? राजांच्या जिवावर उठल्या चाकरांचा काय मरातब कराय पायजे हुता तुम्हासारा?"

आता सरलष्कर-पंत यांचीच बोलाचाली वाढतेय का काव अशा शंकेने मजालस थरकली. छत्रपतींनी मध्येच हात उठवून हंबीररावांना रोखून घेतले. आणि म्हटलं,

"सरलष्कर, सुमार असा. पंतांना बोलू द्या. त्यांचा अधिकार आहे तो."

त्या बोलांनी पुरते निर्भय झालेले पंत म्हणाले, "आम्ही काय पिकलं पान. आज आहोत – उद्या नाही. एवढा मातब्बर गनिम तोंडावर येऊन ठेपलाय त्याचा काही विचार केला आहे काय सरलष्कर?"

त्यांच्या या रोकड्या सवालाने मात्र महाराज बोलतेच झाले,

"पंत, काळजाचा सवाल केलात. त्यासाठी आम्ही काय करतो आहोत ते आमचं आम्हास ठाऊक. मुलूख उजाड होतो आहे तो औरंगच्या मारगिरीनं. तीस हजारांवर तवानी सैन्यसंचणी बांधलीय. जागजागी मोगली फौजेशी चकमकी झडताहेत. खजिना त्या भाराखाली वाकलाय. एका बाजूनं औरंगच्या फौजा चौतर्फानं दौलतीत घुसल्यात. ती संधी साधून दर्या धरून फिरंगी, हबशी उचल खाताहेत. इदल, कुतुबशाही अंग मुरवून गुमान आहेत. काय करते, असते तरी आबासाहेब अशा समयास? पंत, तुम्ही बोलल्याचा राग-रोष नाही. हरजींना प्रांत ठाकेठीक राखून चालविणेस कळवा … आणि … आणि आता तुम्ही – तुम्ही नका जाऊ कर्नाटकात."

महाराज काही विचाराने थांबले. तडक उठलेच. मजालसही उठली. प्रत्येकजण विचार करीतच बाहेर पडला.

दुपारी रघुनाथपंतांनी दिलेला खाना घेऊन महाराज गडाच्या वाटेला लागले. विचारच विचार, मृगाच्या आभाळागत भरून आले त्यांच्या मनात. ते कुणाशीच काही बोलले नाहीत.

रात्री सुखदालनात हुलग्याच्या माडग्याचा कटोरा घेऊन आलेल्या येसूबाई त्यांना विचारगत बघून म्हणाल्या, "तब्येतीत काही सुमार स्वारींच्या?"

महाराजांनी येसूबाईंना निरखले. त्यांना आठवले ते आबासाहेबांनी येसूबाईंना दिलेली शिक्केकट्यार. 'श्री सखी राज्ञी जयति' या मुद्रेची आपणच दिलेली जोखीम. त्यांना बघताना रघुनाथपंतांशी झालेली सारी मुद्द्याची चर्चा मनात फिरली. येसूबाईंच्या कानी भेटीचा सर्व करिना घालून राजांनी त्यांनाच विचारलं, "सल्ला काय तुमचा पंतांच्या बाबतीत?"

येसूबाई विचारगत झाल्या. मग निर्धारानं म्हणाल्या – "आम्हाला वाटलं …"

"काय?"

"पंतांवरच मुजमूची जोखीम सोपवावी!"

"… आणि खंडेराव आहेत मुजमूदार त्यांचं काय?"

"एकांती घेऊन समजूत काढावी त्यांची."

येसूबाईंच्या मनाप्रमाणेच झाले. रघुनाथपंतांना मरातबाने मुजुमदारीची वस्त्रे देण्यात आली. कर्नाटकाची मुजुमदारी त्यांचे चिरंजीव तिमाजी रघुनाथ यांना देण्यात आली. खंडेरावांची समजूत नीट पटवून हे झाले.

महाराज सिंहासनसदरेवर फेर घेत होते. भोवती अदबीने उभे असलेले निळोपंत, प्रल्हादपंत, खंडेराव, रघुनाथपंत खालमानेने चिंताक्रांत उभे होते. फेर थांबवून राजांनी प्रल्हादपंतांना विचारले, "पंत, तुम्ही टोपीकरांच्या दरबारातून आलात. काय चाल आहे गोऱ्यांची ?"

"जी. ते राजी झालेत हबश्यांना थारा न द्यायला. मुगलांची गलबतंही दर्या ओलांडणार नाहीत याची हमी दिलेय त्यांनी." शेजारी उभ्या हेन्री स्मिथ या गोऱ्या वकिलाकडे हातरोख देत त्यांनी त्याची ओळख छत्रपतींना करून देत म्हटले, "हे त्यांचे हेजिब, हेन्री म्हणून." हेन्री गुडघ्यांवर बसत लवला. डुयीची उंच माटाची, पीसधारी टोपी त्याने उतरून हलविली.

त्याच्याकडे नजराणा नाही या जाणिवेनं प्रल्हादपंत लगबगीने म्हणाले, "स्वामी, गोऱ्या दरबारनं दिला होता नजराणा यांच्या संगती. पण ..."

"आम्हाला तो पेश न करता यांनी मध्येच ठेवून घेतला – असंच म्हणायचं आहे तुम्हाला पंत !"

"क्षमा असावी. तसं नाही – पण हे आणि आम्ही निघालो मुंबईहून करंजामार्गानं इकडं येण्यासाठी. पण चार हबशी गलबतांनी रोखला आमचा दर्यामार्ग. यांना आणि आम्हाला गलबतात दडून राहावं लागलं. शरम वाटते पण यांच्याकडचा नजराणा आणि आमचं सामान लुटून नेलं हबश्यांनी उंदेरीकडं."

महाराज ते ऐकून संतप्त होतील अशा भयाने प्रल्हादपंतांनी गर्दन टाकली. राजांना ती जाणवली. त्यांच्याजवळ येत ते म्हणाले, "न्यायाधीश, नजराणा गेला याची एवढीसुद्धा खंत करू नका. तुम्ही – तुम्ही सुक्षेम परत आलात हाच आम्हाला नजराणा." गोऱ्या वकिलाकडे हात करून महाराज म्हणाले, "यांची, साजेशी देखभाल करा." असे म्हणून राजांनी हेन्रीला नजराणा देवविला.

हेन्री पुन्हा लवला. उठून जायला निघाला. त्याला बोलण्यातले काहीच कळले नव्हते. पटली होती ती राजांची मर्दानी सौंदर्याची मूर्ती ! पंत व हेन्री निघून गेले.

कवी कुलेश अकबराचा वकील अब्दुल हमीद याच्यासह भेटीला आले.

"स्वामी, शहजादाको हिंदोस्थान जानेमें कामयाबी नहीं मिली। खान रुहुल्लाने आकर सब रास्ते रोक दिये। बडी मुष्किलसे वापस लौटे शहजादे।" औरंगने आपल्या बेट्याची केलेली अचूक नाकेबंदी कुलेशांनी सांगितली. महाराजांच्या कपाळी जाळे एकवटले. चटकन् त्यावर त्यांनी सवाल घातला – "धनाजी कुठं ?"

"जी. धनाजी गये गुजराथमें। भडोचको तसनस किया है। दुर्गादास हैं उनके साथ।"

"तुम्ही शहजाद्याच्या पीछेहाटीचं सांगितलंत कुलेश. आणखी काही ?" धनाजींच्या आगेकुचीने महाराजांना दु:खातही सुख शोधावे लागले. तेही आपल्यापाशीच ठेवत कुलेशांना त्यांनी विचारले.

"हम समझे नहीं ..." खुद्द कुलेशच गोंधळले त्या सवालाने.

कविराज, याद असेल, आम्ही मरातबानं नेताजींच्या बरोबर नजराणा पाठविला होता शहजाद्यांना. त्यात मानाचा म्हणून मोत्याचा कंठाही दिला होता दिल्लीचे 'शहेनशाह' बनायला निघालेल्या शहजाद्यांना ! काय करिना त्या कंठ्याचा ? आलाय कानी ?"

कुलेशांनी चमकून अकबराच्या हेजिबाकडे बघितले. ही मामुली बाब महाराजांपर्यंत कशी पोचली एवढ्या धामधुमीत असा त्या नजरेचा मतलब होता.

"आका अलीने वो कंठा बक्ष दिया एक लवंडी को हुजूर !" अब्दुल हमीद बेफिकिरीने अकबरापुढे बोलावा तसा महाराजांसमोर बोलून गेला.

"खामोऽश !" छत्रपती संतप्त होत कडाडले. नाकपाळी लालावत रुंदावली त्यांची. श्वास चढीला पडल्याने भरदार छातवान वर खाली लपापले. अकबराने मरातबी कंठा 'मामुली' मानला याची चीड होती त्यात. त्याहून शिगेचा संताप होता – त्याच्या मामुली हेजिबाने या देशीच्या स्त्रीला 'लवंडी' म्हटले याचा.

"कुलेश, जाब विचारा याचा शहजाद्याला !" आपल्याच विचारात महाराज तरातर निघूनही गेले. अब्दुलने शरमेने गर्दन खाली टाकली.

दारूकोठारावर, शिलेखान्यावर देख टाकून सिंहासनसदरेवर आल्या राजांना खंडोजी बल्लाळ उत्तरेतून परतल्या गंगाराम हिंदोस्थानी सोबत पेश झाले.

"बोला हिंदोस्थानी ?" जय सियाराम म्हणत नमस्कार करणाऱ्या गंगारामला राजांनी विचारले. त्याच्या उत्तरेतल्या कर्तृत्वाचा हवाल ऐकायला ते उत्सुक होते.

"बिहारमें मोंघीर कब्ज किया हमने नरेश ! आप के फौजी आदमी बडे तेज हैं राजासाब." गंगाराम गौरवाने म्हणाला.

"हिंदोस्थानी पाटण्यावरही गेले होते चालून उत्तरेत ... पण ..." छत्रपतींना गंगारामच्या सगळ्या बाबींची माहिती मिळावी या हेताने मध्येच खंडोजी बोलले.

"रुकलात चिटणीस ?"

"दाबजोर फौजीबळाच्या जोरावर तिथल्या मुगल सुभेदारानं पिछेहाट घ्यायला लावलेय हिंदोस्थानींना. फेर मदतीची उमेद राखून आलेत ते दक्षिणेत."

"खंडोजी यांना नजराणा द्या. पाचाडपागेचा, उत्तरेची हवा सोसेल असा तगडा पावलोक द्या." आणि हिंदोस्थानीकडे बघत महाराज म्हणाले, "दोन दिवस थांबा हिंदोस्थानी. फार टप्प्यानं आलात, विश्रांती घ्या."

"जय सियाराम की !" नमस्कार घालून गंगाराम निघून गेला.

कल्याण भिवंडी भागातून रणमस्तखान आणि बहादूरखान यांच्या धुमाकुळीच्या खबरा येऊन पोहोचल्या होत्या. त्यासाठी खास बोलावून घेतलेले हंबीरराव, मानाजी, केसोपंत, रूपाजी आणि तुकोजी पालकर यांच्या सोबतीने खुद्द महाराज कल्याणवर उतरले. कल्याणला छोटेखानी कोट होता. तो राखण्यासाठी महाराज दिवसभर फळीफळीवर घोडा फेकत होते. एके दिवशी संध्याकाळी, दिवसभर थकले, श्रमले महाराज तळावर परतले. या आघाडीचे रूपाजी, केसोपंत, निळोपंत त्यांना सामने आले. त्यात नव्हते जाया झालेले हंबीरराव आणि तुकोजी. मनच्या काही विचाराने महाराज म्हणाले, "तुकोजींना बोलावून घ्या. हा पडला घेर तसा नाही निपटायचा."

"काय झालं पेशवे ?" चरकलेल्या महाराजांनी विचारले.

"जी, तुकोजी गेले स्वामी !" छत्रपतींसकट सर्वांनी उसासा टाकला.

चौल, गोवा, वऱ्हाड भागातून खबरा येतच होत्या. कल्याणात गुंतून पडणे शक्यच नव्हते. तुकोजींना अगीनडाग देऊन, मोहीम निळोपंत व हंबीररावांवर सोपवून महाराज रायगडाच्या वाटेला लागले.

गडावर आल्या छत्रपतींना खानदेश भागात बेरूरला मावळ्यांनी केल्या यशस्वी हमल्याची आणि खजिना भरणाऱ्या भरपेट लुटीची, बिदरला केल्या चौथ वसुलीची दिलाशाची खबर मिळाली. नळदुर्गतर्फेला राजांचा सरदार भिकुलाल यांची कासिमखानाबरोबर गाठ पडली होती. खानाचा मीर अबिद दिवाण मारला गेला होता.

गोव्याहून आलेले येसाजी गंभीर महाराजांना खासगीत पेश झाले. फिरंग्यांनी गोव्यात घातला धुमाकूळ खाशांसमोर ठेवताना म्हणाले, "काही रया राहिली नाही फिरंगाणाची धनी. पणजी सोडून फिरंगी लगतच्या अंत्रुज, सालसेत, बारदेश भागात चालून येत्यात, भल्या पहाटेचं. कानडी माणूससमेळ आणि नव्या माटाच्या बंदुका आहेत त्याच्याकडं. अशीच गत राहिली तर ..." कसे सांगावं म्हणून येसाजी रुकले. छातीवरून उतरलेले उपरणे मनच्या पिळाने मुठीत चुरगाळले गेले त्यांच्या.

"तर काय होईल, बोला, येसाजी." महाराजांची गर्दन झटकन वर झाली.

"फिरंगी गावं लुटत नाहीत नुसती स्वामी ! किरिस्ताव व्हायला राजी नसलेल्या उभ्या गावची माणसं चूड पेटवून जाळतात भर चौकात ! घरचा कर्ता माणूस मेला तर डोंबाच्या वृत्तीनं सरकारजमा करतात त्याची सारी मालमत्ता. आडा-विहिरीत पावाचे उष्टे तुकडे टाकून, ते पाणी पिताच धर्म बुडला अशी भूमका उठवतात. तरण्याताठ्या पोरी बाटवून भिक्षुणी म्हणून नेतात आपल्या देवळात. पांढरे झगे चढवून धर्माच्या प्रसारासाठी भरीस घालतात त्यांना दिवसभर आणि रात्री ...." येसाजींनी मानच खाली टाकली. त्यांच्या पापण्या दहिवरल्या. उपरण्याची मूठ चाळवता-चाळवता गपकन थांबली.

कानी पडणारे ते शब्द ऐकून छत्रपती सैरभैर झाले. जखमी वाघागत नुसते फेरच फेर घेऊ लागले. फिरंग्यांच्या करणीचा संताप, चोहोतर्फांनी औरंगनं फेकलेल्या दौलतीवरच्या, ठिकठिकाणच्या फौजांचा ताण, हबशी, गोरे यांची संधिसाधू चाल, त्यांच्या भोसलाई मनात अनेक विचारांनी थैमान घातले.

"– हीच गत राहिली तर पुरा फिरंगाण किरिस्ताव होईल महाराज. जमेल तशी माणसं फिरंगाण सोडून कारवार, बेळगाव, वरघाटात परागंदा होताहेत., तगून आहेत ती जीव मुठीत धरून हडबडलीत." डोळ्यांतल्या पाण्याचे थेंब खळकन ओघळले येसाजींच्या उपरण्यावर.

परडीभर पसरता भंडारा, जगदंबेच्या मानकरी भुत्याने एकवटून घ्यावा तसे, काही एक विचाराने छत्रपतींनी आपले मन एकवटून घेतले.

अकबराचा करिना महाराजांच्या कानांवर घालण्यासाठी कवी कुलेश भेटीस आले. राजांनी विचारलेल्या कंठ्याच्या बाबीला अकबराने बेमुर्वतखोर जाब दिला होता – "हम शहेनशाह हैं। जी चाहे करेंगे।" ते उत्तर ऐकून, त्याच्या दिमतीला दिला घोडा आणि पावलोक छत्रपतींनी तत्काळ काढून घेतला होता. त्याला दिली जाणारी पेशगीची रक्कमही बंद केली होती. त्यामुळे खफा झाला अकबर आपल्या डेऱ्यांना जाळ लावून तळ उठवीत गोव्याच्या रोखाने जाण्यासाठी बांदा येथे पोहोचला होता.

राजांनी कुमक आणि पेशगी काढून घेतल्याने पुरत्या नाराज झाल्या अकबराचा पुढचा मनसुबा सांगताना कुलेश म्हणाले, "सुनते हैं, शहजादा फिरंगाण गया है।"

राजे विचारगत झाले. त्यांना मिळेल तेवढा शहजादा वापरायचा होता. हातचा जाऊ द्यायचा नव्हता.

"कुलेश, बऱ्या बारकाव्यानं ध्यान ठेवा शहजाद्याच्या हालचालीवर. तो फिरंग्यास सामील होता कामा नये. प्रसंगी त्यासच वापरा फिरंग्यांच्या बाबीनं." राजांचा बेत मनी रुजवीत कुलेश गेले. कानी पडलेल्या फिरंगाणाच्या काळीजवेधी खबरेने बेचैन झालेले छत्रपती रायाजी-अंताजीसह आघाडी मनोऱ्याच्या रोखाने निघाले. त्या उंच मनोऱ्यावरच्या गडवाऱ्यावर त्यांचे खास बाबीचे निर्णय पक्के होत असत.

दफ्तर, सिंहासन-सदर, खासे महाल इथे खाशांना शोधून शेवटी खुद्द खंडोजीच मनोरा चढून आले. त्यांना बघताच महाराजांनी मनचा हेत बोलता केला.

"चिटणीस, चेऊलतर्फेच्या सुभेदारास लिहा. फिरंग्यांच्या कोटास घेर टाका."

"जी." कानी आल्या बाबी राजांसमोर ठेवण्यापूर्वी खंडोजी घोटाळले.

"बोला." राजांनी त्यांची अडचण हेरली.

"स्वामी, दर्यावर भूमच्या ठाण्याला बावीस गलबतं आणि शंभरावर गुराबे उतरलेत."

ते ऐकून महाराज निर्णय देत म्हणाले, "आपली शंभरावर गलबतं त्या तर्फेला रसद, नाखव्यांसह तयार ठेवायला सांगा दर्यासारंगांना. पुण्याला दामाजी रघुनाथांना राजगड, पुरंधर, शिवापूरला चढाईची नवी संचणी जय्यत करायला हारकारा द्या, खंडोजी!"

"जी. औरंगाबादेहून औरंगचा हेजिब शेख महंमद पणजीला फिरंगी विजरईला रुजू झाला आहे. त्यानं आपल्या दौलतीच्या खिलाफ फिरंग्यांनी उभे राहावे अशी गळ घातली. आपणाला दिला जाणारा आताषी कारखान्यांचा वस्तभाव घेऊन येणारी जहाजं दर्यातून सोडू नयेत असा खोडा टाकला आहे" खंडोजींनी औरंगच्या तिरक्या चालीचा माग दिला.

"खंडोजी, मंगळवेढे भागात इदलशाहीचा मियाखान, सय्यदखान, हसनखान असा तालेवारीचा लढाऊ सरदार नुसता ठाण होऊन आहे. त्यांना या वक्ताला जोड देण्यास लिहा. केवळ मराठीच नाही, दख्खनेतल्या अवघ्या शाह्या आज ना उद्या औरंग पटात धरणार हे जाणून असावे, असे साफ कळवा त्यांना. आणि..." खंडोजींना कुडीभर निरखत क्षणैक थांबून राजे म्हणाले, "मोठ्या मोहिमेचा बेत आमच्या मनी आहे. तुम्हास घ्यावे म्हणतो संगती आम्ही. तयारीनं असा." खंडोजी, आणि महाराज मनोरा उतरू लागले. दोघांच्या मनी दोन टोकांचे विचार होते.

याच वेळी पणजीच्या किल्ल्यात फिरंगी विजरईला शहजादा अकबर भेटला होता. त्याला मदत देण्याचेही फिरंग्यांनी कबूल केले होते. ही मदत होती मक्केला जाण्यासाठी लागणारी लांब चालीच्या जहाजांची! पण–

औरंगचा शेख महमद भेटताच विजरईने तीही चाल पालटली. मदत रोखली! अकबर अडवून पडला. बांद्याला ठाण झाला.

आता कडाक्याच्या थंडीने जोर धरला. पुरा रायगड धुक्याच्या दाट गोधडीखाली उत्तररात्रीपासूनच झाकाळून जाऊ लागला. अशाच एका थंडीच्या दिवशी राजांचा निरोप घेऊन रायगडाहून निघालेले येसाजी गंभीर पणजीला फिरंग्यांच्या दरबारात प्रवेशले.

फिरंगी विजरई कोंद - दि -आल्वोर हा पोर्तुगीज वाणाचा गरम कोट घालून, उभट, लाकडी बैठकीवर बसला होता. त्याचे फिरंगी दरबारीही छोट्या लाकडी बैठकीवर बसले होते. येसाजींनी दुभाष्या शेणवीच्या मध्यस्थीने विजरईला रोखठोक सवाल केला, "फिरंगी मोगलांशी संगनमत करून चालवतात हे कसे?"

वर फिरंगाणात चौल, तारापूर भागात दोन भुईकोट राजांनी कब्ज केल्याचे पाठबळ घेत येसाजींनी विचारले, "औरंगजेबाचा मोगली हेजिब शेख महंमद याच्याशी फिरंगी दरबारची बोलणी चालली ती कसली? मोगली जहाजे दर्यामार्गे ये - जा करतात त्यास हा दरबार परवानगी देतो कसा?"

दुभाष्याने येसाजीचे प्रश्न कानी घालताच विजरई बिघडला! त्याने आपल्या दरबाराची चाल न सांगता उलटाच सवाल केला की येसाजी गंभीरांच्याकडे राजांची ओळखपत्रे आहेत काय?

ती 'नाहीत' हे ऐकताच, त्याने येसाजी गंभीरांना चक्क बाहेरचा रस्ता दाखवला. येसाजींनी त्या अपमानास्पद बाबीचा हारकारा रायगडी धाडला.

येसाजी गंभीरांची झाली मानहानी ऐकून, "फिरंग्यांची जहाजे दिसतील तेथे घेर टाकून कब्ज करा," असा हुकूम आपल्या व अरबांच्या जोड आरमाराला राजांनी दिला.

कवी कुलेशही आता टिटवाळ्याच्या कुमकेला चार हजार धारकऱ्यांच्या पाठबळाने उतरले होते. त्यांची आणि इज्जतखान व रजपूत पद्मसिंह यांच्या जोड सैन्याशी चकमक उडाली होती. काही झाले तरी कल्याण-भिवंडीचा भाग औरंगाच्या घशात पडू द्यायचा नाही याचा हंबीरराव, निळोपंतांनी विडाच उचलला होता. रामसेजचा औरंगचा चिवट घेर तर चाललाच होता.

या वेळी महाराजांच्या मनात फिरत होता फिरंगी! कुठे चिमट ठेवून नाक दाबावे म्हणजे फिरंगी तोंड खोलेल याचाच विचार करत ते खासेवाड्यात फेर घेत होते. त्यांच्या भेटीला सुरनीस रामचंद्रपंत हाती खलिता घेऊन आले. तो फिरंगी दरबारचा पणजीहून आलेला खलिता होता.

रिवाज, तपशील देऊन रामचंद्रपंत विजरईचा खलिता वाचू लागले–

"तुमच्या दरबारने वेंगुर्ला बंदरात दस्त केलेली आमची जहाजे अद्याप सोडली नाहीत. 'आमच्या' फिरंगाणात तुमच्या फौजांनी जाळल्या गावांची नुकसानभरपाई दिली नाही. तुमच्या वकिलाकडे दरबारचे ओळखपत्र नाही. अशा परिस्थितीत तुमच्याशी मैत्री राखणे अशक्यच आहे! सुलुखाचा काय असेल तो निर्णय तातडीने घेऊन कळवावा. नाहीतर मोगल बादशहाशी मैत्रीचा सुलूख करणेचा निर्णय या दरबाराला घ्यावा लागेल!"

तो दरबारी रिवाजाचा खलिता नव्हताच. ती फिरंगी विजरईची मराठी दरबारला दिलेला छुपी तराटणीच होती!

'नाहीतर' ह्या शब्दापासूनच महाराजांच्या कपाळीचे दुबोटी शिवगंध थडथडू लागले. "पंत, जाबसुद्धा देऊ नका या खलित्याचा! जो असेल तो साऽफ दवूच फिरंग्यास." महाराजांनीही निवाडाच सांगितला.

"–पण एवढा औरंग तोंडावर पसरला असताना या वेळी?" रामचंद्रपंतांना बोलल्याशिवाय राहवले नाही.

"केलाय त्याचाही विचार आम्ही पंत. हा मैत्रीच्या सुलुखाचा खलिता नाहीच. फिरंगी औरंगचीच जोड देणार. त्यास मिळण्यापूर्वीच त्याला तोडला पाहिजे. नाहीतर

आजच फिरंगाणात हैदोस घालणारा फिरंगी उद्या भवतीचा मुलूख आणि पुरा तळकोकण कुरतडून खाईल. आम्ही राहू मैत्रीच्या सुलुखानं गाफील."

"जी" रामचंद्रपंतांचीही मती गुंग व्हावी असाच तिढेबाज होता तो खलिता.

"पंत, चांगोजींना सांगा आम्ही आजच गड उतरणार आहोत, गांगोली जवळ करण्यासाठी."

"गांगोली ?" विचारावेसे वाटले पंतांना पण त्यांनी आवरले.

चांगोजींनी राजांच्या जाण्याची सिद्धता केली. गड उतरून, पाचाडचा पावलोक दिमतीला घेऊन राजे पादशाहपूरच्या पहिल्या मुक्कामावर आले. वेळ रात्रीची होती.

प्रल्हादपंतांबरोबर आलेला टोपीकरांचा मुंबईचा वकील परतीच्या मार्गावर होता. त्याचा मुक्कामही पादशाहपूरलाच होता. तो इंग्रज वकील हेन्री स्मिथ रात्रीचाच महाराजांच्या भेटीस आला. त्याबरोबर दुभाष्या राम शेणवीही होता.

शेणवी म्हणाला, "टोपीकर दरबारास प्रल्हादपंतांच्या मुंबई भेटीत झाल्या कराराची कागदपत्रे या वकिलासोबतच द्यावी महाराज!"

एकतर मजलेच्या मुक्कामावर, भलत्या अवेळी आणि टोपीकरांना आल्या वकिलांबरोबरच करारपत्रे द्यावीत म्हणून भेटणाऱ्या शेणवीचा राजांना संतापच आला. ते म्हणाले, "शेण ऽ वी, करारपत्रे काय उडून जाणार आहेत आम्हासोबत ? टोपीकर दरबार तर रिवाजात जाणता म्हणून महशूर. कसा आला हा वकील भलत्या जागी, अशा अवेळी तुम्हास घेऊन ?"

शेणवीचे पायच लटलटू लागले. चाचरत कसेतरी तो सफाईचे म्हणून बोलला, "आम्हीच आणला त्यास. कसूर माफ असावा. तो जाईल. आम्ही राहू मागे, महाराज म्हणतील तेव्हा भेटू."

"काही जरुरी नाही तुम्हीसुद्धा राहण्याची मागं! मिळणे ते मिळतील करारपत्राचे कागद रायगडी-दफ्तरातून प्रल्हादपंतांच्या हस्ते. या तुम्ही." महाराजांनी शेणव्याचे शेपूटच तोडले.

पादशाहपूरहून रात्रीच कूच करून कल्याणजवळच्या मढगढीमार्गे राजे गांगोलीला आले. त्यांच्याबरोबर दोन हजार घोडालोक आणि दोनशे पावलोक होता. त्यांच्या राहुट्या गांगोलीत पडल्या. पुत्रप्राप्ती झाली त्या वेळी राजे येसूबाईंना भेटण्यासाठी मागे आले होते गांगोलीत.

संगती आलेल्या प्रल्हादपंतांशी राजांची पुढच्या हालचालीची, वाड्याच्या सदरेवर बातचीत चालली होती. "न्यायाधीश, बहिर्जींना कलम द्या. गाठीचे निवडक खबरगीर फिरंग्यांच्या चौल-तारापूर भागात पेरण्यास लिहा. मिळेल ती खबर उचलून टाकोटाक आम्हास पावती करायला कळवा."

"जी. एक संतोषाची खबर आली आहे. बीड भागात आपल्या फौजेनं आदिलशाहीचा किल्ले धारूर कब्ज केला आहे." प्रल्हादपंत म्हणाले.

किल्ले धारूर! याच किल्ल्यावर मिर्झाराजेने नेताजी पालकरकाकांस कैद करून ठेवले होते, आम्ही आबासाहेबांसह आग्र्यातून सहीसलामत सुटलो त्याने संतापून गेलेल्या औरंगने कैदी काकांना किल्ल्याबाहेर काढून, जखडबंद करून, उंटाच्या पाठीवर लादून पाठवावे असा मिर्झा राजास हुकूम केला आणि चांदणीचौकात पोचताच त्यांची भरचौकात सुन्नत केली. नेताजी पालकरांच्या आठवणीने राजे कातर झाले. समाधान एवढेच की तो किल्ले धारूर आता स्वराज्यात आला.

जसा पन्हाळा तसेच गांगोली गाव राजांच्या आठवणींच्या गाठीचे होते. इथल्या नदीला एक घेराचा डोह होता. त्यात, आलेच कधी तर खाशे, होडकी टाकून पाणफेर घेता यावा अशी सोय गांगोलीच्या सुभेदाराने केली होती.

दोन दिवस झाले आणि मनात औरंग, फिरंगी, सिद्दी, टोपीकर यांच्या आघाड्याच आघाड्या फिरत असलेले राजे प्रल्हादपंतांना म्हणाले, "चला न्यायाधीश, पाणफेर टाकू मिळूनच."

गांगोलीच्या सुभेदाराने खाशांसाठी, दोरखंडाने खुंट्यांना आवळलेली होडकी खुली करून सिद्ध केली. महाराज आणि न्यायाधीश होड्यांत बसले. सोबतीला दहा बारा धारकरीही बसले. राजकारणाच्या नाना बाबींवर चर्चा सुरू झाली. होडकी डोहात संथ फेर घेऊ लागली. मधूनच वल्ह्यांचा 'चुबुक - चुबुक' असा आवाज उठत होता. यात हाका मिसळवत डोहकाठावरून खुद्द महाराजांना कुणीतरी सादवीत होते!

"सा ऽ हेब, सरका ऽ र, महारा ऽ ज" कोणीतरी पोटतिडिकेने, हात उंचावून साद घालीत होते. महाराजांसह सर्व आश्चर्याने घोटाळ्यात पडले होते. महाराजांचा हातइशारा पकडत होड्या सरसरत काठाकडे आल्या. महाराज भुईउतार झाले. काठावरची, भगवी कफनीधारी असामी थेट महाराजांसमोर लोटांगण घालून ऐकणाऱ्यांचे काळीज पिळवटून टाकेल असे गलबलून टाकणारे, घोगरट बोलली —

"साहेब थोर, सर्वज्ञ शास्त्रार्थाचा अर्थ स्वत: जाणतात. पंडितांचा निशा होय ऐसा निवाडा करतात. मग माझ्या बाबींचे पारिपत्य का होत नाही ?" तो होता चिपळूणचा कृष्णाजीपंत! रायगडावर उपोषण धरलेला!

"सुमार व्हाबाबा. एकांती आहोत आम्ही इथं. बोला — साफ साफ बोला काय सल आहे तुमचा ? पारिपत्य करू आम्ही त्याचे."

कृष्णाजीपंताने आपले चिपळूणचे देशकुलकर्ण, खाशांच्या मसलती बैठकीचे असल्याचा फायदा घेऊन राहुजी सोमनाथांनी कसे गिळंकृत केले याची कलमकथा सांगितली. ती शांतपणे ऐकून घेतल्यावर महाराजांनी न्यायाधीशांना नजर दिली.

"महाराज, कृष्णाजी म्हणतो ते सही आहे. थोरल्या महाराजांनीसुद्धा एकाचा

वतनछेद करून दुसऱ्यास कधी दिला नाही. राहुजींच्या गैरमेळाने, आपला अपसमज करून दिल्यानं हे झालं आहे." न्यायाधीश तपशील देत म्हणाले.

"न्यायाधीश, तुम्ही, रामचंद्रपंत, कुलेश असे बसून मजालस भरवा. कृष्णाजीपंतांचं देशकुलकर्णं त्यांचं त्यास मिळेल असं राजपत्र सिद्ध करा. आणि... आणि राहुजींना कळवा– तुम्ही आबासाहेबांपासून सेवेत असता असा मनाचा हलका भाव कैसा दाखविला? बिनबोभाट वतन कृष्णाजीपंतास सुपूर्द करा!"

महाराजांनी डोहाकाठीच दिल्या निवाड्याने मन भरून पावले कृष्णाजीचे.

औरंगाबादेच्या आपल्या शाही महालात औरंगजेब बेचैन फेऱ्या घेत होता. रामसेज, कल्याण-भिवंडी, कोल्हापूर-पन्हाळा मराठी मुलखात त्याने फेकलेल्या चौफेर फळ्यांवरून त्याच्या मनाजोगी एकही खबर येत नव्हती! त्याचा स्वभाव आता चिडचिडा आणि संशयखोर झाला होता. त्याचे रणमस्त, बहादूर, मामूर, शाबदी, ईरज, इज्जत असे पसतिसावर मातबर खान जागजागी प्रचंड तळ टाकून बसले होते. आज्जम, कामबक्ष असे शहजादे, मुईजुद्दीनसारखे नातू त्याने या पहाडी मुलूखभर पेरले होते. एकही नाबकार त्याला तसल्ली देईल अशी कामयाबीची खबर काही पाठवत नव्हता. प्रत्येकजण नव्या कुमकेची, तोफांची, घोडे-उंटांची, रसदेची नुसती मागणी करीत होता! नाही म्हणायला त्याच्या रुहुल्लाखानाने सुपूर्द केलेली जोखीम, त्याच्या इच्छेबाहेर फत्ते केली होती. फितवेखोरीची! गाजरांची जुडी समोर बांधून, घाण्याचे बैल लाकडी लाटेभोवती फिरते ठेवावेत तसे रुहुल्लाने जागजागचे मराठी सरदार स्वराज्यापासून तोडून सलतनतीभवती फिरते केले होते.

फेऱ्या घेणाऱ्या औरंगजेबाच्या कदमा-कदमाबरोबर, खाटकाचा पाळीव बोका पायात घोटाळत, घोटाळत फिरावा तसा वजीर असदखान– "जी– आका अली, जो हुक्म हजरतपन्हा, बिल्कुल दुरुस्त हजरत" म्हणत फिरत होता. फर्मानेच फर्माने घेतलेले घुडस्वार, सांडणीस्वार, जासूद औरंगाबादेच्या वेशीतून बाहेर पडत होते.

मरहठ्ठ्यांनी आता कहार मांडला होता. ते जालना, नगर, पेडगाव, वऱ्हाड, खानदेश, सोलापूर या बादशाहाच्या खास फौजबंद ठाण्यांपर्यंत थेट धडका देत होते.

इकडे तारापूरवर तर कोटबंद फिरंग्यांची पाचावर धारणा बसली. खासा राजेच एक हजार घोडा आणि दोनशे पावलोकांनिशी गांगोलीहून तारापुरावर उतरले! संगती प्रल्हादपंत होते. फिरंग्यांना धडक भरविणारा "हर हर म्हाऽदेव" चा रणघोष उठला. दमण, वसई भागात पूर्वीच पेरलेल्या कुमकी शिबंद्या राजांना मिळाल्या. पुरे तारापूर दिवसाढवळ्या लुटीवर आणि जाळावर पडले. फिरंग्यांकडचे कानडी आणि फिरंगी सैनिक जीव बचावण्यासाठी रानोमाळ पळू लागले. बऱ्हाणपूर, औरंगाबादेकडे मोगलांची झाली तीच गत तारापूरच्या फिरंग्यांची झाली.

राजांच्या विजयी फौजेतील तुकड्या दमण वसईतर्फेच्या असेरीम, डहाणू, सैवाना, अशा गावांवर उतरल्या. ती गावेही लुटली - जाळली गेली.

तारापूरच्या माळावर पडल्या डेऱ्यात राजे आणि प्रल्हादपंत फिरंग्यांच्या, औरंगजेबाच्या मूग गिळून बसल्या आदिल व कुत्बशाही दरबारच्या चालींची चर्चा करीत होते. ती तोडत वर्दीदार डेऱ्यात आला आणि म्हणाला, "दमणचं हरी शिवदेव भेटीला आल्यात. संगती एक काढण्या घातलेला, पांढऱ्या ढगल्याचा कैदी हाय."

राजांनी इजाजती हात उठविला. हरी शिवदेव काढणीबंद कैद्याला पाठीशी घेऊन डेऱ्यात आले. तो एक फिरंगी पाद्री होता.

रिवाज देत हरी शिवदेव म्हणाले, "लुटीची वस्त असती तर गोणीत भरून धाडली असती गडाच्या जामादारीत, पण या कुचकामी डगलेवाल्याचं काय करावं? आज्ञा व्हावी महाराज."

पाद्र्याला अंगभर न्याहाळत महाराज बसल्या बैठकीवरून उठले. कैदी पाद्र्यासमोर आले. तो रंगाने लालबुंद आणि किरमिजी दाढीचा पाद्री कुठल्या तरी चमत्कारिक बोलीत काहीतरी बोलला. आकाशाकडे डोळे नेत उजवा तळहात त्याने कपाळ व डावा, उजवा खांदा यांना भिडवला. त्याचे डोळे भयकातर झाल्याचे साफ दिसून येत होते. अंगचा सफेद डगला लटलटत होता. त्याच्या समोर उभे राहून त्याच्या निळ्या-घाऱ्या डोळ्यांत आपली नजर खुपसलेल्या महाराजांच्या मनात येसाजी गंभीरांनी कानी घातलेल्या तळफिरंगाणाच्या हलाखीचे बोल तर घुमत होतेच. पण तो पाद्री बघताना, कशी कोण जाणे राजांना समर्थांची याद झाली.

"कारभारी - कार्यी लावावे –
मागील अपराध क्षमावे.
चढती वाढती कीर्ति - पावाल येणे॥
सकळ लोक एक करावे.
गनिमा निपटून काढावे॥"

राजे पाद्र्याकडे बघतच राहिले. तो थरथर कापतच होता. राजांबद्दल बरेच काहीबाही ऐकून होता तो. त्याला वाटले आपली गर्दन उडवून कत्लच होणार आता!

पाद्र्यापासून वळते होत पुन्हा बैठक घेत ते शेजारीच उभ्या असलेल्या प्रल्हादपंतांना म्हणाले, "काय करावं या किरिस्ताव पाद्र्याचं न्यायाधीश?"

"जी, सोडून द्यावं त्यास. तो काही लढाऊ असामी नाही." प्रल्हादपंतांनी निवाडा देत आपला अंदाज सांगताना पुढे म्हटले– "शिवाय आपले येसाजी गंभीर फिरंग्यांच्या दरबारी हेजिबी करताहेत. यास काही बरंवाईट केलं तर त्यांना तोशीस दिल्याशिवाय राहायचा नाही तो दरबार."

महाराज विचारगत झाले. "अगोदर मरतात ती मनं आणि मग मरतात ती माणसं. असले हस्तक मारतात ती आमच्या मावळमाणसांची मनंच. यास सोडावं? कदापि नाही! मारावं ते राजकारणास लागी नाही."

हरी शिवदेवांकडे बघत महाराजांनी निवाडा दिला. "यास असाच रायगडी धाडा, हरिजी. कोठीबंद ठेवण्यास कळवा. याची ही गत ऐकून फिरंगी दरबार काय करतो ते दिसेल. तो मैत्रीचा सुलूख करा म्हणतो ते ढोंगी की मनचं तेही उघड होईल!"

रायगडी आलेले महाराज दोन गंभीर बाबींचा विचार करीत होते. शिलेखाना, अंबारखाना, दफ्तर, सिंहासनसदर कोठेही ते असले तरी त्या बाबी सावलीगत त्यांचा पाठलाग करीत. एक बाब होती, वेलवण मुक्कामी रघुनाथपंत हणमंते यांचा काळ झाल्याची. मोठ्या उमेदीने कर्नाटकातून आल्या पंतांना मुजमूची जोखीम महाराजांनी दिली होती. रघुनाथपंत! बिरवाडी मुक्कामी त्यांच्याशी झाल्या भेटीच्या आठवणी राजमनात सारख्या फिरत होत्या. केवढी निडर असामी रघुनाथपंत!

शेवटी आपल्याच मनाचा कौल घेऊन राजांनी मुजुमदारीच्या सेवेची जोखीम रघुनाथपंतांचे चिरंजीव नारायण रघुनाथ यांच्या सुपूर्द केली.

दुसरी गंभीर बाब होती येसाजी गंभीर यांना पणजीत फिरंग्यांनी कैद केल्याची. ती कानी पडताच राजे समजून गेले की फिरंगी दरबारची चाल काय आहे. तो दरबार आता औरंगच्या गळ्यात पडणार हे शाबीत झाले होते.

अद्याप राजस्थानातील मिर्झाचा मुलगा, अंबरचा राजा रामसिंग म्हणावी तशी साथ काही राजांना देत नव्हता. खंडोजींना बोलावून घेऊन राजांनी रामसिंगाला दुसरा दीर्घ मार्मिक खलिता लिहायचा मजकूर सांगितला.

"फिरंगी! फिरंगी!" या मनच्या भिंगरीवरच राजे जामदारखाना, आताषी कोठार, पाचाडपागा या ठिकाणांना सारख्या भेटी देत होते. येसूबाई, बाळराजे, भवानीबाई यांच्याशी निवांत बोलायलाही उसंत मिळत नव्हती त्यांना.

असेच पाचाडपागेची जनावरे नजरेखाली घालत ते पेशवे, खंडोजी, रायाजी-अंताजी अशा शेलक्यांसह पायफेर घेत होते. मधूनच उमद्या जनावराचे पाठवान थोपटत होते. जनावर अंगभर भोवरा उठवून, कान फडकावून साथ देत होते.

"खंडोजी, अंबरचा रामसिंग नाही साथ देत, आपली म्हणावी ती माणसं नाही पण जनावरं किती लगोलग साथ देतात." महाराज काही कढाने म्हणाले.

"जी, जनावरांची नजर समोर असते... माणसांची चौफेर फिरते! कुणीकडे स्थिरावेल सांगता येत नाही!" खंडोजी रांगडे बोलले.

राजांचे आपल्याकडे ध्यान जावे म्हणून एक खबरगीर लगबगीने पागेच्या दरवाज्यात घुसला. राजांना जुहार देत न राहवून तिथूनच, अदबीने म्हणाला— "चांगभलं धनी ऽ ऽ,

कल्याण-भिवंडीचा गनिमतळ उठला! औरंगाबादेच्या वाटंला लागल्यात रणमस्त, बहादूर, रुहुल्ला ढीग समदं खान! आपलं रूपाजी, सरलष्कर, मानाजी घाटा-पांदीत मिळंल तिथं छापं मारत्याहैत त्येंच्यावर."

राजांभवतीच्या सगळ्या माणसांचे चेहरे उजळ झाले. "जगदंब!" म्हणत राजांनी छातीवरच्या माळेला हात भिडवून क्षणैक डोळे मिटले.

ज्या हेताने ते तारापूर-दमण भागात गेले होते तो आता हाती घेता येणार होता. पण चाल काय असावी औरंगची फौजफळी मागे घेण्यात? राजे विचारगत झाले.

ज्या मुरादीने औरंगने कल्याण-भिवंडी पटात घेण्यासाठी जंगजंग पछाडले होते ती पुरी झाली नव्हती. सगळी कोकणपट्टी मुंबईचा टोपीकर, पणजीचा फिरंगी आणि जंजिऱ्याचा हबशी यांच्याशी जोड घेत घशात घालायची. राजांचा दर्यामार्गच ताब्यात घ्यायचा. मग दर्या आणि माती यांची चिमट फौजीबळाने आवळायची. काफर, दगाबाज, सेवाच्या पहाडी मुलुखाचं धूपदान करून त्याच्या पाक सुवासात नमाज पढायचा!

कल्याण भिवंडीहून नामोश घेत परतणाऱ्या रणमस्त, बहादूर यांची आता तो खरड काढणार होता. एकट्या बक्षी रुहुल्लाखानाला मात्र जडावाचा खंजीर आणि घोडा बक्षून सर्फराज करणार होता. कारण कामगिरीच केली होती त्याने तशी मोलाची. भवानीच्या माळेतली एक एक कवडी उचलून औरंगच्या तसबीहच्या माळेत गुंफण्याची, फितवेखोर फोडण्याची!

मृगाने झड धरली. पाऊसमाऱ्याखाली जागाजागी पडलेले मोगली तळ झोडपून निघू लागले. गडागडांना गवती झडपा चढल्या. रामसेजचा चिवट, नेक किल्लेदार अद्याप चिकाटीने घेर झुंझवीतच होता. तळकोकणवरचा औरंगचा फौजीताग कमी झाला याच संधीचा फायदा घ्यायचा ठरविलेले राजे पडत्या पावसात येसूबाईंचा निरोप आणि थोरल्या आऊंच्या व आबासाहेबांच्या समाधीचे दर्शन घेऊन महाडघाटीने राजापूरवर उतरले. आठ हजारांचे घोडदळ होते त्यांच्यासंगती.

चेऊल ऊर्फ रेवदंड्याचे राघो विश्वनाथ, दमणचे हरी शिवदेव, दाभोळचे वेंकाजी निमदेव यांना तातडीचे हारकारे रायगडाहूनच गेले होते.

घसघसत्या पावसात तळकोकणच्या मर्दान्यांची खाशा डेऱ्यात खलबती बैठक बसली. मानकऱ्यांना मनसुबा खुला करीत राजे म्हणाले, "गनिम कल्याण भिवंडीवरून उठला. आता त्याचं पाठबळ घेत उचल खाणाऱ्या फिरंग्यास धडा देणं आहे! खुद्द आम्ही जाणार आहेत चालून रेवदंड्यावर, तुम्ही वकुबाचे ते आपआपल्या ठाण्यावर सावध राहून रसद-शिबंदीची प्रसंगी कुमक करण्यास सिद्ध असावं. राघो विश्वनाथ, तुम्ही रेवदंडा प्रांतीचे. मुलूखाचा काही तपशील?" राजांनी बेत खुला करीत राघोंना विचारले.

"जी. फिरंग्यांच्या कोटास दोम फरांसिस म्हणून सालार आहे. दिमतीला तोफखाना आहे त्याच्या. पावसात लागी पडायचा नाही त्याच्या तो. बळ धरून वेळेसच घेर टाकला पाहिजे." राजांच्या मनसुब्याला राघो विश्वनाथांनी दुजोरा दिला.

'स्वारी रेवदंड्यावर' खल होऊन सर्वांना निरोपाचे विडे देण्यात आले. पावसाची तमा न करता कांबळी, काचोळी पांघरून खबरगीर रेवदंडा-दमण भागात पांगले.

फिरंग्यांविरुद्ध स्वराज्याच्या फौजेच्या आघाडीची ठिणगी ऐन पाऊसकाळात पेटली. रेवदंडा हल्ल्याचे मुख्य लक्ष ठेवून, कोरलाईचा किल्ला, अंजोर असा घेर धरत राजांच्या मावळी फौजा वरफिरंगणात घुसल्या.

रेवदंडा पाडण्यासाठी दोरबाज धारकऱ्यांनी किल्ल्याच्या तटाला, पाऊसमारा अंगावर घेत शिड्या भिडविल्या. फिरंगी दोम फरांसीसने तटावरून दगड, बाण बरसवायला सुरुवात केली. खुद्द दोम हाती बंदूक घेऊन दोरबाजांवर बार टाकू लागला. पूर्वी जसा पन्हाळ्याला आबासाहेबांना घेरात कोंडत सिद्दी जौहराने घेर आवळला होता तसाच आता दोम फरांसीसला कोंडत राजांनी घेर आवळला. त्या खबरीने जागा झालेला पणजीचा विजरई कोंद-दि-आल्व्होर मग पेचात पडला. त्याने याकुतखानाला व हबशी खैरतला मदतीचा खलिता दर्यामार्गे सुरतला धाडला.

राजे रोज घेरावर घोडाफेर टाकत होते. शिड्यांवरून कोसळलेल्या दगड, बाणांनी जाया झालेल्या धारकऱ्यांना धीर देत होते. भिजत, पावसाळी सांजा पाठीवर घेत परतत होते. अशाच एका सांजेला सुभेदार राघो विश्वनाथ त्यांच्या भेटीला डेऱ्यात आले. भिजल्या आवाजात म्हणाले, "कोल्हापूर-पन्हाळा प्रांत नेटानं आबादान राखून असणारे डबीर जनार्दनपंत हणमंते गेल्याची खबर आहे स्वामी!"

राघो विश्वनाथ आपल्या स्वामींच्या चर्येवरची घालमेल बघून पुढचे कसे बोलावे याच विचारात पडले. मन बांधून शेवटी म्हणालेच, "थोरल्या स्वामींपासून मुन्शीच्या चाकरीत असलेला काझी हैदर औरंगाबादेत गनिमाला मिळालाय. बादशाहनं त्याला दहा हजारांची बक्षिसी आणि दोन हजार स्वारांची मन्सबी दिलेय!"

काही सांगावे झाले तर ते कोणास? गणोजी, कान्होजी पारखे झाले त्या समयी श्रीसखींना वाटले तसेच राजांना वाटले. स्वतःच स्वतःशी बराच विचार करून त्यांनी राघोंना सांगितले, "आजच रायगडी खलितास्वार पाठवा, डबीरी जनार्दनपंतांचे पुत्र वासुदेवपंतांस सुपूर्द करण्यास कळवा."

रेवदंड्याच्या वेढ्याला दीड महिना झाला. दोम फरांसीस चिवट झुंज देत होता. राजे हटायला तयार नव्हते. कल्याण-भिवंडी, मलकापूर, पन्हाळा, सोलापूर, रामसेज, वऱ्हाड, खानदेश, रायगड चारी बाजूंनी खबरा यात होत्या. हंबीरराव, केसो त्रिमल, नारूजी, संताजी जगताप, कुलेश, जागजागीचे लढाऊ म्होरके पावसातही आपआपली

जोखीम सांभाळून होते. घडल्या बारीक सारीक चकमकीची, फितव्याची, खटकणाऱ्या खुट्ट झाल्या बाबीची खडान् खडा खबर, नदी-नाले ओलांडत बहिर्जींचे नेक खबरगीर थेट रेवदंड्यांपर्यंत पोचवत होते.

रात्रभर आभाळ फाटल्यागत पाऊस कोसळत राहिला. रेवदंड्याचे थकले-भागले फिरंगी घरट्याघरट्यांत आराम घेत राहिले. भल्या पहाटेच, पडल्या पावसाने कातावलेले फिरंगी पहारे बदलत असताना, संभाजीराजांनी तलवारीचे टोक रोखून मावळ्यांना रेवदंड्याचा हल्ला निकराचा करताना चेतावनी दिली, "हर ह ऽ र महादेव!" श्रावणी पहाट थरकून गेली. मावळी फौज तुटून पडली.

तीन आघाड्यांनी एकाच पहाटेला तोंड फोडले, रेवदंड्यांचे मेरी चर्च, किल्ला आणि मोरावचा किल्ला. चर्चचा फिरंगी संरक्षक डोमिंगो गोम्स याने तर कानडी तोफजींना पावसाळी चिखलात राबवून चर्चच्या मनोऱ्यावरच तोफा चढविल्या!

पावसाळी ढगाळला दिवस चढत होता. तिन्ही मारगिरीच्या जागांवर मावळे शिड्या लावत, तोफगोळे झेलत, दगडबाणांचा मारा पेलत, इसरीने लढत होते. तिन्ही फिरंगी ठाण्यांनी मावळ्यांची हाय खाल्ली. पावसामुळे, तोफबाणांच्या माऱ्याने मावळ्यांनाही म्हणावे तसे यश नव्हते. हा किल्ला पडला तर वेंगुर्ला, दाभोळ, नागोठणे, रेवदंडा अशी दर्यासाखळी बांधून मुंबईकर गोऱ्यांशी प्रल्हादपंतांनी केल्या मैत्रीच्या तहाची जोड घेत राजांना मराठी आरमार बळकट करायचे होते. अरबांच्या मदतीने चाललेला फिरंगीमोगलांचा दर्यादोस्ताना तोडायचा होता.

रेवदंडा, दमण, वसई भागात घुसलेल्या राजांच्या फौजांमुळे धास्तावून गेलेल्या विजरईने, प्रजेसह पाद्र्यांनासुद्धा फर्मान काढले– "संभाजीराजा चालून येत आहे. मिळतील ती हत्यारे घेऊन असाल तेथे जंगास सिद्ध राहा!"

याच वेळी कल्याण-भिवंडीत मार खाऊन परतलेल्या रणमस्तखानालाही 'बहादूरखान' ही किताबत देऊन औरंगने त्याचा मरातब केला होता. का? तर त्यालाच आता आदिलशाहीच्या विजापुरावर धाडावयाचा होता.

रमजानचा महिना असल्याने औरंगाबादेच्या दौलतखान्यात येऊन बादशाह रोजा धरून होता. थुंकीही न गिळता पाळाव्या लागणाऱ्या, कोरड पडल्या उपाशी तोंडानेच तो विजापूरच्या शिकंदर आदिलशाहाला लिहायच्या खलित्याचा मजकूर सांगत होता. मनी 'अलिजांना आपलाच काही शक आला की काय?' ही धास्ती धडक भरत असताना प्रत्यक्ष त्याची सूनच तो मजकूर रेखीत होती– आज पहिल्यानेच त्याने आपल्या सुनेलासुद्धा राजकारणी मतलबासाठी कलमी सेवेवर घेतले होते!

सरत्या पावसाळ्यात तिहेरी पट्ट्यांचा शतरंज खेळीला पडला. औरंगाबाद, पणजी आणि रायगड असे ते पट्टे होते. खेळे होते मोगल, फिरंगी आणि मराठे.

रेवदंड्याहून राजांना रायगडी परतावेच लागले होते, कारण पणजीचा विजरई तळफिरंगाणात चालून येण्यासाठी हत्यारे, सैन्यसंचणी यांची जय्यत तयारी करतो आहे अशी पक्की खबर होती. त्याला लढाऊ सामान पुरविणारी दोन गलबते पोर्तुगालहून, सात-दर्यापार होऊन पणजीला उतरली होती.

औरंगजेबाची कल्याण-भिवंडीवरची पीछेहाट ही राजांनी केल्या अंदाजाप्रमाणे हूल होती.

बाहेर तुरळक पाणसरी कोसळत होत्या. खासेमहालात बोलावून घेतल्या निळोपंतांना राजे म्हणाले, "पेशवे, बिचोलीत ठाण झाल्या अकबरास कळवा की तुम्ही आणि दुर्गादास मिळून कारवारात डचांची भेट घ्या. डचांची पडेल ती मदत शहजाद्याच्या बोटाच्या आकडीनं खेचली पाहिजे. त्यासाठी मरातबाचा नजराणा पाठवा बिचोलीस ... मात्र ... मात्र कंठ्यासारखा अलंकार नका पाठवू नजराण्यात!"

"जी. रेवदंड्याचा घेर म्होरक्याविना पावसात आहे. तेव्हा –" निळोपंतांनी मोलाची बाब पुढे घेतली.

"नाइलाजानं उमेदीनं घातला घेर सोडून आलोत आम्ही पेशवे. वरफिरंगणावरचा आमचा घेर सुटावा म्हणून फिरंगी तळकोकणावर दाव टाकणार आहे. प्रसंगी बेळगावमार्गे रामघाटानं औरंगजेब त्याला कुमक करणार अशी खात्रीची खबर आहे. औरंगजेबाला – 'दिल्लीतख्ताचा शहेनशहा' म्हणवून घेणाऱ्या – अकबराला दस्त करायचं आहे. आणि त्याच मार्गानं आपल्या मुलखातही घुसायचं आहे."

"फिरंगी-मोगलांची जोड पडली तर पुरा तळ आणि वरकोकण गिळंकृत केल्याशिवाय औरंग राहणार नाही महाराज." निळोपंत आपल्या स्वामींच्या मनातलेच बोलले.

"त्यासाठी आम्ही वरफिरंगाणात रेवदंड्याचा वेढा तुमच्या देखरेखीखाली देणार आहोत."

"जशी आज्ञा. आम्ही जाऊ कुमकबंद होऊन रेवदंड्यावर."

पेशव्यांशी ठरल्या मनसुब्याप्रमाणे महाराज त्यांना संगती घेऊन रायगड उतरले. आणि पडत्या पावसात आठ हजारांची फौज दिमतीला देऊन महाराजांनी निळोपंतांना पाचाडपागेसमोर निरोप दिला.

महाराजांनी अटकळ बांधली तसाच या वेळी औरंगाबादेतून आपल्या आबाजानांचा जामा, गुडघे टेकून चुंबत औरंगजेबाचा लाडका शहजादा शहाअलमही वाजतगाजत वेशीबाहेर पडला. त्याच्या दिमतीला तुर्की, पठाण, मोगल, फितूर मिळून पंचेचाळीस हजारांचे सैन्य होते! त्यात तोफखान्याचा दरोगा आतषखान होता. लुत्फुल्ला, इखलास, जान निसार, सादत असे खान होते.

आणि पहाडी, डोंगरदऱ्यांच्या मुलखाची शहाआलमला अचूक आणि इमानेइतबारे

माहिती पुरविण्यासाठी नागोजी माने नावाचा सातारातर्फेचा, रहिमतपूरचा, एक 'माहितगार' मराठा सरदारही होता. सुरतहून दर्यामार्गे पणजीला धान्य, शस्त्रे आणून ती त्याला पुरविली जाणार होती.

भेटीस आलेल्या शहजाद्याला औरंगने कानमंत्र दिला होता. "बांदा, बिचोली, पणजी भागात फिरणाऱ्या बागी अकबराला दिसेल तिथं कत्लच करावा!"

भावाचा भावानेच काटा काढावा हे दोघांचाही 'बाप' शांत-थंडपणे सांगत होता. तिहेरी पट्ट्यांचा शतरंज सुरू होता.

पाऊस उलगला. बेत साफ करणाऱ्या फिरंग्यांच्या हालचाली सुरू झाल्या. ते पणजीची मांडवी खाडी ओलांडून लगतची गावे रात्रीबेरात्री बेचिराख करू लागले. कैद माणसे सक्तीने बाटवू लागले. माणसे हवालदिल झाल्याच्या खबरा रोजाना रायगड चढू लागल्या. चौल भागात घेर टाकून बसल्या निळोपंतांच्या कानी त्या पडताच पुरा रेवदंडा, दमण, वसई पट्टा त्यांनी पटाखाली धरला. त्याने भेदरलेले चार हजारांवर फिरंगी मुंबईच्या पंखांखाली आसऱ्याला गेले.

पणजीची घुसखोर चाल पारखूनच बोलावून घेतलेले येसाजी कंक आणि फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ महाराजांच्या भेटीसाठी आले. येसाजींच्या बरोबर त्यांचा ऐन बांडा मुलगा कृष्णाजी बघताच महाराजांना धनाजी जाधवांचीच आठवण झाली. कृष्णाजी मल्लखांबासारखा घोटीव आणि ताठ अंगकाठीचा सावळा गडी होता.

"कंककाका, फिरंगी आज ना उद्या फोंड्याच्या कोटाकडे मुसंडी मारणार. तुम्ही, धर्माजी आता फोंडाफळी नेटाक ठेवावी." महाराज येसाजींना म्हणाले.

"बरी कामदारी सोपवलिसा धनी. आम्हावर हाय न्हवं फोंडा, काळजीच करू नगा त्येची. ह्या पोराला तेवढ्यासाठनंच आणलाय संगट." उतार झाले तरी खड्या बोलीचे येसाजी कृष्णाजीकडे हातरोख देत म्हणाले.

धर्माजी नागनाथांना राजांनी रसद, कुमक, फिरंग्यांच्या लढाईचं तंत्र यांची तपशीलवार माहिती दिली. धर्माजी, येसाजी, कृष्णाजी गडावर एक मुक्काम टाकून फोंड्याकडे उतरले.

आपल्याच विचारात राजे हिरकणी माचीवरून दिसणारा, फरशीच्या आकाराचा सूर्यास्त बघण्यात हरवले होते. डावे-उजवे मुधोजी, चांगोजी, खंडोजी उभे होते. कुणीच काही बोलत नव्हते. एवढ्यात जोत्याजी केसरकर लगालगा माचीवरच आला. राजांना स्वत:त डुबलेले पाहून सांगावे की नको या विचाराने घुटमळला. काही तरी विचाराने महाराजच वळले. जोत्याजी आता मात्र सामोरा झाला.

"धनी, दिलेरखानाची खबर हाय ..." तो चाचरला.

"जोत्याजी, नाव नका काढू आम्हासमोर त्याचं." महाराजांच्या मनात क्षणभरातच दिलेरच्या गोटातले साल सरकले.

"जी ती पाळीच यायची न्हाई आता कुणावर! दिलेरनं आपल्या गोटात हिरकणी खाऊन जीव दिला धनी!!"

"काऽय जोत्याजी, काय म्हणालात?" आज पहिल्यानेच फारा दिवसांनी राजांच्या उभ्या देही काटा सरकला.

"खरं हाय धनी – बादशानं त्येची समद्या म्होरं लई खरड क्येली. म्हनला, 'तुम जैसा सालार है नमकहराम, फते क्यू नहीं की मुलुखमें?' आन् बेइज्जतीने बिघाडला खान तसाच आपल्या डेऱ्यात परतला आन्...."

दिलेर! रामराजांच्या मासाहेब! गोदावरी! मावळतीला जाणाऱ्या बिंबाच्या तिकोनी फरशीगत जळजळीत विचारच विचार शंभुमनात फिरू लागले आणि मग बराच वेळ अनेक रूपांतला पठाण दिलेर तेवढाच महाराजांच्या मनात रेंगाळत राहिला.

राजापुरात एकीकडून राजांनी फर्मान दिलेल्या शिबंद्या येऊन मिळत होत्या, दुसरीकडून फोंड्याचा घेर फिरंगी बळकट करताहेत अशा खबरांवर खबरा येत होत्या. आता राजापूर मराठी फौजेचा जंगी तळच झाले होते. तीस हजारांवर मावळा तिथे डेरेदाखल झाला होता. धर्माजी, नागनाथ, हंबीरराव, खंडोजी त्या पुऱ्या तळाची देवघेव बघत होते. धर्माजींना बोलावून घेत राजांनी फर्मावले, "सुभेदार तुम्ही फ्रेंचाच्या वखारीत जाऊन त्यांच्या विजरईची भेट घ्या. त्यांना साफ समज द्या. इथून फिरंग्यास कोण्या वजेची कुमक करण्याची आगळीक त्यांनी करू नये. इथला आमचा तळभार वाढला आहे. तातडीच्या खर्चासाठी दीड हजार पागोडेही कर्ज म्हणून देण्याची मागणी घाला त्यास."

"जी, फोंडा आता अधिक नाही तग धरायचा. आठ दिवस झाले. येसाजी कुमकेची वाट बघत नेटानं घेर झुंजविताहेत." धर्माजी फोंड्याचे सुभेदार असल्याने त्यांनी चिंतेची बाब पुढे घेतली.

धर्माजींना राजे काही बोलणार तोच डेऱ्याबाहेर 'ठोऽऽ ठोऽऽ' अशी कुणी तरी सरळ बोंब ठोकल्याचा मोठा आवाज आला!

राजांनी धर्माजींकडे चमकून बघितले. काही क्षणातच एका इसमाला दंडाला धरून खंडोजीच आत आले. त्याला पुढे घालत म्हणाले, "नायकवडी आहे हा फोंडा कोटाचा. काही फिर्याद आहे म्हणतो. मिनत्या केल्या सांगत नाही. म्हणून शेवटी खाशासामनेच आणावा लागला." खंडोजी वैतागलेले दिसत होते.

धर्माजींनी आपल्या प्रांतीच्या नायकवडीला ओळखले. त्याच्याजवळ जात त्याचा दंड खंडोजीच्या हातून सोडवून घेत म्हणाले, "बोंब मारून फिर्याद करायचा हाच रिवाज आहे तळकोकणात चिटणीस! काही बेअदब केली नाही त्यानं."

महाराज नायकवडीच्या समोर आले. राजांच्या पायावर डोके ठेवण्यासाठी तो आडवाच झाला. त्याला राजे म्हणाले, "ऊठा. बोला. निडरपणे फिर्याद बोला तुमची."

"माजी एकल्याची न्हाई!" धीर चेपलेला नायकवडी फिर्याद ठेवत म्हणाला, "मुलखाची हाय. कशापायी धनी अडकून पडल्यात हतं? आमचा फोंडा तर जाणारच पर भवतीचा मुलुखबी जाणार फिरंग्याच्या घशात. जे असंल त्ये आजच कराय पायजे."

राजांच्या मनातली बाबच छेडली फिर्यादी नायकवडीने. वळते होत राजांनी विचारलं, "आणि काही फिर्यादी?"

"आज लई जोराची हालचाल चाललिया फिरंग्यांची फोंड्याभवत्यानं. आज रातीलाच घालील त्यो वर्माचा हमला कोटावर."

"खंडोजी, हंबीरमामांना बोलावून घ्या. धर्माजी, पाच हजारांचा निवडीचा घोडालोक तयार ठेवा. जमेल तेवढे, पायदळ आत्ताच कूच करा फोंडामार्गानं. आम्ही – खुद्द आम्हीच जाऊ येसाजींच्या कुमकेला!" राजे निर्धारी बोलले.

आला नायकवडी समाधानाने डेऱ्याबाहेर पडला. आत आले खिदमतगार राजांच्या अंगी बख्तर, ढाल, हत्यारे चढवू लागले.

याद फर्मावलेले हंबीरराव आले. "आम्ही फोंड्यांची कुमक करायला राजापूर सोडतो आहोत सरलष्कर. तुम्ही आमची वर्दी मिळताच पुऱ्या जमावानं येऊन मिळा. फोंडाच नाही, फिरंगाणच धरायचा आहे घेरात!" राजे त्यांना म्हणाले.

"आम्ही संगतीच आलो तर..." राजांना एकले पुढे सोडणे हंबीररावांच्या जिवावर आले.

"पुरा तळ हलायला वेळ लागेल. त्यासाठी तुम्ही मागे असा."

लढाऊ साज अंगावर घेतलेले राजे बाहेर पडले. धर्माजी, खंडोजी, हंबीरराव यांना गाठीच्या फौजेवर ठेवून, त्यांनी सिद्ध झाल्या 'चंद्रावतावर' मांड घेतली.

'जय भवाऽनी' त्यांनी हंबीररावांसह सर्वांचा निरोप घेत टाच भरली. उधळत्या चंद्रावताच्या आघाडी खुरातले चंदेरी कडे उन्हात झमझमू लागले!

विजरई आल्वोर आपल्या साथीदारांसह, भगदाड पडल्या फोंड्यात, निकराचा आखरी हमला करून शिरण्यासाठी फौजेची शिस्त मांडून तयारच होता. त्याचे वाजंत्री फिरंगी पडघम घुमवीत फौजेला चेतना देत होते. चित्रविचित्र किलकाऱ्या उठवीत होते.

तटावरून हवालदिल येसाजी-कृष्णाजी कंक त्यांच्याकडे बघत आपल्या धारकऱ्यांना धीर देत गरगर फिरत होते. आता फोंडा होता जिवा-मरणाच्या ऐन टोकावर. थोडा अवधी झाला तर...

एवढ्यात उठल्या! "हर हर म्हाऽद्येव" च्या गगनस्पर्शी मर्दान्या किलकाऱ्या उठल्या. सरसरत येत्या धूळलोटांतून फडफडत येणारा भगवा जरीपटका येसाजी-कृष्णाजींना तटावरनं दिसला. पुरा फोंडा कोट तो बघताना चैतन्याने कसा सळसळून उठला. ऐलतीराला त्यानं साद दिली 'हर हर म्हाऽद्येव.' फोंडाही पैलतीरावरून कडाडला.

मध्ये सापडलेले फिरंगी गोंधळून मागे वळताना कुजबुजू लागले – "ता पळय. राजा इलो!" हा, हा म्हणता विजरईने अंग मोडून मांडल्या सैन्याची शिस्त पा ऽ र विस्कटली.

तसे तटावरचे मावळे तर आनंदी जल्लोषाने आरोळ्याच आरोळ्या ठोकू लागले.

भिडले! पायदळ मध्ये घेऊन पाचहजार घोडदळासह संभाजीराजे थेट कोट फोंड्याच्या पायथ्याला भिडले. घेराचा आता रंगच पा ऽ र पालटला.

बगलेला उभ्या एकाही फिरंग्याची हत्याराला हात घालायची हिंमत काही झाली नाही. राजांचा तो जसा उपराळ्याचा हल्ला नव्हताच. होता फोंडा गडचढीचा हमेशाचा प्रघात! फोंड्यावर आता चक्क नौबती दुडदुडू लागल्या!

येसाजींनी आज आठ दिवसांनंतर फोंड्याचा दरवाजा उघडला. सामने थोरल्यांचे अंकुर, तडफदार, बांडे राजे बघताच डोळे अनेक आठवणींनी डबडबून आले म्हातारबाचे. रिवाज द्यायला ते कमरेत वाकताहेत हे बघून राजे चटकन् पुढे झाले. ऐन भराचे राजे आणि उतारवयाचे येसाजी यांची कडकडून ऊरभेट पडली. गोव्यातल्या किल्ले फोंड्यावर!

"कंककाका, तटातील धारकरी बाहेर काढा टाकोटाकीनं. फिरंगी माघार घेणार काढत्या पायांनी. त्यांचा आत्ताच पाठलाग केला पाहिजे!"

"जी." येसाजी-कृष्णाजी धायपाती, लवलवत्या पानांसारखे हलू लागले.

राजांनी अंदाज बांधला तसेच झाले होते. विजरईने माघारीचा हुकूम देताच, त्याचीच वाट बघणारे त्याचे सैनिक आल्या वाटेने परतीसाठी सैरभैर पळू लागले.

दुर्भाटजवळ मावळी घोडाइतांनी माघार घेऊन दौडत्या फिरंग्यांना गाठले. मोर्चे धरलेल्या फिरंगी बंदुका कडकडल्या. मावळी घोडी बिचकून मुस्काटे फिरवू लागली. ते पाहून येसाजीपुत्र कृष्णाजीच बिथरला! त्याने आभाळाकडे गर्दन उठवून सर्व घोडाइतांचे पाठकणे सुरसुरून फुलवीत केवढीतरी मोठी किलकारी दिली. "हर - हर - हर म्हा ऽऽ देव." ती लढाई होती दौडत येणाऱ्या मावळी भालाइतांची आणि बंदिस्त मोर्चे धरत माघार घेणाऱ्या फिरंगी बंदुकधाऱ्यांची. फिरंगी मोर्चे पार विस्कळीत झाले. घुसलेल्या काही मावळे भालाइतांच्या भाल्यांच्या माऱ्यातून खुद्द विजरई दोन वेळा नशिबाने सलामत निसटला होता. कित्येक फिरंगी नदीतून पोहत होते. कैक गळाभर पाण्यात जीव मुठीत धरून उभे होते. भेदरलेल्या विजरईने त्या लोकांची दुर्दशा डोळ्यांनी पाहिली.

– आणि – आणि अंगभर रक्ताने न्हालेला, मोर्चामागून मोर्चे फोडत चाललेला, अंगी गोळ्याच गोळ्या झेलून फुलल्या पळसवृक्षासारखा रक्तबंबाळ दिसणारा, घामेजला कृष्णाजी छाताडावर वर्मी गोळी लागताच ग्लानी येऊन घोड्यावरून कोसळला!! ज्या ठिकाणी जाया झालेले येसाजी, कांबळ्यावर आणून ठेवले होते त्या जागी, त्यांच्याशेजारीच कृष्णाजीलाही मावळ्यांनी घोंगडीवर झोपविले.

आता दोन्हीकडचा मार सुमार झाला होता. कित्येक फिरंगी आणि मावळे कामी आले होते. सांजावत आल्याने हत्यारे थांबली होती.

महाराज घोंगडीवर झोपविल्या येसाजीजवळ आले.

त्यांना बघून क्षीण आवाजात म्हातारबा येसाजी म्हणाले, "सुक्षेम हाईसा न्हवं?" काय बोलावे तेच राजांना सुचेना. ते कृष्णाजीच्या घोंगडीजवळ आले. ती घोंगडीच रक्ताने चिंब झाली होती. कृष्णाजीने ग्लानीने भरलेले डोळे किलकिले केले. उजव्या पायपंजावर बसत राजे त्यांच्या जखमी देहभर, आईच्या मायेने हात फिरवीत म्हणाले, "ऐसा कैसा रे फुटोन गेलास तू कृष्णा!" त्यांनी भवतीच्यांना आज्ञा केली, "या बापलेकांस आत्ताच कऱ्हाड प्रांती डोलीतून त्यांच्या गावी पोचवा."

नेसरीच्या प्रतापराव गुजरांची, पुरंदरच्या मुरारबाजी आणि घोडखिंडीच्या बाजी देशपांड्यांची, मरणाचा लाकडी खोडा वळता करून घेणाऱ्या जंजिऱ्याच्या कोंडाजी फर्जंदांची याद व्हावी असाच हाही प्रसंग होता – गोव्याच्या कृष्णाजी कंकाचा.

सालसेत, बारदेशवर हंबीरराव उतरले. दुर्भाट-आगाशी मार्गे धर्माजी नागनाथ घुसले. राजांच्या तितोंडी फौजा निकराने गोव्यात शिरग्यासाठी पुढे घुसल्या. राजे आणि खंडोजी जुवे बेटावर चालून गेले. त्यांनी ते पहिल्याच धडकेत कब्ज केले.

जुवे बेट मराठ्यांनी ताब्यात घेताच विजरई हबकला. आता त्या बेटावरून एक खाडी पार केली की जुन्या गोव्यातच मराठ्यांचा प्रवेश होणार होता! भयकातर झाल्या फिरंगी पाद्यांनी, विजरईच्या तातडीच्या आज्ञेने सेंट झेवियरच्या चर्चमधील घंटा धोका म्हणून रात्रीच्याच अखंड बदडायला सुरुवात केली!

बिचोलीहून आलेला अकबरही या हल्ल्यात राजांबरोबर होता. एकदा त्याने जंजिऱ्यावर खाडीच भरून काढू बघणारे राजे प्रत्यक्ष समोर पाहिले होते. आता गोव्याची खैर नाही हे तो मनोमन जाणून होता.

जुवे घेतल्याच्या दुसऱ्याच दिवशी विजरई चारशे सैनिकांसह भल्या पहाटेच, ते परत घेण्यासाठी खाडी पार करून निकरानं चालून आला.

टेकडीवरचे राजे, त्याला टेकडी चढू देण्यासाठी प्रथम गुमान राहिले. तो माऱ्याच्या टप्प्यात येताच टेकडीवरून दगडी गुंड बरसवत राजे सैन्यासह टेकडी उतरू लागले.

"पळा ऽ पळा ऽ!" चालून आलेले फिरंगी मांडाची घोडी, नीट टेकडी उतरेनात म्हणून ती टाकूनच पळू लागले. त्यांना कळेना मावळ्यांचं भिर्र केवढं आहे?

यातच बगलेने आलेली तीनशे स्वारांची मावळी कुमक राजांच्या सेनेला मिळाली.

जुवे बेटाच्या लगतच्या टेकड्यांवरून गोव्यातले फिरंगी विचित्र नजारा बघू लागले. उतरंडीवरून तेगी पेलत धावून येणारे मावळे आणि विजरईसह जीव घेऊन पळणारे फिरंगी! चार मावळ्यांनी विजरईचा घोडा घेरलेला बघताच काळजे चरकली फिरंग्यांची. दोम रोद्रिगो घोडा फेकत विजरईच्या मदतीला आला म्हणूनच जिवे वाचला तो! तरीही तलवारीचा एक निसटता वार बगलेला बसून घायाळ झालाच तो.

रोद्रिगो केवढ्याने तरी ओरडला – "खाडी पकडा. पळा."

भेदरलेला, रक्तबंबाळ विजरई खाडीच्या रोखाने जीव तोडून जनावर फेकू लागला. त्याच्यावरच नजर खिळवून समोरच्या फिरंगी धारकऱ्यांशी लढणाऱ्या राजांनी आपला 'चंद्रावत' कौशल्याने बाहेर काढला. विजरईच्याच पाठलागावर फेकला.

टेकडीवरच्या बघ्यांना कधी नव्हे असा नजारा बघणे भाग पडत होते.

पुढे घायाळ, जीव बचावण्यासाठी दौडणारा आपला पार भेदरलेला विजरई कोंद-द-अल्व्होर आणि त्याला गाठण्यासाठी तलवार पेलून धावणारा सैतान 'संबा!'"

राजे एकलेच विजरईच्या मागे धावताहेत हे पाहून चलाख खंडोजींनीही आपला घोडा त्यांच्या मागे दौडता काढला.

गर्जत्या, फेसाळत्या, भरतीच्या खाडीतच भेदरलेल्या विजरईने घोडा घातला. पुरा गर्भगळीत झालेला विजरई प्राणभयाने सपासप खारट पाणी तोडत मध्ये उभी असलेली होडी गाठण्यासाठी जिवाचे रान करू लागला. होडीही त्याच्या रोखाने सरकू लागली.

चंद्रावतासह खाडीकाठाकडे दौडणारे राजे चुटपुटत ओरडले – "सोडू नको त्यास! उभी गावे जाळतो - बाटवतो –"

आणि पाठलागावरच्या बेभान, संतप्त राजांनी मांडाखालचा चंद्रावतच, अनावर चुटपुटीने दमदार टाच भरत थेट खाडीतच घुसविला!! खारट पाण्याचे चौफेर फव्वारेच फव्वारे उडाले. दहा हात आत घुसलेला चंद्रावत खाडीच्या, भरतीच्या ओढीला हां-हां म्हणता वाहतीला लागला.

विजरईने होडी गाठलेली बघून आणि त्याला मारायला धावून येणारा 'संबाच' घोड्यासह वाहतीला लागलेला बघून टेकडीवरचे बघे जल्लोषाने टाळ्या पिटू लागले.

राजे चंद्रावताच्या रिकिबीतले पाय आता सोडवू बघत होते. ते सुटले. एका हाताने वाहतीचा चंद्रावत आवरत दुसऱ्या हाताच्या बळाने तरंगते राजे चंद्रावतासह वाहतीला लागले. टेकड्यावर आता तर टाळ्या-आरोळ्यांचा पाऊसच पाऊस पडू लागला.

एकच क्षण – पण उभं आयुष्य सरकवून गेला तो राजांच्या डोळ्यांसमोर. मराठी दौलतच खारट पाण्यावर वाहतीला लागली.

–आणि टेकडीवरच्या बघ्यांची दातखीळच बसली. त्यांना घोड्यावरूनच एक माणूस जिवाच्या आकांताने खाडीच्या पाण्यात झेपावताना दिसला. सपासप हात मारत त्याने 'संबाला', पाते लवायच्या आत गाठलेही. आपल्या हातांची जोड देत देत तो वाहणाऱ्या संबाला खाडीकाठाकडे आणू लागला. कायदे राजांच्या हातून सुटताच चंद्रावतही अंगच्या बळावर पोहत काठाकडे निघाला.

घोड्यावरून पाण्यात झेप घेणारा तो पाणीदार वीर होता खंडोजी बल्लाळ!

पुरते अंगभर भिजले राजे-चिटणीस सुखरूप खाडीकाठाला आले. राजांनी खंडोजीकडे डोळाभर बघत त्यांना भावभिजली मिठीच भरली.

आता राजे हंबीररावांची जोड करायला साल्सेत, बारदेश प्रांतावर उतरले. हा तोच प्रांत होता जिथे फिरंग्यांनी धार्मिक जुलमाचा हैदोस घातला होता.

ज्या प्रांतात गरीब कोळ्यांच्या तरण्याताठ्या पोरी जबरीने बाटवून दिवसा त्यांचा धर्मप्रसारासाठी आणि रात्री त्यांच्या शरीरांचा उपभोगासाठी फिरंगी वापर करीत होते अशा भिक्षुणींचे तीन मठ मावळी सैनिकांनी फोडले. सर्वांत मोठा मठ होता राचोलीचा. तो फुटताच, दावी तोडलेल्या सफेद गाई चौखुर उधळाव्यात तशा पांढरे झगेवाल्या कोळी-भिक्षुणी मानेवरचे जोखड उतरताच मुक्तपणे वाट फुटेल तिकडे पळू लागल्या. त्यांना मनमोकळे पळताना बघून घोड्यावर स्वार झालेले राजे समाधानी, भरल्या नजरेने सरलष्करांकडे बघत म्हणाले, "मामा, हे बघायला आमच्या थोरल्या आऊच पाहिजे होत्या आज."

त्यांच्या मनात मात्र एका कठोर सत्याची टिटवी केकाटत गेली, "आमच्या राणूअक्का आणि दुर्गा अशा मुक्त करण्याचं भाग्य लाभतं या हातांस तर!"

बारदेशच्या आभाळाने कधीच टिपले नव्हते असे एक दृश्य सामोरे आले राजांच्या. सोलापूर-पंढरपूर भागात पाच-तास बैल एकाच दावणीला जखडून गावकीची समाईक इरजिक घालतात तद्वत सात फिरंगी पाद्री एकाच दावणीला जखडून टाकलेली एक मावळी तुकडी पेश झाली.

"काय करावं ह्येंचं धनी? द्यावं का मासळीमारीच्या जाळ्यावानी फेकून दर्यात?" तुकडीचा म्होरक्या म्हणाला.

सगळ्या पाद्र्यांच्या गर्दनी, देठ मोडल्यागत छातीवर पडल्या होत्या. राजे बारकाव्याने त्यांना निरखू लागले. "समर्थ राहू द्याच – दिवाकर गोसाव्यांसारखाही का नाही दिसत यांपैकी एकही जण? समर्थांच्या पायठशांवर धर्म वाट शोधीत चालतो असं वाटायचं! यांच्या? हे धर्माचीच पायवाट करून ती तुडवितात. दुसऱ्यांचे हक्क पायदळी कुचलतो तो कसला धर्म? एवढे कब्ज झालेत तरी का नाही मनाला वाटत यांना बाटवावं? बाटवणं म्हणजे तरी काय? बाटतात ती शरीरं – मनं कुणाला आणि कशी येणार बाटवता?"

"हुकूम व्हावा धनी." अनावर उताविळीने म्होरक्या म्हणाला.

"बैलच आहेत हे धर्माच्या घाण्यास जुंपलेले. जुलमाचे तेल गाळणारे. यांच्याही पाठीवर कोरडे ओढा आणि धिंड काढा यांची!" संतप्त राजे कडाडले.

तिकडे पणजीत जुन्या देवळात, भेदरलेले फिरंगी एकजाग झाले होते. खांद्या-कपाळाशी हात नेत आकाशीच्या बापाची 'करुणा' भाकत होते. शवपेटीचे झाकण खोलून आज पहिल्याने विजरई कोंद-दि-अल्वोर झेवियरच्या शवाच्या हातातील सुवर्णी धर्मदंड आपल्या हातात घेऊन वारंवार तो आभाळरोखाने उठवीत पुटपुटत होता – "राख, गोव्याची लाज राख. हा 'संबा' कसाही जाऊ दे. पण परत जाऊ दे. पाहिजे तर घेऊ दे गोवा त्याला – पण आमचे जीव नको!"

फिरंगी जहाजे पोर्तुगालला कूच व्हायच्या सिद्धतेने गाठीचा सोन्या-नाण्याचा खजिना भरून पणजीच्या दर्यात सज्ज झाली होती. त्यात फिरंगी बायका-पोरे चढलीही होती. विजरईची ही झेवियरच्या शवाला आखरी करुणा होती. मग तो देऊळ सोडतानाच ती शवपेटीही घेऊन जाणार होता. देवळाच्या मोठाल्या घंटा ठणठणत होत्या.

दुर्भाट, जुवे, अंत्रुज, बारदेशच्या मावळी फौजा एकजाग होऊ लागल्या. राजे त्या पणजीत घुसविणार होते. त्यासाठी राजे, हंबीरराव, खंडोजी, धर्माजी दर्यात एकवट होणारी होडकी तळपत्या नजरेने बघू लागले. पण –

आणि 'पण'ची माशी शिंकलीच! कवी कुलेशांनी धाडलेला रामोशी खबरगीर राजांना शोधत धापा टाकत आला. खबर ठेवत म्हणाला, "शाआलम लाखाच्या बळानं रामघाट उतरतोय! रांगच्या रांग लागलीया घाटात."

"क्का ऽ य?" विस्फारल्या डोळ्यांनी राजे किंचाळलेच.

पुन्हा तोच प्रसंग आला – योजावे पण साधावे असे घडूच नये! शहाआलम आणि विजरई यांची कात्री आवळली जाण्यापूर्वी गोव्यात घुसविल्या सेनेसह फिरंगाणाबाहेर पडण्याशिवाय अन्य मार्गच नव्हता.

तहाला तयार झाल्या फिरंग्यांशी तह करण्याची जोखीम कुलेश आणि अकबर यांच्यावर सोपवून रायगडी आलेल्या राजांच्या मनी दोनच बाबी घोळत होत्या. कोकणात उतरलेला शहाआलम आणि मुंबईचा टोपीकर! फिरंग्यांनी मागे येसाजी गंभीर यांच्याकडे ओळखपत्रे नाहीत अशी तक्रार केली होती. म्हणून गोवा सोडताना फिरंग्यांशी करायच्या सुलुखासाठी राजांनी कुलेशांना 'कुलएख्तयार' केलं. त्या सुलुखाची सारी बाबच त्यांच्यावर सोपविली. राजकारणाच्या सोयीसाठी कुलेशांची ही नामजादी होती. तीच कित्येकांना खटकली. 'छंदोगामात्य-कुलएख्तयार' – कनोजा भारी होत चाललाय अशी खुसपूस उठू लागली.

आज्ञेप्रमाणे कुलेश-अकबर फोंडा, भीमगड येथे फिरंग्यांच्या वकिलाच्या भेटीगाठी घेऊन तहाची बोलणी करू लागले.

फिरंग्यांशी चालल्या तहाबाबत अकबर एकदा रायगडावर राजांना भेटूनही गेला.

टोपीकरांची मुंबईची बसकण आता स्वराज्याला घातक ठरणार हे पारखलेल्या राजांनी त्यांच्यावरच लक्ष एकवट केले. टोपीकरांची कारंजा, एलेफंटा ही बेटे आणि माहीम, दंतोरा, सारगाव, कोळवा ही ठाणी मावळ्यांनी कब्ज केली.

मुंबईवर चालून जाण्यासाठी जावळी, कऱ्हाड, पुणे, पन्हाळा भागात नवी सैन्यसंचणी सुरू झाली.

अकबर राजांजवळ बापाविरुद्ध कुमक मागून थकला होता. म्हणत होता, "**मला इराणला** जाऊ द्या." राजे त्याला चुचकारून फिरंग्यांशी चालत्या तहाची **मध्यस्थी**

करण्याचे सुचवीत होते. मात्र मनात आता याला जवळ ठेवून घ्यावा की नाही? याचा विचार करीत होते.

शहाअलमला दक्षिण कोकणात पेरून औरंग आपण स्वत:च आदिलशाहीच्या विजापुरावर चालून जाणार अशी खबर होती. लाख फौजेनिशी कुडाळ, बांदा, डिचोली भागात फिरणाऱ्या शहाअलमची पाचावर धारण बसली होती. कारण दर्यामार्गे मिळणारी त्याची रसद मध्येच मराठ्यांनी लुटली होती. पाणोठे विखारी केल्याने त्यांच्या घोड्यांना पाणीसुद्धा मिळेनासे झाले होते.

आबासाहेबांनी राखली तशी आदिलशाही राखणे भाग होते. राजांनी त्याच बेताने पेशवे निळोपंत आणि हंबीररावांना बोलावून घेतले.

"पेशवे, आदिलशाहीवर चालून जाण्याचा बेत दिसतोय औरंगचा. पाठबळ देऊन राखली तर ती शाही खूप दिवस झुंजेल." राजे स्वत:शीच बोलल्यासारखेच बोलले.

"जी. आम्हीच जाऊ होतर आदिलशाहीच्या कुमकेला." हंबीररावांना राजांचा विचार पटला.

"तुम्हासच पाठवू मामासाहेब, पण आत्ता नाही. योग्य समयास. निळोपंत, तुम्ही नव्या संचणीचा आठरा हजार लढाऊ विजापूरमार्गे कूच होईल ते करा." राजे औरंगच्या चालीच्या मागचा विचार करू लागले.

एवढ्यात दक्षिण कोकणातून घोडा फेकत आलेला खबरगीर विश्वासच राजांच्या भेटीला आला. त्याने आणलेली खबर राजांचा तणाव सैल करणारी होती.

"शाअलम मार खात खात, हैराण होऊन परतीच्या वाटेवर घाटात पोचलाय धनी. लाखाच्या सेनेतलं अवघं चाळीस, पंचेचाळीस हजार उरल्यात त्येच्याकडं. त्येच्यातबी बळ न्हाई हत्यार पेलायचं. बापाला त्यानं नगरकडं सांडणीस्वार धाडलाय – 'मुझकू घोडे और खेचर भेज देव. नहीं तो मर जाऊँगा मय वहाँ पहाडमें।'"

ते शांतपणे ऐकून घेत राजे हंबीररावांना म्हणाले, "आता तुम्ही आम्ही संगतोच उतरू मुंबईजवळच्या पालतट्ट्यावर सरलष्कर."

राजांचे बोलणे तुटकच राहावे अशी बातमी निळोपंतांनी राजांच्या कानी घातली. "कऱ्हाड प्रांतात परतलेले येसाजी कंक तब्येतीने सुधारताहेत ... पण कृष्णाजी जखमा फुटून गेले स्वामी!"

कृष्णाजी! राजांचे मन खिन्न झाले. काही क्षण विचारातच गेले. कृष्णाजीला बायको आणि तीन वर्षांचा मुलगा आहे या जाणिवेने राजे पेशव्यांना म्हणाले, "कृष्णाजीस सालिना हजार आणि येसाजींना हजार होन मिळतील अशी व्यवस्था करा पेशवे. आणि खंडोजींना हजार होन, आणि पालखीचा मरातब द्या."

'संबाला' कसलीही मदत न करण्याबद्दल औरंगने आदिलशाहाला लिहिले. मराठी - मोगल - फिरंगी यांच्या फौजी धावणीमुळे दक्षिण कोकणात तर दुष्काळ पडला.

मुंबईच्या केजविनने आपल्या हलाखीचे पत्र लंडनचा राजा चार्ल्स् याला लिहिले. त्यात तो म्हणतो – "आपल्या लगत असलेल्या 'शंभुजी' या ताकदवान राजाने पोर्तुगीजांचा चाळीस मैलांचा पट्टा वेचिराख केला आहे. तीस हजारांवर त्याच्या सेना मुंबईचा रोख धरून भोवती पसरल्या आहेत. आपल्याजवळ फक्त दीड-दोनशे आपले आणि दोनशे काळे सैनिक आहेत. शंभुजीने आपल्याकडे साठ तोफा, चारशे पिंपे आताषीसामान, कथील, लहान-मोठी जहाजे-कापड यांची मागणी केली आहे. मागण्या पुऱ्या झाल्या नाहीत तर मुंबईवर हल्ला करण्याची धमकी दिली आहे. काय करावे? पोर्तुगीजांचा तपशील ध्यानी ठेवून तह करावा असे वाटते!"

पालतट्टा धरून कारंजा-एलेफंटा असा फेर टाकून, मुंबई आणि वसई भागातील टोपीकर आणि फिरंगी यांच्याशी एकाच वेळी दुहेरी चालून जाण्याच्या इराद्यात असलेले राजे रायगडी परतले.

सिंहासनसदरेवर त्यांना रात्रीची वर्दी आली – "पणजीहून आलेले फिरंगी हेजीब घेऊन कुलएख्त्यार कुलेश भेटीस येताहेत."

पाटगावला मौनीबाबांच्या दर्शनासाठी गेलेले कुलेश तिथे भेटलेल्या फिरंगी वकील मंडळासह तसेच रायगडी आले होते. त्यांच्यासंगती फ्रायर, कॉन्सिको, थेमुडो, पाद्री ऑगस्टीन, अल्बुकेर्की अशी मंडळी होती.

वकीलमंडळाने राजांना नजराणा दिला! मोठ्या धास्ती अदबीने ते पेश आले होते. अल्बुकेर्की, कुलेश व अकबर यांच्याशी झाल्या बोलण्याचा तपाशील दुभाष्या राम नाईक याच्या मध्यस्थीने राजांना देत होता.

मनातून राजांना फिरंग्यांशी तहच करायचा नव्हता, काही ना काही कारण पुढे करीत राजांनी फिरंगी व वकीलमंडळाला तीन रात्री रखडविले.

तिसऱ्या रात्री वैतागलेल्या अल्बुकेर्कीने तहाबाबतचा निर्धार व्यक्त केला. "आमचा दरबार अंजदीव बेट सोडणार नाही! राजे मागतात ती बक्षिसी मिळणार नाही!"

"मतलब?" राजे ते ऐकताना बैठकी आसनावरून उठलेच. त्यांची चर्याच काटेफड्यागत लालबुंद झाली. "कुलेऽश, या फिरंग्यास सांगा – आम्ही सांगतो त्या तहाच्या अटी मान्य नसतील तर वरफिरंगणातून आमचे पेशवे हटणार नाहीत. भीमगडाच्या कैद्यांना सोडले जाणार नाही. बारदेशात कब्ज केल्या तोफा परत केल्या जाणार नाहीत! जरूर तर आम्ही पुन्हा चालून येऊ!"

अल्बुकेर्की ते रूप पाहूनच चळाचळा कापायला लागला. वकीलमंडळातील एकट्या फ्रायरच्या मनात मात्र राजांचे ते स्वरूप बिंबून राहिले.

राजे बिरवाडीला आले. इथे उतरण्यासाठी आबासाहेबांनीच खासेवाडा बांधला होता. त्याच्या सदरेवर प्रल्हादपंत, इंग्रज वकील गॅरी यासह भेटीस आले.

मुंबईच्या गव्हर्नर केजविनने लिहिलेल्या पत्राला लंडन दरबारचे पत्र आले होते. म्हणून तर केजविननं आपला वकील टाकोटाक धाडला होता.

"टोपीकर कर्नाटकात वखारीच्या सवलती मागताहेत. फिरंग्यांचे समजून आमचे पकडलेले 'प्रेसिडेंट' नावाचे जहाज परत करावे म्हणतात." गॅरीला पुढे घालीत प्रल्हादपंत म्हणाले.

राजांनी इंग्रजी वकिलाला अंगभर निरखला. "हे टोपीकर फिरंगी, डच, फरांसिस कोण कोठच्या देशीचे. दर्यापट्ट्या धरून मिळेल त्या दरबारचे पाय चाटत जागजागी वखारी घालतात. आज वखारी घालतात – उद्या हातपाय पसरतील. औरंग खासाच उतरला नसता फौजबंदीनं दख्खनेत तर आम्हीच घेतला असता यांचा समाचार. पण या बिकट समयास चौफेर गनिम ठेवावा तो किती?" राजमनात विचार आले.

शांतपणे राजांनी प्रल्हादपंतांमार्फत गॅरीशी बोलणी केली. थॉमस विल्किन्स आणि दुभाषी राम शेणवी गॅरीच्या मदतीला असल्याने चांगली तीन दिवस ही बोलणी बिरवाडीत चालली. तहाच्या अटीचा मसुदा प्रल्हादपंतांना सिद्ध करायला सांगून राजे रायगडाकडे गेले. पण प्रल्हादपंत टोपीकरांना मसुदा देऊन नेहमीप्रमाणे गड चढले नाहीत. त्यांची आणि मानाजी मोरे, गंगाधरपंत, राहुजी सोमनाथ, वासुदेवपंत यांची कसलीतरी एकांती बैठक ठरली होती तिकडे ते निघून गेले.

या वेळी शहाअलम आणि औरंगजेब या बेटाबापाची अहमदनगरमध्ये भेट होत होती. बापाने पाठविलेल्या घोड्यांच्या आणि खेचरांच्या मदतीने शहाअलम कसातरी घाट चढून आला होता. एक लाखापैकी आता फक्त चाळीस हजार सैनिक शिल्लक होते त्याच्या संगती!

गर्दन टाकून नगरच्या किल्ल्यात पेश झालेल्या शहजाद्याला औरंगजेब केवढ्यातरी नफरतीने म्हणाला, "वो बागी अकबर कमसे कम अकेला गया। तुम हशम लेकर गये और उन्हे गवाँकर आये। जूरत कैसी हुई काला मुँह लेकर आने की? तुम भी क्यों नही गये उसके साथ?"

बिचारा शहाअलम काय जाब देणार होता? शरमिंदा होऊन तो बापासमोरून निघून गेला.

संभाच्या जनान्यातल्या बायका खुल्दाबादेत कोठीत आहेत याचा फायदा घेऊन मावळे जालन्यापर्यंत छापे घालतात याने चडफडणाऱ्या औरंगजेबाने वजीर असदखानाला बोलावून फर्मावले, "संबाके जनानेकी औरतें भेज दो बहादूरगड। पैहरा जारी रक्खो साथ।"

बादशाहाच्या हुकमाने दुर्गाबाई आणि राणूआक्का बहादुरगडात हलविण्यात आल्या. पेडगावच्या किल्लेदाराने त्याबद्दल लेखी पोचपावती बादशाहाला पाठविली.

मृग तोंडावर आला. रामसेज, कल्याण, भिवंडी, बागलाण, पुणे अशा प्रांतांतून उन्हात घामाने निथळलेले बहिर्जी, विश्वास, महादेव असे खबरीखात्याचे खासे पाठोपाठ रायगड चढू लागले. चारीबाजूंनी रायगडावर खबरा थडकू लागल्या. "औरंगजेब रामसेज, तळकोकणातील काही किल्ले इथं मोजक्याच शिबंद्या ठेवून फौजा मागं घेतो आहे. त्याचे जागोजागचे सरदार औरंगाबाद जवळ करताहेत!"

औरंग आणि माघार? असे कधीच घडले नव्हते त्याच्या हयातीत. अगदी वयाच्या चौदाव्या वर्षापासून तो स्वारीशिकारीत होता. पण 'माघार' अशी तो पहिल्यानेच घेत होता. गेली तीन वर्षे मराठी मुलूख पाडण्यासाठी त्याने जंग जंग पछाडले होते. हाती काहीसुद्धा आले नव्हते त्याच्या. फक्त लढाया, घेर, कत्तली यांतच पुरी तीन वर्षे जाया झाली होती त्याची. जाताजाताही त्याने रायगडावरच चालून जायचा गाजीउद्दिनखानाला हुकूम दिला होता.

"हंबीरराव, रूपाजी, कुलेश, रामचंद्रपंत सगळ्या खाशांस चढ्या घोड्यांनी रायगड जवळ करण्यास लिहा. फर्मानं आल्या खबरगिरांकडूनच धाडा चौफेर." निळोपंतांना, सरसर फेर घेत राजे आज्ञेमागून आज्ञा देत होते. ते आपल्याच विचारात गढले होते. "का घेत असावा औरंग फौजा मागे? काय हेत आहे त्याचा यात? पावसाळा तोंडावर ठेवून या चाली आहेत त्याच्या की पावसाळा उलगताच जोरावारीनं पुन्हा धरणार तो मोहरा?"

आता तर राजांना उसंतच नव्हती. निळोपंत, खंडोजी एकामागून एक थैलीस्वार गड उतरवू लागले. जागोजाग पांगलेले मंत्री सुभेदार राजथैली मिळताच रायगडाच्या वाटेला लागले. इंग्रज वखारीचा मुंबईहून सारखा तगादा लागला होता. "सुलुखाचे कागद शिक्कामोर्तब करून पक्के पाठवून द्या." त्याकडे लक्ष द्यायलाही वेळ नव्हता. राजांनी ती पुरी बाबच प्रल्हादपंतांवर सोपविली.

हंबीरराव, रूपाजी, कुलेश, संताजी – गुजराथेतून परतलेले धनाजी, रामचंद्रपंत, दौलतखान नेमक्या खाशांची रायगडाच्या सिंहासनासदरेला उन्हतापीच्या ऐन दिवसांत मसलती बैठक बसली. पेशवे निळोपंत मसलत खोलत म्हणाले, "सांप्रत गनिम. पावसाला सुरुवात होण्यापूर्वी मुलुखभरची फौज मागे घेतो आहे. खबरा आहेत तो आदिलशाहीवर चालून जाणार. त्यावर भरोसा ठेवून गाफील राहून नाही निभायचे. खाशांना पाचारण केलं आहे ते या मसलतीसाठीच."

"शहाअलम नगरहून निघून सोलापूरमार्गे चालला आहे. बादशाहाचा आदिलशाहीवरच रोख दिसतोय." रामचंद्रपंतांनी सुचविले.

"मध्येच गाठून तोडला पाहिजे त्यास." राजे निर्धाराने बोलले.

"विज्यापुरावर ग्येला त्यो तरी पेशवं म्हंत्यात तसं गाफील राहून न्हाई भागायचं." हंबीरराव राजांच्या मनातलेच बोलले.

"सरलष्करांचं सही आहे. त्यासाठीच मसलतीत घेतलंय साऱ्यांना. पाऊस आहे म्हणून सुमार राहू नका कुणी. मिळेल ती संचणी पावसात खडी करून धाडावी लागेल आदिलशाहीच्या मदतीस."

कितीतरी वेळ मग खोलवरचे बोलणे झाले. जमल्या खाशांना बारीकसारीक सूचना देण्यात आल्या. सगळ्यांना निरोपाचे विडे देण्यात आले.

अशा वेळी नेहमी बोलणारे प्रल्हादपंत गुमान राहिलेले कुणालाच नाही कळले. मसलत संपताच ते, राहुजी, मानाजी मोरे प्रल्हादपंतांच्या मंत्रीबाडीतील वाड्यात एकमेकांना भेटले. बराच वेळ दबक्या आवाजात काहीतरी बोलत राहिले.

पावसाने धार धरली. पुऱ्या सालभर दुष्काळाने हैराण झालेल्या रयतेला दिलासा मिळाला. त्यापेक्षा मोठा दिलासा मिळाला तैनाती मोगली सेना त्यांच्या भागातून उठल्या याचा. आता माणसे शिवाराच्या कामाला लागली.

बालेकिल्ल्यातील खासेवाड्याच्या झरोक्यातून दिसणाऱ्या सरसरत्या पाणधारा बघत राजे विचारगत झाले होते. "केवढा अटीतटीचा जंग खेळलो आम्ही औरंगशी! कशासाठी? कुणाच्या बळावर? का झाले घरचे असून पारखे शिर्के आणि फलटणकर? काय वाटत असेल पेडगावच्या कोठीत दुर्गा आणि राणूआक्कांना?"

"महाराज, कुनी पठानी असामी आलेय पावसाचं गड चढून, भेट मागतीय." पुरुषा नावाच्या चाकराने वर्दी आणली. थोड्याच वेळात तो एका उमद्या, लढाऊ पठाणाला घेऊन आत आला. त्याला बघताच महाराजांना वाटले याला पाहिले आहे कुठेतरी. पण कुठे? काही आठवेना –

"आदाबअर्ज – जिल्हे सुबहानी – मुल्के मऱ्हाट." आल्या पठाणाने कुर्निसात दिला. त्याच्या पठाणी खमिसावरची कलाबतू झळझळली.

"कौन? मिलनेका मतलब?" राजे त्याला निरखत अजून आठवू बघत होते.

"पेहचाना नहीं राजासाबने नाचिजको? पठाणी मोकळे हास्य खुलले.

"नहीं. बताओ."

"मिरबातखान! दिलेरचा भाऊ! तो भीमेचा काठ. खेचल्यासारखे राजे पुढे झाले. "खाऽन – तुम?" म्हणत मिरबातला त्यांनी ऊरभेट दिली.

"कैसा हाल?" सगळे माहीत होते तरी बळेच राजांनी विचारले.

"क्या बताना राजासाब! वो क्या बादशहा है? शैतान है – संगदिल! हमारे भाईजान की जान ली उसने बेइज्जत कर के! तंग आये उसके जुल्मसे!" मिरबात पिळवटून बोलला.

"खान, कळलंय आम्हास सगळं. तुम्ही दोन दिवस मनमोकळी विश्रांती घ्या गडावर. काही उणं पडायचं नाही तुम्हास."

"दो दिन? इस बरसातमें आये हैं हम – क्या मेहमानदारीके लिये राजासाब? जिंदगी रख्खी है पैरपर राजासाबके." कमरबंद खोलून मिरबातने आपली पठाणी तेगच, गुडघा

जमिनीवर टेकत छत्रपतींच्या पायांवर ठेवली.

त्याची तेग त्याच्या हाती ठेवताना राजांच्या मनी विचार फिरून गेला – "आम्ही दिलेरच्या गोटातून पन्हाळगडी परतलो तर 'लेकरा कुठं गेला होतास?' म्हणत आम्हाला मिठी घ्यायला आबासाहेब तरी होते. यास कोण?"

राजांनी मिरबातला पदरी ठेवून घेतले.

कोकणातून आलेला अकबराचा खलिता घेऊन पेशवे भेटीला आले. राजांच्या हाती श्रीसखी नुकत्याच देऊन गेलेल्या वाफारल्या हुलग्याच्या माडग्याच्या कटोरा होता.

"शहजादे म्हणतात – फिरंग्यांना तहाची कागदपत्रे लवकर पाठवावी." पेशव्यांनी अकबराचा तपशील समोर ठेवला.

"आणिक काही?"

"जी. ते म्हणतात – म्हणतात –" निळोपंत चाचरले.

"बोलाऽ" राजांना शंका आली की आणखी काही मागणी आहे की काय शहजाद्यांची?

"जी. शहजादे म्हणतात – कुलेश सच्चे इमानदार चाकर आहेत राजांचे. अल्लाने करावं आणि कुण्या पाप्याची बदनजर ना पडावी त्यांच्यावर." खरे तर निळोपंतांना अकबरकृत कुलेशांची ही तारीफ मनोमन आवडली नव्हती.

"एवढंच?" राजांनी छातीवरची कवड्यांची माळ वरखाली होईल असा दीर्घ उसासा टाकला. ज्यांच्याबद्दल बोलणे चालले होते ते कुलेशच आले. त्यांना बघून रिवाज देत निळोपंत निघून गेले.

"इस कठिन समय को साथ देनेके लिए लिखा है हमने सब जमीनदारोंको स्वामी!" कुलेशांनी आपण लिहिलेल्या सर्व पत्रांचा मजकूर पेश केला.

राजांनी कुलेशांना सांगितले, "तुमची चिंता वाटते शहजाद्यास कुलेश."

"हम लिखेंगे उसको – खुद की करनी चाहिए उसने!" हसत कुलेश म्हणाले.

"तहाचे कागद पाठवा असा तगादा धरतो आहे शहजादा कुलेश."

"जी. सुलुख हुआ है तो भेजने चाहिए करारपत्र."

"तूर्तास फिरंग्यांशी चालली तळ व वर कोकणाची लढाई तहकूब करावी म्हणतो आम्ही."

"अच्छा होगा वह!" कुलेशांनी दुजोरा दिला.

"चला सदरी जाऊ कविजी." राजांनी कुलेशांसह सिंहासनसदर जवळ केली.

"महाराज, परततानासुद्धा औरंगनं माणूसफोडीचा तडाखा दिलाय." खंडोजी चिंतेने म्हणाले.

"कोण – कोण चिटणीस?"

"नायब शाहकुली, खंडूजी, रंभा शंकराजी अशा फितल्या माणसांना मनसबी दिल्या आहेत नगरकोटात बादशहानं."

ते ऐकताना सचिंत झालेले राजे सदरेच्या झरोक्याशी झाले. आभाळातून कोसळताना पांढऱ्याधोट असलेल्या पाणसरी भुईला मिळताच गढळ होत वाहून जाताना त्यांना दिसू लागल्या.

"मोगली सेना परतत आहेत या संधीचा फायदा घेत फिरंग्यांनी कारंजा बेटाचा ताबा घेतलाय स्वामी." खंडोजींनी पाणधारा निरखणाऱ्या राजांची तंद्रा तोडली.

"कुलेश, खंडोजी, का आणि कशी आली आपल्या बोलीचालीत कळत नाही पण केवढी मार्मिक म्हण आहे एक – कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ!"

"समजलो नाही आम्ही." सरळधोप स्वभावाचे खंडोजी बुचकळ्यात पडले. कुलेशांना तर ती मऱ्हाटबोली म्हण कळलीच नाही.

"खास नाही काही खंडोजी. दिलेरचा भाऊ भेटल्यापासून घोळतंय हे आमच्या मनी." जे बोलायचे होते ते मनाआड टाकत तिसरेच काही तरी बोलायचे म्हणून बोलले राजे. बाहेर श्रावणसरीचा खेळ सुरू होता. त्याने सिंहासन सदरेसमोरचा हमचौक क्षणात उन्हात, क्षणात पाऊसधारांत न्हाऊन निघत होता.

नवरात्राचे देव घटात बसले. रायगडाच्या देवमहाली अंबेच्या देव्हाऱ्यासमोर पंचधान्यांचे कोंब मातीच्या वाफ्यातून वर डोकावले. दसरा पार पडला आणि राजकारणाचे नवे कोंब भवितव्याच्या वाफ्यातून डोकावू लागले.

थोड्याच दिवसांत, रायगड ज्याचा अंदाज बांधून होता ती खबर येऊन थडकली – "बादशहानं आदिलशाही विरुद्ध मोहीम खोलली. कुतुबशाही, आदिलशाही यांचा मेळ पडू नये म्हणून हसन अली तानाशाहा याला गोवळकोंड्यात घेरून टाकला. औरंगनं आपला बेटा आझम यास फौजबंदीनं जेव्हा विजापूरचा बालराजा शिकंदर याच्या रोखानं फेकला तेव्हा दोन्ही शाह्या खडबडून जाग्या झाल्या! इस्लामी असल्या तरी त्या 'दख्खनी' आहेत हे साफ झालं होतं. जशी त्या शाह्यांनी नांग्या टाकून, गुमान राखत मराठी दौलतीची गंमत पाहिली होती – तसंच आता आपण वागायचं का?" मोठा वर्माचा होता हा सवाल महाराजांपुढे.

दसऱ्याच्या निमित्ताने जमलेले खासे, बोलावून घेतलेले मर्दाने यांची त्यासाठीच राजांनी सिंहासनसदर बोलावली. या बैठकीत हंबीरराव सोडून अष्टप्रधानांतील निवडक असे पेशवे निळोपंत, प्रल्हादपंत, नारायण रघुनाथ, मोरेश्वरपंत, रामचंद्रपंत व कुलेश आणि कर्नाटकातून खास पाचारण केलेले हरजीराजे सुद्धा होते.

पेशव्यांनी बैठकीबेत खुला केला – "नगरकोटाच्या खबरा आहेत. गनिम आदिलशाहीचा रोख धरून फौजा पेरतो आहे. आपल्या मुलखातून त्यानं नामोश घेत जवळ जवळ सगळे तळ उठविले आहेत ..."

बैठक शांतपणे, कान व मन लावून पेशव्यांचे बोलणे ऐकत होती. बैठकी सिंहासनवजा आसनावर बसलेले राजे मसलतभर नजर फिरवीत होते. आबासाहेब गेल्यापासून, पन्हाळा सोडल्यानंतरची साले भिंगरीसारखी मनी फिरकी घेऊ लागली.

"कै. स्वामींनी आदिलशाही डुबते तर डुबू द्या असे काही मनी आणले नव्हते. तोच प्रसंग आज आहे. त्यासाठी मसलतीस पाचारण केले आहे साऱ्यास." पेशव्यांचे निवेदन चालूच होते. पुढची चाल कशी ठेवावी ? असा सवाल उठवून ते बोलण्याचे थांबले. खरे तर हा केवढातरी निःश्वासाचा समय होता. औरंगने मोहरा फिरविला होता. तोच बेत सुचवीत कुलेश म्हणाले, "आदिलशाही की फिक्र इस दर्बारको क्यों ? वे चूप बैठे थे हम पर गुजरी तो !"

"छंदोगामात्य म्हणतात ते रास्त आहे. कर्नाटकात होतो आम्ही तरी हररोज इकडच्या खबरीसाठी जीव टांगणीला पडायचा आमचा. त्यासाठीच रघुनाथपंतांना धाडलं होतं आम्ही." राजांशेजारी बसलेले हरजीराजे त्यांना दुजोरा देत म्हणाले.

"आम्हाला वाटतं आता फितवेखोरांची कसून शहानिशा व्हावी. पुढील काळात तरी धोका राहायचा नाही त्यामुळे." एवढा वेळ गप्प असलेले प्रल्हादपंत बोलले.

"थोरल्या स्वामींची पायवाट धरत आदिलशाहीला जमेल तेवढी कुमक करावी. जुनी आहे ती शाही. चिवट झुंजेल बादशाहाशी. शिवाय सर्जाखानासारखे मातबर आहेत त्या दरबारात. आपल्या सरलष्करांची बाहेरून जोड घेत ते झुंजत ठेवतील औरंग." निळोपंत वर्मीचे बोलले.

मसलतकऱ्यांचे मनोगत महाराज शांतपणे ऐकत होते. राजमनाच्या कसावर ते पारखून घेत होते. त्यांच्या मनात उलटसुलट विचारांची पाठशिवण पडली होती.

आबासाहेबांनी या श्रींच्या राज्याची मुहूर्तमेढ आदिलशाही तोडूनच केली होती. मिर्झाराजेसंगती तर त्यांना नाइलाजाने विजापुरावर चालून जावे लागले होते. एवढे असले तरी सुरतेपावेतो दौडणाऱ्या त्यांनी कधी विजापुरावर आपणहून चाल घेतली नव्हती ! पन्हाळ्यावरच्या अखेरच्या भेटीत तर ते आम्हास वारंवार म्हणाले, "आज ना उद्या औरंग दौलतीवर उतरणार. त्याची फिकीर करा."

आता मसलतीच्या साऱ्या नजरा राजांच्यावर एकवटल्या.

"आम्हास पेशव्यांची मसलत पटते. या समयी आदिलशाही वाऱ्यावर सोडून नाही चालणार. तिला पाठबळ देत झुंजवलं पाहिजे औरंगशी. आम्ही त्यासाठीच सरलष्करांना धाडलं आहे. शिकंदरशाहानं आगवानीही केली आहे त्याची. औरंग केव्हा फिरेल दौलतीवर त्याचा नेम नाही. तो गुंतून पडणेच लागी आहे." महाराज समोर दिसणारी पूर्वक्षितिजकड नजरेत पकडत निर्धारी बोलले.

"हरजी, तुम्ही कर्नाटक रोखून आहात. तिकडंसुद्धा घुसतील मोगली फौजा." हरजींच्याकडे वळून राजे केवढेतरी टोकाचे बोलले.

"जी. मोगली असूनही ज्या शाहीवर औरंगनं आज हत्यार धरलं तो उद्या कुत्बशाही, कर्नाटक, पुरी दखखनच धरेल पटाखाली हे आम्ही जाणतो. त्यासाठीच कर्नाटक कसा नेटाबळानं ठेवलाय आम्ही हे नजरेखाली घालायला यावं एकदा महाराजांनी कर्नाटकात." हरजी धीराचे बोलले.

औरंग परतला म्हणून संकट टळलं असं न मानता नवीं संचणी करून जागोजागच्या बाक्यांनी गडकोट जय्यत तैयार ठेवून सावध असावे असा निर्णय करून मसलत उठली.

पेशवे निळोपंत चिंताक्रांत चर्येने खाशांच्या भेटीस आले. बराच वेळ ते काही बोलेनात.

"जे असेल ते बोला निळोपंत. काहीसुद्धा ऐकण्याची सवय झाली आहे आम्हांस. आणखी कोण कोण फिरले ? सांगा." खासेवाड्याच्या बैठकी – दालनभर शांत फिरत राहिले महाराज. जागजागी उभ्या पहारेकऱ्यांनीही नावे ऐकण्यासाठी नकळत कान टवकारले.

"फितव्याच्या बाबी ऐकण्याची आम्हालाही सवय झाली आहे स्वामी – पण – पण आम्ही बोलणार आहोत ती बाबत फितव्याची नाही ... !" पंतांनी हाती धरले उपरणे भावावेगाने चुरगाळले.

"मतलब ?" राजांचा पायफेर गपकन् थांबला. ते पेशव्यांच्या समोर येत त्यांच्या डोळ्यांत खोलवर बघत राहिले.

"गंभीर आहे ही बाबत महाराज. कटावाची !!" पेशव्यांनी आपलीच गर्दन खाली टाकली.

पाठीवर पाल पडल्यासारखेच वाटले ते ऐकताना महाराजांना. ताणल्या डोळ्यांनी, सुन्न होत ते समोरचे न उकलणारे शून्यच बघत राहिले. मग एकदम कडाडलेच.

"काय – बोलता काय पेशवे ? औरंग, फिरंगी, हबशी, टोपीकर कुणा कुणास कमी वाटले ? कशासाठी आणि कुणी कुणी केला कटाव ?"

"महाराज, शरम वाटते पण नको ती माणसं आहेत या कटावात. आपले – आपले मानाजी मोरे ! राहुजी सोमनाथ, गंगाधरपंत, वासुदेवपंत ..."

"बस्स – बस्स पेशवे. ऐकवत नाही." उभे महाराज आधारासाठी म्हणून बैठकीवर जाऊन बसले.

"महाराज फिरंगाणाच्या मोहिमेत गुंतल्याचं पाहून मागे राहिलेल्या या इमानदारांनी नको तशी डोकी चालवली." पेशवेच सांगताना व्याकुळ झाले.

"कशासाठी ? काय मनसुब्यानं ?" महाराज आता सुमार शांतपणे ऐकू लागले. हा तिसरा कटाव होता !

"रामराजांना गादीवर बसवून आपल्या हाती कारभार घ्यावा, असा बेत आहे या मंडळींचा. पुरी शहानिशा केलीय आम्ही. यामागे कोणीतरी बडी असामी असावी अशी पक्की खात्री आहे आमची. पण ती कोण याचा तलाश नाही लागत अद्याप."

"निळोपंत, तुम्ही जा आणि असतील तसे घेऊन या रामराजांस आमच्या सामने." आपल्याशीच बोलावे तसे बोलले महाराज.

"जी आज्ञा." म्हणत निळोपंत गेले.

" मानाजी मोरे ! रामसेज, बागलाण भागात दौलतीसाठी तळहाती शिर घेऊन घोडा फेकणारे ! कसे पडले या नको त्या समयास या भरीला ? राहुजी ? केवढे वयस्क ! आम्ही त्यांनी गिळंकृत केलेले चिपळूणचे कुलकर्ण ज्याचे त्यास दिले याचा तर सल नसेल त्यांना ? " राजमन स्वत:शीच जणू बोलत होते.

निळोपंत येसाजी दाभाड्यांसह रामराजांना घेऊन आले. ऐन भरीच्या तोंडावर आलेले रामराजे गोरेपान पण नाजूक दिसत होते. नुकतीच ओठांवर लव फिरली होती. त्यांच्या पुढे होत, मुजरा करू बघणाऱ्या रामराजांना हाताला धरून महाराजांनी स्वत: बरोबर चालवीत आपल्या शेजारी बसवून घेतले.

ताराऊंची चौकशी करून राजांनी रामराजांना, कुणालाही जाणवावी अशा हल्लक आवाजात विचारले, "रामराजे, आम्ही एक विचारू ? शांतपणे बोलाल आमच्याशी ? "

" जी. दादामहाराजांना असं का वाटावं आज ? आम्ही जाणतो, दौलत चौतर्फेनं संकटात आहे. जशी हरजीराजांना दिली तशी काही कामगिरी द्यावी आम्हास. लहान नाही आम्ही आता ! " रामराजांच्या बोलण्यात बरीचशी झाक त्यांच्या मातोश्रींची उतरली होती. चेहरा आणि बोलणे मात्र निरागस होते.

" देऊ. समय येताच तुम्हासही साजेशी कामगिरी देऊ आम्ही. आम्ही नाही दिली तर जगदंब देईल ! " रामराजांना कटावाची सुतराम कल्पना नाही याची खातर झाली होती. काही क्षण स्वत:शीच झगडले महाराज.

" येसाजी, आमच्या रामराजांना घेऊन जा. तुम्हावर फार जोखीम आहे यांची. आमची काही माणसं तुमच्या जोडीला राहतील आता. " येसाजी दाभाड्यांना राजाज्ञा मिळाली. ते रामराजांसह निघून जाताच निळोपंतांना आज्ञा झाली, " पेशवे, मानाजी, राहुजी सारे कटाववाले दिसतील तेथे दस्त करण्याची आज्ञापत्रं द्या. कटावाची सूत्रधार ' बडी ' असामी कोण याचा सावधपणे शोध घ्या. " राजांचे मन गलबलले.

कडाक्याच्या थंडीचा हंगाम सुरू झाला. फोंडा, भीमगड, मर्दनगड या भागात बैठका घेऊन अकबर व कुलेश यांनी फिरंग्यांशी सुलूख पक्का केला.

तहात अनेक अटी होत्या. फिरंग्यांनी मोगली जहाजांना आपल्या बंदरातून जाण्याची परवानगी देऊ नये. दोन्ही दरबारांनी आपल्या कोठीतील कैदी मुक्त करावे. परस्परांच्या मुलखात व्यापारास मोकळीक असावी. फिरंगी मुलखाच्या तोंडावर राजांनी गडकोट बांधू नयेत ! अशा मुख्य अटी होत्या. मर्दनगडावर तहाची आखरी बोलणी झाली. राजांनी तहाच्या कागदपत्रावर शिक्के-मोर्तब करण्यासाठी अकबर, राय किरनसिंह, महादजी नाईक यांना पणजीला पाठविले. तह पक्का झाला.

शहजादा अकबरसंगती फिरंगी विजरईने राजांना नरमाईचा खलिता धाडला. त्यात लिहिले होते – " राजांनी सुलुखाची कलमे पाळावीत. आम्ही ती काटेकोरपणे पाळू. दोन्ही दरबारांत खुला व्यापार व मुख्य म्हणजे ' शांतता ' राहावी. " फोंड्यावर अचानक चालून येणारा विजरईच हे लिहीत होता. तह पाळावा म्हणून वसईतील आपल्या फौजा राजांनी काढून घेतल्या. वसईकरांमागचा मावळ्यांचा ससेमिरा उठला – पण रोगराईचा सुरू झाला. वसईत प्लेगाची लागण पसरली.

टोपीकर दरबारचे काम बघणाऱ्या प्रल्हादपंतांना राजांनी बोलावून घेतले. पंत चलबिचल झाले होते – पण चर्या शांत ठेवून ते राजांच्या सामने आले.

" न्यायाधीश, टोपीकरांच्या सुलुखाचं ... "

" जी. पुरा करून दिलाय तो आम्ही त्यांच्या हेजिबांकडं. " प्रल्हादपंतांनी प्रथम सुस्कारा सोडला. मग ते तहाचा कलमबार तपशील सांगू लागले, " तह दोन बाबींचा मोर्तब केला आहे. कर्नाटक प्रांती ते वखारी घालायला परवानगी मागताहेत ती आणि दौलतीशी त्याचे संबंध कसे राहावेत ही. "

न्यायाधीशांनी सांगितलेली सर्व तहकलमे राजांनी शांतपणे ऐकून घेतली. स्वत:शीच विचार करीत त्यांनी विचारले, " टोपीकर पाळेल हा सुलूख पंत ? तुम्हास काय वाटतं ? मोठी बसकण झालेय मुंबईत हबशी, मोगल, फिरंगी यांची त्याच्या आसऱ्यानं. "

" जी. कलमातच मान्य केलंय टोपीकर विजरईनं की तह बरकलम पाळू असं. शिवाय बोलवा आहे विजरई केजविन मायदेशी आपल्या राजाला ही तहाची प्रत समक्ष दाखवायलाच निघाल्याची. कुणी ग्रांथम साहेब सुरतेहून त्याच्या जागी आल्याचंही कळतं. "

राजे टोपीकरांच्या विचारात तसेच प्रल्हादपंतांसमोर आले. पंतांच्या छातीभर सरकलेले उपरणे नाकळेलसे थरकले.

" तब्येत सुमार दिसत्येय न्यायाधीश तुमची. खूप तापदरा झाली तुमची गोऱ्या हेजिबांशी बोलणी करण्यात. " बराच वेळ बोलताना चलबिचल झालेल्या पंतांना राजांनी घरोब्याने विचारले.

" जी. तशी खास नाही – पण मुंबईहून परतताना हबशांनी केलेल्या दर्याछाप्यापासून थंडी सोसवत नाही आताशा. "

" राजकारण रोजचंच आहे पंत. तुम्ही न्यायाधीश. तुम्हास थंडी सोसली नाही तर तुम्ही दिलेला न्याय रयतेस सोसायचा नाही. मोगली फौजा परतल्या आहेत आता. थोडा विश्राम घ्या तुम्ही. "

" जी. " म्हणत प्रल्हादपंत निघून गेले. जाताना ते कसल्यातरी विचारात खोलवर बुडून गेले होते.

□ □ □

ॐ १४ ॐ

मंत्रीबाडीतील निळोपंतांच्या वाड्यावरचा खाजगी कारभारी भेटीला आल्याची राजांना वर्दी आली. कारभारी यावा असे सहसा कधी घडत नव्हते. काय झाले असावे या शंकेनेच राजांनी पेशव्यांच्या कारभाऱ्याला पेश घेतले. तो भीत भीत म्हणाला, “धन्यांनी आपली भेट मागितलेय. ते येऊ शकत नाहीत इथवर महाराज.”

“का ? काय झालं पेशव्यांस ?”

“पोटशुळानं तळमळताहेत ते एकसारखे अंथरुणावर.” कारभारी उत्तरला.

“काऽय ?” महाराजांच्या कानात जसा शब्द-बाणच घुसला होता.

राया, अंता, खंडोजी, पुरुषा, जोत्याजी असा माणूसमेळ घेत ते निळोपंतांची तब्येत बघायला मंत्रीबाडीकडे निघाले. महाराज येताहेत या वार्तेने बाडी खडबडून उठली. इथे एका हारीत सुरनीस, डबीर, न्यायाधीश, अमात्य यांचे एकालगत एक वाडे होते. प्रत्येकावर हत्यारी पहारेकरी होते.

निळोपंतांना बघण्यासाठी प्रवेश करायला म्हणून राजांनी वाड्याच्या पायरीवर पाय ठेवला मात्र; राजांच्या मनी, आठवणीच आठवणी उतरल्या.

हा तोच वाडा होता जिथे मोरोपंतांनी आपला देह ठेवला होता. अखेरच्या क्षणी त्यांनी आपल्या चिरंजीवांच्या – निळोपंतांच्या हाती पेशवाईच्या मुद्रा आणि एक भिकबाळीचा करंड ठेवला होता. मोरोपंत ! सावलीसारखे आबासाहेबांच्या पाठीशी असणारे, कसे निघाले आम्हास कैद करायला फौजबंद होऊन पन्हाळ्याकडे ? बिरवाडीला रघुनाथपंत मजालसीत बोलले तेव्हा मोरोपंत हवे होते. तेच देऊ शकले असते हणमंत्यांना पटेलसा जाब. त्यांच्या या वाड्यावर – त्यांच्यावर हत्यारी पहारे बसवावे लागले आम्हास. त्यांचे पद आम्ही त्यांच्यामागे निळोपंतांना दिले. त्यांच्या तोंडी कधी खंत नाही आली आपल्या वडिलांबद्दल. कसले ऋणानुबंध हे ?

समोर आलेल्या निळोपंतांच्या बंधूंसमवेत – गंगाधर मोरेश्वरांच्या बरोबर राजे पेशव्यांच्या वाड्यात प्रवेशले. तळमळत्या स्थितीतही निळोपंत रिवाजासाठी पलंगावरून उठू लागले. पुढे होत राजांनी त्यांना लेटते केले. शेजारी बसून तब्येतीची वाजपूस करू लागले. असह्य वेदनांनी पेशवे, डोळे घट्ट मिटून घेत तळमळतच म्हणत होते – “ही उदराची व्यथा नको त्या समयास आली स्वामी.”

“पंत, तुम्ही बरे वाटेतो आराम घ्या. तुमच्या पेशवाई दफ्तराचे काम बघतील तोवर गंगाधरपंत.” राजांनी पेशव्यांच्या मनावरचे दडपण सुमार केले.

मंत्रीबाडीतून आलेल्या राजांना चांगोजी काटकर एका असामीसह सामोरा झाला. ती असामी होती कारवारची. संताजी पावला नावाची.

“महाराजांच्या फौजेचं पाठबळ घेत कारवारात राम दळव्याची बंडाळी मोडून काढली आम्ही धनी.” रिवाज देत संताजी म्हणाला. महाराजांच्या चर्येवर, ते ऐकताना समाधानाची लकेर पसरली.

ऐन उन्हतापीचे दिवस सुरू झाले. अशा उन्हाळ्यातच औरंगने विजापूरला चहूबाजूंनी घेर टाकला. विजापूर कोटाला भक्कम खंदक होता. त्याचा आधार घेत आदिलशाही फौज कोट निकराने लढवू लागली. कुतुबशाहीने विजापूरच्या मदतीला तीस हजारांची सेना पाठविली. आता दक्षिणेच्या तिन्ही शाह्या आणि दिल्लीची मोगलाई यांचे लक्ष एकवटले ते विजापुरावर. याच विजापुरात शहाजीराजांना काढण्या घालून फिरवण्यात आले होते. इथेच बड्या बेगमेच्या दरबारात ‘सेवा को जिंदा या मुर्दा पेश करूंगा’ अशी कसम खात अफजलने असर महालात विडा उचलला होता. आणि तीच आदिलशाही राखायला हंबीरराव घोडदळासह विजापुराभोवती घिरट्या घालत होते. मेलगिरी पंडित मध्यस्थी करीत होते.

हरसूलच्या गंगाधर नागनाथ नावाच्या, दाढी कोरलेल्या एका असामीला घेऊन कुलेश खासेवाड्याच्या सदरेला राजांना पेश आले. सोबत आणल्या असामीची ओळख करून देत कुलेश म्हणाले, “नेताजीराव को बडे स्वामीने पावन कर दिया है। इस बेचारेको भी दिया जाय।”

गंगाधर नागनाथ हरसूलचा – मूळ मोगली चाकर – ब्राह्मण – त्याला जबरीने मुसलमान करण्यात आले होते. आपले शुद्धीकरण करून धर्मात घ्यावे म्हणून तो एवढ्या लांबवर गड चढून आला होता.

“महाराज, दया करा. माणसात घ्या मला.” म्हणून स्फुंदत तो राजांच्या समोर धाडकन कोसळलाच. राजांनी पुढे येत, वाकून त्याला उठते केले. थोपटून त्याला शांतवत कुलेशांना विचारले, “काय करता येईल यांच्या शुद्धीकरणासाठी छंदोगामात्य ?”

“जी. इसको प्रायश्चित्त लेना पडेगा। पश्चात विधिनुसार धर्मप्रवेश करना पडेगा।”

“प्रायश्चित्त कोण प्रकाराने केले पाहिजे यास समजावून सांगा. बाब धर्मखात्याची असल्याने मोरेश्वर पंडितांच्या देखरेखीखाली यास शुद्ध करून घ्या.” राजांनी गंगाधरचे पडेल खांदे दिलासा देत थोपटले. त्यांचा मनोमन कसलातरी विचार चालला होता.

का ? आमच्या रयतेवरच शुद्ध करवून घेण्याची नौबत का यावी ? नेताजी तर सरनोबत होते. हा मामुली इथवर आला म्हणून लागेल तडीस. जे येणार नाहीत, येऊ शकत-धजत नाहीत त्यांचे काय ? आम्हाला का वाटत नाहीत हाती कब्ज झालेले

मोगल, फिरंगी, पाद्री, टोपीकर, हबशी यांना बाटवावे असे ? बराच वेळ महाराज त्या विचारात गुंतून राहिले. कुलेश आणि गंगाधर गेल्याचेही त्यांच्या ध्यानी आले नाही.

पेशवाईची नव्याने सूत्रे हाती घेतलेल्या गंगाधर मोरेश्वरांना राजांनी बोलावून घेतले. चेऊल भागातील रयतेला द्यायच्या सवलती त्यांना सांगितल्या.

हबश्यांचा पुरा बंदोबस्त राहावा या विचाराने ते गंगाधर मोरेश्वरांना म्हणाले, "जंजिरा कोटाच्या तर्फेनं नव्या नामजादीची पत्रं पाठवा पेशवे. खंदेरीवर माणकोजी, सागरगडावर उदाजी पडवळ आणि सुभानजी खराडे, कुलाबा कोटावर भिवजी गुजर ही वकुबाची माणसं नामजाद करा. त्यांना तातडीनं नेमल्या जागा जवळ करायची समज द्या."

महाराज सांगत होते ते ध्यानपूर्वक ऐकणाऱ्या गंगाधर मोरेश्वरांना काही तरी महत्त्वाचे बोलायचे आहे हे राजांनी ताडले. मध्येच थांबत त्यांनी विचारले, "आमच्या निळोपंतांची तब्येत बरी की कशी ?"

"जी. कालपासून ठीक आहेत ते. थोडी विश्रांती घ्यावी लागेल. आम्हाला म्हणायचं होतं ..." गंगाधर बाब वर्माची असल्याने अडखळले.

"बोला. काय आहे ?" राजांना ते कशाबद्दल सांगणार याचा काही अंदाज आला नाही.

"कर्नाटककडची-तंजावरची खबर आहे की –"

"काय ? बोला." राजांच्या कपाळीचे शिवगंध आक्रसले.

"एकोजी महाराजांचे चिरंजीव अर्जुनजी तंजावर सोडून मोगलास मिळाले !"

'जगदंब' म्हणत, इंगळी डसल्यागत राजे बैठकीवरून उठले. मन बधिर झाले त्यांचे.

विजापूर नजरेच्या टप्प्यात राहावे यासाठी आता औरंगजेबाने आपला प्रचंड तळ नगरहून सोलापूरला हलविला. कुतुबशहाच्या, दिलजमाईच्या आलेल्या खलित्यात त्याने दोन वर्मी अटी घातल्या. त्यातली एक होती, पूर्वी पेशकश म्हणून वीस लाख पगोडे देणाऱ्या कुतुबशहाने आता एक कोट वीस लाखांची पेशकश द्यावी ! दुसरी अट होती आकण्णा आणि मादण्णा या हिंदू अधिकाऱ्यांना दरबारातून ताबडतोब बडतर्फ करावे ! या अटी नव्हत्याच. उद्या आपल्या फौजा गोवळकोंड्यावर उतरणार याची ती दिलेली सरळ स्मज होती.

औरंगच्या मराठी मुलखातून फौज मागे घेण्याच्या एकाच खेळीवर आता शतरंजचा पटच पालटला. राजा बाल उमरीचा आणि सरदारांत बेदिली याचा फायदा घेण्यासाठी औरंगने कमकुवत आदिलशाहीच पटाखाली धरली. तिला राखण्यासाठी कुतुब आणि मराठशाही धडपडू लागली.

कोकणातील वतनदारांची बंडाळी मोडण्यात सचिव रामचंद्रपंतांची ताकद खर्ची पडत होती. त्यांना रायगडी यायलाही फावत नव्हते. त्यासाठीच शंकराजी नारायण यांना याद फर्मावून राजांनी सचिवपदाची जोखीम त्यांच्यावर सोपविली.

जशी शुद्धीकरणाची बाब काट्यासारखी राजांच्या मनी सलत होती तशीच आणखी एक बाब होती. मुलुखातल्या बागलाणपासून कारवारपर्यंतच्या वरघाटातील भिल्ल, कोळी, धनगर अशा अश्राप, असहाय लोकांना गुलाम म्हणून खरेदी करून त्यांचे तांडेच्या तांडे सिद्दी व टोपीकर बोटीवर लादून दूरदेशी पाठवीत होते. माणसांना जसे काही वालीच नव्हते कुणी. याला पायबंद घालणे आवश्यक होते. नव्याने नामजाद शंकराजी नारायण यांना त्यासाठी राजांनी याद घेतले.

"शंकराजी, वरघाटाची रयत गुलाम म्हणून हबशी व टोपीकर खरेदी करून त्यांचा दूरदेशी विक्रा मांडतात. कशी जातात ही माणसं, काही माग ?" शंकराजींच्या ध्यानीमनी नसलेली बाब पुढे आली.

"जी. जकात भरतात त्यांची दरडोई तीन पगोडे खजिन्यात. गरीब, अन्नाला मोताद माणसं एवढ्यावरही गुलाम म्हणून जायला तयार होतात !"

"तीन पागोड्यांस एक माणूस ! शंकराजी, अशी रानावनातली जी माणसं आहेत त्यांचं मन वळवून संचणी करायला कळवा घाटाघाटातील सुभेदारांना. यातूनही शिपाईगिरीपरीस गुलामगिरीच चखोट मानून जे दूरदेशी जायला राजीच असतील त्यांच्यासाठी खरेदीदारावर दरडोई बारा पगोडे जकात जारी करा !" राजे कडव्या निकालाने बोलले. हुकमाची तातडीने तामिली करण्यासाठी शंकराजी निघून गेले.

गुलामी ! केवढा कलंक हा माणुसकीवरचा ! जनावर, लाकूडफाट्यासारखा माणसाचा भाव. घाण्याच्या बैलासारखे लादलेले जिणे. कुठून आले हे हबशी, टोपीकर ? बेधडक इथली माणसे खरेदी करतात. कुणाकडे जावे त्या गुलामांनी आसऱ्याला ? आबासाहेबांनी जहाजावर चढविलेल्या बाळाजींना त्यांच्या मातेसह, दिले पैसे भरून उतरून घेतले. गुलामीतून मोकळे केले. गेले असते बाळाजी कुठल्या तरी देशी गुलाम म्हणून तर ? काय झाली असती त्यांची गत ? बाळाजींना आबासाहेबांनी जहाजावरून उतरून घेतले. आम्हाला त्यांना कटावाच्या आरोपापोटी हत्तीच्या पायी द्यावे लागले ! मांडवीच्या खाडीत वाहतीला लागलेला आमचा घोडा त्यांच्या खंडोजींनी बचावला ! कसला तिढा हा हयातीचा ? का उकलत नाही ?

आपल्याच विचारांत हरवलेले, सैरभैर महाराज महाली फेर घेत असताना जोत्याजी केसरकर बाळराजांच्यासह आला. त्याच्या भुजेवरून उतरताच बाळराजे दुडक्या चालीने येऊन राजांच्या पायांना मिठी भरत बिलगले. त्यांना मायेने वर घेत त्यांची पाठ थोपटीत राजे म्हणाले, "तुम्ही नाही कुणाचे गुलाम हे ठीक आहे."

बाळराजांना 'गुलाम' या शब्दाचा अर्थच कळला नाही. ते गोंधळून आपल्या आबांकडे बघू लागले.

"बोलत नाही ते जोत्याजी ?" बराच वेळ जोत्याजी गुमान राहिला हे ध्यानी येऊन राजांनी सहज विचारले.

"हेरी काय नाय पर कानावर भल्या फाटेचंच आलंय याक."

"काय?" बाळराजांच्या पाठीवरचा फिरता हात थांबवत राजांनी विचारले.

"...म्हंत्यात भागानगरात औरंगजेबाच्या चिथावणीनं बहकलेल्या कुतुबशाही सरदारांनी आकण्णा आन् मादण्णा यांचा खून केला. भरचौकात भोकसलं त्येस्नी!"

अंगावर वीज कोसळावी तसेच वाटले राजांना ते ऐकताना.

याच आकण्णा आणि मादण्णा यांच्या मध्यस्थीने आबासाहेबांपासून दौलतीने गोवळकोंड्याशी सलोख्याचे संबंध राखले होते. भागानगरच्या भेटीत तर आकण्णांच्या घरी जाऊन आबासाहेबांनी 'विश्वासू घर' म्हणून भोजनही घेतले होते.

आमची माणसे फोडून जसे आम्हाला औरंग हैराण करतो आहे तसेच हे खून करवून कुतुबशाही खिळखिळीच केली आहे त्याने... "औरंग! काय हवस आहे या माणसाची?" महाराज स्वत:शीच पुटपुटले.

मृगाचे दिवस आले. आता पाणधार केव्हा धरेल याचा नेम नव्हता. आदिलशाहीवरचा औरंगच्या फौजांचा ताण वाढत होता. मेलगिरी पंडित, सर्जाखान आणि शिकंदरशहाला भेटून विजापूरहून परतले होते. त्यांनी सर्जाखानाचा तातडीच्या मदतीचा निरोप आणला होता.

आता गाठीच्या आणि राजकारणात तरबेज कुलेशांना आदिलशाही आघाडीवर पाठविण्याशिवाय मार्ग नव्हता. समोर याद घेतल्या कुलेशांना राजे म्हणाले, "माणसं पुरविल्याशिवाय आदिलशाही तगत नाही छंदोगामात्य."

"सोचते हैं हमही जायेंगे आदिलशाही कुमक के लिये।" कुलेशांनी, राजांनी विचारण्यापूर्वीच जोखीम पेलण्याची तयारी दाखविली.

"मनचे बोललात आमच्या कुलेश. आजच गड उतरा आणि पन्हाळगडाच्या रोखानं कूच व्हा. तिथलीही शिबंदी पाठीशी घेत आदिलशाहीत उतरा. शहजादा आजमच्या फौजा येतील आडव्या तुम्हाला मिरज प्रांतात."

"जी. हम आजही गड छोडेंगे।" कुलेश आज्ञा घेऊन निघून गेले.

मिरज, सोलापूर, अकलूज, इंदापूर अशी उभी पट्टी धरून राजांनी आता हंबीरराव, कुलेश यांच्या फौजफळ्या आदिलशाहीच्या पाठीशी उभ्या केल्या.

बाहेर गडमाथ्यावर पाऊस कोसळत होता. राजमनात विचारधारा थडथडत होत्या. याच वेळी लंडन दरबारचा खलिता घेऊन एक जहाज सुरत बंदराला लागले होते. त्या खलित्यात लंडनकरांनी स्पष्ट शब्दांत लिहिले होते– "राजा शंभूजी याच्या गोटात दाखल होऊन तुम्ही त्या युद्धसंमुख राजाशी दाट मैत्री संपादन करा. मग तुम्हाला मोगल किंवा पोर्तुगीज यांना भिण्याचे कारण नाही. मुंबईजवळ सिद्दी किंवा मोगल यांना फिरकू देऊ नका. त्या राजाशी झालेल्या तहाच्या पूर्ततेसाठी सोबत बंदुका आणि दारूगोळा पाठविला आहे. अधिक लागल्यास मद्रासच्या जलकोटातून घ्या."

राजांच्या ताकदीचे जे मोल सात दर्यापार, टोपीकर दरबारला कळले होते ते या देशचे असून, आप्तेष्ट असून कैकांना कळले नव्हते! लंडन दरबारने राजांना 'युद्धसंमुख वीर' म्हटले होते.

निळोपंत आणि प्रल्हादपंत राजांच्या भेटीस आले.

पोटशुळाची व्यथा सुमार होताच निळोपंत प्रल्हाद निराजींच्यासह वानापूर येथे इंग्रज वकील रिचर्ड स्टॅन्ले याच्याशी बोलणी करून आले होते. स्टॅन्लेशी झाल्या बोलण्याचा तपशील राजांना देत निळोपंत म्हणाले, "आपले सुभेदार टोपीकर व्यापाऱ्यांकडून कर घेतात अशी तक्रार हा इंग्रज वकील करतोय महाराज."

"जकातीपोटीचे आहेत ते कर पेशवे. नेहमीचीच आहे ही त्यांची तक्रार."

"जी. आम्ही गोऱ्या वकिलास त्याची समज दिलेय. या भीतीनं ते जादा वखारी घालायला तयार नाहीत आणि खुल्या व्यापारावरचे कर द्यायला कुरकुरतात. पण वरून काहीतरी कानपिचकी आलेली दिसते. भाषा नरमाईची वाटली वकिलाची."

"काय शेवट झाला तुमच्या बोलण्याचा पेशवे?"

"टोपीकरांनी आपला वकील मुंबईला ठेवून घेण्यास मान्यता दिली आहे. त्यांचाही एक वकील आपल्याकडे राहील." पंतांनी प्रल्हाद निराजींच्याकडे बघत जाब दिला.

"आता न्यायाधीशांना टोपीकर दरबारात गुंतवून नाही भागायचं. कुणी दुसरी असामी पाठवा पेशवे मुंबईला. काय प्रल्हादपंत?" राजांनी न्यायाधीशांचा सल्ला विचारला.

"जशी आज्ञा. नवी माणसं तयार झाली पाहिजेत हेजिबीत." प्रल्हादपंतांना आपले वकील म्हणून झालेले मागील वेळचे हाल राजांना पसंत पडले नसावेत की काय अशी शंका आली.

"आम्ही गोऱ्यांच्या वकिलाकडे दोन बंदुकांची मागणी घातली. त्यानं ती मान्य केली आहे स्वामी." पेशवे उजळ चर्येने म्हणाले.

"बंदुका देतीलच ते निळोपंत. सिद्दी, मोगलांना ते पाठीशी घालतात त्याचं काय?" राजांनी मूळ धरले.

"हबश्यांना टोपीकरांनी हाकललंच आहे. हबशी आता आपल्या समुद्रपट्टीत फिरतो ते उंदेरीतून, असं इंग्रज वकिलाचं म्हणणं आहे. मोगली आरमारालाही त्यांनी सख्त ताकीद अलीकडे दिली आहे."

बराच वेळ प्रल्हादपंत काही बोलत नाहीत हे ध्यानी आल्याने राजांनी त्यांना विचारले, "न्यायाधीश, बोलत नाही ते? तब्येत?"

"जी. तसं काही नाही. बरे आहोत आम्ही." त्यांच्या घशाला हे बोलताना कोरड पडली. त्यांच्या डोळ्यांच्या बाहुल्या फडफडल्या. दोघेही मुजरे देत निघून गेले.

विचित्रगडाचा हवालदार संताजी निंबाळकर याचा आलेला खलिता घेऊन खंडोजी बल्लाळ राजांच्या भेटीस आले. मामला कारीच्या सर्जेराव जेध्यांचा होता. कारीच्या जेधे घराण्याने दौलतीची, कान्होजी जेध्यांपासून सेवा केलेली होती.

औरंग दक्षिणेत उतरला आणि जेध्यांच्या बुद्धीने पलट खाल्ली! भाऊबंदकीने मने पोखरली. सर्जेराव जेध्यांचा भाऊ शिवाजी जेधे मोगलांना मिळाला. त्याने सर्जेरावांची गुरेढोरे वळवून नेली. त्यांचा मुलूख तसनस केला.

हा कथला वास्तविक स्वराज्यातला पण सर्जेरावांनीही मोगलांचीच पाठ धरली. शिरवळच्या मोगली अधिकाऱ्याकडे विचित्रगडचा हवालदार संताजी निंबाळकर याला मध्यस्थ घालून आपली भाऊबंदकीची बाब सोडवून घ्यायची खूप कोशिस केली. राजांच्या कानी जेध्यांचा हा सगळा करिना आला होता.

संताजी निंबाळकरांचा सर्जेरावांची सफाई देणारा खलिता खंडोजी वाचू लागले –

"... आम्ही राजमान्य स्वामींच्या पायी एकनिष्ठच आहोत. स्वामी कृपाळू होऊन आमचे देशमुखी वतन, अभयपत्र देऊन स्वाधीन करतील तर निष्ठेने सेवा करू."

शब्दागणिक जेध्यांचा दुटप्पीपणा ऐकून महाराजांच्या कपाळीची शीर थडथडू लागली. सरासर पायफेर घेत ते म्हणाले, "चिटणीस, कलमदास्तान घ्या. आम्ही सांगू तो मजकूर शब्दबर रेखून तातडीनं पाठवा."

खंडोजी कलमी सेवेवर बसले. समोर सर्जेराव जेधेच असल्यागत महाराज मजकूर सांगू लागले, "... तुम्ही, संताजी निंबाळकर मुद्राधारी विचित्रगड यासी पत्र लिहून मुद्दा सांगोन पाठविला की, आपला भाऊ शिवाजी जेधा याने हरामखोरी करून शिरवळास गेला. त्याने आपली गुरेढोरे वळून नेली. पुढे आम्हास बरे पाहणार नाही. याबद्दल आपण उठोन सिरवळास आलो आहे. ऐसियासी आपण रा. स्वामींच्या पायाजवळी एकनिष्ठच आहे ... त्यावरून हे आज्ञापत्र तुम्हास लिहिले आहे.

"तरी आधी तुम्हीच सरासरी हरामखोरी केली की वतनदार होऊन इमाने इतबारे वर्तावे ते गोष्ट न करिता स्वामींचे अन्न बहुत दिवस भक्षिले. त्याचे सार्थक केलेत की स्वामींच्या पायाशी दुर्बुद्धी धरून दोन दिवसांचे मोगल त्याकडे जाऊन राहिलेत. तुमचा भाऊ गनिमाकडे केला; तो बरे पाहिना ऐसे होते तरी तुम्ही हुजूर यावे होते!! म्हणजे तुमचा एतबार व एकनिष्ठता कळो येती. ते केले नाही. तरी बरीच गोष्ट जाहली. या उपरेही गनिमाकडे रहाणेच असेल तरी सुखेच राहणे. तुमचा हिसाब तो काय? या क्षणी स्वामी आज्ञा करितात तरी गनिमादेखील तुम्हास कापून काढवीतच आहेत हे बरे समजणे!

"एकनिष्ठेने स्वामींचे पायाजवळी वर्तावे असे असेल तरी जो राबता करणे तो हुजूर लेहून पाठवावा. हुजराती खेरीज दुसरियाकडे एकंदर राबता न करणे.

"तुमचेजवळ एकनिष्ठताच आहे, ऐसे स्वामींस कळलियावरी जे आज्ञा करणे ते करतील. तेणेप्रमाणे वर्तणूक करणे."

खंडोजींनी खलित्यावर वाळूची चिमट शिवरून तो थैलीबंद केला.

"पेशव्यांनी खानदेशात धरणगावच्या वखारी लुटल्याची पलटी म्हणून मुंबईच्या टोपीकरांनी आपलं धोरण बदललं आहे स्वामी." खंडोजींनी दुसरी बाब पुढे घेतली.

"बदलाचं धोरण काय आहे खंडोजी?" राजे त्रस्त झाले.

"आपला समुद्रपट्टीचा मुलूख मारण्याचा ते यत्न करताहेत. पण आपले सारंग डोळ्यांत तेल घालून जागते आहेत."

राजांनी समाधानाचा सुस्कारा सोडला.

चेऊलच्या खबरा आहेत. हबश्यांनी चेऊल जागजागी जेर केलं आहे. थोरल्या स्वामींच्या निर्वाणाची व्यथा दवा देऊन बरी करणाऱ्या पिलाजी न्हाव्याचा मुलगा बजाजी यानं हबश्यांच्या उंदेरी बेटावर जोरावारीचा हमला केला. त्यामुळं चिडून हबशी चौलात मेळानं घुसले आहेत. कित्येक चौलकरांची कापाकापी केली त्यांनी."

खबर सांगताना खंडोजी आणि ती ऐकताना महाराज पिळवटून निघाले. राजांच्या मनी आबासाहेबांचे अखेरचे बोल थडथडत फिरले– "जंजिरा-उंदेरीवर हबशी पाय ठेवून आहे."

गलबतात लादून हबश्यांनी पसार केलेल्या, मुंबईत कामी आलेल्या सारंग सिद्दी मिश्रीची नेक मुद्रा त्यांच्या डोळ्यांसमोर तरळू लागली. जंजिराखाडीच भरून काढण्यासाठी स्वतः केलेल्या जिद्दी यत्नांची सय मनात फडफडून गेली. हबशी! दौलतीच्या पदरास कुरतडणारा उंदीर!

समर्थांच्या चाफळमठाच्या यात्रेसाठी येणाऱ्या व्यापाऱ्यांच्या तक्रारी येत होत्या. त्यांच्याकडून भरमसाट कर घेतले जात होते. याला कुठेतरी पायबंद बसणे आवश्यक होते. त्यासाठी राजांनी धर्मखात्याच्या मोरेश्वर पंडितांना, त्यांच्या चिटणीसासह, याद घेतले. "पंडित, चाफळमठाची कोण तक्रार?" राजांनी मोरेश्वरांना जाब विचारला.

"जी. मठाच्या निगराणीची बाब काही मार्गी लागत नाही. उद्धव गोसावी मनमाना कारभार करतात. त्यांच्या चिथावणीनं दिवाणी लोक व्यापार-उदिमासाठी येणाऱ्या लोकांकडून भरपेट कर घेतात." मोरेश्वरांनी चाफळची हालहवाल सांगितली. ती सांगताना समर्थांमागे मठाच्या होणाऱ्या आबदांनी त्यांचेही मन व्याकुळले.

राजे चिंतागत झाले. चिटणीसांकडे बघत म्हणाले, "कलम घ्या. कऱ्हाडचे देशाधिकारी रंगो विश्वनाथ आणि साताऱ्याचे अंबाजी मोरदेव यांना ताकीदपत्र द्या."

राजे धर्मखात्याच्या चिटणीसांना ताकीदपत्राचा मजकूर सांगू लागले –

"चाफळ श्रीरघुनाथ यात्रेचे नंदादीप, लिहिणार व अफराद यांचे वेतनाची मोईन सादर आहे. त्याप्रमाणे तुम्ही ऐवज पाववत नाही. सिंगणवाडी येथे सारे ऐवजाची वरात बिलाकसुर पावावी. दिवाणी लोक वाणियांजवळ उचापती करतात ते धास्तीने यात्रा मोडू

पाहते. ऐसे सहसा न करणे. दिवाकर गोसावी हस्ते पूर्वीलप्रमाणे महोत्सव चालवावा. उद्धव गोसाव्यिास मधेच कथले करावयास संबंध नाही. शहापूर येथे हनुमंताचे देवालय आहे. ते उत्पन्न वाहगावचा कृष्णाजी पाटील व पुजारी भक्षतो. तरी बरजोद ताकीद करणे आणि पाटलाने खादले ते इनाम बेरीज त्यापासून घेऊन दिवाकर गोसावियास पावते करणे.'' मठाच्या बारीकसारीक बाबींचा निवाडा राजांनी सांगितला. त्यांचे मन मात्र समर्थांच्या आठवणींत गुंतून गेले.

गेली तीन चार वर्षे झालेल्या फौजांच्या धावणींनी जागजागची शिवारे उजाड झाली होती. त्यातच नुकतेच दुष्काळी साल चाटून गेले होते. गावोगावचे कुणबी हवालदिल झाले होते. त्यांना धीर, दिलासा देऊन राने तवानी करणे भाग होते. फौजा घोड्यांच्या खुरांनी आणि शिवारांच्या पोटाने धावतात हे जाणलेल्या राजांनी सुरनीस शंकराजींना सदेवर घेऊन मुलुखभरच्या सुभेदारांना आज्ञापत्र देण्यास सांगितले– ''जागजागच्या वतनी देशमुखांनी मशागत व लागवडीसाठी कुणब्यांना पाठबळ द्यावे–''

विजापूरभोवती चौटाप दौडणाऱ्या हंबीररावांचे स्वारामागून स्वार येत होते– कुमक धाडावी. नागोजी बल्लाळांना त्यासाठी याद घेऊन राजांनी फौजबंदीने विजापूरचे रोखे त्यांना पाठवून दिले.

बहिर्जी नाईक रामघाटात झालेल्या हातघाईची खबर देऊन गेल्यापासून महाराज संत्रस्त झाले होते. कुडाळचे खेम सावंत फिरंग्यांना मिळाले होते. त्यांच्या मदतीने गोव्यालगतचा प्रदेश लुटत होते. त्यांना सोंद्याचा राम दळवी, पंधरा हजारांच्या फौजेने हातभार लावीत होता. कारवार जाळत-लुटत होता.

या बंडखोरांना खीळ घालावी म्हणून रामचंद्रपंत आणि धर्माजी नागनाथ आटापिटा करीत होते. पण– पण एवढी आदिलशाहीला राजे कुमक करीत होते तरी त्यांचाच सालार सर्जाखान याने रामघाटात सहा हजार हशमांचा तळ टाकून रामचंद्रपंत आणि धर्माजी यांना रोखून धरले होते. हत्ती, घोडे टाकून त्यांना पिछाट घ्यायला लावले होते. या घटनांचे साफ कारण होते. आदिलशाहीला राजांची कुमक घ्यायची होती, देसाई-दळवींच्या मार्फतीने मिळेल तेवढा कोकणपट्टीचा मुलूख मारून विजापूरचा खजिना भरायचा होता! कसेही करून औरंगच्या रेट्यापुढे तगायचे होते.

कोकणातील देसाई-दळव्यांचा उपद्रव कसा वारावा या विचारात असतानाच प्रल्हाद निराजी राजांच्या भेटीला आले. त्यांच्याबरोबर विठोजी बापूजी व गोविंद नारायण या चेऊलच्या दोन असामी होत्या. त्यांनी राजांना रिवाज दिला.

''या उभयतांवर मोठा अन्याय झाला आहे स्वामी. सूर्याजी विसाजी प्रभू याने या गरिबांकडून जोरावारीने खतपत्र करून घेतले आहे. यांचा जमीनजुमला जुलमाने खादला आहे.'' प्रल्हादपंतांनी सगळा कथला सांगितला.

विठोजी आणि गोविंद हात जोडून वाकून एकसारखे गयावया करू लागले– ''मायबाऽप, न्याय द्या आम्हास. वाऱ्यावर सोडू नका.''

''न्यायाधीश, चौलास देशाधिकारी कोण?'' राजांनी पंतांकडे तपास घेतला.

''जी. येसाजी अनंत.''

''त्यांना तातडीनं आज्ञापत्र द्या. या बाबांच्याकडून बळजोरीने करवून घेतलेले खतपत्र रद्दबादल ठरवावे. ज्यांच्या काळात हे खतपत्र झाले ते पूर्वील देशाधिकारी कोण?''

''हरी शिवदेव महाराज.'' प्रल्हादपंतांना राजे एवढ्या मुळापर्यंत जातील याचा अंदाजच नव्हता.

''त्यांस एक सख्त समज द्या न्यायाधीश– विठोजी बापूजी व गोविंद नारायण हुजूर आले आहेत. खतपत्राचा मामला जुलूम कानी आला. तुम्ही सुभेदार! तमाशा पाहता. वरतून सूर्याजीची कोशिस करिता. यावरून तुमची कारकुनी कळो आली. जोरावारीने एकाचे काढून दुसऱ्याचे घशात घालावे ही कोण दिवाणी चाकरी?'' संतप्त राजांनी हरी शिवदेवना काय समज द्यावी हे प्रल्हादपंतांना सांगितले.

इकडे आपल्या अश्राप रयतेला वाजवी न्याय मिळावा यासाठी राजे तिळतिळ तुटत होते. त्या वेळी सोलापूरच्या औरंगजेबाच्या प्रचंड तळावर घडणारा प्रसंग तुळजापूरची भवानी तिकडे पाझरत्या डोळ्यांनी बघत होती. आणि नुसतीच बघत होती.

रेशमी तणावांनी पेललेला औरंगजेबाचा आलिशान शामियाना हिवाळी वाऱ्यावर लहरत होता. चांदताऱ्यांचे हिरवे निशाण त्यावर फडकत होते. साठ हजार फौजीतळाच्या राहुट्या जागजागी पडल्या होत्या. शाही शामियान्याच्या बाहेर नगारा, झेंडा, पोहच्यांचे तबक हे सामान हारीने मांडले होते. हत्यारी हशम एका हत्तीभोवती कडे धरून पहारा देत होते. साखळदंड वाजवीत चीत्कारत तो हत्ती डुलत होता.

शामियान्यात मुहम्मद आज्जम, मुईजुद्दीन, बेदारबख्त, रणमस्तखान अशा खाशा असामी कदमावर नजर लावून खड्या होत्या. उंची आसनावर औरंगजेब बसला होता. त्याच्या डाव्या हाताशी मौलवींचे पथक बसले होते.

चाळीस पन्नास घोडेस्वारांच्या दुडक्या पथकातून दोन अरबी, उमद्या घोड्यांवर मांड घेतलेले खासे स्वार शामियान्याजवळ आले. पहारेकऱ्यांनी त्यांना तसलीम दिली. दोघेही आत शिरले. दोघांनी बादशाहला तिवार कुर्निसात केला. त्यांतील तरण्याबांड, उंच असामीला बुढा औरंगजेब बारकाईने निरखत होता. दुसरा वृद्ध वयस्क इसम पुढे झाला. त्याने आपल्या 'जिल्हे सुबहानींच्या' उजव्या हाताशी असलेले तबक उचलून बादशहासमोर धरले. बादशहाने आपला माळधारी हात तबकाला लावला. तबकधारी होता वजीर असदखान. त्याने तबकातील हिरवीशार खिल्लत उचलून, आपल्या बरोबर आलेल्या तरण्याबांड सरदाराच्या खांद्यावर पांघरली. तिच्यावरचा जरीबतू चांदतारा झगमगला. बांड्याने औरंगजेबाला कमरेत झुकत पुन्हा कुर्निसात केला. त्याला पंचहजारी आणि बाहेर मांडलेल्या चीजवस्तू हत्तीसह बक्ष केल्याचे जाहीर करण्यात आले. हत्तीने

बडा माणूस साखळबंद करून टाकला. तो होता अचलोजी महाडिक! आबासाहेबांच्या जावयाचा भाऊ!

अचलोजीच्या कानी आल्या बातमीने घायाळ व्हायलाही राजांना उसंत मिळू नये म्हणून की काय अशी जंजिऱ्याच्या हबशी कासमने पुन्हा उचल खाल्ली. चौल, राजापुरात आपले हबशी तांडे घुसवून त्याने निर्दय कत्तली करविल्या. जंजिरा सोडून दर्यामार्गे तो स्वतःच कल्याणवर चालून आला. दाभोळ बंदरात तर त्याच्या आणि गोविंदजी कान्हो यांच्या आरमारी दर्याभांडणात गोविंदजी मारले गेले.

आदिलशाहीचे एक एक मातब्बर ठाणे कोसळत होते. एवढा भक्कम मिरजेचा भुईकोट पण तोही किल्लेदार आसदखानाने रणमस्त आणि रुहुल्लाखान यांच्या सुपूर्द केला. मिरज ताब्यात येताच कोल्हापूर-पन्हाळा भागात मोगलांच्या हालचाली वाढल्या. एकटे हंबीरराव मावळतीची पन्हाळ्यापासून हुक्केरीपर्यंतची आदिलशाही तुडवीत ती राखण्यासाठी जिवाचे रान करीत होते.

लक्ष्मेश्वराच्या रवणगौडा देसायाने मोगलांविरुद्ध चिवट झुंज दिली होती. त्याला इनामपत्र देण्यासाठी राजांनी पेशव्यांना पाचारण केले.

आपणाला कशासाठी याद केले आहे याची काहीच कल्पना नसलेले निळोपंत पुण्याहून दामाजींनी कळविलेली बाब पुढे ठेवीत म्हणाले, "रुहुल्ला आणि रणमस्तखान मिरजेहून पुण्यावर उतरले आहेत महाराज. तिथल्या देशमुख, देशपांड्यांना मसलतीत घेऊन फितवण्याचे यत्न चाललेत त्यांचे."

असले ऐकून काही वाटावे असे दिवसच राहिले नव्हते. आज राजांना फार जाणवले की कुठूनतरी समर्थमुखातली गोसावी नांदी कानी पडावी.

भवतीच्या यातनांनी मनाची तलखली होत असलेले राजे अंतःपुरी दालनात आले. बराच वेळ ते काही बोलत नाहीत हे जाणवल्याने येसूबाई म्हणाल्या, "पाटगावहून मठाचा माणूस आलाय. मौनीबाबांची तब्येत सुमार असल्याचं कळतंय."

राजांनी चमकून येसूबाईंच्याकडे बघितले. ते काहीच बोलले नाहीत. या धावपळीच्या काळात मौनीबाबा, मोरया गोसावी, मल्हारबाबा या कुणाचेच दर्शन घेणेही जमले नव्हते. मन चुटपुटले त्यांचे त्या जाणिवेने. दुहाती बाळराजांचे हात घेऊन राया-अंता आले. बाळराजे 'मासाहेब' म्हणत येसूबाईंना बिलगले. मायलेकरांचे रूप बघताना राजांना आपल्या थोरल्या आऊंची सय झाली.

सदरेवर आलेल्या राजांना पन्हाळा भागातून आलेला म्हलोजीबाबा घोरपड्यांचा तरणा मुलगा संताजी सामोरा आला. त्याला हंबीररावांनी धाडला होता. नुकतीच पन्हाळ्याजवळ हंबीरराव-म्हलोजी यांची रणमस्त व रुहुल्लाखान यांच्याशी जोरावारीची हातघाई झाली होती. तिचा वृत्तान्त राजांना देऊन संताजी म्हणाला, "पार पिटाळल्यात दोन्ही खानं बेळगावच्या बाजूला सरलष्करांनी. बेळगावचा किल्लेदार मुरादखान यास कोट नेटानं झुंजवावा असा थैलीस्वार दिलाय."

संताजीच्या उत्साही मुद्रेकडे बघताना आणि त्याने सांगितलेले ऐकताना महाराजांना समाधान वाटले. संताजीच्या जवळ येऊन त्याचा खांदा थोपटीत राजांनी विचारले, "कसे आहेत आमचे म्हलोजीबाबा आणि किल्ले पन्हाळा?"

"जी. आबा गेल्यात कापशीला– गावाकडं. किल्ला म्हनशिला तर तूर्ताला आम्हाकडंच हाय की."

या पाऊसमान्यातच कुडाळच्या निळकंठ नारायणांनी पाठविलेला थैलीस्वार, कांबळी खोळ पांघरून रायगड चढून आला. त्याने आणलेल्या थैलीत मजकूर होता– "मोगली सारंग याकुतखानाचा खेमसावंतास खलिता आहे की– पादशहास येऊन मिळावे. जशी अर्जुनजी अचलोजी यांची केली तशी हजरत तुमचीही सर्फराजी करतील." निळकंठ नारायण कुडाळचा देशाधिकारी होता. मोठ्या हुन्नराने त्याने खेमसावंताशी याकुतखान बांधत असलेल्या संधानाची बित्तंबातमी कळविली होती.

शेकोटीतला लाकडी ओंडका धुमसावा तसे राजांचे मन भरून आले होते. एवढा तापवंत सूर्यनारायण पण त्यालाही वाळवी डसावी असे दिवस धरले होते.

अनेकविध विचारांनी राजांचे मन भरून आले होते. कसलेतरी नाकळते अशुभ भवती भिरभिरतेय असे वाटत होते. ते कुणाशीच मनमोकळे बोलत नव्हते. असंख्य गव्या रेड्यांची एकमेकांना माथी थडकावीत, तुंबळ टक्कर माजावी तशी त्यांच्या भोसलाई मनात विचारांची प्रचंड खळबळ माजली होती.

"कुणासच कसं वाटेना हे राज्य श्रींचं म्हणून? का नांगी टाकताहेत सारे औरंगपुढं? औरंगजेब! आम्हास आम्यास एकदा विचारणारा– खेलोगे हौदा हमारे पहेलवानसे? कसा दिसत असेल तो या उतारवयात? त्याला होत असेल का आपल्या दूर पडल्या दिल्लीची याद? दिसत असतील कधी आबासाहेबांच्या-आमच्या मुद्रा त्याच्या मिटल्या डोळ्यांस? येत असेल त्याला आपल्या बापाची-भावाची, विष चारलेल्या मिर्झाराजाची, हिरकणी खाल्लेल्या दिलेरची, कैदेत टाकलेल्या आपल्या मुलांची याद?"

रायगडची राजसभा भरली होती. नुकताच श्रावण संपला होता. सिंहासनचौकातील आडपडदे हिवाळी वाऱ्यावर थरथरत होते. पूर्वाभिमुख राजसिंहासनावर महाराज बसले होते. त्यांची चर्या गंभीर होती. प्रधानमंडळातील आठी खांबांजवळ अष्टप्रधान उभे होते. सिंहासनपायरीवरच्या आसनावर बाळ शिवाजीराजे बसले होते. त्यांच्या शेजारी छंदोगामात्य कुलेश खडे होते. दरबारी चौकात अंथरलेल्या रुजाम्यांवर रूपाजी, कृष्णाजी नरस प्रभू, येसाजी, म्हलोजीबाबा, संताजी-धनाजी, जानराव, बारदमल असे कितीतरी मानकरी आपआपल्या जागी खडे होते. एवढे माणूस एकवटले होते पण आडपड्यांची सळसळही ऐकू यावी अशी भयाण शांतता दरबारभर पसरली होती.

कारण ? कारण साफ होते. त्रिदलातील एक दल तुटले होते. आदिलशाहीचे विजापूर पडले होते! बाल शिकंदर औरंगजेबाच्या हवाली झाला होता. तळपत्या नंग्या तेगी पेललेल्या हशमांच्या घेरात सजल्या शाही हत्तीच्या हौद्यात बसून औरंगजेबाने विजापुरात फतेचा फेरफटका टाकला होता. शहरभर दवंडी पिटली होती – "बिजापूर की रियाजा अब दिल्लीतख्तके सल्तनतकी रियाया है। किसपर भी जुल्मजोरी नहीं होंगी। सब शाही सल्तनतसे इमानदारी रक्खे।"

दक्षिणेत उतरलेल्या औरंगजेबाला आता चार वर्षांनंतर पहिली फत्ते मिळाली! पठाणी बेदिलीनं बजबजलेली आदिलशाही कोसळली. ती खबर लागताच चौवाटा जासूद फेकून हा दरबार राजांनी भरविला होता. गंभीर मसलतीचा दरबार.

सगळ्यांची कल्पना होती नेहमीसारखे निळोपंत दरबारी बोलणे खोलतील. तसे घडले नाही. सिंहासनाच्या दुहातीच्या कोरल्या सिंहमुखांवर आपले हातपंजे घट्ट रुपवीत महाराजच बोलले – "सारे जाणता ... इदलशाही पडली." भरून आले छातवान रिते करीत महाराजांनी लांबीचा सुस्कारा सोडला. शांतताच शांतता पसरली.

"ऋणानुबंधाची ती गादी राखून औरंग गुंतवून ठेवावा यासाठी आम्ही जंग जंग केलं. आता दौलतीवरचं सावट वाढलं आहे. खबरा आहेत मोगली फौजा आता गोवळकोंड्याचा रोख धरतील. ती हूलही असेल. साऱ्या बाक्यांना त्यासाठीच पाचारण केलं आहे. ज्यास जे वाटेल ते मोकळ्या मनी मसलतीचं बोलावं. हे राज्य उभारण्यासाठी आबासाहेबांपासून गावोगावचे धारकरी कामी आलेत हे सारे जाणता. हे राज्य आमचं एकल्याचं नाही, हे आई जगदंबेचं, जिवाचा आटापिटा केलेल्या थोरल्या आऊंचं-आबासाहेबांचं, रानावनांत राबणाऱ्या खानदेश-वऱ्हाडपासून जिंजीपावेतो लढणाऱ्या धारकऱ्यांचं हे राज्य आहे. प्राणबाजी लावून ते राखून चालविणं ही जोखीम तुम्हा-आम्हांवर आहे." काय नि किती बोलावेसे झालेले महाराज सिंहासनावरून उठले.

सारा दरबार कानांचे शिंपले करून ते शंभूबोल ऐकत होता.

"समय बाका आहे. मोका साधून याच प्रसंगी कोकणपट्टीचे वतनदार बंडाळी करताहेत. आपले म्हणावे ते पारखे होऊन, गनिमतळ गाठून मनसबीसाठी औरंगजेबास कुर्निसात करीत आहेत. हबशी दर्यापट्टीची रयत हैराण करतो आहे. खांद्यास खांदा लावून एकदिलाने सर्वांनी शर्थ करणं भाग आहे. आमचा भरोसा आहे सारे खुला मनसुबा दरबारसमोर ठेवतील. कोणी कचदिल होऊन आतबाहेर करणार नाहीत." आपण नकळत उभे ठाकलोत हे जाणवलेले राजे बसते झाले.

राजांना बघताना मिर्झा राजाशी तह करून त्याच्या तळावर भेटीला जायला निघालेल्या थोरल्या धन्यांची मुद्रा हंबीररावांना आठवली. त्यांचा खडा आवाज दरबारी चौकात, खडक फोडणाऱ्या पहारेसारखा स्पष्ट खणखणला, "एवढं चिंतागती व्हाय नगं महाराजांनी. आदिलशाही पडल्याली न्हाई. पठाणांच्या बेदिलीचा कांव्यानं फायदा उठवून बादशानं पाडल्याली हाय. आम्ही हाय तवर त्येच्या प्याद्यालादिकुन थारा देत

न्हाई मुलखात. ही जी खिल्लता पांघराय बुनगी, बुजगावणी पळत्यात त्यास्नी आज न्हाई, उद्या कळेल पायात कसल्या कळकीचा काटा रुतलाय त्ये. महाराजांनी बिनघोरी असावं. आम्ही पाठीशी हाव." हंबीररावांच्या रूपाने जसा मावळकडाच रांगड्या बोलीत, कुचमल्या दरबारला धीर देत सुनावून गेला.

"कोकणपट्टीतल्या पुंडपाळेगार वतनदारांच्या बाबीत आम्ही डोळ्यांत तेल घालून जागते आहोत. प्राण गेला तरी त्यांचा व मोगलांचा मेळ नाही पडू देत आम्ही." रामचंद्रपंतांनी सरलष्करांना जोड दिली. धर्माजी नागनाथांनी त्यांच्या बोलीला मान डुलवून साथ भरली. थिजल्या, मुकाट दरबाराला अंग धरू लागले.

"आजवर केली त्याहून प्रसंगी दौलतीची साथच करू आम्ही. त्यासाठी पडेल ते मोल देऊ." खंडोजी बल्लाळांनी आज पहिल्याने दरबारातली चिटणिसी बैठक सोडून खडे होत आपली दाद नोंदविली.

"शहजांदा अकबरकी मददसे फिरंगोंको चूप बिठाना, जमीनदारोंको मिलाकर राजासाबके साथ रखना हमारी जोखीम है। पन्हाला, खेलना, मलकापूर प्रांत की राजासाब फिक्र न करें।" कुलेशांनी कनोजी हिंदोस्थानीत आपली साथ प्रकट केली. खांबालगतचे न्यायाधीश प्रल्हादपंत आणि काही मंत्री ते ऐकताना चुळबुळले.

आता मात्र हंबीरराव सडेतोडच बोलले, "राजकारणातलं काही कळत न्हाई आम्हास्नी. महाराजांनी बोलताव म्हणून माफी करावी." हंबीरराव घुटमळले.

"बोला. सरलष्कर तुम्ही कदिम, घरचे. अगदी नि:संकोच बोला."

"माफी असावी महाराज. त्या शाजाद्याचा काही उपेग न्हाई. उलट त्याचंच निमित्त करून बादशा पुन्हा दौलतीत घुसायचं भ्या हाय. छंदुगामात्यांनी नाद सोडावा आता त्येचा अन् ..."

आता दरबारचे ध्यान एकट्या हंबीररावांवर खिळले. अनेकांच्या मनातला सल बोलण्याचे – तेही भरदरबारात हे फक्त हंबीररावच करू धजत होते. त्यांचा अधिकार, वय व त्याग होताच तेवढा.

"काय आहे मनी ? साफ बोला मामासाहेब." राजांनी त्यांना मुभा दिली.

आज हंबीरराव दरबारात असूनही गैररिवाजी असे प्रथमच खाकरले. आपली निडर नजर भोवतीच्या साती प्रधानी खांबांवर आणि छंदोगामात्यांवर त्यांनी एकदा फिरविली. डोळे जसे टेहळणीचे भेदक भोंगीर झाले त्यांचे. सप्तप्रधान, कुलेश, दरबारी मानकरी, खुद्द महाराज सारेच हंबीररावांकडे बघू लागले.

"बाब आमच्या अखत्यारीची न्हाई महाराज. पर कुनीतरी, कवातरी ह्ये बोलाय पायजेच. आम्ही रगात सांडलंय थोरल्यांच्या ह्या गादीपायी म्हूनच बोलताव – कानांवर येतंय आमच्या की, मंत्रिमंडळातल्या असामी, दफ्तरी अधिकारी आणि छंदुगामात्य कबजी यांचा बेबनाव हाय!"

प्रधानी खांबांलगतच्या बड्या असामी एकमेकांकडे बघूच लागल्या. कुलेशांचा चेहरा खरकन उतरला. काळीज पिळून काढणारी एक वेदना त्यांच्या मुद्रेवर पसरली. त्यांनी गर्दनच खाली घातली.

"कसला बेबनाव सरलष्कर ?" महाराजांच्या कपाळी आठ्या धरल्या.

"आम्हास्नी कळतंय मंत्रीबाडीतील कुणी असामी छंदुगामात्यास्नी 'कनुजा' म्हून पंगतीला घेत न्हाई! कबजी दिकुन कुनाकडं जात न्हाईत. त्येंचं महाराजांच्या आसपास असणं कैकांना पसंद न्हाई. या बाक्या वक्ताला येळेसुर या बाबीचा कंडका पडाय पायजे." हत्यारघाईतले हंबीरराव परवडले पण हे जबानमार करणारे नको असेच मंत्रिमंडळातील असामींना होऊन गेले.

निर्धाराने प्रल्हादपंत म्हणाले, "सरलष्कर म्हणतात ते रास्त आहे. छंदोगामात्यच कुणाकडे पंक्तीस जात नाहीत. अष्टप्रधानांहून ते स्वत:स वेगळे मानतात. महाराजांच्या खास गोटातले मानतात. सर्वांस आपल्या वाड्याकडे पंक्तीस पाचारण करतात. कुणी जात नाही त्यांच्याकडे."

ते ऐकताना थरथर कापणारे छंदोगामात्य संतापाने म्हणाले, "सरकार, झूट बोलते हैं न्यायाधीश। हमने कनोजमें जनम लिया ये कैसा कसूर हमारा ? राजासाब के चरणोंमें निष्ठा रखते हैं और आखरी दमतक रखेंगे। मंत्रिगणसे क्या वास्ता हमारा ?" कुलेशांना क्रोधभाराने धड बोलवेना.

चित्रविचित्र विचारांची, क्षणभरातच राजांच्या मनात तुंबळ घाई माजून गेली. आपण कसला विचार करतो आहोत आणि भोवती केवढा गैरमेळ घर करून बसला आहे या विचाराने तर मन अपार खंतावले त्यांचे.

"सरलष्करांचा अभिमान वाटतो आम्हास." राजांची नजर हंबीररावांवरून दरबारभर सरकली. "हा कसला समय आणि ही कोण मानपानाची बाबत मोक्याच्या म्हणणाऱ्या तुम्हा आपल्या माणसांच्या मनी ? कुलेशांना आम्ही 'छंदोगामात्य' केलं, फिरंग्यांच्या सुलुखासाठी 'कुलएख्त्यार' केलं ते त्यांचा वकूब बघून, त्यांना हिंदोस्थानी बोलभाषा चांगली अवगत म्हणून! कवी भूषण राहते आमच्या दरबारी तर त्यांसही 'छंदोगामात्य' करून गौरविले असते आम्ही."

प्रधानी-खांबालगतच्या मंत्रिगणांनी गर्दनी खाली घातलेल्या बघून राजांचे काळीज पिळवटले. विट्यासारखी आपली धारी नजर कुलेशांवर रोखत ते म्हणाले, "कुलेश, मंत्रिगणांशी आमचा काय संबंध असं म्हणताना चुकताहात तुम्ही! सरलष्कर म्हणतात ते सही आहे. मानापानाच्या या गफलतींचा वेळीच कंडका पाडला पाहिजे. रामजी पांगेऱ्यांच्या कोरजाई गावठाणात कंबळी छपराखाली बसून रामजींच्या झोपडीतील कांदाभाकर प्रेमानं ओठांआड करणारे आमचे आबासाहेब आम्ही तर नाहीच, पण कुणीच विसरता कामा नये... पुन्हा असा बोभाट कानी येतो तर लहान-थोर, आपला-परका कुणाचीच गय धरणार नाही आम्ही !!" नाकशेंडा लालावलेले महाराज भावावेगाने आपसूकच खडे झाले. पुरा दरबार त्यांच्याकडे बघू लागला. वेगळाच भाव शंभुमुद्रेवर पसरला. तलवारीच्या पात्याच्या धारेसारखा शब्द न् शब्द फुटू लागला. "आदिलशाही पडली याची धास्त, काळजी करायलाही समय नाही आम्हास. जमल्या बाक्यांना आम्ही निक्षून-निर्वाणीचं सांगतो. प्राणबाजी लावून आबासाहेबांचं हे राज्य राखण्याची आम्ही हरभातेनं कोशिस करणार आहोत. साऱ्यांनीच पोख्त विचारानं आमच्या पाठीशी राहावं. आपसांतील लहान-थोर मानपानाचे बगलेस ठेवून प्रसंगास साऱ्यांनी कसं सामोरे जावं, फक्त त्या मसलतीचं बोलावं."

कोंडी फोडत हंबीररावच म्हणाले, "आता जमेल त्या ताकदीनिशी गोवळकोंडा राखाय पायजे. उगवतीच्या तोंडावयली आपली ठाणी रातध्याड जागती ठेवाय पायजेत. जमेल तेवढा घोडा गोवळकोंड्याभवती फिरता ठेवाय पायजे."

"आता निस्त्या मोगली फौजाच न्हाईत, आदिलशाहीचा मेळ घेऊन पुढची चाल ठेवील अवरंगजेब." म्हलोजीबाबा पूर्वी आदिलशाहीत होते. तिथल्या सरदारांचा अंदाज बांधीत ते म्हणाले.

"विजापूरचा राजा बाळ. गोवळकोंड्याचा हसनशहा उमेदीचा आहे. कुतुबशाही नाही नमायची औरंगसमोर." निळोपंत आपला सल्ला ठेवत म्हणाले.

"पेशवे, मोगल कुतुबशाहीकडं वळतील हा अंदाज आहे. तसं घडेलच असं नाही. शक्यता आहे तो शहाजाद्याचं निमित्त ठेवून आपल्या दौलतीचाच मोहरा धरेल." प्रल्हादपंतांनी अकबराशी चाललेली बोलणी आपणाला पसंत नाहीत हे हंबीररावांचे मतच पुढे घेतले. आता खऱ्या मसलतीला तोंड फुटले!

बराच वेळ दरबारात एकमेकानं उलट-सुलट खल झाला. एक गोष्ट त्यातून स्पष्ट झाली. आदिलशाही पडणे हा दक्षिणफळीला केवढा जबर धक्का आहे हे सर्वांनाच जाणवून गेले. प्रधानमंडळ आणि कुलेश यांची मने परस्परांबद्दल साफ नाहीत हेही सिद्ध झाले. हंबीररावांसह अनेकांना मराठी मुलखातला शहजादा अकबर ही गोत्यात घालणारी अडगळ वाटते हे उघड होऊनच चुकले.

पंतांकडील सुरनिशी दफ्तर शंकराजी नारायण यांच्याकडे सोपवून राजांनी पंतांना कोकणपट्टीसाठी मोकळे ठेवले होते. त्यामुळे रामचंद्रपंत नाराज तर नाहीत, या शंकेने त्यांनी विचारले, "तुमच्या ठायी शंकराजींना सुरनिशी दफ्तराकडं नामजाद केलं आम्ही. पंत, त्यासाठी तुम्ही नाराज तर नाही ?"

"जी. तसं मनीसुद्धा नाही आमच्या. कोकणपट्टीची बंडाळी जोखमीची म्हणून तर आम्हावर ती बाब सोपविली आहे स्वामींनी हे जाणतो आम्ही. ती पार पाडताना यातना होतात काळजास. जीभ धजत नाही घडलं सत्य सांगावयास."

" मतलब ? रामचंद्रपंत खोलून बोला जे बोलणं ते." महाराजांची नजर रामचंद्रपंतांवर जखडून पडली.

" जी. माफी असावी. पण— पण कुडाळच्या खेमसावंतास जाणारा खलिता स्वारासुद्धा कब्ज केलाय आपल्या जासुदांनी."

" कुणाचा खलिता ? "

" जी ... जी ... " रामचंद्रपंतांनी दुशेल्यातून खलितावळीच काढली. पण जबानीतून नाव काढणे काही जमले नाही त्यांना.

राजांनी पंतांच्या हातातील वळी ओढूनच घेतली. आतील खलित्यावर जसजशी त्यांची नजर सरसरत फिरू लागली तसतशी फरीसारखी दिसणारी त्यांची मुद्रा लाल होत घामाने डवरून आली.

आदिलशाही पडल्याचे कारण पुढे करीत कुडाळच्या खेमसावंतांना, आबासाहेबांचे जावई, राजांचे मेहुणे, फलटणकर महादजी नाईक-निंबाळकर लिहीत होते —

" मातीच्या ढेकळागत दिल्लीधीशासमोर इदलशाही पडली. संभाजीचीही बाबत राहणार नाही ! भागानगरीची मोहीम जालियावरी दिल्लीश्वर याचाही परामर्श घेतील. दहा हजार घोडा आम्हीच तुमचे कुमकेस घेऊन येतो. रायरीपावेतो कडेकोट ठाणेबंदी केली जाईल."

राजांच्या हातातला खलिता थरथरू लागला. संतापाने नाकपुड्या फाकल्या. वळी, खलिता तसाच पंतांच्या हातात खुपसून ते पुटपुटले, " हरामखोर. डोमकावळे."

रामचंद्रपंतांनी मान खाली घालत कर्तव्य म्हणून सांगितले — " अशाच मजकुराचा खलिता शेख महमद बक्षी या मोगली सरदाराचा आहे ... त्यानं सावंतास ... "

राजांना तळहात दोन्ही कानांवर ठेवून घ्यावेसे वाटले. काही न बोलता ते महादरवाज्यातून दसराचौकाकडे चालले. रामचंद्रपंत, चांगोजी काटकर, खंडोजी, राया-अंता त्यांच्या पाठीशी झाले. गडाच्या महादरवाज्याच्या रोखाने मोरेश्वर पंडितराव आणि निळोपंत झपाझप चालत येताना पाहून ते जागीच थांबले.

मोरेश्वरांनी नुकतीच गड चढून आलेली एक भगवी छाटीधारी असामी राजांना दाखवून म्हटलं, " पाटगावहून आलेत हे. म्हणतात ... " पेशव्यांकडे बघत पंडितराव घुटमळले. आपल्या सुकल्या ओठांवरून त्यांनी जीभ फिरविली.

" मठशिष्य आहेत हे पाटगावचे." निळोपंतही रुकले.

" पेशवे, यांना इथवर यायचा त्रास कशाला दिलात ? आधीच गड चढलेत. आम्ही भेटलो असतो सदरेवर. काय बाबा, आमच्या मौनीबाबांची तब्येत कशी ? नाराज नाहीत ना ते आम्हावर, बरेच दिवस दर्शनासाठी नाही आलो म्हणून ? " राजांनी शिष्याला विचारले.

महाराजांच्या शब्दाशब्दांबरोबर मठशिष्याच्या भरल्या डोळ्यांतून आसवांचे थेंब

छातीवर टपटपले. त्याच्या तोंडून रखडते बोल बाहेर पडले — " बाबांनी — मौनीबाबांनी देहकार्य संपविलं महाराऽज ! निर्वाण केलं त्यांनी भुदरगडतर्फेला पाटगावी."

' जगदंब ' म्हणत महाराजांनी हातबोटे छातीशी नेत गपकन डोळेच मिटले. त्या मिटल्या डोळ्यांमसोर सर्वसंगत्याग केलेल्या मौनीबाबांच्या शांत, सात्त्विक मुद्राच्या मुद्रा तरळू लागल्या.

विजापूर पडताच मोगली फौजा लगतच्या पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा भागात पांगल्या. सालार सर्जाखानासह झाडून सारे विजापुरी सरदार औरंगजेबाला मिळाले.

आपले खान विजापूरभोवती पांगते ठेवून, विजापुरावर हत्यारी बंदोबस्त बसवून औरंगजेबाने विजापूर सोडले. तो सोलापुराकडे निघाला.

कर्नाटकातून हरजीराजांचे सारखे हारकारे येत होते. राजांनी अंदाज केल्याप्रमाणे मिळतील ते कर्नाटकातील सरदार गळाला लावून, आपले फौजबंद खान सीमेवर पेरायला औरंगजेबाने सुरुवात केली.

हरजींची कुमक करायला पाठविण्यासाठी राजांनी केसो त्रिमल व संताजी घोरपड्यांना याद घेतले. समोर जिंजीकोट फिरत असलेले राजे त्यांना म्हणाले, " केसोपंत, तुम्ही आता संताजींसह कर्नाटकात हरजींच्या कुमकेला आपल्या जमावानिशी उतरा. रघुनाथपंत गेल्यापासून हरजी एकले एवढा प्रांत सांभाळताहेत. जैतजी काटकर, काकडे आहेत त्यांच्या दिमतीला. तुम्ही त्यांना रघुनाथपंतांच्या ठायी आहात. त्यांच्या-तुमच्या एक विचारे कर्नाटक राखून असा." राजांनी केसो त्रिमल व संताजींना मानवस्त्रे दिली. हरजीराजांची जोड करण्यासाठी निरोप दिला.

" निळोपंत, मुद्रा त्रासिक दिसत्येय. तुमची तब्येत ? " महाराज बोलत दफ्तरी दालनातील पेशव्यांच्या समोरच आले. निळोपंतांनी चमकून वर पाहिले. त्यांचे डोळे पाणथरून आले. उपरण्याचा शेव त्यांनी नेत्रकडांना लावला.

" पेशवेऽ, झालं काय ? " राजांचाच आवाज विचारताना चिरकला. भोवतीचे हत्यारी पहारेकरीही चमकून बघू लागले.

" काय सांगायचं स्वामी ! आम्ही पेशवे — कुणास आता कसं तोंड दावणार ? आमचाच ... एक जवळचा नातेवाईक कैद करून गुलाम म्हणून घेऊन गेला माजोर हबशी. डोळ्यास डोळा नाही लागत ते ऐकल्यापासून."

" पंडितराव, चेऊलच्या सुभेदार रायाजी सदर प्रभूंना स्वार द्या." धर्मखात्याचे प्रमुख मोरेश्वर राजांचे सांगणे ध्यानपूर्वक ऐकत होते.

" कोण वजेचा रायाजींना स्वार द्यायचा स्वामी ? " मोरेश्वरांनी विचारले.

" चेऊलच्या एका निपुत्रिक बाईची अखेरची इच्छा होती की, आपला जमीनजुमला मोरयाबाबांच्या चिंचवडमठास आपल्या माघारे द्यावा. बाई आता गेल्या. जाण्यापूर्वी

त्यांनी आम्हास आपली इच्छा निरोप्याकडून कळविली आहे." त्या बाईंचे नाव, जमिनीचा तपशील मोरेश्वर पंडितरावांना सांगता-सांगताच महाराज थांबले. केवढ्यातरी चमत्कारिक सत्याने त्यांचे मन भरून आले. कोण, कुठली, आम्ही ना पाहिली, देखलेली स्त्री असामी. आपले सारे हक्काचे ते मोरयाबाबांच्या धर्मस्थानास अर्पून टाकते. आणि – आणि शिर्के, अर्जुनजी, अचलोजी, महादजी – 'जी' म्हणत म्हणत मनसबांसाठी औरंगतळावर चालत जातात!

भागानगराहून आलेल्या कुतुबशहाच्या वकिलासह पेशवे महाराजांना पेश आले. वकिलाबरोबर चार-पाच सरपोसबंद तबके घेतलेले खिदमतगार होते.

"हे कुतुबशाहीचे राजदूत भेटीस आले आहेत महाराज." सिंहासनसदरेला आसनावर बसलेल्या राजांना निळोपंतांनी वकिलाचा परिचय दिला. वकिलाने कुर्निसात करून आपल्या हजरत तानाशाहांचा निरोप राजांना सांगितला, "हमारे हजरतने ये एक लाख पेशकश राजासाबके खिदमत में पेश भेजी है।" वकिलाने आपल्या खिदमतगारांवर नजर टाकली. त्यांनी झुकून पुढे होत, हातस्पर्श द्यावा म्हणून तबके राजांसमोर धरली. त्या तबकाकडे आणि वकिलाकडे आळीपाळीने बघत राजांनी वकिलाच्या ध्यानीमनी नसलेला धक्का त्याला दिला – "ही खास कुतुबशाही रीत दिसते निळोपंत. आमच्या आणि भागानगरच्या दरबाराशी सलोख्याचे संबंध राहावे म्हणून धडपडणाऱ्या मादण्णा आणि आकण्णा यांचे कुतुबशाहीत भररस्त्यात खून करविले जातात. का? तर दिल्ली सल्तनतीच्या औरंगची त्यांच्यावर 'काफर' म्हणून नाराजी होती यासाठी? तोच औरंग गोवळकोंड्यावर चालून येतो आहे हे साफ झाल्यावर आम्हाला ही लाखाची पेशकश पाठविली जाते. का? तर या बाक्या समयी आम्ही कुतुबशाहीच्या पाठी राहावं!"

निरुत्तर झालेला कुतुबशाही वकील निळोपंतांनीच आता काही बोलावे यासाठी त्यांच्याकडे बघतच राहिला. निळोपंतांनी अनुभवी बोल पुढे ठेवले.

"रास्त आहे स्वामी म्हणतात ते. मादण्णा आणि आकण्णा काय वकुबाच्या असामी होत्या हे लवकरच कळून येईल कुतुबशाही दरबारास. पण त्यांच्या आडमुठ्या धोरणाची चाल धरून नाही भागायचं या दरबारास असं वाटतं आम्हाला."

"यासाठीच पूर्वीपासून पाठीशी आहेत आम्ही गोवळकोंड्याच्या. जे आबासाहेबांनी राखलं तेच धोरण कुतुबशाहीशी राखून चालविलं आम्ही – पुढंही चालविणार आहोत." पेशकशीची तबके निरखत महाराजांनी त्यांना हातस्पर्श दिला.

वकिलाने सुटकेचा निःश्वास टाकला.

तानाशाहासाठी त्याला फेरनजराणा देताना महाराज म्हणाले, "तुमच्या हजरतास सांगा, आम्ही पाठीशी आहोत कुतुबशाहीच्या. आपल्या संकटाला भरदमानं तोंड देण्याची तयारी ठेवून असा. या." वकिलाची रीतसर बोळवण करण्यात आली.

महाराज गोवळकोंड्याच्या कुमकेला कुणाला पाठवावे या विचारात गढले असतानाच किल्लेदार चांगोजी काटकर त्यांच्या सामने आला. गळ्यातील गोफबंद व चांदीपेटीचा ताईत डुलवीत त्याने वर्दी दिली, "गोव्याचं सुंदरजी बाजी आल्यात."

महाराजांनी रुकाराचा हात उठविला. चांगोजी सुंदरजींना घेऊन आला. फिरंग्यांनी गोव्यालगतचा मुलूख लुटला, गावे बाटविली, वतनदार त्यांना मिळाले, असलेच काही अशुभ आता ऐकायला मिळणार यासाठी राजांनी मनाची तयारीही केली. चर्या मात्र शांत ठेवून एवढ्या दूरवर आल्या सुंदरजींना त्यांनी आपुलकीने हालहवाल विचारली. ती देऊन प्रसन्न चर्येने सुंदरजी म्हणाले, "एक खास बाब स्वामींच्या कानी घालण्यासाठी जातीनं आलो आम्ही एवढ्या पल्ल्यावर."

"बोला." महाराजांना ते कशाबद्दल बोलणार याचा काहीच अंदाज आला नाही.

"आता पणजीच्या बंदरातून खाशा सवाऱ्या घेतलेली गलबतं निघालीही असतील."

"कसल्या सवाऱ्या?"

"विजरई कोंद-दि-आल्व्होर आणि त्याच्या कबिल्याच्या!"

"मतलब?" महाराज विचारातच पडले.

"पोर्तुगालच्या बड्या दरबारला स्वामींनी गोव्याची केलेली दैना शब्दबर पावली आहे. दरबारनं त्यासाठी खरमरीत खलिता लिहून विजरईची चांगलीच खरड केली आहे. मराठी मुलखावर गैरलागू चालून जाण्याचा त्यास जाब विचारला आहे."

सुंदरजी हुरुपाने सांगत होते. राजांच्या पाणीदार डोळ्यांसमोर तरळत होता, घोंगडीवर झोपविलेला, पळसवृक्षाला लाजविणारा कृष्णाजी कंक!

"विजरईला बड्या दरबारनं पोर्तुगालला परत बोलावून घेतलंय स्वामी. त्याच्या जागी दोम रुद्रिगो द कोस्त म्हणून कुण्या नव्या विजरईची नामजादी झालेय गोव्यावर."

तळपत्या शंभुनेत्रांसमोर मांडवीची निळी पांढरट खाडी तरळू लागली. ते सुंदरजींना म्हणाले, "आमच्या कानी कुणी मनास संतोष देईल असं काही घालतच नव्हतं. सुंदरजी, चला जगदीशाचं दर्शन घेऊ. तुम्ही बरी खबर आणली आहे."

महाराज, सुंदरजी, चांगोजीसह जगदीश्वराच्या मंदिराकडे चालले.

या वेळी त्या तिघांनाही कल्पना असायचे कारण नव्हते की, कैलासवासी स्वामींनी सुरतेला जवळचे म्हणून खजिन्यासाठी निवडलेल्या बागलाणातील साल्हेर-मुल्हेर किल्ल्यांपैकी साल्हेरीचा किल्ला नेकनामखानाने या वेळी फितुरीचा फास टाकून ओढत औरंगजेबाच्या घशात आणून घातला होता!

दिवाळी आली नि गेली. पुणे, सातारा, मिरज, सांगली, बेळगाव, हुबळी या देश व कर्नाटकप्रांतात या दिवाळीच्या दिवल्या काही पाजळल्या नाहीत. गेला पावसाळा कोरडाच परतल्याने त्या भागात भयाण दुष्काळ पसरला. त्याच्या काळीजवेधी वार्ता

रोजाना राजांच्या कानी पडू लागल्या. लढते सैन्य आणि राबता कुणबावा या बिकट काळी राखणे महत्त्वाचे होते. खुद्द राजे रायगडाच्या अंबारखान्यातील धान्यगोणी घेऊन देशावर पाठविल्या जाणाऱ्या काबाडीच्या बैलांच्या तांड्यावर जातीने देख देत होते. पन्हाळ्याहून कुलेश व म्हलोजीबाबा गंगा-जमुना या अंबारकोठ्यांचे धान्य बेळगावच्या वाटेला लावीत होते.

तीन-चार साल लढून दमगीर झालेला प्रत्येक गडकोट, नुकतीच आदिलशाही पडलेली, वतनदारांची जागजागी माजलेली बंडाळी, त्यातच पडलेला हा दुष्काळ. गेल्या चार सालांतील घटना कशा चित्रांसारख्या फिरत होत्या राजांच्या डोळ्यांसमोर.

ही औरंगची दक्षिणेत उतरायची दुसरी वेळ होती. पहिल्याने तो आला होता दख्खनसुभा म्हणून. परतला होता बंडखोर शहजादा म्हणून. आता दुसऱ्या वेळी आला होता दिल्लीतख्ताचा शहेनशहा म्हणून पुरी दख्खन गिळायला. त्याच्या दाबजोर रेट्यासमोर आदिलशाही कोसळली होती.

आता त्याने दुतोंडी हालचाली सुरू केल्या. एकीकडून गोवळकोंडा पाडायचा, दुसरीकडून मराठी दौलतीचा कर्नाटकातील मिळेल तेवढा प्रदेश कुरतडायचा. तिला खिळखिळी करण्यासाठी त्यांचे खास अस्त्र 'फोडाफोडी' आणखी चालूच होते.

कर्नाटकात घुसलेल्या औरंगच्या फौजांच्या पाठलागावर हरजींचे गोपाळ दादाजी व विठ्ठल पिलाजी हे तोडीजोडीचे सरदार कोसळून पडत होते.

जे कानी येत होते त्याचाच मेळ मनाशी घालत राजे खासेवाड्याच्या दफ्तरी सदरेत खंडोजींना जागजागी धाडायच्या खलित्यांचे मजकूर सांगू लागले. कसल्यातरी खोलीच्या विचारात गढल्याने त्यांचा मजकूर सलग येत नव्हता. एवढ्यात गिरजोजीने दफ्तरी येऊन वर्दी आणली, "पेशवं येत्यात."

थोड्या वेळातच आपल्या कारभाऱ्यासह निळोपंत रुजू झाले.

"महाराज, सिद्दी कासम त्याच्या खुदाची खैर म्हणून थोडक्यात बचावून निसटला जैतापुरच्या लढाईत." पेशवे उत्साहाने म्हणाले.

"तपशील काय पेशवे ?" महाराजांच्या डोळ्यांसमोर जैतापूरची खाडी तरळू लागली. पेशव्यांनी तपशील दिला. थोडा वेळ शांतता पसरली.

"जेधे फिरून चाकरीत यायचा मनसुबा धरून आहेत. पुरंधरच्या बाजी घोलपांमार्फत निरोप आला आहे तसा त्यांचा." पेशव्यांनी सर्जेराव जेध्याची बाब चर्चेला घेतली.

"कशासाठी खोळंबलेत ते पेशवे ?" राजमुद्रा त्रासिक झाली.

"अभयपत्राची मागणी आहे जेध्यांची महाराज."

"अभयपत्र ?" महाराज विषादाने हसले.

"पंत, गेले होते जेधे औरंगच्या पायांशी त्याचं अभयपत्र घेऊन ? हे कान्होजींचे वारस जेधेच ही मागणी घालतात असं मानावं काय ?"

पेशव्यांना काय बोलावे ते सुचेना.

"पेशवे, त्यांनी नको त्या वक्तास धरसोड केली तरी आम्हास नाही करता येत. चुकले, फुटले तरी जेधे दौलताचे कदिम चाकर होते. द्या त्यांना अभयपत्र पाठवून. पत्रात लिहा – 'तुम्ही गनिमाकडे जाऊन सेवा करिता. कोण्या भरास भरून गेलेत ? बरे जे झाले ते फिरोन न ये. परंतु गनिमाची सेवा करता तुम्हास कष्ट होतात. सांप्रत सेवेसी येऊन कार्यभाग करावा. कष्टाची मुजरा होईल. तुम्ही कदिम लोक. स्वामींचे बहुत अन्न भक्षिले. तुमचा भरवसा असे. क्रिया मनी धरून यावयाचे केले तरी बहुत उत्तम केले. कदाचित गनिमाकडे गेले होतेस. त्या गोष्टी करिता यावयाचा अनमान कराल तर सर्वस्वी न करणे. बेशक येणे. तुमची सर्फराजी करून बरे चालवू. अंतर न पडे."

अभयपत्रात लिहावयाचा मजकूर पेशव्यांना सांगताना छत्रपतींच्या मनी समर्थांचे निर्वाणीचे बोल घुमत होते, "सकळ लोक एक करावे। कारभारी कार्यी लावावे। गनिमा निपटून काढावे। चढती वाढती पदवी पावल येणे."

अभयपत्राचा मजकूर मनी घोळत असलेले निळोपंत जायला निघाले. तेव्हा त्यांना थोपवून बराच वेळ मनात घोळत असलेला मनसुबा राजांनी त्यांच्या कानी घातला.

"पंत, हंबीररावांसुद्धा जेवढे खासे तेवढ्यास खलबतासाठी आवतनाचे हारकारे द्या."

महाराजांच्या मनी काय असावे याचा विचार करीतच पेशवे निघून गेले.

मुंबईहून आल्या वार्तेचा राजे विचार करीत होते. तेथील दौलतीचा हेजिब वारल्याची खबर होती. त्या जागी कुणाला नामजाद करावे यासाठी राजांनी प्रल्हादपंतांना याद केले. "न्यायाधीश, टोपीकरांच्या दरबारी वकिलाची हकीगत कानी आलीच असेल. तुम्ही त्या दरबाराशी संबंधाचे. नव्यानं कुणाला नामजाद करावं त्या जागी ?"

प्रल्हादपंतांनी आपणालाच हुकूम झाला नाही यासाठी हलका निःश्वास टाकला.

"आम्हाला वाटतं त्रिंबक गोपाळ नीट सांभाळतील तो दरबार. तिथल्या दुभाष्यांचा व त्यांचा दाट परिचय आहे. शिवाय आमच्याबरोबर एक-दोनदा टोपीकरांच्या दरबारात ते जाऊनही आलेत."

राजे व न्यायाधीश यांची त्रिंबकजीबद्दल बारकाव्याची चर्चा झाली.

"पंत, हेजिब म्हणून त्रिंबकजींना आपले ओळखपत्र द्या." राजांनी निवाडा दिला.

प्रल्हादपंत गेले. शिलेखान्यावर नजर टाकून यावी या विचाराने राजे पेहराव अंगी घ्यायला आसवाबखान्यात आले. खिदमतगार त्यांच्या अंगी पेहरावी साज चढवू लागले. एका खिदमतगाराने त्यांच्या मस्तकी राजटोप ठेवला, दर्पणात बघताना आज त्यांना फार प्रकर्षाने जाणवले की – आपला टोप आबासाहेबांच्या उभट टोपागत नाही! तो बसका – मोगली माटाचा आहे!

"आबासाहेबांचा टोप घ्या दास्तानाबाहेर. दर्शन घेऊ या एकदा त्याचं." आसवाबखानाच्या प्रमुखाकडे बघत राजे म्हणाले.

"जी." त्यानं थोरल्यांच्या राजटोपाचं तबक हळुवार दास्तानाबाहेर घेतले. राजांच्या समोर धरले. क्षणभरच शंभुमनाला वाटले या टोपाखाली हुबेहूब आबासाहेबच उभे राहतील. राजांनी त्या तबकातील टोपाला बोटे भिडवून ती कपाळी लावली.

हरवलेल्या छत्रपतींचे "स्वाऽमी, स्वाऽमी" या सादवल्या बोलाकडे ध्यानच नव्हते.

"अंऽ" एकदम वळून त्यांनी पाहिले. समोर कवी कुलेश आणि राजापूरचे सुभेदार देवाजी विठ्ठल रिवाजासाठी झुकताना त्यांना दिसले.

"तुम्ही?" कुलेशांकडे आश्चर्याने पाहत त्यांनी विचारले. आपण स्वामींना भेटायला गैररिवाजाने थेट आसवाबखान्यात आलो आहोत हे जाणून कुलेश अदबीने म्हणाले, "क्षमा स्वामी. मामलाही है ऐसा जो यहाँ आना पडा।"

"कसला?" सुभेदार देवाजी विठ्ठल यांना निरखत राजांनी विचारले.

"जी. जे पाहिलं ते तातडीनं सरकारांच्या कानी घालण्याजोगं आहे. नाही तर कसुरीचा गुन्हा बसेल माथी म्हणून राजापुराहून टाकोटाक आलोत आम्ही."

"बोला, देवजी." कधी सहसा न पडणारी तिकोनी आठी राजकपाळी उमटली.

देवजींनी क्षणैक कुलेशांकडे बघितले. कुलेशांनी त्यांना नजरेनेच दिलासा दिला.

"राजापूरच्या खाडीत गलबतात बसून शहजादा अकबर... अकबर इराणला निघून गेला महाराज!" ज्यासाठी ते आले होते ती बाब देवाजींनी सांगितली.

"झियाउद्दीन महमद शुजाई और पचास आदमी हैं उसके साथ।" कुलेशांनी अधिकाची माहिती दिली.

अकबराच्या पहिल्या भेटीपासूनच्या कैक आठवणी राजमनात फिरल्या. आम्ही दिलेला मानाचा मोतीकंठा कलावंतिणीला देणारा, आमच्यासाठी फिरंगी दरबारात मध्यस्थी करणारा, बापाविरुद्ध बंड करून उठलेला अकबर— न भेटता—न बोलता इराणला निघून गेला! अकबर! काय ऋणानुबंध त्याचा? काय उपयोग झाला त्याचा आम्हास? कशासाठी दिला त्यास आसरा आम्ही? त्याच्या मार्गाने काही राजकारण चालते होईल म्हणून! पण औरंगजेबाला एक निमित्त झाले आमच्या मुलुखात फौजा घुसवायला. आम्ही अकबराला आसरा न देता हाकलला असता दौलतीपार तर? टळता औरंगचा ससेमिरा आबासाहेबांच्या या श्रींच्या राज्यामागचा? कधीच नाही. तरीही तो चालून आलाच असता. विचारच विचार उफाळून गेले शंभुमनात. शांतपणे त्यांनी देवाजींना विचारले, "सुभेदार, दुर्गादासही गेले त्याच्याबरोबर?"

"जी नाही. दुर्गादास आपल्या आसामी घेऊन रतलामकडे निघून गेले." राजांनी ते ऐकून सुटकेचा वाटावा असा सुस्कारा सोडला. दुर्गादासबद्दल त्यांचे मत चांगले होते.

तेही भरीला पडून गेले असते अकबराबरोबर इराणात तर?

"तुम्हास काय वाटतं कविजी, करील इराणचा शाहा आब्बास शंहजाद्याची मदत? येतील दोघे चालून दिल्लीवर?" राजांनी कुलेशांना विचारले.

"नामुमकीन स्वामी! शहजादे की कबर अब इराणमें होगी! उस कब्र को कलमा पढने के लिए शाही खूनका भी कोई नहीं मिलेगा वहाँ।"

जहरी होते तरी ते सत्य होते. ते ऐकून राजे क्षणमात्र विचारगत झाले.

याच दरम्यान जिंजीच्या उत्तर वेशीत बारा हजार सैन्य पाठीशी घेत प्रवेशणाऱ्या केसो त्रिमल आणि संताजी घोरपडे यांच्या आगवानीसाठी हरजीराजांनी पाठविलेले जैतजी काटकर आणि गोपाळ दादाजी त्यांना खांदाभेट देत होते. नौबती, नगारे दुडदुडत होते. आता कर्नाटक हरजीराजे आणि केसो त्रिमल यांच्या जोडचालीने औरंगजेबाशी झुंजणार होता.

रायगडाच्या खलबतखान्यात अंथरल्या लोड-गिर्द्यांच्या खाशा बैठकीवर राजे बसले होते. बैठकीत कुलेश, रूपाजी, खंडोजी बल्लाळ, निळोपंत, प्रल्हादपंत, कर्नाटकातून पाचारण केलेले गोपाळ पंडित, धनाजी जाधव अशी खास मंडळी बसली होती.

निळोपंतांनी खलबताचा हेत खोलला— "इदलशाही तर पडली— तिचेच सरदार गाठीशी घेत गनिमानं दुतोंडी हमला पुकारला आहे. एकीकडून गोवळकोंड्याचा मुलूख आणि दुसरीकडून आपला कर्नाटक पटात घ्यायचा इरादा आहे त्याचा—"

"त्यासाठी खुद्द आम्हीच फौजी बळानं कर्नाटक प्रांतात उतरतो आहोत." राजांनी खलबत आपल्या हाती घेत नजर सर्वांवर फिरवली.

"म्हैसूरचा याचप्पा नायक यास बरा धडा देणं आहे. विजापूरच्या घेरात औरंगला मदत करून तो दबा धरून आहे. हरजींच्या कुमकेसाठी आम्ही केसो त्रिमल व संताजींना धाडलंच आहे. आता आम्हीच उतरू त्यांच्या साथीला. धनाजी, रूपाजी, खंडोजी, तुम्ही बरोबर असा आमच्या. पेशवे राणीसाहेबांच्या शिक्का-मोर्तबाने इकडील कारभार हुशारीनं बघतील."

खलबतातील प्रत्येकजण कान लावून राजाज्ञा ऐकत होता.

"पेशवे, आम्ही येत असल्याचा थैलीस्वार धाडा जिंजीला हरजींच्याकडे. जे इथं अवघे राहणार आहात ते आपआपल्या जागी बरे नेटाक असा. औरंगच्या फौजा मुलुखात घुसू म्हणतील त्यांना कुबल जागी गाठून शिकस्त देण्याची शर्थ करावी."

खलबतातल्या मंत्रिगणांना वाटले कर्नाटकाच्या स्वारीत राजे आपल्याबरोबर कुलेशांनाही घेतील. पण कुलेशांवर त्यांनी तिसरीच जोखीम सोपविली.

"कुलेश, तुम्ही शहजादा गेल्याचं पाहून फिरंगी सुलूख मोडून उचल खाऊ बघतील त्यावर बरं ध्यान ठेवा."

बराच वेळ खलबत चालले. अगदी बारीकसारीक सूचना मागे राहणाऱ्या सर्वांना राजांनी दिल्या. पुन्हा भंडारापरडी फिरली. खलबत उठले. पहाऱ्याच्या एका धारकऱ्यानं खलबताच्या मिटल्या शिळेला आतून हत्यारमुठीचा सांकेतिक ठोका दिला. शिळा खोलली गेली. उजेड व वारा अंगावर घेत राजे शिळेबाहेर पडले. त्यांच्या मनात कर्नाटकाचे विचार घोळू लागले. त्यांना कल्पनाही असायचे कारण नव्हते की, जिंजीला हरजीराजांच्या खासेवाड्यात केसो त्रिमल आणि हरजीराजे यांची, ऐकणाऱ्याचा थरकाप उडावा अशी जंगी तोंडातोंडी जुंपली होती! कारण काय होते त्याचे?

सेंट जॉर्ज येथील टोपीकरांच्या वखारीवर देखरेख ठेवण्यासाठी हरजींनी नेमलेल्या गोपाळ दादाजींच्या जागी केसोपंतांनी आपल्या अखत्यारीत चिमाजी पंडितला नेमले होते. गोपाळ दादाजी कडक शिस्तीचे असल्याने टोपीकरांना मानवणारे नव्हते. त्यांची बदली करावी म्हणून सेंट जॉर्जच्या वखारवाल्यांनी केसो त्रिमलांना बक्षीस देण्याचे ठरविले होते. हा सारा घालमेलीचा करीना हरजींच्या कानी पडला होता. केसो त्रिमलांची त्यासाठी खरड काढल्याने त्यांचे व त्रिमलांचे संबंध मनोमन बिघडले होते!!

कर्नाटकस्वारीची पूर्वतयारी म्हणून मोरस, कोडग, मलेय व तिगुड येथील नायकांना मदतीसाठी पत्रे धाडण्यात आली. या स्वारीत हरजींना पावलोपावली नडणाऱ्या म्हैसूरच्या चिक्कदेवरायाला खिळते करून हरजींचा भार हलका करायचा होता. औरंगजेबाच्या धास्तीने विजापूर आणि गोवळकोंडा दरबारांनी राजांना खंडणी आणि नजराणे पाठविल्याची बाब चिक्कदेवरायाला मुळीच पसंत नव्हती. आदिलशाही पडल्याचा फायदा घेऊन आपण बादशहाचेच आहोत असे वरकरणी भासवत चिक्कदेवरायाला कर्नाटकातील मिळेल तेवढा आदिलशाही मुलूख मारायचा होता.

रायगडावर कर्नाटकस्वारीची जय्यत तयारी झाली. हरजीराजांना आगेवर्दीचे खबरगीर धाडण्यात आले. स्वारीत राजांच्या सोबतीला जाणारा खंडोजी, रूपाजी, धनाजी, गोपाळ पंडित असा मेळ सिंहासनसदरेला एकवटला.

श्रीसखींचा निरोप घेण्यासाठी राजे देवमहाली आले. घोटीव शिसवी देव्हाऱ्यात पुजलेल्या कुलदेवता जगदंबेला आणि आबासाहेबांच्या नित्यपूजेच्या शिवलिंगाला त्यांनी नमस्कार केला. देव्हाऱ्याशेजारी बाळराजांसह उभ्या असलेल्या येसूबाईंनी त्यांच्या हाततळव्यावर तीर्थजल दिले. ते ओठांआड करीत राजांनी पसरल्या हातांनी बाळराजांनी जवळ घेत विचारले, "येता आमच्या संगती जिंजीला?" आणि मग हसून त्यांची पाठ थोपटली.

"प्रवासात स्वारीनं तब्येतीला जपून असावं. पल्ला लांबचा आहे." येसूबाई बाळराजांना पुन्हा आपल्याजवळ घेत म्हणाल्या. "आबासाहेब असेच स्वारीला म्हणून कर्नाटकात गेले. जागोजागचं बदलतं पाणी त्यांना बाधिक झालं. तशातच गडावर येताच सूर्यग्रहणाच्या दिवशी कुशावर्ताच्या टाक्यात गळाभर पाण्यात उभं राहून त्यांनी दानं वाटली. आणि – विषम ज्वरानं बिछायतीला खिळून पडले ते ..."

"स्वारी शिकारीची सवयच झाली आहे आम्हास. आमची नका काळजी करू. शिवाय घालावा खाडीत घोडा म्हटलं तरी कर्नाटकात दर्याही नाही. तुम्ही काळजी राखा ती इथल्या कारभाराची. तुमच्या शिक्केमोर्तबावर अडीनडीचं सर्व चालवावं, असं सांगून ठेवलं आहे आम्ही पेशव्यांना. येऊ आम्ही?" राजे जायला वळले.

"थांबावं थोडं स्वारींनी." पुढे होत येसूबाई राजांच्या तिबार पाया पडल्या.

"एक मागणं आहे. आठवणीनं पुरं करावं स्वारीनं." येसूबाई म्हणाल्या.

"बोलावं श्रीसखींनी."

बरेच दिवस मनी घोळणारं एक राहून गेलंय. आम्ही नाही निदान स्वारीनं तरी ते पुरं करावं." येसूबाई देव्हाऱ्याकडे बघत थांबल्या.

"बोला. अशी कोणती बाब आम्ही असताना मनी रेंगाळती ठेवावी लागली?"

"थोरल्या आबासाहेबांची छत्री कर्नाटक प्रांत होदिगेरीस आहे असं नुसतं ऐकून आहोत आम्ही! कधी जाणं घडलं तर स्वारींसह जोडीनं पाद्यपूजा करावी त्या छत्रीची असं कैकवेळा येऊन जातं मनी! स्वारी जातेच आहे. आठवणीनं पाद्यपूजा करावी."

राजे येसूबाईंच्याकडे बघतच राहिले. त्यांनी तर मनोमन हे केव्हाच ठरवून टाकले होते. शहाजीराजांच्या न आठवणाऱ्या मुद्रेला डोळ्यांसमोर आणण्याचा त्यांनी खूप यत्न केला. जमले नाही. "तुमचं मागणं नव्हे 'आज्ञा' आम्ही बरी ध्यानी ठेवू. खरं तर तुम्हासच संगती नेलं असतं आम्ही. पण ..." पुढे काहीच न बोलता राजे देवमहालाबाहेर पडले.

रामराजांच्या वाड्यात त्यांची वाजपूस करून, येसाजी दाभाड्यांना आवश्यक त्या सूचना करून सिंहासनसदरेला आले.

महाडघाटाने तीस हजारांची घोडा व पावलोकांची फौज पहिल्या मुक्कामाला किल्ले पन्हाळ्यावर आली. इथे म्हलोजीबाबा आणि हंबीरराव राजांच्या आगवानीसाठी पाच दरवाज्यात उभे होते. फार दिवसांनी राजांची ही पन्हाळभेट होती. पाच दरवाज्यातच चंद्रावतावरची मांड मोडून पायउतार होताच ते म्हलोजींना व हंबीररावांना म्हणाले, "चला. प्रथम रंगरूपी शिवपिंडीचं दर्शन घेऊ सरलष्कर."

"चलावं." हंबीरराव, म्हलोजी, खंडोजी, धनाजी राजांच्या पाठीशी झाले.

"मामासाहेब, आता औरंगनं गोवळकोंडा आणि आपला कर्नाटक चालीखाली धरलाय. आम्ही त्यासाठीच जिंजीला उतरतो आहोत." जाता जाताच राजांनी सरलष्करांना मनची चिंता बोलून दाखविली.

"कळलंय आम्हास्नी ते. पन्हाळा आन बेळगाव मारायची लई झायली क्येली त्येच्या रणमस्त-रुहुल्लानी. पर आम्ही हाव, म्हलोजी हाईत. पार पिटाळलंय त्येस्नी."

"तुम्ही आहात म्हणूनच पन्हाळा-कोल्हापूर भागाची धास्त वाटत नाही आम्हास."

बोलता बोलता मंडळी बालेकिल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशी असलेल्या रंगरूपी शिवपिंडीच्या घुमटीजवळ आली. दर्शनासाठी घुमटीत गेली.

म्हलोजी, हंबीररावांना पन्हाळा प्रांताच्या सर्व सूचना देऊन, एक मुक्काम पन्हाळ्यावर टाकून राजे सैन्यासह सूतकट्टीच्या बारीनं बेळगावला जायला वेशीवर आले. निरोप द्यायला आलेल्या हंबीररावांना त्यांनी खांदाभेट दिली. न राहवून हंबीररावांनी विचारले, "रायगडाचा काय हालहवाल धनी ?"

तो सवाल आपल्या ताराऊसाठी हंबीररावांनी विचारला आहे हे ताडूनच राजे म्हणाले, "सारं सुक्षेम आहे, आमच्या ताराऊ चखोट आहेत."

राजांनी सर्वांचा निरोप घेऊन पन्हाळा सोडला. मजल दरमजल करत फौज बेळगाव, धारवाड, गदग, चिक्कनहळ्ळी, चिक्कबाळापूर असे मुक्काम करत नंदीदुर्गाजवळ आली. नंदीदुर्गाचा कोट नजरटप्प्यात येताच राजांच्या आठवणींचे टाके डहुळले. याच नंदीदुर्गाला घेर टाकायला ते एकदा आले होते. कुणाबरोबर ? दिलेरसंगती ! त्या आठवणी गेल्या, तो दिलेर गेला.

दोड्डबाळापूर, तिरुवनमलईमार्गे राजांची फौज जिंजीच्या वेशीत आली. वेशीत हरजीराजे आगवानीसाठी उभे होते. त्यांच्या डावे-उजवे केसो त्रिमल, संताजी जैतजी काटकर, दादाजी काकडे, तिमाजी हणमंते अशा आसामी उभ्या होत्या.

चंद्रावतावरून राजे पायउतार होताच त्यांच्या स्वागतासाठी कर्नाटकाच्या तोफांची भांडी फुटली. नौबती झडल्या. पुढे होत राजांनी हरजींना खांदाभेट दिली. कर्नाटक प्रांताच्या आणि बरोबर आणलेल्या माणूसमेळासह ते जिंजीच्या कोटाकडे पालखीतून निघाले. त्यांच्या मनी आबासाहेबांच्या आठवणी दाटून आल्या. केवढ्या पल्ल्याची त्यांची दृष्टी ! कुठे रायगड, कुठे जिंजी ? हे सारे त्यांनी उभे गेले. आम्र्याच्या कोठीतून सलामत सुटल्यावर. ते राखण्यासाठी आम्हास पडेल ते मोल द्यावे लागणार.

सारे जिंजीकर गच्ची, माळवद धरून शिवपुत्राचे दर्शन घेत होते. औरंगजेबाला पिछाट घ्यायला लावणारा राजा डोळे भरून पाहत होते. सर्वांना त्या उमद्या, जवान रूपाचा अभिमान वाटत होता. राजे जिंजीच्या कोटात आले.

बालेकिल्ल्यातील हरजींच्या खासेवाड्यातील हमचौकात राजांना त्यांच्या भगिनी अंबिकाबाई एक तेवत्या निरांजनाचे तबक घेऊन सामोऱ्या आल्या. सोनमोहरांनी राजांचा सतका उतरून त्यांनी आपल्या बंधूंना ओवाळले. दोघा बहीणभावांच्या डोळ्यांत, निरांजनांच्या उजेडात एकाच सत्याची राजवेदना वितळून पाझरताना दोघांनाही जाणवली – "मोगली कोठडीत खुलदाबादेला बंदिस्त पडलेल्या राणूआक्का आणि दुर्गाबाई यांची."

ती परती सारत राजे पुढे होत झुकले. आपल्या आक्कासाहेबांच्या पायांना बोटे भिडवितानाच त्यांनी घोगरट विचारले, "बऱ्या आहात ?"

"जी. गोमट्या आहोत. आमच्या येसूबाई, बाळराजे कसे ?" अंबिकाबाईंनी तबक दासीच्या हाती देत राजांना खांदे धरून उठते घेताना विचारले. किती वर्षांनंतरची भेट होती ही दोघा बहीणभावंडांची ! दोघांनाही शेवटच्या समयीच्या आबासाहेबांची भेट घडली नव्हती ! विचारायला सवाल कैक होते दोन्ही मनांत.

दुपारचे थाळे होताच राजे व हरजी खासेवाड्याच्या सदरेच्या बैठकीवर बसले. कर्नाटक व दौलतीच्या खाशा असामी बगलेने दुहाती उभ्या राहिल्या होत्या. सदरेवर कर्नाटकी उंची रुजामे पसरले होते. कासवाच्या माटाची पानदाने मांडली होती. दक्षिणी तलम वाणाचे आडपडदे चौहातीच्या दरवाज्यावर सळसळत होते.

हरजींनी छत्रपतींना प्रवासाचा हालहवाल विचारला. हरजींनी नुकताच गोवळकोंड्याचा कर्नाटकातील अकेरा, सौंदीपत्ती, कोतवारा असा मुलूख कब्ज केला होता त्याची माहिती दिली. संताजी घोरपड्यांना हातरोख देत हरजी म्हणाले,

"बाकी संताजी ही असामी फार मोलावकुबाची धाडली तुम्ही राजे."

"आणि आमचे केसोपंत ?" राजांनी त्रिमलांकडे बघत विचारले.

हरजी क्षणभर घोटाळले. तांबुलाच्या निमित्ताने समोरचे पानदान पुढे घेत त्यांनी सवालाला कसबाने बगल देत तिसराच सवाल आपणहून खडा केला.

"एवढी आदिलशाही जोरावारीची पण नाही टिकली ती औरंगजेबापुढं. आता गोवळकोंड्याचा मोहरा धरलाय त्यानं. तुम्हास काय वाटतं पुढचं राजे ?"

हरजींनी सवालाला बगल दिलेय हे राजांनी जाणले. पण त्यांनी उभा केलेला पेचही महत्त्वाचा होता म्हणून गंभीरपणे ते हरजींना म्हणाले, "तुम्ही जमेल तेवढा इदल आणि कुतुबशाहीचा मुलूख आताच दस्त करून घ्या. उद्या त्याचेच निमित्त करून मोगली फौजा प्रांतावर उतरतील. फार काळ नाही तग धरायचा आता गोवळकोंडा."

ते ऐकताना सारी सदर ताणावर पडली. तो सुमार करण्यासाठी हरजी म्हणाले, "कांजीवरमजवळ याचप्पा नायकाशी झाली आमची हातघाई वांदीवाशच्या मैदानात. हे संताजी होते संगती. पार पिटाळला आम्ही याचप्पाला म्हैसुराकडे. तिथला चिक्कदेव ओडियार कुमक मागतो आहे आमची. बेंगळूर भागात मोगलांचा कासमखान फिरतोय. त्याला शिकस्त द्यायचा इरादा आहे चिक्कदेवाचा."

"चिक्कदेव असामी कशी ?" राजांनी हरजींना विचारले.

"जी. सुलुखाचे संबंध राखण्याजोगी नाही. राजांच्या भेटीसाठी खासा येणार चिक्कदेवराय. पण त्यांचा बेंगळुरावर डोळा आहे."

बराच वेळ राजे हरजींची कर्नाटक प्रांतावर बोलणी झाली.

"इथून बेंगळूर किती मजलांवर राजे ?" छत्रपतींनी हरजींना विचारले.

"जी. असेल की साताठ मजलांवर." त्या सवालाचा नीट अंदाज न लागल्याने हरजी गोंधळले. "हेत काय राजांचा ?" त्यांनी विचारले.

"चला, जिंजीचा कोट तरी नजरेखाली घालू." बोलणे थांबवून सदर सोडत राजे उठले. सर्वांसह त्यांनी किल्लयावरचा बुरूज अन् बुरूज पाहिला. किल्ला भक्कम तटबंद होता. बुरुजाबुरुजावर मारगिरीची तोफभांडी नीट मांडली होती. चौक्या, पहारे पुरेसे ठेवून

हरजींनी किल्ला बंदिस्त राखला होता. त्यांच्यासह किल्ल्यावरचा शिलेखाना, अंबारकोठार, खजिना, दारूकोठार नजरेखाली घालून समाधानी झालेले राजे हरजींना म्हणाले, " हा कोट गाठीचा आहे असे आबासाहेब आम्हाला पन्हाळ्याच्या अखेरीच्या भेटीत म्हणाले होते. तुम्ही ही गाठ चावरसारखी खूब बंदिस्त आवळली आहे राजे. आम्हास संतोष आहे."

दोन दिवस झाले. इक्केरीच्या राणी चन्नम्माचा, राजांना भेटण्यासाठी दूत आला. राणीचा नवरा वेडसर असल्याने तीच इक्केरीचा राज्यकारभार बघत होती. तिला म्हैसूरचा चिक्कदेवराय ताप देत होता. तसा चिक्कदेव पुरा धोरणी होता. थोरल्या महाराजांनी कर्नाटकावर स्वारी करून बराचसा मुलूख कब्ज केला ही बाबच त्याला खटकत होती. तो आपल्या भोवतीच्या इक्केरी, रामनाड, मदुरा येथील नायकाचे प्रांत कुरतडत होता. एकोजीकाकांची राजधानी बेंगळूरहून तंजावरला हलल्यापासून तर चिक्कदेवाचा बेंगळूरवरच डोळा होता. चिक्कदेवाविरुद्ध हरजींना मदत करण्याची आज्ञा व्हावी असा निरोप घेऊन राणीचा दूत आला होता. त्याने राजांना नजराणा देऊन राणीचा निरोप सांगितला.

बाईमाणूस असून धाडसाने कारभार हाकणाऱ्या चन्नमाराणीला मदतीचा शब्द देऊन राजांनी तिला आदरपूर्वक फेरनजराणा पाठवून दिला.

हरजींच्याकडून त्यांनी जिंजीभवती असलेल्या मदुरा, म्हैसूर, रामनाड ह्या नायकांची काय काय चाल आहे याची माहिती घेतली.

मोरस, तिगुड, कोडग, मलेय येथील दूतही येऊन राजांना भेटून गेले. त्यांना मरातब देऊ करून लवकरच आपण एक मोठी मोहीम खोलणार त्यात मदत करावी असा त्या दूतांकरवी सर्व नायकांना राजांनी शब्द टाकला.

दिवस उकाड्याचे होते. रात्रीच्या भोजनानंतर राजे हरजींच्यासह दिवाणीमहालात चोपाळ्यावर बसले होते. हरजींना राजांचा पुढचा बेत काय असावा याचा साधारण अंदाज आला होता. पण मध्येच राजांनी बेंगळूबद्दल एकदा विचारले असल्याने तो अंदाज पक्का झाला नव्हता. अचलोजीच्या फितव्याने संतापून ते बेंगळुरावर उतरतात की काय अशी एक शंका हरजींना होती.

चोपाळ्याच्या लोखंडी सळया कुरकुरत होत्या. जागोजाग टेंभ्याखाली हत्यारी पहारे उभे होते. राजांच्या मनचा हेतू जाहीर व्हावा म्हणून हरजींनी विचारले, " बेंगळूर किती मजलांवर आहे असं विचारलं होतं राजांनी. अचलोजी पोरवयाचे. काकासाहेबांच्याकडं बघता आम्हांस वाटतं ..."

फिरता चोपाळा पायाने रोखत हरजींचा बोलत तोडत राजांनी विचारले, " आता श्रीरंगपट्टण किती मजलांवर ते सांगा."

हरजींनी बांधला होता तोच अंदाज राजांच्या तोंडून बाहेर आला. म्हैसूरच्या चिक्कदेवरायाचे मातब्बर ठाणे असलेल्या श्रीरंगपट्टणची आता गय नाही हे हरजींनी ताडले.

" जी. तेही असेल सातआठ मजलांवरच."

" आम्ही खासाच घ्यावं म्हणतो चिक्कदेवाचं श्रीरंगपट्टण घेरात. तुमच्या दिमतीची निवडक लढाऊ असामी फौजसुद्धा द्या आमच्यासंगती. मोरस, तिगुड, कोडग व मलेयच्या नायकांना आम्ही घेर टाकताच श्रीरंगपट्टणवर चालून येण्यास हरकारे द्या. बेंगलूरवर डोळा ठेवणाऱ्या चिक्कदेवाचे त्याशिवाय नाही उघडायचे डोळे."

" हे बरं झालं. इतरांस नडतो तसा हा चिक्कदेव आम्हालाही जागोजाग नडतोच आहे. आम्हीही येऊ तुमच्या संगती त्याच्या समाचारास." हरजी हुरूपाने म्हणाले.

" गरज नाही त्याची राजे. तुम्ही जिंजी राखून असा. कासम-रणमस्ताच्या फौजा दौडताहेत प्रांतात. मोहिमेच्या सिद्धतेला उद्याच लागा. प्रांताचे जाणकार खबरगीर मात्र द्या तुमच्या फौजफळीबरोबर." बराच वेळ राजे श्रीरंगपट्टणच्या घेराचा आराखडा मनाशी बांधत राहिले. हरजी मोहिमेच्या तयारीची आखणी करत राहिले.

श्रीरंगपट्टणभोवती 'हरहर महादेवाच्या' किलकाऱ्यांचा लोळ उठला. संताजी घोरपडे, त्रिंबकजी भोसले, दादाजी काकडे, केसो त्रिमल, धनाजी, खंडोजी अशा मर्दान्यांच्या संगती राजे श्रीरंगपट्टणला भिडले. चिक्कदेवरायाला या हमल्याची अगोदरच कुणकुण लागल्याने तो उगवतीच्या प्रदेशाकडे निसटला. तेथील रयतेकडून बळजोरीने खंडणी वसूल घेण्याचा त्याने सपाटा लावला. या जुलमाने हैराण झालेल्या त्याच्याच रयतेने आणि काही मंत्रिगणांनी त्याच्याविरुद्ध बंड पुकारले. रयतेने एकजाग होत आपल्यातीलच एक वैष्णव आणि एक शैव असे सेनाप्रमुख नामजाद करून दोन फळ्यांचे सैन्य उभे केले. त्यातील एक सत्यमंगलमवर चालून गेली. दुसरीने खुद्द म्हैसूरलाच घेर टाकून प्रत्यक्ष चिक्कदेवरायालाच त्यात कोंडले.

राजांच्या फौजेने चिक्कदेवाचे श्रीरंगपट्टण लुटीवर घातले. मदुरेकडून त्याच्या कुमकेला जाणाऱ्या शिबंद्यांवर छापे मारून त्याला एकाकी पाडले.

राजांच्या फौजेतील कर्नाटकची फळी श्रीरंगपट्टणच्या कोटाला घेर टाकून बसली. मराठी मुलखातून आलेली फळी म्हैसूर राज्यातील प्रदेश लुटत चालली. म्हैसूरच्या कोटात अडकलेल्या चिक्कदेवरायाला काय करावे सुचेना. आता त्याला शेजार सुचला! त्याने रामनाडच्या नायकाला मदत करण्यासाठी खलिता धाडला.

राजांनी हमल्यावर जातानाच जिंजीपासून श्रीरंगपट्टणपावेतो खबरगीर पेरले होते. ते खुद्द श्रीरंगपट्टणच्या घेरावर देख ठेवून होते. राजांची प्रांत गोवे, जंजिरा, बऱ्हाणपूर येथील कीरत ऐकून असलेला चिक्कदेव पुरता सटपटला होता. श्रीरंगपट्टण हातचे जाणार याची तर त्याने खूणगाठच बांधली होती. या घेराच्या खबरा ऐकून भोवतीचे नायकही हबकले होते. संताजी, धनाजी, खंडेजी यांच्या चपळ तुकड्या म्हैसूर राज्यात चौफेर पसरल्या. श्रीरंगपट्टणचा किल्लेदार निकराने कोट झुंजवीत होता. पण त्यानेही आशा सोडली होती.

कोटाबाहेरच्या मैदानावर राजांसाठी खास डेरा उठवण्यात आला होता. म्हैसूरभर दौडणाऱ्या मावळी तुकड्या त्या डेऱ्यासमोर हररोज लुटीचा ऐवज आणून त्याची रास लावीत होत्या. घेरातील दरबाज कोटाला लोखंडी गळांचे दोर टाकून तटं पार करू बघत होते. आपल्या चंद्रावतावर मांड घेऊन राजे रोज तटाभोवती फेर टाकत होते. पण – हा पणच नडत आला होता त्यांना हयातभर. एके दिवशी त्यांच्या डेऱ्यात शिरलेल्या खबरगिराने येऊन त्यांच्या कानी घातली ती कर्नाटकची नव्हती, मराठी मुलखाची खबर होती – " औरंगजेब थेट किल्ले पन्हाळ्याला वेढा देण्याच्या बेतात आहे ! "

पन्हाळा ! पाखराच्या कोटरागत वाटणारा गड ! आबासाहेबांची अखेरची भेट झाली ते ठिकाण ! हंबीरराव – म्हलोजीबाबा – राजांच्या डोळ्यांसमोर ठकाठक चित्रे फिरली. त्यांनी संताजी, केसो त्रिमल यांना घेरातील फौज एकवट करण्याची आज्ञा दिली.

आता कर्नाटकात आलेल्या राजांना तातडीने परतणेच भाग होते. तरीही त्यांनी हरजींच्या सोबत जिंजीभवतीचा वांदीवाश, वृद्धाचलम, तिरुवनमलाई हा प्रदेश नजरेखाली घातला. परतीच्या प्रवासाला दोन दिवस असताना हरजींच्या खासेवाड्यात दिवाणी दालनात ते हरजींना प्रांतराखणीच्या महत्त्वाच्या सूचना देत होते. दालनात फक्त केसो त्रिमल आणि संताजी याच वरकड असामी होत्या.

द्यायच्या त्या सर्व सूचना देऊन होताच राजांनी मनी रेंगाळणाऱ्या मुद्द्याच्या बाबीला तोंड फोडले. " तुमचा केसोपंतांचा काही गैरमेळ कानी येतोय राजे." ते ऐकताच हरजी व केसो त्रिमलांनी गर्दनी टाकल्या.

" कारण कोण याचं संताजी ? " राजांनी घोरपड्यांना मध्येच घेतले. संताजींनी दोघांच्या बिनसण्यांचे कारण बयाजीने सांगितले. ते ऐकून राजे बेचैन झाले. प्रांताचे अखत्यारी म्हणून हरजींना समजावणी देत म्हणाले, " मनाच्या गैरमेळानं काय काय सोसावं लागतं ते भोगलंय आम्ही राजे. माणसांची मनं तुटली की आपुलकीचा देठच खुंटतो. कार्यी लावायची ती मोठी कामे बगलेलाच पडतात, नको तिथं माणसाचं बळ खर्ची पडतं. तुम्ही जाणते आहात. समर्थांनी आम्हास कधी काळी लिहिला तो बोध तुमच्या कानी फक्त घालून ठेवतो. तुम्ही जाणा काय जाणायचे ते त्यातून." राजे क्षणैक थांबले. समर्थांच्या नुसत्या आठवणीनेही कातर झाले त्यांचे मन. ते हरजींच्याकडे बघत, स्वतःला हरवल्यागत बोलले, " मागील अपराध क्षमावे। कारभारी हाती धरावे। सुखी करूनि सोडावे। कामाकडे। "

ते ऐकून हरजी विचारगत झाले. बैठकीवरून उठत केसोपंतांजवळ जात राजांनी त्यांना हलक्या शब्दांत समज दिली, " केसोपंत, आबासाहेबांनी पहिले पेशवे शामराज यांना कोण धडा दिला ते कानी असेल तुमच्या. खुद्द आम्हास काय काय निवाडे घ्यावे लागले ते याद करताना मनची घालमेल होते आमच्या. जगदंब करो तसा प्रसंग न येवो तुमच्या आणि हरजींच्या मध्ये. बरे हुषारीनं, राजांच्या एकविचारे असा."

केसोपंत, हरजी, संताजी भारावून राजांच्याकडे बघत राहिले. क्षणमात्र त्यांना थोरले महाराज तर समोर नाहीत ना असा भास झाला.

" झालं गेलं जनावराच्या टापेगत मागं टाकून तुम्ही दोघांनी एकमेकांस पक्क्या दिलजमाईची आमच्या सामने खांदाभेट द्या." राजांनी हरजी व केसोपंतांवर आपली पुखरनजर फिरविली. क्षणभर त्या दोघांनी एकमेकांकडे पाहिले आणि पसरत्या हातांनी एकमेकांस स्वामींसमोर खांदाभेट दिली. ती बघताना राजांच्या मुखावर समाधानाची लकेर तरळून गेली. संताजी भरून पावले.

दोन दिवस हरजी-अंबाक्कांचा पाहुणचार घेऊन राजांनी जिंजी सोडली. त्यांना सोबत करायला हरजी, संताजी-केसोपंतांसह संगती चालले. फौजा बेंगळूरच्या मार्गाला लावण्याची राजांची आज्ञा झाली. ती ऐकताच गोंधळलेल्या हरजींचा गैरसमज दूर करत राजे त्यांना म्हणाले, " आम्ही जाणतो तुम्ही कसल्या विचारात पडलात ते. अर्जुनजीवर कसला राग नाही आमचा. बेंगळुरावर नाही चालून जात आम्ही. आम्ही चाललो आहोत होदिगेरीला ! आमच्या थोरल्या महाराजसाहेबांच्या छत्रीचं दर्शन घ्यायला. पाद्यपूजा करायला. त्यांचे आशीर्वाद मागायला."

हरजींनी ते ऐकून सुस्कारा सोडला. मजला टाकत राजांची परतीची फौज बेंगळूरजवळ होदिगेरीच्या रानात आली. हरजी, खंडोजी, संताजी अशा निवडक असाम्या संगती घेऊन राजांचे घोडेपथक शहाजीराजांच्या छत्रीकडे चालले.

शहाजीराजांच्या छत्रीचे ठिकाण आले. एकोजीकाकांनी इथे नित्यपूजेच्या पुजाऱ्यांची व्यवस्था केली होती. पायउतार होऊन राजे खाशामेळासह छत्रीसमोर आले. कैक विचारांनी मन भरून आले त्यांचे. पायीच्या मोजड्या उतरून, पुजाऱ्याने दिलेली फुलओंजळ आपल्या आजोबांची यादगीर झालेल्या पादुकांवर राजांनी वाहिली. शिवगंधी कपाळ त्या पादुकांना भिडविताना नाना विचार त्यांच्या मनात दाटून आले.

" आमच्या मासाहेबांचा नाही तसाच तुमचा चेहराही नाही आठवत ! कधी बालपणी दिसले असतील तेवढेच तुमचे ओझरते पाय. निजामशाहीपासून आदिलशाहीपर्यंत फिरली तुमची पावले. आमच्या आबासाहेबांनी हे केवढं नव्हत्याचं होतं केलं ! बागलाणपासून जिंजीपर्यंतच्या आबासाहेबांच्या या राजपादुका राखण्याची आम्ही शर्थ करतो आहोत. आशीर्वाद द्या आम्हास." राजांमागून सर्वांनी छत्रीचे दर्शन घेतले. हरजींचा निरोप घेण्यासाठी त्यांची खांदाभेट घेताना राजे त्यांना न राहवून म्हणाले, " हा कर्नाटक प्रांत ही गाठीची सबल जागा, बरी बांधून राखून असा ती. येतो आम्ही."

मराठी मुलुखात पन्हाळ्यावर येताच राजांना म्हलोजींच्याकडून कळले की, पन्हाळ्यावर चालून येण्याची औरंगजेबाची हूल होती ! त्याच्या मिरज, कऱ्हाड, बेळगाव भागात फिरत्या फौजांना रोखण्यासाठी हंबीरराव तिकडे गेले होते.

पन्हाळ्यावर एक मुक्काम टाकून राजांनी म्हलोजींचा निरोप घेतला. ते महाडघाटाने

रायगड चढून आले. गडाला जागजागी गवती झड्या लावल्या होत्या. मृग तोंडाशी आल्याने वाळवणाची धान्ये गोणी भरून अंबारखान्यात थप्यांनी रचली जात होती.

गड चढून आलेल्या राजांना निळोपंतांनी मागील हालचालींचा तपशील दिला. कुलेश खेळण्यावर, रामचंद्रपंत कोकणात, हंबीरराव देशावर अशी नेमल्या जागी माणसे जागते फौजीतळ बांधून पावसाळ्यातही जागरूक होते.

अंत:पुरात येसूबाईंच्या भेटीस आलेल्या राजांनी कर्नाटक स्वारीतले प्रसंग त्यांच्या कानी घातले. येसूबाईंना ऐकायची होती ती छत्री-दर्शनाची बाब. ती सर्वांत शेवटी राजांनी त्यांना सांगितली.

पेन्नर, तुंगभद्रा, कृष्णा अशा भरल्या नद्या पार करूनही हरजींच्या प्रांत कर्नाटकाच्या खबरा येत होत्या.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कासमखानाने एकोजीकाकांचे बेंगळूर मारून ते तीन लाख रुपयांना विकले होते! कुणाला? म्हैसूरच्या चिक्कदेवरायाला! हातचे बेंगळूर हे मातब्बर ठाणे गेले या धसक्याने एकोजीकाकांचा तंजावरला काळ झाला होता.

श्रावणाचे दिवस सुरू झाले. मनी घोळणाऱ्या दोन बाबी मार्गी लावण्यासाठी राजांनी मोरेश्वर पंडितरावांना खासेवाड्यात याद घेतले. चिंचवडहून मोरयाबाबांचा एक शिष्य बाबांची तक्रार घेऊन नुकताच राजांना भेटून गेला होता. पुणे प्रांतातील लष्करी धामधुमीच्या काळात फौजेच्या अधिकाऱ्यांनी बाबांच्या मठस्थानाला बेमुर्वत उपद्रव दिला होता. फेर घेणाऱ्या राजांनी विचारले,

"पंडितराव, प्रांत पुण्याला सुभा कोण सध्यास?"

"जी. विनायक उमाजी आहेत." मोरेश्वर विचारात पडत उत्तरले.

विनायकांचे नाव ऐकताच राजांना त्यांचे वडील उमाजींची आठवण झाली. उमाजींनी राजांना बालपणी पुराणग्रंथांची बारीक अर्थबर शिकवण दिली होती.

"पंडितराव, विनायकांना फौजेच्या जुमलेदार, हवालदार, बारगीर, हशम, बाजेलष्कर हुजरात सर्वांस समज देण्यासाठी आज्ञापत्र तातडीनं धाडा. कलमात लिहा... तुम्ही अवघे मठाच्या रहदारीस नाहक दरफ्ती करता... उपद्रव देऊन धामधूमही करता. चिंचवडचा मठ मोरयाबाबांचा. कै. आबासाहेबांपासून बाबा चरणधूली घेण्याच्या अधिकाराचे. तुम्ही मठातर्फेच्या रयतेकडून गैरसनदी मनास येईल ते मागत होता म्हणून कळो आले. तरी हे ढंग आम्हास कैसे मानो पाहतात? या उपरीही बदराहा वर्तणूक केलिया तुमचा एकंदर तो मुलाहिजा होणार नाही. जो धामधूम करील त्यास जिवेच मारले जाईल. बरे जाणून मौजे मजकुरास तसदी न देणे. ताकीद असे."

मोरेश्वर पंडितरावांनी मजकूर ध्यानपूर्वक ऐकला. आज्ञापत्र कुणा स्वारामार्फत जोखमीने पाठवावे याचा ते मनाशी मेळ मांडू लागले. आपल्याच विचारात फिरणाऱ्या राजांनी दुसऱ्या एका आज्ञापत्राच्या विषयाला तोंड फोडले.

"जसे हे पाठवाल तसेच वाई प्रांतातील कसबे निंबच्या सदानंद गोसाव्यांच्या मठाबाबतही आज्ञापत्र द्या. मठास ऐवज देण्यास हयगय करीत आहे. त्यांना कलम द्या... पहिलेपासून मठाचे अन्नछत्र चालिले असता मधेच ऐवजाबाबे कुसूर करावया गरज काये? याउपरी ऐवज पाववावया बाबे एवढी ती सुस्ती न करणे. पहिलेपासून मोईन असेल तैसा पाववीत जाऊन अन्नछत्र चालो देणे. धर्मकार्यास खलेल न करणे. उजूर न करणे. जाणिजे."

रिवाज भरून पंडितराव निघून गेले. राजांच्या मनात मात्र समर्थ आणि मोरयाबाबा यांची जोड ताडून बघणारे, न आकळणारे विचार फिरून गेले.

गणेशचतुर्थीच्या सणाचे दिवस आले. गडावरची राउळे रंगाऱ्यांनी रंगोटीला घेतली. नुकताच पावसाळा उलगल्याने अधूनमधून उन्हाची किरणे गडमाथ्यावर उतरू लागली. गडवाटा मात्र अजूनही शेवाळलेल्याच होत्या. त्यावरून पुन:पुन्हा पाय घसरत असताही बरोबर दुभाष्या शेणवीला घेऊन मुंबईहून आलेले टोपीकरांच्या दरबाराचे दोन वकील गड चढून आले. त्यांची नावे होती जॉर्ज वेल्डन व रॉबर्ट ग्रॅहॅम. राजांनी नव्याने नामजाद केलेले दौलतीचे वकील त्र्यंबक गोपाळही त्यांच्याबरोबर होते.

सुरत लुटणाऱ्या शिवाजीराजांची कीरत ऐकून असलेले गोरे वकील, गोव्यात फिरंग्यांची दैना करणारे त्यांचे पुत्र— राजे कसे दिसत असतील, आपल्याशी कसे बोलतील याचाच विचार करीत होते. त्या चौघांना घेऊन प्रल्हादपंत राजांच्या भेटीसाठी सिंहासनसदरेला आले. गोऱ्या वकिलाने आणले नजराणे पेश केले. रिचर्ड केजविनला लंडनला परत जायला लावणाऱ्या उमद्या राजांना, दोघेही वकील टेकल्या गुडघ्याने रिवाज देऊन निरखू लागले. त्र्यंबक गोपाळांनी आपल्या स्वामींना त्यांचा परिचय करून दिला.

"मुंबईजवळच्या कोर्लास या बेटाच्या सुलुखासाठी आलेत हे गोरे हेजिब मुंबईहून." प्रल्हादपंतांनी राजांना त्यांचा येण्याचा हेतू सांगितला.

"काय तपशिली कलम आहे त्यांचे सुलुखाबाबत?" राजांनी दोन्ही गोऱ्यांना बारकाईने निरखत विचारले.

"कोर्लास बेटाचे हबश्यांपासून संरक्षण करण्यासाठी राजी आहेत टोपीकर. त्यासाठी ते आपली फौज बेटावर ठेवण्यासही तयार आहेत. पण त्यासाठी त्यांचं एक मागणं आहे आपल्या दरबारकडून." त्र्यंबकपंतांनी राजांच्या कानी घातले.

"कोण वजेचं मागणं?" राजांचे कपाळ आठ्याळ झाले.

ते म्हणतात, "यासाठी आपल्या दरबारनं त्यांना दोन हजार मुदे भात व रुपये पन्नास हजार रोख द्यावेत!"

"बस्स?" राजे आसनाला पाठ टेकत हसून म्हणाले. त्यांच्या मनी, गेली दोन वर्षे भाताच्या कणासाठी दुष्काळामुळे तळमळणारी मुलूखभराची प्रजा फिरून गेली.

औरंगजेबाच्या फौजा परतवून लावण्यासाठी खर्ची पडलेला खजिना तरळून गेला. तरी पण त्यांनी विचारले, "तुमचं काय मत प्रल्हादपंत ?"

"घातल्या त्या दरबारनं अटी म्हणजे त्या मान्य केल्या असं होत नाही. थोडं ओढून धरलं तर भाताची आणि रोख रकमेची मागणी घटवतील टोपीकर." प्रल्हादपंतांनी आपला सल्ला दिला.

"तुम्हास काय वाटतं त्र्यंबकपंत या अटींबाबत ?"

त्यावर राजांनी आपल्या वकिलांना चाचपले.

स्वामीच कौल देतील या आशेने बघणारे त्र्यंबकपंत गोंधळले. म्हणाले, "जी. मोगली फौजांचा ताण दौलतीवर आहे. निभत असेल ही बेटाची बाब परस्पर तर सुलूख मान्य करावा."

"नवीन असलात तरी वकुबाचे आहात त्र्यंबकपंत !" राजांनी मध्येच त्र्यंबकपंतांना कौलच वाटावा असे हसत म्हटले, "न्यायाधीश, करावयाचाच तर ओढूनताणून सुलूख कशासाठी ? यांना सांगा, 'आम्हास मान्य आहेत त्यांच्या अटी ! त्यांनी तातडीनं बेटाच्या राखणदारीसाठी आपल्या फौजा पाठवून द्याव्या.'" त्र्यंबकपंत आणि न्यायाधीश एवढ्या तडकाफडकी तह झाल्याचे आश्चर्य वाटून राजांकडे बघतच राहिले.

ग्रॅहॅम आणि वेल्डन नजराणे मिळताच खूष झाले. आपला तह लवकर फते झाला हे आपल्या नव्या विजरईला सांगायला ते मोकळे होते.

ज्या भागानगरात आबासाहेबांच्या अखेरच्या कर्नाटकस्वारीच्या वेळी गोवळकोंड्याच्या अबुल हसन तानाशाहाने आगवानी करून, त्यांना नजराणे देऊन मैत्रीची ऊरभेट दिली होती त्याच भागानगरात तानाशाहाच्या दंडात औरंगजेबाच्या 'शाही' काढण्या पडल्या ! आता विजापूर, गोवळकोंड्याच्या फौजाच दिमतीला घेऊन औरंग केव्हाही मराठी मुलखावर उतरणार हे साफ होते. कुणीही काही बोलण्याच्या स्थितीत नव्हते. सारेच श्रींचे राज्य राखून कसे चालवावे याच विचाराने घेरले होते.

"आता कुणी घेऊ म्हणतील तर श्वास घ्यायलाही कुणास फुरसत नाही. दक्षिणेतल्या लगतच्या दोन्ही शाह्या पडल्या. गनिमाचा डोळा तर पहिल्यापासून आम्हांवरच. बागलाण, खानदेश, कोकण, देश दौलतीच्या चहूबाजूंच्या सुभेदार, हवालदारांना साऱ्यांवर केवढी जोखीम पडते आहे याचं कलम द्या. मिळेल तेवढी तवानी संचणी तातडीनं करण्यास लिहा. आम्ही चौलच्या नाडल्या रयतेला सवलती देण्यासाठी खासा चौलात उतरतो आहोत. कळवा तसं सुभेदार रायाजी सदक प्रभूंना." कितीतरी विचार एकाच वेळी राजमनात भरून आलेले छत्रपती पेशवे यांना एकामागून एक आज्ञा देत होते.

आबासाहेबांच्या आठवणीने मनाचे टाके ओसंडू लागले. कधी त्यांच्या प्राणावर, तर कधी त्यांच्या दौलतीच्या प्राणावर केवढे बाके प्रसंग गुदरून गेले. आज नेमके काय केले असते त्यांनी ? चारी कवाडांवर शंभुमन धडका घेऊ लागले.

निळोपंत, येसाजी, रामचंद्रपंत सर्वांनी धीरा-इमानाचे वचन वाटावे असे बोल देत राजांना रोकडा पाठिंबा बोलून दाखविला.

आपल्याच विचारात गढलेल्या राजांनी सावधानीचे पाऊल म्हणून निळोपंतांना सांगितले, "पंत, कर्नाटकात हरजींना फौजा तयारीनं सीमेवर पेरण्याचा खलिता द्या. औरंग आहे तो ! नेम नाही देता येत कुठं वळेल याचा."

ते ऐकताना पेशवे विचारात पडले. आज सर्वांना वाटून गेले की, 'मुलूख थोडा जिकडे पुढा' म्हणत राज्य उठविणे एक वेळ केवढे सोपे, पण उठविले ते राखणे केवढे यातायातीचे !

"तुम्ही सारे कदिम, जाणते आहात. मर्दानगीचे आहात. प्रसंगी प्राणांची कुरवंडी करावी लागेल, बागलाणपासून जिंजीपर्यंत पसरलेला हा मुलूखपट्टा राखायला. हे एकल्या आबासाहेबांचं नव्हतं, आमचं नाही, ते साऱ्यांचं जिवामोलाचं राज्य आहे. कुणीच कचदिल होऊ नका. एकदा आबासाहेबांसंगती आम्ही याच औरंगच्या आम्र्याच्या कोठीत अडकून पडलो होतो. बऱ्या जाणतेपणी अवघे समजून घ्या, आज ही उभी दौलतच त्याच्या कोठडीत बंदिस्त पडण्याचं भय समोर आहे. चला आमच्यासह. मेळानं जगदीश्वराचं दर्शन घेऊ." आपल्याच लयीत सिंहासनसदर सोडून राजे महादरवाज्याकडे चालले. सारे त्यांच्या पाठीशी चालले. फक्त एकले न्यायाधीश प्रल्हादपंत रामराजांच्या वाड्याकडे, कुणाला न कळेलसे वळले. कसला न्यायनिवाडा घ्यायचा होता त्यांना तिथे, हे त्यांचे त्यांनाच ठाऊक !

स्नान करून कपाळी शिवगंध घेताना राजांची डावी पापणी फडफडली होती. सकाळपासून मनाला नाकळेलशी चुटपूट लागून राहिली होती. दुपारचा थाळा घेताना श्रीसखींना ते म्हणालेही होते, "कळत नाही पण जिवाची उलघाल होते आहे आज. औरंगच्या फौजा हरजींच्या प्रांतात घुसल्या की काय असा शक येतो आहे."

दिवस कलतीला लागला तसे राजे राया-अंता, पुरुषा यांच्यासह आघाडी मनोऱ्यावर आले. इथून पायतळी गंगासागराचा तलाव दिसत होता. त्यावर ओळंबलेल्या आंब्याच्या फांदीवर मान आखडती घेऊन बसलेला एक खंड्यापक्षी राजांना दिसला. निश्चल खड्या असलेल्या त्या पाखराला, राजे एकटक निरखू लागले. त्यांना काय होत आहे ते कळले नाही. डोळ्यांचे पाते लवायच्या आत खंड्या उडाला. त्याने थेट पाण्यात सूरझेप घेतली. गेला तसाच पाते लवायच्या आत तो पाण्याबाहेर पडला. त्याच्या लांबट, काळसर चोचीत त्याने पाण्याबाहेर उचललेली, तडफडती मासोळी दिसली आणि किरणांच्या तिरिपेत चांदवा उठवून क्षणात चोचीआड झाली. याच तलावाकाठी, असाच खंड्यापक्षी कधीकाळी पाहिल्याचे त्यांना आठवत होते. पण कधी ? काही गवसत नव्हते. खंड्याच्या सूरझेपेने गंगावर्तावर पाणलहरी उठल्या तशा राजमनात विचारलहरी उठू लागल्या. मनाच्या काठाळीत विरू लागल्या.

जगदीश्वराच्या मंदिराकडे सांजदर्शनासाठी चाललेल्या राजांना येसाजी कंक आणि खंडोजी वाटेतच सामोरे आले. त्यांना काहीतरी बोलायचे होते.

येसाजी-खंडोजी यांच्यासह राजे जगदीश्वराकडे चालले.

खंडोजी म्हणाले, "रामसेज-एवढी सालं निकरानं झुंजणारा आपला रामसेज ..."

चालते राजे थांबले. खंडोजी चरकले. कसे बोलावे, विचारात पडले.

"पडला ... हेंच ना चिटणीस ?" राजांनीच त्यांना विचारले.

"जी. लढून नाही. कपटी चालीनं. फितवा करून पाडला. एवढ्या ताकदीचा रामसेज, धनी." क्षणभर खंडोजींनी गर्दन खाली घातली. लागलीच ती उठवून राजांना दिलासा वाटावा म्हणून ते म्हणाले, "पण हरजींची खबर आहे स्वामी पडल्या गोवळकोंड्याचा शक्य तेवढा मुलूख कब्ज धरून घेतला आहे त्यांनी कर्नाटकात."

खंडोजींचे शब्द राजांच्या कानी पडत होते. मनाला न डुचमळता सांजवाऱ्यात मुरत होते. साऱ्यांसह ते जगदीश्वराच्या हमचौकात आले. त्यांनाच कळली नाही, पण आज त्यांची नजर कशी कुणास ठाऊक समोरच्या गाभाऱ्यातल्या शिवपिंडीवरच्या अभिषेकपात्रावरच खिळून पडली. वाऱ्याने पात्र मंद डुलत होते. त्याबरोबर अभिषेकधारही डुलत होती.

दर्शन करून सारेजण बालेकिल्ल्यात परतले. सूर्य आता डुबला. गडाच्या लहाना दरवाज्यात, महाद्वारात सांजनौबती दुडदुडल्या. पुरते सांजावून आले. नेमाप्रमाणे देवडीवाले दरवाजे बंद करून घेऊ लागले. ते दरवाजे पार करीत आलेला तळबीडचा एक स्वार पाचसहा सोबत्यांसह महादरवाजा पार करून बालेकिल्ल्यात आला. त्याच्या अंगावरचे कपडे घामाने पुरते डबडबले होते, चेहरा पार कळंजून गेला होता. देवडीवाल्यांना हातानेच थोपवत काही न सांगता तो कसेतरी दरवाजे मागे टाकत बालेकिल्ल्यावर आला.

महाराज नुकतेच परतले होते. डुईचा टोप त्यांनी उतरून तबकात ठेवला होता. मुलूखभर पडलेल्या दुष्काळात गडागडाहून रसदीचा पुरवठा कसकसा करावा याची कल्पना ते मुजुमदार हणमंत्यांना देत होते. येसाजी-खंडोजी ते ध्यान लावून ऐकत होते.

"म्हा ऽ राज ऽ, घात झाला." राजांसह सर्वांचे काळीज थरकून उठावे असे पिळवटते बोल वाड्याचे सदरीदालन चिरत गेले. गड चढून आलेला स्वार राजांना बघताच पुढे होत सरळ त्यांच्या पायांवर देह टाकत गदगदू लागला. ते होते तळबीडचे शंकराजी मोहिते.

पायांपासून केसावळीपर्यंत थरकलेले राजे झपकन वाकले. शंकराजींच्या खांद्यावर थोपटत त्यांनी शंकराजींना विचारले, "का ऽ य झालं शंकराजी ?"

राजांच्या हातस्पर्शाने गद्‌गदून गेल्या शंकराजींना काही क्षण बोलवेना. तुटक तुटक बोल कसेतरी त्यांच्या तोंडून बाहेर पडले, "आम्ही – आम्ही झालावंच पर हुबी दौलत पोरकी झाली. धनी ऽ तुमचं ... तुमचं मामासाहेब – समद्यांचं सरलष्कर – आमचं भाव ..." असह्य असह्य कढाने शंकराजींनी घट्ट मिटल्या डोळ्यांनी तगमगती गर्दन इकडे तिकडे झटकली. त्यांच्या डुईची पगडी उडून रुजाम्यावर उतरली. "सरलष्कर म्येलं धनी ऽ !!"

वाई प्रांतात घुसलेल्या मोंगली फौजेला हुसकून लावण्यासाठी झालेल्या हातघाईच्या लढाईत सरलष्कर हंबीररावांच्या भरदार छाताडावर तापला जडशीळ, लोखंडी तोफगोळा येऊन अचानक आदळला होता. त्या गोळ्याने हंबीररावांची नव्हे तर थोरल्या स्वामींच्या श्रींच्या राज्याची छातीच फोडून टाकली होती. भुईवर कोसळताना हंबीरराव जिवाच्या पिळाने ओरडले होते, "आमच्या ताराऊला सांबाळा धनी ऽ. जै वागजाई ऽ" आणि वाईच्या माळरानावरूनच त्यांनी अखेरचा मुजरा रायगडाकडे तोंड करून राजांच्या पायाशी रुजू केला होता.

फराशीच्या रुजाम्यावर पडल्या शंकराजींचे 'गेले !' हे बोल ऐकताच राजांनी आपले दोन्ही हातच कानांवर घेतले.

'दिली आमची घरसोबा-ताराऊ रामराजास्नी' म्हणणारे, आम्ही आरोपित म्हणून आबासाहेबांच्या समोर दरबारी उभे राहण्याच्या कैचीत सापडलो तेव्हा 'बाईलाच दरबारात साक्षीसाठी बोलवावं' म्हणत आमच्या पाठीशी उभे राहणारे, आम्हास कैद करायला निघालेल्या सुरनीस-पेशव्यांनाच कैद करून आमच्या भेटीसाठी पन्हाळ्यावर आलेले, वऱ्हाड-बऱ्हाणपूर, भडोच तुडविणारे, चाकरीने सरलष्कर असलेले पण ऋणानुबंधाने आम्हास आबासाहेबांच्या ठायीच वाटणारे मामासाहेब हंबीरराव मोहिते ! त्यांची रूपेच रूपे राजांच्या डोळ्यांसमोर नाचू लागली. शंकराजींना उठते करण्याचे भानही त्यांना राहिले नाही. ते आपोआपच उठते व्हावेत, येसाजी-खंडोजी, राया-अंता, पुरुषा, पहारे सारेच चक्रावून जावेत असे, आपले तोंड ओंजळीत घेत राजे कुडीभर हलत मुसमुसू लागले. एवढे घनदाट प्रसंग कोसळले, छत्रपती कधीच नव्हते डोळ्यांवाटे फुटले. आज मात्र फुटले.

"कुठं आहेत मामासाहेब ? का गेले असे न बोलता, न भेटता ? कुणाकडे पाहावे आम्ही ?" भरून आल्या डोळ्यांनी राजे कसेतरीच पुटपुटले.

एव्हाना बातमी गडभर पसरली होती. माणसे खासेवाड्याकडे लोटत होती. पोरवयाच्या ताराऊंना घेऊन येसूबाई आलेल्या बघताच खेचल्यासारखे राजे, ताराऊंच्या जवळ गेले. काही न बोलताच त्यांनी ताराऊंचे खांदे थोपटत श्रीसखींच्याकडे बघितले. मोठ्या निकराने डोळ्यांतले पाणथेंब रोखत राजे शंकराजींना म्हणाले, "चला, संगती या."

मशालधाऱ्यांनी वेढलेल्या पालखीत बसून येसाजी, निळोपंत, खंडोजी यांच्यासह राजे महाडघाटाकडे चालले. आणल्या जाणाऱ्या सरलष्कर हंबीरराव मोहित्यांच्या आखरी दर्शनासाठी.

हंबीररावांच्या देहाला अगीनडाग देण्यात आला. हंबीरमामा गेले आणि एका भयाण पोकळीने राजमन घेरले. ते कुणाशीच खुल्या मनी बोलेनात. रोजनेमाचे त्यांचे स्नान, स्फटिकपूजा, दफ्तर, गडदेख, थाळा हे चुकार होऊ लागले. त्यांचे कशातच लक्ष लागेना. स्नानाला हमामखान्यात बसले तर डुयीवर पडणाऱ्या पाणधारेबरोबरच मनावर विचारधारा कोसळू लागल्या. सरशीने कपाळी शिवगंध रेखून घेताना छत्रपतींना ती सरशीच रक्तमाखल्या फरशीसारखी दिसू लागली. दफ्तरात खंडोजी, चिमणगावकर यांना खलित्याचा मजकूर सांगताना ते मध्येच म्हणू लागले, " राहू द्या. चिटणीस, कुणासच नका धाडू खलिता. बेतले असतील ते रद्द करा." थाळा घेताना तबकातले त्यांचे पदार्थ तसेच चिवडलेले राहू लागले. मनच उडाले जसे काही त्यांचे सगळ्यावरून.

विचार– विचार! नुसत्या विचारांनी मेंदूची निशाणकाठी थरथरू लागली त्यांच्या. 'श्रींचे राज्य' म्हणजे नेमके काय ? कोण होते आबासाहेब ? थोरल्या आऊ, सती गेल्या मासाहेब, समर्थ हे सारे कोण ? कोंडाजी, कृष्णाजी, हंबीरमामा आणि ज्यांना आम्ही कधीच पाहिलंसुद्धा नाही ते लढायांत देह ठेवून गेलेले असंख्यात धारकरी, औरंगला तसलीम करून खिल्लत पांघरणारे शिर्के, निंबाळकर, अचलोजी, अर्जुनजी, बंडाळी करणारे कोकणपट्टीचे वतनदार. कसला शतरंज चालला आहे हा ? का खेळतो आहोत आम्ही तो ? कोण खेळेल आमच्या माघारी तो ? रामराजे ? आमचे बाळराजे ? केवढा पाताळयंत्री, निर्दय औरंग! तख्तासाठी सख्ख्या भावांचे काटे काढणारा, बापाला विषमालिश करवून आईच्या कबरीलगत दफन करणारा. तगेल आबांची-आमची ही नवथर गादी त्याच्यासामने ? की ? जशी इदलशाही, कुतुबशाही पडली तसे हे राज्य ...? नाऽही. नाऽही. जिवाचे चाळ करून बांधलेत त्यासाठी आम्ही पायांत. एकल्या आम्हालाच ही आच लागून काय कामाचे ?

रात्रंदिवस चमत्कारिक एकलेपणाच्या शिरशिरीने राजमन भणभणू लागले. माणसे येत होती, नित्याप्रमाणे काही सांगू बघत होती. हात उठवून त्यांना थोपते करीत राजे तुटक बोलत होते– " बस्स. थोडक्यात बोला. अमक्यातमक्यास भेटा." असे तुटक बोल त्यांच्या तोंडून ऐकू आले की माणूस चक्रावत होते. चालत्या हत्तीच्या पायांत रानवेलींचा चिवट गुंतवा अडकावा तसे झाले होते. भवती वावरण्याऱ्या कित्येकांना ते खटकू लागले. एकाचीही मात्र ते बोलण्याची छाती होईना.

एक दिवस दुपारचा थाळा चिवडून उठणाऱ्या राजांना न राहवून येसूबाईंनी अखेर विचारलेच, " स्वारींचं कशातच लक्ष नाही. हे कोण थाळा चिवडणं ? किती दिस ? "

येसूबाईंना निरखत उष्टावल्या हाताचा रोख थाळ्याला देत ते म्हणाले, " आम्हासच कळत नाही– असं का ? तुम्ही एकदा म्हणाला होता– तुटलंय आमचं शृंगारपूर आजपासून. त्या वेळी तुम्हाला वाटलं असेल तसंच वाटतंय आम्हास– आमचंही शृंगारपूरच तुटल्यागत!" बसल्या चौरंगीवरूनच झरोक्यातून दिसणारे रायगडाच्या भवतीचे, दूरवरचे गडशिखरांचे टोक न्याहळत राजे पुटपुटले.

एवढ्या बोलक्या–साफ, तडक येसूबाई त्याही गुमान झाल्या ते ऐकताना. काय बोलणार होत्या त्या तरी ? आबासाहेबांचे बागलाणपासून जिंजीपर्यंतचे 'शृंगारपूर' सरलष्करांच्या जाण्याने ओस झाले आहे हे त्यांनाही फार जाणवले.

मुदीच्या दालनातून बाहेर आलेल्या राजांनी रामचंद्रपंतांना याद घेतले. त्रस्त, कातावून गेलेली दिसत होती त्यांची चर्या.

रामचंद्रपंत शंकराजींच्यासह भेटीस आले. शंकराजी थोडे कचरतच आपल्याकडील एक मामला पुढे घेत म्हणाले, " देवरूखचा पिलाजी देसाई गडावर आला आहे स्वामी. त्याची.. त्याची वतनाबाबत ... "

" बस्स शंकराजी, त्याचं म्हणणं ऐकून घ्या तुम्ही. तुम्हास वाटेल तो निवाडा करा! आमच्या ... आमच्या सामनेसुद्धा आणू नका कुणाला–" राजे तुटक बोलले. प्रत्येकाला कुचंबून ठेवणारी शांतता पसरली.

" कोकणात केव्हा उतरणार रामचंद्रपंत तुम्ही ? " राजांनी विचारले.

" जी. आजच." रामचंद्रपंतांना प्रश्नाचा अंदाज आला नाही.

" जाताना थोडी वाकडी वाट करून खेळण्याला जा. तिथं कुलेश आहेत. आम्ही टाकोटाकीनं याद केल्याचं समक्ष भेटून कळवा त्यांना!"

" जी. आम्ही खासच जाऊ." सदरेबाहेर पडणाऱ्या रामचंद्रपंतांना राजांच्या मनी कोणते राजकारण खेळत असावे याचा अंदाज आला नाही. त्यांना, शंकराजींना खासा राजांना कल्पना नव्हती की मराठ्यांचा 'सालार' गेल्याची खबर औरंगजेबाला लागली होती. " सुबहान अल्लाऽ!" असं पुटपुटत त्यानं ही खुशखबर स्वीकारली होती.

गोवळकोंड्याच्या जिंकलेल्या बंदिस्त कोटात बादशहाने मरातबाचा दरबार भरविला होता. कुतुबशाही पाडणाऱ्या आपल्या आणि विजापुरी फौजेतील सरदारांना बादशहानं मन्सबी बक्ष केल्या, खिल्लती पांघरल्या. सर्वांत शेवटी आपला शहजादा मुहम्मद आझम याला खिल्लत पांघरून तो भरल्या दरबारात त्याला म्हणाला, " शहजादे, लईम संभा को नेस्तनाबूत करने हम बडे उम्मीदसे तुमको नामजाद करते हैं। फते के खबर की राह ताकते हैं।"

आपल्या आब्बाजानांच्या तलम जाम्याचे गुडघे टेकून चुंबन घेत आझमने अदबीने त्याला दिलासा दिला– " बेफिक्र रहिये मेरे आब्बाजान. जिंदा या मुर्दा पेश ही करेंगे लईमको कदमों के सामने।"

आता औरंगच्या फौजा मराठी मुलखाकडे सरकू लागल्या!! बेळगाव, सोलापूर, मिरज, अकलूज अशी पुरती उगवती धरून त्यांच्या छावण्या पसरल्या. मातब्बरखानाने तर मोठीच उचल खाऊन किल्ले पट्टागड कब्ज केला. बादशहाचे रुहुल्ला, शाबदी, झुल्फिकार, रणमस्त, नेकनाम असे वीस-एक खान जागोजाग पांगले. खिल्लत,

मनसबीचे तुकडे हाती नाचवत ते गाओगावच्या सरदारांना चुचकारू लागले. त्यांच्या पडेल खबरा येऊन रोज गडावर थडकू लागल्या.

हुकमाप्रमाणे कवी कुलेश रायगडी आले. ते स्वत:च 'का याद फर्मावलं असावं?' याचा विचार करून थकले होते. दुपारच्या निवांत वेळी ते राजांना पेश झाले.

"सालार की बात सुनी. हुक्म होते ही सेवामें पेश आये स्वामी." हंबीररावांच्या आठवणीने कुलेशही गंभीर झाले.

"त्यासाठीच याद घेतलंय आम्ही तुम्हाला कविजी. आम्हास वाटतं... वाटतं." आपल्याच विचारगुंफेत शिरलेले राजे दोन्ही तळहात एकमेकांवर घासत बराच वेळ नुसते फेरच घेत राहिले.

"कुलेऽऽश–" बऱ्याच वेळाने राजे बोलले. आम्हाला वाटतं–वाटतं कुठंतरी बळ कमी पडतंय आमचं. "फौजांचं नाही. आशीर्वादाचं."

ते ऐकताना कुलेशही विचारात पडले. म्हणाले, "हुक्म क्या है स्वामीका?"

"पाठीशी दैवीशक्ती पाहिजे कुलेश. काळ बाका आहे. आम्ही आग्र्यात होतो तसा."

"धर्मस्थल का तो अच्छा चलाते हैं स्वामी। फिर भी हमें लगता है– कुछ कठोर उपासना की जरूरत है।"

"कठोर? कसली? कोणतीही कठोर उपासना करावयास तयार आहोत आम्ही."

कुलेश विचारात पडले. रुकले.

"बोला. कसली कठोर उपासना?"

"जी. देवी की उपासना! शाक्त पंथ की धारणा... लेकिन..." कुलेश चाचपडले.

"बोला काय अडचण?" राजे त्यांची कनोजी पगडी निरखत बोलले.

"स्वामी का अभिषेक हुआ है. यह गड अभिषेकस्थळ है. छोडना पडेगा."

राजे विचारात पडले. मग म्हणाले, "ठीक आहे. सोडू रायगड. गांगोली आहे, संगमेश्वर आहे. तिकडे जाऊ. पण कठोर म्हणालात ती उपासना कसली?"

"स्वामी इस उपासनासे रणचंडी को प्रसन्न किया जाता है। उसके लिये बली देना, उपोषण, पूजा आदि विधि रहते हैं– और–"

"आणि काय? बोला कुलेश. आम्ही काहीही करण्यास राजी आहोत."

"जो इतर देव देवता का लेते हैं वैसा जल का नहीं सोमरस का तीर्थ लेना पडता है इस उपासनामें। राजासाब यह करेंगे तो गहजब होगा। इसलिये..."

"कुलेश, तुम्ही म्हणता ती उपासना आम्ही करू! तुम्हाला माहीत नाही पण दिलेरच्या गोटात गेल्यापासून– आमचा– आमचा कबिला मागे अडकून पडल्यापासून घेतो आम्ही कधी कधी मद्य. त्यानं गहजब माजायचं कारण नाही. तुम्ही तयारीला लागा चंडी-उपासनेच्या– उद्याच गड उतरून गांगोलीला जाऊ."

"जी. इस उपासना के उपचार शृंगारपूरके शिवयोगी जानते हैं।"

शृंगारपूर! राजांच्या कपाळी आठी धरली. तरीही ते म्हणाले, "बोलावून घ्या त्यांना. मनी आलं आहे तर करून टाका उपासनेचं."

कुलेश पुढच्या तयारीसाठी निघून गेले. राजांच्या उघड्या पुखर डोळ्यांसमोर हाती शस्त्र पेललेली रणचंडीची मूर्ती फिरत राहिली.

हरजीराजे कर्नाटकात घुसलेल्या मोगली फौजांचा चांगला समाचार घेत होते. त्यांच्या आज्ञेने संताजी वीस हजार फौजबळाने कांजीवरमला उतरले. मद्रासजवळ आलेल्या मोगली फौजांची हरजींच्या सरदारांशी जागोजाग गाठ पडत होती. वांदीवाशला तर मोठी लढाई जुंपली होती दुसऱ्यांदा दोन्ही सैन्यांची.

भागानगरहून निघालेल्या आझमने बेळगावचा भुईकोट विजापूरकराकडून कब्ज केला. जंग जंग केले होते तो राखण्यासाठी हंबीररावांनी.

औरंगची चाल साफ प्रकट झाली. स्वत: विजापूर गोवळकोंड्यात फिरतं राहून आपल्या मातब्बर फौजा त्याने कर्नाटकात उतरविल्या. मराठी मुलखात आझम पेरून फोडाफोडीसाठी विसावर खान फेकले.

गांगोलीला जायला कुलेशांसह राजे गड उतरले. राया-अंताला वाटले होते नेहमीसारखे आपणाला बरोबर घेतले जाईल. पण त्यांना मागेच राहण्याची आज्ञा करून खाजगी सेवेसाठी खिदमतगार पुरुषा घेण्यात आला. त्याच्याबरोबर कुलेशांच्या वाड्याकडचे निवडक वीसएक सेवकही होते. पाचाड सोडण्यापूर्वी थोरल्या आऊंच्या छत्रीचे दर्शन घेतलेले महाराज पाचाडवाड्याच्या सदरेवर आले. तिथल्या रिवाजी घाटेला नेहमीसारखा आतील टोल न दिसल्यामुळे त्यांनी वाड्याच्या निगराणीच्या हिरोजी इंदुलकरांना विचारले, "हिरोजी, घाट रिकामी ठेवल्येय ती?"

हिरोजी घाटेकडे बघत जाबाचे म्हणाले, "जी... तडा गेलाय घाटेच्या घेराला अंग धरून! दिसत न्हाई त्यो वरवरनं म्हून टोल उतरून टिवलाय!"

राजे आणि कुलेश ती लोंबकळती रिकामी घाट बघतच राहिले. राजांच्या मनी थोरल्या आऊंच्या कैक आठवणी घणघणून गेल्या. पाचाडच्या मंडळींचा निरोप घेऊन ते कुलेशांसह वेशीबाहेर पडले. गडावर निळोपंत, येसाजी, मोरेश्वर, खंडोजी सर्वांना त्यांनी त्यांच्या त्यांच्या खात्यांच्या सर्व सूचना दिल्या होत्या. आपण कुठे जातो आहोत हे मात्र ते कुणालाच बोलले नाहीत. येसूबाईंनासुद्धा. चांगोजी काटकरामार्फत गांगोलीच्या सुभेदारांना आपण येत असल्याचा स्वार त्यांनी पाठवला होता. कुलेशांनीही तसाच स्वार शृंगारपूरला शिवयोग्यांना पाठवून कळविले होते की, निरोप मिळताच शिष्यगणांसह गांगोली जवळ करावी. स्वाराबरोबर दिलेल्या पत्रात 'कठोर उपासनेचा' संकल्प कळविला होता. गांगोली नजरटप्प्यात आले. बाळ शिवाजीराजांच्या जन्माचे, येसूबाईंचे प्यारे असे हे गावठाण, राजे येणार ह्या वर्दीने येथील खास वाडा चाकरांनी बयाजीने नेटका लावला होता. कुलेशांच्या आज्ञेप्रमाणे पूर्वीच येऊन पोचलेले शिवयोगी शिष्यगणांसह

छत्रपतींना सामोरे आले. त्यांनी वाड्याच्या माजघरी दालनात रणचंडीची मूर्ती आणून पूर्वाभिमुख ठेवली होती. तिच्यासमोर यज्ञकुंड सिद्ध केले होते. जागजागी व्याघ्रचर्मे अंथरलेली होती.

कारभारी, शिवयोगी, शिष्य, कुलेश यांच्यासह राजे वाड्यात प्रवेशले. सदरेवर अंथरलेल्या खास बैठकीवर विसावले. शिवयोग्यांनी त्यांना चिपळूण, राजापूर, संगमेश्वर, देवरूख अशा भागातून खास बोलावून घेतलेल्या पंथाच्या निवडक तांत्रिकांचा परिचय करून दिला. सूर्य मेघांनी घेरला.

" हां-हूं म्हणत राजे कुलेशांना, शिवयोग्यांना दाद देत होते. पण त्यांच्या मनी फिरत होता औरंग. मध्येच त्यात येसूबाई-धाराऊंच्या बाबतचे विचार मिसळत होते. धाराऊचे बोल तर काल ऐकल्यासारखे जसेनूतसे कानात घुमू लागले. "ल्हान हाईस. जाऊ द्ये मला होळाकडं. ज्या जागेला कूस उजावली त्या जागेला ध्याई ठेवण्यासारं सार्थिक न्हाई जल्माचं."

वाड्याच्या कारभाऱ्यांनी शिवयोग्यांच्या सूचनेप्रमाणे उपासनेची सगळी तयारी करून ठेवली होती. पुऱ्या वाड्याला नंग्या तेगींच्या निवडक धारकऱ्यांचे कडे त्याने टाकले होते. शिवयोगी मुहूर्त काढतील त्या 'शुभयोगावर' कठोर उपासनेला सुरुवात होणार होती.

मधेच मलकापूरहून कुलेशांचा कारभारी त्यांना भेटायला गांगोलीला आला. त्याने मलकापूरच्या तुळाजी देसाईविरुद्ध दिवाणी बाकीबद्दल तक्रार आणली होती. देसायाला द्यायचे तांकीदपत्र सिद्ध करून कुलेशांनी कारभाऱ्याला वाटेस लावले.

'कमी पडलंय ते आशीर्वादाचं बळ' कसल्या रूपात 'रणचंडी' राजांना देणार म्हणून दूर टप्प्यावरून तुळजापूरची जगदंबा गांगोलीकडे डोळे लावून बसली होती!

□ □ □

१५

कडक उनतापीचे दिवस सुरू झाले. गांगोलीच्या माळावर उष्म्याच्या लहलहत्या झळा उसळू लागल्या. आंबा, वडाच्या घेरांखाली तान्हेली गुरेढोरे ल्हापत साकळी जवळ करू लागली.

शिवयोग्यांनी काढलेल्या मुहूर्तावर वाड्यातल्या देवीसमोर पंथाचे 'शक्तीला' आवाहन करणारे अनुष्ठान बसले. ही उपासना कठोर तर होतीच, पण ती एकान्ती असल्याने वाडा बंदिस्त झाला होता. प्रलयंकर शिवाला शक्तीच्या रूपात या अनुष्ठानाने पाचारण करायचे होते. पंथाच्या तंत्राप्रमाणे शक्तीला बळी द्यायचे होते. मंत्रोच्चारात यज्ञातील अग्नीला हवी आणि समिधा अर्पण करायच्या होत्या.

राजांना आपण 'राजे' आहोत हे परते ठेवून शक्तीचा 'उपासक' म्हणून तिला निकोप मनाने सादवायचे होते. ही उपासना धनदौलत, स्थावर, गडकोट, कब्जात आहे ते राखावे का वाढवावे यासाठी नव्हती. होती निर्णायकी युद्धातील अंतिम विजयाच्या प्राप्तीसाठी — फत्तेसाठी. जे जे नागसर्पासारखे सळसळते आहे ते ते विधिपूर्वक देवीला अर्पण करायचे होते!

या उपासनेसाठी राजांनी अंगचा राजपेहराव उतरून तबकात ठेवला. अंगी भगवी वस्त्रे धारण केली. डुईचा टोप उतरून केसावळ मुक्त सोडली. दर्पणात आपले ते रूप बघताना त्यांना त्रिमलांसोबत मथुरेहून निघताना अशीच भगवी छाटी घातलेले आपलेच बालरूप याद झाले. 'केवढा काळ मागे हटला! त्या वेळी औरंगच्या आम्याच्या कोठीतून सलामत मुलखात पोचण्यासाठी अशी भगवी छाटीच पांघरावी लागली होती आम्हास. आता तोच औरंग, तीच भगवी वस्त्रे!!"

राजे अनुष्ठानाला बसले. शिवयोग्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी सर्व विधी संपन्न केले. होय! तीर्थ म्हणून दिले ते मद्यही घेतले. रोज वेगवेगळे विधी वाड्यावर मंत्रोच्चारात पार पाडले जात होते. उपासनेचा काळ संपताच संध्याकाळी कुलेश, शिवयोग्यांसह राजे होडक्यात बसून शिवेजवळच्या डोहात पाणफेर घेत होते.

या कडक उपासनेमुळे राजे रोजानाच्या असामींपासून तुटल्यासारखे झाले होते. स्वत: कुलेश त्यांना वाड्यावर कुणालाही भेटू देत नव्हते. त्यात त्यांचा कोणताही हेतू नसताना भोवतीच्या कैकांना वाटले राजे कुलेशांच्या आहारी गेले. त्यातच शिवयोग्याबरोबर

आलेले शिष्य शृंगारापुरात परतल्यावर राजांच्या उपासनेबद्दल इथे तिथे बोलत होते. धावत्या वाऱ्यावर स्वार होऊन ते गणोजी शिर्क्यांच्या कानावर येत होते.

दुर्वांच्या मुळ्यांसारख्याच भुमकाच भुमका जिकडे तिकडे पसरल्या– "कब्जी कलुषानं राजा मुठीत घ्येतला !... राजं लई पेत्यात ! कुणाची गाठभ्येट पडू देत न्हाई त्येंची बामन !"

वळिवाच्या वावटळी उठून गेल्या. वळिवाचे एक दोन पाऊस पडले. अशाच एका पावसानंतर मातीचा मत्त दरवळता गंध पसरला. गांगोलीच्या वाड्यात, सदरेलगत बांधलेल्या चोपाळ्यावर बसलेल्या राजांना तो जाणवला. शेजारीच सुरुदार खांबाजवळ उभ्या असलेल्या कुलेशांना त्यांनी विचारले, "कविराज, किती वळीव पडून गेले असतील या धरतीवर, तिच्या जन्मापासून ! माती का तावते ? वळीव का कोसळतो तिच्यावर ? जीव उमलून टाकणारा गंध कसा सुटतो तिच्यातून ? हे आभाळ आणि धरती याशिवाय कुणाला कसे सांगता येईल ? ज्या शक्तीची आपण उपासना करतो आहोत ती पावेल ? सुटेल कधी जीवनाच्या मातीला सुगंध ?"

कवी होते तरी कुलेश ते राजबोल ऐकतच राहिले. काही जाब न सुचल्याने विषय पालटत म्हणाले, "हम सुनते हैं स्वामी, हमारे और आपके बारेमें कुछ शक सा पैदा हुआ है लोगोंमें। रिआया कहती है, आपको ... हमने मुठ्ठीमें कब्ज किया है।"

चोपाळ्याचा घेतला झोल राजांनी गपकन थांबवला. डोळे रोखले गेले त्यांचे कुलेशांवर. तुटकसे राजांनी झटकन कुलेशांना विचारले, "खुद्द तुम्हास काय वाटतं ? आहे तुमची मूठ एवढी समर्थ ?"

"क्या बोलते हैं आप स्वामी ?"

"तुम्हा-आम्हाबद्दल असे म्हणणाऱ्यांची कीव वाटते. एवढ्या थोर मुठीचे आबासाहेब पण – मनाच्या उमाळीसरसे तीही फोडून गेलो आम्ही एका काळ्या क्षणी. एवढा पुरंधर मुठीत पकडणारा दिलेर ! पण त्यालाही नाही ठेवता आले मुठीत आम्हाला ! यांचा वकूब तुमच्यात आहे असे म्हणणाऱ्यांना हसावं की रडावं ? कुलेश, समुद्रमंथनातून आलेले विष ओठांआड करणारा शंकर जगाला नीलकंठ म्हणून कधी दिसलाच नाही. त्याच्याही जिंदगीत एक 'पार्वती' असते हे पटत नाही चटकन लोकांस."

येसूबाईंच्या आठवणीने महाराज चोपाळ्याचा थांबलेला झोल पुन्हा घेऊ लागले.

मृगाने धार धरली. एरवी कुठेही असले तरी पाऊसकाळ तोंडावर आला की राजे रायगड जवळ करीत असत. या वर्षी ते अजून घडले नाही. साहजिकच रायगडावर येसूबाई, निळोपंत, येसाजी कंक, खंडोजी चिंतेने राजांची वाट बघू लागले.

गांगोलीत सदरेवर याद घेतल्या कुलेशांनी जोखीम आणि कर्तव्य म्हणून राजांच्या कानी घातले, 'बारिश शुरू हुई है। रायगढ लौटना चाहिये। स्वामी, सब लोग राह देखते होंगे !"

"कविराज, माणसं नसली तरी हा पाऊसकाळ पाठीशी उभा राहील आमच्या. खिळवून ठेवील तो औरंगच्या फौजा जागाच्या जागी. तुम्ही उपासनेसाठी याहून सबल दुसरे ठिकाण शोधा." खरे सांगायचे तर राजांना रायगडी परतावेसेच वाटत नव्हते. घडी घडी वाटत होते त्यांना की असेल तो फौजफाटा एकजाग करून थेट औरंगच्या छावणीवर चालून जावे.

राजांचा विचार ऐकून कुलेशच चक्रावले. कुठून आपण कठोर उपासनेचे व्रत बोलून गेलो असे त्यांना झाले. पण कशालाच काही इलाज नव्हता. राजांची इच्छा म्हणजे ती राजाज्ञाच होती. कुलेशांनी आपल्या दिमतीची निवडक माणसे संगमेश्वराला पाठवली. त्यांनी संगमेश्वराच्या देसायांचा वाडा योग्य असल्याची खबर आणली.

राजाज्ञेने कुलेश आणि शिवयोगी यांनी संगमेश्वराला जाऊन तिथेही पंथाच्या आणखी एका ठिकाणाची स्थापना केली. आता राजांचे मुक्काम भर पावसात गांगोली आणि संगमेश्वर असे पडू लागले. शृंगारपूर व शिर्काण भागात शिर्क्यांनी तर आवईच उठवली की, "कलुषा औरंगजेबाचा हस्तक आहे ! राजांच्या जवळ राहून तो बादशहाच्या वतीनं फितुरी करतो आहे !"

स्वत: कुलेश आता पेचेत सापडल्यागत झाले होते. राजे आपणच एकले होत चालले होते. पंथाचे सर्व विधी ते काटेकोर करत होते. तीर्थ म्हणून मद्य घेत होते. त्या सुन्न करणाऱ्या काळात त्यांना पाहिजे ते एकलेपण गवसत होते. अनेक क्षणचित्रे त्यांच्या मिटल्या डोळ्यांसमोरून सरकत जात होती. कुणालाच काय पण कुलेशांनाही ते आपल्यासमोर फार वेळ थांबू देत नव्हते. बाहेर पावसाने जागोजागच्या नद्या तुडुंब भरून वाहत होत्या. आडवळणी असलेल्या गांगोली-संगमेश्वराचा रायगडाशी जसा संबंधच तुटला होता. गडावर महाराणी व पेशवे यांच्या आज्ञेवर, कौलावर दफ्तराचे, निवाड्याचे काम चालले होते.

दोन महिने झाले. गडावरची माणसे हवालदिल झाली. आषाढाचे दिवस आले. राजांच्या फक्त खुशालीचे स्वार गडावर येत होते . गांगोली संगमेश्वरात पंथाची उपासना चालूच होती. शिवयोगी कुलेश राजांना "गडी चला – परतू या" म्हणून विनवून थकले होते. राजे कुणाचे काही ऐकत नव्हते. कुणाशीच बोलत नव्हते.

शंभुदेहात राहून त्यांचा प्रलयंकर शिवाला 'शक्तीच्या रूपात' साद घालणारा भोसलाई आत्मा, खुद्द त्यांनासुद्धा जीवनाचे टोक हाताशी गवसू नये अशा संवादात गुंतला होता. कसला संवाद ?

"पुरंधर ! जिथं आम्ही जिंदगीचा पहिला श्वास घेतला. सासवडच्या कऱ्हा नदीच्या काठी असलेल्या सोपानदेवांच्या समाधीलगतचा. केवढी फिरली ही पावलं पुरंधरावर आकार घेतल्यापासून ! आमच्या जन्मदात्या मासाहेब आम्हास नीट याद येत नाहीत. त्यांची जागा घेतली थोरल्या आऊंनी, धाराऊनं. काय योग हे ! शेवटच्या क्षणी आम्ही

नाही भेटू शकलो आबासाहेबांना, धाराऊला. थोरल्या मासाहेब आमच्या समोरच पाचाडवाड्यात गेल्या. सती गेल्या मासाहेबांना तर आमच्या हातांनीच द्यावा लागला चूड आम्हास. खरंच! मथुरेहून त्रिमलांच्या सोबत मुलखाकडं यायला निघतानाच गवसतो आम्ही पेरल्या पहाऱ्यांच्या तावडीत तर? पन्हाळ्यावर आम्हाविरुद्ध रचलेला विषप्रयोगाचा कटाव सफल होता तर? करता जेरबंद दिलेरच आम्हास आपल्या गोटात तर? केवढ्या प्राणघाती कृष्णच्छायेतून गेली ही हयात!

"गडकोट, जामदारखाने, खजिने यांची, रायगडाच्या सिंहासनावरची हवस वाटली आम्हास? उगाच सख्ख्या बहिणीला पाठमोर होऊन आमच्या पाठीशी उभे राहिले हंबीरराव? उगाच दिली त्यांनी आपली लाडकी ताराऊ आमच्या एका शब्दाखातर रामराजांना? का म्हणून आले शहजादा अकबर आणि दिलेरचा भाऊ मिरबातखान आम्हाकडं? समर्थ म्हणाले, 'आबासाहेबांहून विशेष ते करावे.' आम्ही ते मानलं का? नाही. का? आबासाहेब आकृती – आम्ही केवळ सावली हे बरं समजून आहोत आम्ही.

"येता औरंगजेब फौजबंद होऊन आबासाहेबांच्या हयातीत दक्षिणेत तर जाते त्यास शरण ते? कधीच नाही. दुर्गाबाईंच्या रूपे जो गुदरला तसा प्रसंग औरंगच्या बेट्यावरही कधी गुदरू नये असेच का वाटत आले आम्हास?

"हा औरंगचा आणि आबासाहेबांचा-आमचा खाजगीचा जंग आहे? नाही. दोन वृत्तींचा जंग आहे, असं एकल्या आम्हासच का वाटतं? पाण्यात ढेकळं विरघळावीत तसं मी मी म्हणणारे का होतायत या दौलतीस पारखे? की त्यांनाही वाटतं ही एकल्या भोसल्यांची दौलत आहे म्हणून? नवरात्रात जगदंबेचा गोंधळी तिला आळवताना ऐकलं आम्ही – 'कुठवर पाहू वाट – माझ्या नेत्रा भरला ताट ...'

"कशाच्या पाठबळावर जगत असतो, धडपडत असतो माणूस? का? आज तेच बळं कमी पडलं असं का वाटतं आहे? मामासाहेब हंबीरराव गेले म्हणून? लगतच्या दोन्ही शाह्या पडल्या म्हणून? साऱ्यांनी एकजुटीनं कंबर कसली तरी निभाव लागू नये अशा औरंगसमोर आमचीच माणसं आम्हाला पारखी झाली म्हणून?"

सवालाचे शेपूट धरून सवाल खडे ठाकत होते. त्यांची उकल व्हावी असा जाब मात्र गवसत नव्हता. बाहेर आषाढी पावसाखाली मावळमाती कशी झोडपून निघत होती.

"तुम्ही छंदोगामात्य असाल, कुलएख्त्यार असाल पण आम्ही महाराणी आहोत. गडावर पेशवे आहेत. पाऊसमाऱ्यातून गनिमफौजा मुलखात दौडताहेत. मोक्याच्या गडकोटांना घेर पडताहेत. आणि तुम्ही... तुम्ही स्वारींना गडाबाहेर काढून ऐषारामात! कोण मजाल ही?" रायगडाच्या दरुणीमहालात अनावर संतापाने लालेलाल झालेल्या येसूबाई उभ्या देही थरथर कापत होत्या. त्यंचे ते रूप बघून दिमतीच्या कुणबिणीही थरकून गेल्या. त्यांनी राणीसाहेबांना 'असं' कधीच नव्हतं बघितलं.

समोर उभे कवी कुलेश ते राजबोल ऐकूनच लटलट कापू लागले. काय जाब द्यावा हे न सुचल्यामुळे त्यांची गर्दन खाली गेली होती. खांद्यावरचे गुलाबकाठी उपरणे थरथर कापत होते. खास खबरगीर पाठवून येसूबाईंनी त्यांना संगमेश्वराहून तातडीने बोलावून घेतले होते. पेश येताच जबानीवर घेतले होते.

"परंतु रानीसाब – हमारी सुनिये – हम." कुलेश बोलू बघत होते. महाराणी त्यांचा एक शब्दही ऐकूनं घेण्याच्या मन:स्थितीत नव्हत्या. स्वत:शी बोलाव्या तशा त्या कुलेशांना सुनावीत होत्या. बेलाग फडाफड बोलत होत्या.

"पावली चंडी? झाला तिचा कृपाशीर्वाद? कधीच का केली नाही अशी उपासना आमच्या आबासाहेबांनी? केवढं होतं गुदरलं त्यांच्यावर? तुम्ही कवी म्हणवता – कसा शिरला कली तुमच्यात?"

येसूबाईंच्या कानीही उठलेल्या आवया पडल्या होत्या. अंगाचा तिळपापड झाला होता त्यांचा त्या ऐकून. मध्येच थांबवून त्या कवींना कुडीभर न्याहाळत होत्या. संशयाने.

"कलुशा बादशहाचा हस्तक आहे!" ही कानी पडलेली जहरी बातमी तर त्यांच्या मनी टिटवीसारखी कर्कश केकाटत होती. काय बोलावे – कसे बोलावे त्यांना समजेना.

"आमच्या कानी आलंय तुमचं कर्तुक. बादशहाच्या वतीनं फितवा करून स्वारीला भलत्याच वाटेस लावणारी तुमची हवस जाणून आहोत आम्ही. शरम कशी वाटली नाही तुम्हास स्वामींच्या खाल्ल्या अन्नाचे असे पांग फेडताना? त्यांच्याशी खेळ ही आमच्याशी गाठ आहे हे समजून असा छंदोगामात्य!" असह्य संतापाने, कोंडीने येसूबाईंना नीट बोलताही येईना.

अंगभर चरकलेल्या कुलेशांचे डोळे डबडबून आले. डुईवरचा पगडीघेर त्यांनी डुलविताच आसवांचे दोन थेंब त्यांच्या डोळ्यांतून उडाले. काय केले नव्हते त्यांनी दौलतीसाठी? मथुरेहून राजांना बालपणी सुखरूप पाठविण्यात त्यांनी थोरल्यांना निष्ठेने, धोका पत्करून मदत केली होती. राजांच्या वतीने शहजादा अकबरासह फिरंगी दरबारात वकिली जमवून तह साधला होता. जीव गलबलून उठला त्यांचा. झटकन पुढे होत त्यांनी राणीसाहेबांचे पायच धरले. त्यांनाही धड बोलवेना.

"रानीसाऽब, चाहे तो गर्दन उडा देना हमारी। हम ... कुलदेवताकी शपथ लेते हैं चरणोंमे ... हम – हम बेमान नही। कुछ भी कीजिये ... हमारे राजासाब को, बडे स्वामीके इस दौलत को बचाइये।" लहान मुलासारखे छंदोगामात्य स्फुंदू लागले.

येसूबाई सुन्न झाल्या ते ऐकताना. झाल्या प्रकारात कुलेशांचा दोष नव्हता. असता तर ते राणीसाहेबांच्या भेटीलाच आले नसते. ते आलेच नसते तर मागचा पुढचा कसलाही विचार न करता निळोपंत, खंडोजींना फौजबंदीने धाडून त्यांना जेरबंदच केले असते येसूबाईंनी.

मग दोष होता तरी कुणाचा? राजांचा? एवढे ब्ऱ्हाणपूर ते पणजी घोडे फेकणारे,

प्रत्यक्ष औरंगलाच पिछाट घ्यायला लावणारे राजे. त्यांच्याबद्दल असे म्हणायची शामत तरी होती कुणाची? दोष असलाच तर होता सभोवार पसरलेल्या असंख्यात कोत्या मनांचा. लालचावलेल्या कैक जिवांचा. हाती पेटती मशाल द्यावी आणि वर धरायला कोणतेच छत न देता ऐन पावसात उभे करून ती तेवती ठेवा असे सांगावे तशी गत झाली होती राजांची. कुणी केले होते हे! जगदंबेनेच. नाहीतर 'आशीर्वादाचं बळ कमी पडतंय' असे तरी का यावे त्यांच्या मनी?

येसूबाई काहीच बोलल्या नाहीत. मनोमन काहीएक पक्का निर्णय घेऊन त्या दालनातून निघून जाताना कुलेशांना एवढेच म्हणाल्या, "आता आमच्या जागी तुम्ही आहात. सावलीसारखे स्वामींच्या पाठीशी असा. आजच गड सोडा."

कुलेश संगमेश्वरला येऊन पोचले. लागलीच त्यांना राजांची आज्ञा झाली. "तुम्ही टाकोटाक खेळग्यास दाखल व्हा. शिर्काणांत काही गडबड दिसते. त्यावर ध्यान ठेवा. मामला घरचा आहे. प्रसंगी आम्हाला लिहा. आम्हीच सोडविला पाहिजे तो." राजांच्या कानीही शिर्क्यांनी उठविलेल्या आवया व त्यांच्या संशयास्पद हालचाली आल्या होत्या. बेळगावचा कोट जिंकून कोल्हापूरकडे सरकलेल्या शहजादा आझमला गणोजी, कान्होजी भेटत होते. घटकाघटका त्याच्याशी कसलातरी गुफ्तगू करीत होते.

आज्ञा मिळाली तरीही कुलेश महाराणींच्या सूचनेप्रमाणे राजांच्या जवळच राहिले. संगमेश्वर गांगोलीच्या वाड्यात समद्य शक्तीची पूजा चालूच होती. ती कधी थांबणार की नाही असे भय निर्माण झाले. संगमेश्वरचे देसाई, गांगोलीचे कारभारी, खिदमतगार पुरुषा, एवढेच काय पंथाचे अधिकारी प्रत्यक्ष शिवयोगी कुणीच राजांसमोर काही बोलू धजत नव्हते. कुलेशांची तर अडकित्त्यात सापडलेल्या सुपारीगत अवस्था झाली होती.

राजे कुणाशीच काही बोलत नव्हते. अवतीभवती सेवा करणारे एकदोन खिदमतगार सोडले तर दुसऱ्या कुणाला थांबू, फिरकू देत नव्हते. त्यांच्या एकाच बाबीवर स्वत:शी खल चालला होता, "हे राज्य आम्हा एकल्याचंच आहे का? तसं नसताही तसं का वाटतं आहे?" सवाल उठत होता, साद काही मिळत नव्हती.

ऐन समोरची चंडी त्यांना नानारूपात दिसताना भासू लागली. कधी ती जगदंबेचे रूप घेत होती. कधी थोरल्या मासाहेब, धाराऊंचे रूप धारण करीत होती, कधी तिच्या डोळ्यांतूनच समर्थ आणि आबासाहेब रायगडाच्या महाद्वारातून बाहेर पडल्यागत दिसत होते. कधी तोफगोळा आदळून तिच्या छातीच्या ठिकऱ्या होऊन आसमानात उडताना दिसत होत्या – हंबीररावांसारख्या!!

वाहून-घडून गेलेले सारे प्रचंड गतीने त्यांच्या डोळ्यांसमोर धावत होते. एरव्ही कुणाचेही काळीज चरकून जावे असा तो पट होता. पण शेतकऱ्याने शिवाराकडे, बांधाकाठी राहून बघावे तसेच राजे आपल्या उभ्या हयातीकडे तिऱ्हाईतपणाने बघत होते.

न कचरता, मनाचा टवका उडू न देता. पुन:पुन्हा त्यांच्या डोळ्यासमोर येऊन थिरावत होती ती फक्त एकच एक मुद्रा – आबासाहेबांची! पन्हाळ्यावर अखेरची ऊरभेट घेताना, हात पसरते करून कवेत घेऊ बघताना म्हणणारी, "लेकरा, कुठं गेला होतास?"

जामदारखान्याचा, अंबरखान्याचा तपास घ्यावा तसे त्यांचे मन आपल्या उभ्या हयातीचा तपास घेत होते – "ज्या तडकाफडकी आम्ही दिलेरच्या गोटात जाऊन आबासाहेबांस पारखे झाले त्यानं – त्यानंच खचले ते. आबासाहेब, केवढा थोर कलंक घेतला आहे आम्ही एवढ्या बाबीनं आमच्या हयातीवर. निघेल कधी काळी तो धुऊन? मिळेल ती संधी?" राजमनात कसली भिंगरी फिरते आहे याची ना कुलेशांना, ना शिवयोग्यांना, एवढेच काय प्रत्यक्ष चंडीलाही कल्पना नव्हती!

आता सरत्या पावसाळ्यावर श्रावणसरींचा खेळ सुरू झाला. पुरी कोकणपट्टी पिवळ्या, हिरव्या कुरणांच्या लाटांनी क्षणात उजळून निघू लागली, क्षणात झाकाळून जाऊ लागली. या वेळी विजापुरात महामारीची साथ पसरली होती. भागानगरात देखणा, बांडा तानाशाहा आपल्या नेक सरदारांसह दोरखंडांनी जखडबंद होऊन औरंगजेबाच्या कोठडीत अस्वस्थ फेर घेत होता.

रायगडाहून उधळलेला खबरगिरांचा म्होरक्या नाईक बहिर्जी श्रावणसरी अंगावर घेत धापावत संगमेश्वरला देसायांच्या वाड्यात शिरला होता. जिवाची बाजी लावून त्याला दौलतीचा ताईत पुन्हा नेऊन रायगडाच्या दंडात बांधायचा होता. महाराणींचा अतिमोलाचा कठोर, कडक तसाच एकदम खाजगतीचा खलिता त्याने संगती आणला होता. कुणाची पर्वा न करता चिंताक्रांत बहिर्जी खांद्यावरची कांबळी खोळ मुठीत घट्ट पकडून थेट देसायांच्या वाड्यात चंडीच्या दालनात घुसला.

यज्ञकुंडाजवळ भगवी वस्त्रे नेसून बसलेल्या राजांना बघून चरकून क्षणैक थांबला. केवढी पालटून गेली होती राजांची मुद्रा! श्राद्धाचे विधी पार पाडण्यासाठी उभ्या राहिलेल्या आप्तेष्टांसारख्या दिसणाऱ्या कुलेश, शिवयोगी आणि शिष्यगण यांच्याकडे ढुंकूनही न बघता न राहवून म्हणाला, "धनी ऽ, गडास्नं आलुया पाऊसपान्याचं. ऊर फुटेतो: वळी दिलीया हीं रानीसायबांनं. म्होरं घालून घेऊनच यायला सांगितलंय धन्यास्नी." बहिर्जी रिवाजाचा जोहार द्यायलाही विसरला होता.

राजे बैठकीच्या व्याघ्रचर्मावरून उठले. यज्ञकुंडाजवळून बहिर्जीकडे चालले. शिवयोगी, कुलेश, शिष्य पुरुषा एवढेच काय प्रत्यक्ष चंडीचेही काळीज धडाडले. आता नायकाची खैर नाही असेच सर्वांना वाटले. थोरल्यांपासून बहिर्जींनी केलेली नेक चाकरी सारे जाणून होते. सुरतेपासून मद्रासपावेतो भुईचा चकता पायांखाली घेतला होता बहिर्जींनी दौलतीच्या सेवेसाठी. येसूबाईंच्यासाठी तर गणोजी पारखे झाल्यापासून त्यांचीच जागा घेतली होती बहिर्जीने. सख्ख्या भावाची. येसाजी कंकासारखी डुई, ओठांवरची केसावळ पांढरी झाली होती बहिर्जी नाईकांची भोसल्यांच्या सेवेत. राजांना येताना बघून चरकले नाहीत ते एकले बहिर्जीच.

आता राजे काही बोलणार तोच सय झाल्या बहिर्जीनं झटकन वाकून पायच धरले त्यांचे. डुईवरचे रामोशी पागोटे हालवून गद्गदत म्हणाला तो, "आन हाय बिरूबाची. ल्य झाली ही ताकदीची पूजा. धनीच असं एकलं हुतो म्हणालं तर मुलुखाच्या आयाबापड्यांनी बघावं कुणाकडे? बास झाली ही चंडी, तकडं जगदंबा इदूळ धरनं वाट बगतीया. चला बघू आमासंगे. नायतर टाका या म्हाताऱ्याला ह्या कुंडात."

राजांच्या हातातली समिधांची छोटी जुडी गळून फरशीवर पडली. चंडी, कुंड, बहिर्जी असे ते टकमक बघू लागले. ते कमरेत वाकले. सर्वांना वाटले पडली मोळी उचलायला ते झुकलेत. पण त्यांनी आपल्या दोन्ही पायांवर डोके भिडवून ते डावे उजवे डोलवीत स्फुंदणाऱ्या बहिर्जींच्या पाठीवर तळहात ठेवला. सूर्यबिंबातून किरण सुटावेत तसे तुटक बोल बहिर्जींच्या कानी पडले, "नाईक, कुचाचा सरंजाम ठेवा. तुम्हा संगतीच निघू आम्ही गडी." खांदे धरून त्यांनी बहिर्जीला उठते केले. त्याने दिलेली खलिता वळी स्वत:च खोलून त्यावर नजर फिरविली. डोळ्यांसमोर लिखावट फिरली त्यांच्या. श्रींच्या राज्यासाठी श्रीसखींनी रेखलेली –

"– झाली तितुकी चंडीची भक्ती पूजा पुरे झाली. एक चंडी स्वारीस पाऊन शक्ती देते तर काय? अवघा मुलुख शक्तिपात झाल्यागत झाला आहे. देखतपत्र, स्वार होऊन नायकसमेत निघोन यावे. ना तर – ना तर आम्हीच निघोन येऊ. आबासाहेबांनी दिधली शिक्केकट्यार आणि श्रीसखी ही मुद्रा यज्ञकुंडात टाकून आम्ही पंथाचे भक्त होण्यासाठी गड सोडून तिकडेच येऊ!"

छत्रपतींनी हातचा खलिता मुठीतच आवळला. त्यांच्या आज्ञेप्रमाणे खासातळ हालविण्याच्या तयारीला सगळे लागले. कुलेशांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. आपल्या दिमतीसह खेळण्याची वाट धरली.

या वेळी विजापूरच्या शाही मशिदीत नमाज पढून आलेला औरंगजेब आपल्या वजीर असदखानाला सांगत होता – "हमने कसम ली है आज नमाज पढते समय कुराने शरीफकी। सेवाके बच्चेका ये तख्त बिखोबुनियाद उखाड देंगे जैसा यहाँ, गोवलकोंडामें लगाया वैसा लगा देंगे चांदतारोंका निशान रायगढपे। शहजादे आझमको लिखो संबापर जासूद फेको, उसका पिछा जारी रखो।"

बालेकिल्ल्याच्या तटबंदीबाहेर मात्र महामारीने मेलेल्या गरीब आदिलशाही रयतेची प्रेते चुपचाप कबरस्तानाकडे नेली जात होती.

गांगोली-संगमेश्वर दोन्ही ठिकाणच्या पंथस्थानातील मूर्ती सांगता करून राजाज्ञेने हलविण्यात आल्या. व्याघ्रचर्माच्या वळ्या काखोटींना मारून शिष्यगणासह आले तसे शिवयोगी निघून गेले. पंथाचे एक प्रचंड वादळ स्रजजीवनात घोंघावत डोकावून सरकून ठेवून गेले. शंभुमनात शक्तिशाली शिवाचा भक्तिभाव जागा झाला होता तो तसाच रेंगाळता ठेवून गेले.

रायगडी आलेले राजे निळोपंतांनी कानी घातलेल्या तपशिलाने बेचैन झाले होते. पेशव्यांनी खालमानेने राजांच्या कानी घातले होते की, "होनगड हसनअलीखानानं आणि त्र्यंबकगड मातब्बरखानानं पाडला आहे." मतलब साफ होता. मोगलांनी नाशकापर्यंत धडक दिली होती.

जिकडे शिर्क्यांच्या बंदोबस्तासाठी कुलेश निघून गेले होते त्या खेळणा व प्रचितगड भागात नागोजी माने व मुलतफितखान यांचे जोडतळ पडत होते. प्रचितगडावरच्या नेक किल्लेदाराने त्यांच्याशी हातघाई करून प्रचितगड राखला होता.

निजामशाही मोडताच आदिलशाहीकडे जाताना ज्या माहुलीचा किल्ल्यावर थोरले महाराज शहाजीराजे यांनी आसरा घेतला होता त्या माहुलीचा किल्लेदार स्वराज्याला हूल देत होता. किल्ल्याच्या भवती फटका टाकणाऱ्या अब्दुल कादर या मोगली सरदाराशी तो संधान बांधू बघत होता. भरपेट इनाम दिले तर किल्ले माहुली त्याच्या घशात सोडायला तयार झाला होता.

कानी पडणाऱ्या एका एका वार्तेने राजमन कुरतडले जात होते. त्यातच कुडाळचे देशाधिकारी निळकंठ नारायण राजांच्या भेटीस आले. त्यांनी तर चक्क तह केला होता. कसला? तर आमचे कुडाळचे वतन 'बादशहानी राखून चालवावे. आम्ही कोकणपट्टीचा वरकड मुलूख जिंकून बादशहास द्यावयास तयार आहोत' असा.

गडी आल्यापासून महाराजांची येसूबाईंशी भेट झाली नव्हती. कशी व्हावी? पंथाचा सल दोन्ही राजमनांत खुपत होता. हटता पावसाळा धरून मोगलांच्या हालचाली वाढल्या होत्या. विजापूरहून औरंगजेबाचे शहजादा आझमला कोल्हापूर-मिरज भागात खलित्यावर खलिते जात होते. हंबीरराव पडताच राजांनी सरलष्कर म्हणून नामजाद केलेले म्हलोजी घोरपडे पन्हाळ्याच्या आसऱ्याने शहजाद्याच्या चाली थोपवीत होते. खंडोजी, पेशवे, खबरगीर यांनी कानी घातलेले बारकावे छत्रपती मनाशी घोळवीत होते. वर्दी घेऊन आलेल्या चांगोजी काटकराने त्यांची तंद्रा तोडली. तो म्हणाला, "कल्याण प्रांतांचे सूर्याजी आन् बोपजी प्रभो आल्यात भेटाय." चांगोजीला इजाजत देऊन राजांनी प्रभुबंधूंना भेटीस बोलावून घेतले. प्रभूंनी परगणे साक्से, पंचमहाल, पेण येथील आपल्या जमिनींच्या कथल्यांची बाबत राजांना सांगितली. शांतपणे प्रभुबंधूंचे बोलणे ऐकून राजांनी न्यायाधीश प्रल्हादपंतांना निवाड्यासाठी बोलावून घ्यायला सांगितले.

पंत आले. बारकाव्याने पाहिले असते तरच त्यांची मुद्रा कावरीबावरी आहे हे कुणालाही कळून येते.

"या प्रभुबंधूंची काय चलबिचल आहे बघा न्यायाधीश?" राजे कसल्यातरी विचारात असल्याने सादिलपणे म्हणाले. प्रभूंना निरखत न्यायाधीशांनी नि:श्वास टाकला.

"या. आम्हा सोबत दफ्तरात" असे प्रभूंना म्हणून प्रल्हादपंत जायला वळले.

"वादळवाऱ्यातही झाडेपेडे डुलली तर चालतात पण मुलखातले कडे थरकून नाही भागत असे बोललो होतो आम्ही तुम्हाला एकदा न्यायाधीश. ते ध्यानी ठेवून यांचा निवाडा करा." राजे त्यांना सूचना म्हणून म्हणाले. ते ऐकून, "जी" म्हणताना पाठमोऱ्या प्रल्हादपंतांच्या पापण्या फडफडल्या, डोळ्यांच्या बाहुल्या क्षणैक गरगरल्या.

औरंगजेबाचा, त्याने पेरलेल्या खानांचा, फितलेल्या जागजागच्या किल्लेदारांचा, फोंडा, कुडाळ, कारवार येथील देसाई, सावंत, दळवी यांचा विचार करत महाली फेर घेणाऱ्या राजांकडे कुणबीण रूपा पेश होऊन म्हणाली, "रानीसाब येत्यात."

राजमन ढवळून गेले. किती विषय होते बोलायला! भाषा कोणती? किती आरोपसफाया होत्या! कुणीतरी ढकलल्यासारखे राजे आपसुकच झरोक्याशी झाले.

येसूबाई आल्या. त्यांनी महालभर नजर फिरविली. महालातले पहारेही मतलब पकडत बाहेर निघून गेले. विचित्र शांतता दोन राजमनांत कुचमून पडली. गळ्याच्या घाट्यापर्यंत आलेले शब्द थडकून परतत मनातच पडू लागले. "एक सांगण्यासाठी आलोत आम्ही." येसूबाई घोगरल्या. राजांनी वळून नुसते श्रीसखींच्याकडे बघितले.

मान डोलवीत येसूबाई म्हणाल्या, "ऐकावं आमचं. शरमिंद्या आहोत आम्ही. ज्या वजेनं शृंगारपुरानं माहेराकडून स्वारींच्याबाबत आवया उठविल्या त्या कानी आल्या आहेत आमच्या."

"येसूऽ..." आभाळात वळीव भरून यावा तसे शंभुनेत्र डवरले. पुन्हा शांततेने पंख फाकले. काय बोलावे दोघांनाही साधेना. डोळ्यांसमोर गणोजी, आणि पिलाजी यांच्याच मुद्रा उभ्या राहिल्या दोघांच्याही.

"आमच्या गुणं खूप तापदरा झाली आहे तुम्हांस. बोलली शृंगारपूरची माणसं काही तरी वाटत नाही त्याचं एवढं तुम्हाकडं बघताना." झरोक्यातून दूरवर दिसणाऱ्या आभाळाच्या निळाईत नजर रोवत राजे संथ, घोगरट म्हणाले.

"तसं काही उणंदुणं बोलायचा अधिकार नाही आमच्या दादा, आबांना स्वारींबाबत. शिवारातला पेरा मागं टाकतो कुणबी, तसं झालं. घडलं मागं टाकावं स्वारीनं. आबासाहेब आणि स्वारी जोडीनं अडकून पडली आग्ऱ्यात त्याहूनही बाका प्रसंग आहे सांप्रत. गनिमांनी चौफेर पाय पेरलेत, आणि आपल्यांनी मात्र ते फिरविलेत!" बोलल्या येसूबाई मनाच्या कढाने भरून आल्या. आवाज धरल्याने क्षणभर रुकल्या.

"याद आहे तुम्हाला? रानवाऱ्याशी बाशिंग बांधलंय आम्ही असं म्हणाला होता एकदा तुम्ही." राजे पाठमोरेच म्हणाले. पसरले पंख शांततेने अधिकच फुलविले.

"जातात कधी आमचे बाळराजे रामराजांच्या वाड्यात? बोलतात ते त्यांच्याशी घरच्यासारखं?" तो विषयच तोडावा म्हणून राजांनी विचारले.

"जी." रामराजे, ताराऊ आणि बाळराजे यांच्या बिल्वदलासारख्या तीन मूर्ती डोळ्यांसमोर तरळल्याने येसूबाईंनी हुरूपाने दाद दिली.

बराच वेळ राजे आणि येसूबाईंचे बोलणे चालले. महालात आलेले रोषणनाईक कोनाड्या-कोनाड्यांतील पलोते हातच्या दिवल्यांनी शिलगावून गेले.

असेच कुडाळच्या भुईकोटातील बैठकमहालातील पलोते भकभकत होते. त्यांच्या उजेडात लोड-गिरद्यांच्या बैठकीवर बसलेले खेमसावंत, जलालखान आणि दुलबा नाईक यांच्याशी खलबतात गेले होते. कसल्या? तर दौलतीतल्या चंदगड तरफेच्या किल्ले पारगडावर चालून जाण्याच्या!

आता थंडीने अंग धरायला सुरुवात केली. खंडोजी, निळोपंत, चिमणगावकर यांना याद घेऊन राजे एवढ्या पडझडीच्या काळातही गावोगावच्या वतनदारांना खलिते पाठवीत होते. जे खाशा वकुबाचे होते त्यांना शंकराजी, निळोपंत, खंडोजी कुणी ना कुणी सोबत घेऊन जातीने भेटत होते. साऱ्यांना पिळवटून सांगत होते, "दोन दिवसांचा गनीम, त्यासी साथ देते होऊ नका. जसा आमचा रामसेज झुंजला तसे हरगावकूस निकरानं लढते ठेवा."

येसाजी कंक, रूपाजी भोसले, बारदरमल, संताजी जगताप, जानराव, धनाजी यांच्या अटीतटीने चौफेर पांगलेल्या तळांना राजे भेट देत होते. विचारला तर हरजींना कर्नाटकात अचूक सैन्यचालीचा सल्ला स्वारामार्फत तातडीने धाडत होते. औरंगच्या टोळधाडीसमोर त्यांना ना मराठी मुलूख, ना कर्नाटक डळमळू द्यायचा होता. परत आलेले सर्जेराव जेधे नेकीने चाकरीला लागले होते. पन्हाळा, खेळणा, राजापूर असा पट्टा धरून म्हलोजी, कुलेश, गंगाजी दादाजी सावधानगीत होते. पुरंधर, पुणे, वाई, सातारा भागात बाजी घोलप, विनायक उमाजी, येसाजी मल्हार, कोनेरे रंगनाथ असे मर्दानि हत्यार परजून ठाकेठीक होते.

अशाच एका थंडीच्या दिवशी येसूबाई आपल्या स्वारीच्या आवडीचे वाफारते, गरम हुलग्याचे माडगे कटोऱ्यात घेऊन राजांच्या भेटीस आल्या. त्यांनी कटोरा चौरंगीवर ठेवला. त्यातून उफाळत्या वाफांकडे बघत राजांनी त्यांना विचारले, "किती दिवस झाले नाही माडग्याला?" झटकन कटोरा उचलून स्वारीच्या हातात देत येसूबाई म्हणाल्या, "स्वारीचं ध्यान नसतं खाण्याकडं आताशा. बघावं चाखून जमलंय का." राजांनी माडगे चाखले. हसून ते म्हणाले, "छान जमलंय." आणि मग हातच्या वाडग्याकडे ते बघतच राहिले.

"हे काय?" येसूबाईंनी नाराज होत विचारले.

"नाही. आम्ही विचार करतो आहोत, कितीतरी मोहिमांचे बेत आखले असतील आबासाहेबांनी असं माडगं चाखत असताना. तुम्ही आम्हाला दिलं तसंच देत असतील माडगं आमच्या मासाहेब आबासाहेबांना. बोलताना बोलले असतील दोघेही केवढंतरी जिवाभावाचं!"

ते ऐकताना आपल्या स्वारींच्या मासाहेब कशा दिसत असतील याचा अंदाज ताडण्यासाठी येसूबाई राजांच्या मुद्रेकडे निरखून बघू लागल्या. मोठे गमतीदार होते ते चित्र. हातच्या कटोऱ्यात आपले आबासाहेब आणि मासाहेब यांचे रूप मनोमन बघणारे छत्रपती आणि त्यांना तसे बघणाऱ्या महाराणी. येवढ्यात राया-अंताच्या हातांना धरलेले बाळराजे आपल्या दोघा काकांना काही तरी विचारीत महालात प्रवेशले.

आल्या आल्या त्यांनी तक्रारच गुदरली. "त्या काका महाराजांच्या वाड्यात आम्ही जाऊ तेव्हा नेमके न्यायाधीश आणि दोन असामी असतात. आम्ही गेलो की बोलायचंच थांबतात. का ? आमचं येणं आवडत नाही त्यांना ?"

ती बाल-तक्रार ऐकताना महाराज गंभीर झाले. "न्यायाधीश रामराजांच्या वाड्यात का जात असावेत ? छे ? कानी पडणाऱ्या फितव्यांच्या खबरांनी आपलं मनच कातर झालं आहे." मनी आला शक त्यांनी झटक्यात उडवूनही लावला.

राया-अंताकडून बाळराजांना आपल्या जवळ घेत त्यांना थोपटून म्हणाले, "तुम्ही आपले आपल्या काकीसाहेबांनाच जाऊन भेटत चला. तिथं असणार नाहीत कुणी अशी मोठी मंडळी." ताराऊंच्या उल्लेखाबरोबर राजांच्या मनी हंबीररावांची मुद्रा खडी ठाकली. वाईच्या लढाईत ते गेलेत असे अजून मन घेतच नव्हते. पेटल्या टेंभ्याच्या तेवत्या ज्योतीभोवती निळसर प्रकाश-कड थरथरताना दिसावी तशी सरलष्कर हंबीररावांची मुद्राच राजनेत्रांसमोर खडी ठाकली. तीच तिन्ही टाकं उचललेली लाल पिळाची दुईची घेरदार कंगणी पगडी, ओठावरून फिरून गालावरच्या कानकल्ल्यात मिसळून गेलेले भरदार मिश्यांचे कंगोल, कपाळीचा गंधटिळा, कानातले चमकते सरलष्करपदाचे मानकरी डौलदार सोनचौकडे, मूळची लालबुंद पण पल्ल्याच्या दौडींनी रापलेली रातांब्यागत दिसणारी करडी पण भाबडी मुद्रा. राजे हंबीररावांच्या आठवणीतच डुंबून गेले.

बाळराजे त्यांना कितीतरी वेळ सांगत राहिले, "महाराजसाहेब – महाराजसाहेब, तुम्हाला नेलं होतं थोरल्या आबांनी लहानपणी उत्तरेकडं. खूप ऽ दूर. तुम्ही नाही ना नेत कधी आम्हाला गडाखाली. आम्हाला स्वप्न पडलं होतं –"

बडबड्या बाळराजांना पुन्हा राया-अंताच्या हवाली करताना राजांनी विचारलं, "आमच्या धाराऊची छत्री कापूरहोळात उभी झाल्याचं कैकदा बोललात. पण दर्शन घ्यावं ते जमलं नाही. एकदा जावं म्हणतो होळाकडं. कोणकोण आहे तिकडं ?"

"जी. समदी हाईत. आम्हा दोगांचं कबिलं, म्हातारा, पोरंठोरं." धाराऊच्या दुधाळ आठवणीने सारेच विचारगत झाले.

कुतुबशाहीचे भागानगर पडून एक साल उलटले. बागलाण, खानदेश, वऱ्हाड, पुणे, सातारा, पन्हाळा दौलतीची उगवती धरून जागजागी औरंगचे फौजबंद सरदार पांगले होते. आता त्याला आदिलशाहीचा सर्जाखान, फिराजजंग आणि असेच दोन्ही शाह्यांचे

काही सरदार मिळाले होते. तरीही फितुरीने काही गडकोट घशात घालण्याशिवाय त्याच्या पदरात फारसे काही पडले नव्हते.

राजांच्या आरमारी फळीने टोपीकर, फिरंगी-हबशी आपल्या जरबेत ठेवले होते. औरंगजेब मनोमन ताडून होता की जसा विसापूर, गोवळकोंड्यावर दिला तसा नुसता फौजी रेटा देऊन 'शिवा संभा' चा हा मुलूख दस्त होणार नाही. दोन सालंपूर्वी त्याने याचा अनुभवच घेतला होता. त्यासाठी शहजादा आझमला धारेवर धरून तो बजावीत होता. "पिछा करो, चाहे जितने दिनार खर्च करो लेकिन मरहठोंका सुबेदार दस्त करो। जिंदा या मुर्दा पेश करो। यूँ उसका मुल्क गिर जायेगा।"

राजांनीही हे मनोमन ताडले होते की, औरंगची ताकद माणसे फोडण्यात आहे. त्यासाठी ते एवढ्याशा कामगिरीसाठीसुद्धा संबंधितांचा मरातब करत होते. चहूबाजूचे गाव अन् गाव अटीतटीने मोगल फौजांशी झुंजत होते. नेहमीची खबरगिरांची टप्प्याने जुळत येणारी साखळी तुटल्यागत झाली होती. तरीही खंडोजी, निळोपंतांचे स्वार राने तुडवीत ठाण्याठाण्यावर आज्ञापत्र पाठवीत होते.

राजांनी आज्ञा केल्याप्रमाणे सुरनीस शंकराजी, कोकणपट्टीचे अधिकारी रामचंद्रपंत, मुजुमदार नारायण रघुनाथ अशा शेलक्यांनी गड जवळ केला.

राया-अंताला सांगितल्याप्रमाणे हुजुरातीची सिबंदी घेऊन राजे रायगड उतरले. संगती खंडोजी, नारायण रघुनाथ आणि राया-अंता होते. वरंदा घाटाने सर्वांसह राजे कापूरहोळाकडे चालले. राया-अंताने खासे धनी येताहेत अशी आगेवर्दी होळाकडे धाडली होती.

चंद्रावतावर मांड घेतलेले राजे जनावर धिम्या चालीवर असतानाच खंडोजींना म्हणाले, "फिरंगाणाच्या स्वारीवरून परतल्यावर आम्ही तुम्हाला पालखीचा मान दिला खंडोजी. तुम्ही कधी पालखीत मात्र बसलेले दिसला नाहीत ते ?"

"जी. स्वामींनी पालखी दिली पण – पण" दौडते खंडोजी बोलताना रुकले.

"पण काय ?"

"पण आमच्या पायाला भिंगरी बांधली आहे त्याचं काय ?" खंडोजी हसत उत्तरले.

पुरंधरचा शिखरटाक दिसू लागला. गाड्यांचे कापूरहोळ आले. राजे येणार म्हणून पुरंधरहून आलेले बाजी घोलप होळाच्या शिवेवर सामोरे आले.याच बाजींनी सर्जेराव जेध्यांना फिरून दौलतीत आणण्याच्या कामी मदत केली होती.

सर्वांसह राजे राया-अंताच्या वाड्याकडे चालले. राजांच्या मनात धाराऊच्या कैक मुद्रा फिरू लागल्या. गाड्याच्या वाड्याच्या दारात मंडळी येताच राजांच्या मनात जपून ठेवलेले आठवणीचे पळसपान फडफडले. राया-अंताच्या बायका वाड्यातून पाण्याच्या भरल्या कळश्या घेऊन बाहेर आल्या. सोनेरी तोडा असलेल्या राजांच्या चंद्रावताच्या खुरांवर त्या त्यांनी ओतल्या. राजे पायउतार झाले. धाराऊच्या सुनांनी त्यांना निरांजनांनी ओवाळले. त्यांच्या कपाळी कुंकुमटिळा भरला.

आज राया-अंता भरून पावले होते. पाणथरल्या डोळ्यांनी आपल्या धन्यांना बघू लागले. कैक दिवसांची आस होती त्या भाबड्या, कुणबाऊ, गाडेबंधूंची. आज ती पूर्ण होत होती. दोघाही भावांना वाटत होतं, "म्हातारी असाय पायजे हुती आज."

समर्थांच्या घुमटीतील रेखलेल्या चित्रातील रामलक्ष्मणागत दोघेही गाडेबंधू माणूसमेळ्यात उभे होते. थोरल्या रायाला, राजांनी आपली हनुवटी छातीशी नेत मानेने बोलावले. रायाला प्रथम ते उमगलेच नाही.

"राया ऽ" हलकी राजसाद आली. "जी" म्हणत राया पुढे झाला.

"ढाल उतरा रायाजी, पाठीची." शंभुबोल ऐकताच राया-अंतासह नारायण रघुनाथ सोडून बाकीचे सर्वजण चरकले. शंका आली साऱ्यांना की, "काय झाली आगळीक रायाची की त्याला शिपाईगिरीच्या चाकरीतून बडतर्फ केले राजांनी ?"

थरकलेला राया तर न राहवून पुटपुटला, "धनी ऽ, पर ..." त्याच्या हातातली ढाल थरारली.

राजांनी तिरके होत फक्त नारायण रघुनाथांकडे पाहिले. ते एका स्वारासह पुढेसे झाले. स्वाराच्या हातात सरपोसबंद तबक होते. रायगडाहूनच आणले होते ते. राजांनी चिमटीने सरपोस ओढून घेतला. तबकातील सोनमाया उन्हाच्या तिरपेत कशी झळाळून उठली. पुरे तबक सोनेरी होनांनी भरले होते. त्या तबकातच राजनेत्रांना थकल्या उमरीची धाराऊ दिसू लागली. ती जशी म्हणत होती, "... माज्या दुदाच्या लेकरा."

राजांनी हातातले तबकच रायाने पसरलेल्या ढालीत ठेवले. ते घोगरले, "राया, आऊंच्या छत्रीवर एक घाट बसवून घ्या! रोज दुबार तिचे टोल होळात कानी पडू द्यात. चला तिकडे."

राया-अंता ढालीतल्या तबकाकडे बघतच राहिले. पुढे होत अंताने रायाला ठोसरले. राया त्याचा अचूक माग ताडत लगबगीने म्हणाला, "कशापायी हे धनी आम्हास्नी ? नगं ह्ये." शिवेवरून वाहत असलेल्या होळासारख्या मनाच्या रायाने परते करण्यासाठी ढालीसह तबक पुढे केले.

हातस्पर्शाने ते पुन्हा मागे लोटताना राजांच्या तर्जनीतला पुखरखडा किरणांत तळपून उठला. ओठांतून त्याहून तळपदार बोल सुटले, "राया-अंता, अंगची कातडी उतरवून तिच्या मोजड्या करून पायी घातल्या असत्या आऊच्या तरी नसती झाली भरपाई तिनं ओठाआड सोडलेल्या दूधधारांची. राहू द्या हे."

सर्वांसह राजांनी धाराऊच्या छत्रीचे दर्शन घेतले. तिच्यावरच्या पादुकांना माथा भिडविताना उगाच त्यांना वाटले, "पुरंधरापेक्षा लगतच्या ह्या कापूरहोळात उपजतो आम्ही तर किती ब्येस होतं!"

गाड्यांच्या वाड्यावर एक मुक्काम टाकून राजे रायगडी परतले.

"बादशहा फौजेसह विजापूरहून हलला स्वामी. शहजादा आझमची कुमक करायला त्याच्या फौजा अकलूज जवळ करताहेत." निळोपंतांनी बादशहाची हालचाल महाराजांसमोर ठेवली.

"जिंजीहून हरजीराजांनी धाडलेले संताजी मुलुखात पावले आहेत. पन्हाळ्यावर ते आपल्या जमावानिशी तळ टाकून आहेत." खंडोजींनी हरजीराजांची हालचाल दिली.

दोन्ही तपशील ऐकून छत्रपती त्यावर विचार करू लागले. तो आझमच्या मदतीने मिरज कोल्हापूर मार्गे पन्हाळ्यावर उतरण्याच्या विचारात असेल का ? ह्या विचाराने ते खंडोजींना म्हणाले, "चिटणीस, पन्हाळ्याला म्हलोजीबाबांना स्वार द्या– औरंग पन्हाळा पटात घेण्याच्या बेतात दिसतो. तुम्ही-संताजी बरे हुशारीनं असा."

"पंत, तुम्ही सोलापूर, अकलूज प्रांतात चलाखीचे नजरबाज पेरा. औरंगची प्रत्येक हालचाल समय जाया न करता बिलाकसूर आम्हास पावली पाहिजे." पेशवे खंडोजी कानी पडणाऱ्या आज्ञा ध्यानपूर्वक ऐकत होते. कल्याण भिवंडी भागातून आलेले येसाजी कंक राजांच्या भेटीस आले. वय झाले होते आता येसाजींचे. ते राजांना म्हणाले, "आम्हास्नी आता नवी जोखीम द्यावी एखांदी!"

येसाजींना निरखून आवाजात हल्लक भरत राजे म्हणाले, "कंककाका खरे तर विश्रामाची उमर तुमची. तुम्ही – तुम्ही आता रायगड सोडून जाऊ नका कुठंच. केव्हाही गड उतरावा लागतो आम्हास. तुमच्या जोगं जाणतं, वकुबाचं कोण आहे दुसरं ?"

म्हातारे कंक आपल्या छत्रपतींना "जी" म्हणून न्याहाळत राहिले. त्यांना थोरल्यांची सय झाली. त्यांचा कृष्णाजी तर गोव्याच्या स्वारीत दौलतीच्या कामी आलाच होता. पोराच्या आठवणीला लिंपण घालून येसाजींनी ती बुजवूनही टाकली होती. महाराजांना शब्द देत ते म्हणाले, "थोरल्यांच्या गडाची चिंता नसावी महाराज. लागली गरज तर बोरगाव तर्फेला सातारा प्रांतात असलेल्या जाधवांच्या धनाजीस्नी घेऊ बोलावून. खाशास्नी भिंगरीगत चौमुलूख तुडवाय लागतो हे जाणताव आम्ही."

"काका, हंबीरराव गेले तेव्हापासून, का कुणास ठाऊक खूप एकलं वाटतं आम्हास. केवढा डोंगराएवढा आधार होता मामासाहेबांचा आम्हास!" हंबीररावांच्या आठवणीने राजे-येसाजी दोघेही ढवळून निघाले.

"खंडुबाची इच्छा त्येला कोन काय करनार ? किती बघितलं या म्हाताऱ्या ध्यायीनं. अजून काय काय बघा ऐकायची नौबत हाय कळत न्हाई." येसाजी स्वत:शीच बोलल्यागत बोलले.

"काका, पेशव्यांच्या संगती दफ्तरात जा. कृष्णाजींच्यासाठी इनामपत्रांचे कागद सिद्ध झाले आहेत. ते घेऊन जा. आमची याद म्हणून ही कृष्णाजींच्या छत्रीवर ठेवा." राजांनी हातातील तर्जनीची अंगठी येसाजींच्या समोर धरली.

रांगडे येसाजी गडबडून गेले. न राहवून म्हणाले, "हे आम्हास्नी नगं. घालायची कुनी ही बोटावर ? आन् असतं कुनी तर हिंमत बी झाली नसती त्येची."

राजांनी अंगठी पुन्हा स्वत:च्या बोटात बसती केली. येसाजी, निळोपंत, खंडोजी निघून गेले.

विचारगत झालेले राजे दरुणीदालनात आले. शिसवी मंचकावर बसून कुणाशी तरी बोलत असलेल्या येसूबाई वर्दी मिळताच चाललेले बोलणे तोडून सावरून खड्या झाल्या होत्या. त्या बोलत होत्या कुलेशांच्या कबिल्याशी. राजे त्यांना बघून परत जायला निघाले. येसूबाई ते ताडून म्हणाल्या, "तसं खास नाही, सादिलच बोलतो आहोत आम्ही. स्वारीनं यावं." तरीही राजे क्षणैक घोटाळले. येसूबाई तपशिलाने म्हणाल्या, "छंदोगामात्यांची वाजपूस करीत होतो आम्ही यांच्याकडे. ते पन्हाळा-खेळणा फिरते राहून बरी नजर ठेवून आहेत शिर्काणावर."

महाराणी आणि राजे यांची बोलण्यात अडचण होऊ नये म्हणून कुलेशांचा कबिला येसूबाईंना, "चलते हैं हम." म्हणत झटकन दालनाबाहेर निघून गेला.

थोडा वेळ शांतता पसरली. दोन्ही राजमनांत शिर्के, औरंगजेब, कोकणपट्टीचे बंडखोर वतनदार, हंबीरराव यांचेच विचार फिरू लागले.

"काय खबर आहे कुलेशांची शिर्काणाबाबत?" राजांनी समोरच्या झरोक्यातून दूरवर दिसणाऱ्या डोंगरकडेला निरखत शांतता फोडली.

"छंदोगामात्यांचे आणि शिर्क्यांचे काहीतरी बिनसलेलं दिसतंय असं म्हणत होत्या बाई." आज येसूबाईंनी आपल्या माहेरचा उल्लेख 'शिर्के' असा केला. राजांना तो जाणवला.

"कोण वजेनं बिनसलंय?" राजांनी तपशील समजण्यासाठी विचारले.

"ते नाही समजलं." येसूबाई त्याच्या कारणाचा अंदाज करीत म्हणाल्या. त्यांची चर्चा चालली आहे तो राजांना कसलीतरी याद होऊन ते म्हणाले, "कारभारी कुठं तुमचे? त्यांना सांगा येसाजी दाभाड्यांना वर्दी द्या म्हणावं, आम्ही रामराजांच्या भेटीस येतो आहोत." रामराजांच्या नावाबरोबर दोन्ही राजमने डहुळली.

"का चाललीय स्वारी रामराजांकडं? कळलं नाही आम्हास," येसूबाईनी विचारले.

राजांच्या मनात एक विचित्र विचार फिरून गेला– "पन्हाळ्यावर आम्ही दस्त होतो तर? बसते रामराजे गादीवर तर?" डोंगरकडे निरखणारी आपली नजर तोडत राजांनी येसूबाईंच्यावर जोडली. त्यांना जाब देण्याऐवजी उलटच विचारले, "काय वाटतं तुम्हास रामराजांबद्दल?

"समजलो नाही आम्ही." येसूबाई गोंधळल्या.

"आमच्या जागी रामराजे बसते तर? बसलो असतो तुम्ही आम्ही पन्हाळ्यावर सुभेदारी तुकडा मोडत तर?"

ध्यानी-मनी नसलेला सवाल राजांच्या तोंडूनच आलेला ऐकून येसूबाई चक्रावल्या. म्हणाल्या, "भलत्या वेळी हा कसला सवाल स्वारींच्या मनी?"

येसूबाईंचे खासगीचे कारभारी आले. त्यांच्याकडे रामराजांसाठी महाराणींनी वर्दी दिली आणि चालता विषयच तोडण्यासाठी त्या वेगळीच बाब पुढे घेत म्हणाल्या,

"मिरजेला ठाण झाला शहाजादा स्वारींच्या मुक्कामाचा माग काढण्यासाठी पन्हाळा भागात खानामागून खान पेरतो आहे अशी खबर आहे. कुठल्याही मुक्कामात स्वारीनं हूल देण्याची खबर घ्यायला विसरू नये."

ते ऐकताना राजे हसले म्हणाले, "किती काळजी करता आमची? एवढी तुमचे दादासाहेब दौलतीचे करते, फलटणकर त्यांना साथ देते, अर्जुनजी-अचलाजी औरंगाबादेऐवजी गडाची वाट धरते तर– जाऊ द्या. आम्ही भेटून येतो रामराजांना."

बाहेर पडणाऱ्या राजांना रूपा कुणबीण व भवानीबाई यांच्यासह येताना बाळराजे दिसले. त्यांना जवळ घेऊन थोपटताना राजे म्हणाले, "येणार काकीसाहेबांच्याकडं? बाळराजांनी होकाराची मान डुलविताच रिवाजी पहाऱ्यात रामराजांच्या वाड्याकडे जायला निघाले. जसे मनात फिरून जाऊ लागले त्यांच्या तसा त्यांचा हात सोबतच्या बाळराजांच्या खांद्यावर भिरू लागला. मनात अनेक सवाल उठले, एकमेकांवर थडकू लागले. "कसे वागतील पुढे जाऊन हे आपल्या हयातीत काका-काकूंशी? का वाटत नाही आम्हास फरक यांच्यात व रामराजांच्यात?"

रामराजांचा वाडा आला. येसाजी दाभाडे राजांना सामोरे आले. त्यांच्यासह राजे वाड्याच्या बैठकी दालनात प्रवेशले. एका मंचकावर बसलेले रामराजे उठते झाले. पुढे येऊन त्यांनी आपल्या दादामहाराजांची पायधूळ मस्तकी घेत बाळराजांना राजांपासून आपल्याजवळ घेतले. लालसर गौर वर्णाचे रामराजे बघताना राजांना त्यांच्या मासाहेबांची आठवण झाली. "काय ऋणानुबंध होता त्यांचा आमचा? केवढं घडू नये ते गेलं घडून त्यांच्यामुळं? या रामराजांच्या बाबत मात्र काहीच का आलं नाही उणं-वावगं मनात? ज्या डोळ्यांनी आमचे हंबीरराव बघत आले यांच्याकडे तसंच आम्हीही नाही का बघितलं?"

"ताराऊंना घ्या बोलावून." बाळराजांचे खांदे थोपटणाऱ्या रामराजांना छत्रपती म्हणाले. ऐन बांड्या उमरीच्या रामराजांचे गाल लालावले. त्यांनी येसाजींना नजर दिली. येसाजी अंत:पुरी दालनात जाऊन ताराऊंच्यासह आले. ताराऊंनीही राजांची पायधूळ घेतली. हंबीररावांच्या आठवणीने हातचा पदरशेव तोंडात घेऊन ताराऊ हमसू लागल्या. दालनभर कोंदवा करणारी शांतता पसरली.

"सुमार व्हा. आम्हीहून आलोत भेटीला ते खास बाबीनं. कोणी काही - कोणी काही सांगतील तर उभयता तिकडं ध्यान देऊ नका. प्रसंग पडला तर याहून अधिक पणास लावावं लागेल तुम्हा आम्हाला. काही वावगं घडलं-खटकलं तर आमच्या श्रीसखींना हमेशा बिनासंकोच विचारत चला. आम्हाला केव्हाही गड उतरावा लागतो. गनिमफौजा चौफेर पांगल्या आहेत." राजांचा शब्दन् शब्द अंगी हंबीररावांचे रक्त वागवीत असलेल्या ताराऊ खंबीरपणे ऐकत होत्या.

रामराजांच्या वाड्याबाहेर पडताना राजांनी येसाजींना आपल्या संगती येण्याची इशारत केली. बाळराजांसह जाणाऱ्या पाठमोऱ्या, राजांकडे रामराजे आणि ताराऊ किती तरी वेळ बघत राहिले.

किल्ले खेळण्यावरून शिर्काणात उतरलेले कुलेश शिबंदीसह शृंगारपूरच्या वेशीवर आले. त्यांनी आपला खाजगीचा कारभारी चार-पाच स्वारांसह गणोजींच्या भेटीसाठी गावात पाठविला. कुलेश राजांच्या वतीने शिर्क्यांशी रदबदली करायला आले होते. कसेही झाले तरी शिर्के मंडळी येसूबाईंच्या माहेरची माणसे होती.

आपल्या कारभाऱ्याची वाट पाहत कुलेश वेशीवरच थांबले. त्यांना माहीत होते, शिर्के औरंगजेबाचे मनसबदार झालेत. तरीही त्यांना भरोसा वाटत होता – वडिलधारे पिलाजी आपल्या गणोजी, कान्होजींची समज पाडतील. अटीतटीच्या या बाक्या समयी अजूनही विचार करतील. राजांच्या पाठीशी राहतील.

कुलेशांचे कारभारी शिर्क्यांच्या वाड्याच्या सदरेवर आले. ही तीच सदर होती. जिथली सुर्व्यांच्या गादी आबासाहेबांनी सिद्दी जोहरच्या वेढ्याच्या वेळी सुर्व्यांनी जोहरला मदत केली म्हणून, 'वाडे-हुडे बांधतात. बसकणी तयार करून गनिमास सामील होतात' म्हणत संतापाने लाथेच्या ठोकरीने उधळून लावली होती. याच सदरेवर सुर्व्यांच्या वतीने नेकीने लढणाऱ्या पिलाजी शिर्क्यांना त्यांनी आपल्या पदरी घेतले होते. याच वाड्यातून शिर्क्यांच्या येसूबाई भोसल्यांची सून म्हणून बाहेर पडल्या होत्या.

शिर्क्यांच्या कारभाऱ्याने आत जाऊन वर्दी दिली. आता उतारीला लागलेले पिलाजी सदरेवर आले. त्यांना कुलेशांच्या कारभाऱ्याने आपण कोण, कशासाठी आलोत याचा तपशील दिला.

पिलाजींच्या मनी केवढेतरी रामायण फिरून गेले. येसूबाईच्या आठवणीने त्यांचे मन हेलावले. थोरल्या महाराजांची आठवण त्यांच्या मनी जागी झाली. 'कसलं वतन ? ही कोण इमानदारी की दोन दिसांचा मुगल त्याच्या पाठीशी व्हावं ? एवढ्या बिकट समयाला पोरीचं कुंकूबळ एकलं टाकावं ? कोण हुताव आम्ही ? कुना गुणं एवढं तालेवारीचं झालाव ?'' ते निर्धाराने म्हणालेही, ''वेशीवरच का थांबलं कब्जी ? ह्यो वाडा काय परका न्हाई. मेळाजोळाचं काय असंल ते बोलू की बसून निवांत.''

कुलेशांच्या कारभाऱ्यांच्या मनी आशा पालवल्या. ते म्हणाले, ''आम्ही परत जाऊन त्यांना घेऊनच येतो.'' ते जायला वळलेही. एवढ्यात मध्यम वयाचे, भरदार छाताडाचे गुणोजी मुजरे घेत सदरेवर आले. त्यांच्या अंगी ईदलशाही माटाचा हिरवा कंच जामा होता. त्यांची मुद्रा येसूबाईशी बरीचशी मिळतीजुळती होती. फरक एकच होता, येसूबाई देवमहालातील देव्हाऱ्याच्या तेवत्या निरांजनासारख्या दिसत तर गणोजी मावळमाचीवर भकभकत पेटत्या पलोत्यासारखे! ते येताच सदरेवर जरब पसरली.

''काय आबा, कुनास्नी आनतो म्हंत्यात हे ?'' गणोजींनी भुवई वाकडी करून कुलेशांच्या कारभाऱ्यांना निरखत पिलाजींना विचारले. त्यांच्या चौकशीला शिर्क्यांच्या कारभाऱ्यांनी सगळी माहिती दिली. ''का ऽ य ? त्यो कब्जी पुरात ? कशापायी बलवता त्येला वाड्यावर आबा ? का घेतलं त्यानं तुमास्नीबी मुठीत ?'' गणोजी संतापाने कुलेशांच्या कारभाऱ्यांकडे बघू लागले. म्हणाले, ''सांगा तुमच्या धन्याला, हे शिरकान हाय म्हनावं, संगमेसुर न्हवं.''

''छंदोगामात्य राजांकडून आलेत. काही खास निरोप आहे राजांचा. ऐकून घ्यावा तो.'' कुलेशांचे कारभारी नम्रपणे म्हणाले. ते ऐकताच गणोजी केवढ्याने तरी त्यांच्यावर कडाडले. ''कोन राजे ? ह्ये शिरकानं हाय, इथले राजे शिर्के. न्हाई चालत दुसऱ्या कुनाचं राजेपन हितं. सांग त्या कब्जीला, बऱ्या बोलानं आला तशी जनावरं मागं पिटाळा म्हनावं! डोळे विस्फारलेल्या गणोजींना संतापाने धड बोलवेना.

सदरेवरचे त्यांचेच चाकर चरकले. कुलेशाचे कारभारीही काय बोलावे या विचारात पडले. कसे तरी म्हणाले, ''असं भलतंच मानून कसं चालेल ?''

''भलतंच ? इदल कुतुबशाही पाडणाऱ्या बादशांनीच केलंय नामजाद आम्हास्नी! काय पाड लागतो भोसल्यांचा त्येंच्या म्होर दिसलंच लौकर. तुमचा कब्जीच हाय आतल्या अंगानं बादशहाकडं! आम्हास्नी वरवरनं चाचपून बघायलाच आलाय!''

कुलेशांचे कारभारी ते ऐकताना हादरलेच. ''निघतो आम्ही.'' म्हणत मान खाली घालून बाहेर पडले. पिलाजी त्यांना थांबविण्यासाठी म्हणाले, ''थांबा कारभारी थोडं.''

''आबा, रायगडावर झालेली शोभा विसरला वाटतं ? काय दिला होता जाब भोसल्यांनी शिरकानाबाबतं हे तुम्ही इसरला असलात तरी आम्ही न्हाई इसरलो.'' गणोजी त्यांनाच रोखत म्हणाले.

आता मात्र वडिलकीच्या अधिकाराने पिळवटलेले पिलाजी म्हणाले, ''भोसले काय म्हणाले ते न्हाई मोलाचं. पोर दिलीया घराला त्या. कसं इसरायचं ते ?''

''त्या 'पोर' नाहीत तुमची. 'रानीसाब' हाईत दौलतीच्या! तुम्ही मानता पर त्या न्हाईत मानत तुम्हास्नी.'' गणोजींनी पिलाजींचे बोलणेच खुंटते केले. आल्या कारभाऱ्याला जरब देत ते म्हणाले, ''शिरकानात आल्या माणसाला दस्त करायची रीत न्हाई शिर्क्यांची, सांगा तुमच्या कब्जीला.'' कुलेशांच्या कारभाऱ्यांच्या पाठीवर गणोजींची करडी जरब पडली.

सुन्न कारभारी मान डुलवीत कुलेशांच्याकडे जाग्रला निघाले. हताश पिलाजी येसूबाईंना आठवत 'वागजाईची इच्छा' म्हणत सदर सोडून आत गेले. गणोजी सदरेवरच संतप्त पायफेर घेऊ लागले. बाहेर शिवारावर देख टाकून आलेले कान्होजी वाड्यात शिरले. त्यांना झाल्या प्रकाराची काहीच कल्पना नव्हती. त्यांना बघताच, कारभाऱ्याकडून धाडल्या निरोपाने कदाचित कुलेश पुरावर चालून येतील या शंकेने

गणोजी त्यांना पुन्हा बाहेर पिटाळत म्हणाले, "जो असंल त्यो घोडा घ्या पागेचा. कब्जी शिवेवर थांबलाय पुराच्या त्येला पिटाळा." आणि स्वत:च गणोजी पुराच्या पावलोकांची शिबंदी घेऊन त्यांना कुमक करण्यासाठी निघाले.

दोघा शिर्के बंधूंनी शिवेवर थांबल्या कुलेशांच्या फौजेच्या पाठलाग करून त्यांना शिरकाणाबाहेर हुसकावून लावले. खेळण्यावर परत येताच आपल्या चिटणीसाला कलमी सेवेवर घेत झाल्या प्रकाराची वार्ता राजांना कळविण्यासाठी संतप्त, अस्वस्थ, हैराण झालेले कुलेश कनोजी बोलीत मजकूर सांगू लागले –

"राजश्रिया विराजित स्वामी के चरणोंपें – आज्ञापालक छंदोगामात्य दंडवत विशेष -

रायगडावर या वेळी देवमहालातील सांजारती झालेल्या कुलदेवतेला - वाघजाईला तळहाती पदरशेव घेऊन नमस्कार करताना 'दौलतीच्या राणीसाब' मनोमन नेहमीसारखे म्हणत होत्या – "पुराची सारी माणसं सुक्षेम ठेव! वय झालंय आबांचं. एकदा घडव भेट त्यांची!"

आणि कोल्हापूरच्या आझमाशहाच्या तळावरून या वेळी 'मरहट्टोंका राजा, मोजदा संभा पनालेपर है' अशी खबर लागल्याने शेख निजाम दख्खनी आणि त्याचा मुलगा इखलास किल्ले पन्हाळ्यावर चालून जात होते!

□ □ □

१६

कुलेशांचा खलिता खंडोजी वाचू लागले –

"शिरकाणात झाल्या बोलाचालीत गणोजी शिर्क्यांशी भांडण झाले. कुमकबंदीनं ते आमच्या तळावर चालून आले. माघार घेत आम्ही खेळण्यावर ठाण झालो आहोत. तवान्या कुमकेनिशी खासे आल्याशिवाय शिर्क्यांची बाब उकलत नाही. मनचं बोलणं ते होत नाही. वाट बघतो आहोत."

इदल, कुत्बशाही डुबवून, त्यांच्याच फौजा दिमतीला घेऊन चौवाटांनी औरंगच्या फौजा मुलखात उतरल्या होत्या. "काय करावं? रायगड या बाक्या समयास सोडावा? कुलेश लिहिताहेत तेही वाजवी आहे. तेच काय पण दुसरे कोणीही गेले तरी हिंमत होणार नाही त्यांची शिर्क्यांशी हातघाई करण्याची. हा अस्तनीतला सल निपटायला आम्ही – आम्हीच उतरायला पाहिजे शिरकाणात." गोव्याच्या स्वारीत खाडीत वाहतीला लागलेल्या जनावरासह आपणाला प्राणबाजी लावून वाचवणाऱ्या खंडोजींना छत्रपतींनी निरखत विचार केला. "धाडावं खंडोजींना शिरकाणात? छे ऽ –" सदर सोडून ते अंत:पुराकडे चालले. हारीने उभ्या सात महालांची कड धरून उभा असलेला सतीचा खांब आला. तो बघताच मासाहेब - पुतळाबाईंच्या आठवणीने त्यांच्या मनात चितेवरच्या पुतळाबाईंचे बोल फिरून गेले. "कधी प्रसंग आलाच तर आमचं हे रूप ध्यानी ठेवा. पुत्र आहात तुम्ही आमचे."

अंत:पुर येताच राया-अंता बाहेरच रुकले. आत येताच भवानीबाईंचा घोडा करून त्यांच्या पाठीवर बसलेले बाळ शिवाजीराजे नजरेस पडले. महाराज तो नजारा बघतच राहिले. स्वारींना बघून लगबगीने पुढे होत येसूबाईंनी बाळराजांना उतरून घेतले. ते बघून महाराज म्हणाले, "का उतरलेत त्यांना? किती साजरे दिसत होते ते चढ्या आसनावर?" बाळराजांना जवळ घेत शिर्क्यांची बाब येसूबाईंच्या कानी कशी घालावी म्हणून छत्रपती घोटाळले. ते अचूक हेरून येसूबाईच म्हणाल्या, "खेळण्यावरून खलिता आल्याचं आलंय कानी आमच्या! काय निवाडा आहे स्वारींचा?"

"खंडोजींना पाठवावं म्हणतो आम्ही तिकडे." महाराजांनी निर्णय दिला.

"आम्हास वाटतं ... खुद्द स्वारीनंच उतरावं शिरकाणात. ही घरची बाब. खंडोजी कचरतील तिथं, आम्हाकडं पाहून!" येसूबाईंनी खरे तर महाराजांच्या मनाचाच निवाडा दिला.

"श्रीसखी राज्ञी जयति" या दिल्या मुद्रेचा अर्थ सार्थ करणाऱ्या येसूबाईंकडे महाराज बघतच राहिले.

दिवसफुटीवर महाराज रायगड सोडून शिरकाणात उतरण्यासाठी सज्ज झाले.

पाचाडपागेत पाच हजार घोडा आणि पावलोक सिद्ध झाला होता. पेशवे निळोपंत, रामचंद्रपंत, खंडोजी, चांगोजी, राया-अंता अशा मेळासह शिर्क्यांशी हत्यारझोंबी वेळ पडली तर घ्यायची म्हणून ते सिंहासनचौकातील सिंहासनासमोर आले. हेच ते सिंहासन होते, ज्याच्यावर बसणे सोपे होते, पण त्याची जोखीम पेलणे फार फार अवघड होते. 'याच सिंहासनाच्या प्रतिष्ठेसाठी खुद्द आबासाहेबांनी आम्हास आरोपित म्हणून पेश घेतलं होतं. पेलेल ही जोखीम आम्हास?' विचारच विचार मनी भरून आलेल्या महाराजांनी सिंहासनासमोरच्या चरणासनाला हात भिडवून तो कपाळी नेला. निरोपासाठी ते येसूबाईंच्याकडे चालले. एकलेच. सोबतचा माणूसमेळ सिंहासनचौकातच थांबला.

काही भलेबुरे घडू नये म्हणून जगदंबेला मनोमन साकडे घालून येसूबाई देवमहालातून बाळराजे व भवानीबाई यांच्यासह नुकत्याच खासेमहालात आल्या होत्या. स्वारी समोर येताच त्यांना म्हणाली, "गडावर जातीनं देख ठेवा. आम्ही नाही इथं."

घरच्या झगड्याने केवढे रामायण घडते, कर्ते पुरुष कसे घायाळ होतात हे जिजाऊंच्या तोंडून कैकवार ऐकलेल्या येसूबाई "सांभाळून असावं." म्हणत तळहाती पदरशेव घेऊन तिबारीचा नमस्कार आपल्या कुंकूबळाला करू लागल्या. महाराजही त्यांचे बोल ऐकताच गंभीर झाले. काही न बोलताच समोरच्या श्रीसखीला डोळाभर निरखताना त्यांना स्पष्ट दिसून गेले की त्यांच्या हातात बाळराजांच्या जन्मावेळी गांगोलीत दिलेली पुखरखड्याची अंगठी दिसत नव्हती! त्यांना दिलासा यावा म्हणून ते म्हणाले, "निर्धास्त असा. शिर्क्यांशी कमी अधिकाचं नाही वागणार आम्ही. पण ... पण अंगठी दिसत नाही हाती तुमच्या आम्ही दिलेली?"

"जी. टवळ्याचं नेजं उचकटलंय तिच्या. घडाईला टाकलेय ती सोनारशाळेत."

"येसू, बिघडले तर अलंकार टाकता येतात नव्या घडाईला. माणसाचं काय? जाऊ द्या. तुम्ही खूप हुशारीनं असा गडावर. औरंगच्या फौजा फिरताहेत चौफेर, येतो आम्ही." महाराजांनी बाळराजांचे पाठवान थोपटले. येसूबाईंनी दिले भवानीचे तीर्थ ओठांआड करताना आपल्या भवानीबाईंना ते हसत म्हणाले, "तुमचं तीर्थ घेतो आहोत!" भवानीबाई लाजल्या. येसूबाईंनी बाळराजे आणि भवानीबाई डावे उजवे बिलगते घेतले. सिंहासनचौकातील माणूसमेळ संगती घेऊन महाराज रायगड उतरले.

खेळण्याच्या बालेकिल्ल्यात कुलेश महाराजांना शिर्क्यांचा तपशील देऊ लागले. "शिर्के नहीं मानते आपको स्वामी!"

विचार काय आहे त्यांचा कविजी? महाराजांनी कुलेशांना विचारले.

"जी. शिर्के खुदको औरंग के नामजाद, शिरकानके 'राजा' मानते हैं. सुना है, रामराजाको हाथ लेकर बगावत करनेका इरादा है उनका।"

"काय ...?" आठ सालांपूर्वी ज्या बाबीने घडू नये ते घडल्याचे बघायला मिळालेल्या महाराजांना तीच बाब आता पुन्हा ऐकायला मिळत होती.

"कौनसे भी ताकतपर तुले है शिर्के! बातचीतमें हमसे झगडा हुआ। – हथियार लेकर हमपर टूट पडे। खेलना लौटना पडा।"

"कविजी, खुद्द आम्हीच चालून जाऊ शिरकाणावर! त्यासाठीच सोडला आहे आम्ही रायगड. तुम्ही आमच्या फौजेची जातीने देखभाल बघा." राजे निर्धारी बोलले.

दोन दिवस महाराज खेळण्यावर विचारात होते. त्यांच्या येण्याची चाहूल शिर्क्यांनाही लागली होती. गणोजी, कान्होजी, सारे शिर्केबंधू शिरकाण बांधून तयारच होते. महाराजांच्या मनात पिलाजींच्या अनेक अठवणी फिरत होत्या.

ज्या शृंगारपुरात जामात म्हणून इतमामाने जावे, तिथे तिसऱ्या दिवशी सैन्यबंदीने चालून जावे लागले राजांना. औरंगला मिळालेले शिर्के तयारच होते. खूप अटीतटीची लढाई झाली शिरकाणात. शिर्क्यांची शिकस्त झाली. गणोजी, कान्होजी तर फौज टाकून कोल्हापूरच्या रोखाने पळूनच गेले. पिलाजी कुठे गायब झाले तेही कळले नाही. आबासाहेबांनी याच पिलाजींना ते सुर्व्यांकडे असताना त्यांची नेक मर्दानगी बघून जवळ केले होते. शृंगारपूरतर्फेला जोडून दिले होते. खुद्द महाराजही आबासाहेबांनंतर पन्हाळ्याहून रायगडी गेले तेव्हा रायगड पटात घेण्याचे पाठबळ दिले होते पिलाजींनी. या सर्वांहून ते श्रीसखी-येसूबाईंचे वडील आहेत या जाणिवेने मनाचे पान कातरले राजांच्या. शिरकाणाच्या बंदोबस्तासाठी शिबंदी मागे ठेवून ते खेळण्याकडे निघाले.

खेळण्यावर येताच कुलेशांसह गडफेर टाकताना शिरकाणावर नजर ठेवणारा खेळणा डागडुजीला आलाय हे फार जाणवले त्यांना.

"डागडुजी करून घ्या पुऱ्या गडाची, कुलेश." राजाज्ञा म्हणून ते बोलून गेले. पण ... "प्रसंगी गडाची करता येते डागडुजी. पण गणोजींसारख्या आप्तेष्टांची कशी करावी?" हे मनात आलेले ते बोलणार होते तरी कुणाला?

"इथे राहूनच शिरकाणावर चोख नजर ठेवा कविजी. आम्ही निघतो पन्हाळा, बत्तीस शिराळा, सातारा वाईमार्गे महाड घाटानं रायगडाला." असे कुलेशांना सांगून एक मुक्काम करून महाराज खेळण्यावरून पन्हाळ्याला आले.

तो हाच पन्हाळा होता ज्याच्याशी राज्यांच्या कैक आठवणी जखडल्या होत्या. या इथेच आबासाहेबांची अखेरची भेट झाली होती. शिवपिंडीचे दर्शन करून बाले किल्याच्या सदरेवर आल्या छत्रपतींच्या आठवणींबरोबर पायफेर चालू होता. नुकत्याच झालेल्या शिर्क्यांच्या लढाईचा आठव फिरत होता. येसूबाईंना कधी आणले नाही या कोटरासारख्या गडावर याची बोच लागली त्यांना.

" कृष्णाजी कोन्हेरे आल्यात भेटीसाटनं." गडातर्फेचे सरनोबत म्हलोजीबाबा म्हणाले. राजांनी त्यांच्याकडे चमकून बघितले. त्यांच्या शेजारी त्यांचे ऐन भरातले संताजी व बहिरोजी हे घोरपडे बंधू उभे होते. आझमशहाच्या बंदोबस्तासाठी राजांसाठी राजांनीच पन्हाळ्याला पाठविलेले न्यायाधीश प्रल्हादपंत होते. ते म्हणाले, " महाजनकीची काही तक्रार आहे कृष्णाजींची."

राजांनी रुकाराचा हात उठविला. कृष्णाजी कोन्हेऱ्यांची तक्रार बितपशिल ऐकून घेतली. " योग्य वाटेल तो निवाडा करा कृष्णाजींचा. त्यासाठी प्रांतमजकुराचे – देसक, नायकवडी, देशकुलकर्णी यांची अगोदर मजालस भरवा न्यायाधीश." प्रल्हादपंतांवर कान्होऱ्यांच्या महाजनकीची बाब त्यांनी सोपवली.

" प्रल्हादपंत, चला सज्जाकोठीवर जाऊ." काही बेताने त्यांनी न्यायाधीशांना बरोबर घेतले. सदर सोडून ते सर्वांसह सज्जाकोठीवर आले.

" पंत – शिर्क्यांच्या बाबीनं बैचेन झालोत आम्ही. तुम्ही बरेच दिवस आहात या प्रांती. काय बेत आहे त्यांचा ? "

पंत चमकले. प्रश्न ऐकताच ... कोरडच पडली त्यांच्या तोंडाला. " बाब घरची आहे स्वामी – काय बोलावं आम्ही ? " त्यांनी जाब दिला कसातरी. ते खरेच होते. कुणीच काही बोलू - करू शकत नव्हते.

उंच कोठीच्या गच्चीवर जाण्यासाठी सारे गच्चीचे जिना चढू लागले. पांढरट गलमिश्यांचे म्हलोजी तर राजांच्या पाठोपाठच तरातर जिने चढले.

सज्जाकोठीच्या गच्चीवरून दिसणारा कोल्हापूर, जोतिबाचा परिसर बघताना राजांनी विचारले, " कोल्हापुरात कोण मुगल ठाण देऊन ? "

" शेख – निजाम कुतुबशाही म्हनतेला! गोवळकोंड्याचा 'मुकर्रबखान' किताबत देऊन नामजाद केलंय बादशानं त्येला विजापूर पडल्यावर. पन्हाळ्यावर लई डोळा ठिऊन हाय." म्हलोजींच्या गलमिश्या गडवाऱ्यावर फरफरत होत्या.

" भिडतो का गडाला ? "

" जी. अधनं मधनं टाकतो झॅप. पन आम्ही हाय न्हवं डोळ्यांत तेल घालून." म्हलोजींनी गलमिश्यांवर हात फिरवला.

शृंगारपुराहून पळालेले गणोजी आणि कान्होजी याच मुकर्रबखानाच्या तळावर येऊन त्याला भेटून गेले असतील याची कल्पना राजांना किंवा म्हलोजींना अर्थातच नव्हती. सायंकाळचा गार मावळवारा चढीला पडला. त्यावर राजांच्या अंगचा जामा फरफरू लागला. टोपातील मोतीलग हिंदकळू लागली. गडाची सांज नौबत दुडदुडली. तिला छातीशी हात नेत मान देताना त्यांना पाचाडसदरेवर घणघणारी थोरल्या आऊंची घाट याद आली. पन्हाळगडाचे पाच–दरवाजा, तीन–दरवाजा सर्व दरवाजे बंद होत होते. कोठीखाली गडपायथ्याच्या वाडीत घरट्याघरट्यांत दिवल्या पेटत होत्या. शांत, निसूर अशी ती पन्हाळी सांज उरात भरून घेत महाराज सज्जाकोठीचा कठडा सोडून जायला म्हणून वळले. एवढ्यात कोठीचे जिने झापा टाकतच चढलेला, धापा टाकणारा पन्हाळ्याचा किल्लेदार लगबगीने म्हणाला, " ... रायेगडाला ...गडाला ... गलिम ... गलिम ... एतिकादखानाचा घेर पडला .. राबत्या बाजूने धनी ! " त्याला धड बोलवतही नव्हते. रिवाज द्यायला तर तो विसरलाच होता. शिवारावर गोफण फिरावी तसे विचार फिरले राजांच्या मनात. येसूबाई, बाळराजे, रामराजे, चांगोजी, जोत्याजी, चर्याच चर्या फिरल्या त्यांच्या उघड्या, विसफारल्या डोळ्यांसमोर. रायगडाला राबत्या बाजूचा घेर !

वर्मी तीर बसलेले, शिकारीतले जनावर, आडव्या येणाऱ्या झाड झाडोऱ्याची पर्वा न करता झेपावत सुटते तसे ते कुणाकडेही न बघता झपाझप कोठी उतरू लागले.

अर्ध्या घंट्यात धावणीची फौज सिद्ध झाली. तिला रायगडाच्या रोखाने दौडते सोडून निवडक असामींनिशी पन्हाळा सोडताना ते म्हलोजींना म्हणाले, " काळीज टाकू नका म्हलोजी. धीरानं असा. लागली गरज तुमची तर हारकारा देऊ. चढ्या रिकिबीनं पाठोपाठ या."

म्हलोजी, संताजी, प्रल्हादपंत यांनी दिलेले मुजरे आपले करत – पाठीवर पन्हाळी सांज आणि मनी रायगड घेऊन चंद्रावताला टाच दिली गेली. पन्हाळा मागे पडला. बत्तीस शिराळा, वाई-महाड मार्गावर, औरंगच्या फौजी राहुट्या पडल्या होत्या. खेळणा, संगमेश्वर मार्गाशिवाय दुसरा रस्ताच नव्हता रायगड जवळ करायला. राजांचे सैन्य त्या मार्गाने दौडू लागले.

खेळण्याच्या बालेकिल्ल्यात अस्वस्थ बेचैन फेर घालणारे छत्रपती कुलेशांना म्हणाले, " आम्ही तातडीनं कूच करणार आहोत. रायगडाकडं कविजी. तुमच्या प्रांतीचा जमेल तितका धारकरी संगती घेणार आहोत. आता क्षणाचाही उसंत नाही कसलाही विचार करायला." किल्ल्याच्या सदरी दालनात त्यांच्याभोवती उभे राहिलेले कुलेश, किल्लेदार, राया-अंता सारेच चिंताक्रांत होते. औरंगचा रायगडाला घेर – याचा मतलब पुरते जाणून होते सारे.

" कौनसी भी जोखीम हो, हमको हुक्म देना स्वामी ! " कुलेश निर्धाराने म्हणाले. पण त्यांच्या मनीही राजांच्या कानी घालावी अशी कुठली तरी बाब घोटाळत होती.

" संगमेश्वराला हरकारा द्या कुलेश. आम्ही येतो आहोत."

" जी." सवयीने कुलेशांनी रुकार दिला. पण त्यांचे मन कशात तरी गुंतले होते.

भागच होते म्हणून त्या दिवशीचा मुक्काम खेळण्यावर टाकून राजे पहाट धरूनच निवडीच्या धारकऱ्यांची शिबंदी पाठीशी घेत संगमेश्वराकडे निघाले. पूर्वेकड धरून नव्या दिवसाचा सूर्य डोकावत उगवत होता. दौडत्या घोड्यावर राजांच्या मनात विचारांच्या टापा थडथडत होत्या. त्यांना बगल धरून दौडणाऱ्या कुलेशांना, पाठीशी दौडणाऱ्या एकाही स्वाराला कल्पनाच नव्हती की, रात्रभर कोल्हापूरच्या तळावर मुकर्रबखानाला,

छत्रपती कुठे आहेत, दिमतीला माणसे किती आहेत या साऱ्यांची खडा न् खडा माहिती पुरवून तळाबाहेर पडलेले गणोजी, कान्होजी शिर्के आणि नागोजी माने शिवरात्र तोंडावर आल्याने कोल्हापूरच्या अंबाबाईचे पहाटदर्शन करून परतत होते!

संगमेश्वराची वेस आली. हे दोन नद्यांच्या संगमाचे ठिकाण होते. संगम काठाला शिवलिंगाच्या राऊळाने गावाच्या नावाला साजेसा अर्थ दिला होता. कधी मनाचा भार असह्य झाला की याच संगमावरच्या शिवालयात राजे दर्शनासाठी येत होते. आज ते संगमेश्वर दौडीच्या वाटेवरच होते. गावठाणातून संगमावर घोड्यांना पाणी दावून मोतद्दारांची एक तुकडी पागेकडे परतताना वेशीत घुसल्या महाराजांच्या सामने आली. मोतद्दार खाशांना रिवाज देण्यासाठी पटापट उतरू लागले. तिंकडे ध्यानही नसलेले महाराज त्या पथकातील एक जनावर, उजाडताच सामने आलेले बघून चंद्रावताचे कायदे खेचून जागीच थांबले. जनावर 'ऐबी' होते ते!! त्या पुऱ्या काळ्याशार जनावराच्या आघाडीच्या खुरांना पांढरे फटफटीत चांदवे होते.

महाराजांच्या मनी ते जनावर बघताना शकाची टिटवी केकाटत फडफडून गेली : "रायगडावर काही बरंवाईट तर ..."

राजांनी संगमावर जाऊन शिवदर्शन घेतले. समोरच्या शिवपिंडीला हात जोडून ते मनोमन म्हणाले, "आम्हाहून आबासाहेबांस प्यार असलेल्या रायगडास ढका लागू नये. त्यासाठी हयातीचं बेलपान करून वाहू तुमच्या या पावन पिंडीवर."

शिबंदीसह राजे संगमेश्वराच्या सरदेसाई आणि कऱ्हाडहून आलेले अर्जोजी गिर्जोजी यादव वाड्यात जमले होते. सज्जनगडाहून आलेले रंगनाथस्वामी गोसावी महाराज संगमेश्वरात आले आहेत याची खबर मिळाल्याने दुपारच्या थाळ्यानंतर भेटीसाठी सरदेसायांच्या वाड्यावर आले. भेटीसाठी आलेल्या गोसाव्यांनी 'जय जय रघुवीर समर्थ' अशी नांदी उठवताच बैठकीवरून उठून महाराजांनी त्यांच्या चरणांवर आपला माथा टेकला. रंगनाथस्वामींनी त्यांच्या राजटोपावर तळहात ठेवून आशीर्वाद देताना त्यांच्या तोंडून समर्थबोल निसटले.

"जरी पाटांतील तुंब निघेना –
तरी मग पाणीच चालेना
तैसे जनांच्या मना
कळले पाहिजे!"

"आम्ही निघतो राजे ... वाघापुरीला जायचं आहे." नांदी उठवून खडावांची चटपट करीत रंगनाथस्वामी बाहेर पडले.

राजांच्या मनात समर्थांनी लिहिलेल्या पत्रातील बोध फिरला ... "अवघे लोक एक करावे। गनिमा निपटून काढावे। चढती वाढती कीर्ती। पावाल येणे॥

"अवघे लोक एक करावे। कसे?" समर्थ हे कैसे व्हावे? हवस पेटल्याने नेकी भुललीत माणसे! फंदफितुरीने धारकऱ्यांची बुजगावणी झालीत. सामने येणाऱ्या असामीच्या नेकीचा मागमूसही लागू नये एवढी आतबाहेर दुटप्पी झालीत माणसे. ओंजळीत मिळेल तेवढाच शिधा शिजवून खाणारे, वणवण करीत मुलूखभर मावळवाऱ्यासारखे पायीच भटकणारे तुम्हासारे संत कुठे! 'कीर्तिरूपे उरावे" म्हणालात. ते तरी असते का माणसाच्या हाती? आबासाहेब उरले ... कीर्तिरूपे उरले. ते – तुम्ही 'माणसे' कशी म्हणावी? 'देवमाणसे' तुम्ही. जगदीश्वराच्या मंदिरातील हमचौकातील दगडी कासवाचे तरी भाग्य मिळेल आम्हास? की पडतील नुसतेच कदम पाठीवर येणाऱ्या प्रत्येक दर्शनभक्ताचे? नाही झाला हा मुलूख एक दिलाचा, एक जिवाचा तर? फिरविली जर अकरा दिशांना तोंडे तुम्ही स्थापन केलेल्या अकरा हनुमंताच्या मूर्तींनी आपली तर?

– 'मग जाणावे फावले गनिमांसी!' समर्थांच्या बोलांनी छत्रपतींच्या समोर जिकडे तिकडे मुगल फौजा दौडताना दिसू लागल्या. खूप कोशिस केली त्यांनी पण औरंगची चर्या काही केल्या नजरेसामने येईना त्यांच्या. समर्थ 'गनिम – गनिम' म्हणून गर्जून सांगताहेत तो 'गनिमच' दिसेना त्यांना. त्यांनी मनोमने भोवतीच्या, खंडोजी, रायाजी, रामचंद्रपंत, कुलेश सर्वांशी ते औरंगसारखे दिसतात का याचा पडताळा पाहिला. नाही! 'औरंग' काही स्पष्ट होईना त्यांच्या नजरेसमोर. मनातले विचारच त्यांनी रंगनाथस्वामींच्या पादुकांच्या रुजाम्यावर उमटलेल्या ठशांवर ठेवले. मन शांत, स्थिर करून घेतले.

सदरेबाहेर शिरकाणातील मौजे मसूचा हरबा देसाई येऊन खाशांच्या भेटीसाठी केव्हाचा खोळंबला होता. त्याची विठोजी शिर्क्यांची भावजय काशीबाई हिच्या खिलाफ मौजे कोतळुक आणि मसू या गावच्या मोकाशाबद्दल तकरीर होती. हा गाव 'बाधेरीतीने' म्हणजे पूर्वीचा वारसा-हक्क रद्दबातल होऊन हरबाकडे आला होता. राजांनीच त्याचे मोकासे, शिर्के हरघडी लष्करी कामाचे म्हणून शिर्क्यांना दिले होते. त्यानेच शिर्के माजोर झाले होते. शिर्क्यांचे धारा वसूल करणारे 'दाणेकरी' भरल्या खळ्यावरून बलात्कारे दाणे उचलून नेत होते. त्याने कातावून देसायांच्या माणसांनी शिर्क्यांची पागाच मुळे मोडून काढली होती. हरबाला मौजे मसूचे सरकारी शिर्के-मोर्तबाचे मोकासे पाहिजे होते म्हणून कुलेशांनी हरबाला पेश घेतला होता.

"धनी, मौजे मसूचं मोकासं द्यावं आता आमास्नी. लई कट्टाळलाव. सरकारास्नी मानत न्हाईत, तर आमास्नी काय मानतील शिर्के! भरल्या खळ्यावयनं दाबजोरीनं दाणा काय नेत्यात! कातावून पागाच मोडून काडली आमी त्यांची. कागुद करून दिला की आमी चाकरीला हावंच धन्यांच्या." रिवाज देताना हरबा देसाई नरड्याला चिमट लावून म्हणाला.

महाराजांच्या डोळ्यांसमोर फिरत होता – एतिकादखानाने घेर टाकलेला रायगड!

आणि समोर आला होता एका मौजाच्या मोकाशाचा कथला! हरबाला कुडीभर न्याहाळत छत्रपती म्हणाले, "पागेच्या रखवालदार धर्मा कवठेकराची काय बाब?" तो वर्माचा सवाल ऐकून हरबा चरकला. शिर्क्यांच्या पागेचा रखवालदार धर्मा याला देसायाच्या माणसांनी जीवे मारून पेंढ्यात घालून डाग दिला होता! धर्मा महार होता.

"जी. लई इयायली क्येली त्येनं पागेवर." हरबा चाचरत कसातरी म्हणाला.

त्याला माहीत होते, राजांच्या दिमतीला जासूद-चाकरीला बहिर्जी, विश्वास असे पट्टीचे रामोशी खबरगीर होते.

"खामोश ऽ! जबान कशी उठते इमानदार चाकराच्या जिवास नख लावून मोकास मागावयास?" शंभूतेज कडाडले, "कुलेश, अमानत करून टाका गौजे मसू, कोतळुक, तुरवटे तर्फेचा सारा गाव सरकारात!"

हरबा देसाईला फेकून देणारी आज्ञा सुटली. थप्पड खाल्ल्यागत हरबा गुमान बाहेर पडला. खाशांचा राजसंताप सुमार होईपर्यंत कुलेश काही क्षण कसे बोलावे म्हणून थांबले. त्यांनाही रायगडाची चिंता लागली होती. धैर्याने ते म्हणाले, "रायगड जानेके पहले..."

"बोला कविजी." महाराज आपल्याच विचारात होते.

"शिवजीका एक अनुष्ठान संपन्न किया तो सबका अरिष्टका कुछ तो निवारण होगा। शिवरात्री आयी है इसलिये..." शिवभक्त असल्याने कुलेश म्हणाले.

"केवढ्या धावपळीची ही हयात कविजी! शिवरात्र तोंडावर आली आहे हेही भुलून गेलो आम्ही! आबासाहेबांनी हर किल्ल्यात सही हाताला शिवपिंडीची घुमट उठवली. का? तर गड चढताच पिंडीचे दर्शन घेता यावे म्हणून! आज त्यांचाच रायगड संकटात पडला आहे. आमच्या हातांनी त्यांचा म्हणून लावा शिवास कौल. पाचाड-पागा आम्ही जाईतो नाही द्यायची दाद छाप्यांना." प्रत्यक्ष रायगडाचा उपराळा करण्यासाठी जाण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. मन कशाचे तरी पाठबळ मागत होते त्यांचे. रायगडाचा घेर तर उठविणेच भाग होते. तिथली पिछाट तर काळीजच कुरतडणारी होती.

खेळणा, पन्हाळा, विशाळगड-पागांना वरकड पावलोक रायगडाच्या वाटेस लावायला खलिते द्या. तुम्ही जातीनं अनुष्ठानाची जोडणी लावा. सकाळ, दुपार, संध्याकाळ औरंग न चुकता नमाज पढतो हे ऐकून आहोत आम्ही." वरवर शांत दिसणारे राजे अंतर्यामी, कुणालाच उकल न होणाऱ्या खोलवट्टात शिरले होते.

संगमेश्वराचा वाडा हलू लागला. माणसे शंकराच्या अनुष्ठानासाठी खपू लागली. संगमाच्या एकमेकींत मिसळलेल्या नद्या शांत वाहत होत्या. भवतीचे उंच डोंगरकडे ताठ खडे होते. त्यांना घेरून कोकणचा हिरवाकंच झाडझाडोरा माजला होता.

मलकापूर, खेळणा, संगमेश्वर भागाचे व्युत्पन्न ब्राह्मण कुलेशांनी संगमेश्वरात पाचारण केले. सरदेसायांच्या वाड्यातील हमचौकात शिवाच्या अनुष्ठानासाठी यज्ञकुंड सिद्ध झाले. देसायांच्या देवघरातील शिवपिंडीवर अभिषेकपात्र संततधार बरसवू लागले. त्याचा थेंबथेंब जसा पुटपुटत होता, "रायगड–रायगड." कुंडात पडल्या समिधांच्या धुराने वाडा कोंदून जात होता. धार्मिक विधी होताच राजे सदरेवर येत होते. अनुष्ठानाचे दोन दिवस झाल्यावर सदरेवर आल्या छत्रपतींना कुलेश म्हणाले, "अब रायगड कूच करना है। मलकापूर, पन्हाळा, संगमेश्वर की जिम्मेदारी है हमपर! इसलिये..." खेळण्यापासून मनात असलेली बाब महाराजांच्या कानी घालायला बेचैन झालेले कुलेश अडखळले.

"तुम्हास तर आम्ही संगतीच घेणार आहोत. आता हा प्रांत नाही, तो ठेवा डोळ्यांसमोर. रायगडचा, इथली जोखीम तर हमेशाचीच." महाराज म्हणाले.

"रायगडके लिये ये बोलनाही पडेगा की.. न्यायदेवता पलट गयी है! खुद न्यायाधीश–न्यायाधीशने–" कुलेश पुन्हा चाचरले.

"मतलब?" महाराजांच्या कपाळीचे गंध आक्रसले.

"खुद न्यायाधीशने षड्यंत्र की चाल रखी है स्वामी के खिलाफ!"

"क ऽ वि जी ऽ!" बसले महाराज अंगावर उकळते करंजेल तेल पडावे तसे ताडकन् उठले. उभे अंग शहारले त्यांचे. संताप, एकलेपणा, कोंडी, चमत्कारिक भावनेने ते जागीच थरथरू लागले. "कुणावरही अदावत घेऊ नका छंदोगामात्य! भूल असेल तुमची, कुलएखत्यारीच्या अधिकाराने केलेली! न्यायाधीश... आणि षड्यंत्र? आईने मुलाचा कडेलोट केल्याची बात ऐकवतसुद्धा नाही आम्हास. पुरावा काय यास?" न्यायाधीश प्रल्हादपंतांना पहिल्या कटावाच्या अदावतीतून इतमामाने मुक्त केल्याचे छत्रपतींना आठवले. "पुन्हा असली गफलत करू नका. नाही सोसणार ते आम्हास." अशी त्या वेळी दिलेली समजही याद आली. रायगडाच्या महाद्वारात ठोकलेल्या खिळ्यांगत त्यांनी आपली नजर कुलेशांच्या डोळ्यांत रोवली. एवढे कुलेश! पण तेही हबकले ती बघताना.

"बोला, कुलएख्त्यार, पुरावा बोला."

"जी." अंगभर थरकलेल्या कुलेशांनी कमरेच्या कनोजी शेल्यातून खेचून प्रत्यक्ष न्यायाधीश प्रल्हादपंतांनी मोगल मनसबदार गणोजी शिर्क्याला लिहिलेला खलिता लटलटत्या हातांनी महाराजांसमोर धरला. तो खोलून महाराज वाचू लागले. शब्दाशब्दांतून जसा डोळ्यांवाटे उतरत शिसरसासारखा थेंब थेंब ठिबकू लागला त्यांच्या काळजावर. स्वारीशिकारीसाठी मुलूखभर दौडणारे, गोऱ्यांच्या दरबारात दौलतीची हेजिबी करणारे प्रत्यक्ष न्यायाधीश आरोपिताच्या पिंजऱ्यात जाऊन बसताना गणोजीला म्हणत होते, "रामराजे एकले आहेत. त्यांनाच हातास धरून गादीवर बसविले तर कुलएख्त्यारी तुम्हासच मिळेल. कोण कुठचा कनोजा! कानामागून येऊन साऱ्यांस तिखट

झाला आहे. राजे तर त्याच्या सांगीशिवाय कुणाचंच मानीत नाहीत." या आशयाचा तो नमुनेदार निवाडा होता. हातचा खलिता वाचून होताच छत्रपतींनी गपकन् डोळे मिटले. त्यांच्या मिटल्या, व्याकुळ डोळ्यांसमोर प्रल्हादपंतांच्या मुद्राच मुद्रा फेर धरून गेल्या.

डोळे मिटूनच संतापाने थरथर कापत, कुलेशांना पण स्वत:च द्यावी तशी त्यांनी आज्ञा दिली, "खलिताच द्या धाडून हा पन्हाळ्यावर. म्हलोजींना सांगा न्यायाधीशांसच वाचू दे हे आरोपपत्र. त्यांच्याच लिखावटीचं – त्यांच्याच खिलाफ. दस्त करा त्यांना असतील तिथं, मिळतील तेव्हा! आणि ... आणि बंद करून टाका तुमचं अनुष्ठान – रायगडासाठी शिवाला कौल घालणारं!" मान खाली घातलेल्या कुलेशांच्या अंगावर खलितावळी फेकून महाराज आपल्या दालनाकडे तरातर निघून गेले. पुरते घायाळ झालेले; सर्वार्थाने एकांती. पुरते एकले होण्यासाठी.

मोठ्या मिनतवारीने बांधल्या अनुष्ठानाची सांगता तरी करून निघावे यासाठी महाराजांना कुलेशांनी तयार केले. सांगतेचा दिवस संगमेश्वरावर उजाडला. आज तर पुरते संगमेश्वर सरदेसायांच्या वाड्यावर येऊन यज्ञकुंडात समिधा वाहून गेले. सगळे गाव सांगतेच्या भोजनाने हात ओले करून तृप्त झाले.

टळत्या दुपारला कऱ्हाडहून आलेले अर्जोजी यादव महाराजांच्या सामने आले. संगमेश्वरात आल्यापासून मनात घोळणारी एक बाब त्यांनी महाराजांना पेश घातली. अर्जोजी बांधकाम कारखान्याचे नामजाद प्रमुख होते. त्यांचे भाऊ गिर्जोजी यांनी तर राणीसाहेब दुर्गाबाई यांचा माग काढत ब्ऱ्हाणपूर, खुल्दाबाद पावेतो पायपीट केली होती. यादवांची दौलतीच्या पायी खूप चाकरी रुजू झाली होती. थोरल्या महाराजांनी यादवांना कऱ्हाड व औंधचे वतन नेऊ अशी जबान दिली होती. पण त्या समयाला त्यांचाच काळ झाला होता. यादवांची बाब आठ वर्षे तशीच पडली होती.

"आमच्या कऱ्हाड-औंधच्या सरकारी कागदांचं आता मनावर घ्यावं धनी. मिरज भागाला शहजाद्याच्या फौजा जोराचा तळ धरून हाईत. आम्ही परतावं तिकडं म्हनताव." अर्जोजींनी आपली बाब धन्यांच्या समोर ठेवली. रायगडाच्या पायथ्याला पाचाडात येसूबाईंच्या शब्दासाठी राजमंदिर उठविणाऱ्या अर्जोजींना महाराजांनी अंगभर नेरखले.

"अर्जोजी, केवढ्या घरोब्याचे तुम्ही आबासाहेबांपासून. पण तुम्हाकडेही ध्यान देणं आम्हास फावलं नाही. नाराज झाला असाल तुम्ही."

सरदेसायांच्या चिटणिसास काही विचाराने बोलावून घेऊन, कऱ्हाड-औंधचे यादवांच्या नावे कागदपत्र सिद्ध करण्याची आज्ञा महाराजांनी त्यांना दिली. सिद्ध झाल्या वतनपत्रांवर दस्तुर करून ते चिटणिसांना म्हणाले, "शिक्कामोर्तब करून द्या हे अर्जोजींना. आणि अर्जोजी, तुम्ही मोर्तबी कागदपत्र मिळताच कऱ्हाड फाट्यास तुमच्या गावानं कूच व्हा."

सांगतेसाठी आलेले ब्राह्मण कुलेशांच्या हातून दक्षिणा घेऊन, राजांना अभीष्ट चिंतून गावोगाव परतू लागले. आता हा शेवटचाच मुक्काम होता संगमेश्वरात. सरदेसायांच्या वाड्यालगत पागेत मोतद्दार जिने खुंटाळ्यांवर ठेवून घोड्यांना खरारा चंदी करू लागले. संगमेश्वराच्या बायाबापड्या रात्री खर्चासाठी लागणारे पाणी कळश्यांनी आपापल्या घरट्याकडे नेऊ लागल्या. पाखरे कोटरांकडे परतत होती.

याच वेळेला गणोजी मुकर्रबखानाच्या कानाशी तोंड नेऊन दबक्या आवाजात म्हणाला, "पाचशे घोडा आहे संगमेश्वराला. भवत्यानं खड्या चढणीचं कडं हाईत. कुमक करायला मातब्बरीचं ठाणं न्हाई आसपास. पन्हाळ्याचा घोरपड्याच जरा दबीत ठेवाय पायजे. माजोर दस्त कराया नामी मोका हाय. फत्ते झाली की मातर आमच्या शिरकाणाचं बादशहास्नी सांगाया विसरू नका खानसाब."

कोल्हापूरला महालक्ष्मीच्या रावळात सांज आरती चालू होती. घाटेच्या आवाजात गणोजीचे इमानदार शब्द विरून जात होते. लगोलग दीड हजार कडव्या हशमांची फौज बांधून मुकर्रबखान निघाला. कोल्हापुराहून आंबा घाटमार्गे संगमेश्वराकडे.

दीड हजार हत्यारबंद हशमांचे घोडापथक खडखडत्या टापांनी कोल्हापुराहून निघाले. आघाडीला होते मुकर्रबखान, त्याचा मुलगा इखलासखान आणि त्यांना दौडीचा, पन्हाळा बगलेला टाकून जवळ आणि बिनघोरी माग दावायला उजवे गणोजी आणि कान्होजी डावे नागोजी माने. घोडी आंबाघाटाच्या रोखाने खाडखाड दौडत असतानाच शक आलेल्या इखलासने मोठ्याने ओरडून आपल्या बापाला विचारले – "हाथ नहीं आया काफर और जानपे बिती जंगमें तो आब्बाजान ?"

"डरपोक, शहिद हो जाएंगे आका जानके नामपर। फतेह हुई तो मालेमाल कर देंगे हजरत गौरसे।" मुकर्रबखान जिवाच्या कराराने दौडत होता. गणोजी, कान्होजी, नागोजी त्याला, 'डावरीकडं – सही हाताला' म्हणत हात उठवून माग देत होते. ओढे, वहाळ, पांदी सपासप मागे पडत होत्या. पुरते सांजावले तसे खिनभर फौज रुकली. पलोते पेटवले गेले. मशालजी घोडाहशमांनी ते एका हाती तोलत आघाडी घेतली. काही फौजफळीत पांगले. एक पेटता जिहादी लोळ पुढे सरकावा तशी जिद्दी फौज टापांवर पडली.

पन्हाळ्याच्या कोकण दरवाज्यावर पहारा देणाऱ्या मेटकऱ्याने पलोत्यांची ती रांग दौडताना बघून बालेकिल्ल्याकडे धावत झेप टाकली. सरनौबत म्हलोजी घोरपड्यांना तो धपापतच म्हणाला – "घात जाला घोरपडेबाबा. कोल्हापूरचा तळ संगमनेरच्या रोखानं दौडतोय. घोडा कितसा हाय माग न्हाई रातीचा धावला."

पन्हाळ्यावर पाठोपाठीने सटासट हुकूम सुटले. म्हलोजी आपले चिरंजीव संताजी, बहिर्जी यांच्या जोडीने पागेसमोर आले. पाचशे घोडा हां हां म्हणता जीनबंद झाला. त्याला पाठीशी घेत म्हलोजी कोकणदरवाज्याने पन्हाळा उतरले. विशाळगडाच्या रोखाने. आडवाट धरून संगमेश्वराकडे दौडू लागले. 'घोर' पडलेल्या मराठी दौलतीला प्राणबाजीने वाचवायला, झाल्या उमरीचे घोरपडे दोन बांड्या मुलांसह दौडू लागले.

"आबा, गाटू आम्ही संगमेश्वर येळेवर ?" थोरल्या संतीजीने शकाने विचारले.

"आरं, निस्तं पोचून काय कामाचं? येळ पडली तर शिर काटून ठिवाय लागेल शिवाजीऱ्हाजाचा अंकुर जपाय!" म्हलोजीच्या पांढरधोट गलमिश्या वाऱ्यावर फरफरून गेल्या.

एकीकडून म्हलोजी आणि दुसऱ्या वाटेने मुकर्रबखान आणि त्यांचे साथीदार संगमेश्वर जवळ करण्यासाठी ऊरफोडीने दौडू लागले. कोल्हापुरात महालक्ष्मीच्या व जोतिबावर नित्याच्या घाटा घणघणून गेल्या. काळरात्र पळापळाने चढू लागली.

या वेळी संगमेश्वर गाढ सुख झाले होते. सरदेसायांच्या वाड्यावर हत्यारी, गस्ती पहारे फिरत होते. वाड्याच्या सुखदालनात मंचकावर लेटलेले छत्रपती मधेच कूस पालटत होते. झोप साधत नव्हती. आदिलशाही, कुतुबशाही घशात घालून अकलूजला ठाण झाला औरंग, गावोगावचे फितवेखोर, दरिया गिळायला बसलेले फिरंगी, हबशी–चित्रांमागून चित्रे त्यांच्या मनी गस्त घालीत होती. येसूबाई, आबासाहेब, थोरल्या आऊ, धाराऊ, समर्थ, सती गेलेल्या आऊसाहेब, कुठेतरी खुल्दाबादेत कोठीत पडलेल्या दुर्गाबाई, राणूआक्का अशा मुद्रा त्यात मिसळत होत्या. वाड्याच्या पागेतली घोडी मधेच नाकपुड्या झटकून फुरफुरत होती.

मध्यरात्र टळली तसा खाशांचा डोळा लागला. पळे पावलापावलांनी पुढे सरकू लागली. रात्रीची कूस फोडून उगवण्यासाठी नवा दिवस धडपडू लागला. उत्तररात्र धरून वाड्याची शांतता भेदत दोन घोडाईत हमचौकात उतरले. तीरासारखे वाड्यात घुसले. खिदमतगाराला त्यांनी कुलेशांना बिगीबिगी उठवायला सांगितले. महाराजांच्या सुखदालनाशेजारच्या कोठीत झोपलेल्या कुलेशांना खिदमतगाराने आत जाऊन उठवले. डुईवर पगडी नसलेले कुलेश भयशंकेने तसेच बाहेर आले.

"क्या है ?" मुजरा करणाऱ्या घोडाइतांना त्यांनी शंकेने विचारले.

"राना-पांदीतनं, आडवाटेनं गनीम संगमेश्वर जवळ करतोय. महाराजांना उठवा चटशिरी. कानी घालू द्या त्येंच्या हे." खबऱ्या घोडाइतांपैकी एक इकडे तिकडे बघत थरकापून म्हणाला. खांद्यावरून लोंबते उपरणे दोन्ही हातांच्या मुठीत गपकन पकडून कुलेश सुखदालनाकडे धावले. आत जाऊन मंचकाशेजारी उभे होत तत्परतेने म्हणाले, "स्वामी, स्वामी उठिये।"

"कोऽण ?" म्हणत महाराज मंचकावरून उठते झाले. बाहेर संगमेश्वराच्या घरट्याघरट्यांत कोंबडी आरवत होती.

"वकुत न्हाई. घोडा फेकत एक फौज रानातनं दौड घेतीया. खाशांनी चढे घोडे व्हावं आन् खिनभरबी न थांबता याच वख्ताला संगमेश्वर सोडावं."

"इथल्या पागंपरास दौडीत लय घोडा हाय. तड न्हाई लागायची." दोन्ही खबरे घोडाईत एका पाठोपाठ एक म्हणाले.

हात पाठीशी बांधून सुखदालनात इकडे तिकडे झपाझप फेर धरणाऱ्या छत्रपतींकडे ते घोडाईत उत्सुक डोळ्यांनी बघू लागले. कोनाड्यात पेटत्या टेंभ्याकडे बघत एकदम थांबून राजे कुलेशांना म्हणाले, "शिर्क्यांची– शिर्क्यांची माणसं आहेत ती. कोल्हापूरशिवाय तळ नाही गनिमाचा जवळपास. बिशाद नाही त्यांची एवढ्या गचपणात घाटा-पांदीतून रात्रीच संगमेश्वरावर चालून येण्याची! कुलेश यांची व्यवस्था करा!" खबऱ्यांच्याकडे हात करत महाराजांनी कुलेशांना आज्ञा केली. विचार करतच कुलेश आणि मुजरा करत, चुटपुटत खबरे बाहेर पडले. महाराज पुन्हा फेर घेऊ लागले. थोड्या वेळाने येऊन मंचकावर लेटले. काही केल्या झोप येईना त्यांना. मनी शिर्क्यांची भिंगरी घुमत-फिरू लागली.

"आता रायगडी गेल्यावर श्रीसखींना कसं सांगायचं त्यांच्या पाठराख्या भावांना हुसकून लावणं पडलं शिरकाणातून? काय हा शिर्क्यांचा आमचा ऋणानुबंध? काय मिळालं श्रीसखींना आमच्या नावे मळवटी बाशिंग बांधून?" राजांच्या मनी विचार आले.

तबकात ठेवलेल्या राजटोपाकडे ते बघू लागले. टेंभ्याच्या मंद उजेडात त्याची कलाबूत झगमगत होती. त्यांना जाणवले आबासाहेबांचा राजटोप उभ्या माटाचा होता. आपला बसक्या माटाचा– मोगली किमॉशागतच! आमच्या आजोबांचाही तसाच! त्यांनी निदान निजामशाही, आदिलशाही सतत जरबेत ठेवल्या. आम्ही? राखू ही मराठशाही?

इकडे संगमेश्वराच्या वेशीत घुसलेले म्हलोजीबाबा आपले घोडालोक संगमेश्वरभवती पांगते फेकून, त्याला कडं टाकून संगमेश्वर राखायला खडे ठाकले. आडवाटेने जिवाची पर्वा न करता घोडे फेकल्याने ते वेळेवर पोचले होते. त्यांच्या पांगत्या शिबंदीने नरड्याच्या घाटा फोडून उगवत्या पहाटेला थरकावून टाकणाऱ्या किलकाऱ्या उठविल्या, "हर हर म्हाद्येऽव." त्या विरायच्या आत बेभान, बेलाग, दौडत्या हशमांची जिहादी फौज पाठीशी घेत मुकर्रब, इखलास धुराळ्याचा लोळ उठवीत संगमेश्वराच्या वेशीत घुसले. उगवता दिवस त्या धुळीच्या लोळाने पुरता झाकाळून गेला. "धीऽन ... धीऽन" च्या आरोळ्यांनी संगमेश्वर दणाणले. कालवाच कालवा झाला. देसायांच्या वाड्यात तो कानावर पडताच ताडकन उठलेले महाराज दरवाज्याकडे झेपावले. बाहेरून भयकातर झालेले धावत येणारे कुलेश त्यांना थडकायचेच थांबले. राया-अंता तर कुणाचंही ऐकायच्या मन:स्थितीत नव्हते. आज सगळा रिवाज बाजूला ठेवत राया तर थेट छत्रपतींच्या दंडाला धरून गदगदा हलवत म्हणाला, "इळभर थांबू नगासा. घात झालाय. हत्यार घ्या नि भाईर पडा– निघा. निघा."

गर्रकन वळून दालनातल्या तबकातील टोप मस्तकावर ठेवून, म्यानातली तलवार बाहेर खेचून म्यान तसेच फेकत राजांनी डाव्या हाती ढाल तोलली. आपल्या दालनातून हाती ढाल-हत्यार घेतलेले कुलेशही बाहेर आले. सगळ्या वाड्यातले माणूस मिळेल त्या

जागेचे हत्यार घेऊन "चला, भाईर व्हा. गाव येरगाटलंय. गनीम आला." म्हणत बाहेर पडू लागले. कालवाच कालवा उडाला वाड्यावर. राया-अंता, कुलेश, अर्जोजी यांच्यासह महाराज दरवाज्याबाहेर पडले. वाड्याच्या पागेतून बाहेर काढलेली घोडी धरून मोतद्दार डोळ्यांत जीव आणून टकमक दरवाज्याकडेच बघत होते. म्हलोजींची फळी फोडून वाड्यापर्यंत घुसलेले दहावीस हशम हत्याराने फेकले की जवळची घोडी ते महाराजांच्या मांडाखाली देणार होते. क्षणक्षण डोंगरागत छाताडावर असह्य झाल्याने मोतद्दार आपल्या जिवापेक्षाही घोडी मोलाची मानून दरवाज्यातल्या झोंबाझोंबीकडे सरकले. एवढ्यात शेपाचशे हशमांचे "धीनऽ धीऽन" गर्जणारे, जंग अंगभर सरसरलेले, बेभान भिरे घेऊन इखलासखान आपल्या हातची तेग नाचवत दरवाज्यातच येऊन भिडला. सगळा जीव महाराजांच्यात अडकल्याने मुकर्रबखानाच्या पथकाचे वार हटवत हटवत म्हलोजीही, संताजी-बहिर्जीसह त्याला आडवे होत मोठ्या निकराने दरवाज्यापाशीच आले. दरवाज्यासमोरच आता कुरुक्षेत्र पेटले, मोतद्दारांनी आणलेली जनावरे राजे, कुलेश, अर्जोजी, राया-अंता यांनी अटीतटीने मांडाखाली घेतली होती. म्हलोजींनी आपला घोडा धन्याच्या जवळ काढला होता. भिंगरीसारखा तो त्यांच्या घोड्याभोवतो फिरवत म्हलोजी झाले वार झेलताना, वार करतानाच ओरडत होते, "भांगा काडा धनी. नावडी जवळ करा. व्हडक्यात बसून इथनं निघा. जिवाची बाजी लावू आमी." म्हलोजींच्या रूपाने मराठी दौलतच आक्रोशत होती. जागजागी मावळे-हशमांची जंगी हत्यारी-मारामारी जुंपली होती. खणखणाट, आरोळ्या, टापा, वार बसताच उठणाऱ्या घोड्यांच्या खिंकाळ्या यांचा कोलाहल माजला होता.

भवानीच्या पोतागत अंगभर सरसरून पेटलेले छत्रपती संभाजीराजे गोफण फिरवावी तसे हातचे हत्यार सपासप फिरवत भांगा मिळेल तिथे मांडाखालचा चंद्रावत घुसवू लागले. म्हलोजी, कुलेश, संताजी, बहिर्जी, अर्जोजी असे कुर्बान पटाईत वादळातून दिवली जतून न्यावी तसे त्यांना नावडीच्या रोखाने भांगा देण्यासाठी, कडे टाकून पणाला पेटले. जसा महाराजांचा पांढरा चंद्रावत सरकत होता तसा इखलासही मधल्या लढत्या मावळ्यांना बगलेला टाकत सरकू लागला. आता महाराज वाड्यापासून नावडीच्या बरेच जवळ आले होते. पहाट सरती असूनही लढणाऱ्या मावळ्यांच्या आणि हशमांच्या अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. आपल्या लोकांना चेतना देताना म्हलोजी, कुलेश— मुकर्रब, इखलास कोरड पडावी अशा किलकाऱ्या देऊ लागले. गर्दीतून बाहेर पडलेल्या काही मावळ्यांनी नदीच्या पात्रात हत्यारबंदीने सिद्ध केलेली होडकी डचमळत होती. काठावरच्या माळरानावर चाललेल्या झोंबाझोंबीकडे डोळ्यांत प्राण आणून बघत होती.

खास काफरांच्या राजाला अंगलटीने भिडण्याच्या आड म्हलोजीच येतात हे हेरलेला इखलास म्हलोजींच्याकडे बोट रोखत ओरडला— "घेर डालो बुढ्ढेको." राजांची आघाडी धरून लढणाऱ्या म्हलोजींच्या भोवती चवताळल्या हशमांनी दाटीच दाटी केली. फळीपासून म्हलोजी तुटून एकले झाले. तरीही हातचे हत्यार लाजून जावे असे खरस पडल्या तोंडाने 'बुढ्या बोलीत' कडकडतच राहिले, "नावडी – व्हडकी – धनी." सिंहगडावरचे शेलारमामा जसे त्यांच्या रूपाने हात फिरवीत होते. मामा फत्ते घेत टिकले होते. पण म्हलोजी? अंगावर जागा नव्हती त्यांच्या जखम झेलायला. आणि – आणि झालाच वार हाशमी, जाड पात्याच्या तेगीचा त्यांच्या छाताड्यावर!! कोसळले – म्हलोजी जनावरावरून खाली कोसळले! दौलतीचे दुसरे मर्दाना सरलष्कर कोसळले.

एव्हाना नावडीच्या नदीकाठापर्यंत पोहोचलेल्या लढत्या राजांच्या कानावर जाळासारखी खबर पडली "म्हलोजीबाबा पडले." ती ऐकताच सुन्न झालेल्या शिवपुत्राच्या हातातली तेग पळभर जागीच रुकली. तोच मोका साधून भोवती भिडल्या हशमांतून आला वार हुकवण्यासाठी झटकन मान कलती फिरवताना राजांच्या डुईचा टोप उडाला. नावडीच्या भुईवर आला. त्याने चरकलेल्या राजांनी कसल्यातरी अनामिक बळाने पायीच्या मोजड्यांची टाच इतक्या जोराने चंद्रावताच्या पोटात खुपसली की कळीसरशी ते जनावर नदीकाठच्या रोखाने बेफाम उधळले.

पण – पण पात्रात उतरावे तो पुरा नदीकाठ नंग्या तेगी उगारलेल्या हशमांनी केव्हाच रोखून टाकला होता. घोडा फिरवलेल्या छत्रपतींना संताजी-बहिर्जी सावलीसारखे मागे आलेले दिसले. त्यांना बघताच महाराज ओरडले, "थांबू नका इथं. रायगड गाठा. मिळेल त्या आसामींनिशी गड राखा – निघा." भोवतीच्या हशमांचे वार दोघेही परतवत होते – राजे आणि घोरपडे बंधू. काळ जसुद्धा हेलावून गेलेले संताजी पिळवटून ओरडले, "हुयाचं ते हुईल. आबा तर ग्येलेच. कसं टाकावं धन्यास्नी मागं एकलं?"

"आण आहे जगदंबेची. हुकूम आहे हा आमचा. निघा –" एवढ्या कोंडीत ऐन जंगमैदानावरसुद्धा त्यांच्या न कळणाऱ्या डोळ्यांकडे बघताना हत्यार फिरवणारे संताजी ओरडून गेले. "जी." आणि त्यांनी घोडा वळवला. बहिर्जी त्यांच्या मागे झाले.

जागजागी नावडीच्या माळावर कामी आलेल्या मावळ्यांचे आणि हशमांचे देह इतस्तत: पडले होते. निपचित पडल्या सरनौबत म्हलोजीबाबांच्या पांढऱ्या गलमिश्या वाऱ्यावर फरफरत होत्या. त्यांचे उघडे डोळे कसल्यातरी आशेने नावडीच्या नदीकाठाकडे जखडले होते. अर्जोजी, राया-अंता सावलीसारखे खाशांच्या पाठीशी होते. हयातीतला हाही सर्ग पुरा करण्यासाठी राजांची उजवी धरून 'कनोजा' म्हणून सगळ्या मंत्रिमंडळाने हयातभर हिणवलेले, हेटाळलेले कुलेश लढत होते! संगमेश्वराबाहेर निसटण्याचे सर्व मार्ग रोखले गेले होते. लढणे आणि लढणे एवढेच सगळ्यांच्या हाती उरले होते. आणि ते सर्वांनीच पुरते जाणले होते. मने करकचून बांधली होती. चारी बाजूला सरासर फिरत्या नुसत्या तेगींचा खणखणाट चालू झाला आणि कुठूनतरी सुटलेला एक तीर कुलेशांच्या उजव्या दंडात सपकारत घुसला. डाव्या हाताने उजवा दंड घट्ट पकडून धरतानाच कुलेश घोड्यावरून कोसळले. कोसळतानाच ओरडले, "मैं गिर गया।"

ते ऐकून अंगावर पडते वार सपासप फेकून देत छत्रपती त्यांच्याजवळ आले. पाते लवायच्या आत भुईवर झेप टाकून त्यांना काखेत हात घालून वर उचलताना म्हणाले, "उटा छंदोगामात्य. दिल धरा. लढता लढता मरू. पुरे करू जिंदगीचें काव्य. साजेसे." कुलेशांनी तीर केव्हाच काढून फेकला होता. जाम्याचा उजवा हातोपा रक्तचिंब झाला होता त्यांचा. तरीही मुठीतले हत्यार नव्हते सोडले त्यांनी. राजांच्या बरोबरच पायउतार झालेले राया-अंता, अर्जोजी असे कितीतरी धारकरी महाराज आणि कुलेश यांच्यावर तुटून पडणाऱ्या हशमांच्या लाटा थोपवून धरण्यासाठी निकर करत होते. आता भुईवरची हातघाईची मारामारी पेटली. कुणाचीच कुणाला जोड मिळणे शक्य नव्हते. इखलास, मुकर्रबही पायउतार झाले होते. हशमांची इतकी दाटी झाली होती की, त्यातल्याच कित्येकांना हत्यार फिरविणेही अशक्य झाले. कुणालाच हत्यार फिरवता येणार नाही इतकं माणूसच माणूस राजांभोवती दाटलं. त्यांच्या जखमी अंगाभोवती चौ बाजवांनी कैक भाल्यांची टोके आणि तलवारींची पाती भिडली. हातची उचललेली, आबासाहेबांची भवानी तशीच रुकली. नैवेद्याचा गुळखडा चहूबाजूंनी काळ्याशार डोंगळ्यांनी घेरला. हीच गत, कुलेश, रायाजी-अंताजी यांची झाली. दाटलेल्या हशमांची कोंडी फोडत मुकर्रबचा तरणाबांड मुलगा इखलास, श्रींच्या राज्याचे वारस असलेल्या, बऱ्हाणपूर, औरंगाबाद तसनस करणाऱ्या, गोव्यातील फिरंग्यांची झोप उडविणाऱ्या, जंजिऱ्यातील हबश्यांना हाय घ्यायला लावणाऱ्या, आका-हजरतला मराठी मुलखातून शिकस्तीनं फौजा माघार घेण्याची नौबत आणणाऱ्या लईम संभासमोर आला.

देहाचे म्यान नावडीच्या मातीवरच ठेवल्यागत तेगीच्या धारेसारख्या तळपत्या नजरेने राजे हातच्या भवानी तलवारीकडे बघत होते. कुणातच नसल्यागत.

"रख दो हथियार" इखलास कडाडला. भक्कम खडकावरून दर्याची लाट जावी तसेच ते शब्द राजांच्या कानांवरून गेले. तसूभरही हालचाल झाली नाही त्यांची.

"काफर सुनते हो? फेंक दो हथियार!" घुश्श्याने पेटलेला इखलास, अभिषेकसमयी पवित्र नद्यांचे जल, तीर्थ म्हणून मस्तकी घेतलेल्या राजांची केसावळ मुठीत पकडून ती गदगदा हलवीत गरजला. त्या बेगुमानीने राजांनी आपली जळजळीत नजर खानावर टाकली. ती बघून राजांच्या हातचे हत्यार क्षणात गर्दनीवर उतरेल म्हणून खान चरकला. एवढ्यात गर्दी फोडत लालसर दाट दाढी-मिश्यांचा खासा मुकर्रबखानच त्या जागी आला. त्याला कुर्निसात करून इखलास म्हणाला, "हथियार नहीं छोडता काफर। मगरूर है।"

"सब्र बेटे। सूरमा आदमी शौकसे हथियार नहीं छोडते।" आपल्या बेट्याला सुमार करत मुकर्रब राजांच्या सामने आला. त्यांच्याकडे बघत भोवतीच्या आपल्या हशमांना म्हणाला, "दस्त करो इसको पहले। रस्से डाल दो हाथोमें। बादमें खींच लो हथियार। ले जाव।"

लढाई थांबली होती. जिवंत मावळे मंडळी काढणीबंद झाली होती. महाराज आणि छंदोगामात्य कवी कुलेश संगमेश्वराच्या शिवासमोर दस्त झाले!!

नवा दिवस फुटीला पडला होता. या वेळी अकलूजच्या साठ हजार फौजी तळावर आपल्या डेऱ्यात इराणी सतरंजीवर गुडघे टेकून सब्र की नमाज पढताना मुहिउद्दिन मुहंमद आलमगीर गाझी औरंगजेब पुटपुटत होता, "अलहम्दुल्लाल्ललाह – ला इलालिल्लिलाह – मुहम्मद उर्रसूलिल्ललाह –"

नमाज पढून होताच खाशा दरबारी डेऱ्यात त्याने वझीर असदखानाला विचारले, "मुकर्रबखाँकी क्या खबर कोल्हापूरसे? पीछा कर रहा है नाचीज संभाका? या पडा है ऐशोआरामसे लौंडियोंके साथ कोल्लापूरमें?"

– आणि मुकर्रबखानाला परतीचीही वाट दावून संगमेश्वराच्या रानातच आपली घोडी थांबवून लढतीची थकावट दूर करण्यासाठी न्याहारीचा कांदा फोडताना गणोजी आणि नागोजी म्हणत होते, "कांदा फोडला की पानी धरतं डोळ्याला. पर विलाज न्हाई. 'भाकरी' तर जाय पायजे!"

मुकर्रबखानाला थांबायला वेळच नव्हता. तो जाणून होता, थांबले तर दस्त केल्या आपल्या कैदी राजाला सोडवण्यासाठी, मिळेल त्या जागेला मावळ्यांच्या तुकड्या जिवे तुटून पडणार होत्या. आपले पडले हशम दफन करण्यासाठी हत्यारबंद हशमांचे पथक मागे ठेवून त्याने इखलासला हुक्म दिला, "जो तैयार है इस्लाम बनने उनको रिहा कर दो।" पकडलेल्या मावळ्यांत राया-अंता होते, ते धर्म डुबविणे मान्य करणे शक्यच नव्हते. नतिजा साफ होता. अर्जोजी कसेतरी निसटले होते. पण एकल्याने काही करणे शक्य नाही म्हणून कऱ्हाडकडे कूच झाले होते. सलामत बचावलेले संताजी-बहिर्जी हुकुमाप्रमाणे रायगडाकडे दौडत होते. संताजीकडे राजांच्या चंद्रावताच्या पाठीवरचे जीन होते. महाराणी येसूबाईंना ते खूण म्हणून तेवढेच दाखवणे शक्य असल्याने त्याने गर्दीतून उचललेले.

राजे पायउतार होताच मुकर्रबच्या चिडल्या हशमांनी वार उतरल्याने घायाळ झाला 'चंद्रावत' चौखुर ताणून भुईवर पडला होता. त्याचे छातवान मंदपणे वरखाली होत होते. उघड्या डोळ्यांतून वेदनांनी पाणधार लागली होती. एका बगलेला आपल्या कामी आलेल्या घोरपड्यांच्या जमावात निष्प्राण पडलेल्या म्हलोजींच्या हातची मरणमूठ हत्यारावर करकचून आवळली होती. डुईची कंगणी, लाल पिळाची पगडी हत्याराजवळ भुईवर पडली होती.

चारी बाजूंनी भालाइतांची टोके भिडवून कुलेश आणि राजांना इखलास मुकर्रबनी एकत्र आणले होते. खांद्यावरच्या हिरव्या खिल्लतीला झटके देत मुकर्रब कसा गरगरा फिरत आपल्या फौजेला हुकमांमागून हुकूम देत होता. "जल्दी करो। वख्त नहीं है।"

मधेच लालसर दाढीवर हात फिरविताना त्याचा चेहरा ओसंडल्या उत्साहाने भरून वाहू लागला.

दस्त मावळे काढण्या खेचून कत्तलीसाठी नेले जाऊ लागले. हशम खेचत्या काढण्यांची ओढ दंडावर बळाने रोखत राया-अंता भरल्या डोळ्यांनी, पिळवटून ओरडले, "धनी ऽऽ"

"हयातभर न्हायलाव सावलीगत पाठीशी. पर आता कसली ही ताटातूट? आमास्नी बी घ्या संगं धनी." थोरल्या रायाच्या डोळ्यांतून कुणबी इमानाचे पाणी खळकन बाराबंदीवर उतरले.

"दुदाचं झालाव तसं रगताचं भाव करा आमास्नी. संगं न्या धनी ऽ" जखडल्याच हातांनी मुजऱ्यासाठी धाकल्या अंताने मान लववली.

थोरल्या आऊ गेल्या तेव्हा, आबासाहेब गेल्याची खबर कानी पडली तेव्हा, समर्थांनी हयातीचा ग्रंथ पुरा केला तेव्हा, काळ्या हौदावर चितेवर चढल्या पुतळा आऊसाहेब बोलल्या तेव्हा भरून आले तसे राजांच्या डोळ्यांचे टाके सरसरत डबडबून आले. काहीच दिसेनासे झाले. जगदंबेनेच राजांशी जोड घातलेले राया-अंता मागे फिरण्यासाठी उसळत असतानाच हशमांनी खेचले.

आता मुकर्रबखानाची फौज परतीसाठी तयार झाली होती. सगळीकडे देख टाकून सगळे मनाजोगे झाले आहे याची पक्की खात्री करून घेत मुकर्रब कडाडला, "डाल दो काफरोंको घोडोंपर। जखड दो रस्सेसे कसके, ले चलो ये शाही तोहफा हजरतको। मरहट्टोंका राजा और उसका बम्मन शायर। बहोत खूब। खैर अल्लाकी।"

भालाइतांनी भाल्याची टोच राजांच्या पाठीला लावली. तसं काढणीवाल्या हशमांनी काढण्या खेचायला सुरुवात केली. बळ एकवटून आपल्याच मुठीने काढण्या पकडून त्या रोखात पाय भुईत जाम रुतवून एकटक मुकर्रबकडे बघत राजे निर्धारी म्हणाले, "खान, जंग आहे हा. दर्शन घेणार आहोत आम्ही आमच्या सरलष्करांचे."

गोंधळलेला मुकर्रब भोवतीच्या हशमांकडे बघत म्हणाला, "क्या बोलता है? मतलब?"

त्याच्यावरची नजर तशीच ठेवून खुद्द राजेच झटकन हिंदुस्तानीत म्हणाले, "जंग है। राजा हैं हम। देखना चाहते हैं हम कुर्बान हुआ हमारा सालार।"

"शौकसे, शौकसे" गर्दन मागे टाकून मुकर्रब एवढा हसला की त्याच्या डोळ्यांत पाणी आले. काढणीवाले भालाईत पाठून खेचलेच जावेत एवढ्या ओढीने राजे म्हलोजी पडलेल्या जागेकडे झेपावले. राजांनी गतप्राण म्हलोजींच्या छातीला हात भिडवून तो कपाळीच्या शिवगंधाला लावून भोवतीच्या कुणालाही कळणार नाही असा मुजरा घातला. फक्त एकाच विचाराने, आले असते पावनखिंडीत पडले बाजीप्रभू आबासाहेबांच्या सामने प्रेत म्हणून तर त्यांनी काय केले असते? सिंहगडावर पडल्या

मालुसरे काकांना बघून काय केले असेल त्यांनी? म्हलोजींनी मरणाच्या मोलाने मिळवला होता तो मुजरा. खुद्द मराठी दौलतीच्या राजाकडून!

हशमांनी काढण्या खेचल्या. भालाइतांनी टोच जारी केली. तयार केल्या घोड्यांवर राजांना आणि कुलेशांना लादण्यात आले. दोघांचेही हात दोरखंडांनी करकचून आवळण्यात आले. रश्यांनी दोघांची शरीरे घोड्यांना जाम जखडून टाकण्यात आली. राजांच्या घोड्यांचे कायदे इखलासने मुठीत आवळले. दोन्ही घोड्यांना ते दौडत रहावेत म्हणून खुब्यावर भाल्याची टोच द्यायला दोन दोन घोडाईत स्वार तयार झाले. छत्रपती, छंदोगामात्यांना गोणीसारखे घोड्यांवर आवळून होताच, हातातली तेग उंच उठवून मुकर्रबखान केवढ्यातरी मोठ्याने ओरडला, "धी ऽन धी ऽन, चलो ऽ"

मराठी दौलत काढणीबंद करून फते झाली. मुकर्रब-इखलासची फौज मिरजेच्या रोखाने दौडू लागली. प्रांत संगमेश्वर, खेळणा, पन्हाळा, मलकापूर कुठल्याच ठाण्याला संगमेश्वरात घडल्या रामायणाची काहीही कल्पना नव्हती. उनतापीचे दिवस आल्याने माणसे शिवारांकडे मशागतीला चालली होती. दहापाच घोडाईत बरोबर घेऊन, जीव संगमेश्वरात अडकलेले संताजी-बहिर्जी रायगडाच्या रोखे दौडत होते, "महाराजास्नी सोडवायाच पायजे पर कसं? कुठं नेलं आसंल हरामजाद्यांनी? घाईत पडल्या आबास्नी डाग द्याया बी जमला न्हाई. काय करावं? कसं करावं?" दौडत्या जनावरांच्या टापांपुढेही त्यांची सैरभैर मने धावत होती.

सरदेसायांच्या वाड्याची वाताहत झाली होती. लढाऊ मर्दाने होते ते कामास आले होते. दस्त झालेले कत्तलीसाठी एकजाग केले जात होते. मुकर्रबखानला नेता येणे शक्यच नसल्यामुळे, स्वाराविना इतस्ततः मोकाट सुटलेली जनावरे शेपट्या चाळवीत नावडीच्या माळावर गवत चाबलत फिरत होती. वाड्याच्या चौकातील सांगतेच्या यज्ञकुंडातील समिधांची राख फरफरत इकडे तिकडे उधळत होती. देव्हाऱ्यातल्या शिवपिंडीवरचे अभिषेकपात्र पाणी संपून कोरडे झाल्याने 'आ' वासून 'शिवपिंडीकडे' बघत होते. अशिव, ओस दिसत होते.

विजयी मुकर्रबची फौज किल्ले पन्हाळा बगलेला टाकून भेडसगाव बत्तीसशिराळा मार्गे मिरजेचे, बंदिस्त भुईकोट मोगली ठाणे जवळ करायला निघाली.

उंच पन्हाळ्याच्या मेटावर गस्त घालणाऱ्या मेटकऱ्यांना दुरवरून ती दिसूनही गेली. पण तिच्यातून सगळ्यांच्याच जिवाचा दिवा फडफडत चाललाय याचा कुणालाही थांग नव्हता. संगमेश्वराहून कसेतरी निसटलेले काही मावळे घोडाईत, मुकर्रब राजांना कोल्हापूरला आपल्या ठाण्यावर नेईल ह्या अंदाजाने विशाळगड जागवून, पन्हाळा तसाच बगलेला ठेवून आडवाटेने कोल्हापूरला जवळ करत होते.

मलकापूर तर्फेने मुकर्रबच्या फौजेने वारणा नदी ओलांडली. पूर्वीच इदलशाहीत असलेले, आता औरंगचे झालेले बत्तीस शिराळ्याचे भुईकोट ठाणे मुकर्रबच्या फौजेने

जवळ केले. वारणेचा हा काठ धरून चारीकडे मोगली ठाणी होती. खान अल्लाद झाला. बिनघोर झाला. गेले दोन दिवस त्याने रात्रीची दौड, संगमेश्वराची लढाई, परतीची ऊरफोड दौड आपल्या फौजेचे कैक हशम गमावूनही शिताफीने साधली होती. संगमेश्वराहून त्याने हरकारे धाडून कोल्हापूरच्या ठाण्याहून मागवून घेतलेली कुमकही पोहोचली होती. मुंगीलाही शिरकाव करता येणार नाही असा हशम आता मुकर्रबच्या प्रचंड फौजेला एकवटला होता. पहारेकरी पिटाळून लावत असल्याने त्यांतल्याच कैकांना इच्छा असूनही काफर कैदी बघायला मिळत नव्हते!

अकलूजला साठ हजार मोगली तळावर नुसता कल्लोळ-कालवा उडाला होता. संगमेश्वराहूनच मुकर्रबने पाठवलेले हरकारे तळावर पोहोचले होते, "सैतान संबा गिरफ्त हुआ." ही खबर काही क्षणांतच हा ऽ हा ऽ म्हणता साठ हजारांच्या तळभर पसरली. पुऱ्या तळावरचे हशम जागजागी एकमेकांना छातवाने भिडवत, मिठ्या मारून जल्लोशाने म्हणत होते, "सुना! काफर संबा कब्ज हुआ. सुबहान अल्ला ऽऽ!"

आपल्या शाही डेऱ्यात, बारबार कुर्निसात घालून ही जन्नती खुष खबर कानी घालणाऱ्या वझीर असदखानाला, तसबीहची माळ गरगर फिरवत, फुटू बघणारा काळजातला आनंद मोठ्या मुश्किलीने रोखत शहेनशाह आलमगीर शांत, धीमा हुक्म देत होता, "फौज उठाव अकलूजकी। बहादूरगड चलनेका इंतजाम करो। भेज दो शाही खिल्लत और मरातब मुकर्रबको। पेश याद फर्माओ उसको।"

एव्हाना बत्तीस शिराळा सोडून मिरज भुईकोट ठाण्यात आल्या मुकर्रबची, पदरचे किंमती कैदी जिवंत ठेवण्याची हर कोशिश चालली होती. त्याला भरवसा होता जान बचावण्यासाठी दोन्ही कैदी झक्कत इस्लाम कुबुल करतील. कुणी सांगावे, सूरमा राजे खिल्लत पांघरून दख्खन सुभेदारीची नामजादी पत्करतील! विजापूरच्या सिकंदर आदिलशाहाचा, गोवळकोंड्याच्या तानाशाहाचा पाड लागला नाही तिथे या मामुली संबाची काय बात! म्हणूनच तो त्यांच्या अवतीभोवती जिवाचें बेरवाईट करण्यासाठी कोणतेही हत्यार त्यांच्या हाती येणार नाही याची, त्यांनी काहीतरी खाना घ्यावा याची हर कोशिश करत होता. एवढी दौड झाली होती. पण सांगतेचे भोजन संगमेश्वरात घेतल्यापासून राजांनी आणि कुलेशांनी अन्नाचा कणही घेतला नव्हता.

आपली तैनाती फौज घेऊन औरंगजेब अकलूजहून पेडगावच्या बहादूरगडाकडे आगेकूच झाला. त्याचा निम्माअधिक तळही हालला. दस्त कैदी बादशहासमोर पेश करायला उतावीळ झालेला मुकर्रब मिरजेहून अकलूजला पोहोचला. कैद्यांना बघायला त्या तळावरचे मागे राहिले हशम आरोळ्या ठोकत झुंडीने दाटीवाटी करू लागले. थंडी हटती टाकून आता ऊनतापीचे दिवस चढू लागले.

भूकंपाने हलावा तसा रायगड गड्ड्यातून हलला होता. संताजी-बहिर्जी गडावर

पोहोचले होते. पाचाडच्या राबत्या बाजूने पडलेला एत्तिकादखानाचा घेर चुकवून चोरदरवाज्याने ते गड चढून आले होते. खासेवाड्यात महाराणी येसूबाईंच्या समोर उभा राहताना संताजी हातच्या जिनाने तोंड झाकून घेत कुडीभर गदगदत म्हणाला, "जगदंबा कोपली मासाब, त्वांड न्हाई सांगाय. धनी संगमेसुरात फसलं! कोल्हापूरच्या खानाच्या घेरात ... घेरात दस्त झालं!!" जिनाने झाकल्या चेहऱ्यानेच येसूबाईंच्या पायावर पडत एवढ्या उभारीचा संताजी – पण तोही गदगदू लागला. कानांवर गपकन हात घेतलेल्या येसूबाई, अंगावर वीज पडल्यागत जागीच बधिर झाल्या. आपण श्रीसखी आहोत, रायगडावर आहोत, महाराणी आहोत, कशाचेच भान उरले नाही त्यांना. "आई ऽ वा ऽ घजाई" असा आगडोंब उभी कुडी हालवून टाकत गरगर फिरला त्यांच्या आतल्या आत, विस्फारल्या भोसलाई डोळ्यांसमोर रायगडासकट ब्रह्मांड फिरले. देवमहालाकडे धावत जगदंबेच्या देव्हाऱ्यासमोर त्या एकल्याच अंगभर हलू – हमसू लागल्या. त्यांना कुशीत थोपटतं घ्यावा अशा जिजाऊ नव्हत्या, धाराऊ नव्हती. आता होती फक्त आणि फक्त जगदंबाच!

केवढे फिरले त्यांच्या मनी! स्वारीला सोडविण्यासाठी जिवाचे रान केले पाहिजे. पण कसे? गड तर खानाच्या घेराने आवळून टाकलेला. त्यांना फार फार सय झाली ती सरलष्कर हंबीरमामांची. भडभडून भडभडून आलं. रूपाजी, मानाजी त्र्यंबक–रामसेजाकडे जखडून पडले होते. निळोपंत कल्याण–भिवंडीत गुंतून पडले होते. जेवढे जेवढे कुवतीचे खासे होते ते ते मुलूखभर अटीतटीने आपआपल्या प्रांताला भिंगरीसारखी अटीतटीची घोडी फेकत होते.

पुरत्या एकाकी झाल्या येसूबाई. वादळातली मोगरवेल थरथरावी तशा थरथरू लागल्या. उभी हयातच फिरली क्षणभरातच त्यांच्या पाणभरल्या डोळ्यांसमोर. 'जन्म देणारं आणि वतनाच्या लालसेनं पारखं झालेलं शृंगारपूर! 'सूनबाई' आहोत असं कधीच भासू नये असे प्रेम देणारे आबासाहेब. थोरल्या आऊ, सती गेल्या मासाहेब यांनी मुलीसारखा दिलेला घरोबा. सिंहासनाच्या हवसेपोटी रात्रंदिन स्वारींना-आम्हास पाण्यात बघणाऱ्या रामराजांच्या मासाहेब. त्यांचे पाठीचे बंधू असून आम्हाला वडिलकीचा पाठआधार देणारे हंबीरमामा. साफ मनाची, वावगी बाब समोर आली तर तडकन बोलून दावणारी स्वारी. आजोळचे असून स्वारींना झोपेच्या सुखालासुद्धा पारखे करणारे फलटणकर. पडली ही दौलत तर काय करील आमचे औरंग? त्याचा जनाना – छी ऽ छी ऽ' मान डावी-उजवी तडफडती झटकताना एकाकी, असहाय लहान मुलीगत त्या हमसू लागल्या. उसासा बाहेरही पडू नये एवढ्या जीवघेण्या कोंडीने त्यांचा ऊर वरखाली डचमळू लागला.

"राणीसा ऽ हेब! धीरानं मन बांधावं. गडावरच नव्हे तर मुलखात जगदंबेच्या रूपानं आता आहात त्या आपण एकल्याच. अशीच आली होती नौबत थोरले महाराज आणि

पोर वयाचे महाराज आम्यात याच औरंगच्या कोठडीत फसले होते त्यासमयास थोरल्या आऊसाहेबांच्यावर! हबशी जौहरच्या घेरात थोरले स्वामी अडकून पडले पन्हाळ्यावर तेव्हा वेढ्याचा उपराळा करण्यासाठी कमरेला हत्यार बांधून जायला निघाल्याही होत्या त्या पन्हाळ्याकडं. हे सारं मनी धरावं. उठावं. पायबळानं गडाला धीर द्यावा." देवमहाली आल्या खंडोजींचे शब्द येसूबाईंच्या पाठीवर जसे मायेचा धीराचा हातच फिरवून गेले. राजा हा उपभोगशून्य स्वामी असतो हे जेवढे खरे तेवढेच किंबहुना त्याहून अधिक, अशा राजाची राणी उपभोगशून्य तर असतेच पण स्वामिनी असलीच तर खांद्यावर पडणाऱ्या फक्त जोखमींची; कारण ती असते केवळ सावली! एकल्या राजाची नव्हे तर त्याच्यासाठी तळहाती जीव घेऊन प्रसंगी आपल्या जिवांची कुरवंडी करणाऱ्या शेकडो रयतेची.

पदरशेवाने आपल्या नेत्रकडा टिपून येसूबाई उठल्याच. एकदा देव्हाऱ्यातील जगदंबमूर्ती डोळ्यांत भरून घेत निर्धारी म्हणाल्या– "खंडोजी, रूपाजी-मानाजींना रामसेज सोडून मिळेल तेवढ्या कुमकेनं रायगडाचा उपराळा करायला लिहा. रामराजांना आता आमच्याच महाली राहाण्याची व्यवस्था करायला सांगा! येसाजी दाभाड्यांना अर्जोजी, गिर्जोजींना असाल तसे रायगड जवळ करायला हारकारे द्या. तुम्ही कुठल्याही कारणासाठी गड सोडू नका. भरोसा आहे आमचा – स्वारी प्रसंगी मोडेल पण रायगडाच्या बाबीनं कसलाही सुलूख नाही मानणार!! जशी स्वारी तसेच रामराजे मानून पोख्तपणे चालविले पाहिजे साऱ्यांनी!!"

त्या येसूबाई नव्हे– साक्षात मूर्तिरूप जगदंबाच मानवी रूपाने बोलताहेत असा खंडोजींना भास झाला.

मिरजेच्या भुईकोट ठाण्यातून बाहेर पडलेले मुकर्रब-इखलास जोखमीचे कैदी घेऊन अकलूजच्या तळावर विश्रांती आणि रसद घेऊन बहादूर गडाकडे निघाले. पिछाडीला राहिलेला अकलूजचा शाही तळही त्यांना सामील झाला. पुराने नदी फुगावी तशी आता मुकर्रबची फौज दिसू लागली. माथ्यावरची ऊन्हतापीची झळ चुकवावी म्हणून फौजेच्या हशमांनी टापश्या बांधून गर्दनी खाली घातल्या होत्या. राजांना आणि कुलेशांना तर लादलेल्या जनावरांच्या गर्दनीशीच दोरखंडाने जखडून टाकले होते. तळपत्या ऊन्हाखाली हजारो घोड्यांचा काफला, खरखरीत, उजाड प्रदेशात संथ चालीने चालला होता. सगळ्या फौजेतल्या तीनच मनांत विचारांची खाई रखरखत होती. दक्षिणेत आल्यापासून शहेनशाहला असा जिंदा तोहफा नजर करण्याची किस्मत लाभलेल्या मुकर्रबखानाच्या मनात एकाच विचाराची की, "जी चाहे सो फैसला लेनेवाले हजरत संबाको ही दख्खन सुभा करें तो क्या? कल उसको भी कुर्निस करना पडेगा!" आणि जनावराच्या गर्दनीशी आपली गर्दन जखडलेल्या राजांच्या मनात – एकाच विचाराची की "पडलाच रायगड तर काय गुजरेल श्रीसखींच्यावर?" आणि त्यांच्याच मागून खेचल्या जाणाऱ्या कवी कुलेशांच्या मनात एकाच विचाराची – की "हमारे साथ नहीं बैठे भोजनमें कभी रायगडके कोई मंत्रिगण। और इस आखरी भोजनमें स्वामी भी नहीं मिले साथ तो?"

मजला मागून मजला मागे पडत होत्या. उन्हाने घायाळ झाल्या राजे कुलेशांना जवळ येऊन घोड्यावरूनच इखलास खोचकपणे जाब करत होता, "प्यास लगी है मरहट्टोंके शहेनशाह और वझीर?" आणि कैद्यांनी मान फिरवताच काखेतल्या बांधल्या पखालीचे पाणी त्यांच्या मुखड्यावर शिंतडून, पखाल आपल्याच तोंडाला लावून घटाघटा पाणी पिऊन खदखदा हसताना म्हणत होता, "क्या गर्मी है? कितना ठंडा है पानी!"

उन्हाची मार असह्य झाली की आपली जनावरे आणि फौज वाटेतल्या आमराईच्या गर्द सावलीखाली उभी करून राजे, कुलेशांची घोडी मात्र मुद्दामच उन्हात खडी केली जात होती. दिवस आता कलायला झाला आणि फौज बहादूरगडापासून दोन कोसांवर येऊन रुकली. मुकर्रब-इखलास कुणाची तरी वाट बघत होते. एकसारखे घोडे फौजेला आघाडीला काढून तळहाताची झड डोळ्यांवर नेत बहादूरगडचा माग घेत होते. बऱ्याच वेळाने एक घोडेपथक समोरून येताना दिसू लागले. त्याच्याबरोबर दोन उंटही होते. पण त्यांच्या पाठीवर स्वार नव्हते. ते माना वरखाली डुचमळ करत तसेच दौडत पथकाबरोबर येत होते. तेही विचारे उन्हाने कासावीस झाले होते.

बहादूरगडाहून खुद्द औरंगजेबानेच फत्ते घेऊन येणाऱ्या मुकर्रबखानच्या आगवानीसाठी पाठविलेले ते त्याचे नेक सरदार होते– सरदारखान आणि हमिदुद्दीनखान! त्यांच्याबरोबर मुकर्रबसाठी मरातबाच्या नव्या खिल्लती देण्यात आल्या होत्या. एका खिदमतगाराच्या घोड्यावर दोन 'तख्ता - कुलाह' म्हणजे इराणी पद्धतीचे लाकडी खोडे होते. सरदार आणि हमिदुद्दीनला बघताच मुकर्रब आणि इखलास पायउतार झाले. पुढे होत त्यांनी त्यांना कडकडून खांदाभेट दिली. हमिदुद्दीन मुकर्रबला म्हणाला, "मुबारक हो खान– अलमपन्हाका हुक्म है, दोनो कैदिओंको 'तख्ता - कुलाह' डालो। उतार दो उनके बदनसे काफर असबाब और चढाओ ये खास खुशामदगारोंके कुर्ते! जकड दो उनको उंटके पीठपर और ले चलो बाजे बजाते, ढिंढ निकालकर, बहादूरगड!"

मुकर्रबखानाच्या हशमांनी पटापट हालचाली करून घोड्यांवर जखडल्या राजे आणि कुलेशांना खाली घेतले. त्यांच्या गळ्यातील मोतीकंठे, कानांतील सोनचौकडे असे मौलिक डाग कुणी कुणी ओरबाडले. त्यांच्या अंगावरचे जामे ओरबाडून काढण्यात आले. त्याऐवजी विदूषकासारखे ढगाळ कुर्ते दोघांच्याही अंगी जबरीनं चढवण्यात आले. कमरेला घंटांच्या माळा आणि काटेरी वेलींची कडी आवळण्यात आली. डोकीवर उंच माटाच्या, लाकडी, विदूषकी टोप्या चढवण्यात आल्या. हात आणि गर्दन जखडून टाकणारे इराणी पद्धतीचे, लाकडी 'तख्ता – कुलाह' त्यांच्या हाता कंठात करकचून आवळण्यात आले.

दोघाही कैद्यांनी सरदारखान, हमिदुद्दीन आणि मुकर्रबखान यांनी दिलेले हुकूम पाळणाऱ्या खिदमदगारांना कसलाही विरोध केला नाही.

कसे दिसत होते राजे आता! कुठल्याही फौजी मावळ्याने त्यांना दुरून तसे बघितले असते तर गनिमाचा बहुरूपी खबरगीर म्हणून दस्तच करून टाकले असते!

ते 'राजे' नव्हतेच. विदूषकी पोशाखात बादशहासमोर पेश केले जाणारे 'बळी' होते. राजचिन्हाची एकच खूण 'नाचिज' म्हणून कुणीही उचकटून न टाकल्याने त्यांच्या अंगावर तशीच होती आणि तीही आबासाहेबांनी दिनरात छातीवर वागविलेली, चौसष्ट कवड्यांची फक्त भवानीमाळ! संगसोबतीला एकच माणूस होते – कुठल्या कुठे कनोज देशात उपजलेला एकमेव कवी – छंदोगामात्य – कुलएख्त्यार कुलेश!

सरदारखान, हमिदुद्दीन, इखलास-मुकर्रब यांनी कैद्यांना चौफेर कडेकोट घेर टाकणारी फौजेची हत्यारबंद शिस्त लावून घेतली. हात रश्यानं जखडलेल्या दंडात काढण्या आवळलेल्या कैद्यांच्या भोवती हजारो हशम तळपत्या नंग्या तेगी नाचवत हारीने उभे ठाकले.

शाही शहाजणे, तुताऱ्या, नगारे, चौघडे यांची एकमेकांत मिसळती घोष गर्दी उसळली. बेहोष हशमांनी नरड्यांच्या घाट्या फोडत किलकाऱ्या उठविल्या – "धीन ऽऽ न धी ऽऽ न."

निघाली! काफर कैद्यांना कडेकोट बंदोबस्तात घेराने जखडून धिंड निघाली. औरंगजेबाच्या पुऱ्या हयातीत त्याने सख्या भावांपासून कैक गनिमांची बेरहम कत्तल केली होती. पण आज त्याच्या हुकमाने निघणारी ही अशी पहिलीच धिंड होती. का घेतला होता त्याने हा असा निर्णय? एकाच हेताने. ही अशा धिंडेची खबर मराठा मुलुखात गावोगाव पांगेल – वाऱ्यासारखी. ती ऐकून हाय खाल्लेले जिंदे मरहट्टे आपसूक झुकत येतील तसलीम करत मन्सबीची खिल्लत मागायला. पडला मराठी मुलूख एकदाचा, की करून टाकता येईल कांजीवरमपासून तहत काबूल पर्यंतचा पट्टा इस्लामचा बंदा!! आणि त्या अफाट सलतनतीची राजधानी करता येईल – देहली!

मोतद्दारांनी हाती धरलेले कैद्यांचे काढणीबंद खेचले. राजे-कुलेश तिरपांगडत त्या झटक्याबरोबर ओढले गेले. भवतीच्या जमावातून शेलक्या शिव्या कल्लोळू लागल्या – "नाबका ऽर लई ऽम, मोज ऽदा – खिंचो कसके शैतानोंको।"

गेल्या नऊ वर्षांत याच सांबरूपी संभाने त्यांची बऱ्हाणपूर, औरंगाबाद अशी कैक ठाणी तसनस केली होती. कैक सुरम्या लढवय्यांना मौतीचे कंठस्नान घातले होते. फकीर फकिराण्याला जिम्मा रोजचा नमाज्सुद्धा नामुमकिन केला होता. त्यांचा नुसता हा घुस्साच नव्हता - शक्य असते तर सपासप हत्यारे चालवून त्यांनी दोन्ही कैद्यांचे एकाच गोळ्यात केव्हाच गाठोडे केले असते.

देठ मोडल्या खालमानेने मराठी दौलतीचे मानकरी छत्रपती आणि छंदोगामात्य कुलेश हत्यारी धारकरी खेचतील तसे भेलकांडत चालू लागले. तशाही स्थितीत त्यांना एकदा तरी बघण्यासाठी कैकजण गर्दी करून पुढे घुसत होते.

जे पाय रुजाम्यांच्या पायघड्यांवरून आत्मविश्वासाने रूपत, चालत आजवर आले होते तेच छत्रपतींचे रक्तदाट, गुब्बार पाय आज पेडगावच्या वाळवंटात फरफटत चालले. ज्या देहाने रायगडावर सोन्याच्या झुलेनं सजल्या हत्तीवरून राजा म्हणून मिरवून घेतले होते तोच जखडबंद देह धिंडीचा भोग भोगू लागला.

राजांनी भोवतीचं काहीच नजरेस पडू नये म्हणून डोळे मिटतेच घेतले होते. कुलेशांचे डोळे उघडेच होते – पण त्यांना दिसले तरी काही भासत नव्हते. त्यांच्या उजव्या दंडातून, संगमेश्वरात रुपल्या बाणाने ओघळून ओघळून थकलेले रक्त आता साकळले होते. काळपटले होते. भवतीच्या हजारो मुगल हशमांचा आनंदी जल्लोषाचा नुसता कलकलाट चालला होता. कुणाचेच कुणालाही काहीही ऐकू येत नव्हते. लोक ओरडत होते – "खिंचो – जोरसे – कसके खिंचो। मरहबा – मुकर्रब-इखलास – आफरीन."

काढणी खेचणाऱ्याने वैतागून एवढा जोरदार हिसडा हातातल्या काढणीला हासडला की जगदंबेच्या कपाळी चढविलेले कौलाचे फूल घरंगळत कोसळावे तसे राजे छाताडावर थेट भुईवर आडवे झाले! तशी भवतीच्या गर्दीत खुषीच्या ऊर्मीची लाटच लाट उसळली. कमरेला नेट देऊन उठणाऱ्या राजांना एकाकी भवानीबाई नि बाळराजांची आठवण झाली. ते बचपणी कमरेलाच घालत होते विळखा! थोडे मोठे झाले आणि सुटला त्यांचा विळखा! आता घालायचे मुजरे! मुजरे मुजरे! आहेत याद किती हातांनी घातले या कुडीला मुजरे? कशासाठी घातले त्यांनी ते? लाचार होते म्हणून? माणसे मान झुकवतात – कशापुढे? सत्तेपुढे? सा ऽ फ गल्लत! माणसे झुकतात प्राणापल्याड जाऊन भवतीच्या कैकांचे माणूसपण जपणाऱ्यांसाठी. आबासाहेब तसेच. ते गेलेत तरी का नाही वाटत गेल्यासारखे? कसे वागते असते तर ते आत्ता?

आणलेले, गर्दीमुळे बुजलेले उंट सांडणीस्वारांनी चुचकारून कसे तरी एकदाचे बसते केले. त्यावर लादण्यासाठी राजांना आणि कुलेशांना काढण्या धरलेले हशम खेचू लागले. ते त्यांना साधेना. पाय भुईत जाम रुतवलेले कैदी तसूभरही हलायला तयार नव्हते. काढणीधारी हशमांची आणि कैद्यांची खेचाखेच बघत असलेला इखलास भोवतीच्या हशमांना बघून कडाडला, "देखते क्या हो बेवकूब, गद्दार! उठाव दोनोंको, डाल दो उंटोंपे।" भोवतीच्या हशमांतले पाच दहा धिप्पाड हशम हातातल्या तेगी म्यानबंद करत पुढे झाले. लुटीची बोचकी उचलावी तसे राजांना आणि कुलेशांना बळजोरीने उचलून त्यांनी उंटावर लादले. दोरखंडांनी दोघांनाही उंटाशी करकचून आवळले. खूर वेडेवाकडे करत वेड्यावाकड्या अंगचणीचे उंट, भोवतीच्या जमावातून "धी ऽ न धी ऽऽ न" चा कल्लोळ उठत असतानाच भेदरून वर उठले. सांडणीस्वारांनी त्यांच्या शेपट्या करकचून

पिराळल्या. त्या कळीसमके माना मागेपुढे करत ती मुकी जनावरे डुचमळत चालू लागली. राजे आणि कुलेशांचे पाय त्या उंटांच्या पोटाभोवती जखडून बांधले होते. दोघांच्याही हातातल्या काढण्या धरून आघाडीला मुकर्रब, इखलास खासे घोड्यावर बसले होते. वाद्यांचा, आरोळ्यांचा कालवा कानठळ्या बसवत असतानाच कधी निघाली नव्हती अशी जल्लोषती धिंड निघाली.

वाटेवर येणाऱ्या मौजे-बुद्रकातली औरंगची रिआया मुकर्रब व इखलासवर खोबरे आणि खारकांचे तुकडे फेकत हर्षाने नाचत होती. दिवस ईदसारखा साजरा होत होता. रात्र 'शबेबारात' सारखी सजली जाणार होती. वाटेवर पसरलेल्या लांबलचक तळावर अशी एकही आसामी नव्हती की तिला दोजखी कैदी बघून डोळ्यांचे पारणे फेडायची जन्नती ख्वाईश नव्हती. फौजेचे हत्यारी लोकच "सबूर, पीछे हटो," म्हणत आपल्याच बाया, मर्दांना, बच्च्यांना मागे हटवीत होते. त्यांची नजर चुकवून बच्चे-मोगल आणि औरती उंटावरच्या कैद्यांना हाती मिळतील ते पायतळीचे दगडी गुंडे मारत होते. "कुत्ते, शैतान, काफर" असे पोटतिडकीने म्हणत, नफरतीने मनातला घुस्सा थुंकीत एकवट करून पायाशी पचापच थुंकत होते.

आता डोळे सताड उघडे केलेल्या क्षत्रियकुलावतंस शिवपुत्र संभाजीराजे यांच्या नजरेत अपार, अशरण तेज उतरले होते. देहात नसल्यासारखेच दिसत होते ते! मांडाखालच्या उंच जनावरापेक्षा, डोक्यावरच्या उंच लाकडी टोपीपेक्षा, एवढेच काय रायगडाच्या उंच आघाडी मनोऱ्यापेक्षा नजर ठरणार नाही अशा उंचवट्यावर जाऊन बसल्यागत दिसत होते त्यांचे डोळे. एवढ्या जोश कल्लोळातही कुलेशांच्याकडे बघत त्यांनी त्यांना विचारलेही, नेहमीच्याच राजबोलीत – "कचरलात छंदोगामात्य ?"

झटकन आपली गर्दन राजांच्याकडे करून ती किंचित लवती करत कुलेश उत्तरले, "जी नहीं. नहीं होती ये आंखें तो ऐसा नहीं देखना पडता स्वामीको!"

मधेच मागे वळून इखलास खेकसला, "क्या बकते हो आपसमें? नाम लो खुदाका."

एरवी जो फासला काही पळात काटला गेला असता तोच सगळ्या तळाचे डोळे निववीत चांगला दोनतीन घंटे काटला जात होता. हिंदोस्थानच्या शहेनशहा आलमगिरांचीच शाही मुराद होती ती. तसा हुकूमही होता.

धिंड बहादूरगडाच्या आघाडी दरवाज्यात आली. दरवाज्यातच बहादूरखान, रणमस्तखान, शाब्दिखान, हसनअलीखान, गझनफरखान असे मुलुखभर तळ टाकून पडलेले खासे सरदार खडे होते. काही ना काही निमित्त काढून त्यांनी आज बहादूरगड जवळ केला होता. खिल्लती फेकून उभा मावळमुलूख फितव्याने फोडणारा बक्षी रुहुल्लाखान तर साऱ्या सरदारांत गरगर फिरत होता. त्यालाही बघायचा होता आंखभरून एकदा, दख्खनेत आल्यापासून हैराण हैराण करणारा शैतान संबा! या खुषीच्या क्षणाची नौबत म्हणून गडावर तोफांची भांडी दणादण कडकडत फुटली.

अंगावरचे विदुषकी, ढगळ कपडेसुद्धा जागजागी फाटलेले, उन्हाने घामेजलेले, अंगावर पडलेल्या दगडगुंड्यांनी जागजागी जाया झालेले कैदी – राजे आणि कुलेश उंटावरून खाली उतरविण्यात आले. गडाच्या लोहारमेटावरून निवडून पाठवलेल्या लोहारांनी झटाझट दोन्ही कैद्यांच्या खांदा-छातीवरून आवळून त्यांच्या पायांत लोखंडी बेड्या सांडशी, हातोड्याने पक्क्या करून टाकल्या. संशयी आणि गैरवाजवी सावध खुद्द औरंगनेच प्रथम कैद्यांना बेड्या आवळण्याचा सख्त हुक्म दिला होता! त्याने सर्व सावधानगी घेतली होती. शक्य असते तर त्याने राजांच्या भोसलाई राजस मनालाही बेड्यात जखडण्याचा हुकूम दिला असता!!

बहादूरगडात दिवाण-इ-आमचा दरबार खचाखच भरला होता. त्यात सगळीकडून आलेले मोगली सरदार, सर्जाखानासारखे इदलशाही, कुतुबशाही सरदार, सर्वांत आघाडीला शहजादे कदमबरहुकूम नजर बांधून दरबारी रिवाजाप्रमाणे खडे होते.

अल्काबाच्या ललकाऱ्या उठताच गुर्झबारदारांनी हातचे गुर्झबी दंड रिवाजी होशियारीसाठी तिबार फरसबंदीवर आपटले. यःकश्चित माशी फिरली तरी ते ऐकू यावे असा सन्नाटाच सन्नाटा पसरला होता दरबारभर. सिंहासन बैठकीच्या पाठच्या दरवाज्यातून प्रथम वझीर असदखान बाहेर आला आणि पाठोपाठ हिंदोस्थानचा शहेनशाह मुहिउद्दीन मुहंमद आलमगीर गाझी औरंगजेब आला. त्याची कोरली दाढी आता पुरी पुरी सफेद झाली होती. शेलाटी अंगकाठी मात्र उमर झाली असताही ताठ होती. डोळे शोधक, तीक्ष्ण होते. तो येताच उभा दरबार तस्लीम देण्यासाठी खाडकन लवला.

"पेश करो दरबारके सामने नापाक काफर कैदियोंको।" असदखानाने आपल्या अली हजरतांचा हुकूम मुकर्रबला सुनावला. मुकर्रबने इखलासला नजरइशारत करताच दहापाच हत्यारी हमशांनी घेर टाकलेले, दख्खनेत आल्यापासून औरंगला घोर लावलेले दोन्ही कैदी दरबारच्या मधोमध पेश घालण्यात आले. कैदी ताठ होते.

आम्याच्या कोठीतून तुरी देऊन सलामत सुटलेला सेवाचा बच्चा संभा, त्याच्या बम्मन एखत्यारासह तख्ता-कुलाहात सामने बघताच, आपले सगे भाई दारा-शुकोह, मुराद, शुजा आणि अब्बाजान शाहजहान यांच्या मौतीची खबर ऐकतानाही फुटल्या नव्हत्या एवढ्या आनंदाच्या उकळ्या बुढ्या औरंगच्या काळजात उसळून उठल्या. कधी भुलून वा चुकूनही तो दरबारी रिवाज मोडत आला नव्हता. पण आज नकळतच तो त्याच्याकडून मोडला गेला! बसल्या आसनावरून तो ताडकन उठला. कैदी संभाजीराजे आणि कुलेश यांच्या गर्दनी एवढ्या घेरावातसुद्धा ताठ खड्याच होत्या. झाली! आज या क्षणाला आम्यातल्या दरबारानंतर प्रथमच मराठी दौलतीचे छत्रपती संभाजीराजे आणि दिल्ली तख्ताचा शहेनशाह मुहम्मद औरंगजेब यांची इतकी वर्षे कुचमलेली 'नजरभेट' झाली! जसे अंगपूत पेटलेल्या ज्योतीला वादळ बघत होते! चिवट जीवनशक्तीला

सर्वग्रासी मौत बघत होती! माणसातल्या मर्दपणाला राजकारणातले गाळीव कपट न्याहाळत होते! काफरी जिंदादिलीला तख्तनशीन बेरहम, शाही मगरुरी पारखत होती!

घरेलू नाचीज मामल्याचा विचार एरव्ही कधी औरंगच्या मनात येणे शक्य नव्हते, पण या क्षणी मात्र एक चमत्कारिक खयाल त्याच्या मनाला धडक देऊ लागला.

"कैसे पैदा करते हैं परवरदिगार ऐसे बेडर सुरमा शख्स काफरों के खोकमें ? नही तो हमारा कमअस्सल बगावतखोर बच्चा। क्या नाम भी रख्खा हमने उसका शाही शोहरतसे – बडे आब्बाजान की याद जगाने – अकब्बर!!"

रानावनांत बरेच दिवस राहिलेल्या बच्चाला राजवाड्यातील गमती खेळणे बऱ्याच दिवसांनी मिळावे तसाच आनंद बुढ्ढा असूनही शहेनशाहला झाला. वरवर तो धीमा, शांत दिसत होता, पण आतून खुषीची अनावर कारंजी उसळ्या घेत होती त्याच्या काळजात. त्यातला एक लब्जही कुणालाही बोलावा अशा हैसियतीचे कोणीही दिसत नव्हते त्याला दरबारात! झाली खुशी कुठेतरी बाहेर ओतून टाकण्यासाठी बैचेन झालेला शहेनशाहा हिंदोस्थान सिंहासनासमोरच्या रुजामेदार पायऱ्या शांतपणे उतरून आज पहिल्याने दरबारी मसनदीच्या चक्क गालिच्यावर आला! क्षणभर त्याने दरबारभर नजर फिरवली आणि मक्केकडे तोंड करून, अस्मानाकडे बघत त्याने पायीच्या गालिच्यावरच खुशीच्या नमाजासाठी गुडघे टेकले!!! कुराणे शरीफच्या आदेशाप्रमाणे तो रोजचे पाच वेळांचे नमाज स्वारीशिकारीतही न चुकता पढत आला होता. तो नमाज पढत असताना कुणाचीच काय वझीर असदखानाचीही शामत होत नव्हती आत जाण्याची! आणि – आणि आज मात्र खचाखच भरल्या दरबारात नेक इस्लामचा मन:पूर्वक नमाज पढताना त्याचे डोळे आनंदाच्या अश्रूंनी भरून आले! हातच्या तसबीहच्या माळेवर ते थबकले. त्याचाच दरबार ते ताज्जुबीने बघू लागला. त्यातल्या कैकांनी तर मागून 'गुस्ताखीची' आफत नको म्हणून आपोआप गुडघे टेकले!

दरबाराबरोबर छत्रपती संभाजीराजेही तो नजारा बघत होते. एवढ्या जीवघेण्या विटंबनेनंतरही त्यांच्यातला, कवी भूषणाची कदर करणाऱ्या आबासाहेबांचा वारसा सांगणारा, 'बुधभूषणम' चा रचनाकार काव्यप्रेमी, मराठमोळा, जातिवंत राजा उफाळून आला. छंदोगामात्य कवी कुलेशांच्याकडे रोखून बघत भरला दरबार थरकून जाईल अशा संथ पण ठणठणीत राजबोलीत ते म्हणाले, "एवढी चर्चा केलीत आमच्याशी काव्याची हयातभर छंदोगामात्य! करून दावा या औरंगला बघताना आत्ता काय वाटतं त्याचं काव्य! या क्षणी! हाती कलम नाही असं न म्हणता!

निघाल्या धिंडीने पुरते घायाळ झालेले कवी कुलेश त्या नुसत्या शब्दांनीच ढवळून निघाले. झटकन् गर्दन वर घेत राजांच्या कपाळीच्या फिसकटल्या शिवगंधाकडे बघतच राहिले. प्रत्यक्ष औरंगच्या सेवेला खिदमतगार रुजू होणार नाहीत अशा तत्परतेने शारदेचे मानकरी कनोजी शब्द त्यांच्यासमोर हात जोडत रुजू झाले. आपोआप त्यांच्या ओठांतून ते त्वेषाने बाहेर प्रकटले – जो आग्या – सुनिए –

"राजन् हो तुम साँचे खूब लडे तुम जंग!
तुव तप तेज निहारके तखत त्यजत औरंग!!"

त्या दोघांच्यापासून दूर असल्याने औरंगला ते ऐकू येणे शक्य नव्हते. दरबार मात्र ते ऐकून चळवळला. जागजागेंतून कुजबूज उठली, "इन्शाल्ला सच तो है! क्या बकता है कुत्ता, काट दो जबान हरामजादेकी ... असली शायर है ... क्या मिसाल है शायरी! ... सबूर – आस्ते ... जबान काट जायेगी ... इसी दरबार में!" दरबारी कुजबुजीची दखलही न घेता नमाज पढून उठत बादशाहा मुकर्रबला म्हणाला, "ले जाव इनको कोठीमें! हटाव सामनेसे!" औरंगच्या एकाच वाक्यावर दरबारी खसखस खाटकन् थांबली! उतरला तसा औरंग संथपणे पुन्हा पायऱ्या चढून दरबारातून निघूनही गेला. दरबार उलगला. साखळबंद कैदी कोठीकडे नेले जाऊ लागले.

त्या खतरनाक आणि आजवर हैराण केलेल्या कैद्यांना बहादूरगडासारख्या शाही ठाण्याच्या कोठीत ठेवणेही औरंगजेबाला काही मानवले नाही. त्याच्या हुकमानेच दुसऱ्याच दिवशी, दरबारी पेश करण्यापूर्वी निघाली होती तशाच धिंडीने, तशाच वेशात दोन्ही कैदी कोरेगाव जवळच्या तुळापूर ठाण्यालगतच्या वढू बुद्रुकात बंदोबस्ताने आणण्यात आले. अकलूजहून हललेला औरंगचा साठ हजार फौजीतळ बहादूरगड धरून, कोरेगाव, तुळापूर, वढू भागात राहुट्या टाकून दाटून पडला होता. इथेच होता संतश्रेष्ठ ज्ञानोबा आणि तुकोबा यांच्या तोंडून स्फुरलेले संत–बोल ऐकून पुलकित झालेल्या इंद्रायणी आणि भीमा यांचा पावन संगम! या संगम काठालाच मावळतीचा पुढा धरून दोन भक्कम खांब रोवण्यात आले होते. हशमांच्या कड्यातून आणलेले दोन्हीही कैदी उंटांवरून खेचूनच पायउतार करण्यात आले. तख्ता - कुलाह आणि साखळदंडांत अगोदरच जखडलेल्या त्यांना मुकर्रब – इखलासच्या देखरेखीखाली, त्या खांबांना मनगटासारख्या दोरखंडांनी पुन्हा जाम जखडण्यात आले! कंठांतल्या तख्ता-कुलाहांनी त्यांचे हात पंखांसारखे पसरतेच होते. संगमेश्वरातून निघाल्यापासून कुठलाही अन्नाचा कण दोघांच्याही घशांआड गेला नव्हता. चेहरे ओढले होते त्याने त्यांचे, पण डोळे मात्र शरीराच्या वेदनांचे कडे फोडून अपार शांत आणि तेजवंत दिसत होते. त्यांची मनेच जशी उतरली होती त्यांच्या फक्त डोळ्यांत!

आवश्यकता नव्हती तरीही जाड पात्याच्या नंग्या तेगी हातांत घेऊन मुकर्रब आणि इखलास, सरदार आणि हमिदुद्दीन कैद्यांभोवती पहारेकऱ्यांवर देखरेख करीत इकडे तिकडे फिरत होते. एकाच भयाने. कुणी सांगावे. भुतांसारखे अचानक उपटणारे मरहट्टे आलेच आणि घडू नये ते घडलेच तर याच खांबांना खुद्द आपणालाच जखडण्याचा हुक्म होईल हजरतांचा याची खातरजमा होती म्हणून! एकसारखे बहादूरगडाच्या रोखाने बघत ते कुणाची तरी वाट बघत होते. आणि कैद्यांभोवती हजारो हत्यारबंद हशमांत खळबळ

माजली : "आ गये! आ गये!" बहादूरगडाच्या रोखाने धुळीचा लोळ उठवीत, शेपाचशे पठाणांचे एक पथक आले. हाताच्या इशारतीनेच पाठच्या दौडत्या पथकाला रोखत बक्षी रुहुल्लाखान पायउतार झाला. त्याचा मालक आलमगीर गाझीनेच त्याला खलबतात घेऊन, कानमंत्र देऊन पिटाळला होता. भवतीच्या कुणाकडेही ढुंकूनसुद्धा न बघता खांद्यावरच्या खिलतीआड दडलेल्या हत्याराच्या मुठीवर हाताची भक्कम मूठ आवळत तरातर चालत थेट राजे आणि कुलेश यांच्या समोरच तो आला.

त्याला बघून लाचार अदबीने पुढे होत मुकर्रब म्हणाला, "क्या हुक्म है आलमपन्हाका काफर कैदियोंके फैसलेमें ?"

"चूऽप" मुकर्रबच्या पायांपासून डोक्यापर्यंत बेफिकिरीच्या नफरतीने बघत रुहुल्ला त्याच्यावर उखडला. कितीही झाले तरी मुकर्रब 'दख्खनी' होता. रुहुल्ला औरंगचा नेक, उत्तर हिंदुस्थानी 'शिया' सरदार होता. खास कामावर नामजादी केल्यानेच तो हिरव्याकंच खिल्लतीत आला होता. खांद्याला जखडल्या छत्रपतींच्या समोर उभा ठाकत, कमरेवर हात ठेवून डोळे राजांच्या डोळ्यांत मगरुरीनं घुसवीत त्याने जाब केला, "खैर चाहते हो सुबेदार, तो ठीक सोचके जवाब दो। आलमपन्हा चाहते हैं तुम्हारा बयान, मौका है खुदाके खैरका आखरी – किस किल्लेपे रखा है तुमने अपना शाही खजाना ?" त्याने 'सुभेदार' असा केलेला उल्लेख राजांना आज पहिल्या प्रथमच ऐकायला मिळत होता. "हंऽऽ" मानेवरचा रानटोळ झटकावा तसा रुहुल्लाचा सवालच राजांनी मानेबरोबर झटकला.

"हम पूछते हैं कहां है तुम्हारा खजाना ?" राजांची डोक्यावरची उंच माटाची, लाकडी विदूषकी टोपी खानाने गद्‌गदा हालवली. जळत्या नजरेने खानाकडे बघताना राजांच्या नाकपुड्या संतापाने कशा फुलून उठल्या. जखडलेले छातवान अनावर संतापाने वरखाली झपापले. आतल्या आत खूप विचारांती त्यांनी साजेसा निवाडा आपल्याशीच घेतला होता. काहो - काहीही न बोलण्याचा!

"बोलो, कौन कौन थे फितूर तुम्हें शाही फौजसे ? कौन कौन भेजते थे खतवाले हशम तुम्हें ?" हट्टाला पेटलेला रुहुल्ला राजांचा मुखडा डावा उजवा गद्‌गदा हालवून टाकत, भोवतीचे हशम अंगभर चरकावेत असा कडाडला.

आपल्या स्वामींशी चाललेली ती बेमुर्वती बघून कुलेश खोड्यातच तळमळते हलले. खोडा फोडण्यासाठी निष्फळ धडधड धडपडले.

"बोलो, गुँगे हो गये क्या काफर ? मामूली चीज है। बताओ और जान बचाओ अपनी नादान।"

राजे खानाकडे नुसते रोखून बघत होते. कुठल्याही धमकीने वा गोडीगुलाबीने आणि सोबतच्या कविकुलेशांखेरीज कुणीही काही विचारल्याची दखल घेण्याच्या पार पलीकडे गेले होते ते. ते बोलते व्हावे म्हणून, "खजाना कहां है ? फितूर कौन थे ?" हेच सवाल

आलटून पालटून विचारून, कैक प्रकारांनी जंग जंग पछाडून रुहुल्लाखान शेवटी थकला. त्याच्या कपाळावर उन्हाच्या तिरिपीने आणि एकसारख्या कंठशोष ओरडण्याने घामाचे थारोळे साचले. ते तर्जनीने निपटून टाकत शिवीच हासडावी तसे तो वैतागून म्हणाला, "नहीं जानता - मानता आलमपन्हाके गुनाहका नतिजा कुत्ते। भोग ले अपने गुँगेपनकी अब सजा – मौत!"

जंग जंग पछाडले रुहुल्लाने राजांना बोलते करण्यासाठी, पण 'ब्र' देखील नाही बाहेर पडला त्यांच्या ओठांतून. त्याच ढंगाने कुलेशांना चाचपून बघताना तर खानाने आपला हमेशाचा 'तुकडा फेकीचा' मन्सबीचा दाणागोटा बाहेर काढत चुचकारून छंदोगामात्यांना विचारले, "ये मरनेवालाही है अपनी मौतसे – होशियार शख्स हो तुम। बता दो कहाँ है इसका, सल्तनतके बऱ्हानपूर–औरंगाबादके लूटका छिपाया खजाना ? कौन कौन थे शामिल इसको, शाही फौजके गद्दार कुत्ते ? मराबतसे मालेमाल कर देंगे शहेनशाह तुमको मन्सब बक्ष करके! बतावो। डरो नहीं अब इसको। बताओ।"

गळ्यातला तख्ता-कुलाह, डुयीची लाकडी टोपी डावी उजवी झटकती हलवून खानाला त्यांनी इमानी चाकरीचा जसा खणखणीत सबकच दिला – "खाऽन, मौका मिलता तो हमही पूछते यही सवाल तुमको! सारे हिंदोस्ताँका खजाना हजम किया है तुम्हारे शहेनशाहने! मन्सबके टुकडे फेंक कर खरीदा नही जाता कभी कवीका इमान। कुत्ते हो तुम, खंदेकी खिल्लत पहेनकर नाजसे हमारे स्वामीकी गर्दन हिलानेवाले बेमुर्वत!!"

"खामोऽश, लईम काफर।" अंगावर सापाचे वेटोळे पडावे तसा खान आक्रोशून उठला. झपकन पुढे होत त्याने मराठी दौलतीच्या कुल एखत्यार, छंदोगामात्यांच्या गालफडावर सणकावती थप्पड दिली. त्याच्या भिवया वाकड्या तिकड्या झाल्या होत्या. दाढीचे केस रोधता न येणाऱ्या घुश्श्याने दाभणासारखे ताठरले होते.

आपल्या लाकडी खोड्यातूनच ते बघताना राजे कुडीभर उफाळले. त्यांना जखडून टाकणारा खांबच हिंदकळला मुळापासून त्यांच्या ताकदवर धडपडीने!

फोडला! आता मात्र राजकुलाच्या बालपणापासूनच्या संस्कारांनी कटाक्षानं मनोमन करकचून बांधून टाकलेला मौनाचा बंधारा राजांनी फोडला. शब्दांचा अनिवार आतषखाना त्यांच्या तोंडून रुहुल्ला, मुकर्रब, इखलास यांच्यासह हरएक हशमाच्या काळजाची, मुर्हमची खाई पेटवावी तसा खाई पेटवीत बेलाग तडतडू लागला – "सांग तुझ्या मालिक 'सुभेदारास' खाऽन! मरणाचे चाळ करून बांधलेत आम्ही पायांत! जन्मदात्या बापास कैद करून, त्यानंच बांधल्या लालतकिल्ल्यात त्यास डांबून – तबिबाकडून जहराचं मालीश त्याच्या बुढ्ढ्या अंगाला फासणारं नाही भोसल्यांचं खानदान! भावांच्या पाठीत, तख्ताच्या हवसेनं खंजीर खुपसणारी नाही आमची भावकी!"

"खामो ऽ श। पाबन्द रख्खो जबान!" थरथर कापणारा रुहुल्ला ओरडला. "काट दो इसकी गर्दन ऽ! इसको पैरके नीचे दो हाथीके! खाने डालो कुत्तोंको इसका मगरूर गोश्त!" चारी बाजूने जळजळीत आरोळ्यांचा एकमेकांत मिसळता कालवा उसळला. तरीही बेडर - बेभान झालेले राजे बोलतच राहिले –

"अरे, खाल्लंच आमचं गोश्त कुत्र्यांनी तर त्यांची औलादही निपजेल इमानदार! सांग तुझ्या मगरूर मालिकला खान – जी भावांची केलीस, जन्म दिल्या बापाची केलीस, हयातभर इमानी चाकरी केलेल्या मिर्झा राजाची, दिलेरची केलीस त्याहून काय करणार दुसरी हालत तू आमची? तैय्यार आहोत आम्ही मन बांधून त्यासाठी या क्षणाला!! ध्यानी ठेव म्हणावं त्याला – आम्ही गेलो तरी सुखासुखी नाही पडणार हा मुलूख त्याच्या घशात इदल – कुत्बशाहीसारखा! इथला उंबरा अन् उंबरा करील पैदा लहानथोर सेवा – संबा!!!"

राजे आपल्या आका अलीची नालस्ती काही रोकत नाहीत हे बघून रुहुल्ला झटक्यात तिरीमिरीने पुढेच झाला. त्यांचे तोंडच बंद करावे म्हणून आपल्या पंजाने त्याने राजांचे दोन्ही ओठ एकाजागी घट्ट करण्यासाठीच सांडसीपकडच घालायचा प्रयत्न केला. गर्दन झटकून ती उडवून लावत राजे शेवटचे पण वर्मी असे सर्वांना ऐकू जाईलसे ओरडले – "आम्हास मारून कधीच सुटणार नाही तुझा पापी हजरत सलामत! ज्या दिल्लीच्या तख्तासाठी तो रचतो आहे एवढे पापांचे डोंगर – त्याच्या आसपासही मिळणार नाही कबरीसाठीसुद्धा वावभर जागा त्यास!! शिराचं नाव 'भंडारा' ठेवून, तोच तळहातावर घेतलेले आमचे जानकुर्बान मावळे – निघालाच परतायला तो उत्तरेकडं, तर खोदतील त्याचीच कबर याच मावळमातीत! बताव उसको – ठोकरसे फेंक दिये हैं हमने उसके सब सवाल!! जा ऽ व!" तरीही राजे उभ्या कुडीभर राजसंतापाने अनावर थरथरू लागले. उभ्या आभाळाने ताकद एकवटून ढाळण्यासाठी जबरी तडाखा दिला तरी न चळता सूर्याचा तापगोल बिंबभर थरारेलच थरारेल तसेच राजे दिसले!! भवतीच्या बघ्यांना क्षणात चाटून गेलं की, घुश्यात असले तरी आलमपन्हा आका अली 'असे' कधीच दिसले नाहीत!

असले काहीच आणि कधीच ऐकण्याची आदत नसलेल्या रुहुल्लाच्या अंगाचा कसा तिळपापड झाला नुसता! "चू ऽ प मनहूस कुत्ते ऽ" ओरडताना नरड्याच्या धमन्या तटतटून फुगल्याच खानाच्या. झेपावत त्याने ज्या कानशिलावर धाराऊ आणि थोरल्या आऊंची बोटे 'आलबला' घेत फिरली होती त्याच कानशिलावर जबरदस्त थपडेचा खडखडता आवाज काढला!! खान घुश्शाने बेभान झाला होता. अशा काही जळजळीत नजरेने राजांनी खानाच्या हाताकडे बघितले की त्या नुसत्या नजरेनेच त्याने आपला झणझणता हात पिरगळा बसावा असा मागे घेतला. पेटत्या आगीतून काढावा तसा! भवतीचे हशम तर थरकून उठले होते. खोड्यात तळमळत्या कुलेशांनी असह्य संतापाने तळमळून – तडफडून गर्दन खाली टाकली.

भुईवर पचकन थुंकत नेमल्या कामगिरीत पुरता नाकामयाब झालेला खान स्वतःशीच पुटपुटला, "मर जायेंगे दोनों भी नाबकार काफर लोंडे कुत्तोंकी मौत। मुराद, दारा की नहीं वो हालत करेंगे पाक इस्लामके असली बंदे आका अली हरामजादोंकी! बू मिट जायेगी काफरोंकी दुनियासे।"

दणदण पाय आपटत, जनावरावर झेप टाकून आपल्या पथकासह खान रूहुल्ला बादशहाला कैद्याची बदतमीजी सांगायला निघूनही गेला. राजांनी उच्चारले शब्द जसेच्या तसे आपल्या हसरतच्या कानी घालण्याची त्याची शामतच नव्हती. दौडतानाच तो विचार करू लागला, ते शब्द सुमार करून दर्बारी रिवाजात कसे काय पेश घालावेत!

सांजावत आल्याने आता मावळकडेवर तापदेवाचा रसरशीत गोळा दिवसभरापेक्षा मोठा दिसू लागला. त्याच्या अवतीभवती लाल, गुलाबी, केसरी यज्ञकुंडच जसे पेटले होते. मनात आणले तरी कधीही तो तेजोगोल खुद्द आभाळालाही दस्त करता येणार नाही, ह्या एकाच विचाराने जखडबंद राजे स्वतःला हरवून एकटक त्याच्याकडेच बघू लागले. त्यांना याद आली. रायगडाच्या हिरकणी माचीवरून दिसणारा हाच तो सूर्यगोल. एकदा तर श्रीसखींच्याबरोबर माचीवर उभे असताना त्यांनी विचारले होते, "काय वाटतं समोरचा सूर्यनारायण बघताना तुम्हास?"

क्षणभरच थांबून त्या पटकन म्हणाल्या होत्या, "माचीच्या या उंचवट्यावरून तो घरचाच वाटतो – आबासाहेबांगत!"

आबासाहेब! केवढा भाग्यवंत, यशवंत आत्मा! रायगडी काळ होताना भवतीच्यांना ते म्हणाले होते, "ये तो मृत्युलोक – येथे जितुके आले तितुके गेले." – कशासाठी येतात माणसे – आणि जातात काय उभवून? का पेटतो तुमच्या आणि समर्थांच्या आठवणीने जिवाचा पोत उजळून? का वाटत नाही तुम्ही गेल्यागत?

हिरकणीमाचीवरून फरशीच्या आकाराचे रूप घेत डुंबताना दिसणारे बिंब, आता खांबाला जखडल्या राजांना कोरीगत सपाट दिसू लागले. हाताच्या तख्ता-कुलाहाचे भानच नव्हते त्यांना. डाव्या हातच्या कुलेशांना म्हणून ते म्हणाले, "डुबतीला चाल्लाय आभाळाचा स्वामी. रिवाज द्या त्यास छंदोगामात्य!" छातीशी नेण्यासाठी त्यांनी आपला हात खेचला. तख्ता-कुलाहच्या लाकडी कड्याला तो खटकन कचला. सणकारती कळच हाताकडून उमटून मस्तकात भिनली त्यांच्या. त्या वेदनेची वाटली नाही एवढी एकाच बाबीची खंत त्या भोसलाई कुलवंतांच्या मनाला पिळवटून गेली, "आम्हाला मुजऱ्याचा रिवाज देण्यासाठी किती अदबशीर हात आजवर लवत हालले. पण – पण आज खुद्द आमचा हात मात्र आमचाच राहिला नाही. साक्षात सूर्यनारायणास वंदन करण्यास!" शरीरापेक्षा मनाच्या या कोंडीने डोळे मिटतेच घेतले त्यांनी. तरीही हालता हालेना त्यांच्या डोळ्यांसमोरून लालीलाल झालेले ते आकाशस्वामी तेजोबिंब.

राज्याभिषेकाच्या वेळी कानावर पडलेले ब्रह्मबोल घुमू लागले– " शिसोदिया वंशज सूर्योकुलोत्पन्न - क्षत्रिय कुलवतंस– "

आता तळभरच्या सांजनौबती दुडदुडू लागल्या. खानसाम्यांनी तांब्याची, कल्हईदार, थोराड भगुणी रसोईसाठी चुलाणांवर चढवली. कसायांनी काटलेले बैल-बोकड जागजागी त्यांवर रटरटू लागले. त्याचा एक तिखट, उग्र वास तळभर पसरला. आता सारा तळ रात्रीचा नमाज पढून, भरघेराच्या मोठमोठ्या परातीसारख्या थाळ्यांतून, पाचपाच दहादहांच्या मेळाने खाना रिचवणार होता. उपाशी आतड्यांनी आणि जागत्या डोळ्यांनी त्या साठ हजारांच्या तळावर फक्त दोनच जीव भुईवरच्या लाकडी खोड्यांत असूनही त्यात नसल्यागत आपापल्या कुलदेवता जगदंबा आणि चंडीची प्रार्थना करणार होते... छत्रपती आणि छंदोगामात्य!!

जागजागी शिलगलेल्या पलोत्यांच्या आगझपेटी वाऱ्यावर वेड्यावाकड्या फरफरू लागल्या. उतरती सांज थरथरू लागली!

आता बहादूरगड सोडून खुद्द औरंगजेबच कोरेगावच्या तळावर येऊन शाही शामियान्यात ठाण झाला. दिल्ली सोडतानाच त्याची पहिली मुराद होती ती 'सेवाची' मराठशाही इस्लामची बंदी करण्याची. त्यासाठीच सलामीचा पहिला फौजी रेटा देऊन बघितला होता त्याने या पहाडी मुलखाला. नाकामयाबीने हात चोळत चार सालांपूर्वीच त्याला फौजी 'पिछाट' घ्यावी लागली होती सेवाच्या बच्चासमोर. आज तोच 'संभा' कैदी म्हणून दस्त झाला होता त्यांच्या पंजात. हालहाल करून त्याचा काटा काढताच त्याच्या या पहाडी मुलखातले दुबळेपतले, अर्धनंगे हशम हातच्या माळेत सहज गुंडाळून टाकणार होता तो. आपल्या शामियान्यात मात्र आता तो विचित्र खयालात गुरफटला होता. त्याला आपला बच्चा अकबर आणि दिलेरचा मिरबातखान यांचा संभालाच शामिल होण्याचा मतलब कळत नव्हता.

संभाने दिल्या बेमुर्वतखोर जाबांची नोंद त्याने घेतलीच होती. फितवेखोरीने ठिकठिकाणचे मराठे सरदार त्याने केव्हाच मुठीत टाकले होते. राहून राहून त्याला एकच विचार छळत होता : " देहली छोडके आये बडे मुरादसे। बुढापा आया नजदीक। होगी हमारी ख्वाईश पुरी ? कांजीवरम से काबूल इस्लामका बंदा करनेकी ? "

वढूच्या तळावरून मुकर्रबखानाकडून रोज त्याला हरकाऱ्यांकडून खबरा येत होत्या– " कैदी कुछ बोलते नहीं– कुछ खाते नहीं."

बादशहाबरोबर त्याच्या सेवेसाठी आलेली त्याची मुलगी झीनतुन्निसा रोज अब्बाजानबरोबर खान्याचे कटोरे, त्याच्यासमोरच त्यातील पदार्थ चाखून, त्यात काही 'जहरी ऐब' नाही याची खातरजमा त्याला करून देत होती! मगच खान्याचे थाळे मांडीत होती. अशाच एक खान्याच्या वेळी मुकर्रबकडून खबऱ्या आला–

" जिद्दी काफरोंने अबतक कुछ नहीं खाया."

रोज मसालेदार मोगली पदार्थांचे शाही थाळे राजांसमोर आणि सिरकुर्म्याचे गोडे थाळे कवी कुलेशांसमोर नेऊन त्यांची भूक चाळवण्याच्या प्रयत्नात मुकर्रब-इखलास पुरते नाकामयाब झाले होते. कैदी दस्त करताना जो जोश मुकर्रबखानात होता त्याचीच जागा आता भयशंकेने घेतली होती– " ऐसेही मर गया काफर तो ? "

कैदी काही खात नाहीत ही मुकर्रबची खबर ऐकून बेचैन औरंगजेब आपल्या थाळ्यापासून उठून फेर घेऊ लागला. मांडल्या अन्नावर माश्या बसू नयेत म्हणून त्यावर पितळी झाकणे झीनतुन्निसा तत्परतेने ठेवू लागली. ते बघून जागीच थबकला. चमत्कारिक असा स्वत:शीच हसला. आपल्या पदार्थ चाखण्यात काही गफलत झाली काय ? अब्बाजानना काही शक आला काय ? याने भांबावलेली झीनत मोठ्या धाडसाने म्हणाली, " हँस पडे अब्बाजान ? शक है कोई ? "

खदखदून हसत औरंगजेब तिला म्हणाला, " मक्खियाँ बैठती हैं थालेपर इसलिये तूने डाल दिये ढक्कन उनपर। बेटी, कभी कभी इन्सानके दिलपर भी बैठती है मक्खियाँ! क्या लाओगी उसके लिये ढक्कन ? एक भाई है तुम्हारा अकबर, जो घूमता है गाँवगाँव तख्त के लिए, अनाज के लिए! और एक है ये सेवाका बच्चा संबा जो हाथ तक नहीं लगाता थालेको। " स्तिमित झाल्या आपल्या मुलीकडे बघतानाच त्याने हुक्म दिला, " ले जाव ये खाना। हम नही चाहते। "

वजीर असदखानाला याद फर्मावून बादशहाने हुक्म दिला, " हम– खुद हम देखना चाहते हैं कैदी संबाको!! जाव। इंतजाम करो। " औरंगच्या हयातीतली ही पहिलीच वेळ होती की तोहून एका कैद्याला बघायला राजी झाला होता!

कैदी खांबांना जखडून आता तीन दिवस झाले होते. एकाही शाही सवालाचा दोघांनीही बादशाहाच्या मनाजोगा जाब काही दिला नव्हता. दोघेही उपाशी होते. कोणीतरी अल्लाचा रहमदिल बंदा मिन्नत कर करून त्यांना फक्त पाणी प्यायला लावत होता. जाताना आपलेच डोळे टिपत कैद्यांना ऐकू जाईलसे पण मनोमन वाटणारे म्हणूनच स्वत:शीच पुटपुटत होता– " कैसी जिद पैदा की है अल्लाताला ने इनमें! हत्यार होते हाथ में तो खुदही काट देते ये अपनी गर्दन! क्या तकदीर है एक एककी! परवरदिगार, इन्हे अच्छे खयाल दो."

रुहुल्लाकडून कैद्यांच्या गुंगेपणाची हकीगत ऐकलेल्या बादशाहाने आपल्या मुल्लामौलवींची तातडीची मजालस भरवली. आपल्या मनचा फैसला मग तो कुणाच्याही बाबत असो तो नेहमीच मुल्लामौलवींच्या तोंडून वदवून घेत असे. असे तो नेहमीच करीत आला होता. म्हणजे आपल्या फैसल्यावर तो इस्लामी धर्माचे शिक्कामोर्तब नेहमी करवून घेई. या कैद्यांबाबत त्याने तेच केले. " शाही शहर लूटने जलानेवाले, मुसलमानों की बेरहम कत्ल करनेवाले, मसजिद तसनस करनेवाले, बगावतखोर को कुराने शरीफसे सजा

कौनसी ? तो सजाये मौत ! '' असा दस्तुर केलेला लेखी फैसला मौलवींच्या मजलसीनं बादशहाच्या हातात ठेवला.

आला ! आपल्या शाही शामियान्यातून बाहेर पडलेला हिंदोस्थानचा शहेनशाह औरंगजेब आपल्या सजल्या हत्तीच्या, चांदीच्या हौद्यात बसून, सोनेरी छताखालची, आपली भुईतळसुद्धा शोधणारी नजर भोवतीच्या सरंजामावर गरागरा फिरवीत शेवटी आला. पाठच्या हत्तींवर बादशाहाचे शहजादे आणि नातू अशा सवाऱ्या होत्या. एका हत्तींवर तर झीनतसह शाही जनानाही बसला होता. आग्रादरबारात बगावतखोर 'सेवाला' बघण्याचे नव्हते एवढे कुतूहल आज त्याचा बच्चा कैद 'संबा' बघायला साऱ्यांच्या मनात दाटले होते. आस्ते कदम चालणाऱ्या कैक खानांतील अनेकांच्या मनात – 'अलमगिराच्या या कैदी बघण्याच्या निवाड्याचं 'ताज्जुब' फिरत होते.

बादशाहा औरंगजेबाची सवारी बुद्रुक वढूच्या ठाण्यावर आली ! माहुतांनी अंकुशटोच देऊन हत्ती बसते केले. तळावर आगवानी मरातब कानठळ्या बसविणाऱ्या तोफा फुटल्या. बादशाहा शहजादे, नातवांसह भुईउतार झाला.

ही चमत्कारिक भेट होती. दिल्ली तख्ताचा अधिकारी असलेल्या, डामडौलात आलेल्या औरंगजेबाची आणि रायगडाच्या सिंहासनाचे अधिकारी असलेल्या, गेली आठ वर्षे चारी आघाड्या सांभाळण्यासाठी जिवाचे रान करणाऱ्या कैद संभाजीराजांची ! तुळापूरच्या वढू बुद्रूकच्या इंद्रायणी-भीमाच्या संगमी माळरानावर ! पुरा तळ गर्दीने दाटला असून तरीही चिडीचाप असताना.

शहेनशाह जखडबंद कैद्यांच्या रोखाने निघाला.

चांगले दहा हातांचे सुरक्षित अंतर ठेवून, हत्यारबंद पहाऱ्यातला औरंगजेब, वजीर असदखान, रुहुल्लाखान, मुकर्रबखान, इखलासखान यांच्या घेरात, खांबाला जखडबंद, ताट गर्दनीच्या कैदी संभाजीराजांसमोर खडा ठाकला !! जखडबंद राजांना पायांपासून न्याहाळत, काळजात प्रचंड खळबळ माजलेली त्याची शाही नजर राजांच्या डोळ्यांवर येऊन खिळली. घालमेल घालमेल झाली नुसती त्याची. काळजाचा देठच हलला गेल्याचे आज पहिल्यानेच त्याला जाणवून गेले, '' इतने हुए बच्चे पैदा हमारे। तैमूरका ये खानदान। एक भी नावकार की आँखें क्यों नहीं देखी हमने ऐसी ! आफताबसे रिश्ता बतानेवाली ! ''

एकदा रुहुल्ला आणि असदकडे बघत खुद्द औरंगनेच राजांना जाब केला, '' बताओ, कहाँ है तुम्हारा लूटमारका खजाना ? कौन कौन थे गद्दार, बगावतखोर फितूर तुम्हें हमारा नमक खा कर ? '' पायीच्या मोजड्यांकडे बघावे एवढ्या नफरतीने आणि फक्त नफरतीनेच आपले सूर्यपेट डोळे औरंगजेबाच्या डोळ्यात रोखून राजे एकटक नुसतेच त्याच्याकडे तिरस्कारानं बघत राहिले. ती नजर नव्हतीच ! बघणाऱ्याचे काळीजच

पोखरून टाकील अशी, कुणालाही जाणवावी अशी डोंगरटोकावर बसलेल्या गरुड पक्ष्याची तीक्ष्ण चोचच होती ती !! ती नजर आणि पापण्यांचा काठ फोडून टाकत उतू जाणारी नफरतच, एवढा काळीजकठोर औरंगजेब पण त्यालाही स्पष्ट जाणवली. गर्दन वर करून बघणाऱ्या माणसाची त्याला कधीच सवय नव्हती. सर्वच त्याच्यासमोर येत, ते 'कदमबर' नजर ठेवूनच ! आणि अशा फेकून देणाऱ्या नफरतीच्या नजरेची तर नव्हतीच नव्हती.

त्या अटीतटीच्या कुचमलेल्या क्षणांनी मनोमन थरकलेला रुहुल्लाखान पुढे होऊन कमरेत लवत, हातचा राखीव उपाय आपल्या आलमपन्हांना सुचवीत दबक्या आवाजात म्हणाला, '' रहम कर दो आका अली। अभी बन जायेगा ये मगरूर इस्लामका बंदा। कौडीमोल – बादमें बतायेगा सब अपने आप। '' मराठी मुलुखात आपण केलेल्या फितवेखोरीच्या इमानदार चाकरीचे पाठबळ मानून हजरत हा सल्ला मानतील असा पागल भरोसा होता त्याला.

'' चूऽप ! बिलकूल बेवकूफ हो तुम बक्षी ! '' नाचवावी तशी नाचणाऱ्या कठपुतळी बाहुलीकडे टाकावी तशी कीव करणारी एक जळजळीत नजर बादशाहाने बक्षी रुहुल्लाखानावर टाकली. राजावर रोखली नजर जराही न चाळवता तो म्हणाला, '' जरा गौरसे देखो एक दफा उसकी आँखें। अरे, अपने बापके साथ पेश आया था आग्रादरबारमें, तो कितनी मासूम थी ये आँखें ! ये अपनायेगा इस्लाम ? बनेगा बंदा ? पढेगा कभी नमाज ? भूल है तुम्हारी। देखो तो कैसे घुरके दखता है नफरतसे ! आँखें नहीं ये – जलती मशालें हैं मशालें ! इसको बंदा बनाना अस्तनीमें अंगार रखना है !!

'' दऽखनीऽ, निकाल दो ... निकाल दो ये बेमुर्वत आँखें ! जलती सलाख घुमाओ इसकी आँखोंमें ! दे दो इस मगरूर काफरको नयी नजर !! '' रुहुल्लाकडे ढुंकूनसुद्धा न बघता, दखनी इखलासला शहेनशाहचा क्षणात आखरी हुक्मही सुटला.

हयातभर हिंदोस्थानात वणवण भटकलेले मोगली, शाही बुढेपण अंगभर थरारले. लाकडी खोड्यातले मावळी तरुणपण ते ऐकताच आपले उभे शरीर भुईवर फेकून देत डोळ्यांतच एकवटले. तोफेचे भांडे फुटावे तशी राजांची भोसलाई जबान तडतडली – '' अरेऽ ! तुला दिसतात, खुपतात तसे दोनच नाहीत आमचे डोळे. आमचे शेकडो, हजारो मावळे आमचे डोळेच झालेत ! हिंदोस्थानचा शहेनशाह असलास तरी काढू शकतोस ते सांडसी वापरून ? काऽढ – पळाचाही वखत न गमावता आमचे हे डोळेच पहिल्याने काढून टाक. तुझी शक्लसुद्धा बघायची इच्छा नाही आम्हास ! गेलीच तर आमची एकल्याची नजर जाईल, पण मिळालीच तर मिळेल त्यानंच नवी नजर आमच्या घरट्याघरट्यांतील जान कुर्बान मावळ्यांना !!

त्या 'बकवासीकडे' लक्षही द्यायची गरज न वाटलेला औरंगजेब क्षणभरच कैदी कुलेशांच्या बाजूने दोन कदम सरकला. त्यांनाही निरखले त्याने खालवर. एवढ्या

घालमेलीतही निसटती चुटपुट त्याला चाटून गेलीच, "इसी तख्ता-कुलाहमें जखडबंद होता बागी शहजादा अकबर तो ? क्या खैर होती अल्लाहकी!"

कुलंगी कुत्यागत मागून चालणाऱ्या इखलासला, कुलेशांकडे बघतच त्यांच्या बाबतही तसाच निवाड्याचा हुक्म त्याने क्षणात दिला, "कर दो हर सजाका अमल पहले इस बम्मन शायरपर! सुनेंगे हम, कैसे देखती है काफर सेवाकी खुदको 'शेरदिल' माननेवाली औलाद अपने शायरकी तिलमिलाहट!"

"जी हुजूर," दोन्ही कैद्यांच्या सजा ऐकून हबकलेले मुकर्रब-इखलास एकदमच कमरेत लवत म्हणाले.

सफेद, कोरीव दाढी फिरलेली गर्दन बादशाहाने झटकली. कुत्तेमोल काफर कैद्यांसाठी आपण जादा वख्त खराब केला हे जाणवल्याने तो जायलाही वळला. त्याच्या किमाँशातले हिरवेकंच पाचूपदक आणि मोतीलग उन्हात कशी झगझगत तळपून उठली.

आता तो पुन्हा कधी – कधीच नजरेससुद्धा पडणार नाही म्हणून राजे कसे अंगभर उकळून गेले. तडफडाट, तडफडाट झालेल्या राजांच्या तोंडून बळीच्या बोकडाचीही झाली नसेल अशी राजा असूनही झालेल्या आपल्या विटंबनेचा बदला घेणारी, त्याच्याच संरजामासमोर त्याला ठोकरून लावणारी एक सणसणीत शिवीच तोंडातून सुटली, "सुव्व ऽ रकी औलाद ऽ! शेरके बच्चे शेर जैसे जीते हैं, मरते हैं तो भी शेर जैसे!"

असला कुठलाच नापाक शब्द कधीही ऐकण्याची कधीच सवय नसलेला औरंगजेब, उभ्या देही संतापाने कसा थरथर कापू लागला. एका मामुली कैद्याने हिंदोस्थानच्या शहेनशाहला चक्क तोंडावर 'सुव्वर' म्हणावे! तेही शहजादे, वजीर, सरदार, प्यादे यांच्या सामने!! आत मुडपलेले त्याचे पाताळयंत्री पातळ ओठ शाही घुश्याने थरथर कापू लागले, टतटतून फुगलेली मस्तकावरची शीर थडथडू लागली. देहाबरोबरच त्याच्या ऐटदार शाही रोबावरची नकसदार, झगमगती कलाबतूही लटलट कापू लागली. हातची तसबीहची माळ गोळा होऊन गपकन मिटल्या मुठीत कोंडून पडली. अंगभर तैमुरी रक्त कसे धडका देत उकळले. टोकदार नाकशेंडा आणि मांसल कानपाळ्या सरसरत लालेलाल झाल्या. कुठलाही कठोर हुक्म देताना हयातभर त्याच्या संथ, धिम्या जबानीने त्याला कधीच दगा दिला नव्हता. आज मात्र दिला – ऐकताना त्याचाच वजीर असदखानही लटलट कापावाच असा, आजवर कुणालाच न दिलेला हुक्म देत तो कडाडला –

"इखला ऽ स दख्खनी ऽ, आँखें निकालनेसे पहले ये – ये बेगुमान, मगरूर जबान कटा दो जडसे! फेंक दो कुत्तोंके सामने!!!"

"हं ऽ, बेवकूब औरंग, मरत नाहीत जबान काटून कुणाचेही बोल कधीच!" आपल्या सुकल्या राजओठांवरून जीभ फिरवत, अगदी शांत निर्धारी बोल राजांच्या तोंडून सुटले.

कुणाचीही दखल न घेता औरंग तरातर चालत हत्तीवरच्या हौद्यात जाऊनही बसला. बुद्रुक वद्धूच्या माथ्यावरचा, माध्यान्हीचा सूर्य जळत्या किरणांनी ठिबकू लागला. वढूची काळीशार भुई त्याने तावून-सुलाखून निघू लागली!!

हजरतांची मुरादच होती, डोळे जाळण्यापूर्वी जबान छाटली जावी. त्यासाठी इखलासने जल्लादी पथकातून न कचरणारे नेटाक जल्लाद, त्यांच्या उघड्याबंब केसाळ छाताडांवर मुठीचे भक्कम कुमके मारून निवडले. बाजूला घेऊन, ते डरू-कचरू नयेत म्हणून त्यांना प्रथम तांब्या-तांब्याभर हबसाणी कडक शराब पाजण्यात आली.

इखलासने तळावरच्या लोहारमेटाचे फौजी लोहार, पेटत्या शेगड्या आणि सांडशींसह बोलावून घेतले. हातभर लांबीच्या दोन दोन लोखंडी सळ्या लोहरी भात्यावर पेटलेल्या, शेगडीसारख्या लोखंडी चुल्हांत लोहारांनी तावणीला टाकल्या. धरणाऱ्यांचे हात पोळू नयेत म्हणून त्या कापडी बासनांच्या घट्ट मुठीत गुंडाळल्या होत्या. काही जल्लादांनी कैद्यांच्या जिभा जबड्यातून बाहेर खेचण्यासाठी हातांत सांडशी घेतल्या. काहींनी त्यांच्या जिभा छाटण्यासाठी खांद्यांना टेकून धारदार नंग्या तेगी पेलल्या. हुकमाची वाट बघत ते सारे शिस्त धरून एका बगलेला खडे झाले.

आलमपन्हांचा हुक्म होता – "आँखे निकालनेसे पहले जबान काट दो। हर सजाका अमल पहले शायरपर करो। बादमें संबापर!"

प्रत्येक सजेचा अंमल पहिल्याने कवी कुलेशांवर करण्याचा हुक्म देण्यात काय मतलब होता औरंगजेबाचा? तर आपल्या प्याऱ्या शायराचे सजा भोगताना होणारे हालहाल बघून राजांचा दिल कचावा, मनोधैर्य ढळावे त्यांचे. फाटूनच जावे त्यांचे काळीज. हताश होत हात पसरून कोणत्याही अटीवर भीकच मागावी त्यांनी जान बचावण्याची. ते नाहीच झाले, तर किमान चाकराचे हाल बघताना त्यांना दिलतोड यातना तरी व्हाव्यात.

कमरेला फक्त तुमानी आवळलेल्या उघड्याबंब आणि घामात निथळणाऱ्या, हातात सांडशी आणि नंग्या तेगी पेललेल्या, पाचदहा काळ्याकभिन्न उलट्या जाड ओठांच्या हबशी जल्लादांचा मेळ घेऊन इखलास कुलेशांच्या समोर आला!

आतापर्यंत सजेची बातमी पुऱ्या तळभर सरकली होती.

जखडबंद कैद्यांची सजा बघून डोळे निववावेत म्हणून फौजी स्त्री-पुरुष सारेच खचाखच दाटले. टाचा वर करून एकमेकांच्या खांद्यावरून कधी बघितले नव्हते अशा सजेचा नजारा ते बघू लागले. एवढा तळ एकवटला होता खांब्राभवतीने, पण डुईवरून उडणाऱ्या रानभोरड्यांची भरभरसुद्धा साफ ऐकू यावी, एवढी शांतताच शांतता पसरली होती.

"मू ऽ खोलो शायरके बच्चे!" कुलेशांचा मुखडा हातपकडीत धरून इखलासने तो डावा उजवा हासडला. त्याची बकबक ऐकूच न आल्यासारखे कुलेश शांतच होते.

हा हुक्म फर्मावणारा इखलास किती मूर्ख होता! आपली जीभ छाटण्यासाठी आपला जबडा कोण आणि कसा काय देणार खोलून!

एकटक रोखून बघणाऱ्या कुलेशांचा शांतपणा बघून तर इखलास पिसाळूनच गेला. पुढे होत त्यांचा जबडा फाकण्यासाठी ताकद लावून दोन्ही हातांनी झटू लागला. कुलेश काही नुसते शायर नव्हते. स्वारी शिकारीत तावून सुलाखून निघालेले सूरमे लढवय्ये होते ते. खूप खटपट करूनही एकल्या इखलासला काही त्यांचा जबडा फाकविणे साधेना. 'दातकुडी' बसल्यागत जाम आवळूनच धरला होता त्यांनी आपला जबडा! त्या जबड्याशी झटून घामाघूम झालेला इखलास शेवटी वैतागून, संतापून उठला. कुलेशांच्या गालावर संतापी थप्पड देत ओरडला, "पकड बैठी क्या मू को तेरे सुव्वर ?"

आपल्या जल्लादांकडे बघत हात उठवून तो चरफडत कडाडला, "सब मिलके खोलो ये जबडा. खींचो बाहर इसकी जबान!" चार-पाच हबशी जल्लाद चटकन पुढे झाले. त्यांनी मराठी दौलतीचे छंदोगामात्य कवी कुलेश यांचा मुखडा आपल्या बळकट पंजानी, चारी बाजूंनी जागीच दाबून धरला.

आता– आता जाणारच आपली जबान म्हणून सगळा जीव जिभेतच एकवटून आणलेले कुलेश आरोळी फोडत मोठ्याने ओरडले, "प्रणाऽम स्वामीऽ मामूली कानोजी शायरका, भाग्यवान हैं हम कि आज– आज आपके साथ पंक्तिमें बैठनेका मौका तो मिला– मौतकी पंक्तिमें!! जै भवानीऽ जै चंडीऽ!" जल्लादांनी कुलेशांची बडबडणारी जीभ तोंडात सांडस खुपसून तिने जाम पकडली. एका झटक्यात, ताकदीने खसकन जबड्याबाहेर खेचली. त्या कळीने ती कविर्जीभ सांडशीतच लवलव हलली. हाती तळपती तेग घेऊन उभ्या असलेल्या एका जल्लादाकडे मुकर्रबने इशारती नजर टाकताच जल्लादाने कुलेशांच्या जिभेवर एवढा जबर वार उतरवला की जिभेचा कंडका पाडून, दोन-तीन दात तोडीत, खालचा ओठ आणि हनुवटी चिरत तो उतरला. एक चीत्कारी हंबरडा फुटला. भवतीच्या बेहोष जल्लोषांत तो मुरूनही गेला. अंगावरचा तख्ता-कुलाह चिंब भिजवून टाकणारा रक्तचिळकांडीचा फव्वाराच फव्वारा उडाला कुलेशांच्या चिरफाळल्या तोंडातून! त्यांच्या कपाळीचा, आतापर्यंत नावापुरताच उरला कनोजी पद्धतीचा गंधटिळा त्या फव्वाऱ्याने दिसेनासाही झाला. अंगचा विदूषकी पेहराव ओघळल्या रक्ताने चिंब भिजला.

आपल्या खोड्यातून राजांनी, रक्तधारांत न्हाऊन निघालेल्या कुलेशांच्या चेहऱ्याकडे बघितले. आपल्या बाळराजांनाच घालावी तशी केवढीतरी हळुवार साद त्यांनी कुलेशांना घातली– "कविराज!"

तुटल्या जीभगड्ड्यातून असह्य वेदनांचा आगडोंब उसळला असताही आपले डोळे उघडून छंदोगामात्य कुलेशांनी आपल्या स्वामींकडे शांतपणे डोळाभर बघितले.

भवतीच्या जमावाच्या कल्लोळत्या आरोळ्यांनी इखलास तर आता पुरता बेभान

झाला होता. कुलेशांच्या जबड्याचा अनुभव घेतल्याने आपणहून त्याने शहाणपणाने राजांच्या जबड्याला काही हातही लावला नाही! सजेचा अंमल करणाऱ्या जल्लादांवर मात्र तो खेकसला, "डर गये कमजोर, डरपोक? खोल दो ये भी जबडा! काट डालो काफरकी हजरतको गाली देनेवाली मनहूस जबान!"

हुकमांचे ताबेदार पाचसात जल्लाद पुढे सरसावले. झुंपली! जखडबंद राजांचा जबडा खोलण्यासाठी खुल्या पाच-सात हबशी जल्लादांची राजांशी झोंबाझोंबी झुंपली. काही केल्या त्यांच्या पंजात आपला जबडाच देत नव्हते राजे.

"वो था शायर, उसने कितना सताया! ये तो है शेर, कभी नहीं मानेगा, सब मिलके पूरी ताकदसे चिपको इसको।" मुकर्रब-इखलास ओरओरडून आपल्या जल्लादांना चेतना देऊ लागले. बघ्यातलेच चार-पाच आपणहून जल्लादांच्या मदतीला धावले.

ठेवला! राजांचा मुखडा काळ्याकभिन्न केसाळ दहावीस हातांनी, तसूभरही हलवता येणार नाही असा जागीच दाबून ठेवला. काळ्याशार नांगीदार विंचवांनी शिवपिंड पुरती झाकाळली! राजांचा जबडा कानशिलाजवळ दोन्ही बाजूंनी एवढ्या जोरात दाबला की तिथल्या जोडहाडांच्या अनावर कळीसमके, रायगडाच्या महाद्वाराचे दोनही दरवाजे खुलावेत तसा भोसलाई राजजबडा आपोआप खुलला.

ज्या ओठांआड जगदीश्वराचे तीर्थ आणि जिजाऊ, धाराऊ, येसूबाई, पुतळाबाई यांच्या हातून पडलेल्या दह्याच्या कवड्या गेल्या होत्या, त्याच ओठांआड जल्लाद हबशाने लोखंडी सांडस ताकदीने खुपसली.

आनंदाच्या आणि दुःखाच्या दोन्ही क्षणी, कुलदेवतेचे स्मरण करणारी "जगदंब जगदंब" अशी नांदी उठविणारी, क्षत्रियकुलावतंस, श्रीमन्महाराज, हिंदुपदपादशहा, गोब्राह्मणप्रतिपालक संभाजीराजे यांची जीभ सांडशीत घट्ट धरण्यात आली.

"लाऽइलाऽह" अशी बघ्या हशमांच्या पाठकण्यात सुरसुरी उठवणारी गर्जना फोडून, विस्फारता येतील तेवढे हबशी डोळे विस्फारून हत्यारी जल्लादाने हातच्या तेगीचा ताकदवर वार, सांडशीत पकडलेल्या, बाहेर खेचलेल्या राजांच्या अंजिरी जिभेवर उतरवला. रक्ताची फवारती कारंजीच उडाली.

"धीऽऽन धीऽऽन" कानठळ्या बसविणारा, बघ्यांच्या कल्लोळी, कालव्यांच्या आरोळ्यांचा पाऊसच पाऊस पडला. सांडशीत पकडलेल्या 'बेगुमान मगरूर' जिभेचा वळवळता तुकडा जल्लादाने त्यावर पचकन् थुंकून "खाने दो कुत्तोंको–" म्हणत सांडशीसह वढू बुद्रुकाच्या तापल्या धुळीत फेकून दिला!

ज्या देहावर अभिषेकसमयी देशभरच्या पवित्र नद्यांच्या जलाचा वर्षाव मंत्रघोषात झाला होता, त्याच देहावर त्यांच्याच रक्ताच्या चिळकांड्या उतरल्या. वेदनांचा एवढा आगडोंब उठला त्यांच्या जीभगड्ड्यातून पण बेभान होत एक साधा हुंकारसुद्धा फुटला नाही त्यांच्या ओठांबाहेर! ओठ दातांखाली घट्ट दाबून, गच्च मिटल्या डोळ्यांनी आवरता

येत नव्हते म्हणूनच त्यांनी जीभगड्ड्यातले ओघळते रक्त ओघळू दिले! काही वेळाने शांतपणे डोळे उघडले. समोरच्या धुळीत आपलीच पडलेली वळवळत जीभ बघताना मात्र काळीज गलबलून उठले त्यांचे – फक्त एकाच विचाराने –

आजवर कधीच नाही पडला भुईवर, याच जिभेतून बाहेर पडलेला आमचा सादिल शब्दसुद्धा! पण – पण आज ती जीभच पडली आहे भुईवर! शांत होण्यापूर्वी वळवळून ती आम्हासच म्हणते आहे – "धनी ऽ, द्या एखादा साजेसा हुकूम – या क्षणीही पाळीन तो!" त्या विचाराने तर राजे देहातीत होऊन आपल्याच जिभेकडे एकटक बघताना पुरते हेलावले. खळबळ-खळबळ माजली त्यांच्या काळजाच्या खोलवटात –

राजे आणि कुलेश रक्तमाखल्या तोंडांनी एकमेकांकडे बघत होते. आता ते 'दोन' जीव नव्हतेच. मावळबोलीतल्या एकाच 'राजकाव्याचे' दोन दिसले तरी एकाच मतलबाचे अर्थपूर्ण सर्ग झाले होते! छत्रपती आणि छंदोगामात्य ही दोन वाटणारी त्यांची रूपे, त्यांच्या जीभगड्ड्यातून अंगभर ओघळून एकमेकांत मिळू मिसळून गेलेल्या रक्तओघांनी त्यांच्या पायतळी एकरूप केली होती. अंगच्या वाहिल्या रक्ताने लालेलाल – मनोमन एकरूप! असताच आबासाहेबांचा प्यारा 'कवी भूषण' हे बघायला आता तर रचूनही टाकला असता त्याने 'शिवराजभूषण' सारखा काव्यग्रंथ – 'कवी-राज-भूषण!' असा.

सजेचा पहिला हप्ता संपला होता. तुटल्या जिभांच्या गड्ड्यांतून दोन्हीही कैद्यांना मरणप्राय यातना होत होत्या. त्या यातनांची नव्हती एवढी खंत दोघांनाही एकाच गोष्टीची वाटत असावी. बागलाणपासून तंजावरपर्यंत पसरलेल्या मराठी दौलतीच्या बाबीने, यापुढे औरंग कुठल्या चालीने जाईल? पण या तर्काने मनात उठणारे विचार त्यांना एकमेकांशी बोलण्याचे साधनच आता उरले नव्हते. कुलेशांना राजांना मनसुब्याचे म्हणून म्हणायचे होते, "इससे जादा जलकोट उठाने चाहिये, फिरंगी-मुघल मिलनेसे पहले – हो सकता है, स्वामीपर हथियार उठानेवाले शिर्के औरंगकीही मदद लेकर खुद महारानीको भी नहीं देंगे चैनकी नींद!!" पण – पण काहीच न बोलता आल्याने नरड्याची नुसती घाटीच हलत राहिली त्यांच्या. व्याकुळ-व्याकुळ झाले होते त्यांचे डोळे, फक्त त्याच कुचंबणेने!

राजांचे मन तर पिंजऱ्यात कोंडलेल्या गरुडपक्ष्यासारखे नरड्याच्या घाटीला धडकाच धडका देऊ लागले. त्यांनाही कुलेशांना सांगायचे होते – "हंबीरराव, म्हलोजीबाबा तर जिवाचे सोने करून गेलेच! कंककाका तर वयाने झालेत. आमच्या चौतर्फा दौडणाऱ्या फौजफळ्यांना जाणता निवाडा देणारे आता सरलष्कर कोण? आमचे रूपाजी, मानाजी, विठोजी की संताजी-धनाजी? केवढी गफलत होईल आमच्या श्रीसखींनी आमच्या ठायी बाळराजांनाच मानून चालविले तर? औरंगच्या रेट्याला जाब देईल असे निघतील धडाडीचे आमचे रामराजे? आणि होईल काय आमच्या मागं खुद्द आमच्या श्रीसखींचं??"

खुल्दाबादेच्या कोठीतील दुर्गाबाईंच्या आठवणीने तर गलबलून गेले त्यांचे आतडे.

आता सूर्य कलतीकडे झुकला होता. कणाकणाने मोठा होत होता.

कैद्यांची जबान काटण्यात घामेघूम झालेले जल्लादी पथक इखलासने – "जा ऽ व आराम फर्माओ ऽ" म्हणत हटवले. दुसरे तवाने जल्लादी पथक, दुसऱ्या सजेच्या अमलासाठी पुढे घेतले. हातघाईच्या जंगात मैदानावर हालत नव्हता एवढ्या तडफेने आज इखलास हालत होता. खातर होती त्याला, पुरी केली तर एवढी बिकट खिदमत वाया जाणार नव्हती. त्याचे मालिक हजरत नोंद घेणारच होते त्याची.

बघ्यांना तर बागी कैद्यांचे डोळे काढण्याची सजा बघून आपले डोळे शांत करून घेण्याची एवढी उतावीळ झाली होती की, हुकमाची संधी मिळती तर त्यांनीच पुढे होत मनची मुराद झटक्यात पुरीही करून घेतली असती!

पुढे घेतल्या तवान्या पथकातील दोन तगडे हबशी निवडून इखलासने बाजूला घेतले. आपणच वाकून लोहारी चुल्ह्यातल्या, एव्हाना तापून लालेलाल झालेल्या लोखंडी सलाखा, त्यांच्या कातडी मुठींना धरत इखलासने चुल्ह्याबाहेर खेचल्या. निवडल्या हबशी जल्लादांच्याच डोळ्यांत त्या खुपसल्यासारख्या नेऊन खुद्द तेच कचदिल नाहीत याची अजब पारख करून घेतली त्याने! निवडलेले हबशी हात, पाय, डोळे होते म्हणूनच माणूस म्हणायचे नाहीतर – गंजल्या लोखंडी पुतळ्यासारखेच दिसत होते ते! तसूभरही हालले नाहीत ते. त्यातल्या एकाच्या हातात आपल्या हातातील तापल्या सलाखा खुशीने देत, कुलेशांच्याकडे बघत इखलास त्याला म्हणाला, "घुसेड दो ये जलती सलाखें इस बम्मन शायरकी आँखोंमें। देखेंगा इसका मालिक कैसी टपकती है शायरी खून के बजाय अपने शायरकी आँखोंसे!!"

घोंघावते समुद्रवादळ, भक्कम खडकाळ बेटाकडे सरकावे तसे "जी हुजूर" म्हणत हाती तापल्या सलाखा घेतलेला हबशी कुलेशांच्या समोर आला – त्यांचे डोळे जाळून काढण्यासाठी.

कुलेश तर 'कवी' होते. इथला निसर्गाने नटलेला मावळी मुलूख त्यांनी डोळाभर बघितला होता. तो, उंचापुरा रायगड, आपला कबिला आणि सर्वांहून अधिक कनोज सोडून एवढ्या दूर ज्याच्यासाठी आलो, त्या स्वामींना पुन्हा बघण्यासाठी डोळेच उरणार नाहीत या जाणिवेने रक्ताळल्या तोंडाच्या राजांना त्यांनी अगोदर डोळाभर बघून घेतले. जल्लाद जसजशा रसरशीत तापल्या, लालेलाल सलाखा डोळ्यांजवळ आणू लागला तसतशी कुलेश आपली गर्दन इकडे तिकडे गरगरा फिरवू लागले. जल्लादाने त्यातूनही निकराने घुसडलेल्या हातच्या सलाखा कैद्याच्या गालावर, कानावर चरचरत भिडू लागल्या. तो जल्लादच चिडून ओरडला – "देखते क्या हो बेवकूब! जकड दो इसकी गर्दनका हिलता पत्ता!"

तसे धक्का बसलेले हबशी लगबगीने पुढे झाले आणि त्यांनी कुलेशांचा मुखडा जागीच

पकडून ठेवला. त्यांना धक्का अशासाठी बसला होता की, तख्ताकुलाहातल्या जखडबंद कैद्याचे डोळे काढणाऱ्या त्या सराईत साथीदाराला आजवर अशी कुणाच्याच मदतीची गरज कधीही पडली नव्हती,

"चर्रर्र ऽ चर्रर्र ऽ" सुताराने शिसवी फाकांना भोके पाडण्यासाठी हातचे किकरे फिरवावे तशा, आपलेच डोळे विस्फारलेल्या जल्लादाने हातच्या लालेलाल लोखंडी, तप्त सलाखा कवी कुलेशांच्या डोळ्यांत खुपसून चराचर फिरविल्या. जळल्या बुबुळांच्या मांसाचा उग्रट वास चारीकडे पसरला. कुलेश कुडीभर धडपडले. "आ : ऽ आ : ऽ" जीभ गमावल्या त्यांच्या कंठातून कसनुसाच आवाज फुटला.

नाकात घुसल्या उग्र जळकट मांसाच्या वासाने आणि कानात शिरल्या त्यांच्या आवाजाने राजे गैरसमजात गेले. त्यांना वाटले मरणाच्या भयाने छंदोगामात्य चरफडून तळमळताहेत. अनावर झाल्याने खुद्द त्यांच्याच कंठातून तसेच कसनुसे शब्द सुटले "ऑ: ऽ ऑ: ऽ!" त्यांना कुलेशांना निर्धाराने म्हणायचे होते– "दौलतीचे छंदोगामात्य असे केव्हापासून लागले मरणाला भ्यायला ?"

खरे तर कुलेशांना म्हणायचे होते– "राजन् हो तुम साँचे खूब लडे तुम जंग।"

जरी एकजीव झाले होते ते अंतरंगाने तरी असा गैरमेळ पडला होता त्यांच्या विचारांचा – गमावल्या जबानीमुळे.

आता तर भवतीचे बघे खुशीने पिसाळल्यागत टाळ्याच टाळ्या पिटत ओरडू लागले. "बहोत खू ऽ ब ! अल्ला मेहरबान ! जल्दी करो भाद्दर ऽ ! निकालो इसकी भी आँखकी कौडियाँ ऽ !"

सजेचा अंमल करणारा जल्लाद आता हातच्या जळकट रक्ताने काळपटलेल्या, तरीही तप्त सलाखांहून अंगभर पेटून उठला होता. वापरून नाकाम झाल्याशा वाटल्याने "बेकार हो गयी सलाखें ये" म्हणत तिरस्काराने त्याने हातच्या सलाखा थेट जीभ-डोळे काढलेल्या कुलेशांच्या अनवाणी पायांवर मुद्दाम फेकल्या.

मागे वळून दुसऱ्या चुल्ह्यातल्या तावणी खात पडलेल्या नव्या सलाखांची लालेलाल जोडी त्याने खसकन् उचलली. लाल डोळे तिच्यावर गरगर फिरवीत बघ्यांना तिची लाली दिसावी म्हणून हात उंचावून ती 'ला ऽ इलाह' म्हणत नाचवली. त्याने ओरडण्यापूर्वीच त्याच्या चार पाच मददगारांनी रायगडाधीप, मराठी दौलतीच्या, शिवपुत्र छत्रपती संभाजीराजांची गर्दन जल्लादाच्या सोयीसाठी चारीकडून जखडून केव्हाच जाम करून टाकली होती.

क्षणानंतर जळून होत्याचे नव्हते होणारे राजांचे डोळे अपार शांत, स्थिर होते. ते डोळे नव्हतेच! दोन तेजोगोलच होते ते. हयातीत कधी नव्हते एवढे चमत्कारिक तेज उतरले होते त्यांत.

एरव्ही उलथा पडणारा खालचा ओठ आता दातांखाली घट्ट पकडून, हातच्या

रसरशीत सलाखा रोखत जल्लाद राजांच्या समोर आला. डुईच्या केसांपासून तुमानीखालच्या पायांपर्यंत घामाने आज पुरता निथळला होता तो. हातच्या तापल्या सलाखा पेलून, द्याव्या लागणाऱ्या कठोर सजेच्या मानसिक उष्म्याने घामेघूम झाला होता तो.

अर्धवट अर्धवट कदम पुढे टाकत तप्त लाल सलाखा पेलून क्षणाक्षणाला तो राजांच्या डोळ्यांकडे एकटक बघत पुढे पुढे सरकू लागला.

आणि – आणि – काय झाले कुणास ठाऊक! हातच्या सलाखा तशाच पेलून तो जागीच पुतळ्यागत गुमान उभा राहिला. अपार तेज उतू जाणाऱ्या, राजांच्या निर्भय, तेजवंत पुष्करी डोळ्यांकडे बघताना त्याचे त्यालाच मनोमन जाणवले– "कितनी जला दी आँखें सलाखोंसे, जिंदगीभर – मगर – मगर कभी देखी तक नहीं ऐसी आँखें! नहीं – नहीं – ये आँखें जलानेके लायक नहीं! जतानेके लायक हैं!"

एवढा पत्थरदिल तो जल्लाद! पण तोही स्वत:शीच चरकून, राजांकडे बघत मान डोलावून दोन कदम मागे हटला!! आणि खुद्द त्याच्याच पाठीत एक सणसणीत तमाचा पडला, भिजल्या पाठीवरून घामाचे तुषार उडाले. कानात इखलासचे करडे, जरबी शब्द घुसले– "नमकहराम! रुक क्यों गया ? निका ऽ ल दो ये आँखें!"

ताबेदार जल्लाद त्या कळीसरसा स्वत:च्या काळजातला माणूस पायतळाशी टाकत पुन्हा पुढे सरसावला. राजांच्या डोळ्यांच्या बाहुल्यांजवळ हातच्या धगधगीत लाल सलाखा नेताच त्याने कराव्या लागणाऱ्या कठोर ताबेदारीच्या दडपणामुळे आपलेच डोळे गपकन मिटून घेतले! त्या क्षणभरातच शंभूनेत्रांसमोर अष्टभुजांची कुलदेवी तुळजाभवानीच चमत्कारिक रूपात तरळून गेली. तिचा मुखडा होता थोरल्या आऊंसारखा, डुईवर मुकुटाऐवजी आबासाहेबांच्या राजटोपागत टोप होता, आठही हातांच्या जागी दिसत होत्या कबिल्यातल्या आकृती. सती गेल्या मासाहेब, श्रीसखी आणि होय– रामराजांच्या मासाहेबसुद्धा! त्या हातांच्या एक एक बोटात बालपणी-मोठेपणी बघितलेले प्रतापराव, मालुसरेकाका, मुरारबाजी, कोंडाजी, कृष्णाजी कंक, हंबीरराव, म्हलोजीबाबा असे कैक मुखडे दिसून गेले. कानात कुठंतरी नांद्या, किलकाऱ्या घुमून गेल्या– "जय जय रघुवीर समर्थ! –उदं गं अंबे उदं! हर हर म्हा ऽ देव! या गोंधळासी माये, अंबे लौकर यावे!!"

"चर्रर्र ऽ चर्रर्र ऽ" हातच्या तप्त सलाखा समोरच्या कैद्यांच्या डोळ्यांत खुपसून, सवयीप्रमाणे त्या जागीच गरगर फिरवून, सलाखा तशाच डोळ्यात ठेवून, मिटल्या डोळ्याच्या जल्लादाने थकावटीने आपलेच गुडघे भुईवर टेकले.

बघ्यांनी बेभान होत हैदोसी गिल्ला घातला– "धी ऽ न धी ऽऽ न – छोड दो अब इसे, जायेगा ये औरंगाबाद, बऱ्हाणपूर तक!"

याही स्थितीत राजांना एका गोष्टीची खंत जरूर वाटत होती – "का नाही ठोकले

आलमगिराच्या कोणी इमानदार जल्लादाने आमच्या नाकात आणि कानात, तोफांच्या रंजुकांना ठोकतात तसे खिळे ? म्हणजे आलाच नसता आमच्या आणि कवी कुलेशांच्या जळक्या मांसाचा एकमेकांत मिसळलेला वास आम्हास ! आणि कानांवर पडलाही नसता बुजगावण्यांचा हा आनंदाने उकळणारा खिजवता कल्लोळ ! ''

आता राजे आणि कुलेश यांचे चेहरे एवढे भयाण दिसत होते की, औरंगजेबाच्या पोरउमरीच्या एखाद्या नातवंडाने त्यांना तसे बघितलेच असते तर दातखीळच बसली असती त्याची ! डुईवर उंच लाकडी टोप्या, गळ्याहातांना जखडणारे तख्ताकुलाह, अंगावर ढगळ विदूषकी, रक्ताळलेले कपडे, कमरेला बांधलेल्या काटेरी वेली आणि जागजागी रक्तथेंब पडलेल्या घंटांच्या माळा, जळून गेलेल्या डोळ्यांच्या खोबणी, त्यांच्यातून उतरलेले जबानी काढल्याने ओठ आणि तोंडभर कुरळ्या दाट दाढीत मिसळलेले, साकळलेले रक्त ! कसे दिसत होते ते ? वळीव पावसाच्या मारगिरीत तडाखून निघालेल्या, मूळच्या अनेक रंगांत चितारलेल्या, रेखीव, देखण्या पण क्षणात ओघळून फिस्कटून गेलेल्या भित्तिचित्रांसारखे !

मावळतीच्या डोंगरकडांआड सूर्य डुबला होता. इंद्रायणी आणि भीमा यांचे एकमेकींत मिसळलेले संगमपाणी थरकत्या लाटा उठवीत वाहत होते.

तळावर सांजेच्या नमाजाची समज देणाऱ्या नौबती दुडदुडू लागल्या. थोड्याच वेळात तळभर नमाजी अजानच्या ललकाऱ्या उठू लागल्या – '' अल्ला हु अकबर ऽऽ ''

राजे आणि कुलेश आता वेदनांसह देहाच्या पार झाले होते. राजांची तर कधी नव्हती अशी मनाची मनाशी फक्त स्वत:शीच अशी बातचीत चालली होती. अंधारून आल्याने ठायी ठायी तळभर पलोते शिलगले होते. त्याहून कितीतरी पलोते शिलगले होते शंभूराजांच्या दुनियापार पोचलेल्या भोसलाई राजमनात.

रातपहाऱ्याचे गस्ते हशम, औरंगजेबाचाच हुकूम असल्याने तळपती हत्यारे पेलून जागजागी फेऱ्या घेताना गस्त देत होते – '' होशियाऽर.''

डोळे, जबान, हात पाय यांसह पुरत्या देहापार गेल्या राजांच्या मनात, खुद्द त्यांनाच अनोखी वाटावी अशा विचारांची प्रचंड धुंदळ माजली होती. स्वत:च बघत होते ते तिऱ्हाइतासारखे आपल्यालाच, आठवत होते त्या बालपणापासूनच्या आतापर्यंतच्या, हयातीकडे.

सुरू झाली ! राजांच्या मनात विचारच विचारांची अनावर कारंजी. उसळू लागले त्या कारंजांतून अस्मानी विचारांचे तजेलदार पाणीच पाणी ! ते नेहमी मांड घेत आलेल्या 'चंद्रावतापेक्षा' सफेद, आता डोळ्यांआड झालेल्या, पुन्हा कधीच न दिसणाऱ्या आकाशीच्या तेजबिंबाच्या रसासारखे, रायगडाच्या निशाणकाठीवर, मावळवाऱ्याने फडफडत्या जरीकाठी भगव्याच्या वाणाचे, आबासाहेबांच्या तोंडून वेळोवेळी बाहेर

पडलेल्या, शिवबोलांचेच आसवाब त्यालेले ! समर्थांच्या तपस्वी कमंडलूतील 'रामतीर्थांसारखे', थोरल्या आऊंच्या तोंडून वेळोवेळी सहजगत्या बाहेर पडणाऱ्या 'जगदंब, जगदंब' ह्या जगन्मातेच्या स्मरणासारखे, आपल्याच हयातीत हे 'श्रीं' चे राज्य राखून चालविण्यासाठी मुलूखभर वेगवेगळ्या जागी देह ठेवलेल्या कोंडाजी फर्जंद, कृष्णाजी कंक, तुकोजी पालकर, निळो बल्लाळ, हंबीरराव, म्हलोजीबाबा यांच्या वाहून गेल्या रक्ताची आण सांगणारे !

आता त्यांच्या मनच्या डोळ्यांना दिसू लागला दौडीत डोळ्यांत भरलेला तिन्ही हंगामांतला मराठी मुलूख – रायगडावर उतरणाऱ्या त्या पावसाळी तिन्हीसांजा. तस फोडून उतू जाणारा कुशावर्ताचा आणि गंगासागराचा तलाव. पाणधारांखाली निथळणारे आघाडी मनोरे, जगदीश्वराचे राऊळ, बालेकिल्ला, व्यापारपेठ, मंत्रीबाडी, हिरकणीमाची, भवानीटोक, टकमकटोक, सातमहाल, सिंहासनचौक यांसह अभिषेकपात्रांतून संततधारेखाली निथळून निघणाऱ्या शिवपिंडीसारखा दिसणारा आमचा प्राणप्रिय रायगड ! गडउतरंडीवर, करवंदीच्या, रामेट्याच्या, अंजनीच्या गचपणात किरकिरणाऱ्या रातकिड्यांचे आणि गडटाक्यात एकलग घुमणाऱ्या बेडकांच्या जमेतींचे पाणधारांच्या सरसरीत एकरूप झालेले आवाज. एरवी पायथ्याशी स्पष्ट दिसणारा, थोरल्या आऊंचा, कोसळत्या पावसात धुरकटता दिसणारा पाचाडवाडा. पडत्या पावसाची तमा न बाळगता, गडभरच्या चौक्याचौक्यांवर कांबळी पांघरून जागल्यांच्या नजरेने गस्त देणारे मेटकरी. गडावरून चहूबाजूंनी पायथ्याशी कोसळताना अखंड घरघरणारे लहान-मोठे स्फटिकसाफ धबधबे. महापुराचे पाणी दुतर्फा फेकून देत नागिणींसारख्या सळसळत धावताना दिसणाऱ्या पायथ्याच्या काळ आणि गांधार नद्या.

हिवाळ्याच्या हंगामात मुलूखभराच्या गडकोटांना बिलगून बसलेले, दहीदाट गर्द धुके. चढत्या दिवसाबरोबर त्याच धुक्याचे तटबंदीच्या थंडगार दगडबंदीवर उठणारे दहिवराचे थरारते थेंब. गडागडांवरच्या नगारखान्यांच्या पायथ्याशी धुमसत धूरफेक करणाऱ्या, पेटत्या शेकोटीतील आंब्याच्या आणि बाभळीच्या लाकूडगाठी. पागेपागेत जनावरांच्या तोंडूनसुद्धा गारठ्याने फुटणारे फव्वारते वाफारे, उरफोडी धाव घेऊन मुलूखभरातून गोळा केलेल्या खबरा पेश ठेवताना गडथंडीने लटलट कापणारे, तरीही सावरत अदबशीर बोलणारे बहिर्जी, विश्वास, कर्माजी यांच्या पथकांचे खबरगीर, वऱ्हाड, खानदेश, कोकण, मराठवाडा, बागलाणपासून ते गोव्यापर्यंत आमच्या 'चंद्रावताच्या' टापांवर टापा ठेवत दौडताना झोंबत्या, थंडगार मावळवाऱ्याने दातवाणे धडाधड आपटणारे आमचे शेकडो, हजारो घोडा व पावलोक. रायगडाच्या मुक्कामी असताना खुद्द श्रीसखींच्या हातून समोर येणारा हुलग्याच्या माडग्याचा वाफाळता गरम कटोरा !

ऊन्हतापीच्या हंगामात जागजागी गडपायथ्याशी शिवारांत, मृग तोंडावर आल्याने

पालापाचोळा एकवटून मातीस तावणी देण्यासाठी कुणब्यांनी पेटविलेले रानतरवे. आंबा, वड, पिंपळ, चिंचेच्या घेरांखाली रवंथ करीत विसावलेली, तान्हेली, दमगीर गुरढोरे. पन्नास कोसांची एकलग धावणी मागे टाकून आल्यावर, तळाच्या जागी पाणथळाकडे ओढ घेणारी, फेसाळती दमगीर घोडी. उन्हाने आणि पेटलेल्या भात्यांच्या धगीने घामाने निथळताना कपाळपट्टीवरची थेंबावळ तर्जनीने निचरून टाकून, हत्यारघडाई करणारे लोहार. फिरत्या चाकांवर त्या हत्यारांना ठिणग्याच ठिणग्यांची फिरती चक्रे उठवीत शिकल देणारे शिकलगार. पागे-पागेसमोर खूर जखडलेल्या घोड्यांच्या नख्या तासळून त्यांना तोंडात खिळ्यांचे पुंजके आवळून मजबूत, तवाने नाल ठोकणारे नालबंद. मुलूखभरच्या रावळा-रावळांत दर्शनासाठी आमच्या मागून प्रवेशण्यापूर्वी पायीची पायताणं उतरून, धूळमाखले पाय साफ करण्यासाठी उंबरठ्याबाहेरच थपाथप पाय आपटणारे आमचे धारकरी.

माती! बालपणी माणसास दूध देणारी, उभारल्या, पुढच्या बांड आयुष्यात त्यास अन्न, पाणी भरविणारी, गोळ्याची मूरत रेखणारी ही माती! एक राजा म्हणून नव्हे, सेनापती म्हणून नव्हे, शिलेदार धारकरी म्हणून नव्हे, एक 'माणूस' म्हणून आमचे या मातीशी नाते काय? माणसाचे मातीशी नाते असते? होय. माणसाचे मातीशीच नाते असते– तसे 'मातीत' मरणारे कैक असतात. 'मातीसाठी' मरणारे फाऽर थोडे!! मिळेल आम्हास ते भाग्य या क्षणाने तरी?

"जगदंबऽ जगदंब" घशाला कोरड पडल्याने ते स्वत:शीच मनोमन पुटपुटले. पाण्याच्या थेंबांऐवजी रक्ताचे थेंब उतरले त्यांच्या घोटल्या घशाआड.

या वेळी नुकताच नमाज पढून आपल्या शाही शामियान्यात आलेल्या औरंगजेबाला इखलास सजेचा शब्दबर तपशील देत होता. कधी नव्हे ते पायफेर घेताना औरंगची पावले बुढाप्यातही झपाझप पडत होती. त्याला बेचैन, सैरभैर बघताना इखलास तर पुरेपूर हबकून गेला होता. काही इतराजी झाली हजरतांची तर!

पण औरंग मात्र वेगळ्याच बेचैनीने पायफेर घेत होता– मधेच थांबत होता. काही विचाराने शामियान्याच्या छताकडे मधूनच बघत होता.

"कुछ नहीं चीखा-चिल्लाया काफर इतनी सख्त सजा लेकर भी?" स्वत:लाच विचारावे तसे त्याने इखलासला विचारले.

"जी, बिल्कुल नहीं." द्यायचा म्हणून इखलासने लवत जाब दिला.

तो ऐकताना एकाच विचाराने हिंदोस्थानचा बादशहा हैराण हैराण झाला. "इसी जगह होता हमारा बागी शहजादा अकबर तो? आती ऐसी सजाकी नौब्त उसपर तो?"

जायच्या इजाजतीच्या हुकमाची वाट बघत इखलास तसाच ताटकळत उभा आहे याचेही त्याला भान नव्हते. दक्षिणेतून निघून आम्याला आपल्या बापाला कैद केल्यापासून राजस्थान, बंगाल, विजापूर, गोवळकोंडा आणि मराठी मुलूख तुडवीत

वणवण भटकलेली आपली हयात, त्याला सताड उघड्या डोळ्यांसमोर सरकताना दिसू लागली. "हमारी एक भी औलाद होती 'संबा' जैसी तो? डालते हम इतने बडे सल्तनतका बोझ भरोसेसे उसके कंधेपर। और– और गुजारते बुढापेकी ये जिंदगी तसल्लीसे, पैगंबरकी खिदमतमें।" एवढा जवळ जवळ पुरा हिंदोस्थान हुकमतीखाली येऊनसुद्धा काहीतरी नेमकेच गमावल्याच्या काळीजतोड, बेचैनीने तो स्वत:च हरवल्यागत झाला. इखलास समोर उभाच असलेला बघताच तो केवढ्याने तरी ओरडला– "जाऽऽव!!"

तळावर कुठेतरी कोंबड्याने बांग दिली. पाठोपाठ बांगांमागून बांगा सुरू झाल्या. आता राजे आणि कुलेशांना फक्त या कोंबड्यांच्या बांगांनी पहाट झाल्याचे, उन्हाच्या चटक्यांनी दिवस चढल्याचे आणि नमाजीसमजेसाठी अजाँबरोबर झडणाऱ्या नौबतींच्या दुडदुडीमुळे केवळ अंदाजाने दिवसरात्रीचा प्रहर कळत होता. त्यांच्या आतड्यांतील 'भूक' आता अंगभरच्या वेदनांनीच शमवून टाकली होती!

तळावर फटफटले. उगवतीची ऊबदार किरणे येऊन राजांच्या अंगाला बिलगली. फाऽर फाऽर जाणवली त्यांना ती ऊब. त्यांच्या मनातून थोरल्या आऊंची, सती गेल्या मासाहेबांची, श्रीसखींची, धाराऊ, दुर्गाबाई, भवानीबाई यांची पुरती 'कबिला' याद करून देणारी सय उफाळली. त्यातच उफाळत्या आणखी दोन आठवणी तीव्रतेने गोदावरी आणि रामराजांच्या मासाहेब यांच्याही.

थोरल्या आऊ! कोण होत्या त्या? त्या होत्या शिवरात्रीची पहाट धरून साक्षात जगदंबेला पडलेल्या गोमट्या स्वप्नासारख्या! त्या स्वप्नानेच पाहिले होते आबासाहेबांच्या रूपाने एक रोकडे मर्दाना सत्य! असते थोरल्या आऊंचे आणि आमचे प्राणप्यारे आबासाहेब आमच्या जागी तर!! कसे-कसे वागते ते?

कसलीतरी प्रचंड झरझर राजांच्या पाठकण्यातून सरसरत वर गेली. पोटात अन्नाचा कणही नव्हता तरी, चेहरा रक्तबंबाळ, तडतडता झाला होता तरी, आबासाहेबांच्या नुसत्या स्मरणानेच नागफण्यागत ताठ झाली त्यांची गर्दन. मनोमन माथाच भिडविला अगोदर त्यांनी आबासाहेबांच्या पावन पायांना आणि पाचाडच्या छत्र्यांच्या पायऱ्यांना. आमच्या घरच्याच आणि भवतीच्या कैक माणसांनी केली फितवेखोरी. बळ द्या आम्हास, आमच्या देहाच्या अवयवांनी आणि तुमच्या मायेखाली पोसल्या मनाने तरी देऊ नये आम्हास या निर्वाणीच्या क्षणी दगा!

आपल्या जन्मदात्या आऊसाहेबांचा चेहरा आठवण्याची खूप कोशीस केली त्यांनी. त्या जागी पुन:पुन्हा दिसू लागला त्यांना धाराऊचाच चेहरा. धाराऊ: कुणबी काळजाला मायेचे लिंपण घातलेला निकोप जीव. स्वत:च्या राया-अंतावर नाही एवढी अमाप माया केली तिने आम्हावर. धाराऊ कोण आमच्या जिंदगीतली? ती थोरल्या आऊंच्या हाती

जगदंबेने दिलेली भंडारा-परडीच! कुणबाऊ निकोप मायेचा केवढा भंडारा उधळला तिने आमच्यावर!

ऐन आषाढी एकादशीच्या रोजी चितेच्या अग्नीचा घास घेऊनच आपला जीवनभरचा उपवास सोडणाऱ्या, आमच्या सती गेल्या मासाहेब! कुणी काय मन मानेल ते मागून घेतले आबासाहेबांकडून. पण त्यांनी? काळ्या हौदावरच्या चितेवर अग्निरूप होताना आपल्यासमोर ठेवून घेतल्या त्या आबासाहेबांच्या फक्त मोजड्या. रायगडाने किती जीव देह ठेवताना पाहिले! पण पहिल्याने 'सती' जाण्याचा मान मिळविला तो त्यांनीच. काय वाटले असेल त्यांना आगझपेटीने देहाची कापूरराख होताना! आजही कानांत घुमतात त्यांचे, त्यांना चूड देताना त्यांनी काढलेले धैर्यशील अमर बोल – "कधी आलाच प्रसंग तर, आमचं हे रूप ध्यानी ठेवा. पुत्र आहात तुम्ही आमचे!"

त्या बोलांची याद होताच राजांचे मन कसे ढवळून-घुसळून निघाले. मासाहेब, मासाहेब तुमचे हे रूप आम्ही नुसते ध्यानीच ठेवले नाही, तर या क्षणी जगून दाखवतो आहोत ते. तुम्ही गेलात सती, गेल्या आबासाहेबांसाठी. आम्ही? आम्हीही सतीच जातो आहोत – पुरुषदेही – इथल्या मावळमातीचा टिळा मस्तकी लेवून!! तुम्हास रिवाजाचा चूड देण्यासाठी घरचे म्हणून आम्ही तरी होतो! इथे आमच्या भवती आहेत औरंगचे तुकडेलाचार बुणगे. तुम्ही नाही, निदान तुमची यादगीर म्हणून आम्हीच उठवले रायगडी तुमच्या नावे 'सतीचं वृंदावन.' आमच्या मागे राहील आमची याद आमच्या मुलखाला, आमच्या माणसांना?

का नाही वाटलात कधी तुम्ही परक्या? आणि का नाही वाटल्या रामराजांच्या मासाहेब कधीच घरच्या? खरेच, आम्ही आणि रामराजे तुमच्याच पोटी उपजतो तर केवढे मिटते सवाल आबासाहेबांचे आणि उभ्या दौलतीचे! का नाही वाटलो आम्ही रामराजांच्या मासाहेबांना घरचेच? दौलतीसाठी? मग फरक तो काय उरतो त्यांच्यात आणि औरंगजेबाचा बागी शहजादा अकबरात? कोण होत्या रामराजांच्या मासाहेब आमच्या जिंदगीत? विष घोटून क्षणात त्या होत्याच्या नव्हत्या झाल्या. असत्याच जर त्या आता आम्हास अशा बघायला हयात तर? खातर आहे आमची, रामराजांना घेत आल्या होत्या तशाच पोटाशी घेतले असते त्यांनीसुद्धा या क्षणी आम्हाला.

आमच्या जिंदगीचा सर्वांत चुकला-हुकला मनसुबा – आमच्या दुर्गाबाई! नाव तेवढे 'दुर्गा' ठेवले आम्ही, पण – पण दुर्गाऐवजी 'कोठीतच' राहिल्या त्या हयातभर – आणि तेही साक्षात औरंगच्या.

समजू उमजू केल्या कुठल्याच गोष्टीचा पश्चात्ताप नाही वाटला कधी आम्हास. रुखरुख तर चाटूनसुद्धा नाही गेली. पण दुर्गा – तुमची सय झाली की पोखरून निघते उभे काळीज. छत्रपतींच्या राणी असून कोठडीत खितपलात तुम्ही आमच्या बच्चांसह आणि आमची पाठराखण करण्यासाठी माहेरपणाच्या निमित्ताने आलेल्या आमच्या राणूआक्का!

कसले मिळाले माहेरपण त्यांना? आबासाहेबांच्या कन्या असून औरंगच्या कोठडीत बंद होण्याचे? तुमच्या सुटकेसाठी किती जंग केला आम्ही? आबासाहेब आणि आम्ही सुटलो आग्र्याच्या विळख्यातून पण तुम्हाला मात्र आम्हास सोडविता आले नाही. छे, छे! कसले हे आमचे जिणे? असेल – असेल – राजा म्हणजे उपभोगशून्य स्वामीसुद्धा असेल! पण – तुम्ही दोघी, थोरल्या आऊ, सती गेल्या मासाहेब, आमच्या श्रीसखी यांच्यासारख्या राजस्त्रिया म्हणजे कोण? खूप विचार केला तरी नाही मिळाला त्याचा जाब कधी आम्हास.

आणि – आणि लिंगाण्याच्या कड्यावरून देह झोकून दिलेली अश्राप गोदावरी! ती म्हणजे तर, कुठेतरी आभाळात तडकणाऱ्या विजेने दूरवरच्या भुईवर कोसळून, भेगाळावे तिचे अंतरंग, तसा आमच्या हयातीतला अदावती-सल. खुद्द आबासाहेबांनी बांधले तिच्यासाठी 'सतीचं वृंदावन' लिंगाण्याच्या पायथ्याशी. आण्णाजींना हत्तीच्या पायी दिल्याची कधीच खंत वाटली नाही आम्हास, पण हकनाक बळी गेलेल्या गोदावरीचा सल डोळ्यांत खुपून गेलेल्या सलाखीसारखा या क्षणीही सलतो काळजात. जाळत जातो तो काळजाचा ऐल-पैल तीर.

आणि आमच्या श्रीसखींचा चेहरा आठवला की झगमगती चांदणवेलच डोळ्यांसमोर उभी राहते. आमच्या पत्नी एवढे नाते वगळले तर उरल्यासुरल्या श्रीसखी आबासाहेबांच्या कन्याच शोभाव्या अशा! का कुणास ठाऊक, त्यांना अवतीभवती बघताना नेहमीच याद होत राहिली तो थोरल्या आऊंची. केवढ्या घोर यातनेत पडल्या असतील त्या या क्षणी? बोलताना त्या नेहमीच म्हणायच्या, "आम्ही आपलं बाशिंग बांधलं आहे रानवाऱ्याशी."

खरोखरच काय करतील – कशा वागतील त्या आम्हामागे? केवढी भाऊबीज घातली आहे गणोजी-कान्होजींनी आपल्या पाठच्या भगिनीला? खुल्दाबादेच्या कोठीतील दुर्गांना याद करताना केवढी अपराधाची जाणीव होते! पण रायगडाच्या श्रीसखींना याद करताना मन ऋणाइताच्या भावनेने कसे शिगोशीग भरून येते. येसू, गांगोलीत तुम्हाला मासोळीच्या वाणाची अंगठी बाळराजांच्या बारशात नजर देताना आम्हाला काय कल्पना होती की, आमच्यामागे तुम्ही पाण्याबाहेरच्या मासोळीसारख्याच व्हाल!

'हं:' कबिल्याच्या आठवणीच आठवणी अनावर झाल्याने त्यांनी मान झटकली.

समोर इंद्रायणी आणि भीमा एकमेकींच्या गळ्यात गळा घालून उन्हाला पीत, तळपत वाहतच होत्या. सूर्य आता तर ऐन माथ्यावर तळपू लागला!!

दूरवरून जवळ जवळ येणाऱ्या घोडेपथकांच्या टापांची थडथड मोठी मोठी होत जावी तशी शंभूमनात आता अष्टप्रधान मंडळाच्या आणि औरंगबरोबर जागजागी झडलेल्या

हातघाईत कामी आलेल्या कैक मर्दान्यांच्या आठवणी थडथडू लागल्या.

भ्रमात गेलेले, शेवटच्या क्षणी उशीखालून काढून भिकबाळीची आणि पेशवेपदाच्या शिक्के-मुद्रांची डबी पुत्र निळोपंतांच्या हाती देणारे मोरोपंत! कसे लागले कच्छपी ते आण्णाजींच्या आणि मासाहेबांच्या? कोण आणि कसा देणार त्याचा जाब? परक्याचे वतन कर्जापोटी आपल्या घशात घालण्याची घालमेल करणाऱ्या पहिल्या पेशव्यांना– शामराजांना पेशवेपदातून मुक्त करणारे आबासाहेब असते आमच्या ठायी तर काय करते मोरोपंतांचे? कोण आणि कसे सांगणार ते? एवढेच कशाला? कुठल्या भिरमिटीने खुद्द आम्ही गेलो आपणहून दिलेरच्या गोटात याचा काय जाब देणार आम्ही झालो तरी?? आमच्या जागी ते आणि त्यांच्या जागी आम्ही असतो तर कसे वागतो आम्ही? का काही क्षणच असतात कुट्टकाळे प्रत्येक माणसाच्या जगत्या हयातीत? नाही तर गेले असते का, एवढ्या पल्ल्याचा विचार करणारे आबासाहेब प्रत्यक्ष औरंगच्या भेटीस आग्र्यात? आणि पडते कशासाठी अडकून कैदकोठीत?

झाली नसेल कधी, आम्हाला आबासाहेबांची होते तशी आमच्या पेशवे निळोपंतांना त्यांच्या वडिलांची कधी याद? कधीच का केला नाही मोरोपंतांचा निसटता सुद्धा उल्लेख आमच्याशी बोलताना त्यांनी? की खांद्यावर जोखीम पडताच तोडूनच टाकावी लागतात माणसास नाळेची नाती? मोरोपंत, रायगडाच्या मंत्रीबाडीतील तुमच्या राहत्या वाड्यावर चौकीपहारे बसविताना काय वाटले आम्हास ते आमचे आम्हालाच ठाऊक! आपल्याच सही हाताने आपलाच डावा हात कलम करायची अशी नौबत औरंगवरही येऊ नये या पुढच्या हयातीत! पंतांची जोखमीची जागा दिली आम्ही त्यांचेच पुत्र निळोपंतास– पण– पण– नाही भरून निघाली कधी त्या क्षणी झाल्या कोंडीची जखम. पंत, तुम्ही, आबासाहेब, गोदावरी यांची मनापासून माफी मागण्यासाठी 'मागूस' म्हणून तडफडतेय आमचे हे मावळमन. पण तुम्ही– तुम्हीच सारे हात डोलवून 'नको नको' का म्हणताय या क्षणाला? का? का?

राजांनी गद्‍गदून गर्दन हलवली. साकळल्या रक्तथेंबांत थटलेले त्यांच्या चेहऱ्यावरचे घामाचे थेंब त्यामुळं इकडे-तिकडे टपकले.

खाचा झाल्या. रक्तसाकळल्या, नाकाम डोळ्यांसमोर आण्णाजी उभे ठाकले त्यांच्या! आण्णाजी– आण्णाजी! कसल्या ऋणानुबंधाची होती ही असामी? आबासाहेबांच्या काळात धाराबंदीचे काम चोख करणारे आण्णाजी– आमची मात्र मुस्कटदाबी करायला धजावलेच कसे? आण्णाजी-गोदावरी-रामराजांच्या मासाहेब. कसला त्रिकोण हा आमच्या पावलापावलात अडकत गेलेला? गोदावरीची माफी मागण्याचे सुद्धा विचार उठतात मनात. मग आण्णाजी, मासाहेबांची मात्र माफी मागण्याचे का नाही घेत मन? अगदी या क्षणीसुद्धा!

आणि गोव्याच्या मांडवीखाडीत आमचा वाहतीला लागलेला घोडा अटीतटीने थोपवून आम्हास प्राणदान देणाऱ्या खंडोजींचे जन्मदाते बाळाजी! आबासाहेबांचे नेक कलमबाज! कलम! हत्यारापेक्षा कारीगर होणारे हत्यारांचेही हत्यार! कसे रोखले त्यांनी ते मासाहेबांच्या भिडेस पडून आम्हाविरुद्ध? त्यांचे पुत्र असूनही कधीच केला नाही निळो-खंडोजींनीसुद्धा आमच्याशी बातचीत करताना त्यांचा उल्लेख? कसा धजावला त्यांचा हात त्यांच्या, आमच्या प्राणांपेक्षाही प्रिय दौलतीचा तुकडा थेट शहजादा अकबरास तोडून देण्याची लिखावट करण्यास? नसतेच पाठवले अकबराने त्यांनी रेखलेले खलिते आम्हांकडे पन्हाळगडावर? होताच त्यांचा– आण्णाजींचा, मासाहेबांचा आमच्यावरच्या विषप्रयोगाचा कटाव फत्ते तर? तर– होता आमच्या श्वासांचा क्षणात शेवट याहून कमी वेदनांनी. पण या क्षणी या वेदनासुद्धा वेदना का नाही वाटत?

आण्णाजी, बाळाजी, शामजी, हिरोजी यांना काय वाटले असेल हत्तींच्या पायी चितचुराडा होताना? खंत? असह्य वेदना? अपार यातना? छे ऽ तपशील आला होता, डोंगराएवढा बोजा अंगावर पडतानासुद्धा ते शांत होते असा. समजू उमजून केल्या करणीने कचदिल होतात ते कसले खंदे शूर? त्यांच्या मनात येऊन पाऽर दूर गेलेले काळे क्षण आज आमच्यासमोर कसे उभे आहेत? का धडपडताहेत ते आपले काळेपण उजळ करण्यासाठी! जखडबंद असले तरी त्यांना इजाजत देण्यासाठी का उठताहेत आमचे हात?

पुरे अंग घुसळून वर उठवण्यासाठी म्हणून राजांनी दोन्ही हातांना झटका दिला. पुन्हा कचला भक्कम तख्ताकुलाह त्यांच्या मनगटात!

निरुपायाने राजे देही शांत राहिले पण मन फडफडतच राहिले– त्या फडफडीतूनच आवाज उठू लागले– "प्रल्हादपंत– न्यायाधीश!" एकदा गफलत झाली तरीही त्यांच्याच हाती न्यायाधीशाची सूत्रे देताना आम्ही म्हणालो होतो, मुलखात जसे डोंगरकडे तसे न्यायाधीश! आल्या वादळवाऱ्यानं झाडंझुडपं डुलली-हेलावली एवढंच काय उन्मळून पडली तरी समजू शकतं. पण– पण डोंगरकडेच पायीचा धर सोडून लटलटू लागले तर?" अगदी निर्वाणीचा म्हणून औरंग दौलत डुबवायला चालून येताच खुद्द न्यायाधीशांनीच हातमिळवणी करावी शिर्क्यांशी? त्यासाठी त्यांनाच दस्त करण्याचा आखरी हुकूम सोडावा लागला आम्हास? आणि– आणि आज तर खुद्द आमच्याच बाबीने 'न्यायाधीश' होण्याची संधी मिळावी औरंगजेबास? शेवटी काळ आणि नियतीच असते का प्रत्येकाचा न्यायाधीश? औरंगने अन्याय नाही, न्यायच दिला आहे आम्हास असे पुन्हा पुन्हा का वाटते? याहून गैर कोणताही निवाडा केला असता त्याने तर दिल्लीच्या चांदणी चौकात नेताजी पालकरांचा मुहम्मद कुलीखान करणारा तो, आमचे मामासाहेब बजाजी निंबाळकर यांच्यावर अफझलच्या स्वारीत गुदरला तसा प्रसंग गुदरता औरंगमुळे आमच्यावर तर?

औरंगने तोही विचार नक्कीच केला असणार म्हणूनच तर त्याने रुहुल्लाच्या सवालास आमच्या सामनेच तडकावून दिले– "ये नहीं पढेगा नमाज कभी."

औरंग! आलीच नसती नौबत तर– राजहवसेपोटी ढोंग म्हणून तू हयातभर पुढे धरलेला इस्लाम न पत्करताही पढलो असतो आम्ही नमाज! एवढ्याचसाठी की तुझ्या अल्लातालाने मेहर होऊन आपल्याच बाप-भावांची अघोर कत्तल करणाऱ्या, आपल्याच बेटीला कैदेत टाकणाऱ्या, लाखो गोरगरीब हिंदूंना जिवे मारणाऱ्या, शरण आलेल्यांना इस्लाम करणाऱ्या, त्यातल्या ताकदवरांना मनसबी बक्षून लाचार करणाऱ्या तुला एकदा तरी माफ करून 'परवरदिगार' असल्याची खातर पटवावी त्याने यासाठी!

जसजशा दिवसरात्रीच्या, कुणासही सोडविता न येणाऱ्या चावरमिठ्या कडकडून पडत होत्या तसतशी राजे-कुलेश दोघांचीही मने साकळून, एकवटून, थळी करून येत होती– एकाच विचारावर "सोनं झालं आहे जिवाचं!"

त्या पुऱ्या तळावर चमत्कारिक विचारांचे जाळेच जाळे पसरले होते. दोघेही जबान, नजर गमावलेले कैदी एकमेकांबद्दल विचार करीत होते. त्यांची मने अडकलीच मागे तर एकाच विचारात अडकत होती– "महाराणी एकल्या आहेत मागं. या इथून तिथवर पसरल्या दौलतीबाबत, रयतेला धीर-दिलासा देऊन उभं करण्यासाठी कशा बांधतील त्या मन? कोण देईल त्यांना घरोब्याचं पाठबळ?"

औरंग तर आपल्या शामियान्यात, कधी दोघा कैद्यांचा, कधी 'सेवाचा' बगावती मुलूख कसा डुबवावा याचा विचार करताना हातची माळ ओढत, मध्येच थांबून छताला निरखत सारख्या पायफेऱ्या घालीत होता. बेटी झीनत त्याला वाळामिश्रित लिंबूशरबत मधून मधून स्वत: देताना धाडसाने विचारत होती– "कैसी है तबियत अब आब्बाजान?" खरे तर आपल्या आब्बाजाननी कैद्यांना सुनावलेली सख्त सजा तेच्याही स्त्रीमनात रुपत-सलत होती.

औरंगलाही पडला होता घोर आपल्या हिंदोस्थानच्या सल्तनतीला आपल्या मागे कोण सांभाळेल याचा! खरोखर सत्तेची राज्यें उठविणे साम, दाम, दंड भेदाने सोपे आहे, ण त्यात जीव अडकणे केवढे अवघड आहे.

तळावरचे सारे सरदार, हशम जथ्याजथ्याने दबक्या कुजबुजीत विचार करीत होते घांचाच– दोन कैदी आणि शहेनशहा यांचा. तो तळ नव्हताच, होते मनामनांचा ळ-गैरमेळ पडलेले विचारच विचार यांचे एक गुंतवळ झालेले प्रचंड जाळे!

नवा दिवस उगवला होता. कैद्यांचे झाले एवढे हाल पुरेसे वाटले नाहीत म्हणूनच बेदार इखलासने नवे जल्लादी पथक कैद्यांसमोर घेतले!!

दोन्ही कैद्यांच्या अंगावरचे विदूषकी कुर्तेही त्या पथकाने टराटर ओरबाडून काढले. े तख्ताकुलाह आणि साखळदंडाखाली अडकून पडल्याने न ओरबाडता आलेले

फक्त चुकार तुकडे.

"देखते क्या हो? फेंक दो कुत्तोंपर वो नमकीन पानी– छाल उखाडकर इनकी!" बावरल्या-बावचळलेल्या हबशी जल्लादांवर इखलास ओरडला.

पथकातले, सापते घेतलेले जल्लाद पुढे झाले. त्यांनी नारळाचे खोबरे किसावे तसे धारदार सापत्यांनी दोन्ही कैद्यांची जागजागी साल सोलायला सुरुवात केली! जल्लादच आता पुरे हैराण झाले. दोन्ही कैद्यांपैकी एकही कैदी अंग सोलवटून निघत असतानाही हूँ की चूं करीत नव्हता. जल्लादांनी आजवर कैक माजोर कैद्यांची साल अशी सोलवटून काढली होती. त्यांचा तडफडाट आणि किंकाळ्या ऐकताना तर नेहमी जोषच संचारत आला होता जल्लादांच्या अंगी. पण आज? काय ताज्जुब बघत होते ते! त्यांचेच हात थरथरू लागले सापते ओढताना!

राजे आणि कुलेशांचे देह आता मानवी दिसेनातच. ते झाले होते जयंतीच्या दिवशी अंगभर शेंदूर फासलेल्या हनुमंताच्या मूर्ती!

सापतेधारी मागे हटले. तख्तासारखी, तांब्याची भगुणी घेतलेले हबशी पुढे झाले. त्या भगुण्यात भरले होते मीठपाणी! तावल्या धावेवर सुतारानं चारी बाजूंनी पाणी शिपकारावे तसे त्या हबशांनी हातच्या भांड्यांतील, मीठपाणी राजे-कुलेशांच्या सोलवट रक्ताळ देहांवर शिपकारायला सुरुवात केली. सुताराच्या पाण्याची 'चरचर' भवतीच्यांना ऐकायला येते, या मीठपाण्याची चरचर तशी कुणालाच ऐकू येत नव्हती. उभ्या अंगाला शेकडो सुया भोसकल्यागत वाटत होते ते फक्त राजे-कुलेशांना! देहांचे आगडोंबी कुंड झाले होते त्यांच्या. गच्च मिटून होणाऱ्या वेदना मिटवाव्यात तर डोळेही नव्हते. तरीही लाटाच लाटांवर डुचमळत्या तळ्याकडे बघत शांतपणे आपली पिसे साफ करीत खंड्या पक्षी काठच्या फांदीवर बसावा तसे ते देहाच्या वेदनांकडे पूर्ण अलिप्त मनाने बघत त्याच्या काठावर शांत बसले होते.

बघ्यांचा कालवाही खरोखरच 'शैतान' वाटावेत असे कैदी समोर बघून थरकल्याने आता चिडीचाप झाला होता. ती सजा बघायला प्रत्यक्ष औरंगजेबच असता तर! तर नक्कीच सगळ्या तळावरच्या सरदारांच्या खिल्लती खेचून आणायचा हुक्म करून त्याने त्याचेच कफन इतमामाने कैद्यांच्या अंगावर पांघरायचा हुकूमही दिला असता! कधी– कधीच नव्हती एवढे हालहाल करणारी सजा त्याने हयातीत कुणालाही फर्मावली.

लटपटलेल्या काळजांचे बघे आता एक एक करता काढत्या पायांनी आपापल्या राहुट्यांकडे परतू लागले. सापते आणि मीठपाण्याची तस्तीभांडी तिथेच फेकून जल्लादी पथकही निघून गेले. इखलास तेवढाच उरला. त्याच्यावर सोपविलेल्या सजेची एकच जोखीम त्याच्यापुरती आता बाकी होती. कैदी पुरते गतप्राण होताच, दोघा ताकदीच्या जल्लादांना निवडून एकाच फटक्यात दोघा कैद्यांची मस्तके धडावेगळी करणे! भाल्याच्या टोकावर ती खोचती ठेवून, वाजतगाजत उभ्या तळभर ती सर्वांना दाखवून

त्यांचीही नाचवत धिंड काढणे. शेवटी, धडे एकीकडे साखळदंडात पडलेली. ती मुंडकी तळाबाहेर कुठेतरी, कोल्ह्या-कुत्र्यांनी खावीत म्हणून भाल्यांसह फेकून देणे. पण या इखलासच्या आखरी जोखिमेलाही अद्याप अवकाश होता.

सजा दिल्याच्या तणावाने इखलास एवढा थकला होता की, क्षणभर त्यालाच वाटले, आपणही जखडलो गेलोत न दिसणाऱ्या एका खांबाला ! तो दोन्ही कैद्यांकडे तसाच बघत राहिला. आता फक्त त्याच्या खिदमतीचे पाच दहा हशमच होते बाकी त्याच्या भवती. काय वाटले त्याचे त्यालाच कुणास ठाऊक. संथ पावले टाकीत तो राजांच्यासमोर आला. भयाण दिसणाऱ्या मरहट्ट्यांच्या बागी सुभेदाराला त्याने पायांपासून लाकडी टोपीपर्यंत निरखले. इखलासची एरव्ही क्रूर, मगरूर वाटणारी नजर आता विचित्र दिसू लागली. राजांच्या देहभर फिरत ती त्यांच्या छातीवरच्या भवानी माळेवर मात्र जखडबंद झाली. फक्त राजांनाच ऐकू येईल एवढे हलके तो पुटपुटला– "दे दो हमे ये सुबेदार" त्याने त्या रक्त, मीठपाणी, घाम यांनी न्हाऊन निघालेल्या चिपचिपीत भवानी माळेला हातच घातला !

"ऑऽऽ ऑऽऽ ऑऽऽ" राजे मरणावरच पडलेली कुडी सगळे बळ एकवटून आता तडफडती हलवू लागले. ती हलविताना नकार दर्शवणारी गर्दन एकसारखी झटकू लागले. खांब हिंदकळू लागला.

जसा पुढं गेला तसाच इखलास हातची भवानी माळ सोडून झटक्यात मागे झाला. का पाहिजे होती त्याला ती ? एवढ्या पहाडी सूरम्याची एक तरी यादगीर म्हणून जपणार होता ती इखलास ! त्यासाठीच देहभर निरखून राजांची फक्त घेता येण्याजोगी माळच शिल्लक होती. 'नको – घेऊ नकोस ती." हा संकेत त्याला कळला होता.

आपल्या खिदमती पथकाच्या हशमांवर तो कसा तरीच ओरडला– "सब चले गये नजारा देखनेवाले नाबकाऽर लौंडे यहांसे ! तुम क्यों रुके ? निकल जाऽव." आणि स्वत: इखलासच आपल्या घोड्यावर झेप घेऊन निघून गेला.

आता वर निळेभोर आभाळ, पायांखाली वढू बुद्रुकाची कितीतरी पुराणी मावळमाती, न दिसणाऱ्या पण जवळच, खांद्याला खांदा मिळवून संथ वाहणाऱ्या इंद्रायणी आणि भीमा, त्यांच्या काठांवर जगाला एकले वाटावेत असे मराठी दौलतीचे छत्रपती संभाजीराजे आणि छंदोगामात्य कवी कुलेश राहिले ! आता राजांचा स्वत:चा स्वत:च्या मनाशी चाललेला वादही थांबला. सुरू झाला – सुरूच झाला फक्त जिवाचा शिवाशी चाललेला आखरीचा शांत-संथ जाबसाल !

"राजा म्हणजे कोण ? सजा भोगणारा राजा म्हणजे कोण ?" यांसारख्या सवालांची उत्तरे शोधत संभाजीराजे भोसले या माणसाचा 'जीव' मनही मागे टाकून 'शिव' मुठीत पकडायला आपल्या उभ्या हयातीचा कानाकोपरा धुंडाळू लागला.

"कोण होत्या आम्हास जन्म देत्या मासाहेब ? का नाही याद येत त्यांचा चेहरा ? का नाही वाटलं कधी आम्ही अंधारातून जन्मास आलो असं ?" आली असेल नक्कीच आबासाहेबांसह थोरल्या आऊंची याद अखेरच्या क्षणी. आणि – आणि नक्कीच येईल शेवटच्या क्षणी, एवढा कठोर आणि हवस असलेला असला तरी औरंगलाही त्याच्या जन्मदात्या आऊंची याद ! कोण होते आबासाहेब ? कोण आहे औरंगजेब ?

आबासाहेब म्हणजे आमच्या मावळमातीने, डोंगरदऱ्यांनी फेकलेला उष्ण श्वास ! मरगळलेल्यांना जगण्याची, कष्ट करत मानाने जगण्याची ऊब देणारा. न होते तेच तर ? औरंगला दख्खनेत उतरायची नौबतही ना येती.

केवढे पल्ल्याचे बोलले होते ते अखेरच्या भेटीत पन्हाळ्यावर– "एवढीशी असते डोळ्याची पापणी पण ती सुद्धा नाही घेत कधी साधं कसपटसुद्धा डोळ्यांत. तुम्ही तर आजचे युवराज आहात – उद्याचे राजे. बरे ध्यानी ठेवा. अगोदर मरतात ती मनं आणि मग मरतात ती माणसं ! राजे होऊ नका; मावळा व्हा." आबासाहेबांच्या बोलांनी जसा त्या भेटीच्या वेळी उसासला होता युवराज म्हणून तसा आता एक मावळा म्हणूनच उसासला त्यांचा जीव.

आम्हाला, मनाचे क्षणाक्षणाला टवके उडावेत म्हणून अशी प्राणकठोर सजा देणारा, आता पार बुढा झाला तरी पिळदार मनाचा औरंग कोण ? पुरा हिंदोस्थान इस्लाम करायला निघालेला, माणुसकीला फुंकरीने विझवू बघणारा. उभा केला असाच, आत्ता या क्षणी त्याच्याच बापाने उठविलेल्या सफेद ताजमहालासमोर त्याला तर ! तर याच्या नजरेची वीज अंगी पडताच काळीठिक्कर पडून जाईल ती देखणी कबरसुद्धा !

नाही. आबासाहेब आणि औरंग यांची तुलनाच नाही होऊ शकत. आम्ही नाही, रायगडाच्या सातमहालातल्या आमच्या एकाही मासाहेबांनी नाही, कुणीच नाही पारखले आबासाहेबांस. असेलच पारखले यांना तर फक्त तिघांनीच. एक थोरल्या आऊसाहेबांनी आणि दुसरे समर्थांनी आणि ... आणि होय तिसऱ्या फक्त औरंगजेबाने !

आम्ही – आम्ही कोण या तिघांत ? थोरल्या आऊ आणि समर्थांच्या दृष्टीने आबासाहेबांची फक्त सावली आणि औरंगच्या दृष्टीने ? त्याच्या दृष्टीने तर आबासाहेब नेमके कोण होते हे नीट पारखता यावयासाठी या क्षणी त्याने नजरेसमोर धरलेला एक दर्पण ! पडले असेल आमच्या देहाच्या दर्पणात, त्या हिंदोस्थानच्या शहेनशहास नीट नजरेला आमच्या आबासाहेबांचे असली रूप ? असता त्याचा एकही शहजादा असा आमच्या जागी तर ?

का वाटले आमचे कोंडाजी, सरलष्कर, म्हलोजीबाबा गेले तेव्हा आमचे एकेक अवयवच गेले असे ? का केली प्राणपणाने आमची सोबत निळोजीपंत, खंडोजी, रामचंद्रपंत, हरजीराजे, रूपाजी, विठोजी चव्हाण, मानाजी मोरे आणि – आणि एवढ्या दूरच्या कनोज देशीच्या कुलेशांनी ? आम्ही केवळ राजे होतो म्हणून ? नाही – नाही.

माणसे फक्त भाकरीच्या तुकड्यासाठी लाचार नसतात. तळहातावर जिवाची ज्योत

घेऊन कुरवंडीसाठी सिद्ध होतात ती अशी सुखासुखी नाही. ज्यांनी साथ दिली आबासाहेबांच्या या श्रींच्या नावे उठलेल्या गोरगरीब रयतेच्या राज्याला राखण्यास त्यांचा अभिमान वाटतो या क्षणी आम्हास. जे फितवेखोरीने पाठमोरे झाले त्यांची एवढीसुद्धा खंत नाही वाटत. खरेच आहे, राजा म्हणजे उपभोगपारखा स्वामी. आणि – आणि वेळोवेळी कटावांच्या काट्यांतून चालत गेलेला, आपलीच माणसे पाठमोरी झाली असताना, औरंगसारख्या माणसाच्या हाती फसलेला, ही अशी सजा अंगांगावर पेलणारा आमच्यासारखा सजेचा राजा म्हणजे कोण ?

सजेचा राजाही असतो, पण 'स्वामी' नव्हे तर 'सेवक'. वेदनांचेच उपभोग करून जित्या देही भरपेट भोगलेले असतात ते त्याने ! सजा घेणारा राजा म्हणजे वेदनांचे उपभोग भोगणारा पहिला सेनापती आणि शेवटचा सेवक !!

केवढे हायसे आणि भरून पावल्याचे समाधान वाटले राजांना आता.

वढूची मावळी सांज आता उतरली. पण दोन्ही कैद्यांना एवढीसुद्धा कल्पना नव्हती की आता सांज आहे, सकाळ की दुपार ? आता त्या दोघांनाही पुरते कळून चुकले की हयातीच्या दौडीचा शेवटचा मुक्कामी तळ जवळ येत चालला आहे. मांडाखालचे हात, पाय, डोळे जबान यांचे जनावर पाऽर फेसाळलेय, थकदिल झालेय ते. त्याला टाच मारावी असेसुद्धा नाही वाटत आता.

दिवसभर आभाळाची दौड करून थकावटीला आलेली मावळकिरणे मायेने जवळ घेत त्यांच्या थकल्या पाठवानांवरून, आपल्या असंख्य लाटांचे हात फिरवीत शांतसंथ वाहतच होत्या फक्त इंद्रायणी आणि भीमा !

राजे आणि कुलेश यांचे डोळे जबान काढल्यापासूनचा बारावा दिवस उगवला. हालहाल झालेले छंदोगामात्य कुलेश मध्यरात्रीच केव्हातरी गतप्राण झाले होते. मरण्यापूर्वी त्यांनी "प्रणाऽम स्वामी !" म्हणण्यासाठी केवढ्यातरी मोठ्याने "ऑंऽऽ ऑंऽऽ" केला होता. त्या चमत्कारिक आवाजाने कैद्यांभोवती गस्त देत फिरणारे, पेंगुळलेले गस्तेही दचकले होते. "ऑंऽऽ ऑंऽऽ" करत राजांनी कुलेशांना प्रतिसाद दिला. छंदोगामात्य आता छत्रपतींना प्रतिसाद देऊच शकत नव्हते. काय झाले असावे हे राजांनी मनोमन ताडले.

कवी कुलेशांच्या जिंदगीचा छंद परमात्म्याच्या महाकाव्याला जाऊन मिळाला होता. त्यात एकरूप झाला होता.

बारावा दिवस ! राजांना कल्पनासुद्धा नव्हती, की असेच रायगडी मंचकावर पडलेले रुग्ण आबासाहेब बाराव्या दिवशीच अनंतात लय पावले होते, त्या दिवशी पायांच्या नखांपासून डुयीच्या केसावळीपर्यंत एक एक अवयव गार पडत होता त्यांचा.

आज असे काय होते आहे ? आमचा पायांच्या नखांपासून डुयीच्या केसावळीपर्यंत मेल्या दहा बारा दिवसांत नव्हता असा अवयव न् अवयव का पेटून उठतो आहे ?

गेल्या थोरल्यांनी ऊरफोड करून इथल्या माणसामाणसाला जगण्यातला अर्थ पटवून सांगितला होता. जाते धाकले आज इथल्या माणसामाणसाला प्रसंग पडलाच तर मरावे कसे याचा अर्थ पटवून देणार होते.

'शिव' आता 'जिवाच्या' अगदी नजरटप्प्यातच दिसू लागला राजांना.

आबासाहेब गेल्यानंतर हितोपदेश म्हणून लिहिला समर्थांचा खलिताच शब्दवर दिसू लागला त्यांच्या जीवज्योतीला –

"शिवराजाचे आठवावें रूप। शिवराजाचा आठवावा साक्षेप।
शिवराजाचा आठवावा प्रताप। भूमंडळीं ॥
शिवराजाचें कैसें बोलणें- कैसे चालणें- सलगी देणे- कैसी आहे ॥
याहून विशेष तें करावें। जीवित तृणवत् मानावें ..."

धर्मातून राजकारण मार्गी लावणारे समर्थ आणि राजकारणाच्या धामधुमीतही धर्मकारण मार्गी लावणारे आबासाहेब ! केवढे पारखले होते त्यांनी परस्परांस !

"जीवित तृणवत् मानावें –" समर्थखलित्यातील हितोपदेश राजांच्या कानामनात – उभ्या देहात घुमू लागला.

आता तर त्यांना उभ्या मराठी दौलतीचाच केवढा तरी भव्य 'गोंधळचौक' समोर मांडल्यागत दिसू लागला. हंबीरराव, खंडोजी, निळोपंत, बहिर्जी, कोंडाजी फर्जंद, म्हलोजीबाबा, कृष्णाजी कंक, रामचंद्रपंत, कुलेश – गेलेले – असलेले कितीतरी लोक हाती संबळ तुणतुणी घुमवीत मिटल्या डोळ्यांनी उदोकारच उदोकार उठवीत होते – "उदं गं अंबे उदं" केवढा भव्य हा, आम्ही यापूर्वी कधीच न बघितलेला आई जगदंबेचा गोंधळ ! सगळ्याच मानकऱ्यांच्या माथी भंडाऱ्याचा मळवट भरलेला साफ दिसतो आहे आम्हास ! दिसत नाही फक्त तुळजाभवानी ! कुठे आहे ती ? हे काय चमत्कारिक दिसते आहे ? हा भास तर नाही ? ही जगदंबेचीच मूरत दिसते आहे. फक्त तिचा मुखडा थोरल्या आऊंगत दिसतो आहे. तिच्या दोन्ही डोळ्यांच्या जागी आबासाहेब आणि समर्थांच्या मुद्रा दिसताहेत ! जगदंबमूर्तीच्या मळवटाच्या आडव्या दुबोटी रेघांत दिसताहेत आमच्या श्रीसखी आणि रामराजांच्या ताराऊ. रामराजांच्या मुद्रेचा पसरता भंडारा या दुबोटी मळवटामागे खडा दिसतो. पण – पण असे का होते आहे ? या एवढ्या भव्य जगदंबमूर्तीत आम्ही – आम्हीच कसे नाही दिसत कुठे ? का ? का ?

आता या क्षणी राजांना सभोवार मांडल्या भव्यच भव्य गोंधळातले आपल्या जीवज्योतीचे नेमके, रसरशीत, स्पष्ट-स्पष्ट मानकरी स्थानच दिसू लागले. इथून तिथवर पसरलेल्या, रंगावल्या, नादभरल्या आभाळाने तेजाळ सूर्यगोळ्याला केवढ्यातरी भरल्या डोळ्यांनी नुसते निरखावे तसे शंभुराजांचे डोळे हरवलेल्या देहाचेच सारे अवयव त्या जीवज्योतीला भरून पावल्या डोळ्यांच्या भावनेने बघू लागले –

ती ज्योत आरोपित संभाजीराजे बिन शिवाजीराजे भोसले नव्हती –

"उभा सह्याद्रीच जिंकण्यास येऊ आलो तर!" म्हणणारी, दिलेरला मिळणारी, भिरमिटलेली, खुद्द त्या ज्योतीलाही कायदे न आवरता आलेली, बेलाग उधळलेली भ्रमचित्त जवानीची ऊर्मी नव्हती –

ती कुणाची छत्रपती, स्वामी, धनी नव्हती.

कुणाचे बाशिंगबळ, कुणाचे आबा, कुणाचे भाऊ नव्हती –

आता ती जीवज्योत कुणा माणसाशी मातीशी कसलेही नाते सांगणारी नव्हतीच.

"क्षत्रियकुलावतंस, सकळगुणमंडित, अखंड लक्ष्मीअलंकृत गोब्राह्मण प्रतिपाळक, श्रीमन्महाराज राजा शंभु" ही गेली अनेक साले धारण केलेली बिरुदावली अंगच्या रक्ताने त्यांनी केव्हाच धुऊन टाकली होती.

जमिनीपासून थेट आभाळापर्यंत आपल्या जिवाची एक नजर ठरणार नाही अशी भव्य, फरफरणारी ज्योत भासू लागली त्यांना.

"कसे आहोत आपण ?" ज्योतीने सवाल केला आपणालाच!

"कसे ? कसे ?" शिवालयातल्या ऐकू येणाऱ्या घंटांनी केवढातरी घोष धरला आता. संबळ तुणतुणी शिगेला चढली. भंडाऱ्याच्या उधळल्या मुठी-मुठींनी आभाळ कसे कोंदून गेले –

"कशी दिसते आहे ही ज्योत ?" भोवतीच्या पंचेंद्रियांना आपल्यातच ओढून घेतलेल्या त्या जीवज्योतीचा झाला होता, आई जगदंबेच्या मांडल्या या भव्य गोंधळचौकातील अंगभर पाजळलेला, फरफरता, पाचपेडी पोत!!!

संताजी धनाजी यांनी तो आपल्या हातांत नाचविता धरला होता. त्यांच्या हातातून तो कैकांच्या हातात जात गोंधळचौकभर अखंड फिरू लागला.

जगदंबेचा तो पाचपेडी-पाजळता पोत. क्षणभर त्याने फरफरता सवालच स्वत:ला केला. "जीवित तृणवत् मानावें!" आपणच जाब दिला – "समर्थ, तृणाच्या पात्यालाही असतं जळून भस्म होण्याचं भय! आम्हास तेही नाही उरलं!!" त्या पोतालाच – पोतमाहात्म्य ऐकू येऊ लागले –

"पंचेंद्रियांचा जीवपोत हा – त्रिगुण गुणी वळला."

कानांतले चौकडे काढून टाकावेत, तसे त्या पोताने पाजळते होतानाच 'त्रिगुण' काढून केव्हाच दूर फेकले होते. पोताला आता काही काही दिसेना. दिसू लागला फक्त इंद्रायणी आणि भीमेचा एकजीव झालेला पावन संगम! याच इंद्रायणीच्या काठी ज्ञानोबांनी आपल्या वारकऱ्यांना मऱ्हाटमोळी गीता सांगितली – ज्ञानेश्वरी! तुकोबांनी आपली गाथा रचली. आमच्यातून वाहून गेल्या रक्ताच्या करंजेलाने आज रेखली जाते आहे एक 'राजगाथा'. एक 'शंभूगाथा' एक 'शंभूभूषणम्!'

पोत फरफरून-फरफरून उठला. औरंगजेबाच्या हुकमाने, जल्लादी पथकांच्या, हाते इखलासने उद्‌ध्वस्त केलेला 'शंभुदेह' सोडून चालला.

समोरच्या इंद्रायणी आणि भीमा यांच्या पावन संगमात तो आता डुबवला जाऊ लागला! डुबतानाही तो फरफरला – "जगदं ऽ ब – जगदंऽब!"

"चर्रर्र ऽ" आवाज उठला.

जगदंबपोत उरात घेऊन इंद्रायणी आणि भीमा आज पहिल्याने माना वाकड्या करून काठावरच्या सजेच्या खांबाकडे बघत बघत संथ वाहू लागल्या.

त्यांना दिसत होती मान टाकलेल्या शंभुदेहाच्या छातवानावर अजूनही मावळतीच्या किरणांत, रक्ताने न्हाऊन गेलेली तरी तळपणारी चौसष्ट कवड्यांची अशरण तळपती माळ आणि फक्त माळ!!

□ □ □

संदर्भ ग्रंथ

History of Aurangazeb – Jadunath Sarkar

मराठी रियासत - गो. स. सरदेसाई

शिवचरित्र आराखडा - त्र्यं. शं. शेजवल्कर

छ. संभाजी महाराज - वा. सी. बेंद्रे

संभाजीकालीन पत्रसारसंग्रह – शं. ना. जोशी

शिवचरित्र - सा. खंड, द. वा. पोतदार

संभाजीकृत - बुधभूषणम्

शिवपुत्र संभाजी - डॉ. कमल गोखले

Grand Rebel - डेनिस किंकेड

कापशीकर घराण्याचा इतिहास - हर्डीकर

ताराबाईकालीन पत्रे - डॉ. आ. ग. पवार

पुण्यश्लोक छत्रपति - बाळशास्त्री हरदास

गोवळकोंड्याची कुतुबशाही - वा. सी. बेंद्रे

श्रीसमर्थ चरित्र - आळतेकर

रायगडचे आत्मचरित्र - शां. वि. आवळसकर

सिंहगड - ग. ह. खरे

ऐतिहासिक आख्यायिका - ग. ह. खरे

शिवचरित्र वृत्तसंग्रह - ग. ह. खरे

स्वराज्यातील तीन गड - ग. ह. खरे

राजा शिवछत्रपति - ब. मो. पुरंदरे

जेधे शकावली

म. साम्राज्याची ९१ कलमी बखर सभासद बखर, मल्हार रामराव चिटणीस बखर

जयरामपांडेकृत - राधाविलासचंपू

राज्याभिषेक शकावली

चित्रगुप्त

शिवदिग्विजय

शिवभारत

मराठ्यांच्या इतिहासाची साधने – वि. का. राजवाडे

पोर्तुगीज - मराठे संबंध - पां. स. पिसुर्लेकर

मागोवा - नरहर कुरुंदकर

भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने - स्वातंत्र्यवीर सावरकर

महाराणी ताराबाई - प्रा. जयसिंग पवार

Chhatrapati Shivaji – सेतु माधवराव पगडी

हिंदवी स्वराज्य आणि मोगल – सेतु माधवराव पगडी

मराठे व औरंगजेब - सेतु माधवराव पगडी

मोगल आणि मराठे - सेतु माधवराव पगडी

इतिहासाचा मागोवा - सेतु माधवराव पगडी

पन्हाळगडचा वेढा - मुं. गो. गुळवणी

प्रतापगडचे युद्ध - श्री. मोडक

शिवतीर्थ रायगड - गो. नी. दांडेकर

ऐतिहासिक शब्दकोश - य. न. केळकर

कोकण इतिहासाची पार्श्वभूमी – त्र्यं. शं. शेजवलकर

महाराष्ट्राचे जलदुर्ग - र. वा. रामदासी

राष्ट्रपुरुष - केदारनाथ मिश्र (प्रभात)

कनोज के रस्मोरिवाज - अवस्थी

मनाचे श्लोक

पाटगावचे मौनीबाबा - श्री. माळी

Forts of Maharashtra - Cap. Brigs
शिवराजभूषण
औरंगजेबनामा
अज्ञानदासाचे पोवाडे
राजव्यवहारकोश- रा.गो. काटे
छ. शिवाजीमहाराज - दि. वि. काळे
महाराष्ट्राची धारातीर्थे - पं. महादेवशास्त्री जोशी
जयपूर अखबारती - भा. इ. सं. मं. पुणे
इतिहास - मंजिरी - द. वि. आपटे
History of Marathas - Grant Duff, Vol. 1 to 3
उद्गीरचा इतिहास - राजाराम राठोड
तुळजापूरची जगदंबा - कोटीभास्कर
करवीर रियासत - स. मा. गर्गे
Shivaji's Visit to Aurangazeb at Agra - Jadunath Sarkar
शककर्ते श्री शिवछत्रपती महाराज - वि. स. वाकसकर
रायगड किल्ल्याचे वर्णन - गो. बा.जोशी
शहाजीराजे भोसले - र. वा. रामदास
मल्हार - रामरावकृत संभाजी व शिवाजी महाराज - भीमराव कुलकर्णी
ज्ञानेश्वर वाङ्मय आणि कार्य - प्रा. न. र. फाटक
तीर्थरूप महाराष्ट्र - पं. महादेवशास्त्री जोशी
महाराष्ट्रातील किल्ले - चिं. ग. गोगटे
Shivaji the Great (Vol. I to IV) - डॉ. बाळकृष्ण
मध्ययुगीन चरित्रकोश - पं. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
अश्वपरीक्षा - रा. स. गुप्ते
औरंगजेबनामा - देवीप्रसादजी
राजसंन्यास - राम गणेश गडकरी
Fall of the Mughal Empire - Jadunath Sarkar
Travels in India - Tavernier
Storia - De - Mogor
N. Manucci
कौटिलीय अर्थशास्त्र -
करंदीकर - हिवरगावकर
ऐतिहासिक पोवाडे - य. न. केळकर
भारतीय संस्कृतिकोश -
सं. : पं. महादेवशास्त्री जोशी
Jinjivas - V. L. Kale
सिंहासनाची आणि इतर व्यवस्था - शं. ना जोशी
मराठ्यांचा आरमारी इतिहास - थत्ते
विजापूर घराण्याचा इतिहास - मोडक - वझे
Historical Miscellany - G. S. Sardesai
Shivaji the Portrait of a Patriot - V. B. Kulkarni
गजपरीक्षा - रा. स. गुप्ते
बुसातुन्निस्सलातीन.
फलटण संस्थानचा इतिहास - फडके

□

शिवाजी सावंत यांचा परिचय

हिरण्यकेशी नदीच्या तीरावर वसलेल्या, कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा या निसर्गसुंदर व छोटेखानी, टुमदार गावात शिवाजीराव सावंत यांचा जन्म झाला. एका शेतकरी कुटुंबात, ३१ ऑगस्ट १९४० साली. तिथंच व्यंकटराव प्रशालेतून ते शालान्त परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. परिस्थितीमुळे महाविद्यालयीन शिक्षणाला एफ. वाय. बी. ए. नंतर रामराम ठोकून त्यांना वाणिज्य शाखेच्या लघुलिपी आणि टंकलेखन यांचा डिप्लोमा परीक्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागला. कोल्हापूरातील राजाराम प्रशालेमध्ये त्यांनी अध्यापक म्हणून १८ वर्षे सेवा केली. तेथून १९७४ पासून परसेवेवर पुण्यात येऊन महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याच्या 'लोकशिक्षण' मासिकाकडे त्यांनी सहा वर्षे संपादक म्हणून काम पाहिले. सध्या सेवानिवृत्त. वास्तव्य पुण्यातच.

भारतीय जीवन आणि संस्कृती याबद्दल सावंतांना प्रारंभापासूनच सार्थ व अभ्यासू अभिमान आहे. 'माझा भारत म्हणजेच महाभारत' हे समीकरण एकदा मनात रुजल्यानंतर त्यांचा महाभारताचा सखोल व्यासंग सुरू झाला. अस्मिता विसरू पाहत असलेल्या भारतीय समाजपुरुषाला 'मृत्युंजय' रविपुत्र कर्ण आपत्तीतही धैर्यशाली व तेजस्वी बनवील असे उत्तर त्यांना गवसले. मग प्रदीर्घ संदर्भशोधन, सखोल व उलटसुलट चिंतन, मनन आणि डोळस प्रवासाने पकडलेले प्रत्ययकारक निरीक्षण यातूनच या प्रदीर्घ व रससंपन्न 'मृत्युंजय' या कादंबरीचा १९६७ साली जन्म झाला.

महाराष्ट्र, त्याचा इतिहास व मराठी भाषा हा तर सावंतांचा जीवनश्वास आहे. मृत्युंजयनंतर तब्बल तेरा वर्षांनी 'छावा' प्रकाशित झाली. कमालीचे विवाद्य, आजवर संदर्भविकृत, एकारलेल्या दृष्टीने बघितलेले शिवपुत्र छ. संभाजीराजे होते या छाव्याचे नायक.

या चरम व्यामिश्र व्यक्तिरेखेला पिता छ. शिवराय या निसर्गदत्त अजोड महापुरुषाच्या तुलनेत अकारणच तराजूत घालून पिढ्यान पिढ्या तुळलेले. परिणामी 'सूर्यापोटी शनैश्चर' असा घनघोर एकतर्फी शिक्का त्यांच्या माथी मारून त्यांना साफ निकालात काढलेले! स्पष्टपणे नाकारलेले!! तेही शेकडो वर्षे नि पिढ्यान पिढ्या! प्रथम 'कादंबरीचे नायक' म्हणून संभाजीराजे निवडणे हेच आव्हानाचे होते.

परिणामी छावा पूर्ण होण्यापूर्वीच १९७२ साली मुंबईत झालेल्या सावंतांच्या एका सत्कार समारोहात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्माणातील सिंहाचा वाटा उचललेल्या प्रत्यक्ष आचार्य अत्र्यांनी हजारोंच्या साक्षीत, सज्जड दम भरल्यागतच सांगितलं होतं, "शिवाजीराव, मृत्युंजय वाचलंय. त्या नावाचाच अग्रलेख मी दै. मराठात लिहिलाय. कर्ण तुम्ही छान शब्दबद्ध केलाय. कधी कधी महर्षी व्यासांच्या श्रीकृष्णासह इतर सर्वांना

तो मागं टाकतो. आता तुम्ही 'छावा' लिहिणार म्हणताय – छ. संभाजीवर! अवश्य लिहा. पण खबरदार संभाजी छ. शिवाजी महाराजांपेक्षा वरचढ झाला तर!!''

आचार्यांचे ते मर्मवेधक वक्तव्य ऐकून टाळ्याच टाळ्या कडाडल्या होत्या त्यावेळी. सत्काराला उत्तर देताना सावंतांनी आचार्य अत्र्यांकडे नम्र आदरानं बघतच उत्तर दिलं होतं, ''माझ्या या कादंबरीचं विचारपूर्वक मी पक्कं निवडलेलं नाव आहे 'छावा'! नावातच त्याचे पिताजी छ. शिवराय हे 'नरसिंह' होते हे व्यक्त होत नाही काय? आचार्यांना मी नम्रपणे सांगतो, ''त्यांच्या सारखाच मीही शिवभक्तच आहे. त्यांनी चिंता करू नये!'' हे उत्तर ऐकल्यानंतरही टाळ्याच टाळ्या झडल्या होत्या. त्यात बसल्या बैठकीतच टाळी पिटत, विशाल उद्रासह देह गदगदवीत खुष झालेले प्रत्यक्ष आचार्यही सहभागी झाले होते. आज ते असते तर त्यांनी दुसराही अग्रलेख निःसंशय लिहिला असता – 'छावा' नावाचा!

१९८० साली छावा प्रकाशित झाल्यानंतर पहिल्या पाच लाभाच्या प्रतींतील एक तुळजापूरला व एक प्रतापगडावर भवानीच्या चरणी भावसमृद्ध संस्कारी वृत्तीमुळं अर्पण करण्याची तीव्र इच्छा सावंतांनी व्यक्त केली. तसे कॉन्टिनेन्टलचे अनंतराव व ते तुळजापूरला जाऊन प्रत वाहून आले. प्रतापगडावरची प्रत स्वहस्ते वाहण्याचं (स्व.) यशवंतराव चव्हाणांनी मान्य केलं होतं. त्याप्रमाणं ते कराडहून परस्पर ठरल्या दिवशी प्रतापगडावर आले. पुण्याहून कॉन्टिनेन्टलचे अनिरुद्ध कुलकर्णी प्रत घेऊन शिवाजीरावांसह प्रतापगडी गेले. जायला थोडा वेळ झाला होता त्यांना. एव्हाना माणसांच्या तांड्यातून भवानीमातेचं दर्शन घेऊन यशवंतराव मंदिराबाहेर आलेही होते! पंपशू पायी चढवीत होते. दोघांतील अनिरुद्धकडं बघून त्यांनी विचारलं. नेमकं व मोजकं. ''छावा आणलाय काय?'' अनिरुद्धनं मान डोलवत वेष्टनातील प्रतच बाहेर काढून पुढं धरली.

''चला!'' म्हणून अत्र्यांइतकेच शिवभक्त यशवंतराव पंपशू उतरून पुन्हा भवानीच्या गर्भगृहाकडं चालू लागले. पांढऱ्याशुभ्र फुलांची ओंजळ वाहिलेली छाव्याची प्रत भवानीचरणी अर्पून यशवंतरावांनी ओंजळ व डोळे मिटून जाणवेल अशी काही क्षण ध्यानलय साधली!

ते मिटल्या ओंजळीनं व डोळी जागत्या मनी जगन्माता भवानीशी काय बोलले असतील ते सोबतच्या पुण्याहून गेलेल्या दोघांसह भवतीच्या कुणालाही कळणं शक्य नव्हतं. मात्र दिल्लीहून शिवाजीरावांना आलेल्या पत्रात त्यांनी आवर्जून लिहिलं होतं – ''तुमचा छावा वाचतो आहे. तो प्रतापगडावर भवानीचरणी मी वाहिला ही आठवण जन्मभर राहील!!''

पूर्वीच्या मृत्युंजयनं तर एक साहित्यगारुडच उभं केलं होतं.

साहित्यिक पुरस्कारानं मंडित आणि तीही रचनाकाराची अशी पहिलीच साहित्यकृती क्वचितच. आजवर महाराष्ट्र शासन, केसरीचा न. चिं. केळकर, ललित मासिकाचा ललित, वीस वर्षांनंतरचा – कलकत्याच्या विचक्षण बंगाल्यांनी बहाल केलेला ताम्रपट व 'पूनमचंद भुतोडिया', गुजराथी भाषांतराला लाभलेले केंद्र व राज्य असे दोन्ही पुरस्कार, इचलकरंजीच्या फाय फाऊंडेशनचा, व पुण्यातील विनोद प्रतिष्ठानचा नुकताच घोषित झालेला आ. अत्रे-कादंबरी पुरस्कार असे लेखकाच्या स्मरणातही नसावेत असे असंख्य पुरस्कार मृत्युंजयाला सगौरव देण्यात आले.

यांत शिरपेचाचा ठरला तो भारतीय ज्ञानपीठ, नवी दिल्ली-३ या विख्यात संस्थेनं दि. ६ फेब्रु. १९९६ रोजी मृत्युंजयाला प्रदान केलेला, मराठीला प्रथमच लाभलेला १२ वा – 'मूर्तिदेवी पुरस्कार.' सध्याचे देशाचे राष्ट्रपती डॉ. के. आर. नारायणन या साहित्यरसज्ञाच्या हस्ते या मूर्तिदेवी पुरस्काराची सरस्वतीची पंचधातूंची प्रशस्त प्रतिमा व ताम्रपटासारखं खोदीव प्रशस्तीपत्र शिवाजी सावंतांना विठ्ठलभाई पटेल सभागृहात खचाखच भरलेल्या साहित्यरसिकांच्या टाळ्यांच्या अविरत गजरात दिल्लीत सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आलं.

मराठीतील अन्य प्रादेशिक भाषांतराची परिसीमा गाठणारी ठरली आहे ही कालजयी संरचना मृत्युंजय. आजपर्यंत हिंदी-भारतीय ज्ञानपीठ दिल्ली, गुजराथी - आर. आर. शेठ, प्रकाशन, मुंबई-२, कन्नड - अमित प्रकाशन, द्वारा - प्रा. अशोक नीलगार, दामोदर कॉलेज, मडगाव-गोवा, राजस्थानी - साहित्य अकादमी, नवी दिल्ली - १, मल्याळम - डी. सी. बुक्स कोट्टायम, केरल, बंगाली - पी. लाल, रायटर्स वर्क शॉप, कलकत्ता-४५, व याच संस्थेनं प्रकाशित केलेलं देखणं इंग्लिश भाषांतर अशा देशी विदेशी भाषांत आज वाचक ही मूळ मराठी भावकथा प्रत्यक्ष वाचताहेत. तेलुगूत अनुवाद सिद्ध झाला आहे. लवकरच तोही प्रकाशित होईल.

मृत्युंजयचा पायमाग धरत छावानंही अनेक प्रकारचा विक्रम सिद्ध केला आहे. प्राचार्य वेदकुमार वेदालंकार उस्मानाबाद यांची 'छावा' सुद्धा भारतीय ज्ञानपीठानंच हिंदीत प्रकाशित केली आहे. तिची सहावी आवृत्ती हिंदी वाचक वाचताहेत. या हिंदी भाषांतरातूनच छ. शिवराय व शंभूराजे यांच्यासह छाव्यात आलेल्या रायगड, प्रतापगड, राजगड, पन्हाळा अशा गडांचा व शेकडो खेड्यापाड्यांचा इतिहास हिंदीभाषक मनोला भिडला आहे.

मराठी रंगमंचावर श्री. मोहन वाघांच्या विख्यात चंद्रलेखानं मृत्युंजय, छावा ही दोन्ही नाटकं देखण्या, दर्जेदार पद्धतीनं सादर केली. मृत्युंजय सतत बारा वर्षे 'हाऊसफुल्ल' श्रेयासह रंगमंचावर ८५० प्रयोगांत खेळले गेले. 'छावा' महाराष्ट्रभर ३५० प्रयोगांत फिरले. दोन्ही नाटकांतील नायक बाळ धुरी या गुणी कलाकाराने समर्थपणे पेलले.

दोन्ही नाटकांची पुस्तके कॉन्टिनेन्टलने छापली. दोन्हींचेही हिंदी भाषांतर झाले आहे. मृत्युंजयचे दिल्लीच्या वाणी प्रकाशनकडून (हे भाषांतर सौ. मृणालिनी शिवाजी सावंत यांनी केले आहे) तर नुकतेच 'छावा' चे भारतीय ज्ञानपीठांकडून. हे भाषांतर 'संघर्ष' नावाने डॉ. दामोदर खडसे यांनी केले आहे. मूळ मराठी छावा कादंबरीलाही महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार घोषित झाला. नुकताच वढू बुद्रुकच्या धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठानचा पुरस्कारही 'छावा'ला देण्यात आला आहे.

मृत्युंजय आकाशवाणी दिल्लीवरून हिंदीत, तर 'छावा' रत्नागिरी केंद्रावरून मराठीत क्रमश: प्रसारित झाली आहे.

म्हणूनच शिवाजी सावंत जसे 'मृत्युंजय'कार तसेच 'छावा'कारही ठरतात.

मृत्युंजय व छावा या दोन्ही मौलिक साहित्यकृतींनी श्री. शिवाजी सावंत यांना अनेक साहित्यिक सन्मानही प्रदान केले. ते १९८३ साली बडोदे साहित्य संमेलनाचे अरोध अध्यक्ष होते. १९८६ च्या बेळगाव येथील द. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते उद्घाटक होते. म. सा. प. पुणे येथे त्यांनी उपाध्यक्ष म्हणून तीन वर्षे काम पाहिले. दर्यापूर येथील विदर्भ साहित्य-संमेलनाचे ते १९९६ मध्ये उद्घाटक होते. १९९७ मध्ये पुण्यातील नवोदितांच्या चौथ्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. १९९८ मध्ये कोल्हापूरात झालेल्या अ. भा. कामगार साहित्य संमेलनाच्या ७ व्या सत्राचे ते अध्यक्ष होते. फेब्रु. ९७ मध्ये सावंतांना पुणे महानगरपालिकेने मानपत्र व चिन्ह समारंभपूर्वक प्रदान केले. याच वर्षी पुणे विद्यापीठाने त्यांना 'जीवन गौरव' प्रदान केला. तर १९९९ मध्ये कोल्हापूर म. न. पा. ने 'कोल्हापूर भूषण' हा गौरव प्रदान केला.

१९८६ साली कृषि-औद्योगिक आघाडीवर आशिया खंडातील सहकारी साखर कारखान्याच्या आद्य जनकाचे कार्य करणाऱ्या पद्मश्री, डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या संघर्षमय जीवनकार्यावर 'लढत' ही प्रदीर्घ व द्विखंडात्मक चरित्र-कहाणी त्यांनी परिश्रमपूर्वक सिद्ध केली. जसा शेतकरी असतो तसेच कामगारही कुठल्याही देशाच्या वाटचालीतील दुसरे बळकट चक्र असते, हे जीवनसत्य मानणाऱ्या सावंतांनी गोदी, माथाडी व असंघटित कामगारांचे झुंजार नेते भाई मनोहर कोतवाल यांच्या जीवनचरित्राचा वेध घेणारी 'संघर्ष' ही चरित्र-कहाणी सादर केली.

याशिवाय त्यांची प्रकाशित झालेली पुस्तके म्हणजे 'अशी मने असे नमुने', (व्यक्तिचित्रे) 'क्रांतिसिंहाची गावरान बोली' (नाना पाटलांची भाषण संकलने) होत.

मेहता पब्लिशिंग हाऊसमार्फत त्यांची शेलका साज, युगंधर- एक चिंतन (प्रस्तावना) ही पुस्तके गतवर्षी प्रकाशित झाली. नुकतीच प्रकाशित झालेली कांचनकण (ललितलेख) व मोरावळा (व्यक्तिचित्रे) ही त्याच प्रकाशनाची प्रकाशने होत.

भारतीयांसाठी सदैव प्रेरक आदर्श असलेल्या, बहुआयामी, योगयोगेश्वर श्रीकृष्णाचा

संदर्भ-संशोधन व पर्यटन, चिंतन मननपर सखोल वेध घेऊन 'युगंधर' ही महाकादंबरी कॉन्टिनेन्टलद्वारा नुकतीच प्रकाशित झाली आहे. ही कादंबरी मराठी वाचकांसाठी किमान पंचवीस वर्षे तरी ताजी राहील.

शिवाजी सावंत विवाहित असून सौ. मृणालिनी शिवाजी सावंत यांना दोन अपत्ये आहेत. मुलगी कादंबिनी, मुलगा अमिताभ. सौ. कादंबिनी पराग धारप मुलगा चि. सोहमसह नुकतेच अमेरिकेत गेलेत.

प्रवास, नाट्य, संगीत, खेळ, व्याख्याने यांत रस असलेल्या शिवाजी सावंतांचे वास्तव्य पुण्यातच आहे.

वास्तव्य - ३, रामकृष्ण परमहंस हौ. सोसायटी,
सिंहगड रस्ता,
पर्वती, पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी - ४३३ ५६ ५५.

❖ कॉन्टिनेन्टल प्रकाशित संग्राह्य कादंबऱ्या ❖

मृत्युंजय	:	शिवाजी सावंत
छावा	:	शिवाजी सावंत
युगंधर	:	शिवाजी सावंत
झेप	:	ना. सं. इनामदार
झुंज	:	ना. सं. इनामदार
राऊ	:	ना. सं. इनामदार
मंत्रावेगळा	:	ना. सं. इनामदार
शहेनशहा	:	ना. सं. इनामदार
शिकस्त	:	ना. सं. इनामदार
राजेश्री	:	ना. सं. इनामदार
ज्येष्ठ	:	अनंत मनोहर
राव	:	अनंत मनोहर
ऑक्टोपस	:	श्री. ना. पेंडसे
गारंबीचा बापू	:	श्री. ना. पेंडसे
यशोदा	:	श्री. ना. पेंडसे
तुंबाडचे खोत (१)	:	श्री. ना. पेंडसे
तुंबाडचे खोत (२)	:	श्री. ना. पेंडसे
हद्दपार	:	श्री. ना. पेंडसे
पवनाकाठचा धोंडी	:	गो. नी. दांडेकर
जैत रे जैत	:	गो. नी. दांडेकर
बारोमास	:	सदानंद देशमुख
तहान	:	सदानंद देशमुख
कल्पनेच्या तीरावर	:	वि. वा. शिरवाडकर
जान्हवी	:	वि. वा. शिरवाडकर
वैष्णव	:	वि. वा. शिरवाडकर
गुलाराबेगम	:	शरद पगारे (अनु. सुभाष रणदिवे)
देवदास	:	शरतचंद्र चतर्जी
परिणीता	:	(अनु. शरदिनी मोहिते)
सुंदर ते मन (ब्युटिफुल माइण्ड)	:	कमलिनी फडके
गड आला पण सिंह गेला	:	ह. ना. आपटे
उंबरठा	:	शांता निसळ
सुताराचा पोर (येशू ख्रिस्त)	:	सनी पाटोळे
मुक्तिदाता मोशे	:	सनी पाटोळे
राष्ट्रपिता अब्राहाम	:	सनी पाटोळे
मुकज्जी		:शिवराम कारंत (अनु. मीना वांगीकर)
चोमा महार	:	शिवराम कारंत (अनु. श्यामलता काकडे)
धर्मश्री	:	एस्. एल्. भैरप्पा (अनु. विजयालक्ष्मी रेवणकर)
चक्रवर्ती (अशोक)	:	मालती दांडेकर
कुंती: मी राजमाता	:	अनंतराव कुलकर्णी
मी गांधारी	:	सुधाकर शुक्ल
मुंगी उडाली आकाशी	:	पद्माकर गोवईकर
स्पंदनांची किमया	:	उषादेवी कोल्हटकर
हरवलेला किनारा	:	उषादेवी कोल्हटकर
रणभूमीच्या छायेत	:	प्रभा गोखले
यज्ञ	:	भा. द. खेर , शैलजा राजे
तुटलेले पंख	:	खलिल जिब्रान(अनु. वसंत शहाणे)
शिक्षणसेवक कृष्णा डोळसे	:	सुभाष किन्होळकर
धरण	:	ना. द. जोशी
कॅप्टनची मुलगी	:	पुश्किन (अनु. पं. आवळीकर) ,
गंगेचा राखणदार	:	गी दलरी (अनु. उमाशशी भालेराव)
मेलेल्यांची गढी	:	दस्तयेवस्की (अनु. विश्राम गुप्ते)
गुन्हा आणि प्रायश्चित	:	दस्तयेवस्की (अनु. का. बा. कोनकर)
कारमाझफ बंधू (१), (२)	:	दस्तयेवस्की (अनु. भाऊ धर्माधिकारी)

पानिपतची मोहीम	:	ना. वि. बापट
काकांचे स्वप्न	:	दस्तयेवस्की (अनु. अविनाश बिनीवाले)
भूमिगताची टिपणे	:	दस्तयेवस्की (अनु. अनिल आंबीकर)
जुगारी	:	दस्तयेवस्की (अनु. जयंत दीक्षित)
शापित कोझाकीण	:	दस्तयेवस्की (अनु. अशोक डांगे)
बोंजूर त्रिस्तेस	:	फ्रान्स्वाज सागां (अनु.जयंतधुपकर)
ब्रेकिंग पॉईंट्स	:	जॅक हिंकली (अनु. विजया बापट)
अजेनी ग्रांदे	:	बाल्झाक (अनु. श्री. मा. भावे)
बेतवेतील प्रतिबिंबे	:	परशुराम देशपांडे
उमाजी राजे	:	शंकर नऱ्हे
ब्रोमदिला	:	अविनाश बिनीवाले
वहिनीसाहेब	:	डॉ. राजेंद्र माने
धाकटा वाडा	:	डॉ. राजेंद्र माने
अखेरचा बादशहा (बहादूरशाह)	:	प्रतिभा रानडे
पानिपतची मोहीम	:	ना. वि. बापट
चौखूर	:	विलासदत्त राऊत
प्रतिनिधी	:	वसंत वरखेडकर
सर्ज्या	:	सुरेश शिंदे
मेंढका	:	सुरेश शिंदे
मूडा	:	सुरेश शिंदे
सत्तावनचा सेनानी (तात्या टोपे)	:	वसंत वरखेडकर
ब्रह्मावर्त	:	माधव साठे
स्वराज्याचा श्रीगणेशा	:	नाथमाधव
स्वराज्याची स्थापना	:	नाथमाधव
स्वराज्याची घटना	:	नाथमाधव
स्वराज्याचा कारभार	:	नाथमाधव
स्वराज्यावरील संकट	:	नाथमाधव
स्वराज्याचे परिवर्तन	:	नाथमाधव
स्वराज्यातील दुफळी	:	नाथमाधव

प्रस्तावना

महाराष्ट्रातील भागवत धर्माच्या मंदिराचे कळस संतश्रेष्ठ, कविकुलगुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगांनी भाविकांना व बुद्धिमंतांना, ग्रामीणांना आणि नागरांना, कवींना आणि समीक्षकांना, स्वदेशवासीयांना आणि परदेशस्थांना गेले साडेतीन शतके सारखाच वेध लावला आहे.

ब्रिटिशांनी १८१८ साली पेशवाई बुडविल्यानंतर थोड्याच दिवसांत महाराष्ट्राच्या ग्रंथव्यवहारात मुद्रणयुग अवतीर्ण झाले. मुद्रणयुगाच्या प्राथमिक अवस्थेपासूनच तुकाराम महाराजांच्या अभंगांनी वर्चस्व प्रस्थापित केल्याचे दिसून येते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या आरंभापासून मुद्रित झालेल्या तुकाराम-गाथ्यांचा परामर्श वि. ल. भावे, बाबाजी गणेश परांजपे, पु. मं. लाड यांनी घेतला आहे. अलीकडच्या काळात सदानंद मोरे यांनी ‘तुकाराम दर्शन’ या ग्रंथामधून विस्तृतपणे या प्रयत्नांचा ऐतिहासिक आढावा घेऊन त्यांचे सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट केले आहे.

सर्व प्रकाशित गाथ्यांचे परीक्षण केले असता असे लक्षात येते, की त्यांच्यापैकी एकही गाथा तुकाराम महाराजांच्या श्रीक्षेत्र देहूच्या परिसरात प्रचलित असलेल्या बोलीत रचलेल्या अभंगांच्या संहितेवर आधारित नाही. स्वतः महाराजांनी स्वहस्ते सर्व अभंग लिहून काढले असते आणि ते सर्व जतन करून ठेवण्यात आले असते, तर कोणतीच समस्या वा अडचण उभी राहिली नसती; परंतु त्यांच्या हातचे समजले जाणारे एकुलते एक हस्तलिखित देहू देवस्थानच्या संग्रहात आहे. इंद्रायणीच्या डोहातून तुकोबांच्या वह्या तरंगून सुरक्षित, कोरड्या वर आल्यावर भाविकांनी प्रसाद म्हणून त्यांची पाने लुटून नेल्याचे तुकाराम-चरित्रकार महिपती सांगतात. कारण काहीही असो, महाराजांच्या हातची पूर्ण संहिता उपलब्ध नाही, हे खरे.

महाराजांचे लेखक संताजी तेली जगनाडे व संताजींचे चिरंजीव बाळोजी यांनी लिहून ठेवलेले सुमारे दोन हजार अभंग हे पाठप्रामाण्याचा विचार करता महत्त्वाचे ठरतात, यात काहीच शंका नाही. त्यांतील संताजीच्या हातचे तेराशे अभंग वि. ल. भावे यांनी प्रकाशित करून बरीच वर्षे झाली. बाळोजींचे हस्तलिखित अप्रकाशितच आहे. अर्थात संपूर्ण जगनाडे संहिता विचारात घेतली, तरीदेखील तिच्यात महाराजांच्या एकूण अभंगांपैकी निम्म्यापेक्षाही अधिक अभंग दाखल नाहीत.

सद्यःकालीन प्रचलित गाथ्यांपैकी बरेच गाथा पंढरपूर येथे सिद्ध झालेले असून, ते उत्तरकालीन आहेत. त्यामुळे त्यांचे प्रामाण्य शाबीत करू पाहणाऱ्यांना दंतकथांचा व आख्यायिकांचा आधार घ्यावा लागतो. याविषयीचे सविस्तर विवेचन पु. मं. लाड व अ. का. प्रियोळकर यांनी केलेले आहे.

अशा परिस्थितीत देहू येथेच सिद्ध झालेली संहिता महत्त्वाची ठरते, हे उघड आहे. ही संहिता संपूर्ण आणि प्राचीन असेल, तर दुधात साखर पडली, म्हणावी लागेल.

देहू परिसरात सिद्ध झालेली एक संपूर्ण संहिता देहूचे संशोधक ह.भ.प. श्रीधरबुवा मोरे-देहूकर यांच्या संग्रही आहे. ही संहिता तिच्यापेक्षा प्राचीन संहितेची नक्कल असली, तरी एकोणिसाव्या शतकातील असल्याने, तिचे मूल्य तसे कमी वाटत असले, तरी देहू परंपरेतील संपूर्ण अशी एकमेव उपलब्ध हस्तलिखित प्रत असल्याने तिला अमूल्यच मानावे लागेल आणि तिच्यापेक्षा प्राचीन पाठ देणारी हस्तलिखित प्रत उपलब्ध होत नसल्याने,

देहू प्रत म्हणून तीच छापली गेली पाहिजे, असा एक पर्याय होता. स्वतः तुकोबांनी स्वहस्ते लिहिलेले अभंग, तुकोबांच्या समकालीनाने किंवा लगतच्या उत्तरकालीनाने लिहिलेले अभंग साडेचार हजारांच्या आसपास मिळत नसल्याने आणि देहूप्रत पुढे येणे हे सांप्रदायिकांच्या व अभ्यासकांच्या दृष्टीने गरजेचे असल्याने, हाही पर्याय अजिबात टाकाऊ होता, असे नाही.

दुसरे असे, की तुकोबांच्या पश्चात देहू देवस्थान संस्थानमध्ये तुकोबांचे सर्व अभंग समाविष्ट असलेली संहिता (अर्थात अनेक वह्यांमध्ये) उपलब्ध होती. त्यामुळे एका बाजूला आपण मृगजळाच्या पाठी लागलो आहोत, असे म्हणण्याचीही सोय नव्हती. महाराजांच्या वैकुंठगमनानंतर थोड्याच दिवसांनी तुकोबांचा वेध लागलेले कचेश्वर भट ब्रह्मे चाकणकर, अभंग लिहून घेऊन पाठ करावे व त्यांच्या आधारे कीर्तन करावे, या हेतूने तेव्हा खेड मुक्कामी असलेले तुकारामपुत्र नारायणबाबा यांना भेटले. काही अभंग लिहून द्या, अशी विनंती केली. त्यावर नारायणबाबांचे 'अंबाजीचे घर। तेथे जावे। सर्वही संग्रह तुकोबाच्या वह्या। जावे लवलाह्या तुम्ही तेथे।।' असे सांगितले. त्यानुसार कचेश्वर देहूला गेले. अंबाजीला/ म्हणजे तुकोबांच्या नातवाला/ थोरल्या मुलाचे/ महादेवबाबांचे चिरंजीव आबाजीबाबा यांना भेटले व त्यांनी त्यांजकडून अभंग मिळवले.

इंग्रजी राजवट स्थिर झाल्यावर येथील नवशिक्षित तरुण आपल्या धर्माचा व समाजरचनेचा पुनर्विचार करू लागले. यातूनच दादोबा पांडुरंग यांनी कधी पुढाकार घेऊन, तर कधी मागे राहून, परमहंस सभा, प्रार्थना समाज या चळवळी सुरू केल्या. या चळवळींचे तत्त्वज्ञान सिद्ध करताना त्यांना तुकोबांच्या अभंगांचा उपयोग झाला. दरम्यान १८५८ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. तेव्हाचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन सर अलेक्झांडर ग्रँट व गव्हर्नर सर बार्टल फ्रिअर सुज्ञ व उदारमतवादी होते. ग्रँट साहेबांनी तुकाराम महाराजांचे अभंग वाचले, तेव्हा ते चकितच झाले व ते त्यांची स्तुती करू लागले. महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, शंकर पांडुरंग पंडित ही मातब्बर मंडळी ग्रँटचे विद्यार्थी. तुकोबांचा महिमा त्यांनी आपल्या गुरूकडून ऐकलेला. शिवाय दादोबा आणि त्यांचे परमहंस सहकारी तेच सांगत होते. त्यामुळे या नवपदवीधरांमध्ये तुकारामविषयक आकर्षण निर्माण झाले व तुकोबा त्यांच्या प्रार्थना समाजाचे केंद्र बनले. दरम्यान प्रसिद्ध कायदेपंडित विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी गणपत कृष्णाजींच्या छापखान्यातून गाथ्याची पूर्ण आवृत्ती पंढरपूर प्रतीवरून प्रसिद्ध केली.

महाराष्ट्राच्या सुशिक्षितांमधील वातावरण अशा प्रकारे तुकाराममय होत असताना इंदुप्रकाश प्रेसचे जनार्दन सखाराम गाडगीळ यांनी गाथा छापायचे ठरवले व मुंबई सरकारकडे आश्रय मागितला. ग्रँट साहेबांच्या शिफारशीवरून सरकारने २४००० रुपये मान्य केले. संस्कृत, प्राकृत, ग्रीक, लॅटिनचे जाणकार शंकर पांडुरंग पंडित आणि विष्णु परशुराम पंडित यांच्याकडे संपादनाची जबाबदारी टाकण्यात आली. १८६९ व १८७३ मध्ये हा गाथा दोन भागांत प्रकाशित झाला.

पंडितांनी संपादनासाठी देहू, तळेगाव, पंढरपूर व कडूस येथील प्रती वापरल्या. पैकी देहू हस्तलिखित त्यांना तुकाराम महाराजांच्या तत्कालीन वंशजांकडून प्राप्त झाले. हे हस्तलिखित वंशजांकडे परंपरेने आलेले असून, ते महाराजांचे ज्येष्ठ पुत्र महादेवबाबा यांच्या हातचे असल्याचे संपादकांना सांगण्यात आले. तळेगाव प्रत ही त्र्यंबक कासार यांनी अठराव्या शतकाच्या अखेरीस केलेली देहू प्रतीची व्यवस्थित नक्कल होती.

पंडितद्वयीने संपादनासाठी देहूहून नेलेले महादेवबाबांच्या हातचे हस्तलिखित देहूला परत आलेच नाही. त्यामुळे परंपरेवर विश्वास ठेवून सदर हस्तलिखित महादेवबाबांच्या हातचे मानायचे नाही, असे ठरवले, तरी हे हस्तलिखित प्राचीनतम व पारंपरिक, महाराजांच्या घरातलेच असल्याने त्याच्या विश्वसनीयतेसंबंधी शंकाच उरत नाही.

प्रस्तुत गाथा प्रसिद्ध झाल्यानंतर वारकऱ्यांना तो मान्य होणे साहजिकच होते. तत्कालीन प्रसिद्ध वारकरी कीर्तनकार ह.भ.प. भाऊसाहेब काटकर यांचे शिफारसपत्र गाथ्याला जोडले आहे. ते प्रातिनिधिक समजायला हरकत नाही. नंतर पंढरपूरमधील महंतमठपतीच आपापल्या पोथ्या घेऊन प्रकाशनाच्या व्यवहारात उतरल्यावर वारकऱ्यांमध्ये प्रस्तुत गाथा काहीसा मागे पडणे स्वाभाविकच समजायला हवे.

अर्थात प्रस्तुत इंदुप्रकाश किंवा पंडिती गाथा अंतिमतः देहू येथील हस्तलिखितावर आधारित असला, तरी तो देहू प्रतीची यथाशब्द छपाई नाही. पंडित आधुनिक विद्येत पारंगत असल्याने त्यांनी देहूप्रत सरळ छापण्याऐवजी त्यांना उपलब्ध झालेल्या हस्तलिखित पोथ्यांवरून तुकाराम-गाथ्याची चिकित्सक किंवा पाठशुद्ध आवृत्ती सिद्ध करण्याचे ठरवले. उपलब्ध हस्तलिखितांमधील जे पाठ त्यांना शुद्ध वाटले, ते स्वीकारून त्यांनी त्यांचा समावेश मुख्य संहितेत केला. जे पाठ त्यांना कोणत्या ना कोणत्या कारणामुळे अस्वीकार्य वाटले, ते त्यांनी स्वीकृत पाठांवर आकडे टाकून तळटीपांमधील त्याच आकड्यांपुढे पाठभेद म्हणून छापले. ते कोणत्या हस्तलिखितात आढळले, याचाही उल्लेख केला.

तुकाराम-गाथ्याची संशोधित आवृत्ती म्हणून पंडिती प्रतीचे स्थान व मूल्य काय, हा वेगळा प्रश्न आहे. परंतु इतिहासाचार्य राजवाड्यांसारख्या चिकित्सक शिरोमणीने त्याची मुक्त कंठाने प्रशंसा केली, तर त्यांचेच शिष्य म्हणविणाऱ्या भाव्यांनी त्यावर टीकेची झोड उठवली.

संशोधितचिकित्सक संहितेचे म्हणून एक महत्त्व असते, हे निदान ज्यांना महाभारताच्या भांडारकर प्रतीची माहिती आहे, त्यांना सांगायला नको. पण प्रत्येक संहितेचे सुद्धा स्वतंत्र स्थान व महत्त्व असते, हेही विसरता कामा नये. विशेषतः गाथ्याला आधारभूत ठरलेल्या देहू संहितेचे, ती देहूत सिद्ध झालेली, स्वतः तुकोबांच्या उच्चारशैलीशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिचित असलेल्यांनी सिद्ध केलेली व उपलब्ध संपूर्ण संहितांमधील सर्वांत प्राचीन असल्यामुळे तर अनेक अंगांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

संपादक, प्रकाशक, मुद्रक यांनी त्यांना उपलब्ध झालेल्या हस्तिलिखितांपैकी देहू व तळेगावची हस्तलिखिते मूळ मालकांस परत न करता गहाळ केली, या त्यांच्या बेजबाबदारपणाबद्दल त्यांना बोल लावण्यात आता अर्थ नाही. 'यद् गतं तद् गतं' एवढेच म्हणून त्याविषयी शोक करण्याने काही निष्पन्न होणार नसल्यामुळे तो मुद्दा सोडून देऊ. (पंढरपूर प्रत म्हणजे गणपत कृष्णाजीचा छापील गाथा. कडूस प्रतीचे मालक देहूकरांपेक्षा चतुर असल्याने त्यांनी संपादनाचे काम पूर्ण होण्यापूर्वीच आपले हस्तलिखित परत नेले.) उलट, शंकर पांडुरंग आणि विष्णु परशराम या पंडितांचे आभार यासाठी मानायला हवेत, की त्यांनी अस्वीकार्य वाटलेले देहूप्रतीतील पाठ तळटीपांत नोंदवले. कारण त्यामुळे या तळटीपांमधील संपादकांनी न स्वीकारलेल्या पाठांची त्यांची मुख्य संहितेतील मूळ ठिकाणी पुनःस्थापना करून देहू संहितेची पुनर्रचना करणे शक्य होते. तुकाराम महाराजांच्या वैकुंठगमनाच्या त्रिशतकोत्तर सुवर्णसोहळावर्षाचे निमित्त साधून देहू देवस्थान प्रकाशने करीत असलेला प्रस्तुत

गाथा म्हणजे पंडितीप्रतीवरून सिद्ध करण्यात आलेली देहू संहितेची पुनर्रचना किंवा पुनःस्थापना होय. हा काहीसा उलटा प्रवास आहे. संशोधित प्रतीचे निस्संपादन करून मूळ प्रतीचे केलेले पुनःसंपादन आहे. पण ते आवश्यक होते व त्याला दुसरा पर्याय नव्हता, इलाजही नव्हता.

अर्थात हे काही यांत्रिकपणे केलेले तांत्रिक काम नव्हे. तळेगाव, पंढरपूर व कडूस येथील संहिताही महत्त्वाच्या आहेत. त्यांत निर्माण झालेले पाठभेद म्हणजे निव्वळ प्रमाद अशी आमची भूमिका नाही. देहू प्रतीतही हस्तदोष, नजरचुका यांमुळे घोटाळे होणे शक्य होते. तसेच, अन्य संहितांचे कर्तेही आपापल्या परीने जबाबदारीनेच काम करीत होते. तेव्हा ज्या ठिकाणी देहू प्रतीतील पाठ भाषिक, तात्त्विक, सामाजिक, ऐतिहासिक, इ. बाजूंनी विचार केला असता, निःसंशयपणे निरर्थक किंवा असंभाव्य वाटले, तेथे इतर प्रतींमधील पाठ आदरपूर्वक स्वीकारले आहेत. या प्रक्रियेत आमची निवड शंभर टक्के अचूक व आक्षेपातीत आहे, असा आमचा दावा नाही, ही प्रक्रिया कधीही न संपणारी आहे.

प्रश्न केवळ पाठभेदांचाच नाही. कोणताही अभंगगाथा हे एक संकलन-संपादन असते. गाथा म्हणजे जाणीवपूर्वक ठरवून केलेली प्रकरणवार ग्रंथरचना नव्हे. प्रत्येक अभंग हा एक स्वतंत्र एकक (ळहग़) म्हणून वाचून, त्याचा अर्थनिर्णय करता येतो व बहुतेकांचा कल त्याकडेच असतो.

पण हे काही एवढे सरळ-सोपे प्रकरण नाही. तुकोबांचे अभंग सहजस्फूर्त असत. पण ते एखाद्या विवक्षित प्रसंगाला अनुलक्षून एकापेक्षा अधिक अभंगही रचीत. अशा वेळी हे सर्व अभंग एकमेकांशी आंतरिकरीत्या संबद्ध असल्याने त्या सर्वांचा मिळून एक गट होई. या गटातील अभंगांचा क्रम अथवा ओळही तितकीच महत्त्वाची. अर्थनिर्णयाच्या दृष्टीने ही बाब फार महत्त्वाची.

महाराजांच्या अभंगांच्या देहू प्रतीच्या संपादकांना, ते देहूचेच असल्यामुळे कालदृष्ट्या तुकोबांना अधिक जवळचे असल्याने तुकारामचरित्र चांगले अवगत होते. महाराजांनी कोणत्या प्रसंगी, किती अभंग, कोणत्या क्रमाने रचले, याचीही माहिती त्यांना बरीच होती. नसल्यास बुजुर्गांकडून मिळण्याचीही शक्यता होती. त्यांनी हे काम गंभीरपणे व कष्टपूर्वक केलेले दिसते. संहितेत अनेक ठिकाणी अभंगांचे गट आकडे टाकून निश्चित केले आहेत. कितीतरी गटांना अनुरूप शीर्षके देण्यात आलेली आहेत. कालांतराने संहितीकरणाचे केंद्र देहूहून पंढरपूरला गेल्यावर ही जाणीवच लुप्तप्राय झाली व महाराज मंडळींनी मूळ ओळींत ढवळाढवळ करून कीर्तनाची सोय वगैरे आनुषंगिक बाबी पुढे ठेवून अभंगांची आपापल्या बुद्ध्यनुसार वर्गीकरणे केली. देहूप्रत ही या ढवळाढवळीपासून मुक्त असल्याने सर्वश्रेष्ठ प्रत आहे.

पंडिती प्रतीत दुबार आलेले अभंग प्रस्तुत प्रतीत एकदाच घेण्यात आलेले आहेत. प्रचलित पंढरपूरकेंद्रित प्रतींपेक्षा या प्रतीत जास्त अभंग आहेत. पंडितांनी घेतलेले काही अभंग वगळण्याची वेळ एकदाच आली. तिचा खुलासा करणे भाग आहे.

'।।शिवाजी राजे यांचे स्वामीस अबदागिरी घोडा, कारकून असे न्यावयास पाठविले, ते अभंग।।'

या मथळ्याखाली पंडिती प्रतीत १४ अभंग येतात. त्यांतील ९ अभंग पंढरपूर प्रतीत व वारकऱ्यांमध्ये प्रचलित असलेल्या अन्य प्रतींत सापडतात. पंडिती प्रतीतील अतिरिक्त ५ अभंग प्रस्तुत गाथ्यात आम्ही वगळले आहेत. हे अभंग सरळ सरळ उत्तरकालीन प्रक्षेप आहेत. अशा प्रकारचे प्रक्षेप होण्याचे एक कारण म्हणजे मूळ वहीत

कोरी राहिलेली पाने.

उपर्युक्त पाच अभंगांतील (महाराष्ट्र शासनाची आवृत्ती, अभंग क्रमांक १८८६-१८९०) तुकाराम महाराजांचे स्वतः विषयीचे उल्लेख त्यांच्या स्वरूपाशी व विचारांशी विसंगत आहेत.

परंतु हा काही आमच्या व्यक्तिनिष्ठ धारणेचा भाग नव्हे. तुकाराम महाराज शिवरायांना समर्थ रामदासांकडे जायला सांगत असतील, तर त्याला आम्ही कोण हरकत घेणार? पण ऐतिहासिक वस्तुस्थिती अशी आहे, की इ. स. १६५० पर्यंत रामदासस्वामी कृष्णाकाठी नुकतेच येऊन, दाखल होऊन, कार्य करू लागले होते व त्यांची माहिती फारशी कोणाला असण्याची शक्यता नव्हती. त्यांना मानमान्यताही मिळाली नव्हती. उलट, तुकोबा प्रसिद्धीच्या आणि सन्मानाच्या शिखरावर होते. अशा परिस्थितीत ते स्वतःची अशी निंदा करीत शिवबांना विन्मुख पाठवतील, हे शक्य नाही.

पण मुद्दा केवळ शक्यतेचाही नाही. ज्या कोणी रामदासभक्ताने हेतुतः किंवा सद्‌भावनेने (ुदद् षरगूॅ) हे अभंग रचले, तो इतिहासविषयक पूर्ण अडाणी असल्यामुळे त्याने या अभंगांमध्ये अष्टप्रधानांचा उल्लेख करताना प्रतिनिधी, राजाज्ञा अशा शिवोत्तर काळातील अधिकाऱ्यांचा उल्लेख केला आहे. इतकेच नव्हे, १६५० पर्यंत ज्याला शिवरायाचे नावही माहीत असणे सुतराम् शक्य नव्हते, तो भूषण कवी शिवदरबारात आणून बसवला आहे आणि सुमंत व डबीर ही एकाच पदाची दोन भाषांमधील दोन नावे असली; तरी ती दोन स्वतंत्र अधिकाऱ्यांची पदनामे मानली आहेत. त्यातही मौज अशी, की शिवराज्यभिषेकापर्यंत प्रचलित असलेल्या डबीर या फारशी भाषेतील शब्दाला सुमंत हा पर्याय राज्यव्यवहारकोशामुळे त्यानंतर प्रचलित झाला. रामदासभक्तांनी भूषण कवीप्रमाणे राज्यव्यहारकोशकर्ते रघुनाथपंत यांनाही १६५० पूर्वी पुणे परिसरात दाखल करण्याचा चमत्कार केला आहे.

अर्थात या प्रसिद्ध रचना समर्थभक्तांच्या असल्या, तरी त्यांचा समावेश देहू वा तळेगाव प्रतीत करण्याचे काम मात्र त्यांचे नव्हे. त्याच्या निदान दोन शक्यता आहेत. १) देहू प्रतीची नक्कल करणारे त्र्यंबक कासार यांनी एखाद्या रामदासी बाडातून हे अभंग आपल्या (तळेगाव) प्रतीत समाविष्ट केले असतील. तेथून ते मूळ देहू प्रतीत नकलून घेण्यात आले असतील. देहू प्रतीत मुळाला सोडून वेगळ्या पाठांचा समावेश (मूळ पाठ खोडून) झालेले दिसून येतात. हे उत्तरकालीन देहूकरांचे काम होय. २) अशाच एखाद्या उत्तरकालीन देहूकराने उपर्युक्त रामदासी प्रक्षेप देहू प्रतीत सामावून घेतले असतील. तिथून ते त्र्यंबक कासाराच्या वहीत नकलले गेले.

मुळात रामदासी संप्रदायातच या अभंगांची निर्मिती कशी झाली, याचा उलगडा करणेही फारसे अवघड नाही. मल्हार रामराव चिटणीस हे शिवशाहीचे बखरकार अठराव्या-एकोणिसाव्या शतकाच्या संधिकाळात होऊन गेले. त्यांचा समर्थ संप्रदायाशी निकट संबंध होता. खुद्द सांप्रदायिक बखरकार हनुमंतस्वामी आणि चाफळ संस्थानाधिकारी रंगो लक्ष्मण मेढे व चिटणीस हे एकत्र लिखाण करीत. हनुमंतस्वामीच्या श्रीसमर्थांच्या बखरीची वाढीव दुसरी आवृत्ती स्वामींच्याच आज्ञेवरून चिटणीस व मेढे यांनी तयारकेली.

शासकीय प्रतीतील उपर्युक्त अभंग चिटणीसांच्या बखरीत शिवाजीतुकाराम भेटीचा प्रसंग सांगताना येतात, हे सांगितले, म्हणजे या प्रक्षेपांचा वेगळा उलगडा करायची गरज नाही. चिटणीस, हनुमंतस्वामी व कदाचित मेढे यांनी भेटीचे वर्णन करताना बहुधा हे अभंग रचले असावेत. अर्थात त्यात आपण काही गैर करत आहोत, असे

त्यांना वाटायचे काही कारण नव्हते. त्यांनी केले, ते प्रामाणिकपणे व समर्थांचा महिमा वाढविण्यासाठी. ही घटना खरोखर घडली व तुकोबांनी शिवरायांना समर्थांकडे जायला सांगितले, ही त्यांची प्रामाणिक समजूत होती. तिच्या पोटी त्यांनी हे केले. तुकोबांनी शिवरायांना गद्यात उपदेश करण्याऐवजी अभंगांत करणे अधिक सयुक्तिक वाटल्याने त्यांची गद्याऐवजी पद्य अभंग करून ते मूळ अभंगांची ओळ विस्कळीत करून त्यांच्यांत मध्येच घुसडले. पण त्यामुळे वृत्तविसंगती निर्माण होते, ओघ बिघडतो, हे त्यांच्या लक्षात आले नाही. परंतु साताऱ्याच्या दरबारात प्रचलित असलेली, पण शिवकाळात मुळातच नसलेली अधिकारपदे त्यांची अडाणीपणे अभंगांत आणली. अर्थात त्यांच्या अडाणी प्रामाणिकपणामुळेच प्रस्तुत प्रक्षेप ओळखणे शक्य झाले. असो.

सदानंद मोरे
दिलीप धोंडे

अ +É < = >ð Añ B Bä +Éä

Eò JÉ MÉ PÉ SÉ U

ज झ ट ठ ड ढ

iÉ lÉ n vÉ xÉ

{É ¡ò ¤É ¦É ¨É

ªÉ ®ú ±É ´É „É

ºÉ ½ lÉ YÉ

अ

अइकाल परी ऐसें नव्हे बाई	२६
अखंड तुझी जया प्रीति	१०७०
अखंड मुडतर	३१५८
अखंड संत निंदी	३९४३
अगत्य ज्या नरका जाणें	३९६६
अगा ए सावळ्या सगुणा	६१६
अगा करुणाकरा करितसें	२८१५
अगा पंढरीच्या राया	४४२४
अंगा भरला ताठा	३५९९
अगा ये उदारा अगा विश्वंभरा	२३०८
अगा ये मधुसूदना माधवा	४४००
अगा ये वैकुंठनायका	६६५
अंगीकार ज्याचा केला नारायणें	२७८८
अंगीं घेऊनियां वारें	४२५५
अंगीं ज्वर तया नावडे साकर	३०५
अगी देखोनियां सती	१८४१
अंगीं देवी खेळे	४२२
अंगें अनुभव जाला मज	२०६५
अगोचरी बोलिलों आज्ञेविण	४९२

अग्न तापली या काया चि होमे	१२०५
अग्निकुंडामध्यें घातला प्रल्हाद	३०८४
अग्निमाजी गेलें	२०४०
अग्नि हा पाचारी कोणासी	२८९०
अग्नीमाजी पडे धातु	१४८७
अचळ न चळे ऐसें जालें	२५३९
अझुनि कां थीर पोरा न ह्मणसी	१४०
अडचणीचें दार	२०८४
अणुरणीयां थोकडा	९८७
अंतरली कुटी मेटी	२१९
अंतराय पडे गोविंदीं अंतर	१४४५
अंतरींचा भाव जाणोनियां गुज	११२६
अंतरींची घेतो गोडी	३५
अंतरींची ज्योती प्रकाशली	२८३७
अंतरींचें गोड	२८१८
अंतरींचें जाणां	१६४२
अंतरींचें ध्यान	१२९३
अति जालें उत्तम वेश्येचें	१७१३
अतित्याई देतां जीव	४४४०
अतित्याई बुडे गंगे	२६९४
अतिवाद लावी	५५२
अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा	११८
अद्वय चि द्वय जालें चि कारण	३७३७
अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान	३७४२
अधमाची यारी	२७६
अधमाचें चित्त अहंकारी मन	४२५८
अंधळें ते सांगे सांगितल्या	३७९३
अंधळ्याची काठी	२८४९
अधिक कोंडितां चरफडी	१८३१
अधिकाचा मज कांटाळा	२१४
अधिकार तैसा करूं उपदेश	३३०५
अधिकार तैसा दावियेले मार्ग	५३८
अधीरा माझ्या मना	२२९९
अनंतजन्में जरी केल्या तपराशी	३३४०
अनंत जुगाचा देव्हारा	४६६
अनंत ब्रह्मांडें उदरीं	१७२
अनंत ब्रह्मांडें एके रोमीं	२४७२
अनंत लक्षणें वाणितां अपार	४०८८
अनंताचे मुखीं होसील गाइला	३४३७
अनंताच्या ऐकों कीर्ती	३५३७
अनंतां जिवांचीं तोडिलीं बंधनें	३६३२
अनन्यासी ठाव एक सर्वकाजें	२२२७

अनाथ परदेशी हीन दीन ३८८३
अनाथाचा नाथ पतितपावन ४३२४
अनाथाचा सखा ऐकिला ४४७०
अनाथांची तुह्मां दया ८७१
अनाथां जीवन ३२८२
अनतापयुक्त गेलिया अभिमान ३४८२
अनुतापें दोष ७२४
अनुभव ऐसा ३७२५
अनुभव तो नाहीं अमुचिया ३७०८
अनुभवा आलें २१५३
अनुभवाचे रस देऊं आर्त्तभूतां ३२२५
अनुभवावांचून सोंग संपादणें ३३४७
अनुभवें अनुभव अवघा चि १३१९
अनुभवें आलें अंगा २८३५
अनुभवें कळों येतें पांडुरंगा १८३८
अनुभवें वदे वाणी २७८१
अनुसरे तो अमर जाला ३२७३
अनुसरे त्यासी फिरों नेदी ३९८९
अनुहात ध्वनि वाहे १७८३
अनेक दोषांचे काट ३५४१
अन्नाच्या परिमळें जरि जाय ३४२
अन्यायासी राजा जरि न करी ३८०१
अपराध जाले जरी असंख्यात ४३९३
अपराधी ह्मणोनि येतों ३६७३
अभक्त ब्राह्मण जळो त्याचें १३१४
अभक्ताचे गांवीं साधु ह्मणजे ३५७३
अभय उत्तर संतीं केलें दान ४८१
अभयदान मज देईं गा उदारा ३८८५
अभयाचें स्थळ ९५८
अभिन्नव सुख तरि या १३६८
अभिमानाची स्वामिनी शांति १३४७
अभिमानाचें तोंड काळें २७००
अभिमानी पांडुरंग २९५१
अमंगळ वाणी ३४९
अमच्या कपाळें तुज ऐसी बुद्धि ३३३०
अमर आहां अमर आहां १३९६
अमर तूं खरा २२९३
अमृत अव्हेरें उचळलें जातां ३२२४
अमृताचीं फळें अमृताची ३०३५
अरे कृष्णा आह्मी तुझे निज ४२१२
अरे कृष्णा तुवां काळया नाथिला ४२१३
अरे गिळिलें हो संसारें १२०४

अरे हें देह व्यर्थ जावें	३०७
अर्थेविण पाठांतर कासया	४१९१
अर्भकाचे साटीं	४०६२
अल्प भाव अल्प मती	६३४
अल्प माझी मती	८००
अल्प विद्या परी	४४६६
अल्ला करे सो होय बाबा	४४३
अल्ला देवे अल्ला दिलावे	४४४
अवगुण तों कोणीं नाहीं	८२६
अवगुणांचे हातीं	४१
अवघा च अन्यायी	३२५९
अवघा चि आकार ग्रासियेला	१४१६
अवघा तो शकुन	१५१२
अवघा भार वाटे देवा	३१५९
अवघा वेंचलों इंद्रियांचे ओढी	८२१
अवघिया चाडा कुंटित करूनि	१७५१
अवघियांच्या आलों मुळें	१५९७
अवघियां दिला गोर	२२६
अवघीं च तीर्थे घडलीं	२७७८
अवघीं तुज बाळें सारिखीं	२९९१
अवघीं भूतें साम्या आलीं	१५०३
अवघी मिथ्या आटी	१३६४
अवघीं मिळोनि कोल्हाळ केला	२३७
अवघें अवघीकडे	२२४
अवघे गोपाळ ह्मणती या रे	१४४
अवघें चि गोड जालें	२३१
अवघे चि निजों नका	१८३५
अवघे चुकविले सायास	२०९०
अवघें जेणें पाप नासे	२९५४
अवघे देव साध	५७९
अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव	३०८
अवघ्या उपचारा	१२८६
अवघ्या कोल्ह्यांचें वर्म अंडीं	४४३२
अवघ्या जेष्ठादेवी कोण	४१८
अवघ्या दशा येणें साधती	६४५
अवघ्या पातकांची मी एक रासी	३९८६
अवघ्या पापें घडला एक	७८८
अवघ्या भूतांचें केलें संतर्पण	१२८४
अवघ्या वाटा जाल्या क्षीण	२२८९
अवचित त्यांणीं देखिला	४५२८
अवचित या तुमच्या पायां	३७६७
अवचिता चि हातीं ठेवा	२५३६

अवतार केला संहारावे ४५६०
अवतार गोकुळीं हो जन १५७१
अवतारनामभेद गणा १५७५
अविट हें क्षीर हरिकथा माउली १०३०
अविश्वासीयाचें शरीर सुतकी २२२६
अवो कृपावंता ३२६३
अशक्य तों तुह्मां नाहीं नारायणा २३०५
अशोकाच्या वनीं सीता शोक ३३९
असंत लक्षण भूतांचा मत्सर ३८६६
असंतीं कांटाळा हा नव्हे मत्सर २७२५
असत्य वचन होतां सर्व १६१३
असा जी सोंवळे ३१८२
असाल ते तुह्मी असा ३७८४
असे नांदतु हा हरी सर्वजीवीं ११०८
असें येथींचिया दिनें १५०८
असो आतां ऐसा धंदा ७९५
असो आतां कांहीं करोनियां २९८०
असो आतां किती ७६५
असो खटपट ३११०
असो खळ ऐसे फार १७१७
असोत लोकांचे बोल २४७९
असोत हे तुझे प्रकार २४२७
असोत हे बोल २१५०
असो तुझें तुजपाशीं २२२४
असोनि न कीजे अलिप्त २७२७
असो मंत्रहीन क्रिया ४८२
असो मागें जालें १८१३
अस्त नाहीं आतां एक चि १३८६
अहंकार तो नासा भेद ३१८३
अहल्या जेणें तारिली रामें ११०२
अहो कृपावंता ४१८८
अहो पुरुषोत्तमा ३७१०
अक्षई तें झालें ७३३
अक्षरांचा श्रम केला ८९९
अज्ञान हा देह स्वरूपीं ४३३२
अज्ञानाची भक्ति इच्छिती ४०८५

आ

आइक नारायणा वचन माझें ३८८२
आइका माझीं कवतुकउत्तरें ३७५०
आइकिली मात २७३५

आइत्याची राशी	१३४४
आइत्या भाग्या धणी व्हावें	४०४६
आकारवंत मूर्ति	३३७७
आगी लागो तया सुखा	२२८६
आग्रहा नांवें पाप	३४००
आचरणा ठाव	३५१
आचरती कर्मे	१४४९
आचरे दोष न धरी धाक	४२३८
आजामेळा अंत मरणासी आला	३८७९
आजि आनंदु रे एकी परमानंदु	२४९३
आजि ओस अमरावती	२१०
आजि का वो तूं दिससी दुश्चिती	३७८
आजिचिया लाभें ब्रह्मांड ठेंगणें	१९५८
आजिचें हें मज तुह्मीं कृपादान	३१४०
आजी दिवस जाला	४६७
आजि दिवस धन्य	१९५५
आजि नवल मी आलें येणें राणें	३८०
आजि बरवें जालें	१९५९
आजिवरी तुह्मां आह्मां नेणपण	२२
आजिवरी होतों तुझे सत्ते खालीं	३४५७
आजिवरी होतों संसाराचे हातीं	३८६४
आजि शिवला मांग	४२२८
आठवे देव तो करावा उपाव	९४३
आठवों नेंदी आवडी आणीक	१६९७
आडकलें देवद्वार	५१५
आड पडे काडी	४०३०
आडलिया जना होसी सहाकारी	२७८५
आडवा तो उभा	२४३७
आण काय सादर	१७९४
आणिकां उपदेशूं नेणें नाचों	४५६
आणिकांची सेवा करावी शरीरें	२६६८
आणिकांची स्तुति आह्मां	२७७
आणिकांच्या कापिती माना	२५६
आणिकांच्या घातें । ज्यांचीं	२८२
आणिकांच्या घातें मानितां	४०८४
आणिकां छळावया जालासी	१७५२
आणिकांसी तारी ऐसा नाहीं	१४९०
आणितां त्या गती	२४४१
आणिलें सेवटा	२९०३
आणीक ऐसें कोठें सांगा	१३८०
आणीक काय थोडीं	४१०
आणीक कांहीं नेणें	२१८०

आणीक कांहीं मज नावडे मात १४५२
आणीक कांहीं या उत्तराचें काज ९०९
आणीक काळें न चले उपाय ५४२
आणीक कोणाचा न करीं मी १४३०
आणीक कोणापुढें वासूं मुख ४३११
आणीक दुसरें मज नाहीं आतां ६९६
आणीक नका करूं चेष्टा ४०००
आणीक पाखांडें असती उदंडें ३४९७
आणिक मात माझ्या नावडे २१०८
आणीक म्यां कोणा यावें ३२३४
आणूनियां मना १३७५
आंत हरि बाहेर हरि १२४५
आतां असों मना अभक्तांची ८११
आतां आवश्यक करणें २६२२
आतां आशीर्वाद १९३१
आतां आहे नाहीं २६००
आतां आह्मां भय नाहीं ४१३२
आतां आह्मां हें चि काम न १०४३
आतां आह्मां हें चि काम वाचे ४१४८
आतां उघडीं डोळे १११
आतां ऐसें करूं १६७
आतां करावा कां सोस १९५२
आतां कळों आले गुण २९९५
आतां काढाकाढी करीं बा १७७४
आतां काशासाटीं दुरी ३४७८
आतां कांहीं सोस न करीं ९३२
आतां केशीराजा हे चि ३२७४
आतां कोठें धांवे मन ३७३४
आतां गाऊं तुज ओविया ८५५
आतां गुण दोष काय विचारिसी २१३८
आतां घेईं माझें २१४९
आतां चक्रधरा १८६९
आतां चुकलें देशावर ३०१३
आतां चुकलें बंधन गेलें २६३८
आतां जावें पंढरीसी ४१४९
आतां तरी पुढें हा चि उपदेश १०१
आतां तरी मज सांगा साच भाव ३८१२
आतां तरी माझी परिसा ४२६३
आतां तळमळ ३४४५
आतां तुज कळेल तें करीं ६२६
आतां तुज मज नाहीं ३९९८
आतां तुझा भाव कळों आला १८५३

आतां तुझें नाम गात	३४२९
आतां तुह्मी कृपावंत	३१६०
आतां तूं तयास होईं वो	१९७३
आतां दुसरें नाहीं वनीं	२६१०
आतां देवा मोकळिलें	३७५८
आतां देह अवसान	२५६४
आतां दोघांमध्यें काय	३५२७
आतां द्यावें अभयदान	३४६८
आतां धरितों पदरीं	३८१९
आतां धर्माधमाअ कांहीं उचित	६३२
आतां न करीं सोस	१६५८
आतां नको चुकों आपुल्या	१८१९
आतां नये बोलों अव्हेराची	२४२०
आतां न यें मागें	४०६
आतां न राहे क्षण एक	३००४
आतां नव्हे गोड कांहीं	३४७७
आतां न ह्मणे मी माझें	२२८७
आतां नेम जाला	२२१७
आतां पंढरीराया	१८११
आतां पहाशील कायमाझाअंत	३८३७
आतां पाविजेल घरा	३७६८
आतां पावन सकळ सुखें	६१४
आतां पाहों पंथ माहेराची	१९०२
आतां पुढें धरीं	७३८
आतां पुढें मना	२९२७
आतां पोरा काय खासी	५६९
आतां बरें घरिच्याघरीं	३५२९
आतां बरें जालें। माझें मज	३३२०
आतां बरें जालें। माझे माथांचें	१८९२
आतां बरे जालें। सकाळीं च	४१६४
आतां भय नाहीं ऐसें वाटे	२६६५
आतां मज तारीं	२२५४
आतां मज देवा	२१९७
आतां मज धरवावी शुद्धि	६१७
आतां मागतों तें ऐक	३०२१
आतां माझा नेणो परतों भाव	६४१
आतां माझा सर्वभावें हा निर्धार	११३०
आतां माझे नका वाणूं गुण	२८६९
आतां माझे सखे येती वारकरी	१९४७
आतां माझ्या दुःखा कोण	३९३०
आतां माझ्या भावा	२०७०
आतां माझ्या मना	२३३४

आतां माझ्या मायबापा	२८०३
आतां मी अनन्य	३८४८
आतां मी देवा पांघरों काई	१०८३
आतां मी न पडे सायासीं	६२५
आतां मी पतित ऐसा	३५६१
आतां मी सर्वथा नव्हें गा	१६८६
आतां मोकलावें	४३९१
आतां येणें पडिपाडें	३७५३
आतां येणें बळें पंढरीनाथ	६४७
आतां येणेंविण नाहीं आह्मां	५३६
आतां येथें खरें	३६४८
आतां येथें जाली जीवासवे	३६३१
आतां येथें लाजे नाहीं	३४५६
आतां वांटों नेदीं आपुलें	४१४७
आतां सांडूं तरी हातीं ना	३६१४
आतां सोडवणें न या	३६६२
आतां हें उचित माझें जना हातीं	३३३२
आतां हें चि जेऊं हें चि जेऊं	२३०
आतां हें चि सार	३२५०
आतां हें न सुटे न चुके	३००७
आतां हें सेवटीं। असो	३३९८
आतां हे सेवटी। माझी	१९३२
आतां होईन धरणेकरी	२५२२
आतां होई माझे बुद्धीचा	२१३१
आत्मस्थिती मज नकोहाविचार	३५६५
आदि मध्य अंत दाखविला दीपें	८२३
आदि वर्तमान जाणसी भविष्य	१६८०
आंधळ्यापांगळ्यांचा एक	४२७
आंधळ्यासि जन अवघे चि	३०२
आधार तो व्हावा	९७६
आधारावांचुनी	८७०
आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा	८
आधीं कां मज लावियेली	४३९४
आधीं च आळशी	७८०
आधीं देह पाहता वाव	४००८
आधी नाहीं कळों आला हा	३३१९
आधीं सोज्वळ करावा मारग	३५३०
आनंदले लोक नरनारी परिवार	११००
आनंदाचा कंद गाइयेला गीतीं	४३१४
आनंदाचा थारा	३४९५
आनंदाचे डोहीं आनंदतरंग	३२४१
आनंदाच्या कोटी	१९६७

आनंदें एकांतीं प्रेमें वोसंडत	१७१०
आनंदें कीर्तन कथा करीं घोष	३८३३
आनुहातीं गुंतला नेणे बाह्य रंग	१६३१
आपटा संवदड रानचारा	४४४६
आपण चाळक बुद्धीच्या	३६४६
आपण चि व्हाल साहे	३७७६
आपण तों असा	३५९४
आपणा लागे काम वाण्याघरीं	३८५५
आपला तो एक देव	३१३९
आपलाल्या तुह्मी रूपासी समजा	९२४
आपलें तों कांहीं	७४५
आपल्या च स्कुंफ्दें	२५०६
आपुला तो देह आह्मां	२२०१
आपुलाला लाहो करूं	८४२
आपुलाल्या परी करितील	४५१७
आपुलिया आंगें तोडीमायाजाळ	२४५२
आपुलिया ऐसें करी	४४२९
आपुलिया काजा	२८९५
आपुल्या बळें नाहीं मी	२९४०
आपुलिया लाजा	१५४९
आपुलिया हिता जो असे जागता	३४
आपुलिये टाकीं	३५०६
आपुली कसोटी शुद्ध राखी	४०८३
आपुली बुटबुट घ्यावी	४१०१
आपुलें आपण जाणावें	२७२६
आपुले गांवींचें न देखेसें जालें	१२७४
आपुलें मरण पाहिलें	२६६९
आपुलें मागतां	७६४
आपुले वरदळ नेदा	४३७२
आपुलें वेचूनि खोडा घाली	३१७३
आपुलेंसें करुनी घ्यावें	४०३७
आपुल्या आपण उगवा	२५३०
आपुल्या आह्मी पुसिलें	२३५२
आपुल्यांचा करीन मोळा	२६३४
आपुल्याचा भोत चाटी	२७२८
आपुल्या पोटासाटीं	४०९३
आपुल्या महिमानें	१४७६
आपुल्या माहेरा जाईन	१५८७
आपुल्या विचार करीन जीवाशीं	९१०
आपे तरे त्याकी कोण बराई	११५६
आमचा तूं ॠणी	२२५७
आमचा विनोद तें जगा मरण	५६२

आमचा स्वदेश	१७०८
आमची कां नये तुह्मांसी करुणा	१८५५
आमची जोडी ते देवाचे चरण	२७९६
आमचे गोसावी अयाचितवृत्ती	२९९
आमच्या हें आलें भागा	८८३
आमुचिया भावें तुज देवपण	२९३६
आमुची कृपाळू तूं होसी माऊली	९३०
आमुची मिरास पंढरी	४३४७
आमुची विश्रांति	३२०७
आमुचें उचित हे चि उपकार	३३६१
आमुचें जीवन हें कथाअमृत	१९९६
आमुचें ठाउके तुह्मां गर्भवास	२४९९
आमुचें दंडवत पायांवरि डोई	४२४९
आमुप जोडल्या सुखाचिया	१९६२
आयुष्य गेलें वांयांविण	७६२
आयुष्य मोजावया बैसला	२८८४
आयुष्य वेचूनि कुटुंब पोसिलें	४०८७
आरुष माझी वाणी बोबडीं	२१८१
आरुष शब्द बोलों मनीं	५१४
आरुषा वचनीं मातेची आवडी	३६८७
आरोनियां पाहे वाट	१५८९
आर्तभूतां द्यावें दान	३६४०
आर्तभूतांप्रति	१३५३
आर्त माझ्या बहु पोटीं	३२३६
आला यांचा भाव देवाचिया	४५२४
आला भागासी तो करीं वेवसाव	१४२०
आलिंगन कंठाकंठीं	२३५६
आलिंगनें घडे	५१
आलिया अतीता ह्मणतसां पुढारें	२४५३
आलिया भोगासी असावें सादर	२३८६
आलिया संसारा उठा वेग करा	३९३३
आलिया संसारीं देखिली पंढरी	४२८६
आलियें धांवति धांवति भेट	४०९
आली लळिताची वेळ	४८४
आली सलगी पायांपाशीं	१२८७
आली सिंहस्थ पर्वणी	२८६०
आलें तें आधीं खाईन भातुकें	१९६१
आलें देवाचिया मना	१६२३
आलें धरायच पेट	२००६
आलें फळ तेव्हां राहलें पिकोन	१२१८
आलें भरा केणें	१०३५
आले संत पाय ठेविती मस्तकीं	२८१२

आले सुरवर नानापक्षी जाले	४३६४
आले हो संसारा तुह्मी एक करा	६२३
आलों उल्लंघुनि दुःखाचे पर्वत	३७६२
आवडी कां ठेवूं	३५२१
आवडीची न पुरे धणी	३७१३
आवडीची सलगी पूजा	३२०९
आवडीचें दान देतो नारायण	२०८३
आवडीचे भेटी निवे	३३४३
आवडीच्या ऐसें जालें	३३२६
आवडीच्या मतें करिती भजन	१२८०
आवडी धरूनि करूं गेलों	३६९२
आवडी धरोनी आलेती आकारा	३८४९
आवडी न पुरे मायबापापासीं	३६९६
आवडी न पुरे सेवितां न सरे	१६९४
आवडीनें धरिलीं नांवें	३०३१
आवडीभोजन प्रकार परवडी	२६३२
आवडी येते कळों	३२६६
आवडीसारिखें संपादिलें सोंग	१६९२
आवडे पंढरी भीमा पांडुरंग	४०७५
आवडेल तैसें तुज आळवीन	३८८८
आवडे सकळां मिष्टान्न	३९४२
आवडें हें रूप गोजिरें सगुण	४०२६
आवल नाम आल्ला बडा लेते	४४०
आविसाचे आसे	३८९७
आशा तृष्णा माया अपमानाचें	१४४१
आशा ते करविते बुद्धीचा लोप	१४०२
आशाबद्ध आह्मी भाकितसों	३७५९
आशाबद्ध जन	६९
आशाबद्ध तो जगाचा दास	१४८९
आशाबद्ध बहु असें निलाजिरें	३५५०
आशाबद्ध वक्ता धाक	६७५
आशाबद्ध वक्ता भय	१४७७
आशा हे समूळ खाणोनी	१४३१
आशीर्वाद तया जाती	४७९
आश्चर्य तें एक जालें	९५५
आश्चर्य या वाटे नसत्या छंदाचे	१३८५
आश्वासावे दास	३७७८
आषाढी निकट	३८०४
आसन शयन भोजन गोविंदें	३१९६
आस निरसली गोविंदाचें	४५२९
आसावलें मन	४४६३
आसुरी स्वभाव निर्दय अंतर	३३७

आहाकटा त्याचे करिती पितर ७५
आहाच तो मोड वाळलियामधीं २५८२
आहांच वाहांच आंत वरी दोन्ही २७
आहारनिद्रे नलगे आदर ३१११
आहा आहा रे भाई ४५१
आहा रे भाई। गंगा नव्हे जळ ४५४
आहा रे भाई। तयावरी ४५३
आहा रे भाई। नमो उदासीन ४५२
आहा रे भाई। प्रथम नमूं ४५०
आहे ऐसा देव वदवावी वाणी ४२०५
आहे तरिं सत्ता ९७९
आहे तें चि आह्मी मागों १२६७
आहे तें चि पुढें पाहों २२२५
आहे तें सकळ कृष्णा चि अर्पण ५४
आहेतें सकळ प्रारब्धा हातीं ३५१७
आहें तैसा आतां आहें ठायीं ३७८६
आहे सकळां वेगळा २९२६
आहो उभा विटेवरी ३३०९
आह्मां अराणूक संवसारा हातीं १९४९
आह्मां अवघें भांडवल १४२१
आह्मां अळंकार मुद्रांचे १६९९
आह्मां आपुलें नावडे संचित ८४४
आह्मां आवडे नाम घेतां २६२०
आह्मां आह्मी आतां वडील १५
आह्मां एकविधा पुण्य २६५३
आह्मां कथा आवश्यक ३५३२
आह्मां कांहीं आह्मां कांहीं ३२८४
आह्मां केलें गुणवंत ३९६५
आह्मां गांजी जन १७३६
आह्मां घरीं एक गाय दुभता हे १५६
आह्मां घरीं धन ३३८५
आह्मां देणें धरा सांगतोतेंकानीं ३८४७
आह्मां निकट वासें १४६
आह्मांपाशीं याचें बळ १२६९
आह्मांपाशीं सरे एक शुद्ध ३३४१
आह्मां बोल लावा ३५२३
आह्मां भय धाक कोणाचा ४०८०
आह्मां भाविकांची जाती ३२५४
आह्मां विष्णुदासांहेंचिभांडवल २८७७
आह्मां वैष्णवांची कुळधर्म ४०२२
आह्मां वैष्णवांचा । नेम २०५३
आह्मां शरणागतां २६०५

आह्मां सर्वभावें हें चि काम १७९९
आह्मासाठी अवतार ५७६
आह्मांसी तों नाहीं आणीक १४३८
आम्हांसी सांगाती ३४९४
आह्मां सुकाळ सुखाचा २७४६
आह्मां सोईरे हरिजन ३१२४
आह्मां हरिच्या दासां कांहीं १६३४
आह्मां हें कवतुक जगा द्यावी ८२८
आह्मां हें चि काम ३९५०
आह्मां हें चि भांडवल २०६९
आह्मां हें सकळ ४०७७
आह्मी असों निश्चितीनें २७८०
आह्मी आइते जेवणार ४०१८
आह्मी आर्तभूत जिवीं २४१६
आह्मी आळीकरें १३४३
आह्मी उतराई १११४
आह्मीं गावें तुह्मीं कोणीं कांहीं १००२
आह्मीं गोवळीं रानटें २२५
आह्मीं घ्यावें तुझें नाम २०५०
आह्मीं जाणावें तें काई २४७०
आह्मीं जाणों तुझा भाव। कैंचा १९८२
आह्मीं जाणों तुझा भाव। दृढ १२२२
आह्मीं जातों आपुल्या गांवा ४४४८
आह्मी जातो तुह्मी कृपा असो १६०१
आह्मीं जालों एकविध २४१५
आह्मी जालों गांवगुंड ४३५
आह्मीं जालों बळिवंत ३४१९
आह्मी ज्याचे दास ३३७०
आह्मी जरी आस ४७
आह्मी तुझ्या दासीं ३१०९
आह्मीं तेणें सुखी १८८६
आह्मी देतों हाका २७४९
आह्मी देव तुह्मी देव २५७९
आह्मी न देखों अवगुणां १६८२
आह्मी नरका जातां ४१५०
आह्मीं नाचों तेणें सुखें २०९४
आह्मीं नामाचे धारक २२९०
आह्मी पतित ह्मणोनि तुज १७९६
आह्मीं पतितांनीं घालावें सांकडें १०६८
आह्मीं पापी तूं पावन ३१८९
आह्मी पाहा कैसीं एकतत्व ३५९३
आह्मी बळकट जालों फिराउनि ९६२

आह्मी बोलों तें तुज कळें	२०१०
आह्मी भाग्याचे भाग्याचे	२९४५
आह्मी भांडों तुजसवें	२२३९
आह्मी भाव जाणों देवा	२०५९
आह्मी भाविकें हे काय जाणों	३६०३
आह्मी मागों ऐसें नाहीं तुजपाशीं	५३१
आह्मी मेलों तेव्हां देह दिला	२९३७
आह्मी याची केली सांडी	१२६८
आह्मी रामाचे राऊत	४२७५
आह्मी विठ्ठलाचे दास जालों	३७९८
आह्मी वीर जुंझार	१४८८
आह्मी वैकुंठवासी	५२०
आह्मी शक्तिहीनें	९६६
आह्मी सदैव सुडके	६०
आह्मी सर्वकाळ	२७०८
आह्मी हरिचे सवंगडे	२२९१
आह्मी हरिचे हरिचे	३९६७
आह्मी ह्मणों कोणी नाहीं तुज	३५१६
आह्मी क्षेत्रींचे संन्यासी	१४८०
आळणीं ऐसें कळों आलें	३१७५
आळवितां कंठ शोकला	१८७७
आळवितां बाळें	१४८४
आळवीन स्वरें	१५४५
आळस आला अंगा	४००५
आळस पाडी विषयकामीं	२९२८
आळिकरा कोठें साहातें	३७७२
आळी करावी ते कळतें बाळका	२५८४
आज्ञा पाळूनियां असें एकसरें	२१८८

इ

इच्छा चाड नाहीं	१८७४
इच्छावें तें जवळी आलें	५७४
इच्छिती तयांसी व्हावें जी	३२५३
इच्छिलें तें शकुनवंती	३१८४
इच्छेचें पाहिलें	१७१९
इच्छेपाशीं आलों	३५९०
इतुलें करीं देवा ऐकें हें वचन	१०१३
इतुलें करीं भलत्या परी	६६१
इंद्रियांचीं दिनें	२४८५
इंद्रावणा केलें	४३००
इंद्रियाचें पुरे कोड	३७५७

इनामाची भरली पेठ ३१४
इंद्रियांसी नेम नाहीं ४१३५
इहलोकीं आह्मां भूषण २९४४
इहलोकींचा हा देहे २५४

उ
उकरडा आधीं अंगीं नरकाडी २७२०
उखतें आयुष्य जायांचें कळिवर २५८८
उगविल्या गुंती १५३८
उगें चि हें मन राहातें निश्चळ ९६१
उंच निंच नेणें कांही भगवंत २८१०
उंच निंच कैसी पाइकाची १०६३
उचित जाणावें मुख्य धर्म आधीं ९००
उचित तें काय जाणावें दुर्बळें ५३०
उचित न कळे इंद्रियाचे ओढी ८८७
उचिताचा काळ ३६६८
उचिताचा दाता २१४७
उचिताचा भाग होतों राखोनियां २७७६
उच्चारूं यासाटीं ३५५७
उजळलें भाग्य आतां ८४३
उजळावया आलों वाटा ३१८
उजळितां उजळे दीपकाची वाती ४२२५
उठाउठीं अभिमान १६२६
उठा भागलेती उजगरा ५०२
उठा सकळ जन उठिले नारायण ४९४
उठोनियां तुका गेला निजस्थळा ५०५
उतरलों पार ७५७
उत्तम घालावें आमुचिये मुखीं १६९८
उत्तम त्या याती २८८०
उदकीं कालवी शेण मलमूत्र २६८१
उदंड शाहाणे होत तर्कवंत ८६९
उदार कृपाळ अनाथांचा नाथ ११२७
उदार कृपाळ पतितपावन ४३७९
उदार कृपाळ सांगसी जना ३३५१
उदार चक्रवर्ती ३७३८
उदार तूं हरी ऐसी कीर्ति २६३६
उदारा कृपाळा अगा देवांच्या २४९१
उदारा कृपाळु पतितपावना २३०१
उदासीनाचा देह ब्रह्मरूप २६४३
उदासीना पावल्या वेगीं २३५४
उद्धत त्या जाती ३५३१

उद्धवअक्रूरासी १७५९
उधाराचा संदेह नाहीं ८६४
उद्वेगाची धांव बैसली आसनीं २५०७
उद्वेगसी बहु फाकती मारग २६८९
उधानु काटीवरी चोपडुची आस ४३३९
उपकारासाटीं बोलों हे उपाय ९४२
उपकारी असे आरोणि उरला १३७२
उपचारासी वांज जालो २१९४
उपजला प्राणी न राहे संसारीं ४३२८
उपजलों मनीं ३९४५
उपजल्या काळें शुभ कां शकुन ३५८४
उपजोनियां पुढती येऊं १६१
उपजोनियां मरे ३३२८
उपजों मरों हे तों आमुची २५६९
उपदेश किती करावा खळासी ३८३१
उपदेश तो भलत्या हातीं २४४
उपाधिवेगळे तुह्मी निर्विकार २२८२
उपाधीचे बीज २१९०
उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा ८०
उपास कराडी २३३५
उपासा सेवटीं अन्नासवें भेटी २६४६
उपेक्षिला येणें कोणी शरणागत १६९१
उंबरांतील कीटका २४६७
उभय भाग्यवंत तरी च समान ४४५१
उभा उभी फळ २१२०
उभा ऐलथडी ३२१२
उभा देखिला भीमातीरीं ६६६
उभा भींवरेच्या तिरीं राहिलाहे ११०५
उभारिला हात ४७७
उभें चंद्रभागे तीरीं २०६८
उभ्या बाजारांत कथा २४७८
उमटती वाणी २३४४
उमटे तें ठायीं २०११
उमा रमा एके सरी ४१८५
उरलें तें भक्तिसुख ३६५७
उरा लावी उर आळंगितां कांता ३०५३
उलंघिली लाज २०५४
उशीर कां केला २८५८
उष्ट्या पत्रावळी करूनियां गोळा १२७९
उसंतिल्या कर्मवाटा ३४७०

ऊ
ऊंस वाढविता वाढली गोडी २२५९

ऋ
ऋण वैर हत्या
ऋणाच्या परिहारा २५२८

ए
एक आतां तुह्मी करा ३५४७
एक एका साह्य करूं २७२२
एक करिती गुरु गुरु १२३१
एक तटस्थ मानसीं ३०९
एक ते गाढव मनुष्याचे वेष ४१९९
एक धरिला चित्तीं २६९८
एक नेणतां नाडलीं ३३३
एकपरि बहिर बरें ३६६६
एक पाहातसां एकांचीं दहनें १५५७
एक प्रेमगुज ऐकें जगजेठी ६७४
एक भाव चित्तीं ७५३
एक मन तुझ्या अवघ्या भांडवला ८८८
एक मागणें हृषीकेशी ६६७
एकमेकीं घेती थडका ४३६५
एकली राणागोविंदा सवें ३७५
एकली वना चालली राना ४३७७
एकल्या नव्हे खेळ चांग १७६६
एकविध आह्मी न धरूं पालट ३१३५
एकविध नारायण ३७२२
एकविध वृत्ति न राहे अंतरीं ३६६१
एकवेळ करीं या दुःखावेगळें ३२३३
एक वेळ प्रायश्चित्त २००५
एक वेळे तरी जाईन माहेरा ४१८३
एक शेरा अन्ना चाड २००५
एक ह्मणती कृष्णा वासिलें ४२२०
एक ह्मणती मुख वासीं नारायणा ४२१९
एका ह्मणे भलें २९०२
एका एक वर्मे लावूनियां अंगीं ३६४७
एकाएकीं आतां असावेंसें वाटे २१६०
एकाएकीं हातोफळी ९२१
एका ऐसें एक होते कोणां २५११
एका गा ए भाई ४३७

एका गावें आह्मीं विठोबाचें १७७२
एका च स्वामीचे पाईक सकळ १०६४
एकाचिया घाट्या टोके १४४६
एकाचिये वेठी ३४६६
एकाचिये सोई कवित्वाचे बांधे ३०२९
एकांचीं उत्तरें ७१९
एका जिवें आतां जिणें जालें दोहीं १७
एकांताचें सुख देईं मज देवा २७६१
एकांतीं लोकांतीं करूं गदारोळ ३२२९
एकादशीव्रत सोमवार न करिती ७२
एकादशीस अन्न पान ३१२
एका पुरुषा दोघी नारी १२३२
एका बीजा केला नास ७६१
एका बोटाची निशाणी २४३८
एका वेळें केलें रितें कलिवर ३४९१
एका हातीं टाळ एका हातीं २६१७
एका ह्मणे भलें २९०२
एकीं असे हेवा ३४२१
एकें घाई खेळतां न पडसी डाईं १९०
एके ठायीं अन्नपाणी ३६७६
एवढा प्रभु भावें तेणें संपुष्टीं ९३४
एवढा संकोच तरि कां व्यालासी १९०६
एवढी अपकीर्ती ३१६५

ऐ

ऐकतों दाट २६६७
ऐक पांडुरंगा एक मात ६५६
ऐक बाई तुज वो कांहीं सांगतें ४४९
ऐक हें सुख होईल दोघांसी १९७७
ऐका ऐका भाविकजन २४५१
ऐका कलीचें हें फळ २९६२
ऐका गा ए अवघे जन २८००
ऐका जी देवा माझी विनवणी ३१४७
ऐका जी संतजन २१८७
ऐका पंडितजन १६१९
ऐका महिमा आवडीचीं २९६
ऐका वचन हें संत १३१९
ऐका संतजन उत्तरें माझे बोबडे २६७२
ऐका हें वचन माझें संतजन २३०२
ऐकिली कीर्त्ति २७१४
ऐकिली मात २७३५

ऐकें पांडुरंगा वचन माझें एक ३६४२
ऐकें रे जना तुझ्या स्वहिताच्या ११३७
ऐकें वचन कमळापती ४८३
ऐकोनियां कीर्ती १९२८
ऐशा भाग्यें जालों २०४१
ऐसा कर घर आवे राम ११५४
ऐसा कोणी नाहीं हें जया नावडे २६७३
ऐसा घेईं कां रे संन्यास २९४२
ऐसा चि तो गोवा ३५१९
ऐसा तंव मोळा ३६५१
ऐसा दुस्तर भवसागर ४१६७
ऐसा माझा आहे भीडमार १००८
ऐसा मी अपार पार नाहीं अंत ४२२२
ऐसा सर्व भाव तुज निरोपिला ४२७२
ऐसा हा लौकिक कदा राखवेना २५९
ऐसिया संपत्ती आह्मां संवसारी १३२०
ऐसी ऐकां अटी ३४१२
ऐसी जिव्हा निकी १३०५
ऐसी जोडी करा राम कंठीं धरा १५३३
ऐसीं ठावीं वर्मे ३३३६
ऐसी ते सांडिली होईल पंढरी १९३८
ऐसी वर्मे आह्मां असोनियां ३७९०
ऐसी वाट पाहे कांहीं १२४८
ऐसी हे गर्जवूं वैखरी ६३५
ऐसेऐसियानें भेटती ते साधु ३४५
ऐसें कलियुगाच्या मुळें ९८७
ऐसें कां जालें तें मज ही न कळे १५००
ऐसें काय उणें जालें तुज देवा ४२५३
ऐसें कां हो न करा कांहीं २६५७
ऐसे कुळीं पुत्र होती १२५७
ऐसे कैसे जाले भोंदू ४२८७
ऐसें कोण पाप बळी ३५५४
ऐसें ठावें नाहीं मूढा ३५००
ऐसे नाना भेष घेउनी हिंडती ३९२५
ऐसे पुढती मिळतां आतां ९०७
ऐसें भाग्य कईं लाहाता होईन २४५८
ऐसे संत जाले कळीं २८४७
ऐसें सत्य माझें येईल अंतरा १६७९
ऐसे सांडुनियां घुरे १३७१

ओ

ॐ तत्सदिति सूत्राचें सार ४४७९
ओनाम्याच्या काळें ७३७
ओले मातीचा भरवसा ४०११
ओलें मूळ भेदी खडकाचें अंग १३९५
ओवाळूं आरती पंढरीराया ५०७
ओस जाल्या दिशा मज ३३५०
ओळखी तयांसी होय एका ४४९६

क
कईं ऐसी दशा येइल माझ्या ३२१८
कइंचें कारण ३७२९
कइं तो दिवस देखेन डोळां ३७४७
कईं देखतां होईन डोळीं ६६८
कईं मात माझे ऐकती कान १२४२
कटावरी कर कासया ठेविले ४३९०
कठिण नारळाचें अंग ३९५५
कंठीं कृष्णमणी ९७
कंठीं धरिला कृष्णमणी १७९
कंठीं नामसिका २९०९
कंठीं राहो नाम ३०३२
कडसणी धरितां अडचणीचा २५०४
कण भुसाच्या आधारें २३६५
कंथा प्रावर्ण १८३२
कथनी पठणी करूनि काय २३४३
कथा करोनियां द्रव्य घेती देती १४६५
कथा करोनियां मोल ज्यापें घेती १४७३
कथाकाळींची मर्यादा सांगतों २३४५
कथा त्रिवेणीसंगम देव भक्त २३४७
कथा दुःख हरी कथा मुक्त करी २१४३
कथा देवाचें ध्यान कथा साधना २३४६
कथा पुराण ऐकतां २०३०
कथा हें भूषण जनामध्यें सार २१००
कथे उभा अंग राखेल जो कोणी २०३२
कथेचा उलंघ १५१७
कथेची सामुग्री ४७२
कथे बैसोनि सादरें ३४५४
कधीं कृपा करिसी नेणें ३५५६
कनकाच्या परियेळीं उजळूनि १५७६
कनवाळ कृपाळ। उदार दयाळ २९९४
कनवाळू कृपाळू भक्तालागीं १७७८
कन्या गो करी कथेचा विकरा १२३

कन्या सासुऱ्यासि जाये	२६६
कपट कांहीं एक	२७२
कब मरूं पाऊं चरन तुह्मारे	११५२
कमोदिनी काय जाणे तो परिमळ	५३३
कर कटावरी तुळसीच्या माळा	५
करणें तें देवा	२८०
करणें ते हें चि करा	३९९९
करणें न करणें वारलें जेथें	३७२८
करवितां व्रत अर्धे पुण्य लाभे	३१२
करविली तैसी केली कटकट	२३३६
करा करा लागपाट	३२८०
करा नारायणा	६०५
कराल तें करा	२५९८
कराल तें काय नव्हे जी विठ्ठला	३२३८
करावा उद्धार किंवा घ्यावी हारी	२३८५
करावा उद्धार हें तुह्मां उचित	२२७२
करावा कांटाळा नव्हे हें उचित	१६६९
करावा कैवाड	२३०३
करावा वर्षाव	३७२०
करावी ते पूजा मनें चि उत्तम	७१
करावें कीर्तन	४१०९
करावें गोमटें	२६५
करावें चिंतन	७१४
करावें तें काम	१६००
करितां कोणाचें ही काज	२०६७
करितां तडातोडी	३१७७
करितां देवार्चन	५९४
करितां या सुखा	२०४२
करितां विचार अवघें एक राज्य	१९७१
करितां विचार तो हा दृढ संसार	२६१४
करितां विचार सांपडलें वर्म	२५६२
करितां वेरझारा	२०१५
करितां होया व्हावें चित्त	२२६६
करिती तया वेवसार आहे	२३६०
करितों कवित्व ह्मणाल हे कोणी	१००१
करिसी कीं न करिसी माझा	१००७
करिसी तें देवा करीं माझें सुखें	५५०
करिसी लाघवे	३४८८
करिसी लाघवें	३११६
करी आणिकांचा अपमान	३७९४
करीं ऐसी धांवाधांवी	३७२१
करीं ऐसें जागें	१०३७

करीं धंदा परी आवडती पाय	२८१३
करीन कोल्हाळ	२१५१
करील आबाळी	१९३०
करी संध्या स्नान	७७४
करीं हें चि काम	१५४८
करुणा बहुत तुझिया अंतरा	३८७८
करूं कवि काय नाहीं आतां	२२१३
करूं जातां सन्निधान	२४०३
करूं तैसें पाठांतर	२५३८
करूनि आरती	५०८
करूनि उचित प्रेम	४८७
करूनि कडविड	३६००
करूनि चाहाडी	१९१८
करूनि चिंतन	३५०१
करूनि जतन	२७४८
करूनि राहों जरी आत्मा चि	२४२१
करूनि विनवणी। माथा	३५५९
करुनियां शुद्ध मन	३३१५
करूनी आइत सत्यभामा मंदिरीं रे	४०१
करूनी विनवणी पायीं ठेवीं	४९५
करूं याची कथा नामाचा गजर	२०१८
करूं स्तुति तरि ते निंदा	३४१७
करोत तपादि साधनें	३६७
करोनि स्नानविधि आणिदेवधर्म	४४०६
कर्कशसंगति	२०७४
कर्म वर्म नव्हती सांग	१३८२
कलयुगामाजी थोर जालें बंड	४१००
कलिधर्म मागें सांगितले संतीं	११२४
कलियुगीं कवित्व करिती पाषांड	७९८
कल्पतरु रुया नव्हती बाभुळा	९८४
कल्पतरूअंगीं इच्छिलें तें फळ	२७१९
कल्पतरूखालीं	२०६१
कल्याण या आशीर्वादें	३२४३
कवण जन्मता कवण जन्मविता	१८२३
कवणदिस येइल कसा	४३२१
कवणा पाषाणासी धरूनि भाव	१७७९
कवणांशीं भांडों कोण माझें	१८७६
कवतुकवाणी बोलतसें लाडें	३६४१
कवतुकवाणें	१८१२
कवळाचिया सुखें	१८०
कवीश्वरांचा तो आह्मांसी विटाळ	१३९०
कंसरायें गर्भ वधियेले सात	१५६८

कस्तुरीचे अंगी भीनली मृत्तिका	२१७६
कस्तुरी भिनली जये मृत्तिके	१७८२
कस्तूरीचें रूप अति हीनवर	२९७४
कहे तुका जग भुला रे	११८०
कहे तुका भला भया	११९६
कहे तुका में सवदा बेचूं	११७७
कळल हे खुण	८९०
कळलें माझा तुज नव्हे रे आठव	३१०७
कळस वाहियेला शिरीं	५१३
कळे न कळे त्या धर्म	३२०१
कळे परि न सुटे गांठी	४०२४
कळेल हें तैसें गाईन मी तुज	२१०९
कळों आला भाव माझा मज	३८११
कळों आलें ऐसें आतां	२६८५
कळों आले तुझें जिणें	३४५५
कळों नये तों चि चुकावितां बरें	३४८७
कळों येतें तरि कां नव्हे	९९८
कळों येतें वर्म	३७४८
काकुलती एकें पाहाती बाहेरी	४५५४
काकुलती येतो हरी	२३५
काखे कडासन आड पडे	२५०
काग बग रिठा मारिले बाळपणीं	१७९७
कांगा किविलवाणा केलों दिनाचा	१२४९
कां गा कोणी न ह्मणे पंढरीची	४०४८
कांगा धर्म केला	१२६५
कां जी आह्मां होतें दोषाचें	३६१६
कां जी तुह्मी ऐसे नव्हा कृपावंत	३६८५
कां जी धरिलें नाम	१४२५
कां जी माझे जीवीं	२४०९
कां जी वाढविलें	२१६२
कांद्यासाटीं जालें ज्ञान	७९२
कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार	८७
कान फाडूनियां मुद्रा ते घालिती	३९२०
कां न वजावें बैसोनि कथे	२८३४
कानीं धरी बोल बहुतांचीं मतें	१४५६
कान्हया रे जगजेठी	२३५१
कान्हो एकली रे एकली रे	४०४
कान्होबा आतां तुह्मी आह्मी	१८१
कान्होबा तूं आलगट	१९७
कापो कोणी माझी मान सुखें	२२३३
काफर सोही आपण बुझे	११८४
काम क्रोध अहंकार नको	३०१५

काम क्रोध आड पडले	४३९८
काम क्रोध आह्मी वाहिले विठ्ठलीं	१६२५
काम क्रोध माझे जीताती शरीरीं	१०५३
कामक्रोध माझे लावियेले	३४३०
काम घातला बांदोडी	२८५
कामधेनूचें वासरूं	४४४९
काम नाहीं काम नाहीं	१३९७
काम सारूनि सकळ	१४७
कामाचा अंकित कांतेतें	४२२४
कां माझा विसर पडिला	१८९९
कां माझे पंढरी न देखती डोळे	१९१०
कामातुर चवी सांडी	८३४
कामातुरा भय लाज ना विचार	१८२१
कामामध्यें काम	३९७९
कामिनीसी जैसा आवडे भ्रतार	४४७८
कामें नेले चित्त नेदी अवलोक	१२५१
कामें पीडिलों माया	१८८
काय आतां आह्मी पोट चि भरावें	९७१
काय आतां यासि ह्मणावें	४५१६
काय आह्मां चाळविसी	४५१३
काय आह्मीं केलें ऐसें	४१७१
काय आह्मीं भक्ति करणें कैसी	६५९
काय उणें आह्मां विठोबाचे पायीं	३४३
काय उणें कां करिशील चोरी	३८६
काय उणें जालें तुज समर्थासि	९१८
काय उणें मज पांडुरंगा पायीं	४०६०
काय उरली ते करूं विनवणी	३६९२
काय एकां जालें ते कां नाहीं	१४९२
काय ऐसा जन्म जावा वांयांविण	१६४४
काय ऐसा सांगा	२१४४
काय ऐसी वेळ	३२६७
काय करावें तें आतां	२७५२
काय करावें म्यां केले ते विचार	१९४८
काय करिती केलीं नित्य पापें	३४०५
काय करील तें नव्हे विश्वंभर	१६४६
काय करूं आतां धरुनियां भीड	४२०८
काय करूं आतां माझिया संचिता	१९७४
काय करूं आतां या मना	४०३३
काय करूं आन दैवतें	९१९
काय करूं कर्माकर्म	९२०
काय करूं जी दातारा	२२०४
काय करूं जीव होतो कासावीस	२५९४

काय करूं पोरा लागली चट ३७०१
काय करूं मज ३५६९
काय करूं सांगतां ही न कळे ३२२३
काय कळे बाळा ३१०
काय काय करितों या मना ६७१
काय काशी करिती गंगा १३७
काय कीर्ति करूं लोक दंभ ११२८
काय कृपेविण घालावें सांकडें ९६७
काय केलें जळचरीं १७१५
काय खावें आतां ६७२
काय जाणें मी पामर पांडुरंगा २२३४
काय जाणों वेद २१२४
काय जालें नेणों माझिया कपाळा १९०५
काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न १७०९
काय तीं करावीं मोलाची ३०६३
काय तुज कैसें जाणवेल देवा ३४२७
काय तुज मागें नाहीं जाणवलें ३५६२
काय तुझा महिमा वर्णूं १५६७
काय तुझी ऐसी वेचते ३८३९
काय तुझी थोरी वर्णूं मी पामर २५४०
काय तुझे उपकार पांडुरंगा १८१६
काय तुझें वेचे मज भेटी देतां १६२१
काय तुमचिया सेवे न वेचते ३५०९
काय तुह्मी जाणां २३२५
काय तें सार्मथ्य न चले १८७१
काय तो विवाद असो भेदाभेद ३१३२
काय त्या दिवस उचिताचा ३६०५
काय दरा करील वन ७०३
काय दिनकरा १०४
काय दिला ठेवा १८८२
काय दिवस गेले अवघे चि ३४५०
काय देवापाशीं उणें २०७१
काय देवें खातां घेतलें २८७९
काय देह घालूं करवती कर्मरी ८५२
काय धर्म नीत १४९८
काय धोविलें कातडें २२६२
काय धोविलें बाहेरी मन २२५८
काय नव्हे करितां तुज ७३९
काय नव्हे केलें ७६६
काय नव्हेसी तूं एक २१६१
काय नाहीं माझे अंतरीं ३२२०
काय नाहीं माता गौरवीत २८२४

काय नाहीं लवत झाडें ८९४
काय नेणों होता दावेदार मेला ५६७
काय न्यून आहे सांगा ४१६१
काय पाठविलें १९५७
काय पाहतोसी कृपेच्या सागरा ४४१७
काय पुण्य ऐसें आहे मजपाशीं २९३५
काय पुण्यराशी १५०७
काय पोरें जालीं फार १९११
काय फार जरी जालों मी ४०६५
काय बा करिशी सोंवळें ४३०९
काय बोलों सांगा २५८१
काय मज एवढा भार ३२२६
काय मागावें कवणासी ३३६९
काय मागें आह्मी गुतलों ४२४५
काय माझा पण होईल लटिका २५४८
काय माझी संत पाहाती जाणीव १६८४
काय माजें नेती वाईट ह्मणोन २८७०
काय माता विसरे बाळा १६६७
काय मी अन्यायी तें घाला २६७४
काय मी उद्धार पावेन ६१९
काय मी जाणता २३११
काय म्यां मानावें हरिकथेचें फळ ५५८
काय या संतांचे मानूं उपकार १७८
काय लवण कळिकेविण २९१६
काय वांचोनियां जालों भूमिभार ३९१५
काय वाणूं आतां न पुरे हे वाणी १५०५
काय विनवावें कोणें तो ३५४८
काय विरक्ती कळे आह्मां ८६५
काय वृंदावन मोहियेलें ३२६०
काय शरीरापें काम १४१०
काय सर्प खातो अन्न २०१९
काय सांगों या संतांचे ३६४४
काय सांगों तुझ्या चरणांच्या ५३४
काय सांगो हृषीकेशा २९९६
काय साधनाच्या कोटी ४१११
काय साहतोसी फुका २२४०
काय सुख आहे वाउगें बोलतां ३९०१
काय ह्याचें घ्यावें १३०३
काय ज्ञानेश्वरीं उणें २३१२
काया वाचा मन ठेविलें १००६
कायावाचा मनें जाला विष्णुदास २७४२
काया वाचा मनें श्रीमुखाची २६२३

कारणापें असतां दृष्टी ३७०२
कां रे गमाविल्या गाई १७७
कां रे तुह्मी ठेवा बहुतां ३१९५
कां रे तुह्मी निर्मळ हरिगुण ३४५९
कां रे दाटोन होतां वेडे ४३७४
कां रे दास होसी संसाराचा खर ११३९
कां रे न पवसी धांवण्या २८०४
कां रे न भजसी हरी ३५४५
कां रे नाठविसी कृपाळु देवासी २३००
कां रे पुंड्या मातलासी ३८२९
कां रे पुंड्या...वस्ति ४३८१
कां रे माझा तुज न ये कळवळा ५४३
कां रे माझी पोरें ह्मणसील ढोरें २८१४
कार्तिकीचा सोहळा ३३१
कार्य चि कारण ३२१४
कालवूनि विष २३६४
काल्याचिये आसे २०८
कावळियासी नाहीं दया उपकार २३९२
कावळ्याच्या गळां ३८१८
काशासाटीं आह्मी जाळीला ३१८५
काशासाठीं बैसों करूनियां हाट २२२०
काशीयात्रा पांच द्वारकेच्या ४४०४
कास घालोनी बळकट ५१९
कासया करावे तपाचे डोंगर २४५९
कासया गा मज घातलें संसारीं २८३८
कासया गुणदोष पाहों २०२५
कासया जी ऐसा माझे माथां २८२०
कासया या लोभें केलें आर्तभूत २५४७
कासया लागला यासी ३३८७
कासया वांचूनि जालों ३४३३
कासयासि व्यर्थ घातलें ४४०९
कासया व्हावें जीतांचि ४०७४
कासया हो माझा राखिला ३५५३
कासियानें पूजा करूं केशीराजा १७२३
कासिया पाषाण पूजिती २८१७
कांहीं एक तरी असावा आधार ३६५३
कांहीं च न लगे आदि अवसान २२२९
कांहीं च मी नव्हे कोणीये ५५६
कांहीं चिंता कोणा नाहीं ४५७६
कांहीं चिंतेविण १९१२
कांहीं जडभारी २१२९
कांहीं जाणों नये पांडुरंगाविण १३३८

कांहीं दुसरा विचार ४००२
कांहीं न मागती देवा २०९२
कांहीं न मागे कोणांसी २७८३
कांहीं नित्यनेमाविण १२२
कांहीं बोलिलों बोबडें १९८३
कांहीं मागणें हें आह्मां अनुचित २२२२
कांहीं माझे कळों आले गुणदोष १९००
कांहीं विपत्ति अपत्यां ३००१
काहे भुला धनसंपत्तीघोर ११६१
काहे रोवे आगले मरना ११६२
काहे लकडा घांस कटावे ३४९६
कां हो आलें नेणों भागा २७११
कां हो एथें काळ आला आह्मां ८५१
कां होती कां होती ३५८
कां हो तुह्मी माझी वदविली १७६८
कां हो देवा कांहीं न बोला ५२९
कां हो पांडुरंगा न करा धांवणें ३८१७
कां हो माझा मानियेला भार ६३८
कांहो वाढवितां देवा ३६४९
काळ जवळि च उभा नेणां २०२६
काळतोंडा सुना २११३
काळयाचे मागें चेंडू ४५२५
काळ सारावा चिंतनें ९८०
काळ सार्थक केला त्यांणीं ४४४७
काळा च सारिखीं वाहाती ३५०२
काळाचिया सत्ता ते नाहीं १४६२
काळाचे ही काळ १७३८
काळावरि घालूं तरि तो सरिसा २२७४
काळावरी सत्ता ३७१५
काळिया नाथूनी आला वरी २३९
काळें खादला हा अवघा आकार ५४१
काळोखी खाऊन कैवाड केला १८३६
किडा अन्नाचें मानुस ४३२६
किती उपदेश करावा खळासी ४२५९
किती एका दिसीं ४१६१
किती करूं शोक १९२९
किती चौघाचारें ३४७४
किती तुजपाशीं देऊं परिहार २१३५
किती या काळाचा सोसावा १४३५
किती रांडवडे ३२५६
किती लाजिरवाणा ३९६१
किती विवंचना करीतसें जीवीं २५२०

किती वेळां खादला दगा १७०२
कितीवेळां जन्मा यावें ३२६८
किती सांगों तरि नाइकति ४३३८
किती सोसिती करंटीं ३७६३
कीर्तन ऐकावया भुलले श्रवण २२४९
कीर्तन चांग कीर्तन चांग १३९९
कीर्तनाची गोडी १००५
कीर्तनाचा विकरा मातेचें गमन ४३८७
कीर्तनाच्या सुखें सुखी होय देव ३९०२
कींविलवाणा जाला आतां ४२३९
कुंकवाची ठेवाठेवी ४०१६
कुचराचे श्रवण १२९७
कुटल्याविण नव्हे मांडा ९९७
कुटुंबाचा केला त्याग २५१
कुतऱ्या ऐसें ज्याचें जिणें २१९२
कुंभ अवघा एक आवा २८७
कुंभपाक लागे तयासि भोगणें ४५०३
कुरंगीपाडस चुकलेंसे वनीं ४३५९
कुरुवंडी करीन काया ३९६२
कुशळ गुंतले निषेधा ९१२
कुशळ वक्ता नव्हे जाणीव श्रोता १४६१
कुळधर्म ज्ञान कुळधर्म साधन १०२०
कुळींची हे कुळदेवी २५६३
कुळींचें दैवत ज्याचें पंढरीनाथ १७५०
कृपा करावी भगवंतें ५१७
कृपा करुनी देवा ३२२
कृपावंत किती ७४७
कृपावंता कोप न धरावा चित्तीं १८५२
कृपावंता दुजें नाहीं तुह्मां पोटीं २१३९
कृपावंतें हाक दिली सकळिकां ४५४४
कृपाळू भक्तांचा ४९०
कृपाळू सज्जन २२४६
कृपाळू ह्मणोनि बोलती पुराणें १२४०
कृपेचा ओलावा १६६५
कृपेचें उत्तर देवाचा प्रसाद १४७०
कृपेचे सागर हे चि साधुजन ४११३
कृष्ण गाता गीतीं कृष्ण ध्यातां १८२९
कृष्ण गोकुळीं जन्मला १७३
कृष्ण माझी माता कृष्ण माझा ५१६
कृष्णरामनाम मांडीं पां वोळी १५२७
कृष्ण हा परिचारी कृष्ण हा ४४९८
कृष्णाचिया सुखें भुक नाहीं ४५५०

कृष्णांजनें जाले सोज्वळ लोचन	८३५
केला अंगीकार पंढरीच्या देवें	४९१
केला कैवाड संतांच्या आधारें	२५६०
केला तैसा अंगिकार	३२५१
केला पण सांडी	२०१२
केला पुढें हरी अस्तमाना दिसा	४५०७
केला मातीचा पशुपति	२६२
केला रावणाचा वध	१०९८
केलियाचें दान	३३४४
केली कटकट गाऊं नाचों नेणतां	५१२
केली प्रज्ञा मनाशीं	३०४८
केली सलगी तोंडपिटी	२७५३
केली सीताशुद्धी	२८४
केली हार्णाळां अंघोळी	३०२६
केलें तरी आतां साच चि करावें	३७०९
केलें नाहीं मनीं तया घडे त्याग	१६८७
केलें पाप जेणें दिलें आन्मोदन	१११५
केलें शकुनें प्रयाण	३१७४
केल्यापुरती आळी	२२१६
केवढा तो अहंकार	३६७२
कैंचा मज धीर	१९२१
कैंचें भांडवल खरा	३५१४
कैवल्याच्या तुह्मां घरीं	९२३
कैं वाहावें जीवन	२८०९
कैसा कृपाळु हें न कळसी देवा	१८५०
कैसा तीं देखिला होसील	२५४६
कैसा सिंदळीचा	३५०
कैसा होतो कृपावंत	३३३४
कैसी करूं आतां सांग तुझी	३९१६
कैसी करूं तुझी सेवा	४४०१
कैंसीं दिसों बरीं	३६१३
कैसे असोनि ठाउकें नेणां	१२५९
कैसें करूं ध्यान कैसा पाहों तुज	६९९
कैसें भलें देवा अनुभवा का नये	३५९७
कोटिजन्म पुण्यसाधन साधिलें	४३२७
कोठें आतां आह्मी वेचावी हे	३५९१
कोठें गुंतलासी कोणांच्या धांवया	१६११
कोठें गुंतलासी द्वारकेच्या राया	१६१०
कोठें गुंतलासी योगीचांचे ध्यानीं	३९८१
कोठें देवा आलें अंगा थोरपण	९९४
कोठें देवा बोलों	३६०४
कोठें नाहीं अधिकार	१४४७

कोठें भोग उरला आतां	१२७१
कोठें मी तुझा धरूं गेलें संग	३९७
कोड आवडीचें	३९८३
कोडियाचे गोरेपण	४३५४
कोंडिला गे माज	२९७०
कोडें रे कोडें ऐका हें कोडें	१४१
कोण आतां कळिकाळा	२६१९
कोण आमचीं योगतपें	४०२०
कोण आह्मां पुसे सिणलें भागलें	१०२७
कोण उपाव करूं भेटावया	४४१३
कोण घरा येतें आमुच्या काशाला	५७२
कोण जाणे कोणा घडे उपासना	५६१
कोणतें कारण राहिले यामुळें	६८१
कोण त्याचा पार पावला धुंडितां	६९१
कोण दुजें हरी सीण	२७४०
कोण पर्वकाळ पहासील तीथ	५२८
कोण पुण्य कोणा गाठीं	२५१८
कोण या पुरुषार्थाची गती	३०२४
कोण येथें रिता गेला	३७५६
कोण वेची वाणी	२९२९
कोण सांगायास	६८९
कोण साक्षीविण	३७४४
कोण सुख धरोनि संसारीं	६२८
कोण होईल आतां संसारपांगिलें	२६०४
कोणा चिंता आड	२८९४
कोणाचिया न पडों छंदा	३२३२
कोणाचें चिंतन करूं ऐशा काळें	३६८४
कोणाच्या आधारें करूं मी विचार	९१७
कोणापाशीं आतां सांगों मी	२६५१
कोणापाशीं द्यावें माप	२५७६
कोणा पुण्य यांचा होईन सेवक	१३७३
कोणा पुण्या फळ	२७६७
कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात	१८९८
कोणाशीं विचार करावा सेवटीं	३१८१
कोणा ही केंडावें हा आह्मां	४०५८
कोणी एकाचिया	४२५६
कोणी एकी भुलली नारी	४००
कोणी निंदा कोणी वंदा	४२८८
कोणी सुना कोणी लेंकी	२३५७
कोणे गांवीं आहे सांगा हा	३०२८
कोणें तुझा सांग केला अंगीकार	२९७
कोण्या काळें येईल मना	२५९२

कोपोनियां पिता बोले प्रल्हादासी	३०८५
कोरडिया ऐशा सारून गोष्टी	३४९९
कोरडिया गोष्टी नावडती मना	४४३४
कोरड्या गोठी चटक्या बोल	१४०७
कौडीकौडीसाटीं फोडिताति	३९२१
कौतुकाची सृष्टी	१३५७
कौलें भरियेली पेंठ	२६१२
क्या कहुं नहीं बुझत लोका	११५१
क्या गाऊं कोई सुननवाला	११४६
क्या मेरे राम कवन सुख सारा	११६३
क्याला मज आयो वारितेसी घरा	४०५
क्रियामतिहीन	७५८

ख

खडा रवाळी साकर	१९८१
खद्योतें फुलविलें रविपुढें ढुंग	३७६०
खरें नानवट निक्षेपीचें जुनें	८७७
खरें बोले तरी	१४२६
खरें भांडवल सांपडलें गांठी	८८४
खळा सदा क्षुद्रीं दृष्टी	२६०७
खादलें च खावें वाटे	३६२३
खावें ल्यावें द्यावें	१८९१
खिस्तीचा उदीम ब्राह्मण	३९०६
खुंटोनियां दोरी आपणियांपाशीं	२७९२
खेचर खडतर	४१९
खेळतां न भ्यावें समर्थाच्या	३१५१
खेळतां मुरारी जाय सरोवरा तिरीं	३९४
खेळतों ते खेळ पायाच्या प्रसादें	३१५७
खेळ नव्हे बरा इंद्र कोपलिया	४५३५
खेळ मांडियेला वाळवंटीं घाईं	१८९
खेळीमेळीं आले घरा गोपीनाथ	४५१५
खेळों मनासवें जीवाच्या संवादें	३६६७
खेळों लागलों सुरकवडी	१०७७
खोंकरी आधन होय पाकसिद्धि	४०३९
खोट्याचा विकरा	२१६९
खोल ओले पडे तें पीक उत्तम	३४८३

ग

गंगा आली आह्मांवरी	२७४४
गंगा गेली सिंधुपाशीं	४३४८

गंगाजळा पाहीं पाठी पोट नाहीं	१७९०
गंगा न देखे विटाळ	१३००
गंगेचिया अंताविण काय चाड	८७८
गजइंद्र पशु आप्तें मोकलिला	२४४५
गजेंद्र तो हस्ती सहस्र वरुषें	३०७७
गडी गेले रडी	१६८
गणेश सारजा करिती गायना	४४३५
गति अधोगति मनाची युक्ति	१११८
गंधर्व अग्नि सोम भोगिती	२५७
गंधर्वनगरीं क्षण एक राहावें	४२४३
गयाळाचें काम हिताचा आवारा	२२०९
गरुडाचें वारिकें कासे पीतांबर	६
गरुडावरि बैसोनि येतो जगजेठी	४०५२
गर्जत जावें नामावळी	३२७२
गर्भाचें धारण	३५२
गर्भी असतां बाळा	२०३८
गव्हांच्या घुगऱ्या	४४२८
गव्हाराचें ज्ञान अवघा रजोगुण	४२०२
गहूं एकजातीं	३२५
गळित जाली काया	४७३
गाई गोपाळ यमुनेचे तटीं	३९६
गाईन ओंविया पंढरिचा देव	४४८२
गाईन ते लीळा चरित्र पवाडे	४१२
गाऊं नेणें परी	२८४३
गाऊं नेणें कळाकुसरी	२९४६
गाऊं वाऊं टाळी रंगीं नाचों	४८८
गाऊं वाणूं तुज विठो तुझा करूं	१५७९
गाजराची पुंगी	२८४४
गांठोळीस धन भाकावी करुणा	१२५८
गाढव शृंगारिलें कोडें	३९४०
गाढवाचें अंगीं चंदनाची उटी	१०५०
गाढवाचे घोडे	७७१
गाढवाचे तानें	९८२
गातां आइकतां कांटाळा जो	१७२४
गाती ओंव्या कामें करितां	४५७५
गातों नाचतों आनदें	३३९४
गातों भाव नाहीं अंगीं	५९८
गातों वासुदेव मी ऐका	४३०
गाबाळाचे ग्रंथीं कां रे पडां सदा	३९९५
गायत्री विकोन पोट जे जाळिती	३०५५
गायनाचे रंगीं	६८७
गायें नाचें वायें टाळी	१५०९

गावलोकिकांहीं लावियेलें पिसें	४१५७
गावें ह्मणउनि गीत	८८९
गासी तरि एक विठ्ठल चि गाईं	१४३६
गुणा आला ईटेवरी	४१७३
गुणांचा चि सांटा	३७०५
गुणांचे आवडी वाचेचा पसरु	३२८८
गुरुकृपे मज बोलविलें देवें	१९८०
गुरुचिया मुखें होईल ब्रह्मज्ञान	४३८४
गुरुपादाग्रींचें जळ	३०९५
गुरुमार्गामुळें भ्रष्ट सर्वकाळ	२९६३
गुरुशिष्यपण	२७८७
गुळ सांडुनि	४२४८
गुळें माखोनियां दगड ठेविला	४०८६
गेला कोठें होता कोठुनियां	४५८१
गेली वीरसरी	९५
गेले टळले पाहार तीन	४३१
गेले पळाले दिवस रोज	२८०२
गोकुळींची गती कोण जाणे परि	४५५५
गोकुळींच्या सुखा	२८२९
गोड जालें पोट धालें	१२४४
गोड नांवें क्षीर	१४७४
गोड लागे परी सांगतां चि न ये	३९८
गोडीपणें जैसा गुळ	५८१
गोणी आली घरा	५६८
गोदे कांठीं होता आड	२५३३
गोपाळ प्रीतीनें कैसे विनविती	४२१६
गोपाळ ह्मणती कान्होबा या रे	२०९
गोपाळां उभडु नावरे दुःखाचा	४५२०
गोपाळांचें कैसें केलें समाधान	४२२१
गोपीचंदन मुद्रा धरणें	४२३४
गोमट्या बीजाचीं फळें ही गोमटीं	३४८४
गोरस घेउनी सातें निघाल्या	३८९
गोविंद गोविंद मना लागलिया	२३१७
गोविंद भ्रतार गोविंद मुळहारी	४५००
गोविंदाचें नाम गोड घेतां वाचे	४५५७
गोविंदावांचोनि वदे ज्याची वाणी	२१९१
गोहो यावा गांवा	३०७०
गौरव गौरवापुरतें	५८६
गौळणी आल्या वाज	४०८
गौळणी बांधिती धारणासि गळा	२२१
गौळीयाची ताकपिरें	१००
ग्रंथाचे अर्थ नेणती हे खळ	२७४१

ग्रासोग्रासीं भाव ४४७७

घ
घटीं अलिप्त असे रवि १५२१
घडिया घालुनि तळीं चालती ४९६
घरीं रांडा पोरें मरती उपवासी १२६
घरोघरीं अवघें जालें ब्रह्मज्ञान १२८३
घरोघरीं बहु जाले कवि १४६३
घातला दुकान । देती २६२८
घातला दुकान । पढीये १७४१
घालिती पव्हया ३११७
घाली कवाड टळली वाड राती ३८७
घालूनियां कास ३५७५
घालूनियां ज्योती १९५४
घालूनियां भार राहिलों निश्चितीं ३७०
घालूनियां मध्यावर्ती ४१५२
घालूनियां मापीं २४६६
घालूनि लोळणी पडिलों अंगणीं ३६५५
घेईन मी जन्म याजसाटीं देवा १७८६
घेईं माझे वाचे ७५०
घेऊं नये तैसें दान ४२४०
घेऊनियां चक्र गदा ११५
घेतां आणिकांचा जीव ३९६४
घेती पाण्यासी हुंबरी १८४
घेसी तरी घेई संताची हे भेटी १२३५
घोंगडियांचा पालट केला १०७६
घोंगडियांची एकी राशी १०७८
घोंगडियास घातली मिठी १०८२
घोंगडें नेलें सांगों मी कोणा १०८५
घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं १५८४
घ्या रे भाई प्या रे भाई ३२८५
घ्या रे भोंकरें भाकरी २०७
घ्या रे लुटी प्रेम सुख ३८०८
घ्यावी तरी घ्यावी उदंड २५९३

च
चक्रफेरीं गळीं गळा ३५८१
चंचळीं चंचळ निश्चळीं निश्चळ ३२६५
चतुर मी जालों आपुल्या भोंवता ९९५
चंदन तो चंदनपणें २६५५

चंदनाचे गांवीं सर्पांच्या वसति	१७५३
चंदनाचे हात पाय ही चंदन	२९०
चंदनाच्या वासें धरितील नाक	९१४
चरणाचा महिमा	२८०७
चरणीं नमन सद्‌गुरूच्या पूर्ण	४३१७
चरफडें चरफड शोकें शोक होये	२९८१
चला आळंदीला जाऊं	४३१६
चला जाऊं रे सामोरे	१५९४
चला पंढरीसी जाऊं	१७००
चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं	२११
चला वळूं गाई दूर	४३६६
चला वळूं गाई। बैसों	१९९
चवदा भुवनें जयाचिये पोटीं	२६१
चवदा भुवनें लोक तिन्हीं दाढे	३०२३
चहूं आश्रमांचे धर्म	७२५
चहूंकडूनियां येती ते कलोळ	४२१४
चाकरीवांचून	२२०२
चांगला तरी पूर्णकाम	६५८
चांगलें नाम गोमटें रूप	६५७
चाड अनन्याची धरी नारायण	४४९०
चातुर्याच्या अनंतकळा	२१७१
चारी वेद जयासाटीं	२४४६
चारी वेद ज्याची...प्रत्यक्ष	४५८३
चारी वेद ज्याची...बांधवी	४४८९
चाल केलासी मोकळा	१३४
चाल घरा उभा राहें नारायणा	३४३५
चाल माझ्या राघो	४६४
चालवणें काय	३३२५
चालावा पंथ तो पाविजे	८९३
चालिती आडवाटा	१७४९
चालिलें न वाटे	२६१३
चालिले सोबती	३४१३
चालें दंडवत घालीं नारायणा	३५६६
चाले हें शरीर कोणाचिये सत्ते	३९१३
चावळलें काय न करी बडबड	२२००
चाहाडाची माता	१९६८
चिंतनाची जोडी	३७१२
चिंतनासी न लगे वेळ	१४४४
चिंतनें अचिंत राहिलों निश्चळ	९४८
चिंतनें सरे तो धन्य	१४४२
चिंतले पावली	४५७२
चितसुं चित जब मिले	११८९

चित मिले तो सब मिले	११९०
चिंता ते पळाली गोकुळाबाहेरी	४४८६
चिंता नाहीं गांवीं विष्णुदासांचिये	२३५९
चिंतामणिदेवा गणपतीसी आणा	२८७३
चिंतिलें तें मनिचें जाणे	८६३
चित्त गुंतलें प्रपंचें	४१६२
चित्त ग्वाही तेथें लौकिकाचें काई	९४५
चित्त घेऊनियां तूं काय देसी	२२५२
चित्त तुझ्या पायीं	१७९५
चित्त तें चिंतन कल्पनेची धांव	३२७५
चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती	१७४५
चित्त समाधानें	६३
चित्ता ऐसी नको देऊं आठवण	२५१७
चित्ताचा चाळक	३१७६
चित्ताचें बांधलें जवळी तें वसे	३१२७
चित्ता मिळे त्याचा संग रुचिकर	४०८२
चित्तीं तुझे पाय डोळां रूपाचें	४१२७
चित्तीं धरीन मी पाऊलें सुकुमार	१०२३
चित्तीं नाहीं आस	२०७३
चित्तीं नाहीं तें जवळीं असोनि	१३६
चित्तीं बैसलें चिंतन	३३३७
चिन्हे उमटताती अंगीं	१५८८
चिरगुटे घालूनि वाढविलें पोट	३०६१
चुकलिया आह्मां करितसां दंड	१८५१
चुकलिया ताळा	२७४७
चुकली ते वाट	३७४६
चुकलों या ऐशा वर्मा	३५३५
चुंबळीचा करी चुंबळीशीं संग	२४६
चुराचुराकर माखन खाया	११४९
चोर टेंकाचे निघाले चोरी	१०४८
चोरटें सुनें मारिलें टाळे	१०४४
चोराचिया धुडका मनी	२७०१
चोरासी चांदणें वेश्येसी सेजार	४१०३
चोरें चोरातें करावा उपदेश	१२०
चौक भरियेला आसनीं पाचारिली	४१३

छ

छळी विष्णुदासा कोणी	३०३
छोडे धन मंदिर बन बसाया	११४७

ज

जग अमंगळ	३१८७
जग अवघें देव	१३३३
जग ऐसें बहुनांवें	२६०८
जग चले उस वाट कोन जाय	११५७
जग जोगी जग जोगी	४३६
जग तरि आह्मां देव	१२९८
जगदेश जगदेश तुज ह्मणती	१५६५
जगा काळ खाय	२०६३
जगाचा हा बाप दाखविलें	४४९५
जगीं ऐसा बाप व्हावा	३०६६
जगीं कीर्ति व्हावी	४०९५
जगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार	३९०७
जगीं मान्य केलें हा तुझा देकार	२९६९
जडलों अंगाअंगीं	९६५
जडलों तों आतां पायीं	३७१४
जतन करीन जीवें	९३३
जन तरी देखें गुंतलें प्रपंचें	१२७५
जन देव तरी पायांचि पडावें	१०७२
जननिया बाळका रे घातलें	२४७७
जननी हे जाणे बाळकाचे वर्म	८१३
जननी हे म्हणे आहा काय जालें	४५३०
जन पूजी याचा मज कां आभार	१८५४
जन मानविलें वरी बाह्यात्कारीं	१०५२
जन विजन जालें आह्मां	४९
जन हें सुखाचे दिल्याघेतल्याचें	२९५६
जनाचिया मना जावें कासियेसी	४२९५
जनीं जनार्दन ऐकतों हे मात	११३१
जन्ममरणांची कायसी चिंता	३९७५
जन्ममरणांची विसरलों चिंता	२६३५
जन्म मृत्यु फार जाले माझ्या	३९२९
जन्मा आलिया गेलिया परी	४६५
जन्मा आलियाचा लाभ	३७५१
जन्मा आलों त्याचे	१५०६
जन्मांतरिंचा परिट न्हावी	२३७१
जन्मांतरीं शुद्ध नाहीं आचरण	३१९२
जन्मा येऊन उदार जाला	१७३९
जन्मा येऊन काय केलें	२२४४
जन्मा येऊनि कां रे निदसुरा	२२६१
जन्मा येऊनि तया लाभ जाला	३४४९
जन्मा येणें घडे पातकाचे मूळें	२८६८
जन्मोजन्मींची संगत	४०६३

जन्मोजन्मी दास ४०४७
जप करितां राग ५५५
जप तप ध्यान न लगे धारणा २९१९
जपाचें निमित्त झोपेचा पसरु ३१९८
जयजय ह्मणा राम ४४५९
जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ २३३०
जयाचिये वाचे नये हा विठ्ठल १४३७
जया दोषां परीहार ३३२
जया नाहीं नेम एकादशीव्रत ५९
जयापासोनि सकळ २९२४
जया शिरीं कारभार २७२१
जयासी नावडे वैष्णवांचा संग ३८५६
जये ठायीं आवडी ठेली ३१५४
जयेवेळीं चोरूनियां नेलीं वत्सें ४५०२
जरा कर्णमूळीं सांगों आली २६७६
जरि न भरे पोट ३९३८
जरी आलें राज्य मोळविक्या २६०३
जरी तुझा मज नसता आधार ४२६८
जरी माझी कोणी कापितील मान ५४९
जरी मी नव्हतों पतित ७५२
जरि हा हो कृपा करिल नारायण ४०६९
जरी हे आड येती लाज ३२४६
जंव नाहीं देखिली पंढरी ८०६
जंव हें सकळ सिद्ध आहे ६५५
जवळीं नाहीं चित्त २०३४
जळती कीर्तनें २३४९
जवळी मुखापाशी ८३९
जळातें संचित १२३३
जळालें तें बाह्य सोंग ३१२६
जळे माझी काया लागला १३१३
जळों अगी पडो खान २६७९
जळो आतां नांव रूप १४०३
जळो जळो ते गुरुपण ४४२३
जळोत तीं येथें उपजविती १२५२
जळो ते जाणींव जळो ते ३७९५
जळो त्यांचें तोंड १६१४
जळो प्रेमा तैसा रंग ९८५
जळो माझी ऐसी बुद्धी ९९१
जळो माझें कर्म वांयां केली १२५०
जाऊं देवाचिया गांवां १८६५
जाऊनियां तीर्था काय तुवां केलें १७२६
जागा घरटी फिरे तस्कराची ४१२५

जाणतें लेंकरूं	२४५६
जाणतों समये	३१४४
जाणपण बरें देवाचे शिरीं	१३२६
जाणवलें इंद्रा चरित्र सकळ	४५३९
जाणसी उचित	२९३१
जाणावें तें काय नेणावें तें काय	१०१५
जाणावें तें सार	२०७६
जाणिवेच्या भारें चेंपला ऊर	३४८१
जाणे अंतरिंचा भाव	२०९३
जाणे त्याचें वर्म नेणे त्याचें कर्म	२९५०
जाणे भक्तीचा जिव्हाळा	७३०
जाणे वर्तमान	१७४०
जाणोनि अंतर	१८८०
जाणोनि नेणतें करीं माझें मन	२९५७
जाणों नेणों काय	३९५२
जातां पंढरीच्या मार्गें	४०६६
जातिविजातीची व्हावयासि भेटी	१३६६
जातीचा पाईक ओळखे पाइका	१०६६
जातीचा ब्राह्मण	३९४८
जातीची शिंदळी	२८४८
जातीचे तें चढे प्रेम	१५६०
जाती पंढरीस	१६०५
जातो न येतिया वाटा	८९१
जातो वाराणसी	५१८
जाय जाय तूं पंढरी	३०६५
जाय तिकडे लागे पाठीं	१६५४
जाय परतें काय आणिला	१८३७
जाय फाकोनियां निवडितां गाई	४५०८
जायांचें अंगुलें लेतां नाहीं मान	१८४७
जायाचे अळंकार	२३६३
जायाचें शरीर जाईल क्षणांत	३८९८
जा रे तुह्मी पंढरपुरा	३२७१
जाला कवतुक करितां रोकडें	४५३४
जाला प्रेतरूप शरीराचा भाव	२६५८
जालासि पंडित पुराण सांगसी	४३६९
जाला हा डांगोरा	३४७३
जालिया दर्शन	३२९१
जाली गाढवी दुधाळ	४४०३
जाली झडपणी खडतर देंवता	४२१
जाली तडातोडी	९७५
जाली पाकसिद्धि वाट पाहे	४९३
जाली हरिकथा रंग वोरसला	४०५४

जाली होती काया	२४९२
जाले आतां सांटे	३४१५
जालें पीक आह्मांअवघासुकाळ	१९९०
जालें भांडवल	२८८८
जालें रामराज्य काय उणें	११०१
जालें समाधान	२५१२
जालों आतां एके ठायीं	२१५
जालों आतां दास। माझी	४१७६
जालों आतां दास। माझे	१६४१
जालों जीवासी उदार	३९४९
जालों तंव साचें	२५०२
जालों द्वारपाळ	२०५६
जालों निर्भर मानसीं	२०९५
जालों बळिवंत	४२४६
जालों स्वयें कृष्ण आठव हा	४५६४
जालों ह्मणती त्याचें मज वाटे	२८६६
जावें बाहेरी हा नाठवे विचार	४५५१
जाळा तुह्मीं माझें जाणतें मीपण	१२१३
जाळें घातलें सागरीं	३९५३
जिकडे जाय तिकडे सवें	३३१७
जिकडे पाहें तिकडे उभा	४४४५
जिकडे पाहे तिकडे देव	३३१६
जिंकावा संसार	३१०१
जिचें पीडे बाळ	१७३३
जिव्हा जाणे फिकें मधुर कीं क्षार	२९१३
जिव्हे जाला चळ	३०६९
जिहीं तुझी कास	४२६५
जीव खादला देवत	१०४०
जीव जायवरी सांडी करी माता	९६९
जीव जीती जीवना संगें	२३६९
जीव तो चि देव भोजन ते	१४३९
जीवन उपाय	२६७१
जीवन हे मुक्त नर जाले पावन	९०१
जीवनावांचूनि तळमळी मासा	१०२५
जीवभाव त्याचा गेला अभिमान	४५६३
जीवशिवाच्या मांडूनि हाला	१७१
जीवाचें जीवन अमृताची तनु	१६८५
जीविता तो माझा पिता	३६७०
जीवित्व तें किती	१३४६
जीवींचा जिव्हाळा	१०४१
जीवींचें कां नेणां	३३१२
जीवींचें जाणावें या नांवें आवडी	८३३

जीवें जीव नेणे पापी सारिका ४१५८
जीवेंसाटीं यत्नभाव ४७८
जीवें व्हावें साटी १८१०
जुंझायाच्या गोष्टी ऐकतां चि ३८६०
जुंझार ते एक विष्णुदास जगीं १४९३
जुनाट हें धन अंत नाहीं पार ४३५३
जें का रंजलें गांजलें ३४७
जे केली आळी ३३५२
जे गाती अखंड विठ्ठलाचे गीत ३१३१
जेजे आळी केली ३८७५
जें जें कांहीं करितों देवा ६९२
जें जें कांहीं मज होईल वासना ३९१५
जें जें केलें तें तें साहे ३६३५
जें जें जेथें पावे ७१५
जें जें मना वाटे गोड २०८७
जें जें होआवें संकल्पें ४०१०
जें ज्याचें जेवण ३४४१
जेणें घडे नारायणीं अंतराय १०८
जेणें तुज जालें रूप आणि नांव ३३७८
जेणें नाहीं केलें आपुलें स्वहित १४९४
जेणें माझें चित्त राहे तुझ्या पायीं ३६४३
जेणें माझें हित होइल तो उपाव ३९०९
जेणें मुखें स्तवी २७५
जेणें वाढे अपकीर्ति २५५२
जेणें वेळ लागे १६६४
जेणें हा जीव दिला दान ६१८
जेणें होय हित ३७७९
जेथें आठवती स्वामीचे ते पाय ३०४३
जेथे कीर्तन करावें ३०७४
जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती १९८९
जेथें जातों तेथें पडतो मतोळा ३६१५
जेथें जावें तेथें कपाळ सरिसें ९३१
जेथें जेथें जासी १६५९
जेथें देखें तेथें उभा १५२३
जेथें देखें तेथें तुझी च पाउलें १८२४
जेथें पाहें तेथें कांडिती भूस ३४८०
जेथें माझी दृष्टि जाय २०८८
जेथें माझी दृष्टि राहिली बैसोन ३५८९
जेथें लक्ष्मीचा वास २४५४
जेथे वैष्णवांचा वास ८६६
जे दोष घडले न फिरे करितां १८२५
जेवितां ही धरी १०५

जेविले ते संत मागें उष्टावळी	३९
जेवीं नवज्वरें तापलें शरीर	८१०
जैशा तुह्मी दुरी आहां	२४३५
जैशासाटीं तैसें हावें	९५३
जैसा अधिकार	२१२१
जैसा तैसा आतां	३५३४
जैसा निर्मळ गंगाओघ	३५४३
जैसी तैसी तरि वाणी	३२८७
जैसीं तैसीं तरी। शरणागतें	१४८२
जैसें चित्त जयावरी	२१०४
जैसें तैसें बाळ	३०५१
जैसें तैसें राहे देवाचें हें देणें	१६३३
जैसें दावी तैसा राहे	१५११
जो का निर्गुण निराकार	४३५२
जों जों घ्यावा सोस	३७०४
जोडिले अंजुळ	३४२६
जोडिलें तें आतां न सरे सरितां	१९९७
जोडी कोणासाटीं	१९१७
जोडीच्या हव्यासें	१९१४
जोडोनियां कर	२०४९
जोडोनियां धन उत्तम वेव्हारें	२८५४
जो भक्तांचा विसावा	१०६९
जो मानी तो देईल काई	१२३८
जो या गेला पंढरपुरा	४२३१
ज्याचा ऐसा अनुभव	१५२९
ज्याची खरी सेवा	५९५
ज्याची जया आस	३९५८
ज्याचे गर्जतां पवाडे। कळिकाळ	१६०७
ज्याचें गर्जतां पवाडे। श्रुतिशास्त्रां	१६०८
ज्याचे गांवीं केला वास	१८९४
ज्याचे जया ध्यान	२३१८
ज्याचें जैसें भावी मन	४३८०
ज्याचे माथां जो जो भार	३३२३
ज्यांच्या संगें होतों पडिलों	२६३१
ज्यां जैसी आवडी त्यां तैसा	४३६३
ज्या ज्या आह्मांपाशीं होतील	१३४२
ज्यानें आड यावें कांहीं	२५६५
ज्याणें ज्याणें जैसें ध्यावें	१४४८
ज्यावें हीनपणें	३२५५
ज्यासी आवडी हरिनामांची	१५५३
ज्यासी नावडे एकादशी	२८८१
ज्यासी विषयाचें ध्यान	२९५९

ज्वरल्यासी काढा औषध पाचन ३१९७

झ
झड मारूनियां बैसलों पंगती २९७१
झरा लागला सुखाचा २००९
झंवविली महारें ४००६
झांकूनियां नेत्र काय जपतोसी ३८९१
झाड कल्पतरू ५९१
झाडा वरपोनि खाऊनियां पाला ३८७०
झेला रे झेला वरचेवर झेला १३९

ट
टंवकारूनि दृष्टि लावूनियां रंग ७८४
टाक रुका चाल रांडे कां ४५७
टाळ घोळ सुख नामाचा गजर २१०१
टाळ दिंडी हातीं १०३८
टिळा टोपी उंच दावी २८४६
टिळा टोपी माळा देवाचें गवाळें ७८२

ठ
ठकिलें काळा मारिली दडी १०७५
ठाकलोंसें द्वारी १४९७
ठायींची ओळखी ३२३
ठाव तुह्मांपाशीं ४२२९
ठाव देऊनियां राखें पायापासीं ४१३१
ठाव नाहीं बुड १८०७
ठेवा जाणीव गुंडून १४५३
ठेविलें जतन १३३६
ठेवूनि इमान राहिलों चरणीं ३४७६
ठेवूनियां डोई २३१३

ड
डगमगी मन निराशेच्या गुणें ३५९२
डळमळिला मेरू आणि तो ३०८६
डाई घालूनियां पोरें २२९
डिवेना डसेना बुझेना निर्मळ ४३१९
डोई वाढवूनि केश ७७०
डोळां भरिलें रूप २५९९

डोळियाचें दैव आजि उभें ठेलें ४४३६
डोळियां पाझर कंठ माझा दाटे १८३०
डोळ्यांमध्यें जैसें कणु २२८४
डौरलों भक्तिसुखें ३२३९

ढ
ढालतरवारे गुंतले हे कर ४३२५
ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला ३३९२
ढेंकणासी बाज गड २४४२
ढेंकरें जेवण दिसे साचे ७०

त
तक्र शिष्यामान १४७८
तिजिलें भेटवी आणूनि वासना २३१६
तटाचे जातीला नाहीं भीड भार ३०१६
तडामोडी करा १७४३
तन मन धन दिलें पंढरिराया ३९३२
तप तीर्थ दान व्रत आचरण १४८५
तपाचे सायास २८४१
तपासी तें मन करूं पाहे घात २७८६
तम भज्याय ते बुरा जिकीर ते ४४१
तया घडले सकळ नेम २३७९
तयांसवें करी काला ४५०६
तया साटीं वेचूं वाणी ४८०
तयासी नेणतीं बहु आवडती २११०
तरले ते मागें आपुलिया सत्ता १८७५
तरलों ह्मणुनि धरिला ताठा ३९५४
तरि कां नेणते होते मागें ॠषी ९१६
तरि कां पवाडे गर्जती पुराणें १०२९
तरि च हा जीव संसारीं उदास २५१९
तरि म्यां आळवावें कोणा ६४९
तरीं आह्मी तुझी धरियेली कास १६६८
तरी कां मागें वांयां कीर्ती ३१०८
तरी कां वोळगणे ३२०२
तरी च जन्मा यावें २४८८
तरीं च म्यां देवा ३५३८
तरी च हीं केलीं ३७९२
तरी च होय वेडी ३३९९
तरीं भले वांयां गेलों ३६५६
तरी सदा निर्भर दास २२७८

तरी हांव केली अमुपा व्यापारें	२७३९
तरुवर बीजा पोटीं	३०५९
तंव ते ह्मणे ऐका हृषीकेशी वो	४०३
तंव तो हरि ह्मणेवो निजांगने वो	४०२
तळमळी चित्त दर्शनाची आशा	२१६६
ताकें कृपण तो जेवूं काय	३५८६
तातडीची धांव अंगा	३८०६
तांतडीनें आह्मां धीर	२५८५
तान्हे तान्ह प्याली	१५२४
तान्हेल्याची धणी	२७८
तापल्यांवाचून नव्हे अळंकार	२३९०
ताप हें हरण श्रीमुख	६६४
तांबगी हें नाणें न चले	४०८१
तामसांची तपें पापाची सिदोरी	२३२७
तारतिम वरी तोंडा च पुरतें	२५२
तारिलीं बहुतें चुकवूनि घात	२११८
तारी ऐसे जड	१०९२
तारुण्याच्या मदें न मनी	३०७२
तारूं लागलें बंदरीं	१५४४
तिन्ही लोक ऋणें बांधिले	२१०६
तिथाअ धोंडा पाणी	११४
तिहीं त्रिभुवनीं	१८८५
तिळ एक अर्ध राई	४०२७
तीहीं ताळी हेचि हाक	३००८
तीर देखोनियां यमुनेचें जळ	४५२२
तीर्थ जळ देखे पाषाण प्रतिमा	२६२६
तीर्थाचिये आस । पंथ तो निट	३१७९
तीर्थाचें मूळ व्रतांचें फळ	१४६८
तीर्थाटणें एकें तपें हुंबरती	१५१५
तीर्थीची अपेक्षा स्थळीं वाढे	२४०६
तीर्थें केलीं कोटीवरी	६८०
तीर्थें फळती काळें जन्में	४२५१
तीळ जाळिले तांदुळ	९०
तुका इच्छा मिटइ तो	११९४
तुका उतरला तुकीं	१६०२
तुका और मिठाई क्या करूं रे	११९७
तुका कुटुंब छोरे रे	११९३
तुका दास तिनका रे	११७८
तुका दास रामका	११८७
तुका पंखिबहिरन मानूं	११७१
तुका प्रभु बडो न मनूं	११७४
तुका प्रीत रामसुं	११७९

तुका बस्तर बिचारा क्या करे रे	११६८
तुका माऱ्या पेटका	११८३
तुका मिलना तो भला	११९२
तुका राम बहुत मिठा रे	११७२
तुका रामसुं चित बांध राखूं	११८८
तुका वेडा अविचार	२८५९
तुका संगत तिन्हसें कहिये	११९१
तुका सुरा नहि सबदका रे	११८१
तुका सुरा बहुत कहावे	११८२
तुक ह्मणे पुन्हा न येती मागुत्या	४४९९
तुका ह्मणे सुख घेतलें गोपाळीं	४५०५
तुज ऐसा कोण उदाराची रासी	९१५
तुज ऐसा कोणी न देखें उदार	१८१५
तुज करितां होय ऐसें कांहीं	२४७६
तुज करितां होती ऐसे	३११४
तुजकरितां होतें आनाचें आन	१८३९
तुज काय करूं मज एक सार	४११२
तुज केलिया नव्हे ऐसें कांई	४२७१
तुज घालोनियां पूजितों संपुष्टीं	२८६१
तुज च पासाव जालोंसों निर्माण	९५०
तुज जाणें तानें नाहीं पांडुरंगा	३३८४
तुज ते सवे आहे ठावें	३००५
तुज दिला देह	३९३६
तुज दिलें आतां करीं यत्न	१७५४
तुज न करितां काय नव्हे एक	१९८६
तुज न भें मी कळिकाळा	३०४४
तुज नाहीं शक्ति	१६७४
तुज पाहातां समोरी	३८३०
तुज पाहावें हे धरितों वासना	२६६७
तुज मज ऐसी परी	३९८०
तुज मज नाहीं भेद	२९१७
तुज मागणें तें देवा	७५५
तुजलागीं माझा जीव जाला	३०२७
तुजवरी ज्याचें मन	६८३
तुज वर्णी ऐसा तुज विण नाहीं	६९४
तुजवांचुनी मागणें काय कोणा	११०४
तुजवांचून कोणा शरण	४४२१
तुजविण कांहीं	४०३८
तुजविण कोणा	२४५७
तुजविण चाड आणिकांची	४२६९
तुजविण देवा	१७९८
तुजविण मज कोण आहे	४४४२

तुजविण मज कोण वो सोयरें	५२६
तुजविण वाणीं आणिकांची थोरी	५६५
तुजविण सत्ता	२३१०
तुजवीण तीळभरी रिता ठाव	४३९७
तुजशीं संबंध चि खोटा	१२२०
तुजसवें आह्मीं अनुसरलों	१२५४
तुजसवें येतों हरी	२३२
तुज ह्मणतील कृपेचा सागर	१५३५
तुझा ठायीं ओस	१६७५
तुझा दास ऐसा ह्मणती	१०१४
तुझा दास मज ह्मणती अंकित	३३६८
तुझा भरवसा	४१७५
तुझा विसर नको माझिया जीवा	१६७८
तुझा शरणागत जन्मोजन्मींचा	७५६
तुझा शरणागत जालों	१०१८
तुझा संग पुरे संग पुरे	२२५३
तुझा ह्मणऊनि जालों उतराई	१६३९
तुझा ह्मणविलों दास	४२४४
तुझा ह्मणवून तुज नेणें	१७५८
तुझा ह्मणोनियां दिसतों	३९२८
तुझिया दासांचा हीन जालों	३८०९
तुझिया नामाचा विसर	३९८५
तुझिया पार नाहीं गुणां	६३७
तुझिया पाळणा ओढे माझें मन	३८५८
तुझिया विनोदें आह्मासी मरण	३५०४
तुझिये संगति	१८७
तुझी कीर्ती सांगों तुजपुढें जरी	४११०
तुझी माझी आहे जुनी सोयरीक	४००३
तुझीं वर्मे आह्मां ठावीं नारायणां	२९९०
तुझें अंगभूत	३९३५
तुझे थोर थोर	७३४
तुझे दारींचा कुतरा	३५७८
तुझें दास्य करूं आणिका मागों	४७०
तुझे नाम गाऊं आता	२९६६
तुझें नाम गाया न सोपें डवळा	३९९७
तुझें नाम गोड नाम गोड	१७६४
तुझें नाम पंढरिनाथा	४१९५
तुझें नाम माझे मुखीं असो	४४५०
तुझें नाम मुखी तयासी विपत्ति	३१४९
तुझें नाम मुखीं न घेतां आवडी	१७७६
तुझे नामें दिनानाथा	४२८९
तुझे पाय माझी काशी	४१४३

तुझे पाय माझें भाळ	४४५३
तुझे पाय माझे राहियेले चित्तीं	१९८८
तुझे पोटीं ठाव	२०४६
तुझें प्रेम माझ्या ह्रदयीं आवडी	४०१७
तुझे मजपाशीं मन	३५१२
तुझें रूप पाहतां देवा	४४४१
तुझे वर्णूं गुण ऐसी नाहीं मती	८०३
तुझें वर्म आह्मां कळों आलें	४११७
तुझें वर्म ठावें	३२४
तुझें वर्म हातीं	२९५२
तुझें ह्मणवितां काय नास जाला	१७२५
तुझे ह्मणों आह्मां	४४३३
तुझ्या नामाची आवडी	२९०५
तुझ्या रूपें माझी काया भरों	२६३९
तुटे भवरोग	७२२
तुटे मायाजाळ विघडे भवसिंधू	३१०३
तुमचा तुह्मीं केला गोवा	९७७
तुमचिये दासींचा दास करूनि	१०४७
तुमची तों भेटी नव्हे ऐसी	१२६६
तुमचे स्तुतियोग्य कोठें माझी	२४२२
तुमच्या पाळणा ओढतसे मन	३६८१
तुशीं कोण घाली हुंबरी	१५३
तुह्मां आह्मां उरी तोंवरी	१०८०
तुह्मां आह्मां जंव जालिया	२५४९
तुह्मां आह्मां तुटी होईल यावरी	१८५६
तुह्मां आह्मां सरी	३५१३
तुह्मां आह्मांसवें न पडावी गांठी	२५७४
तुह्मांआह्मांसी दरुषण	३३३९
तुह्मां उद्धरणें फार	३६५९
तुह्मां ठावा होता देवा	८४७
तुह्मां न पडे वेच	२९००
तुह्मां सांगतो कलयुगा फळ	४०१२
तुह्मांसाटीं आह्मां आपुला विसर	२२७१
तुह्मांसी न कळे सांगा काय	३६९५
तुह्मांसी हें अवघें ठावें	३४७१
तुह्मां होईल देवा पडिला विसर	९६४
तुह्मी आह्मी भले आतां	२५१६
तुह्मी कांटाळला तरी	२९३२
तुह्मी गोपी बाळा मज कैशा नेणा	१७६
तुह्मीं जावें निजमंदिरा	५१०
तुह्मी तरी सांगा कांहीं	४६८
तुह्मीं तों सदैव	३५९६

तुह्मी पाय संतीं	१७३७
तुह्मी बैसलेती निर्गुणाचे खोळे	१५०१
तुह्मी माझा देवा करिजे अंगीकार	३६३७
तुह्मी येथें पाठविला धरणेकरी	२३३७
तुह्मी विश्वनाथ	१६५१
तुह्मी संतजनीं	१९२५
तुह्मी संत मायबाप कृपावंत	३२९६
तुह्मी सनकादिक संत	१५८६
तुह्मी साच नुपेक्षाल हा भरवसा	९६३
तुह्मी साधु संत कैवल्यसागर	४४५७
तुळसीमाळा घालुनी कंठीं	६४२
तुळसीवृंदावनीं उपजला कांदा	४४५५
तू आह्मां सोयरा सज्जन	३८८७
तूं कृपाळू माउली	२२३२
तूं च मायबाप बंधु सखा	४८६
तूंचि अनाथाचा दाता	६२०
तूं पांढरा स्पटिक मणी	१२२५
तूं बळिया शिरोमणी	६६९
तूं माउलीहून मयाळ चंद्राहूनि	२२३६
तूं माझा कोंवसा	३७८७
तूं माझा मायबाप सकळ	२४२५
तूं माझी माउली तूं माझी	२५९७
तूं श्रीयेचा पती	२०४४
त्रुशाकाळें उदकें भेटी	१२९६
ते काय पवाडे नाहीं	४२१०
तें च किती वारंवार	२६४५
ते चि करीं मात	३८१०
तेज्या इशारती	८९७
तेणें वेशें माझीं चोरिलीं	२०२९
तेणें सुखें माझें निवालें	३३५६
तेथें सुखाची वसति	२७५५
ते माझे सोयरे सज्जन सांगाती	२६३
तेरा दिवस जाले निश्चक्र	२४८३
तेलनीशीं रुसला वेडा	५६
तेव्हां धालें पोट बैसलों पंगती	१०२८
तेव्हा होतों भोगाधीन	२५५९
तें ही नव्हे जें करितां कांहीं	७०४
तैसें नव्हों आह्मी विठ्ठलाचे	३१३७
तों च हीं क्षुल्लकें सखीं	१३१०
तों चि प्रसंग आला सहज	३००९
तो चि लटिक्यामाजी भला	२८३२
तोडुनि पुष्पवटिका	१७९२

तोंडें खाये फार १६१५
तोंडे बोलावें तें तरी वाटे खरें १८९६
तो बोले कोमळ निष्ठुर ४५६९
तो या साच भावें न कळे चि ४५४१
तोंवरी तोंवरी जंबुक करि २७७३
तोंवरी तोंवरी शोभतील गारा २७७४
तोंवरी म्यां त्यास कैसें १९४४
त्याग तरी ऐसा करा २७६५
त्याग तंव मज न वजतां केला ८१६
त्यागें भोग माझ्या येतील ३१६८
त्यांचिया चरणा माझें दंडवत ३३२७
त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा २९
त्यांनीं धणीवरी संग केला २०६
त्यांसि राखे बळें आपुले जे ४५४५
त्या हरिदासांची भेटी घेतां ४०१३
त्रासला हा जीव संसारींच्या ३८९९
त्राहे त्राहे त्राहे सोडवीं अनंता ३८२५
त्रिपुटीच्या योगें १३१७
त्रिविधकर्माचे वेगळाले २४००
त्रैलोकींचा नाथ सकळांचा ३०९१
त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं ६०२

थ
थडियेसी निघतां पाषाणांच्या २४९७
थुंकोनियां मान १३०२
थोडें आहे थोडें आहे ११०
थोडे तुह्मी मागें होती उद्धरिले ३५१५
थोडें परी निरें ५७८
थोर अन्याय केला तुझा अंत २२३१
थोर ती गळाली पाहिजे ३०६४

द
दगडाच्या देवा बगाड नवस ३५५८
दंड अन्यायाच्या माथां ३१८८
दधिमाझी लोणी जाणती २७९७
दंभें कीर्ति पोट भरे मानी जन ८५३
दया तिचें नांव भूतांचें पाळण २६४
दया क्षमा शांति १४२७
दर्दुराचें पिलुं ह्मणे रामराम ३८७७
दर्पणासी नखटें लाजे ८२९

दर्पणासी बुजे	३७८८
दर्शनाची आस	८४९
दर्शनाचें आर्त जीवा	२४१०
दसरा दिवाळी तो चि आह्मां	३९०५
दह्यांचिया अंगीं निघे ताक	२४८२
दाखवूनि आस	१८०५
दाटे कंठ लागे डोळियां पाझर	२४१३
दाढी डोई मुंडी मुंडुनियां सर्व	३९२२
दाता तो एक जाणा	२३०६
दाता नारायण	३२१
दानें कांपे हात	८४
दामाजीपंताची रसद गुदरली	४३३३
दारिद्रानें विप्र पीडिला अपार	४४६९
दारीं परोवरी	२०४७
दावी वर्म सोपें भाविकां	४४९२
दावूनियां कोणा कांहीं	१६६६
दावूनियां बंड	३१६९
दास जालों हरिदासांचा	१११७
दासां सर्व काळ	१७०७
दासीचा जो संग करी	४२४७
दासों पाछें दौरे राम	११५३
दास्य करी दासांचें	६५२
दिक चि या नाहीं संसारसंबंधा	२५२१
दिनदिन शंका वाटे	१७६२
दिनरजनीं हा चि धंदा	८७६
दिनाचा कृपाळु दुष्टजना काळ	४५६८
दिला जीवभाव	३४६५
दिली चाले वाचा	२३८९
दिली मान तरी नेघावी शत्रूची	३१७१
दिली हाक मनें नव्हे ती जतन	३३६७
दिवट्या छत्री घोडे	१८७८
दिवट्या वाद्यें लावुनि खाणें	२६९
दिवसा व्यापार चावटी	४१८७
दीन आणि दुर्बळांसी	३६२८
दीनानाथा तुझीं ब्रिदें चराचर	५४४
दीप घेऊनियां धुंडिती अंधार	५६३
दीप न देखे अंधारा	८७४
दुखवलें चित्त आजिच्या प्रसंगें	३१२८
दुःख वाटे ऐसी ऐकोनियें गोष्टी	८०७
दुःखाचिये साटिं तेथें मिळे	२१०७
दुःखाची संगति	२६९०
दुःखाचे डोंगर लागती सोसावे	९०५

दुःखी होती लोभें करावें तें	४५३७
दुःखें दुभागलें हृदयसंपुष्ट	२९७८
दुजा ऐसा कोण बळी आहे	१३
दुजें खंडे तरी	४५
दुडीवरी दुडी	२८६३
दुद दहीं ताक पशूंचें पाळण	११३५
दुधाचे घागरी मद्याचा हा बुंद	१६४८
दुधाळ गाढवी जरी जाली	३०४०
दुबळें सदैवा	३३९०
दुर्जनाचा मान	२१२७
दुर्जनाची गंधी विष्ठेचिया परी	११७
दुर्जनाची जाती	२६६९
दुर्जनाची जोडी	२२०६
दुर्जनाचें अंग अवघें चि	२१८६
दुर्जनासि करी साहे	६६
दुर्बळ हें अवघें जन	५८९
दुर्बळाचें कोण	२०५८
दुर्बळाचे हातीं सांपडलें	२१३३
दुर्बळा वाणीच्या एक दोनि	२०३५
दुर्बुद्धि ते मना	३०५८
दुर्वासया स्वामी गुंतलों	३०८९
दुर्वासें निरोप आणिला	३०९३
दुष्ट आचरण ग्वाही माझें	२६६४
दुष्ट भूषण सज्जनाचें	२०२७
दुष्टाचें चित्त न भिन्नें अंतरीं	१७२२
दूरि तों चि होतों आपुले	३४८६
देईं डोळे भेटी न धरीं संकोच	१९०७
देईल तें उणें नाहीं	२५५८
देऊं कपाट	३३८०
देऊं ते उपमा	८४८
देऊनियां प्रेम मागितलें चित्त	३८०५
देखण्याच्या तीन जाती	१३१८
देखत आखों झुटा कोरा	११६४
देखत होतों आधीं मागें पुढें	४२५
देखिलासि माती खातां	२२२
देखिलें तें धरिन मनें	३६२१
देखीचा दिमाख शिकोनियां	८९५
देखीचें तें ज्ञान करावें तें	४०९१
देखोनि पुराणिकांची दाढी	११६
देखोनियां तुझ्या रूपाचा आकार	५३५
देखोनि हखली अंड	७७
देखोवेखीं करिती गुरू	२१०२

देती घेती परज गेली १२९
देव अवघें प्रतिपादा २९४८
देव आड जाला ३५४
देव आतां आह्मीं केला असे ४३८५
देव आमचा आमचा जीव १८६४
देव आहे सुकाळ देशीं २७९१
देवकीनंदनें ३१३३
देव कैंचा तया दुरी ४१२०
देव गावा घ्यावा ऐसें जालें ४०१४
देव घ्या कोणी देव घ्या १००३
देव जडला जाइना अंगा ४१६८
देव जाणता देव जाणता ३६४५
देव जाले अवघे जन ३१२२
देव तिहीं बळें धरिला सायासें ३८९५
देव तिळीं आला ४०५९
देव तीर्थ येर दिसे जया ३२२२
देव ते संत देव ते संत २४८९
देव त्यां फावला भाविकां ४५४०
देव दयाळ देव दयाळ १८५८
देर धरी नाना सोंगें ४०४५
देव निढळ देव निढळ १८६०
देव पाहावया करीं वो सायास १९७८
देव पाहों देव पाहों १८६३
देव बराडी देव बराडी १८६१
देव बासर देव बासर १८५९
देव भक्तालागीं करूं नेदी ३०४१
देव भला देव भला १८६२
देर मजुर देव मजुर १८५७
देव राखे तया मारील कोण १६०९
देव वसे चित्तीं २४६१
देव सखा आतां केलें नव्हे २६१८
देव सखा जरी ३७२
देव होईजेत देवाचे संगती ३२७
देव होसी तरी आणिकातें ११२३
देवा आतां ऐसा करीं उपकार १९८५
देवा आदिदेवा जगत्रयजीवा ४४८४
देवा ऐकें हे विनंती १४५७
देवा ऐसा शिष्य देई ८०५
देवाचा भक्त तो देवासी गोड १७८१
देवाचिया वस्त्रा स्वप्नीं ही ३०५२
देवाचिये चाडे प्रमाण उचित २६०६
देवाचिये पायीं देईं मना बुडी ३७९७

देवाचिये पायीं वेचों सर्व ३९६८
देवाचिये माथां घालूनियां भार १२८९
देवाची ते खूण आला ३४३६
देवाची पूजा हें भूतांचें पाळण ३८४०
देवाची भांडारी ३२८९
देवाचे घरीं देवें केली चोरी १८३४
देवाचें चरित्र नाठवे सर्वथा ३७४१
देवाचें निर्माल्य कोण शिवे ३२२१
देवाचें भजन कां रे न करीसी ३३५९
देवाचे ह्मणोनि देवीं अनादर २४३
देवाच्या उद्देशें जेथें जेथें भाव २५०३
देवाच्या निरोपें पिटितों डांगोरा ३४५८
देवाच्या प्रसादें करा रे भोजन ४०
देवाच्या संबंधें विश्व चि सोयरें ८२०
देवांच्याही देवा गोपिकांच्या १९०४
देवा तुजपें माझ्या पूर्वजांचें ३००२
देवा तुज मज पण १७८७
देवा तूं आमचा कृपाळ ६३०
देवा तूं कृपाकरुणासिंधु ६२७
देवा बोलें आतां बोला ४१७९
देवा मी चांडाळ चांडाळ ६७०
देवावरिल भार १३०१
देवावरी भार ३०४६
देवासाटीं जाणा तयाची १४८६
देवासी अवतार भक्तांसी १०३२
देवासी तो पुरे एकभाव गांठी २५६६
देवासी पैं भांडों एकचित्त ४४७५
देवासी लागे सकळांसी पोसावें १७८५
देवीं आणि दैतीं सिंधु ३०७९
देवी देव जाला भोग सरला ४२०
देवें जीव धाला ५९६
देवें दिला देह भजना गोमटा ३७००
देवें देऊळ सेविलें २३०४
देश वेष नव्हे माझा ४२४
देह आणि देहसंबंधें निंदावीं १२८८
देह जाईल जाईल ३१०५
देह तंव असे भोगाचे अधीन २६२१
देह तंव आहे प्रारब्धा अधीन ३८४२
देह तुझ्या पायीं २९५५
देह नव्हे मी हें सरे १२९०
देह निरसे तरी २१६८
देह प्रारब्धा शिरीं ३५३६

देहबुद्धि वसे जयाजिये अंगीं ३३८८
देहबुद्धि वसे लोभ जयां चित्तीं ५४०
देहभाव आह्मी राहिलों ठेवूनि १२१७
देह मृत्याचें भातुकें ३१६७
देह हा सादर पाहावा निश्चित ८०२
देहीं असोनियां देव ४४५८
दैत्यभारें पीडिली पृथुवी बाळा १५६६
दैन्य दुःख आह्मां न येती २११२
दो दिवसांचा पाहुणा ४४५२
दोन्ही टिपरीं एक चि नाद १९२
दोन्ही हात ठेवूनि कटी १२४३
दोराच्या आधारें पर्वत चढला ३८७२
दोष करूनि आह्मी पतित सिद्ध ४०४३
दोष पळती कीर्तनें ६०४
दोहीं बाहीं आह्मां वास ३१४६
दोहींमध्यें एक घडेल विश्वासें १९४१
द्या जी आह्मां कांहीं सांगा जी ४९८
द्या जी माझ्या विचारूनियां २४९८
द्याल ऐसें दिसे ३५९५
द्याल ठाव तरि राहेन संगती १३१६
द्याल माळ जरी पडेन मी पायां ५०९
द्रव्य असतां धर्म न करी ५९९
द्रव्याचा तो आह्मी धरितों ९०२
द्रव्याचिया कोटी २६५०
द्रव्याचिया मागें कळिकाळाचा ९०३
द्वारकेचें केणें आलें या ११२०
द्वारपाळ विनंती करी ३१४५
द्वेषाचिया ध्यानें हरिरूप ४५६२

ध
धडकला अग्नि आह्मा ४२११
धणी न पुरे गुण गातां ७५१
धन मेळवूनि कोटी ३८२३
धनवंत एक बहिर अंधळे ३१२९
धनवंता घरीं २७८९
धनवंतालागीं २९०७
धना गुंतलें चित्त माझें मुरारी ११०६
धनासीं च धन २१५२
धनी ज्या पाइका मानितो १०६१
धनें वित्तें कुळें ३३०३
धन्य आजि दिन ९८८

धन्य काळ संतभेटी	८७५
धन्य जालों हो संसारीं	४३६०
धन्य तें गोधन कांबळी	२२०
धन्य ते पंढरी धन्य भीमातीर	१७२९
धन्य ते संसारीं	९९६
धन्य तो ग्राम जेथें हरिदास	३७३०
धन्य त्या गौळणी इंद्राच्या	१७५
धन्य दिवस आजि डोळियां	३८५३
धन्य दिवस आजि दरुषणें	१५७८
धन्य देहूं गांव पुण्य भूमि ठाव	७८३
धन्यधन्य ज्यास पंढरीसी वास	३८६५
धन्य पुंडलिका बहु बरें केलें	१७२८
धन्य बा ह्या ऐशा नारी	२३५३
धन्य भावशीळ	७७९
धन्य मी मानीन आपुलें संचित	१६९३
धन्ये शुद्ध जाती	१३४५
धन्या आतां काय करूं	४३०२
धरावा तो बरा	३४४२
धरावें तों भय	३४९३
धरितां इच्छा दुरी पळे	२१७४
धरितां ये पंढरीची वाट	१३७६
धरितों वासना परीन ये फळ	१९०९
धरियेलीं सोंगें	१६०६
धरियेलें रूप कृष्णनाम बुंथी	४५७७
धरिला पालव न सोडी माझा	३९५
धरिलीं जीं होतीं चित्तीं	३१६२
धरिल्या देहाचें सार्थक करीन	३९८८
धरी दोही ठायीं सारखा चि	४५६७
धरूनि पालव असुडीन करें	१६७०
धरूनियां चाली हांवा	२६४१
धरूनियां मनीं बोलिलों संकल्प	३८६३
धरूनियां सोई परतलें मन	२६११
धरूनि हें आलों जीवीं	३६५८
धरोनि दोन्ही रूपें पाळणें	२७७५
धरोनियां फरश करी	४३३५
धर्म तो न कळे	२२०५
धर्म रक्षावया अवतार घेशी	३८८०
धर्म रक्षावया साठीं	२६०
धर्माची तूं मूर्ती	४३
धर्माचें पाळण	२१२५
धवळलें जगदाकार	३४०९
धाईं अंतरिंच्या सुखें	९११

धाकुट्याचे मुखीं घास घाली २४२
धालें मग पोट १६५
धालों सुखें ढेकर देऊं १७६५
धांव कान्होबा गेल्या गाई २४१
धांव घालीं आई ८४६
धांव धांव गरुजध्वजा २४४३
धांवा केला धांवा ३४२५
धांवा शीघ्रवत २६८७
धांवे त्यासी फावे १२७६
धांवे माते सोई १८४४
धांवोनियां आलों पहावया मुख ४१५६
धिग जिणें त्याचा स्वामी हीन ८५४
धिग जिणें तो बाईले आधीन ३०६
धिग तो दुर्जन नाहीं भूतदया ४०५१
धिंद धिंद तुझ्या करीन २९८५
धीर तो कारण एकविधभाव २०००
धीर तो कारण साहे होतो ११३३
धीर नव्हे मनें २६४९
धेनु चरे वनांतरीं १५५१
धोंड्यासवें आदळितां फुटे ३४४३
ध्याईन तुझें रूप गाईन तुझें ३३५८
ध्यानीं ध्यातां पंढरिराया ४०५७
ध्यानी योगीराज बैसलें कपाटीं ३६१

न
न करवे धंदा ५७१
न करा टांचणी २९०४
न करावी आतां पोटासाटीं ८८२
न करावी चिंता ३४३८
न करावी स्तुती माझी संतजनीं १०४६
न करि त्याचें गांढेपण ३११९
न करीं उदास २६७०
न करीं तळमळ राहें रे निश्चळ ११३८
न करीं तुमची सेवा २७०३
न करीं पठण घोष अक्षरांचा ३४०१
न करीं रे मना कांहीं च ३५६८
न करीं संग राहें रे निश्चळ ११२
न कळतां काय करावा उपाय ८६२
न कळतां कोणी मोडियेले व्रत २११६
न कळसी ज्ञाना न ३८२०
न कळे जी भक्ती काय करूं ३६६०

न कळे तत्त्वज्ञान मूढ माझी	१०१२
न कळें तें कळों येईल उगलें	३०३७
न कळे ब्रह्मज्ञान आचार विचार	३८७३
न कळे महिमा वेद मोनावले	४३४०
न कळे माव मुनी मागे एकी	२४९०
नका कांहीं उपचार माझ्या	३८४
नका घालूं दुध जयामध्यें सार	११४५
नका दंतकथा येथें सांगों कोणी	३११८
नका धरूं कोणी	२१२८
नका मजपाशीं	३४१४
नका वांटूं मन विधिनिषेधांसी	८१४
नको आतां पुसों कांहीं	२३९४
नको आह्मांसवें गोपाळा	२३३
नको ऐसें जालें अन्न	१६५५
नको कांहीं पडों ग्रंथाचिये भरीं	२३१४
नको घालूं झांसां	३६८९
नको दुष्ट संग	२०९६
नको देऊं देवा पोटीं हें संतान	२८५३
नको धरूं आस व्हावें या	१९७५
नको नको मना गुंतूं	२७९८
नको बोलों भांडा	१७१२
नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिति भाव	१०१६
नको मज ताठा नको अभिमान	३४३४
नको मझे मानूं आहाच ते शब्द	२५५०
नको येऊं लाजे होय तूं परती	४२९६
नको विद्या वयसा आयुष्य	४४४३
नको सांडूं अन्न नको सेवूं वन	१३६३
नको होऊं देऊं भावीं अभावना	८१५
न गमे न गमे न गमे हरिविण	३२२७
न गमेसी जाली दिवसरजनी	२१५८
न घडे मायबापें बाळकाचा घात	४१०८
न चलवे पंथ वेच नसतां	२४९६
नजर करे सो हि जिंके बाबा	४४२
नटनाट्यें अवघें केलें संपादिलें	५६४
नटनाट्य तुम्हीं केलें याच साठीं	१२६९
न देखवे डोळां ऐसा हा आकांत	५५०
न देखिजे ऐसें केलें	१६०३
न देखें न बोलें नाइकें आणीक	१२
न देखोन कांहीं	२४९
न धरी प्रतिष्ठा कोणाची यम	३४५२
न पडो आतां हाडीं घाव	३७८२
न पवीजे तया ठाया	३७५४

न पवे सन्निध वाटते चिंता	६३१
न पालटे एक	१८९७
न पालटे जाती जिवाचिये	३१७०
न पाहे माघारें आतां परतोनि	२५३४
न पूजीं आणिकां देवा न करीं	१४५८
न बैससी खालीं	१९१६
न बोलतां तुह्मां कळों न ये गुज	३१
न बोलसी तें ही कळलें देवा	६२४
न बोलावें परी पडिला प्रसंग	१८४८
न बोलेसी करा वाचा	१४००
नभोमय जालें जळ	२५७७
न मनावी चिंता कांहीं	३०९९
न मनावी चिंता तुह्मीं संतजनीं	९२५
न मनावें तैसें गुरूचें वचन	१२०३
न मनीं ते ज्ञानी न मनीं ते	२८१६
नमस्कारी भूतें विसरोनि याती	३०२२
नमावे पाय हें माझें उचित	२८२३
नमितों या देवा	२३६८
न मिळती एका एक	४२३२
न मिळो खावया न वाढो	५४७
नमोनमो तुज माझें हें कारण	३९१७
नमो विष्णुविश्वरूपा मायबापा	११२५
नम्र जाला भूतां	१४७५
नये इच्छूं सेवा स्वइच्छा जगाची	१२०७
नये ऐसें बोलों कठिण उत्तरें	३५६३
नये जरी कांहीं	७१७
नये जरी तुज मधुर उत्तर	३२
न ये नेत्रां जळ	८२
नये पाहों मुख मात्रागमन्याचें	१४६४
नये पुसों आज्ञा केली एकसरें	१७७०
नये वांटूं मन	२८५६
नये सोमसरी उपचाराची हरी	२९८८
नये स्तवूं काचें होतें क्रियानष्ट	२५९१
नयो वाचे अनुचित वाणी	२१७२
नरदेह वायां जाय	४३५७
नर नारी बाळें अवघा नारायण	४०९२
नरस्तुति आणि कथेचा विकरा	२६२९
न राहे रसना बोलतां आवडी	३०
न राहे क्षण एक वैकुंठीं	१९६५
न लगती मज शब्दब्रह्मज्ञान	३९२७
न लगावी दिठी	४०१९
न लगे चंदना सांगावा परिमळ	२८९

न लगे चिंता आतां	२९८२
न लगे देवा तुझें आह्मांसी	४१३६
न लगे देशकाळ	१४११
न लगे द्यावा जीव सहज चि	२९१४
न लगे पाहावे अबद्ध वांकडें	२१११
न लगे मरावें	३३६५
न लगे मायेसी बाळें निरवावें	१२२८
न लगे हें मज तुझे ब्रह्मज्ञान	५३२
नव जातां घरा	२११२
न वजावा तो काळ वांयां	२७१८
न वजे वांयां कांहीं ऐकतां	१०२२
नवां नवसांचीं	७६०
न विचारितां ठायाठाव	२९०८
नव्हतियाचा सोस होतां	१४०८
नव्हती आली सीसा सुरी अथवा	२२३५
नव्हती ते संत करितां कवित्व	२२९५
नव्हती भेटी तों चि बरें	३१५३
नव्हती माझे बोल। अवघें	९४६
नव्हती माझे बोल जाणां	२६७५
नव्हती हीं माझीं जायाचीं भूषणें	२४३२
नव्हती हे उसणे बोल	३७०३
नव्हतील जपें नव्हतील तपें	३४१८
नव्हतें तें कळों आलें	३५२६
नव्हतों सावचित	३४१
नव्हावा तो बरा मुळीं च संबंध	३५०८
न व्हावें तें जालें। तुह्मां	२०१३
न व्हावें तें जालें देखियेले पाय	३६२
नव्हे आराणूक परि मनीं वाहे	९९३
नव्हे आराणूक संवसारा हातीं	७३
नव्हे कांहीं कवणाचा	१८००
नव्हे खळवादी मता च पुरता	१४५९
नव्हे गुरुदास्य संसारियां	१२०६
नव्हे जाखाई जोखाई	२३७४
नव्हे तुह्मां सरी	२२१५
नव्हें दास खरा	२३०९
नव्हे धीर कांहीं पाठवूं निरोप	१९०१
नव्हे नरनारी संवसारीं अंतरलों	४६२
नव्हेव निग्रह देहासी दंडण	२७१३
नव्हे निष्ठावंत तुज काय बोल	४३९९
नव्हे परि ह्मणवीं दास	३३०७
नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें	१३६२
नव्हे ब्रह्मज्ञान बोलतां सिद्ध	१७८९

नव्हे भिडा हें कारण २७५०
नव्हे मतोळ्याचा वाण २६२७
नव्हे मी आहाच आशेचें बांधलें ३५८५
नव्हे मी शाहाणा ३६०२
नव्हे मी स्वतंत्र अंगाचा पाईक २९७५
नव्हे शब्द एक देशी ६८६
नव्हेसी तूं लांसी ३५२२
नव्हें हें कवित्व टांकसाळी नाणें ४३७४
नव्हें हें गुरुत्व मेघवृष्टि वाणी १५२०
नव्हो आतां जीवीं कपटवसती २४३१
नव्हों आह्मी आजिकालीचीं १३५९
नव्हों गांढे आळसी १६७७
नव्हों वैद्य आह्मी अर्थाचे भुकेले ३३०६
नव्हों सभाधीट ३६५०
न संगतां तुह्मां कळों येतें अंतर १२५३
न संगावें वर्म १३६५
न संडवे अन्न ७१८
न संडावा आतां ऐसें वाटे ठाव २५५६
न संडावा ठाव २१८९
न सडा अवगुण ५८७
नसतां अधिकार उपदेशासी २४६५
नसता चि दाउनि भेव २७०९
नसतों किविलवाणें २५०१
न सरे भांडार २७३८
न सरे लुटितां मागें बहुतां जनीं ३८५१
नसावें ओशाळ १७४४
नसे तरी मनो नसो ७१६
न सोडीं न सोडीं न सोडीं ३५५
न ह्मणे कवणां सिद्ध साधक २०३९
न ह्मणे वो आह्मी आपुलेनि ४३२३
न ह्मणे साना थोर १८७३
नाइकावे कानीं तयाचे ते बोल १४६६
नागर गोडें बाळरूप २३७७
नागलें देखनि चांगलें बोले ४०४०
नागवूनि एकें नागवीं च केलीं १९७२
नाच गाणें माझा जवळील ठाव ५००
नाचतां देखिलीं गाई वत्सें जन ४५५६
नाचावेंसें वाटे मना ३१५६
नाचे टाळी पिटी ७८१
नातुडे जो कवणेपरी २०८९
नाना मतांतरें शब्दाची वित्पत्ति ४३०५
नाम आठवितां सद्गदित कंठीं ८१२

नाम आहे जयापाशीं ४३३६
नाम उच्चारितां कंठीं २७८४
नाम घेतां उठाउठीं २७७०
नाम घेतां कंठ शीतळ शरीर २२५०
नाम घेतां न लगे मोल २३८१
नाम घेतां मन निवे १३७७
नाम घेतां वांयां गेला २३८२
नाम तारक भवसिंधु ४०२१
नाम दुसी त्याचें नको दरषण २३७२
नामदेवें केले स्वप्नामाजी जागें १३१५
नामधारकासी नाही वर्णावर्ण ३८१४
नाम न वदे ज्याची वाचा २९७२
नामपाठ मुक्ताफळांच्या ओवणी ७०९
नाम पावन पावन ४४६५
नामसंकीर्तन साधन पैं सोपें २४४८
नाम साराचें ही सार ५९७
नाम ह्मणतां मोक्ष नाहीं १४३४
नामाचा डांगोरा फिरवीं घरोघरीं ४४७३
नामाचा महिमा बोलिलों ३७६५
नामाची आवडी तो चि जाणा १२०१
नामाचें चिंतन प्रगट पसारा १४३३
नामाचे पवाडे बोलती पुराणें १४५०
नामाचें सार्मथ्य कां रे दवडिसी ३०८२
नामाविण काय वाउगी चावट २८८६
नामासारिखी ४२७७
नारायण आले निजमंदिरासि ४५३३
नारायण भूतीं न कळे जयांसी ४५११
नारायणे ऐसा ३५४०
नारायणें कंस चाणूर मदिला ४५६६
र्नारे तरि काय नुजेडे कोंबडें २२७७
नावडावें जन नावडावा मान २२८१
नावडे जें चित्ता १८७९
नावडे ज्या कथा उठोनियां २०३३
नावडे तरि कां येतील हे भांड ८३०
नाशवंत देह नासेल हा जाणा १४८३
नाहीं आइकत तुह्मी माझे बोल २२१४
नाहीं आलें भक्तिसुख अनुभवा १४१२
नाहीं आह्मां शत्रु सासुरें २०३७
नाहीं आह्मी विष्णुदास ७९६
नाहीं उल्लंघिले कोणाचें वचन ९६८
नाहीं कांटाळलों परि वाटे भय १०१०
नाहीं काम माझें काज तुह्मांसवें १०

नाहीं काष्ठाचा गुमान	१८८७
नाहीं कोणी दिस जात	१६४५
नाहीं खंड जाला	३६६४
नाहीं गुणदोष लिंपों देत अंगीं	३७५२
नाहीं घटिका ह्मणसी	२९९३
नाहीं घाटावें लागत	२३६१
नाहीं जप तप जीवाची आटणी	३८४१
नाहीं जालें मोल कळे देतां	१८४९
नाहीं जों वेचलों जिवाचिया	२२१२
नाहीं तरी आतां कैचा अनुभव	२७०७
नाहीं तुंज कांहीं मागत संपत्ती	२९२०
नाहीं तुझे उगा पडत गळां	१०७९
नाहीं तुह्मां कांहीं लाविलें	३१८६
नाहीं तुह्मी केला	१८६८
नाहीं त्याची शंका वैकुंठनायका	४५१४
नाहीं त्रिभुवनीं सुख या समान	१६९५
नाहीं दिलें कधीं कठिण उत्तर	१६५७
नाहीं दुकळलों अन्ना	६०८
नाहीं देणें घेणें	२०१६
नाहीं देवाचा विश्वास	३५७०
नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोळें	२३१५
नाहीं नाश हरि आठवितां मुखें	४५५२
नाहीं निर्मळ जीवन	७५९
नाहीं पाइतन भूपतीशीं दावा	२१०५
नाहीं पाक होत उफराटे चाली	४०५३
नाहीं बळ योग अभ्यास कराया	४२६४
नाहीं भ्यालों तरी पावलों या	३४६१
नाहीं मज कृपा केली पांडुरंगें	३६३६
नाहीं मज कोणी उरला दुर्जन	३६८२
नाहीं मागितला	१२२४
नाहीं माथां भार	२५१४
नाहीं म्यां वंचिला मंत्र	३२६४
नाहीं येथें वाणी	१३३५
नाहीं रिकामीक परी वाहे मनीं	४४६८
नाहीं रूप नाहीं नांव	२९२५
नाहीं लाग माग	३३६६
नाहीं लोपों येत गुण	२५८६
नाहीं वागवीत जाणिवेचें ओझें	३२१९
नाहीं विचारीत	१८८१
नाहीं शब्दाधीन वर्म आहे दुरी	४३०६
नाहीं संतपण मिळतें हें हाटीं	१२००
नाहीं संतांशीं शरण	४४६७

नाहीं सरों येत कोरड्या उत्तरीं	३७६१
नाहीं सरों येत जोडिल्या वचनीं	२६९६
नाहीं संसाराची चाड	४३६७
नाहीं साजत हो मोठा	७११
नाहीं सुख मज न लगे हा मान	५४६
नाहीं सुगंधाची लागती लावणी	१५१४
नाहीं हानि परी न राहावे निसुर	१९४३
नाहीं हित ठावें	३८३६
नाहीं होत भार घातल्या उदास	२५६८
निगमाचें वन	७००
निघालें तें अगीहूनि	२६०९
निघालें दिवाळें	३१७८
निंचपण बरवें देवा	१२७८
निजदास उभा तात्काळ पायापें	४५२७
निजल्यानं गातां उभा नारायण	१६२४
निजसेजेची अंतुरी	३९७२
निजों नव्हे सकाळ वेळीं	३२७७
नित्य उठोनियां खायाची	३८७४
नित्य या मनासी करितों	२१३२
निंचपणं बरवें देवा	१२७८
निंदक तो परउपकारी	४१८९
निंदावें हें जग	३६१७
निंदा स्तुति करवी पोट	१४०४
निंदी कोणी मारी	४८
निनांवा हें तुला	२९९२
निंबाचिया झाडा साकरेचें	३३८९
निरंजनीं आह्मीं बांधियेलें घर	४३०३
निरांजनीं एकटवाणें	३१५२
निरोधती परि न मोडे विकार	३७२६
निरोधाचें मज न साहे वचन	१२१९
निरोप सांगतां	१७०४
निरोपासी वेचे	१९१३
निर्गुणाचे घ्यावें गुणासी दर्शन	९४९
निर्दयासी तुह्मी करितां दंडण	२५००
निर्धाराचें अवघें गोड	९७४
निर्वाहापुरतें अन्न आच्छादन	१४८१
निर्वैर व्हावें सर्वभूतांसवें	२३८८
निर्वैर होणें साधनाचें मूळ	१४२३
निवडावे खडे	२१२६
निवडुनि दिलें नवनीत	८८६
निवडे जेवण सेवटींच्या घांसें	३३६४
निवडोनि वाण काढिले निराळे	१३२२

निश्चितीनें होतों करूनियां सेवा ३७७७
निष्ठावंत भाव भक्ताचा १४३२
निष्ठुर तो दिसे निराकारपणें २५२५
निष्ठुर मी जालों अतिवादागुणें २५७१
निष्ठुर यासाटीं करतों भाषण ३५१०
निष्ठुरा उत्तरीं न धरावा राग १६७१
निसुर संसार करून २९९९
नीट पाट करूनि थाट ४६३
नीत सांडोनि अवनीत चाले ४२९१
नुगवे तें उगवून सांगितलें भाई १४२
नेघें तुझें नाम १८०२
नेणतियांसाटीं नेणता लाहान ४४९७
नेणती तयांसि साच भाव २०५
नेणती वेद श्रुति कोणी ७४८
नेणपणें नाहीं केला हा बोभाट ३६३४
नेणें अर्थ कांहीं नव्हती माझे १७८४
नेणें करूं सेवा २९२३
नेणें गति काय कवण १६३८
नेणें गाऊं कांहीं धड बोलतां ४८५
नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर ७८
नेणें जप तप अनुष्ठान याग २६८४
नेणें कांुफ्कों कान २७६४
नेणें वर्म धर्म जीं आलीं ४५३२
नेणें सुनें चोर पाहुणा मागता १०५१
नेणों काय नाड २१७९
नेणों वेळा काळ २००
नेत्र झांकोनियां काय जपतोसी ३०४९
नेत्राची वासना ३३७४
नेदावी सलगी न करावा संग ३७१८
नेदी कळों केल्याविण तें ४५१९
नेदी दुःख देखों दासा नारायण ४५४३
नेलें सळेंबळें ३४७२
नेसणें आलें होतें गळ्या २९१२
नो बोलावें ऐसें जनासी उत्तर ३३३१

प
पंचभूतांचा गोंधळ १२११
पंचभूतांचिये सांपडलों संदीं ३१२१
पंचाग्निसाधन करूं ४३९६
पटे ढाळूं आह्मी विष्णुदास १५१६
पडतां जड भारी २३७५

पडली घोर रजनी	४३७८
पंडित तो चि एक भला	१६१८
पंडित वाचक जरी जाला पुरता	२५५
पंडित ह्मणतां थोर सुख	१६१७
पडियेलों वनीं थोर चिंतवनी	१२७३
पडिला प्रसंग कां मी ऐसा	३६०६
पडिलिया ताळा	३६६९
पडिली भुली धांवतें सैराट	३८५
पडिली हे रूढी जगा परिचार	३४७९
पडिलों बाहेरि आपल्या कर्तव्यें	३५७९
पडिलों भोवणीं	८८०
पडोनियां राही	१८३३
पंढरपुरीचें दैवत भजावें	४२९७
पंढरिय माझें माहेर साजणी	१५६३
पंढरीचा महिमा	११३
पंढरीचा वारकरी	४३६१
पंढरीचा वास धन्य ते चि	४०९०
पंढरीची वाट पाहें निरंतर	१५३२
पंढरीची वारी आहे माझे	२३४१
पंढरीची वारी जयांचिये घरीं	४४६४
पंढरीचें बा भूत मोटें	४०३१
पंढरीचे वारकरी	३०३४
पंढरी चोहटा मांडियेला खेळ	१९५
पंढरी पंढरी ह्मणतां	१६२७
पंढरी पावन जालें माझें मन	४३८८
पंढरी पुण्यभूमी भीमा	१५७०
पंढरीस घडे अतित्यायें मृत्य	२१७०
पंढरीस जाऊं ह्मणती	४३२९
पंढरीस जाते निरोप आइका	२२४५
पंढरीस जा रे आलेनो संसारा	३०३६
पंढरीस दुःख न मिळे ओखदा	१११९
पंढरीसी जाय	८५९
पंढरीसी जावें ऐसें माझे मनीं	३९३१
पढियंते आह्मा तुजपाशी मागावे	५२७
पढियंतें मागा पांडुरंगापाशीं	३६०१
पतनासि जे नेती	३५३
पतित पतित	४७६
पतितपावना	१५४७
पतितनिरासी	२०१४
पतित मी पापी शरण आलों	२९७३
पतिव्रता ऐसी जगामध्यें	३९११
पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती	१६१६

पतिव्रते आनंद मनीं १७४८
पतिव्रतेची कीर्त्ती वाखाणितां ४२०४
पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण ९३६
पत्र उचटिलें प्रेत्नें ३०११
पदोपदीं दिलें अंग ८८५
पदोंपदीं पायां पडणें ३३९७
पंधरा दिवसां एक एकादशी २०९९
पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार ४३३१
पय दध घृत आणि नवनीत ४३३०
परउपकारें कायावाचा मन २२७५
परतें मी आहें सहज चि २८७२
परद्रव्य परकांता ३१९९
परद्वव्य परनारी। अभिळासूनि २८४५
परद्रव्य परनारीचा अभिळास १६३५
परपीडक तो आह्मां २७८२
परपुरुषाचें सुख भोगे तरी २५
परमानंदा परमपुरुषोत्तमरामा १५७९
परमार्थी तो न ह्मणावा आपुला १५२८
परमेष्ठिपदा ५८२
परस्त्रीतें ह्मणतां माता १६१२
पराधीन माझें करूनियां ३६३३
पराविया नारी माउलीसमान ६१
पराविया नारी रखुमाईसमान ५२४
परि तो आहे कृपेचा सागर १९३५
परिमळ ह्मूण चोळूं नये फूल ६४
परिमळें काष्ठ ताजवां तुळविलें २०३६
परिस आतां माझी परिसावी ४१६५
परिस काय धातु १७९१
परिसाचे अंगें सोनें जाला ३३२२
परिसें गे सुनेबाई ४१९८
परिसें वो माते माझी विनवणी १६५०
परिसोनि उत्तर १९२७
पर्वकाळीं ४२७४
पवित्र तें अन्न २८०६
पवित्र तें कुळ पावन तो देश ४२७६
पवित्र तो देह वाणी पुण्यवंत १५४०
पवित्र व्हावया घालीन लोळणी १९६३
पवित्र सुदिन उत्तम दिवस ५०६
पवित्र सोंवळीं ६८
पवित्र होईन चरित्रउच्चारें १६४३
पशु ऐसे होती ज्ञानी १४२४
पसरूनि राहिलों बाहो २४१४

पसरोनि मुखें ४३४६
पहा ते पांडव अखंड वनवासी ३९७१
पहावया तुझा जरि बोलें अंत ४२६६
पहावा नयनीं विठ्ठल चि ४४०७
पहिली माझी ओवी ओवीन ४३३४
पळाले ते भ्याड १६४
पक्षीयाचे घरीं नाहीं सामुगरी ४४१०
पाईक जो जाणे पाइकींनी भाव १०५८
पाईक तो प्रजा राखोनियां कुळ १०६०
पाइकपणें खरा मुशारा १०६२
पाईकपणें जोतिला सिद्धांत १०५६
पाइकांनीं पंथ चालविल्या वाटा १०५९
पाइकीचें सुख पाइकासी ठावे १०५७
पाखांड्यांनीं पाठी पुरविला ७९७
पांगुळ जालों देवा नाहीं हात ४२३
पाचारितां धांवे २४०८
पाटीं पोटीं देव ७२८
पाठवणें पडणें पायां ९५७
पाठवाल तेथें गर्जेन पवाडे ३५८३
पाठीलागा काळ येतसे ३५०५
पाठी लागे तया दवडीं दुरी ३२९७
पाठीवरी भार ३७२६
पाठेळ करितां न साहावे वारा २३९१
पाडावी ते बरी ३१९०
पांडुरंगा आतां ऐका हे विनंती ३९६९
पांडुरंगा ऐसा सांडुनि वेव्हारा ३४७५
पांडुरंगा करूं प्रथम नमना ४४८१
पांडुरंगा कांहीं आइकावी मात २१४१
पांडुरंगा कृपाळुवा दयावंता ४०७०
पांडुरंगा तुझे काय वाणूं गुण ३०८८
पांडुरंगे पांडुरंगे २४४४
पांडुरंगे पाहा खादलीसे रडी ४१५१
पांडुरंगें सत्य केला अनुग्रह ४३०४
पाणिपात्र दिगांबरा १५२५
पाण्या निघाली गुजरी ४२९४
पात्र शुद्ध चित्त गोही ३२४७
पानें जो खाईल बैसोनि कथेसी ३९७८
पाप ताप दैन्य जाय उठाउठीं १५४१
पाप ताप माझे गुणदोष ४४१५
पाप पुण्य दोन्ही वाहाती मारग १९९३
पापपुण्य सुखदुःखाचीं मंडळें १४७१
पापाचिया मुळें ४१६६

पापाची मी राशी	२८६२
पापाची वासना नको	४३८६
पापाचीं संचितें देहासी	४०३५
पापिया चांडाळा हरिकथा	३८९२
पापी तो नाठवी आपुल्या	४००७
पापी ह्मणों तरी आठवितों पाय	१५३७
पायरवे अन्न	२०५२
पायांच्या प्रसादें	१८४६
पाया जाला नारू	४३५५
पायां पडावें हें माझें	२८२१
पायांपासीं चित्त	३५११
पाया लावुनियां दोरी	३८२१
पावतों ताडन	३४९२
पावला प्रसाद आतां	५०३
पावलें पावलें तुझें आह्मां सर्व	३७
पावलों पंढरीं वैकुंठभुवन	३८८४
पावलों पावलों	३५७
पावलों प्रसाद इच्छा केली	४१३७
पावलों हा देह कागतालिन्यायें	४०२३
पाववावें ठाया	१२६२
पाववील ठाया	७७८
पावावे संतोष	२२१८
पावे ऐसा नाश	५८८
पाषाण देव पाषाण पायरी	२२६०
पाषाण परिस भूमि जांबूनद	४०३४
पाषाण प्रतिमा सोन्याच्या	३८६१
पाषाण फुटती तें दुःख	४५२१
पाहतां तव एकला दिसे	२२७०
पाहा किती आले शरण	२६३७
पाहा कैसे कैसे	३७२४
पाहातां गोवळी	२०२
पाहातां ठायाठाव	२४४७
पाहातां रूप डोळां भरें	२९७७
पाहातां श्रीमुख सुखावलें सुख	९२८
पाहातां हें बरवें जालें	३५८०
पाहाती गौळणी	१६६
पाहातोसी काय	१३०८
पाहा रे तमासा तुमचा येथें	२२८
पाहा रे हें दैवत कैसें	१३८३
पाहावया माजी नभा	३९९
पाहा हो कलिचें महिमान	३०२५
पाहा हो देवा कैसे जन	३२३१

पाहुणे घरासी	१५९५
पाहुनियां ग्रंथ करावें	२३१९
पाहें तिकडे दिशा ओस	३३२४
पाहें प्रसादाची वाट	५११
पाहें मजकडे भरोनियां दृष्टी	१५३४
पाहों ग्रंथ तरी आयुष्य नाहीं	२९७६
पाळितों वचन	३५२३
पाळियेले लळे	४२३०
पाळिलीं पोसिलों	२१४०
पिकलिये सेंदे कडुपण	४२८०
पिकल्या सेताचा आह्मां देतो	१९७०
पिकवावें धन	३११५
पिंडदान पिंडें ठेविलें करून	२६६१
पिंड पदावरी	१६५२
पिंडपोशकाच्या जळो	४०४१
पिंड पोसावे हे अधमाचें ज्ञान	५४८
पुंडलिक भक्तराय	३१६६
पुंडलिकांचे निकटसेवे	३४०२
पुढिलाचें इच्छी फळ	९२२
पुढिलांचे सोई माझ्या मना	२६२४
पुढिलिया सुखें निंब देतां भले	२१३७
पुढें आतां कैंचा जन्म	११३४
पुढें जेणें लाभ घडे	२७९९
पुढें तरी चित्ता	१९२०
पुढें येते देवी	४१७
पुण्य उभें राहो आतां	२७३४
पुण्य परउपकार पाप ते परपीडा	१०२१
पुण्यपापा ठाव नाहीं	४११८
पुण्य फळलें बहुतां दिवसां	४१३०
पुण्यवंत व्हावें	३२६
पुण्यविकरा तें मातेचें गमन	१२९२
पुत्र जाला चोर	३१६४
पुत्राची वार्ता	३६०
पुनीत केलें विष्णुदासीं	१०७१
पुरली धांव कडिये घेंई	२०८६
पुरविली आळी	४७१
पुराणप्रसिद्ध सीमा	२३८०
पुराणींचा इतिहास	१३८१
पुरुषा हातीं कंकणचुडा	२१८२
पुष्ट कांति निवती डोळे	२२६८
पुसावें ते ठाईं आपुल्या आपण	२४१७
पुसावेंसें हें चि वाटे	१२१२

पूजा पूज्यमान	७४१
पूजा समाधानें	३३५
पूजा एकासनीं आसनीं आसन	२७४
पूर आला आनंदाचा	६९५
पूर्वजांसी नर्का जाणें तें	२०८१
पूर्वी पूर्वजांची गती	२९९८
पूर्वी बहुतांचे केले प्रतिपाळ	४४०८
पूर्वीहूनि बहु भक्त सांभाळिले	३८७६
पेणावलें ढोर मार खाय पाठी	३२९०
पैल आला राम रावणासी	१०९६
पैल आली आगी कान्हो काय रे	२०३
पैल आले हरी	१५९१
पैल घरीं जाली चोरी	१७०१
पैल दिसतील भार	१५९३
पैल सांवळें तेज पुंजाळ कैसें	११०७
पोट धालें आतां जीव आवडी	२६१६
पोट धालें मग न लगे परती	३४६३
पोट लागलें पाठीशीं	१५६४
पोटाचे ते नट पाहों नये छंद	५५३
पोटापुरतें काम	१३४९
पोटासाटीं खटपट करिसी	२७४५
पोटीं जन्मती रोग	६८५
पोटीं शूळ अंगीं उटी चंदनाची	२१५४
पोरा लागलीसे चट	४१७८
पृथक मी सांगों किती	१२९१
प्रगटलें ज्ञान	३२४८
प्रगट व्हावें हे अज्ञानवासना	४२६७
प्रजन्यें पडावें आपुल्या स्वभावें	१९९९
प्रजी तो पाईक ओळीचा नाईक	१०६५
प्रथम नमन तुज एकदंता	६०९
प्रथमारंभीं लंबोदर	६१०
प्रपंच परमार्थ संपादोनी	४०७८
प्रपंच वोसरो	२९६१
प्रपंचाची पीडा सोसिती	४१९०
प्रमाण हें त्याच्या बोला	२०९१
प्रल्हादकारणें नरसिंहीं	३०८१
प्रवृत्तिनिवृत्तीचे आटूनियां	४३०८
प्रसिद्ध हा असे जगा	२५५५
प्राक्तनाच्या योगें आळशावरी	४०९६
प्राण समर्पिला आह्मी	२७७१
प्राणियां एक बीजमंत्र	२४९४
प्रायश्चित्तें देतो तुका	२१८५

प्रारब्ध क्रियमाण	२९४
प्रारब्धा हातीं जन	१४०१
प्रारब्धें चि जोडे धन	२८३९
प्रीति करी सत्ता	३३४२
प्रीति नाहीं राया वर्जिली	२३८४
प्रीतिभंग माझा केला पांडुरंगा	९५१
प्रीताचा कलहे पदरासी	२२४१
प्रीतीचा तो कळवळा	३६९३
प्रीतीचिया बोला नाहीं	२८५०
प्रीतीच्या भांडणा नाहीं	३६८८
प्रेम अमृताची धार	२३३३
प्रेम अमृतें रसना ओलावली	२०२४
प्रेम जडलें तुझें पायीं	४१४२
प्रेम तेथें वास करी	१८६६
प्रेम देवाचें देणें	२८३१
प्रेम नये सांगतां बोलतां	३५६०
प्रेमभेटी आळिंगण	३१९३
प्रेमसूत्र दोरी	७७७

फ

फजितखोरा मना किती तुज	९९०
फटकाळ देव्हारा फटकाळ	३३७२
फट्याचे बडबडे चवी ना	४१८६
फल पाया तो खुस भया	११८६
फळकट तो संसार	२७२३
फळ देठींहून झडे	१८४०
फळ पिके देंठीं	१८४२
फळाची तों पोटीं	२०५७
फावलें तुह्मां मागें	२४१९
फिरंगी वाखर लोखंडाचे विळे	५६०
फिरविलें देऊळ जगामाजी	४२९८
फिराविलीं दोनी	२८२६
फुकाचें ते लुटा सार	२३८३
फुगडी फू फुगडी घालितां	१५०
फुगडी फू सवती माझें तूं	१५१
फोडिलें भांडार	३२४०
फोडुनी सांगडी बांधली	९४१

ब

बंधनाचा तोडूं फांसा	२६४४

बरगासाटीं खादलें शेण	८४५
बरवयांबरवंट	२८९२
बरवा झाला वेवसाव	६१२
बरवा बरवा बरवा रे देवा तूं	६७८
बरवी नामावळी	१२९५
बरवी हे वेळ सांपडली संधि	३८५४
बरवें ऐसें आलें मना	३२४२
बरवें जालें लागलों कारणीं	६४४
बरवें झालें आलों जन्मासी	६३३
बरवें दुकानीं बैसावें	४०३२
बरवें देशाउर जालें	८४०
बरवें बरवें केलें विठोबा बरवें	३५६
बरवें माझ्या केलें मनें	३७६९
बरा कुणबी केलों.	३२०
बरा जाणतोसी धर्मनीती	३०००
बराडियाची आवडी पुरे	३४६७
बरा रे निर्गुणा नष्ट नारायणा	२९८४
बरें आह्मां कळों आलें देवपण	२२३८
बरें जालीयाचे अवघें सांगाती	४४३०
बरें जालें आजिवरी	६४०
बरें जालें आलीं ज्याची	८८१
बरें जालें गेलें	५७०
बरें जालें देवा निघालें दिवाळें	१३३०
बरें सावधान	२२०३
बसतां चोरापाशीं तैसी होय	४१९२
बहु उतावीळ भक्तीचिया काजा	१२१५
बहु काळीं बहु काळीं	१८२
बहु कृपावंतें माझीं मायबापें	३६१२
बहु क्लेशी जालों या हो	४१८२
बहु जन्मांतरें फेरे	३२३७
बहुजन्मां शेवटीं स्वामी तुझी	४४१२
बहुजन्में केला लाग	३०३८
बहुजन्में सोस केला	३४६९
बहु टाळाटाळी	३०६८
बहुडविले जन मन जालें निश्चळ	४९९
बहुत असती मागें सुखी केलीं	३८४५
बहुत करूनि चाळवाचाळवी	२६२५
बहुत कृपाळु दीनाचा दयाळु	३०८७
बहुत जाचलों संसारीं	६५४
बहुत प्रकार परि ते गव्हाचे	३१२३
बहुत सोसिले मागें न कळतां	१३८४
बहुतांचे संगती	४११

बहुतांच्या आह्मी न मिळों	२८
बहुतां छंदांचें बहु वसे जन	२३३१
बहुतां जन्मां अंतीं जन्मलासी	४३३७
बहुतां जन्मां अंतीं। जोडी	१३५०
बहुतां जन्मींचें संचित	१५४३
बहुतां जातीचा केला अंगीकार	२६१५
बहुतां दिसांची आजि जाली	३१६३
बहुतां पुरे ऐसा वाण	२५०८
बहुतां रीती काकुलती	९५४
बहुते गेलीं वायां	७९४
बहु दिस नाहीं माहेरिंची भेटी	१९५०
बहु दूरवरी	१०५५
बहु देवा बरें जालें	२५२६
बहु धीर केला	३७१७
बहु नांवें ठेविलीं स्तुतीचे	२३९७
बहु फिरलों ठायाठाव	३७५५
बहु बरा बहु बरा	१८३
बहु बरें एकाएकीं	२२१०
बहु बोलणें नये कामा	३००६
बहु भितों जाणपणा	१९८४
बहु या प्रपंचें भोगविल्या खाणी	३८६२
बहु वाटे भये	२१९८
बहु होता भला	२७५१
बहुक्षीदक्षीण	१२६४
बळ बुद्धी वेंचुनियां शक्ती	१८७२
बळियाचे अंकित	५२१
बळिवंत आह्मी समर्थाचे दास	१७७१
बळिवंत कर्म	२८०८
बळी ह्मणे आजि दुर्वासिया	३०९०
बळें डाईं न पडे हरी	१७०
बळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग	८६०
बाइल तरी ऐसी व्हावी	२९६७
बाइल मेली मुक्त जाली	७७२
बाइले आधीन होय ज्याचें	२९६८
बाईल चालिली माहेरा	४४५४
बाईल सवासिण आई	८३
बांधे सोडी हें तों धन्याचिये	१८२२
बाप करी जोडी लेंकराचे ओढी	३२५७
बाप माझा दिनानाथ	३८२७
बारंबार काहे मरत अभागी	११६६
बारावर्षे बाळपण	४२२६
बाराही सोळा गडियांचा मेळा	१९१

बा रे कृष्णा तुझें मुख कीं	४२१८
बा रे पांडुरंगा केव्हां येशी	४३९५
बाहिर पडिलों आपुल्या कर्तव्यें	६७७
बाळ काय जाणे जीवनउपाय	३४०३
बाळपणीं हरि	३३८
बाळपणें ऐसीं वरुषें गेलीं बारा	३०७१
बाळ बापा ह्मणे काका	१३५
बाळ माते निष्ठुर होये	३९५९
बाळ माते लाते वरी	३२१०
बाळ माते पाशीं	१०२४
बाळाचें जीवन	३१४३
बाळेंविण माय क्षणभरि न राहे	३९०३
बीज पेरे सेतीं	२०७५
बीज भाजुनि	४२८३
बीजापोटीं पाहे फळ	१३३९
बीजीं फळाचा भरवसा	३६९०
बुडतां आवरीं	७३२
बुद्धिमंद शिरीं	२०८०
बुद्धिहीना उपदेश	२७०२
बुद्धिहीनां जडजीवां	२३९५
बुद्धीचा जनिता लक्ष्मीचा पति	१२२७
बुद्धीचा पालट धरा रे कांहीं	१०६७
बेगडाचा रंग राहे कोण काळ	२१५५
बैसतां कोणापें नाहीं समाधान	१९४२
बैसलों तो कडियेवरी	३१४८
बैसलोंसे दारीं	२०५५
बैसवुनि फेरी	१४५
बैसो आतां मनीं	४३४९
बैसों खेळूं जेवूं	७२७
बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त	१७२७
बैसोनि निश्चळ करीं त्याचें	११४०
बैसोनियां खाऊं जोडी	३४६०
बैसों पाठमोरी	२४११
बोध्य अवतार माझिया	४१४०
बोलणें चि नाहीं	१४१७
बोलणें ते आह्मी बोलों उपयोगीं	३५०३
बोलतां वचन असा पाठमोरे	२२१९
बोलतों निकुरें	१२२६
बोल नाहीं तुझ्या दातृत्वपणासी	३८१३
बोल बोलतां वाटे सोपें	७०५
बोल बोले अबोलणे	४३३
बोलविलें जेणें	१७६७

बोलविसी तरी	३४६४
बोलविसी तैसें आणीं अनुभवां	३०४
बोलविसी माझें मुख	१७४७
बोलाचे गौरव	२९६४
बोलायाचा त्यासीं	८९
बोलाल या आतां आपुल्यापुरतें	२४३४
बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल	१३३१
बोलावें तें आतां आह्मी	३३०४
बोलावें ते धर्मा मिळे	३१९
बोलावें ह्मूण हे बोलतों उपाय	२५८९
बोलिलिया गुणीं नाहीं पाविजेत	३६३८
बोलिलीं तीं काय	१९५६
बोलिलीं लेंकुरें	२३२४
बोलिलें चि बोलें पडपडताळूनि	१२७०
बोलिलेती देवऋृषी दुर्वासया	३०९२
बोलिलों उत्कर्षे	४०९७
बोलिलों जैसें बोलविलें देवें	२००३
बोलिलों तें आतां कांहीं	१९३३
बोलिलों तें आतां पाळावें वचन	१५९९
बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता	१३१
बोलिलों ते धर्म अनुभव अंगें	३३२१
बोली मैंदाची बरवी असे	६०३
बोले तैसा चाले	४२९३
बोलों अबोलणें मरोनियां जिणें	५३७
बोलोनि दाऊं कां तुह्मी नेणा	१२४७
बोलोनियां काय दावू	३२७६
बोळविला देह आपुलेनि हातें	२६६०
बोध्यअवतार माझिया	४१४०
ब्रह्मचारी धर्म घोकावें अक्षर	१४७९
ब्रह्म न लिंपे त्या मेळें	७०२
ब्रह्मनिष्ठ काडी	२५३
ब्रह्मयाचे वेद शंखासुरें नेले	३०७८
ब्रह्मरसगोडी तयांसी फावली	१६३२
ब्रह्मरस घेईं काढा	२०६४
ब्रह्मरूपाचीं कर्मे ब्रह्मरूप	१५१३
ब्रह्महत्या मारिल्या गाई	२७०
ब्रह्मज्ञान जरी कळे उठाउठी	३०५४
ब्रह्मज्ञान जेथें आहे घरोघरीं	३८३४
ब्रह्मज्ञान तरी एके दिवसीं कळे	२४६८
ब्रह्मज्ञान दारीं येतें काकुलती	३३८६
ब्रह्मज्ञानाची भरोवरी	३५५५
ब्रह्मादिक जया लाभासि ठेंगणे	४४

ब्रह्मादिकां न कळे खोळ १९६
ब्राह्मण तो नव्हे ऐसी ज्याची १२२९
ब्राह्मण तो याती अंत्यज असतां १२३०
ब्राह्मणा न कळे आपुलें तें वर्म ४३५६
ब्रिदावळी ज्याचे रुळते चरणीं ४५७९
ब्रीद याचें जगदानी ३६२५
ब्रीद मेरे साइंयाके ११९५

भ
भक्तऋणी देव बोलती पुराणें ९२
भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास १३०९
भक्तजनां दिलें निजसुख देवें ४४९३
भक्त देवाघरचा सुना २८९१
भक्त भागवत जीवन्मुक्त संत १०७३
भक्तवत्सल दीनानाथ ३३७१
भक्तांचा महिमा भक्त चि १४४०
भक्तांचीं सांकडीं स्वये सोसी ३९८४
भक्ताविण देवा १०२
भक्तां समागमें सर्वभावें हरि २०२३
भक्तांहूनि देवा आवडे तें काई ३९९२
भक्ता ह्मणऊनि वंचावें जीवें २२०८
भक्ति आह्मी केली सांडुनी ४१३३
भक्तिऋण घेतलें माझें ४२९७
भक्ति ज्याची थोडी पूर्ण ४२२१
भक्ति ज्याची थोडी ३०३९
भक्ति तें नमन वैराग्य तो २१७७
भक्ति तों कठिण शुळावरील १५३६
भक्तिप्रतिपाळे दीन वो वत्सळे ५२५
भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां ३०३९
भक्तिभाव आह्मी बांधिलासे १९९८
भक्तिभावें करी बैसोनि निश्चित ३८७१
भक्तिसुखें जे मातले २०९८
भक्तीचिया पोटीं बोध कांकडा १५७७
भक्तीचिया पोटीं रत्नाचिया १३२४
भक्तीचें वर्म जयाचिये हातीं ४११४
भक्तीवीण जिणें जळो ४४२०
भक्तीसाटीं केली यशोदेसी ४५१०
भगवंता तुजकारणें मेलों ४२८
भगवें तरी श्वान सहज ३८५२
भजन घाली भोगावरी ३११
भजन या नासिलें हेडि ३५४२

भजनें चि जालें ३१९१
भजल्या गोपिका सर्व भावें ४५७३
भय नाहीं भेव ४०५६
भय वाटे पर ११११
भय हरिजनीं २८८३
भय होतें आह्मीपणे ३७३२
भयाची तों आह्मां चित्तीं २४०७
भरणी आली मुक्त पेठा ४४७६
भरला दिसे हाट १४१९
भरिला उलंडूनि रिता करी घट ३७९
भलते जन्मीं मज ३३९३
भला ह्मणे जन २१४५
भले भणवितां संतांचे सेवक ३७३
भले रे भाई जिन्हें किया चीज ११५८
भले लोक तुज बहु मानवती १९७६
भले लोक नाहीं सांडीत ३८०२
भलो नंदाजीको डिकरो ३८३
भल्याचें कारण सांगावें २७३२
भल्याचें दरुषण ३०३०
भवसागर तरतां ३४६
भवसिंधूचें काय कोडें ७१०
भवसिंधूचें हें तारूं ९२७
भवाचिया संगें बहू च नाडिले ४१२३
भाग त्या सुखाचे वांकड्यां ४५३८
भागलेती देवा १९५३
भागलों मी आतां आपुल्या ३८५०
भागल्यांचा तूं विसावा ३५७४
भागल्याचें तारूं शिणल्याची ४१६०
भाग सीण गेला २४६२
भाग्यवंत आह्मी विष्णुदास ४२५०
भाग्यवंत ह्मणों तयां २१०३
भाग्यवंता ऐशी जोडी २६०२
भाग्यवंतां हें चि काम १३५५
भाग्यवंता हे परवडी २२९७
भाग्याचा उदय २७०६
भाग्यालागीं लांचावले ४२०३
भाग्यासाटीं गुरु केला ४१७२
भाग्यें ऐसी जाली जोडी ९३५
भांडवल माझें लटिक्याचे गांठी ३४३९
भांडवी माऊली कवतुकें बाळा ८३७
भांडावें तें गोड १४९९
भांडावें तों हित १६७६

भाते मरूनि हरिनामाचे	३९५७
भार घालीं देवा	१६२८
भार देखोनि वैष्णवांचे	२२४२
भारवाही नोळखती या	४५३६
भाव तैसें फळ	७४२
भाव दावी शुद्ध देखोनियां	४५१२
भाव देवाचें उचित	५८५
भाव धरिला चरणीं ह्मणवितों	३९९६
भाव धरी तया तारील पाषाण	५७३
भाव नाहीं काय मुद्रा वाणी	१७६१
भावनेच्या मुळें अंतरला	४५२३
भावबळें कैसा जालासी लाहान	१२३९
भावबळें विष्णुदास	१४०६
भावभक्तिवादें करावें कीर्तन	४१०२
भावाचिया बळें	१८८९
भावापुढें बळ	१८८८
भाविकांचें काज अंगें देव करी	२४४९
भाविकां हें वर्म सांपडलें	२०२२
भावें गावें गीत	२४२९
भिऊं नका बोले झाकुनियां	२०४
भिक्ष्यापत्र अवलंबणें	१४०५
भीत नाहीं आतां आपुल्या	५५९
भीतरी गेले हरी राहा क्षणभरीत्र	४९७
भीमातिरींचा नाटक	४३७३
भीमातीरवासी	४४०२
भीमातीरीं एक वसलें नगर	१९४
भीस्त न पावे मालथी	११८५
भुंकती तीं द्यावीं भुंकों	५५४
भुंकुनियां सुनें लागे	३२७०
भुके नाहीं अन्न	२७०४
भुक्ति मुक्ति तुझें जळों	२९८६
भूक पोटापुरती	३२००
भूतदयापरत्वें जया तया परी	१४५१
भूत नावरे कोणासी	४३७१
भूतबाधा आह्मां घरीं	२२११
भूत भविष्य कळों यावें	१०७४
भूतांचिये नांदे जीवीं	३२०४
भूतीं देव ह्मणोनि भेटतों	२९१०
भूतीं भगवंत	८२७
भूतां भगवद्भाव	२७६३
भूमि अवघी शुद्ध जाणा	३११२
भूमीवरि कोण ऐसा	३९४७

भेटीची आवडी उताविळ मन	३४०८
भेटीलागीं जीवा लागलीसे	२८११
भेटीलागीं पंढरिनाथा	३५७६
भेटीवांचोनियां दुजें नाहीं	३८९६
भेणें पळे डोळसा	२६९९
भेद तुटलियावरी	३२०६
भेदाभेदताळा न घडे	३१३०
भोक्ता नारायण लक्ष्मीचा पति	२८७४
भोग तो न घडे संचितांवांचूनि	२३८७
भोग द्यावे देवा	१८४५
भोग भोगावरी द्यावा	१६२९
भोगावरी आह्मीं घातला पाषाण	८५०
भोगियेल्या नारी	४४३७
भोगिला गोपिकां यादवां	४५८०
भोगी जाला त्याग	४०१५
भोगें घडे त्याग	९३
भोजन तें पाशांतीचें	१३४८
भोजनाच्या काळीं	१९८
भोंदावया मीस घेऊनि	४२५४
भोरप्यानें सोंग पालटिलें वरी	९४
भोवंडींसरिसें	१३५८
भोळे भक्ति भाव धरिती	४०२९
भोळे भाविक हे जुनाट	४२६२
भ्यालीं जिवा चुकलीं देवा	२३८
भ्रतारअंगसंगें सुखाची	४०९९
भ्रतारेंसी मार्या बोले	४२२३
भ्रमना पाउलें वेचिलीं वाव	१३३७

म

मऊ मेनाहूनि आह्मी विष्णुदास	९८१
मंगळाचा मंगळ सांटा	३७६४
मज अंगाच्या अनुभवें	१२६१
मज अनाथाकारणें	३४३२
मज अभयदान देईं दातारा	३७१९
मज ऐसें कोण उद्धरिलें सांगा	१८७०
मज कांहीं सीण न व्हावा	३६८३
मज कोणी कांहीं करी	२०४८
मज चि भोंवता केला येणें जोग	५६६
मज ते हांसतील संत	६३९
मज त्याची भीड नुल्लंघवे देवा	१९८७
मज दास करी त्यांचा	५७

मज नष्टा माया मोह नाहीं लोभ ३३४८
मज नाहीं कोठें उरला दुर्जन ३८३५
मज नाहीं तुझ्या ज्ञानाची ते १६८३
मज नाहीं धीर २१६५
मज पाहातां हें लटिकें सकळ १२१०
मजपुढें नाहीं आणीक बोलता २१५६
मज माझा उपदेश २९४९
मजशीं पुरें न पडे वादें १६७३
मज संतांचा आधार ७५४
मजसवें आतां येऊं नका कोणी १९
मजसवें नको चेष्टा ५८४
मजुराचें पोट भरे २७९४
मढें झांकूनियां करिती पेरणी ८१७
मणि पडिला दाढेसी मकरतोंडीं ४२६१
मतिविण काय वर्णूं तुझें ध्यान ३३४९
मंत्र चळ पिसें लागतें सत्वर २२९४
मंत्रयंत्र नहि मानत साखी ११४८
मत्स्यकूर्मशेषा कोणाचा आधार ३०१८
मथनासाटीं धर्माधर्म ४१०५
मथनीचें नवनीत २५३५
मथनें भोगे सार ३७११
मथुरेच्या राया १६५३
मदें मातलें नागवें नाचे २०२०
मधुरा उत्तरासवें नाहीं चाड ३८६९
मन उताविळ ३३७५
मन करा रे प्रसन्न २९१
मन गुंतलें लुलयां ७४९
मन जालें भाट ३४८५
मन माझें चपळ न राहे निश्चल १७३१
मनवाचातीत तुझें हें स्वरूप ८०४
मन वोळी मना ७०१
मना एक करीं १९६४
मनाचिये साक्षी जाली सांगों ३६५४
मना वाटे तैसीं बोलिलों वचनें ४५८२
मना सांडिं हे वासना दुष्ट ११०९
मनीं भाव असे कांहीं ४१५९
मनीं वसे त्याचें आवडे उत्तर ९९२
मनु राजा एक देहपुरी ४२९
मनें हरिरूपीं गुंतल्या वासना ४४९४
मनोमय पूजा ७२९
मनोरथ जैसे गोकुळींच्या जना ४४८५
मरण माझें मरोन गेलें २३३८

मरणा हातीं सुटली काया १३६१
मरणाही आधीं राहिलों मरोनी २४
मरोनि जाईन गुणनामावरूनि ३०२०
मरोनियां गेली माया ३५२४
मविले मविती १९१५
मशीं पोरा घे रे बार १५४
मस्तकीं सहावें ठांकियासी ४१९३
महा जी महादेवा महाकाळमर्दना १५७४
महारासि सिवे ५५
महुरा ऐसीं फळें नाहीं १२८५
माउलीची चाली लेंकराचे ३६७१
माउलीसी सांगे कोण ३९८२
माकडा दिसती कंवटी नारळा ३४०७
माकडें मुठीं धरिले फुटाणे १३२
माग विटूदांडू २०१
मागणें तें एक तुजप्रति आहे १५८०
मागणें तें मागों देवा २०७२
मागता भिकारी जालों तुझे द्वारीं १७६०
मागतां विभाग १४१३
मागतियाचे दोनि च कर १७३२
मागत्याची कोठें घडते निरास ३६८६
मागत्याची टाळाटाळी ४२००
मागायाची नाहीं इच्छा ९५६
मागायास गेलों सिदोरी २३४
मागितल्यास आस करा ३५२८
मागितल्यास कर पसरी २२२३
मागील ते आटी येणें घडे २६७७
मागील विसर होईल सकळ ३६०७
मागुता हा चि जन्म पावसी ६५१
मागें असताशी कळला ३००३
मागें चिंता होती आस ३३०८
मागें जैसा होता माझे अंगीं २१३४
मागेन तें एक तुज । देई २९३०
मागें नेणपणें घडलें तें क्षमा २८१
मागें पुढें जालों लाटा ३७२७
मागें पुढे नाहीं ३७७०
मागें पुढे पाहें सांभाळूनि दोनी २२७
मागें बहुत जाले खेळ ४००४
मागें बहुतां जनां राखिले ३१०६
मागें बहुतां जन्मीं हें चि २२९२
मागें शरणागत तारिले बहुत १०१७
मागें संतीं होतें जें जें सांगितलें ८९८

माझा घात पात अथवा हित ४१०६
माझा तंव खुंटला उपाव ६४८
माझा तुह्मी देवा केला अंगीकार १८९५
माझा देव्हारा साचा ४१६
माझा पाहा अनुभव ३१००
माझा मज नाहीं २२२१
माझा स्वामी तुझी वागवितो २८७५
माझिया जीवाचा मज निरधार ४०७३
माझिया जीवासी हे चि पैं ३१३४
माझिया तो जीवें घेतला हा ४२०९
माझिया देहाची मज नाहीं चाड २१७३
माझिया मनाची बैसली ३६२६
माझिया मीपणा। जाला ५२
माझिया मीपणावर पडो २८२५
माझिया संचिता १७५६
माझिये जातीचें मज भेटो कोणी १९९५
माझिये बुद्धीचा खुंटला उपाव ३६२०
माझिये मनींचा जाणा हा निर्धार ३७१
माझिये मनींचा जाणोनियां भाव ३६९
माझी आतां लोक सुखें निंदा ३३९१
माझी आतां सत्ता आहे २४१८
माझी पाठ करा कवी ७९
माझी भक्ती भोळी ९७८
माझी मज जाती आवरली देवा २५०९
माझीं मेलीं बहुवरि १४२९
माझी विठ्ठल माउली १११३
माझी सर्व चिंता आहे ३०६२
माझे अंतरींचें तो चि जाणे २१४२
माझें आराधन १०४२
माझें कोण आहे तुजविण देवा ४३९२
माझे गडी कोण कोण २१२
माझें घोंगडें पडिलें ठायीं १०८६
माझें चित्त तुझे पायीं ३३६०
माझें जड भारी २५१५
माझें जीवन तुझे पाय ३८२८
माझे तों फुकाचे कायेचे चि ३६७४
माझे तों स्वभाव ३५०७
माझें परिसावें गाऱ्हाणें ४३८३
माझे पाय तुझी डोई २८०५
माझें मज आतां न देखे १७६३
माझे मज कळों येती अवगुण २८५१
माझें मज द्यावें ३४१६

माझें मन पाहे कसून ३९४६
माझे मनोरथ पावले सिद्धी १४६९
माझें मागणें ४०६१
माझें माझ्या हाता आलें २५७२
माझें माथां तुझा हात ३६१८
माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ ३८८९
माझे लेखीं देव मेला २३३९
माझे विषयीं तुज पडतां विसर ३५७२
माझे हातीं आहे करावें ३३४५
माझें ह्मणतां याला कां रे नाहीं ३०१
माझ्या इंद्रियासी लागलें भांडण ३४४७
माझ्या कपाळाच्या गुणें ३६५२
माझ्या बापें मज दिधलें भातुकें २३२२
माझ्या भावें केलीं जोडी ३०१२
माझ्या मना लागो चाळा २९५३
माझ्या मुखावाटा नयो हें वचन ९४४
माझ्या मुखें मज बोलवितो हरि ३३८२
माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव ८६७
मांडवाच्या दारा १२१
मांडे पुऱ्या मुखें सांगों जाणें २८८
माता कापी गळा २८४२
मातेचिये चित्तीं २७६६
मातेची अवस्था काय जाणे ३४१०
मातेचीं जो थानें फाडी १३४०
माते लेकरांत भिन्न ३९३७
मातेविण बाळा १८१४
मान अपमान गोवे १०९
मान इच्छी तो अपमान पावे २७६८
मानामान किती १३०७
मानावया जग व्हावी द्रव्यमाया ११२९
मानी भक्तांचे उपकार १४९५
मानूं कांहीं आह्मी आपुलिया ४२९२
माप ह्मणे मी मवितें ६८८
मायझवा खर गाढवाचें बीज ३०१७
मायबाप करिती चिंता १७३०
मायबाप जोहार १२७
मायबाप निमाल्यावरी २९९७
माय बाप बंधु सोयरा सांगाती ४४१४
मायबाप सवें न ये धनवित्त ३२७८
मायबापाचिये भेटी २६४२
मायबापापुढें लाटिकें लेंकरूं १६९६
मायबापपुढें लेंकराची आळी ३३८१

मायबापें केवळ काशी २८९६
मायबापें जरी सर्पीण बोका २९२
मायबापें सांभाळिती ३८२२
मायलेकरांत भिन्न ३९३४
माय वनीं धाल्या धाये ३९३४
माया तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि माया. ६५
माया ब्रह्म ऐसें ह्मणती धर्मठक ९८
माया मोहोजाळीं होतों सांपडलों १२१६
मायारूपें ऐसें मोहिलेंसे जन ३९१४
माया साक्षी आह्मी नेणों भीड १३९२
मायेचा मारिला अंगीं नाहीं ४०५०
मायें मोकलिलें कोठें जावें २३७६
मायेवरी सत्ता आवडीची ३३३३
मारगीं चालतां पाउलापाउलीं १६४०
मारगीं बहुत ३३०
मारिले असुर दाटले मेदिनी ४५७०
मारूं नये सर्का संताचिये दृष्टी ३७३१
मार्ग चुकले विदेशीं एकले ३२८६
मांस खातां हाउस करी ३३८३
मांस चर्म हाडें २८९३
माहार माते चपणीं भरे २२८३
माहेरिंचा काय येईल निरोप १९३४
माहेरिंचे आलें तें मज माहेर १९४५
मिटवण्याचे धनी १४१४
मिथ्या आहे सर्व अवघें हें ४४३१
मिळे हरिदासांची दाटी ३९५१
मिळोनि गौळणी देती यशोदे ३८८
मी अवगुणी अन्यायी किती २२३७
मी च विखळ मी च विखळ २७३०
मीचि मज व्यालों १३३२
मी तंव अनाथ अपराधी ६१३
मी तंव बैसलों धरूनियां ३४२८
मी तें मी तूं तें तूं २१९५
मी तों अल्प मतिहीन ११०३
मी तों दीनाहूनि दीन ६०६
मी तों बहु सुखी आनंदभरिता ३८०७
मी तों सर्वभावें ६९७
मी त्यांसी अनन्य तीं कोणा ३६११
मी दास तयाचा ३३६२
मी दास तयांचा जयां ३८५९
मी माझें करित होतों जतन १०८४
मी याचक तूं दाता २०४५

मी हें ऐसें काय जाती	१३८९
मुकें होतां तुझ्या पदरीचें जातें	३८०३
मुक्त कासया ह्मणावें	७३६
मुक्त तो आशंका नाहीं जया	१४५५
मुक्त होता परी बळें जाला	१५६२
मुक्तिपांग नाहीं विष्णुचिया	१६६१
मुख डोळां पाहे	२८२८
मुखाकडे वास	२५१३
मुखीं नाम हातीं मोक्ष	२२८५
मुखीं विठ्ठलाचें नाम	४१४१
मुखें बोलावें तें जीविंचें जाणसी	१८२०
मुखें बोलें ब्रह्मज्ञान	६०७
मुखें संति इंद्रियें जती	४१५५
मुखें सांगे त्यांसि पैल चेंडू	४५१८
मुखें सांगे ब्रह्मज्ञान	४००१
मुख्य आधीं विषयत्याग	३२४९
मुख्य आहे आह्मां मातेचा	२९८७
मुंगी आणि राव	१८८४
मुंगीचिया घरा कोण जाय मूळ	२३७०
मुंगी होऊनि साकर खावी	२८८२
मुदल जतन जालें	१२६०
मुदलामध्यें पडे तोटा	१७०३
मुनि मुक्त जाले भेणें गर्भवासा	१०४५
मुरुकुश दोन्ही मारिले असूर	३०९४
मुसळाचें धनु नव्हे हो सर्वथा	४३०१
मुसावलें अंग	७२३
मुळाचिया मुळें	१३५४
मुळींचा तुह्मां लागला चाळा	१०८१
मुळीं नेणपण	२०७७
मूर्तिमंत देव नांदतो पंढरी	१२९४
मूळ करणें संतां	३९८७
मूळस्थळ ज्याचें गोमतीचे	२९८३
मृगजळ दिसे साचपणा ऐसें	९९
मृगजळा काय करावा उतार	३००
मृगाचिये अंगीं कस्तुरीचा वास	४२८५
मृत्युलोकीं आह्मां आवडती परी	५२२
मेघवृष्टीनें करावा उपदेश	२२८०
मेरे रामको नाम जो लेवे	११५५
मेला तरी जावो सुखें नरकासी	२६९१
मेलियांच्या रांडा इच्छिती	२५७०
मेल्यावरि मोक्ष संसारसंबंध	२१५९
मेळउनि सकळ गोपाळ	१७४

मैत्र केले महा बळी ८६
मैंद आला पंढरीस ८३६
मैं भुली घरजानी बाट ३८१
मोकळी गुंतें रिती कुंथे ४५८
मोकळें मन रसाळ वाणी ९९९
मोटळें हाटीं सोडिल्या गांठीं ३२७९
मोल घेऊनियां कथा जरी करीं ४०६८
मोल देऊनियां सांटवावे दोष १२६३
मोल वेचूनियां धुंडिती सेवका २९१५
मोलाचें आयुष्य वेचतसे सेवे २७१५
मोलाचें आयुष्य वेचुनियां जाय ३९००
मोलें घातलें रडाया २४८७
मोहरोनि चित्ता २१२३
मोहऱ्याच्या संगें ५८३
मोक्ष तुमचा देवा ७०८
मोक्ष देवापाशीं नाहीं ३१३८
मोक्षपदें तुच्छ केलीं याकारणें १७११
मोक्षाचें आह्मांसी नाहीं अवघड १४४३
मौन कां धरिलें विश्वाच्या ४२०७
म्हणउनि जालो तुटी ३७८१

य
यत्न आतां तुह्मी करा ३२८१
यथार्थ वाद सांडूनि उपचार ११३२
यथार्थवादें तुज न वर्णवे १८२८
यथाविधी पूजा करी ९२६
यमधर्म आणिक ब्रह्मादिक ४१८०
यमुपरी त्यांणीं वसविली २११५
यम सांगे दूतां तुह्मां नाहीं २३५०
यमाचे हे पाश नाटोपती ४४७४
यमुनेतटीं मांडिला खेळ १६९
यमुनें पाबळीं १४८
यज्ञनिमित्त तें शरीरासी बंधन १७२०
यज्ञ भूतांच्या पाळणा १३११
याचा कोणी करी पक्ष २७१
याचा तंव हा चि मोळा २५५४
या चि नांवें दोष १४६०
याचिया आधारें राहिलों २११९
याची कोठें लागली चट ३६२७
याची सवे लागली जीवा २५५३
याचि हाका तुझे द्वारीं १२२१

यांच्या पूर्वपुण्या कोण	४४८७
याजसाटीं केला होता	१३२३
याजसाठीं भक्ति	३४८
याजसाटीं वनांतरा	७३१
याति गुणें रूपें काय ते	३९७७
यातिहीन मज काय	१०८८
याती मतिहीन रूपें लीन दीन	१२१४
याती शूद्र वैश केला वेवसाव	१३२८
याती हीन मति हीन	२७४३
या रे करूं गाई	२१६
या रे गडे हो धरूं घाई	१९३
या रे नाचों अवघेजण	३९४४
या रे हरिदासानों जिंकों	३२५८
याल तर या रे लागें	१६२
यालागीं आवडी ह्मणा राम	३८९०
यावरी न कळे संचित आपलें	१९३६
यावें माहेरास	१७३४
यासाटीं करितों निष्ठुर भाषण	४१७७
यांसि समाचार सांगतों	४५५३
यासी कोणी ह्मणे निंदेची	३३६३
या हो या चला जाऊं सकळा	१४९
युक्ताहार न लगे आणिक साधनें	९६
युक्ति तंव जाल्या	२५४४
येईं गे विठ्ठले	४३८९
येईल घरा देव	४४१९
येईल तुझ्या नामा	२६८३
येईल तें घेईन	२१८
येईं वो येईं वो येईं धांवोनियां	२२६३
येउनी जाउनी पाहें तुजकडे	३८८१
येऊं द्या जी कांहीं वेसकरास	१२८
येऊनि नरदेहा झाकितील	२३७३
येऊनि नरदेहा विचारावें	४२८१
येऊनि संसारा काय हित	४२७८
येऊनि संसारीं	२९३३
ये गा महाविष्णु अनंतभुजाच्या	४४१६
येगा येगा पांडुरंगा	१११२
येणें जाणें तरी	२७३१
येणें जाला तुमचे पोतडीचा	३६८०
येणें पांगें पायांपाशीं	२५२९
येणें बोधें आह्मी असों	१५४२
येणें मार्गे आले	२७७२
येणें मुखें तुझे वर्णी गुण	२४२४

येतील अंतरा शिष्टाचे	३७७४
येती वारकरी	१९२३
येथीचिया अळंकारें	३१७
येथील जे एक घडी	२३५८
येथील हा ठसा	५९३
येथीलिया अनुभवें	१५९०
येथूनियां ठाव	१४१८
येथें आड कांहीं न साहे	३२९२
येथें दुसरी न सरे आटी	१४५४
येथें नाहीं उरों आले अवतार	८७२
येथें बोलिनियां काय	१६३०
ये दशे चरित्र केलें	४५५९
ये रे कृष्णा खुणाविती खेळों	३९३
येहेलोकीं आह्मां वस्तीचें	२३९८
योग तप या चि नांवें	७७३
योगाचें तें भाग्य क्षमा	८१
योग्याची संपदा त्याग	१३६०

र

रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा	४२९०
रंगलें या रंगें पालट न धरीं	२०६२
रंगीं रंगे नारायण	४१७४
रंगीं रंगें रे श्रीरंगे	२२४३
रचियेला गांव सागराचे पोटीं	४५७४
रज्जु धरूनियां हातीं	१८०१
रज्जुसर्पाकार	१५८२
रडे अळंकार देन्याचिये कांती	९०४
रडोनियां मान	२७३
रणीं निघतां शूर न पाहे	२६४७
रत्नजडित सिंहासन	४७४
रत्नाच्या वोवणी कांचे ऐशा	३७९१
रवि दीप हीरा दाविती देखणें	१२५५
रवि रश्मिकळा	५७७
रवीचा प्रकाश	१३७०
राउळासी जातां त्रास	३०५७
राजस सुकुमार मदनाचा पुतळा	४
राजस सुंदर बाळा	४४५
राजा करी तैसे	२५७८
राजा चाले तेथें वैभव सांगातें	८१८
राजा प्रजा द्वाड देश	७८६
रात्री दिवस आह्मां	४०७१

राम कहे सो मुख भलारे। खाये १९७५
राम कहे सो मुख भला रे । ११७६
राम कहो जीवना फल सो ही ११६०
राम कृष्ण ऐसीं उच्चारितां ४०४४
राम कृष्ण गीती गात ४३४
राम कृष्ण गोविंद नारायण ३९९३
रामनाम हा चि मांडिला ४४११
रामनामाचे पवाडे ४४१८
रामभजन सब सार मिठाई ११६५
राम राज्य राम प्रजा लोकपाळ १३२१
रामराम उत्तम अक्षरें १०९४
रामराम कहे रे मन ११६९
राम राम दोनी अक्षरें ४३२
रामरूप केली १०९९
राम ह्मणतां कामक्रोधांचें ३०१९
राम ह्मणतां तरे जाणतां १०९५
राम ह्मणतां राम चि होइजे १०९३
राम ह्मणे ग्रासोग्रासीं १०९१
रामें स्नानसंध्या केलें क्रियाकर्म २००१
रामा अयोध्येच्या राया ६८२
रामा वनवास १०९०
रायाचें सेवक २४६३
रासभ धुतला महा तीर्थांमाजी ८०९
राहाणें तें पायांपाशीं २६५४
राहिलों निराळा २६५२
राहे उभा वादावादीं ३७८०
राहो आतां हें चि ध्यान ८२२
राहो ये चि ठायीं ३१३६
रिकामें तूं नको मना ३१२०
रिद्धिसिद्धि दासी कामधेनु घरीं १२८२
रिण वैर हत्या १२२३
रुची रुची घेऊं गोडी १३७८
रुचे सकळा मिष्टान्न ४१२४
रुसलों आह्मीं आपुलिया ३३९५
रुसलों संसारा ३४२३
रुळें महाद्वारीं १९२४
रूप नांवें माया बोलावया १३५१
रूपीं जडले लोचन २४५५
रूपें गोविलें चित्त २२३०
रोगिया मिष्टान्न ४१०४
रोजकीर्दी जमा धरूनी सकळ २३९९

ल

लंकेमाजी घरें किती तीं आइका ३०७५
लचाळाच्या कामा नाहीं २६९७
लटकियाच्या आशा ८३८
लटिका ऐसा ह्मणतां देव ९५२
लटिका चि केला १८०४
लटिका तो प्रपंच एक २७५९
लटिका प्रपंच वांजेची ४३२२
लटिकी ग्वाही सभेआंत ४२३७
लटिकें तें रुचे १३५६
लटिकें तें ज्ञान लटिकें तें २७६२
लटिकें हासें लटिकें रडें २८६५
लटिक्याचें आंवतणें ४१७०
लटिक्याचें वाणी चवी ना २५९०
लडिवाळ ह्मणोनि निष्ठुर न ३५६४
लय लक्षी मन न राहे निश्चळ २६५६
लय लक्षूनियां जालों ह्मणती २०८५
लये लये लखोटा १५२
लवण मेळवितां जळें २४७४
लवविलें तया सवें लवे जाती २३४०
लक्षूनियां योगी पाहाती ६९८
लक्ष्मीवल्लभा १०३६
लागपाठ केला ३४२०
लागलिया मुख स्तनां ८२५
लागलें भरतें ३३०२
लागो तुझी सोय ऐसे ३८८६
लागों दिलें अंगा २६८६
लागोनियां पायां विनवितों २८६४
लागों नेदीं बोल पायां तुझ्या २९३८
लाघवी सूत्रधारी दोरी नाचवी २२४८
लाजती पुराणें ३११०
लाज ना विचार १८०६
लाज वाटे पुढें तोंड दाखवितां २१३६
लाज वाटे मज मानिती हे १७४६
लाजोनियां काळें राहिलें ३५४९
लाडाच्या उत्तरीं वाढविती २१९६
लाडें भाकितों करुणा ४०७६
लापनिकशब्दें नातुडे हा देव १७८८
लांब धांवे पाय चोरी ३४४६
लांब लांब जटा २७७७
लांबवूनि जटा नेसोनि ३९१९

लाभ खरा नये तुटी	२३९३
लाभ जाला बहुतां दिसीं	२००७
लाभ पुढें करी	४०३६
लाल कमलि वोढे पेनाये	११५९
लालुचाईसाटीं बळकाविसी	२९८९
लावुनि काहाळा	७३५
लावुनियां गोठी	३३७३
लावूनि कोलित	३४११
लावूनियां पुष्टी पोरें	२७३३
लांवूनियां मुद्रा	३९२४
लाहानपण दे गा देवा	१२७७
लीलाविग्रही तो लेववी	४५०१
लेकरा आईतें पित्याची जतन	८३१
लेकराची आळी न पुरवी	१३५२
लेंकराचें हित। वाहे माउलीचें	१७३५
लेंकरा लेववी माता अळंकार	२५४३
लेखिलें कवित्व माझे	३६७९
लेखी दुखण्यासमान	४४६२
लोक फार वाखा अमंगळ	२४८४
लोकमान देहसुख	१७५७
लोक ह्मणती मज देव	२९०१
लोकां कळों आला देव	४५४८
लोखंडाचे न पाहे दोष	४२७३
लोभावरी ठेवुनि हेत	३१०४
लोभीकें चित्त धन बैठे	११७०
लोह कफ गारा सिद्ध हे	३१४२
लोह चुंबकाच्या बळें	७६९
लौकिकापुरती नव्हे माझी	२६३०
लौकिकासाटीं या पसाऱ्याचा	२५६७

व

वक्त्या आधीं मान	१२५
वचन तें नाहीं तोडीत शरीरा	२४३०
वचनाचा अनुभव हातीं	३१९४
वचनांचे मांडे दावावे प्रकार	१३२७
वचना फिरती अधम जन	१४७२
वचनें चि व्हावें आपण उदार	२५८७
वचनें ही नाड	७२०
वंचुनियां पिंड	२२९८
वटवट केली	१८०९
वडिलें दिलें भूमिदान	४२३६

वत्स पळे धेनु धांवे पाठीलागीं	८१९
वदवावी वाणी माझी कृपावंत	२८२२
वंदिलें वंदावें जीवाचिये साटीं	२८७६
वंदीन मी भूतें	७४०
वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी	३८
वदे वाणी परी दुर्लभ अनुभव	९६०
वदे साक्षत्वेंसी वाणी	१३०४
वरता वेंघोनि घातली उडी	२३६
वरतें करोनियां तोंड	२९६०
वरि बोला रस	७४३
वरिवरि बोले युद्धाचिया गोष्टी	४२४२
वर्णावी ते थोरी एकाविठ्ठलाची	२८५२
वर्णावे ते किती	२६९२
वर्णाश्रम करिसी चोख	७७६
वर्णूं महिमा ऐसी नाहीं मज	५४५
वर्त्तता बासर	३०४७
वर्म तरि आह्मां दावा	९७२
वसनें थिल्लरीं	१५६१
वसवावें घर	५९२
वळितें जें गाई	८५
वळी गाई धांवे घरा	१८५
वाइटानें भलें	१७१६
वाखर घेउनि आलें	७७५
वाघाचा काळभूत दिसे	३३५४
वाघें उपदेशिला कोल्हा	३०४२
वाचाचापल्यें बहु जालों कुशळ	१७७३
वाचाळ लटिके अभक्त जे	४५४६
वाचेचिया आळा कवळिलें	३२९४
वाचे विठ्ठल नाहीं	२११७
वाजतील तुरें	५९०
वांजा गाई दुभती	२८७१
वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण	३८५७
वाट दावी त्याचें गेलें काय	३३४६
वाट पाहें बाहे निडळीं	४६९
वाट पाहें हरि कां नये आझूनि	१६५६
वाट वैकुंठीं पाहाती	९२९
वांटा घेईं लवकरि	८९२
वाटीभर विष दिलें प्रल्हादासी	३०८३
वाटुली पाहातां सिणले डोळुले	८०१
वाटे या जनाचें थोर बा आश्चर्य	१४९१
वाढलियां मान न मनावी	१३९१
वाढवावा पुढें आणिक प्रकार	३६०८

वाढविलें कां गा ३०९६
वांयां ऐसा जन्म गेला ३५५२
वांयां जातों देवा १०३९
वांयां जाय ऐसा ३६२२
वांयां तैसे बोल हरिशीं अंतर ४५६५
वांयांविण वाढविला हा १०११
वारकरी पायांपाशीं ३३११
वारंवार तुज द्यावया आठव २४२६
वारंवार हा चि पडावा विसर ३७४९
वाराणसी गया पाहिली द्वारका २४८०
वाराणसीपर्यंत असों सुखरूप १६०४
वारितां बळें धरितां हातीं ७८९
वारिलें लिगाड २०५१
वास नारायणें केला मथुरेसी ४५७१
वासनेच्या मुखीं अदळूनि भीतें ९४७
वाहावतों पुरीं २१४८
वाळूनियां जन सांडी मज दुरी १८१७
वाळो जन मज ह्मणोत शिंदळी ७
विकल तेथें विका २३६६
विचा केला ठोबा ४०९८
विंचा पीडी नांगी २४०५
विचार करिती बैसोनि गौळणी ४४८३
विचार नाहीं न नर खर तो तैसा ११२२
विचारा वांचून ७२१
विचारिलें आधीं आपुल्या ३१७२
विटंबिलें भट २८३०
विटाळ तो परद्रव्य परनारी ९८३
विटेवरी समचरण ४४२५
विठोबाचें नाम ज्याचे मुखीं ४०२८
विठोबाचे पायीं जीव म्यां ४१८१
विठो सांपडावया हातीं ९३८
विठ्ठल आमचें जीवन ६११
विठ्ठल आमुचा निजांचा २२५५
विठ्ठल कीर्तनाचे अंतीं २४९५
विठ्ठल गीतीं गावा विठ्ठल चित्तीं ९३७
विठ्ठल गीतीं विठ्ठल चित्तीं १११६
विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी १६२०
विठ्ठलनामाचा नाहीं ज्या २३७८
विठ्ठल नावाडा फुकाचा ७४६
विठ्ठल भीमातीरवासी ६६३
विठ्ठल माझा जीव विठ्ठल ३०९८
विठ्ठल माझी माय २०९७

विठ्ठल मुक्तिदाता	२११४
विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा	१५५५
विठ्ठल विठ्ठल येणें छंदें	३०३३
विठ्ठल सोयरा सज्जन विसांवा	३३५७
विठ्ठल सोयरा सज्जन सांगाती	८५७
विठ्ठल हा चित्तीं	१५५४
विठ्ठला रे तुझे वर्णितां गुणवाद	३२२८
विठ्ठला रे तूं उदाराचा राव	६७६
विठ्ठलावांचोनि ब्रह्म जे बोलती	३८६७
विठ्ठला विठ्ठला	२९५८
वितीयेवढेंसें पोट	२१८३
विधवेसी एक सुत	४३४२
विधीनें सेवन	३१६
विनति घातली अवधारीं	४१५
विनवितों चतुरा तुज विश्वंभरा	३८२४
विनवितों तरी आणितोसि परी	२५१०
विनवितों सेवटीं	३२०८
विनवीजे ऐसें कांहीं	३६३०
विनवीजे ऐसें भाग्य नाहीं देवा	१९०३
विभ्रंशिली बुद्धि देहांत जवळी	२७१७
वियोग न घडे सन्निध वसलें	१९४६
विरहतापे कांुफ्दे छंद करिते जाती	३९२
विश्वंभरा वोळे	२४१२
विश्वव्यापी माया	६८४
विश्वाचा जनिता	१०३
विश्वास तो देव	३४८९
विश्वास धरूनि राहिलों निवांत	३७९६
विश्वासिया नाहीं लागत सायास	३२१६
विश्वीं विश्वंभर	३७३५
विष पोटीं सर्पा	२९४७
विषम वाटे दुरवरी	३७३३
विशमाची शंका वाटे	२३५५
विषयओढीं भुलले जीव	६२२
विषय तो मरणसंगीं	२७२९
विषयांचे लोलिंगत	४२३५
विषयाचें सुख एथें वाटे गोड	७९९
विषयी अद्वये	२३६७
विषयीं विसर पडिला निःशेष	१५२६
विष्ठा भक्षी तया अमृत पारिखें	२१९९
विष्णुदासां भोग	२४२८
विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म	४६
विष्णुमय सर्व वैष्णवांसी ठावें	१००४

विसरलें कुळ आपुला आचार	११
वीट नेघे ऐसें रांधा	३४०
वीर विठ्ठलाचे गाढे	११३६
वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती	६७
वृत्तीवरि आह्मां येणें काशासाटीं	३५८७
वृद्धपणीं आली जरा	४३३८
वृद्धपणीं न पुसे कोणी	४४३९
वृक्ष वल्ली आह्मां सोयरीं	२४७१
वेंचावें तें जीवें	२१६४
वेठी ऐसा भाव	४३५०
वेडावलीं काय करावें या	४५४२
वेडिया उपचार करितां सोहळे	२२७९
वेडीं ते वेडीं बहुत चि वेडीं	२०८२
वेडें वांकडें गाईन	२७५७
वेढा वेढा रे पंढरी	३९७०
वेद अनंत बोलिला	४०४९
वेद जया गाती	२०४३
वेद नेले शंखासुरें	३४०६
वेदपुरुष तरि नेती कां वचन	१३१२
वेदविहित तुह्मी आइका हो कर्मे	१४६७
वेदशास्त्र नाहीं पुराण प्रमाण	२१७५
वेदाचा तो अर्थ आह्मांसीच	२२५६
वेदाचें गव्हर न कळे पाठकां	३१५
वेरझारीं जाला सीण	२०६०
वेश वंदाया पुरते	१३४१
वेशा नाहीं बोल अवगुण	९८६
वेसन गेलें निष्काम जाले नर	४५५
वेळोवेळां हें चि सांगें	१३७९
वैकुंठा जावया	३६३
वैकुंठा देव आणिला भूतळा	४२८४
वैकुंठीचें सुख	३७४०
वैकुंठीच्या लोकां दुर्लभ	४४९१
वैद वाचविती जीवा	३२९
वैद्य एक पंढरिराव	२०६६
वैभव राज्य संपत्ती टाकावी	४१५३
वैभवाचे धनी	३२१७
वैभवाचे धनी सकळ	३८४६
वैरागरापाशीं रत्नाचिया खाणी	३६७७
वैराग्याचा अंगी जालासे संचार	३७७१
वैराग्याचें भाग्य	२९१८
वैष्णव तो जया	३६६
वैष्णवमुनिविप्रांचा सन्मान	२४६०

वैष्णवांची कीर्ती गाईली पुराणीं २००२
वैष्णवां संगती सुख वाटे जीवा २५४१
वैष्णवें चोरटीं २६६६
वोखटा तरी मी विटलों देहासी ३६९७
वोडविले अंग ३३१३
वोनव्या सोंकरीं ११४३
वोरसोनि येती १९६०
वोळलीचा दोहूं पान्हा २१७
व्यभिचारिणी गणिका कुंटणी ३०७६
व्यवहार तो खोटा १८०३
व्यापक हा विश्वंभर ४३४५
व्यापिलें सर्वत्र ३३३८
व्याल्याविण करी शोभनतांतडी १०७
व्हावया भिकारी हें आह्मां ३४९८

श
शकुनानें लाभ हानि २७१२
शक्ति द्याव्या देवा ३२१३
शंख करिशी ज्याच्या नांवें ४४८
शंखचक्रगदापद्म १५९२
शब्दज्ञानी येऊं नेदीं दृष्टीपुढें ३८००
शब्दांचीं रत्नें करूनी अळंकार ५०४
शब्दा नाहीं धीर ११९
शरण आलें त्यासी न दावीं १०२६
शरण शरण जी हनुमंता २८३
शरण शरण वाणी २५४२
शरणागत जालों ३२९३
शरीर दुःखाचें कोठार ६६०
शाक्त गधडा जये देशीं ७८५
शाक्तांची शूकरी माय ७९०
शांतीपरतें नाहीं सुख ५८०
शादीचें तें सोंग २२०७
शास्त्रज्ञ हो ज्ञाते असती बहुत ४१३४
शास्त्राचें जें सार वेदांची २९५
शाहाणपणें वेद मुका २७९३
शाहाणियां पुरे एक चि वचन १३६७
शिकल्या बोलाचे सांगतील वाद २९३
शिकल्या शब्दाचें उत्पादितों ३७०६
शिकवणें नाक झाडी ४२३३
शिकवणेसाटीं वाटते तळमळ ४४६०

शिकविलें तुह्मीं तें राहे तोंवरी	२०
शिकविले बोल	२१४६
शिकवूनि बोल	२७५४
शिकवूनि हित	२८९८
शिंकें लावियेलें दुरी	१६३
शिखा सूत्र तुझा गुंतला जमान	३९१०
शिजल्यावरी जाळ	३२११
शिंदळा साल्याचा नाहीं हा	१३८
शिव शक्ति आणि सूर्य	४४५६
शिष्याची जो नेघे सेवा	१४२८
शिष्या सांगे उपदेश	४४४४
शिळा जया देव	२८१९
शिळा स्फटिकाची न पालटे	४४८८
शीतळ तें शीतळाहुनी	२५३२
शीतळ साउली आमुची माउली	१०८९
शुकसनकादिकीं उभारिला बाहो	१३०
शुद्ध ऐसें ब्रह्मज्ञान	२८८९
शुद्ध चर्या हें चि संतांचें पूजन	८३२
शुद्ध दळणाचें सुख सांगों काई	१६०
शुद्धबीजा पोटीं	६२
शुद्धाशुद्ध निवडे कैसें	३४५१
शुद्धीचें सारोनि भरियेली पाळी	१५९
शुभ मात तिहीं आणिली	४५३१
शुभ जाल्या दिशा अवघा चि	१९९२
शूकरासी विष्ठा माने सावकास	८०८
शूद्रवंशीं जन्मलों	२७५६
शूरत्वासी मोल	१७०५
शूरां साजती हतियारें	१७१४
शृंगारिक माझीं नव्हती उत्तरें	२५९६
शेवटींची विनंती	४३८२
शेवटीची विनवणी	१०००
शोकवावा म्यां देहे	२६८२
शोकें शोक वाढे	३६४
शोधितां चि नये	१५८१
शोधिसील मूळें	३२८
शोधूनि अन्वय वंश	४३०७
श्रम परिहारा	३५८२
श्रीअनंता मधुसूदना	६४६
श्रीपंढरीशा पतितपावना	२३०७
श्रीमुख वोणवा गिळीत	४२१५
श्रीराम सखा ऐसा धरीं	४१४५
श्रीसंतांचिया माथा चरणांवरी	२१७८

श्वान शीघ्रकोपी ७६
श्वानाचियापरी लोळें ३९७३
श्वाना दिली सवे १८०८

ष

षड्रसीं रांधिलें ४२८२

स

सकलगुणें संपन्न ३७३९
संकल्पासी अधिष्ठान २६०१
संकल्पिला तुज सकळ ही ४०५५
सकळ चिंतामणी शरीर ५३
सकळतीर्थाहुनि। पंढरी हे ३९५६
सकळतीर्थाहुनी। पंढरीनाथ ४४२७
सकळ तुझे पायीं मानिला ३८४३
सकळ देवांचें दैवत २८५७
सकळ धर्म मज विठोबाचें नाम ८६८
सकळ पूजा स्तुति २६४८
सकळ सत्ताधारी २५७५
सकळ ही माझी बोळवण करा १५९८
सकळ हे माया नागवे कवणा ४४२६
सकळिकांचें समाधान १५४६
सकळिकांच्या पायां माझी ६९०
सकुमार मुखकमळ १५७३
संकोचतो जीव महत्वाच्या भारें ४११९
संकोचोनि काय जालासी २३२१
सख्यत्वासी गेलो करीत २९७९
संगतीनें होतो पंगतीचा लाभ २५६१
संगें वाढे सीण न घडे भजन ४११६
संचित उत्तम भूमि कसूनियां ४५०४
संचित तैशी बुद्धि उपजे ४३५८
संचित प्रारब्ध क्रियमाण २९२२
संचितावांचून २६९३
संचितें चि खावें १८९३
सज्जन तो शब्द सत्य जो मानी १७७५
संत आले घरा ३२०५
संत गाती हरिकीर्त्तनीं २८८७
संतचरणरज लागतां सहज ४३४१
संतचिन्हें लेउनि अंगीं ४०४२
संतजना माझी यावया करुणा ४२५२

संत देखोनियां स्वयें दृष्टी टाळी ४२६०
संत न पन्हयां लें खडा ११७३
संतनिंदा ज्याचे घरीं १६२२
संत पंढरीस जाती १७१८
संतपाउलें साजरीं ४१०७
संत मागे पाणी नेदी एक चूळ ६७३
संत मानितील मज १८६७
संत मारगीं चालती ३०५०
संतसंगती न करावा वास ३४४०
संतसंगें याचा वास सर्वकाळ २२६७
संतसमागम एखादिया परी ३७४
संतसेवेसि अंग चोरी २८०१
संता आवडे तो काळाचा ही १३९३
संताचा अतिक्रम २७९
संतांचा पढीयावो कैशापरि ४०८९
संतांचा महिमा तो बहु दुर्गम ११९
संतांचिया पायीं माझा विश्वास २२४७
संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ १२३६
संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें ९१३
संतांची स्तुति ते दर्शनाच्या २७३६
संताचे उपदेश आमुचे मस्तकीं २२७३
संताचे गुण दोष आणितां २४५
संतांचे घरींचा दास मी कामारी २००४
संतांचें सुख जालें या देवा १२३७
संतांच्या धिकारें अमंगळ जिणें १३९४
संतांच्या पादुका घेईन मोचे ४१२८
संतांच्या हेळणे बाटलें जें ३०६७
संतां नाहीं मान ३२६२
संतानीं सरता केलों तैसेपरी ४१२६
संतांपायीं विन्मुख जाला ४१९६
संतांपाशीं बहु असावे मर्यादा १२३४
संतांसी तों नाहीं सन्मानाची १५५८
संतांसी क्षोभवी कोण्या ही २६८०
संतीं केला अंगीकार १५९६
सतीचें तें घेतां वाण २४३६
संतोषे माउली आरुषा वचनीं ३६२९
सत्ताबळें येतो मागतां विभाग २२६५
सत्तावर्ते मन १८९०
सत्तेचें भोजन समयीं आतुडे २५५७
सत्य आठवितां देव ३६२४
सत्य आह्मां मनीं २८९७
सत्य तूं सत्य तूं सत्य तूं ३३२९

सत्य तो आवडे	७१३
सत्य त्यागा चि समान	३६१९
सत्यत्वेशीं घेणें भक्तीचा	२४३९
सत्यसंकल्पाचा दाता नारायण	१५०४
सत्य सत्यें देतें फळ	१२०८
सत्य साच खरें	७१२
सत्या माप वाढे	३६६३
सदा तळमळ	५८
सदा नामघोष करूं हरिकथा	४२४१
सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती	३
सदा सर्वकाळ अंतरीं कुटिल	२७७९
संदेह निरसे तरि रुचिकर	९५९
संदेह बाधक आपआपणयातें	२०३१
सदैव तुह्मां अवघें आहे	९०६
सदैव हे वारकरी	३३३५
सद्गदित कंठ दाटो	१५२२
सद्गुरुरायें कृपा मज केली	३६८
सद्गुरूचे चरणीं ठेविला	४३१२
सद्गुरूनें मज आशीर्वाद	४३१३
सद्गुरूवांचूनि प्रेतरूप वाणी	४३१८
संध्या करितोसी केशवाच्या	१६४७
संध्या कर्म ध्यान जपतप	१७२१
सन्मुख चि तुह्मीं सांगावी जी	३४३१
संपदा सोहळा नावडे मनाला	२३४२
सब संबाल भ्याने लौंढे खडा	४३९
संबाल यारा उपर तले दोन्हो	४३८
समचरण दृष्टि विटेवरी साजिरी	१
समरंगणा आला	१०९७
समर्थपणें हे करा संपादणी	२५७३
समर्थ या नांवें दिनांचा कृपाळ	३६७८
समर्थाचा ठाव संचलाचि असे	२६३३
समर्थाची धरिली कास	२५३७
समर्थाचें केलें	१६३६
समर्थाचे पोटीं	१९१९
समर्थाचें बाळ कीविलवाणें	१०४९
समर्थाचे बाळ पांघरे वाकळ	३५६७
समर्थाचे सेवे कोठें नाहीं घात	३७१६
समर्थाचे सेवे बहु असे हित	४२७९
समर्थासी नाहीं वर्णावर्णभेद	१०३४
समर्थासी लाज आपुल्या	३८३२
समर्पक वाणी	१९२२
समर्पिली वाणी	१४१५

समश्रुळित असतां वाचा ३३५३
सम सपाट वेसनकाट ४६१
समागमें असे हरी नेणतियां ४५५८
समाधान त्यांचीं इद्रियें सकळ ४५४९
समुद्रवळयांकित पृथ्वीचें दान २२८८
समुद्र हा पिता बंधु हा चंद्रमा ४१२२
संयोग सकळां असे सर्वकाळ ४५०९
सरतें माझें तुझें ३११३
सरलियाचा सोस मनीं ३१५५
सरलें आतां नाहीं २६६२
सरळीं हीं नामें उच्चारावीं सदा १५३९
सरे आह्मांपाशीं एक शुद्धभाव ३४४४
सरे ऐसें ज्याचें दान ३१०२
सर्प भुलोन गुंतला नादा १०८७
सर्प विंचू दिसे २४८
सर्वकाळ डोळां बैसो नारायण ३८६८
सर्वकाळ माझे चित्तीं १५१०
सर्वथा ही खोटा संग २१९३
सर्वपक्षीं हरि साहेसखा जाला २९३४
सर्व भाग्यहीन २७०५
सर्वभावें आलों तुज चि शरण १२४१
सर्वरसीं मीनलें चित्त १३८८
सर्वविशीं आह्मीं हे चि जोडी २४२३
सर्वविशीं माझा त्रासलासे जीव ९०८
सर्व संगीं विट आला २५३१
सर्व सुख आह्मी भोगूं सर्व १६
सर्वसुखा अधिकारी ४३५१
सर्वसुखाचिया आशा जन्म ६१५
सर्वसुखें आजी एथें चि ८५६
सर्वस्वाचा त्याग तो सदा १०१९
सर्वस्वाची साटी ३९३९
सर्वस्वा मुकावें तेणें हरीसी २७६०
सर्वात्मकपण २४४०
सर्वापरी तुझे गुण गाऊं उत्तम ४१४६
सर्वा भूतीं द्यावें अन्न ३०४५
सवंग जालें सवंग जालें ३२९५
संवसारतापें तापलों मी देवा ९१
संवसार तीहीं केला पाठमोरा ५३९
संवसारसांतें आले हो आइका २०७८
संसार करिती मोठ्या महत्त्वानें ४२०१
संसार तो कोण देखे १२७२
संसारसंगें परमार्थ जोडे १५५९

संसारसिंधु हा दुस्तर ६६२
संसारसोहळे भोगितां सकळ १०३१
संसारा आलिया एक ४०७९
संसाराचा माथां भार ८९६
संसाराची कोण गोडी ३५२५
संसाराचे अंगीं अवघी च वेसनें १५८५
संसाराचे धांवे वेठी ३६१०
संसाराच्या नांवें घालूनियां ३२१५
संसाराच्या भेणें १७९३
संसारापासूनी कैसें सोडविशी २७६९
संसारीं असतां हरिनाम घेसी ३९९०
संसारींचें ओझें वाहता ४३२०
सहज पावतां भगवंतीं परि हीं २४६९
सहज मी आंधळा गा ४२६
सहज लीळा मी साक्षी याचा २४३३
साकरेचें नाम घेतां कळे गोडी २४०१
साकरेच्या गोण्या बैलाचिये ३०६०
साकरेच्या योगें वर्ख २९०६
सांखळिलों प्रीती गळां ३२९८
सांगतां गोष्टी लागती गोडा १६७२
सांगतां दुर्लभ ज्ञानाचिया गोष्टी १३२५
सांगतां हें नये सुख ८४१
सांगतों तरि तुह्मी भजा ३७९९
सांगतों तें तुह्मीं अइकावें कानीं २१
सांगतों या मना तें माझें नाइके १८१८
सांग त्वां कोणासी तारिलें ४१८४
सांग पांडुरंगा मज हा उपाव ४०६४
सांगा दास नव्हें तुमचा मी २२२६
सांगावें तें बरें असतें १६४९
सांगों काय नेणा देवा ९७३
सांगों जाणती शकुन १४९६
साच मज काय कळों नये देवा १००९
साच माझा देव्हारा ४१४
साच हा विठ्ठल साच हें करणें ४११५
साजे अळंकार १३०६
सांटविला हरी ७०७
सांटविले वाण ८२४
सांडवले सकळांचे अभिमान ४५४७
सांडावी हे भीड अधमाचे चाळे ४०२५
सांडियेली काया ३५७७
सांडियेलें रूप विक्राळ भ्यासुर ४२१७
सांडुनियां पंढरीराव ७९३

सांडूनि वैकुंठ	४८९
सांडोनी दों अक्षरां	१५१८
सांडुनिया सर्व	२४८१
सांडुनिया सुखाचा वाटा	३३९६
सांडूनि कीर्तन	२३४८
सात पांच गौळणी आलिया	३९१
सातदिवसांचा जरी जाला	४३१५
सातां पांचां तरीं वचनां सेवटीं	३५५१
सातें चला काजळ घाला	४५९
सादाविलें एका	१७४२
साधक जाले कळी	१२०९
साधकाची दशा उदास	२८३६
साधन संपत्ति हें चि माझें धन	१८२७
साधनाचे कष्ट मोटे	३९६३
साधनांच्या कळा आकार	१३३४
साधनें तरी हीं च दोन्ही	५७५
साधनें आमुचीं	१९९१
साधावया भक्तिकाज	१५५०
साधावा तो देव सर्वस्वाचे	२६७८
साधूच्या दर्शना लाजशी	३०५६
साधूनि बचनाग खाती तोळा	२९८
सांपडला संदीं	२४७
सांपडला हातीं	१६६०
सांपडलें जुनें	३०१४
सापें ज्यासी खावें	१९६९
सामावे कारण	३७८३
सारा माग विटूदांडू	२०१
सारावीं लिंगाडें धरावा सुपंथ	२०७९
सारासार विचार करा उठाउठी	४०६७
सारीन ते आतां एकाचि भोजनें	३४६२
सालोमालो हरिचे दास	२३६२
सावडीं कांडण ओवी नारायण	१५८
सावध जालों सावध जालों	३३
सावधान ऐसें काय तें विचारा	२४७३
सांवळें रूपडें चोरटें चित्ताचें	२४५०
सांवळें सुंदर पाहें दृष्टीभरी	४३७६
सांवळें सुंदर रूप मनोहर	३९९१
सावित्रीची विटंबण	२१५७
सासुरियां वीट आला भरतारा	२३
साही शास्त्रां अतिदुरी	३०९७
साहोनियां टाकीघाये	२०२८
साहोनियां टोले उरवावें सार	१४२२

साळंकृत कन्यादान	२६८
सिकविला तैसा पढों जाणे	३७०७
सिंचन करितां मूळ	२०१७
सिणलेती सेवकां देउनि	५०१
सिणलों दातारा करितां	१७८०
सिंदळीचे सोर चोराची दया	३३५५
सिंदळीसी नाहीं पोराची पैं	३९१२
सिद्ध करूनियां ठेविलें कांडण	१५७
सिद्धीचा दास नव्हे श्रुतीचा	३४४८
सिळें खातां आला वीट	३३०१
सीण भाग हरे तेथींच्या निरोपें	१९०८
सुकलियां कोमा अत्यंत	२५९५
सुकाळ हा दिवसरजनी	२२६९
सुख नाहीं कोठें आलिया	२४७५
सुख पाहतां जवापाडें	८८
सुख या संतसमागें	६२९
सुखरूप ऐसें कोण दुजें सांगा	२४६४
सुखरूप चाली	३७४५
सुख वाटे तुझे वर्णितां पवाडे	६०७
सुख वाटे परि वर्म	३१६१
सुखवाटे ये चि ठायीं	३३७९
सुख सुखा भेटे	२८९९
सुख सुखा विरजण जालें	३५४४
सुख हें नावडे आह्मां कोणा बळें	१९७९
सुखाची वसति जाली माझे	३२८३
सुखाचें ओतलें	२००८
सुखाचे व्यवहारीं सुखलाभ	२८७८
सुखें खावें अन्न	२३२०
सुखें घेऊं जन्मांतरें	२४०२
सुखें न मनीं अवगुण	१६८१
सुखें वोळंब दावी गोहा	३६
सुखें होतों कोठें घेतली सुती	१२०२
संगरणीबाई थिता नास केला	३८२६
सुटायाच कांहीं पाहातों उपाय	१११०
सुंदर अंगकांती मुखें भाळ	१५७२
सुंदर तें ध्यान उभें विटेवरी	२
सुंदर मुख साजिरें	४४७
सुदिन सुवेळ	४४६
सुधारसें ओलावली	२७२४
सुनियांचा हा चि भाव	३२९९
सुनियांची आवडी देवा	३३००
सुरवर येती तीर्थे नित्यकाळ	११२१

सुराणीचीं जालों लाडिकीं	३४९०
सुलभ कीर्तनें दिलें ठसावूनि	३५८८
सेकीं हें ना तेसें जालें	३९४१
सेजेचा एकांत अगीपाशीं कळें	२७३३
सेत आलें सुगी सांभाळावे	११४४
सेत करा रे फुकाचें	११४२
सेंदरीं हें देवी दैवतें	६२१
सेवकासी आज्ञा निरोपाची	१७६९
सेवकासी आज्ञा स्वामीची	२६८८
सेवकें करावें सांगितलें काम	३१५०
सेवकें करावें स्वामीचें वचन	२३२९
सेवट तो भला	२९६५
सेवट तो होती तुझियानें गोड	३५१८
सेवटासी जरी आलें	२१८४
सेवटींची हे विनंती	३३१४
सेवा तें आवडी उच्चारावें नाम	१५३०
सेवितों रस तो वांटितों आणिकां	३४४
सेवीन उच्छिष्ट लोळेन अंगणीं	१६६२
सैन्य जन हांसे राया जालें काई	४५६१
सोइरे धाइरे दिल्याघेतल्याचे	३९७४
सोइऱ्यासी	३८१६
सोंगें छंदें कांहीं	१५०२
सोडवा सोडवा	३५९
सोडियेल्या गाई नवलक्ष	४३६२
सोडियेल्या गांठीं	२८२७
सोडिला संसार	७२६
सोनियांचा कळस	११४१
सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें	२५८
सोनें दावी वरी तांबें तयापोटीं	९४०
सोन्याचे पर्वत करवती पाषाण	२०२१
सोपें वर्म आह्मां सांगितलें संतीं	१२९९
सोलीव जें सुख अतिसुखाहुनि	६७९
सोंवळा तो जाला	४२२७
सोंवळा होऊं तों वोवळें जडलें	३७८५
सोसियेला आटी गर्भवास फेरे	४५७८
सोसें बहुगर्भवासीं	३२५२
सोसें वाढे दोष	१४०९
सोसें सोसें मारूं हाका	२६४०
सोसोनि विपत्ती	७६३
सोळा सहस्र होऊं येतें	२९४३
सौरी सुर जालें दुर डौल घेतला	४६०
स्तवूनियां नरा	३२६१

स्तुति करीं जैसा नाहीं अधिकार १०५४
स्तुति करूं तरी नव्हे चि ६९३
स्तुती अथवा निंदा करावी ३१४१
स्तुती तरि करूं काय २२२८
स्त्रियांचा तो संग नको नारायणा ५२३
स्त्रिया धन बा हें खोटें ४००९
स्त्रिया पुत्र कळत्र हें तंव ३९२६
स्त्रीपुत्रादिकीं राहिला आदर ८७९
स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण ४१३९
स्मरणाचे वेळे ३२३०
स्मरतां कां घडे नास ३३१८
स्मशान ते भूमि प्रेतरूप जन ७४
स्मशानीं आह्मां न्याहालीचें २७९५
स्वप्नींचिया गोष्टी ३३६
स्वप्नींचिया गोष्टी मज धरिलें ३३६
स्वप्नींचें हें धन हातीं ना पदरीं ३७७३
स्वप्नींच्या व्यवहारा काळातर ४३७०
स्वयें आपण चि रिता ४०९४
स्वयें पाक करी १७५५
स्वयें सुखाचे जाले अनुभव ३७७
स्वर्गींचे अमर इच्छिताति देवा ४३४४
स्वल्प वाट चला जाऊं १९६६
स्वामिकाज गुरुभक्ति २२५१
स्वामित्वाचीं वर्मे असोनि २५२७
स्वामिसेवा गोड ४१९४
स्वामीचिया सत्ता ३६७५
स्वामीचें हें देणें ३४२२
स्वामीच्या सामर्थ्ये ४४७२
स्वामी तू ही कैसा न पडसी ४३१०
स्वामीसी संकट पडे जे गोष्टीचें ३८९४

ह
हनुमंत महाबळी २८६
हम दास तीन्हके सुनाहो ११६७
हमामा रे पोरा हमामा रे १५५
हरिकथेची आवडी देवा १८२६
हरिकथे नाहीं विश्वास २३३२
हरिकथेवांचून इच्छिती २३२८
हरि गोपाळांसवें सकळां २४०
हरिचिया भक्ता नाहीं भयचिंता ३९०४
हरिची हरिकथा नावडे जया १६९०

हरिच्या जागरणा	४२
हरिच्या दासां भयें	१७०६
हरिच्या दासां सोपें वर्म	३२०३
हरिजनांची कोणां न घडावी	१५५२
हरिजनीं प्राण विकली हे काया	४१२९
हरि तुझी कांति रे सांवळी	३९०
हरि तूं निष्ठुर निर्गुण	१३३
हरि तैसे हरीचे दास	६५३
हरिदासाचिये घरीं	४१६९
हरिनामवेली पावली विस्तार	३२४४
हरिनामाचें करूनि तारूं	१५१९
हरिनें माझें हरिलें चित्त	१२४६
हरिबिन रहियां न जाये जिहिरा	३८२
हरिभक्त माझे जिवलग सोइरे	२७५८
हरिरता चपळा नारी	४०७
हरिसुं मिल दे एक हि बेर	११५०
हरिहर सांडुनि देव	७९१
हरिहरां भेद	१२४
हरि हरि तुह्मीं ह्मणारे सकळ	१२५६
हरि ह्मणतां गति पातकें नासती	२८५५
हरि तुझें नाम गाईन अखंड	३९९४
हरीच्या जागरणा	४२
हरीविण जिणें व्यर्थ चि संसारीं	४३६८
हळूहळू जाड	३०१०
हाकेसरिसी उडी	७६८
हागतां ही खोडी	२१६७
हागिल्याचे सिंके वोणवाचि राहे	२२७६
हा गे आलों कोणी ह्मणे	२५४५
हा गे माझा अनुभव	२७९०
हा गे माझे हातीं	२२३
हा गे हा चि आतां लाहो	३६९४
हाचि नेम आतां न फिरें माघारी	९
हा चि परमानंद आळंगीन बाहीं	९२९
हा चि माझा नेम धरिला हो	३९०८
हातपाय मिळोनि मेळा	४१५४
हातीं घेऊनियां काठी	१३९८
हातींचें न संडावें देवें	६४३
हातीं धरिलियाची लाज	४४२२
हातीं धरूं जावें	२४८६
हातीं होन दावी बेना	२६७
हा तों नव्हता दीन	३६३९
हा तों नव्हे कांहीं निराशेचा	२५२४

हारपल्याची नका चित्तीं २९११
हारपोनी गेली निशी ३७२३
हारस आनंदाचा १४३
हालवूनि खुंट १८४३
हासों रुसों आतां वाढवूं आवडी १८
हित जाणे चित्त ३६९९
हित तें हें एक राम कंठीं राहे १९९४
हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा १६८८
हित सांगे तेणें दिलें जीवदान २९४१
हितावरी यावें २९२१
हिरण्याक्ष दैत्य मातला जे ३०८०
हिरा ठेवितां ऐरणीं ५०
हिरा ठेवितां काळें गाहाण ४१९७
हिरा शोभला कोंदणीं ४७५
हीं च त्यांचीं पंचभूतें ८७३
हीन माझी याति २८४०
हीनवर बीजवर दोघी त्या ४४७१
हीनसुखबुद्धीपासीं २५८०
हुंदकी पिसवी हलवी दाढी ३५९८
हुंबरती गाये तयांकडे कान १०३३
हें आह्मां सकळा ३२३५
हें कां आह्मां सेवादान २७१०
हे चि अनुवाद सदा सर्वकाळ २१३
हें चि जतन करा दान २५०५
हे चि तुझी पूजा ७४४
हे चि थोर भक्ति आवडती २८६७
हें चि दान देगा देवा २२९६
हें चि भवरोगाचें औषध ६५०
हे चि भेटी साच रूपाचा २९३९
हें चि मागणे विठाबाई ४४०५
हें चि माझे चित्तीं ४२०६
हे चि माझें तप हें चि माझें ३७४३
हे चि माझें धन ९८९
हे चि याच्या ऐसें मागावें दान २२६४
हेचि वादकाची कळा ३६६५
हे चि वारंवार ३७६६
हे चि वेळ देवा नका मागें ४२९९
हें चि सर्वसुख जपावा ३५७१
हें चि सुख पुढें मागतों ४२७०
हें तों एक संतांठायीं ३५३९
हे तों टाळाटाळी ३९६०
हें तों वाटलें आश्चर्य ३४२४

हेंदऱ्याचें भरितां कान	२६९५
हे माझी मिराशी	१६३७
हें ही ऐसें तें ही ऐसें	३६९८
होईं आतां माझ्या भोगाचा	४४६१
होइन खडे गोटे	४०७२
होइल कृपादान	१९२६
होइल माझी संतीं भाकिली	१९४०
होईन भिकारी	७०६
होईल जाला अंगे देव जो	२८३३
होईल तरी पुसापुसी	२५२३
होईल तो भोग भोगीन आपुला	३८३८
होईल निरोप घेतला यावरी	१९३७
होउनि कृपाळ	२१३०
होउनि जंगम विभूती लाविती	३९२३
होऊं नको कांहीं या मना	२८८५
होऊं शब्दस्पर्श	३८४४
होऊनि संन्यासी भगवीं लुगडीं	३९१८
होकां दुराचारी	७६७
हो कां नर अथवा नारी	१६८९
हो का पुत्र पत्नी बंधु	१०६
होतीं नेणों जालीं कठिणें	१९५१
होतें तैसें पायीं केलें निवेदन	४२३८
होतें बहुत हें दिवस मानसीं	३७६
होतों तें चिंतीत मानसीं	६३६
होतों सांपडलों वेठी	३२६९
होयें वारकरी	८५८
ह्मणउनि काय जीऊं	३७७५
ह्मणउनि खेळ मांडियेला ऐसा	३६५
ह्मणउनि शरण जावें	३७८९
ह्मणउनि दास नव्हे ऐसा जालों	९७०
ह्मणऊनि काकुळती	२३९६
ह्मणऊनि जालों क्षेत्रींचे	२७१६
ह्मणऊनि धरिले पाय	३२४२
ह्मणऊनि लवलाहें	२५५१
ह्मणतां हरिदास कां रे नाहीं	१२८१
ह्मणती घालों धणीवरी	१८६
ह्मणवितां हरि न ह्मणे तयाला	३४५३
ह्मणविती ऐसे आइकतों संत	५५१
ह्मणवितों दास ते नाहीं करणी	८६१
ह्मणवितों दास न करितां सेवा	३१२५
ह्मणवितों दास। परि मी असें	१५८३
ह्मणवितों दास। मज	३३४

ह्मणसी दावीन अवस्था ३३७६
ह्मणसी नाहीं रे संचित ११९८
ह्मणसी होऊनि निश्चिंता १७७७
ह्मणे चेंडू कोणें आणिला ४५२६
ह्मणे विठ्ठल पाषाण ४३४३
ह्मणे विठ्ठल ब्रह्म नव्हे १५५६
ह्मातारपणीं थेटे पडसें ३०७३

क्ष
क्षणभरी आह्मीं सोसिलें वाईट १४
क्षणक्षणा जीवा वाटतसे खंती २५८३
क्षणक्षणां सांभाळितों १३७४
क्षणक्षणा हा चि करावा विचार ३१८०
क्षमाशास्त्र जया नराचिया ३९७६
क्षर अक्षर हे तुमचे विभाग १३८७
क्षरला सागर गंगा ओघीं मिळे ३५४६
क्षीर मागे तया रायतें वाढी २४०४
क्षुधा तृषा कांहीं सर्वथा नावडे ४१४४
क्षुधारथी अन्नें दुष्काळें पीडीलें ३८९३
क्षुधेलिया अन्न २१६३
क्षेम देयाला हो १६६३
क्षेम मायबाप पुसेन हें आधीं १९३९
क्षोभ आणि कृपा मातेची ३६०९

ज्ञ
ज्ञानियांचा गुरू राजा महाराव २३२३
ज्ञानियांचे घरीं चोजवितां १५३१

मंगलाचरण - अभंग ६

१

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ।।१।।
आणीक न लगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त्त नको देवा ।।धृ।।
ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें दुश्चित झणी जडों देसी ।।२।।
तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म । जे जे कर्मधर्म नाशवंत।।३।।

२

सुंदर तें ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ।।१।।
तुळसीचे हार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर तें चि रूप ।।धृ।।
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ।।२।।
तुका म्हणे माझें हें चि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ।।३।।

३

सदा माझे डोळे जडो तुझे मूताअ । रखुमाईच्या पती सोयरिया ।।१।।
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ।।धृ।।
विठो माउलिये हा चि वर देईं । संचरोनि राहीं ह्रदयामाजी ।।२।।
तुका म्हणे कांहीं न मागे आणीक । तुझे पायीं सुख सर्व आहे ।।३।।

४

राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपलिया ।।१।।
कस्तुरी मळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ।।धृ।।
मुगुट कुंडले श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतलें सकळ ही ।।२।।
कासे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळ सांवळा बाइयानो ।।३।।
सकळ ही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं।।४।।

५

कर कटावरी तुळसीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावीं हरी ।।१।।
ठेविले चरण दोन्ही विटेवरी । ऐसें रूप हरी दावीं डोळां ।।धृ।।
कटीं पीतांबर कास मिरवली । दाखवीं वहिली ऐसी मूर्ती ।।२।।
गरुडपारावरी उभा राहिलासी । आठवें मानसीं तें चि रूप ।।३।।
झुरोनी पांजरा होऊं पाहें आतां । येईं पंढरीनाथा भेटावया ।।४।।

तुका म्हणे माझी पुरवावी आस । विनंती उदास करूं नये ।।५।।

६
गरुडाचें वारिकें कासे पीतांबर । सांवळें मनोहर कैं देखेन ।।१।।
बरवया बरवंटा घनमेघ सांवळा । वैजयंतीमाळा गळां शोभे ।।धृ।।
मुगुट माथां कोटि सूर्यांचा झळाळ । कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं ।।२।।
ओतींव श्रीमुख सुखाचें सकळ । वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी ।।३।।
उद्धव अक्रूर उभे दोहींकडे । वर्णिती पवाडे सनकादिक ।।४।।
तुका म्हणे नव्हे आणिकांसारिखा । तो चि माझा सखा पांडुरंग ।।५।। ।।६।।

विराण्या - अभंग २५
७
वाळो जन मज म्हणोत शिंदळी । परि हा वनमाळी न विसंबें ।।१।।
सांडूनि लौकिक जालियें उदास । नाहीं भय आस जीवित्वाची ।।२।।
नाइकें वचन बोलतां या लोकां । म्हणे जालों तुका हरिरता ।।३।।

८
आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा । म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ।।१।।
रात्रंदिस मज पाहिजे जवळी । क्षण त्यानिराळी न गमे घडी ।।२।।
नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां । रातलें अनंता तुका म्हणे ।।३।।

९
हाचि नेम आतां न फिरें माघारी । बैसलें शेजारीं गोविंदाचे ।।१।।
घररिघी जालें पट्टराणी बळें । वरिलें सांवळें परब्रम्ह ।।२।।
बळियाचा अंगसंग जाला आतां । नाहीं भय चिंता तुका म्हणे ।।३।।

१०
. नाहीं काम माझें काज तुम्हांसवें । होतें गुप्त ठावें केलें आतां ।।१।।
व्यभिचार माझा पडिला ठाउका । न सर ती लोकांमाजी जालें ।।२।।
न धरावा लोभ कांहीं मजविशीं । जालें देवपिशी तुका म्हणे।।३।।

११

. विसरले कुळ आपुला आचार । पती भावे दीर घर सोय ।।१।।
सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातलें अनंता चित्त माझें ।।२।।
मज आतां कोणी आळवाल झणी । तुका म्हणे कानीं बहिरी जालें ।।३।।

१२
न देखें न बोलें नाइकें आणीक । बैसला हा एक हरि चित्तीं ।।१।।
सासुरें माहेर मज नाहीं कोणी । एक केलें दोन्ही मिळोनियां।।२।।
आळ आला होता आम्ही भांडखोरी । तुका म्हणे खरी केली मात ।।३।।

१३
दुजा ऐंसा कोण बळी आहे आतां । हरि या अनंता पासूनिया ।।१।।
बळियाच्या आम्ही जालों बळिवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ।।२।।
तुका म्हणे आम्ही जिवाच्या उदारा । जालों प्रीतिकरा गोविंदासी ।।३।।

१४
क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट । साधिलें अवीट निजसुख ।।१।।
सांडी मांडी मागें केल्या भरोवरी । अधिक चि परी दुःखाचिया ।।२।।
तुका म्हणे येणें जाणें नाहीं आतां । राहिलों अनंताचिये पायीं ।।३।।

१५
आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं । नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ।।१।।
फावला एकांत एकविध भाव । हरि आम्हांसवें सर्व भोगी ।।२।।
तुका म्हणे अंगसंग एके ठायीं । असों जेथें नाहीं दुजें कोणी ।।३।।

१६
सर्व सुख आम्ही भोगूं सर्व काळ । तोडियेलें जाळ मोहपाश ।।१।।
याचसाठी सांडियेले भरतार । रातलों या परपुरुषाशीं ।।२।।
तुका म्हणे आतां गर्भ नये धरूं । औषध जें करूं फळ नव्हे ।।३।।

१७
एका जिवें आतां जिणें जालें दोहीं । वेगळीक कांहीं नव्हे आतां ।।१।।
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक । पुरविली हे भाक सांभाळिली ।।२।।
तुका म्हणे जालें सायासाचें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ।।३।।

१८
हासों रुसों आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ।।१।।
सेवासुखें करूं विनोदवचन । आम्ही नारायण एकाएकीं ।।२।।
तुका म्हणे आम्ही जालों उदासीन । आपुल्या आधीन केला पति ।।३।।

१९
मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयानो ।।१।।
न साहवे तुम्हां या जनाची कूट । बोलती वाईट ओखटें तें ।।२।।
तुका म्हणे जालों उदास मोकळ्या । विचरों गोवळ्यासवें आम्ही ।।३।।
२०
शिकविलें तुम्हीं तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग तों ।।१।।
प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ।।२।।
तुका म्हणे चित्तीं बैसला अनंत । दिसों नेदी नित्य अनित्य तें ।।३।।

२१
सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ।।१।।
जोंवरी या तुम्हां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ।।२।।
तुका म्हणे काय वांयांविण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ।।३।।

२२
आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण । कौतुकें खेळणें संग होता ।।१।।
आतां अनावर जालें अगुणाची । करूं नये तें चि करीं सुखें ।।२।।
तुका म्हणे आतां बुडविलीं दोन्ही । कुळें एक मनीं नारायण ।।३।।

२३
सासुरियां वीट आला भरतारा । इकडे माहेरा स्वभावें चि ।।१।।
सांडवर कोणी न धरिती हातीं । प्रारब्धाची गति भोगूं आतां ।।२।।
न व्हावी ते जाली आमुची भंडाई । तुका म्हणे काई लाजों आतां ।।३।।

२४
मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ।।१।।
आतां तुम्ही पाहा आमुचें नवल । नका वेचूं बोल वांयांविण ।।२।।

तुका म्हणे तुम्ही भयाभीत नारी । कैसे संग सरी तुम्हां आम्हां ।।३।।

२५
परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनि करीं घ्यावें सीस ।।१।।
संवसारा आगी आपुलेनि हातें । लावूनि मागुतें पाहूं नये ।।२।।
तुका म्हणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपासोई ।।३।।

२६
अइकाल परी ऐसें नव्हे बाई । न संडा या सोई भ्रताराची ।।१।।
नव्हे आराणुक लौकिकापासून । आपुल्या आपण गोविलें तें ।।२।।
तुका म्हणे मन कराल कठीण । त्या या निवडोन मजपाशीं ।।३।।

२७
आहांच वाहांच आंत वरी दोन्ही । न लगा गडणी आम्हां तैशा ।।१।।
भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा । आवरूनि मना बंद द्यावा ।।२।।
तुका म्हणे कांहीं अभ्यासावांचुनी । नव्हे हे करणी भलतीची ।।३।।

२८
बहुतांच्या आम्ही न मिळों मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या ।।१।।
विचार करितां वांयां जाय काळ । लटिकें तें मूळ फजितीचें ।।२।।
तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचिया ।।३।।

२९
त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा । कठिण हें जिवा तोंचिवरी ।।१।।
मागिलांचे दुःख लागों नेदी अंगा । अंतर हें संगा नेदी पुढें ।।२।।
तुका म्हणे सर्वविशीं हा संपन्न । जाणती महिमान श्रुति ऐसें ।।३।।

३०
न राहे रसना बोलतां आवडी । पायीं दिली बुडी माझ्या मनें ।।१।।
मानेल त्या तुम्ही अइका स्वभावें । मी तों माझ्याभावें अनुसरलें ।।२।।
तुका म्हणे तुम्हीं फिरावें बहुतीं । माझी तों हे गती जाली आतां ।।३।।

३१

न बोलतां तुम्हां कळों न ये गुज । म्हणउनी लाज सांडियेली ।।१।।
आतां तुम्हां पुढें जोडीतसें हात । नका कोणी अंत पाहों माझा ।।२।।
तुका म्हणे आम्ही बैसलों शेजारीं । करील तें हरी पाहों आतां ।।३।। ।।२५।।

३२
नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ।।१।।
नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येइल तैसा बोल रामकृष्ण ।।धृ।।
देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंशीं प्रीति भावबळें ।।२।।
तुका म्हणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ।।३।।

३३
सावध जालों सावध जालों । हरिच्या आलों जागरणा ।।१।।
तेथें वैष्णवांचे भार । जयजयकार गर्जतसे ।।धृ।।
पळोनियां गेली झोप । होतें पाप आड तें ।।२।।
तुका म्हणे त्या ठाया । ओल छाया कृपेची ।।३।।

३४
आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ।।१।।
कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्त्विक । तयाचा हरिख वाटे देवा ।।धृ।।
गीता भागवत करिती श्रवण । आणीक चिंतन विठोबाचें ।।२।।
तुका म्हणे मज घडो त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ।।३।।

३५
अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची ।।१।।
देव सोयरा देव सोयरा । देव सोयरा दीनाचा ।।धृ।।
आपुल्या वैभवें । शृंगारावें निर्मळ ।।२।।
तुका म्हणे जेवी सवें । प्रेम द्यावें प्रीतीचें ।।३।।

३६
सुखें वोळंब दावी गोहा । माझें दुःख नेणा पाहा ।।१।।
आवडीचा मारिला वेडा । होय होय कैसा म्हणे भिडा ।।धृ।।
निपट मज न चले अन्न । पायली गहूं सांजा तीन ।।२।।

गेले वारीं तुम्हीं आणिली साकर ।सातदी गेली साडेदहा शेर ।।३।।
अखंड मज पोटाची व्यथा । दुधभात साकर तूप पथ्या ।।४।।
दो पाहरा मज लहरी येती। शुद्ध नाहीं पडे सुपती ।।५।।
नीज नये घाली फुलें । जवळीं न साहती मुलें ।।६।।
अंगी चंदन लावितें भाळीं । सदा शूळ माझे कपाळीं ।।७।।
हाड गळोनि आलें मास । माझें दुःख तुम्हां नेणवे कैसें ।।८।।
तुका म्हणे जिता गाढव केला । मेलियावरि नरका नेला ।।९।।

३७
पावलें पावलें तुझें आम्हां सर्व । दुजा नको भाव होऊं देऊं ।।१।।
जेथें तेथें तुझीं च पाउलें । त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ।।धृ।।
भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद । आम्हां नको वाद त्यांशीं देऊं ।।२।।
तुका म्हणे अणु तुजविण नाहीं । नभाहूनि पाहीं वाढ आहे ।।३।।

३८
वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी । पूर्वकर्मा होळी करुनी सांडूं ।।१।।
अमुप हे गांठीं बांधूं भांडवल । अनाथा विठ्ठल आम्हां जोगा ।।धृ।।
अवघे होती लाभ एका या चिंतनें । नामसंकीर्तनें गोविंदाच्या ।।२।।
जन्ममरणाच्या खुंटतील खेपा । होईल हा सोपा सिद्ध पंथ ।।३।।
गेले पुढें त्यांचा शोधीत मारग । चला जाऊं माग घेत आम्ही ।।४।।
तुका म्हणे घालूं जीवपणा चिरा । जाऊं त्या माहेरा निजाचिया।।५।।

३९
जेविले ते संत मागें उष्टावळी । अवघ्या पत्रावळी करुनी झाडा ।।१।।
सोवळ्या ओंवळ्या राहिलों निराळा । पासूनि सकळां अवघ्यां दुरीं ।।धृ।।
परें परतें मज न लागे सांगावें । हें तों देवें बरें शिकविलें ।।२।।
दुसऱ्यातें आम्ही नाहीं आतळत । जाणोनि संकेत उभा असे ।।३।।
येथें कोणीं कांहीं न धरावी शंका । मज चाड एका भोजनाची ।।४।।
लांचावला तुका मारितसे झड । पुरविलें कोड नारायणें ।।५।।

४०
देवाच्या प्रसादें करा रे भोजन । व्हाल कोण कोण अधिकारी ते ।।१।।
ब्रम्हादिकांसि हें दुर्लभ उच्छिष्ट । नका मानूं वीट ब्रम्हरसीं ।।धृ।।

अवघियां पुरतें वोसंडलें पात्र । अधिकार सर्वत्र आहे येथें ।।२।।
इच्छादानी येथें वळला समर्थ । अवघें चि आर्त पुरवितो ।।३।।
सरे येथें ऐसें नाहीं कदाकाळीं । पुढती वाटे कवळीं घ्यावें ऐसें ।।४।।
तुका म्हणे पाक लक्ष्मुीच्या हातें । कामारीसांगातें निरुपम।।५।।

४१
अवगुणांचे हातीं । आहे अवघी फजीती ।।१।।
नाहीं पात्रासवें चाड । प्रमाण तें फिकें गोड ।।धृ।।
विष तांब्या वाटी । भरली लावूं नये होटीं ।।२।।
तुका म्हणे भाव । शुद्ध बरा सोंग वाव ।।३।।

४२
हरीच्या जागरणा । जातां कां रे नये मना ।।१।।
कोठें पाहासील तुटी । आयुष्य वेचे फुकासाटीं ।।२।।
ज्यांची तुज गुंती । ते तों मोकलिती अंतीं ।।२।। तुका म्हणे बरा । लाभ काय तो विचारा ।।३।।

४३
धर्माची तूं मूर्ती । पाप पुण्य तुझे हातीं ।।१।।
मज सोडवीं दातारा । कर्मापासूनि दुस्तरा ।।धृ।।
करिसी अंगीकार । तरी काय माझा भार ।।२।।४३
जिवींच्या जीवना । तुका म्हणे नारायणा ।।३।।

४४
ब्रम्हादिक जया लाभासि ठेंगणे । बळिये आम्ही भले शरणागत ।।१।।
कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ । जाला पद्मनाभ सेवाऋृणी ।।धृ।।
कामधेनूचिया क्षीरा पार नाहीं । इच्छेचिये वाही वरुषावे ।।२।।
बैसलिये ठायीं लागलें भरतें । त्रिपुटीवरतें भेदी ऐसें ।।३।।
हरि नाहीं आम्हां विष्णुदासां जगीं । नारायण अंगीं विसावला ।।४।।
तुका म्हणे बहु लाटे हें भोजन । नाहीं रिता कोण राहत राहों ।।५।।

४५
दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरि ।। आपणाबाहेरी। न लगे ठाव

धुंडावा ।।१।।
इतुलें जाणावया जाणा । कोंडें तरी मनें मना ।। पारधीच्या खुणा । जाणतें चि साधावे ।।धृ।।
देह आधीं काय खरा । देहसंबंधपसारा ।। बुजगावणें चोरा । रक्षणसें भासतें ।।२।।
तुका करी जागा । नको चाचपूं वाउगा ।। आहेसि तूं आगा। अंगीं डोळे उघडी ।।३।।

४६
विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ।।१।।
अइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ।।धृ।।
कोणा ही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ।।२।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ।।३।।

४७
आम्ही जरी आस । जालों टाकोनि उदास ।।१।।
आतां कोण भय धरी । पुढें मरणाचें हरी ।।धृ।।
भलते ठायीं पडों । देह तुरंगीं हा चढो ।।२।।
तुमचें तुम्हांपासीं । आम्ही आहों जैसीं तैसीं ।।३।।
गेले मानामान । सुखदुःखाचें खंडन ।।४।।
तुका म्हणे चित्तीं। नाहीं वागवीत खंती ।।५।।

४८
निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ।।१।।
मज हें ही नाहीं तें ही नाहीं । वेगळा दोहीं पासुनी ।।धृ।।
देहभोग भोगें घडे। जें जें जोडे तें बरें ।।२।।
अवघें पावे नारायणीं । जनार्दनीं तुक्याचें ।।३।।

४९
जन विजन जालें आम्हां । विठ्ठलनामा प्रमाणें ।।१।।
पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई ।।धृ।।
वन पट्टण एकभाव। अवघा ठाव सरता जाला ।।२।।
आठव नाहीं सुखदुःखा । नाचे तुका कौतुकें ।।३।।

५०
हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ।।१।।
तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ।।धृ।।
मोहरा होय तोचि अंगें। सूत न जळे ज्याचे संगें ।।२।।
तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ।।३।।

५१
आलिंगनें घडे । मोक्ष सायुज्यता जोडे ।।१।।
ऐसा संताचा महिमा । जाली बोलायाची सीमा ।।धृ।।
तीर्थें पर्वकाळ । अवघीं पायांपें सकळ ।।२।।
तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ।।३।।

५२
माझिया मीपणा । जाला यावरी उगाणा ।।१।।
भोगी त्यागी पांडुरंग । त्यानें वसविलें अंग ।।धृ।।
टाळिलें निमित्त । फार थोडें घात हित ।।२।।
यावें कामावरी । तुका म्हणे नाहीं उरी ।।३।।

५३
सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार आशा समूळ ।। निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धि । निर्मळ स्फटिक जैसा ।।१।।
मोक्षाचें तीर्थ न लगे वाराणसी । येती तयापासीं अवघीं जनें।। तीर्थांसी तीर्थ जाला तो चि एक । मोक्ष तेणें दर्शनें ।।धृ।।
मन शुद्ध तया काय करिसी माळा । मंडित सकळा भूषणांसी ।। हरिच्या गुणें गर्जताती सदा । आनंद तया मानसीं ।।२।।
तन मन धन दिलें पुरुषोत्तमा । आशा नाहीं कवणाची ।। तुका म्हणे तो परिसाहूनि आगळा । काय महिमा वर्णूं त्याची ।।३।।

५४
आहे तें सकळ कृष्णा चि अर्पण । न कळतां मन दुजें भावी ।।१।।
म्हणउनी पाठी लागतील भूतें । येती गवसीत पांचजणें ।।धृ।।
ज्याचे त्या वंचलें आठव न होतां । दंड या निमित्ताकारणें हा ।।२।।

तुका म्हणे काळें चेंपियेला गळा । मी मी वेळोवेळा करीतसे ।।३।।

५५
महारासि सिवे । कोपे ब्राम्हण तो नव्हे ।।१।।
तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करितां नाहीं ।।धृ।।
नातळे चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ ।।२।।
ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो त्या याती ।।३।।

५६
तेलनीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भिडा ।।१।।
आपुलें हित आपण पाही । संकोच तो न धरी कांहीं ।।धृ।।
नावडे लोकां टाकिला गोहो । बोडिले डोकें सांडिला मोहो ।।२।।
शेजारणीच्या गेली रागें ।कुतऱ्यांनी घर भरिलें मागें ।।३।।
पिसारागें भाजिलें घर । नागविलें तें नेणे फार ।।४।।
तुका म्हणे वांच्या रागें । फेडिलें सावलें देखिलें जगें ।।५।।

५७
मज दास करी त्यांचा । संतदासांच्या दासांचा ।।१।।
मग होत कल्पवरी । सुखें गर्भवास हरी ।।धृ।।
नीचवृत्तिकाम । परी मुखीं तुझें नाम ।।२।।
तुका म्हणे सेवे । माझे संकल्प वेचावे ।।३।।

५८
सदा तळमळ । चित्ताचिये हळहळ ।।१।।
त्याचें दर्शन न व्हावें । शव असतां तो जिवे ।।धृ।।
कुशब्दाची घाणी । अमंगळविली वाणी ।।२।।
नेणे शब्द पर । तुका म्हणे परउपकार ।।३।।

५९
जया नाहीं नेम एकादशीव्रत । जाणावें तें प्रेत शव लोकीं ।।१।।
त्याचें वय नित्य काळ लेखीताहे । रागें दात खाय कराकरा ।।धृ।।
जयाचिये द्वारीं तुळसीवृंदावन । नाहीं तें स्मशान गृह जाणां ।।२।।
जये कुळीं नाहीं एक ही वैष्णव । त्याचा बुडे भवनदीतापा ।।३।।

विठोबाचें नाम नुच्चारी जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड रजकाचें ।।४।।
तुका म्हणे त्याचे काष्ठ हातपाय । कीर्तना नव जाय हरीचिया ।।५।।

६०
आम्ही सदैव सुडके । जवळीं येतां चोर धाके ।। जाऊं पुडी भिकें । कुतरीं घर राखती ।।१।।
नांदणूक ऐसी सांगा । नाहीं तरी वांयां भागा ।। थोरपण अंगा । तरी ऐसें आणावें ।।धृ।।
अक्षय साचार । केलें सायासांनी घर ।। एरंडसिंवार । दुजा भार न साहती ।।२।।
धन कण घरोघरीं । पोट भरे भिकेवरी ।। जतन तीं करी । कोणगुरें वासरें ।।३।।
जाली सकळ निश्चिंती । भांडवल शेण माती । झळझळीत भिंती । वृंदावनें तुळसीचीं ।।४।।
तुका म्हणे देवा । अवघा निरविला हेवा ।। कुटुंबाची सेवा । तो चि करी आमुच्या ।।५।।

६१
पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेचे ।।१।।
न करितां परनिंदा द्रव्य अभिलाष । काय तुमचें यास वेचे सांगा ।।धृ।।
बैसलिये ठायी म्हणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ।।२।।
संताचे वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचे सांगा ।।३।।
खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास ऐसें सांगा ।।४।।
तुका म्हणे देव जोडे याचसाटीं । आणीक ते आटी न लगे कांहीं ।।५।।

६२
शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ।।१।।
मुखीं अमृताची वाणी । देह वेचावा कारणीं ।।धृ।।
सर्वांगीं निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ।।२।।
तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ।।३।।

६३
चित्त समाधानें । तरी विष वाटे सोनें ।।१।।

बहु खोटा अतिशय । जाणां भले सांगों काय ।।धृ।।
मनाच्या तळमळें । चंदनें ही अंग पोळे ।।२।।
तुका म्हणे दुजा । उपचार पीडा पूजा ।।३।।

६४
परिमळ म्हूण चोळूं नये फूल । खाऊं नये मूल आवडतें ।।१।।
मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद । यंत्र भेदुनि नाद पाहूं नये ।।२।।
कर्मफळ म्हणुनी इच्छूं नये काम । तुका म्हणे वर्म दावूं लोकां ।।३।।

६५
माया तें चि ब्रम्ह ब्रम्ह तेंचि माया । अंग आणि छाया तया परी ।।१।।
तोडितां न तुटे सारितां निराळी । लोटांगणांतळीं हारपते ।।धृ।।
दुजें नाहीं तेथें बळ कोणासाठीं । आणिक ते आटी विचाराची ।।२।।
तुका म्हणे उंच वाढे उंचपणें । ठेंगणीं लवणें जैसीं तैसीं ।।३।।

६६
दुर्जनासि करी साहे । तो ही दंड हे लाहे ।।१।।
शिंदळीच्या कुंटणी वाटा । संग खोटा खोट्याचा ।।धृ।।
येर येरा कांचणी भेटे। आगी उठे तेथूनी ।।२।।
तुका म्हणे कापूं नाकें । पुढें आणिकें शिकविती ।।३।।

६७
वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती । जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ।।१।।
भाडेकरी वाहे पाठीवरी भार । अंतरींचें सार लाभ नाहीं ।।धृ।।
देवपूजेवरी ठेवूनियां मन । पाषाणा पाषाण पूजी लोभें ।।२।।
तुका म्हणे फळ चिंतिती आदरें । लाघव हे चार शिंदळीचे ।।३।।

६८
पवित्र सोंवळीं । एक तीं च भूमंडळीं ।।१।।
ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव ।।धृ।।
तीं च भाग्यवंतें । सरतीं पुरतीं धनवित्तें ।।२।।
तुका म्हणे देवा । त्यांची केल्या पावे सेवा ।।३।।

६९
आशाबद्ध जन । काय जाणे नारायण ।।१।।
करी इंद्रियांची सेवा । पाहे आवडीचा हेवा ।।धृ।।
भ्रमलें चावळे । तैसें उचित न कळे ।।२।।
तुका म्हणे विषें । अन्न नाशियलें जैसें ।।३।।

७०
ढेकरें जेवण दिसे साचें । नाहीं तरि काचें कुंथाकुंथी ।।१।।
हे ही बोल ते ही बोल । कोरडे फोल रुचीविण ।।धृ।।
गव्हांचिया होती परी । फके वरी खाऊं नये ।।२।।
तुकां म्हणे असे हातींचें कांकण । तयासी दर्पण विल्हाळक ।।३।।

७१
करावी ते पूजा मनें चि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ।।१।।
कळावें तयासि कळे अंतरींचें । कारण तें साचें साचा अंगीं ।।धृ।।
अतिशया अंतीं लाभ किंवा घात । फळ देतें चित्त बीजा ऐसें ।।२।।
तुका म्हणे जेणें राहे समाधान । ऐसें तें भजन पार पावी ।।३।।

७२
एकादशीव्रत सोमवार न करिती । कोण त्यांची गति होइल नेणों ।।१।।
काय करूं बहु वाटे तळमळ । आंधळीं सकळ बहिर्मुख ।।धृ।।
हरिहरां नाहीं बोटभरी वाती । कोण त्यांची गति होईल नेणों ।।२।।
तुका म्हणे नाहीं नारायणीं प्रीति । कोण त्यांची गति होइल नेणों ।।३।।

७३
नव्हे आराणूक संवसारा हातीं । सर्वकाळ चित्तीं हा चि धंदा ।।१।।
देवधर्म सांदीं पडिला सकळ । विषयीं गोंधळ गाजतसे ।।ध्रु. ।।
रात्रि दीस न पुरे कुटुंबाचें समाधान । दुर्लभ दर्शन ईश्वराचें ।।२।।
तुका म्हणे आत्महत्या रे घातकी । थोर होते चुकी नारायणीं ।।३।।

७४
स्मशान ते भूमि प्रेतरूप जन । सेवाभक्तिहीन ग्रामवासी ।।१।।
भरतील पोट श्वानाचिया परी । वस्ति दिली घरीं यमदूतां ।।धृ।।

अपूज्य लिंग तेथें अतित न घे थारा । ऐसी वस्ती चोरां कंटकांची ।।२।।
तुका म्हणे नाहीं ठावी स्थिति मती । यमाची निश्चिंती कुळवाडी ।।३।।

७५
आहाकटा त्याचे करिती पितर । वंशीं दुराचार पुत्र जाला ।।१।।
गळे चि ना गर्भ नव्हे चि कां वांज । माता त्याची लाजलावा पापी ।।ध्रु. ।।
परपीडें परद्वारीं सावधान । सादर चि मन अभाग्याचें ।।२।।
न मिळतां निंदा चाहडी उपवास । संग्रहाचे दोष सकळ ही ।।३।।
परउपकार पुण्य त्या वावडें । विषाचें तें कीडें दुग्धीं मरे ।।४।।
तुका म्हणे विटाळाची च तो मूर्ति । दया क्षमा शांति नातळे त्या ।।५।।

७६
श्वान शीघ्रकोपी । आपणा घातकर पापी ।।१।।
नाहीं भीड आणि धीर । उपदेश न जिरे क्षीर ।।ध्रु. ।।
माणसांसि भुंके । विजातीनें द्यावे थुंके ।।२।।
तुका म्हणे चित्त । मळिण करा तें फजित ।।३।।

७७
देखोनि हरखली अंड । पुत्र जाला म्हणे रांड ।। तंव तो जाला भांड । चाहाड चोर शिंदळ ।।१।।
जाय तिकडे पीडी लोकां। जोडी भांडवल थुंका ।। थोर जाला चुका । वर कां नाहीं घातली ।।धृ।।
भूमि कांपे त्याच्या भारें । कुंभपाकाचीं शरीरें ।।निष्ठुरउत्तरें। पापदृष्टी मळिणचित्त ।।२।।
दुराचारी तो चांडाळ । पाप सांगातें विटाळ । तुका म्हणे खळ । म्हणोनियां निषिद्ध तो ।।३।।

७८
नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर । घालूं तुज भार पांडुरंगा ।।१।।
नेणें राग वेळ काळ घात मात । तुझे पायीं चित्त ठेवीं देवा ।।२।।
तुका म्हणे मज चाड नाहीं जना । तुज नारायणा वांचूनिया।।३।।

७९

माझी पाठ करा कवी । उट लावी दारोदार ।।१।।
तंव तया पारखी सिव । लाजे ठाव सांडितां ।।ध्रु. ।।
उष्टावळी करूनि जमा । कुंथुनि प्रेमा आणितसे ।।२।।
तुका म्हणे बाहेरमुदी । आहा च गोविंदीं न सरती ।।३।।

८०

उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा । नेदूं आतां पीडा आतळों ते ।।१।।
काशासाठीं हात भरूनि धुवावे । चालतिया गोवे मारगासि ।।ध्रु. ।।
काय नाहीं देवें करूनि ठेविलें । असें तें आपुलें ते ते ठायीं ।।२।।
तुका म्हणे जेव्हां गेला अहंकार । तेव्हां आपपर बोळविले ।।३।।

८१

योगाचें तें भाग्य क्षमा । आधीं दमा इंद्रियें ।।१।।
अवघीं भाग्यें येती घरा । देव सोयरा जालिया ।।ध्रु. ।।
मिरासीचें म्हूण सेत। नाहीं देत पीक उगें ।।२।।
तुका म्हणे उचित जाणां । उगीं सिणा काशाला ।।३।।

८२

न ये नेत्रां जळ । नाहीं अंतरीं कळवळ ।।१।।
तों हे चावटीचे बोल । जन रंजवणें फोल ।।ध्रु. ।।
न फळे उत्तर । नाहीं स्वामी जों सादर ।।२।।
तुका म्हणे भेटी । जंव नाहीं दृष्टादृष्टी ।।३।।

८३

बाईल सवासिण आई । आपण पितरांचे ठायीं ।।१।।
थोर वेच जाला नष्टा । अवघ्या अपसव्य चेष्टा ।।ध्रु. ।।
विषयांचे चरवणीं । केली आयुष्याची गाळणी ।।२।।
तुका म्हणे लंडा । नाहीं दया देव धोंडा ।।३।।

८४

दानें कांपे हात । नाव तेविशीं मात ।।१।।
कथी चावटीचे बोल । हिंग क्षीरीं मिथ्या फोल ।।धृ।।

न वजती पाप । तीर्था म्हणे वेचूं काय ।।२।।
तुका म्हणे मनीं नाहीं । न ये आकारातें कांहीं ।।३।।

८५
वळितें जें गाई । त्यासि फार लागे काई ।।१।।
निवे भावाच्या उत्तरीं । भलते एके धणी वरी ।।धृ।।
न लगती प्रकार । कांहीं मानाचा आदर ।।२।।
सांडी थोरपणा । तुका म्हणे सवें दीना ।।३।।

८६
मैत्र केले महा बळी । कामा न येती अंतकाळीं ।।१।।
आधीं घे रे रामनाम । सामा भरीं हा उत्तम ।।धृ।।
नाहीं तरी यम । दांत खातो करकरा ।।२।।
धन मेळविलें कोडी । काळ घेतल्या न सोडी ।।३।।
कामा न ये हा परिवार । सैन्य लोक बहु फार ।।४।।
तंववरि मिरविसी बळ । जंव आला नाहीं काळ ।।५।।
तुका म्हणे बापा । चुकवीं चौऱ्याशींच्या खेपा ।।६।।

८७
कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार । एकाचें उत्तर एका न ये ।।१।।
तैसें मज नको करूं कमळापति । देईं या संगति सज्जनांची ।।धृ।।
तिनें पाचारिलें इल बा म्हणोन । येरु पळे आण जाली आतां ।।२।।
तुका म्हणे येर येरा जें विच्छिन्न । तेथें वाढे सीण सुखा पोटीं ।।३।।

८८
सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वता एवढें ।।१।।
धरीं धरीं आठवण । मानीं संताचें वचन ।।धृ।।
नेलें रात्रीनें तें अर्धे । बाळपण जराव्याधें ।।२।।
तुका म्हणे पुढा । घाणा जुंती जसी मूढा ।।३।।

८९
बोलायाचा त्यासीं । नको संबंध मानसीं ।।१।।
जया घडली संतनिंदा । तुज विसरूनि गोविंदा ।।धृ।।

जळो त्याचें तोंड। नको दृष्टीपुढें भांड ।।२।।
तुका म्हणे देवा । तया दुरी मज ठेवा ।।३।।

९०
तीळ जाळिले तांदुळ । काम क्रोधे तैसे चि खळ ।।१।।
कां रे सिणलासी वाउगा । न भजतां पांडुरंगा ।।धृ।।
मानदंभासाठीं। केली अक्षरांची आटी ।।२।।
तप करूनि तीर्थाटन । वाढविला अभिमान ।।३।।
वांटिलें तें धन । केली अहंता जतन ।।४।।
तुका म्हणे चुकलें वर्म । केला अवघा चि अधर्म ।।५।।

९१
संवसारतापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ।।१।।
म्हणऊनी तुझे आठविले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ।।धृ।।
बहुतां जन्मींचा जालों भारवाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ।।२।।
वेढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ।।३।।
बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दिवस जालों कासाविस ।।४।।
तुका म्हणे आतां धांव घाली वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीननाथा ।।५।।

९२
भक्तऋृणी देव बोलती पुराणें । निर्धार वचनें साच करीं ।।१।।
मागें काय जाणों अइकिली वार्त्ता । कबिर सातें जातां घडिया वांटी ।।धृ।।
माघारिया धन आणिलें घरासि । न घे केला त्यासि त्याग तेणें ।।२।।
नामदेवाचिया घरासि आणिलें । तेणें लुटविलें द्विजां हातीं ।।३।।
प्रत्यक्षासि काय द्यावें हें प्रमाण । व्यंकोबाचें ऋृण फेडियेलें ।।४।।
बीज दळोनियां केली आराधना । लागे नारायणा पेरणें तें ।।५।।
तुका म्हणे नाहीं जयासि निर्धार । नाडला साचार तो चि एक ।।६।।

९३
भोगें घडे त्याग । त्यागें अंगा येती भोग ।।१।।
ऐसें उफराटें वर्म । धर्मा अंगीं च अधर्म ।।धृ।।
देव अंतरे तें पाप । खोटे उगवा संकल्प ।।२।।
तुका म्हणे भीड खोटी । लाभ विचारावा पोटीं ।।३।।

९४
भोरप्यानें सोंग पालटिलें वरी । ध्यान धरी मत्स्या जैसें ।।१।।
टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदि जगीं फांसे जैसे ।।धृ।।
ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा । भीतरील फांसा कळों नेदी ।।२।।
खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया नळी तया साठीं ।।३।।
तुका म्हणे तैसा भला मी लोकांत । परी तूं कृपावंत पांडुरंगा ।।४।।

९५
गेली वीरसरी । मग त्यासि रांड मारी ।।१।।
मग नये तैसी सत्ता । गेली मागील आणितां ।।धृ।।
भंगलिया चित्ता । न ये काशानें सांदितां ।।२।।
तुका म्हणे धीर । भंगलिया पाठीं कीर ।।३।।

९६
युक्ताहार न लगे आणिक साधनें । अल्प नारायणें दाखविलें ।।१।।
कलियुगामाजी करावें कीर्तन । तेणें नारायण देइल भेटी ।।धृ।।
न लगे हा लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावें वनांतर भस्म दंड ।।२।।
तुका म्हणे मज आणि उपाव । दिसती ते वाव नामाविण ।।३।।

९७
कंठीं कृष्णमणी । नाहीं अशुभ ते वाणी ।।१।।
हो का नर अथवा नारी । रांड तयें नावें खरी ।।धृ।।
नाहीं हातीं दान । शूरपणाचें कांकण ।।२।।
वाळियेली संतीं । केली बोडोनि फजिती ।।३।।
तुका म्हणे ताळा । नाहीं त्याची अवकळा ।।४।।

९८
माया ब्रम्ह ऐसें म्हणती धर्मठक । आपणासरिसे लोक नागविले ।।१।।
विषयीं लंपट शिकवी कुविद्या । मनामागें नांद्या होऊनि फिरे ।।धृ।।
करुनी खातां पाक जिरे सुरण राई । करितां अतित्याई दुःख पावे ।।२।।
औषध द्यावया चाळविलें बाळा । दावूनियां गुळा दृष्टीपुढें ।।३।।
तरावया आधीं शोधा वेदवाणी । वांजट बोलणीं वारा त्यांचीं ।।४।।

तुका म्हणे जयां पिंडाचें पाळण। न घडे नारायणभेट तयां ।।५।।

९९
मृगजळ दिसे साचपणा ऐसें । खोटियाचें पिसें ऊर फोडी ।।१।।
जाणोन कां करा आपुलाले घात । विचारा रे हित लवलाहीं ।।धृ।।
संचित सांगातीं बोळवणें सवें । आचरलें द्यावें फळ तेणें ।।२।।
तुका म्हणे शेखी श्मशान तोंवरी । संबंध गोवरी अंगीं सवें ।।३।।

१००
गौळीयाची ताकपिरें । कोण पोरें चांगलीं ।।१।।
येवढा त्यांचा छंद देवा । काय सेवा भक्ती ते ।।धृ।।
काय उपास पडिले होते । कण्याभोंवते विदुराच्या ।।२।।
तुका म्हणे कुब्जा दासी । रूपरासी हीनकळा ।।३।।

१०१
आतां तरी पुढें हा चि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ।।१।।
सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ।।धृ।।
हित तें करावे देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ।।२।।
तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ।।३।।

१०२
भक्ताविण देवा । कैंचें रूप घडे सेवा ।।१।।
शोभविलें येर येरां । सोनें एके ठायीं हिरा ।।धृ।।
देवाविण भक्ता । कोण देता निष्कामता ।।२।।
तुका म्हणे बाळ । माता जैसें स्नेहजाळ ।।३।।

१०३
विश्वाचा जनिता । म्हणे यशोदेसि माता ।।१।।
ऐसा भक्तांचा अंकित । लागे तैसी लावी प्रीत ।।धृ।।
निष्काम निराळा। गोपी लावियेल्या चाळा ।।२।।
तुका म्हणे आलें । रूपा अव्यक्त चांगलें ।।३।।
१०४
काय दिनकरा । केला कोंबड्यानें खरा ।।१।।

कां हो ऐसा संत ठेवा । भार माझे माथां देवा ।।धृ।।
आडविलें दासीं । तरि कां मरती उपवासी ।।२।।
तुका म्हणे हातीं । कळा सकळ अनंतीं ।।३।।

१०५
जेवितां ही घरी । नाक हागतिया परी ।।१।।
ऐसियाचा करी चाळा । आपुली च अवकळा ।।धृ।।
सांडावें मांडावें । काय ऐसें नाहीं ठावें ।।२।।
तुका म्हणे करी । ताका दुधा एक सरी ।।३।।

१०६
हो का पुत्र पत्नी बंधु । त्यांचा तोडावा संबंधु ।।१।।
कळों आलें खटव्याळसें । शिवों नये लिंपों दोषें ।।धृ।।
फोडावें मडकें। मेलें लेखीं घायें एकें ।।२।।
तुका म्हणे त्यागें । विण चुकीजेना भोगें ।।३।।

१०७
व्याल्याविण करी शोभनतांतडी । चार ते गधडी करीतसे ।।१।।
कासया पाल्हाळ आणिकांचे देखी । सांगतां नव्हे सुखी साखरेसि ।।धृ।।
कुंथाच्या ढेकरें न देवेल पुष्टी । रूप दावी कष्टी मळिण वरी ।।२।।
तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका । अनुभवेंविण नका वाव घेऊं ।।३।।

१०८
जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ।।१।।
येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ।।धृ।।
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ।।२।।
तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ।।३।।

१०९
मान अपमान गोवे । अवघे गुंडूनी ठेवावे ।।१।।
हें चि देवाचें दर्शन । सदा राहे समाधान ।।धृ।।
शांतीची वसती । तेथें खुंटे काळगती ।।२।।
आली ऊर्मी साहे । तुका म्हणे थोडें आहे ।।३।।

११०
थोडें आहे थोडें आहे । चित्त साहे जालिया ।।१।।
हर्षामर्ष नाहीं अंगीं । पांडुरंगीं सरलें तें ।।धृ।।
अवघ्या साधनांचें सार। न लगे फार शोधावें ।।२।।
तुका म्हणे लटिकें पाहें । सांडीं देह अभिमान ।।३।।

१११
आतां उघडीं डोळे । जरी अद्यापि न कळे ।। तरी मातेचिये खोळे । दगड आला पोटासि ।।१।।
मनुष्यदेहा ऐसा निध। साधिली ते साधे सिद्ध ।। करूनि प्रबोध । संत पार उतरले ।।धृ।।
नाव चंद्रभागे तीरीं । उभी पुंडलीकाचे द्वारीं ।। कट धरूनियां करीं । उभाउभी पालवी ।।२।।
तुका म्हणे फुकासाठीं । पायीं घातली या मिठी ।। होतो उठाउठी । लवकरी च उतार ।।३।।

११२
न करीं संग राहें रे निश्चळ । लागों नेदीं मळ ममतेचा ।।१।।
या नांवें अद्वैत खरें ब्रम्हज्ञान । अनुभवावांचून बडबड ते ।।धृ।।
इंद्रियांचा जय वासनेचा क्षय । संकल्पा ही न ये वरी मन ।।२।।
तुका म्हणे न ये जाणीव अंतरा । अंतरीं या थारा आनंदाचा ।।३।।
११३
पंढरीचा महिमा । देतां आणीक उपमा ।।१।।
ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभी भेटे ।।धृ।।
आहेति सकळ । तीर्थें काळें देती फळ ।।२।।
तुका म्हणे पेठ । भूमिवरी हे वैकुंठ ।।३।।

११४
तिथाअ धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ।।१।।
मिळालिया संतसंग । समर्पितां भलें अंग ।।धृ।।
तीथाअ भाव फळे । येथें आनाड तें वळे ।।२।।
तुका म्हणे पाप । गेलें गेल्या कळे ताप ।।३।।

११५
घेऊनियां चक्र गदा । हा चि धंदा करी तो ।।१।।
भक्ता राखे पायापासीं । दुर्जनासी संहारी ।।धृ।।
अव्यक्त तें आकारलें। रूपा आलें गुणवंत ।।२।।
तुका म्हणे पुरवी इच्छा । जया तैसा विठ्ठल ।।३।।

११६
देखोनि पुराणिकांची दाढी । रडे कांुफ्दे नाक ओढी ।।१।।
प्रेम खरें दिसे जना । भिन्न अंतरीं भावना ।।धृ।।
आवरितां नावरे । खुर आठवी नेवरे ।।२।।
बोलों नयें मुखावाटां । म्हणे होतां ब्यांचा तोटा ।।३।।
दोन्ही सिंगें चारी पाय । खुणा दावी म्हणे होय ।।४।।
मना आणितां बोकड । मेला त्याची चरफड ।।५।।
होता भाव पोटीं। मुखा आलासे शेवटीं ।।६।।
तुका म्हणे कुडें । कळों येतें तें रोकडें ।।७।।

११७
दुर्जनाची गंधी विष्ठेचिया परी । देखोनियां दुरी व्हावें तया ।।१।।
अइका हो तुम्ही मात हे सज्जन । करूं संघष्टन नये बोलों ।।धृ।।
दुर्जनाचे अंगीं अखंड विटाळ । वाणी रजस्वला स्त्रवे तैशी ।।२।।
दुर्जनाचें भय धरावें त्यापरी । पिसाळलेवरी धांवे श्वान ।।३।।
दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग । बोलिलासे त्याग देशाचा त्या ।।४।।
तुका म्हणे किती सांगावें पृथक । अंग कुंभीपाक दुर्जनाचें ।।५।।

११८
अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा । ओळखा जातीचा अंत्यज तो ।।१।।
वेद श्रुति नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठाचें वचन न मानी जो ।।धृ।।
तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ।।२।।

११९
शब्दा नाहीं धीर । ज्याची बुद्धि नाहीं स्थिर ।।१।।
त्याचें न व्हावे दर्शन । खळा पंगती भोजन ।।धृ।।

संतास जो निंदी। अधम लोभासाठीं वंदी ।।२।।
तुका म्हणे पोटीं । भाव अणीक जया होटीं ।।३।।

१२०
चोरें चोरातें करावा उपदेश । आपुला अभ्यास असेल तो ।।१।।
शिंदळीच्या मागें वेचितां पाउलें । होईल आपुलें तिच्या ऐसें ।।धृ।।
तुका म्हणे भितो पुढिलिया दत्ता । म्हणऊनि चिंता उपजली ।।२।।

१२१
मांडवाच्या दारा । पुढें आणिला म्हातारा ।।१।।
म्हणे नवरी आणा रांड । जाळा नवऱ्याचें तोंड ।।धृ।।
समय न कळे । काय उपयोगीं ये वेळे ।।२।।
तुका म्हणे खरा । येथूनिया दूर करा ।।३।।

१२२
कांहीं नित्यनेमाविण । अन्न खाय तो श्वान ।। वांयां मनुष्यपण । भार वाहे तो वृषभ ।।१।।
त्याचा होय भूमी भार । नेणे यातीचा आचार ।। जाला दावेदार । भोगवी अघोर पितरांसि ।।धृ।।
अखंड अशुभ वाणी । खरें न बोले स्वप्नीं ।। पापी तयाहुनी । आणीक नाहीं दुसरा ।।२।।
पोट पोसी एकला । भूतीं दया नाहीं ज्याला ।। पाठीं लागे आल्या । अतिताचे दाराशीं ।।३।।
कांहीं संतांचे पूजन । न घडे तीर्थांचें भ्रमण ।। यमाचा आंदण । सीण थोर पावेल ।।४।।
तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी । देवा विसरूनी । गेलीं म्हणतां मी माझें ।।५।।

१२३
कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ।।१।।
गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण । यातिशीं कारण नाहीं देवा ।।२।।
आशाबद्ध नये करूं तें करिती । तुका म्हणे जाती नरकामधीं ।।३।।

१२४
हरिहरां भेद । नाहीं करूं नये वाद ।।१।।
एक एकाचे हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ।।धृ।।
भेदकासी नाड । एक वेलांटी च आड ।।२।।
उजवें वामांग । तुका म्हणे एक चि अंग ।।३।।

१२५
वक्त्या आधीं मान । गंध अक्षता पूजन । श्रोता यति जाला जाण । तरी त्या नाहीं उचित ।।१।।
शीर सर्वांगा प्रमाण । यथाविधि कर चरण । धर्माचें पाळण । सकळीं सत्य करावें ।।धृ।।
पट्ट पुत्र सांभाळी । पिता त्याची आज्ञा पाळी । प्रमाण सकळीं । ते मर्यादा करावी ।।२।।
वरासनीं पाषाण । तो न मानावा सामान्य । येर उपकरणें । सोनियाचीं परी तीं नीच ।।३।।
सोनियाचा पैंजण । मुगुटमणि केला हीण । जयाचें कारण । तया ठायीं अळंकार ।।४।।
सेवका स्वामीसाठीं मान । त्याचें नाम त्याचें धन । तुका म्हणे जाण। तुम्ही संत तदथाअ ।।५।।

१२६
घरीं रांडा पोरें मरती उपवासीं । सांगे लोकांपासीं थोरपण ।।१।।
नेऊनियां घरा दाखवावें काय । काळतोंडा जाय चुकावूनि ।।२।।
तुका म्हणे आम्ही जाणों त्या प्रमाण । ठकावे हे जन तैसे नहों ।।३।।

जोहार - अभंग ३
१२७
मायबाप जोहार । सारा साधावया आलों वेसकर ।।१।।
मागील पुढील करा झाडा । नाहीं तरी खोडा घालिती जी ।।धृ।।
फांकुं नका रुजू जालिया वांचून । सांगा जी कोण घरीं तीं धण्या ।।२।।
आजि मायबाप करा तडामोडी । उद्यां कोणी घडी राहेना हो ।।३।।
तुका म्हणे कांहीं न चले ते बोली । अखरते सालीं झाडा घेती ।।४।।

१२८
येऊं द्या जी कांहीं वेसकरास । आंतून बाहेर वोजेचा घास ।।१।।
जों यावें तों हात चि रिता नाहीं । कधीं तरीं कांहीं द्यावें घ्यावें ।।२।।
तुका म्हणे उद्यां लावीन म्हनेरा । जे हे दारोदारांभोंवतीं फिरा ।।३।।

१२९
देती घेती परज गेली । घर खालीं करूनियां ।।१।।
धांवणियाचे न पडे हातीं । खादली राती काळोखी ।।धृ।।
वधियांचे अवघें नेलें । काहीं ठेविलें नाहीं मागें ।।२।।
सोंग संपादुनि दाविला भाव । गेला आधीं माव वरि होती ।।३।।
घराकडे पाहूं नये सें चि जालें । अमानत केलें दिवाणांत ।।४।।
आतां तुका कोणा न लगे चि हातीं । जाली ते निश्चिती बोलों नये ।।५।। ।।३।।

१३०
शुकसनकादिकीं उभारिला बाहो । परिक्षितीला हो दिसां सातां ।।१।।
उठाउठी करी स्मरणाचा धांवा । धरवत देवा नाहीं धीर ।।धृ।।
त्वरा जाली गरुड टाकियेला मागें । द्रौपदीच्या लागें नारायणें ।।२।।
तुका म्हणे करी बहु च तांतडी । प्रेमाची आवडी लोभ फार ।।३।।

१३१
बोललों तें कांहीं तुमचिया हिता । वचन नेणतां क्षमा कीजे ।।१।।
वाट दावी तया न लगे रुसावें । अतित्याई जीवें नाश पावे ।।धृ।।
निंब दिला रोग तुटाया अंतरीं । पोभाळितां वरि आंत चरे ।।२।।
तुका म्हणे हित देखण्यासि कळे । पडती आंधळे कूपा माजी ।।३।।

१३२
माकडें मुठीं धरिलें फुटाणे । गुंतले ते नेणे हात तेथें ।।१।।
काय तो तयाचा लेखावा अन्याय । हित नेणे काय आपुलें तें ।।धृ।।
शुकें नळिकेशीं गोवियेले पाय । विसरोनि जाय पक्ष दोन्ही ।।२।।
तुका म्हणे एक ऐसे पशुजीव । न चले उपाव कांहीं तेथें ।।३।।

१३३
हरि तूं निष्ठुर निर्गुण । नाहीं माया बहु कठिण । नव्हे तें करिसी आन । कवणें नाहीं केलें तें ।।१।।
घेऊनि हरिश्चंद्राचें वैभव । राज्य घोडे भाग्य सर्व । पुत्र पत्नी जीव । डोंबाघरीं वोपविलीं ।।धृ।।
नळा दमयंतीचा योग । बिघडिला त्यांचा संग । ऐसें जाणे जग । पुराणें ही बोलती ।।२।।
राजा शिबी चक्रवर्ती । कृपाळु दया भूतीं । तुळविलें अंतीं । तुळें मास तयाचें ।।३।।
कर्ण भिडता समरंगणीं । बाणीं व्यापियेला रणीं । मागसी पाडोनी । तेथें दांत तयाचे ।।४।।
बळी सर्वस्वें उदार । जेणें उभारिला कर । करूनि काहार । तो पाताळीं घातला ।।५।।
श्रियाळाच्या घरीं । धरणें मांडिलें मुरारी । मारविलें करीं । त्याचें बाळ त्याहातीं ।।६।।
तुज भावें जे भजती । त्यांच्या संसारा हे गति । ठाव नाहीं पुढती। तुका म्हणे करिसी तें ।।७।।

१३४
चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळां ।।१।।
तुज पापचि नाहीं ऐसें । नाम घेतां जवळीं वसे ।।धृ।।
पंच पातकांच्या कोडी । नामें जळतां न लगे घडी ।।२।।
केलीं मागें नको राहों । तुज जमान आम्ही आहों ।।३।।
करीं तुज जीं करवती । आणिक नामें घेऊं किती ।।४।।
तुका म्हणे काळा । रीग नाहीं निघती ज्वाळा ।।५।।

१३५
बाळ बापा म्हणे काका । तरी तो कां निपराध ।।१।।
जैसा तैसा भाव गोड । पुरवी कोड विठ्ठल ।।धृ।।
साकरेसि म्हणतां धोंडा । तरी कां तोंडा न रुचे ।।२।।
तुका म्हणे आरुष बोल । नव्हे फोल आहाच ।।३।।

१३६

चित्तीं नाहीं तें जवळीं असोनि काय । वत्स सांडी माय तेणें न्यायें ।।१।।
प्रीतीचा तो वायु गोड लागे मात । जरी जाय चित्त मिळोनियां ।।२।।
तुका म्हणे अवघें फिकें भावाविण । मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ।।३।।

१३७
काय कशी करिती गंगा । भीतरिं चांगा नाहीं तो ।।१।।
अधणीं कुचर बाहेर तैसा । नये रसा पाकासि ।।धृ।।
काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या ।।२।।
तुका म्हणे प्रेमें विण । बोले भुंके अवघा शीण ।।३।।

१३८
शिंदळा साल्याचा नाहीं हा विश्वास । बाईल तो त्यास न विसंभे ।।१।।
दुष्ट बुद्धि चोरी करी निरंतर । तो म्हणे इतर लोक तैसे ।।२।।
तुका म्हणे जया चित्तीं जे वासना । तयाची भावना तयापरी ।।३।।

काला चेंडुफळी - अभंग १००
१३९
झेला रे झेला वरचेवर झेला । हातिचें गमावी तो पाठीं साहे टोला ।।१।।
त्रिगुणाचा चेंडू हातें झुगारी निराळा । वरिलिया मुखें मन लावी तेथें डोळा ।।धृ।।
आगळा होऊनि धरी वरिचिया वरी। चपळ तो जिंके गांढ्या ठके येरझारीं ।।२।।
हातीं सांपडलें उभें बैसों नेदी कोणी । सोरीमागें सोरी घेती ओणवें करूनि ।।३।।
डाई पडिलिया सोसी दुःखाचे डोंगर । पाठीवरी भार भोंवता ही उभा फेर ।।४।।
तुका म्हणे सुख पाहे तयाचें आगळें । जिंकी तो हरवी कोणी एका तरी काळें ।।५।।

१४०
अझुनि कां थीर पोरा न म्हणसी किर । धरुनियां धीर लाजे बुर निघाला ।।१।।
मोकळा होतासि कां रे पडिलासि डाईं । वरिलांचा भार आतां उतरेसा नाहीं

||धृ||
मेळवूनि मेळा एकाएकीं दिली मिठी । कवळिलें एक बहु बैसविलीं पाठीं ||२||
तळील तें वरी वरील तें येतें तळा । न सुटे तोंवरी येथें गुंतलिया खेळा ||३||
सांडितां ठाव पुढें सईल धरी हात । चढेल तो पडेल ऐसी ऐका रे मात ||४||
तुका म्हणे किती आवरावे हात पाय । न खेळावें तोंच बरें वरी न ये डाय ||५||

कोडें - अभंग २

१४१
कोडें रे कोडें ऐका हें कोडें । उगवूनि फार राहे गुंतोनियां थोडें ||१||
पुसतसे सांगा मी हें माझें ऐसें काई || रुसूं नका नुगवे तो झवे आपुली आई ||धृ||
सांगतों हें मूळ काहीं न धरावी खंती । ज्यालें ज्यवो मेलें मरो प्रारब्धा हातीं ||२||
तुका म्हणे अभिमान सांडावा सकळीं । नये अंगावरी वांयां येऊं देऊं कळी ||३||

१४२
नुगवे तें उगवून सांगितलें भाई । घालुनियां ताळा आतां शुद्ध राखा घाई ||१||
आतां कांहीं नाहीं राहिलें । म्यां आपणा आपण पाहिलें ||धृ||
कमाईस मोल येथें नका रीस मानू। निवडूं नये मज कोणा येथें वानूं ||२||
तुका म्हणे पदोपदीं कान्हो वनमाळी । जयेजत मग सेवटिला एक वेळीं ||३||

१४३
हारस आनंदाचा । घोष करा हरिनामाचा । कोण हा दैवाचा । भाग पावे येथील ||१||
पुण्य पाहिजे बहुत । जन्मांतरींचें संचित । होईल करीत । आला अधिकारी तो ||धृ||

काय पाहातां हे भाई । हरुषें नाचा धरा घाई । पोटभरी कांहीं । घेतां उरी कांहीं ठेवा ।।२।।
जें सुख दृष्टी आहे । तें च अंतरीं जो लाहे । तुका म्हणे काय। कळिकाळ तें बापुडें ।।३।।

१४४
अवघे गोपाळ म्हणती या रे करूं काला । काय कोणाची सिदोरी ते पाहों द्या मला ।
नका कांहीं मागें पुढें रे ठेवूं खरें च बोला । वंची वंचला तो चि रे येथें भोवंडा त्याला ।।१।।
घेतल्या वांचून झाडा रे नेदी आपुलें कांहीं । एकां एक ग्वाही बहुत देती मोकळें नाहीं ।
ताक सांडी येर येर रे काला भात भाकरी दहीं । आलें घेतो मध्यें बैसला नाहीं आणवीत तें ही ।।धृ।।
एका नाहीं धीर तांतडी दिल्या सोडोनि मोटा । एक सोडितील गाठी रे एक चालती वाटा ।
एक उभा भार वाहोनि पाहे उगाचि खोटा । एक ते करूनि आराले आतां ऐसें चि घाटा ।।२।।
एकीं स्थिराविल्या गाई रे एक वळत्या देती । एकांच्या फांकल्या वोढाळा फेरे भोंवतीं घेती।
एकें चाराबोरा गुंतलीं नाहीं जीवन चित्तीं । एक एका चला म्हणती एक हुंबरी घेती ।।३।।
एकीं एकें वाटा लाविलीं भोळीं नेणतीं मुलें । आपण घरींच गुंतले माळा नासिलीं फुलें ।
गांठीचें तें सोडूं नावडे खाय आइतें दिलें । सांपडलें वेठी वोढी रे भार वाहातां मेलें ।।४।।
एक ते माया गुंतले घरीं बहुत काम । वार्ता ही नाहीं तयाची तया कांहीं च ठावें
जैसें होतें शिळें संचित तैसें लागलें खावें । हातोहातीं गेलें वेचुनि मग पडिलें ठावें ।।५।।
एकीं हातीं पायीं पटे रे अंगीं लाविल्या राखा । एक ते सोलिव बोडके केली सपाट शिखा।
एक ते आळसी तळीं रे वरी वाढिल्या काखा । सिदोरी वांचून बुद्धि रे केला

अवघ्यां वाखा ।।६।
तुका म्हणे आतां कान्होबा आम्हां वांटोनि द्यावें । आहे नाहीं आम्हांपाशीं तें तुज अवघें चि ठावें।
मोकलितां तुम्ही शरण आम्ही कवणासि जावें । कृपावंते कृपा केली रे पोट भरे तों खावें ।।७।।

१४५
बैसवुनि फेरी । गडियां मध्यभागीं हरी । अवघियांचें करी । समाधान सारिखें ।।१।।
पाहे तो देखे समोर । भोगी अवघे प्रकार । हरुषें झेली कर । कवळ मुखीं देती ते ।।धृ।।
बोले बोलतिया सवें । देतील तें त्यांचें घ्यावें । एक एका ठावें । येर येरा अदृश्य ।।२।।
तुका म्हणे देवा । बहु आवडीचा हेवा । कोणाचिया जीवा वाटों नेदी विषम ।।३।।

१४६
आम्हां निकट वासें । कळों आलें जैसें तैसें । नाहीं अनारीसें । कान्होबाचे अंतरीं ।।१।।
पीडती आपुल्या भावना । जैसी जयाची वासना । कर्माचा देखणा । पाहे लीळा कौतुक ।।धृ।।
खेळ खेळे न पडे डाईं । ज्याचा भार त्याच्या ठायीं । कोणी पडतील डाईं । कोणी कोडीं उगवीती ।।२।।
तुका म्हणे कवळ । हातीं घेऊनि गोपाळ । देतो ज्यांचें बळ । त्यांसि तैसा विभाग ।।३।।

१४७
काम सारूनि सकळ । आले अवघे गोपाळ । जाली आतां वेळ । म्हणती आणा सिदोऱ्या ।।१।।
देती आपुलाला झाडा। गाई बैसविल्या वाडां । दोंदिल बोबडा । वांकड्याचा हरि मेळीं ।।धृ।।
आपुलालिये आवडी । मुदा बांधल्या परवडी । निवडूनियां गोडी । हरि मेळवी त्यांत तें ।।२।।

भार वागविला खांदीं । नव्हती मिळाली जों मांदी । सकाळांचे संदी । वोझीं अवघीं उतरलीं ।।३।।
मागे जो तांतडी । त्यासि रागा येती गडी । तुझी कां रे कुडी । येथें मिथ्या भावना ।।४।।
एक एकाच्या संवादें । कैसे धाले ब्रम्हानंदें । तुका म्हणे पदें । या रे वंदूं हरीचीं ।।५।।

१४८
यमुनें पाबळीं । गडियां बोले वनमाळी । आणा सिदोऱ्या सकळी । काला करूं आजी ।
अवघें एके ठायीं । करूनि स्वाद त्याचा पाहीं । मजपाशीं आहे तें ही । तुम्हामाजी देतों ।।१।।
म्हणती बरवें गोपाळ । म्हणती बरवें गोपाळ । वाहाती सकळ । मोहरी पांवे आनंदें।
खडकीं सोडियेल्या मोटा । अवघा केला एकवटा । काला करूनियां वांटा । गडियां देतो हरि ।।धृ।।
एकापुढें एक । घाली हात पसरी मुख । गोळा पांवे तया सुख । अधिक चि वाटे ।
म्हणती गोड जालें । म्हणती गोड जालें ।आणिक देईं । नाहीं पोट धालें ।।२।।
हात नेतो मुखापासीं । एर आशा तोंड वासी । खाय आपण तयासी । दावी वांकुलिया ।
देऊनियां मिठी। पळे लागतील पाठीं । धरूनि काढितील ओठीं । मुखामाजी खाती ।।३।।
म्हणती ठकडा रे कान्हा। लावी घांसा भरी राणा । दुम करितो शहाणा । पाठोवाठीं तयाच्या ।
अवधियांचे खाय । कवळ कृष्णा माझी माय । सुरवर म्हणती हाय हाय । सुखा अंतरलों ।।४।।
एक एका मारी । ढुंगा पाठी तोंडावरी। गोळा न साहवे हरि । म्हणे पुरे आतां ।
येतो काकुलती । गोळा न साहवे श्रीपती । म्हणे खेळों आतां नीती । सांगों आदरिलें ।।५।।
आनंदाचे फेरी । माजी घालुनियां हरी । एक घालिती हुंबरी । वाती सिंगें

पांवे ।
वांकडे बोबडे । खुडे मुडे एक लुडे । कृष्णा आवडती पुढें । बहु भाविक ते ।।६।।
करी कवतुक । त्यांचें देखोनियां मुख । हरी वाटतसे सुख । खदखदां हांसे ।
एक एकाचें उच्छिष्ट । खातां न मानिती वीट । केलीं लाजतां ही धीट । आपुलिया संगें ।।७।।
नाहीं ज्याची गेली भुक । त्याचें पसरवितो मुख । अवघियां देतो सुख । सारिखें चि हरी ।
म्हणती भला भला हरी । तुझी संगती रे बरी । आतां चाळविसी तरी । न वजों आणिकां सवें ।।८।।
गाई विसरल्या चार । पक्षी श्वापदांचे भार। जालें यमुनेचें स्थिर । जळ वाहों ठेलें ।
देव पाहाती सकळ। मुखें घोटूनियां लाळ । धन्य म्हणती गोपाळ । धिग जालों आम्ही।।९।।
म्हणती कैसें करावें । म्हणती कैसें करावें । यमुनाजळीं व्हावें । मत्स्य शेष घ्यावया ।
सुरवरांचे थाट । भरलें यमुनेचें तट । तंव अधिक ची होंट । मटमटां वाजवी ।।१०।।
आनंदें सहित । क्रीडा करी गोपीनाथ । म्हणती यमुनेंत हात । नका धुऊं कोणी ।
म्हणती जाणे जीवीचें । म्हणती जाणे जीवीचें । लाजे त्यास येथें कैचें । शेष कृष्णाचें । लाभ थोरिवे ।।११।।
धन्य दिवस काळ। आजी पावला गोपाळ । म्हणती धालों रे सकळ । तुझिया नि हातें ।
मानवले गडी। एक एकांचे आवडी । दहीं खादलें परवडी । धणीवरी आजी ।।१२।।
तुझा संग बरवा । नित्य आम्हां द्यावा । ऐसें करूनि जीवा। नित्य देवा चालावें ।
तंव म्हणे वनमाळी । घ्यारे काठिया कांबळी। आतां जाऊं खेळीमेळीं । गाई चारावया ।।१३।।
तुका म्हणे प्रेमें धालीं । कोणा न साहवे चाली । गाई गोपाळांसि केली। आपण यांसरी ।

आजि जाला आनंद । आजि जाला आनंद । चाले परमानंद । सवें आम्हांसहित ।।१४।।

१४९
या हो या चला जाऊं सकळा । पाहों हा सोहळा आजि वृंदावनींचा ।।१।।
वाइला गोपाळें वेणुनाद पडे कानीं । धीर नव्हे मनीं चित्त जालें चंचळ ।।धृ।।
उरलें तें सांडा काम नका करूं गोवी। हे चि वेळ ठावी मज कृष्णभेटीची ।।२।।
निवतील डोळे याचें श्रीमुख पाहातां । बोलती तें आतां घरचीं सोसूं वाईट ।।३।।
कृष्णभेटीआड कांहीं नावडे आणीक । लाज तरी लोक मन जालें उदास ।।४।।
एकाएकीं चालियेल्या सादावीत सवें । तुका म्हणे देवें रूपें केल्या तन्मय ।।५।।

फुगड्या - अभंग २
१५०
फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे । लाज सांडोनि एक एकी पाहे ।।१।।
फुगडी गे अवघें मोडी गे । तरीच गोडी गे संसार तोडी गे ।।धृ।।
मागें जें शिकली होतीस पोटीं । तें चि विचारूनि आतां उच्चारी ओठीं ।।२।।
त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं । सावरूनि धरी घाली मूळबंदीं गांठी ।।३।।
आगळें पाउल जिंके एकाएक । पावसी मान हे मानवती तिन्ही लोक ।।४।।
तुका म्हणे तुजमजमध्यें एक भाव। सम तुकें बार घेऊं पावों उंच ठाव ।।५।।

१५१
फुगडी फू सवती माझे तूं । हागुनि भरलें धू तुझ्या ढुंगा तोंडावरि ।।१।।
फुगडी घेतां आली हरी । ऊठ जावो जगनोवरी ।।धृ।।
हातपाय बेंबळ जाती । ढुंगण घोळितां लागे माती ।।२।।
सात पांच आणिल्या हरी । वांचुनी काय तगसी पोरी ।।३।।

सरला दम पांगले पाय । आझुनि वरी घोळिसी काय ।।४।।
तुका म्हणे आझुन तरी । सांगितलें तें गधडी करी ।।५।। ।।२।।

लखोटा - अभंग १
१५२
लये लये लखोटा । मूळबंदि कासोटा । भावा केलें साहें । आतां माझें पाहें ।।१।।
हातोहातीं गुंतली । जीवपणा मुकली। धीर माझा निका । सांडीं बोल फिका ।।२।।
अंगीकारी हरि । नको पडों फेरी । लाज धरीं भांडे । जग झोडी रांडे ।।३।।
बैस भावा पाठीं। ऐक माझ्या गोष्टी । केला सांडीं गोहो । येथें धरीं मोहो ।।४।।
पाठमोरा डोल । आवरी तें बोल । पांगलीस बाळा । पुढें अवकळा ।।५।।
आतां उभी ठायीं । उभाउभीं पाहीं । नको होऊं डुकरी । पुढें गाढव कुतरी ।।६।।
नामा केलें खरें । आपुलें म्या बरें। तुका म्हणे येरी । पांगविल्या पोरी ।।७।।

हुंबरी - अभंग १
१५३
तुशीं कोण घाली हुंबरी । साही पांगल्या अठरा चारी ।।धृ।।
सहस्त्र मुखावरी हरी । शेष शिणविलें ।।१।।
चेंडुवासवें घातली उडी । नाथिला काळिया देऊनि बुडी ।।२।।
अशुद्ध पीतां करुणा नाहीं । तुवां माउशी ही मारियेली ।।३।।
रावणाचें घर बुडविलें सारें । त्याचीं रांडापोरें मारियेलीं ।।४।।
जाणो तो ठावा आहेसि आम्हां । तुवां आपुला मामा मारियेला ।।५।।
याशीं खेळतां नाश थोरू । तुकयास्वामी सारंगधरू ।।६।। ।।१।।

हमामा - अभंग २
१५४
मशीं पोरा घे रे बार । तुझें बुजीन खालील द्वार ।।१।।

पोरा हमामा रे हमामा रे ।।धृ।।
मशीं हमामा तूं घालीं । पोरा वरी सांभाळीं खालीं ।।२।।
तरी च मशीं बोल । पोरा जिव्हाळ्याची ओल ।।३।।
मशीं घेतां भास । जीवा मीतूंपणा नास ।।४।।
मज सवें खरा । पण जाऊं नेदी घरा ।।५।।
आमुचिये रंगीं । दुजें तगेना ये संगीं ।।६।।
तुक्यासवें भास । हरी जीवा करी नास ।।७।।

१५५
हमामा रे पोरा हमामा रे । हमामा घालितां ठकलें पोर। करी येरझार चौऱ्याशीची ।।१।।
पहिले पहारा रंगासि आलें । सोहं सोहं सें बार घेतलें । देखोनि गडी तें विसरलें । डाईं पडिलें आपणची ।।धृ।।
दुसऱ्या पहारा महा आनंदें । हमामा घाली छंदछंदें। दिस वाडे तों गोड वाटे । परि पुढें नेणे पोर काय होतें तें ।।२।।
तिसऱ्या पहारा घेतला बार । अहंपणे पाय न राहे स्थिर । सोस सोस करितां डाईं पडसी । सत्य जाणें हा निर्धार ।।३।।
चौथ्या पहारा हमामा । घालिसी कांपविसी हातपाय । सुऱ्यापाटिलाचा पोर यम । त्याचे पडलीस डाईं ।।४।।
हमामा घालितां भ्याला तुका त्यानें सांडिली गड्याची सोई । यादवांचा मूल एक विठोबा त्यासवें चारितो गाई ।।५।। ।।२।।

गाई - अभंग १
१५६
आम्हां घरीं एक गाय दुभता हे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ।।१।।
वान ते सांवळी नांव ते श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें ।।धृ।।
वत्स नाहीं माय भलत्या सवें जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरणा ।।२।।
चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धाले सनकादिक सिद्ध मुनी ।।३।।
तुका म्हणे माझी भूक तेथें काय । जोगाविते माय तिन्ही लोकां ।।४।। ।।१।।

कांडण - अभंग २
१५७

सिद्ध करूनियां ठेविलें कांडण । मज सांगातीण शुद्ध बुद्धि गे ।।१।।
आठव हा धरीं मज जागें करीं । मागिले पाहारीं सेवटिचा गे ।।धृ।।
सम तुकें घाव घालीं वो साजणी । मी तुजमिळणी जंव मिळें ।।२।।
एक कशी पाखडी दुसरी निवडी । निःशेष तिसडी ओज करी ।।३।।
सरलें कांडण पाकसिद्धि करी । मेळवण क्षिरीसाकरेचें ।।४।।
उद्धव अक्रूर बंधु दोघेजण । बाप नारायण जेवणार ।।५।।
तुका म्हणे मज माहेरीं आवडी । म्हणोनि तांतडी मूळ केलें ।।६।।

१५८
सावडीं कांडण ओवी नारायण । निवडे आपण भूस सार ।।१।।
मुसळ आधारीं आवरूनि धरीं । सांवरोनि थिरीं घाव घालीं ।।धृ।।
वाजती कांकणें अनुहात गजरें । छंद माहियेरे गाऊं गीति ।।२।।
कांडिता कांडण नव्हे भाग शीण । तुजमजपण निवडे तों ।।३।।
तुका म्हणे रूप उमटे आरिसा । पाक त्या सरिसा शुद्ध जाला ।।४।। ।।२।।

आडसण दळण - अभंग १

१५९
शुद्धीचें सारोनि भरियेली पाळी । भरडोनि वोंगळी नाम केलें ।।१।।
आडसोनि शुद्ध करीं वो साजणी । सिद्ध कां पापिणी नासियेलें ।।धृ।।
सुपीं तों चि पाहें धड उगटिलें । नव्हतां नासिलें जगझोडी ।।२।।
सुपीं तों चि आहे तुज तें आधीन । दळिल्या जेवण जैसें तैसें ।।३।।
सुपीं तों चि संग घेईं धडफुडी । एकसा गधडी नास केला ।।४।।
दळितां आदळे तुज कां न कळे । काय गेले डोळे कान तुझे ।।५।।
सुपीं तों चि वोज न करितां सायास । पडसी सांदीस तुका म्हणे ।।६।। ।।१।।

दळण - अभंग १

१६०
शुद्ध दळणाचें सुख सांगों काई । मानवित सईबाई तुज ।।१।।
शुद्ध तें वळण लवकरी पावे । डोलवितां निवे अष्टांग तें ।।धृ।।
शुद्ध हें जेवितां तन निवे मन । अल्प त्या इंधन बुडा लागे ।।२।।
शुद्ध त्याचा पाक सुचित चांगला । अविट तयाला नाश नाहीं ।।३।।

तुका म्हणे शुद्ध आवडे सकळां । भ्रतार वेगळा न करी जीवें ।।४।। ।।१।।

१६१
उपजोनियां पुढती येऊं । काला खाऊं दहींभात ।।१।।
वैकुंठीं तों ऐसें नाहीं । कवळ कांहीं काल्याचें ।।धृ।।
एकमेकां देऊं मुखीं । सुखीं घालूं हुंबरी ।।२।।
तुका म्हणे वाळवंट । बरवें नीट उत्तम ।।३।।

१६२
याल तर या रे लागें । अवघे माझ्या मागें मागें ।।१।।
आजि देतों पोटभरी । पुरे म्हणाल तोंवरी ।।धृ।।
हळू हळू चला । कोणी कोणाशीं न बोला ।।२।।
तुका म्हणे सांडा घाटे । तेणें नका भरूं पोटें ।।३।।

१६३
शिंकें लावियेलें दुरी । होतों तिघांचे मी वरी ।।१।।
तुम्ही व्हारे दोहींकडे । मुख पसरूनि गडे ।।धृ।।
वाहाती त्या धारा। घ्यारे दोहींच्या कोंपरा ।।२।।
तुका म्हणे हातीं टोका । अधिक उणें नेदी एका ।।३।।

१६४
पळाले ते भ्याड । त्यांसि येथें जाला नाड ।।१।।
धीट घेती धणीवरी । शिंकीं उतरितो हरी ।।धृ।।
आपुलिया मतीं । पडलीं विचारीं तीं रितीं ।।२।।
तुका लागे घ्यारे पायां । कैं पावाल या ठाया ।।३।।

१६५
धालें मग पोट । केला गड्यांनी बोभाट ।।१।।
ये रे ये रे नारायणा । बोलों अबोलण्या खुणा ।।धृ।।
खांद्यावरी भार । तीं शिणती बहु फार ।।२।।
तुकयाच्या दातारें । नेलीं सुखी केलीं पोरें ।।३।।

१६६
पाहाती गौळणी । तंव पालथी दुधाणी ।।१।।
म्हणती नंदाचिया पोरें । आजि चोरी केली खरें ।।धृ।।
त्याविण हे नासी नव्हे दुसरिया ऐसी ।।२।।
सवें तुका मेळा । त्याणें अगुणा आणिला ।।३।।

१६७
आतां ऐसें करूं । दोघां धरूनियां मारूं ।।१।।
मग टाकिती हे खोडी । तोंडीं लागली ते गोडी ।।धृ।।
कोंडूं घरामधीं । न बोलोनि जागों बुद्धी ।।२।।
बोलावितो देवा । तुका गडियांचा मेळावा ।।३।।

१६८
गडी गेले रडी । कान्हो नेदीस तूं चढी ।।१।।
आम्ही न खेळों न खेळों । आला भाव तुझा कळों ।।धृ।।
न साहावे भार। बहु लागतो उशीर ।।२।।
तुका आला रागें । येऊं नेदी मागें मागें ।।३।।

हाल - अभंग २
१६९
यमुनेतटीं मांडिला खेळ । म्हणे गोपाळ गडियांसि ।।१।।
हाल महाहाल मांडा । वाउगी सांडा मोकळी ।।धृ।।
नांवें ठेवूनि वांटा गडी । न वजे रडी मग कोणी ।।२।।
तुका म्हणे कान्हो तिळतांदळ्या । जिंके तो करी आपुला खेळ्या ।।३।।

१७०
बळें डाईं न पडे हरी । बुद्धि करी शाहणा तो ।।१।।
मोकळें देवा खेळों द्यावें । सम भावें सांपडावया ।।धृ।।
येतो जातो वेळोवेळां । न कळे कळा सांपडती ।।२।।
तुका म्हणे धरा ठायींच्या ठायीं । मिठी जीवीं पायीं घालुनियां ।।३।। ।।२।।

सुतुतू - अभंग १

१७१
जीवशिवाच्या मांडूनि हाला । अहं सोहं दोन्ही भेडती भला ।।१।।
घाली सुतुतू फिरोनि पाही आपुणासि । पाही बळिया तो मागिला तुटी पुढिलासि ।।धृ।।
खेळिया तो हाल सांभाळी । धुम घाली तो पडे पाताळीं ।।२।।
बळिया गांढ्या तो चि खेळे । दम पुरे तो वेळोवेळां खेळे ।।३।।
हातीं पडे तो चि ढांग । दम पुरे तो खेळिया चांग ।।४।।
मागें पुढें पाहे तो जिंके । हातीं पडे तो चि आधार फिके ।।५।।
आपल्या बळें खळे रे भाई । गडियाची सांडोनि सोई ।।६।।
तुका म्हणे मी खेळिया नव्हें । जिकडे पडें त्याचि सवें ।।७।। ।।१।।

१७२
अनंत ब्रम्हांडे उदरीं । हरि हा बाळक नंदा घरीं ।।१।।
नवल केव्हडें केव्हडें । न कळे कान्होबाचें कोडें ।।धृ।।
पृथ्वी जेणें तृप्त केली । त्यासि यशोदा भोजन घाली ।।२।।
विश्वव्यापक कमळापती। त्यासि गौळणी कडिये घेती ।।३।।
तुका म्हणे नटधारी। भोग भोगून ब्रम्हचारी ।।४।।

१७३
कृष्ण गोकुळीं जन्मला । दुष्टां चळकांप सुटला ।।१।।
होतां कृष्णाचा अवतार । आनंद करिती घरोघर ।।धृ।।
प्रेम नाम वाचें गाती । सदा आनंदें नाचती ।।२।।
तुका म्हणे हरती दोष । आनंदानें करिती घोष ।।३।।

१७४
मेळउनि सकळ गोपाळ । कांहीं करिती विचार ।।१।।
चला जाऊं चोरूं लोणी । आजि घेऊं चंद्रधणी । वेळ लावियेला अझुणी। एकाकरितां गडे हो ।।धृ।।
वाट काढिली गोविंदीं । मागें गोपाळांची मांदी ।।२।।
अवघा चि वावरे । कळों नेदी कोणा फिरे ।।३।।
घर पाहोनि एकांताचें । नवविधा नवनीताचें ।।४।।
रिघे आपण भीतरी । पुरवी माथुलियाच्या हरी ।।५।।

बोलों नेदी म्हणे स्थीर । खुणा दावी खा रे क्षीर ।।६।।

१७५

धन्य त्या गौळणी इंद्राच्या पूजनीं । नैवेद्य हिरोनि खातो कृष्ण ।।१।।
अरे कृष्णा इंद्र अमर इच्छिती । कोण तयांप्रति येइल आतां ।।२।।
तुका म्हणे देव दाखवी विंदान । नैवेद्य खाऊन हासों लागे ।।३।।

१७६

तुम्ही गोपी बाळा मज कैशा नेणा । इंद्र अमरराणा म्यां चि केला ।।१।।
इंद्र चंद्र सूर्य ब्रम्हा तिन्ही लोक । माझे सकळीक यम धर्म ।।धृ।।
मजपासूनिया जाले जीव शिव । देवांचा ही देव मी च कृष्ण ।।२।।
तुका म्हणे त्यांसी बोले नारायण । व्यर्थ मी पाषाण जन्मा आलों ।।३।।

१७७

कां रे गमाविल्या गाई । आली वळती तुझी जाई । मागें जालें काई । एकातें का नेणसी ।।१।।
केलास फजित । मागें पुढें ही बहुत । लाज नाहीं नित्य । नित्य दंड पावतां ।।धृ।।
वोला खोडा खिळ गाढी । ऐसा कोण तये काढी । धांवेल का पाडी । तुझी आधीं वोढाळा ।।२।।
चाल धांवें । मी ही येतों तुजसवें । तुका म्हणे जंव । तेथें नाहीं पावली ।।३।।

१७८

काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागविती ।।१।।
काय देवा यांसि व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ।।धृ।।
सहज बोलणें हित उपदेश । करूनि सायास शिकविती ।।२।।
तुका म्हणे वत्स धेनुचिया चित्तीं । तैसें मज येती सांभाळित ।।३।।

१७९

कंठीं धरिला कृष्णमणी । अवघा जनीं प्रकाश ।।१।।
काला वांटूं एकमेकां । वैष्णवा निका संभ्रम ।।धृ।।
वांकुलिया ब्रम्हादिकां । उत्तम लोकां दाखवूं ।।२।।
तुका म्हणे भूमंडळीं । आम्ही बळी वीर गाडे ।।३।।

१८०
कवळाचिया सुखें । परब्रम्ह जालें गोरखें । हात गोऊनि खाय मुखें । बोटासांदी लोणचें ।।१।।
कोण जाणे तेथें । कोण लाभ कां तें । ब्रम्हादिकां दुर्लभ ।।धृ।।
घाली हमामा हुंबरी । पांवा वाजवी छंदें मोहरी । गोपाळांचे फेरी । हरि छंदें नाचतसे ।।२।।
काय नव्हतें त्या घरीं खावया । रिघे लोणी चोरावया । तुका म्हणे सवें तया । आम्ही ही सोंकलों ।।३।।

१८१
कान्होबा आतां तुम्ही आम्ही च गडे । कोणाकडे जाऊं नेदूं ।।१।।
वाहीन तुझी भारशिदोरी । वळतीवरी येऊं नेदीं ।।धृ।।
ढवळे गाईचें दूध काढूं । एकएकल्यां ठोंबे मारूं ।।२।।
तुका म्हणे टोकवूं त्यांला । जे तुझ्या बोला मानीत ना ।।३।।

१८२
बहु काळीं बहु काळी । आम्ही देवाचीं गोवळीं ।।१।।
नाहीं विटों देत भात । जेऊं बेसवी सांगातें ।।धृ।।
बहु काळें बहु काळें । माझें पांघरे कांबळें ।।२।।
तुका म्हणे नाहीं नाहीं । त्याचें आमचें सें कांहीं ।।३।।

१८३
बहु बरा बहु बरा । यासांगातें मिळे चारा ।।१।।
म्हणोनि जीवेंसाठीं । घेतली कान्होबाची पाठी ।।धृ।।
बरवा बरवा दिसे । समागम याचा निमिषें ।।२।।
पुढती पुढती तुका । सोंकला सोंकवितो लोकां ।।३।।

१८४
घेती पाण्यासी हुंबरी । त्यांचें समाधान करी ।।१।।
ऐशी गोपाळांची सवे । जाती तिकडे मागें धांवे ।।धृ।।
स्थिरावली गंगा । पांगविली म्हणे उगा ।।२।।
मोहरी पांवा काठी । तुका म्हणे यांजसाठी ।।३।।

१८५
वळी गाई धांवे घरा । आमच्या करी येरझारा ।।१।।
नांव घेतां तो जवळी । बहु भला कान्हो बळी ।।धृ।।
नेदी पडों उणें पुरें। म्हणे अवघें चि बरें ।।२।।
तुका म्हणे चित्ता । वाटे न व्हावा परता ।।३।।
१८६
म्हणती धालों धणीवरी । आतां न लगे शिदोरी । नये क्षणभरी । आतां यासि विसंबों ।।१।।
चाल चाल रे कान्होबा खेळ मांडूं रानीं । बैसवूं गोठणीं गाई जमा करूनि ।।धृ।।
न लगे जावें घरा। चुकलिया येरझारा । सज्जन सोयरा । मायबाप तूं आम्हां ।।२।।
तुका म्हणे धालें पोट । आतां कशाचा बोभाट । पाहाणें ते वाट । मागें पुढें राहिली ।।३।।

१८७
तुझिये संगति । जाली आमुची निश्चिंति ।।१।।
नाहीं देखिलें तें मिळे । भोग सुखाचे सोहळे ।।धृ।।
घरीं ताकाचें सरोवर। येथें नवनीताचे पूर ।।२।।
तुका म्हणे आतां । आम्ही न वजों दवडितां ।।३।।

१८८
कामें पीडिलों माया । बहु मारी नाहीं दया ।।१।।
तुझ्या राहिलों आधारें । जालें अवघें चि बरें ।।धृ।।
तुझे लागलों संगती। आतां येतों काकुळती ।।२।।
तुका म्हणे तुझ्या भिडा । कान्होबा हे गेली पीडा ।।३।।

टिपरी - अभंग ७
१८९
खेळ मांडियेला वाळवंटीं घाई । नाचती वैष्णव भाई रे। क्रोध अभिमान केला पावटणी । एक एका लागतील पायीं रे ।।१।।
नाचती आनंदकल्लोळीं । पवित्र गाणें नामावळी । कळिकाळावरि घातलीसे

कास । एक एकाहुनी बळी रे ।।धृ।।
गोपीचंदनउटी तुळसीच्या माळा । हार मिरवती गळां । टाळ मृदंग घाई पुष्पवरुषाव। अनुपम्य सुखसोंहळा रे ।।२।।
लुब्धलीं नादीं लागली समाधी । मूढ जन नर नारी लोकां । पंडित ज्ञानी योगी महानुभाव । एकचि सिद्धसाधकां रे ।।३।।
वर्णाभिमान विसरली याति । एकएकां लोटांगणीं जाती । निर्मळ चित्तें जालीं नवनीतें । पाषाणा पाझर सुटती रे ।।४।।
होतो जयजयकार गर्जत अंबर । मातले हे वैष्णव वीर रे । तुका म्हणे सोपी केली पायवाट । उतरावया भवसागर रे ।।५।।

१९०

एके घाईं खेळतां न पडसी डाईं । दुचाळ्याने ठकसील भाई रे ।
त्रिगुणांचे फेरी थोर कष्टी होसी । या चौघांसी तरी धरीं सोई रे ।।१।।
खेळ खेळोनियां निराळा चि राही । सांडी या विषयाची घाई रे ।
तेणें चि खेळें बसवंत होसी । ऐसें सत्य जाणें माझ्या भाई रे ।।धृ।।
सिंपियाचा पोर एक खेळिया नामा । तेणें विठ्ठल बसवंत केला रे । आपुल्या सवंगडिया सिकवूनि घाईं ।
तेणें सतंतर फड जागविला रे । एक घाईं खेळतां तो न चुके चि कोठें । तया संत जन मानवले रे ।।२।।
ज्ञानदेव मुक्ताबाई वटेश्वर चांगा । सोपान आनंदें खेळती रे । कान्हो गोवारी त्यांनीं बसवंत केला
आपण भोंवतीं नाचती रे । सकळिकां मिळोनि एकी च घाईं । त्याच्या ब्रम्हादिक लागती पायीं रे ।।३।।
रामा बसवंत कबिर खेळिया । जोडा बरवा मिळाला रे । पांचा सवंगडियां एक चि घाई
तेथें नाद बरवा उमटला रे । ब्रम्हादिक सुरवर मिळोनियां त्यांनीं । तो ही खेळ निवडिला रे ।।४।।
ब्राम्हणाचा पोर खेळिया एक भला तेणें जन खेळकर केला रे । जनार्दन बसवंत करूनियां ।
तेणें वैष्णवांचा मेळ मिळविला रे । एक चि घाईं खेळतां खेळतो । आपण चि बसवंत जाला रे ।।५।।
आणीक खेळिये होउनियां गेले । वर्णावया वाचा मज नाहीं रे । तुका म्हणे गडे हो हुशारूनि खेळा ।

पुढिलांची धरूनियां सोई रे । एक चि घाईं खेळतां जो चुकला । तो पडेल संसारडाईं रे ।।६।।

१९१
बाराही सोळा गडियांचा मेळा । सतरावा बसवंत खेळिया रे ।
जतिस पद राखों जेणें टिपरिया घाईं । अनुहातें वायें मांदळा रे ।।१।।
नाचत पंढरिये जाऊं रे खेळिया । विठ्ठल रखुमाई पाहूं रे ।।धृ।।
सा चहूं वेगळा अठराही निराळा । गाऊं वाजवूं एक चाळा रे ।
विसरती पक्षी चारा घेणें पाणी । तारुण्य देहभाव बाळा रे ।।२।।
आनंद तेथिचा मुकियासि वाचा । बहिरे ऐकती कानीं रे ।
आंधळ्यांसि डोळे पांगळांसि पाय । तुका म्हणे वृद्ध होती तारुण्यें रे ।।३।।

१९२
दोन्ही टिपरीं एक चि नाद । सगुण निर्गुण नाहीं भेद रे ।
कुसरी अंगें मोडितील परी । मेळविति एका छंदें रे ।।१।।
कांहीं च न वजे वांयां रे । खेळिया एक चि बसवंत अवघियां रे ।
सम विषम तेथें होऊं च नेदी । जाणऊनि आगळिया रे ।।धृ।।
संत महंत सिद्ध खेळतील घाईं । ते च सांभाळी माझ्या भाई रे ।
हात राखोन हाणिती टिपऱ्या । टिपरें मिळोनि जाय त्याची सोई रे ।।२।।
विताळाचें अवघें जाईल वांयां । काय ते शृंगारूनि काया रे ।
निवडूनि बाहेर काढिती निराळा । जो न मिळे संताचिया घाई रे ।।३।।
प्रकाराचें काज नाहीं सोडीं लाज । निःशंक होउनियां खेळें रे।
नेणतीं नेणतीं च एकें पावलीं मान । विठ्ठल नामाचिया बळें रे ।।४।।
रोमांच गुढिया डोलविती अंगें । भावबळें खेळविती सोंगें रे।
तुका म्हणे कंठ सद्गदित दाटे । या विठोबाच्या अंगसंगें रे ।।५।।

१९३
या रे गडे हो धरूं घाई जाणतां ही नेणतां । नाम गाऊं टाळी वाहूं आपुलिया हिता ।।१।।
फावलें तें घ्यारे आतां प्रेमदाता पांडुरंग । आजि सोनियाचा दिवस सोनियाचा वोडवला रंग ।।धृ।।
हिंडती रानोरान भुजंगांत कांट्यावन । सुख तयांहून आम्हां गातां नाचतां रे ।।२।।

तुका म्हणे ब्रम्हादिकां सांवळें दुर्लभ सुखा । आजि येथें आलें फुका नाम मुखा कीर्तनीं ।।३।।

१९४

भीमातीरीं एक वसलें नगर । त्याचें नांव पंढरपुर रे ।
तेथील मोकासी चार भुजा त्यासी । बाइला सोळा हजार रे ।।१।।
नाचत जाऊं त्याच्या गांवा रे खेळिया । सुख देईल विसावा रे ।
पुढें गेले ते निधाई जाले । वाणितील त्याची सीमा रे ।।धृ।।
बळियां आगळा पाळी लोकपाळां । रीघ नाहीं कळिकाळा रे ।
पुंडलीक पाटील केली कुळवाडी । तो जाला भवदुःखा वेगळा रे ।।२।।
संतसज्जनीं मांडिलीं दुकाने । जया जें पाहिजे तें आहे रे ।
भुक्तिमुक्ति फुका च साठीं । कोणी तयाकडे न पाहे रे ।।३।।
दोन्ही च हाट भरले घनदाट । अपार मिळाले वारकरी रे ।
न वजों म्हणती आम्ही वैकुंठा । जिहीं देखिली पंढरी रे ।।४।।
बहुत दिस होती मज आस। आजि घडलें सायासीं रे ।
तुका म्हणे होय तुमचेनी पुण्यें । भेटी तया पायांसी रे ।।५।।

१९५

पंढरी चोहटा मांडियेला खेळ । वैष्णव मिळोनि सकळ रे ।
टाळ टिपरी मांदळे एक नाद रे । जाला बसवंत देवकीचा बाळ रे ।।१।।
चला तें कवतुक भाई रे । पाहों डोळां कामीं गुंतलेति काई रे ।
भाग्यवंत कोणी गेले सांगाति । ऐसें सुख त्रिभुवनीं नाहीं रे ।।धृ।।
आनंदाचे वाद सुखाचे संवाद । एक एका दाखविती छंद रे।
साही अठरा चारी घालुनियां घाई । नाचती फेरी टाळशुद्ध रे ।।२।।
भक्ताचीं भूषणें मुद्रा आभरणें । शोभती चंदनाच्या उट्या रे ।
सत्व सुंदर कास घालूनि कुसरी । गर्जती नाम बोभाटीं रे ।।३।।
हरि हर ब्रम्हा तीर्थासहित भीमा । देव कोटी तेहतीस रे ।
विस्मित होऊनि ठाकले सकळ जन । अमरावती केली ओस रे ।।४।।
वाणितील थोरी वैकुंठिचीं परी । न पवे पंढरीची सरी रे ।
तुकयाचा दास म्हणे नका आळस करूं । सांगतों नरनारींस रे ।।५।।
।।७।।

१९६

ब्रम्हादिकां न कळे खोळ । ते हे आकळ धरिली ।।१।।
मोहरी पांवा वाहे काठी । धांवे पाठीं गाईचे ।।धृ।।
उच्छिष्ट न लभे देवा । तें हें सदैवां गोवळ्यां ।।२।।
तुका म्हणे जोड जाली । ते हे माउली आमुची ।।३।।

१९७

कान्होबा तूं आलगट । नाहीं लाज बहु धीट । पाहिलें वाईट । बोलोनियां खोटें ।।१।।
परि तूं न संडिसी खोडी । करिसी केली घडीघडी । पाडिसी रोकडी । तुटी माये आम्हांसी ।।धृ।।
तूं ठायींचा गोवळ । अविचारी अनर्गळ । चोरटा शिंदळ । ऐसा पिटूं डांगोरा ।।२।।
जरी तुझी आई । आम्ही घालूं सर्वा ठायीं । तुका म्हणे तें ही । तुज वाटे भूषण ।।३।।

१९८

भोजनाच्या काळीं । कान्हो मांडियेली आळी । काला करी वनमाळी अन्न एकवटा ।
देईं निवडुनी । माते म्हणतो जननी। हात पिटूनि मेदिनी । वरि अंग घाली ।।१।।
कैसा आळ घेसी । नव्हे तें चि करविसी । घेईं दुसरें तयेसी । वारी म्हणे नको ।।धृ।।
आतां काय करूं । नये यासि हाणूं मारूं । नव्हे बुझावितां स्थिरू कांहीं करिना हा ।
तोंचिं केलें एके ठायीं । आतां निवडूनि खाईं । आम्हा जाचितोसि काई । हरिसि म्हणे माता ।।२।।
त्याचें तयाकुन । करवितां तुटे भान । तंव जालें समाधान उठोनियां बैसे।
माते बरें जाणविलें। अंग चोरूनि आपुलें । तोडियलें एका बोलें । कैसें सुखदुःख ।।३।।
ताट पालवें झाकिलें होतें तैसें तेथें केलें । भिन्नाभिन्न निवडिलें । अन्नें वेगळालीं ।
विस्मित जननी । भाव देखोनियां मनीं । म्हणे नाहीं ऐसा कोणी । तुज सारिखा रे ।।४।।
हरुषली माये । सुख अंगीं न समाये । कवळूनि बाहे । देती आलिंगन।

आनंद भोजनीं ।
तेथें फिटलीसे धणी । तुका म्हणे कोणी। सांडा शेष मज ।।५।।

१९९
चला वळूं गाई । बैसों जेऊं एके ठायीं ।।१।।
बहु केली वणवण । पायपिटी जाला सिण ।।धृ।।
खांदीं भार पोटीं भुक । काय खेळायाचें सुख ।।२।।
तुका म्हणे धांवे । मग अवघें बरवें ।।३।।

२००
नेणों वेळा काळ । धालों तुझ्यानें सकळ ।।१।।
नाहीं नाहीं रे कान्होबा भय आम्हापाशीं । वळूनि पुरविसी गाई पोटा खावया ।।धृ।।
तुजपाशीं भये । हें तों बोलों परी नये ।।२।।
तुका म्हणे बोल । आम्हा अनुभवें फोल ।।३।।

विटूदांडू - अभंग १
२०१
माग विटूदांडू । आणीक कांही खेळ मांडूं ।।१।।
बहु अंगा आले डाव । स्थिर नाहीं कोठें पाव ।।धृ।।
कोली हाणे टोला। झेली तेणें तो गोविला ।।२।।
एकमेकां हाका मारी । सेल जाळी एक धरी ।।३।।
राजी आलें नांव । फेरा न चुके चि धांव ।।४।।
पुढें एक पाटी । एक एकें दोघां आटी ।।५।।
एका सोस पोटीं । एक धांवे हात पिटी ।।६।।
तुका म्हणे आतां । खेळ मोडावा परता ।।७।।
।।१।।

२०२
पाहातां गोवळी । खाय त्यांची उष्टावळी ।।१।।
करिती नामाचें चिंतन । गडी कान्होबाचें ध्यान ।।धृ।।
आली द्यावी डाई । धांवे वळत्या मागें गाई ।।२।।
एके ठायीं काला । तुका म्हणे भाविकाला ।।३।।

२०३
पैल आली आगी कान्हो काय रे करावें । न कळे तें कैसें आजि वांचों आम्ही जीवें ।।१।।
धांव रे हरी सांपडलों संधी । वोणव्याचे मधीं बुद्धि कांहीं करावी ।।धृ।।
अवचितां जाळ येतां देखियेला वरी । परतोनि पाहतां आधीं होतों पाठमोरी ।।२।।
सभोंवता फेर रीग न पुरे पळतां । तुका म्हणे जाणसी तें करावें अनंता ।।३।।

२०४
भिऊं नका बोले झाकुनियां राहा डोळे । चालवील देव धाक नाहीं येणें वेळे ।।१।।
बाप रे हा देवांचा ही देव कळों । नेदी माव काय करी करवी ते ।।धृ।।
पसरूनि मुख विश्वरूप खाय जाळ। सारूनियां संधी अवघे पाहाती गोपाळ ।।२।।
तुका म्हणे आम्ही मागें भ्यालों वांयांविण । कळों आलें आतां या सांगातें नाहीं शिण ।।३।।

२०५
नेणती तयांसि साच भाव दावी हरी । लाज नाहीं नाचे पांवा वाजवी मोहरी ।।१।।
चला रे याच्या पायां लागों आतां । राखिलें जळतां महा आगीपासूनि ।।धृ।।
कैसी रे कान्होबा एवढी गिळियेली आगी । न देखों पोळला तुज तोंडीं कोठें अंगी ।।२।।
तुका म्हणे तुम्ही कां रे करितां नवल । आमची सिदोरी खातो त्याचें आलें बळ ।।३।।

२०६
त्यांनीं धणीवरी संग केला हरीसवें । देऊनि आपुलें तो चि देईल तें खावें ।।१।।
न ठेवी आभार प्रेमाचा भुकेला । बहु दिवस संग हा चि निर्धार त्याला ।।धृ।।

कान्होबा तू जेवीं घासोघासीं म्हणती। आरुष गोपाळें त्यांची बहु देवा प्रीती ।।२।।
तुका म्हणे आतां जाऊं आपुलिया घरा । तोय वांचविलें ऐसें सांगों रे दातारा ।।३।।

२०७
घ्या रे भोंकरें भाकरी । दहींभाताची सिदोरी । ताक सांडीं दुरी । असेल तें तयापें ।।१।।
येथें द्यावें तैसें घ्यावे । थोडें परी निरें व्हावें । सांगतों हे ठावें । असों द्या रे सकळां ।।धृ।।
माझें आहे तैसें पाहे । नाहीं तरी घरा जाये । चोरोनियां माये । नवनीत आणावें ।।२।।
तुका म्हणे घरीं । माझें कोणी नाहीं हरी । नका करूं दुरी । मज पायां वेगळें ।।३।।

२०८
काल्याचिये आसे । देव जळीं जाले मासे । पुसोनियां हांसे टिरीसांगातें हात ।।१।।
लाजे त्यासि वांटा नाहीं । जाणे अंतरीचें तें ही । दीन होतां कांहीं । होऊं नेदी वेगळें ।।धृ।।
उपाय अपाय यापुढें । खोटे निवडितां कुडे । जोडुनियां पुढें । हात उभे नुपेक्षी ।।२।।
तें घ्या रे सावकाशें । जया फावेल तो तैसें । तुका म्हणे रसें । प्रेमाचिया आनंदें ।।३।।

२०९
गोपाळ म्हणती कान्होबा या रे कांहीं मागों । आपुलाले आम्ही जीवीची तया आवडी सांगों ।
एक म्हणती उगे रे उगे मागें चि लागों । निजों नका कोणी घरीं रे आजि अवघे चि जागों ।।१।।
जाणोनि नेणता हरि रे मध्यें उगाचि बैसे । नाइकोनि बोल अइके कोण कोणाचे कैसे ।
एक एकाच्या संवादा जाणे न मिळे ची ऐसें। पोटीचें होटा आणवी देतो

तयांसि तैसें ।।धृ।।
एक म्हणति बहु रे आम्ही पीडिलों माया । नेदी दहींभातसिदोरी ताक घालिती पिया ।
तापलों वळितां गोधनें नाहीं जीवन छाया । आतां मागों पोटभरी रे याच्या लागोनि पायां ।।२।।
एक म्हणति तुमचें अरे पोट तें किती। मागों गाई म्हैसी घोडे रे धन संपत्ति हत्ति ।
देव गडी कान्हो आमुचा आम्हां काय हातिं । कन्याकुमरें दासी रे बाजावरी सुपती ।।३।।
एक म्हणती बेटे हो कोण करी जतन । गाढव तैसें चि घोडें रे कोण तयाचा मान ।
लागे भवरोग वाहतां खांदीं चवघे जण । हातीं काठ्या डोया बोडक्या हिंडों मोकळे राण ।।४।।
एक म्हणती रानीं रे बहु सावजें फार । फाडफाडूं खाती डोळे रे पाय नेतील कर ।
राखोनि राखे आपणा ऐसा कइचा शूर । बैसोनि राहों घरीं रे कोण करी हे चार ।।५।।
घरीं बैसलिया बहुतें बहु सांगती काम । रिकामें कोणासि नावडे ऐसें आम्हासि ठावें ।
चौघांमध्यें बरें दिसेसें तेथें नेमक व्हावें। लपोनि सहज खेळतां भलें गडियासवें ।।६।।
एक म्हणती गडी ते भले मिळती मता । केली तयावरी चाली रे बरी आपुली सत्ता ।
नसावे ते तेथें तैसे रे खेळ हाणिती लाता । रडी एकाएकीं गेलिया गोंधळ उडती लाता ।।७।।
एक म्हणती खेळतां उगीं राहतीं पोरें । ऐसें काय घडों शके रे कोणी लहान थोरें ।
अवघीं येती रागा रे एका म्हणतां बरें । संगें वाढे कलह हरावा एकाएकीं च खरें ।।८।।
एक म्हणती एकला रे तूं जासील कोठें । सांडी मांडी हें वाउगें तुझे बोल चि खोटे ।
ठायीं राहा उगे ठायीं च कां रे सिणसी वाटे । अवघियांची सिदोरी तुझे भरली मोटे ।।९।।

तुका म्हणे काय काहण्या अरे सांगाल गोष्टी । चाटावे तुमचे बोल रे भुका लागल्या पोटीं ।
जागा करूं या रे कान्होबा मागों कवळ ताटीं । धाले गडी तुका ढेकर देतो विठ्ठल कंठीं ।।१०।।

२१०
आजि ओस अमरावती । काला पाहावया येती । देव विसरती । देहभाव आपुला ।।१।।
आनंद न समाये मेदिनी । चारा विसरल्या पाणी । तटस्थ त्या ध्यानीं । गाई जाल्या श्वापदें ।।धृ।।
जें या देवांचें दैवत । उभें आहे या रंगांत । गोपाळांसहित । क्रीडा करी कान्होबा ।।२।।

२११
चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं । मांडियेला काला भोंवती गोपाळांची दाटी ।।१।।
आनंदें कवळ देती एकामुखीं एक । न म्हणती सान थोर अवघीं सकळिक ।।धृ।।
हमामा हुंबरी पांवा वाजविती मोहरी । घेतलासे फेर माजी घालुनियां हरी ।।२।।
लुब्धल्या नारी नर अवघ्या पशुयाती । विसरलीं देहभाव शंका नाहीं चित्तीं ।।३।।
पुष्पाचा वरुषाव जाली आरतियांची दाटी । तुळसी गुंफोनियां माळा घालितील कंठीं ।।४।।
यादवांचा राणा गोपीमनोहर कान्हा । तुका म्हणे सुख वाटे देखोनियां मना ।।५।।

२१२
माझे गडी कोण कोण । निवडा भिन्न यांतुनी ।।१।।
आपआपणामध्यें मिळों । एक खेळों एकाशीं ।।धृ।।
घाबरियांच्या मोडा काड्या । धाडा भाड्यां वळतियां ।।२।।
तुका म्हणे देवापाशीं। विटाळशी नसावी ।।३।।

२१३
हे चि अनुवाद सदा सर्वकाळ । करुनियां गोपाळकाला सेवूं ।।१।।
वोरसलें कामधेनूचें दुभतें । संपूर्ण आइतें गगनभरी ।।धृ।।
संत सनकादिक गोमट्या परवडी । विभाग आवडी इच्छेचिये ।।२।।
तुका म्हणे मधीं घालूं नारायण । मग नव्हे सीण कोणा खेळें ।।३।।

२१४
अधिकाचा मज कांटाळा । तुम्हां गोपाळां संगति ।।१।।
काय नाहीं तुम्हापाशीं । सकळांविशीं संपन्न ।।धृ।।
उद्योगाचा नेघें भार। लागल्या सार पुरतें ।।२।।
तुका म्हणे अधीर जिणें । नारायणें न करावें ।।३।।

२१५
जालों आतां एके ठायीं । न वंचूं कांहीं एकमेकां ।।१।।
सरलों हेंगे देउनि मोट । कटकट काशाची ।।धृ।।
सोडोनियां गांठीं पाहें । काय आहे त्यांत तें ।।२।।
तुका म्हणे जालों निराळा । आतां गोपाळा देऊं बोभा ।।३।।

२१६
या रे करूं गाई । जमा निजलेती काई । बोभाटानें आई । घरा गेल्या मारील ।।१।।
घाला घाला रे फुकारे । ज्याची तेणें चि मोहरे । एवढें चि पुरे । केलियानें सावध ।।धृ।।
नेणोनियां खेळा। समय समयाच्या वेळा । दुश्चिताजवळा । मिळालेति दुश्चित ।।२।।
तुका म्हणे शीक । न धरितां लागे भीक । धरा सकळीक । मनेरी धांवा वळतियां ।।३।।

२१७
वोळलीचा दोहूं पान्हा । मज कान्हा सांगितला ।।१।।
घ्या जि हेंगे क्षीर हातीं । निगुतीनें वाढावें ।।धृ।।
सांगितलें केलें काम। नव्हे धर्म सत्याचा ।।२।।
तुका म्हणे नवें जुनें । ऐसें कोणें सोसावें।।३।।

२१८
 येइल तें घेइन भागा । नव्हे जोगा दुसरिया ।।१।।
आवडी ते तुम्ही जाणा । बहु गुणांसारिखी ।।धृ।।
मज घेती डांगवरी। सवें हरि नसलिया ।।२।।
तुका म्हणे राबवा देवा । करीन सेवा सांगितली ।।३।।

२१९
 अंतरली कुटी मेटी । भय धरूनियां पोटीं । म्हणतां जगजेठी । धांवें करुणाउत्तरीं ।।१।।
बाप बळिया शिरोमणी । उताविळ या वचनीं । पडलिया कानीं । धांवा न करी आळस ।।धृ।।
बळ दुनी शरणागता । स्वामी वाहों नेदी चिंता । आइतें चि दाता । पंगतीस बैसवी ।।२।।
वाहे खांदीं पाववी घरा । त्याच्या करी येरझारा। बोबड्या उत्तरा । स्वामी तुकया मानवे ।।३।।

२२०
 धन्य तें गोधन कांबळी काष्ठिका । मोहरी पांवा निका ब्रीद वांकी ।।१।।
धन्य तें गोकुळ धन्य ते गोपाळ । नर नारी सकळ धन्य जाल्या ।।धृ।।
धन्य देवकी जसवंती दोहींचें । वसुदेवनंदाचें भाग्य जालें ।।२।।
धन्य त्या गोपिका सोळा सहस्र बाळा । यादवां सकळां धन्य जालें ।।३।।
धन्य म्हणे तुका जन्मा तीं चि आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ।।४।।

२२१
 गौळणी बांधिती धारणासि गळा । खेळे त्या गोपाळांमाजी ब्रम्ह ।।१।।
धांवोनियां मागे यशोदे भोजन । हिंडे रानोरान गाईपाठीं ।।धृ।।
तुका म्हणे सर्व कळा ज्याचे अंगीं । भोळेपणालागीं भीक मागे ।।२।।

२२२
 देखिलासि माती खातां । दावियानें बांधी माता ।।१।।
जाळी घेउनि कांबळी काठी । गाई वळी वेणु पाठीं ।।धृ।।
मोठें भावार्थाचें बळ । देव जाला त्याचें बाळ ।।२।।

तुका म्हणे भक्तासाठीं। देव धांवे पाठोवाटीं ।।३।।

२२३
हा गे माझे हातीं । पाहा कवळ सांगाती ।।१।।
देवें दिला खातों भाग । कराल तर करा लाग ।।धृ।।
धालें ऐसें पोट । वरी करूनियां बोट ।।२।।
तुका म्हणे घरीं । मग कैं जी या परी ।।३।।

२२४
अवघें अवघीकडे । दिलें पाहे मजकडे । अशा सवंगडे। सहित थोरी लागली ।।१।।
कां रे धरिला अबोला । माझा वांटा देईं मला । सिदोरीचा केला । झाडा आतां निवडे ना ।।धृ।।
भूक लागली अनंता । कां रे नेणसी जाणतां । भागलों वळितां । गाई सैरा ओढाळा ।।२।।
तुका करुणा भाकी । हरि पाहे गोळा टाकी । घेता जाला सुखी। भीतरी वांटी आणीकां ।।३।।

२२५
आम्ही गोवळीं रानटें । नव्हों जनांतील धीटें ।।१।।
सिदोरीचा करूं काला । एक वांटितों एकाला ।।धृ।।
खेळों आपआपणांशीं। आमचीं तीं आम्हांपाशीं ।।२।।
मिळालों नेणते । तुका कान्होबा भोंवते ।।३।।

२२६
अवधियां दिला गोर । मजकरे पाहीना ।।१।।
कांुफ्दे गोपाळ डोळे चोळी । ढुंगा थापली हाणे तोंडा ।।धृ।।
आवडती थोर मोटे । मी रे पोरटें दैन्यवाणे ।।२।।
तुका म्हणे जाणों भाव । जीविंचा देव बुझावी ।।३।।

मृदंग पाट्या - अभंग
२२७
मागें पुढें पाहें सांभाळूनि दोनी ठाय । चुकावूनि जाय गडी राखे गडियांसि

।।१।।
मुरडे दंडा दोहीं तोंडें गडियां सावध करी । भेटतियासंगे तया हाल तुजवरी ।।धृ।।
गडियां गडी वांटुनि देईं । ज्याचा सोडी ते चि ठायीं ।।२।।
अगळ्या बळें करील काय। तुज देणें लागे डोय ।।३।।
नवां घरीं पाउला करीं । सांपडे तो तेथें धरीं ।।४।।
जिंकोनि डाव करीं । टाहो सत्ता आणिकांवरी ।।५।।
सांपडोनि डाईं बहु । काळ गुंतलासी ।।६।।
बळिया गडी फळी । फोडी न धरितां त्यांसी ।।७।।
चुकांडी जो खाय मिळोनि अंगीं जाय। गुंतलासी काय तुका म्हणे अझूनी ।।८।।

२२८
पाहा रे तमासा तुमचा येथें नव्हे लाग । देईन तो भाग आलियाचा बाहेरी ।।१।।
जागा रे गोपाळ नो ठायीं ठायीं जागा । चाहुलीनें भागा दूर मजपासूनि ।।धृ।।
न रिघतां ठाव आम्हा ठावा पाळतियां । भयाभीत वांयां तेथें काय चांचपा ।।२।।
तुका म्हणे हातां चडे जीवाचिये साटीं । मिटक्या देतां गोड मग लागतें शेवटीं ।।३।।

२२९
डाई घालुनियां पोरें । त्यांचीं गुरें चुकवीलीं ।।१।।
खेळ खेळतां फोडिल्या डोया । आपण होय निराळा ।।धृ।।
मारिती माया घेती जीव । नाहीं कीव अन्यायें ।।२।।
तुका कान्होबा मागें । तया अंगें कळों आलें ।।३।।

२३०
आतां हें चि जेऊं हें चि जेऊं । सवें घेऊं सिदोरी ।।१।।
हरिनामाचा खिचडा केला । प्रेमें मोहिला साधनें ।।धृ।।
चवीं चवीं घेऊं घास । ब्रम्हरस आवडी ।।२।।
तुका म्हणे गोड लागे । तों तों मागे रसना ।।३।।

२३१
अवघें चि गोड जालें । मागीलये भरी आलें ।।१।।
साह्य जाला पांडुरंग । दिला अभ्यंतरीं संग ।।धृ।।
थडिये पावतां तो वाव । मागें वाहावतां ठाव ।।२।।
तुका म्हणे गेलें । स्वप्नींचें जागें जालें ।।३।।

२३२
तुजसवें येतों हरी । आम्हां लाज नाहीं तरी । उचलिला गिरी । चांग तईं वांचलों ।।१।।
मोडा आतां खेळ । गाई गेल्या जाला वेळ । फांकल्या ओढाळ । नाहीं तो चि आवरा ।।धृ।।
चांग दैवें यमुनेसी वांचलों बुडतां । निलाजिरीं आम्ही नाहीं भय धाक या अनंता ।।२।।
खातों आगी माती । आतां पुरे हा सांगाती । भोंवतां भोंवेल। आम्हां वाटतें हें चित्तीं ।।३।।
तुका म्हणे उरी नाहीं तुजसवें। शाहाणे या भावें दुरी छंद भोळियां सवें ।।४।।

२३३
नको आम्हांसवें गोपाळा । येऊं ओढाळा तुझ्या गाई ।।१।।
कोण धांवें त्यांच्या लागें । मागें मागें येरझारी ।।धृ।।
न बैसती एके ठायीं । धांवती दाही दाहा वाटां ।।२।।
तुका म्हणे तू राख मनेरी। मग त्या येरी आम्ही जाणों ।।३।।

२३४
मागायास गेलों सिदोरी । तुझ्या मायाघरीं गांजियेलों ।।१।।
तुजविणें ते नेदी कोणा । सांगतां खुणा जिवें गेलों ।।धृ।।
वांयांविण केली येरझार । आतां पुरे घर तुझी माया ।।२।।
तुका म्हणे तूं आम्हां वेगळा । राहें गोपाळा म्हणउनी ।।३।।

२३५
काकुलती येतो हरी । क्षणभरी निवडितां ।।१।।
तुमची मज लागली सवे । ठायींचे नवे नव्हों गडी ।।धृ।।

आणीक बोलाविती फार । बहु थोर नावडती ।।२।।
भाविकें त्यांची आवडी मोठी । तुका म्हणे मिठी घाली जिवें ।।३।।

२३६
वरता वेंघोनि घातली उडी । कळंबाबुडीं यमुनेसी ।।१।।
हरि बुडाला बोंब घाला । घरचीं त्यांला ठावा नाहीं ।।धृ।।
भवनदीचा न कळे पार । काळिया माजी थोर विखार ।।२।।
तुका म्हणे काय वाउग्या हाका । हातींचा गमावुनियां थिंका ।।३।।

२३७
अवघीं मिळोनि कोल्हाळ केला । आतां होता म्हणती गेला ।।१।।
आपलिया रडती भावें । जयासवें जयापरी ।।धृ।।
चुकलों आम्ही खेळतां खेळ । गेला गोपाळ हातींचा ।।२।।
तुका म्हणे धांवती थडी । न घली उडी आंत कोणी ।।३।।

२३८
भ्यालीं जिवा चुकलीं देवा । नाहीं ठावा जवळीं तो ।।१।।
आहाकटा करिती हाय । हात डोकें पिटिती पाय ।।धृ।।
जवळी होतां न कळे आम्हां । गेल्या सीमा नाहीं दुःखा ।।२।।
तुका म्हणे हा लाघवी मोटा । पाहे खोटा खरा भाव ।।३।।

२३९
काळिया नाथूनि आला वरी । पैल हरी दाखविती ।।१।।
दुसरिया भावें न कळे कोणा । होय नव्हेसा संदेह मना ।।धृ।।
रूपा भिन्न पालट जाला । गोरें सांवळेंसा पैं देखिला ।।२।।
आश्वासीत आला करें । तुका खरें म्हणे देव ।।३।।

२४०
हरि गोपाळांसवें सकळां । भेटे गळ्या गळा मेळवूनी ।।१।।
भाविकें त्यांची आवडी मोठी । सांगे गोष्टी जीवींचिया ।।धृ।।
योगियांच्या ध्याना जो नये । भाकरी त्यांच्या मागोनि खाये ।।२।।
तुका म्हणे असे शाहाणियां दुरी । बोबडियां दास कामारी ।।३।।

२४१
धांव कान्होबा गेल्या गाई । न म्हणे मी कोण ही काई ।।१।।
आपुलियांचें वचन देवा । गोड सेवा करीतसे ।।धृ।।
मागतां आधीं द्यावा डाव । बळिया मी तो नाहीं भाव ।।२।।
तुका म्हणे ऐशा सवें । अनुसरावें जीवेंभावें ।।३।।

२४२
धाकुट्याचे मुखीं घांस घाली माता । वरी करी सत्ता शाहाणियां ।।१।।
ऐसें जाणपणें पडिलें अंतर । वाढे तों तों थोर अंतराय ।।धृ।।
दोन्ही उभयतां आपण चि व्याली । आवडीची चाली भिन्न भिन्न ।।२।।
तुका म्हणे अंगापासूनि निराळें । निवडिलें बळें रडतें स्तनीं ।।३।।

२४३
देवाचे म्हणोनि देवीं अनादर । हें मोठें आश्चर्य वाटतसे ।।१।।
आतां येरा जना म्हणावें तें काई । जया भार डोई संसाराचा ।।धृ।।
त्यजुनी संसार अभिमान सांटा । जुलूम हा मोटा दिसतसे ।।२।।
तुका म्हणे अळस करूनियां साहे । बळें कैसे पाहें वांयां जाती ।।३।।

२४४
उपदेश तो भलत्या हातीं । जाला चित्तीं धरावा ।।१।।
नये जाऊं पात्रावरी । कवटी सारी नारळें ।।धृ।।
स्त्री पुत्र बंदीजन । नारायण स्मरविती ।।२।।
तुका म्हणे रत्नसार । परि उपकार चिंधीचे ।।३।।

२४५
संतांचे गुण दोष आणितां या मना । केलिया उगाणा सुकृताचा ।।१।।
पिळोनियां पाहे पुष्पाचा परिमळ । चिरोनि केळी केळ गाढव तो ।।धृ।।
तुका म्हणे गंगे अग्नीसि विटाळ । लावी तो चांडाळ दुःख पावे ।।२।।

२४६
चुंबळीचा करी चुंबळीशीं संग । अंगीं वसे रंग क्रियाहीन ।।१।।
बीजा ऐसें फळ दावी परिपाकीं । परिमळ लौकिकीं जाती ऐसा ।।धृ।।
माकडाच्या गळां रत्न कुळांगना । सांडूनियां सुना बिदी धुंडी ।।२।।

तुका म्हणे ऐसा व्याली ते गाढवी । फजिती ते व्हावी आहे पुढें ।।३।।

२४७
सांपडला संदीं । मग बळिया पडे फंदीं ।।१।।
ऐसी कोणी वाहे वेळ । हातीं काळाच्या सकळ ।।धृ।।
दाता मागे दान । जाय याचका शरण ।।२।।
तुका म्हणे नेणां । काय सांगों नारायणा ।।३।।

२४८
सर्प विंचू दिसे । धन अभाग्या कोळसे ।।१।।
आला डोळ्यांसि कवळ । तेणें मळलें उजळ ।।धृ।।
अंगाचे भोंवडी । भोय झाड फिरती धोंडी ।।२।।
तुका म्हणे नाड । पाप ठाके हिता आड ।।३।।

२४९
न देखोन कांहीं । म्या पाहिलें सकळ ही ।।१।।
जालों अवधियांपरी । मी हें माझें ठेलें दुरी ।।धृ।।
न घेतां घेतलें । हातें पायें उसंतिलें ।।२।।
खादलें न खातां । रसना रस जाली घेतां ।।३।।
न बोलोनि बोलें । केलें प्रगट झांकिलें ।।४।।
नाइकिलें कानीं। तुका म्हणे आलें मनीं ।।५।।

ब्रम्हचारी फिर्याद गेला - अभंग २
२५०
काखे कडासन आड पडे । खडबड खडबडे हुसकलें ।।१।।
दादकरा दादकरा । फजितखोरा लाज नाहीं ।।धृ।।
अवघा जाला राम राम । कोणी कर्म आचरे ना ।।२।।
हरिदासांच्या पडती पायां । म्हणती तयां नागवावें ।।३।।
दोहीं ठायीं फजीत जालें । पारणें केलें अवकळा ।।४।।
तुका म्हणे नाश केला । विटंबिला वेश जिहीं ।।५।।

२५१
कुटुंबाचा केला त्याग । नाहीं राग जंव गेला ।।१।।

भजन तें वोंगळवाणें । नरका जाणें चुके ना ।।धृ।।
अक्षराची केली आटी । जरी पोटीं संतनिंदा ।।२।।
तुका म्हणे मागें पाय । तया जाय स्थळासि ।।३।।

।।२।।

२५२

तारतिम वरी तोंडा च पुरतें । अंतरा हें येतें अंतरीचें ।।१।।
ऐसी काय बरी दिसे ठकाठकी । दिसतें लौकिकीं सत्या ऐसें ।।धृ।।
भोजनांत द्यावें विष कालवूनि । मोहचाळवणी मारावया ।।२।।
तुका म्हणे मैंद देखों नेदी कुडें । आदर चि पुढें सोंग दावी ।।३।।

२५३

ब्रम्हनिष्ठ काडी । जरी जीवानांवें मोडी ।।१।।
तया घडली गुरुहत्या । गेला उपदेश तो मिथ्या ।।धृ।।
सांगितलें कानीं। रूप आपुलें वाखाणी ।।२।।
भूतांच्या मत्सरें । ब्रम्हज्ञान नेलें चोरें ।।३।।
शिकल्या सांगे गोष्टी । भेद क्रोध वाहे पोटीं ।।४।।
निंदा स्तुति स्तवनीं । तुका म्हणे वेंची वाणी ।।५।।

२५४

इहलोकींचा हा देहे । देव इच्छितताती पाहें ।।१।।
धन्य आम्ही जन्मा आलों । दास विठोबाचे जालों ।।धृ।।
आयुष्याच्या या साधनें । सच्चिदानंद पदवी घेणें ।।२।।
तुका म्हणे पावठणी । करूं स्वर्गाची निशाणी ।।३।।

२५५

पंडित वाचक जरी जाला पुरता । तरी कृष्णकथा ऐके भावें ।।१।।
क्षीर तुपा साकरे जालिया भेटी । तैसी पडे मिठी गोडपणें ।।धृ।।
जाणोनियां लाभ घेईं हा पदरीं । गोड गोडावरी सेवीं बापा ।।२।।
जाणिवेचें मूळ उपडोनी खोड । जरी तुज चाड आहे तुझी ।।३।।
नाना परिमळद्रव्य उपचार । अंगी उटी सारचंदनाची ।।४।।
जेविलियाविण शून्य ते शृंगार । तैसी गोडी हरिकथेविण ।।५।।
ज्याकारणें वेदश्रुति ही पुराणें । तें चि विठ्ठलनाणें तिष्ठे कथे ।।६।।

तुका म्हणे येर दगडाचीं पेंवें । खळखळ आवघें मूळ तेथें।।७।।

२५६
आणिकांच्या कापिती माना । निष्ठुरपणा पार नाहीं ।।१।।
करिती बेटे उसणवारी । यमपुरी भोगावया ।।धृ।।
सेंदराचें दैवत केलें । नवस बोले तयासि ।।२।।
तुका म्हणे नाचति पोरें । खोडितां येरें अंग दुखे ।।३।।

२५७
गंधर्व अग्नि सोम भोगिती कुमारी । कोठें चराचरीं त्याग केला ।।१।।
गायत्री स्वमुखें भक्षीतसे मळ । मिळाल्या वाहाळ गंगाओघ ।।धृ।।
कागाचिये विष्ठें जन्म पिंपळासि । पांडवकुळासि पाहातां दोष ।।२।।
शकुंतळा सूत कर्ण शृंगी व्यास । यांच्या नामें नाश पातकांसि ।।३।।
गणिका अजामेळ कुब्जा तो विदुर । पाहातां विचार पिंगळेचा ।।४।।
वाल्हा विश्वामित्र वसिष्ठ नारद । यांचे पूर्व शुद्ध काय आहे ।।५।।
न व्हावी तीं जालीं कर्में नरनारी । अनुतापें हरी स्मरतां मुक्त ।।६।।
तुका म्हणे पूर्व नाठवी श्रीहरी । मूळ जो उच्चारी नरक त्यासि ।।७।।

२५८
सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें । भक्षावया दिलें श्वाना लागीं ।।१।।
मुक्ताफळहार खरासि घातला । कस्तुरी सुकराला चोजविली ।।धृ।।
वेदपरायण बधिरा सांगे ज्ञान । तयाची ते खुण काय जाणे ।।२।।
तुका म्हणे ज्याचें तो चि एक जाणे । भक्तीचें महिमान साधु जाणे ।।३।।

२५९
ऐसा हा लौकिक कदा राखवेना । पतितपावना देवराया ।।१।।
संसार करितां म्हणती हा दोषी । टाकितां आळसी पोटपोसा ।।धृ।।
आचार करितां म्हणती हा पसारा । न करितां नरा निंदिताती ।।२।।
संतसंग करितां म्हणती हा उपदेशी । येरा अभाग्यासि ज्ञान नाहीं ।।३।।
धन नाहीं त्यासि ठायींचा करंटा । समर्थासि ताठा लाविताती ।।४।।
बहु बोलों जातां म्हणति हा वाचाळ । न बोलतां सकळ म्हणती गर्वी ।।५।।
भेटिसि न वजातां म्हणती हा निष्ठुर । येतां जातां घर बुडविलें ।।६।।
लग्न करूं जातां म्हणती हा मातला। न करितां जाला नपुंसक ।।७।।

निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ। पातकाचें मूळ पोरवडा ।।८।।
लोक जैसा लोक धरितां धरवे ना। अभक्ता जिरे ना संतसंग ।।९।।
तुका म्हणे आतां ऐकावें वचन । त्यजुनियां जन भक्ति करा ।।१०।।

२६०
धर्म रक्षावया साठीं । करणें आटी आम्हांसि ।।१।।
वाचा बोलों वेदनीती । करूं संतीं केलें तें ।।धृ।।
न बाणतां स्थिति अंगीं । कर्म त्यागी लंड तो ।।२।।
तुका म्हणे अधम त्यासी । भक्ति दूषी हरीची ।।३।।

२६१
चवदा भुवनें जयाचिये पोटीं । तो चि आम्हीं कंठीं साठविला ।।१।।
काय एक उणें आमुचिये घरीं । वोळगती द्वारीं रिद्धिसिद्धी ।।धृ।।
असुर जयानें घातले तोडरीं । तो आम्हांसि जोडी कर दोन्ही ।।२।।
रूप नाहीं रेखा जयासि आकार । आम्हीं तो साकार भक्तीं केला ।।३।।
अनंत ब्रम्हांडें जयाचिये अंगीं । समान तो मुंगी आम्हासाठीं ।।४।।
रिद्धिसिद्धी सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ।।५।।
तुका म्हणे आम्ही देवाहूनि बळी। जालों हे निराळी ठेवुनि आशा ।।६।।

२६२
केला मातीचा पशुपति । परि मातीसि काय म्हणती । शिवपूजा शिवासी पावे । माती मातीमाजी सामावे ।।१।।
तैसे पूजिती आम्हां संत । पूजा घेतो भगवंत । आम्ही किंकर संतांचे दास। संतपदवी नको आम्हांस ।।धृ।।
केला पाषाणाचा विष्णु । परी पाषाण नव्हे विष्णु। विष्णुपूजा विष्णुसि अर्पे । पाषाण राहे पाषाणरूपें ।।२।।
केली कांशाची जगदंबा । परि कांसें नव्हे अंबा । पूजा अंबेची अंबेला घेणें । कांसें राहे कांसेंपणें ।।३।।
ब्रम्हानंद पूर्णामाजी । तुका म्हणे केली कांजी । ज्याची पूजा त्याणें चि घेणें। आम्ही पाषाणरूप राहणें ।।४।।

२६३
ते माझे सोयरे सज्जन सांगाती । पाय आठविती विठोबाचे ।।१।।

येरा मानी विधि पाळणापुरतें । देवाचीं तीं भूतें म्हणोनियां ।।धृ।।
सर्वभावें जालों वैष्णवांचा दास । करीन त्यांच्या आस उच्छिष्टाची ।।२।।
तुका म्हणे जैसे मानती हरिदास । तैशी नाहीं आस आणिकांची ।।३।।

२६४
दया तिचें नांव भूतांचें पाळण । अणीक निर्दळण कंटकांचें ।।१।।
पाप त्याचें नांव न विचारितां नीत । भलतें चि उन्मत्त करी सदा ।।२।।
तुका म्हणे धर्म रक्षावया साठीं । देवास ही आटी जन्म घेणें ।।३।।

२६५
करावें गोमटें । बाळा माते तें उमटे ।।१।।
आपुलिया जीवाहूनी । असे वाल्हें तें जननी ।।धृ।।
वियोग तें तिस । त्याच्या उपचारें तें विष ।।२।।
तुका म्हणे पायें । डोळा सुखावे ज्या न्यायें ।।३।।

२६६
कन्या सासुऱ्यासि जाये । मागें परतोनी पाहे ।।१।।
तैसें जालें माझ्या जिवा । केव्हां भेटसी केशवा ।।धृ।।
चुकलिया माये। बाळ हुरू हुरू पाहे ।।२।।
जीवना वेगळी मासोळी । तुका म्हणे तळमळी ।।३।।

२६७
हातीं होन दावी बेना । करिती लेंकीच्या धारणा ।।१।।
ऐसे धर्म जाले कळीं । पुण्य रंक पाप बळी ।।धृ।।
सांडिले आचार। द्विज चाहाड जाले चोर ।।२।।
टिळे लपविती पातडीं । लेती विजारा कातडीं ।।३।।
बैसोनियां तक्तां । अन्नेंविण पिडिती लोकां ।।४।।
मुदबख लिहिणें । तेलतुपावरी जिणें ।।५।।
नीचाचे चाकर । चुकलिया खाती मार ।।६।।
राजा प्रजा पीडी । क्षेत्री दुश्चितासी तोडी ।।७।।
वैश्यशूद्रादिक । हे तों सहज नीच लोक ।।८।।
अवघे बाह्य रंग । आंत हिरवें वरी सोंग ।।९।।
तुका म्हणे देवा । काय निद्रा केली धांवा ।।१०।।

२६८
साळंकृत कन्यादान । करितां पृथ्वीसमान ।।१।।
परि तें न कळे या मूढा । येइल कळों भोग पुढां ।।धृ।।
आचरतां कर्म । भरे पोट राहे धर्म ।।२।।
सत्या देव साहे । ऐसें करूनियां पाहें ।।३।।
अन्न मान धन । हें तों प्रारब्धा आधीन ।।४।।
तुका म्हणे सोस । दुःख आतां पुढें नास ।।५।।

२६९
दिवट्या वाद्यें लावुनि खाणें । करूनि मंडण दिली हातीं ।।१।।
नवरा नेई नवरी घरा । पूजन वरा पाद्याचें ।।धृ।।
गौरविली विहीण व्याही । घडिलें कांहीं ठेवूं नका ।।२।।
करूं द्यावें न्हावें वरें। ठायीचें कां रे न कळे चि ।।३।।
वऱ्हडियांचे लागे पाठीं। जैसी उटिका तेलीं ।।४।।
तुका म्हणे जोडिला थुंका । पुढें नरका सामग्री ।।५।।

२७०
ब्रम्हहत्या मारिल्या गाई । आणीक काई पाप केलें ।।१।।
ऐका जेणें विकिली कन्या । पवाडे त्या सुन्याचे ।।धृ।।
नरमांस खादली भाडी । हाका मारी म्हणोनि ।।२।।
अवघें पाप केलें तेणें । जेणें सोनें अभिळाषिलें ।।३।।
उच्चारितां मज तें पाप । जिव्हे कांप सुटतसे ।।४।।
तुका म्हणे कोरान्न रांड । बेटा भांड मागे ना कां ।।५।।

२७१
याचा कोणी करी पक्ष । तो ही त्याशी समतुल्य ।।१।।
फुकासाठीं पावे दुःखाचा विभाग । पूर्वजांसि लाग निरयदंडीं ।।धृ।।
ऐके राजा न करी दंड । जरि या लंड दुष्टासि ।।२।।
तुका म्हणे त्याचें अन्न । मद्यपाना समान ।।३।।

२७२
कपट कांहीं एक । नेणें भुलवायाचें लोक ।।१।।

तुमचें करितों कीर्त्तन । गातों उत्तम ते गुण ।।धृ।।
दाऊं नेणें जडीबुटी । चमत्कार उठाउठी ।।२।।
नाहीं शिष्यशाखा । सांगों अयाचित लोकां ।।३।।
नव्हें मठपति । नाहीं चाहुरांची वृत्ति ।।४।।
नाहीं देवार्चन । असे मांडिलें दुकान ।।५।।
नाहीं वेताळ प्रसन्न । कांहीं सांगों खाण खुण ।।६।।
नव्हें पुराणिक । करणें सांगणें आणीक ।।७।।
नेणें वाद घटा पटा । करितां पंडित करंटा ।।८।।
नाहीं जाळीत भणदीं । उदो म्हणोनि आनंदी ।।९।।
नाहीं हालवीत माळा । भोंवतें मेळवुनि गबाळा ।।१०।।
आगमीचें कुडें नेणें । स्तंभन मोहन उच्चाटणें ।।११।।
नव्हें यांच्या ऐसा । तुका निरयवासी पिसा ।।१२।।

२७३
रडोनियां मान । कोण मागतां भूषण ।।१।।
देवें दिलें तरी गोड । राहे रुचि आणि कोड ।।धृ।।
लावितां लावणी । विके भीके केज्या दानी ।।२।।
तुका म्हणे धीरा । विण कैसा होतो हिरा।।३।।

२७४
पूज्या एकासनीं आसनीं आसन । बैसतां गमन मातेशीं तें ।।१।।
सांगतों ते धर्म नीतीचे संकेत । सावधान हित व्हावें तरी ।।धृ।।
संतां ठाया ठाव पूजनाची इच्छा । जीवनीं च वळसा सांपडला ।।२।।
तुका म्हणे एकाएकीं वरासनें । दुजें तेथें भिन्न अशोभ्य तें ।।३।।

२७५
जेणें मुखें स्तवी । तें चि निंदे पाठीं लावी ।।१।।
ऐसी अधमाची याती । लोपी सोनें खाय माती ।।धृ।।
गुदद्वारा वाटे । मिष्टान्नांचा नरक लोटे ।।२।।
विंचु लाभाविण । तुका म्हणे वाहे शीण ।।३।।

२७६
अधमाची यारी । रंग पतंगाचे परी ।।१।।

विटे न लगतां क्षण । मोल जाय वांयां विण ।।धृ।।
सर्पाचिया परी । विषें भरला कल्हारीं ।।२।।
तुका म्हणे देवा । मज झणी ऐसे दावा ।।३।।

२७७
आणिकांची स्तुति आम्हां ब्रम्हहत्या । एका वांचूनि त्या पांडुरंगा ।।१।।
आम्हां विष्णुदासां एकविध भाव । न म्हणों या देव आणिकांसि ।।धृ।।
शतखंड माझी होईल रसना । जरी या वचना पालटेन ।।२।।
तुका म्हणे मज आणिका संकल्पें । अवघीं च पापें घडतील ।।३।।

२७८
तान्हेल्याची धणी । फिटे गंगा नव्हे उणी ।।१।।
माझे मनोरथ सिद्धी । पाववावे कृपानिधी ।।धृ।।
तूं तों उदाराचा राणा । माझी अल्प चि वासना ।।२।।
कृपादृष्टीं पाहें । तुका म्हणे होईं साहे ।।३।।

२७९
संताचा अतिक्रम । देवपूजा तो अधर्म ।।१।।
येती दगड तैसे वरी । मंत्रपुष्पें देवा शिरीं ।।धृ।।
अतीतासि गाळी । देवा नैवेद्यासी पोळी ।।२।।
तुका म्हणे देवा । ताडण भेदकांची सेवा ।।३।।

२८०
करणें तें देवा । हे चि एक पावे सेवा ।।१।।
अवघें घडे येणे सांग । भक्त देवाचें तें अंग ।।धृ।।
हें चि एक वर्म । काय बोलिला तो धर्म ।।२।।
तुका म्हणे खरें । खरें त्रिवाचा उत्तरें ।।३।।

२८१
मागें नेणपणें घडलें तें क्षमा । आतां देतों सीमा करूनियां ।।१।।
परनारीचें जया घडलें गमन । दावीतो वदन जननीरत ।।धृ।।
उपदेशा वरी मन नाहीं हातीं । तो आम्हां पुढती पाहूं नये ।।२।।
तुका म्हणे साक्षी असों द्यावें मन । घातली ते आण पाळावया ।।३।।

२८२
आणिकांच्या घातें । ज्यांचीं निवतील चित्तें ।।१।।
ते चि ओळखावे पापी । निरयवासी शीघ्रकोपी ।।धृ।।
कान पसरोनी । ऐके वदे दुष्ट वाणी ।।२।।
तुका म्हणे भांडा । धीर नाहीं ज्याच्या तोंडा।।३।।

हनुमंतस्तुति - अभंग ४
२८३
शरण शरण जी हनुमंता । तुज आलों रामदूता ।।१।।
काय भक्तीच्या त्या वाटा । मज दावाव्या सुभटा ।।धृ।।
शूर आणि धीर । स्वामिकाजीं तूं सादर ।।२।।
तुका म्हणे रुद्रा । अंजनीचिया कुमरा ।।३।।

२८४
केली सीताशुद्धी । मूळ रामायणा आधीं ।।१।।
ऐसा प्रतापी गहन । सुरां सकळ भक्तांचें भूषण ।।धृ।।
जाऊनि पाताळा। केली देवाची अवकळा ।।२।।
राम लक्षुमण । नेले आणिले चोरून ।।३।।
जोडूनियां कर । उभा सन्मुख समोर ।।४।।
तुका म्हणे जपें । वायुसुता जाती पापें ।।५।।

२८५
काम घातला बांदोडी । काळ केला देशधडी ।।१।।
तया माझें दंडवत । कपिकुळीं हनूमंत ।।धृ।।
शरीर वज्रा ऐसें । कवळी ब्रम्हांड जो पुच्छे ।।२।।
रामाच्या सेवका । शरण आलों म्हणे तुका ।।३।।

२८६
हनुमंत महाबळी । रावणाची दाढी जाळी ।।१।।
तया माझा नमस्कार । वारंवार निरंतर ।।धृ।।
करोनी उड्डाण । केलें लंकेचें दहन ।।२।।

जाळीयेली लंका । धन्य धन्य म्हणे तुका ।।३।। ।।४।।

२८७
कुंभ अवघा एक आवा । पाकीं एकीं गुफे डावा ।।१।।
ऐसे भिन्न भिन्न साटे । केले प्रारब्धानें वांटे ।।धृ।।
हिरे दगड एक खाणी । कैचें विजातीसी पाणी ।।२।।
तुका म्हणे शिरीं । एक एकाची पायरी ।।३।।

२८८
मांडे पुऱ्या मुखें सांगों जाणे मात । तोंडीं लाळ हात चोळी रिते ।।१।।
ऐसियाच्या गोष्टी फिक्या मिठेंविण । रुचि नेदी अन्न चवी नाहीं ।।धृ।।
बोलों जाणे अंगीं नाहीं शूरपण । काय तें वचन जाळावें तें ।।२।।
तुका म्हणे बहुतोंडे जे वाचाळ । तेंग तें च मूळ लटिक्याचें ।।३।।

२८९
न लगे चंदना सांगावा परिमळ । वनस्पतिमेळ हाकारुनी ।।१।।
अंतरीचें धांवे स्वभावें बाहेरी । धरितां ही परी आवरे ना ।।धृ।।
सूर्य नाहीं जागें करीत या जना । प्रकाश किरणा कर म्हून ।।२।।
तुका म्हणे मेघ नाचवी मयूरें । लपवितां खरें येत नाहीं ।।३।।

२९०
चंदनाचे हात पाय ही चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ।।१।।
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड ।।धृ।।
तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहातां अवगुण मिळे चि ना ।।२।।

२९१
मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण । मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।१।।
मनें प्रतिमा स्थापिली । मनें मना पूजा केली । मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ।।धृ।।
मन गुरू आणि शिष्य । करी आपुलें चि दास्य । प्रसन्न आपआपणास। गति अथवा अधोगति ।।२।।

साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात । नाहीं नाहीं आनुदैवत । तुका म्हणे दुसरें ।।३।।

२९२
मायबापें जरी सर्पीण बोका । त्यांचे संगें सुखा न पवे बाळ ।।१।।
चंदनाचा शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी फोडी प्राण नाशी ।।२।।
तुका म्हणे नरकीं घाली अभिमान । जरी होय ज्ञान गर्व ताठा ।।३।।

२९३
शिकल्या बोलाचे सांगतील वाद । अनुभव भेद नाहीं कोणा ।।१।।
पंडित हे ज्ञानी करितील कथा । न मिळती अर्था निजसुखा ।।२।।
तुका म्हणे जैसी लांचासाठीं ग्वाही । देतील हे नाहीं ठावी वस्तु ।।३।।

२९४
प्रारब्ध क्रियमाण । भक्तां संचित नाहीं जाण ।।१।।
अवघा देव चि जाला पाहीं । भरोनियां अंतर्बाहीं ।।धृ।।
सत्वरजतमबाधा। नव्हे हरिभक्तांसि कदा ।।२।।
खाय बोले करी । अवघा त्यांच्या अंगें हरी ।।३।।
देवभक्तपण । तुका म्हणे नाहीं भिन्न ।।४।।

२९५
शास्त्राचें जें सार वेदांची जो मूर्ति । तो माझा सांगाती प्राणसखा ।।१।।
म्हणउनी नाहीं आणिकांचा पांग । सर्व जालें सांग नामें एका ।।धृ।।
सगुण निर्गुण जयाचीं अंगें । तो चि आम्हां संगें क्रीडा करी ।।२।।
तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते । स्वयंभू आइते केले नव्हों ।।३।।

२९६
ऐका महिमा आवडीचीं । बोरें खाय भिलटीचीं ।।१।।
थोर प्रेमाचा भुकेला । हा चि दुष्काळ तयाला । अष्टमा सिद्धींला । न मनी क्षीरसागराला ।।धृ।।
पव्हे सुदामदेवाचे । फके मारी कोरडे च ।।२।।
न म्हणे उच्छिष्ट अथवा थोडे । तुका म्हणे भक्तीपुढें ।।३।।

२९७
कोणें तुझा सांग केला अंगीकार । निश्चिति त्वां थोर मानियेली ।।१।।
कोणें ऐसा तुज उपदेश केला । नको या विठ्ठला शरण जाऊं ।।धृ।।
तेव्हां तुज कोण घालील पाठीसी । घासील भूमीसी वदन यम ।।२।।
कां रे नागवसी आयुष्य खातो काळ । दिसेंदिस बळ क्षीण होतें ।।३।।
तुका म्हणे यासि सांगा कोणी तरी। विसरला हरी मायबाप ।।४।।

२९८
साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । आणिकातें डोळां न पाहवे ।।१।।
साधूनी भुजंग धरितील हातीं । आणिकें कापती देखोनियां ।।२।।
असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।।३।।

२९९
आमचे गोसावी अयाचितवृत्ती । करवी शिष्याहातीं उपदेश ।।१।।
दगडाची नाव आधींच ते जड । ते काय दगड तारूं जाणे ।।१।।
तुका म्हणे वेष विटंबिला त्यांनी । सोंगसंपादणी करिती परी।।३।।

३००
मृगजळा काय करावा उतार । पावावया पार पैल थडी ।।१।।
खापराचे होन खेळती लेंकुरें । कोण त्या वेव्हारें लाभ हाणि ।।धृ।।
मंगळदायक करिती कुमारी । काय त्यांची खरी सोयरीक ।।२।।
स्वप्नींचें जें सुखदुःख जालें काहीं । जागृतीं तो नाहीं साच भाव ।।३।।
सारीं जालीं मेलीं लटिकें वचन । बद्ध मुक्त शीण तुका म्हणे ।।४।।

माझें म्हणतां याला कां रे नाहीं लाज । कन्या पुत्र भाज धन वित्त ।।१।।
कोणी सोडवी ना काळाचे हातींचें । एकाविणें साचें नारायणा ।।२।।
तुका म्हणे किती सांगावें चांडाळा । नेणे जीवकळा कोण्या जीतो ।।३।।

३०२
आंधळ्यासि जन अवघे चि आंधळे । आपणासि डोळे दृष्टी नाहीं ।।१।।
रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासि कारण चवी नाहीं ।।२।।
तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें ।।३।।

३०३
छळी विष्णुदासा कोणी । त्याची अमंगळ वाणी ।।१।।
येऊं न द्यावा समोर । अभागी तो दुराचार ।।धृ।।
नावडे हरिकथा। त्याची व्यभिचारीण माता ।।२।।
तुका म्हणे याति । भ्रष्ट तयाचि ते मति ।।३।।

३०४
बोलविसी तैसें आणीं अनुभवा । नाहीं तरी देवा विटंबना ।।१।।
मिठेंविण काय करावें मिष्टान्न । शव जीवेंविण शृंगारिले ।।धृ।।
संपादणीविण विटंबिले सोंग । गुणेंविण चांग रूप हीन ।।२।।
कन्यापुत्रेंविण मंगळदायकें । वेचिलें हें फिके द्रव्य तरी ।।३।।
तुका म्हणे तैसी होते मज परी । न देखे अंतरीं प्रेमभाव ।।४।।

३०५
अंगीं ज्वर तया नावडे साकर । जन तो इतर गोडी जाणे ।।१।।
एकाचिये तोंडीं पडिली ते माती । अवघे ते खाती पोटभरी ।।धृ।।
चारितां बळें येत असे दांतीं । मागोनियां घेती भाग्यवंत ।।२।।
तुका म्हणे नसे संचित हें बरें । तयासि दुसरें काय करी ।।३।।

३०६
धिग जीणें तो बाईले आधीन । परलोक मान नाही दोन्ही ।।१।।
धिग जीणें ज्याचें लोभावरी मन । अतीतपूजन घडे चि ना ।।धृ।।
धिग जीणें आळस निद्रा जया फार । अमित आहार अघोरिया ।।२।।
धिग जीणें नाहीं विवेक वैराग्य । झुरे मानालागीं साधुपणा ।।३।।

तुका म्हणे धिग ऐसे जाले लोक । निंदक वादक नरका जाती ।।४।।

३०७
अरे हें देह व्यर्थ जावें । ऐसें जरी तुज व्हावें । द्यूतकर्म मनोभावें । सारीपाट खेळावा ।।१।।
मग कैचें हरिचें नाम । निजेलिया जागा राम । जन्मोजन्मींचा अधम । दुःख थोर साधिलें ।।धृ।।
विषयसुखाचा लंपट । दासीगमनीं अतिधीट । तया तेचि वाट । अधोगती जावया ।।२।।
अणीक एक कोड । नरका जावयाची चाड। तरी संतनिंदा गोड । करीं कवतुकें सदा ।।३।।
तुका म्हणे ऐसें । मना लावी राम पिसें । नाहीं तरी आलिया सायासें । फुकट जासी ठकोनी ।।४।।

३०८
अवघें ब्रम्हरूप रिता नाहीं ठाव । प्रतिमा तो देव कैसा नव्हे ।।१।।
नाहीं भाव तया सांगावें तें किती । आपुल्याला मतीं पाषांडिया ।।धृ।।
जया भावें संत बोलिले वचन । नाहीं अनुमोदन शाब्दिकांसि ।।२।।
तुका म्हणे संतीं भाव केला बळी । न कळतां खळीं दूषिला देव ।।३।।

३०९
एक तटस्थ मानसीं । एक सहज चि आळसी ।।१।।
दोन्ही दिसती सारिखीं । वर्म जाणे तो पारखी ।।धृ।।
एक ध्यानीं करिती जप । एक बैसुनि घेती झोप ।।२।।
एकां सर्वस्वाचा त्याग। एकां पोटासाठीं जोग ।।३।।
एकां भक्ति पोटासाठीं । एकां देवासवें गांठी ।।४।।
वर्म पोटीं एका । फळें दोन म्हणे तुका ।।५।।

३१०
काय कळे बाळा । बाप सदैव दुबळा ।।१।।
आहे नाहीं हें न कळे । हातीं काय कोण्या वेळे ।।धृ।।
देखिलें तें दृष्टी । मागे घालूनियां मिठी ।।२।।
तुका म्हणे भावें । माझ्या मज समजावें ।।३।।

३११
भजन घाली भोगावरी । अकर्तव्य मनीं धरी ।।१।।
धिग त्याचें साधुपण । विटाळूनी वर्ते मन ।।धृ।।
नाहीं वैराग्याचा लेश । अर्थचाड जावें आस ।।२।।
हें ना तें सें जालें । तुका म्हणे वांयां गेलें ।।३।।

३१२
एकादशीस अन्न पान । जे नर करिती भोजन । श्वानविष्ठे समान । अधम जन तो एक ।।१।।
ऐका व्रताचें महिमान। नेमें आचरती जन । गाती ऐकतीं हरिकीर्तन । ते समान विष्णूशीं ।।धृ।।
अशुद्ध विटाळसीचें खळ । विडा भक्षितां तांबूल । सांपडे सबळ । काळाहातीं न सुटे ।।२।।
सेज बाज विलास भोग । करी कामिनीशीं संग । तया जोडे क्षयरोग । जन्मव्याधी बळिवंत ।।३।।
आपण न वजे हरिकीर्तना । अणिकां वारी जातां कोणा । त्याच्या पापें जाणा । ठेंगणा महा मेरु ।।४।।
तया दंडी यमदूत । जाले तयाचे अंकित । तुका म्हणे व्रत । एकादशी चुकलीया ।।५।।

३१३
करवितां व्रत अर्धे पुण्य लाभे । मोडवितां दोघे नरका जाती ।।१।।
शुद्धबुद्धि होय दोघां एक मान । चोरासवें कोण जिवें राखे ।।धृ।।
आपुलें देऊनी आपुला चि घात । न करावा थीत जाणोनियां ।।२।।
देऊनियां वेच धाडी वाराणसी । नेदावें चोरासि चंद्रबळ ।।३।।
तुका म्हणे तप तीर्थ व्रत याग । भक्ति हे मारग मोडूं नये ।।४।।

३१४
इनामाची भरली पेठ । वाहाती दाट मारग ।।१।।
अवघेची येती वाण । अवघे शकुन लाभाचे ।।धृ।।
अडचणी त्या केल्या दुरी । देण्या उरी घेण्याच्या ।।२।।
तुका म्हणे जोडी जाली । ते आपुली आपणा ।।३।।

३१५
वेदाचें गव्हर न कळे पाठकां । अधिकार लोकां नाहीं येरां ।।१।।
विठोबाचें नाम सुलभ सोपारें । तारी एक सरे भवसिंधु ।।धृ।।
जाणत्या असाध्य मंत्र तंत्र काळ । येर तो सकळ मूढ लोक ।।२।।
तुका म्हणे विधि निषेध लोपला । उच्छेद या जाला मारगाचा ।।३।।

३१६
विधीनें सेवन । विषयत्यागातें समान ।।१।।
मुख्य धर्म देव चित्तीं । आदि अवसान अंतीं ।।धृ।।
बहु अतिशय खोटा । तर्कें होती बहु वाटा ।।२।।
तुका म्हणे भावें । कृपा करीजेते देवें ।।३।।

३१७
येथीचिया अळंकारें । काय खरें पूजन ।।१।।
वैकुंठींच्या लावूं वाटा ।सर्व साटा ते ठायीं ।।धृ।।
येथीचिया नाशवंतें । काय रितें चाळवूं ।।२।।
तुका म्हणे वैष्णव जेन । माझे गण समुदाय ।।३।।

३१८
उजळावया आलों वाटा । खरा खोटा निवाड ।।१।।
बोलविले बोल बोलें । धनीविठ्ठला सन्निध ।।धृ।।
तरी मनीं नाहीं शंका । बळें एका स्वामीच्या ।।२।।
तुका म्हणे नये आम्हां । पुढें कामा गबाळ ।।३।।

३१९
बोलावें तें धर्मा मिळे । बरे डोळे उघडूनि ।।१।।
काशासाठीं खावें शेण । जेणें जन थुंकी तें ।।धृ।।
दुजें ऐसें काय बळी । जें या जाळी अग्नीसि ।।२।।
तुका म्हणे शूर रणीं । गांढें मनीं बुरबुरी ।।३।।

३२०
बरा कुणबी केलों । नाहीं तरि दंभेंचि असतों मेलों ।।१।।

भलें केलें देवराया । नाचे तुका लागे पायां ।।धृ।।
विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ।।२।।
सेवा चुकतों संताची । नागवण हे फुकाची ।।३।।
गर्व होता ताठा । जातों यमपंथें वाटा ।।४।।
तुका म्हणे थोरपणें । नरक होती अभिमानें ।।५।।

३२१
दाता नारायण । स्वयें भोगिता आपण ।।१।।
आतां काय उरलें वाचे । पुढें शब्द बोलायाचे ।।धृ।।
देखती जे डोळे । रूप आपुलें तें खेळे ।।२।।
तुका म्हणे नाद । जाला अवघा गोविंद ।।३।।

३२२
कृपा करुनी देवा । मज साच तें दाखवा ।।१।।
तुम्ही दयावंत कैसे । कीर्ति जगामाजी वसे ।।धृ।।
पाहोनियां डोळां । हातीं ओढवाल काळा ।।२।।
तुका म्हणे देवा । माझा करावा कुठावा ।।३।।

३२३
ठायींची ओळखी । येइल टाकुं टाका सुखीं ।।१।।
तुमचा जाईल ईमान । माझे कपाळीं पतन ।।धृ।।
ठेविला तो ठेवा। अभिळाषें बुडवावा ।।२।।
मनीं न विचारा । तुका म्हणे हे दातारा ।।३।।

३२४
तुझें वर्म ठावें । माझ्या पाडियेलें भावें ।।१।।
रूप कासवाचे परी । धरुनि राहेन अंतरीं ।।धृ।।
नेदी होऊं तुटी । मेळवीन दृष्टादृष्टी ।।२।।
तुका म्हणे देवा । चिंतन ते तुझी सेवा ।।३।।

३२५
गहूं एकजाती । परी त्या पाधाणी नासिती ।।१।।
वर्म जाणावें तें सार । कोठें काय थोडें फार ।।धृ।।

कमाईच्या सारें । जाति दाविती प्रकार ।।२।।
तुका म्हणे मोल । गुणा मिथ्या फिके बोल ।।३।।

३२६
पुण्यवंत व्हावें । घेतां सज्जनांची नांवें ।।१।।
नेघे माझे वाचे तुटी । महा लाभ फुकासाठी ।।धृ।।
विश्रांतीचा ठाव । पायीं संतांचिया भाव ।।२।।
तुका म्हणे जपें । संतांचिया जाती पापें ।।३।।

३२७
देव होईजेत देवाचे संगती । पतन पंगती जगाचिया ।।१।।
दोहींकडे दोन्ही वाहातील वाटा । करितील सांटा आपुलाला ।।धृ।।
दाखविले परी नाहीं वर्जिजेतां । आला तो तो चित्ता भाग भरा ।।२।।
तुका म्हणे अंगीं आवडीचें बळ । उपदेश मूळबीजमात्र ।।३।।

३२८
शोधिसील मूळें । त्याचें करीसी वाटोळें ।।१।।
ऐसे संतांचे बोभाट । तुझे बहु जाले तट ।।धृ।।
लौकिका बाहेरी । घाली रोंखीं जया धरी ।।२।।
तुका म्हणे गुण । तुझा लागलिया शून्य ।।३।।

३२९
वैद वाचविती जीवा । तरी कोण ध्यातें देवा ।।१।।
काय जाणों कैसी परी । प्रारब्ध तें ठेवी उरी ।।धृ।।
नवसें कन्यापुत्र होती । तरि कां करणें लागे पती ।।२।।
जाणे हा विचार । स्वामी तुकयाचा दातार ।।३।।

३३०
मारगीं बहुत । या चि गेले साधुसंत ।।१।।
नका जाऊ आडराणें । ऐसीं गर्जती पुराणें ।।धृ।।
चोखाळिल्या वाटा । न लगे पुसाव्या धोपटा ।।२।।
झळकती पताका । गरुड टके म्हणे तुका ।।३।।

३३१
कार्तिकीचा सोहळा । चला जाऊं पाहूं डोळां । आले वैकुंठ जवळां । सन्निध पंढरीये ।।१।।
पीक पिकलें घुमरी । प्रेम न समाये अंबरीं । अवघी मातली पंढरी । घरोघरीं सुकाळ ।।धृ।।
चालती स्थिर स्थिर । गरुड टकयांचे भार । गर्जती गंभीर । टाळ श्रुति मृदंग ।।२।।
मिळालिया भद्रजाती । कैशा आनंदें डुलती । शूर उठावती । एका एक आगळे ।।३।।
नामामृत कल्लोळ । वृंदें कोंदलीं सकळ । आले वैष्णवदळ । कळिकाळ कांपती ।।४।।
आस करिती ब्रम्हादिक । देखुनि वाळवंटीचें सुख । धन्य धन्य मृत्युलोक। म्हणती भाग्याचे कैसे ।।५।।
मरण मुक्ति वाराणसी । पितृॠण गया नासी । उधार नाहीं पंढरीसि । पायापाशीं विठोबाच्या ।।६।।
तुका म्हणे आतां । काय करणें आम्हां चिंता । सकळ सिद्धींचा दाता । तो सर्वथा नुपेक्षी ।।७।।

३३२
जया दोषां परीहार । नाहीं नाहीं धुंडितां शास्त्र । ते हरती अपार । पंढरपुर देखिलिया ।।१।।
धन्य धन्य भीमातीर । चंद्रभागा सरोवर । पद्मातीर्थी विठ्ठल वीर । क्रीडास्थळ वेणुनादीं ।।धृ।।
सकळतीर्थांचें माहेर । भूवैकुंठ निर्विकार । होतो नामाचा गजर । असुरकाळ कांपती ।।२।।
नाहीं उपमा द्यावया । सम तुल्य आणिका ठाया । धन्य भाग्य जयां । जे पंढरपूर देखती ।।३।।
उपजोनि संसारीं। एक वेळ पाहें पा पंढरी । महा दोषां कैची उरी। देवभक्त देखिलिया ।।४।।
ऐसी विष्णूची नगरी । चतुर्भुज नर नारी। सुदर्शन घरटी करी । रीग न पुरे कळिकाळा ।।५।।
तें सुख वर्णावया गति। एवढी कैची मज मति । जे पंढरपुरा जाती । ते पावती वैकुंठ ।।६।।

तुका म्हणे या शब्दाचा । जया विश्वास नाहीं साचा । अधम जन्मांतरिचा।
तया पंढरी नावडे ।।७।।

३३३
एक नेणतां नाडली । एकां जाणिवेची भुली ।।१।।
बोलों नेणें मुकें । वेडें वाचाळ काय निकें ।।धृ।।
दोहीं सवा नाड। विहीर एकीकडे आड ।।२।।
तुका म्हणे कर्म । तुझें कळों नेदी वर्म ।।३।।

३३४
म्हणवितों दास । मज एवढी च आस ।।१।।
परी ते अंगीं नाहीं वर्म । करीं आपुला तूं धर्म ।।धृ।।
बडबडितों तोंडें । रितें भावेंविण धेंडें ।।२।।
तुका म्हणे बरा । दावूं जाणतों पसारा ।।३।।

३३५
पूजा समाधानें । अतिशयें वाढे सीण ।।१।।
हें तों जाणां तुम्ही संत । आहे बोलिली ते नीत ।।धृ।।
पाहिजे तें केलें । सहज प्रसंगीं घडलें ।।२।।
तुका म्हणे माथा । पायीं ठेवीं तुम्हां संतां ।।३।।

३३६
स्वप्नींचिया गोष्टी । मज धरिलें होतें वेठी । जालिया सेवटीं । जालें लटिकें
सकळ ।।१।।
वायां भाकिली करुणा । मूळ पावावया सिणा । राव रंक राणा । कैंचे
स्थानावरि आहे ।।धृ।।
सोसिलें तें अंगें । खरें होतें नव्हतां जागें । अनुभव ही सांगे । दुःखें डोळे
उघडीले ।।२।।
तुका म्हणे संतीं । सावचित केलें अंतीं । नाहीं तरि होती । टाळी बैसोनि
राहिली ।।३।।

३३७
आसुरी स्वभाव निर्दय अंतर । मानसीं निष्ठुर अतिवादी ।।१।।

याति कुळ येथें असे अप्रमाण । गुणाचें कारण असे अंगीं ।।धृ।।
काळकुट पितळ सोनें शुद्ध रंग । अंगाचेंच अंग साक्ष देतें ।।२।।
तुका म्हणे बरी जातीसवें भेटी । नवनीत पोटीं सांटविलें ।।३।।

३३८
बाळपणीं हरि । खेळे मथुरेमाझारी । पायीं घागरिया सरी । कडदोरा वांकी ।
मुख पाहे माता । सुख न माये चित्ता । धन्य मानव संचिता । वोडवलें आजि ।।१।।
बाळ चांगलें वो । बाळ चांगलें वो । म्हणतां चांगलें ।
वेळ लागे तया बोलें । जीवापरीस तें वाल्हें । मज आवडतें ।।धृ।।
मिळोनियां याती । येती नारी कुमारी बहुती । नाही आठव त्या चित्तीं । देहभाव कांहीं ।
विसरल्या घरें । तान्हीं पारठीं लेकुरें । धाक सांडोनियां येरें । तान भूक नाहीं ।।२।।
एकी असतील घरीं । चित्त तयापासीं परी । वेगीं करोनि वोसरी । तेथें जाऊं पाहे ।
लाज सांडियेली वोज । नाहीं फजितीचें काज । सुख सांडोनियां सेज । तेथें धाव घाली ।।३।।
वेधियेल्या बाळा । नर नारी या सकळा । बाळा खेळवी अबला । त्याही विसरल्या ।
कुमर कुमारी । नाभाव हा शरीरीं । दृष्टी न फिरे माघारी । तया देखतां हे ।।४।।
वैरभाव नाहीं । आप पर कोणीं कांहीं । शोक मोह दुःख ठायीं । तया निरसलीं ।
तुका म्हणे सुखी । केलीं आपणासारिखीं। स्वामी माझा कवतुकें । बाळवेषें खेळे ।।५।।

३३९
अशोकाच्या वनीं सीता शोक करी । कां हों अंतरले रघुनाथ दुरी ।
येउनि गुंफेमाजी दुष्टें केली चोरी । कांहो मज आणिले अवघड लंकापुरी ।।१।।
सांगा वो त्रीजटे सखिये ऐसी मात। देईल कां नेदी भेटी रघुनाथ ।
मन उताविळ जाला दुरी पंथ। राहों न सके प्राण माझा कुडी आंत ।।धृ।।

काय दुष्ट आचरण होतें म्यां केलें । तीर्थ व्रत होतें कवणाचें भंगीलें ।
गाईवत्सा पत्नीपुरुषा विघडिलें । न कळे वो संचित चरण अंतरले ।।२।।
नाडियेलें आशा मृगकांतिसोने । धाडिलें रघुनाथा पाठिलागे तेणें ।
उलंघिली आज्ञा माव काय मी जाणें । देखुनी सूनाट घेउनि आलें सुनें ।।३।।
नाहीं मूळ मारग लाग अणीक सोये । एकाविण नामें रघुनाथाच्या माये ।
उपटी पक्षिया एक देउनि पाये । उदकवेढ्यामध्यें तेथें चाले काये ।।४।।
जनकाची नंदिनी दुःखें ग्लानी थोरी । चुकली कुरंगिणी मेळा तैशा परी ।
संमोखी त्रीजटा स्थिर स्थिर वो करी । घेइल तुकयास्वामी राम लंकापुरी ।।५।।

३४०
वीट नेघे ऐसें रांधा । जेणें बाधा उपजे ना ।।१।।
तरी च तें गोड राहे । निरें पाहे स्वयंभ ।।धृ।।
आणिकां गुणां पोटीं वाव। दावी भाव आपुला ।।२।।
तुका म्हणे शुद्ध जाती । ते मागुती परतेना ।।३।।

३४१
नव्हतों सावचित । तेणें अंतरलें हित ।।१।।
पडिला नामाचा विसर । वाढविला संवसार ।।धृ।।
लटिक्याचे पुरीं वाहोनियां गेलों दुरी ।।२।।
तुका म्हणे नाव । आम्हां सांपडला भाव ।।३।।

३४२
अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक । तरि कां हे पाक घरोघरीं ।।१।।
आपुलालें तुम्ही करा रे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम ।।धृ।।
देखोनि जीवन जरि जाय तान । तरि कां सांटवण घरोघरीं ।।२।।
देखोनियां छाया सुख न पवीजे । जंव न बैसीजे तया तळीं ।।३ ।।
हित तरी होय गातां अईकतां । जरि राहे चित्ता दृढ भाव ।।४।।
तुका म्हणे होसी भावें चि तूं मुक्त । काय करिसी युक्त जाणिवेची।।५।।

३४३
काय उणें आम्हां विठोबाचे पाईं । नाहीं ऐसें काई येथें एक ।।१।।

ते हें भोंवतालें ठायीं वांटूं मन । बराडी करून दारोदारीं ।।धृ।।
कोण बळी माझ्या विठोबा वेगळा । आणीक आगळा दुजा सांगा ।।२।।
तुका म्हणे मोक्ष विठोबाचे गावीं । फुकाचीं लुटावीं भांडारें तीं ।।३।।

३४४
सेवितों रस तो वांटितों आणिकां । घ्या रे होऊं नका राणभरी ।।१।।
विटेवरी ज्याचीं पाउलें समान । तो चि एक दानशूर दाता ।।धृ।।
मनाचे संकल्प पाववील सिद्धी । जरी राहे बुद्धी याचे पायीं ।।२।।
तुका म्हणे मज धाडिलें निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ।।३।।

३४५
ऐसे ऐसियानें भेटती ते साधु । ज्याच्या दरशनें तुटे भवबंदु ।
जे कां सच्चिदानंदीं नित्यानंदु । जे कां मोक्षसिद्धी तीर्थ वंदूं रे ।।१।।
भाव सर्वकारण मूळ वंदु । सदा समबुद्धि नास्ति भेदु।
भूतकृपा मोडीं द्वेषकंदु । शत्रु मित्र पुत्र सम करीं बंधु रे ।।धृ।।
मन बुद्धि काया वाचा शुद्ध करीं । रूप सर्वत्र देखोनि नमस्कारीं ।
लघुत्व सर्वभावें अंगीकारीं । सांडीमांडी मीतूंपण ऐसी थोरी रे ।।२।।
अर्थकामचाड नाहीं चिंता । मानामान मोह माया मिथ्या ।
वर्ते समाधानीं जाणोनि नेणता । साधु भेट देती तया अवचिता रे ।।३।।
मनीं दृढ धरीं विश्वास । नाहीं सांडीमांडीचा सायास ।
साधुदर्शन नित्यकाळ त्यास । तुका म्हणे जो विटला जाणीवेस रे ।।४।।

३४६
भवसागर तरतां । कां रे करीतसां चिंता । पैल उभा दाता । कटीं कर ठेवुनियां ।।१।।
त्याचे पायीं घाला मिठी । मोल नेघे जगजेठी । भावा एका साठीं । खांदां वाहे आपुल्या ।।धृ।।
सुखें करावा संसार । परि न संडावे दोन्ही वार । दया क्षमा घर । चोजवीत येतील ।।२।।
भुक्तिमुक्तीची चिंता । नाहीं दैन्य दरिद्रता। तुका म्हणे दाता । पांडुरंग वोळगिल्या ।।३।।

३४७

जें का रंजलें गांजलें । त्यासि म्हणे जो आपुलें ।।१।।
तो चि साधु ओळखावा । देव तेथें चि जाणावा ।।धृ।।
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ।।२।।
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि घरी जो हृदयीं ।।३।।
दया करणें जें पुत्रासी । ते चि दासा आणि दासी ।।४।।
तुका म्हणे सांगूं किती । तो चि भगवंताची मूर्ती ।।५।।

३४८
याजसाठीं भक्ति । जगीं रूढवावया ख्याति ।।१।।
नाहीं तरी कोठें दुजें । आहे बोलाया सहजें ।।धृ।।
गौरव यासाटीं । स्वामिसेवेची कसोटी ।।२।।
तुका म्हणे अळंकारा । देवभक्त लोकीं खरा ।।३।।

३४९
अमंगळ वाणी । नये ऐकों ते कानीं ।।१।।
जो हे दूषी हरिची कथा । त्यासि क्षयरोगव्यथा ।।धृ।।
याति वर्ण श्रेष्ठ । परि तो चांडाळ पापिष्ठ ।।२।।
तुका म्हणे पाप । माय नावडे ज्या बाप ।।३।।

३५०
कैसा सिंदळीचा । नव्हे ऐसी ज्याची वाचा ।।१।।
वाचे नुच्चारी गोविंदा । सदा करी परनिंदा ।।धृ।।
कैसा निरयगांवा । जाऊं न पवे विसावा ।।२।।
तुका म्हणे दंड । कैसा न पवे तो लंड ।।३।।

३५१
आचरणा ठाव ।नाहीं अंगीं स्वता भाव ।।१।।
करवी आणिकांचे घात । खोडी काढूनि पंडित ।।धृ।।
श्वानाचियापरी मिष्टान्नासि विटाळ करी ।।२।।
तुका म्हणे ऐसा । सटवे चि ना पांचा दिसां ।।३।।

३५२
गर्भाचें धारण । तिनें वागविला सिण ।।१।।

व्याली कुऱ्हाडीचा दांडा । वर न घली च तोंडा ।।धृ।।
उपजला काळ । कुळा लाविला विटाळ ।।२।।
तुका म्हणे जाय । नरका अभक्ताची माय।।३।।

३५३
पतनासि जे नेती । तिचा खोटा स्नेह प्रीती ।।१।।
विधीपुरतें कारण । बहु वारावें वचन ।।धृ।।
सर्वस्वासि नाडी । ऐसी लाघवाची बेडी ।।२।।
तुका म्हणे दुरी । राखतां हे तों ची बरी ।।३।।

३५४
देव आड जाला । तो भोगिता मी उगला । अवघा निवारला । शीण शुभाअशुभाचा ।।१।।
जीवशिवाचें भातुकें । केलें क्रीडाया कौतुकें । कैचीं येथें लोकें । हा आभास अनित्य ।।धृ।।
विष्णुमय खरें जग । येथें लागतसे लाग । वांटिले विभाग । वर्णधर्म हा खेळ तयाचा ।।२।।
अवघी एकाची च वीण । तेथें कैचें भिन्नाभिन्न । वेदपुरुष नारायण । तेणें केला निवाडा ।।३।।
प्रसादाचा रस । तुका लाधला सौरस । पायापाशीं वास । निकट नव्हे निराळा ।।४।।

मंबाजी गोसावी यांनीं स्वामीस पीडा केली - अभंग ।।५।।

३५५
न सोडीं न सोडीं न सोडीं । विठोबा चरण न सोडीं ।।१।।
भलतें जड पडो भारी । जीवावरी आगोज ।।धृ।।
शतखंड देह शस्त्रधारी । करितां परी न भीयें ।।२।।
तुका म्हणे केली आधीं । दृढ बुद्धी सावध ।।३।।

३५६

बरवें बरवें केलें विठोबा बरवें । पाहोनि आंत क्षमा अंगी कांटीवरी मारविलें ।।१।।
शिव्या गाळी नीत नाहीं । बहु फार विटंबिलें ।।२।।
तुका म्हणे क्रोधा हातीं । सोडवूनि घेतलें रे ।।३।।

३५७
पावलों पावलों । देवा पावलों रे ।।१।।
बरवें संचित होतें तैसें जालें रें । आतां काय बोलों रे ।।२।।
सोज्ज्वळ कंटकवाटा भावें करूं गेलों रे । तुका म्हणे करूनि वेगळा केलों रे ।।३।।

३५८
कां होती कां होती । देवा एवढी फजीती ।।१।।
मुळीं वर्म नसतों चुकलों । तो मी ऐसें चित्तीं ।।धृ।।
होणार होऊनि गेलें। मिथ्या आतां खंती रे ।।२।।
तुका म्हणे पुरे आतां । दुर्जनाची संगती रे ।।३।।

३५९
सोडवा सोडवा । सोडवा हो अनंता ।।१।।
तुजविण ऐसा । कोण दुजा प्राणदाता ।।धृ।।
कोणा लाज नेणां ऐसें । आणिकां शरण आम्ही जातां ।।२।।
तुका म्हणे सखया । माझ्या रखुमाईच्या कांता ।।३।।
।।५।।

३६०
पुत्राची वार्ता । शुभ ऐके जेवीं माता ।।१।।
तैसें राहो माझें मन । गातां ऐकतां हरिगुण ।।धृ।।
नादें लुब्ध जाला मृग । देह विसरला अंग ।।२।।
तुका म्हणे पाहे । कासवीचें पिलें माये ।।३।।

३६१
ध्यानी योगीराज बैसले कपाटीं । लागे पाठोवाटीं तयांचिया ।।१।।
तान भुक त्यांचें राखे शीत उष्ण । जाले उदासीन देहभाव ।।धृ।।

कोण सखें तयां आणीक सोयरें । असे त्यां दुसरें हरीविण ।।२।।
कोण सुख त्यांच्या जीवासि आनंद । नाहीं राज्यमद घडी तयां ।।३।।
तुका म्हणे विष अमृता समान । कृपा नारायण करितां होय ।।४।।

३६२
न व्हावें तें जालें देखियेले पाय । आतां फिरूं काय मागें देवा ।।१।।
बहु दिस होतों करीत हे आस । तें आलें सायासें फळ आजि ।।धृ।।
कोठवरि जिणें संसाराच्या आशा । उगवो हा फांसा येथूनियां ।।२।।
बुडालीं तयांचा मूळ ना मारग । लागे तो लाग सांडूनियां ।।३।।
पुढें उलंघितां दुःखाचे डोंगर । नाहीं अंतपार गर्भवासा ।।४।।
तुका म्हणे कास धरीन पीतांबरीं । तूं भवसागरीं तारूं देवा ।।५।।

३६३
वैकुंठा जावया तपाचे सायास । करणें जीवा नास न लगे कांहीं ।।१।।
तया पुंडलिकें केला उपकार । फेडावया भार पृथीवीचा ।।२।।
तुका म्हणे सोपी केली पायवाट । पंढरी वैकुंठ भूमीवरी ।।३।।

३६४
शोकें शोक वाढे । हिमतीचे धीर गाढे ।।१।।
येथें केले नव्हे काई ।। लंडीपण खोटें भाई ।।धृ।।
करिती होया होय । परी नव्हे कोणी साह्य ।।२।।
तुका म्हणे घडी । साधिलिया एक थोडी ।।३।।

३६५
म्हणउनी खेळ मांडियेला ऐसा । नाहीं कोणी दिशा वर्जीयेली ।।१।।
माझिया गोतें हें वसलें सकळ । न देखिजे मूळ विटाळाचें ।।धृ।।
करूनि ओळखी दिली एकसरें । न देखों दुसरें विषमासी ।।२।।
तुका म्हणे नाहीं काळापाशीं गोवा । स्थिति मति देवा वांचूनियां ।।३।।

३६६
वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ।।१।।
नाहीं आणीक प्रमाण । तन धन तृण जन ।।धृ।।
पडतां जड भारी । नेमा न टळे निर्धारीं ।।२।।

तुका म्हणे याती । हो का तयाची भलती ।।३।।

३६७
करोत तपादि साधनें । कोणी साधो गोरांजनें ।।१।।
आम्ही न वजों तया वाटा । नाचूं पंढरीचोहटां ।।धृ।।
पावोत आत्मस्थिति । कोणी म्हणोत उत्तम मुक्ति ।।२।।
तुका म्हणे छंद । आम्हां हरिच्या दासां निंद्य ।।३।।

।। स्वामीस सद्‌गुरूची कृपा जाली - अभंग ४ ।।
३६८
सद्‌गुरुरायें कृपा मज केली । परी नाहीं घडली सेवा कांहीं ।।१।।
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ।।धृ।।
भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ।।२।।
कांहीं कळहे उपजला अंतराय । म्हणोनियां काय त्वरा जाली ।।३।।
राघवचैतन्य कैशवचैतन्य । सांगितली खुण माळिकेची ।।४।।
बाबाजी आपलें सांगितलें नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरि ।।५।।
माघाशुद्ध दशमी पाहुनि गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ।।६।।

३६९
माझिये मनींचा जाणोनियां भाव । तो करी उपाव गुरुराजा ।।१।।
आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें गुंपा कांहीं कोठें ।।धृ।।
जाती पुढें एक उतरले पार । हा भवसागर साधुसंत ।।२।।
जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटीं ।।३।।
तुका म्हणे मज दावियेला तारू । कृपेचा सागरु पांडुरंग ।।४।।

३७०
घालुनियां भार राहिलों निश्चितीं । निरविलें संतीं विठोबासि ।।१।।
लावूनियां हातें कुरवाळिला माथा । सांगितलें चिंता न करावी ।।धृ।।
कटीं कर सम चरण साजिरे । राहिला भीवरें तीरीं उभा ।।२।।
खुंटले सायास अणिकि या जीवा । धरिले केशवा पाय तुझे ।।३।।
तुज वाटे आतां तें करीं अनंता । तुका म्हणे संता लाज माझी ।।४।।

३७१

माझिये मनींचा जाणा हा निर्धार । जिवासि उदार जालों आतां ।।१।।
तुजविण दुजें न धरीं आणिका । भय लज्जा शंका टाकियेली ।।धृ।।
ठायींचा संबंध तुज मज होता । विशेष अनंता केला संतीं ।।२।।
जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं । हें चि आतां नाही लाज तुम्हां ।।३।।
तुका म्हणे संतीं घातला हावाला । न सोडीं विठ्ठला पाय आतां ।।४।। ।।४।।

३७२
देव सखा जरी । जग अवघें कृपा करी ।।१।।
ऐसा असोनि अनुभव । कासाविस होती जीव ।।धृ।।
देवाची जतन। तया बाधूं न शके अग्न ।।२।।
तुका म्हणे हरी । प्रऱ्हादासि यत्न करी ।।३।।

३७३
भले भणवितां संतांचे सेवक । आइत्याची भीक सुखरूप ।।१।।
ठसावितां बहु लागती सायास । चुकल्या घडे नास अल्प वर्म ।।धृ।।
पाकसिद्धी लागे संचित आइतें । घडतां सोई तें तेव्हां गोड ।।२।।
तुका म्हणे बरे सांगतां चि गोष्टी । रणभूमि दृष्टी न पडे तों ।।३।।

३७४
संतसमागम एखादिया परी । राहावें त्याचे द्वारीं श्वानयाती ।।१।।
तेथें रामनाम होईल श्रवण । घडेल भोजन उच्छिष्टाचें ।।धृ।।
कामारी बटीक सेवेचे सेवक । दीनपण रंक तेथें भलें ।।२।।
तुका म्हणे सर्व सुख त्या संगती । घडेल पंगती संतांचिया ।।३।।

३७५
एकली राणागोविंदा सवें । गेलें ठावें तें जालें ।।१।।
मज न म्हणा न म्हणा शिंदळी । नाहीं विषम जवळीं आतळलें ।।धृ।।
नव्हती देखिली म्यां वाट । म्हणोनि हा धीट संग केला ।।२।।
भेणें मिठी दिधली गळां । सेजे जवळ दडालें ।।३।।
सलगी धरी पयोधर। साहाती करमुर सवें ।।४।।
आहेव मी गर्भीणपणें । हें सांगणें कां लागे ।।५।।
तुका म्हणे सेवटा नेलें । संपादिलें उभयतां ।।६।।

३७६
होतें बहुत हें दिवस मानसीं । आजि नवस हे फळले नवसीं ।
व्हावी भेटी ते जाली गोविंदासीं । आतां सेवा करीन निश्चयेसीं वो ।।१।।
स्थिर स्थिर मज चि साहे करा । बहु कष्ट सोसिल्या येरझारा ।
येथें आड मज न साहावे वारा । देऊनि कपाट आलें तें दुसरें वारा वो ।।धृ।।
मूळ सत्ता हे सायासाची जोडी । नेदी वेगळें होऊं एकी घडी ।
नाहीं लौकिक स्मरला आवडी । आता येणें काळें या वो लोभें वेडी वो ।।२।।
उदयीं उदय साधिला अवकाश । निश्चितीनें निश्चिती सावकाश ।
धरिये गोडी बहुत आला रस । तुका म्हणे हा मागुता न ये दिवस वो ।।३।।

३७७
स्वयें सुखाचे जाले अनुभव । एक एकीपाशीं सांगतील भाव ।
अवघ्यां अवघा हा कैसा नवलाव । सर्वसाक्ष तेथें चि त्याचा जीव वो ।।१।।
आपआपणाशीं करिती नवल । परि वादावाद न संडिती बोल ।
एका मेघःशामें जलधर वोल । रसीं उताविळ हृदय सखोल वो ।।धृ।।
एक विषय तो सकळांचा हरि । त्याच्या आवडीनें आवडी इतरीं ।
अंध बहिर हे प्रेत लोकां चारी । त्यांची कीर्ति गाइली पुराणांतरी वो ।।२।।
स्तुति पराविया मुखें रुचिकर । प्रीतिपात्राच्या गौरवीं आदर ।
परस्परें हे सादरा सादर । योग सज्जनाच्या सुखा नाहीं पार वो ।।३।।
भक्तिवल्लभ न तुटे चराचरीं । आप्त अनाप्त हे ऐशी ठेवी उरी ।
दुरी जवळी संचिता ऐसें धरी । रंगा रंगा ऐसें होणें लागे हरि वो ।।४।।
तुका लाधला हें उच्छिष्ट भोजन । आला बाहेरी प्रेमें वोसंडून ।
पडिलें कानीं त्या जीवाचें जतन । धरियेले एकाभावें हृदयीं चरण वो ।।५।।

३७८
आजि का वो तूं दिससी दुश्चिती । म्हणी एका मन लगे तुझ्या चित्तीं ।
दिलें ठेवूं तें विसरसी हातीं । नेणों काय बैसला हरि चित्तीं वो ।।१।।
सर सर परती जालीस आतां भांड । कैसें दाखविसी जगासी या तोंड ।
व्याली माय ते लाजविली रांड । नाहीं थार दो ठायीं जाला खंड वो ।।धृ।।

होतें तैसें तें उमटलें वरी । बाह्य संपादणी अंतरींची चोरी ।
नाहीं मर्यादा निःसंग बावरी । मन हें गोविंदीं देह काम करी वो ।।२।।
नाहीं करीत उत्तर कोणासवें । पराधीन भोजन दिलें खावें ।
नाहीं अचळ सावरावा ठावे । देखों उदासीन तुज देहभावें वो ।।३।।
कोठें नेणों हा फावला एकांत । सदा किलकिल भोंवतीं बहुत ।
दोघे एकवाटा बोलावया मात । नाहीं लाज धरिली दिला हात वो ।।४।।
करी कवतुक खेळ खेळे कान्हा । दावी लाघव भांडवी सासासुना ।
परा भक्ति हे शुद्ध तुम्ही जाणा । तुका म्हणें ऐसें कळों यावें जना वो ।।५।।

३७९
भरिला उलंडूनि रिता करी घट । मीस पाणियाचें गोविंदाची चट ।
चाले झडझडां उसंतूनि वाट । पाहे पाळतूनि उभा तो चि नीट वो ।।१।।
चाळा लावियेले गोप गोपीनाथें । जाणे आवडीचें रूप जेथें तेथें ।
दावी बहुतांच्या बहुवेषपंथें । गुणातीतें खेळ मांडियेला येथें वो ।।धृ।।
मनीं आवडे तें करावें उत्तर । कांहीं निमित्ताचा पाहोनि आधार ।
उगा राहे कां मारिसी कंकर । मात वाढविसी उत्तरा उत्तर वो ।।२।।
धरिली खोडी दे टाकोनियां मागें । न ये विनोद हा कामा मशीं संगें ।
मिठी घालीन या जीवाचिया त्यागें । नाहीं ठाउकी पडिलीं तुझीं सोंगें रें
।।३।।
सुख अंतरींचें बाह्य ठसठसी । म्हणे विनोद हा काय सोंग यासी ।
तुज मज काय सोयरीक ऐसी । नंदानंदन या थोरपणें जासी रे ।।४।।
करी कारण तें कळों नेदी कोणा । सुख अंतरींचे बाह्य रंग जाना ।
मन मिनलें रे तुका म्हणे मना । भोग अंतरींचा पावे नारायणा वो ।।५।।

३८०
आजि नवल मी आलें येणे राणें । भेटी अवचिती नंदाचिया कान्हें ।
गोवी सांगती वो सकळ ही जन । होतें संचित आणियेलें तेणें वो ।।१।।
गेलें होउनि न चले आतां कांहीं । साद घालितां जवळी दुजें नाहीं ।
अंगीं जडला मग उरलें तें काई । आतां राखतां गुमान भलें बाई वो ।।धृ।।
बहुत कामें मज नाहीं आराणूक। एक सारितां तों पुढें उभें एक ।
आजि मी टाकोनि आलें सकळिक। तंव रचिलें आणिक कवतुक वो ।।२।।
चिंता करितां हरिली नारायणें। अंगसंगें मिनतां दोघेजणें ।
सुखें निर्भर जालियें त्याच्या गुणें । तुका म्हणे खुंटलें येणें जाणें वो ।।३।।

३८१
मैं भुली घरजानी बाट । गोरस बेचन आयें हाट ।।१।।
कान्हा रे मनमोहन लाल । सब ही बिसरूं देखें गोपाल ।।धृ।।
काहां पग डारूं देख आनेरा । देखें तों सब वोहिन घेरा ।।२।।
हुं तों थकित भैर तुका । भागा रे सब मनका धोका ।।३।।

३८२
हरिबिन रहियां न जाये जिहिरा । कबकी थाडी देखें राहा ।।१।।
क्या मेरे लाल कवन चुकी भई । क्या मोहिपासिती बेर लगाई ।।धृ।।
कोई सखी हरी जावे बुलावन । बार हि डारूं उसपर तन ।।२।।
तुका प्रभु कब देखें पाऊं । पासीं आऊं फेर न जाऊं ।।३।।

३८३
भलो नंदाजीको डिकरो । लाज राखीलीन हमारो ।।१।।
आगळ आवो देवजी कान्हा । मैं घरछोडी आहे म्हांना ।।धृ।।
उन्हसुं कळना वेतो भला । खसम अहंकार दादुला ।।२।।
तुका प्रभु परवली हरी ।छपी आहे हुं जगाथी न्यारी ।।३।।

३८४
नका कांहीं उपचार माझ्या शरीरा । करूं न साहती बहु होतो उबारा ।
मनोजन्य व्यथा वेध जाला अंतरा । लवकरी आणा नंदाचिया कुमरा ।।१।।
सखिया वेशिया तुम्ही प्राणवल्लभा । निवेदिला भाव आर्तभूत या लोभा ।
उमटली अंगीं वो सांवळी प्रभा । साच हे अवस्था कळे मज माझ्या क्षोभा ।।धृ।।
नये कळों नेदावी हे दुजियासि मात । घडावा तयासि उत्कंठा एकांत ।
एकाएकीं साक्षी येथें आपुलें चित्त । कोण्या काळें होइल नेणों भाग्य उदित वो ।।२।।
स्वाद सीण देहभान निद्रा खंडन । पाहिले तटस्थ उन्मळित लोचन ।
अवघें वोसाऊन उरले ते चरण । तुका म्हणे दर्शनापें आलें जीवन ।।३।।

३८५
पडिली भुली धांवतें सैराट । छंद गोविंदाचा चोजवितें वाट ।

मागें सांडोनि सकळ बोभाट । वंदीं पदांबुजें ठेवुनि ललाट वो ।।१।।
कोणी सांगा या गोविंदाची शुद्धी । होतें वहिलें लपाला आतां खांदीं ।
कोठें आड आली हे देहबुद्धी । धांवा आळवीं करुणा कृपानिधी वो ।।धृ।।
मागें बहुतांचा अंतरला संग । मुळें जयाचिया तेणें केला त्याग ।
पहिलें पाहातां तें हरपलें अंग । खुंटली वाट नाहींसें जालें जग वो ।।२।।
शोकें वियोग घडला सकळांचा । गेल्या शरण हा अन्याय आमुचा ।
केला उच्चार रे घडल्या दोषांचा। जाला प्रगट स्वामी तुकयाचा वो ।।३।।

३८६
काय उणें कां करिशील चोरी । किती सांगों तुज नाइकसी हरी ।
परपरता तूं पळोनि जासी दुरी । अनावर या लौकिका बाहेरी वो ।।१।।
माया करुणा हे करिते बहुत । किती सोसूं या जनांचे आघात ।
न पुरे अवसरु हें चि नित्यानित्य । तूं चि सोडवीं करूनि स्थिर चित्त ।।धृ।।
बहुत कामें मी गुंतलियें घरीं । जासी डोळा तूं चुकावूनि हरी ।
करितां लाग न येसी च पळभरी । नाहीं सायासाची उरों दिली उरी वो
।।२।।
तुज म्हणीयें मी न संगें अनंता । नको जाऊं या डोळियां परता ।
न लगे जोडी हे तुजविण आतां । तुकयास्वामी कान्होबा गुणभरिता वो
।।३।।

३८७
घाली कवाड टळली वाड राती । कामें व्यापिलीं कां पडिली दुश्चित्ती ।
कोणे लागला गे सदैवेचे हातीं । आजि शून्य शेजे नाहीं दिसे पती वो
।।१।।
बोले दूतिकेशीं राधा हें वचन । मशीं लाघव दाखवी नारायण ।
म्हणे कोमळ परी बहु गे निर्गुण । याशीं न बोलें कळला मज पूर्ण वो ।।धृ।।
धाडिलें गरुडा आणिलें हनुमंता। तैं पाचारिलें होउनि ये वो सीता ।
लाजिनली रूप न ये पालटितां । जाला भीमकी आपण राम सीता वो
।।२।।
सत्यभामा दान करी नारदासी । तैं कळला वो मज हृषीकेशी ।
तुळे घालितां न ये कनक वो रासी । सम तुके एक पान तुळसी वो ।।३।।
मज भुली पडली कैशापरी । आम्हां भोगूनि म्हणे मी ब्रम्हचारी ।
दिली वाट यमुने मायें खरी । तुम्हां आम्हां न कळे अद्यापवरी वो ।।४।।

जाणे जीवींचें सकळ नारायण । असे व्यापूनि तो न दिसे लपून ।
राधा संबोखिली प्रीती आलिंगून । तुका म्हणे येथें भाव चि कारण वो ।।५।।

३८८
मिळोनि गौळणी देती यशोदे गाऱ्हाणीं । दहिं दुध तुप लोणीं शिंकां नुरे कांहीं ।
मेळवुनी पोरें तेथें रिघे एकसरें । वेगीं आणोनी सामोरें तेथें लोणी खाय ।।१।।
हरि सोंकला वो हरि सोंकला वो । सोंकला तो वारीं तुज लाज नाहीं तरी ।
आम्हां सांपडतां उरी तुज मज नाहीं ।।धृ।।
तुज वाटतसे कोड यासि लागतसे गोड । काय हासतेसी वेड तुज लागलें वो ।
आम्ही जाऊं तुजवरी पोरें चाळविल्या पोरी । काय सांगों भांडखोरी लाज वाटे आम्हां ।।२।।
मुख मळिण वदन उभा हाडतिये घोणे । तंव दसवंती म्हणे आणा शीक लावूं ।
थोर आणिला कांटाळा घरीं दारीं लोकपाळां। डेरा रिघोनी गुसळा तेथें लोणी खाय ।।३।।
मिळोनि सकळा दावें लावूनियां गळां । कैशा बांधिती उखळा येथें राहे उगा ।
बरा सांपडलासी हरी आजिच्यानें करिसिल चोरी । डोळे घालुनियां येरी येरीकडे हांसे ।।४।।
फांकल्या सकळा उपडूनियां उखळा । मोडी वृक्ष विमळार्जुन दोन्ही ।
उठिला गजर दसवंती नव्हे धीर । धांवे तुकयाचा दातार आळंगिला वेगीं ।।५।।

३८९
गोरस घेउनी सातें निघाल्या गौळणी । तंव ती कृष्णाची करणी काय करी तेथें ।
जाला पानसरा मिठी घातली पदरा । आधीं दान माझें सारा मग चाला पंथें ।।१।।
सर जाऊं दे परता । मुळीं भेटलासी आतां ।
नाट लागलें संचिता । खेपा खुंटलिया ।।धृ।।
आसुडी पदरा धरी आणीक दुसरा । येरी झोंबतील करा काय वेडा होसी ।

आलों गेलों बहु वेळां नेणों गोरा कीं सांवळा । सर परता गोवळा काय बोलतोसी ।।२।।
आम्ही येथें अधिकारी मागें केली तुम्ही चोरी । आतां कळलियावरी मागें केलें त्याचें ।
बोलिल्या हांसुनी आम्ही सासुरवासिनी । कां रे झोंबसी दुरूनी करी मात कांहीं ।।३।।
वांयां परनारी कैशा धरिसी पदरीं । तयां कळलिया उरी तुज मज नाहीं ।
जडला जिव्हारीं फांकों नेदी तया नारी । जेथें वर्म तें धरी जाऊं पाहे तियेचें ।।४।।
तया हाती सांपडल्या हाटीं पाटीं चुकाविल्या। कृष्णमिळणीं मिळाल्या त्याही न फिरती ।
तुका म्हणे खंती वांयां न धरावी चित्तीं । होतें तुमच्या संचितीं वोडवलें आजि ।।५।।

३९०
हरी तुझी कांति रे सांवळी । मी रे गोरी चांपेकळी । तुझ्या दर्शनें होईन काळी । मग हें वाळी जन मज ।।१।।
उगला राहें न करीं चाळा । तुज किती सांगों रे गोवळा । तुझा खडबड कांबळा। अरे नंदबाळा आलगटा ।।धृ।।
तुझिये अंगीं घुरट घाणी। बहु खासी दुध तुप लोणी । घरिचें बाहेरिल आणोनी । मी रे चांदणी सकुमार ।।२।।
मज ते हांसतील जन । धिःकारिती मज देखोन । अंगीं तुझें देखोनि लक्षण । मग विटंबणा होइल रे ।।३।।
तुज लाज भय शंका नाहीं । मज तंव सज्जन पिशुन व्याही । आणीक मात बोलूं काहीं । मसी भीड नाहीं तुज माझी ।।४।।
वचन मोडी नेदी हात । कळलें न साहे ची मात । तुकयास्वामी गोपीनाथ । जीवन्मुक्त करूनि भोगी ।।५।।

३९१
सात पांच गौळणी आलिया मिळोनी यशोदे गाऱ्हाणें देती कैसें ।
काय व्यालीस पोर चोरटें सिरजोर जनावेगळें ची कैसें।
दहिं दुध लोणी शिंकां नुरे चि कांहीं कवाड जैशाचें तैसें ।
चाळवूनि नाशिली कन्याकुमरें आमुच्या सुनांसि लाविलें पिसें गे बाइये

।।१।।
आझुनि तरी यासि सांगें बरव्या परी नाहीं तरी नाहीं उरी जीवेसाटी ।
मिळोनि सकळै जणी करूं वाखा सखीं तुज मज होईल तुटी गे बाइये ।।धृ।।
नेणे आपपर लौकिक वेव्हार भलते ठायीं भलतें करी । पाळतुनि घरीं आम्ही नसतां तेथें आपण संचार करी।
सोगया चुंबन देतो आलिंगन लोळे मेजाबाजावरी । शिंकीं कडा फोडी गोरसाचे डेरे धरितां न सांपडे करीं गे बाइये ।।२।।
आतां याची चाड नाहीं आम्हां भीड सांपतां कोड पुरवूं मनिचें । सोसिलें बहु दिस नव्हता केला निस म्हणुनि एकुलतें तुमचें ।
चरण खांबीं जीवें बांधैन सरिसा जवें न चले कांहीं याचें । अर्थ प्राण देतां न सोडी सर्वथा भलतें हो या जिवाचें गे बाइये ।।३।।
घेउनी जननी हातीं चक्रपाणी देतिसे गौळणी वेळोवेळां । निष्ठुर वाद झणीं बोलाल सकळा क्षोभ जाइल माझ्या बाळा ।
जेथें लागे हात वाढतें नवनीत अमृताच्या कल्लोळा । देखोनि तुकयास्वामी देश देहभाव विसरल्या सकळा गे बाइये ।।४।।

३९२
विरहतापें कांुफ्दे छंद करिते जाती । हा गे तो गे सावधान सवें चि दुश्चिती ।
न सांभाळुनि अंग लोटी पाहे भोंवतीं । वेगळी च पडों पाहे कुळाहुनिया ती ।।१।।
खुंटलीसी जाली येथें अवघियांची गती । आपुलीं परावीं कोण नेणें भोंवती ।
त्यांचीं नांवें बोभे अहो अहो श्रीपती । नवलाव हा येरां वाटोनियां हांसती ।।धृ।।
बाहेरी च धांवे रानां न धरी च घर । न कळे बंधना जाला तेणें संचार ।
विसरूनि गेली सासुरें की माहेर । एका अवलोकी एका पडिला विसर ।।२।।
तुका म्हणे तुम्ही अवघ्या राहा निश्चळा । न ये आतां येऊं येथें सर्वथा बळा ।
त्याचा त्याच्या मुखें अवघाची निर्वाळा । बहुतां मतें येथें तर्कवाद निराळा ।।३।।

३९३
ये रे कृष्णा खुणाविती खेळों भातुकें । मिळालिया बाळा एके ठायीं कवतुकें

।
कळों नेदी माया त्याचें त्यास ठाउकें । खेळतोंसें दावी लक्षलक्षापें मुकें
।।१।।
अखंडित चटे त्यांनीं लावियेला कान्हा । आवडे तया त्या वाहाती संकल्प
मना ।
काया वाचा मनें रूपीं गुंतल्या वासना । एकांताचें सुख जाती घेवोनियां राणा
।।धृ।।
अवघियांचा जाणें जाला मेळासा हरी । मिळोनियां जावें तेथें तया भीतरी ।
कळों नेदी घरिच्या करी गोवूनी चोरी । हातोहातीं नेती परपरत्या दुरी
।।२।।
आनंदें निर्भर आपणाशीं आपण । क्रीडतील बाळा त्यजिलें पारिखें जन ।
एकाएकीं तेथें नाहीं दुसरें भिन्न । तुका म्हणे एका नारायणा वांचून ।।३।।

३९४
खेळतां मुरारी जाय सरोवरा तिरीं । तंव नग्न चि या नारी तेथें देखियेल्या ।
मांडिले विंदान ख्याल सुखाचें संधान । अंग लपवूनी मान पिलंगत चाले
।।१।।
ख्याल मांडिला रे ख्याल मांडिला रे । पायां पडतां रे न सोडी नेदी साउलां
रे ।।धृ।।
साड्या साउलीं पातळें गोंडे कसणिया चोळ्या । बुंथी घेउनी सकळा
कळंबावरी पळे।
खांदी धरूनियां करीं दृष्टी घालोनि सामोरी । बैसे पाला वोढी वरी
खदखदां हांसे ।।२।।
आनंदें कल्लोळ बाळा खेळती सकळ देती उलटिया चपळ । एकी एकीहूनि
म्हैस वेल सुर काडी ।
एकी उगविती कोडीं । नाना परीच्या निकडी खेळ मांडियेला ।।३।।
एकी आलिया बाहेरी पाहे लुगडें तंव नारी । म्हणे नाहीं नेलें चोरी काय
जाणों केव्हां।
केला सकळी हाकारा तंव आलिया बाहेरा । आतां म्हणतील घरां जावें कैशा
परी ।।४।।
तंव हांसे वनमाळी वरी पाहोनी सकळी । लाजे रिघालिया जळीं मागें पुढें
हात ।
लाज राखावी गोपाळा आम्हांजणींची सकळां । काय मागसी ये वेळा देऊं

गुळवाटी ।।५।।
जोडोनियां कर या गे सकळी समोर । वांयां न बोलावें फार बडबड कांहीं ।
भातुकें भूषण नाहीं चाड नेघें धन । करा एक चित्त मन या गे मजपाशीं ।।६।।
एक एकीकडे पाहे लाज सांडूनियां राहे। म्हणे चला आतां सये जाऊं तयापाशीं ।
जोडोनियां हात कैशा राहिल्या निवांत । तुका म्हणे केली मात लाज राखिली तयांची ।।७।।

३९५
धरिला पालव न सोडी माझा येणें । कांहीं करितां या नंदाचिया कान्हें ।
एकली न येतें मी ऐसें काय जाणें । कोठें भरलें अवघड या राणें रे ।।१।।
सोडी पालव जाऊ दे मज हरी । वेळ लागला रे कोपतील घरीं ।
सासू दारुण सासरा आहे भारी । तुज मज सांगतां नाहीं उरी रे ।।धृ।।
सखिया वेशिया होतिया । तुज फावलें रे फांकतां तयांसी ।
होतें अंतर तर सांपडतें कैसी । एकाएकीं अंगीं जडलासी रे ।।२।।
कैसी भागली हे करितां उत्तर । शक्ति मावळल्या आसुडितां कर ।
स्वामी तुकयाचा भोगिया चतुर। भोग भोगी त्यांचा राखे लोकाचार वो ।।३।।

३९६
गाई गोपाळ यमुनेचे तटीं । येती पाणिया मिळोनि जगजेटी ।
चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं । चला चला म्हणती पाहूं दृष्टी वो ।।१।।
ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी । चित्त विव्हळ देखावया हरी ।
मिस पाणियाचें करितील घरीं । बारा सोळा मिळोनि परस्परीं वो ।।धृ।।
चिरें चोळिया त्या धुतां विसरती । ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ती ।
कोणा नाठवे कोण कुळ याती । जालीं ताटस्त सकळ नेत्रपातीं वो ।।२।।
दंतधावनाचा मुखामाजी हात । वाद्यें वाजती नाइके जनमात ।
करी श्रवण कृष्णवेणुगीत । स्वामी तुकयाचा पुरवील मनोरथ वो ।।३।।

३९७
कोठें मी तुझा धरूं गेलें संग । लावियेलें जग माझ्या पाठीं ।।१।।
सर सर रे परता अवगुणाच्या गोवळा । नको लावूं चाळा खोटा येथें ।।धृ।।

रूपाच्या लावण्यें नेली चित्तवृत्ती । न देखें भोंवतीं मी ते माझी ।।२।।
तुकयाचा स्वामी माझे जीवीं च बैसला। बोलीं च अबोला करूनियां ।।३।।

३९८
गोड लागे परी सांगतां चि न ये । बैसे मिठी सये आवडीची ।।१।।
वेधलें वो येणें श्रीरंगरंगें । मीमाजी अंगें हारपलीं ।।धृ।।
परते चि ना दृष्टी बैसली ते ठायीं । विसावोनि पायीं ठेलें मन ।।२।।
तुकयाच्या स्वामीसवें जाली भेटी । तेव्हां जाली तुटी मागिल्यांची ।।३।।

३९९
पाहावया माजी नभा । दिसे शोभा चांगली ।।१।।
बैसला तो माझे मनीं । नका कोणी लाजवूं ।।धृ।।
जीवा आवडे जीवाहूनि । नव्हे क्षण वेगळा ।।२।।
जालें विश्वंभरा ऐसी । तुकया दासी स्वामीची ।।३।।

४००
कोणी एकी भुलली नारी । विकितां गोरस म्हणे घ्या हरी ।।१।।
देखिला डोळां बैसला मनीं । तो वदनीं उच्चारी ।।धृ।।
आपुलियाचा विसर भोळा । गोविंद कळा कौतुकें ।।२।।
तुका म्हणे हांसे जन । नाहीं कान ते ठायीं ।।३।।

४०१
करूनी आइत सत्यभामा मंदिरीं रे । वाट पाहे टळोनि गेली रात्री रे । न ये चि देव येतील कामलहरी रे । पडिली दुश्चिती तंव तो कवाड टिमकारी रे ।।१।।
सर गा परता कळला तुझा भाव रे । कार्या पुरतें हें दाविसी लाघव रे । बोलतोसी तें अवघी तुझी माव रे । जाणोनि आलासी उजडता समयो रे ।।धृ।।
मी च वेडी तुजला बोल नाहीं रे । दानावेळे विटंबणा जाली काय रे । मागुती रुद्रासि भेटी दिली तईं रे । विश्वास तो तुझ्या बोला आझुनि तरी रे ।।२।।
भ्रम होता तो अवघा कळों आला रे । मानवत होतें मी भला भला रे । नष्टा क्रिया नाहीं मां तुझ्या बोला रे । तुकयाबंधु स्वामी कानड्या कौसाल्या रे ।।३।।

४०२
तंव तो हरि म्हणे वो निजांगने वो । लाइ नीच कां देसील डोहणे वो । मजपें दुजें आलें तें देव जाणे वो । शब्द काय हे बोलसी ते उणे वो ।।१।।
पाहा मनीं विचारुनी आधि वो । सांडूनि देईं भ्रांति करीं स्थिर बुद्धि वो । तंट केलें हें माझें तुझें उपाधीं वो । उघडी डोळे आझुनि तरी धरीं शुद्धि वो ।।धृ।।
कोठें तरी दुनियांत वर्तलें वो । स्त्रियांनीं भ्रतारा दानां दिलें वो । कैसा भला मी नव्हे तें सोसिलें वो । रुसतेसी तूं उफराटें नवल जालें वो ।।२।।
काय सांग म्यां दैन्य केली कैसी वो । तुझ्या गर्वें आणविलें हनुमंतासि वो । कष्टी केलें मज गरुडा भीमकीसि वो । तुकयाबंधु म्हणे खरें खोटें नव्हे यासि वो ।।३।।

४०३
तंव ते म्हणे ऐका हृषीकेशी वो । नवाजिलें तुम्ही म्हणां आपणांसि वो । तरी कां वंचनुक सुमनासि वो । नट नाट्य बरें संपादूं जाणतोसि वो ।।१।।
सर हो परता परता हो आतां हरी । म्हणे सत्राजिताची कुमरी । जाणतें मी या शब्दाच्या कुसरी । ऐसें च करून ठकविलें आजिवरी ।।धृ।।
भावें गेलें म्हूण न व्हावा वियोग। मनिचे आर्त जन्मांतरीं व्हावा संग । तों तों केलें हें पाठमोरें जग । ऐसें काय जाणें हे तुझे रंग ।।२।।
काय करूं या नागविलें कामें । लागलें तयास्तव इतुकें सोसावें । नाहीं तरी कां नव्हती ठावीं वर्मे। परद्वारीं ऐसा हाकलिती प्रसिद्ध नांवें ।।३।।
काय किती सांगावे तुझे गुण । न फुटे वाणी निष्ठुर ऐसा निर्गुण । आप पर न म्हणसी माय बहीण । सासूसुनास लावुनि पाहासी भांडण ।।४।।
इतुकियावरी म्हणे वैकुंठिंचा राणा । होऊन गेलें तें नये आणूं मना । आतां न करीं तैसें करी क्रिया आणा । भक्तवत्सल म्हणे तुकयाबंधु कान्हा ।।५।।

४०४
कान्हो एकली रे एकली रे । तुजसवें चुकलें रे । भय वाटे वनीं मज अबळा धाकली रे ।।१।।
निघतां घरीं आई बा वारी। तुजसवें कां आलियें हरी ।।धृ।।
लोक वाटा सांगती खोटा । परी मी चटा लागलियें ।।२।।
पिकल्या बोरी जालें सामोरी । काय जाणें कोठें राहिला हरी ।।३।।

आड खुंट जालिया जाळी । काय जाणों कान्हें मांडिली रळी ।।४।।
तुका म्हणे जाऊं आलिया वाटा । पाहों हरी पायीं न मोडे कांटा ।।५।।

४०५
क्याला मज आयो वारितेसी घरा । खेळतों सोकरा नंदाचा मी ।।१।।
बहु दिसीं जाली यासीं मज भेटी । आतां वाटे तुटी न परावी ।।धृ।।
कोवळें बोलतो मना आवरतें । डोळियाचें पातें ढापवेना ।।२।।
आजि सकळांसी आलें चोलुनियां । कां गो पाठी वांयां पुलविली ।।३।।
तुमचें तें काय खोळंबलें काज । बल्या कां गो मज कोंडा घरीं ।।४।।
तुकयाचा धनी गोकुळनायक । सरा कांहीं एक बोलतों मी ।।५।।

४०६
आता न यें मागें । मी आलें याच्या रागें । काय माझें जगें । कोपोनियां करावें ।।१।।
कां गो कलित्यां कोल्हाल । तुम्ही भलत्या च सकल । वेचाल ते बोल । झुटे होती बोलिले ।।धृ।।
याचे भेटी माझें मन । स्वरुपीं ठाकले लोचन । वेगळें तें क्षण आतां होऊं नावरे ।।२।।
काज काम नको जालें । बीजें नावरे बोलिलें । याचिया भेदिलें। कामबाणीं अंतर ।।३।।
या वेगळें होणें । आतां जळो तैसें जिणें । घेतलें तें मनें । आतां मागें न फिरे ।।४।।
आतां मोटी वार। माझी नका धरूं चार । तुकयाचा दातार । शेजे तो मी सुतलों ।।५।।

४०७
हरिरता चपळा नारी । लागवरी न रिघती ।।१।।
अवघ्या अंगें सर्वोत्तम । भोगी काम भोगता ।।धृ।।
वाचा वाच्यत्वासि न ये । कोठें काय करावें ।।२।।
तुका म्हणे देवा ऐशा । देवपिशा उदारा ।।३।।

४०८
गौळणी आल्या वाज । म्हणती या गे राखों आज । सांपडवुनी माजघरांत

धरुनी कोंडूं । उघडें कवाड उभ्या काळोशाचे आड । साता पांचा एक भीड मौनेंची ठेल्या ।।१।।
नित्य सोंकवला नेदी । सांगों चित्त बोला । आतां सांपडतां याला कोण सोडी जीवें ।।धृ।।
जाणोनियां हरी त्याच घरा आला चोरी । गडियां ठेवुनी बाहेरी पूर्वद्वारें शिरे । त्यांच्या भयाभीत चाले पिलंगत भोंवतालें । पाहे तंव देखियेलें नवनीत पुढें ।।२।।
उतरोनि सिंकें । पाहे चाखोनियां निकें। गोड तें चि एका एकें । हातीं लांबवितो । जाणे राखती तयांसि । तेथें अधिक चि नासी । माग लावी हात पुसी । चोरी जाणावया ।।३।।
जाणोनियां नारी । मूळ वर्मद्वार धरी । माजे कोंडूनी भीतरी । घरांत धरीयेला । कां रे नागविसी । माझे मुळीं लागलासी । आणवीन तुजपासीं । मागें खादलें तें ।।४।।
दोही संदी बाहे । धरूनि नेती माते पाहे । काय नासी केली आहे । घरामाजी येणें । तुका म्हणे मुख । त्याचें वाढों नेदी दुःख । दसवंती कवतुक। करुनी रंजविल्या ।।३।।

४०९

आलियें धांवति धांवति भेट होइल म्हूण । तंव ते टळली वेळ वो माझा उरला सीण ।।१।।
आतां काय करूं सांग वो मज भेटेल कैसा । हरिलागीं प्राण फुटे वो थोरी लागली आशा ।।धृ।।
लाविला उशीर बहुतीं बहु ओढिती ओढा । सांभाळितां सांग असांग दुःख पावल्यें पीडा ।।२।।
जळो आतां संसारु वो कईं शेवट पुरे । तुकयाच्या स्वामी गोपाळालागीं जीव झुरे ।।३।।

४१०

आणीक काय थोडीं । परि तें फार खोटीं कुडीं ।।१।।
सदा मोकळीं च गुरें । होती फजीत तीं पोरें ।।धृ।।
सदा घालिता हुंबरी। एक एकांचे न करी ।।२।।
तुका म्हणे घरीं माय वेळोवेळां मारी ।।३।।

४११
बहुतांचे संगती । बहु पावलों फजिती ।।१।।
बरें केलें नंदबाळें । मागिलांचें तोंड काळें ।।धृ।।
माझा करितील तंटा । लपती आलिया बोभाटा ।।२।।
तुका म्हणी काई । किती म्हणों बाप आई ।।३।।

४१२
गाईन ते लीळा चरित्र पवाडे । राखिले संवगडे सहित गाई ।।१।।
चोरिलें नवनीत बांधविला गळा । जे तुम्हीं गोपाळा छंद केले ।।धृ।।
मोहिल्या गोपिका पांवयाच्या छंदें । केली ते गोविंदें क्रीडा गाऊं ।।२।।
मायबापा लाड दाखविलें कौतुक । तें या आणूं सुख अंतरासी ।।३।।
निर्दाळिले दुष्ट भक्तां प्रतिपाळी । ऐसा म्हणों बळी आमुचा स्वामी ।।४।।
तुका म्हणे सरसी असों येणें वोघें । लागोनि संबंधें सर्वकाळ ।।५।।

डांका - अभंग ८
४१३
चौक भरियेला आसनीं पाचारिली कुळस्वामिनी । वैकुंठवासिनि ये धांवोनी झडकरी ।।१।।
रंगा येईं वो विठाई सांवळिये डोळसे । तुझें श्रीमुख साजिरें तें मी केधवां देखेन ।।धृ।।
रजतमधुपारती। पंचप्राणांची आरती । अवघी सारोनी आइती । ये धांवती झडकरी ।।२।।
मन मारोनियां मेंढा । आशा मनसा तृष्णा सुटी । भक्तिभाव नैवेद्य ताटीं । भरोनि केला हाकारा ।।३।।
डांका अनुहात गजरे । येउनि अंगासी संचरे । आपुला घेउनी पुरस्कार । आरोग्य करीं तुकयासी ।।४।।

४१४
साच माझा देव्हारा । भाक ठेवा भाव खरा । त्रिगुणाचा फुलवरा । आणा विनति सांगतों ।।१।।
माझें दैवत हें रंगीं । नाचे वैष्णवांच्या संगीं । भरलें मग अंगीं । निवाड करी दोहींचा ।।धृ।।

तुझें आहे तुजपासीं । परि तूं जागा चुकलासी । चिवडुनियां नासी। तुझ्या घरिच्यांनीं केली ।।२।।
आतां न पडे ठावें । वांचूनियां माझ्या देवें । अंधकार व्हावें । नासु ठाव शोधावा ।।३।।
आंधळ्यासी डोळे। देते पांगुळासी पाय । वांजा पुत्र फळे । नवस पुरविते विठाई ।।४।।
उगविलीं कोडीं । मागें कितेकांचीं बापुडीं । तुका म्हणे घडी। न लगे नवस द्या आधीं ।।५।।

४१५
विनति घातली अवधारीं । मज देईं वो अभय करीं । पीडिलों खेचरीं । आणीक वारी नांवांची ।।१।।
रंगा येईं वो एकला रंग वोडवला । हरिनाम उठिला गजर केला हाकारा ।।धृ।।
देवांचे दैवते । तुज नमिलें आदिनाथे । ये वो कृपावंते । भोगा माझ्या धांवति ।।२।।
न लवीं आतां वेळ । आइत सारिली सकळ । तुका म्हणे कुळ । आमुचिये दैवते ।।३।।

४१६
माझा देव्हारा साचा । नाहीं आणीक कोणाचा । त्रिभुवनीं याचा । ठसा न लगे पुसावें ।।१।।
या रे लोटांगणीं । कांहीं करा विनवणी। करील झाडणी । भूत काढी संसार ।।धृ।।
पडिले विषयांचे गोंधळीं । ते त्रिगुण आकळी । हरिनाम आरोळी । कानीं पडतां ते उठी ।।२।।
घेतला अहंकार । काम क्रोध या मत्सरें । पळती प्रेमभरें। अवघे ठाव सांडुनी ।।३।।
घेतलासे पुरा । माया ममता आसरा । अवघ्या एक सरा । पळती रंग देखोनी ।।४।।
तुका म्हणे द्यावा भाव । फिटेल मनिचा संदेह । आणीक न लगे ठाव । कांहीं कोठें हिंडावें ।।५।।

४१७
पुढें येते देवी । तिची जती चालों द्यावी । मागील झाडावी । झाडा मान आसडी ।।१।।
एकवीरा आली अंगा । आतां निवारील रोगा । माझ्या भक्तापाशीं सांगा । पूजा भावें करावी ।।धृ।।
मेंढा मारावा लोवाळ । पूजा पावली सकळ । तुम्हीं केलें बळ । मग मी ठायीं न पडें ।।२।।
तुका म्हणें मुळीं । लागली ते आली कुळीं । वंदुनी सकळीं । जीवें भावों ओवाळा ।।३।।

४१८
अवघ्या जेष्ठादेवी कोण पूजनाचा ठाव । धरितां चि भाव कोठें नाहींसें जालें ।।१।।
दिसे सारिखें सारिखें । परि तें कारणीं पारिखें । तळीं गेलें देखें । वरी टोले न साहाती ।।धृ।।
पट एका शिरीं । यथाविधीनें त्या येरी । बसकोळ्या घागरी डेरे रांझण गाडगीं ।।२।।
तुका म्हणे माना । येथें कोणीं रुसावें ना । आपुलाल्या स्थानां । जेथें त्या चि शोभल्या ।।३।।

४१९
खेचर खडतर । काळ कांपती असुर । नांदे भीमातीर। पंढरपुर पाटणीं ।।१।।
आतां करी कां रे हाकारा । सहस्र नामें एकसरा । दवडिते खेचरा । अंगसंगें धरूनी ।।धृ।।
सीते जाली झडपणी । राहाणे वासुगीच्या बनीं । पावली जननी । झोंटि मोकळिया केशी ।।२।।
लाविलें कावरें । प्रल्हादा म्हैसासुरें । आली येकसरें । दांत खात रंगासी ।।३।।
वसुदेवाचीं बाळें । सात खादलीं ज्या काळें। आली भोगवेळे । तया कारणें तेथें ।।४।।
पांडवें बापुडीं । वाज केलीं फिरती वेडीं । धांवोनियां काढी । अंगसंगें त्राहाविलीं ।।५।।

नामाचें चिंतन । तेथें धांवते आपण । न विचारितां हीण । भाव देखे जयाचा ।।६।।
कुळीची कुळदेवता । तुका म्हणे आम्हां माता । काय भय भूतां । काळ यमदूताचें ।।७।।

४२०
देवी देव जाला भोग सरला यावरी । सांगाया दुसरी ऐसी नाहीं उरली ।।१।।
हरिनाम देवनाम तुम्ही गाऊनियां जागा । पेंठवणी मागा नका ठेवूं लिगाड ।।धृ।।
शेवटीं सुताळी बरवी वाजवावी डांक । ताळा घाली एक सरलियाचे शेवटीं ।।२।।
गुंडाळा देव्हारा मान देती मानकरी । तुका म्हणे बरीं आजि कोडीं उगविलीं ।।३।।
।।८।।

४२१
जाली झडपणी खडतर देवता । संचरली आतां निघों नये ।।१।।
मज उपचार झणी उपचार झणी आतां करा । न साहे दुसरा भार कांहीं ।।धृ।।
नेऊनियां घाला चंद्रभागे तिरीं । जीवा नाहीं उरी कांहीं आतां ।।२।।
तुका म्हणे कळों आलें वर्तमान । माझें तों वचन आच्छादलें ।।३।।

४२२
अंगीं देवी खेळे । कां रे तुम्हासी न कळे । कोणाचे हे चाळे सुख दुःख न मनितां ।।१।।
मीं तों आतां येथें नाहीं । ओळखी वचनाच्या ठायीं । पालटाचा घेईं । भाव खरें लोपे ना ।।धृ।।
आपुलाले तुम्ही पुसा । सोवा एव्याच सरिसा । थिरावल्या कैसा काय जाणों विचार ।।२।।
तुका म्हणे लाभकाळ । तेथें नसावें शीतळ । मग तैशी वेळ । कोठें जाते सांपडों ।।३।।

४२३
पांगुळ जालों देवा नाहीं हात ना पाय । बैसलों जयावरी सैराट तें जाय ।
खेटितां कुंप कांटी । खुंट दरडी न पाहे। आधार नाहीं मज कोणी । बाप ना माये ।।१।।
दाते हो दान करा। जातें पंढरपुरा । न्या मज तेथवरी । अखमाचा सोयरा ।।धृ।।
हिंडतां गव्हानें गा । शिणलों दारोदारीं । न मिळे चि दाता कोणी जन्मदुःखातें वारी ।
कीर्ति हे संतां मुखीं । तो चि दाखवा हरी । पांगळां पाय देतो । नांदे पंढरपुरीं ।।२।।
या पोटाकारणें गा । जालों पांगीला जना । न सरे चि बापमाय भीक नाहीं खंडणा ।
पुढारा म्हणती एक । तया नाहीं करुणा । श्वान हें लागे पाठीं । आशा बहु दारुणा ।।३।।
काय मी चुकलों गा मागें नेणवे कांहीं । न कळे चि पाप पुण्य । तेथें आठव नाहीं
मी माजी भुललों गा । दीप पतंगासोयी । द्या मज जीवदान । संत महानुभाव कांहीं ।।४।।
दुरोनि आलों मी गा । दुःख जालें दारुण । यावया येथवरी
होतें हें चि कारण । दुर्लभ भेटी तुम्हां । पायीं जालें दरुषन । विनवितो तुका संतां । दोन्ही कर जोडून ।।५।।

४२४
देश वेष नव्हे माझा । सहज फिरत आलों । करूं सत्ता कवणावरी कोठें स्थिर राहिलों ।
पाय डोळे म्हणतां माझे । तींहीं कैसा मोकलिलों । परदेशीं नाहीं कोणी । अंध पांगुळ जालों ।।१।।
आतां माझी करीं चिंता । दान देईं भगवंता । पाठीं पोटीं नाहीं कोणी । निरवीं सज्जन संता ।।धृ।।
चालतां वाट पुढें । भय वाटतें चित्तीं । बहुत जन गेलीं नाहीं आलीं मागुतीं ।
न देखें काय जालें। कान तरी ऐकती । बैसलों संधिभागीं । तुज धरूनि चित्तीं ।।२।।

भाकितों करुणा गा । जैसा सांडिला ठाव । न भरें पोट कधीं नाहीं निश्चळ पाव ।
हिंडतां भागलों गा । लक्ष चौऱ्याशी गांव । धरूनि राहिलों गा । हा चि वसता ठाव ।।३।।
भरवसा काय आतां । कोण आणि अवचिता । तैसी च जाली कीर्ति । तया मज बहुतां ।
म्हणउनि मारीं हाका । सोयी पावें पुण्यवंता । लागली भूक थोरी । तूं चि कृपाळू दाता ।।४।।
संचित सांडवलें । कांहीं होतें जवळीं । वित्त गोत पुत माया । तुटली हे लागावळी ।
निष्काम जालों देवा। होतें माझे कपाळीं । तुका म्हणे तूं चि आतां । माझा सर्वस्वें बळी ।।५।।

४२५
देखत होतों आधीं मागें पुढें सकळ । मग हे दृष्टी गेली वरी आले पडळ ।
तिमिर कोंदलेंसें वाढे वाढतां प्रबळ । भीत मी जालों देवा । काय ज्याल्याचें फळ ।।१।।
आतां मज दृष्टी देईं । पांडुरंगा मायबापा । शरण आलों आतां । निवारूनियां पापा ।
अंजन लेववुनी। करीं मारग सोपा । जाईन सिद्धपंथें । अवघ्या चुकती खेपा ।।धृ।।
होतसे खेद चित्ता । कांहीं नाठवे विचार । जात होतों जना मागें तोही सांडिला आधार ।
हा ना तोसा ठाव जाला। अवघा पडिला अंधार । फिरलीं माझीं मज । कोणी न देती आधार ।।२।।
जोंवरि चळण गा । तोंवरि म्हणती माझा । मानिती लहान थोर देहसुखाच्या काजा ।
इंद्रियें मावळलीं । आला बागुल आजा। कैसा विपरीत जाला। तो चि देह नव्हे दुजा ।।३।।
गुंतलों या संसारें। कैसा झालोंसें अंध। मी माझें वाढवुनी मायातृष्णेचा बाध।
स्वहित न दिसे चि । केला आपुला वध । लागले काळ पाठीं । सवें काम हे क्रोध ।।४।।
लागती चालतां गा । गुणदोषाच्या ठेंसा । सांडिली वाट मग जालों निराळा

कैसा ।
पाहातों वास तुझी । थोरी करूनी आशा । तुका म्हणे वैद्यराजा। पंढरीच्या निवासा ।।५।।

४२६
सहज मी आंधळा गा निजनिराकार पंथें । वृत्ति हे निवृत्ति जाली जन न दिसे तेथें ।
मी माजी हारपलें ठायीं जेथींचा तेथें। अदृश्य तें चि जालें कांहीं दृश्य जें होतें ।।१।।
सुखी मी निजलों गा शून्य सारूनि तेथें । त्रिकूटशिखरीं गा दान मिळे आइतें ।।धृ।।
टाकिली पात्र झोळी धर्मअधर्म आशा । कोल्हाळ चुकविला त्रिगुणाचा वोळसा ।
न मागें मी भीक आतां हा चि जाला भरवसा। वोळली सत्रावी गा तिणें पुरविली इच्छा ।।२।।
ऊर्ध्वमुखें आळविला सोहं शब्दाचा नाद । अरूप जागविला दाता घेऊनि छंद ।
घेऊनि आला दान निजतत्त्व निजबोध । स्वरूपीं मेळविलें नांव ठेविला भेद ।।३।।
शब्द हा बहुसार उपकाराची राशी । म्हणोनि चालविला मागें येतील त्यांसीं ।
मागोनि आली वाट सिद्धओळीचि तैसी । तरले तरले गा आणीक ही विश्वासी ।।४।।
वर्म तें एक आहे दृढ धरावा भाव । जाणिवनागवण नेदी लागो ठाव ।
म्हणोनि संग टाकी सेवीं अद्वैत भाव । तुका म्हणे हा चि संतीं मागें केला उपाव ।।५।।

४२७
आंधळ्यापांगळ्यांचा एक विठोबा दाता । प्रसवला विश्व तो चि सर्व होय जाणता ।
घडी मोडी हेळामात्रें पापपुण्यसंचिता। भवदुःख कोण वारी तुजवांचुनि चिंता ।।१।।
धर्म गा जागो तुझा तूं चि कृपाळू राजा । जाणसी जीवींचें गा न सांगतां सहजा ।।धृ।।

घातली लोळणी गा पुंडलीकें वाळवंटीं । पंढरी पुण्य ठाव नीरे भीवरे तटीं ।
न देखे दुसरें गा । जाली अदृश्यदृष्टी । वोळला प्रेमदाता केली अमृतवृष्टी ।।२।।
आणीक उपमन्यु एक बाळ धाकुटें। न देखे न चलवे जना चालते वाटे ।
घातली लोळणी गा हरिनाम बोभाटे । पावला त्याकारणें धांव घातली नेटें ।।३।।
बैसोनि खोळी शुक राहे गर्भ आंधळा । शीणला येरझारी दुःख आठवी वेळा ।
मागील सोसिलें तें ना भीं म्हणे गोपाळा । पावला त्याकारणें । लाज राखिली कळा ।।४।।
न देखे जो या जना तया दावी आपणा । वेगळा सुखदुःखा मोहो सांडवी धना ।
आपपर तें ही नाहीं बंधुवर्ग सज्जना। तुकया ते चि परी जाली पावें नारायणा ।।५।।

४२८

भगवंता तुजकारणें मेलों जीता चि कैसी । निष्काम बुद्धी ठेली चळण नाहीं तयासी ।
न चलती हात पाय दृष्टि फिरली कैसी। जाणतां न देखों गा क्षर आणि अक्षरासी ।।१।।
विठोबा दान दे गा तुझ्या सारिखें नामा । कीर्ति हे वाखाणिली थोर वाढली सीमा ।।धृ।।
भुक्ति मुक्ति तूं चि एक होसि सिद्धीचा दाता । म्हणोनि सांडवली शोक भय लज्जा चिंता ।
सर्वस्वें त्याग केला धांव घातली आतां। कृपादान देई देवा येउनि सामोरा आतां ।।२।।
संसारसागरू गा भवदुःखाचें मूळ । जनवाद अंथरुण माजी केले इंगळ ।
इंद्रियें वज्रघातें तपे उष्ण वरी जाळ । सोसिलें काय करूं दुर्भर हे चांडाळ ।।३।।
तिहीं लोकीं तुझें नाम वृक्ष पल्लव शाखा । वेंघलों वरि खोडा भाव धरूनि टेंका ।
जाणवी नरनारी जागो धरम लोकां । पावती पुण्यवंत सोई आमुचिये हाका ।।४।।
नाठवे आपपर आतां काय बा करूं । सारिखा सोइसवा हारपला विचारू ।

घातला योगक्षेम तुज आपुला भारू । तुकया शरणागता देईं अभयकरू ।।५।।

वासुदेव - अभंग ६

४२९

मनु राजा एक देहपुरी । असे नांदतु त्यासि दोघी नारी।
पुत्र पौत्र संपन्न भारी । तेणें कृपा केली आम्हांवरी गा ।।१।।
म्हणउनि आलों या देशा । होतों नाहीं तरी भुललों दिशा ।
दाता तो मज भेटला इच्छा । येउनि मारग दाविला सरिसा गा।।धृ।।
सवें घेउनि चौघेजण । आला कुमर सुलक्षण ।
कडे चुकवुनि कांटवण। ऐका आणिली तीं कोण कोण गा ।।२।।
पुढें भक्तीनें धरिलें हातीं। मागें ज्ञान वैराग्य धर्म येती ।
स्थिर केलीं जीं आचपळें होतीं । सिद्ध आणुनि लाविलीं पंथीं गा ।।३।।
केले उपकार सांगों काय । बाप न करी ऐसी माय ।
धर्में त्याच्या देखियेले पाय । दिलें अखय भय वारुनि दान गा ।।४।।
होतों पीडत हिंडतां गांव । पोट भरेना राहावया ठाव ।
तो येणें अवघा संदेह । म्हणे फेडियेला तुकयाचा बंधव गा ।।५।।

४३०

गातों वासुदेव मीं ऐका । चित्त ठेवुनि ठायीं भावें एका।
डोळे झाकुनि रात्र करूं नका । काळ करीत बैसला लेखा गा ।।१।।
राम राम स्मरा आधीं । लाहो करा गांठ घाला मूळबंदीं ।
सांडावा उगिया उपाधी । लक्ष लावुनि राहा गोविंदीं गा ।।धृ।।
ऐसा अल्प मानवी देह । शत गणिलें अर्ध रात्र खाय ।
पुढें बालत्व पीडा रोग क्षय । काय भजनासि उरलें तें पाहें गा ।।२।।
क्षणभंगुर नाहीं भरवसा। व्हा रे सावध सोडा माया आशा ।
न चळे बळ पडेल मग फासा । पुढें हुशार थोर आहे वोळसा गा ।।३।।
कांहीं थोडें बहुत लागपाठ । करा भक्ति भाव धरा बळकट ।
तन मन ध्यान लावुनियां नीट । जर असेल करणें गोड शेवट गा ।।४।।
विनवितों सकळां जनां । कर जोडुनि थोरां लाहनां ।
दान इतुलें द्या मज दीना । म्हणे तुकयाबंधु राम म्हणा गा ।।५।।

४३१

गेले टळले पाहार तीन । काय निदसुरा अझून ।

जागे होउनि करा कांहीं दान । नका ऐकोनि झाकों लोचन गा ।।१।।

हरी राम कृष्ण वासुदेवा । जाणवितसें जना ।

चिपळ्या टाळ हातीं मुखीं घोष । नारायणा गा ।।धृ।।

जें टाकेल कोणा कांहीं । फळ पुष्प अथवा तोय ।

द्या परी मीस घेऊं नका भाई । पुढें विन्मुख होतां बरें नाहीं गा ।।२।।

देवाकारणें भाव तस्मात । द्यावें न लगे फारसें वित्त।

जालें एक चित्त तरी बहुत । तेवढ्यासाठीं नका करूं वाताहात गा ।।३।।

आलों येथवरी बहु सायासें । करितां दान हें चि मागावयास।

नका भार घेऊं करूं निरास । धर्म सारफळ संसारास गा ।।४।।

आतां मागुता येईल फेरा । हें तों घडे या नगरा ।

म्हणे तुकयाबंधु धरा । ओळखी नाहीं तरी जाल अघोरा गा ।।५।।

४३२

राम राम दोनी अक्षरें । सुलभ आणि सोपारें । जागा मागिले पाहारें । सेवटिचें गोड तें चि खरें गा ।।१।।

राम कृष्ण वासुदेवा । जाणवी जनासि । वाजवी चिपळिया । टाळ घागऱ्याघोषें गा ।।धृ।।

गाय वासुदेव वासुदेवा । भिन्न नाहीं आणिका नांवा । दान जाणोनियां करीं आवा । न ठेवीं उरीं कांहीं ठेवा गा ।।२।।

एक वेळा जाणविती । धरूनियां राहा चित्तीं । नेघें भार सांडीं कामा हातीं। नीज घेउनि फिरती गा ।।३।।

सुपात्रीं सर्व भाव । मी तों सर्व वासुदेव । जाणती कृपाळु संत महानुभाव । जया भिन्न भेद नाहीं ठाव गा ।।४।।

शूर दान जीवें उदार । नाहीं वासुदेवी विसर । कीर्ति वाढे चराचर । तुका म्हणे तया नमस्कार गा ।।५।।

४३३

बोल बोले अबोलणे । जागें बाहेर आंत निजेलें । कैसें घरांत घरकुल केलें । नेणों आंधार ना उजेडलें गा ।।१।।

वासुदेव करितों फेरा । वाडियांत बाहेर दारा । कोणी कांहीं तरी दान करा । जाब नेदा तरी जातों सामोरा गा ।।धृ।।

हातीं टाळ दिंडी मुखीं गाणें। गजर होतो बहु मोट्यानें । नाहीं निवडिलीं थोरलाहानें । नका निजों भिकेच्या भेणें गा ।।२।।
मी वासुदेव तत्वता । कळों येईल विचारितां। आहे ठाउका सभाग्या संतां । नाहीं दुजा आणीक मागता गा ।।३।।
काय जागाचि निजलासी । सुनें जागोन दारापासीं तुझ्या हितापाठीं करी व्यास व्यासी । भेटी न घेसी वासुदेवासी गा ।।४।।
ऐसें जागविलें अवघें जन । होतें संचित तींहीं केलें दान । तुका म्हणे दुबळीं कोणकोण । गेलीं वासुदेवा विसरून गा ।।५।।

४३४
रामकृष्ण गीती गात । टाळ चिपळ्या वाजवीत । छंदें आपुलिया नाचत । नीज घेऊनि फिरत गा ।।१।।
जनीं वनीं हा अवघा देव । वासनेचा हा पुसावा ठाव । मग वोळगती वासुदेव । ऐसा मनीं वसूं द्यावा भाव गा ।।धृ।।
निज दासाची थोर आवडी । वासुदेवासि लागली गोडी । मुखीं नाम उच्चारी घडोघडीं । ऐसी करा हे वासुदेवजोडी गा ।।२।।
अवघा सारूनि सेवट जाला । प्रयत्न न चले कांहीं केला । जागा होईं सांडुनि झोपेला । दान देईं वासुदेवालागा ।।३।।
तुका म्हणे रे धन्य त्याचें जिणें । जींहीं घातलें वासुदेवा दान। त्याला न लगे येणें जाणें । जालें वासुदेवीं राहणे गा ।।४।। ।।६।।

गांवगुंड - अभंग १
४३५
आम्ही जालों गांवगुंड । अवघ्या पुंड भूतांसी ।।१।।
दुसरें तें खेळों आलें । एका बोले तो मियां ।।धृ।।
अवघियांचा येऊं लाग । नेदूं अंग शिवाया ।।२।।
तुका म्हणे खुंटूं नाद । जिंतूं वाद सर्तीनें ।।३।।
।।१।।

जोगी - अभंग १
४३६
जग जोगी जग जोगी । जागजागे बोलती ।।१।।
जागता जगदेव । राखा कांहीं भाव ।।धृ।।

अवघा क्षेत्रपाळ । पूजा सकळ ।।२।।
पूजापात्र कांहीं । फल पुष्प तोय ।।३।।
बहुतां दिसां फेरा । आला या नगरा ।।४।।
नका घेऊं भार । धर्म तो चि सार ।।५।।
तुका मागे दान । द्या जी अनन्य ।।६।।
।।१।।

सरवदा - अभंग १
४३७
एका गा ए भाई । सरवदा सांगतो काई । येथें नाडेल माई । दोघां पुत्रांची ।
ते करिती तिची विटंबना । अवघ्या प्रसिद्ध जना । एक न मारितां शाहाणा । तो जाणा सुख न पवे ।।१।।
आणीक ऐका गा ए । सरवदा सांगतो काय । खरें चि बोले तो जाय। नरकामध्यें अधोगती ।
हें चौघांच्या मुखें । मना आणावें सुखें। अवघीं चुकती दुःखें । खोटें बोला नरनारी ।।धृ।।
आणीक नाडेल एक जाण । सरवदा बोलतो वचन । जागें माझें म्हणोन । पडिलें खान तया घरीं ।
म्हणोन न म्हणा माझें कांहीं । निजीं निजा सुखें ठायीं । यत्न होईल तईं । चोराठायीं विश्वास ।।२।।
आणीक एकी परी । सरवदा सांगतो थोरी । दुःख पावेल नारी । पतिव्रता यामधीं ।
पांचांनीं दिधली हातीं । म्हणोनि न मनावी निश्चिती । परपुरुषीं होय रती । सुखगती ते पावे ।।३।।
एकी परी । सरवदा सांगतो तें करीं । दान देतां जो न वारी । नव्हे भला भला तो तुका म्हणे आई ।
येथें नांव काई । सांगसी तें ठायीं । मरो रांडेचें ।।४।।
।।१।।

मुंढा - अभंग ३
४३८
संबाल यारा उपर तलें दोन्हो मारकी चोट । नजर करे सो ही राखे पश्वा

जावे लुट ।।१।।
प्यार खुदाई रे बाबा जिकिर खुदाई ।।धृ।।
उडे कुदे ढुंग नचावे आगल भुलन प्यार । लडबड खडबड कांहेकां खचलावत भार ।।२।।
कहे तुका चलो एका हम जिन्होंके सात । मिलावे तो उसे देना तो ही चढावे हात ।।३।।

४३९
सब संबाल भ्याने लौंढे खडा केऊं गुंग । मदिरथी मता हुवा भुलि पाडी भंग ।।१।।
आपसकुं संबाल आपसकुं संबाल । मुंढे खुब राख ताल । मुथिवोहि बोला नहीं तो करूँगा हाल ।।धृ।।
आवलका तो पीछें नहीं मुदल बिसर जाय । फिरते नहीं लाज रंडी गधे गोते खाय ।।२।।
जिन्हो खातिर इतना होता सो नहीं तुझे बेफाम । उचा जोरो लिया तुंबा तुंबा बुरा काम ।।३।।
निकल जावे चिकल जोरो मुंढे दिलदारी । जबानीकी छोड दे बात फिर एक तारी ।।४।।
कहे तुका फिसल रुका मेरेको दान देख । पकड धका गांडगुडघी मार चलाऊं आलेख ।।५।।

४४०
आवल नाम आल्ला बडा लेते भुल न जाये । इलाम त्याकालजमुपरताहाी तुंब बजाये ।।१।।
आल्ला एक तुं नबी एक तुं ।।धृ।।
काटतें सिर पावों हात नहीं जीव उराये । आगले देखे पिछले बुझे । आपें हजुर आयें ।।२।।
सब सबरी नचाव म्याने । खडा आपनी सात । हात पावों रखते जबाब । नहीं आगली बात ।।३।।
सुनो भाई बजार नहीं । सब हि निरचे लाव । नन्हा बडा नहीं कोये एक ठोर मिलाव ।।४।।
एक तार नहीं प्यार । जीवतनकी आस । कहे तुका सो हि मुंढा । राखलिये पायेनपास ।।५।। ।।३।।

डोई फोडा - अभंग १

४४१

तम भज्याय ते बुरा जिकीर ते करे । सीर काटे ऊर कुटे ताहां सब डरे ।।१।।

ताहां एक तु ही ताहां एक तु ही । ताहां एक तु ही रे बाबा हमें तुम्हें नहीं ।।धृ।।

दिदार देखो भुले नहीं किशे पछाने कोये । सचा नहीं पकडुं सके झुटा झुटे रोये ।।२।।

किसे कहे मेरा किन्हे सात लिया भास । नहीं मेलो मिले जीवना झुटा किया नास ।।३।।

सुनो भाई कैसा तो ही । होय तैसा होय । बाट खाना आल्ला कहना एकबारां तो ही ।।४।।

भला लिया भेक मुंढे । आपना नफा देख । कहे तुका सो ही संका । हाक आल्ला एक ।।५।। ।।१।।

मलंग - अभंग १

४४२

नजर करे सो ही जिंके बाबा दुरथी तमासा देख । लकडी फांसा लेकर बैठा आगले ठकण भेख ।।१।।

काहे भुला एक देखत आंखो मार तडांगो बाजार ।।धृ।।

दमरी चमरी जो नर भुला। सोत आघो हि लत खाये ।।२।।

नहि बुलावत किसे बाबा आप हि मत जाये । कहे तुका उस असाके संग फिरफिर गोदे खाये ।।३।। ।।१।।

दरवेस -अभंग १

४४३

अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज । गाउ बछरे तिस चलावे यारी बाघो न सात ।।१।।

ख्याल मेरा साहेबका। बाबा हुवा करतार । व्हांटें आघे चढे पीठ । आपे हुवा असुवार ।।२।।

जिकिर करो अल्लाकी बाबा सबल्यां अंदर भेस । कहे तुका जो नर बुझे सो हि भया दरवेस ।।३।।।।१।।

वैद्यगोळी - अभंग १

४४४

अल्ला देवे अल्ला दिलावे अल्ला दारु अल्ला खलावे। अल्ला बगर नही कोये अल्ला करे सो हि होये ।।१।।

मर्द होये वो खडा फीर नामर्दकुं नहीं धीर । आपने दिलकुं करना खुसी तीन दामकी क्या खुमासी ।।धृ।।

सब रसोंका किया मार । भजनगोली एक हि सार । इमान तो सब ही सखा । थोडी तो भी लेकर ज्या ।।२।।

जिन्हो पास नीत सोये । वो हि बसकर तिरोवे । सांतो पांचो मार चलावे । उतार सो पीछे खावे ।।३।।

सब ज्वानी निकल जावे। पीछे गधडा मटी खावे । गांवढाळ सो क्या लेवे । हगवनि भरी नहि धोवे ।।४।।

मेरी दारु जिन्हें खाया । दिदार दरगां सो हि पाया । तल्हे मुंढी घाल जावे । बिगारी सोवे क्या लेवे ।।५।।

बजारका बुझे भाव। वो हि पुसता आवे ठाव । फुकट बाटु कहे तुका । लेवे सोहि लें हिसखा ।।६।। ।।१।।

गोंधळ - अभंग ३

४४५

राजस सुंदर बाळा । पाहों आलिया सकळा वो । बिबीं बिंबोनि ठेली
माझी परब्रम्ह वेल्हाळा वो । कोटि रविशशि माझी। परब्रम्ह वेल्हाळा वो
।।१।।

राजस विठाबाई । माझें ध्यान तुझे पायीं वो । त्यजुनियां चौघींसी । लावी आपुलिये सोई वो ।।धृ।।

सकुमार साजिरी । कैसीं पाउलें गोजिरीं वो । कंठीं तुळसीमाळा
उभी भीवरेच्या तिरीं वो । दंत हिरया ज्योति । शंखचक्र मिरवे करीं वो
।।२।।

निर्गुण निराकार । वेदां न कळे चि आकार वो । शेषादिक श्रमले
श्रुती न कळे तुझा पार वो । उभारोनि बाहे । भक्तां देत अभयकर वो
।।३।।

येउनि पंढरपुरा । अवतरली सारंगधरा वो । देखोनि भक्ति भाव
वोरसली अमृतधारा वो । देउनि प्रेमपान्हा । तुकया स्वामीनें किंकरा वो

।।४।।

४४६
 सुदिन सुवेळ । तुझा गोंधळ वो । पंच प्राण दिवटे । दोनी नेत्रांचे हिलाल वो ।।१।।
पंढरपुरनिवासे । तुझे रंगी नाचत असें वो । नवस पुरवीं माझा । मनिंची जाणोनियां इच्छा वो ।।धृ।।
मांडिला देव्हारा । तुझा त्रिभुवनामाझारी वो । चौक साधियेला । नाभिकळस ठेविला वरी वो ।।२।।
बैसली देवता । पुढें वैष्णवाचें गाणें वो । उद्‍गारे गर्जती । कंठीं तुळसीचीं दर्शनें वो ।।३।।
स्वानंदाचे ताटीं । धूप दीप पंचारती वो । ओवाळिली माता । विठाबाई पंचभूतीं वो ।।४।।
तुझें तुज पावलें । माझा नवस पुरवीं आतां वो । तुका म्हणे राखें । आपुलिया शरणागता वो ।।५।।

४४७
 सुंदर मुख साजिरें । कुंडलें मनोहर गोमटीं वो । नागर नाग खोपा । केशर कस्तुरी मळवटीं वो ।
 विशाळ व्यंकट नेत्र । वैजयंती तळपे कंठीं वो । कास पीतांबराची । चंदन सुगंध साजे उटी वो ।।१।।
अतिबरवंटा बाळा । आली सुलक्षणीं गोंधळा वो । राजस तेजोराशी। मिरवी शिरोमणी वेल्हाळा वो ।
 कोटि रविशशिप्रभा लोपल्या सकळा वो । न कळे ब्रम्हादिकां । अनुपम्य इची लीळा वो ।।धृ।।
सावळी सकुमार । गोरी भुजा शोभती चारी वो । सखोल वक्षस्थळ । सुढाळ पदक झळके वरी वो ।
 कटीं क्षुद्र घंटिका । शब्द करिताती माधुरी वो । गर्जत चरणीं वाकी । अभिनव संगीत नृत्य करी वो ।।२।।
अष्टांगें मंडित काय । वर्णावी रूपठेवणी वो । शोधिव सुंदर रसाची ओतिली। सुगंध लावण्यखाणी वो ।
 सर्वकळासंपन्न । मंजुळ बोले हास्यवदनीं वो । बहु रूपें नटली । आदिशक्ति नारायणी वो ।।३।।

घटस्थापना केली । पंढरपुरमहानगरीं वो । अस्मानी मंडप दिला । तिन्ही ताळांवरी वो ।
आरंभिला गोंधळ इनें । चंद्रभागेतिरीं वो । आली भक्तिकाजा। कृष्णाबाई योगेश्वरी वो ।।४।।
तेहतिस कोटि देव । चौंडा अष्ट कोटि भैरव वो । आरत्या कुरवंड्या । करिती पुष्पांचा वरुषाव वो ।
नारद तुंबर गायन । ब्रम्हानंद करिती गंधर्व वो। वंदी चरणरज तेथें । तुकयाचा बंधव वो ।।५।।

४४८

शंख करिशी ज्याच्या नांवें । त्याचें तुज नाहीं ठावें ।
ऐक सांगतों एका भावें । सांपडे घरीं तें जीवउनि खावें । रे विठ्ठल ।।१।।
टिळे माळा करंडी सोंग । धरुनि चाळविलें जग ।
पसरी हात नाहीं त्याग । दावी दगड पुजी भग । रे विठ्ठल ।।२।।
राख लावुनि अंग मळी । वाये ठोके मी एक बळी ।
वासने हातीं बांधवी नळी। त्यासि येउनि गिळी । रे विठ्ठल ।।३।।
कोण तें राहडीचें सुख । वरते पाय हारतें मुख ।
करवी पीडा भोगवी दुःख । पडे नरकीं परी न पळे चि मूर्ख । रे विठ्ठल ।।४।।
सिकला फाक मारी हाका । रांडा पोरें मेळवी लोकां ।
विटंबी शरीर मागे रुका । केलें तें गेलें अवघें चि फुका । रे विठ्ठल ।।५।।
कळावें जनां मी एक बळी । उभा राहोनि मांडी फळी ।
फोडोनि गुडघे कोंपर चोळी । आपला घात करोनि आपण चि तळमळे । रे विठ्ठल ।।६।।
फुकट खेळें ठकलीं वांयां । धरुनि सोंग बोडक्या डोया ।
शिवों नये ती अंतरीं माया । संपादणीविण विटंबिली काया । रे विठ्ठल ।।७।।
धुळी माती कांहीं खेळों च नका। जवादी चंदन घ्यावा बुका ।
आपणा परिमळ आणिकां लोकां । मोलाची महिमा फजिती फुका । रे विठ्ठल ।।८।।
बहुत दुःखी जालियां खेळें । अंगीं बुद्धि नाहींत बळें ।
पाठीवरी तोबा तोंड काळें । रसना द्रवे उपस्थाच्या मुळें । रे विठ्ठल ।।९।।
काय सांगतो तें ऐका तुका। मोडा खेळ कांहीं अवगों च नका ।

चला जेवूं आधीं पोटीं लागल्या भुका । धाल्यावरी बरा टाकमटिका। रे विठ्ठल ।।१०।।

४४९

ऐक बाई तुज वो कांहीं सांगतें शकुन । निजलिया भुर होसी जागें म्हणउन ।।१।।
मान्य माझें केलें सांगतें एका बोलें । न येतां हे भलें कळों कोणा लोकांसि ।।धृ।।
सांगतें गुण जीवीची खुण ऐक माझी मात । बैस एका भावें माझे हातीं दे वो हात ।।२।।
बरवा घरचार तुज सांपडला ठाव । फळ नाहीं पोटीं येथें दिसे खोटा भाव ।।३।।
आहे तुझे हातीं एका नवसाचें फळ । भावा करीं साह्य चहूं अठरांच्या बळें ।।४।।
करीं लागपाठ चित्त वित्त नको पाहों । अखई तो चुडा तुज भोगईल ना हो ।।५।।
कुळींची हे मुळी तुझे लागलीसे देवी । पडिला विसर नेदी फळ नाहीं ठावी ।।६।।
तुका म्हणे नांद सुखें धरीं आठवण । माझ्या येती कोणी त्यांचा राख बरा मान ।।७।।

कावडे - अभंग ५

४५०

आहा रे भाई । प्रथम नमूं तो विनायक ।
ठेवुनि गुरुचरणीं मस्तक । वदेल प्रसादिक वाणी । हरिहरांचे पवाडे ।।१।।
माझी ऐसी ब्रीदावळी । दासें दासत्वें आगळी ।
पान्हेरीनें मार्ग मळी। जीवन घ्या रे कापडि हो ।।२।।
जें या सीतळाहुनि सीतळ। पातळाहुनि जें पातळ ।
प्रेमामृत रसाळ । तें हें सेवा अहो भाग्याचे ।।३।।
जिंकाल तरी जिंका रे अभिमान । दवडाल तरी दवडा लज्जा आणि मान ।
धराल ते धरा शंभूचे चरण । दावाल पण ऐसा दावा तो ।।४।।
काळा घेऊं नेदीं वाव । आला तो राखें घावडाव ।
शुद्ध सत्वीं राखोनि भाव । म्हणा महादेव हरिहर वाणी गर्जों द्या ।।५।।

पराविया नारी माउली समान । परधनीं बाटों नेदीं मन ।
जीवित्व तें तृणासमान । स्वामिकाजीं जाण शूर म्हणों तया ।।६।।
शक्ति वेचाविया परउपकारा । खोटें खोट्याचा पसारा ।
सत्य तें भवनदीचा तारा । आळस तो न करा येथे अहो सांगतों ।।७।।
व्रत करा एकादशी सोमवार । कथा पूजन हरिजागर ।
पुण्य तें असे गातां नाचतां बहु फार । पुन्हा बोलिला संसार नाहीं नाहीं सत्यत्वें ।।८।।
संग संतांचा करितां बरवा । उत्तमोत्तम कीर्तीचा ठेवा ।
पंथ तो सुपंथें चालावा । उगवा वासना लिगाड ।।९।।
तुका चालवितो कावडी । प्रवृत्ति निवृत्ति चोखडी ।
पुढती पुढती अधिक गोडी । भरुनि कळस भजन आवडी केशवदास नटतसे ।।१०।।

४५१
आहा आहा रे भाई । हें अन्नदानाचें सत्र ।
पव्हे घातली सर्वत्र । पंथीं अवघे पंथ मात्र । इच्छाभोजनाचें आर्त पुरवावया ।।१।।
यावें तेणें घ्यावें । न सरेसें केलें सदाशिवें ।
पात्र शुद्ध पाहिजे बरवें । मंगळभावें सकळ हरि म्हणा रे ।।२।।
नव्हे हें कांहीं मोकळें। साक्षी चौघांचिया वेगळें ।
नेदी नाचों मताचिया बळें । अणु अणोरणीया आगळें । महदि महदा साक्षित्वें हरि म्हणा रे ।।३।।
हे हरि नामाची आंबिली । जगा पोटभरी केली ।
विश्रांति कल्पतरूची साउली । सकळां वर्णां सेवितां भली । म्हणा हर हर महादेव ।।४।।
तुका हरिदास तराळ । अवघे हाकारी सकळ ।
या रे वंदूं शिखरातळ । चैत्रमास पर्वकाळ महादेवदर्शनें ।।५।।

४५२
आहा रे भाई । नमो उदासीन जाले देहभावा । आळविती देवा तया नमो ।।१।।
नमो तीर्थपंथें चालती तयांसी । येती त्यांसी बोळविती त्यां नमो ।।२।।
नमो तयां संतवचनीं विश्वास । नमो भावें दास्य गुरुचें त्यां ।।३।।

नमो तया मातापित्यांचें पाळण । नमो त्या वचन सत्य वदे ।।४।।
नमो तया जाणे आणिकाचें सुखदुःख । राखे तान भुक तया नमो ।।५।।
परोपकारी नमो पुण्यवंता । नमो त्या दमित्या इंद्रियांसि ।।६।।
तुका म्हणे नमो हरिचिया दासा । तेथें सर्व इच्छा पुरलीसे ।।७।।

४५३
आहा रे भाई । तयावरी माझी ब्रीदावळी । भ्रष्ट ये कळी क्रियाहीन ।।१।।
थुंका थुंका रे त्याच्या तोंडावरी । वाणिली ते थोरी दवडा वांयां बाहेरी ।।धृ।।
बाइलेचा दास पित्रांस उदास । भीक भिकाऱ्यास नये दारा ।।२।।
विद्याबळें वाद सांगोनियां छळी । आणिकांसि फळी मांडोनियां ।।३।।
गांविंचिया देवा नाहीं दंडवत । ब्राम्हण अतीत घडे चि ना ।।४।।
सदा सर्वकाळ करितो चि निंदा । स्वप्नीं ही गोविंदा आठवीना ।।५।।
खासेमध्यें धन पोटासि बंधन । नेणें ऐसा दानधर्म कांहीं ।।६।।
तुका म्हणे नटे दावुनियां सोंग । लवों नेदी अंग भक्तिभावें ।।७।।

४५४
आहा रे भाई । गंगा नव्हे जळ । वृक्ष नव्हे वड पिंपळ। तुळसी रुद्राक्ष नव्हे माळ । श्रेष्ठ तनु देवाचिया ।।१।।
समुद्र नदी नव्हे पैं गा । पाषाण म्हणों नये लिंगा । संत नव्हती जगा। मानसा त्या सारिखे ।।२।।
काठी म्हणों नये वेतु । अन्न म्हणों नये सांतु । राम राम हे मातु । नये म्हणों शब्द हे ।।३।।
चंद्र सूर्य नव्हती तारांगणें । मेरु तो नव्हे पर्वता समान । शेष वासुकी नव्हे सर्प जाण । विखाराच्या सारिखे ।।४।।
गरुड नव्हे पाखरूं । ढोर नव्हे नंदिकेश्वरू । झाड नव्हे कल्पतरू । कामधेनु गाय न म्हणावी ।।५।।
कूर्म नव्हे कासव । डुकर नव्हे वराह । ब्रम्हा नव्हे जीव । स्त्री नव्हे लक्ष्मी ।।६।।
गवाक्ष नव्हे हाड । पाटाव नव्हे कापड । परीस नव्हे दगड । सगुण ते ईश्वरीचे ।।७।।
सोनें नव्हे धातु । मीठ नव्हे रेतु । नाहीं नाहीं चर्मांतु । कृष्णजिन व्याघ्रांबर ।।८।।
मुक्ताफळें नव्हेति गारा । खड्याऐसा नव्हे हिरा । जीव नव्हे सोइरा ।

बोळवीजे स्वइच्छेनें ।।९।।
गांव नव्हे द्वारावती । रणसोड नव्हे मूर्ति । तीर्थ नव्हे गोमती । मोक्ष घडे दर्शनें ।।१०।।
कृष्ण नव्हे भोगी । शंकर नव्हे जोगी । तुका पांडुरंगीं । हा प्रसाद लाधला ।।११।।
।।५।।

सौऱ्या - अभंग ११
४५५
वेसन गेलें निष्काम जालें नर नव्हे नारी । आपल्या तुटी पारख्या भेटी सौरियांचे फेरी ।।१।।
त्याचा वेध लागला छंद हरि गोविंद वेळोवेळां । आपुलेमागें हासत रागें सावलें घालिती गळां ।।धृ।।
जन वेषा भीतें तोंडा आमुच्या भांडपणा । कर कटीं भीमा तटीं पंढरीचा राणा ।।२।।
वेगळ्या याति पडिलों खंतीं अवघ्या एका भावें। टाकियेली चाड देहभाव जीवें शिवें ।।३।।
सकळांमधीं आगळी बुद्धि तिची करूं सेवा । वाय तुंबामूढासवें भक्ती नाचों भावा ।।४।।
म्हणे तुका टाक रुका नाचों निर्लज्जा । बहु जालें सुख काम चुकलों या काजा ।।५।।

४५६
आणिकां उपदेशूं नेणें नाचों आपण । मुंढा वांयां मारगेली वांयां हांसे जन ।।१।।
तैसा नव्हे चाळा आवरीं मन डोळा। पुढिलांच्या कळा कवतुक जाणोनी ।।धृ।।
बाहिरल्या वेषें आंत जसें तसें । झाकलें तों बरें पोट भरे तेणें मिसें ।।२।।
तुका म्हणे केला तरी करीं शुद्ध भाव । नाहीं तरी जासी वांयां हा ना तोसा ठाव ।।३।।

४५७

टाक रुका चाल रांडे कां गे केली गोवी । पुसोनियां आलें ठाव म्हणोनि देतें सिवी ।।१।।
आतां येणें छंदें नाचों विनोदें। नाहीं या गोविंदें माझें मजसी केलें ।।धृ।।
कोरडे ते बोल कांगे वेचितेसी वांयां । वर्ते करूनि दावीं तुझ्या मुळींचिया ठाया ।।२।।
याजसाठीं म्या डौर धरियेला हातीं । तुका म्हणे तुम्हा गांठी सोडायाची खंती ।।३।।

४५८
मोकळी गुंते रिती कुंथे नाहीं भार दावें । धेडवाडा बैसली खोडा घेतली आपुल्या भावें ।।१।।
ऐका बाई लाज नाहीं आणिकां त्या गरतीची । समाधानीं उंच स्थानीं जाणे सेवा पतीची ।।धृ।।
न बोलतां करी चिंता न मारिता पळे । दादला सेज नावडे निजे जगझोडीचे चाळे ।।२।।
देखत आंध बहिर कानीं बोल बोलतां मुकें । तुका म्हणे पतन सोयरीं ऐसीं जालीं एकें ।।३।।

४५९
सातें चला काजळ घाला तेल फणी करा । दिवाणदारीं बैसले पारीं नाचों फेर धरा ।।१।।
या साहेबाचें जालें देणें वेळोवेळां न लगे येणें । आतां हाटीं काशासाठीं हिंडों पाटी दुकानें ।।धृ।।
अवघ्या जणी मुंढा धणी नाचों एकें घाईं । सरसावलें सुख कैसा चाळा एके ठायीं ।।२।।
तुका म्हणे वोळगों एका तोड चिंता माया। देऊं उद्गार आतां जाऊं मुळीचिया ठाया ।।३।।

४६०
सौरी सुर जालें दुर डौर घेतला हातीं । माया मोह सांडवलें तीही लोकीं जालें सरती ।।१।।
चाल विठाबाई अवघी पांज देईं । न धरीं गुज कांहीं वाळवंटीं सांपडतां ।।धृ।।

हिंडोनि चौऱ्यांशी घरें आलें तुझ्या दारा । एक्या रुक्यासाठीं आंचवलें संसारा ।।२।।
लाज मेली शंका गेली नाचों महाद्वारीं । भ्रांति सावलें फिटोनि गेलें आतां कैची उरी ।।३।।
जालें भांडी जगा सांडी नाहीं भीड चाड । घालीन चरणीं मिठी पुरविन जीविंचें तें कोड ।।४।।
तुका म्हणे रुका करी संसारतुटी । आतां तुम्हां आम्हां कैसी जाली जीवे साटीं ।।५।।

४६१
सम सपाट वेसनकाट निःसंग जालें सौरी । कुडपीयेला देश आतां येऊं नेदीं दुसरी ।।१।।
गाऊं रघुरामा हें चि उरलें आम्हां। नाहीं जीवतमा वित्तगोतासहीत ।।धृ।।
ठाव जाला रिता झाकुनि काय आतां । कोणासवें लाज कोण दुजा पाहता ।।२।।
सौरीयांचा संग आम्हां दुरावलें जग । भिन्न जालें सुख भाव पालटला रंग ।।३।।
लाज भय झणी नाहीं तजियेलीं दोन्ही । फिराविला वेष नव्हों कोणाचीं च कोणी ।।४।।
तुका म्हणे हा आम्हां वेष दिला जेणें। जनाप्रचित सवें असों एकपणें ।।५।।

४६२
नव्हे नरनारी संवसारीं अंतरलों निर्लज्ज निष्काम जना वेगळे चि ठेलों ।।१।।
चाल रघुरामा न आपुल्या गांवा । तुजविण आम्हां कोण सोयरा सांगाती ।।धृ।।
जनवाद लोकनिंद्य पिशुनाचे चेरे। साहूं तुजसाठीं अंतरलीं सहोदरें ।।२।।
बहुता पाठीं निरोप हाटीं पाठविला तुज । तुका म्हणे आतां सांडुनि लौकिक लाज ।।३।।

४६३
नीट पाट करूनि थाट । दावीतसे तोरा । आपणाकडे पाहो कोणी । निघाली बाजारा ।।१।।

ते सौरी नव्हे निकी । भक्तीविण फिकी ।।धृ।।
चांग भांग करूनि सोंग । दावी माळा मुदी । रुक्याची आस धरूनि । हालवी ती फुदी ।।२।।
थोरे घरीं करी फेरी । तेथें नाचे बरी । जेथें निघे रुका । तेथें हालवी टिरी ।।३।।
आंत मांग बाहेर चांग । सौरी ती नव्हे तेग । तुका दास नटतसे । न करी त्याचा संग ।।४।।

४६४
चाल माझ्या राघो । डोंगरीं दिवा लागो ।।धृ।।
घर केलें दार केलें । घरीं नाहीं वरो । सेजारणी पापिणीचीं पांच पोरें मरो ।।१।।
घरीं पांच पोरें । तीं मजहुनि आहेत थोरें । पांचांच्या बळें । खादलीं बावन केळें ।।२।।
घर केलें दार केलें । दुकान केला मोटा। पाटाची राणी धांगडधिंगा तिचा मोटा ।।३।।
दुकान केला मोटा । तर पदरीं रुका खोटा । हिजडा म्हणसी जोगी । तर सोळा सहस्त्र भोगी । तुका म्हणे वेगीं । तर हरि म्हणा जगीं ।।४।।

४६५
जन्मा आलिया गेलिया परी । भक्ति नाहीं केली ।
माझें माझें म्हणोनियां । गुंतगुंतों मेलीं ।।१।।
येथें कांहीं नाहीं । लव गुरूच्या पायीं । चाल रांडें टाकी रुका ।
नकों करूं बोल । गुरुविण मार्ग नाहीं । करिसी तें फोल ।।२।।
खाउनी जेउनि लेउनि नेसुनि । म्हणती आम्ही बऱ्या । साधु संत घरा आल्या । होती पाठमोऱ्या ।।३।।
वाचोनि पढोनि जाले शाहणे । म्हणती आम्ही संत । परनारी देखोनि त्यांचें । चंचळ जालें चित्त ।।४।।
टिळा टोपी घालुनि माळा। म्हणती आम्ही साधु । दयाधर्म चित्तीं नाहीं । ते जाणावे भोंदु ।।५।।
कलियुगीं घरोघरीं । संत जाले फार । वीतिभरी पोटासाठीं । हिंडती दारोदार ।।६।।
संत म्हणती केली निंदा । निंदा नव्हे भाई । तुका असे अनन्यें भावें शरण

संतां पायीं ।।७।। ।।११।।

वाघा - अभंग १

४६६

अनंत जुगाचा देव्हारा । निजबोधांचा घुमारा । अवचिता भरला वारा । या मल्लारी देवाचा ।।१।।

शुद्धसत्त्वाचा कवडा मोठा। बोधबिरडें बांधला गांठा । गळां वैराग्याचा पट्टा । वाटा दावूं या भक्तीच्या ।।२।।

हृदय कोटंबा सांगातें । घोळ वाजवूं अनुहातें। ज्ञानभांडाराचें पोतें । रितें नव्हे कल्पांतीं ।।३।।

लक्ष चौऱ्यांशी घरें चारी । या जन्माची केली वारी । प्रसन्न जाला देव मल्लारी । सोहंभावीं राहिलों ।।४।।

या देवाचें भरतां वारें । अंगीं प्रेमाचें फेंपरें। गुरुगुरु करी वेडे चारें । पाहा तुकें भुंकविलें ।।५।। ।।१।।

ळळित - अभंग ११

४६७

आजी दिवस जाला । धन्य सोनियाचा भला ।।१।।

जालें संताचे पंगती । बरवें भोजन निगुती ।।धृ।।

रामकृष्णनामें । बरवीं मोहियेलीं प्रेमें ।।२।।

तुका म्हणे आला । चवी रसाळ हा काला ।।३।।

४६८

तुम्ही तरी सांगा कांहीं । आम्हांविशीं रखुमाबाई ।।१।।

कांहीं उरलें तें ठायीं । वेगीं पाठवुनी देईं ।।धृ।।

टोकत बैसलों देखा। इच्छीतसें ग्रासा एका ।।२।।

प्रेम देउनि बहुडा जाला । तुका म्हणे विठ्ठल बोला ।।३।।

४६९

वाट पाहें बाहे निडळीं ठेवुनियां हात । पंढरीचे वाटे दृष्टि लागलें चित्त ।।१।।

कईं येतां देखें माझा मायबाप । घटिका बोटें दिवस लेखीं धरूनियां माप ।।धृ।।

डावा डोळा लवे उजवी स्फुरते बाहे । मन उताविळ भाव सांडुनियां देहे ।।२।।
सुखसेजे गोडचित्तीं न लगे आणीक । नाठवे घर दार तान पळाली भूक ।।३।।
तुका म्हणे धन्य दिवस ऐसा तो कोण । पंढरीचे वाटे येतां मूळ देखेन ।।४।।

४७०
तुझें दास्य करूं आणिका मागों खावया । धिग् जालें जिणें माझें पंढरीराया ।।१।।
काय गा विठोबा तुज म्हणावें । थोराच्या दैवें गोड शुभअशुभ ।।धृ।।
संसाराचा धाक निरंतर आम्हांसी। मरण भलें परि काय अवकळा तैसी ।।२।।
तुझे शरणागत शरण जाऊं आणिकांसी । तुका म्हणे कवणा लाज हें कां नेणसी ।।३।।

४७१
पुरविली आळी । जे जे केली ते ते काळीं ।।१।।
माय तरी ऐसी सांगा । कृपाळुवा पांडुरंगा ।।धृ।।
घेतलें नुतरी उचलोनि कडियेवरी ।।२।।
तुका म्हणे घांस । मुखीं घाली ब्रम्हरस ।।३।।

४७२
कथेची सामुग्री । देह अवसानावरी ।।१।।
नको जाऊं देऊं भंगा । गात्रें माझीं पांडुरंगा ।।धृ।।
आयुष्य करीं उणें । परी मज आवडो कीर्तन ।।२।।
तुका म्हणे हाणी । या वेगळी मना नाणीं ।।३।।

४७३
गळित जाली काया । हें चि लळित पंढरिराया ।।१।।
आलें अवसानापासीं । रूप राहिलें मानसीं ।।धृ।।
वाइला कळस । तेथें स्थिरावला रस ।।२।।
तुका म्हणे गोड जालें । नारायणीं पोट धालें ।।३।।

४७४

रत्नजडित सिंहासन । वरी बैसले आपण ।।१।।
कुंचे ढळती दोहीं बाहीं । जवळी रखुमाई राही ।।धृ।।
नाना उपचारीं । सिद्धि वोळगती कामारी ।।२।।
हातीं घेऊनि पादुका । उभा बंदिजन तुका ।।३।।

४७५
हिरा शोभला कोंदणीं । जडित माणिकांची खाणी ।।१।।
तैसा दिसे नारायण । मुख सुखाचे मंडण ।।धृ।।
कोटि चंद्रलीळा । पूर्णिमेच्या पूर्णकळा ।।२।।
तुका म्हणे दृष्टि धाये । परतोनि माघारी ते न ये ।।३।।

४७६
पतित पतित । परी मी त्रिवाचा पतित ।।१।।
परी तूं आपुलिया सत्ता । मज करावें सरता ।।धृ।।
नाहीं चित्तशुद्धि । स्थिर पायांपाशीं बुद्धि ।।२।।
अपराधाचा केलों । तुका म्हणे किती बोलों ।।३।।

४७७
उभारिला हात । जगीं जाणविली मात ।।१।।
देव बैसले सिंहासनीं । आल्या याचका होय धनी ।।धृ।।
एकाच्या कैवाडें । उगवे बहुतांचें कोडें ।।२।।
दोहीं ठायीं तुका । नाहीं पडों देत चुका ।।३।।
।।११।।

आशीर्वाद - अभंग ५
४७८
जीवेंसाटीं यत्नभाव । त्याची नाव बळकट ।।१।।
पैल तीरा जातां कांहीं । संदेह नाहीं भवनदी ।।धृ।।
विश्वासाची धन्य जाती। तेथें वस्ती देवाची ।।२।।
तुका म्हणे भोळियांचा । देव साचा अंकित ।।३।।

४७९
आशीर्वाद तया जाती । आवडी चित्तीं देवाची ।।१।।

कल्याण ती असो क्षेम । वाढे प्रेम आगळें ।।धृ।।
भक्तिभाग्यगांठी धन। त्या नमन जीवासी ।।२।।
तुका म्हणे हरिचे दास । तेथें आस सकळ ।।३।।

४८०
तया साटीं वेचूं वाणी । अइकों कानीं वारता ।।१।।
क्षेम माझे हरिजन । समाधान पुसतां त्यां ।।धृ।।
परत्रींचे जे सांगाती। त्यांची याती न विचारीं ।।२।।
तुका म्हणे धैर्यवंतें । निर्मळचित्तें सरवीं तीं ।।३।।

४८१
अभय उत्तर संतीं केलें दान । जालें समाधान चित्त तेणें ।।१।।
आतां प्रेमरसें न घडे खंडण । द्यावें कृपादान नारायणा ।।धृ।।
आलें जें उचित देहविभागासी । तेणें पायांपासीं उभी असों ।।२।।
तुका म्हणे करी पूजन वैखरी । बोबडा उत्तरीं गातों गीत ।।३।।

४८२
असो मंत्रहीन क्रिया । नका चर्या विचारूं ।।१।।
सेवेमधीं जमा धरा । कृपा करा शेवटीं ।।धृ।।
विचारूनि ठाया ठाव। येथें भाव राहिला ।।२।।
आतां तुकयापाशीं हेवा । नाहीं देवा तांतडी ।।३।। ।।५।।

४८३
ऐकें वचन कमळापती । मज रंकाची विनंती ।।१।।
कर जोडितों कथाकाळीं । आपण असावें जवळी ।।धृ।।
घेईं ऐसी भाक। मागेन जरि कांहीं आणिक ।।२।।
तुकयाबंधु म्हणे देवा । शब्द इतुका राखावा ।।३।।

४८४
आली लळिताची वेळ । असा सावध सकळ ।।१।।
लाहो करा वेगीं स्मरा । टाळी वाउनि विश्वंभरा ।।धृ।।
जालिया अवसान । न संपडती चरण ।।२।।

तुकयाबंधु म्हणे थोडें । अवधि उरली आहे पुढें ।।३।।

४८५
नेणें गाऊं कांहीं धड बोलतां वचन । कायावाचामनेंसहित आलों शरण ।।१।।
करीं अंगीकार नको मोकलूं हरी । पतितपावन ब्रिदें करावीं खरीं ।।धृ।।
नेणें भक्तिभाव तुझा म्हणवितों दास । जरि देसी अंतर तरि लज्जा कोणास ।।२।।
म्हणे तुकयाबंधु तुझे धरियेले पाये । आतां कोण दुजा ऐसा आम्हांसी आहे ।।३।।

४८६
तूं च मायबाप बंधु सखा आमचा । वित्त गोत जीवलग जीवाचा ।।१।।
आणीक प्रमाण नाहीं दुसरें आतां । योगक्षेमभार तुझे घातला माथां ।।धृ।।
तूं च क्रियाकर्म धर्म देव तूं कुळ । तूं च तप तीर्थ व्रत गुरु सकळ ।।२।।
म्हणे तुकयाबंधु करिता कार्यता देवा । तूं च भाव भक्ति पूजा पुनस्कार आघवा ।।३।।

४८७
करुनि उचित । प्रेम घालीं ह्रदयांत ।।१।।
आलों दान मागायास । थोरी करूनियां आस ।।धृ।।
चिंतन समयीं । सेवा आपुली च देईं ।।२।।
तुकयाबंधु म्हणे भावा । मज निरवावें देवा ।।३।।

४८८
गाऊं वाऊं टाळी रंगीं नाचों उदास । सांडोनि भय लज्जा शंका आस निरास ।।१।।
बळियाचा बळी तो कैवारी आमुचा। भुक्तिमुक्तिदाता सकळां ही सिद्धींचा ।।धृ।।
मारूं शब्दशस्त्रबाण निःशंक अनिवार । कंटकाचा चुर शिर फोडूं काळाचें ।।२।।
म्हणे तुकयाबंधु नाहीं जीवाची चाड । आपुलिया तेथें काय आणिकांची भीड ।।३।।

४८९
 सांडूनि वैकुंठ । उभा विटेवरी नीट ।।१।।
आला आला रे जगजेठी । भक्ता पुंडलिकाचे भेटी ।।धृ।।
पैल चंद्रभागे तिरीं । कट धरूनियां करीं ।।२।।
तुकयाबंधु म्हणे अंबर । गजर होतो जयजयकार ।।३।।

४९०
 कृपाळु भक्तांचा । ऐसा पति गोपिकांचा ।।१।।
उभा न पाचारितां दारीं । न संगतां काम करी ।।धृ।।
भाव देखोनि निर्मळ। रजां वोडवी कपाळ ।।२।।
तुकयाबंधु म्हणे न भजा । कां रे ऐसा भोळा राजा ।।३।।

४९१
 केला अंगीकार पंढरीच्या देवें । आतां काय करिती काळ मशक मानवें ।।१।।
घातलीं बाहेर तीं भय होतें ज्यानें । बैसला आपण तेथें घालुनियां ठाणें ।।धृ।।
लागों नेदी वारा दुजियाचा अंगासी । हा पुरता निर्धार कळों आला आम्हांसी ।।२।।
म्हणे तुकयाबंधु न लगे करावी चिंता । कोणेविशीं आतां बैसलों हस्तीवरी माथां ।।३।।

४९२
 अगोचरी बोलिलों आज्ञेविण आगळें । परी तें आतां न संडावें राउळें ।।१।।
जाईल रोकडा बोल न पुसती आम्हां । तुझा तुझें म्हणविलें पाहा पुरुषोत्तमा ।।धृ।।
न व्हावा न वजावा न कळतां अन्याय । न धरावें तें मनीं भलता करा उपाय ।।२।।
म्हणे तुकयाबंधु हीन मी म्हणोनि लाजसी । वारा लागों पाहातोहे उंच्या झाडासी ।।३।।

४९३

जाली पाकसिद्धि वाट पाहे रखुमाई । उदक तापलें डेरां चीकसा मर्दुनि अई ।।१।।
उठा पांडुरंगा उशीर जाला भोजनीं। उभ्या आंचवणा गोपी कळस घेउनी ।।धृ।।
अवघ्या सावचित्त सेवेलागीं सकळा । उद्धव अक्रूर आले पाचारूं मुळा ।।२।।
सावरिली सेज सुमनयाति सुगंधा । रत्नदीप ताटीं वाळा विडिया विनोदा ।।३।।
तुका विनंती करी पाहे पंढरीराणा । असा सावचित्त सांगे सकळा जना ।।४।।

४९४
उठा सकळ जन उठिले नारायण । आनंदले मुनिजन तिन्ही लोक ।।१।।
करा जयजयकार वाद्यांचा गजर । मृदंग विणे अपार टाळ घोळ ।।धृ।।
जोडोनि दोन्ही कर मुख पाहा सादर । पायावरी शिर ठेवूनियां ।।२।।
तुका म्हणे काय पढियंतें तें मागा । आपुलालें सांगा सुख दुःखें ।।३।।

४९५
करूनी विनवणी पायीं ठेवीं माथा । परिसावी विनवणी माझी पंढरीनाथा ।।१।।
अखंडित असावेंसें वाटतें पायीं । साहोनि संकोच ठाव थोडासा देईं ।।धृ।।
असो नमो भाव आलों तुझिया ठाया। पाहें कृपादृष्टी मज पंढरीराया ।।२।।
तुका म्हणे आम्हीं तुझीं वेडीं वांकडीं । नामें भवपाश हातें आपुल्या तोडीं ।।३।।

४९६
घडिया घालुनि तळीं चालती वनमाळी । उमटती कोमळीं कुंकुमाचीं ।।१।।
वंदा चरणरज अवघे सकळ जन । तारियेले पाषाण उदकीं जेणें ।।धृ।।
पैस धरुनी चला ठाकत ठायीं ठायीं । मौन्य धरुनी कांहीं नो बोलावें ।।२।।
तुका अवसरु जाणवितो पुढें। उघडलीं महाल मंदिरें कवाडें ।।३।।

४९७
भीतरी गेले हरी राहा क्षणभरी । होईल फळ धीर करावा ।।१।।
न करीं त्वरा ऐकें मात । क्षण एक निवांत बैसावें ।।धृ।।
करूनी मर्दन सारिलें पाणी । न्हाले देव अंग पुसी भवानी ।।२।।

नेसला सोनसळा विनवी रखुमाई । वाढिलें आतां ठायीं चलावें जी ।।३।।
करुनियां भोजन घेतलें आंचवण । आनंदें नारायण पहुडले ।।४।।
तुका मात जाणवी आतां । सकळां बहुतां होती ची ।।५।।

४९८
द्या जी आम्हां कांहीं सांगा जी रखुमाई । शेष उरलें ठायीं सनकादिकांचें ।।१।।
टोकत बाहेरी बैसलों आशा । पुराया ग्रासा एकमेकां ।।धृ।।
येथवरी आलों तुझिया नांवें । आस करुनी आम्ही दातारा ।।२।।
प्रेम देउनियां बहुडा आतां दिला । तुका म्हणे आतां विठ्ठल बोला ।।३।।

४९९
बहुडविलें जन मन जालें निश्चळ । चुकवूनी कोल्हाळ आला तुका ।।१।।
पर्यंकीं निद्रा करावें शयन । रखुमाई आपण समवेत ।।धृ।।
घेउनियां आलों हातीं टाळ वीणा । सेवेसि चरणा स्वामीचिया ।।२।।
तुका म्हणे आतां परिसावीं सादरें । बोबडीं उत्तरें पांडुरंगा ।।३।।

५००
नाच गाणें माझा जवळील ठाव । निरोपीन भाव होईल तो ।।१।।
तुम्हां निद्रा मज आज्ञा ते स्वभावें । उतरूनि जीवें जाईन लोण ।।धृ।।
एकाएकीं बहु करीन सुस्वरें । मधुर उत्तरें आवडीनें ।।२।।
तुका म्हणे तूं जगदानी उदार । फेडशील भार एका वेळा ।।३।।

५०१
सिणलेती सेवकां देउनि इच्छादान । केला अभिमान अंगीकारा ।।१।।
अहो दीनानाथा आनंदमूर्ती । तुम्हांसि शोभती ब्रीदें ऐसीं ।।धृ।।
बहुतांनीं विनविलें बहुतां प्रकारीं । सकळां ठायीं हरी पुरलेती ।।२।।
तुका म्हणे अगा कुटुंबवत्सळा । कोण तुझी लीळा जाणे ऐसी ।।३।।

५०२
उठा भागलेती उजगरा । जाला स्वामी निद्रा करा ।।१।।
वाट पाहाते रुक्मिणी । उभी मंचक संवारुणी ।।धृ।।
केली करा क्षमा। बडबड पुरुषोत्तमा ।।२।।

लागतो चरणा । तुकयाबंधु नारायणा ।।३।।

५०३
पावला प्रसाद आतां विटोनि जावें । आपला तो श्रम कळों येतसे जीवें ।।१।।
आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा । पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा ।।धृ।।
तुम्हांसि जागवूं आम्ही आपुलिया चाडा । शुभाशुभ कर्मे दोष वाराया पीडा ।।२।।
तुका म्हणे दिलें उच्छिष्टाचें भोजन । आम्हां आपुलिया नाहीं निवडिलें भिन्न ।।३।।

५०४
शब्दांचीं रत्नें करूनी अळंकार । तेणें विश्वंभर पूजियेला ।।१।।
भावाचे उपचार करूनि भोजन । तेणें नारायण जेवविला ।।धृ।।
संसारा हातीं दिलें आंचवण । मुखशुद्धी मन समर्पिलें ।।२।।
रंगलीं इंद्रियें सुरंग तांबूल । माथां तुळसीदळ समर्पिलें ।।३।।
एकभावदीप करूनि निरांजन । देऊनि आसन देहाचें या ।।४।।
न बोलोनि तुका करी चरणसेवा । निजविलें देवा माजघरीं ।।५।।

५०५
उठोनियां तुका गेला निजस्थळा । उरले राउळा माजी देव ।।१।।
निउल जालें सेवका स्वामींचें । आज्ञे करुनी चित्त समाधान ।।धृ।।
पहुडलिया हरी अनंतशैनावरी । तेथें नाहीं उरी कांहीं काम ।।२।।
अवघी बाहेर घालूनि गेला तुका । सांगितलें लोकां निजले देव ।।३।।

दसरा - अभंग १

५०६
पवित्र सुदिन उत्तम दिवस दसरा । सांपडला तो साधा आजि मुहूर्त बरा ।
गर्जा जेजेकार हरि हृदयीं धरा । आळस नका करूं लाहानां सांगतों थोरां ।।१।।

या हो या हो बाइयानो निघाले हरी। सिलंगणा वेगीं घेउनि आरत्या करीं ।
ओवाळूं श्रीमुख वंदूं पाउलें शिरीं । आम्हां दैव आलें येथें घरिच्या घरीं ।।धृ।।
अक्षय मुहूर्त औठामध्यें साधे तें । मग येरी गर्जे जैसें तैसें होत जातें ।
म्हणोनि मागें पुढें कोणी न पाहावें येथें । सांडा परतें काम जाऊं हरी सांगातें ।।२।।
बहुतां बहुतां रीतीं चित्तीं धरा हें मनीं । नका गै करूं आइकाल ज्या कानीं ।
मग हें सुख कधीं न देखाल स्वप्नीं । उरेल हायहाय मागें होईल काहाणी ।।३।।
ऐसियास वंचती त्यांच्या अभाग्या पार । नाहीं नाहीं नाहीं सत्य जाणा निर्धार ।
मग हे वेळ घटिका न ये अजरामर। कळलें असों द्या मग पडतील विचार ।।४।।
जयासाटीं ब्रम्हादिक जालेति पिसे । उच्छिष्टा कारणें देव जळीं जाले मासे ।
अर्द्धांगीं विश्वमाता लक्षुमी वसे । तो हा तुकयाबंधु म्हणे आलें अनायासें ।।५।।

५०७

ओवाळूं आरती पंढरीराया । सर्वभावें शरण आलों तुझिया पायां ।।१।।
सर्व व्यापून कैसें रूप आकळ । तो हा गौळ्या घरीं जाला कृष्ण बाळ ।।धृ।।
स्वरूप गुणातीत जाला अवतारधारी। तो हा पांडुरंग उभा विटेवरी ।।२।।
भक्तीचिया काजा कैसा रूपासि आला । ब्रिदाचा तोडर चरणीं मिरविला ।।३।।
आरतें आरती ओवाळिली । वाखाणितां कीर्त्ति वाचा परतली ।।४।।
भावभक्तिबळें होसी कृपाळु देवा । तुका म्हणे पांडुरंगा तुझ्या न कळती मावा ।।५।।

५०८

करूनि आरती । आतां ओवाळूं श्रीपती ।।१।।
आजि पुरले नवस । धन्य जाला हा दिवस ।।धृ।।
पाहा वो सकळा । पुण्यवंता तुम्ही बाळा ।।२।।
तुका वाहे टाळी । होता सन्निध जवळी ।।३।।

५०९
द्याल माळ जरी पडेन मी पायां । दंडवत वांयां कोण वेची ।।१।।
आलें तें हिशोबें अवघिया प्रमाण । द्यावें तरी दान मान होतो ।।धृ।।
मोकळिया मनें घ्याल जरी सेवा । प्रसाद पाठवा लवकरी ।।२।।
तुका म्हणे तुम्ही जालिया कृपण । नामाची जतन मग कैची ।।३।।

५१०
तुम्हीं जावें निजमंदिरा । आम्ही जातों आपुल्या घरा ।।१।।
विठोबा लोभ असों देईं । आम्ही असों तुमचें पाईं ।।धृ।।
चित्त करी सेवा । आम्ही जातों आपुल्या गावां ।।२।।
तुका म्हणे दिशा भुलों। फिरोन पायापाशीं आलों ।।३।।

५११
पाहें प्रसादाची वाट । द्यावें धोवोनियां ताट ।।१।।
शेष घेउनि जाईन । तुमचें जालिया भोजन ।।धृ।।
जालों एकसवा । तुम्हां आडुनियां देवा ।।२।।
तुका म्हणे चित्त । करूनि राहिलों निश्चिंत।।३।।

५१२
केली कटकट गाऊं नाचों नेणतां । लाज नाहीं भय आम्हां पोटाची चिंता ।।१।।
बैसा सिणलेती पाय रगडूं दातारा । जाणवूं द्या वारा उब जाली शरीरा ।।धृ।।
उशिरा उशीर किती काय म्हणावा । जननिये बाळका कोप कांहीं न धरावा ।।२।।
तुझिये संगतीं येऊं करूं कोल्हाळ । तुका म्हणे बाळें अवघीं मिळोन गोपाळ ।।३।।

५१३
कळस वाहियेला शिरीं । सहस्रनामें पूजा करीं ।।१।।
पीक पिकलें पिकलें । घन दाटोनियां आलें ।।धृ।।
शेवटीचें दान । भागा आला नारायण ।।२।।
तुका म्हणे पोट । भरलें वारले बोभाट ।।३।।

५१४
आरुष शब्द बोलों मनीं न धरावें कांहीं । लडिवाळ बाळकें तूं चि आमुचि आई ।।१।।
देईं गे विठाबाई प्रेमभातुकें । अवघियां कवतुकें लहानां थोरां सकळां ।।धृ।।
असो नसो भाव आलों तुझिया ठाया । पाहे कृपादृष्टी आतां पंढरीराया ।।२।।
तुका म्हणे आम्ही तुझीं वेडीं वांकुडीं । नामें भवपाश आतां आपुलिया तोडीं ।।३।।

५१५
आडकलें देवद्वार । व्यर्थ काय करकर ।।१।।
आतां चला जाऊं घरा । नका करूं उजगरा ।।धृ।।
देवा लागलीसे निज । येथें उभ्या काय काज ।।२।।
राग येतो देवा । तुका म्हणे नेघे सेवा ।।३।।

५१६
कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । बहिणी बंधु चुलता कृष्ण माझा ।।१।।
कृष्ण माझा गुरू कृष्ण माझें तारूं । उतरी पैल पारू भवनदीची ।।धृ।।
कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन । सोइरा सज्जन कृष्ण माझा ।।२।।
तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसावा। वाटे न करावा परता जीवा ।।३।।

५१७
कृपा करावी भगवंतें । ऐसा शिष्य द्यावा मातें ।।१।।
माझें व्रत जो चालवी । त्यासि द्यावें त्वां पालवी ।।धृ।।
व्हावा ब्रम्हज्ञानी गुंडा । तिहीं लोकीं ज्याचा झेंडा ।।२।।
तुका तुका हाका मारी । माझ्या विठोबाच्या द्वारीं ।।३।।

५१८
जातो वाराणसी । निरवी गाई घोडे म्हैसी ।।१।।
गेलों येतों नाहीं ऐसा । सत्य मानावा भरवसा ।।धृ।।
नका काढूं माझीं पेवें। तुम्हीं वरळा भूस खावें ।।२।।
भिकारियाचे पाठीं । तुम्ही घेउनि लागा काठी ।।३।।

सांगा जेवाया ब्राम्हण । तरी कापा माझी मान ।।४।।
वोकलिया वोका । म्यां खर्चिला नाहीं रुका ।।५।।
तुम्हीं खावें ताकपाणी । जतन करा तूपलोणी ।।६।।
नाहीं माझें मनीं । पोरें रांडा नागवणी ।।७।।
तुका म्हणे नीट । होतें तैसें बोले स्पष्ट ।।८।।

५१९
कास घालोनी बळकट । झालों कळिकाळासी नीट । केली पायवाट । भवसिंधूवरूनि ।।१।।
या रे या रे लाहान थोर । याति भलते नारीनर । करावा विचार । न लगे चिंता कोणासी ।।धृ।।
कामी गुंतले रिकामे । जपी तपी येथें जमे । लाविले दमामे। मुक्त आणि मुमुक्षा ।।२।।
एकंदर शिका । पाठविला इहलोका । आलों म्हणे तुका । मी नामाचा धारक ।।३।।

५२०
आम्ही वैकुंठवासी । आलों या चि कारणासी । बोलिले जे ॠषी । साच भावें वर्ताव्या ।।१।।
झाडूं संतांचे मारग । आडरानें भरलें जग । उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं ।।धृ।।
अर्थे लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें । विषयलोभी मन । साधनें बुडविलीं ।।२।।
पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा । तुका म्हणे करा। जेजेकार आनंदें ।।३।।

५२१
बळियाचे अंकित । आम्ही जालों बळिवंत ।।१।।
लाता हाणोनि संसारा । केला षडूमाअचा मारा ।।धृ।।
जन धन तन । केलें तृणाही समान ।।२।।
तुका म्हणे आतां । आम्ही मुक्तीचिया माथां ।।३।।

५२२

मृत्युलोकीं आम्हां आवडती परी । नाहीं एका हरिनामें विण ।।१।।
विटलें हें चित्त प्रपंचापासूनि । वमन हें मनीं बैसलेंसे ।।धृ।।
सोनें रूपें आम्हां मृत्तिके समान । माणिकें पाषाण खडे तैसे ।।२।।
तुका म्हणे तैशा दिसतील नारी । रिसाचियापरी आम्हांपुढें ।।३।।

५२३
स्त्रियांचा तो संग नको नारायणा । काष्ठा या पाषाणामृत्तिकेच्या ।।१।।
नाठवे हा देव न घडे भजन । लांचावलें मन आवरे ना ।।धृ।।
दृष्टिमुखें मरण इंद्रियाच्या द्वारें । लावण्य तें खरें दुःखमूळ ।।२।।
तुका म्हणे जरी अग्नि जाला साधु । परी पावे बाधूं संघट्टणें ।।३।।

५२४
पराविया नारी रखुमाईसमान । हें गेलें नेमून ठायींचें चि ।।१।।
जाईं वो तूं माते न करीं सायास । आम्ही विष्णुदास नव्हों तैसे ।।धृ।।
न साहावें मज तुझें हें पतन । नको हें वचन दुष्ट वदों ।।२।।
तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार । तरी काय नर थोडे जाले ।।३।।

५२५
भक्तिप्रतिपाळे दीन वो वत्सळे । विठ्ठले कृपाळे होसी माये ।।१।।
पडिला विसर माझा काय गुणें । कपाळ हें उणें काय करूं ।।२।।
तुका म्हणे माझें जाळूनि संचित । करीं वो उचित भेट देईं ।।३।।

५२६
तुजविण मज कोण वो सोयरें । आणीक दुसरें पांडुरंगे ।।१।।
लागलीसे आस पाहा तुझें वास । रात्री वो दिवस लेखीं बोटीं ।।२।।
काम गोड मज न लगे हा धंदा । तुका म्हणे सदा हें चि ध्यान ।।३।।

५२७
पढियंतें आम्ही तुजपाशीं मागावें । जीवींचें सांगावें हितगुज ।।१।।
पाळसील लळे दीन वो वत्सले । विठ्ठले कृपाळे जननिये ।।धृ।।
जीव भाव तुझ्या ठेवियेला पायीं । तूं चि सर्वा ठायीं एक आम्हां ।।२।।
दुजियाचा संग लागों नेदीं वारा । नाहीं जात घरा आणिकांच्या ।।३।।
सर्वसत्ता एकी आहे तुजपाशीं । ठावें आहे देसी मागेन तें ।।४।।

म्हणउनि पुढें मांडियेली आळी । थिंकोनियां चोळी डोळे तुका ।।५।।

५२८
कोण पर्वकाळ पहासील तीथ । होतें माझें चित्त कासावीस ।।१।।
पाठवीं भातुकें प्रेरीं झडकरी । नको राखों उरी पांडुरंगा ।।धृ।।
न धरावा कोप मजवरी कांहीं । अवगुणी अन्यायी म्हणोनियां ।।२।।
काय रडवीसी नेणतियां पोरां । जाणतियां थोरां याचिपरी ।।३।।
काय उभी कर ठेवुनियां कटीं । बुझावीं धाकुटीं लडिवाळें ।।४।।
तुका म्हणे आतां पदरासी पिळा । घालीन निराळा नव्हे मग ।।५।।

५२९
कां हो देवा कांहीं न बोला चि गोष्टी । कां मज हिंपुटी करीतसा ।।१।।
कंठीं प्राण पाहें वचनाची आस । तों दिसे उदास धरिलें ऐसें ।।धृ।।
येणें काळें बुंथी घेतलीसे खोल । कां नये विटाळ होऊं माझा ।।२।।
लाज वाटे मज म्हणवितां देवाचा । न पुससी फुकाचा तुका म्हणे ।।३।।

५३०
उचित तें काय जाणावें दुर्बळें । थोरिवेचें काळें तोंड देवा ।।१।।
देतों हाका कोणी नाइकती द्वारीं । ओस कोणी घरीं नाहींऐसें ।।धृ।।
आलिया अतीता शब्द समाधान । करितां वचन कायवेंचे।।२।।
तुका म्हणे तुम्हां साजे हें श्रीहरी । आम्ही निलाजिरीं नाहीं ऐसीं ।।३।।

५३१
आम्ही मागों ऐसें नाहीं तुजपाशीं । जरीं तूं भीतोसि पांडुरंगा ।।१।।
पाहें विचारूनि आहे तुज ठावें । आम्ही धालों नावें तुझ्या एका ।।धृ।।
ॠद्धिसिद्धि तुझें मुख्य भांडवल । हें तों आम्हां फोल भक्तीपुढें ।।२।।
तुका म्हणे जाऊं वैकुंठा चालत । बैसोनि निश्चिंत सुख भोगूं ।।३।।

५३२
न लगे हें मज तुझें ब्रम्हज्ञान । गोजिरें सगुण रूप पुरे ।।१।।
लागला उशीर पतितपावना । विसरोनि वचना गेलासि या ।।धृ।।
जाळोनि संसार बैसलों अंगणीं । तुझे नाहीं मनीं मानसीं तें ।।२।।
तुका म्हणे नको रागेजों विठ्ठला । उठीं देईं मला भेटी आतां ।।३।।

५३३
 कमोदिनी काय जाणे तो परिमळ । भ्रमर सकळ भोगीतसे ।।१।।
तैसें तुज ठावें नाहीं तुझें नाम । आम्ही च तें प्रेमसुख जाणों ।।धृ।।
माते तृण बाळा दुधाची ते गोडी । ज्याची नये जोडी त्यासी कामा ।।२।।
तुका म्हणे मुक्ताफळ शिंपीपोटीं । नाहीं त्याची भेटी भोग तिये ।।३।।

५३४
 काय सांगों तुझ्या चरणांच्या सुखा । अनुभव ठाउका नाहीं तुज ।।१।।
बोलतां हें कैसें वाटे खरेपण । अमृताचे गुण अमृतासी ।।धृ।।
आम्ही एकएका ग्वाही मायपुतें । जाणों तें निरुतें सुख दोघें ।।२।।
तुका म्हणे आम्हां मोक्षाचा कांटाळा । कां तुम्ही गोपाळा नेणां ऐसें ।।३।।

५३५
 देखोनियां तुझ्या रूपाचा आकार । उभा कटीं कर ठेवूनियां ।।१।।
तेणें माझ्या चित्ता होतें समाधान । वाटतें चरण न सोडावे ।।धृ।।
मुखें गातों गीत वाजवितों टाळी । नाचतों राउळीं प्रेमसुखें ।।२।।
तुका म्हणे मज तुझ्या नामापुढें । तुश हें बापुडें सकळी काळ ।।३।।

५३६
 आतां येणेंविण नाहीं आम्हां चाड । कोण बडबड करी वांयां ।।१।।
सुख तें चि दुःख पुण्यपाप खरें । हें तों आम्हां बरें कळों आलें ।।धृ।।
तुका म्हणे वाचा वाईली अनंता । बोलायाचें आतां काम नाहीं ।।३।।

५३७
 बोलों अबोलणें मरोनियां जिणें । असोनि नसणें जनि आम्हां ।।१।।
भोगीं त्याग जाला संगीं च असंग । तोडियेले लाग माग दोन्ही ।।२।।
तुका म्हणे नव्हें दिसतों मी तैसा । पुसणें तें पुसा पांडुरंगा ।।३।।

५३८
 अधिकार तैसा दावियेले मार्ग । चालतां हें मग कळों येतें ।।१।।
जाळूं नये नाव पावलेनि पार । मागील आधार बहुतांचा ।।२।।
तुका म्हणे रोग वैदाचे अंगीं । नाहीं करी जगीं उपकार ।।३।।

५३९
संवसार तीहीं केला पाठमोरा । नाहीं द्रव्य दारा जया चित्तीं ।।१।।
शुभाशुभ नाहीं हर्षामर्ष अंगीं । जनार्दन जगीं होउनि ठेला ।।२।।
तुका म्हणे देहें दिला एकसरें । जयासि दुसरें नाहीं मग ।।३।।

५४०
देहबुद्धि वसे लोभ जयां चित्तीं । आपुलें जाणती परावें जे ।।१।।
तयासि चालतां पाहिजे सिदोरी । दुःख पावे करी असत्य तो ।।२।।
तुका म्हणे धर्म रक्षाया कारणें । छाया इच्छी उन्हें तापला तो ।।३।।

५४१
काळें खादला हा अवघा आकार । उत्पत्तिसंहारघडमोडी ।।१।।
वीज तो अंकुर आच्छादिला पोटीं । अनंता सेवटीं एकाचिया ।।२।।
तुका म्हणे शब्दें व्यापिलें आकाश । गुढार हें तैसें कळों नये ।।३।।

५४२
आणीक काळें न चले उपाय । धरावे या पाय विठोबाचे ।।१।।
अवघें चि पुण्य असे तया पोटीं । अवघिया तुटी होय पापा ।।धृ।।
अवघें मोकळें अवघिया काळें । उद्धरती कुळें नरनारी ।।२।।
काळ वेळ नाहीं गर्भवासदुःखें । उच्चारितां मुखें नाम एक ।।३।।
तुका म्हणे कांहीं न लगे सांडावें । सांगतसें भावें घेती तयां ।।४।।
५४३
कां रे माझा तुज न ये कळवळा । असोनि जवळा हृदयस्था ।।१ ।।
अगा नारायणा निष्ठुरा निर्गुणा । केला शोक नेणां कंठस्फोट ।।धृ।।
कां हें चित्त नाहीं पावलें विश्रांती । इंद्रियांची गति कुंटे चि ना ।।२।।
तुका म्हणे कां रे धरियेला कोप । पाप सरलें नेणों पांडुरंगा ।।३।।

५४४
दीनानाथा तुझीं ब्रिदें चराचर । घेसील कैवार शरणागता ।।१।।
पुराणीं जे तुझे गर्जती पवाडे । ते आम्हां रोकडे कळों आले ।।धृ।।
आपुल्या दासांचें न साहासी उणें । उभा त्याकारणें राहिलासी ।।२।।
चक्र गदा हातीं आयुधें अपारें । न्यून तेथें पुरें करूं धावें ।।३।।

तुका म्हणे तुज भक्तीचें कारण । करावया पूर्ण अवतार ।।४।।

५४५
वर्णूं महिमा ऐसी नाहीं मज वाचा । न बोलवे साचा पार तुझा ।।१।।
ठायींची हे काया ठेविली चरणीं । आतां ओवाळुनि काय सांडूं ।।धृ।।
नाहीं भाव ऐसा करूं तुझी सेवा । जीव वाहूं देवा तो ही तुझा ।।२।।
मज माझें कांहीं न दिसे पाहातां । जें तुज अनंता समर्पावें ।।३।।
तुका म्हणे आतां नाहीं मज थार । तुझे उपकार फेडावया ।।४।।

५४६
नाहीं सुख मज न लगे हा मान । न राहे हें जन काय करूं ।।१।।
देहउपचारें पोळतसे अंग । विषतुल्य चांग मिष्टान्न तें ।।धृ।।
नाइकवे स्तुति वाणितां थोरीव । होतो माझा जीव कासावीस ।।२।।
तुज पावें ऐसी सांग कांहीं कळा । नको मृगजळा गोवूं मज ।।३।।
तुका म्हणे आतां करीं माझें हित । काढावें जळत आगींतूनि ।।४।।

५४७
न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ।।१।।
ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणीक लोकांसी हें चि सांगे ।।धृ।।
विटंबो शरीर होत कां विपत्ति । परि राहो चित्तीं नारायण ।।२।।
तुका म्हणे नासिवंत हें सकळ । आठवे गोपाळ तें चि हित ।।३।।

५४८
पिंड पोसावे हें अधमाचें ज्ञान । विलास मिष्टान्न करूनियां ।।१।।
शरीर रक्षावें हा धर्म बोलती । काय असे हातीं तयाचिया ।।धृ।।
क्षणभंगुर हें जाय न कळतां । ग्रास गिळी सत्ता नाहीं हातीं ।।२।।
कर्वतिलीं देहें कापियेलें मांस । गेले वनवासा शुकादिक ।।३।।
तुका म्हणे राज्य करितां जनक । अग्नीमाजी एक पाय जळे ।।४।।

५४९
जरी माझी कोणी कापितील मान । तरी नको आन वदों जिव्हे ।।१।।
सकळां इंद्रियां हे माझी विनंती । नका होऊं परतीं पांडुरंगा ।।धृ।।
आणिकांची मात नाइकावी कानीं । आणीक नयनीं न पाहावें ।।२।।

चित्ता तुवां पायीं रहावें अखंडित । होउनी निश्चित एकविध ।।३।।
चला पाय हात हें चि काम करा । माझ्या नमस्कारा विठोबाच्या ।।४।।
तुका म्हणे तुम्हां भय काय करी । आमुचा कैवारी नारायण ।।५।।

५५०
करिसी तें देवा करीं माझें सुखें । परी मी त्यासी मुखें न म्हणें संत ।।१।।
जया राज्य द्रव्य करणें उपार्जना । वश दंभमाना इच्छे जाले ।।धृ।।
जगदेव परी निवडीन निराळे । ज्ञानाचे आंधळे भारवाही ।।२।।
तुका म्हणे भय न धरीं मानसीं । ऐसियाचे विशीं करितां दंड ।।३।।

५५१
म्हणविती ऐसे आइकतों संत । न देखीजे होत डोळां कोणीं ।।१।।
ऐसियांचा कोण मानितें विश्वास । निवडे तो रस घाईडाई ।।धृ।।
पर्जन्याचे काळीं वाहाळाचे नद । ओसरतां बुंद न थारे चि ।।२।।
हिऱ्या ऐशा गारा दिसती दूरोन । तुका म्हणे घन न भेटे तों ।।३।।

५५२
अतिवाद लावी । एक बोट सोंग दावी ।।१।।
त्याचा बहुरूपी नट । नव्हे वैष्णव तो चाट ।।धृ।।
प्रतिपादी वाळी । एक पुजी एका छळी ।।२।।
तुका म्हणे नाहीं । भूतदया ज्याचे ठायीं ।।३।।

५५३
पोटाचे ते नट पाहों नये छंद । विषयांचे भेद विषयरूप ।।१।।
अथाअ परमार्थ कैसा घडों सके । चित्त लोभी भीके सोंग वांयां ।।धृ।।
देवाचीं चरित्रें दाखविती लीळा । लाघवाच्या कळा मोहावया ।।२।।
तुका म्हणे चित्तीं राहे अभिळास । दोघां नरकवास सारिखा चि ।।३।।

५५४
भुंकती तीं द्यावीं भुंकों । आपण त्यांचें नये शिकों ।।१।।
भाविकांनीं दुर्जनाचें । मानूं नये कांहीं साचें ।।धृ।।
होइल तैसें बळ । फजीत करावे ते खळ ।।२।।
तुका म्हणे त्यांचें । पाप नाहीं ताडणाचें ।।३।।

५५५
जप करितां राग । आला जवळी तो मांग ।।१।।
नको भोंवतालें जगीं । पाहों जवळी राख अंगीं ।।धृ।।
कुड्याची संगती। सदा भोजन पंगती ।।२।।
तुका म्हणे ब्रम्ह । साधी विरहित कर्म ।।३।।

५५६
कांहीं च मी नव्हें कोणिये गांवींचा । एकट ठायींचा ठायीं एक ।।१।।
नाहीं जात कोठें येत फिरोनियां । अवघें चि वांयांविण बोलें ।।धृ।।
नाहीं मज कोणी आपुलें दुसरें । कोणाचा मी खरें कांहीं नव्हे ।।२।।
नाहीं आम्हां ज्यावें मरावें लागत । आहों अखंडित जैसे तैसे ।।३।।
तुका म्हणे नांवरूप नाहीं आम्हां । वेगळा ह्या कर्मा अकर्मासी ।।४।।

लोहगावांस परचक्रवेढा पडला - अभंग ३
५५७
न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होतें ।।१।।
काय तुम्ही येथें नसालसें जालें । आम्हीं न देखिलें पाहिजे हें ।।धृ।।
परचक्र कोठें हरिदासांच्या वासें । न देखिजेत देशें राहातिया ।।२।।
तुका म्हणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें जालें ।।३।।

५५८
काय म्यां मानावें हरिकथेचें फळ । तरिजे सकळ जनीं ऐसें ।।१।।
उच्छेद तो असे हा गे आरंभला । रोकडें विठ्ठला परचक्र ।।धृ।।
पापाविण नाहीं पाप येत पुढें । साक्षसी रोकडें साक्ष आलें ।।२।।
तुका म्हणे जेथें वसतील दास । तेथें तुझा वास कैसा आतां ।।३।।

५५९
भीत नाहीं आतां आपुल्या मरणा । दुःखी होतां जना न देखवे ।।१।।
आमची तो जाती ऐसी परंपरा । कां तुम्ही दातारा नेणां ऐसें ।।धृ।।
भजनीं विक्षेप तें चि पैं मरण । न वजावा क्षण एक वांयां ।।२।।
तुका म्हणे नाहीं आघाताचा वारा । ते स्थळीं दातारा ठाव मागें ।।३।।
।।३।।

५६०
फिरंगी वाखर लोखंडाचे विळे । परि ते निराळे गुणमोल ।।१।।
पायरी प्रतिमा एक चि पाषाण । परि तें महिमान वेगळालें ।।२।।
तुका म्हणे तैशा नव्हतील परी । संतजना सरी सारिखिया ।।३।।

५६१
कोण जाणे कोणा घडे उपासना । कोण या वचनाप्रति पावे ।।१।।
आतां माझा श्रोता वक्ता तूं चि देवा । करावी ते सेवा तुझी च मां ।।धृ।।
कुशळ चतुर येथें न सरते । करितील रिते तर्क मतें ।।२।।
तुका म्हणे जालें पेणें एके घरीं । मज आणि हरी तुम्हां गांठी ।।३।।

५६२
आमचा विनोद तें जगा मरण । करिती भावहीण देखोवेखीं ।।१।।
न कळे सतंत हिताचा विचार । तों हे दारोदार खाती फेरे ।।धृ।।
वंदिलें वंदावें निंदिलें निंदावें । एक गेलें जावें त्याचि वाटा ।।२।।
तुका म्हणे कोणी नाइके सांगतां । होती यमदूता वरपडे ।।३।।

५६३
दीप घेउनियां धुंडिती अंधार । भेटे हा विचार अघटित ।।१।।
विष्णुदास आम्ही न भ्यों कळिकाळा । भुलों मृगजळा न घडे तें ।।धृ।।
उधळितां माती रविकळा मळे । हें कैसें न कळे भाग्यहीना ।।२।।
तुका म्हणे तृणें झांके हुताशन । हें तंव वचन वाउगें चि ।।३।।

५६४
नटनाट्यें अवघें संपादिलें सोंग । भेद दाऊं रंग न पालटे ।।१।।
मांडियेला खेळ कौतुक बहुरूप । आपुलें स्वरूप जाणतसों ।।धृ।।
स्फटिकाची शिळा उपाधि न मिळे । भाव दावी पिवळे लाल संगे ।।२।।
तुका म्हणे आम्ही या जनाविरहित । होऊनि निश्चिंत क्रीडा करूं ।।३।।

५६५
तुजविण वाणीं आणिकांची थोरी । तरी माझी हरी जिव्हा झडो ।।१।।
तुजविण चित्ता आवडे आणीक । तरी हा मस्तक भंगो माझा ।।धृ।।

नेत्रीं आणिकांसि पाहीन आवडी । जातु ते चि घडी चांडाळ हे ।।२।।
कथामृतपान न करिती श्रवण । काय प्रयोजन मग यांचें ।।३।।
तुका म्हणे काय वांचून कारण । तुज एक क्षण विसंबतां ।।४।।

स्वामींचे स्त्रीनें स्वामींस कठिण उत्तरें केलीं - अभंग ७

५६६
मज चि भोंवता केला येणें जोग । काय याचा भोग अंतरला ।।१।।
चालोनियां घरा सर्व सुखें येती । माझी तों फजीती चुके चि ना ।।धृ।।
कोणाची बाईल होऊनियां वोढूं । संवसारीं काढूं आपदा किती ।।२।।
काय तरी देऊं तोडितील पोरें । मरतीं तरी बरें होतें आतां ।।३।।
कांहीं नेदी वांचों धोवियेलें घर । सारवावया ढोर शेण नाहीं ।।४।।
तुका म्हणे रांड न करितां विचार । वाहुनियां भार कुंथे माथां ।।५।।

५६७
काय नेणों होता दावेदार मेला । वैर तो साधिला होउनि गोहो ।।१।।
किती सर्वकाळ सोसावें हें दुःख । किती लोकां मुख वासूं तरीं ।।धृ।।
झवे आपुली आई काय माझें केलें । धड या विठ्ठलें संसाराचें ।।२।।
तुका म्हणे येती बाईले असडे । कांुफ्दोनियां रडे हांसे कांहीं ।।३।।

५६८
गोणी आली घरा । दाणे खाऊं नेदी पोरा ।।१।।
भरी लोकांची पांटोरी । मेला चोरटा खाणोरी ।।धृ।।
खवळली पिसी । हाता झोंबे जैसी लांसी ।।२।।
तुका म्हणे खोटा । रांडे संचिताचा सांटा ।।३।।

५६९
आतां पोरा काय खासी । गोहो जाला देवलसी ।।१।।
डोचकें तिंबी घातल्या माळा । उदमाचा सांडी चाळा ।।धृ।।
आपल्या पोटा केली थार । आमचा नाहीं येसपार ।।२।।
हातीं टाळ तोंड वासी। गाय देउळीं । देवापासीं ।।३।।
आतां आम्ही करूं काय । न वसे घरीं राणा जाय ।।४।।
तुका म्हणे आतां धीरी । आझुनि नाहीं जालें तरी ।।५।।

५७०
बरें जालें गेलें । आजी अवघें मिळालें ।।१।।
आतां खाईन पोटभरी । ओल्या कोरड्या भाकरी ।।धृ।।
किती तरी तोंड। याशीं वाजवूं मी रांड ।।२।।
तुका बाइले मानवला । चीथू करूनियां बोला ।।३।।

५७१
न करवे धंदा । आइता तोंडीं पडे लोंदा ।।१।।
उठितें तें कुटितें टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ ।।धृ।।
जिवंत चि मेले। लाजा वाटुनियां प्याले ।।२।।
संसाराकडे । न पाहाती ओस पडे ।।३।।
तळमळती यांच्या रांडा । घालिती जीवा नांवें धोंडा ।।४।।
तुका म्हणे बरें जालें । घे गे बाइले लीहिलें ।।५।।

५७२
कोण घरा येतें आमुच्या काशाला । काय ज्याचा त्याला नाहीं धंदा ।।१।।
देवासाटीं जालें ब्रम्हांड सोइरें । कोमळ्या उत्तरें काय वेचे ।।धृ।।
मानें पाचारितां नव्हे आराणुक । ऐसे येती लोक प्रीतीसाटीं ।।२।।
तुका म्हणे रांडे नावडे भूषण । कांतेलेंसें श्वान पाठीं लागे ।।३।।
।।७।।

५७३
भाव धरी तया तारील पाषाण । दुर्जना सज्जन काय करी ।।१।।
करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुंस । खापरा परीस काय करी ।।धृ।।
काय करिल तया साकरेचें आळें । बीज तैसीं फळें येती तया ।।२।।
तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ । कठीण हा खळ तयाहूनी ।।३।।

५७४
इच्छावें तें जवळी आलें । काय बोलें कारण ।।१।।
नामरूपीं पडिली गांठी । अवघ्या गोष्टी सरल्या ।।धृ।।
मुकियाचे परी जीवीं । साकर जेवों खादली ।।२।।
तुका म्हणे काय बोलें । आतां भलें मौन्य ची ।।३।।

५७५
साधनें तरी हीं च दोन्ही । जरी कोणी साधील ।।१।।
परद्रव्य परनारी । याचा धरीं विटाळ ।।धृ।।
देवभाग्यें घरा येती । संपत्ती त्या सकळा ।।२।।
तुका म्हणे तें शरीर । गृह भांडार देवाचें ।।३।।

५७६
आम्हासाठीं अवतार । मत्स्यकूर्मादि सूकर ।।१।।
मोहें धांवे घाली पान्हा । नांव घेतां पंढरीराणा ।।धृ।।
कोठें न दिसे पाहतां। उडी घाली अवचिता ।।२।।
सुख ठेवी आम्हासाठीं । दुःख आपणची घोंटी ।।३।।
आम्हां घाली पाठीकडे । पुढें कळिकाळाशीं भिडे ।।४।।
तुका म्हणे कृपानीधी । आम्हां उतरीं नांवेमधीं ।।५।।

५७७
रवि रश्मिकळा । नये काढितां निराळा ।।१।।
तैसा आम्हां जाला भाव । अंगीं जडोनि ठेला देव ।।धृ।।
गोडी साकरेपासुनी। कैसी निवडती दोन्ही ।।२।।
तुका म्हणे नाद उठी । विरोनि जाय नभा पोटीं ।।३।।

५७८
थोडें परी निरें । अविट तें घ्यावें खरें ।।१।।
घ्यावें जेणें नये तुटी । बीज वाढे बीजा पोटीं ।।धृ।।
चित्त ठेवीं ग्वाही । आणिकांशीं चाड नाहीं ।।२।।
आपलें तें हित फार । तुका म्हणे खरें सार ।।३।।

५७९
अवघे देव साध । परी या अवगुणांचा बाध ।।१।।
म्हणउनी नव्हे सरी । राहे एका एक दुरी ।।धृ।।
ऊंस कांदा एक आळां । स्वाद गोडीचा निराळा ।।२।।
तुका म्हणे नव्हे सरी । विष अमृताची परी ।।३।।

५८०

शांतीपरतें नाहीं सुख । येर अवघें ची दुःख ।।१।।
म्हणउनी शांति धरा । उतराल पैल तीरा ।।धृ।।
खवळलिया कामक्रोधीं। अंगी भरती आधिव्याधी ।।२।।
म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपेंआप ।।३।।

५८१
गोडीपणें जैसा गुळ । तैसा देव जाला सकळ ।।१।।
आतां भजों कवणे परी । देव सबाह्य अंतरीं ।।धृ।।
उदका वेगळा। नव्हे तरंग निराळा ।।२।।
हेम अळंकारा नामीं । तुका म्हणे तैसे आम्ही ।।३।।

५८२
परमेष्ठिपदा । तुच्छ करिती सर्वदा ।।१।।
हें चि ज्यांचें धन । सदा हरीचें स्मरण ।।धृ।।
इंद्रपदादिक भोग । भोग नव्हे तो भवरोग ।।२।।
सार्वभौमराज्य । त्यांसि कांहीं नाहीं काज ।।३।।
पाताळींचें आधिपत्य । ते तों मानिती विपत्य ।।४।।
योगसिद्धिसार। ज्यासि वाटे तें असार ।।५।।
मोक्षायेवढें सुख । सुख नव्हे चि तें दुःख ।।६।।
तुका म्हणे हरीविण । त्यासि अवघा वाटे सिण ।।७।।

५८३
मोहोऱ्याच्या संगें । सुत नव्हे आगीजोगें ।।१।।
नाहीं तरी त्याचें भक्ष । काय सांगणें ते साक्ष ।।धृ।।
स्वामीचिया अंगें । रूप नव्हे कोणाजोगें ।।२।।
तुका म्हणे खोडी । देवमणी न देती दडी ।।३।।

५८४
मजसवें नको चेष्टा । नव्हे साळी कांहीं कोष्टा ।।१।।
बैस सांडोनि दिमाख । जाय काळें करीं मुख ।।धृ।।
येथें न सरे चार। हीण आणीक वेव्हार ।।२।।
तुका विष्णुदास । रस जाणतो नीरस ।।३।।

५८५

भाव देवाचें उचित । भाव तोचि भगवंत ।।१।।
धन्यधन्य शुद्ध जाती । संदेह कैंचा तेथें चित्तीं ।।धृ।।
बहुत बराडी । देवजवळी आवडी ।।२।।
तुका म्हणे हें रोकडें । लाभ अधिकारी चोखडे ।।३।।

५८६

गौरव गौरवापुरतें । फळ सत्याचे संकल्प ।।१।।
कठिण योगाहुनि क्षम । ओकलिया होतो श्रम ।।धृ।।
पावलें मरे सिवेपाशीं। क्लेश उरत ते क्लेशीं ।।२।।
तुका म्हणे बहु आणी । कठिण निघालिया रणीं ।।३।।

५८७

न संडी अवगुण । वर्मे मानीतसे सिण ।।१।।
भोग देतां करिती काई । फुटतां यमदंडें डोई ।।धृ।।
पापपुण्यझाडा । देतां तेथें मोटी पीडा ।।२।।
तुका म्हणे बोला । माझ्या सिणती विठ्ठला ।।३।।

५८८

पावे ऐसा नाश । अवधियां दिला त्रास ।।१।।
अविटाचा केला संग । सर्व भोगी पांडुरंग ।।धृ।।
आइता च पाक । संयोगाचा सकळिक ।।२।।
तुका म्हणे धणी । सीमा राहिली होऊनी ।।३।।

५८९

दुर्बळ हें अवघें जन । नारायणीं विमुख ।।१।।
झाडोनियां हात जाती । पात्र होतीं दंडासी ।।धृ।।
सिदोरी तें पापपुण्य । सवेंसिण भिकेचा ।।२।।
तुका म्हणे पडिला वाहो । कैसा पाहा हो लटिक्याचा ।।३।।

५९०

वाजतील तुरें । येणें आनंदें गजरें ।।१।।
जिंकोनियां अहंकार । पावटणी केलें शिर ।।धृ।।

काळा नाहीं वाव । परा श्रमा कोठें ठाव ।।२।।
तुका म्हणे आतां । सोपें वैकुंठासी जातां ।।३।।

५९१
झाड कल्पतरू । न करी याचकीं आव्हेरू ।।१।।
तुम्ही सवाअ सर्वोत्तम । ऐसे विसरतां धर्म ।।धृ।।
परिसा तुमचें देणें । तो त्या जागे अभिमानें ।।२।।
गाऱ्हाण्यानें तुका । गर्जे मारुनियां हाका ।।३।।

५९२
वसवावें घर । देवें बरें निरंतर ।।१।।
संग आसनीं शयनीं । घडे भोजनीं गमनीं ।।धृ।।.
संकल्प विकल्प । मावळोनि पुण्यपाप ।।२।।
तुका म्हणे काळ । अवघा गोविंदें सुकाळ ।।३।।

५९३
येथील हा ठसा । गेला पडोनियां ऐसा ।।१।।
घरीं देवाचे अबोला । त्याची ते चि सवे त्याला ।।ध्रु।।.
नाहीं पाहावें लागत। एकाएकीं च ते रित ।।२।।
तुका म्हणे जन । तयामध्यें येवढें भिन्न ।।३।।

५९४. करितां देवार्चन । घरा आले संतजन ।।१।।
देव सारावे परते । संत पूजावे आरते ।।धृ।।.
शाळिग्राम विष्णुमूर्ती । संत हो का भलते याती ।।२।।
तुका म्हणे संधी । अधिक वैष्णवांची मांदी ।।३।।

५९५. ज्याची खरी सेवा । त्याच्या भय काय जीवा ।।१।।
करितां स्वामीसवें वाद । अधिक अधिक आनंद ।।धृ।।.
असावा तो धर्म । मग साहों जातें वर्म ।।२।।
वदे वाग्देवी । तुका विठ्ठली गौरवी ।।३।।

५९६. देवें जीव धाला । संसार तो कडू झाला ।।१।।
ते चि येतील ढेंकर । आनंदाचे हरिहर ।।धृ।।.

वेधी आणिकांस । ऐसा जया अंगीं कस ।।२।।
तुका म्हणे भुक । येणें न लगे आणीक ।।३।।

५९७. नाम साराचें ही सार । शरणागत यमकिंकर ।।१।।
उतमातम । वाचे बोला पुरुषोत्तम ।।धृ।।.
नाम जपतां चंद्रमौळी । नामें तरला वाल्हा कोळी ।।२।।
तुका म्हणे वर्णू काय । तारक विठोबाचे पाय ।।३।।

५९८. गातों भाव नाहीं अंगीं । भूषण करावया जगीं ।।१।।
परि तूं पतितपावन । करीं साच हें वचन ।।धृ।।.
मुखें म्हणवितों दास । चित्तीं माया लोभ आस ।।५।।
तुका म्हणे दावीं वेश । तैसा अंतरीं नाहीं लेश ।।३।।

५९९. द्रव्य असतां धर्म न करी । नागविला राजद्वारीं ।।१।।
माय त्यासि व्याली जेव्हां । रांड सटवी नव्हती तेव्हां ।।धृ।।.
कथाकाळीं निद्रा लागे । कामीं श्वानापरी जागे ।।२।।
भोग स्त्रियेसि देतां लाजे । वस्त्र दासीचें घेउनि निजे ।।३।।
तुका म्हणे जाण । नर गाढवाहुनी हीन ।।४।।

६००. मुखें बोले ब्रम्हज्ञान । मनीं धनअभिमान ।।१।।
ऐशियाची करी सेवा । काय सुख होय जीवा ।।धृ।।.
पोटासाठीं संत । झाले कलींत बहुत ।।२।।
विरळा ऐसा कोणी । तुका त्यासि लोटांगणी ।।३।।

६०१
एक वेळ प्रायश्चित्त । केलें चित्त मुंडण ।।१।।
अहंकारा नांवें दोष । त्याचें ओस पाडिले ।।धृ।।
अनुतापें स्नानविधि । यज्ञसिद्धि देहहोम ।।२।।
जीवशिवा होतां चुका । तेथें तुका विनटला ।।३।।

६०२
त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं । आमचें त्या काई असे ओझें ।।१।।
पाषाणाचे पोटीं बैसला दर्दुर । तया मुखीं चार कोण घाली ।।धृ।।

पक्षी अजगर न करी संचित । तयासि अनंत प्रतिपाळी ।।२।।
तुका म्हणे तया भार घातलिया । उपेक्षीना दयासिंधु माझा ।।३।।

६०३
 बोली मैंदाची बरवी असे । वाटे अंतरीं घालावे फांसे ।।१।।
कैसा वरिवरि दिसताहे चांग । नव्हे भाविक केवळ मांग ।।धृ।।
टिळा टोपी माळा कंठीं । अंधारीं नेउनि चेंपी घांटी ।।२।।
तुका म्हणे तो केवळ पुंड । त्याजवरी यमदंड ।।३।।

६०४
 दोष पळती कीर्तनें । तुझ्या नामें संकीर्तनें ।।१।।
हें कां करूं आदरिलें । खोटें वचन आपुलें ।।धृ।।
तुम्ही पापा भीतां । आम्हां उपजावया चिंता ।।२।।
तुका म्हणे सेवा । कळिकाळा जिंकी देवा ।।३।।

६०५
 करा नारायणा । माझ्या दुःखाची खंडणा ।।१।।
वृत्ति राखा पायांपाशीं । वस्ती धरूनि मानसीं ।।धृ।।
पाळोनियां लळा । आतां पाववावें फळा ।।२।।
तुका म्हणे दीनें । त्यांचा हरतिया सीण ।।३।।

६०६
 मी तों दीनाहूनि दीन । माझा तूज अभिमान ।।१।।
मी तों आलों शरणागत । माझें करावें स्वहित ।।धृ।।
दिनानाथा कृपाळुवा। सांभाळावें आपुल्या नांवा ।।२।।
तुका म्हणे आतां । भलें नव्हे मोकलितां ।।३।।

६०७
 सुख वाटे तुझे वर्णितां पवाडे । प्रेम मिठी पडे वदनासी ।।१।।
व्याले दोन्ही पक्षी एका वृक्षावरी । आला दुराचारी पारधी तो ।।धृ।।
वृक्षाचिया माथां सोडिला ससाना । धनुष्यासि बाणा लावियेलें ।।२।।
तये काळीं तुज पक्षी आठविती । धांवें गा श्रीपती मायबापा ।।३।।
उडोनियां जातां ससाना मारील । बैसतां विंधील पारधी तो ।।४।।

ऐकोनियां धांवा तया पक्षियांचा । धरिला सर्पाचा वेश वेगीं ।।५।।
डंखोनि पारधी भुमीसि पाडिला । बाण तो लागला ससान्यासी ।।६।।
ऐसा तूं कृपाळु आपुलिया दासा । होसील कोंवसा संकटींचा ।।७।।
तुका म्हणे तुझी कीर्ति त्रिभुवना । वेदाचिये वाणी वर्णवेना ।।८।।

६०८
 नाही दुकळलों अन्ना । परि या मान जनार्दना ।।१।।
देव केला सकळसाक्षी । काळीं आणि शुद्धपक्षीं ।।धृ।।
भोगी भोगविता। बाळासवें तो चि पिता ।।२।।
कर्म अकर्म जळालें । प्रौढें तुका तें उरले ।।३।।

नाटाचे अभंग समाप्त ६३
६०९
 प्रथम नमन तुज एकदंता । रंगीं रसाळ वोडवीं कथा। मति सौरस करीं प्रबळता । जेणें फिटे आतां अंधकार ।।१।।
तुझिये कृपेचें भरितें । आणीक काय राहिलें तेथें । मारग सिद्धाच्यानि पंथें। पावविसी तेथें तूं चि एक ।।धृ।।
आरंभा आदि तुझें वंदन । सकळ करितां कारण । देव ऋषि मुनि आदिकरुन । ग्रंथ पुराण निर्माणी ।।२।।
काय वर्णूं तुझी गती । एवढी कैची मज मती । दिनानाथ तुज म्हणती । करी । करीं सत्य वचन हें चि आपुलें ।।३।।
मज वाहावतां मायेच्या पुरीं । बुडतां डोहीं भवसागरीं । तुज वांचुनि कोण तारी । पाव झडकरी तुका म्हणे ।।४।।

६१०
 प्रथमारंभीं लंबोदर । सकळ सिद्धींचा दातार । चतुर्भुज फरशधर । न कळे पार वर्णितां ।।१।।
तो देव नटला गौरीबाळ । पायीं बांधोनि घागऱ्या घोळ । नारदतुंबरसहित मेळ । सुटला पळ विघ्नांसी ।।२।।
नटारंभी थाटियला रंग । भुजा नाचवी हालवी अंग। सेंदुरविलेपनें चांग । मुगुटीं नाग मिरविला ।।३।।
जया मानवतीदेव ऋषि मुनी । पाहातां न पुरें डोळियां धनी । असुर जयाच्या चरणीं। आदीं अवसानीं तो चि एक ।।४।।

सकळां सिद्धींचा दातार । जयाच्या रूपा नाहीं पार । तुका म्हणे आमुचा दातार । भवसागर तारील हा ।।५।।

६११
विठ्ठल आमचें जीवन । आगमनिगमाचें स्थान । विठ्ठल सिद्धीचें साधन । विठ्ठल ध्यानविसावा ।।१।।
विठ्ठल कुळींचें दैवत। विठ्ठल वित्त गोत । विठ्ठल पुण्य पुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ।।२।।
विठ्ठल विस्तारला जनीं । सप्त ही पाताळें भरूनी । विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनिमानसीं ।।३।।
विठ्ठल जीवाचा जिव्हाळा। विठ्ठल कृपेचा कोंवळा । विठ्ठल प्रेमाचा पुतळा। लावियेलें चाळा । विश्व विठ्ठलें ।।४।।
विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता । विठ्ठलेंविण चाड नाहीं गोता । तुका म्हणे आतां नाहीं दुसरें ।।५।।

६१२
बरवा झाला वेवसाव । पावलों चिंतिला चि ठाव । दृढ पायीं राहिला भाव । पावला जीव विश्रांती ।।१।।
बरवा फळला शकुन । अवघा निवारिला सिण । तुमचें जालिया दरुषण । जन्ममरण नाहीं आता ।।धृ।।
बरवें जालें आलों या ठाया । होतें संचित ठायींच पाया । देहभाव पालटली काया । पडली छाया ब्रम्हींची ।।२।।
जोडिलें न सरे हें धन । अविनाश आनंदघन । अमूर्तमूर्ति मधुसूदन। सम चरण देखियेले ।।३।।
जुनाट जुगादिचें नाणें । बहुता काळाचें ठेवणें । लोपलें होतें पारिखेपणें । ठावचळण चुकविला ।।४।।
आतां या जीवाचियासाठीं । न सुटे पडलिया मिठी। तुका म्हणे सिणलों जगजेठी । न लगो दिठी दुसऱ्याची ।।५।।

६१३
मी तंव अनाथ अपराधी । कर्महीन मतिमंदबुद्धी । तुज म्यां आठविलें नाहीं कधीं । वाचे कृपानीधी मायबापा ।।१।।
नाहीं ऐकिलें गाइलें गीत । धरिली लाज सांडिलें हित । नावडे पुराण बैसले

संत । केली बहुत परनिंदा ।।धृ।।
केला करविला नाहीं उपकार। नाहीं दया आली पीडितां पर । करू नये तो केला व्यापार। वाहिला भार कुटुंबाचा ।।२।।
नाही केलें तीर्थाचें भ्रमण । पाळिला पिंड करचरण । नाहीं संतसेवा घडलें दान । पूजावलोकन मुर्तीचें ।।३।।
असंगसंग घडले अन्याय । बहुत अधर्म उपाय । न कळे हित करावें तें काय । नये बोलूं आठवूं तें ।।४।।
आप आपण्या घातकर। शत्रु जालों मी दावेदार । तूं तंव कृपेचा सागर। उतरीं पार तुका म्हणे ।।५।।

६१४

आतां पावन सकळ सुखें । खादलें कदा तें नखें । अवघे सरलें पारिखें । सकळ देखें माहियरें ।।१।।
जवळी विठ्ठल रखुमाई । बहिणी बंधु बाप आई । सकळ गोताची च साई । पारिखें काईं ऐसें नेणिजे ।।धृ।।
जगदाकारीं जाली सत्ता । वारोनी गेली पराधीनता । अवघे आपुलें चि आतां । लाज आणि चिंता दुऱ्हावली ।।२।।
वावरे इच्छा वसे घरीं । आपुले सत्तेचे माहेरीं । करवी तैसें आपण करी । भीड न धरी चुकल्याची ।।३।।
सोसिला होता सासुरवास। बहुतांचा बहुत दिवस । बहु कामें पुरविला सोस । आतां उदास आपुल्यातें ।।४।।
करिती कवतुक लाडें । मज बोलविती कोडें । मायबाप उत्तरें गोडें । बोले बोबडें पुढें तुका ।।५।।

६१५

सर्वसुखाचिया आशा जन्म गेला । क्षण मुक्ती यत्न नाहीं केला । हिंडतां दिशा सीण पावला । मायावेष्टिला जीव माझा ।।१।।
माझें स्वहित नेणती कोणी । कांहीं न करितां मजवांचुनी । स्वजन तंव सुखमांडणी । नेणती कोणी आदि अंत ।।धृ।।
काय सांगों गर्भीची यातना । मज भोगितां नारायणा । मांस मळ मूत्र जाणा । तुज क्षणक्षणा ध्यात असें ।।२।।
मज चालतां प्रयाणकाळीं। असतां न दिसती जवळी । मृत्तिके मृत्तिका कवळी । एकले मेळीं संचिताचे ।।३।।

आतां मज ऐसें करीं गा देवा । कांहीं घडे तुझी चरणसेवा । तुका विनवीतसे केशवा । चालवीं दावा संसारें ।।४।।

६१६

अगा ए सावळ्या सगुणा । गुणनिधिनाम नारायणा । आमची परिसा विज्ञापना । सांभाळी दीना आपुलिया ।।१।।
बहु या उदराचे कष्ट । आम्हांसि केलें कर्मभ्रष्ट । तुमची चुकविली वाट । करीं वटवट या निमित्यें ।।धृ।।
जालों पांगिला जनासी । संसाराची आंदणी दासी । न कळे कधीं सोडविसी । दृढपाशीं बहु बांधलों ।।२।।
येथें तों नये आठव कांहीं । विसावा तो क्षण एक नाहीं । पडिलों आणिके प्रवाहीं । हित तों कांहीं दिसे चि ना ।।३।।
जीवित्व वेचलों वियोगें । हिंडतां प्रवास वाउगें । कांहीं व्याधि पीडा रोगें । केलिया भोगें तडातोडी ।।४।।
माझा मीं च जालों शत्रु । कैचा पुत्र दारा कैचा मित्रु । कासया घातला पसरु । अहो जगद्‌गुरु तुका म्हणे ।।५।।

६१७

आतां मज धरवावी शुद्धि । येथुनी परतवावी बुद्धि । घ्यावें सोडवुनि कृपानिधि । सांपडलों संधीं काळचक्रीं ।।१।।
करिसील तरि नव्हे काई । राईचा डोंगर पर्वत राई । आपुले करुणेची खाई। करीं वो आई मजवरी ।।धृ।।
मागील काळ अज्ञानपणें । सरला स्वभावें त्या गुणें । नेणे आयुष्य जालें उणें । पुढील पेणें अंतरलें ।।२।।
आतां मज वाटतसे भय । दिवसेंदिवस चालत जाय । येथें म्या येउनि केलें काय । नाहीं तुझे पाय आठविले ।।३।।
करूनि अपराध क्षमा । होतील केले पुरुषोत्तमा । आपुले नामीं घ्यावा प्रेमा। सोडवीं भ्रमापासुनिया ।।४।।
हृदय वसो तुमच्या गुणीं । ठाव हा पायांपें चरणीं । करूं हा रस सेवन वाणी । फिटे तों धणी तुका म्हणे ।।५।।

६१८

जेणें हा जीव दिला दान । तयाचें करीन चिंतन । जगजीवन नारायण ।

गाईन गुण तयाचे ।।१।।
जो या उभा भीवरेच्या तिरीं । कट धरूनियां करीं । पाउलें सम चि साजिरीं । अंतरीं धरोनि राहेन ।।धृ।।
जो या असुरांचा काळ । भक्तजनप्रतिपाळ । खेळे हीं लाघवें सकळ । तयाच्या भाळ पायांवरी ।।२।।
जो या गोपाळांच्या मेळीं । खेळु खेळे वनमाळी । रसातळा नेला बळी । राहे पाताळीं स्वामी माझा ।।३।।
जो हा लावण्यपुतळा । जयाचे अंगीं सकळ कळा । जयाचे गळां वैजयंतीमाळा । तया वेळोवेळां दंडवत ।।४।।
जयाचे नाम पाप नासी । लक्ष्मी ऐसी जयाची दासी । जो हा तेजोपुंज्यरासी । सर्वभावें त्यासि तुका शरण ।।५।।

६१९

काय मी उद्धार पावेन । काय कृपा करील नारायण । ऐसें तुम्ही सांगा संतजन । करा समाधान चित्त माझें ।।१।।
काय हें खंडईल कर्म । पारुषतील धर्माधर्म । कासयानें तें कळे वर्म । म्हणउनी श्रम वाटतसे ।।धृ।।
काय हो स्थिर राहेल बुद्धी । कांहीं अरिष्ट न येल मधीं । धरिली जाईल ते शुद्धी । शेवट कधीं तो मज न कळे ।।२।।
काय ऐसें पुण्य होईल गांठीं । घालीन पायीं देवाचे मिठी । मज तो कृवाळील जगजेठी । दाटइन कंठीं सद्‌गदित ।।३।।
काय हे निवतील डोळे । सुख तें देखोनी सोहळे । संचित कैसें तें न कळे । होतील डोहळे वासनेसी ।।४।।
ऐसी चिंता करीं सदा सर्वकाळ । रात्रिदिवस तळमळ । तुका म्हणे नाहीं आपुलें बळ । जेणें फळ पावें निश्चयेंसी ।।५।।

६२०

तूंचि अनाथाचा दाता । दुःख मोह नासावया चिंता । शरण आलों तुज आतां । तारीं कृपावंता मायबापा ।।१।।
संतसंगति देईं चरणसेवा । जेणें तुझा विसर न पडावा । हा च भाव माझिया जीवा । पुरवीं देवा मनोरथ ।।२।।
मज भाव प्रेम देई कीर्ती । गुण नाम वर्णावया स्तुती । विघ्नां सोडवूनि हातीं । विनंती माझी परिसावी हे ।।३।।

आणीक कांहीं नाहीं मागणें । सुखसंपत्तिराज्यचाड धन । सांकडें न पडे तुज जेणें । दुजें भक्तीविण मायबापा ।।४।।
जोडोनियां कर पायीं ठेवीं माथा । तुका विनवी पंढरिनाथा । रंगीं वोडवावी रंगकथा । पुरवीं व्यथा मायबापा ।।५।।

६२१
सेंदरीं हें देवी दैवतें । कोण तीं पुजी भुतेंकेतें । आपुल्या पोटा जीं रडतें । मागती शितें अवदान ।।१।।
आपुले इच्छे आणिकां पीडी । काय तें देईल बराडी । कळों ही आली तयाची जोडी । अल्प रोकडी बुद्धि अधरा ।।धृ।।
दासीचा पाहुनरउखतें। धणी देईल आपुल्या हातें । करुणाभाषणउचितें । हें तों रितें सतंत शक्तिहीन ।।२।।
काय तें थिल्लरीचें पाणी । ओठ न भिजे फिटे धणी । सीण तरीं आदीं आवसानीं । क्षोभे पुरश्र्चरणीं दिलें फळ ।।३।।
विलेपनें बुजविती तोंड । भार खोल वाहाती उदंड । करविती आपणयां दंड। ऐसियास भांड म्हणे देव तो ।।४।।
तैसा नव्हे नारायण । जगव्यापक जनार्दनष । तुका म्हणे त्याचें करा चिंतन । वंदूं चरण येती सकळें ।।५।।

६२२
विषयओढीं भुलले जीव । आतां यांची कोण करील कींव । नुपजे नारायणीं भाव । पावोनि ठाव नरदेह ।।१।।
कोण सुख धरोनि संसारीं । पडोनि काळाचे आहारीं । माप या लागलें शरीरीं । जालियावरी सळे ओढिती ।।धृ।।
बापुडीं होतील सेवटीं । आयुष्यासवें जालिया तुटी । भोगिले मागें पुढे ही कोटी । होईल भेटी जन्मासी ।।२।।
जंतिली घाणां बांधोनि डोळे । मागें जोडी आर तेणेंही पोळे । चालिलों किती तें न कळे । दुःखें हारंबळे भूकतान ।।३।।
एवढें जयाचें निमित्त । प्रारब्ध क्रियमाण संचित । तें हें देह मानुनि अनित्य। न करिती नित्य नामस्मरण ।।४।।
तुका म्हणे न वेंचतां मोल । तो हा यासि महाग विठ्ठल । वेंचितां फुकाचे चि बोल। केवढें खोल अभागिया ।।५।।

६२३
आले हो संसारा तुम्ही एक करा । मुक्तिमारग हळू चि धरा । काळदंड कुंभयातना थोरा । कां रे अघोरा देखसी ना ।।१।।
नाहीं त्या यमासि करुणा । बाहेर काढितां कुडी प्राणा । ओढाळ सांपडे जैं धान्या । चोर यातना धरिजेतां ।।२।।
नाहीं दिलें पावइल कैसा । चालतां पंथ तेणें वळसा । नसेल ठाउकें ऐकतो कैसा । नेती बंद जैसा धरोनियां ।।३।।
क्षण एक नागीवा पायीं । न चलवे तया करितां कांहीं । वोढितां कांटवणा सोईं । अग्निस्तंभीं बाही कवटाळविती ।।४।।
देखोनि अंगें कांपती । तये नदीमाजी चालविती। लागे ठाव न लगे बुडविती । वरि मारिती यमदंड ।।५।।
तानभूक न साहावे वेळ । तो राखिती कितीएक काळ । पिंड पाळूनि कैसा सीतळ । तो तप्तभूमीं ज्वाळ लोळविती ।।६।।
म्हणउनी करा कांहीं सायास । व्हावेल तर व्हा रे उदास । करवेल तर करा नामघोष । सेवा भक्तिरस तुका म्हणे ।।७।।

६२४
न बोलसी तें ही कळलें देवा । लाजसी आपुलिया नांवा। तुज मी नाहीं घालीत गोवा । भीड केशवा कासयाची ।।१।।
उतरीं आपुला हा पार । मजशीं बोलोनि उत्तर । माझा तुज नव्हे अंगीकार । मग विचार करीन मी ।।२।।
दात्या आणि मागत्यासी । धर्मनीति तरी बोलिली ऐसी । यथानशक्ति टाकेल तैसी । बाधी दोघांसी विन्मुखता ।।३।।
म्हणोनि करितों मी आस । तुझिया वचनाची वास । धीर हा करूनि सायास । न टळें नेमास आपुलिया ।।४।।
तुझें म्यां घेतल्या वांचून । न वजें एथूनि वचन । हा चि माझा नेम सत्य जाण । आहे नाहीं म्हणे तुका म्हणे ।।५।।

६२५
आतां मी न पडें सायासीं । संसारदुःखाचिये पाशीं । शरण रिघेन संतांसी । ठाव पायांपाशीं मागेन त्यां ।।१।।
न कळे संचित होतें काय । कोण्या पुण्यें तुझे लाधती पाय । आतां मज न विसंबें माय । मोकलूनि धाय विनवीतसें ।।२।।

बहुत जाचलों संसारें । मोहमायाजाळाच्या विखारें । त्रिगुण येतील लहरें । तेणें दुःखें थोरें आक्रंदलों ।।३।।
आणीक दुःखें सांगों मी किती । सकळ संसारस्थिती । न साहे पाषाण फुटती । भय चित्तीं कांप भरलासे ।।४।।
आतां मज न साहवे सर्वथा । संसारगंधीची हे वार्ता । जालों वेडा असोनि जाणता । पावें अनंता तुका म्हणे ।।५।।

६२६
आतां तुज कळेल तें करीं । तारिसी तरि तारीं मारीं । जवळी अथवा दुरी धरीं । घाली संसारीं अथवा नको ।।१।।
शरण आलों नेणतपणें । भाव आणि भक्ति कांहीं च नेणें । मतिमंद सर्वज्ञानें । बहु रंक उणें रंकाहुनी ।।धृ।।
मन स्थिर नाहीं माझिये हातीं। इंद्रियें धांवतां नावरती । सकळ खुंटलिया युक्ती । शांति निवृत्ति जवळी नाहीं ।।२।।
सकळ निवेदिला भाव । तुझिये पायीं ठेविला जीव । आतां करीं कळे तो उपाव । तूं चि सर्व ठाव माझा देवा ।।३।।
राहिलों धरूनि विश्वास । आधार नेटीं तुझी कास । आणीक नेणें मी सायास । तुका म्हणे यास तुझें उचित ।।४।।

६२७
देवा तूं कृपाकरुणासिंधु । होसी मायबाप आमचा बंधु। जीवनसिद्धि साधनसिंधु । तोडिसी भवबंधु काळपाश ।।१।।
शरणागता वज्रपंजर । अभयदाना तूं उदार । सकळां देवां तूं अगोचर । होसी अविकार अविनाश ।।धृ।।
भागली स्तुति करितां फार । तेथें मी काय तें गव्हार । जाणावया तुझा हा विचार । नको अंतर देऊं आतां ।।२।।
नेणें भाव परि म्हणवीं तुझा । नेणें भक्ति परि करितों पूजा । आपुल्या नामाचिया काजा । तुज केशीराजा लागे धांवणें ।।३।।
तुझिया बळें पंढरीनाथा । जालों निर्भर तुटली व्यथा । घातला भार तुझिया माथां। न भीं सर्वथा तुका म्हणे ।।४।।

६२८
कोण सुख धरोनि संसारीं । राहों सांग मज बा हरी । अवघ्या नाशिवंता

परी । थिता दुरी अंतरसी ।।१।।
प्रथम केला गभाअ वास । काय ते सांगावे सायास । दुःख भोगिलें नव ही मास । आलों जन्मास येथवरी ।।२।।
बाळपण गेलें नेणतां । तारुण्यदशे विषयव्यथा। वृद्धपणीं प्रवर्तली चिंता । मरें मागुता जन्म धरीं ।।३।।
क्षण एक तो ही नाहीं विसावा । लक्ष चौऱ्याशीं घेतल्या धांवा ।
भोवंडिती पाठीं लागल्या हांवा । लागो आगी नांवा माझ्या मीपणा ।।४।।
आतां पुरे ऐसी भरोवरी । रंक होऊनि राहेन द्वारीं । तुझा दास मी दीन कामारी। तुका म्हणे करीं कृपा आतां ।।५।।

६२९
सुख या संतसमागमें । नित्य दुनावे तुझिया नामें । दहन होती सकळ कर्मे । सर्वकाळ प्रेमें डुलतसों ।।१।।
म्हणोनि नाहीं कांहीं चिंता । तूं चि आमुचा मातापिता । बहिणी बंधु आणि चुलता । आणिकां गोतां सर्वांठायीं ।।२।।
ऐसा हा कळला निर्धार। मा माझा तुज न पडे विसर । अससी देऊनियां धीर । बाह्य अभ्यंतर मजजवळा ।।३।।
दुःख तें कैसें नये स्वप्नासी । भुक्तिमुक्ति जाल्या कामारी दासी । त्यांचें वर्म तूं आम्हांपाशीं । सुखें राहिलासी प्रेमाचिया ।।४।।
जेथें तुझ्या कीर्तनाचा घोष । जळती पापें पळती दोष । काय तें उणें आम्हां आनंदास । सेवूं ब्रम्हरस तुका म्हणे ।।५।।

६३०
देवा तूं आमचा कृपाळ । भक्तिप्रतिपाळ दीनवत्सळ । माय तूं माउली स्नेहाळ । भार सकळ चालविसी ।।१।।
तुज लागली सकळ चिंता । राखणें लागे वांकडें जातां । पुडती निरविसी संतां । नव्हे विसंबतां धीर तुज ।।२।।
आम्हां भय चिंता नाहीं धाक जन्म मरण कांहीं एक । जाला इहलोकीं परलोक । आलें सकळैकवैकुंठ ।।३।।
न कळे दिवस कीं राती । अखंड लागलीसे ज्योती । आनंदलहरीची गती । वर्णू कीर्ती तया सुखा ।।४।।
तुझिया नामाचीं भूषणें । तों यें मज लेवविलीं लेणें । तुका म्हणे तुझियान गुणें । काय तें उणें एक आम्हां ।।५।।

६३१

न पवे सन्निध वाटते चिंता । वरि या बहुतांची सत्ता । नुगवे पडत जातो गुंता । कर्मा बळिवंता सांपडलों ।।१।।
बहु भार पडियेला शिरीं । मी हें माझें मजवरी । उघड्या नागविलों चोरीं । घरिच्याघरीं जाणजाणतां ।।धृ।।
तुज मागणें इतुलें आतां । मज या निरवावें संतां । जाला कंठस्फोट आळवितां । उदास आतां न करावें ।।२।।
अति हा निकट समय । मग म्यां करावें तें काय । दिवस गेलिया टाकईल छाय । उरईल हाय रातिकाळीं ।।३।।
होईल संचिताची सत्ता। अंगा येईल पराधीनता । ठाव तो न दिसे लपतां। बहुत चिंता प्रवर्तली ।।४।।
ऐसी या संकटाची संधी । धांव घालावी कृपानिधी । तुका म्हणे माझी बळबुद्धी । सकळ सिद्धी पाय तुझे ।।५।।

६३२

आतां धर्माधमाअ कांहीं उचित । माझें विचारावें हित । तुज मी ठाउका पतित । शरणागत परि जालों ।।१।।
येथें राया रंका एकी सरी । नाहीं भिन्नाभिन्न तुमच्या घरीं । पावलों पाय भलत्या परी। मग बाहेरी न घालावें ।।धृ।।
ऐसें हें चालत आलें मागें । नाहीं मी बोलत वाउगें । आपुलिया पडिल्या प्रसंगें । कीर्ति हे जगे वाणिजेते ।।२।।
घालोनियां माथां बैसलों भार । सांडिला लौकिक वेव्हार । आधीं हे विचारिली थार । अविनाश पर पद ऐसें ।।३।।
येथें एक वर्म पाहिजे धीर । परि म्यां लेखिलें असार । देह हें नाशिवंत जाणार । धरिलें सार नाम तुझें ।।४।।
केली आराणुक सकळां हातीं। धरावें धरिलें तें चित्तीं । तुका म्हणें सांगितलें संतीं। देईं अंतीं ठाव मज देवा ।।५।।

६३३

बरवें झालें आलों जन्मासी । जोड जोडिली मनुष्य देहा ऐसी । महा लाभाची उत्तम रासी । जेणें सुखासी पात्र होइजे ।।१।।
दिलीं इंद्रियें हात पाय कान । डोळे मुख बोलावया वचन । जेणें तूं जोडसी

नारायण । नासे जीवपण भवरोग ।।धृ।।
तिळेंतीळ पुण्य सांचा पडे । तरि हें बहुतां जन्मीं जोडे । नाम तुझें वाचेसी आतुडे । समागम घडे संतांचा ।।२।।
ऐसिये पावविलों ठायीं । आतां मी कांई होऊं उतराई। येवढा जीव ठेवीन पायीं । तूं माझे आई पांडुरंगे ।।३।।
फेडियेला डोळियांचा कवळ । धुतला गुणदोषांचा मळ । लावूनि स्तनीं केलों सीतळ । निजविलों बाळ निजस्थानीं ।।४।।
नाहीं या आनंदासी जोडा । सांगतां गोष्टी लागती गोडा । आला आकारा आमुच्या चाडा। तुका म्हणे भिडा भक्तीचिया ।।५।।

६३४

अल्प भाव अल्प मती । अल्प आयुष्य नाहीं हातीं । अपराधाची वोळिलों मूर्ती । अहो वेदमूर्ती परियेसा ।।१।।
किती दोषा देऊं परिहार । गुणदोषें मळिलें अंतर । आदि वर्तमान भविष्याकार। गेला अंतपार ऐसें नाहीं ।।धृ।।
विविध कर्म चौऱ्याशी फेरा । त्रिविध भोग या शरीरा । कर्मकोठार पांजरा । जन्मजरामरणसांटवण ।।२।।
जीवा नाहीं कुडीचें लाहातें । यें भिन्न पंच भूतें । रचतें खचतें संचितें । असार रितें फलकट ।।३।।
पुत्र पत्नी सहोदर । मायबाप गोताचा पसर । मिळतां काष्ठें लोटतां पूर । आदळीं दूर होती खलाळीं ।।४।।
म्हणोनि नासावें अज्ञान । इतुलें करीं कृपादान । कृपाळु तूं जनार्दन । धरूनि चरण तुका विनवी ।।५।।

६३५

ऐसी हे गर्जवूं वैखरी । केशव मुकुंद मुरारी । राम कृष्ण नामें बरीं । हरी हरी दोष सकळ ।।१।।
जनार्दना जगजीवना। विराटस्वरूपा वामना । महदादि मधुसूदना । भवबंधना तोडितिया ।।धृ।।
चक्रपाणी गदाधरा । असुरमर्दना वीर्यवीरा । सकळमुगुटमणि शूरा । अहो दातारा जगदानिया ।।२।।
मदनमूर्ती मनमोहना । गोपाळगोपिकारमणा । नटनाट्यकौशल्य कान्हा । अहो संपन्ना सर्वगुणें ।।३।।

गुणवंता आणि निर्गुणा । सर्वसाक्षी आणि सर्वजाणा। करोनि अकर्ता आपणा । नेदी अभिमाना आतळों ।।४।।
कासयानें घडे याची सेवा । काय एक समर्पावें या देवा । वश्य तो नव्हे वांचुनि भावा । पाय जीवावेगळे न करी तुका ।।५।।

६३६
होतों तें चिंतीत मानसीं । नवस फळले नवसीं । जोडिते नारायणा ऐसी । अविट ज्यासी नाश नाहीं ।।१।।
धरिले जीवीं न सोडीं पाय । आलें या जीवित्वाचें काय । कैं हे पाविजेती ठाय । लाविली सोय संचितानें ।।धृ।।
मज तों पडियेली होती भुली। चित्ताची अपसव्य चाली । होती मृगजळें गोवी केली । दृष्टि उघडली बरें जालें ।।२।।
आतां हा सिद्धि पावो भाव । मध्यें चांचल्यें न व्हावा जीव । ऐसी तुम्हां भाकीतसें कींव । कृपाळुवा जगदानिया ।।३।।
कळों येतें आपुले बुद्धी । ऐसें तों न घडतें कधीं। केवढे आघात ते मधीं । लज्जा रिद्धी उभी आड ठाके ।।४।।
कृपा या केली संतजनीं । माझी अळंकारिली वाणी । प्रीति हे लाविली कीर्तनीं । तुका चरणीं लोळतसे ।।५।।

६३७
तुझिया पार नाहीं गुणां । माझी अल्प मति नारायणा। भवतारका जी सुजाणा । एक विज्ञापना पायांपाशीं ।।१।।
काय जाणावें म्यां दीनें । तुझिये भक्तीचीं लक्षणें । धड तें तोंड धोऊं नेणें । परि चिंतनें काळ सारीं ।।धृ।।
न लवीं आणीक कांहीं पिसें। माझिया मना वांयां जाय ऐसें । चालवीं आपुल्या प्रकाशें । हातीं सरिसें धरोनिया ।२।।
तुज समर्पिली काया । जीवें भावें पंढरीराया। सांभाळीं समविषम डाया । करीं छाया कृपेची ।।३।।
चतुर तरीं चतुरां रावो । जाणता तरीं जीवांचा जीव । न्यून तो कोण एक ठाव। आरुष भाव परि माझा ।।४।।
होतें तें माझें भांडवल । पायांपें निवेदिले बोल । आदरा ऐसें पाविजे मोल । तुका म्हणे साच फोल तूं जाणसी।।५।।

६३८
 कां हो माझा मानियेला भार । ऐसा दिसे फार । अनंत पावविलीं उद्धार । नव्हे चि थार मज शेवटीं ।।१।।
पाप बळिवंत गाढें । तुज ही राहों सकतें पुढें । मागील कांहीं राहिलें ओढें । नवल कोडें देखियेलें ।।२।।
काय मानिती संतजन । तुमचें हीनत्ववचन। कीं वृद्ध जाला नारायण । न चले पण आधील तो ।।३।।
आतां न करावी चोरी । बहुत न धरावें दुरी । पडदा काय घरच्याघरीं । धरिलें दुरी तेव्हां धरिलें ।।४।।
नको चाळवूं अनंता । कासया होतोसि नेणता । काय तूं नाहीं धरीत सत्ता । तुका म्हणे आतां होईं प्रगट ।।५।।

६३९
 मज ते हांसतील संत । जीहीं देखिलेती मूर्तिमंत । म्हणोनि उद्वेगलें चित्त । आहा च भक्त ऐसा दिसें ।।१।।
ध्यानीं म्या वर्णावेति कैसे । पुढें एकीं स्तुति केली असे । तेथूनि जीव निघत नसे । ऐसिये आश लागलोंसें ।।धृ।।
कासया पाडिला जी धडा । उगा चि वेडा आणि वांकडा । आम्हां लेंकरांसि पीडा । एक मागें जोडा दुसऱ्याचा ।।२।।
सांगा कोणाचा अन्याय । ऐसें मी धरीतसें पाय । तूं तंव सम चि सकळां माय । काय अन्याय एक माझा ।।३।।
नये हा जरी कारणा । तरी कां व्यालेति नारायणा । वचन द्यावें जी वचना । मज अज्ञाना समजावीं ।।४।।
बहुत दिवस केला बोभाट । पाहातां श्रमलों ते वाट । तुका म्हणे विस्तारलें ताट । काय वीट आला नेणों स्वामी ।।५।।

६४०
 बरें जालें आजिवरी । नाहीं पडिलों मृत्याचे आहारीं । वांचोन आलों एथवरी । उरलें तें हरी तुम्हां समर्पण ।।१।।
दिला या काळें अवकाश । नाहीं पावलें आयुष्य नाश । कार्या कारण उरलें शेष । गेलें तें भूस जावो परतें ।।धृ।।
बुडणें खोटें पावतां थडी । स्वप्नीं जाली ओढाओढी । नासली जागृतीची घडी । साच जोडी शेवटीं गोड घास ।।२।।

तुम्हासि पावविली हाक । तेणें निरसला धाक । तुमचें भातें हें कवतुक । जे शरणागत लोक रक्षावे ।।३।।
रवीच्या नावें निशीचा नाश । उदय होतां चि प्रकाश । अतां कैचा आम्हां दोष । तूं जगदीश कैवारी ।।४।।
आतां जळो देह सुख दंभ मान । न करीं याचें साधन । तूं जगदादि नारायण । आलों शरण तुका म्हणे ।।५।।

६४१
आतां माझा नेणों परतों भाव । विसावोनि पायीं ठेविला जीव । सकळां लाभांचा हा ठाव । ऐसा वाव जाला चित्ताठायीं ।।१।।
भांडवल गांठी तरि विश्वास । जालों तों जालों निश्चय दास । न पाहें मागील ते वास । पुढती सोस सेवेचा ची ।।धृ।।
आहे तें निवेदिलें सर्व । मी हें माझें मोडियला गर्व । अकाळीं काळ अवघें पर्व । जाला भरवसा कृपेलाभाचा ।।२।।
वेव्हारीं वेव्हारा अनंत । नाहीं यावांचुनी जाणत । तरी हें समाधान चित्त । लाभहानी नाहीं येत अंतरा ।।३।।
करूनि नातळों संसारा । अंग भिन्न राखिला पसारा । कळवळा तो जीवनीं खरा । बीजाचा थारा दुरी आघात ।।४।।
बहु मतापासूनि निराळा । होऊनि राहिलों सोंवळा । बैसल्या रूपाचा कळवळा । तुका म्हणे डोळां लेइलों तें ।।५।।

६४२
तुळसीमाळा घालुनी कंठीं । उभा विटेवरी जगजेठी । अवलोकोनि पुंडलीका दृष्टी । असे भीमातटीं पंढरीनाथ ।।१।।
भुक्तिमुक्ति जयाच्या कामारी । रिद्धिसिद्धि वोळगती द्वारीं । सुदर्शन घरटी करी । काळ कांपे दुरी धाकें तया ।।२।।
जगज्जननी असे वाम भागीं । भीमकी शोभली अर्धांगीं । जैसी विद्युल्लता झमके मेघीं । दरुषणें भंगी महा दोष ।।३।।
सुखसागर परमानंदु । गोपीगोपाळां गोधनां छंदु । पक्षिश्वापदां जयाचा वेधु । वाहे गोविंदु पांवा छंदें ।।४।।
मुखमंडित चतुर्भुजा । मनमोहना गरुडध्वजा । तुका म्हणे स्वामी माझा । पावे भक्तिकाजा लवलाहीं ।।५।।

६४३
 हातींचें न संडावें देवें । शरण आलों जीवें भावें । आपुलें ऐसें म्हणावें । करितों जीवें निंबलोण ।।१।।
बैसतां संतांचे पंगती । कळों आलें कमळापती । आपुलीं कोणी च नव्हती । निश्चय चित्तीं दृढ जाला ।।धृ।।
येती तुझिया भजना आड । दाविती प्रपंचाचें कोड । कनिष्ठीं रुचि ठेऊनि गोड । देखत नाड कळतसे ।।२।।
मरती मेलीं नेणों किती । तो चि लाभ तयाचे संगती । म्हणोनि येतों काकुलती । धीर तो चित्तीं दृढ द्यावा ।।३।।
सुखें निंदोत हे जन । न करीं तयांशीं वचन । आदिपिता तूं नारायण । जोडी चरण तुमचे तें ।।४।।
आपलें आपण न करूं हित । करूं हें प्रमाण संचित । तरी मी नष्ट चि पतित । तुका म्हणे मज संत हांसती ।।५।।

६४४
 बरवें जालें लागलों कारणीं । तुमचे राहिलों चरणीं । फेडीन संतसंगती धणी । गर्जइल गुणीं वैखरी ।।१।।
न वंचें शरीर सेवेसी । काया वाचा आणि मनेसीं । जालों संताची अंदणी दासी। केला याविशीं निर्धार ।।धृ।।
जीवनीं राखिला जिव्हाळा । जालों मी मजसी निराळा । पंचभूतांचा पुतळा । सहज लीळा वर्ततसे ।।२।।
जयाचें जया होईल ठावें । लाहो या साधियेला भावें । ऐसें होतें राखियलें जीवें । येथूनि देवें भोवहुनी ।।३।।
आस निरसली ये खेपे। अवघे पंथ जाले सोपे । तुमचे दीनबंधु कृपें । दुसरें कांपे सत्ताधाकें ।।४।।
अंकिले पणें आनंदरूप । आतळों नये पुण्यपाप । सारूनि ठेविले संकल्प । तुका म्हणे आपें आप एकाएकीं ।।५।।

६४५
 अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुणभक्ती। प्रगटे ह्रदयींची मूर्ती । भावशुद्धि जाणोनियां ।।१।।
बीज आणि फळ हरींचे नाम । सकळ पुण्य सकळ धर्म । सकळां कळांचें हे वर्म। निवारी श्रम सकळ ही ।।धृ।।

जेथें कीर्तन हें नामघोष । करिती निर्लज्ज हरीचे दास । सकळ वोथंबले रस । तुटती पाश भवबंधाचे ।।२।।
येती अंगा वसती लक्षणें । अंतरीं देवें धरिलें ठाणें। आपण चि येती तयाचा गुण । जाणें येणें खुंटे वस्तीचें ।।३।।
न लगे सांडावा आश्रम । उपजले कुळींचे धर्म । आणीक न करावे श्रम । एक पुरे नाम विठोबाचें ।।४।।
वेदपुरुष नारायण । योगियांचें ब्रम्ह शून्य । मुक्ता आत्मा परिपूर्ण । तुका म्हणे सगुण भोळ्या आम्हां ।।५।।

६४६
श्रीअनंता मधुसूदना । पद्मनाभा नारायणा । जगव्यापका जनार्दना । आनंदघना अविनाशा ।।१।।
सकळदेवा आदिदेवा । कृपाळुवा जी केशवा । महा महानुभवा । सदाशिवा सहजरूपा ।।धृ।।
चक्रधरा विश्वंभरा । गरुडध्वजा करुणाकरा । सहस्त्रपादा सहस्त्रकरा । क्षीरसागरा शेषशयना ।।२।।
कमलनयना कमलापती । कामिनीमोहना मदनमूर्ती । भवतारका धरित्या क्षिती । वामनमूर्ती त्रिविक्रमा ।।३।।
अगा ये सगुणा निर्गुणा । जगज्जनित्या जगज्जीवना। वसुदेवदेवकीनंदना । बाळरांगणा बाळकृष्णा ।।४।।
तुका आला लोटांगणी । मज ठाव द्यावा जी चरणीं । हे चि करीतसें विनवणी। भवबंधनीं सोडवावें ।।५।।

६४७
आतां येणें बळें पंढरीनाथ । जवळी राहिला तिष्ठत । पाहातां न कळे जयाचा अंत । तो चि हृदयांत घालूं आतां ।।१।।
विसरोनि आपुला देहपणभाव । नामें चि भुलविला पंढरीराव । न विचारी याती कुळ नांव । लागावया पाव संतांचे ।।२।।
बरें वर्म आलें आमुचिया हातां । हिंडावें धुंडावें न लगतां । होय अविनाश सहाकारी दाता । चतुर्भुज संता परि धाकें ।।३।।
होय आवडी सानें थोर । रूप सुंदर मनोहर । भक्तिप्रिय लोभापर । करी आदर याचकपणें ।।४।।
तें वर्म आलें आमुच्या हाता । म्हणोनि शरण निघालों संतां । तुका म्हणे

पंढरीनाथा । न सोडी आतां जीवें भावें ।।५।।

६४८
 माझा तंव खुंटला उपाव । जेणें तुझे आतुडती पाव । करूं भक्ति तरि नाहीं भाव । नाहीं हातीं जीव कवणेविशीं ।।१।।
धर्म करूं तरि नाहीं चित्त । दान देऊं तरि नाहीं वित्त । नेणें पुजों ब्राम्हण अतीत । नाहीं भूतदया पोटा हातीं ।।२।।
नेणें गुरुदास्य संतसेवन । जप तप अनुष्ठान । नव्हे वैराग्य वनसेवन । नव्हे दमन इंद्रियांसी ।।३।।
तीर्थ करूं तरि मन नये सवें । व्रत करूं तरि विधि नेणें स्वभावें । देव जरि आहे म्हणों मजसवें । तरि आपपरावें न वंचे ।।४।।
म्हणोनि जालों शरणागत । तुझा दास मी अंकित । यास कांहीं न लगे संचित । जालों निश्चिंत तुका म्हणे ।।५।।

६४९
 तरि म्यां आळवावे कोणा । कोण हे पुरवील वासना। तुजवांचूनि नारायणा । लावी स्तना कृपावंते ।।१।।
आपुला न विचारी सिण । न धरीं अंगसंगें भिन्न । अंगीकारिलें राखें दीन । देईं जीवदान आवडीचें ।।धृ।।
माझिये मनासिहे आस । नित्य सेवावा ब्रम्हरस । अखंड चरणींचा वास । पुरवीं आस याचकाची ।।२।।
माझिया संचिताचा ठेवा । तेणें हे वाट दाविली देवा । एवढ्या आदराचा हेवा । मागें सेवादान आवडीनें ।।३।।
आळवीन करुणावचनीं। आणीक गोड न लगे मनीं । निद्रा जागृती आणि स्वप्नीं । धरिलें ध्यानीं मनीं रूप ।।४।।
आतां भेट न भेटतां आहे । किंवा नाहीं ऐसें विचारूनि पाहें । लागला झरा अखंड आहे । तुका म्हणे साहे केलें अंतरीं ।।५।।

६५०
 हें चि भवरोगाचें औषध । जन्म जरा तुटे व्याध । आणीक कांहीं नव्हे बाध । करील वध षड्वर्गा ।।१।।
सांवळें रूप ल्यावें डोळां । सा चौ अठरांचा गोळा । पदर लागों नेदी खळा । नाममंत्रमाळा विष्णुसहस्त्र ।।धृ।।

भोजना न द्यावें अन्न । जेणें चुके अनुपान । तरीं च घेतल्याचा गुण । होईल जाण सत्य भाव ।।२।।
नये निघों आपुलिया घरा । बाहेर लागों नये वारा । बहु बोलणें तें सारा । संग दुसरा वर्जावा ।।३।।
पास तें एक द्यावें वरी । नवनीताची होईल परी । होईल गुसळिलें तें निवारी । सार भीतरी नाहीं तया ।।४।।
न्हायें अनुतापीं पांघरें दिशा । स्वेद निघों दे अवघी आशा । होसिल मागें होतासि तैसा । तुका म्हणे दशा भोगीं वैराग्य ।।५।।

६५१
मागुता हा चि जन्म पावसी । भोगिलें सुखदुःख जाणसी। हें तों न घडे रे सायासीं । कां रे अंध होसी जाणोनियां ।।१।।
लक्ष चौऱ्याशी न चुके फेरा । गर्भवासीं यातना थोरा । येउनि पडसी संदेहपुरा। वोळसा थोरा मायाजाळीं ।।२।।
पशु काय पापपुण्य जाणती । उत्तम मध्यम भोग भोगिती । कांहीं एक उपजतां मरती । बहिरीं अंध होती पांगुळ मुकीं ।।३।।
नरदेह निधान लागलें हातीं । उत्तम सार उत्तम गती । होइन देव चि म्हणती ते होती । तरि कां चित्तीं न धरावें ।।४।।
क्षण एक मन स्थिर करूनी । साव होईं डोळे उघडोनी । पाहें वेद बोलिले पुराणीं । तुका विनवणी करीतसे ।।५।।

६५२
दास्य करी दासांचें । उणें न साहे तयांचें । वाढिलें ठायींचें । भानें टाकोनियां धांवे ।।१।।
ऐसा कृपेचा सागर । विटे उभा कटीं कर । सर्वस्वें उदार । भक्तांलागीं प्रगटे ।।धृ।।
हृदयीं श्रीवत्सलांछन । मिरवी भक्तांचें भूषण । नाहीं तयाचा सीण । सुख धरिलें लातेचें ।।२।।
सत्यभामा दान करी । उजुर नाहीं अंगीकारी । सेवकाच्या शिरीं । धरूनि चाले पादुका ।।३।।
राखे दारवंटा बळीचा। रथी जाला अर्जुनाचा । दास सेवकांचा । होय साचा अंकित ।।४।।
भिडा नो बोलवें पुंडलिकाशीं । उभा मर्यादा पाठीशीं । तुका म्हणे ऐसी । कां

रे न भजा माउली ।।५।।

६५३
 हरि तैसे हरीचे दास । नाहीं तयां भय मोह चिंता आस। होउनि राहाती उदास । बळकट कांस भक्तीची ।।१।।
धरूनि पाय तजिलें जन । न लगे मान मृत्तिकाधन । कंठीं नाम अमृताचें पान। न लगे आन ऐसें जालें ।।धृ।।
वाव तरी उदंड च पोटीं । धीर सिंधु ऐसे जगजेठी । कामक्रोधा न सुटे मिठी । वेठी तरी गिऱ्हे राबवीती ।।२।।
बळें तरि नांगवती काळा । लीन तरि सकळांच्या तळा । उदार देहासी सकळा । जाणोनि कळा सर्व नेणते ।।३।।
संसार तो तयांचा दास । मोक्ष तें पाहातसे वास । रिद्धिसिद्धि देशटा त्रास । न शिवति यास वैष्णवजन ।।४।।
जन्ममृत्युस्वप्नांसारिखें । आप त्यां न दिसे पारखें । तुका म्हणे अखंडित सुखें । वाणी वदे मुखें प्रेमा अमृताची ।।५।।

६५४
 बहुत जाचलों संसारीं । वसें गभाअ मातेच्या उदरीं । लक्ष चौऱ्याशी योनिद्वारीं । जालों भिकारी याचक ।।१।।
जिणें पराधीन आणिकां हातीं । दृढ पाशीं बांधलों संचितीं । प्रारब्ध क्रियमाण सांगाती । भोवंडिती सत्ता आपुलिया ।।धृ।।
न भरे पोट नाहीं विसांवा । नाहीं नेम एक ठाव गांवा । नाहीं सत्ता न फिरे ऐसी देवा । लाहे जीवा खापरीं तडफडी ।।२।।
काळ बहुत गेले ऐसिया रीती । आणीक पुढें नेणों किती । खंडणा नाहीं पुनरावृत्ती । मज कल्पांतीं तरी वेगळें ।।३।।
ऐसें दुःख कोण हरील माझें । कोणा भार घालूं आपुलें ओझें । भवसिंधुतारक नाम तुझें । धांवसि काजें आडलिया ।।४।।
आतां धांव घालीं नारायणा । मजकारणें रंका दीना । गुण न विचारीं अवगुणा । तुका करुणा भाकीतसे ।।५।।

६५५
 जंव हें सकळ सिद्ध आहे । हात चालावया पाये । तंव तूं आपुलें स्वहित पाहें । तीर्थयात्रे जायें चुकों नको ।।१।।

जंव काळ असे दुरी ठेला । तंव तूं हरिगुण गायें आइक वहिला । मनीं भाव धरूनि भला । न वंचें त्याला चुकों नको ।।२।।
जोडोनि धन न घलीं माती । ब्रम्हवृंदें पूजन इति । सत्य आचरण दया भूतीं । करीं सांगाती चुकों नको ।।३।।
दशा यौवन बाणली अंगीं । पांगिला नव्हें विषयसंगीं । काम क्रोध लोभ मोह त्यागीं । राहें संतसंगीं चुकों नको ।।५।।
मग तेथें न चले कांहीं । सत्ता संपदा राहेल ठायींच्या ठायीं। पुढें संचित जाईल ग्वाही । तुका म्हणे ते ही यमआज्ञा ।।५।।

६५६
ऐक पांडुरंगा एक मात । कांहीं बोलणें आहे एकांत । आम्हां जरी तारील संचित । तरी उचित काय तुझें ।।१।।
उसनें फेडितां धर्म तो कोण । काय तया मानवेल जन । काय गा मिरवूनि भूषण । वांयां थोरपण जनांमध्यें ।।धृ।।
अन्न जरी न मिळे तयासी देणें । आगांतुक पात्र उचित दान । उपकार तरी धनमंत्रीपणें । जरी देणेंघेणें नाहीं आशा ।।२।।
शूर तों तयासी बोलिजे जाणा । पाठीशीं घालूनि राखे दीना । पार पुण्य नाहीं त्या भूषणा । ऐक नारायणा वचन हें ।।३।।
आतां पुढें बोलणें तें काईं । मज तारिसी तरी च सही । वचन आपुलें सिद्धी नेईं । तुका म्हणे तईं मज कळसी ।।४।।

६५७
चांगलें नाम गोमटें रूप । निवती डोळे हरती ताप । विठ्ठल विठ्ठल हा जप । प्रगट स्वल्प । अति सार ।।१।।
शस्त्र हे निर्वाणींचा बाण । निकट समय अवसान । कोठें योजेल दश दान। खंडी नारायण दुःख चिंतनें ।।धृ।।
सकळ श्रेष्ठांचें मत । पावे सिद्धी पाववी अनंत । म्हणोनि व्हावें शरणागत । आहे उचित एवढें चि ।।२।।
म्हणोनि रुसलों संसारा । सर्प विखार हा पांढरा । तुजशीं अंतर रे दातारा । या चि दावेदारानिमित्त ।।३।।
येणें मज भोगविल्या खाणी। नसतां छंद लाविला मनीं । माजलों मी माझे भ्रमणीं । जाली बोडणी विटंबना ।।४।।
पावलों केलियाचा दंड । खाणी भोगिविल्या उदंड। आतां केला पाहिजे खंड

। तुका दंडवत घाली देवा ।।५।।

६५८
चांगला तरी पूर्णकाम । गोड तरी याचें चि नाम । दयाळ तरी अवघा धर्म । भला तरी दासा श्रम होऊं नेदी ।।१।।
उदार तरी लक्ष्मीयेसी । जुंझार तरी कळिकाळासी । चतुर तरी गुणांची च रासी । जाणता तयासी तो एक ।।धृ।।
जुनाट तरी बहु काळा । न कळे जयाची लीळा । नेणता गोवळीं गोवळा । लाघवी अवळाभुलवणा ।।२।।
गांढ्या तरी भावाचा अंकित । बराडी तरी उच्छिष्टाची प्रीत । ओंगळ तरी कुब्जेशीं रत । भ्याड अनंत बहु पापा ।।३।।
खेळतो येणें चि खेळावा । नट तो येणें चि आवगावा। लपोनि जीवीं न कळे जीवा । धरितां देवा नातुडेसी ।।४।।
उंच तरी बहुत चि उंच । नीच तरी बहुत चि नीच । तुका म्हणे बोलिलों साच। नाहीं अहाच पूजा केली ।।५।।

६५९
काय आम्ही भक्ति करणें कैसी । काय एक वाहावें तुम्हांसी । अवघा भरोनि उरलासी । वाणीं खाणीं रसीं रूपगंधी ।।१।।
कसें करूं इंद्रियां बंधन । पुण्यपापाचें खंडण । काय व्रत करूं आचरण । काय तुजविण उरलें तें ।।२।।
काय डोळे झांकुनियां पाहूं । मंत्रजप काय ध्याऊं । कवणें ठायीं धरूनि भाव । काय तें वाव तुजविण ।।३।।
काय हिंडों कवण दिशा । कवणे ठायीं पाय ठेवूं कैसा । काय तूं नव्हेसि न कळे तैसा । काय मी कैसा पाहों आतां ।।४।।
तुझिया नामाची सकळ । पूजा अर्चन मंत्र माळ । धूप दीप नैवेद्य फळ तांबूल । घेऊं पुष्पांजुळ तुका म्हणे ।।५।।

६६०
शरीर दुःखाचें कोठार । शरीर रोगाचें भांडार । शरीर दुर्गंधीची थार । नाहीं अपवित्र शरीरा ऐसें ।।१।।
शरीर उत्तम चांगलें। शरीर सुखाचें घोंसुलें । शरीरें साध्य होय केलें । शरीरें साधलें परब्रम्ह ।।धृ।।

शरीर विटाळाचें अळें । मायामोहपाशजाळें। पतन शरीराच्या मुळें । शरीर काळें व्यापिलें ।।२।।
शरीर सकळ हें शुद्ध । शरीर निधींचा ही निध । शरीरें तुटे भवबंध । वसे मध्यें भोगी देव शरीरा ।।३।।
शरीर अविद्येचा बांधा । शरीर अवगुणाचा रांधा । शरीरीं वसे बहुत बाधा । नाहीं गुण सुदा एक शरीरीं ।।४।।
शरीरा दुःख नेदावा भोग । न द्यावें सुख न करीं त्याग । नव्हे वोखटें ना चांग । तुका म्हणे वेग करीं हरिभजनीं ।।५।।

६६१
इतुलें करीं भलत्या परी । परद्रव्य परनारी । सांडुनि अभिलाष अंतरीं । वर्तें वेव्हारीं सुखरूप ।।१।।
न करीं दंभाचा सायास । शांती राहें बहुवस । जिव्हे सेवीं सुगंधरस । न करीं आळस रामनामीं ।।२।।
जनमित्र होईं सकळांचा । अशुभ न बोलावी वाचा । संग न धरावा दुर्जनाचा । करीं संतांचा सायास ।।३।।
करिसी देवाविण आस । अवघी होईल निरास । तृष्णा वाढविसी बहुवस । कधीं सुखास न पवसी ।।४।।
धरूनि विश्वास करीं धीर । करितां देव हा चि निर्धार । तयाचा वाहे योगक्षेमभार । नाहीं अंतर तुका म्हणे ।।५।।

६६२
संसारसिंधु हा दुस्तर । नुलंघवे उलंघितां पार । बहुत वाहाविलें दूर । न लगे चि तीर पैल थडी ।।१।।
किती जन्म जाला फेरा । गणित नाहीं जी दातारा । पडिलों आवताअ भोंवरा । बहुता थोरा वोळसिया ।।धृ।।
वाढलों परी नेणती बुद्धी । नाहीं परतली धरिली शुद्धी । मग म्यां विचारावें कधीं । ऐसी संधी सांडुनिया ।।२।।
अनेक खाणीं आहार निद्रा । भयमैथुनाचा चि थारा । बाळत्व तारुण्य जरा । प्रधान पुरा भोग तेथें ।।३।।
ऐसीं उलंघूनि आलों स्थळें । बहु भोवंडिलों काळें । आतां हें उगवावें जाळें । उजेडा बळें दिवसाच्या ।।४।।
सांडीन या संसाराची वाट । बहु येणें भोगविले कष्ट । दावी सत्या ऐसें नष्ट

। तुका म्हणे भ्रष्ट जालों देवद्रोही ।।५।।

६६३
विठ्ठल भीमातीरवासी । विठ्ठल पंढरीनिवासी । विठ्ठल पुंडलिकापासीं । कृपादानाविसीं उदार ।।१।।
विठ्ठल स्मरणा कोंवळा। विठ्ठल गौरवीं आगळा । आधार ब्रम्हांडा सकळा । विठ्ठल लीळाविग्रही ।।धृ।।
उभा चि परी न मनी सीण । नाहीं उद्धरितां भिन्न । समर्थाचे घरीं एक अन्न । आर्तभूता क्षणोक्षणा सांभाळी ।।२।।
रुचीचे प्रकार। आणिताती आदरें । कोठें ही न पडे अंतर । थोरां थोर धाकुट्या धाकुटा ।।३।।
करितां बळ धरितां नये । झोंबतां डोळे मनें च होय। आपुल्या उद्देशाची सोय । जाणे हृदयनिवासी ।।४।।
पान्हा तरी आल्या अंतर तेथें । तों नाहीं भरिलें रितें । करितों सेवन आइतें । तुका म्हणे चित्तें चित्त मेळवूनी ।।५।।

६६४
ताप हें हरण श्रीमुख । हरी भवरोगा ऐसें दुःख । अवलोकितां उपजे सुख । उभें सन्मुख दृष्टीपुढें ।।१।।
न पुरे डोळियांची धणी । सखोल कृपेची च खाणी । स्तवितां न पुरे वेदवाणी । तो हा समचरणी कृपानिधी ।।धृ।।
रामकृष्णध्यान वामननारसिंहीं । उग्र आणि सौम्य कांहीं च नाहीं । सांपडे भरलीये वाही । भाव शुद्ध पाहीं याचें भातुकें ।।२।।
गुणगंभीर चतुर सुजाण। शूर धीर उदार नारायण। व्यापक तरी त्रिभुवन । मनमोहनलावण्य हें ।।३।।
ठाण हें साजिरें सुंदर । अविनाश अविकार । अनंत आणि अपार । तो हा कटीं कर धरिताहे ।।४।।
जयाची वाणी सुमनमाळा। परमामृतजिव्हाळा । अनंता अंगीं अनंत कळा । तुका जवळा चरण सेवे ।।५।।
कान्होबा०नाट अभंग ७
६६५
अगा ये वैकुंटनायका । अगा ये त्रैलोक्यतारका । अगा जनार्दना जगव्यापका । अगा पाळका भक्तांचिया ।।१।।

अगा ये वसुदेवदेवकीनंदना । अगा ये गोपिकारमणा । अगा बळिबंध वामना।
अगा निधाना गुणनिधी ।।धृ।।
अगा ये द्रौपदीबांधवा । अगा ये सखया पांडवा । अगा जीवाचिये जीवा ।
अगा माधवा मधुसूदना ।।२।।
अगा महेश्वरा महाराजा । अगा श्रीहरी गरुडध्वजा । अगा सुंदरा सहस्त्रभुजा
। पार मी तुझा काय वर्णूं ।।३।।
अगा अंबऋषिपरंपरा। निलारंभ निर्विकारा । अगा गोवर्धन धरणीधरा । अगा
माहेरा दीनाचिया ।।४।।
अगा धर्मराया धर्मशीळा । कृपासिंधु कृपाळा । अगा प्रेमाचिया कल्लोळा ।
सकळकळाप्रवीणा ।।५।।
अगा चतुरा सुजाणा । मधुरागिरा सुलक्षणा । अगा उदारा असुरमर्दना । राखें
शरणा तुकयाबंधु ।।६।।

६६६
उभा देखिला भीमातीरीं । कर मिरवले कटावरी । पाउलें तरी सम चि
साजिरीं । नाम तरी अनंत अतिगोड ।।१।।
शंखचक्रांकित भूषणें । जडितमेखळा चिद्रत्नें । पितांबर उटी शोभे गोरेपणें ।
लोपलीं तेणें रवितेजें ।।२।।
श्रवणीं कुंडलें देती ढाळ । दशांगुळीं मुद्रिका माळ । दंतओळी हिरे झळाळ ।
मुख निर्मळ सुखरासी ।।३।।
कडीं कडदोरा वांकी वेळा । बाहीं बाहुवटे पदक गळां । मृगनाभी रेखिला
टिळा । लवती डोळां विद्युल्लता ।।४।।
सुंदरपणाची साम्यता । काय वर्णूं ते पावे आतां । तुकयाबंधु म्हणे रे अच्युता
। धन्य ते मातापिता प्रसवली ।।५।।

६६७
एक मागणें हृषीकेशी । चित्त द्यावें सांगतों वचनासी । मज अंतर तुझ्या
चरणासी । न पडे ऐसी कृपा करीं ।।१।।
नको दुजी बुद्धि आणीक । रिद्धिसिद्धी परलोक । तूं स्वामी मी सेवक ।
खंडणा नको करूं ऐसी ।।धृ।।
मना येईल तो जन्म देईं । भलते कुळीं भलते ठायीं । तें मी सांकडें घालीत
नाहीं । हृदयींहुनीं तूं न वजें ।।२।।
इतुलें करीं भलत्या परी । भलत्या भावें तुझें द्वारीं । राहेन दास होऊनि

कामारी । वदो वैखरी नित्य नाम ।।३।।
नको विचारूं दुसरें आतां । शरण आलों जी पंढरीनाथा । तुकयाबंधु म्हणे रे अच्युता । आहेसि तूं दाता दानशूर ।।४।।

६६८
कईं देखतां होईन डोळीं । सकळां भूतीं मूर्ति सांवळी। जीवा नांव भूमंडळीं । जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं ।।१।।
ऐसा कृपा करील नारायण । जीव जगाचा होईन । प्रेमसागरीं बुडईन । होईल स्नान अनुतापीं ।।धृ।।
ऐसा कईं येईन दैवास । दृश्य नासोनि जाईल आस । सदा संतचरणीं देहाचा वास । सेवीन शेष धणीवरी ।।२।।
कईं नवसा येतील अंकुर । सुखा नाहींसा होईल पार । अमृत तें पृथ्वीजळ सागर । वाहाती पूर आनंदाचे ।।३।।
प्रसन्न दया क्षमा शांति । कईं नवविधा होईल भक्ति । भोगीन वैराग्यसंपत्ति । मनोरथ कळती तईं पुरले ।।४।।
तुकयाबंधु म्हणे सांग । नव्हे तुजविण निरसेना पांग । म्हणोनि घातलें साष्टांग । पांडुरंगा वरी चरणा ।।५।।

६६९
तूं बळिया शिरोमणी । आहेसि माजी ये त्रिभुवनीं । रिघालों पाठी तुझी म्हणउनी । आतां करीन मी असेल तें ।।१।।
तूं देवा प्रतापदिनकर । सुरा असुरांचा सुर । महावीरां वीर धनुर्धर । मी तों पामर काय तेथें ।।धृ।।
कृपासिंधु दीनवत्सल । फोडिली देवाची बंदशाळ । संहारूनि राक्षसदळ । शरणागत राजीं स्थापिला ।।२।।
उपकर्म करावा बहुत । तरी तूं जाणसी धर्मनीत । उचित काय तें अनुचित । राखें शरणागत आलों आतां ।।३।।
किती म्यां काय विनवावें । शरण आलों जीवें भावें । तुकयाबंधु म्हणे करावें । क्षेम अवघें येणें काळें ।।४।।

६७०
देवा मी चांडाळ चांडाळ । म्हणतां लागताहे वेळ । नसे पाहातां भूमंडळ । ऐसा अमंगळ खळ दुसरा ।।१।।

जन्मा उपजलियापासुनी । असत्य कर्म तें अझुनी । सत्य आचरण नेणें स्वप्नीं । निखळ खाणी अवगुणांची ।।२।।
भक्ति दया अथवा कथा। कानीं न साहवे वार्ता । अखंड विषयांची वेथा । अधम पुरता अधमाहुनी ।।३।।
काम क्रोध दंभ अहंकार । गर्व ताठा मद मत्सर । यांचें तरी माहेरघर । परउपकार वैरी तैसा ।।४।।
निंदा द्वेष घात विश्वास । करितां नाहीं केला आळस । करूं नये ते केले संतउपहास । अभक्ष तें ही भक्षिलें ।।५।।
पाळिलें नाहीं पितृवचन। सदा परद्वारीं परधनीं ध्यान । बोलों नये घडलें ऐसें अनोविन । दासीगमन आदिकरूनी ।।६।।
कायामनें वाचाइंद्रियांशीं । सकळ पापांची च राशी । तुकयाबंधु म्हणे ऐसियासी । आलों हृषीकेशी तुज शरण ।।७।।

६७१

काय काय करितों या मना । परी नाइके नारायणा । करूं नये त्याची करी विवंचना । पतना नेऊं आदरिलें ।।१।।
भलतिये सवें धांवे सैराट । वाट आडवाट दरे दरकुट । न विचारी कुडें कांहीं कपट । घात बळकट मांडियेला ।।२।।
न पुरती भ्रमणा दाही दिशा । सप्त ही पाताळ आकाशा । घाली उडी बळें चि देखोनि फांसा । केलों या देशा पाहुणा ।।३।।
चेतवूनि इंद्रियें सकळ। आशा तृष्णा कल्पना काम क्रोध काळ । दुराविली शुद्ध बुद्धि केली राळ । ऐसें चांडाळ अनिवार हें ।।४।।
आतां काय ऐसें करावें यासी । बहु जाचिलों केलों कासाविसी । तुकयाबंधु म्हणे हृषीकेशी । धांव मज ऐसी परी जाली ।।५।।
नाटाचे अभंग समाप्त ६३

६७२

काय खावें आतां कोणीकडे जावें । गांवांत राहावें कोण्या बळें ।।१।।
कोपला पाटील गांवचे हे लोक । आतां घाली भीक कोण मज ।।धृ।।
आतां येणें चवी सांडिली म्हणती । निवाडा करिती दिवाणांत ।।२।।
भल्या लोकीं यास सांगितली मात । केला माझा घात दुर्बळाचा ।।३।।
तुका म्हणे याचा संग नव्हे भला । शोधीत विठ्ठला जाऊं आतां ।।४।।

६७३
संत मागे पाणी नेदी एक चूळ । दासीस आंघोळ ठेवी पाणी ।।१।।
संतासी देखोनी होय पाठमोरा । दासीचिया पोरा चुंबन देतो ।।धृ।।
संतासी देखोनि करितो ढवाळ्या । भावें धुतो चोळ्या दासीचिया ।।२।।
तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका । जातो यमलोका भोगावया ।।३।।

६७४
एक प्रेमगुज ऐकें जगजेठी । आठवली गोष्टी सांगतसें ।।१।।
एक मृग दोन्ही पाडसांसहित । आनंदें चरत होती वनी ।।धृ।।
अवचिता तेथें पारधी पावला । घेऊनियां आला श्वानें दोन्ही ।।२।।
एकीकडे त्याणें चिरिल्या वाघुरा । ठेविलें श्वानपुत्रा एकीकडे ।।३।।
एकीकडे तेणें वोणवा लाविला । आपण राहिला एकीकडे ।।४।।
चहूंकडोनियां मृगें वेढियेलीं । स्मरों तें लागलीं नाम तुझें ।।५।।
रामा कृष्णा हरी गोविंदा केशवा । देवाचिया देवा पावें आतां ।।६।।
कोण रक्षी आतां ऐसिये संकटीं । बापा जगजेठी तुजविण ।।७।।
आइकोनि तुम्ही तयांचीं वचनें । कृपाअंतःकरणें कळवळिलां ।।८।।
आज्ञा तये काळीं केली पर्जन्यासी । वेगीं पावकासी विझवावें ।।९।।
ससें एक तेथें उठवुनी पळविलें । तया पाठीं गेली श्वानें दोन्ही ।।१०।।
मृगें चमकोनी सत्वर चाललीं । गोविंदें रक्षिलीं म्हणोनियां ।।११।।
ऐसा तूं कृपाळु दयाळु आहेसी । आपुल्या भक्तांसी जीवलग ।।१२।।
ऐसी तुझी कीर्ती जीवीं आवडती । रखुमाईच्या पती तुका म्हणे ।।१३।।

६७५
आशाबद्ध वक्ता । धाक श्रोतयाच्या चित्ता ।।१।।
वांयां गेलें तें भजन । उभयतां लोभी मन ।।धृ।।
बहिर्मुख एके ठायीं । तैसें जालें तया दोहीं ।।२।।
माप तैसी गोणी । तुका म्हणे रितीं दोन्ही ।।३।।

६७६
विठ्ठला रे तूं उदाराचा राव । विठ्ठला तूं जीव या जगाचा ।।१।।
विठ्ठला रे तूं उदाराची रासी । विठ्ठला तुजपाशीं सकळसिद्धी ।।धृ।।
विठ्ठला रे तुझें नाम बहु गोड । विठ्ठला रे कोड पुरविसी ।।२।।

विठ्ठला रे तुझें श्रीमुख चांगलें । विठ्ठला लागलें ध्यान मनीं ।।३।।
विठ्ठला रे वाचे बोला बहुरस । विठ्ठला रे सास घेतला जीवें ।।४।।
विठ्ठला रे शोक करीतसे तुका । विठ्ठला तूं ये कां झडकरी ।।५।।

६७७
बाहिर पडिलों आपुल्या कर्तव्यें । संसारासि जीवें वेटाळिलों ।।१।।
एकामध्यें एक नाहीं मिळों येत । ताक नवनीत निवडीलें ।।धृ।।
जालीं दोनी नामें एका चि मथनीं । दुसरिया गुणीं वेगळालीं ।।२।।
तुका म्हणे दाखविल्या मुक्ताफळीं । शिंपले चि स्वस्थळीं खुंटलिया ।।३।।

६७८
बरवा बरवा बरवा रे देवा तूं । जीवाहूनी आवडसी जीवा रे देवा तूं ।।१।।
पाहातां वदन संतुष्ट लोचन । जाले आइकतां गुण श्रवण रे देवा ।।धृ।।
अष्टै अंगें तनु त्रिविध ताप गेला सीण । वर्णितां लक्षण रे देवा ।।२।।
मन जालें उन्मन अनुपम ग्रहण । तुकयाबंधु म्हणे महिमा नेणें रे ।।३।।

६७९
सोलीव जें सुख अतिसुखाहुनि । उभें हें अंगणीं वैष्णवांच्या ।।१।।
वृंदावन सडे चौक रंग माळा । नाचे तो सोहोळा देखोनियां ।।धृ।।
भूषणमंडित सदा सर्वकाळ । मुद्रा आणि माळ तुळसी कंठीं ।।२।।
नामओघ मुखीं अमृताचें सार । मस्तक पवित्र सहित रजें ।।३।।
तुका म्हणे मोक्ष भक्ताचिया मना । नये हा वासना त्याची करी ।।४।।

६८०
तीर्थें केलीं कोटीवरी । नाहीं देखिली पंढरी ।।१।।
जळो त्याचें ज्यालेंपण । न देखे चि समचरण ।।धृ।।
योग याग अनंत केले । नाहीं समचरण देखिले ।।२।।
तुका म्हणे विठ्ठलपायीं। अनंत तीर्थें घडिलीं पाहीं ।।३।।

६८१
कोणतें कारण राहिलें यामुळें । जें म्यां तुज बळें कष्टवावें ।।१।।
नाहीं जात जीव नाहीं होत हानी । सहज तें मनीं आठवलें ।।धृ।।
नाहीं कांहीं चिंता मरतों उपवासी । अथवा त्या म्हैसी गाई व्हाव्या ।।२।।

हें तों तुज कळों येतसे अंतरीं । लाखणीक वरी साच भाव ।।३।।
तुका म्हणे देवा नासिवंतासाठीं । पायांसवें तुटी करिती तुझ्या ।।४।।

६८२
रामा अयोध्येच्या राया । दिनानाथा रे सखया ।।१।।
पाप ताप विघ्न हरीं । दिनानाथा सुख करीं ।।धृ।।
भिलटीचिया रे उच्छिष्टा । स्वीकारिसी रे तूं भ्रष्टा ।।२।।
मी तों सलगीचें मूल । तुका म्हणे तू सखोल ।।३।।

६८३
तुजवरी ज्याचें मन । दरुषण दे त्याचें ।।१।।
कैसा जाती शुद्ध भाव । हात पाव ना वृत्ती ।।धृ।।
अवघियांचा करूनि मेळा । तुज डोळां रोखिलें ।।२।।
तुका म्हणे तुज आड । लपोनि कोड दावीं देवा ।।३।।

६८४
विश्वव्यापी माया । तिणें झाकुळिलें छाया ।।१।।
सत्य गेलें भोळ्यावारी । अविद्येची चाली थोरी ।।धृ।।
आपुलें चि मन । करवी आपणां बंधन ।।२।।
तुका म्हणे देवा । तुम्ही कोडीं हीं उगवा ।।३।।

६८५
पोटीं जन्मती रोग । तरि कां म्हणावे आप्तवर्ग ।।१।।
रानीं वसती औषधी । तरि कां म्हणाव्या निपराधी ।।२।।
तैसें शरीराचें नातें । तुका म्हणे सर्व आप्तें ।।३।।

६८६
नव्हे शब्द एक देशी । सांडी गवशी कोणाला ।।१।।
जाली माझी वैखरी । विश्वंभरी व्यापक ।।धृ।।
मोकलिलें जावें बाणें। भाता जेणे वाइलें ।।२।।
आतां येथें कैचा तुका । बोले सिका स्वामीचा ।।३।।

६८७

गायनाचे रंगीं । शक्ति अद्‌भुत हे अंगीं ।।१।।
हें तों देणें तुमचें देवा । घ्यावी अखंडित सेवा ।।धृ।।
अंगीं प्रेमाचें भरतें । नाहीं उतार चढतें ।।२।।
तुका म्हणे वाणी । नाम अमृताची खाणी ।।३।।

६८८
माप म्हणे मी मवितें । भरी धणी ठेवी रितें ।।१।।
देवा अभिमान नको । माझेठायीं देऊं सकों ।।धृ।।
देशी चाले सिका । रितें कोण लेखी रंका ।।२।।
हातीं सूत्रदोरी । तुका म्हणे त्याची थोरी ।।३।।

६८९
कोण सांगायास । गेलें होतें देशोदेश ।।१।।
नेलें वाऱ्या हातीं माप । समर्थ तो माझा बाप ।।धृ।।
कोणाची हे सत्ता। जाली वाचा वदविता ।।२।।
तुका म्हणे या निश्चयें । माझें निरसलें भय ।।३।।

६९०
सकळिकांच्या पायां माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ।।१।।
अहो श्रोते वक्ते सकळ ही जन । बरें पारखुन बांधा गांठी ।।धृ।।
फोडिलें भांडार धन्याचा हा माल । मी तंव हामाल भारवाही ।।२।।
तुका म्हणे चाली जाली चहूं देशी । उतरला कसीं खरा माल ।।३।।

६९१
कोण त्याचा पार पावला धुंडितां । पुढें विचारितां विश्वंभरा ।।१।।
अणुरेणु सूक्ष्मस्थूळा पार नाहीं । श्रुती नेती त्या ही खुंटलिया ।।धृ।।
फळांत कीटक येवढें आकाश । ऐसीं तरुवरास अनेक किती ।।२।।
दाविलें अनंतें अर्जुनासि पोटीं । आणीक त्या सृष्टि कृष्णलोक ।।३।।
तुका म्हणे लागा संतांचिये कासे । ठाव घेतां कैसे वांचा जीवें ।।४।।

६९२
जें जें कांही करितों देवा । तें तें सेवा समर्पे ।।१।।
भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज ।।धृ।।

आम्ही दुजें नेणों कोणा। हें चि मना मन साक्ष ।।२।।
तुका म्हणे जगन्नाथा । हें अन्यथा नव्हे कीं ।।३।।

६९३
स्तुति करूं तरी नव्हे चि या वेदा । तेथें माझा धंदा कोणीकडे ।।१।।
परी हे वैखरी गोडावली सुखें । रसना रस मुखें इच्छीतसे ।।धृ।।
रूप वर्णावया कोठें पुरे मती । रोमीं होती जाती ब्रम्हांडें हीं ।।२।।
तुका म्हणे तूं ऐसा एक साचा । ऐसी तंव वाचा जाली नाहीं ।।३।।

६९४
तुज वर्णी ऐसा तुज विण नाहीं । दुजा कोणी तीहीं त्रिभुवनीं ।।१।।
सहस्त्रमुखें शेष सिणला बापुडा । चिरलिया धडा जिव्हा त्याच्या ।।धृ।।
अव्यक्ता अलक्षा अपारा अनंता । निर्गुणा सचिद नारायणा ।।२।।
रूप नाम घेसी आपुल्या स्वइच्छा । होसी भाव तैसा त्याकारणें ।।३।।
तुका म्हणे जरी दाविसी आपणा । तरि च नारायणा कळों येसी ।।४।।

६९५
पूर आला आनंदाचा । लाटा उसळती प्रेमाच्या ।।१।।
बांधूं विठ्ठलसांगडी । पोहुनि जाऊं पैल थडी । अवघे जन गडी । घाला उडी भाई नो ।।धृ।।
हें तों नाहीं सर्वकाळ । अमुप अमृतांचें जळ ।।२।।
तुका म्हणे थोरा पुण्यें । ओघ आला पंथें येणें ।।३।।

६९६
आणीक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलें या चित्तापासुनियां ।।१।।
पांडुरंग मनीं पांडुरंग ध्यानीं । जाग्रतीं स्वप्नीं पांडुरंग ।।धृ।।
पडिलें वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं दुजा ।।२।।
तुका म्हणे नेत्रीं केलें ओळखण । साजिरें तें ध्यान विटेवरी ।।३।।

६९७
मी तों सर्वभावें अनधिकारी । होइल कैसी परी नेणों देवा ।।१।।
पुराणींचे अर्थ आणितां मनास । होय कासावीस जीव माझा ।।धृ।।
इंद्रियांचीं आम्ही पांगिलों अंकितें । त्यांचे रंगीं चित्त रंगलेंसे ।।२।।

एकाचें ही मज न घडे दमन । अवघीं नेमून कैसीं राखों ।।३।।
तुका म्हणे मज तारीं पंढरीराया । नाहीं तरी वांयां गेलों दास ।।४।।

६९८
लक्षूनियां योगी पाहाती आभास । तें दिसे आम्हांस दृष्टीपुढें ।।१।।
कर दोनी कटी राहिलासे उभा । सांवळी हे प्रभा अंगकांती ।।धृ।।
व्यापूनि वेगळें राहिलेंसे दुरी । सकळां अंतरीं निर्विकार ।।२।।
रूप नाहीं रेखा नाम ही जयासी । आपुला मानसीं शिव ध्याय ।।३।।
अंत नाहीं पार वर्णा नाहीं थार । कुळ याति शिर हस्त पाद ।।४।।
अचेत चेतलें भक्ताचिया सुखें । आपुल्या कौतुकें तुका म्हणे ।।५।।

६९९
कैसें करूं ध्यान कैसा पाहों तुज । वर्म दावीं मज याचकासी ।।१।।
कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा । कोण्या भावें देवा आतुडसी ।।धृ।।
कैसी कीर्ती वाणूं कैसा लक्षा आणूं । जाणूं हा कवण कैसा तुज ।।२।।
कैसा गाऊं गीतीं कैसा ध्याऊं चित्तीं । कैसी स्थिती मती दावीं मज ।।३।।
तुका म्हणे जैसें दास केलें देवा। तैसें हें अनुभवा आणीं मज ।।४।।

७००
निगमाचें वन । नका शोधूं करूं सीण ।।१।।
या रे गौळियांचे घरीं । बांधलें तें दावें वरी ।।धृ।।
पीडलेती भ्रमें । वाट न कळतां वर्मे ।।२।।
तुका म्हणे भार । माथा टाका अहंकार ।।३।।

७०१
मन वोळी मना । बुद्धि बुद्धी क्षण क्षणां ।।१।।
मी च मज राखण जालों । ज्याणें तेथें चि धरिलों ।।धृ।।
जें जें जेथें उठी। तें तें तया हातें कुंटी ।।२।।
भांजिली खांजनी । तुका साक्ष उरला दोन्ही ।।३।।

७०२
ब्रम्ह न लिंपे त्या मेळें । कर्माअकर्मा वेगळें ।।१।।
तो चि एक तया जाणे । पावे अनुभविलें खुणें ।।धृ।।

शोच अशौचाचे संधी । तन आळा तना चि मधीं ।।२।।
पापपुण्यां नाहीं ठाव । तुका म्हणे सहज भाव ।।३।।
७०३
काय दरा करील वन । समाधान नाहीं जंव ।।१।।
तरी काय तेथें असती थोडीं । काय जोडी तयांसी ।।धृ।।
रिगतां धांवा पेंवामध्यें । जोडे सिद्धि ते ठायीं ।।२।।
काय भस्म करील राख । अंतर पाख नाहीं तों ।।३।।
वर्णाआश्रमाचे धर्म । जाती श्रम जालिया ।।४।।
तुका म्हणे सोंग पाश । निरसे आस तें हित ।।५।।

७०४
तें हीं नव्हे जें करितां कांहीं । ध्यातां ध्यायीं तें ही नव्हे ।।१।।
तें ही नव्हे जें जाणवी जना । वाटे मना तें नव्हे ।।धृ।।
त्रास मानिजे कांटाळा । अशुभ वाचाळा तें ही नव्हे ।।२।।
तें ही नव्हे जें भोंवतें भोंवे । नागवें धांवे तें ही नव्हे ।।३।।
तुका म्हणे एक चि आहे । सहजिं पाहें सहज ।।४।।

७०५
बोल बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीर कांपे ।।१।।
नव्हे वैराग्य सोपारें । मज बोलतां न वटे खरें ।।धृ।।
विष खावें ग्रासोग्रासीं । धन्य तो चि एक सोसी ।।२।।
तुका म्हणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ।।३।।

७०६
होईन भिकारी । पंढरीचा वारकरी ।।१।।
हा चि माझा नेम धर्म । अवघें विठोबाचें नाम ।।धृ।।
हे चि माझी उपासना । लागन संतांच्या चरणा ।।२।।
तुका म्हणे देवा । करीन ते भोळी सेवा ।।३।।

७०७
सांटविला हरी । जींहीं हृदयमंदिरीं ।।१।।
त्यांची सरली वेरझार । जाला सफळ व्यापार ।।धृ।।
हरी आला हाता । मग कैंची भय चिंता । तुका म्हणे हरी । कांहीं उरों नेदी

उरी ।।३।।

७०८
 मोक्ष तुमचा देवा । तुम्ही दुर्लभ तो ठेवा ।।१।।
मज भक्तीची आवडी । नाहीं अंतरीं ते गोडी ।।धृ।।
आपल्या प्रकारा । करा जतन दातारा ।।२।।
तुका म्हणे भेटी । पुरे एक चि शेवटीं ।।३।।

७०९
 नामपाठ मुक्ताफळांच्या ओवणी । हें सुख सगुणीं अभिनव ।।१।।
तरी आम्ही जालों उदास निर्गुणा । भक्तांचिया मना मोक्ष नये ।।धृ।।
द्यावें घ्यावें ऐसें येथें उरे भाव । काय ठाया ठाव पुसोनियां ।।२।।
तुका म्हणे आतां अभयदान करा । म्हणा विश्वंभरा दिलें ऐसें ।।३।।

७१०
 भवसिंधूचें काय कोडें । दावी वाट चाले पुढें ।।१।।
तारूं भला पांडुरंग । पाय भिजों नेदी अंग ।।धृ।।
मागें उतरिलें बहुत । पैल तिरीं साधुसंत ।।२।।
तुका म्हणे लाग वेगें । जाऊं तयाचिया मागें ।।३।।

७११
 नाहीं साजत हो मोठा । मज अळंकार खोटा ।।१।।
असें तुमचा रजरेण । संतां पायींची वाहाण ।।धृ।।
नाहीं स्वरूपीं ओळखी । भक्तिभाव करीं देखीं ।।२।।
नाहीं शून्याकारीं । क्षर ओळखी अक्षरीं ।।३।।
नाहीं विवेक या ठायीं । आत्मा अनात्मा काई ।।४।।
कांहीं नव्हें तुका । पांयां पडने हें ऐका ।।५।।

७१२
 सत्य साच खरें । नाम विठोबाचें बरें ।।१।।
जेणें तुटती बंधनें । उभयलोकीं कीर्ति जेणें ।।धृ।।
भाव ज्याचे गांठी । त्यासी लाभ उठाउठी ।।२।।
तुका म्हणे भोळा । जिंकुं जाणे कळिकाळा ।।३।।

७१३
 सत्य तो आवडे । विकल्पानें भाव उडे ।।१।।
आम्ही तुमच्या कृपादानें । जाणों शुद्ध मंद सोनें ।।धृ।।
आला भोग अंगा। न लवूं उसीर त्या त्यागा ।।२।।
तुका म्हणे देवा । अंजन ते तुझी सेवा ।।३।।

७१४
 करावें चिंतन । तें चि बरें न भेटून ।।१।।
बरवा अंगीं राहे भाव । तो गे तो चि जाणा देव ।।धृ।।
दर्शणाची उरी । अवस्था चि अंग धरी ।।२।।
तुका म्हणे मन । तेथें सकळ कारण ।।३।।

७१५
 जें जें जेथें पावे । तें तें समर्पावें सेवे ।।१।।
सहज पूजा या चि नांवें । गळित अभिमानें व्हावें ।।धृ।।
अवघें भोगितां गोसावी। आदीं आवसानीं जीवी ।।२।।
तुका म्हणे सिण । न धरितां नव्हे भिन्न ।।३।।

७१६
 नसे तरी मनो नसो । परी वाचे तरी वसो ।।१।।
देह पडो या चिंतनें । विठ्ठलनामसंकीर्तनें ।।धृ।।
दंभस्थिती भलत्या भावें । मज हरिजन म्हणावें ।।२।।
तुका म्हणे काळें तरी । मज सांभाळील हरी ।।३।।

७१७
 नये जरी कांहीं । तरी भलतें चि वाहीं ।।१।।
म्हणविल्या ढास । कोण न धरी वेठीस ।।धृ।।
समर्थाच्या नांवें । भलतैसें विकावें ।।२।।
तुका म्हणे सत्ता । वरी असते बहुतां ।।३।।

७१८
 न संडवे अन्न । मज न सेववे वन ।।१।।

म्हणउनी नारायणा । कींव भाकितों करुणा ।।धृ।।
नाहीं अधिकार । कांहीं घोकाया अक्षर ।।२।।
तुका म्हणे थोडें । आयुष्य अवघें चि कोडें ।।३।।

७१९
एकांचीं उत्तरें । गोड अमृत मधुरें ।।१।।
ऐशा देवाच्या विभुती । भिन्न प्रारब्धाची गती ।।धृ।।
एकांचीं वचनें । कडु अत्यंत तीक्षणें ।।२।।
प्रकाराचें तीन । तुका म्हणे केलें जन ।।३।।

७२०
वचनें ही नाड । न बोले तें मुकें खोड ।।१।।
दोहीं वेगळें तें हित । बोली अबोलणी नीत ।।धृ।।
अंधार प्रकाशी । जाय दिवस पावे निशी ।।२।।
बीज पृथिवीच्या पोटीं । तुका म्हणे दावी दृष्टी ।।३।।

७२१
विचारा वांचून । न पवीजे समाधान ।।१।।
देह त्रिगुणांचा बांधा । माजी नाहीं गुण सुदा ।।धृ।।
देवाचिये चाडे । देवा द्यावें जें जें घडे ।।२।।
तुका म्हणे होतें । बहु गोमटें उचितें ।।३।।

७२२
तुटे भवरोग । संचितक्रियमाणभोग ।।१।।
ऐसें विठोबाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ।।धृ।।
वसों न सके पाप । पळे त्रिविध तो ताप ।।२।।
तुका म्हणे माया । होय दासी लागे पायां ।।३।।

७२३
मुसावलें अंग । रंगीं मेळविला रंग ।।१।।
एकीं एक दृढ जालें । मुळा आपुलिया आलें ।।धृ।।
सागरीं थेंबुडा । पडिल्या निवडे कोण्या वाटा ।।२।।
तुका म्हणे नवें । नव्हे जाणावें हें देवें ।।३।।

७२४
 अनुतापें दोष । जाय न लगतां निमिष ।।१।।
परि तो राहे विसावला । आदीं अवसानीं भला ।।धृ।।
हें चि प्रायश्चित । अनुतापीं न्हाय चित्त ।।२।।
तुका म्हणे पापा । शिवों नये अनुतापा ।।३।।

७२५
 चहूं आश्रमांचे धर्म । न राखतां जोडे कर्म ।।१।।
तैसी नव्हे भोळी सेवा । एक भाव चि कारण देवा ।।धृ।।
तपें इंद्रियां आघात । क्षणें एका वाताहात ।।२।।
मंत्र चळे थोडा । तरि धड चि होय वेडा ।।३।।
व्रतें करितां सांग । तरी एक चुकतां भंग ।।४।।
धर्म सत्त्व चि कारण । नाहीं तरी केला सिण ।।५।।
भूतदयेसि आघात । उंचनिच वाताहात ।।६।।
तुका म्हणे दुजें । विधिनिषेधाचें ओझें ।।७।।

७२६
 सोडिला संसार । माया तयावरि फार ।।१।।
धांवत चाले मागें मागें । सुखदुःख साहे अंगे ।।धृ।।
यानें घ्यावें नाम । तीसीकरणें त्याचें काम ।।२।।
तुका म्हणे भोळी । विठ्ठलकृपेची कोंवळी ।।३।।

७२७
 बैसों खेळूं जेवूं । तेथें नाम तुझें गाऊं ।।१।।
रामकृष्णनाममाळा । घालूं ओवुनियां गळा ।।धृ।।
विश्वास हा धरूं। नाम बळकट करूं ।।२।।
तुका म्हणे आतां । आम्हां जीवन शरणागतां ।।३।।

७२८
 पाटीं पोटीं देव । कैचा हरिदासां भेव ।।१।।
करा आनंदें कीर्तन । नका आशंकितमन ।।धृ।।
एथें कोठें काळ । करील देवापाशीं बळ ।।२।।

तुका म्हणे धनी । सपुरता काय वाणी ।।३।।

७२९
मनोमय पूजा । हे चि पढीयें केशीराजा ।।१।।
घेतो कल्पनेचा भोग । न मानेती बाह्य रंग ।।धृ।।
अंतरींचें जाणे । आदिवर्तमान खुणे ।।२।।
तुका म्हणे कुडें । कोठें सरे त्याच्या पुढें ।।३।।

७३०
जाणे भक्तीचा जिव्हाळा । तो चि देवीचा पुतळा ।।१।।
आणीक नये माझ्या मना । हो का पंडित शाहाणा ।।धृ।।
नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ।।२।।
तुका म्हणे नवविध । भक्ति जाणे तो चि शुद्ध ।।३।।

७३१
याजसाठीं वनांतरा । जातों सांडुनियां घरा ।।१।।
माझें दिठावेल प्रेम । बुद्धि होईल निष्काम ।।धृ।।
अद्वैताची वाणी । नाहीं ऐकत मी कानीं ।।२।।
तुका म्हणे अहंब्रम्ह । आड येऊं नेदीं भ्रम ।।३।।
७३२
बुडतां आवरीं । मज भवाचे सागरीं ।।१।।
नको मानूं भार । पाहों दोषांचे डोंगर ।।धृ।।
आहे तें सांभाळीं । तुझी कैसी ब्रीदावळी ।।२।।
तुका म्हणे दोषी । मी तों पातकांची राशी ।।३।।
७३३
अक्षई तें झालें । आतां न मोडे रचिलें ।।१।।
पाया पडिला खोले ठायीं । तेथें पुढें चाली नाहीं ।।धृ।।
होतें विखुरलें । ताळा जमे झडती आलें ।।२।।
तुका म्हणे बोली । पुढें कुंटित चि जाली ।।३।।

७३४
तुझे थोर थोर । भक्त करिती विचार ।।१।।
जपतपादि साधनें । मज चिंतवेना मनें ।।धृ।।

करुणावचनें । म्यां भाकावीं तुम्हां दीनें ।।२।।
तुका म्हणे घेईं । माझें थोडें फार ठायीं ।।३।।

७३५
लावुनि काहाळा । सुखें करितों सोहोळा ।।१।।
सादवीत गेलों जना । भय नाहीं सत्य जाणां ।।धृ।।
गात नाचत विनोदें । टाळघागऱ्यांच्या छंदें ।।२।।
तुका म्हणे भेव । नाहीं पुढें येतो देव ।।३।।

७३६
मुक्त कासया म्हणावें । बंधन तें नाहीं ठावें ।।१।।
सुखें करितों कीर्तन । भय विसरलें मन ।।धृ।।
देखिजेना नास । घालूं कोणावरी कास ।।२।।
तुका म्हणे साहे । देव आहे तैसा आहे ।।३।।

७३७
ओनाम्याच्या काळें । खडें मांडविलें बाळें ।।१।।
तें चि पुढें पुढें काई । मग लागलिया सोई ।।धृ।।
रज्जु सर्प होता । तोंवरी चि न कळतां ।।२।।
तुका म्हणे साचें । भय नाहीं बागुलाचें ।।३।।

७३८
आतां पुढें धरीं । माझे आठव वैखरी ।।१।।
नको बडबडूं भांडे । कांहीं वाउगें तें रांडें ।।धृ।।
विठ्ठल विठ्ठल । ऐसे सांडुनियां बोल ।।२।।
तुका म्हणे आण । तुज स्वामीची हे जाण ।।३।।

७३९
काय नव्हे करितां तुज । आतां राखें माझी लाज ।।१।।
मी तों अपराधाची राशी । शिखा अंगुष्ट तोंपाशीं ।।धृ।।
त्राहें त्राहें त्राहें । मज कृपादृष्टी पाहें ।।२।।
तुका म्हणे देवा । सत्या घ्यावी आतां सेवा ।।३।।

७४०
वंदीन मी भूतें । आतां अवघीं चि समस्तें ।।१।।
तुमची करीन भावना । पदोपदीं नारायणा ।।धृ।।
गाळुनियां भेद । प्रमाण तो ऐसा वेद ।।२।।
तुका म्हणे मग । नव्हे दुजयाचा संग ।।३।।

७४१
पूजा पुज्यमान । कथे उभे हरिजन ।।१।।
ज्याची कीर्ती वाखाणिती । तेथें ओतली ते मुर्ती ।।धृ।।
देहाचा विसर । केला आनंदें संचार ।।२।।
गेला अभिमान । लाज बोळविला मान ।।३।।
शोक मोह चिंता । याची नेणती ते वार्ता ।।४।।
तुका म्हणे सखे । विठोबा च ते सारिखे ।।५।।

७४२
भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ।।१।।
धांवे जातीपाशीं जाती । खुण येरयेरां चित्तीं ।।धृ।।
हिरा हिरकणी । काढी आंतुनि आहिरणी ।।२।।
तुका म्हणे केलें । मन शुद्ध हें चांगलें ।।३।।

७४३
वरि बोला रस । कथी ज्ञान माजी फोस ।।१।।
ऐसे लटिके जे ठक । तयां येहे ना पर लोक ।।धृ।।
परिस एक सांगे । अंगा धुळी हे न लगे ।।२।।
तुका म्हणे हाडें । कुतऱ्या लाविलें झगडें ।।३।।

७४४
हे चि तुझी पूजा । आतां करीन केशीराजा ।।१।।
अवघीं तुझींच हें पदें । नमस्कारीन अभेदें ।।धृ।।
न वर्जितदिशा । जाय तेथें चि सरिसा ।।२।।
नव्हे एकदेशी । तुका म्हणे गुणदोषीं ।।३।।

७४५

आपलें तों कांहीं । येथें सांगिजेसें नाहीं ।।१।।
परि हे वाणी वायचळ । छंद करविते बरळ ।।धृ।।
पंचभूतांचा हा मेळा । देह सत्यत्वें निराळा ।।२।।
तुका म्हणे भुली । इच्या उफराट्या चाली ।।३।।

७४६
विठ्ठल नावाडा फुकाचा । आळविल्या साटीं वाचा ।।१।।
कटीं कर जैसे तैसे । उभा राहिला न बैसे ।।धृ।।
न पाहे सिदोरी । जाती कुळ न विचारी ।।२।।
तुका म्हणे भेटी । हाका देतां उठाउठीं ।।३।।

७४७
कृपावंत किती । दीनें बहु आवडती ।।१।।
त्यांचा भार वाहे माथां । करी योगक्षेमचिंता ।।धृ।।
भुलें नेदी वाट । करीं धरूनि दावी नीट ।।२।।
तुका म्हणे जीवें । अनुसरतां एका भावें ।।३।।

७४८
नेणती वेद श्रुति कोणी । आम्हां भाविकां वांचुनी ।।१।।
रूप आवडे आम्हांशी । तैसी जोडी हृषीकेशी ।।धृ।।
आम्हीं भावें बळिवंत। तुज घालूं हृदयांत ।।२।।
तुका म्हणे तुज धाक । देतां पावसील हाक ।।३।।

७४९
मन गुंतलें लुलयां । जाय धांवोनि त्या ठाया ।।१।।
मागें परती तो बळी । शूर एक भूमंडळीं ।।धृ।।
येऊनियां घाली घाला । नेणों काय होई तुला ।।२।।
तुका म्हणें येणें । बहु नाडिले शाहाणे ।।३।।

७५०
घेईं माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ।।१।।
तुम्ही घ्या रे डोळे सुख । पाहा विठोबाचें मुख ।।धृ।।
तुम्ही ऐका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ।।२।।

मना तेथें धांव घेईं । राहें विठोबाचे पायीं ।।३।।
तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ।।४।।

७५१
धणी न पुरे गुण गातां । रूप दृष्टी न्याहाळितां ।।१।।
बरवा बरवा पांडुरंग । कांति सांवळी सुरंग ।।धृ।।
सर्वमंगळाचें सार। मुख सिद्धीचें भांडार ।।२।।
तुका म्हणे सुखा । अंतपार नाहीं लेखा ।।३।।

७५२
जरी मी नव्हतों पतित । तरि तूं पावन कैंचा येथ ।।१।।
म्हणोनि माझें नाम आधीं । मग तूं पावन कृपानिधी ।।धृ।।
लोहो महिमान परिसा । नाहीं तरीं दगड जैसा ।।२।।
तुका म्हणे याचकभावें। कल्पतरु मान पावे ।।३।।

७५३
एक भाव चित्तीं । तरीं न लगे कांहीं युक्ती ।।१।।
कळों आलें जीवें । मज माझियाचि भावें ।।धृ।।
आठव चि पुरे । सुख अवघें मोहो रे ।।२।।
तुका म्हणे मन । पूजा इच्छी नारायण ।।३।।

७५४
मज संतांचा आधार । तूं एकलें निर्विकार ।।१।।
पाहा विचारूनि देवा । नको आम्हांसवें दावा ।।धृ।।
तुज बोल न बोलवे। आम्हां भांडायाची सवे ।।२।।
तुका म्हणे तरी । ऐक्यभाव उरे उरी ।।३।।

७५५
तुज मागणें तें देवा । आम्हां तुझी चरणसेवा ।।१।।
आन नेघों देसी तरी । रिद्धि सिद्धि मुक्ति चारी ।।धृ।।
संतसंगति सर्वकाळ । थोर प्रेमाचा सुकाळ ।।२।।
तुका म्हणे नाम । तेणें पुरे माझें काम ।।३।।

७५६
तुझा शरणागत । जन्मोजन्मींचा अंकित ।।१।।
आणीक नेणें कांहीं हेवा । तुजवांचूनि केशवा ।।धृ।।
हें चि माझें गाणें । तुझें नामसंकीर्तन ।।२।।
तुझ्या नामाचीं भूषणें । तुका म्हणे ल्यालों लेणें ।।३।।

७५७
उतरलों पार । सत्य झाला हा निर्धार ।।१।।
तुझें नाम धरिलें कंठीं । केली संसारासी तुटी ।।धृ।।
आतां नव्हे बाधा । कोणेविशीं कांहीं कदा ।।२।।
तुका म्हणे कांहीं । आतां उरलें ऐसें नाहीं ।।३।।

७५८
क्रियामतिहीन । एक मी गा तुझें दीन ।।१।।
देवा करावा सांभाळ । वारीं माझी तळमळ ।।धृ।।
नको माझे ठायीं । गुणदोष घालूं कांहीं ।।२।।
अपराधाच्या कोटी । तुका म्हणे घालीं पोटीं ।।३।।

७५९
नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ।।१।।
तैसी चित्तशुद्धि नाहीं । तेथें बोध करील काई ।।धृ।।
वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करील वसंतकाळ ।।२।।
वांजे न होती लेकरें । काय करावें भ्रतारें ।।३।।
नपुंसका पुरुषासी । काय करील बाइल त्यासी ।।४।।
प्राण गेलिया शरीर । काय करील वेव्हार ।।५।।
तुका म्हणे जीवनेंविण । पीक नव्हे नव्हे जाण ।।६।।

७६०
नवां नवसांचीं । जालों तुम्हासी वाणीचीं ।।१।।
कोण तुझें नाम घेतें । देवा पिंडदान देतें ।।धृ।।
कोण होतें मागें पुढें । दुजें बोलाया रोकडें ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगा । कोणा घेतासि वो संगा ।।३।।

७६१
एका बीजा केला नास । मग भोगेल कणीस ।।१।।
कळे सकळां हा भाव । लाहानथोरांवरी जीव ।।धृ।।
लाभ नाहीं फुकासाठीं । केल्यावीण जीवासाठीं ।।२।।
तुका म्हणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ।।३।।

७६२
आयुष्य गेलें वांयांविण । थोर झाली नागवण ।।१।।
आतां धांवें धांवें तरी । काय पाहातोसि हरी ।।धृ।।
माझे तुझे या चि गती । दिवस गेले तोंडीं माती ।।२।।
मन वाव घेऊं नेदी । बुडवूं पाहे भवनदी ।।३।।
पडिला विषयाचा घाला । तेणें नागविलें मला ।।४।।
शरण आलों आतां धांवें । तुका म्हणे मज पावें ।।५।।

७६३
सोसोनि विपत्ती । जोडी दिली तुझे हातीं ।।१।।
त्याचा हा चि उपकार । अंतीं आम्हाशीं वेव्हार ।।धृ।।
नामरूपा केला ठाव। तुज कोण म्हणतें देव ।।२।।
तुका म्हणे हरी । तुज ठाव दिला घरीं ।।३।।

७६४
आपुलें मागतां । काय नाहीं आम्हां सत्ता ।।१।।
परि या लौकिकाकारणें । उरीं ठेविली बोलणें ।।धृ।।
ये चि आतां घडी । करूं बैसों ते ची फडी ।।२।।
तुका म्हणे करितों तुला । ठाव नाहींसें विठ्ठला ।।३।।

७६५
असो आतां किती । तुज यावें काकुलती ।।१।।
माझें प्रारब्ध हें गाढें । तूं बापुडें तयापुढें ।।धृ।।
सोडवीन आतां । ब्रीदें तुझीं पंढरीनाथा ।।२।।
तुका म्हणे बळी । तो गांढ्याचे कान पिळी ।।३।।

७६६

काय नव्हे केलें । एका चिंतितां विठ्ठलें ।।१।।
सर्व- साधनांचें सार । भवसिंधु उतरी पार ।।धृ।।
योगायागतपें । केलीं तयानें अमुपें ।।२।।
तुका म्हणे जपा । मंत्र तीं अक्षरी सोपा ।।३।।

७६७
हो कां दुराचारी । वाचे नाम जो उच्चारी ।।१।।
त्याचा दास मी अंकित । कायावाचामनेंसहित ।।धृ।।
नसो भाव चित्तीं । हरिचे गुण गातां गीतीं ।।२।।
करी अनाचार । वाचे हरिनामउच्चार ।।३।।
हो कां भलतें कुळ । शुचि अथवा चांडाळ ।।४।।
म्हणवी हरिचा दास । तुका म्हणे धन्य त्यास ।।५।।

७६८
हाकेसरिसी उडी । घालूनियां स्तंभ फोडी ।।१।।
ऐसी कृपावंत कोण । माझे विठाईवांचून ।।धृ।।
करितां आठव । धांवोनियां घाली कव ।।२।।
तुका म्हणे गीती गातां । नामें द्यावी सायुज्यता ।।३।।

७६९
लोह चुंबकाच्या बळें । उभें राहिलें निराळें ।।१।।
तैसा तूं चि आम्हांठायीं । खेळतोसी अंतर्बाहीं ।।धृ।।
भक्ष अग्नीचा तो दोरा । त्यासि वांचवी मोहरा ।।२।।
तुका म्हणे अधीलपणें । नेली लांकडें चंदनें ।।३।।

७७०
डोई वाढवूनि केश । भूतें आणिती अंगास ।।१।।
तरी ते नव्हति संतजन । तेथें नाहीं आत्मखुण ।।धृ।।
मेळवूनि नरनारी। शकुन सांगती नानापरी ।।२।।
तुका म्हणे मैंद । नाहीं त्यापासीं गोविंद ।।३।।

७७१
गाढवाचे घोडे । आम्ही करूं दृष्टीपुढें ।।१।।

चघळी वाहाणा । माघारिया बांडा सुना ।।धृ।।
सोंगसंपादनी । तरि करूं शुद्ध वाणी ।।२।।
तुका म्हणे खळ । करूं समयीं निर्मळ ।।३।।

७७२
बाईल मेली मुक्त जाली । देवें माया सोडविली ।।१।।
विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ।।धृ।।
पोर मेलें बरें जालें । देवें मायाविरहित केलें ।।२।।
माता मेली मज देखतां । तुका म्हणे हरली चिंता ।।३।।

७७३
योग तप या चि नांवें । गळित व्हावें अभिमानें ।।१।।
करणें तें हें चि करा । सत्यें बरा व्यापार ।।धृ।।
तरि खंडे येरझार। निघे भार देहाचा ।।२।।
तुका म्हणे मानामान । हें बंधन नसावें ।।३।।

७७४
करी संध्यास्नान । वारी खाउनियां अन्न ।।१।।
तया नाहीं लाभहानी । आदा वेंचाचिये मानीं ।।धृ।।
मजुराचें धन । विळा दोर चि जतन ।।२।।
तुका म्हणे नाहीं । अधीरासी देव कांहीं ।।३।।

७७५
वाखर घेउनि आलें । त्यासी तरवारेणें हालें ।।१।।
नव्हे आपुलें उचित । करुनि टाकावें फजित ।।धृ।।
अंगुळिया मोडी। त्यासी काय सिलें घोडीं ।।२।।
नपुंसकासाठीं । तुका म्हणे न लगे जेठी ।।३।।

७७६
वर्णाश्रम करिसी चोख । तरि तूं पावसी उत्तम लोक ।।१।।
तुजला तें नाहीं ठावें । जेणें अंगें चि ब्रम्ह व्हावें ।।धृ।।
जरि तूं जालासी पंडित । करिसी शब्दाचें पांडित्य ।।२।।
गासी तान मान बंध । हाव भाव गीत छंद ।।३।।

जाणसील तूं स्वतंत्र । आगमोक्त पूजायंत्र ।।४।।
साधनाच्या ओढी । डोळियांच्या मोडामोडी ।।५।।
तुका म्हणे देहीं । संत जाहाले विदेही ।।६।।

७७७
प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातों हरी ।।१।।
मनेंसहित वाचा काया । अवघें दिलें पंढरीराया ।।धृ।।
सत्ता सकळ तया हातीं। माझी कींव काकुलती ।।२।।
तुका म्हणे ठेवी तैसें । आम्ही राहों त्याचे इच्छे ।।३।।

७७८
पाववील ठाया । पांडुरंग चिंतिलिया ।।१।।
त्यासी चिंतिलिया मनीं । चित्ता करी गंवसणी ।।धृ।।
पावावया फळ । अंगीं असावें हें बळ ।।२।।
तुका म्हणे तईं । सिद्धि वोळगती पायीं ।।३।।

७७९
धन्य भावशीळ । ज्याचें हृदय निर्मळ ।।१।।
पूजी प्रतिमेचे देव । संत म्हणती तेथें भाव ।।धृ।।
विधिनिषेध नेणती । एक निष्ठा धरुनी चित्तीं ।।२।।
तुका म्हणे तैसें देवा । होणें लागे त्यांच्या भावा ।।३।।

७८०
आधीं च आळशी । वरी गुरूचा उपदेशी ।।१।।
मग त्या कैंची आडकाठी । विधिनिषेधाची भेटी ।।धृ।।
नाचरवे धर्म । न करवे विधिकर्म ।।२।।
तुका म्हणे ते गाढव । घेती मनासवें धांव ।।३।।

७८१
नाचे टाळी पिटी । प्रेमें अंग धरणीं लोटी ।।१।।
माझे सखे ते सज्जन । भोळे भाविक हरिजन ।।धृ।।
न धरिती लाज । नाहीं जनासवें काज ।।२।।
तुका म्हणे दाटे । कंठ नेत्रीं जळ लोटे ।।३।।

७८२
टिळा टोपी माळा देवाचें गवाळें । वागवी वोंगळ पोटासाटीं ।।१।।
तुळसी खोवी कानीं दर्भ खोवी शेंडी । लटिकी धरी बोंडी नासिकाची ।।धृ।।
कीर्तनाचे वेळे रडे पडे लोळे । प्रेमेंविण डोळे गळताती ।।२।।
तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ।।३।।

७८३
धन्य देहूं गांव पुण्य भूमि ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ।।१।।
धन्य क्षेत्रवासी लोक दइवाचे । उच्चारिती वाचे नामघोष ।।धृ।।
कर कटी उभा विश्वाचा जनिता । वामांगीं ते माता रखुमादेवी ।।२।।
गरुड पारीं उभा जोडुनियां कर । अश्वत्थ समोर उत्तरामुख ।।३।।
दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर । शोभे गंगातीर इंद्रायणी ।।४।।
लक्ष्मीनारायण बल्लाळाचें वन । तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ।।५।।
विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरी । हनुमंत शेजारीं सहित दोघे ।।६।।
तेथें दास तुका करितो कीर्तन । हृदयीं चरण विठोबाचे ।।७।।

शात्कावर - अभंग १३
७८४
टंवकारूनि दृष्टी लावुनियां रंग । दावी झगमग डोळ्यांपुढें ।।१।।
म्हणती शिष्यासी लागली समाधी । लटकी चि उपाधी झकविती ।।धृ।।
दीपाचिया ज्योती कोंडियेलें तेज । उपदेश सांजरात्रीमाजी ।।२।।
रांगोळिया चौक शृंगारुनी वोजा । आवरण पूजा यंत्र करी ।।३।।
पडदा लावोनियां दीप चहूं कोनीं । बैसोनि आसनीं मुद्रा दावी ।।४।।
नैवेद्यासी म्हणे करावें पक्वान्न । पात्रासी दिव्यान्न परवडी ।।५।।
जाला उपदेश कवळ घ्या रे मुखीं । आपोशन शेखीं बुडविलें ।।६।।
पाषांड करोनि मांडिली जीविका । बुडवी भाविकां लोकांप्रती ।।७।।
कायावाचामनें सोडवी संकल्प । गुरु गुरु जप प्रतिपादी ।।८।।
शुद्ध परमार्थ बुडविला तेणें । गुरुत्वभूषणें भोग भोगी ।।९।।
विधीचा ही लोप बुडविला वेद । शास्त्रांचा ही बोध हरविला ।।१०।।
योगाची धारणा नाहीं प्राणायाम । सांडी यम नेम नित्यादिक ।।११।।
वैराग्याचा लोप हरिभजनीं विक्षेप । वाढविलें पाप मतिलंडें ।।१२।।
तुका म्हणे गेलें गुरुत्व गुखाडी । पूर्वजांसी धाडी नर्कवासा ।।१३।।

७८५
शाक्त गधडा जये देशीं । तेथें राशी पापाच्या ।।१।।
सुकृताचा उदो केला । गोंधळ घाला इंद्रियें ।।धृ।।
क्रोधरूपें वसे काम । तीचें नाम जपतसे ।।२।।
मद्यभक्षण मांगिण जाती । विटाळ चित्तीं सांटविला ।।३।।
स्तवुनियां पूजी रांड । न लजे भांड दाढीसी ।।४।।
तुका म्हणे भगवती । नेइल अंतीं आपणापें ।।५।।

७८६
राजा प्रजा द्वाड देश । शाक्त वास करिती तो ।।१।।
अधर्माचें उबड पीक । धर्म रंक त्या गांवीं ।।धृ।।
न पिके भूमि कांपे भारें । मेघ वारें पीतील ।।२।।
तुका म्हणे अवघीं दुःखें । येती सुखें वस्तीसी ।।३।।

७८७
ऐसें कलियुगाच्या मुळें । जालें धर्माचें वाटोळें ।।१।।
सांडुनियां रामराम । ब्राम्हण म्हणती दोमदोष ।।धृ।।
शिवों नये तीं निळीं । वस्त्रें पांघरती काळीं ।।२।।
तुका म्हणे वृत्ति । सांडुनि गदा मागत जाती ।।३।।

७८८
अवघ्या पापें घडला एक । उपासक शक्तीचा ।।१।।
त्याचा विटाळ नको अंगा । पांडुरंगा माझिया ।।धृ।।
काम क्रोध मद्य अंगीं । रंगला रंगीं अवगुणी ।।२।।
करितां पाप न धरी शंका। म्हणे तुका कोणी ही ।।३।।

७८९
वारितां बळें धरितां हातीं । जुलुमें जाती नरकामधीं ।।१।।
रंडीदासाप्रति कांहीं । उपदेश तो ही चालेना ।।धृ।।
जन्म केला वाताहात । थोर घात येठायीं ।।२।।
तुका म्हणे पंढरीनाथा । तुझी कथा दूषीती ।।३।।

७९०
शाक्तांची शूकरी माय । विष्ठा खाय बिदीची ।।१।।
तिची त्या पडली सवे । मागें धांवें म्हणोनि ।।धृ।।
शाक्तांची गाढवी माय । भुंकत जाय वेसदारा ।।२।।
तुका म्हणे शिंदळीचे । बोलतां वाचे निंद्य ते ।।३।।

७९१
हरिहर सांडूनि देव । धरिती भाव क्षुल्लकीं ।।१।।
ऐका त्यांची विटंबणा । देवपणा भक्तांची ।।धृ।।
अंगीं कवडे घाली गळां । परडी कळाहीन हातीं ।।२।।
गळां गांठा हिंडें दारीं । मनुष्य परी कुतरीं तीं ।।३।।
माथां सेंदुर दांत खाती । जेंगट हातीं सटवीचें ।।४।।
पूजिती विकट दौंद । पशु सोंड गजाची ।।५।।
ऐशा छंदें चुकलीं वाटा । भाव खोटा भजन ।।६।।
तुका म्हणे विष्णुशिवा । वांचुनि देवा भजती ती ।।७।।

७९२
कांद्यासाठी जालें ज्ञान । तेणें जन नाडिलें ।।१।।
ऐकाकाम क्रोध बुचबुची । भुंके पुची व्यालीची ।।धृ।।
पूजेलागीं द्रव्य मागे।काय सांगे शिष्यातें ।।२।।
तुका म्हणे कैंचें ब्रम्ह । अवघा भ्रम विषयांचा।।३।।

७९३
सांडुनियां पंढरीराव । कवणातें म्हणों देव ।।१।।
बहु लाज वाटे चित्ता । आणिकांतें देव म्हणतां ।।धृ।।
सांडुनियां हिरा । कोणें वेचाव्या त्या गारा ।।२।।
तुका म्हणे हरिहर । ऐसी सांडुनियां धुर ।।३।।

७९४
बहुतें गेलीं वांयां । न भजतां पंढरीराया ।।१।।
करिती कामिकांची सेवा । लागोन मागोन खात्या देवा ।।धृ।।
अवधियांचा धनी । त्यासी गेलीं विसरोनि ।।२।।
तुका म्हणे अंतीं । पडती यमाचिया हातीं ।।३।।

७९५
असो आतां ऐसा धंदा । तुज गोविंदा आठवूं ।।१।।
रक्षिता तूं होसी जरी । तरि काय येरीं करावें ।।धृ।।
काया वाचा मन पायीं । राहे ठायीं करूं तें ।।२।।
तुका म्हणे गाइन गीतीं । रूप चित्तीं धरूनियां ।।३।।

७९६
नाहीं आम्ही विष्णुदास । करीत आस कोणांची ।।१।।
कां हे नष्ट करिती निंदा । नेणों सदा आमुची ।।धृ।।
असों भलते ठायीं मनें । समाधानें आपुलिया ।।२।।
तुका म्हणे करूं देवा । तुझी सेवा धंदा तो ।।३।। ।।१३।।

७९७
पाखांड्यांनीं पाठी पुरविला दुमाला । तेथें मी विठ्ठला काय बोलों ।।१।।
कांद्याचा खाणार चोजवी कस्तुरी । आपुलें भिकारी अर्थ नेणे ।।धृ।।
न कळे तें मज पुसती छळूनी । लागतां चरणीं न सोडिती ।।२।।
तुझ्या पांयांविण दुजें नेणें कांहीं । तूं चि सर्वांठायीं एक मज ।।३।।
तुका म्हणे खीळ पडो त्यांच्या तोंडा । किती बोलों भांडां वादकांशीं ।।४।।

७९८
कलियुगीं कवित्व करिती पाषांड । कुशळ हे भांड बहु जाले ।।१।।
द्रव्य दारा चित्तीं प्रजांची आवडी । मुखें बडबडी कोरडा चि ।।धृ।।
डंव करी सोंग मानावया जग । मुखें बोले त्याग मनीं नाहीं ।।२।।
वेदाज्ञे करोनि न करिती स्वहित । नव्हती अलिप्त देहाहुनी ।।३।।
तुका म्हणे दंड साहील यमाचे । न करी जो वाचे बोले तैसें ।।४।।

७९९
विषयाचें सुख एथें वाटे गोड । पुढें अवघड यमदंड ।।१।।
मारिती तोडिती झोडिती निष्ठुर । यमाचे किंकर बहुसाल ।।धृ।।
असिपत्रीं तरुवरखैराचे विंगळ । निघतील ज्वाळ तेलपाकीं ।।२।।
तप्तभूमीवरि लोळविती पाहीं । अग्निस्तंभ बाहीं कवळविती ।।३।।

म्हणऊनि तुका येतो काकुलती । पुरे आतां योनी गर्भवास ।।४।।

८००
अल्प माझी मती । म्हणोनि येतों काकुलती ।।१।।
आतां दाखवा दाखवा । मज पाउलें केशवा ।।धृ।।
धीर माझ्या मना। नाहीं नाहीं नारायणा ।।२।।
तुका म्हणे दया । मज करा अभागिया ।।३।।

८०१
वाटुली पाहातां सिणले डोळुले । दाविसी पाउलें कइं वो डोळां ।।१।।
तूं माय माउली कृपेची साउली । विठ्ठले पाहिली वास तुझी ।।२।।
तुका म्हणे माझ्या असांवल्या बाह्या । तुज क्षेम द्याया पांडुरंगा ।।३।।

८०२
देह हा सादर पाहावा निश्चित । सर्व सुख एथें नाम आहे ।।१।।
ब्रम्ह जें देखणें द्वैत जेव्हां गेलें । शरीर तें जालें ब्रम्हरूप ।।धृ।।
यजन याजन तप व्रतें करिती । विकल्पें नागवती शुद्ध पुण्या ।।२।।
तुका म्हणे सर्व सुख एथें आहे । भ्रांति दूर पाहें टाकुनियां ।।३।। ।।१३।।

८०३
तुझे वर्णूं गुण ऐसी नाहीं मती । राहिल्या त्या श्रुती मौन्यपणें ।।१।।
मौन्यपणें वाचा थोंटावल्या चारी । ऐसें तुझें हरी रूप आहे ।।धृ।।
रूप तुझें ऐसें डोळां न देखवे । जेथें हें झकवे ब्रम्हादिक ।।२।।
ब्रम्हादिक देवा कर्माची कचाटी । म्हणोनि आटाटी फार त्यांसी ।।३।।
तुका म्हणे तुझें गुण नाम रूप । आहेसी अमुप वाणूं काई ।।४।।

८०४
मनवाचातीत तुझें हें स्वरूप । म्हणोनियां माप भक्ति केलें ।।१।।
भक्तीचिया मापें मोजितों अनंता । इतरानें तत्वता न मोजवे ।।धृ।।
योग याग तपें देहाचिया योगें । ज्ञानाचिया लागें न सांपडेसी ।।२।।
तुका म्हणे आम्ही भोळ्या भावें सेवा । घ्यावी जी केशवा करितों ऐसी ।।३।।

८०५

देवा ऐसा शिष्य देई । ब्रम्हज्ञानी निपुण पाहीं ।।१।।
जो कां भावाचा आगळा । भक्तिप्रेमाचा पुतळा ।।धृ।।
ऐशा युक्ति ज्याला बाणे । तेथें वैराग्याचें ठाणें ।।२।।
ऐसा जाला हो शरीरीं । तुका लिंबलोण करी ।।३।।

८०६

जंव नाहीं देखिली पंढरी । तोंवरी वर्णिसी थोर वैकुंठींची ।।१।।
मोक्षसिद्धि तेथें हिंडे दारोदारीं । होऊनि कामारी दीनरूप ।।धृ।।
वृंदावन सडे चौक रंग माळा । अभिन्नव सोहोळा घरोघरीं ।।२।।
नामघोष कथापुराणकीर्तनीं । ओविया कांडणीं पांडुरंग ।।३।।
सर्व सुख तेथें असे सर्वकाळ । ब्रम्ह तें केवळ नांदतसे ।।४।।
तुका म्हणे जें न साधे सायासें । तें हें प्रत्यक्ष दिसे विटेवरि ।।५।।

८०७

दुःख वाटे ऐसी ऐकोनियें गोष्टी । जेणें घडे तुटी तुझ्या पायीं ।।१।।
येतो कळवळा देखोनियां घात । करितों फजित नाइकती ।।धृ।।
काय करूं देवा ऐसी नाहीं शक्ति । दंडुनि पुढती वाटे लावूं ।।२।।
तुका म्हणे मज दावूं नको ऐसे । दृष्टीपुढें पिसे पांडुरंगा ।।३।।

८०८

शूकरासी विष्ठा माने सावकास । मिष्टान्नाची त्यास काय गोडी ।।१।।
तेवीं अभक्तांसी आवडे पाखांड । न लगे त्यां गोड परमार्थ ।।धृ।।
श्वानासी भोजन दिलें पंचामृत । तरी त्याचें चित्त हाडावरि ।।२।।
तुका म्हणे सर्पा पाजिलिया क्षीर । वमितां विखार विष जालें ।।३।।

८०९

रासभ धुतला महा तीर्थांमाजी । नव्हे जैसा तेजी शामकर्ण ।।१।।
तेवीं खळा काय केला उपदेश । नव्हे चि मानस शुद्ध त्याचें ।।धृ।।
सर्पासी पाजिलें शर्करापीयूष । अंतरींचें विष जाऊं नेणे ।।२।।
तुका म्हणे श्वाना क्षिरीचें भोजन । सवें चि वमन जेवी तया ।।३।।

८१०

जेवीं नवज्वरें तापलें शरीर । लागे तया क्षीर विषातुल्य ।।१।।
तेवीं परमार्थ जीहीं दुराविला । तयालागीं झाला सन्निपात ।।धृ।।
कामिनी जयाच्या जाहाली नेत्रासी । देखी तो चंद्रासी पीतवर्ण ।।२।।
तुका म्हणे मद्यपानाची आवडी । न रुचे त्या गोडी नवनीताची ।।३।।

८११
आतां असों मना अभक्तांची कथा । न होईं दुश्चिता हरिनामीं ।।१।।
नये त्याची कदा गोष्टी करूं मात । जिव्हे प्रायश्चित्त त्याच्या नांवें ।।धृ।।
प्रभातें न घ्यावें नांव माकडाचें । तैसें अभक्ताचें सर्वकाळ ।।२।।
तुका म्हणे आतां आठवूं मंगळ । जेणें सर्व काळ सुखरूप ।।३।।

८१२
नाम आठवितां सद्गदित कंठीं । प्रेम वाढे पोटीं ऐसें करीं ।।१।।
रोमांच जीवन आनंदाश्रु नेत्रीं । अष्टांग ही गात्रीं प्रेम तुझें ।।धृ।।
सर्व ही शरीर वेचो या कीर्तनीं । गाऊं निशिदिनीं नाम तुझें ।।२।।
तुका म्हणे दुजें न करीं कल्पांतीं । सर्वदा विश्रांति संतां पाईं ।।३।।

८१३
जननी हे जाणे बाळकाचें वर्म । सुख दुःख धर्म जें जें कांहीं ।।१।।
अंधापुढें जेणें दिधला आधार । त्याचा हा विचार तो चि जाणे ।।धृ।।
शरणागता जेणें घातलें पाठीशीं । तो जाणे तेविशीं राखों तया ।।२।।
कासे लागे तया न लगती सायास । पोहोणारा त्यास पार पावी ।।३।।
तुका म्हणे जीव विठ्ठलाचे हातीं । दिला त्याची गति तो चि जाणे ।।४।।

८१४
नका वांटूं मन विधिनिषेधांसी । स्मरावा मानसीं पांडुरंग ।।१।।
खादलिया अन्ना मासी बोलों नये । अवघें चि जाये एका घांसें ।।धृ।।
जोडी होते परी ते बहु कठिण । करितां जतन सांभाळावें ।।२।।
तुका म्हणें येथें न मना विषाद । निंबेंविण व्याध तुटों नये ।।३।।

८१५
नको होऊं देऊं भावीं अभावना । या चि नांवें जाणा बहु दोष ।।१।।
मेघवृष्टि येथें होते अनिवार । जिव्हाळ्यां उखर लाभ नाड ।।धृ।।

उत्तमा विभागें कनिष्ठाची इच्छा । कल्पतरु तैसा फळे त्यासी ।।२।।
तुका म्हणे जिणें बहु थोडें आहे । आपुलिया पाहें पुढें बरें ।।३।।

८१६
त्याग तंव मज न वजतां केला । कांहीं च विठ्ठला मनांतूनि ।।१।।
भागलिया आला उबग सहज । न धरितां काज जालें मनीं ।।धृ।।
देह जड जालें ॠणाच्या आभारें । केलें संवसारें कासावीस ।।२।।
तुका म्हणे गेला आळसकिळस । अकर्तव्य दोष निवारिले ।।३।।

८१७
मढें झांकुनियां करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहें ।।१।।
तयापरी करीं स्वहित आपुलें । जयासी फावलें नरदेह ।।धृ।।
ओटीच्या परिस मुठीचें तें वाढे । यापरि कैवाडें स्वहिताचें ।।२।।
नाहीं काळसत्ता आपुलिये हातीं । जाणते हे गुंती उगविती ।।३।।
तुका म्हणे पाहें आपुली सूचना । करितो शाहाणा मृत्युलोकीं ।।४।।

८१८
राजा चाले तेथें वैभव सांगातें । हें काय लागतें सांगावें त्या ।।१।।
कोणी कोणा एथें न मनी जी फुका । कृपेविण एका देवाचिया ।।धृ।।
शृंगारिलें नाहीं तगोंयेत वरि । उमटे लौकरि जैसे तैतें ।।२।।
तुका म्हणे घरीं वसे नारायण । कृपेची ते खुण साम्या येते ।।३।।

८१९
वत्स पळे धेनु धांवे पाठीलागीं । प्रीतीचा तो अंगीं आयुर्भाव ।।१।।
शिकविलें काय येईल कारणा । सूत्र ओढी मना आणिकांच्या ।।धृ।।
सांडिलें तें नाहीं घेत मेळवितां । म्हणऊनि लाता मागें सारी ।।२।।
तुका म्हणे आग्रह करावा न लगे । सांगतसे अंगें अनुभव ।।३।।

८२०
देवाच्या संबंधें विश्व चि सोयरें । सूत्र ओढे दोरें एका एक ।।१।।
आहाच हें नव्हे विटायासारिखें । जीव जीवनीं देखें सामावलें ।।धृ।।
आणिकांचें सुख दुःख उमटे अंतरीं । एथील इतरीं तेणें न्यायें ।।२।।
तुका म्हणे ठसावलें शुद्ध जाती । शोभा चि पुढती विशेषता ।।३।।

८२१
अवघा वेंचलों इंद्रियांचे ओढी । जालें तें तें घडी निरोपिलें ।।१।।
असावा जी ठावा सेवेसी विचार । आपुला म्यां भार उतरिला ।।धृ।।
कायावाचामनें तो चि निजध्यास । एथें जालों ओस भक्तिभावें ।।२।।
तुका म्हणे करूं येईल धावणें । तरि नारायणें सांभाळावें ।।३।।

८२२
राहो आतां हें चि ध्यान । डोळा मन लंपटो ।।१।।
कोंडकोंडुनि धरीन जीवें । देहभावें ओंवाळीन ।।धृ।।
होईल येणें कळसा आलें । स्थिरावलें अंतरीं ।।२।।
तुका म्हणे गोजिरिया । विठोबा पायां पडों द्या ।।३।।

८२३
आदि मध्य अंत दाखविला दीपें । हा तों आपणापें यत्न बरा ।।१।।
दाशत्त्वें दाविलें धन्याचें भांडार । तोंतों नव्हे सार एथुनियां ।।धृ।।
उपायानें सोस नासला सकळ । सत्ते सत्ताबळ अंगा आलें ।।२।।
तुका म्हणे दृष्टि सकळांचे शिरीं । वचन चि करी बैसोनियां ।।३।।

८२४
सांटविले वाण । पैस घातला दुकान ।।१।।
जें ज्या पाहिजे जे काळीं । आहे सिद्ध चि जवळी ।।धृ।।
निवडिलें साचें । उत्तममध्यमकनिष्ठाचें ।।२।।
तुका बैसला दुकानीं । दावी मोला ऐसी वाणी ।।३।।

८२५
लागलिया मुख स्तनां । घाली पान्हा माउली ।।१।।
उभयतां आवडी लाडें । कोडें कोड पुरतसे ।।धृ।।
मेळवितां अंगें अंग । प्रेमें रंग वाढतो ।।२।।
तुका म्हणे जड भारी । अवघें शिरीं जननीचे ।।३।।

८२६
अवगुण तों कोणीं नाहीं प्रतिष्ठिले । मागें होत आले शिष्टाचार ।।१।।

दुर्बळाच्या नांवें पिटावा डांगोरा । हा तों नव्हे बरा सत्यवाद ।।धृ।।
मद्य आणि मधु एकरासी नांवें । तरि कां तें खावें आधारें त्या ।।२।।
तुका म्हणे माझा उच्छिष्ट प्रसाद । निवडी भेदाभेद वृष्टिन्यायें ।।३।।

८२७
भूतीं भगवंत । हा तों जाणतों संकेत ।।१।।
भारी मोकलितों वाण । ज्याचा त्यासी कळे गुण ।।धृ।।
करावा उपदेश। निवडोनि तरि दोष ।।२।।
तुका म्हणे वाटे । चुकतां आडरानें कांटे ।।३।।

८२८
आम्हां हें कवतुक जगा द्यावी नीत । करावे फजित चुकती ते ।।१।।
कासयाचा बाध एकाच्या निरोपें । काय व्हावें कोपें जगाचिया ।।धृ।।
अविद्येचा येथें कोठें परिश्रम । रामकृष्णनाम ऐसे बाण ।।२।।
तुका म्हणे येथें खऱ्याचा विकरा । न सरती येरा खोट्या परी ।।३।।

८२९
दर्पणासी नखटें लाजे । शुद्ध खिजे देखोनि ।।१।।
ऐसें अवगुणांच्या बाधें । दिसे सुदें विपरीत ।।धृ।।
अंधळ्यास काय हिरा । गारां चि तो सारिखा ।।२।।
तुका म्हणे भुंके सुनें । ठाया नेणे ठाव तो ।।३।।

८३०
नावडे तरि कां येतील हे भांड । घेउनियां तोंड काळें येथें ।।१।।
नासोनियां जाय रस यासंगती । खळाचे पंगती नारायणा ।।धृ।।
तोंडावाटा नर्क काढी अमंगळ । मिष्टान्ना विटाळ करी सुनें ।।२।।
तुका म्हणे नाहीं संतांची मर्यादा । निंदे तो चि निंदा मायझवा ।।३।।

८३१
लेकरा आईतें पित्याची जतन । दावी निजधन सर्व जोडी ।।१।।
त्यापरि आमचा जालासे सांभाळ । देखिला चि काळ नाहीं आड ।।धृ।।
भुकेचे संनिध वसे स्तनपान । उपायाची भिन्न चिंता नाहीं ।।२।।
आळवूनि तुका उभा पैलथडी । घातली या उडी पांडुरंगें ।।३।।

८३२
शुद्ध चर्या हें चि संताचें पूजन । लागत चि धन नाहीं वित्त ।।१।।
सगुणाचे सोई सगुण विश्रांती । आपण चि येती चोजवीत ।।धृ।।
कीर्तनीं चि वोळे कृपेचा वोरस । दुरीपणें वास संनिधता ।।२।।
तुका म्हणे वर्म सांगतों सवंगें । मन लावा लागें स्वहिताच्या ।।३।।

८३३
जीवींचें जाणावें या नांवें आवडी । हेंकड तें ओढी अमंगळ ।।१।।
चित्ताच्या संकोचें कांहीं च न घडे । अतिशयें वेडे चार तो चि ।।धृ।।
काळाविण कांहीं नाहीं रुचों येत । करूनि संकेत ठेवियेला ।।२।।
तुका म्हणे कळे वचनें चांचणी । काय बोलवूनि वेळोवेळां ।।३।।

८३४
कामातुर चवी सांडी । बरळ तोंडीं बरळे ।।१।।
रंगलें तें अंगीं दावी । विष देववी आसडे ।।धृ।।
धनसोसें लागे वेड । ते बडबड शमेना ।।२।।
तुका म्हणे वेसनें दोन्ही । नर्कखाणी भोगावया ।।३।।

८३५
कृष्णांजनें जाले सोज्वळ लोचन । तेणें दिले वान निवडुनी ।।१।।
निरोपाच्या मापें करीं लडबड । त्याचें त्यानें गोड नारायणें ।।धृ।।
भाग्यवंतांघरीं करितां विश्वासें । कार्य त्यासरिसें होईजेतें ।।२।।
तुका म्हणे पोट भरे बरे वोजा । निज ठाव निजा निजस्थानीं ।।३।।

८३६
मैंद आला पंढरीस । हातीं घेउनि प्रेमपाश ।।१।।
पुढें नाडियलें जग । नेतो लागों नेदी माग ।।धृ।।
उभारोनि बाहे । दृष्टादृष्टी वेधीताहे ।।२।।
वैकंठीहुनि पेणें । केलें पंढरीकारणें ।।३।।
पुंडलिकें यारा । देउनि आणिलें चोरा ।।४।।
तुका म्हणे चला । तुम्ही आम्ही धरूं त्याला ।।५।।

८३७
भांडवी माउली कवतुकें बाळा । आपणा सकळां साक्षित्वेसीं ।।१।।
माझी माझी म्हणे एकएकां मारी । हें तों नाहीं दुरी उभयतां ।।धृ।।
तुझें थोडें भातें माझें बहु फार । छंद करकर वाद मिथ्या ।।२।।
तुका म्हणे एके ठायीं आहे वर्म । हें चि होय श्रम निवारितें ।।३।।

८३८
लटिकियाच्या आशा । होतों पडिलों वळसा । होउनियां दोषा । पात्र मिथ्या अभिमानें ।।१।।
बरवी उघडली दृष्टी । नाहीं तरी होतों कष्टी । आक्रंदते सृष्टी । मात्र या चेष्टांनीं ।।धृ।।
मरणाची नाहीं शुद्धी । लोभीं प्रवर्तली बुद्धी । परती तों कधीं । घडे चि ना माघारीं ।।२।।
सांचूनि मरे धन । लावी पोरांसी भांडण । नाहीं नारायण । तुका म्हणे स्मरीला ।।३।।

८३९
जवळी मुखापाशीं । असतां नेघे अहर्निशीं ।।१।।
भवनिर्दाळण नाम । विठ्ठल विठ्ठल नासी काम ।।धृ।।
सुखाचें शेजार । करूं कां नावडें घर ।।२।।
तुका म्हणे ठेवा । कां हा न करी चि बरवा ।।३।।

८४०
बरवें देशाउर जालें । काय बोलें बोलावें ।।१।।
लाभें लाभ दुणावला । जीव धाला दरुषणें ।।धृ।।
भाग्यें जाली संतभेटी। आवडी पोटीं होती ते ।।२।।
तुका म्हणे श्रम केला । अवघा आला फळासी ।।३।।

८४१
सांगतां हें नये सुख । कीर्ती मुख न पुरे ।।१।।
आवडीनें सेवन करू । जीवींचें धरूं जीवीं च ।।धृ।।
उपमा या देतां लाभा । काशा शोभा सारिखी ।।२।।
तुका म्हणे नुचलीं डोई । ठेविली पायीं संतांचे ।।३।।

८४२
आपुलाला लाहो करूं । केणें भरूं हा विठ्ठल ।।१।।
भाग्य पावलों या ठाया । आतां काया कुरवंडी ।।धृ।।
पुढती कोठें घडे ऐसें । बहुतां दिसें फावलें ।।२।।
तुका म्हणे जाली जोडी । चरण घडी न विसंभें ।।३।।

८४३
उजळलें भाग्य आतां । अवघी चिंता वारली ।।१।।
संतदर्शनें हा लाभ । पद्मनाभ जोडला ।।धृ।।
संपुष्ट हा हृदयपेटी । करूनि पोटीं सांटवूं ।।२।।
तुका म्हणे होता ठेवा । तो या भावा सांपडला ।।३।।

८४४
आम्हां आपुलें नावडे संचित । चरफडी चित्त कळवळ्यानें ।।१।।
न कळतां जाला खोळंब मारगा । जगीं जालों जगा बहुरूपी ।।धृ।।
कळों आलें बरें उघडले डोळे । कर्णधार मिळे तरि बरें ।।२।।
तुका म्हणे व्हाल ऐकत करुणा । तरि नारायणा उडी घाला ।।३।।

८४५
बरगासाटीं खादलें शेण । मिळतां अन्न न संडी ।।१।।
फजित तो केला आहे । ताडण साहे गौरव ।।धृ।।
ओढाळाची ओंगळ ओढी । उगी खोडी नवजाय ।।२।।
तुका फजीत करी बुच्या। विसरे कुच्या खोडी तेणें ।।३।।

८४६
धांव घालीं आई । आतां पाहातेसी काई ।।१।।
धीर नाहीं माझे पोटीं । जालें वियोगें हिंपुटीं ।।धृ।।
करावें सीतळ । बहु जाली हळहळ ।।२।।
तुका म्हणे डोई । कधीं ठेवीन हे पायीं ।।३।।

८४७
तुम्हां ठावा होता देवा । माझें अंतरींचा हेवा ।।१।।

होती काशानें सुटका । तरि हे वैकुंठनायका ।।धृ।।
नसतें सांभाळिलें। जरि तुम्हीं आश्वासिलें ।।२।।
तुका म्हणे कृपाळुवा । बरवा केला सावाधावा ।।३।।

८४८
देऊं ते उपमा । आवडीनें पुरुषोत्तमा ।।१।।
पाहातां काशा तूं सारिखा । तिंहीं लोकांच्या जनका ।।धृ।।
आरुष हे वाणी। गोड वरूनि घेतां कानीं ।।२।।
आवडीनें खेळे । तुका पुरवावे सोहाळे ।।३।।

८४९
दर्शनाची आस । आतां ना साहे उदास ।।१।।
जीव आला पायांपाशीं । येथें असें कलिवरेंसीं ।।धृ।।
कांहीं च नाठवे । ठायीं बैसलें नुठवे ।।२।।
जीव असतां पाहीं । तुका ठकावला ठायीं ।।३।।

८५०
भोगावरि आम्हीं घातला पाषाण । मरणा मरण आणियेलें ।।१।।
विश्व तूं व्यापक काय मी निराळा । काशासाठीं बळा येऊं आतां ।।धृ।।
काय सारूनियां काढावें बाहेरी । आणूनि भीतरी काय ठेवूं ।।२।।
केला तरी उरे वाद चि कोरडा । बळें घ्यावी पीडा स्वपनींची ।।३।।
आवघे चि वाण आले तुम्हां घरा । मजुरी मजुरा रोज कीर्दी ।।४।।
तुका म्हणे कांहीं नेणें लाभ हानी । असेल तो धनी राखो वाडा ।।५।।

८५१
कां हो एथें काळ आला आम्हां आड । तुम्हांपाशीं नाड करावया ।।१।।
कां हो विचाराचें पडिलें सांकडें । काय ऐसें कोडें उपजलें ।।धृ।।
कां हो उपजेना द्यावी ऐशी भेटी । काय द्वैत पोटीं धरिलें देवा ।।२।।
पाप फार किंवा जालासी दुर्बळ । मागिल तें बळ नाहीं आतां ।।३।।
काय जालें देणें निघालें दिवाळें । कीं बांधलासि बळें ॠणेंपायीं ।।४।।
तुका म्हणे कां रे ऐसी केली गोवी । तुझी माझी ठेवी निवडुनियां ।।५।।

८५२

काय देह घालूं करवती करमरी । टाकुं या भितरी अग्नीमाजी ।।१।।
काय सेवूं वन शीत उष्ण तान । साहों कीं मोहन धरुनी बैसों ।।धृ।।
काय लावूं अंगीं भस्म उधळण । हिंडूं देश कोण खुंट चारी ।।२।।
काय तजूं अन्न करूनि उपास । काय करूं नास जीवित्वाचा ।।३।।
तुका म्हणे काय करावा उपाव । ऐसा देईं भाव पांडुरंगा ।।४।।

८५३
दंभें कीर्ति पोट भरे मानी जन । स्वहित कारण नव्हे कांहीं ।।१।।
अंतरती तुझे पाय मज दुरी । धरितां हे थोरी जाणिवेची ।।धृ।।
पिंडाच्या पाळणें धांवती विकार । मज दावेदार मजमाजी ।।२।।
कैसा करूं घात आपुला आपण । धरूनि गुमान लोकलाज ।।३।।
तुका म्हणे मज दावी तो सोहोळा । देखें पाय डोळां तुझे देवा ।।४।।

८५४
धिग जिणें त्याचा स्वामी हीन वर । मरण तें बर भलें मग ।।१।।
ऐका जी देवा ऐसी आहे नीत । काय तें उचित सांभाळावें ।।धृ।।
देशोदेशीं धाक जयाच्या उत्तरें । तयाचें कुतरें परि भलें ।।२।।
तुका म्हणे हें कां सुचलें उत्तर । जाणोनि अंतर ओळखावें ।।३।।

८५५
आतां गाऊं तुज ओविया मंगळीं । करूं गदारोळी हरिकथा ।।१।।
होसि निवारिता आमुचें सकळ । भय तळमळ पापपुण्य ।।धृ।।
भोगिले ते भोग लावूं तुझे अंगीं । अलिप्त या जगीं होउनि राहों ।।२।।
तुका म्हणे आम्ही लाडिकीं लेंकरें । न राहों अंतरे पायांविण ।।३।।

८५६
सर्व सुखें आजी एथें चि वोळलीं । संतांचीं देखिलीं चरणांबुजें ।।१।।
सर्वकाळ होतों आठवीत मनीं । फिटली ते धणी येणें काळें ।।२।।
तुका म्हणे वाचा राहिली कुंटित । पुढें जालें चित्त समाधान ।।३।।

८५७
विठ्ठल सोयरा सज्जन सांगाती । विठ्ठल या चित्तीं बैसलासे ।।१।।
विठ्ठलें हें अंग व्यापिली ते काया । विठ्ठल हे छाया माझी मज ।।धृ।।

बैसला विठ्ठल जिव्हेचिया माथां । न वदे अन्यथा आन दुजें ।।२।।
सकळां इंद्रियां मन एक प्रधान । तें ही करी ध्यान विठोबाचें ।।३।।
तुका म्हणे या विठ्ठलासी आतां । नये विसंबतां माझें मज ।।४।।

८५८
होयें वारकरी । पांहे पांहे रे पंढरी ।।१।।
काय करावीं साधनें । फळ अवघें चि तेणें ।।धृ।।
अभिमान नुरे । कोड अवघें चि पुरे ।।२।।
तुका म्हणे डोळां । विठो बैसला सांवळा ।।३।।

८५९
पंढरीसी जाय । तो विसरे बापमाय ।।१।।
अवघा होय पांडुरंग । राहे धरूनियां अंग ।।धृ।।
न लगे धन मान । देहभावें उदासीन ।।२।।
तुका म्हणे मळ । नासी तात्काळ तें स्थळ ।।३।।

८६०
बळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग । नाहीं जाला त्याग अंतरींचा ।।१।।
ऐसें येतें नित्य माझ्या अनुभवा । मनासी हा ठावा समाचार ।।धृ।।
जागृतीचा नाहीं अनुभव स्वप्नीं । जातों विसरुनि सकळ हें ।।२।।
प्रपंचाबाहेरि नाहीं आलें चित्त । केले करी नित्य वेवसाय ।।३।।
तुका म्हणे मज भोरप्या चि परी । जालें सोंग वरी आंत तैसें ।।४।।

८६१
म्हणवितों दास ते नाहीं करणी । आंत वरी दोन्ही भिन्न भाव ।।१।।
गातों नाचतों तें दाखवितों जना । प्रेम नारायणा नाहीं अंगीं ।।धृ।।
पाविजे तें वर्म न कळे चि कांहीं । बुडालों या डोहीं दंभाचिया ।।२।।
भांडवल काळें हातोहातीं नेलें । माप या लागलें आयुष्यासी ।।३।।
तुका म्हणे वांयां गेलों ऐसा दिसें । होईल या हांसें लौकिकाचें ।।४।।

८६२
न कळतां काय करावा उपाय । जेणें राहे भाव तुझ्या पायीं ।।१।।
येऊनियां वास करिसी हृदयीं । ऐसें घडे कईं कासयानें ।।धृ।।

साच भावें तुझें चिंतन मानसीं । राहे हें करिसी कैं गा देवा ।।२।।
लटिकें हें माझें करूनियां दुरी । साच तूं अंतरीं येउनि राहें ।।३।।
तुका म्हणे मज राखावें पतिता ।आपुलिया सत्ता पांडुरंगा ।।४।।

८६३
चिंतिलें तें मनिंचें जाणें । पुरवी खुणे अंतरींचें ।।१।।
रात्री न कळे दिवस न कळे । अंगीं खेळे दैवत हें ।।धृ।।
नवसियाचे नव रस । भोगी त्यास भिन्न नाहीं ।।२।।
तुका म्हणे सम चि देणें । समचरण उभा असे ।।३।।

८६४
उधाराचा संदेह नाहीं । याचा कांहीं सेवकां ।।१।।
पांडुरंग अभिमानी । जीवदानी कोंवसा ।।धृ।।
बुडतां जळीं जळतां अंगीं । ते प्रसंगीं राखावें ।।२।।
तुका म्हणे आम्हांसाटीं । कृपा पोटीं वागवी ।।३।।

८६५
काय विरक्ति कळे आम्हां । जाणों एका नामा विठोबाच्या ।।१।।
नाचों सुखें वैष्णवमेळीं । टाळघोळीं आनंदें ।।धृ।।
शांति क्षमा दया मी काय जाणें । गोविंद कीर्तनेंवांचूनियां ।।२।।
कासया उदास असों देहावरी । अमृतसागरीं बुडोनियां ।।३।।
कासया एकांत सेवूं तया वना । आनंद तो जनामाजी असे ।।४।।
तुका म्हणे आम्हां ऐसा भरवसा । विठ्ठल सरसा चालतसे ।।५।।

८६६
जेथें वैष्णवांचा वास । धन्य भूमी पुण्य देश ।।१।।
दोष नाहीं ओखदासी । दूत सांगे यमापाशीं ।।धृ।।
गरुडटकयांच्या भारें । भूमि गर्जे जेजेकारें ।।२।।
सहज तयां जनां छंद । वाचे गोविंद गोविंद ।।३।।
तुळसीवनें रंगमाळा । अवघा वैकुंठसोहळा ।।४।।
तुका म्हणे भेणें । काळ नये तेणें राणें ।।५।।

८६७

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपण चि देव होय गुरू ।।१।।
पढियें देहभावें पुरवितो वासना । अतीं तें आपणापाशीं न्यावें ।।धृ।।
मागें पुढें उभा राहे सांभाळीत । आलिया आघात निवारावे ।।२।।
योगक्षेम जाणे जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ।।३।।
तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारूनी ।।४।।

८६८
सकळ धर्म मज विठोबाचें नाम । आणीक त्यां वर्म नेणें कांहीं ।।१।।
काय जाणों संतां निरविलें देवें । करिती या भावें कृपा मज ।।२।।
तुका म्हणे माझा कोण अधिकार । तो मज विचार कळों यावा ।।३।।

८६९
उदंड शाहाणे होत तर्कवंत । परि या नेणवे अंत विठोबाचा ।।१।।
उदंडा अक्षरां करोत भरोवरी । परि ते नेणवे थोरी विठोबाची ।।२।।
तुका म्हणे नाहीं भोळेपणाविण । जाणीव ते सिण रितें माप ।।३।।

८७०
आधारावांचुनी । काय सांगसी काहाणी ।।१।।
ठावा नाहीं पंढरीराव । तोंवरी अवघें चि वाव ।।धृ।।
मानिताहे कोण । तुझें कोरडें ब्रम्हज्ञान ।।२।।
तुका म्हणे ठेवा । जाणपण एक सवा ।।३।।

८७१
अनाथांची तुम्हां दया । पंढरीराया येतसे ।।१।।
ऐसी ऐकोनियां कीर्ति । बहु विश्रांति पावलों ।।धृ।।
अनाथांच्या धांवा घरा । नामें करा कुडावा ।।२।।
तुका म्हणे सवघड हित । ठेवूं चित्त पायांपें ।।३।।

८७२
येथें नाहीं उरों आले अवतार । येर ते पामर जीव किती ।।१।।
विषयांचे झणी व्हाल लोलिंगत । चेवलिया अंत न लगे मज ।।धृ।।
वाहोनियां भार कुंथसील ओंझे । नव्हे तें चि माझें थीता त्याग ।।२।।
तुका म्हणे कैसी नाहीं त्याची लाज । संतीं केशीराज साधियेला ।।३।।

८७३
हीं च त्यांचीं पंचभूतें । जीवन भातें प्रेमाचें ।।१।।
कळवळा धरिला संतीं । ते निगुती कैवाड ।।धृ।।
हा च काळ वर्तमान । साधन ही संपत्ती ।।२।।
तुका म्हणे दिवसरातीं । हें चि खाती अन्न ते ।।३।।

८७४
दीप न देखे अंधारा । आतां हें चि करा जतन ।।१।।
नारायण नारायण । गांठी धन बळकट ।।धृ।।
चिंतामणीपाशीं चिंता । तत्वता ही नयेल ।।२।।
तुका म्हणे उभयलोकीं । हे चि निकी सामोग्री ।।३।।

८७५
धन्य काळ संतभेटी । पायीं मिठी पडिली तो ।।१।।
संदेहाची सुटली गांठी । जालें पोटीं शीतळ ।।धृ।।
भवनदीचा जाला तारा । या उत्तरा प्रसादें ।।२।।
तुका म्हणे मंगळ आतां । कोण दाता याहूनि ।।३।।

८७६
दिनरजनीं हा चि धंदा । गोविंदाचे पवाडे ।।१।।
संकल्पिला देह देवा । सकळ हेवा तये ठायीं ।।धृ।।
नाहीं अवसान घडी । सकळ जोडी इंद्रियां ।।२।।
कीर्ति मुखें गर्जे तुका । करी लोकां सावध ।।३।।

८७७
खरें नानवट निक्षेपीचें जुनें । काढिलें ठेवणें समर्थाचें ।।१।।
मजुराच्या हातें मापाचा उकल । मी तों येथें फोल सत्ता त्याची ।।धृ।।
कुलाळाच्या हातें घटाच्या उत्पत्ति । पाठवी त्या जाती पाकस्थळा ।।२।।
तुका म्हणे जीवन तें नारायणीं । प्रभा जाते कीणाअ प्रकाशाची ।।३।।

८७८
गंगेचिया अंताविण काय चाड । आपुलें तें कोड तृषेपाशीं ।।१।।

विठ्ठल हे मूर्ति साजिरी सुंदर । घालीं निरंतर ह्रदयपुटीं ।।धृ।।
कारण तें असे नवनीतापाशीं । गबाळ तें सोसी इतर कोण ।।२।।
बाळाचे सोईतें घांस घाली माता । आटाहास चिंता नाहीं तया ।।३।।
गाऊं नाचों करूं आनंदसोहळा । भाव चि आगळा नाहीं हातां ।।४।।
तुका म्हणे अवघें जालें एकमय । परलोकींची काय चाड आतां ।।५।।

८७९
स्त्रीपुत्रादिकीं राहिला आदर । विषयीं पडिभर अतिशय ।।१।।
आतां हाता धांवा नारायणा । मज हे वासना अनावर ।।धृ।।
येउनियां आड ठाके लोकलाज । तें हें दिसे काज अंतरलें ।।२।।
तुका म्हणे आम्हां जेथें जेथें गोवा । तेथें तुम्हीं देवा सांभाळावें ।।३।।

८८०
पडिलों भोवणीं । होतों बहु चिंतवणी ।।१।।
होतों चुकलों मारग । लाहो केला लाग वेगें ।।धृ।।
इंद्रियांचे संदी । होतों सांपडलों बंदीं ।।२।।
तुका म्हणे बरें जालें । विठ्ठलसें वाचे आलें ।।३।।

८८१
बरें जालें आलीं ज्याचीं त्याच्या घरा । चुकला पाऱ्हेरा ओढाळांचा ।।१।।
बहु केलें दुखी त्यांचिया सांभाळें । आतां तोंड काळें तेणें लोभें ।।धृ।।
त्यांचिया अन्यायें भोगा माझें अंग । सकळ ही लाग द्यावा लागे ।।२।।
नाहीं कोठें स्थिर राहों दिलें क्षण । आजिवरी सिण पावलों तो ।।३।।
वेगळाल्या खोडी केली तडातडी। सांगावया घडी नाहीं सुख ।।४।।
निरवूनि तुका चालिला गोवारें । देवापाशीं भार सांडवूनि ।।५।।

८८२
न करावी आतां पोटासाटीं चिंता । आहे त्या संचिता माप लावूं ।।१।।
दृष्टि ते घालावी परमार्थाठायीं । क्षुल्लका उपायीं सिण जाला ।।धृ।।
येथें तंव नाहीं घेइजेसें सवें । कांहीं नये जीवें वेचों मिथ्या ।।२।।
खंडणें चि नव्हे उद्वेग वेरझारीं । बापुडे संसारीं सदा असों ।।३।।
शेवटा पाववी नावेचें बैसनें । भुजाबळें कोणें कष्टी व्हावें ।।४।।
तुका म्हणे आतां सकळांचें सार । करावा व्यापार तरी ऐसा ।।५।।

८८३

आमच्या हें आलें भागा । जीव्हार या जगाचें ।।१।।
धरूनियां ठेलों जीवें । बळकट भावें एकविध ।।धृ।।
आणूनियां केला रूपा । उभा सोपा जवळी ।।२।।
तुका म्हणे अंकित केला । खालीं आला वचनें ।।३।।

८८४

खरें भांडवल सांपडलें गांठी । जेणें नये तुटी उदमासी ।।१।।
संवगाचें केणें सांपडलें घरीं । भरूनि वैखरी सांटविलें ।।धृ।।
घेतां देतां लाभ होतसे सकळां । सदेवां दुर्बळा भाव तैसा ।।२।।
फडा आलिया तो न वजे निरासे । जरि कांहीं त्यास न कळतां ।।३।।
तुका म्हणे आतां जालीसे निश्चिंती । आणीक तें चित्तीं न धरूं दुजें ।।४।।

८८५

पदोपदीं दिलें अंग । जालें सांग कारण ।।१।।
रुधवूनि ठेलों ठाव । जगा वाव सकळ ।।धृ।।
पुढती चाली मनालाहो । वाढे देहो संतोष ।।२।।
। तुका म्हणे क्षरभागीं । जालों जगीं व्यापक ।।३।।

८८६

निवडुनि दिलें नवनीत । संचित ते भोगीत ।।१।।
आतां पुढें भावसार । जीवना थार पाहावया ।।धृ।।
पारखियाचे पडिलें हातीं । चांचपती आंधळीं ।।२।।
तुका म्हणे सेवन घडे । त्यासी जोडे लाभ हा ।।३।।

८८७

उचित न कळे इंद्रियाचे ओढी । मुखें बडबडी शिकलें तें ।।१।।
आपण जाऊन न्यावीं नरकास । बळें बेताळीस कुळें जग ।।धृ।।
अबोलणें बोले डोळे झांकुनियां । बडबडी वांयां दंभासाटीं ।।२।।
तुका म्हणे आम्ही तेथील पारखी । नाचे देखोवेखीं जाणों खरें ।।३।।

८८८

एक मन तुझ्या अवघ्या भांडवला । वांटितां तें तुला येई कैसें ।।१।।
म्हणउनि दृढ धरीं पांडुरंग । देहा लावीं संग प्रारब्धाचा ।।धृ।।
आणिका संकल्पा नको गोऊं मन । तरी च कारण साध्य होय ।।२।।
तुका म्हणे ऐसें जाणावें उचित । तरी सहज स्थित येईल कळों ।।३।।

८८९
गावे म्हणउनि गीत । धरुनि राहे तैसें चित्त ।।१।।
हें चि थोर अवघड आहे । अन्न देखोनि भूक राहे ।।धृ।।
ऐकावी म्हूण कथा । राहे तैसें धरुनि चित्ता ।।२।।
तुका म्हणे धणी । नव्हे जेविल्यावांचुनि ।।३।।

८९०
कळल हे खुण । तरि दावी नारायण ।।१।।
सत्य संतांपाशीं राहे । येरां भय आड आहे ।।धृ।।
अनुचिया ऐसें । असे भरलें प्रकाशें ।।२।।
इंद्रियांचें धनी । ते हे जाती समजूनि ।।३।।
तर्क कुतर्क वाटा । नागवण घटापटा ।।४।।
तुका म्हणे ल्यावें । डोळां अंजन बरवें ।।५।।

८९१
जातो न येतिया वाटा । काय निरवितो करंटा ।।१।।
कैसा जालासे बेश्रम । लाज नाहीं न म्हणे राम ।।धृ।।
पाहे वैरियाकडे। डोळे वासुनियां रडे ।।२।।
बांधुनियां यमा हातीं । दिला नाहीं त्याची खंती ।।३।।
नाहीं यांपें काम । ऐसें जाणे तो अधम ।।४।।
अझुन तरि मुका । कां रे जालासि म्हणे तुका ।।५।।

८९२
वांटा घेईं लवकरि । मागें अंतरसी दुरी । केली भरोवरी। सार नेती आणीक ।।१।।
ऐसीं भांमावलीं किती । काय जाणों नेणों किती । समय नेणती । माथां भार वाहोनि ।।धृ।।
नाहीं सारिलें तोंवरी । धांव घेईं वेग करीं । घेतलें पदरीं । फावलें तें

आपुलें ।।२।।
फट लंडी म्हणे तुका । एक न साहावे धका । तरि च या सुखा । मग कैसा पावसी ।।३।।

८९३
चालावा पंथ तो पाविजे त्या ठाया । ऐकिल्या वांयां वारता त्या ।।१।।
ऐका जी वोजे पडतसें पायां । भावाचि तें जायावाट नव्हे ।।धृ।।
व्याली कुमारीचा अनुभवें अनुभव । सांगतां तो भाव येत नाहीं ।।२।।
तुका म्हणे येथें पाहिजे आरालें । बिंबीं निवळलें तरि भासे ।।३।।

८९४
काय नाहीं लवत झाडें । विसरे वेडें देहभाव ।।१।।
जया न फळे उपदेश । धस ऐसा त्या नांवें ।।धृ।।
काय नाहीं असत जड । दगड तो अबोलणा ।।२।।
तुका म्हणे कुचर दाणा । तैसा म्हणा डेंग हा ।।३।।

८९५
देखीचा दिमाख शिकोनियां दावी । हिऱ्या ऐसी केवीं गारगोटी ।।१।।
मर्यादा ते जाण अरे अभागिया । देवाच्या ऐसिया सकळ मूर्ति ।।धृ।।
काय पडिलेंसी लटिक्याचे भरी । वोंवाळुनि थोरी परती सांडीं ।।२।।
तुका म्हणे पुढें दिसतसे घात । करितों फजित म्हणउनी ।।३।।

८९६
संसाराचा माथां भार । कांहीं पर न ठेवीं ।।१।।
भक्तीची ते जाती ऐसी । सर्वस्वासी मुकावें ।।धृ।।
भिक्षाणी वेवसाव। काला करितो गाढव ।।२।।
करुनि वस्ती बाजारीं । म्हणवी कासया निस्पृही ।।३।।
प्रसादा आडुनि कवी । केलें तुप पाणी तेवीं ।।४।।
तुका म्हणे होंई सुर । किंवा निसुर मजुर ।।५।।

८९७
तेज्या इशारती । तटा फोक वरी घेती ।।१।।
काय सांगावें त्याहूनी । ऐका रे धरा मनीं ।।धृ।।

नव्हे भांडखोर । ओढूनि धरूं पदर ।।२।।
तुका म्हणे तोंड । काळें करा खालीं मुंड ।।३।।

८९८
मागें संतीं होतें जें जें सांगितलें । तें येऊं लागलें अनुभवा ।।१।।
आचारभ्रष्ट होती लोक कळी । पुण्य क्षीण बळी जालें पाप ।।धृ।।
वर्णधर्म कोण न धरी विटाळ । घालिती गोंधळ एके ठायीं ।।२।।
वेदाचे पाठक सेवितील मद्य । न देखती भेद विषयीं भांड ।।३।।
तुका म्हणे किती करावे फजित । ते चि छंद नित्य बहु होती ।।४।।

८९९
अक्षरांचा श्रम केला । फळा आला तेणें तो ।।१।।
अवघियाचा तळ धरी । जीवा उरी नुरउनी ।।धृ।।
फळलें तें लवे भारें । पीक खरें आलें तईं ।।२।।
तुका म्हणे देवा । पुढें भाव सारावा ।।३।।

९००
उचित जाणावें मुख्य धर्म आधीं । चित्तशुद्ध बुद्धी ठायीं स्थिर ।।१।।
न घलावी धांव मनाचिये ओढी । वचन आवडी संताचिये ।।२।।
अंतरीं या राहे वचनाचा विश्वास । न उगे उपदेश तुका म्हणे ।।३।।

९०१
जीवन हे मुक्त नर जाले पावन । तजा हो दुर्जनसंगति ही ।।१।।
बहुत अन्न विष मोहरीच्या मानें । अवघें चि तेणें विष होय ।।२।।
तुका म्हणे जेणें आपलें स्वहित । तैसी करीं नीत विचारूनि ।।३।।

९०२
द्रव्याचा तो आम्ही धरितों विटाळ । तया पाठी काळ लाग करी ।।१।।
करोनियां हें चि राहिलों जीवन । एक नारायण नाम ऐसें ।।२।।
तुका म्हणे हें चि करुनि जतन । आलिया ही दान याचकासी ।।३।।

९०३
द्रव्याचिया मागें कळिकाळाचा लाग । म्हणोनियां संग खोटा त्याचा ।।१।।

निरयाचें मूळ घालुनिया मागें । मांडिली प्रसंगें कथा पुढें ।।धृ।।
आजिच्या प्रसंगें हा चि लाभ घ्यावा । पुढील भार देवावरी घाला ।।२।।
प्रालब्ध कांहीं न पालटे सोसें । तृष्णेचें हें पिसें वांयांविण ।।३।।
तुका म्हणे घेईं राहे ऐसें धन । सादर श्रवण करोनियां ।।४।।

९०४
रडे अळंकार दैन्याचिये कांती । उतमा विपत्तिसंग घडे ।।१।।
एकाविण एक अशोभ दातारा । कृपेच्या सागरा पांडुरंगा ।।धृ।।
रांधूं नेणे तया पुढील आइतें । केलें तें सोइतें वांयां जाय ।।२।।
तुका म्हणे चिंतामणि शेळी गळा । पावे अवकळा म्हणउनी ।।३।।

९०५
दुःखाचे डोंगर लागती सोसावे । ऐसें तंव ठावें सकळांसीं ।।१।।
कांहीं न करिती विचार हिताचा । न करिती वाचा नामघोष ।।धृ।।
भोग कळों येतो मागिल ते जन्म । उत्तम मध्यम कनिष्ठ ते ।।२।।
तुका म्हणे येथें झांकितील डोळे । भोग देतेवेळे येइल कळों ।।३।।

९०६
सदैव तुम्हां अवघें आहे । हातपाय चालाया ।।१।।
मुखीं वाणी कानीं कीर्ति । डोळे मूर्ती देखाया ।।धृ।।
अंध बहिर ठकलीं किती । मुकीं होती पांगुळें ।।२।।
घरास आगि लावुनि जागा। न पळे तो गा वांचे ना ।।३।।
तुका म्हणे जागा हिता । कांहीं आतां आपुल्या ।।४।।

९०७
ऐसे पुढती मिळतां आतां । नाहीं सत्ता स्वतंत्र ।।१।।
म्हणउनि फावलें तें घ्यावें । नाम गावें आवडी ।।धृ।।
संचित प्रारब्ध गाढें । धांवे पुढें क्रियमाण ।।२।।
तुका म्हणे घुबडा ऐसें । जन्म सरिसे शुकराचें ।।३।।

९०८
सर्वविशीं माझा त्रासलासे जीव । आतां कोण भाव निवडे एक ।।१।।
संसाराची मज न साहे चि वार्ता । आणीक म्हणतां माझें कोणी ।।धृ।।

देहसुख कांहीं बोलिले उपचार । विष तें आदर बंद वाटे ।।२।।
उपाधि दाटणी प्रतिष्ठा गौरव । होय माझा जीव कासावीस ।।३।।
तुका म्हणे कांहीं आणीक न साहे । आवडती पाय वैष्णवांचे ।।२।।

९०९
आणीक कांहीं या उत्तराचें काज । नाहीं आतां मज बोलावया ।।१।।
भिन्न भेद हे भावनास्वभाव । नव्हे कांहीं देव एकविध ।।धृ।।
गुण दोष कोणें निवडावे धर्म । कोण जाणे कर्म अकर्म तें ।।२।।
तरि च भलें आतां न करावा संग । दुःखाचा प्रसंग तोडावया ।।३।।
तुका म्हणे गुण गाईं या देवाचे । घेईं माझे वाचे हे चि धणी ।।४।।

९१०
आपुल्या विचार करीन जीवाशीं । काय या जनाशीं चाड मज ।।१।।
आपुलें स्वहित जाणती सकळ । निरोधितां बळें दुःख वाटे ।।धृ।।
आइको नाइको कथा कोणी तरी । जाऊनियां घरीं निजो सुखें ।।२।।
माझी कोण वोज जाला हा शेवट । देखोनियां वाट आणिकां लावूं ।।३।।
तुका म्हणे भाकुं आपुली करुणा । जयाची वासना तथा फळे ।।४।।

९११
धाईं अंतरिंच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें ।।१।।
विधिनिषेध उर फोडी । जंव नाहीं अनुभवगोडी ।।धृ।।
वाढे तळमळ उभयता । नाहीं देखिलें अनुभवितां ।।२।।
अपुल्या मतें पिसें । परि तें आहे जैसेंतैसें ।।३।।
साधनाची सिद्धि । मोन करा स्थिर बुद्धि ।।४।।
तुका म्हणे वादें । वांयां गेलीं ब्रम्हवृंदें ।।५।।

९१२
कुशळ गुंतले निषेधा । वादी प्रवर्तले वादा ।।१।।
कैसी ठकलीं बापुडीं । दंभविषयांचे सांकडीं ।।धृ।।
भुस उपणुनि केलें काय । हारपले दोन्ही ठाय ।।२।।
तुका म्हणे लागे हातां । काय मथिलें घुसळितां ।।३।।

९१३

संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें । काय म्यां गव्हारें जाणावें हें ।।१।।
विठ्ठलाचें नाम घेतां नये शुद्ध । तेथें मज बोध काय कळे ।।धृ।।
करितों कवतुक बोबडा उत्तरीं । झणी मजवरि कोप धरा ।।२।।
काय माझी याति नेणां हा विचार । काय मी तें फार बोलों नेणें ।।३।।
तुका म्हणे मज बोलवितो देव । अर्थ गुह्य भाव तो चि जाणे ।।४।।

९१४
चंदनाच्या वासें धरितील नाक । नावडे कनक न घडे हें ।।१।।
साकरेसी गोडी सारिखी सकळां । थोरां मोट्यां बाळां धाकुटियां ।।२।।
तुका म्हणे माझें चित्त शुद्ध होतें । तरि का निंदितें जन मज ।।३।।

९१५
तुज ऐसा कोण उदाराची रासी । आपुलें चि देसी पद दासा ।।१।।
शुद्ध हीन कांहीं न पाहासी कुळ । करिसी निर्मळ वास देहीं ।।२।।
भावें हें कदान्न खासी त्याचे घरीं । अभक्तांची परी नावडेती ।।३।।
न वजासी जेथें दुरी दवडितां । न येसी जो चित्ता योगियांच्या ।।४।।
तुका म्हणे ऐसीं ब्रीदें तुझीं खरीं । बोलतील चारी वेद मुखें ।।५।।

९१६
तरि कां नेणते होते मागें ॠषी । तींहीं या जनासी दुराविलें ।।१।।
वोळगती जया अष्टमासिद्धि । ते या जनबुद्धी नातळती ।।२।।
कंदमूळें पाला धातूच्या पोषणा । खातील वास राणां तरी केला ।।३।।
लावुनियां नेत्र उगे चि बैसले । न बोलत ठेले मौन्यमुद्रे ।।४।।
तुका म्हणे ऐसें करीं माझ्या चित्ता । दुरावीं अनंता जन दुरी ।।५।।

९१७
कोणाच्या आधारें करूं मी विचार । कोण देइल धीर माझ्या जीवा ।।१।।
शास्त्रज्ञ पंडित नव्हें मी वाचक । यातिशुद्ध एक ठाव नाहीं ।।२।।
कलियुगीं बहु कुशळ हे जन । छळितील गुण तुझे गातां ।।३।।
मज हा संदेह झाला दोहीं सवा । भजन करूं देवा किंवा नको ।।४।।
तुका म्हणे आतां दुरावितां जन । किंवा हें मरण भलें दोन्ही ।।५।।

९१८

काय उणें जालें तुज समर्थासी । ऐसा मजपाशीं कोण दोष ।।१।।
जो तूं माझा न करिसी अंगीकार । सांगेन वेव्हार संतांमधीं ।।२।।
तुजविण रत आणिकांचे ठायीं । ऐसें कोण ग्वाही दावीं मज ।।३।।
तुका म्हणे काय धरूनी गुमान । सांग उगवून पांडुरंगा ।।४।।

९१९
काय करूं आन दैवतें । एका विण पंढरीनाथें ।।१।।
सरिता मिळाली सागरीं । आणिकां नांवां कैची उरी ।।धृ।।
अनेक दीपीचा प्रकाश । सूर्य उगवतां नाश ।।२।।
तुका म्हणे नेणें दुजें । एका विण पंढरीराजें ।।३।।

९२०
काय करूं कर्माकर्म । बरें सांपडलें वर्म ।।१।।
होसी नामा च सारिका । समजाविली नाहीं लेखा ।।धृ।।
नाहीं वेचावेच जाला । उरला आहेसी संचला ।।२।।
तुका म्हणे माझें । काय होईल तुम्हां ओझें ।।३।।

९२१
एकाएकीं हातोफळी । ठाया बळी पावले ते ।।१।।
आम्ही देवा शक्तिहीनें । भाकुं तेणें करुणा ।।धृ।।
पावटणी केला काळ । जया बळ होतें तें ।।२।।
तुका म्हणे वीर्यावीर । संतधीर समुद्र ।।३।।

९२२
पुढिलाचें इच्छी फळ । नाहीं बळ तें अंगीं ।।१।।
संत गेले तया ठाया । देवराया पाववीं ।।धृ।।
ज्येष्ठांचीं कां आम्हां जोडी। परवडी न लभों ।।२।।
तुका म्हणे करीं कोड । पुरवीं लाड आमुचा ।।३।।

९२३
कैवल्याच्या तुम्हां घरीं । रासी हरी उदंड ।।१।।
मजसाठीं कां जी वाणी । नव्हे धणी विभागा ।।धृ।।
सर्वा गुणीं सपुरता । ऐसा पिता असोनी ।।२।।

तुका म्हणे पांडुरंगा । जालों सांगा सन्मुख ।।३।।

९२४
आपलाल्या तुम्ही रूपासी समजा । कासया वरजा आरसिया ।।१।।
हें तों नव्हे देहबुद्धीचें कारण । होइल नारायणें दान केलें ।।धृ।।
बब्रूचिया बाणें वर्मासि स्पर्शावें । हें तों नाहीं ठावें मोकलित्या ।।२।।
तुका म्हणे बहु मुखें या वचना । सत्याविण जाणा चाल नाहीं ।।३।।

९२५
न मनावी चिंता तुम्हीं संतजनीं । हिरा स्पटिकमणी केंवि होय ।।१।।
पडिला प्रसंग स्तळा त्या सारिखा । देखिला पारिखा भाव कांहीं ।।धृ।।
बहुतांसी भय एकाचिया दंडें । बहुत या तोंडें वचनासी ।।२।।
तुका म्हणे नाहीं वैखरी बा सर । करायाचे चार वेडे वेडे ।।३।।

९२६
यथाविधि पूजा करी । सामोग्री तोंवरि हे नाहीं ।।१।।
आतां माझा सर्व भार । तूं दातार चालविसी ।।धृ।।
मंगळ तें तुम्ही जाणां । नारायणा काय तें ।।२।।
तुका म्हणे समर्पिला । तुज विठ्ठला देहभाव ।।३।।

९२७
भवसिंधूचें हें तारूं । मज विचारूं पाहातां ।।१।।
चित्तीं तुझे धरिन पाय । सुख काय तें तेथें ।।धृ।।
माझ्या खुणा मनापाशीं। तें या रसीं बुडालें ।।२।।
तुका म्हणे वर्म आलें । हातां भलें हें माझ्या ।।३।।

९२८
पाहातां श्रीमुख सुखावलें सुख । डोळियांची भूक न वजे माझी ।।१।।
जिव्हे गोडी तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिकें पुढें ।।धृ।।
श्रवणीची वाट चोखाळली शुद्ध । गेले भेदाभेद वारोनियां ।।२।।
महामळें मन होतें जें गांदलें । शुद्ध चोखाळलें स्पटिक जैसें ।।३।।
तुका म्हणे माझ्या जीवाचें जीवन । विठ्ठल निधान सांपडलें ।।४।।

९२९
 हा चि परमानंद आळंगीन बाहीं । क्षेम देतां ठायीं द्वैत तुटे ।।१।।
बोलायासि मात मन निवे हरषें चित्त । दुणी वाढे प्रीत प्रेमसुख ।।धृ।।
जनांत भूषण वैकुंठीं सरता । फावलें स्वहिता सर्वभावें ।।२।।
तुटला वेव्हार माया लोकाचार । समूळ संसार पारुषला ।।३।।
तुका म्हणे हा विठ्ठल चि व्हावा । आणिकी या जीवा चाड नाहीं ।।४।।

९३०
 आमुची कृपाळू तूं होसी माउली । विठ्ठले साउली शरणागता ।।१।।
प्रेमपान्हा स्तनीं सदा सर्वकाळ । दृष्टि हे निर्मळ अमृताची ।।धृ।।
भूक तान दुःख वाटों नेदीं सीण । अंतरींचा गुण जाणोनियां ।।२।।
आशा तृष्णा माया चिंता दवडीं दुरी । ठाव आम्हां करीं खेळावया ।।३।।
तुका म्हणे लावीं संताचा सांगात । जेथें न पवे हात कळिकाळाचा ।।४।।

९३१
 जेथें जावें तेथें कपाळ सरिसें । लाभ तो विशेषें संतसंगें ।।१।।
पूर्व पुण्यें जरि होतीं सानुकूळ । अंतरायमूळ नुपजे तेथें ।।धृ।।
भाग्य तरी नव्हे धन पुत्र दारा । निकट वास बरा संतांपायीं ।।२।।
तुका म्हणे हे चि करावी मिरासी । बळी संतांपाशीं द्यावा जीव ।।३।।

९३२
 आतां कांहीं सोस न करीं आणीक । धरीन तें एक हें चि दृढ ।।१।।
जेणें भवसिंधु उतरिजे पार । तुटे हा दुस्तर गर्भवास ।।धृ।।
जोडीन ते आतां देवाचे चरण । अविनाश धन परमार्थ ।।२।।
तुका म्हणे बरा जोडला हा देह । मनुष्यपणें इहलोका आलों ।।३।।

९३३
 जतन करीन जीवें । शुद्धभावें करूनी ।।१।।
विठ्ठल विठ्ठल हें धन । जीवन अंतकाळींचें ।।ध्रु.।।
वर्दळ हें संचित सारूं । बरवा करूं उदिम हा ।।२।।
तुका म्हणे हृदयपेटी । ये संपुटीं सांटवूं ।।३।।
९३४
 एवढा प्रभु भावें । तेणें संपुष्टी राहावें ।।१।।

होय भक्तीं केला तैसा । पुरवी धरावी ते इच्छा ।।धृ।।
एवढा जगदानी। मागे तुळसीदळ पाणी ।।२।।
आला नांवा रूपा । तुका म्हणे जाला सोपा ।।३।।

९३५
भाग्यें ऐसी जाली जोडी । आतां घडी विसंभेना ।।१।।
विटेवरी समचरण । संतीं खुण सांगितली ।।धृ।।
अवघें आतां काम सारूं । हा चि करूं कैवाड ।।२।।
तुका म्हणे खंडूं खेपा । पुढें पापापुण्याच्या ।।३।।

९३६
पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हां नारायण तैशापरी ।।१।।
सर्वभावें लोभ्या आवडे हें धन । आम्हां नारायण तैशापरी ।।२।।
तुका म्हणे एकविध जालें मन । विठ्ठला वांचून नेणे दुजें ।।३।।

९३७
विठ्ठल गीतीं गावा विठ्ठल चित्तीं ध्यावा । विठ्ठल उभा पाहावा विटेवरी ।।१।।
अनाथाचा बंधु विठ्ठल कृपासिंधु । तोडी भवबंधु यमपाश ।।धृ।।
तो चि शरणागतां हा विठ्ठल मुक्तिदाता । विठ्ठल या संतांसमागमें ।।२।।
विठ्ठल गुणनिधि विठ्ठल सर्व सिद्धि। लागली समाधि विठ्ठलनामें ।।३।।
विठ्ठलाचें नाम घेतां जालें सुख। गोडावलें मुख तुका म्हणे ।।४।।

९३८
विठो सांपडावया हातीं । ठावी जाली एक गती । न धरीं भय चित्तीं । बळ किती तयाचें ।।१।।
लागे आपण चि हातीं । किंव भाकावी काकुलती । करी मग चित्तीं । असेल तें तयाचें ।।धृ।।
एकलिया भावबळें । कैं सांपडे तो काळें । वैष्णवांच्या मेळें। उभा ठाके हाकेसी ।।२।।
बांधा माझिया जीवासी । तुका म्हणे प्रेमपाशीं । न सोडीं तयासी । सर्वस्वासी उदार ।।३।।

९३९

वाट वैकुंठीं पाहाती । भक्त कैं पां येथें येती । तयां जन्ममरणखंती । नाहीं चित्तीं परलोक ।।१।।
धन्यधन्य हरिचे दास। तयां सुलभ गर्भवास । ब्रम्हादिक करिती आस । तीर्थावास भेटीची ।।धृ।।
कथाश्रवण व्हावयास । यमधर्मा थोर आस । पाहे रात्रदिवस। वाट कर जोडोनियां ।।२।।
रिद्धिसिद्धी न पाचारितां । त्या धुंडिती हरिभक्तां । मोक्ष सायोज्यता । वाट पाहे भक्तांची ।।३।।
असती जेथें उभे ठेले । सदा प्रेमसुखें धाले । आणीक ही उद्धरिले । महादोषी चांडाळ ।।४।।
सकळ करिती त्यांची आस । सर्वभावें ते उदास । धन्यभाग्य त्यांस । तुका म्हणे दरुषणें ।।५।।

९४०
सोनें दावी वरी तांबें तयापोटीं । खरियाचे साटीं विकुं पाहे ।।१।।
पारखी तो जाणे तयाचे जीवींचें । निवडी दोहींचें वेगळालें ।।धृ।।
क्षीरा नीरा कैसें होय एकपण । स्वादीं तो चि भिन्न भिन्न काढी ।।२।।
तुका म्हणे थीता नागवला चि खोटा । अपमान मोटा पावईल ।।३।।

९४१
फोडुनि सांगडी बांधली माजासी । पैल थडी कैसी पावे सहजीं ।।१।।
आपला घात आपण चि करी । आणिकां सांगतां नाइके तरी ।।धृ।।
भुकेभेणें विष देऊ पाहे आतां । आपल्या चि घाता करूं पाहे ।।२।।
तुका म्हणे एक चालतील पुढें । तयांसी वांकडें जातां ठके ।।३।।

९४२
उपकारासाटीं बोलों हे उपाय । येणेंविण काय आम्हां चाड ।।१।।
बुडतां हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा म्हणउनि ।।२।।
तुका म्हणे माझे देखतिल डोळे । भोग देते वेळे येईल कळों ।।३।।

९४३
आठवे देव तो करावा उपाव । येर तजीं वाव खटपटा ।।१।।
होईं बा जागा होईं वा जागा । वाउगा कां गा सिणसील ।।धृ।।

जाणिवेच्या भारें भवाचिये डोहीं । बुडसी तों कांहीं निघेसि ना ।।२।।
तुका म्हणे देवा पावसील भावें । जाणतां तें ठावें कांहीं नव्हे ।।३।।

९४४
माझ्या मुखावाटा नयो हें वचन । व्हावें संतान द्रव्य कोणां ।।१।।
फुकाचा विभाग पतनदुःखासी । दोहींमुळें त्यासी तें चि साधे ।।धृ।।
नाइकावी निंदा स्तुति माझ्या कानें । सादर या मनें होऊनियां ।।२।।
तुका म्हणे देव असाध्य यामुळें । आशामोहजाळें गुंतलिया ।।३।।

९४५
चित्त ग्वाही तेथें लौकिकाचें काई । स्वहित तें ठायीं आपणापें ।।१।।
मनासी विचार तो चि साच भाव । व्यापक हा देव अंतर्बाहीं ।।धृ।।
शुद्ध भावा न लगे सुचावा परिहार । उमटे साचार आणिके ठायीं ।।२।।
भोगित्यासी काज अंतरीचें गोड । बाहिरल्या चाड नाहीं रंगें ।।३।।
तुका म्हणे भाव शुद्ध हें कारण । भाट नारायण होईल त्यांचा ।।४।।

९४६
नव्हती माझे बोल । अवघें करितो विठ्ठल ।।१।।
कांहीं न धरावी खंती । हित होइल धरा चित्तीं ।।धृ।।
खोटी ते अहंता । वाट टाकिली सांगतां ।।२।।
ज्याचें तो चि जाणें । मी मापाडें तुका म्हणे ।।३।।

९४७
वासनेच्या मुखीं अदळूनि भीतें । निर्वाहापुरतें कारण तें ।।१।।
या नांवें अंतरा आला नारायण । चित्तसमाधान खुण त्याची ।।धृ।।
सर्वकाळ हा चि करणें विचार । विवेकीं सादर आत्मत्वाचे ।।२।।
तुका म्हणे जों जों भजनासी वळे । अंग तों तों कळे सन्निधता ।।३।।

९४८
चिंतनें अचिंत राहिलों निश्चळ । तें चि किती काळ वाढवावें ।।१।।
अबोल्याचा काळ आतां ऐशावरी । वचनाची उरी उरली नाहीं ।।धृ।।
करूं आला तों तों केला लवलाहो । उरों च संदेहे दिला नाहीं ।।२।।
तुका म्हणे मोह परते चि ना मागें । म्हणउनि त्यागें त्याग जाला ।।३।।

९४९
 निर्गुणाचे घ्यावें गुणासी दर्शन । एकाएकीं भिन्न भेद घडे ।।१।।
तुम्हां आम्हां आतां न पडे यावरी । आहों तें चि बरी जेथें तेथें ।।धृ।।
आपणापासुनी नसावें अंतर । वेचिलें उत्तर म्हणउनि ।।२।।
तुका म्हणे अंगा आली कठिन्यता । आमच्या अनंता तुम्हां ऐसी ।।३।।

९५०
 तुज च पासाव जालोंसों निर्माण । असावें तें भिन्न कासयानें ।।१।।
पाहावा जी ठायीं करूनि विचार । नुन्य कोठें फार असे चि ना ।।धृ।।
ठेविलिये ठायीं आज्ञेचें पाळण । करूनि जतन राहिलोंसें ।।२।।
तुका म्हणें आतां बोलतसें स्पष्ट । जालों क्रियानष्ट तुम्हाऐसा ।।३।।

९५१
 प्रीतिभंग माझा केला पांडुरंगा । भक्तिरस सांगा कां जी तुम्हीं ।।१।।
म्हणऊनि कांहीं न ठेवीं चि उरी । आलों वर्मावरी एकाएकीं ।।धृ।।
न देखों चि कांहीं परती माघारी । उरली ते उरी नाहीं मुळीं ।।२।।
तुका म्हणे आला अंतरासी खंड । तरि माझें तोंड खवळिलें ।।३।।

९५२
 लटिका ऐसा म्हणतां देव । संदेहसा वाटतसे ।।१।।
ऐसें आलें अनुभवा । मज ही सेवा करिता ।।धृ।।
शून्याकारी बहु मोळा । भेंडोळा हे पवाडे ।।२।।
तुका म्हणे ताळी नाहीं । एके ठायीं चपळत्वें ।।३।।

९५३
 जैशासाठीं तैसें हावें । हें बरवें कळलेंसे ।।१।।
उदास तूं नारायणा । मी ही म्हणा तुम्ही च ।।धृ।।
ठका महाठक जोडा । जो धडफुडा लागासी ।।२।।
एकांगी च भांडे तुका । नाहीं धोका जीवित्वें ।।३।।

९५४
 बहुतां रीती काकुलती । आलों चित्तीं न धरा च ।।१।।

आतां काशासाटीं देवा । मिथ्या हेवा वाढवूं ।।धृ।।
तुम्हां आम्हां जाली तुटी । आतां भेटी चिंतनें ।।२।।
तुका म्हणे लाजिरवाणें । आधर जिणें इच्छेचें ।।३।।

९५५
आश्चर्य तें एक जालें । मना आलें माझिया ।।१।।
मढ्यापाशीं करुणा केली । तैसी गेली वृथा हे ।।धृ।।
न यावा तो कैसा राग । खोटें मग देखोनि ।।२।।
तुका म्हणे कैंचा बोला । शोध विठ्ठला माझिया ।।३।।

९५६
मागायाची नाहीं इच्छा । जो मी ऐसा संकोचों ।।१।।
लटिकियाची न करूं स्तुति । इच्छा चित्तीं धरूनि ।।धृ।।
हिशोबें तें आलें घ्यावें । हें तों ठावें सकळांसी ।।२।।
तुका म्हणे स्वामिसेवा । येथें देवा काशाची ।।३।।

९५७
पाठवणें पडणें पायां । उद्धार वांयां काशाचा ।।१।।
घडलें तें भेटीसवें । दिसेल बरवें सकळां ।।धृ।।
न घडतां दृष्टादृष्टी। काय गोष्टी कोरड्या ।।२।।
अबोल्यानें असे तुका । अंतर ऐका साक्षीतें ।।३।।

९५८
अभयाचें स्थळ । तें हें एक अचळ ।।१।।
तरि धरिला विश्वास । ठेलों होउनियां दास ।।धृ।।
पुरली आवडी । पायीं लागलीसे गोडी ।।२।।
तुका म्हणे कंठीं नाम । अंगीं भरलें सप्रेम ।।३।।

९५९
संदेह निरसे तरि रुचिकर । फिक्यासी आदर चवी नाहीं ।।१।।
आतां नको मज खोट्यानें फटवूं । कोठें येऊं जाऊं वेळोवेळां ।।धृ।।
गेला तरि काय जीवाचें सांकडें । वांचउनि पुढें काय काज ।।२।।
तुका म्हणे कसीं निवडा जी बरें । केलीं तैसीं पोरें आळीपायीं ।।३।।

९६०
 वदे वाणी परि दुर्लभ अनुभव । चालीचा चि वाहो बहुतेक ।।१।।
आम्ही ऐसें कैसें राहावें निश्चळ । पाठिलाग काळ जिंतितसे ।।धृ।।
वाढवितां पोट दंभाचे पसारे । येतील माघारे मुदला तोटे ।।२।।
तुका म्हणे बरें जागवितां मना । तुमच्या नारायणा अभयें करें ।।३।।

९६१
 उगें चि हें मन राहातें निश्चळ । तरि कां तळमळ साट होती ।।१।।
काय तुमचीं नेणों कवतुक विंदानें । सर्वोत्तमपणें खेळतसां ।।धृ।।
नानाछंदें आम्हां नाचवावें जीवां । वाढवाव्या हांवा भलत्यापुढें ।।२।।
तुका म्हणे तुम्ही आपुली प्रतिष्ठा । वाढवावया चेष्टा करीतसां ।।३।।

९६२
 आम्ही बळकट जालों फिराउनी । तुमच्या वचनीं तुम्हां गोऊं ।।१।।
जालें तेव्हां जालें मागील तें मागें । आतां वर्मलागें ठावीं जालीं ।।धृ।।
तोडावया अवघ्या चेष्टांचा संबंध । शुद्धापाशीं शुद्ध बुद्ध व्हावें ।।२।।
तुका म्हणे आम्हां आत्मत्वाची सोय । आपण चि होय तैसा चि तूं ।।३।।

९६३
 तुम्ही साच नुपेक्षाल हा भरवसा । मज जाणतसां अधीरसें ।।१।।
कासया घातला लांबणी उद्धार । ठेवा करकर वारूनियां ।।धृ।।
सुटों नये ऐसें कळले निरुतें । कां घ्यावें मागुतें आळवुनि ।।२।।
तुका म्हणे तुम्ही सभाग्य जी देवा । माझा तुम्हां केवा काय आला ।।३।।

९६४
 तुम्हां होईल देवा पडिला विसर । आम्हीं तें उत्तर यत्न केलें ।।१।।
पतितपावन ब्रीदें मिरविसी । याचा काय देसी झाडा सांग ।।धृ।।
आहाच मी नव्हें अर्थाचें भुकेलें । भलत्या एका बोलें वारेन त्या ।।२।।
तुका म्हणे देह देईन सांडणें । सहित अभिमानें ओवाळूनि ।।३।।

९६५
 जडलों अंगाअंगीं । मग ठेवीं प्रसंगीं । कांहीं उरीजोगी। लोकीं आहे पुरती

।।१।।
ठेवीं निवारुनि आधीं । अवकाश तो चि बुद्धी । सांपडली संधी । मग बळ कोणासी ।।धृ।।
गळा बांधेन पायीं । हालों नेदीं ठायिचा ठायीं । निवाड तो तईं । अवकळा केलिया ।।२।।
तुका म्हणे ठावे । तुम्ही असा जी बरवे । बोभाटाची सवे । मुळींहुनी विठोबा ।।३।।

९६६
आम्ही शक्तिहीनें । कैसें कराल तें नेणें । लिगाडाच्या गुणें । खोळंबला राहिलों ।।१।।
माझें मज देईं देवा । असे ठेविला तो ठेवा । नाहीं करीत हेवा । कांहीं अधीक आगळा ।।धृ।।
नाहीं गळां पडलों झोंड । तुमचें तें चि माझें तोंड । चौघां चार खंड । लांबणी हे अनुचित ।।२।।
नाहीं येत बळा । आतां तुम्हासी ञ्चगोपाळा । तुका म्हणे गळा । उगवा पायां लागतों ।।३।।

९६७
काय कृपेविण घालावें सांकडें । निश्चिती निवाडें कोण्या एका ।।१।।
आहों तैसीं पुढें असों दीनपणें । वेचूनि वचनें करुणेचीं ।।धृ।।
धरूं भय आतां काय वाहों चिंता । काय करूं आतां आप्तपण ।।२।।
तुका म्हणे आम्ही भावहीन जीव । म्हणउनी देव दुरे दुरी ।।३।।

९६८
नाहीं उल्लंघिले कोणाचे वचन । मज कां नारायण दुरी जाला ।।१।।
अशंकितें मनें करीं आळवण । नाहीं समाधान निश्चितीचें ।।धृ।।
दासांचा विसर हें तों अनुचित । असे सर्व नीत पायांपाशीं ।।२।।
तुका म्हणे तुम्हां लाज येत नाहीं । आम्हां चिंताडोहीं बुडवितां ।।३।।

९६९
जीव जायवरी सांडी करी माता । हे तों आश्चर्यता बाळकाची ।।१।।
दुर्बळ कीं नाहीं आइकत कानीं । काय नारायणीं न्यून जालें ।।धृ।।

क्षणक्षणा माझा ने घावा सांभाळ । अभाग्याचा काळ ऐसा आला ।।२।।
तुका म्हणे नाहीं वचनासी रुचि । फल कटवें चि तें तें होय ।।३।।

९७०
म्हणउनी दास नव्हे ऐसा जालों । अनुभवें बोलों स्वामीपुढें ।।१।।
कां नाहीं वचन प्रतिउत्तराचें । मी च माझ्या वेचें अट्टाहासें ।।धृ।।
कासयाने गोडी उपजावा विश्वास । प्रीती कांहीं रस वाचुनियां ।।२।।
तुका म्हणे अगा चतुरा शिरोमणी । विचारावें मनीं केशीराजा ।।३।।

९७१
काय आतां आम्हीं पोट चि भरावें । जग चाळवावें भक्त म्हूण ।।१।।
ऐसा तरि एक सांगा जी विचार । बहु होतों फार कासावीस ।।धृ।।
काय कवित्वाची घालूनियां रूढी । करूं जोडाजोडी अक्षरांची ।।२।।
तुका म्हणे काय गुंपोनि दुकाना । राहों नारायणा करुनी घात ।।३।।

९७२
वर्म तरि आम्हां दावा । काय देवा जाणें मी ।।१।।
बहुतां रंगीं हीन जालों । तरि आलों शरण ।।धृ।।
द्याल जरि तुम्ही धीर । होईल स्थिर मन ठायीं ।।२।।
तुका म्हणे सत्ताबळें । लडिवाळें राखावीं ।।३।।

९७३
सांगों काय नेणा देवा । बोलाची त्या आवडी ।।१।।
वांयां मज चुकुर करा । विश्वंभरा विनोदें ।।धृ।।
आवडीच्या करा ऐसें। अंतर्वासें जाणतसां ।।२।।
तुका म्हणे समाधानें । होइन मनें मोकळा ।।३।।

९७४
निर्धाराचें अवघें गोड । वाटे कोड कौतुक ।।१।।
बैसलिया भाव पांयीं । बरा तईं नाचेन ।।धृ।।
स्वामी कळे सावधान। तरि मन उल्हासे ।।२।।
तुका म्हणे आश्वासावें । प्रेम द्यावें विठ्ठले ।।३।।

९७५
 जाली तडातोडी । अवघीं पडिलों उघडीं ।।१।।
नव्हों कोणांची च कांहीं । तुझे भरलिया वाहीं ।।धृ।।
पारुशला संवसार। मोडली बैसण्याची थार ।।२।।
आतां म्हणे तुका । देवा अंतरें राखों नका ।।३।।

९७६
 आधार तो व्हावा । ऐसी आस करीं देवा ।।१।।
तुम्हांपाशीं काय उणें । काय वेचे समाधानें ।।धृ।।
सेवेच्या अभिळासें। मन बहु जालें पिसें ।।२।।
अरे भक्तापराधीना । तुका म्हणे नारायणा ।।३।।

९७७
 तुमचा तुम्हीं केला गोवा । आतां चुकवितां देवा ।।१।।
कैसें सरे चाळवणें । केलें काशाला शाहाणें ।।धृ।।
कासया रूपा । नांवा आलेति गा बापा ।।२।।
तुका म्हणे आतां । न सरे हवाले घालितां ।।३।।

९७८
 माझी भक्ती भोळी । एकविध भावबळी ।।१।।
मी कां पडेन निराळा । ऐसा सांडूनि सोहळा ।।धृ।।
आतां अनारिसा । येथं न व्हावें सहसा ।।२।।
तुका म्हणे जोडुनि पाय । पुढें उगा उभा राहें ।।३।।

९७९
 आहे तरिं सत्ता । ऐशा करितों वारता ।।१।।
अंगसंगाचीं उत्तरें । सलगीसेवेनें लेंकरें ।।धृ।।
तरी निकटवासें । असों अशंकेच्या नासें ।।२।।
तुका म्हणे रुची । येथें भिन्नता कैची ।।३।।

९८०
 काळ सारावा चिंतनें । एकांतवासीं गंगास्नानें । देवाचें पूजन । प्रदक्षणा तुळसीच्या ।।१।।

युक्त आहार वेहार । नेम इंद्रियांचा सार । नसावी वासर । निद्रा बहु भाषण ।।धृ।।
परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण । व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ।।२।।
देह समर्पिजे देवा । भार कांहीं च न घ्यावा । होईल आघवा। तुका म्हणे आनंद ।।३।।

९८१
मऊ मेनाहूनि आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ।।१।।
मेले जित असों निजोनियां जागे । जो जो जो जें मागे तें तें देऊं ।।धृ।।
भले तरि देऊं गांडीची लंगोटी । नाठ्याळा चि गांठीं देऊं माथां ।।२।।
मायबापाहूनि बहू मायावंत । करूं घातपात शत्रूहूनि ।।३।।
अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ।।४।।
तुका म्हणे आम्ही अवघे चि गोड । ज्याचें पुरे कोड त्याचेपरि ।।५।।

९८२
गाढवाचें तानें । पालटलें क्षणक्षणें ।।१।।
तैसे अधमाचे गुण । एकविध नाहीं मन ।।धृ।।
उपजतां बरें दिसे । रूप वाढतां तें नासे ।।२।।
तुका म्हणे भुंकते वेळे । वेळ अवेळ न कळे ।।३।।

९८३
विटाळ तो परद्रव्य परनारी । येथुनि जो दुरी तो सोंवळा ।।१।।
गद्यें पद्यें कांहीं न धरावी उपाधी । स्वाधीन चि बुद्धि करुनी ठेवा ।।धृ।।
विचाराचें कांहीं करावें स्वहित । पापपुण्यांचीत भांडवल ।।२।।
तुका म्हणे न लगे जावें वनांतरा । विश्व विश्वंभरा सारिखें चि ।।३।।

९८४
कल्पतरु रुया नव्हती बाभुळा । पुरविती फळा इच्छितिया ।।१।।
उदंड त्या गाई म्हैसी आणि शेळ्या । परि त्या निराळ्या कामधेनु ।।२।।
तुका म्हणे देव दाखवील दृष्टी । तया सवें भेटी थोर पुण्य ।।३।।

९८५

जळो प्रेमा तैसा रंग । जाय भुलोनि पतंग ।।१।।
सासूसाटीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ।।धृ।।
मैंद मुखींचा कोंवळा। भाव अंतरीं निराळा ।।२।।
जैसी वृंदावनकांती । उत्तम धरूं ये हातीं ।।३।।
बक ध्यान धरी । सोंग करूनि मासे मारी ।।४।।
तुका म्हणे सर्प डोले । तैसा कथेमाजी खुले ।।५।।

९८६
वेशा नाहीं बोल अवगुण दूषीले । ऐशा बोला भले झणें क्षोभा ।।१।।
कोण नेणे अन्न जीवाचें जीवन । विषमेळवण विष होय ।।धृ।।
सोनें शुद्ध नेणे कोण हा विचार । डांकें हीनवर केलें त्यासी ।।२।।
याती शुद्ध परि अधम लक्षण । वांयां गेलें तेणें सोंगें ही तें ।।३।।
तुका म्हणे शूर तो चि पावे मान । आणीक मंडण भार वाही ।।४।।

९८७
अणुरणीयां थोकडा । तुका आकाशाएवढा ।।१।।
गिळुनि सांडिलें कळिवर । भव भ्रमाचा आकार ।।धृ।।
सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ।।२।।
तुका म्हणे आतां । उरलों उपकारापुरता ।।३।।

९८८
धन्य आजि दिन । जालें संताचें दर्शन ।।१।।
जाली पापातापा तुटी । दैन्य गेलें उठाउठीं ।।धृ।।
जालें समाधान । पायीं विसांवले मन ।।२।।
तुका म्हणे आले घरा । तो चि दिवाळीदसरा ।।३।।

९८९
हें चि माझे धन । तुमचे वंदावे चरण ।।१।।
येणें भाग्यें असों जीत । एवढें समर्पूनी चित्त ।।धृ।।
सांभाळिलें देवा । मज अनाथा जी जीवा ।।२।।
जोडूनियां कर । तुका विनवितो किंकर ।।३।।

९९०

फजितखोरा मना किती तुज सांगों । नको कोणा लागों मागें मागें ।।१।।
स्नेहवादें दुःख जडलेंसे अंगीं । निष्ठुर हें जगीं प्रेमसुख ।।धृ।।
निंदास्तुती कोणी करो दयामया । न धरीं चाड या सुखदुःखें ।।२।।
योगिराज कां रे न राहाती बैसोनी । एकिये आसनीं या चि गुणें ।।३।।
तुका म्हणे मना पाहें विचारून । होईं रे कठिण वज्राऐसें ।।४।।

९९१
जळो माझी ऐसी बुद्धी । मज घाली तुजमधीं । आवडे हे विधि । निषेधीं चि चांगली ।।१।।
तूं स्वामी मी सेवक । उंच पद निंच एक । ऐसें करावें कौतुक । नको करूं खंडणा ।।धृ।।
जळ न खाती जळा । वृक्ष आपुलिया फळा । भोक्ता निराळा । तेणें गोडी निवडिली ।।२।।
हिरा शोभला कोंदणें । अळंकारीं मिरवे सोनें । एक असतां तेणें । काय दुजें जाणावें ।।३।।
उष्णें छाये सुख वाटे। बाळें माते पान्हा फुटे । एका एक भेटे । कोण सुख ते काळीं ।।४।।
तुका म्हणे हित । हें चि मानी माझें चित्त । नव्हे आतां मुक्त । ऐसा जाला भरवसा ।।५।।

९९२
मनीं वसे त्याचें आवडे उत्तर । वाटे समाचार घ्यावा ऐसें ।।१।।
जातीचें तें झुरे येर येरासाटीं । वियोगें ही तुटी नेघे कधीं ।।धृ।।
भेटीची अपेक्षा वरता आदर । पुसे नव्हे धीर मागुतालें ।।२।।
तुका म्हणे माझ्या जीवाचें जीवन । सोइरे हरिजन प्राणसखे ।।३।।

९९३
नव्हे आराणूक परि मनीं वाहे । होईल त्या साहे पांडुरंग ।।१।।
पंढरीसि जावें उदेग मानसीं । धरिल्या पावसी संदेह नाहीं ।।धृ।।
नसो बळ देह असो पराधीन । परि हें चिंतन टाकों नको ।।२।।
तुका म्हणे देह पडो या चिंतनें । पुढें लागे येणें याजसाटीं ।।३।।

९९४

कोठें देवा आलें अंगा थोरपण । बरें होतें दीन होतों तरीं ।।१।।
साधन ते सेवा संतांची उत्तम । आवडीनें नाम गाईन तें ।।धृ।।
न पुसतें कोणी कोठें ही असतां । समाधान चित्ताचिया सुखें ।।२।।
तुका म्हणे जन अव्हेरितें मज । तरी केशीराज सांभाळिता ।।३।।

९९५
चतुर मी जालों आपुल्या भोंवता । भावेंविण रिता कांुफ्ज अंगीं ।।१।।
आतां पुढें वांयां जावें हें तें काई । कामक्रोधें ठायीं वास केला ।।धृ।।
गुणदोष आले जगाचे अंतरा । भूताच्या मत्सरावरी बुद्धि ।।२।।
तुका हमणे करूं उपदेश लोकां । नाहीं जालों एका परता दोषा ।।३।।

९९६
धन्य ते संसारीं । दयावंत जे अंतरीं ।।१।।
येथें उपकारासाठीं । आले घर ज्यां वैकुंठीं ।।धृ।।
लटिकें वचन । नाहीं देहीं उदासीन ।।२।।
मधुरा वाणी ओटीं । तुका म्हणे वाव पोटीं ।।३।।

९९७
कुटल्याविण नव्हे मांडा । अळसें धोंडा पडतसे ।।१।।
राग नको धरूं मनीं । गांडमणी सांगतों ।।धृ।।
तरटापुढें बरें नाचे। सुतकाचें मुसळ ।।२।।
तुका म्हणे काठी सार । करी फार शाहाणें ।।३।।

९९८
कळों येतें तरि कां नव्हे । पडती गोवें भ्रमाचे ।।१।।
जाणतां चि होतो घात । परिसा मत देवा हें ।।धृ।।
आंविसासाटीं फासा मान । पाडी धनइच्छा ते ।।२।।
तुका म्हणे होणार खोटें । कर्म मोटें बळिवंत ।।३।।

९९९
मोकळें मन रसाळ वाणी । या चि गुणीं संपन्न ।।१।।
लक्ष्मी ते ऐशा नावें । भाग्यें ज्यावें तरि त्यांनीं ।।धृ।।
नमन नम्रता अंगीं । नेघे रंगीं पालट ।।२।।

तुका म्हणे त्याच्या नांवें । घेतां व्हावें संतोषी ।।३।।

१०००
शेवटची विनवणी । संतजनीं परिसावी ।।१।।
विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हांसी ।।धृ।।
पुढें फार बोलों काई । अवघें पायीं विदित ।।२।।
तुका म्हणे पडिलों पायां । करा छाया कृपेची ।।३।।

१००१
करितों कवित्व म्हणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ।।१।।
माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ।।धृ।।
काय मी पामर जाणे अर्थभेद । वदवी गोविंद तें चि वदें ।।२।।
निमित्त मापासी बैसविलों आहें । मी तों कांहीं नव्हे स्वामिसत्ता ।।३।।
तुका म्हणे आहें पाईक चि खरा । वागवितों मुद्रा नामाची हे ।।४।।

१००२
आम्हीं गावें तुम्हीं कोणीं कांहीं न म्हणावें । ऐसें तंव आम्हां सांगितलें नाहीं देवें ।।१।।
म्हणा रामराम टाळी वाजवा हातें। नाचा डोला प्रेमें आपुलिया स्वहितें ।।धृ।।
सहज घडे तया आळस करणें तें काई । अग्नीचें भातुकें हात पाळितां कां पायीं ।।२।।
येथें नाहीं लाज भक्तिभाव लौकिक । हांसे तया घडे ब्रम्हहत्यापातक ।।३।।
जया जैसा भाव निरोपण करावा । येथें नाहीं चाड ताळविताळ या देवा ।।४।।
सदैव ज्यां कथा काळ घडे श्रवण । तुका म्हणे येर जन्मा आले पाषाण ।।५।।

१००३
देव घ्या कोणी देव घ्या कोणी । आइता आला घर पुसोनी ।।१।।
देव न लगे देव न लगे । सांटवणेचे रुधले जागे ।।धृ।।
देव मंदला देव मंदला । भाव बुडाला काय करूं ।।२।।
देव घ्या फुका देव घ्या फुका । न लगे रुका मोल कांहीं ।।३।।
दुबळा तुका भावेंविणें । उधारा देव घेतला रुणें ।।४।।

१००४
विष्णुमय सर्व वैष्णवांसी ठावें । येरांनीं वाहावे भार माथां ।।१।।
साधनें संकटें सर्वांलागीं सीण । व्हावा लागे क्षीण अहंमान ।।धृ।।
भाव हा कठीण वज्र हें भेदवे । परि न छेदवे मायाजाळ ।।२।।
तुका म्हणे वर्म भजनें चि सांपडे । येरांसी तों पडे ओस दिशा ।।३।।

१००५
कीर्तनाची गोडी । देव निवडी आपण ।।१।।
कोणी व्हा रे अधिकारी । त्यासी हरि देईल ।।धृ।।
वैराग्याचे बळें । साही खळ जिणावे ।।२।।
उरेल ना उरी । तुका करी बोभाट ।।३।।

१००६
कायावाचामन ठेविलें गाहाण । घेतलें तुझें रिण जोडीलागीं ।।१।।
अवघें आलें आंत पोटा पडिलें थीतें । सारूनि निश्चिंत जालों देवा ।।धृ।।
द्यावयासी आतां नाहीं तोळा मासा । आधील मवेशा तुज ठावी ।।२।।
तुझ्या रिणें गेले बहुत बांधोन । जाले मजहून थोरथोर ।।३।।
तुका म्हणे तुझे खतीं जें गुंतलें । करूनि आपुलें घेईं देवा ।।४।।

१००७
करिसी कीं न करिसी माझा अंगीकार । हा मज विचार पडिला देवा ।।१।।
देसी कीं न देसी पायांचें दर्शन । म्हणऊनि मन स्थिर नाहीं ।।धृ।।
बोलसी कीं न बोलसी मजसवें देवा । म्हणोनियां जीवा भय वाटे ।।२।।
होईल कीं न होय तुज माझा आठव। पडिला संदेह हा चि मज ।।३।।
तुका म्हणे मी कमाईचे हीण। म्हणऊनि सीण करीं देवा ।।४।।

१००८
ऐसा माझा आहे भीडभार । नांवाचा मी फार वांयां गेलों ।।१।।
काय सेवा रुजु आहे सत्ताबळ । तें मज राउळ कृपा करी ।।धृ।।
काय याती शुद्ध आहे कुळ कर्म । तेणें पडे वर्म तुझे ठायीं ।।२।।
कोण तपोनिध दानधर्मसीळ । अंगीं एक बळ आहे सत्ता ।।३।।
तुका म्हणे वांयां जालों भूमी भार । होईल विचार काय नेणों ।।४।।

१००९
साच मज काय कळों नये देवा । काय तुझी सेवा काहे नव्हे ।।१।।
करावें तें बरें जेणें समाधान । सेवावें हें वन न बोलावें ।।धृ।।
शुद्ध माझा भाव होइल तुझे पायीं । तरि च हें देईं निवडूनि ।।२।।
उचित अनुचित कळों आली गोष्टी । तुझे कृपादृष्टी पांडुरंगा ।।३।।
तुका म्हणे मज पायांसवे चाड । सांगसी तें गोड आहे मज ।।४।।

१०१०
नाहीं कंटाळलों परि वाटे भय । करावें तें काय न कळतां ।।१।।
जन वन आम्हां समान चि जालें । कामक्रोध गेले पावटणी ।।धृ।।
षडऊर्मी शत्रु जिंतिले अनंता । नामाचिया सत्ताबळें तुझ्या ।।२।।
म्हणऊनिं मुख्य धर्म आम्हां सेवकांचा ऐसा । स्वामी करी शिरसा पाळावें तें ।।३।।
म्हणऊनिं तुका अवलोकुनी पाय । वचनाची पाहे वास एका ।।४।।

१०११
वांयांविण वाढविला हा लौकिक । आणिला लटिक वाद दोघां ।।१।।
नाहीं ऐसा जाला देव माझ्या मतें । भुकेलें जेवितें काय जाणे ।।धृ।।
शब्दज्ञानें गौरविली हे वैखरी । साच तें अंतरीं बिंबे चि ना ।।२।।
जालों परदेशी गेले दोन्ही ठाय । संसार ना पाय तुझे देवा ।।३।।
तुका म्हणे मागें कळों येतें ऐसें । न घेतों हें पिसें लावूनियां ।।४।।

१०१२
न कळे तत्त्वज्ञान मूढ माझी मती । परि ध्यातों चित्तीं चरणकमळ ।।१।।
आगमाचे भेद मी काय जाणें । काळ तो चिंतनें सारीतसें ।।धृ।।
कांहीं नेणें परि म्हणवितों दास । होइल त्याचा त्यास अभिमान ।।२।।
संसाराची सोय सांडिला मारग । दुराविलें जग एका घायें ।।३।।
मागिल्या लागाचें केलेंसे खंडण । एकाएकीं मन राखियेलें ।।४।।
तुका म्हणे अगा रखुमादेवीवरा । भक्तकरुणाकरा सांभाळावें ।।५।।

१०१३
इतुलें करीं देवा ऐकें हें वचन । समूळ अभिमान जाळीं माझा ।।१।।

इतुलें करीं देवा ऐकें हे गोष्टी । सर्व समदृष्टी तुज देखें ।।धृ।।
इतुलें करीं देवा विनवितों तुज । संतांचे चरणरज वंदीं माथां ।।२।।
इतुलें करीं देवा ऐकें हे मात । हृदयीं पंढरीनाथ दिवसरात्रीं ।।३।।
भलतिया भावें तारीं पंढरीनाथा । तुका म्हणे आतां शरण आलों ।।४।।

१०१४
तुझा दास ऐसा म्हणती लोकपाळ । म्हणऊनि सांभाळ करीं माझा ।।१।।
अनाथाचा नाथ पतितपावन । हें आतां जतन करीं नाम ।।धृ।।
माझें गुण दोष पाहातां न लगे अंत । ऐसें माझें चित्त मज ग्वाही ।।२।।
नेणें तुझी कैसी करावी हे सेवा । जाणसी तूं देवा अंतरींचें ।।३।।
तुका म्हणे तूं या कृपेचा सिंधु । तोडीं भवबंधु माझा देवा ।।४।।

१०१५
जाणावें ते काय नेणावें ते काय । ध्यावे तुझे पाय हें चि सार ।।१।।
करावें तें काय न करावें तें काय । ध्यावें तुझे पाय हें चि सार ।।धृ।।
बोलावें तें काय न बोलावें तें काय । ध्यावे तुझे पाय हें चि सार ।।२।।
जावें तें कोठें न वजावे आतां । बरवें आठवितां नाम तुझें ।।३।।
तुका म्हणे तूं करिसी तें सोपे । पुण्यें होती पापें आमुच्या मतें ।।४।।

१०१६
नको ब्रम्हज्ञान आत्मस्थितिभाव । मी भक्त तूं देव ऐसें करीं ।।१।।
दावीं रूप मज गोपिकारमणा । ठेवीन चरणांवरी माथा ।।धृ।।
पाहोनि श्रीमुख देइन आलिंगन । जीवें निंबलोण उतरीन ।।२।।
पुसतां सांगेन हितगुज मात । बैसोनि एकांत सुखगोष्टी ।।३।।
तुका म्हणे यासी न लावीं उशीर । माझें अभ्यंतर जाणोनियां ।।४।।

१०१७
मागें शरणागत तारिले बहुत । म्हणती दीनानाथ तुज देवा ।।१।।
पाहिले अपराध नाहीं याती कुळ । तारिला अजामेळ गणिका भिल्ली ।।धृ।।
अढळपदीं बाळ बैसविला धुरु । क्षीराचा सागरु उपमन्ये ।।२।।
गजेंद्रपशु नाडियें जळचरें । भवसिंधुपार उतरिला ।।३।।
प्रल्हाद अग्नींत राखिला जळांत । विषाचें अमृत तुझ्या नामें ।।४।।
पांडवां संकट पडतां जडभारी । त्यांचा तू कैवारी नारायणा ।।५।।

तुका म्हणे तूं या अनाथाचा नाथ । ऐकोनियां मात शरण आलों ।।६।।

१०१८
तुझा शरणागत जालों मी अंकित । करीं माझें हित पांडुरंगा ।।१।।
पतितपावन तुझी ब्रीदावळी । ते आतां सांभाळीं मायबापा ।।धृ।।
अनाथाचा नाथ बोलतील संत ऐकोनियां मात विश्वासलों ।।२।।
न करावी निरास न धरावें उदास । देईं याचकास कृपादान ।।३।।
तुका म्हणे मी तों पातकांची रासी । देईं पायापासीं ठाव देवा ।।४।।

१०१९
सर्वस्वाचा त्याग तो सदा सोंवळा । न लिंपे विटाळा अग्नि जैसा ।।१।।
सत्यवादी करी संसार सकळ । अलिप्त कमळ जळीं जैसें ।।धृ।।
घडे ज्या उपकार भूतांची दया । आत्मस्थिति तया अंगीं वसे ।।२।।
नो बोले गुणदोष नाइके जो कानीं । वर्तोनि तो जनीं जनार्दन ।।३।।
तुका म्हणे वर्म जाणितल्याविण । पावे करितां सीण सांडीमांडी ।।४।।

१०२०
कुळधर्म ज्ञान कुळधर्म साधन । कुळधर्मे निधान हातीं चढे ।।१।।
कुळधर्म भक्ति कुळधर्म गति । कुळधर्म विश्रांति पाववील ।।धृ।।
कुळधर्म दया कुळधर्म उपकार । कुळधर्म सार साधनाचें ।।२।।
कुळधर्म महत्त्व कुळधर्म मान । कुळधर्म पावन परलोकींचें ।।३।।
तुका म्हणे कुळधर्म दावी देवीं देव । यथाविध भाव जरीं होय ।।४।।

१०२१
पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणीक नाहीं जोडा दुजा यासी ।।१।।
सत्य तो चि धर्म असत्य तें कर्म । आणीक हे वर्म नाहीं दुजें ।।धृ।।
गति ते चि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखते ।।२।।
संतांचा संग तो चि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळा ।।३।।
तुका म्हणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ।।४।।

१०२२
न वजे वांयां कांहीं ऐकतां हरिकथा । आपण करितां वांयां न वजे ।।१।।
न वजे वांयां कांहीं देवळासी जातां । देवासी पूजितां वांयां न वजे ।।धृ।।

न वजे वांयां कांहीं केलिया तीर्थ । अथवा कां व्रत वांयां न वजे ।।२।।
न वजे वांयां जालें संतांचें दर्शन । शुद्ध आचरण वांयां न वजे ।।३।।
तुका म्हणे भाव असतां नसतां । सायास करितां वांयां न वजे ।।४।।

१०२३
चित्तीं धरीन मी पाउलें सकुमारें । सकळ बिढार संपत्तीचें ।।१।।
कंठीं धरिन मी नाम अमृताची वल्ली । होईल राहिली शीतळ तनु ।।धृ।।
पाहेन श्रीमुख साजिरें सुंदर । सकळां अगर लावण्यांचें ।।२।।
करिन अंगसंग बाळकाचे परी । बैसेन तों वरी नुतरीं कडिये ।।३।।
तुका म्हणे हा केला तैसा होय । धरिली मनें सोय विठोबाची ।।४।।

१०२४
बाळ मातेपाशीं सांगे तानभूक । उपायाचें दुःख काय जाणे ।।१।।
तयापरी करीं पाळण हें माझें । घेउनियां ओझें सकळ भार ।।धृ।।
कासया गुणदोष आणिसील मना । सर्व नारायणा अपराधी ।।२।।
सेवाहीन दीन पातकांची रासी । आतां विचारिसी काय ऐसें ।।३।।
जेणें काळें पायीं अनुसरलें चित्त । निर्धार हें हित जालें ऐसें ।।४।।
तुका म्हणे तुम्ही तारिलें बहुतां । माझी कांहीं चिंता असों दे वो ।।५।।

१०२५
जीवनावांचूनि तळमळी मासा । प्रकार हा तैसा होतो जीवा ।।१।।
न संपडे जालें भूमिगत धन । चरफडी मन तयापरी ।।धृ।।
मातेचा वियोग जालियां हो बाळा । तो कळवळा जाणा देवा ।।२।।
सांगावे ते किती तुम्हांसी प्रकार । सकळांचें सार पाय दावीं ।।३।।
ये चि चिंते माझा करपला भीतर । कां नेणों विसर पडिला माझा ।।४।।
तुका म्हणे तूं हें जाणसी सकळ । यावरि कृपाळ होईं देवा ।।५।।

१०२६
शरण आलें त्यासी न दावीं हे पाठी । ऐका जगजेठी विज्ञापना ।।१।।
अळविती तयांसी उत्तर झडकरी । द्यावें परिसा हरी विज्ञापना ।।धृ।।
गांजिलियाचें करावें धांवणें । विनंती नारायणें परिसावी हे ।।२।।
भागलियाचा होईं रे विसांवा । परिसावी केशवा विज्ञापना ।।३।।
अंकिताचा भार वागवावा माथां । परिसावी अनंता विज्ञापना ।।४।।

तुका म्हणे आम्हां विसरावें ना देवा । परिसावी हे देवा विज्ञापना ।।५।।

१०२७
कोण आम्हां पुसे सिणलें भागलें । तुजविण उगलें पांडुरंगा ।।१।।
कोणापाशीं आम्हीं सांगावें सुखदुःख । कोण तानभूक निवारील ।।धृ।।
कोण या तापाचा करील परिहार । उतरील पार कोण दुजा ।।२।।
कोणापें इच्छेचें मागावें भातुकें । कोण कवतुकें बुझावील ।।३।।
कोणावरी आम्हीं करावी हे सत्ता । होइल साहाता कोण दुजा ।।४।।
तुका म्हणे अगा स्वामी सर्व जाणां । दंडवत चरणां तुमच्या देवा ।।५।।

१०२८
तेव्हां धालें पोट बैसलों पंगती । आतां आम्हां मुक्तिपांग काई ।।१।।
धांवा केला आतां होईल धांवणे । तया कायी करणें लागे सध्या ।।धृ।।
गायनाचा आतां कोठें उरला काळ। आनंदें सकळ भरी आलें ।।२।।
देवाच्या सख्यत्वें विषमासी ठाव । मध्यें कोठें वाव राहों सके ।।३।।
तेव्हां जाली अवघी बाधा वाताहात। प्रेम हृदयांत प्रवेशलें ।।४।।
तुका म्हणे आम्हीं जिंतिलें भरवसा । देव कोठें दासा मोकलितो ।।५।।

१०२९
तरि कां पवाडे गर्जती पुराणें । असता नारायण शक्तिहीन ।।१।।
कीर्तीविण नाहीं नामाचा डांगोरा । येर कां इतरां वाणीत ना ।।धृ।।
तरि च म्हणा तो आहे चिरंजीव । केलियाचा जीव सुखीं गुण ।।२।।
चांगलेपण हें निरुपायता अंगीं । बाणलें श्रीरंगा म्हणऊनि ।।३।।
तरि च हा थोर सांगितलें करी । अभिमान हरीपाशीं नाहीं ।।४।।
तुका म्हणे तरि करिती याची सेवा । देवापाशीं हेवा नाहीं कुडें ।।५।।

१०३०
अविट हें क्षीर हरिकथा माउली । सेविती सेविली वैष्णवजनीं ।।१।।
अमृत राहिलें लाजोनि माघारें । येणें रसें थोरें ब्रम्हानंदे ।।धृ।।
पतित पातकी पावनपंगती । चतुर्भुज होती देवाऐसे ।।२।।
सर्व सुखें तया मोहोरती ठाया । जेथें दाटणी या वैष्णवांची ।।३।।
निर्गुण हें सोंग धरिलें गुणवंत । धरूनियां प्रीत गाये नाचे ।।४।।
तुका म्हणे केलीं साधनें गाळणी । सुलभ कीर्तनीं होऊनी ठेला ।।५।।

१०३१
 संसारसोहळे भोगितां सकळ । भक्तां त्याचें बळ विटोबाचें ।।१।।
भय चिंता धाक न मनिती मनीं । भक्तां चक्रपाणि सांभाळीत ।।धृ।।
पापपुण्य त्यांचें धरूं न शके अंग । भक्तांसी श्रीरंग सर्वभावे ।।२।।
नव्हती ते मुक्त आवडे संसार । देव भक्तां भार सर्व वाहे ।।३।।
तुका म्हणे देव भक्तां वेळाईत । भक्त ते निश्चित त्याचियानें ।।४।।

१०३२
 देवासी अवतार भक्तांसी संसार । दोहींचा विचार एकपणें ।।१।।
भक्तांसी सोहळे देवाचिया अंगें । देव त्यांच्या संगें सुख भोगी ।।धृ।।
देवें भक्तां रूप दिलासे आकार । भक्तीं त्याचा पार वाखाणिला ।।२।।
एका अंगीं दोन्ही जालीं हीं निर्माण । देवभक्तपण स्वामिसेवा ।।३।।
तुका म्हणे येथें नाहीं भिन्नभाव । भक्त तो चि देव देव भक्त ।।४।।

१०३३
 हुंबरती गाये तयांकडे कान । कैवल्यनिधान देउनि ठाके ।।१।।
गोपाळांची पूजा उच्छिष्ट कवळी । तेणें वनमाळी सुखावला ।।धृ।।
चोरोनियां खाये दुध दहीं लोणी । भावें चक्रपाणि गोविला तो ।।२।।
निष्काम तो जाला कामासी लंपट । गोपिकांची वाट पाहात बैसे ।।३।।
जगदानी इच्छी तुळसीएकदळ । भावाचा सकळ विकिला तो ।।४।।
तुका म्हणे हें चि चैतन्यें सावळें । व्यापुनि निराळें राहिलेंसे ।।५।।

१०३४
 समर्थासी नाहीं वर्णावर्णभेद । सामग्री ते सर्व सिद्ध घरीं ।।१।।
आदराचे ठायीं बहु च आदर । मागितलें फार तेथें वाढी ।।धृ।।
न म्हणे सोइरा सुहुर्द आवश्यक । राजा आणि रंक सारिखा चि ।।३।।
भाव देखे तेथें करी लडबड । जडा राखे जड निराळें चि ।।३।।
कोणी न विसंभे याचकाचा ठाव । विनवुनी देव शंका फेडी ।।४।।
तुका म्हणे पोट भरुनी उरवी । धालें ऐसें दावी अनुभवें ।।५।।

१०३५
 आले भरा केणें । येरझार चुके जेणें ।।१।।

उभें केलें विटेवरी । पेंठ इनाम पंढरी ।।धृ।।
वाहाती मारग । अवघें मोहोरलें जग ।।२।।
तुका म्हणे माप । खरें आणा माझे बाप ।।३।।

१०३६
लक्ष्मीवल्लभा । दिनानाथा पद्मनाभा ।।१।।
सुख वसे तुझे पायीं । मज ठेवीं ते चि ठायीं ।।धृ।।
माझी अल्प हे वासना। तूं तो उदाराचा राणा ।।२।।
तुका म्हणे भोगें । पीडा केली धांव वेगें ।।३।।

१०३७
करीं ऐसें जागें । वेळोवेळां पायां लागें ।।१।।
प्रेम झोंबो कंठीं । देह धरणिये लोटीं ।।धृ।।
राहे लोकाचार पडे अवघा विसर ।।२।।
तुका म्हणे ध्यावें । तुज विभीचारभावें ।।३।।

१०३८
टाळ दिंडी हातीं । वैकुंठींचे सांगाती ।।१।।
जाल तरी कोणा जा गा । करा सिदोरी ते वेगा ।।धृ।।
जाती सादावीत । तेथें असों द्यावें चित्त ।।२।।
तुका म्हणे बोल । जाती बोलत विठ्ठल ।।३।।

१०३९
वांयां जातों देवा । नेणें भक्ती करूं सेवा ।।१।।
आतां जोडोनियां हात । उभा राहिलों निवांत ।।धृ।।
करावें तें काय। न कळें अवलोकितों पाय ।।२।।
तुका म्हणे दान । दिलें पदरीं घेईन ।।३।।

१०४०
जीव खादला देवत । माझा येणें महाभूतें । झोंबलें निरुतें । कांहीं करितां न सुटे ।।१।।
आतां करूं काय । न चले करितां उपाय । तुम्हां आम्हां सय । विघडाविघड केली ।।धृ।।

बोलतां दुश्चिती । मी वो पडियेलें भ्रांती । आठव हा चित्तीं । न ये म्हणतां मी माझें ।।२।।
भलतें चि चावळे । जना अवघिया वेगळे । नाठवती बाळें । आपपर सारिखें ।।३।।
नका बोलों सये । मज वचन न साहे। बैसाल त्या राहें । उग्या वाचा खुंटोनी ।।४।।
तुम्हां आम्हां भेटी । नाहीं जाली जीवेंसाटीं । तुका म्हणे दृष्टी । पाहा जवळी आहे तों ।।५।।

१०४१
जीवीचा जिव्हाळा । पाहों आपुलिया डोळां ।।१।।
आम्हां विठ्ठल एक देव । येर अवघे चि वाव ।।धृ।।
पुंडलिकाचे पाठीं। उभा हात ठेवुनि कटी ।।२।।
तुका म्हणे चित्तीं । वाहूं रखुमाईचा पती ।।३।।

१०४२
माझें आराधन । पंढरपुरींचें निधान ।।१।।
तया एकाविण दुजें । कांहीं नेणें पंढरीराजें ।।धृ।।
दास विठ्ठलाचा । अंकित अंकिला ठायींचा ।।२।।
तुका म्हणे आतां । नव्हे पालट सर्वथा ।।३।।

१०४३
आतां आम्हां हें चि काम । न विसंभावें तुझें नाम । वाहुनियां टाळी । प्रेमसुखें नाचावें ।।१।।
अवघी जाली आराणूक । मागें पुढें सकळिक । त्रिपुटीचें दुःख । प्रारब्ध सारिलें ।।धृ।।
गोदातटें निर्मळें । देव देवांचीं देवळें । संत महंत मेळें । दिवस जाय सुखाचा ।।२।।
तुका म्हणे पंढरीनाथा । आणिक नाहीं मज चिंता । योगक्षेम माथां । भार तुझ्या घातला ।।३।।

१०४४
चोरटें सुनें मारिलें टाळे । केंउं करी परि न संडी चाळे ।।१।।

ऐसें एक दुराचारी गा देवा । आपुलिया जीवा घात करी ।।धृ।।
नाक गेलें तरि लाज ना विचार । हिंडे फजितखोर दारोदारीं ।।२।।
तुका म्हणे कर्म बळिवंत गाढें । नेदी तया पुढेंमागें सरों ।।३।।

१०४५
मुनि मुक्त जाले भेणें गर्भवासा । आम्हां विष्णुदासां सुलभ तो ।।१।।
अवघा चि संसार केला ब्रम्हरूप । विठ्ठलस्वरूप म्हणोनियां ।।धृ।।
पुराणीं उपदेश साधन उद्‌भट । आम्हां सोपी वाट वैकुंठींची ।।२।।
तुका म्हणे जनां सकळांसहित । घेऊं अखंडित प्रेमसुख ।।२।।

१०४६
न करावी स्तुति माझी संतजनीं । होईल या वचनीं अभिमान ।।१।।
भारें भवनदी नुतरवे पार । दुरावती दूर तुमचे पाय ।।२।।
तुका म्हणे गर्व पुरवील पाठी । होईल माझ्या तुटी विठोबाची ।।३।।

१०४७
तुमचिये दासींचा दास करूनि ठेवा । आशीर्वाद द्यावा हा चि मज ।।१।।
नवविधा काय बोलिली जे भक्ती । घ्यावी माझ्या हातीं संतजनीं ।।२।।
तुका म्हणे तुमच्या पायांच्या आधारें। उत्तरेन खरें भवनदी ।।३।।

१०४८
चोर टेंकाचे निघाले चोरी । आपलें तैसें पारखे घरीं ।।१।।
नाहीं नफा नागवे आपण । गमाविले कान हात पाय ।।धृ।।
बुद्धिहीन नये कांहीं चि कारणा । तयासवें जाणा तें चि सुख ।।२।।
तुका म्हणे नाहीं ठाउकें वर्म । तयासी कर्म वोडवलें ।।३।।

१०४९
समर्थाचें बाळ कीविलवाणें दिसे । तरी कोणा हांसे जन देवा ।।१।।
अवगुणी जरी जालें तें वोंगळ । करावा सांभाळ लागे त्याचा ।।२।।
तुका म्हणे तैसा मी एक पतित । परि मुद्रांकित जालों तुझा ।।३।।

१०५०
गाढवाचे अंगीं चंदनाची उटी । राख तया तेणें केलीसे भेटी ।।१।।

सहज गुण जयाचे देहीं । पालट कांहीं नव्हे तया ।।धृ।।
माकडाचे गळां मोलाचा मणि । घातला चावुनी टाकी थुंकोनि ।।२।।
तुका म्हणे खळा नावडे हित । अविद्या वाढवी आपुलें मत ।।३।।

१०५१
नेणे सुनें चोर पाहुणा मागता । देखून भलता भुंकतसे ।।१।।
शिकविलें कांहीं न चले तया । बोलियेले वांयां बोल जाती ।।धृ।।
क्षीर ओकुनियां खाय अमंगळ । आपुली ते ढाळ जाऊं नेदी ।।२।।
वंदूं निंदूं काय दुराचार । खळाचा विचार तुका म्हणे ।।३।।

१०५२
जन मानविलें वरी बाह्यात्कारीं । तैसा मी अंतरीं नाहीं जालों ।।१।।
म्हणउनी पंढरीनाथा वाटतसे चिंता । प्रगट बोलतां लाज वाटे ।।धृ।।
संतां ब्रम्हरूप जालें अवघें जन । ते माझे अवगुण न देखती ।।२।।
तुका म्हणे मी तों आपणांसी ठावा । आहें बरा देवा जैसा तैसा ।।३।।

१०५३
काम क्रोध माझे जीताती शरीरीं । कोवळें तें वरी बोलतसें ।।१।।
कैसा सरतां जालों तुझ्या पायीं । पांडुरंगा कांहीं न कळे हें ।।धृ।।
पुराणींची ग्वाही वदतील संत । तैसें नाहीं चित्त शुद्ध जालें ।।२।।
तुका म्हणे मज आणूनि अनुभवा । दाखवीं हें देवा साच खरें ।।३।।

१०५४
स्तुति करीं जैसा नाहीं अधिकार । न कळे विचार योग्यतेचा ।।१।।
तुमचें मी दास संतांचें दुर्बळ । करूनि सांभाळ राखा पायीं ।।धृ।।
रामकृष्णहरि मंत्र उच्चारणा । आवडी चरणां विठोबाच्या ।।२।।
तुका म्हणे तुमचें सेवितों उच्छिष्ट । क्षमा करीं धीट होऊनियां ।।३।।

१०५५
बहु दूरवरी । वेठी ओझें होतें शिरीं ।।१।।
आतां उतरला भार । तुम्हीं केला अंगीकार ।।धृ।।
बहु काकुलती । आलों मागें किती ।।२।।
तुका म्हणे देवा । आजि सफळ जाली सेवा ।।३।।

पाईक - अभंग ११

१०५६

पाईकपणें जोतिला सिद्धांत । सुर धरी मात वचन चित्तीं ।।१।।
पाइकावांचून नव्हे कधीं सुख । प्रजांमध्यें दुःख न सरे पीडा ।।धृ।।
तरि व्हावें पाईक जिवाचा उदार । सकळ त्यांचा भार स्वामी वाहे ।।२।।
पाइकीचें सुख जयां नाहीं ठावें । धिग त्यांनीं ज्यावें वांयांविण ।।३।।
तुका म्हणे एका क्षणांचा करार । पाईक अपार सुख भोगी ।।४।।

१०५७

पाइकीचें सुख पाइकासी ठावें । म्हणोनियां जीवें केली साटीं ।।१।।
येतां गोळ्या बाण साहिले भडमार । वर्षातां अपार वृष्टि वरी ।।धृ।।
स्वामीपुढें व्हावें पडतां भांडण । मग त्या मंडन शोभा दावी ।।२।।
पाइकांनीं सुख भोगिलें अपार । शुद्ध आणि धीर अंतर्बाहीं ।।३।।
तुका म्हणे या सिद्धांताच्या खुणा । जाणे तो शाहाणा करी तो भोगी ।।४।।

१०५८

पाईक जो जाणे पाइकींनीं भाव । लाग पगें ठाव चोरवाट ।।१।।
आपणां राखोनि ठकावें आणीक । घ्यावें सकळीक हरूनियां ।।धृ।।
येऊं नेदी लाग लागों नेदी माग । पाईक त्या जग स्वामी मानी ।।२।।
ऐसें जन केलें पाइकें पाईक । जया कोणी भीक न घलिती ।।३।।
तुका म्हणे ऐसे जयाचे पाईक । बळिया तो नाइक त्रैलोकींचा ।।४।।

१०५९

पाइकांनीं पंथ चालविल्या वाटा । पारख्याचा सांटा मोडोनियां ।।१।।
पारखिये ठायीं घेउनियां खाणें । आपलें तें जन राखियेलें ।।धृ।।
आधारेंविण जें बोलतां चावळे । आपलें तें कळे नव्हे ऐसें ।।२।।
सांडितां मारग मारिती पाईक । आणिकांसी शीक लागावया ।।३।।
तुका म्हणे विश्वा घेऊनि विश्वास । पाईक तयास सुख देती ।।४।।

१०६०

पाईक तो प्रजा राखोनियां कुळ । पारखिया मूळ छेदी दुष्टा ।।१।।
तो एक पाईक पाइकां नाईक । भाव सकळीक स्वामिकाजीं ।।धृ।।

तृणवत तनु सोनें ज्या पाषाण । पाइका त्या भिन्न नाहीं स्वामी ।।२।।
विश्वासावांचूनि पाइकासी मोल । नाहीं मिथ्या बोल बोलिलिया ।।३।।
तुका म्हणे नये स्वामी उणेपण । पाइका जतन करी त्यासी ।।४।।

१०६१
धनी ज्या पाइका मानितो आपण । तया भितें जन सकळीक ।।१।।
जिवाचे उदार शोभती पाईक । मिरवती नाईक मुगुटमणि ।।धृ।।
आपुलिया सत्ता स्वामीचें वैभव । भोगिती गौरव सकळ सुख ।।२।।
कमाइचीं हीणें पडिलीं उदंडें । नाहीं तयां खंड येती जाती ।।३।।
तुका म्हणे तरि पाइकी च भली । थोडीबहुत केली स्वामिसेवा ।।४।।

१०६२
पाइकपणें खरा मुशारा । पाईक तो खरा पाइकीनें ।।१।।
पाईक जाणें मारितें अंग । पाइकासी भंग नाहीं तया ।।धृ।।
एके दोहीं घरीं घेतलें खाणें । पाईक तो पणें निवडला ।।२।।
करूनि कारण स्वामी यश द्यावें । पाइका त्या नांव खरेपण ।।३।।
तुका म्हणे ठाव पाइकां निराळा । नाहीं स्वामी स्थळा गेल्याविण ।।४।।

१०६३
उंच निंच कैसी पाइकाची वोळी । कोण गांढे बळी निवडिले ।।१।।
स्वामिकाजीं एक सर्वस्वें तत्पर । एक ते कुचर आशाबद्ध ।।धृ।।
प्रसंगावांचूनि आणिती आयुर्भाव । पाईक तो नांव मिरवी वांयां ।।२।।
गणतीचे एक उंच निंच फार । तयांमध्यें शूर विरळा थोडे ।।३।।
तुका म्हणे स्वामी जाणे त्यांचा मान । पाईक पाहोन मोल करी ।।४।।

१०६४
एका च स्वामीचे पाईक सकळ । जैसें बळ तैसें मोल तया ।।१।।
स्वामिपदीं एकां ठाव उंच स्थळीं । एक तीं निराळीं जवळी दुरी ।।धृ।।
हीन कमाईचा हीन आन ठाव । उंचा सर्व भाव उंच पद ।।२।।
पाइकपणें तो सर्वत्र सरता । चांग तरी परता गांढ्या ठाव ।।३।।
तुका म्हणे मरण आहे या सकळां । भेणें अवकळा अभयें मोल ।।४।।

१०६५

प्रजी तो पाईक ओळीचा नाईक । पोटासाटीं एकें जैशीं तैशीं ।।१।।
आगळें पाऊल आणिकांसी तरी । पळती माघारीं तोडिजेती ।।धृ।।
पाठीवरी घाय म्हणती फटमर । धडा अंग शूर मान पावे ।।२।।
घेईल दरवडा देहा तो पाईक । मारी सकळीक सर्व हरी ।।३।।
तुका म्हणे नव्हे बोलाचें कारण । कमाईचा पण सिद्धी पावे ।।४।।

१०६६
जातीचा पाईक ओळखे पाइका । आदर तो एका त्याचे ठायीं ।।१।।
धरितील पोटासाटीं हतियेरें । कळती तीं खरें वेठीचींसीं ।।धृ।।
जीताचें तें असे खरें घायडाय । पारखिया काय पाशीं लोपे ।।२।।
तुका म्हणे नमूं देव म्हूण जना । जालियांच्या खुणा जाणतसों ।।३।।
।।११।।

१०६७
बुद्धीचा पालट धरा रे कांहीं । मागुता नाहीं मनुष्यदेह ।।१।।
आपुल्या हिताचे नव्हती सायास । गृहदाराआसधनवित्त ।।धृ।।
अवचितें निधान लागलें हें हातीं । भोगावी विपत्ती गर्भवास ।।२।।
यावें जावें पुढें ऐसें चि कारण । भोगावें पतन नरकवास ।।३।।
तुका म्हणे धरीं आठव या देहीं । नाहींतरि कांहीं बरें नव्हे ।।४।।

१०६८
आम्हीं पतितांनीं घालावें सांकडें । तुम्हां लागे कोडें उगवणें ।।१।।
आचरतां दोष न धरूं सांभाळ । निवाड उकल तुम्हां हातीं ।।धृ।।
न घेतां कवडी करावा कुढावा । पाचारितां देवा नामासाठीं ।।२।।
दयासिंधु नाम पतितपावन । हें आम्हां वचन सांपडलें ।।३।।
तुका म्हणे करूं अन्यायाच्या कोटी । कृपावंत पोटीं तूं चि देवा ।।४।।

१०६९
जो भक्तांचा विसावा । उभा पाचारितो धांवा ।।१।।
हातीं प्रेमाचें भातुकें । मुखीं घाली कवतुकें । भवसिंधू सुखें । उतरी कासे लावूनि ।।धृ।।
थोर भक्तांची आस । पाहे भोंवताली वास ।।२।।
तुका म्हणे कृपादानी । फेडी आवडीची धणी ।।३।।

१०७०
 अखंड तुझी जया प्रीति । मज दे त्यांची संगति । मग मी कमळापति । तुज नानीं कांटाळा ।।१।।
पडोन राहेन ते ठायीं । उगा चि संतांचिये पायीं । न मगें न करीं कांहीं । तुझी आण विठोबा ।।धृ।।
तुम्ही आम्ही पीडों ज्यानें । दोन्ही वारती एकानें । बैसलों धरणें । हाका देत दारेशीं ।।२।।
तुका म्हणे या बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला । न पाहिजे केला । अवघा माझा आव्हेर ।।३।।

१०७१
 पुनीत केलें विष्णुदासीं । संगें आपुलिया दोषी ।।१।।
कोण पाहे तयांकडे । वीर विठ्ठलाचे गाढे । अशुभ त्यांपुढें शुभ होउनियां ठाके ।।धृ।।
प्रेमसुखाचिया रासी । पाप नाहीं ओखदासी ।।२।।
तुका म्हणे त्यांनीं । केली वैकुंठ मेदिनी ।।३।।

१०७२
 जन देव तरी पायां चि पडावें । त्याचिया स्वभावें चाड नाहीं ।।१।।
अग्नीचें सौजन्य शीतनिवारण । पालवीं बांधोनि नेतां नये ।।२।।
तुका म्हणे विंचु सर्प नारायण । वंदावे दुरोन शिवों नये ।।३।।

१०७३
 भक्त भागवत जीवन्मुक्त संत । महिमा अत्यद्‌भुत चराचरीं।
 ऐसिया अनंतामाजी तूं अनंत । लीलावेश होत जगत्राता ।।१।।
ब्रम्हानंद तुकें तुळे आला तुका । तो हा विश्वसंख्या क्रीडे जनीं ।।धृ।।
शास्त्रा श्रेष्ठाचार अविरुद्ध क्रिया । तुझी भक्तराया देखियेली ।
 देऊनि तिळाजुळी काम्य निषिद्धांसी । विधिविण योगेशी ब्रम्हार्पण ।।२।।
संत ग्रहमेळीं जगधंद्या गिळी । पैल उदयाचळीं भानु तुका ।
 संत वृंदें तीर्थ गौतमी हरिकथा । तुकया नर सिंहस्ता भेटों आली ।।३।।
शांति पतिव्रते जाले परिनयन । काम संतर्पण निष्कामता।
 क्षमा क्षमापणें प्रसिद्ध प्रथा जगीं । तें तों तुझ्या अंगी मूर्तिमंत ।।४।।

दया दिनानाथा तुवा जीवविली । विश्वीं विस्तारली कीर्ति तुझी ।
वेदवाक्यबाहु उभारिला ध्वज । पूजिले देव द्विज सर्वभूतें ।।५।।
अधर्म क्षयव्याधि धर्मांशीं स्पर्शला । तो त्वां उपचारिला अनन्यभक्ति।
ब्रम्ह ऐक्यभावें भक्ति विस्तारिली । वाक्यें सपळ केलीं वेदविहितें ।।६।।
देहबुद्धि जात्या अभिमानें वंचलों । तो मी उपेक्षिलों न पाहिजे।
न घडो याचे पायीं बुद्धीचा व्यभिचार । मागे रामेश्वर रामचंद्र ।।७।।

१०७४
भूत भविष्य कळों यावें वर्तमान । हें तों भाग्यहीन त्यांची जोडी ।।१।।
आम्हीं विष्णुदासीं देव ध्यावा चित्तें । होणार तें होतें प्रारब्धें ।।धृ।।
जगरूढीसाटीं घातलें दुकान । जातो नारायण अंतरोनि ।।२।।
तुका म्हणे हा हो प्रपंच गाढा । थोरली ते पीडा रिद्धिसिद्धी ।।३।।

।।घोंगड्याचे अभंग-।।१२।।
१०७५
ठकिलें काळा मारिली दडी । दिली कुडी टाकोनियां ।।१।।
पांघुरलों बहु काळें । घोंगडें बळें सांडवलें ।।धृ।।
नये ऐसा लाग वरी । परते दुरी लपालें ।।२ ।।
तुका म्हणे आड सेवा । लाविला हेवा धांदली ।।३।।

१०७६
घोंगडियांचा पालट केला । मुलांमुलां आपुल्यांत ।।१।।
कान्होबा तो मी च दिसें । लाविलें पिसें संवगडियां ।।धृ।।
तो बोले मी उगाच बैसें । आनारिसें न दिसे ।।२।।
तुका म्हणे दिलें सोंग । नेदी वेंग जाऊं देऊं ।।३।।

१०७७
खेळों लागलों सुरकवडी । माझी घोंगडी हारपली ।।१।।
कान्होबाचे पडिलों गळां । घेईं गोपाळा देईं झाडा ।।धृ।।
मी तों हागे उघडा जालों । अवघ्या आलों बाहेरी ।।२।।
तुका म्हणे बुद्धि काची । नाहीं ठायींची मजपाशीं ।।३।।

१०७८

घोंगडियांची एकी राशी । त्याचपाशीं तें ही होतें ।।१।।
माझियाचा माग दावा । केला गोवा उगवों द्या ।।धृ।।
व्हावें ऐसें निसंतान । घेइन आन तुजपाशीं ।।२।।
तुका म्हणे लाहाण मोठा । सांड ताठा हा देवा ।।३।।

१०७९
नाहीं तुझे उगा पडत गळां । पुढें गोपाळा जाऊं नको ।।१।।
चाहाड तुझे दाविन घरीं । बोलण्या उरी नाहीं ऐसी ।।धृ।।
तुम्हां आम्हां पडदा होता । सरला आतां सरोबरी ।।२।।
तुका म्हणे उरती गोठी । पडिली मिठी न सुटे ।।३।।

१०८०
तुम्हां आम्हां उरी तोंवरी । जनाचारी ऐसें तैसी ।।१।।
माझें घोंगडें टाकुन देईं । एके ठायीं मग असों ।।धृ।।
विरोधानें पडे तुटी । कपट पोटीं नसावें ।।२।।
तुका म्हणे तूं जाणता हरी । मज वेव्हारीं बोलविसी ।।३।।

१०८१
मुळींचा तुम्हां लागला चाळा । तो गोपाळा न संडा ।।१।।
घ्यावें त्याचें देणें चि नाहीं । ये चि वाहिं देखतसों ।।धृ।।
माझी तरी घोंगडी मोठी । गांडीची लंगोटी सोडिस ना ।।२।।
तुका म्हणे म्यां सांडिली आशा । हुंगिला फांसा येथुनियां ।।३।।

१०८२
घोंगडियास घातली मिठी । न सोडी साटी केली जीवें ।।१।।
हा गे चोर धरा धांवा कोणी । घरांत राहाटे चहूं कोणी ।।धृ।।
नोळखवे म्यां धरिला हातीं । देह्यादिप माय लाविली वाती ।।२।।
न पावे धांवणें मारितो हाका । जनाचारीं तुका नागवला ।।३।।

१०८३
आतां मी देवा पांघरों काई । भिकेचें तें ही उरे चि ना ।।१।।
सदैव दुबळें नेणें चोर । देखोनि सुनाट फोडितो घर ।।धृ।।
नाहीं मजपाशीं फुटकी फोडी । पांचांनीं घोंगडी दिली होती ।।२।।

तुका म्हणे जना वेगळें जालें । एक चि नेलें एकल्याचें ।।३।।

१०८४

मी माझें करित होतों जतन । भीतरिल्या चोरें घेतलें खानें ।।१।।
मज आल्याविण आधीं च होता । मज न कळतां मज माजी ।।धृ।।
घोंगडें नेलें घोंगडें नेलें । उघडें केलें उघडें चि ।।२।।
तुका म्हणे चोरटा चि जाला साव । सहज चि न्याय नाहीं तेथें ।।३।।

१०८५

घोंगडें नेलें सांगों मी कोणा । दुबळें माझें नाणीत मना ।।१।।
पुढें तें मज न मिळे आतां । जवळी सत्ता दाम नाहीं ।।धृ।।
सेटे महाजन ऐका कोणी । घोंगडियाची करा शोधणी ।।२।।
घोंगडियाचा करा बोभाट । तुका म्हणे जंव भरला हाट ।।३।।

१०८६

माझें घोंगडें पडिलें ठायीं । माग तया पायीं सांपडला ।।१।।
चोर तो भला चोर तो भला । पाठिसी घातला पुंडलिकें ।।धृ।।
चोर कुठोरि एके चि ठायीं । वेगळें पाहावें नलगेच कांहीं ।।२।।
आणिकांचीं ही चोरलीं आधीं । माझें तयामधीं मेळविलें ।।३।।
आपल्या आपण शोधिलें तींहीं । करीन मी ही ते चि परी ।।४।।
तुका म्हणे माझें हित चि जालें । फाटकें जाउन धडकें चि आलें ।।५।। ।।१२।।

१०८७

सर्प भुलोन गुंतला नादा । गारुडियें फांदां घातलासे।
हिंडवुनि पोट भरी दारोदारीं । कोंडुनि पेटारी असेरया ।।१।।
तैसी परी मज जाली पांडुरंगा । गुंतलों तो मी गा सोडीं आतां ।
माझें मज कांहीं न चलेसें जालें । कृपा तुज न करितां ।।धृ।।
आविसें मिनु लावियला गळीं । भक्ष तो गिळी म्हणउनियां ।
काढूनि बाहेरी प्राण घेऊं पाहे । तेथे बापुमाये कवण रया ।।२।।
पक्षी पिलयां पातलें आशा । देखोनियां फांसा गुंते बळें ।
मरण नेणें माया धांवोनि वोसरे । जीवित्व ना जालीं बाळें ।।३।।
गोडपणें मासी गुंतली लिगाडीं । सांपडे फडफडी अधिकाअधिक ।

तुका म्हणे प्राण घेतला आशा । पंढरीनिवासा धाव घालीं ।।४।।

१०८८
यातिहीन मज काय तो अभिमान । मानी तुज जन नारायणा ।।१।।
काय सुख मज तयाची हे खंती । आपुलाला घेती गुणभाव ।।धृ।।
द्रव्यामुळें माथां वाहियेली चिंधी । होन जयामधीं होता गांठी ।।२।।
तुका म्हणे जन वंदितो वेगळा । मजसी दुर्बळा काय चाड ।।३।।

१०८९
शीतळ साउली आमुची माउली । विठाई वोळली प्रेमपान्हा ।।१।।
जाऊनि वोसंगा वोरस । लागलें तें इच्छे पीइन वरी ।।धृ।।
कृपा तनु माझा सांभाळी दुभूनि । अमृतजीवनी लोटलीसे ।।२।।
आनंदाचा ठाव नाहीं माझा चित्तीं । सागर तो किती उपमेसी ।।३।।
सैर जाये पडे तयेसी सांकडें । सांभाळीत पुढें मागें आस ।।४।।
तुका म्हणे चिंता कैसी ते मी नेणें । लडिवाळ तान्हें विठाईचें ।।५।।

रामचरित्र - अभंग ।।१४।।
१०९०
रामा वनवास । तेणें वसे सर्व देश ।।१।।
केलें नामाचें जतन । समर्थ तो नव्हे भिन्न ।।धृ।।
वनांतरीं रडे । ऐसे पुराणीं पवाडे ।।२।।
तुका म्हणें ऋषिनेम । ऐसा कळोनि कां भ्रम ।।३।।

१०९१
राम म्हणे ग्रासोग्रासीं । तो चि जेविला उपवासी ।।१।।
धन्यधन्य तें शरीर । तीर्थांव्रतांचे माहेर ।।धृ।।
राम म्हणे करितां धंदा । सुखसमाधि त्या सदा ।।२।।
राम म्हणे वाटे चाली । यज्ञ पाउलापाउलीं ।।३।।
राम म्हणें भोगीं त्यागीं । कर्म न लिंपे त्या अंगीं ।।४।।
ऐसा राम जपे नित्य । तुका म्हणे जीवन्मुक्त ।।५।।

१०९२
तारी ऐसे जड । उदकावरी जो दगड ।।१।।

तो हा न करी तें काई । कां रे लीन नव्हां पायीं ।।धृ।।
सीळा मनुष्य जाली। ज्याच्या चरणाचे चाली ।।२।।
वानरां हातीं लंका । घेवविली म्हणे तुका ।।३।।

१०९३
राम म्हणतां राम चि होइजे । पदीं बैसोन पदवी घेइजे ।।१।।
ऐसें सुख वचनीं आहे । विश्वासें अनुभव पाहें ।।धृ।।
रामरसाचिया चवी । आन रस रुचती केवीं ।।२।।
तुका म्हणे चाखोनि सांगें । मज अनुभव आहे अंगें ।।३।।

१०९४
रामराम उत्तम अक्षरें । कंठीं धरिलीं आपण शंकरें ।।१।।
कैसीं तारक उत्तम तिहीं लोकां । हळाहळ शीतळ केलें शिवा देखा ।।धृ।।
हा चि मंत्र उपदेश भवानी । तिच्या चुकल्या गर्भादियोनि ।।२।।
जुन्हाट नागर नीच नवें । तुका म्हणें म्यां धरिलें जीवें भावें ।।३।।

१०९५
राम म्हणतां तरे जाणता अणतां । हो का यातिभलता कुळहीन ।।१।।
राम म्हणतां न लगे आणीक सायास । केले महा दोष तेही जळती ।।धृ।।
राम म्हणे तया जवळी नये भूत । कैचा यमदूत म्हणतां राम ।।२।।
राम म्हणतां तरे भवसिंधुपार । चुके वेरझार म्हणतां राम ।।३।।
तुका म्हणें हें सुखाचें हें साधन । सेवीं अमृतपान एका भावें ।।४।।

१०९६
पैल आला राम रावणासी सांगती । काय निदसुरा निजलासी भूपति ।।१।।
अवघें लंकेमाजी जाले रामाचे दूत । व्यापिलें सर्वत्र बाहेरी भीतरी आंत ।।धृ।।
अवघे अंगलग तुझे वधियेले वीर । होई शरणागत किंवा युद्धासी सादर ।।२।।
तुका म्हणे ऐक्या भावें रामेसी भेटी । करूनि घेई आतां संवंघेसी तुटी ।।३।।

१०९७
समरंगणा आला । रामें रावण देखिला ।।१।।

कैसे भीडतील दोन्ही । नांव सारुनियां रणीं ।।धृ।।
प्रेमसुखाचें संधान । बाणें निवारिती बाण ।।२।।
तुकयास्वामी रघुनाथ । वर्म जाणोनि केली मात ।।३।।

१०९८
केला रावणाचा वध । अवघा तोडिला संबंध ।।१।।
लंकाराज्यें बिभीषणा । केली चिरकाळ स्थापना ।।धृ।।
उदार्याची सीमा । काय वर्णूं रघुरामा ।।२।।
तुका म्हणे माझा दाता । रामें सोडविली सीता ।।३।।

१०९९
रामरूप केली । रामें कौसल्या माउली ।।१।।
राम राहिला मानसीं । ध्यानीं चिंतनीं जयासी ।
राम होय त्यासी । संदेह नाहीं हा भरवसा ।।धृ।।
अयोध्येचे लोक । राम जाले सकळीक ।।२।।
स्मरतां जानकी । रामरूप जाले कपि ।।३।।
रावणेसी लंका। राम आपण जाला देखा ।।४।।
ऐसा नित्य राम ध्याय । तुका वंदी त्याचे पाय ।।५।।

११००
आनंदले लोक नरनारी परिवार । शंखभेरीतुरें वाद्यांचे गजर ।।१।।
आनंद जाला अयोध्येसी आले रघुनाथ । अवघा जेजेकार आळंगिला भरत ।।धृ।।
करिती अक्षवाणें ओंवाळिती रघुवीरा । लक्ष्मीसहित लक्ष्मण दुसरा ।।२।।
जालें रामराज्य आनंदलीं सकळें । तुका म्हणे गाईवत्सें नरनारीबाळें ।।३।।

११०१
जालें रामराज्य काय उणें आम्हांसी । धरणी धरी पीक गाई वोळल्या म्हैसी ।।१।।
राम वेळोवेळां आम्ही गाऊं ओवियें। दळितां कांडितां जेवितां गे बाइये ।।धृ।।
स्वप्नीं ही दुःख कोणी न देखे डोळां । नामाच्या गजरें भय सुटलें काळा ।।२।।
तुका म्हणे रामें सुख दिलें आपुलें । तयां गर्भवासीं येणें जाणें खुंटलें ।।३।।

११०२
अहल्या जेणें तारिली रामें । गणिका परलोका नेली नामें ।।१।।
रामहरे रघुराजहरे । रामहरे महाराजहरे ।।धृ।।
कंठ शीतळ जपतां शूळपाणी । राम जपतां अविनाश भवाणी ।।२।।
तारकमंत्रश्रवण काशी । नाम जपतां वाल्मीक ॠषि ।।३।।
नाम जपें बीज मंत्र नळा । सिंधु तरती ज्याच्या प्रतापें शिळा ।।४।।
नामजप जीवन मुनिजना ।। तुकयास्वामी रघुनंदना ।।५।।

११०३
मी तों अल्प मतिहीन । काय वर्णूं तुझे गुण । उदकीं तारिले पाषाण । हें महिमान नामाचें ।।१।।
नाम चांगलें चांगलें । माझे कंठीं राहो भलें । कपिकुळ उद्धरिलें । मुक्त केलें राक्षसां ।।धृ।।
द्रोणागिरि कपिहातीं । आणविला सीतापती । थोर केली ख्याति । भरतभेटीसमयीं ।।२।।
शिळा होती मनुष्य जाली । थोर कीर्ति वाखाणिली । लंका दहन केली । हनुमंते काशानें ।।३।।
राम जानकीजीवन । योगियांचे निजध्यान । राम राजीवलोचन । तुका चरण वंदितो ।।४।। ।।१४।।

श्लोकरूपी अभंग - ।।६।।
११०४
तुजवाचुनी मागणें काय कोणा । महीमंडळीं विश्वव्यापकजना ।
जीवभावना पुरवूं कोण जाणे । तुजवांचुनी होत कां रावराणे ।।१।।
नसे मोक्षदाता तिहींमाजि लोकां । भवतारकु तूजवांचुनि एका ।
मनीं मानसीं चिंतितां रूपनाम । पळे पाप ताप भयें नास काम ।।२।।
हरी नाम हें साच तुझें पुराणीं । हरीहातिचें काळगर्भादियोनी ।
करूं मुखवाणी कैसी देशघडी । तुजवांचुनि वाणितां व्यर्थ गोडी ।।३।।
भवभंजना व्यापक लोक तिन्ही । तुज वाणितां श्रमला शेषफणी ।
असो भावें जीव तुझ्या सर्व पायीं । दुजें मागणें आणीक व्यर्थ काईं ।।४।।
दिनानाथ हे साक्ष तूझी जनासी । दिनें तारिलीं पातकी थोर दोषी ।
तुका राहिला पायिं तो राख देव। असें मागतसे तुझी चरणसेवा ।।५।।

११०५
उभा भींवरेच्या तिरी राहिलाहे । असे सन्मुख दक्षिणे मूख वाहे ।
महापातकांसी पळ कांप थोर । कैसे गर्जती घोष हे नामवीर ।।१।।
गुणगंभीर हा धीर हास्यमुख । वदे वदनीं अमृत सर्वसुख ।
लागलें मुनिवरां गोड चित्तीं । देहभावना तुटलियासि खंती ।।२।।
ठसा घातला ये भूमिमाजी थोर । इच्छादाना हा द्यावयासी उदार ।
जया वोळगती सिद्धि सर्वठायीं । तुझें नाम हें चांगलें गे विठाई ।।३।।
असे उघडा हा विटेवरि उभा । कटसूत्र हें धरुनि भक्तिलोभा ।
पुढें वाट दावी भवसागराची । विठो माउली हे सिद्धसाधकांची ।।४।।
करा वेगु हा धरा पंथ आधीं । जया पार नाहीं सुखा तें च साधीं ।
म्हणे तुका पंढरीस सर्व आलें । असे विश्व हें जीवनें त्याचि ज्यालें ।।५।।

११०६
धना गुंतलें चित्त माझें मुरारी । मन घेउनी हिंडवी दारोदारीं ।
मरे हिंडतां न पुरे यासि कांहीं । मही ठेंगणी परी तें तृप्त नाहीं ।।१।।
न दिसे शुद्ध पाहातां निजमती । पुढें पडिलों इंद्रियां थोर घातीं ।
जिवा नास त्या संगती दंड बेडी । हरी शीघ्र या दुष्टसंगासि तोडीं ।।२।।
असीं आणिकें काय सांगों अनंता । मोहो पापिणी दुष्टमायाममता ।
क्रोध काम यातना थोर करी । तुजवांचुनी सोडवी कोण हरी ।।३।।
निज देखतां निज हे दूरि जाये । निद्रा आळस दंभ यी भीत आहे ।
तयां वस्ति देहीं नको देउं देवा । तुजवांचुनी आणिक नास्ति हेवा ।।४।।
करीं घात पात शंका लाज थोरी । असे सत्य भाव बहू भक्ति दूरी ।
नको मोकलूं दीनबंधु अनाथा । तुका वीनवी ठेवुनी पायिं माथा ।।५।।

११०७
पैल सांवळें तेज पुंजाळ कैसें । सिरीं तुर्बिलीं साजिरीं मोरवीसें ।
हरे त्यासि रे देखतां ताप माया । भजा रे भजा यादव योगिराया ।।१।।
जया कामिनी लुब्धल्या सहस्त्रसोळा । सुकुमार या गोपिका दिव्य बाळा ।
शोभे मध्यभागीं कळा चंद्रकोटी । रुपा मीनली साजिरी माळकंठीं ।।२।।
असे यादवां श्रेष्ठ हा चक्रपाणी । जया वंदिती कोटि तेहतीस तीन्ही ।
महाकाळ हे कांपती दैत्य ज्यासी । पाहा सांवळें रूप हें पापनासी ।।३।।
कसीं पाउलें साजिरीं कुंकुमाचीं। कसी वीट हे लाधली दैवांची।

जया चिंतितां अग्नि हा शांति नीवे। धरा मानसीं आपला देहभाव ।।४।।
मुनी देखतां मूख हें चित्त ध्याय। देह मांडला भाव हा बापमाय।
तुक्या लागलें मानसीं देवपीसें । चित्त चोरटें सांवळें रूप कैसें ।।५।।

११०८
असे नांदतु हा हरी सर्वजीवीं । असे व्यापुनी अग्नि हा काष्ठ तेवीं ।
घटीं बिंबलें बिंब हें ठायिठायीं । तया संगती नासु हा त्यासि नाहीं ।।१।।
तन वाटितां क्षीर हें होत नाहीं । पशू भक्षितां पालटे तें चि देहीं ।
तया वर्म तो जाणता एक आहे । असे व्यापक व्यापुनी अंतर्बाहे ।।२।।
फळ कर्दळीं सेवटीं येत आहे । असे शोधितां पोकळीमाजि काये ।
धीर नाहीं त्यें वाउगें धीग जालें । फळ पुष्पना यत्न व्यर्थ गेले ।।३।।
असे नाम हें दर्पणें सिद्ध केलें। असे बिंब तें या मळा आहे ठेलें ।
कैसें शुद्ध नाहीं दिसे माजिरूप। नका वाढवूं सीण हा पुण्यपाप ।।४।।
करा वर्म ठावें नका सोंग वांयां। तुका वीनवीतो पडों काय पायां ।
तुज पुत्र दारा धन वासना हे । मग ऊरलें शेवटीं काय पाहें ।।५।।

११०९
मना सांडि हे वासना दुष्ट खोडी । मती मानसीं एक हे व्यर्थ गोडी ।
असे हीत माझें तुज कांहीं एक । धरीं विठ्ठलीं प्रेम हें पायिं सूख ।।१।।
ऐसा सर्वभावें तुज शरण आलों । देहदुःख हें भोगितां फार भ्यालों ।
भवतारितें दूसरें नाहिं कोणी । गुरु होत कां देव तेहतीस तीन्ही ।।२।।
जना वासना हे धना थोरि आहे । तुज लागली संगती ते चि सोये ।
करीं सर्व संगी परि त्यागु ठायीं । तुका विनवीतो मस्तक ठेवुनि पायीं ।।३।। ।।६।।

१११०
सुटायाचा कांहीं पाहातों उपाय । तों हे देखें पाय गोवियेले ।।१।।
ऐसिया दुःखाचे सांपडलों संदी । हारपली बुद्धि बळ माझें ।।धृ।।
प्रारब्ध क्रियमाण संचिताचें । वोढत ठायींचे आलें साचें ।।२।।
विधिनिषेधाचे सांपडलों चपे । एकें एक लोपे निवडेना ।।३।।
सारावें तें वाढे त्याचिया चि अंगें । तृष्णेचिया संगें दुःखी जालों ।।४।।
तुका म्हणे आतां करीं सोडवण । सर्वशक्तिहीन जालों देवा ।।५।।

१११‍१
 भय वाटे पर । न सुटे हा संसार ।।१।।
ऐसा पडिलों कांचणी । करीं धांवा म्हणउनी ।।धृ।।
विचारितों कांहीं । तों हें मन हातीं नाहीं ।।२।।
तुका म्हणे देवा । येथें न पुरे रिघावा ।।३।।

१११२
 येगा येगा पांडुरंगा । घेई उचलुनि वोसंगा ।।१।।
ऐसी असोनियां वेसी । दिसतों मी परदेसी ।।धृ।।
उगवूनि गोवा । सोडवूनि न्यावें देवा ।।२।।
तुज आड कांहीं । बळ करी ऐसें नाहीं ।।३।।
तुका म्हणे हृषीकेशी । काय उशीर लाविसी ।।४।।

१११३
 माझी विठ्ठल माउली । प्रेमें पान्हा पान्हायेली ।।१।।
कृवाळूनि लावी स्तनीं । न वजे दुरी जवळूनि ।।धृ।।
केली पुरवी आळी । नव्हे निष्ठुर कोंवळी ।।२।।
तुका म्हणे घांस । मुखीं घाली ब्रम्हरस ।।३।।

१११४
 आम्ही उतराई । भाव निरोपूनि पायीं ।।१।।
तुम्ही पुरवावी आळी । करावी ते लडिवाळीं ।।धृ।।
आमचा हा नेम । तुम्हां उचित हा धर्म ।।२।।
तुका म्हणे देवा । जाणों सांगितली सेवा ।।३।।

१११५
 केलें पाप जेणें दिलें आन्मोदन । दोघांसी पतन सारिके चि ।।१।।
विष नवनीता विष करी संगें । दुर्जनाच्या त्यागें सर्व हित ।।धृ।।
देखिलें ओढाळ निघालिया सेता । टाळावें निमित्या थैक म्हूण ।।२।।
तुका म्हणे जोडे केल्याविण कर्म । देखतां तो श्रम न मानितां ।।३।।

१११६
 विठ्ठल गीतीं विठ्ठल चित्तीं । विठ्ठल विश्रांति भोग जया ।।१।।

विठ्ठल आसनीं विठ्ठल शयनीं । विठ्ठल भोजनीं ग्रासोग्रासीं ।।धृ।।
विठ्ठल जागृतिस्वप्नी सुषुप्ति । आन दुजें नेणती विठ्ठलेंविण ।।२।।
भूषण अळंकार सुखाचे प्रकार । विठ्ठल निर्धार जयां नरां ।।३।।
तुका म्हणे ते ही विठ्ठल चि जाले । संकल्प मुराले दुजेपणें ।।४।।

११९७
दास जालों हरिदासांचा । बुद्धिकायामनेंवाचा ।।१।।
तेथें प्रेमाचा सुकाळ । टाळमृदंगकल्लोळ ।
नासे दुष्टबुद्धि सकळ । समाधि हरिकीर्त्तनीं ।।धृ।।
ऐकतां हरिकथा । भक्ति लागे त्या अभक्तां ।।२।।
देखोनि कीर्तनाचा रंग । कैसा उभा पांडुरंग ।।३।।
हें सुख ब्रम्हादिकां । म्हणे नाहीं नाहीं तुका ।।४।।

११९८
गति अधोगति मनाची युक्ति । मन लावीं एकांतीं साधुसंगें ।।१।।
जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ।।धृ।।
मान अपमान मनाचें लक्षण । लाविलिया ध्यान तें चि करी ।।२।।
तुका म्हणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौऱ्याशीचा ।।३।।

११९९
पंढरीस दुःख न मिळे ओखदा । प्रेमसुख सदा सर्वकाळ ।।१।।
पुंडलिकें हाट भरियेली पेंठ । अवघें वैकुंठ आणियेलें ।।धृ।।
उदमासी तुटी नाहीं कोणा हानि । घेऊनियां धणी लाभ घेती ।।२।।
पुरलें देशासी भरलें सिगेसी । अवघी पंचक्रोशी दुमदुमीत ।।३।।
तुका म्हणे संतां लागलीसे धणी । बैसले राहोनि पंढरीस ।।४।।

११२०
द्वारकेचें केणें आलें या चि ठाया । पुढें भक्तराया चोजवीत ।।१।।
गोविलें विसारें माप केलें खरें । न पाहे माघारें अद्यापवरी ।।धृ।।
वैष्णव मापार नाहीं जाली सळे । पुढें ही न कळे पार त्याचा ।।२।।
लाभ जाला त्यांनीं धरिला तो विचार । आहिक्य परत्र सांटविलें ।।३।।
तुका म्हणे मज मिळाली मजुरी । विश्वास या घरीं संतांचिया ।।४।।

११२१
 सुरवर येती तीर्थें नित्यकाळ । पेंठ त्या निर्मळ चंद्रभागा ।।१।।
साक्षभूत नव्हे सांगितली मात । महिमा अत्यद्भुत वर्णवेना ।।धृ।।
पंचक्रोशीमाजी रीग नाहीं दोषा । जळती आपैसा अघोर ते ।।२।।
निर्विषय नर चतुर्भुज नारी । अवघा घरोघरीं ब्रम्हानंदु ।।३।।
तुका म्हणे ज्यापें नाहीं पुष्पलेश । जा रे पंढरीस घेईं कोटि ।।४।।

११२२
 विचार नाहीं नर खर तो तैसा । वाहे ज्ञान पाठी भार लगड तैसा ।।१।।
वादावाद करणें त्यासी तों च वरी । गुखाडीची चाड सरे तों च बाहेरी ।।धृ।।
सौभाग्यसंपन्न हो कां वृद्ध प्रतिष्ठ । चिकरूनि सांडी पायां लागली ते विष्ठ ।।२।।
नाहीं याति कुळ फांसे ओढी तयासी । तुका म्हणे काय मुद्रासोंग जाळिसी ।।३।।

११२३
 देव होसी तरी आणिकांतें करिसी । संदेह येविशीं करणें न लगे ।।१।।
दुष्ट होसी तरी अणिकांतें करिसी । संदेह येविशीं करणें न लगे ।।२।।
तुका म्हणे जें दर्पणीं बिंबलें । तें तया बाणलें निश्चयेसीं ।।३।।

११२४
 कलिधर्म मागें सांगितले संतीं । आचार सांडिती द्विजलोक ।।१।।
ते चि कळों आतां येतसे प्रचिती । अधर्मा टेंकती धर्म नव्हे ।।धृ।।
तप व्रत करितां लागती सायास । पाळितां पिंडास गोड वाटे ।।२।।
देव म्हणऊनी न येती देऊळा । संसारा वेगळा तरी कां नव्हे ।।३।।
तुका म्हणे मज धरितां गुमान । ऐसे कोणी जन नरका जाती ।।४।।

११२५
 नमो विष्णुविश्वरूपा मायबापा । अपरा अमुपा पांडुरंगा ।।१।।
विनवितों रंक दास मी सेवक । वचन तें एक आइकावें ।।धृ।।
तुझी स्तुति वेद करितां भागला । निवांत चि ठेला नेति नेति ।।२।।
ऋषि मुनि बहु सिद्ध कविजन । वर्णितां ते गुण न सरती ।।३।।

तुका म्हणे तेथें काय माझी वाणी । जे तुझी वाखाणी कीर्ती देवा ।।४।।

११२६
अंतरींचा भाव जाणोनियां गुज । तैसें केलें काज पांडुरंगा ।।१।।
घातलें वचन न पडे चि खालीं । तूं आम्हां माउली अनाथांची ।।धृ।।
मज याचकाची पुरवावी आशा । पंढरीनिवासा मायबापा ।।२।।
नाशिली आशंका माझिया जीवाची । उरली भेदाची होती कांहीं ।।३।।
तुका म्हणे आतां केलों मी निर्भर । गाईन अपार गुण तुझे ।।४।।

११२७
उदार कृपाळ अनाथांचा नाथ । ऐकसी मात शरणागतां ।।१।।
सर्व भार माथां चालविसी त्यांचा । अनुसरलीं वाचा काया मनें ।।धृ।।
पाचारितां उभा राहासी जवळी । पाहिजे ते काळीं पुरवावें ।।२।।
चालतां ही पंथ सांभाळिसी वाटे । वारिसील कांटे खडे हातें ।।३।।
तुका म्हणे चिंता नाहीं तुझ्या दासां । तूं त्यांचा कोंवसा सर्वभावें ।।४।।

११२८
काय कीर्ती करूं लोक दंभ मान । दाखवीं चरण तुझे मज ।।१।।
मज आतां ऐसें नको करूं देवा । तुझा दास जावा वांयां विण ।।धृ।।
होइल थोरपण जाणीवेचा भार । दुरावेन दूर तुझा पायीं ।।२।।
अंतरींचा भाव काय कळे लोकां । एक मानी एकां देखोवेखीं ।।३।।
तुका म्हणे तुझे पाय आतुडती । ते मज विपत्ति गोड देवा ।।४।।

११२९
मानावया जग व्हावी द्रव्यमाया । नाहीं ते माझिया जीवा चाड ।।१।।
तुझ्या पायांसाठीं केली आराणूक । आतां कांहीं एक नको दुजें ।।धृ।।
करूनियां कृपा करीं अंगीकार । न लवीं उसीर आतां देवा ।।२।।
नव्हे साच कांहीं कळों आलें मना । म्हणोनि वासना आवरिली ।।३।।
तुका म्हणे आतां मनोरथ सिद्धी। माझे कृपानिधी पाववावे ।।४।।

११३०
आतां माझा सर्वभावें हा निर्धार । न करीं विचार आणिकांसी ।।१।।
सर्वभावें नाम गाईन आवडी । सर्व माझी जोडी पाय तुझे ।।धृ।।

लोटांगण तुझ्या घालीन अंगणीं । पाहीन भरोनि डोळे मुख ।।२।।
निर्लज्ज होऊनि नाचेन रंगणीं । येऊं नेदी मनीं शंका कांहीं ।।३।।
अंकित अंकिला दास तुझा देवा । संकल्प हा जीवा तुका म्हणे ।।४।।

११३१
जनीं जनार्दन ऐकतों हे मात । कैसा तो वृत्तांत न कळे आम्हां ।।१।।
जन्म जरा मरण कवण भोगी भोग । व्याधि नाना रोग सुखदुःखें ।।धृ।।
पापपुण्यें शुद्धाशुद्ध आचरणें । हीं कोणांकारणें कवणें केलीं ।।२।।
आम्हां मरण नाश तूं तंव अविनाश । कैसा हा विश्वास साच मानूं ।।३।।
तुका म्हणे तूं चि निवडीं हा गुढार । दाखवीं साचार तें चि मज ।।४।।

११३२
यथार्थ वाद सांडूनि उपचार । बोलती ते अघोर भोगितील ।।१।।
चोरा धरितां सांगे कुठोऱ्याचें नांव । दोघांचे ही पाव हात जाती ।।२।।
तुका म्हणे असे पुराणीं निवाड । माझी हे बडबड नव्हे कांहीं ।।३।।

११३३
धीर तो कारण साहे होतो नारायण । नेदी होऊं सीण वाहों चिंता दासांसी ।।१।।
सुखें करावें कीर्तन हर्षें गावे हरिचे गुण। वारी सुदर्शन आपण चि कळिकाळ ।।धृ।।
जीव वेची माता बाळा जडभारी होतां । तो तों नव्हे दाता प्राकृतां यां सारिखा ।।२।।
हें तों माझ्या अनुभवें अनुभवा आलें जीवें । तुका म्हणे सत्य व्हावें आहाच नये कारणा ।।३।।

११३४
पुढें आतां कैंचा जन्म । ऐसा श्रम वारेसा ।।१।।
सर्वथाही फिरों नये । ऐसी सोय लागलिया ।।धृ।।
पांडुरंगा ऐसी नाव । तारूं भाव असतां ।।२।।
तुका म्हणे चुकती बापा । पुन्हा खेपा सकळा ।।३।।

११३५

 दुद दहीं ताक पशूचें पाळण । त्यांमध्यें कारण घृतसार ।।१।।
हें चि वर्म आम्हां भाविकांचे हातीं । म्हणऊनि चित्तीं धरिला राम ।।धृ।।
लोहो कफ गारा अग्नीचिया काजें । येऱ्हवी तें ओझें कोण वाहे ।।२।।
तुका म्हणे खोरीं पाहारा जतन । जोंवरि हें धन हातीं लागे ।।३।।

११३६
 वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ।।१।।
करिती घोष जेजेकार । जळती दोषांचे डोंगर ।।धृ।।
क्षमा दया शांति । बाण अभंग ते हातीं ।।२।।
तुका म्हणें बळी । ते चि एक भूमंडळीं ।।३।।

११३७
 ऐकें रे जना तुझ्या स्वहिताच्या खुणा । पंढरीचा राणा मनामाजी स्मरावा ।।१।।
मग कैचें रे बंधन वाचे गातां नारायण। भवसिंधु तो जाण ये चि तीरी सरेल ।।धृ।।
दास्य करील कळिकाळ बंद तुटेल मायाजाळ । होतील सकळ रिद्धिसिद्धी म्हणियारीं ।।२।।
सकळशास्त्रांचें सार हें वेदांचें गव्हर । पाहातां विचार हा चि करिती पुराणें ।।३।।
ब्राम्हण क्षेत्री वैश्य शूद्र चांडाळां आहे अधिकार । बाळें नारीनर आदि करोनि वेश्या ही ।।४।।
तुका म्हणे अनुभवें आम्हीं पाडियलें ठावें । आणीक ही दैवें सुख घेती भाविकें ।।५।।

११३८
 न करीं तळमळ राहें रे निश्चळ । आहे हा कृपाळ स्वामी माझा ।।१।।
अविनाश सुख देईल निर्वाणी । चुकतील खाणी चौऱ्याशीच्या ।।धृ।।
आणिकिया जीवां होईल उद्धार । ते ही उपकार घडती कोटि ।।२।।
आहिक्य परत्रीं होसील सरता । उच्चारीं रे वाचा रामराम ।।३।।
तुका म्हणे सांडीं संसाराचा छंद । मग परमानंद पावसील ।।४।।

११३९

कां रे दास होसी संसाराचा खर । दुःखाचे डोंगर भोगावया ।।१।।
मिष्टान्नाची गोडी जिव्हेच्या अगरीं । मसक भरल्यावरी स्वाद नेणे ।।धृ।।
आणीक ही भोग आणिकां इंद्रियांचे। नाहीं ऐसे साचे जवळी कांहीं ।।२।।
रूप दृष्टि धाय पाहातां पाहातां। न घडे सर्वथा आणि तृष्णा ।।३।।
तुका म्हणे कां रे नाशिवंतासाटीं। देवासवें तुटी करितोसी ।।४।।

११४०
बैसोनि निश्चळ करीं त्याचें ध्यान । देईल तो अन्नवस्त्रदाता ।।१।।
काय आम्हां करणें अधिक सांचुनी । देव जाला ॠणी पुरविता ।।धृ।।
दयाळ मयाळ जाणे कळवळा । शरणागतां लळा राखों जाणे ।।२।।
न लगे मागणें सांगणें तयासी। जाणे इच्छा तैसी पुरवी त्याची ।।३।।
तुका म्हणे लेईं अळंकार अंगीं । विठ्ठल हा जगीं तूं चि होसी ।।४।।

११४१
सोनियांचा कळस । माजी भरिला सुरारस ।।१।।
काय करावें प्रमाण । तुम्ही सांगा संतजन ।।धृ।।
मृत्तिकेचा घट । माजी अमृताचा सांट ।।२।।
तुका म्हणे हित । तें मज सांगावें त्वरित ।।३।।

सेतावर - अभंग ३
११४२
सेत करा रे फुकाचें । नाम विठोबारायाचें ।।१।।
नाहीं वेठी जेवा सारा । जाहाती नाहीं म्हणियारा ।
सरिक नाहीं रे दुसरा । धनी सारा तुझा तूं ।।धृ।।
जपतप नांगरणी । न लगे आटी दुनवणी ।।२।।
कर्म कुळवणी ।। न लगे धर्मपाळी दोन्ही ।।३।।
ज्ञानपाभारी ती फणी । न लगे करावी पेरणी ।।४।।
बीज न लगे संचिताचें । पीक पिकलें ठायींचे ।।५।।
नाहीं यमाचें चोरटें । विठ्ठल पागोऱ्याच्या नेटें ।।६।।
पीक न वजे हा भरवसा । करी उद्वेग तो पिसा ।।७।।
सराये सर्व काळ । वांयां न वजे घटिकापळ ।।८।।
प्रेम पिकलें अपार । नाहीं सांटवावया थार ।।९।।
ऐसीये जोडी जो चुकला । तुका म्हणे धिग त्याला ।।१०।।

११४३
 वोनव्या सोंकरीं । सेत खादलें पांखरीं ।।१।।
तैसा खाऊं नको दगा । निदसुरा राहुनि जागा ।।धृ।।
चोरासवें वाट ।। चालोनि केलें तळपट ।।
२।। डोळे झांकुनि राती ।।
कूर्पी पडे दिवसा जोती ।।३।।
पोसी वांज गाय । तेथें कैची दुध साय ।।४।।
फुटकी सांगडी । तुका म्हणे न पवे थडी ।।५।।

११४४
 सेत आलें सुगी सांभाळावे चारी कोण । पिका आलें परी केलें पाहिजे जतन ।।१।।
सोंकरीं सोंकरीं विसावा तों वरा । नकोउभें आहे तों ।।धृ।।
गोफणेसी गुंडा घालीं पागोऱ्याच्या नेटें। पळती हाहाकारें अवघीं पांखरांची थाटें ।।२।।
पेटवूनि आगटी राहें जागा पालटूनि । पडिलिया मान बळ बुद्धि व्हावीं दोनी ।।३।।
खळे दानें विश्व सुखी करीं होतां रासी । सारा सारूनियां ज्याचे भाग देईं त्यासी ।।४।।
तुका म्हणे मग नाहीं आपुलें कारण । निज आलें हातां भूस सांडिलें निकण ।।५।। ।।३।।

११४५
 नका घालूं दुध जयामध्यें सार । ताकाचे उपकार तरी करा ।।१।।
नेदा तरी हें हो नका देऊं अन्न । फुकाचें जीवन तरी पाजा ।।२।।
तुका म्हणे मज सगुणाची चाड । पुरवा कोणी कोड दुर्बळाचें ।।३।।

उतराधिपदें - २२
११४६
 क्या गाऊं कोई सुननवाला । देखें तों सब जग ही भुला ।।१।।
खेलों आपणे राम इसातें । जैसी वैसी करहों मात ।।धृ।।
काहांसे ल्यावों माधर वाणी । रीझे ऐसी लोक बिराणी ।।२।।

गिरिधर लाल तो भावहि भुका । राग कला नहिं जानत तुका ।।३।।

११४७

छोडे धन मंदिर बन बसाया । मांगत टूका घरघर खाया ।।१।।
तीनसों हम करवों सलाम । ज्या मुखें बैठा राजाराम ।।धृ।।
तुलसीमाला बभूत चऱ्हावे । हरजीके गुण निर्मल गावे ।।२।।
कहे तुका जो साईं हमारा । हिरनकश्यप उन्हें मारहि डारा ।।३।।

११४८

मंत्रयंत्र नहिं मानत साखी । प्रेमभाव नहिं अंतर राखी ।।१।।
राम कहे त्याके पगहूं लागूं । देखत कपट अमिमान दुर भागूं ।।धृ।।
अधिक याती कुलहीन नहिं ज्यानु । ज्याणे नारायन सो प्राणी मानूं ।।२।।
कहे तुका जीव तन डारू वारी । राम उपासिंहु बलियारी ।।३।।

११४९

चुराचुराकर माखन खाया । गौळणीका नंद कुमर कन्हया ।।१।।
काहे बडाई दिखावत मोहि । जाणत हुं प्रभुपणा तेरा खव हि ।।धृ।।
और बात सुन उखळसुं गळा । बांधलिया आपना तूं गोपाळा ।।२।।
फेरत वनबन गाऊ धरावतें । कहे तुकयाबंधु लकरी लेले हात ।।३।।

११५०

हरिसुं मिल दे एक हि बेर । पाछे तूं फिर नावे घर ।।१।।
मात सुनो दुति आवे मनावन । जाया करति भर जोबन ।।धृ।।
हरिसुख मोहि कहिया न जाये । तव तूं बुझे आगोपाये ।।२।।
देखहि भाव कछु पकरि हात । मिलाइ तुका प्रभुसात ।।३।।

११५१

क्या कहुं नहीं बुझत लोका । लिजावे जम मारत धका ।।१।।
क्या जीवनेकी पकडी आस । हातों लिया नहिं तेरा घांस ।।धृ।।
किसे दिवाने कहता मेरा । कछु जावे तन तूं सब ल्या न्यारा ।।२।।
कहे तुका तूं भया दिवाना । आपना विचार कर ले जाना ।।३।।

११५२

कब मरूं पाऊं चरन तुम्हारे । ठाकुर मेरे जीवन प्यारे ।।१।।
जग रडे ज्याकुं सो मोहि मीठा । मीठा दर आनंदमाहि पैठा ।।धृ।।
भला पाऊं जनम ईण्हे बेर । बस मायाके असंग फेर ।।२।।
कहे तुका धन मानहि दारा । वोहिलिये गुंडलीयें पसारा ।।३।।

११५३
दासों पाछें दौरे राम । सोवे खडा आपें मुकाम ।।१।।
प्रेमरसडी बांधी गळे । खैंच चले उधर ।।धृ।।
आपणे जनसु भुल न देवे । कर हि धर आघें बाट बसावे ।।२।।
तुका प्रभु दीनदयाला। वारि रे तुज पर हुं गोपाला ।।३।।

११५४
ऐसा कर घर आवे राम । और धंदा सब छोर हि काम ।। ध्रु।।
इतन गोते काहे खाता । जब तूं आपणा भूल न होता ।।१।।
अंतरजामी जानत साचा । मनका एक उपर बाचा ।।२।।
तुकाप्रभु देसबिदेस । भरिया खाली नहिं लेस ।।३।।

११५५
मेरे रामको नाम जो लेवे बारोंबार । त्याके पाऊं मेरे तनकी पैजार ।।धृ।।
हांसत खेलत चालत बाट । खाणा खाते सोते खाट ।।१।।
जातनसुं मुजे कछु नहिं प्यार । असते की नही हेंदु धेड चंभार ।।२।।
ज्याका चित लगा मेरे रामको नाव । कहे तुका मेरा चित लगा त्याके पाव ।।३।।

११५६
आपे तरे त्याकी कोण बराई । औरनकुं भलो नाम घराई ।।धृ।।
काहे भूमि इतना भार राखे । दुभत धेनु नहिं दुध चाखे ।।१।।
बरसतें मेघ फलतेंहें बिरखा । कोन काम अपनी उन्होति रखा ।।२।।
काहे चंदा सुरज खावे फेरा । खिन एक बैठन पावत घेरा ।।३।।
काहे परिस कंचन करे धातु । नहिं मोल तुटत पावत घातु ।।४।।
कहे तुका उपकार हि काज । सब कररहिया रघुराज ।।५।।

११५७

जग चले उस घाट कोन जाय । नहिं समजत फिरफिर गोदे खाय ।।धृ।।
नहिं एकदो सकल संसार । जो बुझे सो आगला स्वार ।।१।।
उपर श्वार बैठे कृष्णांपीठ । नहिं बाचे कोइ जावे लूठ ।।२।।
देख हि डर फेर बैठा तुका । जोवत मारग राम हि एका ।।३।।

११५८
भले रे भाई जिन्हें किया चीज । आछा नहिं मिलत बीज ।।धृ।।
फीरतफीरत पाया सारा । मीटत लोले धन किनारा ।।१।।
तीरथ बरत फिर पाया जोग । नहिं तलमल तुटति भवरोग ।।२।।
कहे तुका मैं ताको दासा । नहिं सिरभार चलावे पासा ।।३।।

११५९
लाल कमलि वोढे पेनाये । मोसु हरिथें कैसें बनाये ।।धृ।।
कहे सखि तुम्हें करति सोर । हिरदा हरिका कठिन कठोर ।।१।।
नहिं क्रिया सरम कछु लाज । और सुनाउं बहुत हे भाज ।।२।।
और नामरूप नहिं गोवलिया । तुकाप्रभु माखन खाया ।।३।।

११६०
राम कहो जीवना फल सो ही । हरिभजनसुं विलंब न पाई ।।धृ।।
कवनका मंदर कवनकी झोपरी । एकारामबिन सब हि फुकरी ।।१।।
कवनकी काया कवनकी माया । एकरामबिन सब हि जाया ।।२।।
कहे तुका सब हि चेलण्हार । एकारामविन नहिं वासार ।।३।।

११६१
काहे भुला धनसंपत्तीघोर । रामराम सुन गाउ हो बाप रे ।।धृ।।
राजे लोक सब कहे तूं आपना । जब काल नहीं पाया ठाना ।।१।।
माया मिथ्या मनका सब धंदा । तजो अभिमान भजो गोविंदा ।।२।।
राना रंग डोंगरकी राई । कहे तुका करे इलाहि ।।३।।

११६२
काहे रोवे आगले मरना । गंव्हार तूं भुला आपना ।।धृ।।
केते मालुम नहिं पडे । नन्हे बडे गये सो ।।१।।
बाप भाई लेखा नहिं । पाछें तूं हि चलनार ।।२।।

काले बाल सिपत भये । खबर पकडो तुका कहे ।।३।।

११६३
क्या मेरे राम कवन सुख सारा । कहकर दे पुछूं दास तुम्हारा ।।धृ।।
तनजोबनकी कोन बराई । ब्याधपीडादि स काटहि खाई ।।१।।
कीर्त बधाऊं तों नाम न मेरा । काहे झुटा पछतऊं घेरा ।।२।।
कहे तुका नहिं समज्यात मात । तुम्हारे शरन हे जोडहि हात ।।३।।

११६४
देखत आखों झुटा कोरा । तो काहे छोरा घरंबार ।।धृ।।
मनसुं किया चाहिये पाख । उपर खाक पसारा ।।१।।
कामक्रोधसो संसार । वो सिरभार चलावे ।।२।।
कहे तुका वो संन्यास। छोडे आस तनकी हि ।।३।।

११६५
रामभजन सब सार मिठाई । हरि संताप जनमदुख राई ।।धृ।।
दुधभात घृत सकरपारे । हरते भुक नहि अंततारे ।।१।।
खावते जुग सब चलिजावे । खटमिठा फिर पचतावे ।।२।।
कहे तुका रामरस जो पावे । बहुरि फेरा वो कबहु न खावे ।।३।।

११६६
बारंबार काहे मरत अभागी । बहुरि मरन संक्या तोरेभागी ।।धृ।।
ये हि तन करते क्या ना होय । भजन भगति करे वैकुंठे जाय ।।१।।
रामनाम मोल नहिं वेचे कबरि । वो हि सब माया छुरावत झगरी ।।२।।
कहे तुका मनसुं मिल राखो । रामरस जिव्हा नित्य चाखो ।।३।।

११६७
हम दास तीन्हके सुनाहो लोकां । रावणमार विभीषण दिई लंका ।।धृ।।
गोबरधन नखपर गोकुल राखा । बर्सन लागा जब मेंहुं फत्तरका ।।१।।
वैकुंठनायक काल कौंसासुरका । दैत डुबाय सब मंगाय गोपिका ।।२।।
स्तंभ फोड पेट चिरीया कसेपका । प्रल्हाद के लियें कहे भाई तुकयाका ।।३।। ।।२२।।

।। साख्या ।। ३० ।।

११६८
तुका बस्तर बिचारा क्यों करे रे । अंतर भगवा न होय।
भीतर मैला केंव मिटे रे । मरे उपर धोय ।।१।।

११६९
रामराम कहे रे मन । औरसुं नहिं काज ।
बहुत उतारे पार । आघे राख तुकाकी लाज ।।१।।

११७०
लोभीकें चित धन बैठे । कामीन चित्त काम ।
माताके चित पुत बैठें । तुकाके मन राम ।।१।।

११७१
तुका पंखिबहिरन मानुं । बोई जनावर बाग ।
असंतनकुं संत न मानूं । जे वर्मकुं दाग ।।१।।

११७२
तुका राम बहुत मिठा रे । भर राखूं शरीर ।
तनकी करूं नावरि । उतारूं पैल तीर ।।१।।

११७३
संतन पन्हयां लें खडा । राहूं ठाकुरद्वार ।
चलत पाछेंहुं फिरों । रज उडत लेऊं सीर ।।१।।

११७४
तुकाप्रभु बडो न मनूं न मानूं बडो । जिसपास बहु दाम ।
बलिहारि उस मुखकी । जीसेती निकसे राम ।।१।।

११७५
राम कहे सो मुख भलारे । खाये खीर खांड ।
हरिबिन मुखमो धूल परी रे । क्या जनि उस रांड ।।१।।

११७६
राम कहे सो मुख भला रे । बिन रामसें बीख ।
आव न जानूं रमते बेरों । जब काल लगावे सीख ।।१।।

११७७
कहे तुका में सवदा बेचूं । लेवेके तन हार ।
मिठा साधुसंतजन रे । मुरुखके सिर मार ।।१।।

११७८
तुका दास तिनका रे । रामभजन निरास ।
क्या बिचारे पंडित करो रे । हात पसारे आस ।।१।।

११७९
तुका प्रीत रामसुं । तैसी मिठी राख ।
पतंग जाय दीप परे रे । करे तनकी खाक ।।१।।

११८०
कहे तुका जग भुला रे । कह्या न मानत कोय ।
हात परे जब कालके । मारत फोरत डोय ।।१।।

११८१
तुका सुरा नहि सबदका रे । जब कमाइ न होये ।
चोट साहे घनकि रे । हिरा नीबरे तोये ।।१।।

११८२
तुका सुरा बहुत कहावे । लडत विरला कोये ।
एक पावे उंच पदवी । एक खौंसां जोये ।।१।।

११८३
तुका माऱ्या पेटका । और न जाने कोये ।
जपता कछु रामनाम । हरिभगतनकी सोये ।।१।।

११८४
काफर सोही आपण बुझे । आला दुनियां भर ।
कहे तुका तुम्हें सुनो रे भाई । हिरिदा जिन्होका कठोर ।।१।।

११८५
भीस्त न पावे मालथी । पढीया लोक रिझाये ।
निचा जथें कमतरिण । सो ही सो फल खाये ।।१।।

११८६
फल पाया तो खुस भया । किन्होसुं न करे बाद ।
बान न देखे मिरगा रे । चित्त मिलाया नाद ।।१।।

११८७
तुका दास रामका । मनमे एक हि भाव ।
तो न पालटू आव । ये हि तन जाव ।।१।।

११८८
तुका रामसुं चित बांध राखूं । तैसा आपनी हात ।
धेनु बछरा छोर जावे । प्रेम न छुटे सात ।।१।।

११८९
चितसुं चित जब मिले । तब तनु थंडा होये ।
तुका मिलनां जिन्होसुं । ऐसा विरला कोये ।।१।।

११९०
चित मिले तो सब मिले । नहिं तो फुकट संग ।
पानी पाथर येक ही ठोर । कोरनभिगे अंग ।।१।।

११९१
तुका संगत तीन्हसें कहिये । जिनथें सुख दुनाये ।
दुर्जन तेरा मू काला । थीतो प्रेम घटाये ।।१।।

११९२

तुका मिलना तो भला । मनसुं मन मिल जाय ।
उपर उपर माटि घसनी । उनकि कोन बराई ।।१।।

११९३
तुका कुटुंब छोरे रे । लरके जोरों सिर गुंदाय ।
जबथे इच्छा नहिं मुई । तब तूं किया काय ।।१।।

११९४
तुका इच्छा मीटइ तो । काहा करे चट खाक ।
मथीया गोला डारदिया तो । नहिं मिले फेरन ताक ।।१।।

११९५
ब्रीद मेरे साइंयाके । तुका चलावे पास ।
सुरा सो हि लरे हमसें । छोरे तनकी आस ।।१।।

११९६
कहे तुका भला भया । हुं हुवा संतनका दास ।
क्या जानूं केते मरता । जो न मिटती मनकी आस ।।१।।

११९७
तुका और मिठाई क्या करूं रे । पाले विकारपिंड ।
राम कहावे सो भली रुखी । माखन खांडखीर ।।१।।
।।३०।।

११९८
म्हणसी नाहीं रे संचित । न करीं न करीं ऐसी मात ।।१।।
लाहो घेईं हरिनामाचा । जन्म जाऊं नेदीं साचा ।।धृ।।
गळां पडेल यमफांसी । मग कैंचा हरि म्हणसी ।।२।।
पुरलासाटीं देहाडा। ऐसें न म्हणें न म्हणें मूढा ।।३।।
नरदेह दुबळा । ऐसें न म्हणें रे चांडाळा ।।४।।
तुका म्हणे सांगों किती । सेको तोंडीं पडेल माती ।।५।।

११९९

संतांचा महिमा तो बहु दुर्गम । शाब्दिकांचे काम नाहीं येथें ।।१।।
बहु धड जरी जाली म्हैस गाय । तरी होईल काय कामधेनु ।।२।।
तुका म्हणे अंगें व्हावें तें आपण । तरी च महिमान येईल कळों ।।३।।

१२००

नाहीं संतपण मिळतें हें हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ।।१।।
नये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ।।१।।
तुका म्हणे मिळे जिवाचिये साटीं । नाहीं तरी गोष्टी बोलों नये ।।३।।

१२०१
नामाची आवडी तो चि जाणा देव । न धरीं संदेह कांहीं मनीं ।।१।।
ऐसें मी हें नाहीं बोलत नेणतां । आनुनि संमता संतांचिया ।।धृ।।
नाम म्हणे तया आणीक साधन । ऐसें हें वचन बोलों नये ।।२।।
तुका म्हणे सुख पावे या वचनीं । ज्याचीं शुद्ध दोन्ही मायबापें ।।३।।

१२०२
सुखें होतो कोठें घेतली सुती । बांधविला गळा आपुले हातीं ।।१।।
काय करूं बहु गुंतलों आतां । नये सरतां मागें पुढें ।।धृ।।
होतें गांठी तें सरलें येतां । आणीक माथां रीण जालें ।।२।।
सोंकरिलियाविण गमाविलें पिक । रांडापोरें भिके लावियेलीं ।।३।।
बहुतांचीं बहु घेतलीं घरें । न पडे पुरें कांहीं केल्या ।।४।।
तुका म्हणे कांहीं न धरावी आस । जावें हें सर्वस्व टाकोनियां ।।५।।

१२०३
न मनावें तैसें गुरूचें वचन । जेणें नारायण अंतरे तें।
आड आला म्हून फोडियेला डोळा । बळिनें आंधळा शुक्र केला ।।१।।
करी देव तरी काय नव्हे एक । कां तुम्ही पृथक सिणा वांयां ।।धृ।।
उलंघुनि भ्रताराची आज्ञा । अन्न ॠषिपत्न्या घेउनि गेल्या ।
अवघे चि त्यांचें देवें केलें काज । धर्म आणि लाज राखियेली ।।२।।
पितियासी पुत्रें केला वैराकार । प्रल्हादें असुर मारविला ।
बहुत विघ्नें केलीं तया आड । परि नाहीं कैवाड सांडियेला ।।३।।
गौळणी करिती देवाशीं व्यभिचार । सांडुनी आचार भ्रष्ट होती ।

तयां दिलें ते कोणासी नाहीं । अवघा अंतर्बाहीं तो चि जाला ।।४।।
देव जोडे ते करावे अधर्म । अंतरे तें कर्म नाचरावें ।
 तुका म्हणे हा जाणतो कळवळा । म्हणोनि अजामेळा उद्धरिलें।।५।।

१२०४
अरे गिळिले हो संसारें । कांहीं तरि राखा खरें । दिला करुणाकरें ।
मनुष्यदेह सत्संग ।।१।।
येथें न घलीं न घलीं आड । संचितसा शब्द नाड । उठाउठीं गोड । बीजें
बीज वाढवा ।।धृ।।
केलें ते क्रियमाण । जालें तें संचित म्हण । प्रारब्ध जाण । उरवरित उरले तें
।।२।।
चित्त खोटें चालीवरि । रोग भोगाचे अंतरीं। रसने अनावरी । तुका म्हणे ढुंग
वाहे ।।३।।

१२०५
अग्न तापलिया काया चि होमे । तापत्रयें संतप्त होती । संचित क्रियमाण
प्रारब्ध तेथें ।
न चुके संसारस्थिति । राहाटघटिका जैसी फिरतां चि राहिली । भरली
जाती एके रितीं ।
साधीं हा प्रपंच पंचाय अग्न । तेणें पावसील निजशांती रे ।।१।।
नारायणनाम नारायणनाम । नित्य करीं काम जिव्हामुखें ।
 जन्मजराव्याधि पापपुण्य तेथें । नासती सकळ ही दुःखें ।।धृ।।
शीत उष्ण वन सेवितां कपाट । आसनसमाधी साधीं । तप तीर्थ दान व्रत
आचरण।
यज्ञ नाना मन बुद्धी । भोगाभोग तेथें न चुकती प्रकार जन्मजरादुःखव्याधि।
 साहोनि काम क्रोध अहंकार । आश्रमीं अविनाश साधीं ।।२।।
घोकितां अक्षर अभिमानविधि । निषेध लागला पाठी । वाद करितां निंदा
घडती दोष होय वज्रलेपो भविष्यति ।
दूषणाचें मूळ भूषण तुका म्हणे । सांडीं मिथ्या खंती । रिघोनि संतां शरण
सर्वभावें । राहें भलतिया स्थिती ।।३।।

१२०६
नव्हे गुरुदास्य संसारियां । वैराग्य तरी भेणें कांपे विषयां । तैसें नाम

पंढरीराया । जया सायास न लगती ।।१।।
म्हणोनि गोड सर्वभावें । आंघोळी न लगे तोंड धुवावें । अर्थचाड जीवें । न लगे भ्यावें संसारा ।।धृ।।
कर्मा तंव न पुरे संसारिक । धर्म तंव फळदायक । नाम विठ्ठलाचें एक । नाशी दुःख भवाचें ।।२।।
न लगे सांडणें मांडणें । आगमनिगमाचें देखणें । अवघें तुका म्हणे। विठ्ठलनामें आटलें ।।३।।

१२०७
नये इच्छूं सेवा स्वइच्छा जगाची । अवज्ञा देवाची घडे तेणें ।।१।।
देहाचा निग्रही त्याचें तो सांभाळी । मग नये कळि अंगावरी ।।धृ।।
आपलिया इच्छा माता सेवा करी । न बाधी ते थोरी येणें क्षोभें ।।२।।
तुका म्हणे सांडा देखीचे दिमाख । मोडसीचें दुःख गांड फाडी ।।३।।

१२०८
सत्य सत्यें देतें फळ । नाहीं लागत चि बळ ।।१।।
ध्यावे देवाचे ते पाय । धीर सकळ उपाय ।।धृ।।
करावी च चिंता। नाहीं लागती तत्वता ।।२।।
तुका म्हणे भावें । शरण म्हणवितां बरवें ।।३।।

१२०९
साधक जाले कळी । गुरुगुडीची लांब नळी ।।१।।
पचीं पडे मद्यपान । भांगभुर्का हें साधन ।।धृ।।
अभेदाचें पाठांतर । अति विषयीं पडिभर ।।२।।
चेल्यांचा सुकाळ । पिंड दंड भंगपाळ ।।३।।
सेवा मानधन । बरे इच्छेनें संपन्न ।।४।।
सोंगाच्या नरकाडी । तुका बोडोनियां सोडी ।।५।।

१२१०
मज पाहातां हें लटिकें सकळ । कोठें मायाजाळ दावीं देवा ।।१।।
कोणाचा कोणासीं न धरे संबंध । आहे शुद्धबुद्ध ठायींचे ठायीं ।।धृ।।
काढा काढा जी मोह बुंथा जाळ । नका लावूं बळें वेड आम्हां ।।२।।
जीव शिव कां ठेवियेली नांवें । सत्य तुम्हां ठावें असोनियां ।।३।।

सेवेच्या अभिळासें न धरा चि विचार । आम्हां दारोदार हिंडविलें ।।४।।
आहे तैसें आतां कळलियावरी । परतें सांडा दुरी दुजेपण ।।५।।
तुका म्हणे काय छायेचा अभिलाष। हंस पावे नाश तारागणीं ।।६।।

१२११
पंचभूतांचा गोंधळ । केला एकेठायीं मेळ । लाविला सबळ । अहंकार त्यापाठीं ।।१।।
तेथें काय मी तें माझें । कोण वागवी हें ओझें । देहा केवीं रिझे । हें काळाचें भातुकें ।।धृ।।
जीव न देखे मरण । धरी नवी सांडी जीर्ण । संचित प्रमाण । भोगा शुभा अशुभा ।।२।।
इच्छा वाढवी ते वेल । खुंटावा तो खरा बोल । तुका म्हणे मोल । झाकलें तें पावेल ।।३।।

१२१२
पुसावेंसें हें चि वाटे । जें जें भेटे तयासी ।।१।।
देव कृपा करील मज । काय लाज राखील ।।धृ।।
अवघियांचा विसर जाला। हा राहिला उदेग ।।२।।
तुका म्हणे चिंता वाटे । कोण भेटे सांगेसें।।३।।

१२१३
जाळा तुम्ही माझें जाणतें मीपण । येणें माझा खुण मांडियेला ।।१।।
खादलें पचे तरि च तें हित । ओकलिया थीत पिंड पीडी ।।धृ।।
तरि भलें भोगे जोडिलें तें धन । पडिलिया खानें जीवनासी ।।२।।
तुका म्हणे मज तारीं गा विठ्ठला । नेणतां चि भला दास तुझा ।।३।।

१२१४
याती मतिहीन रूपें लीन दीन । आणीक अवगुण जाणोनियां ।।१।।
केला त्या विठ्ठलें माझा अंगीकार । ऐसा हा विचार जाणोनियां ।।धृ।।
जें कांहीं करितों तें माझे स्वहित । आली हे प्रचित कळों चित्ता ।।२।।
जालें सुख जीवा आनंद अपार । परमानंदें भार घेतला माझा ।।३।।
तुका म्हणे यासी नांवाचा अभिमान। म्हणोनि शरण तारी बळें ।।४।।

१२१५
बहु उतावीळ भक्तीचिया काजा । होसी केशीराजा मायबापा ।।१।।
तुझ्या पायीं मज जालासे विश्वास । म्हणोनियां आस मोकलिली ।।धृ।।
ऋषि मुनि सिद्ध साधक अपार । कळला विचार त्यांसी तुझा ।।२।।
नाहीं नास तें सुख दिलें तयांस । जाले जे उदास सर्वभावें ।।३।।
तुका म्हणे सुख न माये मानसीं । धरिले जीवेंसी पाय तुझे ।।४।।

१२१६
माया मोहोजाळीं होतों सांपडलों । परि या विठ्ठला कृपा आली ।।१।।
काढूनि बाहेरि ठेविलों निराळा । कवतुक डोळां दाखविलें ।।धृ।।
नाचे उडे माया करी कवतुक । नासिवंत सुखें साच केलीं ।।२।।
रडे कांुफ्दे दुःखें कुटितील माथा । एकासी रडतां तें ही मरे ।।३।।
तुका म्हणे मज वाटतें नवल । मी माझे बोल ऐकोनियां ।।४।।

१२१७
देहभाव आम्ही राहिलों ठेवूनि । निवांत चरणीं विठोबाच्या ।।१।।
आमुच्या हिताचा जाणोनि उपाव । तो चि पुढें देव करीतसे ।।धृ।।
म्हणउनी नाहीं सुख दुःख मनीं । ऐकिलिया कानीं वचनाचें ।।२।।
जालों मी निःसंग निवांत एकला । भार त्या विठ्ठला घालूनियां ।।३।।
तुका म्हणे जालों जयाचे अंकित । तो चि माझें हित सर्व जाणे ।।४।।

१२१८
आलें फळ तेव्हां राहिलें पिकोन । जरी तें जतन होय देंठीं ।।१।।
नामें चि सिद्धि नामें चि सिद्धि । व्यभिचारबुद्धि न पवतां ।।धृ।।
चालिला पंथ तो पावईल ठाया । जरि आड तया नये कांहीं ।।२।।
तुका म्हणे मध्यें पडती आघात । तेणें होय घात हाणी लाभ ।।३।।

१२१९
निरोधाचें मज न साहे वचन । बहु होतें मन कासावीस ।।१।।
म्हणऊनि जीवा न साहे संगति । बैसतां एकांतीं गोड वाटे ।।धृ।।
देहाची भावना वासनेचा संग । नावडे उबग आला यांचा ।।२।।
तुका म्हणे देव अंतरे ज्यामुळें । आशामोहोजाळें दुःख वाढे ।।३।।

१२२०
तुजशीं संबंध चि खोटा । परता परता रे थोंटा ।।१।।
देवा तुझें काय घ्यावें । आप आपणां ठकावें ।।धृ।।
जेथें मुदल न ये हातां । व्याज मरावें लेखितां ।।२।।
तुका म्हणे ऐसा । त्रिभुवनीं तुझा ठसा ।।३।।

१२२१
या चि हाका तुझे द्वारीं । सदा देखों रिणकरी ।।१।।
सदा करिसी खंड दंड । देवा बहु गा तूं लंड ।।धृ।।
सुखें गोविसी भोजना । लपवूनियां आपणां ।।२।।
एकें एक बुझाविसी । तुका म्हणे ठक होसी ।।३।।

१२२२
आम्ही जाणों तुझा भाव । दृढ धरियेले पाव ।।१।।
फांकुं नेदूं चुकावितां । नेघों थोडें बहु देतां ।।धृ।।
बहुता दिसाचें लिगाड । आलें होत होत जड ।।२।।
तुका म्हणे आतां । नेघें सर्वस्व ही देतां ।।३।।

१२२३
रिण वैर हत्या । हें तों न सुटे नेंदितां ।।१।।
हें कां नेणां पांडुरंगा । तुम्ही सांगतसां जगा ।।धृ।।
माझा संबंध तो किती। चुकवा लोकाची फजिती ।।२।।
तुका म्हणे या चि साठीं । मज न घेतां नये तुटी ।।३।।

१२२४
नाहीं मागितला । तुम्हां मान म्यां विठ्ठला ।।१।।
जे हे करविली फजिती । माझी एवढी जना हातीं ।।धृ।।
नाहीं केला पोट । पुढें घालूनि बोभाट ।।२।।
तुका म्हणे धरूनि हात । नाहीं नेले दिवानांत ।।३।।

१२२५
तूं पांढरा स्पटिक मणी । करिसी आणिकां त्याहुनि ।।१।।
म्हणोनि तुझ्या दारा । न येत ठकती दातारा ।।धृ।।

तुझी ठावी नांदनूक । अवघा बुडविला लोक ।।२।।
तुका म्हणे ज्याचें घेसी । त्यास हें चि दाखविसी ।।३।।

१२२६
बोलतों निकुरें । नव्हेत सलगीचीं उत्तरें ।।१।।
माझे संतापलें मन । परपीडा ऐकोन ।।धृ।।
अंगावरि आलें । तोंवरि जाईल सोसिलें ।।२।।
तुज भक्तांची आण देवा । जरि तुका येथें ठेवा ।।३।।

१२२७
बुद्धीचा जनिता लक्ष्मीचा पति । आठवितां चित्तीं काय नव्हे ।।१।।
आणिकां उपायां कोण वांटी मन । सुखाचें निधान पांडुरंग ।।धृ।।
गीत गावों नाचों छंदें वावों टाळी । वैष्णवांचे मेळीं सुखरूप ।।२।।
अनंत ब्रम्हांडें एके रोमावळी । आम्ही केला भोळीं भावें उभा ।।३।।
लडिका हा केला संवसारसिंधु ।। मोक्ष खरा बंधु नाहीं पुढें ।।४।।
तुका म्हणे ज्याच्या नामाचे अंकित । राहिलों निश्चिंत त्याच्या बळें ।।५।।

१२२८
न लगे मायेसी बाळें निरवावें । आपुल्या स्वभावें ओढे त्यासी ।।१।।
मज कां लागला करणें विचार । ज्याचा जार भार त्याचे मायां ।।धृ।।
गोड धड त्यासी ठेवी न मगतां । समाधान खातां नेदी मना ।।२।।
खेळतां गुंतलें उमगूनी आणी । बैसोनियां स्तनीं लावी बळें ।।३।।
त्याच्या दुःखेंपणें आपण खापरीं । लाही तळीं वरी होय जैसी ।।४।।
तुका म्हणे देह विसरे आपुला । आघात तो त्याला लागों नेदी ।।५।।

१२२९
ब्राम्हण तो नव्हे ऐसी ज्यासी बुद्धि । पाहा श्रुतीमधीं विचारूनि ।।१।।
जयासी नावडे हरिनामकीर्तन । आणीक नृत्य न वैष्णवांचें ।।धृ।।
सत्य त्याचे वेळे घडला व्यभिचार । मातेसी वेव्हार अंत्यजाचा ।।२।।
तुका म्हणे येथें मानी आनसारिखें । तात्काळ तो मुखें कुष्ट होय ।।३।।

१२३०
ब्राम्हण तो याती अंतेज असतां । मानावा तत्वता निश्चयेसी ।।१।।

रामकृष्णें नाम उच्चारी सरळें । आठवी सांवळें रूप मनीं ।।धृ।।
शांति क्षमा दया अलंकार अंगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ।।२।।
तुका म्हणे गेल्या शडऊर्मी अंगें । सांडुनियां मग ब्रम्हं चि तो ।।३।।

१२३१
एक करिती गुरु गुरु । भोंवता भारु शिष्यांचा ।।१।।
पुंस नाहीं पाय चारी । मनुष्य परी कुतरीं तीं ।।धृ।।
परस्त्री मद्यपान। पेंडखान माजविलें ।।२।।
तुका म्हणे निर्भर चित्तीं । अधोगती जावया ।।३।।

१२३२
एका पुरुषा दोघी नारी । पाप वसे त्याचे घरीं ।।१।।
पाप न लगे धुंडावें । लागेल तेणें तेथें जावें ।।धृ।।
कांहीं दुसरा विचार । न लगे करावा चि फार ।।२।।
असत्य जे वाणी । तेथें पापाची च खाणी ।।३।।
सत्य बोले मुखें । तेथें उचंबळती सुखें ।।४।।
तुका म्हणे दोन्ही । जवळी च लाभहानी ।।५।।

१२३३
जळातें संचित । ऐसी आहे धर्म नीत ।।१।।
माझ्या विठोबाचे पाय । वेळोवेळां मनीं ध्याय ।।धृ।।
नेदी कर्म घडों । कोठें आडराणें पडों ।।२।।
तुका म्हणे मळ । राहों नेदी ताप जाळ ।।३।।

१२३४
संतापाशीं बहु असावें मर्यादा । फलकटाचा धंदा उर फोडी ।।१।।
वासर तो भुंके गाढवाचेपरी । उडे पाठीवरि दंड तेणें ।।धृ।।
समय नेणें तें वेडें चाहाटळ । अवगुणाचा ओंगळ मान पावे ।।२।।
तुका म्हणे काय वांयां चाळवणी । पिटपिटघाणी हागवणेची ।।३।।

१२३५
घेसी तरी घेईं संताची भेटी । आणीक ते गोष्टी नको मना ।।१।।
सर्वभावें त्यांचें देव भांडवल । आणीक ते बोल न बोलती ।।धृ।।

करिसील तो करीं संतांचा सांगत । आणीक ते मात नको मना ।।२।।
बैससी तरी बैस संतां च मधीं । आणीक ते बुद्धि नको मना ।।३।।
जासी तरि जाईं संतांचिया गांवां । होईल विसावा तेथें मना ।।४।।
तुका म्हणे संत सुखाचे सागर । मना निरंतर धणी घेईं ।।५।।

१२३६
संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ।।१।।
तेथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक ते चि मज ।।धृ।।
संतांचिये गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ।।२।।
संतांचे भोजन अमृताचे पान । करिती कीर्तन सर्वकाळ ।।३।।
संतांचा उदीम उपदेशाची पेठ । प्रेमसुख साटीं घेती देती ।।४।।
तुका म्हणे तेथें आणिक नाहीं परी । म्हणोनि भिकारी जालों त्यांचा ।।५।।

१२३७
संतांचें सुख जालें या देवा । म्हणऊनि सेवा करी त्यांची ।।१।।
तेथें माझा काय कोण तो विचार । वर्णावया पार महिमा त्यांचा ।।धृ।।
निर्गुण आकार जाला गुणवंत । घाली दंडवत पूजोनियां ।।२।।
तीर्थें त्यांची इच्छा करिती नित्यकाळ । व्हावया निर्मळ आपणांसी ।।३।।
अष्टमा सिद्धींचा कोण आला पाड । वागों नेदी आड कोणी तया ।।४।।
तुका म्हणे ते बळिया शिरोमणी । राहिलों चरणीं निकटवासें ।।५।।

१२३८
जो मानी तो देईल काई । न मनी तो नेईल काई ।।१।।
आम्हां विठ्ठल सर्वभूतीं । राहो चित्तीं भलतैसा ।।धृ।।
आध्येन तें जना काई । जल्पें वांयांविण ठायीं ।।२।।
वंदी निंदी तुज तो गा। तुका म्हणे पांडुरंगा ।।३।।

१२३९
भावबळें कैसा जालासी लाहान । मागें संतीं ध्यान वर्णियेलें ।।१।।
तें मज उचित करूनियां देवा । दाखवीं केशवा मायबापा ।।धृ।।
पाहोनियां डोळां बोलेन मी गोष्टी । आळंगुनि मिठी देइन पांयीं ।।२।।
चरणीं दृष्टि उभा राहेन समोर । जोडोनियां कर पुढें दोन्ही ।।३।।
तुका म्हणे उत्कंठित वासना । पुरवीं नारायणा आर्त माझें ।।४।।

१२४०
कृपाळु म्हणोनि बोलती पुराणें । निर्धार वचनें यांचीं मज ।।१।।
आणीक उपाय नेणें मी कांहीं । तुझें वर्म ठायीं पडे तैसें ।।धृ।।
नये धड कांहीं बोलतां वचन । रिघालों शरण सर्वभावें ।।२।।
कृपा करिसी तरि थोडें तुज काम । माझा तरि श्रम बहु हरे ।।३।।
तुका म्हणे मज दाखवीं श्रीमुख । हरेल या भूक डोळियांची ।।४।।

१२४१
सर्वभावें आलों तुज चि शरण । कायावाचामनेंसहित देवा ।।१।।
आणीक दुसरें नये माझ्या मना । राहिली वासना तुझ्या पायीं ।।धृ।।
माझिये वारचें कांहीं जडभारी । तुजविण वारी कोण एक ।।३।।
तुझे आम्ही दास आमुचा तूं ॠणी । चालत दूरूनी आलें मागें ।।३।।
तुका म्हणे आतां घेतलें धरणें । हिशोबाकारणें भेटी देईं ।।४।।

१२४२. कईं मात माझे ऐकती कान । बोलतां वचन संतां मुखीं ।।१।।
केला पांडूरंगें तुझा अंगीकार । मग होइल धीर माझ्या जीवा ।।धृ।।
म्हणऊनि मुख अवलोकितों पाय । हे चि मज आहे थोरी आशा ।।२।।
माझिया मनाचा हा चि विश्वास । न करीं सायास साधनांचे ।।३।।
तुका म्हणे मज होईल भरवसा । तरलों मी ऐसा साच भाव ।।४।।

१२४३
दोन्ही हात ठेवुनि कटीं । उभा भीवरेच्या तटीं । कष्टलासी साटीं । भक्तिकाजें विठ्ठला ।।१।।
भागलासी मायबापा । बहु श्रम केल्या खेपा । आम्हालागीं सोपा । दैत्या काळ कृतांत ।।धृ।।
होतासी क्षीरसागरीं । मही दाटली असुरीं । म्हणोनियां घरीं। गौळियांचे अवतार ।।२।।
केला पुंडलिकें गोवा । तुज पंढरीसि देवा। तुका म्हणे भावा । साटीं हातीं सांपडसी ।।३।।

१२४४
गोड जालें पोट धालें । अवचित वाचे आलें । म्हणतां पाप गेलें । विठ्ठलसें

वाचेसी ।।१।।
सत्य माना रे सकळ । उद्धरिला अजामेळ । पातकी चांडाळ । नामासाटीं आपुलिया ।।धृ।।
चित्त पावलें आनंदा । सुखसमाधीतें सदा । म्हणतां गोविंदा । वेळोवेळां वाचेसी ।।२।।
हें जाणती अनुभवी । जया चाड तो चोजवी । तुका म्हणे दावी । रूप तें चि अरूपा ।।३।।

१२४५
आंत हरि बाहेर हरि । हरिनें घरीं कोंडिलें ।।१।।
हरिनें कामा घातला चिरा । वित्तवरा मुकविलें ।।धृ।।
हरिने जीवें केली साटी । पाडिली तुटी सकळांसी ।।२।।
तुका म्हणे वेगळा नव्हे । हरि भोवे भोंवताला ।।३।।

१२४६
हरिनें माझें हरिलें चित्त । भार वित्त विसरलें ।।१।।
आतां कैसी जाऊं घरा । नव्हे बरा लौकिक ।।धृ।।
पारखियांसी सांगतां गोटी । घरची कुटी खातील ।।२।।
तुका म्हणे निवांत राहीं। पाहिलें पाहीं धणीवरि ।।३।।

।। भुपाळ्या ।। अभंग ।। ८ ।।
१२४७
बोलोनि दाऊं कां तुम्ही नेणा जी देवा । ठेवाल तें ठेवा ठायीं तैसा राहेन ।।१।।
पांगुळलें मन कांहीं नाठवे उपाय । म्हणऊनि पाय जीवीं धरूनि राहिलों ।।धृ।।
त्यागें भोगें दुःख काय सांडावें मांडावें । ऐसी धरियेली जीवें माझ्या थोरी आशंका ।।२।।
तुका म्हणे माते बाळा चुकलिया वनीं । न पवतां जननी दुःख पावे विठ्ठले ।।३।।

१२४८
ऐसी वाट पाहे कांहीं निरोप कां मूळ । कां हे कळवळ तुज उमटे चि ना

।।१।।
आवो पांडुरंगे पंढरीचे निवासे । लावूनियां आस चाळवूनी ठेविलें ।।धृ।।
काय जन्मा येवूनियां केली म्यां जोडी। ऐसें घडीघडी चित्तां येतें आठवूं
।।२।।
तुका म्हणे खरा न पवे चि विभाग । धिकारितें जग हें चि लाहों हिशोबें
।।३।।

१२४९
कां गा किविलवाणा केलों दीनाचा दीन । काय तुझी हीन शक्ति जालीसी
दिसे ।।१।।
लाज येते मना तुझा म्हणवितां दास । गोडी नाहीं रस बोलिली यासारिखी
।।धृ।।
लाजविलीं मागें संतांची हीं उत्तरें । कळों येतें खरें दुजें एकावरूनि ।।२।।
तुका म्हणे माझी कोणें वदविली वाणी । प्रसादावांचूनि तुमचिया विठ्ठला
।।३।।

१२५०
जळो माझें कर्म वायां केली कटकट । जालें तैसें तंट नाहीं आलें अनुभवा
।।१।।
आता पुढें धीर काय देऊं या मना। ऐसें नारायणा प्रेरिलें तें पाहिजे ।।धृ।।
गुणवंत केलों दोष जाणायासाठीं। माझें माझें पोटीं बळकट दूषण ।।२।।
तुका म्हणे अहो केशीराजा दयाळा । बरवा हा लळा पाळियेला शेवटीं ।।३।।

१२५१
कामें नेलें चित्त नेदी अवलोकुं मुख । बहु वाटे दुःख फुटों पाहे हृदय ।।१।।
कां जी सासुरवासी मज केलें भगवंता । आपुलिया सत्ता स्वाधीनता ते नाहीं
।।धृ।।
प्रभातेसि वाटे तुमच्या यावें दर्शना । येथें न चले चोरी उरली राहे वासना
।।२।।
येथें अवघे वांयां गेले दिसती सायास । तुका म्हणे नास दिसे जाल्या वेचाचा
।।३।।

१२५२

जळोत तीं येथें उपजविती अंतराय । सायासाची जोडी माझी तुमचे पाय ।।१।।
आतां मज साहे येथें करावें देवा । तुझी घेईं सेवा सकळ गोवा उगवूनि ।।धृ।।
भोगें रोगा जोडोनियां दिलें आणीकां । अरुचि ते हो कां आतां सकळांपासूनि ।।२।।
तुका म्हणे असो तुझें तुझे मस्तकीं । नाहीं ये लौकिकीं आतां मज वर्तनें ।।३।।

१२५३
न संगतां तुम्हां कळों येतें अंतर । विश्वीं विश्वंभर परिहार चि न लगे ।।१।।
परि हे अनावर आवरितां आवडी । अवसान ते घडी पुरों देत नाहीं ।।धृ।।
काय उणें मज येथें ठेविलिये ठायीं । पोटा आलों तईंपासूनिया समर्थ ।।२।।
तुका म्हणे अवघी आवरिली वासना । आतां नारायणा दुसरियापासूनि ।।३।।

१२५४
तुजसवें आम्हीं अनुसरलों अबळा । नको अंगीं कळा राहों हरी हीन देऊं ।।१।।
सासुरवासा भीतों जीव ओढे तुजपाशीं । आतां दोहींविशीं लज्जा राखें आमुची ।।धृ।।
न कळतां संग जाला सहज खेळतां । प्रवर्तली चिंता मागिलांचियावरि ।।२।।
तुका म्हणे असतां जैसें तैसें बरवें । वचन या भावें वेचुनियां विनटलों ।३।। ।।८।।

१२५५
रवि दीप हीरा दाविती देखणे । अदृश्य दर्षने संतांचे नी ।।१।।
त्यांचा महिमा काय वर्णूं मी पामर । न कळे तो साचार ब्रम्हादिकां ।।धृ।।
तापली चंदन निववितो कुडी । त्रिगुण तो काढी संतसंग ।।२।।
मायबापें पिंड पाळीला माया । जन्ममरण जाया संतसंग ।।३।।
संतांचें वचन वारी जन्मदुःख । मिष्टान्न तें भूकनिवारण ।।४।।
तुका म्हणे जवळी न पाचारितां जावें । संतचरणीं भावें रिघावया ।।५।।

१२५६

हरि हरि तुम्हीं म्हणा रे सकळ । तेणें मायाजाळ तुटईल ।।१।।
आणिका नका कांहीं गाबाळाचे भरी । पडों येथें थोरी नागवण ।।धृ।।
भावें तुळसीदळ पाणी जोडा हात । म्हणावा पतित वेळोवेळां ।।२।।
तुका म्हणे ही तंव कृपेचा सागर । नामासाटीं पार पाववील ।।३।।

१२५७
ऐसे कुळीं पुत्र होती । बुडविती पूर्वजा ।।१।।
चाहाडी चोरी भांडवला । वांटा आला भागासी ।।धृ।।
त्याचियानें दुःखी मही । भार तेही न साहे ।।२।।
तुका म्हणे ग्रामपशु । केला नाशु अयुषा ।।३।।

१२५८
गांठोळीस धन भाकावी करुणा । दावूनि सज्जना कींव पीडी ।।१।।
नाठेळाची भक्ति कुचराचें बळ । कोरडें वोंगळ मार खाय ।।धृ।।
सांडोव्यासी घाली देवाची करंडी । विल्हाळ त्या धोंडी पूजा दावी ।।२।।
तुका म्हणे ऐसे माकडाचे छंद । अवघे धंदधंद सिंदळीचे ।।३।।

१२५९
कैसें असोनि ठाउकें नेणां । दुःख पावाल पुढिले पेणा ।।१।।
आतां जागें रे भाई जागें रे । चोर निजल्या नाडूनि भागे रे ।।धृ।।
आतां नका रे भाई नका रे । आहे गांठीं तें लुटवूं लोकां रे ।।२।।
तुका म्हणे एकांच्या घायें । कां रे जाणोनि न धरा भये ।।३।।

१२६०
मुदल जतन जालें । मग लाभाचें काय आलें ।।१।।
घरीं देउनि अंतर गांठी । राख्या पारिख्यां न सुटे मिठी ।।धृ।।
घाला पडे थोडें च वाटे । काम मैंदाचें च पेटे ।।२।।
तुका म्हणे वरदळ खोटें । फांसे अंतरिंच्या कपटें ।।३।।

१२६१
मज अंगाच्या अनुभवें । काई वाईट बरें ठावें ।।१।।
जालों दोहींचा देखणा । नये मागें पुढें ही मना ।।धृ।।
वोस वसती ठावी । परि हे चाली दुःख पावी ।।२।।

तुका म्हणे घेऊं देवा । सवें करूनि बोळावा ।।३।।

१२६२
पाववावें ठाया । ऐसें सवें बोलों तया ।।१।।
भावा ऐसी क्रिया राखे । खोट्या खोटेपणें वाखे ।।धृ।।
न ठेवूं अंतर । कांहीं भेदाचा पदर ।।२।।
तुका म्हणे जीवें भावें । सत्या मानविजे देवें ।।३।।

१२६३
मोल देऊनियां सांटवावे दोष । नटाचे ते वेश पाहोनियां ।।१।।
हरिदासां मुखें हरिकथाकीर्तन । तेथें पुण्यें पुण्य विशेषता ।।धृ।।
हरितील वस्त्रें गोपिकांच्या वेशें । पाप त्यासरिसें मात्रागमन ।।२।।
तुका म्हणे पाहा ऐसें जालें जन । सेवाभक्तिहीन रसीं गोडी ।।३।।

१२६४
बहुक्षीदक्षीण । आलों सोसुनियां वन ।।१।।
विठोबा विसांवया विसांवया । पडों देईं पायां ।।धृ।।
बहुतां काकुलती । आलों सोसिली फजिती ।।२।।
केली तुजसाटीं । तुका म्हणे येवढी आटी ।।३।।

१२६५
कां गा धर्म केला । असोन सत्तेचा आपुला ।।१।।
उभाउभीं पाय जोडीं । आतां फांकों नेदीं घडी ।।धृ।।
नको सोडूं ठाव । आतां घेऊं नेदीं वाव ।।२।।
तुका म्हणे इच्छा । तैसा करीन सरिसा ।।३।।

१२६६
तुमची तों भेटी नव्हे ऐसी जाली । कोरडी च बोली ब्रम्हज्ञान ।।१।।
आतां न बोलावें ऐसें वाटे देवा । संग न करावा कोणांसवें ।।धृ।।
तुम्हां निमित्यासी सांपडले अंग । नेदावा हा संग विचारिलें ।।२।।
तुका म्हणे माझी राहिली वासना । आवडी दर्शनाची च होती ।।३।।

१२६७

आहे तें चि आम्ही मागों तुजपाशीं । नव्हों तुज ऐसीं क्रियानष्टें ।।१।।
न बोलावीं तों च वर्मे बरें दिसे । प्रकट ते कैसे गुण करूं ।।धृ।।
एका ऐसें एका द्यावयाचा मोळा । कां तुम्हां गोपाळा नाहीं ऐसा ।।२।।
तुका म्हणे लोकां नाहीं कळों आलें । करावें आपुलें जतन तों ।।३।।

१२६८
आम्हीं याची केली सांडी । कोठें तोंडीं लागावें ।।१।।
आहे तैसा असो आतां चिंतें चिंता वाढते ।।धृ।।
बोलिल्याचा मानी सीण । भिन्न भिन्न राहावें ।।२।।
तुका म्हणे आम्हांपाशीं । धीराऐसी जतन ।।३।।

१२६९
आम्हांपाशीं याचें बळ । कोण काळवरी तों ।।१।।
करूनि ठेलों जीवेंसाटीं । होय भेटी तोंवरि ।।धृ।।
लागलों तों न फिरें पाठी । पडिल्या गांठी वांचूनि ।।२।।
तुका म्हणे अवकाशें । तुमच्या ऐसें होवया ।।३।।

१२७०
बोलिलें चि बोलें पडपडताळूनि । उपजत मनीं नाहीं शंका ।।१।।
बहुतांची माय बहुत कृपाळ । साहोनि कोल्हाळ बुझाविसी ।।धृ।।
बहुतांच्या भावें वांटिसी भातुकें । बहु कवतुकें खेळविसी ।।२।।
तुका म्हणे ऐसें जाणतसों वर्म । करणें तो श्रम न वजे वांयां।।३।। ।।१२।।

१२७१
कोठें भोग उरला आतां । आठवितां तुज मज ।।१।।
आड कांहीं नये दुजें । फळ बीजें आणिलें ।।धृ।।
उद्वेग ते वांयांविण। कैंचा सीण चिंतनें ।।२।।
तुका म्हणे गेला भ्रम । तुमच्या धर्में पायांच्या ।।३।।

१२७२
संसार तो कोण देखे । आम्हां सखे हरिजन ।।१।।
काळ ब्रम्हानंदें सरे । आवडी उरे संचली ।।धृ।।

स्वप्नीं ते ही नाहीं चिंता । रात्री जातां दिवस ।।२।।
तुका म्हणे ब्रम्हरसें । होय सरिसें भोजन ।।३।।

१२७३
पडियेलों वनीं थोर चिंतवनी । उसीर कां आझूनि लावियेला ।।१।।
येईं गा विठ्ठला येईं गा विठ्ठला । प्राण हा फुटला आळवितां ।।धृ।।
काय तुज नाहीं लौकिकाची शंका । आपुल्या बाळका मोकलितां ।।२।।
तुका म्हणे बहु खंती वाटे जीवा । धरियेलें देवा दुरी दिसे ।।३।।

१२७४
आपुले गांवींचें न देखेसें जालें । परदेसी एकलें किती कंठूं ।।१।।
म्हणऊनि पाहें मूळ येतां वाटे । जीवलग भेटे कोणी तरी ।।धृ।।
पाहातां अवघ्या दिसतील दिशा । सकळ ही वोसा दृष्टीपुढें ।।२।।१२७४
तुका म्हणे कोणी न संगे वारता । तुझी वाटे चिंता पांडुरंगा ।।३।।

१२७५
जन तरी देखें गुंतलें प्रपंचें । स्मरण तें त्याचें त्यासी नाहीं ।।१।।
म्हणऊनि मागें परतलें मन । घालणीचें रान देखोनियां ।।धृ।।
इंद्रियांचा गाजे गोंधळ ये ठायीं । फोडीतसे डोई अहंकार ।।२।।
तुका म्हणे देवा वासनेच्या आटें । केलीं तळपटें बहुतांचीं ।।३।।

१२७६
धांवे त्यासी फावे । दुजे उगवूनि गोवे ।।१।।
घ्यावें भरूनियां घर । मग नाहीं येरझार ।।धृ।।
धणी उभें केलें । पुंडलिकें या उगलें ।।२।।
तुका म्हणे ठसा । गेला पडोनियां ऐसा ।।३।।

१२७७
लाहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ।।१।।
ऐरावत रत्न थोर । तया अंकुशाचा मार ।।धृ।।
ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ।।२।।
तुका म्हणे जाण । व्हावें लाहनाहुनि लाहन ।।३।।

१२७८
निंचपण बरवें देवा । न चले कोणाचा ही दावा ।।१।।
महा पुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहाती ।।धृ।।
येतां सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरि ।।२।।
तुका म्हणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ।।३।।

१२७९
उष्ट्या पत्रावळी करूनियां गोळा । दाखविती कळा कवित्वाची ।।१।।
ऐसे जे पातकी ते नरकीं पचती । जोंवरी भ्रमती चंद्रसूर्य ।।२।।
तुका म्हणे एक नारायण घ्याईं । वरकडा वाहीं शोक असे ।।३।।

१२८०
आवडीच्या मतें करिती भजन । भोग नारायणें म्हणती केला ।।१।।
अवघा देव म्हणे वेगळें तें काय । अर्थासाठीं डोय फोडूं पाहे ।।धृ।।
लाजे कमंडल धरितां भोपळा । आणीक थीगळा प्रावरणा ।।२।।
शाला गडवे धातुद्रव्यइच्छा चित्तीं । नैश्वर्य बोलती अवघें मुखें ।।३।।
तुका म्हणें यांस देवा नाहीं भेटी । ऐसे कल्पकोटि जन्म घेतां ।।४।।

१२८१
म्हणतां हरिदास कां रे नाहीं लाज । दीनास महाराज म्हणसी हीना ।।१।।
काय ऐसें पोट न भरे तें गेलें । हालविसी कुले सभेमाजी ।।२।।
तुका म्हणे पोटें केली विटंबना । दीन जाला जना कींव भाकी ।।३।।

१२८२
रिद्धिसिद्धी दासी कामधेनु घरीं । परि नाहीं भाकरी भक्षावया ।।१।।
लोडें वालिस्तें पलंग सुपति । परि नाहीं लंगोटी नेसावया ।।धृ।।
पुसाल तरि आम्हां वैकुंठींचा वास । परि नाहीं राहृयास ठाव कोठें ।।२।।
तुका म्हणे आम्ही राजे त्रैलोक्याचे । परि नाहीं कोणाचें उणे पुरें ।।३।।

१२८३
घरोघरीं अवघें जालें ब्रम्हज्ञान । परि मेळवण बहु माजी ।।१।।
निरें कोणापाशीं होय एक रज । तरि द्या रे मज दुर्बळासी ।।धृ।।
आशा तृष्णा माया कालवूनि दोन्ही । दंभ तो दूरोनि दिसतसे ।।२।।

काम क्रोध लोभ सिणवी बहुत । मेळवूनि आंत काळकूट ।।३।।
तुका म्हणे तेथें कांहीं हातां नये । आयुष्य मोलें जाये वांयांविण ।।४।।

१२८४
अवघ्या भूतांचें केलें संतर्पण । अवघी च दान दिली भूमि ।।१।।
अवघा चि काळ दिनरात्रशुद्धी । साधियेली विधि पर्वकाळ ।।धृ।।
अवघीं च तीर्थें व्रतें केले याग । अवघें चि सांग जालें कर्म ।।२।।
अवघें चि फळ आलें आम्हां हातां । अवघें चि अनंता समर्पिलें ।।३।।
तुका म्हणे आतां बोलों अबोलणें । कायावाचामनें उरलों नाहीं ।।४।।

१२८५
महुरा ऐसीं फळें नाहीं । आलीं कांहीं गळती ।।१।।
पक्वदशे येती थोडीं । नास आढी वेचे तो ।।धृ।।
विरुळा पावे विरुळा पावे । अवघड गोवे सेवटाचे ।।२।।
उंच निंच परिवार देवी। धन्या ठावी चाकरी ।।३।।
झळके तेथें पावे आणी । ऐसे क्षणी बहु थोडे ।।४।।
पावेल तो पैल थडी । म्हणों गडी आपुला ।।५।।
तुका म्हणे उभाऱ्यानें । कोण खरें मानितसे ।।६।।

१२८६
अवघ्या उपचारा । एक मनें चि दातारा ।।१।।
घ्यावी घ्यावी हे चि सेवा । माझी दुर्बळाची देवा ।।धृ।।
अवधियाचा ठाव। पायांवरि जीवभाव ।।२।।
चित्ताचें आसन । तुका करितो कीर्तन ।।३।।

१२८७
आली सलगी पायांपाशीं । होइल तैसी करीन ।।१।।
आणीक आम्हीं कोठें जावें । येथें जीवें वेचलों ।।धृ।।
अवघ्या निरोपणा भाव । हा चि ठाव उरलासे ।।२।।
तुका म्हणे पाळीं लळे। कृपाळुवे विठ्ठले ।।३।।

१२८८
देह आणि देहसंबंधें निंदावीं । इतरें वंदावीं श्वानशूकरें ।।१।।

येणें नांवें जाला मी माझ्याचा झाडा । मोहा नांवें खोडा गर्भवास ।।धृ।।
गृह आणि वित्त स्वदेशा विटावें । इतरा भेटावें श्वापदझाडां ।।२।।
तुका म्हणे मी हें माझें न यो वाचे । येणें नांवें साचे साधुजन ।।३।।

१२८९
देवाचिये माथां घालुनियां भार । सांडीं कळिवर ओंवाळूनि ।।१ ।।
नाथिला हा छंद अभिमान अंगीं । निमित्याचे वेगीं सारीं ओझें ।।धृ।।
करुणावचनीं लाहो एकसरें । नेदावें दुसरें आड येऊं ।।२।।
तुका म्हणे सांडीं लटिक्याचा संग । आनंद तो मग प्रगटेल ।।३।।

१२९०
देह नव्हे मी हें सरे । उरला उरे विठ्ठल ।।१।।
म्हणऊनि लाहो करा । काळ सारा चिंतनें ।।धृ।।
पाळणाची नाहीं चिंता । ठाव रिता देवाचा ।।२।।
तुका म्हणे जीवासाटीं । देव पोटीं पडेल ।।३।।

१२९१
पृथक मी सांगों किती । धर्म नीती सकळां ।।१।।
अवघियांचा एक ठाव । शुद्ध भाव विठ्ठलीं ।।धृ।।
क्षराअक्षराचा भाग । करा लाग पंढरीये ।।२।।
तुका म्हणे आगमींचें । मथिलें साचें नवनीत ।।३।।

१२९२
पुण्यविकरा तें मातेचें गमन । भाडी ऐसें धन विटाळ तो ।।१।।
आत्महत्यारा हा विषयांचा लोभी । म्हणावें तें नाभी करवी दंड ।।धृ।।
नागवला अल्प लोभाचिये साटीं । घेऊनि कांचवटि परिस दिला ।।२।।
तुका म्हणे हात झाडिले परत्रीं । श्रम तो चि श्रोत्रीं वेठी केली ।।३।।

१२९३
अंतरींचें ध्यान । मुख्य या नांवें पूजन ।।१।।
उपाधि तें अवघें पाप । गोड निरसतां संकल्प ।।धृ।।
आज्ञा पाळावी हा धर्म । जाणते हो जाणा वर्म ।।२।।
तुका म्हणे वृत्ति । अविट हे सहज स्थिति ।।३।।

१२९४
मूळ करणें संतां । नाहीं मिळत उचिता ।।१।।
घडे कासयानें सेवा । सांग ब्रम्हांडाच्या जीवा ।।धृ।।
सागर सागरीं । सामावेसी कैंची थोरी ।।२।।
तुका म्हणे भावें । शरण म्हणवितां बरवें ।।३।।

१२९५
बरवी नामावळी । तुझी महादोषां होळी ।।१।।
जालें आम्हांसी जीवन । धणीवरि हें सेवन ।।धृ।।
सोपें आणि गोड । किती अमृता ही वाड ।।२।।
तुका म्हणे अच्युता । आमचा कल्पतरु दाता ।।३।।

१२९६
त्रुशाकाळें उदकें भेटी । पडे मिठी आवडीची ।।१।।
ऐसियाचा हो कां संग । जिवलग संतांचा ।।धृ।।
मिष्टान्नाचा योग भुके । म्हणतां चुके पुरेसें ।।२।।
तुका म्हणे माते बाळा । कळवळा भेटीचा ।।३।।

१२९७
कुचराचे श्रवण । गुणदोषांवरि मन ।।१।।
असोनियां नसे कथे । मूर्ख अभाग्य तें तेथें ।।धृ।।
निरर्थक कारणीं । कान डोळे वेची वाणी ।।२।।
पापाचे सांगाती । तोंडीं ओढाळांचे माती ।।३।।
हिताचिया नांवें । वोस पडिले देहभावें ।।४।।
फजीत करूनि सांडीं । तुका करी बोडाबोडी ।।५।।

१२९८
जग तरि आम्हां देव । परि हे निंदितों स्वभाव ।।१।।
येतो हिताचा कळवळा । पडती हातीं म्हून काळा ।।धृ।।
नाहीं कोणी सखा । आम्हां निपराध पारिखा ।।२।।
उपक्रमें वदे । तुका वर्मासी तें भेदे ।।३।।

१२९९
सोपें वर्म आम्हां सांगितलें संतीं । टाळ दिंडी हातीं घेउनि नाचा ।।१।।
समाधीचें सुख सांडा ओंवाळून । ऐसें हें कीर्तन ब्रम्हरस ।।धृ।।
पुढती घडे चढतें सेवन आगळें । भक्तिभाग्यबळें निर्भरता ।।२।।
उपजों चि नये संदेह चित्तासी । मुक्ति चारी दासी हरिदासांच्या ।।३।।
तुका म्हणे मन पावोनि विश्रांती । त्रिविध नासती ताप क्षणें ।।४।।

१३००
गंगा न देखे विटाळ । तें चि रांजणीं ही जळ ।।१।।
अल्पमहदा नव्हे सरी । विटाळ तो भेद धरी ।।धृ।।
काय खंडिली भूमिका । वर्णा पायरिकां लोकां ।।२।।
तुका म्हणे अगीविण । बीजें वेगळीं तों भिन्न ।।३।।

१३०१
देवावरिल भार । काढूं नये कांहीं पर ।।१।।
तानभुके आठवण । घडे तें बरें चिंतन ।।धृ।।
देखावी निश्चिंती । ते चि अंतर श्रीपती ।।२।।
वैभव सकळ । तुका मानितो विटाळ ।।३।।

१३०२
थुंकोनियां मान । दंभ करितों कीर्तन ।।१।।
जालों उदासीन देहीं । एकाविण चाड नाहीं ।।धृ।।
अर्थ अनर्थ सारिखा । करूनि ठेविला पारिखा ।।२।।
उपाधिवेगळा । तुका राहिला सोंवळा ।।३।।

१३०३
काय ह्याचें घ्यावें । नित्य नित्य कोणें गावें ।।१।।
केलें हरिकथेनें वाज । अंतरोनी जाते निज ।।धृ।।
काम संसार । अंतरीं हे करकर ।।२।।
तुका म्हणे हेंड । ऐसे मानिती ते लंड ।।३।।

१३०४
वदे साक्षत्वेंसीं वाणी । नारायणीं मिश्रित ।।१।।

न लगे कांहीं चाचपावें । जातों भावें पेरीत ।।धृ।।
भांडार त्या दातियाचें। मी कैचें ये ठायीं ।।२।।
सादावीत गेला तुका । येथें एकाएकीं तो ।।३।।

१३०५
ऐसी जिव्हा निकी । विठ्ठल विठ्ठल कां न घोकी ।।१।।
जेणें पाविजे उद्धार । तेथें राखावें अंतर ।।धृ।।
गुंपोनि चावटी । तेथें कोणा लाभें भेटी ।।२।।
तुका म्हणे कळा । देवाविण अमंगळा ।।३।।

१३०६
साजे अळंकार । तरि भोगितां भ्रतार ।।१।।
व्यभिचारा टाकमटिका । उपहास होती लोकां ।।धृ।।
शूरत्वाची वाणी । रूप मिरवे मंडणीं ।।२।।
तुका म्हणे जिणें । शर्त्तीविण लाजिरवाणें ।।३।।

१३०७
मानामान किती । तुझ्या क्षुल्लका संपत्ती ।।१।।
जा रे चाळवीं बापुडीं । कोणी धरिती तीं गोडी ।।धृ।।
रिद्धिसिद्धी देसी। आम्हीं चुंभळें नव्हों तैसीं ।।२।।
तुका म्हणे ठका । ऐसें नागविलें लोकां ।।३।।

१३०८
पाहातोसी काय । आतां पुढें करीं पाय ।।१।।
वरि ठेवूं दे मस्तक । ठेलों जोडूनि हस्तक ।।धृ।।
बरवें करीं सम । नको भंगों देऊं प्रेम ।।२।।
तुका म्हणे चला । पुढती सामोरे विठ्ठला ।।३।।

१३०९
भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश निवारूनि ।।१।।
विषय तो त्यांचा जाला नारायण । नावडे धन जन माता पिता ।।धृ।।
निर्वाणीं गोविंद असे मागेंपुढें । कांहीं च सांकडें पडों नेदी ।।२।।
तुका म्हणे सत्य कर्मा व्हावें साहे । घातलिया भये नर्का जाणें ।।३।।

१३१०
तों च हीं क्षुल्लकें सखीं सहोदरें । नाहीं विश्वंभरें वोळखी तों ।।१।।
नारायण विश्वंभर विश्वपिता । प्रमाण तो होतां सकळ मिथ्या ।।धृ।।
रवि नुगवे तों दीपिकाचें काज । प्रकाशें तें तेज सहज लोपे ।।२।।
तुका म्हणे देहसंबंध संचितें । कारण निरुतें नारायणीं ।।३।।

१३११
यज्ञ भूतांच्या पाळणा । भेद कारीये कारणा । पावावया उपासना ।
ब्रम्हस्थानीं प्रस्थान ।।१।।
एक परी पडिलें भागीं । फळ बीजाचिये अंगीं । धन्य तो चि जगीं । आदि
अंत सांभाळी ।।धृ।।
आवशक तो शेवट । मागें अवघी खटपट । चालों जाणे वाट । ऐसा विरळा
एखादा ।।२।।
तुका होवोनि निराळा । क्षराअक्षरावेगळा । पाहे निगमकळा । बोले
विठ्ठलप्रसादें ।।३।।

१३१२
वेदपुरुष तरि नेती कां वचन । निवडूनि भिन्न दाखविलें ।।१।।
तुझीं वर्मे तूं चि दावूनि अनंता । होतोसी नेणता कोण्या गुणें ।।धृ।।
यज्ञाचा भोक्ता तरि कां नव्हे सांग । उणें पडतां अंग क्षोभ घडे ।।२।।
वससी तूं या भूतांचे अंतरीं । तरि कां भेद हरी दावियेला ।।३।।
तपतिर्थाटणें तुझे मूर्तिदान । तरि कां अभिमान आड येतो ।।४।।
आतां क्षमा कीजे विनवितो तुका । देऊनियां हाका उभा द्वारीं ।।५।।

लोहागांवीं स्वामींच्या अंगावर ऊन पाणी घातलें - तो अभंग ।।१।।
१३१३
जळे माझी काया लागला वोणवा । धांव रे केशवा मायबापा ।।१।।
पेटली सकळ कांति रोमावळी । नावरे हे होळी दहन जालें ।।धृ।।
फुटोनियां दोन्ही भाग होऊं पाहे । पाहातोसी काय हृदय माझें ।।२।।
घेऊनि जीवन धांवें लवलाहीं । कवणाचें काहींहीं न चले येथें ।।३।।
तुका म्हणे माझी तूं होसी जननी । आणीक निर्वाणीं कोण
राखे ।।४।। ।।१।।

१३१४
अभक्त ब्राम्हण जळो त्याचें तोंड । काय त्यासी रांड प्रसवली ।।१।।
वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कुळ याती ।।धृ।।
ऐसा हा निवाडा जालासे पुराणीं । नव्हे माझी वाणी पदरींची ।।२।।
तुका म्हणे आगी लागो थोरपणा । दृष्टि त्या दुर्जना न पडो माझी ।।३।।

नामदेव व पांडुरंग यांनी स्वप्नांत येऊन स्वामींस आज्ञा केली कीं कवित्व करणें - ते अभंग ।।२।।
१३१५
नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ।।१।।
सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको ।।धृ।।
माप टाकी सळ धरिली विठ्ठलें । थापटोनि केलें सावधान ।।२।।
प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उरले शेवटीं लावी तुका ।।३।।

१३१६
द्याल ठाव तरि राहेन संगती । संतांचे पंगती पायांपाशीं ।।१।।
आवडीचा ठाव आलोंसें टाकून । आतां उदासीन न धरावें ।।धृ।।
सेवटील स्थळ निंच माझी वृत्ति । आधारें विश्रांती पावईन ।।२२।।
नामदेवापायीं तुक्या स्वप्नीं भेटी । प्रसाद हा पोटीं राहिलासे ।।३।। ।।२।।

१३१७
त्रिपुटीच्या योगें । कांहीं नव्हे कोणां जोगें । एक जातां लागें । एक पाठीं लागतें ।।१।।
मागें पुढें अवघा काळ । पळों नये न चले बळ । करितां कोल्हाळ । कृपे खांदां हरि वाहे ।।धृ।।
पापपुण्यात्मयाच्या शक्ती । असती योजिल्या श्रीपती । यावें काकुलती। तेथें सत्तानायेका ।।२।।
तुका उभा पैल थडी । तरि हे प्रकाश निवडी । घातल्या सांगडी । तापे पेटीं हाकारी ।।३।।

१३१८
देखण्याच्या तीन जाती । वेठी वार्ता अत्यंतीं ।।१।।
जैसा भाव तैसें फळ । स्वातीतोय एक जळ ।।धृ।।
पाहे सांगे आणि जेवी । अंतर महदांतर तेवी ।।२।।
तुका म्हणे हिरा । पारखियां मूढां गारा ।।३।।

१३१९
अनुभवें अनुभव अवघा चि साधिला । तरि स्थिरावला मनु ठायीं ।।१।।
पिटूनियां मुसे आला अळंकार । दग्ध तें असार होऊनियां ।।धृ।।
एक चि उरलें कायावाचामना । आनंद भुवनामाजी त्रयीं ।।२।।
तुका म्हणे आम्ही जिंकिला संसार । होऊनि किंकर विठोबाचे ।।३।।

१३२०
ऐसिया संपत्ती आम्हां संवसारी । भोगाचिया परि काय सांगों ।।१।।
काम तो कामना भोगीतसे देवा । आळिंगणें हेवा चरण चुंबीं ।।धृ।।
शांतीच्या संयोगें निरसला ताप । दुसरें तें पाप भेदबुद्धि ।।२।।
तुका म्हणे पाहें तिकडे सारिखें । आपुलें पारिखें निरसलें ।।३।।

१३२१
राम राज्य राम प्रजा लोकपाळ । एक चि सकळ दुजें नाहीं ।।१।।
मंगळावांचूनि उमटेना वाणी । अखंड चि खाणी एकी रासी ।।धृ।।
मोडलें हें स्वामी ठावाठाव सेवा । वाढवा तो हेवा कोणा अंगें ।।२।।
तुका म्हणे अवघें दुमदुमिलें देवें । उरलें तें गावें हें चि आतां ।।३।।

१३२२
निवडोनि वाण काढिले निराळे । प्रमाण डोहळे यावरि ते ।।१।।
जयाचा विभाग तयासी च फळे । देखणें निराळें कौतुकासी ।।धृ।।
शूर तो ओळखे घायडायहात । येरां होइल मात सांगायासी ।।२।।
तुका म्हणे माझी केळवते वाणी । केला निजस्थानीं जाणवसा ।।३।।

१३२३
याजसाटीं केला होता आटाहास्ये । शेवटाचा दिस गोड व्हावा ।।१।।
आतां निश्चितीनें पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ।।धृ।।

कवतुक वाटे जालिया वेचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ।।२।।
म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ।।३।।

१३२४
भक्तीचिया पोटीं रत्नाचिया खाणी । बम्हींची ठेवणी सकळ वस्तु ।।१।।
माउलीचे मागें बाळकांची हरी । एका सूत्रें दोरी ओढतसे ।।धृ।।
जेथील जें मागे तें रायासमोर । नाहींसें उत्तर येत नाहीं ।।२।।
सेवेचिये सत्ते धनी च सेवक । आपुलें तें एक न वंची कांहीं ।।३।।
आदिअंताठाव असे मध्यभाग । भोंवतें भासे मग उंचासनी ।।४।।
भावारूढ तुका जाला एकाएकीं । देव च लौकिकीं अवघा केला ।।५।।

१३२५
सांगतां दुर्लभ ज्ञानाचिया गोष्टी । अनुभव तो पोटीं कैचा घडे ।।१।।
भजनाचे सोई जगा परिहार । नेणत्यां सादर चित्त कथे ।।धृ।।
नाइकवे कानीं साधन उपाय । ऐकतो गाय हरुषें गीत ।।२।।
नव्हे आराणूक जावयासी वना । वेध कामिमना हरिकथेचा ।।३।।
काळाच्या साधना कोणा अंगीं बळ । चिंतना मंगळ अष्टप्रहर ।।४।।
तुका म्हणे आम्ही खेळों भातुकुलें । विभागासी मुलें भोळीं येथें ।।५।।

१३२६
जाणपण बरें देवाचे शिरीं । आम्ही ऐसीं बरीं नेणतीं च ।।१।।
देखणियांपुढें रुचे कवतुक । उभयतां सुख वाढतसे ।।धृ।।
आशंकेचा बाधा नाहीं लडिवाळां । चित्त वरि खेळा समबुद्धि ।।२।।
तुका म्हणे दिशा मोकळ्या सकळा । अवकाशीं खेळा ठाव जाला ।।३।।

१३२७
वचनांचे मांडे दावावे प्रकार । काय त्या साचार कौतुकाचे ।।१।।
जातां घरा मागें । उरों नेणें खंती । मिळाल्या बहुतीं फांकलिया ।।धृ।।
उदयीं च अस्त उदयो संपादला । कल्पनेचा केला जागेपणें ।।२।।
जाणवूनि गेला हांडोरियां पोरां । सावध इतरां करुनी तुका ।।३।।

स्वामीस संतांनीं पुसलें कीं तुम्हांस वैराग्य कोण्या प्रकारें जालें तें सांगा - ते अभंग ।। ३ ।।

१३२८
याति शूद्र वैश केला वेवसाव । आदि तो हा देव कुळपूज्य ।।१।।
नये बोलों परि पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न तुम्हीं संतीं ।।धृ।।
संवसारें जालों अतिदुःखें दुखी । मायबाप सेखीं कर्मलिया ।।२।।
दुष्काळें आटिलें द्रव्यें नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ।।३।।
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें । वेवसाय देख तुटी येतां ।।४।।
देवाचें देऊळ होतें तें भंगलें । चित्तासी जें आलें करावेंसें ।।५।।
आरंभीं कीर्तन करीं एकादशी । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ।।६।।
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें। विश्वासें आदरें करोनियां ।।७।।
गाती पुढें त्यांचें धरावें धृपद । भावें चित्त शुद्ध करोनियां ।।८।।
संताचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ।।९।।
टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनि ।।१०।।
वचन मानिलें नाहीं सहुर्दाचें । समूळ प्रपंचें वीट आला ।।११।।
सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमतां ।।१२।।
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ।।१३।।
यावरि या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ।।१४।।
निषेधाचा कांहीं पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें ।।१५।।
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ।।१६।।
विस्तारीं सांगतां बहुत प्रकार । होईल उशीर आतां पुरे ।।१७।।
आतां आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणे ।।१८।।
भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसा कळों आलें ।।१९।।
तुका म्हणे माझें सर्व भांडवल । बोलविले पांडुरंगें ।।२०।।

१३२९
ऐका वचन हें संत । मी तों आगळा पतित । काय काजें प्रीत । करीतसां आदरें ।।१।।
माझें चित्त मज ग्वाही । सत्य तरलों मी नाहीं । एकांचिये वांहीं । एक देखीं मानिती ।।धृ।।
बहु पीडिलों संसारें । मोडीं पुसें पिटीं ढोरें । न पडतां पुरें । या विचारें राहिलों ।।२।।
सहज सरलें होतें कांहीं । द्रव्य थोडें बहु तें ही । त्याग केला नाहीं । दिलें द्विजां याचकां ।।३।।
प्रियापुत्रबंधु । यांचा तोडिला संबंधु । सहज जालों मंदु । भाग्यहीन करंटा

।।४।।
तोंड न दाखवे जना । शिरें सांदी भरें राणां । एकांत तो जाणां । तयासाटीं लागला ।।५।।
पोटें पिटिलों काहारें । दया नाहीं या विचारें । बोलावितां बरें । सहज म्हणें यासाटीं ।।६।।
सहज वडिलां होती सेवा । म्हणोनि पूजितों या देवा । तुका म्हणे भावा । साटीं झणी घ्या कोणी ।।७।।

१३३०
बरें जालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ।।१।।
अनुतापें तुझें राहिलें चिंतन । जाला हा वमन संवसार ।।धृ।।
बरें जालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें ।।३।।
बरें जालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों तुज शरण देवा ।।४।।
बरें जालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिलीं ।।५।।
तुका म्हणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासीं जागरण ।।६।। ।।३।।

१३३१. बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल । करावा विठ्ठल जीवभाव ।।१।।
येणें सोसें मन जालें हांवभरी । परती माघारी घेत नाहीं ।।धृ।।
बंधनापासूनि उकलली गांठी । देतां आली मिठी सावकाशें ।।२।।
तुका म्हणे देह भारिला विठ्ठलें । कामक्रोधें केलें घर रितें ।।३।।

१३३२
मीचि मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ।।१।।
आतां पुरले नवस । निरसोनी गेली आस ।।धृ।।
जालों बरा बळी। गेलों मरोनि तेकाळीं ।।२।।
दोहींकडे पाहे । तुका आहे तैसा आहे ।।३।।

१३३३
जग अवघें देव । मुख्य उपदेशाची ठेव ।।१।।
आधीं आपणयां नासी । तरि उतरे ये कसीं ।।धृ।।
ब्रम्हज्ञानाचें कोठार । तें हें निश्चयें उत्तर ।।२।।
तुका म्हणे ते उन्मनी । नास कारया कारणीं ।।३।।

१३३४
साधनांच्या कळा आकार आकृति । कारण नवनीतीं मथनाचें ।।१।।
पक्षियासी नाहीं मारगीं आडताळा । अंतराक्षी फळासी चि पावे ।।धृ।।
भक्तीची जोडी ते उखत्या चि साटीं । उणें पुरें तुटी तेथें नाहीं ।।२।।
तुका म्हणे आलें सांचत सांचणी । आजि जाली क्षणी एकसरें ।।३३।।

१३३५
नाहीं येथें वाणी । सकळां वणाअ घ्यावी धणी ।।१।।
जालें दर्पणाचें अंग । ज्याचा त्यासी दावी रंग ।।धृ।।
एका भावाचा एकांत । पीक पिकला अनंत ।।२।।
तुका खळे दाणीं । करी बैसोनी वांटणी ।।३।।

१३३६
ठेविलें जतन । करूनियां निज धन ।।१।।
जयापासाव उत्पत्ति । तें हें बीज धरिलें हातीं ।।धृ।।
निवडिलें वरळा भूस । सार आइन जिनस ।।२।।
तुका म्हणे नारायण । भाग संचिताचा गुण ।।३।।

१३३७
भ्रमना पाउलें वेचिलीं तीं वाव । प्रवेशतां ठाव एक द्वार ।।१।।
सार तीं पाउलें विठोबाचीं जीवीं । कोणीं न विसंभावीं क्षणभरि ।।धृ।।
सुलभ हें केलें सकळां जीवन । कांुफ्कावें चि कान न लगेसें ।।२।।
तुका म्हणे येथें सकळ ही कोड । पुरे मूळ खोड विस्ताराचें ।।३।।

१३३८
कांहीं जाणों नये पांडुरंगाविण । पाविजेल सीण संदेहानें ।।१।।
भलतिया नावें आळविला पिता । तरि तो जाणता कळवळा ।।धृ।।
अळंकार जातो गौरवितां वाणी । सर्वगात्रा धणी हरिकथा ।।२।।
तुका म्हणे उपज विल्हाळे आवडी । करावा तो घडी घडी लाहो ।।३।।

१३३९
बीजापोटीं पाहे फळ । विध न करितां सकळ ।।१।।

तया मूर्ख म्हणावें वेडें । कैसें तुटेल सांकडें ।।धृ।।
दावितिया वाट। वेठी धरूं पाहे चाट ।।२।।
पुढिल्या उपाया । तुका म्हणे राखे काया ।।३।।

१३४०
मातेचीं जो थानें फाडी । तया जोडी कोण ते ।।१।।
वेदां निंदी तो चांडाळ । भ्रष्ट सुतकिया खळ ।।धृ।।
अगी लावी घरा । मग वसती कोठें थारा ।।२।।
तुका म्हणे वर्म । येरा नाचवितो भ्रम ।।३।।

१३४१
वेश वंदाया पुरते । कोण ब्राम्हण निरुते ।।१।।
ऐसें सांगा मजपाशीं । संतां निरवितों येविशीं ।।धृ।।
असा जी प्रवीण । ग्रंथीं कळे शुद्धहीण ।।२।।
तुका म्हणे लोपें । सत्याचिया घडती पापें ।।३।।

१३४२
ज्या ज्या आम्हांपाशीं होतील ज्या शक्ति । तेणें हा श्रीपती अळंकारूं ।।१।।
अवघा पायांपाशीं दिला जीवभाव । जन्ममरणाठाव पुसियेला ।।धृ।।
ज्याचें देणें त्यासी घातला संकल्प। बंधनाचें पाप चुकविलें ।।२।।
तुका म्हणे येथें उरला विठ्ठल । खाये बोले बोल गाये नाचे ।।३।।

१३४३
आम्ही आळीकरें । प्रेमसुखाचीं लेंकुरें ।।१।।
पायीं गोविली वासना । तुश केलें ब्रम्हज्ञाना ।।धृ।।
येतां पाहें मुळा । वाट पंढरीच्या डोळां ।।२।।
तुका म्हणे स्थळें । मग मी पाहेन सकळें ।।३।।

१३४४
आइत्याची राशी । आली पाकसिद्धीपाशीं ।।१।।
आतां सांडोनि भोजन । भिके जावें वेडेपणें ।।धृ।।
उसंतिली वाट । मागें परतावें फुकट ।।२।।
तुका म्हणे वाणी । वेचों बैसोन ठाकणीं ।।३।।

१३४५
धन्ये शुद्ध जाती । धरीं लौकरी परती ।।१।।
ऐकिलें तें चि कानीं । होय परिपाक मनीं ।।धृ।।
कळवळा पोटीं । सावधान हितासाठीं ।।२।।
तुका म्हणे भाव । त्याचा तो चि जाणां देव ।।३।।

१३४६
जीवित्व तें किती । हें चि धरितां बरें चित्तीं ।।१।।
संत सुमनें उत्तरें । मृदु रसाळ मधुरें ।।धृ।।
विसांवतां कानीं । परिपाक घडे मनीं ।।२।।
तुका म्हणे जोडी । हाय जतन रोकडी ।।३।।

१३४७
अभिमानाची स्वामिनी शांति । महत्त्व घेती सकळ ।।१।।
कळोनि ही न कळे वर्म । तरि श्रम पावती ।।धृ।।
सर्व सत्ता करितां धीर । वीर्यां वीर आगळा ।।२।।
तुका म्हणे तिखट तिखें । मृदसखें आवडी ।।३।।

१३४८
भोजन तें पाशांतीचें । निंचें उंचें उसाळी ।।१।।
जैशी कारंज्याची कळा । तो जिव्हाळा स्वहिता ।।धृ।।
कल्पना ते देवाविण । न करी भिन्न इतरीं ।।२।।
तुका म्हणे पावे भूती । ते निश्चिती मापली ।।३।।

१३४९
पोटापुरतें काम । परि अगत्य तो राम ।।१।।
कारण तें हें चि करीं । चित्तीं पांडुरंग धरीं ।।धृ।।
प्रारब्धी हेवा । जोडी देवाची ते सेवा ।।२।।
तुका म्हणे बळ । बुद्धी वेचूनि सकळ ।।३।।

१३५०
बहुतां जन्मां अंतीं । जोडी लागली हे हातीं ।।१।।

मनुष्यदेहा ऐसा ठाव । धरीं पांडुरंगीं भाव ।।धृ।।
बहु केला फेरा । येथें सांपडला थारा ।।२।।
तुका म्हणे जाणे । ऐसे भले ते शाहाणे।।३।।

१३५१
रूप नांवें माया बोलावया ठाव । भागा आले भाव तयावरि ।।१।।
सींव वाटे परी न खंडे पृथिवी । शाहाणे ते जीवीं समजती ।।धृ।।
पोटा आलें तिच्या लोळे मांड्यांवरि । पारखी न करी खंतीं चित्तीं ।।२।।
तुका म्हणे भक्तीसाटीं हरिहर । अरूपीचें क्षरविभाग हें ।।३।।

१३५२
लेकराची आळी न पुरवी कैसी । काय तयापाशीं उणें जालें ।।१।।
आम्हां लडिवाळां नाहीं तें प्रमाण । कांहीं ब्रम्हज्ञान आत्मस्थिति ।।धृ।।
वचनाचा घेईन अनुभव पदरीं । जें हें जनाचारीं मिरवलें ।।२।।
तुका म्हणे माझी भोळिवेची आटी । दावीन शेवटीं कौतुक हें ।।३।।

१३५३
आर्तभूतांप्रति । उत्तम योजाव्या त्या शक्ति ।।१।।
फळ आणि समाधान । तेथें उत्तम कारण ।।धृ।।
अल्पें तो संतोषी। स्थळीं सांपडे उदेसीं ।।२।।
सहज संगम । तुका म्हणे तो उत्तम ।।३।।

१३५४
मुळाचिया मुळें । दुःखें वाढती सकळे ।।१।।
ऐसा योगियांचा धर्म । नव्हे वाढवावा श्रम ।।धृ।।
न कळे आवडी । कोण आहे कैसी घडी ।।२।।
तुका म्हणे थीत । दुःख पाववावें चित्त ।।३।।

१३५५
भाग्यवंतां हें चि काम । मापी नाम वैखरी ।।१।।
आनंदाची पुष्टि अंगीं । श्रोते संगीं उद्धरती ।।धृ।।
पिकविलें तया खाणें किती । पंगतीस सुकाळ ।।२।।
तुका करी प्रणिपात । दंडवत आचारियां ।।३।।

१३५६
लटिकें तें रुचे । साच कोणां ही न पचे ।।१।।
ऐसा माजल्याचा गुण । भोगें कळों येइल सीण ।।धृ।।
वाढवी ममता । नाहीं वरपडला तो दूतां ।।२।।
कांहीं न मनी माकड । तुका उपदेश हेकड ।।३।।

१३५७
कौतुकाची सृष्टी । कौतुकें चि केलें कष्टी ।।१।।
मोडे तरी भलें खेळ । फांके फांकिल्या कोल्हाळ ।।धृ।।
जाणणियासाटीं। भय सामावलें पोटीं ।।२।।
तुका म्हणे चेता । होणें तें तूं च आइता ।।३।।

१३५८
भोवंडींसरिसें । अवघें भोंवत चि दिसे ।।१।।
ठायीं राहिल्या निश्चळ । आहे अचळीं अचळ ।।धृ।।
एक हाकेचा कपाटीं। तेथें आणीक नाद उठी ।।२।।
अभ्रें धांवे शशी । तुका असे ते तें दुसरें भासी ।।३।।

१३५९
नव्हों आम्ही आजिकालीचीं । काचीं कुचीं चाळवणी ।।१।।
एके ठायीं मूळडाळ । ठावा सकळ आहेसी ।।धृ।।
तुमचें आमचेंसें कांहीं । भिन्न नाहीं वांटलें ।।२।।
तुका म्हणे जेथें असें । तेथें दिसें तुमचासा ।।३।।

१३६०
योग्याची संपदा त्याग आणि शांति । उभयलोकीं कीर्ति सोहळा मान ।।१।।
येरयेरांवरी जायांचें उसिणें । भाग्यस्थळीं देणें झाडावेसीं ।।धृ।।
केलिया फावला ठायींचा तो लाहो । तृष्णेचा तो काहो काव्हवितो ।।२।।
तुका म्हणे लाभ अकर्तव्या नांवें । शिवपद जीवें भोगिजेल ।।३।।

१३६१
मरणा हातीं सुटली काया । विचारें या निश्चयें ।।१।।

नासोनियां गेली खंती । सहजस्थिति भोगाचे ।।धृ।।
न देखें सें जालें श्रम । आलें वर्म हाता हें ।।२।।
तुका म्हणे कैची कींव । कोठें जीव निराळा ।।३।।

१३६२
नव्हे ब्रम्हचर्य बाइलेच्या त्यागें । वैराग्य वाउगें देशत्यागें ।।१।।
काम वाढे भय वासनेच्या द्वारें । सांडावें तें धीरें आचावाचे ।।धृ।।
कांपवूनि टिरी शूरत्वाची मात । केलें वाताहात उचित काळें ।।२।।
तुका म्हणे करी जिव्हेसी विटाळ । लटिक्याची मळ स्तुति होतां ।।३।।

१३६३
नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चिंतीं नारायण सर्व भोगीं ।।१।।
मातेचिये खांदीं बाळ नेणे सीण । भावना त्या भिन्न मुंडाविया ।।धृ।।
नको गुंपों भोगीं नको पडों त्यागीं । लावुनि सरें अंगीं देवाचिया ।।२।।
तुका म्हणे नको पुसों वेळोवेळां । उपदेश वेगळा उरला नाहीं ।।३।।

१३६४
अवघी मिथ्या आटी । राम नाहीं तंव कंठीं ।।१।।
सावधान सावधान । उगवीं संकल्पीं हें मन ।।धृ।।
सांडिलें तें मांडे। आघ्र उरल्या काळें दंडे ।।२।।
तुका म्हणे आलें भागा । देउनि चिंतीं पांडुरंगा ।।३।।

१३६५
न संगावें वर्म । जनीं असों द्यावा भ्रम ।।१।।
उगींच लागतील पाठीं । होतीं रितीं च हिंपुटीं ।।धृ।।
सिकविल्या गोटी । शिकोनि धरितील पोटीं ।।२।।
तुका म्हणे सीण । होइल अनुभवाविण ।।३।।

१३६६
जातिविजातीची व्हावयासि भेटी । संकल्प तो पोटीं वाहों नये ।।१।।
होणार तें घडो होणाराच्या गुणें । होइल नारायणें निर्मिलें तें ।।धृ।।
व्याघ्राचिये भुके वधावी ते गाय । याचें नांव काय पुण्य असे ।।२।।
तुका म्हणे न करी विचार पुरता । गरज्याची माता पिता खर ।।३।।

१३६७
शाहाणियां पुरे एक चि वचन । विशारती खुण ते चि त्यासी ।।१।।
उपदेश असे बहुतांकारणें । घेतला तो मनें पाहिजे हा ।।धृ।।
फांसावेना तरिं दुःख घेतें वाव । मग होतो जीव कासावीस ।।२।।
तुका म्हणे नको राग धरूं झोंडा । नुघडितां पीडा होइल डोळे ।।३।।

१३६८
अभिन्नव सुख तरि या विचारें । विचारावें बरें संतजनीं ।।१।।
रूपाच्या आठवें दोन्ही ही आपण । वियोगें तो क्षीण होत नाहीं ।।धृ।।
पूजा तरि चित्तें कल्पा तें ब्रम्हांड । आहाच तो खंड एकदेसी ।।२।।
तुका म्हणे माझा अनुभव यापरि । डोई पायांवरि ठेवीतसें ।।३।।

१३६९
नटनाट्य तुम्ही केलें याच साटीं । कवतुकें दृष्टी निववावी ।।१।।
नाहीं तरि काय कळलें चि आहे । वाघ आणि गाय लांकडाची ।।धृ।।
अभेद चि असे मांडियेलें खेळा । केल्या दीपकळा बहुएकी ।।२।।
तुका म्हणे रूप नाहीं दर्पणांत । संतोषाची मात दुसरें तें ।।३।।

१३७०
रवीचा प्रकाश । तो चि निशी घडे नाश । जाल्या बहुवस । तरि त्या काय दीपिका ।।१।।
आतां हा चि वसो जीवीं । माझे अंतरी गोसावीं । होऊं येती ठावीं । काय वर्मे याच्यानें ।।धृ।।
सवें असतां धणी । आड येऊं न सके कोणी । न लगे विनवणी । पृथकाची करावी ।।२।।
जन्माचिया गति । येणें अवघ्या खुंटती । कारण ते प्रीति । तुका म्हणे जवळी ।।३।।

१३७१
ऐसे सांडुनियां घुरे । किविलवाणी दिसां कां रे । कामें उर भरे । हातीं नुरे मृत्तिका ।।१।।
उदार हा जगदानी । पांडुरंग अभिमानी । तुळसीदळ पाणी । चिंतनाचा

भुकेला ।।धृ।।
न लगे पुसावी चाकरी । कोणी वकील ये घरीं । त्याचा तो चाकरी । पारपत्य सकळ ।।२।।
नाहीं आडकाटी । तुका म्हणे जातां भेटी । न बोलतां मिठी । उगी च पायीं घालावी ।।३।।

१३७२
उपकारी असे आरोणि उरला । आपुलें तयाला पर नाहीं ।।१।।
लाभावरि घ्यावें सांपडलें काम । आपला तो श्रम न विचारी ।।धृ।।
जीवा ऐसें देखे आणिकां जीवांसी । निखळ चि रासि गुणांची च ।।२।।
तुका म्हणे देव तयांचा पांगिला । न भंगे संचला धीर सदा ।।३।।

१३७३
कोणा पुण्यें यांचा होईन सेवक । जींहीं द्वंदादिक दुराविलें ।।१।।
ऐसें वर्म मज दावीं नारायणा । अंतरीं च खुणा प्रकटोनि ।।धृ।।
बहु अवघड असे संतभेटी । तरि जगजेठी करुणा केली ।।२।।
तुका म्हणे मग नयें वृत्तीवरी । सुखाचे शेजारीं पहुडईन ।।३।।

१३७४
क्षणक्षणां सांभाळितों । साक्षी होतों आपुला ।।१।।
न घडावी पायीं तुटी । मन मुठी घातलें ।।धृ।।
विचारतों वचनां आधीं । धरूनि शुद्धी ठेविली ।।२।।
तुका म्हणे मागें भ्यालों ।। तरीं जालों जागृत ।।३।।

१३७५
आणूनियां मना । आवघ्या धांडोळिल्या खुणा । देखिला तो राणा । पंढरपूरनिवासी ।।१।।
यासी अनुसरल्या काय । घडे ऐसें वांयां जाय । देखिले ते पाय । सम जीवीं राहाती ।।धृ।।
तो देखावा हा विध । चिंतनें तें कार्य सिद्ध । आणिकां संबंध । नाहीं पर्वकाळासी ।।२।।
तुका म्हणे खळ । हो क्षणें चि निर्मळ । जाऊनियां मळ । वाळवंटीं नाचती ।।३।।

१३७६
धरितां ये पंढरीची वाट । नाहीं संकट मुक्तीचें ।।१।।
वंदूं येती देव पदें । त्या आनंदें उत्साहें ।।धृ।।
नृत्यछंदें उडती रज । जे सहज चालतां ।।२।।
तुका म्हणे गरुड टके । वैष्णव निके संभ्रम ।।३।।

१३७७
नाम घेतां मन निवे । जिव्हे अमृत चि स्त्रवे । होताती बरवे । ऐसे शकुन लाभाचे ।।१।।
मन रंगलें रंगलें । तुझ्या चरणीं स्थिरावलें । केलिया विठ्ठलें । ऐसी कृपा जाणावी ।।धृ।।
जालें भोजनसें दिसे । चिरा पडोनि ठेला इच्छे । धालियाच्या ऐसें। अंगा येती उद्‌गार ।।२।।
सुख भेटों आलें सुखा । निध सांपडला मुखा । तुका म्हणे लेखा । आतां नाहीं आनंदा ।।३।।

१३७८
रुची रुची घेऊं गोडी । प्रेमसुखें जाली जोडी ।।१।।
काळ जाऊं नेदूं वांयां । चिंतितां विठोबाच्या पायां ।।धृ।।
करूं भजन भोजन । धणी घेऊं नारायण ।।२।।
तुका म्हणे जीव धाला । होय तुझ्यानें विठ्ठला ।।३।।

१३७९
वेळोवेळां हें चि सांगें । दान मागें जगासि ।।१।।
विठ्ठल हे मंगळवाणी । घेऊं धणी पंगती ।।धृ।।
वेचतसे पळें पळ । केलें बळ पाहिजे ।।२।।
तुका म्हणे दुश्चित नका । राहों फुका नाड हा ।।३।।

१३८०
आणीक ऐसें कोठें सांगा । पांडुरंगा सारिखें ।।१।।
दैवत ये भूमंडळीं । उद्धार कळी पावितें ।।धृ।।
कोठें कांहीं कोठें कांहीं । शोध ठायीं स्थळासी ।।२।।

आनेत्रींचें तीथाअ नासे । तीथाअ वसे वज्रलेप ।।३।।
पांडुरंगींचें पांडुरंगीं । पाप अंगीं राहेना ।।४।।
ऐसें हरें गिरिजेप्रति । गुह्य स्थिती सांगितली ।।५।।
तुका म्हणे तीर्थ क्षेत्र । सर्वत्र हें दैवत ।।६।।

१३८१
पुराणींचा इतिहास । गोड रस सेविला ।।१।।
नव्हती हे आहाच बोल । मोकळें फोल कवित्व ।।धृ।।
भावें घ्या रे भावें घ्या रे । येगदा जा रे पंढरिये ।।२।।
भाग्यें आलेति मनुष्यदेहा । तो हा पाहा विठ्ठल ।।३।।
पापपुण्या करील झाडा । जाइल पीडा जन्माची ।।४ ।।
घ्यावी हातीं टाळदिंडी । गावे तोंडीं गुणवाद ।।५।।
तुका म्हणे घटापटा । न लगे वाटा शोधाव्या ।।६।।

१३८२
कर्म धर्म नव्हती सांग । उण्या अंगें पतन ।।१।।
भलत्या काळें नामावळी । सुलभ भोळी भाविकां ।।धृ।।
प्रायश्चित्तें पडती पायां । गाती तयां वैष्णवां ।।२।।
तुका म्हणे नुपजे दोष करा घोष आनंदे ।।३।।

१३८३
पाहा रे हें दैवत कैसें । भक्तिपिसें भाविक ।।१।।
पाचारिल्या सरिसें पावे । ऐसें सेवे बराडी ।।धृ।।
शुल्क काष्ठीं गुरुगुरी । लाज हरि न धरी ।।२।।
तुका म्हणे अर्धनारी । ऐसीं धरी रूपडीं ।।३।।

१३८४
बहुत सोसिले मागें न कळतां । पुढती काय आतां अंध व्हावें ।।१।।
एकाचिये अंगीं हें ठेवावें लावून । नये भिन्न भिन्ना चांचपडो ।।धृ।।
कोण होईल तो ब्रम्हांडचाळक । आपणें चि हाके देईल हाके ।।२।।
तुका म्हणे दिलीं चेतवूनि सुणीं । कौतुकावांचूनि नाहीं छळ ।।३।।

१३८५

आश्चर्य या वाटे नसत्या छंदाचें । कैसें दिलें साचें करोनियां ।।१।।
दुजियासी तंव अकळ हा भाव । करावा तो जीव साक्ष येथें ।।धृ।।
एकीं अनेकत्व अनेकीं एकत्व । प्रकृतिस्वभाव प्रमाणें चि ।।२।।
तुका म्हणे करूं उगवूं जाणसी । कुशळ येविशीं तुम्ही देवा ।।३।।

१३८६
अस्त नाहीं आतां एक चि मोहोरा । पासूनि अंधारा दुरि जालों ।।१।।
साक्षत्वें या जालों गुणाचा देखणा । करीं नारायणा तरी खरें ।।धृ।।
आठवें विसरु पडियेला मागें । आलें तें चि भागें यत्न केलें ।।२।।
तुका म्हणे माझा विनोद देवासी । आम्ही तुम्हां ऐसीं दोन्ही नव्हों ।।३।।

१३८७
क्षर अक्षर हे तुमचे विभाग । कासयानें जग दुरी धरा ।।१।।
तैसे आम्ही नेणों पालटों च कांहीं । त्यागिल्याची नाहीं मागें चाड ।।धृ।।
प्रतिपादिता तूं समविषमाचा । प्रसाद तो याचा पापपुण्य ।।२।।
तुका म्हणे तुम्हां नाना अवगणीं । लागे संपादणी लटिक्याची ।।३।।

१३८८
सर्वरसीं मीनलें चित्त । अखंडित आनंदु ।।१।।
गोत पति विश्वंभरीं । जाला हरि सोयरा ।।धृ।।
वोळखी ते एका नांवें । इतरभावें खंडणा ।।२।।
तुका म्हणे नांवें रूपें । दुसरीं पापें हारपलीं ।।३।।

१३८९
मीं हें ऐसें काय जाती । अवघड किती पाहातां ।।१।।
नाहीं होत उल्लंघन । नसतां भिन्न दुसरें ।।धृ।।
अंधारानें तेज नेलें। दृष्टीखालें अंतर ।।२।।
तुका म्हणे सवें देव । घेतां ठाव दावील ।।३।।

१३९०
कवेश्वरांचा तो आम्हांसी विटाळ । प्रसाद वोंगळ चिवडिती ।।१।।
दंभाचे आवडी बहिराट अंधळे । सेवटासि काळें होइल तोंड ।।धृ।।
सोन्यासेजारी तों लाखेची जतन । सतंत ते गुण जैसेतैसे ।।२।।

सेव्य सेववता न पडतां ठावी । तुका म्हणे गोवी पावती हीं ।।३।।

१३९१
वाढलियां मान न मनावी निश्चिती । भूतांचिये प्रीती भूतपण ।।१।।
म्हणऊनि मना लावावी कांचणी । इंद्रियांचे झणी ओढी भरे ।।धृ।।
एका एकपणें एकाचिये अंगीं । लागे रंग रंगीं मिळलिया ।।२।।
तुका म्हणे देव निष्काम निराळा । जीवदशे चाळा चळणांचा ।।३।।

१३९२
माया साक्षी आम्ही नेणों भीड भार । आप आणि पर नाहीं दोन्ही ।।१।।
सत्याचिये साटीं अवघा चि भरे । नावडे व्यापार तुटीचा तो ।।धृ।।
पोंभाळिता चरे अंतरींचें दुःख । लांसें फांसें मुख उघडावें ।।२।।
तुका म्हणे नव्हे स्फीतीचा हा ठाव । निवाड्यासी देव साक्षी केला ।।३।।

१३९३
संतां आवडे तो काळाचा ही काळ । समर्थाचें बाळ जेवीं समर्थ ।।१।।
परिसतां तेथें नाहीं एकविणें । मोहें न पवे सीण ऐसें राखे ।।धृ।।
केले अन्याय ते सांडवी उपचारें । न देखें दुसरें नासा मूळ ।।२।।
तुका म्हणे मुख्य कल्पतरुछाया । काय नाहीं दया तये ठायीं ।।३।।

१३९४
संतांच्या धीकारें अमंगळ जिणें । विश्वशत्रु तेणें सांडी परि ।।१।।
कुळ आणि रूप वांयां संवसार । गेला भरतार मोकलितां ।।धृ।।
मूळ राखे तया फळा काय उणें । चतुर लक्षणें राखों जाणे ।।२।।
तुका म्हणे सायास तो एके ठायीं । दीप हातीं तई अवघें बरें ।।३।।

१३९५
ओलें मूळ भेदी खडकाचें अंग । आभ्यासासी सांग कार्यसिद्धि ।।१।।
नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड । नाहीं कईवाड तोंच वरि ।।धृ।।
दोरें चिरा कापे पडिला कांचणी । अभ्यासें सेवनीं विष पडे ।।२।।
तुका म्हणे कैंचा बैसण्यासी ठाव । जठरीं बाळा वाव एकाएकीं ।।३।।

१३९६

अमर आहां अमर आहां । खरें कीं पाहा खोटें हें ।।१।।
न म्हणां देह माझा ऐसा । मग भरवसा कळेल ।।धृ।।
कैंचा धाक कैंचा धाक । सकळिक हें आपुलें ।।२।।
देव चि बरे देव चि बरे । तुका म्हणे खरे तुम्ही ।।३।।

१३९७
काम नाहीं काम नाहीं । जालों पाहीं रिकामा ।।१।।
फावल्या या करूं चेष्टा । निश्चळ दृष्टा बैसोनि ।।धृ।।
नसत्या छंदें नसत्या छंदें । जग विनोदें विन्हडतसे ।।२।।
एकाएकीं एकाएकीं । तुका लोकीं निराळा ।।३।।

१३९८
हातीं घेऊनियां काठी । तुका लागला कळिवरा पाठी ।।१।।
नेऊनि निजविलें स्मशानीं । माणसें जाळी ते ठाकणीं ।।धृ।।
काडिलें तें ओढें । मागील उपचाराचें पुढें ।।२।।
नाहीं वाटों आला भेव । सुख दुःख भोगिता देव ।।३।।
याजसाटीं हें निर्वाण । केलें कसियेलें मन ।।४।।
तुका म्हणे अनुभव बरा । नाहीं तरी सास्त होय चोरा ।।५।।

१३९९
कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ।।१।।
प्रेमाछंदें नाचे डोले । हारपला देहभाव ।।धृ।।
एकदेशीं जीवकळा। हा सकळां सोयरा ।।२।।
तुका म्हणे उरला देव । गेला भेव त्या काळें ।।३।।

१४००
न बोलेसी करा वाचा । उपाधीचा संबंध ।।१।।
एका तुमच्या नामाविण । अवघा सीण कळतसे ।।धृ।।
संकल्पाचे ओढी मन । पापपुण्य सम चि ।।२।।
तुका म्हणे नारायणीं । पावो वाणी विसांवा ।।३।।

१४०१
प्रारब्धा हातीं जन । सुख सीण पावतसे ।।१।।

करितां घाईळाचा संग । अंगें अंग माखावें ।।धृ।।
आविसा अंगें पीडा वसे । त्यागें असे बहु सुख ।।२।।
तुका म्हणे जीव भ्याला । अवघ्या आला बाहेरी ।।३।।

१४०२
आशा ते करविते बुद्धीचा लोप । संदेह तें पाप कैसें नव्हे ।।१।।
आपला आपण करावा विचार । प्रसन्न तें सार मन गोही ।।धृ।।
नांवें रूपें अंगीं लाविला विटाळ । होतें त्या निर्मळ शुद्ध बुद्ध ।।२।।
अंधळ्यानें नये देखण्याची चाली । चालों ऐसी बोली तुका बोले ।।३।।

१४०३
जळो आतां नांव रूप । माझें पाप गांठींचें ।।१।।
संतांचिया चरणरजें । उतरूं ओझें मातीचें ।।धृ।।
लटिकियाचा अभिमान । होता सीण पावित ।।२।।
तुका म्हणे अरूपींचें । सुख साचें निनांवें ।।३।।

१४०४
निंदा स्तुती करवी पोट । सोंग दाखवी बोभाट ।।१।।
जटा राख विटंबना । धीर नाहीं क्षमा मना ।।धृ।।
शृंगारिलें मढें । जीवेंविण जैसें कुडें ।।२।।
तुका म्हणे रागें । भलतें चावळे वाउगें ।।३।।

१४०५
भिक्ष्यापत्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें । ऐसियासी नारायणें । उपेक्षीजे सर्वथा ।।१।।
देवा पायीं नाहीं भाव। भक्ति वरी वरी वाव । समर्पिला जीव । नाहीं तो हा व्यभिचार ।।धृ।।
जगा घालावें सांकडें । दीन होऊनि बापुडें । हें चि अभाग्य रोकडें । मूळ आणि विश्वास ।।२।।
काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार । तुका म्हणे सार । दृढ पाय धरावे ।।३।।

१४०६

भावबळें विष्णुदास । नाहीं नास पावत ।।१।।
योगभाग्यें घरा येती । सर्व शक्ति चालत ।।धृ।।
पित्याचें जें काय धन । पुत्रा कोण वंचील ।।२।।
तुका म्हणे कडे बैसों । तेणें असों निर्भर ।।३।।

१४०७
कोरड्या गोठी चटक्या बोल । शिकल्या सांगे नाहीं ओल ।।१।।
कोण यांचें मना आणी । ऐकों कानीं नाइकोनि ।।धृ।।
घरोघरीं सांगती ज्ञान । भूस सिणें कांडिती ।।२।।
तुका म्हणे आपुल्या मति । काय रितीं पोकळें ।।३।।

१४०८
नव्हतियाचा सोस होता । झडो आतां पदर ।।१।।
देखणें तें देखियेलें । आतां भलें साक्षित्वें ।।धृ।।
लाभें कळों आली हानि । राहों दोन्हीं निराळीं ।।२।।
तुका म्हणे एकाएकीं । हा कां लोकीं पसारा ।।३।।

१४०९
सोसें वाढे दोष । जाला न पालटे कस ।।१।।
ऐसें बरवें वचन । करितां तें नारायण ।।धृ।।
असे प्रारब्ध नेमें । श्रमुचि उरे श्रम ।।२।।
सुख देते शांती । तुका म्हणे धरितां चित्तीं ।।३।।

१४१०
काय शरीरापें काम । कृपा साधावया प्रेम । उचिताचे धर्म । भागा आले ते करूं ।।१।।
देईन हाक नारायणा । तें तों नाकळे बंधना । पंढरीचा राणा । आइकोन धांवेल ।।धृ।।
सातांपांचांचें गोठलें । प्रारब्धें आकारलें । आतां हें संचलें । असो भोगा सांभाळीं ।।२।।
फावली ते बरवी संधि । सावधान करूं बुद्धी । तुका म्हणे मधीं । कोठें नेघें विसावा ।।३।।

१४११
न लगे देशकाळ । मंत्रविधानें सकळ । मनें चि निश्चळ । करूनि करुणा भाकावी ।।१।।
येतो बैसलिया ठाया । आसणें व्यापी देवराया । निर्मळ ते काया । अधिष्ठान तयाचें ।।धृ।।
कल्पनेचा साक्षी । तरि आदरें चि लक्षी । आवडीनें भक्षी । कोरडें धान्य मटमटां ।।२।।
घेणें तरि भाव । लक्षी दासांचा उपाव। तुका म्हणे जीव । जीवीं मेळविल अनंत ।।३।।

१४१२
नाहीं आलें भक्तिसुख अनुभवा । तो मी ज्ञान देवा काय करूं ।।१।।
नसावें जी तुम्ही कांहीं निश्चिंतीनें । माझिया वचनें अभेदाच्या ।।धृ।।
एकाएकीं मन नेदी समाधान । देखिल्या चरण वांचूनियां ।।२।।
तुका म्हणे वाचा गुणीं लांचावली । न राह उगली मौन्य मज ।।३।।

१४१३
मागतां विभाग । कोठें लपाल जी मग ।।१।।
संत साक्षी या वचना । त्यांसी ठाउकिया खुणा ।।धृ।।
होइन धरणेकरी। मग मी रिघों नेदीं बाहेरी ।।२।।
तुका म्हणे मी अक्षर । तुज देवपणाचा भार ।।३।।

१४१४
मिटवण्याचे धनी । तुम्ही वेवसाय जनीं ।।१।।
कोण पडे ये लिगाडीं । केली तैसीं उगवा कोडीं ।।धृ।।
केलें सांगितलें काम । दिले पाळूनियां धर्म ।।२।।
तुका म्हणे आतां । असो तुमचें तुमचे माथां ।।३।।

१४१५
समर्पिली वाणी । पांडुरंगीं घेते धणी ।।१।।
पूजा होते मुक्ताफळीं । रस ओविया मंगळीं ।।धृ।।
धार अखंडित । ओघ चालियेला नित ।।२।।
पूर्णाहुति जीवें । तुका घेऊनि ठेला भावें ।।३।।

१४१६
अवघा चि आकार ग्रासियेला काळें । एक चि निराळें हरिचें नाम ।।१।।
धरूनि राहिलों अविनाश कंठीं । जीवन हें पोटीं सांटविलें ।।धृ।।
शरीरसंपत्ति मृगजळभान । जाईल नासोन खरें नव्हे ।।२।।
तुका म्हणे आतां उपाधीच्या नांवें । आणियेला देवें वीट मज ।।३।।

१४१७
बोलणें चि नाहीं । आतां देवाविण कांहीं ।।१।।
एकसरें केला नेम । देवा दिले क्रोध काम ।।धृ।।
पाहेन ते पाय । जोंवरि हे दृष्टि धाय ।।२।।
तुका म्हणे मनें । हे चि संकल्प वाहाणें ।।३।।

१४१८
येथूनियां ठाव । अवघे लक्षायाचे भाव ।।१।।
उंची देवाचे चरण । तेथें जालें अधिष्ठान ।।धृ।।
आघातावेगळा । असे ठाव हा निराळा ।।२।।
तुका म्हणे स्थळ । धरूनि राहिलों अचळ ।।३।।

१४१९
भरला दिसे हाट । अवघी वाढली खटपट । संचिताचे वाट । वाटाऊनि फांकती ।।१।।
भोगा ऐसे ठायाठाव । कर्मा त्रिविधाचे भाव । द्रष्टा येथें देव । विरहित संकल्पा ।।धृ।।
दिला पाडूनियां धडा । पापपुण्यांचा निवाडा । आचरती गोडा । आचरणें आपुलाल्या ।।२।।
तुका म्हणे पराधीनें । जालीं ओढलिया ऋणें । तुटती बंधनें । जरि देवा आळविते ।।३।।

१४२०
आला भागासी तो करीं वेवसाव । परि राहो भाव तुझ्या पायीं ।।१।।
काय चाले तुम्हीं बांधलें दातारा । वाहिलिया भारा उसंतितों ।।धृ।।
शरीर तें करी शरीराचे धर्म । नको देऊं वर्म चुकों मना ।।२।।

चळण फिरवी ठाव बहुवस । न घडो आळस चिंतनाचा ।।३।।
इंद्रियें करोत आपुले व्यापार । आवडीसी थार देईं पायीं ।।४।।
तुका म्हणे नको देऊं काळा हातीं । येतों काकुलती म्हणऊनि ।।५।।

१४२१
आम्हां अवघें भांडवल । येथें विठ्ठल एकला ।।१।।
कायावाचामनोभावें । येथें जीवें वेचलों ।।धृ।।
परतें कांहीं नेणें दुजें। तत्त्वबीजें पाउलें ।।२।।
तुका म्हणे संतसंगें । येणें रंगें रंगलों ।।३।।

१४२२
साहोनियां टोले उरवावें सार । मग अंगीकार खऱ्या मोलें ।।१।।
भोगाचे सांभाळीं द्यावें कळिवर । संचित चि थार मोडूनियां ।।धृ।।
महत्त्वाचे ठायीं भोगावी अप्रतिष्ठा । विटवावें नष्टां पंचभूतां ।।२।।
तुका म्हणे मग कैंचा संवसार । जयाचा आदर तें चि व्हावें ।।३।।

१४२३
निर्वैर होणें साधनाचें मूळ । येर ते विल्हाळ सांडीमांडी ।।१।।
नाहीं चालों येती सोंगसंपादणी । निवडे अवसानीं शुद्धाशुद्ध ।।धृ।।
त्यागा नांव तरी निर्विषयवासना । कारीयेकारणांपुरते विधि ।।२।।
तुका म्हणे राहे चिंतनीं आवडी । येणें नांवें जोडी सत्यत्वेंशीं ।।३।।

१४२४
पशु ऐसे होती ज्ञानी । चर्वणीं या विषयांचे ।।१।।
ठेवूनियां लोभीं लोभ । जाला क्षोभ आत्मत्वीं ।।धृ।।
केला आणिकां वाढी पाक । खाणें ताक मूर्खासी ।।२।।
तुका म्हणे मोठा घात । वाताहात हा देह ।।३।।

१४२५
कां जी धरिलें नाम । तुम्ही असोनि निष्काम ।।१।।
कोणां सांगतसां ज्ञान । ठकाठकीचें लक्षण ।।धृ।।
आवडीनें नाचें। आहे तरी पुढें साचें ।।२।।
तुका म्हणे प्रेम । नाहीं भंगायाचें काम ।।३।।

१४२६
खरें बोले तरी । फुकासाठीं जोडे हरी ।।१।।
ऐसे फुकाचे उपाय । सांडूनियां वांयां जाय ।।धृ।।
परउपकार । एका वचनाचा फार ।।२।।
तुका म्हणे मळ । मनें सांडितां शीतळ ।।३।।

१४२७
दया क्षमा शांति । तेथें देवाची वसति ।।१।।
पावे धांवोनियां घरा । राहे धरोनियां थारा ।।धृ।।
कीर्तनाचे वाटे । बराडिया ऐसा लोटे ।।२।।
तुका म्हणे घडे । पूजा नामें देव जोडे ।।३।।

१४२८
शिष्यांची जो नेघे सेवा । मानी देवासारिखें ।।१।।
त्याचा फळे उपदेश । आणिकां दोष उफराटे ।।धृ।।
त्याचें खरें ब्रम्हज्ञान । उदासीन देहभावीं ।।२।।
तुका म्हणे सत्य सांगें । योत रागें येती ते ।।३।।

१४२९
माझी मेलीं बहुवरिं । तूं कां जैसा तैसा हरी ।।१।।
विठो कैसा वांचलासि । आतां सांग मजपाशीं ।।धृ।।
तुज देखतां चि माझा । बाप मेला आजा पणजा ।।२।।
आम्हां लागलेंसे पाठी । बालत्व तारुण्यें काठीं ।।३।।
तुज फावलें तें मागें । कोणी नसतां वादिलागें ।।४।।
तुका म्हणे तुझ्या अंगीं । मज देखिल लागलीं औघीं ।।५।।

१४३०
आणीक कोणाचा न करीं मी संग । जेणें होय भंग माझ्या चित्ता ।।१।।
विठ्ठलावांचूनि आणीक जे वाणी । नाइकें मी कानीं आपुलिया ।।धृ।।
समाधानासाटीं बोलावी हे मात । परि माझें चित्त नाहीं कोठें ।।२।।
जिवाहूनि मज ते चि आवडती । आवडे ज्या चित्तीं पांडुरंग ।।३।।
तुका म्हणे माझें तो चि जाणे हित । आणिकांच्या चित्त नेदीं बोला ।।४।।

१४३१
आशा हे समूळ खाणोनि काडावी । तेव्हां चि गोसावी व्हावें तेणें ।।१।।
नाहीं तरी सुखें असावें संसारीं । फजिती दुसरी करूं नये ।।धृ।।
आशा मारूनिया जयवंत व्हावें । तेव्हां चि निघावें सर्वांतूनि ।।२।।
तुका म्हणे जरीं योगाची तांतडी । आशेची बीबुडी करीं आधीं ।।३।।

१४३२
निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुकों नये ।।१।।
निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास । पाहों नये वास आणिकांची ।।२।।
तुका म्हणे ऐसा कोणें उपेक्षिला । नाहीं ऐकिला ऐसा कोणीं ।।३।।

१४३३
नामाचें चिंतन प्रगट पसारा । असाल तें करा जेथें तेथें ।।१।।
सोडवील माझा स्वामी निश्चयेसीं । प्रतिज्ञा हे दासीं केली आम्हीं ।।धृ।।
गुण दोष नाहीं पाहात कीर्तनीं । प्रेमें चक्रपाणी वश्य होय ।।२।।
तुका म्हणे कडु वाटतो प्रपंच । रोकडे रोमांच कंठ दाटे ।।३।।

१४३४
नाम म्हणतां मोक्ष नाहीं । ऐसा उपदेश करिती कांहीं । बधिर व्हावें त्याचे ठायीं । दुष्ट वचन वाक्य तें ।।१।।
जयाचे राहिलें मानसीं । तें चि पावले तयासी । चांचपडतां मेलीं पिसीं । भलतैसीं वाचाळें ।।धृ।।
नवविधीचा निषेध । जेणें मुखें करिती वाद । जन्मा आले निंद्य । शूकरयाती संसारा ।।२।।
काय सांगों वेळोवेळां । आठव नाहीं चांडाळा । नामासाठीं बाळा । क्षीरसागरीं कोंडिलें ।।३।।
आपुलिया नामासाठीं । लागे शंखासुरापाठीं। फोडोनियां पोटीं । वेद चारी काढिले ।।४।।
जगीं प्रसिद्ध हे बोली। नामें गणिका तारिली । आणिकें ही उद्धरिलीं । पातकी महादोषी ।।५।।
जे हे पवाडे गर्जती । नाम प्रल्हादाचा चित्तीं । जळतां बुडतां घातीं । राखे हातीं विषाचे ।।६।।

काय सांगों ऐशीं किती । तुका म्हणे नामख्याती । नरकाप्रती जाती ।
निषेधिती तीं एकें ।।७।।

१४३५
किती या काळाचा सोसावा वळसा । लागला सरिसा पाठोवाठीं ।।१।।
लक्ष चौऱ्याशीची करा सोडवण । रिघा या शरण पांडुरंगा ।।धृ।।
उपजल्या पिंडा मरण सांगातें । मरतें उपजतें सवें चि तें ।।२।।
तुका म्हणे माळ गुंतली राहाटीं । गाडग्याची सुटी फुटलिया ।।३।।

१४३६
गासी तरि एक विठ्ठल चि गाईं । नाहीं तरि ठायीं राहें उगा ।।१।।
अद्वैतीं तों नाहीं बोलाचें कारण । जाणीवेचा श्रम करिसी वांयां ।।२।।
तुका म्हणे किती करावी फजिती । लाज नाहीं नीतिं निलाजिरा ।।३।।

१४३७
जयाचिये वाचे नये हा विठ्ठल । त्याचे मज बोल नावडती ।।१।।
शत्रु तो म्यां केला न म्हणें आपुला । जो विन्मुख विठ्ठला सर्वभावें ।।२।।
जयासी नावडे विठोबाचें नाम । तो जाणा अधम तुका म्हणे ।।३।।

१४३८
आम्हांसी तों नाहीं आणीक प्रमाण । नामासी कारण विठोबाच्या ।।१।।
घालूनियां कास करितो कैवाड । वागों नेदीं आड कळिकाळासी ।।धृ।।
अबद्ध वांकडें जैशातैशा परी । वाचे हरि हरि उच्चारावें ।।२।।
तुका म्हणे आम्हां सांपडलें निज । सकळां हें बीज पुराणांचें ।।३।।

१४३९
जीव तो चि देव भोजन ते भक्ति । मरण तेचि मुक्ति पापांड्याची ।।१।।
पिंडाच्या पोषकी नागविलें जन । लटिकें पुराण केलें वेद ।।धृ।।
मना आला तैसा करिती विचार । म्हणती संसार नाहीं पुन्हा ।।२।।
तुका म्हणे पाठीं उडती यमदंड । पापपुण्य लंड न विचारी ।।३।।

१४४०
भक्तांचा महिमा भक्त चिं जाणती । दुर्लभ या गति आणिकांसी ।।१।।

जाणोनि नेणते जाले तेणें सुखें । नो बोलोनि मुखें बोलताती ।।धृ।।
अभेदूनि भेद राखियेला अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ।।२।।
टाळ घोष कथा प्रेमाचा सुकाळ । मूढ लोकपाळ तरावया ।।३।।
तुका म्हणे हें तों आहे तयां ठावें । जिहीं एक्या भावें जाणीतलें ।।४।।

१४४१
आशा तृष्णा माया अपमानाचें बीज । नासिलिया पूज्य होईजेतें ।।१।।
अधीरासी नाहीं चालों जातां मान । दुर्लभ दरुषण धीर त्याचें ।।२।।
तुका म्हणे नाहीं आणिकांसी बोल । वांयां जाय मोल बुद्धीपाशीं ।।३।।

१४४२
चिंतनें सरे तो धन्य काळ । सकळ मंगळ मंगळांचें ।।१।।
संसारसिंधु नाहीं हरिदासा । गर्भवास कैसा नेणती ते ।।धृ।।
जनवन ऐसें कृपेच्या सागरें । दाटला आभारें पांडुरंग ।।२।।
तुका म्हणे देवा भक्तांचे बंधन । दाखविलें भिन्न परी एक ।।३।।

१४४३
मोक्षाचें आम्हांसी नाहीं अवघड । तो असे उघाड गांठोळीस ।।१।।
भक्तीचे सोहळे होतील जीवासी । नवल तेविशीं पुरवितां ।।धृ।।
ज्याचें त्यासी देणें कोण तें उचित । मानूनियां हित घेतों सुख ।।२।।
तुका म्हणे सुखें देईं संवसार । आवडीसी थार करीं माझे ।।३।।
।।१२।।

१४४४
चिंतनासी न लगे वेळ । सर्व काळ करावें ।।१।।
सदा वाचे नारायण । तें वदन मंगळ ।।धृ।।
पढिये सर्वोत्तमा भाव । येथें वाव पसारा ।।२।।
ऐसें उपदेशी तुका । अवघ्या लोकां सकळां ।।३।।

१४४५
अंतराय पडे गोविंदीं अंतर । जो जो घ्यावा भार तो चि बाधी ।।१।।
बैसलिये ठायीं आठवीन पाय । पाहीन तो ठाय तुझा देवा ।।धृ।।
अखंड तें खंडे संकल्पीं विकल्प । मनोजन्य पाप रज्जुसर्प ।।२।।

तुका म्हणे विश्वीं विश्वंभर वसे । राहों ऐसे दशे सुखरूप ।।३।।

१४४६
एकाचिया घाट्या टोके । एक फिके उपचार ।।१।।
ऐसी सवे गोवळिया । भाव तया पढियंता ।।धृ।।
एकाचेथें उच्छिष्ट खाय । एका जाय ठकोणि ।।२।।
तुका म्हणे सोपें । बहु रूपें अनंत ।।३।।

१४४७
कोठें नाहीं अधिकार । गेले नर वांयां ते ।।१।।
ऐका हें सोपें वर्म । न लगे श्रम चिंतना ।।धृ।।
मृत्याचिये अंगीं छाये । उपाये चि खुंटतां ।।२।।
तुका म्हणे अवघे जन । येथें मन असों द्या ।।३।।

१४४८
ज्याणें ज्याणें जैसें ध्यावें । तैसें व्हावें कृपाळें ।।१।।
सगुणनिर्गुणांचा ठाव । विटे पाव धरियेले ।।धृ।।
अवघें साकरेचें अंग । नये व्यंग निवडितां ।।२।।
तुका म्हणे जें जें करी । तें तें हरी भोगिता ।।३।।

१४४९
आचरती कर्मे । तेथें काळें कर्मधर्मे ।।१।।
खेळे गोवळियांसवें । करिती तें त्यांचें साहावें ।।धृ।।
यज्ञमुखें घांस । मंत्रपूजेसी उदास ।।२।।
तुका म्हणे चोरी । योगियां ही सवें करी ।।३।।

१४५०
नामाचे पवाडे बोलती पुराणें । होऊनि कीर्तन तो चि ठेला ।।१।।
आदिनाथा कंठीं आगळा हा मंत्र । आवडीचें स्तोत्र सदा घोकी ।।धृ।।
आगळें हे सार उत्तमा उत्तम । ब्रम्हकर्मा नाम एक तुझें ।।२।।
तिहीं त्रिभुवनीं गमन नारदा । हातीं विणा सदा नाम मुखीं ।।३।।
परिक्षिती मृत्यु सातां दिवसांचा । मुक्त जाला वाचा उच्चारितां ।।४।।
कोळियाची कीर्ति वाढली गहन । केलें रामायण रामा आधीं ।।५।।

सगुण निर्गुण तुज म्हणे वेद । तुका म्हणे भेद नाहीं नांवा ।।६।।

१४५१
भूतदयापरत्वें जया तया परी । संत नमस्कारीं सर्वभावें ।।१।।
शिकल्या बोलाचा धरीसील ताठा । तरी जासी वाटा यमपंथें ।।धृ।।
हिरा परिस मोहरा आणीक पाषाण । नव्हे परी जन संतां तैसी ।।२।।
सरितां वाहाळां गंगे सागरा समान । लेखी तयाहून अधम नाहीं ।।३।।
आणीक अमुप होती तारांगणें । रविशशिमानें लेखूं नये ।।४।।
तुका म्हणे नाहीं नरमता अंगी । नव्हे तें फिरंगी कठिण लोह ।।५।।

१४५२
आणीक कांहीं मज नावडे मात । एक पंढरिनाथ वांचुनिया ।।१।।
त्याची च कथा आवडे कीर्तन । तें मज श्रवणें गोड लागे ।।२।।
तुका म्हणे संत म्हणोत भलतें । विठ्ठलापरतें न मनी कांहीं ।।३।।

१४५३
ठेवा जाणीव गुंडून । येथें भाव चि प्रमाण ।।१।।
एका अनुसरल्या काज । अवघें जाणें पंढरिराज ।।धृ।।
तर्कवितर्कासी वाव न लागे सायासीं ।।२।।
तुका म्हणे भावेंविण । अवघा बोलती तो सीण ।।३।।

१४५४
येथें दुसरी न सरे आटी । देवा भेटी जावया ।।१।।
तो चि ध्यावा एका चित्तें । करूनि रितें कळिवर ।।धृ।।
षडउर्मी हृदयांत । यांचा अंत पुरवूनि ।।२।।
तुका म्हणे खुंटे आस । तेथें वास करी तो ।।३।।

१४५५
मुक्त तो आशंका नाहीं जया अंगीं । बद्ध मोहोसंगीं लज्जा चिंता ।।१।।
सुख पावे शांती धरूनि एकांत । दुःखी तो लोकांत दंभ करी ।।२।।
तुका म्हणे लागे थोडा च विचार । परी हे प्रकार नागविती ।।३।।

१४५६

कानीं धरी बोल बहुतांचीं मतें । चाट त्यापरतें आणीक नाहीं ।।१।।
पावेल गौरव वोढाळाचे परी । दंड पाठीवरी यमदूतां ।।धृ।।
शब्दज्ञानी एक आपुल्याला मतें । सांगती वेदांत भिन्नभावें ।।२।।
तुका म्हणे एक भाव न धरिती । पडिली हे माती त्यांचे तोंडीं ।।३।।

१४५७
देवा ऐकें हे विनंती । मज नको रे हे मुक्ति । तया इच्छा गति । हें चि सुख आगळें ।।१।।
या वैष्णवांचे घरीं । प्रेमसुख इच्छा करी । रिद्धिसिद्धी द्वारीं । कर जोडूनि उभ्या ।।धृ।।
नको वैकुंठींचा वास । असे तया सुखा नास । अद्‌भुत हा रस । कथाकाळीं नामाचा ।।२।।
तुझ्या नामाचा महिमा । तुज न कळे रे मेघशामा । तुका म्हणे आम्हां । जन्म गोड यासाटीं ।।३।।

१४५८
न पूजीं आणिकां देवां न करीं त्यांची सेवा । न मनीं या केशवाविण दुजें ।।१।।
काय उणें जालें मज तयापायीं । तें मी मागों काई कवणासी ।।धृ।।
आणिकाची कीर्ती नाइकें न बोलें । चाड या विठ्ठलेंविण नाहीं ।।२।।
न पाहें लोचनीं श्रीमुखावांचूनि । पंढरी सांडूनि न वजें कोठें ।।३।।
न करीं कांहीं आस मुक्तीचे सायास । न भें संसारास येतां जातां ।।४।।
तुका म्हणे कांहीं व्हावें ऐसें जीवा । नाहीं या केशवाविण दुजें ।।५।।

१४५९
नव्हे खळवादी मता च पुरता । सत्याची हे सत्ता उपदेश ।।१।।
साक्षत्वेंसी मना आणावीं उत्तरें । परिपाकीं खरें खोटें कळे ।।धृ।।
नव्हे एकदेशी शब्द हा उखता । ब्रम्हांडापुरता घेईल त्यासी ।।२।।
तुका विनवणी करी जाणतियां । बहुमतें वांयां श्रमों नये ।।३।।

१४६०
या चि नांवें दोष । राहे अंतरीं किल्मिष ।।१।।
मना अंगीं पुण्य पाप । शुभ उत्तम संकल्प ।।धृ।।

बिजाऐसीं फळें । उत्तम कां अमंगळें ।।२।।
तुका म्हणे चित्त । शुद्ध करावें हे नित ।।३।।

१४६१
कुशळ वक्ता नव्हे जाणीव श्रोता । राहे भाव चित्ता धरूनियां ।।१।।
धन्य तो जगीं धन्य तो जगीं । ब्रम्ह तया अंगीं वसतसे ।।धृ।।
न धोवी तोंड न करी अंघोळी । जपे सदाकाळीं रामराम ।।२।।
जप तप ध्यान नेणे याग युक्ती । कृपाळु जो भूतीं दयावंत ।।३।।
तुका म्हणे होय जाणोनि नेणता । आवडे अनंता जीवाहूनि ।।४।।

१४६२
काळाचिया सत्ता ते नाहीं घटिका । पंढरीनायका आठवितां ।।१।।
सदाकाळ गणना करी आयुष्याची । कथेचे वेळेची आज्ञा नाहीं ।।धृ।।
याकारणें माझ्या विठोबाची कीर्ति । आहे हे त्रिजगतीं थोर वाट ।।२।।
तुका म्हणे जन्मा आलियाचें फळ । स्मरावा गोपाळ तें चि खरें ।।३।।

१४६३
घरोघरीं बहु जाले कवि । नेणे प्रसादाची चवी ।।१।।
लंडा भूषणांची चाड । पुढें न विचारी नाड ।।धृ।।
काढावें आइतें। तें चि जोडावें स्वहितें ।।२।।
तुका म्हणे कळे । परि होताती अंधळे ।।३।।

१४६४
नये पाहों मुख मात्रागमन्याचें । तैसें अभक्ताचें गुरुपुत्रा ।।१।।
म्हणऊनि बरें धरितां एकांत । तेणें नव्हे घात भजनासी ।।धृ।।
नये होऊं कदा निंदकाची भेटी । जया द्वैत पोटीं चांडाळाच्या ।।२।।
तुका म्हणे नका बोलों त्यासी गोष्टी । जयाचिये दृष्टी पाप वाढे ।।३।।

१४६५
कथा करोनिया द्रव्य घेती देती । तयां अधोगति नरकवास ।।१।।
रवरव कुंभपाक भोगिती यातना । नये नारायणा करुणा त्यांची ।।धृ।।
असिखड्गधारा छेदिती सर्वांग । तप्तभूमी अंग लोळविती ।।२।।
तुका म्हणे तया नरक न चुकती । सांपडले हातीं यमाचिया ।।३।।

१४६६
नाइकावे कानीं तयाचे ते बोल । भक्तीविण फोल ज्ञान सांगे ।।१।।
वाखाणी अद्वैत भक्तिभावेंविण । दुःख पावे सीण श्रोता वक्ता ।।धृ।।
अहं ब्रम्ह म्हणोनि पाळित पिंडा । नो बोलावें भांडा तया सवें ।।२।।
वेदबाह्य लंड बोले जो पाषांड । त्याचें काळें तोंड संतांमध्ये ।।३।।
तुका म्हणे खंडी देवभक्तपण । वरिष्ठ त्याहूनि श्वपच तो ।।४।।

१४६७
वेदविहित तुम्ही आइका हो कर्मे । बोलतों तीं वर्मे संतांपुढे ।।१।।
चारी वर्ण जाले एकाचिये अंगीं । पापपुण्य भागीं विभागिलें ।।धृ।।
प्रथम पाउलीं पावविला पंथ । आदि मध्य अंत भेद नाहीं ।।२।।
आंबे बोरी वड बाभुळा चंदन । गुणागुणें भिन्न अग्नि एक ।।३।।
तुका म्हणे मन उन्मन जों होय । तोंवरि हे सोय विधि पाळीं ।।४।।

१४६८
तीर्थांचे मूळ व्रतांचें फळ । ब्रम्ह तें केवळ पंढरिये ।।१।।
तें आम्हीं देखिलें आपुल्या नयनीं । फिटलीं पारणीं डोळियांचीं ।।धृ।।
जीवांचें जीवन सुखाचें सेजार । उभें कटीं कर ठेवूनियां ।।२।।
जनाचा जनिता कृपेचा सागर । दीनां लोभापार दुष्टां काळ ।।३।।
सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानीं । आकार निर्गुणीं तें चि असे ।।४।।
तुका म्हणे नाहीं श्रुती आतुडलें । आम्हां सांपडलें गीती गातां ।।५।।

१४६९
माझे मनोरथ पावले सिद्धी । तईं पायीं बुद्धि स्थिरावली ।।१।।
समाधान जीव राहिला निश्चळ । गेली हळहळ स्मरण हें ।।धृ।।
त्रिविध तापाचें जालेंसे दहन । सुखावलें मन प्रेमसुखें ।।२।।
महालाभ वाचे वसे पांडुरंग । अंगोअंगीं संग अखंडित ।।३।।
जीवनाचा जाला ओलावा अंतरीं । विश्व विश्वंभरीं सामावलें ।।४।।
तुका म्हणे माप भरी आलें सिगे । धारबोळ गंगे पूर वाहे ।।५।।

१४७०
कृपेचें उत्तर देवाचा प्रसाद । आनंदीं आनंद वाढवावा ।।१।।

बहुतांच्या भाग्यें लागलें जाहाज । येथें आतां काज लवलाहें ।।धृ।।
अलभ्य तें आलें दारावरी फुका । येथें आता चुका न पाहिजे ।।२।।
तुका म्हणे जिव्हाश्रवणाच्या द्वारें । माप भरा वरें सिगेवरि ।।३।।

१४७१
पापपुण्यसुखदुःखाचीं मंडळें । एक एकाबळें वाव घेती ।।१।।
कवतुक डोळां पाहिलें सकळ । नाचवितो काळ जीवांसी तो ।।धृ।।
स्वर्गाचिया भोगें सरतां नरक । मागें पुढें एक एक दोन्ही ।।२।।
तुका म्हणे भय उपजलें मना । घेईं नारायणा कडिये मज ।।३।।

१४७२
वचना फिरती अधम जन । नारायण तो नव्हे ।।१।।
केला आतां अंगीकार । न मनी भार समर्थ ।।धृ।।
संसाराचा नाहीं पांग । देव सांग सकळ ।।२।।
तुका म्हणे कीर्त वाणूं । मध्यें नाणूं संकल्प ।।३।।

१४७३
कथा करोनियां मोल ज्यापें घेती । ते ही दोघे जाती नरकामध्यें ।।१।।
ब्रम्ह पूर्ण करा ब्रम्ह पूर्ण करा । अखंड स्मरा रामराम ।।धृ।।
मधुरवाणीच्या नका पडों भरी । जाल यमपुरी भोगावया ।।२।।
तुका म्हणे करीं ब्रम्हांड ठेंगणें । हात पसरी जिणें धिग त्याचें ।।३।।

१४७४
गोड नांवें क्षीर । परी साकरेचा धीर ।।१।।
तैसें जाणा ब्रम्हज्ञान । बापुडें तें भक्तीविण ।।धृ।।
रुची नेदी अन्न । ज्यांत नसतां लवण ।।२।।
अंधळ्याचे श्रम । शिकविल्याचें चि नाम ।।३।।
तुका म्हणे तारा । नाव तंबुऱ्याच्या सारा ।।४।।

१४७५
नम्र जाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ।।१।।
हें चि शूरत्वाचे अंग । हरी आणिला श्रीरंग ।।धृ।।
अवघा जाला पण । लवण सकळां कारण ।।२।।

तुका म्हणे पाणी । पाताळ तें परी खणी ।।३।।

१४७६
आपुल्या महिमानें । धातु परिसें केलें सोनें ।।१।।
तैसें न मनीं माझे आतां । गुणदोष पंढरिनाथा ।।धृ।।
गांवाखालील वाहाळ । गंगा न मनी अमंगळ ।।२।।
तुका म्हणे माती । केली कस्तुरीनें सरती ।।३।।

१४७७
आशाबद्ध वक्ता । भय श्रोतयाच्या चित्ता ।।१।।
गातो तें चि नाहीं ठावें । तोंड वासी कांहीं द्यावें ।।धृ।।
जालें लोभाचें मांजर । भीक मागे दारोदार ।।२।।
तुका म्हणे गोणी । माप आणि रितीं दोन्ही ।।३।।

१४७८
तक्र शिष्या मान । दुग्धा म्हणे नारायण ।।१।।
ऐशीं ज्ञानाचीं डोबडें । आशा विटंबिलीं मूढें ।।धृ।।
उपदेश तो जगा । आपण सोंवळा इतका मांगा ।।२।।
रसनाशिश्नाचे अंकित । तुका म्हणे वरदळ स्पित ।।३।।

१४७९
ब्रम्हचारी धर्म घोकावें अक्षर । आश्रमीं विचार षटकर्मे ।।१।।
वानप्रस्थ तरी संयोगीं वियोग । संन्यास तो त्याग संकल्पाचा ।।धृ।।
परमहंस तरी जाणे सहज वर्म । तेथें याती धर्म कुळ नाहीं ।।२।।
बोले वर्म जो चाले याविरहित । तो जाणा पतित श्रुति बोले ।।३।।
तुका म्हणे कांहीं नाहीं नेमाविण । मोकळा तो सीण दुःख पावे ।।४।।

१४८०
आम्ही क्षेत्रींचे संन्यासी । देहभरित ह्रषीकेशी । नाहीं केली ऐशी ।
आशाकामबोहरी ।।१।।
आलें अयाचित अंगा । सहज तें आम्हां भागा । दाता पांडुरंगा । ऐसा करितां
निश्चिंती ।।धृ।।
दंड धरिला दंडायमान । मुळीं मुंडिलें मुंडण । बंदी बंद कौपीन । बहिरवास

औठडें ।।२।।
काळें साधियेला काळ । मन करूनि निश्चळ । लौकिकीं विटाळ । धरूनि असों ऐकांत ।।३।।
कार्यकारणाची चाली । वाचावाचत्वें नेमिली । एका नेमें चाली । स्वरूपीं च राहाणें ।।४।।
नव्हे वेषधारी । तुका आहाच वरवरी । आहे तैसीं बरीं। खंडें निवडितों वेदांची ।।५।।

१४८१
निर्वाहापुरतें अन्न आच्छादन । आश्रमासी स्थान कोंपी गुहा ।।१।।
कोठें ही चित्तासी नसावें बंधन । हृदयीं नारायण सांटवावा ।।धृ।।
नये बोलों फार बैसों जनामधीं । सावधान बुद्धी इंद्रियें दमी ।।२।।
तुका म्हणे घडी घडीनें साधावी । त्रिगुणांची गोवी उगवूनि ।।३।।

१४८२
जैसीं तैसीं तरी । शरणागतें तुझीं हरी ।।१।।
आतां न पाहिजे केलें । ब्रीद लटिकें आपुलें ।।धृ।।
शुद्ध नाहीं चित्त । परी म्हणवितों भक्त ।।२।।
मज कोण पुसे रंका । नाम सांगे तुझें तुका ।।३।।

१४८३
नाशवंत देह नासेल हा जाणा । कां रे उच्चाराना वाचे नाम ।।१।।
नामें चि तारिले कोट्यान हे कोटी । नामें हे वैकुंठी बैसविले ।।धृ।।
नामापरतें सार नाहीं त्रिभुवनीं । तें कां तुम्ही मनीं आठवाना ।।२।।
तुका म्हणे नाम वेदांसी आगळें । तें दिलें गोपाळें फुकासाटीं ।।३।।

१४८४
आळवितां बाळें । मातेतें सुख आगळें ।।१।।
द्यावें आवडी भातुकें । पाहे निवे कवतुकें ।।धृ।।
लेववूनि अळंकार । दृष्टी करावी सादर ।।२।।
आपुलिये पदीं । बैसवूनि कोडें वंदी ।।३।।
नेदी लागों दिठी । उचलोनि लावी कंठीं ।।४।।
तुका म्हणे लाभा । वारी घ्या वो पद्मनाभा ।।५।।

१४८५
तप तीर्थ दान व्रत आचरण । गातां हरिगुण वारूं नये ।।१।।
कोटि कुळें त्याचीं वाटुली पाहाती । त्या तया घडती ब्रम्हहत्या ।।धृ।।
आपुलिया पापें न सुटे सायासें । कोणा काळें ऐसें निस्तरेल ।।२।।
व्हावें साह्य तया न घलावें भय । फुकासाटीं पाहे लाभ घात ।।३।।
तुका म्हणे हित माना या वचना ।।सुख दुःख जाणा साधे फुका ।।४।।

१४८६
देवासाटीं जाणा तयासी च आटी । असेल ज्या गांठीं पुण्यराशी ।।१।।
निर्बळा पाठवी बळें वाराणसी । मेला आला त्यासी अर्ध पुण्य ।।धृ।।
कथें निद्राभंग करावा भोजनीं । तया सुखा धणी पार नाहीं ।।२।।
यागीं रीण घ्यावें द्यावें सुख लाहीं । बुडतां चिंता नाहीं उभयतां ।।३।।
तुका म्हणे वर्म जाणोनि करावें । एक न घलावें एकावरी ।।४।।

१४८७
अग्नीमाजी पडे धातु । लीन होउनि राहे अतु । होय शुद्ध न पवे घातु । पटतंतुप्रमाण ।।१।।
बाह्यरंगाचें कारण । मिथ्या अवघें चि भाषण । गर्व ताठा हें अज्ञान । मरण सवें वाहातसे ।।धृ।।
पुरें मातलिया नदी । लव्हा नांदे जीवनसंधी । वृक्ष उन्मळोनि भेदी । परि तो कधीं भंगेना ।।२।।
हस्ती परदळ तें भंगी । तया पायीं न मरे मुंगी । कोण जाय संगी । पाणोवाणी तयेच्या ।।३।।
पिटितां घणें वरि सैरा । तया पोटीं राहे हिरा । तैशा काय तगती गारा । तया थोरा होऊनि ।।४।।
लीन दीन हें चि सार । भव उतरावया पार। बुडे माथां भार । तुका म्हणें वाहोनि ।।५।।

१४८८
आम्ही वीर जुंझार । करूं जमदाढे मार । तापटिले भार । मोड जाला दोषांचा ।।१।।
जाला हाहाकार । आले हांकीत जुंझार । शंखचक्रांचे शृंगार । कंठीं हार

तुळसीचे ।।धृ।।
रामनामांकित बाण । गोपी लाविला चंदन । झळकती निशाणें । गरुडटके पताका ।।२।।
तुका म्हणे काळ । जालों जिंकोनि निश्चळ । पावला सकळ। भोग आम्हां आमचा ।।३।।

१४८९
आशाबद्ध तो जगाचा दास । पूज्य तो उदास सर्वजना ।।१।।
आहे तें अधीन आपुले हातीं । आणिकां ठेविती काय बोल ।।धृ।।
जाणतिया पाठीं लागला उपाध । नेणता तो सिद्ध भोजनासी ।।२।।
तुका म्हणे भय बांधलें गांठीं । चोर लागे पाठी दुम तया ।।३।।

१४९०
आणिकांसी तारी ऐसा नाहीं कोणी । धड तें नासोनि भलता टाकी ।।१।।
सोनें शुद्ध होतें अविट तें घरीं । नासिलें सोनारीं अळंकारीं ।।धृ।।
ओल शुद्ध काळी काळें जिरें बीज । कैंचें लागे निज हाता तेथें ।।२।।
एक गहू करिती अनेक प्रकार । सांजा दिवसीं क्षीर घुगरिया ।।३।।
तुका म्हणे विषा रुचि एका हातीं । पाधानी नासिती नवनीत ।।४।।

१४९१
वाटे या जनाचें थोर बा आश्चर्य । न करिती विचार कां हिताचा ।।१।।
कोण दम ऐसा आहे यांचे पोटीं । येईल शेवटीं कोण कामा ।।धृ।।
काय मानुनियां राहिले निश्चिंती । काय जाब देती यमदूतां ।।२।।
कां हीं विसरलीं मरण बापुडीं । काय यांसी गोडी लागलीसे ।।३।।
काय हातीं नाहीं करील तयासी ।। काय जालें यांसी काय जाणों ।।४।।
कां हीं नाठविती देवकीनंदना । सुटाया बंधनापासूनियां ।।५।।
काय मोल यासी लागे धन वित्त । कां हें यांचें चित्त घेत नाहीं ।।६।।
तुका म्हणे कां हीं भोगितील खाणी ।। कां त्या चक्रपाणी विसरलीं ।।७।।

१४९२
काय एकां जालें तें कां नाहीं ठावें । काय हें सांगावें काय म्हूण ।।१।।
देखतील डोळां ऐकती कानीं । बोलिलें पुराणीं तें ही ठावें ।।धृ।।
काय हें शरीर साच कीं जाणार । सकळ विचार जाणती हा ।।२।।

कां हें कळों नये आपुलें आपणा । बाळत्व तारुण्य वृद्धदशा ।।३।।
कां हें आवडलें प्रियापुत्रधन । काय कामा कोण कोणा आलें ।।४।।
कां हें जन्म वांयां घातलें उत्तम । कां हे रामराम न म्हणती ।।५।।
काय भुली यांसी पडली जाणतां । देखती मरतां आणिकांसी ।।६।।
काय करिती हे बांधलिया काळें । तुका म्हणे बळें वज्रपाशीं ।।७।।

१४९३
जुंझार ते एक विष्णुदास जगीं । पापपुण्य अंगीं नातळे त्यां ।।१।।
गोविंद आसनीं गोविंद शयनीं । गोविंद त्यां मनीं बैसलासे ।।धृ।।
ऊर्ध पुंड भाळीं कंठीं शोभे माळी । कांपिजे कळिकाळ तया भेणें ।।२।।
तुका म्हणे शंखचक्रांचे शृंगार । नामामृतसार मुखामाजी ।।३।।

१४९४
जेणें नाहीं केलें आपुलें स्वहित । पुढिलांचा घात इच्छीतसे ।।१।।
संचितासी जाय मिळोनियां खोडी । पतनाचे ओंडीवरी हांव ।।धृ।।
बांधलें गांठी तें लागलें भोगावें । ऐसियासी देवें काय कीजे ।।२।।
तुका म्हणे जया गांवां जाणे जया । पुसोनियां तया वाट चाले ।।३।।

१४९५
मानी भक्तांचे उपकार । रुणीया म्हणवी निरंतर । केला निर्गुणीं आकार । कीर्त मुखें वर्णितां ।।१।।
म्हणोनि जया जे वासना ।। ते पुरवितो पंढरिराणा । जाला भक्तांचा आंदणा । ते उपकार फेडावया ।।धृ।।
अंबऋृषीकारणें । जन्म घेतले नारायणें । एवडें भक्तींचे लहणें । दास्य करी हा दासाचें ।।२।।
म्हणियें करितां शंका न धरी । रक्षपाळ बळिच्या द्वारीं । भक्तीचा आभारी । रीग न पुरे जावया ।।३।।
अर्जुनाचे रथवारु । ते वागवी सर्वेश्वरु । एवडे भक्तीचे उपकारु । मागें मागें हिंडतसे ।।४।।
पुंडलिकाचे द्वारीं । सम पाउलीं विटेवरी । न वजे कट करीं । धरूनि तेथें राहिला ।।५।।
भावभक्तीचा अंकित । नाम साजे दिनानाथ । म्हणोनि राहिला निवांत । तुका चरण धरोनि ।।६।।

१४९६
सांगों जाणती शकुन । भूत भविष्य वर्तमान ।।१।।
त्यांचा आम्हांसी कंटाळा । पाहों नावडती डोळां ।।धृ।।
रिद्धिसिद्धींचे साधक । वाचासिद्ध होती एक ।।२।।
तुका म्हणे जाती । पुण्यक्षयें अधोगती ।।३।।

१४९७
ठाकलोंसें द्वारीं । उभें याचक भीकारी ।।१।।
मज भीक कांहीं देवा । प्रेमभातुकें पाठवा ।।धृ।।
याचकाचा भार । नये घेऊं येरझार ।।२।।
तुका म्हणे दान । सेवा घेतल्यावांचून ।।३।।

सदाशिवावर अभंग ।। २ ।।
१४९८
काय धर्म नीत । तुम्हां शिकवावें हित ।।१।।
अवघें रचियेलें हेळा । लीळा ब्रम्हांड सकळा ।।धृ।।
नाम महादेव । येथें निवडला भाव ।।२।।
तुका म्हणे वेळे । माझें तुम्हां कां न कळे ।।३।।

१४९९
भांडावें तें गोड । पुरे सकळ ही कोड ।।१।।
ऐसा घरींचा या मोळा । ठावा निकटां जवळां ।।धृ।।
हाक देतां दारीं । येती जवळी सामोरीं ।।२।।
तुका म्हणे शिवें । मागितलें हातीं द्यावें ।।३।। २।।

१५००
ऐसें कां जालें तें मज ही न कळे । कीर्तनाचे रळेपळे जगीं ।।१।।
कैसें तुम्हां देवा वाटतसे बरें । संतांचीं उत्तरें लाजविलीं ।।धृ।।
भाविकां कंटक करिताती पीडा । हा तंव रोकडा अनुभव ।।२।।
तुका म्हणे नाम निर्वाणीचा बाण । याचा अभिमान नाहीं तुम्हां ।।३।।

१५०१
तुम्ही बैसलेती निर्गुणाचे खोळे । आम्हां कां हे डोळे कान दिले ।।१।।
नाइकवे तुझी अपकीर्त्ति देवा । अव्हेरली सेवा न देखवे ।।धृ।।
आपुले पोटीं तों राखियेला वाव । आम्हांसी कां भाव अल्प दिला ।।२।।
तुका म्हणे दुःखी असें हें कळों द्या । पुढिलिया धंद्या मन नेघे ।।३।।

१५०२
सोंगें छंदें कांहीं । देव जोडे ऐसें नाहीं ।।१।।
सारा अवघें गाबाळ । डोळ्या आडील पडळ ।।धृ।।
शुद्ध भावाविण । जो जो केला तो तो सीण ।।२।।
तुका म्हणे कळे । परि होताती अंधळे ।।३।।

१५०३
अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ।।१।।
विश्वास तो खरा मग । पांडुरंगकृपेचा ।।धृ।।
माझी कोणी न धरो शंका ।हो कां लोकां निर्द्वंद्व ।।२।।
तुका म्हणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ।।३।।

१५०४
सत्यसंकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ।।१।।
येथें अळंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचेंतें ।।धृ।।
अंतरींचें बीज जाणे कळवळा । व्यापक सकळां ब्रम्हांडाचा ।।२।।
तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्तकाळघडी आल्याविण ।।३।।

१५०५
काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ।।१।।
थोरींव सांडिली आपुली परिसें । नेणे सिवों कैसें लोखंडासी ।।धृ।।
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ।।२।।
भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ।।३।।
तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ।।४।।

१५०६
जन्मा आलों त्याचें । आजि फळ जालें साचें ।।१।।

तुम्ही सांभाळिलों संतीं । भय निवारली खंती ।।धृ।।
कृत्याकृत्य जालों । इच्छा केली ते पावलों ।।२।।
तुका म्हणे काळ । आतां करूं न शके बळ ।।३।।

१५०७
काय पुण्यराशी । गेल्या भेदूनि आकाशीं ।।१।।
तुम्ही जालेति कृपाळ । माझा केला जी सांभाळ ।।धृ।।
काय वोळलें संचित । ऐसें नेणें अगणित ।।२।।
तुका म्हणे नेणें । काय केलें नारायणें ।।३।।

१५०८
असें येथींचिया दिनें । भाग्यहीन सकळां ।।१।।
भांडवल एवढें गांठी । नाम कंठीं धरियेलें ।।धृ।।
आणिक तें दुजें कांहीं । मज नाहीं यावरी ।।२।।
तुका म्हणे केली कोणें । एवढा नेणें लौकिक ।।३।।

१५०९
गायें नाचें वायें टाळी । साधन कळी उत्तम हें ।।१।।
काय जाणों तरले किती । नाव ऐती या बैसा ।।धृ।।
सायासाचें नाहीं काम । घेतां नाम विठोबाचें ।।२।।
तुका म्हणे निर्वाणीचें । शस्त्र साचें हें एक ।।३।।

१५१०
सर्वकाळ माझे चित्तीं । हे चि खंती राहिली ।।१।।
बैसलें तें रूप डोळां । वेळोवेळां आठवे ।।धृ।।
वेव्हाराची सरली मात । अखंडित अनुसंधान ।।२।।
तुका म्हणे वेध जाला । अंगा आला श्रीरंग ।।३।।

१५११
जैसें दावी तैसा राहे । तरि कां देव दुरी आहे ।।१।।
दुःख पावायाचें मूळ । रहनी ठाव नाहीं ताळ ।।धृ।।
माळामुद्रांवरी। कैंचा सोंगें जोडे हरि ।।२।।
तुका म्हणे देखें । ऐसे परीचीं बहुतेकें ।।३।।

१५१२

अवघा तो शकुन । हृदयीं देवाचे चरण ।।१।।
येथें नसतां वियोग । लाभा उणें काय मग ।।धृ।।
संग हरिच्या नामाचा। शुचिर्भूत सदा वाचा ।।२।।
तुका म्हणे हरिच्या दासां । शुभकाळ अवघ्या दिशा ।।३।।

१५१३

ब्रम्हरूपाचीं कर्मे ब्रम्हरूप । विरहित संकल्प होती जाती ।।१।।
ठेविलिया दिसे रंगाऐसी शिळा । उपाधि निराळा स्फटिक मणि ।।धृ।।
नानाभाषामतें आळविती बाळा । प्रबोध तो मूळा जननीठायीं ।।२।।
तुका म्हणे माझें नमन जाणतियां । लागतसें पायां वेळोवेळां ।।३।।

१५१४

नाहीं सुगंधाची लागती लावणी । लावावी ते मनीं शुद्ध होतां ।।१।।
वाऱ्या हातीं माप चाले सज्जनाचें । कीर्ति मुख त्याचें नारायण ।।धृ।।
प्रभा आणि रवि काय असे आन । उदयीं तंव जन सकळ साक्षी ।।२।।
तुका म्हणे बरा सत्याचा सायास । नवनीता नाश नाहीं पुन्हा ।।३।।

१५१५

तीर्थाटणें एकें तपें हुंबरती । नाथिले धरिती अभिमान ।।१।।
तैसे विष्णुदास नव्हती साबडे । एकाचिया पडे पायां एक ।।धृ।।
अक्षरें आणिती अंगासी जाणीव । इच्छा ते गौरव पूज्य व्हावें ।।२।।
तुका म्हणे विधिनिषधाचे डोहीं । पडिले त्यां नाहीं देव कधीं ।।३।।

१५१६

पटे ढाळूं आम्ही विष्णुदास जगीं । लागों नेदूं अंगीं पापपुण्य ।।१।।
निर्भर अंतरीं सदा सर्वकाळ । घेतला सकळ भार देवें ।।धृ।।
बळिवंत जेणें रचिलें सकळ । आम्हां त्याचें बळ अंकितांसी ।।२।।
तुका म्हणे आम्ही देखत चि नाहीं । देवाविण कांहीं दुसरें तें ।।३।।

१५१७

कथेचा उलंघ तो अधमां अधम । नावडे ज्या नाम ओळखा तो ।।१।।

कासया जीऊन जाला भूमी भार । अनउपकार माते कुंसी ।।धृ।।
निद्रेचा आदर जागरणीं वीट । त्याचे पोटीं कीट कुपथ्याचें ।।२।।
तुका म्हणे दोन्ही बुडविलीं कुळें । ज्याचें तोंड काळें कथेमाजी ।।३।।

१५१८
सांडोनी दों अक्षरां । काय करूं हा पसारा ।
विधिनिषेधाचा भारा । तेणें दातारा नातुडेसी ।।१।।
म्हणोनि बोबडा उत्तरीं । वाचें जपें निरंतरीं ।
नाम तुझें हरी । भवसागरीं तारूं तें ।।धृ।।
सर्वमय ऐसें वेदांचें वचन । श्रुति गर्जती पुराणें ।
नाहीं आणीक ध्यान । रे साधन मज चाड ।।२।।
शेवटीं ब्रम्हार्पण । या चि मंत्राचें कारण ।
काना मात्र वांयांविण । तुका म्हणे बिंदुलीं ।।३।।

१५१९
हरिनामाचें करूनि तारूं । भवसिंधुपार उतरलों ।।१।।
फावलें फावलें आतां । पायीं संतां विनटलों ।।धृ।।
हरिनामाचा शस्त्र घोडा । संसार गाढा छेदिला ।।२।।
हरिनामाचीं धनुष्यकांडें । विन्मुख तोंडें कळिकाळ ।।३।।
येणें चि बळें सरते आम्ही । हरिचे नामें लोकीं तिहीं ।।४।।
तुका म्हणे जालों साचे । श्रीविठ्ठलाचे डिंगर ।।५।।

१५२०
नव्हें हें गुरुत्व मेघवृष्टि वाणी । ऐकावी कानीं संतजनीं ।।१।।
आरुष हा शब्द देवाचा प्रसाद । करविला वाद तैसा केला ।।धृ।।
देहपिंड दान दिला एकसरें । मुळिचें तें खरें टांकसाळ ।।२।।
तुका म्हणे झरा लागला नवनीत । सेविलिया हित पोट धाय ।।३।।

१५२१
घटीं अलिप्त असे रवि । अग्नि काष्ठामाजी जेवी । तैसा नारायण जीवीं । जीवसाक्षीवर्तनें ।।१।।
भोग ज्याचे तया अंगीं । भिन्न प्रारब्ध जगीं । विचित्र ये रंगीं । रंगें रंगला गोसावी ।।धृ।।

देह संकल्पासारिखें । एक एकांसी पारिखें । सुख आणि दुःखें । अंगी कर्मे त्रिविध ।।२।।
तुका म्हणे कोडें । न कळे तयासी सांकडें । त्याचिया निवाडें । उगवे केलें विंदान ।।३।।

१५२२
सद्गदित कंठ दाटो । येणें फुटो हृदय ।।१।।
चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो विठ्ठला ।।धृ।।
नेत्रीं जळ वाहो सदां । आनंदाचे रोमांच ।।२।।
तुका म्हणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ।।३।।

१५२३
जेथें देखें तेथें उभा । अवघ्या गगनाचा गाभा ।।१।।
डोळां बैसलें बैसलें । ध्यान राहोनि संचलें ।।धृ।।
सरसावलें मन । केले सोज्वळ लोचन ।।२।।
तुका म्हणे सवें । आतां असिजेत देवें ।।३।।

१५२४
तान्हे तान्ह प्याली । भूक भुकेने खादली ।।१।।
जेथें तें च नाहीं जालें । झाडा घेतला विठ्ठलें ।।धृ।।
वास वासनेसी नाहीं । मन पांगुळलें पायीं ।।२।।
शेष उरला तुका । जीवा जीवीं जाला चुका ।।३।।

१५२५
पाणिपात्र दिगांबरा । हस्त करा सारिखे ।।१।।
आवश्यक देव मनीं । चिंतनींच सादर ।।धृ।।
भिक्षा कामधेनुऐशी । अवकाशीं शयन ।।२।।
पांघरोनि तुका दिशा ।। केला वास अलक्षीं ।।३।।

१५२६
विषयीं विसर पडिला निःशेष । अंगीं ब्रम्हरस ठसावला ।।१।।
माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ।।धृ।।
लाभाचिया सोसें पुढें चाली मना । धनाचा कृपणा लोभ जैसा ।।२।।

तुका म्हणे गंगासागरसंगमीं । अवघ्या जाल्या ऊर्मि एकमय ।।३।।

१५२७
कृष्णरामनाम मांडीं पां वोळी । तेणें होइल होळी पापा धुनी ।।१।।
ऐसा मना छंद लावीं रे अभ्यास । जया नाहीं नास ब्रम्हरसा ।।धृ।।
जोडी तरी ऐसी करावी न सरे । पुढें आस नुरे मागुताली ।।२।।
तुका म्हणे ऐसें धरा कांहीं मनीं । यातायाती खाणीं चुकतील ।।३।।

१५२८
परमार्थी तो न म्हणावा आपुला । सलगी धाकुला हेळूं नये ।।१।।
थोडा चि स्फुलिंग बहुत दावाग्नी । वाढतां इंधनीं वाढविला ।।धृ।।
पितियानें तैसा वंदावा कुमर । जयाचें अंतर देवें वसे ।।२।।
तुका म्हणे शिरीं वाहावें खापर । माजी असे सार नवनीत ।।३।।

१५२९
ज्याचा ऐसा अनुभव । विश्व देव सत्यत्वें ।।१।।
देव तया जवळी असे । पाप नासे दरुषणें ।।धृ।।
कामक्रोधा नाहीं चाली । भूतीं जाली समता ।।२।।
तुका म्हणे भेदाभेद । गेले वाद खंडोनि ।।३।।

१५३०
सेवा ते आवडी उच्चारावें नाम । भेदाभेदकाम निवारूनि ।।१।।
न लगे हालावें चालावें बाहेरी । अवघें चि घरीं बैसलिया ।।धृ।।
देवाचीं च नामें देवाचिये शिरीं । सर्व अळंकारीं समर्पावीं ।।२।।
तुका म्हणे आहे भावें चि संतोषी । वसे नामापाशीं आपुलिया ।।३।।

१५३१
ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठी लागे ।।१।।
म्हणोनियां ऐसे सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ।।धृ।।
वेदपारायण पंडित वाचक । न मिळती एक एकांमधीं ।।२।।
पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखें चेष्टा विपरीत ।।३।।
आपुलिया नाहीं निवाले जे अंगें । योगी करती रागें गुरगुरु ।।४।।
तुका म्हणे मज कोणांचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ।।५।।

१५३२
पंढरीची वाट पाहें निरंतर । निडळावरी कर ठेवूनियां ।।१।।
जातियां निरोप पाठवीं माहेरा । कां मज सासुरा सांडियेलें ।।धृ।।
पैल कोण दिसे गरुडाचे वारिकें । विठ्ठलासारिकें चतुर्भुज ।।२।।
तुका म्हणे धीर नाहीं माझ्या जीवा । भेटसी केधवां पांडुरंगा ।।३।।

१५३३
ऐसी जोडी करा राम कंठीं धरा । जेणें चुके फेरा गर्भवास ।।१।।
नासिवंत आटी प्रियापुत्रधन । बीज ज्याचा सीण तें चि फळ ।।धृ।।
नाव धड करा सहस्रा नामांची । जे भवसिंधूची थडी पावे ।।२।।
तुका म्हणे काळा हाणा तोंडावरी । भाता भरा हरिरामबाणीं ।।३।।

१५३४
पाहें मजकडे भरोनियां दृष्टी । बहुत हिंपुष्टी जालों माते ।।१।।
करावेंसे वाटे जीवा स्तनपान । नव्हे हें वचन श्रृंघारिक ।।धृ।।
सत्यासाटीं माझी शब्दविवंचना । जोडिल्या वचनाचें तें नव्हे ।।२।।
तुका म्हणे माझी कळवळ्याची कींव । भागलासे जीव कर्तव्यानें ।।३।।

१५३५
तुज म्हणतील कृपेचा सागर । तरि कां केला धीर पांडुरंगा ।।१।।
आझुनि कां नये तुज माझी दया । काय देवराया पाहातोसि ।।धृ।।
आळवितों जैसें पाडस कुरंगिणी । पीडिलिया वनीं तानभूक ।।२।।
प्रेमरसपान्हा पाजीं माझे आई । धांवें वो विठाई वोरसोनि ।।३।।
तुका म्हणे माझें कोण हरी दुःख । तुजविण एक पांडुरंगा ।।४।।

१५३६
भक्ति तों कठिण शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ।।१।।
जेथें पाहें तेथें देखीचा पर्वत । पायाविण भिंत तांतडीची ।।धृ।।
कामावलें तरि पाका ओज घडे । रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे ।।२।।
तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ।।३।।

१५३७

पापी म्हणों तरि आठवितों पाय । दोष बळी काय तयाहूनि ।।१।।
ऐशा विचाराचे घालूनि कोंडणी । काय चक्रपाणी निजलेती ।।धृ।।
एकवेळ जेणें पुत्राच्या उद्देशें ।। घेतल्याचें कैसें नेलें दुःख ।।२।।
तुका म्हणे अहो वैकुंठनायका । चिंता कां सेवका तुमचिया ।।३।।

१५३८
उगविल्या गुंती । ऐशा मागें नेणों किती ।।१।।
ख्यात केली अजामेळें । होतें निघालें दिवाळें ।।धृ।।
मोकलिला प्रायश्चितीं । कोणी न धरिती हातीं ।।२।।
तुका म्हणे मुक्त वाट । वैकुंठीची घडघडाट ।।३।।

१५३९
सरळीं हीं नामें उच्चारावीं सदा । हरि बा गोविंदा रामकृष्णा ।।१।।
पुण्य पर्वकाळ तीर्थें ही सकळ । कथा सिंधुजळ न्हाऊं येती ।।धृ।।
अवघे चि लाभ बैसलिया घरा । येती भाव धरा एके ठायीं ।।२।।
सेळ्या मेंढ्या गाई सेवा घेती म्हैसी । कामधेनु तैसी नव्हे एक ।।३।।
तुका म्हणे सुखें पाविजे अनंता । हें वर्म जाणतां सुलभ चि ।।४।।

१५४०
पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्व काळ ।।१।।
तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील रासी पातकाच्या ।।धृ।।
देव इच्छी रज चरणींची माती । धांवत चालती मागें मागें ।।२।।
काय त्यां उरलें वेगळें आणीक । वैकुंठनायक जयां कंठीं ।।३।।
तुका म्हणे देवभक्तांचा संगम । तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ।।४।।

१५४१
पाप ताप दैन्य जाय उठाउठीं । जालिया भेटी हरिदासांची ।।१।।
ऐसें बळ नाहीं आणिकांचे अंगीं । तपें तिर्थें जगीं दानें व्रतें ।।धृ।।
चरणींचे रज वंदी शूळपाणी । नाचती कीर्तनीं त्यांचे माथां ।।२।।
भव तरावया उत्तम हे नाव । भिजों नेंदी पाव हात कांहीं ।।३।।
तुका म्हणे मन जालें समाधान । देखिले चरण वैष्णवांचे ।।४।।

१५४२

येणें बोधें आम्ही असों सर्वकाळ । करूनि निर्मळ हरिकथा ।।१।।
आम्ही भूमीवरी एक दइवांचे । निधान हें वाचे सांपडलें ।।धृ।।
तरतील कुळें दोन्ही उभयतां । गातां आइकतां सुखरूप ।।२।।
न चळे हा मंत्र न म्हणों यातीकुळ । न लगे काळ वेळ विचारावी ।।३।।
तुका म्हणे माझा विठ्ठल विसांवा । सांटवीन हांवा हृदयांत ।।४।।

१५४३
बहुतां जन्मींचें संचित । सबळ होय जरि बहुत । तरि चि होय हरिभक्त । कृपावंत मानसीं ।।१।।
म्हणवी म्हणियारा तयांचा । दास आपुल्या दासांचा । अनुसरले वाचा । काया मनें विठ्ठलीं ।।धृ।।
असे भूतदया मानसीं । अवघा देखे हृषीकेशी । जीवें न विसंबे तयासी । मागें मागें हिंडतसे ।।२।।
तुका म्हणे निर्विकार । शरणागतां वज्रपंजर । जे जे अनुसरले नर । तयां जन्म चुकलें ।।३।।

१५४४
तारूं लागलें बंदरीं । चंद्रभागेचिये तिरीं ।।१।।
लुटा लुटा संतजन । अमुप हें रासी धन ।।धृ।।
जाला हरिनामाचा तारा। सीड लागलें फरारा ।।२।।
तुका जवळी हमाल । भार चालवी विठ्ठल ।।३।।

१५४५
आळवीन स्वरें । कैशा मधुरा उत्तरें ।।१।।
यें वो यें वो पांडुरंगे । प्रेमपान्हा मज दें गे ।।धृ।।
पसरूनि चोंची । वचन हें करुणेची ।।२।।
तुका म्हणे बळी । आम्ही लडिवाळें आळीं ।।३।।

१५४६
सकळिकांचें समाधान । नव्हे देखिल्यावांचून ।।१।।
रूप दाखवीं रे आतां । सहस्रभुजांच्या मंडिता ।।धृ।।
शंखचक्रपद्मगदा। गरुडासहित ये गोविंदा ।।२।।
तुका म्हणे कान्हा । भूक लागली नयनां ।।३।।

१५४७
पतितपावना । दिनानाथा नारायणा ।।१।।
तुझें रूप माझे मनीं । राहो नाम जपो वाणी ।।धृ।।
ब्रम्हांडनायका । भक्तजनाच्या पाळका ।।२।।
जीवांचिया जीवा । तुका म्हणे देवदेवा ।।३।।

१५४८
करीं हें चि काम । मना जपें राम राम ।।१।।
लागो हा चि छंद । मना गोविंद गोविंद ।।२।।
तुका म्हणे मना । मज भीक द्यावी दीना ।।३।।

१५४९
आपुलिया लाजा । धांवे भक्तांचिया काजा ।।१।।
नाम धरिलें दिनानाथ । सत्य करावया व्रत ।।धृ।।
आघात निवारी। छाया पीतांबरें करी ।।२।।
उभा कर कटीं । तुका म्हणे याजसाटीं ।।३।।

१५५०
साधावया भक्तिकाज । नाहीं लाज हा धरीत ।।१।।
ऐसियासी शरण जावें । शक्ती जीवें न वंची ।।धृ।।
भीष्मपण केला खरा । धनुर्धरा रक्षीलें ।।२।।
तुका म्हणे साक्ष हातीं । तो म्यां चित्तीं धरियेला ।।३।।

१५५१
धेनु चरे वनांतरीं । चित्त बाळकापें घरीं ।।१।।
तैसें करीं वो माझे आई । ठाव देऊनि राखें पायीं ।।धृ।।
न काढितां तळमळी । जिवनाबाहेर मासोळी ।।२।।
तुका म्हणे कुडी । जीवाप्राणांची आवडी ।।३।।

१५५२
हरिजनाची कोणां न घडावी निंदा । साहात गोविंदा नाहीं त्याचें ।।१।।
रूपा येऊनियां धरी अवतार । भक्तां अभयंकर खळां कष्ट ।।धृ।।

दुर्वास हा छळों आला आंबऋषी । सुदर्शन त्यासी जाळित फिरे ।।२।।
द्रौपदीच्या क्षोभें कौरवांची शांति । होऊनि श्रीपति साहे केलें ।।३।।
न साहे चि बभ्रु पांडवां पारिखा । धुडाविला सखा बळिभद्र ।।४।।
तुका म्हणे अंगीं राखिली दुर्गंधि । अश्वत्थामा वधी पांडवपुत्रां ।।५।।

१५५३
ज्यासी आवडी हरिनामांची । तो चि एक बहु शुचि ।।१।।
जपतो हरिनामें बीज । तो चि वर्णांमाजी द्विज ।।२।।
तुका म्हणे वर्णा धर्म । अवघें आहे सम ब्रम्ह ।।३।।

१५५४
विठ्ठल हा चित्तीं । गोड लागे गातां गीतीं ।।१।।
आम्हां विठ्ठल जीवन । टाळ चिपळिया धन ।।धृ।।
विठ्ठल हे वाणी। अमृत हे संजिवनी ।।२।।
रंगला या रंगें । तुका विठ्ठल सर्वांगें ।।३।।

१५५५
विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा । करी पापा निर्मूळ ।।१।।
भाग्यवंता छंद मनीं । कोडें कानीं ऐकती ।।धृ।।
विठ्ठल हें दैवत भोळें। चाड काळें न धरावी ।।२।।
तुका म्हणे भलते याती । विठ्ठल चित्तीं ते शुद्ध ।।३।।

१५५६
म्हणे विठ्ठल ब्रम्ह नव्हे । त्याचे बोल नाइकावे ।।१।।
मग तो हो का कोणी एक । आदि करोनि ब्रम्हादिक ।।धृ।।
नाहीं विठ्ठल जया ठावा । तो ही डोळां न पाहावा ।।२।।
तुका म्हणे नाहीं। त्याची भीड मज कांहीं ।।३।।

१५५७
एक पाहातसां एकांचीं दहनें । सावध त्या गुणें कां रे नव्हा ।।१।।
मारा हाक देवा भय अटाहासें । जंव काळाऐसें जालें नाहीं ।।धृ।।
मरणांची तंव गांठोडी पदरीं । जिणें तो चि वरि माप भरी ।।२।।
तुका म्हणे धींग वाहाती मारग । अंगा आलें मग हालों नेदी ।।३।।

१५५८
संतांसी तों नाहीं सन्मानाची चाड । परि पडे द्वाड अव्हेरितो ।।१।।
म्हणऊनि तया न वजावें ठाया । होतसे घात या दुर्बळाचा ।।धृ।।
भावहीना आड येतसे आशंका । उचितासी चुका घालावया ।।२।।
तुका म्हणे जया संकोच दर्शनें । तया ठाया जाणें अनुचित ।।३।।

१५५९
संसारसंगें परमार्थ जोडे । ऐसें काय घडे जाणतेनो ।।१।।
हेंडग्याच्या आळां अवघीं चिपाडें । काय तेथें गोडें निवडावीं ।।धृ।।
ढेकणाचे बाजे सुखाची कल्पना । मूर्खत्व वचना येऊं पाहे ।।२।।
तुका म्हणे मद्य सांडवी लंगोटी । सांगितला सेटीं विचार त्या ।।३।।

१५६०
जातीचें तें चढे प्रेम । पक्षी स्मरे राम राम ।।१।।
ते काय गुण लागती येरां । कागा पिंजरा शोभेना ।।धृ।।
शिकविलें तें सुजात सोसी । मग तयासी मोल चढे ।।२।।
तुका म्हणे वेषधारी ।। हिजड्या नारी नव्हती ।।३।।

१५६१
वसनें थिल्लरीं । बेडुक सागरा धिक्कारी ।।१।।
नाहीं देखिला ना ठावा । तोंड पिटी करी हांवा ।।धृ।।
फुगातें काउळें । म्हणे मी राजहंसा आगळें ।।२।।
गजाहूनि खर । म्हणे चांगला मी फार ।।३।।
मुलाम्याचें नाणें । तुका म्हणे नव्हे सोनें ।।४।।

१५६२
मुक्त होता परी बळें जाला बद्ध । घेउनियां छंद माझें माझें ।।१।।
पाप पुण्य अंगीं घेतलें जडून । वर्म नेणे कोण करिता तो ।।२।।
तुका म्हणे वांयां गेलें वांयां विण । जैसा मृगशीण मृगजळीं ।।३।।

१५६३
पंढरीये माझें माहेर साजणी । ओविये कांडणीं गाऊं गीत ।।१।।

राही रखुमाई सत्यभामा माता । पांडुरंग पिता माहियेर ।।धृ।।
उद्धव अक्रूर व्यास आंबऋषि । भाई नारदासी गौरवीन ।।२।।
गरुड बंधु लडिवाळ पुंडलीक । यांचें कवतुक वाटे मज ।।३।।
मज बहु गोत संत आणि महंत । नित्य आठवीत ओवियेसी ।।४।।
निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ।।५।।
नागोजन मित्रा नरहरि सोनारा । रोहिदास कबिरा सोईरिया ।।६।।
परसो भागवता सुरदास सांवता । गाईन नेणतां सकळांसी ।।७।।
चोखामेळा संत जिवाचे सोइरे । न पडे विसर यांचा घडी ।।८।।
जीवींच्या जीवना एका जनार्दना । पाटका कान्हया मिराबाई ।।९।।
आणीक हे संत महानुभाव मुनि । सकळां चरणीं जीव माझा ।।१०।।
आनंदें ओविया गाईन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारकरी ।।११।।
तुका म्हणे माझा बळिया बापमाय । हरुषें नांदों सये घराचारी ।।१२।।

१५६४
पोट लागलें पाठीशीं । हिंडवितें देशोदेशीं ।।१।।
पोटाभेणें जिकडे जावें । तिकडे पोट येतें सवें ।।धृ।।
जप तप अनुष्ठान। पोटासाटीं जाले दीन ।।२।।
पोटें सांडियेली चवी । नीचापुढें तें नाचवी ।।३।।
पोट काशियानें भरे । तुका म्हणे झुरझुरूं मरे ।।४।।

आरत्या ।। १३ ।।
१५६५
जगदेश जगदेश तुज म्हणती । परि या जनामाजी असशील युक्ति ।
पुण्यपापविरहित सकळां अधिपति । दृष्टा परि नळणी अलिप्त गति ।।१।।
जय देव जय देव जय पंढरिनाथा । श्रीपंढरिनाथा । नुरे पाप विठ्ठल म्हणतां सर्वथा ।।धृ।।
आगम निगम तुज नेणती कोणी । परि तूं भाव भक्ति जवळी च दोन्ही ।
नेणतां विधियुक्त राते पूजेनी । न माये ब्रम्हांडीं संपुष्टशयनीं ।।२।।
असुरां काळ भासे विक्राळ पुढें । पसरी मुखएक चावितो धुडें ।
भक्ता शरणागता चाले तो पुढें । दावी वाट जाऊ नेदी वांकडें ।।३।।
एकाएकीं बहु विस्तरला सुखें । खेळे त्याची लीळा तो चि कवतुकें।
तेथें नरनारी कवण बाळकें । काय पापपुण्य कवण सुखदुःखें ।।४।।
सकळा वर्मा तूं चि जाणशी एक । बद्ध मोक्ष प्राप्त आणि सुखदुःख।

जाणों म्हणतां तुज टकलीं बहुतेकें । तुका म्हणे शरण आलों मज राखें
।।५।।

१५६६
दैत्यभारें पीडिली पृथुवी बाळा । म्हणोनि तूज येणें जालें गोपाळा ।
भक्तिप्रतिपाळक उत्सव सोहळा । मंगळें तुज गाती आबळ बाळा ।।१।।
जय देव जय देव जय गरुडध्वजा । श्रीगरुडध्वजा। आरती ओवाळूं तुज
भक्तीकाजा ।।धृ।।
गुण रूप नाम नाहीं जयासी। चिंतितां तैसा चि होसी तयांसी ।
मत्स्य कूर्म वराह नरसिंह जालासी। असुरां काळ मुणि ठाके ध्यानासी
।।२।।
सहस्र रूपें नाम सांवळा ना गोरा । श्रुति नेती म्हणती तुज विश्वंभरा।
जीवनां जीवन तूं चि होसी दातारा । न कळे पार ब्रम्हादिकां सुरवरां ।।३।।
संतां महंतां घरीं म्हणवी म्हणियारा । शंखचक्रगदाआयुधांचा भारा ।
सुदर्शन घरटी फिरे अवश्वरा । सकुमार ना स्थूळ होसी गोजिरा ।।४।।
भावेंविण तुझें न घडे पूजन । सकळ ही गंगा जाल्या तुजपासून ।
उत्पत्ति प्रळय तू चि करिसी पाळण । धरूनि राहिला तुका निश्चयीं चरण
।।५।।

१५६७
काय तुझा महिमा वर्णूं मी किती । नामें मात्रे भवपाश तुटती ।
पाहातां पाउले हे विष्णुमूर्ती । कोटिकुळां सहित जे उद्धरती ।।१।।
जय देव जय देव जय पंढरिराया । श्रीपंढरिराया। करुनियां कुरवंडी ।
सांडीन काया ।।धृ।।
मंगळआरतीचा थोर महिमा । आणीक द्यावया नाहीं उपमा ।
श्रीमुखासहित देखे जो कर्मा । पासुन सुटे जैसा रवि नासी तमा ।।२।।
धन्य व्रतकाळ हे एकादशी । जागरण उपवास घडे जयांसी ।
विष्णूचें पूजन एकाभावेंसी। नित्यमुक्त पूज्य तिहीं लोकांसी ।।३।।
न वजे वांयां काळ जे तुज ध्याती । असे तुझा वास तयांच्या चित्तीं ।
धालें सुखें सदा प्रेमें डुल्लती । तीर्थें मळिन वास तयांचा वाहाती ।।४।।
देव भक्त तूं चि जालासी दोन्ही । वाढावया सुख भक्ति हे जनीं ।
जड जीवां उद्धार होय लागोनि । शरण तुका वंदी पाउलें दोन्ही ।।५।।

१५६८
कंसरायें गर्भ वधियेले सात । म्हणोनि गोकुळासी आले अनंत ।
घ्यावया अवतार जालें हें चि निमित्य । असुर संहारूनि तारावे भक्त ।।१।।
जय देव जय देव जय विश्वरूपा । श्रीविश्वरूपा । ओवाळीन तुज देहदीपें बापा ।।धृ।।
स्थूळरूप होऊनि धरितसे सानें । जैसा भाव तैसा तयांकारणें ।
दैत्यांसी भासला सिहीं गजान । काळासी महाकाळ यशोदेसी तान्हें ।।२।।
अनंत वर्णी कोणा न कळे चि पार । सगुण कीं निर्गुण हा ही निर्धार ।
पांगलीं साई अठरा करितां वेव्हार । तो वळितसे गौळियांचें खिल्लार ।।३।।
तेहतिस कोटि तिहीं देवांसी श्रेष्ठ । पाउलें पाताळीं नेणती स्वर्ग मुगुट ।
गिळिलीं चौदा भूवनें तरि न भरे चि पोट । तो खाउन धाला गोपाळाचें उच्छिष्ट ।।४।।
महिमा वर्णूं तरि पांगलिया श्रुति । सिणला शेष चिरल्या जिव्हा करितां स्तुती ।
भावेंविण कांहीं न चले चि युक्ति । राखें शरण तुकयाबंधु करी विनंती ।।५।।

१५६९
परमानंदा परमपुरुषोत्तमरामा । अच्युता अनंता हरि मेघश्यामा ।
अविनाशा अलक्षा परता परब्रम्हा । अकळकळा कमळापती न कळे महिमा ।।१।।
जय देव जय देव जया जी श्रीपती । मंगळशुभदायका करीन आरती ।।धृ।।
गोविंदा गोपाळा गोकुळरक्षणा। गिरिधरकर भवसागरतारक दधिमथना ।
मधुसूदन मुनिजीवन धरणीश्रमहरणा । दीनवत्सळ सकळां मूळ जय जयनिधाना ।।२।।
विश्वंभरा सर्वेश्वर जगदाधारा । चक्रधर करुणाकर पावन गजेंद्रा ।
सुखसागर गुणआगर मुगुटमणी शूरा । कल्याणकैवल्यमूर्ति मनोहरा ।।३।।
गरुडासना शेषशयना नरहरी । नारायणा ध्याना सुरहरवरगौरी।
नंदा नंदनवंदन त्रिभुवनांभीतरी । अनंतनामीं ठसा अवतारांवरी ।।४।।
सगुणनिर्गुणसाक्ष श्रीमंत संतां । भगवाना भगवंता कालकृदांता।
उत्पत्तिपाळणपासुन संहारणसत्ता । शरण तुकयाबंधु तारीं रिति बहुतां ।।५।।

१५७०

पंढरि पुण्यभूमी भीमा दक्षिणावाहिनी । तीर्थ हें चंद्रभागा महा पातकां धुनी ।
उतरलें वैकुंठमहासुख मेदिनी ।।१।।
जय देवा पांडुरंगा जय अनाथनाथा । आरती ओंवाळीन तुम्हां लक्ष्मीकांता ।।धृ।।
नित्य नवा सोहळा हो महावाद्यां गजर । सन्मुख गरुड पारीं उभा जोडुनि कर ।
मंडितचतुर्भुजा कटीं मिरवती कर ।।२।।
हरिनाम कीर्तन हो आनंद महाद्वारीं । नाचती प्रेमसुखें नर तेथिंच्या नारी ।
जीवन्मुक्त लोक नित्य पाहाती हरी ।।३।।
आषाढी कार्तिकी हो गरुडटकयां भार । गर्जती नाम घोष महावैष्णववीर ।
पापासी रीग नाहीं असुर कांपती सुर ।।४।।
हें सुख पुंडलिकें कसें आणिलें बापें । निर्गुण साकारले आम्हांलागिं हें सोपें ।
म्हणोनि चरण धरोनि तुका राहिला सुखें ।।५।।

१५७१

अवतार गोकुळीं हो जन तारावयासी । लावण्यरूपडें हे तेजपुंजाळरासी ।
उगवतां कोटि बिंबें रवि लोपले शशी । उत्साव सुरवरां मही थोर मानसीं ।।१।।
जय देवा कृष्णनाथा जय रखुमाईकांता। आरती ओंवाळीन तुम्हां देवकीसुता । जय देवा कृष्णनाथा ।।धृ।।
वसुदेवदेवकीची बंद फोडुनी शाळ । होउनि विश्वजनिता तया पोटिंचा बाळ ।
दैत्य हे त्रासियेले समूळ कंसासी काळ । राजया उग्रसेना केला मथुरापाळ ।।२।।
राखतां गोधनें हो इंद्र कोपला वरि । मेघ जो कडाडिला शिळा वर्षतां धारीं ।
राखिलें गोकुळ हें नखीं धरिला गिरी। निर्भय लोकपाळ अवतरले हरी ।।३।।
कौतुक पाहावया माव ब्रह्म्यानें केली । वत्सें चोरोनियां सत्यलोकासि नेलीं ।
गोपाळ गाईवत्सें दोहीं ठायीं राखीलीं । सुखाचा प्रेमसिंधु अनाथांची माउली ।।४।।

तारिलें भक्तजना दैत्य निर्दाळूनि । पांडवां साहकारी आडल्यां निर्वाणी ।
गुण मी काय वर्णूं मति केवढी वाणी । विनवितो दास तुका ठाव देईं चरणीं ।।५।।

१५७२
सुंदर अंगकांती मुखें भाळ सुरेख । बाणली उटी अंगीं टिळा साजिरी रेख ।
मस्तकीं मुगुट कानीं कुंडलां तेज फांके। आरक्त दंत हिरे कैसे शोभले निके ।।१।।
जय देवा चुतर्भुजा जया लावण्यतेजा । आरती ओवाळीन भवतारिया हा वोजा । जय. ।।धृ।।
उदार जुंझार हा जया वाणिती श्रुति । परतल्या नेति म्हणती तयां न कळे गति ।
भाट हा चतुर्मुखें अनुवाद करिती । पांगलीं साही अठरा रूप न गति ।।२।।
ऐकोनि रूप ऐसें तुजलागीं धुंडिती। बोडके नग्न एक निराहार ईति ।
साधनें योग नाना तपें दारुण किती। सांडिलें सुख दिली संसारा शांती ।।३।।
भरूनि माजी लोकां तिहीं नांदसि एक। कामिनी मनमोहना रूप नाम अनेक ।
नासति नाममात्रें भवपातकें शोक । पाउलें वंदिताती सिद्ध आणि साधक ।।४।।
उपमा द्यावयासी दुजें काय हें तुज । तत्त्वासि तत्त्वसार मूळ जालासी बीज ।
खेळसि बाळलीळा अवतार सहज । विनवितो दास तुका कर जोडोनि तुज ।।५।।

१५७३
सकुमार मुखकमळ निजसारनिर्मळ । सावळी सुनीळ तनु भ्रमरांग कुरळ ।
झळकति दिव्य तेजें दंत माज पातळ । मिरवलिं मयोरपत्रें मुगुट कुंडलें माळ ।।१।।
जय देवा जगदीश्वरा । धन्य रखुमाईवरा । आरती करीन काया । ओंवाळिन सुंदरा । जय. ।।धृ।।
गोजिरें ठाणमाण भुजा मंडित चारी । शोभति शंखचक्रगदापद्म मोहरी ।
हृदयीं ब्रम्हपद बाणलें शृंगारीं । गर्जति चरणीं वांकी कंठ कोकिळास्वरीं ।।२।।

घवघवित उटी अंगीं बावन चंदनांची । लल्हाट कस्तुरिचा कास पितांबरीची ।
कटिसूत्र वरि साजिरें प्रभा वर मोतियांची। संगीत सकळ मुद्रा पाउलें कुंकुमाचीं ।।३।।
सौभाग्यसुख सागर गुणलावण्यखाणी । लाघवी दीनवत्सळ विश्व लाविलें ध्यानीं ।
आश्चर्य देव करिती ॠषि राहिले मुनि । धन्य ते प्रसवली ऐसिया नंदपत्नी ।।४।।
वर्णितां ध्यान महिमा श्रुति राहिल्या नेति । रविकोटि चंद्र तारा प्रकाशा न तुळती ।
उदार सुर गंभीर पूर्ण आनंदमूर्ति । तुकयाबंधु म्हणे स्तवूं मी काय किती ।।५।।

१५७४
महा जी महादेवा महाकाळमर्दना । मांडियेलें उग्रतप महादीप्त दारुणा ।
परिधान व्याघ्रांबर चिदाभस्मलेपना । स्मशान क्रीडास्थळ तुम्हा जी त्रिनयना ।।१।।
जय देवा हरेश्वरा जय पार्वतीवरा। आरती ओंवाळिन कैवल्यदातारा । जय. ।।धृ।।
रुद्र हें नाम तुम्हां उग्र संहारासी । शंकर शिव भोळा उदार सर्वस्वीं ।
उदक बेलपत्र टाळी वाहिल्या देसी । आपुलें पद दासां ठाव देईं कैलासीं ।।२।।
त्रैलोक्यव्यापका हो जन आणि विजन । विराटस्वरूप हें तुझें साजिरें ध्यान ।
करितो वेद स्तुती कीर्ती मुखें आपण । जाणतां नेणवे हो तुमचें महिमान ।।३।।
बोलतां नाम महिमा असे आश्चर्य जगीं । उपदेश केल्यानंतरें पापें पळती वेगीं ।
हरहर वाणी गर्जे प्रेम संचरे अंगीं । राहिलि दृष्टी चरणीं रंग मीनला रंगीं ।।४।।
पुजूनि लिंग उभा तुका जोडोनी हात। करिती विज्ञापना परिसावी हे मात ।
अखंड राहूं द्यावें माझें चरणीं चित्त । घातले साष्टांग मागे मस्तकीं हात ।।५।।

१५७५
अवतारनामभेद गणा आदि अगाद । जयासि पार नाहीं पुढें खुंटला वाद ।
एक चि दंत शोभे मुख विक्राळ दोंद । ब्रम्हांडामाजि दावी अनंत हे छंद ।।१।।
जय जया गणपती ओंवाळित आरती । साजिऱ्या सरळ भुजा फरशकमळ शोभती ।।धृ।।
हे मही ठेंगणी हो तुज नृत्यनायका । भोंवरि फेर देतां असुर मदिले एकां ।
घातले तोडरीं हो भक्तजनपाळका । सहस्र नाम तुज भुक्तिमुक्तिदायका ।।२।।
सुंदर शोभला हो रूपें लोपलीं तेजें । उपमा काय देऊं असे आणिक दुजें ।
रविशशितारागणें जयामाजी सहजें । उदरी सामावलीं जया ब्रम्हांडबीजें ।।३।।
वर्णिता शेष लीळा तया भागलीं मुखें । पांगुळले वेद चारी कैसे राहिले सुखें ।
अवतार जन्मला हो लिंगनाभी या मुखें । अमूर्त मूर्तिमंत होय भक्तीच्या सुखें ।।४।।
विश्व हें रूप तुझें हस्त पाद मुखडें । ऐसा चि भाव देईं तया नाचतां पुढें ।
धूप दीप पंचारति ओंवाळिन निवाडें । राखें या शरणागता तुका खेळतां लाडें ।।५।।

१५७६
कनकाच्या परियेळीं उजळूनि आरती । रत्नदीपशोभा कैशा पाजळल्या ज्योती ।।१।।
ओंवाळूं गे माये सबाह्य साजिरा । राहिरखुमाईसत्यभामेच्या वरा ।ध्रु.।।
मंडितचतुर्भुज दिव्य कानीं कुंडलें। श्रीमुखाची शोभा पाहातां तेज फांकलें ।।२।।
वैजयंती माळ गळां शोभे श्रीमंत । शंखचक्रगदापद्म आयुधें शोभत ।।३।।
सांवळा सकुमार जैसा कर्दळीगाभा । चरणीचीं नेपुरें वांकी गर्जती नभा ।।४।।
ओंवाळितां मन हें उभें ठाकलें ठायीं । समदृष्टि समाधि तुकया लागली पायीं ।।५।।

१५७७
भक्तीचिया पोटीं बोध कांकडा ज्योती । पंचप्राण जीवें भावें ओंवाळूं आरती ।।१।।
ओंवाळू आरती माझ्या पंढरीनाथा। दोन्ही कर जोडोनि चरणीं ठेवीन माथा ।।धृ।।
काय महिमा वर्णूं आतां सांगणें तें किती । कोटि ब्रम्हहत्या मुख पाहतां जाती ।।२।।
राही रखुमाई दोही दों बाही । मयूर पिच्छचामरें ढाळिति ठायीं ठायीं ।।३।।
तुका म्हणे दीप घेऊनि उन्मनति शोभा । विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ।।४।।
।।१३।।

१५७८
धन्य दिवस आजि दरुषण संतांचें । नांदे तया घरीं दैवत पंढरीचें ।।१।।
धन्य पुण्य रूप कैसा जालें संसार । देव आणि भक्त दुजा नाहीं विचार ।।धृ।।
धन्य पूर्व पुण्य वोडवलें निरुतें । संतांचें दर्शन जालें भाग्यें बहुतें ।।२।।
तुका म्हणे धन्य आम्हां जोडली जोडी । संतांचे चरण आतां जीवें न सोडीं ।।३।।

१५७९
गाऊं वाणूं तुज विठो तुझा करूं अनुवाद । जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ।।१।।
आनंद रे विठोबा जाला माझे मनीं। देखिले लोचनीं विटेसहित पाउले ।।धृ।।
न करीं तपसाधनें रे मुक्तीचे सायास । हा चि जन्मोजन्मी गोड भक्तीचा रस ।।२।।
तुका म्हणे आम्हां प्रेमा उणें तें काई । पंढरीचा राणा सांटविला ह्रदयीं ।।३।।

१५८०
मागणें तें एक तुजप्रति आहे । देशी तरि पाहें पांडुरंगा ।।१।।
या संतांसी निरवीं हें मज देईं । आणिक दुजें काहीं न मगें तुज ।।२।।

तुका म्हणे आतां उदार होईं । मज ठेवीं पायीं संतांचिया ।।३।।

स्वामींनीं काया ब्रम्ह केली ते अभंग ।। २४ ।।
१५८१
शोधितां चि नये । म्हणोनि वोळगतों पाये ।।१।।
आतां दिसों नये जना । ऐसें करा नारायणा ।।धृ।।
परतोनि मन । गेलें ठायीं चि मुरोन ।।२।।
विसरला तुका । बोलों चालों जाला मुका ।।३।।

१५८२
रज्जुसर्पाकार । भासयेलें जगडंबर ।।१।।
म्हणोनि आठवती पाय । घेतों आलाय बलाय ।।धृ।।
द्रुश द्रुमाकार लाणी। केलों सर्व सासी धणी ।।२।।
तुकीं तुकला तुका । विश्वीं भरोनि उरला लोकां ।।३।।

१५८३
म्हणवितों दास । परि मी असें उदास ।।१।।
हा चि निश्चय माझा । परि मी निश्चयाहुनि दुजा ।।धृ।।
सरतें कर्तुत्व माझ्यानें । परि मी त्याही हून भिन्न ।।२।।
तुका तुकासी तुकला । तुका तुकाहुनि निराळा ।।१।।

१५८४
घोंटवीन लाळ ब्रम्हज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिती सांडवीन ।।१।।
ब्रम्हभूत होते काया च कीर्तनीं । भाग्य तरी ॠणी देवा ऐसा ।।धृ।।
तीर्थ भ्रमकासी आणीन आळस । कडु स्वर्गवास करिन भोग ।।२।।
सांडवीन तपोनिधा अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ।।३।।
भक्तिभाग्यप्रेमा साधीन पुरुषार्थ । ब्रम्हींचा जो अर्थ निजठेवा ।।४।।
धन्य म्हणवीन येहे लोकीं लोकां । भाग्य आम्हीं तुका देखियेला ।।५।।

१५८५
संसाराचे अंगीं अवघीं च वेसनें । आम्ही या कीर्तनें शुद्ध जालों ।।१।।
आतां हें सोंवळें जालें त्रिभुवन । विषम धोऊन सांडियेलें ।।धृ।।
ब्रम्हपुरीं वास करणें अखंड । न देखिजे तोंड विटाळाचें ।।२।।

तुका म्हणे आम्हां एकांताचा वास । ब्रम्हीं ब्रम्हरस सेवूं सदा ।।३।।

१५८६
तुम्ही सनकादिक संत । म्हणवितां कृपावंत ।।१।।
एवढा करा उपकार । देवा सांगा नमस्कार ।।धृ।।
भाकूनि करुणा । विनवा वैकुंठींचा राणा ।।२।।१५८६
तुका म्हणे मज आठवा । मुळ लवकरी पाठवा ।।३।।

१५८७
आपुल्या माहेरा जाईन मी आतां । निरोप या संतां हातीं आला ।।१।।
सुख दुःख माझें ऐकिलें कानीं । कळवळा मनीं करुणेचा ।।धृ।।
करुनी सिद्ध मूळ साउलें भातुकें । येती दिसें एकें न्यावयासी ।।२।।
त्या चि पंथें माझें लागलेंसे चित्त । वाट पाहें नित्य माहेराची ।।३।।
तुका म्हणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबाप ।।४।।

१५८८
चिन्हें उमटताती अंगीं । शकुना जोगीं उत्तम ।।१।।
आठवला बापमाय । येइल काय मूळ नेणों ।।धृ।।
उत्कंठित जालें मन । ते चि खुण तेथींचि ।।२।।१५८८
तुका म्हणे काम वारीं । आळस घरीं करमेना ।।३।।

१५८९
आरोनियां पाहे वाट । कटकट सोसेना ।।१।।
आलियांस पुसें मात । तेथें चित्त लागलें ।।धृ।।
दळीं कांडीं लोकांऐसें । परि मी नसें ते ठायीं ।।२।।
तुका म्हणे येथें पिसें । तेथें तैसें असेल ।।३।।

१५९०
येथीलिया अनुभवें । कळों जीवें हें येतसे ।।१।।
दोहीं ठायीं एक जीव । माझी कींव त्या अंगीं ।।धृ।।
भूक भुके चि खाउनि धाय । नाहीं हाय अन्नाची ।।२।।
तुका म्हणे सुख जालें । अंतर धालें त्यागुणें ।।३।।

१५९१
पैल आले हरि । शंख चक्र शोभे करीं ।।१।।
गरुड येतो फडत्कारें । ना भी ना भी म्हणे त्वरे ।।धृ।।
मुगुटकुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति ।।२।।
मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ।।३।।
चुतर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ।।४।।
पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ।।५।।
तुका जालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ।।६।।

१५९२
शंखचक्रगदापद्म । पैल आला पुरुषोत्तम ।।१।।
ना भी ना भी भक्तराया । वेगीं पावलों सखया ।।धृ।।
दुरूनि येतां दिसे दृष्टी। धाकें दोष पळती सृष्टी ।।२।।
तुका देखोनि एकला । वैकुंठींहूनि हरि आला ।।३।।

१५९३
पैल दिसतील भार । दिंडी पताका अपार ।।१।।
आला पंढरीचा राणा । दिसतील त्याच्या खुणा ।
सुख वाटे मना । डोळे बाह्या स्फुरती ।।धृ।।
उठिले गजर नामाचे । दळभार वैष्णवांचे ।।२।।
तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ।।३।।

१५९४
जाऊं रे सामोरे । पुढें भेटों विठ्ठल धुरे ।।१।।
तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणीं ।
फेडावया धणी । प्रेमसुखाची आजि ।।धृ।।
पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ।।२।।
आळंगिला बाहीं । ठेविला विठोबाचे पायीं ।।३।।

१५९५
पाहुणे घरासी । आजि आले हृषीकेशी ।।१।।
काय करूं उपचार । कोंप मोडकी जर्जर ।
कण्या दरदर । पाण्यामाजी रांधिल्या ।।धृ।।

घरीं मोडकिया बाजा । वरि वाकळांच्या शेजा ।।२।।
मुखशुद्धि तुळसी दळ । तुका म्हणे मी दुर्बळ ।।३।।

१५९६
संतीं केला अंगीकार । त्यासी अभिमान थोर ।।१।।
कांहीं ठेविलें चरणीं । घेतीं तें चि पुरवूनि ।
तुका पायवणी । घेऊनियां निराळा ।।धृ।।
नसतां कांहीं संचित । भेटी जाली अवचित ।।२।।
देव मिळोनियां भक्त । तुका केलासे सनाथ ।।३।।

१५९७
अवघियांच्या आलों मुळें । एका वेळे न्यावया ।।१।।
सिद्ध व्हावें सिद्ध व्हावें । आधीं ठावें करितों ।।धृ।।
जोंवरि ते घटिका दुरी । आहे उरी तो काळ ।।२।।
मंगळाचे वेळे उभे । असों शोभे सावध ।।३।।
अवघियांचा योग घडे । तरी जोडे श्लाघ्यता ।।४।।
तुका म्हणे पाहें वाट । बहु आट करूनि ।।५।।

१५९८
सकळ ही माझी बोळवण करा । परतोनि घरा जावें तुम्हीं ।।१।।
कर्मधर्मे तुम्हां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशीर्वाद ।।धृ।।
वाढवूनि दिलों एकाचिये हातीं । सकळ निश्चिंती जाली तेथें ।।२।।
आतां मज जाणें प्राणेश्वरासवें । माझिया भावें अनुसरलों ।।३।।
वाढवितां लोभ होईल उसीर । अवघींच स्थिर करा ठायीं ।।४।।
धर्म अर्थ काम जाला एके ठायीं । मेळविला जिंहीं हाता हात ।।५।।
तुका म्हणे आतां जाली हे चि भेटी । उरल्या त्या गोष्टी बोलावया ।।६।।

१५९९
बोलिलों तें आतां पाळावें वचन । ऐसें पुण्य कोण माझे गांठी ।।१।।
जातों आतां आज्ञा घेऊनियां स्वामी । काळक्षेप आम्ही करूं कोठें ।।धृ।।
न घडे यावरि न धरवे धीर । पीडतां राष्ट्र देखोनि जग ।।२।।
तुका म्हणे तुम्ही दिसे मोकलिलें । काय आतां आलें जीवित्वाचें ।।३।।

१६००
करावें तें काम । उगाच वाढवावा श्रम ।।१।।
अवघें एकमय । राज्य बोलों चालों नये ।।धृ।।
दुजयाची सत्ता । न चलेसी जाली आतां ।।२।।
आतां नाहीं तुका । पुन्हा हारपला लोकां ।।३।।

१६०१
आम्ही जातों तुम्ही कृपा असों द्यावी । सकळा सांगावी विनंती माझी ।।१।।
वाडवेळ जाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलावितो ।।२।।
अंतकाळीं विठो आम्हांसी पावला । कुडीसहित जाला गुप्त तुका ।।३।।

१६०२
तुका उतरला तुकीं । नवल जालें तिहीं लोकीं ।।१।।
नित्य करितों कीर्तन । हें चि माझें अनुष्ठान ।।धृ।।
तुका बैसला विमानीं । संत पाहाती लोचनीं ।।२।।
देव भावाचा भुकेला । तुका वैकुंठासी नेला ।।३।।

१६०३
न देखिजे ऐसें केलें । या विठ्ठलें दुःखासी ।।१।।
कृपेचिये सिंव्हासनीं । अधिष्ठानीं बैसविलें ।।धृ।।
वाजता तो नलगे वारा क्षीरसागरा शयनीं ।।२।।
तुका म्हणें अवघें ठायीं । मज पायीं राखिलें ।।३।।

१६०४
वाराणसीपर्यंत असों सुखरूप । सांगावा निरोप संतांसी हा ।।१।।
येथूनियां आम्हां जाणें निजधामा । सवें असे आम्हां गरुड हा ।।२।।
कृपा असों द्यावी मज दीनावरी । जातोंसों माहेरी तुका म्हणे ।।३।। ।।२४।।

शखे १५७१ एकाहत्तरीं विरोधनामसंवत्सरीं फालगुनवद्य द्वितीया सोमवासरीं प्रथमप्रहरीं तुकोबा गुप्त जाले ।।१।।

१६०५
जाती पंढरीस । म्हणे जाईंन तयांस ।।१।।
तया आहे संवसार । ऐसें बोले तो माहार ।।धृ।।
असो नसो भाव । जो हा देखे पंढरिराव ।।२।।
चंद्रभागे न्हाती । तुका म्हणे भलते याती ।।३।।

१६०६
धरियेलीं सोंगें । येणें अवघीं पांडुरंगें ।।१।।
तें हें ब्रम्ह विटेवरी । उभें चंद्रभागे तिरीं ।।धृ।।
अंतर व्यापी बाहे । धांडोळितां कोठें नोहे ।।२।।
योगयागतपें । ज्याकारणें दानजपें ।।३।।
दिले नेदी जति । भोग सकळ ज्या होती ।।४।।
अवघी लीळा पाहे । तुका म्हणे दासां साहे ।।५।।

१६०७
ज्याचे गर्जतां पवाडे । कळिकाळ पायां पडे ।।१।।
तो हा पंढरीचा राणा । पुसा सा चौं अठरा जणां ।।धृ।।
चिंतितां जयासी । भुक्तिमुक्ति कामारी दासी ।।२।।
वैकुंठासी जावें । तुका म्हणे ज्याच्या नांवें ।।३।।

१६०८
ज्याचे गर्जतां पवाडे । श्रुतिशास्त्रां मौन्य पडे ।।१।।
तेथें माझी वाचा किती । पुरे करावया स्तुती ।।धृ।।
सिणलें सहस्त्र तोंडें । शेषाफणी ऐसें धेंडें ।।२।।
तुका म्हणे मही । पत्र सिंधु न पुरे शाही ।।३।।

१६०९
देव राखे तया मारील कोण । न मोडे कांटा हिंडतां वन ।।१।।
न जळे न बुडे नव्हे कांहीं । विष तें ही अमृत पाहीं ।।धृ।।
न चुके वाट न पडे फंदीं । नव्हे कधीं कधीं यमबाधा ।।२।।

तुका म्हणे नारायण । येता गोळ्या वारी वाण ।।३।।

१६१०
कोठे गुंतलासी द्वारकेच्या राया । वेळ कां सखया लावियेला ।।१।।
दिनानाथ ब्रीद सांभाळीं आपुले । नको पाहों केलें पापपुण्य ।।धृ।।
पतितपावन ब्रीदें चराचर । पातकी अपार उद्धरिले ।।२।।
तुकयाबंधु म्हणे द्रौपदीचा धांवा । केला तैसा मला पावें आतां ।।३।।

१६११
कोठें गुंतलासी कोणांच्या धांवया । आली देवराया निद्रा तुज ।।१।।
कोठें गुंतलासी भक्तिप्रेमसुखें । न सुटेती मुखें गोपिकांचीं ।।धृ।।
काय पडिलें तुज कोणाचें संकट । दुरी पंथ वाट न चालवे ।।२।।
काय माझे तुज गुण दोष दिसती । म्हणोनि श्रीपती कोपलासी ।।३।।
काय जालें सांग माझिया कपाळा । उरला जीव डोळां तुका म्हणे ।।४।।

१६१२
परस्त्रीतें म्हणतां माता । चित्त लाजवितें चित्ता ।।१।।
काय बोलोनियां तोंडें । मनामाजी कानकोंडें ।।धृ।।
धर्मधारिष्टगोष्टी सांगे । उष्ट्या हाते नुडवी काग ।।२।।
जें जें कर्म वसे अंगीं । तें तें आठवे प्रसंगीं ।।३।।
बोले तैसा चाले । तुका म्हणे तो अमोल ।।४।।

१६१३
असत्य वचन होतां सर्व जोडी । जरी लग्नघडी परउपकार ।।१।।
जाईल पतना यासि संदेह नाहीं । साक्ष आहे कांहीं सांगतों ते ।।धृ।।
वदविलें मुखें नारायणें धर्मा । अंगुष्ठ त्या कर्मासाटीं गेला ।।२।।
तुका म्हणे आतां सांभळा रे पुढें । अंतरिंचे कुडें देइल दुःख ।।३।।

१६१४
जळों त्याचें तोंड । ऐसी कां ते व्याली रांड ।।१।।
सदा भोवयासी गांठी । क्रोध धडधडीत पोटीं ।।धृ।।
फोडिली गोंवरी। ऐसी दिसे तोंडावरी ।।२।।
तुका म्हणे नाहीं । चित्ता समाधान कांहीं ।।३।।

१६१५
तोंडें खाये फार । पादे बोचा करी मार ।।१।।
एक ऐसे ते शाहाणे । आपुले अधीन तें नेणें ।।धृ।।
कुले घालूनि उघडे। रागें पाहे लोकांकडे ।।२।।
खेळे जुतकर्म । मग बोंबली जुलूम ।।३।।
निजतां आला मोहो । वीतां म्हणे मेला गोहो ।।४।।
तुका म्हणे त्यांनीं। मनुष्यपणा केली हानी ।।५।।

१६१६
पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं ।।१।।
तैसें माझें मन एकविध जालें । नावडे विठ्ठलेंविण दुजें ।।धृ।।
सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाय ते कोकिळा वसंतेंसी ।।२।।
तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकांचे नावडती ।।३।।

१६१७
पंडित म्हणतां थोर सुख । परि तो पाहातां अवघा मूर्ख ।।१।।
काय करावें घोकिलें । वेदपठण वांयां गेलें ।।धृ।।
वेदीं सांगितलें तें न करी । सम ब्रम्ह नेणे दुराचारी ।।२।।
तुका देखे जीवीं शिव । हा तेथींचा अनुभव ।।३।।

१६१८
पंडित तो चि एक भला । नित्य भजे जो विठ्ठला ।।१।।
अवघें सम ब्रम्ह पाहे । सर्वां भूतीं विठ्ठल आहे ।।धृ।।
रिता नाहीं कोणी ठाव । सर्वां भूतीं वासुदेव ।।२।।
तुका म्हणे तो चि दास। त्यां देखिल्या जाती दोष ।।३।।

१६१९
ऐका पंडितजन । तुमचे वंदितों चरण ।।१।।
नका करूं नरस्तुति । माझी परिसा हे विनंती ।।धृ।।
अन्न आच्छादन । हें तों प्रारब्धा अधीन ।।२।।
तुका म्हणे वाणी । सुखें वेचा नारायणीं ।।३।।

१६२०
विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी । विठ्ठल तोंडीं उच्चारा ।।१।।
विठ्ठल अवघ्या भांडवला । विठ्ठल बोला विठ्ठल ।।धृ।।
विठ्ठल नाद विठ्ठल भेद । विठ्ठल छंद विठ्ठल ।।२।।
विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा। तुकया मुखा विठ्ठल ।।३।।

१६२१
काय तुझें वेचे मज भेटी देतां । वचन बोलतां एक दोन ।।१।।
काय तुझें रूप घेतों मी चोरोनि । त्या भेणें लपोनि राहिलासी ।।धृ।।
काय तुझें आम्हां करावें वैकुंठ । भेवों नको भेट आतां मज ।।२।।
तुका म्हणे तुझी नलगे दसोडी । परि आहे आवडी दर्शनाची ।।३।।

१६२२
संतनिंदा ज्याचे घरीं । नव्हे घर ते यमपुरी ।।१।।
त्याच्या पापा नाहीं जोडा । संगें जना होय पीडा ।।धृ।।
संतनिंदा आवडे ज्यासी । तो जिता चि नर्कवासी ।।२।।
तुका म्हणे तो नष्ट। जाणा गाढव तो स्पष्ट ।।३।।

१६२३
आलें देवाचिया मना । तेथें कोणाचें चालेना ।।१।।
हरिश्चंद्र ताराराणी । वाहे डोंबा घरीं पाणी ।।धृ।।
पांडवांचा साहाकारी। राज्यावरोनि केले दुरी ।।२।।
तुका म्हणे उगेचि राहा । होईल तें सहज पाहा ।।३।।

१६२४
निजल्यानें गातां उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले ।।१।।
उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे नाना छंदें गोविंद हा ।।धृ।।
मारगीं चालतां मुखीं नाम वाणी । उभा चक्रपाणी मागें पुढें ।।२।।
तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी । प्रेमे घाली उडी नामासाटीं ।।३।।

१६२५
काम क्रोध आम्ही वाहिले विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ।।१।।
आतां कोण पाहे मागें परतोनि । गेले हारपोनि देहभाव ।।धृ।।

रिद्धिसिद्धी सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ।।२।।
तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास । करूनि ठेलों ग्रास ब्रम्हांडाचा ।।३।।

१६२६
उठाउठीं अभिमान । जाय ऐसें स्थळ कोण ।।१।।
तें या पंढरीस घडे । खळां पाझर रोकडे ।।धृ।।
अश्रूचिया धारा । कोठें रोमांच शरीरा ।।२।।
तुका म्हणे काला । कोठें अभेद देखिला ।।३।।

१६२७
पंढरी पंढरी । म्हणतां पापाची बोहोरी ।।१।।
धन्य धन्य जगीं ठाव । होतो नामाचा उत्साव ।।धृ।।
रिद्धिसिद्धी लोटांगणीं। प्रेमसुखाचिया खाणी ।।२।।
अधिक अक्षरानें एका । भूवैकुंठ म्हणे तुका ।।३।।

१६२८
भार घालीं देवा । न लगे देश डोई घ्यावा ।।१।।
देह प्रारब्धा अधीन । सोसें अधिक वाढे सीण ।।धृ।।
व्यवसाय निमित्त। फळ देतसे संचित ।।२।।
तुका म्हणे फिरे । भोंवडीनें दम जिरे ।।३।।

१६२९
भोग भोगावरी द्यावा । संचिताचा करुनी ठेवा ।।१।।
शांती धरणें जिवासाटीं । दशा उत्तम गोमटी ।।धृ।।
देह लेखावें असार । सत्य परउपकार ।।२।।
तुका म्हणे हे मिरासी । बुडी द्यावी ब्रम्हरसी ।।३।।

१६३०
येथें बोलोनियां काय । व्हावा गुरू तरि जाय ।।१।।
मज न साहे वांकडें । ये विठ्ठलकथेपुढें ।।धृ।।
ऐकोनि मरसी कथा। जंव आहेसि तुं जीता ।।२।।
हुरमतीची चाड । तेणें न करावी बडबड ।।३।।
पुसेल कोणी त्यास । जा रे करीं उपदेश ।।४।।

आम्ही विठ्ठलाचे वीर । फोडूं कळिकाळाचें शीर ।।५।।
घेऊं पुढती जन्म । वाणूं कीर्त मुखें नाम ।।६।।
तुका म्हणे मुक्ती । नाहीं आस चि ये चित्ती ।।७।।

१६३१
आनुहातीं गुंतला नेणे बाह्य रंग । वृत्ति येतां मग बळ लागे ।।१।।
मदें माते तया नाहीं देहभाव । आपुले आवेव आवरितां ।।धृ।।
आणिकांची वाणी वेद तेणें मुखें । उपचारदुःखें नाठवती ।।२।।
तें सुख बोलतां आश्र्चर्य या जना । विपरीत मना भासतसे ।।३।।
तुका म्हणे बाह्य रंग तो विठ्ठल । अंतर निवालें ब्रम्हरसें ।।४।।

१६३२
ब्रम्हरसगोडी तयांसी फावली । वासना निमाली सकळ ज्यांची ।।१।।
नाहीं त्या विटाळ अखंड सोंवळीं । उपाधीवेगळीं जाणिवेच्या ।।धृ।।
मन हें निश्र्चळ जालें एके ठायीं । तयां उणें काई निजसुखा ।।२।।
तीं चि पुण्यवंतें परउपकारी । प्रबोधी त्या नारीनरलोकां ।।३।।
तुका म्हणे त्यांचे पायीं पायपोस । होऊनियां वास करिन तेथें ।। ४।।

१६३३
जैसें तैसें राहे देवाचें हें देणें । यत्न करितां तेणें काय नव्हे ।।१।।
दासां कृपासिंधु नुपेक्षी सर्वथा । अंतरींची व्यथा कळे त्यासी ।।धृ।।
मागों नेणे परी माय जाणे वर्म । बाळा नेदी श्रम पावों कांहीं ।।२।।
तुका म्हणे मज अनुभव अंगें । वचन वाउगें मानेना हें ।।३।।

१६३४
आम्हां हरिच्या दासां कांहीं । भय नाहीं त्रैलोकीं ।।१।।
देव उभा मागें-पुढें । उगवी कोडें संकट ।।धृ।।
जैसा केला तैसा होय। धांवे सोय धरोनि ।।२।।
तुका म्हणे असों सुखें । गाऊं मुखें विठोबा ।।३।।

१६३५
परद्रव्यपरनारीचा अभिळास । तेथूनि हारास सर्वभाग्या ।।१।।
घटिका दिवस मास वरुषें लागेतीन । बांधलें पतन गांठोडीस ।।धृ।।

पुढें घात त्याचा रोकडा शकुन । पुढें करी गुण निश्चयेंसी ।।२।।
तुका म्हणे एकां तडतांथवड । काळ लागे नाड परी खरा ।।३।।

१६३६
समर्थाचें केलें । कोणां जाईल मोडिलें ।।१।।
वांयां करावी ते उरे । खटपटें सोस पुरे ।।धृ।।
ठेविला जो ठेवा । आपुलाला तैसा खावा ।।२।।
ज्याचें त्याचें हातीं । भुके तयाची फजिती ।।३।।
तुका म्हणे कोटी । बाळे जाले शूळ पोटी ।।४।।

१६३७
हे माझी मिराशी । ठाव तुझ्या पायांपाशीं ।।१।।
याचा धरीन अभिमान । करीन आपुलें जतन ।।धृ।।
देऊनियां जीव। बळी साधिला हा ठाव ।।२।।
तुका म्हणे देवा । जुन्हाट हे माझी सेवा ।।३।।

१६३८
नेणे गति काय कवण अधोगति । मानिली निश्चिती तुझ्या पायीं ।।१।।
कर्म धर्म कोण नेणें हा उपाव । तुझ्या पायीं भाव ठेवियेला ।।धृ।।
नेणें निरसं पाप पुण्य नेणें काय । म्हणऊनि पाय धरिले तुझे ।।२।।
वेडा मी अविचार न कळे विचार । तुज माझा भार पांडुरंगा ।।३।।
तुका म्हणे तुज करितां नव्हे काय । माझा तो उपाय कवण तेथें ।।४।।

१६३९
तुझा म्हणऊनि जालों उतराई । त्याचें वर्म काई तें मी नेणें ।।१।।
हातीं धरोनियां दावीं मज वाट । पुढें कोण नीट तें चि देवा ।।धृ।।
देवभक्तपण करावें जतन । दोहीं पक्षीं जाण तूं चि बळी ।।२।।
अभिमानें तुज लागली हे लाज । शरणागतां काज करावया ।।३।।
तुका म्हणे बहु नेणता मी फार । म्हणऊनि विचार जाणविला ।।४।।

१६४०
मारगीं चालतां पाउलापाउलीं । चिंतावी माउली पांडुरंग ।।१।।
सर्व सुख लागे घेउनिया पाठी । आवडींचा कंठीं रस ओती ।।धृ।।

पीतांबरें छाया करी लोभापर । पाहे तें उत्तर आवडीचें ।।२।।
तुका म्हणे हें चि करावें जीवन । वाचे नारायण तान भूक ।।३।।

१६४१
जालों आतां दास । माझे तोडोनियां पाश ।।१।।
ठाव द्यावा पायांपाशीं । मी तो पातकांची राशी ।।धृ।।
सकळ ही गोवा । माझा उगवूनि देवा ।।२।।
तुका म्हणे भय । करा जवळी तें नये ।।३।।

१६४२
अंतरींचें जाणां । तरि कां येऊं दिलें मना ।।१।।
तुमची करावी म्यां सेवा । आतां अव्हेरितां देवा ।।धृ।।
नव्हती मोडामोडी । केली मागें ते चि घडी ।।२।।
तुका म्हणे दिला वाव । पायीं लागों दिला भाव ।।३।।

१६४३
पवित्र होईन चरित्रउच्चारें । रूपाच्या आधारें गोजिरिया ।।१।।
आपुरती बुद्धि पुण्य नाहीं गांठी । पायीं घालीं मिठी पाहें डोळां ।।धृ।।
गाईन ओविया शिष्टांच्या आधारें । सारीन विचारें आयुष्या या ।।२।।
तुका म्हणे तुझें नाम नारायणा । ठेवीन मी मना आपुलिया ।।३।।

१६४४
काय ऐसा जन्म जावा वांयांविण । कांहीं तरी ऋण असो माथां ।।१।।
कोणे तरी काळें होईल आठव । नाहीं जरी भाव भार खरा ।।धृ।।
शता एकातरी जन्माच्या शेवटीं । कृपाळुवा पोटीं होइल दया ।।२।।
तुका म्हणे नाहीं फांकों तरी देत । सर्वांचें उचित सांपडलें ।।३।।

१६४५
नाहीं कोणी दिस जात वांयांविण । साध्य नाहीं सीण लटिका चि ।।१।।
एकाचिये माथां असावें निमित्त । नसो नाहीं हित कपाळीं तें ।।धृ।।
कांहीं एक तरी बोलायाचा जागा । नेदिती वाउगा उभा ठाकों ।।२।।
तुका म्हणे वर्मे कळों येती कांहीं । ओळखी जे नाहीं होईल ते ।।३।।

१६४६
काय करील तें नव्हे विश्वंभर । सेवका दारिद्र लाज नाहीं ।।१।।
मजपासूनि हें पडिलें अंतर । काय तो अव्हेर करूं जाणे ।।धृ।।
नामाच्या चिंतनें नासी गर्भवास । नेदी करूं आस आणिकांची ।।२।।
तुका म्हणे नेणों किती वांयां गेले । तयां उद्धरिलें पांडुरंगें ।।३।।

१६४७
संध्या करितोसी केशवाच्या नांवें । आरंभीं तें ठावें नाहीं कैसें ।।१।।
किती या सांगावें करूनि फजित । खळ नेणे हित जवळीं तें ।।धृ।।
माजल्या न कळे उचित तें काय । नेघावें तें खाय घ्यावें सांडी ।।२।।
तुका म्हणे घेती भिंती सवें डोकें । वावसी तें एकें अंधारलीं ।।३।।

१६४८
दुधाचे घागरी मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ।।१।।
तैसे खळां मुखें न करावें श्रवण । अहंकारें मन विटाळलें ।।धृ।।
काय करावीं तें बत्तीस लक्षणें । नाक नाहीं तेणें वांयां गेलीं ।।२।।
तुका म्हणे अन्न जिरों नेदी माशी । आपुलिया जैशी सवें श्वर्गें ।।३।।

१६४९
सांगावें तें बरें असतें हें पोटीं । दुःख देते खोटी बुद्धि मग ।।१।।
आपला आपण करावा वेव्हार । जिंकोनि अंतर मन ग्वाही ।।धृ।।
नाहीं मागें येत बोलिलें वचन । पावावा तो सीण बरा मग ।।२।।
तुका म्हणे बहु भ्यालों खटपटे । आतां देवा खोटे शब्द पुरे ।।३।।

वाराणसीस यात्रा चालली तेव्हां स्वामींनीं भागीरथीस पत्र धाडिलें - ते अभंग
।। ४ ।।
१६५०
परिसें वो माते माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ।।१।।
भागीरथी महादोष निवारणी । सकळां स्वामिणी तीर्थांचिये ।।धृ।।
जीतां भुक्ति मोक्ष मरणें तुझ्या तिरीं । अहिक्यपरत्री सुखरूप ।।२।।
तुका विष्णुदास संतांचें पोसनें । वागपुष्प तेणें पाठविलें ।।३।।

१६५१

तुम्ही विश्वनाथ । दीनरंक मी अनाथ ।।१।।
कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ।।धृ।।
काय उणें तुम्हांपाशीं। मी तों अल्पें चि संतोषी ।।२।।
तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ।।३।।

१६५२
पिंड पदावरी । दिला आपुलिये करीं ।।१।।
माझें जालें गयावर्जन । फिटलें पितरांचें ॠण ।।धृ।।
केलें कर्मांतर । बोंब मारिली हरिहर ।।२।।
तुका म्हणे माझें । भार उतरलें ओझें ।।३।।
।।३।।

१६५३
मथुरेच्या राया । माझें दंडवत पायां ।।१।।
तुमचे कृपेचें पोसनें । माझा समाचार घेणें ।।धृ।।
नाम धरिलें कंठीं । असें आर्तभूत पोटीं ।।२।।
जीवींचें ते जाणा । तुका म्हणे नारायणा ।।३।।

१६५४
जाय तिकडे लागे पाठीं । नाहीं तुटी आठवाची ।।१।।
हरूनियां नेलें चित्त । माझें थीत भांडवल ।।धृ।।
दावूनियां रूप डोळां। मन चाळा लावियेलें ।।२।।
आणीक तोंडा पडिली मिठी । कान गोठी नाइकती ।।३।।
बोलिल्याचा आठव न घडे । वाणी ओढे ते सोई ।।४।।
तुका म्हणे प्रेमधगी । भरली अंगीं अखंड ।।५।।

१६५५
नको ऐसें जालें अन्न । भूक तान ते गेली ।।१।।
गोविंदाची आवडी जीवा । करीन सेवा धणीवरी ।।धृ।।
राहिलें तें राहो काम । सकळ धर्म देहीचे ।।२।।
देह घरिला त्याचें फळ । आणीक काळ धन्य हा ।।३।।
जाऊं नेदीं करितां सोस । क्षेमा दोष करवीन ।।४।।
तुका म्हणे या च पाठी । आता साटी जीवाची ।।५।।

१६५६
वाट पाहें हरि कां नये आझूनि । निष्ठुर कां मनीं धरियेलें ।।१।।
काय करूं धीर होत नाहीं जीवा । काय आड ठेवा उभा ठेला ।।धृ।।
नाहीं माझा धांवा पडियेला कानीं । कोठें चक्रपाणी गुंतलेती ।।२।।
नाही आलें कळों अंतरा अंतर । कृपावंत फार ऐकतो ।।३।।
बहुता दिसांचें राहिलें भातुकें । नाहीं कवतुकें कृवाळिलें ।।४।।
तुका म्हणे देईं एकवेळा भेटी । शीतळ हें पोटीं होइल मग ।।५।।

१६५७
नाहीं दिलें कधीं कठिण उत्तर । तरी कां अंतर पडियेलें ।।१।।
म्हणऊनि आतां वियोग न साहे । लांचावलें देहे संघष्टणें ।।धृ।।
वेळोवेळां वाचे आठवितों नाम । अधिक चि प्रेम चढे घेतां ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगे जननिये । घेऊनि कडिये बुझाविलें ।।३।।

१६५८
आतां न करीं सोस । सेवीन हा ब्रम्हरस ।।१।।
सुखें सेवीन अमृत । ब्रम्हपदींचें निश्चित ।।धृ।।
तुमचा निज ठेवा । आम्ही पाडियेला ठावा ।।२।।
तुका म्हणे देवरांया । आतां लपालेती वांयां ।।३।।

१६५९
जेथें जेथें जासी । तेथें मज चि तूं पासी ।।१।।
ऐसा पसरीन भाव । रिता नाहीं कोणी ठाव ।।धृ।।
चित्त जडलें पायीं । पाळती हें ठायीं ठायीं ।।२।।
तुका म्हणे पोटीं । देव घालुनि सांगें गोष्टी ।।३।।

१६६०
सांपडला हातीं । तरी जाली हे निश्चिंती ।।१।।
नाहीं धांवा घेत मन । इंद्रियांचें समाधान ।।धृ।।
सांडियेला हेवा । अवघा संचिताचा ठेवा ।।२।।
तुका म्हणे काम । निरसुनियां घेतों नाम ।।३।।

१६६१
मुक्तिपांग नाहीं विष्णुचिया दासां । संसार तो कैसा न देखती ।।१।।
बैसला गोविंद जडोनियां चित्ती । आदि ते चि अंतीं अवसान ।।धृ।।
भोग नारायणा देऊनि निराळीं । ओविया मंगळीं तो चि गाती ।।२।।
बळ बुद्धि त्यांची उपकारासाटीं । अमृत तें पोटी सांटवलें ।।३।।
दयावेंत तरी देवा च सारिखीं । आपुलीं पारखीं नोळखती ।।४।।
तुका म्हणे त्यांचा जीव तो चि देव । वैकुंठ तो ठाव वसती तो ।।५।।

१६६२
सेवीन उच्छिष्ट लोळेन अंगणीं । वैष्णवां चरणीं होइन जोडा ।।१।।
ऐसें जन्म आतां मज देईं देवा । आवडी हे जीवा सर्व काळ ।।धृ।।
त्यांचे चरणरज येती अंगावरी । वंदीत ते शिरीं जाइन मागें ।।२।।
तुका म्हणे येथें राहिलासे भाव । सकळ ही वाव जाणोनियां ।।३।।

१६६३
क्षेम देयाला हो । स्फुरताती दंड बाहो ।।१।।
आतां झडझडां चालें । देईं उचलूं पाउलें ।।धृ।।
सांडीं हंसगती । बहु उत्कंठा हे चित्तीं ।।२।।
तुका म्हणे आई । श्रीरंगे विठाबाई ।।३।।

१६६४
जेणें वेळ लागे । ऐसें सांडीं पांडुरंगे ।।१।।
कंठ कंठा मिळों देईं । माझा वोरस तूं घेईं ।।धृ।।
नको पीतांबर । सांवरूं हे अळंकार ।।२।।
टाकीं वो भातुकें । लौकिकाचें कवतुकें ।।३।।
हातां पायां नको । कांहीं वेगळालें राखों ।।४।।
तुका म्हणे यावरी । मग सुखें अळंकारीं ।।५।।

१६६५
कृपेचा ओलावा । दिसे वेगळा चि देवा ।।१।।
मी हें इच्छीतसें साचें । न लगे फुकटशाई काचें ।।धृ।।
जेणें जाय कळसा। पाया उत्तम तो तैसा ।।२।।
तुका म्हणे घरीं । तुझ्या अवधिया परी ।।३।।

१६६६
दावूनियां कोणां कांहीं । ते चि वाहीं चाळविलीं ।।१।।
तैसें नको करूं देवा । शुद्धभावा माझिया ।।धृ।।
रिद्धिसिद्धी ऐसे आड । येती नाड नागवूं ।।२।।
उदकाऐसे दावुनि ओढी । उर फोडी झळई ।।३।।
दर्पणींचें दिलें धन । दिसे पण चरफडी ।।४।।
तुका म्हणे पायांसाटीं । करीं आटी कळों द्या ।।५।।

१६६७
काय माता विसरे बाळा । कळवळा प्रीतीचा ।।१।।
आवडीनें गळां मिठी । घाली उठी बैसवी ।।धृ।।
लावूं धांवे मुख स्तना । नये मना निराळें ।।२।।
भावंडाचें भातें दावी । आपुलें लावी त्यास जी ।।३।।
माझें थोडें त्याचें फार । उत्तर हें वाढवी ।।४।।
तुका म्हणे नारायणा । तुम्ही जाणां बुझावूं ।।५।।

१६६८
तरीं आम्ही तुझी धरियेली कास । नाहीं कोणी दास वांयां गेला ।।१।।
आगा पंढरीच्या उभ्या विटेवरी । येईं लवकरी धांवें नेटे ।।धृ।।
पालवितों तुज उभी करोनि बाहे । कृपावंता पाहे मजकडे ।।२।।
तुका म्हणे तुज बहु कान डोळे । कां हे माझे वेळे ऐसी परी ।।३।।

१६६९
करावा कांटाळा नव्हे हें उचित । आधीं च कां प्रीत लावियेली ।।१।।
जाणतसां तुम्हीं रूपाचें लाघव । आपुलें तें जीव घेतें ऐसा ।।धृ।।
काय म्हणऊनि आलेती आकारा । आम्हां उजगरा करावया ।।२।।
तुका म्हणे भीड होती आजिवरी । आतां देवा उरी कोण ठेवी ।।३।।

१६७०
धरूनि पालव असुडीन करें । मग काय बरें दिसे लोकीं ।।१।।
काय तें विचारा ठायींचें आपणां । जो हा नारायणा अवकाश ।।धृ।।
अंतर पायांसी तो वरी या गोष्टी । पडिलिया मिठी हालों नेदीं ।।२।।

रुसलेती तरी होईल बुझावणी । तांतडी करूनि साधावें हें ।।३।।
सांपडलिया आधीं कारणासी ठाव । येथें करूं भाव दृढ आतां ।।४।।
तुका म्हणे तुझे ठाउके बोभाट । मग खटपट चुकली ते ।।५।।

१६७१
निष्ठुरा उत्तरीं न धरावा राग । आहे लागभाग ठायींचा चि ।।१।।
तूं माझा जनिता तूं माझा जनिता । रखुमाईच्या कांता पांडुरंगा ।।धृ।।
मुळींच्या ठेवण्यां आहे अधिकार । दुरावोनि दूर गेलों होतों ।।२।।
पोटींच्या आठवा पडिला विसर । काहीं आला भार माथां तेणें ।।३।।
राखिला हा होता बहु चौघां चार । साक्षीने वेव्हार निवडिला ।।४।।
तुका म्हणे कांहीं बोलणें न लगे । आतां पांडुरंगे तूं मी ऐसें ।।५।।

१६७२
सांगतां गोष्टी लागती गोडा । हा तो रोकडा अनुभव ।।१।।
सुख जालें सुख जालें । नये बोले बोलतां ।।धृ।।
अंतर तें नये दिसों । आतां सोस कासया ।।२।।
तुका म्हणे जतन करूं । हें चि धरूं जीवेंसी ।।३।।

१६७३
मजशीं पुरे न पडे वादें । सुख दोहींच्या संवादें ।।१।।
तूं चि आगळा काशानें । शिर काय पायांविणे ।।धृ।।
वाहों तुझा भार । दुःख साहोनि अपार ।।२।।
तुका म्हणे नाहीं भेद । देवा करूं नये वाद ।।३।।

१६७४
तुज नाहीं शक्ति । काम घेसी आम्हां हातीं ।।१।।
ऐसें अनुभवें पाहीं । उरलें बोलिजेसें नाहीं ।।धृ।।
लपोनियां आड । आम्हां तुझा कैवाड ।।२।।
तुका म्हणे तुजसाठी । आम्हां संवसारें तुटी ।।३।।

१६७५
तुझाठायीं ओस । दोन्ही पुण्य आणि दोष ।।१।।
झडलें उरलें किती । आम्ही धरियेलें चित्तीं ।।धृ।।

कळलासी नष्टा। यातिक्रियाकर्मभ्रष्टा ।।२।।
तुका म्हणे बोला । नाहीं ताळा गा विठ्ठला ।।३।।

१६७६
भांडावें तों हित । ठायी पडा तें उचित ।।१।।
नये खंडों देऊं वाद । आम्हां भांडवलभेद ।।धृ।।
शब्दासारसें भेटी । नये पडों देऊं तुटी ।।२।।
तुका म्हणे आळस । तो चि कारणांचा नास ।।३।।

१६७७
नव्हों गांढे आळसी । जो तूं आम्हांपुढें जासी ।।१।।
अरे दिलें आम्हां हातीं । वर्म वेवादाचें संतीं ।।धृ।।
धरोनियां वाट। जालों शिरोमणि थोंट ।।२।।
तुका म्हणे देवा । वाद करीन खरी सेवा ।।३।।

१६७८
तुझा विसर नको माझिया जीवा । क्षण एक केशवा मायबापा ।।१।।
जाओ राहो देह आतां ये चि घडी । कायसी आवडी याची मज ।।धृ।।
कुश्चीळ इंद्रियें आपुलिया गुणें । यांचिया पाळणें कोण हित ।।२।।
पुत्र पत्नी बंधु सोयरीं खाणोरीं । यांचा कोण धरी संग आतां ।।३।।
पिंड हा उसना आणिला पांचांचा । सेकीं लागे ज्याचा त्यासी देणें ।।४।।
तुका म्हणे नाहीं आणिक सोइरें । तुजविण दुसरें पांडुरंगा ।।५।।

१६७९
ऐसें सत्य माझें येईल अंतरा । तरि मज करा कृपा देवा ।।१।।
वचनांसारिखें तळमळी चित्त । बाहेरि तो आंत होइल भाव ।।धृ।।
तरि मज ठाव द्यावा पायांपाशीं । सत्यत्वें जाणसी दास खरा ।।२।।
तुका म्हणे सत्य निकट सेवकें । तरि च भातुकें प्रेम द्यावें ।।३।।

१६८०
आदि वर्तमान जाणसी भविष्य । मागें पुढें नीस संचिताचा ।।१।।
आतां काय देऊं पायांपें परिहार । जाणां तो विचार करा देवा ।।धृ।।
आपुलें तें येथें काय चाले केलें । जोडावे ते भले हात पुढें ।।२।।

तुका म्हणे फिके बोल माझे वारा । कराल दातारा होईल तें ।।३।।

१६८१
सुखें न मनी अवगुण । दुःख भोगी त्याचें कोण ।।१।।
हें कां ठायींचें न कळे । राती करा झांकुनि डोळे ।।धृ।।
चालोनि आड वाटे । पायीं मोडविले कांटे ।।२।।
तुका म्हणे कोणा। बोल ठेवितो शाहाणा ।।३।।

१६८२
आम्ही न देखों अवगुणां । पापी पवित्र शाहाणा ।।१।।
अवघीं रूपें तुझीं देवा । वंदूं भावें करूं सेवा ।।धृ।।
मज मुक्ती सवें चाड । नेणें पाषाण धातु वाड ।।२।।
तुका म्हणे घोटीं। विष अमृत तुजसाटीं ।।३।।

१६८३
मज नाहीं तुझ्या ज्ञानाची ते चाड । घेतां वाटे गोड नाम तुझें ।।१।।
नेणतें लेंकरूं आवडीचें तान्हें । बोलतों वचनें आवडीनें ।।धृ।।
भक्ती नेणें कांहीं वैराग्य तें नाहीं । घातला विठाई भार तुज ।।२।।
तुका म्हणे नाचें निर्लज्ज होऊनि । नाहीं माझे मनीं दुजा भाव ।।३।।

१६८४
काय माझी संत पाहाती जाणीव । सर्व माझा भावत्यांचे पायीं ।।१।।
कारण सरतें करा पांडुरंगीं । भूषणाची जगीं काय चाड ।।धृ।।
बोबडा उत्तरीं म्हणें हरिहरि । आणीक भीकारी नेणें दुजें।।२।।
तुका म्हणे तुम्ही विठ्ठलाचे दास । करितों मी आस उच्छिष्टाची।।३।।

१६८५
जीवाचें जीवन अमृताची तनु । ब्रम्हांड भूषणु नारायण ।।१।।
सुखाचा सांगात अंतकासी अंत । निजांचा निवांत नारायण ।।धृ।।
गोडाचें ही गोड हर्षाचें ही कोड । प्रीतीचा ही लाड नारायण ।।२।।
भावाचा निज भाव नांवांचा हा नांव । अवघा पंढरिराव अवतरलासे ।।३।।
तुका म्हणे जें हें साराचें हें सार । माझा अंगीकार तेणें केला ।।४।।

१६८६
आतां मी सर्वथा नव्हें गा दुर्बळ । यातिहीनकुळ दैन्यवाणा ।।१।।
माय रखुमाई पांडुरंग पिता । शुद्ध उभयतां पक्ष दोन्ही ।।धृ।।
बापुडा मी नव्हें दुर्बळ ठेंगणा । पांगिला हा कोणा आणिकांसी ।।२।।
दृष्ट नव्हों आम्ही अभागी अनाथ । आमुचा समर्थ कैवारी हा ।।३।।
संवसार आम्हां सरला सकळ । लपोनियां काळ ठेला धाकें ।।४।।
तुका म्हणे जालों निर्भर मानसीं । जोडलिया रासी सुखाचिया ।।५।।

१६८७
केलें नाहीं मनीं तया घडे त्याग । उबगें उद्वेग नाहीं चित्तीं ।।१।।
देव चि हा जाणे अंतरींचा भाव । मिथ्या तो उपाव बाह्य रंग ।।धृ।।
त्यागिल्याचें ध्यान राहिलें अंतरीं । अवघी ते परी विटंबना ।।२।।
तुका म्हणे आपआपण्यां विचारा । कोण हा दुसरा सांगे तुम्हां ।।३।।

१६८८
हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा । चित्त शुद्ध सेवा देवाची हे ।।१।।
आवडी विठ्ठल गाईजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ।।धृ।।
आणीकां अंतरीं निदावी वसति । करावी हे शांती वासनेची ।।२।।
तुका म्हणे बाण हा चि निर्वाणींचा । वाउगी हे वाचा वेचूं नये ।।३।।

१६८९
हो कां नर अथवा नारी । ज्यांचा आवडता हरि ।।१।।
ते मज विठोबासमान । नमूं आवडी ते जन ।।धृ।।
ज्याचें अंतर निर्मळ । त्याचें सबाह्य कोमळ ।।२।।
तुका म्हणे भावें । जिव्हें प्रेम वोसंडावें ।।३।।

१६९०
हरिची हरिकथा नावडे जया । अधम म्हणतां तया वेळ लागे ।
मनुष्यदेहीं तया नाट लागलें । अघोर साधिलें कुंभपाक ।।१।।
कासया जन्मा आला तो पाषाण । जंत कां होऊन पडिला नाहीं।
उपजे मरोनि वेळोवेळां भांड । परिलाज लंड न धरी कांहीं ।।धृ।।
ऐसियाची माता कासया प्रसवली । वर नाहीं घातली मुखावरी।
देवधर्माविण तो हा चांडाळ नर । न साहे भूमि भार क्षणभरी ।।२।।

राम म्हणतां तुझें काय वेचेल । कां हित आपुलें न विचारिसी ।
जन्मोजन्मींचा होईल नरकीं । तुका म्हणे चुकी जरी यासी ।।३।।

१६९१
उपेक्षिला येणें कोणी शरणागत । ऐसी नाहीं मात आईकिली ।।१।।
आतां काय ब्रीद सांडील आपुलें । ठायींचें धरिलें जाणोनियां ।।धृ।।
माझ्या दोषासाटीं होइल पाठमोरा । ऐसा कोण पुरा भोग बळी ।।२।।
तुका म्हणे रूप आमुच्या कैवारें । धरिलें गोजिरें चतुर्भुज ।।३।।

१६९२
आवडीसारिखें संपादिलें सोंग । अनंत हें मग जालें नाम ।।१।।
कळे ऐशा वाटा रचिल्या सुलभा । दुर्गम या नभाचा ही साक्षी ।।धृ।।
हातें जेवी एक मुखीं मागे घांस । माउली जयास तैसी बाळा ।।२।।
तुका म्हणे माझें ध्यान विटेंवरी । तैसी च गोजिरी दिसे मूर्ति ।।३।।

१६९३
धन्य मी मानीन आपुलें संचित । राहिलीसे प्रीत तुझे नामीं ।।१।।
धन्य जालों आतां यासि संदेह नाहीं । न पडों या वाहीं काळा हातीं ।।धृ।।
ब्रम्हरस करूं भोजन पंगती । संतांचे संगती सर्वकाळ ।।२।।
तुका म्हणे पोट धालें चि न धाये । खादलें चि खायें आवडीनें ।।३।।

१६९४
आवडी न पुरे सेवितां न सरे । पडियेली धुरेसवें गांठी ।।१।।
न पुरे हा जन्म हें सुख सांटितां । पुढती ही आतां हें चि मागों ।।धृ।।
मारगाची चिंता पालखी बैसतां । नाहीं उसंतितां कोसपेणी ।।२।।
तुका म्हणे माझी विठ्ठल माउली । जाणे ते लागली भूक तान ।।३।।

१६९५
नाहीं त्रिभुवनीं सुख या समान । म्हणऊनि मन स्थिरावलें ।।१।।
धरियेलीं जीवीं पाउलें कोमळीं । केली एकावळी नाममाळा ।।धृ।।
शीतळ होऊनियां पावलों विश्रांती । न साहे पुढती घाली चित्ता ।।२।।
तुका म्हणे जाले सकळ सोहळे । पुरविले डोहळे पांडुरंगें ।।३।।

१६९६
मायबापापुढें लाटिकें लेंकरूं । तैसे बोल करूं कवतुकें ।।१।।
कृपावंता घालीं प्रेमपान्हारस । वोळली वोरसे पांडुरंग ।।धृ।।
नाहीं धीर खुंटी जवळी हुंबरे । ठायीं च पाखर कवळिते ।।२।।
तुका म्हणे मज होऊं नेदी सीण । कळों नेदी भिन्न आहे ऐसें ।।३।।

१६९७
आठवों नेंदी आवडी आणीक । भरूनियां लोक तिन्ही राहे ।।१।।
मन धांवे तेथें तिचें चि दुभतें । संपूर्ण आइतें सर्वकाळ ।।धृ।।
न लगे वोळावीं इंद्रियें धांवतां । ठाव नाहीं रिता उरों दिला ।।२।।
तुका म्हणे समपाउलाचा खुंट । केला बळकट हालों नेदी ।।३।।

१६९८
उत्तम घालावें आमुचिये मुखीं । निवारावें दुःखी होऊनि तें ।।१।।
न बैसे न वजे जवळूनि दुरी । मागें पुढें वारी घातपात ।।धृ।।
नाहीं शंका असो भलतिये ठायीं । मावळलें पाहीं द्वैताद्वैत ।।२।।
तुका म्हणे भार घेतला विठ्ठलें । अंतरीं भरलें बाह्य रूप ।।३।।

१६९९
आम्हां अळंकार मुद्रांचे शृंगार । तुळसीचे हार वाहों कंठीं ।।१।।
लाडिके डिंगर पंढरिरायाचे । निरंतर वाचे नामघोष ।।धृ।।
आम्हां आणिकांची चाड चि नाहीं । सर्व सुखें पायीं विठोबाच्या ।।२।।
तुका म्हणे आम्ही नेघों या मुक्ती । एकविण चित्तीं दुजें नाहीं ।।३।।

१७००
चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवरा पाहूं ।।१।।
डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ।।धृ।।
संतां महंतां होतील भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ।।२।।
तें तीर्थांचे माहेर । सर्वसुखाचें भांडार ।।३।।
जन्म नाहीं रे आणीक । तुका म्हणे माझी भाक ।।४।।

१७०१
पैल घरीं जाली चोरी । देहा करीं बोंब ।।१।।

हाबा हाबा करिसी काये । फिराऊनि नेट्यां वायें ।।धृ।।
सांडुनियां शुद्धी। निजलासी गेली बुद्धी ।।२।।
चोरीं तुझा काढला बुर । वेगळें भावा घातलें दूर ।।३।।
भलतियासी देसी वाव । लाहेसि तूं एवढा ठाव ।।४।।
तुका म्हणे अझुनि तरी । उरलें तें जतन करीं ।।५।।

१७०२
किती वेळा खादला दगा । अझून कां जागसी ना ।।१।।
लाज नाहीं हिंडतां गांवें । दुःख नवें नित्य नित्य ।।धृ।।
सवें चोरा हातीं फांसे । देखतां कैसे न देखसी ।।२।।
तुका म्हणे सांडिती वाट । तळपट करावया ।।३।।

१७०३
मुदलामध्यें पडे तोटा । ऐसा खोटा उदीम ।।१।।
आणिकांची कां लाज नाहीं । आळसा जिहीं तजिलें ।।धृ।।
एके सांते सरिखीं वित्तें । हानि हित वेगळालीं ।।२।।
तुका म्हणे हित धरा । नव्हे पुरा गांवढाळ ।।३।।

१७०४
निरोप सांगतां । न धरीं भय न करीं चिंता ।।१।।
असो ज्याचें त्याचे त्याचे माथां । आपण करावी ते कथा ।।धृ।।
उतरावा भार । किंवा न व्हावें सादर ।।२।।
तुका म्हणे धाक । तया इह ना परलोक ।।३।।

१७०५
शूरत्वासी मोल । नये कामा फिके बोल ।।१।।
केला न संडी कैवाड । जीवेंसाटीं तों हे होड ।।धृ।।
धीर तो कारण । साह्य होतो नारायण ।।२।।
तुका म्हणे हरि । दासां रक्षितो निर्धारीं ।।३।।

१७०६
हरिच्या दासां भये । ऐसें बोलों तें ही नये ।।१।।
राहोनियां आड । उभा देव पुरवी कोड ।।धृ।।

हरिच्या दासां चिंता। अघटित हे वार्ता ।।२।।
खावे ल्यावें द्यावें । तुका म्हणे पुरवावें ।।३।।

१७०७
दासां सर्व काळ । तेथें सुखाचे कल्लोळ ।।१।।
जेथें वसती हरिदास । पुण्य पिके पापा नास ।।धृ।।
फिरे सुदर्शन । घेऊनियां नारायण ।।२।।
तुका म्हणे घरीं । होय म्हणियारा कामारी ।।३।।

१७०८
आमचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास ।।१।।
मायबापाचीं लाडकीं । कळों आलें हें लौकिकीं ।।धृ।।
नाहीं निपराद । कोणां आम्हांमध्यें भेद ।।२।।
तुका म्हणे मान । अवघें आमचें हें धन ।।३।।

१७०९
काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न । खरा विलेपन चंदनाचें ।।१।।
नको नको देवा खळाची संगति । रस ज्या पंगती नाहीं कथे ।।धृ।।
काय सेज बाज माकडा विलास । अळंकारा नास करुनी टाकी ।।२।।
तुका म्हणे काय पाजूनि नवनीत । सर्पा विष थीत अमृताचें ।।३।।

१७१०
आनंदें एकांतीं प्रेमें वोसंडत । घेऊं अगणित प्रेमसुख ।।१।।
गोप्य धन वारा लागों यास । पाहों नेदूं वास दुर्जनासी ।।धृ।।
झणी दृष्टि लागे आवडीच्या रसा । सेवूं जिरे तैसा आपणासी ।।२।।
तुका म्हणे हें बहु सकुमार । न साहावे भार वचनाचा ।।३।।

१७११
मोक्षपदें तुच्छ केलीं याकारणें । आम्हां जन्म घेणें युगायुगीं ।।१।।
विटे ऐसें सुख नव्हे भक्तिरस । पुडतीपुडती आस सेवावें हें ।।धृ।।
देवा हातीं रूप धरविला आकार । नेदूं निराकार होऊं त्यासी ।।२।।
तुका म्हणे चित्त निवांत राहिलें । ध्याईं तीं पाउलें विटेवरि ।।३।।

१७१२
नको बोलों भांडा । खीळ घालुन बैस तोंडा ।।१।।
ऐक विठोबाचे गुण । करीं सादर श्रवण ।।धृ।।
प्रेमसुखा आड । काय वाजातें चाभाड ।।२।।
तुका म्हणे हिता । कां रे नागवसी थीता ।।३।।

१७१३
अति जालें उत्तम वेश्येचें लावण्य । परि ते सवासीण न म्हणावी ।।१।।
उचित अनुचित केले ठाया ठाव । गुणां मोल वाव थोरपण ।।धृ।।
शूरत्वावांचूनि शूरांमाजी ठाव । नाहीं आयुर्भाव आणिलिया ।।२।।
तुका म्हणे सोंग पोटाचे उपाय । कारण कमाईविण नाहीं ।।३।।

१७१४
शूरां साजती हतियारें । गांढ्यां हासतील पोरें ।।१।।
काय केली विटंबण । मोतीं नासिकावांचून ।।धृ।।
पतिव्रते रूप साजे। सिंदळ काजळ लेतां लाजे ।।२।।
दासी पत्नी सुता । नव्हे सरी एक पिता ।।३।।
मान बुद्धिवंतां । थोर न मनिती पिता ।।४।।
तुका म्हणे तरी । आंत शुद्ध दंडे वरी ।।५।।

१७१५
काय केलें जळचरीं । ढीवर त्यांच्या घातावरी ।।१।।
हा तों ठायींचा विचार । आहे यातिवैराकार ।।धृ।।
श्वापदातें वधी । निरपराधें पारधी ।।२।।
तुका म्हणे खळ । संतां पीडिती चांडाळ ।।३।।

१७१६
वाइटानें भलें । हीनें दाविलें चांगलें ।।१।।
एकाविण एका । कैचें मोल होतें फुका ।।धृ।।
विषें दाविलें अमृत । कडू गोड घातें हित ।।२।।
काळिमेनें ज्योती । दिवस कळों आला राती ।।३।।
उंच निंच गारा । हिरा परिस मोहरा ।।४।।
तुका म्हणे भले । ऐसे नष्टांनीं कळले ।।५।।

१७१७
असो खळ ऐसे फार । आम्हां त्यांचे उपकार ।।१।।
करिती पातकांची धुनी । मोल न घेतां साबनीं ।।धृ।।
फुकाचे मजुर। ओझें वागविती भार ।।२।।
पार उतरुन म्हणे तुका । आम्हां आपण जाती नरका ।।३।।

१७१८
संत पंढरीस जाती । निरोप धाडीं तया हातीं ।।१।।
माझा न पडावा विसर । तुका विनवितो किंकर ।।धृ।।
केरसुणी महाद्वारीं । ते मी असें निरंतरीं ।।२।।
तुमचे पायीं पाइतन । मोचे माझे तन मन ।।३।।
तांबुलाची पिकधरणी । ते मी असें मुख पसरूनि ।।४।।
तुमची इष्टा पंढरीराया । ते सारसुबी माझी काया ।।५।।
लागती पादुका । ते मी तळील मृत्तिका ।।६।।
तुका म्हणे पंढरिनाथा। दुजें न धरावें सर्वथा ।।७।।

१७१९
इच्छेचें पाहिलें । डोळीं अंतीं मोकलिलें ।।१।।
यांचा विश्वास तो काई । ऐसें विचारूनि पाहीं ।।धृ।।
सुगंध अभ्यंगें पाळितां । केश फिरले जाणतां ।।२।।
पिंड पाळितां ओसरे । अवघी घेऊनि मागें सरे ।।३।।
करितां उपचार । कोणां नाहीं उपकार ।।४।।
अल्प जीवन करीं । तुका म्हणे साधीं हरी ।।५।।

१७२०
यज्ञनिमित्त तें शरिरासी बंधन । कां रे तृष्णा वांयांविण वाढविली ।।१।।
नव्हे ते भक्ति परलोकसाधन । विषयांनीं बंधन केलें तुज ।।धृ।।
आशा धरूनि फळाची । तीथाअ व्रतीं मुक्ति कैंचि ।।२।।
तुका म्हणे सिणसी वांया । शरण न वजतां पंढरिराया ।।३।।

१७२१
संध्या कर्म ध्यान जप तप अनुष्ठान । अवघें घडे नाम उच्चारितां ।

न वेचे मोल कांहीं लागती न सायास । तरी कां आळस करिसी झणी ।।१।।
ऐसें हे सार कां नेघेसी फुकाचें । काय तुझें वेचे मोल तया ।।धृ।।
पुत्रस्नेहें शोक करी अजामेळ । तंव तो कृपाळ जवळी उभा ।
अनाथांच्या नाथें घातला विमानीं । नेला उचलूनि परलोका ।।२।।
अंतकाळीं गणिका पक्षियाच्या छंदें । राम राम उच्चारिलें ।
तंव त्या दिनानाथा कृपा आली । त्यानें तयेसी वैकुंठा नेलें ।।३।।
अवचिता नाम आलिया हे गती । चिंतितां चित्तीं जवळी असे ।
तुका म्हणे भावें स्मरा राम राम । कोण जाणे तये दशे ।।४।।

१७२२
दुष्टाचें चित्त न भिन्ने अंतरीं । जरी जन्मवरी उपदेशिला।
पालथे घागरी घातलें जीवन । न धरी च जाण तें ही त्याला ।।१।।
जन्मा येउनि तेणें पतन चि साधिलें । तमोगुणें व्यापिलें जया नरा।
जळो जळो हें त्याचें ज्यालेपण । कासया हे आलें संवसारा ।।धृ।।
पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पाहातां अंतरीं कोरडा तो।
कुचर मुग नये चि पाका । पाहातां सारिखा होता तैसा ।।२।।
तुका म्हणे असे उपाय सकळां । न चले या खळा प्रेत्न कांहीं ।
म्हणऊनि संग न करितां भला । धरितां अबोला सर्व हित ।।३।।

१७२३
कासियानें पूजा करूं केशीराजा । हा चि संदेह माझा फेडीं आतां ।।१।।
उदकें न्हाणूं तरी स्वरूप तुझें । तेथें काय माझें वेचे देवा ।।धृ।।
गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ । तेथें मी दुर्बळ काय करूं ।।२।।
फळदाता तूंच तांबोल अक्षता । तरी काय आतां वाहों तुज ।।३।।
वाहूं दक्षिणा जरी धातु नारायण । ब्रम्ह तें चि अन्न दुजें काई ।।४।।
गातां तूं ओंकार टाळी नादेश्वर । नाचावया थार नाहीं कोठें ।।५।।
तुका म्हणें मज अवघें तुझें नाम । धूप दीप रामकृष्णहरि ।।६।।

१७२४
गातां आइकतां कांटाळा जो करी । वास त्या अघोरीं कुंभपाकीं ।।१।।
रागें यमधर्म जाचविती तया । तु दिलें कासया मुख कान ।।धृ।।
विषयांच्या सुखें अखंड जगासी । न वजे एकादशी जागरणा ।।२।।

वेचूनियां द्रव्य सेवी मद्यपान । नाहीं दिलें अन्न अतीतासी ।।३।।
तीर्थाटण नाहीं केले उपकार । पाळिलें शरीर पुष्ट लोभें ।।४।।
तुका म्हणे मग केला साहे दंड । नाइकती लंड सांगितलें ।।५।।

१७२५
तुझें म्हणवितां काय नास जाला । ऐकें बा विठ्ठला कीर्ती तुझी ।।१।।
परी तुज नाहीं आमचे उपकार । नामरूपा थार केलियाचे ।।धृ।।
समूळीं संसार केला देशधडी । सांडिली आवडी ममतेची ।।२।।
लोभ दंभ काम क्रोध अहंकार । यांसी नाहीं थार ऐसें केलें ।।३।।
मृत्तिका पाषाण तैसें केलें धन । आपले ते कोण पर नेणों ।।४।।
तुका म्हणे जालों देहासी उदार । आणीक विचार काय तेथें ।।५।।

१७२६
जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरीं वरीं ।।१।।
अंतरींचें शुद्ध कासयानें जालें । भूषण तों केलें आपणया ।।धृ।।
इंद्रावण फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडे चि ना ।।२।।
तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया कुंफ्दां तुम्ही ।।३।।

१७२७
बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त । तया सुखा अंतपार नाहीं ।।१।।
येऊनि अंतरीं राहील गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ।।धृ।।
राम कृष्ण हरि मुकुंद मुरारि । मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ।।२।।
तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होइल भाव एकविध ।।३।।

१७२८
धन्य पुंडलिका बहु बरें केलें । निधान आणिलें पंढरिये ।।१।।
न पवीजे केल्या तपांचिया रासी । तें जनलोकांसी दाखविलें ।।धृ।।
सर्वोत्तम तीर्थ क्षेत्र आणि देव । शास्त्रांनी हा भाव निवडिला ।।२।।
विष्णुपद गया रामधाम काशी । अवघीं पायांपाशीं विठोबाच्या ।।३।।
तुका म्हणे मोक्ष देखिल्या कळस । तात्काळ या नास अहंकाराचा ।।४।।

१७२९
धन्य ते पंढरी धन्य भीमातीर । आणियेलें सार पुंडलिकें ।।१।।

धन्य तो हि लोक अवघा दैवांचा । सुकाळ प्रेमाचा घरोघरीं ।।धृ।।
धन्य ते ही भूमी धन्य तरुवर । धन्य ते सुरवर तीर्थरूप ।।२।।
धन्य त्या नरनारी मुखीं नाम ध्यान । आनंदें भवन गर्जतसे ।।३।।
धन्य पशु पक्षी कीटक पाषाण । अवघा नारायण अवतरला ।।४।।
तुका म्हणे धन्य संसारातें आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ।।५।।

१७३०
मायबाप करिती चिंता । पोर नाइके सांगतां ।।१।।
नको जाऊं देउळासी । नेतो बागुल लोकांसी ।।धृ।।
कर्णद्वारें पुराणिक। भुलवी शब्दें लावी भीक ।।२।।
वैष्णवां संगती । हातीं पडलीं नेणों किती ।।३।।
आम्हां कैंचा मग । करिसी उघडियांचा संग ।।४।।
तुका म्हणे जाणें नरका । त्यांचा उपदेश आइका ।।५।।

१७३१
मन माझें चपळ न राहे निश्चळ । घडी एकी पळ स्थिर नाहीं ।।१।।
आतां तूं उदास नव्हें नारायणा । धांवें मज दीना गांजियेलें ।।धृ।।
धांव घालीं पुढें इंद्रियांचे ओढी । केलें तडातडी चित्त माझें ।।२।।
तुका म्हणे माझा न चले सायास । राहिलों हे आस धरुनी तुझी ।।३।।

१७३२
मागतियाचे दोनि च कर । अमित भांडार दातियाचें ।।१।।
काय करूं आतां कासयांत भरूं । हा मज विचारु पडियेला ।।धृ।।
एकें सांटवणें प्रेमें वोसंडलीं । जिव्हा हे भागली करितां माप ।।२।।
तुका म्हणे आतां आहे तेथें असो । अंखुनियां बैसों पायांपाशीं ।।३।।

१७३३
जिचें पीडे बाळ । प्राण तयेचा विकळ ।।१।।
ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी एक जीव ।।धृ।।
सुखाची विश्रांती । उमटे मातेचिये चित्तीं ।।२।।
तुका म्हणे संत । तुम्ही बहु कृपावंत ।।३।।

१७३४

यावें माहेरास । हे च सर्वकाळ आस ।।१।।
घ्यावी उच्छिष्टाची धणी । तीर्थ इच्छी पायवणी ।।धृ।।
भोग उभा आड । आहे तोंवरी च नाड ।।२।।
तुका म्हणे देवें । माझें सिद्धी पाववावें ।।३।।

१७३५
लेंकराचें हित । वाहे माउलीचें चित्त ।।१।।
ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभेंविण प्रीती ।।धृ।।
पोटीं भार वाहे। त्याचें सर्वस्व ही साहे ।।२।।
तुका म्हणे माझें । तैसे तुम्हां संतां ओझें ।।३।।

१७३६
आम्हां गांजी जन । तरि कां मेला नारायण ।।१।।
जालों पोरटीं निढळें । नाहीं ठाव बुड आळें ।।धृ।।
आम्हीं जना भ्यावें। तरि कां न लाजिजे देवें ।।२।।
तुका म्हणे देश । जाला देवाविण ओस ।।३।।

१७३७
तुम्ही पाय संतीं । माझे ठेवियेले चित्तीं ।।१।।
आतां बाधूं न सके काळ । जालीं विषम शीतळ ।।धृ।।
भय नाहीं मनीं । देव वसे घरीं रानीं ।।२।।
तुका म्हणे भये । आतां स्वप्नीं ही नये ।।३।।

१७३८
काळाचे ही काळ । आम्ही विठोबाचे लडिवाळ ।।१।।
करूं सत्ता सर्वां ठायी । वसों निकटवासें पायीं ।।धृ।।
ऐसी कोणाची वैखरी । वदे आमुचे समोरी ।।२।।
तुका म्हणे बाण । हातीं हरिनाम तीक्षण ।।३।।

१७३९
जन्मा येऊन उदार जाला । उद्धार केला वंशाचा । मेळवूनि धन मेळवी माती । सदा विपत्ती भोगीतसे ।।१।।
नाम घेतां न मिळे अन्न । नव्हे कारण देखिलिया । धर्म करितां ऐके कानीं ।

बांधे निजोनि डोकियासी ।।धृ।।
घरा व्याही पाहुणा आला । म्हणे त्याला बरें नाहीं । तुमचे गावीं वैद्य आहे । बैसोनि काय प्रयोजन ।।२।।
उजवूं किती होतिल पोरें । मरतां बरें म्हणे यांसी । म्हणऊनि देवा नवस करी । दावी घरींहुनि बोनें ।।३।।
पर्वकाळीं भट घरासी आला । बोंब घाला म्हणे पोरां । तुमचा उणा होईल वांटा । काळ पिठासी आला ।।४।।
दाढी करितां अडका गेला । घरांत आला बाइलेपें । म्हणे आतां उगवीं मोडी । डोई बोडीं आपुली ।।५।।
तीर्थ स्वप्नीं नेणें गंगा । पूजन लिंगा गांविंचिया । आडकुनि दार बैसे दारीं। आल्या घर म्हणे ओस ।।६।।
तुका म्हणे ऐसे आहेत गा हरी। या ही तारीं जीवांसी । माझ्या भय वाटे चित्तीं । नरका जाती म्हणोनि ।।७।।

१७४०
जाणे वर्तमान । परि तें न वारे त्याच्याने ।।१।।
तो ही कारणांचा दास । देव म्हणवितां पावे नास ।।धृ।।
वेची अनुष्ठान। सिद्धी कराया प्रसन्न ।।२।।
तुका म्हणे त्याचें । मुदल गेलें हाटवेचें ।।३।।

१७४१
घातला दुकान । पढीये तैसा आहे वान ।।१।।
आम्ही भांडारी देवाचे । द्यावें घ्यावें माप वाचे ।।धृ।।
उगवूं जाणों मोडी । जाली नव्हे त्याची जोडी ।।२।।
तुका म्हणे पुडी । मोल तैसी खरी कुडी ।।३।।

१७४२
सादाविलें एका । सरें अवघियां लोकां ।।१।।
आतां आवडीचे हातीं । भेद नाहीं ये पंगती ।।धृ।।
मोकळी च पोतीं । नाहीं पुसायाची गुंती ।।२।।
तुका म्हणे बरा । आहे ढसाळ वेव्हारा ।।३।।

१७४३

तडामोडी करा । परि उत्तम तें भरा ।।१।।
जेणें खंडे एके खेपे । जाय तेथें लाभें वोपे ।।धृ।।
दाविल्या सारिखें । मागें नसावें पारिखें ।।२।।
मागें पुढें ॠण । तुका म्हणे फिटे हीण ।।३।।

१७४४
नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ।।१।।
जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ।।धृ।।
राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ।।२।।
होवा वाटे जना । तुका म्हणे साटीं गुणां ।।३।।

अनघडसिद्धाच्या शब्देंकरून रामेश्वरभटाच्या शरीरीं दाह जाला तो ज्यानें शमला तो अभंग ।। १ ।।
१७४५
चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्प तया ।।१।।
विष तें अमृत अघातें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ।।धृ।।
दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ।।२।।
आवडेल जीवां जीवाचे परी । सकळां अंतरीं एक भाव ।।३।।
तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणियेते येणें अनुभवें ।।४।।

१७४६
लाज वाटे मज मानिती हे लोक । हें तों नाहीं एक माझे अंगी ।।१।।
मजुनि झिजलों मापाचिया परी । जाळावी हे थोरी लाभाविण ।।धृ।।
कोमळ कंटक तीक्षण अगरीं । पोचट ते वरी अंगकांति ।।२।।
चित्रींचे लेप शृंगारिलें निकें । जीवेंविण फिकें रूप त्याचें ।।३।।
तुका म्हणे दिसें वांयां गेलों देवा । अनुभव ठावा नाहीं तेणें ।।४।।

१७४७
बोलविसी माझें मुख । परी या जना वाटे दुःख ।।१।।
जया जयाची आवडी । तया लागीं तें चरफडी ।।धृ।।
कठीण देतां काढा । जल्पे रोगी मेळवी दाढा ।।२।।
खाऊं नये तें चि मागे । निवारितां रडों लागे ।।३।।
वैद्या भीड काय । अतित्याई जीवें जाय ।।४।।

नये भिडा सांगों आन । पथ्य औषधाकारण ।।५।।
धन माया पुत्र दारा । हे तों आवडी नरका थारा ।।६।।
तुका म्हणे यांत । आवडे ते करा मात ।।७।।

१७४८
पतिव्रते आनंद मनीं । सिंदळ खोंचे व्यभिचारवचनीं ।।१।।
जळो वर्म लागो आगी । शुद्धपण भलें जगीं ।।धृ।।
सुख पुराणीं आचारशीळा । दुःख वाटे अनर्गळा ।।२।।
शूरा उल्हास अंगीं । गांढ्या मरण ते प्रसंगीं ।।३।।
शुद्ध सोनें उजळे अगी । हीन काळें धांवे रंगीं ।।४।।
तुका म्हणे तो चि हिरा । घनघायें निवडे पुरा ।।५।।

१७४९
चालिती आड वाटा । आणिकां द्राविती जे नीटा ।।१।।
न मनीं तयांचे उपकार । नाहीं जोडा तो गंव्हार ।।धृ।।
विष सेवूनि वारी मागें । प्राण जातां जेणें संगें ।।२।।
बुडतां हाक मारी । ठाव नाहीं आणिकां वारी ।।३।।
तुका म्हणे न करीं हिंका । गुण घेऊन अवगुण टाका ।।४।।

१७५०
कुळींचे दैवत ज्याचें पंढरीनाथ । होईन दासीसुत त्याचे घरीं ।।१।।
शुद्ध यातिकुळवर्णा चाड नाहीं । करीं भलते ठायीं दास तुझा ।।धृ।।
पंढरीस कोणी जाती वारेकरी । होईन त्यांचे घरीं पशुयाति ।।२।।
विठ्ठलचिंतन दिवसरात्रीं ध्यान । होईन पायतन त्याचे पायीं ।।३।।
तुळसीवृंदावन जयाचे अंगणीं । होइन केरसुणी त्याचे घरीं ।।४।।
तुका म्हणे हा चि भाव माझ्या चित्तीं । नाहीं आणिकां गती चाड मज ।।५।।

१७५१
अवधिया चाडा कुंटित करूनि । लावीं आपुली च गोडी । आशा मनसा तृष्णा कल्पना ।
करूनियां देशधडी । मीतूंपणापासाव गुंतलों । मिथ्या संकल्प तो माझा तोडीं ।
तुझिये चरणीं माझे दोन्ही पक्ष । अवघी करुनि दाखवीं पिंडी रे रे ।।१।।

माझें साच काय केलें मृगजळ । वर्णा याती कुळ अभिमान । कुमारी भातुकें खेळती कवतुकें । काय त्यांचें साचपण ।।धृ।।
वेगळाल्या भावें चित्ता तडातोडी । केलों देशधडी मायाजाळें । गोत वित्त माय बाप बहिणी सुत ।
बंधुवर्ग माझीं बाळें । एका एक न धरी संबंध पुरलिया । पातलिया जवळी काळें ।
जाणोनियां त्याग सर्वस्वें केला। सांभाळीं आपुलें जाळें ।।२।।
एकां जवळी धरी आणिकां अंतरीं । तीं काय सोयरीं नव्हतीं माझीं । एकांचे पाळण एकांसी भांडण ।
चाड कवणिये काजीं । अधिक असे उणें कवण कवण्या गुणें । हे माव न कळे चि तुझी ।
म्हणोनि चिंतनीं राहिलों श्रीपती। तुका म्हणे भाक माझी ।।३।।

१७५२
आणिकां छळावया जालासी शाहाणा । स्वहिता घातले खानें । आडिके पैके करूनि सायास ।
कृपणें सांचलें धन। न जिरे क्षीर श्वानासी भक्षितां । याती तयाचा गुण ।
तारुण्यदशे अधम मातला । दवडी हात पाय कान ।।१।।
काय जालें यांस वांयां कां ठकले । हातीं सांपडलें टाकीतसे ।
घेउनि स्फटिकमणी टाकी चिंतामणी । नागवले आपुले इच्छे ।।धृ।।
सिद्धीं सेविलें सेविती अधम । पात्रासारिखे फळ । सिंपिला मोतीं जन्मलें स्वाती ।
वरुषलें सर्वत्र जळ । कापुस पट नये चि कारणा । तयास पातला काळ ।
तें चि भुजंगें धरिलें कंठीं । मा विष जालें त्याची गरळ ।।२।।
भक्षूनि मिष्टान्न घृतसाकर । सहित सोलुनि केळें । घालुनियां घसां अंगोळिया।
हाते वांत करू बळें । कुंथावयाची आवडी बोंबा । उन्हवणी रडवी बाळें ।
तुका म्हणे जे जैसें करिती । ते पवती तैसीं च फळें ।।३।।

१७५३
चंदनाचे गांवीं सर्पांच्या वसति । भोगिते ते होती द्वीपांतरीं ।।१।।
एका ओझें एका लाभ घडे देवा । संचिताचा ठेवा वेगळाला ।।धृ।।
क्षीराची वसति अशुद्ध सेवावें । जवळी तें जावें भोगें दुरी ।।२।।

तुका म्हणे ऐसी बुद्धि ज्याची जड । त्याहुनि दगड बरे देवा ।।३।।

१७५४
तुज दिलें आतां करीं यत्न याचा । जीवाभाव-वाचाकायामन ।।१।।
भागलों दातारा सीण जाला भारी । आतां मज तारीं शरणागता ।।धृ।।
नेणतां सोसिली तयाची आटणी । नव्हतां ही कोणी कांहीं माझीं ।।२।।
वर्म नेणें दिशा हिंडती मोकट । इंद्रियें सुनाट दाही दिशा ।।३।।
वेरझारीफेरा सिणलों सायासीं । आतां हृषीकेशी अंगिकारीं ।।४।।
तुका म्हणे मन इंद्रियांचे सोई । धांवे यासी काई करूं आतां ।।५।।

१७५५
स्वयें पाक करी । संशय तो चि धरी । संदेहसागरीं। आणीक परी बुडती ।।१।।
जाणे विरळा एक । जालें तेथींचे हें सुख। देखिले बहुतेक । पुसतां वाट चुकले ।।धृ।।
तो चि जाणे सोंवळें । शोधी विकल्पाचीं मुळें । नाचती पाल्हाळें । जे विटाळें कोंडिले ।।२।।
तो चि साधी संधी । सावध त्रिकाळ जो बुद्धी । संदेहाचा संधी। वेठी आणि करियेले ।।३।।
अखंड ते ध्यान । समबुद्धि समाधान । सोंग वांयांविण । ते झांकून बैसती ।।४।।
करणें जयासाटीं । जो नातुडे कवणे आटी । तुका म्हणे साटी । चित्तवित्तेंवांचूनि ।।५।।

१७५६
माझिया संचिता । दृढ देखोनि बळिवंता । पळसी पंढरिनाथा । भेणे आतां तयाच्या ।।१।।
तरि मज कळलासी । नव्हतां भेटी जाणीवेसी । एक संपादिसी । मान करिसी लोकांत ।।धृ।।
तरि हें प्रारब्ध जी गाढें । कांहीं न चले तयापुढें । काय तुज म्यां कोंडें । रें सांकडें घालावें ।।२।।
भोगधीपति क्रियमाण । तें तुज नांगवे अजून। तरि का वांयांविण । तुज म्यां सीण करावा ।।३।।

तुज नव्हतां माझें कांहीं । परि मी न संडीं भक्तिसोई । हो कां भलत्या ठायीं । कुळीं जन्म भलतैसा ।।४।।
तूं भितोसि माझिया दोषा । कांहीं मागणें ते आशा । तुका म्हणे ऐसा । कांहीं न धरीं संकोच ।।५।।

१७५७
लोकमान देहसुख । संपत्तिउपभोग अनेक । विटंबना दुःख । तुझिये भेटीवांचूनि ।।१।।
तरी मज ये भेट ये भेट । काय ठाकलासी नीट । थोर पुण्यें वीट । तुज दैवें चि लाधली ।।धृ।।
काय ब्रम्हज्ञान करूं कोरडें । रितें मावेचें मापाडें । भेटीविण कुडें । तुझिये अवघें मज वाटे ।।२।। आत्मस्थितीचा विचार । काय करूं हा उद्धार। न देखतां धीर । चतुर्भुज मज नाहीं ।३।।
रिद्धीसिद्धी काय करूं । अथवा अगम्य विचारू । भेटीविण भारु । तुझिये वाटे मज यांचा ।।४।।
तुजवांचूनि कांहीं व्हावें । ऐसें नको माझिया जीवें। तुका म्हणे द्यावें । दरुषण पायांचें ।।५।।

१७५८
तुझा म्हणवून तुज नेणें । ऐसें काय माझें जिणें।।१।।
तरि मज कवणाचा आधार । करोनियां राहों धीर ।।धृ।।
काय शब्दीं चि ऐकिला । भेटी नव्हतां गा विठ्ठला ।।२।।
तुका म्हणे आतां । अभय देईं पंढरिनाथा ।।३।।

१७५९
उद्धवअक्रूरासी । आणीक व्यासआंबऋृषी । रुक्मांगदाप्रल्हादासी । दाविलें तें दाखवीं ।।१।।
तरि मी पाहेन पाहेन। तुझे श्रीमुखचरण । उताविळ मन । तयाकारणें तेथें ।।धृ।।
जनकश्रुतदेवा करीं । कैसा शोभलासी हरी । विदुराच्या घरीं । कण्या धरी कवतुकें ।।२।।
पांडवा अकांतीं । तेथें पावसी स्मरती । घातलें द्रौपदी । यागीं बिरडें चोळीचें ।।३।।

करी गोपीचें कवतुक । गाईगोपाळांसी सुख । दावीं तें चि मुख । दृष्टी माझ्या आपुलें ।।४।।
तरि तूं अनाथाचा दाता । मागतियां शरणागतां । तुका म्हणें आतां। कोड पुरवीं हें माझें ।।५।।

१७६०
मागता भिकारी जालों तुझे द्वारीं । देईं मज हरी कृपादान ।।१।।

प्रेम प्रीति नाम उचित करावें । भावें संचरावें ह्रदयामाजी ।।धृ।।
सर्वभावें शरण आलों पांडुरंगा । कृपाळु तूं जगामाजी एक ।।२।।
तापत्रयें माझी तापविली काया । शीतळ व्हावया पाय तुझे ।।३।।
संबंधीं जनवाद पीडलों परोपरी । अंतरलों दुरी तुजसी तेणें ।।४।।
तुका म्हणे आतां तुझा शरणागता । करावें सनाथ मायबापा ।।५।।

१७६१
भाव नाहीं काय मुद्रा वाणी । बैसे बगळा निश्चळ ध्यानीं ।।१।।
न मनी नाम न मनी त्यासी । वाचाळ शब्द पिटी भासी ।।धृ।।
नाहीं चाड देवाची कांहीं । छळणें टोंके तस्करघाई ।।२।।
तुका म्हणे त्याचा संग । नको शब्द स्पर्शअंग ।।३।।

१७६२
दिनदिन शंका वाटे । आयुष्य नेणवतां गाढें ।।१।।
कैसीं भुललीं बापुडीं । दंबविषयांचे सांकडीं ।।धृ।।
विसरला मरण। त्याची नाहीं आठवण ।।२।।
देखत देखत पाहीं । तुका म्हणे आठव नाहीं ।।३।।

१७६३
माझें मज आतां न देखें निरसतां । म्हणऊन आधार केला । संसाराची आस सांडुनि लौकिक ।
जीव भाव तुज दिला । नव्हतीं माझीं कोणी मी कवणांचा । अर्थ मोहो सांडवला ।
तारीं मारीं करीं भलतें दातारा । होऊन तुझा आतां ठेलों रे ।।१।।
असो माझें कोडें तुज हे सांकडें । मी असेन निवाडें सुखरूप ।

बाळकासी चिंता काय पोटवेथा । जया शिरीं मायबाप ।।धृ।।
पापपुण्यें श्रुति आटिल्या। शास्त्रांस न लगे चि ठाव ।
विधिनिषिधें गोविलीं पुराणें वेदांसी तो अहंभाव ।
ओंकाराचें मूळ व्यापिलें माया । तेथें न धरे च भाव ।
म्हणऊन काबाड सांडिलें उपसतां । धरिलें तुझें चि नांव ।।२।।
तनमनइंद्रियें ठेवूनि राहिलों । सर्व आशा तुझे पायीं । तप तीर्थ दान करवूं कवणा ।
हातीं अधीन तें मज काई । आहिक्यें परत्रें चाड नाहीं सर्वथा । जन्म सदा मज देहीं ।
मायामोहपाश करीं विष तैसें । तुका म्हणे माझ्याठायीं ।।३।।

१७६४
तुझें नाम गोड नाम गोड । पुरे कोड सकळ ही ।।१।।
रसना येरां रसां विटे । घेतां घोट अधिक हें ।।धृ।।
आणिकां रसें मरण गांठी । येणें तुटी संसारें ।।२।।
तुका म्हणे आहार जाला। हा विठ्ठला आम्हांसी ।।३।।

१७६५
धालों सुखें ढेकर देऊं । उमटे जेवूं तोंवरी ।।१।।
क्रीडा करूं निरांजनीं । न पुरे धणी हरिसवें ।।धृ।।
अवघे खेळों अवघ्यामधीं । डाईं न पडों ऐसी बुद्धि ।।२।।
तुका म्हणे वांचवीत। आम्हां सत्ता समर्थ ।।३।।

१७६६
एकल्या नव्हे खेळ चांग । धरिला संग म्हणऊनि।।१।।
उमटे तेव्हां कळे नाद । भेदाभेद निवडेना ।।धृ।।
दुसरा परी एक ऐसा । वजे रिसा निकुरें ही ।।२।।
तुका म्हणे कळत्यां कळे । येर खेळे खेळ म्हूण ।।३।।

१७६७
बोलविले जेणें । तो चि याचें गुह्य जाणे ।।१।।
मी तों काबाडाचा धनी । जेवूं मागावें थिंकोनि ।।धृ।।
मजुराच्या हातें । माप जालें गेलें रितें ।।२।।

जाला पुरविता । पांडुरंग माझा पिता।।३।।
मायबापासवें । बाळें कौतुकें खेळावें ।।४।।
जैसा करिती धंदा । तैसा पडोनियां छंदा ।।५।।
त्याच्या साच गाई म्हैसी । येणें खेळावें मातीशीं ।।६।।
तुका म्हणे बोल । माझा बोलतो विठ्ठल ।।७।।

१७६८
कां हो तुम्ही माझी वदविली वाणी । नेदा हे निवडूनि पांडुरंगा ।।१।।
आणीक म्यां कोणां पुसावा विचार । मुळीं संवसार दुराविला ।।धृ।।
स्वामिसेवा म्हूण घेतली पदरीं । सांगितलें करीं कारण तें ।।२।।
तुका म्हणें नाहीं शिकविलें जेणें । तो याच्या वचनें उगा राहे ।।३।।

१७६९
सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण । जोंवरी हा प्राण जाय त्याचा ।।१।।
आणिकांचा धाक न धरावा मनीं । निरोपावचनीं टळों नये ।।धृ।।
समय सांभाळूनि आगळें उत्तर । द्यावें भेदी वज्र तपायरी ।।२।।
तुका म्हणे तरी म्हणवावें सेवक । खादलें तें हाक अन्न होय ।।३।।

१७७०
नये पुसों आज्ञा केली एकसरें । आम्हांसी दुसरें आतां नाहीं ।।१।।
ज्याचें तो बळिवंत सर्व निवारिता । आम्हां काय चिंता करणें लागें ।।धृ।।
बुद्धीचा जनिता विश्वाचा व्यापक । काय नाहीं एक अंगीं तया ।।२।।
तुका म्हणे मज होईल वारिता । तरी काय सत्ता नाहीं हातीं ।।३।।

१७७१
बळिवंत आम्ही समर्थाचे दास । घातली या कास कळिकाळासी ।।१।।
तेथें मानसाचा कोण आला पाड । उलंघोनि जड गेलों आधीं ।।धृ।।
संसाराचे बळी साधिलें निधान । मारिले दुर्जन षडवर्ग ।।२।।
तुका म्हणे एक उरला धरिता ठाव । येर केले वाव तृणवत ।।३।।

१७७२
एका गावें आम्हीं विठोबाचे नाम । आणिकांपें काम नाहीं आतां ।।१।।
मोडूनियां वाटा सूक्षम सगर । केला राज्यभार चाले ऐसा ।।धृ।।

लावूनि मृदांग टाळश्रुतिघोष । सेवूं ब्रम्हरस आवडीनें ।।२।।
तुका म्हणे महापातकी पतित । ऐसियांचे हित हेळामात्रें ।।३।।

१७७३
वाचाचापल्ये बहु जालों कुशळ । नाहीं बीजमूळ हाता आलें ।।१।।
म्हणोनि पंढरिराया दुखी होतें मन । अंतरींचे कोण जाणे माझें ।।धृ।।
पूज्य जालों अंगा आला अभिमान । पुढील कारण खोळंबलें ।।२।।
तुका म्हणे खूण न कळे चि निरुती। सांपडलों हातीं अहंकाराचे ।।३।।

१७७४
आतां काढाकाढी करीं बा पंढरिराया । नाहीं तरी वांयां गेलों दास ।।१।।
जाणतां बैसलों दगडाचे नावे । तिचा धर्म घ्यावे प्राण हा चि ।।धृ।।
मनाचा स्वभाव इंद्रियांचे ओढी । पतनाचे जोडी वरी हांव ।।२।।
तुका म्हणे जाली अंधळ्याची परी । आतां मज हरी वाट दावीं ।।३।।

१७७५
सज्जन तो शब्द सत्य जो मानी । छळी दुर्जन आणिकांसी ।।१।।
एक गुण तो केला दोंठायीं । ज्याचा त्यास पाहीं जैसा तैसा ।।धृ।।
भाविक शब्द बोले वाणीचा । लटिका वाचा वाचाळ तो ।।२।।
परउपकार घडे तो भला । नाठ्याळ तया दया नाहीं ।।३।।
जाणीवंत तो पायरी जाणे । अधम तो नेणे खुंट जैसा।।४।।
हित तें अनहित केलें कैसें । तुका म्हणे पिसें लागलें यास ।।५।।

१७७६
तुझें नाम मुखीं न घेतां आवडी । जिव्हा ते चि घडी झडो माझी ।।१।।
हें मज देईं हें मज देईं । आणिक दुजें कांहीं न मगें तुज ।।धृ।।
बहिर कान तुझी कीर्ती नाइकतां । पाय न देखतां जात डोळे ।।३।।
मना तुझें ध्यान नाहीं नित्य काळ । धिग तें चांडाळ जळो जळो ।।३।।
हातपाय तेणें पंथ न चलतां । जावे ते अनंता गळोनियां ।।४।।
तुजविण जिणें नाहीं मज चाड । तुका म्हणे गोड नाम तुझें ।।५।।

१७७७.
म्हणसी होऊनी निश्चिंता । हरूनियां अवघी चिंता । मग जाऊं एकांता

भजन करूं । संसारसंभ्रमें आशा लागे पाठी । तेणें जीवा साटी होईल तुझ्या ।।१।।
सेकीं नाडसील नाडसील । विषयसंगें अवघा नाडसील । मागुता पडसील भवडोहीं ।।धृ।।
शरीर सकळ मायेचा बांधा । यासी नाहीं कधीं अराणूक । करिती तडातोडी आंत बाह्यात्कारीं । ऐसे जाती चारी दिवस वेगीं ।।२।।
मोलाची घडी जाते वांयांविण । न मिळे मोल धन देतां कोडी ।
जागा होईं करीं हिताचा उपाय । तुका म्हणे हाय करिसी मग ।।३।।

१७७८
कनवाळू कृपाळू भक्तांलागीं मोही । गजेंद्राचा धांवा तुवां केला विठाई ।।१।।
पांडुरंगे ये वो पांडुरंगे । जीवाचे जिवलगे ये वो पांडुरंगे ।।धृ।।
भक्तांच्या कैवारें कष्टलीस विठ्ठले । आंबऋषीकारणें जन्म दाहा घेतले ।।२।।
प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार केला । विदारूनि दैत्य प्रेमपान्हा पाजिला ।।३।।
उपमन्याकारणें कैसी धांवसी लवलाहीं । पाजी प्रेमपान्हा क्षीरसागराठायीं ।।४।।
कौरवीं पांचाळी सभेमाजी आणिली । वस्त्रहरणीं वस्त्रें कैसी जाली माउली ।।५।।
दुर्वास पातला धर्मा छळावया वनीं । धांवसी लवलाहीं शाखादेठ घेऊनि ।।६।।
कृपाळू माउली भुक्तिमुक्तिभांडार । करीं माझा अंगीकार तुका म्हणे विठ्ठले ।।७।।

१७७९
कवणा पाषाणासी धरूनि भाव । कवणावरी पाव ठेवूं आतां ।
म्हणऊनि निश्चित राहिलों मनीं । तूं चि सर्वां खाणी देखोनियां ।।१।।
कवणाचें कारण न लगे कांहीं । सर्वांठायीं तूं एक।
कायावाचामन ठेविलें तुझ्या पायीं । आता उरलें काई न दिसे देवा ।।धृ।।
जळें जळ काय धोविलें एक । कवण तें पातक हरलें तेथें ।
पापपुण्य हे वासना सकळ । ते तुज समूळ समर्पिली ।।२।।
पितरस्वरूपी तूं चि जनार्दन। सव्य तें कवण अपसव्य ।
तुका म्हणे जीत पिंड तुम्हां हातीं। देऊनि निश्चिंती मानियेली ।।३।।

१७८०
सिणलों दातारा करितां वेरझारा । आतां सोडवीं संसारापासोनियां ।।१।।
न सुटे चि बाकी नव्हे झाडापाडा । घातलोंसें खोडा हाडांचिया ।।धृ।।
मायबापें माझीं जीवाचीं सांगाती । तीं देतील हातीं काळाचिया ।।२।।
पडताळूनि सुरी बैसली सेजारीं । यमफासा करीं घेऊनिया ।।३।।
पाठी पोटीं एकें लागलीं सरसीं । नेती नरकापाशीं ओढूनियां ।।४।।
जन साहेभूत असे या सकळां । मी एक निराळा परदेशी ।।५।।
कोणा काकुलती नाहीं कोणे परी । तुजविण हरी कृपाळुवा ।।६।।
तुका म्हणे मज तुझाची भरवसा । म्हणऊनि आशा मोकलिली ।।७।।

१७८१
देवाचा भक्त तो देवासी गोड । आणिकांसी चाड नाहीं त्याची ।
कवणाचा सोइरा नव्हे च सांगाती । अवघियां हातीं अंतरला ।।१।।
निष्काम वेडें म्हणतील बापुडे । अवघियां सांकडें जाला कैसा ।
माझें ऐसें तया न म्हणत कोणी । असे रानीं वनीं भलते ठायीं ।।धृ।।
प्रातःस्नान करी विभूतिचर्चन । दखोनिया जन निंदा करी ।
कंठीं तुळसीमाळा बैसोनि निराळा । म्हणती या चांडाळा काय जालें ।।२।।
गातां शंका नाहीं बैसे भलते ठायीं । शिव्या देती आई बाप भाऊ ।
घरी बाइल म्हणे कोठें व्याली रांड । बरें होतें शंड मरता तरी ।।३।।
जन्मोनि जाला अवघियां वेगळा । म्हणोनि गोपाळा दुर्लभ तो ।
तुका म्हणे जो संसारा रुसला । तेणें चि टाकिला सिद्धपंथ ।।४।।

१७८२
कस्तुरी भिनली जये मृत्तिके । तयेसी आणिके कैसी सरी ।।१।।
लोखंडाचे अंगीं लागला परिस । तया आणिकास कैसी सरी ।।२।।
तुका म्हणे मी न वजें यातीवरी । पूज्यमान करीं वैष्णवांसी ।। ।३।।

१७८३
अनुहात ध्वनि वाहे सकळां पिंडीं । राम नाहीं तोंडीं कैसा तरे ।।१।।
सकळां जीवांमाजी देव आहे खरा । देखिल्या दुसरा विण न तरे ।।धृ।।
ज्ञान सकळांमाजी आहे हें साच । भक्तीविण तें च ब्रम्ह नव्हे ।।२।।
काय मुद्रा कळल्या कराव्या सांगतां । दीप न लगतां उन्मनीचा ।।३।।

तुका म्हणे नका पिंडाचें पाळण । स्थापू नारायण आतुडेना ।।४।।

१७८४
नेणें अर्थ कांहीं नव्हती माझे बोल । विनवितों कोपाल संत झणी ।।१।।
नव्हती माझे बोल बोले पांडुरंग । असे अंगसंगें व्यापूनिया ।।धृ।।
मज मूढा शक्ति कैंचा हा विचार । निगमादिकां पार बोलावया ।।२।।
राम कृष्ण हरी मुकुंदा मुरारि । बोबडा उत्तरीं हें चि ध्यान ।।३।।
तुका म्हणे गुरुकृपेचा आधार । पांडुरंगें भार घेतला माझा ।।४।।

१७८५
देवासी लागे सकळांसी पोसावें । आम्हां न लगे खावें काय चिंता ।।१।।
देवा विचारावें लागे पापपुण्य । आम्हासी हे जन अवघें भलें ।।धृ।।
देवासी उत्पत्ति लागला संहार । आम्हां नाहीं फार थोडें काहीं ।।२।।
देवासी काम लागला धंदा । आम्हासी ते सदा रिकामीक ।।३।।
तुका म्हणे आम्ही भले देवाहून । विचारितां गुण सर्वभावें ।।४।।

१७८६
घेईन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरणसेवा साधावया ।।१।।
हरिनामकीर्तन संतांचे पूजन । घालूं लोटांगण महाद्वारीं ।।धृ।।
आनंदें निर्भर असों भलते ठायीं । सुखदुःख नाहीं चाड आम्हां ।।२।।
आणीक सायास न करीं न धरीं आस । होईन उदास सर्व भावें ।।३।।
मोक्ष आम्हां घरीं कामारी ते दासी । होय सांगों तैसी तुका म्हणे ।।४।।

१७८७
देवा तुज मज पण । पाहों आगळा तो कोण ।।१।।
तरी साच मी पतित । तूं च खोटा दिनानाथ ।
ग्वाही साधुसंत जन। करूनि अंगीं लावीन ।।धृ।।
आम्ही धरिले भेदाभेद । तुज नव्हे त्याचा छेद ।।२।।
न चले तुझे कांहीं त्यास । आम्ही बळकाविले दोष ।।३।।
दिशा भरल्या माझ्या मनें । लपालासी त्याच्या भेणें ।।४।।
तुका म्हणे चित्त । करी तुझी माझी नीत ।।५।।

१७८८

लापनिकशब्दें नातुडे हा देव । मनिंचे गुह्य भाव शुद्ध बोला ।।१।।
अंतरिंचा भेद जाणे परमानंद । जयासी संवाद करणें लागे ।।२।।
तुका म्हणे जरी आपुलें स्वहित । तरी करीं चित्त शुद्धभावें ।।३।।

१७८९
नव्हे ब्रम्हज्ञान बोलतां सिद्ध । जंव हा आत्मबोध नाहीं चित्तीं ।।१।।
काय करिसी वांयां लटिका चि पाल्हाळ । श्रम तो केवळ जाणिवेचा ।।धृ।।
मी च देव ऐसें सांगसी या लोकां । विषयांच्या सुखा टोंकोनियां ।।२।।
अमृताची गोडी पुढिलां सांगसी। आपण उपवासी मरोनिया ।।३।।
तुका म्हणे जरि राहील तळमळ । ब्रम्ह तें केवळ सदोदित ।।४।।

१७९०
गंगाजळा पाहीं पाठी पोट नाहीं । अवगुण तो कांहीं अमृतासी ।।१।।
रवि दीप काळिमा काय जाणे हिरा । आणिका तिमिरा नासे तेणे ।।धृ।।
कर्पूरकांडणी काय कोंडा कणी । सिंधू मिळवणीं काय चाले ।।२।।
परिस चिंतामणि आणिकांचा गुणी । पालटे लागोनि नव्हे तैसा ।।३।।
तुका म्हणे तैसे जाणा संतजन । सर्वत्र संपूर्ण गगन जैसें ।।४।।

१७९१
परिस काय धातु । फेडितो निभ्रांतु लोहपांगु ।।१।।
काय तयाहूनि जालासी बापुडें । फेडितां सांकडें माझे एक ।।धृ।।
कल्तपरु कोड पुरवितो रोकडा । चिंतामणि खडा चिंतिलें तें ।।२।।
चंदनांच्या वासें वसतां चंदन । होती काष्ठ आन वृक्षयाती ।।३।।
काय त्याचें उणें जालें त्यासी देतां । विचारीं अनंता तुका म्हणे।।४।।

१७९२
तोडुनि पुष्पवटिका फळवृक्षयाति । बाभळा राखती करूनि सार ।।१।।
कोण हित तेणें देखिलें आपुलें । आणीक पाहिलें सुख काई ।।धृ।।
धान्यें बीजें जेणें जाळिलीं सकळें । पेरितो काळें जिरें बीज ।।२।।
मोडोनिया वाटा पुढिलांची सोय । आडरानें जाय घेउनि लोकां ।।३।।
विषाचें अमृत ठेवूनियां नाम । करितो अधम ब्रम्हहत्या ।।४।।
तुका म्हणे त्यास नाइके सांगतां । तया हाल करितां पाप नाहीं ।।५।।

१७९३
संसाराच्या भेणें । पळों न लाहेसें केलें ।।१।।
जेथें तेथें आपण आहे । आम्हीं करावें तें काये ।।धृ।।
एकांतींसी ठाव । तिहीं लोकीं नाहीं वाव ।।२।।
गांवा जातों ऐसें । न लगे म्हणावें तें कैसें ।।३।।
स्वप्नाचे परी । जागा पाहे तंव घरीं ।।४।।
तुका म्हणे काये । तुझे घेतले म्यां आहे ।।५।।

१७९४
आण काय सादर । विशीं आम्हां कां निष्ठुर ।।१।।
केलें भक्त तैसें देईं । तुझें प्रेम माझ्याठायीं ।।धृ।।
काय पंगतीस कोंडा । एकांतासी साकरमांडा ।।२।।
काय एकपण । पोतां घालूनि गांठी खूण ।।३।।
काय घ्यावें ऐसें । त्या आपण अनारिसें ।।४।।
तुका म्हणे मधीं । आतां तोडूं भेद बुद्धी ।।५।।

१७९५
चित्त तुझ्या पायीं । ठेवुनि जालों उतराई ।।१।।
परि तूं खोटा केशीराजा । अंतपार न कळे तुझा ।।धृ।।
आम्ही सर्वस्वें उदार । तुज देऊनियां धीर ।।२।।
इंद्रियांची होळी । संवसार दिला बळी ।।३।।
न पडे विसर । तुझा आम्हां निरंतर ।।४।।
प्रेम एकासाटी। तुका म्हणे न वेचे गांठी ।।५।।

१७९६
आम्ही पतित म्हणोनि तुज आलों शरण । करितों चिंतन दिवस रात्रीं ।
नाहीं तरी मज काय होती चाड । धरावया भीड तुज चित्तीं ।।१।।
आम्हां न तारावें तुम्ही काय करावें । सांगीजोजी भावें नारायणा ।।धृ।।
अन्याय एकाचा अंगीकार करणें। तया हातीं देणें लाज ते चि ।
काय ते शूरत्व मिरवूनि बोलणें । जनामाजी दावणें बळरया ।।२।।
पोह्या अन्नछत्र घालूनियां घरीं । दंडितो बाहेरी आलियासी ।
नव्हे कीर्त कांहीं न माने लोकां । काय विटंबणा तैसी ।।३।।
प्रत्यक्षासी काय द्यावें हें प्रमाण । पाहातां दर्पण साक्ष काई ।

तुका म्हणे तरी आम्हां का न कळे । तरलों किंवा आम्ही नाहीं ।।४।।

१७९७
काग बग रिठा मारिले बाळपणीं । अवघी दैत्यखाणी बुडविली ।।१।।
तो मज दावा तो मज दावा । नंदनंदन जीवा आवडे तो ।।धृ।।
गोवर्धन गिरी उचलिला करीं । गोकुळ भीतरी राखियेलें ।।२।।
बघुनि भौमासुरा आणिल्या गोपांगना । राज्य उग्रसेना मथुरेचें ।।३।।
पांडव जोहरीं राखिले कुसरी । विवराभीतरीं चालविले।।४।।
तुका म्हणे हा भक्तांचा कृपाळ । दुष्टजना काळ नारायण ।।५।।

१७९८
तुजविण देवा । कोणा म्हणे माझी जिव्हा ।।१।।
तरि हे हो कां शतखंड । पडो झडोनियां रांड ।।धृ।।
कांहीं इच्छेसाटीं । करिल वळवळ करंटी ।।२।।
तुका म्हणे कर । कटीं तयाचा विसर।।३।।

१७९९
आम्हां सर्वभावें हें चि काम । न विसंभावें तुझें नाम।।१।।
न लगे करावी हे चिंता । तरणें करणें काय आतां।।धृ।।
आसनीं भोजनीं शयनीं । दुजें नाहीं ध्यानीं मनीं ।।२।।
तुका म्हणे कृपानिधी । माझी तोडिली उपाधी ।।३।।

१८००
नव्हें कांहीं कवणाचा । भाव जाणवला साचा ।।१।।
म्हणोनि तुझ्या पायीं । जीव ठेविला निश्चयीं ।।धृ।।
शरीर जायाचें कोंपट । याची काय खटपट ।।२।।
तुका म्हणे वांयांविण । देवा कळों आला सीण ।।३।।

१८०१
रज्जु धरूनियां हातीं । भेडसाविलीं नेणतीं । कळों येतां चित्तीं । दोरी दोघां सारिखी ।।१।।
तुम्हांआम्हांमध्यें हरी । जाली होती तैसी परी । मृगजळाच्या पुरीं । ठाव पाहों तरावया ।।धृ।।
सरी चिताक भोंवरी । अळंकाराचिया परी । नामें जालीं दुरी । एक सोनें आटितां ।।२।।
पिसांचीं पारवीं । करोनि बाजागिरी दावी । तुका म्हणे तेवीं । मज नको चाळवूं ।।३।।

१८०२
नेघें तुझें नाम । न करीं सांगितलें काम ।।१।।
वाढे वचनें वचन । दोष उच्चारितां गुण ।।धृ।।
आतां तुझ्या घरा । कोण करी येरझारा ।।२ ।।
तुका म्हणे ठायीं । मजपाशीं काय नाहीं ।।३।।

१८०३
व्यवहार तो खोटा । आतां न वजों तुझ्या वाटा।।१।।
एका नामा नाहीं ताळ । केली सहस्रांची माळ ।।धृ।।
पाहों जातां घाई। खेळसी लपंडाई ।।२।।
तुका म्हणे चार । बहु करितोसी फार।।३।।

१८०४
लटिका चि केला । सोंग पसारा दाविला ।।१।।
अवघा बुडालासी ऋणें । बहुतांचे देणें घेणें ।।धृ।।

लावियेलीं चाळा। बहू दावूनि पुतळा ।।२।।
तुका म्हणे हात । आम्ही अवरिली मात ।।३।।

१८०५
दाखवूनि आस । केला बहुतांचा नास ।।१।।
थोंटा झोडा शिरोमणी । भेटलासी नागवणी ।।धृ।।
सुखाचें उत्तर । नाहीं मुदलासी थार ।।२।।
तुका म्हणे काय । तुझे घ्यावें उरे हाय ।।३।।

१८०६
लाज ना विचार । बाजारी तूं भांडखोर ।।१।।
ऐसें ज्याणें व्हावें । त्याची गांठी तुजसवें ।।धृ।।
फेडिसी लंगोटी । घेसी सकळांसी तुटी ।।२।।
तुका म्हणे चोरा । तुला आप ना दुसरा ।।३।।

१८०७
ठाव नाहीं बुड । घरें वसविसी कुड ।।१।।
भलते ठायीं तुझा वास । सदा एरवी उदास ।।धृ।।
जागा ना निजेला । धाला ना भुकेला ।।२।।
न पुसतां भलें । तुका म्हणे बुझें बोलें ।।३।।

१८०८
श्वाना दिली सवे । पायांभोंवतें तें भोंवे ।।१।।
तैसी जाली मज परी । वसे निकट सेजारीं ।।धृ।।
जेवितां जवळी । येऊनियां पुंस घोळी ।।२।।
कोपेल तो घनी । तुका म्हणे नेणें मनीं।।३।।

१८०९
वटवट केली । न विचारितां मना आली ।।१।।
मज कराल तें क्षमा । कैसें नेणों पुरुषोत्तमा ।।धृ।।
उचित न कळे । जिव्हा भलतें चि बरळे ।।२।।
तुका म्हणे कांहीं । लौकिकाची चाड नाहीं ।।३।।

१८१०
जीवें व्हावें साटी । पडे संवसारें तुटी ।।१।।
ऐशीं बोलिलों वचनें । सवें घेउनि नारायण ।।धृ।।
नाहीं जन्मा आलों । करील ऐसें नेदीं बोलों ।।२।।
ठाव पुसी सेणें । तुका म्हणे खुंटी येणें ।।३।।

१८११
आता पंढरीराया । माझ्या निरसावें भया ।।१।।
मनीं राहिली आशंका । स्वामिभयाची सेवका ।।धृ।।
ठेवा माथां हात । कांहीं बोला अभयमात ।।२।।
तुका म्हणे लाडें । खेळें ऐसें करा पुढें।।३।।

१८१२
कवतुकवाणें । बोलों बोबड्या वचनें ।।१।।
हें तों नसावें अंतरीं । आम्हां धरायाचें दुरी ।।धृ।।
स्तुति तैसी निंदा । माना सम चि गोविंदा ।।२।।
तुका म्हणे बोलें । मज तुम्ही शिकविलें।।३।।

१८१३
असो मागें जालें । पुडें गोड तें चांगलें ।।१।।
आतां माझे मनीं । कांहीं अपराध न मनीं ।।धृ।।
नेदीं अवसान । करितां नामाचें चिंतन ।।२।।
तुका म्हणे बोले । तुज आधीं च गोविलें।।३।।

१८१४
मातेविण बाळा । आणिक न माने सोहळा ।।१।।
तैसें जालें माझ्या चित्ता । तुजविण पंढरिनाथा ।।धृ।।
वाट पाहे मेघा बिंदु । नेघे चातक सरिता सिंधू ।।२।।
सारसांसी निशीं । ध्यान रवीच्या प्रकाशीं ।।३।।
जीवनाविण मत्स्य । जैसें धेनूलागीं वत्स ।।४।।
पतिव्रते जिणें । भ्रताराच्या वर्त्तमानें ।।५।।
कृपणाचें धन । लोभालागीं जैसें मन ।।६।।
तुका म्हणे काय । तुजविण प्राण राहे।।७।।

१८१५
तुजऐसा कोणी न देखें उदार । अभयदानशूर पांडुरंगा ।।१।।
शरण येती त्यांचे न विचारिसी दोष । न मागतां त्यांस अढळ देसी ।।धृ।।
धांवसी आडणी ऐकोनियां धांवा । कइवारें देवा भक्तांचिया ।।२।।
दोष त्यांचे जाळी कल्पकोटिवरी । नामासाटीं हरि आपुलिया ।।३।।
तुका म्हणे तुज वाणूं कैशा परी । एक मुख हरी आयुष्य थोडें ।।४।।

१८१६
काय तुझे उपकार पांडुरंगा । सांगों मी या जगामाजी आतां ।।१।।
जतन हें माझें करूनि संचित । दिलें अवचित आणूनियां।।धृ।।
घडल्या दोषांचें न घली च भरी । आली यास थोरी कृपा देवा ।।२।।
नव्हतें ठाउकें आइकिलें नाहीं । न मगतां पाहीं दान दिलें ।।३।।
तुका म्हणे याच्या उपकारासाटीं । नाहीं माझें गाठीं कांहीं एंक ।।४।।

१८१७
वाळूनियां जन सांडी मज दुरी । करिसील हरी ऐसें कधीं ।।१।।
आठवीन पाय धरूनि अनुताप । वाहे जळ झोंप नाहीं डोळां ।।धृ।।
नावडती जीवा आणीक प्रकार । आवडी ते फार एकांताची ।।२।।
तुका म्हणे ऐसी धरितों वासना । होईं नारायणा साह्य मज ।।३।।

१८१८
सांगतों या मना तें माझें नाइके । घातावरी टेंके चांडाळ हें ।।१।।
म्हणऊनि पाहे तरतें बुडतें । न ल्हाये पुरतें बळ करूं ।।धृ।।
काय तें संचित न कळे पाहातां । मतिमंद चित्ता उपजतें।।२।।
तुका म्हणे ऐसें बळ नाहीं अंगी । पाहोनियां वेगीं पार टाकीं ।।३।।

१८१९
आतां नको चुकों आपुल्या उचिता । उदारा या कांता रखुमाईच्या ।।१।।
आचरावे दोष हें आम्हां विहित । तारावे पतित तुमचें तें ।।धृ।।
आम्ही तों आपुलें केलेसें जतन । घडो तुम्हांकून घडेल ते ।।२।।
तुका म्हणे विठो चतुराच्या राया । आहे ते कासया मोडों देसी ।।३।।

१८२०
मुखें बोलावें तें जीविंचें जाणसी । विदित पायांपाशीं सर्व आहे ।।१।।
आतां हें चि भलें भाकावी करुणा । विनियोग तो जाणां तुम्ही त्याचा ।।धृ।।
आपलें तों येथें केलें नव्हे कांहीं । साधनाचा वांहीं पडों नये ।।२।।
तुका म्हणे देह दिला पिंडदान । वेळोवेळां कोण चिंता करी ।।३।।

१८२१
कामातुरा भय लाज ना विचार । शरीर असार तृणतुल्य ।।१।।
नवल हे लीळा करात्याचें लाघव । प्रारब्धें भाव दाखविले ।।धृ।।
लोभालोभ एका धनाचिये ठायीं । आणिकांची सोई चाड नाहीं ।।२।।
तुका म्हणे भूक न विचारी प्रकार । योजे तें चि सार यथाकाळें ।।३।।

१८२२
बांधे सोडी हें तों धन्याचिये हातीं । हेंकडें गोविती आपणां बळें ।।१।।
भुललियासी नाहीं देहाचा आठव । धोतऱ्यानें भाव पालटिला ।।धृ।।
घरांत रिघावें दाराचिये सोई । भिंतीसवें डोई घेऊनि फोडी ।।२।।
तुका म्हणे देवा गेलीं विसरोन । आतां वर्म कोण दावी यांसी ।।३।।

१८२३
कवण जन्मता कवण जन्मविता । न कळे कृपावंता माव तुझी ।।१।।
कवण हा दाता कवण हा मागता । न कळे कृपावंता माव तुझी ।।धृ।।
कवण भोगिता कवण भोगविता । न कळे कृपावंता माव तुझी ।।२।।
कवण ते रूप कवण अरूपता । न कळे कृपावंता माव तुझी ।।३।।
सर्वां ठायीं तूं चि सर्व ही जालासी। तुका म्हणे यासी दुजें नव्हे ।।४।।

१८२४
जेथें देखें तेथें तुझी च पाउलें । विश्व अवघें कोंदाटलें।
रूप गुण नाम अवघा मेघश्याम । वेगळें तें काय उरलें ।
जातां लोटांगणीं अवघी च मेदिनी । सकळ देव पाट जालें ।
सदा पर्वकाळ सुदिन सुवेळ । चित्त प्रेमें असे धालें ।।१।।
अवघा आम्हां तूं च जालासी देवा । संसार हेवा कामधंदा ।
न लगे जाणें कोठें कांहीं च करणें । मुखीं नाम ध्यान सदा ।।धृ।।
वाचा बोले ते तुझे चि गुणवाद। मंत्रजप कथा स्तुति ।

भोजन सारूं ठायीं फल तांबोल कांहीं । पूजा नैवेद्य तुज होती ।
चालतां प्रदक्षणा निद्रा लोटांगण । दंडवत तुजप्रति ।
देखोन दृष्टी परस्परें गोष्टी । अवघ्या तुझ्या मूर्ति।।२।।
जाल्या तीर्थरूप वावी नदी कूप । अवघें गंगाजळ जालें।
महाल मंदिरें माड्या तनघरें । झोपड्या अवघीं देव देवाइलें।
ऐकें कानीं त्या हरिनामध्वनी । नाना शब्द होत जाले ।
तुका म्हणे या विठोबाचे दास । सदा प्रेमसुखें धाले ।।३।।

१८२५
जे दोष घडले न फिटे करितां कांहीं । सरते तुझ्या पायीं जाले तैसे ।।१।।
माझा कां हो करूं नये अंगीकार । जालेती निष्ठुर पांडुरंगा ।।धृ।।
यातिहीन नये ऐकों ज्यां वेद । तयां दिलें पद वैकुंठींचें ।।२।।
तुका म्हणे कां रे एकाचा आभार । घेसी माथां भार वाहोनियां ।।३।।

१८२६
हरिकथेची आवडी देवा । करितो सेवा दासांची।।१।।
म्हणोनि हिंडे मागें मागें । घरटी जागे घालितसे ।।धृ।।
निर्लज्ज भोजें नाचत रंगीं । भरतें अंगीं प्रेमाचें ।।२।।
तुका म्हणे विकलें देवें। आपण भावें संवसाटी ।।३।।

१८२७
साधन संपत्ति हें चि माझें धन । सकळ चरण विठोबाचे ।।१।।
शीतळ हा पंथ माहेराची वाट । जवळी च नीट सुखरूप ।।धृ।।
वैष्णवांचा संग रामगाणें गाणें । मंडित भूषण अळंकार ।।२।।
भवनदी आड नव्हतीसी जाली । कोरडी च चाली जावें पायी ।।३।।
मायबाप दोघें पाहातील वाट । ठेवूनिया कटीं कर उभी ।।४।।
तुका म्हणे केव्हां देखेन कळस । पळाली आळस निद्रा भूक ।।५।।

१८२८
यथार्थवादें तुज न वर्णवे कदा । बोलतों ते निंदा करितों तुझी ।
वेदश्रुति तुज नेणती कोणी । चोवीस ठेंगणीं धांडोळितां।।१।।
आतां मज क्षमा करावें देवा । सलगी ते केशवा बोलियेलों ।।धृ।।
सगुण कीं साकार निर्गुण कीं निराकार । न कळे हा पार वेदां श्रुतीं ।

तो आम्ही भावें केलासी लहान । ठेवूनियां नांवें पाचारितों ।।२।।
सहस्त्रमुखें शेष सीणला स्तवितां । पार न कळतां ब्रम्हा ठेला ।
तेथें माझी देहबुद्धि तें काई । थोर मी अन्यायी तुका म्हणे ।।३।।

१८२९
कृष्ण गातां गीतीं कृष्ण ध्यातां चित्तीं । ते ही कृष्ण होती कृष्णध्यानें ।।१।।
आसनीं शयनीं भोजनीं जेवितां । म्हणारे भोगिता नारायण ।।धृ।।
ओविये दळणीं गावा नारायण । कांडितां कांडण करितां काम ।।२।।
नर नारी याति हो कोणी भलतीं । भावें एका प्रीती नारायणा ।।३।।
तुका म्हणे एका भावें भजा हरी । कांति ते दुसरी रूप एक ।।४।।

१८३०
डोळियां पाझर कंठ माझा दाटे । येऊं देईं भेटे पांडुरंगे ।।१।।
बहु दिस टाकिले निरास कां केलें । कोठें वो गुंतलें चित्त तुझें ।।धृ।।
बहु धंदा तुज नाहीं वो आठव । राहिलासे जीव माझा कंठीं ।।२।।
पंढरीस जाती वारकरी संतां । निरोप बहुतां हातीं धाडीं ।।३।।
तुजविण कोण सांवा धांवा करी । ये वो झडकरी पांडुरंगे ।।४।।
काय तुझी वाट पाहों कोठवरी । कृपाळु कांपरी विसरलासी ।।५।।
एक वेळ माझा धरूनि आठव । तुका म्हणे ये वो न्यावयासी ।।६।।

१८३१
अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी।।१।।
काय करूं या मना आतां । का विसरातें पंढरिनाथा ।
करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ।।धृ।।
भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ।।२।।
बहुत चंचळ चपळ । जातां येतां न लगे वेळ।।३।।
किती राखों दोनी काळ । निजलिया जागे वेळे ।।४।।
मज राखें आतां । तुका म्हणे पंढरिनाथा ।।५।।

१८३२
कंथा प्रावर्ण । नव्हे भिक्षेचें तें अन्न ।।१।।
करीं यापरी स्वहित । विचारूनि धर्म नीत ।।धृ।।
देऊळ नव्हे घर । प्रपंच परउपकार ।।२।।

विधिसेवन काम । नव्हे शब्द रामराम ।।३।।
हत्या क्षत्रधर्म । नव्हे निष्काम तें कर्म ।।४।।
तुका म्हणे संतीं । करूनि ठेविली आइती ।।५।।

१८३३
पडोनियां राहीं । उगा च संतांचिये पायीं ।।१।।
न लगे पुसणें सांगावें । चित्त शुद्ध करीं भावें ।।धृ।।
सहज ते स्थिति। उपदेश परयुक्ति ।।२।।
तुका म्हणे भाव । जवळी धरूनि आणी देव।।३।।

१८३४
देवाचे घरीं देवें केले चोरी । देवें देव नागवूनि केला भिकारी ।।१।।
धांवणियां धांवा धांवणियां धांवा । माग चि नाहीं जावें कवणिया गांवा ।।धृ।।
सवें चि होता चोर घरिचिया घरीं । फावलियावरी केलें अवघें वाटोळें
।।२।।
तुका म्हणे येथें कोणी च नाहीं । नागवलें कोण गेलें कोणाचें काई ।।३।।

१८३५
अवघे चि निजों नका अवघिये ठायीं । वेळ अवेळ तरी सांभाळावी कांहीं
।।१।।
जतन करा रे जतन करा । घालूं पाहे घरावरी घाला चोरटें ।।धृ।।
सीतरिलीं फार खाती भोंवताले फेरे । गेलें नये हातां सेकीं तळमळ उरे
।।२।।
तुका म्हणे आम्ही करूं आपलें जतन । न लगे कांहीं कोणां द्यावें उघडा रे
कान ।।३।।

१८३६
काळोखी खाऊन कैवाड केला धीर । आपुलिया हितें जाले जनामध्यें शूर
।।१।।
कां रें तुम्ही नेणां कां रे तुम्ही नेणां। अल्पसुखासाटीं पडशी विपत्तीचे घाणां
।।धृ।।
नाहीं ऐसी लाज काय तयांपें आगळें । काय नव्हे केलें आपुलिया बळें
।।२।।

तुका म्हणे तरी सुख अवघें चि बरें । जतन करून हे आपुलालीं ढोरें।।३।।

१८३७
जाय परतें काय आणिला कांटाळा । बोला एक वेळा ऐसें तरी ।।१।।
कां हो केलें तुम्ही निष्ठुर देवा । मानेना हे सेवा करितों ते ।।धृ।।
भाग्यवंत त्यांसी सांगितल्या गोष्टी । तें नाहीं अदृष्टीं आमुचिया ।।२।।
तुका म्हणे तुम्हापासूनि अंतर । न पडे नाहीं स्थिर बुद्धि माझी ।।३।।

१८३८
अनुभवें कळों येतें पांडुरंगा । रुसावें तें कां गा तुम्हांवरी ।।१।।
आवरितां चित्त नावरे दुर्जन । घात करी मन माझें मज ।।धृ।।
अंतरीं संसार भक्ति बाह्यात्कार । म्हणोनि अंतर तुझ्या पायीं ।।२।।
तुका म्हणे काय करूं नेणें वर्म । आलें तैसें कर्म सोसूं पुढें ।।३।।

१८३९
तुजकरितां होतें आनाचें आन । तारिले पाषाण उदकीं देवा ।।१।।
कां नये कैवार करूं अंगीकार । माझा बहु भार चड जाला ।।धृ।।
चुकलासी म्हणों तरी जीवांचा ही जीव । रिता नाहीं ठाव उरों दिला ।।२।।
तुका म्हणे ऐसें काय सत्ताबळ । माझे परी कृपाळ आहां तुम्ही ।।३।।

१८४०
फळ देंठींहून झडे । मग मागुतें न जोडे ।।१।।
म्हणोनि तांतडी खोटी । कारण उचिताचे पोटीं ।।धृ।।
पुढें चढे हात। त्याग मागिलां उचित ।।२।।
तुका म्हणे रणीं । नये पाहों परतोनि ।।३।।

१८४१
अगी देखोनियां सती । अंगीं रोमांच उठती ।।१।।
हा तो नव्हे उपदेश । सुख अंतरीं उल्हासे ।।धृ।।
वित्तगोतांकडे । चित्त न घाली न रडे ।।२।।
आठवूनि एका । उडी घाली म्हणे तुका ।।३।।

१८४२

फळ पिके देंठीं । निमित्य वारियाची भेटी ।।१।।
हा तों अनुभव रोकडा । कळों येतो खरा कुडा ।।धृ।।
तोडिलिया बळें। वांयां जाती काचीं फळें ।।२।।
तुका म्हणे मन । तेथे आपुलें कारण ।।३।।

१८४३
हालवूनि खुंट । आधीं करावा बळकट ।।१।।
मग तयाच्या आधारें । करणें अवघें चि बरें ।।धृ।।
सुख दुःख साहे । हर्षामषाअ भंगा नये ।।२।।
तुका म्हणे जीवें । आधीं मरोनि राहावें।।३।।

१८४४
धांवे माते सोई । बाळ न विचारितां कांहीं ।।१।।
मग त्याचें जाणें निकें । अंग वोडवी कौतुकें ।।धृ।।
नेणे सर्प दोरी । अगी भलतें हातीं धरी ।।२।।
तीविन तें नेणें । आणीक कांहीं तुका म्हणे ।।३।।

१८४५
भोग द्यावे देवा । त्याग भोगीं च बरवा ।।१।।
आपण व्हावें एकीकडे । देव कळेवरी जोडे ।।धृ।।
योजे यथाकाळें । उत्तम पाला कंदें मूळें ।।२।।
वंचक त्यासी दोष । तुका म्हणे मिथ्या सोस।।३।।

१८४६
पायांच्या प्रसादें । कांहीं बोलिलों विनोदें ।।१।।
मज क्षमा करणें संतीं । नव्हे अंगभूत युक्ति ।।धृ।।
नव्हे हा उपदेश । तुमचें बडबडिलों शेष ।।२।।
तुमचे कृपेचें पोसणें । जन्मोजन्मीं तुका म्हणे ।।३।।

१८४७
जायांचें अंगुलें लेतां नाहीं मान । शोभा नेदी जन हांसविलें ।।१।।
गुसळितां ताक कांडितां भूस । साध्य नाहीं क्लेश जाती वांयां ।।२।।
तुका म्हणे नाहीं स्वता भांडवल । भिकेचें तें फोल बीज नव्हे ।।३।।

१८४८
न बोलावें परी पडिला प्रसंग । हाकलितें जग तुझ्या नामें ।।१।।
लटिकें चि सोंग मांडिला पसारा । भिकारी तूं खरा कळों आलें ।।धृ।।
निलाजिरीं आम्ही करोनियां धीर । राहिलों आधार धरूनियां ।।२।।
कैसा नेणों आतां करिसी शेवट । केली कटकट त्याची पुढें ।।३।।
तुका म्हणे कांहीं न बोलसी देवा । उचित हे सेवा घेसी माझी ।।४।।

१८४९
नाहीं जालें मोल कळे देतां काळीं । कोण पाहों बळी दोघांमध्यें ।।१।।
आम्ही तरी जालों जीवासी उदार । कैंचा हा धीर तुजपाशीं ।।धृ।।
बहु चाळविलें मागें आजिवरी । आतां पुढें हरि जाऊं नेदीं ।।२।।
नव्हती जों भेटी नामाची ओळखी । म्हणऊनि दुःखी बहु जालें ।।३।।
तुका म्हणे कांहीं राहों नेदीं बाकी । एकवेळा चुकी जाली आतां ।।४।।

१८५०
कैसा कृपाळु हें न कळसी देवा । न बोलसी सेवा घेसी माझी ।।१।।
काय ऐसें बळ आहे तुजपाशीं । पाहों हा रिघेसी कोणा आड ।।धृ।।
पाडियेला ठायीं तुझा थारा मारा । अवघा दातारा लपसी तो ।।२।।
आतां तुम्हां आम्हां उरी तों चि बरें । काय हें उत्तरें वाढवूनि ।।३।।
तुका म्हणे मज साह्य झाले संत । म्हणऊनि मात फावली हे ।।४।।

१८५१
चुकलिया आम्हां करितसां दंड । हाकासी कां खंड पांडुरंगा ।।१।।
चाळविलीं एकें रिद्धिसिद्धीवरी । तैसा मी भिकारी नव्हें देवा ।।धृ।।
कां मी येथें गुंतों मांडूनि पसारा । मागुता दातारा दंभासाटीं ।।२।।
केलें म्यां जतन आपुलें वचन । ठायींचें धरून होतों पोटीं ।।३।।
तुका म्हणे ताळा घातला आडाखीं । ठावें होतें सेकीं आडविसी ।।४।।

१८५२
कृपावंता कोप न धरावा चित्तीं । छळूं वक्रोक्ती स्तुती करूं ।।१।।
आम्ही तुझा पार काय जाणों देवा । नेणों कैसी सेवा करावी ते ।।धृ।।
अनंता अरूपा अलक्षा अच्युता । निर्गुणा सचिता सर्वोत्तमा ।।२।।

चांगलीं हीं नामें घेतलीं ठेवून । जालासी लाहान भक्तिकाजा ।।३।।
तुका म्हणे तुझ्या पायांवरी सदा । मस्तक गोविंदा असो माझा ।।४।।

१८५३
आतां तुझा भाव कळों आला देवा । ठकूनियां सेवा घेसी माझी ।।१।।
टाकूनि सांकडें आपुलिये माथां । घातला या संतावरी भार ।।धृ।।
स्तुती करवूनि पिटिला डांगोरा । तें कोण दातारा साच करी ।।२।।
जातीचें वाणी मी पोटींचे कुडें । नका मजपुढें ठकाठकी ।।३।।
तुका म्हणे नाहीं आलें अनुभवा । आधीं च मी देवा कैसें नाचों ।।४।।

१८५४
जन पूजी याचा मज कां आभार । हा तुम्ही विचार जाणां देवा ।।१।।
पत्र कोण मानी वंदितील सिक्का । गौरव सेवका त्या चि मुळें ।।धृ।।
मी मीपणें होतों जनामधीं आधीं । कोणें दिलें कधीं काय तेव्हां ।।२।।
आतां तूं भोगिता सर्व नारायणा । नको आम्हां दीनां पीडा करूं ।।३।।
आपुलिया हातें देसील मुशारा । तुका म्हणे खरा तो चि आम्हां ।।४।।

१८५५
आमची कां नये तुम्हासी करुणा । किती नारायणा आळवावें ।।१।।
काय जाणां तुम्ही दुर्बळाचें जिणें । वैभवाच्या गुणें आपुलिया ।।धृ।।
देती घेती करिती खटपटा आणिकें । निराळा कौतुकें पाहोनियां ।।२।।
दिवस बोटींीं आम्हीं धरियेलें माप । वाहातों संकल्प स्वहिताचा ।।३।।
तुका म्हणे मग देसी कोण्या काळें । चुकुर दुर्बळें होतों आम्ही ।।४।।

१८५६
तुम्हां आम्हां तुटी होईल यावरी । ऐसें मज हरी दिसतसे ।।१।।
वचनाचा कांहीं न देखों आधार । करावा हा धीर कोठवरी ।।धृ।।
सारिलें संचित होतें गांठी कांहीं । पुढें ॠण तें ही नेदी कोणी ।।२।।
जावें चि न लगे कोणांचिया घरा । उडाला पातेरा तुझ्या संगें ।।३।।
तुका म्हणे आम्हां हा चि लाभ जाला । मनुष्यधर्म गेला पांडुरंगा ।।४।।

१८५७
देव मजुर देव मजुर । नाहीं उजुर सेवेपुढें ।।१।।

देव गांढ्याळ देव गांढ्याळ । देखोनियां बळ लपतसे ।।२।।
देव तर काई देव तर काई । तुका म्हणे राई तरी मोटी ।।३।।

१८५८
देव दयाळ देव दयाळ । साहे कोल्हाळ बहुतांचा।।१।।
देव उदार देव उदार । थोड्यासाटीं फार देऊं जाणे ।।२।।
देव चांगला देव चांगला । तुका लागला चरणीं ।।३।।

१८५९
देव बासर देव बासर । असे निरंतर जेथें तेथें ।।१।।
देव खोळंबा देव खोळंबा । मज झळंबा म्हूण कोंडी ।।धृ।।
देव लागट देव लागट । लाविलिया चट जीवीं जडे ।।२।।
देव बावळा देव बावळा । भावें जवळा लुडबुडी ।।३।।
देव न व्हावा देव न व्हावा। तुका म्हणे गोवा करी कामीं ।।४।।

१८६०
देव निढळ देव निढळ । मूळ नाहीं डाळ परदेशी।।१।।
देव अकुळी देव अकुळी । भलते ठायीं सोयरीक ।।२।।
देव लिगाड्या देव लिगाड्या । तुका म्हणे भाड्या दंभें ठकी ।।३।।

१८६१
देव बराडी देव बराडी । घाली देंठासाटीं उडी ।।१।।
देव भ्याड देव भ्याड । राखे बळीचें कवाड ।।धृ।।
देव भाविक भाविक । होय दासाचें सेवक ।।२।।
देव होया देव होया । जैसा म्हणे तैसा तया ।।३।।
देव लाहान लाहान । तुका म्हणे अनुरेण।।४।।

१८६२
देव भला देव भला । मिळोनि जाय जैसा त्याला।।१।।
देव उदार उदार । देतां नाहीं थोडें फार ।।धृ।।
देव बळी देव बळी। जोडा नाहीं भूमंडळीं ।।२।।
देव व्हावा देव व्हावा । आवडे तो सर्वां जीवां ।।३।।
देव चांगला चांगला । तुका चरणीं लागला ।।४।।

१८६३
देव पाहों देव पाहों । उंचे ठायीं उभे राहों ।।१।।
देव देखिला देखिला । तो नाहीं कोणां भ्याला ।।धृ।।
देवा कांहीं मागों मागों । जीव भाव त्यासी सांगों ।।२।।
देव जाणे देव जाणे । पुरवी मनींचिये खुणे ।।३।।
देव कातर कातर । तुका म्हणे अभ्यंतर ।।४।।

१८६४
देव आमचा आमचा । जीव सकळ जीवांचा ।।१।।
देव आहे देव आहे । जवळीं आम्हां अंतरबाहे ।।धृ।।
देव गोड देव गोड । पुरवी कोडाचें ही कोड ।।२।।
देव आम्हां राखे राखे । घाली कळिकाळासी काखे ।।३।।
देव दयाळ देव दयाळ । करी तुक्याचा सांभाळ ।।४।।

१८६५
जाऊं देवाचिया गांवां । देव देईल विसांवा ।।१।।
देवा सांगों सुखदुःख । देव निवारील भूक ।।धृ।।
घालूं देवासी च भार। देव सुखाचा सागर ।।२।।
राहों जवळी देवापाशीं । आतां जडोनि पायांसी ।।३।।
तुका म्हणे आम्ही बाळें । या देवाचीं लडिवाळें।।४।।

१८६६
प्रेम तेथें वास करी । मुखीं उच्चारितां हरी ।।१।।
प्रेम यावें तया गांवा । चोजवीत या वैष्णवां ।।धृ।।
प्रेमें पाठी लागे बळें। भक्त देखोनियां भोळे ।।२।।
प्रेम न वजे दवडितां । शिरे बळें जेथें कथा ।।३।।
तुका म्हणे थोर आशा । प्रेमा घरीं विष्णुदासां।।४।।

१८६७
संत मानितील मज । तेणें वाटतसे लाज ।।१।।
तुम्ही कृपा केली नाहीं । चित्त माझें मज ग्वाही ।।धृ।।
गोविलों थोरिवां । दुःख वाटतसे जीवा ।।२।।

तुका म्हणे माया । अवरा हे पंढरिराया ।।३।।

१८६८
नाहीं तुम्ही केला । अंगीकार तो विठ्ठला ।।१।।
सोंगें न पवीजे थडी । माजी फुटकी सांगडी ।।धृ।।
प्रेम नाही अंगीं । भले म्हणविलें जगीं ।।२।।
तुका म्हणे देवा । मज वांयां कां चाळवा।।३।।

१८६९
आतां चक्रधरा । झणी आम्हांस अव्हेरा ।।१।।
तुमचीं म्हणविल्यावरी । जैसीं तैसीं तरी हरी ।।धृ।।
काळ आम्हां खाय । तरी तुझें नांव जाय ।।२।।१८६९
तुका म्हणे देवा । आतां पण सिद्धी न्यावा ।।३।।

१८७०
मज ऐसें कोण उद्धरिलें सांगा । ब्रीदें पांडुरंगा बोलतसां ।।१।।
हातींच्या कांकणां कायसा आरिसा । उरलों मी जैसा तैसा आहें ।।धृ।।
धनमंत्री हरी रोग्याचिये वेथे । तें तों कांहीं येथें न देखिजे ।।२।।
तुका म्हणे नाहीं अनुभव अंगें । वचन वाउगें कोण मानी ।।३।।

१८७१
काय तें सामर्थ्य न चले या काळें । काय जालीं बळें शक्तिहीण ।।१।।
माझिया संचितें आणिलासी हरी । जालें तुजवरी वरिष्ठ तें ।।धृ।।
काय गमाविली सुदर्शन गदा । नो बोला गोविंदा लाजतसां ।।२।।
तुका म्हणे काय ब्रिदाचें तें काम । सांडा परतें नाम दिनानाथ ।।३।।

१८७२
बळ बुद्धी वेचुनियां शक्ती । उदक चालवावें युक्ती।।१।।
नाहीं चळण तया अंगीं । धांवें लवणामागें वेगीं।।धृ।।
पाट मोट कळा । भरित पखाळा सागळा ।।२।।
बीज ज्यासी घ्यावें। तुका म्हणे तैसें व्हावें ।।३।।

१८७३

न म्हणे साना थोर । दृष्ट पापी अथवा चोर ।।१।।
सकळा द्यावी एकी चवी । तान हरूनि निववी ।।धृ।।
न म्हणे दिवस राती । सर्व काल सर्वां भूतीं ।।२।।
तुका म्हणे झारी । घेतां तांब्यानें खापरी ।।३।।

१८७४
इच्छा चाड नाहीं । न धरी संकोच ही कांहीं ।।१।।
उदका नेलें तिकडे जावें । केलें तैसें सहज व्हावें ।।धृ।।
मोहरी कांदा ऊंस । एक वाफा भिन्न रस ।।२।।
तुका म्हणे सुख । पीडा इच्छा पावे दुःख ।।३।।

१८७५
तरले ते मागें आपुलिया सत्ता । कमाई अनंता करूनियां ।।१।।
उसनें फेडितां धर्म तेथें कोण । ते तुज अनन्ये तुम्ही त्यांसी ।।धृ।।
मज ऐसा कोण सांगा वांयां गेला । तो तुम्ही तारिला पांडुरंगा ।।२।।
तुका म्हणे नांवासारिखी करणी । न देखें हें मनीं समजावें ।।३।।

१८७६
कवणांशीं भांडों कोण माझें साहे । कोण मज आहे तुजविण ।।१।।
धरिलें उदास दुरदुरांतरें । सांडी एकसरें केली माझी।।धृ।।
आइकोन माझे नाइकसी बोल । देखोनियां खोळ बुंथी घेसी ।।२।।
तुका म्हणे एके गांवींची वसती । म्हणऊनि खंती वाटे देवा ।।३।।

१८७७
आळवितां कंठ शोकला भीतर । आयुष्य वेचे धीर नाहीं मना ।।१।।
अझून कां नये हें तुझ्या अंतरा । दिनाच्या माहेरा पांडुरंगा ।।धृ।।
धन दिसे डोळा दगडाचे परी । भोग ते शरीरीं विष जालें ।।२।।
चुकलों काय तें मज क्षमा करीं । आळिंगूनि हरी प्रेम द्यावें ।।३।।
अवस्था राहिली रूपाची अंतरीं । बाहेर भीतरी सर्व काळ ।।४।।
तुका म्हणे माजे सकळ उपाय । पांडुरंगा पाय तुझे आतां ।।५।।

।। शिवाजी राजे यांनीं स्वामींस अबदागिरी, घोडा,
कारकून असे न्यावयास पाठविले ते अभंग ।। १४ ।।

१८७८
दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे ।।१।।
आतां येथें पंढरिराया । मज गोविसी कासया ।।धृ।।
मान दंभ चेष्टा। हे तों शूकराची विष्ठा ।।२।।
तुका म्हणे देवा । माझे सोडववणे धांवा ।।३।।

१८७९
नावडे जें चित्ता । तें चि होसी पुरविता ।।१।।
कां रे पुरविली पाठी । माझी केली जीवेसाटीं ।।धृ।।
न करावा संग । वाटे दुरावावें जग ।।२।।
सेवावा एकांत । वाटे न बोलावी मात ।।३।।
जन धन तन । वाटे लेखावें वमन ।।४।।
तुका म्हणे सत्ता । हातीं तुझ्या पंढरिनाथा ।।५।।

१८८०
जाणोनि अंतर । टाळिसील करकर ।।१।।
तुज लागली हे खोडी । पांडुरंगा बहु कुडी ।।धृ।।
उठविसी दारीं । धरणें एखादिया परी ।।२।।
तुका म्हणे पाये । कैसे सोडीन ते पाहें ।।३।।

१८८१
नाहीं विचारीत । मेघ हागनदारी सेत ।।१।।
नये पाहों त्याचा अंत । ठेवीं कारणापें चित्त ।।धृ।।
वर्जीत गंगा । नाहीं उत्तम अधम जगा ।।२।।
तुका म्हणे मळ । नाहीं अग्नीसी विटाळ।।३।।

१८८२
काय दिला ठेवा । आम्हां विठ्ठल चि व्हावा ।।१।।
तुम्ही कळलेती उदार । साटीं परिसाची गार ।।धृ।।
जीव दिला तरी। वचना माझ्या नये सरी ।।२।।
तुका म्हणे धन । आम्हां गोमासासमान ।।३।।

१८८३

पिकवावें धन । ज्याची आस करी जन ।।१।।
पुढें उरे खातां देतां । नव्हे खंडण मवितां ।।धृ।।
खोलीं पडे ओली बीज। तरीं च हातीं लागे निज ।।२।।
तुका म्हणे धनी । विठ्ठल अक्षरी हीं तिन्ही ।।३।।

१८८४
मुंगी आणि राव । आम्हां सारखाची जीव ।।१।।
गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ।।धृ।।
सोनें आणि माती। आम्हां समान हें चित्तीं ।।२।।
तुका म्हणे आलें । घरा वैकुंठ सगळें ।।३।।

१८८५
तिहीं त्रिभुवनीं । आम्ही वैभवाचे धनी ।।१।।
हातां आले घाव डाव । आमचा मायबाप देव ।।धृ।।
काय त्रिभुवनीं बळ। अंगीं आमुच्या सकळ ।।२।।
तुका म्हणे सत्ता । अवघी आमुची च आतां ।।३।।

१८८६
आम्ही तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ।।१।।
तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिकेसमान ।।धृ।।
कंटीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ।।२।।
म्हणवा हरिचे दास । तुका म्हणे मज हे आस ।।३।।
।।९।।

१८८७
नाही काष्ठाचा गुमान । गोवी भ्रमरा सुमन ।।१।।
प्रेम प्रीतीचे बांधलें । तें न सुटे कांहीं केलें ।।धृ।।
पदरीं घालीं पिळा। बाप निर्बळ साटी बाळा ।।२।।
तुका म्हणे भावें । भेणें देवा आकारावें ।।३।।

१८८८
भावापुढें बळ । नाहीं कोणाचे सबळ ।।१।।
करी देवावरी सत्ता । कोण त्याहूनि परता ।।धृ।।

बैसे तेथें येती । न पाचारितां सर्व शक्ति ।।२।।
तुका म्हणे राहे । तयाकडे कोण पाहे।।३।।

१८८९
भावाचिया बळें । आम्ही निर्भर दुर्बळें ।।१।।
नाहीं आणिकांची सत्ता । सदा समाधान चित्ता ।।धृ।।
तर्का नाहीं ठाव । येथें रिघावया वाव ।।२।।
एकछत्रीं राज । तुक्या पांडुरंगीं काज।।३।।

१८९०
सत्तावर्त्ते मन । पाळी विठ्ठलाची आन ।।१।।
आज्ञा वाहोनियां शिरीं । सांगितलें तें चि करीं ।।धृ।।
सरलीसे धांव । न लगे वाढवावी हांव ।।२।।
आहे नाहीं त्याचें । तुका म्हणे कळे साचें।।३।।

१८९१
खावें ल्यावें द्यावें । जमाखर्च तुझ्या नांवें ।।१।।
आतां चुकली खटपट । झाड्या पाड्याचा बोभाट ।।धृ।।
आहे नाहीं त्याचें । आम्हां काम सांगायाचें ।।२।।
तुका म्हणे चिंता । भार वाहे तुझ्या माथां ।।३।।

१८९२
आतां बरें जालें । माझे माथांचें निघालें ।।१।।
चुकली हे मरमर । भार माथांचे डोंगर ।।धृ।।
नसतां कांहीं जोडी । करिती बहुतें तडातोडी ।।२।।
जाला झाडापाडा । तुका म्हणे गेली पीडा ।।३।।

१८९३
संचितें चि खावें । पुढें कोणाचें न घ्यावें ।।१।।
आतां पुरे हे चाकरी । राहों बैसोनियां घरीं ।।धृ।।
नाहीं काम हातीं। आराणूक दिसराती ।।२।।
तुका म्हणे सत्ता । पुरे पराधीन आतां ।।३।।

१८९४
ज्याचे गांवीं केला वास । त्यासी नसावें उदास।।१।।
तरी च जोडिलें तें भोगे । कांहीं आघात न लगे ।।धृ।।
वाढवावी थोरी। मुखें म्हणे तुझे हरी ।।२।।
तुका म्हणे हे गोमटी । दासा न घलावी तुटी ।।३।।

१८९५
माझा तुम्ही देवा केला अंगीकार । हें मज साचार कैसें कळे ।।१।।
कां हो कांहीं माझ्या नये अनुभवा । विचारितां देवा आहें तैसा ।।धृ।।
लौकिकाचा मज लाविसी आभार । शिरोरत्नभार दुःखाचा हा ।।२।।
तुका म्हणे नाहीं पालट अंतरीं । तेथें दिसे हरी ठकाठकी ।।३।।

१८९६
तोंडें बोलावें तें तरी वाटे खरें । जीव येरेयेरें वंचिजे ना ।।१।।
हें तुम्हां सांगणें काय उगवूनि । जावें समजोनि पांडुरंगा।।धृ।।
जेवित्याची खूण वाढित्या अंतरीं । प्रीतीनें हे धरी चाली तेथें ।।२।।
तुका म्हणे बहु परीचे आदर । अत्यंत वेव्हारसंपादणी ।।३।।

१८९७
न पालटे एक । भोळा भक्त चि भाविक ।।१।।
येरां नास आहे पुढें । पुण्य सरतां उघडें ।।धृ।।
नेणे गर्भवास । एक विष्णूचा चि दास ।।२।।
तुका म्हणे खरें । नाम विठोबाचे बरें ।।३।।

।। स्वामींनीं पत्र पंढरीनाथास पंढरीस पाठविलें ते अभंग ।। ६६ ।।
संतांबरोबर पाठविल्या पत्राचे अभंग ३६
१८९८
कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात । चाल तुज पंढरिनाथ बोलावितो ।।१।।
मग मी न धरीं आस मागील बोभाट । वेगीं धरिन वाट माहेराची ।।धृ।।
निरांजिरें चित्त करितें तळमळ । केधवां देखती मूळ आलें डोळे ।।२।।

तुका म्हणे कई भाग्याची उजरी। होईल पंढरी देखावया ।।३।।

१८९९
कां माझा विसर पडिला मायबाप । सांडियेली कृपा कोण्या गुणें ।।१।।
कैसा कंठूनियां राहों संवसार । काय एक धीर देऊं मना ।।धृ।।
नाहीं निरोपाची पावली वारता । करावी ते चिंता ऐसी कांहीं ।।२।।
तुका म्हणे एक वेचूनि वचन । नाहीं समाधान केलें माझें ।।३।।

१९००
कांहीं माझे कळों आले गुणदोष । म्हणऊनि उदास धरिलें ऐसें ।।१।।
नाहीं तरी येथें न घडे अनुचित । नाहीं ऐसी रीत तया घरीं ।।धृ।।
कळावें तें मना आपुलिया सवें । ठायींचे हें घ्यावें विचारूनि ।।२।।
मज अव्हेरिलें देवें । माझिया कर्तव्यें बुद्धीचिया।।३।।

१९०१
नव्हे धीर कांहीं पाठवूं निरोप । आला तरीं कोप येऊ सुखें ।।१।।
कोपोनियां तरी देईल उत्तर । जैसें तैसें पर फिरावूनि ।।धृ।।
नाहीं तया तरी काय एक पोर । मज तों माहेर आणीक नाहीं ।।२।।
तुका म्हणे असे तयामध्यें हित । आपण निवांत असों नये ।।३।।

१९०२
आतां पाहों पंथ माहेराची वाट । कामाचा बोभाट पडो सुखें ।।१।।
काय करूं आतां न गमेसें जालें । बहुत सोसिलें बहु दिस ।।धृ।।
घर लागे पाठी चित्ता उभे वारे । आपुलें तें झुरे पाहावया ।।२।।
तुका म्हणे जीव गेला तरी जाव । धरिला तो देव भाव सिद्धी ।।३।।

१९०३
विनवीजे ऐसें भाग्य नाहीं देवा । पायांशीं केशवा सलगी केली ।।१।।
धीटपणें पत्र लिहिलें आवडी । पार नेणे थोडी मति माझी ।।धृ।।
जेथें देवा तुझा न कळे चि पार । तेथें मी पामर काय वाणूं ।।२।।
जैसे तैसे माझे बोल अंगीकारीं । बोबड्या उत्तरीं गौरवितों ।।३।।
तुका म्हणे विटेवरि जी पाउलें । तेथें म्यां ठेविलें मस्तक हें ।।४।।

१९०४
देवांच्या ही देवा गोपिकांच्या पती । उदार हे ख्याती त्रिभुवनीं ।।१।।
पातकांच्या रासी नासितोसी नामें । जळतील कर्में महा दोष ।।धृ।।
सर्व सुखें तुझ्या वोळगती पायीं । रिद्धि सिद्धि ठायीं मुक्तिचारी ।।२।।
इंद्रासी दुर्लभ पाविजे तें पद । गीत गातां छंद वातां टाळी ।।३।।
तुका म्हणे जड जीव शक्तिहीन । त्यांचें तूं जीवन पांडुरंगा ।।४।।

१९०५
काय जालें नेणों माझिया कपाळा । न देखीजे डोळां मूळ येतां ।।१।।
बहु दिस पाहें वचनासी वास । धरिलें उदास पांडुरंगा ।।धृ।।
नाहीं निरोपाचें पावलें उत्तर । ऐसें तों निष्ठुर न पाहिजे ।।२।।
पडिला विसर किंवा कांहीं धंदा । त्याहूनि गोविंदा जरूरसा ।।३।।
तुका म्हणे आलें वेचाचें सांकडें । देणें घेणें पुढें तो ही धाक ।।४।।

१९०६
एवढा संकोच तरि कां व्यालासी । आम्ही कोणांपाशीं तोंड वासूं ।।१।।
कोण मज पुसे सिणलें भागलें । जरी मोकलिलें तुम्हीं देवा ।।धृ।।
कवणाची वाट पाहों कोणीकडे । कोण मज ओढे जीवलग ।।२।।
कोण जाणे माझे जीवींचें सांकडें । उगवील कोडें संकटाचें।।३।।
तुका म्हणे तुम्ही देखिली निश्चिंती । काय माझे चित्तीं पांडुरंगा ।।४।।

१९०७
देईं डोळे भेटी न धरीं संकोच । न घलीं कांहीं वेच तुजवरी ।।१।।
तुज बुडवावें ऐसा कोण धर्म । अहर्निशीं नाम घेतां थोडें ।।धृ।।
फार थोडें काहीं करूनि पातळ । त्याजमध्यें काळ कडे लावूं ।।२।।
आहे माझी ते चि सारीन सिदोरी । भार तुजवरी नेदीं माझा ।।३।।
तुका म्हणे आम्हां लेंकराची जाती । भेटावया खंती वाटतसे ।।४।।

१९०८
सीण भाग हरे तेथींच्या निरोपें । देखिलिया रूप उरी नुरे ।।१।।
इंद्रियांची धांव होईल कुंटित । पावेल हें चित्त समाधान।।धृ।।
माहेर आहेसें लौकिकीं कळावें । निढळ बरवें शोभा नेदी ।।२।।
आस नाहीं परी उरी बरी वाटे । आपलें तें भेटे आपणासी ।।३।।

तुका म्हणे माझी अविट आवडी । खंडण तांतडी होऊं नेदीं ।।४।।

१९०९
धरितों वासना परी नये फळ । प्राप्तीचा तो काळ नाहीं आला ।।१।।
तळमळी चित्त घातलें खापरीं । फुटतसे परी लाहीचिया ।।धृ।।
प्रकार ते कांहीं नावडती जीवा । नाहीं पुढें ठावा काळ हातीं ।।२।।
जातों तळा येतों मागुता लौकरी । वोळशाचे फेरी सांपडलों ।।३।।
तुका म्हणे बहु करितों विचार । उतरें डोंगर एक चढें ।।४।।

१९१०
कां माझे पंढरी न देखती डोळे । काय हें न कळे पाप यांचें ।।१।।
पाय पंथें कां हे न चलती वाट । कोण हें अदृष्ट कर्म बळी ।।धृ।।
कां हें पायांवरी न पडे मस्तक । क्षेम कां हस्तक न पवती ।।२।।
कां या इंद्रियांची न पुरे वासना । पवित्र होईना जिव्हा कीर्ती ।।३।।
तुका म्हणे कईं जाऊनि मोटळें । पडेन हा लोळें महाद्वारीं ।।४।।

१९११
काय पोरें जालीं फार । किंवा न साहे करकर ।।१।।
म्हणऊनि केली सांडी । घांस घेऊं न ल्हां तोंडीं ।।धृ।।
करूं कलागती। तुज भांडणें भोंवतीं ।।२।।
तुका म्हणे टांचें । घरीं जालेंसे वरोचें ।।३।।

१९१२
कांहीं चिंतेविण । नाहीं उपजत सीण ।।१।।
तरी हा पडिला विसर । माझा तुम्हां जाला भार ।।धृ।।
आली कांहीं तुटी । गेली सुटोनियां गांठी ।।२।।
तुका म्हणे घरीं । बहु बैसले रिणकरी।।३।।

१९१३
निरोपासी वेचे । काय बोलतां फुकाचें ।।१।।
परी हें नेघेवे चि यश । भेओं नको सुखी आस ।।धृ।।
सुख समाधानें । कोण पाहे देणें घेणें ।।२।।
न लगे निरोपासी मोल । तुका म्हणे वेचे बोल ।।३।।

१९१४
जोडीच्या हव्यासें । लागे धनांचें चि पिसें ।।१।।
मग आणीक दुसरें । लोभ्या नावडती पोरें ।।धृ।।
पाहे रुक्याकडे । मग अवघें ओस पडे ।।२।।
तुका म्हणे देवा । तुला बहुत चि हेवा ।।३।।

१९१५
मविलें मविती । नेणों रासी पडिल्या किती ।।१।।
परि तूं धाला चि न धासी । आलें उभाउभीं घेसी ।।धृ।।
अवघ्यां अवघा काळ । वाटा पाहाती सकळ ।।२।।
तुका म्हणे नाहीं । अराणूक तुज कांहीं ।।३।।

१९१६
न बैससी खालीं । सम उभा च पाउलीं ।।१।।
ऐसे जाले बहुत दिस । जालीं युगें अठ्ठाविस ।।धृ।।
नाहीं भाग सीण । अराणूक एक क्षण ।।२।।
तुका म्हणे किती । मापें केलीं देती घेती।।३।।

१९१७
जोडी कोणांसाटीं । एवढी करितोसी आटी ।।१।।
जरी हें आम्हां नाहीं सुख । रडों पोरें पोटीं भूक ।।धृ।।
करूनि जतन। कोणा देसील हें धन ।।२।।
आमचे तळमळे । तुझें होईल वाटोळें ।।३।।
घेसील हा श्राप । माझा होऊनियां बाप ।।४।।
तुका म्हणे उरी । आतां न ठेवीं यावरी ।।५।।

१९१८
करूनि चाहाडी । अवघी बुडवीन जोडी ।।१।।
जरि तूं होऊनि उदास । माझी बुडविसी आस ।।धृ।।
येथें न करी काम। मुखें नेघें तुझें नाम ।।२।।
तुका म्हणे कुळ । तुझें बुडवीन समूळ।।३।।

१९१९
समर्थाचे पोटीं । आम्ही जन्मलों करंटीं ।।१।।
ऐसी जाली जगीं कीर्ति । तुझ्या नामाची फजिती ।।धृ।।
येथें नाहीं खाया। न ये कोणी मूळ न्याया ।।२।।
तुका म्हणे जिणें । आतां खोटें जीवपणें ।।३।।

१९२०
पुढें तरी चित्ता । काय येईल तें आतां ।।१।।
मज सांगोनिया धाडीं । वाट पाहातों वराडी ।।धृ।।
कंठीं धरिला प्राण । पायांपाशीं आलें मन ।।२।।
तुका म्हणे चिंता । बहु वाटतसे आतां।।३।।

१९२१
कैंचा मज धीर । कोठें बुद्धि माझी स्थिर ।।१।।
जें या मनासी आवरूं । आंत पोटीं वाव धरूं ।।धृ।।
कैंची शुद्ध मति। भांडवल ऐसें हातीं ।।२।।
तुका म्हणे कोण दशा आली सांगा ।।३।।

१९२२
समर्पक वाणी । नाहीं ऐकिजेसी कानीं ।।१।।
आतां भावें करूनि साचा । पायां पडिलों विठोबाच्या ।।धृ।।
न कळे उचित। करूं समाधान चित्त ।।२।।
तुका म्हणे विनंती । विनविली धरा चित्तीं ।।३।।

१९२३
येती वारकरी । वाट पाहातों तोंवरी ।।१।।
घालूनियां दंडवत । पुसेन निरोपाची मात ।।धृ।।
पत्र हातीं दिलें । जया जेथें पाठविलें ।।२।।
तुका म्हणे येती । जाइन सामोरा पुढती ।।३।।

१९२४
रुळें महाद्वारीं । पायांखालील पायरी ।।१।।
तैसें माझें दंडवत । सांगा निरोप हा संत ।।धृ।।

पडे दंडकाठी । देह भलतीसवा लोटी ।।२।।
तुका म्हणे बाळ । लोळे न धरितां सांभाळ।।३।।

१९२५
तुम्ही संतजनीं । माझी करावी विनवणी ।।१।।
काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ।।धृ।।
भाका बहुतां रीती। माझी कीव काकुलती ।।२।।
न देखे पंढरी । तुका चरण विटेवरी।।३।।

१९२६
होइल कृपादान । तरी मी येईन धांवोन ।।१।।
होती संतांचिया भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ।।धृ।।
रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ।।२।।
तुका म्हणे ताप । हरती देखोनियां बाप।।३।।

१९२७
परिसोनि उत्तर । जाब देईजे सत्वर ।।१।।
जरी तूं होसी कृपावंत । तरि हा बोलावीं पतित ।।धृ।।
नाणीं कांहीं मना । करूनि पापाचा उगाणा ।।२।।
तुका म्हणे नाहीं । काय शक्ति तुझे पायीं ।।३।।

१९२८
ऐकोनियां कीर्ती । ऐसी वाटती विश्रांती ।।१।।
माते सुख डोळां पडे । तेथें कोण लाभ जोडे ।।धृ।।
बोलतां ये वाचे । वीट नये जिव्हा नाचे ।।२।।
तुका म्हणे धांवे । वासना ते रस घ्यावे।।३।।

१९२९
किती करूं शोक । पुढें वाढे दुःखें दुःख ।।१।।
आतां जाणसी तें करीं । माझें कोण मनीं धरी ।।धृ।।
पुण्य होतें गांठी । तरि कां लागती हे आटी ।।२।।
तुका म्हणे बळ । माझी राहिली तळमळ ।।३।।

१९३०
करील आबाळी । माझ्या दांताची कसाळी ।।१।।
जासी एखादा मरोन । पाठी लागेल हें जन ।।धृ।।
घरीं लागे कळहे। नाहीं जात तो शीतळ ।।२।।
तुका म्हणे पोरवडे । मज येतील रोकडे ।।३।।

१९३१
आतां आशीर्वाद । माझा असो सुखें नांद ।।१।।
म्हणसी कोणा तरी काळें । आहेतसी माझीं बाळें ।।धृ।।
दुरी दूरांतर। तरी घेसी समाचार ।।२।।
नेसी कधीं तरी । तुका म्हणे लाज हरी ।।३।।

१९३२
आतां हे सेवटीं । माझी आइकावी गोष्टी ।।१।।
आतां द्यावा वचनाचा । जाब कळे तैसा याचा ।।धृ।।
आतां करकर। पुढें न करीं उत्तर ।।२।।
तुका म्हणे ठसा । तुझा आहे राखें तैसा ।।३।।

१९३३
बोलिलों ते आतां । कांहीं जाणतां नेणतां ।।१।।
क्षमा करावे अन्याय । पांडुरंगे माझे माय ।।धृ।।
स्तुती निंदा केली। लागे पाहिजे साहिली ।।२।।
तुका म्हणे लाड । दिला तैसें पुरवा कोड ।।३।।
।।३६।।

या पत्राच्या उत्तराच्या मार्गप्रतीक्षेचे अभंग १९
१९३४
माहेरिंचा काय येईल निरोप । म्हणऊनि झोंप नाहीं डोळां ।।१।।
वाट पाहें आस धरूनियां जीवीं । निडळा हे ठेवीं वरी बाहे ।।धृ।।
बोटवरी माप लेखितों दिवस । होतों कासावीस धीर नाहीं ।।२।।
काय नेणों संतां पडेल विसर । कीं नव्हे सादर मायबाप।।३।।
तुका म्हणे तेथें होईल दाटणी । कोण माझें आणी मना तेथें ।।४।।

१९३५
परि तो आहे कृपेचा सागर । तोंवरी अंतर पडों नेदी।।१।।
बहुकानदृष्टी आइके देखणा । पुरोनियां जना उरलासे।।धृ।।
सांगितल्याविणें जाणे अंतरिंचें । पुरवावें ज्याचें तैसें कोड ।।२।।
बहुमुखें कीर्ती आइकिली कानीं । विश्वास ही मनीं आहे माझा ।।३।।
तुका म्हणे नाहीं जात वांयांविण । पाळितो वचन बोलिलों तें ।।४।।

१९३६
यावरि न कळे संचित आपुलें । कैसें वोडवलें होइल पुढें ।।१।।
करील विक्षेप धाडितां मुळासी । किंवा धाडा ऐसी तांतडी हे ।।धृ।।
जोंवरी हे डोळां देखें वारकरी । तों हें भरोवरी करी चित्त ।।२।।
आस वाढविते बुद्धीचे तरंग । मनाचे ही वेग वावडती।।३।।
तुका म्हणे तेव्हां होतील निश्चळ । इंद्रियें सकळ निरोपानें ।।४।।

१९३७
होईल निरोप घेतला यावरी । राउळाभीतरीं जाऊनियां।।१।।
करूनियां दधिमंगळभोजन । प्रयाण शकुनसुमुहूर्तें।।धृ।।
होतील दाटले सद्‌गदित कंठीं । भरतें या पोटीं वियोगाचें ।।२।।
येरयेरां भेटी क्षेम आलिंगनें । केलीं समाधान होतीं संतीं ।।३।।
तुका म्हणे चाली न साहे मनास । पाहाती कळस परपरतों ।।४।।

१९३८
ऐसी ते सांडिली होईल पंढरी । येते वारकरी होत वाटे ।।१।।
देखिले सोहळे होती आठवत । चालती ते मात करूनियां ।।धृ।।
केली आइकिली होईल जे कथा । राहिलें तें चित्ता होइल प्रेम ।।२।।
गरुडटके टाळ मृदांग पताका । सांगती ते एकां एक सुख ।।३।।
तुका म्हणे आतां येती लवलाहीं । आलिंगूनि बाहीं देइन क्षेम ।।४।।

१९३९
क्षेम मायबाप पुसेन हें आधीं । न घलीं हें मधीं सुख दुःख ।।१।।
न करीं तांतडी आपणांपासूनि । आइकेन कानीं सांगतीं तें ।।धृ।।
अंतरींचें संत जाणतील गूज । निरोप तो मज सांगतील।।२।।

पायांवरी डोई ठेवीन आदरें । प्रीतिपडिभरें आळिंगून ।।३।।
तुका म्हणे काया करीन कुरवंडी । ओवाळून सांडीं त्यांवरून ।।४।।

१९४०
होइल माझी संतीं भाकिली करुणा । जे त्या नारायणा मनीं बैसे ।।१।।
शृंगारूनि माझीं बोबडीं उत्तरें । होतील विस्तारें सांगितलीं ।।धृ।।
क्षेम आहे ऐसें होइल सांगितलें । पाहिजे धाडिलें शीघ्र मूळ ।।२।।
अवस्था जे माझी ठावी आहे संतां । होइल कृपावंता निरोपिली ।।३।।
तुका म्हणे सवें येईल मुऱ्हाळी । किंवा कांहीं उरी राखतील ।।४।।

१९४१
दोहींमध्यें एक घडेल विश्वासें । भातुकें सरिसें मूळ तरी ।।१।।
करिती निरास निःशेष न घडे । कांहीं तरी ओढे चित्त माये ।।धृ।।
लौकिकाची तरी धरितील लाज । काय माझ्या काज आचरणें ।।२।।
अथवा कोणाचें घेणें लागे रीण । नाहीं तरी हीनकर्मी कांहीं ।।३।।
व्यालीचिये अंगीं असती वेधना । तुका म्हणे मना मन साक्ष ।।४।।

१९४२
बैसतां कोणापें नाहीं समाधान । विवरे हें मन ते चि सोई ।।१।।
घडी घडी मज आठवे माहेर । न पडे विसर क्षणभरी।।धृ।।
नो बोलावें ऐसा करितों विचार । प्रसंगीं तों फार आठवतें ।।२।।
इंद्रियांसी वाहो पडिली ते चाली । होती विसांवली ये चि ठायीं।।३।।
एकसरें सोस माहेरासी जावें । तुका म्हणे जीवें घेतलासे ।।४।।

१९४३
नाहीं हानि परी न राहावे निसुर । न पडे विसर काय करूं ।।१।।
पुसाविसी वाटे मात कापडियां । पाठविती न्याया मूळ मज ।।धृ।।
आणीक या मना नावडे सोहळा । करितें टकळा माहेरींचा ।।२।।
बहु कामें केलें बहु कासावीस । बहु जाले दिस भेटी नाहीं ।।३।।
तुका म्हणे त्याचें न कळे अंतर । अवस्था तों फार होते मज ।।४।।

१९४४
तोंवरी म्यां त्यास कैसें निषेधावें । जों नाहीं बरवें कळों आलें ।।१।।

कोणाचिया मुखें तट नाहीं मागें । वचन वाउगें बोलों नये ।।धृ।।
दिसे हानि परी निरास न घडे । हे तंव रोकडे अनुभव।।२।।
आपुलिया भोगें होईल उशीर । तोंवरी कां धीर केला नाहीं ।।३।।
तुका म्हणे गोड करील सेवट । पाहिली ते वाट ठायीं आहे ।।४।।

१९४५
माहेरींचें आलें तें मज माहेर । सुखाचें उत्तर करिन त्यासी ।।१।।
पायांवरी माथा आळिंगीन बाहीं । घेईन लवलाहीं पायवणी ।।धृ।।
सुख समाचार पुसेन सकळ । कैसा पर्वकाळ आहे त्यास ।।२।।
आपुले जीवींचें सुखदुःख भावें । सांगेन अघवें आहे तैसें ।।३।।
तुका म्हणे वीट नेघें आवडीचा । बोलिली च वाचा बोलवीन ।।४।।

१९४६
वियोग न घडे सन्निध वसलें । अखंड राहिलें होय चित्तीं ।।१।।
विसरु न पडे विकल्प न घडे । आलें तें आवडे तया पंथें ।।धृ।।
कामाचा विसर नाठवे शरीर । रसना मधुर नेणे फिकें।।२।।
निरोपासी काज असो अनामिक । निवडितां एक नये मज ।।३।।
तुका म्हणे हित चित्तें ओढियेलें । जेथें तें उगलें जावें येणें ।।४।।

१९४७
आतां माझे सखे येती वारकरी । जीवा आस थोरी लागली ते ।।१।।
सांगतील माझ्या निरोपाची मात । सकळ वृत्तांत माहेरींचा ।।धृ।।
काय लाभ जाला काय होतें केणें । काय काय कोणे सांटविलें ।।२।।
मागणें तें काय धाडिलें भातुकें । पुसेन तें सुखें आहेतसीं ।।३।।
तुका म्हणे काय सांगती ते कानीं । ऐकोनियां मनीं धरुनि राहें ।।४।।

१९४८
काय करावें म्यां केले ते विचार । घडेल साचार काय पाहों ।।१।।
काय मन नाहीं धरीत आवडी । प्रारब्धीं जोडी ते चि खरी ।।धृ।।
काय म्यां तेथींचें रांधिलें चाखोनि । तें हें करीं मनीं विवंचना ।।२।।
आणीक ही त्यासी बहुत कारण । बहु असे जिणें ओढीचें ही ।।३।।
तुका म्हणे आम्हां बोळविल्यावरी । परती माघारी केली नाहीं ।।४।।

१९४९
आम्हां अराणूक संवसारा हातीं । पडिली नव्हती आजिवरी ।।१।।
पुत्रदाराधन होता मनी धंदा । गोवियेलों सदा होतों कामें ।।धृ।।
वोडवलें ऐसें दिसतें कपाळ । राहिलें सकळ आवरोनि।।२।।
मागें पुढें कांहीं न दिसे पाहातां । तेथूनियां चिंता उपजली ।।३।।
तुका म्हणे वाट पाह्याचें कारण । येथीचिया हिंणें जालें भाग्य ।।४।।

१९५०
बहु दिस नाहीं माहेरिंची भेटी । जाली होती तुटी व्यवसायें ।।१।।
आपुल्याला होतों गुंतलों व्यासंगें । नाहीं त्या प्रसंगें आठवलें ।।धृ।।
तुटातें तुटतें जडती जडलें । आहे तें आपुलें आपणापें ।।२।।
बहु निरोपाचें पावलें उत्तर । जवळी च पर एक तें ही ।।३।।
काय जाणों मोह होईल सांडिला । बहु दिस तुटला तुका म्हणे ।।४।।

१९५१
होतीं नेणों जालीं कठिणें कठीण । जवळी च मन मनें ग्वाही ।।१।।
आम्ही होतों सोई सांडिला मारग । घडिलें तें मग तिकून ही ।।धृ।।
निश्चितीनें होते पुढिलांची सांडी । न चाले ते कोंडी मायबापा ।।२।।
आम्हां नाहीं त्यांचा घडिला आठव । त्यांचा बहु जीव विखुरला ।।३।।
तुका म्हणे जालें धर्माचें माहेर । पडिलें अंतर आम्हांकूनि ।।४।।

१९५२
आतां करावा कां सोंस वांयांविण । लटिका चि सीण मनासी हा ।।१।।
असेल तें कळों येईल लौकरी । आतां वारकरी आल्यापाठी ।।धृ।।
बहु विलंबाचें सन्निध पातलें । धीराचें राहिलें फळ पोटीं ।।२।।
चालिलें तें ठाव पावेल सेवटीं । पुरलिया तुटी पाउलांची ।।३।।
तुका म्हणे आसे लागलासे जीव । म्हणऊनि कींव भाकीतसें ।।४।। ।।१९।।

व संत परत आले त्यांची भेट झाली ते अभंग ११
१९५३
भागलेती देवा । माझा नमस्कार घ्यावा ।।१।।

तुम्ही क्षेम कीं सकळ । बाळ अवघे गोपाळ ।।धृ।।
मारगीं चालतां । श्रमलेती येतां जातां ।।२।।
तुका म्हणे कांहीं । कृपा आहे माझ्या ठायीं ।।३।।

१९५४
घालूनियां ज्योती । वाट पाहें दिवसराती ।।१।।
बहु उताविळ मन । तुमचें व्हावें दरुषण ।।धृ।।
आलों बोळवीत । तैसें या चि पंथें चित्त ।।२।।
तुका म्हणे पेणी । येतां जातां दिवस गणीं।।३।।

१९५५
आजि दिवस धन्य । तुमचें जालें दरुषण ।।१।।
सांगा माहेरींची मात । अवघा विस्तारीं वृत्तांत ।।धृ।।
आइकतों मन। करूनि सादर श्रवण ।।२।।
तुका म्हणे नाम । माझा सकळ संभ्रम ।।३।।

१९५६
बोलिलीं तीं काय । माझा बाप आणि माय ।।१।।
ऐसें सांगा जी झडकरी । तुम्ही सखे वारकरी ।।धृ।।
पत्राचें वचन । काय दिलें फिरावून ।।२।।
तुका म्हणे कांहीं । मना आणिलें कीं नाहीं ।।३।।

१९५७
काय पाठविलें । सांगा भातुकें विठ्ठलें ।।१।।
आसे लागलासे जीव । काय केली माझी कींव ।।धृ।।
फेडिलें मुडतर । किंवा कांहीं जरजर ।।२।।
तुका म्हणे सांगा । कैसें आर्त पांडुरंगा।।३।।

१९५८
आजिचिया लाभें ब्रम्हांड ठेंगणें । सुखी जालें मन कल्पवेना ।।१।।
आर्तभूत माझा जीव जयांसाटीं । त्यांच्या जाल्या भेटी पायांसवें ।।धृ।।
वाटुली पाहातां सिणले नयन । बहु होतें मन आर्तभूत ।।२।।
माझ्या निरोपाचें आणिलें उत्तर । होइल समाचार सांगती तो ।।३।।

तुका म्हणे भेटी निवारला ताप । फळलें संकल्प संत आले ।।४।।

१९५९
आजि बरवें जालें । माझें माहेर भेटलें ।।१।।
डोळां देखिले सज्जन । निवारला भाग सीण ।।धृ।।
धन्य जालों आतां । क्षेम देऊनियां संतां ।।२।।
इच्छेचें पावलों । तुका म्हणे धन्य जालों।।३।।

१९६०
वोरसोनि येती । वत्सें धेनुवेच्या चित्तीं ।।१।।
माझा कराया सांभाळ । वोरसोनियां कृपाळ ।।धृ।।
स्नेहें भूक तान । विसरती जाले सीण ।।२।।
तुका म्हणे कौतुकें । दिलें प्रेमाचें भातुकें।।३।।

१९६१
आलें तें आधीं खाईन भातुकें । मग कवतुकें गाईन ओव्या ।।१।।
सांगितला आधीं आइकों निरोप । होइल माझा बाप पुसें तों तें ।।२।।
तुका म्हणे माझे सखे वारकरी । आले हे माहेरीहून आजि ।।३।।

१९६२
आमुप जोडल्या सुखाचिया रासी । पार त्या भाग्यासी नाहीं आतां ।।१।।
काय सांगों सुख जालें आलिंगन । निवाली दर्शनें कांति माझी ।।२।।
तुका म्हणे यांच्या उपकारासाटीं । नाहीं माझे गांठी कांहीं एक ।।३।।

१९६३
पवित्र व्हावया घालीन लोळणी । ठेवीन चरणीं मस्तक हें ।।१।।
जोडोनि हस्तक करीन विनवणी । घेइन पायवणी धोवोनियां ।।२।।
तुका म्हणे माझें भांडवल सुचें । संतां हें ठायींचें ठावें आहे ।।३।। ।।११।।
पत्राचे अभंग समाप्त । ३६ । १९ । ११ ।। ६६।।

१९६४
मना एक करीं । म्हणे जाईन पंढरी । उभा विटेवरी। तो पाहेन सांवळा

।।१।।
करीन सांगती तें काम । जरी जपसी हें नाम । नित्य वाचे राम । हरि कृष्ण गोविंदा ।।धृ।।
लागें संतांचिया पायां । कथे उल्हास गावया । आलों मागावया । शरण देईं उचित।।२।।
नाचें रंगीं वाहें टाळी । होय सादर ते काळीं । तुका म्हणे मळी । सांडूनियां अंतरी ।।३।।

१९६५
न राहे क्षण एक वैकुंठीं । क्षीरसागरीं त्रिपुटी ।
जाय तेथें दाटी । वैष्णवांची धांवोनि ।।१।।
भाविक गे माये भोळें गुणाचें। आवडे तयाचें नाम घेतां तयासी ।।धृ।।
जो नातुडे कवणिये परी । तपें दानें व्रतें थोरी ।
म्हणतां वाचे हरि । राम कृष्ण गोविंदा ।।२।।
चौदा भुवनें जया पोटीं । तो राहे भक्तांचिये कंठीं ।
करूनियां साटी। चित्त प्रेम दोहींची ।।३।।
जया रूप ना आकार । धरी नाना अवतार ।
घेतलीं हजार । नांवें ठेवूनि आपणां ।।४।।
ऐसा भक्तांचा ऋृणी । पाहातां आगमीं पुराणीं ।
नाहीं तुका म्हणे ध्यानीं । तो कीर्तनीं नाचतसे ।।५।।

१९६६
स्वल्प वाट चला जाऊं । वाचे गाऊं विठ्ठल ।।१।।
तुम्ही आम्ही खेळीमेळीं । गदा रोळी आनंदें ।।धृ।।
ध्वजा कुंचे गरुडटके । शृंगार निके करोनि ।।२।।
तुका म्हणे हें चि नीट । जवळी वाट वैकुंठा ।।३।।

१९६७
आनंदाच्या कोटी । सांटवल्या आम्हां पोटीं ।।१।।
प्रेम चालिला प्रवाहो । नामओघ लवलाहो ।।धृ।।
अखंड खंडेना जीवन । राम कृष्ण नारायण ।।२।।
थडी आहिक्य परत्र । तुका म्हणे सम तीर ।।३।।

१९६८
चाहाडाची माता । व्यभिचारीण तत्त्वता ।।१।।
पाहे संतांचें उणें । छिद्र छळावया सुनें ।।धृ।।
जेणों त्याच्या वाचें । कांहीं सोडिलें गाठीचें ।।२।।
तुका म्हणे घात । व्हावा ऐसी जोडी मात ।।३।।

१९६९
सापें ज्यासी खावें । तेणें प्राणासी मुकावें ।।१।।
काय लाधला दुर्जन । तोंडावरी थुंकी जन ।।धृ।।
विंचु हाणें नांगी। अग्न लावी आणिकां अंगीं ।।२।।
तुका म्हणे जाती । नरका पाउलीं चालती ।।३।।
।।६।।

स्वामींनीं स्त्रीस उपदेश केला ते अभंग ।। ११ ।।

१९७०
पिकल्या सेताचा आम्हां देतो वांटा । चौधरी गोमटा पांडुरंग ।।१।।
सत्तर टके बाकी उरली मागे तो हा । मागें झडले दाहा आजिवरी ।।धृ।।
हांडा भांडीं गुरें दाखवी ऐवज । माजघरीं बाजे बैसलासे ।।२।।
मज यासी भांडतां जाब नेदी बळें । म्हणे एका वेळे घ्याल वांटा ।।३।।
तुका म्हणे स्त्रिये काय वो करावें । नेदितां लपावें काय कोठें ।।४।।

१९७१
करितां विचार अवघें एक राज्य । दुजा कोण मज पाठी घाली ।।१।।
कोण्या रीती जावें आम्ही वो पळोनि । मोकळ अंगणीं मागें पुढें ।।धृ।।
काय तें गव्हाणें हिंडावीं वो किती । दूत ते लागती याच पाठी ।।२।।
कोठें याची करूं केलों कुळवाडी । आतां हा न सोडी जीवें आम्हां ।।३।।
होऊनि बेबाख येथें चि राहावें। देईल तें खावें तुका म्हणे ।।४।।

१९७२
नागवूनि एकें नागवीं च केली । फिरोनियां आलीं नाहीं येथें ।।१।।
भेणें सुती कोणी न घेती पालवीं । करूनियां गोवी निसंतान ।।धृ।।
एकें तीं गोविलीं घेऊनि जमान । हांसतील जन लोक तयां ।।२।।
सरले तयांसी घाली वैकुंठीं । न सोडी हे साटी जीवें जाली ।।३।।

तुका म्हणे जालों जाणोनि नेणती । सांपडलों हातीं याचे आम्ही ।।४।।

१९७३
आतां तूं तयास होई वो उदास । आरंभला नास माझ्या जीवा ।।१।।
जरूर हें जालें मज कां नावडे । उपास रोकडे येती आतां ।।धृ।।
बरें म्या तुझिया जीवाचें तें काय । व्हावें हें तें पाहें विचारूनि ।।२।।
तुज मज तुटी नव्हे या विचारें । सहित लेकुरें राहों सुखें ।।३।।
तुका म्हणे तरी तुझा माझा संग । घडेल वियोग कधीं नव्हे ।।४।।

१९७४
काय करूं आतां माझिया संचिता । तेणें जीववित्ता साटी केली ।।१।।
न म्हणावें कोणी माझें हें करणें । हुकुम तो येणें देवें केला ।।धृ।।
करूनि मोकळा सोडिलों भिकारी । पुरविली तरी पाठी माझी ।।२।।
पाणिया भोंपळा जेवावया पानें । लाविलीं वो येणें देवें आम्हां ।।३।।
तुका म्हणे यासी नाहीं वो करुणा । आहे नागवणा ठावा मज ।।४।।

१९७५
नको धरूं आस व्हावें या बाळांस । निर्माण तें त्यांस त्यांचें आहे ।।१।।
आपुला तूं गळा घेईं उगवूनि । चुकवीं जाचणी गर्भवास ।।धृ।।
अवेज देखोनि बांधितील गळा । म्हणोनि निराळा पळतुसें ।।२।।
देखोनियां त्यांचा अवघड मार । कांपे थरथर जीव माझा ।।३।।
तुका म्हणे जरी आहे माझी चाड । तरी करीं वाड चित्त आतां ।।४।।

१९७६
भले लोक तुज बहु मानवती । वाढेल या कीर्ति जगामाजी ।।१।।
म्हणे मेलीं गुरें भांडीं नेलीं चोरें । नाहींत लेंकुरें जालीं मज ।।धृ।।
आस निरसूनि कठिण हें मन । करीं वो समान वज्र तैसें ।।२।।
किंचित हें सुख टाकीं वो थुंकोनि । पावसील धनी परमानंद ।।३।।
तुका म्हणे थोर चुकती सायास । भवबंद पाश तुटोनियां ।।४।।

१९७७
ऐक हें सुख होईल दोघांसी । सोहळा हे ॠषि करिती देव ।।१।।
जडितविमानें बैसविती मानें । गंधर्वांचें गाणें नामघोष ।।धृ।।

संत महंत सिद्ध येतील सामोरे । सर्वसुखा पुरे कोड तेथें ।।२।।
आलिंगूनि लोळों त्यांच्या पायांवरी । जाऊं तेथवरी मायबापें ।।३।।
तुका म्हणे तया सुखा वर्णूं काय । जेव्हां बापमाय देखें डोळां ।।४।।

१९७८
देव पाहावया करीं वो सायास । न धरीं हे आस नाशिवंत ।।१।।
दिन शुद्ध सोम सकाळीं पातला । द्वादशी घडला पर्वकाळ ।।धृ।।
द्विजां पाचारूनि शुद्ध करीं मन । देईं वो हें दान यथाविध ।।२।।
नको चिंता करूं वस्त्रा या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ।।३।।
तुका म्हणे दुरी सांगतों पाल्हाळीं । परी तो जवळी आहे आम्हां ।।४।।

१९७९
सुख हें नावडे आम्हां कोणा बळें । नेणसी अंधळें जालीशी तूं ।।१।।
भूक तान कैसी राहिली निश्चळ । खुंटलें चपळ मन ठायीं ।।धृ।।
द्रव्य जीवाहूनि आवडे या जना । आम्हांसी पाषाणाहूनि हीन ।।२।।
सोइरे सज्जन जन आणि वन । अवघें समान काय गुणें ।।३।।
तुका म्हणे आम्हां जवळी च आहे । सुख दुःख साहे पांडुरंग ।।४।।

१९८०
गुरुकृपे मज बोलविलें देवें । होईल हें घ्यावें हित कांहीं ।।१।।
सत्य देवें माझा केला अंगीकार । आणीक विचार नाहीं आतां ।।धृ।।
होई बळकट घालूनियां कास । हा चि उपदेश तुज आतां ।।२।।
सडा संमार्जन तुळसीवृंदावन । अतीतपूजन ब्राम्हणाचें।।३।।
वैष्णवांची दासी होईं सर्वभावें । मुखीं नाम घ्यावें विठोबाचें ।।४।।
पूर्णबोध स्त्रीभ्रतारसंवाद । धन्य जिहीं वाद आइकिला।।५।।
तुका म्हणे आहे पांडुरंगकथा । तरेल जो चित्ता धरील कोणी ।।६।।

।।११।।

१९८१
खडा रवाळी साकर । जाला नामाचा चि फेर ।
न दिसे अंतर । गोडी ठायीं निवडितां ।।१।।
तुम्ही आम्ही पांडुरंगा । भिन्न ऐसें काय सांगा ।
जाळविलें जगा । मी हें माझें यासाटीं।।ध्रु।।

पायीं हातीं नाकीं शिरीं । हेम राहे अळंकारीं ।
मुसे आल्यावरी। काय निवडे वेगळें ।।२।।
निजलिया लाभ हानी । तों च खरी ते स्वप्नीं ।
तुका म्हणे दोन्ही । निवारलीं जागतां ।।३।।

१९८२
आम्ही जाणों तुझा भाव । कैंचा भक्त कैंचा देव । बीजा नाहीं ठाव । कैंचें फळ शेवटीं ।।१।।
संपादिलें बहु रूप । कैंचें पुण्य कैंचें पाप । नव्हतों आम्ही आप । आपणासी देखिलें।।धृ।।
एके ठायीं घरिच्याघरीं । न कळतां जाली चोरी । तेथें तें चि दुरी । जाणें येणें खुंटलें ।।२।।
तुका म्हणे धरूनि हातीं । उर ठेविली मागुती । एकांतीं लोकांतीं । देवभक्तिसोहळा ।।३।।

१९८३
कांहीं बोलिलों बोबडें । मायबापा तुम्हांपुढें । सलगी लाडें कोडें । मज क्षमा करावी ।।१।।
काय जाणावा महिमा । तुमचा म्यां पुरुषोत्तमा । आवडीनें सीमा । सांडविली मज हातीं ।।धृ।।
घडे अवज्ञा सख्यत्वें । बाळें बापासी न भ्यावें । काय म्यां सांगावें । आहे ठावें तुम्हासी ।।२।।
तुका म्हणे देवा । प्रेम लोभ न संडावा । पाळिला पाळावा । लळा पुढती आगळा ।।३।।

१९८४
बहु भितों जाणपणा । आड न यो नारायणा ।
घेइन प्रेमपान्हा । भक्तिसुख निवाडें ।।१।।
यासी तुळे ऐसे कांहीं । दुजें त्रिभुवनीं नाहीं ।
काला भात दहीं । ब्रम्हादिकां दुर्लभ ।।धृ।।
निमिशा अर्ध संतसंगति । वास वैकुंठीं कल्पांतीं ।
मोक्षपदें होती । ते विश्रांति बापुडी ।।२।।
तुका म्हणे हें चि देईं । मीतूंपणा खंड नाहीं।

बोलिलों त्या नाहीं । अभेदाची आवडी ।।३।।
।।४।।

१९८५
देवा आतां ऐसा करीं उपकार । देहेचा विसर पाडीं मज ।।१।।
तरीं च हा जीव सुख पावे माझा । बरें केशीराजा कळों आलें ।।धृ।।
ठाव देईं चित्ता राख पायांपाशीं । सकळ वृत्तींसी अखंडित ।।२।।
असे भय आतां लाज काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ।।३।।
मागणें तें एक हें चि आहे आतां । नाम मुखीं संतसंग देईं ।।४।।
तुका म्हणे नको वरपंग देवा । घेईं माझी सेवा भावशुद्ध ।।५।।

१९८६
तुज न करितां काय नव्हे एक । हे तों सकळिक संतवाणी ।।१।।
घेईं माझा भार करीं कइवार । उतरीं हा पार भवसिंधु ।।धृ।।
उचित अनुचित पापपुण्यकाला । हा तों नये मला निवडितां ।।२।।
कुंटित राहिली बोलतां बोलतां । पार न पवतां वाणी पुढें ।।३।।
पुसतां ही कोणां न कळे हें गुज । राखें आतां लाज पांडुरंगा ।।४।।
तुका म्हणे बहु पाहिलें या जीवें । वर्म जालें जी ठावें नाम तुझें ।।५।।

१९८७
मज त्याची भीड नुलंघवे देवा । जो म्हणे केशवा दास तुझा ।।१।।
मज आवडती बहु तैसे जन । करिती कीर्तन कथा तुझी ।।धृ।।
सांडूनियां लाज नाचेन त्यांपुढें । आइकती कोडें नाम तुझें ।।२।।
न लगे उपचार होईन भिकारी । वैष्णवांच्या घरीं उष्टावळी।।३।।
तुका म्हणे जाणों उचित अनुचित । विचारूनि हित तें चि करूं ।।४।।

१९८८
तुझे पाय माझे राहियेले चित्तीं । ते मज दाविती वर्म देवा ।।१।।
आम्हां अंधां तुझ्या पायांचा आधार । जाणसी विचार चाळवितां ।।धृ।।
मन स्थिर ठेलें इंद्रियें निश्चळ । हें तों माझें बळ नव्हे देवा ।।२।।
पापपुण्य भेद नासिलें तिमिर । त्रिगुण शरीर सांडियेलें ।।३।।
तुका म्हणे तुझा प्रताप हा खरा । मी जाणें दातारा शरणागत ।।४।।

१९८९
जेथें जातों तेथें तू माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां ।।१।।
चालों वाटे आम्ही तुझा चि आधार । चालविसी भार सवें माझा ।।धृ।।
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ।।२।।
अवघें जन मज जाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ।।३।।
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं ।।४।।

१९९०
जालें पीक आम्हां अवघा सुकाळ । घेऊं अवघा काळ प्रेमसुख ।।१।।
जाली अराणुक अवघियांपासून । अवघा गेला सीण भाग आतां ।।धृ।।
अवघा जाला आम्हां एक पांडुरंग । आतां नाहीं जग माझें तुझें ।।२।।
अवघे चि आम्ही ल्यालों अळंकार । शोभलों हि फार अवघ्यांवरी ।।३।।
तुका म्हणे आम्ही सदेवांचे दास। करणें न लगे आस
आणिकांची ।।४।। ।।६।।

१९९१
साधनें आमुचीं आज्ञेचीं धारकें । प्रमाण सेवकें स्वामिसत्ता ।।१।।
प्रकाशिलें जग आपुल्या प्रकाशें । रवि कर्मरसें अलिप्त त्या ।।धृ।।
सांगणें तें तें नाहीं करणें आपण । मोलही वचन बाध जालें ।।२।।
तुका म्हणे आम्हां भांडवल हातीं । येरझारा खाती केवढियें ।।३।।

१९९२
शुभ जाल्या दिशा अवघा चि काळ । अशुभ मंगळ मंगळाचें ।।१।।
हातींचिया दीपें दुराविली निशी । न देखिजे कैसी आहे ते ही ।।धृ।।
सुख दुःखाहूनि नाहीं विपरीत । देतील आघात हितफळें ।।२।।
तुका म्हणे आतां आम्हांसी हें भलें । अवघे चि जाले जीव जंत ।।३।।

१९९३
पाप पुण्य दोन्ही वाहाती मारग । स्वर्गनर्कभोग यांचीं पेणीं ।।१।।
एका आड एक न लगे पुसावें । जेविल्या देखावें मागें भूक ।।धृ।।
राहाटीं पडिलें भरोनियां रितीं । होतील मागुतीं येतीं जातीं ।।२।।
तुका म्हणे आम्ही खेळतियांमधीं । नाहीं केली बुद्धी स्थिर पाहों ।।३।।
।।३।।

१९९४
हित तें हें एक राम कंठीं राहे । नाठविती देहभाव देही ।।१।।
हा चि एक धर्म निज बीजवर्म । हें चि जाळी कर्मे केलीं महा ।।धृ।।
चित्त राहे पायीं रूप बैसे डोळां । जीवें कळवळा आवडीचा ।।२।।
अखंड न खंडे अभंग न भंगे । तुका म्हणे गंगे मिळणी सिंधु ।।३।।
।।१।।

१९९५
माझिये जातीचें मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया ।।१।।
आवडे ज्या हरि अंतरापासूनि । ऐसियाचे मनीं आर्त माझें ।।धृ।।
तयालागीं जीव होतो कासावीस । पाहातील वास नयन हे ।।२।।
सुफळ हा जन्म होईल तेथून । देतां आलिंगन वैष्णवांसी ।।३।।
तुका म्हणे तो चि सुदिन सोहळा । गाऊं या गोपाळा धणीवरि ।।४।।

१९९६
आमुचें जीवन हें कथाअमृत । आणिक ही संतसमागम।।१।।
सारूं एके ठायीं भोजन परवडी । स्वादरसें गोडी पदोपदीं ।।धृ।।
धालिया ढेंकर येती आनंदाचे । वोसंडलें वाचे प्रेमसुख ।।२।।
पिकलें स्वरूप आलिया घुमरि । रासी ते अंबरीं न समाये ।।३।।
मोजितां तयाचा अंत नाहीं पार । खुंटला व्यापार तुका म्हणे ।।४।।

१९९७
जोडिलें तें आतां न सरे सारितां । जीव बळी देतां हाता आलें ।।१।।
संचित सारूनि बांधिलें धरणें । तुंबिलें जीवन आक्षय हें ।।धृ।।
शीत उष्ण तेथें सुखदुःख नाहीं । अंतर सबाही एक जालें ।।२।।
बीज तो अंकुर पत्र शाखा फळें । प्राप्तबीज मुळें अवघें नासे ।।३।।
तुका म्हणे नामीं राहिलीसे गोडी । बीजाच्या परवडी होती जाती ।।४।।

१९९८
भक्तिभाव आम्ही बांधिलासे गांठी । साधावितों हाटीं घ्या रे कोणी ।।१।।
सुखाचिया पेंठे घातला दुकान । मांडियेले वान रामनाम ।।धृ।।
सुखाचें फुकाचें सकळांचें सार । तरावया पार भवसिंधु ।।२।।

मागें भाग्यवंत जाले थोर थोर । तिहीं केला फार हा चि सांटा ।।३।।
खोटें कुडें तेथें नाहीं घातपात । तुका म्हणे चित्त शुद्ध करीं ।।४।।

१९९९
प्रजन्यें पडावें आपुल्या स्वभावें । आपुलाल्या दैवें पिके भूमि ।।१।।
बीज तें चि फळ येईल शेवटीं । लाभहानितुटी ज्याची तया ।।धृ।।
दीपाचिये अंगीं नाहीं दुजाभाव । धणी चोर साव सारिखे चि ।।२।।
काउळें ढोंपरा ककर तित्तिरा । राजहंसा चारा मुक्ताफळें ।।३।।
तुका म्हणे येथें आवडी कारण । पिकला नारायण जयां तैसा ।।४।।

२०००
धीर तो कारण एकविधभाव । पतिव्रते नाहो सर्वभावें।।१।।
चातक हे जळ न पाहाती दृष्टी । वाट पाहे कंठीं प्राण मेघा ।।धृ।।
सूर्यविकाशनी नेघे चंद्रामृत । वाट पाहे अस्तउदयाची।।२।।
धेनु येऊं नेदी जवळी आणिकां । आपुल्या बाळकाविण वत्सा ।।३।।
तुका म्हणे नेम प्राणांसवेंसाटी । तरी च या गोष्टी
विठोबाची ।।४।। ।।६।।

२००१
रामें स्नानसंध्या केलें क्रियाकर्म । त्याचा भवश्रम निवारला ।।१।।
आणिकें दुरावलीं करितां खटपट । वाउगे बोभाट वर्माविण।।धृ।।
रामनामीं जिहीं धरिला विश्वास । तिंहीं भवपाश तोडियेले ।।२।।
तुका म्हणे केलें कळिकाळ ठेंगणें । नामसंकीर्तनें भाविकांनीं ।।३।।

२००२
वैष्णवांची कीर्ती गाइली पुराणीं । साही अठरांजणीं चहूं वेदीं ।।१।।
ऐसे कोणी दावा ग्रंथांचे वाचक । कर्मठ धार्मिक पुण्यशील ।।धृ।।
आदिनाथ शंकर नारद मुनेश्वर । शुका ऐसा थोर आणिक नाहीं ।।२।।
तुका म्हणे मुगुटमणी हे भक्ति । आणीक विश्रांति अरतिया ।।३।।

२००३
बोलिलों जैसें बोलविलें देवें । माझें तुम्हां ठावें जातिकुळ ।।१।।
करा क्षमा कांहीं नका धरूं कोप । संत मायबाप दीनावरि ।।धृ।।

वाचेचा चाळक जाला दावी वर्म । उचित ते धर्म मजपुढें ।।२।।
तुका म्हणे घडे अपराध नेणतां । द्यावा मज आतां ठाव पायीं ।।३।।

२००४
संतांचे घरींचा दास मी कामारी । दारीं परोपरीं लोळतसें ।।१।।
चरणींचे रज लागती अंगांस । तेण बेताळीस उद्धरती ।।धृ।।
उच्छिष्ट हें जमा करुनि पत्रावळी । घालीन कवळी मुखामाजी ।।२।।
तुका म्हणे मी आणीक विचार । नेणें हे चि सार मानीतसें ।।३।। ।।४।।

२००५
एक शेरा अन्ना चाड । येर वाउगी बडबड ।।१।।
कां रे तृष्णा वाढविसी । बांधवूनि मोहपाशीं ।।धृ।।
ओठ हात तुझा जागा। येर सिणसी वाउगा ।।२।।
तुका म्हणे श्रम । एक विसरतां राम ।।३।।

२००६
आलें धरायच पेट । पुढें मागुतें न भेटे ।।१।।
होसी फजीती वरपडा । लक्ष चौऱ्यासीचे वेढां ।।धृ।।
नाहीं कोणांचा सांगात । दुःख भोगितां आघात ।।२।।
एका पाउलाची वाट । कोणां सांगावा बोभाट ।।३।।
जुंतिजेसी घाणां । नाहीं मारित्या करुणा ।।४।।
तुका म्हणे हित पाहें । जोंवरि हें हातीं आहे ।।५।।

२००७
लाभ जाला बहुतां दिसीं । लाहो करा पुढें नासी । मनुष्यदेहा ऐसी । उत्तमजोडी जोडिली ।।१।।
घेईं हरिनाम सादरें । भरा सुखाचीं भांडारें । जालिया व्यापारें । लाहो हेवा जोडीचा।।धृ।।
घेउनि माप हातीं । काळ मोवी दिवस राती । चोर लाग घेती । पुढें तैसें पळावें ।।२।।
हित सावकासें । म्हणे करीन तें पिसें । हातीं काय ऐसें । तुका म्हणे नेणसी ।।३।। ।।३।।

२००८
सुखाचें ओतलें । दिसे श्रीमुख चांगलें ।।१।।
मनेंधरिला अभिळास । मिठी घातली पायांस ।।धृ।।
होतां दृष्टादृष्टी । तापगेला उठाउठी ।।२।।
तुका म्हणे जाला । लाभें लाभ दुणावला ।।३।।

२००९
झरा लागला सुखाचा । ऐसा मापारी कइंचा ।।१।।
जो हें माप तोंडें धरी । सळे जाली ते आवरी ।।धृ।।
जाले बहु काळ । कोणा नाहीं ऐसें बळ ।।२।।
तुका म्हणे तळ । नाहीं पाहेसा सकळ ।।३।।

२०१०
आम्ही बोलों तें तुज कळे । एक दोहीं ठायीं खेळे।।१।।
काय परिहाराचें काम । जाणें अंतरींचें राम ।।धृ।।
कळोनियां काय चाड । माझी लोकांसी बडबड ।।२।।
कारण सवें एका । अवघें आहे म्हणे तुका ।।३।।

२०११
उमटे तें ठायीं । तुझे निरोपावें पायीं ।।१।।
आम्हीं करावें चिंतन । तुझें नामसंकीर्तन ।।धृ।।
भोजन भोजनाच्या काळीं। मागों करूनियां आळी ।।२।।
तुका म्हणे माथां । भार तुझ्या पंढरिनाथा।।३।।

२०१२
केला पण सांडी । ऐसियासी म्हणती लंडी ।।१।।
आतां पाहा विचारून । समर्थासी बोले कोण ।।धृ।।
आपला निवाड। आपणें चि करितां गोड ।।२।।
तुम्हीं आम्हीं देवा । बोलिला बोल सिद्धी न्यावा ।।३।।
आसे धुरे उणें । मागें सरे तुका म्हणे।।४।।

२०१३

न व्हावें तें जालें । तुम्हां आम्हांसी लागलें ।।१।।
आतां हालमाकलमें । भांडोनियां काढूं वर्मे ।।धृ।।
पाटोळ्यासवेंसाटी। दिली रगटयाची गांठी ।।२।।
तुका म्हणे हरी । आणूनियां करिन सरी ।।३।।

२०१४
पतितमिरासी । ते म्यां धरिला जीवेंसी ।।१।।
आतां बळिया सांग कोण । ग्वाही तुझें माझें मन ।।धृ।।
पावणांचा ठसा। दावीं मज तुझा कैसा ।।२।।
वाव तुका म्हणे जालें । रोख पाहिजे दाविलें ।।३।।

२०१५
करितां वेरझारा । उभा न राहासी वेव्हारा ।।१।।
हे तों झोंडाईचे चाळे । काय पोटीं तें न कळे ।।धृ।।
आरगुणी मुग । बैसलासी जैसा बग ।।२।।
तुका म्हणे किती । बुडविलीं आळवितीं।।३।।

२०१६
नाहीं देणें घेणे । गोवी केली अभिमानें ।।१।।
आतां कां हो निवडूं नेदां । पांडुरंगा येवढा धंदा ।।धृ।।
पांचांमधीं जावें । थोड्यासाटीं फजित व्हावें ।।२।।
तुज ऐसी नाहीं । पांडुरंगा आम्ही कांहीं ।।३।।
टाकुं तो वेव्हार । तुज बहू करकर ।।४।।
तुका म्हणे आतां । निवडूं संतां हें देखतां ।।५।। ।।९।।

२०१७
सिंचन करितां मूळ । वृक्ष वोल्हावे सकळ ।।१।।
नको पृथकाचे भरी । पडों एक मूळ धरीं ।।धृ।।
पाणचोऱ्याचें दार। वरिल दाटावें तें थोर ।।२।।
वस्व जाला राजा । मग आपुल्या त्या प्रजा ।।३।।
एक चिंतामणी । फिटे सर्व सुखधणी ।।४।।
तुका म्हणे धांवा । आहे पंढरिये विसांवा ।।५।।

२०१८

करूं याची कथा नामाचा गजर । आम्हां संवसार काय करी ।।१।।
म्हणवूं हरिचे दास लेऊं तीं भूषणें । कांपे तयाभेणें कळिकाळ ।।धृ।।
आशा भय लाज आड नये चिंता । ऐसी तया सत्ता समर्थाची ।।२।।
तुका म्हणे करूं ऐसियांचा संग । जेणें नव्हे भंग चिंतनाचा ।।३।। ।।२।।

२०१९

काय सर्प खातो अन्न । काय ध्यान बगाचें ।।१।।
अंतरींची बुद्धि खोटी । भरलें पोटीं वाईट ।।धृ।।
काय उंदीर नाहीं धांवीं । राख लावी गाढव ।।२।।
तुका म्हणे सुसर जळीं । काउळीं कां न न्हाती ।।३।।

२०२०

मदें मातलें नागवें नाचे । अनुचित वाचे बडबडी।।१।।
आतां शिकवावा कोणासी विचार । कर्म तें दुस्तर करवी धीट।।धृ।।
आलें अंगासी तें बळिवंत गाढें । काय वेड्यापुढें धर्मनीत ।।२।।
तुका म्हणे कळों येईल तो भाव । अंगावरिल घाव उमटतां ।।३।। ।।२।।

२०२१

सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरू ।।१।।
परि या दुर्लभ विठोबाचे पाय । तेथें हे उपाय न सरती ।।धृ।।
अमृतें सागर भरवे ती गंगा । म्हणवेल उगा राहें काळा ।।२।।
भूत भविष्य कळों येईल वर्तमान । करवती प्रसन्न रिद्धिसिद्धी ।।३।।
स्थान मान कळों येती योगमुद्रा । नेववेल वारा ब्रम्हांडासी ।।४।।
तुका म्हणे मोक्ष राहे आलीकडे । इतर बापुडें काय तेथें ।।५।। ।।१।।

२०२२

भाविकां हें वर्म सांपडलें निकें । सेविती कवतुकें धणीवरि ।।१।।
इच्छितील तैसा नाचे त्यांचे छंदें । वंदिती तीं पदें सकुमारें ।।धृ।।

विसरले मुक्ती भक्तिअभिळासें । ओढत सरिसें सुखा आलें ।।२।।
तुका म्हणे नाहीं मागायाची आस । पांडुरंग त्यांस विसंबेना ।।३।।

२०२३
भक्तां समागमें सर्वभावें हरि । सर्व काम करी न संगतां ।।१।।
सांटवला राहे हृदयसंपुष्टीं । बाहेर धाकुटी मूर्ति उभा।।धृ।।
मागण्याची वास पाहे मुखाकडे । चिंतिल्या रोकडे मनोरथ ।।२।।
तुका म्हणे जीव भाव देवापायीं । ठेवूनि ते कांहीं न मगती ।।३।।

२०२४
प्रेमअमृतें रसना ओलावली । मनाची राहिली वृत्ति पायीं ।।१।।
सकळ ही तेथें वोळलीं मंगळें । वृष्टि केली जळें आनंदाच्या ।।धृ।।
सकळ इंद्रियें जालीं ब्रम्हरूप । ओतलें स्वरूप माजी तया ।।२।।
तुका म्हणे जेथें वसे भक्तराव । तेथें नांदे देव संदेह नाहीं ।।३।।
।।३।।

२०२५
कासया गुणदोष पाहों आणिकांचे । मज काय त्यांचें उणें असे ।।१।।
काय पापपुण्य पाहों आणिकांचें । मज काय त्यांचें उणें असें ।।धृ।।
नष्टदुष्टपण कवणाचें वाणू । तयाहून आनु अधिक माझें ।।२।।
कुचर खोटा मज कोण असे आगळा । तो मी पाहों डोळां आपुलिये ।।३।।
तुका म्हणे मी भांडवलें पुरता । तुजसी पंढरिनाथा लावियेलें
।।४।। ।।१।।

२०२६
काळ जवळि च उभा नेणां । घाली झांपडी खुंटी कानां ।।१।।
कैसा हुशार सावध राहीं । आपुला तूं अपुलेठायीं।।धृ।।
काळ जवळिच उभा पाहीं । नेदी कोणासि देऊं कांहीं ।।२।।
काळें पुरविली पाठी । वरुषें जालीं तरी साठी ।।३।।
काळ भोंवताला भोंवे। राम येऊं नेदी जिव्हे ।।४।।
तुका म्हणे काळा । कर्म मिळतें तें जाळा
।।५।। ।।१।।

२०२७

दुष्ट भूषण सज्जनाचें । अलभ्यलाभ पुण्य त्याचें।।१।।
धन्य ऐसा परउपकारी । जाय नरका आणिकांवारि ।।धृ।।
मळ खाये संवदणी । करी आणिकांची उजळणी ।।२।।
तुका म्हणे त्याचा । प्रीती आदर करा साचा ।।३।।

२०२८

साहोनियां टांकीघाये । पाषाण देव चि जाला पाहें।।१।।
तया रीती दृढ मन । करीं साधाया कारण ।।धृ।।
बाण शस्त्र साहे गोळी । सुरां ठाव उंच स्थळीं ।।२।।
तुका म्हणे सती । अग्न न देखे ज्या रीती ।।३।।

।।२।।

२०२९

तेणें वेशें माझीं चोरिलीं अंगें । मानावया जग आत्मैपणे।
नाहीं चाड भीड संसाराचें कोड । उदासीन सर्व गुणें ।
भय मोह लज्जा निरसली शंका । अवघियां एक चि पणें ।
विठ्ठलाच्या पायीं बैसोनि राहिलीं । भागलीं नुटित तेणें ।।१।।
आतां त्यांसीं काय चाले माझें बळ । जालोंसें दुर्बळ सत्त्वहीन ।
दग्ध पट दिसे संगति बरवंट । काय त्याचें कारण ।।धृ।।
आळसें दृष्टी न पाहे आपुलें । एक चि देखिलें सर्वरूप ।
मानामान तेथें खुंटोनि राहिलें । पिसुन तो कोण बाप ।
ज्योति ना अंधार अवघा एकंकार। तेथें काय पुण्यपाप ।
विठ्ठलावांचुनि कांहीं च नावडे । वेगळाल्या भावें रूप ।।२।।
बळबडिवार लौकिक वेव्हार । गेली आशा तृष्णा माया ।
सुखदुःखाची वार्ता नाइके । अंतरलों दुरी तया ।
मीतूंपणनिःकाम होऊनि । राहिलों आपुलिया ठायां ।
तुजविण आतां मज नाहीं कोणी । तुका म्हणे देवराया ।।३।।

।।१।।

२०३०

कथा पुराण ऐकतां । झोंप नाथिलि तत्त्वता । खाटेवरि पडतां । व्यापी चिंता तळमळ ।।१।।

ऐसी गहन कर्मगति। काय तयासी रडती । जाले जाणते जो चित्तीं । कांहीं नेघे आपुला।।धृ।।
उदक लावितां न धरे । चिंता करी केव्हां सरे । जाऊं नका धीरें । म्हणे करितां ढवाळ्या ।।२।।
जवळी गोंचिड क्षीरा । जैसी कमळणी दर्दुरा । तुका म्हणे दुरा । देशत्यागें तयासी ।।३।।

२०३१
संदेह बाधक आपआपणयांतें । रज्जुसर्पवत भासतसे।
भेऊनियां काय देखिलें येणें । मारें घायेंविण लोळतसे ।।१।।
आपणें चि तारी आपण चि मारी । आपण उद्धरी आपणयां ।
शुकनळिकेन्यायें गुंतलासी काय । विचारूनि पाहें मोकळिया ।।ध्रु।।
पापपुण्य कैसे भांजिले अख । दशकाचा एक उरविला ।
जाणोनियां काय होतोसी नेणता । शून्या ठाव रिता नाहीं नाहीं ।।२।।
दुरा दृष्टी पाहें न्याहाळूनि । मृगजला पाणी न म्हणें चाडा ।
धांवतां चि फुटे नव्हे समाधान । तुका म्हणे जाण पावे पीडा ।।३।। ।।२।।

२०३२
कथे उभा अंग राखे जो कोणी । ऐसा कोण गणी तया पापा ।।१।।
येथें तो पातकी न येता च भला । रणीं कुचराला काय चाले ।।धृ।।
कथे बैसोनी आणीक चर्चा । धिग त्याची वाचा कुंभपाक ।।२।।
तुका म्हणे ऐलपैल ते थडीचे । बुडतील साच मध्यभागीं ।।३।।

२०३३
नावडे ज्या कथा उठोनियां जाती । ते यमा फावती बरे वोजा ।।१।।
तो असे जवळी गोंचिडाच्या न्यायें । देशत्यागें ठायें तया दुरी ।।धृ।।
नव्हे भला कोणी नावडे दुसरा । पाहुणा किंकरा यमा होय ।।२।।
तुका म्हणे तया करावें तें काई । पाषाण कां नाहीं जळामध्यें ।।३।।

२०३४
जवळी नाहीं चित्त । काय मांडियेलें प्रेत ।।१।।
कैसा पाहे चद्रिंद्राष्टि । दीप स्नेहाच्या शेवटीं ।।धृ।।

कांतेलेंसें श्वान । तैसें दिशा हिंडे मन ।।२।।
त्याचे कानीं हाणे । कोण बोंब तुका म्हणे।।३।।

२०३५
दुर्बळा वाणीच्या एक दोनि सिद्धि । सदैवा समाधि विश्वरूपीं ।।१।।
काय त्याचें वांयां गेलें तें एक । सदा प्रेमसुख सर्वकाळ ।।धृ।।
तीर्थ देव दुरी तया भाग्यहीना । विश्व त्या सज्जना दुमदुमिलें ।।२।।
तुका म्हणे एक वाहाती मोळिया । भाग्यें आगळिया घरा येती ।।३।। ।।४।।

२०३६
परिमळें काष्ठ ताजवां तुळविलें । आणीक नांवांचीं थोडीं । एक तें कातिवें उभविलीं ढवळारें
एकाचिया कुड मेडी । एक दीनरूप आणिती मेळिया । एक ते बांधोनि माडी
अवघियां बाजार एक चि जाला । मांविकलीं आपुल्या पाडीं ।।१।।
गुण तो सार रूपमध्यकार । अवगुण तो फार पीडीतसे ।।धृ।।
एक गुणें आगळे असती । अमोल्य नांवांचे खडे । एक समर्थ दुर्बळा घरीं
फार मोलाचे थोडे । एक झगमग करिती वाळवंटीं । कोणी न पाहाती तयांकडे
सभाग्य संपन्न आपुलाले घरीं । मायेक दैन्य बापुडें ।।२।।
एक मानें रूपें सारिख्या असती । अनेकप्रकार याती। ज्याचिया संचितें जैसें आलें पुढें
तयाची तैसी च गति । एक उंचपदीं बैसउनि सुखें । दास्य करवी एका हातीं
तुका म्हणे कां मानिती सुख । चुकलिया वांयां खंती ।।३।। ।।१।।

२०३७
नाहीं आम्हां शत्रु सासुरें पिसुन । दाटलें हें घन माहियेर ।।१।।
पाहें तेथें पांडुरंग रखुमाई । सत्यभामा राही जननिया।।धृ।।
लज्जा भय कांही आम्हां चिंता नाहीं । सर्वसुखें पायीं वोळगती ।।२।।
तुका म्हणे आम्ही सदैवाचीं बाळें । जालों लडिवाळें सकळांचीं ।।३।।

२०३८
गभाअ असतां बाळा । कोण पाळी त्याचा लळा।।१।।
कैसा लाघवी सूत्रधारी । कृपाळुवा माझा हरी ।।धृ।।
सर्प पिलीं वितां चि खाय । वांचलिया कोण माय ।।२।।
गगनीं लागला कोसरा । कोण पुरवी तेथें चारा ।।३।।
पोटीं पाषाणांचे जीव । कवण जीव त्याचा भाव ।।४।।
तुका म्हणे निश्चळ राहें । होईल तें सहज पाहें ।।५।।

२०३९
न म्हणे कवणां सिद्ध साधक गंव्हार । अवघा विश्वंभर वांचूनियां ।।१।।
ऐसें माझे बुद्धि काया वाचा मन । लावीं तुझें ध्यान पांडुरंगा ।।धृ।।
गातां प्रेमगुण शंका माझ्या मनीं । नाचतां रंगणीं नाठवावी ।।२।।
देईं चरणसेवा भूतांचें भजन । वर्णा अभिमान सांडवूनि ।।३।।
आशापाश माझी तोडीं माया चिंता । तुजविण वेथा नको कांहीं ।।४।।
तुका म्हणे सर्व भाव तुझे पायीं । राहे ऐसें देईं प्रेम देवा ।।५।।

२०४०
अग्निमाजी गेलें । अग्नि होऊन तें च ठेलें ।।१।।
काय उरलें तया पण । मागील तें नाम गुण ।।धृ।।
लोह लागेपरिसा अंगीं । तो ही भूषण जाला जगीं ।।२।।
सरिता वोहळा ओघा। गंगे मिळोनि जाल्या गंगा ।।३।।
चंदनाच्या वासें । तरु चंदन जालेस्पर्शे।।४।।
तुका जडला संतां पायीं । दुजेपणा ठाव नाहीं।।५।।
।।४।।

२०४१
ऐशा भाग्यें जालों । तरी धन्य जन्मा आलों ।।१।।
रुळें तळीले पायरी । संत पाय देती वरी ।।धृ।।
प्रेमामृतपान । होईल चरणरजें स्नान ।।२।।
तुका म्हणे सुखें । तया हरतील दुःखें।।३।।

२०४२
करितां या सुखा । अंतपार नाहीं लेखा ।।१।।

माथां पडती संतपाय । सुख कैवल्य तें काय ।।धृ।।
ऐसा लाभ नाहीं । दुजा विचारितां कांहीं ।।२।।
तुका म्हणे गोड । तेथें पुरे माझें कोड।।३।।
।।२।।

२०४३
वेद जया गाती । आम्हां तयाची संगति ।।१।।
नाम धरियेलें कंठीं । अवघा सांटविला पोटीं ।।धृ।।
ॐकाराचें बीज । हातीं आमुचे तें निज ।।२।।
तुका म्हणे बहु मोटें । अणुरणियां धाकुटें ।।३।।

२०४४
तूं श्रीयेचा पति । माझी बहु हीन याती ।।१।।
दोघे असों एके ठायीं । माझा माथा तुझे पायीं ।।धृ।।
माझ्या दीनपणां पार । नाहीं बहु तूं उदार ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगा । मी ओहोळ तूं गंगा ।।३।।

२०४५
मी याचक तूं दाता । काय सत्य पाहों आतां ।।१।।
म्या तों पसरिला हात । करीं आपुलें उचित ।।धृ।।
आम्ही घ्यावें नाम । तुम्हां समाधान काम ।।२।।
तुका म्हणे देवराजा । वाद खंडीं तुझा माझा ।।३।।

२०४६
तुझे पोटीं ठाव । व्हावा ऐसा माझा भाव ।।१।।
करीं वासनेसारिखें । प्राण फुटे येणें दुःखें ।।धृ।।
अहंकार खोटे । वाटे श्वापदांची थाटे ।।२।।
तुका म्हणे आई । हातीं धरूनि संग देई ।।३।।

२०४७
दारीं परोवरी । कुडीं कवाडीं मी घरीं ।।१।।
तुमच्या लागलों पोषणा । अवघे ठायीं नारायणा ।।धृ।।
नेदीं खाऊं जेवूं । हातींतोंडींचें ही घेऊं ।।२ ।।

तुका म्हणे अंगीं । जडलों ठायींचा सलगी ।।३।।
२०४८
मज कोणी कांहीं करी । उमटे तुमचे अंतरीं ।।१।।
व्याला वाडविलें म्हूण । मज सुख तुज सीण ।।धृ।।
माझें पोट धालें। तुझे अंगीं उमटलें ।।२।।
तुका म्हणे खेळें । तेथें तुमचिया बळें ।।३।।

२०४९
जोडोनियां कर । उभा राहिलों समोर ।।१।।
हें चि माझेंभांडवल।जाणे कारण विठ्ठल ।।धृ।।
भाकितों करुणा । आतां नुपेक्षावें दीना ।।२।।
तुका म्हणे डोई । ठेवीं वेळोवेळां पायीं ।।३।।

२०५०
आम्ही घ्यावें तुझें नाम । तुम्ही आम्हां द्यावें प्रेम।।१।।
ऐसें निवडिलें मुळीं । संतीं बैसोनि सकळीं ।।धृ।।
माझी डोई पायांवरी । तुम्ही न धरावी दुरी ।।२।।
तुका म्हणे केला । खंड दोघांचा विठ्ठला ।।३।।

२०५१
वारिलें लिगाड । बहुदिसांचें हें जाड ।।१।।
न बोलावें ऐसें केलें । काहीं वाउगें तितुलें ।।धृ।।
जाला चौघांचार । गेला खंडोनि वेव्हार ।।२।।
तुका म्हणे देवा । करीन ते घ्यावी सेवा।।३।।

२०५२
पायरवे अन्न । मग करी क्षीदक्षीण ।।१।।
ऐसे होती घातपात । लाभे विण संगें थीत ।।धृ।।
जन्माची जोडी । वाताहात एके घडी ।।२।।
तुका म्हणे शंका । हित आड या लौकिका ।।३।।

२०५३
आम्हांवैष्णवांचा।नेमकायामनेंवाचा।।१।।

धीर धरूं जिवासाटीं । येऊं नेदूं लाभा तुटी ।।धृ।।
उचित समय । लाजनिवारावें भय ।।२।।
तुका म्हणे कळा । जाणों नेम नाहीं बाळा ।।३।।

२०५४
उलंघिली लाज । तेणें साधियेलें काज ।।१।।
सुखें नाचे पैलतीरीं । गेलों भवाचे सागरीं ।।धृ।।
नामाची सांगडी । सुखें बांधली आवडी ।।२।।
तुका म्हणे लोकां । उरली वाचा मारीं हाका।।३।।

२०५५
बैसलोंसे दारीं । धरणें कोंडोनि भिकारी ।।१।।
आतां कोठें हालों नेदीं । बरी सांपडली संदी ।।धृ।।
किती वेरझारा । मागें घातलीया घरा ।।२।।
माझें मज नारायणा । देतां ां रे नये मना।।३।।
भांडावें तें किती । बहु सोसिली फजिती ।।४।।
तुका म्हणे नाहीं । लाज तुझे अंगीं कांहीं ।।५।।

२०५६
जालों द्वारपाळ । तुझें राखिलें सकळ ।।१।।
नाहीं लागों दिलें अंगा । आड ठाकलों मी जगा ।।धृ।।
करूनियां नीती। दिल्याप्रमाणें चालती ।।२।।
हातीं दंड काठी । भा जिवाचिये साटीं।।३।।
बळ बुद्धी युक्ती । तुज दिल्या सर्व शक्ती ।।४।।
तुका म्हणे खरा । आतां घेईन मुशारा ।।५।।

२०५७
फळाची तों पोटीं । घडे वियोगें ही भेटी ।।१।।
करावें चिंतन । सार तें चि आठवण ।।धृ।।
चित्त चित्ता ग्वाही । उपचारें चाड नाहीं ।।२।।
तुका म्हणे देवा । पावे ंतरींची सेवा।।३।। ।।१५।।

२०५८

दुर्बळाचें कोण । ऐके घालूनियां मन । राहिलें कारण। तयावांचूनि काय तें ।।१।।
कळों आलें अनुभवें । पांडुरंगा माझ्या जीवें । न संगतां ठावें । पडे चर्या देखोनि ।।धृ।।
काम क्रोध माझा देहीं । भेदाभेद ोले नाहीं । होतें तेथें कांहीं । तुज कृपा करितां।।२।।
हें तों नव्हे उचित । नुपेक्षावें शरणागत । तुका म्हणे रीत । तुमची आम्हां न कळे ।।३।।

२०५९

आम्ही भाव जाणों देवा । न कळती तुझिया मावा । गणिकेचा कुढावा । पतना न्यावा दशरथ ।।१।।
तरी म्यां काय गा करावें । कोण्या रीती तुज पावें । न संगतां ठावें । तुम्हांविण न पडे।।धृ।।
दोनी फाकलिया वाटा । ाोवी केला घटापटा । नव्हे धीर फांटा । आड रानें भरती ।।२।।
तुका म्हणे माझे डोळे । तुझे देखती हे चाळे । आतां येणें वेळे । चरण जीवें न सोडीं ।।३।।

२०६०

वेरझारीं जाला सीण । बहु केलें क्षीदक्षीण । भांडणासी दिन । आजी येथें फावला ।।१।।
आतां काय भीड भार । धरूनियां लोकचार । बुडवूनि वेव्हार । सरोबरी करावी ।।धृ।।
आलें बहुतांच्या मना । कां रे न ोसी ाहाणा । मुळींच्या वचना । आम्ही जागों आपुल्या ।।२।।
तुका म्हणे चौघांमधीं । तुज नेलें होतें आधीं । आतां नामधीं । उरी कांहीं राहिली ।।३।। ।।३।।

२०६१

कल्पतरूखालीं । फळें येती मागीतलीं ।।१।।
तेथें बैसल्याचा भाव । विचारूनि बोलें ठाव ।।धृ।।
द्यावें तें उत्तर । येतो प्रतित्याचा फेर ।।२।।

तुका म्हणे मनीं । आपुल्या च लाभहानि।।३।।

२०६२
रंगलें या रंगें पालट न धरी । खेवलें अंतरीं पालटेना।।१।।
सावळें निखळ कृष्णनाम ठसे । अंगसंगें कैसे शोभा देती ।।धृ।।
पवित्र जालें तें न लिंपे विटाळा । नैदी बैसों मला आडवरी ।।२।।
तुका म्हणे काळें काळें केलें तोंड । प्रकाश अभंड देखोनियां ।।३।।

२०६३
जगा काळ खाय । आम्ही माथां दिले पाय ।।१।।
नाचों तेथें उभा राहे । जातां व्यंग करी साहे ।।धृ।।
हरिच्या गुणें धाला । होता खात चि भुकेला ।।२।।
तुका म्हणे हळु । जाला कढत शीतळु ।।३।।
।।३।।

२०६४
ब्रम्हरस घेई काढा । जेणें पीडा वारेल ।।१।।
पथ्य नाम विठोबाचें । अणीक वाचे न सेवीं ।।धृ।।
भवरोगाऐसें जाय । आणीक काय क्षुल्लकें ।।२।।
तुका म्हणे नव्हे बाधा । अणीक कदा भूतांची ।।३।।

२०६५
अंगें अनुभव जाला मज । संतरजचरणांचा ।।१।।
सुखी जालों या सेवनें । दुःख नेणें यावरी ।।धृ।।
निर्माल्याचें तुळसीदळ । विष्णुजळ चरणींचें ।।२।।
तुका म्हणे भावसार । करूनि फार मिश्रित ।।३।।

२०६६
वैद्य एक पंढरिराव । अंतर्भाव तो जाणे ।।१।।
रोगाऐशा द्याव्या वल्ली । जाणे जाली बाधा ते ।।धृ।।
नेदी रुका वेचों मोल । पोहे बोल प्रीतीचे ।।२।।
तुका म्हणे दयावंता । सदा चिंता दीनांची ।।३।।

२०६७
करितां कोणाचें ही काज । नाहीं लाज देवासी ।।१।।
बरे करावें हें काम । धरिलें नाम दीनबंधु ।।धृ।।
करुनि अराणूक पाहे । भलत्या साह्य व्हावया ।।२।।
बोले तैसी करणी करी । तुका म्हणे एक हरि ।।३।।
।।४।।

२०६८
उभें चंद्रभागे तीरीं । कट धरोनियां करीं ।
पाउलें गोजिरीं । विटेवरी शोभलीं ।।१।।
त्याचा छंद माझ्या जीवा । काया वाचा मनें हेवा ।
संचिताचा ठेवा । जोडी हातीं लागली ।।धृ।।
रूप डोळियां आवडे । कीर्ति श्रवणीं पवाडे ।
मस्तक नावडे । उठों पायांवरोनि ।।२।।
तुका म्हणे नाम । ज्याचें नासी क्रोध काम ।
हरी भवश्रम । उच्चारितां वाचेसी ।।३।।

२०६९
आम्हां हें चि भांडवल । म्हणों विठ्ठल विठ्ठल ।।१।।
सुखें तरों भवनदी । संग वैष्णवांची मांदी ।।धृ।।
बाखराचें वाण। सांडूं हें जेवूं जेवण ।।२।।
न लगे वारंवार । तुका म्हणे वेरझार ।।३।।

२०७०
आतां माझ्या भावा । अंतराय नको देवा ।।१।।
आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ।।धृ।।
दृढ माझें मन। येथें राखावें बांधोन ।।२।।
तुका म्हणे वाटे । नको फुटों देऊं फांटे।।३।।
।।३।।

२०७१
काय देवापाशीं उणें । हिंडे दारोदारीं सुनें ।।१।।
करी अक्षरांची आटी । एके कवडी च साटीं ।।धृ।।

निंदी कोणां स्तवी । चिंतातुर सदा जीवीं ।।२।।
तुका म्हणे भांड । जलो जळो त्याचें तोंड ।।३।।

२०७२
मागणें तें मागों देवा । करूं भक्ती त्याची सेवा ।।१।।
काय उणे तयापाशीं । रिद्धिसिद्धी ज्याच्या दासी ।।धृ।।
कायावाचामन । करूं देवा हें अर्पण ।।२।।
तुका म्हणे विश्वंभर । ज्याच्यानें हें चराचर ।।३।।

२०७३
चित्तीं नाहीं आस । त्याचा पांडुरंग दास ।।१।।
असे भक्तांचिये घरीं । काम न संगतां करी ।।धृ।।
अनाथाचा बंधु । असे अंगीं हा संबंधुं ।।२।।
तुका म्हणे भावें । देवा सत्ता राबवावें ।।३।।

२०७४
कर्कशसंगति । दुःख उदंड फजिती ।।१।।
नाहीं इह ना परलोक । मजुर दिसे जैसें रंक ।।धृ।।
वचन सेंटावरी । त्याचें ठेवूनि धिक्कारी ।।२।।
तुका म्हणे पायीं बेडी । पडिली कपाळीं कुऱ्हाडी ।।३।।
।।४।।

२०७५
बीज पेरे सेतीं । मग गाडेवरी वाहाती ।।१।।
वांयां गेलें ऐसें दिसे । लाभ त्याचे अंगीं वसे ।।धृ।।
पाल्याची जतन । तरि प्रांतीं येती कण ।।२।।
तुका म्हणे आळा । उदक देतां लाभे फळा ।।३।।

२०७६
जाणावें तें सार । नाहीं तरी दगा फार ।।१।।
डोळे झांकिलिया रवि । नाहीं ऐसा होय जेवीं ।।धृ।।
बहुथोड्या आड । निवारितां लाभें जाड ।।२।।
तुका म्हणे खरें । नेलें हातींचे अंधारें।।३।।

२०७७
मुळीं नेणपण । जाला तरी अभिमान ।।१।।
वांयां जावें हें चि खरें । केलें तेणें चि प्रकारें ।।धृ।।
अराणूक नाहीं कधीं। जाली तरि भेदबुद्धि ।।२।।
अंतरली नाव । तुका म्हणे नाहीं ठाव।।३।।
।।३।।

२०७८
संवसारसांते आले हो आइका । तुटीचें ते नका केणें भरूं ।।१।।
लाभाचा हा काळ अवघे विचारा । पारखी ते करा साह्य येथें ।।धृ।।
शृंगारिलें दिसे न कळे अंतर । गोविला पदर उगवेना ।।२।।
तुका म्हणे खोटें गुंपतां विसारें । हातिंचिया खरें हातीं घ्यावें ।।३।।

२०७९
सारावीं लिगाडें धरावा सुपंथ । जावें उसंतीत हळूहळू ।।१।।
पुढें जातियाचे उमटले माग । भांबावलें जग आडरानें ।।धृ।।
वेचल्याचा पाहे वरावरि झाडा । बळाचा निधडा पुढिलिया ।।२।।
तुका म्हणे जैसी दाखववावी वाणी । ते द्यावी भरोनी शेवट तों ।।३।।

२०८०
बुद्धिमंद शिरीं । भार फजिती पदरीं ।।१।।
जाय तेथें अपमान । पावे हाणी थुंकी जन ।।धृ।।
खरियाचा पाड । मागें लावावें लिगाड ।।२।।
तुका म्हणे करी । वर्म नेणें भरोवरी ।।३।।
।।३।।

२०८१
पूर्वजांसी नर्का । जाणें तें आइका ।।१।।
निंदा करावी चाहाडी । मनीं धरूनि आवडी ।।धृ।।
मात्रागमना ऐसी।जोडी पातकांची रासी ।।२।।
तुका म्हणे वाट । कुंभपाकाची ते नीट।।

२०८२
वेडीं तें वेडीं बहुत चि वेडीं । चाखतां गोडी चवी नेणे ।।धृ।।
देहा लावी वात । पालव घाली जाली रात ।।१।।
कडिये मूल भोंवतें भोंये । मोकलुनि रडे धाये ।।२।।
लेंकरें वित्त पुसे जगा । माझा गोहो कोण तो सांगा ।।३।।
आपुली शुद्धि जया नाहीं । आणिकांची ते जाणे काई ।।४।।
तुका म्हणे ऐसे जन । नर्का जातां राखे कोण ।।५।।

२०८३
आवडीचें दान देतो नारायण । बाहे उभारोनि राहिलासे।।१।।
जें जयासी रुचे तें करी समोर । सर्वज्ञ उदार मायबाप ।।धृ।।
ठायीं पडिलिया तें चि लागे खावें । ठायींचे चि घ्यावें विचारूनि ।।२।।
बीज पेरूनियां तें चि घ्यावें फळ । डोरलीस केळ कैंचें लागे ।।३।।
तुका म्हणे देवा कांहीं बोल नाहीं । तुझा तूं चि पाहीं शत्रु सखा ।।४।।

२०८४
अडचणीचें दार । बाहेर माजी पैस फार ।।१।।
काय करावें तें मौन्य । दाही दिशा हिंडे मन ।।धृ।।
बाहेर दावी वेश । माजी वासनेचे लेश ।।२।।
नाहीं इंद्रियां दमन । काय मांडिला दुकान ।।३।।
सारविलें निकें । वरि माजी अवघें फिकें ।।४।।
तुका म्हणे अंतीं । कांहीं न लगे चि हातीं ।।५।।

२०८५
लय लक्षूनियां जालों म्हणती देव । तो ही नव्हे भाव सत्य जाणा ।।१।।
जालों बहुश्रुत न लगे आतां कांहीं । नको राहूं ते ही निश्चितीनें ।।धृ।।
तपें दान काय मानिसी विश्वास । बीज फळ त्यास आहे पुढें ।।२।।
कर्म आचरण यातीचा स्वगुण । विशेष तो गुण काय तेथें ।।३।।
तुका म्हणे जरी होईल निष्काम । तरि च होय राम देखे डोळां ।।४।। ।।५।।

२०८६
पुरली धांव कडिये घेईं । पुढें पायीं न चलवीं ।।१।।

कृपाळुवे पांडुरंगे । अंगसंगे जिवलगे ।।धृ।।
अवघी निवारावी भूक। अवघ्या दुःख जन्माचें ।।२।।
तुका म्हणे बोलवेना । लावीं स्तनां विश्वरें ।।३।।

२०८७
जें जें मना वाटे गोड । तें तें कोड पुरविसी ।।१।।
आतां तूं चि बाह्यात्कारीं । अवघ्यापरी जालासी ।।धृ।।
नाहीं सायासाचें काम । घेतां नाम आवडी ।।२।।
तुका म्हणे सर्वसांगे । पांडुरंगे दयाळे ।।३।।

२०८८
जेथें माझी दृष्टि जाय । तेथें पाय भावीन ।।१।।
असेन या समाधानें । पूजा मनें करीन ।।धृ।।
अवघा च अवघे देसी। सुख घेवविसी संपन्न ।।२।।
तुका म्हणे बंधन नाहीं । ऐसें कांहीं ते करूं ।।३।।
।।३।।

२०८९
नातुडे जो कवणे परी । उभा केला विटेवरी ।।१।।
भला भला पुंडलिका । मानलासी जनलोकां ।।धृ।।
कोण्या काळें सुखा। ऐशा कोण पावता ।।२।।
अवघा आणिला परिवार । गोपी गोपाळांचा भार ।।३।।
तुका म्हणे धन्य जालें । भूमी वैकुंठ आणिलें।।४।।

२०९०
अवघे चुकविले सायास । तप रासी जीवा नास।।१।।
जीव देऊनियां बळी । अवघीं तारिलीं दुर्बळीं । केला भूमंडळीं । माजी थोर पवाडा ।।धृ।।
कांहीं न मगे याची गती । लुटवितो जगा हातीं ।।२।।
तुका म्हणे भक्तराजा । कोण वर्णी पार तुझा ।।३।।

२०९१
प्रमाण हें त्याच्या बोला । देव भक्तांचा अंकिला।।१।।

न पुसतां जातां नये । खालीं बैसतां ही भिये ।।धृ।।
अवघा त्याचा होत । जीव भावाही सहित ।।२।।
वदे उपचाराची वाणी । कांहीं माग म्हणऊनि ।।३।।
उदासीनाच्या लागें । तुका म्हणे धांवे मागें।।४।।

२०९२
कांहीं न मागती देवा । त्यांची करूं धांवे सेवा ।।१।।
हळूहळू फेडी ॠण । होऊनियां रूपें दीन ।।धृ।।
होऊं न सके वेगळा । क्षण एक त्यां निराळा ।।२।।
तुका म्हणे भक्तिभाव । हा चि देवाचा ही देव ।।३।।

२०९३
जाणे अंतरिंचा भाव । तो चि करितो उपाव ।।१।।
न लगें सांगावें मांगावें ।।
जीवें भावें अनुसरावें । अविनाश घ्यावें। फळ धीर धरोनि ।।धृ।।
बाळा न मागतां भोजन । माता घाली पाचारून ।।२।।
तुका म्हणे तरी । एकीं लंघियेले गिरी ।।३।।

२०९४
आम्ही नाचों तेणें सुखें । वाऊं टाळी गातों मुखें।।१।।
देव कृपेचा कोंवळा । शरणागता पाळी लळा ।।धृ।।
आम्हां जाला हा निर्धार । मागें तारिलें अपार ।।२।।
तुका म्हणे संतीं । वर्म दिलें आम्हां हातीं ।।३।।

२०९५
जालों निर्भर मानसीं । म्हणऊनि कळलासी ।।१।।
तुझे म्हणविती त्यांस । भय चिंता नाहीं आस ।।धृ।।
चुकविसी पाश । गर्भवासयातना ।।२।।
तुझें जाणोनियां वर्म । कंठीं धरियेलें नाम ।।३।।
तुका म्हणे तेणें सुखें । विसरलों जन्मदुःख ।।४।।
।।७।।

२०९६

नको दुष्टसंग । पडे भजनामधीं भंग ।।१।।
काय विचार देखिला । सांग माझा तो विठ्ठला ।।धृ।।
तुज निषेधितां । मज न साहे सर्वथा ।।२।।
एका माझ्या जीवें । वाद करूं कोणासवें।।३।।
तुझे वर्णूं गुण । कीं हे राखों दुष्टजन ।।४।।
काय करूं एका। मुखें सांग म्हणे तुका ।।५।।

२०९७
विठ्ठल माझी माय । आम्हां सुखा उणें काय ।।१।।
घेतों अमृताची धनी । प्रेम वोसंडलें स्तनीं ।।धृ।।
क्रीडों वैष्णवांच्या मेळीं । करूं आनंदाच्या जळीं ।।२।।
तुका म्हणे कृपावंत । ठेवीं आम्हांपाशीं चित्त ।।३।।

२०९८
भक्तिसुखें जे मातले । ते कळिकाळा शूर जाले।।१।।
हातीं बाण हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे ।।धृ।।
महां दोषां आला त्रास । जन्ममरणां केला नाश ।।२।।
सहस्त्रनामाची आरोळी। एक एकाहूनि बळी ।।३।।
नाहीं आणिकांचा गुमान । ज्याचें अंकित त्यावांचून ।।४।।
तुका म्हणे त्यांच्या घरीं । मोक्षसिद्धी या कामारी।।५।। ।।३।।

२०९९
पंधरां दिवसां एक एकादशी । कां रे न करिसी व्रतसार ।।१।।
काय तुझा जीव जातो एका दिसें । फराळाच्या मिसें धणी घेसी ।।धृ।।
स्वहित कारण मानवेल जन । हरिकथा पूजन वैष्णवांचें ।।२।।
थोडे तुज घरीं होती उजगरे । देउळासी कां रे मरसी जातां ।।३।।
तुका म्हणे कां रे सकुमार जालासी । काय जाब देसी यमदूतां ।।४।।

२१००
कथा हें भूषण जनामध्यें सार । तरले अपार बहुत येणें ।।१।।
नीचिये कुळींचा उंचा वंद्य होय । हरीचे जो गाय गुणवाद ।।धृ।।
देव त्याची माथां वंदी पायधुळी । दीप झाला कुळीं वंशाचिये ।।२।।

त्याची निंदा करी त्याची कुष्ठ वाणी । मुख संवदणी रजकाची ।।३।।
तुका म्हणे नाहीं चोरीचा व्यापार । विठ्ठलाचें सार नाम ध्यावें ।।४।।

२१०१
टाळघोळ सुख नामाचा गजर । घोषें जेजेकार ब्रम्हानंदु।।१।।
गरुडटके दिंडी पताकांचे भार । आनंद अपार ब्रम्हादिकां।।धृ।।
आनंदें वैष्णव जाती लोटांगणीं । एक एकाहुनि भद्रजाति ।।२।।
तेणें सुखें सुटे पाषाणां पाझर । नष्ट खळ नर शुद्ध होती ।।३।।
तुका म्हणे सोपें वैकुंठवासी जातां । रामकृष्ण कथा हे ची वाट ।।४।। ।।३।।

२१०२
देखोवेखीं करिती गुरू । नाहीं ठाउका विचारु।।१।।
वर्म तें न पडे ठायीं । पांडुरंगाविण कांहीं ।।धृ।।
शिकों कळा शिकों येती । प्रेम नाहीं कोणां हातीं ।।२।।
तुका म्हणे सार । भक्ति नेणती गव्हार ।।३।।

२१०३
भाग्यवंत म्हणों तयां । शरण गेले पंढरिराया ।।१।।
तरले तरले हा भरवसा । नामधारकांचा ठसा ।।धृ।।
भुक्तिमुक्तीचें तें स्थळ । भाविकनिर्मळ निर्मळ ।।२।।
गाइलें पुराणीं । तुका म्हणे वेदवाणी ।।३।।

२१०४
जैसें चित्त जयावरी । तैसें जवळी तें दुरी ।।१।।
न लगे द्यावा परिहार । या कोरडें उत्तर ।
असे अभ्यंतर । साक्षभूत जवळी ।।धृ।।
अवघें जाणे सूत्रधारी । कोण नाचे कोणे परी ।।२।।
तुका म्हणे बुद्धि । ज्याची ते च तया सिद्धि ।।३।।

२१०५
नाहीं पाइतन भूपतीशीं दावा । धिग त्या कर्तव्या आगी लागो ।।१।।
मुंगियांच्या मुखा गजाचा आहार । न साहावे भार जाय जीवें ।।२।।
तुका म्हणे आधीं करावा विचार । शूरपणें तीर मोकलावा ।।३।।

२१०६
तिन्ही लोक ऋणें बांधिले जयानें । सर्वसिद्धि केणें तये घरीं ।।१।।
पंढरीचोहोटां घातला दुकान । मांडियेले वान आवडीचे ।।धृ।।
आषाढी कार्तिकी भरियेले हाट । इनाम हे पेंठ घेतां देतां ।।२।।
मुक्ति कोणी तेथें हातीं नेघे फुका । लुटितील सुखा प्रेमाचिया ।।३।।
तुका म्हणे संतसज्जन भाग्याचें । अनंतां जन्मींचे सांटेकरी ।।४।।

२१०७
दुःखाचिये साटीं तेथें मिळे सुख । अनाथाची भूक दैन्य जाय ।।१।।
उदाराचा राणा पंढरीस आहे । उभारोनि बाहे पालवितो ।।१।।
जाणतियाहूनि नेणत्याची गोडी । आळिंगी आवडी करूनियां ।।२।।
शीण घेऊनियां प्रेम देतो साटी । न विचारी तुटी लाभा कांहीं ।।३।।
तुका म्हणे असों अनाथ दुबळीं । आम्हांसी तो पाळी पांडुरंग ।।४।।

२१०८
आणिक मात माझ्या नावडे जीवासी । काय करूं यासी पांडुरंगा ।।१।।
मुखा तें चि गोड श्रवणां आवडी । चित्त माझें ओढी तुझे पायीं ।।धृ।।
जये पदीं नाहीं विठ्ठलाचें नाम । मज होती श्रम आइकतां ।।२।।
आणिकाचें मज म्हणवितां लाज । वाटे हें सहज न बोलावें ।।३।।
तुका म्हणे मज तूं च आवडसी । सर्वभावेंविसीं पांडुरंगा ।।४।।

२१०९
कळेल हें तैसें गाईन मी तुज । जनासवें काज काय माझें ।।१।।
करीन मी स्तुती आपुले आवडी । जैसी माझ्या गोडी वाटे जीवा ।।धृ।।
होऊनी निर्भर नाचेन मी छंदें । आपुल्या आनंदें करूनियां ।।२।।
काय करूं कळा युक्ती या कुसरी । जाणिवेच्या परी सकळिका ।।३।।
तुका म्हणे माझें जयासवें काज । भोळा तो सहज पांडुरंग ।।४।।

२११०
तयासी नेणतीं बहु आवडती । होय जयां चित्तीं एक भाव ।।१।।
उपमन्यु धुरु हें काय जाणती । प्रल्हादाच्या चित्तीं नारायण ।।धृ।।
कोळें भिल्लें पशु श्वापदें अपारें । कृपेच्या सागरें तारियेलीं ।।२।।

काय तें गोपाळें चांगलीं शाहाणीं । तयां चक्रपाणी जेवी सवें ।।३।।
तुका म्हणे भोळा भाविक हा देव । आम्ही त्याचे पाव धरूनी ठेलों ।।४।।

२१११
न लगे पाहावें अबद्ध वांकडें । उच्चारावें कोडें नाम तुझें ।।१।।
नाहीं वेळ नाहीं पंडितांचा धाक । होत कां वाचक वेदवक्ते ।।धृ।।
पुराणीं ही कोठें न मिळे पाहातां । तैशीं या अनंता ठेवूं नामें ।।२।।
आपुलिया मना उपजे आनंद । तैसे करूं छंद कथेकाळीं ।।३।।
तुका म्हणे आम्ही आनंदें चि धालों । आनंद चि ल्यालों अळंकार ।।४।।

२११२
दैन्य दुःख आम्हां न येती जवळी । दहन हे होळी होती दोष ।।१।।
सर्व सुखें येती मानें लोटांगणीं । कोण यांसी आणी दृष्टीपुढें ।।धृ।।
आमुची आवडी संतसमागम । आणीक त्या नाम विठोबाचें ।।२।।
आमचें मागणें मागों त्याची सेवा । मोक्षाची निर्दैवा कोणा चाड ।।३।।
तुका म्हणे पोटीं सांटविला देव । नुन्य तो भाव कोण आम्हां ।।४।।

२११३
काळतोंडा सुना । भलतें चोरुनि करी जना ।।१।।
धिग त्याचें साधुपण । विटाळुनि वर्ते मन ।।धृ।।
मंत्र ऐसे घोकी । वश व्हावें जेणें लोकीं ।।२।।
तुका म्हणे थीत । नागवला नव्हे हित।।३।।

२११४
विठ्ठल मुक्तिदाता । नव्हे मरो हें बोलता ।।१।।
मज न साहावें कानीं । विष उत्तर लागे मनीं ।।धृ।।
हरीकथेतें धीकारी । शत्रु माझा तो वैरी ।।२।।
सुना काळतोंडा । जो या देवा म्हणे धोंडा।।३।।
अहं म्हणे ब्रम्ह । नेणे भक्तीचें तें वर्म ।।४।।
तुका म्हणे क्षण। नको तयाचें दर्षण ।।५।।

२११५
यमपुरी त्यांणीं वसविली जाणा । उच्छेद भजना विधी केला ।।१।।

अवघड कोणी न करी सांगतां । सुलभ बहुतां गोड वाटे ।।धृ।।
काय ते नेणते होते मागें ॠषी । आधार लोकांसी ग्रंथ केले ।।२।।
द्रव्य दारा कोणें स्थापियेलें धन । पिंडाचें पाळण विषयभोग ।।३।।
तुका म्हणे दोहीं ठायीं हा फजित । पावे यमदूतजना हातीं ।।४।।

२११६
न कळतां कोणीं मोडियेलें व्रत । तया प्रायश्चित्त चाले कांहीं ।।१।।
जाणतियां वज्रलेप जाले थोर । तयांस अघोर कुंभपाक ।।धृ।।
आतां जरी कोणी नाइके सांगतां । तया शिकवितां तें चि पाप ।।२।।
काय करूं मज देवें बोलविलें । माझें खोळंबिलें काय होतें ।।३।।
तुका म्हणे जना पाहा विचारूनी । सुख वाटे मनीं तें चि करा ।।४।।

२११७
वाचे विठ्ठल नाहीं । तो चि प्रेतरूप पाहीं ।।१।।
धिग त्याचें ज्यालेपण । भार न साहे मेदिन ।।धृ।।
न बैसे कीर्तनीं । गुण नाइके जो कानीं ।।२।।
जातां कांटाळे देउळा । तो चि सुना मुखकाळा ।।३।।
हरिभक्तीविण । त्याचें जळो शाहाणपण ।।४।।
तुका म्हणे तेणें । वंशा आणियेलें उणें ।।५।।

२११८
तारिलीं बहुतें चुकवूनि घात । नाम हें अमृत स्वीकारितां।।१।।
नेणतां सायास शुद्ध आचरण । यातीकुळहीन नामासाटीं ।।धृ।।
जन्म नांव धरी भक्तीच्या पाळणा । आकार कारणा या च साटीं ।।२।।
असुरीं दाटली पाप होतां फार । मग फेडी भार पृथिवीचा ।।३।।
तुका म्हणे देव भक्तपण सार । कवतुक- वेव्हार तयासाटीं ।।४।।

२११९
याचिया आधारें राहिलों निश्चिंत । ठेवूनियां चित्त पायीं सुखें ।।१।।
माझें सुखदुःख जाणे हित फार । घातलासे भार पांडुरंगा ।।धृ।।
कृपेचीं पोसणीं ठायींचीं अंखिलीं । म्हणऊनि लागली यास चिंता ।।२।।
मन राखे हातीं घेऊनियां काठी । इंद्रियें तापटीं फांकों नेदी ।।३।।
तुका म्हणे यासी अवघड नाहीं । शरणागता कांहीं रक्षावया ।।४।।

२१२०
उभाउभी फळ । अंगीं मंत्राचे या बळ ।।१।।
म्हणा विठ्ठल विठ्ठल । गोड आणि स्वल्प बोल ।।धृ।।
कळिकाळाची बाधा । नव्हे उच्चारितां सदा ।।२।।
तुका म्हणे रोग । वारे भवाऐसा भोग ।।३।।

२१२१
जैसा अधिकार । तैसें बोलावें उत्तर ।।१।।
काय वाउगी घसघस । आम्ही विठोबाचे दास ।।धृ।।
आम्ही जाणों एका देवा । जैसी तैसी करूं सेवा ।।२।।
तुका म्हणे भावें । माझें पुढें पडेल ठावें ।।३।।

२१२२
नव जातां घरा । आम्ही कोणाच्या दातारा ।।१।।
कां हे छळूं येती लोक । दाट बळें चि कंटक ।।धृ।।
नाहीं आम्ही खात। कांहीं कोणाचें लागत ।।२।।
कळे तैसी सेवा । तुका म्हणे करूं देवा ।।३।।

२१२३
मोहरोनी चित्ता । आणूं हळूं चि वरि हिता ।।१।।
तों हे पडती आघात । खोडी काढिती पंडित ।।धृ।।
संवसारा भेणें । कांहीं उसंती तों पेणें ।।२।।
एखादिया भावें । तुका म्हणे जवळी यावें ।।३।।

२१२४
काय जाणों वेद । आम्ही आगमाचे भेद ।।१।।
एक रूप तुझें मनीं । धरूनि राहिलों चिंतनी ।।धृ।।
कोठें अधिकार । नाहीं रानट विचार ।।२।।
तुका म्हणे दीना । नुपेक्षावें नारायणा।।३।।

२१२५
धर्माचे पाळण । करणें पाषांड खंडण ।।१।।

हें चि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ।।धृ।।
तीक्षण उत्तरें । हातीं घेउनि बाण फिरें ।।२।।
नाहीं भीड भार । तुका म्हणे साना थोर।।३।।

२१२६
निवडावें खडे । तरी दळण वोजें घडे ।।१।।
नाहीं तरि नासोनि जाय । कारण आळस उरे हाय ।।धृ।।
निवडावें तन। सेतीं करावें राखण ।।२।।
तुका म्हणे नीत । न विचारितां नव्हे हित।।३।।

२१२७
दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ।।१।।
लात हाणोनियां वारी । गुंड वाट शुद्ध करी ।।धृ।।
बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ।।२।।
तुका म्हणे नखें । काढुनि टाकिजेती सुखें ।।३।।

२१२८
नका धरूं कोणी । राग वचनाचा मनीं ।।१।।
येथें बहुतांचें हित । शुद्ध करोनि राखा चित्त ।।धृ।।
नाहीं केली निंदा । आम्हीं दुसिलेंसे भेदा ।।२।।
तुका म्हणे मज । येणें विण काय काज।।३।।

२१२९
कांहीं जडभारी । पडतां ते अवश्वरी ।।१।।
तुज आठवावे पाय । आम्हीं मोकलूनि धाय ।।धृ।।
तान पीडी भूक । शीत उष्ण वाटे दुःख ।।२।।
तुका म्हणे लाड । तेथें पुरे माझें कोड।।३।।

२१३०
होउनि कृपाळ । भार घेतला सकळ ।।१।।
तूं चि चालविसी माझें । भार सकळ ही ओझें ।।धृ।।
देह तुझ्या पायीं । ठेवुनि झालों उतराई ।।२।।
कायावाचामनें । तुका म्हणे दुजें नेणें।।३।।

२१३१
आतां होईं माझे बुद्धीचा जनिता । अवरावें चित्ता पांडुरंगा ।।१।।
येथूनियां कोठें न वजें बाहेरी । ऐसें मज धरीं सत्ताबळें ।।धृ।।
अनावर गुण बहुतां जातींचे । न बोलावें वाचे ऐसें करीं ।।२।।
तुका म्हणे हित कोणिये जातीचें । तुज ठावें साचें मायबापा ।।३।।

२१३२
नित्य मनासी करितों विचार । तों हें अनावर विषयलोभी।।१।।
आतां मज राखें आपुलिया बळें । न देखें हे जाळें उगवतां ।।धृ।।
सांपडलों गळीं नाहीं त्याची सत्ता । उगळी मागुता घेतला तो ।।२।।
तुका म्हणे मी तों अज्ञान चि आहें । परि तुझी पाहें वास देवा ।।३।।

२१३३
दुर्बळाचे हातीं सांपडलें धन । करितां जतन नये त्यासी ।।१।।
तैसी परी मज झाली नारायणा । योगक्षेम जाणां तुम्ही आतां ।।धृ।।
खातां लेतां नये मिरवितां वरि । राजा दंड करी जनराग ।।२।।
तुका म्हणे मग तळमळ उरे । देखिलें तें झुरे पाहावया ।।३।।

२१३४
मागें जैसा होता माझे अंगीं भाव । तैसा एक ठाव नाहीं आतां ।।१।।
ऐसें गोही माझें मन मजपाशीं । तुटी मुदलेंसी दिसे पुढें ।।धृ।।
पुढिलांचे मना आणि गुणदोष । पूज्य आपणांस करावया ।।२।।
तुका म्हणे जाली कोंबड्याची परी । पुढें चि उकरी लाभ नेणें ।।३।।

२१३५
किती तुजपाशीं देऊं परिहार । जाणसी अंतर पांडुरंगा।।१।।
आतां माझें हातीं देईं हित । करीं माझें चित्त समाधान।।धृ।।
राग आला तरी कापूं नये मान । बाळा मायेविण कोण दुजें ।।२।।
तुका म्हणे ऐसा होईल लौकिक । मागे बाळ भीक समर्थाचें ।।३।।

२१३६
लाज वाटे पुढें तोंड दाखवितां । परि जाऊं आतां कोणापाशी ।।१।।

चुकलिया काम मागतों मुशारा । लाज फजितखोरा नाहीं मज ।।धृ।।
पाय सांडूनिया फिरतों बासर । स्वामिसेवे चोर होऊनियां ।।२।।
तुका म्हणे मज पाहिजे दंडिलें । पुढें हे घडलें न पाहिजे ।।३।।

२१३७
पुढिलिया सुखें निंब देतां भले । बहुत वारलें होय दुःख ।।१।।
हें तों वर्म असे माउलीचे हातीं । हाणी मारी प्रीती हितासाठीं ।।धृ।।
खेळतां विसरे भूक तान घर । धरूनियां कर आणी बळें ।।२।।
तुका म्हणे पाळी तोंडींचिया घांसें । उदार सर्वस्वें सर्वकाळ ।।३।।

२१३८
आतां गुण दोष काय विचारिसी । मी तों आहे रासी पातकांची ।।१।।
पतितपावनासवें समागम । अपुलाला धर्म चालवीजे।।धृ।।
घनघायें भेटी लोखंडपरिसा । तरी अनारिसा न पालटे ।।२।।
तुका म्हणे माती कोण पुसे फुका । कस्तुरीच्या तुका समागमें ।।३।।

२१३९
कृपावंता दुजें नाहीं तुम्हां पोटीं । लाडें बोलें गोठी सुख मातें ।।१।।
घेउनि भातुकें लागसील पाठी । लाविसील ओंठीं ब्रम्हरस ।।धृ।।
आपुलिये पांख घालिसी पाखर । उदार मजवर कृपाळू तूं ।।२।।
तुका म्हणे आम्हांकारणें गोविंदा । वागविसी गदा सुदर्शन ।।३।।

२१४०
पाळिलों पोसिलों जन्मजन्मांतरीं । वागविलों करीं धरोनियां ।।१।।
आतां काय माझा घडेल अव्हेर । मागें बहु दूर वागविलें ।।धृ।।
नेदी वारा अंगीं लागों आघाताचा । घेतला ठायींचा भार माथां ।।२।।
तुका म्हणे बोल करितों आवडी । अविट ते चि गोडी अंतरींची ।।३।।

२१४१
पांडुरंगा कांहीं आइकावी मात । न करावें मुक्त आतां मज ।।१।।
जन्मांतरें मज तैसीं देईं देवा । जेणें चरणसेवा घडे तुझी ।।धृ।।
वाखाणीन कीर्ती आपुलिया मुखें । नाचेन मी सुखें तुजपुढें ।।२।।
करूनि कामारी दास दीनाहुनी । आपुला अंगणीं ठाव मज ।।३।।

तुका म्हणे आम्ही मृत्युलोकीं भले । तुझे चि अंखिले पांडुरंगा ।।४।।

२१४२
माझे अंतरींचें तो चि जाणे एक । वैकुंठनायक पांडुरंग ।।१।।
जीव भाव त्याचे ठेवियेला पायीं । मज चिंता नाहीं कवणेविशीं ।।धृ।।
सुखसमारंभें संतसमागमें । गाऊं वाचे नाम विठोबाचें ।।२।।
गातां पुण्य होय आइकतां लाभ । संसारबंद तुटतील ।।३।।
तुका म्हणे जीव तयासी विकिला । आणीक विठ्ठलाविण नेणें ।।४।।

२१४३
कथा दुःख हरी कथा मुक्त करी । कथा याची बरी विठोबाची ।।१।।
कथा पाप नासी उद्धरिले दोषी । समाधि कथेसी मूढजना ।।धृ।।
कथा तप ध्यान कथा अनुष्ठान । अमृत हे पान हरिकथा ।।२।।
कथा मंत्रजप कथा हरी ताप । कथाकाळी कांप कळिकाळासी ।।३।।
तुका म्हणे कथा देवाचें ही ध्यान । समाधि लागोन उभा तेथें ।।४।।
।।१३।।

२१४४
काय ऐसा सांगा । धर्म मज पांडुरंगा ।।१।।
तुझे पायीं पावें ऐसा । जेणें उगवे हा फांसा ।।धृ।।
करीं कृपादान । तैसें बोलवीं वचन ।।२।।
तुका म्हणे देवा । माझें हृदय वसवा ।।३।।

२१४५
भला म्हणे जन । परि नाहीं समाधान ।।१।।
माझें तळमळी चित्त । अंतरलें दिसे हित ।।धृ।।
कृपेचा आधार । नाहीं दंभ जाला भार ।।२।।
तुका म्हणे कृपे । अंतराय कोण्या पापें ।।३।।

२१४६
शिकविले बोल । बोलें तैसी नाहीं ओल ।।१।।
आतां देवा संदेह नाहीं । वांयां गेलों यासी कांहीं ।।धृ।।
एकांताचा वास । नाहीं संकल्पाचा नास ।।२।।

बुद्धि नाहीं स्थिर । तुका म्हणे शब्दा धीर ।।३।।

२१४७
उचिताचा दाता । कृपावंता तूं अनंता ।।१।।
कां रे न घालिसी धांव । तुझें उच्चारितां नांव ।।धृ।।
काय बळयुक्ति । नाहीं तुझे अंगीं शक्ति ।।२।।
तुका म्हणे तूं विश्वंभर । ओस माझें कां अंतर ।।३।।

२१४८
वाहवितों पुरीं । आतां उचित तें करीं ।।१।।
माझी शक्ति नारायणा । कींव भाकावी करुणा ।।धृ।।
आम्हां ओढी काळ। तुझें क्षीण झालें बळ ।।२।।
तुका म्हणे गोडी । जीवा मातेचिया ओढी ।।३।।

२१४९
आतां घेईं माझें । भार सकळ ही ओझें ।।१।।
काय करिसी होई वाड । आलों पोटासीं दगड ।।धृ।।
तूं चि डोळे वाती। होई दीपक सांगातीं ।।२।।
तुका म्हणे कांहीं । विचाराया चाड नाहीं।।३।।

२१५०
असोत हे बोल । अवघें तूं चि भांडवल ।।१।।
माझा मायबाप देवा । सज्जन सोयरा केशवा ।।धृ।।
गाळियेले भेद । सारियेले वादावाद ।।२।।
तुका म्हणे मधीं । आतां न पडे उपाधि।।३।।

२१५१
करीन कोल्हाळ । आतां हा चि सर्वकाळ ।।१।।
आतां ये वो माझे आई । देईं भातुकें विठाई ।।धृ।।
उपायासी नाम। दिलें याचें पुढें क्षेम ।।२।।
बीज आणि फळ । हें चि तुका म्हणे मूळ।।३।।

२१५२

धनासीं च धन । करी आपण जतन ।।१।।
तुज आळवितां गोडी । पांडुरंगा खरी जोडी ।।धृ।।
जेविल्याचें खरें । वरी उमटे ढेंकरें ।।२।।
तुका म्हणे धाय । तेथें कोठें उरे हाय ।।३।।

२१५३
अनुभवा आलें । माझें चित्तींचें क्षरलें ।।१।।
असे जवळी अंतर । फिरे आवडीच्या फेरें ।।धृ।।
खादलें चि वाटे । खावें भेटलें चि भेटे ।।२।।
तुका म्हणे उभें । आम्ही राखियेलें लोभें।।३।।
।।१०।।

२१५४
पोटीं शूळ अंगीं उटी चंदनाची । आवडी सुखाची कोण तया ।।१।।
तैसें मज कां गा केलें पंढरिराया । लौकिक हा वांयां वाढविला ।।धृ।।
ज्वरिलियापुढें वाढिलीं मिष्टान्नें । काय चवी तेणें घ्यावी त्याची ।।२।।
तुका म्हणे मढें शृंगारिलें वरी । ते चि जाली परी मज देवा ।।३।।

२१५५
बेगडाचा रंग राहे कोण काळ । अंगें हें पितळ न देखतां ।।१।।
माझें चित्त मज जवळीच गो ही । तुझी मज नाहीं भेटी ऐसें ।।धृ।।
दासीसुतां नाहीं पितियाचा ठाव । अवघें चि वाव सोंग त्याचें ।।२।।
तुका म्हणे माझी केली विटंबना । अनुभवें जना येईल कळों ।।३।।

२१५६
मजपुढें नाहीं आणीक बोलता । ऐसें कांहीं चित्ता वाटतसें ।।१।।
याचा कांहीं तुम्हीं देखा परिहार । सर्वज्ञ उदार पांडुरंगा ।।धृ।।
काम क्रोध नाहीं सांडिलें आसन । राहिले वसोन देहामध्यें ।।२।।
तुका म्हणे आतां जालों उतराई । कळों यावें पायीं निरोपिलें ।।३।।

२१५७
सावित्रीची विटंबण । रांडपण करीतसे ।।१।।
काय जाळावें तें नांव । अवघें वाव असे तें ।।धृ।।

कुबिर नांव मोळी वाहे। कैसी पाहें फजिती ।।२।।
तुका म्हणे ठुणगुण देखें । उगीं मूर्ख कांुफ्दतां ।।३।।

२१५८
न गमेसी जाली दिवसरजनी । राहिलों लाजोनि नो बोलावें ।।१।।
रुचिविण काय शब्द वाऱ्या माप । अनादरें कोप येत असे ।।धृ।।
आपुलिया रडे आपुलें चि मन । दाटे समाधान पावतसें।।२।।
तुका म्हणे तुम्ही असा जी जाणते । काय करूं रिते वादावाद ।।३।।

२१५९
मेल्यावरि मोक्ष संसारसंबंधें । आरालिया बधे ठेवा आम्हां ।।१।।
वागवीत संदेह राहों कोठवरी । मग काय थोरी सेवकाची ।।धृ।।
गाणें गीत आम्हां नाचणें आनंदें । प्रेम कोठें भेदें अंगा येतें ।।२।।
तुका म्हणे किती सांगावे दृष्टांत । नसतां तूं अनंत सानकुळ ।।३।।

२१६०
एकाएकीं आतां असावेंसें वाटे । तरि च हे खोटे चाळे केले ।।१।।
वाजवूनि तोंड घातलों बाहेरी । कुल्प करुनी दारीं माजी वसा ।।धृ।।
उजेडाचा केला दाटोनि अंधार । सवें हुद्देदार चेष्टाविला ।।२।।
तुका म्हणे भय होतें तों चि वरी । होती कांहीं उरी स्वामिसेवा ।।३।।

२१६१
काय नव्हेसी तूं एक । देखों कासया पृथक ।।१।।
मुंग्या कैंचे मुंगळे । नटनाट्य तुझे चाळे ।।धृ।।
जाली तरी मर्यादा। किंवा त्रासावें गोविंदा ।।२।।
तुका म्हणे साचा । कोठें जासी ह्रदयींचा।।३।।

२१६२
कां जी वाढविलें । न लगतां हें उगलें ।।१।।
आतां मानितां कांटाळा । भोवतीं मिळालिया बाळा ।।धृ।।
लावूनियां सवे। पळतां दिसाल बरवे ।।२।।
तुका म्हणे बापा । येतां न कळा चि रूपा ।।३।।

।।३।।

२१६३
क्षुधेलिया अन्न । द्यावें पात्र न विचारून ।।१।।
धर्म आहे वर्मा अंगीं । कळलें पाहिजे प्रसंगीं ।।धृ।।
द्रव्य आणि कन्या। येथें कुळ कर्म शोधण्या ।।२।।
तुका म्हणे पुण्य गांठी । तरि च उचितासी भेटी ।।३।।

२१६४
वेचावें तें जीवें । पूजा घडे ऐशा नावें ।।१।।
बिगारीची ते बिगारी । साक्षी अंतरींचा हरी ।।धृ।।
फळ बीजाऐसें । कार्यकारणासरिसें ।।२।।
तुका म्हणे मान । लवणासारिखें लवण।।३।।

२१६५
मज नाहीं धीर । तुम्ही न करा अंगीकार ।।१।।
ऐसें पडिलें विषम । बळी देवाहूनि कर्म ।।धृ।।
चालों नेणें वाट । केल्या न पवा बोभाट ।।२।।
वेचों नेणे जीवें । तुका उदास धरिला देवें।।३।।

२१६६
तळमळी चित्त दर्शनाची आशा । बहु जगदीशा करुणा केली ।।१।।
वचनीं च संत पावले स्वरूप । माझें नेदी पाप योगा येऊं ।।धृ।।
वेठीऐसा करीं भक्तिवेवसाव । न पवे चि जीव समाधान ।।२।।
तुका म्हणे कई देसील विसांवा । पांडुरंगे धांवा घेतें मन ।।३।।
।।४।।

२१६७
हागतां ही खोडी । चळण मोडवितें काडी ।।१।।
ऐसे अनावर गुण । आवरावे काय म्हूण ।।धृ।।
नाहीं जरी संग । तरी बडबडविती रंग ।।२।।
तुका म्हणे देवा । तुमची न घडे चि सेवा ।।३।।
।।१।।

२१६८
देह निरसे तरी । बोलावया नुरे उरी ।।१।।
येर वाचेचें वाग्जाळ । अळंकारापुरते बोल ।।धृ।।
काचें तरी कढे । जाती ऐसें चित्त ओढे ।।२।।
विष्णुदास तुका । पूर्ण धनी जाणे चुका।।३।।

२१६९
खोट्याचा विकरा । येथें नव्हे कांच हिरा ।।१।।
काय दावायाचें काम । उगा च वाढवावा श्रम ।।धृ।।
परीक्षकाविण । मिरवों जाणों तें तें हीण ।।२।।
तुका पायां पडे । वाद पुरे हे झगडे।।३।।
।।२।।

२१७०
पंढरीस घडे अतित्यायें मृत्य । तो जाय पतित अधःपाता ।।१।।
दुराचारें मोक्ष सुखाचे वसति । भोळी बाळमूर्ति पांडुरंग ।।धृ।।
केला न सहावे तीर्थउपवास । कथेविण दोषसाधन तें ।।२।।
कालियापें भेद मानितां निवडे । श्रोत्रियांसी जोडे आंतेजेता।।३।।
माहेरीं सलज्ज ते जाणा सिंदळी । काळिमा काजळी पावविते ।।४।।
तुका म्हणे तेथें विश्वास जतन । पुरे भीमास्नान सम पाय ।।५।।
।।१।।

२१७१
चातुर्याच्या अनंतकळा । सत्या विरळा जाणत ।।१।।
हांसत्यासवें हांसे जन । रडतां भिन्न पालटे ।।धृ।।
जळो ऐसे वांजट बोल । गुणां मोल भूस मिथ्या ।।२।।
तुका म्हणे अंधळ्याऐसें । वोंगळ पिसें कौतुक ।।३।।

२१७२
नयो वाचे अनुचित वाणी । नसो मनीं कुडी बुद्धि।।१।।
ऐसें मागा अरे जना । नारायणा विनवूनि ।।धृ।।
कामक्रोधां पडो चिरा । ऐसा बरा सायास ।।२।।
तुका म्हणे नानाछंदें । या विनोदें न पडावें ।।३।।

२१७३
माझिया देहाची मज नाहीं चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ।।१।।
इच्छितां ते मान मागा देवापासीं । आसा संचितासी गुंपले हो ।।धृ।।
देह आम्ही केला भोगाचे सांभाळीं । राहिलों निराळीं मानामानां ।।२।।
तुका म्हणे कोणें वेचावें वचन । नसतां तो सीण वाढवावा ।।३।।

२१७४
धरितां इच्छा दुरी पळे । पाठी सोहळे उदासा ।।१।।
म्हणऊनि असट मन । नका खुण सांगतों ।।धृ।।
आविसापासी अवघें वर्म । सोस श्रम पाववी ।।२।।
तुका म्हणे बीज न्यावें । तेथें यावें फळानें ।।३।।
।।४।।

२१७५
वेद शास्त्र नाहीं पुराण प्रमाण । तयाचें वदन नावलोका।।१।।
ताकिर्याचें अंग आपणा पारिखें । माजिऱ्यासारिखें वाईचाळे ।।धृ।।
माता निंदी तया कोण तो आधार । भंगलें खपर याचे नावें ।।२।।
तुका म्हणे आडराणें ज्याची चाली । तयाची ते बोली मिठेंविण ।।३।।

२१७६
कस्तुरीचें अंगीं मीनली मृत्तिका । मग वेगळी कां येईल लेखूं ।।१।।
तयापरि भेद नाहीं देवभक्तीं । संदेहाच्या युक्ति सरों द्याव्या ।।धृ।।
इंधनें ते आगी संयोगाच्या गुणें । सागरा दरुषणें वाहाळ तों चि ।।२।।
तुका म्हणे माझें साक्षीचें वचन । येथें तों कारण शुद्ध भाव ।।३।।

२१७७
भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रम्हीं भोग ब्रम्हतनु ।।१।।
देहाच्या निरसनें पाविजे या ठाया । माझी ऐसी काया जंव नव्हे ।।धृ।।
उदक अग्नि धान्य जाल्या घडे पाक । एकाविण एक कामा नये ।।२।।
तुका म्हणे मज केले ते चांचणी । बडबडीची वाणी अथवा सत्य ।।३।।
।।३।।

२१७८
श्रीसंतांचिया माथा चरणांवरी । साष्टांग हें करीं दंडवत ।।१।।
विश्रांती पावलों सांभाळउत्तरीं । वाढलें अंतरीं प्रेमसुखें।।धृ।।
डौरली हे काया कृपेच्या वोरसें । नव्हे अनारिसें उद्धरलों ।।२।।
तुका म्हणे मज न घडतां सेवा । पूर्वपुण्यठेवा वोडवला ।।३।।

२१७९
नेणों काय नाड । आला उचित काळा आड ।।१।।
नाहीं जाली संतभेटी । येवढी हानी काय मोठी ।।धृ।।
सहज पायांपासीं । जवळी पावलिया ऐसी ।।२।।
चुकी जाली आतां काय। तुका म्हणे उरली हाय ।।३।।

२१८०
आणीक कांहीं नेणें । असें पायांच्या चिंतनें ।।१।।
माझा न व्हावा विसर । नाहीं आणीक आधार ।।धृ।।
भांडवल सेवा। हा चि ठेवियेला ठेवा ।।२।।
करीं मानभावा । तुका विनंती करी देवा ।।३।।

२१८१
आरुश माझी वाणी बोबडीं उत्तरें । केली ते लेकुरें सलगी पायीं ।।१।।
करावें कवतुक संतीं मायबापीं । जीवन देउनि रोपीं विस्तारिजे ।।धृ।।
आधारें वदली प्रसादाची वाणी । उच्छिष्टसेवणी तुमचिया ।।२।।
तुका म्हणे हे चि करितों विनंती । मागोनि पुढती सेवादान
।।३।। ।।४।।

२१८२
पुरुषा हातीं कंकणचुडा । नवल दोडा वृत्ति या ।।१।।
पाहा कैसी विटंबणा । नारायणा देखिली ।।धृ।।
जळो ऐसी ब्रिदावळी। भाटवोळीपणाची ।।२।।
तुका म्हणे पाहों डोळां । अवकळा नये हे।।३।।

२१८३
वितीयेवढेंसें पोट । केवढा बोभाट तयाचा ।।१।।

जळो याची विटंबना । भूक जना नाचवी ।।धृ।।
अभिमान सिरीं भार । जाले खर तृष्णेचे ।।२।।
तुका म्हणे नरका जावें । हा चि जीवें व्यापार ।।३।।

२१८४
सेवटासी जरी आलें । तरी जालें आंधळें ।।१।।
स्वहिताचा लेश नाहीं । दगडा कांहीं अंतरीं ।।धृ।।
काय परिसासवें भेटी । खापरखुंटी जालिया ।।२।।
तुका म्हणे अधम जन । अवगुणें चि वाढवी ।।३।।

२१८५
प्रायश्चित्तें देतो तुका । जातो लोकां सकळां ।।१।।
धरितील ते तरती मनीं । जाती घाणी वांयां त्या ।।धृ।।
निग्रहअनुग्रहाचे ठाय । देतो घाय पाहोनि ।।२।।
तुका जाला नरसिंहीं । भय नाहीं कृपेनें ।।३।।
।।४।।

२१८६
दुर्जनाचें अंग अवघें चि सरळ । नर्काचा कोथळ सांटवण ।।१।।
खाय अमंगळ बोले अमंगळ । उठवी कपाळ संघष्टणें ।।धृ।।
सर्पा मंत्र चाले धरावया हातीं । खळाची ते जाती निखळे चि ।।२।।
तुका म्हणे कांहीं न साहे उपमा । आणीक अधमा वोखट्याची ।।३।।

२१८७
ऐका जी संतजन । सादर मन करूनि ।।१।।
सकळांचें सार एक । कंटक ते तजावे ।।धृ।।
विशेषता कांद्याहूनि । सेवित्या घाणी आगळी ।।२।।
तुका म्हणे ज्याची जोडी । ते परवडी बैसीजे।।३।।

२१८८
आज्ञा पाळुनियां असें एकसरें । तुमचीं उत्तरें संतांचीं हीं ।।१।।
भागवूनि देह ठेवियेला पायीं । चरणावरि डोई येथुनें चि।।धृ।।
येणें जाणें हें तों उपाधीचे मूळ । पूजा ते सकळ अकर्तव्य ।।२।।

तुका म्हणे असें चरणींचा रज । पदीं च सहज जेथें तेथें ।।३।। ।।३।।

२१८९
न संडावा ठाव । ऐसा निश्चयाचा भाव ।।१।।
आतां पुरे पुन्हा यात्रा । हें चि सारूनि सर्वत्रा ।।धृ।।
संनिध चि सेवा । असों करुनियां देवा ।।२।।
आज्ञेच्या पाळणें । असें तुका संतां म्हणे।।३।।

२१९०
उपाधीजें बीज । जळोनि राहिलें सहज ।।१।।
आम्हां राहिली ते आतां । चाली देवाचिया सत्ता ।।धृ।।
प्राधीन तें जिणें । केलें सत्ता नारायणें ।।२।।
तुका म्हणे जाणें पाय । खुंटले आणीक उपाय ।।३।।

२१९१
गोविंदावांचोनि वदे ज्याची वाणी । हगवण घाणी पिटपिट ते ।।१।।
मस्तक सांडूनि सिसफूल गुडघां । चार तो अवघा बावळ्याचा ।।धृ।।
अंगभूत म्हूण पूजितो वाहाणा । म्हणतां शाहाणा येइल कैसा ।।२।।
तुका म्हणे वेश्या सांगे सवासिणी । इतर पूजनीं भाव तैसा ।।३।।

२१९२
कुतऱ्याऐसें ज्याचें जिणें । संग कोणी न करीजे।।१।।
जाय तिकडे हाडहाडी । गोऱ्हवाडी च सोइरीं ।।धृ।।
अवगुणांचा त्याग नाहीं । खवळे पाहीं उपदेशें ।।२।।
तुका म्हणे कैंची लवी । ठेंग्या केवीं अंकुर ।।३।।

२१९३
सर्वथा ही खोटा संग । उपजे भंग मनासी ।।१।।
बहु रंगें भरलें जन । संपन्न चि अवगुणी ।।धृ।।
सेविलिया निःकामबुद्धी। मदें शुद्धी सांडवी ।।२।।
त्रासोनियां बोले तुका । आतां लोकां दंडवत ।।३।।
।।५।।

२१९४
उपचारासी वांज जालों । नका बोलों यावरी ।।१।।
असेल तें असो तैसें । भेटीसरिसें नमन ।।धृ।।
दुसऱ्यामध्यें कोण मिळे । छंद चाळे बहु मतें ।।२।।
एकाएकीं आतां तुका । लौकिका या बाहेरी ।।३।।

२१९५
मी तें मी तूं तें तूं । कुंकुड हें लाडसी ।।१।।
वचनासी पडो तुटी । पोटींचें पोटीं राखावें ।।धृ।।
तेथील तेथें येथील येथें । वेगळ्या कुंथे कोण भारें ।।२।।
याचें यास त्याचें त्यास । तुक्यानें कास घातली ।।३।।
।।२।।

२१९६
लाडाच्या उत्तरीं वाढविती कलहे । हा तो अमंगळ जातिगुण ।।१।।
तमाचे शरीरीं विटाळ चि वसे । विचाराचा नसे लेश तो ही ।।धृ।।
कवतुकें घ्यावे लेंकराचे बोल । साहिलिया मोल ऐसें नाहीं ।।२।।
तुका म्हणे काय उपदेश खळा । न्हाउनि काउळा खतें धुंडी ।।३।।

२१९७
आतां मज देवा । इचे हातींचें सोडवा ।।१।।
पाठी लागलीसे लांसी । इच्छा जिते जैसी तैसी ।।धृ।।
फेडा आतां पांग। अंगीं लपवुनी अंग ।।२।।
दुजें नेणें तुका । कांहीं तुम्हासी ठाउका।।३।।

२१९८
बहु वाटे भये । माझे उडी घाला दये ।।१।।
फांसा गुंतलों लिगाडीं । न चले बळ चरफडी ।।धृ।।
कुंटित चि युक्ति । माझ्या जाल्या सर्व शक्ति ।।२।।
तुका म्हणे देवा । काममोहें केला गोवा ।।३।।
।।३।।

२१९९
विष्ठा भक्षी तया अमृत पारिखें । वोंगळ चि सखें वोंगळाचें ।।१।।
नये पाहों कांहीं गोन्हवाडीचा अंत । झणी ठाका संत दुर्जनापें ।।धृ।।
भेंसळीच्या बीजा अमंगळ गुण । उपजवी सीण दरुषणें ।।२।।
तुका म्हणे छी थूं जया घरीं धन । तेथें तें कारण कासयाचें ।।३।। ।।१।।

२२००
चावळलें काय न करी बडबड । न म्हणे फिकें गोड भुकेलें तें ।।१।।
उमजल्याविण न धरी सांभाळ । असो खळखळ जनाची हे ।।धृ।।
गरज्या न कळे आपुलिया चाडा । करावी ते पीडा कोणा काई ।।२।।
तुका म्हणे भोग भोगितील भोगें । संचित तें जोगें आहे कोणा ।।३।।

२२०१
आपुला तो देह आम्हां उपेक्षीत । कोठें जाऊं हित सांगों कोणा ।।१।।
कोण नाहीं दक्ष करितां संसार । आम्हीं हा विचार वमन केला ।।धृ।।
नाहीं या धरीत जीवित्वाची चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ।।२।।
तुका म्हणे असों चिंतोनियां देवा । मी माझें हा हेवा सारूनियां ।।३।। ।।२।।

२२०२
चाकरीवांचून । खाणें अनुचित वेतन ।।१।।
धणी काढोनियां निजा । करील ये कामाची पूजा ।।धृ।।
उचितावेगळें । अभिलाषें तोंड काळें ।।२।।
सांगे तरी तुका । पाहा लाज नाहीं लोकां ।।३।।

२२०३
बरें सावधान । राहावें समय राखोन ।।१।।
नाहीं सारखिया वेळा । अवघ्या पावतां अवकळा ।।धृ।।
लाभ अथवा हानी । थोड्यामध्यें च भोवनी ।।२।।
तुका म्हणे राखा । आपणा नाहीं तोंचि वाखा ।।३।।
।।२।।

२२०४
काय करूं जी दातारा । कांहीं न पुरे संसारा ।।१।।
जाली माकडाची परि । येतों तळा जातों वरी ।।धृ।।
घालीं भलते ठायीं हात । होती शिव्या बैस लात ।।२।।
आदि अंतीं तुका । सांगे न कळे झाला चुका ।।३।।

२२०५
धर्म तो न कळे । काय झांकितील डोळे ।।१।।
जीव भ्रमले या कामें । कैसीं कळों येती वर्मे ।।धृ।।
विषयांचा माज । कांहीं धरूं नेदी लाज ।।२।।
तुका म्हणे लांसी । माया नाचविते कैसी ।।३।।
।।२।।

२२०६
दुर्जनाची जोडी । सज्जनाचे खेंटर तोडी ।।१।।
पाहे निमित्य तें उणें । धांवे छळावया सुनें ।।धृ।।
न म्हणे रामराम । मनें वाचे हें चि काम ।।२।।
तुका म्हणे भागा । आली निंदा करी मागा।।३।।

२२०७
शादीचें तें सोंग । संपादितां जरा वेंग ।।१।।
पाहा कैसी विटंबना । मूर्खा अभाग्याची जना ।।धृ।।
दिसतें तें लोपी । झिंज्या बोडुनियां पापी ।।२।।
सिंदळी त्या सती । तुका म्हणे थुंका घेती ।।३।।
।।२।।

२२०८
भक्ता म्हणऊनि वंचावें जीवें । तेणें शेण खावें काशासाटीं ।।१।।
नासिले अडबंद कौपीन ते माळा । अडचण राउळामाजी केली ।।धृ।।
अंगीकारिले सेवे अंतराय । तया जाला न्याय खापराचा ।।२।।
तुका म्हणे कोठें तगों येती घाणीं । आहाच ही मनीं अधीरता
।।३।। ।।१।।

२२०९
गयाळाचें काम हिताचा आवारा । लाज फजितखोरा असत नाहीं ।।१।।
चित्ता न मिळे तें डोळां सलों येतें । असावें परतें जवळूनि ।।धृ।।
न करावा संग न बोलावी मात । सावधान चित्त नाहीं त्यासी ।।२।।
तुका म्हणे दुःख देतील माकडें । घालिती सांकडें उफराटें ।।३।।

२२१०
बहु बरें एकाएकीं । संग चुकी करावा ।।१।।
ऐसें बरें जालें ठावें । अनुभवें आपुल्या ।।धृ।।
सांगावें तें काम मना । सलगी जना नेदावी ।।२।।
तुका म्हणे निघे अगी । दुजे संगीं आतळतां ।।३।।
।।२।।

अलकापुरीं स्वामी कीर्तनास उभे राहिले तेव्हां कवित्वाचा निषेध करून लोक बोलिले कीं कवित्व बुडवणें तेव्हां कवित्व बुडवून पांच दिवस होते ।। लोकांनीं फार पीडा केली कीं संसारही नाहीं व परमार्थही बुडविला आणीक कोणी असतें तें जीव देतें मग निद्रा केली ते अभंग ।। २० ।।
२२११
भूतबाधा आम्हां घरीं । हें तों आश्चर्य गा हरी ।।१।।
जाला भक्तीचा कळस । आले वस्तीस दोष ।।धृ।।
जागरणाचें फळ । दिली जोडोनि तळमळ ।।२।।
तुका म्हणे देवा । आहाच कळों आली सेवा ।।३।।

२२१२
नाहीं जों वेचलों जिवाचिया त्यागें । तोंवरी वाउगें काय बोलों ।।१।।
जाणिवलें आतां करीं ये उदेश । जोडी किंवा नाश तुमची जीवें ।।धृ।।
ठायींचे चि आलें होतें ऐसें मना । जावें ऐसें वना दृढ जालें ।।२।।
तुका म्हणे मग वेचीन उत्तरें । उद्धेसिलें खरें जाल्यावरी ।।३।।

२२१३
करूं कवि काय आतां नाही लाज । मज भक्तराज हांसतील ।।१।।
आतां आला एका निवाड्याचा दिस । सत्याविण रस विरसला ।।धृ।।

अनुभवाविण कोण करी पाप । रिते चि संकल्प लाजलावे ।।२।।
तुका म्हणे आतां न धरवे धीर । नव्हे जीव स्थिर माझा मज ।।३।।

२२१४
नाहीं आइकत तुम्ही माझे बोल । कासया हें फोल उपणूं भूस ।।१।।
येसी तें करीन बैसलिया ठाया । तूं चि बुझावया जवळी देवा ।।धृ।।
करावे ते केले सकळ उपाय । आतां पाहों काय अझुनि वास ।।२।।
तुका म्हणे आला आझेसी सेवट । होऊनियां नीट पायां पडों ।।३।।

२२१५
नव्हे तुम्हां सरी । येवढें कारण मुरारी ।।१।।
मग जैसा तैसा काळ । दाट सारावा पातळ ।।धृ।।
स्वामींचें तें सांडें । पुत्र होतां काळतोंडें ।।२।।
शब्दा नाहीं रुची । मग कोठें तुका वेची।।३।।

२२१६
केल्यापुरती आळी । कांहीं होते टाळाटाळी ।।१।।
सत्यसंकल्पाचें फळ । होतां न दिसे चि बळ ।।धृ।।
दळणांच्या ओव्या । रित्या खरें मापें घ्याव्या ।।२।।
जातीं उखळें चाटूं । तुका म्हणे राज्य घाटूं ।।३।।

२२१७
आतां नेम जाला । या च कळसीं विठ्ठला ।।१।।
हातीं न धरीं लेखणी । काय भुसकट ते वाणी ।।धृ।।
जाणें तेणें काळ । उरला सारीन सकळ ।।२।।
तुका म्हणे घाटी । चाटू कोरडा शेवटीं ।।३।।

२२१८
पावावे संतोष । तुम्हीं यासाटीं सायास ।।१।।
करीं आवडी वचनें । पालटूनि क्षणक्षणें ।।धृ।।
द्यावें अभयदान । भुमीन पाडावें वचन ।।२।।
तुका म्हणे परस्परें । कांहीं वाढवीं उत्तरें ।।३।।

२२१९
बोलतां वचन असा पाठमोरे । मज भाव बरे कळों आले ।।१।।
मागतिलें नये अरुचीनें हातां । नाहीं वरी सत्ता आदराची।।धृ।।
समाधानासाटीं लाविलासे कान । चोरलें तें मन दिसतसां ।।२।।
तुका म्हणे आम्हां तुमचे चि फंद । वरदळ छंद कळों येती ।।३।।

२२२०
काशासाटीं बैसों करूनियां हाट । वाउगा बोभाट डांगोरा हा ।।१।।
काय आलें एका जिवाच्या उद्धारें । पावशी उच्चारें काय हो तें ।।धृ।।
नेदी पट परी अन्नें तों न मरी । आपुलिये थोरीसाटीं राजा ।।२।।
तुका म्हणे आतां अव्हेरिलें तरी । मग कोण करी दुकान हा ।।३।।

२२२१
माझा मज नाहीं । आला उबेग तो कांहीं ।।१।।
तुमच्या नामाची जतन । नव्हतां थोर वाटे सीण ।।धृ।।
न पडावी निंदा । कानीं स्वामींची गोविंदा ।।२।।
तुका म्हणे लाज । आम्हां स्वामीचें तें काज ।।३।।

२२२२
कांहीं मागणें हें आम्हां अनुचित । वडिलांची रीत जाणतसों ।।१।।
देह तुच्छ जालें सकळ उपाधी । सेवेपाशीं बुद्धि राहिलीसे ।।धृ।।
शब्द तो उपाधि अचळ निश्चय । अनुभव हो काय नाहीं अंगीं ।।२।।
तुका म्हणे देह फांकिला विभागीं । उपकार अंगीं उरविला ।।३।।

२२२३
मागितल्यास कर पसरी । पळतां भरी वाखती ।।१।।
काय आम्ही नेणों वर्म । केला श्रम नेणतां ।।धृ।।
बोलतां बरें येतां रागा । कठीण लागा मागेंमागें ।।२।।
तुका म्हणे येथें बोली । असे चाली उफराटी ।।३।।

२२२४
असो तुझें तुजपाशीं । आम्हां त्यासी काय चाड ।।१।।
निरोधें कां कोंडूं मन । समाधान असोनी ।।धृ।।

करावा तो उरे आट । खटपट वाढतसे ।।२।।
तुका म्हणे येउनि रागा । कां मी भागा मुकेन ।।३।।

२२२५
आहे तें चि पुढें पाहों । बरे आहों येथें चि ।।१।।
काय वाढवूनि काम । उगा च श्रम तृष्णेचा ।।धृ।।
स्थिरावतां ओघीं बरें । चाली पुरें पडेना ।।२।।
तुका म्हणे वळितां मन । आम्हां क्षण न लगे ।।३।।

२२२६
सांगा दास नव्हें तुमचा मी कैसा । ऐसें पंढरीशा विचारूनि ।।१।।
कोणासाटीं केली प्रपंचाची होळी । या पायां वेगळी मायबापा ।।धृ।।
नसेल तो द्यावा सत्यत्वासी धीर । नये भाजूं हीर उफराटे ।।२।।
तुका म्हणे आम्हां आहिक्य परत्रीं । नाहीं कुळगोत्रीं दुजें कांहीं ।।३।।

२२२७
अनन्यासी ठाव एक सर्वकाजें । एकाविण दुजें नेणे चित्त ।।१।।
न पुरतां आळी देशधडी व्हावें । हें काय बरवें दिसतसे।।धृ।।
लेंकराचा भार माउलीचे शिरीं । निढळ तें दुरी धरिलिया ।।२।।
तुका म्हणे किती घातली लांबणी । समर्थ होउनि केवढ्यासाटीं ।।३।।

२२२८
स्तुती तरि करूं काय कोणापासीं । कीर्त तरि कैसी वाखाणावी ।।१।।
खोट्या तंव नाहीं अनुवादाचें काम । उरला भ्रम वरि बरा ।।धृ।।
म्हणवावें त्याची खुण नाहीं हातीं । अवकळा फजिती सावकाशें ।।२।।
तुका म्हणे हेंगे तुमचें माझें तोंड । होऊनिया लंड आळवितों ।।३।।

२२२९
कांहीं च न लगे आदि अवसान । बहुत कठीण दिसतसां ।।१।।
अवघ्याच माझ्या वेचविल्या शक्ती । न चलेसी युक्ति जाली पुढें ।।धृ।।
बोलिलें वचन हारपलें नभीं । उतरलों तों उभीं आहों तैसीं ।।२।।
तुका म्हणे कांहीं न करावेंसें जालें । थकित चि ठेलें वित्त उगें ।।३।।

२२३०
रूपें गोविलें चित्त । पायीं राहिलें निश्चिंत ।।१।।
तुम्हीं देवा अवघे चि गोमटे । मुख देखतां दुःख न भेटे ।।धृ।।
जाली इंद्रियां विश्रांति । भ्रमतां पीडत ते होतीं ।।२।।
तुका म्हणे भेटी । सुटली भवबंदाची गांठी ।।३।।
।।२०।।

स्वामींनीं तेरा दिवस निद्रा केली. मग भगवंतें येऊन समाधान केलें कीं, कवित्व कोरडें आहे तें काढणें उदकांतून

२२३१
थोर अन्याय केला तुझा अंत म्यां पाहिला । जनाचिया बोलासाटीं चित्त क्षोभविलें ।।१।।
भागविलासी केला सीण अधम मी यातिहीन । झांकूनि लोचन दिवस तेरा राहिलों ।।धृ।।
अवघें घालूनियां कोडें तानभुकेचें सांकडें । योगक्षेम पुढें तुज करणें लागेल ।।२।।
उदकीं राखिले कागद चुकविला जनवाद । तुका म्हणे ब्रीद साच केलें आपुलें ।।३।।

२२३२
तूं कृपाळू माउली आम्हां दीनांची साउली । न संरित आली बाळवेशें जवळी ।।१।।
माझें केलें समाधान रूप गोजिरें सगुण । निववलें मन आलिंगन देऊनी ।।धृ।।
कृपा केली जना हातीं पायीं ठाव दिला संतीं । कळों नये चित्तीं दुःख कैसें आहे तें।।२।।
तुका म्हणे मी अन्यायी क्षमा करीं वो माझे आई । आतां पुढें काई तुज घालूं सांकडें ।।३।।

२२३३
कापो कोणी माझी मान सुखें पीडोत दुर्जन । तुज होय सीण तें मी न करीं सर्वथा ।।१।।

चुकी जाली एकवेळा मज पासूनि चांडाळा । उभें करोनियां जळा माजी वह्या राखिल्या।।धृ।।
नाहीं केला हा विचार माझा कोण अधिकार । समर्थासी भार न कळे कैसा घालावा ।।२।।
गेलें होऊनियां मागें नये बोलों तें वाउगें । पुढिलिया प्रसंगें तुका म्हणे जाणावें ।।३।।

२२३४
काय जाणें मी पामर पांडुरंगा तुझा पार । धरिलिया धीर काय एक न करिसी ।।१।।
उताविळ जालों आधीं मतिमंद हीनबुद्धि । परि तूं कृपानिधी नाहीं केला अव्हेर ।।धृ।।
तूं देवांचा ही देव अवघ्या ब्रम्हांडाचा जीव । आम्हां दासां कींव कां भाकणें लागली ।।२।।
तुका म्हणे विश्वंभरा मी तों पतित चि खरा । अन्याय दुसरा दारीं धरणें बैसलों ।।३।।

२२३५
नव्हती आली सीसा सुरी अथवा घाय पाठीवरी । तो म्यां केला हरी एवढा तुम्हां आकांत ।।१।।
वांटिलासी दोहीं ठायीं मजपाशीं आणि डोहीं । लागों दिला नाहीं येथें तेथें आघात ।।धृ।।
जीव घेती मायबापें थोड्या अन्याच्या कोपें । हें तों नव्हे सोपें साहों तों चि जाणीतलें ।।२।।
तुका म्हणे कृपावंता तुज ऐसा नाहीं दाता। काय वाणूं आतां वाणी माझी कुंटली ।।३।।

वर्षाव केला
२२३६
तूं माउलीहून मयाळ चंद्राहूनि शीतळ । पाणियाहूनि पातळ कल्लोळ प्रेमाचा ।।१।।
देऊं काशाची उपमा दुजी तुज पुरुषोत्तमा । ओंवाळूनि नामा तुझ्या वरूनि टाकिलों ।।धृ।।

तुवां केलें रे अमृता गोड त्या ही तूं परता । पांचां तत्त्वांचा जनिता सकळ सत्तानायक ।।२।।
कांहीं न बोलोनि आतां उगा च चरणीं ठेवितों माथा । तुका म्हणे पंढरिनाथा क्षमा करीं अपराध ।।३।।

२२३७
मी अवगुणी अन्यायी किती म्हणोन सांगों काई । आतां मज पायीं ठाव देईं विठ्ठले ।।१।।
पुरे पुरे हा संसार कर्म बळिवंत दुस्तर । राहों नेदी स्थिर एके ठायीं निश्चळ ।।धृ।।
अनेक बुद्धिचे तरंग क्षणक्षणां पालटती रंग । धरूं जातां संग तंव तो होतो बाधक ।।२।।
तुका म्हणे आतां अवघी तोडीं माझी चिंता । येऊनि पंढरिनाथा वास करीं हृदयीं ।।३।। ।।७।।

२२३८
बरें आम्हां कळों आलें देवपण । आतां गुज कोण राखे तुझें ।।१।।
मारिलें कां मज सांग आजिवरी । आतां सरोबरी तुज मज ।।धृ।।
जें आम्ही बोलों तें आहे तुझ्या अंगीं । देईन प्रसंगीं आजि शिव्या ।।२।।
निलाजिरा तुज नाहीं याति कुळ । चोरटा शिंदळ ठावा जना ।।३।।
खासी धोंडे माती जीव जंत झाडें । एकलें उघडें परदेसी ।।४।।
गाढव कुतरा ऐसा मज ठावा बईल तूं देवा भारवाही ।।५।।
लडिका तूं मागें बहुतांसी ठावा । आलें अनुभवा माझ्या तें ही ।।६।।
तुका म्हणे मज खवळिलें भांडा । आतां धीर तोंडा न धरवे ।।७।।

२२३९
आम्ही भांडों तुजसवें । वर्मी धरूं जालें ठावें ।।१।।
होसी सरड बेडुक । बाग गांढ्या ही पाईक ।।धृ।।
बळ करी तया भ्यावें । पळों लागे तया घ्यावें ।।२।।
तुका म्हणे दूर परता । नर नारी ना तूं भूता ।।३।।

२२४०
काय साहतोसी फुका । माझा बुडविला रुका ।।१।।

रीण घराचें पांगिलें । तें न सुटे कांहीं केलें ।।धृ।।
चौघांचिया मतें। आधीं खरें केलें होते ।।२।।
तुका म्हणे यावरी । आतां भीड कोण धरी ।।३।।

२२४१
प्रीतीचा कलहे पदरासी घाली पीळ । सरों नेदी बाळ मागें पुढें पित्यासी ।।१।।
काय लागे त्यासी बळ हेडावितां कोण काळ । गोवितें सबळ जाळीं स्नेहसूत्राचीं ।।धृ।।
सलगी दिला लाड बोले तें तें वाटे गोड । करी बुझावोनि कोड हातीं देऊनि भातुकें।।२।।
तुका म्हणे बोल कोणा हें कां नेणां नारायणा । सलगीच्या वचना कैचें उपजे विषम।३।। ।।४।।

२२४२
भार देखोनि वैष्णवांचे । दूत पळाले यमाचे ।।१।।
आले आले वैष्णववीर । काळ कांपती असुर ।।धृ।।
गरुडटकयाच्या भारें । भूमी गर्जे जेजेकारें ।। ।२।।
तुका म्हणे काळ । पळे देखोनियां बळ ।।३।।
।।१।।

२२४३
रंगीं रंगें रे श्रीरंगे । काय भुललासी पतंगें ।।१।।
शरीर जायांचें ठेवणें । धरिसी अभिळास झणें ।।धृ।।
नव्हे तुझा हा परिवार । द्रव्य दारा क्षणभंगुर ।।२।।
अंतकाळींचा सोइरा । तुका म्हणे विठो धरा ।।३।।
।।१।।

२२४४
जन्मा येउनि काय केलें । तुवां मुदल गमाविलें।।१।।
कां रे न फिरसी माघारा । अझुनि तरी फजितखोरा ।।धृ।।
केली गांठोळीची नासी । पुढें भीके चि मागसी ।।२।।
तुका म्हणे ठाया । जाईं आपल्या आलिया ।।३।।
।।१।।

२२४५
पंढरीस जाते निरोप आइका । वैकुंठनायका क्षम सांगा ।।१।।
अनाथांचा नाथ हें तुझें वचन । धांवें नको दीन गांजों देऊं ।।धृ।।
ग्रासिलें भुजंगें सर्पें महाकाळें । न दिसे हें जाळें उगवतां।।२।।
कामक्रोधसुनीं श्वापदीं बहुतीं । वेढलों आवताअ मायेचिये।।३।।
मृदजलनदी बुडविना तरी । आणूनियां वरी तळा नेते ।।४।।
तुका म्हणे तुवां धरिलें उदास । तरि पाहों वास कवणाची।।५।।

२२४६
कृपाळू सज्जन तुम्ही संतजन । हें चि कृपादान तुमचें मज ।।१।।
आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा । कींव माझी सांगा काकुलती ।।धृ।।
अनाथ अपराधी पतिताआगळा । परि पायांवेगळा नका करूं ।।२।।
तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरि । मग मज हरि उपेक्षीना ।।३।।

२२४७
संतांचिया पायीं माझा विश्वास । सर्वभावें दास जालों त्यांचा ।।१।।
ते चि माझें हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी ।।धृ।।
भागलिया मज वाहतील कडे । यांचियातें जोडे सर्व सुख ।।२।।
तुका म्हणे शेष घेईन आवडी । वचन न मोडीं बोलिलों तें ।।३।। ।।३।।

२२४८
लाघवी सूत्रधारी दोरी नाचवी कुसरी । उपजवी पाळूनि संसारि नानापरिचीं लाघवें ।।१।।
पुरोनि पंढरिये उरलें भक्तिसुखें लांचावलें । उभें चि राहिलें कर कटीं न बैसे ।।धृ।।
बहु काळें ना सावळें बहु कठिण ना कोंवळें । गुणत्रया वेगळें बहुबळें आथीलें ।।२।।
असोनि नसे सकळांमधीं मना अगोचर बुद्धी । स्वामी माझा कृपानिधि तुका म्हणे विठ्ठल ।।३।।

२२४९

कीर्तन ऐकावया भुलले श्रवण । श्रीमुख लोचन देखावया ।।१।।
उदित हें भाग्य होईल कोणे काळीं । चित्त तळमळी म्हणऊनि ।।धृ।।
उतावीळ बाह्या भेटिलागीं दंड । लोटांगणीं धड जावयासी ।।२।।
तुका म्हणे माथा ठेवीन चरणीं । होतील पारणी इंद्रियांची ।।३।।

२२५०
नाम घेतां कंठ शीतळ शरीर । इंद्रियां व्यापार नाठवती ।।१।।
गोड गोमटें हें अमृतासी वाड । केला कइवाड माझ्या चित्तें ।।धृ।।
प्रेमरसें जाली पुष्ट अंगकांति । त्रिविध सांडिती ताप अंग ।।२।।
तुका म्हणे तेथें विकाराची मात । बोलों नये हित सकळांचें ।।३।।
।।३।।

२२५१
स्वामिकाज गुरुभक्ति । पितृवचन सेवा पति ।।१।।
हे चि विष्णूची महापूजा । अनुभाव नाहीं दुजा ।।धृ।।
सत्य बोले मुखें । दुखवे आणिकांच्या दुःखें ।।२।।
निश्चयाचें बळ । तुका म्हणे तें च फळ ।।३।।

२२५२
चित्त घेऊनियां तू काय देसी । ऐसें मजपासीं सांग आधीं ।।१।।
तरि च पंढरिराया करिन साटोवाटी । नेघें जया तुटी येईल तें ।।धृ।।
रिद्धिसिद्धि कांहीं दाविसी अभिळास । नाहीं मज आस मुक्तीची ही ।।२।।
तुका म्हणे तुझें माझें घडे तर । भक्तीचा भाव रे देणें घेणें ।।३।।

२२५३
तुझा संग पुरे संग पुरे । संगति पुरे विठोबा ।।१।।
आपल्या सारिखें करिसी दासां । भिकारिसा जग जाणे ।।धृ।।
रूपा नाहीं ठाव नांवा । तैसें आमुचें करिसी देवा ।।२।।
तुका म्हणे तोयें आपुलें भेंडोळें । करिसी वाटोळें माझें तैसें ।।३।।

२२५४
आतां मज तारीं । वचन हें साच करीं ।।१।।
तुझें नाम दिनानाथ । ब्रिदावळी जगविख्यात ।।धृ।।

कोण लेखी माझ्या दोषा । तुझा त्रिभुवनीं ठसा ।।२।।
वांयां जातां मज । तुका म्हणे तुम्हां लाज ।।३।।

२२५५
विठ्ठल आमुचा निजांचा । सज्जन सोयरा जीवाचा।।१।।
मायबाप चुलता बंधु । अवघा तुजशीं संबंधु ।।धृ।।
उभयकुळींसाक्ष। तूं चि माझा मातुळपक्ष ।।२।।
समर्पिली काया । तुका म्हणे पंढरिराया।।३।।

२२५६
वेदाचा तो अर्थ आम्हांसी च ठावा । येरांनी वाहावा भार माथां ।।१।।
खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं । भार धन वाही मजुरीचें ।।धृ।।
उत्पत्तिपाळणसंहाराचें निज । जेणें नेलें बीज त्याचे हातीं ।।२।।
तुका म्हणे आलें आपण चि फळ । हातोहातीं मूळ सांपडलें ।।३।।

२२५७
आमचा तूं ॠणी ठायींचा चि देवा । मागावया ठेवा आलों दारा ।।१।।
वर्म तुझें आम्हां सांपडलें हातीं । धरियेले चित्तीं दृढ पाय ।।धृ।।
बैसलों धरणें कोंडोनियां द्वारीं । आंतूनि बाहेरी येओं नेदी ।।२।।
तुज मज सरी होइल या विचारें । जळो भांडखोरें निलाजिरीं ।।३।।
भांडवल माझें मिरविसी जनीं । सहस्र वोवनी नाममाळा ।।४।।
तुका म्हणे आम्ही केली जिवें साटी । तुम्हां आम्हां तुटी घालूं आतां ।।५।।

२२५८
काय धोविलें बाहेरी मन मळलें अंतरीं । गादलें जन्मवरीं असत्यकाटें काटलें ।।१।।
सांडी व्यापार दंभाचा शुद्ध करीं रे मन वाचा । तुझिया चित्ताचा तूं च ग्वाही आपुला ।।धृ।।
पापपुण्यविटाळ देहीं भरितां न विचारिसी कांहीं । काय चाचपसी मही जी अखंड सोंवळी ।।२।।
कामक्रोधा वेगळा ऐसा होईं कां सोंवळा । तुका म्हणे कळा गुंडुन ठेवीं कुसरी ।।३।।

२२५९
ऊंस वाढवितां वाढली गोडी । गुळ साकर हे त्याची परवडी ।।१।।
सत्यकर्मे आचरें रे । बापा सत्यकर्मे आचरें रे ।
सत्यकर्मे आचरें होईल हित । वाढेल दुःख असत्याचें ।।धृ।।
साकरेच्या आळां लाविला कांदा । स्थूळसानापरि वाढे दुर्गंधा ।।२।।
सत्य असत्य हें ऐसिया परी । तुका म्हणे याचा विचार करीं ।।३।।

२२६०
पाषाण देव पाषाण पायरी । पूजा एकावरी पाय ठेवी ।।१।।
सार तो भाव सार तो भाव । अनुभवीं देव ते चि जाले।।धृ।।
उदका भिन्न पालट काई । गंगा गोड येरां चवी काय नाहीं ।।२।।
तुका म्हणे हें भाविकांचें वर्म । येरीं धर्माधर्म विचारावें।।३।।
।।१०।।

२२६१
जन्मा येऊनि कां रे निदसुरा । जायें भेटी वरा रखुमाईच्या ।।१।।
पाप ताप दैन्य जाईल सकळ । पावसी अढळउत्तम तें ।।धृ।।
संतमहंतसिद्धहरिदासदाटणी । फिटती पारणीं इंद्रियांचीं।।२।।
तुका म्हणे तेथें नामाचा गजर । फुकाची अपार लुटी घेईं ।।३।।

२२६२
काय धोविलें कातडें । काळकुट भीतरि कुडें ।।१।।
उगा राहें लोकभांडा । चाळविल्या पोरें रांडा ।।धृ।।
घेसी बुंथी पानवथां । उगा च हालविसी माथा ।।२।।
लावूनि बैसे टाळी । मन इंद्रियें मोकळीं ।।३।।
हालवीत बैस माळा । विषयजप वेळोवेळां।।४।।
तुका म्हणे हा व्यापार । नाम विठोबाचें सार ।।५।।
।।२।।

२२६३
येईं वो येईं वो येईं धांवोनियां । विलंब कां वायां लाविला कृपाळे ।।१।।
विठाबाई विश्वंभरे भवच्छेदके । कोठें गुंतलीस अगे विश्वव्यापके ।।धृ।।
न करीं न करीं न करीं आतां अळस अव्हेरु । व्हावया प्रकट कैंचें दूरि अंतरु ।।२।।

नेघें नेघें नेघें माझी वाचा विसांवा । तुका म्हणे हांवा हांवा हांवा साधावा ।।३।।

२२६४
हें चि याच्या ऐसें मागावें दान । वंदूनि चरण नारायणा ।।१।।
धीर उदारींव निर्मळ निर्मत्सर । येणें सर्वेश्वर ऐसें नांव ।।धृ।।
हा चि होईजेल याचिया विभागें । अनुभववी अंगें अनुभववील ।।२।।
जोडे तयाचे कां न करावे सायास । जाला तरि अळस दीनपणे ।।३।।
पावल्यामागें कां न घलावी धांव । धरिल्या तरि हांव बळ येतें ।।४।।
तुका म्हणे घालूं खंडीमध्ये टांक । देवाचें हें एक करुनी घेऊं ।।५।।

२२६५
सत्ताबळें येतो मागतां विभाग । लावावया लाग निमित्य करूं ।।१।।
तुझीं ऐसीं मुखें करूं उच्चारण । बोलें नारायण सांपडवूं ।।धृ।।
आसेविण नाहीं उपजत मोहो । तरि च हा गोहो न पडे फंदीं ।।२।।
तुका म्हणे आतां व्हावें याजऐसें । सरिसें सरिसें समागमें ।।३।।

२२६६
करितां होया व्हावें चित्त चि नाहीं । घटापटा कांहीं करूं नये ।।१।।
मग हालत चि नाहीं जवळून । करावा तो सीण सीणवितो ।।धृ।।
साहत चि नाहीं कांहीं पांकुळलें । उगल्या उगलें ढळत आहे ।।२।।
तुका म्हणे तरी बोलावें झांकून । येथें खुणे खूण पुरतें चि ।।३।।

२२६७
संतसंगें याचा वास सर्वकाळ । संचला सकळ मूर्तिमंत ।।१।।
घालूनियां काळ अवघा बाहेरी । त्यासी च अंतरीं वास दिला ।।धृ।।
आपुलेसें जिंहीं नाहीं उरों दिलें । चोजवितां भलें ऐसीं स्थळें ।।२।।
तुका म्हणे नाही झांकत परिमळ । चंदनाचें स्थळ चंदन चि ।।३।।

२२६८
पुष्ट कांति निवती डोळे । हे सोहळे श्रीरंगीं ।।१।।
अंतर्बाहीं विलेपन । हें भूषण मिरवूं ।।धृ।।
इच्छेऐसी आवड पुरे । विश्वंभरे जवळी ।।२।।

तुका करी नारायण । या या सेवन नामाचें।।३।।

२२६९
सुकाळ हा दिवसरजनी । नीत धणी नवी च ।।१।।
करुण सेवूं नानापरी । राहे उरी गोडीनें ।।धृ।।
सरे ऐसा नाहीं झरा। पंक्ती करा समवेत ।।२।।
तुका म्हणे बरवा पान्हा । कान्हाबाई माउलीचा ।।३।।

२२७०
पाहतां तव एकला दिसे । कैसा असे व्यापक ।।१।।
ज्याचे त्याचे मिळणीं मिळे । तरी खेळे बहुरूपी ।।धृ।।
जाणिवेचें नेदी अंग । दिसों रंग निवडीना ।।२।।
तुका म्हणे ये चि ठायीं । हें तों नाहीं सर्वत्र ।।३।। ।।८।।

२२७१
तुम्हांसाटीं आम्हां आपुला विसर । करितां अव्हेर कैसें दिसे ।।१।।
विचाराजी आतां ठायीचें हे देवा । आम्हां नये हेवा वाढवितां ।।धृ।।
आलों टाकोनियां सुखाची वसती । पुढें माझ्या युक्ति खुंटलिया ।।२।।
तुका म्हणे जाला सकळ वृत्तांत । केला प्रणिपात म्हणऊनि ।।३।।

२२७२
करावा उद्धार हें तुम्हां उचित । आम्ही केली नीत कळली ते ।।१।।
पाववील हाक धांवा म्हणऊन । करावें जतन ज्याचें तेणें ।।धृ।।
दुश्चितासी बोल ठेवायासी ठाव । ऐसा आम्ही भाव जाणतसों ।।२।।
तुका म्हणे माझें कायावाचामन । दुसरें तें ध्यान करित नाही ।।३।।

२२७३
संताचे उपदेश आमुचे मस्तकीं । नाहीं मृतेलोकीं राहाणेसा ।।१।।
म्हणऊनि बहु तळमळी चित्त । येईं वो धांवत पांडुरंगे ।।धृ।।
उपजली चिंता लागला उसीर । होत नाहीं धीर निढळ वाटे ।।२।।२२७३
तुका म्हणे पोटीं रिघालेंसे भय । करूं आतां काय ऐसें जालें ।।३।।

२२७४

काळावरि घालूं तरि तो सरिसा । न पुरतां इच्छा दास कैसे ।।१।।
आतां नाहीं कांहीं उसिराचें काम । न खंडावें प्रेम नारायणा ।।धृ।।
देणें लागे मग विलंब कां आड । गोड तरि गोड आदि अंत ।।२।। २२७४
तुका म्हणे होइल दरुषणें निश्चिंती । गाईन तें गीतीं ध्यान मग ।।३।।

२२७५
परउपकारें कायावाचामन । वेचे सुदर्शन रक्षी तया।।१।।
याजसाटीं असें योजिलें श्रीपति । संकल्पाचे हातीं सर्व जोडा।।धृ।।
परपीडे ज्याची जिव्हा मुंडताळे । यमदूत डाळे करिती पूजा ।।२।।
तुका म्हणे अंबऋृषी दुर्योधना । काय झालें नेणां दुर्वासया ।।३।।

२२७६
हागिल्याचे सिंके वोणवा चि राहे । अपशकुन पाहे वेडगळ ।।१।।
अत्यंत समय नेणतां अवकळा । येऊं नये बळा सिक धरा ।।धृ।।
भोजनसमयीं ओकाचा आठव । ठकोनियां जीव कष्टी करी ।।२।।
तुका म्हणे किती सांगों उगवून । अभाग्याचे गुण अनावर ।।३।।

२२७७
नारे तरि काय नुजेडे कोंबडें । करूनियां वेडें आघ्रो दावी ।।१।।
आइत्याचें साहे फुकाचा विभाग । विक्षेपानें जग ची थू करी ।।धृ।।
नेमून ठेविला करत्यानें काळ । नल्हायेसें बळ करूं पुढें।।२।।
तुका म्हणे देव साहे जाल्यावरी । असांग चि करी सर्व संग ।।३।। ।।७।।

२२७८
तरी सदा निर्भर दास । चिंताआसविरहित ।।१।।
अवघा चि एकीं ठाव । सर्व भाव विठ्ठलीं ।।धृ।।
निरविलें तेव्हां त्यास । जाला वास त्यामाजी ।।२।।
तुका म्हणे रूप ध्यावें । नाहीं ठावे गुणदोष ।।३।।

२२७९
वेडिया उपचार करितां सोहळे । काय सुख कळे तयासी तें ।
अंधापुढें दीप नाचती नाचणें । भक्तिभावेंविण भक्ति तैसी ।।१।।

तिमाणें राखण ठेवियेलें सेता । घालुनियां माथां चुना तया ।
खादलें म्हणोनि सेवटीं बोबाली । ठायींची भुली कां नेणां रया ।।धृ।।
मुकियापासाव सांगतां पुराण । रोगिया मिष्टान्न काई होय ।
नपुंसका काय करील पद्मिणी । रुचिविण वाणी तैसे होय।।२।।
हात पाय नाहीं करिल तो काई । वृक्षा फळ आहे अमोलिक।
हातां नये तैसा वांयां च तळमळी । भावेंविण भोळीं म्हणे तुका ।।३।।

२२८०
मेघवृष्टीनें करावा उपदेश परि गुरुनें न करावा शिष्य। वांटा लाभे त्यास केल्या अर्धकर्माचा ।।१।।
द्रव्य वेचावें अन्नसत्रीं भूतीं द्यावें सर्वत्र । नेदावा हा पुत्र उत्तमयाती पोसना ।।धृ।।
बीज न पेरावें खडकीं ओल नाहीं ज्याचे बुडखीं । थीतां ठके सेखीं पाठी लागे दिवाण ।।२।।
गुज बोलावें संतांशीं पत्नी राखावी जैसी दासी । लाड देतां तियेसी वांटा पावे कर्माचा ।।३।।
शुद्ध कसूनिपाहावें वरि रंगा न भुलावें । तुका म्हणे घ्यावें जया नये तुटी तें ।।४।।

२२८१
नावडावें जन नावडावा मान । करूनि प्रमाण तूं चि होईं ।।१।।
सोडुनि देहसंबंध वेसनें । ऐसी नारायणें कृपा कीजे।।धृ।।
नावडावें रूप नावडावे रस । अवघी राहो आस पायांपाशीं ।।२।।
तुका म्हणे आतां आपुलिया सत्ता । करूनि अनंता ठेवा ऐसें ।।३।।

२२८२
उपाधिवेगळे तुम्ही निर्विकार । कांहीं च संसार तुम्हां नाहीं ।।१।।
ऐसें मज करूनि ठेवा नारायणा । समूळ वासना नुरवावी ।।धृ।।
निसंग तुम्हांसी राहणें एकट । नाहीं कटकट साहों येक ।।२।।
तुका म्हणे नाहीं मिळों येत शिळा । रंगासी सकळा स्पटिकाची ।।३।।

२२८३
माहार माते चपणी भरे । न कळे खरें पुढील ।।१।।

वोंगळ अधमाचे गुण । जातां घडी न लगे चि ।।धृ।।
श्वान झोळी स्वामिसत्ता । कोप येतां उतरे ।।२।।
तुका म्हणे गुमान कां । सांगों लोकां अधमासी ।।३।।

२२८४
डोळ्यामध्यें जैसें कणु । अणु तें हि न समाये ।।१।।
तैसें शुद्ध करीं हित । नका चित्त बाटवूं ।।धृ।।
आपल्याचा कळवळा। आणिका बाळावरि न ये ।।२।।
तुका म्हणे बीज मुडा । जैशा चाडा पिकाच्या ।।३।।

२२८५
मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांसी ।।१।।
वैष्णवांचा माल खरा । तुरतुरा वस्तूसी ।।धृ।।
भस्म दंड न लगे काठी । तीर्थां आटी भ्रमण ।।२।।
तुका म्हणे आडकाठी । नाहीं भेटी देवाचे ।।३।।

२२८६
आगी लागो तया सुखा । जेणें हरि नये मुखा ।।१।।
मज होत कां विपत्ति । पांडुरंग राहो चित्तीं ।।धृ।।
जळो तें समूळ। धन संपत्ति उत्तम कुळ ।।२।।
तुका म्हणे देवा । जेणें घडे तुझी सेवा।।३।।

२२८७
आतां न म्हणे मी माझें । नेघें भार कांहीं ओझें ।।१।।
तूं चि तारिता मारिता । कळों आलासी निरुता ।।धृ।।
अवघा तूं चि जनार्दन । संत बोलती वचन ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगा । तुझ्या रिगालों वोसंगा ।।३।।

२२८८
समुद्रवळयांकित पृथ्वीचें दान । करितां समान न ये नामा ।।१।।
म्हणऊनि कोणीं न करावा आळस । म्हणा रात्रीदिवस रामराम ।।धृ।।
सकळ ही शास्त्रें पठण करतां वेद । सरी नये गोविंदनाम एकें ।।२।।
सकळ ही तीर्थें प्रयाग काशी । करितां नामाशीं तुळेति ना ।।३।।

कर्वतीं कर्मरीं देहासी दंडण । करितां समान नये नामा ।।४।।
तुका म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार । नाम हें चि सार विठोबाचें ।।५।।

२२८९
अवघ्या वाटा झाल्या क्षीण कळीं न घडे साधन । उचित विधि विधान न कळे न घडे सर्वथा ।।१।।
भक्तिपंथ बहु सोपा पुण्य नागवया पापा । येणें जाणें खेपा येणें चि एक खंडती।।धृ।।
उभारोनि बाहे विठो पालवीत आहे । दासां मी चि साहे मुखें बोले आपुल्या ।।२।।
भाविक विश्वासी पार उतरिलें त्यांसी । तुका म्हणे नासी कुतर्क्याचे कपाळीं ।।३।।

२२९०
आम्हीं नामाचें धारक नेणों प्रकार आणीक । सर्व भावें एक विठ्ठल चि प्रमाण ।।१।।
न लगे जाणावें नेणावें गावें आनंदें नाचावें । प्रेमसुख घ्यावें वैष्णवांचे संगती ।।धृ।।
भावबळें घालूं कास लज्जा चिंता दवडूं आस । पायीं निजध्यास म्हणों दास विष्णूचे ।।२।।
भय नाहीं जन्म घेतां मोक्षपदा हाणों लाता । तुका म्हणे सत्ता धरूं निकट सेवेची ।।३।।

२२९१
आम्ही हरिचे सवंगडे जुने ठायींचे वेडे बागडे । हातीं धरुनी कडे पाठीसवें वागविलों ।।१।।
म्हणोनि भिन्न भेद नाहीं देवा आम्हां एकदेहीं । नाहीं जालों कहीं एका एक वेगळे ।।धृ।।
निद्रा करितां होतों पायीं सवें चि लंका घेतली तईं । वान्नरें गोवळ गाई सवें चारित फिरतसों ।।२।।
आम्हां नामाचें चिंतन राम कृष्ण नारायण। तुका म्हणे क्षण खातां जेवितां न विसंभों ।।३।।

२२९२
मागें बहुतां जन्मीं हें चि करित आलों आम्ही । भवतापश्रमी दुःखें पीडिलीं निववूं त्यां ।।१।।
गर्जों हरिचे पवाडे मिळों वैष्णव बागडे । पाझर रोकडे काढूं पाषाणामध्यें ।।धृ।।
भाव शुद्ध नामावळी हर्षें नाचों पिटूं टाळी । घालूं पायां तळीं कळिकाळ त्याबळें ।।२।।
कामक्रोध बंदखाणी तुका म्हणे दिले दोन्ही । इंद्रियांचे धणी आम्ही जालों गोसांवी ।।३।।

२२९३
अमर तूं खरा । नव्हे कैसा मी दातारा ।।१।।
चाल जाऊं संतांपुढें । वाद सांगेन निवाडें ।।धृ।।
तुज नांव जर नाहीं । तर माझें दाव काई ।।२।।
तुज रूप नाहीं । तर माझें दाव काई।।३।।
खळसी तूं लीळा । तेथें मी काय वेगळा ।।४।।
साच तूं लटिका । तैसा मी ही म्हणे तुका ।।५।।

२२९४
मंत्र चळ पिसें लागतें सत्वर । अबद्ध ते फार तरले नामें ।।१।।
आशोचे तो बाधी आणिकां अक्षरां । नाम निदसुरा घेतां तरे ।।धृ।।
रागज्ञानघात चुकतां होय वेळ । नाम सर्वकाळ शुभदायक।।२।।
आणिकां भजना बोलिला निषेध । नाम तें अभेद सकळां मुखीं ।।३।।
तुका म्हणे तपें घालिती घालणी । वेश्या उद्धरूनि नेली नामें ।।४।।

२२९५
नव्हती ते संत करितां कवित्व । संताचे ते आप्त नव्हती संत ।।१।।
येथें नाहीं वेश सरतें आडनांवें । निवडे घावडाव व्हावा अंगीं ।।धृ।।
नव्हती ते संत धरितां भोंपळा । करितां वाकळा प्रावरण ।।२।।
नव्हती ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ।।३।।
नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचरणें नव्हती संत ।।४।।
नव्हती संत करितां तप तीर्थाटणें । सेविलिया वन नव्हती संत ।।५।।
नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणें । भस्म उधळणें नव्हती संत ।।६।।

तुका म्हणे नाहीं निरसला देहे । तों अवघे हे सांसारिक ।।७।।

२२९६
हें चि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।।
गुण गाईन आवडी । हे चि माझी सर्व जोडी ।।धृ।।
न लगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देईं सदा ।।२।।
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हासी ।।३।।

२२९७
भाग्यवंता हे परवडी । करिती जोडी जन्माची ।।१।।
आपुलाल्या लाहो भावें । जें ज्या व्हावें तें आहे ।।धृ।।
इच्छाभोजनाचा दाता । न लगे चिंता करावी ।।२।।
तुका म्हणे आल्या थाऱ्या । वस्तु बऱ्या मोलाच्या ।।३।।

२२९८
वंचुनियां पिंड । भाता दान करी लंड ।।१।।
जैसी याची चाली वरी । तैसा अंतरला दुरी ।।धृ।।
मेला राखे दिस । ज्यालेपणें जालें वोस ।।२।।
तुका म्हणे देवा । लोभें न पुरे चि सेवा।।३।।

२२९९
अधीरा माझ्या मना ऐक एकी मात । तूं कां रे दुश्चित निरंतर ।।१।।
हे चि चिंता काय खावें म्हणऊनि । भले तुजहूनि पक्षिराज ।।धृ।।
पाहा ते चातक नेघे भूमिजळा । वरुषे उन्हाळा मेघ तया ।।२।।
सकळयातींमध्यें ठक हा सोनार । त्याघरीं व्यापार झारियाचा ।।३।।
तुका म्हणे जळीं वनीं जीव एक । तयापाशीं लेख काय असे ।।४।।

२३००
कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जनासी एकला तो ।।१।।
बाळा दुधा कोण करितें उत्पत्ती । वाढवी श्रीपति सवें दोन्ही ।।धृ।।
फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ।।२।।
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनि ।।३।।
तुका म्हणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ।।४।।

२३०१
उदारा कृपाळा पतितपावना । ब्रिदें नारायणा साच तुझीं ।।१।।
वर्णिलासी जैसा जाणतां नेणतां । तैसा तूं अनंता साच होसी ।।धृ।।
दैत्यां काळ भक्तां मेघश्याममूर्ति । चतुर्भुज हातीं शंख चक्र ।।२।।
काम इच्छा तयां तैसा होसी राणीं । यशोदेच्या स्तनीं पान करी ।।३।।
होऊनि सकळ कांहींच न होसी । तुका म्हणे यासी वेद ग्वाही ।।४।।

२३०२
ऐका संतजन उत्तरें माझे बोबडे बोल । करीं लाड तुम्हांपुढें हो कोणी झणी कोपाल ।।१।।
उपाय साधन आइका कोण गति अवगति । दृढ बैसोनि सादर तुम्ही धरावें चित्तीं ।।धृ।।
धर्म तयासी घडे रे ज्याचे स्वाधीन भाज । कर्म तयासी जोडे रे भीत नाहीं लाज ।।२।।
पुण्य तें जाणां रे भाइनो परउपकाराचें । परपीडा परनिंदा रे खरें पाप तयाचें ।।३।।
लाभ तयासी जाला रे मुखीं देव उच्चारी । प्रपंचापाठी गुंतला हाणी तयासी च थोरी ।।४।।
सुख तें जाणा रे भाइनो संतसमागम । दुःख तें जाणारे भाइनो शम तेथे विशम ।।५।।
साधन तयासी साधे रे ज्याची स्वाधीन बुद्धि । पराधीनासी आहे घात रे थोर जाण संबंधी ।।६।।
मान पावे तो आगळा मुख्य इंद्रियें राखे । अपमानी तो अधररसस्वाद चाखे।।६।।
जाणता तयासी बोलिजे जाणे समाधान । नेणता तयासी बोलिजे वाद करी भूषण ।।८।।
भला तो चि एक जाणा रे गयावर्जन करी । बुरा धन नष्ट मेळवी परद्वार जो करी ।।९।।
आचारी अन्न काढी रे गाई अतितभाग । अनाचारी करी भोजन ग्वाही नसतां संग ।।१०।।
स्वहित तेणें चि केलें रे भूतीं देखिला देव । अनहित तयाचें जालें रे आणी अहंभाव ।।११।।

धन्य जन्मा ते चि आले रे एक हरिचे दास । धिग ते विषयीं गुंतले केला आयुष्या नास ।।१२।।
जोहोरि तो चि एक जाणा रे जाणे सिद्धलक्षणें । वेडसरु तो भुले रे वरदळभूषणें ।।१३।।
बळियाढा तो चि जाणा रे भक्ति दृढ शरीरीं। गांढ्या तयासी बोलिजे एक भाव न धरी ।।१४।।
खोल तो वचन गुरूचें जो गिळूनि बैसे । उथळ धीर नाहीं अंगीं रे म्हणे होईल कैसें।।१५।।
उदार तो जीवभाव रे ठेवी देवाचे पायीं । कृपण तयासी बोलिजे पडे उपाधिडाईं ।।१६।।
चांगलेंपण तें चि रे ज्याचें अंतर शुद्ध । वोंगळ मळिन अंतरीं वाणी वाहे दुर्गंध ।।१७।।
गोड तें चि एक आहे रे सार विठ्ठलनाम । कडु तो संसार रे लक्षचौऱ्याशी जन्म ।।१८।।
तुका म्हणे मना घरी रे संतसंगतिसोई । न लगे कांहीं करावें राहें विठ्ठलपायीं ।।१९।।

।। येकाखडी ।। १।।
२३०३
करावा कैवाड । नाहीं तरी आला नाड ।।१।।
स्मरा पंढरीचा देव । मनीं धरोनिया भाव ।।धृ।।
खचविलें काळें । उगवा लवलाहें जाळें ।।२।।
गजर नामाचा । करा लवलाहे वाचा ।।३।।
घरटी चक्रफेरा । जन्ममृत्याचा भोंवरा ।।४।।
नानाहव्यासांची जोडी। तृष्णा करी देशधडी ।।५।।
चरणीं ठेवा चित्त । म्हणवा देवाचे अंकित ।।६।।
छंद नानापरी । कळा न पविजे हरी ।।७।।
जगाचा जनिता । भुक्तिमुक्तींचा ही दाता ।।८।।
झणी माझें माझें । भार वागविसी ओझें ।।९।।
यांची कां रे गेली बुद्धि । नाहीं तरायाची शुद्धि ।।१०।।
टणक धाकुलीं । अवघीं सरती विठ्ठलीं ।।११।।
ठसा त्रिभुवनीं । उदार हा शिरोमणि ।।१२।।
डगमगी तो वांयां जाय । धीर नाहीं गोता खाय ।।१३।।

ढळों नये जरी । लाभ घरिचिया घरीं।।१४।।
नाहीं ऐसें राहे । कांहीं नासिवंत देहे ।।१५।।
तरणा भाग्यवंत । नटे हरिकीर्तनांत ।।१६।।
थडी टाकी पैलतीर । बाहे ठोके होय वीर ।।१७।।
दया तिचें नांव । अहंकार जाय जंव।।१८।।
धनधान्य हेवा । नाडे कुटुंबाची सेवा ।।१९।।
नाम गोविंदाचें । घ्या रे हें चि भाग्य साचें ।।२०।।
परउपकारा । वेचा शक्ति निंदा वारा।।२१।।
फळ भोग इच्छा । देव आहे जयां तैसा ।।२२।।
बरवा ऐसा छंद । वाचे गोविंद गोविंद ।।२३।।
भविष्याचे माथां । भजन न द्यावें सर्वथा ।।२४।।
माग लागला न संडीं । अळसें माती घालीं तोंडीं ।।२५।।
यश कीर्ति मान । तरी जोडे नारायण ।।२६।।
रवि लोपे तेजें । जरी हारपे हें दुजें ।।२७।।
लकार लाविला । असतां नसतां चि उगला ।।२८।।
वासने चि धाडी । बंद खोड्या नाड्या बेडी ।।२९।।
सरतें न कळे । काय झांकियेले डोळे ।।३०।।
खंती ते न धरा । होणें गाढव कुतरा ।।३१।।
सायासाच्या जोडी । पिके काढियेल्या पेडी ।।३२।।
हातीं हित आहे । परि न करिसी पाहें।।३३।।
अळंकार लेणें । ल्या रे तुळसीमुद्राभूषणें ।।३४।।
ख्याति केली विष्णुदासीं । तुका म्हणे पाहा कैसी ।।३५।।

२३०४
देवें देऊळ सेविलें । उदक कोरडें चि ठेविलें ।।१।।
नव्हे मत गूढ उमानें कांहीं । तूं आपणआपणापें पाहीं ।।धृ।।
पाठें पूर वोसंडला । सरिता सागर तुंबोनि ठेला ।।२।।
वांजेघरीं बाळ तान्हा । एक बाळी दों कानां ।।३।।
तुका म्हणे पैस । अनुभविया ठावा गोडीरस ।।४।।
।। लोहागांवीं कीर्तनांत मेलें मूल जीत झालें ते समयीं स्वामींनीं अभंग केले ते ।।
२३०५
अशक्य तों तुम्हां नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ।।१।।

मागें काय जाणों स्वामीचे पवाडे । आतां कां रोकडे दावूं नये ।।धृ।।
थोर भाग्य आम्ही समर्थाचे कासे । म्हणवितों दास काय थोडें ।।२।।
तुका म्हणे माझे निववावे डोळे । दावूनि सोहळे सामर्थ्याचे ।।३।।

२३०६
दाता तो एक जाणा । नारायणा स्मरवी ।।१।।
आणीक नासिवंतें काय । न सरे हाय ज्यांच्यानें ।।धृ।।
यावें तयां काकुलती । जे दाविती सुपंथ ।।२।।
तुका म्हणे उरी नुरे । त्याचे खरे उपकार ।।३।।

अलंकापुरीं ब्राम्हण धरणें बसून बेताळीस दिवस उपवासी होता त्यास द्दष्टांत कीं देहूस तुकोबापाशी जाणें. ब्राम्हण स्वामीपें आला त्याबद्दल अभंग ।। ३१ ।।
२३०७
श्रीपंढरीशा पतितपावना । एक विज्ञापना पायांपाशीं।।१।।
अनाथां जीवांचा तूं काजकैवारी । ऐसी चराचरीं ब्रिदावळी ।।धृ।।
न संगतां कळे अंतरीचें गुज । आतां तुझी लाज तुज देवा ।।२।।
आळिकर ज्याचें करिसी समाधान । अभयाचें दान देऊनियां ।।३।।
तुका म्हणे तूं चि खेळें दोहीं ठायीं । नसेल तो देईं धीर मना ।।४।।

२३०८
अगा ये उदारा अगा विश्वंभरा । रखुमाईच्या वरा पांडुरंगा ।।१।।
अगा सर्वोत्तमा अगा कृष्णा रामा । अगा मेघश्यामा विश्वजनित्या ।।धृ।।
अगा कृपावंता जीवन तूं दाता । अगा सर्वसत्ता धरितया ।।२।।
अगा सर्वजाणा अगा नारायणा । करुणवचना चित्त द्यावें ।।३।।
तुका म्हणे नाहीं अधिकार तैसी । सरती पायांपाशीं केली मागें ।।४।।

२३०९
नव्हें दास खरा । परि जाला हा डांगोरा ।।१।।
यासी काय करूं आतां । तूं हें सकळ जाणता ।।धृ।।
नाहीं पुण्यगाठीं । जे हें वेचूं कोणासाठीं ।।२।।
तुका म्हणे कां उपाधी । वाढविली कृपानिधी ।।३।।

२३१०
तुजविण सत्ता । नाहीं वाचा वदविता ।।१।।
ऐसे आम्ही जाणों दास । म्हणोनि जालों उदास ।।धृ।।
तुम्ही दिला धीर। तेणें मन झालें स्थिर ।।२।।
तुका म्हणे आड । केलों मी हें तुझें कोड।।३।।

२३११
काय मी जाणता । तुम्हांहुनि अनंता ।।१।।
जो हा करूं अतिशय । कां तुम्हां दया नये ।।धृ।।
काय तुज नाहीं कृपा । विश्वाचिया मायबापा ।।२।।
तुका म्हणे वाणी । माझी वदे तुम्हांहुनि।।३।।

२३१२
काय ज्ञानेश्वरीं उणें । तिंहीं पाठविलें धरणें ।।१।।
ऐकोनियां लिखित । म्हूण जाणवली हे मात ।।धृ।।
तरी जाणे धणी। वदे सेवकाची वाणी ।।२।।
तुका म्हणे ठेवा । होतां सांभाळावें देवा ।।३।।

२३१३
ठेवूनियां डोई । पायीं जालों उतराई ।।१।।
कारण तें तुम्हीं जाणां । मी तराळ नारायणा ।।धृ।।
प्रसंगीं वचन । दिलें तें चि खावें अन्न ।।२।।
तुका म्हणे भार । तुम्ही जाणां थोडा फार ।।३।।

उपदेश अभंग ।। ११ ।।
२३१४
नको कांहीं पडों ग्रंथाचे भरीं । शीघ व्रत करीं हें चि एक ।।१।।
देवाचिये चाडे आळवावें देवा । ओस देहभावा पाडोनियां।।धृ।।
साधनें घालिती काळाचिये मुखी । गर्भवास सेकीं न चुकती ।।२।।
उधाराचा मोक्ष होय नव्हे ऐसा । पतनासी इच्छा आवश्यक ।।३।।
रोकडी पातली अंगसंगें जरा । आतां उजगरा कोठवरि ।।४।।
तुका म्हणे घालीं नामासाठी उडी । पांडुरंग थडी पाववील ।।५।।

२३१५
नाहीं देवापाशीं मोक्षाचे गांठोळें । आणूनि निराळें द्यावें हातीं ।।१।।
इंद्रियांचा जय साधुनियां मन । निर्विषय कारण असे तेथें ।।धृ।।
उपास पारणीं अक्षरांची आटी । सत्कर्मा शेवटीं असे फळ ।।२।।
आदरें संकल्प वारीं अतिशय । सहज तें काय दुःख जाण ।।३।।
स्वप्नींच्या घायें विळवसी वांयां । रडे रडतियासवें मिथ्या ।।४।।
तुका म्हणे फळ आहे मूळापाशीं । शरण देवासीं जाय वेगीं ।।५।।

२३१६
तजिलें भेटवी आणूनि वासना । दाविल्याचे जना काय काज ।।१।।
आळवावें देवा भाकूनि करुणा । आपुलिया मना साक्ष करीं ।।धृ।।
नाहीं जावें यावें दुरूनि लागत । आहे साक्षभूत अंतरींचा ।।२।।
तुका म्हणे हा आहे कृपासिंधु। तोडी भवबंधु तात्काळिक ।।३।।

२३१७
गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ।।१।।
मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ।।धृ।।
आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ।।२।।
तुका म्हणे आळी । जेवी नुरे चि वेगळी।।३।।

२३१८
ज्याचें जया ध्यान । तें चि होय त्याचें मन ।।१।।
म्हणऊनि अवघें सारा । पांडुरंग दृढ धरा ।।धृ।।
सम खूण ज्याचे पाय । उभा व्यापक विटे ठाय ।।२।।
तुका म्हणे नभा । परता अनूचा ही गाभा ।।३।।
२३१९
पाहुनियां ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हां आलें जाण फळ त्याचें ।।१।।
नाहीं तरि वांयां केली तोंडपिटी । उरी ते शेवटी उरलीसे ।।धृ।।
पढोनियां वेद हरिगुण गावे । ठावें तें जाणावें तेव्हां जालें ।।२।।
तप तिर्थाटण तेव्हां कार्यसिद्धि । स्थिर राहे बुद्धि हरिच्या नामीं ।।३।।
यागयज्ञादिक काय दानधर्म । तरि फळ नाम कंठीं राहे ।।४।।
तुका म्हणे नको काबाडाचे भरी । पडों सार धरीं हें चि एक ।।५।।

२३२०
सुखें खावें अन्न । त्याचें करावें चिंतन ।।१।।
त्याचें दिलें त्यासी पावे । फळ आपणासी फावे ।।धृ।।
आहे हा आधार। नाम त्याचें विश्वंभर ।।२।।
नाही रिता ठाव । तुका म्हणे पसरीं भाव।।३।।

२३२१
संकोचोनि काय जालासी लहान । घेईं अपोशण ब्रम्हांडाचें ।।१।।
करोनि पारणें आंचवें संसारा । उशीर उशिरा लावूं नको ।।धृ।।
घरकुलानें होता पडिला अंधार । तेणें केलें फार कासावीस ।।२।।
झुगारूनि दुरी लपविलें काखे । तुका म्हणे वाखे कौतुकाचे ।।३।।

२३२२
माझ्या बापें मज दिधलें भातुकें । म्हणोनि कवतुकें क्रीडा करीं ।।१।।
केली आळी पुढें बोलिलों वचन । उत्तम हें ज्ञान आलें त्याचें ।।धृ।।
घेऊनि विभाग जावें लवलाहा । आलेति या ठाया आपुलिया ।।२।।
तुका ज्ञानदेवीं समुदाय । करावा मी पाय येइन वंदूं ।।३।।

२३२३
ज्ञानियांचा गुरु राजा महाराव । म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हां ।।१।।
मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ।।धृ।।
ब्रम्हादिक जेथें तुम्हां वोळगणे । इतर तुळणें काय पुरे।।२।।
तुका म्हणे नेणे युक्तीची ते खोलीं । म्हणोनि ठेविली पायीं डोई ।।३।।

२३२४
बोलिलीं लेकुरें । वेडीं वांकुडीं उत्तरें ।।१।।
करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ।।धृ।।
नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ।।२।।
तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायांपें किंकरा ।।३।।

२३२५
काय तुम्ही जाणां । करूं अव्हेर नारायणा ।।१।।
तरी या लटिक्याची गोही । निवडली दुसरे ठायीं ।।धृ।।

कळों अंतरींचा गुण । नये फिटल्यावांचून ।।२।।
आणिलें अनुभवा । जनाच्या हें ज्ञानदेवा ।।३।।
आणीक कोणी मिती । त्यांच्या चिंतनें विश्रांति।।४।।
तुका म्हणे बीज पोटीं । फळ तैसें चि सेवटीं ।।५।।

२३२६
अविश्वासीयाचें शरीर सुतकी । विटाळ पातकी भेद वाही ।।१।।
काय त्याचे वेल जाईल मांडवा । होता तैसा ठेवा आला पुढें ।।धृ।।
मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा । कपाळीचें धोंडा उभा ठाके । तुका म्हणे
जैसा कुचराचा दाणा । परिपाकीं अन्ना न मिळे जैसा ।।३।।

२३२७. तामसाचीं तपें पापाची सिदोरी । तमोगुणें भरी घातले ते ।।१।।
राज्यमदा आड सुखाची संपत्ति । उलंघूनि जाती निरयगांवा।।धृ।।
इंद्रियें दमिलीं इच्छा जिती जीवीं । नागविती ठावीं नाहीं पुढें ।।२।।
तुका म्हणे हरिभजनावांचून । करिती तो सीण पाहों नये ।।३।।

२३२८
हरिकथेवांचून इच्छिती स्वहित । हरिजन चित्त न घला तेथें ।।१।।
जाईल भंगोन आपुला विश्वास । होईल या नास कारणांचा ।।धृ।।
ज्याचिया बैसावे भोजनपंगती । त्याचिया संगती तैसे खावें ।।२।।
तुका म्हणे काय जालेसि जाणते । देवा ही परते थोर तुम्ही ।।३।।

२३२९
सेवकें करावें स्वामीचें वचन । त्यासी हुंतूंपण कामा नये ।।१।।
घेईल जीव कां सारील परतें । भंगलिया चित्तें सांदी जनां।।धृ।।
खद्योतें दावावी रवी केवीं वाट । आपुलें चि नीट उसंतावें ।।२।।
तुका म्हणे तो ज्ञानाचा सागर । परि नेंदी अगर भिजों भेदें ।।३।।

२३३०
जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ।।१।।
करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ।।धृ।।
जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ।।२।।

तुका म्हणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्ताचिया ।।३।।

२३३१
बहुतां छंदाचें बहु वसे जन । नये वांटूं मन त्यांच्या संगें ।।१।।
करावा जतन आपुला विश्वास । अंगा आला रस आवडीचा ।।धृ।।
सुखाची समाधी हरिकथा माउली । विश्रांति साउली सिणलियांची ।।२।।
तुका म्हणे बुडे बांधोनि दगड । तेथें काय कोड धांवायाचें ।।३।।

२३३२
हरिकथे नाहीं । विश्वास ज्याचे ठायीं ।।१।।
त्याची वाणी अमंगळ । कान उंदराचें बीळ ।।धृ।।
सांडुनि हा रस । करिती आणीक सायास ।।२।।
तुका म्हणे पिसीं । वांयां गेलीं किती ऐसीं।।३।।

२३३३
प्रेम अमृताची धार । वाहे देवा ही समोर ।।१।।
उर्ध्ववाहिनी हरिकथा । मुगुटमणि सकळां तीर्थां ।।धृ।।
शिवाचें जीवन। जाळी महादोष कीर्तन ।।२।।
तुका म्हणे हरि । इची स्तुति वाणी थोरी ।।३।।

२३३४
आतां माझ्या मना । इची घडो उपासना ।।१।।
ऐसें करींपांडुरंगा।प्रेमवोसंडेसेंअंगा ।।धृ।।
सर्व काळ नये । वाचेविट आड भये ।।२।।
तुका वैष्णवांसंगती । हें चि भजन पंगती ।।३।।

२३३५
उपास कराडी । तिहीं करावीं बापुडीं ।।१।।
आम्ही विठोबाचे दास । चिंता झुगारावी आस ।।धृ।।
भक्तीच्या उत्कर्षे । नाहीं मुक्तीचें तें पिसें ।।२।।
तुका म्हणे बळ । अंगीं आमुच्या सकळ ।।३।।

२३३६

करविली तैसी केली कटकट । वांकडें कीं नीट देव जाणे ।।१।।
कोणाकारणें हें जालेंसे निर्माण । देवाचें कारण देव जाणे ।।२।।
तुका म्हणे मी या अभिमाना वेगळा । घालुनि गोपाळा भार असें ।।३।।

२३३७
तुम्ही येथें पाठविला धरणेकरी । त्याची जाली परी आइका ते ।।१।।
आतां काय पुढें वाढवुनि विस्तार । जाला समाचार आइका तो ।।धृ।।
देवाचें उचित एकादश अभंग । महाफळ त्याग करूनि गेला ।।२।।
तुका म्हणे सेवा समर्पूनि पायीं । जालों उतराई ठावें असो ।।३।।
।।३१।।

२३३८
मरण माझें मरोन गेलें । मज केलें अमर ।।१।।
ठाव पुसिलें बुड पुसिलें । वोस वोसलें देहभावा ।।धृ।।
आला होता गेला पूर । धरिला धीर जीवनीं ।।२।।
तुका म्हणे बुनादीचें । जालें साचें उजवणें ।।३।।

२३३९
माझे लेखीं देव मेला । असो त्याला असेल ।।१।।
गोष्टी न करी नांव नेघें । गेलों दोघें खंडोनी ।।धृ।।
स्तुतिसमवेत निंदा । केला धंदा उदंड ।।२।।
तुका म्हणे निवांत ठेलों । वेचित आलों जीवित्व ।।३।।

२३४०
लवविलें तया सवें लवे जाती । अभिमाना हातीं सांपडेना ।।१।।
भोळिवेचें लेणें विष्णुदासां साजे । तेथें भाव दुजे हारपती ।।धृ।।
अर्चन वंदन नवविधा भक्ति । दया क्षमा शांति ठायीं ।।२।।
तये गांवीं नाहीं दुःखाची वसती । अवघा चि भूतीं नारायण ।।३।।
अव घें चि जालें सोंवळें ब्रम्हांड । विटाळाचें तोंड न देखती ।।४।।
तुका म्हणे गाजे वैकुंठीं सोहळा । याही भूमंडळामाजी कीर्ति ।।५।।

२३४१
पंढरीची वारी आहे माझे घरीं । आणीक न करीं तीर्थव्रत ।।१।।

व्रत एकादशी करीन उपवासी । गाइन अहर्निशीं मुखीं नाम ।।२।।
नाम विठोबाचें घेईन मी वाचे । बीज कल्पांतींचें तुका म्हणे ।।३।।

२३४२
संपदा सोहळा नावडे मनाला । करी तें टकळा पंढरीचा ।।१।।
जावें पंढरिसी आवडी मनासी । कधीं एकादशी आषाढी हे ।।२।।
तुका म्हणे ऐसें आर्त ज्याचे मनीं । त्याची चक्रपाणी वाट पाहे ।।३।।

२३४३
कथनी पठणी करूनि काय । वांचुनि रहणी वांयां जाय ।।१।।
मुखीं वाणी अमृतगोडी । मिथ्या भुकें चरफडी ।।धृ।।
पिळणी पाक करितां दगडा । काय जडा होय तें ।।२।।
मधु मेळवूनि माशी । आणिका सांसी पारधिया ।।३।।
मेळऊनि धन मेळवी माती । लोभ्या हातीं तें चि मुखीं ।।४।।
आपलें केलें आपण खाय । तुका वंदी त्याचे पाय ।।५।।

२३४४
उमटती वाणी । वाटे नामाचिया ध्वनी ।।१।।
बरें सेवन उपकारा । द्यावें द्यावें या उत्तरा ।।धृ।।
सरळ आणि मृद । कथा पाहावी तें उर्ध ।।२।।
गात जात तुका । हा चि उपदेश आइका।।३।।

२३४५
कथाकाळींची मर्यादा सांगतों ते भावें वंदा । प्रीतीने गोविंदा हें चि एक आवडे ।।१।।
टाळ वाद्या गीत नृत्य अंतःकरणें प्रेमभरित । वाणिता तो कीर्त तद्भावने लेखावा ।।धृ।।
नये अळसें मोडूं अंग कथे कानवडें हुंग । हेळणेचा रंग दावी तो चांडाळ ।।२।।
तोंडी विडा माने ताठा थोरपणे धाली गेंठा । चित्त नेदी नामपाठा गोष्टी लावी तो चांडाळ ।।४।।
कथे इच्छी मान दावूनियां थोरपण रजा संकोच न लुगडी सांवरी तो चांडाळा ।।४।।

आपण बैसे बाजेवरी सामान हरिच्या दासां धरी । तरि तो सुळावरि वाहिजे निश्चयेसीं ।।५।।
येतां नकरी नमस्कार कर जोडोनियां नम्र । न म्हणवितां थोर आणिकां खेटी तो चांडाळ ।।६।।
तुका विनवी जना कथे नाणावें अवगुणा । करा नारायणा ॠणी समर्पक भावें ।।७।।

२३४६
कथा देवाचें ध्यान । कथा साधना मंडण । कथे ऐसें पुण्य आणीक नाहीं सर्वथा ।।१।।
ऐसा साच खरा भाव । कथेमाजी उभा देव ।।धृ।।
मंत्र स्वल्प जना उच्चारितां वाचे मना । म्हणतां नारायणा क्षणें जळती महा दोष ।।२।।
भावें करितां कीर्तन तरे तारी आणीक जन । भेटे नारायण संदेह नाहीं म्हणे तुका ।।३।।

२३४७
कथा त्रिवेणीसंगम देव भक्त आणि नाम । तेथींचें उत्तम चरणरज वंदितां ।।१।।
जळती दोषांचे डोंगर शुद्ध होती नारी नर । गाती ऐकती सादर जे पवित्र हरिकथा ।।धृ।।
तीर्थें तया ठाया येती पुनीत व्हावया । पर्वकाळ पायां तळीं वसे वैष्णवां।।२।।
अनुपम्य हा महिमा नाहीं द्यावया उपमा । तुका म्हणे ब्रम्हा नेणे वर्णूं या सुखा ।।३।।

२३४८
सांडूनि कीर्तन न करीं आणीक काज । नाचेन निर्लज्ज तुझ्या रंगीं ।।१।।
आवडीचें आर्त पुरवीं पंढरिराया । शरण तुझ्या पायां या चि लागीं ।।धृ।।
टाळी वाहूनियां विठ्ठल म्हणेन । तेणें निवारीन भवश्रम ।।२।।
तुका म्हणे देवा नुपेक्षावें आम्हां । न्यावें निजधामा आपुलिया ।।३।।

२३४९
जळती कीर्तनें दोष पळतील विघ्नें ।।१।।

हें चि बळिवंत गाढें । आनंद करूं दिंडीपुढें ।।धृ।।
कळि पापाची हे मूर्ति। नामखड्‌ग घेऊं हातीं ।।२।।
तुका म्हणे जाऊं । बळें दमामे ही लावूं ।।३।।

२३५०
यम सांगे दूतां तुम्हां नाहीं तेथें सत्ता । जेथें होय कथा सदा घोष नामाचा ।।१।।
नका जाऊं तया गांवां नामधारकाच्या शिवां । सुदर्शन येवा घरटी फिरे भोंवती ।।धृ।।
चक्र गदा घेउनी हरि उभा असे त्यांचे द्वारीं । लक्ष्मी कामारी रिद्धिसिद्धीसहित ।।२।।
ते बळियाशिरोमणी हरिभक्त ये मेदिनी । तुका म्हणे कानीं यम सांगे दूतांचे ।।३।।

२३५१
कान्हया रे जगजेठी । देईं भेटी एकवेळे ।।१।।
काय मोकलिलें वनीं । सावजांनीं वेढिलें ।।धृ।।
येथवरी होता संग । अंगें अंग लपविलें ।।२।।
तुका म्हणें पाहिलें मागें । एवढ्या वेगें अंतरला ।।३।।

२३५२
आपुल्या आम्ही पुसिलें नाही । तुज कांहीं कारणें।।१।।
मागें मागें धांवत आलों । कांहीं बोलों यासाटीं ।।धृ।।
बहुत दिस होतें मनीं । घ्यावी धणी एकांतीं ।।२।।
तुका म्हणे उभा राहें । कान्हो पाहें मजकडे ।।३।।

२३५३
धन्य बा ह्या ऐशा नारी । घरीं दारीं नांदती ।।१।।
चोरूनिया तुजपाशीं । येतां त्यांसी न कळतां ।।धृ।।
दोन्हीं ठायीं समाधान । सम कठीण बहुतचि ।।२।।
तुका म्हणे जीवासाठीं । दुर्लभ भेटी ते देवा ।।३।।

२३५४

उदासीना पावल्या वेगीं । अंगा अंगीं जडलिया।।१।।
वेटाळिला भोंवता हरी । मयोरफेरीं नाचती ।।धृ।।
मना आले करिती चार । त्या फार हा एकला ।।२।।
तुका म्हणे नारायणीं । निराजनी मीनलिया ।।३।।

२३५५
विशमाची शंका वाटे । सारिखें भेटे तरी सुख ।।१।।
म्हणऊनि चोरिलें जना । आल्या राणां एकांतीं ।।धृ।।
दुजियासी कळों नये । जया सोय नाहीं हे ।२।।
तुका म्हणे मोकळें मन । नारायण भोगासी ।।३।।

२३५६
आलिंगन कंठाकंठीं । पडे मिठी सर्वांगें ।।१।।
न घडे मागें परतें मन । नारायण संभोगी ।।धृ।।
वचनासी वचन मिळे। रिघती डोळे डोळियांत ।।२।।
तुका म्हणे अंतर्ध्यानीं । जीव जीवनीं विराल्या ।।३।।

२३५७
कोणी सुना कोणी लेंकी । कोणी एकी सतंता ।।१।।
अवधियांची जगनिंद । जाली धिंद सारखी ।।धृ।।
अवघ्या अवघ्या चोरा । विना वरा मायबापा ।।२।।
तुका म्हणे करा सेवा । आलें जीवावर तरी ।।३।।

२३५८
येथील जें एक घडी । तये जोडी पार नाहीं ।।१।।
ती त्यांचा सासुरवास । कैंचा रस हा तेथें ।।धृ।।
अवघे दिवस गेले कामा । हीं जन्मा खंडण ।।२।।
तुका म्हणे रतल्या जनीं । सोडा झणी कान्होबा ।।३।।
।।८।।

२३५९
चिंता नाहीं गांवीं विष्णुदासांचिये । घोष जयजयकार सदा ।।१।।
नारायण घरीं सांठविलें धन । अवघे चि वाण तया पोटीं ।।धृ।।

सवंग सकळां पुरे धणीवरी । सेवावया नारी नर बाळा।।२।।
तुका म्हणे येणें आनंदी आनंदु । गोविंदें गोविंदु पिकविला।।३।।

२३६०
करिती तया वेवसाव आहे । येथें व्हा रे साहे एकां एक ।।१।।
गातां आइकतां समान चि घडे । लाभें लाभ जोडे विशेषता ।।धृ।।
प्रेमाचें भरतें भातें घ्यावें अंगीं । नटे टाळी रंगीं शूरत्वेंसी ।।२।।
तुका म्हणे बहुजन्मांचे खंडण । होइल हा सीण निवारोनि ।।३।। ।।२।।

२३६१
नाहीं घाटावें लागत । एका सितें कळें भात ।।१।।
क्षीर निवडितें पाणी । चोंची हंसाचिये आणी ।।धृ।।
आंगडें फाडुनि घोंगडें करी । अवकळा तये परी ।।२।।
तुका म्हणे कण । भुसीं निवडे कैंचा सीण ।।३।।

स्वामीचें अभंगींचें नांव काढून सालोमालो आपलें नांव घालीत त्यावर अभंग ।। ८ ।।

२३६२
सालोमालो हरिचे दास । म्हणउन केला अवघा नास।।१।।
अवघें बचमंगळ केलें । म्हणती एकांचें आपुले ।।धृ।।
मोडूनि संतांचीं वचनें । करिती आपणां भूषणें ।।२।।
तुका म्हणे कवी । जगामधीं रूढ दावी ।।३।।

२३६३
जायाचे अळंकार । बुडवूनि होती चोर ।।१।।
त्यांसी ताडणाची पूजा । योग घडे ब-या वोजा ।।धृ।।
अभिलाषाच्या सुखें। अंतीं होती काळीं मुखें ।।२।।
तुका म्हणे चोरा । होय भूषण मातेरा ।।३।।

२३६४
कालवूनि विष । केला अमृताचा नास ।।१।।

ऐशा अभाग्याच्या बुद्धि । सत्य लोपी नाहीं शुद्धि ।।धृ।।
नाक कापुनि लावी सोनें । कोण अळंकार तेणें ।।२।।
तुका म्हणे बावी । मोडूनि मदार बांधावी ।।३।।

२३६५
कण भुसाच्या आधारें । परि तें निवडितां बरें ।।
काय घोंगालि पाधाणी । ताकामध्यें घाटी लोणी ।।धृ।।
सुइणीपुढें चेंटा । काय लपविसी चाटा ।।२।।
तुका म्हणे ज्ञान । दिमाकाची भनभन ।।३।।

२३६६
विकल तेथें विका । माती नांव ठेवूनि बुका ।।१।।
हा तो निवाड्याचा ठाव । खऱ्या खोट्या निवडी भाव ।।धृ।।
गऱ्हवारे हा विधि । पोट वाढविलें चिंधीं ।।२।।
लावूं जाणे विल्हे। तुका साच आणिक कल्हे ।।३।।

२३६७
विषयीं अद्वये । त्यासी आम्हां सिवो नये ।।१।।
देव तेथुनि निराळा । असे निष्काम वेगळा ।।धृ।।
वासनेची बुंथी । तेथें कैची ब्रम्हस्थिति ।।२।।
तुका म्हणे असतां देहीं । तेथें नाही जेमेतीं ।।३।।

२३६८
नमितों या देवा । माझी एके ठायीं सेवा ।।१।।
गुणअवगुण निवाडा । म्हैस म्हैस रेडा रेडा ।।धृ।।
जनीं जनार्दन। साक्ष त्यासी लोटांगण ।।२।।
तुका म्हणे खडे । निवडू दळणीं घडघडे ।।३।।
।।८।।

२३६९
जीव जीती जीवना संगें । मत्स्या मरण त्या वियोगें।।१।।
जया चित्तीं जैसा भाव । तयां जवळि तैसा देव ।।धृ।।
सकळां पाडीये भानु । परि त्या कमळाचें जीवनु ।।२।।

तुका म्हणे माता । वाहे तान्हे याची चिंता ।।३।।

२३७०
मुंगीचिया घरा कोण जाय मूळ । देखोनियां गूळ धांव घाली ।।१।।
याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धांवे हिता आपुलिया ।।धृ।।
उदक अन्न काये म्हणे मज खा ये । भुकेला तो जाये चोजवीत ।।२।।
व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा । दुःखाच्या परिहारा आपुलिया ।।३।।
तुका म्हणे जया आपुलें स्वहित। करणें तो चि प्रीत धरी कथे ।।४।।

२३७१
जन्मांतरिंचा परिट न्हावी । जात ठेवी त्यानें तें।।१।।
वाखर जैसा चरचरी । तोंड करी संव दणी ।।धृ।।
पूर्व जन्म शिखासूत्र । मळ मूत्र अंतरीं ।।२।।
तुका म्हणे करिती निंदा । धुवटधंदा पुढिलांचा ।।३।।

२३७२
नाम दुसी त्याचें नको दरषण । विष तें वचन वाटे मज ।।२।।
अमंगळ वाणी नाइकवे कानीं । निंदेची पोहोणी उठे तेथें।।धृ।।
काय लभ्य त्याचिये वचनीं । कोणत्या पुराणीं दिली ग्वाही ।।२।।
काय आड लावूं त्याचिया तोंडासी । आतां या जिभेसी काय करूं ।।३।।
तुका म्हणे संत न मनिती त्यांस । घेऊं पाहे ग्रास यमदूत ।।४।।

२३७३
येऊनि नरदेहा झांकितील डोळे । बळें चि अंधळे होती लोक ।।१।।
उजडासरसी न चलती वाट । पुढील बोभाट जाणोनियां ।।धृ।।
बहु फेरे आले सोसोनि वोळसा । पुढें नाहीं ऐसा लाभ मग ।।२।।
तुका म्हणे जाऊं सादावीत वाट । भेटे तरी भेटो कोणी तरी ।।३।।

२३७४
नव्हे जोखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ।।१।।
बळिया माझा पंढरिराव । जो या देवांचा ही देव ।।धृ।।
रंडी चंडी शक्ति । मद्यमांस भक्षिती ।।२।।
बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाटीं देव ।।३।।

गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ।।४।।
मुंज्या म्हैसासुरें । हें तों कोण लेखी पोरें ।।५।।
वेताळें फेताळें । जळो त्यांचें तोंड काळें ।।६।।
तुका म्हणे चित्तीं । धरा रखुमाईचा पती।।७।।
२३७५
पडतां जड भारी । दासीं आठवावा हरी ।।१।।
मग तो होऊं नेदी सीण । आड घाली सुदर्शन ।।धृ।।
नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ।।२।।
तुका म्हणे प्राण । करा देवासी अर्पण ।।३।।
२३७६
मायें मोकलिलें कोठें जावें बळें । आपुलिया बळें न वंचे तें ।।१।।
रुसोनियां पळे सांडुनियां ताट । मागें पाहे वाट यावें ऐसीं ।।धृ।।
भांडवल आम्हां आळी करावी हे । आपणें माये धांवसील ।।२।।
तुका म्हणे आळी करुनियां निकी । देसील भातुकीं बुझाऊनि ।।३।।

२३७७
नागर गोडें बाळरूप । तें स्वरूप काळीचें ।।१।।
गाईगोपाळांच्या संगें । आलें लागें पुंडलीका ।।धृ।।
तें हें ध्यान दिगांबर । कटीं कर मिरवती ।।२।।
नेणपणे उगें चि उभें । भक्तिलोभें राहिलें ।।३।।
नेणे वरदळाचा मान । विटे चरण सम उभें ।।४।।
सहज कटावरी हात । दहींभात शिदोरी ।।५।।
मोहरी पांवा गांजिवा पाठीं । धरिली काठी ज्या काळें ।।६।।
रम्य स्थळ चंद्रभागा । पांडुरंगा क्रीडेसी ।।७।।
भीमा दक्षणमुख वाहे । दृष्टी पाहे समोर।।८।।
तारावेसे मूढ लोक । दिली भाक पुंडलिका ।।९।।
तुका म्हणे वैकुंठवासी । भक्तांपासीं राहिला ।।१०।।

२३७८
विठ्ठलनामाचा नाहीं ज्या विश्वास । तो वसे उदास नरकामध्यें ।।१।।
तयासी बोलतां होईल विटाळ । नेव जाये तो जळस्नान करितां ।।धृ।।
विठ्ठलनामाची नाहीं ज्या आवडी । त्याची काळ घडी लेखिताहे ।।२।।
तुका म्हणे मज विठोबाची आण। जरी प्रतिवचन करिन त्यासी ।।३।।

२३७९
तया घडले सकळ नेम । मुखीं विठोबाचें नाम।।१।।
कांहीं न लगे सिणावें । आणिक वेगळाल्या भावें । वाचे उच्चारावें।
रामकृष्णगोविंदा ।।धृ।।
फळ पावाल अवलिळा । भोग वैकुंठ सोहळा ।।२।।
तुका म्हणे त्याच्या नांवें । तो चि होइजेल स्वभावें।।३।।

२३८०
पुराणप्रसिद्ध सीमा । नामतारकमहिमा ।।१।।
मागें जाळी महा दोष । पुढें नाही गर्भवास ।।धृ।।
जें निंदिलें शास्त्रें । वंद्य जालें नाममात्रें ।।२।।
तुका म्हणे ऐसा । त्रिभुवनीं नामठसा ।।३।।

२३८१
नाम घेतां न लगे मोल । नाममंत्र नाहीं खोल ।।१।।
दों अक्षरांचें काम । उच्चारावें राम राम ।।धृ।।
नाहीं वर्णाधमयाती। नामीं अवघीं चि सरतीं ।।२।।
तुका म्हणे नाम । चैतन्य निजधाम।।३।।

२३८२
नाम घेतां वांयां गेलां । ऐसा कोणें आईकिला ।।१।।
सांगा विनवितों तुम्हांसी । संत महंत सिद्ध ऋषी ।।धृ।।
नामें तरला नाहीं कोण । ऐसा द्यावा निवडून ।।२।।
सलगीच्या उत्तरा । तुका म्हणे क्षमा करा ।।३।।

२३८३
फुकाचें तें लुटा सार । व्हा रे अमर सदैव ।।१।।
नाहीं गर्भवास पुढती । डोंगर जळती दोषांचे ।।धृ।।
उदंड भावें उदंड घ्यावें । नाम गावें आवडी ।।२।।
तुका म्हणे घरिच्या घरीं । देशा उरीं न सीणीजे ।।३।।
।।१५।।

२३८४
प्रीति नाही राया वर्जिली ते कांता । परी तिची सत्ता जगावरी ।।१।।
तैसे दंभी जालों तरी तुझे भक्त । वास यमदूत न पाहाती ।।धृ।।
राजयाचा पुत्र अपराधी देखा । तो काय आणिकां दंडवेल ।।२।।
बाहातरी खोडी परी देवमण कंठीं । तैसो जगजेठी म्हणे तुका ।।३।।

२३८५
करावा उद्धार किंवा घ्यावी हारी । एका बोला स्थिरी राहें देवा ।।१।।
निरसनें माझा होईल संदेह । अवघें चि आहे मूळ पायीं ।।धृ।।
राहिलों चिकटूण कांहीं चि न कळे । कोणा नेणों काळे उदय भाग्य ।।२।।
तुका म्हणे बहु उद्वेगला जीव । भाकीतसें कीव देवराया ।।३।।
।।१।।

२३८६
आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनियां ।।१।।
मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंके ।।धृ।।
भयाचिये पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भले ।।२।।
तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ।।३।।

२३८७
भोग तो न घडे संचितावांचूनि । करावें तें मनीं समाधान ।।१।।
म्हणऊनी मनीं मानूं नये खेदु । म्हणावा गोविंद वेळोवेळां ।।धृ।।
आणिकां रुसावें न लगे बहुतां । आपुल्या संचितावांचूनियां ।।२।।
तुका म्हणे भार घातलिया वरी । होईल कैवारी नारायण ।।३।।

२३८८
निर्वैर व्हावें सर्वभूतांसवें । साधन बरवें हें चि एक।।१।।
तरी च अंगीकार करिल नारायण । बडबड तो सीण येणेंविण ।।धृ।।
सोइरें पिशुन समान चि घटे । चित्त पर ओढे उपकारी ।।२।।
तुका म्हणे चित्त जालिया निर्मळ । तरि च सकळ केलें होय ।।३।।

२३८९
दिली चाले वाचा । क्षय मागिल्या तपाचा ।।१।।

रिद्धि सिद्धि येती घरा । त्याचा करिती पसारा ।।धृ।।
मानदंभांसाटीं। पडे देवासवें तुटी ।।२।।
तुका म्हणे मेवा । कैचा वेठीच्या नदवां।।३।।

२३९०
तापल्यावांचून नव्हे अळंकार । पिटूनियां सार उरलें तें ।।१।।
मग कदाकाळीं नव्हे शुद्ध जाति । नासें शत्रु होती मित्र ते चि ।।धृ।।
कळिवर बरें भोगूं द्यावें भोगा । फांसिलें तें रोगा हातीं सुटे ।।२।।
तुका म्हणे मन करावें पाठेळ । साहावे चि जाळ सिजेवरि ।।३।।

२३९१
पाठेळ करितां न साहावे वारा । साहेलिया ढोरा गोणी चाले ।।१।।
आपणां आपण हे चि कसवटी । हर्षामर्ष पोटीं विरों द्यावें ।।धृ।।
नवनीत तोंवरी कडकडी लोणी । निश्चळ होऊनी राहे मग ।।२।।
तुका म्हणे जरी जग टाकी घाया । त्याच्या पडे पायां जन मग ।।३।।

२३९२
कावळियासी नाहीं दया उपकार । काळिमा अंतर विटाळसें ।।१।।
तैसें कुधनाचें जिणें अमंगळ । घाणेरी वोंगळ वदे वाणी ।।धृ।।
कडु भोंपळ्याचा उपचारें पाक । सेविल्या तिडीक कपाळासी ।।२।।
तुका म्हणे विष सांडूं नेणे साप । आदरें तें पाप त्याचे ठायीं ।।३।।

२३९३
लाभ खरा नये तुटी । नाहीं आडखळा भेटी ।।१।।
जाय अवघिया देशा । येथें संचलाची तैसा ।।धृ।।
मग न लगे पारखी। अवघीं सकट सारखीं । तुका म्हणे वोळे । रूपें भुलविले डोळे ।।३।।

२३९४. नको आतां पुसों कांहीं । लवलाहीं उसंती ।।१।।
जाय वेगीं पंढरपुरा । तो सोयरा दीनांचा ।।धृ।।
वचनाचा न करीं गोवा । रिघें देवासीं शरण ।।२।।
तुका म्हणे कृपावंता । बहु चिंता दीनाची ।।३।।

२३९५
बुद्धिहीनां जडजीवां । नको देवा उपेक्षूं ।।१।।
परिसावी हे विज्ञापना । आम्हां दीनां दासांची ।।धृ।।
चिंतूनियां आले पाय । त्यांसी काय वंचन ।।२।।
तुका म्हणे पुरुषोत्तमा । करीं क्षमा अपराध।।३।।

२३९६
म्हणऊनि काकुळती । येतों पुढतों पुढती । तुम्हां असे हातीं । कमळापती भांडार ।।१।।
फेडूं आलेती दरिद्र । तरी न लगे उशीर । पुरे अभयंकर । ठाया ठाव रंकाशी ।।धृ।।
कोठें न घली धांव । याजसाठीं तजिली हांव । घेऊं नेदी वाव । मना केला विरोध ।।२।।
कारणांच्या गुणें । वेळ काळ तोही नेणें । तुमच्या कीर्तनें । तुका तुम्हां जागवी ।।३।।

२३९७
बहु नांवें ठेविलीं स्तुतीचे आवडी । बहुत या गोडी आली रसा ।।१।।
बहु सोसें सेवन केलें बहुवस । बहु आला दिस गोमट्याचा ।।धृ।।
बहुतां पुरला बहुतां उरला । बहुतांचा केला बहु नट ।।२।।
बहु तुका जाला निकट वृत्ती । बहु काकुलती येऊनियां।।३।।

२३९८
येहलोकीं आम्हां वस्तीचें पेणें । उदासीन तेणें देहभावीं।।१।।
कार्यापुरतें कारण मारगीं । उलंघूनि वेगीं जावें स्थळा ।।धृ।।
सोंगसंपादणी चालवितों वेव्हार । अत्यंतिक आदर नाहीं गोवा ।।२।।
तुका म्हणे वेंच लाविला संचिता । होइल घेतां लोभ कोणां ।।३।।

२३९९
रोजकीर्दी जमा धरुनी सकळ । खताविला काळ वरावरी ।।१।।
नाहीं होत झाड्यापाड्याचें लिगाड । हुजराती ते गोड सेवा रूजू ।।धृ।।
चोरासाटीं रदबदल आटा हाश । जळो जिणे दाश बहुताचें ।।२।।
सावधान तुका निर्भर मानसीं । सालझाड्यापाशी गुंपों नेणे ।।३।।

२४००
त्रिविधकर्माचे वेगळाले भाव । निवडूनि ठाव दाखविला।।१।।
आलियाचा झाडा राहिल्याचा ठाव । सुख गौरव संतां अंगीं ।।धृ।।
हिशेबें आलें तें सकळांसी प्रमाण । तेथें नाही आन चालों येत ।।२।।
तुका म्हणे नाहीं पापपुण्य खतीं । झाड्याची हुजती हातां आली ।।३।।

२४०१
साकरेचें नाम घेतां कळे गोडी । तैसी आम्हां जोडी वैष्णवांची ।।१।।
मोक्ष गांठी असे ठेविला बांधोनी । सोस तो भजनीं आवडीचा ।।धृ।।
भोजनाची चिंता माय वाहे बाळा । आम्हांसि तरी खेळावरि चित्त ।।२।।
तुका म्हणे आम्ही देहउपकारें । गाऊं निरंतर नाचों लागों ।।३।।

२४०२
सुखें घेऊं जन्मांतरें । एक बरें इहलोकीं ।।१।।
पंढरीचे वारकरी । होतां थोरी जोडी हे।।धृ।।
हरिदासांचा समागम। अंगीं प्रेम विसांवे ।।२।।
तुका म्हणे हें चि मन । इच्छादान मागतसे ।।३।।

२४०३
करूं जातां सन्निधान । क्षणि जन पालटे ।।१।।
आतां गोमटे ते पाय । तुझे माय विठ्ठले ।।धृ।।
हें तों आलें अनुभवा । पाहावें जीवावरूनि ।।२।।
तुका म्हणे केला त्याग । सर्वसंग म्हणऊनि ।।३।।

२४०४
क्षीर मागे तया रायतें वाढी । पाधानी गधडी ऐशा नांवें ।।१।।
समयो जाणां समयो जाणां । भलतें नाणां भलतेथें।।धृ।।
अमंगळ वाणी वदवी मंगळी । अशुभ वोंगळी शोभन तें ।।२।।
तुका म्हणे नेणें समयो ठाया ठाव । राहाडी ते वाव नरकाडी ।।३।।

२४०५
विंचा पीडी नांगी । ज्याचा दोष त्याचे अंगीं ।।१।।
केला पाहिजे विचार । मन मित्र दावेदार ।।धृ।।
मधुरा उत्तरीं । रांवा खेळे उरावरी ।।२।।
तुका म्हणे रेडा । सुखें जाती ऐशा पीडा ।।३।।

२४०६
तीथाअची अपेक्षा स्थळीं वाढे धर्म । जाणावें तें वर्म बहु पुण्य ।।१।।
बहु बरी ऐसी भाविकांची जोडी । काळ नाहीं घडी जात वांयां ।।धृ।।
करूनी चिंतन करवावें आणिकां । तो या जाला लोकां नाव जगीं ।।२।।
तुका म्हणे ऐसे परउपकारी । त्यांच्या पायांवरी डोई माझी ।।३।।

२४०७
भयाची तों आम्हां चिंत्तीं । राहो खंती सकेना ।।१।।
समर्पिलों जीवें भावें । काशा भ्यावें कारणें ।।धृ।।
करीन तें कवतुकें। अवघें निकें शोभेल ।।२।।
तुका म्हणे माप भरूं । दिस सारूं कवतुकें ।।३।।

२४०८
पाचारितां धावे । ऐसी ठायींची हे सवे ।।१।।
बोले करुणा वचनीं । करी कृपा लावी स्तनीं ।।धृ।।
जाणे कळवळा । भावसिद्धींचा जिव्हाळा ।।२।।
तुका म्हणे नाम । मागें मागें धांवे प्रेम।।३।।

२४०९
कां जी माझे जीवीं । आळस ठेविला गोसावीं ।।१।।
येवढा घात आणीक काय । चिंतनासी अंतराय ।।धृ।।
देहआत्म वंदी । केला घात कुबुद्धी ।।२।।
तुका म्हणे मन । कळवळी वाटे सीण ।।३।।

२४१०
दर्शनाचें आर्त जीवा । बहु देवा राहिलें ।।१।।
आतां जाणसी तें करीं । विश्वंभरीं काय उणें ।।धृ।।

येथें जरी उरे चिंता । कोण दाता याहूनी ।।२।।
तुका म्हणे जाणवलें । आम्हां भलें एवढेंच।।३।।

२४११
बैसों पाठमोरीं । मना वाटे तैसे करीं ।।१।।
परिं तूं जाणसीं आवडीं । बाळा बहुतांचीं परवडी ।।धृ।।
आपुलाल्या इच्छा। मागों जया व्हावें जैशा ।।२।।
तुका म्हणे आई । नव्हसी उदास विठाई ।।३।।

२४१२
विश्वंभरा वोळे । बहुत हात कान डोळे ।।१।।
जेथें असे तेथें देखे । मागितलें तें आइके ।।धृ।।
जें जें वाटे गोड । तैसें पुरवितो कोड ।।२।।
तुका म्हणे भेटी । कांहीं पडों नेदी तुटी ।।३।।

२४१३
दाटे कंठ लागे डोळियां पाझर । गुणाची अपार वृष्टि वरी ।।१।।
तेणें सुखें छंदें घेईन सोंहळा । होऊनि निराळा पापपुण्यां।।धृ।।
तुझ्या मोहें पडो मागील विसर । आलापें सुस्वर करिन कंठ ।।२।।
तुका म्हणे येथें पाहिजे सौरस । तुम्हांविण रस गोड नव्हे।।३।।

२४१४
पसरूनि राहिलों बाहो । सोयी अहो तुमचिये ।।१।।
आतां यावें लागवेगें । पांडुरंगे धांवत ।।धृ।।
बैसायाची इच्छा कडे। चाली खडे रुपताती ।।२।।
तुका म्हणे कृपाळुवा । करीन सेवा लागली ।।३।।

२४१५
आम्ही जालों एकविध । सुद्या सुदें असावें ।।१।।
यावरी तुमचा मोळा । तो गोपाळा अकळ ।।धृ।।
घेतलें तें उसणें द्यावें । कांहीं भावें विशेषें ।।२।।
तुका म्हणे क्रियानष्ट । तरी कष्ट घेतसां ।।३।।

२४१६
आम्ही आर्तभूत जिवीं । तुम्ही गोसावी तों उदास।।१।।
वादावाद समर्थाशीं । काशानशीं करावा ।।धृ।।
आम्ही मरों वेरझारीं। स्वामी घरीं बैसले ।।२।।
तुका म्हणे करितां वाद । कांहीं भेद कळेना।।३।।

२४१७
पुसावें तें ठाई आपुल्या आपण । अहंकारा शून्य घालूनियां ।।१।।
येर वाग्जाळ मायेचा अहंकार । वचनाशीं थार अज्ञान तें ।।धृ।।
फळ तें चि बीज बीज तें ची फळ । उपनांवें मूळ न पालटे ।।२।।
तुका म्हणे अवघे गव्हांचे प्रकार । सोनें अलंकार मिथ्या नांव ।।३।।

२४१८
माझी आतां सत्ता आहे । तुम्हां पायां हे वरती ।।१।।
एकाविण नेणें दुजा । पंढरिराजा सर्वांगें ।।धृ।।
पुरवावी केली आळी । जे जे काळीं मागण तें ।।२।।
तुका म्हणे सुटसी कैसा । धरूनि दिशा राहिलों ।।३।।

२४१९
फावलें तुम्हां मागें । नवतों लागें पावलों ।।१।।
आलों आतां उभा राहें । जवळी पाहें सन्मुख ।।धृ।।
घरीं होती गोवी जाली । कामें बोली न घडे चि ।।२।।
तुका म्हणे धडफुडा । जालों झाडा देईं देवा ।।३।।

२४२०
आतां नये बोलों अव्हेराची मात । बाळावरि चित्त असों द्यावें ।।१।।
तुज कां सांगणें लागे हा प्रकार । परि हें उत्तर आवडीचें ।।धृ।।
न वंचीं वो कांहीं एकही प्रकार । आपणां अंतर नका मज ।।२।।
तुका म्हणे मोहो राखावा सतंत । नये पाहों अंत पांडुरंगा ।।३।।

२४२१
करूनि राहों जरी आत्मा चि प्रमाण । निश्चळ नव्हे मन काय करूं ।।१।।
जेवलिया विण काशाचे ढेंकर । शब्दाचे प्रकार शब्द चि ते ।।धृ।।

पुरे पुरे आतां तुमचें ब्रम्हज्ञान । आम्हासी चरण न सोडणें ।।२।।
विरोधें विरोध वाढे पुढतोपुढती । वासनेचे हातीं गर्भवास ।।३।।
सांडीमांडीअंगीं वसे पुण्यपाप । बंधन संकल्प या चि नांवें ।।४।।
तुका म्हणे नाहीं मुक्तता मोकळी । ऐसा कोण बळी निरसी देह ।।५।।

२४२२
तुमचे स्तुतियोग्य कोटें माझी वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ।।१।।
भक्तिभाग्य तरी नेदीं तुळसीदळ । जोडूनि अंजुळ उभा असें ।।धृ।।
कैचें भाग्य ऐसें पाविजे संनिध । नेणें पाळूं विध करुणा भाकीं ।।२।।
संतांचे सेवटीं उच्छिष्टाची आस । करूनियां वास पाहातसें ।।३।।
करीं इच्छा मज म्हणोत आपुलें । एखादिया बोलें निमित्याच्या ।।४।।
तुका म्हणे शरण आलों हें साधन । करितों चिंतन रात्रदिवस ।।५।।

२४२३
सर्वविशीं आम्हीं हे चि जोडी केली । स्वीमीची साधिली चरणसेवा ।।१।।
पाहिलें चि नाहीं मागें परतोनी । जिंकिला तो क्षणीं क्षण काळ ।।धृ।।
नाहीं पडों दिला विचाराचा गोवा । नाहीं पाठी हेवा येऊं दिला ।।२।।
केला लाग वेगीं अवघी चि तांतडी । भावना ते कुडी दुराविली ।।३।।
कोठें मग ऐसें होतें सावकास । जळो तया आस वेव्हाराची ।।४।।
तुका म्हणे लाभ घेतला पालवीं। आतां नाहीं गोवी कशाची ही ।।५।।

२४२४
येणें मुखें तुझे वणाअ गुण नाम । तें चि मज प्रेम देईं देवा ।।१।।
डोळे भरूनियां पाहें तुझें मुख । तें चि मज सुख देईं देवा ।।धृ।।
कान भरोनियां ऐकें तुझी कीर्ती । ते मज विश्रांती देई देवा ।।२।।
वाहें रंगीं टाळी नाचेन उदास । हें देईं हातांस पायां बळ।।३।।
तुका म्हणे माझा सकळ देहभाव । आणीक नको ठाव चिंतूं यासी ।।४।।

२४२५
तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत । तूं चि माझें हित करिता देवा ।।१।।
तूं चि माझा देव तूं चि माझा जीव । तूं चि माझा भाव पांडुरंगा ।।धृ।।
तूं चि माझा आचार तूंचि माझा विचार। तूं चि सर्व भार चालविसी ।।२।।
सर्व भावें मज तूं होसी प्रमाण । ऐसी तुझी आण वाहातुसें ।।३।।

तुका म्हणे तुज विकला जीवभाव। कळे तो उपाव करीं आतां ।।४।।

२४२६
वारंवार तुज द्यावया आठव । ऐक तो भाव माझा कैसा।।१।।
गेले मग नये फिरोन दिवस । पुडिलांची आस गणित नाहीं ।।धृ।।
गुणां अवगुणांचे पडती आघात । तेणें होय चित्त कासावीस ।।२।।
कांहीं एक तुझा न देखों आधार । म्हणऊनी धीर नाहीं जीवा ।।३।।
तुका म्हणे तूं ब्रम्हांडाचा जीव । तरी कां आम्ही कींव भाकीतसों ।।४।।

२४२७
असोत हे तुझे प्रकार सकळ । काय खळखळ करावी हे ।।१।।
आमुचें स्वहित जाणतसों आम्ही । तुझें वर्म नामीं आहे तुझ्या ।।धृ।।
विचारितां आयुष्य जातें वांयांविण । रोज जन्मा गोवण पडतसे ।।२।।
राहेन मी तुझे पाय आठवूनी । आणीक तें मनीं येऊं नेदीं ।।३।।
तुका म्हणे येथें येसी अनायासें । थोर तुज पिसें कीर्तनाचें ।।४।।

२४२८
विष्णुदासां भोग । जरी आम्हां पीडी रोग ।।१।।
तरि हें दिसे लाजिरवाणें । काय तुम्हांसी सांगणें ।।धृ।।
आम्हां काळें खावें । बोलिलें तें वांयां जावें ।।२।।
तुका म्हणे दास । आम्ही भोगूं गर्भवास ।।३।।

२४२९
भावें गावें गीत । शुद्ध करूनियां चित्त ।।१।।
तुज व्हावा आहे देव । तरि हा सुलभ उपाव ।।धृ।।
आणिकांचे कानीं । गुण दोष मना नाणीं ।।२।।
मस्तक ठेंगणा । करी संतांच्या चरणा।।३।।
वेचीं तें वचन । जेणें राहे समाधान ।।४।।
तुका म्हणे फार । थोडा तरी पर उपकार ।।५।।

२४३०
वचन तें नाहीं तोडीत शरीरा । भेदत अंतरा वज्रा- ऐसें ।।१।।
कांहीं न सहावें काशा करणें । संदेह निधान देह बळी।।धृ।।

नाहीं शब्द मुखीं लागत तिखट । नाहीं जड होत पोट तेणें ।।२।।
तुका म्हणे जरी गिळे अहंकार । तरी वसे घर नारायण।।३।।

२४३१
नव्हो आतां जीवीं कपटवसती । मग काकुळती कोणा यावें ।।१।।
सत्याचिये मापें गांठीं नये नाड । आदि अंत गोड नारायण ।।धृ।।
चोखटिया नाहीं विटाळाचा आघात । साच ते साचांत सांचा पडे ।।२।।
विचारिली वाट उसंत सीतळ । बुद्धीपुढें बळ तृणतुल्य ।।३।।
आहाराच्या घासें पचोनियां जिरे । वासना ही उरे उर्वरीत ।।४।।
तुका म्हणे ताळा घालावा वचनीं । तूं माझी जननी पांडुरंगे ।।५।।

२४३२
नव्हती हीं माझीं जायाचीं भूषणें । असे नारायणें उचित केलें ।।१।।
शब्दाच्या वोवोनी रत्नाचिया माळा । मुळींच जिव्हाळा झरवणी ।।धृ।।
अर्थांतरीं असे अनुभवसेवन । परिपाकीं मन साक्ष येथें ।।२।।
तुका म्हणे मज सरतें परतें । हें नाहीं अनंतें उरों दिलें ।।३।।

२४३३
सहज लीळा मी साक्षी याचा । नये वंचूं वाचा ऐसें जालें ।।१।।
उपक्रमें वदे निशब्दाची वाणी । जे कोठें बंधनीं गुंपों नेणें ।।धृ।।
तम नासी परि वेव्हारा वेगळा । रविप्रभाकळा वर्ते जन।।२।।
तुका म्हणे येथें गेला अतिशय । आतां पुन्हा नये तोंड दावूं ।।३।।

२४३४
बोलाल या आतां आपुल्यापुरतें । मज या अनंतें गोवियेलें ।।१।।
झाडिला न सोडी हातींचा पालव । वेधी वेधें जीव वेधियेला ।।धृ।।
तुमचे ते शब्द कोरडिया गोष्टी । मज सवें मिठी अंगसंगें ।।२।।
तुका म्हणे तुम्हां होईल हे परी । अनुभव वरी येईल मग ।।३।।

२४३५
जैशा तुम्ही दुरी आहां । तैशा राहा अंतरें ।।१।।
नका येऊं देऊं आळ । अंगीं गोपाळ जडलासे ।।धृ।।
अवघा हा चि राखा काळ । विक्राळ चि भोंवता ।।२।।

तुका म्हणे मज ऐशा । होतां पिशा जगनिंद्य ।।३।।

२४३६
सतीचें तें घेतां वाण । बहु कठीण परिणामीं ।।१।।
जिवासाटीं गौरव वाढे । आहाच जोडे तें नव्हे ।।धृ।।
जरि होय उघडी दृष्टि । तरि गोष्टी युद्धाच्या ।।२।।
तुका म्हणे अंगा येतां । तरी सत्ता धैर्याची ।।३।।

२४३७
आडवा तो उभा । असे दाटोनियां प्रभा ।।१।।
देव नाहीं एकविध । एक भाव असे शुद्ध ।।धृ।।
भेदाभेद आटी । नाहीं फार कोठें तुटी ।।२।।
तुका म्हणे गोवा । उगवा वेव्हाराचा हेवा।।३।।

२४३८
एका बोटाची निशाणी । परीपाख नाहीं मनीं ।।१।।
तरिं तें संपादिलें सोंग । कारणावांचूनियां वेंग ।।धृ।।
वैष्णवांचा धर्म। जग विष्णु नेणे वर्म ।।२।।
अतिशयें पाप । तुका सत्य करी माप ।।३।।

२४३९
सत्यत्वेंशीं घेणें भक्तीचा अनुभव । स्वामीचा गौरव इच्छीतसें ।।१।।
मग तें अवीट न भंगे साचारें । पावलें विस्तारें फिरों नेणे ।।धृ।।
वाणी वदे त्याचा कोणांसी विश्वास । अभयें करें दास सत्य तईं ।।२।।
तुका म्हणे आधीं न करीं तांतडी । पायीं जाली जोडी तेणें शुद्ध ।।३।।

२४४०
सर्वात्मकपण । माझें हिरोनि नेतो कोण ।।१।।
मनीं भक्तीची आवडी । हेवा व्हावी ऐशी जोडी ।।धृ।।
घेईन जन्मांतरें। हें चि करावया खरें ।।२।।
तुका म्हणे देवा । ऋणी करूनि ठेवूं सेवा।।३।।

२४४१

आणितां त्या गती । हंस काउळे न होती ।।१।।
सांडा सांडा रे मठारे । येथें गांठीसवें धुरें ।।धृ।।
नाकेंविण मोती । उभ्या बाजारें फजिती ।।२।।
हुकुमदाज तुका । येथें कोणी कुंफ्दों नका ।।३।।

२४४२
ढेंकणासी बाज गड । उतरचढ केवढी ।।१।।
होता तैसा कळों भाव । आला वाव अंतरींचा ।।धृ।।
बोरामध्यें वसे अळी। अठोळीच भोंवती ।।२।।
पोटासाटीं वेंची चणे । राजा म्हणे तोंडें मी ।।३।।
बेडकानें चिखल खावा । काय ठावा सागर ।।४।।
तुका म्हणे ऐसें आहे । काय पाहे त्यांत तें ।।५।।

२४४३
धांव धांव गरुडध्वजा । आम्हां अनाथांच्या काजा।।१।।
बहु जालों कासावीस । म्हणोनि पाहें तुझी वास ।।धृ।।
पाहें पाहें त्या मारगें । कोणी येतें माझ्या लागें ।।२।।
असोनियां ऐसा । तुज सारिखा कोंवसा ।।३।।
न लवावा उशीर । नेणों कां हा केला धीर।।४।।
तुका म्हणे चाली । नको चालूं धांव घालीं ।।५।।

२४४४
पांडुरंगे पांडुरंगे । माझे गंगे माउलिये ।।१।।
पान्हां घाली प्रेमधारा । पूर क्षीरा लोटों दे ।।धृ।।
अंगें अंग मेळउनी । करीं धणी फेडाया ।।२।।
तुका म्हणे घेइन उड्या । सांडिन कुड्या भावना।।३।।

२४४५
गजइंद्र पशु आप्तें मोकलिला । तो तुज स्मरला पांडुरंगा ।।१।।
त्यासाठीं गरुड सांडुनि धांवसी । माया झळंबेसी दिनानाथा ।।धृ।।
धेनु वत्सावरी झेंप घाली जैसी । तैसें गजेंद्रासी सोडविलें ।।२।।
तुका म्हणे ब्रीद बांधलें यासाठीं । भक्तांसी संकटीं रक्षावया ।।३।।

२४४६
 चारी वेद जयासाटीं । त्याचें नाम धरा कंठीं ।।१।।
न करीं आणीक साधनें । कष्टसी कां वांयांविण ।।धृ।।
अठरा पुराणांचे पोटीं । नामाविण नाहीं गोठी ।।२।।
गीता जेणें उपदेशिली। ते ही विटेवरी माउली ।।३।।
तुका म्हणे सार धरीं । वाचे हरिनाम उच्चारीं ।।४।।

२४४७
 पाहातां ठायाठाव । जातो अंतरोनि देव ।।१।।
नये वाटों गुणदोषीं । मना जतन येविशीं ।।धृ।।
त्रिविधदेह परिचारा । जनीं जनार्दन खरा ।।२।।
तुका म्हणे धीरें- । विण कैसें होतें बरें।।३।।

२४४८
 नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरें।।१।।
न लगे सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ।।धृ।।
ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ।।२।।
रामकृष्णहरिविठ्ठलकेशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ।।३।।
याहूनि आणीक नाहीं पैं साधन । वाहातसें आण विठोबाची ।।४।।
तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनि । शाहाणा तो धणी घेतो येथें ।।५।।

२४४९
 भाविकांचें काज अंगें देव करी । काढी धर्माघरीं उच्छिष्ट तें ।।१।।
उच्छिष्ट तीं फळें खाय भिल्लटीचीं । आवडी तयांची मोठी देवा ।।धृ।।
काय देवा घरीं न मिळेची अन्न । मागे भाजीपान द्रौपदीसी ।।२।।
अर्जुनाचीं घोडीं धुतलीं अनंतें । संकटें बहुतें निवारिलीं ।।३।।
तुका म्हणे ऐसीं आवडती लडिवाळें । जाणीवेचें काळें तोंड देवा ।।४।।

२४५०
 सांवळें रूपडें चोरटें चित्ताचें । उभें पंढरीचे विटेवरी।।१।।
डोळियांची धणी पाहातां न पुरे । तया लागीं झुरे मन माझें ।।धृ।।
आन गोड कांहीं न लगे संसारीं । राहिले अंतरीं पाय तुझे।।२।।
प्राण रिघों पाहे कुडी हे सांडुनी । श्रीमुख नयनीं न देखतां ।।३।।

चित्त मोहियेलें नंदाच्या नंदनें । तुका म्हणे येणें गरुडध्वजें ।।४।।

२४५१
ऐका ऐका भाविकजन । कोण कोण व्हाल ते ।।१।।
ताकिकांर्चा टाका संग । पांडुरंग स्मरा हो ।।धृ।।
नका शोधूं मतांतरें। नुमगे खरें बुडाल ।।२।।
कलिमध्यें दास तुका । जातो लोकां सांगत ।।३।।

२४५२
आपुलिया आंगें तोडी मायाजाळ । ऐसें नाहीं बळ कोणापाशीं ।।१।।
रांडापोरें त्याग करी कुटुंबाचा । नावरे हे वाचा आणि मन ।।धृ।।
हर्षामर्ष जों हे नाहीं जों जिराले । तोंवरि हे केले चार त्यांनीं ।।२।।
मुक्त जालों ऐसें बोलों जाये मुखें । तुका म्हणे दुःखें बांधला तो ।।३।।

२४५३
आलिया अतीता म्हणतसां पुढारें । आपुलें रोकडें सत्त्व जाय ।।१।।
काय त्याचा भार घेऊनि मस्तकीं । हीनकर्मी लोकीं म्हणावया ।।धृ।।
दारीं हाका कैसें करवतें भोजन । रुची तरि अन्न कैसें देतें ।।२।।
तुका म्हणे ध्वज उभारिला कर । ते शक्ति उदार काय जाली ।।३।।

२४५४
जेथें लक्ष्मीचा वास । गंगा आली पापा नास ।।१।।
तें म्यां हृदयीं धरिलें । तापें हरण पाउलें ।।धृ।।
सेवा केली संतजनीं। सुखें राहिले लपोनि ।।२।।
तुका म्हणे वांकी । भाट जाली तिहीं लोकीं ।।३।।

२४५५
रूपीं जडले लोचन । पायीं स्थिरावलें मन ।।१।।
देहभाव हरपला । तुज पाहातां विठ्ठला ।।धृ।।
कळों नये सुखदुःख। तान हरपली भूक ।।२।।
तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शनें मागुती ।।३।।

२४५६

जाणतें लेकरूं । माता लागे दूर धरूं ।।१।।
तैसें न करीं कृपावंते । पांडुरंगे माझे माते ।।धृ।।
नाहीं मुक्ताफळा । भेटी मागुती त्या जळा ।।२।।
तुका म्हणे लोणी । ताक सांडी निवडूनि।।३।।

२४५७
तुजविण कोणां । शरण जाऊं नारायणा ।।१।।
ऐसा न देखें मी कोणी । तुजा तिहीं त्रिभुवनीं ।।धृ।।
पाहिलीं पुराणें । धांडोळिलीं दरुषणें ।।२।।
तुका म्हणे ठायीं । जडून ठेलों तुझ्या पायीं ।।३।।

२४५८
ऐसें भाग्य कईं लाहाता होईन । अवघें देखें जन ब्रम्हरूप ।।१।।
मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ।।धृ।।
शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ।।२।।
विवेकासहित वैराग्याचें बळ । धग्धगितोज्ज्वाळ अग्नि जैसा ।।३।।
भक्ति नवविधा भावशुद्ध बरी । अळंकारावरी मुगुटमणि ।।४।।
तुका म्हणे माझी पुरवी वासना । कोण नारायणा तुजविण ।।५।।

२४५९
कासया करावे तपाचे डोंगर । आणीक अपार दुःखरासी।।१।।
कासया फिरावे अनेक ते देश । दावितील आस पुढें लाभ ।।धृ।।
कासया पुजावीं अनेक दैवतें । पोटभरे तेथें लाभ नाहीं ।।२।।
कासया करावे मुक्तीचे सायास । मिळे पंढरीस फुका साटीं ।।३।।
तुका म्हणे करीं कीर्तन पसारा । लाभ येईल घरा पाहिजे तो ।।४।।

२४६०
वैष्णवमुनिविप्रांचा सन्मान । करावा आपण घेऊं नये ।।१।।
प्रभु जाला तरी संसाराचा दास । विहित तयासी यांची सेवा ।।२।।
तुका म्हणे हे आशीर्वादें बळी । जाईल तो छळी नरकायासीं ।।३।।

२४६१
देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ।।१।।

ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ।।धृ।।
हरिजनासी भेटी । नहो अंगसंगें तुटी ।।२।।
तुका म्हणे जिणें । भलें संतसंघष्टणें ।।३।।

२४६२
भाग सीण गेला । माझा सकळ विठ्ठला ।।१।।
तुझा म्हणवितों दास । केली उच्छिष्टाची आस ।।धृ।।
राहिली तळमळ । तईं पासोनी सकळ ।।२।।
तुका म्हणे धालें । पोट ऐसें कळों आलें।।३।।

२४६३
रायाचें सेवक । सेवटीचें पीडी रंक ।।१।।
हा तों हिणाव कवणा । कां हो नेणां नारायणा ।।धृ।।
परिसेंसी भेटी । नव्हे लोहोपणा तुटी ।।२।।
तुझें नाम कंठीं । तुक्या काळासवें भेटी।।३।।

२४६४
सुखरूप ऐसें कोण दुजें सांगा । माझ्या पांडुरंगा सारिकें तें ।।१।।
न लगे हिंडणें मुंडणें ते कांहीं । साधनाची नाहीं आटाआटी ।।धृ।।
चंद्रभागे स्नान विध तो हरिकथा । समाधान चित्ता सर्वकाळ ।।२।।
तुका म्हणे काला वैकुंठीं दुर्लभ । विशेष तो लाभ संतसंग ।।३।।

२४६५
नसतां अधिकार उपदेशासी बळत्कार । तरि ते केले हो चार माकडा आणि गारूडी ।।१।।
धन धान्य राज्य बोल वृथा रंजवणें फोल । नाहीं तेथें ओल बीज वेची मूर्ख तो ।।धृ।।
नये बांधों गांठी पदरा आण ऐसी तुटी । असोन कसोटी शिष्टाचारअनुभव।।२।।
उपदेसी तुका मेघ वृष्टीनें आइका । संकल्पासी धोका सहज तें उत्तम ।।३।।

२४६६
घालुनियां मापीं । देवभक्त बैसले जपीं ।।१।।

तैसी होते सांडउलंडी । निजनिजांची मुडी ।।धृ।।
अमुपीं उखतें । आपण वोस आपण यातें ।।२।।
देव आतां जाला । उगवे संकोच वहिला।।३।।
अखंड नेलें वेठी । भार सत्याविण गांठी ।।४।।
आडकिला झोंपा । रिता कळिवरचा खोंपा ।।५।।
गोदातीरीं आड । करिते करविते द्वाड।।६।।
तुका म्हणे बळें । उपदेशाचें तोंड काळें ।।७।।

२४६७
उंबरांतील कीटका । हें चि ब्रम्हांड ऐसें लेखा ।।१।।
ऐसीं उंबरें किती झाडीं । ऐशीं झाडें किती नवखडीं ।।धृ।।
हें चि ब्रम्हांड आम्हांसी । ऐसीं अगणित अंडें कैसीं ।।२।।
विराटाचे अंगी तैसे । मोजूं जातां अगणित केंश ।।३।।
ऐशा विराटाच्या कोटी । सांटवल्या ज्याच्या पोटीं ।।४।।
तो हा नंदाचा बाळमुकुंद । तान्हा म्हणवी परमानंद ।।५।।
ऐशी अगम्य ईश्वरी लीळा । ब्रम्हानंदीं गम्य तुक्याला ।।६।।

२४६८
ब्रम्हज्ञान तरी एके दिवसीं कळे । तात्काळ हा गळे अभिमान ।।१।।
अभिमान लागे शुकाचिये पाठी । व्यासें उपराटी दृष्टी केली ।।धृ।।
जनकभेटीसी पाठविला तेणें । अभिमान नाणें खोटें केलें ।।२।।
खोटें करूनियां लाविला अभ्यासीं । मेरुशिखरासी शुक गेला ।।३।।
जाऊनियां तेणें साधिली समाधी । तुका म्हणे तधीं होतों आम्ही ।।४।।

२४६९
सहज पावतां भगवंतीं परि हीं विकल्पें परतीं । फुकाची हे चित्तीं वाठवण कां न धरिती ।।१।।
हरि व्यापक सर्वगत हें तंव मुख्यत्वें वेदांत । चिंतनासी चित्त असों द्यावें सावध ।।धृ।।
विरजाहोम या चि नांवें देह नव्हे मी जाणावें । मग कां जी यावें वरी लागे संकल्पा ।।२।।
कामक्रोधे देह मळिण स्वाहाकारीं कैंचें पुण्य । मंत्रीं पूजियेला यज्ञ मनमुंडण नव्हे चि ।।३।।

अनन्यभक्तीचे उपाय ते या विठोबाचे पाय । ध्याइल तो काय जाणे चुकों मारग ।।४।।
आतां सांगे तुका एक तुम्ही चुकों नका । सांडीमांडी धोका शरण रिघतां गोमटें ।।५।।

२४७०
आम्हीं जाणावें तें काई तुझें वर्म कोणे ठायीं । अंतपार नाहीं ऐसें श्रुति बोलती ।।१।।
होईं मज तैसा मज तैसा साना सकुमार रुषीकेशा । पुरवीं माझी आशा भुजा चारी दाखवीं।।धृ।।
खालता सप्त ही पाताळा वरता स्वर्गाहूनि ढिसाळा । तो मी मस्यक डोळां कैसा पाहों आपला ।।२।।
मज असे हा भरवसा पढीयें वोसी तयां तैसा । पंढरीनिवासा तुका म्हणे गा विठोबा ।।३।।

२४७१
वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षी ही सुस्वरें आळविती ।।१।।
येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुण दोष अंगा येत ।।धृ।।
आकाश मंडप पृथुवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करी ।।२।।
कंथाकुमंडलु देहउपचारा । जाणवितो वारा अवश्वरु।।३।।
हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ।।४।।
तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुला चि वाद आपणांसी ।।५।।

२४७२
अनंत ब्रम्हांडें । एके रोमीं ऐसें धेंडें ।।१।।
तो या गौळियांचे घरीं । उंबरा चढतां टेंका धरी ।।धृ।।
मारी दैत्य गाडे । ज्यांचे पुराणीं पवाडे ।।२।।
तुका म्हणे कळा । अंगीं जयाच्या सकळा ।।३।।

२४७३
सावधान ऐसें काय तें विचारा । आले हो संसारा सकळ ही ।।१।।
अंतीं समयाचा करणें विचार । वेचती सादर घटिका पळें ।।धृ।।
मंगळ हें नोहे कन्यापुत्रादिक । राहिला लौकिक अंतरपाट ।।२।।

तुका म्हणे देव अंतरला दुरी । डोळिया अंधारी पडलीसे ।।३।।

२४७४
लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ।।१।।
तैसा समरस जालों । तुजमाजी हरपलों ।।धृ।।
अग्निकर्पुराच्या मेळीं । काय उरली काजळी ।।२।।
तुका म्हणे होती । तुझी माझी एक ज्योती ।।३।।

२४७५
सुख नाहीं कोठें आलिया संसारीं । वांया हांवभरी होऊं नका ।।१।।
दुःखबांदवडी आहे हा संसार । सुखाचा विचार नाहीं कोठें ।।धृ।।
चवदा कल्पेंवरी आयुष्य जयाला । परी तो राहिला ताटीखालीं ।।२।।
तुका म्हणे वेगीं जाय सुटोनियां । धरूनि हृदयामाजी हरि ।।३।।

२४७६
तुज करितां होय ऐसें कांहीं नाहीं । डोंगराची राई रंक राणा ।।१।।
अशुभाचें शुभ करितां तुज कांही । अवघड नाहीं पांडुरंगा ।।धृ।।
सोळा सहस्र नारी ब्रम्हचारी कैसा । निराहारी दुर्वासा नवल नव्हे ।।२।।
पंचभ्रतार द्रौपदी सती । करितां पितृशांती पुण्य धर्मा ।।३।।
दशरथा पातकें ब्रम्हहत्ये ऐसीं । नवल त्याचे कुशीं जन्म तुझा ।।४।।
मुनेश्वरा नाहीं दोष अनुमात्र । भांडवितां सुत्र वध होती ।।५।।
तुका म्हणे माझे दोष ते कायी । सरता तुझा पायीं जालों देवा ।।६।।

पाळणा
२४७७
जननिया बाळका रे घातलें पाळणा । पंचतत्त्वीं जडियेल्या वारतिया चहूं कोणा । अखंड जडियेल्या तया ढाळ अंगणा । वैखरी धरूनि हातीं भाव दावी खेळणा ।।१।।
निजीं रे निजीं आतां । म्हणोनि परिये दे माता । खेळतां कष्टलासी बाळा तूं रे नेणतां । निजीं रे निजीं आतां ।।धृ।।
खेळतां बाहेरि रे मुला लोकांच्या सवें । बागुल काळतोंडा नाहीं नेतो तें ठावें । खेळतां दुश्चित्ता रे देखोनि तें न्यावें । म्हणोनि सांगें तुज शीघ्र वचन पाळावें।।२।।

संचित मागें तुज शुद्ध होतें सांगाती । तेणें तुज वांचविलें वेरझारिया हातीं । आणीक नेली मागें काय जाणों तीं किती । आलासि येथवरि थोरपुण्यें बहुतीं ।।३।।
खेळतां शुक देवा तो रे लागला पाठीं । लपाला वरुषें बारा तिये मातेचे पोटीं । रिघतां बाहेरि रे पळे घेऊनि कासोटी । ते चि परी जाली स्वामी भेणें रिघें कपाटीं ।।४।।
खेळतां चक्रवर्ती जनका लागला धाक । पडिला अग्नीमाजी पाव जळत एक। भरलासे कांप अंगीं सुख नाठवें दुःख। आप पर तें ही नाहीं देहभाव सकळिक ।।५।।
सिभ्रीया चक्रवर्ती कव पडिली अवचिती । धीट तो न भे तया मास कापिलें हातीं । टाकिलें तयावरी खुणें गोविला अंतीं । पावला मायबाप हिरोन घेतला हातीं ।।६।।
बांधलें अजामेळा वेश्यागणीका कैसी । मारिली हाक धाकें कळलें मायबापासी। घातली धांव नेटें वेगीं पावला त्यासी । हिरोनि नेलीं दोघें आपणयां तीं पासी ।।७।।
धरूनी आठवू रे बाळा राहें निश्चळ । खेळतां दुश्चिता रे नको जाऊं बरळ। टोंकताहे तुजलागीं दिवस लेखूनी काळ । मग नेदी आठवूं रे नेत्रीं घालीं पडळ ।।८।।
ऐसी तीं कृपावंतें बाळा मोहिलें चित्त । सुस्वरें कंठ गाय मधुर आणि संगीत । तेणें तें चि चित्त राहे होऊनियां निवांत । पावती तुका म्हणे नाहीं विश्वास ते घात ।।९।।
।।१।।

२४७८
उभ्या बाजारांत कथा । हे तों नावडे पंढरिनाथा।।१।।
अवघें पोटासाटीं ढोंग । तेथें कैंचा पांडुरंग ।।धृ।।
लावी अनुसंधान। कांहीं देईल म्हणऊन ।।२।।
काय केलें रांडलेंका । तुला राजी नाहीं तुका ।।३।।

२४७९
असोत लोकांचे बोल शिरावरी । माझी मज बरी विठाबाई ।।१।।
आपंगिलें मज आहे ते कृपाळु । बहुत कनवाळु अंतरींची ।।धृ।।
वेदशास्त्रें जिसी वर्णिती पुराणें । तिचें मी पोसणें लडिवाळ ।।२।।

जिचें नाम कामधेनु कल्पतरू । तिचें मी लेंकरूं तुका म्हणे ।।३।।

२४८०
वाराणसी गया पाहिली द्वारका । परी नये तुका पंढरीच्या ।।१।।
पंढरीसी नाहीं कोणा अभिमान । पायां पडे जन एकमेका ।।२।।
तुका म्हणे जाय एकवेळ पंढरी । तयाचिये घरीं यम न ये ।।३।।

२४८१
सांडुनियां सर्व लौकिकाची लाज । आळवा यदुराज भक्तिभावें ।।१।।
पाहूनियां झाडें वरबडूनि पाला । खाऊनि विठ्ठला आळवावें ।।धृ।।
वेंचूनियां चिंध्या भरूनियां धागा । गुंडाळूनि ढुंगा आळवावें ।।२।।
तुका म्हणे ऐसें मांडिल्या निर्वाण । तया नारायण उपेक्षीना ।।३।।

२४८२
दह्यांचिया अंगीं निघे ताक लोणी । एका मोलें दोन्ही मागों नये ।।१।।
आकाशाचे पोटीं चंद्र तारांगणें । दोहींशी समान पाहों नये ।।धृ।।
पृथ्वीचा पोटीं हिरा गारगोटी । दोहोंसी समसाटी करूं नये ।।२।।
तुका म्हणे तैसे संत आणि जन । दोहींसी समान भजूं नये ।।३।।

२४८३
तेरा दिवस जाले निश्चक्र करितां । न पवसी अनंता मायबापा ।।१।।
पाषाणांची खोळ घेउनि बैसलासी । काय हृषीकेशी जालें तुज ।।धृ।।
तुजवरी आतां प्राण मी तजीन । हत्या मी घालीन पांडुरंगा ।।२।।
फार विठाबाई धरिली तुझी आस । करीन जीवा नास पांडुरंगा ।।३।।
तुका म्हणे आतां मांडिलें निर्वाण । प्राण हा सांडीन तुजवरी ।।४।।

२४८४
लोक फार वाखा अमंगळ जाला । त्याचा त्याग केला पांडुरंगा ।।१।।
विषयां वंचलों मीपणा मुकलों । शरण तुज आलों पांडुरंगा ।।धृ।।
घर दार अवघीं तजिलीं नारायणा । जीवींच्या जीवना पांडुरंगा ।।२।।
तुका म्हणे पडिलों पुंडलिकापाशीं । धांव हृषीकेशी आळिंगीं मज ।।३।।

२४८५

इंद्रियांचीं दिनें । आम्ही केलों नारायणें ।।१।।
म्हणऊनि ऐसें सोसीं । काय सांगों कोणांपाशी ।।धृ।।
नाहीं अंगीं बळ । त्याग करींसा सकळ ।।२।।
तुका म्हणे मोटें । प्रारब्ध होतें खोटें ।।३।।

२४८६
हातीं धरूं जावें । तेणें परतें चि व्हावें ।।१।।
ऐसा कां हो आला वांटा । हीन भाग्याचा करंटा ।।धृ।।
देव ना संसार । दोहीं ठायीं नाहीं थार ।।२।।
तुका म्हणे पीक । भूमि न दे न मिळे भीक ।।३।।

२४८७
मोलें घातलें रडाया । नाहीं असुं आणि माया ।।१।।
तैसा भक्तिवाद काय । रंगबेगडीचा न्याय ।।धृ।।
वेठी धरिल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव ।।२।।
काजव्याच्या ज्योती । तुका म्हणे न लगे वाती ।।३।।

२४८८
तरि च जन्मा यावें । दास विठ्ठलाचें व्हावें ।।१।।
नाहीं तरि काय थोडीं । श्वानशूकरें बापुडीं ।।धृ।।
ज्याल्याचें तें फळ। अंगीं लागों नेदी मळ ।।२।।
तुका म्हणे भले । ज्याच्या नावें मानवलें ।।३।।

।। लळतें ९ ।।
२४८९
देव ते संत देव ते संत । निमित्य त्या प्रतिमा ।।१।।
मी तों सांगतसें भावें । असो ठावें सकळां ।।धृ।।
निराकारी ओस दिशा । येथें इच्छा पुरतसे ।।२।।
तुका म्हणे रोकडें केणें । सेवितां येणें पोट धाय ।।३।।

२४९०
न कळे माव मुनि मागे एकी अंतुरी । साठी संवत्सरां जन्म तया उदरीं

।।१।।
कैसा आकळे गे माये चपळ वो । त्रिभुवनव्यापक सकळ वो ।।धृ।।
हनुमंता भेटी गर्व हरिला दोहींचा । गरुडा विटंबना रूपा सत्यभामेच्या ।।२।।
द्रौपदीचा भेद पुरविला समयीं । ऋषि फळवनीं देंठीं लावितां ठायीं ।।३।।
अर्जुनाच्या रथीं कपि स्तंभीं ठेविला । दोहीं पैज तेथें गर्व हरी दादुला ।।४।।
भावभक्ती सत्त्वगुण जाला दुर्जना । तुका म्हणे सकळां छंदें खेळे आपण ।।५।।

२४९१
उदारा कृपाळा अंगा देवांच्या देवा । तुजसवें पण आतां आमुचा दावा ।।१।।
कैसा जासी सांग आतां मजपासुनी । केलें वाताहात दिले संसारा पाणी ।।धृ।।
अवघीं आवरूनि तुझे लाविलीं पाठीं । आतां त्या विसर सोहंकोहंच्या गोष्टी ।।२।।
तुका म्हणे आतां चरणीं घातली मिठी । पडिली ते पडो तुम्हा आम्हांसी तुटी ।।३।।

२४९२
जाली होती काया । बहु मळीन देवराया ।।१।।
तुमच्या उजळली नामें । चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ।।धृ।।
अनुतापें झाला झाडा । प्रारब्धाचा केला तोडा ।।२।।
तुका म्हणे देह पायीं । ठेवूनि झालों उतराई ।।३।।

२४९३
आजि आनंदु रे एकी परमानंदु रे । जया श्रुति नेति नेति म्हणती गोविंदु रे ।।१।।
विठोबाचीं वेडीं आम्हां आनंदु सदा । गाऊं नाचों वाऊं टाळी रंजवूं गोविंदा ।।धृ।।
सदा सन सांत आम्हां नित्य दिवाळी । आनंदें निर्भर आमचा कैवारी बळी ।।२।।
तुका म्हणे नाहीं जन्ममरणांचा धाक । संत सनकादिक तें आमचें

कवतुक।।३।।

२४९४
प्राणियां एक बीजमंत्र उच्चारीं । प्रतिदिनीं रामकृष्ण म्हण कां मुरारि ।।१।।
हें चि साधन रे तुज सर्व सिद्धींचे । नाम उच्चारीं पां गोपाळाचें वाचे ।।धृ।।
उपास पारणें न लगे वनसेवन। न लगे धूम्रपान पंचाअग्नतापन ।।२।।
फुकाचें सुखाचें कांहीं न वेचें भांडार । कोटी यज्ञां परिस तुका म्हणे हें सार ।।३।।

२४९५
विठ्ठल कीर्तनाचे अंतीं । जय जय हरी जे म्हणती।।१।।
तें चि सुकृताचें फळ । वाचा रामनामें निखळ ।।धृ।।
बैसोनि हरिकथेसी । होय सावध चित्तासी ।।२।।
तुका म्हणे त्याचा जन्म । सुफळ जाला भवक्रम ।।३।।

२४९६
न चलवे पंथ वेच नसतां पालवीं । शरीर विटंबिलें वाटे भीक मागावी ।।१।।
न करीं रे तैसें आपआपणां । नित्य राम राम तुम्ही सकळ म्हणा ।।धृ।।
राम म्हणवितां रांडा पोरें निरविशी । पडसी यमा हांतीं जाचविती चौऱ्याशी ।।२।।
मुखीं नाहीं राम तो ही आत्महत्यारा । तुका म्हणे लाज नाहीं तया गंव्हारा ।।३।।

२४९७
थडियेसी निघतां पाषाणांच्या सांगडी । बुडतां मध्यभागीं तेथें कोण घाली उडी ।।१।।
न करी रे तैसें आपआपणा । पतंग जाय वांयां जीवें ज्योती घालूनियां ।।धृ।।
सावधपणें सोमवल वाटी भरोनियां प्याला । मरणा अंतीं वैद्य बोलावितो गहिला ।।२।।
तुकाम्हणे करीं ठायींचा चि विचार । जंवें नाहीं पातला यमाचा किंकर ।।३।।
।।९।।

२४९८
द्या जी माझा विचारोनियां विभाग । न खंडे हा लाग आहाचपणें ।।१।।
किती नेणों तुम्हां साहाते कटकट । आम्ही च वाईट निवडलों ते ।।धृ।।
करवितां कल्हें जिवाचियेसाटीं । हे तुम्हां वोखटीं ढाळ देवा ।।२।।
तुका म्हणे धीर कारण आपुला । तुम्हीं तों विठ्ठला मायातीत ।।३।।

२४९९
आमुचे ठाउके तुम्हां गर्भवास । बळिवंत दोष केले भोग ।।१।।
काय हा सांगावा नसतां नवलावो । मैंदपणें भाव भुलवणेचा ।।धृ।।
एका पळवूनि एका पाठी लावा । कवतुक देवा पाहावया ।।२।।
तुका म्हणे ज्याणें असें चेतविलें । त्याच्यानें उगळें कैसें नव्हे ।।३।।

२५००
निर्दयासी तुम्ही करितां दंडण । तुमचें गाऱ्हाणें कोठें द्यावें ।।१।।
भाकितों करुणा ऐकती कान ।उगलें चि मौन्य धरिलें ऐसें ।।धृ।।
दीनपणें पाहें पाय भिडावोनि । मंजुळा वचनीं विनवीतसें।।२।।
तुका म्हणे गांठी मनाची उकला । काय जी विठ्ठला पाहातसां ।।३।।

२५०१
नसतों किविलवाणें । कांहीं तुमच्या कृपादानें ।।१।।
हे चि तयाची ओळखी । धालें टवटवित मुखीं ।।धृ।।
वांयां जात नाहीं । वचन प्रीतीचें तें कांहीं ।।२।।
तुका म्हणे देवा । सत्य येतें अनुभवा ।।३।।

२५०२
जालों तंव साचें । दास राहवणें काचें ।।१।।
हें कां मिळतें उचित । तुम्ही नेणा कृपावंत ।।धृ।।
सिंहाचें ते पिलें । जाय घेऊनियां कोल्हें ।।२।।
तुका म्हणे नास । आम्हां म्हणविलियां दास।।३।।

२५०३
देवाच्या उद्देशें जेथें जेथें भाव । तो तो वसे ठाव विश्वंभरें ।।१।।

लोभाचे संकल्प पळालियावरी । कैंची तेथें उरी पापपुण्या ।।धृ।।
शुद्ध भक्ती मन जालिया निर्मळ । कुश्चळी विटाळ वज्रलेप ।।२।।
तुका म्हणे ज्याचें तयासी च कळे । प्रांत येतो फळें कळों मग ।।३।।

२५०४
कडसणी धरितां अडचणीचा ठाव । म्हणऊनि जीव त्रासलासे ।।१।।
लौकिकाबाहेरि राहिलों निराळा । तुजविण वेगळा नाहीं तुजा ।।धृ।।
संकोचानें नाहीं होत धणीवरी । उरवूनि उरी काय काज ।।२।।
तुका म्हणे केलें इच्छे चि सारिखें । नाहींसें पारिखें येथें कोणी ।।३।।

२५०५
हें चि जतन करा दान । धरुनी चरण राहिलों तो।।१।।
आणीक कांहीं न घलीं भार । बहुत फार सांकडें ।।धृ।।
घ्यावी माझ्या हातें सेवा । हे चि देवा विनवणी ।।२।।
तुका तुमचा म्हणवी दास । तेणें आस पुरवावी ।।३।।

२५०६
आपल्या च स्कांुफ्दें । जेथें तेथें घेती छंदें ।।१।।
पडिला सत्याचा दुष्काळ । बहु फार जाली घोळ ।।धृ।।
विश्वासाचे माठ । त्याचे कपाळीं तें नाट ।।२।।
तुका म्हणे घाणा । मूढा तीथाअ प्रदक्षिणा ।।३।।

२५०७
उद्वेगाची धांव बैसली आसनीं । पडिलें नारायणीं मोटळें हें ।।१।।
सकळ निश्चिती जाली हा भरवसा । नाहीं गर्भवासा येणें ऐसा ।।धृ।।
आपुलिया नांवें नाहीं आम्हां जिणें । अभिमान तेणें नेला देवें ।।२।।
तुका म्हणे चेळें एकाचिया सत्ता । आपुलें मिरवितां पणें ऐसें ।।३।।

२५०८
बहुतां पुरे ऐसा वाण । आलें धन घरासी ।।१।।
घ्या रे फुका मोलेंविण । नारायण न भुला ।।धृ।।
ऐका निवळल्या मनें। बरवें कानें सादर ।।२।।
तुका म्हणे करूनि अंतीं । निश्चिती हे ठेवावी ।।३।।

२५०९
माझी मज जाती आवरली देवा । नव्हतां या गोवा इंद्रियांचा ।।१।।
कासया मी तुझा म्हणवितों दास । असतों उदास सर्व भावें ।।धृ।।
भयाचिया भेणें धरियेली कास । न पुरतां आस काय थोरी ।।२।।
तुका म्हणे आपआपुलीं जतन । कैचें थोरपण मग तुम्हां ।।३।।

२५१०
विनवितों तरी आणितोसि परी । याचकानें थोरी दातयाची ।।१।।
आमुचे ही कांहीं असों द्या प्रकार । एकल्यानें थोर कैचे तुम्ही ।।धृ।।
नेघावी जी कांहीं बहु साल सेवा । गौरव तें देवा यत्न कीजे ।।२।।
तुका म्हणे नाहीं आमुची मिरासी । असावेंसें ऐसीं दुर्बळें चि ।।३।।

२५११
एका ऐसें एक होतें कोणां काळें । समर्थाच्या बळें काय नव्हे ।।१।।
घालूनि बैसलों मिरासीस पाया । जिंकों देवराया संदेह नाहीं ।।धृ।।
केला तो न संडीं आतां कइवाड । वारीन हे आड कामक्रोध ।।२।।
तुका म्हणे जाळीं अळसाची धाडी । नव्हती आली जोडी कळों साच ।।३।।

२५१२
जाले समाधान । तुमचे धरिले चरण ।।१।।
आतां उठावेंसें मना । येत नाहीं नारायणा ।।धृ।।
सुरवाडिकपणें । येथें सांपडलें केणें ।।२।।
तुका म्हणे भाग । गेला निवारला लाग ।।३।।

२५१३
मुखाकडे वास । पाहें करूनियां आस ।।१।।
आतां होईल ते शिरीं । मनोगत आज्ञा धरीं ।।धृ।।
तुम्हीं अंगीकार । केला पाहिजे हें सार ।।२।।
तुका म्हणे दारीं । उभें याचक मीं हरी ।।३।।

२५१४
नाहीं माथां भार । तुम्ही घेत हा विचार ।।१।।

जाणोनियां ऐसें केलें । दुरिल अंगेसी लाविलें ।।धृ।।
आतां बोलावें आवडी । नाम घ्यावें घडी घडी ।।२।।
तुका म्हणे दुरी । देवा खोटी ऐसी उरी ।।३।।

२५१५
माझें जड भारी । आतां अवघें तुम्हांवरी ।।१।।
जालों अंकित अंकिला । तुमच्या मुकलों मागिला ।।धृ।।
करितों जें काम। माझी सेवा तुझें नाम ।।२।।
तुका पायां लागे । कांहीं नेदी ना न मगे।।३।।

२५१६
तुम्ही आम्ही भले आतां । जालों चिंता काशाची।।१।।
आपुलाले आलों स्थळीं । मौन कळी वाढेना ।।धृ।।
सहज जें मनीं होतें । तें उचितें घडलें ।।२।।
तुका म्हणे नसतें अंगा । येत संगा सारिखें ।।३।।

२५१७
चित्ता ऐसी नको देऊं आठवण । जेणें देवाचे चरण अंतरे तें ।।१।।
आलिया वचनें रामनामध्वनि । ऐकावीं कानीं ऐसीं गोडें ।।धृ।।
मत्सराचा ठाव शरीरीं नसावा । लाभेंविण जीवा दुःख देतो ।।२।।
तुका म्हणे राहे अंतर शीतळ । शांतीचें तें बळ क्षमा अंगीं ।।३।।

२५१८
कोण पुण्य कोणा गांठी । ज्यासी ऐसियांची भेटी।।१।।
जिहीं हरी धरिला मनीं । दिलें संवसारा पाणी ।।धृ।।
कोण हा भाग्याचा । ऐसियांसी बोले वाचा ।।२।।
तुका म्हणे त्यांचे भेटी। होय संसारासी तुटी ।।३।।

२५१९
तरि च हा जीव संसारीं उदास । धरिला विश्वास तुम्हां सोई ।।१।।
एके जातीविण नाहीं कळवळा । ओढली गोपाळा सूत्रदोरी ।।धृ।।
फुटतसे प्राण क्षणांच्या विसरें । हें तों परस्परें सारिखें चि ।।२।।
तुका म्हणे चित्तीं राखिला अनुभव । तेणें हा संदेह निवारला ।।३।।

२५२०
किती विवंचना करीतसें जीवीं । मन धांवडवी दाही दिशा ।।१।।
कोणा एका भावें तुम्ही अंगीकार । करावा विचार या च साटीं ।।धृ।।
इतर ते आतां लाभ तुच्छ जाले । अनुभवा आले गुणागुण ।।२।।
तुका म्हणे लागो अखंड समाधि । जावें प्रेमबोधीं बुडोनियां ।।३।।

२५२१
दिक चि या नाहीं संसारसंबंधा । तुटेना या बाधा भवरोगाची ।।१।।
तांतडींत करीं म्हणऊनि तांतडी । साधिली ते घडी सोनियाची ।।धृ।।
संकल्पाच्या बीजें इंद्रियांची चाली । प्रारब्ध तें घाली गर्भवासीं ।।२।।
तुका म्हणे बीजें जाळुनी सकळ । करावा गोपाळ आपुला तो ।।३।।

२५२२
आतां होइन धरणेकरी । भीतरीच कोंडीन ।।१।।
नाही केली जीवेंसाटी । तों कां गोष्टी रुचे तें ।।धृ।।
आधी निर्धार तो सार । मग भार सोसीन ।।२।।
तुका म्हणे खाऊं जेवूं । नेदूं होऊं वेगळा ।।३।।

२५२३
होइल तरि पुसापुसी । उत्तर त्यासी योजावें ।।१।।
तोंवरि मी पुढें कांहीं । आपुलें नाहीं घालीत ।।धृ।।
जाणेनियां अंतर देव । जेव्हां भेव फेडील ।।२।।
तुका म्हणे धरिला हातीं । करील खंतीवेगळें ।।३।।

२५२४
हा तों नव्हे कांहीं निराशेचा ठाव । भलें पोटीं वाव राखिलिया ।।१।।
विश्वंभरें विश्व सामाविलें पोटी । तेथें चि सेवटीं आम्ही असों ।।धृ।।
नेणतां चिंतन करितों अंतरीं । तेथें अभ्यंतरीं उमटेल ।।२।।
तुका म्हणे माझा स्वामी अबोलणा । पुरवूं खुणे खुणा जाणतसों ।।३।।

२५२५
निष्ठुर तो दिसे निराकारपणें । कोंवळा सगुणें प्रतिपाळी।।१।।

केला च करावा केला कइवाड । होईल तें गोड न परेते ।।धृ।।
मथिलिया लागे नवनीत हातां । नासे वितळितां आहाच तें ।।२।।
तुका म्हणे आतां मनाशीं विचार । करावा तो सार एकचित्त ।।३।।

२५२६
बहु देवा बरें जालें । नसतें गेलें सोंवळें ।।१।।
धोवटाशीं पडिली गांठी । जगजेठीप्रसादें ।।धृ।।
गादल्याचा जाला जाडा । गेली पीडा विकल्प ।।२।।
तुका म्हणे वरावरी । निर्मळ करी निर्मळा ।।३।।

२५२७
स्वामित्वाचीं वर्मे असोनि जवळी । वाहों जावें मोळी गुणांसवें ।।१।।
काबाडापासूनि सोडवा दातारा । कांहीं नका भारा पात्र करूं ।।धृ।।
धनवंत्र्याचिये अंगीं सत्ताबळ । व्याधि तो सकळ तोडावया ।।२।।
तुका म्हणे आलें मोड्यासी कोंपट । सांडव्याची वाट विसरावी ।।३।।

२५२८
ऋणाच्या परिहारा जालों वोळगणा । द्यावी नारायणा वासलाती ।।१।।
जालों उतराई शरीरसंकल्पें । चुकों द्यावीं पापें सकळ ही ।।धृ।।
आजिवरि होतों धरूनि जिवासी । व्याजें कासाविसी बहु केलें ।।२।।
तुका म्हणे मना आणिला म्यां भाव । तुमचा तेथें ठाव आहे देवा ।।३।।

२५२९
येणें पांगें पायांपाशीं । निश्चयेंसी राहेन ।।१।।
सांगितली करीन सेवा । सकळ देवा दास्यत्व ।।धृ।।
बंधनाची तुटली बेडी । हे चि जोडी मग आम्हां ।।२।।
तुका म्हणे नव्हें क्षण । पायांविण वेगळा ।।३।।

२५३०
आपुल्या आपण उगवा लिगाड । काय माझें जड करुन घ्याल ।।१।।
उधारासी काय उधाराचें काम । वाढवूं चि श्रम नये देवा ।।धृ।।
करा आतां मजसाटीं वाड पोट । ठाव नाहीं तंटे जालें लोकीं ।।२।।
तुका म्हणे बाकी झडलियावरी । न पडें वेव्हारीं संचिताचे ।।३।।

२५३१
सर्व संगीं विट आला । तूं एकला आवडसी ।।१।।
दिली आतां पायीं मिठी । जगजेठी न सोडीं ।।धृ।।
बहु जालों क्षीदक्षीण । येणें सीण तो नासे ।।२।।
तुका म्हणे गंगवास । बहु त्या आस स्थळाची ।।३।।

२५३२
शीतळ तें शीतळाहुनी । पायवणी चरणींचें ।।१।।
सेवन हे शिरसा धरीं । अंतरीं हीं वरदळा ।।धृ।।
अवघें चि नासी पाप । तीर्थ बाप माझ्याचें ।।२।।
बैसोनियां तुका तळीं । त्या कल्लोळीं डौरला ।।३।।

२५३३
गोदे कांठीं होता आड । करूनि कोड कवतुकें।।१।।
देखण्यांनीं एक केलें । आइत्या नेलें जिवनापें ।।धृ।।
राखोनियां ठाव । अल्प जीव लावूनि ।।२।।
तुका म्हणे फिटे धनी । हे सज्जनीं विश्रांति ।।३।।

२५३४
न पाहें माघारें आतां परतोनि । संसारापासूनि विटला जीव ।।१।।
सामोरें येऊनि कवळीं दातारा । काळाचा हाकारा न साहावे ।।धृ।।
सावधान चित्त होईल आधारें । खेळतां ही बरें वाटईल ।।२।।
तुका म्हणे कंठ दाटला या सोसें । न पवे कैसें जवळी हें ।।३।।

२५३५
मथनीचें नवनीत । सर्व हितकारक ।।१।।
दंडवत दंडा परी । मागें उरी नुरावी ।।धृ।।
वचनाचा तो पसरुं काई । तांतडी डोईपाशींच ।।२।।
तुका म्हणे जगजेठी । लावीं कंठीं उचलूनि ।।३।।

२५३६
अवचिता चि हातीं ठेवा । दिला सेवा न करितां।।१।।

भाग्य फळलें जाली भेटी । नेघें तुटी यावरी ।।धृ।।
दैन्य गेलें हरली चिंता । सदैव आतां यावरी ।।२।।
तुका म्हणे वांटा जाला । बोलों बोली देवासीं ।।३।।

२५३७
समर्थाची धरिली कास । आतां नाश काशाचा ।।१।।
धांव पावें करीन लाहो । तुमच्या आहो विठ्ठला ।।धृ।।
न लगे मज पाहाणें दिशा । हाकेसरिसा ओढसी ।।२।।
तुका म्हणे नव्हे धीर । तुम्हां स्थिर दयेनें ।।३।।

२५३८
करूं तैसें पाठांतर । करुणाकर भाषण ।।१।।
जिहीं केला मूर्तिमंत । ऐसे संतप्रसाद ।।धृ।।
सोज्ज्वळ केल्या वाटा । आइत्या नीटा मागीलां ।।२।।
तुका म्हणे घेऊं धांवा । करूं हांवा ते जोडी ।।३।।

२५३९
अचळ न चळे ऐसें जालें मन । धरूनि निज खुण राहिलोंसें ।।१।।
आवडी बैसली गुणांची अंतरीं । करूं धणीवरी सेवन तें ।।धृ।।
एकविध भाव नव्हे अभावना । आणिकिया गुणां न मिळवे ।।२।।
तुका म्हणे माझे पडिलें आहारीं । ध्यान विटेवरी ठाकले तें ।।३।।

२५४०
काय तुझी थोरी वर्णूं मी पामर । होसी दयाकर कृपासिंधु ।।१।।
तुज ऐसी दया नाहीं आणिकासी । ऐसें हृषीकेशी नवल एक ।।धृ।।
कुरुक्षेत्रभूमीवरी पक्षी व्याले । तृणामाजी केलें कोठें त्यांनीं ।।२।।
अकस्मात तेथें रणखांब रोविला । युद्धाचा नेमिला ठाव तेथें ।।३।।
कौरव पांडव दळभार दोन्ही । झुंजावया रणीं आले तेथें ।।४।।
तये काळीं तुज पक्षी आठविती । पाव बा श्रीपती म्हणोनियां ।।५।।
हस्ती घोडे रथ येथें धांवतील । पाषाण होतील शतचूर्ण ।।६।।
ऐसिये आकांतीं वांचों कैसे परी । धांव बा श्रीहरी लवलाहें ।।७।।
टाकोनियां पिलीं कैसें जावें आतां । पावें जगन्नाथा लवलाहीं ।।८।।
आली तिये काळीं कृपा तुझ्या चित्ता । अनाथांच्या नाथा नारायणा ।।९।।

एका गजाचिया कंठीं घंटा होती। पाडिली अवचिती तयांवरी ।।१०।।
अठरा दिवस तेथे द्वंदजुंज जालें । वारा ऊन लागलें नाहीं तयां ।।११।।
जुंज जाल्यावरी दाविलें अर्जुना । तुम्हीं नारायणा पक्षियांसी ।।१२।।
पाहें आपुलिया दासां म्यां रक्षिलें । रणीं वांचविलें कैशा परी ।।१३।।
ऐसी तुज माया आपुल्या भक्तांची । माउली आमुची तुका म्हणे ।।१४।।

२५४१
वैष्णवां संगती सुख वाटे जीवा । आणीक मी देवा कांहीं नेणें ।।१।।
गायें नाचें उडें आपुलिया छंदें । मनाच्या आनंदें आवडीनें ।।धृ।।
लाज भय शंका दुराविला मान । न कळे साधन यापरतें ।।२।।
तुका म्हणे आतां आपुल्या सायासें । आम्हां जगदेशें सांभाळावें ।।३।।

२५४२
शरण शरण वाणी । शरण त्रिवाचा विनवणी ।।१।।
स्तुती न पुरे हे वाचा । सत्य दास मी दासांचा ।।धृ।।
देह सांभाळून। पायांवरी लोटांगण ।।२।।
विनवी संता तुका दीन । नव्हे गोरवें उत्तीर्ण ।।३।।

२५४३
लेंकरा लेववी माता अळंकार । नाहीं अंतपार आवडीसी।।१।।
कृपेचें पोसणें तुमचें मी दीन । आजि संतजन मायबाप ।।धृ।।
आरुषा उत्तरीं संतोषे माउली । कवळूनि घाली हृदयात ।।२।।
पोटा आलें त्याचे नेणे गुणदोष । कल्याण चि असे असावें हें ।।३।।
मनाची ते चाली मोहाचिये सोई । ओघें गंगा काई परतों जाणे ।।४।।
तुका म्हणे कोठें उदार मेघां शक्ति । माझी तृषा किती चातकाची ।।५।।

२५४४
युक्ति तंव जाल्या कुंटित सकळा । उरली हे कळा जीवनाची ।।१।।
संतचरणीं भावें ठेविलें मस्तक । जोडोनि हस्तक राहिलोंसें ।।धृ।।
जाणपणें नेणें कांहीं चि प्रकार । साक्षी तें अंतर अंतरासी ।।२।।
तुका म्हणे तुम्ही केलें अभयदान । जेणें समाधान राहिलेंसे ।।३।।

२५४५

हा गे आलों कोणी म्हणे बुडतिया । तेणें किती तया बळ चढे ।।१।।
तुम्ही तंव भार घेतला सकळ । आश्वासिलों बाळ अभयकरें ।।धृ।।
भुकेलियां आस दावितां निर्धार । किती होय धीर समाधान ।।२।।
तुका म्हणे दिली चिंतामणीसाटीं । उचित कांचवटी दंडवत ।।३।।

२५४६
कैसा तीं देखिला होसील गोपाळीं । पुण्यवंतीं डोळीं नारायणा ।।१।।
तेणें लोभें जीव जालासे बराडी । आम्ही ऐशी जोडी कईं लाभों ।।धृ।।
असेल तें कैसें दर्शनाचें सुख । अनुभवें श्रीमुख अनुभवितां ।।२।।
तुका म्हणे वाटे देसी आलिंगन । अवस्था ते क्षणाक्षणां होते ।।३।।

२५४७
कासया या लोभें केलें आर्तभूत । सांगा माझें चित्त नारायणा ।।१।।
चातकाचे परी एक चि निर्धार । लक्षभेदीतीर फिरों नेणे ।।धृ।।
सांवळें रूपडें चतुर्भुज मूर्ति । कृष्णनाम चित्तीं संकल्प हा ।।२।।
तुका म्हणे करीं आवडीसी ठाव । नको माझा भाव भंगों देऊं ।।३।।

२५४८
काय माझा पण होईल लटिका । ब्रिदावळी लोकां दाविली ते ।।१।।
खरी करूनियां देईं माझी आळी । येऊनि कृवाळी पांडुरंगे ।।धृ।।
आणीक म्यां कोणा म्हणवावें हातीं । नये काकुलती दुजियासी ।।२।।
तुका म्हणे मज येथें चि ओळखी । होईन तो सुखी पायांनीं च ।।३।।

२५४९
तुम्हां आम्हां जंव जालिया समान । तेथें कोणां कोण सनमानी ।।१।।
उरी तों राहिली गोमटें गौरव । ओढे माझा जीव पायांपाशीं ।।धृ।।
नेणपणें आम्ही आळवूं वोरसें । बोलवितों रसें शब्दरत्नें ।।२।।
तुका म्हणे लळे पाळीं वो विठ्ठले । कां हे उरविले भेदाभेद ।।३।।

२५५०
नको माझे मानूं आहाच ते शब्द । कळवळ्याचा वाद करीतसें ।।१।।
कासयानें बळ करूं पायांपाशीं । भाकावी ते दासीं करुणा आम्हीं ।।धृ।।
काय मज चाड असे या लौकिकें । परी असे निकें अनुभवाचें ।।२।।

लांचावल्यासाटीं वचनाची आळी । टकळ्यानें घोळी जवळी मन ।।३।।
वाटतसे आस पुरविसी ऐसें । तरि अंगीं पिसें लावियेले ।।४।।
तुका म्हणे माझी येथें चि आवडी। श्रीमुखाची जोडी इच्छीतसें ।।५।।

२५५१
म्हणऊनी लवलाहें । पाय आहें चिंतीत ।।१।।
पाठिलागा येतो काळ । तूं कृपाळू माउली ।।धृ।।
बहु उसंतीत आलों । तया भ्यालों स्थळासी ।।२।।
तुका म्हणे तूं जननी । ये निर्वाणीं विठ्ठलें।।३।।

२५५२
जेणें वाढे अपकीर्ति । सर्वाथाअ तें वर्जावें ।।१।।
सत्य रुचे भलेपण । वचन तें जगासी ।।धृ।।
होइजेतें शूर त्यागें । वाउगें तें सारावें ।।२।।
तुका म्हणे खोटें वर्म । निंद्यकर्म काळिमा ।।३।।

२५५३
याची सवे लागली जीवा । गोडी हेवा संगाचा ।।१।।
परतें न सरवे दुरी । क्षण हरीपासूनि ।।धृ।।
जालें तरी काय तंट । आतां चट न संटे ।।२।।
तुका म्हणे चक्रचाळे । वेळ बळें लाविलें।।३।।

२५५४
याचा तंव हा चि मोळा । देखिला डोळा उदंड।।१।।
नेदी मग फिरों मागें । अंगा अंगें संचरे ।।धृ।।
कां गा याची नेणां खोडी । जीभा जोडी करितसां ।।२।।
पांघरे तें बहु काळें । घोंगडें ही ठायींचें ।।३।।
अंगीं वसे चि ना लाज । न म्हणे भाज कोणाची।।४।।
सर्वसाक्षी अबोल्यानें । दुश्चित कोणें नसावें ।।५।।
तुका म्हणे धरिला हातीं । मग निश्चिंतीं हरीनें ।।६।।

२५५५
प्रसिद्ध हा असे जगा । अवघ्या रंगारंगाचा ।।१।।

तरी वाटा न वजे कोणी । नारायणीं घरबुडी ।।धृ।।
बहुतां ऐसें केलें मागें । लाग लागें लागेना ।।२।।
हो कां नर अथवा नारी । लाहान थोरीं आदर ।।३।।
जालें वेगळें लोकीं पुरे । मग नुरे समूळ ।।४।।
कळेना तो आहे कैसा । कोणी दिशा बहु थोडा ।।५।।
तुका म्हणे दुसऱ्या भावें । छायें नावें न देखवे ।।६।।

२५५६
न संडावा आतां ऐसें वाटे ठाव । भयाशी उपाव रक्षणाचा ।।१।।
म्हणऊनि मनें वळियेलें मन । कारियेकारण चाड नाहीं ।।धृ।।
नाना वीचि उपाधि करूनियां मूळ । राखतां विटाळ तें चि व्हावें ।।२।।
तुका म्हणे येथें न वेचे वचन । निजीं निजखूण सांपडली ।।३।।

२५५७
सत्तेचें भोजन समयीं आतुडे । सेवन ही घडे रुचिनेसी।।१।।
वर्मे श्रम नेला जालें एकमय । हृदयस्थीं सोय संग जाला ।।धृ।।
कोथळीस जमा पडिलें संचित । मापल्याचा वित्त नेम जाला ।।२।।
तुका म्हणे धणी ऐसा जालों आतां । करीन ते सत्ता माझी आहे ।।३।।

२५५८
देईल तें उणें नाहीं । याचे कांहीं पदरीं ।।१।।
पाहिजे तें संचित आतां । येथें सत्ता करावया ।।धृ।।
गुणां ऐसा भरणा भरी। जो जें चारी तें लाभे ।।२।।
तुका म्हणे देवीं देव । फळे भव आपुला ।।३।।

२५५९
तेव्हां होतों भोगाधीन । तुम्हां भिन्न पासूनि ।।१।।
आतां बोलों नये ऐसें । आनारिसें वेगळें ।।धृ।।
सन्मुख जालों स्वामीकडे । भव औठडे निराळे ।।२।।
चिंतिलें तें चिंतामणी । फिटे धणी तों द्यावें ।।३।।
सहज स्थित आहे अंगीं । प्रसंगीं ते वंचेना।।४।।
तुमची देवा धरिली कास । केला नास प्रपंचा ।।५।।
तुका म्हणे जाणोनि वर्म । कर्माकर्मे ठेविलीं ।।६।।

।।५।।

२५६०
 केला कैवाड संतांच्या आधारें । अनुभवें खरें कळों आलें ।।१।।
काय जीवित्वाची धरुनियां आशा । व्हावें गर्भवासा पात्र भेणें ।।धृ।।
अबाळीनें जावें निचिंतिया ठायां । रांडा रोटा वांयां करूं नये ।।२।।
तुका म्हणे बळी देतां तें निधान । भिकेसाटीं कोण राज्य देतो ।।३।।

२५६१
 संगतीनें होतो पंगतीचा लाभ । अशोभीं अनुभव असिजेतें ।।१।।
जैसीं तैसीं असों पुढिलांचे सोई । धरिती हातीं पायीं आचारिये ।।धृ।।
उपकारी नाहीं देखत आपदा । पुढिलांची सदा दया चित्तीं ।।२।।
तुका म्हणे तरीं सज्जनाची कीर्ति । पुरवावी आर्ति निर्बळांची ।।३।।

२५६२
 करितां विचार सांपडलें वर्म । समूळ निश्रम परिहाराचें।।१।।
मज घेऊनियां आपणांसी द्यावें । साटी जीवें जीवें नारायणा ।।धृ।।
उरी नाहीं मग पडदा कां आला । स्वमुखें चि भला करितां वाद ।।२।।
तुका म्हणे माझें खरें देणें घेणें । तुम्ही साक्षी जाणें अंतरींचें ।।३।।

२५६३
 कुळींची हे कुळदेवी । केली ठावी संतांनीं ।।१।।
बरवें जालें शरण गेलों । उगविलों संकटीं ।।धृ।।
आणिला रूपा ही बळें । करूनि खळें हरिदासीं ।।२।।
तुका म्हणे समागमें । नाचों प्रेमें लागलों ।।३।।

२५६४
 आतां देह अवसान । हें जतन तोंवरी ।।१।।
गाऊं नाचों गदारोळें । जिंकों बळें संसार ।।धृ।।
या चि जीऊं अभिमानें। सेवाधनें बळकट ।।२।।
तुका म्हणे न सरें मागें । होईन लागें आगळा ।।३।।

२५६५

ज्याने आड यावें कांहीं । त्याचें नाहीं बळ आतां ।।१।।
मन येथें साह्य जालें । हरिच्या धालें गुणवादीं ।।धृ।।
चुकुर तो गेला काळ । जालें बळ संगाचें ।।२।।
तुका म्हणे धरूं सत्ता । होईल आतां करूं तें ।।३।।

२५६६
देवासी तो पुरे एकभाव गांठी । तो चि त्याचे मिठी देइल पायीं ।।१।।
पाहोनि राहीन कवतुक निराळा । मी मज वेगळा होऊनियां ।।धृ।।
कांहीं नेघें शिरीं निमित्त्याचा भार । न लगे उत्तर वेचावें चि ।।२।।
तुका म्हणे जीवें पडिलिया गांठी । मग नाहीं मिठी सुटों येत ।।३।।

२५६७
लौकिकासाटीं या पसाऱ्याचा गोवा । कांहीं नाहीं देवा लागों येत ।।१।।
ठेवावा माथा तो नुचलावा पायीं । ठांयींचिये ठांयीं हालों नये ।।धृ।।
डव्हळिल्या मनें वितळिलें रूप । नांवऐसें पाप उपाधीचें ।।२।।
तुका म्हणे देव प्रीतीनें कवळी । ठेवील जवळी उठवूनि ।।३।।

२५६८
नाहीं होत भार घातल्या उदास । पुरवावी आस सकळ ही ।।१।।
ऐसा नाहीं मज एकाचा अनुभव । धरिला तो भाव उद्धरलें ।।धृ।।
उतावीळ असे शरणागतकाजें । धांव केशीराजे आइकतां ।।२।।
तुका म्हणे हित चिंतन भरवंसा । नेदी गर्भवासा येऊं देवा ।।३।।

२५६९
उपजों मरों हे तों आमुची मिरासी । हें तूं निवारिसी तरी थोर ।।१।।
उभा राहीं करीं खरा खोटा वाद । आम्ही जालों निंद लंडीपणें ।।धृ।।
उभयतां आहे करणें समान । तुम्हां ऐसा म्हणें मी ही देवा ।।२।।
तुका म्हणे हातीं सांपडलें वर्म । अवघाची भ्रम फेडिन आतां ।।३।।

२५७०
मेलियांच्या रांडा इच्छिती लेकरूं । लाज नाहीं धरूं प्रीती कैशी ।।१।।
मागिलां पुढिलां एकी सरोबरी । काळाची पेटारी खांदा वाहे ।।धृ।।
आन दिसे परी मरणें चि खरें । सांपळा उंदिरें सामाविलीं ।।२।।

तुका म्हणे जाली मनाची परती । निवळली ज्योती दिसों आली ।।३।।

२५७१
निष्ठुर मी जालों अतिवादागुणें । हें कां नारायणें नेणिजेल ।।१।।
सांडियेली तुम्ही गोत परिसोय । फोडविली डोय कर्मा हातीं ।।धृ।।
सांपडूनि संदी केली जीवेंसाटीं । घ्यावयासि तुटी कारण हें ।।२।।
तुका म्हणे तुज काय म्हणों उणें । नाहीं अभिमानें चाड देवा ।।३।।

२५७२
माझें माझ्या हाता आलें । आतां भलें सकळ ।।१।।
काशासाटीं विषम थारा । तो अंतरा विटाळ ।।धृ।।
जालीं तया दुःखें तुटी । मागिल पोटीं नसावें ।।२।।
तुका म्हणे शुद्धकुळ । तेथें मळ काशाचा ।।३।।

२५७३
समर्थपणें हे करा संपादणी । नसतें चि मनीं धरिल्याची।।१।।
दुसऱ्याचें येथें नाहीं चालों येत । तरि मी निवांत पाय पाहें ।।धृ।।
खोटियाचें खरें खरियाचें खोटें । मानलें गोमटें तुम्हांसी तें ।।२।।
तुका म्हणे तुम्हां सवें करितां वाद । होईजेतें निंद जनीं देवा ।।३।।

२५७४
तुम्हां आम्हांसवें न पडावी गांठी । आलेति जगजेठी कळों आतां ।।१।।
किती म्हणों आतां वाइटा वाइट । शिवों नये वीट आल्यावरी ।।धृ।।
बोलिल्याची आतां हे चि परचित । भीड भार थीत बुडवील ।।२।।
तुका म्हणे आली रोकडी प्रचिती । झांकणें तें किती कोठें देवा ।।३।।

२५७५
सकळ सत्ताधारी । व्हावें ऐसें काय हरी ।।१।।
परि या कृपेच्या वोरसें । कुढावयाचें चि पिसें ।।धृ।।
अंगें सर्वोत्तम । अवघा चि पूर्णकाम ।।२।।
तुका म्हणे दाता । तरि हा जीव दान देता।।३।।

२५७६

कोणापाशीं द्यावें माप । आपीं आप राहिलें ।।१।।
कासयाची भरोवरी । काय दुरी जवळी ।।धृ।।
एकें दाखविले दाहा। फांटा पाहा पुसून ।।२।।
तुका म्हणे सरलें वोझें । आतां माझें सकळ।।३।।

२५७७
नभोमय जालें जळ । एकीं सकळ हरपलें ।।१।।
आतां काय सारासारी । त्याच्या लहरी तयांत ।।धृ।।
कैचा तेथ यावा सांडी । आप कोंडी आपण्यां ।।२।।
तुका म्हणे कल्प जाला। अस्त गेला उदय ।।३।।

२५७८
राजा करी तैसे दाम । ते ही चाम चालती ।।१।।
कारण ते सत्ता शिरीं । कोण करी अव्हेर ।।धृ।।
वाइले तें सुनें खांदीं । चाले पदीं बैसविलें ।।२।।
तुका म्हणे विश्वंभरें । करुणाकरें रक्षिलें ।।३।।

२५७९
आम्ही देव तुम्ही देव । मध्यें भेव अधीक ।।१।।
कैवाडाच्या धांवा लागें । मागें मागें विठ्ठले ।।धृ।।
भेडसाविलें हाके नादें । वोळखी भेदें मोडिली ।।२।।
तुका म्हणे उभा राहे । मागें पाहे परतोनि ।।३।।

२५८०
हीनसुरबुद्धीपासीं । आकृतीसी भेद नाहीं ।।१।।
एक दांडी एक खांदी । पदीं पदीं भोगणें ।।धृ।।
एकाऐसें एक नाहीं । भिन्न पाहीं प्रकृती ।।२।।
तुका म्हणे भूमी खंडे । पीक दंडे जेथें तें।।३।।

२५८१
काय बोलों सांगा । याउपरी पांडुरंगा ।।१।।
कांहीं आधारावांचून । पुढें न चले वचन ।।धृ।।
वाढे ऐसा रस । कांहीं करावा सौरस ।।२।।

भक्तिभाग्यसीमा । द्यावा जोडोनियां प्रेमा।।३।।
कोरड्या उत्तरीं । नका गौरवूं वैखरी ।।४।।
करी विज्ञापना । तुका प्रसादाची दाना ।।५।।

२५८२
आहाच तो मोड वाळलियामधीं । अधीराची बुद्धि तेणें न्यायें ।।१।।
म्हणऊनि संग न करीं दुसरें । चित्त मळीन द्वारें दोड पडे ।।धृ।।
विषासाटीं सर्पा भयाभीत लोक । हें तों सकळीक जाणतसां ।।२।।
तुका म्हणे काचें राहे कुळांकुड । अवगुण तो नाड ज्याचा तया ।।३।।

२५८३
क्षणक्षणां जीवा वाटतसे खंती । आठवती चित्तीं पाय देवा ।।१।।
येईं वो येईं वो येईं लवलाहीं । आळिंगूनि बाहीं क्षेम देईं ।।धृ।।
उताविळ मन पंथ अवलोकी । आठवा ते चुकी काय जाली ।।२।।
तुका म्हणे माझ्या जीवींच्या जीवना । घाला नारायणा उडी वेगीं ।।३।।

२५८४
आळी करावी ते कळतें बाळका । बुझवावें हें कां नेणां तुम्ही ।।१।।
निवाड तो तेथें असे पायांपाशीं । तुम्हांआम्हांविशीं एकेठायीं ।।धृ।।
आणीक तों आम्ही न देखोंसें जालें । जाणावें शिणलें भागलेंसें ।।२।।
तुका म्हणे तुम्हां लागतें सांगावें । अंतरींचें ठावें काय नाहीं ।।३।।

२५८५
तांतडीनें आम्हां धीर चि न कळे । पाळावे हे लळे लवलाहीं ।।१।।
नका कांहीं पाहों सावकाशीं देवा । करा एक हेवा तुमचा माझा ।।धृ।।
वोरसाचा हेवा सांभाळावी प्रीत । नाहीं राहों येत अंगीं सदा ।।२।।
तुका म्हणे मज नका गोवूं खेळा । भोजनाची वेळा राखियेली ।।३।।

२५८६
नाहीं लोपों येत गुण । वेधी आणीकें चंदन ।।१।।
न संगतां पडे ताळा । रूप दर्पणीं सकळां ।।धृ।।
सारविलें वरी । आहाच तें क्षणभरी ।।२।।
तुका म्हणे वोहळें । सागराच्या ऐसें व्हावें।।३।।

२५८७
 वचनें चि व्हावें आपण उदार । होइल विश्वंभर संपुष्ट चि ।।१।।
सत्यसंकल्पाचीं फळें बीजाऐसीं । शुद्ध नाहीं नासी पावों येत ।।धृ।।
वंचिलिया काया येतसे उपेगा । शरीर हें नरकाचें चि आळें ।।२।।
तुका म्हणे जीव जितां थारे लावा । पडिलिया गोवा देशधडी ।।३।।

२५८८
 उखतें आयुष्य जायांचें कळिवर । अवघें वोडंबर विषयांचें ।।१।।
कोणासी हा लागे पुसणें विचार । मनें चि सादर करूं आतां ।।धृ।।
उत्पत्ति प्रळय पडिलें दळण । पाकाचें भोजन बीज वाढे ।।२।।
तुका म्हणे जाऊं अभयाच्या ठायां । रिघों देवराया शरण वेगीं ।।३।।

२५८९
 बोलावे म्हूण हे बोलतों उपाय । प्रवाहें हें जाय गंगाजळ ।।१।।
भाग्ययोगें कोणां घडेल सेवन । कैंचे येथें जन अधिकारी ।।धृ।।
मुखीं देतां घांस पळवितीं तोंडें । अंगींचिया भांडे असुकानें ।।२।।
तुका म्हणे पूजा करितों देवाची । आपुलिया रुची मनाचिये ।।३।।

२५९०
 लटिक्याचे वाणी चवी ना संवाद । नांहीं कोणां वाद रुचों येत ।।१।।
अन्याय तो त्याचा नव्हे वायचाळा । मायबापीं वेळा न साधिली ।।धृ।।
अनावर अंगीं प्रबळ अवगुण । तांतडीनें मन लाहो साधी ।।२।।
तुका म्हणे दोष आणि अवकळा । न पडतां ताळा घडे तसे ।।३।।

२५९१
 नये स्तवूं काचें होतें क्रियानष्ट । कांुफ्दाचे ते कष्ट भंगा मूळ ।।१।।
नाहीं परमार्थ साधत लौकिकें । धरुन होतों फिकें अंगा आलें ।।धृ।।
पारखिया पुढें नये घालूं तोंड । तुटी लाभा खंड होतो माना ।।२।।
तुका म्हणे तरी मिरवतें परवडी । कामावल्या गोडी अविनाश ।।३।।

२५९२
 कोण्या काळें येईल मना । नारायणा तुमचिया।।१।।

माझा करणें अंगीकार । सर्व भार फेडूनि ।।धृ।।
लागली हे तळमळ चित्ता । तरी दुश्चिता संसारी ।।२।।
सुखाची च पाहें वास । मागें दोष सांभाळीं ।।३।।
इच्छा पूर्ण जाल्याविण । कैसा सीण वारेल ।।४।।
लाहो काया मनें वाचा । देवा साच्या भेटीचा ।।५।।
कांटाळा तो न धरावा । तुम्ही देवा दासांचा ।।६।।
तुका म्हणे माझे वेळे । न कळे कां हें उफराटें ।।७।।

२५९३
घ्यावी तरी घ्यावी उदंड चि सेवा । द्यावें तरी देवा उदंड चि ।।१।।
ऐसीं कैंचीं आम्ही पुरतीं भांडवलें । आल्या करीं बोलें समाधान ।।धृ।।
व्हावें तरीं व्हावें बहुत चि दुरी । आलिया अंतरीं वसवावें ।।२।।
तुका म्हणे तुझें सख्यत्व आपणीं । अससील ऋणी आवडीचा ।।३।।

२५९४
काय करूं जीव होतो कासावीस । कोंडलिये दिस गमे चि ना ।।१।।
पडिलें हें दिसे ब्रम्हांड चि वोस । दाटोनि उच्छ्वास राहातसे ।।२।।
तुका म्हणे आगा सर्वजाणतिया । विश्वंभरें काया निववावी ।।३।।

२५९५
सुकलियां कोमां अत्यंत जळधर । तेणें च प्रकार न्याय असे ।।१।।
न चलें पाउलीं सांडीं गरुडासन । मनाचें हो मन त्वरेलागीं ।।२।।
तुका म्हणे भूक न साहावे बाळा । जीवनांची कळा ओढलीसे ।।३।।

२५९६
शृंगारिक माझीं नव्हती उत्तरें । आळवितों खरे अवस्थेच्या ।।१।।
न घलावा मधीं कामाचा विलंब । तुम्ही तों स्वयंभ करुणामूर्ति ।।२।।
तुका म्हणे केलें सन्मुख वदन । देखतां चरण पोटाळीन ।।३।।

२५९७
तूं माझी माउली तूं माझी साउली । पाहातों वाटुली पांडुरंगे ।।१।।
तूं मज येकुला वडील धाकुला । तूं मज आपुला सोयरा जीव ।।२।।
तुका म्हणे जीव तुजपाशीं असे । तुझियानें ओस सर्व दिशा ।।३।।

२५९८
 कराल तें करा । हातें आपुल्या दातारा ।।१।।
बळियाचीं आम्ही बाळें । असों निर्भर या सळे ।।धृ।।
आतां कोठें काळ । करील देवापाशीं बळ ।।२।।
तुका म्हणे पंढरीराया । थापटितों ठोक बाह्या ।।३।।

२५९९
 डोळां भरिलें रूप । चित्ता पायांपें संकल्प ।।१।।
अवघी घातली वांटणी । प्रेम राहिलें कीर्तनी ।।धृ।।
वाचा केली माप । रासीं हरिनाम अमुप ।।२।।
भरूनियां भाग । तुका बैसला पांडुरंग ।।३।।

२६००
 आतां आहे नाहीं । न कळे आळी करा कांहीं ।।१।।
देसी पुरवुनी इच्छा । आतां पंढरीनिवासा ।।धृ।।
नेणे भाग सीण । दुजें कोणी तुम्हांविण ।।२।।
आतां नव्हे दुरी । तुका पायीं मिठी मारी।।३।।

२६०१
 संकल्पासी अधिष्ठान । नारायण गोमटें ।।१।।
अवधियांचें पुरे कोड । फिडे जड देहत्व ।।धृ।।
उभय लोकीं उत्तम कीर्ति । देव चित्तीं राहिलिया ।।२।।
तुका म्हणे जीव धाय । नये हाय जवळी ।।३।।

२६०२
 भाग्यवंता ऐशी जोडी । परवडी संतांची ।।१।।
धन घरीं पांडुरंग । अभंग जें सरेना ।।धृ।।
जनाविरहित हा लाभ । टांचें नभ सांटवणें ।।२।।
तुका म्हणे विष्णुदासां । नाहीं आशा दुसरी।।३।।

२६०३
 जरी आलें राज्य मोळविक्या हातां । तरी तो मागुता व्यवसायी ।।१।।

तृष्णेचीं मंजुरें नेणती विसांवा । वाढें हांव हांवां काम कामीं ।।धृ।।
वैभवाचीं सुखें नातळतां अंगा । चिंता करी भोगा विघ्न जाळी ।।२।।
तुका म्हणे वाहे मरणाचें भय । रक्षणउपाय करूनि असे ।।३।।

२६०४
कोण होईल आतां संसारपांगिलें । आहे उगवलें सहजें चि ।।१।।
केला तो चालवीं आपुला प्रपंच । काय कोणां वेच आदा घे दे ।।धृ।।
सहजें चि घडे आतां मोळ्याविण । येथें काय सीण आणि लाभ ।।२।।
तुका म्हणे जालों सहज देखणा । ज्याच्या तेणें खुणा दाखविल्या ।।३।।

२६०५
आम्हां शरणागतां । एवढी काय करणें चिंता ।।१।।
परि हे कौतुकाचे खेळ । अवघे पाहातों सकळ ।।धृ।।
अभयदानवृंदें। आम्हां कैंचीं द्वंदें ।।२।।
तुका म्हणे आम्ही । हरिजन साधनाचे स्वामी।।३।।

२६०६
देवाचिये चाडे प्रमाण उचित । नये वांटूं चित्त निषेधासीं ।।१।।
नये राहों उभें कसमळापाशीं । भुंकतील तैसीं सांडावीं तीं ।।२।।
तुका म्हणे क्षमा सुखाची हे रासी । सांडूनि कां ऐसी दुःखी व्हावें ।।३।।
।।१।।

२६०७
खळा सदा क्षुद्रीं दृष्टी । करी कष्टी सज्जना ।।१।।
करितां आपुलाले परी । धणीवरी व्यापार ।।धृ।।
दया संतां भांडवल। वेची बोल उपकार ।।२।।
तुका म्हणे आपुलालें । उसंतिलें ज्यांणीं तें ।।३।।

२६०८
जग ऐसें बहुनांवें । बहुनावें भावना ।।१।।
पाहों बोलों बहु नये । सत्य काय सांभाळा ।।धृ।।
कारियासी जें कारण। तें जतन करावें ।।२।।
तुका म्हणे संतजनीं । हें चि मनीं धरावें ।।३।।

२६०९
निघालें तें अगीहूनि । आतां झणी आतळे ।।१।।
पळवा परपरतें दुरी । आतां हरी येथूनि ।।धृ।।
धरिलें तैसें श्रुत करा हो । येथें आहो प्रपंचीं ।।२।।
अबोल्यानें ठेला तुका । भेउनि लोकां निराळा ।।३।।

२६१०
आतां दुसरें नाहीं वनीं । निरांजनी पडिलों ।।१।।
तुमची च पाहें वास । अवघी आस निरसली ।।धृ।।
मागिलांचा मोडला माग । घडला त्याग अरुची ।।२।।
तुका म्हणे करुणाकरा । तूं सोयरा जीवींचा ।।३।।

२६११
धरूनियां सोई परतलें मन । अनुलक्षीं चरण करूनियां।।१।।
येईं पांडुरंगे नेईं सांभाळूनि । करुणावचनीं आळवितों।।धृ।।
बुद्धि जाली साह्य परि नाहीं बळ । अवलोकितों जळ वाहे नेत्रीं ।।२।।
न चलती पाय गळित जाली काया । म्हणऊनि दया येऊं द्यावी ।।३।।
दिशच्या करितों वारियासीं मात । जोडुनियां हात वास पाहें ।।४।।
तुका म्हणे वेग करावा सत्वर । पावावया तीर भवनदीचें ।।५।।

२६१२
कौलें भरियेली पेंठ । निग्रहाचे खोटे तंट ।।१।।
ऐसें माता जाणे वर्म । बाळ वाढवितां धर्म ।।धृ।।
कामवितां लोहो कसे। तांतडीनें काम नासे ।।२।।
तुका म्हणे खडे । देतां अक्षरें तें जोडे ।।३।।

२६१३
चालिलें न वाटे । गाऊनियां जातां वाटे ।।१।।
बरवा वैष्णवांचा संग । येतो सामोरा श्रीरंग ।।धृ।।
नाहीं भय आड । कांहीं विषमांचें जड ।।२।।
तुका म्हणे भक्ति । सुखरूप आदीं अंतीं ।।३।।

२६१४
 करितां विचार तो हा दृढ संसार । ब्रम्हांदिकां पार नुलंघवे सामर्थ्यें ।।१।।
शरण शरण नारायणा मज अंगीकारीं दीना। आलें तें वचनांपासीं माझ्या सामर्थ्य ।।धृ।।
पाठीवरी मोळी तो चि कळवा पायीं तळीं । सांपडला जाळीं मत्स्य जाला तो न्याय ।।२।।
आतां करीन तांतडी लाभाची ते याच जोडी । तुका म्हणे ओढी पायां सोई मनाची ।।३।।

२६१५
 बहुतां जातीचा केला अंगीकार । बहुत ही फार सर्वोत्तमें ।।१।।
सरला चि नाहीं कोणांचिये वेचें । अक्षोभ ठायींचें ठायीं आहे ।।धृ।।
लागत चि नाहीं घेतां अंतपार । वसवी अंतर अणुचें ही ।।२।।
तुका म्हणे केला होय टाकीऐसा । पुरवावी इच्छा धरिली ते ।।३।।

२६१६
 पोट धालें आतां जीवनीं आवडी । पुरवावे परवडी बहुतांचे ।।१।।
काय आंचवणा तांतडीचें काम । मागील तीं श्रम न पवावीं ।।धृ।।
वाढितिया पोटीं बहु असे वाव । सांभाळितां ठाव काय वांचे ।।२।।
दाविल्यावांचूनि नाहीं कळों येत । तेथें ही दुश्चित एकपणें ।।३।।
नावेचा भार तो उदकाचे शिरीं । काय हळू भारी तये ठायीं ।।४।।
तुका म्हणे गीतीं गाऊनि गोविंद । करूं ब्रम्हानंद एकसरें।।५।।

२६१७
 एका हातीं टाळ एका हातीं चिपळिया । घालिती हुंमरी एक वाताती टाळिया ।।१।।
मातले वैष्णव नटती नाना छंदें। नाहीं चाड मोक्षपदें भजनीं आवडी ।।धृ।।
हाका अरोळिया गीतवादें सुखसोहळे । जाय तें न कळे केव्हां रजनी दिवस ।।२।।
तीथाअ नाहीं चाड न लगे जावें वनांतरा । तुका म्हणे हरिहरात्मक चि पृथुवी।।३।।

२६१८

देव सखा आतां केलें नव्हे काई । येणें सकळई सोइरीं च ।।१।।
भाग्यवंत जालों गोतें सपुरतीं । आतां पुण्या नीती पार नाहीं ।।धृ।।
पाहातां दिसती भरलिया दिशा । ठसावला ठसा लोकत्रयीं ।।२।।
अविनाश जोडी आम्हां भाग्यवंतां । जाली होती सत्ता संचिताची ।।३।।
पायांवरी डोई ठेवाया अरोथा । जाली द्यावी सत्ता क्षेम ऐसी ।।४।।
तुका म्हणे जीव पावला विसावा । म्हणवितां देवा तुमचींसीं ।।५।।

२६१९
कोण आतां कळिकाळा । येऊं बळा देईल ।।१।।
सत्ता झाली त्रिभुवनीं । चक्रपाणी कोंवसा ।।धृ।।
लडिवाळांचा भार वाहे । उभा आहे कुढावया ।।२।।
तुका म्हणे घटिका दिस । निमिश ही न विसंभे ।।३।।

२६२०
आम्हां आवडे नाम घेतां । तो ही पिता संतोषे ।।१।।
उभयतां एकचित्त । तरी प्रीत वाढली ।।धृ।।
आम्ही शोभों निकटवासें। अनारिसें न दिसे ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगे । अवघीं अंगें निवालीं।।३।।

२६२१
देह तंव असे भोगाचे अधीन । याचें सुख सीण क्षीणभंगर ।।१।।
अविनाश जोडी देवापायीं भाव । कल्याणाचा ठाव सकळही ।।धृ।।
क्षणभंगुर हा तेथील पसारा । आलिया हाकारा अवघें राहे ।।२।।
तुका म्हणे येथें सकळ विश्रांति । आठवावा चित्तीं नारायण ।।३।।

२६२२
आतां आवश्यक करणें समाधान । पाहिलें निर्वाण न पाहिजे ।।१।।
केलें तरीं आतां शुशोभें करावें । दिसतें बरवें संतांमधीं ।।धृ।।
नाहीं भक्तराजीं ठेविला उधार । नामाचा आकार त्यांचियानें ।।२।।
तुका म्हणे माझ्या वडिलांचें ठेवणें । गोप्य नारायणें न करावें ।।३।।

२६२३
काया वाचा मनें श्रीमुखाची वास । आणीक उदास विचारासी ।।१।।

काय आतां मोक्ष करावा जी देवा । तुमचिया गोवा दर्शनासी ।।धृ।।
केलिया नेमासी उभें ठाडें व्हावें । नेमलें तें भावें पालटेना ।।१२।।
तुका म्हणे जों जों कराल उशीर । तों तों मज फार रडवील ।।३।।

२६२४
पुढीलांचे सोयी माझ्या मना चाली । मताची आणिली नाहीं बुद्धी ।।१।।
केलासी तो उभा आजवरी संतीं । धरविलें हातीं कट देवा ।।धृ।।
आहे तें ची मागों नाहीं खोटा चाळा । नये येऊं बळा लेंकराशीं ।।२।।
तुका म्हणे माझा साक्षीचा वेव्हार । कृपण जी थोर परी तुम्ही ।।३।।

२६२५
बहुत करूनि चाळवाचाळवी । किती तुम्ही गोवी करीतसां ।।१।।
लागटपणें मी आलों येथवरी । चाड ते दुसरी न धरूनि ।।धृ।।
दुजियाचा तंव तुम्हांसी कांटाळा । राहासी निराळा एकाएकीं ।।२।।
तुका म्हणे आतां यावरी गोविंदा । मजशीं विनोदा येऊं नये ।।३।।

२६२६
तीर्थ जळ देखे पाषाण प्रतिमा । संत ते अधमा माणसाऐसे ।।१।।
वांजेच्या मैथुनापरी गेलें वांयां । बांडेल्याचें जायां जालें पीक ।।धृ।।
अभाविक सदा सुतकी चांडाळ । सदा तळमळ चुके चि ना ।।२।।
तुका म्हणे वरदळी ज्याची दृष्टी । देहबुद्धि कष्टी सदा दुःखी ।।३।।

२६२७
नव्हे मतोळ्याचा वाण । नीच नवा नारायण ।।१।।
सुख उपजे श्रवणें । खरें टांकसाळी नाणें ।।धृ।।
लाभ हातोहातीं । अधिक पुढतोंपुढती ।।२।।
तुका म्हणे नेणों किती । पुरोनि उरलें पुढती ।।३।।

२६२८
घातला दुकान । देती आलियासी दान ।।१।।
संत उदार उदार । भरलें अनंत भांडार ।।धृ।।
मागत्याची पुरे । धणी आणिकांसी उरे ।।२।।
तुका म्हणे पोतें । देवें भरिलें नव्हे रितें ।।३।।

२६२९

नरस्तुति आणि कथेचा विकरा । हें नको दातारा घडों देऊं ।।१।।
ऐसिये कृपेचि भाकितों करुणा । आहेसि तूं राणा उदाराचा ।।धृ।।
पराविया नारी आणि परधना । नको देऊं मनावरी येऊं ।।२।।
भूतांचा मत्सर आणि संतनिंदा । हें नको गोविंदा घडों देऊं ।।३।।
देहअभिमान नको देऊं शरीरीं । चढों कांहीं परी एक देऊं ।।४।।
तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडों देऊं ।।५।।

२६३०

लौकिकापुरती नव्हे माझी सेवा । अनन्य केशवा दास तुझा ।।१।।
म्हणऊनि करीं पायांसवें आळी । आणीक वेगळी नेणें परी ।।धृ।।
एकविध आम्ही स्वामिसेवेसाटीं । वरी तो चि पोटीं एकभाव ।।२।।
तुका म्हणे करीं सांगितलें काम । तुम्हां धर्माधर्म ठावे देवा ।।३।।

२६३१

ज्यांच्या संगें होतों पडिलों भोवनीं । ते केली धोवनी झाडूनियां ।।१।।
आतां एकाएकीं मनासीं विचार । करूं नाहीं भार दुजा याचा ।।धृ।।
प्रसादसेवनें आली उष्टावळी । उचित ते काळीं अवचित ।।२।।
तुका म्हणे वर्म सांपडलें हातीं । सांडिली ते खंती चिंता देवा ।।३।।

२६३२

आवडीभोजन प्रकार परवडी । भिन्नाभिन्न गोडी एक रसा ।।१।।
भोगित्या पंगती लाधलों प्रसाद । तिंहीं नाहीं भेद राखियेला ।।धृ।।
पाकसिद्धि स्वहस्तकें विनियोग। आवडीचे भाग सिद्ध केले ।।२।।
तुका म्हणे आला उच्छिष्ट प्रसाद । तेणें हा आनंद माझ्या जीवा ।।३।।

२६३३

समर्थाचा ठाव संचलाचि असे । दुर्बळाची आस पुढें करी ।।१।।
पावलें घेईन पदरीं हें दान । एकांतीं भोजन करूं दाऊं।।धृ।।
न लगे पाहावी उचिताची वेळ । अयाचित काळ साधला तो ।।२।।
तुका म्हणे पोट धालिया उपरी । गौरवा उत्तरीं पूजूं देवा ।।३।।

२६३४
 आपुल्यांचा करीन मोळा । माझ्या कुळाचारांचा।।१।।
अवघियांचे वंदिन पाय । ठायाठाय न देखें ।।धृ।।
नेदीं तुटों समाधान । थांबों जन सकळ ।।२।।
तुका म्हणे झाडा होय । तों हे सोय न संडीं ।।३।।

२६३५
 जन्ममरणांची विसरलों चिंता । तूं माझा अनंता मायबाप ।।१।।
होतील ते डोळां पाहेन प्रकार । भय आणि भार निरसलीं ।।धृ।।
लिगाडाचें मूळ होतीं पंच भूतें । त्यांचें यां पुरतें विभागिलें ।।२।।
तुका म्हणे जाला प्रपंच पारिखा । जिवासी तूं सखा पांडुरंगा ।।३।।

२६३६
 उदार तूं हरी ऐसी कीर्ति चराचरीं । अनंत हे थोरी गर्जतील पवाडे ।।१।।
तुझे लागों पायीं माझा भाव पुसी जन्ममरणां ठाव। देवाचा तूं देव स्वामी सकळा ब्रम्हांडा ।।धृ।।
मागणें तें तुज मागों जीवभाव तुज सांगों । लागों तरी लागों पायां तुमच्या दातारा ।।२।।
दिसों देसी कीविलवाणें तरी तुज चि हें उणें । तुका म्हणे जिणें माझें तुज अधीन ।।३।।

२६३७
 पाहा किती आले शरण समान चि केले । नाहीं विचारिले गुण दोष कोणांचे ।।१।।
मज सेवटींसा द्यावा ठाव तयांचिये देवा । नाहीं करीत हेवा कांहीं थोरपणाचा ।।धृ।।
नाहीं पाहिला आचार कुळगोत्रांचा विचार । फेडूं आला भार मग न म्हणे दगड ।।२।।
तुका म्हणे सर्वजाणा तुझ्या आल्यावरि मना । केला तो उगाणा घडल्या दोषांच्या ।।३।।

२६३८
 आतां चुकलें बंधन गेलें विसरोनि दान । आपुले ते वाण सावकाश विकावे

।।१।।
लाभ जोडला अनंत घरीं सांपडलें वित्त । हातोहातीं थीत उरों तळ नल्हाचि
।।धृ।।
होतें गोविलें विसारें माप जालें एकसरें । होतें होरें वारें तों चि लाहो
साधिला।।२।।
कराया जतन तुका म्हणे निजधन । केला नारायण साह्य नेदी विसंबों
।।३।।

२६३९
तुझ्या रूपें माझी काया भरों द्यावी पंढरीराया । दर्पणींची छाया एका रूपें
भिन्नत्व ।।१।।
सुख पडिलें साटवण सत्ता वेचे शनें शनें । अडचणीचे कोन चारी मार्ग
उगवले ।।धृ।।
वसो डोळ्यांची बाहुली कवळे भिन्न छाया आली । कृष्णांजन चाली नव्हे प्रति
माघारी ।।२।।
जीव ठसावला शिवें मना आलें तेथें जावें । फांटा पडिला नांवें तुका म्हणे
खंडलें ।।३।।

२६४०
सोसें सोसें मारूं हाका । होइल चुका म्हणऊनि।।१।।
मागें पुढें क्षणभरी । नव्हे दुरी अंतर ।।धृ।।
नाम मुखीं बैसला चाळा। वेळोवेळां पडताळीं ।।२।।
तुका म्हणे सुखी केलें । या विठ्ठलें बहुतांसी ।।३।।

२६४१
धरूनियां चाली हांवा । येइन गांवां धांवत ।।१।।
पाठविसी मूळ तरी । लवकरी विठ्ठले ।।धृ।।
नाचेन त्या प्रेमसुखें । कीर्ती मुखें गाईन ।।२।।२६४१
तुका म्हणे संतमेळीं । पायधुळी वंदीन।।३।।

२६४२
मायबापाचिये भेटी । अवघ्या तुटी संकोचा ।।१।।
भोगिलें तें आहे सुख । खातां मुख मोकळें ।।धृ।।

उत्तम तें बाळासाटीं । लावी ओठीं माउली ।।२।।
तुका म्हणे जाली धणी । आनंद मनीं न समाये ।।३।।

२६४३
उदासीनाचा देह ब्रम्हरूप । नाहीं पुण्य पाप लागत त्या ।।१।।
अनुताप अंगीं अग्निचिया ज्वाळा । नाहीं मृगजळा विझों येत ।।धृ।।
दोष ऐशा नावें देहाचा आदर । विटलें अंतर अहंभावें।।२।।
तुका म्हणे जाय नासोनियां खंती । तंव चि हे चित्तीं बद्धता ते ।।३।।

२६४४
बंधनाचा तोडूं फांसा । देऊं आशा टाकोनि ।।१।।
नाहीं तें च घेतां शिरीं । होइल दुरी निजपंथ ।।धृ।।
नाथिलें चि माझें तुझें । कोण वोझें वागवी ।।२।।
तुका म्हणे अंतराय । देवीं काय जिणें तें ।।३।।

२६४५
तें च किती वारंवार । बोलों फार बोलिलें ।।१।।
आतां माझें दंडवत । तुमच्या संत चरणांसी ।।धृ।।
आवडी ते नीच नवी । जाली जीवीं वसती ।।२।।
तुका म्हणे बरवें जालें । घरा आलें बंदरीचें ।।३।।

२६४६
उपासा सेवटीं अन्नासवें भेटी । तैसी माझी मिठी पडो पायीं ।।१।।
पुरवीं वासना साच सर्वजाणा । आम्हां नारायणा अंकिताची ।।धृ।।
बहुदिसां पुत्रामातेमध्यें भेटीं । तैसा दाटो पोटीं प्रीतिउभोड ।।२।।
तुका म्हणे धन कृपणा सोयरें । यापरि दुसरें नहो आतां ।।३।।

२६४७
रणीं निघतां शूर न पाहे माघारें । ऐशा मज धीरें राख आतां ।।१।।
संसारा हातीं अंतरलों दुरी । आतां कृपा करीं नारायणा ।।धृ।।
वागवितों तुझिया नामाचें हत्यार । हा चि बडिवार मिरवितों ।।२।।
तुका म्हणे मज फिरतां माघारें । तेथें उणें पुरें तुम्ही जाणां ।।३।।

२६४८

सकळ पूजा स्तुति । करावी ते व्होवें याती ।।१।।
म्हणऊनि वारा जन । संतपूजा नारायण ।।धृ।।
सेवावें तें वरी । दावी उमटूनि ढेंकरीं ।।२।।
तुका म्हणे सुरा । दुधा म्हणतां केवीं बरा।।३।।

२६४९

धीर नव्हे मनें । काय तयापाशीं उणें ।।१।।
भार घातलियावरी । दासां नुपेक्षील हरी ।।धृ।।
याऐसी आटी । द्यावी द्रव्याचिये साटी ।।२।।
तुका म्हणे पोटें । देवा बहु केलें खोटें ।।३।।

२६५०

द्रव्याचिया कोटी । नये गांडीची लंगोटी ।।१।।
अंती बोळवणेसाटीं । पांडुरंग धरा कंठीं ।।धृ।।
लोभाची लोभिकें । यांचें सन्निधान फिकें ।।२।।
तुका म्हणे हितें । जग नव्हो पडो रितें।।३।।

२६५१

कोणापाशीं आतां सांगों मी बोभाट । कधीं खटखट सरेल हे ।।१।।
कोणां आराणूक होईल कोणे काळीं । आपुलालीं जाळीं उगवूनि ।।धृ।।
माझा येणें दुःखें फुटतसे प्राण । न कळतां जन सुखी असे ।।२।।
भोगा आधीं मनें मानिलासे त्रास । पाहें लपायास ठाव कोठें ।।३।।
तुका म्हणे देतों देवाचें गाऱ्हाणें । माझें रिण येणें सोसियेलें ।।४।।

२६५२

राहिलों निराळा । पाहों कवतुक डोळां ।।१।।
करूं जगाचा विनोद । डोळां पाहोनियां छंद ।।धृ।।
भुललिया संसारें । आलें डोळ्यासी माजिरें ।।२।।
तुका म्हणे माथा । कोणी नुचली सर्वथा ।।३।।

२६५३

आम्हां एकविधा पुण्य सर्वकाळ । चरणसकळ स्वामीचे ते ।।१।।

चित्ताचे संकल्प राहिलें चळण । आज्ञा ते प्रमाण करुनी असों ।।धृ।।
दुजियापासून परतलें मन । केलें द्यावें दान होईल तें।।२।।
तुका म्हणे आतां पुरला नवस । एकाविण ओस सकळ ही।।३।।

२६५४
राहाणें तें पायांपाशी । आणिकां रसीं विटोनि ।।१।।
ऐसा धीर देईं मना । नारायणा विनवितों ।।धृ।।
अंतरीं तों तुझा वास । आणिकां नास कारण ।।२।।
तुका म्हणे शेवटींचें । वाटे साचें राखावें ।।३।।

२६५५
चंदन तो चंदनपणें । सहज गुणसंपन्न ।।१।।
वेधलिया धन्य जाती । भाग्यें होती सन्मुख ।।धृ।।
परिसा अंगीं परिसपण । बाणोनि तें राहिलें ।।२।।
तुका म्हणे कैंची खंती । सुजाती ते ठाकणी ।।३।।

२६५६
लय लक्षी मन न राहे निश्चळ । मुख्य तेथें बळ आसनाचें ।।१।।
हें तों असाध्य जी सर्वत्र या जना । भलें नारायणां आळवितां ।।धृ।।
कामनेचा त्याग वैराग्य या नांव । कुटुंब ते सर्वविषयजात ।।२।।
कर्म उसंतावें चालत पाउलीं । होय जों राहिली देहबुद्धि ।।३।।
भक्ति तें नमावें जीवजंतुभूत । शांतवूनि ऊत कामक्रोध ।।४।।
तुका म्हणे साध्य साधन अवघडें । देतां हें सांकडें देह बळी ।।५।।

२६५७
ऐसें कां हो न करा कांहीं । पुढें नाहीं नास ज्या ।।१।।
विश्वंभरा शरणागत । भूतजात वंदूनि ।।धृ।।
श्रुतीचें कां नेघा फळ। सारमूळ जाणोनि ।।२।।
तुका म्हणे पुढें कांहीं । वाट नाहीं यावरी।।३।।

२६५८
जाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव श्मशानींचा ।।१।।
रडती रात्रदिवस कामक्रोधमाया । म्हणती हायहाया यमधर्म ।।धृ।।

वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा । ज्ञानाग्नि भरभरां जीवित्वेसी ।।२।।
फिरविला घट फोडिला चरणीं । महावाक्य जनीं बोंब जाली ।।३।।
दिली तिळांजुळी कुळनामरूपांसी । शरीर ज्याचें त्यासी समर्पिलें ।।४।।
तुका म्हणे रक्षा जाली आपींआप । उजळला दीप गुरुकृपा ।।५।।

२६५९
आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाला सोहळा अनुपम्य ।।१।।
आनंदे दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग जाला ।।धृ।।
एकदेशीं होतों अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें जाला सुकाळ हा ।।२।।
फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझ्या संकोचें दुरी जालों ।।३।।
नारायणें दिला वस्तीस ठाव । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ।।४।।
तुका म्हणे दिलें उमटूनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनियां ।।५।।

२६६०
बोळविला देह आपुलेनि हातें । हुताशिलीं भूतें ब्रम्हाग्नीसीं ।।१।।
एकवेळे जालें सकळ कारण । आतां नारायण नारायण ।।धृ।।
अमृतसंजीवनी निववली खाई । अंगें तये ठायीं हारपलीं ।।२।।
एकादशीविध जागरण उपवास । बारावा दिवस भोजनाचा ।।३।।
अवघीं कर्में जालीं घटस्पोटापाशीं । संबंध एकेसी उरला नामीं ।।४।।
तुका म्हणे आतां आनंदीं आनंदु । गोविंदीं गोविंदु विस्तारला ।।५।।

२६६१
पिंडदान पिंडें ठेविलें करून । तिळीं तिळवण मूळत्रयीं।।१।।
सारिले संकल्प एका चि वचनें । ब्रम्हीं ब्रम्हार्पण सेवटींच्या ।।धृ।।
सव्य अपसव्य बुडालें हें कर्म । एका एक वर्म एकोविष्णु ।।२।।
पित्यापुत्रत्वाचें जालें अवसान । जनीं जनार्दन अभेदेंसी ।।३।।
आहे तैसी पूजा पावली सकळ । सहज तो काळ साधियेला ।।४।।
तुका म्हणे केला अवघियांचा उद्धार । आतां नमस्कार सेवटींचा ।।५।।

२६६२
सरलें आतां नाहीं । न म्हणे वेळकाळ कांहीं ।।१।।
विठ्ठल कृपाळु माउली । सदा प्रेमें पान्हायेली ।।धृ।।
सीण न विचारी भाग । नव्हे निष्ठुर नाहीं राग ।।२।।

भेदाभेद नाहीं । तुका म्हणे तिच्याठायीं ।।३।।

२६६३
तुज पाहावें हे धरितों वासना । परि आचरणा नाहीं ठाव ।।१।।
करिसी कैवार आपुलिया सत्ता । तरि च देखता होइन पाय ।।धृ।।
बाहिरल्या वेषें उत्तम दंडलें । भीतरी मुंडलें नाहीं तैसें।।२।।
तुका म्हणे वांयां गेलों च मी आहे । जरि तुम्ही साहे न व्हा देवा ।।३।।

२६६४
दुष्ट आचरण ग्वाही माझें मन । मज ठावे गुण दोष माझे ।।१।।
आतां तुम्ही सर्वजाण पांडुरंगा । पाहिजे प्रसंगाऐसें केलें।।धृ।।
व्याह्याजांवायांचे पंगती दुर्बळ । वंचिजे तो काळ नव्हे कांहीं ।।२।।
तुका म्हणे आतां जालों शरणागत । पुढिल उचित तुम्हां हातीं ।।३।।

२६६५
आतां भय नाहीं ऐसें वाटे जीवा । घडलिया सेवा समर्थाची ।।१।।
आतां माझ्या मनें धरावा निर्धार । चिंतनीं अंतर न पडावें ।।धृ।।
येथें नाहीं जाली कोणांची निरास । आल्या याचकास कृपेविशीं ।।२।।
तुका म्हणे येथें नाहीं दुजी परी । राया रंका सरी देवा पायीं ।।३।।

२६६६
वैष्णवें चोरटीं । आलीं घरासी करंटीं ।।१।।
आजि आपुलें जतन । करा भांडें पांघुरण ।।धृ।।
ज्याचे घरीं खावें ।त्याचें सर्वस्वें ही न्यावें ।।२।।
तुका म्हणे माग । नाहीं लागों देत लाग।।३।।

२६६७
ऐकतों दाट । आले एकांचें बोभाट ।।१।।
नका विश्वासों यावरी । चोर देहाचे खाणोरी ।।धृ।।
हे चि यांची जोडी। सदा बोडकीं उघडीं ।।२।।
तुका म्हणे न्यावें । ज्याचे त्यासी नाहीं ठावें ।।३।।

२६६८

आणिकांची सेवा करावी शरीरें । तीं येथें उत्तरे कोरडीं च ।।१।।
ऐसा पांडुरंग सुलभ सोपारा । नेघे येरझारा सेवकाच्या ।।धृ।।
आणिकांचे भेटी आडकाठी पडे । येथें तें न घडे वचन ही ।।२।।
आणिकांचे देणें काळीं पोट भरे । येथील न सरे कल्पांतीं ही ।।३।।
आणिकें दंडिती चुकलिया सेवा । येथें सोस हेवा नाहीं दोन्ही ।।४।।
तुका म्हणे करी आपण्यासारिखें । उद्धरी पारिखें उंच निंच ।।५।।

२६६९
दुर्जनाची जाती । त्याचे तोंडीं पडे माती ।।१।।
त्याची बुद्धि त्यासी नाडी । वाचे अनुचित बडबडी ।।धृ।।
पाहें संतांकडे । दोषदृष्टी सांडी भडे ।।२।।
उंच निंच नाहीं । तुका म्हणे खळा कांहीं ।।३।।

२६७०
न करीं उदास । माझी पुरवावी आस ।।१।।
ऐका ऐका नारायणा । माझी परिसा विज्ञापना ।।धृ।।
मायबाप बंधुजन। तूं चि सोयरा सज्जन ।।२।।
तुका म्हणे तुजविरहित । माझें कोण करी हित ।।३।।

२६७१
जीवन उपाय । वैदेवाणी तुझे पाय ।।१।।
ते मी नाठवीं घडिघडी । म्हणोनियां चरफडीं ।।धृ।।
तुटे भवरोग । जेथें सर्व सुखें भोग ।।२।।
तुका म्हणे विटे । धरियेले जें गोमटें ।।३।।

२६७२
ऐका हें वचन माझें संतजन । विनवितों जोडुन कर तुम्हां ।।१।।
तर्क करूनियां आपुल्या भावना । बोलतिया जना कोण वारी ।।धृ।।
आमुच्या जीवींचा तो चि जाणे भावो । रकुमाईचा नाहो पांडुरंग ।।२।।
चित्त माझें त्याचे गुंतलेंसे पायीं । म्हणऊनि कांहीं नावडे त्या ।।३।।
तुका म्हणे मज न साहे मीनती । खेद होय चित्तीं भंग मना ।।४।।

२६७३

ऐसा कोणी नाहीं हें जया नावडे । कन्या पुत्र घोडे दारा धन ।।१।।
निंब घेतें रोगी कवणिया सुखें । हरावया दुःखें व्याधि पीडा ।।धृ।।
काय पळे सुखें चोरा लागे पाठी । न घलावी काठी आड तया ।।२।।
जयाचें कारण तो चि जाणे करूं । नये कोणां वारूं आणिकासी ।।३।।
तुका म्हणे तरी सांपडे निधान । द्यावा ओंवाळून जीव बळी ।।४।।

२६७४
काय मी अन्यायी तें घाला पालवीं । आणीक वाट दावीं चालावया ।।१।।
माग पाहोनियां जातों ते च सोयी । न वजावें कायी कोण सांगा ।।धृ।।
धोपट मारग लागलासे गाढा । मज काय पीडा करा तुम्ही ।।२।।
वारितां ही भय कोण धरी धाक । परी तुम्हां एक सांगतों मी ।।३।।
तुका म्हणे शूर दोहीं पक्षीं भला । मरतां मुक्त जाला मान पावे ।।४।।

२६७५
नव्हती माझे बोल जाणां हा निर्धार । मी आहें मजूर विठोबाचा ।।१।।
निर्धारा वचन सोडविलें माझ्या । कृपाळुवें लज्जा राखियेली ।।धृ।।
निर्भर मानसीं जालों आनंदाचा । गोडावली वाचा नामघोषें ।।२।।
आतां भय माझें नासलें संसारीं । जालोंसें यावरी गगनाचा ।।३।।
तुका म्हणे हा तों संतांचा प्रसाद । लाधलों आनंद प्रेमसुख ।।४।।

२६७६
जरा कर्णमूळीं सांगों आली गोष्टी । मृत्याचिये भेटी जवळी आली ।।१।।
आतां माझ्या मना होईं सावधान । वोंपुण्याची जाण कार्यसिद्धी ।।धृ।।
शेवटील घडी बुडतां न लगे वेळ । साधावा तो काळ जवळी आला ।।२।।
तुका म्हणे चिंतीं कुळींची देवता । वारावा भोंवता शब्द मिथ्या ।।३।।

२६७७
मागील ते आटी येणें घडे सांग । सुतवेल अंग एका सूत्रें ।।१।।
पहिपाहुणेर ते सोहळ्यापुरते । तेथुनि आरते उपचार ते।।धृ।।
आवश्यक तेथें आगळा आदर । चाली थोडें फार संपादतें ।।२।।
तुका म्हणे ऋृण फिटे एके घडी । अलभ्य ते जोडी हातां आल्या ।।३।।

२६७८

साधावा तो देव सर्वस्वाचेसाटीं । प्रारब्ध तुटी क्रियमाण।।१।।
मग कासयानें पुन्हा संवसार । बीजाचे अंकुर दग्ध होती ।।धृ।।
जिणें दिल्हें त्यासी द्यावा पिंडदान । उत्तीर्ण चरण धरूनि व्हावें ।।२।।
तुका म्हणे निज भोगईल निजता । नाहीं होइल सत्ता दुजियाची ।।३।।

२६७९
जळों अगी पडो खान । नारायण भोक्ता ।।१।।
ऐसी ज्याची वदे वाणी । नारायणीं ते पावे ।।धृ।।
भोजनकाळीं करितां धंदा । म्हणा गोविंदा पावलें ।।२।।
तुका म्हणे न लगे मोल। देवा बोल आवडती ।।३।।

२६८०
संतांसी क्षोभवी कोण्या ही प्रकारें । त्याचें नव्हें बरें उभयलोकीं ।।१।।
देवाचा तो वैरी शत्रु दावेदार । पृथ्वी ही थार नेदी तया ।।धृ।।
संतांपाशीं ज्याचा नुरे चि विश्वास । त्याचे जाले दोष बळिवंत ।।२।।
तुका म्हणे क्षीर वासराच्या अंगें । किंवा धांवे लागें विषमें मारूं ।।३।।

२६८१
उदकीं कालवी शेण मलमूत्र । तो होय पवित्र कासयानें ।।१।।
उद्धारासी ठाव नाहीं भाग्यहीना । विन्मुख चरणां संतांचिया ।।धृ।।
दुखवी तो बुडे सांगडीचा तापा । अतित्याई पापाची च मूर्ति ।।२।।
तुका म्हणे जेव्हां फिरतें कपाळ । तरी अमंगळ योग होतो ।।३।।

२६८२
शोकवावा म्यां देहे । ऐसें नेणों पोटीं आहे ।।१।।
तरी च नेदा जी उत्तर । दुःखी राखिलें अंतर ।।धृ।।
जावें वनांतरा। येणें उद्देशें दातारा ।।२।।
तुका म्हणे गिरी । मज सेववावी दरी ।।३।।

२६८३
येइल तुझ्या नामा । जाल म्हणों पुरुषोत्तमा ।।१।।
धीर राहिलों धरूनि । त्रास उपजला मनीं ।।धृ।।
जगा कथा नांव। निराशेनें नुपजे भाव ।।२।।

तुम्ही साक्षी कीं गा । तुका म्हणे पांडुरंगा ।।३।।

२६८४
नेणें जप तप अनुष्ठान याग । काळें तंव लाग घेतलासे ।।१।।
रिघालो या भेणें देवाचे पाठीसी । लागे त्याचें त्यासी सांभाळणें ।।धृ।।
मापें माप सळे चालिली चढती । जाली मग राती काय चाले ।।२।।
तुका म्हणे चोरा हातीं जे वांचलें । लाभावरी आलें वारिलेशु ।।३।।

२६८५
कळों आलें ऐसें आतां । नाहीं सत्ता तुम्हांसी ।।१।।
तरी वीर्य नाहीं नामा । जातो प्रेमा खंडत ।।ध्रु. ।।
आड ऐसें येतें पाप। वाढे ताप आगळा ।।२।।
तुका म्हणे गुण जाला । हा विठ्ठला हीनशक्ति ।।३।।

२६८६
लागों दिलें अंगा । ऐसें कां गा सन्निध ।।१।।
कोण्या पापें उदो केला । तो देखिला प्रळय ।।धृ।।
न देखवे पिडला सर्प। दया दर्प विषाचा ।।२।।
तुका म्हणे भलें । मज तो न वजे साहिलें।।३।।

२६८७
धांवा शीघ्रवत । किंवा घ्यावें दंडवत ।।१।।
तुमचा जातो बडिवार । आम्हीं होतों हीनवर ।।धृ।।
न धरावा धीर । धांवा नका चालों स्थिर ।।२।।
तुका म्हणे वाणी । माझी लाजली जी गुणीं ।।३।।

२६८८
सेवकासी आज्ञा निरोपासी काम । स्वामीचे ते धर्म स्वामी जाणे ।।१।।
मनाचिये मुळीं रहावें बैसोन । आक्रशावे गुण पायांपाशीं ।।धृ।।
भेटीचे तांतडी करीतसे लाहो । ओंवाळावा देहो ऐसें वाटे ।।४।।
तुका म्हणे माझें करावें कारण । आपुलें जतन ब्रीद कशाला ।।३।।

२६८९.

उद्वेगासी बहु फाकती मारग । नव्हे ऐसें अंग माझें होतें ।।१।।
आतां कोण यासी करणें विचार । तो देखा साचार पांडुरंगा ।।ध्रु।।
मज तो अत्यंत दर्शनाची आस । जाला तरि हो नाश जीवित्वाचा ।।२।।
तुका म्हणे आहे वचनाची उरी । करितों तोंवरि विज्ञापना ।।३।।

२६९०
दुःखाची संगति । तिच्याठायीं कोण प्रीति ।।१।।
अवघें असो हें निराळें । करूं सोइरें सावळें ।।धृ।।
क्षणभंगुर ते ठाव। करूनि सांडावे चि वाव ।।२।।
तुका म्हणे बरा । ठाव पावलों हा थारा ।।३।।

२६९१
मेला तरी जावो सुखें नरकासी । कळंकी याविशीं शिवों नये ।।१।।
रजस्वला करी वेलासी आघात । अंतरें तों हित दुरी बरें ।।धृ।।
उगी च कां आलीं नासवावीं फळें । विटाळ विटाळें कालवूनि ।।२।।
तुका म्हणे लोणी घालोनि शेणांत । उपेगाची मात काय असे ।।३।।

२६९२
वर्णावे ते किती । केले पवाडे श्रीपति ।।१।।
विश्वासिया घडे लाभ । देइल तरी पद्मनाभ ।।धृ।।
भाव शुद्ध तरी । सांगितलें काम करी ।।२।।
तुका म्हणे भोळा देव । परि हा नागवी संदेह ।।३।।

२६९३
संचितावांचून । पंथ न चलवे कारण ।।१।।
कोरडी ते अवघी आटी । वांयां जाय लाळ घोंटीं ।।धृ।।
धन वित्त जोडे । देव ऐसें तों न घडे ।।२।।
तुका म्हणे आड । स्वहितासी बहु नाड ।।३।।

२६९४
अतित्याई बुडे गंगे । पाप लागे त्याचें त्या ।।१।।
हें तों आपुलिया गुणें । असे जेणें योजिलें ।।धृ।।

अवचटें अग्नि जाळी । न सांभाळी दुःख पावे ।।२।।
जैसें तैंसें दावी आरसा । नकट्या कैसा पालटे ।।३।।

२६९५
हेंदऱ्याचें भरितां कान । हलवी मान भोंक रितें ।।१।।
नाहीं मी येथें सांगों स्पष्ट । भावें नष्ट घेत नाहीं ।।धृ।।
अवगुणी वाटलें चित्त । तया हित आतळे ना ।।२।।
तुका म्हणे फजितखोरा। म्हणतां बरा उगा रहा ।।३।।

२६९६
नाहीं सरो येत जोडिल्या वचनीं । कवित्वाची वाणी कुशळता ।।१।।
सत्याचा अनुभव वेधी सत्यपणें । अनुभवाच्या गुणें रुचों येतों ।।धृ।।
काय आगीपाशीं शृंगारिलें चाले । पोटींचें उकले कसापाशीं ।।२।।
तुका म्हणे येथे करावा उकल । लागे चि ना बोल वाढवूनि ।।३।।

२६९७
लचाळाच्या कामा नाहीं ताळावाळा । न कळे ओंगळा उपदेश ।।१।।
वचनचर्येची न कळे चांचणी । ऐसी संघष्टनी अमंगळ ।।धृ।।
समय न कळे वेडगळ बुद्धि । विजाती ते शुद्धि चांच चाट ।।२।।
तुका म्हणे याचा धिक्कार चि बरा । बहुमति खराहूनि हीन ।।३।।

२६९८
एक धरिला चित्तीं । आम्हीं रखुमाईचा पती ।।१।।
तेणें जालें अवघें काम । निवारला भवश्रम ।।धृ।।
परद्रव्य परनारी । जालीं विषाचिये परी ।।२।।
तुका म्हणे फार । नाहीं लागत वेव्हार ।।३।।

२६९९
भेणें पळे डोळसा । न कळे मृत्यु तो सरिसा ।।१।।
कैसी जाली दिशाभुली । न वजातिये वाटे चाली ।।धृ।।
संसाराची खंती । मावळल्या तरी शक्ति ।।२।।
तुका म्हणे हीणा । बुद्धि चुकली नारायणा ।।३।।

२७००

अभिमानाचें तोंड काळें । दावी बळें अंधार ।।१।।
लाभ न्यावा हातोहातीं । तोंडी माती पाडोनि ।।धृ।।
लागलीसे पाठी लाज । जालें काज नासाया ।।२।।
तुका म्हणे कुश्चळ मनीं । विटंबनीं पडिलीं तीं ।।३।।

२७०१
चोराचिया धुडका मनीं । वसे ध्यानीं लंछन ।।१।।
ऐशा आम्हीं करणें काय । वरसो न्यायें पर्जन्य ।।धृ।।
ज्याच्या बैसे खतावरी । ते चुरचुरी दुखवूनि ।।२।।
तुका म्हणे ज्याची खोडी । त्याची जोडी त्या पीडी ।।३।।

२७०२
बुद्धिहीना उपदेश । तें तें विष अमृतीं ।।१।।
हुंगों नये गोऱ्हवाडी । तेथें जोडी विटाळ ।।धृ।।
अळसियाचे अंतर कुडें। जैसें मढें निष्काम ।।२।।
तुका म्हणे ऐशा हाती । मज श्रीपती वांचवा ।।३।।

२७०३
न करीं तुमची सेवा । बापुडें मी पण देवा ।
बोलिलों तो पाववा । पण सिद्धी सकळ ।।१।।
आणीक काय तुम्हां काम । आम्हां नेदा तरी प्रेम ।
कैसे धर्माधर्म । निश्चयेंसी रहाती ।।धृ।।
आम्हीं वेचलों शरीरें । तुझी बीज पेरा खरें ।
संयोगाचें बरें । गोड होतें उभयतां ।।३।।
एका हातें टाळी । कोठें वाजते निराळी ।
जाला तरी बळी । स्वामीविण शोभेना ।।३।।
रूपा यावे जी अनंता । धरीन पुटाची त्या सत्ता ।
होईन सरता । संतांमाजी पोसणा ।।४।।
ठेविलें उधारा । वरी काय तो पातेरा ।
तुका म्हणे बरा । रोकडा चि निवाड ।।५।।

२७०४. भुके नाहीं अन्न । मेल्यावरी पिंडदान ।।१।।
हे तों चाळवाचाळवी । केलें आपण चि जेवी ।।धृ।।
नैवेद्याचा आळ । वेच ठाकणीं सकळ ।।२।।
तुका म्हणे जड । मज न राखावें दगड ।।३।।

२७०५
 सर्व भाग्यहीन । ऐसें सांभाळिलों दीन ।।१।।
पायीं संतांचे मस्तक । असों जोडोनि हस्तक ।।धृ।।
जाणें तरि सेवा । दीन दुर्बळ जी देवा ।।२।।
तुका म्हणे जीव । समर्पून भाकीं कींव ।।३।।

२७०६
 भाग्याचा उदय । ते हे जोडी संतपाय ।।१।।
येथूनिया नुठो माथा । मरणांवाचूनि सर्वथा ।।धृ।।
होईं बळकट । माझ्या मना तूं रे धीट ।।२।।
तुका म्हणे लोटांगणीं । भक्तिभाग्यें जाली धणी ।।३।।

२७०७
 नाहीं तरी आतां कैचा अनुभव । जालासीं तूं देव घरघेणा ।।१।।
जेथें तेथें देखें लांचाचा पर्वत । घ्यावें तरि चित्त समाधान ।।धृ।।
आधीं वरी हात या नांवें उदार । उसण्याचे उपकार फिटाफीट ।।२।।
तुका म्हणे जैसी तैसी करूं सेवा । सामर्थ्य न देवा पायांपाशीं ।।३।।

२७०८
 आम्ही सर्वकाळ कैंचीं सावधानें । वेवसायें मन अभ्यासलें ।।१।।
तरी म्हणा मोट ठेविली चरणीं । केलों गुणागुणीं कासावीस ।।धृ।।
याचे कानसुळीं मारीतसे हाका । मज घाटूं नका मधीं आतां ।।२।।
तुका म्हणे निद्रा जागृति सुषुप्ति । तुम्ही हो श्रीपती साक्षी येथें ।।३।।

२७०९
 नसता चि दाउनि भेव । केला जीव हिंपुटी ।।१।।
जालों तेव्हां कळलें जना । वाउगा हा आकांत ।।धृ।।
गंवसिलों पुढें मागें लागलागे पावला ।।२।।
तुका म्हणे केली आणि । सलगीच्यांनी सन्मुख ।।३।।

२७१०
 हें का आम्हां सेवादान । देखों सीण विषमाचा ।।१।।

सांभाळा जी ब्रीदावळी । तुम्हीं कां कळीसारिखे ।।धृ।।
शरणागत वैऱ्या हातीं । हे निश्चिंती देखिली ।।२।।
तुका म्हणे इच्छीं भेटी । पाय पोटीं उफराटे ।।३।।

२७११
कां हो आलें नेणों भागा । पांडुरंगा माझिया ।।१।।
उफराटी तुम्हां चाली । क्रिया गेली सत्याची ।।धृ।।
साक्षी हेंगे माझें मन । आर्त कोण होतें तें ।।२।।
तुका म्हणे समर्थपणे । काय नेणें करीतसां ।।३।।

२७१२
शकुनानें लाभ हानि । येथूनि च कळतसे ।।१।।
भयारूढ जालें मन । आतां कोण विश्वास ।।धृ।।
प्रीत कळे आलिंगनीं। संपादनीं अत्यंत ।।२।।
तुका म्हणे मोकलिलें । कळों आलें बरवें हें।।३।।

२७१३
नव्हेव निग्रह देहासी दंडण । न वजे भूकतान सहावली ।।१।।
तरि नित्य नित्य करीं आळवण । माझा अभिमान असों द्यावा ।।धृ।।
नाहीं विटाळिलें कायावाचामन । संकल्पासी भिन्न असें चि या ।।२।।
तुका म्हणे भवसागरीं उतार । कराया आधार इच्छीतसें ।।३।।

२७१४
ऐकिली कीर्त्ति संतांच्या वदनीं । तरि हें ठाकोनि आलों स्थळ ।।१।।
मागिला पुढिला करावें सारिखें । पालटों पारिखें नये देवा ।।धृ।।
आम्हासी विश्वास नामाचा आधार । तुटतां हे थार उरी नाहीं ।।२।।
तुका म्हणे येथें नसावें चि दुजें । विनंती पंढरिराजें परिसावी हे ।।३।।

२७१५
मोलाचें आयुष्य वेचतसे सेवे । नुगवतां गोवे खेद होतो ।।१।।
उगवूं आलेति तुम्हीं नारायणा । परिहार या सिणा निमिस्यांत ।।धृ।।
लिगाडाचे मासी न्यायें जाली परी । उरली ते उरी नाहीं कांहीं ।।२।।
तुका म्हणे लाहो साधीं वाचाबळें । ओढियेलों काळें धांव घाला ।।३।।

२७१६
म्हणऊनि जालों क्षेत्रींचे संन्यासी । चित्त आशापाशीं आवरूनि ।।१।।
कदापि ही नव्हे सीमा उल्लंघन । केलें विसर्जन आव्हानीं च ।।धृ।।
पारिखा तो आतां जाला दुजा ठाव । दृढ केला भाव एकविध ।।२।।
तुका म्हणे कार्यकारणाचा हेवा । नाहीं जीव देवा समर्पिला ।।३।।

२७१७
विभ्रंशिली बुद्धि देहांत जवळी । काळाची अकाळीं वायचाळा ।।१।।
पालटलें जैसें देंठ सोडी पान । पिकलें आपण तयापरी ।।धृ।।
न मारितां हीन बुद्धि दुःख पावी । माजल्याची गोवी तयापरी ।।२।।
तुका म्हणे गळ लागलिया मत्स्या । तळमळेचा तैसा लवलाहो ।।३।।

२७१८
न वजावा तो काळ वांयां । मुख्य दया हे देवा ।।१।।
म्हणऊनि जैसें तैसें । रहणी असें पायांचे ।।धृ।।
मोकळें हे मन कष्ट। करी नष्ट दुर्जन ।।२।।
तुका म्हणे कांहीं नेणें । न वजें येणेंपरी वांयां ।।३।।

२७१९
कल्पतरूअंगीं इच्छिलें तें फळ । अभागी दुर्बळ भावें सिद्धी ।।१।।
धन्य त्या जाती धन्य त्या जाती । नारायण चित्तीं सांठविला ।।धृ।।
बीजाऐसा द्यावा उदकें अंकुर । गुणाचे प्रकार ज्याचे तया ।।२।।
तुका म्हणे कळे पारखिया हिरा । ओझें पाठी खरा चंदनाचें ।।३।।

२७२०
उकरडा आधीं अंगीं नरकाडी । जातीची ते जोडी ते चि चित्तीं ।।१।।
कासयानें देखे अंधळा माणिकें । चवीविण फिके वांयां जाय ।।धृ।।
काय जाणे विष पालटों उपचारें । मुखासी अंतर तों चि बरें ।।२।।
तुका म्हणे काय उपदेश वेड्या । संगें होतो रेड्यासवें कष्ट ।।३।।

२७२१
जया शिरीं कारभार । बुद्धि सार तयाची ।।१।।

वर्ते तैसें वर्ते जन । बहुतां गुण एकाचा ।।धृ।।
आपणीयां पाक करी । तो इतरीं सेविजे ।।२।।
तुका म्हणे शूर राखे । गाढ्या वाखेसांगातें।।३।।

२७२२
एक एका साह्य करूं । अवघें धरूं सुपंथ ।।१।।
कोण जाणे कैसी परी । पुढें उरी ठेवितां ।।धृ।।
अवघे धन्य होऊं आता । स्मरवितां स्मरण ।।२।।
तुका म्हणे अवघी जोडी । ते आवडा चरणांची ।।३।।

२७२३
फळकट तो संसार । येथें सार भगवंत ।।१।।
ऐसें जागवितों मना । सरसें जनासहित ।।धृ।।
अवघें निरसूनि काम । घ्यावें नाम विठोबाचें ।।२।।
तुका म्हणे देवाविण । केला सीण तो मिथ्या ।।३।।

२७२४
सुधारसें ओलावली । रसना धाली न धाय ।।१।।
कळों नये जाली धणी । नारायणीं पूर्णता ।।धृ।।
आवडे तें तें च यासी । ब्रम्हरसीं निरसें ।।२।।
तुका म्हणे बहुतां परी । करूनि करीं सेवन ।।३।।

२७२५
असंतीं कांटाळा हा नव्हे मत्सर । ब्रम्ह तें विकारविरहित।।१।।
तरि म्हणा त्याग प्रतिपादलासे । अनादि हा असे वैराकार ।।धृ।।
सिजलें हिरवें एका नांवें धान्य । सेवनापें भिन्न निवडे तें ।।२।।
तुका म्हणे भूतीं साक्ष नारायण । अवगुणीं दंडण गुणीं पुजा ।।३।।

२७२६
आपुलें आपण जाणावें स्वहित । जेणें राहे चित्त समाधान ।।१।।
बहुरंगें माया असे विखरली । कुंटित चि चाली होतां बरी ।।धृ।।
पूजा ते अबोला चित्ताच्या प्रकारीं । भाव विश्वंभरीं समर्पावा ।।२।।
तुका म्हणे गेला फिटोनियां भेव । मग होतो देव मनाचा चि ।।३।।

२७२७
असोनि न कीजे अलिप्त अहंकारें । उगी च या भारें कुंथाकुंथी ।।१।।
धांवा सोडवणें वेगीं लवकरी । मी तों जालों हरी शक्तिहीन ।।धृ।।
भ्रमल्यानें दिसें बांधल्याचेपरी । माझें मजवरी वाहोनियां ।।२।।
तुका म्हणे धांव घेतलीसे सोई । आतां पुढें येईं लवकरी ।।३।।

२७२८
आपुल्याचा भोत चाटी । मारी करंटीं पारिख्या।।१।।
ऐसें जन भुललें देवा । मिथ्या हेवा वाढवी ।।धृ।।
गळ गिळी आविसें मासा । प्राण आशा घेतला ।।२।।
तुका म्हणे बोकडमोहो । धरी पहा हो खाटिक ।।३।।

२७२९
विषय तो मरणसंगीं । नेणे सुटिका अभागी ।।१।।
शास्त्राचा केला लुंडा । तोंडीं पाडियेला धोंडा ।।धृ।।
अगदीं मोक्ष नाहीं ठावा । काय सांगावें गाढवा ।।२।।
तुका म्हणे ग्यानगड । सुखें देवा पावेना नाड ।।३।।

२७३०
मी च विखळ मी च विखळ । येर सकळ बहु बरें।।१।।
पाहिजे हें क्षमा केलें । येणें बोलें विनवणी ।।धृ।।
मी च माझें मी च माझें । जालें ओझें अन्याय ।।२।।
आधीं आंचवला आधीं आंचवला । तुका जाला निमनुष्य ।।३।।

२७३१
येणें जाणें तरी । राहे देव कृपा करी ।।१।।
ऐसें तंव पुण्य नाहीं । पाहातां माझे गांठी कांहीं ।।धृ।।
भय निवारिता कोण वेगळा अनंता ।।२।।
तुका म्हणे वारे भोग । वारी तरी पांडुरंग ।।३।।

२७३२
भल्याचें कारण सांगावें स्वहित । जैसी कळे नीत आपणासी ।।१।।

परी आम्ही असों एकाचिये हातीं । नाचवितो चित्तीं त्याचें तैसें ।।धृ।।
वाट सांगे त्याच्या पुण्या नाहीं पार । होती उपकार अगणित ।।२।।
तुका म्हणे तुम्ही बहु कृपावंत । आपुलें उचित केलें संतीं ।।३।।

२७३३
लावूनियां पुष्टी पोरें । आणि करकर कथेमाजी ।।१।।
पडा पायां करा विनंती । दवडा हातीं धरोनियां ।।धृ।।
कुर्वाळूनि बैसे मोहें । प्रेम कां हे नासीतसे ।।२।।
तुका म्हणे वाटे चित्त । करा फजित म्हणऊनि ।।३।।

२७३४
पुण्य उभें राहो आतां । संताचें याकारणें ।।१।।
पंढरीचे लागा वाटे । सखा भेटे विठ्ठल ।।धृ।।
संकल्प हे यावे फळा । कळवळा बहुतांचा ।।२।।
तुका म्हणे होऊनि क्षमा । पुरुषोत्तमा अपराध ।।३।।

२७३५
आइकिली मात । पुरविले मनोरथ ।। ।।
प्रेम वाढविलें देवा । बरवी घेऊनियां सेवा ।।धृ।।
केली विनवणी । तैसी पुरविली धणी ।।२।।
तुका म्हणे काया । रसा कुरोंडी वरोनियां ।।३।।

२७३६
संतांची स्तुति ते दर्शनाच्या योगें । पडिल्या प्रसंगें ऐसी कीजें ।।१।।
संकल्प ते सदा स्वामीचे चि चित्तीं । फाकों नये वृत्ति अखंडित ।।धृ।।
दास्यत्व तें असे एकविध नांवें । उरों नये जीवें भिन्नत्वासी ।।२।।
निज बीजा येथें तुका अधिकारी । पाहिजे तें पेरी तये वेळे ।।३।।

२७३७
सेजेचा एकांत आगीपाशीं कळे । झांकिलिया डोळे अधःपात ।।१।।
राहो अथवा मग जळो अगीमधीं । निवाडु तो आधीं होऊनि गेला ।।धृ।।
भेणें झडपणी नाहीं येथें दुजें । पादरधिटा ओझें हतियारें ।।२।।
तुका म्हणे मज नाहीं जी भरवसा । तोवरि सहसा निवाडु तो ।।३।।

२७३८
न सरे भांडार । भरलें वेचितां अपार ।।१।।
मवित्याचें पोट भरे । पुढिलासी पुढें उरे ।।धृ।।
कारणापुरता लाहो आपुलाल्या हिता ।।२।।
तुका म्हणे देवा । पुढें केला चाले हेवा ।।३।।

२७३९
तरी हांव केली अमुपा व्यापारें । व्हावें एकसरें धनवंत ।।१।।
जालों हरिदास शूरत्वाच्या नेमें । जालीं ठावीं वर्मे पुढिलांची ।।धृ।।
जनावेगळें हें असे अभिन्नव । बळी दिला जीव म्हणऊनि ।।२।।
तुका म्हणे तरी लागलों विल्हेसी । चालतिया दिसीं स्वामी ॠणी ।।३।।

२७४०
कोण दुजें हरी सीण । शरण दीन आल्याचा ।।१।।
तुम्हांविण जगदीशा । उदार ठसा त्रिभुवनीं ।।धृ।।
कोण ऐसें वारी पाप । हरी ताप जन्माचा ।।२।।
तुका म्हणे धांव घाली । कोण चाली मनाचे ।।३।।

२७४१
ग्रंथाचे अर्थ नेणती हे खळ । बहु अनर्गळ जाले विषयीं ।।१।।
नाहीं भेदू म्हूण भलतें चि आचरे । मोकळा विचरे मनासवें ।।२।।
तुका म्हणे विषा नांव तें अमृत । पापपुण्या भीत नाहीं नष्ट ।।३।।

२७४२
कायावाचामनें जाला विष्णुदास । काम क्रोध त्यास बाधीतना ।।१।।
विश्वास तो करी स्वामीवरी सत्ता । सकळ भोगिता होय त्याचें ।।२।।
तुका म्हणे चित्त करावें निर्मळ । येऊनि गोपाळ राहे तेथें ।।३।।

२७४३
याती हीन मति हीन कर्म हीन माझें । सांडोनियां सर्व लज्जा शरण आलों तुज ।।१।।
येईं गा तूं मायबापा पंढरीच्या राया । तुजविण सीण जाला क्षीण जाली काया

।।धृ।।
दिनानाथ दीनबंधू नाम तुज साजे । पतितपावन नाम ऐसी ब्रीदावळी गाजे।।२।।
विटेवरि वीट उभा कटावरी कर । तुका म्हणे हें चि आम्हां ध्यान निरंतर ।।३।।

२७४४
गंगा आली आम्हांवरि । संतपाउलें साजिरीं ।।१।।
तेथें करीन मी अंघोळी । उडे चरणरजधुळी । येती तीर्थावळी । पर्वकाळ सकळ ।।धृ।।
पाप पळालें जळालें । भवदुःख दुरावलें।।२।।
तुका म्हणे धन्य जालों । सप्तसागरांत न्हालों ।।३।।

२७४५
पोटासाठीं खटपट करिसी अवघा वीळ । राम राम म्हणतां तुझी बसली दांतखीळ ।।१।।
हरिचें नाम कदाकाळीं कां रे नये वाचे । म्हणतां राम राम तुझ्या बाचें काय वेचें ।।धृ।।
द्रव्याचिया आशा तुजला दाही दिशा न पुरती । कीर्तनासी जातां तुझी जड झाली माती ।।२।।
तुका म्हणे ऐशा जीवा काय करूं आता । राम राम न म्हणे त्याचा गाढव मातापिता ।।३।।

२७४६
आम्हां सुकाळ सुखाचा । जवळी हाट पंढरीचा । सादाविती वाचा । रामनामें वैष्णव ।।१।।
घ्या रे आपुलाल्या परी । नका ठेवूं कांही उरी । ओसरतां भरी । तोंडवरी अंबर ।।धृ।।
वाहे बंदर द्वारका । खेप आली पुंडलिका । उभे चि विकिलें एका । सनकादिकां सांपडलें ।।२।।
धन्य धन्य हे भूमंडळी । प्रगटली नामावळी । घेती जीं दुबळीं । तीं आगळीं सदैव ।।३।।
माप आपुलेनि हातें । कोणी नाहीं निवारितें । पैस करूनि चित्तें । घ्यावें हितें

आपुलिया ।।४।।
नाहीं वाटितां सरलें । आहे तैसें चि भरलें । तुका म्हणे गेलें । वांयांविण न घेतां ।।५।।

२७४७
चुकलिया ताळा । वाती घालुनि बैसे डोळां ।।१।।
तैसें जागें करीं चित्ता । कांहीं आपुलिया हिता ।।धृ।।
निक्षेपिलें धन। तेथें गुंतलेसे मन ।।२।।
नाशिवंतासाटीं । तुका म्हणे करिसी आटी ।।३।।

२७४८
करूनि जतन । कोणा कामा आलें धन ।।१ ।।
ऐसें जाणतां जाणतां । कां रे होतोसी नेणता ।।धृ।।
प्रिया पुत्र बंधु । नाहीं तुज यांशीं संबंधु ।।२।।
तुका म्हणे एका । हरीविण नाहीं सखा ।।३।।

२७४९
आम्हीं देतों हाका । कां रे जालासी तूं मुका ।।१।।
न बोलसी नारायणा । कळलासी क्रियाहीना ।।धृ।।
आधीं करूं चौघाचार। मग सांडूं भीडभार ।।२।।
तुका म्हणे सेवटीं । तुम्हां आम्हां घालूं तुटी ।।३।।

२७५०
नव्हे भिडा हें कारण । जाणे करूं ऐसे जन ।।१।।
जों जों धरावा लौकिक । रडवितोसी आणीक ।।धृ।।
चाल जाऊं संतांपुढें । ते हें निवडिती रोकडें ।।२।।
तुका म्हणे तूं निर्लज्ज । आम्हां रोकडी गरज ।।३।।

२७५१
बहु होता भला । परि ये रांडेनें नासिला ।।१।।
बहु शिकला रंग चाळे । खरें खोटें इचे वेळे ।।धृ।।
नव्हतें आळवितें कोणी । इनें केला जगऋणी ।।२।।
ज्याचे त्यासी नेदी देऊं । तुका म्हणे धांवे खाऊं ।।३।।

२७५२
काय करावें तें आतां । जालें नयेसें बोलतां ।।१।।
नाहीं दोघांचिये हातीं । गांठी घालावी एकांतीं ।।धृ।।
होय आपुलें काज । तों हे भीड सांडूं लाज ।।२।।
तुका म्हणे देवा । आधीं निवडूं हा गोवा ।।३।।

२७५३
केली सलगी तोंडपिटी । आम्ही लडिवाळें धाकुटीं।।१।।
न बोलावें तें चि आलें । देवा पाहिजे साहिलें ।।धृ।।
अवघ्यांमध्यें एक वेडें । तें चि खेळविती कोडें ।।२।।
तुका म्हणे मायबापा । मजवरि कोपों नका ।।३।।

२७५४
शिकवूनि बोल । केलें कवतुक नवल ।।१।।
आपणियां रंजविलें । बापें माझिया विठ्ठलें ।।धृ।।
हातीं प्रेमाचें भातुकें । आम्हां देऊनियां निकें ।।२।।
तुका करी टाहो । पाहे रखुमाईचा नाहो ।।३।।

२७५५
तेथें सुखाची वसति । गाती वैष्णव नाचती । पताका झळकती । गर्जती हरिनामें ।।१।।
दोषा जाली घेघेमारी । पळती भरले दिशा चारी । न येती माघारीं । नाहीं उरी परताया ।।धृ।।
विसरोनि देवपणा । उभा पंढरीचा राणा । विटोनि निर्गुणा । रूप धरिलें गोजिरें ।।२।।
पोट सेवितां न धाये । भूक भुकेली च राहे । तुका म्हणे पाहे । कोण आस या मुक्तीची ।।३।।

२७५६
शूद्रवंशी जन्मलों । म्हणोनि दंभें मोकलिलों ।।१।।
अरे तूं चि माझा आतां । मायबाप पंढरीनाथा ।।धृ।।
घोकाया अक्षर। मज नाहीं अधिकार ।।२।।

सर्वभावें दीन । तुका म्हणे यातिहीन ।।३।।

२७५७
वेडें वांकडें गाईन । परि मी तुझा चि म्हणवीन।।१।।
मज तारीं दिनानाथा । ब्रीदें साच करीं आता ।।धृ।।
केल्या अपराधांच्या राशीं । म्हणऊनि आलों तुजपाशीं ।।२।।
तुका म्हणे मज तारीं । सांडीं ब्रीद नाहींतरी ।।३।।

२७५८
हरिभक्त माझे जिवलग सोइरे । हृदयीं पाउले धरिन त्यांचे ।।१।।
अंतकाळीं येती माझ्या सोडवणे । मस्तक बैसणें देइन त्यांसी ।।धृ।।
आणिक सोइरे सज्जन वो कोणी । वैष्णवांवांचोनि नाहीं मज ।।२।।
देइन आलिंगण धरीन चरण । संवसारसीण नासे तेणें ।।३।।
कंठीं तुळशीमाळा नामाचे धारक । ते माझे तारक भवनदीचे ।।४।।
तयांचे चरणीं घालीन मी मिठी । चाड हे वैकुंठीं नाहीं मज ।।५।।
अळसें दंभें भावें हरिचें नाम गाती । ते माझे सांगाती परलोकींचे ।।६।।
कायावाचामनें देइन क्षेम त्यासी । चाड जीवित्वासी नाहीं मज ।।७।।
हरिचें नाम मज म्हणविती कोणी । तया सुखा धणी धणी वरी ।।८।।
तुका म्हणे तया उपकारें बांधलों। म्हणऊनि आलों शरण संतां ।।९।।

२७५९
लटिका तो प्रपंच एक हरि साचा । हरिविण आहाच सर्व इंद्रियें ।।१।।
लटिकें तें मौन्य भ्रमाचें स्वप्न । हरिविण ध्यान नश्वर आहे ।।धृ।।
लटिकिया विपत्ति हरिविण करिती । हरि नाहीं चित्तीं तो शव जाणा ।।२।।
तुका म्हणे हरि हें धरिसी निर्धारीं । तरीं तूं झडकरी जासी वैकुंठा ।।३।।

२७६०
सर्वस्वा मुकावें तेणें हरीसी जिंकावें । अर्थ प्राण जीवें देहत्याग ।।१।।
मोह ममता माया चाड नाहीं चिंता । विषयकंदुवेथा जाळूनियां ।।धृ।।
लोकलज्जा दंभ आणि अहंकार । करूनि मत्सर देशधडी ।।२।।
शांति क्षमा दया सखिया विनउनी । मूळ चक्रपाणी धाडी त्यांसी ।।३।।
तुका म्हणे याती अक्षरें अभिमान । सांडोनिया शरण रिघें संतां ।।४।।

२७६१
एकांतांचे सुख देईं मज देवा । आघात या जीवा चुकवूनि ।।१।।
ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर । आपुला विसर पडों नेदीं ।।धृ।।
मायबाळा भेटी सुखाची आवडी । तैशी मज गोडी देईं देवा ।।२।।
कीर्ती ऐकोनियां जालों शरणांगत । दासाचें तूं हित करितोसी ।।३।।
तुका म्हणे मी तों दीन पापराशी । घालावें पाठीशी मायबापा ।।४।।

२७६२
लटिकें तें ज्ञान लटिकें ते ध्यान । जरि हरिकिर्तन प्रिय नाहीं ।।१।।
लटिकें चि दंभ घातला दुकान । चाळविलें जन पोटासाटीं ।।धृ।।
लटिकें चि केलें वेदपारायण । जरि नाहीं स्कांुफ्दन प्रेम कथे ।।२।।
लटिकें तें तप लटिका तो जप । अळस निद्रा झोप कथाकाळीं ।।३।।
नाम नावडे तो करील बाहेरी । नाहीं त्याची खरी चित्तशुद्धि ।।४।।
तुका म्हणे ऐसीं गर्जती पुराणें । शिष्टांची वचनें मागिला ही ।।५।।

२७६३
भूतीं भगवद्भाव । मात्रासहित जीव । अद्वैत ठाव । निरंजन एकला ।।१।।
ऐसीं गर्जती पुराणें । वेदवाणी सकळ जन । संत गर्जतील तेणें । अनुभवें निर्भर ।।धृ।।
माझें तुझें हा विकार । निरसतां एकंकार । न लगे कांहीं फार । विचार चि करणें ।।२।।
तुका म्हणे दुजें । हें तों नाहीं सहजें । संकल्पाच्या काजें । आपें आप वाढलें ।।३।।

२७६४
नेणें कांुफ्कों कान । नाहीं एकांतींचें ज्ञान ।।१।।
तुम्ही आइका हो संत । माझा सादर वृत्तांत ।।धृ।।
नाहीं देखिला तो डोळां। देव दाखवूं सकळां ।।२।।
चिंतनाच्या सुखें । तुका म्हणे नेणें दुःखें ।।३।।

२७६५
त्याग तरी ऐसा करा । अहंकारा दवडावें ।।१।।
मग जैसा तैसा राहें । काय पाहें उरलें तें ।।धृ।।

अंतरींचें विषम गाढें । येऊं पुढें नेदावें ।।२।।
तुका म्हणे शुद्ध मन । समाधान पाहिजे।।३।।

२७६६
 मातेचिये चित्तीं । अवघी बाळकाची व्याप्ति ।।१।।
देह विसरे आपुला । जवळीं घेतां सीण गेला ।।धृ।।
दावी प्रेमभातें। आणि अंगावरि चढतें ।।२।।
तुका संतापुढें । पायीं झोंबे लाडें कोडें।।३।।

२७६७
 कोणा पुण्या फळ आलें । आजि देखिलीं पाउलें।।१।।
ऐसें नेणें नारायणा । संतीं सांभाळिलें दीना ।।धृ।।
कोण लाभकाळ। दीन आजि मंगळ ।।२।।
तुका म्हणे जाला । लाभ सहज विठ्ठला।।३।।

२७६८
 मान इच्छी तो अपमान पावे । अमंगळ सवे अभाग्याची।।१।।
एकाचिये अंगीं दुजियाचा वास । आशा पुढें नाश सिद्ध करी ।।धृ।।
आधीं फळासी कोठें पावों शके । वासनेची भिकेवरी चाली ।।२।।
तुका म्हणे राजहंस ढोरा नांव । काय तया घ्यावें अळंकाराचें ।।३।।

२७६९
 संसारापासूनि कैसें सोडविशी । न कळे हृषीकेशी काय जाणें । करितां न सरे अधिक वाट पाहीं ।
तृष्णा देशधडी केलों। भक्तिभजनभाव यांसी नाहीं ठाव । चरणीं तुझ्या अंतरलों।
मागें पुढें रीग न पुरे चि पाहातां । अवघा अवघीं वेष्टिलों ।।१।।
आतां माझी लाज राखें नारायणा । हीन हीन लीन याचकाची ।
करितां न कळे कांहीं असतील गुण दोष । करीं होळी संचिताची।।धृ।।
इंद्रियें द्वारें मन धांवे सैरें । नांगवे करितां चि कांहीं । हात पाय कान मुख लिंगस्थान ।
नेत्र घ्राणद्वारें पाहीं । जया जैसी सोय तया तैसें होय। क्षण एक स्थिर नाहीं ।

करिती ताडातोडी ऐसी यांची खोडी। न चले माझें यास कांहीं ।।२।।
शरीरसंबंधु पुत्र पत्नी बंधु। धन लोभ मायावंत । जन लोकपाळ मैत्र हे सकळ ।
सोइरीं सज्जनें बहुतें । नाना कर्म डाय करिती उपाय । बुडावया घातपातें ।
तुका म्हणे हरी राखे भलत्या परी । आम्ही तुझीं शरणागतें ।।३।।

२७७०
नाम घेतां उठाउठीं । होय संसारासी तुटी ।।१।।
ऐसा लाभ बांधा गांठी । विठ्ठलपायीं पडे मिठी ।।धृ।।
नामापरतें साधन नाहीं । जें तूं करिशी आणिक कांहीं ।।२।।
हाकारोनि सांगे तुका । नाम घेतां राहों नका ।।३।।

२७७१
प्राण समर्पिला आम्ही । आतां उशीर कां स्वामी।।१।।
माझें फेडावें उसणें । भार न मना या ॠणें ।।धृ।।
जाला कंठस्फोट। जवळी पातलों निकट ।।२।।
तुका म्हणे सेवा । कैसी बरी वाटे देवा।।३।।

२७७२
येणें मार्गें आले । त्यांचें निसंतान केलें ।।१।।
ऐसी अवघड वाट । कोणा सांगावा बोभाट ।।धृ।।
नागविल्या थाटी । उरों नेदी च लंगोटी ।।२।।
तुका म्हणे चोर । तो हा उभा कटिकर ।।३।।

२७७३
तोंवरि तोंवरि जंबुक करि गर्जना । जंव त्या पंचानना देखिलें नाहीं ।।१।।
तोंवरि तोवरिं सिंधु करि गर्जना । जंव त्या अगस्तिब्राम्हणा देखिलें नाहीं ।।धृ।।
तोंवरि तोंवरि वैराग्याच्या गोष्टी। जंव सुंदर वनिता दृष्टी पडिली नाहीं ।।२।।
तोंवरि तोंवरि शूरत्वाच्या गोष्टी । जंव परमाईचा पुत्र दृष्टी देखिला नाहीं ।।३।।
तोंवरि तोंवरि माळामुद्रांचीं भूषणें । जंव तुक्याचें दर्शन जालें नाहीं।।४।।

२७७४

तोंवरि तोंवरि शोभतील गारा । जंव नाहीं हिरा प्रकाशला ।।१।।
तोंवरि तोंवरि शोभतील दीपिका । नुगवता एका भास्करासी ।।२।।
तोंवरि तोंवरि सांगती संताचिया गोष्टी । जंव नाहीं भेटी तुक्यासवें ।।३।।

२७७५

धरोनि दोन्ही रूपें पाळणें संहार । करी कोप रुद्र दयाळ विष्णु ।।१।।
जटाजूट एका मुगुट माथां शिरीं । कमळापति गौरीहर एक ।।धृ।।
भस्मउद्धळण लक्ष्मीचा भोग । शंकर श्रीरंग उभयरूपीं ।।२।।
वैजयंती माळा वासुगीचा हार । लेणें अळंकार हरिहरा ।।३।।
कपाळ झोळी एका स्मशानींचा वास । एक जगन्निवास विश्वंभर ।।४।।
तुका म्हणे मज उभयरूपीं एक । सारोनि संकल्प शरण आलों ।।५।।

२७७६

उचिताचा भाग होतों राखोनियां । दिसती ते वांयां कष्ट गेले ।।१।।
वचनाची कांहीं राहे चि ना रुचि । खळाऐसें वाची कुची जालें ।।धृ।।
विश्वासानें माझें बुडविलें घर । करविला धीर येथवरी ।।२।।
तुका म्हणे शेकीं थार नाहीं बुड । कैसें तुम्हीं कोड पुरविलें ।।३।।

२७७७

लांब लांब जटा काय वाढवूनि । पावडें घेऊनि क्रोधें चाले ।।१।।
खायाचा वोळसा शिव्या दे जनाला । ऐशा तापशाला बोध कैंचा ।।धृ।।
सेवी भांग अफू तमाखू उदंड । परि तो अखंड भ्रांतीमाजी ।।२।।
तुका म्हणे ऐसा सर्वस्वें बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग ।।३।।

२७७८

अवघीं च तीर्थें घडलीं एकवेळा । चंद्रभागा डोळां देखिलिया ।।१।।
अवघीं च पापें गेलीं दिगांतरीं । वैकुंठ पंढरी देखिलिया ।।धृ।।
अवघिया संतां एकवेळा भेटी । पुंडलीक दृष्टी देखिलिया ।।२।।
तुका म्हणे जन्मा आल्याचें सार्थक । विठ्ठल चि एक देखिलिया ।।३।।

२७७९

सदा सर्वकाळ अंतरीं कुटिल । तेणें गळां माळ घालूं नये ।।१।।
ज्यासी नाहीं दया क्षमा शांति । तेणें अंगीं विभूती लावूं नये ।।धृ।।
जयासी न कळे भक्तीचें महिमान । तेणें ब्रम्हज्ञान बोलों नये ।।२।।
ज्याचें मन नाहीं लागलें हातासी । तेणें प्रपंचासी टाकुं नये ।।३।।
तुका म्हणे ज्यासी नाहीं हरिभक्ति । तेणें भगवें हातीं धरूं नये ।।४।।

२७८०
आम्ही असों निश्चिंतीनें । एक्या गुणें तुमचिया।।१।।
दुराचारी तरले नामें । घेतां प्रेम म्हणोनि ।।धृ।।
नाहीं तुम्हां धांव घेता। कृपावंता आळस ।।२।।
तुका म्हणे विसरूं कांहीं । तुज वो आई विठ्ठले ।।३।।

२७८१
अनुभवें वदे वाणी । अंतर ध्यानीं आपुलें ।।१।।
कैंची चिका दुधचवी । जरी दावी पांढरें ।।धृ।।
जातीऐसा दावी रंग। बहु जग या नावें ।।२।।
तुका म्हणे खद्योत ते । ढुंगाभोंवतें आपुलिया ।।३।।

२७८२
परपीडक तो आम्हां दावेदार । विश्वीं विश्वंभर म्हणऊनि।।१।।
दंडूं त्यागूं बळें नावलोकुं डोळा । राखूं तो चांडाळा ऐसा दुरि ।।धृ।।
अनाचार कांहीं न साहे अवगुणें । बहु होय मन कासावीस ।।२।।
तुका म्हणे माझी एकविध सेवा । विमुख ते देवा वाळी चित्तें ।।३।।

२७८३
कांहीं न मागे कोणांसी । तो चि आवडे देवासी।।१।।
देव तयासी म्हणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ।।धृ।।
भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ।।२।।
नाहीं नाहीं त्यासमान । तुका म्हणे मी जमान ।।३।।

२७८४
नाम उच्चारितां कंटीं । पुढें उभा जगजेठी ।।१।।
ऐसें धरोनियां ध्यान । मनें करावें चिंतन ।।धृ।।

ब्रम्हादिकांच्या ध्याना नये । तो हा कीर्तनाचे सोये ।।२।।
तुका म्हणे सार घ्यावें । मनें हरिरूप पाहावें ।।३।।

२७८५
आडलिया जना होसी सहाकारी । अंधळियाकरीं काठी तूं चि ।।१।।
आडिले गांजिले पीडिले संसारीं । त्यांचा तूं कैवारी नारायणा ।।धृ।।
प्रल्हाद महासंकटीं रक्षिला । तुम्ही अपंगिला नानापरी ।।२।।
आपुलें चि अंग तुम्ही वोडविलें । त्याचें निवारलें महा दुःख ।।३।।
तुका म्हणे तुझे कृपे पार नाहीं । माझे विठाबाई जननीये ।।४।।

२७८६
तपासी तें मन करूं पाहे घात । धरोनि सांगात इंद्रियांचा ।।१।।
म्हणोनि कीर्तन आवडलें मज । सांडोनियां लाज हें चि करी ।।धृ।।
पाहातां आगमनिगमाचे ठाव । तेथें नाहीं भाव एकविध ।।२।।
तुका म्हणे येथें नाहीं वो विकार । नाम एक सार विठोबाचें ।।३।।

२७८७
गुरुशिष्यपण । हें तों अधमलक्षण ।।१।।
भूतीं नारायण खरा । आप तैसा चि दुसरा ।।धृ।।
न कळतां दोरी साप। राहूं नेंदावा तो कांप ।।२।।
तुका म्हणे गुणदोषी । ऐसें न पडावें सोसीं ।।३।।

२७८८
अंगीकार ज्याचा केला नारायणें । निंद्य तें हि तेणें वंद्य केलें ।।१।।
अजामेळ भिल्ली तारीली कुंटणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ।।धृ।।
ब्रम्हहत्याराशी पातकें अपार । वाल्मीक किंकर वंद्य केला ।।२।।
तुका म्हणे येथें भजन प्रमाण । काय थोरपण जाळावें तें ।।३।।

२७८९
धनवंता घरीं । करी धन चि चाकरी ।।१।।
होय बैसल्या व्यापार । न लगे सांडावें चि घर ।।धृ।।
रानीं वनीं दीपीं । असतीं तीं होतीं सोपीं ।।२।।
तुका म्हणे मोल । देतां कांहीं नव्हे खोल ।।३।।

२७९०
 हा गे माझा अनुभव । भक्तिभाव भाग्याचा ।।१।।
केला ऋणी नारायण । नव्हे क्षण वेगळा ।।धृ।।
घालोनियां भार माथा। अवघी चिंता वारली ।।२।।
तुका म्हणे वचन साटीं । नाम कंठीं धरोनि ।।३।।

२७९१
 देव आहे सुकाळ देशीं । अभाग्यासी दुर्भिक्षा ।।१।।
नेणती हा करूं सांटा । भरले फांटा आडरानें ।।धृ।।
वसवूनि असे घर । माग दूर घातला ।।२।।
तुका म्हणे मन मुरे । मग जें उरे तें चि तूं ।।३।।

२७९२
 खुंटोनियां दोरी आपणियांपाशीं । वावडी आकाशीं मोकलिली ।।१।।
आपुलिया आहे मालासी जतन । गाहाणाचे ऋण बुडों नेणें ।।धृ।।
बीज नेलें तेथें येईल अंकुर । जतन तें सार करा याची ।।२।।
तुका म्हणे माझी निश्चितीची सेवा । वेगळें नाहीं देवा उरों दिलें ।।३।।

२७९३
 शाहाणपणें वेद मुका । गोपिका त्या ताकटी ।।१।।
कैसें येथें कैसें तेथें । शहाणे ते जाणती ।।धृ।।
यज्ञमुखें खोडी काढी । कोण गोडी बोरांची ।।२।।
तुका म्हणे भावाविण । अवघा सीण केला होय ।।३।।

२७९४
 मजुराचें पोट भरे । दाता उरे संचला ।।१।।
या रे या रे हातोहातीं । काय माती सारावी ।।धृ।।
रोजकीर्दी होतां झाडा । रोकडा चि पर्वत ।।२।।
तुका म्हणे खोल पाया । वेचों काया क्लेशेसीं ।।३।।

२७९५
 स्मशानीं आम्हां न्याहालीचें सुख । या नांवें कौतुक तुमची कृपा ।।१।।

नाहीं तरीं वांयां अवघें निर्फळ । शब्द ते पोकळ बडबड ।।धृ।।
झाडें झुडें जीव सोइरे पाषाण । होती तईं दान तुम्हीं केलें ।।२।।
तुका म्हणे आतां पाहे अनुभव । घेऊनि हातीं जीव पांडुरंगा ।।३।।

२७९६
आमची जोडी ते देवाचे चरण । करावें चिंतन विठोबाचें ।।१।।
लागेल तरीं कोणी घ्यावें धणीवरी । आमुपचि परी आवडीच्या ।।धृ।।
उभारिला कर प्रसिद्ध या जग । करूं केला त्याग मागें पुढें ।।२।।
तुका म्हणे होय दरिद्र विच्छिन्न । ऐसे देऊं दान एकवेळे ।।३।।

२७९७
दधिमाझी लोणी जाणती सकळ । तें काढी निराळें जाणे मथन ।।१।।
अग्नि काष्ठामाजी ऐसें जाणे जन । मथिलियाविण कैसा जाळी ।।धृ।।
तुका म्हणे मुख मळीण दर्पणीं । उजळिल्यावांचूनि कैसें भासे ।।२।।

२७९८
नको नको मना गुंतूं मायाजाळीं । काळ आला जवळी ग्रासावया ।।१।।
काळाची हे उडी पडेल बा जेव्हां । सोडविना तेव्हां मायबाप ।।धृ।।
सोडवीना राजा देशींचा चौधरी । आणीक सोइरीं भलीं भलीं ।।२।।
तुका म्हणे तुला सोडवीना कोणी । एका चक्रपाणी वांचूनियां ।।३।।

२७९९
पुढें जेणें लाभ घडे । तें चि वेडे नाशिती ।।१।।
येवढी कोठें नागवण । अंधारुण विष घ्यावें ।।धृ।।
होणारासी मिळे बुद्धि । नेदी शुद्धी धरूं तें ।।२।।
तुका म्हणे जना सोंग । दावी रंग आणीक ।।३।।

२८००
ऐका गा ए अवघे जन । शुद्ध मन तें हित ।।१।।
अवघा काळ नव्हे जरी । समयावरी जाणावें ।।धृ।।
नाहीं कोणी सवें येता । संचिता या वेगळा ।।२।।
बरवा अवकाश आहे । करा साहे इंद्रियें ।।३।।
कर्मभूमीऐसा ठाव । वेवसाव जाणावा ।।४।।

तुका म्हणे उत्तम जोडी । जाती घडी नरदेह ।।५।।

२८०१
संतसेवेसि अंग चोरी । दृष्टी न पडो तयावरी ।।१।।
ऐसियासी व्याली रांड । जळो जळो तिचें तोंड ।।धृ।।
संतचरणीं ठेवितां भाव । आपेंआप भेटे देव ।।२।।
तुका म्हणे संतसेवा । माझ्या पूर्वजांचा ठेवा ।।३।।

२८०२
गेले पळाले दिवस रोज । काय म्हणतोसि माझें माझें ।।१।।
सळे धरोनि बैसला काळ । फाकों नेदी घटिका पळ।।धृ।।
कां रे अद्यापि न कळे । केश फिरले कान डोळे ।।२।।
हित कळोनि असतां हातीं । तोंडीं पाडोनि घेसी माती ।।३।।
तुज ठाउकें मी जाणार । पाया शोधोनि बांधिसी घर ।।४।।
तुका म्हणे वेगें । पंढरिराया शरण रिघें ।।५।।

२८०३
आतां माझ्या मायबापा । तूं या पापा प्रायश्चित्त।।१।।
फजित हे केले खळ । तो विटाळ निवारीं ।।धृ।।
प्रेम आतां पाजीं रस । करीं वास अंतरीं ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगा । जिवलगा माझिया ।।३।।

२८०४
कां रे न पवसी धांवण्या । अंगराख्या नारायणा।।१।।
अंगीं असोनियां बळ । होसी खट्याळ नाठ्याळ ।।धृ।।
आम्हां नरकासी जातां । काय येइल तुझ्या हातां ।।२।।
तुका म्हणे कान्हा। क्रियानष्टा नारायणा ।।३।।

२८०५
माझे पाय तुझी डोई । ऐसें करिं गा भाक देईं ।।१।।
पाहतां तंव उफराटें । घडे तई भाग्य मोठें ।।धृ।।
बहु साधन मोलाच। यासी जोडा दुजें कैचें ।।२।।
नका अनमानूं विठ्ठला । तुका म्हणे धडा जाला ।।३।।

२८०६
पवित्र तें अन्न । हरिचिंतनीं भोजन ।।१।।
येर वेठ्या पोट भरी । चाम मसकाचे परी ।।धृ।।
जेऊनि तो धाला । हरिचिंतनीं केला काला ।।२।।
तुका म्हणे चवी आलें । जें कां मिश्रित विठ्ठलें।।३।।

२८०७
चरणाचा महिमा । हा तो तुझ्या पुरुषोत्तमा ।।१।।
अंध पारखी माणिकें । बोलविशी स्पष्ट मुकें ।।धृ।।
काय नाहीं सत्ता। हातीं तुझ्या पंढरीनाथा ।।२।।
तुका म्हणे मूढा । मज चेष्टविलें जडा ।।३।।

२८०८
बळिवंत कर्म । करी आपुला तो धर्म ।।१।।
पुढें घालुनियां सत्ता । न्यावें पतना पतिता ।।धृ।।
आचरणें खोटीं । केलीं सलताती पोटीं ।।२।।
तुका म्हणे देवा । नाहीं भजन केली सेवा ।।३।।

२८०९
कैं वाहावें जीवन । कैं पलंगीं शयन ।।१।।
जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ।।धृ।।
कैं भौज्य नानापरी । कैं कोरड्या भाकरी ।।२।।
कैं बसावें वहनीं । कैं पायीं अन्हवाणी ।।३।।
कैं उत्तम प्रावर्णें । कैं वसनें तीं जीर्णें ।।४।।
कैं सकळ संपत्ती । कैं भोगणें विपत्ती ।।५।।
कैं सज्जनाशीं संग । कैं दुर्जनाशीं योग ।।६।।
तुका म्हणे जाण । सुख दुःख तें समान ।।७।।

२८१०
उंचनिंच नेणे कांहीं भगवंत । तिष्ठे भाव भक्त देखोनियां ।।१।।
दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्या घरीं रक्षी प्रल्हादासी ।।धृ।।
चर्म रंगूं लागे रोहिदासा संगीं । कबिराचे मागीं विणी शेले ।।२।।

सजनकसाया विकुं लागे मास । मळा सांवत्यास खुरपूं लागे ।।३।।
नरहरिसोनारा घडों कांुफ्कुं लागे । चोख्यामेळ्या संगें ढोरें ओढी ।।४।।
नामयाची जनी सवें वेची शेणी । धर्मा घरीं पाणी वाहे झाडी ।।५।।
नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित । ज्ञानियाची भिंत अंगीं ओढी ।।६।।
अर्जुनाचीं घोडीं हाकी हा सारथी । भक्षी पोहे प्रीती सुदाम्याची ।।७।।
गौळियांचे घरीं गाई अंगें वळी । द्वारपाळ बळीद्वारीं जाला ।।८।।
यंकोबाचें ॠण फेडी हृषीकेशी । आंबॠषीचे सोशी गर्भवास ।।९।।
मिराबाई साटीं घेतो विषप्याला । दामाजीचा जाला पाडेवार ।।१०।।
घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची। हुंडी महत्याची अंगें भरी ।।११।।
पुंडलिकासाटीं अझूनि तिष्ठत । तुका म्हणे मात धन्य याची ।।१२।।

२८११
भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहे रात्रीं दिवस वाट तुझी ।।१।।
पूर्णिमेचा चंद्र चकोराचें जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ।।धृ।।
दिवाळीच्या मुळा लेंकी आसावली । पाहतसे वाटुली पंढरीची ।।२।।
भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परि माउलीची ।।३।।
तुका म्हणे मज लागलीसे भूक । धांवूनि श्रीमुख दावीं देवा ।।४।।

२८१२
आले संत पाय ठेविती मस्तकीं । येहीं उभयलोकीं सरता केलों ।।१।।
वंदीन पाउलें लोळेन चरणीं । आजि इच्छाधणी फिटईल ।।धृ।।
अवघीं पूर्व पुण्यें जालीं सानुकूळ । अवघें चि मंगळ संतभेटी ।।२।।
तुका म्हणे कृतकृत्य जालों देवा । नेणें परि सेवा डोळां देखें ।।३।।

२८१३
करीं धंदा परि आवडती पाय । प्रीती सांगों काय नेणां देवा ।।१।।
रूप डोळां देखें सदा सर्वकाळ । संपादितों आळ प्रपंचाचा ।।धृ।।
नेमून ठेविली कारया कारणीं । आमुचिये वाणी गुण वदे ।।२।।
मनासीं उत्कंठा दर्शनाचा हेवा । नाहीं लोभ जीवा धन धान्य ।।३।।
उसंतितों पंथ वेठीचिया परी । जीवनसूत्र दोरीपाशीं ओढ ।।४।।
तुका म्हणे ऐसें करितों निर्वाण । जीव तुम्हां भिन्न नाहीं माझा ।।५।।

२८१४

कां रे माझीं पोरें म्हणसील ढोरें । मायबाप खरें काय एक ।।१।।
कां रे गेलें म्हणोनि करिसी तळमळ । मिथ्याचि कोल्हाळ मेलियाचा ।।धृ।।
कां रे माझें माझें म्हणसील गोत । नो संडविती दूत यमा हातीं ।।२।।
कां रे मी बळिया म्हणविसी ऐसा । सरणापाशीं कैसा उचलविसी ।।३।।
तुका म्हणे न धरीं भरवसा कांहीं । वेगीं शरण जाईं पांडुरंगा ।।४ ।।

२८१५
अगा करुणाकरा करितसें धांवा । या मज सोडवा लवकरि ।।१।।
ऐकोनियां माझीं करुणेचीं वचनें । व्हावें नारायणें उतावीळ ।।धृ।।
मागें पुढें अवघा दिसे रिता ठाव । ठेवूनि पायीं भाव वाट पाहें ।।२।।
उशीर तो आतां न पाहिजे केला । अहो जी विठ्ठला मायबापा ।।३।।
उरलें तें एक हें चि मज आतां । अवघें विचारितां शून्य जालें ।।४।।
तुका म्हणे आतां करीं कृपादान । पाउलें समान दावीं डोळां ।।५।।

२८१६
न मनीं ते ज्ञानी न मनीं ते पंडित । ऐसे परीचे एकएका भावें ।।१।।
धातू पोसोनियां आणिकां उपदेश । अंतरीं तो लेश प्रेम नाहीं ।।धृ।।
न मनीं ते योगी न मनीं ते हरिदास । दर्शनें बहुवस बहुतां परीचीं ।।२।।
तुका म्हणे तयां नमन बाह्यात्कारी । आवडती परी चित्तशुद्धीचे ।।३।।

२८१७
कासिया पाषाण पूजिती पितळ । अष्ट धातु खळ भावें विण ।।१।।
भाव चि कारण भाव चि कारण । मोक्षाचें साधन बोलियेलें ।।धृ।।
काय करिल जपमाळा कंठमाळा । करिशी वेळोवेळां विषयजप ।।२।।
काय करिशील पंडित हे वाणी । अक्षराभिमानी थोर होय ।।३।।
काय करिशील कुशल गायन । अंतरीं मळीण कुबुद्धि ते ।।४।।
तुका म्हणे भाव नाहीं करी सेवा । तेणें काय देवा योग्य होशी ।।५।।

२८१८
अंतरींचें गोड । राहें आवडीचें कोड ।।१।।
संघष्टणें येती अंगा । गुणदोष मनभंगा ।।धृ।।
उचिताच्या कळा । नाहीं कळती सकळा ।।२।।
तुका म्हणे अभावना । भावीं मूळ तें पतना।।३।।

२८१९
शिळा जया देव । तैसा फळे त्याचा भाव ।।१।।
होय जतन तें गोड । अंतरा येती नाड ।।धृ।।
देव जोडे भावें । इच्छेचें तें प्रेम घ्यावें ।।२।।
तुका म्हणे मोड दावी । तैशीं फळें आलीं व्हावीं ।।३।।

२८२०
कासया जी ऐसा माझे माथां ठेवा । भार तुम्ही देवा संतजन ।।१।।
विचित्र विंदानी नानाकळा खेळ । नाचवी पुतळे नारायण ।।धृ।।
काय वानरांची अंगींची ते शक्ति । उदका तरती वरी शिळा ।।२।।
तुका म्हणे करी निमित्य चि आड । चेष्टवूनि जड दावी पुढें ।।३।।

२८२१
पायां पडावें हें माझें भांडवल । सरती हे बोल कोठें पायीं ।।१।।
तरि हे सलगी कवतुक केलें । लडिवाळ धाकुलें असें बाळ ।।धृ।।
काय उणें तुम्हां संताचिये घरीं । विदित या परी सकळ ही ।।२।।
तुका म्हणे माझें उचित हे सेवा । नये करूं ठेवाठेवी कांहीं।।३।।

२८२२
वदवावी वाणी माझी कृपावंता । वागपुष्प संतां समर्पीशी ।।१।।
सर्वसंकटाचा तुम्हां परिहार । घालावा म्यां भार पांडुरंगा ।।धृ।।
एकसरें चिंता ठेवूनियां पायीं । जालों उतराई होतों तेणें ।।२।।
तुका म्हणे येथें जालें अवसान । काया वाचा मन वेचूनियां ।।३।।

२८२३
नमावे पाय हें माझें उचित । आशीर्वादें हित तुमचिया।।१।।
कृपेचा वोरस न समाये पोटीं । म्हणोनि उफराटीं वचनें हीं ।।धृ।।
तुमची उष्टावळी हें माझें भोजन । झाडावें अंगण केरपुंजे ।।२।।
परि ऐसें पुण्य नाहीं माझें गांठीं । जेणें पडे मिठी पायांसवें ।।३।।
तुका म्हणे राहे आठवण चित्तीं । ऐशी कृपा संतीं केली तुम्हीं ।।४।।

२८२४

काय नाहीं माता गौरवीत बाळा । काय नाहीं लळा पाळीत ते ।।१।।
काय नाहीं त्याची करीत ते सेवा । काय नाहीं जीवा गोमटें तें ।।धृ।।
अमंगळपणें कांटाळा न धरी । उचलोनि करीं कंठीं लावी ।।२।।
लेववी आपुले अंगें अळंकार । संतोषाये फार देखोनियां ।।३।।
तुका म्हणे स्तुति योग्य नाहीं परी । तुम्हां लाज थोरी अंकिताची ।।४।।

२८२५
माझिया मीपणावर पडों पाषाण । जळो हें भूषण नाम माझें ।
पापा नाहीं पार दुःखाचे डोंगर । जालों ये भूमीसी ओझें ।।१।।
काय विटंबना सांगों किती । पाषाण फुटती ऐसें दुःख ।
नर नारी सकळ उत्तम चांडाळ । न पाहाती माझें मुख ।।धृ।।
काया वाचा मनें अघटित करणें चर्मचक्षु हात पाय ।
निंदा द्वेष घात विश्वासीं व्यभिचार । आणीक सांगों किती काय ।।२।।
लक्ष्मीमदें मातें घडले महा दोष । पत्नी दोनी भेदभेद ।
पितृवचन घडली अवज्ञा अविचार। कुटिल कचर वादी निंद्य ।।३।।
आणीक किती सांगों ते अवगुण । न वळे जिव्हा कांपे मन ।
भुतदया उपकार नाहीं शब्दा धीर । विषयीं लंपट हीन ।।४।।
संत महानुभाव ऐका हें उत्तरें। अवगुण अविचारें वृद्धि पापा ।
तुका म्हणे सरतें करा पांडुरंगीं । शरण आलों मायबापा ।।५।।

२८२६
फिराविलीं दोनी । कन्या आणि चक्रपाणी ।।१।।
जाला आनंदें आनंद । अवतरले गोविंद ।।धृ।।
तुटलीं बंधनें । वसुदेवदेवकीचीं दर्शनें ।।२।।
गोकुळासी आलें । ब्रम्ह अव्यक्त चांगलें ।।३।।
नंद दसवंती । धन्य देखिले श्रीपती ।।४।।
निशीं जन्मकाळ । आले अष्टमी गोपाळ ।।५।।
आनंदली मही । भार गेला सकळ ही ।।६।।
तुका म्हणे कंसा । आट भोविला वळसा ।।७।।

२८२७
सोडियेल्या गांठी । दरुषणें कृष्णभेटी ।।१।।
करिती नारी अक्षवाणें । जीवभाव देती दानें ।।धृ।।

उपजल्या काळें । रूपें मोहीलीं सकळें ।।२।।
तुका तेथें वारी ।।एकी आडोनि दुसरी ।।३।।

२८२८
मुख डोळां पाहे । तैशी च ते उभी राहे ।।१।।
केल्याविण नव्हे हातीं । धरोनि आरती परती ।।धृ।।
न धरिती मनीं। कांहीं संकोच दाटणी ।।२।।
तुका म्हणें देवें । ओस केल्या देहभावें ।।३।।

२८२९
गोकुळीच्या सुखा । अंतपार नाहीं लेखा ।।१।।
बाळकृष्ण नंदा घरीं । आनंदल्या नरनारी ।।धृ।।
गुढिया तोरणें । करिती कथा गाती गाणें ।।२।।
तुका म्हणे छंदें । येणें वेधिलीं गोविंदें ।।३।।

२८३०
विटंबिलें भट । दिला पाठीवरी पाट ।।१।।
खोटें जाणोनि अंतर । न साहे चि विश्वंभर ।।धृ।।
तें चि करी दान । जैसें आइके वचन ।।२।।
तुका म्हणे देवें । पूतना शोषियेली जीवें।।३।।
।।५।।

२८३१
प्रेम देवाचें देणें । देहभाव जाय जेणें । न धरावी मनें। शुद्धी देशकाळाची ।।१।।
मुक्त लज्जाविरहित । भाग्यवंत हरिभक्त। जाले वोसंडत । नामकीर्तिपवाडे ।।धृ।।
जोडी जाली अविनाश । जन्मोनि जाले हरिसे दास । त्यांस नव्हे गर्भवास । परब्रम्हीं सौरस ।।२।।
हे चि वाहाती संकल्प । पुण्यप्रसंगाचे जप । तुका म्हणे पाप । गांवीं नाहीं हरिजना ।।३।।

२८३२

तो चि लटिक्यामाजी भला । म्हणे देव म्यां देखिला।।१।।
ऐशियाच्या उपदेशें । भवबंधन कैसें नासे ।
बुडवी आपणासरिसे । अभिमानें आणिकांस ।।धृ।।
आणिक नाहीं जोडा । देव म्हणवितां या मूढा ।।२।।
आणिकांचे न मनी साचें । तुका म्हणे या श्रेष्ठांचें ।।३।।

२८३३
होईल जाला अंगें देव जो आपण । तयासी हे जन अवघे देव ।।१।।
येरांनीं सांगावी रेमट काहाणी । चित्ता रंजवणी करावया ।।धृ।।
धाला आणिकांची नेणे तान भूक । सुखें पाहें सुख आपुलिया ।।२।।
तुका म्हणे येथें पाहिजे अनुभव । शब्दाचें गौरव कामा नये ।।३।।

२८३४
कां न वजावें बैसोनि कथे । ऐसें ऐका हो श्रोते । पांडुरंग तेथें । उभा असे तिष्ठत ।।१।।
म्हणऊनि करी धीर । लक्ष लावूनि सादर । भवसिंधुपार । असेल ज्या तरणें ।।धृ।।
कथे कांहीं अणुमात्र। नो बोलावें हा वृत्तांत । देवभक्तां चित्त । समरसीं खंडणा ।।२।।
कां वैष्णवा पूजावें । ऐका घेईल जो भावें । चरणरजा शिवें । वोडविला मस्तक ।।३।।
ऐसें जाणा हे निभ्रांत । देव वैष्णवांचा अंकित । अलिप्त अतीत । परमित त्यासाठीं ।।४।।
घालोनि लोळणा। तुका आला लोटांगणीं । वंदी पायवणीं । संतचरणींचें माथां ।।५।।

२८३५
अनुभवें आलें अंगा । तें या जगा देतसें ।।१।।
नव्हती हाततुके बोल । मूळ ओल अंतरिंची ।।धृ।।
उतरूनि दिलें कशीं । शुद्धरसीं सरे तें ।।२।।
तुका म्हणे दुसरें नाहीं । ऐसी ग्वाही गुजरली ।।३।।

२८३६

साधकाची दशा उदास असावी । उपाधि नसावी अंतर्बाही ।।१।।
लोलुपता काय निद्रेतें जिणावें । भोजन करावें परमित ।।धृ।।
एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं वचन । प्राण गेल्या जाण बोलों नये ।।२।।
संग सज्जनाचा उच्चार नामाचा । घोष कीर्तनाचा अहर्निशीं ।।३।।
तुका म्हणे ऐसा साधनीं जो राहे । तो चि ज्ञान लाहे गुरुकृपा ।।४।।

२८३७
अंतरींची ज्योती प्रकाशली दीप्ति । मुळींची जे होती आच्छादिली ।।१।।
तेथींचा आनंद ब्रम्हांडीं न माये । उपमेशीं काये देऊं सुखा ।।धृ।।
भावाचे मथिलें निर्गुण संचलें । तें हें उभें केलें विटेवरी ।।२।।
तुरा म्हणे आम्हां ब्रम्हांड पंढरी । प्रेमाची जे थोरी सांठवण ।।३।।

२८३८
कासया गा मज घातलें संसारीं । चित्त पायांवरी नाहीं तुझ्या ।।१।।
कासया गा मज घातलें या जन्मा । नाहीं तुझा प्रेमा नित्य नवा ।।धृ।।
नामाविण माझी वाचा अमंगळ । ऐसा कां चांडाळ निर्मियेलें ।।२।।
तुका म्हणे माझी जळो जळो काया । विठ्ठला सखया वांचूनियां ।।३।।

२८३९
प्रारब्धें चि जोडे धन । प्रारब्धें चि वाडे मान ।।१।।
सोस करिसी वांयां । भज मना पंढरीराया ।।धृ।।
प्रारब्धें चि होय सुख। प्रारब्धें चि पावे दुःख ।।२।।
प्रारब्धें चि भरे पोट । तुका करीना बोभाट ।।३।।

२८४०
हीन माझी याति । वरी स्तुती केली संतीं ।।१।।
अंगीं वसूं पाहे गर्व । माझें हरावया सर्व ।।धृ।।
मी एक जाणता । ऐसें वाटतसे चित्ता ।।२।।
राख राख गेलों वांयां । तुका म्हणे पंढरीराया ।।३।।

२८४१
तपाचे सायास । न लगे घेणें वनवास ।।१।।
ऐसें कळलें आम्हां एक । जालों नामाचे धारक ।।धृ।।

जाळीं महाकर्में । दावीं निजसुख धर्में ।।२।।
तुका म्हणे येणें । कळिकाळ तें ठेंगणें।।३।।

२८४२
 माता कापी गळा । तेथें कोण राखी बाळा ।।१।।
हें कां नेणां नारायणा । मज चाळवितां दिना ।।धृ।।
नागवी धावणें । तेथें साह्य व्हावें कोणें ।।२।।
राजा सर्व हरी । तेथें दुजा कोण वारी ।।३।।
तुझ्या केल्याविण । नव्हे स्थिर वश जन ।।४।।
तुका म्हणे हरी। सूत्र तुम्हां हातीं दोरी।।५।।

२८४३
 गाऊं नेणें परी मी कांहीं गाईन । शरण जाईन पांडुरंगा ।।१।।
ब्रम्हांडनायक मी त्याचा अंकित । काय यमदूत करिती काळ ।।धृ।।
वश्या ज्याच्या नामें तारिली गणिका । अजामेळासारिखा पापरासीं ।।२।।
चरणींच्या रजें अहिल्या तारिली। रूपवंत केली कुबजा क्षणें ।।३।।
पृथिवी तारिली पाताळासी जातां। तुका म्हणे आतां आम्ही किती ।।४।।

२८४४
 गाजराची पुंगी । तैसे नवे जाले जोगी ।।१।।
काय करोनि पठन । केली अहंता जतन ।।धृ।।
अल्प असे ज्ञान । अंगीं ताठा अभिमान ।।२।।
तुका म्हणे लंड । त्याचें हाणोनि फोडा तोंड।।३।।

२८४५
 परद्रव्य परनारी । अभिळासूनि नाक धरी ।।१।।
जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ।।धृ।।
सोहोळ्याची स्थिती । क्रोधें विटाळला चित्तीं ।।२।।
तुका म्हणे सोंग । दावी बाहेरील रंग ।।३।।

२८४६
 टिळा टोपी उंच दावी । जगीं मी एक गोसावी ।।१।।
अवघा वरपंग सारा । पोटीं विषयांचा थारा ।।धृ।।

मुद्रा लावितां कोरोनि । मान व्हावयासी जनीं ।।२।।
तुका म्हणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ।।३।।

२८४७
ऐसे संत जाले कळीं । तोंडीं तमाखूची नळी ।।१।।
स्नानसंध्या बुडविली । पुढें भांग वोडवली ।।धृ।।
भांगभुर्का हें साधन। पची पडे मद्यपान ।।२।।
तुका म्हणे अवघें सोंग । तेथें कैचा पांडुरंग ।।३।।

२८४८
जातीची शिंदळी । तिला कोण वंशावळी ।।१।।
आपघर ना बापघर । चित्तीं मनीं व्यभिचार ।।धृ।।
सेजे असोनियां धणी । परद्वार मना आणी ।।२।।
तुका म्हणे असील जाती । जातीसाठीं खाती माती ।।३।।

२८४९
अंधळ्याची काठी । हिरोनियां कडा लोटी ।।१।।
हें कां देखण्या उचित । लाभ किंवा कांहीं हित ।।धृ।।
साकर म्हणोनि माती । चाळवूनि द्यावी हातीं ।।२।।
तुका म्हणे वाटे । देवा पसरावे सराटे ।।३।।

२८५०
प्रीतिचिया बोला नाहीं पेसपाड । भलतसें गोड करूनि घेई ।।१।।
तैसें विठ्ठलराया तुज मज आहे । आवडीनें गायें नाम तुझें ।।धृ।।
वेडे वांकडे बाळकाचे बोल । करिती नवल मायबाप ।।२।।
तुका म्हणे तुज येवो माझी दया । जीवींच्या सखया जिवलगा ।।३।।

२८५१
माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ।।१।।
आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ।।धृ।।
वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियां अधीन जालों देवा ।।२।।
तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ।।३।।

२८५२
वर्णावी ते थोरी एका विठ्ठलाची । कीर्ती मानवाची सांगों नये ।।१।।
उदंड चि जाले जन्मोनियां मेले । होऊनियां गेले राव रंक ।।धृ।।
त्यांचें नाम कोणी नेघे चराचरीं । साही वेद चारी वर्णिताती ।।२।।
अक्षय अढळ चळेना ढळेना । तया नारायणा ध्यात जावें ।।३।।
तुका म्हणे तुझी विठ्ठल चित्तीं ध्यातां । जन्ममरण व्यथा दूर होती ।।४।।

२८५३
नको देऊं देवा पोटीं हें संतान । मायाजाळें जाण नाठवसी ।।१।।
नको देऊं देवा द्रव्य आणि भाग्य । तो एक उद्वेग होय जीवा ।।२।।
तुका म्हणे करीं फकिराचे परी । रात्रदिवस हरि येइल घरा ।।३।।

२८५४
जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ।।१।।
उत्तम चि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।।धृ।।
परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ।।२।।
भूतदया गाईपशूचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी।।३।।
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ।।४।।
तुका म्हणे हें चि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ।।५।।

२८५५
हरि म्हणतां गति पातकें नासती । कळिकाळ कांपती हरि म्हणतां ।।१।।
हरि म्हणतां भुक्ति हरि म्हणतां मुक्ति । चुके यातायाती हरि म्हणतां ।।धृ।।
तपें अनुष्ठानें न लगती साधनें । तुटती बंधनें हरि म्हणतां ।।२।।
तुका म्हणे भावें जपा हरिचें नाम । मग काळयम शरण तुम्हा ।।३।।

२८५६
नये वांटूं मन । कांहीं न देखावें भिन्न ।।१।।
पाय विठोबाचे चित्तीं । असों द्यावे दिवसराती ।।धृ।।
नये काकुळती । कोणा यावें हरिभक्ति ।।२।।
तुका म्हणे साई । करील कृपेची विठाई।।३।।

२८५७

सकळ देवांचें दैवत । उभें असे रंगा आंत ।।१।।
रंगा लुटा माझे बाप । शुद्ध भाव खरें माप ।।धृ।।
रंग लुटिला बहुतीं । शुक नारदादि संतीं ।।२।।
तुका लुटितां हे रंग । साह्य जाला पांडुरंग ।।३।।

२८५८
उशीर कां केला । कृपाळुवा विठ्ठला ।।१।।
मज दिलें कोणा हातीं । काय मानिली निश्चिंती ।।धृ।।
कोठवरी धरूं धीर । आतां मन करूं स्थिर ।।२।।
तुका म्हणे जीव । ऐसी भाकितसे कींव ।।३।।

२८५९
तुका वेडा अविचार । करी बडबड फार ।।१।।
नित्य वाचे हा चि छंद । राम कृष्ण हरि गोविंद ।।धृ।।
धरी पांडुरंगीं भाव। आणीक नेणें दुजा देव ।।२।।
गुरुज्ञान सर्वा ठायीं । दुजें न विचारी कांहीं ।।३।।
बोल नाईके कोणाचे । कथे नागवा चि नाचे।।४।।
संगउपचारें कांटाळे । सुखें भलते ठायीं लोळे ।।५।।
कांहीं उपदेशिलें नेणे । वाचे विठ्ठल विठ्ठल म्हणे ।।६।।
केला बहुतीं फजित । तरी हें चि करी नित्य ।।७।।
अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ।।८।।

२८६०
आली सिंहस्थपर्वणी । न्हाव्या भटा जाली धणी।।१।।
अंतरीं पापाच्या कोडी । वरिवरि बोडी डोई दाढी ।।धृ।।
बोडिलें तें निघालें । काय पालटलें सांग वहिलें ।।२।।
पाप गेल्याची काय खुण । नाहीं पालटले अवगुण ।।३।।
भक्तिभावें विण । तुका म्हणे अवघा सीण ।।४।।

२८६१
तुज घालोनियां पूजितों संपुष्टीं । परि तुझ्या पोटीं चवदा भुवनें ।।१।।
तुज नाचऊनि दाखवूं कौतुका । परी रूपरेखा नाहीं तुज ।।धृ।।
तुजलागीं आम्ही गात असों गीत । परी तूं अतीत शब्दाहूनि ।।२।।

तुजलागीं आम्हीं घातियेल्या माळा । परि तूं वेगळा कर्तृत्वासी ।।३।।
तुका म्हणे आतां होऊनि परमित । माझें कांहीं हित विचारावें ।।४।।

२८६२
पापाची मी राशी । सेवाचोर पायांपाशीं ।।१।।
करा दंड नारायणा । माझ्या मनाची खंडणा ।।धृ।।
जना हातीं सेवा । घेतों लंडपणें देवा ।।२।।
तुझा ना संसार । तुका दोहींकडे चोर ।।३।।

२८६३
दुडीवरी दुडी । चाले मोकळी गुजरी ।।१।।
ध्यान लागो ऐसें हरी । तुझे चरणीं तैशापरी ।।धृ।।
आवंतण्याची आस । जैसी लागे दुर्बळासी ।।२।।
लोभ्या कळांतराची आस । बोटें मोजी दिवस मास ।।३।।
तुका म्हणे पंढरीनाथा । मजला आणिक नको व्यथा ।।४।।

२८६४
लागोनियां पायां विनवितों तुम्हाला । करें टाळी बोला मुखें नाम ।।१।।
विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळां । हा सुखसोहळा स्वगाअ नाहीं ।।धृ।।
कृष्ण विष्णु हरि गोविंद गोपाळ । मार्ग हा प्रांजळ वैकुंठीचा ।।२।।
सकळांसीं येथें आहे अधिकार । कलयुगीं उद्धार हरिनामें ।।३।।
तुका म्हणे नामापाशीं चारी मुक्ति । ऐसें बहुग्रंथीं बोलियेलें ।।४।।

२८६५
लटिकें हासें लटिकें रडें । लटिकें उडें लटिक्यापें।।१।।
लटिकें माझें लटिकें तुझें । लटिकें ओझें लटिक्याचें ।।धृ।।
लटिकें गायें लटिकें ध्यायें । लटिकें जायें लटिक्यापें ।।३।।
लटिका भोगी लटिका त्यागी । लटिका जोगी जग माया ।।३।।
लटिका तुका लटिक्या भावें । लटिकें बोले लटिक्यासवें ।।४।।

२८६६. जालों म्हणती त्याचें मज वाटे आश्चर्य । ऐका नव्हे धीर वचन माझें ।।१।।
शिजलिया अन्ना ग्वाही दांत हात । जिव्हेसी चाखत न कळे कैसें ।।धृ।।

तापलिया तेली बावन चंदन । बुंद एक क्षण शीतळ करी ।।२।।
पारखी तो जाणे अंतरींचा भेद । मूढजना छंद लावण्यांचा ।।३।।
तुका म्हणे कसीं निवडे आपण । शुद्ध मंद हीन जैसें तैसें ।।४।।

२८६७
हे चि थोर भक्ति आवडती देवा । संकल्पावी माया संसाराची ।।१।।
ठेविलें अनंतें तैसें चि राह वें । चित्तीं असों द्यावें समाधान ।।धृ।।
वाहिल्या उद्वेग दुःख चि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ।।२।।
तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवा पायीं ।।३।।

२८६८
जन्मा येणें घडे पातकाचे मूळें । संचिताचें फळ आपुलिया ।।१।।
मग वांयांविण दुःख वाहों नये । रुसोनियां काय देवावरी ।।धृ।।
ठाउका चि आहे संसार दुःखाचा । चित्तीं सीण याचा वाहों नये ।।२।।
तुका म्हणे नाम त्याचें आठवावें । तेणें विसरावें जन्मदुःख ।।३।।

२८६९
आतां माझे नका वाणूं गुण दोष । करितों उपदेश याचा कांहीं ।।१।।
मानदंभासाठीं छळीतसें कोणा । आण या चरणां विठोबाची ।।२।।
तुका म्हणे हें तों ठावें पांडुरंगा । काय कळे जगा अंतरींचें ।।३।।

२८७०
काय माझें नेती वाईट म्हणोन । करूं समाधान कशासाटीं ।।१।।
काय मज लोक नेती परलोका । जातां कोणा एका निवारेल ।।धृ।।
न म्हणें कोणासी उत्तम वाईट । सुखें माझी कूट खावो मागें ।।२।।
सर्व माझा भार असे पांडुरंगा । काय माझें जगासवें काज ।।३।।
तुका म्हणे माझें सर्व ही साधन । नामसंकीर्त्तन विठोबाचें ।।४।।

देवांनीं स्वामींस चिंचवडास नेलें होतें ते अभंग, आरत्या ।। १३ ।।
२८७१
वांजा गाई दुभती । देवा ऐसी तुझी ख्याति ।।१।।
ऐसें मागत नाहीं तुज । चरण दाखवावे मज ।।धृ।।
चातक पाखरूं। त्यासी वर्षे मेघधारु ।। ।।

पक्षी राजहंस । अमोलिक मोतीं त्यास।।३।।
तुका म्हणे देवा । कां गा खोचलासी जीवा ।।४।।

२८७२. परतें मी आहें सहज चि दुरी । वेगळें भिकारी नामरूपा ।।१।।
न लगे रुसावें धरावा संकोच । सहज तें नीच आलें भागा ।।धृ।।
पडिलिये ठायीं उच्छिष्ट सेवावें । आरते तें चि देवें केलें ऐसें ।।२।।
तुका म्हणे तुम्ही आम्हां जी वेगळे । केलेती निराळे द्विज देवें ।।३।।

२८७३
चिंतामणिदेवा गणपतीसी आणा । करवावें भोजना दुजे पात्रीं ।।१।।
देव म्हणती तुक्या एवढी कैची थोरी । अभिमानाभीतरी नागवलों ।।धृ।।
वाडवेळ जाला सिळें जालें अन्न । तटस्थ ब्राम्हण बैसलेती ।।२।।
तुका म्हणे देवा तुमच्या सुकृतें । आणीन त्वरित मोरयासी ।।३।।

२८७४
भोक्ता नारायण लक्ष्मीचा पति । म्हणोनि प्राणाहुती घेतलिया ।।१।।
भर्ता आणि भोक्ता कर्त्ता आणि करविता । आपण सहजता पूर्णकाम ।।धृ।।
विश्वंभर कृपादृष्टी सांभाळीत । प्रार्थना करीत ब्राम्हणांची ।।२।।
कवळोकवळीं नाम घ्या गोविंदाचें । भोजन भक्तांचें तुका म्हणे ।।३।।

२८७५
माझा स्वामी तुझी वागवितो लात । तेथें मी पतित काय आलों ।।१।।
तीर्थें तुमच्या चरणीं जाहालीं निर्मळ । तेथें मी दुर्बळ काय वाणूं ।।२।।
तुका म्हणे तुम्ही देवा द्विजवंद्य । मी तों काय निंद्य हीन याति ।।३।।

२८७६
वंदिलें वंदावें जीवाचिये साटीं । किंवा बरी तुटी आरंभीं च ।।१।।
स्वहिताची चाड ते ऐका हे बोल । अवघें चि मोल धीरा अंगीं ।।धृ।।
सिंपिलें तें रोंप वरीवरी बरें । वाळलिया वरी कोंभ नये ।।२।।
तुका म्हणे टाकीघायें देवपण । फुटलिया जन कुला पुसी ।।३।।

२८७७
आम्हां विष्णुदासां हें चि भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ।।१।।

वाणी नाहीं घ्यावें आपुलिया हातें । करोनियां चित्तें समाधान ।।२।।
तुका म्हणे द्रव्य मेळविलें मागें । हें तों कोणासंगें आलें नाहीं ।।३।।

२८७८
सुखाचे व्यवहारीं सुखलाभ जाला । आनंदें कोंदला मागें पुढें ।।१।।
संगती पंगती देवासवें घडे । नित्यानित्य पडे तें चि सांचा ।।धृ।।
समर्थचे घरीं सकळ संपदा । नाहीं तुटी कदा कासयाची।।२।।
तुका म्हणे येथें लाभाचिया कोटी । बहु वाव पोटीं समर्थाचे ।।३।।

२८७९
काय देवें खातां घेतलें हातींचें । आलें हें तयाचें थोर भय ।।१।।
म्हणतां गजरें राम एकसरें । जळती पापें थोरें भयधाकें।।धृ।।
काय खोळंबले हात पाय अंग । नाशिलें हें सांग रूप काय ।।२।।
कोण लोकीं सांगा घातला बाहेरी । म्हणतां हरि हरि तुका म्हणे।।३।।

२८८०
उत्तम त्या याति । देवा शरण अनन्यगति ।।१।।
नाहीं दुजा ठाव । कांहीं उत्तम मध्यम भाव ।।धृ।।
उमटती ठसे । ब्रम्हप्राप्ति अंगीं दिसे ।।२।।
भाविक विश्वासी।तुका म्हणे नमन त्यांसी।।३।।
।।१०।।

२८८१
ज्यासी नावडे एकादशी । तो जिता चि नरकवासी।।१।।
ज्यासी नावडे हें व्रत । त्यासी नरक तो ही भीत ।।धृ।।
ज्यासी मान्य एकादशी । तो जिता चि मुक्तवासी ।।२।।
ज्यासी घडे एकादशी । जाणें लागे विष्णुपाशीं ।।३।।
तुका म्हणे पुण्यराशी । तो चि करी एकादशी ।।४।।

२८८२
मुंगी होउनि साकर खावी । निजवस्तूची भेटी घ्यावी।।१।।
वाळवंटी साकर पडे । गज येउनि काय रडे ।।धृ।।
जाला हरिदास गोसांवी । अवघी मायिक क्रिया दावी ।।२।।

पाठ पाठांतरिक विद्या । जनरंजवणी संध्या ।।३।।
प्रेम नसतां अंगा आणी । दृढ भाव नाहीं मनीं ।।४।।
ब्रम्हज्ञान वाचे बोले । करणी पाहातां न निवती डोळे ।।५।।
मिथ्या भगल वाढविती । आपुली आपण पूजा घेती ।।६।।
तुका म्हणे धाकुटें व्हावें । निजवस्तूसी मागुनि घ्यावें ।।७।।

२८८३
भय हरिजनीं । कांहीं न धरावें मनीं ।।१।।
नारायण ऐसा सखा । काय जगाचा हा लेखा ।।धृ।।
चित्त वित्त हेवा । समर्पून राहा देवा ।।२।।
तुका म्हणे मन । असों द्यावें समाधान।।३।।

२८८४
आयुष्य मोजावया बैसला मापारी । तूं कां रे वेव्हारी संसाराचा ।।१।।
नेईल ओढोनि ठाउकें नसतां । न राहे दुश्चिता हरिविण ।।धृ।।
कठीण हें दुःख यम जाचतील । कोण सोडवील तया ठायीं ।।२।।
राहतील दुरी सज्जन सोयरीं । आठवीं श्रीहरी लवलाहीं ।।३।।
तुका म्हणे किती करिसी लंडायी । होईल भंडाई पुढें थोर ।।४।।

२८८५
होऊं नको कांहीं या मना आधीन । नाइकें वचन याचें कांहीं ।।१।।
हटियाची गोष्टी मोडून टाकावी । सोई ही धरावी विठोबाची ।।धृ।।
आपुले आधीन करूनियां ठेवा । नाहीं तरि जीवा घातक हें ।।२।।
तुका म्हणे जाले जे मना आधीन । तयांसी बंधन यम करी ।।३।।

२८८६
नामाविण काय वाउगी चावट । वांयां वटवट हरीविण।।१।।
फुकट चि सांगे लोकाचिया गोष्टी । राम जगजेठी वाचे नये ।।धृ।।
मेळवूनि चाट करी सुरापान । विषयांच्या गुणें माततसे ।।२।।
बैसोनि टवाळी करी दुजयाची । नाहीं गोविंदाची आठवण ।।३।।
बळें यम दांत खाय तयावरी । जंव भरे दोरी आयुष्याची ।।४।।
तुका म्हणे तुला सोडवील कोण । नाहीं नारायण आठविला ।।५।।

२८८७
संत गाती हरिकीर्त्तनीं । त्यांचें घेइन पायवणी ।।१।।
हें चि तप तीर्थ माझें । आणीक मी नेणें दुजें ।।धृ।।
काया कुरवंडी करीन । संत महंत ओंवाळीन ।।२।।
संत महंत माझी पूजा । अनुभाव नाहीं दुजा ।।३।।
तुका म्हणे नेणें कांहीं । अवघें आहे संतापायीं ।।४।।

२८८८
जालें भांडवल । अवघा पिकला विठ्ठल ।।१।।
आतां वाणी काशासाटीं । धीर धरावा च पोटीं ।।धृ।।
आपुल्या संकोचें । म्हणऊनि तेथें टांचे ।।२।।
घेतों खऱ्या मापें । तुका देखोनियां सोपें ।।३।।

२८८९
शुद्ध ऐसें ब्रम्हज्ञान । करा मन सादर ।।१।।
रवि रसां सकळां शोषी । गुणदोषीं न लिंपे ।।धृ।।
कोणासवें नाहीं चोरी । सकळांवरी समत्व ।।२।।
सत्य तरी ऐसें आहे । तुका पाहे उपदेशीं।।३।।

२८९०
अग्नि हा पाचारी कोणासी साक्षेपें । हिंवें तो चि तापे जाणोनियां ।।१।।
उदक म्हणे काय या हो मज प्यावें । तृषित तो धांवे सेवावया ।।धृ।।
काय वस्त्र म्हणे यावो मज नेसा । आपुले स्वइच्छा जग वोढी ।।२।।
तुक्यास्वामी म्हणे काय मज स्मरा । आपुल्या उद्धारा लागूनियां ।।३।।

२८९१
भक्त देवाघरचा सुना । देव भक्ताचा पोसणा ।।१।।
येर येरां जडलें कैसें । जीवा अंगें जैसें तैसें ।।धृ।।
देव भक्ताची कृपाळु माता । भक्त देवाचा जनिता ।।२।।
तुका म्हणे अंगें । एक एकाचिया संगें ।।३।।

२८९२
बरवयांबरवंट । विटे चरण सम नीट ।।१।।

ते म्या हृदयीं धरिले । तापशमन पाउलें ।।धृ।।
सकळां तीर्थां अधिष्ठान । करी लक्ष्मुमी संवाहन ।।२।।
तुका म्हणे अंतीं । ठाव मागितला संतीं।।३।।

२८९३
मासं चर्म हाडें । देवा अवघीं च गोडें ।।१।।
जे जे हरिरंगीं रंगले । कांहीं न वचे वांयां गेले ।।धृ।।
वेद खाय शंखासुर। त्याचें वागवी कलिवर ।।२।।
तुका म्हणे ऐसा । बराडी हा भक्तिरसा।।३।।

२८९४
कोणा चिंता आड । कोणा लोकलाज नाड ।।१।।
कैंचा राम अभागिया । करी कटकट वांयां ।।धृ।।
स्मरणाचा राग । क्रोधें विटाळलें अंग ।।२।।
तुका म्हणे जडा । काय चाले या दगडा।।३।।

२८९५
आपुलिया काजा । आम्हीं सांडियेलें लाजा ।।१।।
तुम्हां असों जागवीत । आपुलें आपुले हित ।।धृ।।
तुम्ही देहशून्य। आम्हां कळे पाप पुण्य ।।२।।
सांगायासी लोकां । उरउरीत उरला तुका ।।३।।

२८९६
मायबापें केवळ काशी । तेणें न वजावें तीर्थासी।।१।।
पुंडलीकें काय केलें । परब्रम्ह उभें ठेलें ।।धृ।।
तैसा होईं सावधान। हृदयीं धरीं नारायण ।।२।।
तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ।।३।।

२८९७
सत्य आम्हां मनीं । नव्हों गाबाळाचे धनी ।।१।।
ऐसें जाणा रे सकळ । भरा शुद्ध टांका मळ ।।धृ।।
देतों तीक्ष्ण उत्तरें । पुढें व्हावयासी बरें ।।२।।
तुका म्हणे बरें घडे । देशोदेशीं चाले कोडें।।३।।

२८९८
 शिकवूनि हित । सोयी लावावे हे नीत ।।१।।
त्याग करूं नये खरें । ऐसें विचारावें बरें ।।धृ।।
तुमचिया तोंडें । धर्माधर्म चि खंडे ।।२।।
मजसाटीं देवा । कां हो लपविला हेवा ।।३।।
जाला सावधान । त्यासी घालावें भोजन ।।४।।
तुका म्हणे पिता । वरी बाळाच्या तो हिता ।।५।।

२८९९
 सुख सुखा भेटे । मग तोडिल्या न तुटे ।।१।।
रविरश्मिकळा । नये घालितां पैं डोळां ।।धृ।।
दुरि तें जवळी । स्नेहें आकाशा कवळी ।।२।।
तुका म्हणे चित्त । माझें पायीं अखंडित।।३।।

२९००
 तुम्हां न पडे वेच । माझा सरेल संकोच ।।१।।
फुकासाटीं जोडे यश । येथें कां करा आळस ।।धृ।।
कृपेचें भुकेलें। होय जीवदान केलें ।।२।।
तुका म्हणे शिकविलें । माझें ऐकावें विठ्ठलें।।३।।

२९०१
 लोक म्हणती मज देव । हा तों अधर्म उपाव ।।१।।
आतां कळेल तें करीं । सीस तुझे हातीं सुरी ।।धृ।।
अधिकार नाहीं। पूजा करिती तैसा कांहीं ।।२।।
मन जाणे पापा । तुका म्हणे मायबापा।।३।।

२९०२
 एका म्हणे भलें । आणिका सहज चि निंदिलें ।।१।।
कांहीं न करितां आयास । सहज घडले ते दोष ।।धृ।।
बरें वाइटाचें। नाहीं मज कांहीं साचें ।।२।।
तुका म्हणे वाणी । खंडोनि राहावें चिंतनीं।।३।।

२९०३
आणिलें सेवटा । आतां कामा नये फांटा ।।१।।
मज आपुलेंसें म्हणा । उपरि या नारायणा ।।धृ।।
वेचियेली वाणी । युक्ती अवघी चरणीं ।।२।।
तुका धरी पाय । क्षमा करवूनि अन्याय।।३।।

२९०४
न करा टांचणी । येथें कांहीं आडचणी ।।१।।
जिव्हा अमुप करी माप । विठ्ठल पिकला माझा बाप ।।२।।
तुका म्हणे सर्वकाळ । अवघा गोविंद गोपाळ ।।३।।

२९०५
तुझ्या नामाची आवडी । आम्ही विठो तुझीं वेडीं।।१।।
आतां न वजों अणिकां ठायां । गाऊं गीत लागों पायां ।।धृ।।
काय वैकुंठ बापुडें । तुझ्या प्रेमासुखापुढें ।।२।।
संतसमागममेळे । प्रेमसुखाचा सुकाळ ।।३।।
तुका म्हणे तुझ्या पायीं । जन्ममरणा ठाव नाहीं ।।४।।

२९०६
साकरेच्या योगें वर्ख । राजा कागदातें देखे ।।१।।
तैसें आम्हां मानुसपण । रामनाम केण्यागुणें ।।धृ।।
फिरंगीच्या योगें करी । राजा काष्ठ हातीं धरी ।।२।।
रत्नकनका योगें लाख । कंठीं धरिती श्रीमंत लोक ।।३।।
देवा देवपाट देव्हाऱ्यावरी बैसे स्पष्ट।।४।।
ब्रम्हानंदयोगें तुका । पढीयंता सज्जन लोकां ।।५।।

२९०७
धनवंतालागीं । सर्वमान्यता आहे जगीं ।।१।।
माता पिता बंधु जन । सर्व मानिती वचन ।।धृ।।
जव मोठा चाले धंदा । तंव बहिण म्हणे दादा ।।२।।
सदा शृंगारभूषणें । कांता लवे बहुमानें।।३।।
तुका म्हणे धन । भाग्य अशाश्वत जाण ।।४।।

२९०८
न विचारितां ठायाठाव । काय भुंके तो गाढव ।।१।।
केला तैसा लाहे दंड । खळ अविचारी लंड ।।धृ।।
करावें लाताळें। ऐसें नेणे कोण्या काळें ।।२।।
न कळे उचित । तुका म्हणे नीत हित।।३।।

२९०९
कंठ नामसिका । आतां कळिकाळासी धका ।।१।।
रोखा माना कीं सिका माना । रोखा सिका तत्समाना ।।धृ।।
रोखा न मना सिका न मना । जतन करा नाककाना ।।२।।
सिका न मनी रावण । त्याचें केलें निसंतान ।।३।।
सिका मानी हळाहळ । जालें सर्वांगीं शीतळ ।।४।।
तुका म्हणे नाम सिका । पटीं बैसलों निजसुखा।।५।।

२९१०
भूतीं देव म्हणोनि भेटतों या जना । नाहीं हे भावना नरनारी ।।१।।
जाणे भाव पांडुरंग अंतरींचा । नलगे द्यावा साचा परिहार ।।धृ।।
दयेसाटीं केला उपाधिपसारा । जड जीवा तारा नाव कथा ।।२।।
तुका म्हणे नाहीं पडत उपवास । फिरतसे आस धरोनियां।।३।।

२९११
हारपल्याची नका चित्तीं । धरूं खंती वांयां च ।।१।।
पावलें तें म्हणा देवा । सहज सेवा या नांवें ।।धृ।।
होणार तें तें भोगें घडे । लाभ जोडे संकल्पें ।।२।।
तुका म्हणे मोकळें मन । अवघें पुण्य या नांवें ।।३।।

२९१२
नेसणें आलें होतें गळ्या । लोक रळ्या करिती।।१।।
आपणियां सावरिलें । जग भलें आपण ।।धृ।।
संबंध तो तुटला येणें । जागेपणें चेष्टाचा ।।२।।
भलती सेवा होती अंगें । बारस वेगें पडिलें ।।३।।
सावरिलें नीट वोजा । दृष्टिलाजा पुढिलांच्या ।।४।।
बरे उघडिले डोळे । हळहळेपासूनि ।।५।।

तुका म्हणे विटंबना । नारायणा चुकली ।।६।।

२९१३
जिव्हा जाणे फिकें मधुर क्षार । येर मास पर हातास न कळे ।।१।।
देखावें नेत्रीं बोलावें मुखें । चित्ता सुखदुःखें कळों येती ।।धृ।।
परिमळासी घ्राण ऐकती श्रवण । एकाचे कारण एका नव्हे ।।२।।
एकदेहीं भिन्न ठेवियेल्या कळा । नाचवी पुतळा सूत्रधारी।।३।।
तुका म्हणे ऐशी जयाची सत्ता । कां तया अनंता विसरलेती ।।४।।

२९१४
न लगे द्यावा जीव सहज चि जाणार । आहे तो विचार जाणा कांहीं ।।१।।
मरण जो मागे गाढवाचा बाळ । बोलिजे चांडाळ शुद्ध त्यासी ।।२।।
तुका म्हणे कई होईल स्वहित । निधान जो थीत टाकुं पाहे ।।३।।

२९१५
मोल वेचूनियां धुंडिती सेवका । आम्ही तरी फुका मागों बळें ।।१।।
नसतां जवळी हित फार करूं । जीव भाव धरूं तुझ्या पायीं ।।धृ।।
नेदूं भोग आम्ही आपुल्या शरीरा । तुम्हांसी दातारा व्हावें म्हूण ।।२।।
कीर्ती तुझी करूं आमुचे सायास । तूं का रे उदास पांडुरंगा ।।३।।
तुका म्हणे तुज काय मागों आम्ही । फुकाचे कां ना भी म्हणसी ना ।।४।।

२९१६
काय लवण कळिकेविण । एके क्षीण सागरा ।।१।।
मां हे येवढी अडचण । नारायणीं मजविण ।।धृ।।
कुबेरा अटाहासे जोडी । काय कवडी कारणें ।।२।।
तुका म्हणे काचमणि । कोण गणी भांडारी ।।३।।

२९१७
तुज मज नाहीं भेद । केला सहज विनोद ।।१।।
तूं माझा आकार । मी तों तूं च निर्धार ।।धृ।।
मी तुजमाजी देवा । घेसी माझ्या अंगें सेवा ।।२।।
मी तुजमाजी अचळ । मजमाजी तुझें बळ।।३।।
तूं बोलसी माझ्या मुखें । मी तों तुजमाजी सुखें ।।४।।

तुका म्हणे देवा । विपरीत ठायीं नांवा ।।५।।

२९१८
 वैराग्याचें भाग्य । संतसंग हा चि लाग ।।१।।
संतकृपेचे हे दीप । करी साधका निष्पाप ।।धृ।।
तो चि देवभक्त । भेदाभेद नाहीं ज्यांत ।।२।।
तुका प्रेमें नाचे गाये । गाणियांत विरोन जाये ।।३।।

२९१९
 जप तप ध्यान न लगे धारणा । विठ्ठलकीर्त्तनामाजी सर्व ।।१।।
राहें माझ्या मना दृढ या वचनीं । आणिक तें मनीं न धरावें ।।धृ।।
कीर्तनसमाधि साधन ते मुद्रा । राहतील थारा धरोनियां।।२।।
तुका म्हणे मुक्ति हरिदासांच्या घरीं । वोळगती चारी ऋद्धिसिद्धि ।।३।।

२९२०
 नाहीं तुज कांहीं मागत संपत्ती । आठवण चित्तीं असों द्यावी ।।१।।
सरलिया भोग येईन सेवटीं । पायापें या भेटी अनुसंधानें ।।धृ।।
आतां मजसाटीं याल आकारास । रोकडी हे आस नाहीं देवा ।।२।।
तुका म्हणे मुखीं असो तुझें नाम । देईल तो श्रम देवो काळ ।।३।।

२९२१
 हितावरी यावें । कोणी बोलिलों या भावें ।।१।।
नव्हे विनोदउत्तर । केले रंजवाया चार ।।धृ।।
केली अटाअटी । अक्षरांची देवासाटीं ।।२।।
तुका म्हणे खिजों । नका जागा येथें निजों ।।३।।

२९२२
 संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघा जाला नारायण।।१।।
नाहीं आम्हांसी संबंधु । जरा मरण कांहीं बाधु ।।धृ।।
द्वैताद्वैतभावें। अवघें व्यापियेलें देवें ।।२।।
तुका म्हणे हरि । आम्हांमाजी क्रीडा करी ।।३।।

२९२३

नेणे करूं सेवा । पांडुरंगा कृपाळुवा ।।१।।
धांवें बुडतों मी काढीं । सत्ता आपुलिया ओढीं ।।धृ।।
क्रियाकर्महीन । जालों इंद्रियां अधीन ।।२।।
तुका विनंती करी । वेळोवेळां पाय धरी।।३।।

२९२४
जयापासोनि सकळ । महीमंडळ जालें ।।१।।
तो एक पंढरीचा राणा । नये श्रुती अनुमाना ।।धृ।।
विवादती जयासाठीं। जगजेटी तो विठ्ठल ।।२।।
तुका म्हणे तो आकळ । आहे सकळव्यापक।।३।।

२९२५
नाहीं रूप नाहीं नांव । नाहीं ठाव धराया ।।१।।
जेथें जावें तेथें आहे । विठ्ठल मायबहीण ।।धृ।।
नाहीं आकार विकार । चराचर भरलेंसे ।।२।।
नव्हे निर्गुण सगुण । जाणे कोण तयासी।।३।।
तुका म्हणे भावाविण । त्याचें मन वोळेना ।।४।।

२९२६
आहे सकळां वेगळा । खेळे कळा चोरोनि ।।१।।
खांबसुत्राचिये परी । देव दोरी हालवितो ।।धृ।।
आपण राहोनि निराळा । कैसी कळा नाचवी ।।२।।
जेव्हां असुडितो दोरी । भूमीवरी पडे तेव्हां ।।३।।
तुका म्हणे तो जाणावा । सखा करावा आपुला ।।४।।

२९२७
आतां पुढें मना । चाली जाली नारायणा ।।१।।
येथें राहिलें राहिलें । कैसें गुंतोनि उगलें ।।धृ।।
भोवतें भोंवनी । आलियांची जाली धणी ।।२।।
तुका म्हणे रंग रंग । रंगलें पांडुरंगे ।।३।।

२९२८
आळस पाडी विषयकामीं । शक्ती देईं तुझ्या नामीं।।१।।

हे चि विनवणी विनवणी । विनविली धरा मनीं ।।धृ।।
आणिक वचना मुकी वाणी । तुमच्या गर्जों द्यावी गुणीं ।।२।।
तुका म्हणे पाय डोळां । पाहें एरवी अंधळा ।।३।।

२९२९
कोण वेची वाणी । आतां क्षुल्लका कारणीं ।।१।।
आतां हें चि काम करूं । विठ्ठल हृदयांत धरूं ।।धृ।।
नेंदाविया वृत्ति। आतां उठों चि बहुती ।।२।।
उपदेश लोकां । करूनी वेडा होतो तुका ।।३।।

२९३०
मागेन तें एक तुज । देईं विचारोनि मज ।।१।।
नको दुर्जनांचा संग । क्षणक्षणा चित्तभंग ।।धृ।।
जन्म घेईन मी नाना । बहु सोसीन यातना ।।२।।
रंक होईन दीनांचा । घायें देहपात साचा।।३।।
तुका म्हणे हें चि आतां । देईं देईं तूं सर्वथा ।।४।।

२९३१
जाणसी उचित । पांडुरंगा धर्मनीत ।।१।।
तरि म्यां बोलावें तें काई । सरे ऐसें तुझे पायीं ।।धृ।।
पालटती क्षणें । संचितप्रारब्धक्रियमाण ।।२।।
तुका म्हणे सत्ता । होसी सकळ करिता।।३।।

२९३२
तुम्ही कांटाळलां तरी । आम्हां न सोडणें हरी ।।१।।
जावें कवणिया ठाया । सांगा विनवितों पायां ।।धृ।।
केली जिवा साटी । आतां सुखें लागा पाठी ।।२।।
तुका म्हणे ठाव । न सोडणें हा चि भाव ।।३।।

२९३३
येउनि संसारीं । मी तों एक जाणें हरी ।।१।।
नेणें आणिक कांहीं धंदा । नित्य ध्यातसें गोविंदा ।।धृ।।
कामक्रोधलोभस्वार्थ। अवघा माझा पंढरिनाथ ।।२।।

तुका म्हणे एक । धणी विठ्ठल मी सेवक ।।३।।

२९३४
सर्वपक्षीं हरि साहेसखा जाला । ओल्या अंगणीच्या कल्पलता त्याला ।।१।।
सहजचाली चालतां पायवाटे । चिंतामणींसमान होती गोटे ।।२।।
तुका तरी सहज बोले वाणी । त्याचे घरीं वेदांत वाहे पाणी ।।३।।

२९३५
काय पुण्य ऐसें आहे मजपाशीं । तांतडी धांवसी पांडुरंगा ।।१।।
काय ऐसा भक्त वांयां गेलों थोर । तूं मज समोर होसी वेगा ।।धृ।।
काय कष्ट माझे देखिली चाकरी । तो तूं झडकरी पाचारिशी ।।२।।
कोण मी नांवाचा थोर गेलों मोटा । अपराधी करंटा नारायणा ।।३।।
तुका म्हणे नाहीं ठाउकें संचित । येणें जन्महित नाहीं केलें ।।४।।

२९३६
आमुचिया भावें तुज देवपण । तें कां विसरोन राहिलासी ।।१।।
समर्थासी नाहीं उपकारस्मरण । दिल्या आठवण वांचोनियां ।।धृ।।
चळण वळण सेवकाच्या बळें । निर्गुणाच्यामुळें सांभाळावें ।।२।।
तुका म्हणे आतां आलों खंडावरी । प्रेम देउनि हरी बुझवावें ।।३।।

२९३७
आम्ही मेलों तेव्हां देह दिला देवा । आतां करूं सेवा कोणाची ।।१।।
सूत्रधारी जैसा हालवितो कळा । तैसा तो पुतळा नाचे छंदें ।।धृ।।
बोलतसें जैसें बोलवितो देव । मज हा संदेह कासयाचा ।।२।।
पाप पुण्य ज्याचें तो चि जाणें कांहीं । संबंध हा नाहीं आम्हांसवें ।।३।।
तुका म्हणे तुम्ही आइका हो मात । आम्ही या अतीत देहाहूनी ।।४।।

२९३८
लागों नेदीं बोल पायां तुझ्या हरी । जीव जावो परि न करीं आण ।।१।।
परनारी मज रखुमाईसमान । वमनाहूनि धन नीच मानीं ।।२।।
तुका म्हणे याची लाज असे कोणा । सहाकारी दीना ज्याची तया ।।३।।

२९३९

हे चि भेटी साच रूपाचा आठव । विसावला जीव आवडीपें ।।१।।
सुखाचें भातुकें करावें जतन । सेविल्या ताहान भूक जाय ।।धृ।।
दुरील जवळी आपण चि होतें । कवळिलें चित्तें जिवापासीं ।।२।।
तुका म्हणे नाम घेतों वेळोवेळां । होतील सकळा शीतळा नाडी ।।३।।

२९४०
आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा भगवंत वाचा त्याची ।।१।।
साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ।।धृ।।
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ।।२।।
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । चालवी पांगळा पायांविण ।।३।।

२९४१
हित सांगे तेणें दिलें जीवदान । घातकी तो जाण मनामागें ।।१।।
बळें हे वारावे अधर्म करितां । अंधळें चालतां आडरानें ।।धृ।।
द्रव्य देऊनियां धाडावें तीर्थासी । नेदावें चोरासी चंद्रबळ ।।२।।
तुका म्हणे ऐसें आहे हें पुराणीं । नाहीं माझी वाणी पदरींची ।।३।।

२९४२
ऐसा घेईं कां रे संन्यास । करीं संकल्पाचा नास।।१।।
मग तूं राहें भलते ठायीं । जनीं वनीं खाटे भोई ।।धृ।।
तोडीं जाणिवेची कळा । होईं वृत्तीसी वेगळा ।।२।।
तुका म्हणणे नभा । होईं आणुचा ही गाभा ।।३।।

२९४३
सोळा सहस्र होऊं येतें । भरलें रितें आम्हापें ।।१।।
ऐसे तुम्हां ठायाठाव । देव म्हूण संपादे ।।धृ।।
कैची चिरामध्यें चिरे। मना बरें आलें तें ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगा । अंगलगा भिन्न करा।।३।।

२९४४
इहलोकीं आम्हां भूषण अवकळा । भोपळा वाकळा आणि भिक्षा ।।१।।
निमोली संपदा भयविरहित । सर्वकाळ चित्त समाधान ।।धृ।।
छिद्राचा आश्रम उंदीरकुळवाडी । धन नाम जोडी देवाचें तें ।।२।।

तुका म्हणे एक सेवटीं राहाणें । वर्ततों या जना विरहित ।।३।।

२९४५
आम्ही भाग्याचे भाग्याचे । आम्हां तांबे भोपळ्याचे।।१।।
लोकां घरीं गाई म्हैसी । आम्हां घरीं उंदीरघुसी ।।धृ।।
लोकां घरीं हत्ती घोडे । आम्हां आधोडीचे जोडे ।।२।।
तुका म्हणे आम्ही सुडके। आम्हां देखोन काळ धाके ।।३।।

२९४६
गाऊं नेणें कळा कुसरी । कान धरोनि म्हणें हरी।।१।।
माझ्या बोबडिया बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ।।धृ।।
मज हंसतील लोक । परि मी गाईन निःशंक ।।२।।
तुझे नामीं मी निर्लज्ज । काय जनासवें काज ।।३।।
तुका म्हणे माझी विनंती । तुम्ही परिसा कमळापती ।।४।।

२९४७
विष पोटीं सर्पा । जन भीतें तया दर्पा ।।१।।
पंच भूतें नाहीं भिन्न । गुण दुःख देती शीण ।।धृ।।
चंदन प्रिय वासें । आवडे तें जातीऐसें ।।२।।
तुका म्हणे दाणा । कुचर मिळों नये अन्ना।।३।।

२९४८
देव अवघें प्रतिपादी । वंदी सकळां एक निंदी ।।१।।
तेथें अवघें गेलें वांयां । विष घास एके ठायां ।।धृ।।
सर्वांग कुरवाळी । उपटी एकच रोमावळी ।।२।।
तुका म्हणे चित्त । नाहीं जयाचें अंकित ।।३।।

२९४९
मज माझा उपदेश । आणिकां नये याचा रीस ।।१।।
तुम्ही अवघे पांडुरंग । मी च दुष्ट सकळ चांग ।।धृ।।
तुमचा मी शरणागत । कांहीं करा माझें हित ।।२।।
तुका पाय धरी । मी हें माझें दुर करीं ।।३।।

२९५०
जाणे त्याचें वर्म नेणे त्याचें कर्म । केल्याविण धर्म नेणवती ।।२।।
मैथुनाचें सुख सांगितल्या शून्य । अनुभवाविण कळूं नये ।।२।।
तुका म्हणे जळो शाब्दिक हें ज्ञान । विठोबाची खूण विरळा जाणे ।।३।।

२९५१
अभिमानी पांडुरंग । गोवा काशाचा हो मग ।।१।।
अनुसरा लवलाहीं । नका विचार करूं कांहीं ।।धृ।।
कोठें राहतील पापें । जालिया हो अनुतापें ।।२।।
तुका म्हणे ये चि घडी । उभ्या पाववील थडी ।।३।।

२९५२
तुझें वर्म हातीं । दिलें सांगोनियां संतीं ।।१।।
मुखीं नाम धरीन कंठीं । अवघा सांटवीन पोटीं ।।धृ।।
नवविधा वेढिन आधीं । सांपडलासी भावसंधी ।।२।।
तुका म्हणे बळिये गाढे । कळिकाळ पायां पडे ।।३।।

२९५३
माझ्या मना लागो चाळा । पहावया विठ्ठला डोळां।।१।।
आणीक नाही चाड । न लगे संसार हा गोड ।।धृ।।
तरि च फळ जन्मा आलों । सरता पांडुरंगीं जालों ।।२।।
तुका म्हणे देवा । देईं चरणांची सेवा ।।३।।

२९५४
अवघें जेणें पाप नासे । तें हें असे पंढरीसी ।।१।।
गात जागा गात जागा । प्रेम मागा विठ्ठला ।।धृ।।
अवघी सुखाची च राशी । पुंडलिकाशीं वोळली हे ।।२।।
तुका म्हणे जवळी आलें। उभे ठालें समचरणीं ।।३।।

२९५५
देह तुझ्या पायीं । ठेवूनि जालों उतराई ।।१।।
आतां माझ्या जीवां । करणें तें करीं देवा ।।धृ।।
बहु अपराधी । मतिमंद हीनबुद्धि ।।२।।

तुका म्हणे नेणें । भावभक्तीचीं लक्षणें ।।३।।

२९५६
जन हें सुखाचें दिल्याघेतल्याचें । अंत हें काळींचें नाहीं कोणी ।।१।।
जाल्या हीन शक्ति नाकडोळे गळती । सांडोनि पळती रांडापोरें ।।धृ।।
बाइल म्हणे खर मरता तरी बरें । नासिलें हें घर थुंकोनियां ।।२।।
तुका म्हणे माझीं नव्हतील कोणी । तुज चक्रपाणी वांचूनियां ।।३।।

२९५७
जाणोनि नेणतें करीं माझें मन । तुझी प्रेमखूण देऊनियां ।।१।।
मग मी व्यवहारीं असेन वर्तत । जेवीं जळाआंत पद्मपत्र ।।धृ।।
ऐकोनि नाइकें निंदास्तुति कानीं । जैसा कां उन्मनी योगिराज ।।२।।
देखोनि न देखें प्रपंच हा दृष्टी । स्वप्नींचिया सृष्टि चेविल्या जेवीं ।।२।।
तुका म्हणे ऐसें जालियावांचून । करणें तें तें सीण वाटतसे ।।४।।

२९५८
विठ्ठला विठ्ठला । कंठ आळवितां फुटला ।।१।।
कईं कृपा करिसी नेणें । मज दीनाचें धांवणें ।।धृ।।
जाल्या येरझारा । जन्मां बहुतांचा फेरा ।।२।।
तुका म्हणे नष्टा । अबोलण्या तुझ्या चेष्टा ।।३।।

२९५९
ज्यासी विषयाचें ध्यान । त्यासी कैंचा नारायण।।१।।
साधु कैंचा पापीयासी । काय चांडाळासी काशी ।।धृ।।
काय पतितासी पिता । काय अधमासी गीता ।।२।।
तुका म्हणे निरंजनी। शट कैंचा ब्रम्हज्ञानी ।।३।।

२९६०
वरतें करोनियां तोंड । हाका मारितो प्रचंड ।।१।।
राग आळवितो नाना । गातो काय तें कळेना ।।धृ।।
आशा धरोनि मनीं । कांहीं देईल म्हणऊनि ।।२।।
पोटा एका साटीं । तुका म्हणे जाले कष्टी ।।३।।

२९६१
प्रपंच वोसरो । चित्त तुझे पायीं मुरो ।।१।।
ऐसें करिं गा पांडुरंगा । शुद्ध रंगवावें रंगा ।।धृ।।
पुरे पुरे आतां । नको दुजियाची सत्ता ।।२।।
लटिकें तें फेडा । तुका म्हणे जाय पीडा।।३।।

२९६२
ऐका कलीचें हें फळ । पुढें होइल ब्रम्हगोळ ।।१।।
चारी वर्ण अठरा याती । भोजन करिती एके पंक्ती ।।धृ।।
पूजितीअसुरा रांडा । मद्य प्राशितील पेंढा ।।२।।
वामकवळ मार्जन । जन जाईल अधोपतन ।।३।।
तुका हरिभक्ति करी । शक्ति पाणी वाहे घरीं।।४।।

२९६३
गुरुमार्गामुळें भ्रष्ट सर्वकाळ । म्हणती याती कुळ नाहीं ब्रम्हीं ।।१।।
पवित्राला म्हणती नको हा कंटक । मानिती आत्मिक अनामिका ।।धृ।।
डोहोर होलार दासी बलुती बारा । उपदेशिती फारा रांडापोरा ।।२।।
कांहीं टाण्या टोण्या विप्र शिष्य होती । उघडी फजिती स्वधर्माची ।।३।।
नसता करुनी होम खाती एके ठायीं । म्हणती पाप नाहीं मोक्ष येणें ।।४।।
इंद्रियांचे पेठे भला कौल देती । मर्यादा जकाती माफ केली ।।५।।
नाहीं शास्त्राधार पात्रापात्र नेणे । उपदेशून घेणें द्रव्य कांहीं ।।६।।
तुका म्हणे ऐसे गुरु शिष्य पूर्ण । विठोबाची आण नरका जाती ।।७।।

२९६४
बोलाचे गौरव । नव्हे माझा हा अनुभव ।।१।।
माझी हरिकथा माउली । नव्हे आणिकांसी पांगिली ।।धृ।।
व्याली वाढविलें। निजपदीं निजवलें ।।२।।
दाटली वो रसें । त्रिभुवन ब्रम्हरसें ।।३।।
विष्णु जोडी कर । माथां रज वंदी हर ।।४।।
तुका म्हणे बळ । तोरडीं हा कळिकाळ ।।५।।

२९६५
सेवट तो भला । माझा बहु गोड जाला ।।१।।

आलों निजांच्या माहेरा । भेटों रखुमाईच्या वरा ।।धृ।।
परिहार जाला । अवघ्या दुःखाचा मागिल्या ।।२।।
तुका म्हणे वाणी । गेली आतां घेऊं धणी ।।३।।

२९६६
तुझें नाम गाऊं आतां । तुझ्या रंगीं नाचों था था।।१।।
तुझ्या नामाचा विश्वास । आम्हां कैंचा गर्भवास ।।धृ।।
तुझे नामीं विसर पडे । तरी कोटी हत्या घडे ।।२।।
नाम घ्या रे कोणी फुका। भावें सांगतसे तुका ।।३।।

२९६७
बाइल तरी ऐसी व्हावी । नरकीं गोवी अनिवार।।१।।
घडों नेदी तीर्थयात्रा । केला कुतरा हातसोंका ।।धृ।।
आपुली च करवी सेवा । पुजवी देवासारिखें ।।२।।
तुका म्हणे गाढव पशु । केला नाशु आयुष्या ।।३।।

२९६८
बाइले अधीन होय ज्याचें जिणें । तयाच्या अवलोकनें पडिजे द्वाड ।।१।।
कासया ते जंत जिताती संसारीं । माकडाच्या परी गारोड्यांच्या ।।धृ।।
वाइलेच्या मना येईल तें खरें । अभागी तें पुरें बाइलेचें ।।२।।
तुका म्हणे मेंग्या गाढवाचें जिणें । कुतऱ्याचें खाणें लगबगा ।।३।।

२९६९
जगीं मान्य केलें हा तुझा देकार । कीं कांहीं विचार आहे पुढें ।।१।।
करितों कवित्व जोडितों अक्षरें । येणें काय पुरें जालें माझें ।।धृ।।
तोंवरि हे माझी न सरे करकर । जो नव्हे विचार तुझ्या मुखें ।।२।।
तुका म्हणे तुज पुंडलिकाची आण । जरी कांहीं वचन करिसी मज ।।३।।

२९७०
कोंडिला गे माज । निरोधुनी द्वार । राखण तें बरें । येथें करा कारण ।।१।।
हा गे हा गे हरि । करितां सांपडला चोरी । घाला गांठी धरी । जीवें माय त्रासाया ।।धृ।।

तें चि पुढें आड । तिचा लोभ तिला नाड । लावुनी चरफड । हात गोउनी पळावें।।२।।
संशयाचें बिऱ्हडें । याचे निरसले भेटी । घेतली ते तुटी । आतां घेतां फावेल ।।३।।
तुका येतो काकुलती । वाउगिया सोड । यासी चि निवाड । आम्ही भार वाहिका ।।४।।

२९७१
झड मारोनियां बैसलों पंगती । उठवितां फजिती दातयाची ।।१।।
काय तें उचित तुम्हां कां न कळे । कां हो झांका डोळे पांडुरंगा ।।धृ।।
घेईन इच्छेचें मागोनि सकळ । नाहीं नव्हे काळ बोलायाचा ।।२।।
तुका म्हणे जालों माना अधिकारी । नाहीं लोक परी लाज देवा ।।३।।

२९७२
नाम न वदे ज्याची वाचा । तो लेंक दो बापांचा।।१।।
हे चि ओळख तयाची । खूण जाणा अभक्ताची ।।धृ।।
ज्याची विठ्ठल नाहीं ठावा । त्याचा संग न करावा ।।२।।
नाम न म्हणे ज्याचें तोंड । तें चि चर्मकाचें कुंड ।।३।।
तुका म्हणे त्याचे दिवशीं। रांड गेली महारापाशीं ।।४।।

२९७३
पतित मी पापी शरण आलों तुज । राखें माझी लाज पांडुरंगा ।।१।।
तारियेले भक्त न कळे तुझा अंत । थोर मी पतित पांडुरंगा ।।धृ।।
द्रौपदी बहिणी वैरीं गांजियेली । आपणाऐसी केली पांडुरंगा ।।२।।
प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार । माझा कां विसर पांडुरंगा ।।३।।
सुदामा ब्राम्हण दारिद्रें पीडिला । आपणाऐसा केला पांडुरंगा ।।४।।
तुका म्हणे तुज शरण निजभावें । पाप निर्दाळावें पांडुरंगा ।।५।।

२९७४
कस्तूरीचें रूप अति हीनवर । माजी असे सार मोल तया ।।१।।
आणीक ही तैसीं चंदनाचीं झाडें । परिमळें वाढे मोल तयां ।।धृ।।

काय रूपें असे परीस चांगला । धातु केली मोला वाढ तेणें ।।२।।
फिरंगी आटितां नये बारा रुके । गुणें मोलें विकें सहस्त्रवरी ।। ।३।।
तुका म्हणे नाहीं जातीसवें काम । ज्याचे मुखीं नाम तो चि धन्य ।।४।।

२९७५
नव्हें मी स्वतंत्र अंगाचा पाईक । जे हे सकळिक सत्ता वारूं ।।१।।
तुम्हां आळवावें पाउला पाउलीं । कृपेची साउली करीं मज ।।धृ।।
शक्तिहीन तरी जालों शरणागत । आपुला वृत्तांत जाणोनियां ।।२।।
तुका म्हणे भवाभेणें धरिलें पाय । आणीक उपाय नेणें कांहीं ।।३।।

२९७६
पाहों ग्रंथ तरी आयुष्य नाहीं हातीं । नाहीं ऐशी मति अर्थ कळे ।।१।।
होईल तें हो या विठोबाच्या नांवें । आचरलें भावें जीवीं धरूं ।।धृ।।
एखादा अंगासी येईल प्रकार । विचारितां फार युक्ति वाढे ।।२।।
तुका म्हणे आळी करितां गोमटी । मायबापा पोटीं येते दया ।।३।।

२९७७
पाहातां रूप डोळां भरें । अंतर नुरे वेगळें । इच्छावशें खेळ मांडी । अवघें सांडी बाहेरी ।।१।।
तो हा नंदानंदन बाइये । यासी काय परिचार वो ।।धृ।।
दिसतो हा नव्हे तैसा । असे दिशाव्यापक । लाघव हा खोळेसाटीं । होतां भेटी परतेना ।।२।।
म्हणोनि उभी ठालीये । परतलीये या वाटा । आड करोनियां तुका। जो या लोकां दाखवितो ।।३।।

२९७८
दुःखें दुभागलें ह्णदयसंपुष्ट । गहिंवरें कंठ दाटताहे।।१।।
ऐसें काय केलें सुमित्रा सखया । दिलें टाकोनियां वनामाजी ।।धृ।।
आक्रंदती बाळें करुणावचनीं । त्या शोकें मेदिनी फुटों पाहे ।।२।।
काय हे सामर्थ्य नव्हतें तुजपाशीं । संगें न्यावयासी अंगभूतां ।।३।।
तुज ठावें आम्हां कोणी नाहीं सखा । उभयलोकीं तुका तुजविण।।४।।
कान्हा म्हणे तुझ्या वियोगें पोरटीं । जालों दे रे भेटी बंधुराया ।।५।।

२९७९
सख्यत्वासी गेलों करीत सलगी । नेणें चि अभागी महिमा तुझा ।।१।।
पावलों आपुलें केलें लाहें रास । निर्दैवां परिस काय होय ।।धृ।।
कष्टविलासी म्यां चांडाळें संसारीं । अद्यापिवरि तरि उपदेशीं ।।२।।
उचित अनुचित सांभाळिलें नाहीं । कान्हा म्हणे कांहीं बोलों आतां ।।३।।

२९८०
असो आतां कांहीं करोनियां ग्लांती । कोणा काकुलती येइल येथें ।।१।।
करूं कांहीं दिस राहे तों सायास । झोंबों त्या लागास भावाचिये ।।धृ।।
करितां रोदना बापुडें म्हणती । परि नये अंतीं कामा कोणी ।।२।।
तुकयाबंधु म्हणे पडिलिया वनीं । विचार तो मनीं बोलिला हे ।।३।।

२९८१
चरफडें चरफड शोकें शोक होये । कार्यमूळ आहे धीरापाशीं ।।१।।
कल्पतसे मज ऐसें हें पाहातां । करावी ते चिंता मिथ्या खोटी ।।धृ।।
न चुके होणार सांडिल्या शूरत्वा । फुकट चि सत्त्वा होइल हानी ।।२।।
तुकयाबंधु म्हणे दिल्या बंद मना । वांचूनि निधाना न पवीजे ।।३।।

२९८२
न लगे चिंता आतां अन्मोन हाता । आलें मूळ भ्राता गेला त्याचें ।।१।।
घरभेद्या येथें आहे तें सुकानु । धरितों कवळून पाय दोन्ही ।।धृ।।
त्याचें त्याचिया मुखें पडिलें ठावें । न लगे सारावें मागें पुढें ।।२।।
तुकयाबंधु म्हणे करील भेटी भावा । सोडीन तेधवां या विठ्ठला ।।३।।

२९८३
मूळस्थळ ज्याचें गोमतीचे तीरीं । तो हा सारी दोरी खेळवितो ।।१।।
ऐसें हे कळलें असावें सकळां । चोर त्या वेगळा नाहीं दुजा ।।धृ।।
वैष्णव हे रे तयाचे पाळती । खूण हे निरुती सांगितली ।।२।।
तुकयाबंधु म्हणे आलें अनुभवास । तेणें च आम्हांस नागविलें ।।३।।

२९८४
बरा रे निर्गुणा नष्ट नारायणा । घरबुडवणा भेटलासी ।।१।।

एके घरीं कोणी कोणासी न धरी । ऐसी अपरांपरी केली आम्हां ।।२।।
कान्हा म्हणे कां रे निःकाम देखिलें । म्हणोनि मना आलें करितोसी ।।३।।

२९८५
धिंदधिंद तुझ्या करीन धिंदड्या । ऐसें काय वेड्या जाणितलें ।।१।।
केली तरी बरें मज भेटी भावास । नाहीं तरि नास आरंभिला ।।धृ।।
मरावें मारावें या आलें प्रसंगा । बरें पांडुरंगा कळलेंसावें ।।२।।
तुकयाबंधु म्हणे तुझी माझी उरी । उडाली न धरीं भीड कांहीं ।।३।।

२९८६
भुक्ति मुक्ति तुझें जळों ब्रम्हज्ञान । दे माझ्या आणोनी भावा वेगीं ।।१।।
रिद्धी सिद्धी मोक्ष ठेवीं गुंडाळून । दे माझ्या आणून भावा वेगीं ।।धृ।।
नको आपुलिया नेऊं वैकुंठासी । दे माझ्या भावासी आणुन वेगीं ।।२।।
नको होऊं कांहीं होसील प्रसन्न। दे माझ्या आणून भावा वेगीं ।।३।।
तुकयाबंधु म्हणे पाहा हो नाहींतरी । हत्या होईल शिरीं पांडुरंगा ।।४।।

२९८७
मुख्य आहे आम्हां मातेचा पटंगा । तुज पांडुरंगा कोण लेखी ।।१।।
नको लावूं आम्हां सवें तूं तोंवरी । पाहा दूरवरी विचारूनी ।।धृ।।
साहे संतजन केले महाराज । न घडे आतां तुज भेईन मी ।।२।।
तुकयाबंधु म्हणे अहिक्यें ऐक्यता । वाढतें अनंता दुःखें दुःख ।।३।।

२९८८
नये सोमसरी उपचाराची हरी । करकरेचें करीं काळें तोंड ।।१।।
मागतों इतुकें जोडुनियां कर । ठेउनियां शीर पायांवरी।।धृ।।
तुम्हां आम्हां एके ठायीं सहवास । येथें द्वैत द्वेष काय बरा ।।२।।
तुकयाबंधु म्हणे बहुतां बहुतां रीती । अनंता विनंती परिसावी हे।।३।।

२९८९
लालुचाईसाटीं बळकाविसी भावा । परी मी जाण देवा जिरों नेदीं ।।१।।
असों द्या निश्र्चय हा मनीं मानसीं । घातली येविशीं दृढ कास ।।धृ।।
मज आहे बळ आळीचें सबळ । फोडीन अंत्राळ हृदय तुझें ।।२।।
करुणारसें तुकयाबंधु म्हणे भुलवीन । काढूनि घेईन निज वस्तु ।।३।।

२९९०
तुझीं वर्मे आम्हां ठावीं नारायणा । परी तूं शाहाणा होत नाहीं ।।१।।
मग कालाबुली हाका देते वेळे । होतोसि परी डोळे नुघडिसी ।।धृ।।
जाणोनि अज्ञान करावें मोहरें । खोटी खोडी हे रे तुझी देवा ।।२।।
तुकयाबंधु म्हणे कारण प्रचीति । पाहातों वेळ किती तेच गुण ।।३।।

२९९१
अवघीं तुज बाळें सारिखीं नाहीं तें । नवल वाटतें पांडुरंगा ।।१।।
म्हणतां लाज नाहीं सकळांची माउली । जवळी धरिलीं एकें दुरी ।।धृ।।
एकां सुख द्यावें घेऊनि वोसंगा । एक दारीं गळा श्रमविती ।।२।।
एकां नवनीत पाजावें दाटून । एकें अन्न अन्नें करितील ।।३।।
एकें वाटतील न वजावीं दुरी । एकांचा मत्सर जवळी येतां ।।४।।
तुकयाबंधु म्हणे नावडतीं त्यांस । कासया व्यालास नारायणा ।।५।।

२९९२
निनांवा हें तुला । नांव साजे रे विठ्ठला ।
बरा शिरविला । फाटक्यामध्यें पाव ।।१।।
कांहीं तरी विचारिलें । पाप पुण्य ऐसें केलें ।
भुरळें घातलें । एकाएकीं भावासी ।।धृ।।
मुद्राधारणें माळ माळा टिळे । बोल रसाळ कोंवळे ।
हातीं फांशाचे गुंडाळे । कोण चाळे गृहस्था हे ।।२ ।।
तुकयाबंधु म्हणे मिस्किन । करितोसी देखोन ।
पाहा दुरिवरी विच्छिन्न । केला परी संसार ।।३।।

२९९३
नाहीं घटिका म्हणसी । लाग लागला तुजपाशीं ।
पडिला हृषीकेशी । जाब सकळ करणें ।।१।।
माझें नेलें पांघरुण । ठावें असोन दुर्बळ दीन ।
माणसांमधून । उठविलें खाणोऱ्या ।।धृ।।
आम्हीं हें जगऊनि होतों पाणी । संदीं देवदेव करूनि ।
जालासी कोठोनि । पैदा चोरा देहाच्या ।।२।।
तुकयाबंधु म्हणे केलें। उघडें मजचि उमगिलें ।

ऐसें काय गेलें । होतें तुज न पुरतें।।३।।

२९९४
कनवाळ कृपाळ । उदार दयाळ मायाळ । म्हणवितोसी परि केवळ ।
गळेकाटू दिसतोसी ।।१।।
काय केलें होतें आम्हीं । सांग तुझें एकये जन्मीं । जालासी जो स्वामी ।
एवढी सत्ता करावया।।धृ।।
भलेपणाचा पवाडा । बरा दाविला रोकडा । करूनि बंधु वेडा । जोडा माझा
विखंडिला ।।२।।
तुकयाबंधु म्हणे भला । कैसें म्हणताती तुजला । जीव आमुचा नेला । अंत
पाहिला कांहींतरी।।३।।

२९९५
आतां कळों आले गुण । अवघे चि यावरोन । चोखट लक्षण । धरिलें हें
घरघेणें ।।१।।
या नांवें कृपासिंधु । म्हणवितोसी दीनबंधु । मज तरी मैंदु । दिसतोसी
पाहातां ।।धृ।।
अमळ दया नाहीं पोटीं । कठीण तैसाचि कपटी । अंधळ्याची काठी । माझी
गुदरसी च ना ।।२।।
तुकयाबंधु म्हणे पुरता । नाहीं म्हूण बरें अनंता। एरवीं असतां । तुझा घोंट
भरियेला ।।३।।

२९९६
काय सांगों हृषीकेशा । आहे अनुताप आला ऐसा । गिळावासी निमिषा ।
निमिष लागों नेदावें ।।१।।
माझें बुडविलें घर। लेंकरें बाळें दारोदार । लाविलीं काहार । तारातीर
करोनि ।।धृ।।
जीव घ्यावा कीं द्यावा । तुझा आपुला केशवा । इतुकें उरलें आहे। भावाचिया
निमित्यें ।।२।।
तुकयाबंधु म्हणें जग । बरें वाईट म्हणो मग । या कारणें परी लाग । न
संडावा सर्वथा ।।३।।

२९९७

मायबाप निमाल्यावरी । घातलें भावाचे आभारीं । तो ही परि हरी । तुज जाला असमाई ।।१।।
हे कां भक्तिचे उपकार। नांदतें विध्वंसिलें घर । प्रसन्नता वेव्हार । सेवटीं हे जालासी ।।धृ।।
एका जिवावरी । होतों दोनी कुटुंबारी । चाळवूं तो तरीं । तुज येतो निर्लज्जा ।।२।।
तुकयाबंधु म्हणे भला । आणीक काय म्हणावें तुला । वेडा त्यानें केला । तुजसवें संबंधु ।।३।।

२९९८
पूवाअ पूर्वजांची गती । हे चि आईकिली होती । सेवे लावूनि श्रीपती । निश्चिंती केली तयांची ।।१।।
कां रे पाठी लागलासी। ऐसा सांग हृषीकेशी । अद्यापवरी न राहासी । अंत पाहासी किती म्हूण ।।धृ।।
जन्मजन्मांतरीं दावा । आम्हां आपणां केशवा । निमित्य चालवा । काईसयास्तव हें ।।२।।
तुकयाबंधु म्हणे अदेखणा । किती होसी नारायणा । देखों सकवेना । खातयासी न खात्या ।।३।।

२९९९
निसुर संसार करून । होतों पोट भरून । केली विवसी निर्माण । देवपण दाखविलें ।।१।।
ऐसा काढियेला निस । काय म्हूण सहित वंश । आणिलें शेवटास । हाउस तरी न पुरे।।धृ।।
उरलों पालव्या सेवटीं । तें ही न देखवे दृष्टी । दोघांमध्ये तुटी । रोकडीचि पाडीली ।।२।।
तुकयाबंधु म्हणे गोड । बहु जालें अति वाड । म्हणोनी कां बुड । मुळ्यांसहित खावें ।।३।।

३०००
बरा जाणतोसी धर्मनीती । उचित अनुचित श्रीपती। करूं येते राती । ऐसी डोळे झांकूनि ।।१।।

आतां जाब काय कैसा। देसी तो दे जगदीशा । आणिला वोळसा । आपणां भोंवता ।।धृ।।
सेवेचिया सुखास्तव । बळें धरिलें अज्ञानत्व । येइल परि हा भाव। ज्याचा त्यासी कारणा ।।२।।
तुकयाबंधु म्हणे नाहीं । आतां आम्हां बोल कांहीं । जडोनियां पायीं । तुझे त्वां चि घेतलें ।।३।।

३००१
कांहीं विपत्ति अपत्यां । आतां अमुचिया होतां । काय होईल अनंता । पाहा बोलों कासया ।।१।।
बरें अनायासें जालें। सायासेंविण बोले चाले । काबाड चुकलें । केलें कष्टावेगळें ।।धृ।।
बरा सांपडलासी वोजा । वर्मावरी केशीराजा । बोलायासी तुझा । उजुरचि नाहींसा ।।२।।
तुकयाबंधु म्हणे दगा । बरा दिला होता बागा । झडकरी चलागा । चांग दैवें पावलों ।।३।।

३००२
देवा तुजपें माझ्या पूर्वजांचें ॠण । आहे तें कां नेदिसी अझून ।
अवगलासीं झोंडपणें । परी मी जाण जीवें जिरों नेदीं ।।१।।
कळों येईल रोकडें । उभा करिन संतांपुढें ।
तुझें काय एवढें । भय आपुलें मागतां ।।धृ।।
आजिवरी होतों नेणता । तों तुज फावलें रे अनंता ।
कवडीचा तो आतां । पडों नेदीन फेर ।।२।।
ठेविला ये जीवनीं जीव । म्हणे तुकयाचा बंधव ।
माझा गळा तुझा पाव । एके ठायीं बांधेन ।।३।।

३००३
मागें असताशी कळला । उमस घेऊं नसता दिला।
तेणें चि काळें केला । असता अवघा निवाडा ।।१।।
इतका न लगता उशीर । न धरितों भीडभार ।
सिद्धासी वेव्हार । कासयासी लागला ।।धृ।।
असोनियां माल खरा । किती केल्या येरझारा ।
धरणें ही दिवस तेरा । माझ्या भावें घेतलें ।।२।।
अझुन तरी इतक्यावरी । चुकवीं जनाचार हरी ।
तुकयाबंधु म्हणे उरी । नाहीं तरी नुरे कांहीं ।।३।।

३००४
आतां न राहें क्षण एक । तुझा कळला रे लौकिक। नेदीं हालों एक । कांहीं

केल्यावांचूनि ।।१।।
संबंध पडिला कोणाशीं। काय डोळे झांकितोसी । नेईन पांचांपाशीं । दे नाहींतरी वोढूनि।।धृ।।
सुखें नेदीस जाणवलें । नास केल्याविण उगलें । तरि तें ही विचारिलें । आम्ही आहे तुज आधीं ।।२।।
असें च करूनि किती । नागविलीं नाहीं नीती । तुकयाबंधु म्हणे अंतीं । न सोडिसी ते खोडी।।३।।

३००५
तुज ते सवे आहे ठावें । घ्यावें त्याचें बुडवावें । परि ते आम्हांसवें आतां न फावे कांहीं ।।१।।
नव्हों सोडायाचे धणी । कष्टें मेळविलें करोनि । पाहा विचारोनी । आढी धरोनि काम नाहीं।।धृ।।
अवघे राहिले प्रकार । जालों जीवासी उदार । असा हा निर्धार । कळला असावा असेल ।।२।।
आतां निदसुर नसावें । गाठ पडली कुणब्यासवें । तुकयाबंधु म्हणे राखावें । देवा महत्व आपुलें।।३।।

३००६
बहु बोलणें नये कामा । वाउगें तें पुरुषोत्तमा । एकाचि वचनें आम्हां । काय सांगणें तें सांग ।।१।।
देणें आहे कीं भांडाई । करणें आहे सांग भाई । आतां भीड कांहीं । कोणी न धरी सर्वथा ।।धृ।।
मागें गेलें जें होउनी । असो तें धरित नाहीं मनीं । आतां पुढें येथूनि । कैसा काय विचार ।।२।।
सारखी नाहीं अवघी वेळ । हें तों कळतें सकळ । तुकयाबंधु म्हणे खळखळ । करावी ते उरेल ।।३।।

३००७
आतां हें न सुटे न चुके । बोल कां दवडिसी फिके।
जन लोक पारिखें । अवघें केलें म्यां यासाटीं ।।१।।
नये सरतां नव्हे भलें । तुझें लक्षण कळलें ।
बैसलासी काढिलें । देहाचें मुळीं दिवाळें ।।धृ।।

दिसतोसी बरा बोल कोंवळे । गुण मैंदाचे चाळे ।
दिसताती ये वेळे । काय करूं विसंबोनि ।।२।।
तुकयाबंधु म्हणे देखतां । अंध बहिर ऐकतां ।
कैसें व्हावें आतां । इतकियाउपरी।।३।।

३००८
तिहीं ताळीं हेचि हाक । म्हणती पांढरा स्फटिक ।
अवघा बुडविला लौकिक । सुखें चि भीके लाविलीं ।।१।।
थोंटा नांव शिरोमणी । नाहीं जोडा त्रिभुवनीं ।
म्हणोनि शाहाणे ते कोणी। तुझे दारीं बैसतिना ।।धृ।।
निर्गुण निलाजिरा निनांवा । लंड झोंड कुडा देवा ।
नागवणा या नांवा । वांचूनि दुजा नाइकों ।।२।।
सर्वगुणें संपन्न । कळों आलासी संपूर्ण ।
तुकयाबंधु म्हणे चरण । आतां जीवें न सोडीं ।।३।।

३००९
तो चि प्रसंग आला सहज । गुज धरितां नव्हे काज। न संडितां लाज । पुढें वोज न दिसे ।।१।।
तूं तर न होसी शाहाणा। नये सांगतों तें ही मना । आपण आपणा । आतां प्रयत्न देखावा ।।धृ।।
न पुरवी पाहातां वाट । द्यावें प्रमाण चोखट । कास घालूनियां नीट । चौघाचार करावा ।।२।।
आतां श्रमाचें कारण । नव्हे व्हावें उदासीन । न पडे तयाविण । गांठी तुकयाबंधु म्हणे।।३।।

३०१०
हळूहळू जाड । होत चालिलें लिगाड । जाणवेल निवाड । न करिसी परी पुढें ।।१।।
मी तों सांगून उतराई । जालों आतां तुज काई । कळों येईल भाई । तैसा करीं विचार ।।धृ।।
मागें युगें अठ्ठाविस । जालीं दिवसाचा दिवस । मुदल व्याज कासावीस। होसी देवा ये कामें ।।२।।
तुकयाबंधु म्हणे राखें । आतां टाकीं तुझीं तीं सुखें । जगजाहिर ठाउकें ।

जालें नाहीं खंडलेंसें ।।३।।

३०११
पत्र उचटिलें प्रेत्नें । ग्वाही कराया कारणें । नाहींतरी पुण्यें । तुझ्या काय उणें आम्हां ।।१।।
नांव तुझें चि करोनि । आहों सुखें पोट भरोनि । केली जाणवणी । म्हणउनि नाहीं म्हणसील।।धृ।।
आतां इतकियाउपरी । दे नको भलतें करीं । म्हणती ॠणकरी । आमुचा इतकें उदंड ।।२।।
तुकयाबंधु जागा । अळवावया पांडुरंगा। केला कांहीं मागायाची नव्हती गरज ।।३।।

३०१२
माझ्या भावें केली जोडी । न सरेसी कल्पकोडी । आणियेलें धाडी । घालुनि अवघें वैकुंठ ।।१।।
आतां न लगे यावें जावें । कोठें कांहीं च करावें । जन्मोजन्मीं खावें । सुखें बैसोनसें जालें ।।धृ।।
असंख्य संख्या नाहीं पार । आनंदें दाटलें अंबर । न माये अपार । त्रिभुवनीं सांटवितां ।।२।।
अवघें भरलें सदोदित । जाले सुखाचे पर्वत । तुकयाबंधु म्हणे परमार्थ । धन अद्‌भुत सांपडलें ।।३।।
३०१३
आतां चुकलें देशावर । करणें अकरणें सर्वत्र । घरासी आगर । आला सकळसिद्धींचा ।।१।।
जालों निधाई निधानें। लागलें अनंतगुणरत्न । जन्माचें विच्छिन्न । दुःख जालें दारिद्र।।धृ।।
तारूं सागरिंचें अवचितें । हेंदोवलें आलें येथें । ओढिलें संचितें । पूर्वदत्तें लाधलें ।।२।।
तुकयाबंधु म्हणे सीमा । नाहीं आमुचिया दैवा। आतां पुरुषोत्तमा । ऐसा सवदागर सांपडला ।।३।।

३०१४
सांपडलें जुनें । आमुच्या वडिलांचें ठेवणें । केली नारायणें । कृपा पुण्यें

पूवाअचिया ।।१।।
सुखें आनंदरूप आतां । आम्ही आहों याकरितां । निवारली चिंता । देणें घेणें चुकलें ।।धृ।।
जालें भांडवल घरिंचें । अमुप नाम विठ्ठलाचें । सुकृत भावाचें । हें तयानें दाविलें ।।२।।
तुकयाबंधु म्हणे फिटला । पांग नाहीं बोलायाला। चाड दुसरी विठ्ठला । वांचूनियां आणीक ।।३।।
।।३७।।

३०१५
काम क्रोध अहंकार नको देहीं । आशा तृष्णा माया लज्जा चिंता कांहीं ।
वास पंढरीचा जन्म सदा देईं । आणीक दुजें मागणें तुज नाहीं ।।१।।
कृपा देईं दान हरि मज कृपा देईं दान । नासीं त्रिमिर दाखवीं चरण ।
आर्त पुरवावें भेटी देऊन । नको उपेक्षूं आलिया शरण ।।धृ।।
नाम अखंड ह्रदयीं राहो वाणी । न पडो विसर क्षण ज्यागृतिं स्वप्नीं ।
संतसमागम ऐसा दे लावुनि । आणीक दुजें कांहीं नेणें तुजवांचूनि ।।२।।
पंथपुरिंचा रविसुत पुरे आतां । आड करावा भवसिंधु ऐसा नव्हता ।
नाहीं आडताळा त्रैलाक्यामाजी सरता । विनवी तुकयाबंधु चरणीं ठेवूनि माथा ।।३।।

३०१६
तटाचे जातीला नाहीं भीड भार । लाता मारी थोर लाहान नेणे ।।१।।
परी तो त्या विशेष मानुष होऊन । करी खंड मान वडिलांचा ।।धृ।।
बेरसा गाढव माया ना बहीण । भुंके चवीविण भलतें चि ।।२।।
तुकयाबंधु म्हणे बोकड मातलें । न विचारी आपुले तोंडीं मुते ।।३।।

३०१७
मायझवा खर गाढवाचें बीज । तें ऐसें सहज कळों येतें ।।१।।
आपमानिलें जेणें श्रेष्ठाचें वचन । ते चि त्याची खुण ओळखावी ।।धृ।।
मद्यपीर पुरा अधम यातीचा । तया उपदेशाचा राग वांयां ।।२।।
तुकयाबंधु म्हणे पिसाळलें सुनें । आप पर तेणें न विचारावें ।।३।।

३०१८

मत्स्यकूर्मशेषा कोणाचा आधार । पृथिवीचा भार वाहावया ।।१।।
काय धाक आम्हां कासयाची चिंता । ऐसा तो असतां साहाकारी ।।धृ।।
शंखचक्रगदा आयुधें अपार । वागवितो भार भक्तांसाटीं ।।२।।
पांडवां जोहरी राखिलें कुसरी । तो हा बंधुचा कैवारी तुकयाच्या ।।३।।

३०१९
राम म्हणतां कामक्रोधांचें दहन । होय अभिमान देशधडी ।।१।।
राम म्हणतां कर्म तुटेल भवबंधन । नये श्रम सीण स्वप्नास ही ।।धृ।।
राम म्हणे जन्म नाहीं गर्भवास । नव्हे दारिद्रास पात्र कधीं ।।२।।
राम म्हणतां यम शरणागत बापुडें । आढळ पद पुढें काय तेथें ।।३।।
राम म्हणतां धर्म घडतील सकळ । त्रिमिर पडळ नासे हेळा ।।४।।
राम म्हणतां म्हणे तुकयाचा बंधु । तरिजेल भवसिंधु संदेह नाहीं ।।५।।

३०२०
मरोनि जाईन गुणनामावरूनि । तुझ्या चक्रपाणी मायबापा ।।१।।
चुकविलीं दुःखें मायेचा वोळसा । तोडोनियां आशापाश तेणें ।।धृ।।
केली काया तनु हिंवसी शीतळ । चिंतातळमळ नाहीं ऐसी ।।२।।
काळें तोंड काळ करूनि राहिलें । भूतमात्र जालें सज्जनसखें ।।३।।
तुकयाबंधु म्हणें अवघ्या देशदिशा । मुक्त रे परेशा तुझ्या पुण्यें ।।४।।

३०२१
आतां मागतों तें ऐक नारायणा । भावपूर्वक मनापासूनियां।।१।।
असों दे मोकळी जिव्हा जरि गाइल गुण । नाहीं तरी खिळुन टाकीं परती ।।धृ।।
मातेचिया परी देखती परनारी। ठेवीं नेत्र तरी नाहीं तरि नको ।।२।।
तरी बरें कांटाळा करिती निंदास्तुतीचा । नाहीं तरि कानांचा ही देख प्रेत्न ।।३।।
सकळ इंद्रियांचा निग्रह करूनि एक । राखवीं पृथक तोडोनि भ्रम ।।४।।
तुकयाबंधु म्हणे ते चि वाट प्राणां । पडता नारायणा विसर तुझा।।५।।

३०२२
नमस्कारी भूतें विसरोनि याती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ।।१।।
परउपकारीं वेचियेल्या शक्ती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ।।धृ।।

द्वयें द्वैतभाव नाहीं जया चित्तीं । तेणें आत्मस्थिती जाणीतली ।।२।।
जयाचिये वाचे नये निंदास्तुती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ।।३।।
उचित अनुचित जाणे धर्मनीती । दृढ भाव भक्ति मानव तो ।।४।।
तुकयाबंधु म्हणे वरकड ते येर । संसाराचे खर भारवाही ।।५।।

३०२३
चवदा भुवनें लोक तिन्हीं दाढे जो कवळी । संपुष्ट तो संबळीमध्यें देखा ।।१।।
उत्पत्तिसंहारकरिता जो पाळण । तो नंदा नंदन म्हणवीतसे ।।धृ।।
असुर तोडरी दैत्यांचा काळ । जाला द्वारपाळ बळीचा तो ।।२।।
लक्ष्मीचा स्वामी क्षीराच्या सागरा । उच्छिष्टकवळा पसरी मुख ।।३।।
तुकयाबंधु म्हणे चतुरांचा रावो । भावें तो पाहा हो केला वेडा ।।४।।

३०२४
कोण या पुरुषार्थाची गति । आणियेला हातोहातीं ।
जाहाज पृथ्वीपति । केली ख्याती अद्भुत ।।१।।
भला रे पुंडलिका भला। महिमा नव जाये वर्णिला ।
दगा देउनि अवधियांला । सांटविलें अविनाश ।।धृ।।
केलें एके घरीं केणें । भरलीं सदोदित दुकानें ।
दुमदुमिलीं सुखानें । हे भाग्याची पंढरी ।।२।।
तुकयाबंधु म्हणे किल्ल्या। संताचे हातीं दिल्या ।
आंगावेगळें आपुल्या । टाकुनि जाला मेहेमान ।।३।।

३०२५
पाहा हो कलिचें महिमान । असत्यासी रिझलें जन।
पापा देती अनुमोदन । करिती हेळण संतांचे ।।१।।
ऐसें अधर्माचें बळ । लोक झकविले सकळ ।
केलें धर्माचें निर्मूळ । प्रळयकाळ आरंभला ।।धृ।।
थोर या युगाचें आश्र्चर्य । ब्रम्हकर्म उत्तम सार ।
सांडूनियां द्विजवर । दावलपीर स्मरताती ।।२।।
ऐसे यथार्थाचे अनर्थ । जाला बुडाला परमार्थ ।
नाहीं जाली ऐसी नीत । हा हा भूत पातलें ।।३।।
शांति क्षमा दया । भावभक्ति सत्क्रिया ।

ठाव नाहीं सांगावया । सत्त्वधैर्य भंगिलें ।।४।।
राहिले वर्णावर्णधर्म । अन्योन्य विचरती कर्म ।
म्हणवितां रामराम । श्रम महा मानिती।।५।।
थेर भोरपाचे विशीं । धांवती भूतें आविसा तैसीं ।
कथा पुराण म्हणतां सिसी । तिडीक उठी नकऱ्याचे ।।६।।
विषयलोभासाटीं । सवार्थेंसीं प्राण साटी ।
परमार्थी पीठ मुठी। मागतां उठती सुनींसीं।।७।।
धनाढ्य देखोनि अनामिक । तयातें मनिती आवश्यक ।
अपमानिले वेदपाठक । सात्त्विक शास्त्रज्ञ संपन्न ।।८।।
पुत्र ते पितियापाशीं । सेवा घेती सेवका ऐसी ।
सुनांचिया दासी । सासा जाल्या आंदण्या।।९।।
खोटें जालें आली विंवसी । केली मर्यादा नाहींसी ।
भ्रतारें तीं भार्यासी । रंक तैसीं मानिती ।।१०।।
नमस्कारावया हरिदासां । लाजती धरिती कांहीं गर्वसा ।
पोटासाटीं खौसा । वंदिती मलिंछाच्या।।११।।
बहुत पाप जालें उचंबळ । उत्तम न म्हणती चांडाळ।
अभक्ष भक्षिती विटाळ । कोणी न धरी कोणाचा ।।१२।।
कैसें जालें नष्ट वर्तमान । एकादशीस खाती अन्न ।
विडे घेऊनि ब्राम्हण। अविंदवाणी वदताती ।।१३।।
कामिनी विटंबिल्या कुळवंती। वदनें दासीचीं चुंबिती ।
सोवळ्याच्या स्फीती । जगीं मिरविती पवित्रता ।।१४।।
मद्यपानाची सुराणी । नवनीता न पुसे कोणी ।
केळवती व्यभिचारिणी । दैन्यवाणी पतिव्रता ।।१५।।
केवढी दोषाची सबळता। जाली पाहा हो भगवंता ।
पुण्य धुडावोनी संता । तीर्थां हरी आणिली ।।१६।।
भेणें मंद जाल्या मेघवृष्टि । आकांतली कांपे सृष्टि ।
देव रिगाले कपाटीं । आटाआटी प्रवर्तली ।।१७।।
अपीक धान्यें दिवसें दिवसें। गाई म्हैसी चेवल्या गोरसें ।
नगरें दिसती उध्वंसें । पिकलीं बहुवसें पाखांडें ।।१८।।
होम हरपलीं हवनें । यज्ञयाग अनुष्ठानें ।
जपतपादिसाधनें । आचरणें भ्रष्टलीं ।।१९।।
अठरा यातींचे व्यापार। करिती तस्कराई विप्र ।
सांडोनियां शुद्ध शुभ्र । वस्त्रें निळीं पांघरती ।।२०।।

गीता लोपली गायत्री । भरले चमत्कार मंत्रीं ।
अश्वाचियापरी। कुमारी विकिती वेदवक्ते ।।२१।।
वेदाध्ययनसंहितारुचि । भकाद्या करिती तयांची ।
आवडी पंडितांची। मुसाफावरी बैसली ।।२२।।
मुख्य सर्वोत्तम साधनें । तीं उच्छेदुनि केलीं दीनें ।
कुडीं कापटें महा मोहनें। मिरविताती दुर्जन ।।२३।।
कळाकुशळता चतुराई । तर्कवादी भेद निंदेठायीं ।
विधिनिषेधाचा वाही । एक ही ऐसीं नाडलीं ।।२४।।
जे संन्यासी तापसी ब्रम्हचारी। होतां वैरागी दिगांबर निस्पृही वैराग्यकारी।
कामक्रोधें व्यापिले भारी। इच्छाकरीं न सुटती ।।२५।।
कैसें विनाशकाळाचें कौतुक । राजे जाले प्रजांचे अंतक ।
पिते पुत्र सहोदर। एकाएक शत्रुघातें वर्त्तती ।।२६।।
केवढी ये रांडेची अंगवण । भ्रमविलें अवघें जन ।
याती अठरा चाऱ्ही वर्ण । कर्दम करूनि विटाळले ।।२७।।
पूवाअहोतें भविष्य केलें । संतीं ते यथार्थ जालें ।
ऐकत होतों ते देखिलें।प्रत्यक्ष लोचनीं ।।२८।।
आतां असो हें आघवें । गति नव्हे कळीमध्येंवागवरावें ।
देवासी भाकोनि करुणावें । वेगें स्मरावें अंतरीं ।।२९।।
अगा ये वैकुंठानायका । काय पाहातोसि या कौतुका ।
धांव कलीनें गांजिलें लोकां । देतो हाका सेवक तुकयाचा ।।३०।।

३०२६
केली हार्णाळां अंघोळी । येऊनि बैसलों राउळीं।।१।।
अजिचें जाले भोजन । राम कृष्ण नारायण ।।२।।
तुकयाबंधु म्हणे नास । नाहीं कल्पांती जयास ।।३।।
।।१२।।

३०२७
तुजलागीं माझा जीव जाला पिसा । अवलोकितों दिशा पांडुरंगा ।।१।।
सांडिला वेव्हार माया लोकाचार । छंद निरंतर हा चि मनीं ।।धृ।।
आइकिलें कानीं तें रूप लोचन । देखावया सीण करिताति ।।२।।
प्राण हा विकळ होय कासावीस । जीवनाविण मत्स्य तयापरी ।।३।।
तुका म्हणे आतां कोण तो उपाव । करूं तुझे पाव आतुडे तो ।।४।।

३०२८
कोणे गांवीं आहे सांगा हा विठ्ठल । जरी ठावा असेल तुम्हां कोणा ।।१।।
लागतसें पायां येतों लोटांगणीं । मात तरी कोणी सांगा याची ।।धृ।।
गुण रूप याचे वाणिती या संतां । मज क्षेम देतां सुख वाटे ।।२।।
सर्वस्वें हा जीव ठेवीन चरणीं । पांडुरंग कोणी दावी तया ।।३।।
तुका म्हणे गाईवत्सा तडातोडी । तैसी जाते घडी एकी मज ।।४।।

३०२९
एकाचिये सोई कवित्वाचे बांधे । बांधिलिया साध्य काय तेथें ।।१।।
काय हातीं लागे भुसाचे कांडणीं । सत्यासी दाटणी करुनि काय ।।धृ।।
कवित्वाचे रूढी पायां पाडी जग । सुखावोनि मग नरका जाय ।।२।।
तुका म्हणे देव केल्याविण साहे । फजिती आहे लटिक्या अंगीं ।।३।।

३०३०
भल्याचें दरुषण । तेथें शुभ चि वचन ।।१।।
बोलावी हे धर्मनीत । क्षोभें होत नाहीं हित ।।धृ।।
मर्यादा ते बरी । वेळ जाणावी चतुरीं ।।२।।
तुका म्हणे बहु । लागे ऐसें बरें मऊ ।।३।।

३०३१
आवडीनें धरिलीं नांवें । प्रियभावें चिंतन ।।१।।
वेडा जाला वेडा जाला । लांचावला भक्तीसी ।।धृ।।
निचाड्या चाड धरी । तुळसी करीं दळ मागे ।।२।।
धरिला मग न करी बळ । तुका म्हणे कळ पायीं ।।३।।

३०३२
कंठीं राहो नाम । अंगीं भरोनियां प्रेम ।।१।।
ऐसें द्यावें कांहीं दान । आलों पतित शरण ।।धृ।।
संतांचिये पायीं । वेळोवेळां ठेवीं डोई ।।२।।
तुका म्हणे तरें । भवसिंधु एका सरें।।३।।

३०३३

विठ्ठल विठ्ठल येणें छंदें । ब्रम्हानंदें गर्जावें ।।१।।
वाये टाळ टाळ्याटाळी । होइल होळी विघ्नांची ।।धृ।।
विठ्ठल आद्ये अवसानीं । विठ्ठल मनीं स्मरावा ।।२।।
तुका म्हणे विठ्ठलवाणी। वदा कानीं आईका ।।३।।

३०३४
पंढरीचे वारकरी । ते अधिकारी मोक्षाचे ।।१।।
पुंडलिका दिला वर । करुणाकरें विठ्ठलें ।।धृ।।
मूढ पापी जैसे तैसे। उतरी कासे लावूनि ।।२।।
तुका म्हणे खरें जालें । एका बोलें संतांच्या ।।३।।

३०३५
अमृताचीं फळें अमृताची वेली । ते चि पुढें चाली बीजाची ही ।।१।।
ऐसियांचा संग देईं नारायणा । बोलावा वचना जयांचिया ।।धृ।।
उत्तम सेवन सितळ कंठासी । पुष्टी कांती तैसी दिसे वरी ।।२।।
तुका म्हणे तैसें होइजेत संगें । वास लागे अंगें चंदनाच्या ।।३।।

३०३६
पंढरीसी जा रे आलेनो संसारा । दीनाचा सोयरा पांडुरंग ।।१।।
वाट पाहे उभा भेटीची आवडी । कृपाळू तांतडी उतावीळ ।।धृ।।
मागील परिहार पुढें नेहे सीण । जालिया दर्षणें एकवेळा ।।२।।
तुका म्हणे नेदी आणिकांचे हातीं । बैसला तो चित्तीं निवडेना ।।३।।

३०३७
न कळे तें कळों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ।।१।।
न दिसे तें दिसों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ।।धृ।।
न बोलों तें बोलों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ।।२।।
न भेटे तें भेटों येईल आपण । करितां चिंतन विठोबाचें ।।३।।
अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर म्हणतां वाचे ।।४।।
तुका म्हणे आसक्त जीव सर्वभावें । तरतील नांवें विठोबाच्या ।।५।।

३०३८
बहुजन्में केला लाग । तो हा भाग लाधलों ।।१।।

जीव देइन हा बळी । करीन होळी संसारा ।।धृ।।
गेलें मग नये हाता । पुढती चिंता वाटतसे ।।२।।
तुका म्हणे तांतड करूं । पाय धरूं बळकट ।।३।।

३०३९
भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानियांसी ।।१।।
आत्मनिष्ठ जरी जाले जीवन्मुक्त । तरी भक्ति सुख दुर्लभ त्यां ।।२।।
तुका म्हणे कृपा करिल नारायण । तरि च हें वर्म पडे ठायीं ।।३।।

३०४०
दुधाळ गाढवी जरी जाली पाहे । पावेल ते काय धेनुसरी ।।१।।
कागाचिया गळा पुष्पाचिया माळा । हंसाची तो कळा काय जाणे ।।धृ।।
मर्कटें अंघोळी लावियेले टिळे । ब्राम्हणाचे लीळे वर्तूं नेणे ।।२।।
जरी तो ब्राम्हण जाला कर्मभ्रष्ट । तुका म्हणे श्रेष्ठ तिहीं लोकीं ।।३।।

३०४१
देव भक्तालागीं करूं नेदी संसार । अंगें वारावार करोनि ठेवी ।।१।।
भाग्य द्यावें तरी अंगीं भरे ताठा । म्हणोनि करंटा करोनि ठेवी ।।धृ।।
स्त्री द्यावी गुणवंती नसती गुंते आशा । यालागीं कर्कशा पाठी लावी ।।२।।
तुका म्हणे मज प्रचित आली देखा । आणीक या लोकां काय सांगों ।।३।।

३०४२
वाघें उपदेशिला कोल्हा । सुखें खाऊं द्यावें मला।।१।।
अंतीं मरसी तें न चुके । मज ही मारितोसी भुके ।।धृ।।
येरू म्हणे भला भला । निवाड तुझ्या तोंडें जाला ।।२।।
देह तंव जाणार । घडेल हा उपकार ।।३।।
येरू म्हणे मनीं । ऐसें जावें समजोनि ।।४।।
गांठी पडली ठका ठका । त्याचा धर्म बोले तुका ।।५।।

३०४३
जेथें आठवती स्वामीचे ते पाय । उत्तम ते ठाय रम्य स्थळ ।।१।।
रान अथवा घर एकांत लोकांत । समाधान चित्त तें ते घडी ।।धृ।।
धन्य तो हा काळ सरे आनंदरूप । वाहातां संकल्प गोविंदाचे ।।२।।

तुका म्हणे लाभकाळ ते चि जीणें । भाग्य नारायण उत्तम तें ।।३।।
३०४४
तुज न भें मी कळिकाळा । मज नामाचा जिव्हाळा।।१।।
माझा बळिया नेणसी कोण । संतां साहे नारायण ।।धृ।।
शंख वधिला सागरीं । वेद घेउनि आला चारी ।।२।।
कूर्मे दैत्य वधिला जेठी । हात पाय लपवी पोटीं ।।३।।
वाराहरूप धरिलें गाढें । धरा प्रतापें धरिली दाढे ।।४।।
हिरण्यकश्यप विदारिला । भक्त प्रल्हाद रक्षिला ।।५।।
वामन जाला दिनानाथ । बळी पाताळीं घातला दैत्य।।६।।
छेदुनियां सहस्र भुजा । कामधेनु आणिली वोजा ।।७।।
शिळा प्रतापें सागरीं तारी । स्थापी बिभीषण रावण मारी ।।८।।
मारोनियां कंसराव । पिता सोडविला वसुदेव ।।९।।
पांचाळीसी गांजितां वैरी । वस्त्रें आपण जाला हरी ।।१०।।
गजेंद्र स्मरे राम राम। त्यासी पाववी वैकुंठधाम ।।११।।
तुका म्हणे हरिरूप जाले । पुन्हा जन्मा नाहीं आले ।।१२।।

३०४५
सर्वा भूतीं द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारोन । उपतिष्ठे कारण । तेथें बीज पेरीजे ।।१।।
पुण्य करितां होय पाप । दुग्ध पाजोनि पोशिला साप । करोनि अघोर जप । दुःख विकत घेतलें ।।धृ।।
भूमी पाहातां नाहीं वेगळी । माळ बरड एक काळी । उत्तम निराळी । मध्यम कनिष्ठ ।।२।।
म्हणोनि विवेकें । कांहीं करणें निकें । तुका म्हणे फिकें । रुची नेदी मिष्टान्न ।।३।।

३०४६
देवावरी भार । वृत्ति अयाचित सार ।।१।।
देह देवाचे सांभाळी । सार योजे यथाकाळीं ।।धृ।।
विश्वासीं निर्धार । विस्तारील विश्वंभर ।।२।।
तुका म्हणे व्हावें । बळ एक चि जाणावें ।।३।।

३०४७

वर्त्ततां बासर । काय करावें शरीर ।।१।।
ठेवा नेमून नेमून । माझें तुमचे पायीं मन ।।धृ।।
नेदाविया वृत्ती । कोठें फांकों चि श्रीपती ।।२।।
तुका म्हणे भले । जन्मा येऊनियां जाले ।।३।।

३०४८
केली प्रज्ञा मनाशीं । तईं मी दास सत्यत्वेशीं । नेईन पायांपाशीं । स्वामी मूळ पंढरिये ।।१।।
तोंवरी हें भरीं पोट । केला तो मिथ्या बोभाट । नाहीं सांपडली वाट । सइराट फिरतसें ।।धृ।।
ज्यावें आदराचें जिणें । स्वामी कृपा करी तेणें । पाळिल्या वचनें । सख्यत्वाचा अनुभव ।।२।।
घडे तैसें घडो आतां । मायबापाची सत्ता। तुका म्हणे चिंता । काय पाहें मारगा ।।३।।

३०४९
नेत्र झाकोनियां काय जपतोसी । जंव नाहीं मानसीं भावप्रेम ।।१।।
उघडा मंत्र जाणा राम कृष्ण म्हणा । तुटती यातना गर्भवास ।।धृ।।
मंत्र यंत्र कांहीं करिसी जडी बुटी । तेणें भूतसृष्टी पावशील ।।२।।
सार तुका जपे बीजमंत्र एक । भवसिंधुतारक रामकृष्ण ।।३।।
३०५०
संत मारगीं चालती । त्यांची लागो मज माती ।।१।।
काय करावीं साधनें । काय नव्हे एक तेणें ।।धृ।।
शेष घेईन उच्छिष्ट । धाय धणीवरी पोट ।।२।।
तुका म्हणे संतां पायीं । जीव ठेविला निश्चयीं ।।३।।

३०५१
जैसें तैसें बाळ मातेसी आवडे । बोलतां बोबडे शब्द गोड ।।१।।
आपुले आवडी लेववी खाववी । पाहोनियां जीवीं सुख वाटे ।।२।।
तुका म्हणे काय देऊं परिहार । काय ते साचार जाणतसें ।।३।।

३०५२
देवाचिया वस्त्रा स्वप्नीं ही नाठवी । स्त्रियेसी पाठवी उंच साडी ।।१।।

गाईचें पाळण नये चि विचारा । अश्वासी खरारा करी अंगें ।।धृ।।
लेकराची रास स्वयें धांवें क्षाळूं ।। न म्हणे प्रक्षाळूं द्विजपायां ।।२।।
तुका म्हणे त्याच्या तोंडावरि थुंका । जातो यमलोका भोगावया ।।३।।

३०५३
उरा लावी उर आळंगितां कांता । संतासी भेटतां अंग चोरी ।।१।।
अतीत देखोनि होय पाठमोरा । व्याह्यासी सामोरा जाय वेगीं ।।धृ।।
द्विजा नमस्कारा मनीं भाव कैचा । तुर्काचे दासीचा लेंक होय ।।२।।
तुका म्हणे तुम्ही क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणीं ।।३।।

३०५४
ब्रम्हज्ञान जरी कळें उठाउठी । तरि कां हिंपुटी वेदशास्त्रें ।।१।।
शास्त्रांचे भांडण जप तीर्थाटणें । उर्वीचें भ्रमण या च साटीं ।।धृ।।
याचसाटीं जप याचसाटीं तप । व्यासें ही अमुप ग्रंथ केले ।।२।।
या च साटीं संतपाय हे सेवावे । तरि च तरावें तुका म्हणे ।।३।।

३०५५
गायत्री विकोन पोट जे जाळिती । तया होय गति यमलोकीं ।।१।।
कन्येचा जे नर करिती विकरा । ते जाती अघोरा नरकपाता ।।धृ।।
नाम गाऊनियां द्रव्य जे मागती । नेणों तयां गति कैसी होय ।।२।।
आमुचा सांगाती आहे तो श्रीहरि । न लगे दुराचारी तुका म्हणे ।।३।।

३०५६
साधूच्या दर्शना लाजसी गव्हारा । वेश्येचिया घरा पुष्पें नेसी ।।१।।
वेश्या दासी मुरळी जगाची वोंवळी । ते तुज सोंवळी वाटे कैशी ।।२।।
तुका म्हणे आतां लाज धरीं बुच्या । टांचराच्या कुच्या मारा वेगीं ।।३।।

३०५७
राउळासी जातां त्रास मानी मोठा । बैसतो चोहोटां आदरेशीं ।।१।।
न करी स्नान संध्या म्हणे रामराम । गुरुगुडीचे प्रेम अहर्निशी ।।धृ।।
देवाब्राम्हणासी जाईना शरण । दासीचे चरण वंदी भावें ।।२।।
सुगंध चंदन सांडोनियां माशी । बसे दुर्गंधीशीं अतिआदरें।।३।।
तुका म्हणे अरे ऐक भाग्यहीना । कां रे रामराणा विसरसी ।।४।।

३०५८
दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ।।१।।
आतां ऐसें करीं । तुझे पाय चित्तीं धरीं ।।धृ।।
उपजला भाव । तुमचे कृपे सिद्धी जावो ।।२।।
तुका म्हणे आतां । लाभ नाहीं या परता ।।३।।

३०५९
तरुवर बीजा पोटीं । बीज तरुवरा सेवटीं ।।१।।
तैसें तुम्हां आम्हां जालें । एकीं एक सामावलें ।।धृ।।
उदकावरील तरंग।तरंग उदकाचें अंग ।।२।।
तुका म्हणे बिंबच्छाया । ठायीं पावली विलया।।३।।

३०६०
साकरेच्या गोण्या बैलाचिये पाठी । तयासी सेवटीं करबाडें ।।१।।
मालाचे पैं पेटे वाहाताती उंटें । तयालागीं कांटे भक्षावया ।।धृ।।
वाउगा हा धंदा आशा वाढविती । बांधोनियां देती यमा हातीं ।।२।।
ज्यासी असे लाभ तो चि जाणे गोडी । येर तीं बापुडीं सिणलीं वांयां ।।३।।
तुका म्हणे शहाणा होईं रे गव्हारा । चोऱ्यासीचा फेरा फिरों नको ।।४।।

३०६१
चिरगुटें घालूनि वाढविलें पोट । गऱ्हवार बोभाट जनामध्यें ।।१।।
लटिके चि डोहळे दाखवी प्रकार । दुध स्तनीं पोर पोटीं नाहीं ।।२।।
तुका म्हणे अंतीं वांज चि ते खरी । फजिती दुसरी जनामध्यें ।।३।।

३०६२
माझी सर्व चिंता आहे विठोबासी । मी त्याच्या पायांसी न विसंभें ।।१।।
विसरतां रूप क्षण एक चित्तीं । जिवलग मूर्ती सांवळी ते ।।धृ।।
विसरतां हरी क्षण एक घडी । अंतरली जोडी लक्षलाभ ।।२।।
तुका म्हणे माझ्या विठोबाचे पाये । संजीवनी आहे हृदयामाजी ।।३।।

३०६३
काय तीं करावीं मोलाचीं माकडें । नाचत ती पुढें संसाराच्या ।।१।।

झाडा देतेवेळे विचकिती दांत । घेती यमदूत दंडवरी ।।धृ।।
हात दांत कान हलविती मान । दाखविती जन मानावया ।।२।।
तुका म्हणे किती जालीं हीं फजित । मागें नाहीं नीत भारवाही ।।३।।

३०६४
थोर ती गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ।।१।।
व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ।।धृ।।
घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावेंविण तैसें पाठांतर ।।२।।
तुका म्हणे धरा निष्ठावंत भाव । जरी पंढरीराव पाहिजे तो।।३।।
३०६५
जाय जाय तूं पंढरी । होय होय वारकरी ।।१।।
सांडोनियां वाळवंट । काय इच्छिसी वैकुंठ ।।धृ।।
खांद्या पताकांचे भार । तुळसीमाळा आणि अबीर ।।२।।
साधुसंतांच्या दाटणी । तुका जाय लोटांगणीं ।।३।।

३०६६
जगीं ऐसा बाप व्हावा । ज्याचा वंश मुक्तिस जावा।।१।।
पोटा येतां हरलें पापा । ज्ञानदेवा मायबापा ।।धृ।।
मुळीं बाप होता ज्ञानी । तरी आम्ही लागलों ध्यानीं ।।२।।
तुका म्हणे मी पोटींचें बाळ । माझी पुरवा ब्रम्हींची आळ ।।३।।

३०६७
संतांच्या हेळणे बाटलें जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड चर्मकाचें ।।१।।
भेसळीचें वीर्य ऐशा अनुभवें । आपुलें परावें नाहीं खळा ।।धृ।।
संतांचा जो शोध करितो चांडाळ । धरावा विठाळ बहु त्याचा ।।२।।
तुका म्हणे केली प्रज्ञा या च साटीं । कांहीं माझे पोटीं शंका नाहीं ।।३।।

३०६८
बहु टाळाटाळी । होतां भोवताहे कळी ।।१।।
बरें नव्हेल सेवटीं । भय असों द्यावें पोटीं ।।धृ।।
मुरगाळी कान । घुसमाडील सावधान ।।२।।
अबोलणा तुका । ऐसें कोणी लेखूं नका ।।३।।

३०६९
जिव्हे जाला चळ । नेये अवसान ते पळ ।।१।।
हें चि वोसनावोनी उठी । देव सांटविला पोटीं ।।धृ।।
नाहीं ओढा वारा। पडिला प्रसंग तो बरा ।।२।।
तुका म्हणे जाली । मज हे अनावर बोली ।।३।।

३०७०
गोहो यावा गांवा । ऐसे नवस करी आवा ।।१।।
कैचें पुण्य तया गांठी । व्रतें वेची लोभासाटीं ।।धृ।।
वाढावें संतान। गृहीं व्हावें धनधान्य ।।२।।
मागे गारगोटी । परिसाचीये साटोवाटी ।।३।।
तुका म्हणे मोल । देउन घेतला सोमवल ।।४।।

३०७१
बाळपणें ऐसीं वरुषें गेलीं बारा । खेळतां या पोरा नानामतें ।।१।।
विटू दांडू चेंडू लगोऱ्या वाघोडीं । चंपे पेंड खडी एकीबेकी ।।धृ।।
हमामा हुंबरी पकव्याच्या बारे । खेळे जंगीभोंवरे चुंबाचुंबी ।।२।।
सेलडेरा आणि निसरभोंवडी । उचली बाले धोंडी अंगबळें ।।३।।
तुका म्हणे ऐसें बाळपण गेलें । मग तारुण्य आलें गर्वमूळ ।।४।।

३०७२
तारुण्याच्या मदें न मनी कोणासी । सदा मुसमुसी खूळ जैसा ।।१।।
अंठोनी वेंठोनीं बांधला मुंडासा । फिरतसे म्हैसा जनामधीं ।।धृ।।
हातीं दीडपान वरती च मान । नाहीं तो सन्मान भलियांसी ।।२।।
श्वानाचिया परी हिंडे दारोदारीं । पाहे परनारी पापदृष्टी ।।३।।
तुका म्हणे ऐसा थोर हा गयाळी । करितां टवाळी जन्म गेला ।।४।।

३०७३
म्हातारपणीं थेटे पडसें खोकला । हात कपाळाला लावुनि बैसे ।।१।।
खोबरियाची वाटी जालें असे मुख । गळतसे नाक श्लेष्मपुरी ।।धृ।।
बोलों जातां शब्द नये चि हा नीट । गडगडी कंठ कफ भारी ।।२।।
सेजारी म्हणती मरेना कां मेला । आणिला कांटाळा येणें आम्हां ।।३।।
तुका म्हणे आतां सांडुनी सर्वकाम । स्मरा राम राम क्षणक्षणा ।।४।।

३०७४
जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ।।१।।
बुका लावूं नये भाळा । माळ घालूं नये गळां ।।धृ।।
तटावृषभासी दाणा। तृण मागों नये जाणा ।।२।।
तुका म्हणे द्रव्य घेती । देती ते ही नरका जाती ।।३।।

३०७५
लंकेमाजी घरें किती तीं आइका । सांगतसें संख्या जैसीतैसी ।।१।।
पांच लक्ष घरें पाषाणांचीं जेथें । सात लक्ष तेथें विटेबंदी ।।धृ।।
कोटि घरें जेथें कांशा आणि तांब्याचीं । शुद्ध कांचनाचीं सप्त कोटी ।।२।।
तुका म्हणे ज्याची संपदा एवढी । सांगातें कवडी गेली नाहीं ।।३।।

३०७६
व्यभिचारिणी गणिका कुंटणी । विश्वास चि मनीं राघोबाचा ।।१।।
ऐसी ही पापिणी वाइली विमानी । अचळ भुवनीं टेवियेली ।।धृ।।
पतितपावन तिहीं लोकीं ठसा । कृपाळू कोंवसा अनाथांचा ।।२।।
तुका म्हणे विठोबाची धरा सोय । आणिक उपाय नेणों किती ।।३।।

३०७७
गजेंद्र तो हस्ती सहस्र वरुषें । जळामाजी नक्रें पीडिलासे ।।१।।
सुहुर्दी सांडिलें कोणी नाहीं साहे । अंतीं वाट पाहे विठो तुझी ।।धृ।।
कृपेच्या सागरा माझ्या नारायणा । तया दोघांजणा तारियेलें ।।२।।
तुका म्हणे नेले वाऊनि विमानी । मी ही आईकोनी विश्वासलों ।।३।।

३०७८
ब्रम्हयाचे वेद शंखासुरें नेले । त्यासाटीं धरिलें मत्स्यरूप ।।१।।
तेणें आत्मा नव्हता नेला ब्रम्हांडासी । काय ब्रम्हयासी नव्हतें ज्ञान ।।धृ।।
परि तेणें धावा केला आवडीनें । जाले नारायण कृपासिंधु ।।२।।
तुका म्हणे विठोबा मी नामधारक । पोसनें सेवक भेटी देईं ।।३।।

३०७९
देवीं आणि दैतीं सिंधू गुसळिला । भार पृथ्वीस जाला साहावेना ।।१।।

जालासी कासव धरिली पाठीवरी । चिंता तुज हरी सकळांची ।।धृ।।
तये काळीं देव करिताती स्तुती । कृपाळु श्रीपती म्हणोनियां ।।२।।
तुका म्हणे ऐसे उदंड पवाडे । ज्यासी सहस्त्र तोंडें सिणला तो ही ।।३।।

३०८०
हिरण्याक्ष दैत्य मातला जे काळीं । वरदानें बळी शंकराच्या ।।१।।
इंद्रपदराज्य घेतलें हिरोनी । देवा चक्रपाणी म्हणती धांव ।।धृ।।
तइं पांडुरंगा शूकर जालेती । तया दैत्यपती मारविले।।२।।
तुका म्हणे ज्यांचीं राज्यें त्यांसी दिलीं । ऐसी तूं माउली पांडुरंगा।।३।।

३०८१
प्रल्हादाकारणें नरसिंहीं जालासी । त्याचिया बोलासी सत्य केलें ।।१।।
राम कृष्ण गोविंदा नारायणा हरि । गर्जे राजद्वारीं भक्तराज ।।धृ।।
विठ्ठल माधव मुकुंद केशव । तेणें दैत्यराव दचकला ।।२।।
तुका म्हणे तयां कारणें सगुण । भक्तांचें वचन सत्य केलें ।।३।।

३०८२
नामाचें सामर्थ्य कां रे दवडीसी । कां रे विसरसी पवाडे हे ।।१।।
खणखणां हाणती खर्ग प्रल्हादासी । न रुपे आंगासी किंचित ही ।।धृ।।
राम कृष्ण हरी ऐसी मारी हाक । तेणें पडे धाक बळियासी ।।२।।
असों द्यावीं सामर्थ्यें ऐसिया कीर्तीचीं । आवडी तुक्याची भेटी देईं ।।३।।

३०८३
वाटीभर विष दिलें प्रल्हादासी । निर्भय मानसीं तुझ्याबळें ।।१।।
भोक्ता नारायण केलें तें प्राशन । प्रतापें जीवन जालें तुझ्या ।।धृ।।
नामाच्या चिंतनें विषाचें तें आप । जाहालें देखत नारायणा ।।२।।
तुका म्हणे ऐसे तुझे बडिवार । सिणला फणीवर वर्णवेना ।।३।।

३०८४
अग्निकुंडामध्यें घातला प्रल्हाद । तरी तो गोविंद विसरेना ।।१।।
पितियासी म्हणे व्यापक श्रीहरि । नांदतो मुरारी सर्वां ठायीं ।।धृ।।
अग्निरूपें माझा सखा नारायण । प्रल्हाद गर्जून हाक मारी ।।२।।
तुका म्हणे अग्नि जाहाला शीतळ । प्रताप सबळ विठो तुझा ।।३।।

३०८५
कोपोनियां पिता बोले प्रल्हादासी । सांग हृषीकेशी कोठें आहे ।।१।।
येरू म्हणे काष्ठीं पाषाणीं सकळीं । आहे वनमाळी जेथें तेथें ।।धृ।।
खांबावरी लात मारिली दुर्जनें । खांबीं नारायण म्हणतां चि ।।२।।
तुका म्हणे कैसा खांब कडाडिला । ब्रम्हा दचकला सत्यलोकीं ।।३।।

३०८६
डळमळिला मेरु आणि तो मांदार । पाताळीं फणिवर डोई झाडी ।।१।।
लोपे तेजें सूर्य आणीक हा चंद्र । कांपतसे इंद्र थरथरां ।।धृ।।
ऐसें रूप उग्र हरीनें धरिलें । दैत्या मारियेलें मांडीवरी।।२।।
तुका म्हणे भक्तांकारणें श्रीहरि । बहु दुराचारी निर्दाळिले ।।३।।

३०८७
बहुत कृपाळु दीनाचा दयाळु । जगीं भक्तवत्सळु नाम तुझें ।।१।।
मानियेला चित्तीं बळीचा उपकार । अझूनि त्याचें द्वार राखसील ।।धृ।।
काय त्याच्या भेणें बैसलासी द्वारीं । नाहीं तुज हरि कृपा बहु ।।२।।
तुका म्हणे भक्तजनाची ममता । तुम्हांसी अनंता अलोलिक ।।३।।

३०८८
पांडुरंगा तुझे काय वाणूं गुण । पवाडे हे धन्य जगीं तुझे ।।१।।
दंडिलें दुर्वासा सुरा असुरानें । तो आला गाऱ्हाणें सांगावया ।।धृ।।
बळिचिये द्वारीं तुम्ही बैसलेती । दुर्वास विनंती करी भावें ।।२।।
तुका म्हणे कृपासागरा श्रीहरी । तुझी भक्तावरी प्रेमच्छाया ।।३।।

३०८९
दुर्वासया स्वामी गुंतलों भाकेसी । पुसा जा बळीसी निरोप द्यावा ।।१।।
त्याचे आज्ञेविण आम्हां येतां नये । द्वारपाळ राहें होऊनियां ।।धृ।।
पुसे दुर्वासया बळीसी जाऊनि । येरू म्हणे झणी बोलों नका ।।२।।
तुका म्हणे केला अन्यत्राचा त्याग । तेव्हां पांडुरंग सखा जाला ।।३।।

३०९०
बळी म्हणे आजि दुर्वासया स्वामी । मागों नका तुम्ही नारायणा ।।१।।

बहुतां प्रयासीं जोडला श्रीहरी । बैसविला द्वारीं राखावया ।।धृ।।
परतला दुर्वास मग हो तेथूनि । चिंतातुर मनीं उद्वेगला ।।२।।
काय तूं एकाचा आहेसी अंकित । होईं कृपावंत तुका म्हणे ।।३।।

३०९१
त्रैलोकींचा नाथ सकळांचा आधार । बळिचें तुवां घर धरियेलें ।।१।।
आम्हां मोकलिलें कोणां निरविलें । कोणा हातीं दिले तिन्ही लोक ।।धृ।।
अनाथांचा बंधु दासांचा कैवारी । ब्रिदें तुझीं हरी जाती वांयां ।।२।।
तुका म्हणे ऐसें बोलिला दुर्वास । वाटला संतोष पांडुरंगा ।।३।।

३०९२
बोलिलेती ते देवऋृषी दुर्वासया । जाय पुसावया मागत्यानें ।।१।।
मागुता दुर्वास पुसे बळिराया । निरोप जावया देईं देवा ।।धृ।।
बळी म्हणे त्यासी जाय मी न म्हणें । जाईल नारायण लागला ची ।।२।।
मजपाशीं राहें कोठें तरीं जाय । तुका म्हणे पाय न सोडीं मी ।।३।।

३०९३
दुर्वासें निरोप आणिला ये रिती । मग वाढलेती नारायणा ।।१।।
ठेविलें चरण बळिचिये द्वारीं । शीर अंगावरी लांबविलें ।।धृ।।
पाडियेलें द्वार द्वारावतियेसी । वरि हृषीकेशी निघालेती ।।२।।
तेथूनियां नाम पडिलें द्वारका । वैकुंठनायका तुका म्हणे ।।३।।

३०९४
मुरुकुश दोन्ही मारिले आसुर । दुर्वास ऋृषीश्वर सुखी केला ।।१।।
मारियेला मुरु म्हणोनी मुरारी । नाम तुझें हरी पडियेलें ।।धृ।।
पूवाअहुनी ऐसा भक्तिप्रतिपाळ । केला त्वां सांभाळ नारायणा ।।२।।
तुका म्हणे ये चि वेळे काय जालें । कां सोंग धरिलें मोहनाचें ।।३।।

३०९५
गुरुपादाग्रींचें जळ । त्यास मानी जो विटाळ ।।१।।
संतीं वाळिला जो खळ । नरकीं पचे चिरकाळ ।।धृ।।
गुरुतीथाअ अनमान । यथासांग मद्यपान ।।२।।
गुरुअंगुष्टा न चोखी । मुख घाली वेश्येमुखीं ।।३।।

तुका म्हणे सांगों किती । मुखीं पडो त्याचे माती ।।४।।

३०९६
वाढविलें कां गा । तुम्ही एवढें पांडुरंगा ।।१।।
काय होती मज चाड । एवढी करावया बडबड ।।धृ।।
ब्रम्हसंतर्पण । लोकीं करावें कीर्तन ।।२।।
निमित्याचा धणी । तुका म्हणे नेणे कोणी ।।३।।

३०९७
साही शास्त्रां अतिदुरी तो परमात्मा श्रीहरि । तो दशरथाचे घरीं क्रीडतो राम ।।१।।
शिवाचें निजदेह वाल्मीकाचें निजगुहे । तो भिल्लटीचीं फळें खाय श्रीराम तो ।।धृ।।
योगियांचे मनीं नातुडे चिंतनीं । वानरांचे कानीं गोष्टी सांगे ।।२।।
चरणीं शिळा उद्धरी नामें गणिका तारी । तो कोळिया घरीं पाहुणा राम।।३।।
क्षण एक सुरवरा नातुडे नमस्कारा । तो रिसा आणि वानरा क्षम दे राम ।।४।।
राम सांवळा सगुण राम योगियाचें ध्यान । राम राजीवलोचन तुका चरण वंदितो ।।५।।

३०९८
विठ्ठल माझा जीव विठ्ठल माझा भाव । कुळधर्म देव विठ्ठल माझा ।।१।।
विठ्ठल माझा गुरु विठ्ठल माझा तारूं । उतरील पारु भवनदीचा ।।धृ।।
विठ्ठल माझी माता विठ्ठल माझा पिता । विठ्ठल चुलता बहिणी बंधु ।।२।।
विठ्ठल हे जन विठ्ठल माझें मन। सोयरा सज्जन विठ्ठल माझा ।।३।।
तुका म्हणे माझा विठ्ठल विसावा। नश्वरित गांवा जाइन त्याच्या ।।४।।

३०९९
न मनावी चिंता । कांहीं माझेविशीं आतां ।।१।।
ज्याणें लौकिक हा केला । तो हें निवारिता भला ।।धृ।।
माझे इच्छे काय । होणार ते एक ठाय ।।२।।
सुखा आणि दुःखा । म्हणे वेगळा मी तुका ।।३।।

३१००
माझा पाहा अनुभव । केला देव आपुला ।।१।।
बोलविलें तें चि द्यावें । उत्तर व्हावें ते काळीं ।।धृ।।
सोडिलिया जग निंद्य । मग गोविंद म्हणियारा ।।२।।
तुका म्हणे धीर केला । तेणें याला गोविलें ।।३।।

३१०१
जिंकावा संसार । येणें नांवें तरी शूर ।।१।।
येरें काय तीं बापुडीं । कीर अहंकाराचीं घोडीं ।।धृ।।
पण ऐशा नांवें । देवा धरिजेतो भावें ।।२।।
तुका म्हणे ज्यावें । सत्य कीर्तीनें बरवें ।।३।।

३१०२
सरे ऐसें ज्याचें दान । त्याचे कोण उपकार ।।१।।
नको वाढूं ऐसें काचें । दे वो साच विठ्ठला ।।धृ।।
रडत मागें सांडी पोर । ते काय थोर माउली ।।२।।
तुका म्हणे कीर्ति वाढे । धर्म गाढे ते ऐसे ।।३।।

३१०३
तुटे मायाजाळ विघडे भवसिंधू । जरि लागे छंदु हरिनामें ।।१।।
येर कर्म धर्म करितां ये कळी । माजी तरला बळी कोण सांगा ।।धृ।।
न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा ।।२।।
न साधवे योग न करवे वैराग्य । साधा भक्तिभाग्य संतसंगें ।।३।।
नव्हे अनुष्ठान न कळे ब्रम्हज्ञान । करावी सोपान कृष्णकथा ।।४।।
तुका म्हणे वर्म दावियेलें संतीं । यापरती विश्रांति आणिक नाहीं ।।५।।

३१०४
लोभावरी ठेवुनि हेत । करी असत्य न्याय नीत।।१।।
त्याच्या पूर्वजां पतन । नरकीं किडे होती जाण ।।धृ।।
कोटिगोहत्यापातक। त्यासी घडेल निष्टंक ।।२।।
मासां श्रवे जे सुंदरा । पाजी विटाळ पितरां ।।३।।
तुका म्हणे ऐसियासी । यम गांजील सायासी ।।४।।

३१०५
देह जाईल जाईल । यासी काळ बा खाईल ।।१।।
कां रे नुमजसी दगडा । कैचे हत्ती घोडे वाडा ।।धृ।।
लोडें बालिस्तें सुपती । जरा आलिया फजिती ।।२।।
शरीरसंबंधाचें नातें । भोरड्या बुडविती सेतातें ।।३।।
अझुनि तरी होईं जागा । तुका म्हणे पुढें दगा।।४।।

३१०६
मागें बहुतां जनां राखिलें आडणी । धांवसी निर्वाणी नाम घेतां ।।१।।
ऐसें ठावें जालें मज बरव्या परी । म्हणऊनि करीं धांवा तुझा ।।धृ।।
माझेविशीं तुज पडिला विसरु । आतां काय करूं पांडुरंगा ।।२।।
अझुनि कां नये तुम्हासी करुणा । दुरि नारायणा धरिलें मज ।।३।।
तुका म्हणे जीव जाऊं पाहे माझा । आतां केशीराजा घालीं उडी ।।४।।

३१०७
कळलें माझा तुज नव्हे रे आठव । काय काज जीव ठेवूं आतां ।।१।।
तूं काय करिसी माझिया संचिता । धिग हे अनंता जालें जिणें ।।धृ।।
पतितपावन राहिलों या आशा । आइकोनि ठसा कीर्ती तुझी ।।२।।
आतां कोण करी माझा अंगीकार । कळलें निष्ठुर जालासी तूं ।।३।।
तुका म्हणे माझी मांडिली निरास । करितों जीवा नास तुजसाटीं ।।४।।

३१०८
तरि कां मागें वांयां कीर्ती वाढविली । जनांत आपुली ब्रिदावळी ।।१।।
साच करितां आतां फिरसी माघारा । ठायींचें दातारा नेणवेचि ।।धृ।।
संतांसी श्रीमुख कैसें दाखविसी । पुढें मात त्यांसी सांगईन ।।२।।
घेईन डांगोरा तुझिया नामाचा । नव्हे अनाथांचा नाथ ऐसा ।।३।।
तुका म्हणे आधीं राहिलों मरोनि । तूं कां होसी धनी निमित्याचा ।।४।।

३१०९
आम्ही तुझ्या दासीं । जरि जावें पतनासी ।।१।।
तरि हें दिसे विपरीत । कोठें बोलिली हे नीत ।।धृ।।
तुझें नाम कंठीं । आम्हां संसार आटी ।।२।।

तुका म्हणे काळ । करी आम्हांसी विटाळ।।३।।

३११०
लाजती पुराणें । वेदां येऊं पाहे उणें ।।१।।
आम्ही नामाचे धारक । किविलवाणीं दिसों रंक ।।धृ।।
बोलिले ते संतीं । बोल वायांविण जाती ।।२।।
तुका म्हणे देवा । रोकडी हे मोडे सेवा।।३।।

३१११
आहारनिद्रे न लगे आदर ।आपण सादर ते चि होय।।१।।
परमितेविण बोलणें ते वांयां । फार थोडें काया पिंड पीडी ।।धृ।।
समाधान त्याचें तो चि एक जाणे । आपुलिये खुणे पावोनियां ।।२।।
तुका म्हणे होय पीडा ते न करीं । मग राहें परी भलतिये ।।३।।

३११२
भूमि अवघी शुद्ध जाणा । अमंगळ हे वासना ।।१।।
तैसे वोसपले जीव । सांडी नसतां अंगीं घाव ।।धृ।।
जीव अवघे देव । खोटा नागवी संदेह ।।२।।
तुका म्हणे शुद्ध । मग तुटलिया भेद ।।३।।

३११३
सरतें माझें तुझें । तरि हें उतरतें ओझें ।।१।।
न लगे सांडावें मांडावें । आहे शुद्ध चि स्वभावें ।।धृ।।
घातला तो आशा। मोहोजाळें गळां फासा ।।२।।
सुखदुःखाचा तो मान । नाहीं दुःखाचा तो शीण ।।३।।
करितां नारायण । एवढें वेचितां वचन ।।४।।
लाभ हानि हे समान । तैसा मान अपमान ।।५।।
तुका म्हणे याचें । नांव सोंवळें साचें ।।६।।

३११४
तुज करितां होती ऐसे । मूढ चतुर पंडित पिसे।।१।।
परि वर्म नेणे तें कोणी । पीडाखाणी भोगितील ।।धृ।।
उलंघितें पांगुळ गिरी । मुकें करी अनुवाद ।।२।।

पापी होय पुण्यवंत । न करी घात दुर्जन ।।३।।
अवघें हेळामात्रें हरि । मुक्त करी ब्रम्हांड।।४।।
तुका म्हणे खेळे लीळा । पाहे वेगळा व्यापूनि ।।५।।

३११५
पिकवावें धन । ज्याची आस करी जन ।।१।।
पुरोनि उरे खातां देतां । नव्हे खंडन मवितां ।।धृ।।
खोलीं पडे ओली बीज। तरीं च हाता लागे निज ।।२।।
तुका म्हणे धणी । विठ्ठल अक्षरें या तिन्ही ।।३।।

३११६
करिसी लाघवें । तूं हें खेळसी आघवें ।।१।।
अहंकार आड । आम्हां जगासी हा नाड ।।धृ।।
येथें भुतें यावें । दावूं लपों ही जाणावें ।।२।।
तुका म्हणे हो श्रीपती । आतां चाळवाल किती।।३।।

३११७
घालिती पव्हया । वाटे अनाथाच्या दया ।।१।।
तैसें कां हें नये करूं । पांडुरंगा आम्हां तारूं ।।धृ।।
रोगियासी काढा । देउनि वारितील पीडा ।।२।।
बुडत्यासाटीं उडी । घालितील कां हे जोडी ।।३।।
सारितील कांटे । पुढें मागिलांचे वाटे ।।४।।
तुका म्हणे भार । घेती भागल्यांचा फार ।।५।।

३११८
नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ।।१।।
अनुभव येथें व्हावा शिष्टाचार । न चलती चार आम्हांपुढें ।।धृ।।
निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ।।२।।
तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें । येरा गाबाळाचें काय काम।।३।।

३११९
न करि त्याचें गांढेपण । नारायण सिद्ध उभा ।।१।।
भवसिंधूचा थडवा केला । बोलाविला पाहिजे ।।धृ।।

याचे सोई पाउल वेचे । मग कैचे आडथळे ।।२।।
तुका म्हणे खरें खोटें । न म्हणे मोटें लहान ।।३।।

३१२०
रिकामें तूं नको मना । राहों क्षणक्षणा ही ।।१।।
वेळोवेळां पारायण । नारायण हें करीं ।।धृ।।
भ्रमणांच्या मोडीं वाटा। न भरें फाटा आडरानें ।।२।।
तुका म्हणे माझ्या जीवें । हें चि घ्यावें धणीवरी ।।३।।

३१२१
पंचभूतांचिये सांपडलों संदीं । घातलोंसे बंदीं अहंकारें।।१।।
आपल्या आपण बांधविला गळा । नेणें चि निराळा असतां हो ।।धृ।।
कासया हा सत्य लेखिला संसार । कां हे केले चार माझें माझें ।।२।।
कां नाहीं शरण गेलों नारायणा । कां नाहीं वासना आवरिली ।।३।।
किंचित सुखाचा धरिला अभिळास । तेणें बहु नास केला पुढें ।।४।।
तुका म्हणे आतां देह देऊं बळी । करुनि सांडूं होळी संचिताची ।।५।।

३१२२
देव जाले अवघे जन । माझे गुण दोष हारपले ।।१।।
बरवें जालें बरवें जालें । चित्त धालें महालाभें ।।धृ।।
दर्पणीचें दुसरें भासे । परि तें असे एक तें ।।२।।
तुका म्हणे सिंधुभेटी । उदका तुटी वाहाळासी ।।३।।

३१२३
बहुत प्रकार परि ते गव्हाचे । जिव्हा नाचे आवडी।।१।।
सरलें परि आवडी नवी । सिंधु दावी तरंग ।।धृ।।
घेतलें घ्यावें वेळोवेळां । माय बाळा न विसंबे ।।२।।
तुका म्हणे रस राहिला वचनीं । तो चि पडताळूनि सेवीतसें ।।३।।

३१२४
आम्हां सोइरे हरिजन । जनीं भाग्य निकंचन ।।१।।
ज्याच्या धैर्या नाहीं भंग । भाव एकविध रंग ।।धृ।।
भुके तान्हे चित्तीं। सदा देव आठविती ।।२।।

तुका म्हणे धन । ज्याचें वित्त नारायण ।।३।।

३१२५
म्हणवितों दास न करितां सेवा । लंडपणें देवा पोट भरीं ।।१।।
खोटें कोठें सरे तुझे पायांपाशीं । अंतर जाणसी पांडुरंगा।।धृ।।
आचरण खोटें आपणासी ठावें । लटिकें बोलावें दुसरें तें ।।२।।
तुका म्हणे ऐसा आहें अपराधी । असो कृपानिधी तुम्हां ठावा ।।३।।

३१२६
जळालें तें बाह्य सोंग । अंतर व्यंग पडिलिया।।१।।
कारण तें अंतरलें । वाइट भलें म्हणवितां ।।धृ।।
तांतडीनें नासी । तांतडीनें च संतोषी ।।२।।
तुका म्हणे धीर । नाहीं बुद्धि एक स्थिर।।३।।

३१२७
चित्ताचें बांधलें जवळी तें वसे । प्रकाशीं प्रकाशे सर्वकाळ ।।१।।
अंतरीं वसावी उत्तम ते भेटी । होऊं कांहीं तुटी न सके चि ।।धृ।।
ब्रम्हांड कवळे आठवणेसाटीं । धरावा तो पोटीं वाव बरा ।।२।।
तुका म्हणे लाभ घरिचिया घरीं । प्रेमतंतु दोरी न सुटतां।।३।।

३१२८
दुखवलें चित्त आजिच्या प्रसंगें । बहु पीडा जगें केली देवा ।।१।।
कधीं हा संबंध तोडिसी तें नेणें । आठवूनि मनें पाय असें ।।धृ।।
आणिकांची येती अंतरा अंतरें । सुखदुःख बरेंवाइट तीं ।।२।।
तुका म्हणे घडे एकांताचा वास । तरिच या नास संबंधाचा।।३।।

३१२९
धनवंत एक बहिर अंधळे । शुभ्र कुष्ठ काळे भोग अंगीं ।।१।।
परारब्धगति न कळे विचित्र । आहे हातीं सूत्र विठोबाचे।।धृ।।
आणीक रोगांचीं नांवें घेऊं किती । अखंड असती जडोनियां ।।२।।
तुका म्हणे नष्ट संचिताचें दान । पावे खातां पण सुख नेदी ।।३।।

३१३०

भेदाभेदताळा न घडे घालितां । आठवा रे आतां नारायण ।।१।।
येणें एक केलें अवघें होय सांग । अच्युताच्या योगें नामें छंदें ।।धृ।।
भोंवरे खळाळ चोर वाटा घेती । पावल मारिती सिवेपाशीं ।।२।।
तुका म्हणे येथें भावेंविण पार । न पविजे सार हें चि आहे ।।३।।

३१३१
जे गाती अखंड विठ्ठलाचे गीत । त्यांचे पायीं चित्त ठेवीन मी ।।१।।
जयांसी आवडे विठ्ठलाचें नाम । ते माझे परम प्राणसखे ।।धृ।।
जयांसी विठ्ठल आवडे लोचनीं । त्यांचें पायवणी स्वीकारीन ।।२।।
विठ्ठलासी जिहीं दिला सर्व भाव । त्यांच्या पायीं ठाव मागईन ।।३।।
तुका म्हणे रज होईन चरणींचा । म्हणविती त्यांचा हरिचे दास ।।४।।

३१३२
काय तो विवाद असो भेदाभेद । साधा परमानंद एका भावें ।।१।।
निघोनि आयुष्य जातें हातोहात । विचारीं पां हित लवलाहीं ।।२।।
तुका म्हणे भावभक्ति हे कारण । नागवी भूषण दंभ तो चि ।।३।।

३१३३
देवकीनंदनें । केलें आपुल्या चिंतनें ।।१।।
मज आपुलिया ऐसें । मना लावूनियां पिसें ।।धृ।।
गोवळे गोपाळां । केलें लावूनियां चाळा ।।२।।
तुका म्हणे संग । केला दुरि नव्हे मग।।३।।

३१३४
माझिया जीवासी हे चि पैं विश्रांति । तुझे पाय चित्तीं पांडुरंगा ।।१।।
भांडवल गांठी आलें सपुरतें । समाधान चित्तें मानियेलें ।।धृ।।
उदंड उच्चारें घातला पसरु । रूपावरी भरु आवडीचा।।२।।
तुका म्हणे मज भक्तीची आवडी । अभेदीं तांतडी नाहीं म्हूण ।।३।।

३१३५
एकविध आम्ही न धरूं पालट । न संडूं ते वाट सांपडली ।।१।।
म्हणवूनि केला पाहिजे सांभाळ । माझें बुद्धीबळ पाय तुझे ।।धृ।।
बहुत न कळे बोलतां प्रकार । अंतरा अंतर साक्ष असे ।।२।।

तुका म्हणे आगा जीवांच्या जीवना । तूं चि नारायणा साक्षी माझा ।।३।।

३१३६
राहो ये चि ठायीं । माझा भाव तुझे पायीं ।।१।।
करीन नामाचें चिंतन । जाऊं नेदीं कोठें मन ।।धृ।।
देईन ये रसीं । आतां बुडी सर्वविशीं ।।२।।
तुका म्हणे देवा । साटी करोनियां जीवा।।३।।

३१३७
तैसे नहों आम्ही विठ्ठलाचे दास । यावें आणिकांस काकुलती ।।१।।
स्वामिचिया सत्ता ठेंगणें सकळ । आला कळिकाळ हाताखालीं ।।धृ।।
अंकिताचा असे अभिमान देवा । समर्पूनि हेवा असों पायीं ।।२।।
तुका म्हणे आम्हां इच्छेचें खेळणें । कोड नारायणें पुरवावें ।।३।।

३१३८
मोक्ष देवापाशीं नाहीं । लटिक्या घाईं विळवतें।।१।।
काय खरें न धरी शुद्धी । गेली बुद्धी भ्रमलें ।।धृ।।
अहंकारास उरलें काई । पांचांठायीं हें वांटे ।।२।।
तुका म्हणे कुंथे भारें । लटिकें खरें मानुनियां ।।३।।

३१३९
आपला तो एक देव करुनि घ्यावा । तेणेंविण जीवा सुख नव्हे ।।१।।
तें तीं माइकें दुःखाचीं जनितीं । नाहीं आदिअंतीं अवसान ।।धृ।।
अविनाश करी आपुलिया ऐसें । लावीं मना पिसें गोविंदाच्या ।।२।।
तुका म्हणे एका मरणें चि सरें । उत्तम चि उरे कीर्ति मागें ।।३।।

३१४०
आजिचें हें मज तुम्हीं कृपादान । दिलें संतजन मायबापीं ।।१।।
आलीं मुखावाटा अमृतवचनें । उत्तीर्ण तीं येणें नव्हे जन्में ।।२।।
तुका म्हणे तुम्हीं उदार कृपाळ । शृंगारिलें बाळ कवतुकें ।।३।।

३१४१
स्तुती अथवा निंदा करावी देवाची । अधम तो वेची व्यर्थ वाणी ।।१।।

आइकोनि होती बहिर हे बोल । वेचूनि ते मोल नरका जाती ।।धृ।।
इह लोकीं थुंका उडे तोंडावरी । करणें अघोरी वास लागे ।।२।।
तुका म्हणे माप वाचेऐसें निकें । भरलें नरकें निंदेसाटीं ।।३।।

३१४२
लोह कफ गारा सिद्ध हे सामुग्री । अग्नि टणत्कारी दिसों येतो ।।१।।
सांगावें तें काई सांगावें तें काई । चित्ता होय ठायीं अनुभव तो ।।धृ।।
अन्नें सांगों येतो तृप्तीचा अनुभव । करूनि उपाव घेऊं हेवा ।।२।।
तुका म्हणे मिळे जीवनीं जीवन । तेथें कोणा कोण नांव ठेवी ।।३।।

३१४३
बाळाचें जीवन । माता जाणें भूक तान ।।१।।
काय करूं विनवणी । असो मस्तक चरणीं ।।धृ।।
ठेविलिये ठायीं । चित्त ठेवुनि असें पायीं ।।२।।
करितों हे सेवा । चिंतन सर्वां ठायीं देवा।।३।।
न्यून तें चि पुरें । घ्यावें करोनि दातारें ।।४।।
तुका म्हणे बुद्धि । अल्प असे अपराधी ।।५।।

३१४४
जाणतों समये । परि मत कामा नये ।।१।।
तुम्ही सांगावें तें बरें । देवा सकळ विचारें ।।धृ।।
फुकाचिये पुसी । चिंता नाहीं होते ऐसी ।।२।।
तुका म्हणे आहे । धर पाय मज साहे ।।३।।

३१४५
द्वारपाळ विनंती करी । उभे द्वारीं राउळा ।।१।।
आपुलिया शरणागता । वाहों चिंता नेदावी ।।धृ।।
वचना या चित्त द्यावें । असो ठावें पायांसी ।।२।।
तुका म्हणे कृपासिंधू । दीनबंधू केशवा ।।३।।

३१४६
दोहीं बाहीं आम्हां वास । असों कास घालूनि ।।१।।
बोल बोलों उभयतां । स्वामीसत्ता सेवेची ।।धृ।।

एकसरें आज्ञा केली । असों चाली ते नीती ।।२।।
तुका म्हणे जोहारितों । आहें होतों ते ठायीं ।।३।।

३१४७
ऐका जी देवा माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ।।१।।
सन्निध पातलों सांडूनियां शंका । सन्मुख चि एकाएकीं पुढें ।।धृ।।
जाणविलें कोठें पावे पायांपाशीं । केली या जिवासी साटी म्हूण ।।२।।
तुका म्हणे माझे हातीं द्या उद्धार । करीं करकर म्हणवूनि ।।३।।

३१४८
बैसलों तों कडियेवरी । नव्हें दुरी वेगळा ।।१।।
घडलें हें बहुवा दिसां । आतां इच्छा पुरवीन ।।धृ।।
बहु होता जाला सीण । नाहीं क्षण विसांवा ।।२।।
दुःखी केलें मीतूंपणें । जवळी नेणें होतें तें ।।३।।
पाहात जे होतों वास । ते चि आस पुरविली।।४।।
तुका म्हणे मायबापा । झणी कोपा विठ्ठला ।।५।।

३१४९
तुझें नाम मुखीं तयासी विपत्ति । आश्चर्य हें चित्तीं वाटतसे ।।१।।
काय जाणों काय होसील निजला । नेणों जी विठ्ठला मायबापा ।।धृ।।
भवबंधनाचे तुटतील फांसे । तें कां येथें असे अव्हेरिलें ।।२।।
तुका म्हणे माझें दचकलें मन । वाटे वांयांविण श्रम केला ।।३।।

३१५०
सेवकें करावें सांगितलें काम । सिक्याचा तो धर्म स्वामी राखे ।।१।।
काय देवा नेणों आलें गांढेपण । तुम्ही शक्तिहीन जाले दिसां ।।धृ।।
विष्णुदास आम्ही निर्भर ज्याबळें । तें दिसे या काळें अव्हेरिलें ।।२।।
तुका म्हणे मूळ पाठवा लौकरी । किंवा करूं हरी काय सांगा ।।३।।

३१५१
खेळतां न भ्यावें समर्थाच्या बाळें । तयाच्या सकळ सत्तेखालीं ।।१।।
तरी लेवविला शोभे अळंकार । नाहीं तरी भार मानाविण ।।धृ।।
अवघी च दिशा असावी मोकळी । मायबाप बळी म्हणऊनि ।।२।।

तुका म्हणे माझें ऐसें आहे देवा । म्हणऊनि सेवा समर्पिली ।।३।।

३१५२
निरांजनीं एकटवाणें । संग नेणें दुसरा ।।१।।
पाहा चाळविलें कैसें । लावुनि पिसें गोवळें ।।धृ।।
लपलें अंगें अंग । दिला संग होता तो ।।२।।
तुका म्हणे नव्हतें ठावें । जालें भावें वाटोळें ।।३।।

३१५३
नव्हती भेटी तों चि बरें । होतां चोरें नाडिलें ।।१।।
अवाधियांचा केला झाडा । रिता वाडा खोंकर ।।धृ।।
चिंतनांचें मूळ चित्त । नेलें वित्त हरूनि ।।२।।
तुका म्हणे मूळा आलें । होतें केलें तैसें चि ।।३।।

३१५४
जये ठायीं आवडी ठेली । मज ते बोली न संडे।।१।।
पुरवावें जीवींचें कोड । भेटी गोड तुज मज ।।धृ।।
आणिलें तें येथवरी । रूप दुरी न करावें ।।२।।
तुका म्हणे नारायणा । सेवाहीना धिग वृत्ति ।।३।।

३१५५
सरलियाचा सोस मनीं । लाजोनियां राहिलों ।।१।।
आवडीनें बोलावितों । येथें तें तों लपावें ।।धृ।।
माझें तें चि मज द्यावें । होतें भावें जोडिलें ।।२।।
तुका म्हणे विश्वंभरा । आळीकरा बुझावा ।।३।।

३१५६
नाचावेंसें वाटे मना । छंद गुणा अधीन ।।१।।
चेष्टविलीं माझीं गात्रें । सत्तासूत्रें हालती ।।धृ।।
नामरूपें रंगा आलीं। ते चि चाली स्वभावें ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगे । अंग संगें कवळिलें।।३।।

३१५७

खेळतों ते खेळ पायांच्या प्रसादें । नव्हती हीं छंदें नासिवंतें ।।१।।
माझा मायबाप उभा विटेवरी । कवतुकें करी कृपादान।।धृ।।
प्रसादाची वाणी वदें ती उत्तरें । नाहीं मतांतरें जोडियेलीं ।।२।।
तुका म्हणे रस वाढितिया अंगें । छाया पांडुरंगें केली वरी ।।३।।

३१५८
अखंड मुडतर । सासुरवास करकर ।।१।।
याची जाली बोळवण । आतां न देखों तो शीण ।।धृ।।
बहुतांची दासी । तये घरीं सासुरवासी ।।२।।
तुका म्हणे मुळें । खंड जाला एका वेळें।।३।।

३१५९
अवघा भार वाटे देवा । संतसेवा न घडतां ।।१।।
कसोटी हे असे हातीं । सत्य भूतीं भगवंत ।।धृ।।
चुकलोंसा दिसें पंथ । गेले संत तो ऐसा ।।२।।
तुका म्हणे सोंग वांयां । कारण या अनुभवें ।।३।।

३१६०
आतां तुम्ही कृपावंत । साधु संत जिवलग ।।१।।
गोमटें तें करा माझें । भार ओझें तुम्हांसी ।।धृ।।
वंचिलें तें पायांपाशीं। नाहीं यासी वेगळें ।।२।।
तुका म्हणे सोडिल्या गांठी । दिली मिठी पायांसी ।।३।।

३१६१
सुख वाटे परी वर्म । धर्माधर्म न कळे ।।१।।
गायें नाचें एवढें जाणें । विठ्ठल म्हणे निर्लज्ज ।।धृ।।
अवघें माझें एवढें धन । साधन ही सकळ ।।२।।
तुका म्हणे, पायां पडें । तुमच्या कोडें संतांच्या ।।३।।

३१६२
धरिलीं जीं होतीं चित्तीं । डोळां तीं च दिसती ।।१।।
आलें आवडीस फळ । जालें कारण सकळ ।।धृ।।
घेईन भातुकें । मागोनियां कवतुकें ।।२।।

तुका म्हणे लाड । विठोबा पुरवील कोड।।३।।

३१६३
बहुतां दिसांची आजि जाली भेटी । जाली होती तुटी काळगती ।।१।।
येथें सावकासें घेईन ते धणी । गेली अडचणी उगवोनि ।।धृ।।
बहु दुःख दिलें होतें घरीं कामें । वाढला हा श्रमश्रमें होता ।।२।।
बहु दिस होता पाहिला मारग । क्लेशाचा त्या त्याग आजि जाला ।।३।।
बहु होती केली सोंगसंपादणी । लौकिकापासूनि निर्गमलें ।।४।।
तुका म्हणे येथें जालें अवसान । परमानंदीं मन विसावलें ।।५।।

३१६४
पुत्र जाला चोर । मायबापा हर्ष थोर ।।१।।
आतां काशासाटीं जोडी । हाट धाटे गुंडगे घडी ।।धृ।।
ऐते अपाहार । आणूनियां भरी घर ।।२।।
मानिली निश्चिंती । नरका जावया उभयतीं।।३।।
झोडाझोडगीचे पोटीं । फळें बीजें तीं करंटीं ।।४।।
तुका म्हणे बेट्या ।। भांडवल न लगे खट्या ।।५।।

३१६५
एवढी अपकीर्ती । ऐकोनियां फजीती ।।१।।
जरि दाविल वदन । थुंका थुंका तो देखोन ।।धृ।।
काळिमेचें जिणें । जीऊनियां राहे सुनें ।।२।।
तुका म्हणे गुण । दरुषणें अपशकुन।।३।।

३१६६
पुंडलीक भक्तराज । तेणें साधियेलें काज । वैकुंठींचें निज । परब्रम्ह आणिलें ।।१।।
पांडुरंग बाळमूर्ति । गाईगोपाळां संगती । येऊनियां प्रीति । उभें सम चि राहिलें ।।धृ।।
एका आगळें अक्षर । वैकुंठ चि दुसरें । म्हणविती येरें । परि ती ऐसीं नव्हेती।।२।।
पाप पंचक्रोशीमधीं । येऊ न सकेचिना आधीं । कैंची तेथें विधि-। निषेधाची वसति ।।३।।

पुराणें वदती ऐसें । चतुर्भुज तीं मानसें । सुदर्शनावरी वसे । रीग न घडे कल्पांतीं ।।४।।
महाक्षेत्र हें पंढरी । अनुपम्य इयेची थोरी । धन्य धन्य वारकरी । तुका म्हणे तेथींचे।।५।।

३१६७
देह मृत्याचें भातुकें । कळों आलें कवतुकें ।।१।।
काय मानियेलें सार । हें चि वाटतें आश्चर्य ।।धृ।।
नानाभोगांची संचितें । करूनि ठेविलें आइतें ।।२।।
तुका म्हणे कोडीं । उगवून न सकती बापुडीं ।।३।।

३१६८
त्यागें भोग माझ्या येतील अंतरा । मग मी दातारा काय करूं ।।१।।
आतां असो तुझे पायीं हें मोटळें । इंद्रियें सकळें काया मन ।।धृ।।
सांडीमांडी विधिनिषेधाचा ठाव । न कळतां भाव जाइल वांयां ।।२।।
तुका म्हणे आतां नको उजगरा । लपवीं दातारा अंगीं मज ।।३।।

३१६९
दावूनियां बंड । पुरे न करी तें भांड ।।१।।
जळो जळो तैसें जिणें । फटमरे लाजिरवाणें ।।धृ।।
घेतलें तें सोंग । बरवें संपादावें सांग ।।२।।
तुका म्हणे धीरें । देवें नुपेक्षिलें खरें ।।३।।

३१७०
न पालटे जाती जीवाचिये साटीं । बाहे तें चि पोटीं दावी वरी ।।१।।
अंतरीं सबाहीं सारिखा चि रंग । वीट आणि भंग नाहीं रसा ।।धृ।।
घणाचिया घायें पोटीं शिरे हिरा । सांडूं नेणे धीरा आपुलिया ।।२।।
तुका म्हणे कढे करावी शीतळ । ऐसें जातिबळ चंदनाचें ।।३।।

३१७१
दिली मान तरी नेघावी शत्रूची । शरण आलें त्यासी जतन जीवें ।।१।।
समर्थासी असे विचाराची आण । भलीं पापपुण्य विचारावें ।।धृ।।
काकुळतीसाटीं सत्याचा विसर । पडिलें अंतर न पाहिजे ।।२।।

तुका म्हणे यश कीर्ति आणि मान । करितां जतन देव जोडे ।।३।।

३१७२
विचारिलें आधीं आपुल्या मानसीं । वांचों येथें कैसीं कोण्या द्वारें ।।१।।
तंव जाला साह्य हृदयनिवासी । बुद्धि दिली ऐसी नास नाहीं ।।धृ।।
उद्वेगाचे होतों पडिलों समुद्रीं । कोण रीती तरी पाविजेल ।।२।।
तुका म्हणे दुःखें आला आयुर्भाव । जाला बहु जीव कासावीस ।।३।।

३१७३
आपुलें वेचूनि खोडा घाली पाव । ऐसे जया भाव हीनबुद्धि तो ।।१।।
विषयांच्या संगें आयुष्याचा नास । पडियेलें ओस स्वहितांचे ।।धृ।।
भुलल्यांचें अंग आपण्या पारिखें । छंदा च सारिखें वर्ततसे ।।२।।
तुका म्हणे दुःख उमटे परिणामीं । लंपटासी कामीं रतलिया ।।३।।

३१७४
केलें शकुनें प्रयाण । आतां मागें फिरे कोण ।।१।।
होय तैसें होय आतां । देह बळी काय चिंता ।।धृ।।
पडिलें पालवीं। त्याचा धाक वाहे जीवीं ।।२।।
तुका म्हणे जीणें । देवा काय हीनपणें ।।३।।

३१७५
आळणी ऐसें कळों आलें । त्यासी भलें मौन्य चि।।१।।
नये कांहीं वेचूं वाणी । वेडे घाणीसांगातें ।।धृ।।
वेगळें तें देहभावा । भ्रम जीवा माजिरा ।।२।।
तुका म्हणे कवतुक केलें । किंवा भलें दवडितां ।।३।।

३१७६
चित्ताचा चाळक । त्याचें उभय सूत्र एक ।।१।।
नाचवितें नानाछंदें । सुखें आपुल्या विनोदें ।।धृ।।
चंद्र कमळणी । नाहीं धाडीत सांगोनि ।।२।।
तुका म्हणे उठी । लोह चुंबकाचे दृष्टी।।३।।
३१७७
करितां तडातोडी । वत्सा माते सोई ओढी ।।१।।

करित्याचा आग्रह उरे । एक एकासाटीं झुरे ।।धृ।।
भुके इच्छी अन्न। तें ही त्यासाटीं निर्माण ।।२।।
तुका म्हणे जाती । एक एकाचिये चित्तीं ।।३।।

३१७८
निघालें दिवाळें । जालें देवाचें वाटोळें ।।१।।
आतां वेचूं नये वाणी । विचारावें मनिच्या मनीं ।।धृ।।
गुंडाळिलीं पोतीं । भीतरी लावियेली वाती ।।२।।
तुका म्हणे करा । ऐसा राहे माजी घरा ।।३।।

३१७९
तीर्थाचिये आस । पंथ तो निट देव । पाविजेतो ठाव अंतराय ।।१।।
म्हणऊनि भलें निश्चळ चि स्थळीं । मनाचिये मुळीं बैसोनियां ।।धृ।।
संकल्पारूढ तें प्रारब्धें चि जिणें । कार्य चि कारणें वाढतसे ।।२।।
तुका म्हणे कामा नाहीं एक मुख । जिरवितां सुख होतें पोटीं ।।३।।

३१८०
क्षणक्षणा हा चि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ।।१।।
नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ।।धृ।।
संतासमागमीं धरूनि आवडी । करावी तांतडी परमाथाअ ।।२।।
तुका म्हणे येह लोकीच्या वेव्हारें । नये डोळे धुरें भरूनि राहों ।।३।।

३१८१
कोणाशीं विचार करावा सेवटीं । एवढ्या लाभें तुटी जाल्या तरे ।।१।।
सांभाळितो शूर आला घावडाव । पुढें दिला पाव न करी मागें ।।धृ।।
घात तो या नांवें येथें अंतराय । अंतरल्या पाय गोविंदाचे ।।२।।
तुका म्हणे गडसंदीचा हा ठाव । केला तो उपाव कार्या येतो ।।३।।

३१८२
असा जी सोंवळें । आहां तैसे चि निराळे ।।१।।
आम्हीं नयों तुमच्या वाटा । काय लटिका चि ताठा ।।धृ।।
चिंतन चि पुरे । काय सलगी सवें धुरे ।।२।।
तुका म्हणे देवा । नका नावडे ते सेवा ।।३।।

३१८३
अहंकार तो नासा भेद । जगीं निंदे ओंवळा ।।१।।
नातळे तो धन्य यासी । जाला वंषीं दीपक ।।धृ।।
करवितो आत्महत्या। नेदी सत्या आतळों ।।२।।
तुका म्हणे गुरुगुरी । माथां थोरी धरोनि।।३।।

३१८४
इच्छिलें ते शकुनवंती । होय देती तात्काळ ।।१।।
क्षीरा नीरा निवाड करी । वरावरी विठ्ठल ।।धृ।।
भाग्याविण कैचें फळ ।अंतर मळमूत्राचें ।।२।।
तुका म्हणे संचित कुडें । तें बापुडें करीतसे ।।३।।

३१८५
काशासाठीं आम्ही जाळिला संसार । न करा विचार ऐसा देवा ।।१।।
कैसें नेणों तुम्हां करवतें उदास । माझा प्रेमरस भंगावया ।।धृ।।
समर्पूनि ठेलों देह हा सकळ । धरितां विटाळ न लजा माझा ।।२।।
तुका म्हणे अवघी मोकलूनि आस । फिरतों उदास कोणासाटीं ।।३।।

३१८६
नाहीं तुम्हां कांहीं लाविलें मागणें । कांटाळ्याच्या भेणें त्रासलेती ।।१।।
एखादिये परी टाळावीं करकर । हा नका विचार देखों कांहीं ।।धृ।।
पायांच्या वियोगें प्राणासवें साटी । ने घवेसी तुटी जाली आतां ।।२।।
तुका म्हणे तुम्हां मागेन तें आतां । हें चि कृपावंता चरणीं वास ।।३।।

३१८७
जग अमंगळ । लागे देखतां विटाळ ।।१।।
धर्म भूतांची ते दया । सत्य कारण ऐसीया ।।धृ।।
नव्हे माझें मत । साक्षी करूनि सांगें संत ।।२।।
तुका म्हणे जीवें । दावी उमटूनि अनुभवें ।।३।।

३१८८
दंड अन्यायाच्या माथां । देखोनि करावा सर्वथा।।१।।

नये उगे बहुतां घाटूं । सिसें सोनियांत आटूं ।।धृ।।
पापुण्यासाठीं । नीत केली सत्ता खोटी ।।२।।
तुका म्हणे देवा । दोष कोणाचा तो दावा ।।३।।

३१८९
आम्ही पापी तूं पावन । हें तों पूर्वापार जाण ।।१।।
नवें करूं नये जुनें । सांभाळावें ज्याचें तेणें ।।धृ।।
राखावा तो ठाव। मिरासी करोनि उपाव ।।२।।
वादें मारी हाका । देवा आइकवी तुका ।।३।।

३१९०
पाडावी ते बरी । गांठी धुरेसवें खरी ।।१।।
नये मरों लंडीपणें । काय बापुडें तें जिणें ।।धृ।।
लुटावें भांडार । तरी जया नाहीं पार ।।२।।
तुका म्हणे नांवें । कीर्ती आगळीनें ज्यावें ।।३।।

३१९१
भजनें चि जालें । मग जीवाचें काय आलें ।।१।।
येऊं नेदावी पुढती । आड भयाची ते जाती ।।धृ।।
करितां सरोबरी। कांहीं न ठेवावी उरी ।।२।।
तुका म्हणे शूर । व्हावे धुरेसीं च धुरे।।३।।

३१९२
जन्मांतरीं शुद्ध नाहीं आचरण । यालागीं चरण अंतरले ।।१।।
वोडवलें संचित येणें जन्में पाहतां । आतां पंढरिनाथा कृपा करीं ।।धृ।।
पतितपावन ब्रिद साच करीं देवा । यालागी कुढावा करीं माझा ।।२।।
अपराधी पातकी दृष्ट दुराचारी । अहाळलों भारी संवसारें ।।३।।
कामक्रोध आदि कल्पनेच्या त्रासें । तुज न पवें ऐसें जालें देवा ।।४।।
हा ना तोसा ठाव जाला पांडुरंगा । नये चि उपेगा काय करूं ।।५।।
आपुलिया नांवा धांवणिया धांवें । लवकरी यावें तुका म्हणे ।।६।।

३१९३
प्रेमभेटी आळिंगण । मग चरण वंदावे ।।१।।

ऐसामाझा भोळा बाप । हरी ताप कवळोनि ।।धृ।।
न संगतां सीण भाग। पांडुरंग जाणतसे ।।२।।
तुका म्हणे कृपावंतें । द्यावें, भातें न मागतां ।।३।।

३१९४
वचनाचा अनुभव हातीं । बोलविती देव मज ।।१।।
परि हें न कळे अभाविकां । जडलोकां जिवांसी ।।धृ।।
अश्रुत हे प्रसादिक । कृपा भीक स्वामीची ।।२।।
तुका म्हणे वरावरी । जातों तरी सांगत ।।३।।

३१९५
कां रे तुम्हीं ठेवा बहुतां निमित्तें । माझिया संचितें वोडवलें ।।१।।
भक्तिप्रेमगोडी बैसली जिव्हारीं । आनंद अंतरीं अंतरीं येणें झाला ।।धृ।।
पुसिलें पडळ त्रिमिर विठ्ठलें । जग चि भरलें ब्रम्हानंदें ।।२।।
तुका म्हणे केलों कामनेवेगळा । आवडी गोपाळावरी वसे ।।३।।

३१९६
आसन शयन भोजन गोविंदें । भरलें आनंदें त्रिभुवन।।१।।
अवघियां केली काळें तडातोडी । अवश्वरु घडी पुरों नये ।।धृ।।
वांटणी घातले शरीराचे भाग । दुजियाचा लाग खंडियेला।।२।।
आवडीच्या आलें आहारासी रूप । पृथक संकल्प मावळले ।।३।।
काम तरी क्रोध बुद्धि मन नासे । भ्रमाचे वोळसे गिळिले शांती ।।४।।
तुका म्हणे मना श्रीरंगाचा रंग । बैसला अभंग एकविध ।।५।।

३१९७
ज्वरल्यासी काढा औषध पाचन । मूढां नारायण स्मरवितो ।।१।।
भवव्याधि येणें तुटेल रोकडी । करूनियां झाडी निश्चयेसी ।।धृ।।
आणिकां उपायां अनुपान कठिण । भाग्यें बरें सीण शीघ्रवत ।।२।।
तुका म्हणे केला उघडा पसारा । भाग्य आलें घरा दारावरी ।।३।।

३१९८
जपाचें निमित्त झोपेचा पसरु । देहाचा विसरू पाडूनियां।।१।।
ऐसीं तीं भजनें अमंगळवाणी । सोंगसंपादणी बहुरूप्याची ।।धृ।।
सेवेविशीं केलें लोभाचिये आसे । तया कोठें असे उरला देव ।।२।।

तुका म्हणे मानदंभ जया चित्तीं । तयाची फजीती करूं आम्ही ।।३।।

३१९९
परद्रव्य परकांता । नातळे जयाचिया चित्ता । आणि कर्मी तो तत्वता । बांधला न वजाय ।।१।।
ऐसा अनुभव रोकडा । विश्वासीतो जीवा जोडा । एकांत त्या पुढां । अवघा करी उकल ।।धृ।।
सकट आंबलें तें अन्न । शोधीं तें चि मद्यपान । विषमानें भिन्न । केलें शुद्धाशुद्ध ।।२।।
तुका म्हणे नित । बरवें अनुभवें उचित । तरी काय हित । मोलें घ्यावें लागतें ।।३।।

३२००
भूक पोटापुरती । तृष्णा भरवी वाखती । करवी फजीती । हांवें भार वाढला ।।१।।
कुळिकेसी लांस फांस । डोई दाढी बोडवी दोष । अविहितनाश । करवी वजन चुकतां ।।धृ।।
विधिसेवनें विहितें । कार्यकारणापुरतें । न वाटे तो चित्तें । अधमांच्या तो त्यागी ।।२।।
आज्ञापालणें ते सेवा । भय धरोनियां जीवा । तुका म्हणे ठेवा । ठेविला तो जतन ।।३।।

३२०१
कळे न कळे त्या धर्म । ऐका सांगतों रे वर्म । माझ्या विठोबाचें नाम । अटाहासें उच्चारा ।।१।।
तो या दाखवील वाटा । तया पाहिजे त्या नीटा । कृपावंत मोटा । पाहिजे तो कळवळा ।।धृ।।
पुसतां चुका होतो वाटा । सवें बोळावा गोमटा । मोडों नेदी कांटा । घेऊं सांटा चोरासी ।।२।।
तुका म्हणे मोल । न लगें द्यावें वेचावे बोल । विठ्ठल विठ्ठल । ऐसा छंद मनासी ।।३।।

३२०२

तरी कां वोळगणे । राजद्वारीं होती सुने ।।१।।
अंगीं दावुनि निष्कामता । पोकळ पोकळी ते वृथा ।।धृ।।
कासया मोकळ। भोंवतें शिष्यांचे गाबाळ ।।२।।
तुका म्हणे ढाळे । बाहेर गुदे तें निराळें।।३।।

३२०३
हरिच्या दासां सोपें वर्म । सर्व धर्म पाउलें ।।१।।
कडिये देव बाहेर खांदी । वैष्णव मांदी क्रीडेसी ।।धृ।।
सरती येणें आटाआटी । नाहीं तुटी लाभाची ।।२।।
तुका म्हणे समाधान । सदा मन आमुचें ।।३।।

३२०४
भूतांचिये नांदे जीवीं । गोसावी च सकळां ।।१।।
क्षणक्षणां जागा ठायीं । दृढ पायीं विश्वास ।।धृ।।
दावूनियां सोंग दुजें । अंतर बीजें वसतसे ।।२।।
तुका म्हणे जाणे धने । धरी तें वर्म चिंतन ।।३।।

३२०५
संत आले घरा । तों मी अभागी दातारा ।।१।।
कासयानें पूजा करूं । चरण हृदयीं च धरूं ।।धृ।।
काया कुरवंडी। करुन ओंवाळून सांडी ।।२।।
तुका म्हणे भावें । हात जोडीं असो ठावें ।।३।।

३२०६
भेद तुटलियावरी । आम्ही तुमचीं च हो हरी ।।१।।
आतां पाळावे पाळावे । आम्हां लडिवाळांचे लळे ।।धृ।।
आणिकांची देवा । नाहीं जाणत चि सेवा ।।२।।
तुका म्हणे हेवा । माझा हेत पायीं देवा ।।३।।

३२०७
आमुची विश्रांति । तुमचे चरण कमळापती ।।१।।
पुढती पुढती नमन । घालूंनियां लोटांगण ।।धृ।।
हें चि एक जाणें। काया वाचा आणि मनें ।।२।।

नीच जनालोकां । तळिले पायेरीस तुका ।।३।।

३२०८
विनवितों सेवटीं । आहे तैसें माझे पोटीं ।।१।।
कंठीं राहावें राहावें । हें चि मागतसें भावें ।।धृ।।
पुरली वासना । येणें होईल नारायणा ।।२।।
तुका म्हणे जो देहाडा । तो चि वर्णीन पवाडा ।।३।।

३२०९
आवडीची सलगी पूजा । विषम दुजा भाव तो ।।१।।
ऐसीं उफराटीं वर्मे । कळों भ्रमें न येती ।।धृ।।
न लगे समाधान मोल । रुचती बोल प्रीतीचे ।।२।।
तुका म्हणे एका जीवें । सूत्र व्होवें गुंतलें ।।३।।

३२१०
बाळ माते लाते वरी । मारी तेणें संतोषे ।।१।।
सुख वसे चित्ता अंगीं । तें हें रंगीं मिळालें ।।धृ।।
भक्षी त्याचा जीवमाग। आले भाग तो बरा ।।२।।
तुका म्हणे ॠणानुबंधें । सांगें सुदें सकळां।।३।।

३२११
शिजल्यावरी जाळ । वांयां जायाचें तें मूळ ।।१।।
ऐसा वारावा तो श्रम । अतिशयीं नाहीं काम ।।धृ।।
सांभाळावें वर्म। उचिताच्या काळें धर्म ।।२।।
तुका म्हणे कळे । ऐसें कारणाचे वेळे ।।३।।

३२१२
उभा ऐल थडी । तेणें घालूं नये उडी ।।१।।
पुढें गेल्याचे उपाय । करावे ते केले काय ।ध्रु.।।
दिसतें आहारीं । नये जाऊं ऐशावरी ।।२।।
अळसाची धाडी ।। तुका म्हणे बहु नाडी।।३।।

३२१३

शक्ती द्याव्या देवा । नाहीं पदार्थी सेवा ।।१।।
मुख्य आहे ऐसा धर्म । जाणते हो जाणा वर्म ।।धृ।।
मना पोटीं देव । जाणे जैसा तैसा भाव ।।२।।
तुका म्हणे सोसें । लागे लाविल्याचें पिसें ।।३।।

३२१४
कार्य चि कारण । तृष्णा पाववितें सीण ।।१।।
काय करुनि ऐसा संग । सोसें चि तूं पांडुरंग ।।धृ।।
रूपीं नाहीं गोडी । हांवें हांवें ऊर फोडी ।।२।।
तुका म्हणे पडे भारी । ऐशा वरदळाचे थोरी ।।३।।

३२१५
संसाराच्या नांवें घालूनियां शून्य । वाढता हा पुण्य केला धर्म ।।१।।
हरिभजनें हें धवळिलें जग । चुकविला लाग कळिकाळाचा ।।धृ।।
कोणां ही नलगे साधनांचा पांग । करणें केला त्याग देहबुद्धी ।।२।।
तुका म्हणे सुख समाधि हरिकथा । नेणें भववेथा गाईल तो ।।३।।

३२१६
विश्वासिया नाहीं लागत सायास । रंग अनायासें अंगा येतो ।।१।।
लेंकराच्या हातें घास मागे माता । वोरसोनि चित्ता सुख पावे ।।धृ।।
गौरव त्या मानी आरुषा वचनीं । भूषण ते वाणी मिरवावी ।।२।।
तुका म्हणे आहेस सकळ ही साक्षी । माझा कईं पक्षी पांडुरंग ।।३।।

३२१७
वैभवाचे धणी सकळां शरणागत । सत्यभावें चित्त अर्पिलें तें ।।१।।
नेदी उरों देव आपणावेगळें । भावाचिया बळें ठायाठाव ।।धृ।।
जाणोनि नेणोनि अंगा आली दशा । मग होय इच्छा आपणच ।।२।।
तुका म्हणे बरें धाकट्याचें जिणें । माता स्तनपानें वाढवते ।।३।।

३२१८
कईं ऐसी दशा येइल माझ्या आंगा । चित्त पांडुरंगा झुरतसे ।।१।।
नाठवुनि देह पायांचें चिंतन । अवसान तें क्षण नाहीं मधीं ।।धृ।।
काय ऐसा पात्र होईन लाभासी । नेणों हृषीकेशी तुष्टईल ।।२।।

तुका म्हणे धन्य मानीन संचित । घेईन तें नित्य प्रेमसुख ।।३।।

३२१९
नाहीं वागवीत जाणिवेचें ओझें । स्वामिसेवेकाजे निर्धारु हा ।।१।।
आज्ञा ते प्रमाण हा मनीं निर्धार । येणें फिटे भार निश्चयेसी ।।धृ।।
आळीकरें आम्ही एकविध चित्तें । तैसें होऊं येतें मायबापें ।।२।।
तुका म्हणे माझी ये जातीची सेवा । घातलासे देवावरी भार ।।३।।

३२२०
काय नाहीं माझे अंतरीं वसति । व्यापक हा भूतीं सकळां नांदे ।।१।।
चित्तासी प्रसाद होईल चळण । तें चि तें वळण मनासही ।।धृ।।
सर्व शक्ति जीवीं राहिल्या कुंटित । नाहीं केलें होत आपुलें तें ।।२।।
तुका म्हणे दोरी खांब सूत्र्या हातीं । नाचवी नाचती जडें तैसीं ।।३।।

३२२१
देवाचें निर्माल्य कोण शिवे हातीं । संकल्पासी होती विकल्प ते ।।१।।
वाहिलें देह हें देवा एकसरें । होईल तें बरें तेणें द्वारें ।।धृ।।
होता भार त्याची निवारली खंती । येथें आतां रिती साटवण ।।२।।
तुका म्हणे इच्छे पावविले कष्ट । म्हणऊनि नष्ट दुरावली ।।३।।

३२२२
देव तीर्थ येर दिसे जया ओस । तोचि तया दोष जाणतिया ।।१।।
तया बरें फावे देवा चुकवितां । संचिताची सत्ता अंतराय ।।धृ।।
शुद्धाशुद्धठाव पापुण्यबीज । पाववील दुजे फळभोग ।।२।।
तुका म्हणे विश्वंभराऐसें वर्म । चुकविल्या धर्म अवघे मिथ्या ।।३।।

३२२३
काय करूं सांगतां ही न कळे वर्म । उपस्थित भ्रम उपजवितो ।।१।।
मन आधीं ज्याचें आलें होईल हातां । तयावरी सत्ता केली चाले ।।धृ।।
अभुकेचे अंगीं चवी ना सवाद । मिथ्या ऐसा वाद दुराग्रह ।।२।।
तुका म्हणे आप राखावें आपणा । संकोचों चि कोणा नये आतां ।।३।।

३२२४

अमृत अव्हेरें उचळलें जातां । विष आर्त्तभूतां आवश्यक ।।१।।
आदरासी मोल नये लावूं केजें । धीर शुद्धबीजें गोमटा तो ।।धृ।।
खऱ्याचिये अंगीं आपणे चाली । लावणी लाविली काय लागे ।।२।।
तुका म्हणे चाडे करा वेवसाव । आम्हांसी तो वाव धीर आहे ।।३।।

३२२५
अनुभवाचे रस देऊं आर्त्तभूतां । सोडूं चोजवितां पुढें पोतीं ।।१।।
देवाचा प्रसाद रत्नाच्या ओवणी । शोभतील गुणीं आपुलिया ।।धृ।।
आधीं भाव सार शुद्ध ते भूमिका । बीज आणि पिका चिंता नाहीं ।।२।।
तुका म्हणे ज्याचें नाम गुणवंत । तें नाहीं लागत पसरावें ।।३।।

३२२६
काय मज एवढा भार । हे वेव्हार चाळवाया ।।१।।
उकल तो जाणे धणी । मज भोजनीं कारण ।।धृ।।
चिंता ज्याची तया शिरीं । लेंकरीं तें खेळावें ।।२।।
तुका म्हणे सेवट झाल । देव या बोला भोगिता ।।३।।

३२२७
न गमे न गमे न गमे हरिविण । न मगे न मगे न मगे मेळवा शाम कोणी गे ।।१।।
तळमळ करी तैसा जीव जळाविण मासा । दिसती दिशा ओसा वो ।।धृ।।
नाठवे भूक तान विकळ जालें मन । घडी जाय प्रमाण जुगा एकी वो ।।२।।
जरी तुम्ही नोळखा सांगतें ऐका । तुकयाबंधूचा सखा जगजीवन ।।३।।

३२२८
विठ्ठला रे तुझे वर्णितां गुणवाद । विठ्ठला रे दग्ध जालीं पापें ।।१।।
विठ्ठला रे तुझें पाहातां श्रीमुख । विठ्ठला रे सुख जालें नयना ।।धृ।।
विठ्ठला रे तुज देतां आलिंगन । विठ्ठला तनमन निवाल्या बाह्या ।।२।।
विठ्ठला रे तुझी ऐकतां कीर्त्ति । विठ्ठल हे विश्रांति पावले स्मरणें ।।३।।
विठ्ठला रे तुकयाबंधु म्हणे देहभाव । विठ्ठला जीवीं पाव धरितां गेला ।।४।।

३२२९
एकांतीं लोकांतीं करूं गदारोळ । लेश तो ही मळ नाहीं येथें ।।१।।

घ्यावें द्यावें आम्हीं आपुलिया सत्ता । न देखों पुसता दुजा कोणी ।।धृ।।
भांडाराची किली माझे हातीं आहे । पाहिजे तो पाहें वान येथें ।।२।।
तुका म्हणे आम्हां विश्वासाच्या बळें। ठेविलें मोकळें देवें येथें ।।३।।

३२३०
स्मरणाचे वेळे । व्हावें सावध न कळे ।।१।।
पडिलों विषयांचे ओढीं । कोणी न दिसेसें काढी ।।धृ।।
भांडवल माझें । वेच जालें भूमी ओझें ।।२।।
तुका म्हणे कळे । तूं चि धावें ऐसें वेळे।।३।।

३२३१
पाहा हो देवा कैसे जन । भिन्न भिन्न संचितें ।।१।।
एक नाहीं एका ऐसें । दावी कैसे शुद्ध हीन ।।धृ।।
पंचभूतें एकी रासी । सूत्रें कैसीं खेळवी ।।२।।
तुका म्हणे जे जे जाती । तैसी स्थिति येतसे ।।३।।

३२३२
कोणाचिया न पडों छंदा । गोविंदासी आळवूं ।।१।।
बहुतांचीं बहु मतें । अवघे रिते पोकळ ।।धृ।।
घटापटा ढवळी मन। होय सीण न करूं तें ।।२।।
तुका म्हणे पांडुरंग । भरूं भाग आला तो ।।३।।

३२३३
एकवेळ करीं या दुःखावेगळें । दुरिताचें जाळें उगवूनि।।१।।
आठवीन पाय हा माझा नवस । रात्री ही दिवस पांडुरंगा ।।धृ।।
बहु दूरवरी भोगविले भोग । आतां पांडुरंगा सोडवावें।।२।।
तुका म्हणे काया करीन कुरवंडी । ओंवाळूनि सांडीं मस्तक हें ।।३।।

३२३४
आणीक म्यां कोणा यावें काकुळती । कोण कामा येती अंतकाळीं ।।१।।
तूं वो माझी सखी होसी पांडुरंगे । लवकरी ये गे वाट पाहें ।।धृ।।
काया वाचा मनें हें चि काम करीं । पाउलें गोजिरीं चिंतीतसें ।।२।।
तुका म्हणे माझी पुरवीं हे आस । घालीं ब्रम्हरस भोजन हें ।।३।।

३२३५
हें आम्हां सकळा । तुझ्या नामाचें चि बळ ।।१।।
करूं अमृताचें पान । दुजें नेणों कांहीं आन ।।धृ।।
जयाचा जो भोग । सुख दुःख पीडी रोग ।।२।।
तुका म्हणे देवा । तुझे पायीं माझा हेवा।।३।।

३२३६
आर्त माझ्या बहु पोटीं । व्हावीं भेटी पायांशी ।।१।।
यासी तुम्ही कृपावंता । माझी चिंता असों द्या ।। ।ध्रु.।।
तळमळ करी चित्त । अखंडित वियोगें ।।२।।
तुका म्हणे पंढरिनाथा । जाणें वेथा अंतरिंची ।।३।।

३२३७
बहु जन्मांतरें फेरे । केले येरे सोडवीं ।।१।।
आळवितों करुणाकरे । विश्वंभरे दयाळे ।।धृ।।
वाहवतों मायापुरीं । येथें करीं कुढावा ।।२।।
तुका म्हणे दुजा कोण । ऐसा सीण निवारी ।।३।।

३२३८
कराल तें काय नव्हे जी विठ्ठला । चित्त द्यावें बोला बोबडिया ।।१।।
सोडवूनि घ्यावें काळचक्रा हातीं । बहुत विपत्ती भोगविल्या ।।धृ।।
ज्यालें जेऊं नेदी मारिलें चि मरो । प्रारब्धा उरो मागुतालीं ।।२।।
तुका म्हणे दुजा खुंटला उपाय । म्हणऊनि पाय आठविले ।।३।।

३२३९
डौरलों भक्तिसुखें । सेवूं अमृत हें मुखें ।।१।।
संतसंगें सारूं काळ । प्रेमसुखाचा कल्लोळ ।।धृ।।
ब्रम्हादिकांसी सुराणी । तो हा आनंद मेदिनी ।।२।।
नाहीं वैकुंठींचा पांग । धांवे कथे पांडुरंग ।।३।।
मुक्त व्हावें काशासाठीं । कैची येणें रसें भेटी।।४।।
तुका म्हणे गोड । हें चि पुरे माझें कोड ।।५।।

३२४०

फोडिलें भांडार । माप घेऊनियां खरें ।।१।।
केली हरिनामाची वरो । मागितलें आतां सरो ।।धृ।।
देशांत सुकाळ । जाला हारपला काळ ।।२।।
घ्यावें धणीवरी । तुका म्हणे लाहान थोरीं ।।३।।

३२४१
आनंदाचे डोहीं आनंदतरंग । आनंद चि अंग आनंदाचें।।१।।
काय सांगों जालें कांहींचियाबाही । पुढें चाली नाहीं आवडीनें ।।धृ।।
गर्भाचे आवडी मातेचा डोहळा । तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ।।२।।
तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सरिसा मुखा आला ।।३।।

३२४२
म्हणऊनि धरिले पाय । अवो माय विठ्ठले ।।१।।
आपुलें चि करूनि घ्यावें । आश्वासावें आम्हास ।।धृ।।
वाढली ते तळमळ चिंता । शम आतां करावी ।।२।।
तुका म्हणे जीवीं वसे । मज नसे वेगळी ।।३।।

३२४३
कल्याण या आशीर्वादें । जाती द्वंद्वें नासोनि ।।१।।
आश्वासिलें नारायणें । प्रेमदानें अंतरिंच्या ।।धृ।।
गेली निवारोनि आतां । सकळ चिंता यावरि ।।२।।
तुका म्हणे गातां गीत । आलें हित सामोरें ।।३।।

३२४४
हरिनामवेली पावली विस्तार । फळीं पुष्पीं भार बोल्हावला ।।१।।
तेथें माझ्या मना होईं पक्षिराज । साधावया काज तृप्तीचें या ।।ध्रु. ।।
मुळींचिया बीजें दाखविली गोडी । लवकर चि जोडी जालियाची ।।२।।
तुका म्हणे क्षणक्षणां जातो काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ।।३।।

३२४५
बरवें ऐसें आलें मना । नारायणा या काळें ।।१।।
देव आम्हा प्राणसखा । जालें दुःखा खंडण ।।ध्रु. ।।
जन्मांतरिंच्या पुण्यरासी । होत्या त्यांसी फळ आलें ।।२।।

तुका म्हणे निजठेवा । होईल हेवा लाधलों ।।३।।

३२४६
जरि हे आड यती लाज । कैसें काज साधतें ।।१।।
कारण केलें उठाउठी । पायीं मिठी घातली ।।धृ।।
समर्पिला जीव भाव । धरिला भाव अखंड ।।२।।
तुका म्हणे आड कांहीं । काळ नाहीं घातला ।।३।।

३२४७
पात्र शुद्ध चित्त गोही । न लगे कांहीं सांगणें ।।१।।
शूर तरी सत्य चि व्हावें । साटी जीवें करूनि ।।धृ।।
अमुप च सुखमान । स्वामी जन मानावें ।।२।।
तुका म्हणे जैसी वाणी । तैसे मनीं परिपाक ।।३।।

३२४८
प्रगटलें ज्ञान । नारायण भूतीं तें ।।१।।
अनुभव च घेऊं व्हावा । विनंती देवा करूनियां ।।धृ।।
देखोवेखीं वदे वाणी। पडिल्या कानीं प्रमाणें ।।२।।
तुका म्हणे योगक्षेम । घडे तें वर्म साधावें ।।३।।
३२४९
मुख्य आधीं विषयत्याग । विधिभाग पाळणें ।।१।।
मन पावे समाधान । हें चि दान देवाचें ।।धृ।।
उदासीन वृत्ति देहीं। चाड नाहीं पाळणें ।।२।।
तुका म्हणे नाहीं भय । सम सोय विषमाची।।३।।

३२५०
आतां हें चि सार हें चि सार । मूळबीज रे आइका।।१।।
आवडीनें आवडी उरे । जें ज्या झुरे तें त्यासी ।।धृ।।
प्रेमाचिया सूत्रदोरी । नाहीं उरी उरवी ।।२।।
तुका म्हणे चिंतन बरें । आहे खरें खऱ्यापें ।।३।।

३२५१
केला तैसा अंगीकार । माझा भार चालवीं ।।१।।

होऊं अंतराय बुद्धी । कृपानिधी नेदावी ।।धृ।।
आम्ही तरी जड जीव। कैंचा भाव पुरता ।।२।।
अनन्यभावें घ्यावी सेवा । आम्हां देवा घडेसी ।।३।।
तुम्हीं आम्ही शरणागतें । कृपावंतें रक्षीजे ।।४।।
तुका म्हणे भाकुं कींव । असों जीव जड आम्ही ।।५।।

३२५२
सोसें बहुगर्भवासीं । मेलों असों उपवासीं । नाहीं सखीं ऐसीं । तेथें कोणी भेटलीं ।।१।।
करीं करीं रे स्वहित । देह तंव हे अनित्य । नाहीं दिलें चित्त । सोडवूं मोहापासोनि ।।धृ।।
पाळी तोंडींचिया घांसें । तें चि होय अनारिसें । ज्या नव्हे ऐसें । खेदी परि सोडवीना ।।२।।
तुका म्हणे धनमानें । माझ्या बाटलों मीपणें । नाहीं दिला जनें । देखों लाभें हा लाभ ।।३।।

३२५३
इच्छिती तयांसी व्हावें जी अरूप । आम्हांसी स्वरूपस्थिती चाड ।।१।।
आतां नव्हे माझा भाव अनारिसा । पाउलांनी इच्छा गोवियेली ।।धृ।।
लेंकरासी कोठें जाणत्याची परी। करूं येते दुरी धरावया ।।२।।
लागली न सुटे नामाची आवडी। माझी भावजोडी भंगूं नका ।।३।।
घेसील वेढे मुक्तीच्या अभिळासें। चाळवीं जा पिसे ब्रम्हज्ञानी ।।४।।
तुका म्हणे माझा कोठें भक्तिरस। पाडावया ओस चाळविसी ।।५।।

३२५४
आम्हां भाविकांची जाती । एकविध जी श्रीपती । अळंकारयुक्ति । सरों शके चि ना ।।१।।
जाणें माउली त्या खुणा। क्षोभ उपजों नेदी मना । शांतवूनि स्तना ।।लावीं अवो कृपाळे।।धृ।।
तुज अवघे होऊं येते । मज वाटों नये चित्ते । उपासने परतें। नये कांहीं आवडों ।।२।।
करूं रूपाची कल्पना । मुखीं नाम उच्चारणा। तुका म्हणे जना । जल स्थल देखतां ।।३।।

३२५५
ज्यावें हीनपणें । कासयाच्या प्रयोजनें ।।१।।
प्रारब्धीं संसार । बरी हिमतीची थार ।।धृ।।
होणार ते कांहीं । येथें अवकळा नाहीं ।।२।।
तुका म्हणे देवें । कृपा केलिया बरवें ।।३।।

३२५६
किती रांडवडे । घालूनि व्हाल रे बापुडे । संसाराचे भिडे । कासावीस जालेती ।।१।।
माझ्या स्वामी शरण रिघा । कृपाळुवा पांडुरंगा । ठेवी अंगसंगा । विश्वासियां जवळी ।।धृ।।
कांहीं न मागतां भलें । होईल तें चि काम केलें । नसावें आथिलें। कांहीं एका संकल्पें ।।२।।
तुका म्हणे भाव । पाववील ठायाठाव । एकविध जीव । ठेविलिया सेवेसी ।।३।।

३२५७
बाप करी जोडी लेंकराचे ओढी । आपुली करवंडी वाळवूनी ।।१।।
एकाएकीं केलों मिरासीचा धनी । कडिये वागवूनी भार खांदीं ।।धृ।।
लेवऊनी पाहे डोळा अळंकार । ठेवा दावी थोर करूनियां ।।२।।
तुका म्हणे नेदी गांजूं आणिकांसी । उदार जीवासी आपुलिया ।।३।।

३२५८
या रे हरिदासानो जिंकों कळिकाळा । आमुचिया बळा पुढें किती बापुडें ।।१।।
रंग सुरंग घमंडी नाना छंदें । हास्यविनोदें मनाचिये आवडी ।।धृ।।
येणें तेणें प्रकारें बहुतां सुख जोडे । पूजन तें घडे नारायणा अंतरीं ।।२।।
वांकड्या माना बोल बोलावे आर्ष । येईल तो त्यांस छंद पढीयें गोविंदा ।।३।।
आपुलालें आवडी एकापुढें एक नटा । नाहीं थोर मोठा लहान या प्रसंगीं ।।४।।
तुका म्हणे येथें प्रेम भंगूं नये कोणीं । देव भक्त दोन्ही निवडितां पातक।।५।।

३२५९

अवघा च अन्यायी । तेथें एकल्याचें काई ।।१।।
आतां अवघें एकवेळें । जळोनि सरो तें निराळें ।।धृ।।
काय माझें खरें । एवढें च राखों बरें ।।२।।
तुका म्हणे आतां । परिहार न लगे चित्ता ।।३।।

३२६०
काय वृंदावन मोहियेलें गुळें । काय जिरें काळें उपचारिलें ।।१।।
तैसी अधमाची जाती च अधम । उपदेश श्रम करावा तो ।।धृ।।
न कळे विंचासी कुरवाळिलें अंग । आपले ते रंग दावीतसे ।।२।।
तुका म्हणे नये पाकासी दगड । शूकरासी गोड जैसी विष्ठा ।।३।।

३२६१
स्तवूनियां नरा । केला आयुष्याचा मातेरा ।।१।।
नारायणचिया लोपें । घडलीं अवघीं चि पापें ।।धृ।।
जीव ज्याचें दान। त्याचा खंडूनियां मान ।।२।।
तुका म्हणे वाणी । आइके त्या दोष कानीं ।।३।।

३२६२
संतां नाहीं मान । देव मानी मुसलमान ।।१।।
ऐसे पोटाचे मारिले । देवा आशा विटंबिले ।।धृ।।
घाली लोटांगण । वंदी नीचाचे चरण ।।२।।
तुका म्हणे धर्म । न कळे माजल्याचा भ्रम।।३।।

३२६३
अवो कृपावंता । होईं बुद्धीचा ये दाता ।।१।।
जेणें पाविजे उद्धार । होय तुझे पायीं थार ।।धृ।।
वदवीं हे वाचा । भाव पांडुरंगीं साचा ।।२।।
तुका म्हणे देवा । माझे अंतर वसवा ।।३।।

३२६४
नाहीं म्या वंचिला मंत्र कोणापाशीं । राहिलों जीवासीं धरूनि तो ।।१।।
विटेवरी भाव ठेवियेलें मन । पाउलें समान चिंतीतसें ।।धृ।।
पावविला पार धरिला विश्वास । घालूनियां कास बळकट ।।२।।

तुका म्हणे मागें पावले उद्धार । तिहीं हा आधार ठेविलासे ।।३।।

३२६५
चंचळीं चंचळ निश्चळीं निश्चळ । वाजवी खळाळ उदकासी ।।१।।
सोपें वर्म परि मन नाहीं हातीं । हा हा भूत चित्तीं भ्रम गाढा ।।धृ।।
रविबिंब नाहीं तुटत उदका । छायेची ते नका सरी धरूं ।।२।।
तुका म्हणे भय धरी रज्जूसाटीं । नाहीं साच पोटीं कळलें तों ।।३।।

३२६६
आवडी येते कळों । गुणें चिन्हें उमटती ।।१।।
पोटीचें ओठीं उभें राहे । चित्त साहे मनासी ।।धृ।।
डाहोळे याची भूक गर्भा । ताटीं प्रभा प्रतिबिंबे ।।२।।
तुका म्हणे मानोन घ्यावें । वाटे खावें वाटतें ।।३।।

३२६७. काय ऐसी वेळ । वोडवली अमंगळ ।।१।।
आजि दुखवलें मन । कथाकाळीं जाला सीण ।।धृ।।
पापाचिया गुणें । त्यांचिया वेळे दर्षणें ।।२।।
तुका म्हणे कानीं । घालूं आले दुष्टवाणी।।३।।

३२६८
किती वेळां जन्मा यावें । नित्य व्हावें फजीत ।।१।।
म्हणऊनि जीव भ्याला । शरण गेला विठोबासी ।।धृ।।
प्रारब्ध पाठी गाढें । न सरें पुढें चालत ।।२।।
तुका म्हणे रोकडीं हे । होती पाहें फजीती ।।३।।

३२६९
होतों सांपडलों वेठी । जातां भेटी संसारा ।।१।।
तों या वाटे कृपा केली । भेटी जाली विठोबासी ।।धृ।।
होता भार माथां माझे । बहु ओझें अमुप ।।२।।
तुका म्हणे केली चिंता । कोण दाता भेटेल ।।३।।

३२७०
भुंकुनियां सुनें लागे हस्तीपाठी । होऊनि हिंपुटी दुःख पावे ।।१।।

काय त्या मशकें तयाचें करावें । आपुल्या स्वभावें पीडतसे ।।धृ।।
मातलें बोकड विटवी पंचानना । घेतलें मरणा धरणें तें ।।२।।
तुका म्हणे संतां पीडितील खळ । घेती तोंड काळें करूनियां ।।३।।

३२७१
जा रे तुम्ही पंढरपुरा । तो सोयरा दीनांचा ।।१।।
गुण दोष नाणी मना । करी आपणासारिखें ।।धृ।।
उभारोनि उभा कर । भवपार उतराया ।।२।।
तुका म्हणे तांतड मोठी । जाली भेटी उदंड।।३।।

३२७२
गर्जत जावें नामावळी । प्रेमें टाळी वाहोनि ।।१।।
येणें सुखें पुढती धांवे । भेटी सवें गोपाळा ।।धृ।।
लोटांगण घाला तळीं । वंदा धुळी संतांची ।।२।।
तुका म्हणे विठ्ठल लाहो । ऐसा बाहो उभारा ।।३।।

३२७३
अनुसरे तो अमर जाला । अंतरला संसारा ।।१।।
न देखती गर्भवास । कधीं दास विष्णूचे ।।धृ।।
विसंभेना माता बाळा। तैसा लळा पाळावा ।।२।।
त्रिभुवनीं ज्याची सत्ता । तुक्या रक्षिता तो जाला ।।३।।

३२७४
आतां केशीराजा हे चि विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ।।१।।
देह असो माझा भलतिये ठायीं । चित्त तुझ्या पायीं असों द्यावें ।।धृ।।
काळाचें खंडण घडावें चिंतन । धनमानजनविन्मुख तो ।।२।।
कफवातपित्त देहअवसानीं । ठेवावीं वारूनि दुरितें हीं।।३।।
सावध तों माझीं इंद्रियें सकळें । दिलीं एका वेळे हाक आधीं ।।४।।
तुका म्हणे तूं या सकळांचा जनिता । येथें ऐकता सकळांसी ।।५।।

३२७५
चित्त तें चिंतन कल्पनेची धांव । जे जे वाढे हांव इंद्रियांची ।।१।।
हात पाव दिसे शरीर चालतां । नावें भेद सत्ता जीवाची ते ।।धृ।।

रवीचिये अंगीं प्रकाशक कळा । वचनें निराळा भेद दिला ।।२।।
तुका म्हणे माप वचनाच्या अंगीं । मौन्य काय रंगीं निवडावें ।।३।।

३२७६
बोलोनियां काय दावूं । तुम्ही जीऊ जगाचे ।।१।।
हे चि आतां माझी सेवा । चिंतन देवा करितों ।।धृ।।
विरक्तासी देह तुच्छ । नाहीं आस देहाची ।।२।।
तुका म्हणे पायापाशीं । येइन ऐसी वासना ।।३।।

३२७७
निजों नव्हें सकाळवेळीं । रातीकाळी चिंन चिंनी।।१।।
वोंगळानें घेतली पाठी । केली आटी जीवासी ।।धृ।।
मेळऊनि सवें जन । चिंता नेणे देवळीं च ।।२।।
तुका म्हणे आलों घरा । तोंडा घोरा बाइलेच्या ।।३।।

३२७८
मायबाप सवें नये धनवित्त । करावें संचित भोगावें तें ।।१।।
म्हणऊनि लाभ काय तो विचारीं । नको चालीवरी चित्त ठेवूं ।।धृ।।
आयुष्य सेवटीं सांडूनि जाणार । नव्हे हें साचार शरीर हें ।।२।।
तुका म्हणे काळें लावियेलें माप । जमे धरी पापपुण्याची ही ।।३।।

३२७९
मोटळें हाटीं सोडिल्या गांठी । विकऱ्या घातलें केण।
ज्याचे भाग त्यासी देऊनि वारिलें । सारूनि लिगाड दान ।
खरें माप हातीं घेऊनि बैसलों । मानिती ते चौघे जन ।
खरें वित्त तेथें आले चोजवीत । गिऱ्हाइक संतजन ।।१।।
झाडिला पालव केला हाट वेच । जाली सकाळीं च अराणूक ।
याल तरि तुम्ही करा लगबग । आमचे ते कोणी लोक ।।धृ।।
एक ते उत्तम मध्यम कनिष्ठ । वित्ताचे प्रकार तीन ।
बहुतां जनाचे बहुत प्रकार । वेगळाले वाण ।
लाभ हाणि कोणा मुदल जालें । कोणासी पडिलें खाण ।
अर्धमर्ध कोणी गुंतोनि राहिले । थोडे तैसे बहु जन ।।२।।
एके सांते आले एक गांवीहून । येकामे चि नव्हे जाणें ।

येतां जातां रुजू नाहीं दिवाणा । काळतोंडीं एकें तेणें ।
लाग भाग एकी एकानीं गोविलें । मागील पुढिलां ॠणें ।
तुका म्हणे आतां पाहूं नये वास। साधावें आपुलें पेणें ।।३।।

३२८०
करा करा लागपाट । धरा पंढरीची वाट । जंव नाहीं चपेट । घात पडिला काळाचा ।।१।।
दुजा ऐसा नाहीं कोणी । जो या काढी भयांतूनि । करा म्हणऊनि । हा विचार ठायींचा ।।धृ।।
होती गात्रें बेंबळीं । दिवस अस्तमाना काळीं । हातपायटाळीं । जें मोकळी आहेती ।।२।।
कां रे घेतलासी सोसें । तुज वाटताहे कैसें। तुका म्हणे ऐसें । पुढें कैं लाहासी ।।३।।

३२८१
यत्न आतां तुम्ही करा । मज दातारा सत्तेनें ।।१।।
विश्वास तो पायांवरि । ठेवुनि हरी राहिलों ।।धृ।।
जाणत चि दुजें नाहीं । आणीक कांहीं प्रकार ।।२।।
तुका म्हणे शरण आलों । नेणें बोलों विनवितां ।।३।।

३२८२
अनाथां जीवन । आम्हां तुमचे चरण । करूनि सांटवण। धरीयेले हृदयीं ।।१।।
पुष्ट जाली अंगकांति । आनंद न समाये चित्तीं । कवतुकें प्रीती । गाऊं नाचों उल्हासें ।।धृ।।
करुणाउत्तरीं। करून आळवण हरी । जाऊं नेदूं दुरी । प्रेमप्रीतिपडिभरें ।।२।।
मोहो माते करी गोवा । ऐसें आहे जी केशवा । तुका म्हणे सेवा । आणीक नाहीं जाणत ।।३।।

३२८३
सुखाची वसति जाली माझे जीवीं । तुमच्या गोसावी कृपादानें ।।१।।
रूप वेळावेळां आठवीं अंतरीं । बैसोनि जिव्हारीं राहिलें तें ।।धृ।।
विसांवलें मन विठ्ठलें प्रपंचा ।। गोडावली वाचा येणें रसें ।।२।।
तुका म्हणे कांहीं नाठवेसें केलें । दुसरें विठ्ठलें मज आतां ।।३।।

३२८४
आम्हां कांहीं आम्हां कांहीं । आतां नाहीं या बोलें।।१।।
मोल सांगा मोल सांगा । घेणें तिंहीं गा पुसावें ।।धृ।।
कैसें घडे कैसें घडे । बडबड तुज मज ।।२।।
मुदलें साटी मुदलें साटी । लाभ पोटीं त्या च मधीं ।।३।।
तुका म्हणे साटवूं घरीं । आडल्या काळें पुसती तरी ।।४।।

३२८५
घ्या रे भाई घ्या रे भाई । कोणी कांहीं थोडें बहु।।१।।
ये च हाटीं ये च हाटीं । बांधा गाठी पारखून ।।धृ।।
वेच आहे वेच आहे । सरलें पाहे मग खोटें ।।२।।
उघडें दुकान उघडें दुकान । रात्री जाली कोण सोडी मग ।।३।।
तुका म्हणे अंतकाळीं । जाती टाळीं बैसोनि ।।४।।

३२८६
मार्ग चुकले विदेशीं एकले । तयावरि जाले दिशाभुली।।१।।
हातीं धरूनियां पावविलें घरा । त्याच्या उपकारा काय द्यावें ।।२।।
तैसा मी कुडकुडा होतों केशीराजा । सेवा न घडे लाजा म्हणऊनि ।।धृ।।
सांडियेला गर्भ उबगोनि माउली । नाहीं सांभाळिली भूमि शुद्ध ।।३।।
उष्ण तान भूक एवढिये अकांतीं । वोसंगा लाविती काय म्हणिजे ।।४।।
खांद्यावरी शूळ मरणाचे वाटे। अन्याय हि मोटे साच केले ।।५।।
हातींचें हिरोनि घातला पाठीसी। तुका म्हणे ऐसी परी जाली ।।६।।

३२८७ जैसी तैसी तरि वाणी । मना आणी माउली ।।१।।
लेकरांच्या स्नेहें गोड । करी कोड त्या गुणें ।।धृ।।
मागें पुढें रिघे पोटीं । साहे खेटी करीतें ।।२।।
तुका विनवी पांडुरंगा । ऐसें पैं गा आहे हें ।।३।।

३२८८
गुणांचे आवडी वाचेचा पसरू । पडिला विसरु इतरांचा ।।१।।
आदिमध्यअंतीं नाहीं अवसान । जीवनीं जीवन मिळोनि गेलें ।।धृ।।
रामकृष्णनाममाळा हे साजिरी । ओविली गोजिरी कंठाजोगी ।।२।।

तुका म्हणे तनु जालीसे शीतळ । अवघी सकळ ब्रम्हानंदें ।।३।।

३२८९
देवाची भांडारी । आदा विनियोग करी ।।१।।
आतां न माखे हातपाय । नेणों होतें ऐसें काय ।।धृ।।
देवें नेली चिंता । जाला सकळ करिता ।।२।।
तुका म्हणे धणी । त्यासी अवघी पुरवणी ।।३।।

३२९०
पेणावलें ढोर मार खाय पाठी । बैसलें तें नुठी तेथूनियां ।।१।।
तैसी माझ्या मना परी जाली देवा । धावें अहंभावा सांडावलों ।।धृ।।
कडां घालीं उडी मागिलांच्या भेणें । मरणामरण न कळे चि ।।२।।
तुका म्हणे जालों त्यापरी दुःखित । असें बोलावीत पांडुरंगा ।।३।।

३२९१
जालिया दर्शन करीन मी सेवा । आणीक ही देवा न लगे दुजें ।।१।।
प्रारब्धा अंगीं अन्न आच्छादन । स्थिर करोनि मन ठेवीं पायीं ।।धृ।।
ये गा ये गा ये गा कृपाळुवा हरी । निववीं अभ्यंतरीं देउनि भेटी ।।२।।
आसावलें मन जीवनाचे ओढी । नामरूपें गोडी लावियेली ।।३।।
काय तुम्हांपाशीं नाहीं भांडवल । माझे मिथ्या बोल जाती ऐसे ।।४।।
काय लोखंडाचे पाहे गुण दोष । सिवोनि परिस सोनें करी ।।५।।
तुका म्हणे माझें अवघें असों द्यावें। आपुलें करावें ब्रीद साच ।।६।।

३२९२
येथें आड कांहीं न साहे आणीक । प्रमाण तें एक हें चि जालें ।।१।।
गाऊं नाचों टाळी गाऊं गाऊं गीत छंदें । डोलवूं विनोदें अंग तेणें ।।धृ।।
मथुनियां सार काढिलें बाहेरी । उपाधि ते येरी निवडिली ।।२।।
तुका म्हणे जगा लाविली शिराणी । सेवितां हे धणी होत नाहीं ।।३।।

३२९३
शरणागत जालों । तेणें मीपणा मुकलों ।।१।।
आतां दिल्याची च वाट । पाहों नाहीं खटपट ।।धृ।।
नलगे उचित । कांहीं पाहावें संचित ।।२।।

तुका म्हणे सेवा । माने तैसी करूं देवा ।।३।।

३२९४
वाचेचिया आळा कवळिलें ब्रम्ह । चुकविला श्रम पृथक तो ।।१।।
सुलभ जालें सुलभ जालें । जवळी आलें पंढरिये ।।धृ।।
नामरूपाचें बांधलें मोटळें । एक एका वेळे सारियेलें ।।२।।
तुका म्हणे वाटे चुकली वसती । उद्धार तो हातीं आणियेला ।।३।।

३२९५
सवंग जालें सवंग जालें । घरा आलें बंदरींचे ।।१।।
आतां हेवा करावा सोस । भक्तिरस बहु गोड ।।धृ।।
पाउल वेचे चिंता नाहीं । आड कांहीं मग नये ।।२।।
तुका म्हणे संचिताचें । नेणें काचें राहों तें ।।३।।

३२९६
तुम्ही संत मायबाप कृपावंत । काय मी पतित कीर्ती वाणूं ।।१।।
अवतार तुम्हां धराया कारणें । उद्धरावें जन जड जीव।।धृ।।
वाढविलें सुख भक्ति भाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचें ।।२।।
तुका म्हणे गुण चंदनाचे अंगीं । तैसे तुम्ही जगीं संतजन ।।३।।

३२९७
पाठी लागे तया दवडीं दुरी । घालीं या बाहेरी संवसारा ।।१।।
येउनि दडें तुमच्या पायीं । धांवें तईं छो म्हणा ।।धृ।।
पारखियाचा वास पडे । खटबड उठी तें ।।२।।
तुका म्हणे लाविला धाक । नेदी ताक खाऊं कोणी ।।३।।

३२९८
सांखळिलों प्रीती गळां । भुंके वेळा जाणोनियां।।१।।
तुमचें मी केशीराजा । सुनें या काजा पाळिलों ।।धृ।।
आलें गेलें कळे वाटा । कोण निटा वाकडिया ।।२।।
तुका म्हणे आलें वारी । दुरितें दुरी नातळतां ।।३।।

३२९९

सुनियांचा हा चि भाव । आपला ठाव राखावा ।।१।।
दुजियाचा येऊं वारा । नेदूं घरावरी देऊं ।।धृ।।
केली याची फाडाफाडी। तडामोडी क्षेत्राची ।।२।।
पातेजत नाहीं लोकां । तुका देवावांचूनि।।३।।

३३००
सुनियांची आवडी देवा । घेत सेवा नाहीं कांहीं ।।१।।
सिकविलें जवळी बैसों । जेथें असों तेथें चि ।।धृ।।
नेदी दुजें बोलों करूं । गुरुगुरु न साहे ।।२।।
तुका म्हणे कृवाळितां । अंग सत्ता संगाची ।।३।।

३३०१
सिळें खातां आला वीट । सुनें धीट पावि धरी।।१।।
कान्होबा ते जाणे खूण । उन उन घास घाली ।।धृ।।
आपुलिये ठायींचे घ्यावें । लाड भावें पाळावा ।।२।।
तुका म्हणे मी जुनाट । मोहो आट परतला ।।३।।

३३०२
लागलें भरतें । ब्रम्हानंदाचें वरतें ।।१।।
जाला हरिनामाचा तारा । सीड लागलें फरारा ।।धृ।।
बैसोनि सकळ । बाळ चालिले गोपाळ ।।२।।
तुका म्हणे वाट । बरवी सांपडली नीट ।।३।।

३३०३
धनें वित्तें कुळें । अवधियानें ते आगळे ।।१।।
ज्याचे नारायण गांठीं । भरला ह्रदय संपुटीं ।।धृ।।
अवघें चि गोड । त्याचें पुरलें सर्व कोड ।।२।।
तुका म्हणे अस्त । उदय त्याच्या तेजा नास्त।।३।।

३३०४
बोलावें तें आतां आम्ही अबोलणे । एका चि वचनें सकळांसी ।।१।।

मेघदृष्टि कांहीं न विचारी ठाव । जैसा ज्याचा भाव त्यासी फळो ।।२।।
तुका म्हणे नाहीं समाधानें चाड । आपणा ही नाड पुढिलांसीं ।।३।।

३३०५
अधिकार तैसा करूं उपदेश । साहे ओझें त्यास तें चि द्यावें ।।१।।
मुंगीवर भार गजाचें पालाण । घालितां तें कोण कार्यसिद्धी ।।२।।
तुका म्हणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी । प्रसंगी तों काढी पारधी तो ।।३।।

३३०६
नव्हों वैद्य आम्ही अर्थाचे भुकेले । भलते द्यावे पाले भलत्यासी ।।१।।
कुपथ्य करूनि विटंबावे रोगी । का हे सलगी भीड त्याची ।।२।।
तुका म्हणे लांसू फांसूं देऊं डाव । सुखाचा उपाव पुढें आहे ।।३।।

३३०७
नव्हें परि म्हणवीं दास । कांहीं निमित्तास मूळ केलें।।१।।
तुमचा तो धर्म कोण । हा आपण विचारा ।।धृ. ।।
नाहीं शुद्ध आचरण । परी चरण चिंतितों ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगा । ऐसें कां गा नेणां हें ।।३।।

३३०८
मागें चिंता होती आस । केला नास या काळें ।।१।।
तुम्ही आम्हां उदासीन । भिन्नाभिन्न वारिलें ।।धृ।।
मोहजाळें दुःख वाढे । ओढे ओढे त्यास तें ।।२।।
तुका म्हणे कोण देवा । आतां हेवा वाढवी ।।३।।

३३०९
आहो उभा विटेवरी । भरोवरी चुकविली ।।१।।
निवारलें जाणें येणें । कोणा कोणें रुसावे ।।धृ।।
संकल्पासी वेचे बळ । भारे फळ निर्माण ।।२।।
तुका म्हणे उभयतां । भेटी सत्ता लोभाची ।।३।।

३३१०
असो खटपट । आतां वाउगे बोभाट ।।१।।

परिसा हे विनवणी । असो मस्तक चरणीं ।।धृ।।
अपराध करा । क्षमा घडले दातारा ।।२।।
तुका म्हणे वेथा । तुम्हा कळे पंढरिनाथा ।।३।।

३३११
वारकरी पायांपाशीं । आले त्यांसी विनविलें ।।१।।
काय काय तें आइका । विसरों नका रंकासी ।।धृ।।
चिंतावोनि चिंता केली । हे राहिली अवस्था ।।२।।
तुका म्हणे संसारा । रुसलों खरा यासाठीं ।।३।।

३३१२
जीवींचें कां नेणां । परि हे आवडी नारायणा ।।१।।
वाढवावें हें उत्तर । कांहीं लाज करकर ।।धृ।।
कोठें वांयां गेले । शब्द उत्तम चांगले ।।२।।
तुका म्हणे बाळा । असतात प्रिय खेळा।।३।।

३३१३
वोडविलें अंग । आतां करूनि घ्यावें सांग ।।१।।
काय पूजा ते मी नेणें । जाणावें जी सर्वजाणें ।।धृ।।
पोटा आलें बाळ। त्याचें जाणावें सकळ ।।२।।
चुका म्हणे हरी । वाहावें जी कडियेवरी।।३।।

३३१४
सेवटींची हे विनंती । पाय चित्तीं रहावे ।।१।।
ऐसे करा कृपादान । तुम्हां मन सन्निध ।।धृ।।
भाग्याविण कैंची भेटी । नव्हे तुटी चिंतनें ।।२।।
तुका म्हणे कळसा आलें । हें विठ्ठलें परिसावें ।।३।।

३३१५
करूंनियां शुद्ध मन । नारायण स्मरावा ।।१।।
तरीच हा तरिजे सिंधु । भवबंधू तोडोनिया ।।धृ।।
तेथे सरे शुद्ध साचें । अंतरींचे बीज तें ।।२।।
तुका म्हणे लवणकळी । पडतां जळीं तें होय ।।३।।

३३१६
जिकडे पाहे तिकडे देव । ऐसा भाव दे कांहीं ।।१।।
काय केलों एकदेशी । गुणदोषीं संपन्न ।।धृ।।
पडें तेथें तुझ्या पायां। करीं वायां न वजतें ।।२।।
तुका म्हणे विषमें सारी । ठाणें धरी जीवासी ।।३।।

३३१७
जिकडे जाय तिकडे सवें । आतां यावें यावरी ।।१।।
माझ्या अवघ्या भांडवला । तूं एकला जालासी ।।धृ।।
आतां दुजें धरा झणी । पायांहूनि वेगळें ।।२।।
तुका म्हणे आतां देवा । नका गोवा यावरी ।।३।।

३३१८
स्मरतां कां घडे नास । विष्णुदास यावरी ।।१।।
ऐसी सीमा जाली जगीं । तरी मी वेगीं अनुसरलों ।।धृ।।
धरिलें तें निवडे आतां । न घडे चित्तावेगळें ।।२।।
तुका म्हणे नाश नाहीं । पुराणें ही गर्जती ।।३।।

३३१९
आधी नाहीं कळों आला हा उपाय । नाहीं तरी काय चुकी होती ।।१।।
घालितो पायांसी मिठी एकसरें । नेदीं तो दुसरें आड येऊं ।।धृ।।
कासया पडतों लटिक्याचे भरी । नव्हता का शिरीं भार घेतों ।।२।।
तुका म्हणे कां हे घेतों गर्भवास । कां या होतों दास कुटुंबाचा ।।३।।

३३२०
आतां बरें जालें । माझें मज कळो आलें ।।१।।
खोटा ऐसा संवसार । मज पायीं द्यावी थार ।।धृ।।
उघडले डोळे । भोग देताकाळीं कळे ।।
तुका म्हणे जीवा । होतां तडातोडी देवा ।।३।।

३३२१
बोलिलों ते धर्म अनुभव अंगें । काय पांडुरंगें उणें केलें ।।१।।

सर्व सिद्धि पायीं वोळगती दासी । इच्छा नाहीं ऐसी व्हावें कांहीं ।।धृ।।
संतसमागमें अळंकार वाणी । करूं हे पेरणी शुद्ध बीजा ।।२।।
तुका म्हणे रामकृष्णनामें गोड । आवडीचें कोड माळ ओऊं ।।३।।

३३२२
परिसाचे अंगें सोनें जाला विळा । वाकणें या कळा हीन नेव्हे ।।१।।
अंतरीं पालट घडला कारण । मग समाधान तें चि गोड ।।धृ।।
पिकली सेंद पूर्वकर्मा नये । अव्हेरु तो काय घडे मग।।२।।
तुका म्हणे आणा पंगती सुरण । पृथक ते गुण केले पाकें।।३।।

३३२३
ज्याचे माथां जो जो भार । ते चि फार तयासी ।।१।।
मागें पुढें अवघें रितें । कळों येतें अनुभवें ।।धृ।।
परिसा अंगीं अमुपसोनें । पोटीं हीन धातु चि ।।२।।
आपुला तो करि धर्म । जाणे वर्म तुका तें ।।३।।

३३२४
पाहें तिकडे दिशा ओस । अवघी पास पायांपें ।।१।।
मन चि साच होइल कईं । प्रेम देईं भेटोनि ।।धृ।।
सर्वापरि पांगुळ असें । न कळे कैंसे तें तुम्हा ।।२।।
तुका म्हणे कृपावंता । तूं तों दाता दीनाचा ।।३।।

३३२५
चालवणें काय । ऐसें अंगे माझे माय ।।१।।
धांव धांव लवलाहें । कंठीं प्राण वाट पाहे ।।धृ।।
पसरूनि कर । तुज चालिलों समोर ।।२।।
देसील विसांवा । तुका म्हणे ऐशा हांवा।।३।।

३३२६
आवडीच्या ऐसें जालें । मुखा आलें हरिनाम ।।१।।
आतां घेऊं धणीवरि । मागें उरी नुरेतों ।।धृ।।
सांटवण मनाऐसी । पुढें रासी अमुप ।।२।।
तुका म्हणे कारण जालें । विठ्ठल तीं अक्षरीं।।३।।

३३२७
त्यांचिया चरणां माझें दंडवत । ज्यांचें धनवित्त पांडुरंग ।।१।।
येथें माझा जीव पावला विसांवा । म्हणऊनि हांवा भरलासें ।।धृ।।
चरणींचें रज लावीन कपाळा । जीं पदें राउळा सोई जाती ।।२।।
आणिक तीं भाग्यें येथें कुरवंडी । करूनियां सांडीं इंद्राऐसी ।।३।।
वैष्णवांचे घरीं देवाची वसति । विश्वास हा चित्तीं सत्यभावें ।।३।।
तुका म्हणे सखे हरिचे ते दास । आतां पुढें आस नाहीं दुजें ।।५।।

३३२८
उपजोनियां मरें । परि हें चि वाटे बरें ।।१।।
नाहीं आवडीसी पार । न म्हणावें जालें फार ।।धृ।।
अमृताची खाणी । उघडली नव्हे धणी ।।२।।
तुका म्हणे पचे । विठ्ठल हें मुखा साचें।।३।।

३३२९
सत्य तूं सत्य तूं सत्य तूं विठ्ठला । कां गा हा दाविला जगदाकार ।।१।।
सांभाळीं आपुली हाक देतो माया । आम्हांसी कां भयाभीत केलें ।।धृ।।
रूप नाहीं त्यासी ठेवियेलें नाम। लटका चि श्रम वाढविला ।।२।।
तुका म्हणे कां गा जालासी चतुर । होतासी निसुर निर्विकार ।।३।।

३३३०
अमच्या कपाळें तुज ऐसी बुद्धि । धरावी ते शुद्धी योगा नये ।।१।।
काय या राहिलें विनोदावांचून । आपुलिया भिन्न केलें आम्हां ।।धृ।।
कोठें मूर्त्तिमंत दावीं पुण्यपाप । काशासी संकल्प वाहाविसी ।।२।।
तुका म्हणे आतां आवरावा चेडा । लटिकी च पीडा पांडुरंगा ।।३।।

३३३१
नो बोलावें ऐसें जनासी उत्तर । करितों विचार बहु वेळा ।।१।।
कोण पाप आड ठाकतें येऊन । पालटिति गुण अंतरींचा ।।धृ।।
संसारा हातीं सोडवूनि गळा । हें कां अवकळा येती पुढें ।।२।।
तुका म्हणे सेवे घडेल अंतराय । यास करूं काय पांडुरंगा ।।३।।

३३३२
आतां हें उचित माझें जना हातीं । पाहिजे फजीती केली कांहीं ।।१।।
मग हे तुमचे न सोडीं चरण । त्रासोनियां मन येइल ठाया ।।धृ।।
वाउगे वाणीचा न धरीं कांटाळा । ऐसी कां चांडाळा बुद्धि मज ।।२।।
तुका म्हणे जरि माथां बैसे घाव । तरि मग वाव नेघे पुढें ।।३।।

३३३३
मायेवरी सत्ता आवडीची बाळा । संकोचोनि लळा प्रतिपाळी ।।१।।
अपराध माझे न मनावे मनीं । तुम्ही संतजनीं मायबापीं ।।धृ।।
आरुष वचन लेंकुराची आळी । साहोनि कवळी मागुताली ।।२।।
तुका म्हणे अंगीं काय नाहीं सत्ता । परि निष्ठुरता उपेजना ।।३।।

३३३४
कैसा होतो कृपावंत । बहुसंत सांगती । पुसणें नाहीं यातीकुळ । लागों वेळ नेदावा ।।१।।
ऐसी काय जाणों किती । उतरती उतरले ।।धृ।।
दावी वैकुंठींच्या वाटा । पाहातां मोठा संपन्न। अभिमान तो नाहीं अंगी । भक्तालागी न बैसे ।।२।।
तुका म्हणे आळस निद्रा । नाहीं थारा त्या अंगीं । आलें द्यावें भलत्या काळें । विठ्ठल बळें आगळा ।।३।।

३३३५
सदैव हे वारकरी । जे पंढरी देखती । पदोपदीं विठ्ठल वाचे । त्यांसी कैचा संसार ।।१।।
दोष पळाले दोष पळाले। पैल आले हरिदास ।।धृ।।
प्रेमभातें भरलें अंगीं । निर्लज्ज रंगीं नाचती । गोपीचंदनाची उटी । तुळसी कंठीं मिरवती ।।२।।
तुका म्हणे देव चित्तीं । मोक्ष हातीं रोकडा । दुर्बळा या शक्तिहीना । त्या ही जना पुरता ।।३।।

३३३६
ऐसीं ठावीं वर्में । तरी सांडवलों भ्रमें ।।१।।
सुखें नाचतों कीर्तनीं । नाहीं आशंकित मनीं ।।धृ।।

ऐसें आलें हाता । बळ तरी गेली चिंता ।।२।।
सुखे येथें जालें तरी । नाहीं आणिकांची उरी ।।३।।
ऐसें केलें देवें । पुढें कांहीं चि न व्हावें ।।४।।
तुका म्हणे मन । आतां जालें समाधान ।।५।।

३३३७
चित्तीं बैसलें चिंतन । नारायण नारायण ।।१।।
न लगे गोड कांहीं आतां । आणीक दुसरें सर्वथा ।।धृ।।
हरपला द्वैतभाव । तेणें देह जाला वाव ।।२।।
तुकयाबंधु म्हणे आम्ही । जालों निष्काम ये कामीं ।।३।।

३३३८
व्यापिलें सर्वत्र । बाहेरी भीतरीं अंत ।।१।।
ऐसें गोविंदें गोविलें । बोलें न वजाये बोलिले ।।धृ।।
संचिताची होळी । करूनि जीव घेतला बळी ।।२।।
तुकयाबंधु म्हणे नाहीं । आतां संसारा उरी कांहीं ।।३।।

३३३९
तुम्हांआम्हांसी दरुषण । जालें दुर्लभ भाषण ।।१।।
म्हणऊनि करितों आतां । दंडवत घ्या समस्तां ।।धृ।।
भविष्याचें माथां देह । कोण जाणें होइल काय ।।२।।
म्हणे तुकयाचा बंधव । आमचा तो जाला भाव ।।३।।

३३४०
अनंतजन्में जरी केल्या तपरासी । तरी हा न पवे म्हणे देह ।।१।।
ऐसें जें निधान लागलेंसे हातीं । त्याची केली माती भाग्यहीना ।।धृ।।
उत्तमाचें सार वेदाचें भांडार । ज्याच्यानें पवित्र तीर्थें होती ।।२।।
तुका म्हणे तुकयाबंधु आणीक उपमा । नाहीं या तों जन्मा द्यावयासी ।।३।।

३३४१
आम्हांपाशीं सरे एक शुद्ध भाव । चतुराई जाणींव न लगे कळा ।।१।।
सर्वजाण माझा स्वामी पांडुरंग । तया अंगसंगें गोपाळासी ।।२।।
तुका म्हणे कर्मधर्मे नये हातां । तयावरि सत्ता भाविकांची ।।३।।

३३४२
प्रीति करी सत्ता । बाळा भीती मातापिता ।।१।।
काय चाले त्याशीं बळ । आळी करितां कोल्हाळ ।।धृ।।
पदरीं घाली मिठी । खेदी मागें पुढें लोटी ।।२।।
बोले मना आलें । तुका साहिला विठ्ठलें ।।३।।

३३४३
आवडीचे भेटी निवे । चित्त पावे विश्रांती ।।१।।
बरवियाचा छंद मना । नारायणा अवीट ।।धृ।।
तळणे कांहीं साम्या पुरे । हें तों नुरे ये रुचि ।।२।।
तुका म्हणे बरवें जालें । फावलें हें कळे त्या ।।३।।
३३४४
केलियाचें दान । करा आपुलें जतन ।।१।।
माझी बुद्धि स्थिर देवा । नाहीं विषयांचा हेवा ।।धृ।।
भावा अंतराय । येती अंतरती पाय ।।२।।
तुका म्हणे जोडी । आदीं अंतीं राहो गोडी।।३।।

३३४५
माझे हातीं आहे करावें चिंतन । तुम्ही कृपादान प्रेम द्यावें ।।१।।
मागति यां भांडवल आळवण । नामाची जतन दातियासी।।धृ।।
बाळक धांवोनि आड निघे स्तनीं ।। घालावा जननी कृपे पान्हां ।।२।।
तुका म्हणे करीं कासवाचे परी । आहे सूत्रदोरी तुझे हातीं ।।३।।

३३४६
वाट दावी त्याचें गेलें काय । नागवला जो वारितां जाय ।।१।।
ऐसीं मागें ठकलीं किती । सांगतां खाती विषगोळा।।धृ।।
विचारोनि पाहे त्यास । न वजे जीवें नव्हे नास ।।२।।
तुका म्हणे जो रुसला जीवा । तयासी केशवा काय चाले ।।३।।

३३४७
अनुभवावांचून सोंग संपादणें । नव्हे हें करणें स्वहिताचें।।१।।
तैसा नको भुलों बाहिरल्या रंगें । हित तें चि वेगें करूनि घेईं ।।धृ।।

बहुरूपी रूपें नटला नारायण । सोंग संपादून जैसा तैसा ।।२।।
पाषाणाचें नाव ठेविलें देव । आणिका तारी भाव परि तो तैसा ।।३।।
कनक झाड म्हुण वंदिलें माथां । परिं तें अर्था न मिळे माजी ।।४।।
तुका म्हणे त्याचा भाव तारी त्यास । अहंभावीं नास तो चि पावे ।।५।।

३३४८
मज नष्टा माया मोह नाहीं लोभ । अधिक हो क्षोभ आदराचा ।।१।।
धिग हें शरीर अनउपकार । न मनी आभार उपकाराचा ।।धृ।।
मजहून नष्ट आहे ऐसा कोण । नावडे मिष्टान्न बहुमोल ।।२।।
न दिसती मज आपलेसे गुण । संचित तें कोण जाणे मागें ।।३।।
तुका म्हणे देखोनियां काई । पांडुरंगा पायीं राखियेलें ।।४।।

३३४९
मतिविण काय वर्णूं तुझें ध्यान । जेथें पडिलें मौन्य वेदश्रुती ।।१।।
करूनि गोजिरा आपुलिये मती । धरियेलें चित्तीं चरणकमळ ।।धृ।।
सुखाचें ओतिलें पाहों ते श्रीमुख । तेणें हरे भूक तान माझी ।।२।।
रसना गोडावली ओव्या गातां गीत । पावलेंसे चित्त समाधान ।।३।।
तुका म्हणे माझी दृष्टि चरणांवरी । पाउलें गोजिरीं कुंकुमाचीं ।।४।।

३३५०
ओस जाल्या मज भिंगुळवाणें । जीवलग नेणें मज कोणी ।।१।।
भय वाटे देखें श्वापदांचे भार । नव्हे मज धीर पांडुरंगा।।धृ।।
अंधकारापुढे न चलवे वाट । लागतील खुंटे कांटे अंगा ।।२।।
एकला निःसंग फांकती मारग । होतों नव्हे लाग चालावया ।।३।।
तुका म्हणे वाट दावूनि सद्‌गुरु । राहि हा दुरू पांडुरंग ।।४।।

३३५१
उदार कृपाळ सांगसी जना । तरी कां त्या रावणा मारियेलें ।
नित्य नित्य पूजा करी श्रीकमळीं । तेणें तुझें काय केलें।।१।।
काय बडिवार सांगसी वांयां । ठावा पंढरिराया आहेसि आम्हां ।
एकला चि जरी देऊं परिहार । आहे दुरिवरी सीमा ।।धृ।।
कर्णाऐसा वीर उदार जुंझार । तो तुवां जर्जर केला वाणीं ।
पडिला भूमी परी नयेची करुणा । दांत पाडियेले दोन्ही ।।२।।

श्रियाळ बापुडे सात्विकवाणी । खादलें कापूनि त्याचें पोर ।
ऐसा कठिण कोण होईल दुसरा । उखळीं कांडविलें शिर ।।३।।
सिभ्री चक्रवर्ती करितां यज्ञयाग । त्याचें चिरिलें अंग ठायीं ठायीं ।
जाचऊनि प्राण घेतला मागें । पुढें न पाहतां कांहीं ।।४।।
बळीचा अन्याय सांग होता काय। बुडविला तो पाय देऊनि माथां ।
कोंडिलें दार हा काय कहार । सांगतोसी चित्त कथा ।।५।।
हरिश्चंद्राचें राज्य घेऊनियां सर्व। विकविला जीव डोंबाघरीं ।
पाडिला विघड नळा दमयंतीमधीं। ऐसी तुझी बुद्धि हरि ।।६।।
आणिकही गुण सांगावे किती । केलिया विपत्ति माउसीच्या ।
वधियेला मामा सखा पुरुषोत्तमा । म्हणे बंधु तुकयाचा ।।७।।

३३५२
जे केली आळी ते अवघी गेली वांयां । उरला पंढरिराया श्रम माझा ।।१।।
काय समाधान केलें कोण वेळे । कोणें माझे लळे पाळियेलें ।।धृ।।
आभास ही नाहीं स्वप्नीं दुश्चिता । प्रत्यक्ष बोलतां कंइचा तो ।।२।।
आतां पुढें लाज वाटे पांडुरंगा । भक्त ऐसे जगामाजी जाले ।।३।।
तुका म्हणे आतां नाहीं भरवसा । मोकलीसी ऐसा वाटतोसी ।।४।।

३३५३
समश्रुळित असतां वाचा । घोष न करिसी कां नामाचा ।।१।।
कां रे वैष्णव नव्हेसी । कवण्या दंभें नागवलासी।।धृ।।
हरि हरि म्हणतां लाजसी । गर्वें फुगोनि चालसी ।।२।।
तारुण्यें उताणा । पुंसेंविण बांडा सुना ।।३।।
जालेंसि महिमेचे वेडें । नाचों लाजसी दिंडीपुढें ।।४।।
अळंकारांच्यानि बळें । वंचलासी तुळसीमाळें।।५।।
कैसा सकुमार जालासी । म्हणसी न टकें एकादशी।।६।।
स्नान न करिसी आंघोळी । विभुती न लाविसी कपाळीं ।।७।।
वरिवरि न्याहाळिसी त्वचा । उपेग नाहीं मांसाचा।।८।।
पद्मनाभी विश्वनाथ । तुका अझून रडत ।।९।।

३३५४
वाघाचा काळभूत दिसे वाघाऐसा । परी नाहीं दशा साच अंगीं ।।१।।
बाहेरील रंग निवडी कसोटी । संघष्टणें भेटी आपेआप ।।धृ।।

सिकविलें तैसें नाचावें माकडें । न चले त्यापुढें युक्ति कांहीं ।।२।।
तुका म्हणे करी लटिक्याचा सांटा । फजित तो खोटा शीघ्र होय ।।३।।

३३५५
सिंदळीचे सोर चोराची दया । तो ही जाणा तया संवसर्गी ।।१।।
फुकासाटीं भोगे दुःखाचा वाटा । उभारोनी कांटा वाटेवरी ।।धृ।।
सर्प पोसूनियां दुधाचा नास । केलें थीता विष अमृताचें ।।२।।
तुका म्हणे यासी न करितां दंडण । पुढिल खंडण नव्हे दोषा ।।३।।

३३५६
तेणें सुखें माझें निवालें अंग । विठ्ठल हें जग देखियेलें ।।१।।
कवतुकें करुणा भाकीतसें लाडें । आवडी बोबडें बोलोनियां ।।धृ।।
मज नाहीं दशा अंतरीं दुःखाची । भावना भेदाची समूळ गेली ।।२।।
तुका म्हणे सुख जालें माझ्या जीवा । रंगलें केशवा तुझ्या रंगे ।।३।।

३३५७
विठ्ठल सोयरा सज्जन विसांवा । जाइन त्याच्या गांवा भेटावया ।।१।।
सीण भाग त्यासी सांगेन आपुला । तो माझा बापुला सर्व जाणे ।।धृ।।
माय माउलिया बंधुवर्गा जना । भाकीन करुणा सकळिकांसी ।।२।।
संत महंत सिद्ध महानुभाव मुनि । जीवभाव जाऊनि सांगेन त्या ।।३।।
माझिये माहेरीं सुखा काय उणें। न लगे येणें जाणें तुका म्हणे ।।४।।
३३५८
ध्याइन तुझें रूप गाइन तुझें नाम । आणीक न करीं काम जिव्हामुखें ।।१।।
पाहिन तुझे पाय ठेविन तेथें डोय । पृथक तें काय न करीं मनीं ।।धृ।।
तुझे चि गुणवाद आइकेन कानीं । आणिकांची वाणी पुरे आतां ।।२।।
करिन सेवा करीं चालेन मी पायीं । आणीक न वजें ठायीं तुजविण ।।३।।
तुका म्हणे जीव ठेविला तुझ्या पायीं । आणीक तो काई देऊं कोणा ।।४।।

३३५९
देवाचें भजन कां रे न करीसी । अखंड हव्यासीं पीडतोसी ।।१।।
देवासी शरण कां रे न वजवे तैसा । बक मीना जैसा मनुष्यालागीं ।।धृ।।
देवाचा विश्वास कां रे नाहीं तैसा । पुत्रस्नेहें जैसा गुंतलासी ।।२।।
कां रे नाहीं तैसी देवाची हे गोडी । नागवूनी सोडी पत्नी तैसी ।।३।।

कां रे नाहीं तैसे देवाचे उपकार । माया मिथ्या भार पितृपूजना ।।४।।
कां रे भय वाहासी लोकांचा धाक । विसरोनि एक नारायण ।।५।।
तुका म्हणे कां रे घातलें वांयां। अवघें आयुष्य जाया भक्तिविण ।।६।।

३३६०
माझें चित्त तुझे पायीं । राहें ऐसें करीं कांहीं । धरोनियां बाहीं । भव तारीं दातारा ।।१।।
चतुरा तूं शिरोमणि । गुणलावण्याची खाणी । मुगुट सकळां मणि । तूं चि धन्य विठोबा ।।धृ।।
करीं त्रिमिराचा नाश । दीप होउनि प्रकाश । तोडीं आशापाश। करीं वास हृदयीं ।।२।।
पाहें गुंतलों नेणतां । तुज असो माझी चिंता। तुका ठेवी माथा । पायीं आतां राखावें ।।३।।

३३६१
आमुचें उचित हे चि उपकार । आपला चि भार घालूं तुज ।।१।।
भूक लागलिया भोजनाची आळी । पांघुरणें काळीं शीताचिये ।।धृ।।
जेणें काळें उठी मनाची आवडी । ते चि मागों घडी आवडे तें ।।२।।
दुःख येऊं नेदी आमचिया घरा । चक्र करी फेरा भोंवताला ।।३।।
तुका म्हणे नाहीं मुक्तीसवें चाड । हें चि आम्हां गोड जन्म घेतां ।।४।।

३३६२
मी दास तयाचा जया चाड नाहीं । सुख दुःख दोहींविरहित जो ।।१।।
राहिलासे उभा भीमरेच्या तीरीं । कट दोहीं करीं धरोनियां ।।धृ।।
नवल काई तरी पाचारितां पावे । न श्मरित धांवे भक्तिकाजें ।।२।।
सर्व भार माझा त्यासी आहें चिंता । तों चि माझा दाता स्वहिताचा ।।३।।
तुका म्हणे त्यास गाईन मी गीतीं । आणीक तें चित्तीं न धरीं कांहीं ।।४।।

३३६३
यासी कोणी म्हणे निंदेचीं उत्तरें । नागवला खरें तो चि एक ।।१।।
आड वाटे जातां लावी नीट सोई । धर्मनीत ते ही ऐसी आहे ।।धृ।।
नाइकता सुखें करावें ताडण । पाप नाहीं पुण्य असे फार ।।२।।
जन्म व्याधि फार चुकतील दुःखें । खंडावा हा सुखें मान त्याचा ।।३।।

तुका म्हणे निंब दिलियावांचून । अंतरींचा सीण कैसा जाय ।।४।।
३३६४
निवडे जेवण सेवटींच्या घांसें । होय त्याच्या ऐसें सकळ ही ।।१।।
न पाहिजे जाला बुद्धीचा पालट । केली खटपट जाय वांयां ।।धृ।।
संपादिलें होय धरिलें तें सोंग । विटंबणा वेंग पडियाली ।।२।।
तुका म्हणे वर्म नेणतां जें रांधी । पाववी ते बुद्धि अवकळा ।।३।।

३३६५
न लगे मरावें । ऐसा ठाव दिला देवें ।।१।।
माझ्या उपकारासाटीं । वागविला म्हूण कंठीं ।।धृ।।
घरीं दिला ठाव । अवघा सकळ ही वाव ।।२।।
तुका म्हणे एके ठायीं । कोठें माझें तुझें नाहीं ।।३।।

३३६६. नाहीं लाग माग । न देखेंसें केलें जग ।।१।।
आतां बैसोनियां खावें । दिलें आइतें या देवें ।।धृ।।
निवारिलें भय । नाहीं दुसऱ्याची सोय ।।२।।
तुका म्हणे कांहीं । बोलायाचें काम नाहीं।।३।।

३३६७
दिली हाक मनें नव्हे ती जतन । वेंटाळिल्या गुणें धांव घेती ।।१।।
काम क्रोध मद मत्सर अहंकार । निंदा द्वेष फार माया तृष्णा ।।धृ।।
इंद्रियांचे भार फिरतील चोर । खान घ्यावया घर फोडूं पाहे ।।२।।
माझा येथें कांहीं न चले पराक्रम । आहे त्याचें वर्म तुझे हातीं ।।३।।
तुका म्हणे आतां करितों उपाय । जेणें तुझे पाय आतुडती ।।४।।

३३६८
तुझा दास मज म्हणती अंकित । अवघे सकळिक लहान थोर ।।१।।
हें चि आतां लागे करावें जतन । तुझें थोरपण तुज देवा ।।धृ।।
होउनी निर्भर राहिलों निश्चिंतें । पावनपतित नाम तुझें ।।२।।
करितां तुज होय डोंगराची राई । न लगतां कांहीं पात्या पातें ।।३।।
तुका म्हणे तुज काय ते आशंका । तारितां मशका मज दीना ।।४।।

३३६९

काय मागावें कवणासी । ज्यासी मागों तो मजपाशीं।।१।।
जरी मागों पद इंद्राचें । तरी शाश्वत नाहीं त्याचें।।धृ।।
जरी मागों ध्रुवपद । तरी त्यासी येथील छंद ।।२।।
स्वर्गभोग मागों पूर्ण । पुण्य सरल्या मागुती येणें ।।३।।
आयुष्य मागों चिरंजीव । जीवा मरण नाहीं स्वभावें ।।४।।
तुका म्हणे एक मागें । एकपणे नाहीं भंग ।।५।।

३३७०
आम्ही ज्याचे दास । त्याचा पंढरिये वास ।।१।।
तो हा देवांचा ही देव । काय कळिकाळाचा भेव ।।धृ।।
वेद जया गाती। श्रुति म्हणती नेति नेति ।।२।।
तुका म्हणे निज । रूपडें हें तत्त्वबीज ।।३।।

३३७१
भक्तवत्सल दिनानाथ । तिहीं लोकीं ज्याची मात।।१।।
तो हा पुंडलिकासाठीं । आला उभा वाळवंटीं ।।धृ।।
गर्भवास धरी। अंबऋषीचा कैवारी ।।२।।
सकळां देवां अधिष्ठान । एका मंत्रासी कारण ।।३।।
तुका म्हणे ध्यानीं । ज्यासि ध्यातो शूळपाणी।।४।।

३३७२
फटकाळ देव्हारा फटकाळ अंगारा । फटकाळ विचारा चालविलें ।।१।।
फटकाळ तो देव फटकाळ तो भक्त । करवितो घात आणिका जीवा ।।२।।
तुका म्हणे अवघें फटकाळ हें जन । अनुभविये खूण जाणतील ।।३।।

३३७३
लावुनियां गोठी । चुकवूं आदरिली दिठी । देउनियां मिठी । पळे महिमा थुलिया ।।१।।
पुढें तो चि करी आड । तिचा लोभ तिसी नाड । लावुनि चरफड । हात गोऊनि पळावें ।।धृ।।
आधीं काकुलती । मोहो घालावा पुढती । तोंडीं पडे माती । फिरतां मागें कैचा तो ।।२।।
तुका म्हणे देवा । यासी रडवी याचा हेवा । भावें कां हे सेवा । सुखें तुम्हां

नार्पिती ।।३।।

३३७४
नेत्राची वासना । तुज पाहावें नारायणा ।।१।।
करीं याचें समाधान । काय पहातोसी अनुमान ।।धृ।।
भेटावें पंढरिराया। हें चि इच्छितताती बाह्या ।।२।।
म्हणतों जावें पंढरीसीं । हेंचि ध्यान चरणासी ।।३।।
चित्त म्हणे पायीं तुझे राहीन निश्चयीं ।।४।।
म्हणे बंधु तुकयाचा । देवा भाव पुरवीं साचा ।।५।।

३३७५
मन उताविळ । जालें न राहे निश्चळ ।।१।।
दे रे भेटी पंढरिराया । उभारोनि चारी बाह्या ।।धृ।।
सर्वांग तळमळी । हात पाय रोमावळी ।।२।।
तुकयाबंधु म्हणे कान्हा । भूक लागली नयना।।३।।

३३७६
म्हणसी दावीन अवस्था । तैसें नको रे अनंता ।।१।।
होऊनियां सहाकार । रूप दाखवीं सुंदर ।।धृ।।
मृगजळाचिया परी। तैसें न करावें हरी ।।२।।
तुकयाबंधु म्हणे हरी । कामा नये बाह्यात्कारी ।।३।।

३३७७
आकारवंत मूर्ति । जेव्हां देखेन मी दृष्टी ।।१।।
मग मी राहेन निवांत । ठेवूनियां तेथें चित्त ।।धृ।।
श्रुति वाखाणिती । तैसा येसील प्रचिती ।।२।।
म्हणे तुकयाचा सेवक । उभा देखेन सन्मुख ।।३।।

३३७८
जेणें तुज जालें रूप आणि नांव । पतित हें दैव तुझें आम्ही ।।१।।
नाहीं तरी तुज कोण हें पुसतें । निराकारी तेथें एकाएकी ।।धृ।।
अंधारे दीपा आणियेली शोभा । माणिकासी प्रभा कोंदणासी ।।२।।
धन्वंतरी रोगें आणिला उजेडा । सुखा काय चाडा जाणावें तें ।।३।।

अमृतासी मोल विषाचिया गुणें । पितळें तरी सोनें उंच निंच ।।४।।
तुका म्हणे आम्ही असोनिया जना । तुज देव पणा आणियेलें ।।५।।

३३७९
सुखवाटे ये चि ठायी । बहु पायीं संतांचें ।।१।।
म्हणऊनि केला वास । नाहीं नास ते ठायीं ।।धृ।।
न करवे हाली चाली । निवारिली चिंता हे ।।२।।
तुका म्हणे निवे तनु । रजकणु लागती ।।३।।

३३८०
देऊं कपाट । कीं कोण काळ राखों वाट ।।१।।
काय होईल तें शिरीं । आज्ञा धरोनियां करीं ।।धृ।।
करूं कळे ऐसी मात। किंवा राखावा एकांत ।।२।।
तुका म्हणे जागों । किंवा कोणा नेंदूं वागों ।।३।।

३३८१
मायबापापुढें लेंकराची आळी । आणीक हे पाळी कोण लळे ।।१।।
सांभाळा जी माझीं विषमें अनंता । जवळी असतां अव्हेर कां ।।धृ।।
आणिकांची चाले सत्ता आम्हांवरी । तुमची ते थोरी काय मग ।।२।।
तुका म्हणे आलों दुरोनि जवळी । आतां टाळाटाळी करूं नये ।।३।।

३३८२
माझ्या मुखें मज बोलवितो हरि । सकळां अंतरीं नारायण ।।१।।
न करावा द्वेष भूतांचा मत्सर । हा तंव विचार जाणों आम्ही ।।२।।
तुका म्हणे दोष नाहीं या विचारें । हिताचीं उत्तरें शिकवितां ।।३।।

३३८३
मांस खातां हाउस करी । जोडुनि वैरी ठेवियेला।।१।।
कोण त्याची करिल कींव । जीवें जीव नेणती ।।धृ।।
पुढिलांसाटीं पाजवी सुरी । आपुली चोरी अंगुळी ।।२।।
तुका म्हणे कुटिती हाडें। आपुल्या नाडें रडती ।।३।।

३३८४

तुज जाणें तानें नाहीं पांडुरंगा । कां जी मज सांगा उपेक्षिलें ।।१।।
तुज ठावें होतें मी पातकी थोर । आधीं च कां थार दिधली पायीं ।।धृ।।
अंक तो पडिला हरिचा मी दास । भेद पंगतीस करूं नये ।।२।।
तुका म्हणे आम्ही जिंतिलें तें खरें । आतां उणें पुरें तुम्हां अंगीं ।।३।।

३३८५
आम्हां घरीं धन शब्दाचीं रत्नें । शब्दाचीं शस्त्रें यत्न करूं ।।१।।
शब्द चि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वांटूं धन जनलोकां ।।२।।
तुका म्हणे पाहा शब्द चि हा देव । शब्दें चि गौरव पूजा करूं ।।३।।

३३८६
ब्रम्हज्ञान दारीं येतें काकुलती । अव्हेरिलें संतीं विष्णुदासीं।।१।।
रिघों पाहे माजी बळें त्याचें घर । दवडिती दूर म्हणोनियां ।।२।।
। तुका म्हणे येथें न चाले सायास । पडिले उदास त्याच्या गळां ।।३।।

३३८७
कासया लागला यासी चौघाचार । मुळींचा वेव्हार निवडिला ।।१।।
ग्वाही बहुतांची घालूनियां वरि । महजर करीं आहे माझ्या ।।धृ।।
तुम्हां वेगळा लागें आपल्या च ठायीं । होतें करुनि तें ही माझें माझें ।।२।।
भांडण सेवटीं जालें एकवट । आतां कटकट करूं नये ।।३।।
ठेविला ठेवा तो आला माझ्या हाता । आतां नाहीं सत्ता तुज देवा ।।४।।
तुका म्हणे वांयांविण खटपटा । राहिलों मी वांटा घेऊनियां ।।५।।

३३८८
देहबुद्धि वसे जयाचियें अंगीं । पूज्यता त्या जगीं सुख मानी ।।१।।
थोर असे दगा जाला त्यासी हाटीं । सोडोनिया गांठी चोरीं नेली ।।धृ।।
गांठीचें जाउनि नव्हे तो मोकळा । बांधिलासे गळा दंभलोभें ।।२।।
पुढिल्या उदिमा जालेंसे खंडण । दिसे नागवण पडे गांठी ।।३।।
तुका म्हणे ऐसे बोलतील संत । जाणूनियां घात कोण करी ।।४।।

३३८९
निंबाचिया झाडा साकरेचें आळें । आपलीं ती फळें न संडी च ।।१।।
तैसें अधमाचें अमंगळ चित्त । वमन तें हित करुनि सांडी ।।धृ।।

परिसाचे अंगीं लाविलें खापर । पालट अंतर नेघे त्याचें ।।२।।
तुका म्हणे वेळू चंदना संगतीं । काय ते नसती जवळिकें ।।३।।

३३९०
दुबळें सदैवा । म्हणे नागवेल केव्हां ।।१।।
आपणासारिखें त्या पाहे । स्वभावासी करिल काये ।।धृ।।
मूढ सभे आंत । इच्छी पंडिताचा घात ।।२।।
गांढें देखुनि शूरा । उगें करितें बुरबुरा ।।३।।
आणिकांचा हेवा । न करीं शरण जाईं देवा ।।४।।
तुका म्हणे किती । करूं दुष्टाची फजिती ।।५।।

३३९१
माझी आतां लोक सुखें निंदा करू । म्हणती विचारू सांडियेला ।।१।।
कारण होय तो करावा विचार । काय भीड भार करूं देवा ।।२।।
तुका म्हणे काय करूं लापनिक । जनाचार सुख नासिवंत ।।३।।

३३९२
ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला । कुसंगें नाडला तैसा साधु ।।१।।
ओढाळाच्या संगें सात्विक नासलीं । क्षण एक नाडलीं समागमें ।।धृ।।
डांकाचे संगती सोनें हीन जालें । मोल तें तुटलें लक्ष कोडी ।।२।।
विषानें पक्वान्नें गोड कडू जालीं । कुसंगानें केली तैसी परी ।।३।।
भावें तुका म्हणे सत्संग हा बरा । कुसंग हा फेरा चौऱ्याशीचा ।।४।।

३३९३
भलते जन्मीं मज घालिसील तरी । न सोडीं मी हरी नाम तुझें ।।१।।
सुख दुःख तुज देईन भोगितां । मग मज चिंता कासयाची ।।धृ।।
तुझा दास म्हणवीन मी अंकिला । भोगितां विठ्ठला गर्भवास ।।२।।
कासया मी तुज भाकितों करुणा । तारीं नारायणा म्हणवुनि ।।३।।
तुका म्हणे तुज येऊं पाहे उणें । तारिसील तेणें आम्हां तया ।।४।।

३३९४
गातों नाचतों आनंदें । टाळघागरिया छंदें ।।१।।
तुझी तुज पुढें देवा । नेणों भावे कैसी सेवा ।।धृ।।

नेणों ताळ घात मात । भलते सवां पाय हात ।।२।।
लाज नाहीं शंका । प्रेम घाला म्हणे तुका ।।३।।

३३९५
रुसलों आम्हीं आपुलिया संवसारा । तेथें जनाचारा काय पाड ।।१।।
आम्हां इष्ट मित्र सज्जन सोयरे । नाहीं या दुसरें देवाविण ।।धृ।।
दुराविले बंधु सखे सहोदर । आणीक विचार काय तेथें ।।२।।
उपाधिवचन नाइकती कान । त्रासलें हें मन बहु माझें।।३।।
तुका म्हणे करा होईल ते दया । सुख दुःख वांयां न धरावें ।।४।।

३३९६
सांडुनि सुखाचा वांटा । मुक्ति मागे तो करंटा ।।१।।
कां रे न घ्यावा जन्म । प्रेम लुटावें नाम ।।धृ।।
येथें मिळतो दहीं भात । वैकुंठीं ते नाहीं मात ।।२।।
तुका म्हणे आतां । मज न लगे सायुज्यता ।।३।।

३३९७
पदोपदीं पायां पडणें । करुणा जाण भाकावी ।।१।।
ये गा ये गा विसांवया । करुणा दयासागरा ।।धृ।।
जोडोनियां करकमळ । नेत्र जळ भरोनि ।।२।।
तुका उभें दारीं पात्र । पुरवीं आर्त विठोबा ।।३।।

३३९८
आतां हें सेवटीं असों पायांवरी । वदती वैखरी वागपुष्प ।।१।।
नुपेक्षावें आम्हां दीना पांडुरंगा । कृपादानीं जगामाजी तुम्हीं ।।धृ।।
वोळवुनी देह सांडियेली शुद्ध । सारियेला भेद जीव शिव ।।२।।
तुका म्हणे मन तुमचे चरणीं । एवढी आयणी पुरवावी।।३।।

३३९९
तरि च होय वेडी । नग्न होय धडफुडी ।।१।।
काय बोलाचें गौरव । आंत वरी दोन भाव ।।धृ।।
मृगजळा न्याहाळितां। तान न वजाये सेवितां ।।२।।
न पाहे आणिकांची आस । शूर बोलिजे तयास ।।३।।

तुका म्हणे हें लक्षण । संत अळंकार लेणें।।४।।

३४००
आग्रहा नांवें पाप । योगीं सारावे संकल्प ।।१।।
सहजा ऐसें भांडवल । असोनि कां सारा बोल ।।धृ।।
तैं न भेटे तें काय । मना अंगींचे उपाय ।।२।।
तुका म्हणे धरीं सोय । वासनेची फोडा डोय ।।३।।

३४०१
न करीं पठन घोष अक्षरांचा । बीजमंत्र आमुचा पांडुरंग ।।१।।
सर्वकाळ नामचिंतन मानसीं । समाधान मनासी समाधि हे ।।धृ।।
न करीं भ्रमण न रिघें कपाटीं । जाईन तेथें दाटी वैष्णवांची ।।२।।
अनु नेणें कांहीं न वजें तपासी । नाचें दिंडीपाशीं जागरणीं ।।३।।
उपवास व्रत न करीं पारणें । रामकृष्ण म्हणें नारायण ।।४।।
आणिकांची सेवा स्तुती नेणें वाणूं । तुका म्हणे आणु दुजें नाहीं ।।५।।

३४०२
पुंडलिकाचे निकटसेवे । कैसा धांवे बराडी ।।१।।
आपुलें थोरपण । नारायण विसरला ।।धृ।।
उभा कटीं ठेवुनि कर। न म्हणे पर बैससें ।।२।।
तुका म्हणे जगदीशा । करणें आशा भक्तांची ।।३।।

३४०३
बाळ काय जाणे जीवनउपाय । मायबाप वाहे सर्व चिंता ।।२।।
आइतें भोजन खेळणें अंतरीं । अंकिताचे शिरीं भार नाहीं ।।ध्रु
।।
आपुलें शरीर रक्षितां न कळे । सांभाळूनि लळे पाळी माय ।।२।।
तुका म्हणे माझा विठ्ठल जनिता । जेथें आमची सत्ता तयावरी ।।३।।

३४०५
काय करिती केलीं नित्य पापें । वसे नाम ज्यापें विठोबाचें ।।१।।
तृणीं हुताशन लागला ते रासी । जळतील तैसीं क्षणमात्रें ।।धृ।।
विष्णुमूर्तिपाद पाहतां चरण । तेथें कर्म कोण राहूं शके ।।२।।

तुका म्हणे नाम जाळी महादोष । जेथें होय घोष कीर्तनाचा ।।३।।

३४०६
वेद नेलें शंखासुरें । केलें ब्रह्म्यानें गाऱ्हाणें ।।१।।
धांव धांव झडकरी । ऐसें कृपाळुवा हरी ।।धृ।।
गजेंद्र नाडियें गांजिला ।। तेणें तुझा धांवा केला ।।
२।। तुका म्हणे पद्मनाभा । जेथें पाहें तेथें उभा ।।३।।

३४०७
माकडा दिसती कंवटी नारळा । भोक्ता निराळा वरील सारी ।।१।।
एका रस एका तोंडीं पडे माती । आपुलाले नेती विभाग ते ।।धृ।।
सुनियांसी क्षीर वाढिल्या ओकवी । भोगित्यां पोसवी धणीवरी ।।२।।
तुका म्हणे भार वागविती मूर्ख । नेतील तें सार परीक्षक ।।३।।

३४०८
भेटीची आवडी उताविळ मन । लागलेंसे ध्यान जीवीं जीवा ।।१।।
आतां आवडीचा पुरवावा सोहळा । येऊनी गोपाळा क्षेम देईं ।।धृ।।
नेत्र उन्मळित राहिले ताटस्त । गंगा अश्रुपात वहावली ।।२।।
तुका म्हणे तुम्ही करा साचपणा । मुळींच्या वचना आपुलिया ।।३।।

३४०९
धवळलें जगदाकार । आंधार तो निरसला ।।१।।
लपों जातां नाहीं ठाव । प्रगट पा पसारा ।।धृ।।
खरियाचा दिवस आला । वाढी बोला न पुरे ।।२।।
तुका म्हणे जिवें साटीं ।। पडिली मिठी धुरेसी ।।३।।

३४१०
मातेची अवस्था काय जाणे बाळ । तिसी तों सकळ चिंता त्याची ।।१।।
ऐसें परस्परें आहे चि विचारा । भोपळ्याचा तारा दगडासी ।।धृ।।
भुजंग पोटाळी चंदनाचें अंग । निवे परि संग नव्हे तैसा ।।२।।
तुका म्हणे करा परिसाचे परी । मज ठेवा सरी लोखंडाचे ।।३।।

३४११

लावूनि कोलित । माझा करितील घात ।।१।।
ऐसे बहुतांचे संधी । सांपडला खोळेमधीं ।।धृ।।
पाहातील उणें । तेथें देती अनुमोदनें ।।२।।
तुका म्हणे रिघे । पुढें नाहीं जालें धींगे ।।३।।

३४१२
ऐसी एकां अटी । रीतीं सिणती करंटीं ।।१।।
साच आपुल्या पुरतें । करून नेघेती कां हितें ।।धृ।।
कां हीं वेचितील वाणी। निरर्थक चि कारणीं ।।२।।
तुका म्हणे देवा । कांहीं समर्पूनि सेवा ।।३।।

३४१३
चालिले सोबती । काय मानिली निश्चिती ।।१।।
काय करिसी एकला । काळ सन्निध पातला ।।धृ।।
कांहीं सावध तो बरवा । करीं आपुला काढावा ।।२।।
चालिले अगळे । हळू च कान केश डोळे ।।३।।
वोसरले दांत । दाढा गडबडल्या आंत ।।४।।
एकली तळमळ । जिव्हा भलते ठायीं लोळे ।।५।।
तुका म्हणे यांणीं। तुझी मांडिली घालणी ।।६।।

३४१४
नका मजपाशीं । वदो प्रपंचाचे विशीं ।।१।।
आतां नाइकावी कानीं । मज देवाविण वाणी ।।धृ।।
येऊनियां रूपा । कोण पाहे पुण्यपापा ।।२।।
मागे आजिवरी । जालें माप नेलें चोरी।।३।।
सांडियेलीं पानें । पुढें पिका अवलोकन ।।४।।
पडों नेदी तुका । आड गुंपूं कांहीं चुका ।।५।।

३४१५
जाले आतां सांटे । कासयाचे लहान मोटे ।।१।।
एक एका पडिलों हातीं । जाली तेव्हां चि निश्चिंती ।।धृ।।
नाहीं फिरों येत मागें । जालें साक्षीचिया अंगें ।।२।।
तुका म्हणे देवा । आतां येथें कोठें हेवा ।।३।।

३४१६
माझें मज द्यावें । नाहीं करवीत नवें ।।१।।
सहस्त्रनामाचें रूपडें । भक्त कैवारी चोखडें ।।धृ।।
साक्षीविण बोलें । तरी मज पाहिजे दंडिलें ।।२।।
तुका म्हणे माल । माझा खरा तो विठ्ठल ।।३।।

३४१७
करूं स्तुती तरि ते निंदा । तुम्ही जाणां हे गोविंदा।।१।।
आम्हां लडिवाळांचे बोल । करा कवतुकें नवल ।।धृ।।
बोबड्या उत्तरीं । तुम्हा रंजवितों हरी ।।२।।
मागतों भातुकें । तुका म्हणे कवतुकें ।।३।।

३४१८
नव्हतील जपें नव्हतील तपें । आम्हांसी हें सोपें गीतीं गातां ।।१।।
न करितां ध्यान न करितां धारणा । तो नाचे कीर्त्तनामाजी हरि ।।धृ।।
जयासी नाहीं रूप आणि आकार । तो चि कटी कर उभा विटे ।।२।।
अनंत ब्रम्हांडें जयाचिया पोटीं । तो आम्हां संपुष्टीं भक्तिभावें ।।३।।
तुका म्हणे वर्म जाणती लडिवाळें । जें होतीं निर्मळें अंतर्बाहीं ।।४।।

३४१९
आम्ही जालों बळिवंत । होऊनियां शरणागत ।।१।।
केला घरांत रिघावा । ठायीं पडियेला ठेवा ।।धृ।।
हातां चढलें धन। नेणं रचिलें कारण ।।२।।
तुका म्हणे मिठी । पायीं देउनि केली सुटी ।।३।।

३४२०
लागपाठ केला । आतां वांटा नित्य त्याला ।।१।।
करा जोडीचा हव्यास । आलें दुरील घरास ।।धृ।।
फोडिलीं भांडारें। मोहोरलीं एकसरें ।।२।।
अवघियां पुरतें । तुका म्हणे घ्यावें हातें।।३।।

३४२१

एकीं असे हेवा । एक अनावड जीवां ।।१।।
देवें केल्या भिन्न जाती । उत्तम कनिष्ठ मध्यस्ती ।।धृ।।
प्रीतिसाटीं भेद। कोणी पूज्य कोणी निंद्य ।।२।।
तुका म्हणे कळा । त्याचा जाणे हा कळवळा ।।३।।

३४२२
स्वामीचें हें देणें । येथें पावलों दर्षणें ।।१।।
करूं आवडीनें वाद । तुमच्या सुखाचा संवाद ।।धृ।।
कळावया वर्म । हा तों पायांचा चि धर्म ।।२।।
तुका म्हणे सिद्धी । हे चि पाववावी बुद्धी ।।३।।

३४२३
रुसलों संसारा । आम्ही आणीक व्यापारा ।।१।।
म्हणऊनि केली सांडी । देउनि पडिलों मुरकंडी ।।धृ।।
परते चि ना मागें । मोहो निष्ठुर जालों अंगें ।।२।।
सांपडला देव । तुका म्हणे गेला भेव ।।३।।

३४२४
हें तों वाटलें आश्चर्य । तुम्हां न धरवे धीर ।।१।।
माझा फुटतसे प्राण । धांवा धांवा म्हणऊन ।।धृ।।
काय नेणों दिशा। जाल्या तुम्हांविण ओशा ।।२।।
तुका म्हणे कां गा । नाइकिजे पांडुरंगा ।।३।।

३४२५
धांवा केला धांवा । श्रम होऊं नेदी जीवा ।।१।।
वर्षे अमृताच्या धारा । घेईं वोसंगा लेंकरा ।।धृ।।
उशीर तो आतां । न करावा हे चिंता ।।२।।
तुका म्हणे त्वरें । वेग करीं विश्वंभरे ।।३।।

३४२६
जोडिले अंजुळ । असें दानउताविळ ।।१।।
पाहा वाहा कृपादृष्टी । आणा अनुभवा गोष्टी ।।धृ।।
तूं धनी मी सेवक । आइक्य तें एका एक ।।२।।

करितों विनंती । तुका सन्मुख पुढती।।३।।

३४२७
काय तुज कैसें जाणवेल देवा । आणावें अनुभवा कैशा परी ।।१।।
सगुण निर्गुण थोर कीं लहान । न कळे अनुमान मज तुझा ।।धृ।।
कोण तो निर्धार करूं हा विचार । भवसिंधु पार तरावया ।।२।।
तुका म्हणे कैसे पाय आतुडती । न पडे श्रीपती वर्म ठावें ।।३।।

३४२८
मी तव बैसलों धरुनियां ध्यास । न करीं उदास पांडुरंगा ।।१।।
नको आतां मज दवडूं श्रीहरी । मागाया भिकारी जालों दास ।।धृ।।
भुकेलों कृपेच्या वचनाकारणें । आशा नारायणें पुरवावी ।।२।।
तुका म्हणे येऊनियां देईं भेटी । कुरवाळुनी पोटीं धरीं मज ।।३।।

३४२९
आतां तुझें नाम गात असें गीतीं । म्हणोनी मानिती लोक मज ।।१।।
अन्नवस्त्रचिंता नाहीं या पोटाची । वारिली देहाची थोर पीडा ।।धृ।।
सज्जन संबंधी तुटली उपाधी ।रोकडी या बंदीं सुटलोंसें ।।२।।
घ्यावा द्यावा कोणें करावा सायास । गेली आशापाश वारोनियां ।।३।।
तुका म्हणे तुज कळेल तें आतां । करा जी अनंता मायबापा ।।४।।

३४३०
कामक्रोध माझे लावियेले पाठीं । बहुत हिंपुटीं जालों देवा ।।१।।
आवरितां तुझे तुज नावरती । थोर वाटे चित्तीं आश्चर्य हें ।।धृ।।
तुझिया विनोदें आम्हां प्राणसाटी । भयभीत पोटीं सदा दुःखी ।।२।।
तुका म्हणे माझ्या कपाळाचा गुण । तुला हांसे कोण समर्थासी ।।३।।

३४३१
सन्मुख चि तुम्हीं सांगावी जी सेवा । ऐसे माझे देवा मनोरथ ।।१।।
निघों आम्ही कांहीं चित्तवित्त घरें । आपुल्या उदारें जीवावरी ।।धृ।।
बोल परस्परें वाढवावें सुख । पाहावें श्रीमुख डोळेभरी ।।२।।
तुका म्हणे सत्य बोलतों वचन । करुनी चरण साक्ष तुझे ।।३।।

३४३२

मज अनाथाकारणें । करीं येणें केशवा ।।१।।
जीव झुरे तुजसाटीं । वाट पोटीं पहातसें ।।धृ।।
चित्त रंगलें चरणीं । तुजवांचूनि न राहे ।।२।।
तुका म्हणे कृपावंत । माझी चिंता असावी।।३।।

३४३३

कासया वांचूनि जालों भूमी भार । तुझ्या पायीं थार नाहीं तरी ।।१।।
जातां भलें काय डोळियांचें काम । जंव पुरुषोत्तम न देखती ।।धृ।।
काय मुख पेंव श्वापदाचें धांव । नित्य तुझें नांव नुच्चारितां ।।२।।
तुका म्हणे आतां पांडुरंगाविण । न वांचतां क्षण जीव भला ।।३।।

३४३४

नको मज ताठा नको अभिमान । तुजवांचूनि क्षीण होतो जीव ।।१।।
दुर्धर हे माया न होय सुटका । वैकुंठनायका सोडवीं मज ।।२।।
तुका म्हणे तुझें जालिया दर्षण । मग निवारण होइल सर्व ।।३।।

३४३५

चाल घरा उभा राहें नारायणा । ठेवूं दे चरणांवरि माथा ।।१।।
वेळोवेळां देईं क्षेमआलिंगन । वरी अवलोकन कृपादृष्टी।।धृ।।
प्रक्षाळूं दे पाय बैसें माजघरीं । चित्त स्थिर करीं पांडुरंगा ।।२।।
आहे त्या संचितें करवीन भोजन । काय न जेवून करिसी आतां ।।३।।
करुणाकरें नाहीं कळों दिलें वर्म । दुरी होतां भ्रम कोण वारी ।।४।।
तुका म्हणे आतां आवडीच्या सत्ता । बोलिलों अनंता करवीन तें ।।५।।

३४३६

देवाची ते खूण आला ज्याच्या घरा । त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा ।।१।।
देवाची ते खूण करावें वाटोंळें । आपणा वेगळें कोणी नाहीं ।।धृ।।
देवाची ते खूण गुंतों नेदी आशा । ममतेच्या पाशा शिवों नेदी ।।२।।
देवाची ते खूण गुंतों नेदी वाचा। लागों असत्याचा मळ नेदी ।।३।।
देवाची ते खूण तोडी मायाजाळ। आणि हें सकळ जग हरी ।।४।।
पहा देवें तेंचि बळकाविलें स्थळ। तुक्यापें सकळ चिन्हें होतीं ।।५।।

३४३७
अनंताचे मुखीं होसील गाइला । अमुप विठ्ठला दास तुम्हां ।।१।।
माझें कोठें आलें होईल विचारा । तरीं च अव्हेरा योग्य जालों ।।धृ।।
सर्वकाळ तुम्ही असा जी संपन्न । चतुरा नारायण शिरोमणि ।।२।।
तुका म्हणे ऐसे कलियुगींचे जीव । तरी नये कीव बहुपापी ।।३।।

३४३८
न करावी चिंता । भय धरावें सर्वथा ।।१।।
दासां साहे नारायण । होय रक्षिता आपण ।।धृ।।
न लगे परिहार । कांहीं योजावें उत्तर ।।२।।
न धरावी शंका । नये बोलों म्हणे तुका ।।३।।

३४३९
भांडवल माझें लटिक्याचे गांठी । उदीम तो तुटी यावी हा चि ।।१।।
कैसी तुझी वाट पाहों कोणा तोंडें । भोंवतीं किं रे भांडे गर्भवास ।।धृ।।
चहूं खाणीचिया रंगलोंसें संगें । सुष्ट दुष्ट अंगें धरूनियां ।।२।।
बहुतांचे बहु पालटलों सळे । बहु आला काळें रंग अंगा ।।३।।
उकलूनि नये दावितां अंतर । घडिचा पदर सारूनियां ।।४।।
तुका म्हणे करीं गोंवळें यासाटीं । आपल्या पालटीं संगें देवा ।।५।।

३४४०
संतसंगतीं न करावा वास । एखादे गुणदोष अंगा येती ।।१।।
मग तया दोषा नाहीं परिहार । होय अपहार सुकृताचा।।२।।
तुका म्हणे नमस्कारावे दुरून । अंतरीं धरून राहें रूप ।।३।।

३४४१
जें ज्याचें जेवण । तें चि याचकासी दान ।।१।।
आतां जाऊं चोजवीत । जेथें वसतील संत ।।धृ।।
होतीं धालीं पोटें। मागें उरलीं उच्छिष्टें ।।२।।
तुका म्हणे धांव । पुढें खुंटईल हांव ।।३।।

३४४२
धरावा तो बरा । ठाव वसतीचा थारा ।।१।।

निजविल्या जागविती । निज पुरवूनि देती ।।धृ।।
एक वेवसाव । त्यांचा संग त्यांचा जीव ।।२।।
हितें केलें हित । ग्वाही एक एकां चित्त ।।३।।
विषमाचें कांहीं । आड तया एक नाहीं ।।४।।
तुका म्हणे बरीं । घरा येतील त्यापरी ।।५।।

३४४३
धोंड्यासवें आदळितां फुटे डोकें । तों तों त्याच्या सुखें घामेजेना ।।१।।
इंगळासी सन्निधान अतित्याई । क्षेम देतां काई सुख वाटे ।।२।।
तुका म्हणे आम्हांसवें जो रुसला । तयाचा अबोला आकाशासीं ।।३।।

३४४४
सरे आम्हांपाशीं एक शुद्धभाव । नाहीं तरी वाव उपचार ।।१।।
कोण मानी वरी रसाळ बोलणें । नाहीं जाली मनें ओळखी तों ।।२।।
तुका म्हणे आम्हां जाणीवेचें दुःख । न पाहों त्या मुख दुर्जनाचें ।।३।।

३४४५
आतां तळमळ । केली पाहिजे सीतळ ।।१।।
करील तें पाहें देव । पायीं ठेवुनियां भाव ।।धृ।।
तो चि अन्नदाता । नाहीं आणिकांची सत्ता ।।२।।
तुका म्हणे दासा । नुपेक्षील हा भरवसा।।३।।

३४४६
लांब धांवे पाय चोरी । भरोवरी जनाच्या ।।१।।
आतां कैसें होय याचें । सिजतां काचें राहिलें ।।धृ।।
खाय ओकी वेळोवेळां । कैसी कळा राहेल ।।२।।
तुका म्हणे भावहीण । त्याचा सीण पाचावा ।।३।।

३४४७
माझ्या इंद्रियांसीं लागलें भांडण । म्हणतील कान रसना धाली ।।१।।
करिती तळमळ हस्त पाद भाळ । नेत्रांसी दुकाळ पडिला थोर ।।धृ।।
गुण गाय मुख आइकती कान । आमचें कारण तैसें नव्हे ।।२।।
दरुषणें फिटे सकळांचा पांग । जेथें ज्याचा भाग घेइल तें ।।३।।

तुका म्हणे ऐसें करीं नारायणा । माझी ही वासना ऐसी आहे ।।४।।

३४४८
सिद्धीचा दास नव्हें श्रुतीचा अंकिला । होईन विठ्ठला सर्व तुझा ।।१।।
सर्वकाळ सुख आमच्या मानसीं । राहिलें जयासी नास नाहीं ।।धृ।।
नेणें पुण्य पाप न पाहें लोचनीं । आणिका वांचूनि पांडुरंगा ।।२।।
न करीं आस मुक्तीचे सायास । भक्तिप्रेमरस सांडूनियां ।।३।।
गर्भवासीं धाक नाहीं येतां जातां । हृदयीं राहतां नाम तुझें ।।४।।
तुका म्हणे जालों तुझा चि अंकिला । न भें मी विठ्ठला कळिकाळासी ।।५।।

३४४९
जन्मा येऊनि तया लाभ जाला । बिडवई भेटला पांडुरंगा ।।१।।
संसारदुःखें नासिलीं तेणें । उत्तम हें केणें नामघोष।।धृ।।
धन्य ते संत सिद्ध महानुभाव । पंढरीचा ठाव टाकियेला ।।२।।
प्रेमदाते ते च पतितपावन । धन्य दरुषण होय त्याला ।।३।।
पावटणिया पंथें जालिया सिद्धी । वोगळे समाधि सायुज्यता ।।४।।
प्रेम अराणूक नाहीं भय धाक । मज तेणें सुखें कांहीं चिंता ।।५।।
तें दुर्लभ संसारासी । जडजीवउद्धारलोकासी ।।६।।
तुका म्हणे त्यासी । धन्य भाग्य दरूषणें ।।७।।

३४५०
काय दिवस गेले अवघे चि वऱ्हाडें । तें आलें सांकडें कथेमाजी ।।१।।
क्षण एके ठायीं मन स्थिर नाहीं । अराणूक कइं होईल पुढें ।।धृ।।
कथेचे विरसें दोषा मूळ होय । तरण उपाय कैचा माती ।।२।।
काय तें सांचवुनि उरलें हें मागें । घटिका एक संगें काय गेलें ।।३।।
ते चि वाणी येथें करा उजळणी । काढावी मथूनि शब्दरत्नें।।४।।
तुका म्हणे हें चि बोलावया चाड । उभयतां नाड हित असे ।।५।।

३४५१
शुद्धाशुद्ध निवडे कैसें । चर्म मास भिन्न नाहीं ।।१।।
कांहीं अधिक नाहीं उणें । कवण्या गुणें देवासी ।।धृ।।
उदक भिन्न असे काई । वाहाळ बावी सरिता नई ।।२।।
सूर्य तेजें निवडी काय। रश्मी रसा सकळा खाय ।।३।।

वर्णा भिन्न दुधा नाहीं । सकळा गाईं सारखें ।।४।।
करितां भिन्न नाहीं माती । मडक्या गति भिन्न नांवें।।५।।
वर्त्ते एकविध अग्नि । नाहीं मनीं शुद्धाशुद्ध ।।६।।
तुका म्हणे पात्र चाड । किंवा विसें अमृत गोड ।।७।।

३४५२
न धरी प्रतिष्ठा कोणाची यम । म्हणतां कां रे राम लाजा झणी ।।१।।
सांपडे हातींचें सोडवील काळा । तो कां वेळोवेळां नये वाचे ।।धृ।।
कोण लोक जो हा सुटला तो एक । गेले कुंभपाक रवरवांत ।।२।।
तुका म्हणे हित तों म्हणा विठ्ठल । न म्हणे तो भोगील कळेल तें ।।३।।

३४५३
म्हणवितां हरी न म्हणे तयाला । दरवडा पडिला देहामाजी ।।१।।
आयुष्यधन त्याचें नेले यमदूतीं । भुलविला निश्चितीं कामरंगें ।।धृ।।
नावडे ती कथा देउळासी जातां । प्रियधनसुता लक्ष तेथें ।।२।।
कोण नेतो तयां घटिका दिवसा एका । कां रे म्हणे तुका नागवसी ।।३।।

३४५४
कथे बैसोनि सादरें । सुखचर्चा परस्परें । नवल काय तो उद्धरे । आणीक तरे सुगंधें ।।१।।
पुण्य घेईं रे फुकाचें । पाप दुष्टवासनेचें । पेरिल्या बीजाचें । फळ घेईं शेवटीं ।।धृ।।
कथा विरस पाडी आळसें । छळणा करूनि मोडी रस । बुडवी आपणासरिसें। विटाळसें नावेसी ।।२।।
सज्जन चंदनाचिये परी । दुर्जन देशत्यागें दुरी । राहो म्हणे हरि । विनंती करी तुका हे ।।३।।

३४५५
कळों आलें तुझें जिणें । देवा तूं माझें पोसनें ।।१।।
वाट पाहासी आठवाची । सत्ता सतंत कईंची ।।धृ।।
बोलावितां यावें रूपा । सदा निर्गुणीं चि लपा ।।२।।
तुका म्हणे तूं परदेशी । येथें आम्हां अंगेजिसी ।।३।।

३४५६
आतां येथें लाजे नाहीं तुझें काम । जाय मज राम आठवूं दे ।।१।।
तुझे भिडे माझे बहु जाले घात । केलों या अंकित दुर्जनाचा ।।धृ।।
माझें केलें मज पारिखें माहेर । नटोनी साचार चाळविलें ।।२।।
सुखासाटीं एक वाहियेलें खांदीं । तेणें बहु मांदी मेळविली ।।३।।
केला चौघाचार नेलों पांचांमधीं । नाहीं दिली शुद्धी धरूं आशा ।।४।।
तुका म्हणे आतां घेईन कांटीवरी । धनी म्यां कैवारी केला देव ।।५।।

३४५७
आजिवरि होतों तुझे सत्ते खालीं । तोंवरी तों केली विटंबणा ।।१।।
आतां तुज राहों नेदीं या देशांत । ऐसा म्यां समर्थ केला धणी ।।धृ।।
सापें रिग केला कोठें बाळपणीं । होतीसी पापिणी काय जाणों ।।२।।
तुका म्हणे म्यां हा बुडविला वेव्हार । तुझे चि ढोपर सोलावया ।।३।।

३४५८
देवाच्या निरोपें पिटितों डांगोरा । लाजे नका थारा देऊं कोणी ।।१।।
मोडिलें या रांडे सुपंथ मारग । चालविलें जग यमपंथें ।।धृ।।
परिचारीं केली आपुली च रूढी । पोटींची ते कुडी ठावी नाहीं ।।२।।
तुका म्हणे आणा राउळा धरून । फजित करून सोडूं मग ।।३।।

३४५९
कां रे तुम्ही निर्मळ हरिगुण गा ना । नाचत आनंदरूप वैकुंठासी जा ना ।।१।।
काय गणिकेच्या याती अधिकार मोटा । दोषी अजामेळ ऐसीं नेलीं वैकुंठा ।।धृ।।
ऐसे नेणों मागें किती अनंत अपार । पंच महादोषी पातकां नाहीं पार ।।२।।
पुत्राचिया लोभें नष्ट म्हणे नारायण । कोण कर्तव्य तुका म्हणे त्याचें पुण्य।।३।।

३४६०
बैसोनियां खाऊं जोडी । ओढाओढी चुकवूनि ।।१।।
ऐसें केलें नारायणें । बरवें जिणें सुखाचें ।।धृ।।
घरीच्या घरीं भांडवल । न लगे बोल वेचावे ।।२।।
तुका म्हणे आटाआटी । चुकली दाटी सकळ ।।३।।

३४६१
नाहीं भ्यालों तरी पावलों या ठाया । तुम्हां आळवाया जवळिकें ।।१।।
सत्ताबळें आतां मागेन भोजन । केलें तें चिंतन आजिवरी ।।धृ।।
नवनीतासाटीं खादला हा जीव । थोड्यासाटीं कीव कोण करी ।।२।।
तुका म्हणे ताक न लगे हें घाटे । पांडुरंगा खोटें चाळवण ।।३।।

३४६२
सारीन तें आतां एकाचि भोजनें । वारीन मागणें वेळोवेळां ।।१।।
सेवटींच्या घासें गोड करीं माते । अगे कृपावंते पांडुरंगे ।।धृ।।
वंचूं नये आतां कांहीं च प्रकार । धाकल्याचें थोर जाल्यावरी ।।२।।
तुका म्हणे आतां बहु चाळवावें । कांहीं नेदीं ठावें उरों मागें ।।३।।

३४६३
पोट धालें मग न लगे परती । जालिया निश्चिंती खेळ गोड ।।१।।
आपुलिया हातें देई वो कवळ । विठ्ठल शीतळ जीवन वरी ।।धृ।।
घराचा विसर होईल आनंद । नाचेन मी छंदें प्रेमाचिया ।।२।।
तुका म्हणे तों च वरी करकर । मग हें उत्तर खंडईल ।।३।।

३४६४
बोलविसी तरी । तुझ्या येईन उत्तरीं ।।१।।
कांहीं कोड कवतिकें । हातीं द्यावया भातुकें ।।धृ।।
बोलविसी तैसें । करीन सेवन सरिसें ।।२।।
तुका म्हणे देवा । माझें चळण तुज सवा।।३।।

३४६५
दिला जीवभाव । तेव्हां सांडिला म्यां ठाव ।।१।।
आतां वर्ते तुझी सत्ता । येथें सकळ अनंता ।।धृ।।
माझीया मरणें । तुम्ही बैसविलें ठाणें ।।२।।
तुका म्हणे काईं । मी हें माझें येथें नाहीं।।३।।

३४६६
एकाचिये वेठी । सांपडलों फुकासाटीं ।।१।।

घेतों काम सत्ताबळें । माझें करूनि भेंडोळें ।।धृ।।
धांवे मागें मागें । जाय तिकडे चि लागे ।।२।।
तुका म्हणे नेलें । माझें सर्वस्वें विठ्ठलें ।।३।।

३४६७
बराडियाची आवडी पुरे । जया झुरे साटीं तें ।।१।।
तैसें जालें माझ्या मना । नुठी चरणावरूनि ।।धृ।।
मागलिया पेणें पावे । विसांवे तें ठाकणीं ।।२।।
तुका म्हणे छाया भेटे । बरें वाटे तापे त्या ।।३।।

३४६८
आतां द्यावें अभयदान । जीवन ये कृपेचें ।।१।।
उभारोनी बाहो देवा । हात ठेवा मस्तकीं ।।धृ।।
नाभी नाभी या उत्तरें । करुणाकरें सांतवीजे ।।२।।
तुका म्हणे केली आस । तो हा दिस फळाचा ।।३।।

३४६९
बहुजन्में सोस केला । त्याचा जाला परिणाम ।।१।।
विठ्ठलसें नाम कंठीं । आवडी पोटीं संचितें ।।धृ।।
येथुन तेथवरी आतां । न लगे चिंता करावी ।।२।।
तुका म्हणे धालें मन । हें चि दान शकुनाचें ।।३।।

३४७०
उसंतिल्या कर्मवाटा । बहु मोटा आघात ।।१।।
शीघ्र यावें शीघ्र यावें । हातीं न्यावें धरूनि ।।धृ।।
भागलों या खटपटे । घटपटें करितां ।।२।।
तुका म्हणे कृपावंता । माझी चिंता खंडावी।।३।।

३४७१
तुम्हांसी हें अवघें ठावें । किती द्यावें स्मरण ।।१।।
कां बा तुम्ही ऐसें नेणें । निष्ठुरपणें टाळित असां ।।धृ।।
आळवितां मायबापा । नये कृपा अझूनि ।।२।।
तुका म्हणे जगदीशा । काय असां निजेले ।।३।।

३४७२
नेलें सळेंबळें । चित्ताविताचें गांठोळें ।।१।।
साह्य जालीं घरिच्या घरीं । होतां ठायीं च कुठोरी ।।धृ।।
मी पातलों या भावा । कपट तें नेणें देवा ।।२।।
तुका म्हणे उघडें केलें । माझें माझ्या हातें नेलें ।।३।।

३४७३
जाला हा डांगोरा । मुखीं लहानाचे थोरा ।।१।।
नागविलों जनाचारीं । कोणी बैसों नेदी दारी ।।धृ।।
संचिताचा ठेवा। आतां आला तैसा घ्यावा ।।२।।
तुका म्हणे देवें । म्हणों केलें हें बरवें ।।३।।

३४७४
किती चौघाचारें । येथें गोविलीं वेव्हारें ।।१।।
असे बांधविले गळे । होऊं न सकती निराळे ।।धृ।।
आपलें आपण । केलें कां नाहीं जतन ।।२।।
तुका म्हणे खंडदंडें । येरझारीं लपती लंडें ।।३।।

३४७५
पांडुरंगा ऐसा सांडुनि वेव्हारा । आणिकांची करा आस वांयां ।।१।।
बहुतांसी दिला उद्धार उदारें । निवडीना खरें खोटें कांहीं ।।धृ।।
याचिया अंकिता वैकुंठ बंदर । आणीक वेव्हार चालितना ।।२।।
तुका म्हणे माझे हातींचें वजन । यासी बोल कोण ठेवूं सके ।।३।।

३४७६
ठेवूनि इमान राहिलों चरणीं । म्हणउनि धणी कृपा करी ।।१।।
आम्हांसी भांडार करणें जतन । आलें गेलें कोण उंच निंच ।।धृ।।
करूनि सांभाळीं राहिला निराळा । एक एक वेळा आज्ञा केली ।।२।।
तुका म्हणे योग्यायोग्य विनीत । देवा नाहीं चित्त येथें देणें ।।३।।

३४७७
आतां नव्हे गोड कांहीं करितां संसार । आणीक संचार जाला माजी ।।१।।

ब्रम्हरसें गेलें भरूनियां अंग । आधील तो रंग पालटला ।।धृ।।
रसनेचिये रुची कंठीं नारायण । बैसोनियां मन निवविलें ।।२।।
तुका म्हणे आतां बैसलों ठाकणीं । इच्छेची ते धणी पुरईल ।।३।।

३४७८
आतां काशासाटीं दुरी । अंतर उरी राखिली ।।१।।
करीं लवकरी मुळ । लहानें तीळ मुळीचिया ।।धृ।।
दोहीं ठायीं उदेगवाणें । दरुषणें निश्चिंती ।।२।। ३४७८
तुका म्हणे वेग व्हावा । ऐसी जीवा उत्कंठा ।।३।।

३४७९
पडिली हे रूढि जगा परिचार । चालविती वेव्हार सत्य म्हूण ।।१।।
मरणाची कां रे नाहीं आठवण । संचिताचा धन लोभ हेवा ।।धृ।।
देहाचें भय तें काळाचें भातुकें । ग्रासूनि तें एकें ठेविलेंसे ।।२।।
तुका म्हणे कांहीं उघडा रे डोळे । जाणोनि अंधळे होऊं नका ।।३।।

३४८०
जेथें पाहें तेथें कांडिती भूस । चिपाडें चोखूनि पाहाती रस ।।१।।
काय सांगों देवा भुलले जीव । बहु यांची येतसे कींव ।।धृ।।
वेठीचें मोटळें लटिकें चि फुगे । पेणिया जाऊनि भिक्षा मागे ।।२।।
तुका म्हणे कां उगे चि खोल । जवळी दाखवी आपणां बोल ।।३।।

३४८१
जाणिवेच्या भारें चेंपला उर । सदा बुरबुर सरे चि ना ।।१।।
किती याचें ऐकों कानीं । मारिलें घाणीं नाळकरी ।।धृ।।
मिठेंविण आळणी बोल । कोरडी फोल घसघस ।।२।।
तुका म्हणे डेंगा न कळे हित । किती फजित करूं तरी ।।३।।

३४८२
अनुतापयुक्त गेलिया अभिमान । विसरूं वचन मागिलांचा ।।१।।
त्याचे पाय माझे लागोत कपाळीं । भोग उष्टावळी धन्यकाळ ।।धृ।।
षड उर्मी जिहीं हाणितल्या लाता । शरण या संता आल्या वेगीं ।।२।।
तुका म्हणे जाती वोळे लवकरी । ठायीं चि अंतरीं शुद्ध होती ।।३।।

३४८३
खोल ओले पडे तें पीक उत्तम । उथळाचा श्रम वांयां जाय ।।१।।
लटिक्याचे आम्ही नव्हों सांटेकरी । थीतें घाली भरी पदरीचें ।।धृ।।
कोणा इहलोकीं पाहिजे पसारा । दंभ पोट भरायाचे चाडे ।।२।।
तुका म्हणे कसीं अगी जें उतरे । तें चि येथें सरे जातिशुद्ध ।।३।।

३४८४
गोमट्या बीजाचीं फळें ही गोमटीं । बाहे तें चि पोटीं समतुक ।।१।।
जातीच्या संतोषें चित्तासी विश्रांति । परतोनि मागुती फिरों नेणें ।।धृ।।
खऱ्याचे पारखीं येत नाहीं तोटा । निवडे तो खोटा ढाळें दुरी ।।२।।
तुका म्हणे मज सत्याचि आवडी । करितां तांतडी येत नाहीं ।।३।।

३४८५
मन जालें भाट । कीर्ति मुखें घडघडाट । पडियेली वाट । ये चि चाली स्वभावें ।।१।।
बोलें देवाचे पवाडे । नित्य नवे चि रोकडे । ज्या परी आवडे । तैसा तैसा करूनि ।।धृ।।
रोखीं रहावें समोर । पुढें मागें चाले भार । करावें उत्तर । सेवा रुजू करूनि।।२।।
पूर वर्षला देकारें । संतोषाच्या अभयें करें । अंगींच्या उत्तरें । तुकया स्वामी शृंगारी ।।३।।

३४८६
दूरि तों चि होतों आपुले आशंके । नव्हतें ठाउकें मूळभेद ।।१।।
आतां जेथें तेथें येइन सांगातें । लपाया पुरतें उरों नेदीं ।।धृ।।
मिथ्या मोहें मज लाविला उशीर । तरी हे अंतर जालें होतें ।।२।।
तुका म्हणे कां रे दाखविसी भिन्न । लटिका चि सीण लपंडाई ।।३
।
३४८७. कळों नये तों चि चुकावितां बरें । मग पाठमोरें काय काज ।।
१।। धरिलेती आतां द्या जी माझा डाव । सांपडतां भाव ऐसा आहे ।।
ध्रु.।। होतासी अंतरें झाकिलिया डोळीं । तो मी हा न्याहाळीं धरुनी दृष्टी ।।
२।। तुका म्हणे तुज रडीची च खोडी । अहाच बराडी तो मी नव्हे ।.३।।

३४८८
करिसी लाघवें । तूं हें खेळसी आघवें ।।१।।
केला अहंकार आड । आम्हां जगासी हा नाड ।।धृ।।
यथंभुतें यावें । दावूं लपों ही जाणावें ।।२।।
तुका म्हणे हो श्रीपती । आतां चाळवाल किती ।।३।।

३४८९
विश्वास तो देव । म्हणुनि धरियेला भाव ।।१।।
माझी वदवितो वाणी । ज्याणें धरिली धरणी ।।धृ।।
जोडिलीं अक्षरें । नव्हेती बुद्धीचीं उत्तरें ।।२।।
नाहीं केली आटी । कांहीं मानदंभासाटीं।।३।।
कोणी भाग्यवंत । तया कळेल उचित ।।४।।
तुका म्हणे झरा । आहे मुळींचा चि खरा ।।५।।

३४९०
सुराणीचीं जालों लाडिकीं एकलीं । वडील धाकुलीं आम्ही देवा ।।१।।
म्हणऊनि कांहीं न घडे अव्हेर । गोमटें उत्तर भातुकें ही ।।धृ।।
कांहीं एक नाहीं वंचिलें वेगळें । मुळींचिया मुळें स्थिराविलें ।।२।।
लेवविलीं अंगीं आपुलीं भूषणें । अळंकार लेणें सकळ ही ।।३।।
सारितां न सरे आमुप भांडार । धना अंतपार नाहीं लेखा ।।४।।
तुका म्हणे आम्ही आळवूं आवडी । म्हणऊनी जोडी दाखविली ।।५।।

३४९१
एका वेळे केलें रितें कलिवर । आंत दिली थार पांडुरंगा ।।१।।
पाळण पोषण लागलें ते सोई । देहाचें तें काई सर्वभावें ।।धृ।।
माझिया मरणें जाली हे वसति । लागली ते ज्योती अविनाशा ।।२।।
जाला ऐसा एका घायें येथें नाहीं । तुका म्हणे कांहीं बोलों नये ।।३।।

३४९२
पावतों ताडन । तरी हें मोकलितों जन ।।१।।
मग मी आठवितों दुःखें । देवा सावकाश मुखें ।।धृ।।
होती अप्रतिष्ठा । हो तों वरपडा कष्टा ।।२।।

तुका म्हणे मान । होतां उत्तम खंडन ।।३।।

३४९३
धरावें तों भय । अंतरोनि जाती पाय ।।१।।
जाल्या तुटी देवासवें । काय वांचोनि करावें ।।धृ।।
कोणासी पारिखें । लेखूं आपणासारिखें ।।२।।
तुका म्हणे असो । अथवा हें आतां नासो।।३।।

३४९४
आम्हांसी सांगाती । होती अराले ते होती ।।१।।
येती आइकतां हाक । दोन मिळोन म्हणती एक ।।धृ।।
आणिकां उत्तरीं। नसे गोवी वैखरी ।।२।।
तुका म्हणे बोल । खूण पहाती विठ्ठल।।३।।

३४९५
आनंदाचा थारा । सुखें मोहरला झरा ।।१।।
ऐसी प्रभुची ज्या कळा । त्याच्या कोण पाहे बळा ।।धृ।।
अंकिता ऐसया। होइल पावविलें ठाया ।।२।।
तुका म्हणे ऐसें । दिलें आभंड प्रकासे ।।३।।

३४९६
काहे लकडा घांस कटावे । खोद हि जुमीन मठ बनावे ।।१।।
देवलवासी तरवरछाया । घरघर माई खपरिबसमाया।।धृ।।
कां छांडियें भार फेरे सीर भागें । मायाको दुःख मिटलिये अंगें।।२।।
कहे तुका तुम सुनो हो सिद्धा । रामबिना और झुटा कछु धंदा ।।३।।

३४९७
आणीक पाखांडें असती उदंडें । तळमळिती पिंडें आपुलिया ।।१।।
त्याचिया बोलाचा नाहीं विश्वास । घातलीसे कास तुझ्या नामीं ।।धृ।।
दृढ एक चित्तें जालों या जीवासी । लाज सर्वविशीं तुम्हांसी हे ।।२।।
पीडों नेदी पशु आपुले अंकित । आहे जें उचित तैसें करा ।।३।।
तुका म्हणे किती भाकावी करुणा । कोप नारायणा येइल तुम्हां ।।४।।

३४९८
व्हावया भिकारी हें आम्हां कारण । अंतरोनि जन जावें दुरी ।।१।।
संबंध तुटावा शब्दाचा ही स्पर्श । म्हणऊनि आस मोकलिली ।।२।।
तुका म्हणे दुःखें उबगला जीव । म्हणऊनी कीव भाकीं देवा ।।३।।

३४९९
कोरडिया ऐशा सारून गोष्टी । करा उठाउठीं हित आधीं ।।१।।
खोळंबला राहे आपुला मारग । पहावी ते मग तुटी कोठें ।।धृ।।
लौकिकाचा आड येईल पसारा । मग येरझारा दुःख देती ।।२।।
तुका म्हणे डांख लागे अळंकारें । मग नव्हे खरें पुटाविण ।।३।।

३५००
ऐसें ठावें नाहीं मूढा । सोस काकुलती पुढां ।।१।।
माझीं नका जाळूं भांडीं । पोटीं भय सोस तोंडीं ।।धृ।।
पातलिया काळ । तेव्हां काय चाले बळ ।।२।।
संचित तें करी । नरका जाया मेल्यावरी ।।३।।
परउपकार । न घडावा हा विचार ।।४।।
तुका म्हणे लांसी । आतां भेटों नये ऐसी ।।५।।

३५०१
करूनी चिंतन खेळों भोवतालें । चित्त येथें आलें पायांपाशीं ।।१।।
येथें नाहीं खोटा चालत परिहार । जाणसी अंतर पांडुरंगा ।।धृ।।
सुखदुःखें तुज देऊनी सकळ । नाहीं ऐसा काळ केला आम्ही ।।२।।
तुका म्हणे जाला देहाचा विसर । नाहीं आतां पर आप दोन्ही ।।३।।

३५०२
काळा च सारिखीं वाहाती क्षेत्रें । करितां दुसरें फळ नाहीं ।।१।।
ऐसें करत्यानें ठेविलें करून । भरिलें भरून माप नेमें।।धृ।।
शीतउष्णकाळीं मेघ वरुषावे । वरुषतां वाव होय शीण।।२।।
तुका म्हणे विष अमृताचे किडे । पालट न घडे जीणें तया ।।३।।

३५०३
बोलणें तें आम्ही बोलों उपयोगीं । पडिलें प्रसंगी काळाऐसें ।।१।।

जयामध्यें देव आदि मध्यें अंतीं । खोल पाया भिंती न खचेसी ।।धृ।।
करणें तें आम्ही करूं एका वेळे । पुढिलिया बळें वाढी खुंटे ।।२।।
तुका म्हणे असों आज्ञेचीं धारकें । म्हणऊनि एकें घायें सारूं ।।३।।

३५०४
तुझिया विनोदें आम्हांसी मरण । सोसियेला सीण बहु फेरे ।।१।।
आतां आपणें चि येसी तें करीन । नाम हें धरीन तुझें कंठीं ।।धृ।।
वियोगें चि आलों उसंतीत वनें । संकल्प हे मनें वाहोनियां ।।२।।
तुका म्हणे वर्म सांपडलें सोपें । गोवियेलों पापें पुण्यें होतों ।।३।।

३५०५
पाठीलागा काळ येतसे या लागें । मी माझें वाउगें मेंढीऐसें ।।१।।
आतां अगी लागो ऐसिया वेव्हारा । तूं माझा सोइरा पांडुरंगा ।।धृ।।
वागविला माथां नसतां चि भार । नव्हे तें साचार जाणील तों ।।२।।
तुका म्हणे केलें जवळील दुरी । मृगजळ वरी आड आलें ।।३।।

३५०६
आपुलिये टाकीं । करीन कांहीं तरी एकी ।।१।।
करीन पायांशीं वोळखी । करिसी तें करीं सुखीं ।।धृ।।
कायाक्लेशगंगाजळ । समर्पीन तुळसीदळ ।।२।।
तुका म्हणे देवा । कर जोडीन ते सेवा ।।३।।

३५०७
माझे तों स्वभाव मज अनावर । तुज ही देतां भार कांहीं नव्हे ।।१।।
ऐसें कळों आलें मज नारायणा । जागृती स्वपना ताळ नाहीं ।।धृ।।
संपादितों तो अवघा बाह्य रंग । तुझा नाहीं संग अभ्यंतरीं ।।२।।
तुका म्हणे सत्या नाहीं पाठी पोट । असतें निघोंट एकी जाती ।।३।।

३५०८
नव्हावा तो बरा मुळीं च संबंध । विश्वासिकां वध बोलिलासे ।।१।।
आतां माझें हित काय तें विचारा । सत्यत्वें दातारा पांडुरंगा ।।ध्रु ।।
नाहीं भाव परी म्हणवितों दास । नका देऊं यास उणेंयेऊं ।।२।।
तुका म्हणे कां हो उद्धरितां दीन । मानीतसां सीण मायबापा।।३।।

३५०९
काय तुमचिया सेवे न वेचते गांठोळी । मोहें टाळाटाळी करीतसां ।।१।।
चतुराच्या राया आहो पांडुरंगा । ऐसें तरी सांगा निवडूनि ।।धृ।।
कोण तुम्हां सुख असे या कौतुकें । भोगितां अनेकें दुःखें आम्हा ।।२।।
तुका म्हणे काय जालासी निर्गुण । आम्हां येथें कोण सोडवील ।।३।।

३५१०
निष्ठुर यासाटीं करितों भाषण । आहेसी तूं सर्वजाण दाता ।।१।।
ऐसें कोण दुःख आहे निवारिता । तो मी जाऊं आतां शरण त्यासी ।।धृ।।
बैसलासी केणें करुनि एक घरीं । नाहीं येथें उरी दुसऱ्याची ।।२।।
तुका म्हणे आलें अवघें चि पायापें । आतां मायबापें नुपेक्षावें ।।३।।

३५११
पायांपासीं चित्त । तेणें भेटी अखंडित ।।१।।
असे खेळे भलते ठायीं । प्रेमसूत्रदोरी पायीं ।।धृ।।
केलेंसे जतन । मुळीं काय तें वचन ।।२।।
तुका म्हणे सर्वजाणा । ठायीं विचारावें मना।।३।।

३५१२
तुझे मजपाशीं मन । माझी येथें भूक तान ।।१।।
जिव्हा रतें एके ठायीं । दुजें बोलायाचें काई ।।धृ।।
माझिया कवतुकें । उभा पहासी भातुकें ।।२।।
तुका म्हणे साचें । तेथें मागील कईचें ।।३।।

३५१३
तुम्हां आम्हां सरी । येथें कईच्या या परी ।।१।।
स्वामिसेवा अळंकार । नाहीं आवडिये थार ।।धृ।।
खुंटलिया वाचा। मग हा आनंद कइचा ।।२।।
तुका म्हणे कोडें । आम्ही नाचों तुज पुढें ।।३।।

३५१४
कैचें भांडवल खरा हातीं भाव । कळवळ्यानें माव दावीतसें ।।१।।

आतां माझा अंत नको सर्वजाणा । पाहों नारायणा निवडूनि ।।धृ।।
संतांचें उच्छिष्ट मागिले पंगती । करावें संगती लागे ऐसें ।।२।।
तुका म्हणे आलों दावूनि विश्वास । संचित तें नास पावे ऐसें ।।३।।

३५१५
थोडे तुम्ही मागें होती उद्धरिले । मज ऐसे गेले वांयां जीव ।।१।।
आतां याचा काहीं न मनावा भार । कृपेचा सागर आहेसी तूं ।।धृ।।
तुज आळवितां पापाची वसति । राहे अंगीं किती बळ त्याचें ।।२।।
तुका म्हणे उदकीं तारिले दगड । तैसा मी ही जड एक देवा ।।३।।

३५१६
आम्ही म्हणों कोणी नाहीं तुज आड । दिसतोसी भ्याड पांडुरंगा ।।१।।
हागे माझ्या भोगें केलासी परता । विश्वंभरीं सत्ता नाहीं ऐसी ।।धृ।।
आम्ही तुज असों देऊनि आधार । नाम वारंवार उच्चारितों ।।२।।
तुका म्हणे मज धरियेलें बळें । पंचभूतीं खळें करूनियां ।।३।।

३५१७
आहेतें सकळ प्रारब्धा हातीं । यावें काकुलती यासी आतां ।।१।।
ऐसा माझ्या मनें सांगितला भाव । तोंवरीच देव दुजा नाहीं ।।धृ।।
अवधियांची जेव्हां सारावी करकर । भावबळें थार धरूं येसी ।।२।।
तुका म्हणे तुज ठेवावें पुजून । आणीक ते गुण नाहीं येथें ।।३।।

३५१८
सेवट तो होती तुझियानें गोड । म्हणऊनि चाड धरीतसों ।।१।।
देऊं भोगाभोग कलिवरचा भार । साहों तुज थार त्याचमधीं ।।धृ।।
तुझ्या बळें कांहीं खटपट काम । वाढवावा श्रम न लगे तो ।।२।।
तुका म्हणे आम्ही चेंपलों या भारें । तुमचें तें खरें देवपण ।।३।।

३५१९
ऐसा चि तो गोवा । न पाहिजे केला देवा ।।१।।
बहु आली दुरिवरी । ओढत हे भरोवरी ।।धृ।।
आम्हांसी न कळे । तुम्ही झाकुं नये डोळे ।।२।।
तुका म्हणे संगें । असों एक एका अंगें।।३।।

३५२०
मायलेंकरांत भिन्न । नाहीं उत्तराचा सीण ।।१।।
धाडीं धाडीं वो भातुकें । रंजविल्याचें कौतुकें ।।धृ।।
करूनि नवल। याचें बोलिलों ते बोल ।।२।।
तुका म्हणे माते । पांडुरंगे कृपावंते।।३।।

३५२१
आवडी कां ठेवूं । बैसोनियां संगें जेवूं ।।१।।
मागें नको ठेवूं उरी । माझी आण तुजवरी ।।धृ।।
देखिले प्रकार । त्याचे पाहेन साचार ।।२।।
तुका म्हणे बाळीं । केली चाहाडी सकळीं।।३।।

३५२२
नव्हेसी तूं लांसी । मायां आणिकां त्या ऐसी ।।१।।
जे हे वांयां जाती बोल । होती निर्फळ चि फोल ।।धृ।।
नव्हेसी दुबळी । कांहीं नाहीं तें जवळी ।।२।।
तुका म्हणे खोटी । कांहीं नव्हेसी करंटी ।।३।।

३५२३
आम्हां बोल लावा । तुम्हां अनुचित हें देवा ।।१।।
ऐसें सांगा कां व्यालेती । काय नाहीं तुम्हां हातीं ।।धृ।।
आतां धरा दुरी । वांयां दवडाया थोरी ।।२।।
तुका म्हणे ठायीं । ऐसें विचारावें पायीं ।।३।।

३५२४
मरोनियां गेली माया । मग तया कोण पुसे ।।१।।
पोरटियांची दाद कोणा । ऐसा जाना प्रवाहो ।।धृ।।
निढळास निढळ जोडा । होय कोडा कवतुका ।।२।।
तुका म्हणे देवाऐसी । आहों सरसीं आपण ।।३।।

३५२५
संसाराची कोण गोडी । दिली जोडी करूनि ।।१।।

निष्ठुर तूं बहु देवा । पुरे हेवा न म्हणवी ।।धृ।।
पाहोनियां कर्म डोळां । निराळा तो वर्जीना ।।२।।
तुका म्हणे तुज माझें । म्हणतां ओझें फुकट ।।३।।

३५२६
नव्हतें तें कळों आलें । तरी बोलें अबोला ।।१।।
तुज मज घातली तुटी । एके भेटीपासूनि ।।धृ।।
आतां याची न धरीं चाड । कांहीं कोड कवतुकें ।।२।।
तुका म्हणे यावें जावें । एका भावें खंडलें ।।३।।

३५२७
आतां दोघांमध्ये काय । उरलें होय वाणीजेसें ।।१।।
निष्ठुर हें केलें मन । समाधान न करूनि ।।धृ।।
झुरावें तें तेथींच्या परी । घरिच्याघरीं अवधिया ।।२।।
तुका म्हणे देवपण । गुंडाळून असों दे ।।३।।

३५२८
मागितल्यास आस करा । उरी धरा कांहींबाहीं ।।१।।
म्हणऊनि सारिली आस । होती यास मूळ तें ।।धृ।।
माझ्या मोहें तुज पान्हा । लोटे स्तना वोरस ।।२।।
तुका म्हणे आळवणे । माझ्या देणें उत्तर ।।३।।

३५२९
आतां बरें घरिच्याघरीं । आपली उरी आपणापें।।१।।
वाइटबरें न पडे दृष्टी । मग कष्टी होइजेना ।।धृ।।
बोलों जातां वाढे बोल । वांयां फोल खटखट ।।२।।
काकुलती यावें देवा । तो तों सेवा इच्छितो ।।३।।
हिशोबाचे खटखटे । चढे तुटे घडेना ।।४।।
तुका म्हणे कळों आलें । दुसरें भलें तों नव्हे ।।५।।

३५३०
आधीं सोज्वळ करावा मारग । चालतां तें मग गोवी नाहीं ।।१।।
ऐसा चालोनियां आला शिष्टाचार । गोवीचा वेव्हार पापपुण्य ।।धृ।।

पळणें तों पळा सांडुनि कांबळें । उपाधीच्या मुळें लाग पावे ।।२।।
तुका म्हणे येथें शूर तो निवडे । पडिले बापुडे कालचक्रीं ।।३।।

३५३१
उद्धत त्या जाती । द्रवें रंगल्या उद्धती ।।१।।
म्हणऊनि बहु फार । त्यांसी असावें अंतर ।।धृ।।
कैंचें पाठी पोट । गोडविषासी सेवट ।।२।।
तुका म्हणे सापा । न कळे कुरवाळिलें बापा ।।३।।

३५३२
आम्हां कथा आवश्यक । येर संपादूं लौकिक ।।१।।
जैसी तैसी माय बरी । मानिल्या त्या माना येरी ।।धृ।।
व्यालीचा कळवळा । जीव बहुत कोंवळा ।।२।।
कवतुकें वावरें । तुका म्हणे या आधारें ।।३।।

३५३३
पाळितों वचन । परि बहु भीतें मन ।।१।।
करितें पायांशीं सलगी । नये बैसों अंगसंगीं ।।धृ।।
जोडोनियां कर । उभें असावें समोर ।।२।।
तुका म्हणे संत । तुम्ही मी बहु पतित ।।३।।

३५३४
जैसा तैसा आतां । मज प्रमाण अनंता ।।१।।
पायां पडणें न संडीं । पोटीं तें च वर तोंडीं ।।धृ।।
एका भावें चाड । आहे तैसें अंतीं गोड ।।२।।
तुका म्हणे आम्हां । टळणें चि नाहीं नेमा ।।३।।

३५३५
चुकलों या ऐशा वर्मा । तरी कर्मा सांपडलों ।।१।।
पाठी लागे करी नास । गर्भवास भोगवी ।।धृ।।
माझें तुझें भिन्नभावें। गळां दावें मोहाचें ।।२।।
तुका म्हणे पाठेळ केलों । नसत्या भ्यालों छंदासी ।।३।।

३५३६
देह प्रारब्धा शिरीं । असोन करी उद्वेग ।।१।।
धांव घालीं नारायणा । माझ्या मना जागवीं ।।धृ।।
ऐसी चुकोनियां वर्मे। पीडा भ्रमें पावलों ।।२।।
तुका म्हणे कैंचा भोग । नव्हे रोग अंगींचा।।३।।

३५३७
अनंताच्या ऐकों कीर्ती । ज्याच्या चित्तीं हरिनाम ।
उलंघूनि गेले सिंधु । हा भवबंधु तोडोनियां ।।१।।
आतां हळुहळु ते चि वाहीं । चालों कांही अधिकारें ।।धृ।।
खुंटूनियां गेले नावा । नाहीं हेवा खोळंबला ।
न लगे मोल द्यावा रुका । भावें एका कारणें।।२।।
तुका म्हणे पाहतों वाट । उभा नीट पाउलीं ।
भीमातिरीं थडवा केला । उठा चला लवलाहें ।।३।।

३५३८
तरीं च म्यां देवा । साटी करूनियां जीवा ।।१।।
येथें बैसलों धरणें । दृढ कायावाचामनें ।।धृ।।
आवरिल्या वृत्ति । मन घेउनियां हातीं ।।२।।
तुका म्हणे जरा । बाहेर येऊं नेदीं घरा ।।३।।

३५३९
हें तों एक संतांठायीं । लाभ पायीं उत्तम ।।१।।
म्हणवितां त्याचे दास । पुढें आस उरेना ।।धृ।।
कृपादान केलें संतीं। कल्पांतीं ही सरेना ।।२।।
तुका म्हणे संतसेवा । हा चि हेवा उत्तम।।३।।

३५४०
नारायणा ऐसा । सेवूं नेणतील रसा ।।१।।
जेणें भवव्याध तुटे । दुःख मागुतें न भेटे ।।धृ।।
न लगे कांहीं आटी । बाधा राहों न सके पोटीं ।।२।।
कैवल्य तें जोडे । पालट लवकरी घडे ।।३।।
जन्ममरणदुःख अटे । जाळें अवघेंचि तुटे ।।४।।

तुका म्हणे जाला । याचा गुण बहुतांला ।।५।।

३५४१
अनेक दोषांचे काट । जे जे गादले निघोंट ।
होती हरिनामें चोखट । क्षण एक न लगतां ।।१।।
तुम्ही हरि म्हणा हरि म्हणा । महादोषांचे छेदना ।।धृ।।
अतिप्रीतीचा बांधला । नष्ट चांडाळीं रतला ।
क्षण न लगतां नेला । वैकुंठासी हरि म्हणतां।।२।।
अमित्य दोषाचें मूळ । जालें वाल्मीकास सबळ ।
जाला हरिनामें निर्मळ । गंगाजळ पैं जैसा ।।३।।
हरि म्हणतां तरले । महादोषी गणिके नेलें ।
कुंटणी भिली उद्धरिलें । वैकुंठासी हरि म्हणतां ।।४।।
हरिविण जन्म नको वांयां । जैसी दर्पणींची छाया ।
म्हणोनि तुका लागे पायां । शरण तया हरीसी ।।५।।

३५४२
भजन या नासिलें हेडि । दंभा लंडा आवडी ।।१।।
जेवीत ना आइता पाक । नासी ताक घुसळूनि ।।धृ।।
एकाएकीं इच्छी पाठ । नेणे चाट कां जेवूं ।।२।।
तुका म्हणे मुलाम्याचें । बंधन साचें सेवटीं ।।३।।

३४४३
जैसा निर्मळ गंगाओघ । तैसा भाग वोगरीं ।।१।।
प्रेम वाढे ग्रासोग्रासीं । ब्रम्हरसीं भोजन ।।धृ।।
तृप्तीवरि आवडी उरे। ऐसे बरे प्रकार ।।२।।
तुका म्हणे पाख मन । नारायण तें भोगी।।३।।

३४४४
सुख सुखा विरजण जालें । तें मथलें नवनीत ।।१।।
हाले डोले हरुषे काया । निवती बाह्या नयन ।।धृ।।
प्रबल तो नारायण । गुणें गुण वाढला ।।२।।
तुका म्हणे भरली सीग । वरी मग वोसंडे ।।३।।

३५४५
कां रे न भजसी हरी । तुज कोण अंगीकारी ।।१।।
होइल यमपुरी । यमदंड यातना ।।धृ।।
कोण जाली लगबग । काय करिसि तेथें मग ।।२।।
कां रे भरला ताठा । करिती वोज नेतां वाटा।।३।।
तोंडा पडिली खिळणी । जिव्हा पिटिती वोढूनि ।।४।।
कां रे पडिली जनलाज । कोण सोडवील तुज ।।५।।
लाज धरीं म्हणे तुका । नको वांयां जाऊं फुका ।।६।।

३५४६
क्षरला सागर गंगा ओघीं मिळे । आपण चि खेळे आपणाशीं ।।१ ।।
मधील ते वाव अवघी उपाधि । तुम्हां आम्हांमधीं ते चि परी ।।धृ।।
घट मठ जाले आकाशाचे पोटीं । वचनें चि तुटी तेथें चि तें ।।२ ।।
तुका म्हणे बीजें बीज दाखविलें । फल पुष्प आलें गेलें वांयां ।।३।।

३५४७
एक आतां तुम्ही करा । मज दातारा सत्तेनें ।।१।।
विश्वास तो पायांवरी । ठेवुनि हरी राहिलों ।।धृ।।
जाणत चि दुजें नाहीं । आणिक कांहीं प्रकार ।।२।।
तुका म्हणे शरण आलों । काय बोलों विनवितों।।३।।

३५४८
काय विनवावें कोणें तो निवाड । केलें माझ्या कोड वचनाचें ।।१।।
आहो कृपनिधी गुणांच्या निधाना । माझ्या अनुमाना नये चि हें ।।धृ।।
बहुत करुणा केलेंसे भासेन । एक ही वचन नाहीं आलें ।।२।।
माझी कांहीं सेवा होईल पावली । निश्चिंती मानिली होती ऐसी ।।३।।
तुका म्हणे माझी उरली ते आटी । अभय कर कटी न देखें चि ।।४।।

३५४९
लाजोनियां काळें राहिलें लिखित । नेदितां ही चित्त समाधान ।।१।।
कैसें सुख वाटे वचनाचे तुटी । प्रीतिविण भेटी रुचि नेदी ।।धृ।।
एकाचिये भेटी एकाचा कोंपर । मावेचा पदर कळों येतो ।।२।।
होत्या आपल्या त्या वेचूनियां शक्ती । पुढें जालों युक्तिकळाहीन ।।३।।

तुका म्हणे तुम्ही समर्थ जी देवा । दुर्बळाची सेवा कोठें पावे ।।४।।

३५५०
आशाबद्ध बहु असे निलाजिरें । होय म्हणें धीरें फळ टोंकें ।।१।।
कारणापें चित्त न पाहें अपमान । चित्त समाधान लाभासाटीं ।।२।।
तुका म्हणे हातें लोटिलें न कळे । झांकितसें डोळे पांडुरंगा ।।३।।

३५५१
सांता पांचां तरीं वचनां सेवटीं । निरोप कां भेटी एक तरी ।।१।।
कां नेणें निष्ठुर केलें नारायणा । न देखें हें मना येतां कांहीं ।।२।।
तुका म्हणे ऐसा न देखें निवाड । कडू किंवा गोड फळ पोटीं ।।३।।

३५५२
वांयां ऐसा जन्म गेला । हें विठ्ठला दुःख वाटे ।।१।।
नाहीं सरता जालों पायीं । तुम्ही जईं न पुसा ।।धृ।।
कां मी जीतों संवसारीं । अद्यापवरी भूमिभार ।।२।।
तुका म्हणे पंढरिनाथा । सबळ व्यथा भवरोग ।।३।।

३५५३
कासया हो माझा राखिला लौकिक । निवाड कां एक केला नाहीं ।।१।।
मग तळमळ न करितें मन । जालें तें कारण कळों येतें ।।२।।
तुका म्हणे केला पाहिजे निवाड । वइदासी भीड मरणें रोग्या ।।३।।

३५५४
ऐसें कोण पाप बळी । जें जवळी येऊं नेदी ।।१।।
तुम्हां तंव होइल ठावें । नेदावें कां कळों हें ।।धृ।।
कोण जाला अंतराय । कां ते पाय अंतरले ।।२।।
तुका म्हणे निमित्याचा । आला सुच अनुभव ।।३।।

३५५५
ब्रम्हज्ञानाची भरोवरी । पुढिला सांगे आपण न करी।।१।।
थू थू त्याच्या तोंडावरी । व्यर्थ सिणवी वैखरी ।।धृ।।
कथा करी वरिवरी । प्रेम नसे चि अंतरीं ।।२।।

तुका म्हणे कवित्व करी । मान वस्तु हे आदरी ।।३।।

३५५६
कधीं कृपा करिसी नेणें । मज दीनाचें धांवणें ।।१।।
भेटी लागीं पंढरीनाथा । जीवीं लागली तळमळ व्यथा ।।धृ।।
सिणलें माझें मन । वाट पाहतां लोचन ।।२।।
तुका म्हणे लागली भूक । तुझें पहावया श्रीमुख ।।३।।

३५५७
उच्चारूं यासाटीं । आम्ही नाम तुझें कंठीं ।।१।।
येसी धांवत धांवत । माउलिये कृपावंते ।।धृ।।
पाय चित्तीं धरूं । क्रिडा भलते ठायीं करूं ।।२।।
तुका म्हणे माझे गंगे । प्रेमभरित पांडुरंगे ।।३।।

३५५८
दगडाच्या देवा बगाड नवस । बाईल कथेस जाऊं नेदी ।।१।।
वेची धनरासी बांधलें स्मशान । दारीं वृंदावन द्वाड मानी।।धृ।।
चोरें नागविला न करी त्याची खंती । परी द्विजा हातीं नेदी रुका ।।२।।
करी पाहुणेर विव्हाया जावयासी । आल्या अतीतासी पाठमोरा ।।३।।
तुका म्हणे जळो धिग त्याचें जिणें । भार वाही सीण वर्म नेणे ।।४।।

३५५९
करूनि विनवणी । माथा ठेवितों चरणीं ।।१।।
होतें तें चि असों द्यावें । रूप सौम्य चि बरवें ।।धृ।।
भया भेणें तुमचा ठाव । तुमच्या कोपें कोठें जावें ।।२।।
तुका पायां लागे । दान समुदाय मागे ।।३।।

३५६०
प्रेम नये सांगतां बोलतां दावितां । अनुभव चित्ता चित्त जाणे ।।१।।
कासवीचें बाळ वाढे कृपादृष्टी । दुधा नाहीं भेटी अंगसंगें ।।धृ।।
पोटामध्यें कोण सांगितलें सर्पा । उपजत लपा म्हणऊनि ।।२।।
बोलों नेणें परी जाणे गोड क्षार । अंतरीं विचार त्यासी ठावा ।।३।।
तुका म्हणे बरें विचारावें मनीं । आणिक भल्यांनी पुसों नये ।।४।।

३५६१
आतां मी पतित ऐसा साच भावें । कळों अनुभवें आलें देवा ।।१।।
काय करावें तें रोकडें चि करीं । राहिली हे उरी नाहीं दोघां ।।धृ।।
येर येरा समदृष्टी द्यावें या उत्तरा । यासी काय करा गोही आतां ।।२।।
तुका म्हणे मेलों सांगतसांगतां । तें चि आलें आतां कळों तुम्हां ।।३।।

३५६२
काय तुज मागें नाहीं जाणवलें । माझें नाहीं केलें हित कांहीं ।।१।।
डोळे झांकुनियां होसी अबोलणा । तेव्हां नारायणा आतां कैसा ।।धृ।।
न कळे उचित न संगतां स्पष्ट । ऐसा क्रियानष्ट काय जाणे ।।२।।
तुका म्हणे माझा घात तुम्हां ठावा । तरि कां आधीं देवा वारूं नये ।।३।।

३५६३
नये ऐसें बोलों कठिण उत्तरें । सलगी लेंकुरें केली पुढें ।।१।।
अपराध कीजे घडला तो क्षमा । सिकवा उत्तमा आमुचिया।।धृ।।
धरूं धावें आगी पोळलें तें नेणे । ओढिलिया होणें माते बाळा ।।२।।
तुका म्हणे फार ज्याचा जार त्यासी । प्रवीण येविशीं असा तुम्ही ।।३।।

३५६४
लडिवाळ म्हणोनी निष्ठुर न बोला । परी सांभाळिला लागे घात ।।१।।
बहु वागवीत आणिलें दुरूनि । दासांची पोसनी बहु आहे ।।धृ।।
नाहीं लागों दिला आघाताचा वारा । निष्ठुर उत्तरा कोमेजतों ।।२।।
तुका म्हणे तुम्ही कृपावंत हरि । शांतवा उत्तरीं अमृताच्या ।।३।।

३५६५
आत्मस्थिति मज नको हा विचार । देई निरंतर चरणसेवा ।।१।।
जन्मोजन्मीं तुझा दास पुरुषोत्तमा । हे चि गोडी माझ्या देईं जीवा ।।धृ।।
काय सायुज्यता मुक्ति हे चि गोड । देव भक्त कोड तेथें नाहीं ।।२।।
काय तें निर्गुण पाहों कैशा परी । वर्णूं तुझी हरी कीर्ती कैसी ।।३।।
गोड चरणसेवा देवभक्तपण । मज देवा झणें दुराविसी ।।४।।
जाणिवेपासूनि सोडवीं माझ्या जीवा । देई चरणसेवा निरंतर ।।५।।
तुका म्हणे गोडा गोड न लगे प्रीतिकर । प्रीति ते ही सार सेवा हे रे ।।६।।

३५६६
चालें दंडवत घालीं नारायणा । आपुल्या कल्याणा लागूनियां ।।१।।
बैसविला पदीं पुत्र राज्य करी । पिता वाहे शिरीं आज्ञा त्याची ।।२।।
तुका म्हणे आहे ठायींचा चि मान । आतां अनुमान कायसा तो ।।३।।

३५६७
समर्थाचें बाळ पांघरे वाकळ । हसती सकळ लोक कोणा ।।१।।
समर्थासी लाज आपुल्या नांवाची । शरण आल्याची लागे चिंता ।।२।।
जरी तुज कांहीं होईल उचित । तरी हा पतित तारीं तुका ।।३।।

३६६८
न करीं रे मना कांहीं च कल्पना । चिंतीं या चरणां विठोबाच्या ।।१।।
येथें सुखाचिया रासी । पुढें ठाव नाहीं कल्पनेसी।।धृ।।
सुखाचें ओतिलें साजिरें श्रीमुख । शोक मोह दुःख पाहाता नाहीं ।।२।।
तुका म्हणे येथें होईल विसांवा । तुटतील हांवा पुढिलिया ।।३।।

३५६९
काय करूं मज नागविलें आळसें । बहुत या सोसें पीडा केली ।।१।।
हिरोनियां नेला मुखींचा उच्चार । पडिलें अंतर जवळी च ।।धृ।।
द्वैताचिया कैसा सांपडलों हातीं । बहुत करती ओढाओढी ।।२।।
तुका म्हणे आतां आपुलिया सवें । न्यावें मज देवें सोडवूनि ।।३।।

३५७०
नाहीं देवाचा विश्वास । करी संतांचा उपहास ।।१।।
। त्याचे तोंडी पडे माती । हीन शूकराची जाती ।।धृ।।
घोकुनी अक्षर। वाद छळणा करीत फिरे ।।२।।
म्हणे देवासी पाषाण । तुका म्हणे भावहीन ।।३।।

३५७१
हें चि सर्वसुख जपावा विठ्ठल । न दवडावा पळ क्षण वांयां ।।१।।
हें चि एक सर्वसाधनांचें मूळ । आतुडे गोपाळ येणें पंथें ।।धृ।।
न लगती कांहीं तपांचिया रासी । करणें वाराणसी नाना तीर्थें ।।२।।

कल्पना हे तिळ देहीं अभिमान । नये नारायण जवळी त्यांच्या ।।३।।
तुका म्हणे नामें देव नेदी भेटी । म्हणे त्याचे होंटीं कुष्ट होय ।।४।।

३५७२
माझे विषयीं तुज पडतां विसर । नको धरूं दूर पांडुरंगा ।।१।।
तुझा म्हणवितों हे चि लाज तुला । आतां झणी मला विसरेसी ।।२।।
तुका म्हणे तुझी माझी नाहीं उरी । आतां केली खरी देवराया ।।३।।

३५७३
अभक्ताचे गांवीं साधु म्हणजे काय । व्याघ्रें वाडां गाय सांपडली ।।१।।
कसाबाचे आळी मांडिलें प्रमाण । बस्वणाची आण तया काई ।।धृ।।
केळी आणि बोरी वसती सेजारी । संवाद कोणे परी घडे येथें ।।२।।
तुका म्हणे खीर केली काऱ्हेळ्याची । शुद्ध गोडी कैची वसे तेथें ।।३।।

३५७४
भागल्यांचा तूं विसांवा । करीं नांवा निंबलोण ।।१।।
परमानंदा पुरुषोत्तमा । हरीं या श्रमापासूनि ।।धृ।।
अनाथांचा अंगीकार। करितां भार न मनिसी ।।२।।
तुका म्हणे इच्छा पुरे । ऐसें धुरेगे विठ्ठल ।।३।।

३५७५
घालूनियां कास । बळें आलों मागायास ।।१।।
प्रेमें देईं पाठवूनि । पांडुरंगा सेवाऋणी ।।धृ।।
होईं रे शाहाणा । कळों नेदावें या जना ।।२।।
तुका म्हणे पायीं । जडलों मग उरलें काई।।३।।

३५७६
भेटीलागीं पंढरिनाथा । जीवीं लागली तळमळ व्यथा।।१।।
कैं कृपा करिसी नेणें । मज दीनाचें धांवणें ।।धृ।।
सीणलें माझें मन । वाट पाहातां लोचन ।।२।।
तुका म्हणे भूक । तुझें पाहावया मुख ।।३।।

३५७७

सांडियेली काया । वरी ओंवाळूनी पायां ।।१।।
शरण शरण नारायणा । मज अंगीकारा दीना ।।धृ।।
आलों लोटांगणीं। रुळें तुमचे चरणीं ।।२।।
तुका म्हणे कईं । डोई ठेवीन हे पायीं।।३।।

३५७८
तुझे दारींचा कुतरा । नको मोकलूं दातारा ।।१।।
धरणें घेतलें घरांत । नको धरून उठवूं हात ।।धृ।।
घेतली मुरकुंडी। थोर जालों मी लंडी ।।२।।
तुका म्हणे जगजीवना । ब्रिदें पाहें नारायणा।।३।।

३५७९
पडिलों बाहेरि आपल्या कर्तव्यें । संसाराचा जीवें वीट आला ।।१।।
एकामध्यें एक नाहीं मिळों येत । ताक नवनीत निडळिया ।।धृ।।
दोनी जालीं नांवें एकाच्या मथनें । भुस सार गुणें वेगळालीं ।।२।।
तुका म्हणे कोठें वसे मुक्ताफळ । सिंपल्याचें स्थळ खंडलिया ।।३।।

३५८१
पाहातां हें बरवें जालें । कळों आलें यावरी ।।१।।
मागिलांचा जाला झाडा । त्या निवाडास्तव ।।धृ।।
विसांवलें अंग दिसे । सरिसे अनुभव ।।२।।
तुका म्हणे बरें जालें । देवें नेलें गवसूनि ।।३।।

३५८१
चक्रफेरीं गळीं गळा । होता गोवियेला माळा ।।१।।
फुटोनियां गेला कुंभ । जालों निष्काम स्वयंभ ।।धृ।।
धरित चि नाहीं थारा । वेठी भ्रमण खोंकरा ।।२।।
तुका म्हणे कौतुक कोडें । आगी काय जाणे मढें ।।३।।

३५८२
श्रमपरिहारा । मूळ हें जालें दातारा ।।१।।
देह निवेदूनि पायीं । जालों रिकामा उतराई ।।धृ।।
आपली ते सत्ता । येथें असों नेदीं आतां ।।२।।

राहिला निराळा । तुका कटकटे वेगळा।।३।।

३५८३
पाठवाल तेथें गर्जेन पवाडे । कायाअ देहाकडे नावलोकीं।।१।।
म्हणउनि मागें कंठींचा सौरस । पावतील नास विघ्नें पुढें ।।धृ।।
कृपेच्या कटाक्षें निभें कळिकाळा । येतां येत बळाशक्तीपुढें ।।२।।
तुका म्हणे गुढी आणीन पायांपें । जगा होइल सोपें नाम तुझें ।।३।।

३५८४
उपजल्या काळें शुभ कां शकुन । आतां आवरोन राहिलेती ।।१।।
नाहीं मागितली वचनाची जोडी । निष्काम कोरडी वरिवरि ।।धृ।।
सत्याविण काय उगी च लांबणी । कारियाची वाणी येर भूस ।।२।।
तुका म्हणे ऐसी कोणा चाळवणी । न विचारा मनीं पांडुरंगा ।।३।।

३५८५
नव्हें मी आहाच आशेचें बांधलें । जें हें टोंकविलें नारायणा ।।१।।
अंतर तों तुम्हां बरें कळों येतें । वेव्हार उचितें चाळवीजे ।।धृ।।
मनें कल्पीलें आवरितां पाप । संकल्पीं विकल्प याचि नांवें ।।२।।
तुका म्हणे आम्हां न सोसे जळजळ । सिजल्यावरी जाळ कढ खोटा ।।३।।

३५८६
ताकें कृपण तो जेवूं काय घाली । आहाच ते चालीवरुनि कळे ।।१।।
काय तुम्हां वेचे घातलें सांकडें । माहें आलें कोडें आजिवरि ।।धृ।।
सेवेंविण आम्ही न लिंपों काया । जाला देवराया निर्धार हा ।।२।।
तुका म्हणे तुझीं राखावया ब्रीदें । येणें अनुवादें कारियासी ।।३।।

३५८७
वृत्तीवरि आम्हां येणें काशासाटीं । एवढी हे आटी सोसावया ।।१।।
जाणतसां परी नेणते जी देवा । भ्रम चि बरवा राखावा तो ।।धृ।।
मोडूनि क्षरलों अभेदाची मूस । तुम्हां कां अळस वोडवला ।।२।।
तुका म्हणे होईं लवकरि उदार । लांबणीचें फार काम नाहीं ।।३।।

३५८८

सुलभ कीर्तनें दिलें ठसावूनि । करितां धरणी उरी कोण ।।१।।
आतां न टळावें केलिया नेमासी । उदाराचा होसी हीन काय ।।धृ।।
एका नेमें कोठें दुसरा पालट । पादिर तो धीट म्हणती त्यासी ।।२।।
तुका म्हणे किती बोलसी उणें । एकाच वचनें खंड करीं ।।३।।

३५८९
जेथें माझी दृष्टि राहिली बैसोन । तेथें चि हें मन गुंडाळातें ।।१।।
टाळावी ते पीडा आपुल्यापासून । दिठावेलें अन्न ओकवितें ।।धृ।।
तुम्हांसी कां कोडें कोणे ही विशीचें । नवलाव याचें वाटतसे ।।२।।
तुका म्हणे वेगीं उभारा जी कर । कीर्त मुखें थोर गर्जईन ।।३।।

३५९०
इच्छेपाशीं आलों फिरोनि मागुता । स्वामीसेवकता आवडीचे ।।१।।
द्यावें लवकरी मागितलें दान । मुळींचें जतन करूनि असें ।।धृ।।
उपाय हे करीं एका चि वचना । दावूनियां खुणा ठाया येतों ।।२।।
तुका म्हणे गांठी किती तुजपाशीं । जगाच्या तोडिसी चिंतनानें ।।३।।

३५९१
कोठें आतां आम्ही वेचावी हे वाणी । कोण मना आणी जाणोनियां ।।१।।
न करावी सांडी आतां टाळाटाळी । देइन ये कळी होइल माजी ।।धृ।।
घरोघरीं जाल्या ज्ञानाचिया गोष्टी । सत्यासवें गांठी न पडवी ।।२।।
तुका म्हणे आम्हां भाकितां करुणा। भलता चि शाहाणा शोध काढी ।।३।।

३५९२
डगमगी मन निराशेच्या गुणें । हें तों नारायणें सांतवीजे ।।१।।
धीरें तूं गंभीर जीवनें जगाचें । जळो विभागाचें आत्रीतत्या ।।धृ।।
भेईल जीव हें देखोनि कठिण । केला जातो सीण तो तो वांयां ।।२।।
तुका म्हणे आवश्यक हें वचन । पाळावें चि वान समयो आहे ।।३।।

३५९३
आम्ही पाहा कैसीं एकतत्त्व जालों । राखणे लागलों वासनेसी ।।१।।
तुम्हांविण कांहीं नावडावें जीवा । केला तो चि देवा केला पण ।।धृ।।
वर्म नेणों परि वृत्ती भंगों नेदुं । वंदिलें चि वंदूं आवडीनें ।।२।।

तुका म्हणे कळे नामाचें जीवन । वारता ही भिन्न नेणों आतां ।।३।।

३५९४
आपण तों असा । समर्थ जी हृषीकेशा ।।१।।
करा करा बुझावणी । काय विलंब वचनीं ।।धृ।।
हेंगे ऐसें म्हणा । उठूनि लागेन चरणा ।।२।।
घेऊनियां सुखें । नाचेल तुका कवतुकें ।।३।।

३५९५
द्याल ऐसें दिसे । तुमचें साचपण इच्छे ।।१।।
म्हणऊनि न भंगे निर्धार । केलें लोचनें सादर ।।धृ।।
मुखाची च वास । पुरला पाहे अवकाश ।।२।।
तुका म्हणे कळे । काय लाभ कोण वेळ ।।३।।

३५९६
तुम्ही तों सदैव । आधरपणें माझी हांव ।।१।।
जळो आशेचें तें जिणें । टोंकतसावें दीनपणें ।।धृ।।
येथूनि सोडवा । आतां अनुभवेंसी देवा ।।२।।
तुका म्हणे जालें । एक मग हें निमालें।।३।।

३५९७
कैसें भलें देवा अनुभवा कां नये । उसीर तो काय तुम्हांपाशीं ।।१।।
आहे तें मागों तों दिसातें जवळी । केल्यामध्यें कळि कोण साध्य ।।धृ।।
नाहीं सांडीत मी सेवेची मर्यादा । लाविला तो धंदा नित्य करीं ।।२।।
तुका म्हणे हात आवरिला गुंती । माझे तंव चित्तीं नाहीं दुजें ।।३।।

३५९८
हुंदकी पिसवी हलवी दाढी । मणी वोढी निंदेचे।।१।।
त्याचें फळ पाकीं यमाचे दंड । घर केलें कुंड कुंभपाक ।।धृ।।
क्रोध पोटीं मांग आणिला अंतरा । भुंकोनि कुतरा जप करी ।।२।।
तुका म्हणे स्नान केलें मळमूत्रें । जेवविलीं पितरें अमंगळें ।।३।।

३५९९

अंगा भरला ताठा । नये वळणी जैसा खुंटा ।।१।।
कैसें न कळे त्या डेंगा । हित आदळलें अंगा ।।धृ।।
जीव जाते वेळे । भरे लकडा ताठी डोळे ।।२।।
मुसळाचें धनु । तुका म्हणे नव्हे अनु ।।३।।

३६००
करूनि कडविड । जमा घडिली लगड ।।१।।
आतां होतें तें चि जालें । नाम ठायींचें चांगलें ।।धृ।।
उतरलें डाईं । उत्तम ते सुलाख ताई ।।२।।
हिंडवितां देश । तुका म्हणे नाहीं नाश ।।३।।

३६०१
पढीयंतें मागा पांडुरंगापाशीं । मज दुर्बळासी काय पीडा ।।१।।
या चि साटीं दुराविला संवसार । वाढे हे अपार माया तृष्णा ।।धृ।।
कांहीं करितां कोठें नव्हें समाधान । विचारितां पुण्य तें चि पाप ।।२।।
तुका म्हणे आतां निश्चळ चि भलें । तुज आठविलें पांडुरंगा ।।३।।

३६०२
नव्हे मी शाहाणा । तरी म्हणा नारायणा ।।१।।
तुम्हां बोलवाया कांहीं । ये च भरलोंसे वाहीं ।।धृ।।
आणावेति रूपा । कोपलेती तरी कोपा ।।२।।
कळोनि आवडी । तुका म्हणे जाते घडी।।३।।

३६०३
आम्ही भाविकें हे काय जाणों खोडी । आइकोनि प्रौढी विनविलें ।।१।।
नाहीं ऐसें येथें जालेती असतां । वाढविली चिंता अधिक सोसें ।।धृ।।
न कळे चि आधीं करितां विचार । न धरितां धीर आहाचता ।।२।।
तुका म्हणे आतां वचनें वचन । वाढले तिक्षीण बुद्धि जाली ।।३।।

३६०४
कोठें देवा बोलों । तुम्हां भीड घालूं गेलों ।।१।।
करावाया सत्त्वहाणी । भांडवलाची टांचणी ।।धृ।।

दुर्बळा मागतां । त्याच्या प्रवर्तला घाता ।।२।।
तुका म्हणे नाहीं । मज कळलें ऐसें कांहीं ।।३।।

३६०५
काय त्या दिवस उचिताचा आला । मागील जो केला श्रम होता ।।१।।
ठेवियेला पूर्ण करूनि संकेत । तयापाशीं चित्त लागलें से ।।धृ।।
जाणसी गे माते लेंकराचें लाड । नये पडों आड निष्ठुरता ।।२।।
तुका म्हणे आम्हीं करावें वचन । तुम्हांसी जतन करणें तें ।।३।।

३६०६
पडिला प्रसंग कां मी ऐसा नेणें । संकल्प ते मनें जिरवले ।।१।।
चेष्टाविलें तरी सांगावें कारणे । भक्ती ते उजेवन करावया ।।धृ।।
लावूनियां दृष्टि घेतली सामोरी । बैसलें जिव्हारीं डसोन तें ।।२।।
तुका म्हणे जीवा लाविला तो चाळा । करावें गोपाळा शीघ्र दान ।।३।।

३६०७
मागील विसर होईल सकळ । केली तळमळ दुःखाची ते ।।१।।
दोहींचें अहिक्य घालीं गडसंदीं । स्थिरावेल बुद्धि पायांपाशीं।।धृ।।
अहाच या केलों देहपरिचारें । तुमचें तें खरें वाटों नये ।।२।।
तुका म्हणे व्हावें लवकरी उदार । मी आहें सादर प्रतिग्रहासी ।।३।।

३६०८
वाढवावा पुढें आणीक प्रकार । एक चि तें फार रुचि नेदी ।।१।।
निंच नवें लेणें देह हा पवाडा । पालट रोकडा वरावरी ।।धृ।।
दिसे शोभिवंत सेवेनें सेवक । स्वामीची ते लोकत्रयीं कीर्ति ।।२।।
तुका म्हणे आजी पाववा संतोष । करुनि कीर्तिघोष नाचईन ।।३।।

३६०९
क्षोभ आणि कृपा मातेची समान । विभाग जतन करुनि ठेवी ।।१।।
क्षणभंगुर ते उपजली चिंता । खरी अखंडता आवडीची ।।धृ।।
सिकवूं जाणे तें गोमाटियासाटीं । लोभें नाहीं तुटी निश्चयेंसी ।।२।।
अघवें चि मिथ्या समया आरतें । देता तो उचितें काळ जाणे ।।३।।
न करी वेव्हार नेदी गांजूं कोणा । भेडसावी तान्हें हाऊ आला ।।४।।

तुका म्हणे करी जिवाची जतन। दचकूनि मन जवळी आणी ।।५।।

३६१०
संसाराचें धांवे वेठी । आवडी पोटीं केवढी ।।१।।
हागों जातां दगड सांची । अंतरीं ही संकल्प ।।धृ।।
लाज तेवढी नारायणीं। वांकडी वाणी पोरांपें ।।२।।
तुका म्हणे बेशरमा । श्रमावरी पडिभरू।।३।।

३६११
मी त्यांसी अनन्य तीं कोणा असती । ऐसें तंव चित्तीं विचारावें ।।१।।
आहे तो विचार आपणयापाशीं । कळा बिंबाऐसी प्रतिबिंबीं ।।धृ।।
शुभ शकून तो शुभ लाभें फळे । पुढील तें कळे अनुभवें ।।२।।
तुका म्हणे माझा असेल आठव । तैसा माझा भाव तुझ्या पायीं ।।३।।

३६१२
बहु कृपावंते माझीं मायबापें । मी माझ्या संकल्पें अंतरलों ।।१।।
संचितानें नाहीं चुकों दिली वाट । लाविलें अदट मजसवें ।।धृ।।
आतां मी रुसतों न कळतां वर्म । परी ठावे धर्म सर्व देवा ।।२।।
तुका म्हणे उभा राहिला न बैसे । आमची माय असे उद्वेग त्या ।।३।।

३६१३
कैसीं दिसों बरीं । आम्ही आळवितां हरि ।।१।।
नाहीं सोंग अळंकार । दास जाला संवसार ।।धृ।।
दुःख आम्हां नाहीं चिंता । हरिचे दास म्हणवितां ।।२।।
तुका म्हणे देवा । ऐसीं जळो करितां सेवा ।।३।।

३६१४
आतां सांडूं तरी हातीं ना पदरीं । सखीं सहोदरीं मोकळिलों ।।१।।
जनाचारामध्यें उडाला पातेरा । जालों निलाजिरा म्हणऊनि ।।धृ।।
कोणाचिया दारा जावेनासें जालें । म्यां च विटंबिलें आपणासी ।।२।।
कां न जाला माझे बुद्धीसी संचार । नाहीं कोठें थार ऐसें जालें ।।३।।
तुका म्हणे तुज भक्त जाले फार । म्हणोनियां थार नाहीं येथें ।।४।।

३६१५
जेथें जातों तेथें पडतो मतोळा । न देखिजे डोळां लाभ कांहीं ।।१।।
कपाळीची रेखा असती उत्तम । तरि कां हा श्रम पावतों मी ।।धृ।।
नव्हे चि तुम्हांस माझा अंगीकार । थीता संवसार अंतरला ।।२।।
भोग तंव जाला खरा भोगावया तो । भांडवल नेतो आयुष्य काळ ।।३।।
कोठें तुझी कीर्ती आइकिली देवा । मुकतों कां जीवा तुका म्हणे ।।४।।

३६१६
कां जी आम्हां होतें दोषाचें दर्शन । तुज समर्पून देहभाव ।।१।।
पांडुरंगा कृपाळुवा दयावंता । धरसील सत्ता सकळ ही ।।धृ।।
कां जी आम्हांवरि आणिकांची सत्ता । तुम्हांसी असता जवळिकें ।।२।।
तुका म्हणे पायीं केलें निवेदन । उचित तें दान करीं सत्ता ।।३।।

३६१७
निंदावें हें जग । ऐसा भागा आला भाग ।।१।।
होतें तैसें आलें फळ । गेलें निवडूनि सकळ ।।धृ।।
दुसऱ्याच्या मता । मिळेनासें जालें चित्ता ।।२।।
तुका जाला सांडा । विटंबिती पोरें रांडा ।।३।।

३६१८
माझे माथां तुझा हात । तुझे पायीं माझें चित्त ।।१।।
ऐसी पडियेली गांठी । शरीरसंबंधाची मिठी ।।धृ।।
येरयेरांपाशीं । सांपडोन गेलों ऐसीं ।।२।।
तुका म्हणे सेवा । माझी कृपा तुझी देवा।।३।।

३६१९
सत्य त्यागा चि समान । नलगे वेचावें वचन ।।१।।
नारायणा ऐसे दास । येरयेरांची च आस ।।धृ।।
मळ नाहीं चित्ता । तेथें देवाची च सत्ता ।।२।।
तुका म्हणे जाण । तें च भल्याचें वचन।।३।।

३६२०
माझिये बुद्धीचा खुंटला उपाव । करिसील काय पाहेन तें ।।१।।

सूत्रधारी तूं हें सकळचाळिता । कासया अनंता भार वाहों ।।धृ।।
वाहिले संकल्प न पवती सिद्धी । येऊं देहबुद्धीवरि नयों ।।२।।
तुका म्हणे दुःखी करिती तरंग । चिंतूं पांडुरंग आवरून।।३।।

३६२१
देखिलें तें धरिन मनें । समाधानें राहेन ।।१।।
भाव माझी सांटवण । जगजीवन कळावया ।।धृ।।
बोळवीन एकसरें । उत्तरें या करुणेच्या ।।२।।
तुका म्हणे नयों रूपा । काय बापा करीसी।।३।।

३६२२
वांयां जाय ऐसा । आतां उगवावा फांसा ।।१।।
माझें परिसावें गाऱ्हाणें । सुखदुःखाचीं वचनें ।।धृ।।
हा चि आम्हां ठाव। पायीं निरोपाया भाव ।।२।।
तुका म्हणे जार । तुझा तुज देवा भार।।३।।

३६२३
खादलें च खावें वाटे । भेटलें भेटे आवडी ।।१।।
वीट नाहीं पांडुरंगीं । वाढे अंगीं आर्त तें ।।धृ।।
इंद्रियांची हांव पुरे। परि हें उरे चिंतन ।।२।।
तुका म्हणे पोट भरे । परि ते उरे भूक पुढें ।।३।।

३६२४
सत्य आठवितां देव । जातो भेंव पळोनि ।।१।।
न लगे कांहीं करणे चिंता । धरी सत्ता सर्व तो ।।धृ।।
ध्रु.।। भावें भाव राहे पायीं । देव तैं संनिध ।।२।।
तुका म्हणे कृष्णनामें । शीतळ प्रेम सर्वांसी ।।३।।

३६२५
ब्रीद याचें जगदानी । तो चि मनीं स्मरावा ।।१।।
सम पाय कर कटी । उभा तटीं भींवरेच्या ।।धृ।।
पाहिलिया वेध लावी । बैसे जीवीं जडोनि ।।२।।
तुका म्हणे भक्तिकाजा । धांवें लाजा लवलाहें ।।३।।

३६२६
माझिया मनाची बैसली आवडी । अवसान घडी एकी नेघे ।।१।।
पाय चित्तीं रूप डोळांच राहिलें । चिंतने गोविलें मुख सदा ।।धृ।।
अवधियांचा जाला विसर हा मागें । वेध हा श्रीरंगें लावियेला ।।२।।
तुका म्हणे कानीं आइकली मात । तो चि जाला घात जीवपणा ।।३।।

३६२७
याची कोठें लागली चट । बहु तट जालेंसे ।।१।।
देवपिसीं देवपिसीं । मजऐसीं जग म्हणे ।।धृ।।
एकांताचें बाहेर आलें । लपविलें झांकेना ।।२।।
तुका म्हणे याचे भेटी । जाली तुटी आपल्यांसी ।।३।।

३६२८
दीन आणि दुर्बळांसी । सुखरासी हरिकथा ।।१।।
तारूं भवसागरींचें । उंचनीच अधिकार ।।धृ।।
चरित्र तें उच्चारावें । केलें देवें गोकुळीं ।।२।।
तुका म्हणे आवडी धरीं । कृपा करी म्हणऊनी।।३।।

३६२९
संतोषे माउली आरुषा वचनी । वोरसोनि स्तनीं लावी बाळा ।।१।।
तैसे परिमळाचें अवघें चि गोड । पुरवितो कोड पांडुरंग ।।धृ।।
सेवा करी साहे निष्ठुर उत्तरें । त्याचें वाहे मनीं तेंच बरें ।।२।।
तुका म्हणे इच्छावसे खेळ खेळें । चिंता ते सकळ कांहीं नेणें ।।३।।

३६३०
विनवीजे ऐसें कांहीं । उरलें नाहीं यावरि ।।१।।
आतां असो पंढरीनाथा । पायीं माथा तुमचिये ।।धृ।।
मागें सारियेली युक्ती । कांहीं होती जवळी ते ।।२।।
निराशेची न करी आस । तुका दास माघारी ।।३।।

३६३१
आतां येथें जाली जीवासवेंसाटी । होतें तैसें पोटीं फळ आलें ।।१।।

आतां धरिले ते नो सोडीं चरण । सांपडलें धन निजठेवा ।।धृ।।
आतां हा अळस असो परता दुरी । नेदावी तें उरी उरों कांहीं ।।२।।
आतां याचा मज न व्हावा विसर । भरोनि अंतर राहों रूप ।।३।।
आतां लोकलाज नयो येथें आड । बहु जालें गोड ब्रम्हरस ।।४।।
तुका म्हणे आतां जन्म हा सफळ । अंतरीं गोपाळ स्थिरावला ।।५।।

३६३२
अनंतां जीवांचीं तोडिलीं बंधनें । मज हि येणें काळें कृपा कीजे ।।१।।
अनंत पवाडे तुझे विश्वंभरा । भक्तकरुणाकरा नारायणा ।।धृ।।
अंतरींचें कळों देईं गुह्य गुज । अंतरीं तें बीज राखईन ।।२।।
समदृष्टी तुझे पाहेन पाउलें । धरीन संचले ह्रदयांत।।३।।
तेणें या चित्ताची राहेल तळमळ । होतील शीतळ सकळ गात्रें ।।४।।
तुका म्हणे शांति करील प्रवेश । मग नव्हे नाश अखंड तो ।।५।।

३६३३
पराधीन माझें करूनियां जीणें । सांडीं काय गुणें केली देवा ।।१।।
उदार हे कीर्ति असे जगामाजी । कां तें ऐसें आजि पालटिलें ।।धृ।।
आळवितों परी न पुरे चि रीग । उचित तो त्याग नाहीं तुम्हां ।।२।।
तुका म्हणे कां बा मुळीं च व्यालासी । ऐसें कां नेणसी पांडुरंगा ।।३।।

३६३४
नेणपणें नाहीं केला हा बोभाट । आतां आली वाट कळों खरी ।।१।।
आतां बहुं शीघ्र यावें लवकरी । वाट पाहें हरी भेटी देईं ।।धृ।।
समर्थाच्या बाळा करुणेचें भाषण । तरी त्याची कोण नांदणूक ।।२।।
तुका म्हणे बहु बोलिले बडिवार । पडिलें अंतर लौकिकीं तें ।।३।।

३६३५
जें जें केलें तें तें साहे । कैसें पाहें भाविक ।।१।।
ओंवाळूनि माझी काया । सांडिली यावरूनि ।।धृ।।
काय होय नव्हें करूं । नेणें धरूं सत्ता ते ।।२।।
तुका म्हणे कटीं कर । उभें धीर धरूनि ।।३।।

३६३६

नाहीं मज कृपा केली पांडुरंगें । संताचिया संगें पोट भरीं ।।१।।
चतुराचे सभे पंडित कुशळ । मी काय दुर्बळ विष्णुदास।।२।।
तुका म्हणे नेणें करूं समाधान । धरिले चरण विठोबाचे ।।३।।

३६३७
तुम्ही माझा देवा करिजे अंगीकार । हा नाहीं विचार मजपाशीं ।।१।।
आतां दोहीं पक्षीं लागलें लक्षणें । देवभक्तपण लाजविलें ।।धृ।।
एकांतीं एकलें न राहे निश्चळ । न राहे च पळ मन ठायीं ।।२।।
पायीं महत्वाची पडिली शंकळा । बांधविला गळा स्नेहा हातीं ।।३।।
शरीर सोकलें देखिलिया सुखा । कदान्न हें मुखा मान्य नाहीं ।।४।।
तुका म्हणे जाला अवगुणांचा थारा । वाढली हे निद्रा अळस बहु ।।५।।

३६३८
बोलिलिया गुणीं नाहीं पाविजेत । देवा नाहीं होत हित तेथें ।।१।।
कवतुक तुझें नवल यावरि । घेसील तें शिरीं काय नव्हे ।।धृ।।
नाहीं मिळों येत संचिताच्या मता । पुराणीं पाहतां अघटित ।।२।।
तुका म्हणे पायीं निरोपिला भाव । न्याल तैसा जाव सिद्धी देवा ।।३।।

३६३९
हा तों नव्हता दीन । टाळायाच्या ऐसा क्षण ।।१।।
कां जी नेणों राखा हात । कैसें देखावें रडत ।।धृ।।
दावूनियां आस । दूर पळविता कास ।।२।।
तुका म्हणे धांव । घेतां न पुरे चि हांव ।।३।।

३६४०
आर्तभूतां द्यावें दान । खरें पुण्य त्या नांवें ।।१।।
होणार तें सुखें घडो । लाभ जोडो महाबुद्धि ।।धृ।।
सत्य संकल्प च साटीं । उजळा पोटीं रविबिंब ।।२।।
तुका म्हणे मनीं वाव । शुद्ध भाव राखावा ।।३।।

३६४१
कवतुकवाणी बोलतसें लाडें । आरुष वांकडें करुनि मुख ।।१।।
दुजेपणीं भाव नाहीं हे आशंका । जननीबाळकामध्यें भेद ।।धृ।।

सलगी दुरूनि जवळी पाचारूं । धांवोनियां करूं अंगसंग।।२।।
धरूनि पालव मागतों भातुकें । आवडीचें निकें प्रेमसुख ।।३।।
तुका म्हणे तुज आमची च गोडी । ऐसी हे आवडी कळों आली ।।४।।

३६४२
ऐकें पांडुरंगा वचन माझें एक । जालों मी सेवक दास तुझा ।।१।।
कळे तैसा आतां करावा उद्धार । खुंटला विचार माझा पुढें ।।धृ।।
दंभ मान माझा करूं पाहे घात । जालिया ही थीत कारणाचा ।।२।।
हीन बुद्धि माझी अधम हे याती । अहंकार चित्तीं वसों पाहे ।।३।।
तुका म्हणे मज विघडतां क्षण । न लगे जतन करीं देवा ।।४।।

३६४३
जेणें माझें चित्त राहे तुझ्या पायीं । अखंड तें देईं प्रेमसुख ।।१।।
देहभाव राख दीन करूनियां । जनाचारी वायां जाय तैसा ।।धृ।।
द्रव्य दारा नको मानाची आवडी । कवणेविशीं गोडी प्रपंचाची ।।२।।
तुझें नाम माझें धरूनियां चित्त । एकांत लोकांत सदा राहो ।।३।।
तुका म्हणे तुझे जडोनियां पायीं । जालों उतराई पांडुरंगा ।।४।।

३६४४
काय सांगों या संतांचे उपकार । मज निरंतर जागविती।।१।।
काय द्यावें त्यांचें व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ।।धृ।।
सहज बोलणें हितउपदेश । करूनि सायास शिकविती।।२।।
तुका म्हणे वत्स धेनुवेचा चित्तीं । तैसे मज येती सांभाळीत ।।३।।

३६४५
देव जाणता देव जाणता । आपली च सत्ता एकाएकीं।।१।।
देव चतुर देव चतुर । जाणोनि अंतर वर्ततसे।।२।।
देव निराळा देव निराळा । अलिप्त विटाळा तुका म्हणे ।।३।।

३६४६
आपण चाळक बुद्धीच्या संचारा । आम्हांसी वेव्हारा पात्र केलें ।।१।।
काय जालें तरी नेघा तुम्हीं भार । आणीक कोणां थोर म्हणों सांगा ।।धृ।।
पंच भूतें तंव कर्माच्या या मोटा । येथें खरा खोटा कोण भाव ।।२।।

तुका म्हणे नाहीं बोलावया जागा । कां देवा वाउगा श्रम करूं ।।३।।

३६४७
एका एक वर्मे लावूनियां अंगीं । ठेवितों प्रसंगीं सांभाळीन ।।१।।
नेघावा जीं तुम्ही वाव बहु फार । धरूनि अंतर ठायाठाव ।।धृ।।
वेव्हारें आलें तें समानें चि होतें । बळ नाहीं येथें चालों येत ।।२।।
तुका म्हणे आतां निवाडा च साटीं । संवसारें तुटी करुनि ठेलों ।।३।।

३६४८
आतां येथें खरें । नये फिरतां माघारें ।।१।।
होइल हो तैसी आबाळी । देहनिमित्य या बळी ।।धृ।।
तुम्हांसवें गांठी । देवा जीवाचिये साटीं ।।२।।
तुका नव्हे लंड । करूं चौघांमध्यें खंड।।३।।

३६४९
कां हो वाडवितां देवा । मज घरी समजावा । केवडा हो गोवा । फार केलें थोड्याचें ।।१।।
ठेविन पायांवरी डोई । यासी तुमचें वेचे काई । जालों उतराई । जाणा एकएकांचे ।।धृ।।
निवाड आपणियांपाशीं । असोन कां व्हावें अपेसी । होती गांठी तैसी । सोडूनियां ठेविली ।।२।।
तुका म्हणे गोड । होतें जालिया निवाड । दर्शनें ही चाड । आवडी च वाढेल ।।३।।

३६५०
नव्हों सभाधीट । समोर बोलाया नीट । एकलीं एकट । दुजें नाहीं देखिलें ।।१।।
आतां अवघें तुम्हीं जाणां । तुमचें माझें नारायणा । येईल करुणा । ते चि पहा तुम्हांसी ।।धृ।।
ताळ नाहीं माझे बुद्धी । धरली न धरवे शुद्धी । आतां बळें कधीं । कोण्या जन्में निवाड ।।२।।
आतां शेवटीचें । उत्तर तें हें चि साचें । शरण आलें त्याचें । तुका म्हणे सांभाळा ।।३।।

३६५१
ऐसा तंव मोळा । तुमचा नसेल गोपाळा ।।१।।
मागत्याची टाळाटाळी । झिंज्या ओढोनि कपाळीं ।।धृ।।
नसेल ना नवें । ऐसें धरियेलें देवें ।।२।।
तुका म्हणे जाला । उशीर नाहीं तो विठ्ठला ।।३।।

३६५२
माझ्या कपाळाच्या गुणें । किंवा सरलेंसे नेणें ।।१।।
नये वचन बाहेरी । उभें तिष्ठतसें दारीं ।।धृ।।
काय सांगायास वेचे। रींद आरंभीं ठायींचे ।।२।।
तुका म्हणे किती । भीड धरावी पुढती ।।३।।

३६५३
कांहीं एक तरी असावा आधार । कासयानें धीर उपजावा ।।१।।
म्हणविल्यासाटीं कैसें पडे रुजु । धणी नाहीं उजू सन्मुख तो ।।धृ।।
वेचल्या दिसांचा कोणावरी लेखा । घालावा हा सुखासुखा आम्हीं ।।२।।
नाहीं मनोगत तोंवरि हे देवा । तुका म्हणे सेवा नेघीजे तों ।।३।।

३६५४
मनाचिये साक्षी जाली सांगों मात । सकळ वृत्तांत आपला तो ।।१।।
तुम्हां परामृश घेणें सत्ताबळें । धरितां निराळें कैसीं वांचों ।।धृ।।
मी माझें सांडून यावया पसारा । आणीक दातारा काय काज ।।२।।
तुका म्हणे आम्ही तुजविण एका । निढळें लौकिका माजी असों ।।३।।

३६५५
घालूनि लोळणी पडिलों अंगणीं । सिंचा सिंचवणी तीर्थ वरि ।।१।।
वोल्हावेल तनु होईल शीतळ । जाली हळहळ बहुतापें ।।धृ।।
पावेन या ठाया कईं जालें होतें । आलों अवचितें उष्ट्यावरि ।।२।।
तुका म्हणे कोणी जाणवा राउळी । येइल जवळी पांडुरंग ।।३।।

३६५६
तरीं भलें वांयां गेलों । जन्मा आलों मागुता । म्हणऊनि ठेलों दास । सावकास

निर्भयें ।।१।।
उणें पुरें काय माझें। त्याचें ओझें तुम्हांसी ।।धृ।।
सांभाळावें तें म्या काई । अवो आई विठ्ठले । मागें जया जाई नें स्थळा । तुज गोपाळा विसरेंना ।।२।।
आपलें म्यां एकसरें । करुनि बरें घेतलें । तुका म्हणे नारायणा । आतां जाणां आपुलें ।।३।।

३६५७
उरलें तें भक्तिसुख । डोळां मुख पाहावें । अंतरींचें कां हों नेणां । नारायणा माझिये ।।१।।
पुरवां तैसी केली आळी । बळी जगदानियां ।।धृ।।
हातीं घेउनि चोरां भातें । दावां रितें बाळका। साजतें हें थोरपण । नाहीं विण वत्सळा ।।२।।
शाहणें तरीं लाड दावी । बाळ जेवीं मातेसी । तुका म्हणे पांडुरंगा । ऐसें पैं गा आहे हें ।।३।।

३६५८
धरूनि हें आलों जीवीं । भेटी व्हावी विठोबासी।।१।।
संकल्प तो नाहीं दुजा । महाराजा विनवितों ।।धृ।।
पायांवरि ठेविन भाळ । येणें सकळ पावलें ।।२।।
तुका म्हणे डोळेभरी । पाहिन हरी श्रीमुख ।।३।।

३६५९
तुम्हां उद्धरणें फार । मज दुसरी नाहीं थार ।।१।।
आतां जैसें तैसें सोसा । काय करणें हृषीकेशा ।।धृ।।
बरें न दिसेल ओळी । एका अन्न एका गाळी ।।२।।
लावितो आभार । तुका विखरलेती फार ।।३।।

३६६०
न कळे जी भक्ती काय करूं सेवा । संकोचोनि देवा राहिलोंसे ।।१।।
जोडोनियां कर राहिलों निवांत । पायांपाशीं चित्त ठेवूनियां ।।धृ।।
दिशाभुली करीं स्थळीं प्रदक्षणा । भ्रमें नारायणा कष्टविलें ।।२।।
तुका म्हणे जालों आज्ञेचा पाळक । जीवनासी एक ठाव केला ।।३।।

३६६१
एकविध वृत्ति न राहे अंतरीं । स्मरणीं च हरी विस्मृति ।।१।।
कैसा हा नवलाव वाटतो अनुभवें । मज माझ्या जीवें साक्षित्वेसी ।।धृ।।
न राहे निश्चळ जागवितां मन । किती क्षीणेंक्षीणें सावरावें ।।२।।
तुका म्हणे बहु केले वेवसाव । तेणें रंगें जीव रंगलासे ।।३।।

३६६२
आतां सोडवणें न या नारायणा । तरि मी न वंचे जाणा काळा हातीं ।।१।।
ऐसें सांगोनिया जालों उतराई । आणीक तें काई माझे हातीं ।।धृ।।
केलियाचें माप नये सेवटासी । करितील नासि अंतराय ।।२।।
तुका म्हणे भय वाटतसे जीवा । धांवणिया धांवा लवकरी ।।३।।

३६६३
सत्या माप वाढे । गबाळाची चाली खोडे ।।१।।
उतरे तें कळें कसी । विखरोणें सर्वदेशीं ।।धृ।।
घरामध्ये राजा । नव्हे हो वा पाटपूजा ।।२।।
तुका म्हणे साचें । रूप तें दर्पणाचें।।३।।

३६६४
नाहीं खंड जाला । माझा तुमचा विठ्ठला ।।१।।
कैसें कैसें हो दुश्चित । आहे चौघांपाशीं नीत ।।धृ।।
मुळींचे लिहिलें । मज आतां सांपडलें ।।२।।
तुका म्हणे मज । न लगे बोलणें सहज।।३।।

३६६५
हेचि वादकाची कळा । नाहीं येऊं येत बळा ।।१।।
धीर करावा करावा । तरी तो आहे आम्हां देवा ।।धृ।।
रिघावें पोटांत। पायां पडोन घ्यावा अंत ।।२।।
तुका म्हणे वरि । गोडा आणावा उत्तरीं ।।३।।

३६६६
एक परि बहिर बरें । परि तीं ढोरें ग्यानगडें ।।१।।

कपाळास लागली अगी । अभागी कां जीतसे ।।धृ।।
एक परि बरें वेडें । तार्किक कुडें जळो तें ।।२।।
तुका म्हणे खातडवासी । अमृतासी नोळखे ।।३।।

३६६७
खेळों मनासवें जीवाच्या संवादें । कौतुक विनोदें निरांजनी ।।१।।
पचीं पडिलें तें रुचे वेळोवेळां । होतसे डोहळा आवडीस ।।धृ।।
एकांताचें सुख जडलें जिव्हारीं । वीट परिचारीं बरा आला ।।२।।
जगाऐसी बुद्धि नव्हे आतां कदा । लंपट गोविंदा जालों पायीं ।।३।।
आणीक ते चिंता न लगे करावी । नित्य नित्य नवी आवडी हे ।।४।।
तुका म्हणे धडा राहिला पडोन । पांडुरंगीं मन विसांवलें ।।५।।

३६६८
उचिताचा काळ । साधावया युक्तिबळ । आपलें सकळ । ते प्रसंगीं पाहिजे ।।१।।
नेम नाहीं लाभ हानि । अवचित घडती दोनी । विचारूनि मनीं । पाहिजे तें प्रयोजावें ।।धृ।।
जाळ जाळा काळें । करपों नेदावें आगळें । जेवितां वेगळें । ज्याचें त्याचें तेथें तें शोभे ।।२।।
पाळी नांगर पाभारीं । तन निवडूनि सोंकरी । तुका म्हणे धरी । सेज जमा सेवटीं ।।३।।

३६६९
पडिलिया ताळा । मग अवघा चि निर्वाळा । तेथें कोणी बळा । नाहीं येत कोणासी ।।१।।
जोडिलें तें लागें हातीं । आपआपली निश्चिती । हर्ष आणि खंती । तेथें दोनी नासलीं ।।धृ।।
सहज सरलिया कारणें । मग एकला आपण । दिसे तरी भिन्न । वचनाचा प्रसंग ।।२।।
करूनि झाडा पाडा । तुका वेगळा लिगाडा। निश्चितीच्या गोडा । गोष्टी म्हूण लागती ।।३।।

३६७०

जीविता तो माझा पिता । उखता तो उखत्यांचा।।१।।
जनार्दनीं सरती कर्में । वाते भ्रमे अनेत्र । अपसव्य सव्यामधीं । ऐसी शुद्धी न धरितां ।।२।।
तुका म्हणे खांद्या पानें । सिंचतां भिन्न कोरडी।।३।।

३६७१
माउलीची चाली लेंकराचे ओढी । तयालागीं काढी प्राणें प्रीती ।।१।।
ऐसी बळिवंत आवडी जी देवा । संतमहानुभावा विनवितों ।।धृ।।
मोहें मोहियेलें सर्वकाळ चित्त । विसरु तो घेत नाहीं क्षणें ।।२।।
तुका म्हणे दिला प्रेमाचा वोरस । सांभाळिलें दास आपुलें तें ।।३।।

३६७२
केवढा तो अहंकार । माझा तुम्हां नव्हे दूर ।।१।।
आतां कोण पडे पायां । तुमच्या अहो पंढरिराया ।।धृ।।
कां जी कृपेनें कृपण । वेचत असे ऐसें धन ।।२।।
तुका म्हणे देवें । दुजियाचें पोतें न्यावें ।।३।।

३६७३
अपराधी म्हणोनि येतों काकुलती । नाहीं तरी होती काय चाड ।।१।।
येइल तारूं तरी तारा जी देवा । नाहीं तरी सेवा घ्या वो भार ।।धृ।।
कासया मी आतां वंचूं हे शरीर । आहें बारगीर जाईं जनें ।।२।।
तुका म्हणे मन करूनि मोकळें । आहें साळेंढाळें उदार मी ।।३।।

३६७४
माझे तों फुकाचे कायेचे चि कष्ट । नव्हे क्रियानष्ट तुम्हांऐसा ।।१।।
कांहीं च न वंचीं आजिचा प्रसंगीं । सकळा ही अंगीं करीन पूजा ।।धृ।।
द्यावें काहीं तुम्हीं हें तों नाहीं आस । असों या उदास देहभावें ।।२।।
तुका म्हणे माझी मावळली खंती । समाधान चित्तीं सर्वकाळ ।।३।।

३६७५
स्वामीचिया सत्ता । आधीं वर्म येतें हाता । पुढती विशेषता । लाभें लाभ आगळा ।।१।।
करीं कवतुकाचे बोल । परि जिव्हाळ्याची ओल । आवडे रसाळ । मायबापा

लाडाचें ।।धृ।।
मनें मेळविलें मना । नाहीं अभावी शाहणा । अंतरींच्या खुणा । वरि दिल्या उमटोनि ।।२।।
नाहीं पराश्रमें काळा । अवघ्या जागविल्या वेळा । देवासी निराळा । तुका क्षण न सोडी ।।३।।

३६७६
एके ठायीं अन्नपाणी । ग्रासोग्रासीं चिंतनीं ।।१।।
वेळोवेळां जागवितों । दुजें येइल म्हूण भीतों ।।धृ।।
नाहीं हीं गुंतत उपचारीं । मानदंभाचे वेव्हारीं ।।२।।
तुका जालासे शाहाणा । आड लपे नारायणा ।।३।।

३६७७
वैरागरापाशीं रत्नाचिया खाणी । हे चि घ्यावी धणी फावेल तों ।।१।।
येथें नाहीं तर्कवितर्काची चाड । होतसे निवाड खऱ्या खोट्यां ।।धृ।।
उगा च सारावा वाढिला तो ठाव । वाढितिया भाव कळतसे ।।२।।
तुका म्हणे टांचणीचें पाणी । येथें झरवणी जैशातैसें।।३।।

३६७८
समर्थ या नांवें दिनांचा कृपाळ । हें तंव सकळ स्वामीअंगीं ।।१।।
मज काय लागे करणें विनवणी । विदित चरणीं सकळ आहे ।।धृ।।
दयासिंधु तुम्हां भांडवल दया । सिंचावें आतां या कृपापीयूषें ।।२।।
तुका म्हणे अवो पंढरिनिवासे । बहु जीव आसे लागलासे ।।३।।

३६७९
लेखिलें कवित्व माझे सहज बोल । न लगे चि ओल जिव्हाळ्याची ।।१।।
नये चि उत्तर कांहीं परतोनि । जालों नारायणीं न सरतें ।।धृ।।
लाजिरवाणी कां वदली हे वाचा । नव्हे च ठायींचा मननशीळ ।।२।।
तुका म्हणे फळ नव्हे चि सायासा । पंढरीनिवासा काय जालें ।।३।।

३६८०
येणें जाला तुमचे पोतडीचा झाडा । केलासी उघडा पांडुरंगा ।।१।।
भरूनियां घरीं राहिलों वाखती । आपुली निश्चिंती आपल्यापें ।।धृ।।

आतां काय उरी उरली ते सांगा । आणिलेति जगाचिये साक्षी ।।२।।
तुका म्हणे कोठें पाहोंजासी आतां । माझी जाली सत्ता तुम्हांवरि ।।३।।

३६८१
तुमच्या पाळणा ओढतसे मन । गेलों विसरोन आपणासी ।।१।।
लागेल पालटें फेडावें उसणें । येणें चि प्रमाणें पांडुरंगा ।।धृ।।
तुमचे आवडी संबंधाचा त्याग । घेतला ये लाग जगनिंदेचा ।।२।।
तुका म्हणे जैसा माझा जीव ओढे । तैसें च तिकडे पाहिजेल ।।३।।

३६८२
नाहीं मज कोणी उरला दुर्जन । मायबापाविण ब्रम्हांडांत।।१।।
कासया जी माझी करणें येविसीं । भयाची मानसीं चिंता संतीं ।।धृ।।
विश्वंभराचिये लागलों सांभाळीं । सत्तेनें तो चाळी आपुलिये ।।२।।
तुका म्हणे माझें पाळणपोषण । करितां आपण पांडुरंगा ।।३।।

३६८३
मज कांहीं सीण न व्हावा यासाटीं । कृपा तुम्हां पोटीं उपजलीं ।।१।।
होतें तैसें केलें आपलें उचित । शिकविलें हित बहु बरें ।।धृ।।
आम्ही न मनावी कोणाची आशंका । तुम्हां भय लोकां आहे मनीं ।।२।।
तुका म्हणे आतां संचिताचा ठेवा । वोडवला घ्यावा जैसा तैसा ।।३।।

३६८४
कोणाचें चिंतन करूं ऐशा काळें । पायांचिया बळें कंठीतसें ।।१।।
पाहातसें वाट येईं गा विठ्ठला । मज कां हा केला परदेश ।।धृ।।
बहुतांचे सत्ते जालों कासावीस । जाय रात्री दिस वैरियांचा ।।२।।
तुका म्हणे बैसें मनाचिये मुळीं । तरीं च ही जाळीं उगवतीं ।।३।।

३६८५
कां जी तुम्हीं ऐसे नव्हा कृपावंत । निवे माझें चित्त ठायिंच्या ठायीं ।।१।।
कांही शम नये विषम अंतरा । शांतीचा तो बरा ऐसा योग ।।धृ।।
दुःखी होतों पंचभूतांच्या विकारें । जडत्वें दातारें राखावीं तीं ।।२।।
तुका म्हणे मोडा अहंकाराची मान । धरितों चरण म्हणऊनि ।।३।।

३६८६
मागत्याची कोठें घडते निरास । लेंकरा उदास नाहीं होतें ।।१।।
कासया मी होऊं उतावीळ जीवीं । जाणता गोसावी सर्व आहे ।।धृ।।
जाला तरी वेळ कवतुकासाटीं । निर्दया तों पोटीं उपजेना ।।२।।
तुका म्हणे त्यासी ठाउकें उचित । होईल संकेत नेमियेला ।।३।।

३६८७
आरुषा वचनीं मातेची आवडी । म्हणऊनि तांतडी घेती नाहीं ।।१।।
काय होइल माझें मांडिलें कवतुक । आदराची भूक रडारोवी ।।धृ।।
लपोनियां करी चुकुर माऊली । नाहीं होती केली निष्ठासांडी ।।२।।
तुका म्हणे करी पारखीं वचनें । भेवउनि तान्हें आळवावें ।।३।।

३६८८
प्रीतीच्या भांडणा नाहीं शिरपाव । वचनाचे चि भाव निष्टुरता ।।१।।
जीणें तरी एका जीवें उभयता । पुत्राचिया पिता दुखवे दुःखें ।।धृ।।
काय जाणे तुटों मायेचें लिगाड । विषम तें आड उरों नेणें ।।२।।
तुका म्हणे मज करुणा उत्तरें । करितां विश्वंभरे पाविजैल ।।३।।

३६८९
नको घालूं झांसां । मना उपाधिवोळसा ।।१।।
जे जे वाहावे संकल्प । पुण्य तरी ते चि पाप ।।धृ।।
उपजतो भेव । होतो कासावीस जीव ।।२।।
तुका म्हणे पाहों । होइल तें निवांत राहों।।३।।

३६९०
बीजीं फळाचा भरवसा । जतन सिंचनासरिसा । चाविलिया आसा । काकुलती ते नाड ।।१।।
हा तों गडसंदीचा ठाव। पिके पिकविला भाव । संकोचोनि जीव । दशा केली जतन ।।धृ।।
माती घाली धनावरी । रांडा रोटा वरीवरी । सुखाचे सेजारीं। दुःख भ्रमें भोगीतसे ।।२।।
तुका म्हणे दिशाभुली । जाल्या उफराटी चाली । निवाडाची बोली । अनुभवें साक्षीसी ।।३।।

३६९१
काय उरली ते करूं विनवणी । वेचलों वचनीं पांडुरंगा ।।१।।
अव्हेरलों आतां कैचें नामरूप । आदर निरोप तरि तो नाहीं ।।धृ।।
माझा मायबाप ये गेलों सलगी । तों हें तुम्हां जगीं सोयइरिका ।।२।।
तुका म्हणे आतां जोडोनियां हात । करी दंडवत ठायिंचाठायीं ।।३।।

३६९२
आवडी धरूनि करूं गेलों लाड । भक्तिप्रेमकोड न पुरे चि ।।१।।
म्हणऊनि जीव ठेला असावोनि । खेद होतो मनीं बहु साल ।।धृ।।
वेठीऐसें वाटे निर्फळ कारण । शीतळ होऊन खोडावलों।।२।।
तुका म्हणे सरतें नव्हें चि पायांपें । बळ केलें पापें नव्हें चि भेटी ।।३।।

३६९३
प्रीतीचा तो कळवळा । जिव्हाळाचि वेगळा ।।१।।
बहु नेदी रडों माता । दुश्चित होतां धीर नव्हे ।।धृ।।
वरी वरी तोंडापुरतें । मोहोरी तें कळतसे ।।२।।
जाणोनियां नेणता तुका । नव्हे लोकांसारिखा ।।३।।

३६९४
हा गे हा चि आतां लाहो । माझा अहो विठ्ठला।।१।।
दंडवत दंडवत । वेगळी मात न बोलें ।।धृ।।
वेगळाल्या कोठें भागें। लाग लागें लावावा ।।२।।
तुका म्हणे केल्या जमा । वृत्तितमा भाजूनि ।।३।।

३६९५
तुम्हांसी न कळे सांगा काय एक । असया संकल्प वागवूं मी ।।१।।
आहे तेथें सत्ता ठेविलें स्थापूनि । प्रमाणें चि वाणी वदे आज्ञा ।।धृ।।
कृपा जाली मग न लगे अंगसंग । निजध्यासें रंग चढता राहे ।।२।।
तुका म्हणे मागें बोलिलों तें वाव । आतां हा चि भाव दृढ झाला ।।३।।

३६९६
आवडी न पुरे मायबापापासीं । घडों का येविसीं सकईल ।।१।।

होईल नेमलें आपुलिया काळें । आलीयाचा बळें आघ्रो उरे ।।धृ।।
जाणविलें तेथे थोडें एकवेळा । सकळ ही कळा सर्वोत्तमीं ।।२।।
तुका म्हणे निवेदिलें गुह्य गुज । आतां तुझी तुज सकळ चिंता ।।३।।

३६९७
वोखटा तरी मी विटलों देहासी । पुरे आतां जैसी जोडी पुन्हां ।।१।।
किती मरमर सोसावी पुढती । राहिलों संगती विठोबाचे ।।धृ।।
आतां कोण याचा करील आदर । जावो कळिवर विटंबोनि ।।२।।
तुका म्हणे आतां सांडि तें चि सांडि । कोण फिरे लंडी यासी मागें ।।३।।

३६९८
हें ही ऐसें तें ही ऐसें । उभय पिसें अविचार ।।१।।
अभिमानाचे ठेलाठेलीं । मधीं जाली हिंपुष्टी ।।धृ।।
धीरा शांती ठाव नुरे । हा चि उरे आबाळ्या ।।२।।
कौतुक हें पाहे तुका । कढतां लोकां अधनि ।।३।।

३६९९
हित जाणे चित्त । कळों येतसे उचित ।।१।।
परिहार ते संपादनी । सत्य कारण कारणीं ।।धृ।।
वरदळ तें नुतरे कसीं । आगीमध्यें तें रसीं ।।२।।
तुका म्हणे करुनी खरें । ठेवितां तें पुढें बरें।।३।।

३७००
देवें दिला देह भजना गोमटा । तों या जाला भांटा बाधिकेच्या ।।१।।
ताठोनियां मान राहिली वरती । अहंकारा हातीं लवों नल्हे ।।धृ।।
दास म्हणावया न वळे रसना । सइरवचना बासे गळा ।।२।।
तुका म्हणे कोठें ठेवावा विटाळ । स्नानें नीर्मळ व्हावयासी ।।३।।

३७०१
काय करूं पोरा लागली चट । धरी वाट देउळाची।।१।।
सांगितलें नेघे कानीं । दुजें मनीं विठ्ठल ।।धृ।।
काम घरीं न करी धंदा । येथें सदा दुश्चित ।।२।।
आमचे कुळीं नव्हतें ऐसें । हें च पिसें निवडलें ।।३।।

लौकिकाची नाहीं लाज । माझें मज पारिखें ।।४।।
तुका म्हणे नरका जाणें । त्या वचनें दुष्टांचीं ।।५।।

३७०२
कारणापें असतां दृष्टी । शंका पोटीं उपजेना ।।१।।
शूर मिरवे रणांगणीं । मरणीं च संतोष ।।धृ।।
पाहिजे तो कळवळा। मग बळा काय उणे ।।२।।
तुका म्हणे उदारपणें । काय उणें मनाचें।।३।।

३७०३
नव्हती हे उसणे बोल । आहाच फोल रंजवण।।१।।
अनुभव तो वरावरी । नाहीं दुरी वेगळा ।।धृ।।
पाहिजे तें आलें रुची।काचाकुची काशाची ।।२।।
तुका म्हणे लाजे आड । त्याची चाड कोणासी ।।३।।

३७०४
जों जों घ्यावा सोस । माझे वारीं गर्भवास । लटिक्याचा दोष । अधिक जडे अंगेसीं ।।१।।
आतां आहे तैसें असो । अनुताप अंगीं वसो । येवढें चि नसो । माझें आणि परावें ।।धृ।।
जागाजालेपणें। काय नासावें स्वप्न । शब्दाचिया शिणें । कष्ट मिथ्या मानावे ।।२।।
छाये माकड विटे । धांवे कुपीं काय भेटे । तुका म्हणे फुटे । डोई गुडघे कोंपर ।।३।।

३७०५
गुणांचा चि सांटा । करूं न वजों आणिका वाटा।।१।।
करिती छंद नानापरी । भरोन सिणती आडभरी ।।धृ।।
नेमली पंगती। आम्हां संतांची संगती ।।२।।
तुका म्हणे लीळा । येर कवतुक पाहों डोळां ।।३।।

३७०६
शिकल्या शब्दाचें उत्पादितों ज्ञान । दरपणींचें धन उपर वाया ।।१।।

अनुभउ कइं होईन भोगिता । सांकडें तें आतां हें चि आलें ।।धृ।।
गायें नाचें करीं शरीराचे धर्म । बीजकळावर्म तुमचें दान ।।२।।
तुका म्हणे केला उशीर न साहे । द्याल तरी आहे सर्व सिद्ध ।।३।।

३७०७
सिकविला तैसा पढों जाणे पुसा । कैंची साच दशा तैसी अंगीं ।
स्वप्नींच्या सुखें नाहीं होत राजा । तैसा दिसे माझा अनुभव ।।१।।
कासया हा केला जिहुवे अळंकार । पायांसी अंतर दिसतसे ।।धृ।।
दर्पणींचें धन हातीं ना पदरीं । डोळां दिसें परी सत्याचिये ।
आस केली तरी लाळ चि घोंटावी । ठकाठकी तेवीं दिसतसे ।।२।।
कवित्वें रसाळ वदविली वाणी । साक्ष ही पुराणीं घडे ऐसी ।
तुका म्हणे गुरें राखोनि गोंवारी । माझीं म्हणे परि लाभ नाहीं ।।३।।

३७०८
अनुभव तो नाहीं अमुचिया दरषणें । अइकिलें कानें वदे वाणी ।
जेविल्याचा कैसा अनुभव अंतरीं । म्हणतां मांडे पुरी काय होतें ।।१।।
नाहींनाहीं गेली तळमळ दातारा । कां जी हरिहरा चाळविलें ।।धृ।।
पत्रीं कुशळता भेटी अनादर । काय तें उत्तर येइल मानूं ।
अंतरीं सबाह्चीं कां नाहीं सारिखें । धरूनि पारिखें वर्त्ततसां।।२।।
आलों आलों ऐसी दाऊनियां आस । वाहों बुडतयास काय द्यावें ।
तुका म्हणे अहो चतुरा शिरोमणि । किती माझी वाणी तुम्ही कोठें।।३।।

३७०९
केलें तरी आता साच चि करावें । विचारिलें द्यावें कृपादान ।।१।।
संकल्पासी नाहीं बोलिला विकल्प । तुम्हां पुण्यपाप कळे देवा ।।धृ।।
उदार शक्ति तंव तुमची भूमंडळीं । ऐसी ब्रिदावळी गर्जतसे ।।२।।
तुका म्हणे अहो रकुमादेवीवरा । उपरोध कां धरा माझा आतां ।।३।।

३७१०
अहो पुरुषोत्तमा । तुम्हां काशाची उपमा ।।१।।
सतंत तो नाहीं बुद्धी । नाळवितां नाहीं शुद्धि ।।धृ।।
जागविलें तरी । तुम्हां वेक्तियेणें हरी ।।२।।
तुका म्हणे देवा । तुम्हा नित्य दिस नवा।।३।।

३७११
मथनें भोगे सार । ताकें घडे उपकार ।।१।।
बरवी सायासाची जोडी । अनुभविया ठावी गोडी ।।धृ।।
पाक आणि रुचि। जेथें तेथें ते कइंची ।।२।।
वाढितो पंगती । तुका आवडी संगती ।।३।।

३७१२
चिंतनाची जोडी । हा चि लाभ घडोघडी ।।१।।
तुम्ही वसूनि अंतरीं । मज जागवा निर्धारीं ।।धृ।।
जाय जेथें मन । आड घाला सुदर्शन ।।२।।
तुका म्हणे भोजें । नाचें हो ऐसें न लजें ।।३।।

३७१३
आवडीची न पुरे धणी । प्रीत मनीं बैसली ।।१।।
नित्य नवा कळवळा । मायबाळामध्यें तों ।।धृ।।
सुख सुखा भेटों आलें । होय वाल्हें पोटींचे ।।२।।
तुका म्हणे ब्रम्हानंदें । संतवृंदें चरणापें ।।३।।

३७१४
जडलों तों आतां पायीं । होऊं काई वेगळा ।।१।।
तुम्हीं संतीं कृपा केली । गंगे चाली ओघाची ।।धृ।।
सांभाळिलों मायबापा । केलों तापावेगळा ।।२।।
वोरसें या जीव धाला । तुका ठेला मौन्य चि ।।३।।

३७१५
काळावरी सत्ता । ऐशा करितो वारता ।।१।।
तो मी हीणाहूनि सांडें । देवे दुऱ्हें काळतोंडें ।।धृ।।
मानूनी भर्वसा । होतों दासा मी ऐसा ।।२।।
तुका म्हणे मान । गेलों वाढवूं थोरपण ।।३।।

३७१६
समर्थाचे सेवे कोठें नाहीं घात । पाहों नये अंत पांडुरंगा ।।१।।

आहे तैसी नीत विचारावी बरी । येऊनी भीतरी वास करा ।।धृ।।
निढळ राखिलें तरी भयाभीत । हर्षामर्ष चित्त पावतसे।।२।।
तुका म्हणे तरी कळेल निवाड । दर्शनाची चाड शुभकीर्ति ।।३।।

३७१७
बहु धीर केला । जाण न होसी विठ्ठला ।।१।।
आतां धरीन पदरीं । करीन तुज मज सरी ।।धृ।।
जालों जीवासी उदार । उभा राहिलों समोर ।।२।।
तुका विनवी संतां । ऐसें सांगा पंढरिनाथा।।३।।

३७१८
नेदावी सलगी न करावा संग । करी चित्ता भंग वेळोवेळा ।।१।।
सर्प शांतिरूप न म्हणावा भला । झोंबे खवळीला तात्काळ तो ।।२।।
तुका म्हणे दुरी राखावा दुर्जन । करावें वचन न घडे तें ।।३।।

३७१९
मज अभयदान देई दातारा । कृपेच्या सागरा मायबापा।।१।।
देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं । आणीक मी कांहीं दुजें नेणें ।।धृ।।
सेवाभक्तिहीन नेणता पतित । आतां माझे हित तुझ्या पायीं ।।२।।
तुका म्हणे माझें सर्व ही साधन । नाम संकीर्तन विठोबाचें ।।३।।

३७२०
करावा वर्षाव । तृषाक्रांत जाला जीव ।।१।।
पाहें आकाशाची वास । जाणता तूं जगनिवास ।।धृ।।
संयोगें विस्तार । वाढी लागे तो अंकूर ।।२।।
तुका म्हणे फळें । चरणांबुजें तीं सकळें।।३।।

३७२१
करीं ऐसी धांवाधांवी । चित्त लावीं चरणापें ।।१।।
मग तो माझा मायबाप । घेइल ताप हरूनी ।।धृ।।
बहुतांच्या मतें गोवा । होऊं जीवा नेदावा ।।२।।
तुका म्हणे करुणाबोलें । धीर विठ्ठलें निघेना ।।३।।

३७२२
एकविध नारायण । तेथें विषमाचा सीण । पालटों चि भिन्न । नये अणुप्रमाण ।।१।।
अवघें सारावें गाबाळ । चुकवूनियां कोल्हाळ । आनंदाचें स्थळ । एकाएकीं एकांत ।।धृ।।
कायावाचामन। स्वरूपीं च अनुसंधान । लक्ष भेदी बाण । येणे पाडें लवलाहो।।२।।
तुका म्हणे आळस निद्रा । येथें देउनियां चिरा । देउनियां धीरा । मिठी जाणा जागृतीं ।।३।।

३७२३
हारपोनि गेली निशी । निद्रा कैसी न देखों ।।१।।
नारायणीं वसलें घर । निरंतर आनंद ।।धृ।।
अवघा रुधविला ठाव। नेला वाव मी माझें ।।२।।
तुका म्हणे एके ठावीं । असूं नाहीं सीनाभिन्न ।।३।।

३७२४
पाहा कैसेकैसे । देवें उद्धरिले आनयासें ।।१।।
ऐका नवल्याची ठेव । नेणतां भक्तिभाव ।।धृ।।
कैलासासी नेला । भिल्ल पानेडी बैसला ।।२।।
पांखांच्या फडत्कारीं । उद्धरुनी नेली घारी ।।३।।
खेचरें पिंडी दिला पाव । त्या पूजनें धाये देव ।।४।।
तुका म्हणे भोळा । स्वामी माझा हो कोंवळा ।।५।।

३७२५
अनुभव ऐसा । मज लागला सरिसा ।।१।।
पाठी बैसली सेजारीं । नव्हे शांत कोणे परी ।।धृ।।
कोठें न लगे जावें । कांहीं घालावया ठावें ।।२।।
तुका म्हणे कोटि । दुःखाच्या च तये पोटीं ।।३।।

३७२६
पाठीवरी भार । जातो वाहूनियां खर ।।१।।
संत नेतील त्या ठाया । माझी आधीन त्यां काया ।।धृ।।

मोटचौफळ । अंतीं उच्छिष्टाचें बळ ।।२।।
न संडीं मारग । येथें न चोरूनि अंग।।३।।
आपुलिया सत्ता । चालविती नाहीं चिंता ।।४।।
कळवळिला तुका । घराचार येथें नका ।।५।।

३७२७
मागें पुढें जालों लाटा । अवघा मोटा सरळ ।।१।।
नाहीं कोठें रितें अंग । नित्य रंग नवा चि ।।धृ।।
पोसिंद्याचे पडिलों हातीं । वोझें माती चुकली ।।२।।
जोगावलों पोटीं खर । पाठी भार वरि नाहीं ।।३।।
अवधिया मोकळ्या दिशा । नाहीं वोळसा कामाचा।।४।।
संताचिये लोळें द्वारीं । पळती दुरी गोमाशा ।।५।।
कांहीं न साहेसा जाला । तुका नेला समर्थ ।।६।।
पातोगें महाद्वारीं। वरि झुली वाकळा ।।७।।

३७२८
करणें न करणें वारलें जेथें । जातों तेणें पंथें संतसंगें।।१।।
संतीं हें पहिलें लाविलें निशाण । ते खुणा पाहोन गर्जे नाम ।।२।।
तुका म्हणे तुम्हीं चला या चि वाटे । भरवशानें भेटे पांडुरंग ।।३।।

३७२९
कइंचें कारण । तृष्णा वाढविते सीण ।।१।।
काय करूनि ऐसा संग । सोसें चि तूं पांडुरंग ।।धृ।।
रूपीं नाहीं गोडी । हांवे हांवे उर फोडी ।।२।।
तुका न पडे भरी । ऐशा वरदळाचे थोरी।।३।।

३७३०
धन्य तो ग्राम जेथें हरिदास । धन्य तो चि वास भाग्य तया ।।१।।
ब्रम्हज्ञान तेथें असे घरोघरीं । धन्य त्या नरनारी चतुर्भुज ।।धृ।।
नाहीं पापा रिघ काळाचें जीवन । हरिनामकीर्त्तन घरोघरीं ।।२।।
तुका म्हणे तिहीं तारिलें सकळां । आपल्या कोटिकुळासहित जीव ।।३।।

३७३१

मारूं नये सर्प संतांचिये दृष्टी । होतील ते कष्टी व्यापकपणें ।।१।।
एक सूत्र जीवशिवीं आइक्यता । रोम उपडितां अंग कांपे ।।धृ।।
नाहीं साहों येत दुखाची ते जाती । परपीडा भूतीं साम्य जालें ।।२।।
तुका म्हणे दिला नीतीचा संकेत । पुजा नांवें चित्त सुखी तेणें ।।३।।

३७३२
भय होतें आम्हीपणें । पाठी येणें घातलें ।।१।।
अवघा आपुला चि देश । काळा लेश उरे चि ना ।।धृ।।
समर्थाचें नाम घेतां । मग चिंता काशाची ।।२।।
तुका म्हणें नारायणें । जालें जिणें सुखाचें ।।३।।

३७३३
विषम वाटे दुरवरी । चालूनि परती घरी । मागील ते उरी । नाहीं उरली भयाची ।।१।।
मुख्य न व्हावा तो नाड । सेवटाचे हातीं गोड । सरलिया चाड । मग कैचे उद्वेग ।।धृ।।
होता पहिला अभ्यास । समयीं घालावया कास । तेव्हां लटिके दोष । योगें अनुतापाच्या ।।२।।
तुका म्हणे आहे । बुद्धी केलियानें साहे । जवळी च पाहें । देव वाट स्मरणाची ।।३।।

३७३४
आतां कोठें धांवे मन । तुझे चरण देखिलिया ।।१।।
भाग गेला सीण गेला । अवघा जाला आनंदु ।।धृ।।
प्रेमरसें बैसली मिठी । आवडी लाठी मुखासी ।।२।।
तुका म्हणे आम्हां जोगें । विठ्ठल घोगें खरें माप ।।३।।

३७३५
विश्वीं विश्वंभर । बोले वेदांतींचा सार ।।१।।
जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकास ।।धृ।।
व्यापिलें हें नारायणें । ऐसीं गर्जती पुराणें ।।२।।
जनीं जनार्दन । संत बोलती वचनें ।।३।।
सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ।।४।।

३७३६
निरोधती परि न मोडे विकार । बहु हीं दुस्तर विषयद्वारें ।।१।।
राहातेति तुम्ही भरोनि अंतरीं । होतों तदाकारी निर्विषचि ।।धृ।।
कृपेचिया साक्षी असती जवळी । वचनें मोकळीं सरत नाहीं ।।२।।
तुका म्हणे ताळा मेळवणीपाशीं । विनंती पायापाशीं हे चि करीं ।।३।।

३७३७
अद्वय चि द्वय जालें चि कारण । धरिलें नारायणें भक्तिसुख ।।१।।
अपरोक्ष आकार जाला चतुर्भुज । एकतत्त्व बीज भिन्न नाहीं ।।धृ।।
शून्य निरशुन्यी राहिलें निर्मळ । तें दिसे केवळ इटेवरी ।।२।।
सुखें घ्यावें नाम वदना ही चाड । सरिता वापी आड एक पाणी ।।३।।
तुका म्हणे मी च आहें तेणें सुखें । भेद नाहीं मुखें नाम गातों ।।४।।

३७३८
उदार चक्रवर्ती । वैकुंठीचा भूपति । पुंडलिकाचिया प्रीती । विटेवरी राहिला ।।१।।
सर्वसिद्धीचा दातार । सवें आणिला परिवार । भक्त अभयंकर । घ्याघ्या ऐसें म्हणतसे ।।धृ।।
जेणें हें विश्व निर्मिलें । महर्षीदेवा संस्थापिलें । एकवीस स्वर्गांतें धरिलें । सत्तामात्रें आपुलिया ।।२।।
तुका म्हणे कृपावंत । इच्छिले पुरवी अर्थ। रिद्धिसिद्धिमुक्ती देतसे । शेखीं संग आपुला ।।३।।

३७३९
सकलगुणें संपन्न । एक देवाचें लक्षण ।।१।।
वरकड कोठें कांहीं । एक आहे एक नाहीं ।।धृ।।
षड्गुण ऐश्वर्य संपन्न । एक भगवंतीं जाण ।।२।।
तुका म्हणे जेंजें बोला । तेंतें साजे या विठ्ठला ।।३।।

३७४०
वैकुंठींचें सुख पंढरिये आलें । अवघें पुंडलिकें सांटविलें ।।१।।
घ्या रे घ्या रे माझे बाप । जिव्हा घेउनि खरें माप। करा एक खेप । मग करणें

न लगे ।।धृ।।
विषय गुंडोनी ठेवीं पसारा । मग धांव घ्या पंढरपुरा ।।२।।
जंव आहे आयुष्याचा लेश। तंव करीं पंढरीचा वास ।।३।।
अळस न करीं लाभाचा । तुका विनवी कुणबियाचा ।।४।।

३७४१
देवाचें चरित्र नाठवे सर्वथा । विनोदार्थ कथा गोड वाटे ।।१।।
हातावरि हात हासोनि आफळी । वाजवितां टाळी लाज वाटे ।।२।।
तुका म्हणे थुंका त्याच्या तोंडावरि । जातो यमपुरी भोगावया ।।३।।

३७४२
अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान । गोड हे चरण सेवा तुझी ।।१।।
करूनी उचित देईं हें चि दान । आवडे कीर्तन नाम तुझें।।धृ।।
देवभक्तपण सुखाचा सोहळा । ठेवुनी निराळा दावी मज ।।२।।
तुका म्हणे आहे तुझें हें सकळ । कोणी एके काळें देईं मज ।।३।।

३७४३
हें चि माझें तप हें चि माझें दान । हें चि अनुष्ठान नाम तुझें ।।१।।
हें चि माझें तीर्थ हें चि माझें व्रत । सत्य हें सुकृत नाम तुझें ।।धृ।।
हा चि माझा धर्म हें चि माझें कर्म । हा चि नित्यनेम नाम तुझें ।।२।।
हा चि माझा योग हा चि माझा यज्ञ । हें चि जपध्यान नाम तुझें ।।३।।
हें चि माझें ज्ञान श्रवण मनन । हें चि निजध्यासन नाम तुझे ।।४।।
हा चि कुळाचार हा चि कुळधर्म । हा चि नित्यनेम नाम तुझें ।।५।।
हा माझा आचार हा माझा विचार । हा माझा निर्धार नाम तुझें ।।६।।
तुका म्हणे दुजें सांगायासि नाहीं । नामेंविण कांहीं धनवित्त ।।७।।

३७४४
कोण साक्षीविण । केलें उद्धारा भजन ।।१।।
ऐसें सांगा जी दातारा । माझी भक्ति परंपरा ।।धृ।।
कोणें नाहीं केली आळी । ब्रम्हज्ञानाहुनि वेगळी ।।२।।
कोणाचें तों कोड । नाहीं पुरविला लाड ।।३।।
कोणाच्या उद्धारा । केला विलंब माघारा।।४।।
तुका म्हणे भिन्न । कांहो बोले साक्षीविण ।।५।।

३७४५
सुखरूप चाली । हळूहळू उसंतिली ।।१।।
बाळगोपाळाची वाट । सेवे सेवकता नीट ।।धृ।।
जरी झाला श्रम । तरी पडों नये भ्रम ।।२।।
तुका म्हणे दासां । देव सरिसासरिसा।।३।।

३७४६
चुकली ते वाट । पुढें सांपडवी नीट ।।१।।
म्हणउनी गर्भवास । नेणती ते हरिचे दास ।।धृ।।
संचिताचा संग । काय जाणों पावें भंग ।।२।।
तुका म्हणे दृष्टी उघडितों नव्हे कष्टी ।।३।।

३७४७
कइं तो दिवस देखेन डोळां । कल्याण मंगळामंगळाचें।।१।।
आयुष्याच्या शेवटीं पायांसवे भेटी । कळिवरें तुटी जाल्या त्वरे ।।धृ।।
सरो हें संचित पदरींचा गोवा । उताविळें देवा मन जालें ।।२।।
पाउलापाउलीं करितां विचार । अनंतविकार चित्ता अंगीं ।।३।।
म्हणउनि भयाभीत होतो जीव । भाकितसें कींव अटाहासें ।।४।।
तुका म्हणे होइल आइकिलें कानीं । तरि चक्रपाणी धांव घाला ।।५।।
दुःखाच्या उत्तरीं आळविले पाय । पाहणें तों काय अजून अंत ।।६।।

३७४८
कळों येतें वर्म । तरी न पवतों श्रम ।।१।।
तुम्हां शिरीं होता भार । आम्हां कैचा संचार ।।धृ।।
होतें अभयदान । तरी स्थिर होतें मन ।।२।।
तुका म्हणे पाहें । ऐसी वाट उभा आहे ।।३।।

३७४९
वारंवार हा चि न पडावा विसर । वसावें अंतर तुमच्या गुणीं ।।१।।
इच्छेचा ये दाता तूं एक समर्था । अगा कृपावंता मायबापा ।।धृ।।
लाभाचिये वोढी उताविळें मन । त्यापरि चिंतन चरणाचें ।।२।।
तुका म्हणे जीवी जीवन ओलावा । पांडुरंगे दावा शीघ्र आतां ।।३।।

३७५०
आइका माझीं कवतुकउत्तरें । देउनी सादरें चित्त देवा।।१।।
वोरसें आवडी आलों पायापासीं । होय तें मनेसीं सुख कीजे ।।धृ।।
तुमचें न भंगे सर्वोत्तमपण । करितां समाधान लेंकराचें।।२।।
तुका म्हणे जरी बोलतों बोबडें । तरी वाडे कोडें कवतुक ।।३।।

३७५१
जन्मा आलियाचा लाभ । पद्मनाभदरुषणें ।।१।।
पाठीलागा येतो काळ । तूं कृपाळु माउली ।।धृ।।
कोण्या उपायें हें घडे । भव आंगडें सुटकेचें ।।२।।
बहु उसंतीत आलों । तया भ्यालों स्थळासी ।।३।।
तुका म्हणे तूं जननी । ये निर्वाणी विठ्ठले ।।४।।

३७५२
नाहीं गुणदोष लिंपों देत अंगीं । झाडितां प्रसंगीं वरावरी ।।१।।
निकटवासिया आळवितों धांवा । तेथूनियां देवा सोडवूनी ।।धृ।।
उमटे अंतरीं तें करूं प्रगट । कळोनी बोभाट धांव घालीं ।।२।।
तुका म्हणे तरि वांचलों या काळें । समर्थाचे बळें सुखी असों ।।३।।

३७५३
आतां येणें पडिपाडें । रस सेवूं हा निवाडें । मुंगी नेली गोडें । ठेविलिये अडचणी ।।१।।
तैसें होय माझ्या जीवा । चरण न सोडीं केशवा । विषयबुद्धि हेवा । वोस पडो सकळ ।।धृ।।
भुकेलिया श्वाना । गांठ पडे सवें अन्ना । भुकों पाहे प्राणा । परि तोंडिंची न सोडी ।।२।।
काय जिंकियेलें मन । जीवित्व कामातुरा तृण । मागे विभिचारिण । भक्ती तुका ये जाती ।।३।।

३७५४
न पवीजे तया ठाया । आलों कायाक्लेशेसीं ।।१।।
आतां माझें आणीं मना । नारायणा ओजेचें ।।धृ।।

बहु रिणें पिडिलों फार । परिहार करावा ।।२।।
तुका म्हणे निर्बळशक्ति । काकुलती म्हुण येतों ।।३।।

३७५५
बहु फिरलों ठायाठाव । कोठें भाव पुरे चि ना ।।१।।
समाधान तों पावलों । उरलों बोलों यावरि ।।धृ।।
घे गा देवा आशीर्वाद । आमुच्या नांद भाग्यानें ।।२।।
तुका म्हणे जेवूं आधी । खवखव मधीं सारावी ।।३।।

३७५६
कोण येथें रिता गेला । जो जो आला या ठाया।।१।।
तातडी ते काय आतां । ज्याची चिंता तयासी ।।धृ।।
नांवासाटीं नेघें भार । न लगे फार वित्पत्ति ।।२।।
तुका म्हणे न लगे जावें । कोठें देवें सुचनें ।।३।।

३७५७
इंद्रियाचें पुरे कोड । तें चि गोड पुढती ही ।।१।।
जावें म्हणती पंढरपुरा । हा चि बरा संसार ।।धृ।।
बैसलें तें मनामुळीं । सुख डोळीं देखिलें ।।२।।
तुका म्हणे देती कान । वाणावाण निवडूनी ।।३।।

३७५८
आतां देवा मोकळिलें । तुम्ही भलें दिसेना ।।१।।
आतां नाहीं जीवभाव । उरला ठाव वेगळा ।।धृ।।
सांभाळुन घ्यावें देवा । आपणासवा यावरि ।।२।।
तुका म्हणे नग्न भाज । तरि ते लाज स्वामीसी ।।३।।

३७५९
आशाबद्ध आम्ही भाकितसों कींव । तत्पर हा जीव कार्यापाशीं ।।१।।
प्रतिउत्तराची पाहातसें वाट । करूनि बोभाट महाद्वारीं ।।धृ।।
आपुल्या उचितें करूनियां ठेवीं । संबंध गोसावी तोडोनियां ।।२।।
तुका म्हणे एक जालिया निवाड । कोण बडबड करी मग ।।३।।

३७६०
खद्योतें फुलविलें रविपुढें ढुंग । साक्षी तंव जग उभयतां ।।१।।
आपल्या आपण नाहीं शोभों येत । चार करी स्फीत दाखवूनि ।।धृ।।
खाणार ताकाचें आसातें माजीरें । आपणें चि अधीर कळों येतें ।।२।।
तुका म्हणे जळो मैंदाची मवाळी । दावूनियां नळी कापी सुखें ।।३।।

३७६१
नाहीं सरों येत कोरड्या उत्तरीं । जिव्हाळ्याची बरी ओल ठायीं ।।१।।
आपुलिया हिता मानिसी कारण । सत्या नारायण साहे असो ।।धृ।।
निर्वाणीं निवाड होतो आगीमुखें । तप्त लोह सुखें धरितां हातीं ।।२।।
तुका म्हणे नेम न टळतां बरें । खऱ्यासी चि खरें ऐसें नांव ।।३।।

३७६२
आलों उल्लंघुनि दुःखाचे पर्वत । पायांपाशीं हित तुमच्या तरी ।।१।।
न देखेल लासा दुःखी होतें मन । कठिणें कठिण वाटतसे ।।धृ।।
नव्हे सांडी परि वाटतें निरास । न ये माझा दिस संकल्पाचा ।।२।।
तुका म्हणे तुम्हीं सदैव जी देवा । माझ्या हा चि जीवा एक ठाव ।।३।।

३७६३
किती सोसिती करंटीं । नेणों संसाराची आटी । सर्वकाळ पोटीं । चिंतेची हळहळ ।।१।।
रिकामिया तोंडें राम । काय उच्चारितां श्रम । उफराटा भ्रम । गोवी विषय माजिरा ।।धृ।।
कळतां न कळे । उघडे झाकियेले डोळे । भरलें त्याचे चाळे । अंगीं वारें मायेचें ।।२।।
तुका म्हणे जन । ऐसें नांवबुद्धिहीन । बहुरंगें भिन्न । एकीं एक निमलें ।।३।।

३७६४
मंगळाचा मंगळ सांटा । विट तोटा नेणे तें ।।१।।
हें भरा सातें आलें । भलें भलें म्हणवावें ।।धृ।।
जनीं जनार्दन वसे । येथें दिसे तें शुद्ध ।।२।।
तुका म्हणे बहुतां मुखें । खरें सुखें ठेवावें।।३।।

३७६५
नामाचा महिमा बोलिलों उत्कर्ष । अंगा कांहीं रस न ये चि तो ।।१।।
कैसें समाधान राहे पांडुरंगा । न लगे चि अंगा आणी कांहीं ।।धृ।।
लाभाचिये अंगीं सोस कवतुकें । फिक्याचें तें फिकें वेवसाव ।।२।।
तुका म्हणे करा आपुला महिमा । नका जाऊं धर्मावरि माझ्या ।।३।।

३७६६
हें चि वारंवार । पडताळुनी उत्तर ।।१।।
करितों पायांसी विनंती । नुपेक्षावें कमळापती ।।धृ।।
गंगोदकें गंगे । अर्घ्य द्यावें पांडुरंगे ।।२।।
जोडोनियां हात । करी तुका प्रणिपात ।।३।।

३७६७
अवचित या तुमच्या पायां । देवराया पावलों ।।१।।
बरवें जालें देशाउर । आल्या दुर सारिखें ।।धृ।।
राहोनियां जातों ठाया । आलियाची निशानी ।।२।।
तुका म्हणे चरणसेवा । जोडी हेवा लाधली ।।३।।

३७६८
आतां पाविजेल घरा । या दातारा संगती ।।१।।
पायावरि ठेवूं माथा । सर्वथा हा नुपेक्षी ।।धृ।।
येथून तेथवरि आतां। नाहीं सत्ता आणिकांची ।।२।।
तुका म्हणे चक्रपाणी । शिरोमणी बळियांचा ।।३।।

३७६९
बरवें माझ्या केलें मनें । पंथें येणें निघालें ।।१।।
अभयें च जावें ठाया । देवराया प्रतापें ।।धृ।।
साधनाचा न लगे पांग । अवघें सांग कीर्तन ।।२।।
तुका म्हणे सत्ता थोरी । कोण करी खोळंबा ।।३।।

३७७०
मागें पुढें नाहीं । दुजें यावेगळें कांहीं ।।१।।
नाहीं उरलें आणीक । केला झाडा सकळिक ।।धृ।।

विश्वासावांचून । नांवें दुजियाचे शून्य ।।२।।
देवाविण कांहीं । तुका म्हणे उरी नाहीं।।३।।

३७७१
वैराग्याचा अंगीं जालासे संचार । इच्छी वनांतर सेवावया ।।१।।
कां जी याचें करूं नये समाधान । वियोगानें मन सिणतसे ।।धृ।।
नये चि यावया पंढरीचें मूळ । न देवे चि माळ कंठींची ही ।।२।।३७७१
तुका म्हणे जालें अप्रीतीचें जिणें । लाजिर हें वाणें सेवा करी ।।३।।

३७७२
आळिकरा कोठें साहातें कठिण । आपुला तें प्राण देऊं पाहे ।।१।।
सांभाळावें मायबापें कृपादृष्टी । पीडितां तो दृष्टी देखों नये ।।धृ।।
अंतरलों मागें संवसारा हातीं । पायांपें सरतीं जालों नाहीं ।।२।।
तुका म्हणे तुम्ही विचारा जी देवा । ठेवाल तें ठेवा कोणे परी ।।३।।

३७७३
स्वप्नींचें हें धन हातीं ना पदरीं । प्रत्यक्ष कां हरि होऊं नये ।।१।।
आजुनि कां करा चाळवाचाळवी । सावकाशें द्यावी सत्य भेटी ।।धृ।।
बोलोनियां फेडा जीवींची काजळी । पाहेन कोमळीं चरणांबुजें ।।२।।
तुका म्हणे माझ्या जीवींचिया जीवा । सारूनियां ठेवा पडदा आतां ।।३।।

३७७४
येतील अंतरा शिष्टाचे अनुभव । तळमळी जीव तया सुखा ।।१।।
आतां माझा जीव घेउनियां बळी । बैसवावें वोळी संतांचिये ।।धृ।।
विस्तारिली वाचा फळेंविण वेल । कोरडे चि बोल फोस वांझे ।।२।।
तुका म्हणे आलों निर्वाणा च वरी । राहों नेदीं उरी नारायणा ।।३।।

३७७५
म्हणउनि काय जीऊं भक्तपण । जायाचीं भूषणें अळंकार ।।१।।
आपुल्या कष्टाची करूनियां जोडी । मिरवीन उघडी इच्छावसें ।।धृ।।
तुके तरि तुकीं खऱ्याचे उत्तम । मुलाम्याच्या भ्रम कोठवरि ।।२।।
तुका म्हणे पुढें आणि मागें फांस । पावें ऐसा नास न करीं देवा ।।३।।

३७७६
आपण चि व्हाल साहे । कसियाला हे धांवणी।।१।।
भाकिली ते उरली कींव । आहे जीव जीवपणें ।।धृ।।
आहाच कैंचा बीजा मोड । प्रीति कोड वांचूनि ।।२।।
तुका म्हणे दंडिन काया । याल तया धांवणिया ।।३।।

३७७७
निश्चितीनें होतों करुनियां सेवा । कां जी मन देवा उद्वेगिलें ।।१।।
अनंत उठती चित्ताचे तरंग । करावा हा त्याग वाटतसे ।।धृ।।
कोण तुम्हांविण मनाचा चाळक । दुजें सांगा एक नारायणा ।।२।।
तुका म्हणे माझा मांडिला विनोद । करऊं नेणें छंद कराल काइ ।।३।।

३७७८
आश्वासावें दास । तरी घडे तो विश्वास ।।१।।
नाहीं चुकत चाकरी । पुट लाडे शोचे थोरी ।।धृ।।
स्वामीच्या उत्तरें । सुख वाटे अभयें करें ।।२।।
न मगें परि भातें । तुका म्हणे निढळि रितें ।।३।।

३७७९
जेणें होय हित । तें तूं जाणसी उचित ।।१।।
मज नको लावूं तैसें । वांयां जायें ऐसें पिसें ।।धृ।।
धरितोसी सत्ता । होसी सकळ जाणता ।।२।।
चतुराच्या राया । अंगीकारावें तुकया।।३।।

३७८०
राहे उभा वादावादीं । तरी फंदीं सांपडे ।।१।।
लव्हाळ्यासी कोठें बळ । करिल जळ आपुलें ।।धृ।।
कठिणासी बळजोडा । नम्र पीडा देखेना ।।२।।
तुका म्हणे सर्वरसीं । मिळे त्यासी गोत तें ।।३।।

३७८१
म्हणउनि जाली तुटी । नाहीं भेटी अहंकारें ।।१।।
दाखविलें देवें वर्म । अवघा भ्रम नासला ।।धृ।।

हातें मुरगाळितां कान। नाहीं भिन्न वेदना ।।२।।
तुका म्हणे एकांतसुखें । अवघें गोतें गुंतलें।।३।।

३७८२
न पडो आतां हाडीं घाव । मध्यें कींव नासक ।।१।।
करविली आत्महत्या । जीवा कां द्वंदाचा ।।धृ।।
आशापाशीं गुंतला गळा । तेणें कळाहीन जालों ।।२।।
तुका म्हणे लावूं मुळी । जीवकुळी थोरेसी ।।३।।

३७८३
सामावे कारण । नाहीं सोसत धरणें ।।१।।
लादी थींके लाजिरवाणी । हीनकमाईची घाणी ।।धृ।।
पुष्प जवळी नाका। दुर्गंधीच्या नांवें थुंका ।।२।।
तुका म्हणे किती । उपदेशहीन जाती।।३।।

३७८४
असाल ते तुम्ही असा । आम्ही सहसा निवडों ना।।१।।
अनुसरलों एका चित्तें । हातोंहातें गींवसित ।।धृ।।
गुणदोष काशासाटीं । तुमचे पोटीं वागवूं ।।२।।
तुका म्हणे दुजें आतां । कोठें चित्ता आतळों ।।३।।

३७८५
सोंवळा होऊं तों वोंवळें जडलें । सांडीमांडी बोलतोंडीं बीजीं ।।१।।
एकसरीं केलीं कळिवरें साटी । आतां नका तुटी पायांसवें ।।धृ।।
संकल्पीं विकल्प पापाचा सुकाळ । रज्जुसर्प मूळ मरणाचें ।।२।।
तुका म्हणे हें तूं ब्रम्हांड चाळिता । मी कां करूं चिंता पांडुरंगा ।।३।।

३७८६
आहे तैसा आतां आहे ठायीं बरा । ठेविलों दातारा उचितें त्या ।।१।।
वचनाचा भार पडिलिया शिरीं । जालें मग भारी उतरेना ।।धृ।।
अबोल्याची सवे लावुनियां मना । फाकों नेदीं गुणा ऐसें करूं ।।२।।
तुका म्हणे आम्हां गोंवळ्याचा संग । राखतें तें अंग जाणतसों ।।३।।

३७८७
तूं माझा कोंवसा । परी न कळे या धसां ।।१।।
कूट खाती मागें पुढें । जाती नरयेगांवा पुढें ।।धृ।।
माझी म्हणती कवी। निषेधुनि पापी जीवीं ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगा । आतां कोण लेखी जगा ।।३।।

३७८८
दर्पणासी बुजे । नखटें तोंड पळवी लाजे ।।१।।
गुण ज्याचे जो अंतरीं । तो चि त्यासी पीडा करी ।।धृ।।
चोरा रुचे निशी। देखोनियां विटे शशी ।।२।।
तुका म्हणे जन । देवा असे भाग्यहीन ।।३।।

३७८९
म्हणउनि शरण जावें । सर्वभावें देवासी ।।१।।
तो हा उतरील पार । भवदुस्तरनदीचा ।।धृ।।
बहु आहे करुणावंत । अनंत हें नाम ज्या ।।२।।
तुका म्हणे साक्षी आलें । तरी केलें प्रगट।।३।।

३७९०
ऐसीं वर्मैं आम्हां असोनियां हातीं । कां होऊं नेणतीं दिशाभुली ।।१।।
पोटाळुनी पाय कवळीन उभा । कृपे पद्मनाभा हालों नेदीं ।।धृ।।
आपुले इच्छेसी घालीन संपुष्टीं । श्रीमुख तें दृष्टी न्याहाळीन ।।२।।
तुका म्हणे बहु सांडियेलीं मतें । आपुल्या पुरतें धरुनी ठेलों ।।३।।

३७९१
रत्नाच्या वोवणी कांचे ऐशा घरी । आव्हेरुनी दुरी अधिकारें ।।१।।
जातिस्वभाव आला डोळ्यां आड । तया घडे नाड न कळतां ।।धृ।।
कामधेनु देखे जैशा गाईम्हैसी । आणिकांतें ऐसी करोनियां ।।२।।
तुका म्हणे काय बोलोनियां फार । जयाचा वेव्हार तया साजे ।।३।।

३७९२
तरी च हीं केलीं । दानें वाईट चांगलीं ।।१।।
येक येक शोभवावें । केलें कवतुक देवें ।।धृ।।

काय त्याची सत्ता । सूत्र आणीक चाळिता ।।२।।
तुका म्हणे धुरें । डोळे भरिले परि खरें।।३।।

३७९३
अंधळें तें सांगे सांगितल्या खुणा । अनुभव देखणा प्रगट त्या ।।१।।
नांदणुक सांगे वडिलाचें बळ । कैसा तो दुर्बळ सुख पावे ।।२।।
तुका म्हणे नांदों आपल्या प्रतापें । तयासी लोकांपें स्तुती सांगों ।।३।।

३७९४
करी आणिकांचा अपमान । खळ छळवादी ब्राम्हण। तया देतां दान । नरका जाती उभयतां ।।१।।
तैसें जालें दोघांजणां। मागतिया यजमाना । जाळियेलें वनां । आपणासहित कांचणी।।धृ।।
घडितां दगडाची नाव । मोल क्लेश गेले वाव । तरता नाहीं ठाव। बुडवी तारूं तरतीया ।।२।।
चोरा दिधला सांटा । तेणें मारियेल्या वाटा । तुका म्हणे ताठा । हें तंव दोघे नाडती ।।३।।

३७९५
जळो ते जाणींव जळो ते शाहाणींव । राहो माझा भाव विठ्ठलपायीं ।।१।।
जळो तो आचार जळो तो विचार । राहो मन स्थीर विठ्ठलपायीं ।।धृ।।
जळो हा लौकिक जळो दंभमान । लागो जीव ध्यान विठ्ठलाचें ।।२।।
जळो हें शरीर जळो हा संबंध । राहो परमानंद माझा कंठीं ।।३।।
तुका म्हणे येथे अवघें चि होय । धरीं मना सोय विठोबाची ।।४।।

३७९६
विश्वास धरूनि राहिलों निवांत । ठेवूनियां चित्त तुझे पायीं ।।१।।
तरावें बुडावें तुझिया वचनें । निर्धार हा मनें केला माझा।।धृ।।
न कळे हें मज साच चाळविलें । देसी तें उगलें घेइन देवा ।।२।।
मागणें तें सरे ऐसें करीं देवा । नाहीं तरी सेवा सांगा पुढें।।३।।
करावें कांहीं कीं पाहावें उगलें । तुका म्हणे बोलें पांडुरंगा।।४।।

३७९७

देवाचिये पायीं देईं मना बुडी । नको धांवों वोढी इंद्रियांचे ।।१।।
सर्व सुखें तेथें होती एकवेळे । न सरती काळें कल्पांतीं ही ।।धृ।।
जाणें येणें खुंटे धांवे वेरजार । न लगे डोंगर उसंतावे ।।२।।
सांगन तें तुज इतुलें चि आतां । मानी धन कांता विषतुल्य ।।३।।
तुका म्हणे तुझे होती उपकार । उतरों हा पार भवसिंधु ।।४।।

३७९८
आम्ही विठ्ठलाचे दास जालों आतां । न चले हे सत्ता आणिकांची ।।१।।
नावरे तयासी ऐसें नाहीं दुजें । करितां पंढरिराजें काय नव्हे ।।धृ।।
कोठें तुज ठाव घ्यावयासी धांवा । मना तूं विसावा घेई आतां ।।२।।
इंद्रियांची वोढी मोडिला व्यापार । ज्या अंगें संचार चाळी तुज ।।३।।
तुका म्हणे आम्ही जिंकोनियां काळ । बैसलों निश्चळ होऊनियां ।।४।।

३७९९
सांगतों तरि तुम्ही भजा रे विठ्ठला । नाहीं तरि गेला जन्म वांयां ।।१।।
करितां भरोवरी दुरावसी दुरी । भवाचिये पुरीं वाहावसी ।।२।।
कांहीं न लगे एक भाव चि कारण । तुका म्हणे आण विठ्ठलाची ।।३।।

३८००
शब्दज्ञानी येऊं नेदीं दृष्टीपुढें । छळवादी कुडे अभक्त ते ।।१।।
जळो ते जाणींव जळो त्याचे दंभ । जळो त्याचें तोंड दुर्जनाचें ।।२।।
तुका म्हणे येती दाटूनि छळाया । त्यांच्या बोडूं डोया न धरूं भीड ।।३।।

३८०१
अन्यायासी राजा जरि न करितां दंड । बहुचक ते लंड पीडिती जना ।।१।।
ने करी निगा कुणबी न काढितां तण । कैंचे येती कण हातासी ते ।।२।।
तुका म्हणे संतां करूं नये अनुचित। पाप नाहीं नीत विचारिता ।।३।।

३८०२
भले लोक नाहीं सांडीत ओळखी । हे तों झाली देखी दुसऱ्याची ।।१।।
असो आतां यासी काय चाले बळ । आपुलें कपाळ वोडवलें ।।धृ।।
समर्थासी काय कोणें हें म्हणावें । आपुलिया जावें भोगावरि ।।२।।
तुका म्हणे तुम्हां बोल नाहीं देवा । नाहीं केली सेवा मनोभावें ।।३।।

३८०३
मुकें होतां तुझ्या पदरीचें जातें । मूर्ख तें भोगितें मीमीपण ।।१।।
आपुलिये घरीं मैंद होऊनी बसे । कवण कवणासी बोलों नका ।।२।।
तुका म्हणे तुम्हां सांगतों मी खुण । देवासी तें ध्यान लावुनि बसा ।।३।।

३८०४
आषाढी निकट । आणी कार्तिकीचा हाट ।।१।।
पुरे दोन्ही च बाजार । न लगे आणीक व्यापार ।।धृ।।
तें चि घ्यावें तें चि घ्यावें । कैवल्याच्या रासी भावें ।।२।।
कांहीं कोणा नेणे । विठो वांचूनि तुका म्हणे ।।३।।

३८०५
देऊनियां प्रेम मागितलें चित्त । जाली फिटाफिट तुम्हां आम्हां ।।१।।
काशानें उदार तुम्हांसी म्हणावें । एक नेसी भावें एक देसी ।।धृ।।
देऊनियां थोडें नेसील हें फार । कुंटिसी विचार अवघियांचा ।।२।।
तुका म्हणे आम्हां भांडवल चित्त । देउनी दुश्चित पाडियेलें ।।३।।

३८०६
तातडीची धांव अंगा आणि भाव । खोळंबा तो मग निश्चयाचा ।।१।।
म्हणउनि बरी विचारावी चाली । उरीचि ते बोली कामा येते ।।धृ।।
कोरडें वैराग्य माजिरा बडिवार । उतरे तो शूर अंगींचें तें ।।२।।
तुका म्हणे बरी झऱ्याची ते चाली । सांचवण्या खोली कैसीयांची ।।३।।

३८०७
मी तों बहु सुखी आनंदभरिता । आहें साधुसंतां मेळीं सदा ।।१।।
देवा कांहीं व्हावें ऐसें नाहीं माझ्या जीवा । आणीक केशवा तुजविण ।।धृ।।
न लगे वैकुंठ मोक्ष सायुज्यता । सुख वाटे घेतां जन्म ऐसें ।।२।।
मृत्युलोकीं कोण धरिलें वासना । पावावया जनासवें दुःख ।।३।।
तुका म्हणे तुझा दास ऐसें लोकां । कांहीं सकळिकां कळों यावें ।।४।।

३८०८
घ्या रे लुटी प्रेम सुख । फेडा आजि धणी । चुकला तो मुकला । जाली

वेरझार हाणी ।।१।।
घाला घातला वैकुंठीं । करूनियां जीवें साटी । पुरविली पाठी । वैष्णवीं काळाची ।।धृ।।
अवघें आणिलें अंबर । विठोसहित तेथें धुर । भेदूनि जिव्हार । नामबाणीं धरियेला ।।२।।
संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघीं जालीं गहन । केलीं पापपुण्यें । देशधडी बापुडीं ।।३।।
आनंदें गर्जती निर्भर । घोष करिती निरंतर । कांपती असुर । वीर कवणा नांगवती।।४।।
जें दुर्लभ ब्रम्हादिकां । आजि सांपडलें फुका । घ्या रे म्हणे तुका । सावचित्त होउनी ।।५।।

३८०९
तुझिया दासांचा हीन जालों दास । न धरीं उदास मायबापा ।।१।।
तुजविण प्राण कैसा राहों पाहे । वियोग न साहे क्षणभरि ।।धृ।।
आणिक माझ्या जीवें मोकलिली आस । पाहे तुझी वास पांडुरंगा ।।२।।
सर्वभावें तुज आणिला उचित । राहिलों निश्चिंत तुझे पायीं ।।३।।
तुका म्हणे तुज असो माझा भार । बोलतों मी फार काय जाणें ।।४।।

३८१०
ते चि करीं मात । जेणें होइल तुझें हित ।।१।।
काय बडबड अमित । सुख जिव्हारीं सिणविसी ।।धृ।।
जो मुळव्याधी पीडिला । त्यासी देखोन हांसे खरजुला ।।२।।
आराथकरी सोसी । त्यासि हांसे तो आळसी ।।३।।
क्षयरोगी म्हणे परता । सर रोगिया तूं आतां ।।४।।
वडस दोहीं डोळां वाढले । आणिकां कानें कोंचें म्हणे ।।५।।
तुका म्हणे लागों पायां । शुद्ध करा आपणियां ।।६।।

३८११
कळों आला भाव माझा मज देवा । वांयांविण जीवा आठविलें ।।१।।
जोडूनि अक्षरें केलीं तोंडपिटी । न लगे सेवटीं हातीं कांहीं ।।२।।
तुका म्हणे माझे गेले दोन्ही ठाय । सवसार ना पाय तुझे मज ।।३।।

३८१२
आतां तरी मज सांगा साच भाव । काय म्यां करावें ऐसें देवा ।।१।।
चुकावया कर्म नव्हतें कारण । केला होय सीण अवघा चि ।।२।।
तुका म्हणे नको पाहूं निरवाण । देईं कृपादान याचकासी ।।३।।

३८१३
बोल नाहीं तुझ्या दातृत्वपणासी । आम्ही अविश्वासी सर्वभावें ।।१।।
दंभें करी भक्ती सोंग दावी जना । अंतरीं भावना वेगळिया ।।२।।
तुका म्हणे देवा तूं काय करिसी । कर्मा दुस्तरासी आमुचिया ।।३।।

३८१४
नामधारकासी नाहीं वर्णावर्ण । लोखंड प्रमाण नाना जात ।।१।।
शस्त्र अथवा गोळे भलता प्रकार । परिसीं संस्कार सकळ ही हेम ।।धृ।।
प्रजन्य वर्षतां जीवना वाहावट । तें समसकट गंगे मिळे ।।२।।
सर्व तें हें जाय गंगा चि होऊन । तैसा वर्णावर्ण नाहीं नामीं ।।३।।
महांपुरीं जैसें जातसे उदक । मध्यें तें तारक नाव जैसी ।।४।।
तये नावेसंगें ब्राम्हण तरती । केवीं ते बुडती अनामिक।।५।।
नाना काष्ठजात पडतां हुताशनीं । ते जात होउनी एकरूप ।।६।।
तेथें निवडेना घुरे कीं चंदन । तैसा वर्णावर्ण नामीं नाहीं ।।७।।
पूर्वानुवोळख तें चि पैं मरण । जरि पावे जीवन नामामृत ।।८।।
नामामृतें जालें मुळीचें स्मरण । सहज साधन तुका म्हणे ।।९।।

३९१५
काय वांचोनियां जालों भूमिभार । तुझ्या पायीं थार नाहीं तरि ।।१।।
जातां भलें काय डोळियांचें काम । जरि पुरुषोत्तम न देखती ।।धृ।।
काय मुख बिळ श्वापदाचे धांव । नित्य तुझें नांव नुच्चारितां ।।२।।
तुका म्हणे पैं या पांडुरंगाविण । न वचे चि क्षण जीव भला ।।३।।

३८१६
सोइऱ्यासी करी पाहुणेर बरा । कांडितो ठोंबरा संता साटीं ।।१।।
गाईसी देखोनी बदबदा मारी । घोड्याची चाकरी गोड वाटे ।।धृ।।
पान फुल नेतो वेश्येसी उदंड । ब्राम्हणासी खांड देऊं नेदी ।।२।।
पर्वकाळीं धर्म न करी नासरी । वेची राजद्वारीं उदंड चि।।३।।

कीर्त्तना जावया होतसे हींपुष्टी । खेळतो सोंकटीं रात्रंदिवस।।४।।
बाइलेच्या गोता आवडीनें पोसी । मातापितियासी दवडितो ।।५।।
तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ।।६।।

३८१७
कां हो पांडुरंगा न करा धांवणें । तरि मज कोणें सोडवावें ।।१।।
तुझा म्हणऊनि आणिकापें उभा । राहों हें तों शोभा नेदी आतां ।।धृ।।
काळें पुरविली पाठी दुरवरी । पुढें पायां धीरी राहों नेदी ।।२।।
नको आणूं माझें संचित मनासी । पावन आहेसी पतितां तूं ।।३।।
तुका म्हणे चाले आणिकांची सत्ता । तुज आळवितां नवल हें ।।४।।

३८१८
कावळ्याच्या गळां मुक्ताफळमाळा । तरी काय त्याला भूषण शोभे ।।१।।
गजालागीं केला कस्तुरीचा लेप । तिचें तो स्वरूप काय जाणे ।।धृ।।
बकापुढें सांगे भावार्थे वचन । वाउगा चि सीण होय त्यासी ।।२।।
तुका म्हणे तैसे अभाविक जन । त्यांसी वांयां सीण करूं नये ।।३।।

३८१९
आतां धरितों पदरीं । तुज मज करीन सरी ।।१।।
जालों जीवासी उदार । उभा ठाकलों समोर ।।२।।
तुका विनवीतसे संतां । ऐसें सांगा पंढरिनाथा ।।३।।

३८२०
न कळसी ज्ञाना न कळसी ध्याना । न कळेसी दर्शना धुंडाळितां ।।१।।
न कळेसी आगमा न कळेसी निगमा । न बोलवे सीमा वेदां पार ।।२।।
तुका म्हणे तुझा नाहीं अंतपार । म्हणोनि विचार पडिला मज ।।३।।

३८२१
पायां लावुनियां दोरी । भृंग बांधिला लेंकुरीं ।।१।।
तैसा पावसी बंधन । मग सोडवील कोण ।।धृ।।
गळां बांधोनियां दोरी । वांनर हिंडवी घरोघरीं ।।२।।
तुका म्हणे पाहें । रीस धांपा देत आहे ।।३।।

३८२२
मायबापें सांभाळिती । लोभाकारणें पाळिती ।।१।।
तैसा नव्हे देवराव । याचा कृपाळु स्वभाव ।।धृ।।
मनासारिखें न होतां । बाळकासी मारी माता ।।२।।
तुका म्हणे सांगूं किती । बाप लेंकासी मारिती ।।३।।

३८२३
धन मेळवूनि कोटी । सवें नये रे लंगोटी ।।१।।
पानें खाशील उदंड । अंतीं जासी सुकल्या तोंडें ।।धृ।।
पलंग न्याहाल्या सुपती । शेवटीं गोवऱ्या सांगाती ।।२।।
तुका म्हणे राम । एक विसरतां श्रम ।।३।।

३८२४
विनवितों चतुरा तुज विश्वंभरा । परियेसी दातारा पांडुरंगा ।।१।।
तुझे दास ऐसें जगीं वाखाणिलें । आतां नव्हे भलें मोकलितां ।।धृ।।
माझे गुणदोष कोण जाणे मात । पावनपतित नाम तुझें ।।२।।
लोभ मोह माया आम्हां बांधवितां । तरि हा अनंता बोल कोणा ।।३।।
तुका म्हणे मी तों पतित चि खरा । परि आलों दातारा शरण तुज ।।४।।

३८२५
त्राहे त्राहे सोडवीं अनंता । लागों दे ममता तुझे पायीं।।१।।
एक चि मागणें देईं तुझी गोडी । न लगे आवडी आणिकाची ।।धृ।।
तुझें नाम गुण वर्णीन पवाडे । आवडीच्या कोडें नाचों रंगीं ।।२।।
बापा विठ्ठलराया हें चि देईं दान । जोडती चरण जेणें तुझे ।।३।।
आवडीसारखें मागितलें जरी । तुका म्हणे करीं समाधान ।।४।।

३८२६
सुगरणीबाई थिता नास केला । गुळ तो घातला भाजीमध्यें ।।१।।
क्षीरीमध्यें हिंग दुधामध्यें बोळ । थितें चि वोंगळ कैसें केलें ।।धृ।।
दळण दळोनी भरूं गेली पाळी । भरडोनि वोंगळी नास केला ।।२।।
कापुराचे सांते आणिला लसण । वागवितां सीण दुःख होय ।।३।।
रत्नाचा जोहारी रत्न चि पारखी । येर देखोदेखीं हातीं घेती ।।४।।
तुका म्हणे जरी योग घडे निका । न घडतां थुंका तोंडावरी ।।५।।

३८२७

बाप माझा दिनानाथ । वाट भक्तांची पाहात ।।१।।
कर ठेवुनियां करीं । उभा चंद्रभागे तिरीं ।।धृ।।
गळां वैजयंतीमाळा। रूपें डोळस सांवळा ।।२।।
तुका म्हणे भेटावया । सदा उभारिल्या बाह्या ।।३।।

३८२८

माझें जीवन तुझे पाय । कृपाळुं तूं माझी माय ।।१।।
नेदीं दिसों किविलवाणें । पांडुरंगा तुझें तान्हें ।।धृ।।
जन्ममरण तुजसाटीं । आणीक नेणें दुजी गोष्टी ।।२।।
तुका म्हणे तुजविण । कोण हरिल माझा सीण ।।३।।

३८२९

कां रे पुंड्या मातलासी । उभें केलें विठ्ठलासी ।।१।।
ऐसा कैसा रे तूं धीट । मागें भिरकाविली वीट ।।धृ।।
युगें जालीं अठ्ठावीस । अजुनी न म्हणसी बैस ।।२।।
भाव देखोनि निकट । देवें सोडिलें वैकुंठ ।।३।।
तुका म्हणे पुंडलिका । तूं चि बळिया एक निका ।।४।।

३८३०

तुज पाहातां समोरी । दृष्टि न फिरे माघारी ।।१।।
माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडिली पंढरिराया ।।धृ।।
नव्हे सारितां निराळें । लवण मेळवितां जळें ।।२।।
तुका म्हणे बळी । जीव दिला पायांतळीं ।।३।।

३८३१

उपदेश किती करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ।।१।।
शुद्ध कां वासना नव्हे चांडाळाची । होळी संचिताची केली तेणें ।।धृ।।
नाहीं भाव मनीं नाइके वचन । आपला आपण उणें घेतों ।।२।।
तुका म्हणे त्यासी काय व्याली रांड । करी बडबड रिती दिसे ।।३।।

३८३२

समर्थासी लाज आपुल्या नामाची । शरण आल्याची लागे चिंता ।।१।।
न पाहे तयाचे गुण दोष अन्याय । सुख देउनि साहे दुःख त्याचें ।।धृ।।
मान भलेपण नाहीं फुकासाटीं । जयावरि गांठी झीज साहे ।।२।।
तुका म्हणे हें तूं सर्व जाणसी । मज अधिरासी धीर नाहीं ।।३।।

३८३३
आनंदें कीर्तन कथा करीं घोष । आवडीचा रस प्रेमसुख ।।१।।
मज या आवडे वैष्णवांचा संग । तेथें नाहीं लाग कळिकाळा ।।धृ।।
स्वल्प मात्र वाचे बैसलासे निका । राम कृष्ण सखा नारायण ।।२।।
विचारितां मज दुजें वाटे लाज । उपदेशें काज आणीक नाहीं ।।३।।
तुका म्हणे चित्त रंगलेंसे ठायीं । माझें तुझ्या पायीं पांडुरंगा ।।४।।

३८३४
ब्रम्हज्ञान जेथें आहे घरोघरीं । सर्व निरंतरी चतुर्भुज।।१।।
पापा नाहीं रीग काळाचें खंडण । हरिनामकीर्तन परोपरी ।।२।।
तुका म्हणे हा चि भाव माझ्या चित्तीं । नाहीं आणिकां गती चाड मज।।३।।

३८३५
मज नाहीं कोठें उरला दुर्जन । मायबापाविण ब्रम्हांडीं हें ।।१।।
कासया जिकीर करणें येविसीं । भयाची मानसीं चिंता खंती ।।धृ।।
विश्वंभराचिये लागलों सांभाळीं । संत नेती चाली आपुलिया ।।२।।
तुका म्हणे माझें पाळणें पोषणें । करी नारायण सर्वस्वेंसी ।।३।।

३८३६
नाहीं हित ठावें जननीजनका । दाविले लौकिकाचार तींहीं ।।१।।
अंधळ्याचे काठी अंधळें लागलें । घात एकवेळे मागेंपुढें ।।धृ।।
न ठेवावी चाली करावा विचार । वरील आहार गळी लावी ।।२।।
तुका म्हणे केला निवाडा रोकडा । राऊत हा घोडा हातोहातीं ।।३।।

३८३७
आतां पहाशील काय माझा अंत । आलों शरणागत तुज देवा ।।१।।
करीं अंगीकार राखें पायांपाशीं । झणीं दिसों देसी कींविलवाणें ।।धृ।।
नाहीं आइकिली मागें ऐसी मात । जे त्वां शरणागत उपेक्षिले ।।२।।

तुका म्हणे आतां धरीं अभिमान । आहेसी तूं दानशूर दाता ।।३।।

३८३८
होईल तो भोग भोगीन आपुला । न घलीं विठ्ठला भार तुज ।।१।।
तुम्हांपासाव हें इच्छीतसें दान । अंतरींचें ध्यान मुखीं नाम ।।धृ।।
नये काकुलती गर्भवासांसाटीं । न धरीं हें पोटीं भय कांहीं ।।२।।
तुका म्हणे मज उदंड एवढें । न वांचावें पुढें मायबापा।।३।।

३८३९
काय तुझी ऐसी वेचते गांठोळी । मांहे टाळाटाळी करीतसां ।।१।।
चतुराच्या राया आहो पांडुरंगा । ऐसें तरि सांगा निवडूनि ।।धृ।।
कोण तुम्हां सुख असे या कवतुकें । भोगितां अनेकें दुःखें आम्ही ।।२।।
तुका म्हणे काय जालासी निर्गुण । आम्हां येथें कोण सोडवील ।।३।।

३८४०
देवाची पूजा हे भूताचें पाळण । मत्सर तो सीण बहुतांचा ।।१।।
रुसावें फुगावें आपुलियावरि । उरला तो हरि सकळ ही ।।२।।
तुका म्हणे संतपण यां चि नांवें । जरि होय जीव सकळांचा ।।३।।

३८४१
नाहीं जप तप जीवाची आटणी । मनासी दाटणी नाहीं केली ।।१।।
निजलिया ठायीं पोकारिला धांवा । सांकडें तें देवा तुझें मज ।।धृ।।
नाहीं आणूनियां समर्पिलें जळ । सेवा ते केवळ चिंतनाची ।।२।।
तुका म्हणे आम्हीं वेचिलीं उत्तरें । घेतलीं उदारें साच भावें ।।३।।

३८४२
देह तंव आहे प्रारब्धा अधीन । याचा मी कां सीण वाहूं भार ।।१।।
सरो माझा काळ तुझिया चिंतनें । कायावाचामनें इच्छीतसें ।।धृ।।
लाभ तो न दिसे याहूनि दुसरा । आणीक दातारा येणें जन्में ।।२।।
तुका म्हणे आलों सोसीत संकटें । मी माझें वोखटें आहे देवा ।।३।।

३८४३
सकळ तुझे पायीं मानिला विश्वास । न करीं उदास आतां मज ।।१।।

जीवीं गातां गोड आइकतां कानीं । पाहातां लोचनीं मूर्ती तुझी ।।धृ।।
मन स्थिर माझें जालेंसे निश्चळ । वारिलीं सकळ आशापाश ।।२।।
जन्मजराव्याधि निवारिलें दुःख । वोसंडलें सुख प्रेम धरी ।।३।।
तुका म्हणे मज जाला हा निर्धार । आतां वांयां फार काय बोलों ।।४।।

३८४४
होऊं शब्दस्पर्श नये माझा तुम्हां । विप्रवृंदा तुम्हां ब्राम्हणांसी।।१।।
म्हणोनियां तुम्हां करितों विनंती । द्यावें शेष हातीं उरलें तें ।।धृ।।
वेदीं कर्म जैसें बोलिलें विहित । करावी ते नीत विचारूनि ।।२।।
तुमचा स्वधर्म माझा अधिकार । भोजन उत्तर तुका म्हणे ।।३।।

३८४५
बहुत असती मागें सुखी केलीं । अनाथा माउली जिवांची तूं ।।१।।
माझिया संकटा न धरीं अळस । लावुनियां कास पार पावीं ।।धृ।।
कृपावंता करा ज्याचा अंगीकार । तया संवसार नाहीं पुन्हां ।। ।२।।
विचारितां नाहीं दुजा बळिवंत । ऐसा सर्वगत व्यापी कोणी ।।३।।
म्हणउनि दिला मुळीं जीवभाव । देह केला वाव समाधिस्थ ।।४।।
तुका म्हणे नाहीं जाणत आणीक । तुजविण एक पांडुरंगा ।।५।।

३८४६
वैभवाचे धनी सकळ शरणागत । सत्यभावें चित्त अर्पिलें तें ।।१।।
नेदी उरों देव आपणांवेगळें । भावाचिया बळें ठायाठाव ।।धृ।।
जाणोनि नेणती अंगा आली दशा । मग होय इच्छा आपणे चि ।।२।।
तुका म्हणे बरे धाकट्याचें जिणें । माता स्तनपानें वाढविते ।।३।।

३८४७
आम्हां देणें धरा सांगतों तें कानीं । चिंता पाय मनीं विठोबाचे ।।१।।
तेणें माझें चित्त होय समाधान । विलास मिष्टान्न न लगे सोनें ।।धृ।।
व्रत एकादशी दारीं वृंदावन । कंठीं ल्या रे लेणें तुळसीमाळा ।।२।।
तुका म्हणे त्याचे घरींची उष्टावळी । मज ते दिवाळी दसरा सण ।।३।।

३८४८
आतां मी अनन्य येथें अधिकारी । होइन कोणे परी नेणें देवा ।।१।।

पुराणींचा अर्थ ऐकतां मानस । होतो कासावीस जीव माझा ।।धृ।।
इंद्रियांचे आम्ही पांगिलों अंकित । त्यांच्यासंगें चित्त रंगलें तें ।।२।।
एकाचें ही जेथें न घडे दमन । अवघीं नेमून कैसीं राखों ।।३।।
तुका म्हणे जरी मोकळिसी आतां । तरी मी अनंता वांयां गेलों ।।४।।

३८४९
आवडी धरोनी आलेती आकारा । केला हा पसारा याजसाटीं ।।१।।
तें मी तुझें नाम गाईन आवडी । क्षण एक घडी विसंबेना ।।धृ।।
वर्म धरावें हा मुख्यधर्मसार । अवघे प्रकार तयापासीं।।२।।
वेगळ्या विचारें वेगळाले भाव । धरायासी ठाव बहु नाहीं ।।३।।
तुका म्हणे घालूं इच्छेचिये पोटीं । कवळुनी धाकुटी मूर्ती जीवें ।।४।।

३८५०
भागलों मी आतां आपुल्या स्वभावें । कृपा करोनि देवें आश्वासीजे ।।१।।
देउनि आलिंगन प्रीतीच्या पडिभरें । अंगें हीं दातारें निववावीं ।।धृ।।
अमृताची दृष्टी घालूनियां वरी । शीतळ हा करीं जीव माझा ।।२।।
घेईं उचलूनि पुसें तानभूक । पुसीं माझें मुख पीतांबरें ।।३।।
बुझावोनि माझी धरीं हनुवंटी । ओवाळुनि दिठी करुनी सांडीं ।।४।।
तुका म्हणे बापा आहो विश्वंभरा । आतां कृपा करा ऐसी कांहीं ।।५।।

३८५१
न सरे लुटितां मागें बहुतां जनीं । जुनाट हे खाणी उघडिली ।।१।।
सिद्ध महामुनि साधक संपन्न । तिहीं हें जतन केलें होतें ।।धृ।।
पायाळाच्या गुणें पडिलें ठाउकें । जगा पुंडलिकें दाखविलें ।।२।।
तुका म्हणे येथें होतों मी दुबळें । आलें या कपाळें थोडें बहु ।।३।।

३८५२
भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथें अनुभवाचा काय पंथ ।।१।।
वाढवुनी चटा फिरे दाही दिशा । तरी जंबुवेषा सहज स्थिति ।।धृ।।
कोरोनियां भूमी करिती मधीं वास । तरी उंदरास काय वाणी ।।२।।
तुका म्हणे ऐसें कासया करावें । देहासी दंडावें वाउगें चि ।।३।।

३८५३

धन्य दिवस आजि डोळियां लाधला । आनंद देखिला धणीवरी ।।१।।
धन्य जालें मुख निवाली रसना । नाम नारायणा घोंष करूं ।।धृ।।
धन्य हें मस्तक सर्वांग शोभलें । संताचीं पाउलें लागताती ।।२।।
धन्य आजि पंथें चालती पाउलें । टाळिया शोभले धन्य कर ।।३।।
धन्य तुका म्हणे आम्हांसी फावलें । पावलों पाउलें विठोबाचीं ।।४।।

३८५४
बरवी हे वेळ सांपडली संधि । साह्य जाली बुद्धि संचितासी ।।१।।
येणें पंथें माझीं चालिलीं पाउलें । दरुषण जालें संतां पायीं ।।धृ।।
त्रासिलें दरिद्रें दोषा जाला खंड । त्या चि काळें पिंड पुनीत जाला ।।२।।
तुका म्हणे जाला अवघा व्यापार । आली वेरझार फळासी हे ।।३।।

३८५५
आपणा लागे काम वाण्याघरीं गुळ । त्याचे याति कुळ काय कीजे ।।१।।
उकरड्यावरी वाढली तुळसी । टाकावी ते कैसी ठायागुणें ।।धृ।।
गाईचा जो भक्ष अमंगळ खाय । तीचें दूध काय सेवूं नये ।।२।।
तुका म्हणे काय सलपटासी काज । फणसांतील बीज काढुनि घ्यावें ।।३।।

३८५६
जयासी नावडे वैष्णवांचा संग । जाणावा तो मांग जन्मांतरीं ।।१।।
अपवित्र वाचा जातीचा अधम । आचरण धर्म नाहीं जया ।।धृ।।
मंजुळवदनीं बचनागाची कांडी । शेवटीं विघडी जीवप्राणा।।२।।
तुका म्हणे ज्याचा पिता नाहीं शुद्ध । तयासी गोविंद अंतरला ।।३।।

३८५७
वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षणें । चिरगुटें घालून वाथयाला ।।१।।
तेवीं शब्दज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाटीं विकूनियां ।।धृ।।
बोलाचि च कढी बोलाचा चि भात । जेवुनियां तृप्त कोण जाला ।।२।।
कागदीं लिहितां नामाची साकर । चाटितां मधुर गोडी नेदी ।।३।।
तुका म्हणे जळो जळो ते महंती । नाहीं लाज चित्तीं आठवण ।।४।।

३८५८
तुझिया पाळणा ओढे माझें मन । गेलों विसरोन देहभाव ।।१।।

लागला पालट फेडणें उसणें । येणें चि प्रमाणें पांडुरंगा ।।२।।
तुका म्हणे माझा जीव जैसा ओढे । तैसा चि तिकडे पाहिजेल ।।३।।

३८५९
मी दास तयांचा जयां चाड नाहीं । सुखदुःख दोहीं विरहित ।।१।।
राहिलासे उभा भीवरेच्या तीरीं । कट दोहीं करीं धरोनियां ।।धृ।।
नवल काय तरी पाचारितां पावे । न स्मरत धांवे भक्तकाजा ।।२।।
सर्व भार माझा त्यासी आहे चिंता । तो चि माझा दाता स्वहिताचा ।।३।।
तुका म्हणे त्यासी गाईन मी गीतीं । आणीक तें चित्तीं न धरीं कांहीं ।।४।।

३८६०
जुंझायाच्या गोष्टी ऐकतां चि सुख । करितां हें दुःख थोर आहे ।।१।।
तैसी हरिभक्ति सुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ।।धृ।।
पिंड पोसिलियां विषयांचा पाइक । वैकुंठनायक कैंचा तेथें ।।२।।
तुका म्हणे व्हावें देहासी उदार । रकुमादेवीवर जोडावया ।।३।।

३८६१
पाषाण प्रतिमा सोन्याच्या पादुका । हें हो हातीं एका समर्थाचे ।।१।।
अनामिका हातीं समर्थाचा सिक्का । न मानितां लोकां येइल कळों ।।२।।
तुका म्हणे येथें दुराग्रह खोटा । आपुल्या अदृष्टा शरण जावें ।।३।।

३८६२
बहु या प्रपंचें भोगविल्या खाणी । टाकोनियां मनीं ठेविला सीण ।।१।।
आतां पायांपाशीं लपवावें देवा । नको पाहूं सेवा भक्ती माझी ।।धृ।।
बहु भय वाटे एकाच्या बोभाटें । आली घायवटे फिरोनियां ।।२।।
तुका म्हणे सिगे भरूं आलें माप । वियोग संताप जाला तुझा ।।३।।

३८६३
धरूनियां मनीं बोलिलों संकल्प । होसी तरि बाप सिद्धी पाव ।।१।।
उत्कंठा हे आजी जाली माझे पोटीं । मोकळिली गोष्टी टाळाटाळ ।।धृ।।
माझा मज असे ठाउका निर्धार । उपाधि उत्तर न साहे पैं ।।२।।
तुका म्हणे जरि दिली आठवण । तरि अभिमान धरीं याचा ।।३।।

३८६४
आजिवरी होतों संसाराचे हातीं । आतां ऐसें चित्तीं उपजलें ।।१।।
तुला शरणागत व्हावें नारायणा । अंगीकारा दिना आपुलिया ।।धृ।।
विसरलों काम याजसाठीं धंदा । सकळ गोविंदा माझें तुझें ।।२।।
तुका म्हणे विज्ञापना परिसावी । आवडी हे जीवीं जाली तैसी ।।३।।

३८६५
धन्यधन्य ज्यास पंढरीसी वास । धन्य ते जन्मास प्राणी आले ।।१।।
बहु खाणीमध्यें होत कोणी एक । त्रिगुण कीटक पक्षिराज ।।धृ।।
उत्तम चांडाळ नर नारी बाळ । अवघे चि सकळ चतुर्भुज ।।२।।
अवघा विठ्ठल तेथें दुजा नाहीं । भरला अंतर्बाहि सदोदीत ।।३।।
तुका म्हणे येथें होउनी राहेन । सांडोवा पाषाण पंढरीचा ।।४।।

३८६६
असंत लक्षण भूतांचा मत्सर । मनास निष्ठुर अतिवादी।।१।।
अंतरीचा रंग उमटे बाहेरी । वोळखियापरी आपेंआप।।धृ।।
संत ते समय वोळखती वेळ । चतुष्ट निर्मळ चित्त सदा ।।२।।
तुका म्हणे हित उचित अनुचित । मज लागे नित आचरावें ।।३।।

३८६७
विठ्ठलावांचोनि ब्रम्ह जें बोलती । वचन तें संतीं मानूं नये ।।१।।
विठ्ठलावांचूनि जेजे उपासना । अवघा चि जाणा संभ्रमु तो ।।धृ।।
विठ्ठलावांचूनि सांगतील गोष्टी । वांयां ते हिंपुटी होत जाणा ।।२।।
विठ्ठलांवाचूनि जें कांहीं जाणती । तितुल्या वित्पत्ति वाउगीया ।।३।।
तुका म्हणे एक विठ्ठल चि खरा । येर तो पसारा वाउगा चि ।।४।।

३८६८
सर्व काळ डोळां बैसो नारायण । नयो अभिमान आड मध्यें ।।१।।
धाड पडो तुझ्या थोरपणावरि । वाचे नरहरि उच्चारीना ।।धृ।।
जळो अंतरींचें सर्व जाणपण । विवादवचन अहंतेचें ।।२।।
सकळां चरणीं गळित माझा जीव । तुका म्हणे भाव एकविध ।।३।।

३८६९

मधुरा उत्तरासवें नाहीं चाड । अंतरंगीं वाड भाव असो ।।१।।
प्राणावेगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख बरा।।धृ।।
जननिंदा होय तो बरा विचार । थोरवीचा भार कामा नये।।२।।
तुका म्हणे चित्तीं भाव निष्टावंत । दया क्षमा शांत सर्वां भूतीं ।।३।।

३८७०
झाडा वरपोनि खाऊनियां पाला । आठवी विठ्ठला वेळोवेळां ।।१।।
वल्कलें नेसुनि ठुंगा गुंडाळुनी । सांडी देहभान जवळुनी ।।धृ।।
लोकमान वमनासमान मानणें । एकांतीं राहणें विठोसाटीं ।।२।।
सहसा करूं नये प्रपंचीं सौजन्य । सेवावें अरण्य एकांतवास ।।३।।
ऐसा हा निर्धार करी जो मनाचा । तुका म्हणे त्याचा पांग फिटे ।।४।।

३८७१
भक्तिभावें करी बैसोनि निश्चित । नको गोवूं चित्त प्रपंचासी ।।१।।
एका दृढ करीं पंढरीचा राव । मग तुज उपाव पुढिल सुचे ।।धृ।।
नको करूं कांहीं देवतापूजन । जप तप ध्यान तें ही नको ।।२।।
मानिसील झणी आपलिक कांहीं । येरझार पाहीं न चुके कदा ।।३।।
ऐसे जन्म किती पावलासी देहीं । अझूनि का नाहीं कळली सोय ।।४।।
सोय घरीं आतां होय पां सावध । अनुभव आनंद आहे कैसा ।।५।।
सहज कैसें आहे तेथीचें तें गुज । अनुभवें निज पाहे तुकीं ।।६।।
तुका म्हणे आतां होई तूं सावध । तोडीं भवबंध एका जन्में ।।७।।

३८७२
दोराच्या आधारें पर्वत चढला । पाउलासाटीं केला अपघात ।।१।।
अष्टोत्तरदशें व्याधि ज्य वैद्यें दवडुनी । तो वैद्य मारूनि उत्तीर्ण जाला ।।धृ।।
नव मास माया वाइलें उदरीं । ते माता चौबारीं नग्न केली ।।२।।
गायत्रीचें क्षीर पिळुनी घेऊनी । उपवासी बांधोनी ताडन करी ।।३।।
तुका म्हणे दासां निंदी त्याचें तोंड । पहातां नरककुंड पूर्वजांसी ।।४।।

३८७३
न कळे ब्रम्हज्ञान आचार विचार । लटिका वेव्हार करीतसे ।।१।।
विश्वामित्री पोटीं तयाचा अवतार । नांव महाखर चांडाळाचें ।।धृ।।
द्रव्यइच्छेसाटीं करीतसे कथा । काय त्या पापिष्ठा न मिळे खाया ।।२।।

पोट पोसावया तोंडें बडबडी । नाहीं धडफुडी एक गोष्टी ।।३।।
तुका म्हणे तया काय व्याली रांड । येउनिया भंड जनामध्यें ।।४।।

३८७४
नित्य उठोनियां खायाची चिंता । आपुल्या तूं हिता नाठवीसी ।।१।।
जननीचे पोटीं उपजलासी जेव्हां । चिंता तुझी तेव्हां केली तेणें ।।धृ।।
चातकां लागूनि मेघ नित्य वर्षे । तो तुज उदास करील केवीं ।।२।।
पक्षी वनचरें आहेत भूमीवरि । तयांलागीं हरि उपेक्षीना ।।३।।
तुका म्हणे भाव धरुन राहें चित्तीं । तरि तो श्रीपति उपेक्षीना ।।४।।

३८७५
जेजे आळी केली तेते गेली वांयां । उरला पंढरिराया श्रम माझा ।।१।।
काय समाधान केलें कोण वेळे । कोणें माझे लळे पाळियेले ।।धृ।।
अभ्यास तो नाहीं स्वप्नीं ही दुश्चिता । प्रत्यक्ष कैंचा चि तो ।।२।।
आतां पुढें लाज वाटे पांडुरंगा । भक्त ऐसें जगामाजी जालें ।।३।।
तुका म्हणे आतां नाहीं भरवसा । मोकलिसी ऐसा वाटतोसी ।।४।।

३८७६
पूवाअहूनि बहु भक्त सांभाळिले । नाहीं अव्हेरिले दास कोणी ।।१।।
जेजे शरण आले तेते आपंगिले । पवाडे विठ्ठले ऐसे तुझे ।।धृ।।
मिरवे चरणीं ऐसीये गोष्टीचें । भक्तसांभाळाचें ब्रीद ऐसें ।।२।।
तुका म्हणे आम्हांसाटी येणें रूपा । माझ्या मायबापा पांडुरंगा ।।३।।

३८७७
दर्दुराचें पिलुं म्हणे रामराम । नाहीं उदक उष्ण होऊं दिलें ।।१।।
कढेमाजी बाळ करी तळमळ । गोविंद गोपाळ पावें वेगीं ।।धृ।।
आज्ञा तये काळीं केली पावकासी । झणी पिलीयासी तापवीसी ।।२।।
तुका म्हणे तुझे ऐसे हे पवाडे । वर्णितां निवाडे सुख वाटे ।।३।।

३८७८
करुणा बहुत तुझिया अंतरा । मज विश्वंभरा कळों आलें ।।१।।
पक्षीयासी तुझें नाम जें ठेविलें । तयें उद्धरिलें गणिकेसी।।धृ।।
कुंटिणी ते दोष बहु आचरली । नाम घेतां आली करुणा तुज ।।२।।

हृदय कोमळ तुझें नारायणा । ऐसें बहुता जनां तारियेलें ।।३।।
तुका म्हणे सीमा नाहीं तुझे दये । कोमळ हृदय पांडुरंगा ।।४।।

३८७९
आजामेळा अंत मरणासी आला । तोंवरि स्मरला नाहीं तुज ।।१।।
प्राण जातेवेळे म्हणे नारायण । त्यासाटीं विमान पाठविलें ।।धृ।।
बहुत कृपाळु होसी जगन्नाथा । त्रैलोक्यसमर्था सोइरिया ।।२।।
तुका म्हणे भक्तकाज तूं कैवारी । तुज साही चारी वर्णिताती ।।३।।

३८८०
धर्म रक्षावया अवतार घेशी । आपुल्या पाळिसी भक्तजना ।।१।।
अंबऋृषीसाटीं जन्म सोसियेलें । दुष्ट निर्दाळिले किती एक ।।धृ।।
धन्य तुज कृपासिंधु म्हणतील । आपुला तूं बोल साच करीं ।।२।।
तुका म्हणे तुज वर्णिती पुराणें । होय नारायणें दयासिंधु ।।३।।

३८८१
येउनी जाउनी पाहें तुजकडे । पडिल्या सांकडें नारायणा ।।१।।
आणीक कोणाचा मज नाहीं आधार । तुजवरि भार जीवें भावें ।।धृ।।
निष्ठुर अथवा होईं तूं कृपाळ । तुज सर्वकाळ विसरेंना ।।२।।
आपुलें वचन राहावें सांभाळून । तुम्हां आम्हां जाण पडिपाडु ।।३।।
ज्याच्या वचनासी अंतर पडेल । बोल तो होईल तयाकडे ।।४।।
तुम्हां आम्हां तैसें नाहीं म्हणे तुका । होशील तूं सखा जीवलगा ।।५।।

३८८२
आइक नारायणा वचन माझें खरें । सांगतों निर्धारें तुजपासीं ।।१।।
नाहीं भाव मज पडिली लोककाज । राहिलेंसे काज तुझे पायीं ।।२।।
जरि तुज कांहीं करणें उचित । तारीं तूं पतित तुका म्हणे ।।३।।

३८८३
अनाथ परदेशी हीन दीन भोळें । उगलें चि लोळे तुझे रंगीं ।।१।।
आपुलें म्हणावें मज नुपेक्षावें । प्रेमसुख द्यावें मायबापा ।।धृ।।
कासवीचे परि दृष्टी पाहें मज । विज्ञानीं उमज दावुनियां ।।२।।
तुका म्हणे तुझा जालों शरणागत । काया वाचा चित्त दुजें नाहीं ।।३।।

३८८४

पावलों पंढरी वैकुंठभवन । धन्य आजि दिन सोनियाचा।।१।।
पावलों पंढरी आनंदगजरें । वाजतील तुरें शंख भेरी ।।धृ।।
पावलों पंढरी क्षेमआलिंगनीं । संत या सज्जनीं निववीलें।।२।।
पावलों पंढरी पार नाहीं सुखा । भेटला हा सखा मायबाप ।।३।।
पावलों पंढरी येरझार खुंटली । माउली वोळली प्रेमपान्हा ।।४।।
पावलों पंढरी आपुलें माहेर । नाहीं संवसार तुका म्हणे ।।५।।

३८८५

अभयदान मज देईं गा उदारा । कृपेच्या सागरा पांडुरंगा ।।१।।
देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं । आणीक मी कांही नेणें दुजें ।।धृ।।
सेवा भक्ति भाव नेणें मी पतित । आतां माझें हित तुझ्या पायीं ।।२।।
अवघा निरोपिला तुज देहभाव । आतां मज पाव पांडुरंगा ।।३।।
तुका म्हणे तुजें नाम दिनानाथ । तें मज उचित करीं आतां ।।४।।

३८८६

लागो तुझी सोय ऐसे कोणी करी । माझे विठाबाई जननिये ।।१।।
पतितपावन म्हणविसी जरी । आवरण करीं तरी माझें ।।धृ।।
नाहीं तरी ब्रीद टाकीं सोडूनियां । न धरिसी माया जरी माझी ।।२।।
बोलिला तो बोल करावा साचार । तरि लोक बरें म्हणतील ।।३।।
करावा संसार लोक लाजे भेणें । वचनासी उणें येऊं नेदीं ।।४।।
तुम्हां आम्हां तैसें नाहीं म्हणे तुका । होशील तूं सखा जीवलग ।।५।।

३८८७

तू आम्हां सोयरा सज्जन सांगाति । तुजलागीं प्रीति चालो सदा ।।१।।
तूं माझा जिव्हाळा जीवाचा जिवलग । होसी अंतरंग अंतरींचा ।।धृ।।
गण गोत मित्र तूं माझें जीवन । अनन्यशरण तुझ्या पांयीं ।।२।।
तुका म्हणे सर्वगुणें तुझा दास । आवडे अभ्यास सदा तुझा ।।३।।

३८८८

आवडेल तैसें तुज आळवीन । वाटे समाधान जीवा तैसें ।।१।।
नाहीं येथें कांहीं लौकिकाची चाड । तुजविण गोड देवराया ।।धृ।।

पुरवीं मनोरथ अंतरींचें आर्त । धायेवरि गीत गाईं तुझे ।।२।।
तुका म्हणे लेंकी आळवी माहेरा । गाऊं या संसारा तुज तैसें ।।३।।

३८८९
माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ । गोविंद गोपाळ राम कृष्ण ।।१।।
अबद्ध चांगलें गाऊं भलतैसें । कळलें हें जैसें मायबापा।।२।।
तुका म्हणे मज न लगे वांकडें । मी तुझें बोबडें बाळ तान्हें ।।३।।

३८९०
यालागीं आवडी म्हणा राम कृष्ण । जोडा नारायण सर्वकाळ ।।१।।
सोपें हें साधन लाभ येतो घरा । वाचेसी उच्चारा राम हरि ।।धृ।।
न लगती कष्ट न लगे सायास । करावा अभ्यास विठ्ठलाचा ।।२।।
न लगे तप तीर्थ करणें महादान । केल्या एक मन जोडे हरि ।।३।।
तुका म्हणे कांहीं न वेचितां धन । जोडे नारायण नामासाटीं ।।४।।

३८९१
झांकूनियां नेत्र काय जपतोसी । जंव नाहीं मानसीं प्रेमभाव ।।१।।
रामनाम म्हणा उघड मंत्र जाणा । चुकती यातना गर्भवास ।।धृ।।
मंत्र यंत्र संध्या करिसी जडीबुटी । तेणें भूतसृष्टी पावसील ।।२।।
तुका म्हणे ऐक सुंदर मंत्र एक । भवसिंधुतारक रामनाम ।।३।।

३८९२
पापिया चांडाळा हरिकथा नावडे । विषयालागीं आवडें गाणें त्याला ।।१।।
ब्राम्हणा दक्षणा देतां रडे रुका । विषयालागीं फुका लुटीतसे ।।धृ।।
वीतभरि लंगोटी नेदी अतीताला । खीरम्या देतो शाला भोरप्यासी ।।२।।
तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरि । जातो यमपुरी भोगावया ।।३।।

३८९३
क्षुधारथी अन्नें दुष्काळें पीडिलें । मिष्टान्न देखिलें तेणें जैसें ।।१।।
तैसें तुझे पायीं लांचावलें मन । झुरे माझा प्राण भेटावया ।।धृ।।
मांजरें देखिला लोणियांचा गोळा । लावुनियां डोळा बैसलेंसे ।।२।।
तुका म्हणे आतां झडी घालूं पाहें । पांडुरंगे माये तुझे पायीं ।।३।।

३८९४
स्वामीसी संकट पडे जे गोष्टीचें । काय त्या प्रेमाचें सुख मज ।।१।।
दुःखवीना चित्त तुझें नारायणा । कांहीं च मागेना तुजपासीं ।।धृ।।
रिद्धि सिद्धि मोक्ष संपत्ति विलास । सोडियेली आस याची जीवें ।।२।।
तुका म्हणे एके वेळे देईं भेटी । वोरसोनि पोटीं आलिंगावें ।।३।।

३८९५
देव तिंहीं बळें धरिला सायासें । करूनियां नास उपाधीचा ।।१।।
पर्वपक्षी धातु धिःकारिलें जन । स्वयें जनार्दन ते चि जाले ।।२।।
तुका म्हणे यासी न चले तांतडी । अनुभवें गोडी येइल कळों ।।३।।

३८९६
भेटीवांचोनियां दुजें नाहीं चित्तीं । येणें काकुलती याजसाटीं ।।१।।
भेटोनियां बोलें आवडीचें गुज । आनंदाच्या भोजें जेवूं संगें ।।धृ।।
मायलेकरासीं नाहीं दुजी परि । जेऊं बरोबरी बैसोनियां ।।२।।
तुका म्हणे ऐसें अंतरींचें आर्त । यावें जी त्वरित नारायणा ।।३।।

३८९७
आविसाचे आसे गळ गिळी मासा । फुटोनियां घसा मरण पावे ।।१।।
मरणाचे वेळे करी तळमळ । आठवी कृपाळ तये वेळीं ।।२।।
अंतकाळीं ज्याच्या नाम आलें मुखा । तुका म्हणे सुखा पार नाहीं ।।३।।

३८९८
जायाचें शरीर जाईल क्षणांत । कां हा गोपिनाथ पावे चि ना ।।१।।
कृपेचे सागर तुम्ही संत सारे । निरोप हा फार सांगा देवा ।।धृ।।
अनाथ अज्ञान कोणी नाहीं त्यासि । पायापें विठ्ठला ठेवीं मज ।।२।।
तुका म्हणे ऐसें करावें निर्वाण । मग तो रक्षण करिल माझें ।।३।।

३८९९
त्रासला हा जीव संसारींच्या सुखा । तुजविण सखा नाहीं कोणी ।।१।।
ऐसें माझें मनीं वाटे नारायणा । घालावी चरणावरि मिठी ।।धृ।।
कइं तें सुंदर देखोनि रूपडें । आवडीच्या कोडें आळंगीन ।।२।।
नाहीं पूर्व पुण्य मज पापरासी । म्हणोनि पायांसी अंतरलों ।।३।।

अलभ्य लाभ कैंचा संचितावेगळा । विनवी गोपाळा दास तुका ।।४।।

३९००
मोलाचें आयुष्य वेचुनियां जाय । पूर्वपुण्यें होय लाभ याचा ।।१।।
अनंतजन्मींचे शेवट पाहतां । नर देह हातां आला तुझ्या ।।धृ।।
कराल ते जोडी येईल कार्यासी । ध्यावें विठ्ठलासी सुखालागीं ।।२।।
सांचलिया धन होईल ठेवणें । तैसा नारायण जोडी करा ।।३।।
करा हरिभक्ती परलोकीं ये कामा । सोडवील यमापासोनियां ।।४।।
तुका म्हणे करा आयुष्याचें मोल । नका वेचूं बोल नामेंविण ।।५।।

३९०१
काय सुख आहे वाउगें बोलतां । ध्यातां पंढरिनाथा कष्ट नाहीं ।।१।।
सर्वकाळ वाचे उच्चारितां हरि । तया सुखा सरि पाड नाहीं ।।धृ।।
रामकृष्णरंगीं रसना रंगली । अमृताची उकळी नाम तुझें ।।२।।
तुका म्हणे धन्य तयाचें वदन । जया नारायण ध्यानीं मनीं ।।३।।

३९०२
कीर्त्तनाच्या सुखें सुखी होय देव । पंढरीचा राव संगीं आहे ।।१।।
भक्त जाय सदा हरि कीर्ति गात । नित्यसेवें अनंत हिंडतसे ।।धृ।।
त्रैलोक्य भ्रमण फिरत नारद । त्यासंगें गोविंद फिरतसे ।।२।।
नारद मंजुळ सुस्वरें गीत गाये । मागाअ चालताहे संगें हरि ।।३।।
तुका म्हणे त्याला गोडी कीर्त्तनाची । नाहीं आणिकांची प्रीति ऐसी ।।४।।

३९०३
बाळेंविण माय क्षणभरि न राहे । न देखतां होये कासाविस ।।१।।
आणिक उदंड बुझाविती जरी । छंद त्या अंतरीं माउलीचा ।।धृ।।
नावडती तया बोल आणिकाचे । देखोनियां नाचे माय दृष्टी ।।२।।
तुका म्हणे माझी विठ्ठल माउली । आणिकांचे बोलीं चाड नाहीं ।।३।।

३९०४
हरिचिया भक्ता नाहीं भयचिंता । दुःखनिवारिता नारायण ।।१।।
न लगे वाहणें संसारउद्वेग । जडों नेदी पांग देवराया ।।धृ।।
असों द्यावा धीर सदा समाधान । आहे नारायण जवळी च ।।२।।

तुका म्हणे माझा सखा पांडुरंग । व्यापियेलें जग तेणें एकें ।।३।।

३९०५
दसरा दिवाळी तो चि आम्हां सन । सखे संतजन भेटतील ।।१।।
आमुप जोडल्या सुखाचिया राशी । पार या भाग्यासी न दिसे आतां ।।धृ।।
धन्य दिवस आजि जाला सोनियाचा । पिकली हे वाचा रामनामें ।।२।।
तुका म्हणे काय होऊं उतराई । जीव ठेऊं पांयीं संतांचिये ।।३।।

३९०६
खिस्तीचा उदीम ब्राम्हण कलयुगीं । महारवाडीं मांगीं हिंडतसे ।।१।।
वेवसाव करितां पर्वत मांगासी । ते पैं विटाळासी न मनिती ।।धृ।।
मांगिणीशीं नित्य करीतसे लेखा । तोंडावरि थुंका पडतसे ।।२।।
आशा माया रांडा नांव हें कागदीं । आठवीना कधीं नारायण ।।३।।
तुका म्हणे देह जालें पराधीन । पांडुरंगाविण गति नाहीं ।।४।।

३९०७
जगीं ब्रम्हक्रिया खिस्तीचा व्यापार । हिंडे घरोघर चांडाळाचे ।।१।।
आंतेजा खिचडी घेताती मागून । गाळिप्रधानि मायबहिणी ।।धृ।।
उत्तमकुळीं जन्म क्रिया अमंगळ । बुडविलें कुळ उभयतां ।।२।।
तुका म्हणे ऐसी कलयुगाची चाली । स्वार्थें बुडविलीं आचरणें ।।३।।

३९०८
हा चि माझा नेम धरिला हो धंदा । यावरि गोविंदा भेटी द्यावी ।।१।।
हा चि माझा ध्यास सदा सर्वकाळ । न्यावयासी मूळ येसी कधीं ।।धृ।।
डोळियांची भूक पहातां श्रीमुख । आलिंगणे सुख निवती भुजा ।।२।।
बहु चित्त ओढे तयाचिये सोई । पुरला हाकांहीं नवस नेणें ।।३।।
बहुबहु काळ जालों कासावीस । वाहिले बहुवस कळेवर ।।४।।
तुका म्हणे आतां पाडावें हें ओझें । पांडुरंगा माझें इयावरि ।।५।।

३९०९
जेणें माझें हित होइल तो उपाव । करिसील भाव जाणोनियां ।।१।।
मज नाहीं सुख दुःख तया खंती । भावना हे चित्तीं नाना छंदें ।।धृ।।
तोडीं हे संबंध तोडीं आशापाश । मज हो सायास न करितां ।।२।।

तुका म्हणे मी तों राहिलों निश्चिंत । कवळोनि एकांतसुख तुझें ।।३।।

३९१०
शिखा सूत्र तुझा गुंतला जमान । तंववरि तूं जाण श्रुतिदास ।।१।।
त्याची तुज कांहीं चुकतां चि नीत । होसील पतित नरकवासी ।।धृ।।
बहु जालासी चतुर शाहणा । शुद्ध आचरणा चुकों नको ।।२।।
शिखा सूत्र याचा तोडीं तूं संबंध । मग तुज बाध नाहींनाहीं ।।३।।
तुका म्हणे तरि वर्त्तूनि निराळा । उमटती कळा ब्रम्हींचिया ।।४।।

३९११
पतिव्रता ऐसी जगामध्यें मात । भोगी पांच सात अंधारीं ते ।।१।।
भ्रतारासी लेखी श्वानाचे समान । परपुरुषीं जाण संभ्रम तो ।।२।।
तुका म्हणे तिच्या दोषा नाहीं पार । भोगील अघोर कुंभपाक ।।३।।

३९१२
सिंदळीसी नाहीं पोराची पैं आस । सांटविल्याबीजास काय करी ।।१।।
अथवा सेतीं बीज पेरिलें भाजोन । सारा देइल कोण काका त्याचा ।।२।।
तुका म्हणे नाहीं खायाची ते चाड । तरि कां लिगाड करुनी घेतोस ।।३।।

३९१३
चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवितें हरीविण ।।१।।
देखवी दाखवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ।।धृ।।
मानसाची देव चालवी अहंता । मी चि एक कर्त्ता म्हणों नये ।।२।।
वृक्षाचीं हीं पानें हाले त्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ।।३।।
तुका म्हणे विठो भरला सबाहीं । तया उणें कांहीं चराचरीं ।।४।।

३९१४
मायारूपें ऐसें मोहिलेंसे जन । भोगिती पतन नामाकर्में।।१।।
काय याची प्रीती करितां आदर । दुरावितां दूर तें चि भलें ।।धृ।।
नाना छंद अंगीं बैसती विकार । छळियेले फार तपोनिधि ।।२।।
तुका म्हणे ऐसें सिकवितों तुज । आतां धरी लाज मना पुढें ।।३।।

३९१५

जेजे कांहीं मज होईल वासना । तेते नारायणा व्हावें तुम्हीं ।।१।।
काय भाव एक निवडूं निराळा । जाणसी तूं कळा अंतरींची ।।धृ।।
तुजविण मज कोण आहे सखा । जें सांगा आणिकां जीवभाव ।।२।।
अवघें पिशुन जालें असे जन । आपपर कोण नाठवे हें ।।३।।
तुका म्हणे तूं चि जीवांचें जीवन । माझें समाधान तुझे हातीं ।।४।।

३९१६
कैसी करूं आतां सांग तुझी सेवा । शब्दज्ञानें देवा नाश केला ।।१।।
आतां तुझें वर्म न कळे अनंता । तुज न संगतां बुडूं पाहें ।।धृ।।
संध्या स्नान केली आचाराची नासी । काय तयापासीं म्हणती एक ।।२।।
बुडविली भक्ति म्हणीते पाषाण । पिंडाचें पाळण स्थापुनियां ।।३।।
न करावी कथा म्हणती एकादशी। भजनाची नासी मांडियेली ।।४।।
न जावें देउळा म्हणती देवघरीं । बुडविलें या परी तुका म्हणे ।।५।।

३९१७
नमोनमो तुज माझें हें कारण । काय जालें उणें करितां स्नान ।।१।।
संतांचा मारग चालतों झाडूनि । हो का लाभ हानि कांहींतरि ।।धृ।।
न करिसी तरि हेंचि कोडें मज । भक्ति गोड काज आणीक नाहीं ।।२।।
करीं सेवा कथा नाचेन रंगणीं । प्रेमसुखधणी पुरेल तों ।।३।।
महाद्वारीं सुख वैष्णवांचे मेळीं । वैकुंठ जवळी वसे तेथें ।।४।।
तुका म्हणे नाहीं मुक्तिसवें चाड । हें चि जन्म गोड घेतां मज ।।५।।

३९१८
होऊनि संन्यासी भगवीं लुगडीं । वासना न सोडी विषयांची ।।१।।
निंदिती कदान्न इच्छिती देवान्न । पाहाताती मान आदराचा ।।२।।
तुका म्हणे ऐसें दांभिक भजन । तया जनार्दन भेटे केवीं ।।३।।

३९१९
लांबवूनि जटा नेसोनि कासोटा । अभिमान मोटा करिताती ।।१।।
सर्वांगा करिती विभूतिलेपन । पाहाती मिष्टान्न भक्षावया ।।२।।
तुका म्हणे त्यांचा नव्हे हा स्वधर्म । न कळतां वर्म मिथ्यावाद ।।३।।

३९२०

कान फाडूनियां मुद्रा तें घालिती । नाथ म्हणविती जगामाजी ।।१।।
घालोनियां फेरा मागती द्रव्यासी । परि शंकरासी नोळखती ।।२।।
पोट भरावया शिकती उपाय । तुका म्हणे जाय नर्क लोका ।।३।।

३९२१
कौडीकौडीसाटीं फोडिताती शिर । काढूनि रुधिर मलंग ते ।।१।।
पांघरती चर्म लोहाची सांकळी । मारिती आरोळी धैर्यबळें ।।२।।
तुका म्हणे त्यांचा नव्हे चि स्वधर्म । न कळे चि वर्म गोविंदाचें ।।३।।

३९२२
दाढी डोई मुंडी मुंडुनियां सर्व । पांघुरति बरवें वस्त्र काळें ।।१।।
उफराटी काठी घेऊनियां हातीं । उपदेश देती सर्वत्रासी।।२।।
चाळवुनी रांडा देउनियां भेष । तुका म्हणे त्यास यम दंडी ।।३।।

३९२३
होउनी जंगम विभूती लाविती । शंख वाजविती घरोघरीं ।।१।।
शिवाचें निर्माल्य तीर्थां न सेविती । घंटा वाजविती पोटासाठीं ।।२।।
तुका म्हणे त्यासी नाहीं शिवभक्ति । व्यापार करिती संसाराचा ।।३।।

३९२४
लावूनियां मुद्रा बांधोनियां कंठीं । हिंडे पोटासाटीं देशोदेशीं ।।१।।
नेसोनि कोपीन शुभ्रवर्ण जाण । पहाती पक्वान्न क्षेत्रींचें तें ।।२।।
तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यापाशीं गोविंद नाहीं नाहीं ।।३।।

३९२५
ऐसे नाना भेष घेऊनी हिंडती । पोटासाटीं घेती प्रतिग्रह ।।१।।
परमार्थासी कोण त्यजी संवसार । सांगापां साचार नांव त्याचें ।।२।।
जन्मतां संसार त्यजियेला शुकें । तोचि निष्कळंक तुका म्हणे ।।३।।

३९२६
स्त्रिया पुत्र कळत्र हें तंव मायावंत । शेवटींचा अंत नाहीं कोणी ।।१।।
यमाचिये हातीं बांधोनियां देती । भूषणें ही घेती काढूनियां ।।२।।
ऐसिया चोरांचा कैसा हा विश्वास । धरिली तुझी कास तुका म्हणे ।।३।।

३९२७
न लगती मज शब्दब्रम्हज्ञान । तुझिया दर्शनावांचूनियां।।१।।
म्हणऊनि तुझें करितों चिंतन । नावडे वचन आणिकांचें ।।धृ।।
काय ते महत्वी करावी मान्यता । तुज न देखतां पांडुरंगा ।।२।।
तुका म्हणे तुज दिधल्यावांचूनि । न राहे त्याहूनि होइन वेडा ।।३।।

३९२८
तुझा म्हणोनियां दिसतों गा दीन । हा चि अभिमान सरे तुझा ।।१।।
अज्ञान बाळका कोपली जननी । तयासी निर्वाणीं कोण पावे ।।धृ।।
तैसा विठो तुजविण परदेशी । नको या दुःखासीं गोऊं मज ।।२।।
तुका म्हणे मज सर्व तुझी आशा । अगा जगदीशा पांडुरंगा ।।३।।

३९२९
जन्म मृत्यू फार जाले माझ्या जीवा । ऐक माझा धांवा पांडुरंगा ।।१।।
सिणलों बहुत करितां येरझारा । रखुमाईच्या वरा पावें वेगीं ।।२।।
तुका म्हणे तूं गा पतितपावन । घेईं माझा सीण जन्मांतर ।।३।।

३९३०
आतां माझ्या दुःखा कोण हो सांगाती । रखुमाईचा पति पावे चि ना ।।१।।
कायविधा त्यानें घातलीसे रेखा । सुटका या दुःखा न होय चि ।।२।।
तुका म्हणे माझी विसरूं नको चिंता । अगा पंढरिनाथा पाव वेगी ।।३।।

३९३१
पंढरीसी जावें ऐसें माझें मनीं । विठाई जननी भेटे केव्हां ।।१।।
न लगे त्याविण सुखाचा सोहळा । लागे मज ज्वाळा अग्निचिया ।।२।।
तुका म्हणे त्याचे पाहिलिया पाय । मग दुःख जाय सर्व माझें ।।३।।

३९३२
तन मन धन दिलें पंढरिराया । आतां सांगावया उरलें नाहीं ।।१।।
अर्थचाड चिंता नाहीं मनीं आशा । तोडियेला फांसा उपाधीचा ।।२।।
तुका म्हणे एक विठोबाचें नाम । आहे जवळी दाम नाहीं रुका ।।३।।

३९३३
आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ।।१।।
देह हें देवाचें धन कुबेराचें । तेथें मनुष्याचें काय आहे ।।धृ।।
देता देवविता नेता नेवविता । येथ याची सत्ता काय आहे ।।२।।
निमित्याचा धनी केला असे झणी । माझेंमाझें म्हणोनि व्यर्थ गेला ।।३।।
तुका म्हणे कां रे नाशवंतासाटीं । देवासवें आटी पाडितोसी ।।४।।

३९३४
माय वनीं धाल्या धाये । गर्भ आंवतणें न पाहें।।१।।
तैसें पूजितां वैष्णव । सुखें संतोषतो देव ।।धृ।।
पुत्राच्या विजयें । पिता सुखातें जाये ।।२।।
तुका म्हणे अमृतसिद्धि । हरे क्षुधा आणि व्याधि ।।३।।

३९३५
तुझें अंगभूत । आम्ही जाणतों समस्त ।।१।।
येरा वाटतसे जना । गुढारसें नारायणा ।।धृ।।
ठावा थारा मारा । परचिया संव चोरा ।।२।।
तुका म्हणे भेदा । करुनि करितों संवादा।।३।।

३९३६
तुज दिला देह । आजूनि वागवितों भय ।।१।।
ऐसा विश्वासघातकी । घडली कळतां हे चुकी ।।धृ।।
बोलतों जें तोंडें । नाहीं अनुभविलें लंडें ।।२।।
दंड लाहें केला । तुका म्हणे जी विठ्ठला ।।३।।

३९३७
माते लेकरांत भिन्न । नाहीं उत्तरांचा सीन ।।१।।
धाडींधाडीं वो भातुकें । रंजविल्याचें कौतुकें ।।धृ।।
करुनि नवल । याचे बोलिलों ते बोल ।।२।।
तुका म्हणे माते । पांडुरंगे कृपावंते।।३।।

३९३८
जरि न भरे पोट । तरि सेवूं दरकूट ।।१।।

परि न घलूं तुज भार । हा चि आमुचा निर्धार ।।धृ।।
तुझें नाम अमोलिक। नेणती हे ब्रम्हादिक ।।२।।
ऐसें नाम तुझें खरें । तुका म्हणे भासे पुरें।।३।।

३९३९
सर्वस्वाची साटी । तरि च देवासवें गांठी ।।१।।
नाहीं तरी जया तैसा । भोग भोगवील इच्छा ।।धृ।।
द्यावें तें चिं घ्यावें । म्हणउनि घ्यावें जीवें ।।२।।
तुका म्हणे उरी । मागें उगवितां बरी ।।३।।

३९४०
गाढव शृंगारिलें कोडें । कांहीं केल्या नव्हे घोडें।।१।।
त्याचें भुंकणें न राहे । स्वभावासी करील काये ।।धृ।।
श्वान शिबिके बैसविलें । भुंकतां न राहे उगलें ।।२।।
तुका म्हणे स्वभावकर्म । कांहीं केल्या न सुटे धर्म ।।३।।

३९४१
सेंकीं हें ना तेंसें जालें । बोलणें तितुकें वांयां गेलें।।१।।
स्वयें आपण चि रिता । रडे पुढिलांच्या हिता ।।धृ।।
सुखसागरीं नेघे वस्ती । अंगीं ज्ञानपणाची मस्ती ।।२।।
तुका म्हणे गाढव लेखा । जेथें भेटेल तेथें ठोका ।।३।।

३९४२
आवडे सकळां मिष्टान्न । रोग्या विषा त्यासमान।।१।।
दर्पण नावडे तया एका । ठाव नाहीं ज्याच्या नाका ।।२।।
तुका म्हणे तैशा खळा । उपदेशाचा कांटाळा ।।३।।

३९४३
अखंड संत निंदी । ऐसी दुर्जनाची बुद्धि ।।१।।
काय म्हणावें तयासी । तो केवळ पापरासि ।।धृ।।
जो स्मरे रामराम । तयासी म्हणावें रिकामें ।।२।।
जो तीर्थव्रत करी । तयासी म्हणावें भिकारी ।।३।।
तुका म्हणे विंच्वाची नांगी । तैसा दुर्जन सर्वांगीं।।४।।

३९४४
या रे नाचों अवघेजण । भावें प्रेमें परिपूर्ण ।।१।।
गाऊं पंढरीचा राणा । क्षेम देऊनिं संतजना ।।धृ।।
सुख साधु सुखासाटीं । नाम हरिनाम बोभाटीं ।।२।।
प्रेमासाटीं तो उदार । देतां नाहीं सानाथोर ।।३।।
पापें पळालीं बापुडीं । काळ झाला देशधडी।।४।।
तुका म्हणे धन्य काळ । आजि प्रेमाचा सुकाळ ।।४।।

३९४५
उपजलों मनीं । हे तों स्वामीची करणी ।।१।।
होइल प्रसादाचें दान । तरि हें कवुतक पाहेन ।।धृ।।
येइल अभय जरि । तरि हे आज्ञा वंदिन शिरीं ।।२।।
भक्तिप्रयोजना । प्रयोजावें बंदिजना।।३।।
यश स्वामिचिये शिरीं । दास्य करावें किंकरीं ।।४।।
तुका म्हणे आळीकरा । त्यासी योजावें उत्तरा ।।५।।

३९४६
माझें मन पाहे कसून । परि चित्त न ढळे तुजपासून।।१।।
कापुनि देइन शिर । पाहा कृपण कीं उदार ।।धृ।।
मजवरि घालीं घण । परि मी न सोडीं चरण ।।२।।
तुका म्हणे अंतीं । तुजवांचूनि नाहीं गति ।।३।।

३९४७
भूमीवरि कोण ऐसा । गांजूं शके हरिच्या दासा।।१।।
सुखें नाचा हो कीर्त्तनीं । जयजयकारें गर्जा वाणी ।।धृ।।
काळा सुटे पळ । जाती दुरितें सकळ ।।२।।
तुका म्हणे चित्तीं । सांगूं मानाची हे निति ।।३।।

३९४८
जातीचा ब्राम्हण । न करितां संध्यास्नान ।।१।।
तो एक नांनवाचा ब्राम्हण । होय हीनाहूनि हीन ।।धृ।।
सांडुनियां शाळिग्राम । नित्य वेश्येचा समागम ।।२।।

नेघे संतांचें जो तीर्थ । अखंड वेश्येचा जो आर्थ ।।३।।
तुका म्हणे ऐसे पापी । पाहूं नका पुनरपि ।।४।।

३९४९
जालों जीवासी उदार । त्यासी काय भीडभार ।।१।।
करीन आडक्या घोंगडें । उभें बाजारीं उघडें ।।धृ।।
जोंजों धरिली भीड । तोंतों बहु केली चीड ।।२।।
तुका म्हणे मूळ । तुझें उच्चारीन कुळ ।।३।।

३९५०
आम्हां हें चि काम । वाचे गाऊं तुझें नाम ।।१।।
आयुष्य मोलाची हे घडी । धरूं पायांची आवडी ।।धृ।।
अमृताची खाणी । याचे ठायीं वेचूं वाणी ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगा । माझ्या जिवाच्या जिवलगा ।।३।।

३९५१
मिळे हरिदासांची दाटी । रीग न होय शेवटी ।।१।।
तेथें म्या काय करावें । माझें कोणें आइकावें ।।धृ।।
कैसें तुज लाजवावें । भक्त म्हणोनियां भावें ।।२।।
नाचतां नये ताळीं । मज वाजवितां टाळी ।।३।।
अंतीं मांडिती भुषणें भूषणे । शरीर माझें दैन्य वाणें ।।४।।
तुका म्हणे कमळापति । मज न द्यावें त्या हातीं।।५।।

३९५२
जाणों नेणों काय । चित्तीं धरूं तुझे पाय ।।१।।
आतां हें चि वर्म । गाऊं धरूनियां प्रेम ।।धृ।।
कासया सांडूं मांडूं। भाव हृदयीं च कोंडूं ।।२।।
तुका म्हणे देवा । जन्मोजन्मीं मागें सेवा।।३।।

३९५३
जाळें घातलें सागरीं । बिंदु न राहे भीतरी ।।१।।
तैसें पापियाचें मन । तया नावडे कीर्त्तन ।।धृ।।
गाढव गंगेसी न्हाणिलें। जाउनि उकरड्यावरि लोळे ।।२।।

प्रीती पोसिलें काउळें । जाउनि विष्ठेवरी लोळे ।।३।।
तुका म्हणे तैसी हरी । कीरव्या नावडे कस्तुरी।।४।।

३९५४
तरलों म्हणऊनि धरिला ताठा । त्यासी चळ जाला फांटा ।।१।।
वांयांविण तुटे दोड । मान सुख इच्छी मांड ।।धृ।।
ग्वाहीविण मात । स्थापी आपुली स्वतंत्र ।।२।।
तुका म्हणे ऐसीं किती । नरका गेलीं अधोगती ।।३।।

३९५५
कठिण नारळाचें अंग । बाहेरी भीतरी तें चांग ।।१।।
तैसा करी कां विचार । शुद्ध कारण अंतर ।।धृ।।
वरि कांटे फणसफळा । माजि अंतरीं जिव्हाळा ।।२।।
ऊंस बाहेरी कठिण काळा । माजी रसाचा जिव्हाळा ।।३।।
मिठें रुचविलें अन्न । नये सतंत कारण ।।४।।

३९५६
सकळतीर्थांहूनि । पंढरीनाथ मुगुटमणी ।।१।।
धन्यधन्य पंढरी । जे मोक्षाची अक्षय पुरी ।।धृ।।
विश्रांतीचा ठाव । तो हा माझा पंढरीराव ।।२।।
तुका म्हणे सांगतों स्पष्ट । दुजी पंढरी वैकुंठ।।३।।

३९५७
भाते भरूनि हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे।।१।।
अनंतनामाची आरोळी । एक एकाहूनि बळी ।।धृ।।
नाहीं आणिकांचा गुमान । ज्याचे अंकित त्यावांचून ।।२।।
रिद्धि सिद्धि ज्या कामारी। तुका म्हणे ज्याचे घरीं ।।३।।

३९५८
ज्याची जया आस । तयाजवळी त्या वास ।।१।।
येर जवळी तें दुरी । धेनु वत्स सांडी घरीं ।।धृ।।
गोडी प्रियापाशीं । सुख उपजे येरासी ।।२।।
तुका म्हणे बोल । घडे तयाठायीं मोल।।३।।

३९५९
बाळ माते निष्ठुर होये । परि तें स्नेह करीत आहे।।१।।
तैसा तूं गा पुरुषोत्तमा । घडी न विसंबसी आम्हां ।।धृ।।
नेणती भागली । कडे घेतां अंग घाली ।।२।।
भूक साहे ताहान । त्याचें राखे समाधान ।।३।।
त्याच्या दुःखें धाये । आपला जीव देऊं पाहे।।४।।
नांवें घाली उडी । तुका म्हणे प्राण काढी ।।५।।

३९६०
हें तों टाळाटाळीं । परि भोवताहे कळी ।।१।।
बरें नव्हेल शेवटीं । भय असों द्यावें पोटीं ।।धृ।।
मुरगाळिला कान । समांडिलें समाधान ।।२।।
धन्य म्हणे आतां । येथें नुधवा माथां।।३।।
अबोलणा तुका । ऐसें कांहीं लेखूं नका ।।४।।

३९६१
किती लाजिरवाणा । मरे उपजोनि शाहाणा ।।१।।
एका घाईं न करीं तुटी । न निघें दवासोई भेटी ।।धृ।।
सोसूनि आबाळी । घायाळ तें ढुंग चोळी ।।२।।
सावध करी तुका । म्हणे निजले हो आइका ।।३।।

३९६२
कुरुवंडी करीन काया । वरोनि पायां गोजिरिया ।।१।।
बैसलें तें रूप डोळां । मन चाळा लागलें ।।धृ।।
परतें न सरवे दुरि । आवडी पुरी बैसली ।।२।।
तुका म्हणे विसावलों । येथें आलों धणीवरि ।।३।।

३९६३
साधनाचे कष्ट मोटे । येथें वाटे थोर हें ।।१।।
मुखें गावें भावें गीत । सर्व हित बैसलिया ।।धृ।।
दासा नव्हे कर्म दान। तन मन निश्चळ ।।२।।
तुका म्हणे आत्मनिष्ट । भागे चेष्ट मनाची।।३।।

३९६४
घेतां आणिकांचा जीव । तेव्हां कींव कराना ।।१।।
आपलें तें वरदळ नेदा । हें गोविंदा कृपणता ।।धृ।।
सेवा तरी इच्छा सांग । चोरिलें अंग साहेना ।।२।।
तुका म्हणे अरे धन्या । निसंतान्या विठोबा ।।३।।

३९६५
आम्हां केलें गुणवंत । तें उचित राखावें ।।१।।
तुम्हांसी तों चाड नाहीं । आणिकां कांहीं सुखदुःखां ।।धृ।।
दासांचें तें देखों नये । उणें काय होइल तें ।।२।।
तुका म्हणे विश्वंभरा । दृष्टि करा सामोरी ।।३।।

३९६६
अगत्य ज्या नरका जाणें । कीर्तनीं तों वीट मानी।।१।।
नावडेसा जाला बाप । आलें पाप वस्तीसि ।।धृ।।
नारायण नाहीं वाचे । ते यमाचे अंदण ।।२।।
तुका म्हणे अभक्तासी । माता दासी जग झोडी ।।३।।

३९६७
आम्ही हरिचे हरिचे । सुर कळिकाळा यमाचे ।।१।।
नामघोष बाण साचे । भाले तुळसी मंजुरेचे ।।धृ।।
आम्ही हरिचे हरिचे दास । कलिकाळावरि घालूं कास ।।२।।
आम्ही हरिचे हरिचे दूत । पुढें पळती यमदूत ।।३।।
तुका म्हणे आम्हांवरी । सुदर्शन घरटी करी ।।४।।

३९६८
देवाचिये पायीं वेचों सर्व शक्ती । होतील विपत्ति ज्याज्या कांहीं ।।१।।
न घेईं माझी वाचा पुढें कांहीं वाव । आणि दुजे भाव बोलायाचे ।।धृ।।
मनाचे वांटणी चित्ताचा विक्षेप । राहो हा अनुताप आहे तैसा ।।२।।
तुका म्हणे घेईं विठ्ठलाचा छंद । आनंदाचा कंद विस्तारेल ।।३।।

३९६९

पांडुरंगा आतां ऐका हे विनंती । बहु माझे चित्तीं भय वाटे ।।१।।
नाहीं आइकिलें संतांचिया मुखें । तें या मज लोकें भडसाविलें ।।धृ।।
विष्णुदासां गति नाहीं तरावया । म्हणती गेले वांयां कष्टत ही ।।२।।
धिक्कारिती मज करितां कीर्तन । काय सांगों शीण ते काळिचा ।।३।।
तुका म्हणे मज वाटतें उदास । काय करूं यास पांडुरंगा ।।४।।

३९७०
वेढा वेढा रे पंढरी । मोर्चे लावा भीमातिरीं ।।१।।
चलाचला संत जन । करा देवासी भांडण ।।धृ।।
लुटालुटा पंढरपूर। धरा रखुमाईचा वर ।।२।।
तुका म्हणे चला । घाव निशानी घातला।।३।।

३९७१
पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवासी आठविती ।।१।।
प्रल्हादासी पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनीं नारायण ।।धृ।।
सुदामा ब्राम्हण दरिद्रें पीडिला । नाहीं विसरला पांडुरंग ।।२।।
तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर जाले तरी ।।३।।

३९७२
निजसेजेची अंतुरी । पादलिया कोण मारी ।।१।।
तैसा आम्हासी उबगतां । तुका विनवितो संतां ।।धृ।।
मूल मांडीवरी हागलें । तें बा कोणे रें त्यागिलें ।।२।।
दासी कामासी चुकली । ते बा कोणें रें विकली ।।३।।
पांडुरंगाचा तुका पापी । संतसाहें काळासि दापी ।।४।।

३९७३
श्वानाचियापरी लोळें तुझ्या दारीं । भुंकों हरिहरि नाम तुझें ।।१।।
भुंकीं उठीं बैसें न वजायें वेगळा । लुडबुडीं गोपाळा पायांपाशीं ।।२।।
तुका म्हणे आम्हां वर्म आहे ठावें । मागेन ते द्यावें प्रेमसुख ।।३।।

३९७४
सोइरे धाइरे दिल्याघेतल्याचे । अंत हें काळीचें नाहीं कोणी ।।१।।
सख्या गोत्रबहिणी सुखाचे संगती । मोकलुनी देती अंतकाळीं ।।धृ।।

आपुलें शरीर आपुल्यासी पारिखें । परावीं होतील नवल काई ।।२।।
तुका म्हणे आतां सोड यांची आस । धरीं रे या कास पांडुरंगा ।।३।।

३९७५
जन्ममरणांची कायसी चिंता । तुझ्या शरणागतां पंढरीराया ।।१।।
वदनीं तुझें नाम अमृतसंजीवनी । असतां चक्रपाणी भय कवणा ।।धृ।।
हृदयीं तुझें रूप बिंबलें साकार । तेथें कोण पार संसाराचा ।।२।।
तुका म्हणे तुझ्या चरणांची पाखर । असतां कळिकाळ पायां तळीं ।।३।।

३९७६
क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ।।१।।
तृण नाहीं तेथें पडे दावाग्नि । जाय तो विझोनि आपसया ।।२।।
तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप ।।३।।

३९७७
याति गुणें रूप काय ते वानर । तयांच्या विचारें वर्ते राम ।।१।।
ब्रम्हहत्यारासि पातकी अनेक । तो वंद्य वाल्मीक तिहीं लोकीं ।।२।।
तुका म्हणे नव्हे चोरीचा व्यापार । म्हणा रघुवीर वेळोवेळां ।।३।।

३९७८
पानें जो खाईल बैसोनि कथेसी । घडेल तयासी गोहत्या ।।१।।
तमाखू ओढूनि काढला जो धूर । बुडेल तें घर तेणें पापें ।।धृ।।
कीर्तनीं बडबड करील जो कोणी । बेडुक होउनी येइल जन्मा ।।२।।
जयाचिये मनीं कथेचा कंटाळा । होती त्या चांडाळा बहु जाच ।।३।।
जाच होती पाठी उडती यमदंड । त्याचें काळें तोंड तुका म्हणे ।।४।।

३९७९
कामांमध्यें काम । कांहीं म्हणा रामराम । जाइल भवश्रम । सुख होईल दुःखाचें ।।१।।
कळों येईल अंतकाळीं । प्राणप्रयाणाचे वेळीं । राहाती निराळीं । रांडापोरें सकळ ।।धृ।।
जीतां जीसी जैसा तैसा । पुढें आहे रे वोळसा । उगवुनि फांसा । काय करणें तें करीं ।।२।।

केलें होतें या चि जन्में । अवघें विठोबाच्या नामें । तुका म्हणे कर्म ।
जाळोनियां तरसी ।।३।।

३९८०
तुज मज ऐसी परी । जैसे तरंग सागरीं ।।१।।
दोहींमाजी एक जाणा । विठ्ठल पंढरीचा राणा ।।धृ।।
देव भक्त ऐसी बोली । जंव भ्रांति नाहीं गेली ।।२।।
तंतु पट जेवीं एक । तैसा विश्वेंसीं व्यापक ।।३।।

३९८१
कोठें गुंतलासी योगीयांचे ध्यानीं । आनंदकीर्तनीं पंढरीच्या ।।१।।
काय काज कोठें पडलीसे गुंती । कानीं न पडती बोल माझे ।।धृ।।
काय शेषनशयनीं सुखनिद्रा आली । सोय कां सांडिली तुम्ही देवा ।।२।।
तुका म्हणे कोठें गुंतलेती सांगा । किती पांडुरंगा वाट पाहूं ।।३।।

३९८२
माउलीसी सांगे कोण । प्रेम वाढवी ताहानें ।।१।।
अंतरींचा कळवळा । करीतसे प्रतिपाळा ।।धृ।।
मायबापाची उपमा। तुज देऊं मेघश्यामा ।।२।।
ते ही साजेना पाहातां । जीवलगा पंढरिनाथा ।।३।।
माय पाळी संसारीं । परलोक राहे दुरी ।।४।।
तैसा नव्हेसी अनंता । काळावरी तुझी सत्ता ।।५।।
तुका म्हणे नारायणा। तुम्हां बहुत करुणा ।।६।।

३९८३
कोड आवडीचें । पुरवीना बाळकाचें ।।१।।
तेव्हां कैसी ते माउली । जाणा काशासाटीं व्याली ।।धृ।।
वत्साचिये आसे। धेनु धांवेना गोरसें ।।२।।
तुका म्हणे धरि । बाळ टाकिलें वानरीं ।।३।।

३९८४
भक्तांची सांकडीं स्वयें सोसी देव । त्यांपाशीं केशव सर्वकाळ ।।१।।
जये ठायीं कीर्तन वैष्णव करिती । तेथें हा श्रीपति उभा असे ।।२।।

तुका म्हणे देव सर्वाठायीं जाला । भरुनी उरला पांडुरंग ।।३।।

३९८५
तुझिया नामाचा विसर न पडावा । ध्यानीं तो राहावा पांडुरंग ।।१।।
सांगितला मंत्र श्रीरामनामाचा । सर्वकाळ वाचा हें चि बोले ।।धृ।।
उफराटें नाम वाल्मीक बोलीला । तो ही वंद्य केला नारायणें ।।२।।
तुका म्हणे मज तुझा चि भरवसा । धांवुनियां कैसा येसी देवा ।।३।।

३९८६
अवघ्यां पातकांची मी एक रासी । अवघा तूं होसी सर्वोत्तमु ।।१।।
जैसा तैसा लागे करणें अंगीकार । माझा सर्व भार चालविणें ।।धृ।।
अवघें चि मज गिळियेलें काळें । अवघीं च बळें तुझे अंगीं ।।२।।
तुका म्हणे आतां खुंटला उपाय । अवघे चि पाय तुझे मज ।।३।।

३९८७
मूर्तिमंत देव नांदतो पंढरी । येर ते दिगांतरीं प्रतिमारूप।।१।।
जाउनियां वना करावें कीर्तन । मानुनी पाषाण विठ्ठलरूप ।।२।।
तुका मुख्य पाहिजे भाव । भावापासीं देव शीघ्र उभा ।।३।।

३९८८
धरिल्या देहाचें सार्थक करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक ।।१।।
लावीन निशान जावया वैकुंठा । माजवीन पेठा कीर्तनाच्या।।धृ।।
नामाचिया नौका करीन सहस्रवरि । नावाडा श्रीहरि पांडुरंग ।।२।।
भाविक हो येथें धरा रे आवांका । म्हणे दास तुका शुद्धयाति ।।३।।

३९८९
अनुसरे त्यासी फिरों नेदी मागें । राहें समागमें अंगसंगें ।।१।।
अंगसंगें असे कर्मसाक्ष देव । जैसा ज्याचा भाव तैसा राहे ।।२।।
फळपाकीं देव देतील प्राणीयें । तुका म्हणे नये सवें कांहीं ।।३।।

३९९०
संसारीं असतां हरिनाम घेसी । तरीं च उद्धरसी पूर्वजेंसी ।।१।।
अवघीं च इंद्रियें न येती कामा । जिव्हे रामनामा उच्चारीं वेगीं ।।धृ।।

शरीरसंपत्ति नव्हे रे आपुली । भ्रांतीची माउली अवघी व्यर्थ ।।२।।
तुका म्हणे सार हरिनामउच्चार । येऱ्हवी येरझार हरीविण ।।३।।

३९९१
सावळें सुंदर रूप मनोहर । राहो निरंतर हृदयीं माझे।।१।।
आणीक कांहीं इच्छा आम्हां नाहीं चाड । तुझें नाम गोड पांडुरंगे ।।धृ।।
जन्मोजन्मीं ऐसें मागितलें तुज । आम्हांसी सहज द्यावें आतां ।।२।।
तुका म्हणे तुज ऐसे दयाळ । धुंडितां सकळ नाहीं आम्हां ।।३।।

३९९२
भक्तांहून देवा आवडे तें काइ । त्रिभुवनीं नाहीं आन दुजें ।।१।।
नावडे वैकुंठ क्षीराचा सागर । धरोनि अंतर राहे दासा।।धृ।।
सर्वभावें त्याचें सर्वस्वें ही गोड । तुळसीदळ कोड करुनी घ्यावें।।२।।
सर्वस्वें त्याचा म्हणवी विकला । चित्त द्यावें बोला सांगितल्या ।।३।।
तुका म्हणे भक्तिसुखाचा बांधिला । आणीक विठ्ठला धर्म नाहीं।।४।।

३९९३
राम कृष्ण गोविंद नारायण हरी । केशवा मुरारी पांडुरंगा ।।१।।
लक्ष्मीनिवासा पाहें दिनबंधु । तुझा लागो छंदु सदा मज ।।२।।
तुझे नामीं प्रेम देई अखंडित । नेणें तप व्रत दान कांहीं।।३।।
तुका म्हणे माझें हें चि गा मागणें । अखंड ही गाणें नाम तुझें ।।४।।

३९९४
हरी तुझें नाम गाईन अखंड । याविण पाखंड नेणें कांहीं ।।१।।
अंतरीं विश्वास अखंड नामाचा । कायामनेंवाचा देईं हें चि ।।२।।
तुका म्हणे आतां देईं संतसंग । तुझे नामीं रंग भरो मना।।३।।

३९९५
गाबाळाचे ग्रंथीं कां रे पडां सदा । मिथ्या भेदवादा वागवितां ।।१।।
संसारगाबाळीं पडसी निखळ । जालासी तूं खळ तेणें मना ।।धृ।।
साधनसंकटीं गुंतसी कासया । व्यर्थ गा अपायामाजी गुंती ।।२।।
निर्मळ फुकाचें नाम गोविंदाचें । अनंतजन्माचे फेडी मळ ।।३।।
तुका म्हणे नको करूं कांहीं कष्ट । नाम वाचे स्पष्ट हरि बोलें ।।४।।

३९९६
भाव धरिला चरणीं म्हणवितों दास । अहिर्निशीं ध्यास करीतसें ।।१।।
करीतसें ध्यास हृदयीं सकळ । भाव तो सबळ धरियेला ।।२।।
धरिले निश्चळ न सोडीं ते पाय । तुका म्हणे सोय करीं माझी ।।३।।

३९९७
तुझें नाम गाया न सोपें डवळा । गाऊं कळवळा प्रेमाचिया ।।१।।
येइल आवडी जैसी अंतरींची । तैसी मनाची कीर्ती गाऊं ।।२।।
माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ । गोविंद गोपाळ राम कृष्ण ।।३।।
अबद्ध चांगलें गाऊं जैसें तैसें । बाहे बाळ जैसें मायबापा ।।४।।
तुका म्हणे मज न लावीं वांकडें । मी तुझें बोबडें बाळ तान्हें ।।५।।

३९९८
आतां तुज मज नाहीं दुजेपण । दाखवीं चरण पांडुरंगा ।।१।।
तुज रूप रेखा नाम गुण नाहीं । एक स्थान पाहीं गांव सिंव ।।धृ।।
नावडे संगाति तुजा दुजयाची । आपुल्या भक्तांची प्रीति तुम्हां ।।२।।
परि आम्हांसाटीं होसील सगुण । स्तंभासी फोडून जयापरि ।।३।।
तुका म्हणें तैसें तुज काय उणें । देईं दरुषण चरणांचें ।।४।।

३९९९
करणें तें हें चि करा । नरका अघोरा कां जातां।।१।।
जयामध्यें नारायण । शुद्धपण तें एक ।।धृ।।
शरणागतां देव राखे। येरां वाखे विघ्नाचे ।।२।।
तुका म्हणे लीन व्हावें । कळे भावें वर्म हें ।।३।।

४०००
आणीक नका करूं चेष्टा । व्हाल कष्टा वरपडी।।१।।
सुखें करा हरिकथा । सर्वथा हे तारील ।।धृ।।
अनाथाचा नाथ देव। अनुभव सत्य हा ।।२।।
तुका म्हणे बहुतां रिती । धरा चित्तीं सकळ।।३।।

४००१

मुखें सांगे ब्रम्हज्ञान । जन लोकाची कापितो मान।।१।।
ज्ञान सांगतो जनासी । नाहीं अनुभव आपणासी ।।धृ।।
कथा करितो देवाची । अंतरीं आशा बहु लोभाची ।।२।।
तुका म्हणे तो चि वेडा। त्याचें हाणूनि थोबाड फोडा ।।३।।

४००२
कांहीं दुसरा विचार । न लगे करावा चि फार ।।१।।
सेट्या ना चौधरी । पांडेपण वाहे शिरीं ।।धृ।।
पाप न लगे धुंडावें।। पाहिजे तरि तेथें जावें ।।२।।
जकातीचा धंदा । तेथें पाप वसे सदा ।।३।।
गाई म्हसी हेड । तुप विकी महा द्वाड ।।४।।
तुका म्हणे पाहीं । तेथें पुण्या रीघ नाहीं ।।५।।

४००३
तुझी माझी आहे जुनी सोयरीक । आधीं बंधु लेंक मग जाले ।।१।।
वांटेकरी म्हणून पुसती आतां । परि आहे सत्ता करीन ते ।।धृ।।
लेंकीचें लेंकरूं नातु जाल्यावरी । मंगळा ही दुरि अंतरलों ।।२।।
बाइलेचा भाऊ पिसुना सोयरा । म्हणउनि करा विनोद हा ।।३।।
आकुळीं तों करूं नये तें चि केलें । न बोलावें भलें तों चि आतां ।।४।।
न म्हणसी लेंकी माउसी बहिणी । आम्हां केलें धणी पापाचें त्या ।।५।।
बहु पांचांजणी केली विटंबना । नये दाऊं जना तोंड ऐसें ।।६।।
तुका म्हणे आधीं मूळ तें चि धरूं । मागील तें करूं उरी आतां ।।७।।

४००४
मागें बहुत जाले खेळ । आतां बळ वोसरलें ।।१।।
हालों नये चालों आतां । घट रिता पोकळ ।।धृ।।
भाजल्याची दिसे घडी । पट ओढी न साहे ।।२।।
तुका म्हणे पाहतां घडी । जगा जोडी अंगारा ।।३।।

४००५
आळस आला अंगा । धांव घालीं पांडुरंगा ।।१।।
सोसूं शरीराचे भाव । पडती अवगुणाचे घाव ।।धृ।।
करावीं व्यसनें। दुरी येउनि नारायणें ।।२।।

जवळील दुरी । जालों देवा धरीं करीं।।३।।
म्हणउनि देवा । वेळोवेळां करीं धावा ।।४।।
तुका म्हणे पांडुरंगा । दुरी धरूं नका अंगा ।।५।।

४००६
झंवविली महारें । त्याची व्याली असे पोरें ।।१।।
करी संताचा मत्सर । कोपें उभारोनि कर ।।धृ।।
बीज तैसें फळ । वरी आलें अमंगळ ।।२।।
तुका म्हणे ठावें । ऐसें जालें अनुभवें।।३।।

४००७
पापी तो नाठवी आपुल्या संचिता । ठेवी भगवंता वरी बोल ।।१।।
भेईना करितां पापाचे डोंगर । दुर्जन पामर दुराचारी।।धृ।।
नाठवी तो खळ आपुली करणी । देवासी निंदोनि बोलतसे ।।२।।
तुका म्हणे त्याच्या तोंडा लागो काटी । नाहीं जगजेठी जया चित्तीं ।।३।।

४००८
आधीं देह पाहता वाव । कैचा प्रारब्धासी ठाव।।१।।
कां रे रडतोसी माना । लागें विठ्ठलचरणा ।।धृ।।
दुजेपण जालें वाव। त्रिभुवनासि नाहीं ठाव ।।२।।
तुका म्हणे खरे पाहें । विठ्ठल पाहोनियां राहें ।।३।।

४००९
स्त्रिया धन बा हें खोटें । नागवले मोठे मोठे ।।१।।
म्हणोनि सांडा दोनी । सुख पावाल निदानीं ।।धृ।।
सर्वदुःखासी कारण । हीं च दोन्हीचीं प्रमाण ।।२।।
आशा सर्वस्वें सांडावी । तेणें निजपदवी पावावी ।।३।।
देह लोभें नाडला । घाला यमाचा पडला।।४।।
तुका म्हणे निरापेक्षा । कांहीं न धरावी अपेक्षा ।।५।।

४०१०
जेंजें होआवें संकल्पें । तें चि पुण्य होय पाप ।।१।।
कारण तें मनापासीं । मेळविल्या मिळे रसीं ।।धृ।।

सांडी मांडी हाली चाली । राहे तरि भली बोली ।।२।।
तुका म्हणे सार । नांव जीवनाचे सागर ।।३।।

४०११
ओले मातीचा भरवसा । कां रे धरिशी मानसा ।।१।।
डोळे चिरीव चांगले । वृद्धपणीं सरवया जाले ।।धृ।।
नाक सरळ चांगलें । येउन हनवटी लागलें ।।२।।
तुका म्हणे आलें नाहीं । तंव हरिला भज रे कांहीं ।।३।।

४०१२
तुम्हां सांगतों कलयुगा फळ । पुढें होइल ब्रम्हगोळ।।१।।
आम्हां म्हणतील कंटक । ऐसा पाडिती दंडक ।।धृ।।
स्त्रिया पूजुनि सरे देती । भलते स्त्रियेसि भलते जाती ।।२।।
श्रेष्ठ वर्ण वेदविद्वांस। अंगीकारी मद्यमांस ।।३।।
चारी वर्ण अठरा याती । कवळ करिती एक पंक्ती ।।४।।
म्हणती अंबेचा क्रीडाकल्लोळ । शिवरूप प्राणी सकळ ।।५।।
ऐसें होइल शकुन देतों । अगोदर सांगुन जातों ।।६।।
तुका सद्‌गुरुदास्य करी । सिद्धि पाणी वाहे घरीं ।।७।।

४०१३
त्या हरिदासांची भेटी घेतां । नर्का उभयतासी जातां।।१।।
माते परीस थोरी कथा । भाड घेतां न लाजे ।।धृ।।
देतां घेतां नरकवासी । उभयतांसी रवरव ।।२।।
तुका म्हणे नरकगांवा । जाती हांवा धरोनि ।।३।।

४०१४
देव गावा ध्यावा ऐसें जालें । परदेशी नाहीं उगलें ।
वडील आणि धाकुलें । नाहीं ऐसें जालें दुसरें तें ।।१।।
नाहीं लागत मुळीहूनि । सुहृदजन आणि जननी ।
लागल्या लागें त्यागें सांडूनि। लोभीये मांडणी संयोगाची ।।धृ।।
शिव बाटला जीवदशे । बहुत ओतत आलें ठसें ।
हीन जालें भूषणाचें इच्छे । निवडती कैसे गुणागुण ।।२।।
आतां हे हुतांश तों बरें । अवघे एक च मोहरें ।

पिटिलियाविण नव्हे खरें । निवडें बरें जातिशुद्ध ।।३।।
तुका उतावेळ याजसाटीं । आहे तें निवेदीन पोटीं ।
आवडी द्यावी जी येथें लाटी । तुझी जगजेठी कीर्ती वाखाणीन ।।४।।

४०१५
भोगी जाला त्याग । गीती गातां पांडुरंग । इंद्रियांचा लाग । आम्हांवरूनि चुकला ।।१।।
करुनि ठेविलों निश्चळ । भय नाहीं तळमळ । घेतला सकळ । अवघा भार विठ्ठलें ।।धृ।।
तळीं पक्षिणीचे परी । नखें चोंची चारा धरी । आणुनियां घरीं । मुखीं घाली बाळका ।।२।।
तुका म्हणे ये आवडी । आम्हीं पांयीं दिली बुडी । आहे तेथें जोडी । जन्मांतरींचें ठेवणें ।।३।।

४०१६
कुंकवाची ठेवाठेवी । बोडकादेवी काशाला ।।१।।
दिवस गमा भरा पोट । कां गे नेटनेटावा ।।धृ।।
दिमाख हा कोणां दावा । लटकी जीवा चरफड ।।२।।
तुका म्हणे झोंडगीं हो । कांुफ्दा कां हो कोरडी ।।३।।

४०१७
तुझें प्रेम माझ्या हृदयीं आवडी । चरण न सोडीं पांडुरंगा ।।१।।
कासया सिनासि थोरिवां कारणें । काय तुझें उणें होइल देवा ।।धृ।।
चातकाची चिंता हरली जळधरें । काय त्याचें सरे थोरपण ।।२।।
चंद्र चकोरांचा पुरवी सोहळा । काय त्याची कळा न्यून होय ।।३।।
तुका म्हणे मज अनाथा सांभाळीं । हृदयकमळीं स्थिर राहें ।।४।।

४०१८
आम्ही आइते जेवणार । न लगे सोसावे डोंगर । सुखाचा वेव्हार । तेणें चि वाढलें ।।१।।
ठेवा जोडला मिरासी । ठाव जाला पायांपासी । नव्हे आणिकांसी । रीघ तेथें यावया ।।धृ।।
बळी दिला जीवभाव । नेणें आणिकांचे नांव । धरिला एक भाव । तो विश्वास

फळला ।।२।।
तुका म्हणे जालों बळी । आम्ही निकट जवळी । बोलिलों तें पाळीं । वचन स्वामी आमचें ।।३।।

४०१९
न लगावी दिठी । माझी तुझे मुखवटी ।।१।।
आधीं पाउलें पाउलें । ते मी पाहेन तें भलें ।।धृ।।
देईन हे काया । वरि सांडणें सांडाया ।।२।।
तुका म्हणे देवा । बहु आवडसी जीवा ।।३।।

४०२०
कोण आमचीं योगतपें । करूं बापें जाणावीं ।।१।।
गीत संतसंगें गाऊं । उभीं ठाऊं जागरणीं ।।धृ।।
आमुचा तो नव्हे लाग । करूं त्याग जावया ।।२।।
तुका म्हणे इंद्रियांसी । ये चि रसीं रंगवूं ।।३।।

४०२१
नाम तारक भवसिंधु । विठ्ठल तारक भवसिंधु ।।१।।
नामधारक तया अरि मित्रु । समता त्यागुनियां क्रोधु ।।धृ।।
नामधारक तया । कदापि न घडे विषयाचा बाधु ।।२।।
ज्या नामें तरले शुकादिक । नारद संत मुनिजन साधु ।।३।।
जाणूनियां जे नसरें । ते नेणति जैसा गज अंधु ।।४।।
सहज तुकया । नाम चि जपतां स्वरुपीं वेधु ।।५।।

४०२२
आम्हां वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा । विश्वास नामाचा एका भावें ।।१।।
तरी च हरिचेदास म्हणवितां श्लाघीजे । निर्वासना कीजे चित्त आधी ।।धृ।।
गाऊं नाचूं प्रेमें आनंदें कीर्तनीं । भुक्ति मुक्ति दोन्ही न मगों तुज ।।२।।
तुका म्हणे देवा ऐसी यांची सेवा। द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं ।।३।।

४०२३
पावलों हा देह कागतालिन्यायें । न घडे उपायें घडों आलें ।।१।।
आतां माझीं खंडीं देह देहांतरें । अभय दातारें देऊनियां।।धृ।।

अंधळ्याचे पाठीं धनाची चरवी । अघटित तेंवि घडों आलें ।।२।।
तुका म्हणे योग घडला बरवा । आतां कास देवा न सोडीं मी ।।३।।

४०२४
कळे परि न सुटे गांठी । जालें पोटीं कुपथ्य ।।१।।
अहंकाराचें आंदणें जीव । राहे कींव केली ते ।।धृ।।
हेंकडाची एकी च वोढी । ते ही खोडी सांगती ।।२।।
तुका म्हणे सांगों किती । कांहीं चित्तीं न राहे ।।३।।

४०२५
सांडावी हे भीड अधमाचे चाळे । मद्यपीर बरळे भलत्या छंदें ।।१।।
ऐसे तंव तुम्ही नाहीं जी दिसत । कां हें अनुचित वदलेत ।।धृ।।
फांटा जाला त्यासी नाहीं वोढा वारा । वेरसा चि खरा हाटो गुण ।।२।।
तुका म्हणे नाहीं ज्याच्या बापा ताळा । तो देखे विटाळा संतां अंगीं ।।३।।

४०२६
आवडे हें रूप गोजिरें सगुण । पाहातां लोचन सुखावलें ।।१।।
आतां दृष्टीपुढें ऐसा चि तूं राहीं । जों मी तुज पाहें पांडुरंगा ।।धृ।।
लाचावलें मन लागलीसे गोडी । तें जीवें न सोडीं ऐसें जालें ।।२।।
तुका म्हणे आम्ही केली जे लडिवाळी । पुरवावी आळी मायबापें ।।३।।

४०२७
तिळ एक अर्ध राई । सीतबुंद पावे काई । तया सुखा नाहीं । अंतपार पाहतां ।।१।।
म्हणउनी करा लाहो । नका मागें पुढें पाहों । अवघ्यामध्यें आहों । सावचित्त तों ।।धृ।।
तीर्थें न येती तुळणी । आजिया सुखाची धणी । जे कासी गयेहुनी । जीं आगळीं असती ।।३।।
येथें धरी लाज । वर्ण अभिमान काज । नाडला सहज । तुका म्हणे तो येथें ।।३।।

४०२८. विठोबाचें नाम ज्याचे मुखीं नित्य । त्या देखिल्या पतित उद्धरिलि ।।१।।
विठ्ठलविठ्ठल भावें म्हणे वाचे । तरी तो काळाचे दांत ठेंसी ।।धृ।।

बहुत तारिले सांगों किती आतां । ऐसा कोणी दाता दुजा नाहीं ।।२।।
तुका म्हणे म्यां ही ऐकोनियां कीर्ती । धरिला एकांतीं ह्रदयामाजी ।।३।।

४०२९
भोळे भक्तिभाव धरिती मानसीं । त्यासी ह्रषीकेशी जवळी च ।।१।।
भाव नाहीं मनीं अभाविक सदा । त्याचिया मी खेदा काय सांगों ।।धृ।।
गणिकेसारिकीं नामें उद्धरीलीं । सज्ञानें पडिलीं खटाटोपीं ।।२।।
तुका म्हणे काय शुद्ध माझी जाति । थोर केली ख्याती हरिनामें ।।३।।

४०३०
आड पडे काडी । तरि ते बहुत पाणी खोडी ।।१।।
दुर्जनाचे संगती । बहुतांचे घात होती ।।धृ।।
एक पडे मासी । तरी ते बहु अन्न नासी ।।२।।
तुका म्हणे रांड । ऐसी कां ते व्याली भांड।।३।।

४०३१
पंढरीचें बा भूत मोटें । आल्या गेल्या झडपी वाटे।।१।।
तेथें जाऊं नका कोणी । गेले नाहीं आले परतोनि ।।२।।
तुका पंढरीसी गेला । पुन्हा जन्मा नाहीं आला ।।३।।

४०३२
बरवे दुकानीं बैसावें । श्रवण मनन असावें ।।१।।
सारासाराचीं पोतीं । ग्राहिक पाहोनि करा रितीं ।।धृ।।
उगे चि फुगों नका गाल । पूर्ण सांठवावा माल ।।२।।
सत्य तराजू पैं धरा । नका कुडत्रिम विकरा ।।३।।
तुका जाला वाणी । चुकवुनि चौऱ्यासीच्या खाणी ।।४।।

४०३३
काय करूं आतां या मना । न संडी विषयांची वासना ।
प्रार्थितां ही राहेना । आदरें पतना नेऊं पाहे ।।१।।
आतां धांवधावें गा श्रीहरी । गेलों वांयां नाहीं तरी ।
न दिसे कोणी आवरी। आणीक दुजा तयासी ।।धृ।।
न राहे एके ठायीं एकी घडी। चित्त तडतडा तोडी ।

घालूं पाहे बा हे उडी या भवडोहीं ।।२।।
आशा तृष्णा कल्पना पापिणी । घात मांडला माझा यांणीं ।
तुका म्हणे चक्रपाणी । काय अजोनि पाहातोसी।।३।।

४०३४
पाषाण परिस भूमि जांबूनद । वंशाचा संबंध धातयाचा।।१।।
सोनियाची पुरी समुद्राचा वेढा । समुदाय गाढा राक्षसांचा ।।धृ।।
ऐसी सहस्त्र त्या सुंदरा कामिनी । माजी मुखरणी मंदोदरी ।।२।।
पुत्रपौत्राचा लेखा कोण करी । मुख्य पुत्र हरी इंद्रा आणी ।।३।।
चौदा चौकडिया आयुष्यगणना । बंधुवर्ग जाणा कुंभकर्ण।।४।।
तुका म्हणे ज्याचे देव बांदवडी । सांगातें कवडी गेली नाहीं ।।५।।

४०३५
पापांचीं संचितें देहासी दंडण । तुज नारायणा बोल नाहीं ।।१।।
पेरी कडू जिरें मागे अमृतफळ । आर्का वृक्षफळें कैसीं येती ।।धृ।।
सुख अथवा दुःख भोग हो देहेचा । नास हा ज्ञानाचा न करावा ।।२।।
तुका म्हणे आतां देवा कां रुसावें । मनासी पुसावें काय केलें ।।३।।

४०३६
लाभ पुढें करी । घात नारायण वारी ।।१।।
ऐसी भक्ताची माउली । करी कृपेची साउली ।।धृ।।
माय बाळकासी । जीव भाव वेची तैसी ।।२।।
तुका म्हणे नाड । नाहीं शरणागता आड ।।३।।

४०३७
आपुलेंसें करुनी घ्यावें । आश्वासावें नाभींसें ।।१।।
ह्मणउनि धरिले पाय । आवो माय विठ्ठले ।।धृ।।
कळलासे सीन चिंता । शम आतां करावा ।।२।।
तुका म्हणे जीवीं वसें । मज नसें वेगळे ।।३।।

४०३८
तुजविणं कांहीं । स्थिर राहे ऐसें नाहीं ।।१।।
कळों आलें बहुता रीती । पांडुरंगा माझ्या चित्तीं ।।धृ।।

मोकलिली आस। सर्वभावें जालों दास ।।२।।
तुका म्हणे तूं चि खरा । येर वाउगा पसारा ।।३।।

४०३९
खोंकरी आधन होय पाकसिद्धि । हें तों घडों कधीं शके चि ना ।।१।।
खापराचे अंगीं घासितां परिस । न पालटे कीस काढिलिया ।।२।।
पालथे घागरी रिचवितां जळ । तुका म्हणे खळ तैसे कथे ।।३।।

४०४०
नागलें देखोनि चांगलें बोले । आपुलें वेचूनि त्याजपुढें खुले ।।१।।
अधमाचे ओंगळ गुण । उचित नेणें तो धर्म कोण।।धृ।।
आर्तभूता न घली पाण्याचा चुळ । न मागे त्यासी घाली साखर गुळ ।।२।।
एकासी आड पडोनि होंकरी । एकासी देखोनि लपवी भाकरी ।।३।।
एकासी धड न बोले वाचा । एकासी म्हणे मी तुझे बांदीचा ।।४।।
तुका म्हणे ते गाढवपशु । लाभेंविण केला आयुष्यनाशु।।५।।

४०४१
पिंडपोशकाच्या जळो ज्ञानगोष्टी । झणी दृष्टिभेटी न हो त्याची ।।१।।
नाहीं संतचिन्ह उमटलें अंगीं । उपदेशालागीं पात्र जाला ।।धृ।।
पोहों सिणलें नये कासे लावितो आणिका । म्हणावें त्या मूर्खा काय आतां ।।२।।
सिणलें तें गेलें सिणलियापासीं । जाली त्या दोघांसी एक गति ।।३।।
तुका म्हणे अहो देवा दिनानाथा। दरुषण आतां नको त्याचें ।।४।।

४०४२
संतचिन्हें लेउनि अंगीं । भूषण मिरविती जगीं ।।१।।
पडिले दुःखाचे सागरीं । वहावले ते भवपुरीं ।।धृ।।
कामक्रोधलोभ चित्तीं । वरिवरि दाविती विरक्ती ।।२।।
आशापाशीं बांधोनि चित्त । म्हणती जालों आम्ही मुक्त ।।३।।
त्यांचे लागले संगती । जाली त्यांसी ते चि गति ।।४।।
तुका म्हणे शब्दज्ञानें । जग नाडियेलें तेणें।।५।।

४०४३

दोष करूनि आम्ही पतित सिद्ध जालों । पावन मागों आलों ब्रीद तुझें ।।१।।
आतां पतिता तारावें कीं ब्रीद हें सोडावें । यांत जें पुरवे तें चि सांगा ।।धृ।।
उद्धार तुमच्यानें नव्हे हो श्रीहरि। सोडा झडकरी ब्रीद आतां ।।२।।
तें ब्रीद घेउनी हिंडों दारोदारीं । सांगू तुझी कीर्ती रे पांडुरंगा ।।३।।
देवें हारविलें ब्रीद हें सोडिलें । पतितें जिंकिलें आम्हीं देवा ।।४।।
तुका म्हणे आम्हीं उठलों दैन्यवरि। विचारा श्रीहरी तुम्ही आतां ।।५।।

४०४४
राम कृष्ण ऐसीं उच्चारितां नामें । नाचेन मी प्रेमें संतांपुढें ।।१।।
काय घडेल तें घडो ये सेवटीं । लाभ हाणी तुटी देव जाणे ।।धृ।।
चिंता मोह आशा ठेवुनि निराळीं । देईन हा बळी जीव पायीं ।।२।।
तुका म्हणे कांहीं उरों नेदीं उरी । सांडीन हे थोरी ओवाळोनी ।।३।।

४०४५
देव धरी नाना सोंगें । नाम श्रेष्ठ पांडुरंग ।।१।।
तो हा गवळियाचे घरीं । नाम सारितो मुरारि ।।धृ।।
धन्य यशोदेचें प्रारब्ध । नाचे अंगणीं गोविंद ।।२।।
ऐशा भक्तांसाटीं देवें । नाना धरियेलीं नांवें ।।३।।
होय दासांचा जो दास । तुका म्हणे विठ्ठलास।।४।।

४०४६
आइत्या भाग्या धणी व्हावे । केनें घ्यावें न सरे तें।।१।।
केणें आहे पंढरपुरीं । उधाराचें लाभीक ।।धृ।।
बाखराची करुनी रीती । भरा पोतीं लवलाहीं ।।२।।
तुका म्हणे संतांपाडें । करूं पुढें वाखती ।।३।।

४०४७
जन्मोजन्मीं दास । व्हावें हे चि माझी आस ।।१।।
पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदीं हरी ।।धृ।।
संतसमागम । अंगीं थिरावलें प्रेम ।।२।।
स्नान चंद्रभागे । तुका म्हणे हें चि मागें ।।३।।

४०४८

कां गा कोणी न म्हणे पंढरीची आई । बोलावितें पाहीं चाल नेटें ।।१।।
तेव्हां माझ्या मना होइल समाधान । जाइल सर्व शीण जन्मांतरिंचा ।।२।।
तुका म्हणे माझी होशील माउली । वोरसोनि घाली प्रेमपान्हा ।।३।।

४०४९
वेद अनंत बोलिला । अर्थ इतका चि शोधिला।।१।।
विठोबासी शरण जावें । निजनिष्ट नाम गावें ।।धृ।।
सकळशास्त्रांचा विचार । अंतीं इतका चि निर्धार ।।२।।
अठरापुराणीं सिद्धांत । तुका म्हणे हा चि हेत ।।३।।

४०५०
मायेचा मारिला अंगीं नाहीं घाव । दुःखें तरी लव धडधडी ।।१।।
न लभे हा काळ न सुटे हातींचा । न बोलवे वाचा खोडावली ।।धृ।।
न पवे धांवणें न पवे चि लाग । न चलती माग धरावया ।।२।।
भेणें तरि अंगा लावियेल्या राखा । परी त्यासी वाखा करीतसे ।।३।।
तुका म्हणे नेदी हाका मारूं देवा । लोकापाठी हेवा लागलासे ।।४।।

४०५१
धिग तो दुर्जन नाहीं भूतदया । व्यर्थ तया माया प्रसवली ।।१।।
कठिण हृदय तया चांडाळाचें । नेणे पराचें दुःख कांहीं ।।धृ।।
आपुला का प्राण तैसे सकळ लोक । न करी विवेक पशु जैसा ।।२।।
तुका म्हणे सुखें कापीतसे गळे । आपुलिया वेळे रडतसे ।।३।।

४०५२
गरुडावरि बैसोनि येतो जगजेठी । त्याचे चरणीं मिठी घालूं चला ।।१।।
सांवळें रूपडें देखिलें लोचनीं । शंख चक्र दोन्ही शोभताहे ।।धृ।।
पीतांबर झळके हे चि त्याची खूण । वाकी रुणझुण करिताती ।।२।।
गरुडाचा चपेटा असे नेटें । कस्तुरीमळवट शोभताहे ।।३।।
पदक एकावळी शोभताहे कंठीं । तुका म्हणे मिठी घालूं चला ।।४।।

४०५३
नाहीं पाक होत उफराटे चाली । बोलिली ते केली व्हावी नीत ।।१।।
नाहीं मानूं येत वांजटाचे बोल । कोरडे च फोल चवी नाहीं ।।धृ।।

तरुवरा आधीं कोठें आहे फळ । चावटा बरळ म्हणा त्यासी ।।२।।
तुका म्हणे किती ठकलीं बापुडीं । गव्हा आहे गोडी मांडे पुऱ्या ।।३।।

४०५४
जाली हरिकथा रंग वोरसला । उचितासी आला पांडुरंग ।।१।।
वांटितो हें प्रेम उचिताचा दाता । घेईं रे तूं आतां धणीवरि ।।धृ।।
प्रेम देऊनियां अवघीं सुखीं केलीं । जें होतीं रंगलीं विटलीं तीं ।।२।।
तुकें हें दुर्बळ देखियलें संतीं । म्हणउनि पुढती आणियेलें ।।३।।

४०५५
संकल्पिला तुज सकळ ही भाव । कोण एक ठाव उरला तेथें ।।१।।
इंद्रियव्यापार जेंजें कांहीं कर्म । करितों ते धर्म सकळ तुझे ।।धृ।।
माझें हित फार लागला विचार । तुज सर्व भार चालवणें ।।२।।
जो कांहीं लौकिक करिसी तो तुझा । अपमान पूजा कांहींतरि ।।३।।
तुका म्हणे मी तों राहिलों निश्चिंत । तुज कळे हित तैसें करीं ।।४।।

४०५६
भय नाहीं भेव । अनुतापीं नव्हतां जीव ।।१।।
जेथें देवाची तळमळ । तेथें काशाचा विटाळ ।।धृ।।
उच्चारितां दोष । नाहीं उरों देत लेश ।।२।।
तुका म्हणे चित्त । होय आवडी मिश्रित।।३।।

४०५७
ध्यानीं ध्यातां पंढरिराया । मनासहित पालटे काया।।१।।
तेथें बोला कैची उरी । माझें मीपण जाला हरि ।।धृ।।
चित्तचैतन्यीं पडतां मिठी । दिसे हरिरूप अवघी सृष्टि ।।२।।
तुका म्हणे सांगों काय । एकाएकीं हरिवृत्तिमय ।।३।।

४०५८
कोणा ही केंडावें हा आम्हां अधर्म । जोजो पावे श्रम तोतो देव ।।१।।
म्हणउनि चित्ता सिकविलें वोजें । आतां हें चि दुजें न बोलावें ।।धृ।।
हालविलें जरि परउपकारें । जिव्हे पाप खरें उपाधीचें।।२।।
तुका म्हणे जीव प्रारब्धा आधीन । कोण वाहे सीण करुणा शोभे ।।३।।

४०५९
देव तिळीं आला । गोडगोड जीव धाला ।।१।।
साधला हा पर्वकाळ । गेला अंतरींचा मळ ।।धृ।।
पापपुण्य गेलें । एका स्नानें चि खुंटलें ।।२।।
तुका म्हणे वाणी । शुद्ध जनार्दनीं जनीं ।।३।।

४०६०
काय उणें मज पांडुरंगा पायीं । रिद्धिसिद्धि ठायीं वोळगती ।।१।।
कोण पाहे सुखा नासिवंताकडे । तृष्णेचें बापुडें नहों आम्ही ।।धृ।।
स्वर्गसुखें आम्हीं केलीं पावटणी । पापपुण्यें दोन्ही उलंडिलीं ।।२।।
तुका म्हणे घरीं आणिलें वैकुंठ । वसविली पेठ वैष्णवांची ।।३।।

४०६१
माझें मागणें तें किती । दाता लक्ष्मीचा पति ।।१।।
तान्हेल्यानें पीतां पाणी । तेणें गंगा नव्हे उणी ।।धृ।।
कल्पतरु जाला देता । तेथें पोटाचा मागता ।।२।।
तुका म्हणे संतां ध्यातां । परब्रम्ह आलें हाता ।।३।।

४०६२
अर्भकाचे साटीं । पंतें हातीं धरिली पाटी ।।१।।
तैसे संत जगीं । क्रिया करुनी दाविती अंगीं ।।धृ।।
बालकाचे चाली । माता जाणुनि पाउल घाली ।।२।।
तुका म्हणे नाव । जनासाटीं उदकीं ठाव ।।३।।

४०६३
जन्मोजन्मींची संगत । भेटी जाली अकस्मात ।।१।।
आतां सोडितां सुटेना । तंतु प्रीतीचा तुटेना ।।धृ।।
माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडिली पंढरिराया ।।२।।
तुका म्हणे अंतीं । तुझी माझी एक गति ।।३।।

४०६४
सांग पांडुरंगा मज हा उपाव । जेणें तुझे पाव आतुडति ।।१।।

न कळे हा निर्धार ब्रम्हादिकां पार । कायसा विचार माझा तेथें ।।२।।
तुका म्हणे आतां धरुनियां धीर । राहूं कोठवर मायबापा ।।३।।

४०६५
काय फार जरी जालों मी शाहाणा । तरी नारायणा नातुडसी ।।१।।
काय जालें जरी मानी मज मन । परि नातुडति चरण तुझे देवा ।।धृ।।
काय जालें जरी जालों उदासीन । परि वर्म भिन्न तुझें देवा ।।२।।
काय जालें जरी केले म्यां सायास । म्हणवितों दास भक्त तुझा ।।३।।
तुका म्हणे तुज दाविल्यावांचून । तुझें वर्म कोण जाणे देवा ।।४।।

४०६६
जातां पंढरीच्या मार्गें । काय वर्णूं सुखा मग ।।१।।
घडे लाभ लक्षकोटि । परब्रम्हीं होइल भेटी ।।धृ।।
नाम गर्जत येती संत । त्यांच्या दर्शनें होईजे मुक्त ।।२।।
जो अलक्ष्य ब्रम्हादिकां । आला संनिध म्हणे तुका ।।३।।

४०६७
सारासार विचार करा उठाउठी । नाम धरा कंठीं विठोबाचें ।।१।।
तयाच्या चिंतनें निरसलें संकट । तरलों दुर्घट भवसिंधु ।।धृ।।
जन्मोनियां कुळीं वाचे स्मरे राम । धरी हा चि नेम अहिर्निशीं ।।२।।
तुका म्हणे कोटी कुळें तीं पुनीत । भावें गातां गीत विठोबाचे ।।३।।

४०६८
मोल घेऊनियां कथा जरी करीं । तरी भंगो हरी देह माझा ।।१।।
माझी कथा करा ऐसें म्हणें कोणा । तरी झडो जाणा जिव्हा माझी ।।धृ।।
साह्य तूं जालासी काय उणें तुपें । आणीक भूतांपें काय मागों ।।२।।
तुका म्हणे सर्व सिद्धि तुझे पायीं । तूं माझा गोसावी पांडुरंगा ।।३।।

४०६९
जरि हा हो कृपा करिल नारायण । तरी हें चि ज्ञान ब्रम्ह होय ।।१।।
कोठोनियां कांहीं न लगे आणावें । न लगे कोठें जावें तरावया ।।धृ।।
जरी देव कांहीं धरिल पैं चित्तीं । तरि हे चि होती दिव्य चक्षु ।।२।।
तुका म्हणे देव दावील आपणा । तरि जीवपणा ठाव नाहीं ।।३।।

४०७०
पांडुरंगा कृपाळुवा दयावंता । धरिसील सत्ता सकळ ही ।।१।।
कां जी आम्हांवरी आणिकांची सत्ता । तुम्हासी असतां जवळिक ।।२।।
तुका म्हणे पायीं केलें निवेदन । उचित हें दान करीं आतां ।।३।।

४०७१
रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।।१।।
जीवा ही आगोज पडती आघात । येऊनियां नित्य नित्य करी ।।२।।
तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें । अवघीयांचें काळें केलें तोंड ।।३।।

४०७२
होइन खडे गोटे । चरणरज साने मोठे । पंढरीचे वाटे । संतचरणीं लागेन ।।१।।
आणीक काय दुजें । म्या मागणें तुजपासीं । अविट तें सुख । भय नास नाहीं ज्यासी ।।धृ।।
होइन मोचे वाहणा । पायीं सकळां संतजनां । मांजर सुकर सुणा । जवळी शेष घ्यावया ।।२।।
सांडोवा पायरी । वाहळ बावी गंगातिरी । होइन तयावरी । संतसज्जन चालती ।।३।।
लागें संतां पांयीं । ऐसा ठेवीं भलता ठायीं । तुका म्हणे देईं । धाक नाहीं जन्माचा ।।४।।

४०७३
माझिया जीवाचा मज निरधार । न करीं उत्तर जनासवें ।।१।।
आपुलें कारण साधों जी विचार । करावा हा धीर धरूनियां ।।धृ।।
काय कराविया आणिका या युक्ति । काय नव्हे भक्ति विठोबाची ।।२।।
एक पुढें गेले वाट दावूनियां । मारग तो वांयां कोण सांडी ।।३।।
तुका म्हणे माझी विठोबासी चिंता । भेईना सर्वथा न घडे तें ।।४।।

४०७४
कासया व्हावें जीतांचि मुक्त । सांडुनियां थीतें प्रेमसुख ।।१।।
वैष्णवांचा दास जाला नारायण । काय त्या मिळोन असे काम ।।धृ।।

काय त्या गांठीचें पडलें सुटोन । उगला चि बैसोन धीरु धरीं ।।२।।
सुख आम्हांसाटीं केलें हें निर्माण । निर्दैव तो कोण हाणे लाता ।।३।।
तुका म्हणे मज न लगे सायोज्यता । राहेन या संतां समागमें ।।४।।

४०७५
आवडे पंढरी भीमा पांडुरंग । चंद्रभागा लिंग पांडुरंग।।१।।
कामधेनु कल्पतरु चिंतामणी । आवडीची धणी पुरवीती।।२।।
तुका म्हणे जीवा थोर जालें सुख । नाठवे हे भूक तान कांहीं ।।३।।

४०७६
लाडें भाकितों करुणा । तूं रे उदाराचा राणा ।।१।।
करिसी आमुचा सांभाळ । तूं रे माउली स्नेहाळ ।।धृ।।
नाहीं चिंता रे आम्हांसी । तूं चि भार चालविसी ।।२।।
आम्ही जालों उदासीन । तूं चि करिसी जतन ।।३।।
आम्हां नाहीं जीवनास । तूं चि पुरविसी घास ।।४।।
तुका म्हणे भलते सवें । जातां मागें मागें धांवे ।।५।।

४०७७
आम्हां हें सकळ । तुझ्या पायांचें चि बळ ।।१।।
करूं अमृताचें पान । दुजें नेणों कांहीं आन ।।धृ।।
जयाचा जो भोग। सुख दुःख पीडा रोग ।।२।।
तुका म्हणे देवा । तुझे पायीं माझा ठेवा ।।३।।

४०७८
प्रपंच परमार्थ संपादोनि दोन्ही । एक ही निदानीं न घडे त्यासी ।।१।।
दोहीं पेंवावरी ठेवूं जातां हात । शेवटीं अपघात शरीराचा ।।२।।
तुका म्हणे तया दोहींकडे धका । शेवटीं तो नरकामाजी पडे ।।३।।

४०७९
संसारा आलिया एक सुख आहे । आठवावे पाय विठोबाचे ।।१।।
येणें होय सर्व संसार सुखाचा । न लगे दुःखाचा लेश कांहीं ।।धृ।।
घेईल तयासी सोपें आहे सुख । बोलियेलें मुखें नारायण ।।२।।
सांगितली सोय करुणासागरें । तुम्हां कांहो बरें न वाटतें ।।३।।

तुका म्हणे तेणें उपकार केला । भोळ्या भाविकाला तरावया ।।४।।

४०८०
आम्हां भय धाक कोणाचा रे पाहें । काळ मशक काय मानव हे ।।१।।
आम्हांसी ते काय चिंता या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ।।धृ।।
काय करावी हे कोणाची मान्यता । करितां अनंता कोण वारी ।।२।।
नाहीं शीण आम्हां जालें कवतुक । पुनीत हे लोक करावया ।।३।।
तुका म्हणे खातों आनंदाचे लाडू । नका चरफडूं घ्या रे तुम्ही ।।४।।

४०८१
तांबगी हें नाणें न चले खऱ्या मोलें । जरी हिंडविलें देशोदेशीं ।।१।।
करणीचें कांहीं न मने सज्जना । यावें लागे मना वृद्धांचिया ।।धृ।।
हिरयासारिका दिसे शिरगोळा । पारखी ते डोळां न पाहाती ।।२।।
देऊनियां भिंग कामाविलें मोतीं । पारखिया हातीं घेतां नये ।।३।।
तुका म्हणे काय नटोनियां व्यर्थ । आपुलें हें चित्त आपणा ग्वाही ।।४।।

४०८२
चित्ता मिळे त्याचा संग रुचिकर । क्षोभवितां दूर तों चि भलें ।।१।।
ऐसी परंपरा आलीसे चालत । भलत्याची नीत त्यागावरी ।।धृ।।
हो कां पिता पुत्र बंधु कोणी तेही । विजाति संग्रहीं धरूं नये ।।२।।
तुका म्हणे सत्य पाळावें वचन । अन्यथा आपण करूं नये ।।३।।

४०८३
आपुली कसोटी शुद्ध राखी कारण । आगीनें भूषण अधिक पुट ।।१।।
नाहीं कोणासवें बोलणें लागत । निश्चिंतीनें चित्तसमाधान ।।धृ।।
लपविलें तें ही ढेंकरें उमटे । खोटियाचें खोटें उर फोडी ।।२।।
तुका म्हणे निंदा स्तुति दोन्ही वाव । आपुलाला भाव फळा येतो ।।३।।

४०८४
आणिकांच्या घातें मानितां संतोष । सुखदुःख दोष अंगीं लागे ।।१।।
ऐसें मनीं वाहूं नयेती संकल्प । करूं नये पाप भांडवल ।।धृ।।
क्लेशाची चित्तीं राहाते कांचणी । अग्नींत टाकोनी ठाव जाळी ।।२।।
तुका म्हणे येणें घडे पुण्यक्षय । होणार तें होय प्रारब्धें चि ।।३।।

४०८५
अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती । तयाचिये मती बोध कैंचा ।।१।।
अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैंचा ।।धृ।।
अज्ञानाचें कर्म फळीं ठेवी मन । निष्काम साधन तया कैंचें ।।२।।
अज्ञानाचें ज्ञान विषयावरी ध्यान । ब्रम्ह सनातन तया कैंचें ।।३।।
तुका म्हणे जळो ऐसियांचे तोंड । अज्ञानाचें बंड वाढविती ।।४।।

४०८६
गुळें माखोनियां दगड ठेविला । वर दिसे भला लोकाचारी ।।१।।
अंतरीं विषयाचें लागलें पैं पिसें । बाहिरल्या वेषें भुलवी लोकां ।।धृ।।
ऐसिया डांभिकां कैची हरिसेवा । नेणे चि सद्भावा कोणे काळीं ।।२।।
तुका म्हणे येणें कैसा होय संत । विटाळलें चित्त कामक्रोधें ।।३।।

४०८७
आयुष्य वेचूनि कुटुंब पोसिलें । काय हित केलें सांग बापा ।।१।।
फुकाचा चाकर जालासी काबाडी । नाहीं सुख घडी भोगावया ।।धृ।।
दुर्लभ मनुष्यजन्म कष्टें पावलासी । दिला कुटुंबासी कामभोग ।।२।।
तुका म्हणे ऐसें आयुष्य नासिलें । पाप तें सांचिलें पतनासी ।।३।।

४०८८
अनंत लक्षणें वाणितां अपार । संताचें तें घर सांपडेना ।।१।।
जये घरीं संत राहती आपण । तें तुम्हां ठिकाण आतुडेना ।।धृ।।
ठिकाण धरूनी पाहवे ते संत । उगा च अकांत करूं नये ।।२।।
संत होऊनियां संतांसी पाहावें । तरि च तरावें तुका म्हणे ।।३।।

४०८९
संतांचा पढीयावो कैशापरि लाहो । नामाचा आठवो कैसा राहे ।।१।।
हे चि थोर चिंता लागली मनासी । निजतां निद्रेसी न लगे डोळा ।।धृ।।
जेवितां जेवणीं न लगे गोड धड । वाटतें काबाड विषयसुख ।।२।।
ऐसिया संकटीं पाव कृपानिधी । लावीं संतपदीं प्रेमभावें ।।३।।
तुका म्हणे आम्हीं नेणों कांहीं हित । तुजविण अनाथ पांडुरंगा ।।४।।

४०९०
पंढरीचा वास धन्य ते चि प्राणी । अमृताची वाणी दिव्य देहो ।।१।।
मूढ मतिहीन दुष्ट अविचारी । ते होती पंढरी दयारूप ।।धृ।।
शांति क्षमा अंगीं विरक्ति सकळ । नैराश्य निर्मळ नारी नर ।।२।।
तुका म्हणे नाहीं वर्णा अभिमान । अवघे जीवनमुक्त लोक ।।३।।

४०९१
देखीचें तें ज्ञान करावें तें काई । अनुभव नाहीं आपणासी ।।१।।
इंद्रियांचे गोडी ठकलीं बहुतें । सोडितां मागुतें आवरेना ।।धृ।।
युक्तीचा आहार नीतीचा वेव्हार । वैराग्य तें सार तरावया ।।२।।
नाव रेवाळितां घाला घाली वारा । तैसा तो पसारा अहंतेचा ।।३।।
तुका म्हणे बुद्धि आपुले अधीन । करी नारायण आतुडे तों ।।४।।

४०९२
नर नारी बाळें अवघा नारायण । ऐसें माझें मन करीं देवा ।।१।।
न यो काम क्रोध द्वेष निंदा द्वंद । अवघा गोविंद निःसंदेह ।।धृ।।
असावें म्यां सदा विषयीं विरक्त । काया वाचा चित्त तुझे पायीं ।।२।।
करोनियां साह्य पुरवीं मनोरथ । व्हावें कृपावंत तुका म्हणे ।।३।।

४०९३
आपुल्या पोटासाटीं । करी लोकांचिया गोष्टी ।।१।।
जेणें घातलें संसारीं । विसरला तो चि हरी ।।धृ।।
पोटा घातलें अन्न । न म्हणे पतितपावन ।।२।।
मी कोठील आणि कोण । हें न कळे ज्यालागून ।।३।।
तुका म्हणे नरस्तुति । करितो भाट त्रिजगतीं।।४।।

४०९४
स्वयें आपण चि रिता । रडे पुढिलांच्या हिता ।।१।।
सेकीं हें ना तेंसें जालें । बोलणें तितुकें वांयां गेलें ।।धृ।।
सुखसागरीं नेघे वस्ती । अंगीं ज्ञानपणाची मस्ती ।।२।।
तुका म्हणे गाढव लेखा। जेथें भेटेल तेथें ठोका ।।३।।

४०९५

जगीं कीर्ति व्हावी । म्हणोनी जालासी गोसावी।।१।।
बहुत केलें पाठांतर । वर्म राहिलेंसे दूर ।।धृ।।
चित्तीं नाहीं अनुताप। लटिकें भगवें स्वरूप ।।२।।
तुका म्हणे सिंदळीच्या । व्यर्थ श्रमविली वाचा ।।३।।

४०९६
प्राक्तनाच्या योगें आळशावरी गंगा । स्नान काय जगा करूं नये ।।१।।
उभी कामधेनु मागिलें अंगणीं । तिसी काय ब्राम्हणीं वंदूं नये ।।धृ।।
कोढियाचे हातें परिसें होय सोनें । अपवित्र म्हणोन घेऊं नये ।।२।।
यातिहीन जाला गांवींचा मोकासी । त्याच्या वचनासी मानूं नये ।।३।।
भावारूढ तुका मुद्रा विठोबाची । न मनी तयांचीं तोंडें काळीं ।।४।।

४०९७
बोलिलों उत्कर्षें । प्रेमरस दाशत्वें ।।१।।
साच करिता नारायण । जया शरण गेलों तो ।।धृ।।
समर्थ तो आहे ऐसा । धरिली इच्छा पुरवी ।।२।।
तुका म्हणे लडिवाळाचें । द्यावें साचें करूनियां ।।३।।

४०९८
विचा केला ठोबा । म्हणोनि नांव तो विठोबा ।।१।।
कां रे नेणां त्याचें नांव । काय वेदासि नाहीं ठाव ।।धृ।।
शेष स्तुती प्रवर्तला । जिव्हा चिरूनि पलंग जाला ।।२।।
तुका म्हणे सत्ता । ज्याची काळाचिये माथा ।।३।।

४०९९
भ्रतारअंगसंगें सुखाची वेवस्था । आधीं तों सांगतां नये कोणा ।।१।।
तथापि सांगणें कुमारिकेपाशीं । ते काय मानसीं सुख मानी ।।धृ।।
तैसा आत्मबोध आधीं बोलों नये । बोलासी तो काय सांपडेल ।।२।।
तथापि सांगणें बहिर्मुखापाशीं । तो काय संतोषासी मूळ होय ।।३।।
तुका म्हणे संत सुखाचे विभागी । ब्रम्हानंद जगीं साधुरूपें ।।४।।

४१००
कलयुगामाजी थोर जालें बंड । नष्ट लोक लंड जाले फार ।।१।।

न धरिती सोय न पुसती कोणा । येतें जैसें मना तैसें चाले ।।धृ।।
सज्जनाचा वारा टेकों नेदी द्वारा । ऐसिया पामरा तारी कोण ।।२।।
विश्वास तयाचा बैसेना कोठें ही । स्तुति निंदा पाहीं जीवीं धरी ।।३।।
तुका म्हणे कैसें केलें नारायणें । जाणावें हें कोणें तयाविण ।।४।।

४१०१
आपुली बुटबुट घ्यावी । माझी परताप द्यावी ।।१।।
आपुला मंत्र नव्हे बरा । माझा बईल चुकला मोरा ।।२।।
तुका म्हणे ऐशा नरा । परिस न झोंबे खापरा ।।३।।

४१०२
भावभक्तिवादें करावें कीर्तन । आशाबधी मन करूं नये ।।१।।
अन्न पाणी धन द्रव्य नारायण । विठ्ठला वांचून बोलूं नये ।।धृ।।
सप्रेम करावें देवाचें कीर्तन । भय द्या सोडून शरीराचें।।२।।
तरी मग जोडे विठ्ठलनिधान । केलिया कीर्तन सिद्धि पावे ।।३।।
देव जोडिलिया तया काय उणें । तुका म्हणे मन धीट करा ।।४।।

४१०३
चोरासी चांदणें वेश्येसी सेजार । परिसेंसी खापर काय होय ।।१।।
दुधाचे आधणीं वैरिले पाषाण । कदा काळीं जाण पाकनव्हे ।।२।।
तुका म्हणे जरि पूर्वपुण्यें सिद्धि । तरि च राहे बुद्धि संतसंगीं।।३।।

४१०४
रोगिया मिष्टान्न मर्कटा चंदन । कागासी लेपन कर्पूराचें ।।१।।
निर्नासिका जैसा नावडे आरिसा । मूर्खालागीं तैसा शास्त्रबोध ।।धृ।।
दास तुका म्हणे विठ्ठलउदारें । अज्ञानअंधारें दूरी केलें ।।२।।

४१०५
मथनासाटीं धर्माधर्म । त्याचें वर्म नवनीत ।।१।।
तें चि तें घाटूं नये । आलें जाय नासूनि ।।धृ।।
सांभाळावें वरावर । वर्म दूर न वजावें ।।२।।
तुका म्हणे घालें पोट । मग बोटचांचणी।।३।।

४१०६
माझा घात पात अथवा हित फार । अवघा विचार तुझ्या हातीं ।।१।।
ठेवुनि जीव भाव तुझ्या ठायीं चित्त । राहिलों निवांत पांडुरंगा ।।धृ।।
चित्ताचा चाळक बुद्धीचा जनिता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं ।।२।।
तुका म्हणे काय करिसी तें पाहीन । ठेविसी राहीन सुखें तेथें ।।३।।

४१०७
संतपाउलें साजिरीं । गंगा आली आम्हांवरी ।।१।।
जेथें पडे रजधुळी । तेथें करावी अंघोळी ।।धृ।।
स्वेतबंद वाराणसी। अवघीं तीर्थें तयापासीं ।।२।।
तुका म्हणे धन्य जालों । संतसागरीं मिळालों ।।३।।

४१०८
न घडे मायबापें बाळकाचा घात । आपणादेखत होऊं नेदी ।।१।।
कां मी मनीं चिंता वाहूं भय धाक । काय नव्हे एक करितां तुज ।।धृ।।
वर्म जाणे त्याच्या हिताचे उपाय । तान भूक वाहे कडिये खांदीं ।।२।।
तुका म्हणे तूं गा कृपावंत भारी । ऐसें मज हरी कळों आलें ।।३।।

४१०९
करावें कीर्तन । मुखीं गावे हरिचे गुण ।।१।।
मग कांहीं नव्हे बाधा । काम दुर्जनाच्या क्रोधा ।।धृ।।
शांतिखड्ग हातीं। काळासी ते नागविती ।।२।।
तुका म्हणे दाता सखा । ऐसा अनंतासारिखा ।।३।।

४११०
तुझी कीर्ती सांगों तुजपुढें जरी । ब्रम्हांडीं ही हरी माईना ते ।।१।।
मेरूची लेखणी सागराची शाई । कागद हा मही न पुरे चि ।।धृ।।
अनंत अपार आपंगिले भक्त । माझें चि संचित ओडवेना ।।२।।
तुका म्हणे तुम्हां बोल नाहीं देवा । पामरें म्यां सेवा केली नाहीं ।।३।।

४१११
काय साधनाच्या कोटी । केल्या आटी होती त्या।।१।।
देव कृपा करी जरी । होय उजरी स्वरूपीं ।।धृ।।

केले होते चिंता श्रम । उपरम न होतां ।।२।।
तुका म्हणे कळों आलें । सर्व जालें आपरूप ।।३।।

४११२
तुज काय करूं मज एक सार । अमृतसागर नाम तुझें ।।१।।
काय येणें उणें आम्हां तयापोटीं । गोवितां हे कंठीं कामधेनु ।।धृ।।
नोळखे तानुलें माय ऐसी कोण । वोरसे देखून शोक त्याचा ।।२।।
जो नाहीं देखिला याचक नयनीं । तो पावे घेउनि लज्जा दान ।।३।।
नामासाटीं प्राण सांडियेला रणीं । शूर ते भांडणीं न फिरती ।।४।।
तुका म्हणे आम्ही गातां गीतीं भला । भेटूनी विठ्ठला काय चाड ।।५।।

४११३
कृपेचे सागर हे साधुजन । तिंहीं कृपादान केलें मज।।१।।
बोबडे वाणीचा केला अंगीकार । तेणें माझा स्थिर केला जीव ।।धृ।।
तेणें सुखें मन स्थिर जालें ठायीं । संतीं दिला पायीं ठाव मज ।।२।।
नाभी नाभी ऐसें बोलिलों वचन । तें माझें कल्याण सर्वस्व ही ।।३।।
तुका म्हणे जालों आनंदनिर्भर । नाम निरंतर घोष करूं ।।४।।

४११४
भक्तीचें वर्म जयाचिये हातीं । तया घरी शांति दया ।।१।।
अष्टमासिद्धि वोळगती द्वारीं । न वजती दुरी दवडितां।।धृ।।
तेथें दुष्ट गुण न मिळे निशेष । चैतन्याचा वास जयामाजी ।।२।।
संतुष्ट चित्त सदा सर्वकाळ । तुटली हळहळ त्रिगुणाची ।।३।।
तुका म्हणे येथें काय तो संदेह । आमचें गौरव आम्ही करूं ।।४।।

४११५
साच हा विठ्ठल साच हें करणें । संत जें वचनें बोलियेले ।।१।।
साच तें स्वहित साच ते प्रचित । साच वेद नीत सांगतील ।।२।।
तुका म्हणे घेती साच साच भावें । लटिकें वर्म ठावें नाहीं त्यांसी ।।३।।

४११६
संगें वाढे सीण न घडे भजन । त्रिविध हें जन बहु देवा ।।१।।
याचि दुःखें या जनाचा कांटाळा । दिसताती डोळां नानाछंद ।।धृ।।

एकविध भाव राहावया ठाव । नेदी हा संदेह राहों चित्तीं ।।२।।
शब्दज्ञानी हित नेणती आपुलें । आणीक देखिलें नावडे त्या ।।३।।
तुका म्हणे आतां एकलें चि भलें । बैसोनि उगलें राहावें तें ।।४।।

४११७
तुझें वर्म आम्हां कळों आलें सुखें । संतांचिया मुखें पांडुरंगा ।।१।।
अवघा चि नट वाउगा पसारा । चेईला तूं खरा तूं चि एक ।।धृ।।
म्हणउनि देहबुद्धि नासिवंता । नातळे या चित्ता नेदावया ।।२।।
सोय हे लागली पुढिलांची वाट । पावले जे नीट तुजपाशीं ।।३।।
तुका म्हणे नाहीं कोणासवें काज । बोलायाचें मज अंतरींचें ।।४।।

४११८
पुण्यपापा ठाव नाहीं सुखदुःखा । हानिलाभशंका नासलिया ।।१।।
जिंता मरण आलें आप पर गेलें । मूळ छेदियेलें संसाराचें ।।धृ।।
अधिकार जाती वर्णधर्मयाती । ठाव नाहीं सत्यअसत्याशी ।।२।।
जन वन भिन्न आचेत चळण । नाहीं दुजेपण ठाव यासी ।।३।।
तुका म्हणें देह वाईलें विठ्ठलीं । तेव्हां च घडली सर्व पूजा ।।४।।

४११९
संकोचतो जीव महत्त्वाच्या भारें । दासत्व चि बरें बहु वाटे ।।१।।
कळावी जी माझी आवडी हे संतां । देणें तरि आतां हें चि द्यावें ।।धृ।।
तुमचे चरण पावविलों सेवा । म्हणउनि हेवा हा चि करीं ।।२।।
विनउनी तुका वंदितो चरण । लेखा रजरेण चरणींचें।।३।।

४१२०
देव कैंचा तया दुरी । भाका बरी करुणा ।।१।।
आळवित्या न लगे धर । माय जाणे रे भातुकें ।।धृ।।
नावे तरी ज्याचा भार । पैल पार जवळी त्या ।।२।।
आतां परदेशी तुका । जाला लोकांवेगळा ।।३।।

४१२१
भक्ति ज्याची थोडी । पूर्ण विषयांची गोडी ।।१।।
तो नर चि नव्हे पाहीं । खर जाणावा तो देहीं ।।धृ।।

भजन पूजन ही नेणे । काय स्वरूपासी जाणे ।।२।।
तुका म्हणे त्याला । भोवंडून बाहेर घाला ।।३।।

४१२२
समुद्र हा पिता बंधु हा चंद्रमा । भगिनी ते रमा शंखाची या ।।१।।
मेहुणा जयाचा द्वारकेचा हरि । शंख दारोदारीं भीक मागे ।।२।।
दुष्ट हें जाणावें आपुलें स्वहित । तुका म्हणे मात ऐसी आहे ।।३।।

४१२३
भवाचिया संगें बहु च नाडिले । कळिकाळें पाडिले तोंडघसीं ।।१।।
तया भवसंगें गुंतलासी वांयां । धन पुत्र जाया भुलों नको ।।धृ।।
जेजे घडी जाय तेते काळ खाय । प्राण्या तरणोपाय काय केला ।।२।।
तुका म्हणे करीं सर्व ही तूं त्याग । अपाअ हें सर्वांग जगदीशीं ।।३।।

४१२४
रुचे सकळा मिष्टान्न । रोग्या विखाच्या समान।।१।।
तरि कां तया एकासाटीं । काम अवघें करणें खोटीं ।।धृ।।
दर्पण नावडे एका । ठाव नाहीं ज्याच्या नाका ।।२।।
तुका म्हणे खळा । उपदेशाचा कांटाळा ।।३।।

४१२५
जागा घरटी फिरे तस्कराची दिवसाराती । नीदसुरें नाडिलीं असो मागों किती ।।१।।
हाट करी सकळ जन । वस्तु करा रे जतन ।।धृ।।
हुशार ठायीं । निजनिजेलिया पाहीं ।।२।।
सावचित्त असे खरा । लाभ घेउन जाये घरा ।।३।।
तराळ राळ बोंबें उतराई। राखा आपुलिया भाई ।।४।।
हरिच्या नामीं घालूं जागा । तुका म्हणे हुशार गा ।।५।।

४१२६
संतांनीं सरता केलों तैसेपरी । चंदनीं ते बोरी व्यापियेली।।१।।
गुण दोष याती न विचारितां कांहीं । ठाव दिला पायीं आपुलिया ।।२।।
तुका म्हणे आलें समर्थाच्या मना । तरि होय राणा रंक त्याचा ।।३।।

४१२७
चित्तीं तुझे पाय डोळां रूपाचें ध्यान । अखंड मुखीं नाम वर्णावे गुण ।।१।।
हें चि एक तुम्हां देवा मागणें दातारा । उचित तें करा माझा भाव जाणूनि ।।धृ।।
खुंटली जाणींव माझें बोलणें आतां । करूं यावी तैसी करावी बाळकाची चिंता ।।२।।
तुका म्हणे आतां नको देऊं अंतर । न कळे पुढें काय बोलों विचार।।३।।

४१२८
संतांच्या पादुका घेईन मोचे खांदीं । हातीं टाळ दिंडी नाचेन पुढें ।।१।।
भजनविधी नेणें साधन उपाय । सकळ सिद्धि पाय हरिदासांचे ।।धृ।।
ध्यानगति मति आसन समाधि । हरिनाम गोविंदीं प्रेमसुख ।।२।।
नेणता निर्लज्ज नेणें नादभेद । सुखें हा गोविंद गाऊं गीतीं ।।३।।
सर्व जोडी मज गोत आणि वित्त । तुका म्हणे संतमहंतपाय ।।४।।

४१२९
हरिजनीं प्राण विकली हे काया । अंकिला मी तया घरीं जालों ।।१।।
म्हणियें सत्वर करीन सांगतां । घेईन मी देतां शेष त्यांचें ।।धृ।।
आस करूनियां राहेन अंगणीं । उचिष्टाची धणी घ्यावयासी ।।२।।
चालतां ते मागाअ चरणीचे रज । उडती सहज घेइन आतां ।।३।।
दुरि त्यांपासूनि न वजें दवडितां । तुका म्हणे लाता घेइन अंगीं ।।४।।

४१३०
पुण्य फळलें बहुतां दिवसां । भाग्यउदयाचा ठसा । जाला सन्मुख तो कैसा । संतचरण पावलों ।।१।।
आजि फिटलें माझें कोडें । भवदुःखाचें सांकडें । कोंदाटलें पुढें । ब्रम्ह सावळें।।धृ।।
आलिंगणें संतांचिया । दिव्य जाली माझी काया । मस्तक पाया । वरी त्यांच्या ठेवितां ।।२।।
तुका म्हणे धन्य झालों । सुखें संतांचिया धालों । लोटांगणीं आलों । पुढें भार देखोनी ।।३।।

४१३१
ठाव देऊनिया राखें पायापासीं । मी तों आहें रासी पातकाची ।।१।।
पातकाची रासी म्हणतां लागे वेळ । ऐके तो कृपाळ नारायण ।।धृ।।
नारायणनामें अवघें सांग जालें । असंग चि केलें एकमय ।।२।।
एकमय जालें विठोबाच्या नामें । भेदाभेद कर्म आणिक कांहीं ।।३।।
तुका म्हणे चित्तीं चिंतिलें जें होतें । तें होय आपैतें नामें याच्या ।।४।।

४१३२
आतां आम्हां भय नाहीं बा कोणाचें । बळ विठोबाचें जालें असे ।।१।।
धीर दिला आम्हां येणें पांडुरंगें । न पांगों या पांगें संसाराच्या ।।२।।
तुका म्हणे माझा कैवारी हा देव । नाहीं भय भेव त्याच्या संगें ।।३।।

४१३३
भक्ति आम्ही केली सांडुनी उद्वेग । पावलों हें सांग सुख याचें ।।१।।
सुख आम्हां जालें धरितां यांचा संग । पळाले उद्वेग सांडूनिया ।।२।।
तुका म्हणे सुख बहु जालें जिवा । घडली या सेवा विठोबाची ।।३।।

४१३४
शास्त्रज्ञ हो ज्ञाते असती बहुत । परि नाहीं चित्त हाता आलें ।।१।।
क्षणा एका साटीं न धरवे धीर । तेणें हा रघुवीर अंतरतो ।।धृ।।
तोळाभर सोनें रतिभार राई । मेळविल्या पाहीं नास होतो ।।२।।
हरीचे अंकित असती विरळागत । तयांसी अच्युत कृपा करी ।।३।।
तुका म्हणे काय धुडवण्या गोष्टी । जंव नाहीं गांठी चित्त आलें ।।४।।

४१३५
इंद्रियांसी नेम नाहीं । मुखीं राम म्हणोनि काई ।।१।।
जेविं मासीसंगें अन्न । सुख नेदी तें भोजन ।।धृ।।
कीर्तन करावें । तैसें करूनी दावावें ।।२।।
हें तों अंगीं नाहीं चिन्हें । गाइलें वेश्येच्या ढव्यानें ।।३।।
तुका म्हणे नका रागा । संत शिवूं नेदिती अंगा ।।४।।

४१३६
न लगे देवा तुझें आम्हांसी वैकुंठ । सायुज्याचा पट न लगे मज ।।१।।

देईं तुझें नाम मज सर्वकाळीं । मागेन वनमाळीहें चि तुज ।।धृ।।
नारद तुंबर उद्धव प्रल्हाद । बळी रुक्मांगद नाम ध्याती ।।२।।
सिद्ध मुनिगण गंधर्व किन्नर । करिताती गजर रामनामें।।३।।
तुका म्हणे हरी देईं तुझें नाम । अखंडित प्रेम हें चि द्यावें ।।४।।

४१३७
पावलों प्रसाद इच्छा केली तैसी । जालें या चित्तासी समाधान ।।१।।
मायबाप माझा उभा कृपादानी । विटे सम जोडूनि पादांबुजें ।।धृ।।
सांभाळासी येऊं नेदी च उणीव । अधिकारगौरव राखे तैसें ।।२।।
तुका म्हणे सर्व अंतर्बाह्य आहे । जया तैसा राहे कवळूनी ।।३।।

४२३८
होतें तैसें पायीं केलें निवेदन । अंतरलों दिन बहुत होतों ।।१।।
संबोखुनी केलें समाधान चित्त । वोगरुणि भात प्रेमरस।।धृ।।
नामरत्नमणी करूनी भूषण । अळंकारमंडण माळा दिली ।।२।।
तुका म्हणे सुखें जालों निरामय । नामीं नामसोय निमग्नता ।।३।।

४१३९
स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण । अंतरींची खुण पावूनियां ।।१।।
पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मीळित । कंठ सद्गदित रोमांच आले ।।धृ।।
चित्त चाकाटलें स्वरूपा माझारी । न निघे बाहेरी सुखावलों ।।२।।
सुनीळ प्रकाश उदैजला दिन । अमृताचें पान जीवनकळा ।।३।।
शशिसूर्या जाली जीवें ओंवाळणी । आनंदा दाटली आनंदाची ।।४।।
तुका म्हणे सुखें प्रेमासी डुलत । वीरालों निश्चिंत निश्चितीनें ।।५।।

४१४०
बोध्यअवतार माझिया अदृष्टा । मौन्य मुखें निष्ठा धरियेली ।।१।।
लोकांचियेसाटीं शाम चतुर्भुज । संतांसवें गुज बोलतसां ।।धृ।।
आलें कलियुग माझिया संचिता । डोळां हाकलितां न पडेसी ।।२।।
म्यां च तुझें काय केलें नारायणा । कां नये करुणा तुका म्हणे ।।३।।

४१४१
मुखीं विठ्ठलाचें नाम । मग कैचा भवभ्रम ।।१।।

चालतां बोलतां खातां । जेवितां निद्रा करितां ।।धृ।।
सुखें असों संसारीं । मग जवळी च हरि ।।२।।
मुक्तिवरील भक्ति जाण । अखंड मुखीं नारायण ।।३।।
मग देवभक्त जाला । तुका तुकीं उतरला ।।४।।

४१४२
प्रेम जडलें तुझे पायीं । आणीक न सुचे मजला कांहीं ।।१।।
रात्रीदिवस तुझें ध्यान । तें चि माझें अनुष्ठान ।।धृ।।
नामापरतें नेणें दुजें । ऐसें कळलें मजला निज ।।२।।
तुका म्हणे अंतकाळीं । आम्हां सोडवीं तात्काळीं ।।३।।

४१४३
तुझे पाय माझी काशी । कोण जाय माझें काशी।।१।।
तुझें रूप तें चि ध्यान । तें चि माझें अनुष्ठान ।।धृ।।
तुझे चरण ते चि गया । जालें गयावर्जन देहा ।।२।।
तुका म्हणे सकळ तीर्थें । तुझें पायीं वसती येथें ।।३।।

४१४४
क्षुधा तृषा कांहीं सर्वथा नावडे । पहावया धांवें कोल्हांटासी ।।१।।
कथेसी साक्षेपें पाचारिला जरी । म्हणे माझ्या घरीं कोणी नाहीं ।।धृ।।
बलत्कारीं जरी आणिला कथेसी । निद्रा घे लोडेंसी टेंकूनियां ।।२।।
तुका म्हणे थुंका त्याच्या तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ।।३।।

४१४५
श्रीराम सखा ऐसा धरीं भाव । मीपणाचा ठाव पुसीं मना ।।१।।
शरण निरंतर म्हण तूं गोविंदा । वाचे लावीं धंदा नारायण ।।धृ।।
यापरि सोपान नाहीं रे साधन । वाहातसें आण तुझी मना ।।२।।
नको कांहीं करूं अळस अंतरीं । जपें निरंतर रघुपती ।।३।।
तुका म्हणे मोठा लाभ नरदेहीं । देहीं च विदेही होती नामें ।।४।।

४१४६
सर्वापरी तुझे गुण गाऊं उत्तम । तुझेठायीं प्रेम राहो माझें ।।१।।
माउलीपरिस आहेसी उदार । तरि कां निष्ठुर मन केलें।।धृ।।

गजेंद्राकारणें केलें त्वां धांवणें । तरि कां निर्वाण पाहातोसी।।२।।
प्रल्हादास कष्टीं रक्षिलें तों देवा । तरि कां केशवा सांडी केली ।।३।।
अन्यायी अजामेळ तो जाला पावन । ऐसें हें पुराण हाका मारी ।।४।।
तुका म्हणे माझे थोर अपराध । नाम करी छेद क्षणमात्रें ।।५।।

४१४७
आतां वांटों नेदीं आपुलें हें मन । न सोडीं चरण विठोबाचे ।।१।।
दुजियाचा संग लागों नेदीं वारा । आपुल्या शरीरावरूनियां ।।धृ।।
यावें जावें आम्हीं देवा च सांगातें । मागूनी करीत हें चि आलों ।।२।।
काय वांयां गेलों तो करूं उद्वेग । उभा पांडुरंग मागें पुढें ।।३।।
तुका म्हणे प्रेम मागतों आगळें । येथें भोगूं फळें वैकुंठींचीं ।।४।।

४१४८
आतां आम्हां हें चि काम । वाचे स्मरूं रामराम ।।१।।
ऐसी मोलाची हे घडी । धरूं पायांची आवडी ।।धृ।।
अमृताची खाणी । तये ठायीं वेचूं वाणी ।।२।।
तुका म्हणे पांडुरंगा । माझ्या जीवींच्या जिवलगा ।।३।।

४१४९
आतां जावें पंढरीसी । दंडवत विठोबासी ।।१।।
जेथें चंद्रभागातिरीं । आम्ही नाचों पंढरपुरीं ।।धृ।।
जेथें संतांची दाटणी । त्याचें घेऊं पायवणी ।।२।।
तुका म्हणे आम्ही बळी । जीव दिधला पायां तळीं ।।३।।

४१५०
आम्ही नरका जातां काय येइल तुझ्या हाता । ऐसा तूं अनंता विचारीं पां
।।१।।
तुज शरण आलियाचें काय हें चि फळ। विचारा दयाळ कृपानिधी ।।धृ।।
तुझें पावनपण न चले आम्हांसीं । ऐसें हृषीकेशी कळों आलें ।।२।।
आम्ही दुःख पावों जन्ममरण वेथा । काय तुझ्या हाता येत असे ।।३।।
तुका म्हणे तुम्ही खादली हो रडी । आम्ही धरली सेंडी नाम तुझें ।।४।।

४१५१

पांडुरंगे पाहा खादलीसे रडी । परिणाम सेंडी धरिली आम्ही ।।१।।
आतां संतांनीं करावी पंचाईत । कोण हा फजितखोर येथें ।।धृ।।
कोणाचा अन्याय येथें आहे स्वामी । गर्जतसों आम्ही पातकी ही ।।२।।
याचें पावनपण सोडवा चि तुम्ही । पतितपावन आम्ही आहों खरें ।।३।।
आम्ही तंव आहों अन्यायी सर्वथा । याची पावन कथा कैसी आहे ।।४।।
तुका म्हणे आम्ही मेलों तरी जाणा । परि तुमच्या चरणा न सोडावें ।।५।।

४१५२
घालूनियां मध्यावर्ती । दाटुनि उपदेश देती ।।१।।
ऐसे पोटभरे संत । तयां कैंचा भगवंत ।।धृ।।
रांडापोरांतें गोविती । वर्षासन ते लाविती ।।२।।
जसे बोलती निरोपणीं । तैसी न करिती करणी ।।३।।
तुका म्हणे तया । तमोगुणियाची क्रिया ।।४।।

४१५३
वैभव राज्य संपत्ती टाकावी । उदरार्थ मागावी माधोकरी।।१।।
आपुलें तें आधीं करावें स्वहित । ऐसी आहे नीत स्वधर्माची ।।धृ।।
वर्ण कुळ जाति याचा अभिमान । तजावा सन्मान लौकिकाचा ।।२।।
तुका म्हणे राहे एकाकी निःशंक । देउनियां हाक कंठीं काळ ।।३।।

४१५४
हातपाय मिळोनि मेळा । चला म्हणती पाहों डोळां।।१।।
देखणी नव्हे देखती कैसे । सकळांचा देखणा डोळा चि असे ।।२।।
डोळ्याचा डोळा पाहों गेला । तुका म्हणे तो पाहों ठेला ।।३।।

४१५५
मुखें संति इंद्रियें जती । आणिक नेणे भाव भक्ती।।१।।
देवा हे चि दोन्ही पदें । येर गाइलीं विनोदें ।।२।।
चित्ताचें आसन। तुका करितो कीर्त्तन ।।३।।

४१५६
धांवोनियां आलों पहावया मुख । गेलें माझें दुःख जन्मांतरिंचें ।।१।।
ऐकिलें ही होतें तैसें चि पाहिलें । मन स्थिरावलें तुझ्या पायीं ।।२।।

तुका म्हणे माझी इच्छा पूर्ण जाली । कांहीं न राहिली वासना हे ।।३।।

४१५७
गावलोकिकाहीं लावियेलें पिसें । काय सांगों ऐसें तुजपासीं ।।१।।
तोंड काळें केलें फिरविलें मज । नाहीं धरिली लाज पांडुरंगा ।।धृ।।
काय तुजपासीं सांगों हें गाऱ्हाणें । मग काय जिणें तुझें माझें ।।२।।
कोणासाटीं आतां करावा संसार । केली वारावार आपणें चि ।।३।।
तुका म्हणे आम्ही मोडिला घरचार । धरियेला धीर तुझ्या पायीं ।।४।।

४१५८
जीवें जीव नेणे पापी सारिका चि । नळी दुजयाची कापूं बैसे ।।१।।
आत्मा नारायण सर्वां घटीं आहे । पशुमध्यें काय कळों नये ।।धृ।।
देखत हा जीव हुंबरे वरडत । निष्ठुराचे हात वाहाती कैसे ।।२।।
तुका म्हणे तया चांडाळासी नर्क । भोगिती अनेक महादुःखें ।।३।।

४१५९
मनीं भाव असे कांहीं । तेथें देव येती पाहीं ।।१।।
पाहा जनाई सुंदरी । तेथें देव पाणी भरी ।।धृ।।
शुद्ध पाहोनियां भाव । त्याचे हृदयीं वसे देव ।।२।।
तुका म्हणे विठोबासी । ठाव देईं चरणापासीं ।।३।।

४१६०
भागल्याचें तारूं शिणल्याची साउली । भुकेलिया घाली प्रेमपान्हा ।।१।।
ऐसी हे कृपाळू अनाथांची वेशी । सुखाची च राशी पांडुरंग ।।धृ।।
सकळां सन्मुख कृपेचिया दृष्टी । पाहे बहु भेटी उतावीळां ।।२।।
तुका म्हणे येथें आतां उरला कैंचा । अनंता जन्मींचा शीण भाग ।।३।।

४१६१
काय न्यून आहे सांगा । पांडुरंगा तुम्हांपें ।।१।।
आमुची तों न पुरे इच्छा । पिता ऐसा मस्तकीं ।।धृ।।
कैसी तुम्हां होय सांडी । करुणा तोंडीं उच्चारें ।।२।।
आश्चर्य चि करी तुका । हे नायका वैकुंठिंचिया ।।३।।

४१६२
चित्त गुंतलें प्रपंचें । जालें वेडें ममतेचें ।।१।।
आतां सोडवीं पांडुरंगा । आलें निवारीं तें आंगा ।।धृ।।
गुंतली चावटी । नामीं रूपीं जाली तुटी ।।२।।
तुका म्हणे चाली । पुढें वाट खोळंबली।।३।।

४१६३
किती एका दिसीं । बुद्धि जाली होती ऐसी ।।१।।
कांहीं करावें स्वहित । तों हें न घडे उचित ।।धृ।।
अवलंबुनी भीक। लाज सांडिली लौकिक ।।२।।
तुका म्हणे दीन । जालों मनुष्यपणा हीन ।।३।।

४१६४
आतां बरें जालें । सकाळीं च कळों आलें ।।१।।
मज न ठेवीं इहलोकीं । आलों तेव्हां जाली चुकी ।।धृ।।
युगमहिमा ठावा । नव्हता ऐसा पुढें देवा ।।२।।४१६४
तुका म्हणे ठेवीं । भोगासाटीं निरयगांवीं ।।३।।

४१६५
परि आतां माझी परिसावी विनंती । रखुमाईच्या पती पांडुरंगा ।।१।।
चुकलिया बाळा न मारावें जीवें । हित तें करावें मायबापीं ।।२।।
तुका म्हणे तुझा म्हणताती मज । आतां आहे लाज हे चि तुम्हां ।।३।।

४१६६
पापाचिया मुळें । जालें सत्याचें वाटोळें ।।१।।
दोष जाले बळिवंत । नाहीं ऐसी जाली नीत ।।धृ।।
मेघ पडों भीती । पिकें सांडियेली क्षिती ।।२।।
तुका म्हणे कांहीं । वेदा वीर्य शक्ति नाहीं।।३।।

४१६७
ऐसा दुस्तर भवसागर । नेणों कैसा उतरूं पार ।।१।।
कामक्रोधादि सावजें थोर । दिसताती भयंकर ।।धृ।।
मायाममतेचे भोवरे । घेती भयानक फेरे ।।२।।

वासनेच्या लहरा येती । उद्योगहेलकावे बसती ।।३।।
तरावया एक युक्ति असे । तुका नामनावेमधीं बैसे।।४।।

४१६८
देव जडला जाइना अंगा । यासी काय करूं सांगा।।१।।
वरकड देव येती जाती । हा देव जन्माचा सांगाती ।।धृ।।
अंगीं भरलें देवाचें वारें । देव जग चि दिसे सारें ।।२।।
भूत न बोले निरुतें। कांहीं केल्या न सुटे तें ।।३।।
जीव खादला दैवतें । माझा आणि पंचभूतें ।।४।।
तुका म्हणे वाडें कोडें । उभें पुंडलिकापुढें।।५।।

४१६९
हरिदासाचिये घरीं । मज उपजवा जन्मांतरीं ।।१।।
म्हणसी कांहीं मागा । हें चि देगा पांडुरंगा ।।धृ।।
संतां लोटांगणीं । जातां लाजों नको मनीं ।।२।।
तुका म्हणे अंगीं । शक्ती देईं नाचें रंगीं ।।३।।

४१७०
लटिक्याचें आंवतणें जेविलिया साच । काय त्या विश्वास तो चि खरा ।।१।।
कोल्हांटिणी लागे आकाशीं खेळत । ते काय पावत अमरपद ।।धृ।।
जळमंडपयाचे घोडे राउत नाचती । ते काय तडवती युद्धालागीं ।।२।।
तुका म्हणे तैसें मतवादीयांचें जिणें। दिसे लाजिरवाणें बोलतां चि ।।३।।

४१७१
काय आम्हीं केलें ऐसें । नुद्धरीजेसें सांगावें ।।१।।
हरण कोल्हें वैकुंठवासी । कोण त्यासी अधिकार ।।धृ।।
गजा नाड्या सरोवरीं । नाहीं हरी विचारिलें ।।२।।
तुका म्हणे गणिका नष्ट। माझे कष्ट त्याहूनि ।।३।।

४१७२
भाग्यासाटीं गुरु केला । नाहीं आम्हांसी फळला।।१।।
याचा मंत्र पडतां कानीं । आमच्या पेवांत गेलें पाणी ।।धृ।।
गुरु केला घरवासी । आमच्या चुकल्या गाईम्हसी ।।२।।

स्वामी आपुली बुटबुट घ्यावी । आमुची प्रताप टाकुन द्यावी ।।३।।
तुका म्हणे ऐसे नष्ट । त्यांसी दुणे होती कष्ट ।।४।।

४१७३
गुणा आला ईटेवरी । पीतांबरधारी सुंदर जो ।।१।।
डोळे कान त्याच्या ठायीं । मन पायीं राहो हें ।।धृ।।
निवारोनी जाय माया । ऐसी छाया जयासी ।।२।।
तुका म्हणे समध्यान । हे चरण सकुमार ।।३।।

४१७४
रंगीं रंगें नारायण । उभा करितों कीर्त्तन ।।१।।
हातीं घेउनियां वीणा । कंठीं राहें नारायणा ।।धृ।।
देखिलीसे मूर्ती । माझ्या ह्रदयाची विश्रांति ।।२।।
तुका म्हणे देवा । देईं कीर्त्तनाचा हेवा ।।३।।

४१७५
तुझा भरवसा आम्हां । फार होता पुरुषोत्तमा ।।१।।
भवसागरसंकटीं । तारिशील जगजेठी ।।धृ।।
नाम आदित्याचें झाड। त्याचा न पडे उजड ।।२।।
सिलंगणीचें सोनें । त्यासीं गाहाण ठेवी कोण ।।३।।
तुका म्हणे देवा । ब्रिद सोडूनियां ठेवा ।।४।।

४१७६
जालों आतां दास । माझी पुरवीं हे आस ।।१।।
पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदीं हरी ।।धृ।।
संतसमागम । अंगीं भरोनियां प्रेम ।।२।।
चंद्रभागे स्नान । तुका म्हणे हें चि दान ।।३।।

४१७७
यासाटीं करितों निष्ठुर भाषण । आहेसी तूं जाण सर्वदाता ।।१।।
ऐसें दुःख कोण आहे निवारिता । तें मी जाऊं आतां शरण त्यासी ।।धृ।।
बैसलासे केणें करुनि एक घरीं । नाहीं येथें उरी दुसऱ्याची ।।२।।
तुका म्हणे आलें अवघें पायांपें । आतां मायबापें नुपेक्षावें ।।३।।

४१७८

पोरा लागलीसे चट । धरी वाट देवळाची ।।१।।
सांगितलें नेघे कानीं । दुजें मनी विठ्ठल ।।धृ।।
काम घरीं न करी धंदा । येथें सदा दुश्चित्त ।।२।।
आमुचे कुळीं नव्हतें ऐसें । हें चि पिसें निवडलें ।।३।।
लौकिकाची नाहीं लाज । माझें मज पारिखें।।४।।
तुका म्हणे नरका जाणें । त्या वचनें दुष्टाचीं ।।५।।

४१७९

देवा बोलें आतां बोला । त्वां कां धरिला अबोला।।१।।
भेऊं नको देईं भेटी । तूं कां पडिलासी संकटीं ।।धृ।।
तुझ्या जीवींचें मी जाणें । म्हणसी मुक्ती आम्हां देणें ।।२।।
तुका म्हणे न लगे कांहीं । चित्त राहो तुझे पायीं ।।३।।

४१८०

यमधर्म आणिक ब्रम्हादिक देव । त्यांचा पूर्ण भाव तुझे पायीं ।।१।।
करिती स्मरण पार्वतीशंकर । तेथें मी किंकर कोणीकडे।।धृ।।
सहस्रमुखेंसी घोष फणिवराचा । मज किंकराचा पाड काय ।।२।।
चंद्र सूर्य आणि सर्व तारांगणें । करिती भ्रमण प्रदक्षिणा ।।३।।
तुका म्हणे त्यांसी स्वरूप कळेना । तेथें मज दीना कोण पुसे ।।४।।

४१८१

विठोबाचे पायीं जीव म्यां ठेविला । भक्तिभावें केला देव ॠणी ।।१।।
देव माझा ॠणी आहे सहाकारी । परसपरवारि भवभय ।।धृ।।
भवभयडोहीं बुडों नेदी पाहीं । धरूनियां बाही तारी मज ।।२।।
तारियेले दास पडिल्या संकटीं । विष केलें पोटीं अमृतमय ।।३।।
अमृतातें सेवीतसे नामरसा । तोडियेला फांसा बंधनाचा ।।४।।
बंधनाचा फांसा आम्हीं कांहीं नेणों । पाय तुझे जाणों पद्मनाभा ।।५।।
पद्मनाभा नाभिकमळीं ब्रम्हादिक । त्रैलोक्यनायक म्हणविसी ।।६।।
म्हणविसी देवा दासाचा अंकित । मनाचा संकेत पाहोनियां ।।७।।
पाहोनियां दृढ निश्चय तयाचा । तो चि दास साचा जवळीक ।।८।।
जवळीक जाली ब्रम्हीं सुखावले । मार्ग दाखविले मूढा जना ।।९।।

मूढा जनामाजी दास तुझा मूढ । कास तुझी दृढ धरियेली ।।१०।।
धरियेले तुझे पाय रे विठ्ठला । तुका सुखी जाला तुझ्या नामें ।।११।।

४१८२
बहु क्लेशी जालों या हो नरदेहीं । कृपादृष्टी पाहीं पांडुरंगा ।।१।।
पांडुरंगा सर्वदेवांचिया देवा । घ्यावी माझी सेवा दिनानाथा ।।धृ।।
दिनानाथ ब्रिद त्रिभुवनीं तुझें । मायबापा ओझें उतरावें ।।२।।
उतरीं सत्वर पैलथडी नेईं । पूर्णसुख देईं पायांपाशीं।।३।।
पायांपाशीं मज ठेवीं निरंतर । आशा तुझी फार दिवस केली ।।४।।
केली आस तुझी वाट मी पाहातों । निशिदिनीं ध्यातों नाम तुझें।।५।।
नाम तुझें गोड स्वभक्ता आवडे । भक्तांलागीं कडे खांदा घेसी।।६।।
घेसी खांद्यावरी खेळविसी लोभें । पाउल शोभे विटेवरि ।।७।।
विटेवरि उभा देखिलासी डोळां । मनाचा सोहळा पुरविसी ।।८।।
पुरवीं सत्वर त्रैलोक्यस्वामिया । मिठी घाली पायां तुका भावें ।।९।।

४१८३
एक वेळे तरी जाईन माहेरा । बहुजन्म फेरा जाल्यावरी।।१।।
चित्ता हे बैसली अविट आवडी । पालट ती घडी नेघे एकी ।।धृ।।
करावें ते करी कारणशरीर । अंतरीं त्या धीर जीवनाचा ।।२।।
तुका म्हणे तरि होइल विलंब । परि माझा लाभ खरा जाला ।।३।।

४१८४
सांग त्वां कोणासी तारिलें । संतांवेगळें उद्धरिलें।।१।।
संत शब्द उपदेशी । मग तूं हो म्हणशी ।।२।।
तुका म्हणे नाहीं तुझा उपकार । करूं संतांचा उच्चार ।।३।।

४१८५
उमा रमा एके सरी । वाराणसी ते पंढरी ।।१।।
दोघे सारिखे सारिखे । विश्वनाथ विठ्ठल सखे ।।धृ।।
तेथें असे भागीरथी। येथें जाणा भीमरथी ।।२।।
वाराणशी त्रिशुलावरी । सुदर्शनावरि पंढरी ।।३।।
मनकर्णिका मनोहर । चंद्रभागा सरोवर ।।४।।
वाराणशी भैरवकाळ । पुंडलीक क्षेत्रपाळ ।।५।।

धुंडिराज दंडपाणी। उभा गरुड कर जोडुनी ।।६।।
गया ते चि गोपाळपुर । प्रयाग निरानरसिंपुर ।।७।।
तेथें असती गयावळ । येथें गाई आणि गोपाळ।।८।।
शमीपत्रपिंड देती । येथें काला निजसुखप्राप्ति ।।९।।
संतसज्जनीं केला काला । तुका प्रसाद लाधला ।।१०।।

४१८६
फट्याचे बडबडे चवी ना संवाद । आपुला चि वाद आपणासी ।।१।।
कोणें या शब्दाचे मरावें घाणी । अंतरें शाहाणी राहिजे हो ।।धृ।।
गाढवाचा भुंक आइकतां कानीं । काय कोडवाणी ऐसियेचें ।।२।।
तुका म्हणे ज्यासी करावें वचन । त्याचे येती गुण अंगास ते ।।३।।

४१८७
दिवसा व्यापारचावटी । रात्री कुटुंबचिंता मोटी ।।१।।
काय करूं या मनासी । नाठवे हृषीकेशी ।।धृ।।
वेश्येपाशीं रात्रीं जागे । हरिकीर्त्तनीं निद्रा लागे ।।२।।
तुका म्हणे काय जालासी । वृथा संसारा आलासी ।।३।।

४१८८
अहो कृपावंता । हाईं बुद्धीचा ये दाता ।।१।।
जेणें पाविजे उद्धार । होय तुझे पायीं थार ।।धृ।।
वदवी हे वाचा । भाव पांडुरंगीं साचा ।।२।।
तुका म्हणे देवा । माझें अंतर वसवा ।।३।।

४१८९
निंदक तो परउपकारी । काय वर्णूं त्याची थोरी । जे रजकाहुनि भले परि । सर्व गुणें आगळा ।।१।।
नेघे मोल धुतो फुका। पाप वरच्यावरि देखा । करी साधका । शुद्ध सरते तिहीं लोकीं ।।धृ।।
मुखसंवदणी सांगते । अवघें सांटविलें तेथें । जिव्हा साबण निरुतें । दोष काढी जन्माचे ।।२।।
तया ठाव यमपुरीं । वास करणें अघोरीं । त्यासी दंडण करी । तुका म्हणे न्हाणी ते ।।३।।

४१९०
प्रपंचाची पीडा सोसिती अघोरी । जया क्षणभरी नाम नये ।।१।।
नाम नाठविती आत्मया रामाचें । धिग जिणें त्याचें भवा मूळ ।।धृ।।
मूळ ते पापाचें आचरण तयाचें । नाहीं राघवाचें स्मरण त्या ।।२।।
स्मरण भजन नावडे जयासी । आंदणीया दासी यमदूतां।।३।।
चिंतन रामाचें न करी तो दोषी । एकांत तयासीं बोलों नये ।।४।।
नये त्याचा संग धरूं म्हणे तुका । धरितां पातका वांटेकरी ।।५।।

४१९१
अर्थेविण पाठांतर कासया करावें । व्यर्थ चि मरावें घोकूनियां ।।१।।
घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहे । अर्थरूप राहे होऊनियां ।।२।।
तुका म्हणे ज्याला अथाअ आहे भेटी । नाहीं तरी गोष्टी बोलों नका ।।३।।

४१९२
बसतां चोरापाशीं तैसी होय बुद्धि । देखतां चि चिंधी मन धांवे ।।१।।
व्यभिचाऱ्यापासीं बैसतां क्षणभरी । देखतां चि नारी मन धांवे ।।धृ।।
प्रपंचाचा छंद टाकूनियां गोवा । धरावें केशवा ह्रदयांत ।।२।।
सांडुनियां देईं संसाराची बेडी । कीर्तनाची गोडी धरावी गा ।।२३।।
तुका म्हणे तुला सांगतों मी एक । रुक्मिणीनायक मुखीं गावा ।।४।।

४१९३
मस्तकीं सहावें ठांकियासी जाण । तेव्हां देवपण भोगावें गा ।।१।।
आपुलिये स्तुती निंदा अथवा मान । टाकावा थुंकोन पैलीकडे ।।धृ।।
सद्‌गुरुसेवन तें चि अमृतपान । करुनी प्राशन बैसावें गा ।।२।।
आपुल्या मस्तकीं पडोत डोंगर । सुखाचें माहेर टाकुं नये ।।३।।
तुका म्हणे आतां सांगूं तुला किती । जिण्याची फजीती करूं नये ।।४।।

४१९४
स्वामिसेवा गोड । माते बाळकाचें कोड ।।१।।
जेंजें मागावें भातुकें । तेंतें पुरवी कौतुकें ।।धृ।।
खेळविलें कोडें । हरुषें बोले कीं बोबडें ।।२।।
तुका म्हणे लाड । तेथें पुरे माझें कोड ।।३।।

४१९५

तुझें नाम पंढरिनाथा । भावेंविण नये हाता ।।१।।
दाहां नये विसां नये । पंनासां साटां नये ।।धृ।।
शां नये सहस्त्रा नये। लक्षकोडीलागीं नये ।।२।।
तुका म्हणे पंढरिनाथा । भावेंविण नये हाता ।।३।।

४१९६

संतांपायीं विन्मुख जाला । तो जरि संगति मागों आला ।।१।।
तरि त्याहुनि दुरी जावें । सुखें एकांतीं बैसावें ।।धृ।।
आत्मचर्चा नाहीं जेथें । अगी लावुनि द्यावी तेथें ।।२।।
तुका म्हणे नाहीं । चित्ता समाधान कांहीं ।।३।।

४१९७

हिरा ठेवितां काळें गाहाण । मोल न तुटे दुकाळीं जाण ।।१।।
तैसे संतजन पाहीं । विनटले श्रीहरिपायीं ।।२।।
तुका म्हणे तैसे भक्त । तयांसी जन हें निंदित ।।३।।

४१९८

परिसें गे सुनेबाई । नको वेचूं दूध दहीं ।।१।।
आवा चालिली पंढरपुरा । वेसीपासुनि आली घरा ।।धृ।।
ऐकें गोष्टी सादर बाळे । करीं जतन फुटकें पाळें ।।२।।
माझे हातींचा कलवडू । मजवाचुंनि नको फोडूं ।।३।।
वळवटक्षिरीचें लिंपन । नको फोडूं मजवांचून ।।४।।
उखळ मुसळ जातें । माझें मन गुंतलें तेथें ।।५।।
भिक्षुक आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ।।६।।
भक्षीं मपित आहारु । नको फारसी वरो सारूं ।।७।।
सून म्हणे बहुत निकें । तुम्ही यात्रेसि जावें सुखें ।।८।।
सासूबाई स्वहित जोडा । सर्व मागील आशा सोडा ।।९।।
सुनमुखीचें वचन कानीं । ऐकोनि सासू विवंची मनीं ।।१०।।
सवतीचे चाळे खोटे । म्यां जावेंसें इला वाटे।।११।।
अतां कासया यात्रे जाऊं । काय जाउनि तेथें पाहूं।।१२।।
मुलें लेंकरें घर दार । माझें येथें चि पंढरपूर ।।१३।।

तुका म्हणे ऐसें जन । गोवियेलें मायेंकरून ।।१४।।

४१९९
एक ते गाढव मनुष्याचे वेष । हालविती पुस पुढें दाढी ।।१।।
निंदा हें भोजन जेवण तयांसी । जोडी घरीं रासी पातकांच्या ।।२।।
तुका म्हणे सुखें बैसोनियां खाती । कुंभपाकीं होती नर्कवासी ।।३।।

४२००
मागत्याची टाळाटाळी । झिंझ्या वोढूनि कपाळीं।।१।।
ऐसा तंव मोळा । तुमचा नसेल गोपाळा ।।धृ।।
नसेल ना नवें । ऐसें धरियेलें देवें ।।२।।
तुका म्हणे जाला । उशीर नाहीं तो विठ्ठला।।३।।

४२०१
संसार करिती मोठ्या महत्वानें । दिसे लोका उणें न कळे त्या ।।१।।
पवित्रपण आपुलें घरच्यासी च दिसे । बाहेर उदास निंदिताती ।।धृ।।
आपणा कळेना आपले अवगुण । पुढिलाचे दोषगुण वाखाणिती ।।२।।
विषयाचे ध्यासें जग बांधियेलें । म्हणोनि लागले जन्ममृत्यु ।।३।।
तुका म्हणे माझें संचित चि असें । देवाजीचें पिसे सहजगुण ।।४।।

४२०२
गव्हाराचें ज्ञान अवघा रजोगुण । सुखवासी होऊन विषय भोगी ।।१।।
त्यासी ज्ञानउपदेश केला । संगेंविण त्याला राहावेना ।।२।।
तुका म्हणे संग उत्तम असावा । याविण उपावा काय सांगों ।।३।।

४२०३
भाग्यालागी लांचावले । देवधर्म ते राहिले ।।१।।
कथे जातां अळसे मन । प्रपंचाचें मोटें ज्ञान ।।धृ।।
अखंडप्रीति जाया । नेणे भजनाच्या ठाया ।।२।।
कथाकीर्त्तन धनाचें । सर्वकाळ विषयीं नाचे ।।३।।
तुका म्हणे पंढरिराया । ऐसे जन्मविले वांयां।।४।।

४२०४
पतिव्रतेची कीर्ती वाखाणितां । सिंदळईच्या माथां तिडिक उठे ।।२।।
आमुचें तें आहे सहज बोलणें । नाहीं विचारून केलें कोणीं ।।धृ।।
अंगें उणें त्याच्या बैसे टाळक्यांत । तेणें ठिणग्या बहुत गाळीतसे ।।२।।
तुका म्हणे आम्ही काय करणें त्यासी । ढका खवंदासी लागतसे ।।३।।

४२०५
आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाहीं ऐसा मनीं अनुभवावा ।।१।।
आवडी आवडी कळिवराकळिवरी । वरिली अंतरी ताळी पडे ।।धृ।।
अपूर्व दर्शन मातेपुत्रा भेटी । रडूं मागे तुटी हर्षयोगें ।।२।।
तुका म्हणे एकें कळतें दुसरें । बरियानें बरें आहाचाचें आहाच ।।३।।

४२०६
हे चि माझे चित्तीं । राहो भावप्रीति । विठ्ठल सुषुप्ती। जागृति स्वप्नासी ।।१।।
आणिक नाहीं तुज मागणें । राज्यचाड संपत्ति धन । जिव्हे सुख तेणें । घेतां देहीं नाम तुझें।।ध्रु।।
तुझें रूप सर्वाठायीं । देखें ऐसें प्रेम देईं । न ठेवावा ठायीं । अनुभव चित्ताचा ।।२।।
जन्ममरणाचा बाध । समुळूनि तुटे कंद । लागो हा चि छंद। हरि गोविंद वाचेसी ।।३।।
काय पालटे दरुषणें । अवघें कोंदाटे चैतन्य । जीवशिवा खंडण । होय ते रे चिंतितां ।।४।।
तुका म्हणे या चि भावें । आम्हीं धालों तुझ्या नामें । सुखें होत जन्म । भलते याती भलतैसीं ।।५।।

४२०७
मौन कां धरिलें विश्वाच्या जीवना । उत्तर वचना देईं माझ्या ।।१।।
तूं माझें संचित तूं चि पूर्वपुण्य । तूं माझें प्राचीन पांडुरंगा ।।धृ।।
तूं माझें सत्कर्म तूं माझा स्वधर्म । तूं चि नित्यनेम नारायणा ।।२।।
कृपावचनाची वाट पाहातसें । करुणा वोरसें बोल कांहीं ।।३।।
तुका म्हणे प्रेमळाच्या प्रियोत्तमा । बोल सर्वोत्तमा मजसवें ।।४।।

४२०८

काय करूं आतां धरुनियां भीड । निःशंक हें तोंड वाजविलें ।।१।।
नव्हे जगीं कोणी मुकियाचा जाण । सार्थक लाजोनी नव्हे हित ।।धृ।।
आलें तें उत्तर बोलें स्वामीसवें । धीट नीट जीवें होऊनियां ।।२।।
तुका म्हणे मना समर्थासीं गांठी । घालावी हे मांडी थापटूनि ।।३।।

४२०९
माझिया तो जीवें घेतला हा सोस । पाहें तुझी वास भेटावया ।।१।।
मातेविण बाळ न मनी आणिका । सर्वकाळ धोका स्तनपाना ।।धृ।।
वोसंगा निघाल्या वांचूनि न राहे । त्याचें आर्त माय पुरवीते ।।२।।
तुका म्हणे माते भक्तां तूं कृपाळ । गिळियेले जाळ वनांतरीं ।।३।।

४२१०
ते काय पवाडे नाहीं म्यां ऐकिले । गोपाळ रक्षिले वनांतरीं ।।१।।
मावेचा वोणवा होऊनि राक्षस । लागला वनास चहूंकडे ।।धृ।।
गगनासी ज्वाळा लागती तुंबळ । गोधनें गोपाळ वेडावलीं ।।२।।
तुका म्हणे तेथें पळावया वाट । नाहीं वा निपट ऐसें जालें ।।३।।

४२११
धडकला अग्नि आह्या येती वरी । गोपाळ श्रीहरी विनविती ।।१।।
अरे कृष्णा काय विचार करावा । आला रे वोणवा जळों आतां ।।धृ।।
अरे कृष्णा तुझें नाम बळिवंत । होय कृपावंत राख आतां ।।२।।
तुका म्हणे अरे कृष्णा नारायणा । गोपाळ करुणा भाकितिले ।।३।।

४२१२
अरे कृष्णा आम्ही तुझे निज गडी । नवनीत आवडी देत होतों ।।१।।
अरे कृष्णा आतां राखेंराखें कैसें तरीं । संकटाभीतरीं पडियेलों ।।धृ।।
वरुषला इंद्र जेव्हां शिळाधारीं । गोवर्धन गिरी उचलिला ।।२।।
तुका म्हणे तुझे पवाडे गोपाळ । वर्णिती सकळ नारायणा ।।३।।

४२१३
अरे कृष्णा तुवां काळया नाथिला । दाढे रगडिला रिठासुर ।।१।।
अरे कृष्णा तुवां पुतना शोषिली । दुर्बुद्धि कळली अंतरींची ।।धृ।।
गोपाळ करुणा ऐसी नानापरी । भाकिती श्रीहरी तुजपुढें ।।२।।

तुझें नाम कामधेनु करुणेची । तुका म्हणे त्यांची आली कृपा ।।३।।

४२१४
चहुंकडूनियां येती ते कलोळ । सभोंवते जाळ जवळि आले ।।१।।
सकुमार मूर्ति श्रीकृष्ण धाकुटी । घोंगडी आणि काठी खांद्यावरि ।।धृ।।
लहान लेंकरूं होत ते सगुण । विक्राळ वदन पसरिलें ।।२।।
चाभाड तें एक गगनीं लागलें । एक तें ठेविलें भूमीवरि ।।३।।
तये वेळे अवघे गोपाळ ही भ्याले । तुकें ही लपालें भेऊनियां ।।४।।

४२१५
श्रीमुख वोणवा गिळीत चालिलें । भ्यासुर वासिलें वदनांबुज ।।१।।
विक्राळ त्या दाढा भ्यानें पाहावेना । धाउनी रसना ज्वाळ गिळी ।।धृ।।
जिव्हा लांब धांवे गोळा करी ज्वाळ । मोटें मुखकमळ त्यांत घाली ।। २।।
तुका म्हणे अवघा वोणवा गीळिला। आनंद जाहाला गोपाळांसी ।।३।।

४२१६
गोपाळ प्रीतीनें कैसे विनविती । विक्राळ श्रीपती होऊं नको ।।१।।
नको रे बा कृष्णा धरूं ऐसें रूप । आम्हां चळकांप सुटलासे ।।धृ।।
होईं बा धाकुटा शाम चतुर्भूज । बैसोनियां गुज सुखें बोलों ।।२।।
वोणव्याच्या रागें गिळिशील आम्हां । तुका मेघशामा पायां लागे ।।३।।

४२१७
सांडियेलें रूप विक्राळ भ्यासुर । झालें सकुमार कोडिसवाणें ।।१।।
शाम चतुर्भुज मुकुट कुंडलें । सुंदर दंडलें नव बाळ ।।धृ।।
गोपाळ म्हणती कैसें रे बा कृष्णा । रूप नारायणा धरियेलें ।।२।।
कैसा वाढलासी विक्राळ जालासी । गटगटा ज्वाळांसी गिळियेलें ।।३।।
तुका म्हणे भावें पुसती गोपाळ । अनाथवत्सल म्हणोनियां ।।४।।

४२१८
बा रे कृष्णा तुझें मुख कीं कोमळ । कैसे येवढे ज्वाळ ग्रासियेले ।।१।।
बा रे कृष्णा तुझी जिव्हा कीं कोवळी । होईल पोळिली नारायणा ।।धृ।।
बैसें कृष्णा तुझें पाहूं मुखकमळ । असेल पोळलें कोणे ठायीं ।।२।।
घोंगडिया घालीं घालूनियां तळीं। वरी वनमाळी बैसविती ।।३।।

तुका म्हणे भावें आकळिला देव । कृपासिंधुराव त्रैलोक्याचा ।।४।।

४२१९

एक म्हणती मुख वासीं नारायणा । पाहों दे वदना डोळेभरि ।।१।।
वासुनियां मुख पहाती सकळ । अवघे गोपाळ व्योमाकार ।।धृ।।
म्हणती गोपाळ बेटे हो हा देव । स्वरूपाचा ठाव न कळे याच्या ।।२।।
तुका म्हणे अवघे विठोबाभोंवते । मिळाले नेणते लहानथोर ।।३।।

४२२०

एक म्हणती कृष्णा वासिलें त्वां मुख । तेव्हां थोर धाक पडिला आम्हां ।।१।।
गिळों लागलासी अग्नीचे कल्लोळ । आम्ही चळचळां कांपतसों ।।धृ।।
ज्वाळांबरोबरि गिळशील आम्हां। ऐसें मेघशामा भय वाटे ।।२।।
तुका म्हणे ऐसे भाग्याचे गोपाळ । फुटकें कपाळ आमुचें चि ।।३।।

४२२१

गोपाळांचें कैसें केलें समाधान । देउनि आलिंगन निवविले ।।१।।
ज्वाळाबरोबरि तुम्हां कां ग्रासीन । अवतार घेणें तुम्हांसाटीं ।।धृ।।
निर्गुण निर्भय मी सर्वांनिराळा । प्रकृतिवेगळा गुणातीत ।।२।।
चिन्मय चिद्रूप अवघें चिदाकार । तुका म्हणे पार नेणे ब्रम्हा ।।३।।

४२२२

ऐसा मी अपार पार नाहीं अंत । परि कृपावंत भाविकांचा ।।१।।
दुर्जनां चांडाळां करीं निर्दाळण । करीं संरक्षण अंकितांचें ।।धृ।।
भक्त माझे सखे जिवलग सांगाती । सर्वांग त्यांप्रति वोडवीन ।।२।।
पीतांबरछाया करीन त्यांवरी । सदा त्यांचे घरीं दारी उभा ।।३।।
माझे भक्त मज सदा जे रातले । त्यांघरीं घेतलें धरणें म्यां ।।४।।
कोठें हें वचन ठेविलें ये वेळे । तुका म्हणे डोळे झांकियेले ।।५।।

४२२३

भ्रतारेंसी भार्या बोले गुज गोष्टी । मज ऐसी कष्टी नाहीं दुजी ।।१।।
अखंड तुमचें धंद्यावरी मन । माझें तों हेळण करिती सर्व ।।धृ।।
जोडितसां तुम्ही खाती हेरेंचोरें । माझीं तंव पोरें हळहळीती ।।२।।
तुमची व्याली माझे डाईं हो पेटली । सदा दुष्ट बोली सोसवेना ।।३।।

दुष्टब्रुति नंदुली सदा द्वेष करी । नांदों मी संसारीं कोण्या सुखें ।।४।।
भावा दीर कांहीं धड हा न बोले । नांदों कोणां खालें कैसी आतां ।।५।।
माझ्या अंगसंगें तुम्हांसी विश्रांति । मग धडगति नाहीं तुमची ।।६।।
ठाकतें उमकतें जीव मुठी धरूनि। परि तुम्ही अजूनि न धरा लाज ।।७।।
वेगळे निघतां संसार करीन । नाहीं तरी प्राण देतें आतां ।।८।।
तुका म्हणे जाला कामाचा अंकित। सांगे मनोगत तैसा वर्ते ।।९।।

४२२४
कामाचा अंकित कांतेतें प्रार्थित । तूं कां हो दुश्चित्त निरंतर ।।१।।
माझीं मायबापें बंधु हो बहिण । तुज करी सीण त्यागीन मी ।।धृ।।
त्यांचें जरि तोंड पाहेन मागुता । तरि मज हत्या घडो तुझी ।।२।।
सकाळ उठोन वेगळा निघेन । वाहातों तुझी आण निश्चयेंसी ।।३।।
वेगळें निघतां घडीन दोरे चुडा । तूं तंव माझा जोडा जन्माचा कीं ।।४।।
ताईत सांकळी गळांचि दुलडी । बाजुबंदजोडी हातसर ।।५।।
वेणीचे जे नग सर्व ही करीन । नको धरूं सीण मनीं कांहीं ।।६।।
नेसावया साडी सेलारी चुनडी । अंगींची कांचोळी जाळिया फुलें ।।७।।
तुका म्हणे केला रांडेनें गाढव । मनासवें धांव घेतलीसे ।।८।।

४२२५
उजळितां उजळे दीपकाची वाती । स्वयंभ ते ज्योति हिऱ्या अंगीं ।।१।।
एकीं महाकष्टें मेळविलें धन । एकासी जतन दैवयोगें ।।धृ।।
परिमळें केलें चंदनाचे चिन्ह । निवडी ते भिन्न गाढव तो ।।२।।
तुका म्हणे जया अंगीं हरिठसा । तो तरे सहसा वंद्य होय ।।३।।

४२२६
बारावर्षें बाळपण । तें ही वेचलें अज्ञानें ।।१।।
ऐसा जन्म गेला वांयां । न भजतां पंढरिराया ।।धृ।।
बाकी उरलीं आठ्याशीं। तीस वेचलीं कामासी ।।२।।
बाकी उरलीं आठावन्न । तीस वेचली ममतेनें ।।३।।
बाकी उरलीं आठावीस । देहगेह विसरलास ।।४।।
तुका म्हणे ऐसा झाडा । संसार हा आहे थोडा ।।५।।

४२२७

सोवळा तो जाला । अंगीकार देवें केला ।।१।।
येर करिती भोजन । पोट पोसाया दुर्जन ।।धृ।।
चुकला हा भार । तयाची च येरझार ।।२।।
तुका म्हणे दास । जाला तया नाहीं नास।।३।।

४२२८
आजि शिवला मांग । माझें विटाळलें आंग ।।१।।
यासी घेऊं प्रायश्चित्त । विठ्ठलविठ्ठल हृदयांत ।।धृ।।
जाली क्रोधासी भेटी । तोंडावाटे नर्क लोटी ।।२।।
अनुतापीं न्हाऊं । तुका म्हणे रवी पाहूं ।।३।।

४२२९
ठाव तुम्हांपाशीं । जाला आतां हृषीकेशी ।।१।।
न लगे जागावें सतत । येथें स्वभावें हे नीत ।।धृ।।
चोरट्यासी थारा। येथें कैंचा जी दातारा ।।२।।
तुका म्हणे मनें । आम्हां जालें समाधान।।३।।

४२३०
पाळियेले लळे । माझे विठ्ठले कृपाळे ।।१।।
बहुजन्माचें पोषणें । सरतें पायांपाशीं तेणें ।।धृ।।
सवे दिली लागों । भातें आवडीचें मागों ।।२।।
तुका म्हणे भिन्न । नाहीं दिसों दिलें क्षण।।३।।

४२३१
जो या गेला पंढरपुरा । आणीक यात्रा न मानी तो।।१।।
सुलभ माय पंढरिराणा । पुरवी खुणा अंतरींच्या ।।धृ।।
जन्मांतरिंच्या पुण्यरासी । वारी त्यासी पंढरी ।।२।।
बाहेर येतां प्राण फुटे । रडें दाटे गहिवरें ।।३।।
दधिमंगळभोजन सारा । म्हणती करा मुरडींव ।।४।।
मागुता हा पाहों ठाव । पंढरिराव दर्शनें ।।५।।
तुका म्हणे भूवैकुंठ । वाळुवंट भींवरा ।।६।।

४२३२

न मिळती एका एक । जये नगरीचे लोक ।।१।।
भलीं तेथें राहूं नये । क्षणें होईल न कळे काय ।।धृ।।
न करितां अन्याय । बळें करी अपाय ।।२।।
नाहीं पुराणाची प्रीति । ठायींठायीं पंचाइती ।।३।।
भल्या बुऱ्या मारी । होतां कोणी न निवारी ।।४।।
अविचाऱ्या हातीं । देऊनि प्रजा नागविती ।।५।।
तुका म्हणे दरी । सुखें सेवावी ते बरी ।।६।।

४२३३
शिकवणें नाक झाडी । पुढील जोडी कळेना ।।१।।
निरयगांवीं भोग देता । तेथें सत्ता आणिकांची ।।धृ।।
अवगुणांचा सांटा करी । ते चि धरी जीवासी ।।२।।
तुका म्हणे जडबुद्धि । कर्मशुद्धी सांडवीं ।।३।।

४२३४
गोपीचंदन मुद्रा धरणें । आम्हां लेणें वैष्णवां ।।१।।
मिरवूं अळंकार लेणें । हीं भूषणें स्वामीचीं ।।धृ।।
विकलों ते सेवाजीवें । एक्या भावें एकविध ।।२।।
तुका म्हणे शूर जालों । बाहेर आलों संसारा ।।३।।

४२३५
विषयांचे लोलिंगत । ते फजीत होतील ।।१।।
न सरे येथें यातिकुळ । शुद्ध मूळबीज व्हावें ।।धृ।।
शिखासूत्र सोंग वरि । दुराचारी दंड पावे ।।२।।
तुका म्हणे अभिमाना । नारायणा न सोसे।।३।।

४२३६
वडिलें दिलें भूमिदान । तें जो मागे अभिळासून ।।१।।
अग्रपूजेचा अधिकारी । श्रेष्ठ दंड यमा घरीं ।।धृ।।
उभयकुल समवेत । नकाअ प्रवेश अद्‌भुत ।।२।।
तप्तलोहें भेटी । तुका म्हणे कल्पकोटी ।।३।।

४२३७

लटिकी ग्वाही सभेआंत । देतां पतित आगळा।।१।।
कुंभपाकीं वस्ती करूं । होय धुरु कुळेसी ।।धृ।।
रजस्वला रुधिर स्त्रवे । तें चि घ्यावें तृषेसी ।।२।।
तुका म्हणे जन्मा आला । काळ जाला कुळासी ।।३।।

४२३८
आचरे दोष न धरी धाक । परीपाक दुःखाचा ।।१।।
चांडाळ तो दुराचारी । अंगीकारी कोण त्या ।।धृ।।
नव्हे संतान वोस घर । अंधकार कुळासी ।।२।।
तुका म्हणे त्याचें दान । घेतां पतन दुःखासी ।।३।।

४२३९
कीविलवाणा जाला आतां । दोष करितां न विचारी।।१।।
अभिळाषी नारी धन । झकवी जन लटिकें चि ।।धृ।।
विश्वासिया करी घात । न धरी चित्ता कांटाळा ।।२।।
तुका म्हणे नाहीं आला । वृथा गेला जन्मासी ।।३।।

४२४०
घेऊं नये तैसें दान । ज्याचें धन अभिळाषी ।।१।।
तो ही येथें कामा नये । नर्का जाय म्हणोनि ।।धृ।।
विकी स्नानसंध्या जप । करी तप पुढिलांचें ।।२।।
तुका म्हणे दांभिक तो । नर्का जातो स्वइच्छा ।।३।।

४२४१
सदा नामघोष करूं हरिकथा । तेणें सदा चित्ता समाधान ।।१।।
सर्वसुख ल्यालों सर्व अलंकार । आनंदें निर्भर डुलतसों ।।धृ।।
असों ऐसा कोठें आठव ही नाहीं । देहीं च विदेही भोगूं दशा ।।२।।
तुका म्हणे आम्ही जालों अग्निरूप । लागों नेदूं पापपुण्य आतां ।।३।।

४२४२
वरिवरि बोले युद्धाचिया गोष्टी । परसैन्या भेटी नाहीं जाली ।।१।।
पराव्याचे भार पाहुनियां दृष्टी । कांपतसे पोटीं थरथरां ।।धृ।।
मनाचा उदार रायांचा जुंझार । फिरंगीचा मार मारीतसे।।२।।

धन्य त्याची माय धन्य त्याचा बाप । अंगीं अनुताप हरिनामें ।।३।।
तुका म्हणे साधु बोले खर्गधार । खोचती अंतरें दुर्जनाचें ।।४।।

४२४३
गंधर्वनगरीं क्षण एक राहावें । तें चि पैं करावें मुळक्षत्र ।।१।।
खपुष्पाची पूजा बांधोनि निर्गुणा । लक्ष्मीनारायणा तोषवावें ।।धृ।।
वंध्यापुत्राचा लग्नाचा सोहळा । आपुलिया डोळां पाहों वेगीं ।।२।।
मृगजळा पोही घालुनि सज्ञाना । तापलिया जना निववावें ।।३।।
तुका म्हणे मिथ्या देहेंद्रियकर्म । ब्रम्हार्पण ब्रम्ह होय बापा ।।४।।

४२४४
तुझा म्हणविलों दास । केली उच्छिष्टासी आस।।१।।
मुखीं घालावा कवळ । जरी तूं होशील कृपाळ ।।२।।
सीण भाग माझा पुसें । तुका म्हणे न करीं हांसें ।।३।।

४२४५
काय मागें आम्ही गुंतलों काशानीं । पुढें वाहों मनीं धाक देवा ।।१।।
कीर्ति चराचरीं आहे तैसी आहे । भेटोनियां काय घ्यावें आम्हां ।।धृ।।
घेउनी धरणें बैसती उपवासी । हट आम्हांपासीं नाहीं तैसा ।।२।।
तातडी तयांनीं केली विटंबणा । आम्हां नारायणा काय उणें ।।३।।
नाहीं मुक्तिचाड वास वैकुंठींचा । जीव भाव आमुचा देऊं तुज ।।४।।
तुका म्हणे काय मानेल तें आतां । तूं घेईं अनंता सर्व माझें ।।५।।

४२४६
जालों बळिवंत । होऊनियां शरणागत ।।१।।
केला घरांत रिघावा । ठायीं पाडियेला ठेवा ।।धृ।।
हाता चढे धन । ऐसें रचलें कारण ।।२।।
तुका म्हणे मिठी । पायीं देउनि केली लुटी।।३।।

४२४७
दासीचा जो संग करी । त्याचे पूर्वज नर्का द्वारीं।।१।।
ऐसे सांगों जातां जना । नये कोणाचिया मना ।।धृ।।
बरें विचारूनी पाहें । तुज अंतीं कोण आहे ।।२।।

तुका म्हणे रांडलेंका । अंतीं जासिल यमलोका ।।३।।

४२४८
गुळ सांडुनि गोडी घ्यावी । मीठ सांडुनि चवि चाखावी ।।१।।
ऐसा प्रपंच सांडुनि घ्यावा । मग परमार्थ जोडावा।।धृ।।
साकरेचा नव्हे ऊंस । आम्हां कैंचा गर्भवास ।।२।।
बीज भाजुनि केली लाही । जन्ममरण आम्हांसि नाहीं ।।३।।
आकारासी कैंचा ठाव । देह प्रत्यक्ष जाला वाव ।।४।।
तुका म्हणे अवघें जग । सर्वां घटीं पांडुरंग ।।५।।

४२४९
आमुचें दंडवत पायांवरि डोई । व्हावें उतराई ठेवूनियां।।१।।
कराल तें काय नव्हे जी विठ्ठला । चित्त द्यावें बोला बोबडिया ।।२।।
तुका म्हणे आम्ही लडिवाळें अनाथें । म्हणोनि दिनानाथें सांभाळावें ।।३।।

४२५०
भाग्यवंत आम्ही विष्णुदास जगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ।।१।।
नाही तें पुरवीत आणुनि जवळी । गाउनी माउली गीत सुखें ।।धृ।।
प्रीति अंगीं असे सदा सर्वकाळ । वोळली सकळ सुखें ठायीं ।।२।।
आपुल्या स्वभावें जैसे जेथें असों । तैसे तेथें दिसों साजिरे चि ।।३।।
वासनेचा कंद उपडिलें मूळ । दुरितें सकळ निवारिलीं ।।४।।
तुका म्हणे भक्तजनाची माउली । करील साउली विठ्ठल आम्हां ।।५।।

४२५१
तीर्थें फळती काळें जन्में आगळिया । संतदृष्टी पाया हेळामात्रें ।।१।।
सुखाचे सुगम वैष्णवांचे पाय । अंतरींचा जाय महाभेव ।।धृ।।
काळें हि न सरे तपें समाधान । कथे मूढजन समाधिस्थ ।।२।।
उपमा द्यावया सांगतां आणीक । नाहीं तिन्ही लोक धुंडाळितां ।।३।।
तुका म्हणे मी राहिलों येणें सुखें । संतसंगें दुःखें नासावया ।।४।।

४२५२
संतजना माझी यावया करुणा । म्हणउनी दीन हीन जालों ।।१।।
नेणें योग युक्ती नाहीं ज्ञान मति । गातसें या गीती पांडुरंगा ।।धृ।।

भाव भक्ती नेणें तप अनुष्ठान । करितों किर्त्तन विठ्ठलाचें ।।२।।
ब्रम्हज्ञान ध्यान न कळे धारणा । एका नारायणा वांचूनियां ।।३।।
तुका म्हणे माझा विटोबासी भार । जाणे हा विचार तो चि माझा ।।४।।

४२५३
ऐसें काय उणें जालें तुज देवा । भावेंविण सेवा घेसी माझी ।।१।।
काय मज द्यावा न लगे मुशारा । पहावें दातारा विचारूनि ।।धृ।।
करितों पाखांडें जोडूनि अक्षरें । नव्हे ज्ञान खरें भक्तिरस ।।२।।
गुणवाद तुझे न बोलवे वाणी । आणिका छळणी वाद सांगें ।।३।।
तरी आतां मज राखें तुझे पायीं । देखसील कांहीं प्रेमरस ।।४।।
तुका म्हणे तुज हांसतील लोक । निःकाम सेवक म्हणोनियां ।।५।।

४२५४
भोंदावया मीस घेऊनि संतांचें । करी कुटुंबाचें दास्य सदा ।।१।।
मनुष्याचे परी बोले रावा करी । रंजवी नरनारी जगामध्यें।।धृ।।
तिमयाचा बैल करी सिकविलें । चित्रींचें बाहुलें गोष्टी सांगे ।।२।।
तुका म्हणे देवा जळो हे महंती । लाज नाहीं चित्तीं निसुगातें ।।३।।

४२५५
अंगीं घेऊनियां वारें दया देती । तया भक्ता हातीं चोट आहे ।।१।।
देव्हारा बैसोनि हालविती सुपें । ऐसीं पापी पापें लिंपताती ।।धृ।।
एकीबेकीन्यायें होतसे प्रचित । तेणें लोक समस्त भुलताती ।।२।।
तयाचे स्वाधीन दैवतें असती । तरी कां मरती त्यांचीं पोरें ।।३।।
तुका म्हणे पाणी अंगारा जयाचा । भक्त कान्होबाचा तो ही नव्हे ।।४।।

४२५६
कोणा एकाचिया पोरें केली आळी । ठावी नाहीं पोळी मागें देखी ।।१।।
बुझाविलें हातीं देउनी खापर । छंद करकर वारियेली ।।धृ।।
तैसें नको करूं मज कृपावंता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं ।।२।।
तुका म्हणे मायबापाचें उचित । करावें तें हित बाळकाचें ।।३।।

४२५७
पंढरपुरींचें दैवत भजावें । काया वाचा जावें शरण त्या ।।१।।

मनीं ध्यान करी अहंता धरूनी । तया चक्रपाणी दूर ठेला ।।धृ।।
मान अभिमान सांडुनियां द्यावे । अवघ्यां नीच व्हावें तरी प्राप्त ।।२।।
तुका म्हणे हें चि कोणासी सांगावें । सादर होउनि भावें भजें देवा ।।३।।

४२५८
अधमाचें चित्त अहंकारीं मन । उपदेश शीण तया केला ।।१।।
पापियाचें मन न करी आचार । विधवे शृंगार व्यर्थ केला ।।धृ।।
अधमाचें चित्त दुश्चित्त ऐकेना । वांयां सीण मना करूं काय ।।२।।
गर्धबासी दिली चंदनाची उटी । केशर लल्हाटीं शुकराच्या।।३।।
पतिवंचकेसी सांगतां उदंड । परि तें पाषांड तिचे मनीं ।।४।।
तुका म्हणे तैसें अभावीं सांगतां । वाउगा चि चित्ता सीण होय ।।५।।

४२५९
किती उपदेश करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ।।१।।
शुद्ध हे वासना नाहीं चांडाळाची । होळी आयुष्याची केली तेणें ।।धृ।।
नाहीं शुद्ध भाव नायके वचन । आपण्या आपण नाडियेलें ।।२।।
तुका म्हणे त्यासी काय व्याली रांड । करितो बडबड रात्रदिस ।।३।।

४२६०
संत देखोनियां स्वयें दृष्टी टाळी । आदरें न्याहाळी परस्त्रीसी ।।१।।
वीट ये कर्णासी संतवाक्यामृता । स्त्रीशब्द ऐकतां निवे कर्ण ।।धृ।।
कथेमाजी निज वाटे नित्यक्षणीं । स्त्रियेचे कीर्त्तनीं प्रेमें जागे ।।२।।
तुका म्हणे तुम्ही क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणीं ।।३।।

४२६१
मणि पडिला दाढेसी मकरतोंडीं । सुखें हस्तें चि काढवेल प्रौढीं ।।१।।
परि मूर्खाचें चित्त बोधवेना । दुधें कूर्मीच्या पाळवेल सेना ।।धृ।।
सकळ पृथ्वी हिंडतां कदाचित । ससीसिंगाची प्राप्त होय तेथें ।।२।।
अतिप्रयत्नें गाळितां वाळुवेतें । दिव्य तेलाची प्राप्त होय तेथें ।।३।।
अतिक्रोधें खवळला फणी पाही । धरूं येतो मस्तकीं पुष्पप्रायी ।।४।।
पहा ब्रम्हानंदें चि एकीं हेळा । महापातकी तो तुका मुक्त केला ।।५।।

४२६२

भोळे भाविक हे जुनाट चांगले । होय तैसें केलें भक्तिभावें ।।१।।
म्हणउनि चिंता नाहीं आम्हां दासां । न भ्यों गर्भवासा जन्म घेतां ।।धृ।।
आपुलिया इच्छा करूं गदारोळ । भोगूं सर्वकाळ सर्व सुखें ।।२।।
तुका म्हणे आम्हां देवाचा सांगात । नाहीं विसंबत येर येरां ।।३।।

४२६३
आतां तरी माझी परिसा वीनवती । रखुमाईच्या पति पांडुरंगा ।।१।।
चुकलिया बाळा न मारावें जीवें । हित तें करावें मायबापीं ।।२।।
तुका म्हणे तुझा म्हणताती मज । आतां आहे लाज हे चि तुम्हां ।।३।।

४२६४
नाही बळयोग अभ्यास कराया । न कळे ते क्रिया साधनाची ।।१।।
तुझिये भेटीचें प्रेम अंतरंगीं । नाहीं बळ अंगीं भजनाचें ।।धृ।।
काय पांडुरंगा करूं बा विचार । झुरतें अंतर भेटावया ।।२।।
तुका म्हणे सांगा वडिलपणें बुद्धी । तुजविण दयानिधी पुसों कोणां ।।३।।

४२६५
जिहीं तुझी कास भावें धरियेली । त्यांची नाहीं केली सांड देवा ।।१।।
काय माझा भोग आहे तो न कळे । सुखें तुम्ही डोळे झांकियेले ।।धृ।।
राव रंक तुज सारिके चि जन । नाहीं थोर लहान तुजपाशीं ।।२।।
तुका म्हणे मागें आपंगिलें भक्तां । माझिया संचिता कृपा नये ।।३।।

४२६६
पहावया तुझा जरि बोलें अंत । तरि माझे जात डोळे देवा ।।१।।
स्तंबीं तुज नाहीं घातलें प्रल्हादें । आपुल्या आनंदें अवतार ।।धृ।।
भक्ताचिया काजा जालासी सगुण । तुज नाहीं गुण रूप नाम ।।२।।
ऐसा कोण देवा अधम यातीचा । निर्धार हा साचा नाहीं तुझा ।।३।।
तुका म्हणे बोले कवतुकें गोष्टी । नेदीं येऊं पोटीं राग देवा ।।४।।

४२६७
प्रगट व्हावें हे अज्ञानवासना । माझी नारायणा हीनबुद्धि ।।१।।
खाणीवाणी होसी काष्टीं तूं पाषाणीं । जंतु जीवाजनीं प्रसिद्ध हा ।।धृ।।
ज्ञानहीन तुज पाहें अल्पमति । लहान हा चित्तीं धरोनियां ।।२।।

परि तूं कृपाळ होसी देवराणा । ब्रिदें तुझीं जना प्रसिद्ध हें ।।३।।
उतावीळ बहु भक्तांचिया काजा । होसी केशीराजा तुका म्हणे ।।४।।

४२६८
जरी तुझा मज नसता आधार । कैसा हा संसार दुऱ्हावला ।।१।।
ऐसा बळी कोण होइल पुरता । जो हे वारी चिंता आशापाश ।।धृ।।
मायामोहफांसा लोकलाजबेडी । तुजवीण तोडी कोण एक ।।२।।
हें तों मज कळों आलें अनुभवें । बरें माझ्या जीवें पांडुरंगा ।।३।।
तुका म्हणे यास तूं चि माझा गोही । पुरी भाव नाहीं जना लोका ।।४।।

४२६९
तुजविण चाड आणिकांची कांहीं । धरीन हें नाहीं तुज ठावें ।।१।।
तरणउपाय योगक्षेम माझा । ठेवियेला तुझ्या पायीं देवा ।।धृ।।
कोण मज आळी काय हे तांतडी । सोनियाची घडी जाय दिस ।।२।।
तुझिया नामाचें ल्यालोंसें भूषण । कृपा संतजन करितील ।।३।।
तुका म्हणे जाला आनंदाचा वास । ह्रदया या नास नव्हे कधीं ।।४।।

४२७०
हें चि सुख पुढे मागतों आगळें । आनंदाचीं फळें सेवादान ।।१।।
जन्मजन्मांतरीं तुझा चि अंकिला । करूनि विठ्ठला दास ठेवीं ।।धृ।।
दुजा भाव आड येऊं नेदीं चित्ता । करावा अनंता नास त्याचा ।।२।।
अभय देऊनि करावें सादर । क्षण तो विसर पडों नेदीं ।।३।।
तुका म्हणे आम्ही जेजे इच्छा करूं । ते ते कल्पतरू पुरविसी ।।४।।

४२७१
तुज केलिया नव्हे ऐसें काई । डोंगराची राई क्षणमात्रें।।१।।
मज या लोकांचा न साहे आघात । देखणें प्रचित जीव घेती ।।धृ।।
सहज विनोदें बोलियेलों गोष्टी । अरंभी तों पोटीं न धरावी ।।२।।
दीनरूप मज करावें नेणता । याहुनी अनंता आहें तैसा ।।३।।
तुका म्हणे जेणें मज तूं भोगसी । तें करीं जनासीं चाड नाहीं ।।४।।

४२७२
ऐसा सर्व भाव तुज निरोपिला । तूं मज एकला सर्वभावें ।।१।।

अंतरींची कां हे नेणसील गोष्टी । परि सुखासाटीं बोलविसी ।।धृ।।
सर्व माझा भार तुज चालवणें । तेथें म्यां बोलणें काय एक ।।२।।
स्वभावें स्वहित हिताचें कारण । कौतुक करून निवडिसी ।।३।।
तुका म्हणे तूं हें जाणसी गा देवा । आमुच्या स्वभावा अंतरींच्या ।।४।।

४२७३
लोखंडाचे न पाहे दोष । शिवोन परीस सोनें करी।।१।।
जैसी तैसी तरीं वाणी । मना आणी माउली ।।धृ।।
लेकराचें स्नेहे गोड । करी कोड त्यागुणें ।। ।।
मागें पुढें रिघे लोटी । साहे खेटी करी तें ।।३।।
तुका विनंती पांडुरंगा । ऐसें सांगा आहे हें ।।४।।

४२७४. पर्वकाळीं धर्म न करी नासरी । खर्ची राजद्वारीं द्रव्यरासी ।।१।।
सोइऱ्याची करी पाहुणेर बरा । कांडवी ठोंबरा संतांलागीं ।।धृ।।
बाइलेचीं सर्व आवडीनें पोसी । मातापितरांसी दवडोनी ।।२।।
श्राद्धीं कष्टी होय सांगतां ब्राम्हण । गोवार मागून सावडीतो ।।३।।
नेतो पानें फुलें वेश्येला उदंड । ब्राम्हणासी खांड नेदी एक ।।४।।
हातें मोऱ्या शोधी कष्ट करी नाना । देवाच्या पूजना कांटाळतो ।।५।।
सारा वेळ धंदा करितां श्रमेना । साधूच्या दर्शना जातां कुंथे ।।६।।
हरिच्या कीर्तनीं गुंगायासि लागे । येरवीं तो जागे उगला चि ।।७।।
पुराणीं बैसतां नाहीं रिकामटी । खेळतो सोंगटी अहोरात्रीं ।।८।।
देवाच्या विभुती न पाहे सर्वथा । करी पानवथा नेत्रभिक्षा ।।९।।
गाईला देखोनी बदबदां मारी । घोड्याची चाकरी गोड लागे ।।१०।।
ब्राम्हणाचें तीर्थ घेतां त्रास मोटा । प्रेमें घेतो घोंटा घटघटां ।।११।।
तुका म्हणे ऐसे प्रपंचीं गुंतले । जन्मोनि मुकले विठोबासी ।।१२।।

४२७५
आम्ही रामाचे राऊत । वीर जुंझार बहुत ।।१।।
मनपवनतुरंग । हातीं नामाची फिरंग ।।धृ।।
वारू चालवूं चहूंखुरीं । घाला घालूं यमपुरी ।।२।।
तुका म्हणे पेणें । आम्हां वैकुंठासी जाणें।।३।।

४२७६

पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरिचे दास घेती जन्म ।।१।।
कर्मधर्म त्याचे जाला नारायण । त्याचेनी पावन तिन्ही लोक ।।धृ।।
वर्णअभिमानें कोण जाले पावन । ऐसें द्या सांगून मजपाशीं ।।३।।
अंत्यजादि योनि तरल्या हरिभजनें । तयाचीं पुराणें भाट जालीं ।।३।।
वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार । धागा हा चांभार रोहिदास ।।४।।
कबीर मोमीन लतिब मुसलमान । शेणा न्हावी जाण विष्णुदास ।।५।।
काणोपात्र खोदु पिंजारी तो दादु । भजनीं अभेदू हरिचे पायीं ।।६।।
चोखामेळा बंका जातीचा माहार । त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ।।७।।
नामयाची जनी कोण तिचा भाव । जेवी पंढरीराव तियेसवें ।।८।।
मैराळा जनक कोण कुळ त्याचें । महिमान तयाचें काय सांगों ।।९।।
यातायातीधर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ।।१०।।
तुका म्हणे तुम्ही विचारावे ग्रंथ । तारिले पतित नेणों किती ।।११।।

४२७७. नामासारिखी करणी । हे तों न दिसे त्रिभुवनीं ।।१।।
सिलंगणीचें सोनें । ठेवूं नये तें गाहाण ।।धृ।।
आदित्याचीं झाडें । काय त्याचा उजड पडे ।।२।।
तुका म्हणे देवा । ब्रिदें सोडोनियां ठेवा ।।३।।

४२७८
येऊनि संसारा काय हित केलें । आयुष्य नासिलें शिश्नोदरा ।।१।।
विषय सेवितां कोण तृप्त जाला । इंधनीं निवाला अग्नि कोठें ।।धृ।।
देखोनी मृगजळ भांबावलीं वेडीं । विचाराची थडी न टाकिती ।।२।।
ऐसियां जीवांसी सोय न लाविसी । निष्ठुर कां होसी कृपाळुवा ।।३।।
तुका म्हणे देवा अगाध पैं थोरी । सर्वांचे अंतरीं पुरलासी ।।४।।

४२७९
समर्थाचे सेवे बहु असे हित । विचार ह्रदयांत करुनी पाहें ।।१।।
वरकडोऐसा नव्हे हा समर्थ । क्षणें चि घडित सृष्टी नाशें ।।धृ।।
ज्याची कृपा होतां आपणा ऐसें करी । उरों नेदी उरी दारिद्राची ।।२।।
ऐशालागीं मन वोळगे अहर्निशीं । तेणें वंद्य होशी ब्रम्हांदिकां ।।३।।
तुका म्हणे हें चि आहे पैं मुद्दल । सत्य माझा बोल हा चि माना ।।४।।

४२८०

पिकलिये सेंदे कडुपण गेलें । तैसें आम्हां केलें पांडुरंगें ।।१।।
काम क्रोध लोभ निमाले ठायीं चि । सर्व आनंदाची सृष्टि जाली ।।धृ।।
आठव नाठव गेले भावाभाव । जाला स्वयमेव पांडुरंग ।।२।।
तुका म्हणे भाग्य या नांवें म्हणीजे । संसारीं जन्मीजे या चि लागीं ।।३।।

४२८१
येऊनि नरदेहा विचारावें सार । धरावा पैं धीर भजनमागाअ ।।१।।
चंचळ चित्तासी ठेवूनियां ठायीं । संतांचिये पायीं लीन व्हावें ।।धृ।।
भावाचा पैं हात धरावा निश्चयें । तेणें भवभय देशधडी ।।२।।
नामापरतें जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाईं सर्वकाळ ।।३।।
तुका म्हणे धन्य वंश त्या नराचा । ऐसा निश्चयाचा मेरु जाला ।।४।।

४२८२
षड्रसीं रांधिलें खापरीं घातलें । चोहोटा ठेविलें मध्यरात्रीं ।।१।।
त्यासी सदाचारी लोक न शिवती । श्वानासी निश्चिती फावलें तें ।।धृ।।
तैसें दुष्टकर्म जालें हरिभक्ता । त्यागिली ममता विषयासक्ति ।।२।।
इहपरलोक उभय विटाळ । मानिती केवळ हरिचे दास ।।३।।
तुका म्हणे देवा आवडे हे सेवा । अनुदिनीं व्हावा पूर्ण हेतु ।।४।।

४२८३
बीज भाजुनि केली लाही । आम्हां जन्ममरण नाहीं।।१।।
आकाराशी कैंचा ठाव । देहप्रत्यक्ष जाला देव ।।धृ।।
साकरेचा नव्हे उस । आम्हां कैंचा गर्भवास ।।२।।
तुका म्हणे औघा योग । सर्वां घटीं पांडुरंग ।।३।।

४२८४
वैकुंठींचा देव आणिला भूतळा । धन्य तो आगळा पुंडलीक ।।१।।
धारिष्ट धैर्याचा वरिष्ठ भक्तांचा । पवित्र पुण्याचा एकनिष्ठ ।।धृ।।
पितृसेवा पुण्यें लाधला निधान । ब्रम्ह सनातन अंगसंगें ।।२।।
अंगसंगें रंगें क्रीडा करी जाणा । ज्या घरीं पाहुणा वैकुंठींचा ।।३।।
धन्य त्याची शक्ति भक्तीची हे ख्याति । तुका म्हणे मुक्ति पायीं लोळे ।।४।।

४२८५

मृगाचिये अंगीं कस्तुरीचा वास । असे ज्याचा त्यास नसे ठाव ।।१।।
भाग्यवंत घेती वेचूनियां मोलें । भारवाही मेले वाहतां ओझें ।।धृ।।
चंद्रामृतें तृप्तिपारणें चकोरा । भ्रमरासी चारा सुगंधाचा ।।२।।
अधिकारी येथें घेती हातवटी । परीक्षावंता दृष्टी रत्न जैसें ।।३।।
तुका म्हणे काय अंधळिया हातीं । दिले जैसें मोतीं वांयां जाय ।।४।।

४२८६
आलिया संसारीं देखिली पंढरी । कीर्ति महाद्वारीं वानूं तुझी ।।१।।
पताकांचे भार नामाचे गजर । देखिल्या संसार सफळ जाला ।।धृ।।
साधुसंतांचिया धन्य जाल्या भेटी । सांपडली लुटी मोक्षाची हे ।।२।।
तुका म्हणे आतां हें चि पैं मागणें । पुढती नाहीं येणें संसारासी ।।३।।

४२८७
ऐसे कैसे जाले भोंदू । कर्म करोनि म्हणति साधु।।१।।
अंगा लावूनियां राख । डोळे झांकुनी करिती पाप ।।धृ।।
दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ।।२।।
तुका म्हणे सांगों किती । जळो तयांची संगती ।।३।।

४२८८
कोणी निंदा कोणी वंदा । आम्हां स्वहिताचा धंदा।।१।।
काय तुम्हांसी गरज । आम्ही भजूं पंढरिराज ।।धृ।।
तुम्हांसारिखें चालावें । तेव्हां स्वहिता मुकावें ।।२।।
तुका म्हणे हो कां कांहीं । गळ दिला विठ्ठल पायीं ।।३।।

४२८९
तुझे नामें दिनानाथा । आम्ही उघडा घातला माथा।।१।।
आतां न धरावें दुरी । बोल येईल ब्रीदावरी ।।धृ।।
पतित होतों ऐसा ठावा । आधीं कां न विचारावा ।।२।।
तुका म्हणे तुझे पायीं । आम्ही मिरास केली पाहीं ।।३।।

४२९०
रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न । चिन्मय अंजन सुदलें डोळां ।।१।।
तेणें अंजनगुणें दिव्यदृष्टि जाली । कल्पना निवाली द्वैताद्वैत ।।धृ।।

देशकालवस्तुभेद मावळला । आत्मा निर्वाळला विश्वाकार ।।२।।
न जाला प्रपंच आहे परब्रम्ह । अहंसोहं ब्रम्ह आकळलें ।।३।।
तत्त्वमसि विद्या ब्रम्हानंद सांग । तें चि जाला अंगें तुका आतां ।।४।।

४२९१
नीत सांडोनि अवनीत चाले । भंडउभंड भलतें चि बोले ।।१।।
त्यांत कोणाचें काय बा गेलें । ज्याचें तेणें अनहित केलें ।।धृ।।
ज्यासि वंदावें त्यासी निंदी । मैत्री सांडोनि होतसे दंदी।।२।।
आन यातीचे संगती लागे । संतसज्जनामध्यें ना वागे।।३।।
केल्याविण पराक्रम सांगे । जेथें सांगे तेथें चि भीक मागे ।।४।।
करी आपुला चि संभ्रम । परि पुढें कठीण फार यम ।।५।।
तुका म्हणे कांहीं नित्यनेम । चित्तीं न धरी तो अधम ।।६।।

४२९२
मानूं कांहीं आम्ही आपुलिया स्वइच्छा । नाहीं तरि सरिसा रंकरावो ।।१।।
आपुल्या उदास आहों देहभावीं । मग लज्जाजीवीं चाड नाहीं ।।२।।
तुका म्हणे खेळों आम्ही सहजलीळे । म्हणोनी निराळे सुख दुःख ।।३।।

४२९३
बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाउलें ।।१।।
अंगें झाडीन अंगण । त्याचें दासत्व करीन ।।धृ।।
त्याचा होईन किंकर। उभा ठाकेन जोडोनि कर ।।२।।
तुका म्हणे देव । त्याचे चरणीं माझा भाव ।।३।।

४२९४
पाण्या निघाली गुजरी । मन ठेविलें दो घागरीं । चाले मोकळ्या पदरीं । परी लक्ष तेथें ।।१।।
वावडी उडाली अंबरीं। हातीं धरोनियां दोरी । दिसे दुरिच्या दुरी । परी लक्ष तेथें।।धृ।।
चोर चोरी करी । ठेवी वनांतरीं । वर्ततसे चराचरीं । परी लक्ष तेथें ।।२।।
व्यभिचारिणी नारी । घराश्रम करी । परपुरुष जिव्हारीं । परी लक्ष तेथें ।।३।।
तुका म्हणे असों भलतिये व्यापारीं। लक्ष सर्वेश्वरीं । चुकों नेदी ।।४।।

४२९५
जनाचिया मना जावें कासियेसी । माझी वाराणसी पांडुरंग ।।१।।
तेथें भागीरथी येथें भीमरथी । अधिक म्हणती चंद्रभागा।।धृ।।
तेथें माधवराव येथें यादवराज । जाणोनियां भाव पुंडलिकाचा ।।२।।
विष्णुपद गया ते चि येथें आहे । प्रत्यक्ष हें पाहे विटेवरी ।।३।।
तुका म्हणे हे चि प्रपंच उद्धरी । आतां पंढरपुरी घडो बापा ।।४।।

४२९६
नको येऊं लाजे होय तूं परती । भजों दे श्रीपती सखा माझा ।।१।।
तुझे संगतीनें मोटा जाला घात । जालों मी अंकित दुर्जनाचा ।।२।।
तुका म्हणे रांडे घेइन काठीवरी । धनी सहाकारी राम केला ।।३।।

४२९७
भक्तिॠण घेतलें माझें । चरण गाहाण आहेत तुझे।।१।।
प्रेम व्याज देईं हरी । माझा हिशेब लवकरी करीं ।।धृ।।
माझें मी न सोडीं धन । नित्य करितों कीर्त्तन ।।२।।
तुझें नाम आहे खत । सुखें करी पंचाईत ।।३।।
तुका म्हणे गरुडध्वजा । यासी साक्ष श्रीगुरुराजा ।।४।।

४२९८
फिरविलें देऊळ जगामाजी ख्याति । नामदेवा हातीं दुध प्याला ।।१।।
भरियेली हुंडी नरसी महत्याची । धनाजीजाटाचींसेतें पेरी ।।धृ।।
मिराबाईसाटीं घेतों विष प्याला । दामाजीचा जाला पाढेवार ।।२।।
कबीराचे मागीं विणूं लागे सेले । उठविलें मूल कुंभाराचें ।।३।।
आतां तुम्ही दया करा पंढरिराया । तुका विनवी पायां नमीतसे ।।४।।

४२९९
हे चि वेळ देवा नका मागें घेऊं । तुम्हांविण जाऊं शरण कोणा ।।१।।
नारायणा ये रे पाहें विचारून । तुजविण कोण आहे मज ।।धृ।।
रात्रहि दिवस तुज आठवूनि आहें । पाहातोसी काये सत्त्व माझें ।।२।।
तुका म्हणे किती येऊं काकुलती । कांहीं माया चित्तीं येऊं द्यावी ।।३।।

४३००

इंद्रावणा केलें साकरेचें आळें । न सांडी वेगळें कडुपण ।।१।।
कावळ्याचें पिलूं कौतुकें पोशिलें । न राहे उगलें विष्ठेविण ।।धृ।।
क्षेम देतां अंगा गांधेलाची पोळी । करवी नादाळी महाशब्द ।।२।।
तुका म्हणे ऐसे न होती ते भले । घालिती ते घाले साधुजना ।।३।।

४३०१
मुसळाचें धनु नव्हे हो सर्वथा । पाषाण पिळितां रस कैंचा ।।१।।
वांझे बाळा जैसें दुध नाहीं स्तनीं । गारा त्या अधणीं न सिजती ।।धृ।।
नवखंड पृथ्वी पिके मृगजळें । डोंगर भेटे बळें असमानासी ।।२।।
नैश्वर ब्रम्ह तेव्हां होय ब्रम्ह । तुका म्हणे श्रम करुनी काय ।।३।।

४३०२
धन्या आतां काय करूं । माझें तान्हुलें लेकरूं।।१।।
धन्या अवचित मरण आलें । मज कोणासी निरविलें ।।धृ।।
माझें दारवंड नका पाडूं । त्याचे हात पाय तोडूं ।।२।।
एके हातीं धरली दाढी । घे कुऱ्हाडी दुजे हातीं ।।३।।
येरी घाव घालूं पाहे । तंव तो उठोनि उभा राहे ।।४।।
तुका म्हणे अवघीं चोरें । सेकी रामनाम सोइरें ।।५।।

४३०३
निरंजनीं आम्हीं बांधियेलें घर । निराकारीं निरंतर राहिलों आम्ही ।।१।।
निराभासीं पूर्ण जालों समरस । खंड ऐक्यास पावलों आम्ही ।।२।।
तुका म्हणे आतां नाहीं अहंकार । जालों तदाकार नित्य शुद्ध ।।३।।

४३०४
पांडुरंगें सत्य केला अनुग्रह । निरसोनि संदेह बुद्धिभेद।।१।।
जीवशिवा सेज रचिली आनंदें । औठावे पदीं आरोहण।।२।।
निजीं निजरूपीं निजविला तुका । अनुहाते बाळका हलरु गाती ।।३।।

४३०५
नाना मतांतरें शब्दाची वित्पत्ति । पाठांतरें होती वाचाळ ते ।।१।।
माझ्या विठोबाचें वर्म आहे दुरी । कैंची तेथें उरी देहभावा ।।धृ।।
यज्ञ याग जप तप अनुष्ठान । राहे ध्येय ध्यान आलीकडे ।।२।।

तुका म्हणे होय उपरति चित्ता । अंगीं सप्रेमता येणें लागें ।।३।।

४३०६
नाहीं शब्दाधीन वर्म आहे दुरी । नव्हे तंत्रीं मंत्रीं अनुभव तो ।।१।।
हर्षामर्षें अंगीं आदळती लाटा । कामक्रोधें तटा सांडियेलें ।।धृ।।
न सरे ते भक्ति विठोबाचे पायीं । उपरति नाहीं जेथें चित्ता ।।२।।
तुका म्हणे सुख देहनिरसनें । चिंतनें चिंतन तद्रूपता ।।३।।

४३०७
शोधूनि अन्वय वंश वंशावळी । परस्परा कुळीं उच्चारण ।।१।।
म्हणविलें मागें पुढें चाले कैसें । केला सामरस्यें अभिषेक ।।धृ।।
एकछत्र झळके उन्मनी निशाणी । अनुहाताच्या ध्वनी गगन गर्जे ।।२।।
तुकया स्वामी स्थापी निजपदीं दासा । करूनि उल्हासा सप्रेमता ।।३।।

४३०८
प्रवृत्तिनिवृत्तीचे आटूनियां भाग । उतरिलें चांग रसायण।।१।।
ज्ञानाग्निहुताशीं कडशिले वोजा । आत्मसिद्धिकाजा लागूनियां ।।धृ।।
ब्रम्हीं ब्रम्हरस शीघ्र जाला पाक । घेतला रुचक प्रतीतीमुखें ।।२।।
स्वानुभवें अंगीं जाला समरस । साधनी निजध्यास ग्रासोग्रासीं ।।३।।
अरोग्यता तुका पावला अष्टांगीं । मिरविला रंगीं निजात्मरंगें ।।४।।

४३०९
काय बा करिशी सोवळें ओवळें । मन नाहीं निर्मळ वाउगें चि ।।१।।
काय बा करीसी पुस्तकांची मोट । घोकितां ह्रदयस्फोट हाता नये ।।धृ।।
काय बा करीसी टाळ आणि मृदंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ।।२।।
काय बा करीसी ज्ञानाचिया गोष्टी । करणी नाहीं पोटीं बोलण्याची ।।३।।
काय बा करीसी दंभलौकिकातें। हित नाहीं मातें तुका म्हणे ।।४।।

४३१०
स्वामी तूं ही कैसा न पडसी डोळां । सुंदर सांवळा घवघवीत ।।१।।
चतुर्भुज माळा रुळे एकावळी । कस्तुरी निडळीं रेखिलीसे ।।धृ।।
शंख चक्रा गदा रुळे वैजयंती । कुंडलें तळपती श्रवणीं दोन्ही ।।२।।
तुका म्हणे स्वामी आतां दावीं पाय । पांडुरंग माय कृपावंते ।।३।।

४३११
आणीक कोणापुढें वासूं मुख सांग । कीं माझें अंतरंग कोण जाणे ।।१।।
पाहें तुजकडे येऊनि जाऊनी । पांडुरंगा मनीं विचारावें ।।धृ।।
भय चिंता अवघे उद्योग सांडिले । आठवुनी पाउलें असें तुझीं ।।२।।
नका विसरूं मज वैकुंठनायका । विनवितो तुका बंदीजन ।।३।।

४३१२
सद्गुरूचे चरणीं ठेविला मस्तक । देउनियां हस्तक उठविलें ।।१।।
उठविलें मज देऊनियां प्रेम । भावार्थें सप्रेमे नमस्कारीं।।२।।
नमस्कारीं त्याला सद्गुरुरायाला । तुका म्हणे बोला नाम वाचें ।।३।।

४३१३
सद्गुरूने मज आशीर्वाद दिला । हरुष भरला हृदयीं माझे ।।१।।
हृदयींचा भाव कळला गुरूसी । आनंदउल्हासीं बोले मज ।।२।।
बोले मज गुरू कृपा तो करूनि । तुका म्हणे मनीं आनंदलों ।।३।।

४३१४
आनंदाचा कंद गाइयेला गीतीं । पाहियेला चित्तीं देवराव ।।१।।
देवराव तो ही आहे निश्चयेसीं । अखंड नामासी बोलवितो ।।२।।
बोलवितो मज कृपा तो करूनि । तुका म्हणे मनीं धरा भाव ।।३।।

४३१५
सातादिवसांचा जरी जाला उपवासी । तरीं कीर्तनासी टाकुं नये ।।१।।
फुटो हा मस्तक तुटो हें शरीर । नामाचा गजर सोडूं नये ।।धृ।।
शरीराचे होत दोनी ते ही भाग । परि कीर्त्तनाचा रंग सोडों नये ।।२।।
तुका म्हणे ऐसा नामीं ज्या निर्धार । तेथें निरंतर देव असे ।।३।।

४३१६
चला आळंदीला जाऊं । ज्ञानदेवा डोळां पाहूं ।।१।।
होतिल संताचिया भेटी । सुखाचिया सांगों गोष्टी ।।धृ।।
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखीं म्हणतां चुकती फेर ।।२।।
तुम्हां जन्म नाहीं एक । तुका म्हणे माझी भाक ।।३।।

४३१७
चरणीं नमन सद्‌गुरूच्या पूर्ण । नित्य हरिगुण गाऊं सदा ।।१।।
गोवर्धन जेणें नखीं हो धरिला । काळ्या नाथिला महाबळी ।।धृ।।
ऐसे हरिगुण गातो वाचेवरि । पतितासी तारी जनार्दन ।।२।।
तुका म्हणे हें चि सज्जना जीवन । वाचेसी स्मरण गोविंदाचें ।।३।।

४३१८
सद्‌गुरूवांचूनि प्रेतरूप वाणी । बोलती पुराणीं व्यासऋृषि।।१।।
म्हणोनि तयाचें पाहूं नये तोंड । निगुरा अखंड सुतकाळा ।।धृ।।
कोणे परी तया नव्हे चि सुटका । देह त्याचा लटिका जाणा तुम्ही ।।२।।
तुका म्हणे ऐसीं बोलती पुराणें । संतांचीं वचनें मागिलां हो ।।३।।

४३१९
डिवेना डसेना बुझेना निर्मळ । परि अमंगळ स्वीकारीना।।१।।
परंतु गर्धब अपवित्र जाणा । पर्वकाळीं दाना देऊं नये ।।धृ।।
डिवी लात्री बुजे बहु नेदी दुध । मुखीं नाहीं शुद्ध विष्ठा खाय ।।२।।
परंतु ते गाय पवित्र हो जाणा । पर्वकाळीं दाना देऊजेते।।३।।
ब्राम्हणें ब्राम्हणा सद्‌गुरू करावा । परि न करावा शूद्रादिक ।।४।।
तुका म्हणे देवें सांगितली सोय । म्हणोनि त्याचे पाय धरिले जीवें ।।५।।

४३२०
संसारींचें ओझें वाहता वाहाविता । तुजविण अनंता नाहीं कोणी ।।१।।
गीतेमाजी शब्द दुंदुभीचा गाजे । योगक्षेमकाज करणें त्याचें ।।धृ।।
चतुर्भुजा करीं वारू शृंगारावे । सारथ्य करावें अर्जुनाचें ।।२।।
श्वपच अंत्यज भक्तिस्नेहें जाला । अचळपदीं केला ध्रुव तुका ।।३।।

४३२१
कवणदिस येइल कैसा । न कळे संपत्तीचा भरंवसा।।१।।
चौदा चौकडिया लंकापति । त्याची कोण जाली गती ।।धृ।।
लंकेसारिखें भुवन । त्याचें त्यासी पारखें जाण ।।२।।
तेहतीस कोटि बांदवडी । राज्य जातां न लगे घडी ।।३।।
ऐसे अहंतेनें नाडिले । तुका म्हणे वांयां गेले ।।४।।

४३२२

लटिका प्रपंच वांजेची संतति । तत्वज्ञा हे भ्रांति बाधूं नेणे ।।१।।
सूर्यबिंबीं काय अंधार रिघेल । मृगजळें तिंबेल नभ काई ।।धृ।।
तैसा दृश्यभास नाडळे चि डोळा । प्रकाशसोहळा भोगीतसे ।।२।।
भोग भोग्य भोक्ता नाडळे चि कांहीं । चैतन्यविग्रहीं पूर्णकाम ।।३।।
तुका ब्रम्हानंदीं आहे तुकब्रम्ह । प्रपंचाचें बंड न देखे डोळां ।।४।।

४३२३

न म्हणे वो आम्ही आपुलेनि चित्तीं । निःशेष अतिप्रीति विषयीं तो ।।१।।
खोटा तो विटाळ । म्हणोनि गाबाळ सांडियेले।।धृ।।
भांगतमाखूचा चित्ताचा आदर । कोरडें उत्तर चाटावें तें ।।२।।
तुका म्हणे आम्ही नव्हों फजितखोर । तुटीचा व्यापार करावया ।।३।।

४३२४

अनाथाचा नाथ पतितपावन । दीनाचें रक्षण करीतसे।।१।।
ऐसें जाणोनियां नामीं विश्वासलों । भीमातिरा आलों धांवत चि ।।धृ।।
स्नान हें करितां त्रिताप निवाले । महाद्वारा आलें मन माझें ।।२।।
तेथें अनुमात्र रीग नव्हे याचा । परतलों साचा तेथूनियां ।।३।।
पुंडलिकापाशीं येऊनि पुसिलें । चिन्मय दाटलें जनार्दन ।।४।।
तुका म्हणे आतां दुजा देव नाहीं । बाप तरी आई तो चि विठो ।।५।।

४३२५

ढालतलवारे गुंतले हे कर । म्हणे जुंझणार कैसा जुंझे ।।१।।
पेटी पडदळे सिले टोप ओझें । हें तों जालें दुजें मरणमूळ ।।धृ।।
बैसविलें मला येणें अश्वावरी । धावूं पळूं तरी कैसा आतां ।।२।।
असोनि उपाय म्हणे हे अपाय । म्हणे हायहाय काय करूं ।।३।।
तुका म्हणे हा तों स्वयें परब्रम्ह । मूर्ख नेणे वर्म संतचरण ।।४।।

४३२६

किडा अन्नाचें मानुस । त्याचा म्हणविल्या दास।।१।।
तें ही त्यासी उपेक्षीना । बोल आपुला सांडीना ।।धृ।।
तो तूं नराचा नरेंद्र । तुजपासूनि इंद्र चंद्र ।।२।।

तुका म्हणे विश्वंभर । तुज वर्णी फणीवर ।।३।।

४३२७
कोटिजन्म पुण्यसाधन साधिलें । तेणें हाता आलें हरिदास्य ।।१।।
रात्रीं दिवस ध्यान हरीचें भजन । कायावाचामन भगवंतीं ।।धृ।।
ऐसिया प्रेमळा म्हणताती वेडा । संसार रोकडा बुडविला ।।२।।
एकवीस कुळें जेणें उद्धरिलीं । हे तों न कळे खोली भाग्यमंदा ।।३।।
तुका म्हणे त्याची पायधुळी मिळे । भवभय पळे वंदितां चि ।।४।।

४३२८
उपजला प्राणी न राहे संसारीं । बैसला सेजारी काळ उसां ।।१।।
पाहा तो उंदीर घेउनि जाय बोका । तैसा काळ लोका नेत असे ।।धृ।।
खाटिकाचे घरीं अजापुत्र पाहें । कसाबाची गाय वांचे कैसी ।।२।।
तुका म्हणे कांहीं करा काढाकाढी । जाती ऐसी घडी पुन्हा नये ।।३।।

४३२९
पंढरीस जाऊं म्हणती । यम थोर चिंता करि ती ।।१।।
या रे नाचों ब्रम्हानंदें । विठ्ठलनामाचिया छंदें ।।धृ।।
धरिली पंढरीची वाट । पापें रिगालीं कपाट ।।२।।
केलें भीमरेचें स्नान । यमपुरी पडिले खान ।।३।।
दुरोनि देखिली पंढरी । पापें गेलीं दुरच्यादुरी ।।४।।
दुरोनि देखिलें राउळ । हरुषें नाचती गोपाळ ।।५।।
तुका म्हणे नाहीं जाणें । अखंड पंढरिराहणें ।।६।।

४३३०
पय दधि घृत आणि नवनीत । तैसें दृश्यजात एकपणें ।।१।।
कनकाचे पाहीं अलंकार केले । कनकत्वा आले एकपणें ।।धृ।।
मृत्तिकेचे घट जाले नानापरी । मृत्तिका अवधारीं एकपणें ।।२।।
तुका म्हणे एक एक ते अनेक । अनेकत्वीं एक एकपणा ।।३।।

४३३१
पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार जाला । विठोबा भेटला निराकार ।।१।।
भांबगिरिपाठारीं वस्ति जाण केली । वृत्ति थिरावली परब्रम्हीं ।।धृ।।

निर्वाण जाणोनि आसन घातलें । ध्यान आरंभिलें देवाजीचें ।।२।।
सर्प विंचू व्याघ्र आंगासी झोंबले । पीडूं जे लागले सकळिक ।।३।।
दीपकीं कर्पूर कैसा तो विराला । तैसा देह जाला तुका म्हणे ।।४।।

४३३२
अज्ञान हा देह स्वरूपीं मीनला । सर्व वोसावला देहपात ।।१।।
ज्ञानस्वरूपाची सांगड मिळाली । अंतरीं पाहिली ज्ञानज्योती ।।२।।
तुका म्हणे चित्त स्वरूपीं राहिलें । देह विसावलें तुझ्या पायीं ।।३।।

४३३३
दामाजीपंताची रसद गुदरली । लज्जा सांभाळिली देवरायें ।।१।।
तयाचें चरित्र परिसा हो सादरें । करितों नमस्कार संतजना ।।धृ।।
मंगळवेढा असे वस्ति कुटुंबेंसी । व्यापारी सर्वांसी मान्य सदा ।।२।।
कर्म काय करी ठाणाचा हवाला । तों कांहीं पडला कठिण काळ ।।३।।
धान्याचीं भांडारें होतीं तीं फोडिलीं । पंढरी रक्षिली दुष्काळांत ।।४।।
दुबळें अनाथ तें हि वांचविलें । राष्ट्रांत ते जाली कीर्त्ति मोठी ।।५।।
मुजुम करीत होता कानडा ब्राम्हण । फिर्याद लिहून पाठविली ।।६।।
अविंदाचें राज्य बेदरीं असतां । कागद पाहतां तलब केली ।।७ ।।
दामाजीपंतासी धरोनि चालविलें । इकडे या विठ्ठलें माव केली ।।८।।
विकते धारणे सवाईचें मोल । धान्याचें सकळ द्रव्य केलें ।।९।।
दामाजीपंताच्या नांवें अर्जदास्त । लिहून खलेती मुद्रा केली ।।१०।।
विठो पाडेवार भक्तां साह्य जाला । वेदरासी गेला रायापासीं ।।११।।
जोहार मायबाप पुसती कोठील । तंव तो म्हणे स्थळ मंगळवेढें ।।१२।।
दामाजीपंतांनीं रसद पाठविली । खलेती ओतिली अर्जदास्त ।।१३।।
देखोनियां राजा संतोष पावला । म्हणे व्यर्थ त्याला तलब केली।।१४।।
काय तुझें नांव पुसती यंत्रधारी । तो म्हणे बेगारी विठा कां जी।।१५।।
पावल्याचा जाब द्यावा मायबाप । करोनि घेतों माप म्हणती ते।।१६।।
पावल्याचा जाब दिधला लिहून । तसरीफ देऊन पाठविला ।।१७।।
छत्री घोडा शिबिका आभरणांसहित । दिला सवें दूत पाठवूनि।।१८।।
वाटे चुकामुक जाली याची त्यांची । ते आले तैसे चि मंगळवेढा।।१९।।
दामाजीपंतासी बेदरासी नेलें । राजा म्हणे जालें कवतुक ।।२०।।
काल गेला विठा बेगारी देऊन । तसरीफ देऊन जाब दिला ।।२१।।
काय तुमचें काज बोला जी सत्वर । बोलाजी निर्धार वचनाचा।।२२।।

कैंचा विठा कोण पाठविला कधीं । काढोनियां आधीं जाब दिला।।२३।।
पहातां चि जाब ह्रदय फुटलें । नयन निडारले राजा देखे ।।२४।।
सावळें सकुमार रूप मनोहर । माथां तेणें भार वाहियेला ।।२५।।
दामाजीपंतासी रायें सन्मानिलें । तो म्हणे आपुलें कर्म नव्हे ।।२६।।
आतां तुमची सेवा पुरे जी स्वामिया । शिणविलें सखया विठोबासी।।२७।।
निरोप घेऊनि आला स्वस्थळासी । उदास सर्वासीं होता जाला ।।२८।।
दामाजीपंतांनीं सेविली पंढरी । ऐसा त्याचा हरि निकटवृत्ति ।।२९।।
तुका म्हणे विठो अनाथ कैवारी । नुपेक्षी हा हरि दासालागीं ।।३०।।

४३३४
पहिली माझी ओवी ओवीन जगत्र । गाईन पवित्र पांडुरंग ।।१।।
दुसरी माझी ओवी दुजें नाहीं कोठें । जनीं वनीं भेटे पांडुरंग ।।धृ।।
तिसरी माझी ओवी तिळा नाहीं ठाव । अवघा चि देव जनीं वनीं ।।२।।
चवथी माझी ओवी वैरिलें दळण । गाईन निधान पांडुरंग ।।३।।
पांचवी माझी ओवी ते माझिया माहेरा । गाईन निरंतरा पांडुरंगा ।।४।।
साहावी माझी ओवी साहा ही आटले। गुरूमूर्त्त भेटले पांडुरंग ।।५।।
सातवी माझी ओवी आठवे वेळोवेळां। बैसलासे डोळां पांडुरंग ।।६।।
आठवी माझी ओवी आठावीस योग। उभा चंद्रभागे पांडुरंग ।।७।।
नववी माझी ओवी सरलें दळण। चुकलें मरण संसारीचें ।।८।।
दाहावी माझी ओवी दाहा अवतारा । न यावें संसारा तुका म्हणे ।।९।।

४३३५
धरोनियां फरश करी । भक्तजनाचीं विघ्नें वारी।।१।।
ऐसा गजानन महाराजा । त्याचें चरणीं हालो लागो माझा ।।धृ।।
सेंदुर शमी बहुप्रिय ज्याला । तुरा दुर्वांचा शोभला ।।२।।
उंदिर असे जयाचें वहन । माथां जडितमुगुट पूर्ण ।।३।।
नागयज्ञोपवीत रुळे । शुभ्र वस्त्र शोभित साजिरें ।।४।।
भावमोदक हराभरी । तुका भावें हे पूजा करी ।।५।।

४३३६
नाम आहे जयापाशीं । जेथें राहे तेथें चि काशी।।१।।
ऐसा नामाचा महिमा । जाणे वाल्मीक शंकर उमा ।।धृ।।
नाम प्रऱ्हादबाळ । जाणे पापी आजामेळ ।।२।।

नाम जाणे तो नारद । नामें ध्रुवा अक्षय पद ।।३।।
नाम गणिकेतें तारी । पशु गजेंद्र उद्धारी।।४।।
नाम जाणे हणुमंत । जाणताति महासंत ।।५।।
नाम जाणे शुकमूर्ति । जाणे राजा परिक्षिती ।।६।।
नाम जाणे तुका । नाहीं संसाराचा धोका ।।७।।

४३३७
बहुतां जन्मां अंतीं जन्मलासी नरा । देव तूं सोइरा करीं आतां ।।१।।
करीं आतां बापा स्वहिताचा स्वार्थ । अनर्थाचा अर्थ सांडीं आतां ।।धृ।।
सांडि आतां कुडी कल्पनेची वाट । मार्ग आहे नीट पंढरीचा ।।२।।
पंढरीस जावें सर्व सुख घ्यावें । रूप तें पाहावें विटेवरि ।।३।।
विटेवरि नीट आनंदाचा कंद । तुका नाचे छंद नामघोषें ।।४।।

४३३८
किती सांगों तरि नाइकति बटकीचे । पुढें सिंदळीचे रडतील ।।१।।
नका नका करूं रांडेची संगती । नेवोनी अधोपाती घालिल यम ।।२।।
तुका म्हणे जरी देवीं नाहीं चाड । हाणोनि थोबाड फोडिल यम ।।३।।

४३३९
उधानु काटीवरि चोपडुची आस । नवरा राजस मिरवतसे ।।१।।
जिव्हाळ्याचा काठी उबाळ्याच्या मोटा । नवरा चोहटा मिरवतसे ।।धृ।।
तुळसीची माळ नवरीचे कंठीं । नोवरा वैकुंठीं वाट पाहे ।।२।।
तुका म्हणे ऐसी नोवऱ्याची कथा । परमार्थ वृथा बुडविला ।।३।।

४३४०
न कळे महिमा वेद मोनावले । जेथें पांगुळले मनपवन ।।१।।
चंद्र सूर्य ज्याचें तेज वागविती । तेथें माझी मती कोणीकडे ।।धृ।।
काय म्यां वाणावें तुझ्या थोरपणा । सहस्रवदना वर्णवेना ।।२।।
तुका म्हणे आम्ही बाळ तूं माउली । कृपेची साउली करीं देवा ।।३।।

४३४१
संतचरणरज लागतां सहज । वासनेचें बीज जळोन जाय ।।१।।
मग रामनामीं उपजे आवडी । सुख घडोघडी वाढों लागे ।।धृ।।

कंठीं प्रेम दाटे नयनीं नीर लोटे । ह्रदयीं प्रगटे रामरूप।।२।।
तुका म्हणे साधन सुलभ गोमटें । परि उपतिष्ठे पूर्वपुण्यें ।।३।।

४३४२
विधवेसि एक सुत । अहर्निशीं तेथें चित्त ।।१।।
तैसा तूं मज एकला । नको मोकलूं विठ्ठला ।।धृ।।
सुपुत्रालागीं बाप । अवघे तेथें चि संकल्प ।।२।।
तुका म्हणे चित्तीं । पतिव्रते जैसा पति।।३।।

४३४३
म्हणे विठ्ठल पाषाण । त्याच्या तोंडावरि वाहाण।।१।।
नको नको दर्शन त्याचें । गलितकुष्ट भरो वाचे ।।धृ।।
शाळिग्रामासि म्हणे धोंडा । कोड पडो त्याच्या तोंडा ।।२।।
भावी सद्गुरु मनुष्य । त्याचें खंडो का आयुष्य ।।३।।
हरिभक्ताच्या करी चेष्टा । त्याचे तोंडीं पडो विष्ठा ।।४।।
तुका म्हणे किती ऐकों । कोठवरी मर्यादा राखों ।।५।।

४३४४
स्वगाअचे अमर इच्छितताति देवा । मृत्युलोकीं व्हावा जन्म आम्हां ।।१।।
नारायणनामें होऊं जिवनमुक्त । किर्त्तनीं अनंत गाऊं गीती ।।धृ।।
वैकुंठींचे जन सदा चिंतिताति । कइं येथें येती हरिचे दास ।।२।।
यमधर्म वाट पाहे निरंतर । जोडोनियां कर तिष्ठतसे ।।३।।
तुका म्हणे पावावया पैल पार । नामंत्र सार भाविकासि।।४।।

४३४५
व्यापक हा विश्वंभर । चराचर याचेनी ।।१।।
पंढरिराव विटेवरि । त्याचींच धरीं पाउलें ।।धृ।।
अवघियांचा हा चि ठाव । देवोदेवीं सकळ ।।२।।
तुका म्हणें न करीं सोस । भेदें दोष उफराटे।।३।।

४३४६
पसरोनि मुखें । कैसे धालों बा हारीखें ।।१।।
ब्रम्हादिका दुर्लभ वांटा । आम्हां फावला राणटां ।।धृ।।

गोड लागे काय तरि। कृपावंत जाला हरि ।।२।।
उडती थेंबुटें । अमृताहुनि गोमटें ।।३।।
गोडाहुनि गोड । जिव्हा नाचे वाटे कोड ।।४।।
खुणावुनि तुका । दावी वर्म बोलों नका ।।५।।

४३४७
आमुचि मिरास पंढरी । आमुचें घर भीमातिरीं ।।१।।
पांडुरंग आमुचा पिता । रकुमाबाई आमुचि माता ।।धृ।।
भाव पुंडलीक मुनि । चंद्रभागा आमुची बहिणी ।।२।।
तुका जुन्हाट मिराशी । ठाव दिला पायांपाशीं ।।३।।

४३४८
गंगा गेली सिंधुपाशीं । जरी तो ठाव नेदी तिशी।।१।।
तिणें जावें कवण्या ठाया । मज सांगा पंढरिराया ।।धृ।।
जळ क्षोभलें जलचरां । माता बाळा नेदी थारा ।।२।।
तुका म्हणे आलों शरण । देवा त्वां कां धरिलें मौन्य ।।३।।

४३४९
बैसो आतां मनीं । आले तैसें चि वदनीं ।।१।।
मग अवघें चि गोड । पुरे सकळ हि कोड ।।धृ।।
बाहेरील भाव । तैसा अंतरीं हि वाव ।।२।।
तुका म्हणे मणि । शोभा दाखवी कोंदणीं।।३।।

४३५०
वेठी ऐसा भाव । न करी अहाच उपाव ।।१।।
रूप डसवी न जिवा । अवघा ये च ठायीं हेवा ।।धृ।।
कृपणाचेपरि । लेखा पळनिमिषेवरि ।।२।।
तुका म्हणे आस । संनिध चि जगदीशा।।३।।

४३५१
सर्वसुखा अधिकारी । मुखें उच्चारी हरिनाम ।।१।।
सर्वांगें तो सर्वोत्तम । मुखीं नाम हरीचें ।।धृ।।
ऐशी उभारिली बाहे। वेदीं पाहें पुराणीं ।।२।।

तुका म्हणे येथें कांही । संदेह नाहीं भरवसा।।३।।

४३५२
जो का निर्गुण निराकार । तेथें धरियेले अवतार।।१।।
निर्गुण होता तो सगुणासि आला । भक्तिसाटीं प्रगटला ।।धृ।।
जो का त्रिभुवनचाळक । तो हा नंदाचा बाळक ।।२।।
सोडविलें वसुदेवदेवकीसि । अवतार धरिला तिचे कुशी ।।३।।
मारियेला कंसराणा । राज्यीं स्थापिलें उग्रसेना ।।४।।
तुका म्हणे देवादिदेव । तो हा उभा पंढरिराव ।।५।।

४३५३
जुनाट हें धन अंत नाहीं पार । खात आले फार सरलें नाहीं ।।१।।
नारद हा मुनि शुक सनकादिक । उरलें आमुप तुम्हां आम्हां ।।धृ।।
येथूनियां धना खाती बहु जन । वाल गुंज उणें जालें नाहीं ।।२।।
तुका म्हणे धना अंत नाहीं पार । कुंटित चार वाचा तेथें ।।३।।

४३५४
कोडियाचें गोरेपण । तैसें अहंकारीज्ञान ।।१।।
त्यासि अंतरीं रिझे कोण । जवळी जातां चिळसवाण ।।धृ।।
प्रेतदेह गौरविलें। तैसें विटंबवाणें जालें ।।२।।
तुका म्हणे खाणें विष्ठा । तैशा देहबुद्धिचेष्टा।।३।।

४३५५
पाया जाला नारू । तेथें बांधला कापूरु ।
तेथें बिबव्याचें काम । अधमासि तों अधम ।।१।।
रुसला गुलाम । धणी करीतो सलाम ।
तेथें चाकराचें काम । अधमासि तों अधम ।।धृ।।
रुसली घरची दासी । धणी समजावी तियेसि ।
तेथें बटकीचें काम। अधमासि तों अधम ।।२।।
देव्हाऱ्यावरि विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।
तेथें पैजारेचें काम । अधमासि तों अधम ।।३।।
तुका म्हणे जाती । जातीसाटीं खाती माती ।।४।।

४३५६
ब्राम्हणा न कळे आपुलें तें वर्म । गंवसे परब्रम्ह नामें एका ।।१।।
लहानथोरासि करितों प्रार्थना । दृढ नारायणा मनीं धरा।।धृ।।
सर्वांप्रति माझी हे चि असे विनंती । आठवा श्रीपती मनामाजी ।।२।।
केशव नारायण करितां आचमन । ते चि संध्या स्नान कर्म क्रिया ।।३।।
नामें करा नित्य भजन भोजन । ब्रम्हकर्म ध्यान याचे पायीं ।।४।।
तुका म्हणे हें चि निर्वाणींचें शस्त्र । म्हणोनि सर्वत्र स्मरा वेगीं ।।५।।

४३५७
नरदेह वांयां जाय । सेवीं सद्‍गुरूचे पाय ।।१।।
सांडोनियां अहंभाव । धरीं भक्ती पूजीं देव ।।धृ।।
थोराचिये वाटे। जातां भवशोक आटे ।।२।।
प्रल्हादातें तारी । तुका म्हणे तो कंठीं धरीं ।।३।।

४३५८
संचित तैशी बुद्धि उपजे मनामधीं । सांगितलें सिद्धि नव जाय ।।१।।
ज्याचा जैसा ठेवा तो त्यापाशीं धांवे । न लगती करावे उपदेश ।।२।।
घेऊन उठती आपुलाले गुण । भविष्याप्रमाणें तुका म्हणे ।।३।।

४३५९
कुरंगीपाडस चुकलेसे वनीं । फुटे दुःखेंकरोनि हृदय त्याचें ।।१।।
तैसा परदेशी जालों तुजविण । नको हो निर्वाण पाहूं माझें ।।धृ।।
अपराध्याच्या कोटि घालीं सर्व पोटीं । नको या शेवटीं उपेक्षूं गा ।।२।।
तुका म्हणे असों द्यावी माझी चिंता । कृपाळु अनंता पांडुरंगा ।।३।।

४३६०
धन्य जालों हो संसारीं । आम्ही देखिली पंढरी ।।१।।
चंद्रभागे करूं स्नान । पुंडलीकाचें दर्शन ।।धृ।।
करूं क्षेत्रप्रदक्षिणा। भेटूं सत या सज्जनां ।।२।।
उभे राहूं गरुडपारीं । डोळेंभरुनी पाहों हरी ।।३।।
तुका म्हणे वाळवंटीं । महालाभ फुकासाटीं ।।४।।

४३६१

पंढरीचा वारकरी । खेपा वैकुंठबंदरीं ।।१।।
तया नाहीं आणखी पेणें । सदा वैकुंठीं राहाणें ।।धृ।।
आला गेला केल्या यात्रा । उद्धरिलें कुळा सर्वत्रा ।।२।।
तुका म्हणे नाहीं । यासि संदेह कल्पांतीं ही ।।३।।

४३६२
सोडियेल्या गाई नवलक्ष गोपाळीं । सवें वनमाळी चालियेला ।।१।।
सुदीन समय भाग्याचा उदय । चारावया गाई वनामाजी ।।धृ।।
गाईगोपाळांच्या संगें चाली हरि । क्रीडा नानापरि खेळताति ।।२ ।।
काठी कांबळीया मोहरीया पोंवा । सिदोरी गांजिवा खांद्यावरि ।।३।।
गोधनें संवगडे खेळे नानापरी । आले भीमातीरीं वेणुनादा ।।४।।
तेथें उभा ठेला गोपाळांसहित । सिदोरिया सोडीत बैसे तेथें ।।५।।
तुका म्हणे ज्यांनीं आणिल्या भाकरी । नेऊनियां हरीपुढें देती ।।६।।

४३६३
ज्यां जैसी आवडी त्यां तैसा विभाग । देत पांडुरंग तृप्ति जाली ।।१।।
मुखींचें उच्छिष्ट हिरोनियां खात । विस्मित विधाता देखोनियां ।।धृ।।
दिलें जें गोपाळां तें नाहीं कोणासि । विस्मित मानसीं सुरवर ।।२।।
देव ऋषि मुनि सिद्ध हे चारण । शिव मरुद्‌गण चंद्र सूर्य ।।३।।
तुका म्हणे आले सकळ हि सुरवर । आनंदें निर्भर पाहावया ।।४।।

४३६४
आले सुरवर नानापक्षी जाले । सकळ अवतरले श्वापदवेषें ।।१।।
श्वानखररूपी होऊनियां आले । उच्छिष्ट कवळ वेचिताति ।।धृ।।
होऊनियां दीन हात पसरिती । मागोनियां घेती उष्टावळी ।।२।।
अभिमान आड घालोनि बाहेरि । तयां म्हणे घ्या रे धणी ।।३।।
तुका म्हणे धणी लाधली अपार । तया सुखा पार काय सांगों ।।४।।

४३६५
एकमेकीं घेती थडका । पाडी धडका देऊनि ।।१।।
एकमेका पाठीवरि । बैसोनि करिती ढवाळी ।।धृ।।
हाता हात हाणे लाही । पळतां घाई चुकविती ।।२।।
तुका म्हणे लपणी चपणी । एका हाणी पाठीवरी ।।३।।

४३६६
चला वळूं गाई । दूर अंतरल्या भाई ।।१।।
खेळ खेळतां जाला शीण । कोण करी वणवण ।।धृ।।
गाई हकारी कान्हया । म्हणोनि लागती ते पायां ।।२।।
तुका म्हणे द्यावें । नाम संकीर्तन बरवें ।।३।।

४३६७
नाहीं संसाराची चाड । गाऊं हरिचें नाम गोड ।।१।।
हो का प्राणाचा ही घात । परि हा न सोडीं अनंत ।।धृ।।
जन्मोजन्मीं हा चि धंदा । संतसंग राहो सदा ।।२।।
तुका म्हणे भाव । तो हा जाणा पंढरिराव ।।३।।

४३६८
हरीविण जिणें व्यर्थ चि संसारीं । प्रेत अळंकारीं मिरवत ।।१।।
देवाविण शब्द व्यर्थ चि कारण । भांड रंजवण सभेसि गा ।।धृ।।
आचार करणें देवाविण जो गा । सर्पाचिया अंगा मृदुपण ।।२।।
तुका म्हणे काय बहु बोलों फार । भक्तीविण नर अभाग्य कीं ।।३।।

४३६९
जालासि पंडित पुराण सांगसी । परि तूं नेणसी मीं हें कोण ।।१।।
गाढवभरी पोथ्या उलथिशी पानें । परि गुरुगम्यखुणे नेणशी बापा ।।२।।
तुका कुणबियाचा नेणे शास्त्रमत । एक पंढरीनाथ विसंबेना ।।३।।

४३७०
स्वप्नींच्या व्यवहारा काळांतर लेखा । जागृतीसि रुका गांठ नाहीं ।।१।।
तेवीं शब्दज्ञानें करिती चावटी । ज्ञान पोटासाटीं विकों नये ।।धृ।।
बोलाची च कढी बोलाचा ची भात । जेवूनियां तृप्त कोण जाला ।।२।।
कागदीं लिहिली नांवाची साकर। चाटितां मधुर केवीं लागे ।।३।।
तुका म्हणे जळो जळो त्याचें ज्ञान। यमपुरी कोण दंड साहे ।।४।।

४३७१
भूत नावरे कोणासी । पुंडलीकें खिळिलें त्यासी।।१।।

समचरण असे विटे । कटिकर उभें नीट ।।धृ।।
वाळुवंटीं नाचती संत । प्रेमामृतें डुल्लत ।।२।।
तुका म्हणे पुंडलीका । भक्तिबळें तूं चि निका ।।३।।

४३७२
आपुले वरदळ नेदा । एवढी गोविंदा कृपणता ।।१।।
यावर बा तुमचा मोळा । हा गोपाळा कळेना ।।धृ।।
सेवा तरी घेतां सांग । चोरिलें अंग सहावेना ।।२।।
तुका जरी क्रियानष्ट । तरी कां कष्ट घेतसां ।।३।।

४३७३
भीमातिरींचा नाटक । यानें लावियेलें चेटक ।।१।।
मन बुद्धि जाली ठक । नेणे संसाराची टुक ।।धृ।।
कैशी प्रसंगीक वाणी । प्रत्यादर कडसणी ।।२।।
तुका म्हणे मोठा ठक । जेथें तेथें उभा ठाके ।।३।।

४३७४
कां रे दाटोन होतां वेडे । देव आहे तुम्हांपुढें ।।१।।
ज्यास पाठ नाहीं पोट । करी त्रैलोक्याचा घोंट ।।धृ।।
तुमची तुम्हां नाहीं सोय । कोणाचें काय जाय ।।२।।
तुका गातो नामीं । तेथें नाहीं आम्ही तुम्ही ।।३।।

४३७५
नव्हे हें कवित्व टांकसाळी नाणें । घेती भले जन भले लोक ।।१।।
लागलासे झरा पूर्ण नवनीतें । सेविलियां हित फार होय ।।२।।
तुका म्हणे देवा केला बलात्कार । अंगा आलें फार महंतपण ।।३।।

४३७६
सांवळें सुंदर पाहे दृष्टिभरि । ऐसें कांहीं करीं मन माझें ।।१।।
मना तुज ठाव दिला त्याचे पायीं । राहें विठाबाईसवें सदा ।।धृ।।
मना नको धरूं आणिकांचा संग । नाहीं पांडुरंग जयां मनीं ।।२।।
वरपंग भाव नको म्हणे तुका । करीं प्राणसखा नारायणा।।३।।

४३७७

एकली वना चालली राना । चोरुनि जना घराचारी।।१।।
कोणी नाहीं संगीसवें । देहभावें उदास ।।धृ।।
जाउनि पडे दुर्घटवनीं। श्वापदांनीं वेढिली ।।२।।
मार्ग न चले जातां पुढें । भय गाढें उदेलें।।३।।
मागील मागें अंतरलीं । पुढील चाली खोळंबा ।।४।।
तुका म्हणे चित्तीं यासि । हृदयस्थासी आपुल्या ।।५।।

४३७८

पडली घोर रजनी । संगी कोणी नसे चि ।।१।।
पहा हो कैसें चालविलें । पिसें गोवलें लावूनि ।।धृ।।
कोठें लपविलें तें अंग । होता संग दिला तो ।। ।२।।
मज कधीं नव्हतें ठावें । दोही भावें वाटोळें ।।३।।
तुका म्हणे कैंची उरी । दोहीपरि नाडिलें ।।४।।

४३७९

उदार कृपाळ पतितपावन । ब्रिदें नारायणा जाती वांयां ।।१।।
वर्णिलासि श्रुति नेणे तुझा पार । राहे मौनाकार नेति ऐसें ।।धृ।।
तेथें माझा धांवा पावे कोणीकडे । अदृष्ट हें पुढें वोडवलें ।।२।।
कोण ऐसा भक्त लाधला भाग्यासी । आठवण ऐसी द्यावी तुज ।।३।।
तुका म्हणे नको पाहों माझा अंत । जाणोनि हे मात उडी घालीं ।।४।।

४३८०

ज्याचें जैसें भावी मन । त्यासि देणें दरुषण ।।१।।
पुरवूं जाणे मनिंची खूण । समाधान करोनि ।।धृ।।
आपणियातें प्रगट करी । छाया वरी कृपेची ।।२।।
तुका म्हणे केले दान । मन उन्मन हरिनामीं ।।३।।

४३८१

कां रे पुंड्या मातलासी । उभें केलें विठ्ठलासि ।।१।।
वस्ति क्षीरसागरवासीं । आला उभा पंढरीसि ।।धृ।।
भक्ती देखोनि निकट । देवें सोडिलें वैकुंठ ।।२।।
तुका म्हणे बळी । तूं चि एक भूमंडळीं ।।३।।

४३८२
शेवटींची विनंती । ऐका ऐका कमळापती ।।१।।
काया वाचा मन । चरणीं असे समर्पण ।।धृ।।
जीवपरमात्मा ऐक्यासि। सदा वसो ह्रदयेंसीं ।।२।।
तुका म्हणे देवा । कंठीं वसावें केशवा।।३।।

४३८३
माझें परिसावें गार्‍हाणें । चित्त द्यावें नारायणें ।।१।।
माझे ह्रदयींचें वर्म । देवा जाणशी तूं कर्म ।।धृ।।
सबाह्यअंतरसाक्ष। ऐसा वेदीं केला पक्ष ।।२।।
तुका म्हणे नेणां । काय सांगों नारायणा।।३।।

४३८४
गुरुचिया मुखें होइल ब्रम्हज्ञान । न कळे प्रेमखुण विठोबाची ।।१।।
वेदातें विचारा पुराणातें पुसा । विठोबाचा कैसा प्रेमभाव ।।२।।
तुका म्हणे सांडा जाणिवेचा शीण । विठोबाची खूण जाणती संत ।।३।।

४३८५
देव आतां आम्हीं केला असे ॠणी । आणिका वांचूनि काय गुंता ।।१।।
एकाचें आर्जव करू एकनिष्ठ । आणिकांचा बोभाट कामा नये ।।धृ।।
बहुतांचे आर्जव केलिया खटपट । नाहीं हा शेवट शुद्ध होत ।।२।।
पुरता विचार आणोनी मानसीं । अंतरलों सर्वासि पईं देखा ।।३।।
तुका म्हणे देवा चरणीं असो भाव । तेणें माझा जीव संतोष हा ।।४।।

४३८६
पापाची वासना नको दावूं डोळां । त्याहुनि अंधळा बराच मी ।।१।।
निंदेचें श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनि ठेवीं देवा ।।धृ।।
अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याजहुनि मुका बराच मी ।।२।।
नको मज कधीं परस्त्रीसंगति । जनांतुन माती उठतां भली ।।३।।
तुका म्हणे मज अवघ्याचा कांटाळा । तूं एक गोपाळा आवडसी ।।४।।

४३८७

कीर्त्तनाचा विकरा मातेचें गमन । भाड खाई धन विटाळ तो ।।१।।
हरिभक्ताचि माता हे हरिगुणकीर्त्ति । इजवर पोट भरिती चांडाळ ते ।।धृ।।
अंत्यज हा ऐसें कल्पांतीं करीना । भाड हे खाईना जननीची ।।२।।
तुका म्हणे त्याचें दर्शन ही खोटें । पूर्वजांसि नेटें नरका धाडी ।।३।।

४३८८
पंढरी पावन जालें माझें मन । आतां करूं ध्यान विठोबाचें ।।१।।
आतां ऐसें करूं नाम गाऊं गीतीं । सुखाचा सांगाती विठो करूं ।।धृ।।
संग करूं त्याचा तो सखा आमचा । अनंतां जन्मांचा मायबाप ।।२।।
परतोनि सोई धरीं कां रे मना । विठ्ठलचरणा घालीं मिठी ।।३।।
घातलीसे मिठी नाही भक्तिभाव । उदार पंढरिराव तुका म्हणे ।।४।।

४३८९
येईं गे विठ्ठले विश्वजीवनकले । सुंदर घननीळे पांडुरंगें ।।१।।
येईं गे विठ्ठले करुणाकल्लोळे । जीव कळवळे भेटावया ।।धृ।।
न लगती गोड आणीक उत्तरें । तुझें प्रेम झुरे भेटावया ।।२।।
तुका म्हणे धांव घालीं कृष्णाबाई । क्षेम चाहूंबाही देईं मज ।।३।।

४३९०
कटावरी कर कासया ठेविले । जननी विठ्ठले जीवलगे।।१।।
शंखचक्रगदाकमळमंडित । आयुधें मंडित कृष्णाबाई।।धृ।।
क्षण एक धीर होत नाहीं चित्ता । केव्हां पंढरिनाथा भेटशील ।।२।।
तुका म्हणे हें चि करीं देईं । तईं च विश्रामा पावईन।।३।।

४३९१
आतां मोकलावें नव्हे हें उचित । तरी कृपावंत म्हणवावें ।।१।।
पूवाअ भक्त जाले सर्व आपंगिले । नाहीं उपेक्षिले तुम्हीं कोणी ।।धृ।।
माझिया वेळेसि कां गा लपालासी । विश्व पोसितोसि लपोनियां ।।२।।
करावी म्हणावी सर्वां भूतीं दया । तरी भेटावया येईन मी ।।३।।
तरी माझे हाती देईं मनबुद्धि । जरि दयानिधि येशील तूं ।।४।।
तुका म्हणे तूं चि अवघा सूत्रधारी । माझी सत्ता हरी काय आहे ।।५।।

४३९२

माझें कोण आहे तुजविण देवा । मुकुंदा केशवा नारायणा ।।१।।
वाट पाहतसें कृपेच्या सागरा । गोपीमनोहरा पांडुरंगा।।धृ।।
साच करीं हरी आपुली ब्रिदावळी । कृपेनें सांभाळीं महाराजा ।।२।।
क्षमा करीं सर्व अपराध माझा । लडिवाळ मी तुझा पांडुरंगा ।।३।।
साह्य होसी तरी जाती साही वैरी । मग सुखें अंतरीं ध्यान तुझें ।।४।।
कृपा करोनि देईं दया क्षमा शांती । तेणें तुझी भक्ति लाभईल ।।५।।
माझें हें सामर्थ्य नव्हे नारायणा । जरी कांहीं करुणा येइल तुज ।।६।।
तुका म्हणे मज कैसें आपंगा जी । आपुलेंसें करा जी पांडुरंगा ।।७।।

४३९३
अपराध जाले जरी असंख्यात । तरी कृपावंत नाम तुझें ।।१।।
तुझें लडिवाळ तुज कृपा यावी । म्यां वाट पाहावी कवणाची ।।धृ।।
मायबाप माझा रुक्मादेवीवर । हा दृढ निर्धार अंतरींचा ।।२।।
तुका म्हणे कोणे गोष्टीचें संकष्ट । न घालीं मज भेट नारायणा ।।३।।

४३९४
आधीं कां मज लावियेली सवे । आतां न राहावे तुजविण ।।१।।
पहिलें चि तोंडक कां गा नाहीं केलें । आतां उपेक्षिलें न सोडीं मी ।।धृ।।
कृपेच्या सागरा न पाहें निर्वाण । जालों तुजवीण कासावीस ।।२।।
तुका म्हणे कोठें गुंतलेति हरी । येईं झडकरी पांडुरंगा ।।३।।

४३९५
बा रे पांडुरंगा केव्हां येशी भेटी । जाहालों हिंपुटी तुजवीण ।।१।।
तुजवीण सखें न वटे मज कोणी । वाटतें चरणीं घालूं मिठी ।।धृ।।
ओवाळावी काया चरणांवरोनि । केव्हां चक्रपाणी भेटशील ।।२।।
तुका म्हणे माझी पुरवीं आवडी । वेगीं घालीं उडी नारायणा ।।३।।

४३९६
पंचाग्निसाधन करूं धूम्रपान । काय तीर्थाटण करूं सांग ।।१।।
सांग कोणे देशीं आहे तुझें गांव । घेऊनियां धांव येऊं तेथें ।।धृ।।
सांग कांहीं वृत्त कोण करूं व्रत । जेणें कृपावंत होशील तूं ।।२।।
वाटतें सेवटीं जालासि निष्ठुर । न देसी उत्तर तुका म्हणे ।।३।।

४३९७
तुजवीण तीळभरी रिता ठाव । नाहीं ऐसें विश्व बोलतसे ।।१।।
बोलियेले योगी मुनी साधु संत । आहेसि या आंत सर्वांठायीं ।।धृ।।
मी तया विश्वासें आलों शरणागत । पूवाअचें अपत्य आहें तुझें ।।२।।
अनंत ब्रम्हांडें भरोनि उरलासि । मजला जालासि कोठें नाहीं ।।३।।
अंतपार नाहीं माझिया रूपासि । काय सेवकासि भेट देऊं ।।४।।
ऐसें विचारिलें म्हणोनि न येशी । सांग हृषीकेशी मायबापा ।।५।।
तुका म्हणे काय करावा उपाय । जेणें तुझे पाय आतुडति ।।६।।

४३९८
काम क्रोध आड पडले पर्वत । राहिला अनंत पलीकडे ।।१।।
नुलंघवे मज न सांपडे वाट । दुस्तर हा घाट वैरियांचा ।।धृ।।
आतां कैंचा मज सखा नारायण । गेला अंतरोन पांडुरंगा ।।२।।
तुका म्हणे व्यर्थ मोलाचें शरीर । गेलें हा विचार कळों आला ।।३।।

४३९९
नव्हे निष्ठावंत तुज काय बोल । सेवेविण मोल मागतसें ।।धृ।।
न घडे भजन शुद्ध भावनिष्ठा । आपुल्या अदृष्टावरी बोल ।।धृ।।
पूवाअ जाले भक्त असंख्य विरक्त । काम क्रोध अहंते निर्दाळिलें ।।२।।
ऐसी अंगवण नाहीं मज देवा । करीतसें हेवा भेटावयाचा ।।३।।
कृपा करोनियां पुरवीं असोसी । आपुल्या ब्रिदासी राखावया ।।४।।
तुका म्हणे एक बाळक अज्ञातें । त्यासि हे पोसित मायबापें ।।५।।

नाटाचे २
४४००
अगा ये मधुसूदना माधवा । अगा ये कमळापती यादवा ।
अगा श्रीधरा केशवा । अगा बांधवा द्रौपदीच्या ।।१।।
अगा विश्वव्यापका जनार्दना । गोकुळवासी गोपिकारमणा ।
अगा गुणनिधि गुणनिधाना । अगा मर्दना कंसाचिया ।।धृ।।
अगा सर्वोत्तमा सर्वेश्वरा । गुणातीता विश्वंभरा ।
अगा निर्गुणा निराकारा । अगा आधारा दीनाचिया ।।२।।
अगा उपमन्यसहाकारा । अगा शयना फणिवरा ।
अगा काळकृतांत असुरा । अगा अपारा अलक्षा ।।३।।

अगा वैकुंठनिवासा । अगा अयोध्यापति राजहंसा ।
अगा ये पंढरिनिवासा। अगा सर्वेशा सहजरूपा ।।४।।
अगा परमात्मा परमपुरुषा। अगा अव्यया जगदीशा ।
अगा कृपाळुवा आपुल्या दासा । तोडीं भवपाशा तुका म्हणे ।।५।।

४४०१
कैसी करूं तुझी सेवा । ऐसें सांगावें जी देवा ।
कैसा आणूं अनुभवा । होशी ठावा कैशापरी ।।१।।
कर्मभ्रष्ट माझें मन । नेणें जप तप अनुष्ठान ।
नाहीं इंद्रियांसि दमन । नव्हे मन एकविध।।धृ।।
नेणे यातीचा आचार । नेणें भक्तीचा विचार ।
मज नाहीं संतांचा आधार । नाहीं स्थिर बुद्धि माझी ।।२।।
न सुटे मायाजाळ । नाहीं वैराग्याचें बळ ।
न जिंकवती सबळ । काम क्रोध शरीरीं ।।३।।
आतां राख कैसें तरि । मज नुपेक्षावें हरी ।
तुझीं ब्रिदें चराचरीं । तैसीं साच करीं तुका म्हणे ।।४।।

४४०२
भीमातीरवासी । तेथें निश्चयेंसी काशी ।।१।।
मुख्यमुक्तीचें माहेर । ऐसें जाणा पंढरपुर ।।धृ।।
घडे भींवरेशीं स्नान । त्यासि पुन्हा नाहीं जन्म ।।२।।
भाव धरोनि नेटका । मोक्ष जवळी म्हणे तुका ।।३।।

४४०३
जाली गाढवी दुधाळ । महिमा गाईची पावेल ।।१।।
श्वान जालेंसे चांगलें । तरी कां सांगातें जेवील ।।धृ।।
जाली सिंदळा चांगली । तरि कां पतिव्रता जाली ।।२।।
तुका म्हणे ऐशा जाति । काय उंचपण पावती ।।३।।

४४०४
काशीयात्रा पांच द्वारकेच्या तीन । पंढरीची जाण एक यात्रा ।।१।।
काशी देह विटंबणें द्वारकें जाळणें । पंढरीशी होणें ब्रम्हरूप ।।धृ।।
अठरापगडयाती सकळ हि वैष्णव । दुजा नाहीं भाव पंढरीसि ।।२।।

तुका म्हणे असो अथवा नसो भाव । दर्शनें पंढरिराव मोक्ष देतो ।।३।।

४४०५
हें चि मागणें विठाबाई । पायीं ठेवूनियां डोई ।।१।।
शांति दया अंतःकरणीं । रंगो रामनामीं वाणी ।।धृ।।
मूळ द्वंद्वाचें विघडो । निजानंदीं वृत्ति जडो ।।२।।
तुका म्हणे हरी । आतां आपुलेंसें करीं ।।३।।

४४०६
करोनि स्नानविधि आणि देवधर्म । क्रिया नित्यनेम तुजसाटीं ।।१।।
तुजलागीं दानें तुजलागीं तीर्थें । सकळ ही व्रतें तुजलागीं ।।धृ।।
सकळ चित्तवृत्ति दिवस आणि राती । आवडशी प्रीती नारायणा ।।२।।
तुका म्हणे याहो पवित्राच्या राया । प्राणविसावया पांडुरंगा ।।३।।

४४०७
पहावा नयनीं विठ्ठल चि एक । कांहीं तरी सार्थक संसाराचें ।।१।।
कोठें पाहों तुज कां गा लपालासि । कांहीं बोल मशीं नारायणा ।।धृ।।
वाटते उदास मज दाही दिशा । तुजविण हृषीकेशा वांचोनियां ।।२।।
नको ठेवूं मज आपणा वेगळें । बहुत कळवळें तुजलागीं ।।३।।
तुका म्हणे भेटी देईं नारायणा । घडी कंठवेना तुजविण ।।४।।

४४०८
पूवाअ बहुतांचे केले प्रतिपाळ । तें मज सकळ श्रुत आहे ।।१।।
अज अविनाश निर्गुण निरामय । विचारिलें काय त्यांचे वेळे ।।धृ।।
तयांचियें वेळे होशी कृपावंत । माझा चि कां अंत पहातोसि ।।२।।
नारद प्रऱ्हाद उपमन्य धुरू । त्यांचा अंगीकारु कैसा केला ।।३।।
अंबऋृषीसाटीं गर्भवास जाले । कां गा मोकलिलें कृपासिंधु ।।४।।
धर्माचें उच्छिष्ट अर्जुनाचीं घोडीं । आणीक सांकडीं कितीएक ।।५।।
जालासि लुगडीं तया द्रौपदीचीं । न ये कां आमुची कृपा कांहीं ।।६।।
तुका म्हणे कां गा जालासि कठीण । माझा भाग सीण कोण जाणे ।।७।।

४४०९
कासयासि व्यर्थ घातलें संसारीं । होतें तैसें जरी तुझे चित्तीं ।।१।।

तुझिये भेटीची थोर असे आस । दिसोनी निरास आली मज ।।धृ।।
आतां काय जिणें जालें निरर्थक । वैकुंठनायक भेटे चि ना ।।२।।
आडलासि काय कृपेच्या सागरा । रकुमादेवीवरा सोइरिया।।३।।
तुका म्हणे देईं चरणाची सेवा । नुपेक्षीं केशवा मायबापा ।।४।।

४४१०
पक्षीयाचे घरीं नाहीं सामुगरी । त्यांची चिंता करी नारायण ।।१।।
अजगर जनावर वारुळांत राहे । त्याजकडे पाहे पांडुरंग ।।धृ।।
चातक हा पक्षी नेघे भूमिजळ । त्यासाटीं घननीळ नित्य वर्षे ।।२।।
तुका म्हणे आम्ही पिप्पलिकांची जात । पुरवीं मनोरथ पांडुरंगा ।।३।।

४४११
रामनाम हा चि मांडिला दुकान । आहे वानोवाण घ्यारे कोणी ।।१।।
नका कोणी करूं घेता रे आळस । वांटितों तुम्हांस फुकाचें हें ।।धृ।।
संचितासारिखे पडे त्याच्या हाता । फारसें मागतां तरी न ये ।।२।।
तुका म्हणे आम्हीं सांठविलें सार । उरलिया थार विचारितां ।।३।।

४४१२
बहुजन्मां शेवटीं स्वामी तुझी भेटी । बहु मोह पोटीं थोर जाला ।।१।।
बहु पुरें पाहिलीं बहु दिशा शोधिली । बहु चिंता वाहिली दुर्भराची ।।धृ।।
बहु काळ गेले अनुचित केलें । बहु नाहीं गाइलें नाम तुझें ।।२।।
ऐसा मी अपराधी अगा कृपानिधि । बहु संतां संनिधि ठेवीं तुका ।।३।।

४४१३
कोण उपाव करूं भेटावया । जाळावी हे काया ऐसें वाटे ।।१।।
सोडोनियां गांव जाऊं वनांतरा । रुकुमादेवीवरा पहावया।।धृ।।
करूं उपवास शोधूं हें शरीर । न धरवे धीर नारायणा।।२।।
जाती आयुष्याचे दिवस हे चारी । मग केव्हां हरी भेटशील ।।३।।
तुका म्हणे कांहीं सांगा विचारोनि । विठो तुझे मनीं असेल तें ।।४।।

४४१४
माय बाप बंधु सोयरा सांगाती । तूं चि माझी प्रीति गण गोत ।।१।।
शरण आलीं त्यांचीं वारिलीं दुरितें । तारिले पतित असंख्यात ।।धृ।।

इतर कोण जाणे पावलें विश्रांति । न येतां तुजप्रति शरणागत ।।२।।
तयामध्यें मज ठेवीं नारायणा । लक्ष्मुमीरमणा सोइरिया ।।३।।
तुका म्हणे देईं दर्शनाचा लाभ । जे पाय दुर्लभ ब्रम्हादिकां ।।४।।

४४१५
पाप ताप माझे गुणदोष निवारीं । कृष्णा विष्णु हरी नारायणा ।।१।।
काम क्रोध वैरी घालोनि बाहेरी । तूं राहें अंतरीं पांडुरंगा ।।धृ।।
करिशील तरी नव्हे कांइ एक । निर्मिलें त्र्यैलोक्य हेळामात्रें ।।२।।
समर्थासि काय आम्हीं शिकवावें । तुका म्हणे यावें पांडुरंगा ।।३।।

४४१६
ये गा महाविष्णु अनंतभुजाच्या । आम्हां अनाथांच्या माहेरा ये ।।१।।
भेटावया तुज ओढे माझा जीव । एकवेळा पाय दावीं डोळां ।।धृ।।
आणीक हे आर्त नाहीं नारायणा । ओढे हे वासना भेटावया ।।२।।
वाटे चित्तीं काय करावा विचार । चरण सुंदर पहावया ।।३।।
तुका म्हणे माझे पुरवीं मनोरथ । येई गा न संवरीत पांडुरंगा ।।४।।

४४१७
काय पाहतोसि कृपेच्या सागरा । नराच्या नरेंद्रा पांडुरंगा ।।१।।
नामाचा प्रताप ब्रिदाचा बडिवार । करावा साचार नारायणा ।।धृ।।
कलीमाजी देव बौध्यरूप जाला । जगाचिया बोला लागूं नका ।।२।।
माय पुत्रा काय मारूं पाहे कळी । जगाची ढवाळी काय काज ।।३।।
तुका म्हणे या हो कृपेच्या सागरा । रुकुमादेवीवरा मायबापा ।।४।।

४४१८
रामनामाचे पवाडे । अखंड ज्याची वाचा पढे ।।१।।
धन्य तो एक संसारीं । रामनाम जो उच्चारी ।।धृ।।
रामनाम गर्जे वाचा । काळ आज्ञाधारक त्याचा ।। २ ।।
तुका म्हणे रामनामीं । कृतकृत्य जालों आम्हीं ।।३।।

४४१९
येइल घरा देव न धरीं संदेहा । फकिराचा यावा व्हावा जेव्हां ।।१।।
होइल फकीर योगी महानुभाव । घडीघडी देव सांभाळील ।।२।।

तुका म्हणे ऐसें बोलती बहुत । येणे गुणें संत जाले राम ।।३।।

४४२०
भक्तीवीण जिणें जळो लाजिरवाणें । संसार भोगणें दुःखमूळ ।।१।।
वीसलक्ष योनि वृक्षामाजी घ्याव्या । जलचरीं भोगाव्या नवलक्ष ।।धृ।।
अकरालक्ष योनि किड्यांमाजी घ्याव्या । दशलक्ष भोगाव्या पक्ष्यांमध्ये ।।२।।
तीसलक्ष योनि पशूंचीये घरीं । मानवाभीतरीं चारलक्ष ।।३।।
एकएक योनि कोटिकोटि फेरा । मनुष्यदेहाचा वारा मग लागे ।।४।।
तुका म्हणे तेव्हां नरदेह नरा । तयाचा मातेरा केला मूढें ।।५।।

४४२१
तुजवांचून कोणा शरण । जाऊं आतां कर जोडून।।१।।
कोण करील माझें साहे । चित्तीं विचारूनि पाहें ।।धृ।।
तूं तंव कृपेचा सागर । दीनबंधु जगदोद्धार ।।२।।
तुका म्हणे निका । भवसिंधु तारक नौका ।।३।।

४४२२
हातीं धरिलियाची लाज । देवा असोंदे गा तुज।।१।।
आहें अमंगळ दुर्बळ । होईं दीन तूं दयाळ ।।धृ।।
बाळ सेंबडें मातेसि । काय नावडे तियेसि ।।२।।
तुका म्हणे जाणें । करोनि देहाचें सांडणें ।।३।।

४४२३
जळोजळो तें गुरुपण । जळोजळो तें चेलेपण ।।१।।
गुरु आला वेशीद्वारीं । शिष्य पळतों खिंडोरीं ।।धृ।।
काशासाटीं जालें येणें । त्याचें आलें वर्षासन ।।२।।
तुका म्हणे चेला । गुरू दोघे हि नरकाला ।।३।।

४४२४
अगा पंढरीच्या राया । वेगीं येईं तूं सावया ।।१।।
दीनबंधु तुझें नाम । देईं आपुलें आम्हां प्रेम ।।धृ।।
जीवनकळा तूं विश्वाची । तूं चि माउली अनाथाची ।।२।।
तुका म्हणे पुंडलिका । ठेवीं मस्तकीं पादुका ।।३।।

४४२५
विटेवरी समचरण । तो हा रुक्मिणीरमण ।।१।।
वेदशास्त्रा माहेर । केले दासा उपकार ।।धृ।।
नामापाशीं चारी मुक्ति। पहा ह्रदयीं प्रतीति ।।२।।
तुका म्हणे कळा । अंगीं जयाच्या सकळा ।।३।।

४४२६
सकळ हे माया नागवे कवणा । भांबाविलें जना दाही दिशा ।।१।।
आशा तृष्णा दंभ लागलीं हीं पाठी । नेदी बैसों हाटीं मोह ठायीं ।।धृ।।
काम क्रोध घरा लावितील आगी । निंदा हिंसा दोघी पळतां खाती ।।२।।
लाज पुढें उभी राहिली आडवी । ते करी गाढवी थोर घात ।।३।।
तुका म्हणे चिंता घाली गर्भवासीं । ओढोनियां पाशीं चहूंकडे ।।४।।

४४२७
सकळतीर्थाहुनि । पंढरी हें मुगुटमणि ।।१।।
काय सांगों तेथिल शोभा । रमावल्लभ जेथें उभा ।।धृ।।
न लभे व्रततीर्थदानीं। तें या विठ्ठलदर्शनीं ।।२।।
साधु संत गाती नाम । सकळ भूतांचा विश्राम ।।३।।
तुका म्हणे स्तुती । करूं काय सांगों किती ।।४।।

४४२८
गव्हांच्या घुगऱ्या । नाचण्यांच्या पुऱ्या । बऱ्या त्या चि बऱ्या । पाधाणी त्या पाधाणी ।।१।।
काय थोरपण । वांयां जाळावा तो शीण । कारणापें भिन्न । निवडे तें निराळें ।।धृ।।
रुचि वोजेपाशी । गरज ते जैशीतैशी । करूं नका नाशी । खावें खाणें जालें तें ।।२।।
तुका म्हणे मोठा । काय करावा तो ताटा । नाहीं वीण निटा । पाविजेत मारग ।।३।।

४४२९
आपुलिया ऐसें करी । संग धरी ज्याचा हो ।।१ ।।

म्हणउनि परपरते । वरवरते पळतसें ।।धृ।।
लोभिक तें लोभा लावी। बांधल्या गोवी वांचूनि ।।२।।
तुका म्हणे नामगोठी । पुरे भेटी तुझी देवा ।।३।।

४४३०
बरें जालीयाचे अवघें सांगाती । वाइटाचे अंतीं कोणी नाहीं ।।१।।
नोहे मातापिता नोहे कांतासुत । इतरांची मात काय सांगों ।।२।।
तुका म्हणे जन दुतोंडी सावज । सांपडे सहज तिकडे धरी ।।३।।

४४३१
मिथ्या आहे सर्व अवघें हें मायिक । न कळे विवेक मज कांहीं ।।१।।
सर्व बाजागिरी वाटती ही खरी । पहातां येथें उरी कांहीं नाहीं ।।धृ।।
आतां मज दुःख वाटतें अंतरीं । उपाय झडकरी सांग कांहीं ।।२।।
पुढें कोण गति न कळे सर्वथा । तुझे पायीं माथा ठेवियेला ।।३।।
करणें तें करीं सुखें आतां हरी । तुज म्यां निर्धारीं धरियेलें ।।४।।
स्वहित तें काय न कळे सर्वथा । तारीं तूं अनंता तुका म्हणे ।।५।।

४४३२
अवघ्या कोल्ह्यांचें वर्म अंडीं । धरितां तोंडीं खीळ पडे ।।१।।
भुंकुं नका भुंकुं नका । आला तुका विष्णुदास ।।धृ।।
कवणे ठायीं सादर व्हावें । नाहीं ठावें गाढवा ।।२।।
दुर्जनासि पंचानन । तुका रजरेणु संतांचा ।।३।।

४४३३
तुझे म्हणों आम्हां । मग उणें पुरुषोत्तमा ।।१।।
ऐसा धर्म काय । अमृतानें मृत्यु होय ।।धृ।।
कल्पवृक्षा तळीं । गांठी बांधलिया झोळी ।।२।।
तुका म्हणे परीस । सांपडल्या उपवास।।३।।

४४३४
कोरडिया गोष्टी नावडती मना । नाहीं ब्रम्हज्ञानाविण चाड ।।१।।
दाखवीं आपुलें सगुण रूपडें । वंदीन मी कोडें पाय तुझे ।।धृ।।
न लगे तो मोक्ष मज सायुज्यता । नावडे हे वार्ता शून्याकारी ।।२।।

तुका म्हणे चाड धरीन श्रीमुखें । येशिल कवतुकें जवळीक ।।३।।

४४३५
गणेश सारजा करिती गायना । आणि देवांगना रंभे ऐशा ।।१।।
तेथें आम्हीं मानवांहीं विनवावें तें काय । सुरवर पाय वंदिति जेथें ।।धृ।।
ज्याच्या गायनासी तटस्थ शंकर । त्या हि परि पार न कळे तुझा ।।२।।
तुका म्हणे आम्ही किंकर ते किती । इंद्राची हि मति नागविशी ।।३।।

४४३६
डोळियांचें दैव आजि उभें ठेलें । निधान देखिलें पंढरीये ।।१।।
काय ते वानावें वाचेचे पालवें । वेदा न बोलवे रूप ज्याचें ।।धृ।।
आनंदाच्या रसें ओंतीव चांगलें । देखतां रंगलें चित्त माझें ।।२।।
तुका म्हणे मी तों सगळाच विरालों । विठ्ठल चि जालों दर्शनानें ।।३।।

४४३७
भोगियेल्या नारी । परि तो बाळब्रम्हचारी ।।१।।
ऐसी ज्याचें अंगीं कळा । पार न कळे वेदाला ।।धृ।।
वळीवळी थोरथोर। मोडोनियां केले चूर ।।२।।
वांकडी कुबज्या । सरसी आणियेली वोजा ।।३।।
मल्ल रगडिला पायीं । गज झुगारिला बाहीं ।।४।।
जिवें मारियेला मामा । धांवें भक्ताचिया कामा ।।५।।
तुका म्हणे पूर्ण । दावी भक्तीचीं विंदानें ।।६।।

४३३८
वृद्धपणीं आली जरा । शरीर कांपे थरथरा ।।१।।
आयुष्य गेलें हें कळेना । स्मरा वेगीं पंढरिराणा ।।धृ।।
दांत दाढा पडिल्या ओस । हनुवटि भेटे नाकास ।।२।।
हात पाय राहिलें कान। नेत्रा पाझर हाले मान ।।३।।
अंगकांति परतली । चिरगुटा ऐसी जाली ।।४।।
आड पडे जिव्हा लोटे । शब्द नये मुखा वाटे।।५।।
लांब लोंबताती अंड । भरभरा वाजे गांड ।।६।।
तुका म्हणे आतां तरी । स्मरा वेगीं हरी हरी ।।७।।

४४३९
वृद्धपणी न पुसे कोणी । विटंबणी देहाची ।।१।।
नव द्वारें जाली मोकळीक । गांड सरली वाजती ।।धृ।।
दंत दाढा गळे थुंका । लागे नाका हनुवटी ।।२।।
शब्द नये मुखावाटा । करिती चेष्टा पोरें ती ।।३।।
तुका म्हणे अजूनि तरी । स्मरें श्रीहरी सोडवील ।।४।।

४४४०
अतित्याई देतां जीव । नये कींव देवासि ।।१।।
थोड्यासाटीं राग आला । जीव दिला गंगेंत ।।धृ।।
त्यासि परलोकीं नाहीं मुक्ति । अधोगति चुकेना ।।२।।
तुका म्हणे कृष्णराम । स्मरतां श्रम वारती ।।३।।

४४४१
तुझें रूप पाहतां देवा । सुख जालें माझ्या जीवा।।१।।
हें तों वाचे बोलवेना । काय सांगों नारायणा ।।धृ।।
जन्मोजन्मींचे सुकृत । तुझे पायीं रमे चित्त ।।२।।
जरी योगाचा अभ्यास । तेव्हां तुझा निजध्यास ।।३।।
तुका म्हणे भक्त । गोड गाऊं हरिचें गीत।।४।।

४४४२
तुजवीण मज कोण आहे देवा । मुकुंदा केशवा नारायणा ।।१।।
जोडोनियां कर कृपेच्या सागरा । गोपीमनोहरा पांडुरंगा ।।धृ।।
साच करीं हरी आपुली ब्रिदावळी । कृपेनें सांभाळीं मायबापा ।।२।।
साह्य होसी जरी जाती सहा वैरी । मग ध्यान करीं आवडीनें ।।३।।
सर्व अपराध क्षमा करीं माझा । लडिवाळ तुझा पांडुरंगा ।।४।।
कृपा करोनियां द्यावी क्षमा शांति । तेणें तुझी भक्ति घडेल देवा ।।५।।
ऐंसें तों सामर्थ्य नाहीं नारायणा । जरी तुज करुणा येइल कांहीं ।।६।।
तुका म्हणे आतां आपंगावें मज । राखें माझी लाज पांडुरंगा ।।७।।

४४४३
नको विद्या वयसा आयुष्य फारसें । नाहीं मज पिसें मुक्तीचें ही ।।१।।
रामकृष्ण म्हणतां जावो माझा प्राण । हें चि कृपादान मागतसें ।।धृ।।

नको धन मान न वाढे संतान । मुखीं नारायण प्राण जावा ।।२।।
तुका म्हणे दीन काकुलती येतों । तुज निरवितों पांडुरंगा ।।३।।

४४४४
शिष्या सांगे उपदेश । गुरुपूजा हे विशेष ।।१।।
दावी आचार सोवळे । दंड कमंडलु माळे ।।धृ।।
छाटी भगवी मानसीं ।व्यर्थ म्हणवी संन्यासी ।।२।।
तुका म्हणे लोभ । न सुटे नाहीं लाभ ।।३।।

४४४५
जिकडे पाहें तिकडे उभा । अवघ्या गगनाचा गाभा।। १ ।।
डोळां बैसलें बैसलें । रूप राहोनि संचलें ।।धृ।।
न वर्जितां दाही दिशा । जिकडे पाहें तिकडे सरिसा ।।२।।
तुका म्हणे समपदीं । उभा दिठीचिये आधीं ।।३।।

४४४६
आपटा संवदड रानचारा । दसऱ्याचा होय तुरा।।१।।
तैसा देवामुळें मान । नाहीं तरी पुसें कोण ।।धृ।।
मृत्तिकेची ते घागरी । पाण्यासाटीं बैसे शिरी ।।२।।
तुका म्हणे माप जाण । दाण्यासवें घेणें देणें ।।३।।

४४४७
काळ सार्थक केला त्यांणी । धरिला मनीं विठ्ठल।।१।।
नाम वाचे श्रवण कीर्त्ति । पाउलें चित्तीं समान ।।धृ।।
कीर्त्तनाचा समारंभ । निर्दंभ सर्वदा ।।२।।
तुका म्हणे स्वरूपसिद्धि । नित्य समाधि हरिनामीं ।।३।।

४४४८
आम्ही जातों आपुल्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ।।१।।
तुमची आमची हे चि भेटी । येथुनियां जन्मतुटी।।धृ।।
आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ।।२।।
येतां निजधामीं कोणी । विठ्ठलविठ्ठल बोला वाणी ।।३।।
रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ।।४।।

४४४९
कामधेनूचें वासरूं । खाया न मिळे काय करूं ।।१।।
ऐसें आम्हां मांडियेलें । विठो त्वां कां सांडियेलें ।।धृ।।
बैसोनि कल्पद्रुमातळीं । पोटासाटीं तळमळीं ।।२।।
तुका म्हणे नारायणा । बरें लोकीं हें दीसेना ।।३।।

४४५०
तुझें नाम माझे मुखी असो देवा । विनवितों राघवा दास तुझा ।।१।।
तुझ्या नामबळें तरले पतित । म्हणोनि माझें चित्त तुझे पायीं ।।२।।
तुका म्हणे तुझें नाम हें सादर । गातां निरंतर सुख वाटे ।।३।।

४४५१
उभय भाग्यवंत तरी च समान । स्थळीं समाधान तरी च राहे ।।१।।
युक्तीचें गौरव नसतां जिव्हाळा । सांचवणी जळा परी नाश ।।धृ।।
लोखंडा परीस ज्ञानिया तो शठ । नांवाचा पालट दगड खरा ।।२।।
तुका म्हणे अवघे विनोदाचे ठाव । एकात्मक भाव नाहीं तेथें ।।३।।

४४५२
दो दिवसांचा पाहुणा चालतो उताणा । कां रे नारायणा न भजसी ।।१।।
तूं अखंड दुश्चित्ता तुज नेती अवचिता । मग पंढरीनाथा भजसी केव्हां ।।२।।
तुका म्हणे ऐसे आहेत उदंड । तया केशव प्रचंड केवीं भेटे ।।३।।

४४५३
तुझे पाय माझें भाळ । एकत्रता सर्वकाळ ।।१।।
हें चिं देईं विठाबाई । पांडुरंगे माझे आई ।।धृ।।
नाहीं मोक्ष मुक्ति चाड । तुझी सेवा लागे गोड ।।२।।
सदा संग सज्जनांचा । नको वियोग पंढरीचा ।।३।।
नित्य चंद्रभागे स्नान । करीं क्षेत्रप्रदक्षण।।४।।
पुंडलीक पाहोन दृष्टी । हर्षें नाचों वाळवंटीं ।।५।।
तुका म्हणे पांडुरंगा । तुझें स्वरूप चंद्रभागा ।।६।।

४४५४

बाईल चालिली माहेरा । संगें दिधला म्हातारा ।।१।।
सिधा सामग्री पोटाची । सवें स्वारी बइलाची ।।धृ।।
जाता पाडिली ढोरानें । सिव्या देती अन्योविन्ये ।।२।।
न सावरी आपणातें । नग्न सावलें वरतें ।।३।।
फजित केलें जनलोकीं । मेला म्हणे पडे नरकीं।।४।।
गोहाची हे गेली लाज । गांजितां कां तुम्ही मज ।।५।।
तुका म्हणे जनीं । छी थू केली विटंबणी ।।६।।

४४५५
तुळसीवृंदावनीं उपजला कांदा । नावडे गोविंदा कांहीं केल्या ।।१।।
तैसे वंशामध्यें जाले जे मानव । जाणावे दानव अभक्त ते ।।धृ।।
केवड्यामधील निर्गंध कणसें । तैशीं तीं माणसें भक्तिहीन ।।२।।
तुका म्हणे जेवीं वंदनांतिल आळी । न चढे निढळीं देवाचिया ।।३।।

४४५६
शिव शक्ति आणि सूर्य गणपति । एक चि म्हणती विष्णूस ही ।।१।।
हिरा गार दोनी मानिती समान । राजस भजनें वांयां जाती ।।धृ।।
अन्य देवतांसि देव म्हणऊन । तामस जीवन तमोयोग्या ।।२।।
वांयां जायासाठीं केलासे हव्यास । अन्य देवतांस देवपण ।।३।।
आपुलिया मुखें सांगतसे धणी । नव्हे माझी वाणी पदरींची ।।४।।
धन्य ते वैष्णव भजती केशव । सात्विक हे जीव मोक्षा योग्य ।।५।।
तुका म्हणे मोक्ष नाहीं कोणापासीं । एका गोविंदासी शरण व्हा रे ।।६।।

४४५७
तुम्ही साधु संत कैवल्यसागर । मोक्षाचे आगर तुम्हां घरीं ।।१।।
तेथें मतिमंद काय बोलों वाणी । अमृताचे धणी पाणी कां घ्या ।।धृ।।
कोटी भानु तेजीं खद्योत बापुडें । तैसा तुम्हांपुढें काय बोलों ।।२।।
तुम्ही अवघे चिंतामणि कल्पतरूचीं वनें । त्यापुढें धांवणें मषकांनीं ।।३।।
वाराणशीक्षेत्र गंगा वाहे कोड । का तेथें पाड कोकणाचे ।।४।।
पल्लवाचा वारा हिमकरीं काय । गगनावरी छाय कोण करी ।।५।।
समुद्राची तृषा हरी ऐसा कोण । जगाची जी तान्ह निवविती ।।६।।
मेरूचा पाठार अवघी ते क्षिति । मषकाचे हातीं मुष्टि फावे ।।७।।
सिंहापुढें काय जंबूक आरोळी । मोतियांचे वोळी कांच काय ।।८।।

कापुरासि काय लावूनि उटावें । काय ओवाळावें दीपकासि ।।९।।
तैशी तुम्ही निरे ज्ञानाचे भरींव । तेथें म्यां बोलावें पाड काय ।।१०।।
कृपानिधि तुम्हीं बोलविलें बोला । सुखें न्याय केला तुमचा मीं ।।११।।
अज्ञान मी वेडें म्हणवितों बाळ । माझा प्रतिपाळ करणें तुम्हां ।।१२।।
बोबडें बोलणें न धरावा कोप । क्षमा करा बाप कृपासिंधु ।।१३।।
तुका म्हणे तुम्ही संत बापमाय । भयें धरिले पाय कृपानिधि ।।१४।।

४४५८
देहीं असोनियां देव । वृथा फिरतो निर्दैव ।।१।।
देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ।।धृ।।
नाभी मृगाचे कस्तुरी। व्यर्थ हिंडे वनांतरीं ।।२।।
साखरेचें मूळ ऊंस । तैसा देहीं देव दिसे।।३।।
दुधीं असतां नवनीत । नेणे तयाचें मथित ।।४।।
तुका सांगे मूढजना । देहीं देव कां पाहाना ।।५।।

४४५९
जयजय म्हणा राम । हातें टाळी वाचे नाम ।।१।।
आटाआटी नाहीं ज्यास । न वेचे मोल न पडे खांस ।।धृ।।
आपण म्हणे आणिकां हातीं । यज्ञादिकीं नये ते गति ।।२।।
आसन भोजन करितां काम । ध्यानसमाधि म्हणतां राम ।।३।।
मंत्र जपा हा चि सार। वर्णा याती जयजयकार ।।४।।
म्हणतां राम म्हणे तुका । वेळोवेळां चुकों नका ।।५।।

४४६०
शिकवणेसाटीं वाटते तळमळ । पुढें येईल काळा फोडों डोई ।।१।।
तेव्हां त्यासि काय देशील उत्तर । मेळउनि अंतर ठेवितोसि ।।धृ।।
येथींचिया सोंगें भोरपियाचे परि । होईल तें दुरि शृंगारिलें ।।२।।
तुका म्हणे कां रे राखिलें खरकटें । रागेल्याचे तंट रागेलें का ।।३।।

४४६१
होईं आतां माझ्या भोगाचा भोगिता । सकळ अनंता शुभाशुभ ।।१।।
आठवुनी पाय राहिलों ह्रदयीं । निवारली तईं सकळ चिंता ।।धृ।।
अचळ न चळे देहाचें चळण । आहे हें वळण प्रारब्धें चि ।।२।।

तुका म्हणे जालें एक चि वचन । केलिया कीर्त्तन आराणुक ।।३।।

४४६२
लेखी दुखण्यासमान । वेचला नारायणीं क्षण ।
उद्यांचें आजि च मरण । आणोनि म्हणे हरि भोक्ता ।।१।।
नाहीं कांहीं पडों येत तुटी । जाणें तो आहे सेवटीं ।
लाभ विचारोनि पोटीं। होईं सेवटीं जागृत ।।धृ।।
आहे ते उरे कटा । लावुनि चळ आपुला फाटा ।
पुरे हें न पुरे सेवटा । तरण्या बळकटा सदा वास।।२।।
म्हणोनि मोडावा कांटाळा । अविद्यात्मक कोंवळा ।
होतील प्रबळा । आशा तृष्णा माया ।।३।।
क्षण या देहाच्या अंतीं। जड होउनि राहेल माती ।
परदेश ते परवर होती । चिळसविती नाकडोळे ।।४।।
जंव या नाहीं पातल्या विपत्ति । आयुष्य भविष्य आहे हातीं ।
लाभ विचारोनि गुंती । तुका म्हणे अंतीं सर्व पिसुनें।।५।।

४४६३
आसावलें मन जीवनाचें ओढी । नामरूपीं गोडी लावियेली ।।१।।
काय तुझे पायीं नाहीं भांडवल । माझे मिथ्या बोल जाती ऐसे ।।धृ।।
काय लोखंडाचे पाहे गुणदोष । सिवोन परीस सोनें करी ।।२।।
तुका म्हणे माझें अवघें असों द्यावें । आपुलें करावें ब्रीद साच ।।३।।

४४६४
पंढरीची वारी जयांचिये घरीं । पायधुळी शिरीं वंदिन त्यांची ।।१।।
दासाचा मी दास पोसणा डोंगर । आतां बहु फार काय बोलों ।।धृ।।
जातीचें मी हीन न कळे भजन । म्हणोनि संतचरण इच्छीतसें ।।२।।
तुका म्हणे मज म्हणावें आपुलें । बहुता तारिलें संतजनीं ।।३।।

४४६५
नाम पावन पावन । त्याहून पवित्र आहे कोण ।।१।।
शिव हालाहालें तापला । तो ही नामें शीतळ जाला ।।धृ।।
शिवास नामाचा आधार । केला कळिकाळ किंकर ।।२।।
मरण जालें काशीपुरी। तेथें नाम चि उद्धरी ।।३।।

तुका म्हणे अवघीं चोरें। एक हरिनाम सोइरें ।।४।।

४४६६
अल्प विद्या परि गर्वशिरोमणि । मजहुनि ज्ञानी कोणी आहे ।।१।।
अंगीं भरे ताठा कोणासी मानीना । साधूची हेळणा स्वयें करी ।।धृ।।
सज्जनाच्या देहीं मानी जो विटाळ । त्रैलोकीं चांडाळ तो चि एक ।।२।।
संतांची जो निंदा करी मुखीं जप। खतेलें तें पाप वज्रलेप ।।३।।
तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ।।४।।

४४६७
नाहीं संतांशीं शरण । काय वाचोनि पुराण ।।१।।
म्हणे विठ्ठलाचा दास । देखोनी परनारीस हांसे ।।धृ।।
करिती विठोबाची भक्ति । दयाधर्म नाहीं चित्तीं ।।२।।
तेथें नाहीं माझा देव। व्यर्थ श्रमवी हा जीव ।।३।।
अंगीं नाहीं क्षमा दया । म्हणती भेट पंढरीराया ।।४।।
नाहीं धर्माची वासना । काय करोनि प्रदक्षिणा।।५।।
ऐसें नव्हे भक्तिवर्म । तेथें नाहीं माझा राम ।।६।।
नये कृपा कांहीं केल्या । नये घाम जीव गेल्या ।।७।।
जैसी खड्गाची धार । विठ्ठलचरणीं तुका शूर ।।८।।

४४६८
नाहीं रिकामीक परी वाहे मनीं । तया चक्रपाणि साह्य होय ।।१।।
उद्वेग जीवासि पंढरीचें ध्यान । तया नारायण साह्य करी ।।धृ।।
शरीरासि बळ नाहीं स्वता भाव । तया पंढरिराव साह्य करी ।।२।।
असो नसो बळ राहे पराधीन । तरी अनुमान करूं नका ।।३।।
तुका म्हणे येणें करोनि चिंतनीं । तया नारायण जवळीक ।।४।।

४४६९
दारिद्रानें विप्र पीडिला अपार । तया पोटीं पोर एक असे ।।१।।
बाहेरी मिष्टान्न मिळे एके दिशीं । घेऊनी छंदासि त्या चि बैसे ।।धृ।।
क्षुधाकाळीं रडे देखिलें तें मागे । कांहीं केल्या नेघे दुजें कांहीं ।।२।।
सहज कौतुकें बोले बापमाये । देवापाशीं आहे मागशी तें ।।३।।
तेव्हां तुजलागीं स्मरे नारायणा । जीवींच्या जीवना पांडुरंगा।।४।।

लागली हे क्षुधा जात असे प्राण । काय हें निर्वाण पाहातोसि ।।५।।
ब्रम्हांडनायक विश्वाचा पाळक । वरी तिन्ही लोक पोसितोसि ।।६।।
प्राण हा उत्कर्ष जाहला विव्हळ । तेव्हां तो कृपाळ धांव घाली ।।७।।
सांडूनि वैकुंठ धांव घाली तईं । आळंगिला बाहीं कृपावंतें ।।८।।
तुका म्हणे दिला क्षीराचा सागर । राहे निरंतर तयापासीं ।।९।।

४४७०
अनाथाचा सखा ऐकिला प्रताप । होसि कृपावंत मजवरि ।।१।।
माझिया गा चित्ता करिं शिकवण । जेणें तुझे चरण जोडतील ।।धृ।।
जोडोनियां कर येतों काकुलती । रकुमाईच्या पति कृपावंता ।।२।।
हरुषें निर्भर करीं माझें मन । दाखवीं चरण पांडुरंगा।।३।।
तुझे भेटीविण जन्म गेलां वांयां । भजन कराया शक्ति नाहीं ।।४।।
न घडे तुझी सेवा न घडे पूजन । जन्मोनि निष्कारण जाऊं पाहे ।।५।।
तुका म्हणे हरि करावें या काय । भजनासि साह्य होईं बापा ।।६।।

४४७१
हीनवर बीजवर दोघी त्या गडणी । अखंड कहाणी संसाराची ।।१।।
माझे पति बहु लहान चि आहे । खेळावया जाय पोरांसवें ।।धृ।।
माझें दुःख जरी ऐकशील सई । म्हातारा तो बाई खोकतसे ।।२।।
खेळे सांजवरी बाहेरी तो राहे । वाट मी पाहें सेजेवरी ।।३।।
पूर्व पुण्य माझें नाहीं वा नीट । बहु होती कष्ट सांगो कांही ।।४।।
जवळ मी जातें अंगा अंग लावूं । नेदी जवळ येऊं कांटाळतो ।।५।।
पूर्व सुकृताचा हा चि बाई ठेवा । तुका म्हणे देवा काय बोल ।।६।।

४४७२
स्वामीच्या सामर्थ्यें । चाले बोलिला पुरुषार्थ ।।१।।
पाठी देवाचें हें बळ । मग लाभे हातीं काळ ।।धृ।।
देव ज्यासी साह्य । तेणें केलें सर्व होय ।।२।।
तुका म्हणे स्वामीसत्ता । मग नाहीं भय चित्ता ।।३।।

४४७३
नामांचा डांगोरा फिरवीं घरोघरीं । म्हणा हरीहरी सर्वभावें ।।१।।
नामें हरती कर्मे वैकुंठींची पै वस्ति । संनिध श्रीपति सदोदित ।।धृ।।

नामाचा महिमा बहुतां कळला । नामें उद्धरिला अजामेळ ।।२।।
गजेंद्राची स्थिति पुराणीं बोलती । नामें चि श्रीपति पावलासे ।।३।।
तुका म्हणे घेतां मुक्ति आहे । नामें सर्व पाहें आकळिलें।।४।।

४४७४
यमाचे हे पाश नाटोपती कोणातें । आम्हां दिनानाथें रक्षियेलें ।।१।।
यम नेतां तुम्हां रक्षील हें कोण । तुम्हां धन्यधन्य कोण म्हणती ।।धृ।।
संतसज्जनमेळा पवित्र संतकीर्ति । त्यांनीं उत्तम स्थिति सांगितली ।।२।।
तें चि धरोनि चित्तीं तुका हित करी। यमासि पांपरी हाणे आतां ।।३।।

४४७५
देवासी पैं भांडों एकचित्त करूनि । आम्हांसि सज्जनीं सांगितलें ।।१।।
आम्हां काय आतां देवें आडो परी । भेटी नेदी तरी सुखें नेदो ।।धृ।।
तो चि नांदो सदा हरि पैं वैकुंठीं । आम्हां देशवटी देवो सुखें ।।२।।
देवें अभिमान चित्तांत धरिला । तरी तो एकला राहो आतां ।।३।।
चित्तीं धरोनि नाम असों सुखें येथें । हर्षें गाऊं गीत गोविंदाचें ।।४।।
तुका म्हणे सर्व देवाची नष्टाई । आम्ही सुखें डुलतसों ।।५।।

४४७६
भरणी आली मुक्त पेठा । करा लाटा व्यापार ।।१।।
उधार घ्या रे उधार घ्या रे । अवघे या रे जातीचे ।।धृ।।
येथें पंक्तिभेद नाहीं । मोठें कांहीं लहान ।।२।।
तुका म्हणे लाभ घ्यावा। मुद्दल भावा जतन ।।३।।

४४७७
ग्रासोग्रासीं भाव । तरी देहिं च जेवी देव ।।१।।
धरीं स्मरण तें सार । नाहीं दुरी तें अंतर ।।धृ।।
भोगितां तूं भावें । देव जेऊं बैसे सवें ।।२।।
तुज पावो देवा । भावें अंतरींची सेवा ।।३।।
गुंतला साधनीं । देव नाहीं त्रिभुवनीं ।।४।।
तुका म्हणे हातीं । न धरितां गमाविती ।।५।।

४४७८

कामिनीसी जैसा आवडे भ्रतार । इच्छीत चकोर चंद्र जैसा ।।१।।
तैसी हे आवडी विठ्ठलाचे पायीं । लागलिया नाहीं गर्भवास ।।धृ।।
दुष्काळें पीडिल्या आवडे भोजन । आणिक जीवन तृषाक्रांता ।।२।।
कामातुर जैसा भय लज्जा सांडोनि । आवडे कामिनी सर्वभावें ।।३।।
तुका म्हणे तैसी राहिली आवडी । पांडुरंग थडी पाववील ।।४।।

४४७९
ॐ तत्सदिति सूत्राचें सार । कृपेचा सागर पांडुरंग।।१।।
हरिःॐ सहित उदत अनुदत । प्रचुरीश्वरासहित पांडुरंग ।।२।।
गोब्राम्हणहिता होऊनि निराळे । वेदाचें तें मूळ तुका म्हणे ।।३।।

४४८०
सांडियेला गर्भ उबगोनि माउली । नाहीं सांभाळिली भूमि शुद्ध ।।१।।
उष्ण तान भूक एवढिये आकांतीं । ओसंगा लाविती काय म्हूण ।।धृ।।
खांद्यावरि शूळ मरणाचिये वाटे । अन्याय ही मोठे केले साच ।।२।।
हातींचा हिरोनि घातला पोटासी। तुका म्हणे ऐसी परी जाली ।।३।।

ओंव्या प्रारंभ २३१ अभंग ३
४४८१
पांडुरंगा करूं प्रथम नमन । दुसरें चरणा संतांचिया।।१।।
याच्या कृपादानें कथेचा विस्तार । बाबाजीसद्‌गुरुदास तुका ।।२।।
काय माझी वाणी मानेल संतांसी । रंजवूं चित्तासी आपुलिया ।।३।।
या मनासी लागो हरिनामाचा छंद । आवडी गोविंद गावयासी ।।४।।
सीण जाला मज संवसारसंभ्रमें । सीतळ या नामें जाली काया।।५।।
या सुखा उपमा नाहीं द्यावयासी । आलें आकारासी निर्विकार ।।६।।
नित्य धांवे तेथें नामाचा गजर । घोष जयजयकार आइकतां ।।७।।
तांतडी ते काय हरिगुण गाय । आणीक उपाय दुःखमूळ ।।८।।
मूळ नरकाचें राज्यमदेंमाते । अंतरे बहुत देव दुरी ।।९।।
दुरी अंतरला नामनिंदकासी । जैसें गोंचिडासी क्षीर राहे ।।१०।।
हे वाट गोमटी वैकुंठासी जातां । रामकृष्णकथा दिंडी ध्वजा ।।११।।
जाणतयांनीं सांगितलें करा । अंतरासी वारा आडूनियां ।।१२।।
यांसी आहे ठावें परि अंध होती । विषयाची खंती वाटे जना ।।१३।।
नाहीं त्या सुटलीं द्रव्य लोभ माया । भस्म दंड छाया तरुवराची ।।१४।।

चित्त ज्याचें पुत्रपत्नीबंधूवरी । सुटल हा परि कैसें जाणा ।।१५।।
जाणत नेणत करा हरिकथा । तराल सर्वथा भाक माझी ।।१६।।
माझी मज असे घडली प्रचित । नसेल पतित ऐसा कोणी ।।१७।।
कोणीं तरी कांहीं केलें आचरण । मज या कीर्तनेंविण नाहीं ।।१८।।
नाहीं भय भक्ता तराया पोटाचें । देवासी तयाचें करणें लागे ।।१९।।
लागे पाठोवाटी पाहे पायांकडे । पीतांबर खडे वाट सांडी ।।२०।।
डिंकोनियां कां रे राहिले हे लोक । हें चि कवतुक वाटे मज ।।२१।।
जयानें तारिले पाषाण सागरीं । तो ध्या रे अंतरीं स्वामी माझा।।२२।।
माझिया जीवाची केली सोडवण । ऐसा नारायण कृपाळु हा ।।२३।।
हा चि माझा नेम हा चि माझा धर्म । नित्य वाचे नाम विठोबाचें ।।२४।।
चेतवला अग्नि तापत्रयज्वाळ । तो करी शितळ रामनाम ।।२५।।
मना धीर करीं दृढ चित्तां धरीं । तारील श्रीहरि मायबाप ।।२६।।
बाप हा कृपाळु भक्ता भाविकांसी । घरीं होय दासी कामारी त्या ।।२७।।
त्याचा भार माथां चालवी आपुला। जिहीं त्या दिधला सर्व भाव ।।२८।।
भावेंविण त्याची प्राप्ति । पुराणें बोलती ऐसी मात ।।२९।।
मात त्याची जया आवडे जीवासी। तया गर्भवासीं नाहीं येणें ।।३०।।
यावें गर्भवासीं तरी च विष्णुदासीं। उद्धार लोकांसी पूज्य होती ।।३१।।
होती आवडत जीवाचे ताइत। त्यां घडी अच्युत न विसंभे ।।३२।।
भेदाभेद नाहीं चिंता दुःख कांहीं । वैकुंठ त्या ठायीं सदा वसे ।।३३।।
वसे तेथें देव सदा सर्वकाळ । करिती निर्मळ नामघोष ।।३४।।
संपदा तयांची न सरे कल्पांतीं । मेळविला भक्ती देवलाभ ।।३५।।
लाभ तयां जाला संसारा येऊनी । भगवंत ॠणी भक्ती केला ।।३६।।
लागलेंसे पिसें काय मूढजनां । काय नारायणा विसरलीं ।।३७।।
विसरलीं तयां थोर जाली हाणी । पचविल्या खाणी चौऱ्यासी ।।३८।।
शिकविलें तरी नाहीं कोणा लाज । लागलीसे भाज धन गोड ।।३९।।
गोड एक आहे अविट गोविंद । आणीक तो छंद नासिवंत ।।४०।।
तळमळ त्याची कांहीं तरी करा । कां रे निदसुरा बुडावया ।।४१।।
या जनासी भय यमाचें नाहीं । सांडियेलीं तिहीं एकराज्यें ।।४२।।
जेणें अग्निमाजी घातलासे पाव । नेणता तो राव जनक होता।।४३।।
तान भूक जिहीं साहिले आघात । तया पाय हात काय नाहीं।।४४।।
नाहीं ऐसा तिहीं केला संवसार । दुःखाचे डोंगर तोडावया ।।४५।।
याच जन्में घडे देवाचें भजन । आणीक हें ज्ञान नाहीं कोठें ।।४६।।
कोठें पुढें नाहीं घ्यावया विसांवा । फिरोनि या गांवा आल्याविण।।४७।।

विनवितां दिवस बहुत लागती । म्हणउनि चित्तीं देव धरा ।।४८।।
धरा पाय तुम्ही संतांचे जीवासी । वियोग तयांसी देवा नाहीं ।।४९।।
नाहीं चाड देवा आणीक सुखाची । आवडी नामाची त्याच्या तया।।५०।।
त्याची च उच्छिष्ट बोलतों उत्तरें । सांगितलें खरें व्यासादिकीं ।।५१।।
व्यासें सांगितलें भक्ति हे विचार । भवसिंधु पार तरावया ।।५२।।
तरावया जना केलें भागवत । गोवळ गोपी भक्त माता पिता ।।५३।।
तारुनियां खरे नेली एक्यासरें । निमित्तें उत्तरें रुसिया ।।५४।।
यासी वर्म ठावें भक्तां तरावया । जननी बाळ माया राख तान्हें ।।५५।।
तान्हेलें भुकेलें म्हणे वेळोवेळां । न मगतां लळा जाणोनियां ।।५६।।
जाणोनियां वर्म देठ लावियेला । द्रौपदीच्या बोलासवें धांवे ।।५७।।
धांवे सर्वता धेनु जैसी वत्सा । भक्तालागीं तैसा नारायण ।।५८।।
नारायण व्होवा हांव ज्याच्या जीवा । धन्य त्याच्या दैवा पार नाहीं ।।५९।।
पार नाहीं सुखा तें दिलें तयासी । अखंड वाचेसी रामनाम ।।६०।।
रामनाम दोनी उत्तम अक्षरें । भवानीशंकरें उपदेशिलीं ।।६१।।
उपदेश करी विश्वनाथ कानीं । वाराणसी प्राणी मध्यें मरे ।।६२।।
मरणाचे अंतीं राम म्हणे जरी । न लगे यमपुरी जावें तया ।।६३।।
तयासी उत्तम ठाव वैकुंठीं । वसे नाम चित्तीं सर्वकाळ ।।६४।।
सर्वकाळ वसे वैष्णवांच्या घरीं । नसे क्षणभरी थिर कोठें ।।६५।।
कोठें नका पाहों करा हरिकथा । तेथें अवचिता सांपडेल ।।६६।।
सांपडे हा देव भाविकांचे हातीं । शाहाणे मरती तरी नाहीं ।।६७।।
नाहीं भलें भक्ती केलियावांचूनि। अहंता पापिणी नागवण ।।६८।।
नागवलों म्हणे देव मी आपणा । लाभ दिला जना ठकलों तो ।।६९।।
तो चि देव येर नव्हे ऐसें कांहीं। जनार्दन ठायीं चहूं खाणी ।।७०।।
खाणी भरूनियां राहिलासे आंत । बोलावया मात ठाव नाहीं ।।७१।।
ठाव नाहीं रिता कोणी देवाविण । ऐसी ते सज्जन संतवाणी ।।७२।।
वाणी बोलूनियां गेलीं एक पुढें । तयासी वांकुडें जातां ठक ।।७३।।
ठका नाहीं अर्थ ठाउका वेदांचा । होऊनि भेदाचा दास ठेला ।।७४।।
दास ठेला पोट अर्थ दंभासाटीं । म्हणउनि तुटी देवासवें ।।७५।।
सवें देव द्विजातीही दुराविला । आणिकांचा आला कोण पाड ।।७६।।
पाड करूनियां नागविलीं फार । पंडित वेव्हार खळवादी ।।७७।।
वादका निंदका देवाचें दरुशन । नव्हे जाला पूर्ण षडकमाअ ।।७८।।
षडकमाअ हीन रामनाम कंठीं । तयासवें भेटी सवें देवा ।।७९।।
देवासी आवड भाविक जो भोळा । शुद्ध त्या चांडाळा करुनि मानी ।।८०।।

मानियेल्या नाहीं विश्वास या बोला । नाम घेतां मला युक्ति थोडी।।८१।।
युक्त थोडी मज दुर्बळाची वाचा । प्रताप नामाचा बोलावया ।।८२।।
बोलतां पांगल्या श्रुति नेति नेति । खुंटलिया युक्ति पुढें त्यांच्या।।८३।।
पुढें पार त्याचा न कळे चि जातां । पाउलें देखतां ब्रम्हादिकां।।८४।।
काय भक्तीपिसें लागलें देवासी । इच्छा ज्याची जैसी तैसा होय।।८५।।
होय हा सगुण निर्गुण आवडी । भक्तिप्रिय गोडी फेडावया ।।८६।।
या बापासी बाळ बोले लाडें कोडें । करुनि वांकुडें मुख तैसें।।८७।।
तैसें याचकाचें समाधान दाता । होय हा राखता सत्त्वकाळीं ।।८८।।
सत्त्वकाळीं कामा न येती आयुधें । बळ हा संबंध सैन्यलोक।।८९।।
सैन्यलोक तया दाखवी प्रताप । लोटला हा कोप कोपावरी ।।९०।।
कोपा मरण नाहीं शांत होय त्यासी । प्रमाण भल्यासी सत्त्वगुणीं।।९१।।
सत्त्वरजतमा आपण नासती । करितां हे भक्ति विठोबाची ।।९२।।
चित्त रंगलिया चैतन्य चि होय । तेथें उणें काय निजसुखा ।।९३।।
सुखाचा सागरु आहे विटेवरी । कृपादान करी तो चि एक ।।९४।।
एक चित्त धरूं विठोबाचे पायीं । तेथें उणें कांहीं एक आम्हां ।।९५।।
आम्हांसी विश्वास याचिया नामाचा । म्हणउनि वाचा घोष करूं।।९६।।
करूं हरिकथा सुखाची समाधि । आणिकाची बुद्धी दुष्ट नास ।।९७।।
नासे संवसार लोकमोहो माया । शरण जा रे तया विठोबासी।।९८।।
सिकविलें मज मूढा संतजनीं । दृढ या वचनीं राहिलोंसे ।।९९।।
राहिलोंसे दृढ विठोबाचे पायीं । तुका म्हणे कांहीं न लगे आंता।।१००।।

४४८२

गाईन ओंविया पंढरिचा देव । आमुचा तो जीव पांडुरंग ।।१।।
रंगलें हें चित्त माझें तया पायीं । म्हणउनि घेईं हा चि लाहो ।।२।।
लाहो करीन मी हा चि संवसारीं । राम कृष्ण हरि नारायण ।।३।।
नारायण नाम घालितां तुकासी । न येती या रासी तपतीर्थें ।।४।।
तीर्थें रज माथां वंदिती संतांचे । जे गाती हरिचे गुणवाद ।।५।।
गुणवाद ज्याचे गातां पूज्य जाले । बडिवार बोले कोण त्यांचा ।।६।।
त्याचा नाहीं पार कळला वेदांसी । आणीक ही ॠषि विचारितां ।।७।।
विचारितां तैसा होय त्यांच्या भावें । निजसुख ठावें नाहीं कोणा ।।८।।
कोणा कवतुक न कळे हे माव । निजलिया जिवें करी धंदा ।।९।।
करुनि कवतुक खेळे हा चि लीळा । व्यापूनि वेगळा पाहातुसे ।।१०।।
सेवटीं आपण एकला चि खरा । सोंग हा पसारा नट केला ।।११।।

लावियेलें चाळा मीपणें हें जन । भोग- तया कोण भोगविशी ।।१२।।
विषयीं गुंतलीं विसरलीं तुज । कन्या पुत्र भाज धनलोभा ।।१३।।
लोभें गिळी फांसा आविसाच्या आशा। पडोनि मासा तळमळी ।।१४।।
तळमळ याची तरी शम होईल । जरी हा विठ्ठल आठविती ।।१५।।
आठव हा तरी संतांच्या सांगातें। किंवा हें संचित जन्मांतरें ।।१६।।
जन्मांतरें तीन भोगितां कळती । केलें तें पावती करितां पुढें ।।१७।।
पुढें जाणोनियां करावें संचित। पुजावे अतीत देव द्विज ।।१८।।
जन्म तुटे ऐसें नव्हे तुम्हां जना । पुढिल्या पावना धर्म करा ।।१९।।
करा जप तप अनुष्ठान याग । संतीं हा मारग स्थापियेला ।।२०।।
लावियेलीं कर्में शुद्ध आचरणें । कोणा एका तेणें काळें पावे ।।२१।।
पावला सत्वर निष्काम उदार। जिंकिली अपार वासना हे ।।२२।।
वासनेचें मूळ छेदिल्या वांचून । तरलेंसें कोणी न म्हणावें ।।२३।।
न म्हणावें जाला पंडित वाचक । करूं मंत्रघोष अक्षरांचा ।।२४।।
चाळविलीं एकें ते चि आवडीनें । लोक दंभमानें देहसुखें ।।२५।।
सुख तरी च घडे भजनाचें सार । वाचे निरंतर रामनाम ।।२६।।
राम हा उच्चार तरी च बैसे वाचे । अनंता जन्माचें पुण्य होय ।।२७।।
पुण्य ऐसें काय रामनामापुढें । काय ते बापुडे यागयज्ञ ।।२८।।
यागयज्ञ तप संसार दायकें । न तुटती एके नामेंविण ।।२९।।
नामेंविण भवसिंधु पावे पार । अइसा विचार नाहीं दुजा ।।३०।।
जाणती हे भक्तराज महामुनि । नाम सुखधणी अमृताची ।।३१।।
अमृताचें सार निजतत्त्व बीज । गुह्याचें तें गुज रामनाम ।।३२।।
नामें असंख्यात तारिले अपार । पुराणीं हें सार प्रसिद्ध हे ।।३३।।
हें चि सुख आम्ही घेऊं सर्वकाळ । करूनि निर्मळ हरिकथा ।।३४।।
कथाकाळीं लागे सकळा समाधि । तात्काळ हे बुद्धि दुष्ट नासे ।।३५।।
नासे लोभ मोहो आशा तृष्णा माया । गातां गुण तया विठोबाचे ।।३६।।
विठोबाचे गुण मज आवडती । आणीक हे चित्तीं न लगे कांहीं ।।३७।।
कांहीं कोणी नका सांगों हे उपाव। माझा मनीं भाव नाहीं दुजा ।।३८।।
जाणोनियां आम्ही दिला जीवभाव। दृढ याचे पाये धरियेले ।।३९।।
धरियेले आतां न सोडीं जीवेंसी । केला ये च विशीं निरधार ।।४०।।
निरधार आतां राहिलों ये नेटीं। संवसारतुटी करूनियां ।।४१।।
येणें अंगीकार केला पांडुरंगें । रंगविला रंगें आपुलिया ।।४२।।
आपुली पाखर घालुनियां वरि । आम्हांसी तो करी यत्न देव ।।४३।।
देव राखे तया आणिकांचें काय। करितां उपाय चाले तेथें ।।४४।।

तेथें नाहीं रिघ कळिकाळासी जातां । दास म्हणवितां विठोबाचे ।।४५।।
विठोबाचे आम्ही लाडिके डिंगर । कांपती असुर काळ धाकें ।।४६।।
धाक तिहीं लोकीं जयाचा दरारा । स्मरण हें करा त्याचें तुम्ही ।।४७।।
तुम्ही निदसुर नका राहूं कोणी । चुकावया खाणी गर्भवास ।।४८।।
गर्भवासदुःख यमाचें दंडणें । थोर होय शीण येतां जातां ।।४९।।
तान भूक पीडा जीतां ते आगात । मेल्या यमदूत जाच करिती ।।५०।।
जाच करिती हे म्हणसी कोणा आहे ठावें । नरकीं कौरवें बुडी दिली ।।५१।।
बुडी दिली कुंभपाकीं दुर्योधनें । दाविना लाजेनें मुख धर्मा ।।५२।।
धर्म हा कृपाळू आलासे जवळी । बैसला पाताळीं वरि नये ।।५३।।
न ये वरि कांहीं करितां उपाव । भोगवितो देव त्याचे त्यासी ।।५४।।
त्यांसी अभिमान गर्व या देहाचा । नुच्चारिती वाचा नारायण ।।५५।।
नारायण विसरलीं संवसारीं । तया अघोरीं वास सत्य ।।५६।।
सत्य मानूनियां संतांच्या वचना । जा रे नारायणा शरण तुम्ही ।।५७।।
तुम्ही नका मानूं कोणी विसवास। पुत्र पत्नी आस धन वित्त।।५८।।
धन वित्त लोभ माया मोहपाश । मांडियले फासे यमदूतीं ।।५९।।
दूतीं याच्या मुखा केलेंसे कुडण । वाचे नारायण येऊं नेदी ।।६०।।
नेदी शुद्धबुद्धि आतळों चित्तासी । नाना कर्म त्यासी दुरावती।।६१।।
दुराविलीं एकें जाणतीं च फार । निंदा अहंकार वादभेद ।।६२।।
वाद भेद निंदा हे फंद काळाचें । गोवितील वाचे रिकामिकें ।।६३।।
रिकामिक देवा होय नव्हे मना । चिंतेचिये घाणा जुंपिजेसी ।।६४।।
सेवटीं हे गळा लावुनियां दोरी । सांभाळ ये करी वासनेचा ।।६५।।
वासनेचा संग होय अंतकाळीं । तरी तपोबळी जन्म धरी ।।६६।।
धरूनियां देव राहतील चित्तीं । आधींचिया गती आठवाया ।।६७।।
आठवावा देव मरणाचे काळीं। म्हणउनि बळी जीव दिले ।।६८।।
दिले टाकूनियां भोग ॠषेश्वरीं । खाती वनांतरीं कंदमूळें ।।६९।।
मुळें सुखाचिया देव अंतरला । अल्पासाटीं नेला अधोगती ।।७०।।
गति हे उत्तम व्हावया उपाव । आहे धरा पाव विठोबाचे ।।७१।।
विठोबाचे पायीं राहिलिया भावें । न लगे कोठें जावें वनांतरा।।७२।।
तरती दुबळीं विठोबाच्या नांवें। संचित ज्या सवें नाहीं शुद्ध।।७३।।
शुद्ध तरी याचे काय तें नवल। म्हणतां विठ्ठल वेळोवेळां ।।७४।।
वेळा कांहीं नाहीं कवणाचे हातीं । न कळे हे गति भविष्याची।।७५।।
भविष्य न सुटे भोगिल्यावांचूनि । संचित जाणोनि शुद्ध करा ।।७६।।
करावे सायास आपुल्या हिताचे । येथें आलियाचे मनुष्यपण ।।७७।।

मनुष्यपण तरी साधी नारायण । नाहीं तरी हीन पशुहूनी ।।७८।।
पशु पाप पुण्य काय ते जाणती । मनुष्या या गति ठाउकिया।।७९।।
ठाउकें हें असे पाप पुण्य लोका । देखती ते एकां भोगितिया।।८०।।
भोगतील एक दुःख संवसारीं । काय सांगों परी वेगळाल्या ।।८१।।
ल्यावें खावें बरें असावें सदैव । हे चि करी हांव संवसारीं ।।८२।।
संवसारें जन गिळिले सकळ । भोगवितो फळ गर्भवासा ।।८३।।
वासनेचें मूळ छेदिल्यावांचून । नव्हे या खंडण गर्भवासा ।।८४।।
सायास केलियावांचुनि तें कांहीं । भोगावरी पाहीं घालूं नये ।।८५।।
नये बळें धड घालूं कांट्यावरि । जाये जीवें धरी सर्प हातीं ।।८६।।
हातीं आहे हित करील तयासी । म्हणउनि ॠषीं सांगितलें ।।८७।।
सांगती या लोकां फजित करूनि ।आपण जे कोणी तरले ते।।८८।।
तेणें वाळवंटीं उभारिले कर । कृपेचा सागर पांडुरंग ।।८९।।
गंगाचरणीं करी पातकांची धुनी । पाउलें तीं मनीं चिंतिलिया ।।९०।।
चिंतनें जयाच्या तारिले पाषाण । उद्धरी चरण लावूनियां ।।९१।।
लावूनियां टाळी नलगे बैसावें । प्रेमसुख घ्यावें संतसंगें ।।९२।।
संतसंगें कथा करावें कीर्तन । सुखाचें साधन रामराम ।।९३।।
मग कोठें देव जाऊं न सके दुरी । बैसोनि भीतरी राहे कंठीं ।।९४।।
राहे व्यापुनियां सकळ शरीर । आपुला विसर पडों नेदी ।।९५।।
नेदी दुःख देखों आपुलिया दासा । वारी गर्भवासा यमदूता ।।९६।।
तान भूक त्यासी वाहों नेदी चिंता । दुश्चिंत हे घेतां नाम होती ।।९७।।
होती जीव त्यांचे सकळ ही जंत । परि ते अंकित संचिताचे ।।९८।।
चेवले जे कोणी देहअभिमानें । त्यांसी नारायणें कृपा केली ।।९९।।
कृपाळू हा देव अनाथा कोंवसा । आम्ही त्याच्या आशा लागलोंसों ।।१००।।
लावियेले कासे येणें पांडुरंगें । तुका म्हणे संगें संतांचिया ।।१०१।।

४४८३

विचार करिती बैसोनि गौळणी । ज्या कृष्णकामिनी कामातुरा ।।१।।
एकांत एकल्या एका च सुखाच्या । आवडती त्यांच्या गोष्टी त्यांला ।।२।।
तर्कवितर्किणी दुराविल्या दुरी । मौन त्या परिचारी आरंभिलें ।।३।।
कुशळा कवित्या कथित्या लोभिका । त्या ही येथें नका आम्हांपाशीं ।।४।।
बोलक्या वाचाळा कृष्णरता नाहीं । यां चोरोनि तींहीं खेट केली ।।५।।
भेऊनियां जना एकी सवा जाल्या । वाती विझविल्या दाटोबळें ।।६।।
कृष्णसुख नाहीं कळलें मानसीं । निंदिती त्या त्यासी कृष्णरता ।।७।।

तो नये जवळी देखोनि कोल्हाळ । म्हणउनि समेळ मेळविला ।।८।।
अंतरीं कोमळा बाहेरी निर्मळा । तल्लीन त्या बाळा कृष्णध्यानीं ।।९।।
हरिरूपीं दृष्टि कानीं त्या च गोष्टी । आळंगिती कंठीं एका एकी ।।१०।।
न साहे वियोग करिती रोदना । भ्रमिष्ट भावना देहाचिया ।।११।।
विसरल्या मागें गृह सुत पती । अवस्था याचिती गोविंदाची ।।१२।।
अवस्था लागोनि निवळ चि ठेल्या । एका एकी जाल्या कृष्णरूपा।।१३।।
कृष्णा म्हणोनियां देती आलिंगन । विरहताप तेणें निवारेना ।।१४।।
ताप कोण वारी गोविंदावांचूनि । साच तो नयनीं न देखतां ।।१५।।
न देखतां त्यांचा प्राण रिघों पाहे । आजि कामास ये उसिर केला ।।१६।।
रित्या ज्ञानगोष्टी तयां नावडती । आळिंगण प्रीती कृष्णाचिया ।।१७।।
मागें कांहीं आम्ही चुकलों त्याची सेवा । असेल या देवा राग आला ।।१८।।
आठविती मागें पापपुण्यदोष । परिहार एकीस एक देती ।।१९।।
अनुतापें जाल्या संतप्त त्या बाळा । टाकुनि विव्हळा धरणी अंग ।।२०।।
जाणोनि चरित्र जवळी च होता । आली त्या अनंता कृपा मग ।।२१।।
होउनी प्रगट दाखविलें रूप । तापत्रय ताप निवविले ।।२२।।
निवालेया देखोनि कृष्णाचें श्रीमुख । शोक मोह दुःख दुरावला।।२३।।
साच भाव त्यांचा आणुनियां मना । आळंगितो राणा वैकुंठींचा।।२४।।
हरिअंगसंगें हरिरूप जाल्या । बोलों विसरल्या तया सुखा ।।२५।।
व्यभिचारभावें भोगिलें अनंता । वर्तोनि असतां घराचारी ।।२६।।
सकळा चोरोनि हरि जयां चित्तीं । धन्य त्या नांदती तयामध्यें।।२७।।
उणें पुरें त्यांचें पडों नेंदी कांहीं । राखे सर्वां ठायीं देव तयां ।।२८।।
न कळे लाघव ब्रम्हादिकां भाव । भक्तिभावें देव केला तैसा ।।२९।।
तुका म्हणे त्यांचा धन्य व्यभिचार । साधिलें अपार निजसुख ।।३०।।

बाळक्रीडा प्रारंभ अभंग - १००

४४८४

देवा आदिदेवा जगत्रया जीवा । परियेसीं केशवा विनंती माझी ।।१।।
माझी वाणी तुझे वर्णी तुझे वर्णी गुण नाम । ऐसी देईं प्रेम कांहीं कळा ।।२।।
कळा तुजपाशीं आमचें जीवन । उचित करून देईं आम्हां ।।३।।
आम्हां शरणागतां तुझा चि आधार। तूं तंव सागर कृपासिंधु ।।४।।
सिंधु पायावाट होय तुझ्या नामें । जाळीं महाकर्मे दुस्तरें तीं ।।५।।
तीं फळें उत्तमें तुझा निजध्यास । नाहीं गर्भवास सेविलिया ।।६।।
सेविंलिया राम कृष्ण नारायण । नाहीं त्या बंधन संसाराचें ।।७।।

संसार तें काय तृणवतमय । अग्नि त्यासी खाय क्षणमात्रें ।।८।।
क्षणमात्रें जाळी दोषांचिया रासी । निंद्य उत्तमासी वंद्य करी ।।९।।
करीं ब्रिदें साच आपलीं आपण । पतितपावन दिनानाथ ।।१०।।
नाथ अनाथाचा पति गोपिकांचा । पुरवी चित्तींचा मनोरथ ।।११।।
चित्तीं जें धरावें तुका म्हणे दासीं । पुरविता होसी मनोरथ ।।१२।।

४४८५
मनोरथ जैसे गोकुळींच्या जना । पुरवावी वासना तयापरी ।।१।।
रिण फेडावया अवतार केला । अविनाश आला आकारासी ।।२।।
सीण जाला वसुदेवदेवकीस । वधी बाळें कंस दुराचारी ।।३।।
दुराचारियासी नाहीं भूतदया । आप पर तया पाप पुण्य ।।४।।
पुण्यकाळ त्याचा राहिलासे उभा । देवकीच्या गर्भा देव आले ।।५।।
गर्भासी तयांच्य आला नारायण । तुटलें बंधन आपेंआप।।६।।
आपेंआप बेड्या तुटल्या शंकळा । बंदाच्या आगळा किलिया कोंडे ।।७।।
कोंडमार केला होता बहु दिस । सोडवी निमिष्य नलगतां ।।८।।
न कळे तो त्यासी सांगितला भाव । आपणासी ठाव नंदाघरीं ।।९।।
नंदाघरीं जातां येतां वसुदेवा । नाहीं जाला गोवा सवें देव ।।१०।।
सवें देव तया आड नये कांहीं । तुका म्हणे नाहीं भय चिंता ।।११।।

४४८६
चिंता ते पळाली गोकुळाबाहेरी । प्रवेश भीतरी केला देवें ।।१।।
देव आला घरा नंदाचिया गांवा । धन्य त्याच्या दैवा दैव आलें ।।२।।
आलें अविनाश धरूनि आकार । दैत्याचा संहार करावया ।।३।।
करावया भक्तजनाचें पालण । आले रामकृष्ण गोकुळासी ।।४।।
गोकुळीं आनंद प्रगटलें सुख । निर्भर हे लोक घरोघरीं ।।५।।
घरोघरीं जाला लक्ष्मीचा वास । दैन्यदाळिद्रास त्रास आला ।।६।।
आला नारायण तयांच्या अंतरा । दया क्षमा नरा नारीलोकां ।।७।।
लोकां गोकुळींच्या जालें ब्रम्हज्ञान । केलियावांचून जपतपें ।।८।।
जपतपें काय करावीं साधनें । जंवें नारायणें कृपा केली ।।९।।
केलीं नारायणें आपुलीं अंकित । तो चि त्यांचें हित सर्व जाणे ।।१०।।
सर्व जाणे एक विष्णु साच खरा । आणीक दुसरा नाहींनाहीं ।।११।।
नाहीं भक्ता दुजें तिहीं त्रिभुवनीं । एका चक्रपाणीवांचूनियां ।।१२।।
याच्या सुखसंगें घेती गर्भवास । तुका म्हणे आस त्यजूनियां ।।१३।।

४४८७

यांच्या पूर्वपुण्या कोण लेखा करी । जिंहीं तो मुरारी खेळविला ।।१।।
खेळविला जिंहीं अंतर्बाह्यसुखें । मेळवूनि मुखें चुंबन दिलें ।।२।।
दिलें त्यांसी सुख अंतरीचें देवें । जिंहीं एका भावें जाणितला ।।३।।
जाणितला तिहीं कामातुर नारी । कृष्णभोगावरी चित्त ज्यांचें ।।४।।
ज्यांचें कृष्णीं तन मन जालें रत । गृह पति सुत विसरल्या ।।५।।
विष तयां जालें धन मान जन । वसविती वन एकांतीं त्या ।।६।।
एकांतीं त्या जाती हरीसी घेउनि । भोगइच्छाधणी फेडावया ।।७।।
वयाच्या संपन्ना तैसा त्यांकारणें । अंतरींचा देणें इच्छाभोग ।।८।।
भोग त्याग नाहीं दोन्ही जयापासीं । तुका म्हणे जैसी स्पटिकशिळा ।।९।।

४४८८

शिळा स्फटिकाची न पालटे भेदें । दाउनियां छंदे जैसी तैसी ।।१।।
जैसा केला तैसा होय क्षणक्षणा । फेडावी वासना भक्तिभावें ।।२।।
फेडावया आला अवघियांची धणी । गोपाळ गौळणी मायबापा ।।३।।
मायबापा सोडविलें बंदीहुनि । चाणूर मर्दुनी कंसादिक ।।४।।
दिक नाहीं देणें अरिमित्रा एक । पूतना कंटक मुक्त केली ।।५।।
मुक्त केला मामा कंस महादोषी । बाळहत्या रासी पातकांच्या ।।६।।
पाप कोठें राहे हरी आठवितां । भक्ती द्वेषें चिंता जैसा तैसा ।।७।।
साक्षी तयापाशीं पूर्वीलकर्माच्या। बांधला सेवेच्या रुणी देव ।।८।।
देव भोळा धांवे भक्ता पाठोवाठी। उच्चारितां कंठीं मागेंमागें ।।९।।
मानाचा कंटाळा तुका म्हणे त्यासी। धांवे तो घरासी भाविकांच्या ।।१०।।

४४८९

चारी वेद ज्याची कीर्ती वाखाणिती । बांधवी तो हातीं गौळणीच्या ।।१।।
गौळणिया गळा बांधिती धारणीं । पायां चक्रपाणी लागे तया ।।२।।
तयाघरीं रिघे चोरावया लोणी । रितें पाळतूनि शिरे माजी ।।३।।
माजी शिरोनियां नवनीत खाये । कवाड तें आहे जैसें तैसें ।।४।।
जैसा तैसा आहे अंतर्बाह्यात्कारीं । म्हणउनि चोरी नसंपडे ।।५।।
नसंपडे तयां करितां खटपट । वाउगे बोभाट वर्माविण ।।६।।
वर्म जाणती त्या एकल्या एकटा । बैसतील वाटा निरोधूनि ।।७।।
निवांत राहिल्या निःसंग होऊनि । निश्चळ ज्या ध्यानीं कृष्णध्यान ।।८।।

न ये क्षणभरी योगियांचे ध्यानीं । धरिती गौळणी भाविका त्या ।।९।।
भाविका तयांसी येतो काकुलती। शाहाण्या मरती नसंपडे ।।१०।।
नलगे वेचावी टोळी धनानांवें । तुका म्हणें भावें चाड एका ।।११।।

४४९०
चाड अनन्याची धरी नारायण । आपणासमान करी रंका ।।१।।
रंक होती राजे यमाचिये घरीं । आचरणें बरी नाहीं म्हणवोनि ।।२।।
नसंपडे इंद्रचंद्रब्रम्हादिकां । अभिमानें एका तिळमात्रें।।३।।
तिळमात्र जरी होय अभिमान । मेरु तो समान भार देवा ।।४।।
भार पृथिवीचा वाहिला सकळ । जड होती खळ दुष्ट लोक ।।५।।
दुष्ट अभक्त जे निष्ठुर मानसीं । केली हे तयांसी यमपुरी ।।६।।
यमदूत त्यांसी करिती यातना । नाहीं नारायणा भजिजेलें ।।७।।
जे नाहीं भजले एका भावें हरी । तयां दंड करी यमधर्म ।।८।।
यमधर्म म्हणे तयां दोषियांसी । कां रे केशवासी चुकलेती ।।९।।
चुकलेती कथा पुराणश्रवण । होते तुम्हां कान डोळे मुख ।।१०।।
कान डोळे मुख संतांची संगति । न धरा च चित्तीं सांगितलें ।।११।।
सांगितलें संतीं तुम्हां उगवूनि । गर्भाद येऊनि यमदंड ।।१२।।
दंडूं आम्हीं रागें म्हणे यमधर्म । देवा होय श्रम दुर्जनाचा ।।१३।।
दुर्जनाचा याणें करूनि संहार । पूर्णअवतार रामकृष्ण ।।१४।।
रामकृष्णनामें रंगले जे नर । तुका म्हणे घर वैकुंठी त्यां ।।१५।।

४४९१
वैकुंठीच्या लोकां दुर्लभ हरिजन । तया नारायण समागमें ।।१।।
समागम त्यांचा धरिला अनंतें । जिहीं चित्तवित्त समर्पिलें ।।२।।
समर्थें तीं गाती हरीचे पवाडे । येर ते बापुडे रावराणे।।३।।
रामकृष्णें केलें कौतुक गोकुळीं । गोपाळांचे मेळीं गाई चारी ।।४।।
गाई चारी मोहोरी पांवा वाहे पाठीं । धन्य जाळी काठी कांबळीचें ।।५।।
काय गौळियांच्या होत्या पुण्यरासी । आणीक त्या म्हैसी गाई पशु ।।६।।
सुख तें अमुप लुटिलें सकळीं । गोपिका गोपाळीं धणीवरि ।।७।।
धणीवरि त्यांसी सांगितली मात । जयाचें जें आर्त तयापरी ।।८।।
परी याचि तुम्ही आइका नवळ । दुर्गम जो खोल साधनासि ।।९।।
शिक लावूनियां घालिती बाहेरी । पाहाती भीतरी सवें चि तो ।।१०।।
तोंडाकडे त्यांच्या पाहे कवतुकें । शिव्या देतां सुखें हासतुसे ।।११।।

हांसतसे शिव्या देतां त्या गौळणी । मरतां जपध्यानीं न बोले तो ।।१२।।
तो जेंजें करिल तें दिसे उत्तम । तुका म्हणे वर्म दावी सोपें ।।१३।।

४४९२
दावी वर्म सोपें भाविकां गोपाळां । वाहे त्यांच्या गळां पाले माळा ।।१।।
मान देती आधीं मागतील डाव । देवा तें गौरव माने सुख ।।२।।
मानती ते मंत्र हमामा हुंबरी । सिंतोडिती वरि स्नान तेणें ।।३।।
वस्त्रें घोंगडिया घालुनियां तळीं । वरी वनमाळी बैसविती ।।४।।
तिंहीं लोकांसी जो दुर्लभ चिंतना । तो धांवे गोधना वळतियां ।।५।।
यांच्या वचनाचीं पुष्पें वाहे शिरीं । नैवेद्य त्यांकरीं कवळ मागे ।।६।।
त्यांचिये मुखींचें हिरोनियां घ्यावें। उच्छिष्ट तें खावें धणीवरी ।।७।।
वरी माथां गुंफे मोरपिसांवेटी । नाचे टाळी पिटी त्यांच्या छंदें ।।८।।
छंदें नाचतील जयासवें हरी । देहभाव वरी विसरलीं ।।९।।
विसरली वरी देहाची भावना । ते चि नारायणा सर्वपूजा ।।१०।।
पूजा भाविकांची न कळतां घ्यावी । न मागतां दावी निज ठाव ।।११।।
ठाव पावावया हिंडे मागें मागें । तुका म्हणे संगें भक्तांचिया ।।१२।।

४४९३
भक्तजनां दिलें निजसुख देवें । गोपिका त्या भावें आळंगिल्या ।।१।।
आळंगिल्या गोपी गुणवंता नारी । त्यांच्या जन्मांतरीं हरि ॠणी ।।२।।
रुसलिया त्यांचें करी समाधान । करविता आण क्रिया करी ।।३।।
क्रिया करी तुम्हां न वजे पासुनि । अवधियाजणी गोपिकांसी ।।४।।
गोपिकांसी म्हणे वैकुंठींचा पति । तुम्हीं माझ्या चित्तीं सर्वभावें ।।५।।
भाव जैसा माझ्याठायीं तुम्ही धरा । तैसा चि मी खरा तुम्हांलागीं ।।६।।
तुम्हां कळों द्या हा माझा साच भाव । तुमचा चि जीव तुम्हां ग्वाही ।।७।।
ग्वाही तुम्हां आम्हां असे नारायण। आपली च आण वाहातसे ।।८।।
सत्य बोले देव भक्तिभाव जैसा। अनुभवें रसा आणूनियां ।।९।।
यांसी बुझावितो वेगळाल्या भावें । एकीचें हें ठावें नाहीं एकी ।।१०।।
एकी क्रिया नाहीं आवधियांचा भाव । पृथक हा देव घेतो तैसें ।।११।।
तैसें कळों नेदी जो मी कोठें नाहीं । अवधियांचे ठायीं जैसा तैसा ।।१२।।
जैसा मनोरथ जये चित्तीं काम । तैसा मेघशाम पुरवितो ।।१३।।
पुरविले मनोरथ गोपिकांचे । आणीक लोकांचे गोकुळींच्या ।।१४।।
गोकुळींच्या लोकां लावियेला छंद । बैसला गोविंद त्याचा चित्तीं ।।१५।।

चित्तें ही चोरूनि घेतलीं सकळा । आवडी गोपाळांवरी तयां ।।१६।।
आवडे तयांसी वैकुंठनायक । गेलीं सकळिक विसरोनि ।।१७।।
निंदा स्तुती कोणी न करी कोणाची । नाहीं या देहाची शुद्धि कोणा।।१८।।
कोणासी नाठवे कन्या पुत्र माया । देव म्हणुनि तया चुंबन देती ।।१९।।
देती या टाकून भ्रतारांसी घरीं । लाज ते अंतरीं आथी च ना ।।२०।।
नाहीं कोणा धाक कोणासी कोणाचा । तुका म्हणे वाचा काया मनें ।।२१।।

४४९४
मनें हरिरूपीं गुंतल्या वासना । उदास या सुना गौळियांच्या ।।१।।
यांच्या भ्रतारांचीं धरूनियां रूपें । त्यांच्या घरीं त्यांपें भोग करी ।।२।।
करी कवतुक त्याचे तयापरी । एकां दिसे हरि एकां लेंक ।।३।।
एक भाव नाहीं सकळांच्या चित्तीं । म्हणऊनि प्रीति तैसें रूप ।।४।।
रूप याचें आहे अवघें चि एक । परि कवतुक दाखविलें ।।५।।
लेंकरूं न कळे स्थूल कीं लहान । खेळे नारायण कवतुकें ।।६।।
कवतुक केलें सोंग बहुरूप । तुका म्हणे बाप जगाचा हा ।।७।।

४४९५
जगाचा हा बाप दाखविलें माये । माती खातां जाये मारावया ।।१।।
मारावया तिणें उगारिली काठी । भुवनें त्या पोटीं चौदा देखे ।।२।।
देखे भयानक झांकियेले डोळे । मागुता तो खेळे तयेपुढे ।।३।।
पुढें रिघोनियां घाली गळां कव । कळों नेदी माव मायावंता ।।४।।
मायावंत विश्वरूप काय जाणे । माझें माझें म्हणे बाळ देवा ।।५।।
बाळपणीं रीठा रगडिला दाढे । मारियेले गाढे कागबग ।।६।।
गळां बांधऊनि उखळासी दावें । उन्मळी त्या भावें विमळार्जुन ।।७।।
न कळे जुनाट जगाचा जीवन । घातलें मोहन गौळियांसी ।।८।।
सिंकीं उतरूनि खाय नवनीत । न कळे बहुत होय तरी ।।९।।
तरीं दुधडेरे भरले रांजण । खाय ते भरून दावी दुणी ।।१०।।
दुणी जालें त्याचा मानिती संतोष दुभत्याची आस धरूनियां ।।११।।
आशाबद्धा देव असोनि जवळी । नेणती ते काळीं स्वार्थामुळें ।।१२।।
मुळें याच देव न कळे तयांसी । चित्त आशापाशीं गोवियेलें ।।१३।।
लेंकरूं आमचें म्हणे दसवंती । नंदाचिये चित्तीं तो चि भाव ।।१४।।
भाव जाणावया चरित्र दाखवी। घुसळितां रवी डेरियांत ।।१५।।
डेरियांत लोणी खादलें रिघोनि । पाहे तों जननी हातीं लागे ।।१६।।

हातीं धरूनियां काढिला बाहेरी। देखोनियां करी चोज त्यासी ।।१७।।
सिकवी विचार नेणे त्याची गती । होता कोणे रीती डेरियांत ।।१८।।
यांसी पुत्रलोभें न कळे हा भाव । कळों नेदी माव देव त्यांसी ।।१९।।
त्यांसी मायामोहजाळ घाली फांस । देर आपणास कळों नेदी ।।२०।।
नेदी राहों भाव लोभिकांचे चित्तीं । जाणतां चि होती अंधळीं तीं ।।२१।।
अंधळीं तीं तुका म्हणे संवसारीं । जिहीं नाहीं हरि ओळखिला ।।२२।।

४४९६

ओळखी तयांसी होय एका भावें । दुसरिया देवें न पविजे ।।१।।
न पविजे कदा उन्मत्त जालिया । डंबु तो चि वांयां नागवण ।।२।।
वनवास देवाकारणें एकांत । करावीं हीं व्रततपें याग।।३।।
व्रत याग यांसी फळलीं बहुतें । होतीं या संचितें गौळियांची ।।४।।
यांसी देवें तारियेलें न कळतां । मागील अनंता ठावें होतें ।।५।।
होतें तें द्यावया आला नारायण । मायबापां रीण गौळियांचें ।।६।।
गौळियांचें सुख दुर्लभ आणिकां । नाहीं ब्रम्हादिकां तुका म्हणे ।।७।।

४४९७

नेणतियांसाटीं नेणता लाहान । थिंकोनि भोजन मागे माये ।।१।।
माया दोनी यास बाप नारायणा । सारखी भावना तयांवरी ।।२।।
तयांवरी त्याचा समचित्त भाव । देवकीवसुदेव नंद दोघे ।।३।।
घेउनियां एके ठायीं अवतार । एकीं केला थोर वाढवूनि।।४।।
उणा पुरा यासी नाहीं कोणी ठाव । सारिखा चि देव अवघियांसी।।५।।
यासी दोनी ठाव सारिखे अनंता । आधील मागुता वाढला तो ।।६।।
वाढला तो सेवाभक्तिचिया गुणें । उपचारमिष्टान्नें करूनियां ।।७।।
करोनियां सायास मेळविलें धन । तें ही कृष्णार्पण केलें तीहीं ।।८।।
कृष्णासी सकळ गाई घोडे म्हैसी । समर्पिल्या दासी जीवें भाव।।९।।
जीवें भावें त्याची करितील सेवा । न विसंबती नांवा क्षणभरी।।१०।।
क्षणभरी होतां वेगळा तयांस । होती कासावीस प्राण त्यांचे ।।११।।
त्यांचे ध्यानीं मनीं सर्वभावें हरि । देह काम करी चित्त त्यापें ।।१२।।
त्याचें चि चिंतन कृष्ण कोठें गेला । कृष्ण हा जेविला नाहीं कृष्ण।।१३।।
कृष्ण आला घरा कृष्ण गेला दारा । कृष्ण हा सोयरा भेटों कृष्णा ।।१४।।
कृष्ण गातां ओंव्या दळणीं कांडणीं । कृष्ण हा भोजनीं पाचारिती ।।१५।।
कृष्ण तयां ध्यानीं आसनीं शयनीं । कृष्ण देखे स्वपनीं कृष्णरूप ।।१६।।

कृष्ण त्यांस दिसे आभास दुश्चितां । धन्य मातापिता तुका म्हणे ।।१७।।

४४९८

कृष्ण हा परिचारी कृष्ण हा वेव्हारी । कृष्ण घ्या वो नारी आणिकी म्हणे ।।१।।
म्हणे कृष्णाविण कैसें तुम्हां गमे । विळ हा करमे वांयांविण ।।२।।
वांयांविण तुम्हीं पिटीत्या चाकटी । घ्या गे जगजेठी क्षणभरी ।।३।।
क्षणभरी याच्या सुखाचा सोहळा । पहा एकवेळा घेऊनियां ।।४।।
याचें सुख तुम्हां कळलियावरि । मग दारोदारीं न फिराल ।।५।।
लटिकें हें तुम्हां वाटेल खेळणें । एका कृष्णाविणें आवघें चि ।।६।।
अवघ्यांचा तुम्हीं टाकाल सांगात । घेऊनि अनंत जाल राना ।।७।।
नावडे तुम्हांस आणीक बोलिलें । मग हें लागलें हरिध्यान ।।८।।
न करा हा मग या जीवा वेगळा । टोंकवाल बाळा आणिका ही ।।९।।
आणिका ही तुम्हा येती काकुलती। जवळी इच्छिती क्षण बैसों ।।१०।।
बैसों चला पाहों गोपाळाचें मुख। एकी एक सुख सांगतील ।।११।।
सांगे जंव ऐसी मात दसवंती । तंव धरिती चित्तीं बाळा ।।१२।।
बाळा एकी घरा घेउनियां जाती । नाहीं त्या परती तुका म्हणे ।।१३।।

४४९९

तुका म्हणे पुन्हा न येती मागुत्या । कृष्णासीं खेळतां दिवस गमे ।।१।।
दिवस राती कांहीं नाठवे तयांसी । पाहातां मुखासी कृष्णाचिया ।।२।।
याच्या मुखें नये डोळयासी वीट । राहिले हे नीट ताटस्थ चि ।।३।।
ताटस्थ राहिलें सकळ शरीर । इंद्रियें व्यापार विसरलीं ।।४।।
विसरल्या तान भुक घर दार । नाहीं हा विचार आहों कोठें ।।५।।
कोठें असों कोण जाला वेळ काळ । नाठवे सकळ विसरल्या ।।६।।
विसरल्या आम्हीं कोणीये जातीच्या। वर्णा ही चहूंच्या एक जाल्या ।।७।।
एक जाल्या तेव्हां कृष्णाचिया सुखें । निःशंकें भातुकें खेळतील ।।८।।
खेळता भातुकें कृष्णाच्या सहित । नाहीं आशंकित चित्त त्यांचें ।।९।।
चित्तीं तो गोविंद लटिकें दळण । करिती हें जन करी तैसें ।।१०।।
जन करी तैसा खेळतील खेळ । अवघा गोपाळ करूनियां ।।११।।
करिती आपला आवघा गोविंद । जना साच फंद लटिका त्या ।।१२।।
त्याणीं केला हरि सासुरें माहेर । बंधु हे कुमर दीर भावें ।।१३।।
भावना राहिली एकाचिये ठायीं । तुका म्हणे पायीं गोविंदाचे ।।१४।।

४५००

गोविंद भ्रतार गोविंद मुळहारी । नामें भेद परि एक चि तो ।।१।।
एकाचीं च नामें ठेवियेलीं दोनी । कल्पितील मनीं यावें जावें ।।२।।
जावें यावें तिहीं घरींचिया घरीं । तेथिची सिदोरी तेथें न्यावी ।।३।।
विचारितां दिसे येणें जाणें खोटें । दाविती गोमटें लोका ऐसें ।।४।।
लोक करूनियां साच वर्तताती । तैशा त्या खेळती लटिक्याची ।।५।।
लटिकीं करिती मंगळदायकें । लटिकीं च एकें एकां व्याही ।।६।।
व्याही भाई हरि सोयरा जावायी । अवघियांच्या ठायीं केला एक ।।७।।
एकासि च पावे जें कांहीं करिती । उपचार संपत्ति नाना भोग ।।८।।
भोग देती सर्व एका नारायणा । लटिक्या भावना व्याही भाई ।।९।।
लटिका च त्यांणीं केला संवसार । जाणती साचार वेगळा त्या ।।१०।।
त्यांणीं मृत्तिकेचें करूनि अवघें । खेळतील दोघें पुरुषनारी ।।११।।
पुरुषनारी त्यांणीं ठेवियेलीं नावें । कवतुकभावें विचरती ।।१२।।
विचरती जैसे साच भावें लोक । तैसें नाहीं सुख खेळतीया ।।१३।।
यांणीं जाणितलें आपआपणया । लटिकें हें वांयां खेळतों तें ।।१४।।
खेळतों ते आम्हीं नव्हों नारीनर । म्हणोनि विकार नाहीं तयां ।।१५।।
तया ठावें आहे आम्ही अवघीं एक । म्हणोनि निःशंक खेळतील ।।१६।।
तयां ठावें नाहीं हरिचिया गुणें । आम्ही कोणकोणें काय खेळों ।।१७।।
काय खातों आम्ही कासया सांगातें । कैसें हें लागतें नेणों मुखी।।१८।।
मुखीं चवी नाहीं वरी अंगीं लाज । वरणा याती काज न धरिती।।१९।।
धरितील कांहीं संकोच त्या मना । हांसतां या जना नाइकती।।२०।।
नाइकती बोल आणिकांचे कानीं । हरि चित्तीं मनीं बैसलासे ।।२१।।
बैसलासे हरि जयांचिये चित्तीं । तयां नावडती मायबापें ।।२२।।
मायबापें त्यांचीं नेती पाचारुनि । बळें परि मनीं हरि वसे ।।२३।।
वसतील बाळा आपलाले घरीं । ध्यान त्या अंतरीं गोविंदाचें ।।२४।।
गोविंदाचें ध्यान निजलिया जाग्या । आणीक वाउग्या न बोलती।।२५।।
न बोलती निजलिया हरिविण । जागृति सपन एक जालें ।।२६।।
एकविध सुख घेती नित्य बाळा । भ्रमर परिमळालागीं तैशा ।।२७।।
तैसा त्यांचा भाव घेतला त्यांपरी । तुका म्हणे हरि बाळलीला।।२८।।

४५०१

लीलाविग्रही तो लेववी खाववी । यशोदा बैसवी मांडीवरी ।।१।।
मांडीवरी भार पुष्पाचिये परी । बैसोनियां करी स्तनपान ।।२।।

नभाचा ही साक्षी पाताळापरता । कुर्वाळिते माता हातें त्यासि ।।३।।
हातें कुर्वाळुनी मुखीं घाली घांस । पुरे म्हणे तीस पोट धालें ।।४।।
पोट धालें मग देतसे ढेंकर । भक्तीचें तें फार तुळसीदळ ।।५।।
तुळसीदळ भावें सहित देवापाणी । फार त्याहुनि क्षीरसागरा ।।६।।
क्षीराचा कांटाळा असे एकवेळ । भक्तीचें तें जळ गोड देवा ।।७।।
देवा भक्त जिवाहुनि आवडती । सकळ हि प्रीति त्यांच्याठायीं ।।८।।
त्यांचा हा अंकित सर्व भावें हरि । तुका म्हणे करी सर्व काज ।।९।।

४५०२

जयेवेळीं चोरूनियां नेलीं वत्सें । तयालागीं तैसें होणें लागे ।।१।।
लागे दोहीं ठायी करावें पाळण । जगाचा जीवन मायबाप ।।२।।
माय जाल्यावरी अवघ्या वत्सांची । घरीं वत्सें जीचीं तैसा जाला ।।३।।
जाला तैसा जैसे घरिंचे गोपाळ । आणिक सकळ मोहरी पांवे ।।४।।
मोहरी पांवे सिंगें वाहिल्या काहाळा । देखिला सोहाळा ब्रम्हादिकीं ।।५।।
ब्रम्हांदिकां सुख स्वपनीं ही नाहीं । तैसें दोहीं ठायीं वोसंडलें ।।६।।
वोसंडल्या क्षीर अमुप त्या गायी । जैसी ज्याची आई तैसा जाला ।।७।।
लाघव कळलें ब्रम्हयासी याचें । परब्रम्ह साचें अवतरलें ।।८।।
तरले हे जन सकळ ही आतां । ऐसें तो विधाता बोलियेला ।।९।।
लागला हे स्तुती करूं अनंताची । चतुर्मुख वाची भक्ती स्तोत्रें ।।१०।।
भक्तिकाजें देवें केला अवतार। पृथ्वीचा भार फेडावया ।।११।।
पृथिवी दाटीली होती या असुरीं । नासाहावे वरीभार तये ।।१२।।
तया काकुलती आपल्या दासांची । तयालागीं वेची सर्वस्व ही ।।१३।।
स्वहित दासांचें करावयालागीं । अव्यक्त हें जगीं व्यक्ती आलें ।।१४।।
लेखा कोण करी यांचिया पुण्याचा । जयांसवें वाचा बोले हरी ।।१५।।
हरी नाममात्रें पातकांच्या रासी । तो आला घरासि गौळियांच्या ।।१६।।
गौळिये अवघीं जालीं कृष्णमय । नामें लोकत्रय तरतील ।।१७।।
तरतील नामें कृष्णाचिया दोषी । बहुत ज्यांपाशीं होइल पाप ।।१८।।
पाप ऐसें नाहीं कृष्णनामें राहे । धन्य तो चि पाहे कृष्णमुख ।।१९।।
मुख माझें काय जो मी वर्णूं पार । मग नमस्कार घाली ब्रम्हा ।।२०।।
ब्रम्हा नमस्कार घाली गोधनासी । कळला तयासि हा चि देव ।।२१।।
देव चि अवगा जालासे सकळ । गाई हा गोपाळ वत्सें तेथें ।।२२।।
तेथें पाहाणें जें आणीक दुसरें । मूर्ख त्या अंतरें दुजा नाहीं ।।२३।।
दुजा भाव तुका म्हणे जया चित्ती । रवरव भोगिती कुंभपाक ।।२४।।

४५०३
कुंभपाक लागे तयासि भोगणें । अवघा चि नेणे देव ऐसा ।।१।।
देव ऐसा ठावा नाहीं जया जना । तयासि यातना यमकरी ।।२।।
कळला हा देव तया साच खरा । गाई वत्सें घरा धाडी ब्रम्हा ।।३।।
ब्रम्हादिकां ऐसा देव अगोचर । कैसा त्याचा पार जाणवेल ।।४।।
जाणवेल देव गौळियांच्या भावें । तुका म्हणे सेवे संचित हें ।।५।।

४५०४
संचित उत्तम भूमि कसूनियां । जाऊं नेणे वांयां परि त्याचें ।।१।।
त्याचिया पिकासि आलिया घुमरी । आल्या गाईवरी आणिक गाई ।।२।।
गाई दवडुनि घालिती बाहेरी । तंव म्हणे हरि बांधा त्या ही ।।३।।
त्याही तुम्ही बांधा तुमच्या सारिख्या । भोवंडा पारिख्या वाड्यांतुनि ।।४।।
पारिख्या न येती कोणाचिया घरा । सूत्रधारी खरा नारायण ।।५।।
नारायण नांदे जयाचिये ठायीं । सहज तेथें नाहीं घालमेली ।।६।।
मेलीं हीं शाहाणीं करितां सायास । नाहीं सुखलेश तुका म्हणे ।।७।।

४५०५
तुका म्हणे सुख घेतलें गोपाळीं । नाचती कांबळीं करुनि ध्वजा ।।१।।
करूनियां टिरी आपुल्या मांदळ । वाजविती टाळ दगडाचे ।।२।।
दगडाचे टाळ कोण त्यांचा नाद । गीत गातां छंद ताल नाहीं ।।३।।
नाही ताळ गातां नाचतां गोपाळां । घननीळ सावळा तयामध्यें ।।४।।
मधीं जयां हरि तें सुख आगळें । देहभाव काळें नाहीं तयां ।।५।।
तयांसि आळंगी आपुलिया करीं । जाती भूमीवरी लोटांगणीं ।।६।।
निजभाव देखे जयांचिये अंगीं । तुका म्हणे संगीं क्रीडे तयां ।।७।।

४५०६
तयांसवें करी काला दहींभात । सिदोऱ्या अनंत मेळवुनी ।।१।।
मेळवुनी अवघियांचे एके ठायीं । मागें पुढें कांहीं उरों नेदी ।।२।।
नेदी चोरी करूं जाणे अंतरींचें । आपलें हीं साचें द्यावें तेथें ।।३।।
द्यावा दहींभात आपले प्रकार । तयांचा वेव्हार सांडवावा ।।४।।
वांटी सकळांसि हातें आपुलिया । जैसें मागे तया तैसें द्यावें ।।५।।
द्यावें सांभाळुनी सम तुकभावें । आपण हि खावें त्यांचें तुक ।।६।।

तुक सकळांचे गोविंदाचे हातीं । कोण कोणे गति भला बुरा ।।७।।
राखे त्यासि तैसें आपलाल्या भावें । विचारुनि द्यावें जैसें तैसें ।।८।।
तैसें सुख नाहीं वैकुंठींच्या लोकां । तें दिलें भाविकां गोपाळांसि ।।९।।
गोपाळांचे मुखीं देउनी कवळ । घांस माखे लाळ खाय त्यांची ।।१०।।
त्यांचिये मुखींचे काढूनियां घांस। झोंबतां हातांस खाय बळें ।।११।।
बळें जयाचिया ठेंगणें सकळ । तयातें गोपाळ पाडितील ।।१२।।
पाठी उचलूनि वाहातील खांदीं । नाचतील मांदीं मेळवुनी ।।१३।।
मांदीं मेळवुनी धणी दिली आम्हां। तुका म्हणे जमा केल्या गाई ।।१४।।

४५०७
केला पुढें हरि अस्तमाना दिसा । मागें त्यासरिसे थाट चाले ।।१।।
थाट चाले गाई गोपाळांची धूम । पुढें कृष्ण राम तयां सोयी ।।२।।
सोयी लागलिया तयांची अनंती । न बोलवितां येती मागें तया ।।३।।
तयांचिये चित्तीं बैसला अनंत । घेती नित्यनित्य तें चि सुख ।।४।।
सुख नाहीं कोणा हरिच्या वियोगें । तुका म्हणे जुगें घडी जाय ।।५।।

४५०८
जाय फाकोनियां निवडितां गाई । आपलाल्या सोयी घराचिये ।।१।।
घराचिये सोयी अंतरला देव । गोपाळांचे जीव गोविंदापे।।२।।
गोविंदे वेधिलें तुका म्हणे मन । वियोगें ही ध्यान संयोगाचें ।।३।।

४५०९
संयोग सकळां असे सर्वकाळ । दुश्चित्त गोपाळ आला दिसे ।।१।।
गोपाळ गुणाचा म्हणे गुणमय । निंबलोण माये उतरिलें ।।२।।
उतरूनि हातें धरि हनूवठी । ओवाळूनि दिठी सांडियेली।।३।।
दिठी घाली माता विश्वाच्या जनका । भक्तिचिया सुखा गोडावला ।।४।।
लहान हा थोर जीवजंत भूतें । आपण दैवतें जाला देवी ।।५।।
देवी म्हैसासुर मुंजिया खेचर । लहान हि थोर देव हरि ।।६।।
हरि तुका म्हणे अवघा एकला । परि या धाकुला भक्तासाटीं ।।७।।

४५१०
भक्तीसाटीं केली यशोदेसी आळी । थिंकोनिया चोळी डोळे देव ।।१।।
देव गिळुनियां धरिलें मोहन । माय म्हणे कोण येथें दुजें ।।२।।

दुजें येथें कोणी नाहीं कृष्णाविण । निरुते जाणोन पुसे देवा ।।३।।
देवापाशीं पुसे देव काय जाला । हांसें आलें बोला याचें हरि ।।४।।
यांचे मी जवळी देव तो नेणती । लटिकें मानिती साच खरें ।।५।।
लटिकें तें साच साच तें लटिके । नेणती लोभिकें आशाबद्ध ।।६।।
सांग म्हणे माय येरु वासी तोंड । तंव तें ब्रम्हांड देखे माजी ।।७।।
माजी जया चंद्र सूर्य तारांगणें । तो भक्तांकारणें बाळलीला ।।८।।
लीळा कोण जाणे याचें महिमान । जगाचें जीवन देवादिदेव ।।९।।
देवें कवतुक दाखविलें तयां । लागतील पायां मायबापें ।।१०।।
मायबाप म्हणे हा चि देव खरा । आणीक पसारा लटिका तो ।।११।।
तो हि त्यांचा देव दिला नारायणें । माझें हें करणें तो हि मी च ।।१२।।
मीं च म्हणउनि जें जें जेथें ध्याती । तेथें मी श्रीपति भोगिता तें ।।१३।।
तें मज वेगळें मी तया निराळा । नाहीं या सकळा ब्रम्हांडांत ।।१४।।
ततभावना तैसें भविष्य तयाचें । फळ देता साचें मी च एक ।।१५।।
मी च एक खरा बोलें नारायण । दाविलें निर्वाण निजदासां ।।१६।।
निजदासां खूण दाविली निरुती । तुका म्हणे भूतीं नारायण ।।१७।।

४५११

नारायण भूतीं न कळे जयांसि । होय गर्भवासीं येणें जाणें ।।१।।
येणें जाणें होय भूतांच्या मत्सरें । न कळतां खरें देव ऐसा ।।२।।
देव ऐसा जया कळला सकळ । गेली तळमळ द्वेषबुद्धि।।३।।
बुद्धीचा पालट नव्हे कोणे काळीं । हरि जळीं स्थळीं तया चित्तीं ।।४।।
चित्त तें निर्मळ जैसें नवनीत । जाणिजे अनंत तयामाजी ।।५।।
तयामाजी हरि जाणिजे त्या भावें । आपलें परावें सारिखें चि ।।६।।
चिंतनें तयाच्या तरती आणीक । जो हें सकळिक देव देखे ।।७।।
देव देखे तो ही कसा देव नव्हे । उरला संदेहे काय त्यासि ।।८।।
काया वाचा मनें पूजावे वैष्णव । म्हणउनि भाव धरूनियां ।।९।।
यांसि कवतुक दाखविलें रानीं । वोणवा गिळूनि गोपाळांसि ।।१०।।
गोपाळांसि डोळे झांकविले हातें । धरिलें अनंतें विश्वरूप ।।११।।
पसरूनि मुख गिळियेलें ज्वाळ । पहाती गोपाळ बोटां सांदी ।।१२।।
संधि सारूनियां पाहिलें अनंता । म्हणती ते आतां कळलांसी ।।१३।।
कळला हा तुझा देह नव्हे देवा । गिळिला वोणवा आणीक तो ।।१४।।
तो तयां कळला आरुषां गोपाळां । दुर्गम सकळां साधनांसि ।।१५।।
सीण उरे तुका म्हणे साधनाचा । भाविकांसि साचा भाव दावी ।।१६।।

४५१२
भाव दावी शुद्ध देखोनियां चित्त । आपल्या अंकित निजदासां ।।१।।
सांगे गोपाळांसि काय पुण्य होतें । वांचलों जळते आगी हातीं ।।२।।
आजि आम्हां येथें राखियेलें देवें । नाहीं तरी जीवें न वंचतों ।।३।।
न वंचत्या गाई जळतों सकळें । पूर्वपुण्यबळें वांचविलें ।।४।।
पूर्वपुण्य होतें तुमचिये गांठी । बोले जगजेठी गोपाळांसि ।।५।।
गोपाळांसि म्हणे वैकुंठनायक । भले तुम्ही एक पुण्यवंत ।।६।।
करी तुका म्हणे करवी आपण । द्यावें थोरपण सेवकांसि ।।७।।

४५१३
काय आम्हां चाळविसी वायांविण । म्हणसी दुरून देखिलासि ।।१।।
लावूनियां डोळे नव्हतों दुश्चित । तुज परचित्त माव होती ।।२।।
होती दृष्टि आंत उघडी आमची । बाहेरी ते वांयां चि कुंची झाकुं ।।३।।
जालासि थोरला थोरल्या तोंडाचा । गिळियेला वाचा धूर आगी ।।४।।
आगी खातो ऐसा आमचा सांगाती । आनंदें नाचती भोंवताली ।।५।।
भोंवतीं आपणा मेळविलीं देवें । तुका म्हणे ठावें नाहीं ज्ञान ।।६।।

४५१४
नाहीं त्याची शंका वैकुंठनायका । नेणती ते एकाविण दुजा ।।१।।
जाणतियां सवें येऊं नेदी हरि । तर्कवादी दुरी दुराविले।।२।।
वादियासि भेद निंदा अहंकार । देऊनियां दूर दुराविले ।।३।।
दुरावले दूर आशाबद्ध देवा । करितां या सवा कुटुंबाची ।।४।।
चित्तीं द्रव्यदारा पुत्रादिसंपत्ती । समान ते होती पशु नर ।।५।।
नरक साधिले विसरोनि देवा । बुडाले ते भवा नदीमाजी ।।६।।
जीहीं हरिसंग केला संवसारीं । तुका म्हणे खरी खेप त्यांची ।।७।।

४५१५
खेळींमेळीं आले घरा गोपीनाथ । गोपाळांसहित मातेपाशीं ।।१।।
मातेपाशीं एक नवल सांगती । जाली तैसी ख्याती वोणव्याची ।।२।।
ओवाळिलें तिनें करूनि आरती । पुसे दसवंती गोपाळांसि ।।३।।
पुसे पडताळुनी मागुती मागुती । गोपाळ सांगती कवतुक ।।४।।
कवतुका कानीं आइकतां त्यांचे । बोलतां ये वाचे वीट नये ।।५।।

नयन गुंतले श्रीमुख पाहतां । न साहे लवतां आड पातें ।।६।।
तेव्हां कवतुक कळों आलें कांहीं । हळुहळु दोहीं मायबापां ।।७।।
हळुहळु त्यांचें पुण्य जालें वाड । वारलें हें जाड तिमिराचें ।।८।।
तिमिर हें तेथें राहों शके कैसें । जालियां प्रकाशें गोविंदाच्या ।।९।।
दावी तुका म्हणे देव ज्या आपणा । पालटे तें क्षणामाजी एका ।।१०।।

४५१६
काय आतां यासि म्हणावें लेंकरूं । जगाचा हा गुरु मायबाप ।।१।।
माया याची यासि राहिली व्यापून । कळों नये क्षण एक होतां ।।२।।
क्षण एक होतां विसरलीं त्यासि । माझेंमाझें ऐसें करी बाळा ।।३।।
करी कवतुक कळों नेदी कोणा । योजूनि कारणा तें चि खेळे ।।४।।
तें सुख लुटिलें घरिचिया घरीं । तुका म्हणे परी आपुलाल्या ।।५।।

४५१७
आपुलाल्यापरी करितील सेवा । गीत गाती देवा खेळवूनि ।।१।।
खेळु मांडियेला यमुने पाबळीं । या रे चेंडुफळी खेळूं आतां ।।२।।
आणविल्या डांगा चवगुणां काठी । बैसोनिया वांटी गडिया गडी ।।३।।
गडी जंव पाहे आपणासमान । नाहीं नारायण म्हणे दुजा ।।४।।
जाणोनि गोविंदें सकळांचा भाव । तयांसि उपाव तो चि सांगे ।।५।।
सांगे सकळांसि व्हा रे एकीकडे । चेंडू राखा गडे तुम्ही माझा ।।६।।
मज हा न लगे आणीक सांगाती । राखावी बहुतीं हाल माझी ।।७।।
माझे हाके हाक मेळवा सकळ । नव जा बरळ एकमेकां ।।८।।
एका समतुकें अवघेचि राहा । जाईल तो पाहा धरा चेंडू ।।९।।
चेंडू धरा ऐसें सांगतो सकळां । आपण निराळा एकला चि ।।१०।।
चिंडुनियां चेंडू हाणे ऊर्ध्वमुखें । ठेलीं सकळिक पाहात चि ।।११।।
पाहात चि ठेलीं न चलतां कांहीं । येरू लवलाहीं म्हणे धरा ।।१२।।
धरावा तयानें त्याचें बळ ज्यासि। येरा आणिकांसि लाग नव्हे ।।१३।।
नव्हे काम बळ बुद्धि नाहीं त्याचें । न धरवे निंचें उंचाविण ।।१४।।
विचारीं पडिले देखिले गोपाळ । या म्हणे सकळ मजमागें ।।१५।।
मार्ग देवाविण न दिसे आणिका । चतुर होत का बहुत जन ।।१६।।
चतुर चिंतिती बहुत मारग । हरि जाय लाग पाहोनियां ।।१७।।
या मागें जे गेले गोविंदा गोपाळ । ते नेले सीतळ पंथ ठायां ।।१८।।
पंथ जे चुकले आपले मतीचे । तयांमागें त्यांचे ते चि हाल ।।१९।।

हाल दोघां एक मोहरां मागिलां । चालतां चुकलां वाट पंथ ।।२०।।
पंथ पुढिलांसी चालतां न कळे । मागिलांनीं डोळे उघडावे ।।२१।।
वयाचा प्रबोध विचार ज्या नाहीं । समान तो देहीं बाळकांसी ।।२२।।
सिकविलें हित नायिके जो कानीं । त्यामागें भल्यांनीं जाऊं नये ।।२३।।
नये तें चि करी श्रेष्ठाचिया मना । मूर्ख एक जाणा तो चि खरा ।।२४।।
रानभरी जाले न कळे मारग । मग तो श्रीरंग आठविला ।।२५।।
लाज सांडूनियां मारितील हाका । कळलें नायका वैकुंठींच्या ।।२६।।
चारी वेद ज्याची कीर्ती वाखाणीती । तया अति प्रीति गोपाळांची।।२७।।
गोपाळांचा धांवा आइकिला कानीं । सोयी चक्रपाणि पालविलें।।२८।।
साया धरूनियां आले हरिपासीं । लहान थोरांसी सांभाळिलें ।।२९।।
सांभाळिलें तुका म्हणे सकळ हि । सुखी जाले ते ही हरिमुखें।।३०।।

४५१८
मुखें सांगे त्यांसि पैल चेंडू पाहा । उदकांत डोहाचिये माथां ।।१।।
माथां कळंबाचे अवघडा ठायीं । दावियेला डोहीं जळामाजी ।।२।।
जळांत पाहातां हाडति या दृष्टि । म्हणे जगजेठी ऐसें नव्हे ।।३।।
नव्हे साच चेंडू छाया दिसे आंत । खरा तेथें चित्त लावा वरी ।।४।।
वरी देखियेला अवघ्यांनीं डोळां । म्हणती गोपाळा आतां कैसें ।।५।।
कैसें करूनियां उतरावा खालीं । देखोनियां भ्यालीं अवघीं डोहो ।।६।।
डोहो बहु खोल काळया भीतरी । सरलीं माघारीं अवघीं जणें ।।७।।
जयाचें कारण तयासी च ठावें । पुसे त्याच्या भावें त्यास हरि ।।८।।
त्यासि नारायण म्हणे राहा तळीं । चढे वनमाळी झाडावरी ।।९।।
वरि जातां वरि पाहाती गोपाळ । म्हणति सकळ आम्ही नेणों ।।१०।।
नेणों म्हणती हें करितोसि काई। आम्हां तुझी आई देइल सिव्या ।।११।।
आपुलिया कानां देउनियां हात । सकळीं निमित्य टाळियेलें ।।१२।।
निमित्याकारणें रचिलें कारण । गेला नारायण खांदीवरी ।।१३।।
खांदीवरी पाव ठेवियेला देवें । पाडावा त्या भावें चेंडू तळीं ।।१४।।
तळील नेणती तुका म्हणे भाव । अंतरींचा देव जाणों नेदी ।।१५।।

४५१९
नेदी कळों केल्याविण तें कारण । दाखवी आणून अनुभवा ।।१।।
न पुरेसा हात घाली चेंडूकडे । म्हणीतलें गडे सांभाळावें ।।२।।
सांभाळ करितां सकळां जिवांचा । गोपाळांसि वाचा म्हणे बरें ।।३।।

बरें विचारुनी करावें कारण । म्हणे नारायण बऱ्या बरें ।।४।।
बरें म्हणउनि तयांकडे पाहे । सोडविला जाय चेंडू तळा ।।५।।
तयासवें उडी घातली अनंतें । गोपाळ रडते येती घरा ।।६।।
येतां त्यांचा लोकीं देखिला कोल्हाळ । सामोरीं सकळ आलीं पुढें ।।७।।
पुसतील मात आपआपल्यासि । हरिदुःखें त्यांसी न बोलवे ।।८।।
न बोलवे हरि बुडालासें मुखें । कुटितील दुःखें उर माथे ।।९।।
मायबापें तुका म्हणे न देखती । ऐसें दुःख चित्तीं गोपाळांच्या ।।१०।।

४५२०
गोपाळां उभडु नावरे दुःखाचा । कुंटित हे वाचा जाली त्यांची ।।१।।
जालें काय ऐसें न कळे कोणासी । म्हणती तुम्हांपासीं देव होता ।।२।।
देवासवें दुःख न पवते ऐसें । कांहीं अनारिसें दिसे आजी ।।३।।
आजि दिसे हरि फांकला यांपाशीं । म्हणउनि ऐशी परि जाली ।।४।।
जाणविल्याविण कैसें कळे त्यांसि। शाहाणे तयांसि कळों आले ।।५।।
कळों आलें तीहीं कांुफ्द शांत केला । ठायींचा च त्यांला थोडा होता ।।६।।
होता तो विचार सांगितला जना । गोपाळ शाहाणा होता त्याणें ।।७।।
सांगे आतां हरि तुम्हां आम्हां नाहीं । बुडाला तो डोहीं यमुनेच्या ।।८।।
यासी अवकाश नव्हे चि पुसतां । जालिया अनंता कोण परि ।।९।।
परि त्या दुःखाची काय सांगों आतां । तुका म्हणे माता लोकपाळ।।१०।।

४५२१
पाषाण फुटती तें दुःख देखोनि । करितां गौळणी शोक लोकां ।।१।।
काय ऐसें पाप होतें आम्हांपासीं । बोलती एकासी एक एका ।।२।।
एकांचिये डोळां असुं बाह्यात्कारी । नाहीं तीं अंतरीं जळतील ।।३।।
जळतील एकें अंतर्बाह्यात्कारें । टाकिलीं लेकुरें कडियेहूनि ।।४।।
निवांत चि एकें राहिलीं निश्चिंत । बाहेरी ना आंत जीव त्यांचे ।।५।।
त्यांचे जीव वरी आले त्या सकळां । एका त्या गोपाळांवांचूनियां ।।६।।
वांचणें तें आतां खोटें संवसारीं । नव्हे भेटी जरी हरिसवें ।।७।।
सवें घेऊनियां चालली गोपाळां । अवघीं च बाळा नर नारी ।।८।।
नर नारी नाहीं मनुष्याचें नावें । गोकुळ हें गांव सांडियेलें ।।९।।
सांडियेलीं अन्नें संपदा सकळ । चित्तीं तो गोपाळ धरुनि जाती ।।१०।।
तिरीं माना घालूनियां उभ्या गाई । तटस्थ या डोहीं यमुनेच्या ।।११।।
यमुनेच्या तिरीं झाडें वृक्ष वल्ली। दुःखें कोमाइलीं कृष्णाचिया ।।१२।।

यांचें त्यांचें दुःख एक जालें तिरीं । मग शोक करी मायबाप ।।१३।।
मायबाप तुका म्हणे सहोदर । तोंवरी च तीर न पवतां ।।१४।।

४५२२
तीर देखोनियां यमुनेचें जळ । कांठीं च कोल्हाळ करिताती ।।१।।
कइवाड नव्हे घालावया उडी । आपणासि ओढी भय मागें ।।२।।
मागें सरे माय पाउला पाउलीं । आपल्या च घाली धाकें अंग ।।३।।
अंग राखोनियां माय खेद करी । अंतरीचें हरी जाणवलें ।।४।।
जाणवलें मग देवें दिली बुडी । तुका म्हणे कुडी भावना हे ।।५।।

४५२३
भावनेच्या मुळें अंतरला देव । शिरला संदेह भयें पोटीं ।।१।।
पोटीं होतें मागें जीव द्यावा ऐसें । बोलिल्या सरिसें न करवे ।।२।।
न करवे त्याग जीवाचा या नास । नारायण त्यास अंतरला ।।३।।
अंतरला बहु बोलतां वाउगें । अंतरींच्या त्यागेंविण गोष्टी ।।४।।
गोष्टी सकळांच्या आइकिल्या देवें । कोण कोण्याभावें रडती तीं ।।५।।
तीं गेलीं घरास आपल्या सकळ । गोधनें गोपाळ लोक माय ।।६।।
मायबापांची तों ऐसी जाली गति । तुका म्हणे अंतीं कळों आलें ।।७।।

४५२४
आला यांचा भाव देवाचिया मना । अंतरीं कारणांसाठीं होता ।।१।।
होता भाव त्यांचा पाहोनि निराळा । नव्हता पाताळा गेला आधीं ।।२।।
आधीं पाठीमोरीं जालीं तीं सकळें । मग या गोपाळें बुडी दिली ।।३।।
दिली हाक त्याणें जाऊनि पाताळा । जागविलें काळा भुजंगासि ।।४।।
भुजंग हा होता निजला मंदिरीं । निर्भर अंतरीं गर्वनिधि ।।५।।
गर्व हरावया आला नारायण । मिस या करून चेंडुवाचें ।।६।।
चेंडुवाचे मिसें काळया नाथावा । तुका म्हणे देवा कारण हें ।।७।।

४५२५
काळयाचे मागे चेंडु पत्नीपाशीं । तेजःपुंज राशी देखियेला ।।१।।
लावण्यपूतळा मुखप्रभाराशी । कोटि रवि शशी उगवले ।।२।।
उघवला खांब कर्दळीचा गाभा । ब्रीदें वांकी नभा देखे पायीं ।।३।।
पाहिला सकळ तिनें न्याहाळूनि । कोण या जननी विसंबली ।।४।।

विसरु हा तीस कैसा याचा जाला । जीवाहुनि वाल्हा दिसतसे ।।५।।
दिसतसे रूप गोजिरें लाहान । पाहातां लोचन सुखावले ।।६।।
पाहिलें पर्तोनि काळा दुष्टाकडे । मग म्हणे कुडें जालें आतां ।।७।।
आतां हा उठोनि खाईल या बाळा । देईल वेल्हाळा माय जीव ।।८।।
जीव याचा कैसा वांचे म्हणे नारी । मोहिली अंतरीं हरिरूपें ।।९।।
रूपे अनंताचीं अनंतप्रकार । न कळे साचार तुका म्हणे ।।१०।।

४५२६

म्हणे चेंडू कोणें आणिला या ठाया । आलों पुरवाया कोड त्याचें ।।१।।
त्याचें आइकोन निष्ठुर वचन । भयाभीत मन जालें तीचें ।।२।।
तिची चित्तवृत्ती होती देवावरी । आधीं ते माघारी फिरली वेगीं ।।३।।
वेगीं मन गेलें भ्रताराचे सोयी । विघ्न आलें कांहीं आम्हांवरीं ।।४।।
वरि उदकास अंत नाहीं पार । अक्षोभ सागर भरलासे ।।५।।
संचार करूनि कोण्या वाटे आला । ठायीं च देखिला अवचिता ।।६।।
अवचिता नेणों येथें उगवला । दिसे तो धाकुला बोल मोठे ।।७।।
मोठ्यानें बोलतो भय नाहीं मनीं । केला उठवूनी काळ जागा ।।८।।
जागविला काळसर्प तये वेळीं । उठिला कल्लोळीं विषाचिये ।।९।।
यमुनेच्या डोहावरी आला ऊत । काळ्याकृतांतधूदकारें ।।१०।।
कारणें ज्या येथें आला नारायण । जालें दरुषण दोघांमधीं ।।११।।
दोघांमध्यें जाले बोल परस्परें । प्रसंग उत्तरें युद्धाचिया ।।१२।।
चिंतावला चित्तीं तोंडे बोले काळ । करीन सकळ ग्रास तुझा ।।१३।।
जाला सावकाश झेंप घाली वरी। तंव म्हणे हरि मुष्टिघातें ।।१४।।
तेणें काळें त्यासि दिसे काळ तैसा। हरावया जैसा जीव जाला ।।१५।।
आठवले काळा हाकारिलें गोत । मिळालीं बहुतें नागकुळें ।।१६।।
कल्हारीं संधानीं धरियेला हरि । अवघा विखारीं व्यापियेला ।।१७।।
यांस तुका म्हणे नाहीं भक्तीविण । गरुडाचें चिंतन केलें मनीं ।।१८।।

४५२७

निजदास उभा तात्काळ पायापें । स्वामी देखे सर्पें वेष्टियेला ।।१।।
लहानथोरें होतीं मिळालीं अपारें । त्याच्या धुदकारें निवारिलीं ।।२।।
निघतां आपटी धरूनि धांवामधीं । एकाचें चि वधी माथें पायें ।।३।।
एकीं जीव दिले येतां च त्या धाकें । येतील तीं एकें काकूलती ।।४।।
यथेष्ट भक्षिलीं पोट धाये वरी । तंव म्हणे हरि पुरे आतां ।।५।।

आतां करूं काम आलों जयासाटीं । हरी घाली मिठी काळयासि ।।६।।
यासि नाथूनियां नाकीं दिली दोरी । चेंडू भार शिरीं कमळांचा ।।७।।
चालविला वरी बैसे नारायण । गरुडा आळंगुन बहुडविलें ।।८।।
विसरु न पडे संवगड्या गाई । यमुनेच्या डोहीं लक्ष त्यांचें ।।९।।
त्याच्या गोष्टी कांठीं बैसोनि सांगती । बुडाला दाविती येथें हरि ।।१०।।
हरीचें चिंतन करितां आठव । तुका म्हणे देव आला वरी ।।११।।

४५२८
अवचित त्यांणीं देखिला भुजंग । पळतील मग हाउ आला ।।१।।
आला घेऊनियां यमुनेबाहेरी । पालवितो करीं गडियांसि।।२।।
गडियांसि म्हणे वैकुंठनायक । या रे सकळिक मजपाशीं ।।३।।
मजपाशीं तुम्हां भय काय करी । जवळि या दुरी जाऊं नका ।।४।।
कानीं आइकिले गोविंदाचे बोल । म्हणती नवल चला पाहों ।।५।।
पाहों आले हरीजवळ सकळ । गोविंदें गोपाळ आळिंगिले ।।६।।
आल्या गाई वरी घालितील माना । वोरसलें स्तना क्षीर लोटें ।।७।।
लोटती सकळें एकावरी एक । होउनि पृथक कुर्वाळलीं ।।८।।
कुर्वाळलीं आनंदें घेती चारापाणी । तिहीं चक्रपाणी देखियेला ।।९।।
त्यां च पाशीं होता परि केली माव । न कळे संदेह पडलिया ।।१०।।
याति वृक्ष वल्ली होत्या कोमेलिया । त्यांसि कृष्णें काया दिव्य दिली ।।११।।
दिलें गोविंदें त्या पदा नाहीं नाश। तुका म्हणे आस निरसली ।।१२।।

४५२९
आस निरसली गोविंदाचे भेटी । संवसारा तुटी पुढिलिया ।।१।।
पुढें पाठविलें गोविंदें गोपाळां । देउनि चपळां हातीं गुढी ।।२।।
हाका आरोळिया देउनि नाचती । एक सादाविती हरि आले ।।३।।
आरंधीं पडिलीं होतीं तयां घरीं । संकीर्ण त्या नारी नरलोक ।।४।।
लोका भूक तान नाहीं निद्रा डोळा । रूप वेळोवेळां आठविती ।।५।।
आहाकटा मग करिती गेलिया । आधीं ठावा तयां नाहीं कोणा ।।६।।
आधीं चुकी मग घडे आठवण । तुका म्हणे जन परिचयें ।।७।।

४५३०
जननी हे म्हणे आहा काय जालें । शरीर रक्षिलें काय काजें ।।१।।
काय काज आतां हरिविण जिणें । नित्य दुःख कोणें सोसावें हें ।।२।।

हें दुःख न सरे हरि न भेटे तों । त्यामागें चि जातों एका वेळे ।।३।।
एकवेळ जरी देखतें मी आतां । तरी जीवापरता न करितें ।।४।।
करितां हे मात हरीचें चिंतन । शुभ तो शकुन तुका म्हणे ।।५।।

४५३१
शुभ मात तिहीं आणिली गोपाळीं । चेंडू वनमाळी घेउनि आले ।।१।।
आली दारा देखे हरुषाची गुढी । सांगितली पुढी हरुषें मात ।।२।।
हरुषलीं माता केलें निंबलोण । गोपाळांवरून कुरवंडी ।।३।।
गोपाळां भोवतें मिळालें गोकुळ । अवघीं सकळ लहान थोरें ।।४।।
थोर सुख जालें ते काळीं आनंद । सांगती गोविंद वरि आला ।।५।।
आले वरि बैसोनियां नारायण । काळया नाथून वहन केलें ।।६।।
नगराबाहेरी निघाले आनंदें । लावूनियां वाद्यें नाना घोष ।।७।।
नारायणापुढें गोपाळ चालती । आनंदें नाचती गाती गीत ।।८।।
तंव तो देखिला वैकुंठींचा पती । लोटांगणीं जाती सकळ ही ।।९।।
सकळ ही एका भावें आलिंगिले । अवघियां जाले अवघे हरि ।।१०।।
हरि आलिंगनें हरिरूप जालीं । आप विसरलीं आपणास ।।११।।
सकळांसी सुख एक दिलें देवें । मायबापां भावें लोकपाळां ।।१२।।
मायबाप देवा नाहीं लोकपाळ । सारिखीं सकळ तुका म्हणे ।।१३।।

४५३२
नेणें वर्ण धर्म जीं आलीं सामोरीं । अवघीं च हरी आळिंगिलीं ।।१।।
हरि लोकपाळ आले नगरांत । सकळांसहित मायबाप ।।२।।
पारणें तयांचें जालें एका वेळे । देखिलें सावळें परब्रम्ह ।।३।।
ब्रम्हानंदें लोक सकळ नाचती । गुढिया उभविती घरोघरीं ।।४।।
घरोघरीं सुख आनंद सोहळा । सडे रंग माळा चौकदारीं ।।५।।
दारीं वृंदावनें तुळसीचीं वनें । रामकृष्णगाणें नारायण।।६।।
नारायण तिहीं पूजिला बहुतीं । नाना पुष्पयाती करूनियां ।।७।।
यांचें ॠण नाहीं फिटलें मागील । पुढें भांडवल जोडिती हीं ।।८।।
हीं नव्हतीं कधीं या देवा वेगळीं । केला वनमाळी सेवाॠणी ।।९।।
सेवाॠणें तुका म्हणे रूपधारी । भक्तांचा कैवारी नारायणा ।।१०।।

४५३३
नारायण आले निजमंदिरासि । जाले या लोकांसि बहुडविते ।।१।।

बहुडविले बहु केलें समाधान । विसरु तो क्षण नका माझा ।।२।।
मात सांगितली सकळ वृत्तांत । केलें दंडवत सकळांनीं ।।३।।
सकळां भातुकें वांटिल्या साखरा । आपलाल्या घरा लोक गेले ।।४।।
लोक गेले कामा गाईपें गोपाळ । वारली सकळ लोभापाठी ।।५।।
लोभ दावुनियां आपला विसर । पाडितो कुमर धनआशा ।।६।।
आशेचे बांधले तुका म्हणे जन । काय नारायण ऐसा जाणे ।।७।।

४५३४
जाला कवतुक करितां रोकडें । आणीक ही पुढें नारायण ।।१।।
येउनियां पुढें धरिला मारग । हरावया भाग इंद्रापाशीं।।२।।
इंद्रा दहीं दुध तूप नेतां लोणी । घेतलें हिरोनि वाटे त्यांचें ।।३।।
हिरोनि घेतल्या कावडी सकळा । म्हणती गोपाळा बरें नव्हे ।।४।।
नव्हे तें चि करी न भे कळिकाळा । तुका म्हणे लीळा खेळे देव ।।५।।

४५३५
खेळ नव्हे बरा इंद्र कोपलिया । देव म्हणे तयां भेऊं नका ।।१।।
नका धरू भय धाक कांहीं मनीं । बोले चक्रपाणि गौळियांसि ।।२।।
गौळियांसि धीर नाहीं या वचनें । आशंकितमनें वेडावलीं ।।३।।
वेडावलीं त्यांसि न कळतां भाव । देवआदिदेव नोळखतां ।।४।।
नोळखतां दुःखें वाहाती शरीरीं । तुका म्हणे वरि भारवाही ।।५।।

४५३६
भारवाही नोळखती या अनंता । जवळी असतां अंगसंगें ।।१।।
अंगसंगें तया न कळे हा देव । कळोनि संदेह मागुताला ।।२।।
मागुती पडती चिंतेचिये डोहीं । जयाची हे नाहीं बुद्धि स्थिर ।।३।।
बुद्धि स्थिर होउं नेदी नारायण । आशबद्ध जन लोभिकांची ।।४।।
लोभिकां न साहे देवाचें करणें । तुका म्हणे तेणें दुःखी होती ।।५।।

४५३७
दुःखी होती लोभें करावें तें काई । उडतील गाई म्हैसी आतां ।।१।।
आणीकही कांहीं होईल अरिष्ट । नायिके हा धीट सांगितलें ।।२।।
सांगों चला याच्या मायबापांपाशीं । निघाले घरासि देवा रागें ।।३।।
रागें काला देतां न घेती कवळ । टोकवी गोपाळ क्रोधियांसि ।।४।।

क्रोध देवावरि धरियेला राग । तुका म्हणे भाग न लभती ।।५।।

४५३८
भाग त्या सुखाचे वांकड्यां बोबड्यां । आपलिया गड्यां भाविकांसि ।।१।।
भारवाही गेले टाकुनि कावडी । नवनीतगोडी भाविकांसि ।।२।।
काला करूनियां वांटिलां सकळां । आनंदें गोपाळांमाजी खेळे ।।३।।
खेळेंमेळें दहीं दुध तूप खाती । भय नाहीं चित्तीं कवणाचें ।।४।।
कवणाचें चाले तुका म्हणे बळ । जयासी गोपाळ साह्य जाला ।।५।।

४५३९
जाणवलें इंद्रा चरित्र सकळ । वांकुल्या गोपाळ दाविताती ।।१।।
तातडिया मेघां आज्ञा करी राव । गोकुळींचा ठाव उरों नेदा ।।२।।
नेदाविया काई म्हसी वांचों लोक । पुरा सकळिक सिळाधारीं ।।३।।
धाक नाहीं माझा गोवळियां पोरां । सकळिक मारा म्हणे मेघां ।।४।।
म्हणविती देव आपणां तोंवरी । जंव नाहीं वरी कोपलों मी ।।५।।
मीपणें हा देव न कळे चि त्यांसी । अभिमानें रासि गर्वाचिया ।।६।।
अभिमानरासि जयाचिये ठायीं । तुका म्हणे तईं देव दुरी ।।७।।

४५४०
देव त्यां फावला गोपाळां । नाहीं तेथें कळा अभिमान।।१।।
नाडलीं आपल्या आपण चि एकें । संदेहदायकें बहुफारें ।।२।।
फारें चाळविलीं नेदी कळों माव । देवाआदिदेव विश्वंभर ।।३।।
विश्वासावांचुनि कळों नये खरा । अभक्तां अधीरा जैसा तैसा ।।४।।
जैसा भाव तैसा जवळि त्या दुरि । तुका म्हणे हरि देतो घेतो ।।५।।

४५४१
तो या साच भावें न कळे चि इंद्रा । म्हणउनि धारा घाली सिळा ।।१।।
घाली धारा मेघ कडाडिला माथा । वरि अवचिता देखियेला ।।२।।
देखती पाऊस वोळला गोपाळ । भ्याले हे सकळ विचारिती ।।३।।
विचार पडला विसरले खेळ । अन्याय गोपाळ म्हणती केला ।।४।।
लागलेंसे गोड न कळे ते काळीं । भेणें वनमाळी आठविती ।।५।।
आतां कायकैसा करावा विचार । गोधनासि थार आपणिया ।।६।।
यांचिया विचारें होणार ते काई । तुका म्हणे ठायीं वेडावलीं ।।७।।

४५४२

वेडावलीं काय करावें या काळीं । म्हणे वनमाळी गोपाळांसि ।।१।।
शिरी धरूं गोवर्द्धन उचलूनि । म्हणे तुम्ही कोणी भिऊं नका ।।२।।
नका सांडूं कोणी आपला आवांका । मारितां या हाका आरोळिया ।।३।।
अशंकित चित्तें न वटे त्यां खरें । धाकें च ते बरें म्हणती चला ।।४।।
चित्ती धाक परि जवळी अनंत । तुका म्हणे घात होऊं नेदी ।।५।।

४५४३

नेदी दुःख देखों दासा नारायण । ठेवी निवारून आल्या आधीं ।।१।।
आधीं पुढें शुद्ध करावा मारग । दासांमागें मग सुखरूप ।।२।।
पर्वतासि हात लाविला अनंतें । तो जाय वरतें आपेंआप ।।३।।
आपल्याआपण उचलिला गिरी । गोपाळ हे करी निमित्यासि ।।४।।
निमित्य करूनि करावें कारण । करितां आपण कळों नेदी ।।५।।
दिनाचा कृपाळु पतितपावन । हें करी वचन सांच खरें ।।६।।
सांगणें न लगे सुखदुःख दासा । तुका म्हणे ऐसा कृपावंत ।।७।।

४५४४

कृपावंतें हाक दिली सकळिकां । माजिया रे नका राहों कोणी ।।१।।
निघाले या भेणे पाउसाच्या जन । देखे गोवर्द्धन उचलिला ।।२।।
लाविले गोपाळ फेरीं चहूंकडे । हांसे कुंफ्दे रडे कोणी धाकें ।।३।।
धाकें हीं सकळ निघालीं भीतरी । उचलिला गिरी तयाखालीं ।।४।।
तयाखालीं गाई वत्सें आलीं लोक । पक्षी सकळिक जीवजाति ।।५।।
जिहीं म्हणविलें हरीचे अंकित । जातीचे ते होत कोणी तरी ।।६।।
जाति कुळ नाहीं तयासि प्रमाण । अनन्या अनन्य तुका म्हणे ।।७।।

४५४५

त्यांसि राखे बळें आपुले जे दास । कळिकाळासि वास पाहों नेदी ।१।।
पाउस न येतां केली यांची थार । लागला तुषार येऊं मग ।।२।।
येउनि दगड बैसतील गिरी । वरुषला धारीं शिळांचिये ।।३।।
शिळांचिये धारीं वरुषला आकांत । होता दिवस सात एक सरें ।।४।।
एक सरें गिरि धरिला गोपाळीं । होतों भाव बळी आम्ही ऐसे ।।५।।
ऐसें कळों आलें देवाचिया चित्ता । म्हणे तुम्हीं आतां हात सोडा ।।६।।

हांसती गोपाळ करूनि नवल । आइकोनि बोल गोविंदाचे ।।७।।
दावितील डोया गुडघे कोपर । फुटले ते भार उचलितां ।।८।।
भार आम्हांवरि घालुनि निराळा । राहिलासी डोळा चुकवुनि ।।९।।
निमित्य अंगुळी लावियेली बरी । पाहों कैसा गिरी धरितोसि ।।१०।।
सिणले हे होते ठायींच्या त्या भारें । लटिकें चि खरें मानुनियां ।।११।।
यांणीं अंत पाहों आदरिला याचा । तुका म्हणे वाचा वाचाळ ते ।।१२।।

४५४६
वाचाळ लटिके अभक्त जे खळ । आपुलें तें बळ वाखाणीती ।।१।।
बळें हुंबरती सत्य त्यां न कळे । नुघडती डोळे अंधळ्यांचे ।।२।।
आसुडिल्या माना हात पाय नेटें । तंव भार बोटें उचलिला ।।३।।
लटिका चि आम्हीं सीण केला देवा । कळों आलें तेव्हां सकळांसि ।।४।।
आलें कळों तुका म्हणे अनुभवें । मग अहंभावें सांडवलीं ।।५।।

४५४७
सांडवले सकळांचे अभिमान । आणिले शरण लोटांगणीं।।१।।
लोटांगणीं आले होऊनियां दीन । मग नारायण म्हणे भलें ।।२।।
भला आजि तुम्ही केला साच पण । गिरि गोवर्धन उचलिला ।।३।।
लागती चरणा सकळ ते काळीं । आम्हांमध्यें बळी तूं चि एक ।।४।।
एका तुजविण न यों आम्ही कामा । कळों कृष्णा रामा आलें आजी ।।५।।
आजिवरि आम्हां होता अभिमान । नेणतां चरणमहिमा तुझा ।।६।।
तुझा पार आम्ही नेणों नारायणा । नखीं गोवर्द्धना राखियेलें ।।७।।
राखियेलें गोकुळ आम्हां सकळांसि । दगडाच्या राशी वरुषतां ।।८।।
वर्णावें तें काय तुझें महिमान । धरिती चरण सकळिक ।।९।।
सकळ ही तान विसरलीं भूक । सकळ ही सुख दिलें त्यांसि ।।१०।।
त्यासि कळों आला वैकुंठनायका। तुका म्हणे लोक निर्भर ते ।।११।।

४५४८
लोकां कळों आला देव आम्हांमधीं । टाकिली उपाधि तिहीं शंका ।।१।।
शंका नाहीं थोरां लाहानां जीवांसि । कळला हा हृषीकेशी मग ।।२।।
मग मनीं जाले निर्भर सकळ । संगें लोकपाळ कृष्णाचिया ।।३।।
कृष्णाचिया ओंव्या गाणें गाती गीत । कृष्णमय चित्त जालें त्यांचें ।।४।।
त्यांसि ठावा नाहीं बाहेरिल भाव । अंतरीं च वाव सुख जालें ।।६।।

सुखें तया दीस न कळे हे राती । अखंड या ज्योती गोविंदाची ।।६।।
चिंतनें चि धालीं न लगे अन्नपाणी । तुका म्हणे मनीं समाधान ।।७।।

४५४९
समाधान त्यांचीं इंद्रियें सकळ । जयां तो गोपाळ समागमें ।।१।।
गोविंदाचा जाला प्रकाश भीतरी । मग त्यां बाहेरी काय काज ।।२।।
काज काम त्यांचें सरले व्यापार । नाहीं आप पर माझें तुझें ।।३।।
माया सकळांची सकळां ही वरी । विषय तें हरि दिसों नेदी ।।४।।
दिसे तया आप परावें सारिखें । तुका म्हणे सुखें कृष्णाचिया ।।५।।

४५५०
कृष्णाचिया सुखें भुक नाहीं तान । सदा समाधान सकळांचें ।।१।।
कळलें चि ऩाहीं जाले किती दिस । बाहेरिल वास विसरलीं ।।२।।
विसरु कामाचा तुका म्हणे जाला । उद्वेग राहिला जावें यावें ।।३।।

४५५१
जावें बाहेरी हा नाठवे विचार । नाहीं समाचार ठावा कांहीं ।।१।।
कांहीं न कळे तें कळों आलें देवा । मांडिला रिघावा कवतुक ।।२।।
कवतुकासाठीं भक्त देहावरि । आणिताहे हरि बोलावया।।३।।
यासि नांव रूप नाहीं हा आकार । कळला साचार भक्ता मुखें ।।४।।
मुखें भक्तांचिया बोलतो आपण । अंगसंगें भिन्न नाहीं दोघां ।।५।।
दोघे वेगळाले लेखिल जो कोणी । तयाचा मेदिनी बहु भार ।।६।।
तयासी घडलीं सकळ ही पापें । भक्तांचिया कोपें निंदा द्वेषें ।।७।।
द्वेषियाचा संग न घडावा कोणा । विष जेंवी प्राणां नाश करी ।।८।।
करितां आइके निंदा या संतांची । तया होती ते चि अधःपात ।।९।।
पतन उद्धार संगाचा महिमा । त्यजावें अधमा संत सेवीं ।।१०।।
संतसेवीं जोडे महालाभरासी । तुका म्हणे यासि नाश नाहीं ।।११।।

४५५२
नाहीं नाश हरि आठवितां मुखें । जोडतील सुखें सकळ ही ।।१।।
सकळी ही सुखें वोळलीं अंतरीं । मग त्याबाहेरी काय काज ।।२।।
येऊं विसरलीं बाहेरी गोपाळें । तल्लीन सकळें कृष्णसुखें ।।३।।
सुख तें योगियां नाहीं समाधीस । दिलें गाई वत्स पशु जीवां ।।४।।

वारला पाऊस केव्हां नाहीं ठावा । तुका म्हणे देवावांचूनियां ।।५।।

४५५३
यांसि समाचार सांगतों सकळा । चलावें गोकुळा म्हणे देव ।।१।।
देव राखे तया आडलिया काळें । देव सुखफळें देतो दासां ।।२।।
दासां दुःख देखों नेदी आपुलिया । निवारी आलिया न कळतां ।।३।।
नाहीं मेघ येतां जातां देखियेला । धारीं वरुषला शिळांचिये ।।४।।
एवढें भक्तांचें सांकडें अनंता । होय निवारिता तुका म्हणे ।।५।।

४५५४
काकुलती एकें पाहाती बाहेरी । तया म्हणे हरि वोसरला ।।१।।
वोसरला मेघ आला होता काळ । बाहेरी सकळ आले लोक ।।२।।
कवतुक जालें ते काळीं आनंद । कळला गोविंद साच भावें ।।३।।
भावें तयापुढें नाचती सकळें । गातील मंगळें ओंव्या गीत ।।४।।
गीत गाती ओंव्या रामकृष्णावरी । गोपाळ मोहोरी वाती पांवे ।।५।।
वत्सें गाई पशू नाचती आनंदें । वेधलिया छंदें गोविंदाच्या ।।६।।
चित्त वेधियेलें गोविंदें जयाचें । कोण तें दैवाचें तयाहुनि ।।७।।
तयाहुनि कोणी नाहीं भाग्यवंत । अखंड सांगात गोविंदाचा ।।८।।
गोविंदाचा संग तुका म्हणे ध्यान । गोविंद ते जन गोकुळींचे ।।९।।

४५५५
गोकुळींची गती कोण जाणे परि । पाहों आला वरी इंद्रराव ।।१।।
इंद्रापाशीं मेघ बोलती बडिवार । सकळ संहार करुनि आलों ।।२।।
आतां जीव नाहीं सांगाया ते रानीं । पुरिलें पाषाणीं शिळाधारीं ।।३।।
रिता कोठें नाहीं राहों दिला ठाव । जल्पती तो भाव न कळतां ।।४।।
न कळतां देव बळें हुंबरती । साच ते पावती अपमान ।।५।।
माव न कळतां केली तोंडपिटी । इंद्र आला दृष्टी पाहावया ।।६।।
पाहतां तें आहे जैसें होतें तैसें । नाचती विशेषें तुका म्हणे ।।७।।

४५५६
नाचतां देखिलीं गाई वत्सें जन । विस्मित होऊन इंद्र ठेला ।।१।।
लागला पाऊस शिळांचिये धारीं । वांचलीं हीं परी कैसीं येथें ।।२।।
येथें आहे नारायण संदेह नाहीं । विघ्न केलें ठायीं निर्विघ्न तें ।।३।।

विचारितां उचलिला गोवर्द्धन । अवतार पूर्ण कळों आला ।।४।।
आला गौळियांच्या घरा नारायण । करितो स्तवन इंद्र त्यांचें ।।५।।
त्यांच्या पुण्या पार कोण करी लेखा । न कळे चतुर्मुखा ब्रम्हयासि ।।६।।
सीणतां जो ध्याना न ये एकवेळा । तो तया गोपाळां समागमें ।।७।।
समागमें गाई वत्स पुण्यवंता । देह कुर्वाळितां अंगसंग ।।८।।
संग जाला मायबापां लोकपाळां । आळिंगिती गळा कंठाकंठ ।।९।।
करिते हे जाले स्तुती सकळिक । देव इंद्रादिक गोविंदाची ।।१०।।
करितील वृष्टी पुष्पवरुषाव । देवआदिदेव पूजियेला।।११।।
पुष्पांजुळी मंत्र घोष जयजयकार । दुमदुमी अंबर नेणें नादें ।।१२।।
नामाचे गजर गंधर्वांचीं गाणीं । आनंद भुवनीं न माये तो ।।१३।।
तो सुखसोहळा अनुपम्य रासी । गोकुळीं देवासी दोहीं ठायीं ।।१४।।
दोहीं ठायीं सुख दिलें नारायणें । गेला दरुषणें वैरभाव ।।१५।।
भावना भेदाची जाय उठाउठी । तुका म्हणे भेटी गोविंदाचे ।।१६।।

४५५७

गोविंदाचें नाम गोड घेतां वाचे । तेथें हे कइंचे वैरभाव ।।१।।
भावें नमस्कार घातले सकळीं । लोटांगणें तळीं महीवरि ।।२।।
वरि हातबाहे उभारिली देवें । कळलीया भावें सकळांच्या।।३।।
सकळ ही वरि बहुडविले स्थळा । चलावें गोपाळा म्हणे घरा ।।४।।
राहिलीं हीं नाचों गोविंदाच्या बोलें । पडिलीया डोलें छंदें हो तीं ।।५।।
छंद तो नावरे आपणा आपला । आनंदाचा आला होता त्यांसि ।।६।।
त्यांच्या तुका म्हणे आनंदें सकळ । ठेंगणें गोपाळ समागमें ।।७।।

४५५८

समागमें असे हरि नेणतियां । नेदी जाऊं वांयां अंकितांसि ।।१।।
अंकितां सावध केलें नारायणें । गोपाळ गोधनें सकळिकां ।।२।।
सकळही जन आले गोकुळासि । आनंद मानसीं सकळांच्या ।।३।।
सकळांचा केला अंगीकार देवें । न कळतां भावें वांचवी त्यां ।।४।।
त्यां जाला निर्धार हरि आम्हांपासीं । निवांत मानसीं निर्भर तीं ।।५।।
निर्भर हे जन गोकुळींचे लोक । केले सकळिक नारायणें ।।६।।
नारायण भय येऊं नेदी गांवा । तुका म्हणे नांवा अनुसरे त्या ।।७।।

४५५९

ये दशे चरित्र केलें नारायणें । रांगतां गोधनें राखिताहे।।१।।
हें सोंग सारिलें या रूपें अनंतें । पुढें हि बहु तें करणें आहे ।।२।।
आहे तुका म्हणे धर्म संस्थापणें । केला नारायणें अवतार।।३।।

४५६०
अवतार केला संहारावे दुष्ट । करिती हे नष्ट परपीडा।।१।।
परपीडा करी दैत्य कंसराव । पुढें तो ही भाव आरंभिला ।।२।।
लाविलें लाघव पाहोनियां संधी । सकळांही वधी दुष्टजना ।।३।।
दुष्टजन परपीडक जे कोणी । ते या चक्रपाणी न साहति ।।४।।
न साहवे दुःख भक्तांचें या देवा । अवतार घ्यावा लागे रूप ।।५।।
रूप हें चांगलें रामकृष्ण नाम । हरे भवश्रम उच्चारितां ।।६।।
उच्चारितां नाम कंस वैरभावें । हरोनियां जीवें कृष्ण केला ।।७।।
कृष्णरूप त्यासि दिसे अवघें जन । पाहे तों आपण कृष्ण जाला ।।८।।
पाहिलें दर्पणीं आधील मुखासि । चतुर्भुज त्यासि तो चि जाला ।।९।।
जालीं कृष्णरूप कन्या पुत्र भाज । तुका म्हणे राज्य सैन्य जन ।।१०।।

४५६१
सैन्य जन हांसे राया जालें काई । वासपे तो ठायीं आपणासि ।।१।।
आपणा आपण जयास तीं तैसीं । वैरभाव ज्यांसि भक्ति नाहीं ।।२।।
नाहीं याचा त्याचा भाव एकविध । म्हणउनि छंद वेगळाले ।।३।।
वेगळाल्या भावें ती तया हांसती । तयास दिसती अवघीं हरि ।।४।।
हरिला कंसाचा जीव भाव देवें । द्वेषाचिया भावें तुका म्हणे ।।५।।

४५६२
द्वेषाचिया ध्यानें हरिरूप जाले । भाव हारपले देहादिक।।१।।
देहादिक कर्मे अभिमान वाढे । तया कंसा जोडे नारायण ।।२।।
नारायण जोडे एकविध भावें । तुका म्हणे जीवें जाणें लागे ।।३।।

४५६३
जीवभाव त्याचा गेला अभिमान । म्हणऊनि जन हांसे कंसा ।।१।।
सावध करितां नये देहावरि । देखोनियां दुरि पळे जन ।।२।।
जन वन हरि जालासे आपण । मग हे लोचन झांकियेले।।३।।
झांकुनि लोचन मौन्यें चि राहिला । नाहीं आतां बोलायाचें काम ।।४।।

बोलायासि दुजें नाहीं हें उरलें । जन कृष्ण जाले स्वयें रूप ।।५।।
रूप पालटलें गुण नाम याति । तुका म्हणे भूतीं देव जाला ।।६।।

४५६४
जालों स्वयें कृष्ण आठव हा चित्तीं । भेद भयवृत्ति उरली आहे ।।१।।
उरली आहे रूप नांव दिसे भिन्न । मी आणि हा कृष्ण आठवतो ।।२।।
तोंवरि हा देव नाहीं तयापासीं । आला दिसे त्यासि तो चि देव ।।३।।
देवरूप त्याची दिसे वरी काया । अंतरीं तो भयाभीत भेदें ।।४।।
भेदें तुका म्हणे अंतरे गोविंद । साचें विण छंद वांयां जाय ।।५।।

४५६५
वांयां तैसे बोल हरिशीं अंतर । केले होती चार भयभेदें ।।१।।
भेदभय गेलें नोळखे आपणा । भेटी नारायणा कंसा जाली ।।२।।
जाली भेटी कंसा हरिशीं निकट । सन्मुख चि नीट येरयेरां ।।३।।
येरयेरां भेटी युद्धाच्या प्रसंगीं । त्याचें शस्त्र अंगीं हाणितलें ।।४।।
त्याचें वर्म होतें ठावें या अनंता । तुका म्हणे सत्तानायक हा ।।५।।

४५६६
नारायणें कंस चाणूर मर्दिला । राज्यीं बैसविला उग्रसेन ।।१।।
उग्रसेन स्थापियेला शरणागत । पुरविला अंत अभक्ताचा।।२।।
अवघें चि केलें कारण अनंतें । आपुलिया हातें सकळ ही ।।३।।
सकळ ही केलीं आपुलीं अंकित । राहे गोपीनाथ मथुरेसि ।।४।।
मथुरेसि आला वैकुंठनायक । जालें सकळिक एक राज्य ।।५।।
राज्य दिलें उग्रसेना शरणागता । सोडविलीं माता पिता दोन्हीं ।।६।।
सोडवणे धांवे भक्ताच्या कैवारें । तुका म्हणे करें शस्त्र धरी ।।७।।

४५६७
धरी दोही ठायीं सारखा चि भाव । देवकी वसुदेव नंद दोघे ।।१।।
दोन्ही एके ठायीं केल्या नारायणें । वाढविला तिणें आणि व्याली ।।२।।
व्याला वाढला हा आपल्या आपण । निमित्या कारणें मायबापा ।।३।।
माय हा जगाची बाप नारायणा । दुजा करी कोण यत्न यासि ।।४।।
कोण जाणे याचे अंतरींचा भाव । कळों नेदी माव तुका म्हणे ।।५।।

४५६८
दिनाचा कृपाळु दुष्टजना काळ । एकला सकळ व्यापक हा ।।१।।
हांसे बोले तैसा नव्हे हा अनंत । नये पराकृत म्हणों यासि ।।२।।
यासि कळावया एक भक्तिभाव । दुजा नाहीं ठाव धांडोळितां ।।३।।
धांडोळितां श्रुति राहिल्या निश्चित । तो करी संकेत गोपींसवें ।।४।।
गोपिकांची वाट पाहे द्रुमातळीं । मागुता न्याहाळी न देखतां ।।५।।
न देखतां त्यांसि उठे बैसे पाहे । वेडावला राहे वेळोवेळां ।।६।।
वेळोवेळां पंथ पाहे गोपिकांचा । तुका म्हणे वाचा नातुडे तो ।।७।।

४५६९
तो बोले कोमळ निष्ठुर साहोनि । कोपतां गौळणी हास्य करी ।।१।।
करावया दास्य भक्तांचें निर्लज्ज । कवतुकें रज माथां वंदी ।।२।।
दिलें उग्रसेना मथुरेचें राज्य । सांगितलें काज करी त्याचें ।।३।।
त्यासि होतां कांहीं अरिष्टनिर्माण । निवारी आपण शरणागता ।।४।।
शरणागतां राखे सर्व भावें हरि । अवतार धरी तयांसाटीं ।।५।।
तयांसाटीं वाहे सुदर्शन गदा । उभा आहे सदा सांभाळित ।।६।।
तळमळ नाहीं तुका म्हणे चित्ता । भक्तांचा अनंता भार माथां ।।७।।

४५७०
मारिले असुर दाटले मेदिनी । होते कोणाकोणी पीडित ते ।।१।।
ते हा नारायण पाठवी अघोरा । संतांच्या मत्सरा घातावरी ।।२।।
वरिले ते दूतीं यमाचिया दंडीं । नुच्चरितां तोंडीं नारायण ।।३।।
नारायण नाम नावडे जयासि । ते जाले मिरासी कुंभपाकीं ।।४।।
कुंभपाकीं सेल मान तो तयांचा । तुका म्हणे वाचा संतनिंदा ।।५।।

४५७१
वास नारायणें केला मथुरेसि । वधूनि दुष्टांसि तये ठायीं ।।१।।
ठायीं पितियाचे मानी उग्रसेना । प्रतिपाळ जनांसहित लोकां ।।२।।
लोकां दुःख नाहीं मागील आठव । देखियेला देव दृष्टी त्यांणीं ।।३।।
देखोनियां देवा विसरलीं कंसा । ठावा नाहीं ऐसा होता येथें ।।४।।
येथें दुजा कोणी नाहीं कृष्णाविणें । ऐसें वाटे मनें काया वाचा ।।५।।
काया वाचा मन कृष्णीं रत जालें । सकळां लागलें कृष्णध्यान ।।६।।
ध्यान गोविंदाचें लागलें या लोकां । निर्भर हे तुका म्हणे चित्तीं ।।७।।

४५७२

चिंतले पावलीं जयां कृष्णभेटी । एरवीं ते आटी वांयांविण ।।१।।
वासना धरिती कृष्णाविणें कांहीं । सीण केला तिहीं साधनांचा ।।२।।
चाळविले डंबें एक अहंकारें । भोग जन्मांतरें न चुकती ।।३।।
न चुकती भोग तपें दानें व्रतें । एका त्या अनंतेंवांचूनियां।।४।।
चुकवुनि जन्म देईल आपणा । भजा नारायणा तुका म्हणे ।।५।।

४५७३

भजल्या गोपिका सर्व भावें देवा । नाहीं चित्तीं हेवा दुजा कांहीं ।।१।।
दुजा छंदु नाहीं तयांचिये मनीं । जागृति सपनीं कृष्णध्यान ।।२।।
ध्यान ज्यां हरीचें हरीसि तयांचें । चित्त ग्वाही ज्यांचें तैशा भावें ।।३।।
भाग्यें पूर्वपुण्यें आठविती लोक । अवघे सकळिक मथुरेचे ।।४।।
मथुरेचे लोक सुखी केले जन । तेथें नारायण राज्य करी ।।५।।
राज्य करी गोपीयादवांसहित । कर्मिलें बहुतकाळ तेथें ।।६।।
तेथें दैत्यीं उपसर्ग केला लोकां । रचिली द्वारका तुका म्हणे ।।७।।

४५७४

रचियेला गांव सागराचे पोटीं । जडोनि गोमटीं नानारत्नें ।।१।।
रत्न खणोखणी सोनियाच्या भिंती । लागलिया ज्योति रविकळा ।।२।।
कळा सकळ ही गोविंदाचे हातीं । मंदिरें निगुतीं उभारिलीं ।।३।।
उभारिलीं दुर्गें दारवंठे फांजी । कोटी चर्या माजी शोभलिया ।।४।।
शोभलें उत्तम गांव सागरांत । सकळांसहित आले हरि ।।५।।
आला नारायण द्वारका नगरा । उदार या शूरा मुगुटमणि ।।६।।
निवडीना याति समान चि केलीं । टणक धाकुलीं नारायणें ।।७।।
नारायणें दिलीं अक्षई मंदिरें । अभंग साचारें सकळांसि।।८।।
सकळ ही धर्मशीळ पुण्यवंत । पवित्र विरक्त नारीनर ।।९।।
रचिलें तें देवें न मोडे कवणा । बळियांचा राणा नारायण ।।१०।।
बळबुद्धीनें तीं देवा च सारिखीं । तुका म्हणे मुखीं गाती ओंव्या ।।११।।

४५७५

गाती ओंव्या कामें करितां सकळें । हालवितां बाळें देवावरि ।।१।।
ऋद्धिसिद्धी दासी दारीं ओळंगती । सकळ संपत्ति सर्वां घरीं ।।२।।

घरीं बैसलिया जोडलें निधान । करिती कीर्त्तन नरनारी ।।३।।
नारीनर लोक धन्य त्यांची याति । जयांसि संगति गोविंदाची ।।४।।
गोविंदें गोविंद केले लोकपाळ । चिंतनें सकळ तुका म्हणे ।।५।।

४५७६
कांहीं चिंता कोणा नाहीं कोणेविशीं । करी द्वारकेसि राज्य देव ।।१।।
द्वारकेसि राज्य करी नारायण । दुष्ट संहारून धर्म पाळी ।।२।।
पाळी वेदआज्ञा ब्राम्हणांचा मान । अतीतपूजन वैष्णवांचें।।३।।
अतीत अलिप्त अवधियां वेगळा । नाहीं हा गोपाळा अभिमान ।।४।।
अभिमान नाहीं तुका म्हणे त्यासि । नेदी आणिकांसि धरूं देव ।।५।।

४५७७
धरियेलें रूप कृष्ण नाम बुंथी । परब्रम्ह क्षिती उतरलें।।१।।
उत्तम हें नाम राम कृष्ण जगीं । तरावयालागीं भवनदी।।२।।
दिनानाथब्रिदें रुळती चरणी । वंदितील मुनि देव ॠषि ।।३।।
ॠषीं मुनीं भेटी दिली नारायणें । आणीक कारणें बहु केलीं ।।४।।
बहु कासावीस जाला भक्तांसाटीं । तुका म्हणे आटी सोसियेली ।।५।।

४५७८
सोसियेला आटी गर्भवास फेरे । आयुधांचे भारे वागवितां ।।१।।
वाहोनि सकळ आपुलिये माथां । भार दासां चिंता वाहों नेदी ।।२।।
नेदी काळाचिये हातीं सेवकांसि । तुका म्हणे ऐसी ब्रिदावळी।।३।।

४५७९
ब्रिदावळी ज्याचे रुळते चरणीं । पाउलें मेदिनी सुखावे त्या ।।१।।
सुखावे मेदिनी कृष्णाचिये चालीं । कुंकुमें शोभलीं होय रेखा ।।२।।
होउनि भ्रमर पाउलांचें सुख । घेती भक्त मुख लावूनियां ।।३।।
याचसाटीं धरियेला अवतार । सुख दिलें फार निजदासां ।।४।।
निज सुख तुका म्हणे भक्तां ठावें । तींहीं च जाणावें भोगूं त्यासि ।।५।।

४५८०
भोगिला गोपिकां यादवां सकळां । गौळणीगोपाळां गाईवत्सां ।।१।।
गाती धणीवरी केला अंगसंग । पाहिला श्रीरंग डोळेभरि ।।२।।

भक्ति नवविधा तयांसि घडली । अवघीं च केली कृष्णरूप ।।३।।
रूप दाखविलें होतां भिन्न भाव । भक्त आणि देव भिन्न नाहीं ।।४।।
नाहीं राहों दिलें जातां निजधामा । तुका म्हणे आम्हांसहित गेला ।।५।।

४५८१
गेला कोठें होता कोठुनियां आला । सहज व्यापला आहे नाहीं ।।१।।
आहे साच भावें सकळव्यापक । नाहीं अभाविक लोकां कोठें ।।२।।
कोठे नाहीं ऐसा नाहीं रिता ठाव । अनुभवी देव स्वयें जालें ।।३।।
जातों येतों आम्ही देवाचे सांगातें । तुका म्हणे गात देवनाम ।।४।।

४५८२
मना वाटे तैसीं बोलिलों वचनें । केली धिटपणें सलगी देवा ।।१।।
वाणी नाहीं शुद्ध याति एक ठाव । भक्ति नेणें भाव नाहीं मनीं ।।२।।
नाहीं जालें ज्ञान पाहिलें अक्षर । मानी जैसें थोर थोरी नाहीं ।।३।।
नाहीं मनीं लाज धरिली आशंका । नाहीं भ्यालों लोकां चतुरांसि ।।४।।
चतुरांच्या राया मी तुझें अंकित । जालों शरणागत देवदेवा ।।५।।
देवा आतां करीं सरतीं हीं वचनें । तुझ्या कृपादानें बोलिलों तीं ।।६।।
तुझें देणें तुझ्या समर्पूनि पायीं । जालों उतरायी पांडुरंगा ।।७।।
रंकाहुनि रंक दास मी दासांचें । सामर्थ्य हें कैचें बोलावया ।।८।।
बोलावया पुरे वाचा माझी कायी। तुका म्हणे पायीं ठाव द्यावा ।।९।।

४५८३
चारी वेद ज्याची कीर्ती वाखाणिती । प्रत्यक्ष ये मूर्ति विठोबाची ।।१।।
चहुंयुगांचें हें साधन साधिलें । अनुभवा आलें आपुलिया ।।२।।
एवढें करूनि आपण निराळा । प्रत्यक्ष डोळां दाखविलें ।।३।।
दावुनि सकळ प्रमाणाच्या युक्ति । जयजयकार करिती अवघे भक्त ।।४।।
भक्ति नवविधा पावली मुळची । जनार्दननामाची संख्या जाली ।।५।।
नवसें ओंव्या आदरें वाचितां । त्याच्या मनोरथा कार्यसिद्धि ।।६।।
सीमा न करवे आणीक ही सुखा। तुका म्हणे देखा पांडुरंगा ।।७।।


दुर्ग
दुर्गट
मारी



दुर्ग दुर्गट भारी

पुस्तक तिसरे

पन्हाळगड ते विशाळगड

(पावनखिंड विशेषांक)

अर्पणपत्रिका

शिवछत्रपतींसाठी घोडखिंडीमध्ये सर्वस्व पणाला लावून लढलेल्या सर्व ज्ञात-अज्ञात शूर मावळ्यांच्या स्मृतींना समर्पित

॥ पुस्तक तिसरे॥

पन्हाळगड ते विशाळगड

(पावनखिंड विशेषांक)

प्रथमावृत्ती: १५ जुलै २०११

(आषाढ शुद्ध पौर्णिमा)

संपादक: नचिकेत जोशी

ही ई-पुस्तिका विनामूल्य वितरणासाठी असून कोणत्याही स्वरूपात हिची विक्री करण्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

©२०११

ई साहित्य प्रतिष्ठान

जी ११०२, ईटर्निटी

मॅरेथॉन चौक

ठाणे - ४००६०४

सहाय्य: सुनिल सामंत, ओंकार ओक, मधुरा शिधये

या पुस्तिकेतील साहित्याचे व प्रकाशचित्रांचे हक्क त्या त्या साहित्यिकाकडे सुरक्षित आहेत

या पुढील अंक विनामूल्य मिळण्यासाठी आपला ई मेल आय डी कळवा :

durgabhari@gmail.com

या पूर्वीची ई पुस्तके विनामूल्य मिळवण्यासाठी भेट द्या

www.esahity.com

अनुक्रम

❖ आडवाटांचे देणे: नचिकेत जोशी

❖ प्रस्तावना

❖ पन्हाळा ते पावनखिंड: डॉ. सतीश संभाजीराव पाटील

❖ दुर्ग पन्हाळा ते सिंधुसागर: आनंद पाळंदे

❖ पन्हाळगड ते पावनखिंड नकाशा

❖ ट्रेकर्ससाठी उपयुक्त माहिती

❖ ऋणनिर्देश

आडवाटांचे देणे

नमस्कार दोस्तहो!!

रोजच्या धावपळीच्या आयुष्यातून निवांतपणा शोधत डोंगरदऱ्या पालथ्या घालायला सुरुवात करून तुम्हाला अनेक वर्षं झाली असतील. अस्सल ट्रेकरची वर्णने वाचून त्यानुसार स्वत:ला त्यात बसवण्याचा प्रयत्नही करून झाला असेल. मनात आलं की पाठीवर (कायम भरून तयार असलेली) सॅक टाकून भटकणं आता सवयीचं झालं असेल. सगळं जग क्रिकेट मॅच किंवा लग्नसमारंभ अशा मोहमयी गोष्टींत अडकले होते, किंवा थिएटरमधल्या उबदार खुर्च्यांवर बसून थंडगार वातावरणात, अगदी जवळ बसून (कुणाच्या हा प्रश्न तुम्हाला पडला नसणार याची आम्हाला खात्री आहे) वेळ घालवत होते, तेव्हा आपण स्वत: मात्र काय केलं होतं ते आठवतंय ना?

उजाडण्याची वाट बघत रेल्वे प्लॅटफ़ॉर्मवर रात्र काढली होती, वाटेतल्या एखाद्या दगडावरच पाठ टेकवली होतो, सूर्योदय-सूर्यास्ताचे फोटो घ्यायला छाती फुटेपर्यंत कड्याच्या दिशेने धावला होतो, बाहेर पडणाऱ्या पावसाच्या आणि रातकिड्यांच्या किरकिऱ्या म्युझिकच्या साथीने गुहेत ट्रेकी गाण्यांची मैफल भरवली होती. अंधारात, पाऊस तोंडावर झेलत राजांचे मावळे असल्यागत नदी-नाले-चिखलगाळ तुडवला होता (आणि मुक्कामाला पोहोचलो तेव्हा पायातून बूट शेवटी ओढून काढावे लागले होते!)."घरी आराम करायचं सोडून इथे मरायला यायला कुणी सांगितलं होतं" हा प्रश्न जेव्हा जेव्हा पडला होता तेव्हा पुढच्याच वळणावर एखाद्या झऱ्याने, एखाद्या बुलबुल-ससाण्याच्या शर्यतीने, एखाद्या नाजूक फुलाने किंवा आकाशातल्या नक्षत्रांच्या सड्याने त्याचं उत्तर परस्पर देऊन टाकलं होतं.(पुढे पुढे मात्र हा प्रश्न कधी पडलाच नाही!) कुठल्याही ट्रेकमध्ये मिसळ-पाव खाल्ला नाही आणि एकदा तरी निसर्गाच्या सान्निध्यात "दान" केलं नाही तर ट्रेक निष्फळ ठरतो, तसेच ट्रेकमध्ये नैसर्गिक पाणीसाठे सोडून इतरत्र आंघोळ करणे हे पाप असते या विचारांवर निष्ठा ठेऊन राजांच्या जयघोषात कधी तोरणा-राजगड, तर कधी रतनगड-हरिश्चंद्रगड, कधी पन्हाळगड-विशाळगड

तर कधी खांडस-भीमाशंकर अशा वाऱ्या केल्या होत्या! (आणि फावल्या वेळात ट्रेकिंगने आम्हाला काय दिलं, किंवा मी ट्रेक का करतो अशा चर्चांमध्येही सहभागी झालो होतो!)

शहरातल्या रंगीबेरंगी दुनियेपेक्षा सह्याद्रीच्या सहवासातली रंगाची दुनिया अधिक मोहक आणि अस्सल आहे हे आपण केव्हाच स्वत:शी कबूल केलं आहे! आणि म्हणूनच एखादा चित्रपट पुन्हा पुन्हा बघावा तसं दर उन्हाळा-पावसाळा-हिवाळयात त्याच ओढीने आजही तेच किल्ले, तेच उतार, तेच बुरूज, तेच दरवाजे, त्याच कातळ-कपारी, त्याच अवघड पायवाटा आपण तुडवत असतो. अर्थात "सर्व प्रकारचे विरोध" (सूज्ञांस अधिक सांगणे नलगे!) मोडून काढून हे करावं लागतं हे खरंच! पण "हे कार्य" व्हावे ही तो श्रींचीच इच्छा!! कदाचित या ट्रेकिंगमुळेच आपण दैनंदिन जीवनातसुद्धा ट्रेकरच्या खाक्यानेच वागतो. कचरा इकडे-तिकडे टाकत नाही, पाणी जपून वापरतो, खिशात सदैव एक टॉर्च घेऊन फिरतो, कशाशीही काहीही तोंडी लावून खाऊ शकतो, कुठेही adjust करू शकतो, इतर पर्यटनस्थळांच्या ठिकाणी चाललेला थिल्लरपणा पाहून आपलं रक्त खवळतं इ. इ.

"दुर्ग दुर्गट भारी" या नव्या ई-पुस्तकांच्या मालिकेत आम्ही आपल्यासोबत करणार आहोत महाराष्ट्रातल्या परिचित-अपरिचित गडकोटांची ई-यात्रा! आपण नवखे असाल तर मार्गदर्शक म्हणून आम्ही आपल्या सोबत असू आणि अट्टल भटके असाल तर आपल्यासाठी ही जुन्या सदाबहार आठवणींची यात्रा असेल. एका पुस्तिकेत एक-दोन किल्ले, त्यांची ऐतिहासिक, भौगोलिक माहिती, वैशिष्ट्ये, प्रवासाचे तपशील इ सर्व माहितीने परिपूर्ण अशी ही मालिका असेल. दुर्गभ्रमंतीचं एक रेकनर म्हणूया हवंतर! :)

आपल्यासारख्या अट्टल भटक्यांच्या स्वागताला आडवाटाही सजवून सदैव तयार असणाऱ्या आपल्या लाडक्या सह्याद्रीमधल्या दुर्गभ्रमंतीला - चला, निघूया!

- नचिकेत जोशी

(संपादक, दुर्ग दुर्गट भारी)

प्रस्तावना

दोस्तहो नमस्कार!

पाऊस आत्ता कुठे सुरू झालाय असं वाटतंय. आता रानांत गचपण होईल, ओढे-नाले तुडुंब भरतील, शहरात कुंपणाच्या भिंतीवरही पाय सटकावा इतकं शेवाळ साठेल, तर डोंगरातल्या कातळांची काय कथा? सह्याद्रीतला पाऊस आगळाच! तो अनुभवायला तिथेच जायला हवं! पायवाटेवरून चालत असतांना कधी आकाशातून काळी शाल डोईवर पांघरली जाईल कळणार नाही आणि आडोसा शोधेपर्यंत त्या ढगांनी आपल्याला चिंब भिजवूनही टाकलं असेल...

सह्याद्रीतल्या पावसाचं आणि शिवप्रभूंचं नातंही विलक्षण गहिरं! या अशाच तुफान पावसाच्या देखरेखीखाली शिवरायांनी आपले अनेक मनसुबे तडीला नेले. तीनशे एक्कावन्न वर्षांपूर्वी आषाढ पौर्णिमेच्या रात्री सहाशे मावळयांची एक तुकडी पावसाच्या धुमाकुळात, विजांच्या तांडवात पन्हाळगड सोडते काय आणि सतत ८-१० तास धावून, आणि नुसतं धावून नाही तर स्वराज्याचं सगळं भविष्य एका पालखीतून सहीसलामत तात्पुरतं संकटातून बाहेर काढून सोळा कोसांवरचा पांढरपाणी ओढा ओलांडते काय! बरं एवढ्यावरच भागत नाही म्हणून त्यातली अर्धी तुकडी एका पावनखिंडीत कष्टांची परिसीमा ओलांडून, पराक्रमाचा एक अजरामर नमुना पेश करून तीन हजार शत्रूला दोन प्रहर (तब्बल सहा तास) रोखून धरते काय आणि दुसरी तुकडी पुन्हा धावाधाव करून चार कोसांवरचा विशाळगड गाठते काय! सारंच काही अविश्वसनीय आणि प्रचंड अभिमानास्पद, अलौकिक!

१२ जुलै १६६० ची रात्र आणि १३ जुलै १६६० चा संपूर्ण दिवस शिरचरित्रातील अमूल्य म्हणावे लागतील! अनेक अज्ञात शूर मावळयांच्या त्या वाटेवरील बलिदानामुळे पुढे इतिहास घडला. पन्हाळगड-विशाळगड वाटेवरच हरवून इतिहासात कायमचे अदृश्य झालेल्या त्या पराक्रमी मावळयांची नावेही आज आपल्याला माहित नाहीत. म्हणूनच त्यांच्या पराक्रमाचीच आठवण आपण न चुकता काढायची आणि मनोमन त्यांना लक्ष वेळा सलाम करायचा...

आणि म्हणूनच, इतिहासाच्या पानापानात सजून राहिलेल्या महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या ई-भटकंतीमध्ये यावेळी आपण किल्ल्यांची सफर न त्या करता पन्हाळगड-विशाळगड वाटेनेच ई-प्रवास करणार आहोत. या वाटेने महाराजांची पालखी गेली, या वाटेवरून बाजीप्रभूंचा पराक्रम गेला. या वाटेने इतिहास केव्हाच निघून गेलाय... त्या ऐतिहासिक घटनेला ३५१ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आपण केवळ त्या वाटेने इतिहासाचा पाठलाग करणार आहोत...

चला निघूया!

पन्हाळा ते पावनखिंड

लेखक: डॉ. सतीश संभाजीराव पाटील (धुळे)

पूर्वप्रसिद्धी: "मस्त भटकंती" (फेब्रु. २००४)

लहानपणी इतिहासात पन्हाळ्याहून शिवाजी महाराजांची कशा प्रकारे यशस्वी सुटका झाली हे वाचलेलं होतं. पन्हाळयाहून रात्रीच्या अंधारात, मुसळधार पावसात, किर्र जंगलातून खाच-खळगे, चिखल, विंचू , काटे यातून मार्ग काढीत, खांद्यावर स्वराज्याची लेणं असलेली राजांची पालखी सांभाळत जीवाच्या करारानी कसे धावले असतील ते वीर? वर भरीस भर रात्रभर अशा प्रकारे अविश्रांत परिश्रम झाल्यावर जीवावर उदार होऊन, थकव्याची आणि जखमांची यत्किंचितही पर्वा न करता पुढील बारा तास शत्रूवर तुटून पडून महाराज विशाळगडी पोहोचेपर्यंत एकही शत्रू खिंडीच्या पार जाऊ न देण्याची बेमिसाल कामगिरी! आषाढ वद्य प्रतिपदा शके १५८२ म्हणजेच १२ जुलै, १६६० ला हे महानाट्य गजापूर च्या खिंडीत घडलं, असं इतिहासकार सांगतात. त्या दिवशी या महानाट्याचा एकूण एक साक्षीदार मृत्युमुखी पडला आणि गजापूरच्या खिंडीच नाव इतिहासात पावनखिंड म्हणून अजरामर झालं.

हे सर्व महानाट्य ज्या परिसरात घडलं, त्या मातीवर आजही आपण पाय ठेवले तर तीच रोमहर्षक अनुभूती होईल का? वातावरणात ती धीरगंभीरता - तो त्वेष - ती जिद्द मनाला स्पर्शून जाईल का, असं लहानपणापासूनच वाटायचं. कामाच्या व्यापातून व वयक्तिक जबाबदार्‍यातून मुद्दाम वेळ काढलाच पाहिजे. हाही योगच. परंतु मुख्य म्हणजे नेमक्या मार्गांनी जाण्यासाठी योग्य मार्गदर्शकही हवाच. ती वाट पाहत असतानाच एक दिवस जुलै च्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्र टाईम्सला बातमी वाचली, 'दरवर्षीप्रमाणे संह्याद्री प्रतिष्ठान कोल्हापूरतर्फे पन्हाळगड ते पावनखिंड यात्रेचं आयोजन. पदभ्रमण,प्रवास, पावसाळी पर्यटन. ट्रेकिंग वा गिरीभ्रमण अशा प्रकारे या मोहिमेला संबोधलं तर तो त्या वीर मावळयांचा नकळत अपमान केल्यासारखं होईल. पश्चिम महाराष्ट्रातील मंडळी या मोहिमेशी परिचित असतीलही, पण खानदेश व एकंदरीतच उत्तर महाराष्ट्र आणि मला तर वाटते बऱ्याच अंशी इतरही महाराष्ट्रातील मंडळीना असे काही आयोजन दर वर्षी होत आहे हेही माहित नसावं.

३४३ वर्षापूर्वी या मोहिमेवर निघालेल्या महाराजांसह सर्वांनाच म्हणजे नरवीर बाजीप्रभू, त्यांचे बंधू फुलाजी, वीररत्न शिवा काशिद व ६०० मावळे यांना कल्पना होती, की वेढा फोडून विशालगडाकडे जाताना पकडले गेलो तर मृत्यू हमखास आणि नाही पकडले गेलो तरी हजारोंच्या संख्येने सिद्दी जौहर चालून आल्यावर एकाने १०-२० शत्रूंना मारले तरी ६०० मावळे किती टिकाव धरणार? म्हणून ध्येय होतं ते फक्त महाराजांना विशाळगडी सुखरूप पोहचवण्याचंच.

या मोहिमेतला पहिला मनाच्या मुजऱ्याचा मानकरी अर्थातच शिवा काशिद. बाजीप्रभूंना राजे स्वतः बाजीकाका संबोधत. वयाने व अनुभवाने परिपक्व असा हा बांदल योद्धा अतिमुत्सद्दी व युद्धकलानिपुण व कल्पक होता. त्या मुत्सद्दीपणा बरोबरच स्वामीनिष्ठाही तीव्र होतीच. ठेवण व बांधा राजांसारखा असल्याने शिवा काशिदची पालखी राजांच्या पालखीसोबत तयार करून सिद्दीच्या फौजांना काही काल तरी हुलकावणी देण्याचा विचार बाजी व इतर मानकर्यांचा. राजांनी अर्थात त्यास मोडता घातला ,पण एकदा ही संकल्पना कानावर पडल्यावर शिवा काशिदचा निग्रह पक्का झाला. कमी आयुष्य पाहिलेला आणि उपभोगलेला शिवा काशिद राजे विशाळगडी सुखरूप पोहोचावेत म्हणून आपलं सर्व आयुष्य पणाला लावायला तयार झाला - नव्हे तो त्याच्या दृष्टीने इतिकर्तव्यतेचा क्षण होता. हा बेत ठरल्यावर तो रद्द करण्यास त्याने साफ नकार दिला. क्षणभर का होईना शिवाजीराजे म्हणून जगण्यात आणि राजांसाठी मरण पत्करण्यात त्या वीराने धन्यता मानली.

विशाळगडाकडे वाटचाल करीत असता सिद्दी जौहर च्या सैन्याने गाठल्यावर मरू किंवा मारू असा सर्वांनी मिळून लढा देण्याची कल्पना शिवारायांचीच, पण त्यांनाही प्रश्न पडला होता की माझ्या जीवाला जीव देणारी हि प्रत्येक व्यक्ती - मी ह्यांना वाऱ्यावर सोडून स्वताचा जीव कसा वाचवू? राजाचं मोठेपण इथेच दिसत. पण बाजीप्रभूंचाही निश्चय होता, लाख मेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा जाता कामा नये. त्याक्षणी मोहिमेची सर्व सूत्रे त्यांनी स्वताकडे घेतली आणि प्रेमाच्या अधिकाराने राजनच आज्ञा केली, - आपण ३०० मावळे घेऊन विशाळगडाकडे निघावे, इथला संग्राम मी सांभाळणार, यात काहीही बदल होणार नाही! हा क्षण महत्वाचा होता. या ठिकाणी राजाचं काही बरंवाईट झाला असतं तर त्या क्षणापर्यंत युवा

अवस्थेत असलेलं मराठा साम्राज्य लयाला गेलं असतं. या घटनेनंतर आग्र्याची कैद व सुटका या दरम्यान जवळ जवळ १२ वर्षांचा मोठा कालखंड शिवरायांना मिळाला, दौलतीची उभारणी करायला! तेंव्हा जाणवते शिवा काशिद, बाजी, फुलाजी आणि सर्व मावळे यांच्या बलिदानाने महाराष्ट्राला काय दिलं ते!

अशा ह्या महानाट्याचे आपण साक्षीदार नव्हतो - पण निदान त्या मार्गावरून त्या मातीतून त्या वातावरणातून त्या हौतात्म्याच्या दिवशी आपण जातो हि जाणीवच किती रोमांचकारी आहे. याच जाणिवेतून मी संह्याद्री प्रतिष्ठानच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. आणि १२ जुलैला पन्हाळयाला गेलो. योगायोगाने ३४३ वर्षानंतर आषाढ वद्य प्रतिपदा इंग्रजी कालगणनेनुसार त्याच दिवशी होती. या मोहिमेत आम्ही एकूण ४०० -४५० जण होतो. माझ्या समवेत पन्नाशीच्या वरील दोन तीन जण, पन्नास ते साठ जण ३५ ते ५० पर्यंतचे, १०० ते दीडशेजण १५ ते ३५ वायोगातले व उरलेले सर्व १२ ते १५ वयातील शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनी.एकूण अंतर ६२ ते ६५ कि.मी. पहिल्या दिवशी साधारण ३५ किमी व दुसर्या दिवशी उरलेला प्रवास असा कार्यक्रम होता. सोय म्हणून हि महायात्रा रात्री अंधारात सुरु न होता सकाळी ९ वाजता सुरु झाली. १०० रुपये नाममात्र नोंदणी फी होती. भाले, तलवारी, पट्टा, ढाल अशी मैदानी खेळांची प्रात्यक्षिके झाल्यावर प्रथम मानवंदना झाली ती अर्थातच शिवा काशिद ह्यांच्या समाधीस्थळी. तिथून बाजीप्रभूंच्या पुतळयाजवळ मानवंदना झाली.आणि मग सुरवात झाली ती त्या रोमांचकारी यात्रेची. वरून पाऊस, खाली डोंगर दऱ्यातील खाच खळगे, चिखल, नाले, ओढे, विंचू-काटे, जळवा मधेच भाताची खाचर, निसरड्या वाटा, दमछाक करणारे चढ, नैसर्गिक जंगल तसंच लागवड केलेलं जंगल असा यादगार अनुभव...

पन्हाळयाभोवतीचे मेटे चुकवून शत्रूला गुंगारा देऊन महाराज याच मार्गाने गेले. राजदिंडी कडून गड उतरल्यावर ३-४ कि.मी. सरळ अंतर गेल्यावर लागतो तो खडा डोंगर कडा. तो चढून जागृत देवस्थान. पठार संपल्यावर तो डोंगर उतरून पुन्हा नवीन डोंगराच्या कधी चढ कधी उताराने व कडे कडेने प्रवास. रस्ता असा नाही. मध्ये ८-१५ घराच्या दोन तीन छोट्या वाड्या पायाखाली एकतर दगड-गोटे नाहीतर गुडघ्यापर्यंत पाय रुतेल एवढा चिखल -

त्यात पाय पडल्यावर उचलताना बूट चिखलात आणि नुसताच पाय वर निघायचा. या गोष्टींची नेहेमीची सवय नसल्याने इथपर्यंतच अंगातलं त्राण नाहीसं होतं. पण मनातली उभारी वाढत जाते. दुपारपर्यंत न थांबता चालत तर अडीच तीनवाजेपर्यंत कुंभारवाडी, खातेवाडी, मंडलोईवाडी, करणेवाडी मार्गेआंबेवाडी, आल्यावर जेवणाचा कार्यक्रम आटोपला. वरून पाऊस खाली चिखल तेंव्हा थोडा घरांचा आडोसा पाहून हातात भाकरी - दशमी पोळी -भाजी जे काय होते तसे घेऊनच जेवण.

पुढचा मार्ग जवळ जवळ सारखाच, मात्र आता अंधार होण्याच्या आतमध्ये येणारे २-३ किमी चं मागच्यांना हली देणं आणि त्यांनी आपल्या मागच्यांना हाका मारणं असा क्रम. झपझप पाय उचलले तर अंधार होतं होतं माळवली धनगरवाडीपर्यंत मार्गात मुक्कामाला थांबता येतं. झोपडी वजा झापाची घरं - आतून शेणाने सारवलेली. त्यात विसाव्याला थांबल्यावर लक्षात येतं ते पायाला गोळे येणं म्हणजे नेमकं काय! डोंगराच्या उतारावरून वाहणारं पाणी पाईपलाइनद्वारे आणून सरकारने या झोपड्यांसमोर नळ दिले आहेत त्यांना पावसाळ्यात चोवीस तास वाहत पाणी.

माझ्यासारख्या धुळयात राहणाऱ्या आणि कधी कधी दिवसच्या दिवस नगरपालिकेच्या नळाच्या पाण्यावाचून काढलेल्या व्यक्तीला ही पर्वणीच होती. इथे राहणारी माणस कामसू - सहकार्यास तत्पर, अतिशय गरीब आणि त्याहीपेक्षा मनाने श्रीमंत. जेवण संयोजाकांतर्फेच होतं. गरम भात आणि आमटी - आम्हाला आम्ही उतरलेल्या झोपडीतल्या माउलीने गरम पिठलं आणि तांदळाची भाकरीही दिली. पहाटे उठून आवरल्यावर नाश्ता होता तो घेऊन पुन्हा वाटचाल सुरु. दुपारपर्यंत म्हसवड, माजवाड ह्या तुलनेने खेडेवजा तीस - चाळीस उम्बरठ्यांच्या गावमार्गे पांढरेपाणी ह्या महत्वाच्या टप्प्यापर्यंत आम्ही पोहोचलो.

याच ठिकाणी आपल्या राजाचे सर्व अधिकार स्वताकडे घेत बाजींनी शिवारायांनाच ३०० मावळयांसह विशाळगडाकडे जाण्याची एक प्रकारे आज्ञाच केली, अन्यथा आपल्या सहकार्यांवरील प्रेमामुळे राजे तेथून जाण्यास तयारच नव्हते. इथूनच पावनखिंडीचा संग्राम सुरु झाला. पांढरेपाणी ते बाजी-फुलाजी व अखेरचा मावळ धारातीर्थी पडला तेथपावेतो ३-४ किमी डोंगराची घळी म्हणजे पावनखिंडीचा परिसर - ती काही एक चिंचोळी जागा नव्हे हे तिथे गेलं

आणि पाहिलं म्हणजे लक्षात येतं. पांढरेपाणी येथे चौके ओढा म्हणून ओढा आहे व घळीच्या शेवटी कासारी नदीचा उगम आहे.

दुपारचं जेवण आटोपून जेंव्हा खिंडीच्या शेवटी पोहोचलो तेंव्हा चार वाजले होते. साडेचार - पाचच्या सुमारास खिंडीत उतरलो तेंव्हा पाऊस चालूच होता. ज्या जागी बाजींनी आपला शेवटचा श्वास घेतला असावा तिथे मानवंदना झाली. संयोजकांपैकी डॉ अमर अडके (आयुर्वेद विशारद) यांची तिथे श्रद्धांजलीकारिता पायी येण्याची ती सव्विसावी वेळ होती. त्यांनी काही औचित्यपूर्ण शब्दात सर्व घटनाक्रम डोळयापुढे उभा केला. या दोन दिवसांच्या यात्रेने आत्मिक समाधान मिळालं तो आनंद काय सांगावा?

आनंद पाळंदे हे महाराष्ट्राच्या गिर्यारोहणा क्षेत्रामधील एक आदराने घेतले जाणारे नाव! सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यामधून फिरणाऱ्या प्रत्येक भटक्यापाशी आनंद पाळंदे यांचे "डोंगरयात्रा" हे पुस्तक असणारच. त्याखेरीज त्यांची दुर्गभ्रमंतीवरील इतरही अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी "आव्हान" या पुस्तकामध्ये पन्हाळा ते सिंधुदुर्ग या भटकंतीवरील "दुर्ग पन्हाळा ते सिंधुसागर" हा लेख आहे. त्या लेखाचा काही भाग खास "दुर्ग दुर्गट भारी"च्या वाचकांसाठी आनंदसरांच्या परवानगीने प्रसिद्ध करत आहोत –

दुर्ग पन्हाळा ते सिंधुसागर

आषाढातली शुद्ध पौर्णिमा अन तरीही पन्हाळगड दाट काळोखात बुडुन गेला. पावसाळयाचे दिवस होते. आकाश मेघांनी झाकोळून गेले होते. कडाडणा-या विजा, गस्त घालणा-या पहारेक-यांच्या ललका-या तेवढया निरव शांततेचा भंग करीत होत्या. बाकी सर्वत्र काळोख अन शांतता यांचे साम्राज्यॐ ही होती शके १५८२ च्या आषाढातली काळोखी रात्रॐ

गडाचा दरवाजा हलकेच उघडला गेला आणि सहाशे धिप्पाड सावल्या अंधारात विलिन होऊन कितीतरी दूरवर निघून गेल्या.

साक्षात पारतंत्र्य सिद्दी जौहरच्या रूपाने गडाला गराडा घालून बसले होते. छावणीत मशालींचे जाळे पसरले होते. पहारेकरी निद्रेच्या गोड गुंगीत होते आणि एकाएकी छावणीत एकच गदारोळ उठला,

"भागो ऽ दौडो ऽ भाग गया ऽ"

"शिवाजी ऽ शिवाजी ऽ"

मी झटकन जागा झालो ते याच गलक्याने.नुकतेच कुठे उजाडत होते.साथी शिलेदारही उठून बसले होते.सामानाची बांधाबांध चालली होती.एकदम लक्षात आले की, पन्हाळगडावरच्या सोनाळे तळयाशेजारील दत्त मंदिरात आम्ही आदल्या दिवशी डेरेदाखल झालो होतो.सात दिवसांचा प्रवास मनात योजला होता.थेट सिंधुसागरापर्यंत.

इतिहाससंशोधक श्री.मु.गो.गुळवणी यांच्यासोबत सोनाळे तळे सोडले.पन्हाळयाच्या इतर घरांवर अजून झोपेची झापड होती तोच राजदिंडी मागे टाकून ही दिंडी व पुसाटीचा बुरूज यामधील तटातल्या वाटेपाशी आलो.श्री.गुळवण्यांच्या आपुलकीची जाणीव मनात ठेवून गडाबाहेर पडलो.समोर म्हसाई पठार व खाली तुरूकवाडी दिसत होती.धावतच खाली उतरण्यास सुरूवात केली.

आम्ही पुढे धावत होतो पण विचार मात्र पूर्वीच्या बुलंद वेढयात शिरले.शके १५८२च्या चैत्री पाडव्याला गडावर दाखल झालेले शिवछत्रपती ४॥ महिने त्या मृत्युमिठीत अडकले आणि मग एका रात्री आदिलशाही फौजेच्या वेढयातून महाराज सहाशे मावळयांसह बाजीप्रभूच्या सांगातीने ऐन पावसाळयात विशाळगडास निसटले.ते ज्या मार्गाने गेले असावेत जवळजवळ त्याच मार्गाने आम्ही पुण्याचे सहाजण आता उन्हाळयात चाललो होतो.जंबोजेट युगातले एक वेडे साहस.

भानावर आलो तेव्हा पुसाटीचा बुरूज मागे पडला होता आणि त्याबरोबर पन्हाळाहीॐ तुरूकवाडीच्या अलीकडून उगवतीकडे पाठ करून म्हसाई पठाराची चढण चढण्यास सुरूवात केली.महाळुंगे गावातून थोडयाच वेळात पठारावर आलो.कसोटी क्रिकेटचे मैदान सहज सामावू शकेल असे हे मोठे पठार आहे.सर्वत्र काळा खडक.पश्चिमेस एक पांढरा ठिपका दिसतो.हेच म्हसाईचे देऊळ.आकाश स्वच्छ असेल तर पन्हाळयाच्या पुसाटी बुरूजावरूनही हे दिसू शकते.

उगवतीला प्रकाश शलाका झोपेतच होत्या.डावीकडची वाट सोडून म्हसाईच्या पठाराच्या दिशेचे चालायला सुरूवात केली.मी, अजित पंडित, वसंत जोशी असे आघाडीवर तर श्रीकांत प्रभुणे, प्रकाश जोशी, सुरेश मराठे हे पिछाडीस होते.डावीकडे खोल दिसणारे कासारीचे हिरवे खोरे न्याहाळत सुमारे दीड तास चालीनंतर एक मोठे खिंडार पार केले व पन्हाळयापासून ८ कि.मी.अंतरावरील म्हसाईचे देऊळ सामोरे आले.पठाराच्या दक्षिण कडयावरील या देवळात एक अंगात आलेली बाई घुमत होती - हुं हुं हुं ऽ ऽ ऽ. म्हसाई देवळाच्या दारातून साधारण उत्तरेला दृष्टी टाकली तर दूरवर एक लाकडी खांब दिसतो.तो आम्ही जवळ केला.पुढे एक कोरडे तळे मागे पडले आणि एका ओढयाच्या घळईत खोदलेली ‘पांडवदरा लेणी’ दृष्टीस आली.ही बुद्धकालीन लेणी अर्धवर्तुळाकृती असून,आठ छोटया व दोन मोठया गुहा आहेत.एका गुहेत घुमटाकार ‘दघोबा’

असून हा बुद्धाचे प्रतीक म्हणून बांधलेला असतो.लेण्याची पडझड बरीच झाली होती.कोरीव काम मात्र अजिबात नाही.

पांडवदरा सोडले तेव्हा मनगटी घडाळयाने नऊ दर्शवले.तासभरात वाटचालीनंतर पुन्हा एक खिंडार लागले.येथूनच उजवीकडे खाली उतरून कुंभारवाडीवरून पठार डावीकडे ठेवून पुढे जायला हवे.पण चुकुन वाट संपली असतानाही आम्ही काटया - कुटयांनी खरचटत दीडशे मीटर उंचीच्या सरळ कडयावर उभे ठाकलो.खालची तांबडया मातीची शेते अन कासारीचे खोरे यांनी मनाला तजेला दिला.

कडयाच्या काठाकाठाने पुढे निघालो आणि कुंवारखिंड दिसू लागली.ही खिंड मोठी गमतीदार आहे.एकावर एक ठेवून रचावे तशी ताशीव खडकांच्या माळाच्या माळा इथे दिसतात.

उत्साहाने पुढे गेलो.पण एक तुटलेला कडा,सामोरा आला.थोडे मागे फिरलो तो वाट गवसली असे वाटले.पण क्षणभरचॐ कारण, पठाराच्या थोडया खालच्या अंगाने गेल्यावर पुन्हा एका कडयाने आमचा मार्ग अडवला.

आता मात्र आमचे धाबे दणाणले.खाली शेतात माणसे दिसत होती,पण अंगठयाएवढी.आम्ही ओरडून - आरडून त्यांचे लक्ष वेधले पण आमचे व त्यांचे आवाज यांनी दरी

नुसती घुमत होती.सरळ तसेच पुढे कुंवारखिंडीत जायचे म्हणजे चक्क कडेलोटच.किंचीत मागे वळलो.एक पावसाळी धबधब्याचा कडा दिसत होता.मोठाल्या शिळा थेट खालपर्यंत पहुडल्या होत्या.सरळसोट कडाऊ मनातला धाडसी विचार एकदम अमलातही आणला व दोन कि.मी.मागे जाण्याचा मरीआईचा फेर चुकवून हा वेताळाचा कडा धडपडत, ठेचकाळत, पसरत आणि खरचटत खाली उतरलो.हा कडा उतरण्यास तब्बल पाऊण तास गेला.पण सफरीत एक आगळेच 'थ्रिल' निर्माण झाले.

काही काळातच शेतात पोहोचलो.रामराम करून चौकशी केली तो कळाले की, ती माणसे कुंभारवाडीतलीऊ सूर्य माथ्यावर येऊ पाहात होता.सायंकाळपर्यंत निदान 'पाटेवाडी' तरी गाठावयाची होती.अन वाटेत तर अजून कितीतरी वाडयाऊ ठरवले की कितीही वाजू देत, करपेवाडीशिवाय पोटपूजा करावयाची नाही.

कुंवारखिंडीच्या उजवीकडून तिला पाठीमागे टाकून चापेवाडीत किंवा खोतवाडीत शिरलो.कुंवारखिंड एक कुंवारी देवीची मूर्ती आहे.पूर्वी कधी काळया खांबातून एक कुमारी स्त्री नाहीशी झाली असे सांगतात.

शास्त्रीय परिभाषेत कुंवारखिंडीत आढळणा-या खडकांस असिताश्म स्तंभ ह्यभसुल्त छेलुम्स्ह म्हणतात.लाखो वर्षांपूर्वी लाव्हारस थंड होत असताना काही विशिष्ट तापमानात

रसाच्या तळापर्यंत जोड निर्माण होऊन वरील प्रकारचे स्तंभ निर्माण झाले.मुंबईतील अंधेरीलाही अशा प्रकारचे स्तंभ आहेत.

चापेवाडीनंतर पिशवीच्या धनगरवाड्यावरून आम्ही पुढे निघालो.कुंवारखिंड मागे पडत होती आणि आमच्या डावीकडची डोंगररांगही सतत लांबलांब वाढत होती, हनुमंताच्या शेपटासारखीॐ करपेवाडी तर अजून कितीतरी दूर होती.

सुमारे २० किलोमीटर चालणे झाले होते.दुपारचे कडकडीत ऊन व चढ उताराचा रस्ता यांनी आपले दात दाखवायला सुरूवात केली.पाय जड होऊन रेंगाळले.आमचे आपोआप दोन गट होऊन एक गट मागे पडला.साधारण २-२॥ च्या सुमारास मांडलाईवाडी आली.तिथल्या मधुर व थंड पाण्याची चव घेऊन पुढे निघालो.आता दोन वाटा फुटल्या, दोन्ही ब-यापैकी बैलगाडीचे रस्ते.संभ्रमात पडून आम्ही नेमके डावीकडच्या चढणीला लागलो ह्यखरे म्हणजे करपेवाडीला जाणारी वाट उजवीकडची, खालच्या अंगाने जाणारीह.तासभरात करपेवाडीला पोहचू असा अंदाज होता.पण बराच वेळ गेला तरी तिचा मागमूस लागेना.

आता निसर्गाचे भेसूर रूप जाणवू लागले.चहूकडे किर्र रान, रखरखीत ऊन. जवळजवळ २ तास मनुष्यवस्तीचा

पायरव नाही.मोठाली गावे कितीतरी दूरॐ आमच्या सवंगड्यांचा तर पत्ताच नव्हता.इतक्यात नवल वर्तले.दूरवर दोन परकरी मुली व त्यांचा भाऊराया जाताना दृष्टीस पडले.इतक्या वेळाच्या निर्मनुष्य प्रदेशामुळे ६ फुटी पंडीतने एकदम पुढे होऊन जोरात हाळी दिली.रानातल्या भीषण शांततेला चिरीत तो आवाज दूरवर गेला आणि आगीतून फुफाटयात सापडलो.डोंगरातून हिंडणा-या तीन भुतांच्या कल्पनेने त्या मुली विलक्षण भयानक रीतीने किंचाळत नाहीशा झाल्या.मनात आले की,जर का यांचे दादा-बाबा आले आणि गैरसमजूतीने कु-हाडी अंगावर पडल्या तरऋ तर कायऋ या भयाण रानात हाडसुद्धा सापडणार नाही कोणालाॐ पुढे आमच्या नावे वीरगळाचे धोंडे उभारायचे तरी नेमक्या जागेवरून संशोधकात वादच होतील.आता पन्हाळा पण नाही अन विशाळगडॐ तो तर नाहीच.संपलच सारं.

पण पुढचा क्षण सुटकेचा आनंद घेऊन आला.झाडीतून मुंडाशी बांधलेली डोकी वर आली.त्यांनी विशेष गैरसमज करून न घेता वाट दाखवली.धडधडणारी हृदये शांत झाली.दूर पाठीमागं एक गाव दिसत होते.त्राण नसतानाही धावतच ते गाव गाठले.करपेवाडीच होती तीॐ आमचे मागचे तीन वीरही भरकटत करपेवाडीस दाखल झाले.पन्हाळयापासून २५ कि.मी.अंतरावर आम्ही पोहोचलो होतो.या सगळया गोंधळात सांजावले होते.विठ्ठलराव जाडगे यांच्या घरी पथा-या पसरल्या.रात्री स्वप्ने पडत होती - जंगलांची, ओढया-नाल्यांची, विशाळगडच्या द-या खो-यांची.

जाग आली ती जात्याच्या घर्रघर्र आवाज आणि गोड ओव्यांनी.सफरीचा आज तिसरा दिवस.तुकाराम जाडग्यांना बरोबर घेऊन करपेवाडीचे अंगण सोडले.भातखाचरातल्या वाटेने आंबेवाडीतून पुढे गेलो.प्रभात समयीची काहीशी गार व कुंद हवा.डोंगरी वा-याचा मंद झुळकांतून येणारा गोड सुवास, यातूनच मार्ग काढीत कळकवाडी,रिंगेवाडी,माळेवाडी अशा पाठोपाठ तीन वाडया मागे टाकत पाटेवाडीत पाऊल ठेवले.करपेवाडी-पाटेवाडी हा दोन तासांचा रस्ता.

वाटेतील वाडयांची रचना एकसारखीच. फणस, आंबे, जांभळी यांनी वेढलेली तांबडी कौलारू घरे आणि अधूनमधून फरसबंद रस्ता.आधुनिक विश्वाच्या था-याला न उभ्या राहणा-या या वाडयांचे सौंदर्य आगळेच.

निसर्गाचे रौद्र पण मनोहर रूप आता जाणवू लागले.पाटेवाडीतून बाहेर पडताच दूरवर एक धनगरवाडा दिसतो.यापुढचा मार्ग नवख्यांना वाटाडयाशिवाय सापडायचा नाही.कारण दाट रानतले ओढे,नाले आणि दिशाहीन वाटा.वाट चुकली तर भरकटण्याशिवाय गत्यंतर नाही.कौरवांनी उभारलेला चक्रव्यूहच जणू.

हा चक्रव्यूह छेदीत मन एकदम मागे गेले. अभिमन्यूरूपी शिवछत्रपती ३०० वर्षांपूर्वी या चक्रव्यूहातून पावसाळयात कसे निसटले असतील शत्रू घोडयावरून जोरदार पाठलाग करतोय. कवींद्र परमानंदाने शिवभारतात

वर्णन केल्याप्रमाणे शिकांच्या योगे उंचसखल झालेला.पर्व ताच्या तुटलेल्या कडयांवरून पडताना गर्जना करण्या-या नद्यांच्यायोगे अतिदुर्गम झालेला, निळया शेवाळयाच्यायोगे जांघडभर चिखल साठलेला, पालवीच्यायोगे चकचकीत दिसणा-या लतावेलींनी ज्याच्यावरील वृक्षांना वेढले आहे.तुफानी पर्जन्यामुळे धांदल उडालेल्या वाघांची गर्दी ज्यांच्यातील गुहांमध्ये झाली आहे, वारूळातून बाहेर पडणा-या सर्पांना मारण्याच्या त्वेषाने, इच्छेने धावणा-या मोरांच्या टाहोंनी भरलेला आणि मनुष्याचा संचार नसलेला असा भयंकर मार्ग सात प्रहरात ह्य२१ तासह उल्लंघून जाणे अग्निदिव्यापेक्षाही बिकट होते.धन्य धन्य त्या बाजीप्रभूची आणि मर्दमावळयांची.

इतिहासगंगेत हरवून जाऊन ओढेनाले ओलांडीत सुकामाच्या किंवा पणुंद-यांच्या धनगरवाडयांवर कधीच पोचलो.या वाडयांतुण एक मधली वाट पांढरपाण्याला आहे.पण तिथे अतिशय दाट रान.ती सापडणार नाही म्हणून जरा लांबच्या वाटेने निघालो,पण एक मोठा ओढा ओलांडून पुढे रानात शिरताच वाट गडप.वाटाडेसुद्धा चक्रावून गेले.थोडा वेळ भरकटून कुठल्याती अंतःप्रेरणेने एक वाट धरून म्हसवडे गाठले.विश्रांती घेऊन पुढे निघालो.मानवाडयावरून मलकापूरईअणुस्कुरा एसटी रस्ता जवळ केला आणि थोडयाच वेळात पांढरपाण्याने पांढरे निषाण दाखवले.पांढरपाणी पन्हाळयाहून सुमारे ४0-४१ किलोमीटर येईल.

तुकाराम जाडग्यांच्या अकृत्रिम निरोप घेतला.पांढरपाण्यात रामचंद्रराव हेगीष्टे यांचा स्नेह संपादून बाहेर पडलो.कडकडीत उन्हाळयातल्या मृगजळात धनगरवाडा उठून दिसत होता.पाऊल वाटेने एक चढण चढून धनगरवाडयात शिरलो.या वक्ताला वाडयात बाप्ये माणसे भेटणे कठीणच.घोडखिंड गवसायची नाही म्हणून सखुबाई कातर या धनगरणीस विचारलं.ती पटकन म्हणाली, “चला मी दावतो वाट तुमास्नी, अगदी गजापूरचा मोहरा दिसेपर्यंत सोडतो.” इथली बायामाणसंही पुरूषीच बोलतात.

रान सुरू झाले आणि एका अनोख्या संवेदनेने मन भरून आले.इथून पुढचा प्रदेश रणभूमीचा.गजापूरच्या घाटातील घोडखिंड ह्यपावनखिंडह इथलीच.इथेच ते झुंज लढले.एका ठिकाणी फरसबंदी वाट लागली.हीच जुनी ऐतिहासिक वाट असावी.रानातली सपाटी संपली आणि घोडेमाळचा उतार सुरू झाला. बरेच खाली उतरलो व एका ओढयात शिरलो.पाण्यात पावले चुबुक चुबुक वाजवीत ओढा वाहत होताा त्या दिशेने निघालो.झाडीच्या गचपणातून ओढा खोल उतरत गेला होता अन काही वेळातच आम्ही एकदम ओढयालगतच ६-७ मीटर उंचीच्या कडयावर येऊन उभे राहिलो.पावनखिंड.

तिथले दृष्य पाहून मन थरारले.झाडीने झाकलेला खोल उतरत जाणारा कासारी नदीचा ओढा, त्यातल्या अजस्त्र शिळा,दोन्ही बाजूचे ३० मीटर्स उंचीचे ताशीव कडे,असे दृष्य

इंग्रजी बोलपटातच असू शकते ही कल्पना क्षणार्धात धुवुन निघाली.झाडाच्या मुळीला धरून कसेबसे तो कडा उतरलो.पालापाचोळा अन अजस्त्र शिळांचा खच पडला होता.पण काशारी नदीचा ओढा इथूच वाहतो.गोड, थंडगार पाणी.ते अमृततुल्य जल प्राशन करून खिंड न्याहाळली.

वाट अरुंद, अवघडॐ ह्यकिंबहुना वाट नाहीचह. खिंडीच्या तोंडाशी एक उंच कडा आहे.पावसाळयात येथून प्रचंड वेगाने पाणी वाहत असणार.हा ओढा केरूमणवाडीस उतरत जाऊन त्याला काशारी नदीचे स्वरूप पुढे आलेले आहे.या खिंडीत उभे राहून वरच्या बाजूने येणा-या शत्रूशी लढणे तेथील परिस्थिती पाहता अशाक्यच वाटते. घोडखिंडीसंबंधी ज्या एकमेव एक्कयाण्णव कलमी बखरीतून उल्लेख आलेला आहे, तो सध्या प्रचलित असलेल्या पावनखिंडीच्या भौगोलिक परिस्थितीशी जुळेलसा वाटत नाही.तेव्हा झुंज झाल्याची खिंड नेमकी हीच असा संभ्रम येथे आल्यावर प्रत्येकाच्या मनात निर्माण होईल असे वाटते.हा वादाचा मुद्दा सोडला तर ती अविस्मरणीय झुंज याच परिसरात कुठेतरी गजापूरच्या घाटी झाली हे निश्चीत.

शाके १५८२ च्या आषाढातील वद्य प्रतिपदेला झालेल्या त्या बाजीप्रभूंच्या अविस्मरणीय झुंजीचा प्रसंग मनाच्या गाभ्यातून काही काळ वर उफाळून आला.हिंदवी स्वराज्य प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णू करण्यासाठी बाजीप्रभू देशपांडे

पायातील पत्थर बनले.अमर झालेॐ एक छोटंसं 'पावनखिंड स्मारक' इथे उभारलं आहे.

सपाटीवरून गजापूरच्या दिशेने निघालो.मनात असं आलं की, खरोखरच ही रणभूमी प्रत्येकानं पायी न्याहाळली पाहिजे.सुमनांजली वाहून भूमीची माती कपाळी लावली पाहिजे.

गजापूरचा मोहरा दिसल्यावर सखूबायला निरोप दिला.बरेच खाली उतरल्यावर कासारी नदी ओलांडली आणि केरूमणवाडी - विशाळगड एस टी रस्त्यावरून गजापूरला श्री.गणपतराव सिनकरांकडे दाखल झालो.द-याखो-यातून पायी भटकंती करून विशाळगडाकडे जाणा-यांनी खुशाल गणपतरावांच्या घरात पाऊल ठेवावे.तिथे अशा वीरांसाठी सदैव स्थान असते.त्यांचा पाहुणचार घेऊन गजापूर सोडले आणि ३ किलोमीटर अंतरावरील विशाळगडाकडे मोहरा वळविला.गडाचे दर्शन लांबून होत नाही हे याचे वैशिष्टयच म्हणावे लागेल. सूर्यनारायण मावळतीकडे झेपावत होता. सावल्या लांबत चालल्या होत्या. त्यामुळे थकल्याभागल्या पावलांनी चालून विशाळगडा समोरच्या पठारावर आलो आणि थोडयाच वेळात गडाच्या अक्राळविक्राळ कडयांचे दर्शन घेत, मधली खोल दरी ओलांडून, पन्हाळगड ते विशाळगड ही पन्नास किलोमीटर अंतराची वाटचाल पायी पूर्ण करून गडात प्रवेश केला.

आकाशात चांदण्या डोकावू लागल्या होत्या. भगवंतेश्वराचे पुजारी श्री. हर्डीकर यांच्याकडे सामान उतरवले. दिवसभराच्या श्रमाने सगळे शिलेदार थकले होते. त्यामुळे देवळात अंग टेकताच निद्रादेवीने हलकेच पांघरूण घातले. गाभा-यातील समईच्या शांत प्रकाशात सगळयांच्या चेह-यावर झळकणारे अतीव समाधान तेवढे जागे होते.

सह्यगिरिच्या घाटमाथ्यावरील घोंघावणा-या वा-यामुळे नवीन दिवसाची चाहूल लागली. विशाळगडाच्या कडे-कपा-या मराठयांच्या पराक्रमाचा सुगंध धुक्याच्या लाटांबरोबर चहूकडे उधळू लागला.

'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्गॐ' विशाळगडाचे वर्णन करण्यास शिवछत्रपतींचे एक प्रधान रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रातील हे वाक्य पुरे आहे.

विशाळगडाचे जुने नाव 'खेळणा' होते. सह्याद्रीच्या मुख्य रांगेत कोल्हापूर-रत्नागिरी रस्त्यावरील आंबा गावापासून एस टी मार्गाने १९ कि. मी. अंतरावर हा दुर्ग अतिशय प्राचीन काळापासून १०२१ मीटर उंचीवर खडा आहे. नावाप्रमाणेच विशाल असलेला हा गड आपल्या धारदार खोल कडयांनी डोळयांना पाताळाचा वेध घ्यायला लावतो. चारही बाजूंनी तितक्याच उंचीच्या पठारांनी वेढलेला असल्याने विशाळगड एखाद्या निसर्गनिर्मीत तुरूंगासारखा भासतो. पूर्व-पश्चिम

बाजूंनी हा चिंचोळया वाटांनी बाहेरच्या प्रदेशाला जोडला गेला आहे.या वाटा रोखल्या तर गडावर कोणी शिरणे अशक्यचॐ एरवीदेखील इथल्या सह्याद्रीचे रौद्रसौंदर्य मोहवून टाकते तर जलधारांच्या वर्षावात याचा डौल कसा खुलत असेल, याची कल्पनाच करावी.

या गडाचे ऐतिहासीक महत्व फार मोलाचे आहे.याचा काल जवळजवळ १० व्या शतकापर्यंत जातो.शिलाहार राज भोज व यादव राजे यांच्या साम्राज्यानंतर मोगलांकडून इ.१६५९ मध्ये शिवाजी राजांच्या समशेरीने या गडाला आपलासा केला आणि पुन्हा वर्षभरानेच सिद्दी जौहरच्या तावडीतून सुटून राजे पन्हाळयाहून आले ते इथेच.रामचंद्रपंत अमात्य यांनीही ‘हुकुमतपनाह’ ही बिरूदावली इथूनच सार्थ केली.इ.१७०२ च्या जूनमध्ये औरंगजेबाने ६ महिन्यांच्या वेढयानंतर मोठी रक्कम देऊन हा गड हस्तगत केला.या लढाईत व नंतर झुंजार मराठयांनी आणि इथल्या धुंवाधार पावसाने मुघलांची अशी धुळधाण उडवली की त्याला तोड नाही.मराठी दुर्गाचे धारदार पाणी औरंगजेबाला विशाळगडानेच दाखवले.

सांप्रत गडावरच्या वास्तूंची फार दुर्दशा झाली आहे.गत इतिहासाचे सोनेरी दिवस पाहणारे हे रखवालदार भग्नावस्थेत आहेत.आपली सर्वच तीर्थस्थळे लोकांच्या बेशिस्तीमुळे व योग्य जाणीव नसल्यामुळेच गलिच्छ झाली

आहेत. तेथील पर्यावरणाला आणि सौंदर्याला बाधा पोहोचली आहे...

आनंद पाळंदे

ह्य'आव्हान' मधून

साभार

पन्हाळगड ते पावनखिंड नकाशा



ट्रेकसाठी उपयुक्त टिप्स: (अर्थात knowledge Transfer)

ट्रेक म्हटलं की उमेदीच्या पहिल्या काही वर्षांतला बराचसा वेळ सॅक भरण्यातच जातो. मला आठवतंय, माझ्या एका मित्राने एका ट्रेकला चक्क बादली आणली होती! खायला, चघळायला काय घ्यावं इथपासून कपडे, शूज कोणते घालावेत, आयत्यावेळेला उपयोगी पडतील अशी साधने कोणती, रानामधल्या वनस्पती-झाडांचे ट्रेकमधले उपयोगी गुणधर्म याबद्दल माहिती देणारा लेख आपण "दुर्ग दुर्गट भारी"मध्ये कायमस्वरूपी प्रकाशित करणार आहोत. पुढच्या वेळी निघताना याची एक प्रिंट घेऊन ठेवा की झालं!

सुरूवात करूया अगदी प्राथमिक टिप्स पासून, लवकरच आपण त्यांची सुधारित आवृत्ती प्रसिद्ध करणार आहोत -

१) ज्या किल्ल्यावर जाणार असाल तिथल्या वाटा, आजूबाजूच्या भूभागाची माहिती, चढायला लागणारा वेळ, राहण्याची सोय याची माहिती गोळा करा आणि घरच्यांनाही देऊन ठेवा. (127 hrs आठवतोय ना? ;))

२) प्रमाण नकाशे मिळालेच तर प्रिंट घेऊन जा. वाटा शोधण्यात त्यांचा खूप उपयोग होतो.

३) आपल्याला संपूर्ण वेळ उचलता येईल इतपतच सॅक भरा. आवश्यक त्याच गोष्टी सॅकमध्ये असाव्यात. उदा, ज्या पातेल्यात चहा करायचा त्यातच तांदूळ भिजवता येतील, अथवा एकच ताट झाकण म्हणूनही ठेवता येईल आणि तांदूळ धुवायला सुद्धा वापरता येईल.

४) कुठल्याही ट्रेकमध्ये टॉर्च, काडेपेटी, (मुक्कामी/नाईट ट्रेकमध्ये मेणबत्त्या) चाकू, (स्विस नाईफ असल्यास उत्तम), रद्दी पेपर, दोर, या गोष्टी घ्याच.

५) पायामध्ये ग्रिप असणारे शूज आवश्यक. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, चढण-उतरण शूजच्या नव्हे तर आपल्या पायांच्या बळावर करणार आहोत हे ध्यानात ठेवावे. त्यामुळे आत्मविश्वासाने पाऊल टाकणेही आवश्यक आहे. पण तरीही, निसरड्या, उभट भूभागावर शूज अतिरिक्त मदत देतात.

६) मुक्कामी ट्रेकमध्ये झोपण्यासाठी कॅरीमॅट उत्तम! वजनाला हलक्या, आटोपशीर असतात.

७) जेवण शिजवून खाण्याची वेळ आल्यास ट्रेकची मजा अजून वाढते. बाहेर पाऊस कोसळतोय, गुहेमध्ये चुलीचा सगळा धूर भरून राहिलाय, अंधारात, टॉर्चच्या प्रकाशात जेवण शिजतंय, त्याचा घमघमाट भूक चाळवतोय, पातेली कुणी घासायची यावर एका बाजूला वाटाघाटी सुरू आहेत.. अर्थात हल्ली रेडी टू कूक ची पॅकेट्स उपलब्ध असतात. नसल्यास पोहे, मॅगी, डाळ/पिठलं-भात. मुगाच्या डाळीची खिचडी हे पदार्थ भूकही भागवतात आणि कमी वेळात तयारही करता येतात. फावल्या वेळात चघळण्यासाठी खजूर, बिस्कीटे, चिक्की सुद्धा घेऊन ठेवा. जांभळे, करवंदांच्या मोसमातला ट्रेक असेल तर मग काय वर्णावी धम्माल महाराजा?

८) प्रत्येकाकडे किमान एक मोठी बाटली पाणी असणे आवश्यक. उन्हाळ्यात २ सुद्धा कधीकधी पुरेनाशा होतात. शिवाय बाटलीचा आपत्कालिन परिस्थितीत 'दाना'साठीही उपयोग होतो तो वेगळाच! :)

९) आपल्या आजारांबद्दल, ऍलर्जीबद्दल प्रत्येकाला माहिती असतेच. त्यानुषंगाने औषधे बरोबर ठेवा. एसटी लागणे, उन्हात फिरल्यास पित्त वाढणे, गवत-झाडीतून फिरल्यास रॅशेस उठणे इ त्रासांना नेहमीच टाळता येणं शक्य नसलं तरी उपाय करता येतात. सर्वासाधारणपणे एक फ़र्स्ट-एड बॉक्स एकाकडे असावा. त्यात ताप-सर्दी-पित्त यावरच्या गोळया, भाजल्यास-खरचटल्यास लावायचे मलम, कापूस, बॅंडेज, सोबतीला छोटी कात्री, दोरा, कोरडी फडकी इ साहित्य ठेवावे. ट्रेकमध्ये जबाबदारीने वागल्यास अपघात टाळता येतात हे खरेच. तरीही खबरदारी म्हणून ही औषधे!

१०) सर्वात शेवटी सर्वात महत्त्वाचे, ट्रेकमध्ये निसर्गाला, रानातल्या पशु-पक्ष्यांना, त्यांच्या अधिवासाला धक्का पोहोचेल असे कुठलेही कार्य करू नका. रात्री गोंधळ, गोंगाट, मद्यपान करून धिंगाणा करणे या गोष्टींसाठी ऐतिहासिक किल्ल्यांपेक्षा इतर उत्तम जागा या जगात भरपूर आहेत. दरीतून येणारा वाऱ्याचा आवाज, पक्ष्यांची मंजूळ किलबिल, उन्ह-पावसाचे खेळ, आणि

यातलं काहीच नसेल तरी निखळ आणि नितळ शांतता यातलंही सौंदर्य अनुभवण्यासारखं असतं!

तसेच अशा ऐतिहासिक ठिकाणी स्वत:ची नावे लिहून येण्यासारखा नामर्दपणा दुसरा नाही. दस्तुरखुद्द शिवछत्रपतींचे नाव एकाही गडावर त्यांनी लिहिले अथवा लिहून घेतलेले नाहीये ही गोष्ट पुरेशी सूचक नाही का?

ट्रेकींगच्या आनंददायी अनुभवासाठी डोंगरभर शुभेच्छा!

ऋणनिर्देश

१. पन्हाळा ते पावनखिंड: लेखक डॉ. सतीश संभाजीराव पाटील
२. दुर्ग पन्हाळा ते सिंधुसागर: लेखक आनंद पाळंदे
३. नकाशा: www.trekkshitij.com

आवाहन

दोस्त !

हा नवीन उपक्रम कसा वाटला ते आम्हाला जरूर कळवा. तसेच आपल्या ट्रेकसाठी या महितीचा आपल्याला कसा उपयोग झाला तेही जाणून घ्यायला आम्हाला आवडेल. यात अजून काय आणि कशी सुधारणा करता येईल तेही सांगा. तुम्हाला अशी एखाद्या गडाची ओळख करून द्यायला आवडेल ?

या गडाबद्दल किंवा बृहन्महाराष्ट्रातल्या कोणत्याही गड किल्ल्याबाबत आपणाकडे माहिती फ़ोटो असल्यास कृपया आमच्याशी संपर्क साधा. पुस्तिकांची ही मालिका अधिकाधिक समृद्ध होण्यासाठी आपली मदत हवी आहे. तसेच गडकिल्ल्यांशी संबंधित काम करणारा आपला काही ग्रुप वगैरे असल्यास आम्हाला आपली माहिती कळवा. आपला किंवा आपल्या माहितीतल्या कुणाचा ब्लॉग, वेबसाईट यांचीही लिंक पाठवा. निवडक दर्जेदार लेखन आम्ही आपल्या नावासहित प्रसिद्ध करू.

आज इवलिसी दिसणारी ही पुस्तिका कालांतराने एक संदर्भ ग्रंथ बनावी अशी इच्छा आणि योजना आहे. आणि हे आपल्या मदतीशिवाय अशक्य आहे.

आपल्या सर्व प्रकारच्या प्रतिसादांसाठी

लिहा

durgabhari@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठानच्या या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ई पुस्तकांसाठी

भेट द्या

www.esahity.com

ई साहित्य प्रतिष्ठान आजवरची प्रकाशने

ओथंब,

मोरया,

चार क्षण,

सईची वही

लोकल गोष्टी

प्रियेचे अभंग

तो आणि ती,

टल्लीची शाळा

अहम् ब्रह्मास्मि

ग्रेव्हयार्ड लिटरेचर

मकरंदच्या त्रिवेण्या

मीरा (मराठी अनुवाद)

सावळया मुलीची गाणी,

देशी दारूचे दुकान (3D),

मराठी कसे लिहावे(ई शाळा),

तो , मी आणि सिगारेट

ओथंब,

ओथंब २

दुर्ग दुर्गट भारी :

किल्ले रायगड

पेबचा किल्ला

नियतकालिके

ई साप्ताहिक नेटाक्षरी

स्वरनेटाक्षरी अल्बम्स

ईस्टाप (मराठी विनोद/ विडंबन)

बालनेटाक्षरी

बखर मराठ्यांची

लेखक : ग्रॅंट डफ़ (१८१८)

First Published in 1823 by Longman’s London

बखर मराठ्यांची

ग्रँट डफ़

First Published in 1823

by Longman’s London

ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून ते जास्तीत जास्त लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचावे या उद्देशाने इथे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान ही मराठी साहित्य इंटरनेटवर जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध व्हावे व वाचले जावे यासाठी काम करते. नवीन मराठी लेखक कवींना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे हाही उद्देश आहे. त्याचबरोबर मुंबई पुण्याबाहेरच्या वाचकांना विशेषतः ग्रामीण भागातील वाचक आणि विदेशातील मराठी मंडळींना मराठी पुस्तके विनासायास विनामूल्य मोबाईलवर किंवा कॉम्प्युटरवर मिळावीत हाही उद्देश आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eleventh floor, eternity,

eastern express highway

Thane, 400604

3 1761 00121513 6

Digitized by the Internet Archive
in 2008 with funding from
Microsoft Corporation

http://www.archive.org/details/historyofmaratha00duffuoft

HISTORY

of the

MARAT,HAS

Translated from the English Original

of

CAPTAIN GRANT DUFF

by

CAPTAIN DAVID CAPON.

BOMBAY

January 1830.

DS
432
M2 D8
LIBRARY
1968
UNIVERSITY OF TORONTO

बखर

मराठ्यांची

क्यापटन ग्रांट डफ याणीं
इंग्रेजींत केलेली तीचें

भाषांतर

क्यापटन डेविड केपनसाहेब याणीं महाराष्ट्र भाषेंत
केलें

मुंबई

जानेवारी सन १८३०

मराठ्यांचीबखर

सन् हजार

एकमारें मुसलमानलोक

हिंदुस्थानांत संचार करूं लागल्या पासून

सन् अठराशें अठरांत मराठ्यांचें

राज्य इंग्रेजांनीं

घेतलें तोंपर्यंत ही बखर.

मुंबईमध्यें सरकारी छापखान्यांत

छापिली सन् इसवी अठराशें

एकुणतीस

बखर लिहिण्याचें कारण.

कोणी ह्मणेल कि ही बखर कोणी कशी निर्माण केली. व करण्याचें कारण काय; तर त्याणें असें समजावें कि बाजिराव असतां, अल्फिष्टन साहेबाच्या हातारवालीं कारभार चालविणारा, कप्तान ग्रांट साहेब पुण्यास होता. तो पुढें बाजिराव गेल्यावर सातान्यास नेमिला. तो तेथें असतां, त्याचा मनांत आलें कि महाराष्ट्र लोक इतक्या योग्यतेस कसे चढले, ते समजावयास त्या लोकांचें प्राचीन वृत्त ध्यानास आणिलें पाहिजे. तेणेंकरून विलायतेंतील लोकांसहि विदित होईल, ह्मणोन त्याणें बहुत जागचे पुरातन लेख जमा केले. त्यांत कित्येक कोणी आपले संतोषें करून दिले, व कित्येक त्याणें द्रव्य खर्चून घेतले; याशिवाय सरकारचीं दप्तरें, पुणें आदिकरून जितके जागीं होतीं, त्या सर्व जागींचे पुरातन लेख आणिले. याशिवाय जाजा देवस्थानीं पूर्वींचीं देवास अग्रहार करून दिलेलीं पत्रें; तीं, व कोणी मोठे सरदार लोक यांस जहागिरीचा सनदा करून दिलेल्या त्या, व मुसलमानानीं लिहिलेल्या बखरा, व पूर्वीं साहेब लोकानीं लिहिलेलें हिंदूंचें वृत्त; यांतील सर्व गोष्टींचा बहुत विचार करून, व त्या त्या समयविशेषाचाहि शोध करून. त्या सर्व विस्तारांतील सारांश निवडून, आपले बरोबर घेऊन विलायतेस गेला. आणि तेथें इंग्रेजी भाषेंत त्याची बखर लिहून छापिली; तिचीं तीन बुकें जालीं. त्यांतील गोष्टी महाराष्ट्र मुलखीं लोकांस फार हितावह आहेत असें समजून सरकार कंपेनी इंग्रेज बहादुर यांचे आज्ञेवरून, कप्तान केपिन साहेब याणीं बाबा साने यांचे साहाय्यानें, ती इंग्रेजी भाषेची बखर, मराठी भाषेंत लिहून, सन अठराशें एकुणतिसांत मुंबैमध्यें छापिली.

देशमर्यादांची गोष्ट.

देशमर्यादा करणारे जे हिंदू, त्याणीं नर्मदा व महानदी या दोहींचा दक्षिणदेशाचे विभाग मुख्य पांच केले. त्यांचीं नावें. एक द्रविडदेश; दुसरा कर्नाटकदेश; तिसरा आंध्रदेश; त्यासच तेलिंगण ह्मणतात. चवथा गोंडवणदेश; पांचवा महाराष्ट्रदेश.

द्रविडदेशाची मर्यादा; रामेश्वरापासून मद्रासेचे उत्तरे पर्यंत. कर्नाटकदेशाची मर्यादा; पूर्वेकडे विंध्याद्रीचें टोंक, पश्चिमेस सह्याद्रीचें टोंक, या दोहोंमध्यें जितका उंच प्रदेश; तो कर्नाटकदेश. त्याचा उत्तर दिशेचे मर्या-

देचें

देचें टोंक, तेलिंगण व महाराष्ट्र या दोंहींमध्यें, मांजरा नदीपर्यंत आहे; तेलिंगण देशाची मर्यादा द्रविडदेशाचे उत्तरे पासून, उत्तरप्रांतीं शिकाकोळ शहर पर्यंत. गोंडवण देशाची मर्यादा; तेलिंगण व महानदी या दोंहींचा मध्यें जितका प्रदेश तो. महाराष्ट्र देशाची मर्यादा, चांदोग जवळचा पर्वत व कोळवण, व बागलाण, व खानदेश उत्तर मर्यादा. असें ज्योतिष शास्त्रांत आहे; परंतु भाषाभेदें करून पाहिलें असतां, महाराष्ट्र मुलुख उत्तरेकडे सातपुडा पर्यंत, व नर्मदेपाशीं नांदोड शहर पर्यंत आहे. त्याची पूर्वेची मर्यादा, नागपुराचे पूर्वेस, वेनगंगा नदी, व वरदानदी यांचा संगम होऊन ती नदी तेथ पासून माणिकदुर्गपर्यंत वायव्यवाहिनी जाली. तेथून पुढें पश्चिमवाहिनी माहुर पर्यंत गेली. त्यापुढें त्या देशाची मर्यादा, नीट दोरी सारिखीच नाहीं; वांकडी तिकडी होत होत निर्ऋतीचे दिशेस गोमंतकपर्यंत गेली. याइतक्या देशांत, बहुधा महाराष्ट्र भाषा आहे; सुरत व भडोज व राजपिंपळी, यांत गुजराथी भाषा आहे, यांचा आसमंतात गुर्जर देश. त्याची व महाराष्ट्रदेशाची भेदमर्यादा सुरतेचे दक्षिणेस दमान बंदर आहे. त्या पासून राजपिंपळी पर्यंत.

महाराष्ट्रदेश फार मोठा, आणि त्याची भाषा बहुधा एकसारिखी व त्यांतील ब्राह्मणाचा मोठ्या समुदायाचें नाव महाराष्ट्र ब्राह्मण; त्यावरून असें वाटतें किं दक्षिणेंत मुसलमान लोकांचा संचार होऊं लागल्याचे पूर्वी, यासर्व मुलखाचा राजा एक असेल, परंतु याचा निश्चय करितां येत नाहीं; कांकिं पुराणांतरीं[+] जशा देवादिकांचा कथा लिहिल्या, त्याप्रमाणें हें लिहिलें नाहीं. या मुलखांतील मुळचे रहाणारे कोण तो सिद्धांत होत नाहीं. पुराणांत लिहिलें आहे किं, महाराष्ट्र मुलखांत मुळचे रहाणारे घडशी लोक; ते वाजंत्रीलोकांत मुख्य, आणि जातीचे नीच आहेत. कावेरी आणि गोदावरी या दोंहीं मध्यें, दंडकारण्य देश तो रावणाचे स्वाधीन होता; तेव्हां त्याणें आपले वाजंत्री घडशी यांस दिला. याप्रमाणें पुराणांत आहे, याविषयीं दुसरी गोष्ट ती अशी; इशवी सनाचा आगोधर अडीजशें वर्षे हिंदूंचा मुलखांत एक

\+ पूर्वी कोणी एक परशुराम नामें अवतारी पुरुष आला; त्याणें क्षत्रियांस जिंकून त्यांचा मुलुख ब्राह्मणास दिला; तेव्हां ते ब्राह्मण त्याला त्या मुलखांत राहूं देइनात. मग तो सह्याद्रिशिखरावर जाऊन, आपणास रहावया करितां समुद्रापाशीं जागा मागूं लागला. त्यासमयीं समुद्र त्याचें ऐकेना; यास्तव त्याणें तेथून एक बाण मारिला. तेव्हां त्यास भिऊन तो बाण पडे तोंपर्यंत समुद्र माघारा हटून गेला. त्याणेंकरून जी जागा रिकामी जाली, तीचें नाव कोंकण, असा पुराणांत लेख आहे.

मोठी ता+गारानामें राजधानी होती. तेथें मिश्रमुलखाचे व्यापारी लोक येतजात असत. त्यापुढें कोणी एक शालीवाहन नामें नीच जातीचा पुरुष शककर्ता जाला. त्याणें त्या शहरीं राज्य केलें; तो राजा सन इशवीचे सत्याह्यात्तर अठ्याह्यात्तर सुमारें जाला. त्यादिवसापासून हिंदूमध्यें त्याचे नावें शक चालूं लागला.

या बरवरींत सन इशवी तारिखा मात्र लिहिल्या, हल्लीं सन अठराशें एकुणतिसांचे चवथ्या महिन्याचे पहिले तारिखेस हिंदूंचें शके सत्राशें एकावन्नावें वर्ष चालतें होणार.

\+ तागारा नामें शहर, कोठें होतें तें आतां निश्चयें करून लिहितां येत नाहीं. परंतु हल्लीं गोदावरीचे कांठीं भीर नामें एक गांव आहे, त्याचे ईशानी दिशेस असेलसें वाटतें.

सर्व भागानुक्रमणिकापत्र.

सन हजारापासून चौदाशें अठ्याहत्तरपर्यंत. भाग पहिला.

१

मुसलमान लोकानीं दक्षिण घेतल्याचा प्रकार. ते लोक नर्मदा उतरून देवगडपर्यंत संचार करिते जाले. तें शहर मुसलमान लोकांनीं आपली राजधानी करून, त्याचें नांव दवलताबाद ठेविलें. त्या लोकांमध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन मुसलमानाचे राज्याचा दोन फळ्या जाल्या. ब्राह्मणी वंश बादशाहाचे राज्याची गोष्ट. तें राज्य असतां, मराठी लोकांचें काय काय वर्तमान जालें तें प्रकरण. दुर्गादेवी नामें मोठा दुष्काळ पडला तें. त्यामुळें मुलुख ओस पडला, आणि किल्ले भलत्याचे हस्तगत जाले. त्याचा बंदोबस्ताकरितां, बादशाहाचें सैन्य निघालें. दादूनरसू काळे याणीं सरकारचे वसुलाचा बंदोबस्त केला. आणखी दोन वेळा राज्याचे बंदोबस्तास, बादशाहानें लश्कर योजिलें.

मुसलमानानीं कोंकणपट्टी जिंकिली. ब्राह्मणी बादशाहाचे वंशाची समाप्ति, कोणे प्रकारें जाली तें.

चौदाशें अठ्याहत्तरांपासून सोळाशें सदतीसपर्यंत भाग दुसरा.

२

ब्राह्मणी वंशाचें राज्य बुडाल्यावर, पांच राज्यें उत्पन्न जालीं; त्यांतून कांहीं दिवसांनीं दोन बुडालीं, आणि तीन राहिलीं; त्यांत एक अहमदनगर, दुसरें विजापूर, तिसरें गोवळकोंडें, या तिहीं राज्यांचे चतुःसीमेचा प्रकार. मुसलमान लोकांचे राज्यांत, मराठे लोक कोणे रीतीनें वागत होते, तें, व मुसलमान लोक मराठ्यांची योग्यता कशी ठेवीत होते तें. अहमदनगरचे बादशाहानें आपलें वजिरीचें काम ब्राह्मणास सांगीतलें, त्याच वेळेस विजापुरचे बादशाहानें ब्राह्मणाचें माहात्म्य वाढविलें. फिरंगी लोक जहाजावर बसून आले. आणि कोंकणांत शिरून, गोवें घेतलें. आणखी मोठा उपद्र-

व करून कोंकणचा वसूल घेतला. नालिकोटाजवळचें लढाईचा प्रकार. विजयानगरचें राज्य बुडालें तें प्रकरण. विजापुरचा बादशाह व अहमदनगरचा बादशाह, हे दोघे मिळोन फिरंगी लोकांशीं लढले. परंतु जय न पावले. महाराष्ट्र देश वकुन करून. विजापुरकर, व अहंमदनगरकर, यांचे हस्तगत आला. अहंमदनगर, व विजापूर, व गोंवळकोंडे, हीं तीन राज्यें कोणकोणत्या प्रकारें चालत होतीं तें. या राज्यांत राहाणार जे मराठे लोक, त्यांस आपआपला धर्म निरनिराळा म्हणून, परस्परें युद्ध करावें लागलें. विजापूर, व अहमदनगर, या दोहीं राज्यांत जितकीं मराठी खुळें होतीं त्यांचें वृत्त. उत्तरेकडून मोंगल लोकांचें सैन्य दक्षिणेचें राज्य घ्यावयास आलें. दिल्लीचा आकबर बादशाह दक्षिण जिंकावयास आला, त्या वेळेस काय काय वर्तमान जालें तें, व तो मरण पावला ते समयीं काय जालें तें. मल्लीकंबराची वर्तणूक, व लखजी जाधवाचें वृत्त. शाहाजी भोंसल्याचें वर्तमान. दिल्लीचा बादशाह जहानगीर, याचे मरणाचा प्रकार, व त्याचा पुत्र, शहाजहान याचें स्थापन. मोंगल लोकांनीं विजापुरकराचे लष्कराचा पराभव केला तो. विजापुरकर, व अहमदनगरकर, यांचा तह ठरला. नोर्निजानिजाम, अहमदनगरचा बादशाह, त्यास फत्तेखानानें मारिलें. मोंगल लोकांनीं शहाजी भोंसल्यास द्यावयाकरितां जे मुलुख कबूल केले होते, ते फत्तेखानानें मोंगलांशीं स्नेह करून आपणास घेतले. यास्तव शाहाजी भोंसले विजापुरकरास मिळाले. मोंगल लोक, व फत्तेखान, यांचा सलूख जाला असतां, फत्तेखानानें मोडिला; म्हणून त्यांचा व याचा युद्धप्रसंग पुनः आला. शाहाजी भोंसल्यानें अहंमदनगरचें राज्य चालविलें. दिल्लीचा बादशाह शहाजहान कोणे प्रकारें राज्य करित होता तें. विजापुरकर यांशीं शाहाजहानानें युद्ध केलें, आणि त्यांचा व याचा सल्ला जाला. मोंगल लोकांनीं शाहाजी भोंसल्यास जिंकल्यावर, तो विजापुरकराचे चाकरीस राहिला; त्या पुढें बहिरीवंश बुडाला.

सोळाशें सतनिसापासून सोळाशें अठ्ठेचाळीसपर्यंत भागतिसरा

३

शहाजी विजापूरकरांचे चाकरीस राहिल्यावर, कसा वागत होता. मग त्याणें दुसरी बायको केली. त्याचा पहिल्या बायकोचे दोघे पुत्र. एक संभाजी. एक शिवाजी. दुसरीचा एक व्यंकोजी.

तो शहाजी करनाटकांत गेला ते समयीं त्याणें, आपली बायको जिजाबाई व पुत्र शिवाजी यांस आपलें जहागीर ठिकाण पुणें, येथें पाठविलीं. आणि त्यांचा बंदोबस्त दादोजी कोंडदेव यांस सांगीतला. विजापूर सरकार, व गोंवळकोंड सरकार. यांचीं लक्ष्यें कोणे प्रकारचीं होतीं तें. मोंगल दक्षिणेचा वसुलाचा बंदोबस्त करिता जाला तें, आणि त्याणें फसली तारीख कधीं स्थापिली तें वर्तमान. दादोजी कोंडदेव याणें वसुलाचा बंदोबस्त कसा केला तो. मावळेलोक यांची हकीकत. शिवाजीचे रक्षक याणीं त्याचे बाळपणीं, त्याला कोणते प्रकारें वागविला तें. त्या शिवाजीचे पक्षपाती पहिले तिघे कोण होते तें प्रकरण. त्याणें तोरणा किल्ला घेतला; तो आपणाकडेसच रहावा म्हणून बादशाहास काय काय समजाविलें तें. राजगड किल्ला बांधिला शिवाजीनें तें वृत्त. दादोजी कोंडदेवाचा मृत्यु. चाकणकिल्ला व कोंडाणें किल्ला. याचे लोक शिवाजीनें आपणास अनुकूळ केले. सुपेपरगणा व पुरंदर किल्ला, शिवाजीनें घेतल्याचा प्रकार.

सोळाशें अठ्ठेचाळिसांपासून सोळाशें सत्तावन्नपर्यंत भागचवथा

४

शिवाजीनें घेतलेल्या मुलखाचे सभोंवते, कोण कोणते अधिकारी व जहागीरदार होते तो प्रकार. वाडीचा सावंत, आणि जंजिऱ्याचा शिद्दी, याचें प्रकरण. शिवाजीनें छापा घालून बादशाहाचा खजिना लुटला. त्या शिवाजीनें कितिएक किल्ले युक्तीनें घेतले. कल्याणी परगणा घेतला तो विस्तार. विजापुरचे बादशाहानें शहाजीला कैद करून, विजापुरी आणविला; त्याची सुटका कोणे प्रकारें जाली तें. तो शहाजी करनाटकान

कांन गेला. आणि आपला पुत्र संभाजी यास. कोणी किल्लेदाराचे पारिपत्यास योजिला; तो मृत्यु पावला. शिवाजीनें जावळीचा राजा घातानें मारविला. आणि त्याचा मुलुख घेतला. शिवाजीनें पहिला पेशवा. शामराज नामें ब्राह्मण केला. सन सोळाशें छत्तिसांपासून मोंगलांची वर्तणूक कसकशी जाली तें. गोवळकोंडेकरांचा कारभारी मिरजुमला याचें वृत्त. शहाजहान दिल्लीचा बादशाह दुखण्यां पडला. तो जीवंत असतां, त्याचे पुत्र चौघे. ते राज्याची इछा करूं लागले. त्या चौघांजणांत एक औरंगजेब नामें होता, त्याचे स्वभावाचें वर्णन. त्याणें बळेंच आपणास बाप असतां राज्याभिषेक करून घेतला, तें प्रकरण.

सोळाशें सत्तावन्नापासून सोळाशें बासष्ट पर्यंत. भागपांचवा

५.

शिवाजीनें औरंगजेबाशीं नम्रभावें करून बोलत असून, मोंगलांशीं कृत्रिम केलें. शिवाजीनें आपल्या लश्करांत स्वार वाढवून, पठाण मुसलमान लोक चाकरीस ठेविले. विजापुरचे मानकरी लोकांत वैमनस्यें पडलीं, त्यांपासून काय जालें तें. शिवाजीचा शामराज पेशवा राजपुरचे शिद्दीपासून, पराभव पावला. त्यावर शिवाजीचा राग होऊन, त्याणें मोरोत्रिमक पिंगळा नामें, दुसरा पेशवा केला. वाडीचे सावंत, पहिल्यानें शिवाजीस मिळाले, मग लवकरच विजापुरकराकडचे जाले. विजापुरकरांकडून शिवाजीचे पारिपत्यास मोठें सैन्य आलें. त्या सैन्याचा मुख्य सरदार, आफसुलखान. तो शिवाजीनें कशा युक्तीनें मारिला तें प्रकरण. शिवाजीनें विजापुरच्या रुस्तमजमान सरदार, याचा पराभव करून विजापुरचे दरवाजापर्यंत, मुलुख लुटला; व त्वरेनें कोंकणांत जाऊन, राजपुरी व दाभोळ लुटलीं. त्या शिवाजीचे पारिपत्यास दुसरें पुनः सैन्य नेमून, त्याचा मुख्य सरदार शिद्दी जोहार केला, त्याणें पन्हाळ्यावर, शिवाजी असतां त्या किल्ल्यास वेढा घातला. असें असतां, तो शिवाजी वांचला कसा, व त्याचा कारकून हरणस मावळ्या देशपांड्याबा-

जी

जी परभू याणें काय पराक्रम केला तें. विजापुरचा बादशाह अल्ली आदिलशाह, याणें शिवाजीनें घेतलेला मुलुख आपण सैन्यसुद्धां येऊन सोडविला तें. पुनः शिवाजीनें कित्येक किल्ले घेतले तें, व त्याचे बापास जाणें धरून विजापुरीं नेला तो बाजी घोरपडा त्यास सांपडला, त्याला मारून त्याचें गांव मुधोळ तें जाळिलें. सावंताच्या वाडी प्रांत शिवाजीनें घेतला तो प्रकार. विजापुरकराशीं तह केला तें वर्तमान. शाहाजी शिवाजीचे भेटीस आला तें प्रकरण. रायगड किल्ल्याची गोष्ट. शिवाजीचें लश्कर किती होतें तें व त्याचे मुलखाची हद्द किती होती तें.

सोळाशें बासष्टां पासून सोळाशें सदसष्टां पर्यंत. भाग सहावा.

६

शिवाजीनें मोंगलांचा मुलुख घेण्याचा उद्योग केला, म्हणून औरंगजेब बादशाह याणें शाइस्तेखान नामें सरदार याची योजना दिल्लीहून केली. त्या शाइस्तेखानानें पुण्यास येऊन. चाकण किल्ला घेतला; त्यापुढें शिवाजीनें काय पराक्रम केला तें प्रकरण. दिल्लीहून बादशाहानें शाइस्तेखानाला माघारा बोलावून. सुलतान माजूम नामें दुसरा दक्षिणेस योजिला.

शिवाजीनें सुरत लुटली. शहाजीचा मृत्यु. शिवाजीनें आपल्ये नावास राजा असें पद जोडून आपल्येच नावें शिक्के चालविले. जे लोक मकेस तीर्थयात्रेस जाणार, ते शिवाजीचीं लढाऊ गलबतें जाऊन लुटले. तो शिवाजी अहमदनगर लुटून माल्वणापाशीं गलबतावर चढून समुद्रांतून जाऊन गोव्यांचे दक्षिणेस बारशिलोर नामें. शहर होतें तें लुटिता आला. शिवाजीस जिंकावयास. राजा जयशिंग, व दिलीरखान हे दोघे त्याला नकळतां त्याचे मुलखीं जाऊन पोंहचले. त्यांणीं कांहीं स्थानें घेतलीं म्हणून शिवाजीला भय प्राप्त जालें. पुरंदर किल्ल्यास घेरा घातला तें वर्तमान. शिवाजी युद्ध सोडून राजा जयशिंग व दिलीरखान यांचा आज्ञानुवर्ती जाला. आणि त्यावेळेस त्याणें कांहीं ठराव करून घेतला. त्यावरून, विजापुरकरांचा व त्या सरदारांचा युद्धप्रसंग

ग घडला. त्यापुढें शिवाजी बादशाहाचे भेटीस दिल्लीस गे-ला. तेव्हां औरंगजेबानें त्याला बंदींत ठेविला असतां, त्याणें आपला जीव कोणे प्रकारें वांचविला. विजापुरकरांशीं जयशिंग लढला, त्याचा विशेष प्रकार. त्या जयशिंगानें विजापुरास घेरा घातला असतां, त्याहीं तो मागें हटविला; तो जयशिंग माघारा दिल्लीस जात असतां वाटेनें मृत्यु पावला.

सोळाशें सदसष्टांपासून सोळाशें एकुणहत्तर पर्यंत भाग सातवा

७

सुलतान माऽजूम, आणि जशवंतशिंग, यांचा स्वभावाचा प्रकार. त्याचे योगें करून, शिवाजीस बादशाहाकडून कांहीं उपकार घडला. विजापुरकरांशीं आणि मोंगल लोकांशीं सल्ला जाला. विजापुरकर व गोंवळकोंडकर, यांणीं वर्षास शिवाजीला खंडणी द्यावी असा नेम ठरला. गोवें आणि जंजिरा घ्यावयास शिवाजी गेला, परंतु जय न पावला. शिवाजी आपल्ये मुलखीं वसुलाचा व लष्कराचा बंदोबस्त करीत असतां लोक नानाप्रकारचा अटकळी करीत होते तें.

त्याणें नवे कायदे चालविले, तो प्रकार. त्याचे अंमल राज्य कारभार चालविणारे, कोण कोण कसकसे होते तें प्रकरण.

सोळाशें सत्तरांपासून सोळाशें सत्याहात्तर पर्यंत भाग आठवा

८

पूर्वी लोकांस असें वाटत होतें कीं, आतां दक्षिणदेशीं बहुत दिवस पर्यंत, उपद्रव होणार नाहीं, परंतु त्यास अंतर पडलें तो प्रकार. तानाजी मालुसरा याणें सिंहगड घेतला; आणि त्याच वेळेस तो तेथेंच मृत्यु पावला. आणिक किलेक किल्ले शिवाजीचे हस्तगत जाले. जंजिरा शिवाजीनें घेतलाच असता, परंतु तिघां शिद्दीमुळें त्याचे हातीं लागला नाहीं. ते शिद्दी, आपला मुलुख मोंगलांस देऊन, त्यांचे चाकरीस राहिले. शिवाजी सुरत लुटून माघारा गेला; त्या वेळेस त्याला धरावयाकरितां, मोंगल जे गेले ते त्याणें जिंकिले.

शिवाजी

शिवाजीनें खानदेश लुटला, आणि वसुलाची चवथाई प्रतिवर्षी घेत जावी, असें ठरलें, व औंडा पाटा व साल्हेर, हे किल्ले घेतले. मोंगल लोक शिवाजीस जिंकावयास आळस किं निमित्त करीत होते तें. मोंगलांचा राज्यांतून दक्षिणदेशाचा कांहीं नवा बंदोबस्त जाला तो. मराठे लोक व मोंगल लोक यांचे युद्धांत मराठे जय पावोन मोठे विख्यात जाले. तें प्रकरण. शिवाजीचें आणि इंग्रेजांचें कांहीं बोलणें जालें तें. शिवाजीनें गोंवळकोंड्यामध्यें स्वारी केली असतां, त्याचे पाठिमागें जंजिन्याहून. आणि सुर्तेहून. लढाऊ गलबतें येऊन समुद्रतीरचे त्याचे गांव लुटले. विजापुरचा बादशाह, अली आदिलशाह याचा मृत्यु. शिवाजीनें हुबळी शहर लुटलें; आणि विजापुरचे सरकाराशीं युद्ध केलें. शिवाजी आणि प्रतापराव, यांमध्यें कांहीं वैमनस्य पडलें. शिवाजीनें कांहीं क्रोधें करून निरोप पाठविला म्हणून, तो प्रतापराव विजापुरचे लश्कराशीं युद्ध करून मृत्यु पावला. त्या युद्धांत मराठे सरदार कोण कोण होते, त्याणीं आपलें लश्कर वांचवून विजापुरकरांचा लश्कराचा पराभव केला. आणि शिवाजीनें त्यांचा संमान केला. शिवाजीला राज्याभिषेक जाला. त्याणें इंग्रेज लोकांशीं तह केला, व कित्येक नवे किल्ले बांधिले; त्या शिवाजीचे शरीरीं साताऱ्यामध्यें समाधान नाहीं असें जालें.

सोळाशें सत्याहत्तरांपासून सोळाशें ऐशीं पर्यंत भाग नववा

१.

शिवाजी कर्नाटक प्रांत घ्यावयास गेला तो प्रकार. तो शिवाजी तिकडे जातांना, वाटेनें देवस्थान पाहून तपस्या करावयास गेला. त्याणें करनाटकीं जाउन युद्ध कोणे प्रकारें केलें तें.

आणि त्याचा सावत्र भाऊ व्यंकाजी, याशीं बोलणें झालें तो प्रकार. मोंगल आणि विजापुरकर मिळून गोंवळकोंडेकर यांचें राज्य बुडवायास सैन्य पाठविलें. परंतु तें कार्य शेवटास गेलें नाहीं. अबदुलकरीमाचा मृत्यु. आणि त्याचे जागीं मसाउदखानाची स्थापना. व्यंकाजी शिवाजीचा लश्करावर छापा घालून, आपणाच पराभव पावला. तो प्रकार. जना-

र्दन

र्दन पंत व हंबीर राव व मोरो पंत यांणीं युद्धें कर्शी केलीं. सुलतान माजूम यास दक्षिणेचा अधिकार, मानक्यान दिला, तें वर्तमान. मोंगलांचें लश्कर विजापुर घ्यावयास आलें म्हणून, मसाउदख्वानानें शिवाजीपाशीं कुमक मागीतली. तो शिवाजी मोंगलांचे मुलखीं जाऊन उपद्रव करिता जाला. आणि तेथून लूट घेऊन माघारा येत असतां, वाटेंत मोंगलांचा लश्करापासून मोठें संकट पावला. नंतर मदनस्च शौर्ये करून, आणि जासुदांचे चातुर्येंकरून, तो व त्याचें सैन्य वांचलें. संभाजीची वर्तणूक. मोंगलांनीं विजापुरचा घेरा उठविला; नंतर शिवाजीनें विजापुरकरांस कुमक केली होती, तीपासून काय लाभ पावला. तेणेंकरून व्यंकाजी निरुत्साह जाल्या, यास्तव त्यास शिवाजीनें हितोपदेशार्थ, पत्र लिहिलें. त्या शिवाजीच्या मृत्यु व त्याचे स्वभावाचें वर्णन. तो मेल्यानंतर तख्ताधिपती कोण कोण जाले तें वर्तमान.

सोळाशें ऐशींपासून सोळाशें एकुणनव्वद पर्यंत — भाग दहावा

१०

संभाजी राज्य घेत असतां, त्याणें काय काय निर्दयपणा केला; त्याणें स्वांदेशीपासून शिद्दीला हांकून द्यावयाचा उद्योग केला, परंतु व्यर्थ गेला. औरंगजेबाचा पुत्र सुलतान महंमद आकबर, तो आपल्ये संरक्षणार्थ संभाजीजवळ राहिला. त्या संभाजीच्या सावत्र भाऊ राजाराम यास अधिपती करून, संभाजीला काढावा असें त्याचे जवळचा लोकांहीं योजिलें, त्यावरून संभाजीनें कित्येक जिवें मारिले. मोंगलांचें लश्कर कोंकणांत गेलें; तें संभाजीनें मागें हटविलें. त्याणें शिद्दीचा जंजिऱ्यास घेरा घातला, आणि उठून गेला. मग पोर्तुगीस लोकांशीं युद्ध करूं लागला. त्याचा वजीर कलुषा याची गोष्ट. पूर्वीं शिवाजीचे वेळेस जो लश्कराचा बंदोबस्त होता, तसा संभाजीचे राज्यांत चालिला नाहीं; त्याचा परिणाम कसा जाला तें प्रकरण. औरंगजेब दक्षिणेस आला, त्या वेळेस देशाचा प्रकार काय होता तो. औरंगजेब दक्षिणेस आला, त्या वेळचें त्याचे संपत्तीचें स्वरूपकथन केलें तें प्रकरण.

मोंगलांचे लष्करानें काय आचरण केलें तें. औरंगजेबानें गोंवळकोंडकरांशीं सल्ला केला. विजापूर मोंगलानीं घेतलें तो प्रकार. त्यावर तें राज्य बुडून शहर ओस पडलें. पहिला आलेला सल्ला मोडून गोंवळकोंडें औरंगजेबानें घेतलें त्यावरून तें राज्य बुडालें. हंबीरराव मराठा सेनापती शिरजीखानास जिंकून आपण मरण पावला तो प्रकार. करनाटकांत काय काय वर्तमान जालें तें. संभाजी केवळ अयोग्य असें समजून, सुलतान महंमद आकबर निघोन गेला. नंतर दक्षिण देशाची दुर्दशा जाली, तें प्रकरण. इंग्रेज लोकांनीं समुद्रांत उपद्रव केला तो प्रकार. संभाजी आपल्या वजिरासुद्धां औरंगजेबाचे कैदेंत सांपडला; त्या दोघांचें मरण.

सोळाशें एकुणनवदांपासून सत्राशें सात पर्यंत. भाग अकरावा

११

मराठ्यानीं रायगडीं मसलत करून संभाजीचा पुत्र शिवाजी तो प्रौढ होई तोंपर्यंत, राजाचा सावत्र भाऊ राजा राम, तो धणी केला. मोंगलानीं रायगड घेतला, तेथें संभाजीची स्त्री येसुबाई, व पुत्र शिवाजी उभयतां सांपडलीं तीं, त्याणीं औरंगजेबाकडे नेलीं. राजाराम जिंजीस गेला तेथें त्याणें शिवाजी प्रमाणें अष्टप्रधानादि करून, आपलें माहात्म्य वाढविलें. मोंगलानीं जिंजीस घेरा घातला तें काम कांहीं निमित्तानें राहिलें. मराठे मोंगलांचा मुलखीं घांस दाणा घेऊं लागले. तन्निमित्त औरंगजेब ब्रह्मपुरीं जाऊन राहिला. इंग्रेजलोक व पोर्तुगीस लोक यांचें कांहीं वर्तमान. संताजी व धनाजी उभयतां कर्नाटकांत जाऊन मोंगलांशीं युद्ध करून जय पावले; मोंगलांचा सरदारास जिंजी घेणें आवश्यक पडलें म्हणून, त्याणें राजारामास काढून लाविला, आणि जिंजी घेतली. मराठ्यानीं सातान्याची राजधानी केली. राजारामाचा अष्टप्रधानांत कांहीं बदली जाली. कान्होजी आंगरे, व शिधोजी गुजर, यांची गोष्ट. संताजी घोरपडा कोणे प्रकारें मरण पावला तें प्रकरण.

राजाराम मोठें लश्कर जमा करून, खांदेशांत व वराडांत खंडणी घेऊं लागला. औरंगजेबानें करनाटकांतून जुलफि-

कार

कारखान बोलावून आणून. राजारामाचे पाठीस लाविला. औरंगजेब फौजेसुद्धां सातार्यास आला. त्याणें युद्ध करून किल्ला घेतला. राजाराम याचा मृत्यु. त्याची स्त्री ताराबाई तिणें राज्य चालविलें. मराठ्यांचें प्राबल्य व मोंगलांची बलहीनता. मराठे लोक कोण कोणत्या कारणार्थ एकचित्तें करून वागत गेले तें प्रकरण. औरंगजेब विजापुरीं येऊन मग त्याणें वांकिणकेरा गांवांस वेढा घातला ती गोष्ट. मोंगलांनीं घेतलेले किल्ले मराठ्यांहीं लढून मागारे घेतले. औरंगजेब अहंमदनगरीं येऊन मृत्यु पावला.

सत्राशें सातांपासून सत्राशें वीसपर्यंत. भाग बारावा.

१२

शाहूला शाहू असें नांव कोणे प्रकारें प्राप्त जालें तें प्रकरण. तो शाहू दिल्लीतून सुटून आपल्या राज्यावर आला; ते समयीं ताराबाईनें तो खोटा म्हटला म्हणून युद्ध जालें. अक्कलकोटच्या राजाची मूळपीठिका. बाळाजी विश्वनाथ याचा उद्भव. मोंगल लोक व शाहू यांची वर्तणूक. धनाजी जाधव याचा मृत्यु. ताराबाईनें पन्हाळा किल्ला घेतला, आणि कोल्हापुराची राजधानी करून, तेथें राहिली. ताराबाईचा पुत्र शिवाजी याचा मृत्यु.

संभाजी राजा होऊन ताराबाई बंदीस पडली. चंद्रसेन जाधव आणि बाळाजी विश्वनाथ, यांचा वाद होऊन, जीं जीं वर्तमानें जालीं तें. निजामउलमुलुख याची गोष्ट. मोंगल व मराठे यांचें युद्ध. निजामउलमुलुखानें कोल्हापुरकरांचा पक्ष धरिला; आणि शिधोजी घोरपड्यानें संभाजीचा पक्ष स्वीकारिला. मराठे लोक यांमध्ये फार अव्यवस्था जाली. कान्होजी आंग्र्यानें बहिरोपंत पेशव्याचा पराभव केला. नंतर बाळाजी विश्वनाथानें कान्होजीशीं तह केला, तेणें करून मराठ्यांस हित होईल असें जाणून, शाहूनें बाळाजीला पेशवाई दिली. मग तो पुरंदरचें आधिपत्य पावला. नंतर मराठ्यांची कांहीं व्यवस्था दिसूं लागली, तो तपशील. शाहूचे स्वभावाचें निरूपण. फरुकशेर बादशाहानें मराठे लोक आपणास अनुकूळ व्हावयाचा उद्योग केला तो पर्याय. त्या-

णें

णें सैयद हुसेन अल्लीखानाशीं कृत्रिम केलें तो विस्तार. शाहू व सैयदहुसेन यांशीं तह होउन, सैयद दिल्लीस गेला. आणि फेरुकशेरास, पदच्युत करून दुसरा बादशाह स्थापिला. बाळाजी विश्वनाथ, चौथ, व सरदेशमुखी, व स्वराज्य, यांचा सनदा घेऊन साताऱ्यासआला. नंतर मराठे लोक स्वराज्यांतील वसूल जमा करूं लागले तो प्रकार. कान्होजी आंग्र्याची गोष्ट.

सनसत्राशें विसांपासून, सत्राशेंसत्वीसपर्यंत भाग तेरावा

१२

निजामउलमुलुखानें सैयदाचे आज्ञेंत वागणें सोडून, मनांत, दक्षिण घ्यावयाचा निश्चय केला. त्यानंतर तो सैयदाच्या सरदाराशीं युद्ध करून जय पावला. सैयद हुसेन अल्लीखान, आपल्या बादशाहासहित, निजामउलमुलुखाचा पारिपत्यास दिल्लीहून निघाला. तो वाटेनें शत्रूच्या मारेकऱ्यानीं मारिला. दुसरा सैयद आबदुलखान, तो निजामउलमुलुखाशीं युद्ध करित असतां पराभव पावोन त्याचे केदेंत सांपडला. त्यावरून दिल्लीमध्यें लोकानीं बादशाहाचे प्रसन्नतेसाठीं मोठा उत्साह केला. परशुराम त्रिंबक, वबाळाजी विश्वनाथ, व खंडेराव दाभाडे, यांचा मरणामुळें, मराठी दरबारांत काय काय वर्तलें तें. बडोदेकर गाइकवाड यांचा मूळपुरुष दमाजी गाइकवाड याचे मरणाचा प्रकार.

निजामउलमुलुख यास बादशाहानें वश करून आपली वजिरी दिली. त्यानंतर तेथील दरबारी लोकानीं त्याचा नाशाचा उद्योग केला. गुजराथेचा अधिकारी हैदरकुली खान, त्याचा नाशाविषयीं, निजामउलमुलुखास बादशाहानें गुप्तपणें आज्ञा केली. तो निजामउलमुलुखाचे हातून पराभव पावला. मग बादशाहानें निजामउलमुलुखास वकील मुतलख नामें मोठी पदवी दिली. बाळाजी विश्वनाथाचा पुत्र बाजिराव याचें वागणें. होळकर, व शिंदे, यांची उत्पत्ती. उदाजी पंवाराची वर्तणूक. बाजीराव, बाळाजी विश्वनाथाचा पुत्र याणें काय काय मसलत केली;

ली; तीचा प्रतिपंथी श्रीपतराव झाला तें प्रकरण. शकरखेराजवळचे लढाईचा प्रकार. सुरतेचा अधिकारी, रुस्तुमअल्ली, तो पिलाजी गाइकवाडाचे घातास प्रवर्तला. अमदाबादच्या अधिकारी आमेदखान, तो कांताजी व पिलाजी यांस चौथ देता आला. तो ऐवज जमा कर्ते समयीं, त्या उभयतांचा कलह होऊन; कांताजीचा विभाग मार्या नदीचे वायव्येस ठरला; व अग्नार्या कडचा विभाग पिलाजीचा ठरला. अमदाबादेस, शहाबागेजवळ लढाई झाली तें. गुजराथचे व्यवस्थेचा प्रकार. बाजिरावानें माळव्या मुलखीं स्वारी घातली.

सन सत्राशें सत्ताविसांपासून, सत्राशें चौतीस पर्यंत भाग चौदावा

१४

निजामउलमुलुखानें, आपलें बळ वाढवायाकरितां, मराठी सरदार लोकांत कलह उत्पन्न व्हावा; म्हणून काय काय उद्योग, केला तें प्रकरण. त्याणें प्रतिनिधीचा योगें शाहूशीं तह करून; हैदराबादचे चवथाईची सोडचिठ्ठी घेतली. तो तह पेशव्याचे मनास आला नाहीं. निजामउलमुलुखानें, शाहू, आणि संभाजी, या उभयतां बंधूंत वैमनस्य पाडावयाचा यत्न केला; तो पेशव्यानीं व्यर्थ पाडिला. त्यावरून पेशवे, व निजामउलमुलुख, यांचें युद्ध जालें. नंतर तो निजामउलमुलुख याचा, बाजिराव पेशवे, यांचा शहाणपणापुढें उपाय चालेना; म्हणून तहाचें बोलणें करूं लागला.

बाजिराव गुजराथची चौथ, व सरदेशमुखीची, सनद पावला. कोल्हापुरचा राजा संभाजी, व प्रतिनिधी, हे उभयतां युद्ध करून; संभाजी पराभव पावला. पेशवे बाजिराव, व सेनापती दाभाडे, या दोघांचें युद्ध जालें; त्यांत बाजिरायाचा जय होऊन; दाभाडा मृत्यु पावला. निजामउलमुलुखाची वर्तणूक. गुजराथ मुलखांत पिलाजी गाइकवाड, व जोतपुरचा राजा, आभीशिंग, यांचा युद्धप्रसंग घडला. त्यापुढें आभिशिंगानें पिलाजीशीं तह करावयाचे निमित्तें करून, मारेकरी पाठवून त्यास मारिला. बुंदलखंड मुलखीं, राजा चतुरसाल, याणें पेशव्यास कुमके

स घेऊन मोंगलास बुंदलखंडांतून पार केला, यास्तव त्याणें बाजिरावाला कांहीं मुलूख बक्षीस दिला. राजा जयसिंग यास माळव्याचें आधिपत्य प्राप्त झालें, तें त्याणें बाजिरावास दिलें.

सन सत्राशें चवतीसांपासून सत्राशें चाळीसपर्यंत भाग पंधरावा

१५

मराठीलोकांची वर्तणूक. रघुजी भोंसल्यास सेनासाहेब सुभा पदवी प्राप्त झाली. वाडीचे सावंत, व आंग्र्या, व शिद्दी यांचें वर्तमान, बाजिराव पेशवा माळव्या मुलखांतून, सातारा आला, तें वृत्त. मल्हारजी होळकर याणें मुलखांत स्वाऱ्या घातल्या तें प्रकरण. दिल्लीच्या बादशाहानें, निजामउलमुलुख आपणास वश व्हावा म्हणून उद्योग केला तो विस्तार. बाजिरावास खर्चाची अडचण पडली; यास्तव त्याणें बादशाह याशीं तहकरून माळव्यामुलखीं कांहीं अधिकार पावला.

त्याशिवाय त्यास दक्षिणेंतही सरदेशपांडेपणा मिळाला.

मोंगल व बाजिराव, या दोहींपक्षीं युद्धाची सिद्धता आली, तेव्हां निजामउलमुलखानें मोंगलांचा पक्ष स्विकारिला. बाजिरावानें पराक्रमेंकरून दिल्लीच्या दरवाजापर्यंत प्रवेश केला तो प्रकार. आंग्र्याची हकीगत. बाजिरावानें निजामउलमुलखाचा लष्करास भोपाळाजवळ वेग घालून असा उपद्रव केला कीं; त्यास याशीं तह करावा लागला. पोर्तुगीस लोक, व इंग्रेजलोक यांची वर्तणुक. पेशवे व रघोजी भोंसले यांचें युद्ध झालें तें. दिल्लीमध्यें फारशी मुलखाचा नादरशाहनामा बादशाह आला; त्यामुळें मोंगल लोक संकट पावले तें प्रकरण. मग थोडकेच दिवसांनीं त्याणें दिल्लीचें तक्त मोंगलांस माघारें देऊन; आपण आपले मुलखीं गेला. मराठ्यांनीं वसई किल्ल्यास घेरा घातला ती कथा. पेशव्यांनीं दक्षिण येतल्याचे पूर्वी माळवा व बुंदलखंड या दोहों मुलखीं कायकाय बंदोबस्त केला तो प्रकार. पेशवा हिंदुस्थानांत संचार करूं लागला. मराठ्यांनीं संभाजी आंग्र्यावर कांहीं मसलत केली होती ती, बाजिरायाचा मरणामुळें सिद्धीस न गेली. हिंदुस्थान व दक्षिणदेश आदिकरून सर्व मु

लखांचा

लरांचा राज्याचीं वर्तमानें बाजीरावाचा स्वभावाचें स्वरूप कथन, व त्याचे पुत्र बाळाजीबाजिराव, व रघुनाथराव, व जनार्दनबाबा, व समशेरबहादुर यांची गोष्ट.

स्तनसत्राशेंच्याळिसांपासून स्त्राशें एकुणवन्नासपर्यंत भाग सोळावा

१६.

कर्नाटकांत मराठ्यांचा प्रवेश. रघोजीभोंसला याणें बाळाजी बाजिराव यास पेशवाई न मिळावी म्हणून राजाजवळ उद्योग केला तो शेवटास न गेला. चिमणाजी आपा याचा मृत्यु. पेशवा राजापासून महत्वाची सनद पावला. भास्करपंत बंगाल्यांत शिरला. दमाजी गाइकवाडानें माळव्यांत स्वाऱ्या घातल्या. अलीवेरदीखानानें भास्करपंतास बंगाल्यांतून काढून दिल्यावर, रघुजीभोंसला याणें स्वयें स्वांग केली. तेव्हां दिल्लीच्या बादशाहानें पेशव्यास माळव्याचा अधिकार व इतर लाभाची आशा दाखविली यास्तव त्याणें अलीवेरदीखानाचा पक्ष स्वीकारून रघुजीला तेथून घालविला. मग पेशवा बादशाहापासून माळव्याची सनद पावोन सातायांस आला. त्यापुढें रघोजीभोंसले आणि बाळाजीबाजिराव पेशवे यांची कांहीं समजूत पडली. निजामउलमुलख याची कांहीं गोष्ट. रघुजीचा भास्करपंत, व मोठेमोठे मानकरी मराठे सरदार पुनः बंगाल्यांत गेले ते अलीवेरदीखाचा कपटानें घातें करून मारिले गेले, आफगाणाचा बादशाह आमेदशाह अबदाली याची गोष्ट. दिल्लीचा बादशाहाचा मृत्यु. आणि त्याचा पुत्राचें स्थापन. निजामउलमुलखाचा मृत्यु. नाशिरजंग मोठें सैन्य घेऊन कर्नाटकास चालिला. राजाराम राजा कसा प्रगट झाला तें प्रकरण. त्यानंतर साताऱ्यास सकुवारबाईची व ताराबाईची काय वर्तणूक जाली. बाळाजीनें सकुवारबाईला कोणेप्रकारें सती घालविली तो विस्तार.

पेशव्यानें रघुजी भोंसला व इतर सरदार वश केले. पुणें मराठे लोक यांची राजधानी झाली. पेशवा व सदाशिवराव भाऊ यांमध्यें कांहीं कलह उत्पन्न झाला. रामचंद्रबाबा शेणवी याचा उद्भव. पेशव्यानें गाजीउद्दिन निजामउल्मुल्कयाचा वडीलपुत्र, याचा पक्ष अंगीकारिला; आणि फ्रांसीस लोकांनीं मुजाफरजंगाचा पक्ष धरून त्यास निजामपदवी दिली. मुजाफरजंगाचा मृत्यु, व सलाबतजंगास निजामपदवीचा लाभ. पेशवा गाजीउद्दिनाच्या कामासाठीं कृष्णेपर्यंत गेला, परंतु ताराबाई व गाईकवाडाच्या कृत्रिमामुळें माघारा आला. राजाराम मोठ्या अडचणीनें बंदींत पडला. सलाबतजंग फ्रांसीस लोकांच्या आश्रयेंकरून गांवें लुटित पुण्याकडे गेला. रघुजी भोंसल्यानें कायकाय संपादन केलें तें प्रकरण. मीरहबीब याचा मृत्यु. दिल्लीकडील कांहीं वर्तमान व मराठे त्या कामांत शिरले तो विस्तार. गाजीउद्दिन, शिंदा व होळकर, यांचा आश्रयेंकरून दिल्लीहून दक्षिणेस चालिला, तो आपली निजामपदवी पावेल असें सिद्ध झालें असतां आपण मृत्यु पावला.

सलाबतजंग निजामपदवी पावल्यावर त्याणें पेशव्यास कायकाय दिलें तो प्रकार. पेशव्यानें कर्नाटकीं स्वारी केली. पेशव्यानें आपला भाऊ रघुनाथराव गुजराथेंत पाठविला तो तें कार्य करून हिंदुस्थानात गेला. रघुजी भोंसल्याचा मृत्यु व त्याच्या चौघां पुत्रांची गोष्ट. पेशवा व ताराबाई यांची समजूत झाली ती कथा. दिल्लीकडचें कांहीं वर्तमान. दिल्लीचा आमेदशाह पादशाह याचे गाजीउद्दिनाच्या पुत्रानें डोळे काढून त्यास कैदेंत ठेविला, आणि जानदारशाह म्हणून पूर्वींचा बादशाह त्याच्या नातू तक्ताधिपती केला. पेशव्यानें आंग्र्याचा मुलुख घ्यावयाविषयीं इंग्रेजांशीं कांहीं बोलणें करून तें काम झाल्याचें पूर्वींच, त्याला सावनूर घ्यावयाकरितां तिकडे जावयाचें अगत्य पडलें. इंग्रेजांचीं लढाऊ जाहाजें आऊन स्वर्णदुर्ग किल्ला

घेतला

घेतला. तो मराठ्यांस सोपविला. मराठे यांणीं आंग्र्याचा मुलुख व किल्ले घेऊन विजयदुर्गास घेरा घातला असतां त्यांचे कुमकेस इंग्रेजांचीं जहाजें जाऊन मराठेलोक आपल्या लोकांत न घेतां तो किल्ला घेतला. मराठेलोक जाऊन त्यांणीं सावनूर किल्ला घेतला. फ्रांशीसलोक यांस दक्षिणेंतून काढावयासाठीं पेशवा व सलाबतजंग यांणीं मसलत केली, ती बसीच्या युक्तीपुढें सिद्धीस गेली नाहीं. पुण्यामध्यें पेशवे, आणि मुंबइचे इंग्रेज यांची समजूत झाली तो प्रकार.

सन सत्राशें छप्पन्नापासून सन सत्राशें साठ पर्यंत भाग अठरावा

१८

रघुनाथराव लश्कर करून हिंदुस्थानांत स्वारीस गेला, व पेशवा कर्नाटकांत जाऊन श्रीरंगपट्टनची खंड घेतली. सवणूर जवळचे लढाईचा प्रकार. म्हैसूरचा सरदार हैदरअल्ली याचा उत्कर्ष. हैदराबादचे दरबारीं कांहीं आभ्यंतरीय कृत्रिम झालें, तें व त्याचा शेवट. इंग्रेजलोकांनीं सुरत घेतली तें प्रकरण. पुनः मराठे यांणीं कर्नाटकांत संचार केला तो व हैदराबादचें कांहीं विशेष वर्तमान. सदाशिवरायाचा स्वभावाचें निरूपण. त्या सदाशिवरायास मारेकरी घातला असतां तो वांचला तें प्रकरण. आमेदनगर मराठ्यांहीं कृत्रिम करून घेतलें. सदाशिवराव सेनेचें मुख्यत्व पावोन रघुनाथराव कारभार करूं लागला, तो प्रकार. दक्षिणेंत मराठे व मोंगल यांशीं युद्ध होऊन मराठ्यांस काय लाभ झाला तो पर्याय.

सन सत्राशें साठापासून एकसष्ट पर्यंत भाग एकुणिसावा.

१९.

आफगाणाचा बादशाह आमेदशाह अबदाली यांणें हिंदुस्थानांत येऊन दिल्ली व मथुराशहर लुटलें. रघुनाथराव यांणें मुलतान व लाहोर पेशव्याचे सत्तेंत आणिलें तें प्रकरण. राणोजी शिंदा याचा पुत्रांचें कांहीं वर्तमान.

दिल्लीचा बादशाह अलमगीर यास शाबुदिन वजीर

यांणें

याणें मारून टाकिला. अबदाली बादशाह याणें मुलतान व लाहोर यांतून मराठ्यांस घालविले आणि आपण दिल्ली कडे चालिला. त्याणें मराठे सरदार यांचा पराभव केला; त्यावरून सदाशिवराव त्याचा पारिपत्यास दक्षिणेहून निघाला. तो पुढें जात असतां त्यास कित्येक सरदार येऊन मिळाले. त्या योगें त्याचें सैन्य फार वाढलें. मग त्याणें तिकडे जाऊन दिल्ली हस्तगत केली, आणि नवा बादशाह स्थापिला. पानपत्याजवळची लढाई. त्यांत मराठ्यांचा बहुत नाश झाला. आफगाण लोकांचा क्रूरतेचें निरूपण. बाळाजी बाजिराव पेशवा याचा मृत्यु. त्याचा स्वभावाचें कथन.

सनसत्राशें एकसष्टांपासून सासष्टपर्यंत भागविसावा.

२०

माधवराव बल्लाळ पेशवा झाला तें प्रकरण. ताराबाईचा मृत्यु. निजाम अल्ली मराठी लोकांत वेमनस्यें पडलीं अशी संधी पाहून त्यांस जिंकावयाकरितां निघाला. टोंक्याचा देवस्थानाचा भंग निजाम अल्लीनें केला तें प्रकरण. तो निजाम अल्ली पुण्याजवळ येऊन त्याशीं व पेशव्याशीं तह झाला. रघुनाथराव व माधवराव पेशवे यांचा विघड झाल्यामुळें रघुनाथराव ओरंगाबादेस गेला तेथें त्यास मोंगलांची कुमक मिळून तो माघारा पुण्यावर येत असतां माधवराव पेशवा आपल्या सुज्ञपणानें त्याचा स्वाधीन झाला. रघुनाथराव मुख्यत्व पावोन त्याचा अनुचित आचरणेंकरून मोठ्मोठ्या लोकांचीं मनें विटलीं; तेणेंकरून ते कित्येक जाऊन मोंगलांस मिळाले. त्यावर मोंगल ब्राह्मणाचें राज्य बुडवावयास उद्युक्त झाला. मोंगल पुण्यास येऊन तें शहर लुटून तेथचा कित्येकां घरांचा खंड घेऊन कित्येक घरें जाळिलीं. शेवटीं रघुनाथराव चांगला समय पाहून मोंगलांचा लष्कराचा अगदीं पराभव करिता झाला. नंतर ओरंगाबादेस पेशवे आणि मोंगल यांचा तह झाला. हेदरअल्लीचा उत्कर्ष. माधवराव फार युक्तीनें त्या हेदराचा पराभव करिता झाला.

पेशवा व निजाम अल्ली मिळून जानोजी भोंसला याशीं

युद्ध करून त्यापासून दिलेला मुलुख कित्येक माघारा घेतला.

सन सत्राशें साठांपासून बाहात्तरपर्यंत भाग एकविसावा.

इंग्लीश सरकार कंपनी बहादुर या नामाचें अर्थसूचन व त्या इंग्लीश लोकांहीं हिंदुमुलखीं कोणे निमित्तें प्रथम प्रवेश केला तें प्रकरण. पुढें त्यांहीं आपल्या रक्षणार्थ राज मंडळी घेतली. मग त्यांशीं आणि निजाम अल्लीशीं स्नेह पडला ती गोष्ट. माधवराव पेशवा करनाटकीं जाऊन तेथचा खंडणीचें बहुत द्रव्य घेऊन माघारा पुण्यास आला. रघुनाथरावानें हिंदुस्थानांत स्वारी केली. मल्हारराव होळकर याचा मृत्यु. रघुनाथराव गोहदच्या राण्याचें स्थान घ्यावयास गेला तो तेथें सिद्धी न पावतां माघारा पुण्यास आला, तेथें आपला पुतण्या माधवराव पेशवा याविषयीं त्याचा मनांत कांहीं अविश्वास उत्पन्न होऊन तो होळकर व दमाजी गाइकवाड व जानोजी भोंसला यांच्या साहाय्यानें युद्ध करून सर्वराज्य आपणास इच्छिता झाला. मग मोठा युद्धप्रसंग होऊन रघुनाथराव माधवरावाचे कैदेंत सांपडला तो प्रकार. माधवराव व निजाम अल्ली एकचित्त होऊन जानोजी भोंसल्याचे मुलखीं गेले तो त्यांस शरण आल्यावर पेशव्यांस हितावह असा जानोजीशीं तह झाला तो विस्तार. माधवराव करनाटकांत जाऊन हैदर अल्लीचा बहुत मुलुख घेतला. मनवगळच्या किल्ला घेतेसमयीं घाडुगे कुळांचे दोनभाग यांचा पुरातन वाद उत्पन्न पुनः झाला ती कथा. करनाटकांत माधवराव आपलें लष्कर त्रिंबकराव मामाच्या स्वाधीन करून आपण माघारा पुण्यास आला. त्या त्रिंबकराव मामानें हैदरास जिंकून त्याशीं तह केला. पानपतचे लढाईनंतर हिंदुस्थानांत कायकाय वर्तमानें झालीं त्यांचा विस्तार. विसाजी कृष्ण सैन्यासहित हिंदुस्थानांत गेला. दिल्लीचा बादशाहानें इंग्लीशांचा आश्रय धरिला. नजीबअदवला याणें मराठ्यांशीं तह केला. दिल्लीचा बादशाह इंग्लीश लोकांचा आश्रय सोडून मराठीलोकांकडे गेला.

गेला. रुजाउद्दवला व रोहिले मिळून मराठे लोकांस मुलखांतून बाहेर घालवावयास सिद्ध झाले. दिल्लीचा बादशाह दक्षणी ब्राह्मणाच्या अनुभवस्वभावास कंटाळला. त्याणें आपल्या सरदारांला सर्व मराठे हांकून द्यावयास सांगितलें. माधवराव पेशवा यांचा मृत्यु, व त्यांचें गुणकथन. रामशास्त्री यांची गोष्ट.

सनसत्राशें बाहात्तरांपासून सत्राशें पंचेहत्तरांपर्यंत भाग बेविसावा.

२२

रघुनाथराव बंदीतून सुटला. परंतु नारायणराव पेशव्याचा कांहीं तंट्यामुळें पुनः बंदींत पडला. नारायणरावाला मारेकरीयाणीं मारिला. मराठ्यांचें सैन्य हिंदुस्थानांतून माघारें फिरलें. रघुजी भोंसल्या यास सेनासाहेब सुभा पदवी प्राप्त झाली. निजामअल्लीवर रघुनाथराव यांचें युद्ध होऊन निजाम पराभव पावल्यांन त्याणें रघुनाथरायास दिलेला मुलुख याणें त्यास माघारा दिला. रघुनाथराव कर्नाटकांत गेला असतां कारभारी लोकांहीं, त्यास अहित अशी कांहीं मसलत केली. त्रिंबकराव मामा रघुनाथरायाशीं युद्ध करून पराभव पावला. मग रघुनाथरायानें हिंदुस्थानांत जाऊन इंग्लीश व होळकर व शिंदे यांशीं आपल्या साहाय्यार्थ कांहीं बोलणें लाविलें. पुण्यांत कारभारी लोकांमध्यें वैमनस्य पडून त्यांचा दोन फळ्या झाल्या. हैदरअल्लीनें कर्नाटकांतील मुलुख मराठ्यांचा घेतला. विलायतेंतून कंपनी सरकारचे आज्ञेनें मुंबेहून कोणी वकील साहेब पुण्यांत रहावयास गेला. इंग्लिशांहीं भडोचकिल्ला घेतला. ठाणें नामें साष्टीचा किल्ला इंग्लिशांहीं घेतला. शिंदा व होळकर. यांहीं राघोबाचा पक्ष सोडिला; यास्तव राघोबा बडोद्यास गेला. गाइकवाडाचें कुमकेचें कांहीं यत्न. राघोबा व इंग्लीश यांचें बोलणें होऊन तह झाला. त्याप्रमाणें त्याचे कुमकेस इंग्लीशांचें लश्कर आलें. ते व रघुनाथराव याचें लश्कर मिळून कसें कसें वर्तलें तो विस्तार. आरासाजवळचे लढाईच्या प्रकार. जहाजाची लढाई. फत्तेसिंग गाइकवाड याचा इंग्लीश व राघोबा यांशीं तह झाला. रघुनाथराव याचा

उत्कर्ष

उत्कर्ष. व माधवराव नारायण पेशवा याचा नाम लोकांमध्यें दिसूं लागला.

सनसत्राशें पंचाहात्तरांपासून एकुण ऐशीं पर्यंत भागतेविसावा.

२३

रघुनाथराव मुंबई सरकारापासून आपलें कार्य करून घेत होता, तें कलकत्ता याचे मुख्य साहेब आणि त्यांचें मंत्रदायक मध्यें पडल्यामुळें सिद्धीस गेलें नाहीं. कलकत्याहून कोणी वकील साहेब पुरंदरास आला, त्याचें व पुरंदरचे कारभारी लोक यांचें वागणें व त्या वकीलाशीं त्या कारभारी मंडळानें तह केला तो विस्तार. हैदरअलीनें पेशव्याचा कांहीं मुलुख घेतला. सदाशिवराव भाऊचें सोंग घेणारा मदोबा याचा उत्कर्ष व पराभव आणि मृत्यु. राजाराम राजा याचा मृत्यु व त्याचे जागीं त्रिंबकजी भोंसला याचा पुत्र शाहू महाराज नामें करून स्थापिला. कोल्हापुरकर व मुधोजी भोंसला यांचें कांहीं मामील वर्तमान. पुण्यांत कारभारी लोकांमध्यें वैमनस्य पडून दुफळी झाली. मोराबा फडनवीस याची मंडळी मुख्यता पावोन राघोबास आणवून तो मुख्य करावा अशी मसलत ठरली. नाना फडनवीसानें आपला अर्थ साधावयासाठीं सकपट युक्ती केल्या तो प्रकार. त्यावरून राघोबाविषयीं मोरोबाचें मन फिरून त्यास रघुनाथरावाविषयीं इंग्लीश बोलत असतांही त्याणें राघोबाचें अगत्य टाकिलें. नाना फडनवीस व त्याची मंडळी श्रेष्ठता पावोन तो मोरोबा फडनवीस व त्याची मंडळी कैद केली. फ्रेंचांचा वकील पुण्यांत येऊन प्रतिष्ठेनें वागला तो प्रकार. त्या निमित्तें कलकत्याहून सहा पलटणें लष्कर मुंबईस येऊं लागलें. नंतर मुंबई सरकारांत मसलत ठरली कीं, राघोबास बळेंच पुण्यामध्यें स्थापावा. त्यावरून नाना फडनवीस याची तयारी. इकडे मुंबईसरकारचे मंडळींत वैमनस्य पडल्यानें राघोबाचा कार्यास इंग्लिशांचें लश्कर विलंब करून बोरघाटावर जमा झालें. मग तेथून पुढें तळेगांवाजवळ मराठी लश्कराची गांठ पडली असतां त्या मुख्य साहेबांस कांहीं भय वाटोन, ते

पुढें

पुढें नआतां त्यांहीं मागें हटाचें अस्तानेम केला, त्यामुळें व-डगांवाजवळ त्या इंग्लीशलोकांवर कांहीं अनर्थ पडला तो प्र-कार. बंगाल्याहून इंग्लीशांचें लश्कर मुंबईस येत होतें तो मिस्तार. महादजी शिंद्यानें रघुनाथरावाविषयीं कायकाय वर्तणूक केली त्या गोष्टीचें कथन. त्या शिंद्यानें सखाराम बापू व चिंतो विठ्ठल हे दोघे नानाफडनवीसाच्या स्वाधीन केले. ते त्यास अनिष्टकारक ह्मणोन त्याणें त्यांस बंदीत ठेविले अ-सतां त्या बंदिवासांतच ते उभयतां मृत्यु पावले.

सनसत्याहशें एकुणऐंशींपासून पंचायशींपर्यंत भागचौविसावा.

२४

जनराल गाडुडसाहेब व नानाफडनवीस यांचें तहाविषयीं कांहीं बोलणें झालें. इंग्लीश दुसऱ्याचा पक्ष न धरितां स्वयेंच मराठ्यांलोकांशीं युद्ध करूं लागले. मग बडोद्याज-वळ दुभायशहर आहे तेथें इंग्लीशांचें लश्कर आऊन तें ठि-काण घेतलें. फत्तेसिंग गायकवाड याशीं तह केल्याचा प्रकार. पेशव्याच्या लोकांपासून अमदाबाद कोट इं-ग्लीशांहीं लढोन घेतला. मग गाडुडसाहेब यास जिं-कावयाकरितां शिंदे व होळकर गुजराथेंत गेले. ते कोण कोणत्या प्रकारें वागले ते प्रकरण. बंगाल्याहून लश्क-र येऊन ग्वाल्हेर व लाहोर हे दोन्ही किल्ले घेतले. कोंक-णांत इंग्लीश व मराठे युद्ध करितें झाले तो प्रकार, दुधारा जवळची लढाई. वसयी किल्ला इंग्लीशांहीं हस्तगत केला.

जनराल गाडुडसाहेब कच्या मसलतीनें बोरघाटास ठाणें धरून राहिला, मग मुंबईकडे त्यास हटून जाणें प्राप्त झालें त्यांत त्याचा कांहींसा नाश झाला. बंगाल्याचें ल-श्कर शिंद्याच्या मुलखांत शिरलें तो प्रकार. मद्रासचे कु-मकेस कलकत्याहून लश्कर पायवाटेनें पाठविलें ते समयीं मुधोजी भोसल्याचें लश्कर त्या लश्कराला होतें तत्सं-बंधें आपल्या लश्करास अडथळा न होण्याविषयीं कल-कत्याच्या साहेबानें तो मुधोजी स्वपक्षानुसारी केला. सर्व मराठे व इंग्लीश यांचा महादजी शिंद्याच्या द्वारें तह झा-

ला दिल्लीकडील काही वर्तमान. हैदरअल्ली मर-
ण पावल्यावर त्याचा पुत्र टिपू याचें वागणें. मद्रासेच्या इंग्ली-
शांहीं मातब्याचा तहाचा वेत ध्यानात न आणिता टिपूशीं
वेगळा तह केला. नाना फडनवीस व निजाम याची टि-
पूवर काही मसलत झाली. रघुनाथरायाचा मृत्यु व त्याचा
पुत्रांची काही गोष्ट सन सत्याशीं च्याहत्तरापासून दिल्लीक-
डे कायकाय वर्तमान झालें तें प्रकरण. रुजाउद्दवल्या-
चा मृत्यु. नजीफखानाचा दत्तपुत्र याणें शिंद्याची कुमक
मागीतली तेणेंकरून तो शिंदा दिल्लीमध्यें फार योग्यता
पावला. त्यायोगें शिंदा उन्मत्त होऊन त्याणें इंग्लीशा-
स काही अमर्याद मागणें केलें त्यावरून ते रुष्ट होऊन
त्यांहीं शिंद्याची मध्यस्थता दूर करून आपला कोणी सा-
हेब नेहेमी पुण्यास असावा असा नेम केला.

सन सत्याशीं पंचायशीं पासून नव्वद पर्यंत भाग पंचविसावा २५.

टिपू नरगुंदच्या देसायाबरोबर कसकसा वागला तें प्रकरण.
त्या टिपूनें हिंदूवर जुलूम करून मुसलमान केले. नाना
फडनवीस याणें टिपूला जिंकावयाविषयीं इंग्लिशाचे कुमके-
विषयीं यत्न केला परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. पुण्याहून
मराठ्याचें लश्कर निघालें ते निजाम अल्ली व मुधोजी भोस-
ले यांस मिळून टिपूवर चालिलें. बदामी किल्ला युद्ध क-
रून मराठ्यांहीं घेतला. तुकोजी होळकर कित्तुरास जाऊन
कायकाय करिता झाला, तो प्रकार. सावनूरच्या नवाबाची का-
हीं गोष्ट. टिपूनें एकाएकी मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें तो
विस्तार. महादजी शिंदा दिल्लीमध्यें योग्यतेस चढून गेला
असता. त्याणें अन्यायकर्मे केलीं त्यामुळें मुसलमानलोक
त्याचा द्वेष करूं लागले. त्या शिंद्यानें रजपुतांकडे खंडणी
मागीतली असता. ते सारे एकत्र मिळून त्याशीं युद्ध करिते
झाले. त्या युद्धाचा प्रकार व त्याचा शेवट कसा झाला तें प्रकर-
ण. त्या शिंद्यास संकट प्राप्त झालें असतां तो कसकसा वाग-
ला तें प्रकरण. त्यास पुण्याहून कुमक येऊन पोहचली.

आयद्या

आग्र्याजवळची लढाई. इस्मायलबेगाचा पराभव. कोर्णा गुलामकादर मामा याचें आचरण व त्याचा मृत्यु. शिंदा दिल्ली मध्यें पुनः मोठी योग्यता पावला. त्याणे आपल्या लष्करचा कायकाय बंदोस्त केला तो विस्तार.

सनसत्राशें नव्वदापासून ब्याण्णवपर्यंत भाग सविसावा

२६

टिपूनें पेशव्यांशीं तह केलेला मोडून फौजेची तयारी केली. नंतर टिपूनें इंग्लीशांचा मित्र त्रावनकोरवाला याशीं युद्ध केलें असतां, त्याचा परिपत्याविषयीं इंग्लिश, व मराठे, व मोंगल, यांचें ऐक्य झालें. इंग्लीशांची टोळी परशराम भाऊस मिळून टिपूशीं युद्धाचा उपक्रम केला. धारवाड किल्याचा युद्धाचा प्रकार. मद्रासेकडून इंग्लीशांचें लश्कर आलें त्याचें वागणें. मोंगलांची वर्तणूक. हरिपंत फडके व परशराम भाऊ यांचें लश्कर इंग्लीशांस मिळालें तो विस्तार. लाटकानवालिसानें टिपूचा पराभव करून श्रीरंगपट्टणास घेरा घालावयाची तयारी केली असतां, अन्न तृणादि तोट्यामुळें त्यास तो उद्योग सोडावा लागला. यानंतर इंग्लीश व मराठे व मोंगल यांचा टिपूचा मुलखीं कसकसा संचार झाला तो प्रकार. लाटकानवालिसानें पुनः श्रीरंगपट्टणास घेरा घातला. मग सल्ला झाल्यावर इंग्लीश व मराठे व मोंगल यास कायकाय लाभ झाला ती कथा. परशराम भाऊ श्रीरंगपट्टणास विलंबें करून आला तो विस्तार. त्यास तेथून माघारा पुण्यास जातांना वाटेनें बहुत उपद्रव सोसावा लागला.

सनसत्राशें ब्याण्णवांपासून पंचाण्णवपर्यंत भाग सत्ताविसावा.

२७

महादजी शिंदा पुण्यांतील कारभारी मंडळी पेक्षां वर्चढ होण्याविषयीं पुण्यास गेला. पेशव्यास वश करून घ्यावयाविषयीं त्याणें उद्योग कसकसा केला तो प्रकार. पेशव्यास नकील मुतलक नामें पदवी प्राप्त होऊन पेशव्यानेंही महादजी शिंद्यास आपला हस्तक करून दिल्लीचा कामावर

स्थापिला

स्थापिला तो विस्तार. रजपुतांच्या मुलखांत शिंदे होळकर यांचा सरदारामधारांचा लखेरीजवळ लढाई झाली तें प्रकरण. त्यामुळें पुण्यातील दरबारांत कांहीं अंतर पडलें. नानाफडनवीस याणीं पेशव्याशीं पक्षांत करून आपल्या युक्तीला मदद केली. महादजी शिंद्याचा मृत्यु. त्याच्या स्वभावाचें व बुद्धीचें वर्णन. त्याचे जागीं त्याच्या भावाचा नातु दवलतराव शिंदा याची स्थापना. बडोद्याचें वर्तमान. गोविंदराव गायकवाड यास बडोद्यांत अधिकार प्राप्त झाला. महाराष्ट्र मुलखाच्या पश्चिमभागी समुद्रतीर तेथचे
१२ मंडळाधिपति त्यांची वर्तमानें. त्यांहीं चांचेपणा केला तो व त्याचें निवारण. मराठीलोक पहिल्या लढाईची चाल टाकून पलटणाच्या भरंवशावर लढूं लागल्यानें काय काय परिणाम झाला तो प्रकार. होळकरानें पलटणें चाकरीस ठेविलीं. मराठा समुदाय मिळून निजामाशीं बाकी ऐवज मागण्याचें निमित्तें युद्धास सिद्ध झाले, व खरड्याची लढाई. निजामाचा पुत्र अलीजहा तो मृत्यु पावला. नानाफडनवीस याची कांहीं गोष्ट

सन सत्राशें पंच्याण्णवापासून नव्याण्णवपर्यंत भाग चौविसावा

२८

नानाफडनवीस माधवराव नारायण पेशव्या यास कोणत्या प्रकारें बंदोबस्तानें वागवीत होता तें व त्याच्या राघोबा रघुनाथरावाचें कुटुंब यांस कशा बंदोबस्तांत रक्षिलें तें प्रकरण. रघुनाथरावाच्या औरस पुत्रांत बाजीराव वडील, त्याचे गुण व स्वभाव यांचें वर्णन. त्या बाजीरावाविषयीं नानानें फार मनसूब केल्या तो पर्याय. माधवराव नारायण पेशवा व बाजीराव रघुनाथ हे दोघे नानाच्या बंदोबस्तांत होते तथापि ते परस्पर दुःखी होऊन त्या उभयतांची मैत्री झाली. तें नानास विदित होऊन त्याणें त्या उभयतांचा विशेष बंदोबस्त केला. तें माधवरावास सहन न होतां त्याणें माडीवरून उडी टाकिली, आणि मृत्यु पावला. नानानें बाजीराव, गादीचा अधिकारी न व्हावा म्हणून यत्न केला.

केला तो प्रकार. बाजीरावानें बाळोबा नाना व शिंदा यांस आपल्या पक्षाचे करून नानाची सरसकट मोडावी असें केलें तें समजून नाना आपणच बाजीरावाला गादीवर बसवावयास उद्युक्त झाला. तेव्हां बाळोबा नाना यानें बाजीरावाला शिंद्याचा बंदींत ठेवून चिमणाजी आपास गादीवर बसवून परशुराम भाऊ पटवर्धन तो मुख्य कारभारी केला. नव्या कारभारी मंडळीनें नानास मुख्य कारभारी करितों असें मिष करून त्यास दगा करावयाची मसलत केली. तें कृत्य नानास विदित होऊन तो सावध झाला त्यांत तो नाना आणि बाजीराव यांचें एकच कार्य पडलें. सर्जेराव घाटगा व बाळोजी कुंजर हे नानाच्या उपयोगीं कसे पडले ते प्रकरण. नंतर बाजीरावास गादीचा धणी करावयाकरितां त्या नानानें शिंदा अनुकूळ केला. ती गोष्ट सिद्धीस गेली नाहीं तोंच बाळोबा नाना त्यास विदित होऊन त्यानें बाजीरावास हिंदुस्थानांत पाठवावयाचें योजिलें; तेथें जाणें न होण्यासाठीं बाजीरावानें कांहीं युक्ति केली तो प्रकार. नानानें शिंद्याचे द्वारें बाळोबा नाना त्यास कैद केला. परशुराम भाऊ पुण्याहून पळाला तेसमयीं त्याचे पाठीस लोक लागले त्यांहीं त्यास धरिला. बाजीरावास पेशवेपदवी प्राप्त झाली. नंतर चिमणाजी आपा यास कांहीं प्रायश्चित्त देऊन तो गुजराथच्या अधिकारी केला तो प्रकार. नानानें करार केल्याप्रमाणें शिंदा व रघोजी भोंसला यांस तें तें प्राप्त केलें. परंतु निजामास कबूल केल्याप्रमाणें बाजीराव देईना म्हणून मशीर उलमुल्क फार रुष्ट होऊन तेथून निघोन गेला. तुकोजी होळकर याचा मृत्यु नंतर त्याच्या पुत्रांत गादीविषयीं वाद पडला. मल्हारराव होळकर युद्ध करून मृत्यु पावला. काशीराव होळकर यास शिंद्याचे द्वारें बापाचा सर्व अधिकार प्राप्त झाला. नाना व शिंदा या दोघांस दूर करावयाविषयीं बाजीराव यत्न करूं लागला. त्यांत शिंद्याच्या हातून नानास कैद करून तो नाना व त्याचे पक्षपाती लोक यांचीं घरें लुटावयाची आज्ञा दिली त्यायोगें सर्व शहरांत दंगा झाला. त्यानंतर बाजीराव पेशवा याचा मुख्य कारभारी अमृतराव झाला. सखाराम घाटगा याणें आपली कन्या शिंद्यास दिली आणि त्याचा मुख्यत्वें कारभार आपण करूं लागला. तो सर्जेराव घाटगा व बाळोजी कुंजर हे दोघे बाजी

रावाच्या

गगाच्या अनुकूळतेनें पुण्यांतील किंत्येक मोठ मोठ्या गृहस्थास अत्यंत पीडा करून त्यांपासून पैका घेते झाले. अमृतरावानें शिंद्यास धरावयाची मसलत केली त्यास सर्जीरावाची अनुकूळता होऊन शेवटीं त्या सर्जीरावाचा शिंत्रपणा मुळें सिद्धीस गेली नाहीं. नानाच्यानें काम परशुराम भाऊ पटवर्धनास सांगून त्यायोगें तो बंदीतून मुक्त झाला.

सन सत्राशें अठ्याण्णवांपासून अठ्ठाशें पर्यंत भाग एकोणतिसावा.

२९

शिंद्याच्या बायांचें वर्तमान. त्या बायांहीं दंगा उत्पन्न केला आणि अमृतरावाचे गोटांत आश्रय पावल्या. पेशवे व शिंदे यांचें वैमनस्य पडलें. शिंद्यानें नानास मुक्त केलें. नंतर शिंदा आणि पेशवा यांचें पुनः ऐक्य झालें. सर्जेराव घाटगा यास शिंद्याच्या आज्ञेनें प्रतिबंध झाला. इंग्लीश व निजाम अली यांचा तह. नाना फडनवीस व सर्जीराव यांच्या कांहीं गोष्टी. सर्जीरावाचें कुटिलवृत्त. इंग्लिशांहीं श्रीरंगपट्टण घेतलें. त्यामुळ त्याची वांटणी केली तें प्रकरण. इंग्लीश आणि निजाम अली यामध्यें नवा तह झाला. बायांचें फार वाढलेलें बंड तें मोडावयास शिंद्यानें बाळोबा नान्यास बंदीतून मुक्त केला. कोल्हापुरचें कांहीं वर्तमान. चतुरशिंग राजा यानें युद्ध केलें तो प्रकार. परशुराम भाऊ पटवर्धन युद्धांत पराजय पावोन मृत्यु पावला.

सन अठराशेंपासून अठराशें तीन पर्यंत भाग तिसावा

३०

नाना फडनविसाच्या मृत्यु व त्याच्या स्वभावाचें वर्णन. बाळोबा नात्या याच्या मृत्यु व धोंडिबा व नारायणराव बक्षी यांस निर्दयपणें पेशव्यानें मारिलें तें प्रकरण. दक्षिणेंत धामधूम झाली तो प्रकार. धोंडीबाचें बंड व त्याचें पारिपत्य इंग्लिशांहीं केलें तें. पुण्यांतील कांहीं वर्तमान. शिंद्याची माळव्यांतील कांहीं गोष्ट. यशवंतराव होळकराच्या प्रादुर्भाव. शिंदा पुणें सोडून हिंदुस्थानांत चालिला नंतर त्याशीं व होळकराशीं युद्ध झालें तो विस्तार. सर्जेराव घाटगा पुण्यांस सोडून शिंद्यास मिळून, इंदुरावर जाऊन तेथें पशावें

नगर

नगर व होळकराचा पराभव केला. यशवंतराव होळकर याणें दक्षिणेंत संचार केला. नंतर तो पुण्याजवळचे लढाईत जय पावला. बाजीराव पेशवा सिंहगडाहून निघोन कोंकणांत जाऊन तेथें इंग्लीशांच्या जहाजांत बसून वसईस गेला. सन सत्राशें व्याण्णवांपासून अठराशें दोहोंपर्यंत बडोद्यांत काय काय वर्तमानें झालीं तो प्रकार.

सन् अठराशें दोहोंपासून अठराशें आठपर्यंत   भाग एकतिसावा.

३१

होळकर पुणें मुकामीं जय पावल्या नंतर तेथच्या लोकांस उपद्रव न देतां नम्रतेनें वागल्याचें कारण. त्याणें बाजीराव पेशवा याचा गादीवर अमृतराव याचा पुत्र विनायकराव यास बसविला. वसईंत पेशवा व इंग्लीश यांचा तह झाला तो प्रकार. त्या तहास विघ्न करावयाविषयीं शिंदे व रघुजी-भोंसले एकमत होऊन गुप्तपणें सैन्य जमा केलें. इंग्लीशांच्या बळानें बाजीराव पेशवा आपल्या गादीवर पुनः बसला. रघुजी भोंसला व शिंदा यांशीं इंग्लीशांहीं तहाचें बोलणें लाविलें तें सिद्धीस न जातां, उभयपक्षीं मैत्री तुटली. आमेदनगर किल्ला इंग्लीशांहीं घेतला. असायी जवळची मोठी लढायी. अशीरगड व भडोंच व पवनगड हे किल्ले इंग्लीशांहीं घेतले. हिंदुस्थानांतील युद्धप्रकार. दिल्ली व आग्रें व लासवारी या जवळच्या लढाईची गोष्ट. दक्षिणेंत आर-गावांजवळ लढायी झाली तें प्रकरण. देवगांवच्या व सर्जीअंजिणगांवच्या तह. होळकर व इंग्लीश यांचें वैमनस्य पडून जनराल लेक साहेब सैन्यासुद्धां त्याचे पाठीस लागून त्यास त्याचे मुलखीं घालविला. त्या नंतर तो होळकर पुनः येऊन त्याणें कार्णेल मानसन साहेब याचा हातास्वालचे एके टोळीचा पराभव केला. मग तो होळकर मोठ्या सैन्यासहित हिंदुस्थानांत शिरला. त्या होळकराचें लश्कर दिल्लीजवळ पराभव पावलें. दिगाजवळची लढायी. तो किल्ला इंग्लीशांहीं घेतला. होळकराचे दक्षिणेंतील किल्ले व त्याची राजधानी इंदूर इंग्लीशांचे हातीं लागले. जनरल्लेक साहेबानें भरतपूर किल्ला घ्यावयाचा उद्योग केला तो शे

वटास

दरास न गेला, तथापि त्या राजानें वकील पाठवून इंग्लीशां शीं तह केला. शिंद्यानें होळकराच्या पक्षास्विकारिल्या यास्त व त्याशीं व इंग्लीशांशीं वैमनस्य पडलें. होळकर पंजाबाकडे पळाला, त्याचे पाठीस लेकसाहेब लागल्या मुळें त्या उभयतांचा तह झाला. तेच समयीं शिंद्यानेंही इंग्लीशांशीं तह केला. होळकर पंजाबांतून आल्यावर, त्यास वेड लागून तो मृत्यु पावला. त्याचा स्वभावादिकांचें वर्णन.

सन् अठराशेंतिहींपासून अठराशें सत्रांपर्यंत भाग बत्तिसावा.

३२

यशवंतराव होळकर मेल्यानंतर त्याचा कारभार अमीर खानानें पुरवले केला तें प्रकरण. शिंदे व नागपुरकर भोसले यांचें वर्तमान. पेंढारी लोकांची कांहीं गोष्ट. बाजीराव पेशवा पुनः गादीवर बसल्यानंतर, कसकसा वागला तें. प्रतिनिधीचें बंड. सदाशिव माणकेश्वर व कुसुरुजी मोरी यांचा वहिवाटीचा प्रकार. बाजीराव पेशवा याणें माधवरावरास्त्याशीं व धरकड जहागीरदार याशीं कोणे प्रकारें कुत्रिम ठेवलें तो विस्तार. त्रिंबकजी डेंगळा योग्यतेस चढल्याचा प्रकार. बाजीरावानें आपल्या जवळ द्रव्य जमा केलें तें, त्याणें इंग्लीशांस बुडवावयाविषयीं कशी मसलत केली ती. त्या बाजीरावाशीं व बडोदेकराशीं वहिवाट झाली तें. गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा वध. त्यापुढें त्रिंबकजी डेंगळा इंग्लीशांचा बंदीत पडलेला पळून जाऊन त्यास बाजीराव पेशव्यानें गुप्तपणें आश्रय दिला. त्यावर इंग्लीशांहीं काय काय केलें तें प्रकरण.

सन अठराशें सत्रांच्या आरंभापासून समाप्तीपर्यंत भाग तेहेतिसावा

३३

बाजीराव पेशवा व बापु गोखले यांणीं एकमतें इंग्लीशांच्या नाशाविषयीं मसलत केली. इंग्लीश व पेशवे यांचा स्नेह तुटून पुण्याजवळ युद्ध झालें. कोरेगांवची लढाई. बापु गोखला अस्याजवळ इंग्लीशांवर हल्ला करून मृत्यु पावला. नागपुरकराचें कृत्य. सीताबर्डीजवळची लढाई

लढाई. नागपूरकर आपासाहेब तो इंग्लीशांशीं स्नेह करून आपल्ये गादीवर बसला. चितू पेंढारी यास होळकराने आश्रय दिला यास्तव मेहेदपुरापाशीं होळकराची व इंग्लीशांची लढाई झाली. मग तो होळकर शरण येऊन त्याचा व इंग्लीशांचा तह झाला. पेंढारी यांचे मुख्य सरदार इंग्लीशांहीं धरिले. सिवनीपाशीं बाजीरावाची व इंग्लीशांची गांठ पडली. आपासाहेब पुनः गादीवर बसल्यानंतर कसकसा वर्तला तें. बाजीराव पेशवा इंग्लीशांचे हस्तगत होऊन, त्यांहीं त्यास ब्रह्मावर्तीं ठेविला. मराठी राज्य इंग्लीशांहीं घेतल्यानंतर कसकसा बंदोबस्त केला तें प्रकरण.

अनुक्रमणिका

मुसलमान लोकानीं दक्षिण घेतल्याचा प्रकार १ ते लोक नर्मदा उतरून, देवगडपर्यंत संचार करित आले २ तें शहर मुसलमान लोकांनीं आपली राजधानी करून,त्याचें नांव दौलताबाद ठेविलें ३ त्या लोकांमध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन,मुसलमानाचे राज्याचा दोन फळ्या झाल्या ४ ब्राह्मणी वंशबादशाहाचे राज्याची गोष्ट ५ तें राज्य असतां, मराठी लोकांचें काय काय वर्तमान झालें तें प्रकरण ६ दुर्गादेवीनामें मोठा दुष्काळ पडला तें ७ त्यामुळें मुलुख ओस पडला,आणि किल्ले भलत्याचे हस्तगत झाले ८ त्याचा बंदोबस्ताकरितां बादशाहाचें सैन्य निघालें ९ दादूनरसू काळे यांणीं सरकारचे वसुलाचा बंदोबस्त केला १० आणखी दोन वेळा, राज्याचे बंदोबस्तास बादशाहानें लश्कर योजिलें ११ मुसलमानानीं कोंकण पट्टी जिंकिली १२ ब्राह्मणी बादशाहाचे वंशाची समाप्ती कोणे कारणानें झाली तें १३ हीं तेरा प्रकरणें मिळोन भाग प्रथम.

प्रथमप्रकरण.

मुसलमान लोकांनीं हिंदुस्थान घेतल्याचा प्रकार.

पूर्वी मुसलमान लोकांनीं हिंदुस्थान घेतल्याचे अगोदर ते उगीच स्वाऱ्या घालून तें लुटित असत; ते, सन् ११०० अकराशांचा सुमारें, अटकनदीस येऊन,पोंचले. त्या पुढें ३०० तीनशें वर्षांनंतर,अल्लाउदीन खिलजी नामें कोणी एक मोठा मुसलमान सरदार याणें, ८००० आठहजार सैन्य घेऊन,नर्मदा उतरून, खानदेशांतून अकस्मात् देवगडासमोर येऊन, डेरा दिला;त्या वेळेस, कोणी एक मराठा,रामदेवराव जाधव, त्या किल्याचा राजा होता, त्याणें आपलें संस्थान राखावयासाठीं कांहीं युद्ध केलें; आणि परतला; मग किल्यांत जाऊन, अल्लाउदीनाशीं तहाचें बोलणें लाविलें; तेव्हां, बहुत द्रव्य दिल्यास, तो आपला मुलुख सोडून जातो, असें ठरलें. इतक्यांत रामदेवाचा पुत्र, मुलखांतून फौज जमा करून घेऊन,आला; आणि बापानें ठरविला तह नमानितां,अल्लाउदीनाशीं युद्ध करूं लागला. त्या प्रसंगीं राजपुत्राचा पराभव झाला. त्यामुळें ते मुसलमान लोक गर्वेकरून उन्मत्त झाले. यास्तव राजास आपलें सर्वद्रव्य आणि इलिचपूर द्यावें लागलें;तेव्हां ते मुसलमान लोक किल्ला सोडून निघाले. तेणेंकरून अल्लाउदीन मोठा विख्यात झाला; आणखी त्याला दिल्लीचें तक्त सहज प्राप्त झालें. मग त्याणें दक्षिणदेशीं तीनवेळा फौज पाठविली. त्या योगेंकरून,बहुतेक दक्षिणदेश, व तेलिंगण, त्याचे हस्तगत आलें; आणि त्या लश्कराचे उपद्रवानें नर्मदेपासून रामेश्वरपर्यंत मुलखाची मोठी हेंगणगत आली. पुढें अल्लाउदीनानें करून विषम राज्य केलें. शेवटीं त्याचा राज्यांत,जागोजागी बंड उत्पन्न झाली; आणि तो मेल्यानंतर,दिल्लीचे [illegible] लोकांत किल्येक [illegible] करून [illegible] पुनः आपलें राज्य स्थापावयास पावले; व,[illegible]

लागले; आणि देवगडासही घेरा घालून, लढूं लागले. तेव्हां, दिल्लीमध्यें मुबरीकनामें बादशाहा होता; तो सैन्य घेऊन आला. ते समयीं, जे लोक, किल्ला सभोंवता वेढून, युद्ध करीत होते; ते बादशाहाशीं युद्ध नकरितां, पळूं लागले. त्यांचे पाठीस बादशाहा लागला. तेव्हां, एक हरपाळदेव राजा सांपडला; त्याचे आंगाचें कातडें काढविलें. तेणेंकरून, तो मृत्यु पावला. मुबरीकानंतर, दिल्लींत, तघलखनामें बादशाहा झाला. त्याचें राज्य असतां, सन १३२३ तेराशेंतेविसांत दक्षिणदेशीं, पुनः बंड उत्पन्न झालें. तें मोडावयास त्याचा पुत्र युनास तो सैन्यसुद्धां येऊन, त्याणें तें बंड मोडिलें; आणि तेलिंगणातील, वारंगूळनामें राजधानी घेतली. तेवेळेस, त्या नगरचे कित्येक मोठे मोठे गृहस्थ परागंदा झाले. नंतर बारावर्षांनीं त्यांतील दोघां गृहस्थांनीं, तुंगभद्रेचे तीरीं, विजयानामें एक नवीच नगरी वसविली. तिची कांहीं काळेंकरून, कोणी एका मोठ्या राजानें राजधानी केली. मग ज्याणें एवढा मोठा पराक्रम केला, असा जो युनास, त्याला, सन १३२५ तेराशें पंचविसांत राज्याभिषेक करून, दिल्लीचे तक्तावर बसविला; आणि त्याचें नांव महंमद तघलख ठेविलें. तो बहुत विद्यानिपुण असे. परंतु उतावळा, अविचारी, निर्दय, राज्यास अयोग्य होता. तो राज्य करूं लागल्यापासून दोनवर्षांनीं मोंगल लोक, मोठी फौज घेऊन, दिल्लीचे दरवाजाजवळ येऊन पोंचले. तेव्हां, बादशाहानें त्यांस बहुत द्रव्य देऊन फिरविले. नंतर, तें द्रव्य जितकें खरचलें होतें, तितकें उत्पन्न करावया करितां, धूरसमुद्र* नामें एक नगर, व कर्नाटक लुटून द्रव्य आणिलें; तरी त्याला पुरेसें झालें नाहीं. यास्तव नाना प्रकारें प्रजेस पीडा करूं लागला. तो प्रकार असा कीं, तांब्याचे पत्र्यांवर शिक्का करून, ते रुपयांचा किमतीनें चालविले; आणि देवगडाचें नांव दौलताबाद ठेवून दिल्लींत राहाणारां लोकांस सांगीतलें, कीं, तुह्मी सर्वांनीं दौलताबादेस जाऊन राहावें. असें सांगीतल्याप्रमाणें त्या लोकांस वर्तविलें. तेणेंकरून, त्यांस बहुत कष्ट झाले; आणि दिल्ली ओस पडली. त्यानंतर त्याचे राज्यांत, कित्येक जागीं बंडें उत्पन्न झालीं. तीं अशीं कीं, तो बादशाहा एक बंड मोडी तों, त्याला दुसरें बंडाचें वर्तमान कळे. असें होऊं लागलें. शेवटीं अफगाण लोक, व उत्तरेकडचे लोक, हा धणी योग्य नव्हे, असें जाणून, राज्यांत आपणच सत्ता करूं लागले. यास्तव बादशाहानें फौज उत्तरेकडे दूर योजिली. त्या संधींत, जो पूर्वीं मुसलमानानीं जिंकिलेला कर्नाटकचे वारंगूळनगरचा राजा, तो मुलखांतून फौज घेऊन, आला; आणि मुसलमान लोकांशीं, मोठ्या युक्तीनें युद्ध करूं लागला. तेवेळेस बादशाहा, संपूर्ण दक्षिणेचा बंदोबस्तास मोठी फौज धरूं लागला. इतक्यांत असें मोठें बंड उत्पन्न झालें, कीं, नर्मदेचे दक्षिणेस जितकीं मुसलमान लोकांचीं वेगळीं वेगळीं संस्थानें झालीं, तितक्यांचें कारण तें बंड. त्या बंडाचें मूळ असें आहे कीं, पूर्वीं गुजराथी

---

* कोणी ह्मणतात कीं, धूरसमुद्र नगर कर्नाटकचे बळदेवाची राजधानी; कोणी ह्मणतात कि, तुळवाचे बंदरचें मोठें शहर होतें; परंतु आतां त्याचा ठिकाणा नाहीं.

लोकांनीं कांहीं बंड केलें, तें बादशाहानें मोडिलें. तेव्हां ते लोक बादशाहाचे भयानें पळाले. ते दौलताबादकरांचा पाठ निघाले. यास्तव बादशाहानें दौलताबादकरांस पदच्युत केलें; आणि सेवकांस आज्ञा केली कीं. गुजराथी लोकांस ह्मणावें, तुह्मीं निर्भयपणें हुजूर येऊन भेटावें. तें सेवकानीं सांगितल्यावरून, गुजराथी लोक, विश्वासानें बादशाहाचे भेटीस जाऊं लागले. तेसमयीं बादशाहा फौजेसहित गुजराथेंत होता; ह्मणून ते तिकडे गेले. ते गुजराथे जवळ गेलेतों, त्यांस असें वाटलें कि, बादशाहा आह्मांस बोलाऊन नेऊन, कांहीं घात करील. याकरितां, जे त्यांना नेणारे बादशाहाचे लोक त्यांचे बरोबर होते, त्यांस तिथेच मारून, बंडाचा झेंडा लावून, माघारें दौलताबादेस चालिले. तेव्हां वाटेनें आतां आतां, जे संस्थानी लोक, बादशाहापासून त्रास पावले होते; ते त्यांस मिळूं लागले. तें सैन्य असें जमलें कीं, ते दौलताबादेजवळ आतांच, त्या किल्यांतल्ये लोकांनी, ह्या सैन्यापुढें बादशाहाचें कांहीं चालणार नाहीं असें जाणून, दौलताबादेचे मुख्य कारभारीस कैद केला; आणि किल्ला बंडवाल्यांस दिला. नंतर त्या बंडाचे लोकांस, असें वाटलें कीं, त्या एवढ्या मोठ्या सैन्यास धनी एक असावा, परंतु तें सैन्य एकाएकीं जमलेलें. ह्मणून, त्यांत कोणी राज्यकरायास योग्य आहे किंवा नाहीं हें कोणास कांहींच समजेना, यास्तव एक इस्मायल नामें १००० एक हजार स्वारांचा सरदार होता त्याला, बादशाहा करून. त्याचें नांव नासरुदिन ठेविलें; आणि दौलताबादचा तक्ताधिपती केला. हें वर्तमान महंमदशाहा बादशाहास कळतांच. तो फौजेसुद्धां गुजराथेंतून आला; तो दौलताबादेस येतो तों ते बंडवाले युद्धास सिद्ध होते, ह्मणून त्यांचें व या बादशाहाचें तत्काळ युद्ध झालें. त्या प्रसंगीं, दोघांतून एकाचाही जय झाला नाहीं; परंतु महंमदशाहाचें सैन्य, जा जागीं लढाई झाली त्याच जाग्यावर होतें; आणि नासरुदिनाचें मागें सरलें. तेव्हां त्या बंडवाल्यांनीं असा विचार केला कीं, नासरुदिनानें किल्याचें रक्षण करावें; आणि सरदारांहीं, फौजेचा वेगळ्या वेगळ्या टोळ्या करून, त्याचे मुलखांत चोंहीं कडून शिरावें; आणि मोठी धुमाळी करावी. समोर लढूं नये. मग तसेंच केलें. हें वर्तमान महंमदाला कळतांच, त्याणें दौलताबादेस वेढा घातला; आणि जे सरदार मुलखांत दंगा करावयास जात होते त्यांत, एक जफीरखान नामें मुख्य होता त्याचे पाठी मागें, एक आपला अंमादउल्मुलक टेब्रीजी नामें, मोठा सरदार लाविला. इकडे सभोंवता वेढा पडल्यामुळें, किल्यांतल्या लोकांनां अन्नपाणी दुर्लभ झालें. यासाठीं, ते असा विचार करूं लागले कीं, आतां युद्ध करूं नये; किल्ला द्यावा. इतक्यांत दिल्लीकडे एक मोठें बंड उत्पन्न झालें. असें वर्तमान महंमदशाहास कळलें. यास्तव किल्ला घ्यावयाचें काम, आपले सरदारांस सांगून, आपण दिल्लीस गेला. हें वर्तमान दक्षिणी लोकांस कळतांच, ते चोंहीं कडून आले; आणि जे बादशाहाचे सरदार किल्याशीं लढत होते त्यांस. नानाप्रकारें उपद्रव करूं लागले. तेव्हां त्यांस असें भय झालें कीं. किल्ला सो-

दून

डून लवकर नर्मदा उतरून, पार जावें ह्मणून, पळों लागले. तेह्वां दक्षिणी लोक त्याचे पाठीस लागले. यास्तव त्यांना वाटेनें दक्षिणी लोकांचा उपद्रव बहुत लागला; परंतु ते तसाच सोशीत सोशीत नर्मदा पार झाले. इकडे जफीरखान पळत होता तो, हें आनंदाचें वर्तमान ऐकून, पाठीस लागलेल्या अंमादउल्मुलुखावर, माघारा उलटला. तेह्वां तो आपल्ये फौजेसहित, बेदरजवळ ठाणें धरून, राहिला. जफीरखान मोठा विचारवंत होता त्याणें, शत्रूशीं तत्काळ युद्ध नकेलें. त्याचे बरोबरीचा आकार मात्र दाखविला. त्याचा अशा आचरणानें, तेलिंगणचे राजास मोठा भरोंसा वाटला; ह्मणून त्याणें त्याचे कुमकेस १५००० पंधरा हजार फौज पाठविली; आणि दौलताबादेहून ५००० पांच हजार आली; आणि त्याची २०००० वीस हजार होती; अशी ४०००० चाळीस हजार झाली. तेह्वां तो अंमादउल्मुलुखाशीं लढूं लागला. ती लढाई फार मोठी झाली. त्यांत अंमादउल्मुलुख पडला; आणीक त्याची फौज बहुत नाश पावली. मग तो मुलुखांत आगोआग ठाणीं घालून, आपण फौजेसहित दौलताबादेस आला. त्या वेळेस नासरूदिन् बादशाहा, याला आपणा पेक्षां मोठा पराक्रमी आणि विख्यात असें आणून, किल्यांतून बाहेर आपण त्याला सामोरा आला; आणि भेटला. मग सर्व मानकरी लोकांस ह्मणाला कीं, मज पेक्षां हा बहुत योग्य आहे. याला तक्ताचा अधिकारी करावा, अशी बादशाहाची आज्ञा होतांच, त्या सर्वांहीं अवश्य ह्मणोन नासरूदिनाचे जागीं, जफीरखानास बसविला. त्याचें नांव सुलतानअल्लाउद्दीन हुसेन कांगो ब्राह्मणी असें ठेविलें. ब्राह्मणी नांव ठेवण्यांचें कारण, असें आहे किं, पूर्वी दिल्ली मध्यें एक कांगो नामें ब्राह्मण होता, त्याणें या जफीरखानास याचे बाळपणांत विकत घेऊन, आपल्ये घरचे कामां करितां, बाळगला होता. नंतर कांहीं दिवसांनीं हा उत्तम गुणी असें जाणून, कांहीं द्रव्य न घेतां, यास ब्राह्मणानें सूट दिल्ही; आणि त्यास आपलें कांहीं द्रव्य देऊन संतोषें करून बोलिला, किं तुला लक्ष्मी प्रसन्न असो. असे त्याचे उपकार, व आशीर्वाद स्मरोन, जफीरखानानें आपल्ये नांवास, कांगो अशीं अक्षरें लाविलीं; आणखी त्या ब्राह्मणास बलावून आणून, त्यास आपल्ये आमदारखान्याचें काम सांगितलें; आणि आपणापासून पुढें जे आपले पुरुष झाले, त्यांचेंही नांव कांगो असें चालविलें. असा त्याणें त्या ब्राह्मणाचा मान केला. हें वर्तमान सन १३४७ तेराशें सत्येताळीसांत झालें. ते वेळेस, महंमदतघलख्य नामें दिल्लीचा बादशाहा मेला, तेणेंकरून जफीरखानाचें राज्य निर्बाध चालूं लागलें. त्यांत जे जे बादशाहा आले; ते ते आपणास ब्राह्मणीवंशज ह्मणवित असत. सुलतान अल्लाउद्दीनहुसेन कांगो ब्राह्मणी बादशाहा झाला ते समयीं, दक्षिणेंत हिंदू लोकांचीं कित्येक संस्थानें होतीं तीं, कित्येक संस्थानी लोकांनीं आप

[illegible] दक्षिणेंत [illegible] मुसलमानानें [illegible] काढून घेतली, [illegible] आहे असें [illegible] कांगोजा [illegible] पडतें आहे [illegible]

आपलीं

आपलीं स्थानें स्वसंतोषें त्यास दिलीं; आणि कित्येक त्याणें बलात्कारें करून घेतलीं. मग जीं घ्यावयास कठीण तीं मात्र राहिलीं. नंतर त्याणें, लोकरंजनार्थ कित्येकांस इनामजमी नी दिल्या. कित्येकांस देशमुख्या व पाटिलक्या दिल्या. कित्येकां सर्दारांस जहागिरी देऊन फौजेसहित चाकरीस ठेविलें. या प्रमाणें त्याणें लोकप्रीति संपादिली; आणि आपल्ये राज्याचे पुष्टीकरणार्थ कित्येक मुसलमान लोकांस मोठमोठ्या जहागिरी देऊन, हिंदू लोकांनीं मुसलमानांचे आज्ञेंत वागावें असें केलें. त्या वेळेस बहुतेक दक्षिणदेश, व कोंकणपट्टी, त्यांणीं घेतली. परंतु दाभोळेपासून रामसपर्यंत कोंकण, व घाटमाथां पुरंदर डोंगर हरणकाशीपावेतों, त्यांचे स्वाधीन झालें नाहीं. अशीं १०० शंभर वर्षें गेलीं; नंतर तेंही घेतलें. सुलतान अल्लाउदीनहुसेन कांगो ब्राह्मणी बादशाहा १० दाहा वर्षें होता; नंतर मेला. त्याचे जागीं त्याचा पुत्र महंमदशाहा ब्राह्मणी स्थापिला. तो सन् १३५७ तेराशें सत्तावन्नांत राज्य करूं लागला. नंतर एक वर्षानें तो सैन्य घेऊन मुलुख घ्यावयास कर्नाटकांत गेला. ते समयीं दौलताबादेंत सैन्य बहुत नव्हतें; आणि असें वर्तमान आलें कीं, बादशाहा कर्नाटकांत मेला. तें ऐकून मुसलमानांतील एक बहिरामखान मजेंदराणी नामें सरदार होता त्याणें, कोणी एक मराठा जाधव याचे मसलतीनें, मोठें बंड उत्पन्न केलें. त्या पूर्वीं अकरा वर्षें मुसलमानाचे राज्यांत बंड नव्हतें. हें बंडाचें वर्तमान बादशाहास कर्नाटकांत कळलें. तेव्हां तो बहिरामखान, बादशाहाचे जातीचा मुसलमान, यास्तव बादशाहानें, त्याला, बहुत युक्तीनें सांगून पाठविलें. निकरानें निरोप पाठविला नाहीं. परंतु मराठी लोकांचे साहाय्यास्तव त्याला तें ऐकतां येईना; आणि पैठणाजवळ एक बादशाहाचा मोठा सरदार होता, तेथें फौजेसहित जाऊन, युद्ध करूं लागला; आणि त्यापासून पराभव पावला. या रीतीनें ब्राह्मणी वंश बादशाहाचे राज्यांत, दुसरें बंड झालें नाहीं. त्यांत मराठी लोकही सुखी असतील. यानंतर सन् १३९६ तेराशें शाण्णवांचे सालीं एक मोठा दुष्काळ पडला. तो इतर दुष्काळां प्रमाणें नव्हता म्हणून, त्याचें नांव दुर्गादेवी असें ठेविलें. तो बारा वर्षें होता. नंतर समयीं पाउस पडों लागला; परंतु बहुत दिवस दुष्काळ होता म्हणून, मुलुख व प्रांत ओस पडले होते याजकरितां त्या दुष्काळानंतर ३० तीस वर्षें पर्यंत वसूल अगदीं थोडा येत होता. या शिवाय जे किल्ले मुसलमानानीं घेतले होते ते, पाळेगारांनीं बळकाविले; आणि प्रजेस नाना प्रकारें दुःख देऊं लागले. त्याचा सुमार सन् १४२९ चौदाशें एकुणतीस त्या वेळेस, सुलतान अमेदशाहा ब्राह्मणी नामें बादशाहा होता, त्याणें तें बंड मोडिलें; आणि लोकांस सुख व्हावें म्हणून, बंदोबस्तासाठीं एक सैन्य सिद्ध करून पाठविलें. त्याचा मुखत्यार मलिक उल्टोजार नामें एक सरदार करून पाठविला. त्याज बराबर एक मोठा शाहाणा ब्राह्मण, दादनरसू काळे नामें पाठविला. तो कोणी पाटील, व देशमुख, व देशपांड्या; आढळला असतां त्याला बरोबर नेऊन, त्याचे जागीं त्याला स्थापावा, असें करित चालिले. तें जबाबदार

काढून

जाऊन त्याणीं तें बंड मोडून, वांई किल्ला घेतला; आणि बेंदरास गेले. मुलुखांचा बंदोबस्त
ताहून नरसूकाळे याजकडे होता त्याणें, प्रांताचे सीमांचें स्मरण नाहींसें पाहून, सर्व हद्दी न-
व्या केल्या. त्यांत जे देश फार लाहान होते ते वाढविले; आणि लोकांस पहिल्ये वर्षीं माफी-
चा कौल दिल्हा. दुसर्‍यें वर्षीं बिघ्यास एक तोबरा दाणा घेऊन, लोक सुखी केले. इतक्यां-
त घाटमाथ्याचे गभोशी लोकांस उपद्रव करूं लागले. तेव्हां बादशाहास असें वाटलें कीं,
सर्व डोंगरी किल्ले घेतल्या वांचून, रैतेस सुख होणार नाहीं. यानंतर सुलतान् अल्लाउदीन
बादशाहा असतां, त्याचा वजीर मियां मनउल्ला त्याणें, असा मनसोबा केला कीं, सारे सह्या-
द्रिकिल्ले, व कोंकणपट्टींत जे मुलुख आपल्ये हातीं आले नाहींत ते घ्यावे. असा विचार
झाल्यावर एक सैन्य नवें सिद्ध करून, मलिखउलटीजार यास नेमिला. त्या लशकराचा
तळ चाकणे जवळ पडला; आणि जुंनराजवळ किल्ला बांधून राहिले; आणिक तेथून फौज
कोंकणांत पाठवून, कित्येक दुष्ट राजे जिंकिले. मग जुंनराहून सैन्यसुद्धां कोंकणांत जाऊ-
न, शिरके यांचे किल्यास घेरा घालून, तो किल्ला घेऊन, मलिखउलटीजारानें राजांस व लो-
कांस आप आपले धर्म सोडून, मुसलमानाचे धर्मानें चालावें ह्मणून, बहुत आग्रह केला.
तेव्हां शिरके जातीचे अम्मल मराठे, यांणीं मोठ्या युक्तीनें त्याची आज्ञा न मोडिली असें दा-
खवून, बोलिले कीं, सिंहगडकर आमचे आप्त आहेत; त्यांस जिंकून वर्तवावें. नंतर आह्मीं
वर्तूं. जर आह्मीं एकटेच तुमचे धर्मानें वागूं लागलों, तर ते आमचा मुलुख घेऊन आह्मा-
स जातीनिराळे टाकितील. असें ते ह्मणाले यासाठीं, तो मुसलमानांचा सरदार, सैन्य घे-
ऊन, सिंहगड घ्यावयास चालिला. ते समयीं शिरके यांणीं वाटेंतच रात्रीं छापा घालून,
त्या सैन्याचा बहुत नाश केला; आणि पुनः आपला मुलुख घेऊन पहिल्याप्रमाणें सुखी
राहिले. त्यानंतर सोळा वर्षे, त्या शिरक्यांचा मुलुख घ्यावयाविषयीं, बादशाहाचे दर-
बारीं उद्योग झाला नाहीं. पुढें ब्राह्मणी वंशाचें राज्य बुडत चालिलें. तें सन १५२४ पंध-
राशें चोविसांत अगदीं बुडालें. असें होण्याचें कारण असें झालें कीं, त्या बादशाहानें स-
र्व संस्थानें घेऊन, आपलें राज्य अमर्याद वाढविलें. त्यामुळें मामलतदारच प्रबळ होऊन,
त्याची आज्ञा मानिनात असें झालें असतां, सन १४७८ चौदाशें अठ्याहात्तरांत, कोणी
एक मोठा शाहाणा ख्वाजेखान गावान् प्रधान होता त्याणें, हा सर्व प्रकार पाहून, हें राज्य या
प्रकारानेंच बुडेल अशी अटकळ करून, न बुडावें ह्मणून, कांहीं बुद्धीचे कल्पनेनें उपायां-
ची योजना करूं लागला. त्यांत पहिल्यानें असें केलें कीं, कित्येक मुलुखांचा तुकड्या न-
व्या अधिक करून, त्या त्या जागीं, एक एक शाहाणा माणूस नेमिला. त्या तुकड्यांचा प्रकार
असा केला कि, पहिला कल्बुर्ग्याचा सामला एक होता, त्याचे भाग दोन केले, एक विजा-
पूर आणि दुसरा आसनाबाद. दौलताबादेचे दोन केले, एक दौलताबाद आणि दुसरा
जुनर भाग. तेलिंगण जुनें त्याचे दोन केले, एक राजमंडी आणि दुसरा वारंगूळ. वराड
जुनें त्याचे दोन केले, एक गावेल आणि दुसरा माहूर. याशिवाय त्याणें आणखी कि-

त्येक

त्येक बंदोबस्ताचे उपयोगी कल्पना केल्या होत्या, त्या कांहीं दिवस चालिल्या; आणि तोही मोठा वाढला; या साठीं बहुतांचे मनांत विषम वाटून, त्यांणीं त्याजवर कांहीं एक निमित्त आणून, बादशाहाचे आज्ञेनें त्याला मारिलें. त्यापुढें ब्राह्मणीवंशाची बादशाही सहजेंच बुडाली. जे ख्वाजेखान्‌गावानास मारविणारे त्यांत एक निजामउल्मुल्क बहिरी ह्मणून होता. त्याचें मूळ असें आहे कि, तो पाथ्री गावचे कुळकर्ण्याचा पुत्र. जा वेळेस दुर्गादेवी नामें मोठा दुष्काळ पडला, ते समयीं, तो आपल्ये बापाबरोबर कर्नाटकप्रांतीं गेला होता. तेथें काळ क्रमणा करीत असतां, आमेदशाहाबली ब्राह्मणी बादशाहाचें लष्कर आलें; त्या लष्करी लोकांनीं त्याला धरून नेला. नंतर बादशाहाचे आज्ञेनें त्यास मुसलमान करून, बादशाहाचे चाकरीस ठेविला. त्याचें नांव मलिखहुसेन ठेविलें. पुढें महमदशाहाचे राज्यांत त्याला, हजार स्वारांची सरदारी दिल्ही. नंतर तो अधिक अधिक योग्यता पावूं लागला असतां, ख्वाजेखान्‌गावानाचे आश्रयानें, त्याला तेलिंगणाची मामलत, व या मुलुखाचाही कित्येक जागा मिळाल्या; आणि निजामउल्मुल्क असें नांव पावला. तो असा कृतघ्न होता कीं, शेवटीं त्याणें आपला संरक्षण करणारा जो ख्वाजेखान्‌गावान् त्यास मारिलें.

भाग दुसरा अनुक्रमणिका.

ब्राह्मणी वंशाचें राज्य बुडाल्यावर पांच राज्यें उत्पन्न झालीं, त्यांतून कांहीं दिवसांनी दोन बुडालीं; आणि तीन राहिलीं; त्यांत एक अहमदनगर, दुसरें विजापूर, तिसरें गोवळकोंडें, या तिन्हीं राज्यांचे चतुःसीमेचा प्रकार. १ मुसलमान लोकांचे राज्यांत मराठे लोक कोणे रीतीनें वागत होते तें, व मुसलमान लोक मराठ्यांची योग्यता कशी ठेवित होते तें. २ अहमदनगरचे बादशाहानें आपल्ये वजीरीचें काम ब्राह्मणास सांगीतलें, त्याच वेळेस विजापुरचे बादशाहानें ब्राह्मणांचें माहात्म्य वाढविलें. ३ फिरंगी लोक जाहाजावर बसून आले, आणि कोंकणांत शिरून गोंवें घेतलें; आणखी मोठा उपद्रव करून कोंकणचा वसूल घेतला. ४ तालीकोटाजवळचे लढाईचा प्रकार. ५ विजयानगरचें राज्य बुडालें तें प्रकरण. ६ विजापूरचा बादशाहा, व अहमदनगरचा बादशाहा, हे दोघे मिळोन फिरंगी लोकांशीं लढले; परंतु जय न पावले. ७ महाराष्ट्रदेश बहुतकरून विजापूरकर व अहमदनगरकर यांचे हस्तगत झाला. ८ अहमदनगर, व विजापूर, व गोंवळकोंडें, ही तीन राज्यें कोण कोणत्या प्रकारें चालत होतीं तें. ९ या राज्यांत राहाणार जे मराठे लोक त्यांस आपआपला धनी निर्निराळा ह्मणून परस्परें युद्ध करावें लागलें. १० विजापूर व अहमदनगर या दोहों राज्यांत जितकीं मराठी खुळें होतीं त्यांचें वृत्त. ११ उत्तरेकडून मोंगलाचें सैन्य दक्षिणेचें राज्य घ्यावयास आलें. १२ दिल्लीचा आकबर

वर बादशाहा दक्षिण जिंकावयास आला त्यावेळेस काय काय वर्तमान झालें तें, व तो मरण पावला तेसमयीं काय झालें तें. १३ मह्लीकंबराची वर्तणूक व लखजी जाधवाचें हनन. १४ शाहाजी भोंसल्याचें वर्तमान. १५ दिल्लीचा बादशाहा जहानगीर याचें मरणाचा प्रकार. व त्याचा पुत्र शाहाजहान याचें स्थापन. १६ मोंगल लोकांनीं विजापूरकराचे लष्कराचा पराभव केला तो. १७ विजापूरकर व अहमदनगरकर यांचा तह ठरला. १८ मोर्तिजानिजाम अहमदनगरचा बादशाहा त्यास विजापुरचा फत्तेखान् बादशाहानें मारिलें. १९ मोंगल लोकांनीं शाहाजी भोंसल्यांस द्यावयाकरितां जे मुलुख कबूल केले होते; ते त्या फत्तेखानानें मोंगलाशीं स्नेह करून आपणास घेतले, यास्तव शाहाजी भोंसले विजापूरकरांस मिळाले. २० मोंगललोक व फत्तेखान यांचा सलूख झाला असतां फत्तेखानानें मोडिला ह्मणून त्यांचा व याचा युद्धप्रसंग पुनः झाला. २१ शाहाजी भोसल्यानें अहमदनगरचें राज्य चालविलें. २२ दिल्लीचा बादशाहा शाहाजाहान कोणे प्रकारें राज्य करित होता तें. २३ विजापूरकर यांशीं शाहाजाहानानें युद्ध केलें, आणि त्यांचा व यांचा सल्ला कसा झाला. २४ मोंगल लोकानीं शाहाजी भोंसल्यास जिंकल्यावर तो विजापूरकरांचे चाकरीस राहिला; त्या पुढें बहिरी वंश बुडाला. २५.

भाग दुसरा.

प्रथम भागीं असें लिहिलें आहे कीं ब्राह्मणी वंशाचें राज्य सन् १५२६ पंधराशें सवीस पर्यंत बुडालें नव्हतें, परंतु त्या पूर्वीच जांचें नांव ब्राह्मणीवंश नव्हे असे पांच मुसलमान दक्षिणेंत सत्ता करूं लागले होते; त्यांत जो विजापुरीं होता त्याचे कुळाचें नांव इदिलशाही होतें; गोंवळकोंडें आणि हैदराबाद हीं दोन्हीं एकच या जागीं जो होता त्याचे कुळांचें नांव कुतुभशाही होतें; तिसरा वराडांत होता, त्याचे वंशास अंमादशाही ह्मणत; चवथा अहमदनगरीं असे तो निजामशाही कुळाचा होता; पांचवा अहमदाबादबेदरचा राहाणार त्याची बरीदशाही कुळी; असे पांच झाले होते; परंतु अंमादशाही आणि बरीदशाही या दोन्हीं कुळ्या थोडक्याच दिवसानीं बुडाल्या; आणि इदिलशाही १ कुतुभशाही २ निजामशाही ३ या तीन्हीं राहिल्या. तेसमयीं मराठी लोकांस तेज आलें. त्या योगें ते स्वतंत्रपणा करूं लागले. दुसरें प्रथम भागांत लिहिलें कीं, सन् १४७७ चौदाशें सत्याहत्तरांत ख्वाजेखानानें राज्यांतल्या परगण्यांचे नवनवे अधीक भाग करून. त्याला जागीं एक एक उत्तम माणूस ठेविला. त्यांत जो दौलताबादेस ठेविला, तो आदिलखान्सावी नामें मुसलमान होता. तोजोंपर्यंत ख्वाजेखान् होता तोंपर्यंत दौलताबादेस होता. नंतर बादशाहानें त्यास विजापुरीं ठेविला. तेथें सहज कांहीं निमित्तें घडलीं तीं सर्व दैवयोगें त्यास अनुकूळ होऊन, शवरीं सन् १४८९ चौदाशें एकुणनव्वदांचे सालीं तो बादशाहाचें पद पावोन, सर्व

राज्याचा

राज्याचा अनुभव येऊं लागला. असें विजापुरचे बादशाहीचें मूळ आहे. त्या दिवसापासून इदिलशाही वंश दक्षिणेंत मोठा विख्यात झाला. अहमदनगरच्या बादशाहीचें मूळ असें झालें कीं, निजामउल्मुल्क बहिरी नांवें ख्वाजेखान गावान वजीराचा आश्रित होता. त्याणें त्या वजीरास मारवून सुलतानाचें मन प्रसन्न करून तो मेल्या नंतर त्याचे पुत्राची वजारी तो आपण करूं लागला; आणि ख्वाजेखानानें दिल्हेल्या अधिकारीं मलिकआमेद नामें आपला पुत्र स्थापिला. अणखी किल्येक जागा आपल्ये पुत्रास देवविल्या. त्यांत जुंनर आणि दौलताबादचे परगणे लावून दिल्हे होते. नंतर निजामउल्मुल्कानें जसा आपला पोषक ख्वाजेखान गावान वजीर याचा घात केला, त्या प्रकारेंच दुसऱ्या कोणी दुष्टानें त्यास मारिलें. त्या वेळेस त्याचा पुत्र मलिकआमेद मोठें बंड उत्पन्न करून आला; आणि बादशाही आपण करूं लागला. त्या समयीं ब्राह्मणी वंशाचा बादशाहा महामुदशाहा ब्राह्मणी होता. त्याणें तें बंड मोडावयाकरितां फार उद्योग केला, परंतु उपाय चालेना असा अहमदनगरचा बादशाहा झाला, आणि त्याचें नांव निजाम. अणखी त्याला बहिरी म्हणत होते.* कुतुबशाही बादशाहीचें मूळ असें आहे कीं, सन १४९५ चौदाशें पंचाणवांत तेलिंगणची मामलत कुतुबउल्मुल्क नामें कोणी एक मुसलमान होता त्याला सांगीतली होती. त्याणें सोळा वर्षे पर्यंत केली. नंतर तो सन १५१२ पंधराशें बारांत गोंवळकोंडयाचे बादशाहीचें तक्त पावला; आणि आपलें नांव कुतुबशाहा असें चालविलें. असाच वराडच्या मामलेदार वराडची बादशाही पावला. त्याचें नांव फत्तेउल्लाअमादउल्मुल्क होतें त्याचें राज्य १५१२ पंधराशें बारापासून १५७४ पंधराशें चौऱ्याहत्तरांपर्यंत चाललें. त्यानंतर अहमदनगरचे बादशाहानें तें राज्य घेतलें. बरीदशाही होती ती अमादशाहीचे आगोदरच बुडाली. तीचे ख्वालीं बेदर व कलबुर्गा यांचे जवळचा मुलुख होता; ती विजापुरचे बादशाहानें घेतली. याप्रमाणें दोन बुडाल्यावर एक विजापूरची, दुसरी अहमदनगरची, तिसरी गोंवळकोंडयाची, या तीन राहिल्या. त्यांत विजापुरचे बादशाहीची हद्द, दक्षिणेस निरा नदी पासून तुंगभद्रा नदी पर्यंत होती; आणि तुंगभद्रेचे दक्षिण तीरीं आदोणी परगणा, व नंदिहाळ शहर होतें, तें ही विजापुरचे बादशाही ख्वालीं होतें; पश्चिमेस कोंकण पट्टींत बाणकोटापासून गमसपर्यंत मुलूख मध्यें मध्यें कांहीं कांहीं ठिकाणें सोडून विजापुराकडे होता. पूर्वेकडे रेचोर परगणा, व इदगीर परगणा, व मलकेर परगणा. व बेदर परगणा, हे चार परगणे विजापुराकडे होते. या खेरीज पूर्वेकडचे दुसरे परगणे जे राहिले, ते गोंवळकोंडयाकडे होते. उत्तरेकडे आंकलकोट, व नळदुर्ग. व कालीयान, व सोलापूर, इतके मुलुख विजा-

---

* बहिरी नांव पडायाचें कारण असें कीं, त्याचा बाप योग्यता पावल्याचे पूर्वीं बहिरी पक्षी यांचें संरक्षण करावयाचें काम पत्करून शिकारख्यान्यांत चाकरीस राहिला होता म्हणून असें नांव पडलें

पुरचे

पुरचे बादशाही खालीं होते. अहमदनगरचे बादशाही खालीं वराडसंबंधी कित्येक मुलुख, व औरंगाबाद सुभा, व आळंद परगणा, कल्याणदेशांतील कित्येक परगणे, व बाणकोटापासून वसई पर्यंत कोंकणपट्टी. इतके मुलुख अहमदनगरचे बादशाही खालीं होते. गोंवळकोंड्याची बादशाही अशी कीं, जीचे पश्चिमेचे आंगीं विजापूरकर व अहमदनगरकर यांचीं राज्यें होतीं. त्यांपासून पूर्वेस समुद्रापावेतों मुलुख गोंवळकोंड्याचे बादशाहीकडे होता; परंतु राजमंड्री शहर व त्या खालचा मुलुख त्याचे स्वाधीन नव्हता. तेथें दुसरा राजा होता. या तिन्हीं राज्यांत मुलुखांचीं नांवें ठेवण्याची रीति अशी होती कीं, मोठें सरकार, त्यामध्यें परगणा, त्याचे आंत कर्यात, तीचे पोटीं समत, तीचे मध्यें महाल, त्याचे आंत तालुका. यांखेरीज हिंदी नांवें दोन प्रांत आणि देश अशीं होतीं. दुसरी राज्यांत अशी रीति होती कीं, ल्हान व मोठा मामला मखत्यानें सांगावा; कदाचित मखता न केला तर बहुतकरून हिंदुलोकांस द्यावा. मखत्याचा पैका घेणें, व मुलुखांत चौकी पाहारा इत्यादि बंदोबस्त ठेवणें, व मुलखाचे सीमेसंबंधी खटलें असल्यास त्याची चौकशी करणें. या इतक्या कामांवर बादशाहाचे दरबारांतून एके एके जागीं आमिलनामें एक एक कारभारी ठेवित. त्या कारभाऱ्यानें वतनसंबंधी अथवा लोकांचे भाऊबंदकीचें वगैरे दुसरें कांहीं खटलें असल्यास त्याची पंचाईत करून पंचांचे विचारानुरूप करावें. जातीनें मनास आणूं नये. विजापुरचे राज्यांत एक मोठा आमिल होता त्याचें नांव मोकासादार ठेविलें असे; आणि दुसरे आमिल त्याचे आज्ञेंत वागत असत. असे कित्येक मोकासादार वीस वीस वर्षें कामावर होते. त्यांत कोणी मेला असतां त्या कामावर त्याचे पुत्रास ठेवित; अशी चाल होती. कांकिं मोकासादारांस त्या द्रव्याचा कांहीं विभाग होता. कित्येक वेळा एका वर्षांत मोकासादार पहिला दूर करून दुसरा ठेविला असें झालें. आणखी मोकासादारी निरंतर मुसलमानांसच द्यावी असें नव्हतें. कधीं कधीं हिंदूसही देत होते. त्या राज्यांत मोकासादारी पेक्षां मोठा अधिकार दुसरा बहुतकरून नव्हता. कधीं कधीं सुभा मोठा असे; परंतु सुभ्यानें नेहमीं त्या प्रांतीं नसावें, बहुधा दरबारींच असावें. त्याणें मुलुखाचे वसुलाचें काम न करावें. परंतु त्याचे मुलुखाचे दप्तरावर त्याची सही येत होती. ब्राह्मणी वंशाचें राज्य बुडाल्यावर कांहीं दिवस नवीं नवीं राज्यें झालीं. परंतु मराठी लोकांचे वर्तमानांत अंतर पडलें नाहीं. त्या वेळेचे बखरीवरून असें वाटतें कीं, बहुधा डोंगरी किल्ले मराठी लोकांकडे बादशाहाकडून असत. कधीं कधीं बादशाहाकडेसच असत. कधीं कधीं देशमुख व देशपांडे यांकडे असत; त्यांत कित्येक प्रांतांतील मोठे मोठे किल्ले बादशाहा आपणाजवळच राखीत. त्या लोकांत ज्याचे स्वाधीन बहुत स्वार असा जो मोठा सरदार त्याला मोठ्या योग्यतेचें नांव मनसब असें देत होते. तो अधिकार व तें नांव कधीं कधीं हिंदूस देत, अशी बादशाहाची कृपा हिंदुलोकांवर होती. याशिवाय हिंदूंनीं फौजेसहित आपल्ये चाकरीस असावें म्हणून कित्येक

जहागिरी

जहागिरी इनामें देत असेत. त्यानिमित्त चाकरी करितां हिंदुलोकांस बहुत फौज ठेवावी लागत नव्हती. त्यासमयीं फलटण देशाचा जहागिरदार विजापूरकराकडे होता. त्यापासून बादशाहा पर्यंत त्यांची चाकरी घेत असे; आणि मराठे पेशवे यांचे वेळेस त्या जहागिरदारापासून ३५० साडेतीनशें त्यांची चाकरी पेशवे घेऊं लागले. पेशवे यांचे पूर्वीं इदिलशाही बादशाहींत मराठे लोकांस बर्गी असे नांव तुच्छ मानानी ठेविलें होतें. तें आतां बहुतकरून प्रसिद्ध नाहीं. असें वाटतें कि, जसें यांतस बारभाई नांव हलकें आहे, तसेंच त्या वेळेस बर्गी नांव कितीस उणें असेल. प्रायः तें नांव कर्नाटक प्रांतीचे बंडकर्णारे त्यांस होतें. त्यांत कोणी मोठे मोठे जहागिरदारही होते; असें असतां सन १५७७ पंधराशें सत्याहत्तरांत त्या बर्ग्यांतील अधिकारी यांणीं कर्नाटकांत मोठें बंड उत्पन्न केलें तेव्हां विजापूरचा इदिलशाह बादशाहा याणें तें बंड मोडावयाकरितां लष्कर पाठविलें तें एक वर्ष पर्यंत लढलें; परंतु उपाय चालेना. ते समयीं बादशाहानें कोणी एक बाबूपंत नामें ब्राह्मण सहाय केला. त्याचे हातानें त्या बर्ग्यांतील बहुतेक अधिकारी आपल्ये हस्तगत करून कपटानें मारिले. यानंतर ते बर्गीलोक विजापुरच्या इदिलशाहा याचेच आश्रयानें निजामशाहा बादशाहाशीं लढूं लागले. विजापूरकर व अहमदनगरकर यांचे लष्करांत बहुतकरून मराठेलोक फार होते. कांकि त्यांचीं राज्यें महाराष्ट्र देशांत होतीं. गोंवळकोंडकर यांचे लष्करांत मराठे लोक बहुत नव्हते. विजापुरकर, व अहमदनगरकर, व गोंवळकोंडकर, यांनि यांजवळ मराठे लोक होते. परस्परें युद्धप्रसंग पडला असतां, आपल्ये जातीचा लोभ न धरितां लढत असत. भाउबंदकी संबंधीं द्वेष पडला, किंवा बापलेकांत विनुष्ट पडलें असतां, भाउबंद, व बापलेक, यांणीं परस्परें निकरानें लढावें. अशी एक मराठी लोकांत चाल होती. ती त्यांचे पूर्वींच्या बामणी वंशाचे राज्या पासून चालत आली. तीचा प्रतिबंध त्या वेळेचा बादशाहानें न केला. कांकि ते आपल्ये जातींत भांडूं लागले; ते दुसऱ्याशीं काय लढतात, असें समजून, सोडिली नाहीं. तशीच रक्षिली. विजापुरकर, व अहमदनगरकर, यांचे राज्यांत मराठे सरदार कोण कोण होते. त्यांचा तपशील मग येईल. आधीं विजापूर, व अहमदनगर, व गोंवळकोंडा, या तिहीं राज्यांत किती बादशाहा झाले, तो विस्तार. त्यानंतर फिरंगी लोक कोंकणांत आले, तें प्रकरण. त्यापुढें मराठे सरदार यांचें वर्तमान लिहिलें जाईल. प्रथम विजापूर, व अहमदनगर, व गोंवळकोंडा, या तिहीं राज्यांत बादशाहा किती झाले तो प्रकार.

विजापूर	अहमदनगर	गोंवळकोंडा
विजापुरचा बादशाहा पहिला सुलतान यूसफ आदिलशाहा. तो १४८९ चौदाशें ए- कुण	अहमदनगरचा बादशाहा पहिला मलिक अहमद. तो निजामउल्मुल्क बहिरी असे.	गोंवळकोंड्याचा बादशाहा पहिला कुतुबउल्मुल्क नांवें १५१२ पंधराशें बारांत आला

विजापूर.

कृष्णानदीपलीकडे तक्ताधिपती आला. आणि १५१० पंधराशें दाहांत मरण पावला.

त्याचा पुत्र दुसरा सुलतान इस्मायल आदिलशाहा. त्याचे जागीं बसविला. तो १५३४ पंधराशें चौतिसांत मेला.

त्याचा पुत्र तिसरा सुलतान मल्लु आदिलशाहा त्याचे ठिकाणीं स्थापिला. तो. १५३५ पंधराशें पंचावन्नांत पदच्युत केला.

त्याचा भाऊ चवथा सुलतान इब्राहीम आदिलशाहा स्थापिला. तो १५५७ पंधराशें सत्तावन्नांत मेला.

त्याचा पुत्र पांचवा सुलतान आदिलशाहा झाला. तो,१५८० पंधराशें ऐशींत कारभाऱ्यानीं कपटानें मारिला.

त्याचा पुत्र साहावा सुलतान इब्राहीम आदिलशाहा. तो. त्याचे स्थानीं बसविला. त्याचे मरणाचा प्रकार तिसरे भागीं येईल.

अहमदनगर.

असें नांव पावून, १४७७ चौदाशें सत्याहत्तरांत राज्य करूं लागला; आणि १५०८ पंधराशें आठ सुमारें तेव्हां मृत्यु पावला.

त्याचा पुत्र दुसरा सुलतान बुऱ्हाण निजाम आला. तो. १५५३ पंधराशें त्रेपन्नांत मरण पावला.

त्याचा पुत्र तिसरा सुलतान हुसेन निजामशाहा बसविला. तो. १५५६ पंधराशें छप्पन्नांत मृत्यु पावला.

त्याचा पुत्र चवथा सुलतान मोर्तिजा निजामशाहा झाला. तो, त्याचे पुत्रानें १५७७ पंधराशें सत्त्येहात्तरांत मारिला; आणि आपण तक्ताधिपती झाला. त्याचें नांव सुलतान हुसेन निजामशाहा बादशाहा. त्याणें दोन महिने राज्य केलें. नंतर कारभाऱ्यांनीं त्यास मारिलें.

त्याचा भाऊ साहावा सुलतान इस्मायल निजामशाहा झाला. तो,तक्ताधिपती असतां, त्याला त्याचे बापानें काढून

गोवळकोंडें.

झाला तो १५५१ पंधराशें एकावन्नांत कारभाऱ्यानीं मारिला.

त्याचा पुत्र दुसरा सुलतान जमशीद. तो, सात महिने राज्य करून मेला.

त्याचा भाऊ तिसरा सुलतान इब्राहीम कुतुबशाहा बादशाहा झाला. तो १५८१ पंधराशें एक्याऐशींत मृत्यु पावला. त्याचा पुत्र चवथा सुलतान महंमद कुली कुतुबशाहा झाला. तो,मेल्यानंतर त्याचा भाऊ सुलतान अबदुल्ला कुतुबशाहा[*] झाला.

[*] इतकीं प्रकरणें मनुष्यांचीं शकाचें मूळापासून मोंगलांपर्यंत आम्हीं या रवेरीज गद्यांत ... तीं पुढचे भागीं येतील.

टून दिला; आणि आपण तें
पद घेतलें, त्याचें नांव सुलता-
नबुराहण निजामशाहा, तो मा-
नवा आला; आणि १५०४ पंध-
राशें चौऱ्याण्णवांत मरण पा-
वला.

सन इसवीशकाचे १४९८ चौदाशें अठ्याण्णवांचे पांचवे महिन्यांत फिरंगी पोर्तुगीस लोक, यांचा जातीचा एक वास्कोदिगा नामें मोठा सर्दार, बरोबर फिरंगी लोक घेऊन जाहाजांत बसून आला, तो केरळ देशीं समुद्रतीरीं एक कलिकत नामें शहर आहे तेथें उतरला; आणि युद्ध न करितां त्या देशांत आपल्ये लोकांसहित सुखवस्ती राहिला. त्याचा स्वभाव सुखवस्ति राहावें असा नव्हता, यास्तव १५०७ पंधराशें सातांत चौल शहराजवळ मिस्री लोकयांचे लढाऊ गलबतांची व पोर्तुगीस लोकांचे लढाऊ गलबतांची गांठ पडतांच उभयतां मोठ्ये निकरानें लढले. नंतर निजाम उल्मुल्क बहिरी यांशीं पोर्तुगीस लोकांनी सख्य केलें; आणि समुद्रांत व मुलखांत उपद्रव करूं लागले. ते सन १५०८ पंधराशें आठांत दाभोळचे खाडींतून येऊन, दाभोळ लुटून, गेले. ते समयीं, त्यांचे हातीं कांहीं मुलुख लागला नव्हता. नंतर, तुळव्याचा तिमोजी नामें एक समुद्रांतला लुटारू होता, तो पोर्तुगीस लोकांचा अल्फान्जो आल्बरकर्क नामें सरदार होता, त्यास मिळाला, मग त्याचे मसलतीनें सन १५१० पंधराशें दाहांचे दुसरे महिन्याचे २१ सत्ताविसाव्ये तारिखेस छापा घालून, गोवें घेतलें, तें त्यावेळेस विजापूरचे राज्याखालीं होतें, म्हणून, विजापूरचा बादशाहा यूसफ आदिलशाहा फौजेसहित आला; आणि त्याणें लढून, गोवें घेतलें. त्यानंतर त्याच वर्षाचे दाहाव्ये महिन्याचे २५ पंचविसाव्ये तारिखेस गोवें पोर्तुगीस लोकांनीं पुनः घेतलें, तें आजपर्यंत त्यांजकडेच आहे. त्यापुढें सन १५३२ पंधराशें बत्तिसांत ते लोक जाहाजांतून आले. ते चिंचणीतारापुरीं येउन उतरले; आणि त्याणीं तेथपासून वसई पर्यंत मुलुख लुटला. ते वेळेस वसईचा किल्ला नवाच बांधलेला होता. तो पाडिला; आणि ठाणें व मुंबई शहर यांची खंडणी घेतली. त्यापुढें दोन वर्षांनीं दमान घेतलें. त्या समयीं गुजराथेंत सुलतान बाहादुर नामें बादशाहा होता. तो दिल्लीचे बादशाहाशीं लढून, केवळ हीनबळ झालेला, असा पाहून, फिरंगी लोक त्याला म्हणूं लागले. कीं आम्हांस वसई परगणा द्या; आणि काठेवाडांत दिउ येथें किल्ला बांधावयास जागा. आणि आर्वस्थानचे जाहाजांचे जकातींत आम्हास कांहीं विभाग असावा, म्हणजे आम्हीं. दिल्लीचे बादशाहाशीं लढाई करावयास तुमचे कुमकेला येउं याप्रमाणें त्याचें बोलणें मान्य करावयास. सुलतानास मोठ्या अडचणीमुळें अगत्य पडलें. नंतर ते पोर्तुगीस लोक

लोक कित्येक वर्षे लोकांस उपद्रव नकरितां. आपल्ये मुलखाचा बंदोबस्त करित होते. पुढें सन १५४८ पंधराशें अठ्ठेचाळीसांत त्याणीं समुद्रतीरचा मुलुख बाणकोटापासून गोमांतकपर्यंत लुटला, आणि जाळिला; ता, तेसमयीं विजापूरचे राज्याखालीं होता. त्या पुढें १५७१ पंधराशें एकाहात्तरपर्यंत त्या लोकांचें वर्तमान विशेष ल्याहाणें असें झालें नाहीं. त्या वर्षी विजापूरचा बादशाहा, व अहमदनगरचा बादशाहा, हे दोघे मिळोन फिरंगी लोकांशीं लढाई करावयास गेले. ते गोवें, आणि चोलशहर, या दोहोंस वेढा घालून लढूं लागले; परंतु पोर्तुगीस लोकांपुढें त्यांचें बळ चाललें नाहीं. ते आपणाच पराभव पावले; आपल्ये जातिस्वभावाप्रमाणें, उगेच बोलूं लागले, किं यांचें युद्ध शौर्ययुक्त नाहीं. हे कपटानें लढतात. असें भाषण करित करित पळून गेले.

आतां, मराठे सरदार यांचें वर्तमान. विजापूरचे बादशाहाचे चाकरीस मराठे सरदार मुख्य होते. एक चंद्रराव मोरे, दुसरे रावनाईक निंबाळकर, ज्यांस फलटणराव ह्मणत होते. तिसरे जुझारराव घाटूग, चौथे रावमाने, पांचवे घोरपडे, साहावे डफळे, सातवे सावंत बहादर वाडीचे देशमुख, वगैरे विजापूरकरांकडे होते. अहमदनगरकरांजवळ होते त्यांत एक रावजाधव, दुसरे राव भोंसले, आणि दुसरे बहुत न्यून पदाचे होते. विजापूरवाल्यांचे चंद्रराव मोरे यांचें मूळ असें आहे कीं, पूर्वी, कर्नाटकांत एक मोरे आडनावाचा नाईक होता. त्याला यूसफ आदिलशाह विजापूरचा बादशाह याणें हिंदी पायदळ फौज १२००० बाराहजार देउन, निरा आणि वारणा या दोहों नद्यांचे मधला मुलुख, जो घ्यावयास कठीण फार अडचणीचा असा होता, तो घ्यावयाचें काम सांगीतलें. ते समयीं, त्या मुलुखांत शिरके यांचे मूळपुरुष होते, आणि त्यांचे सहाय जे होते ते एक गुजर, दुसरे मामुलकर, तिसरे मोहिते, चौथे महाडिक, वगैरे असतां मोरेयाणीं तेथें जाउन ते शिरके व त्यांचे सहाय जिंकून तो मुलुख घेतला. एवढें काम केलें ह्मणून बादशाह याणें त्याचे नावाला चंद्रराव असें पद जोडून त्यास जावळीचा राजा केला. ते मोरे त्या पुरुषापासून पुढें सात पुरुषपर्यंत तेथेंच होते; त्याणीं तें राज्य उत्तम नीतीनें केलें ह्मणून, बहुत लोक येउन तो मुलुख वस्तीस योग्य नसतां तेथेंच राहिले. त्या बादशाहानें ठेविलेलें चंद्रराव असें नांव मोरे यांचे सातां पिढ्यांस चालिलें. ते बादशाहाचे आज्ञेंत वागत ह्मणून बादशाह त्यांचे मुलुखाचा वसुल, आपलें स्वामित्वमात्र राखावयास फार थोडा घेत असे. ज्यांस फलटण नाईक ह्मणत तेच निंबाळकर; त्यांचे कुळाचें पूर्वीचें नांव पंवार असें होतें; त्यांचा मूळपुरुष निंबाळीक गावीं राहात होता; त्या गावांस आतां निंबळक ह्मणतात. हें कुळ मराठी लोकांत पुरातन आहे; याचे पहिल्ये पुरुषांस फलटणदेशाचे देशमुखीचा विभाग होता. सन सोळाशें चाळीस सुमारें विजापूरचे बादशाहानें त्यांस सरदेशमुखी दिली; त्याणीं आपलें नांव बदलून दुसरें केलें नाहीं. जें पहिलें

नाईक

नाईक असें दोन तेंच चालविलें. सन सोळाशें सुमारें त्या कुळाचा एक पुरुष वंगोजी नाईक होता, त्यास लोक जगपाळ ह्मणत. तो मोठी पुंडाई करीत असे. त्याची वहीण शिवाजी महाराजाची माय आजी. मल्लावरीचे देशमुख जुझारराव, ते घाटगे यांचे कुळांत श्रेष्ठ होते; त्यांचें राहाणें ग्वटाव देशीं असे; त्यांचे देशाची मर्यादा व निंबाळकर यांचे देशाची मर्यादा या दोहोंमध्यें महादेवाचा डोंगर. ते घाटगे माण परगण्याचे देशमूख होते. त्यांचे मूळ पुरुषास ब्राह्मणीवंशाचे बादशाहानें मनसब[+] दिल्ही होती. ती तारीख कोणती व तो बादशाह कोणनावाचा होता तें कळत नाहीं. विजापुरच्या बादशाह इब्राहीम आदिलशाह, याणें घाटगे यांस सरदेशमुखी[*] व जुझारराव असें नाव, सन सोळाशें सहासांत दिल्हें. पूर्वीपासून घाटगे यांचे कुळाचा स्वभाव आपल्ये आपल्यांत भांडावें असा लोकांत प्रसिद्ध आहे. माने यांचे मूळपुरुष म्हसवडचे देशमूख होते, त्यांची जागा व घाटगे यांची जागा दोन्ही शेजारीं होत्या. ते विजापुरकराजवळ शिलेदारी[†] करून विख्यात झाले. घोरपडे यांचें मूळचें उपनाव भोसले होतें. त्यांचा एक पुरुष कोंकणचा मोठा कठीण किल्ला घ्यावयाकरितां, घोरपडीचे कमरेस व आपल्ये कमरेस एक दोरी बांधून, घोरपड किल्यावर चढवून त्या दोरीवरून आपण किल्यावर गेला; आणि तो किल्ला घेतला. ह्मणून त्याचें नाव घोरपडे पडलें आहे, असें बखरेवरून वाटतें. विजापूरचे बादशाहींत[‡] त्याची देशमुखी होती, त्याचे कुळास नावें दुसरीं, त्या नावांतच दोन होतीं एक कापशी, आणि एक मुधोळ. कापशी वारणातीरीं होते; आणि मुधोळ घटप्रभेचे कांठीं असत. डफळे विजापुराजवळ जत परगणा आहे तेथचे देशमूख. यांचें पूर्वीचें उपनाव चव्हाण हे डफळापुरीं पाटिलकी करीत ह्मणून, यांचें नांव डफळे असें पडलें. विजापूरसरकारांतून त्यांस मनसब अधिकार मिळाला होता; परंतु दुसरें कांहीं वेगळें नाव मिळालें नाहीं. सावंत पहिलेपासून वाडीचे देशमूख, त्याणीं पोर्टुगीसलोकांशीं फार चांगली लढाई केली ह्मणून बादशाहानें त्यांचे नांवांस बहादर असें पद जोडिलें त्यापासून सावंत बहादर असें त्यांस लोक ह्मणूं लागले. त्यांचें मूळचें उपनाव भोंसले. त्यांजवळ नुस्ती पायदळ फौज होती, आणि त्या मुलुखीं दुसऱ्ये फौजेचा उपयोग नव्हता त्या वाडीसंनास कु-

---

+ मनसब ह्मणजे, मोंगलाईंत स्वारांचे सरदारी सारिखा अधिकार होता, तो कधीं कधीं १०००० दहा हजार स्वारांचा असे. ते लोक त्याचे खर्चाप्रमाणें त्यास जहागीर देत असत.

---

* सरदेशमुख्यास विजापूरचे बादशाहींत वसुलाचा विभाग किती होता तो कळत नाहीं; परंतु दिल्लीचा औरंजेब बादशाह याचे वेळेस कित्येका सरदेशमुख्याना शेंकडा दोन रुपये प्रमाणें विभाग होता.

---

† शिलेदार ह्मणजे जो आपल्ये खर्चाचा घोड्यावर बसून धण्याची चाकरी करितो तो, आणि जो धण्याचे घोड्यावर बसून चाकरी करितो तो बारगीर.

---

‡ कापशी यांस विजापूरचे सरकारांत नवकरस ह्मणत, आणि मुधोळास मानकरस ह्मणत.

डाळ

डाळ देश म्हणतात. अहमदनगरचे राज्यांत एक मराठा सरदार मुख्य होता, त्याचें नांव जाधवराव; तो शिंदखेरचा देशमुख. त्याचा मूळपुरुष देवगडचा राजा असेल. असें वाटतें कीं सर्व मराठी कुळांत जाधवरावाप्रमाणें दुसरा प्रतापी नव्हता. सन सोळाशें-चा सुमारें निजामशाह बादशाहाचे सरकारांतून त्याला दहा हजार स्वारांची सरदारी सांगत, त्याचे बंदोबस्तास जाहागीर दिल्ही होती. दुसरे मुख्य सरदार भोसले ते मोठे कुलीन होत. असें वाटतें कीं त्यांची पाटिलकी बहुत जागां होती; परंतु त्यांचें राहाव-याचें ठिकाण दवलताबादेजवळ वेरूळ म्हणून गांव आहे, तें. पहिले बाबजी भोसले यां-स पुत्र दोघे. त्यांत वडील विठोजी, धाकटा मालोजी. त्याला जगपाळराव नाईक निंबाळकर फलटणचा देशमुख, याची बहीण दीपाबाई दिल्ही होती. तो मालोजी भोंसला पंचवीसांवर्षांचा झाल्यावर आपल्ये बरोबर कित्येक स्वार घेउन लुकजी जाधवाचे आश्रयानें मोर्तिजा निजमशाह बादशाह याचे चाकरीस राहिला. हें वर्तमान सन पंधरशें सत्त्याहात्तरांत झालें. त्या मालोजीस पुत्र नव्हता म्हणून त्याणें मोठी देवसेवा केली; परंतु पुत्र झाला नाहीं. मग अहमदनगरीं एक मुसलमान जातीचा शाहसरीफ नावें मोठा सिद्ध होता; त्याणें आपल्ये देवाजवळ विनंती करून मालोजीस सांगीतलें कीं, तुला पुत्र होईल. नंतर, कांहीं दिवसांनीं त्याची स्त्री दीपाबाई प्रसूत झाली, पुत्र झाला. मालोजीनें तो सिद्धाचे प्रसादें करून झाला असें जाणून, त्या मुलाचें नांव शाहाजी ठेविलें. त्यावर दुसरे वर्षीं दुसरा पुत्र झाला. त्याचें नांव सरीफजी ठेविलें. त्या शाहाजी भोंसल्याचें जन्म पंधराशें चौऱ्याण्णवांत झालें. मालोजी भोंसले उत्तम प्रकारें सरकारचाकरी करून योग्यता पावूं लागले; आणि ज्या जाधवाचे आश्रयानें चाकरी मिळविली तो लुकजी जाधवराव ही त्यावर बहुत कृपा करूं लागला. मालोजीचा पुत्र शाहाजी रुपानें फार चांगला होता. सन पंधराशें नव्याण्णवांत शिमग्यामध्यें मालोजीनें आपल्ये पुत्रास लुकजी जाधवरावाचे घरीं नेलें. तेव्हां जाधवराव त्या मुलाचें रूप पाहून बहुत खुष होउन त्या मुलास जवळ बोलाउन जिजाबाई कन्या मांडीवर होती तिला बोलिल्या कीं, हा तुला नवरा पाहिजे काय? आणीक मंडळीस म्हणूं लागला कीं, हा जोडा कसा दिसतो. इतक्यांत तीं दोन्हीं मुलें एकमेकांवर गुलाल उधळूं लागलीं; तें पाहून सर्व मंडळीस चमत्कार वाटला, आणि हांसूं लागले. तेवेळेस भोंसले उभे राहून बोलिले कीं, ऐका हो सर्व मंडळी, आज पासून जाधवराव आमचे व्याही झाले यास तुम्हीं साक्षी आहांत. तेव्हां त्या मंडळींत कोणी कोणी म्हणाले कीं हें ठीक आहे. तें ऐकून जाधवराव विरक्त होउन उगाच राहिला, कांहीं बोलिला नाहीं. त्यानंतर, दुसरे दिवशीं जाधवानें त्यास भोजनास बोलाविलें, तेव्हां तो म्हणाला कीं, तुम्हीं व्याही व्हाल तर मी येईन. नाहीं तर येणार नाहीं. हें ऐकून किमपि मान्य न केलें; आणि त्याचे स्त्रीसही कळवा-

न

म राग येऊन बोलिली. कीं असें भाषण विनोदांत ही नक्षावें; माझे कन्येचे आणि त्याचे योग्यतेस अंतर किती आहे? त्यानंतर मालोजी आपल्ये राहायाचे ठिकाणीं गेला परंतु त्याणें तो अर्थ मनांत धरून त्याचे साधनाकरितां. कांहीं लबाडया करून द्रव्य मिळविलें, तें चांभारगोंद्याचा सावकार शेषाप्पा नाईक याजवळ ठेविलें; आणि लोकांत अशी प्रसिद्धि केली कीं, भवानी आम्हाला प्रसन्न होऊन द्रव्य देऊन बोलली कीं, तुमचे कुळांत एक राजा होईल; तो सांबासारिखा गुणवान् होईल; आणि ब्राह्मणाचें पोषण फार चांगलें करील; आणखी त्या पुरुषापासून पुढें २७ सत्तावीस पुरुष पर्यंत त्याचें राज्य निर्बाध चालेल. इतकें केल्यावर आणखी मोठी कीर्ति व्हावी म्हणून कित्येक जागीं देवालयें व तळीं बांधिलीं आणि वहून घोडे विकत घेतले. ते समयीं, त्या राज्याचें सामर्थ्य कमी होऊं लागलें होतें, तें समजून याणें त्या दर्बारी लोकांस द्रव्य देऊन वश केले होते, त्या योगेंकरून त्याला बादशाहापासून पांच हजार स्वारांची सरदारी, आणि मालोजी राजे असें नांव मिळालें. याखेरीज शिवनेर व चाकण या दोहों किल्यांची, व यांचे खालचे मुलुखाची मामलत प्राप्त झाली; आणि पुणे परगणा व सुपे परगणा त्यास जाहागीर मिळाला. एवढया योग्यतेस आल्यावर बादशाह याचे आज्ञेनें त्याशीं संबंध करावयास जाधवराव सिद्ध झाले मग जाधवरावाची कन्या जिजाबाई व मालोजीचा पुत्र शाहाजी या दोघांचें लग्न मोठया समारंभानें झालें.

सन् पंधराशें नव्वदांत दिल्लीचा मोठा यशस्वी आकबर बादशाह याणें मनांत आणिलें कि, दक्षिणेचे अस्के बादशाह जिंकावे. तेव्हां ते सर्व परस्परें लढत असत, आणि आपसांत आपसांत वैमनस्यें होतीं, म्हणून आकबरास बहुतेक दक्षिणेचें राज्य मिळालें. याखेरीज खानदेश व निजामाचा मुलुख, त्यांत अहमदनगरचा किल्ला आणि कांहीं वराडदेश हे त्याचे हस्तगत झाले. तो बादशाह पंधरा वर्षांत इतकें करून सोळाशें पांचांत मृत्यु पावला. अहमदनगरचा किल्ला जावेळेस आकबराचे लोक मोंगल याणीं घेतला, ते समयीं, तेथचा बादशाहा निजाम् शाह बहादर तो केवळ बाळ होता त्याला त्या मोंगलांनी बंदींत ठेविला. त्याचे पूर्वी अहमदनगरचे राज्यांत दोन फळ्या झाल्या होत्या, एकाचे मुख्त्यार हिंदू होते, एकाचे हपशी, जांत कित्येक श्रेष्ठ मुसलमान होते. त्यांत हिंदूनीं आपल्ये कुमकेस आकबराचा मोंगलांस बोलाविलें, ते त्यांची कुमक न करितां मुलुख मात्र घेते झाले. तेव्हां, हिंदूचे मोटे मोटे मानकरी यांस पश्चात्ताप झाला, मुसलमान लोक यांचा मुलुख मोंगलानीं घेतला, आणि बादशाह बंदींत ठेविला तरी, ते त्या आपल्या राज्याविषयीं निराश झाले नाहींत ते आपल्ये सामर्थ्येंकरून श्रेष्ठत्व पावले. त्यांत एक मोठा कल्पक फार शाहाणा मल्लीकंबर नामें होता, तो त्या लोकांसह वर्तमान बादशाह याणें घेतलेल्या मुलुखाखेरीज उरलेल्या मुलुखाचा बंदोबस्त राखून राहिला; आणि नवाच एक बादशाह करून

रून त्याचें नांव दुसरा मोर्तिजा निजामशाह असें ठेविलें. अशीक, दौलताबादचे किल्याचर बाहेरि सरकारचा झेंडा लाविला. त्यानंतर तो मल्लीकंबर लवकर प्रसिद्धीस आला. त्या वेळेस दिल्लीचा तख्ताधिपती जाहानगीर नामें नवा झाला होता, त्याचे पुत्रानें बंड उत्पन्न केलें. त्यामुळे त्या मोंगल लोकांस मल्लीकंबराला उपद्रव करावयास अवकाश सांपडला नाहीं. इतक्यांत, मल्लीकंबरानें आपल्या मुलुखाचा बंदोबस्त चांगला केला, आणि आपली प्रजा व शेजारचे संस्थानी लोक वश करून घेतले; आणि दौलताबादेजवळ एक खिडकी+ नामें शहर वसविलें; त्यांत मोठे मोठे माहाल बांधून ती मोठी राजधानी केली. मग त्याणें कित्येक वेळां मोंगल लोकांचा पराभव केला. आणि थोडकेच दिवसांनीं अहमदनगरचा किल्ला व कित्येक वगैरे मुलुख मोंगलांपासून घेतला; परंतु मोंगलांनीं मल्लीकंबराकडे फार दिवस टिकूं दिला नाहीं, पुनः घेतला. त्या मुलुखांत पहिली रीति अशी होती की, जो मख्तुलानें काम पत्करील त्याला सामलत सांगावी, ती मल्लीकंबरानें मोडिली, आणि वसूलाचे कामावर मुखत्यार मुसलमान ठेवून ब्राह्मणाचे हातून काम करवीत असे, निरंतर त्याचाच जय असे असें नाहीं कित्येक वेळां मोंगल लोकांनींही त्याचा पराभव केला. सन सोळाशें एकवीसांत कित्येक मराठे सरदार त्याची चाकरी सोडून मोंगलांस मिळाले. त्यांत शिंदखेडचा देशमूख लुकजी जाधव होता, त्याचा मोंगलांनीं मोठा संमान करून त्याला मोठी मनसब दिली त्यावरून असें वाटतें कीं, त्या वेळेस मराठे योग्यतेस येऊं लागले होते. ते समयीं दिल्लींत बादशाहाचे पुत्रानें बंड केलें, त्यामुळें मोंगलांस मल्लीकंबराला उपद्रव करावयास फावलें नाहीं. पुढें सन सोळाशें सव्वीसांत मल्लीकंबर मरण पावला. त्यानंतर इभ्राहीम् आदिलशाह विजापूरचा बादशाह एकाच वर्षानें मेला. त्याणें आणि मल्लीकंबरानें प्रजेस सुख दिलें. म्हणून अद्यापि लोक त्यांचे गुण आठवतात. आतां विजापुरीं मोठीं मोठीं घरें व देवालयें मोडकेली आहेत त्यांत इभ्राहीमाची कबर केवळ नवी बांधल्याप्रमाणें दिसत्ये, आणि फार सुंदर आहे. इभ्राहीम आदिलशाह याचा पुत्र महंमद आदिलशाह बापाचे पाठीमागें तख्ताधिपती झाला. तेव्हां, त्याचें वय पंधरा वर्षांचें होतें. त्याचे जवळ शिबंदी पुष्कळ होती, आणि त्याचे जामदारखान्यांत द्रव्य बहूत असे, आणखी, त्याचे राज्यांत प्रजा सुखी होत्या मल्लीकंबराचे पुत्र दोघे एक फत्तेखान, एक चंगेजूखान, त्यांत फत्तेखान याणें आपल्या बापाचा अधिकार जो मोर्तिजा निजामशाहापाशीं होता तो संभाळिला; आणि मोंगलांशीं युद्धें केलीं; परंतु त्याची योग्यता मल्लीकंबराप्रमाणें नव्हती, त्यामुळें तो अगदीं बुडाला असता; परंतु खानजाहान् लोदी नामें एक मोंगलांचा मोठा सरदार मुख्य होता त्यास त्याची दया आली, म्हणून त्याणें त्याशीं सल्ला केला. पुढें

+ खिडकी शहराचें नांव औरंगाबाद पडलें त्याचें कारण पुढें येईल.

मोर्तिजा

मोर्तिजा निजामशाह मोठा झाल्यावर,एकवर्षपर्यंत त्याणें फत्तेखानाचे अन्याय ध्यानांत आणून,त्याला सन् सोळाशें एकुणतिसांत बंदींत ठेविला. त्यानंतर लुकजी जाधवराव आपला पहिला धणी मोर्तिजा निजामशाह याजकडे यावयाविषयीं इच्छा करूं लागला. तेव्हां,त्याणें तो मोगलास मिळाला ह्मणून त्याचें बोलणें मान्य केल्याप्रमाणें बाह्य आकार दाखवून, मग कोणे एके दिवशीं कांहीं कामासाठीं ह्मणून त्याला त्याचे सोयरे धायरे सुद्धां दौलताबादेंत बोलावून आणून,एकाएकीं दगा करून मारिले.त्यानंतर त्याची स्त्री भर्त्याची फौज घेऊन शिंदखेडीस गेली आणि तीचे बहिणीचा नवरा जगदेवराव जाधव याचे आश्रयानें मोंगलाचे लश्करांत जाउन मिळाली. मग तीचे विनंतीवरून मोंगलांनी जगदेवराव जाधव यास लुकजी जाधवाचा अधिकार व पांचहजार स्वारांची मनसब दिली. तेव्हां,पासून शिंदखेडच्या जाधवाचें कुळ मोंगलांच्या अभिमान धरूं लागलें दिल्लीचा बादशाह जहानगीर सन् सोळाशें सत्तावन्नांत मेला. नंतर एकवर्षानें त्याचा पुत्र शहाजहान यास तक्ताधिपती केला ते समयीं,महाराष्ट्र मुलुख जितका मोंगलांनीं घेतलेला होता त्याचा अधिकारी खान्जाहानलोदी नामें होता, त्याशीं शहाजहान बादशाह द्वेष करीत असे. त्याणें त्यास धरावयास फौज पाठविली तेव्हां,तो पळून गेला, तो निजामशाह याचे लश्करांत जाउन त्यांचा आश्रय करून राहिला. ह्मणून,शहाजहान् बादशाह दक्षिणेंत फौज घेऊन चालिला तेव्हां,खान्जहान लोदी निजामशाहास सोडून दक्षिण देशांतच अगर्वा पळाला. तेवेळेस,त्याचा सहाय शहाजी भोंसला होता. तो शहाजहानाचें मोठें सामर्थ्य पाहून खानजहान्लोदी यास सोडून त्यास मिळाला. तेव्हां तो शहाजी व त्याचे बरोबर जे दुसरे सरदार होते ते बादशाहापासून मनसब व मोठा संमान पावले. असें वर्तमान सन् सोळाशें एकुणतिसांत झालें. त्या वर्षी,आणि त्याचे पुढचे वर्षी,दक्षिणदेशीं पर्जन्य पडला नाहीं ह्मणून मोठा दुष्काळ आणि महारोग एकदांच पडले. तेव्हां खान्जहान्लोदी सर्वप्रकारें निरुपाय होउन दक्षिणेंतून निघोन काबुल प्रांतीं जाउन आफगाणलोकांस मिळावें ह्मणून निघाला. तों त्याच्या वाटेनें शहाजहान बादशाहाचे सरदारलोक भेटले. मग त्यांशीं व याशीं युद्ध होउन तो खान्जहान्लोदी मरण पावला. त्यानंतर त्या सरदारांनी अहमदनगरचा बादशाह निजामशाह याचे कित्येक जहागीरदार व मनसबदार याचे अधिकार व मुलुख घेउन आपल्या लोकांस दिले. तेव्हां,तो बादशाह आपलें संस्थान जाईल ह्मणून भ्याला, आणि जो बंदीस ठेवलेला फत्तेखान् यास सोडून पहिल्याप्रमाणें त्याला वजीरीचें काम सांगितलें. अशी त्या बादशाहाची अनीती पाहून एक त्याचे लश्करचा तकरीबखान नामें मोठा सरदार होता तो,त्याची चाकरी सोडून मोंगललोकांकडे जाउन मिळाला. ते समयीं विजापूरकर

व अहमदनगरकर हे आपल्या आपल्या मध्यें एकमत होउन मोंगलाचा पराभव करावा अशी इछा करूं लागले, आणि तो विचार शेवटास न्यावयाकरितां त्यांस असें दिसूं लागलें कीं, जो पूर्वी विजापूरकरांचा व मोंगललोकांचा तह ठरलेला होता तो कामास येईल. तो तह असा कीं, विजापूरकर व मोंगललोक या दोघांनीं मिळून अहमदनगरचें राज्य बुडवून तो मुलुख उभयतां वाटून घ्यावा. त्यांत धारवाड किल्ला, व अणीक कांहीं मुलुख, व सोलापूर किल्ला विजापूरकरांचे वांट्यांत यावा. नंतर विजापूरकरांनीं आपलें लष्कर रणदुल्लाखान सरदार बरोबर देऊन मोंगलांकडे पाठविलें. तो सरदार असें बोलिला कीं, आह्मी पूर्व संकेताप्रमाणें आलों, तुह्मीं धारवाड किल्ला आमचे स्वाधीन करा. ते समयीं ते मोंगल लोकांचे सरदार त्यांस किल्ला एकाएकी देईनात. इतक्यांत, अहमदनगरकरांनी विजापूरकरांस सोलापूर किल्ला द्यावयास कबूल केला. त्या योगेंकरून त्या उभयतांची मसलत पक्की झाली असतां, कांहीं दैवगतीनें मोंगललोकांचें लष्कर व विजापूरकरांचें लष्कर या दोहोंत कांहीं कलह उत्पन्न होउन, मोठें युद्ध जाहालें. त्यांत विजापूरकर पराभव पावला. तेव्हां, ती मसलत सहजच व्यर्थ झाली, आणि तो दुष्ट फत्तेखान् याणें आपल्यें धण्यास कैद केला. आणखी त्याचे गळ्यास दोरीचा फांस घालून मारिला; आणि मानकरी सरदार जे त्याचे इष्ट होते तेही मारिले असें त्या फत्तेखानानें दुष्कर्म केल्यानंतर मोंगलांचा बादशाहा शहाजहान् याजकडे आपल्या कर्माची क्षमा होण्याविषयीं विनंती पत्र पाठविलें कीं, मीं हें कर्म तुमचा कार्याकरितां केलें, आणि त्याचे स्थानीं त्याचा पुत्र तुमचें उत्तर येई तोंपर्यंत बसविला आहे. तेव्हां, शहाजहानानें अहमदनगरचा मुलुख फार घेतला होता; परंतु कित्येक अवघड किल्ले त्या फत्तेखानाकडेसच राहिले होते, ह्मणून, बादशाहानें त्याचें पत्र मान्य केलेंसें दाखविलें, आणि उत्तर दिलें कीं, जर त्याचे आमदारखान्यांतले चांगले चांगले अलंकार व त्याचे उत्तम हत्ती असतील ते आह्माकडे पाठवाल तर, तुह्मीं केलेलें आह्मीं मानुं. त्या उत्तराबरोबर कित्येक जहागीरांची सनद व मोठे संमानाचें सूचक कांहीं अलंकारादिक पाठविलें. त्यास देणें दिलें त्यांत पूर्वी शहाजी भोंसल्यास दिलेला कांहीं मुलुख होता, ते समयीं, फत्तेखान् निरुपाय होउन बादशाहानें लिहिल्याप्रमाणें पाठवून देता झाला. नंतर अहमदनगरचा बादशाहा लहान ह्मणून तें राज्य फत्तेखानाकडेस राहिलें. ह्याप्रकारें पाहून शहाजी भोंसला अत्यंत खिन्न झाला आणि महंमद आदिलशाह विजापूरचा बादशाह याचा आश्रय धरून चाकरीस राहिला. त्या वेळेस, विजापूरचा मुख्य कारभारी मोठा सुज्ञ मुरारपंत नामें ब्राह्मण होता, त्याणें शहाजीचे मसलतीनें फौज तयार करून दौलताबाद घ्यावयास पाठविली. त्या वेळेस, फत्तेखान दौलताबादेंत होता, त्याणें आपलें संरक्षण करावयाकरितां मोंगलांनीं यावें ह्मणून त्यांस दौलता-

बाद

वाद किल्ला घावयास केला, त्यावरून, मोंगललोक दौलताबादेस येउन पोंचले नाहींत तोंच, विजापूरचें लष्कर दौलताबादेस आलें. तेव्हां, शहाजीचें व दौलताबादच्या लोकांचें मोठें युद्ध झालें; त्यांत शहाजीचा पराभव होऊन मागें आठ कोस हटला. नंतर, हें काम पराक्रमानें होणार नाहीं असें समजून, तह करणें इत्यादि युक्ती चालवावयास फत्तेखानाला निरोप पाठविला, कीं, तुह्मीं त्यांस किल्ला दिला असतां उभय पक्षीं हित नाहीं, हीच मसलत कीं, दोघांनीं मिळून त्याला त्याचें पूर्वस्थान दाखवावें; आणि तुमचा व आमचा पहिला संकेत असाच होता. तें ऐकून त्याणें मान्य केलें. नंतर, ते मोंगललोक आल्यावर त्यांवर हे दोघे मिळून तोफा सोडूं लागले, तेव्हां, मोंगलांचा सरदार मोहबतखान् तो क्रोधयुक्त होऊन निश्चय करिता झाला कीं, फत्तेखानाचें पारिपत्य अवश्य केलें पाहिजे. मग मोंगल लढूं लागले तेसमयीं, ते किल्लेकरी महत्प्रयास करून अठ्ठावन्न दिवस पर्यंत टिकले. नंतर, त्यांची बेगमी सरली यास्तव त्याणीं किल्ला मोंगलांस दिला. तेव्हां, मोंगलांनीं फत्तेखानाला त्या अधिकारावरून काढिला, आणि त्याचे हातचा स्थापिलेला मुलगा ग्वालेर किल्ल्यावर बंदींत ठेविला. पुढें फत्तेखान् वेडलागून मेला. यानंतर, शहाजीचे मनांत आलें कीं, अहमदनगरचे बादशाहाचा कारभार आपण करावा. ह्मणून निजामशाहाचे स्थानीं दुसरा नक्ताधिपती केला, आणि कित्येक ब्राह्मण जवळ बाळगून राज्य करायास आरंभ केला. आणि फौज जमा करून कित्येक किल्ले हस्तगत केले, व आगोजाग नव्या बादशाहाचा अंमल बसवूं लागला. ते समयीं, शाहाजाहान् बादशाह याणें दक्षिणेचें सगळें राज्य, आपला पुत्र, अथवा दुसरा कोणी आत्मीय, यांवांचून इतरांस दिलें असतां, त्यापासून आपणास अपाय होईल. असें समजून पुत्र औरंगजेब् लहान, यास्तव तो मोठा होई तोंपर्यंत, राज्याचे विभाग दोन करून एक खान्‌डौरान्, दुसरा खान्‌जमान्, यां दोघांस ते अधिकार दिले. त्या विभागांचा प्रकार असा; खानदेशाचा जितका मुलुख पूर्वीं मोंगलांकडे होता तो, व जालना परगणा, व वराडचा पैनघाट भाग, इतके मुलुख मिळून एकभाग. दुसरा जो मुलुख निजामशाहा बादशाह अहमदनगरकर यापासून घेतला होता तो. असे दोन दोघांचे स्वाधीन करून सांगितलें कीं, उभयतां पश्चिमेचा बंदोबस्त ठेवून शहाजीला जिंकावयास अनुकूळ असावें. त्या वेळेस शहाजी भोंसला मोठें सैन्य जमा करून विजापूरकरांचे आश्रयानें मुलुखांत उपद्रव करीत होता; त्यासाठीं शाहाजाहानास मोठा राग आला, कां कीं, दौलताबाद किल्ला जरी हस्तगत झाला तरी, राज्याचा बंदोबस्त होईना, ह्मणून शाहाजाहानानें मोठें सैन्य मिळवून निश्चय केला कीं, अहमदनगरचें राज्य घ्यावें. ह्याकरितां दक्षिणेचीं राज्यें बुडालीं तरी चिंता नाहीं. पुर्वीं शाहाजाहानास तें राज्य बुडवावें हें योग्य दिसत नव्हतें. तें कशासाठीं तें कळत नाहीं. कोणजाणे कांहीं राजकारणार्थ, किंवा कांहीं नीतिसाठीं. प्रथम विजापूरकराकडे वकील पाठवून बोल

पें

णें आपिलें कीं, अहमदनगरकरांचे किल्ले तुम्हीं घेतले आहेत ते सर्व सरंजाम सुद्धा आमचे स्वाधीन करा. त्यांत मुलुखमैदान नामें एक मोठी तोफ. जी परिंड्याहून विजापुरास नेली. ती द्यावी. याखेरीज शहाजीचे मसलतीस लागूं नये. याप्रमाणें वागल्यानंतर, निजामशाहींत जितका कोंकणपट्टा मुलुख पादशाही होता तितका व सोलापूर किल्ला. तुम्हाला देऊं; नाहीं तर अगदीं बुडवून टाकूं. हें बोलणें त्याणीं मान्य केलें नाहीं. तेव्हां, शाहाजाहानानें फौज जमा करून त्या लष्कराचे भाग चार केले. त्यांतले दोन शहाजी भोसल्यावर नेमिले. आणि दोन विजापूरकरांवर योजिले. तेवेळेस नासिक, व चांदोर, या जवळचे जितके शहाजीचे किल्ले होते ते, मोंगलांचे सरदार याणीं घेतले. हें वर्तमान सन सोळाशें पस्तिसांत झालें. त्यावेळेस खयरतखान मोंगलांचा सरदार विजापूरचे राज्यांत शिरला. आणि त्याणें नळदुर्ग घेतला, आणखी सोलापूर व बेदर. यादोहों मध्यें मुलुख अ[illegible] तोही घेतला. सेय्यदखान जहान याचे समोर शहाजी लढला नाहीं, एकाएकीं छापा घालीत असे. याप्रमाणें फार दिवस लढला. तो पहिल्यानें अहमदनगरासमीप होता, मग लढतां लढतां शेवटीं चांभारगोंदें, आणि वागमती या दोहों मुलुखांचे मध्यें हटून गेला. नंतर, मोंगल मोठा सामर्थ्यवान म्हणून मिरज व कोल्हापूर या दोहों मुलुखांमध्यें राहिला. तेव्हां, विजापूरचें लष्कर शहाजीस अनुकूल होतांच, त्यात जहानाचें सामर्थ्य चालेनासें झालें. तेव्हां मोंगलांचे दरबारांतून त्यास आज्ञा अशी आली कीं, मिरज, व कोल्हापूर, व रायबाग. या तिहीं शहरां जवळचा मुलुख उद्ध्वस्त करावा. त्याणें त्याप्रमाणें करून कित्येक लोक धरून आपल्या बरोबर नेले. याशिवाय खानडौरान, खानदेशांतून लष्करसहित वाटेनें मुलुखास उपद्रव करीत विजापुरास येऊन पोंचला. तो विजापूरहि घेता; परंतु त्या बादशाहानें संभोंवतें दहा कोसपर्यंत अन्न पाणी मिळेनासें करून ठेविलें होतें म्हणून, विजापूर त्याचे हातीं येईना. यास्तव खानडौराननें त्याशीं सल्ला केला. ती तारीख सन सोळाशें छत्तीस. या सल्ल्याचा प्रकार अवश्य जाणावा. कां कीं, त्यापासून शिवाजी महाराज याचें माहात्म्य उत्पन्न झालें. त्या सल्ल्याचा प्रकार असा; परिंडा व सोलापूर, व त्यां खालचा मुलुख व नळदुर्ग यांत, व काल्यायान परगणा, व बेदर मुलुख. याशिवाय कोंकणच्या काल्यायान परगणा, आणि नीरा नदी व भीमा नदी. या दोहों मधला मुलुख, इतकें राज्य विजापूरकराकडे असावें. याखेरीज शहाजीचे किल्ले जितके असतील ते मोंगलांस दिले असतां, त्यास अभय आहे. आणखी विजापूरकरांनीं वर्षास वीस लक्ष होन मोंगलांस खंड द्यावा. विजापूरकर सल्ला करितात हें वर्तमान शहाजीला कळतांच, तो कोंकणांत जाऊन आपल्या किल्ल्यांचा बंदोबस्त करूं लागला. तेव्हां मोंगलांनीं त्याचा त्रिंबक किल्ला व शिवनेर किल्ला, व कोंकणच्या कित्येक मुलुख घेतला. ते समयीं शहाजीनें मोंगलांचे बादशाहास विनंती केली कीं, माझे अपराधांची क्षमा करून मला आपल्या चाकरीस ठेवा-

वें

वें. यांचीं तारीख सन सोळाशें सततीस. बादशाहानें आपल्या चाकरीस त्याला ठेविलें नाहीं, विजापूरकरांचे चाकरीस रहावें अशी आज्ञा दिली. त्यावरून शहाजी विजापूरकरांचा आश्रय करून राहिला. मग त्याणें स्थापिलेला बादशाह लहान होता तो, मोंगलाचा सरदार खानजमान याणें धरून ग्वाल्हेर किल्ल्यावर पहिले दोन मुलगे होते तेथें नेऊन ठेविला. असें अहमदनगरचें राज्य आणि बादशाह वहिरी वंश्य होते तें बुडालें. या भागाचे अनुक्रमणिकेंत तालिकोटाचे लढाईचा प्रकार आहे परंतु ग्रंथ पर्यंत लिहिला नाहीं याकरितां लिहिला जातो. तो असा कीं, पूर्वीं हिंदूंचें विजयानगराचें मोठें राज्य कर्नाटकांत कानडे लोक यांणीं स्थापिलेलें होतें. मग, सन पंधराशें चौसष्टांत दक्षिणेचे सर्व बादशाह मिळून त्या लोकांशीं जाऊन लढले. तो युद्ध प्रसंग फार मोठा झाला. ते समयीं, तें राज्य अगदीं बुडालें. लढाई तालीकोटाजवळ झाली. त्या तालीकोटाचें नांव राक्षितागडी असें कोणी बखरेंत लिहितात.

सन सोळाशें सततीसापासून सन सोळाशें अठ्ठावीस पर्यंत झालेलीं सर्व वर्तमानें मिळून भाग तिसरा.

तिसऱ्या भागाची अनुक्रमणिका

शहाजी विजापूरकराचे चाकरीस राहिल्यावर कसकसा वागत होता १. मग त्याणें दुसरी बायको केली २. त्याचा पहिल्या बायकोचे पुत्र दोघे. एक संभाजी. एक शिवाजी ३. दुसरीचा एक व्यंकोजी ४. तो शहाजी कर्नाटकांत गेला ते समयीं, त्याणें आपली पहिली बायको जिजाबाई व पुत्र शिवाजी, यांस आपले जहागीर ठिकाण पुणें येथें पाठविलीं; आणि त्यांचा बंदोबस्त दादोजी कोंडदेव यास सांगितला ५. विजापूर सरकार व गोंवळकोंड सरकार यांचीं लक्षें कोणे प्रकारचीं होतीं ते ६. मोंगल दक्षिणेचे वसूलाचा बंदोबस्त करिता झाला तें, आणि त्याणें फसली तारीख कधीं पासून स्थापिली तें वर्तमान ७. दादोजी कोंडदेव याणें वसूलाचा बंदोबस्त कसा केला तो ८. मावळे लोक यांची हकीकत ९. शिवाजीचे सरक्षक यांणीं त्याचें बाळपणीं त्याला कोणते प्रकारें वागविला तें १०. त्या शिवाजीचे पक्षपातें पहिले निघे कोण होते ते प्रकरण ११. त्याणें तोरणा किल्ला घेतला १२. तो आपणाकडेसच रहावा म्हणून बादशाह यास काय काय समजाविलें तें १३. राजगड किल्ला शिवाजीनें बांधिला तें १४. दादोजी कोंडदेवाचा मृत्यु १५. चाकण व कोंडाणें किल्ला, यांचे लोक शिवाजीनें आपणास अनुकूळ केले १६. सुपें परगणा. व पुरंदर किल्ला शिवाजीनें घेतल्याचा प्रकार १७

भाग

भाग तिसरा.

ज्या समयीं शहाजी विजापूरकरांचे चाकरीस राहिला तेव्हां त्यांचा प्रधान मुरारपंत याणें मोठ्या संतोषानें त्याला ठेविला; आणि सुपे परगणा, व पुणें परगणा त्यास दिला. कां कीं, त्याचे गुण व चातुर्य, तो मुरारपंत जाणत होता. पुणें व सुपें त्याचें पहिलें ठिकाण म्हणून त्याला दिलें. यानंतर, मुरारपंतानें भीमा व नीरा या दोहों नद्यांचे मध्ये जो विजापूरकरांस नवा मिळालेला मुलुख, त्याचा बंदोबस्त शहाजीचे साहाय्यानें केला, तेणेंकरून शहाजीचें चातुर्य फार प्रकट झालें. म्हणून तो मुरारपंत त्यावर बहुत संतुष्ट होऊन, जे समयीं माघारा बादशाहापाशीं आला, ते समयीं, बादशाहाजवळ त्याची फार स्तुती केली. नंतर, बादशाहाचें लष्कर कर्नाटकांत आल्ये वेळेस, बादशाह याणें शहाजीला त्या लष्कराचा दुसरा अधिकार दिला आणि त्याचा मित्र रणदुल्लाखान होता, त्याला त्या लष्कराचा मुख्य अधिकारी केला. यानंतर, त्यांचा जय झाल्यावर शहाजीला त्या मुलुखांत कोल्हार, बंगलोर, उसकट, बाळापूर, आणि सेरा, हे पांच परगणे बादशाहानें जहागीर दिले याशिवाय कराड+ परगण्यांत बावीस गांवांचे देशमुखीची सनद दिली. त्याला बादशाह याणें दोहों जागीं जहागीर दिल्याचें कारण असें असेल; शहाजीनें समजावें कीं, बादशाह याचे मुलुखाचे रक्षणेंकरून माझा मुलुखाचें संरक्षण होईल.

शहाजी भोंसला याणें मोंगलांची चाकरी सोडल्यापासून त्याचे सोयरे शिंदकेरचे देशमुख जाधव, यांचें व शहाजीचें वांकडें पडलें. मग जे समयीं मोंगलांशीं शहाजीचें युद्ध झालें ते समयीं, जगदेवराव जाधव शहाजीची स्त्री जिजाबाई तिचा चुलता, मोंगलांकडून शहाजीशीं लढत होता. संन सोळाशें तिसांत शहाजीनें दुसरी स्त्री मोहिते यांची कन्या केली; तेणेंकरून जिजाबाईला विषाद आला, यास्तव दुसरा कोणी आप्त याचे घरीं जाऊन राहिली. ती तीन वर्षे तेथेंच होती, नंतर मोंगलांनीं तें स्थान घेतलें परंतु मोंगलांजवळ भोंसले व जाधव होते त्यांणीं तिला सोडविली; आणि शहाजीचा कोंडाणें किल्ला येथें पोंचविली. तिचे दोघे पुत्र, त्यांत वडिल संभाजी, धाकटा शिवाजी, याचें जन्म शिवनेर‡ किल्ल्यामध्यें संन सोळाशें सत्ताविसांत झालें. थोरला पुत्र संभाजी बापास फार प्रिय होता; त्याला आपण कोठेंही गेला असतां बरोबर नेत असे; आणि शिवाजी आईजवळ होता. त्याला आई मोंगलांचे हातीं न लागूं देतां फार युक्तीनें जपत असे. नंतर जेव्हां शहाजी मुरारपंताबरोबर विजापुरास गेला, तेव्हां शिवाजीला घेऊन जिजाबाई त्याबरोबर गेली. ते वेळेस शहाजीनें पुत्र शिवाजी यास सातां वर्षांनीं पुनः पाहिला. त्यापुढें शहाजीजवळ जिजाबाई व शिवाजी फार दिवस राहिलीं नाहींत.

\+ कराड शहर साताऱ्याचे दक्षिणेस पंधरा कोस आहे.

---

‡ शिवनेरी किल्ला पुण्याचे उत्तरेस पंचवीस कोसांवर आहे त्याची पेठ जुन्नर.

सईबाई

सईबाई निंबाळकरांची कन्या शिवाजीला केली. तेथपर्यंत शहाजी स्वारी विजापुरी होती. नंतर कर्नाटकांत शहाजी जावयास निघाला, ते वेळेस जिजाबाई व शिवाजी पुण्यास रहावयास गेली. शहाजीची दुसरी स्त्री तुकाबाई मोहित्यांची कन्या तिचा पुत्र व्यंकोजी. याशिवाय एक संताजी नामें शहाजीच्या दासी पुत्र होता.

जे कोणी मराठे सरदार असतात ते बहुतकरून ब्राह्मण कारकून बाळगतात; त्यांत शहाजीजवळ ब्राह्मण बहुतच होते. त्यामध्यें दोघे अत्यंत विश्वासू एक दादोजी कोंडदेव आणि दुसरे नारोपंत हणमंते. त्यामध्यें नारोपंत हणमंते यांस कर्नाटकचे जहागिरीचा बंदोबस्त सांगितला; आणि दादोजी कोंडदेव यांस पुणे प्रांतींचा व बायको व मुलगा यांचा बंदोबस्त सांगितला; तो दादोजी कोंडदेव वसुलाचे कामांत निपुण होता, त्यांचे हातून लागवड चांगली होऊन उत्पन्न अधिक होत असे. नंतर शहाजीच्या शौर्यावरून प्रसन्न होऊन, बादशहानें इंदापूर परगणा, व बारामती परगणा, व पुण्याजवळचे मावळांतली तळवट जमीन, पुणें प्रांतांचे जाहागिरीला अधिक लावून दिली; तशी दादोजी कोंडदेव यांचीही योग्यता त्या मुलुखाच्या संरक्षणें करून वाढली.

त्यावेळेस गोवळकोंडे दरबारी, आणि विजापुरचे दरबारी आपआपल्या राज्यांची मर्यादा कर्नाटकापर्यंत होती. ती बादशाह्या कमितीं दक्षिण कर्णांत होते. ते दोघे जर संगतीशीं सावधपणानें वागते, तर उपयोगी होते, तें टाकून कर्नाटकांतील आणखी आणखी मुलुख घेऊं लागले; त्या दोघांत उपयोगाचें इतकेंमात्र झालें कीं महंमद आदिलशाहा विजापुरच्या बादशाह, याणें गोवळकोंड्याचा कुतुबशाह बादशाह, याचे कन्येशीं आपलें लग्न केलें.

महंमद आदिलशाह जातीनें शूर नव्हता. त्याचे लष्करास सरदार संभाळीत होते. त्याणें विजापुरची रचना मात्र फार चांगली केली, आणि त्या शहरांत पाण्याचे नळ बांधून आणिले ते अद्यापि आहेत.

मोंगलांच्या बादशाह शहाजहान याणें दक्षिणेच्या बादशाहांशीं सल्ला केल्यावर आपले नवे घेतलेले मुलुख यांचा बंदोबस्त करूं लागला. तेव्हां पूर्वी जे दक्षिणेचे दोन भाग केलेले होते ते एकत्र करून, त्याचा अधिकारी पुत्र औरंगजेब, यास केला. त्या शहाजहानाचे राज्यांत दक्षिण देशाचे मुलुखाचे हिशेबाची रीति नवी झाली. त्याचा करणारा तोडरमल्ल नामें मोठा बुद्धिमान एक हिंदु होता त्याणें उत्तम मध्यम कनिष्ठ जमिनी पाहून, त्यांचे उत्पन्नाच्या अर्धांशापासून सप्तमांशपर्यंत घ्यावा असें ठरविलें. त्यांत जो हिस्सा सरकारी ठरल्याचा पैका द्यावा असें केलें, याप्रमाणें कित्येक वर्षे गेल्यानंतर सरकारचे दप्तरांत जमिनीचा सर्व उत्पन्नाचा आकार करून जो हिशेब ठरला त्याचा चतुर्थांश सरकारानें घ्यावा असें कर

रून

रून रहाणी करणें टाकिलें ओ यथाई विशेष झाला तोच मार्ग मलिका ही रीति शहा जहानानें तीतेचे उत्तरेच्या मुलुखांतही स्थापिली तेथें ती रीति पुरती होण्यास वीस वर्षें लागलीं ती रीति टंका या नामें प्रसिद्ध होती टंका असें नाव पडलें याचें कारण असें कीं त्यापूर्वी नाख्याचा टक्का घेत होते ती चाल मोडून याणें टक्याचें रुपें घ्यावें असे करून त्याचें नांव टंका असें ठेविलें त्याचा सुमार सन सोळाशें अठतीस त्याच वेळेस मराठी लोकांत फसली शक चालू झाला दादोजी कोंडदेव याचा मुलुख मोंगलाचे मुलुखाजवळच होता परंतु त्याणें मलीकंबरी रीति चालविली ती अशी कीं प्रतिवर्षी पाहणी करून शेताचे प्राप्तीचा वसूल घ्यावा कधीं जिनस न घेतला तर त्याचा पैका घेत असें दिसतें कीं मोंगलाचे रीती पेक्षां दादोजी कोंडदेव याची रीति शेतकरी यांस भारी पडे परंतु तो मुलुख फार सुखकारक यावरून असें वाटतें कीं त्या मुलुखाला ती रीती योग्यच होती.

मावळांत रहाणारे जे लोक होते ते केवळ दरिद्री परंतु शरीरेंकरून सुदृढ त्यांणी अति मेहनत करावी तेव्हां त्यांस उदरनिर्वाहापुरतें मिळत असे मग तो मुलुख जेव्हां दादोजीचे स्वाधीन झाला तेव्हां त्याणें त्या लोकाची अवस्था अशी पाहिली कीं ते झोपड्यांतून रहातात आणि जांस वस्त्रें व पात्रें नाहींत त्यांणीं हिंस्र प्राणी यांपासून शरीराचें रक्षण झालें पाहिजे या साठीं सर्वांनीं शस्त्रें मात्र बाळगलेलीं होतीं तेव्हां त्याणें त्या लोकांचे पोषणाकरितां कित्येक वर्षें त्यापासून वसूल घेतला नाहीं. आणि त्यांखेरीज दुसऱ्यां लोकांकडचा वसूल जमा करावयाचे कामावर कित्येक ते मावळी लोक चाकरीस ठेविले. त्या योगें ते सहज पोसले गेले.

जे समयीं जिजाबाई व शिवाजी यांजबरोबर दादोजी कोंडदेव पुण्यास गेले. ते वेळेस त्या दादोजीनें पुण्यांत एक मोठा वाडा बांधिला; आणि त्यांत जिजाबाई व शिवाजी यांस ठेवून, आपण शिवाजीला जे गुण धनीपणाचे उपयोगी ते शिकवित झाला.

बहुधा मराठे सरदार यांस लिहितां आणि वाचतां येत नाहीं; ते असें समजतात कि हें काम कारकुनानें करावें; त्यांत शिवाजीला तर कधीं आपलें नांवही लिहितां येत नव्हतें. परंतु शौर्योपयोगि जें धनुर्विद्याइत्यादि कौशल्य त्यांत प्रवीण होता; जसें त्याला घोड्यावर बसतां येत होतें तसें कोणत्याहि मराठी सरदारास येत नसे. त्या शिवाजीला बाळपणीं भारती युद्धकथा व भागवती युद्धकथा अत्यंत प्रिय असेत. पुढें त्याचे मोठेपणांतही त्याणें कोठें कथा होत्ये असें ऐकिलें म्हणजे, जरी वाटेमध्यें कांहीं मोठें भय असलें तरी तें न मानितां तो कीर्तनास जाई; त्याची हिंदूचे धर्मावर प्रीति होती आणि मुसलमानाचे धर्माचा तो लहानपणापासून तिरस्कार करी. जेव्हां त्याचें वय सोळा वर्षांचें आलें तेव्हां त्याणें अप्रयोजक लोकांची संगत

धरिली

धरिली. आणि बादशाहाची आज्ञा न मानितां आपण नवेंच बंड करील असें दिसूं लागलें.

तेव्हां दादोजी कोंडदेवानें त्या शिवाजीचें असें विपरीत लक्ष्य पाहून त्याला आपल्या युक्तीचा कांहीं चांगला उपदेश वारंवार केला आणि त्याची चित्तवृत्ती मुलुखाचे बंदोबस्ती कडे व्हावी म्हणून जाहागिरीचे बंदोबस्ताचें काम त्यावर टाकूं लागला; तेणेंकरून त्याचा मान वहुत झाला आणि मराठे सरदार लोक त्याचे भेटीस येऊं लागले. तोही त्यांचा संमान करी; त्या योगें ते सरदार लोक त्यावर प्रीति ठेवीत होते; कांकीं तो सर्वांशीं लीनपणानें वागत असे. असें असतांही त्याला लोक म्हणत कीं कोंकणांत जे दरवडे पडतात त्यांत शहाजीचा पुत्र याचें बळ आहे.

तो शिवाजी मावळे लोकांवर निरंतर प्रीति करीत असे, कांकीं ते लोक वेडे आणि केवळ मूर्ख दिसत, परंतु त्यांचे योग्य त्यांस कांहीं काम सांगितलें असतां त्यांणीं तें काम अतिसावधपणानें करित असावें. त्यांना मावळचा सर्व चोरवाटा ठाउक होत्या म्हणून शिवाजी त्यांस आपल्ये शिकारीचे कामांत घेई; त्यांणीं त्याला अस्केडोंगरी किल्ले माहीत करून दिले. त्यानंतर त्याला असें वाटलें कीं जर यांतून एक किल्ला आपणास मिळेल तर त्या लाभास उपमा नाहीं.

त्या वेळेस मुसलमान लोकांचे राज्यांत डोंगरी किल्ल्यांचा बंदोबस्तांची दक्षता नव्हती कांकीं ते जागे पर्जन्यकाळीं वस्ती करणारास रोगकारक. आणि त्या लोकांस यत्न नकरितां प्राप्त झाले म्हणून त्यांना डोंगरी किल्ल्यांचें माहात्म्य वाटत नव्हतें.

ज्या समयीं शिवाजीनें आपणास किल्ला असावा असें मनांत आणिलें, त्या वेळेस त्याचे जहागिरींत किल्लेकरी बादशाह याजकडचे होते; कोंडाणें* किल्ल्यावर अधिकारी मुसलमान असे. आणखी पुरंदरावर मुशारपताचा ठेवणाईत नीळकंठराव नामें ब्राम्हण होता. ते दोघे किल्लेकरी व शहाजीचें कुळ यांचा स्नेह होता. मावळांत तिघे शिवाजीचे सोबती प्रसिध्ध होते एसूजी कंक, दुसरे तानाजी मालुसरे, तिसरे बाजी फासलकर. मिळून तिघे.

जे समयीं शिवाजी लश्कर मिळवूं लागला. तेव्हां ते तिघे पहिल्यानें त्यास मिळाले; त्यांणीं संत तोरणेश्वराच्या शोधाळिसांत तोरणा किल्ल्याचे लोक वश करून. तो किल्ला शिवाजीला देवविला.

त्यानंतर शिवाजीनें विजापुरास वकिल पाठवून बादशाहास विनंती केली कीं, मी किल्ला घेतला हा आपल्ये राजधानीपासून फार लांब आहे आणि एथचे लोक-मोठे उत्पाती; यास्तव ही जागा विश्वासू सेवकाचे स्वाधीन असल्यास राज्याचा बंदोबस्त उत्तम होईल. त्यावरून किल्ला त्याकडे असावा अशी आज्ञा झाली नाहीं; परंतु त्याणें बादशाहाचे दरबारी लोकांस लांच दिला त्यामुळें त्या दरबारीं ती गोष्ट

* कोंडाणें किल्ल्यास हालीं सिंहगड म्हणतात.

पुनः

पुनः मिळाला नाहीं आणि किल्ला त्याकडेच राहिला. अशीं कित्येक वर्षें गेल्यावर शिवाजीनें मावळे लोक चाकरीस ठेवून, किल्ल्याची डागडुजी केली.

मग कोणे एके दिवशीं त्या किल्ल्यांत खणूं लागला तों त्याला दैवयोगें करून कित्येक काळचा कोणीं ठेवलेला मोहरांचा हंडा सांपडला.

तेव्हां त्याणें युक्तीनें लोकांत अशी प्रसिद्धी केली कीं भवानी आम्हाला प्रसन्न झाली ती द्रव्य देत्ये हें ऐकून लोक त्याला भजूं लागले.

तेव्हां शिवाजीनें दारू गोळी व शस्त्रें इत्यादि युद्धोपयोगी पदार्थ विकत घेऊन तोरणा याचे आग्नेयी दिशेस दीड कोसावर मोरबद नामें उंच डोंगर आहे त्यावर अति मेहनतीनें मोठ्या त्वरें करून दुसरा किल्ला बांधिला, आणि त्याचें नांव राजगड ठेविलें हें वर्तमान संन सोळाशें सत्तेचाळिसांत झालें.

तो किल्ला बहुतेक बांधला गेला इतक्यांत विजापुरी बादशाहास तें वर्तमान कळलें तेव्हां त्याणें शिवाजीला मनाई पत्र पाठविलें आणि कर्नाटकांत शहाजीला लिहिलें कीं हें तुमचे पुत्रानें तुमचे आज्ञेवांचून केलें नसेल; यावरून त्याणें उत्तर दिलें कीं हा अपराध मजकडे नाहीं, परंतु माझा पुत्र सरकारचा विश्वासू चाकर आहे त्याणें कांहीं तरी सरकारहित पाहिल्यावांचून केलें नसेल.

जे समयीं शिवाजी किल्ला बांधावयास लागला तेव्हांपासून दादोजी कोंडदेव याणें वारंवार हितोपदेश केला कीं अशानें सर्व कुळ बुडेल; शिवाजीनें तें ऐकून मान्य केल्याप्रमाणें दाखविलें, तेव्हां दादोजी असें समजला कीं हा आपल्ये मनांतील अर्थ सिद्धीस नेईल माझें ऐकणार नाहीं, असें त्याचे मनांत येतांच त्याला अत्यंत चिंता लागली, आणि वार्धक्यामुळें दुखणें लागलें तेणें करून तो आसन्नमरण झाला ते समयीं शिवाजीला बोलावून आणिलें आणि बोलिला कीं मीं आपल्ये धण्याचे हिताविषयीं तुम्हाला निषेधित होतों, परंतु आतां माझी विनंती ऐकावी, आपण स्वतंत्रपणानेंच वागावें, परंतु गाई व ब्राम्हण व प्रजा यांचा प्रतिपाळ करून मुसलमानांपासून हिंदूंचीं देवस्थानें रक्षावीं, इतकें बोलून आपलीं सारीं कुटुंबाचीं माणसें शिवाजीचे हातीं देऊन प्राण सोडिला.

शिवाजीचे मनांत पूर्वींच होतें कीं आपण स्वतंत्रपणानें असावें त्यावर दादोजीनें आपल्ये अंतकाळीं सांगीतलें त्यावरून त्याचे मनांत विशेष आलें. आणि दुसरे जे त्याचे जहागिरींत अधिकारी होते तेही दादोजीनें शेवटीं सांगीतलेलें ऐकून शिवाजीस अनुसरले.

असें वाटतें कीं प्रथम शिवाजी आपलें मात्र हित इछित होता तो दादोजीनें शेवटीं सांगीतलें तें ऐकून, आपला मुलुख व गाई ब्राम्हण सुखी असावे असें मनांत आणूं लागला असेल तेव्हां त्याचा स्वभाव श्लाघ्य होऊं लागला

दादोजी कोंडदेवाचे मरणानंतर, शिवाजी आपले पित्याचे जहागिरीचा वसूल पित्याचेच नावें घेऊं लागला, परंतु शहाजीचेही आज्ञेंत वागूं नये असें त्याचे मनांत होतें, कां कीं दादोजी कोंडदेव मेल्यावर, त्याणें कारकून पाठवून जहागिरीचा वसूल खर्चास मागितला; शिवाजीनें उत्तर केलें कीं पृथ्वीचा पैका पृथ्वीच पुरत नाहीं, त्यानंतर आणखी कित्येक वेळा शहाजीनें द्रव्य मागावयास कारकून पाठविले, परंतु शिवाजीनें दिलें नाहीं.

त्या शहाजीचे जहागिरींत दोन अधिकारी होते, एक फिरंगोजी नरसाळा चाकणचा किल्लेकरी; दुसरे बाजी मोहिते तुकाबाई शहाजीची दुसरी स्त्री तिचे बंधू ते सुपेपरगणा याचे मामलतदार; हे दोघे शिवाजीला अनुकूळ नव्हते. या साठीं वकील पाठवून फिरंगोजी वश केला, आणि चाकण किल्ला व त्या खालचे कित्येक गांव घेतले; मग त्यालाच त्या मामलतीची सनद दिली.

बाजी मोहिते याजवळ सुपेपरगणा यामध्यें उत्तम स्वार तीनशें होते, तो कधींही वश होउन शिवाजीला वसूल देईना, ह्मणून शिवाजी मावळे लोक बरोबर घेऊन रात्रीस सुप्यांत शिरून, बाजी मोहिते व त्यांचे मुख्य कारभारी यांस धरून कैद केले, आणि जे चाकरी करावयास अनुकूळ झाले त्यांस चाकरीस ठेविले; जे वश न झाले ते शहाजीकडे कर्नाटकांत पाठविले. या प्रमाणें चाकण किल्ला व सुपेपरगणा आपल्ये सत्तेंत आणिला; या खेरीज कोंडाणें किल्ल्याचे मुसलमानानें बहुत लांच घेऊन किल्ला शिवाजीला दिला; त्याचे नांव शिवाजीनें सिंहगड असें ठेविलें. सुपेपरगणा, व चाकण किल्ला. या दोहों पेक्षां सिंहगड किल्ला मिळाला तो मोठा लाभ.

पुरंदर किल्ल्याचा अधिकारी, मुरारपंताचे हातचा ठेवणाईत निळकंठराव तो दादोजी कोंडदेव मृत्यु पावला त्याच सुमारें मेला; त्याचे पुत्र तीन त्यांत जो वडील त्याणें विजापुरचे आज्ञेची वाट न पाहतां, आपल्ये बापाचें काम संभाळिलें; तेव्हां त्याचे कनिष्ठ बंधू दोघे, त्याणीं आपणास त्या अधिकारांत व गुरें चरावयास कुरणांत कांहीं विभाग असावा ह्मणून वाद आरंभिला; तेव्हां तो देईना, यास्तव त्यांहीं शिवाजीला विनंती केली कीं आमचे कलहाची मध्यस्थी आपण करावी. असें ते ह्मणतांच त्याणें मान्य केलें, आणि त्यांस असें समजाविलें, कीं मला आंतून पक्ष तुह्मां दोघांचा, बाह्य तर तिऱ्हाईतपणानें तिघे सारिखे.

यानंतर सुप्यास आलों असा आकार दाखवून लष्करासहित पुरंदरकिल्ल्याखालीं येवून उतरला, तेव्हां त्याणीं त्यास बोलावणें पाठविलें; तें असें कीं आपण थोडके शिपाई बरोबर घेउन किल्ल्यावर यावें, नंतर तो त्याप्रमाणेंच वर गेला, आणि रात्रीस बोलतां बोलतां त्या तिघांतला थोरला भाउ निजावयास गेल्यावर याणें त्या दोघां भावांस अशी मसलत दिली कीं, याला जर बंदीस घातला तर

शातनच एकेल. कदाचित त्याच शिपाई कांहीं गडबड करितील तर मी भावळेलो-क घरनें आतांच बोलावून बंदोबस्त करितों; तेव्हां त्या दोघांहीं मान्य केलें, त्यावरू-न त्याच रात्रीं भावळेलोक किल्ल्याचे माचीस, व बालकिल्ल्यावर नेऊन, पहांटेस किल्ला आपण घेतला; आणि त्या शिपायांचा बंदोबस्त केला, तेव्हां त्यांस असें समजलें कीं आ-म्हीं निघेहीं बादशाहा. किल्ल्याचा धणी शिवाजी; मग शिवाजी त्यांस म्हणाला कीं, मीं आपल्या हिंदुधर्माचे रक्षणार्थ अशीं कामें करितों; तुम्हीं माझे चाकरीस रहावें, तुम-चे किल्ल्याचे बदल, तुम्हाला किल्ले गावें इनाम देतों.

तेव्हां त्यांणीं तें मान्य करून त्याचे चाकरीस राहिले.

अशा युक्तीनें एकही मनुष्य न मरतां युद्ध केल्या वांचून, चाकण किल्ला व नि-रा नदी या दोहों मधला मुलुख शिवाजीनें घेतला.

त्या वेळेस महंमद आदिलशाह विजापुरकर आपल्ये नगरची शोभा स्वस्थ-पणें वसून करीत होता, त्याला शिवाजीचें कृत्य कळलें असल्ये तरी तो असें मानित असेल कीं जों पर्यंत शहाजी जहागिरदार आपल्ये लष्करांत आहे तों पर्यंत चिंता नाहीं; इकडे शिवाजी तर केवळ व्याघ्राप्रमाणें लपून लपून जेथे जेथे कार्य साधेल ते-थे तेथे युक्तीनें कार्य करून घेणार, असा त्याचा स्वभाव बादशाहाचे ध्यानांत आ-ला नाहीं.

गेलसी लागें अठ्याविसांपासून सोळाशें सत्तावेंन पर्यंत आलेलीं वर्तमानें मिळून भाग चवथा.

चवथ्या भागाची अनुक्रमणिका.

शिवाजीनें घेतलेल्या मुलुखाचे सभोंवते, कोण कोण अधिकारी व जहागिर-दार होते तो प्रकार. १

वाडीचा सावंत आणि जंजिऱ्याचा शिद्दी, यांचें प्रकरण. २

शिवाजीनें छापा घालून बादशाहा याचा खजीना लुटला. ३

त्या शिवाजीनें कितिएक किल्ले युक्तीनें घेतले. ४

कालियानी परगणा घेतला तो विस्तार. ५

विजापुरचे बादशाहानें शहाजीला कैद करून विजापुरीं आणविला. ६

त्याची सुटका कोणे प्रकारें झाली तें. ७

तो शहाजी कर्नाटकांत गेला आणि आपला पुत्र संभाजी यास कोणी कि-ल्लेदारानें धारिष्ट्यानें मारिला तो वृत्त्य पावला. ८

शिवाजीनें

शिवाजीनें जावळीचा राजा यानाने मारविला. आणि त्याचा मुलुख घेतला. ९
शिवाजीनें [illegible] ल्या पेशवा शामराज नामें ब्राह्मण केला. १०
संन सोळाशें छप्पन्नांपासून मोगलाची वर्तणूक कशी कशी आली तें. ११
गोवळकोंडकरांचा कारभारी मिर्जुमला याचें वृत्त. १२
शहाजहान दिल्लीचा बादशाह दुखण्यांत पडला. १३
तो जीवंत असतां त्याचे पुत्र चवघे ते राज्याची इच्छा करूं लागले. १४
त्या चवघांजणांत एक औरंगजेब नामें होता त्याचे स्वभावाचें वर्णन. १५
त्याणें वळेच आपला बाप असतां राज्याभिषेक करून घेतला. १६

भाग चवथा.

एथपर्यंत दक्षिणेचा हद्दी व अधिकारी यांचा प्रकार लिहिला. परंतु शिवाजीनें घेतलेल्या मुलुखाचे सभोंवते कोणकोण जहागिरदार होते. यांचें वृत्त लिहिल्यावांचून शिवाजीचें संपूर्ण वर्तमान कळणार नाहीं. यास्तव तें लिहिलें पाहिजे त्याचा प्रकार असा, संन सोळाशें अठ्ठेचाळीस. तिस्रे दक्षिणतीरीं पूर्वेचे आरंगी शिरोळपर्यंत. आणि दक्षिणेस कृष्णेचे उत्तरेचा डोंगर पर्यंत. मुलुख, बंडाळ नामें हरणास मावळचा देशमूख याजकडे होता; त्याखेरीज रोहिडा किल्ला त्याचे स्वाधीन असे. तो शिवाजीला छत्रिनी जाणून निरंतर फौज बाळगीत असे.

वांईमध्यें विजापूरसरकारचा मोकासेदार होता. त्याचे स्वाधीन किल्ला पांडवगड, व कमळगड, व कित्येक किल्ले असत.

घांटमाथा कृष्णेपासून वारणेपर्यंत मुलुख, चंद्रराव मोरे जावळीचे राजे याजकडे होता. कोल्हापूर परगणा व मोठा सुदृढ पन्हाळा किल्ला. कोणि सरदार सरदार बादशाह यांचा ठेवणाईत होता त्याचे स्वाधीन असत.

पूर्वी विजापुरचे सरकारांत जो मुलुख होता त्यांत कित्येक स्थळें जहागीरदार. व वतनदार देशमूख यांजकडे असेत; परंतु रत्नागिरी, व राजपूरी, व दाभोळ, व अंजनवेल, व इतक्यांचे खालचा मुलुख बादशाह याचे सरदारांकडे असे. याखेरीज मुख्य सरदार वाडीचे देशमूख सावंत, ते तेथचे पुरातन वतनदार. असे शृंगारपुरीचे वतनदार पुरातन दळवे होते.

याशिवाय पहिला अहमदनगर सरकाराकडे कालीयान परगणा, त्याचे भाग दोन, एक उत्तरेस भिंवडी पासून नागोठणे पर्यंत; दुसरा दक्षिणेस. उत्तरेचा भाग व त्यांतले सारे किल्ले एक बादशाहाचा मुसलमान सरदार होता, त्याजकडे असत. दक्षिणेचा भाग कोणि एका शिद्याला जहागीर देऊन, त्याणें लढाऊ गलबतें ठेऊन. सावकारी गलबतांचें संरक्षण करावें. आणि जे मकेस तीर्थयात्रेकरितां जाणार, त्यांस पोंचते करावे; असें काम त्यास सांगीतले होतें. ऊक-

रुगलवती चाकरी जहागिरी सुद्धा, एकासच वंशपरंपरेनें द्यावी असें नव्हतें; कोणी ए-
ग्वादा योग्य शिद्दी पाहून त्याला देत असत. त्या सरदारांचें राहावयाचें मूळस्थान,
दंडाराजपूर.

त्यावेळेस जो मुख्य शिद्दी सरदार होता, त्याचें नांव फत्तेखान. त्याचे स्वाधी-
न नवें घोंसाळें, वरेडी, वगैरे कितिएक स्थानें होतीं. याप्रमाणें शिवाजीनें घेतलेल्या
मुलुखाचे आसमंतात राहाणारे संस्थानी होते.

आतां पुनः शिवाजीचें वर्तमान. तो मावळे लोक चाकरीस ठेऊन, कोंकणचे
लोकांचें वर्तन आपणास कळावें, व त्याणी वश व्हावें म्हणून कितिएक ब्राह्मण कार-
कून कोंकणांत पाठवीत असे; नंतर त्याला असें समजलें कीं कालियानीचा सुभेदार,
मुलाना आमेद, तो विजापुरास मोठा खजीना पाठवितो; तेव्हां त्या शिवाजीनें सुपेप-
रगण्यांतले तीनशें घोडे घेतलेले होते, त्यांवर आपले विश्वासू चारगीर बसवून कि-
तिएक मावळे लोक बरोबर घेऊन, एकाएकीं वाटेंत छापा घालून, तें द्रव्य त्या स्वारांज-
वळ सारी सारिखीं ओझीं होतसें, वांटून दिलें; आणि मोठ्ये त्वरेनें राजगडास ने-
लें.

हें छाप्याचें वर्तमान विजापुरीं कळल्यावर शिवाजी मोठा धुंड असे लोक स-
मजून आश्चर्य करितात, तों दुसरें वर्तमान गेलें कीं शिवाजीनें कांगोरी, तुंग, तिको-
ना, भोरप, कुंवारी, लोहगड, आणि राजमाची, हे सात किल्ले बलात्कारें घेतले, या-
ज्वेरीज कोंकणांत गेलेले जे त्याचे कारकून, त्याणीं तेथचे लोक वश करून नवें, घोंसा-
ळें, आणि रेडी, हे किल्ले घेतले; आणि मावळे लोक याणीं कितिएक मोठीं मोठीं
कोंकणचीं शहरें लुटून, तें द्रव्य राजगडास नेलें.

शिवाजीचे कारकून मंडळींत एक दादोजी कोंडदेवाचे शिक्षेचा, कारकून, मो-
ठा चतुर आणि शूर, आबाजी सोनदेव नामें होता; त्याणें कांहीं शिपाई लोक बरोब-
र घेऊन, अकस्मात् कालियानीस जाऊन तेथच्या सुभेदार यास कैद केला; तेव्हां ते-
थचे आसमंतात किल्ले सहज सही झाले.

शिवाजीला आपलें ऐश्वर्य, इतकें वाढेल असें वाटत नव्हतें; तों, हें आनंदा-
चें वर्तमान ऐकतांच, अत्यंत हर्षेकरून युक्त होत्साता कालियानीस जाऊन, त्या आ-
बाजी सोनदेवाचा बहुत संमान करून त्यालाच त्या मुलुखाचा सुभेदार केला. त्यानं-
तर, त्या मुलुखाचे वसुलाचें काम चालविलें; तें असें शिवाजीनें पुरातन चाली क-
शा होत्या त्या ध्यानांत आणून, त्या चालविल्या; आणि देवस्थानांचें व ब्राह्मणांस
जें पूर्वींचे दिलेलें तें तसेंच चालविलें.

शिवाजीनें जा शिद्याचे किल्ले घेतले होते, तो मोठा शूर होता म्हणून, त्याचे
भयानें त्या किल्ल्यांचे बंदोबस्ता करितां, घोंसाळ्याजवळ बिरवाडी किल्ला, आणि रेडी

जवळ

जवळ लिंगाणा किल्ला, असे दोन बांधिले.

जो मुल्लाना सुभेदार आबाजी सोनदेवानें कैद केला होता, त्याचा शिवाजीनें मोठा संमान करून माघारा विजापुरास पाठविला; तो तेथें पोंचल्याचे पूर्वींच तें स्थान शिवाजीनें घेतल्याचें वर्तमान बादशाहास कळलें होतें, यास्तव त्याला दुसरा कांहीं अधिकार मिळाला नाहीं बादशाहाची भेटमात्र झाली.

त्यावेळेस विजापूरचा महंमद आदिलशाह बादशाह याणें शिवाजीचा बाप शहाजी, याचें ऐश्वर्य कर्नाटकांत फार वाढविलें होतें; तो बादशाह असें समजला कीं हें बंड शहाजी अनुकूल झाल्यावांचून होणार नाहीं; म्हणून त्याच समयीं शिवाजीकडे, फौज नयोजितां, बाजी घोरपडा मुधोळकर नामें एक मोठा सरदार शहाजीबरोबर असे, त्याला सांगोन पाठविलें कीं, शहाजीस कैद करावा; त्यावरून त्याणें त्याला भोजनास बोलावून आणून दग्यानें कैद केला.

त्यानंतर संन सोळाशें एकुणपन्नासांत शहाजीला विजापुरीं बादशाहाजवळ नेला, तेव्हां बादशाहानें त्याला आज्ञा केली कीं हें बंड तूं मोडावेंस; कांकीं हें तुजपासूनच उत्पन्न झालें. तेव्हां तो बहुत प्रकारें विनंती करून बोलिला कीं शिवाजी माझाही बहुत उपमर्द करितो, परंतु तें बादशाह याला सत्य वाटेना; यास्तव त्याला चिरेबंदी कोठडींत घालून त्या कोठडीचें दार वारामात्र जाईसें छिद्र राखून बंद केलें, आणि सांगितलें कीं शिवाजी अमुक दिवसांत अपराधांची क्षमा मागावयास न आल्यास हेंही छिद्र बंद होईल. हें वर्तमान शिवाजीला कळल्यावर, त्याचे मनांत आलें कीं, क्षमा मागावयास जावें, परंतु त्याची स्त्री सईबाई तीणें मसलत दिली कीं विजापुरचें सरकार केवळ अविश्वासास्पद आहे, त्यास हेंच बरें कीं आपलें महत्व वाढवावें, आणि त्यांस भयप्रदर्शन करावें. तेव्हां शिवाजीनें मोंगलांचा आश्रय करून शाहाजहान दिल्लीचा बादशाह यास आपल्या बापाचे मुक्ततेविषईं पत्र पाठविलें; त्यांत मीं तुमची चाकरी करीन म्हणून लिहिलें, त्यावरून त्याणें विजापुरचे बादशाहास कांहीं सूचना लिहिली असेल. तीव मुरारपंत नामें विजापुरकरांचा मुख्य कारभारी होता, त्याचें व शिवाजीचें इष्टत्व होतें तें, या दोहीं योगांहीं शहाजीला कोठडींतून काढून किल्ल्यामध्यें बंदींत ठेविला. अशी त्याची सुटका झाल्यावर शिवाजी मोंगलांचे चाकरीस कांहीं निमित्तें करून बोलीप्रमाणें जाईना, आणि वकील पाठवून बोलणें लाविलें कीं, अहमदनगर व जुंनर परगणा यांत आमची पहिली वाकी राहिली आहे, ती द्यावयास आज्ञा व्हावी. तेव्हां शहाजहानाचें उत्तर गेलें किं तुम्हीं एथें येऊन, भेटल्यानंतर तुमचें देण्याचा विचार केला जाईल*, असें संन

* हें शहाजहानानें उत्तरपत्र व आणखी कित्येक शहाजहानाचीं व औरंगजेब बादशाह यांचीं पत्रें. मुंबईचे किल्ल्यांत साहेबांचे पुस्तकसंग्रहस्थानीं आहेत.

सोळाशें

सोळाशें पंन्नासांत घडलें.

यापुढें चार वर्षें पर्यंत शहाजी विजापुरीं कैदेंत होता, तेव्हां विजापुरकरांस असें वाटलें कीं शहाजीला जर उपद्रव केला, तर शिवाजी मोंगलांस सुदुःख देईल, शिवाजीला असें वाटलें कीं मी जर विजापुरकरांशीं वांकडा वागेन, तर बापास पीडा होईल; म्हणून त्या चोहों वर्षांत उभयतांकडून दंगा झाला नाहीं; परंतु एक हिंदू बाजी शामराज नामें होता, त्याणें शिवाजीला महाडाहून धरून बादशाहाकडे न्यावयाचा बेत केला, तो सिद्धीस गेला नाहीं.

शहाजी बंदींत असतां, त्याणें कित्येक वेळां कर्नाटकांत जावयास बादशाहाजवळ आज्ञा मागीतली. परंतु बादशाहानें दिली नाहीं; शेवटीं कर्नाटकांत मोठें बंड उत्पन्न झालें, त्यामुळें बादशाह त्याचे बोलण्यास अनुकूळ झाला, परंतु आधीं शपथ घेतली कीं मुधोळकर जहागीरदार याशीं तुझें वैमनस्य नसावें. याप्रमाणें करार ठरवून शहाजीची सुटका संन सोळाशें त्रेपन्नांत झाली.

तो सुटतांच त्याणें शिवाजीला पत्र पाठविलें कीं तूं जर माझा पुत्र खरा आहेस तर मुधोळकराचें पारिपत्य कर, ही शहाजीची आज्ञा शिवाजीनें मनांत राखून, कशा प्रकारें सिद्धीस नेली. तें वर्तमान पुढें लिहिण्यांत येईल.

मग शहाजी कर्नाटकांत गेला, ते समयीं त्याणें असें पाहिलें कीं तेथचे मंडळाधिपती आपल्या आपल्यांत भांडतात, त्यामुळें आपल्ये जहागिरीस उपद्रव लागला; यासाठीं त्याणें आपला थोरला पुत्र संभाजी यास एक कानिकगिरीचा किल्लेदार याचें पारिपत्य करावयास पाठविला, तो जाऊन त्याशीं लढला, तेव्हां त्यापासून पराभव पावून संभाजी आपले बरोबरचे कित्येक लोक सुद्धां मेला गेला.

त्यानंतर कर्नाटकांत फार दंगे झाले तेणेंकरून विजापुरचे दरबारांत शिवाजीचे चौकशीविषयीं अवसर झाला नाहीं.

तो शिवाजी बापाची मुक्तता ऐकून, कोंकणांतील घेतल्या खेरीज उरलेलीं स्थळें व संपूर्ण घाटमाथा घ्यावयास मसलत अगरवी करूं लागला, त्यांत प्रथमतः जावळी परगणा आपल्ये हातीं यावयाविषयीं उद्योग केला, तो असा त्या मुलुखाची माहितगारी व्हावयाकरितां गुप्त पहाणी करावयास एक रघोबल्लाळ नामें ब्राह्मण व संभाजी कावाजी नामें एक शूद्र असे दोघे कारकून तेथचे राजे चंद्रराव मोरे यांचे कन्येशीं आपण विवाह करणार, असें निमित्त करून त्या बोलण्यासाठीं म्हणून पाठविले; त्यांबरोबर पंचवीस मावळे लोक दिले, ते कारकून त्याकडे जातांच त्या राजानें त्यांचा संमान केला. ते कित्येक दिवस बोलणें करीत तेथे राहिले, शेवटीं शेवटीं त्या ब्राह्मणाचे मनांत आलें कीं चंद्रराव मोरे यांस मारून टाकावयास अवघड नाहीं; हें त्या शूद्रासही ठीक वाटलें मग शिवा-

जीला

जीला याप्रमाणें लिहिलें, त्याणें उत्तर दिलें कीं हें योग्य आहे आम्ही तुमचे साह्याम्यास लश्कर घेउन येतों. त्यानंतर शिवाजी राजगडाहून पुरंदरास आला; तेथून गडीस निघोन कृष्णेचे उगमीं महाबळेश्वर देव आहे तेथें रानांत त्याचे लोक गुप्तरूपें राहिले होते, त्यांत आऊन मिळाला. नंतर रघोजीला ही गोष्ट सिद्धता समजली, तेव्हां तो त्या कावाजीला बरोबर घेऊन मोऱ्याचे घरीं जाऊन, त्यास ह्मणाला कीं आपण व आपले बंधू उभयतांशीं एकांत करावयास आलों, त्यांहीं तें मान्य करून दोघे भाऊ त्यांशीं बोलावयास एकांतस्थळीं गेले, तेव्हां रघोजी बल्लाळ याणें त्या राजाचे काळजांत खंजीर खुपसून त्याला मारिला आणि संभाजीला कावाजीनें त्याला मारिला, नंतर ते दोघे तेथून पळून रानांत गेले, तेथें त्यांचे साह्याम्यास शिवाजीचे लोक येत होते त्यांची गांठ पडली.

इकडे आवळीमध्यें लोक राजाचे मरणाचा विस्मय करितात,तों शिवाजीचे लोकांनीं येऊन हल्ला केला; ते समयीं हिंमतराव नामें त्याचा प्रधान, व त्या राजाचे पुत्र होते, त्यांही यांशीं बहुत निकरानें युद्ध केलें; शेवटीं तो हिंमतराव मेला तेव्हां तें युद्ध मोडलें. आणि तें स्थान शिवाजीचे हातीं लागलें. यानंतर वासोटा किल्ला शिवाजीनें घेतला तेणेंकरून आवळी मुलुख संपूर्ण शिवाजीचे स्वाधीन झाला

शिवाजीनें दुसरा रोहिडा किल्ला घेतला तो प्रकार असा; मावळे लोक बरोबर घेऊन, रात्रीस आऊन,ते किल्ल्याचे लोक सावधनसतां, किल्ल्यास शिडी लावून वर चढून गेले; तेथें हरणस् मावळचा देशमूख बंडाळ, उपनांवाचा होता; त्याणें त्या लोकांचा तो कोलाहल ऐकून हत्यार घेऊन उठला आणि लढूं लागला त्याचे बरोबर जे लोक होते तेही बहुत लढले शेवटीं तो बंडाळ पडला तेव्हां तें युद्ध संपलें; त्यांत आवळीचा देशपांड्या बाजी परभू नामें होता,त्याचें शौर्य पाहून, शिवाजीनें त्याचा संमान केला आणि त्याचा अधिकार त्याकडे ठेवून तो आपले जवळ चाकरीस ठेविला.

यानंतर सन सोळाशें छप्पन्नांत शिवाजीचे मनांत आलें कीं निरा व कोयना या दोहीं नद्यांचे कांठीं जो आपला मुलुख आहे तो. व पारघाट, याची वाट,यांचे संरक्षणार्थ एक किल्ला कृष्णेचे उगमीं बांधावा; मग त्या कामावर एक आपल्ये छपेंतला देशस्थ ब्राह्मण मोरोत्रिंमळ पिंगळे नामें योजिला; त्या किल्ल्याचें नाव प्रतापगड ठेविलें. त्या वेळेस एक शामराज नामें शिवाजीचा मुख्य कारभारी होता त्यास पेशवेपद देऊन, त्याचे स्वाधीन कित्येक फौजेची सरदारी ठेविली.

इतके दिवस शिवाजी विजापुरचे राज्यांत मात्र उपद्रव करीत होता; मोंगलांचे वाटेस गेला नाहीं. यापुढें सन सोळाशें सत्तावन्नांत मोंगलांचाही राज्यांत

ज्यांत उपद्रव करूं लागला; असें त्याचें धैर्य आणि रीतिविपर्यास झाला.

संन सोळाशें छत्तिसांत मोगल लोकांनीं दक्षिणेचा बादशाहाशीं स्नेह केला. त्यापासून ते दक्षिणेत उपद्रव नकरितां, आपल्ये राज्याची बळकटी करित होते; त्यांचा धनी औरंगजेब तो दिल्लीचा बादशाहाचा पुत्र होता. त्याणें व्यापारी लोकांस हित, आणि प्रजेस सुखकारक, असे नवे कायदे केले; आणि जें मल्लीकंबरानें वसविलेलें खिडकीशहर त्याची राजधानी केली, तिचें नाव औरंगाबाद ठेविलें. परंतु तो युद्धनिपुण होता तेणेंकरून त्याचे मनास युद्धावांचून उगेंच राहणें आवडत नव्हतें; यास्तव त्याणें संधि पाहून गोंवळकोंड सरकाराशीं कलह आरंभिला, तो प्रकार असा, संन सोळाशें पंचावन्नांत गोवळकोंडेचा बादशाह कुतुबशाह, याशीं, आणि याचे वजिराचा पुत्र याशीं, वितुष्ट पडलें होतें; तेव्हां त्या बादशाहानें कांहीं निमित्त त्यावर आणून, त्यास शिक्षा दिल्ही. म्हणून त्या वजीरास राग आला त्याणें औरंगजेब बादशाह याचा आश्रय केला, आणि त्याचा पिता दिल्लीचा बादशाह शहाजहान् त्याजकडे फिर्याद केली. त्यावरून शहाजहानानें कुतुबशाह याला निषेधपत्र पाठविलें, त्याणेंकरून त्याला राग आला त्याणें वजीरपुत्र कैद केला, आणि त्याचे पित्याचे दौलतीची जप्ती केली.

त्या वजिराचें नाव मीरजुमला, त्याचा परिचय सर्व मुसलमानी दरबारांत होता; तो पहिला जोहारीपणा करीत असे, यास्तव हिरे इत्यादि जवाहीर विकावयास मोठ्मोठ्ये दरबारीं त्याचें जाणें घडे; शेवटीं तो आपलें चातुर्य व धनसंपत्ती या दोहों योगांहीं कुतुबशाह याचा वजिर झाला. त्याचे पुत्राचें नाव महंमद आमीन.

जेव्हां औरंगजेब यास कळलें कीं आपला पिता दिल्लीचा बादशाह, याची कुतुबशाह याणें अमर्यादा केली, तेव्हां औरंगजेब याणें तो अमर्यादेचा प्रकार विस्तृत करून, शहाजहानास विनंती पत्र लिहिलें; त्यावरून बादशाह याची आज्ञा झाली कीं सैन्य तयार करून, मीरजुमला याचा अंगीकार करावा, तेव्हां औरंगजेब याणें आपला पुत्र सुलतान महंमद, याजबरोबर फौज देऊन हैदराबादेस लग्नाचें मिष करून पाठविला; त्या मागून आपण मोठी सेना घेऊन, त्याचे पाठोपाठ निघाला.

तो कुतुबशाह असें जाणत होता कीं हा लग्नास येतो आहे, मग जेव्हां हैदराबादेचा दरवाजाजवळ आला तेव्हां त्याला त्याचा वैरभाव समजला; तेसमयीं कुतुबशाह याणें तो वजिराचा पुत्र, महंमद आमीन, यास सोडिला, आणि त्याचे बापाचा दवलतीची जप्ती उठविली; आणखी त्याच वेळेस आपले सरदार यांस युद्धाचे कुमकेस बोलावणें पाठविलें; ते सरदार येऊन पोंचले नाहींत तों सुलतान

महंमद

महंमद याणें हैदराबाद शहर लुटलें, आणि त्या बादशाहास पीडा करून, करार करविला कीं. आपली कन्या सुलतान महंमदास द्यावी व खंडणीची बाकी एक कोटि रुपये द्यावे. हें वर्तमान दिल्लीचा बादशाह शहाजहान यास समजल्यावर, त्याणें मान्य करून वीस लक्ष माफ करून ऐशीं लक्ष घेतले.

यानंतर सन सोळाशें छप्पन्नांत. औरंगजेब व मीरजुमला हे दोघे एकचित्त होऊन मसलत करिते झाले, कीं विजापूर व गोंवळकोंडें हीं दोन्हीं राज्यें मोंगलांचे सत्तेंत आणावीं; नंतर कांहीं दिवसांनीं मीरजुमला यास दिल्लीचे बादशाहानें बोलावून नेला. आणि आपल्ये वजिरीचें काम सांगीतलें; त्यापासून तो बादशाहाजवळ बोलत असे कीं, हीं दोन्हीं राज्यें आपल्ये सत्तेंत असावीं तें बोलणें बादशाह मानीत नसे; पुढें महंमद आदिलशाह विजापुरचा बादशाह, त्याच वर्षाचे अकरावे महिन्याचे चवथ्ये तारखेस मेला; तेव्हां बादशाह याणें तें मान्य करून विजापुरावर लष्कर योजिलें, त्यांत मीरजुमला मुख्य करून औरंगजेब त्या स्वारींत केला; मग ते दोघे एकचित्त होऊन तो मीरजुमला औरंगजेबाचे आज्ञेंत वागूं लागला.

इकडे विजापुरीं महंमद आदिलशाह याचा पुत्र, अल्ली आदिलशाह तक्ताधिपती जाला. त्याणें दिल्लीचे बादशाहाचें अनुमोदन घेतलें नाहीं. त्यावरून मोंगल हा त्याचा पुत्र नव्हे असें लटकेंच निमित्त करून युद्धास गेले; असें निर्निमित्त युद्ध कधीं आलें नव्हतें.

ते मोंगल विजापुरीं येतात, असें समजतांच, त्याणीं युद्धाची सिद्धता यथाशक्ति केली; परंतु अवकाश केवळ थोडा ह्मणून मोंगलांशीं मैदानांत युद्ध करावयाजोगी फौज मिळाली नाहीं. यास्तव आपल्ये मुलखाचे मर्यादेंत आणि वाटेवर. अवघड अशीं जितकीं स्थानें होतीं. तितक्ये जागीं फौज पाठवून बंदोबस्त ठेविला. आणखी जे कांहीं घोडेस्वार उरले होते त्यांचा मुख्य, खान् महंमद सरदार, व दुसरे मुसलमान सरदार होते ते बरोबर देऊन त्यांस आज्ञा केली कीं जास्थळीं युद्धप्रसंग होईल, तेथें तुह्मीं कुमक करावी; त्या वेळेस विजापुरकरांचे मराठे जहागिरदार लोक. सर्जेराव घाटगे, व बाजी घोरपडे निंबाळकर. वगैरे कित्येक फौजेसहीत येऊन कुमक करिते जाले.

सन् सोळाशें सत्तावन्नांचे तिसरे महिन्यांत लष्कर सहीत औरंगजेब पूर्वेचे वाटेनें विजापुरकरांचे मुलखांत शिरला. आणि तत्काळ कालियान किल्ला घेतला, व ज्याचा विजापुरकरांस मोठा भरंवसा होता, असा जो बेदर किल्ला, तोही एका दिवसांत घेतला. नंतर कलबुर्गा किल्ला एकाएकीं हल्ला करून घेतला. असा प्रवेश झाल्यानें, औरंगजेब यास आनंद वाटला, परंतु जे विजापुरकरांचे स्वार

कुमकेस

कुमकेस फिरत असत त्यांचा उपद्रव फार लागूं लागला; तेव्हां त्याणें जो विजापुरचा मुख्य कारभारी खान महंमद नामें सरदार होता, त्याला कांहीं देऊन तो आपल्ये शर्ती प्रमाणें लढेनासा केला. त्या मुख्याची वृत्ति पालटतांच, दुसरे जे सरदार होते, ते त्याचे कुमकेवांचून हीनबळ जाले; तेव्हां तो औरंगजेब मोठ्या त्वरेनें विजापुरास गेला, त्यामुळें तेथचे लोक यांस त्याला दाणापाणी मिळेनासें करावयास फावलें नाहीं; त्याणें लागल्याच शहरास वेढा घातला, आणि मोठे निकरानें युद्ध आरंभिलें, ते समयीं विजापुरकर त्याशीं बहुत आर्जवानें सल्ल्याची गोष्ट बोलूं लागले; परंतु त्या औरंगजेबाचे मनांत तें राज्य अगदीं बुडवावें असें होतें, यास्तव तो ऐकेना; इतक्यांत त्याची बहीण रोषनाराबेगम होती, तिणें दिल्लीहून पत्र पाठविलें कीं शहाजहानाचे शरीरास फार असमाधान जालें; तो लेख पाहातांच, औरंगजेबानें त्यांपासून कांहीं द्रव्य घेऊन जो त्यांचा मुलुख घेतला होता तो त्यांचे स्वाधीन करून, आपल्ये फौजेसुद्धां विजापुराहून निघोन माघारां दिल्लीस गेला.

दिल्लीचा बादशाह शहाजहान याचे पुत्र चवघे त्यांत एक बापापाशीं दाराशेखो नामें होता; एक सुलतान सुजा, तो बंगाल्याचा स्थानाधिपति, एक औरंगजेब, एक सुलतान मुराद, तो गुजराथेचा तक्ताधिपति, हे चवघेही आपल्ये बापाचा अंतकाळ जवळ आला असें जाणून, आपणास दिल्लीचें तक्ताधिपत्य मिळावें म्हणून सैन्यें सिद्ध करिते जाले. त्यांत जो दाराशेखो नामें शहाजादा जवळ होता, तो बापाची शक्ति क्षीण पाहून राज्यकारभार आपण करूं लागला, तो स्वभावें करून सरळ होता; औरंगजेब मोठा कपटी, तो मुसलमान लोकांस निरंतर असें समजावित असे, कीं आपले वडील धर्माचे कामांत सावधपणा ठेवीत नाहींत, मी हें राज्य अशासाठीं इछितों कीं आपला धर्म उत्तम प्रकारें चालवावा; नंतर आपला भाऊ सुलतान मुराद यासही तसेंच समजाऊन, भुलथाप दिली कीं तुह्मीं व आह्मीं एकचित्त असतां मीं धर्मकृत्यें मात्र चालवीन तें त्यास मान्य वाटलें आणि दोघे मिळून दाराशेखोशीं युद्धें करून कित्येकवेळा त्याचा पराभव केला; शेवटीं तो परागंदा जाला, नंतर औरंगजेब याचे हातीं सांपडला, त्याणें तो मारून टाकला. इतक्यांत शहाजहान समाधान पावला त्याणें वारंवार पुत्रांस आज्ञा केली कीं तुह्मीं आपआपल्ये संस्थानीं जा, परंतु ते जाईनात, शेवटीं औरंगजेब याणें सर्व आपल्ये हातीं आणून बापास आपलेजवळ बंदींत ठेविला; आणि सुलतान मुराद याचें लश्कर वश करून घेतलें, व त्यास कैद केला; तेव्हां संन सोळाशें अठ्ठावन्नांत तो औरंगजेब दिल्लीचा तक्ताधिपति जाला, यानंतर त्याणें दक्षिणेहून मीरजुमला यास बोलावून आणिला, आणि दोघे मिळून जो उरलेला सुलतान सुजा नामें तिसरा भाऊ त्याचे पाठीस लागले, तो पळून बंगाल्याचे पलिकडे आराकान प्रांतीं गेला; त्यास तेथें को-

णीं

णी दुष्टानें मारिला, याप्रकारें औरंगजेब यास कोणी प्रतिस्पर्धी नाहीं असा तो दिल्लीचा तख्ताधिपति झाला.

सन सोळाशें सत्तावन्नां पासून सोळाशें बासष्ट पर्यंत झालेलीं सर्व वर्तमानें मिळून भाग पांचवा.

भाग पांचवा अनुक्रमणिका.

शिवाजीनें औरंगजेबाशीं नम्रभावेंकरून बोलत असून, मोंगलांशीं कृत्रिम केलें. १

त्या शिवाजीनें आपल्ये लश्करांत स्वार वाढवून, पठाण मुसलमान लोक चाकरीस ठेविले. २

विजापुरचे मानकरी लोकांत वेमनस्यें पडलीं त्यापासून काय झालें तें. ३

शिवाजीचा शामराज पेशवा राजपुरचे शिद्दीपासून पराभव पावला; त्यावर शिवाजीचा राग होऊन त्याणें मोरोत्रिंमल पिंगळे नामें दुसरा पेशवा केला. ४

वाडीचे सावंत पहिल्यानें शिवाजीस मिळाले, मग लवकरच विजापुरकरांकडचे झाले. ५

विजापुरकरांकडून शिवाजीचे पारिपत्यास मोठें सैन्य आलें. ६

त्या सैन्याचा मुख्य सरदार आफसुलखान तो शिवाजीनें कशा युक्ती करून मारिला तें प्रकरण. ७

शिवाजीनें विजापुरचा रुस्तमजमान सरदार याचा पराभव करून विजापुरचे दरवाजापर्यंत मुलुख लुटला, व त्वरेनें कोंकणांत जाऊन राजपुरी व दाभोळ लुटलीं. ८

त्या शिवाजीचे पारिपत्यास पुनः दुसरें मोठें सैन्य नेमून, त्याचा मुख्य सरदार शिद्दीजोहर केला, त्याणें पन्हाळ्याकिल्ल्यावर शिवाजी असतां त्या किल्ल्यास वेढा घातला. ९

असें असतां तो शिवाजी वांचला कसा, व त्याचा कारकून हरणस मावळचा देशपांड्या बाजीपरभू याणें काय काय पराक्रम केला तें. १०

विजापुरचा बादशाह अल्ली आदिलशाह याणें शिवाजीनें घेतलेला मुलुख आपण सैन्यसुद्धां येऊन सोडविला तें. ११

पुनः शिवाजीनें कित्येक किल्ले घेतले तें व त्याचे बापास जाणें धरून विजापुरीं नेलें तो बाजी घोरपडा त्यास सांपडला त्याला मारून, त्याचें गांव मुधोळ तें जाळिलें १२

सांवतांच्या वाडीप्रांत शिवाजीनें घेतला तो प्रकार. १३

विजापुरकरांशीं

विजापुरकरांशीं तह केला तें वर्तमान. १४
शहाजी शिवाजीचे भेटीस आला तें प्रकरण. १५
रायगड किल्ल्याची गोष्ट. १६
शिवाजीचें लष्कर किती होतें तें व त्याचे मुलखाची हद्द किती होती तें. १७

भाग पांचवा.

औरंगजेब जा वेळेस विजापुरकरांशीं लढूं लागला त्या वेळेस त्याला शिवाजीनें विनंतीपत्र पाठविलें कीं, मीं मोंगलांचा चाकर आहें त्यास विजापुरकरांचा जो मुलुख मीं घेतलेला आहे, त्याचे संरक्षणाविषयीं मला कृपा करून सनद द्यावी; तेव्हां औरंगजेब याणें त्यास तो मुलुख दिला आणि आज्ञा केली कीं दाभोळ व त्या खालचा मुलुख, दिल्लीचा सरकारचा असून तेथे विजापुरकर उगेच सत्ता करितात, त्यास तोही मुलुख घ्यावा; नंतर शिवाजीनें औरंगजेब याचें लष्कर दूर, आणि विजापुरकरांचे शहास गुंतलें, असें जाणून आपलें स्वार पुंडाई करून वाढवावे असा मनसोबा करून, त्याणें संन सोळाशें सत्तावन्नांत मोंगलांशीं कृत्रिम केलें. तें असें रात्रीस फौजेसहित एकाएकीं जाऊन जुन्नर शहर अगदीं लुटलें. तेथून तीन लक्ष होन व दोनशें घोडे व कित्येक मोठे मोठे अलंकार व कित्येक उंच उंच वस्त्रें इत्यादि संपत्ति घेऊन पुण्यास गेला, आणि तेथे त्याचे दुसरे लोक होते, त्यांजवळ ती सर्व दौलत देऊन राजगडास पाठविली. मग आपण चोरवाटेनें जाऊन अहमदनगरास दाखल जाला; त्याची इच्छा अशी होती कीं त्या नगराची पेंठ सगळी एकाएकीं लुटून तें द्रव्य न्यावें तो त्याचा मनोरथ पूर्ण झाला नाहीं; त्यास लाभ मोठा झाला तो असा, सातशें घोडे व चार हत्ती सांपडले, तितकेच घेऊन पळाला; कां कीं त्या किल्ल्यांतून स्वार आले ते त्याचे लोकांस ठार मारूं लागले.

नंतर शिवाजीनें पुण्यास येऊन कित्येक बारगीर व कित्येक शिलेदार चाकरीस ठेविले; त्यांत एक शिलेदार माणकोजी दहोंदा नामें त्याचे बापाचे वोळखीचा होता त्याला सरनोबत पद दिलें; पुढें तो मेल्यावर तें पद मोठा धारा शूर नेटाजी पालकर नामें होता त्यास दिलें.

यानंतर मोंगलानीं विजापुरचें राज्य बुडविलें म्हणजे पुढें आपणास भय होईल, असें समजून शिवाजीनें औरंगजेबास बहुत आर्जवें करून विनंतीपत्र लिहिलें कीं निश्चय मीं यापुढें तुमचे आज्ञेबाहेर वागणार नाहीं. माझे अपराधांची क्षमा असावी. या लेखाचे दृढीकरणार्थ कांहीं बोलणें करावयाकरितां शिवाजीनें आपला परम विश्वासू रघुनाथपंत नामें वकील पाठविला; नंतर मोंगलांनी विजापुरकरांशीं सल्ला केला व शहाजहानाचे शरीरीं समाधान नाहीं, असें वर्तमान कळल्यावर दुसरा वकील कृष्णाजी भास्कर नामें पाठविला त्याणें बोलणें लाविलें

कीं आह्मीं आपल्ये चाकरीकरितां पुष्कळ स्वार जमा केले आहेत त्यास जेसमयीं आपण बाहेर निघतील तेव्हां आज्ञा झाल्यास आह्मीं आपल्ये मुलखाचा बंदोबस्त राखूं; अशी चाकरी आमचे हातून घडली असतां, आमची पहिली तुमचे मुलखीं देशमुखी होती ती, अह्मास द्यावी. याखेरीज दुसरें असें समजाविलें कीं कोंकणांत आदिलखान आहे त्याची वर्तणूक नीट नाहीं त्यास तो जर मुलुख आमचे स्वाधीन होईल तर प्रजा सुख पावेल.

त्या वेळेस औरंगजेब आपले भावांशीं कलहास गुंतला होता, ह्मणून शिवाजीचें इतकें धट्टाईचें बोलणें कांहीं कार्यांतरीं लक्ष्य ठेवून मान्य केलें; त्यावरून शिवाजीनें कित्येक नवे लोक चाकरीस ठेवून जांचा बंदोबस्त चांगला नव्हता असे समुद्रतीरचे कित्येक किल्ले घेतले; तेथे कांहीं गलबतें बाळगून चांचेपणा करूं लागला.

यानंतर औरंगजेब जातांच विजापुरकरांनीं दूर केलेले पायदळ पठाण लोक आले ते, शिवाजीनें सातशें चाकरीस ठेविले; त्या पूर्वीं त्याणें कधींही मुसलमान लोक चाकरीस ठेविले नव्हते. जाणें चंद्रराव मोऱ्यास मारिलें तो रघोबल्लाळ त्यांचा मुख्य सरदार केला, मग ते लोक त्याचे फार कामास पडले.

औरंगजेब निघून गेल्यावर विजापुरीं मानकरी लोकांत वैमनस्य पडलेलें होतें, ते सर्व मिळून जर शिवाजीचें बंड मोडिते, तर तो प्रकार उत्तम होता, परंतु तें टाकून, आपआपल्यांत एकमेकाचा नाशास प्रवृत्त जाले, तेथचा मुख्य वजीर खानमहंमद, त्याणें आपले धण्याचा घात केला ह्मणून, तो आला ह्मणजे त्याचें पारिपत्य करावें, असा त्या दरबारीं निश्चय ठरला होता; त्याची शिक्षा नीतीनें करावी तें न केलें, त्याला अभय देऊन बोलाविला, तो विजापुरचा दरवाजाशीं येतांच त्यास हत्तीवरून ओढून मारिला. अशी अव्यवस्था होण्याचें कारण असें कीं तेथचा तक्ताधिपति अल्पवयाचा होता; आणि कारभारी लोकांत वैमनस्यें पडलीं असेत.

शिवाजीचे मनांत होतें कीं सारी कोंकणपट्टी घ्यावी यास्तव त्याणें आपला शामराज पेशवा शिद्दीचा मुलुख घ्यावयास पाठविला. त्या वेळेस फत्तेखान नामें शिद्दी होता, त्याणें लढून त्या शामराजाचा अगदीं मोड केला; हें वर्तमान सन सोळाशें एकुणसन्नासांत घडलें

हा शिवाजीचे फौजेचा पहिला मोड झाला यावरून त्याची उत्साहशक्ति क्षीण झाली.

त्याणें शामराज पंत पेशव्यास माघारा बोलावून नेला, आणि त्याचा अधिकार मोरोत्रिंमल पिंगळे यांस दिला; याशिवाय ते मोड झालेले जे लोक त्यांचे कुमकेस दुसरी फौज पाठविली, त्या मोडाचे पूर्वीं वाडीचे सावंत याणीं शिवाजीची

उत्तम

उत्तम तयारी व विजापुरकर केवळ आळशी असें पाहून आपण शिवाजीला मिळावें अशा मसलतीनें वकील पाठविला; तेव्हां असें ठरलें कीं सावंतांची देशमुखी सोडून अर्धावद्दल शिवाजीनें घेऊन त्यांचें रक्षण करावें. असें ठरल्यावर ते सावंत यांस पुढें थोडकेच दिवसांनीं असें वाटलें कीं आह्मीं जें केलें तें ठीक नव्हे. ह्मणून विजापुरकरांशीं पहिले प्रमाणें मिळाले.

जें दुसरें लश्कर मोड झालेल्या लोकांचे कुमकेस बरोबर रघुनाथपंत देऊन पाठविलें तें पावसाळा येई तों पर्यंत जय पावलें नाहीं, नंतर ते लोक निघोन आपल्ये मुलखीं गेले.

शेवटीं विजापुरचे दरबारांत असा निश्चय झाला कीं शिवाजीचें बंड अवश्य मोडिलें पाहिजे; तेव्हां त्याणीं सैन्य सिद्ध केलें. तें असें पांच हजार स्वार. आणि सात हजार पायदळ. व कित्येक तोफा. व कित्येक जेजाला. व कित्येक बाण. तयार करून कोणी एक मोठा कुलीन आफसुलखान नामें मुसलमान मुखत्यार केला; तो बादशाहाची आज्ञा घेऊन निघते समयीं. आपले जातीचा गर्विष्ठपणानें बोलिला कीं शिवाजी केवळ क्षुद्रजीव आहे यास बांधून स्वामीचे सिंहासनाचे पायरीवर आणून टाकीन.

मग पर्जन्य काळ गेल्यावर, सन सोळाशें एकुणसाठांत तें लश्कर पंढरपुरावरून वाईस आलें; तें शिवाजीला कळतांच तो प्रतापगडीं जाऊन राहिला. आणि तेथून वकील पाठवून त्या आफसुलखानाशीं फार गरीबाईचें बोलणें लाविलें; तें असें कीं तुज सारिखा महा प्रतापी सरदार. याशीं माझी लढाईची शक्ति किती; जर तुमचे योगें करून बादशाह माझे अपराधांची क्षमा करील, तर मजवर मोठे उपकार होतील; त्यास हें सिद्ध झालें ह्मणजे तुह्माला मीं आपला सर्व मुलुख देईन. तो आफसुलखान उन्मत्त पणानेंच आपणास राजकार्यदक्ष असें मानित होता. त्यावरून शिवाजीचें ज्ञान गणित नसे; त्याला पूर्वीं काहीं दिवस वांई परगण्याची मामलत होती. त्यावरून त्याला असें ठाऊक होतें कीं हा मुलुख केवळ पराक्रमें करून घ्यावयास अवघड आहे; हीं सर्व कारणें आणि शिवाजीचें गरीबीचें बोलणें मिळून त्याचें मन कांहींसें प्रसन्न झालें; तेणें करून त्याणें गोपीनाथपंत नामें एक कारकून कांहीं बोलणें करावयाकरितां पाठविला. तो पारगांवास पोंचल्यावर शिवाजी त्याचे भेटीसाठीं किल्ल्यावरून खालीं उतरला, तेव्हां तो ब्राह्मण शिवाजीशीं बोलिला कीं आफसुलखान शहाजीचा इष्ट आहे. तो तुमचा नाश इछीत नाहीं, तुह्मीं लढाई न करितां जर मुलुख द्याल तर तो बादशाहाकडून क्षमा करवील; आणि तुह्माला कांहीं जहागीर देववील, ही गोष्ट शिवाजीचे मनास आली, तेव्हां त्याणें तो वकील व त्या बरोबरचे लोक यांचे संमानार्थ स्थळा-

दिकाचा

दिकाचा बंदोबस्त केला. आणि त्या कारकुनास त्या लोकांपासून कांहीं दूर वेगळीं राहावयाजागा दिली. असें करून रात्रीस कोणाला कळूं नदेतां, त्याब्राह्मणाकडे शिवाजी येऊन बहुत नम्रतेनें दंडवत करून बोलिला कीं. तुह्मीं ब्राह्मण आहां शूद्रांचे गुरू आहांत; त्यास मीं आपणास विनंती करितों कीं मला भवानी प्रसन्न होऊन बोलिली. कीं तूं गाई आणि ब्राह्मण यांचा प्रतिपाळ कर. यास्तव मीजें कर्म करितों; तें केवळ गाईब्राह्मणांचा पालनार्थच करितों; त्यास जर तुह्मीं मला अनुकूळ व्हाल तर तुह्मास आपले भाग्यांत व सोयऱ्यांत सुखी ह्मणवून राहावयास हिंवरें गांवजहागीर करून देईन. त्यावरून तो ब्राह्मण वश होऊन त्याणें शिवाजीला निष्कपटपणाविषयीं शपथ दिली. मग ते दोघे मसलत करूं लागले कीं सांप्रत जें भय निर्माण झालें आहे, याचें निवारण कसें करावें; त्यांत त्या ब्राह्मणाचे अटकळींत असें आलें कीं आफसुलखान यास शिवाजीशीं एकांतांत आणावयाचें अवघड नाहीं, तेह्मां शिवाजीनें आपला वकील कृष्णाजी भास्कर त्या गोपिनाथपंताबरोबर आफसुलखानाकडे पाठविला. त्याणीं त्यास असें सांगीतलें कीं तुह्माला शिवाजी फार भितो, कदाचित् तुह्मीं जाऊन जर त्याला अभय द्याल, तर तो विश्वासेंकरून आपले स्वाधीन होईल, आणि युद्ध नकरितां मुलुख देईल.

असें त्यांचें सकृत्रिम बोलणें आफसुलखानानें सत्य मानिलें. आणि असावधपणें त्या गोपिनाथपंतानें सांगीतल्याप्रमाणें वर्तूं लागला, तेह्मां विजापुरकरांचें लश्कर जावळीस गेलें तेसमयीं शिवाजीनें मोरोपंत व नेटाजी पालकर व पुष्कळ मावळे लोक कोंकणांतून आणून, प्रतापगड व जावळी या दोहों जागीं गुप्त ठेविले.

यानंतर आफसुलखान भेटीची तयारीकरून बरोबर दीडहजार फौज घेउन, प्रतापगडाजवळ आला; तेह्मां गोपिनाथपंतानें शिवाजी भिईल असें समजावून फौज मागें ठेवविली. आणि एक हत्यारबंद बरोबर घेऊन, एकटा आफसुलखान यास त्या हत्यारबंदासुद्धां भेटीचा संकेताचे मांडावर नेवून शिवाजी येतो ह्मणून वाट पाहात बसले.

इकडे किल्ल्यामध्यें शिवाजीनें स्नानकरून नित्य नियम उरकून. मातेचा चरणावर मस्तक ठेवून आशीर्वाद घेतला; आणि आंगांत चिलखात चढवून, त्यावर आंगरखा घालून. त्याचे उजव्ये अस्तनींत गुप्त बिचवा नामें शस्त्र घातलें; आणि डाव्ये हातीं वाघनखें घेतलीं; आणि भेटीस निघाला. त्या बरोबर त्याचा पुरातन विश्वासू शिपाई तानाजी मालुसरा हत्यारबंद होता. तें भेटीचें स्थान जवळ आलें तेह्मां शिवाजी दबकत दबकत येऊं लागला, तेंह्मां गोपिनाथपंतानें असें समजाविलें कीं तो तुमचे जवळचा हत्यार बंदास भितो, कांकीं त्याची आकृती फार

सुकुमार

सुकुमार आणि व्हाहान आहे. याकरितां ह्या एकीकडे झाला पाहिजे, त्यावरून त्याला अमळसा दूर केला. नंतर शिवाजी व आफसुलखान एकमेकास भेटतां भेटतां शिवाजीनें आफसुलखानाचे पोटांत, वाघनखें खुपसलीं; तीं बळकट लागलीं; परंतु तो आफसुलखान त्वरेनें त्यापासून दूर होऊन, तरवार उपसून शिवाजीला वार करून, अरे घात आहे, अरे घात आहे, असें बोलिला. त्याच वेळेस शिवाजीनें त्यास आपल्ये अस्तणींतला बिचवा काढून मारिला, तेव्हां तो भूमींवर पडला; त्याणें जो शिवाजीस वार केला तो त्याचे चिलखाता मुळें लागुजाला नाहीं, इतकें सर्व एका क्षणांत जालें. तो त्या आफसुलखानाचे बरोबर आलेला हत्यारबंद सैयदबंधू नामें होता, तो आपल्ये धण्याजवळ आला इतक्यांत त्याचे हातची तरवार शिवाजीनें घेतली. घेतांच तो तानाजी व शिवाजी, हे दोघे त्या एकल्या बरोबर लढूं लागले; आणि त्यास कित्येक वेळा बोलले कीं तुला, आतां आह्मीं जीवदान देतों; त्याणें त्या बोलण्याचा धिक्कार करून त्यांशीं लढून मेला, असा तो स्वस्वाम्यभिमानी परम योग्य ह्मणून, त्याचें नाव लिहिलें; तो मृत्यु पावला ते समयीं शिवाजीचे लोक आले, त्याणीं त्या आफसुलखानाचें शिर कापून किल्ल्यावर नेलें.

तें शिर किल्ल्यावर नेतांच संकेताप्रमाणें तोफेचा बार केला; तो बार होतांच, एकाएकीं प्रतापगडचे व आवळीचे लोक येऊन, आफसुलखानाचे लष्करावर छापा घातला; तेव्हां त्या लष्कराचा बहुत नाश जाला, त्या वेळेस शिवाजीला चार हजार घोडे व कांहीं हत्ती व कांहीं उंटें आणि बहुत द्रव्य, व तोफा व जेजाळा वगैरे, पुष्कळ सरंजाम सांपडला.

अशा अधर्में करून वैभव संपादन केलें असतांही, त्याचे जवळचा लोकांहीं त्याची प्रशंसा केली; त्याणीं धर्माधर्माचा विचार चित्तांत आणिलाच नाहीं. त्या छाप्यांत कित्येक लोक धरून नेले, त्यांतून जे कोणी गेले त्यांस दुःख न देतां शिवाजीनें जाऊं दिले. त्यांत एक झुंझारराव घाटगा नामें सरदार मोठा कुलीन होता, त्याचें आणि शहाजीचें इष्टत्व होतें, त्याणें राहावें ह्मणून शिवाजीनें फार आग्रह केला, परंतु तो ऐकेना, तेव्हां त्याचा मोठा संमान करून त्याला बादशाहाकडे जाऊं दिला.

यारवेरीज त्या धरलेल्या लोकांत आफसुलखानाची स्त्री व पुत्र सांपडलेलीं, एक शिवाजीचा सरदार खंडोजी कांकडा नामें असे, त्याचे स्वाधीन होतीं; त्याणें त्यांपासून कांहीं लांच घेऊन, सोडून दिलीं; यास्तव शिवाजीनें त्या कांकड्याचें डोकें मारिवलें.

त्या लढाईंत जे जखमी जाले त्यांचा शिवाजीनें मोठा संमान करून त्यां-

स कित्येक अलंकार वस्त्रें दिलीं; या योगें करून त्याची मोठी कीर्ति जाली. आणि शिपाई लोक युद्धाविषयीं तयार आले.

अद्यापि शिवाजीचे पुरुष त्या आफसुलख्यानाचे तरवारेस अमूल्य मानून फार जपतात.

तो गोपीनाथ पंत दगा केलेला त्यास संकेताप्रमाणें शिवाजीनें हिंवरें गांव देऊन, मोठा संमान केला. आणि सरदारीचा अधिकार देऊन आपल्ये चाकरीस ठेविला.

यानंतर शिवाजीनें पन्हाळ्याचा किल्लेदार वशकरून तो किल्ला घेतला. नंतर कृष्णेचे उभयतीरची खंडणी घेत चालिला; या खेरीज कोंकणाचे व सह्याद्रीवरचे कित्येक किल्ले त्यास लढाई नकरितां त्या लोकांनी दिले; परंतु रांगणा व खेळणा हे दोन किल्ले युद्धकरून घेतले; त्या वेळेस त्या खेळण्या किल्ल्याचें नाव विशाळगड पडलें. तें अद्यापि तसेंच चाललें आहे. हें वर्तमान सन सोळाशें एकुणसाठांचे बाराव्ये महिन्यांत विजापुरीं कळलें, तेव्हां त्या बादशाहानें आपला सरदार मिरजेस, रुस्तुलजमान नामें होता, त्यास आज्ञा केली कीं कोल्हापुरचे बंदोबस्तास निघावें तेव्हां त्याजवळ तीन हजार स्वार आणि कांहींसें पायदळमात्र होतें. तो पन्हाळ्याजवळ येतांच शिवाजीनें आपले स्वार जमा करून त्याचा अगदीं पराभव केला, आणि कृष्णेचा पार घालविला.

यानंतर पायदळ आणून शिवाजीनें विजापुर पर्यंत खंडणी घेतली. आणि अति त्वरेनें माघारां विशाळगडास गेला कीं ज्याचे पाठीस कोणी सरदार लावावयास अवकाश आला नाहीं.

त्यानंतर सन सोळाशें साठांचे पहिल्या महिन्यांत, शिवाजीनें कोंकणांत समुद्रतीरीं राजपूर व दाभोळ हीं दोन्हीं स्थानें लुटून बहुत द्रव्य राजगडास नेलें हें सारें शिवाजीचें कृत्य विजापुरीं कळल्यावर तेथचे दरबारी लोकांत जें पूर्वीं वैमनस्य पडलें होतें तें मोडून, सर्व एकचित्त होऊन कर्नाटकांत कर्नोळास एक जोहर नामें शिद्दी मोठा विख्यात पुरुष होता, त्याज बरोबर आफसुलखानाचे दुप्पट फौज देऊन शिवाजीचे पारिपत्यास योजिला; तेथे असें ठरलें होतें कीं आधीं पन्हळा किल्ला घ्यावा, मग तो शिवाजीचे जवळ पोंहचतांच दंडाराजपुरचा फत्तेखान शिद्दी, व वाडीचा सावंत या दोघांनां जोहर शिद्दीचे कुमकेस यावयास आज्ञा करावी.

इकडे शिवाजीनें कोंकणांत बंदोबस्तासाठीं राजपुरचे शिद्दीवर रघुनाथपंत योजिला, आणि कालियानी व भिंवडी यांचे संरक्षणार्थ आबाजीसोनदेव नेमिला; आणिक वाडीचा सावंतावर बाजी फासकर सरनोबत यास पाठविला;

ठविला. मोरोपंत यास देशांत सिंहगड व पुरंदर व प्रतापगड यांचे. व मुलखाचे रक्षणार्थ आज्ञा केली. शिवाजीनें पन्हळा किल्ला असा सुदृढ कीं कोणाचे हातीं लागावयाचा नाहीं. याप्रमाणें समजून तेथें आपण मोठ्या बंदोबस्तानें राहिला.

त्या शिवाजीनें विजापुरकरांचें लश्कर येताना वाटेनें त्यास कांहीं उपद्रव केला नाहीं. मग जेव्हां तें अगदीं जवळ येऊन पडलें. तेव्हां नेटाजी पालकर याजबरोबर स्वार देऊन त्या लश्करासभोंवत्या मुलखांत स्वांच्या मारून लुटून ओस पाडून. त्या लश्करास. धान्यादि मिळेनासें केलें; आणि रात्रीस किल्ल्यांतून मावळे लोक कुमकेस पाठवून छापा घालवी. अशा प्रकारें त्या लश्कराचा फार नाश केला; शेवटीं त्या शिद्दीजोहरानें आपल्ये लश्करांत अशी आज्ञा केली कीं असें घातकर्म करणारा जो तो सांपडला असतां त्याला जीवंत ठेवूं नये. आणि किल्ल्यास वेढा असा घातला कीं अगदीं दुसर्याचा प्रवेश आंत नहोय. असे चार महिने राहिले तेव्हां शिवाजीस असें समजलें कीं मीं या किल्ल्यावर राहिलों हें ठीक नकेलें. कांकीं आतां आपल्यास पळायास वाट नाहीं व मुलखांत काय होतें आहे तें समजत नाहीं; त्यास आतां कसा तरी आपला जीव वांचेल अशी युक्ति करावी.

इकडे चार महिने झाल्यावर त्या वेढा घालणारांस असें वाटलें आतां शिवाजी आपल्ये हातीं लागला; तेणेंकरून त्यांस बहुत आनंद जाला. आणि अत्यंत सावधपणानें बंदोबस्त करूं लागले.

जो शिवाजीचा मुलुख कोंकणांत होता तेथें ते समयीं जागोजाग युद्धें होत होतीं; फत्तेखान शिद्दीनें कित्येक वेळा रघुनाथ पंताचा पराभव करून. लढाऊ गलबतें बाळगून त्याचे मुलखांत जाऊन कित्येक जागीं उपद्रव केला.

याखेरीज वाडीचे सावंताशीं बाजिराव फासलकर लढाई करीत होता. ती लढाई अशी झाली कीं दोनीं लश्करांच्या सारखा नाश जाला आणि दोहोंकडचे दोघे मुख्य सावंत व फासलकर हे पडले.

शिवाजीचे मनांत आलें कीं आतां आंतच राहून मरावें हें योग्य नाहीं. कसें तरी बाहेर पडावें; म्हणून शिद्दीजोहरास निरोप पाठविला. कीं जर माझे जीवास+ भय नसेल, तर मी तहाचें बोलणें करावयास येतों; मग त्याचें अभयवचन ऐकून. बरोबर थोडकीं माणसें घेऊन संध्याकाळच्या थोडा दिवस असतां शिवाजी किल्ल्याखालीं उतरला तो जेथें शिद्दीजोहराचे सैनिकानीं मोरच्या बांधिला होता. त्या जवळ त्या शिद्दीजोहराशीं व शिवाजीशीं भेट जाली; त-

---

\+ मराठी लोकांत अद्यापि असा विश्वास आहे कीं शिद्दी लोक वचनाचे खरे प्रमाणिक.

तर

तर त्या दोघांचें बोलणें झालें त्यावरून लोकांस असें वाटलें कीं आतां शिवाजी युद्ध करीत नाहीं; तो तर आपलें बोलणें युक्तीनें बहुतेक मोठीं मोठीं कलमें बोलून कांहीं हलकीं कलमें राहिलीं तीं युक्तीनें नसंपवितां संध्याकाळ आला म्हणून, उद्यां बोलेन असें समजावून, माघारा किल्ल्यावर गेला; तेव्हां ते घेरा घातलेले लोक असें समजले कीं आतां किल्ला हस्तगत जाला; त्यास इतःपर बहुत सावधपणा राखण्याचें कारण नाहीं, त्यावरून ते असावध राहिले.

तो त्यांची असावधता पाहून बरोबर मावळे लोक घेऊन रात्रीस अंधारांतच निघोन किल्ला उतरोन त्या लोकांस कळूं न देतां रांगण्याकडे पळाला, तो बहुत दूर गेल्यावर लोकांस समजलें, तेव्हां त्याचे पाठीमागून त्या शिद्दीजोहराचे स्वार व पायदळ लोक धांवले; त्याणीं रांगण्याचे आलीकडे तीन कोस सुमारें एके खेंडींत चहढतांना पाहिला, तेव्हां, त्याणेंही त्यांस पाहिलें; मग त्या खेंडींतच मावळे लोक ठेवून त्यांस सांगीतलें कीं मी जों पर्यंत किल्ल्यावर जाऊन तोफांचे बार पांच करीन तों पर्यंत तुह्मीं हे येताहेत यांशीं येथूनच लढत असावें, त्या वेळेस त्या मावळ्यांचा मुख्य बाजीपरभू यास करून, आपण किल्ल्यावर गेला.

नंतर त्या लोकांशीं तो परभू दोन प्रहर पर्यंत मोठ्या शौर्येंकरून लढला, त्याणें कित्येक वेळा त्या मोंगलांस हटविलें; शेवटीं दुसरी मोठी फौज आली तेव्हां फार मोठें युद्ध जालें त्यांत ते मावळे लोक अर्धे पडले, आणि तो परभूही पडला, ते समयीं त्याणें किल्ल्यावरचे तोफेचे पांच बार ऐकिले, आणि बोलिला कीं आतां मी सुखी आलों; इतकें करून प्राण सोडिला. हें सर्व वर्तमान विजापुरचे बादशाहास कळलें तेव्हां त्या शिद्दीजोहराविषयीं त्याचे मनांत वांकडें येऊन तो रागें भरला; कांकीं त्यास असें वाटलें कीं याणें कांहीं लांच घेऊन शिवाजीला सोडून दिला. मग सन सोळाशें एकसष्टांत तो बादशाह आपण आंगें सैन्य घेऊन कराडास आला, तेथें जे कोणी सभोंवते संस्थानीं लोक होते त्याणीं त्याचे सेवेंत तत्पर असून असें समजाविलें कीं आह्मास शिवाजीचा पक्ष किमपि नाहीं. तो शिद्दीजोहर बादशाहाचे भेटीस आला, त्याणें बादशाहाचे मनांतील संशय उडविला, आणि आपण आपल्ये ठिकाणीं कर्नोळास गेला.

मग त्या बादशाहानें रांगणा किल्ला व विशाळगड या दोहों खेरीज, शिवाजीचा पन्हाळा व त्या संबंधीं कित्येक किल्ले घेतले; पुढें पर्जन्यकाळ जवळ आला तेव्हां फौजेसहित कृष्णेचे कांठीं चिमळगेशहरीं जाऊन राहिला, तो शिवाजी बादशाहाचे सन्मुख कधींही लढला नाहीं; परंतु कांहीं संधी पाहून सन

सोळाशें

सोळाशें बासष्टांत त्याणें राजापूर लुटून तेथे कोणी इंग्रेज लोक व्यापारी राहात होते ते धरून नेऊन कैदेंत ठेविले

यानंतर शिवाजीनें शृंगारपूर युद्ध करून घेतलें. तेथें दळवे नामें एक पाळेगार होता. तो युद्धांत पडला. याप्रमाणें शिवाजीनें हिंदूचीं दोन ठिकाणें घेतलीं. एक जावळी एक शृंगारपूर. तें हिंदुलोकांस फार अयोग्य वाटलें: यास्तव तें लोकांचे मनांतलें जावें म्हणून शिवाजी केवळ धार्मिकपणा करूं लागला: तो असा कीं आपणास तुळजापुरचे भवानीचे दर्शनास जावयास फावेना म्हणून प्रतापगडास मोठ्या समारंभानें देवीची स्थापना केली: आणि रामदास नामें एक महासाधू ब्राह्मण होता तो गुरु केला. हीं दोन कारणें आणखी तिसरें कारण असें. शृंगारपुरचे रहाणारे सुर्वे नामें मराठे होते ते वश केले. त्यामुळें जे शृंगारपुरचे रहाणार लोक ते शिद्दीचे मुलखांत रहावयास गेले नाहीं तेथेच राहिले.

मग कर्नाटकप्रांतांत कित्येक जागीं बंडें उत्पन्न झालीं. तेणेंकरून विजापुरचे दरबारांत असा विचार पडला कीं आधीं शिवाजीचें पारिपत्य करावें किंवा त्या बंडाचे पारिपत्यास जावें इतक्यांत वाडीकर सावंतांनीं लिहून पाठविलें कीं आह्माला तुमची कुमक असेल तर आह्मीं शिवाजीला जिंकूं; त्यावरून असा निश्चय ठरला कीं बादशाहानें फौज घेऊन कर्नाटकांत जावें. आणि बाजी घोरपडा मुधोळकर व बाहलोलखान मुसल्मान या दोघांहीं सावंतांचे कुमकेस असावें. तेव्हां बादशाह कर्नाटकांत चालिला. इकडे शिवाजीवर जाणारांची तयारी होऊं लागली ते समयीं बाजी घोरपडा आपल्ये कांहीं कामानिमित्त आपल्ये ठिकाणीं गेला, हें वर्तमान कोणी शिवाजीस सांगीतलें तें ऐकतांच तो शिवाजी कांहीं लोक बरोबर घेऊन मोठ्या त्वरेनें चोरवाटेनें जाऊन अकस्मात मुधोळ शहरीं पोंहचला. तेथें छापा घालून तो मुधोळकर व त्याचे कित्येक भाऊबंद व कित्येक शिपाई लोक मारून टाकिले. आणि लवकर निघून विशाळगडीं माघारा गेला.

इकडे बादशाह कर्नाटकांत गेला तेथें रायचूर व तुर्गळ हीं दोन्हीं ठिकाणें घेऊं लागला. तेथें शिपाई लोक होते त्याणीं मोठ्या शौर्यें करून लढाई केली: आणि त्या बादशाहानेंही महत्प्रयत्न करून तीं स्थानें घेतलीं, हें वर्तमान सन सोळाशें बासष्टांत घडलें. त्या शिद्दीजोहरास बादशाहाचे भय पडलें, तें असें तो समजला कीं बादशाहाचे मनांत माझे विषयीं संशय आहे. त्यास त्याचा विश्वास धरूं नये म्हणून त्याणें बंडाचा आश्रय केला. नंतर त्याणें अशी संधी पाहिली कीं जुझारराव घाटगे व फलटणचे रा-

व नाईक निंबाळकर या दोघांचें लष्कर बादशाहाचे लष्करापासून दूर आणीला दोहों लष्करामध्यें तुंगभद्रा नदी इतकें आणून एकाएकी जाऊन त्या लष्करावर छापा घालून, मोठी गडबड करून त्यां लोकांस पिटून लाविलें; इतक्यांत तो बालोलखान नवें सैन्य कुमकेस घेऊन माघारा उलटला, आणि त्या जोहराचे सैन्याचा नाश केला.

यानंतर ते शिद्दी जोहराचे लोक आपल्ये जिवाचे रक्षणार्थ बादशाहानें क्षमा करावी म्हणून आपला धणी शिद्दी जोहर यास मारिला; त्या योगेंकरून तिकडचें बंड बहुतएक मोडलें; परंतु त्याची समाप्ती व्हावयास दोन वर्षे लागलीं, तोंपर्यंत बादशाह तेथेंच होता, नंतर विजापुरीं आला तरी त्यांतील कांही कामें राहिलीं.

बादशाहाचें लश्कर कर्नाटक प्रांतीं बंड मोडावयास गुंतलें तेणेंकरून शिवाजीला मोठा उपयोग जाला तो असा कीं त्या बादशाहानें जे सरदार शिवाजीवर नेमिले होते त्यांसही त्याला आपल्यें कुमकेस बोलावून बंडाचे बंदोबस्तास न्यावें लागलें तेव्हां शिवाजीनें जाऊन वाडीचे सांवताचा मुलुख घेतला ते वेळेस सांवत पळाले त्याणीं गोव्यांचे पोर्तुगीस लोकांकडे जाऊन त्यांचा आश्रय केला परंतु शिवाजीनें त्या लोकांस भय दाखविताच त्याणीं हांकून दिले तेव्हां सावंत शिवाजीला शरण गेले ते समयीं शिवाजीनें त्यांचें देशमुखीचें वेतन त्यांस दिलें त्यापासून ते शिवाजीचे चाकर जाले.

यानंतर शिवाजीनें रेडी व सिंधुदुर्ग, ज्यास माल्वणही म्हणतात, हे दोन किल्ले बांधिले आणि कुलाबा व सुवर्णदुर्ग व विजेदुर्ग, हे किल्ले नीट केले; आणखी कित्येक लढाऊ गलबतें केलीं तीं पुष्कळ आलीं तेव्हां त्याचें ठेवण्याचें मुख्य ठिकाण कुलाबा, जो मुंबईचे दक्षिणेस बारा कोसांवर आहे तो केला; आणि त्यांचे मुख्य सरदार दोन केले, एक दर्यावसागर. आणि एक मेनाक भंडारी ते फार चांचेपणा करीत असत; त्यांच्या उपद्रवास भिऊन गोव्यांचे पोर्तुगीस लोकही त्यांस तोफा वगैरे कित्येक युद्धोपयोगी पदार्थ देऊन त्यांशीं इष्टत्व राखीत. असें जाल्यावर विजापुरचे बादशाहाचा वजीर, अबदुल महंमद, याणें शिवाजीशीं गुप्तपणें, तहाचें बोलणें लाविलें; त्यांत बारीक गोष्टी काय काय होत्या त्या आतां समजत नाहींत; परंतु असें दिसतें कीं त्याचा घटक शिवाजीचा बाप शहाजी असेल; कांकीं ते समयीं शहाजीनें कर्नाटकांतून बादशाहाचा निरोप घेऊन बरोबर पुत्र व्यंकोजी घेतला, आणि मोठ्या समारंभानें शिवाजीचे भेटीस आला. मग दोन महिने राहून बहुत आनंदें करून कित्येक अपूर्व पदार्थ शिवाजी पासून घेऊन, त्याणें बादशाहाचे भेटीस नेले.

त्यापासून

त्यापासून शहाजी जीवंत होता, तोंपर्यंत बादशाह आणि शिवाजी यांची परस्परें प्रीति होती.

शहाजीची व शिवाजीची भेट जाली, त्याच सुमारें, शिवाजी राजगडाहून निघून रेडी किल्ल्यावर रहावयास गेला. त्या किल्ल्याचें नाव बदलून रायगड असें दुसरें ठेविलें; तेथें राजकारभाराचे उपयोगी हवेल्या बांधिल्या, आणि मोठी मेहनत करून तो असा सुदृढ केला कीं कोणाचे हातीं लागूं नये.

त्यावेळेस शिवाजीचे मुलखाची मर्यादा इतकी होती, कालीयानीपासून गोंवेपर्यंत कोंकणपट्टी; घाटमाथा, भीमेपासून वारणेपर्यंत. त्याचे मुलखाची विशेष रुंदी सुप्यापासून जंजिऱ्यापर्यंत होती. तो पुंडाई करी म्हणून त्याचें थोडकें राज्य असून त्याजवळ फौज फार असे त्याचें पायदळ पन्नास हजार होतें, आणि सात हजार स्वार होते; असा तो शिवाजी पराक्रमी जाला यास्तव विजापुरकरांनीं त्याशीं इष्टत्व केलें; तेणेंकरून तो रिकामा जाला म्हणून, त्याचे मनांत आलें कीं आतां मोंगलांशीं युद्ध करावयाची मसलत करावी.

सन सोळाशें बासष्टांपासून जालेलीं वर्तमानें मिळून भाग सहावा.

सहाव्या भागाची अनुक्रमणिका.

शिवाजीनें मोंगलांच्या मुलुख घेण्याचा उद्योग केला. १

म्हणून त्यावर औरंगजेब बादशाह याणें शाइस्तेखान नामें सरदार याची योजना दिल्लीहून केली. २

त्या शाइस्तेखानानें पुण्यास येऊन, चाकण किल्ला घेतला. ३

त्यापुढें शिवाजीनें काय पराक्रम केला तें प्रकरण. ४

दिल्लीहून बादशाहानें त्या शाइस्तेखानाला माघारा बोलावून सुलतानमाजुम नामें दुसरा सरदार दक्षिणेस योजिला. ५

शिवाजीनें सुरत लुटली. ६

शहाजीचा मृत्यु. ७

शिवाजीनें आपल्ये नावास राजा असें पद जोडून आपल्येच नावें शिक्के चालविले. ८

जे लोक मकेस तीर्थयात्रे करितां जाणार ते शिवाजीचीं लढाऊ गलबतें जाऊन, लुटले. ९

तो शिवाजी अहंमदनगर लुटून, माल्वणापाशीं गलबतांवर चढून समुद्रांतून जाऊन गोव्यांचे दक्षिणेस बारशिलोर नामें शहर होतें तें लुटिता आला. १०

शिवाजी म

शिवाजीस जिंकावयास, राजा जयशिंग व दिलीरखान हे दोघे त्याला नकळतां त्याचे मुलखीं जाऊन पोंचले. ११

त्याणीं कांहीं स्थानें घेतलीं म्हणून शिवाजीला भय प्राप्त जालें. १२

पुरंदर किल्ल्यास घेरा घातला तें वर्तमान. १३

शिवाजी युद्ध सोडून राजा जयशिंग व दिलीरखान, या दोघां सरदारांचा आज्ञानुवर्ती जाला; आणि त्याणें त्यावेळेस कांहीं ठराव करून घेतला. १४

त्यावरून विजापुरकरांचा व त्या सरदारांचा युद्धप्रसंग घडला. १५

त्यापुढें शिवाजी बादशाहाचे भेटीला दिल्लीस गेला; तेव्हां ओरंगजेबानें त्याला बंदींत ठेविला असतां, त्याणें आपला जीव कोणत्या प्रकारें वांचविला. १६

विजापुरकरांशीं जयशिंग लढला त्याचा विशेष प्रकार. १७

त्या जयशिंगानें विजापुरास घेरा घातला असतां त्यांहीं तो मागें हटविला. १८

तो जयशिंग माघारा दिल्लीस जात असतां वाटेनें मृत्यु पावला. १९.

भाग सहावा.

शिवाजीनें मोंगलांस जिंकावया करितां मोठें सैन्य जमा केलें, त्यांत पायदळाचा सरदार मोरोपंत केला. आणि नेटाजी पोलकर स्वारांचा सरदार केला, त्या मोरोपंतानें पर्जन्यकाळीं जुन्नराचे उत्तरेकडचे कित्येक किल्ले घेतले, मग पाउसकाळ गेल्यानंतर चांगले मार्ग जाल्यावर नेटाजी पालकरानें स्वारांसहित ओरंगाबादेपर्यंत मोंगलांचा मुलखांत जाऊन मोठी लुटालुट करून बहुत द्रव्य घेऊन माघारा पुण्यास गेला. तो त्या मुलखांत कोठेही फार वस्ती करीत नसे, आणि वाटेनेंही सरळ मार्ग सोडून वांकडेतिकडे मार्ग करून भलत्या गांवांहून भलतेच गांवीं जावें असें करीत फिरला; तेणेंकरून मोंगलांचे सरदारांस त्याला धरावयास अवकाश सांपडला नाहीं, म्हणून तो ती सर्व लूट घेऊन स्वस्थपणें पुण्यास पोंचला; हें वर्तमान सन सोळाशें बासष्टांत जालें. त्या वेळेस दक्षिणेंत षाइस्तेखान नामें मुसलमान सुभेदार होता, त्यास दिल्लीचा तक्ताधिपतीनें आज्ञा केली कीं शिवाजी फार अमर्याद जाला आहे त्यास तूं त्याचे मुलखीं जाऊन तो मुलुख बलात्कारें करून घे; तेव्हां तो षाइस्तेखान मोठें सैन्य जमा करून ओरंगाबादेहून निघाला, त्याणें अहमदनगर व पेरगांव यांवरून येऊन पुणें शहर घेतलें.

यानंतर तो जुन्नर किल्ला घ्यावयास निघाला, त्या वाटेंत लहानसा चाकणचा किल्ला होता तो पाहून त्यास असें वाटलें कीं हा लहान किल्ला

आणि

आणि माझें येवढें मोठें सैन्य आहे, यास्तव एथचे लोक भिऊन मला किल्ला देतील; परंतु तेथचा किल्लेकरी फिरोंजी नरसाला नामें, मोठा शूर तो सोळा वर्षे तेथचा अधिकार मुख्यत्वें करून करीत होता; तो किल्ला देइना, तेव्हां तो थाइस्तेखान आपल्ये सैन्यासुद्धां दोन महिने त्या किल्ल्याशीं लढला, तरी किल्ला आला नाहीं. तेव्हां ईशानी दिशेचे बुर्जाखालीं सुरुंग पाडून तो बुरुज उडविला, उडतांच त्या मोंगलानीं मोठा हल्ला केला, आणि एकाएकीं धांवले, परंतु तो फिरोंजी व त्याचे लोक मोठे पराक्रमी, ते त्या मोडक्या बुर्जाचे शिखरावर चढून त्याणीं कित्येक वेळा त्या मोंगलांस मागें हटिवले; याप्रमाणें युद्ध दिवस मावळे तों पर्यंत जालें, नंतर रात्रीस ते मोंगल लोक लढेनातसे जाले. तेव्हां किल्लेकरी सहज राहिले. मग दुसरे दिवशीं फिरोंजीनें आपल्या संतोषानें किल्ला दिला. असें त्याचें शौर्य म्हणून थाइस्तेखानानें त्यास आपल्ये चाकरीस ठेवावयासाठीं फार आग्रह केला, परंतु तो राहिना यास्तव त्याचा मोठा संमान करून त्याला जाऊं दिला; तो जाऊन शिवाजीस मिळाला, तेथेही त्याचा फार मान होउन त्याची योग्यता वाढली.

त्या थाइस्तेखानाला चाकणचा किल्ला घ्यावयास इतके श्रम जाले त्यावरून त्याचे मनांत आलें कीं डोंगरी किल्ले फार उंच आणि मोठे कठीण, ते आमचे हातीं कसे लागतील, म्हणून त्याणें औरंगजेबास लिहून पाठविलें; त्यावरूनही त्याला तें काम मोठें कठीनसें वाटलें नाहीं; कांकीं तो मराठी लोकांस केवळ अप्रयोजक मानी, तथापि त्याणें जोनपुरचा राजा यशवंतशिंग रजपूत, यास थाइस्तेखानाचे कुमकेस सैन्यासहित पाठविला. तो येऊन पोंहचला तोंपर्यंत खानाचें लश्कर पुण्याजवळ उगेंच पडलें होतें. इतक्यांत नेताजी पालकरानें औरंगाबादेजवळचा व अहमदनगराचे सभोंवता मुलुख मारक्यान लुटून जाळून ओस पाडला; परंतु त्याला पहिल्याप्रमाणें नीकळेपणानें दंगा करावयास फावलें नाहीं. कांकीं मोंगलांनीं त्यास पिटून लाविलें, तेव्हां त्याचे कित्येक स्वार पडले आणि त्यालाही जखमा लागल्या. तें मोंगलांचें लश्कर जेव्हां समीप आलें तेव्हां शिवाजी राजगड सोडून सिंहगडास गेला. तेथें त्याला असें वर्तमान कळलें कीं थाइस्तेखान पुण्यामध्यें जी हवेली दादोजी कोंडदेवानें जिजाबाईस रहावयाकरितां बांधलेली आहे, तींत राहिला. तेव्हां त्याला धरून न्यावयाची मसलत करूं लागला; तो थाइस्तेखानही शिवाजीजवळ आहे त्यास तो कोणे वेळेस घात करील असा संशय धरून पुण्यामध्यें परवानगीखेरीज कोणी मराठा येउं देत नसे. मग कांहीं सिद्धता करून सन सोळाशें त्रेसष्टाचे चवथे महिन्यांत शि-

वाजी

वाजी पंचवीस मावळे लोक बरोबर घेऊन पुण्यांत मोठ्या युक्तीनें कोणी मराठ्याचें लग्न होत होतें त्याचे सोयऱ्यांत मिसळून शहरांत शिरला. नंतर रात्रीस हळूच जाऊन त्या हवेलीचे माडीवर एक संयपाक घर होतें त्याची एक खिडकी फोडून आंत गेला; तो फोडीत होता तेव्हां त्या षाइस्तेखानाचा बायकांनीं ऐकिलें, त्यांहीं त्यास कळविलें, तें ऐकतांच तो षाइस्तेखान एका खिडकीला दोर लावून त्या दोरावरून उतरूं लागला इतक्यांत शिवाजी आला, त्याणें त्यास तरवारेचा वार केला, तेणें करून त्याचें एक बोट तुटलें आणि तो वांचला. त्याचा पुत्र आबुलफत्तेखान व त्याचे जवळचे कोणी शिपाई होते ते शिवाजीनें जिवें मारून टाकिले. तो असा नाश करून त्या मावळ्या लोकांसहित निघाला; त्याणें वाटेंत कित्येक शिपाई लोक ठेविले होते ते त्यास मिळाले. मग त्या लोकांनीं पुण्यांपासून दोन कोसांवर जाऊन आपणास मोंगलांचें भय नाहीं असें लोकांस कळवाया करितां चुडी पेटवून सिंहगडास गेले. मग दुसरे दिवशीं सकाळीं ते मोंगलांचे स्वार तरवारा चमकावीत, आणि नगारा वाजवीत, त्या किल्ल्याजवळ आले; त्यांस केवळ समीप येऊं दिले; मग एकाएकीं किल्ल्यावरून तोफांचा भडमार करून त्यानां अत्यंत घाबरे करून माघारे हटविले; त्यांत एक कार्टोजी गुजर नामें शिवाजीचा सरदार होता, त्याणें फारच पाठ घेतली, आणि दूर पिटून घालविले.

याशिवाय कांहीं कांहीं पराभव जाल्यानें तो षाइस्तेखान उदासचित्त होऊन, त्याणें केवळ अप्रयोजकपणें औरंगजेबास पत्र पाठविलें कीं यशवंतशिंग फितुरी, आणि लश्करी लोक कुमार्गवर्ती जाले; त्यावेळेस काश्मीरास जाण्याची सिद्धता करीत होता, तेसमयीं त्याला खानाचा पराभव आणि यशवंतशिंगाशीं व त्या खानाशीं वैमनस्य पडलें असें समजलें, तेव्हां तो औरंगजेब दिल्लींत होता, त्याणें सुलतान माजम नामें मुसलमान यास दक्षिणेचा सुभेदार करून त्याचे हाताखालीं यशवंतशिंगानें वागावें असें केलें; आणि षाइस्तेखानास बंगाल्याची सुभेदारी सांगीतली.

यानंतर यशवंतशिंगानें सिंहगडास घेरा घालावयाचा अल्पसा उद्योग केला, परंतु तो शेवटास गेला नाहीं. मग ते मोंगल लोक मोठीं मोठीं पतकें चाकणेस व जुनरास ठेवून, मोठें लश्कर घेऊन औरंगाबादेस गेले.

त्यापुढें शिवाजीनें कालियानीजवळ व दंडाराजपुरापाशीं लश्कर जमा करून असें दाखविलें किं पोर्तुगीस लोकांचीं वसई किल्ला व चौल घेणार परंतु त्याचे मनांत सुरत लुटावयाची होती; तेसमयीं तेथें वकून संपत्ती होती ला शोधास त्याणें बहिर्जी नामें एक जासूद पाठविला होता तो सर्व मराठा

लोकांत

लोकांत प्रसिद्ध होता.

याप्रमाणें तयारी करून शिवाजी निघाला तो उत्तरेकडे जाऊं लागला, ते समयीं लोकांत असें दर्शविलें कीं शिवाजी देवदर्शनार्थ नाशिकास जातो, त्यावरून लोक कल्पना करूं लागले कीं तो उगाच देवदर्शनास जातो आहे. इतक्यांत एकाएकी चार हजार स्वारांसहित तो सुर्तेस जाऊन दाखल झाला तेथे कांहीं मोठीशी अडचण न पडतां, सहा दिवस मनास येईल तसें शहर लुटून सावकाशपणें तें द्रव्य नेऊन रायगडीं ठेविलें. ते वेळेस ती नवी राजधानी केली होती. तेव्हां सुर्तेंत कित्येक मोठीं मोठीं भांडारें इंग्रेजी लोकांचीं व दच् लोक यांचीं होतीं; तेथे जे लोक होते त्यांणीं युद्ध करून तें द्रव्य रक्षिलें. त्याबरोबर आणिकही जवळचे जवळचे लोकांचीं द्रव्यें राखलीं; नाहींतर त्यास अति धन सांपडलें असतें. तो शिवाजी सुर्तेस दाखल झाला हें वर्तमान सन सोळाशें चौसष्टांचे पहिल्या महिन्याचे पांचव्ये तारखेस घडलें.

शिवाजी जेव्हां सुर्तेहून माघारा रायगडास गेला, तेव्हां त्याला वर्तमान कळलें कीं शहाजी तुंगभद्रेचे कांठीं बेदनुराजवळ बसवे पटन नामें गांव आहे, तेथें शिकारीस गेला असतां दैवगतीनें घोडयावरून पडून मृत्यु पावला, यानंतर शिवाजी आपल्या बापाची क्रिया होई तों पर्यंत सिंहगडास होता, मग रायगडास जाऊन आपल्ये राज्याचा बंदोबस्त करीत कांहीं महिने तेथे राहिला. तो बंदोबस्त झाल्यावर आपल्या नावास राजा असें पद जोडून आपल्या नावाचा शिक्का चालवूं लागला.

तेच समयीं त्या शिवाजीनें आणखी कांहीं कृत्य केलें तें असें सन सोळाशें चौसष्टांच्या आठव्या महिन्यांत अहंमदनगरची पेठ लुटून औरंगाबादेचे सभोंवताले मुलखींही धामधूम केली; त्या वेळेस विजापुरकरांचे दोघे सरदार फौजेसहित पन्हाळ्याजवळ राहिले होते त्यांणी शिवाजी फार दूर गेला असें पाहून कोंकणपट्टी जी पूर्वींची त्यांची होती ती घ्यावयाविषयीं भगीरथप्रयत्न केला तेव्हां त्यांचा हातीं कांहीं कांहीं स्थळें लागलीं; तों अकस्मात् शिवाजी मोठें सैन्य घेऊन आला आणि मोठी लढाई करून त्यांचा पराभव केला. त्या शिवाजीचें युद्धादिप्रसंगीं जेथे जेथे प्रयोजन लागे तेथे तेथे तो प्रकट होई; यास्तव त्या वेळेचे लोकांत जर कोणास असें भासलें असलें कि, शिवाजीला एक शरीर नाहीं ते बहुत आहेत. तर तें आश्चर्य नव्हे, असा त्या शिवाजीचा सावधपणा.

त्या शिवाजीचा लढाऊ गलबतांनीं कित्येक दुसरीं गलबतें जिंकून बहुत द्रव्य जमा केलें होतें आणि मोंगल लोकांचा जहाजांवर बसून मकेस जा

णारे

णारे कित्येक यात्रेकरू द्रव्यवंत लुटून धरून नेऊन त्यांस बंदींत ठेवून त्यांपासून फार पैका घेऊन सोडून दिले.

पुढें सन सोळाशें सासष्टांचे पहिल्या महिन्यांत, शिवाजीला असें समजलें कीं मोंगलांनीं जें लश्कर जुनरजवळ ठेविलें होतें, तें मोठें वाढविलें; ह्मणून तें आपणास बाधक आहे किं काय, त्या शोधासाठीं सिंहगडास जाऊन राहिला. तेव्हां तें लश्कर आपणास बाधक नाहीं असें जाणून दुसऱ्या कांहीं कार्याविषयीं उद्युक्त जाला, तो असा किं मोंगलांस जिंकावयास जातो असें दाखवून, एकाएकीं फौजेसहित कोंकणांत जाऊन माल्वणापाशीं ती फौज जहाजांवर चढविली; आणि गोव्यांचे दक्षिणेस साठसत्तर कोसांवर बहुत द्रव्य भरलेलें बारशिलोर नामें शहर होतें, तेथें जाऊन तें शहर लुटून पुष्कळ द्रव्य घेऊन चारहजार फौजेसहित गोकर्णमहाबळेश्वरीं उतरला. तेथून बहुतेक जहाजें परतविलीं, आणि आपण फौजेसहित, त्या देवाचे दर्शनास गेला. मग त्या फौजेच्या लहान लहान टोळ्या करून मुलखांत गावें लुटावयास पाठविल्या, त्या मुलखीं पेठांचे गांव बहुत होते ते लुटून फार द्रव्य आणिलें, मग पायवाटेनें आपलें लश्कर पाठवून आपण जहाजावर बसून माघारां रायगडास चालिला. तेव्हां त्या जळमार्गांत मोठा वारा येऊन तें गलबत दक्षिणेस हटविलें; तें कित्येक दिवस कडेस लागलें नाहीं ह्मणून तो फार दुःख पावोन असें समजला किं ही माझी जळ मार्गाची पहिलीच खेप यांत मला भवानी अनुकूळ नाहीं, तिचा क्रोधें करूनच मी एवढ्या संकटातें पावलों.

या पुढें त्या शिवाजीवर समुद्रांतल्ये संकटापेक्षां मोठें विघ्न आलें होतें तें असें एक मिरजा राजा जयशिंग रजपूत दुसरा दिलीरखान नामें आफगाण हे दोघे ओरंगजेबानें मोठी फौज देऊन, शिवाजीला जिंकावयास पाठविले.

जर कोणी ह्मणेल किं त्याचे इतके अन्याय होईपर्यंत तों परियंत ओरंगजेबानें कां पारिपत्य केलें नाहीं तर त्याणें असें समजावें किं तो ओरंगजेब कृत्रिमानें तक्ताधिपति जालेला यास्तव त्याला आपलाच बंदोबस्त राखणें अवघड पडलें होतें.

त्या वेळेस ओरंगजेबानें क्षारगी लोकांचे बादशाहाशीं कांहीं बोलणें लाविलें होतें तेंही एक निमित्त पारिपत्य नहोण्यास; आणि तो ओरंगजेब असें मानी किं, आपण जेव्हां मनावर घेऊं, तेव्हां सगळी दक्षिण एकदांच घेऊं; आणि ह्मणे किं शिवाजी आह्मास डोंगरी उंद्रासमान आहे.

त्या

त्या शिवाजीनें आपणास राजा ह्मणविलें, आणि सुरत लुटली असे कित्येक अन्याय केले असतां, औरंगजेबास ते मोठेसे वाटले नाहीं परंतु त्याणें मकेस जाणारे यात्रेकरु लोक लुटले, त्यावरून तो क्रोधाविष्ट फारच झाला; कां कि, त्याणें केवळ धार्मिक साधुपणाचें सोंग केलें होतें, ह्मणून त्याला शिवाजीचा पारिपत्यास अवश्य उद्युक्त व्हावें लागलें.

जे दोघे सरदार बरोबर फौज देऊन दक्षिणेंत शिवाजीवर नेमिले होते, ते मोंगलांत मोठे प्रबळ असत; त्याणीं पूर्वी औरंगजेबाची अवज्ञा केली होती, यास्तव त्यांस दूरचे चाकरीवर नेमिलें, आणि त्या कामास पुरेसें सैन्य दिलें नाहीं, कां कि त्याचा मनोदय त्यांस वाढवायाचा नव्हता, त्याची मसलत अशी असेलसें वाटतें कि दक्षिणेचें राज्य समयास आपल्ये हातीं लागेल असें रक्षावें.

यापुढें औरंगजेबाचे ते दोघे सरदार लश्कर घेऊन निघाले तेव्हां राजा जयशिंग याचा पुत्र रामशिंग यास औरंगजेबानें आपले जवळ ठेवून घेतला; तो बाह्यत्कारें तर, स्नेहानें ठेविला, परंतु मनांत असें होतें कि, त्याचे बापापासून कांहीं अपाय नव्हावा.

जा समयीं शिवाजी जहाजावर चढून गोव्यांचे दक्षिणेस जाऊं लागला, तेसमयीं ते औरंगजेबाचे दोघे सरदार लश्करासहित नर्मदेस येऊन पोंहचले; तें वर्तमान शिवाजीला कळलें नाहीं, मग तो जेव्हां माघारा रायगडास आला तेव्हां त्यास समजलें कि, त्या दोघां सरदारानीं पुण्यांस येऊन पुरंदर किल्ला, आणि सिंहगड यांस घेरा घातला, आणि त्यांचे कित्येक लोक राजगडासही पोंहचले.

तो राजा जयशिंग मोठा विख्यात आणि जाजवळ फौज पुष्कळ, असा अकस्मात आल्यानें शिवाजी फार भ्याला आणि कांहीं मसलत करावयाकरितां आपले मोठे मोठे मानकरी रायगडास बोलाविले; तेही भयपावोन एकचित्त मसलत होईना, मग लोकांमध्यें वर्तमान असें उठलें कि भवानी शिवाजीचे स्वप्नांत येऊन बोलिली कि, ह्या जयशिंग हिंदूचा राजा आहे यापुढें तुमचें कांहीं चालावयाचें नाहीं, ह्मणून हे सारे एकचित्त होईनात असे रायगडचे दरबारी लोक शंकित झाले, परंतु पुरंदरकर किमपि भ्याले नाहीं, ते मोठ्या धैर्यानें लढत होते; त्यांत मुख्य किल्लेकरी महाडचा देशमुख बाजीपरभू नामें होता, त्याजवळ मावळे लोक व हेटकरी लोक होते, त्याणीं फार दिवस किल्ला रक्षिला;

+ ह्या बाजी परभू, जाणे पूर्वी पन्हाळ्यावर रक्षिलें, तो नव्हे; आणि त्याचा कोणी संबंधीही नव्हे.

क्षिला; शेवटीं दिलीरखान किल्ल्याचे माचीचा बुर्जाखालीं सुरंग पाडूं लागला असतां, कित्येक वेळा त्या हेटकऱ्यानीं व मावळ्यानीं किल्ल्याबाहेर येऊन छापा घातला तथापि त्या सुरुंग फोडणारानीं आपला अर्थ सिद्धीस नेला. तेव्हां त्या किल्ल्याची माची त्यांचे हातीं लागली आणि ते किल्ल्यावर जाऊं लागले; तेव्हां त्या दिलीरखानाचे लोकांस असें वाटलें कीं किल्ला हस्तगत जाला; त्यावरून आपला सावधपणा टाकून निर्भयपणें लुटूं लागले. तेव्हां त्या हेटकरी लोकांनीं गोळ्यांचा भडमार असा केला कीं, त्या लोकांस आपले जिवाचे रक्षणार्थ कोठेतरी आश्रय पहावा लागला; त्याच वेळेस मावळे लोकांचा सरदारानें सारे मावळे लोक जमा करून हातीं तरवारा घेऊन त्यांवर एकदांच पडला; तेव्हां मोंगलांचे जे लोक उभे राहून लढले ते मारले गेले; बकेड पळाले तेव्हां दिलीरखान किल्ल्याखालीं, हत्तीवर बसून आपल्या लोकांचें चातुर्य पहात होता; मग त्याणें आपल्या मोंगलांचा पराभव जाला असें पाहून आपले जवळचे पठाणाचे टोळीस बोलाऊन, त्या पळालेल्या लोकांस धीर देऊन, आपले हातचे धनुष्याचा टणत्कार करीत ते सारे लोक आपले हत्ती पुढें चालविले; तेव्हां ते जय पावलेले मावळे लोक अत्यंत धैर्ययुक्त होत्साते, असे लढले कीं त्या पठाणांतलेही कित्येक शूर मागें हटूं लागले. त्या समयीं तो दिलीरखान याणें आपले हत्तीवरून मावळे लोकांचा सरदार मोठा पराक्रमी असा पाहून, त्याला तीर मारिला तेणेंकरून तो तात्काळ मृत्यु पावला, तेव्हां ते सारे मावळे लोक पाठ दाखवून माघारे थाले किल्ल्यावर पळून गेले, नंतर मोंगल लोक फिरून माचीवर चढले, परंतु त्याणीं पुनः वरून, गोळ्यांचा मार केला तेव्हां ते मातब्यान माघारे हटले. ते समयीं दिलीरखान असें समजला कीं या किल्ल्याचे उत्तरेकडून लढाई करणें उपयोगी नाहीं मग त्या किल्लेचा ईशानीकडे वेगळा लहानसा वज्रगड नामें किल्ला आहे, त्याला शिडी लावून वर चढून तेथून त्या किल्ल्याचे थाले किल्ल्यावर तोफांचा मार चालविला; तो कित्येक दिवसपर्यंत तसाच चालला होता. परंतु त्या किल्ल्याचा फारसा नाश जाला नाहीं; आणि पावसामुळें मोंगल लोकांचा उपाय चालेना. असें असतांही पुरंदरकरानीं उदास चित्त होऊन शिवाजीला पत्र पाठविलें कीं, आतां आमचा उपाय नाहीं किल्ला शत्रूस देतों. तेव्हां शिवाजीचें उत्तर आलें कीं तूर्त देऊं नये, त्यावरून किल्ला त्याणीं तसाच रक्षिला.

जेव्हां जयसिंग शिवाजीचे मुलखांत आला तेव्हां पासूनच शिवाजीनें त्याशीं सल्ल्याचें बोलणें लाविलें होतें तेव्हांपासून तो त्याणें पूर्वी केलेली

हाति में नाणून, आपले बंदोबस्तांत किमपि उणें पडों देत नव्हता. तें पाहून शिवाजीनें मोंगलांशीं चाकरीचा करार केला होता त्याप्रमाणें सरळभावें करून चालूं लागला. तो सन सोळाशें पांसष्टांचे सातवे महिन्यांत थोडके लोक बरोबर घेऊन जयशिंगाचे लश्करांत पोहंचला. त्याणें त्याचा समान करून भेटून आपले उजव्ये बाजूस बसविला. मग दुसरे दिवशीं शिवाजी पुरंदरास दिलीरखानाचे भेटीस गेला तेव्हां जयशिंगानें शिवाजीशीं मसलत करण्याचा विचार त्यास न पुसोन केला म्हणून त्याचे मनांत राग होता यास्तव त्याणें शिवाजीला असें सांगीतलें कि आह्मीं किल्ला बलात्कारें करून घेऊं, आणि तथचे लोकांस मारून टाकूं. ते समयीं शिवाजीनें त्याशीं आर्जवाचा गोष्टी बोलून किल्ल्याची किल्ली त्याचे स्वाधीन केली, तेव्हां असें ठरलें कि मोंगलांचे जितके मुलुख शिवाजी कडे होते ते सारे द्यावे, आणि जे निजामशाई मुलखांतले किल्ले बत्तीस शिवाजी कडे होते त्यांतले वीस मोंगलांस द्यावे, त्यांत पुरंदर व सिंहगड द्यावा; बाकी जे उरले बारा ते शिवाजीनें दिल्लीचा बादशाहापासून चाकरी करितां जहागीर करून घ्यावे. ते वेळेस शिवाजीचा पुत्र संभाजी आठां वर्षांचा होता. त्यास पांच हजारी स्वारांची मनसब द्यावी, असें ठरलें होतें. ते वेळेस जो मुलुख शिवाजी कडे होता, त्याचा वसूल एक लक्ष सुमारें होन येत, आणि तो जयशिंगाचा आश्रयानें मोंगलांचे लश्करांत फिरत असे असा तो अनर्थ शांतीनें पावला.

याशिवाय शिवाजीनें ओरंगजेबास विनंती पत्र लिहिलें किं विजापुरचे बादशाहाकडे जो मुलुख आहे, त्यांत मला चौन पैकीं चवथाई; आणि सरदेशमुखीचा दहावा अंश. द्यावा; हीं दोन्हीं मिळून उत्पन्न सुमार होन पांच लक्ष याप्रमाणें शिवाजीनें ओरंगजेबास मागून त्याला स्वामिल वर्षास तीन लक्ष होन द्यावे, असे चाळीस लक्ष पर्यंत भरणा होई तों देत असावें, असें कबूल केलें. त्यावेळेस ओरंगजेबाचे मनांत होतें कि विजापुरचें राज्य बुडवावें, म्हणून त्याणें तें मान्य करून लिहिलें कि एक हापता आतांच द्यावा, व विजापुरकरांचा मुलुख घेण्याविषयीं राजा जयशिंग यास फौजेसहित सहाय व्हावें याशिवाय शिवाजीनें जयशिंगाशीं ठरविलें तेंही मान्य केलें.

मग शिवाजी आपले पहिले करारा प्रमाणें दोन हजार स्वार आणि आठ हजार पायदळ बरोबर घेऊन जयशिंगाची कुमक करित होता. त्याणें प्रथम फलटण घेतलें, व त्याचे मावळे लोक याणीं ताटोरा किल्ला शिडी लावून घेतला.

इकडे विजापुरकर आदिलशाह याणें आपली सेनेची सिद्धता करून

मोंगलांनीं आपले विजापुरीं नयावें म्हणून फार फार बोलणें केलें; आणि पूर्वींचें राहिलेलें जें स्वामित्व संबंधी देणें, तेंही तक्ताधिपतीला द्यावयास सिद्ध जाला; परंतु जयशिंग ऐकेना, तो अकुंठित गतीनें मंगळवेढ्या पर्यंत पोंचला, तेथें विजापुरकरांचे स्वार आले; त्यांची व यांची गांठ पडतांच, ते मोठ्या शौर्यें करून लढले; त्यांत अबदुलमहंमद विजापुरचा प्रधान तो मुख्य सरदार, त्याचे आज्ञेंत तें लष्कर वागत असे. या खेरीज जे दुसरे सरदार होते ते एक अबदुलकरीम, व बालोळखान, व खवासखान, व शिद्दी अजीस, तो शिद्दीजोहराचा पुत्र; व व्यंकोजी राजा भोंसला, तो शिवाजीचा भाउबंद होता; आणि रताजी मान्या, म्हसवाडचा देशमुख; या दोघांहीं विजापुरकरांचे फोजेंत मराठे स्वारांचें आधिपत्य स्वीकारिलें, याणीं व यांजवळचे मराठ्या लोकांनीं, त्या लढाईत मोठी शौर्थ केली.+

शिवाजी व त्याचा सरदार नेटाजी पालकर या दोघांहीं मोंगलांचा पक्ष स्वीकारिल्यावर, हे आपले पराक्रमें करून मोठे विख्यात जाले; ते असे कि जांची कीर्ति औरंगजेबापाशीं जाउन, तो प्रसन्न जाला; आणि त्याणें शिवाजीला बहुमान सूचक वस्त्रें पाठविलीं. या खेरीज जांमध्यें शिवाजीची बहुत प्रकारें स्तुती, असें एक पत्र पाठविलें.

मग कांहीं दिवसांनीं दुसरें एक पत्र पाठविलें, त्यांत असें लिहिलें, किं तुह्मीं येऊन भेटावें नंतर तुमचा मोठा संमान होईल; आणि तुह्माला जा वेळेस दक्षिणेस जावयाचें असेल, त्या वेळेस कांहीं अडचण पडणार नाहीं. या पत्राचा मजकूर व जयशिंगाची मसलत यांवरून शिवाजीचा निश्चय जाला, किं दिल्लीस जावें; तेव्हां त्याणें आपले सारे मानकरी लोक यांस सांगून पाठविलें किं सर्वांहीं रायगडीं येऊन हजीर व्हावें; मग ते सारे येऊन हजीर होत, तावत्काळ पर्यंत, त्याणें आपल्या अस्त्यां किल्ल्यांचा बंदोबस्त आपण जाऊन केला.

नंतर रायगडीं येऊन त्याणें सर्व मानकरी यांचे समक्ष मोरोत्रिंमल पिंगळे व आबाजी सोनदेव, व आनाजी दत्तो, या नियोजणास आज्ञा केली कीं, मीं दिल्लीस जाऊन येईन तों पर्यंत, तुह्मीं मुख्यत्वें करून कारभार करावा. मग तो संभाजी नामें पुत्रास बरोबर घेऊन सन सोळाशें सदसष्टांचे तिसरे महिन्यांत दिल्लीस जावया करितां निघाला. त्याचे बरोबर पांचशें स्वार व एक हजार मावळे लोक होते; मग तो दिल्ली जवळ गेला तेव्हां औरंगजेबानें ग-

---

+ त्या लढाई वरून विजापुरकरानें रताजी मान्यास कांहीं इनाम मुलुख जहागीर दिला, त्याची सनद अद्यापि त्यांचे वंश्यांजवळ आहे.

मशिंगराजा जयशिंगाचा पुत्र व दुसरा एक लहानसा सरदार, असे दोघे त्याचे भेटीस सामोरे पाठविले, आपण किंवा आपले जवळचा कोणी मोठा माणूस न पाठविला. हा अपमान शिवाजी मनांत समजला परंतु सहन केलें. यापुढें शिवाजीनें जेव्हां दरबारांत बादशाहास नजर दिली, तेव्हां त्यास पांच हजार स्वारांचा मनसबदारांचे पंगतींत बसविला, तेव्हां शिवाजीला राग आटपेना. यास्तवजे त्या ओळींत बसलेले होते लोक, त्यांशीं आपली खिन्नता समजेसें, कांहीं बोलिला; त्यांहीं नें बादशाहास कळविलें.. त्यावरून दरबारी लोक आप आपले घरीं गेल्यावर, बादशहयाचा असा निरोप गेला किं. शिवाजीनें फिरून दरबारीं येऊं नये. तेव्हां शिवाजीचे मनांत कांहीं भय उत्पन्न जालें, त्याणें औरंगजेबास विनंती केली किं. मीं स्वामीची सेवा कशी केली, व आज्ञे प्रमाणें निघोन आलों कसा, तें सर्व ध्यानांत आणावें; आणि जर माझे चाकरीचें येथें प्रयोजन नसलें, तर माझे मुलखीं मला माघारें जावयास आज्ञा द्यावी. मीं व माझे बरोबरचे लोक यांस एथचें पाणी मानत नाहीं. त्यावरून औरंगजेब कांहीं स्पष्ट उत्तर देईना. आणि शहरचा कोतवालास सांगीतलें न किं शिवाजी जा हवेलींत आहे, ती सभोंवती चवकी बशीव आणि जर तो कुठे वाडया बाहेर जाऊं लागला, तर तो आपले हातचा सुटून जाईना, असा बंदोबस्त राख. त्याणें याप्रमाणें केलें तेव्हां. शिवाजीनें पुनः विनंती केली किं, हा जुलूम मजवर गुदरला; त्यास जे माझे बरोबरचे लोक आहेत, यांस तरी माघारें जावयास आज्ञा द्यावी. ही विनंती औरंगजेबानें तात्काळ मानिली, आणि लोक जाऊं दिले. मग आतां शिवाजी पक्का हातीं लागला. असें मनांत समजून. मोठा हर्ष पावला; शिवाजीनें तर आपल्ये मसलती करितां तसें केलें. त्याचे लोक गेल्यावर तो तेथचे दरबारी मोठे मोठे मान करी लोक यांचे घरोघर नित्य नित्य जाऊन त्यांस कित्येक पदार्थ भेटी देऊन त्यांशीं स्नेह पाडूं लागला; मग जेव्हां बहुत स्नेही जाले, तेव्हां, आपले शरीरास समाधान नाहीं असें सोंग करून थोडकेच दिवसांत केवळ मरणोन्मुख आल्या सारिखें दाखविलें. पुढें थोडकें सें समाधान जालेंसें करून दाखविलें. आणि कित्येक ब्राह्मणास धर्म केला; नंतर कित्येकां वैद्यांस नजरा पाठविल्या; या खेरीज आपले इष्ट यांचे घरोघर व कित्येक देवस्थानी व ब्राह्मण व फकीर. वगैरे कित्येक गरीब लोक, यांस मिठाई वगैरे पदार्थ द्यावयाकरितां मोठे मोठे बुरडी पेटारे भरून पाठवूं लागला; असें कित्येक दिवस चालविलें. मग एके दिवशीं आपला पुत्र व आपण दोघे दोहों पेटाऱ्यांत निजून, माणसां कडून ते पेटारे शहरा बाहेर, एकीकडे आपले संकेत स्थळीं नेववून. तिथे बाहेर निघोन दोघे एका घोडयावर बसून पळाले; ते दुसरे दिवशीं मथुरेस जा-

ऊन

रून पोंहचले, तेथें कोणी दक्षणी ब्राह्मणाचे घरीं पुत्रास ठेवून. आपण आपले बरोबरच्या लोकांसहित गोसाव्यांचा वेष धरून, तीर्थें करीत करीत. माघारा दक्षिणेस गेला. तो शिवाजी सासष्टांचे बाराव्या महिन्यांत रायगडीं पोंहचला.

शिवाजी दिल्लीहून माघारा आपल्या मुलखीं रायगडास आला, तेव्हां त्याणें पाहिलें किं, सर्व गोष्टी आपणास अनुकूळ आहेत; त्या अशा, जयशिंगानें विजापुरास वेढा घातला होता, तो तेथें जय पावला नाहीं, व त्या मोंगल लोकांचें काम फार धिमें यास्तव गोवळकोंडचा बादशाहानें आपला एक मोठा सरदार फौजेसहित विजापुरकरांचे साहाय्यास पाठविला; मग तो जयशिंग पुरंदर व सिंहगड इत्यादि किल्ल्यांतून आपले लोक ठेवून, माघारा दिल्लीस गेला. हें वर्तमान सन सोळाशें सदसष्टांत घडलें. तो जयशिंग गेल्यावर मोरोत्रिंमळ पिंगळे याणीं ते मोंगल हांकून दिले; आणि शिवाजी कोंकणांत आल्यावर, थोडक्याच दिवसांत कालियानी परगणा बहुतेक हस्तगत जाला.

औरंगजेब शिवाजी पळून गेला ह्मणून फार खिन्न जाला, परंतु आपले मनांत शिवाजीचा मोठा संमान करून पाठवावयाचा होता; असें दाखवून, जयशिंगाचा पुत्र रामशिंग शिवाजीला पळून जाण्यास अनुकूळ होता त्याला दरबार मना केलें, आणि त्याचा बाप जयशिंग पराभव पावला या निमित्तें करून माघारा दिल्लीस बोलाविला, नंतर त्या कामावर सुलतान माजुम नामें दुसरा सरदार नेमिला; तो सुलतान पूर्वीं दक्षिणेस पाठविला असतां, जेव्हां जयशिंग नेमिला, तेव्हां त्यास माघारा बोलावून नेला; तो जयशिंग याचा पराभव जाल्यावर पुनः पाठविला. तेव्हां तो दक्षिणेहुन माघारा दिल्लीस येत असतां वाटेसच त्यास असमाधान होऊन मृत्यु पावला.

सन सोळाशें सदसष्टां पासून सोळाशें एकुणहात्तर पर्यंत जालेलीं वर्तमानें मिळून भाग सातवा.

सातव्या भागाची अनुक्रमणिका.

सुलतान माजुम आणि जशवंतशिंग यांचे स्वभावाचा प्रकार. १

त्याचे योगेंकरून शिवाजीस बादशाहापासून कांहीं उपकार घडला. २

विजापुरकरांशीं आणि मोंगलांशीं सल्ला जाला. ३

विजापुरकर व गोवळकोंडकर याणीं वर्षास शिवाजीला खंडणी द्यावी असा नेम ठरला. ४

गोवें आणि जंजिरा यांस घ्यावयास शिवाजी गेला परंतु जय पावला नाहीं.

नाहीं. ५

शिवाजी आपले मुलखीं वसुलाचा व लश्कराचा बंदोबस्त करीत असतां लोक नाना प्रकारचा अटकळी करीत होते तें. ६

त्याणें नवे कायदे चालविले तो प्रकार. ७

त्याचेजवळ राज्यकारभार चालविणारे कोण कोण कसे कसे होते तें प्रकरण. ८

भाग सातवा.

दक्षिणेच्या अधिकारी सुलतान माजुम नामें यास औरंगजेबानें पुनः केला, त्याचे बरोबर दुसरा जशवंत शिंग आला ह्मणून, शिवाजी आनंद पावला, कांकिं दिल्लीमध्यें त्याचें त्याशीं इष्टत्व पडलें होतें. त्या जशवंत शिंगास लोक थोर कुलीन ह्मणत होते. परंतु तो कृपण होता, तो गुण रजपुत लोकांमध्यें बहुधा असतो. तो हिंदूंचे धर्मास फार मानीत असे. औरंगजेबाचा विश्वास त्यावर नव्हता; कांकिं तो पूर्वीं त्यास प्रतिकूल होता.

सुलतान माजुम तर, बहुत प्रकारें उत्तम गुणवंत होता, पण मोठा उधळा आणि अत्यंत विषयी असे; तो कांहीं कार्याविषयीं वश करून घ्यावयास केवळ सुलभ असे; तो बहुधा जशवंत शिंगाचें बोलणें मानीत होता.

या दोघांचा स्वभाव पाहून शिवाजी असें समजला किं, यांनां कांहीं द्रव्य दिलें असतां, आपलें कार्य सिद्धीस जाईल. ह्मणून त्याणें कित्येक द्रव्य खर्चून सुलतान माजुमास विनंती केली किं, दिल्लीचे बादशाहाचे चाकरीविषयीं माझें मन निष्कपट आहे; त्यास, तुह्मीं मज विषयीं बादशाहास विनंती करून मजवर पहिल्या प्रमाणें त्याची कृपा होई असें करावें. तेव्हां सुलतान माजुमानें बादशाहास कांहीं लिहिलें, त्या वरून शिवाजीला राजा असें पद प्राप्त जालें; आणि पुणें व चाकण व सुपें परगणा, हे त्यास मिळाले. यांतील पुरंदर व सिंहगड हे औरंगजेबानें आपल्यास ठेविले, त्या शिवाजीचा पुत्र संभाजी यास पूर्वीं देऊं केलेली मनसब दिली; आणि वराडांत एक जाहागीर खेरीज दिली.

त्या औरंगजेबाची एवढी कृपा होण्याचें कारण असें दिसतें किं, शिवाजी कधींतरी दिल्लीस येईल मग दगा करावा असें त्याचे मनांत असेल, कांकिं त्याचा पहिल्यापासून असा दुष्ट स्वभाव होताच.

सन सोळाशें अडसष्टांमध्यें, विजापुरकरांचा वकील आग्रें शहरांत येऊन औरंगजेब आणि अल्ली आदिलशाह विजापुरकर, यांशीं तह जाला. इतःपर युद्ध नव्हावें ह्मणून विजापुरकरानें औरंगजेबास सोलापुर परगणा, व कि-

ल्ला

ला, यांचा वसूल एक लक्ष ऐशीं हजार होन येत होता तो देऊं केला. त्याच वेळे-स जशवंतशिंगाचे आश्रयानें शिवाजी विजापुरकरांकडे चौत व देशमुखी मागूं लागला; तेव्हां त्याचे बदल दर्साल तीन लक्ष रुपये गुप्तपणें द्यावयास केले. हें वर्तमान लोकांत प्रसिद्ध होऊं दिलें नाहीं; कां कीं पूर्वीं मुसलमानानीं हिंदू जिंकिले होते, त्यांस खंडणी देणें, ह्मणजे त्या लोकांस केवळ लज्जास्पद होई. गोंवळकोंड्याचा बादशाह तोही अशाच कांहीं निमित्तें करून, शिवाजीला वर्षास पांच लक्ष रुपये देऊं लागला.

त्यानंतर शिवाजीचे मनांत आलें कीं गोवें एकाएकी छापा घालून घ्यावें; परंतु ते पोर्टुगीस लोक त्याची मसलत समजून सावध जाले, मग त्याणें जंजिरा घ्यावयाचा उद्योग केला, तो बहुत युद्ध जालें तरी हातीं लागला नाहीं.

मग शिवाजी दोन वर्षें पर्यंत रिकामा होता, तेव्हां कित्येक लोक कल्पना करूं लागले कीं याणें एवढा लौकिक मेळवलेला जो तो आतां व्यर्थ जाईल. कां कीं हा अगदीं रिकामा बसला ह्मणून. शिवाजी तर उगाच राहिला नव्हता, तो आपले राज्याचे व लश्कराचे वर्तणुकेचे कायदे कांहीं नवे नवे करून, कांहीं कांहीं जुने मोडून, चौकशी करीत होता. त्या कायद्यांचा प्रकार लिहिला पाहिजे, कां कीं त्यापुढें जे मराठे राजे जाले, ते त्या कायद्याप्रमाणें चालत होते.

शिवाजीचा प्राबल्यास मूळ मावळे व हेटकरी लोक, ते पायदळ; त्यांचे योगें करून मोठे मोठे किल्ले घेऊन, मग मुलुख लुटून तें द्रव्य त्या घेतलेल्या किल्ल्यांवर नेऊन ठेविता जाला. इतके दिवस त्याणें स्वार फारसे बाळगले नव्हते, आणि यापूर्वीं त्याचा लौकिकही मोठा जाला नव्हता; तो यापुढें फारच वहाडला.

शिवाजीचे मावळे लोक घाटमाथां रहात होते, व हेटकरी कोंकणांत राहात असत. ते हत्यारें वगैरे सरंजाम आपला बाळगीत असत, परंतु दारू गोळी वगैरे सरकारचें मागोन घेत. त्यांचीं वस्त्रें एकसारिखीं नव्हतीं, बहुधा ते लोक मल्लासारिखे मांडचोळणें घालून कांचे भिडवीत; आणि डोकीस पागोटें सर्वांचा असे, आणखी कित्येक अंगरखे घालीत, आणि कित्येक धोत्रें पांघरत. त्यांची हत्यारें तरवार व ढाल व बंदूक, या प्रमाणें असतां, दहामध्यें एक तीरकमाण बाळगी; कां कीं गनीमास बंदुकेचा बारानें लोक सावध न व्हावे याकरितां. ते हेटकरी लोक बंदुकेच्या कामांत मोठे निपुण होते; परंतु त्यांस मावळे लोकांप्रमाणें तरवार घेऊन दुसऱ्याचे अंगाशीं अंग भिडवून, युद्ध करतां येत नव्हतें. हेटकरी लोक व मावळे लोक यांस जसें मोठे मोठे कडे चढून जातां येत होतें, तसें इतर लोकांस येत नव्हतें. त्यांमध्यें दहा लोकांस एक ना-

ईक

ईक. पन्नासांस एक हवालदार, शंभरांस एक जुमलेदार, हजारांस, एक हजारी नामें. सरदार असे, त्याहून मोठा पांचहजारी असे. त्यापेक्षां सरनोबत नामें मुख्य असे.

त्याचे स्वारांत दोन भेद होते, एक बारगीर. एक शिलेदार; बारगीर सरकारचे घोडयावर बसणारे, आणि शिलेदार आपल्या घोडयावर बसणारे होते; त्यांत बारगीर यांचे समुदायांस पागा अशीं नावें ठेवून, युद्ध प्रसंगीं शिलेदारांचे वर्तणुकेचा बंदोबस्तास, त्या पागांची नेमणूक करीत असे.

मराठे स्वार यांचीं वस्त्रें अशीं; चोळणा, व रुदार अंगरखा, व कंबरबंध. त्यांतच तरवार वळकट बांधित; आणि पागोट्याचे वेढे डोकीवरून हनवटी खालून घेऊन. कान सुद्धां झांकून मोठ्या बंदोबस्तानें बांधीत; आणि मिशा मोठमोठ्या राखीत. बहुत करून त्या लोकांचें हत्यार भाला, त्याविषयीं ते बहुत कुशळ असत, आणि कित्येक ढालतरवारवाले व कित्येक बंदुकवाले होते. त्यांत पंचविसां स्वारांस एक हवलदार असे, आणि सवाशें स्वारांस एक जुमलेदार; पांचां जुमलेदारांस एक सुभेदार, दरसुभेदारास एक एक हिशेब लिहिणार व एक एक त्याहिशेबाची चोकशी करणारा शिवाजीनें ठेवून दिलेला असे; ते लिहिणारे व चोकशीकरणारे ब्राह्मण किंवा परभू असत. दहा सुभेदारांस एक मुख्य सरदार, त्याचें नाव पांच हजारी असे. त्याचेजवळ सरकारचा ठेवणाईत, हिशेबाची चोकशी करणारा. मुजुमदार नामें असे. तो ब्राह्मण, आणि त्याचे हाताखालीं आमीन नामें सरकारचा परभू असे. याखेरीज कित्येक सरदारांजवळ कित्येक सरकारी कारकून व कित्येक त्या सरदारांचे खासगीचे कारकून असेत. याशिवाय सर्व मोठे मोठे सरदार यांजवळ गुप्तरूपें करून बाहेरची बातमी कळविणारे जासूद होते; शिवाजीजवळ एक बहिरजी नामें जासूद होता; लोक कल्पना करीत कि भवानी येऊन शिवाजीला अत्यंत गुप्त वर्तमान कळवित्ये, त्याचें कारण तो बहिरजी जासूद होता. सरनोबत दोन असेत. एक स्वारांचा असे, एक पायदळाचा असे.

जेव्हां शिवाजी फौज ठेवूं लागला तेव्हां कोणी आपला जुना चाकर आमीन घेतल्यावांचून नवा ठेवीत नसे. कोणास कांहीं लूट किंवा शत्रूच्या कांहीं जिन्नस सांपडला असतां त्याणें तो जिन्नस सरकारांत नेऊन द्यावा; मग त्याचे योग्यते प्रमाणें त्यास कांहीं भाग देऊन त्याची प्रशंसा करावी अशी चाल होती. शिवाजीनें शत्रूस लुटावयाची मनाई केली नाहीं, परंतु गाई व शेतकरी लोक व बायका यांस उपद्रव करूं नये; आणि मुसलमान लोक व त्यांचे पक्षपाती कोणी द्रव्यवंत हिंदुलोक यांस धरून नेऊन पैका घेऊन सोडावे असें होतें. शिवा-

जी

जीचे लश्करांत कोणी बायको वगैरे नेऊं नये, जर कोणी नेली तर त्याचें डोकें मारावें असा नेम होता. कोणी शिपाई शौर्य करून लढत असून जर त्यास वार लागला तर, त्याला नावास चढवून कांहीं बक्षीस देत असे. तो शिवाजी बहुधा कोणास जहागीर देत नसे कांकिं आपल्या मुलखांत जहागीरदार कोणी नवाढावे असें त्याचे मनांत असे. सर्व किल्ल्यांस ब्राह्मण व रामोशी व महार व मांग हे शिबंदी खंरीज असत; त्यांनां किल्ल्याचे समोंवतीं वेतनें दिली असत. त्यांणीं किल्ल्याची चौकशी राखावी असें होतें, जे ब्राह्मण होते त्यांस सबनीस ह्मणत; त्यांणीं तेथील धान्यादिकाचा बंदोबस्त राखावा; आणि किल्ल्यांत राहावें. इतर जे रामोशी व महार आणि मांग यांस गडकरी ह्मणत; त्यांणीं बाहेर राहून बाहेरची चौकशी करावी; ते गडकरी किल्ला ह्मणजे केवळ आपली माता असें मानीत असत.

प्रतिवर्षीं दसऱ्यास शिवाजी मोठा समारंभ करी, त्या वेळेस आपल्या सर्व लश्कराची हजिरी घेत असे, घोडें व माणूस व शस्त्रें यांचा खुणा लिहीत असे; हजीरी जाल्यावर ते लोक बहुधा स्वारीस जात असत.

प्रतिवर्षीं सरकारांत हिशेबाची चौकशी होऊन कोणाचें देणें राहिलें असल्यास, प्रांतांतील वसूल जमा करणारास त्याचा पैका द्यावयास आज्ञा देई परंतु गांवांस उपद्रव करीत नसे.

शिवाजीनें जे वसुलाचे कायदे केले त्यांस मूळ दादोजी कोंडदेवानें जो नेम ठरविला होता तें. तो दर वर्षास पिकाची पहाणी करून वसूल ठरवित असे, असें वाटतें किं जमिनीचें उत्पन्न त्यांतील तीन भाग रैतेस उरवून, दोन सरकारानें घ्यावे असें होतें, कधीं नवा मुलुख शिवाजीचे हातीं लागला असतां, लश्करादिसंबंधी खर्च घ्यावयाची चाल असल्यास ती मोडी. आणि मखलानें वसूल घेणें आढळलें असतां तेंही मना करी.

त्याचे मुलखीं सर्व देशमुख व देशपांडे यांहीं आपला हक जो घेणें, तो त्यांणीं सरकारची आज्ञा जाल्यावांचून घेऊं नये असें होतें.

शिवाजीचे कित्येक मानकरी लोक मसलत करीत किं, लश्करास खर्चाची नेमणूक परभारां गांव गांना करावी; परंतु तें शिवाजीचा मनास येइना कां किं ते लोक स्वयें सत्ता करूं लागतील, आणि रैतेस उपद्रव होईल. त्या शिवाजीनें विजापुरचे मुलखांत अशी अवस्था पाहिली होती; याच विषयीं त्याणें जेथें आपली फौज ठेवायास योग्य नाहीं, असा किल्ला अथवा भुंडकोट पाहिला असतां, खणून टाकी. त्याणें घेतलेल्या नव्या मुलखीं जेंजें देवस्थानाकडे पूर्वीं कोणी दिलेलें तें तें तसें तसें चालविलें.

शिवाजीनें

शिवाजीनें वसुलाचे कायदे फार सुलभ केले म्हणून, मराठे लोक त्याची प्रशंसा करीत, आणि या योगें प्रजेस सुख होतें असें म्हणत; परंतु त्याचें कर्म येवढें वर्णनीय नव्हतें. कां कि तो स्वयें पहाणी करावयास रिकामा नव्हता; त्यामुळें त्याचे कायदे चांगले असले तरी लोकांस सुख होणें दुर्लभ. त्या वेळेचा एक मुसलमान बखर लिहिणार होता, आणि एक इंग्रेज मुलुख पाहावयाकरितां गेला होता; त्याचा लेख वरून असें वाटतें दुसऱ्या मुलखापेक्षां, शिवाजीचे मुलखीं प्रजा बेजार होती. आणखी त्या मुसलमानाचेही बखर लिहिण्यांत असें कि, शिवाजी मोठा नाशक. त्या शिवाजीचा हातीं जे विजापुरचे मुलुख लागले होते, त्यांतील पहिली मखल्याची चाल मोडून प्रतिवर्षी पहाणी करून वसूल घेतल्यामुळें, तेथचे प्रजेस मात्र, हितावह पडलें असेल.

शिवाजीच्या राज्यांत मुलुखसंबंधें किंवा द्रव्यसंबंधें, फिर्यादेची पंचाईत करीत. इतर न्याय बहुधा शास्त्ररीती पाहून करीत; आणि पूर्वी मुसलमानानीं आपले कुराणांतली जी रीति लाविली होती, तीही थोडीशी घेत; आणि मनसोबी करीत. या दिवसांत हिंदूचे शास्त्रास आणि मराठे लोकांचे रीतीस अंतर दिसतें, त्याचें कारण हेंच असेल.

शिवाजीनें आपला राज्य कारभार चालवायाकरितां, आठ प्रधान केले. त्यांचीं नामें आणि कार्यें, यांचा विस्तार असा. पहिला प्रधान पेशवा, तो सर्व श्रेष्ठ; त्याणें सर्व चौकशी करावी. दुसरा, मजीमदार, त्याणें सर्व जमाबंदी करून, खर्चाची चौकशी राखावी. तिसरा सुर्णीस त्याणें दप्तराचें रक्षण करावें, आणि स्मरणार्थ सर्व सदांचा नकला सरकारचे वहीवर लिहाव्या. चवथा वांकनीस, त्याचें काम खासगी शिबंदी व खासगी दप्तर यांची सर्व बंदोबस्ती राखावी. पांचवा सरनोबत तो लश्करांत मुख्य, त्याणें मुख्यपणानें लश्करांत काम करावें. साहावा डबीर त्याणें पर राज्याची चौकशी करीत असावें, आणि परकी राजाशीं कांहीं काम पडलें असतां तें त्याणें करावें; व कोणी बाहेरचा वकील आला तर त्याशींही बोलणें त्याणेंच करावें. सातवा न्यायाधीश तो न्याय करणार. आठवा न्यायशास्त्री, त्याणें शास्त्रार्थसंबंधी कामें करावीं. शिवाजीचे वेळचीं या आठां प्रधानांचीं नावें; पेशवे मोरो त्रिमल पिंगळे. मजीमदार आबाजी सोनदेव, कालियानी परगण्याचा सुभेदार. सुरणीस आनाजी दत्तो; वांकनीस दत्ताजी पंत. सरनोबत दोघे, एक स्वारांचा प्रतापराव गुजर. दुसरा पायदळाचा येसजी कंक. डबीर सोमनाथ पंत. न्यायाधीश दोघे, एक निराजी रावजी, दुसरा गोमाजी नाईक. न्यायशास्त्री शंभु पाध्ये पहिले, आणि त्यांचे पाठी मागें रघुनाथ पंत झाले; या अष्टप्रधानांतले न्यायाधीश व न्यायशास्त्री या दोघांवांचून, वरकडांस शिवा

जीचा

जीचा लश्करांत अधिकार होते, त्यामुळें त्यांस बहुधा आपआपले अधिकार संभाळावयास फावत नव्हतें; यास्तव ते आपआपला एकेक कारकून ठेवून कामें चालवीत होते. त्यांत ज्याला मोर्तब ठोकावयाची आज्ञा होती, त्याला मुतालिक ह्मणत. यांचीं व्यवहारी नावें. अशीं कारभारी व दिवाण, फडनीस, सबनीस, कारखाननीस, चिटनीस, जामदार, पोतनीस, यांत फडणीस याणें खर्चाची चौकशी करावी. सबनीस याणें दप्तराची चौकशी राखावी. कारखाननीस याणें किल्ल्याचे व लश्कराचे उपयोगी अन्नादि सर्व पदार्थांचा बंदोबस्त राखावा. चिटनीस याणें कागदपत्र आलेलें व कुठें पाठवावयाचें याचा बंदोबस्त राखावा. जामदार याणें नाण्यावांचून सर्व प्रकारचें जवाहीर व अळंकार संभाळावे. पोतनीस याणें पैका संभाळावा.

शिवाजी आपले जवळ निरंतर फडनीस, व जामदार, व चिटनीस, व फारशी कागद पत्र वाचणारा फारसनीस, असे ठेवीत असे, त्यांत जो चिटनीस, तो बाळाजी आनाजी नामें परभू होता. त्याला शिवाजीनें एकवेळ मुंबईस कांहीं कामांसाठीं इंग्रेजी सरकारांत पाठविला होता, तेव्हां तो साहेब लोकांस मोठा चतुरसा वाटला.

फडनीस बाळकृष्ण पंत हणमंते, तो शहाजीचा मुख्य कारभाऱ्याचा भाऊबंद होता.

ठोयापानाईक पुंडे, चांभारगोंदेकर जांजवळ शहाजीचे लग्नाचे पूर्वीं, मालोजी भोंसल्याचा पैका होता, त्यांचा नातू तो शिवाजीचे जवळचा जामदार.

सन सोळाशें सत्तरां पासून सत्याहात्तर पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग आठवा.

अनुक्रमणिका.

पूर्वीं असें वाटत होतें कि आतां दक्षिण देशीं बहुत दिवस पर्यंत उपद्रव होणार नाहीं परंतु त्यास अंतर पडलें.

तानाजी मालुसरा याणें सिंहगड घेतला आणि त्याच वेळेस तेथेंच मृत्यु पावला.

आणखी कित्येक किल्ले शिवाजीचे हस्तगत झाले.

जंजिरा शिवाजीनें घेतलाच असता, परंतु तिघां शिद्दीं मुळें, त्याचे हातीं लागला नाहीं.

ते

ते शिद्दी आपला मुलुख मोंगलांस देऊन, त्यांचे चाकरीस राहिले.

शिवाजी सुरत लुटून मायारा गेला त्यावेळेस त्याला धरावयाकरितां, मोंगल जे गेले ते त्याणें जिंकिले.

शिवाजीनें खानदेश लुटला आणि वसुलाची चवथाई प्रतिवर्षी घेत जावी असें ठरविलें. व ओंडा पाटा व साल्हेर हे किल्ले घेतले.

मोंगललोक शिवाजीस जिंकावयाचा आळस किंनिमित्त करीत होते तें.

मोंगलांचा राज्यांतून दक्षिणदेशाचा कांहीं नवा बंदोबस्त झाला तो.

मराठे लोक व मोंगल लोक यांचे युद्धांत मराठे लोक जय पाऊन मोठे विख्यात झाले तें प्रकरण.

शिवाजीचें आणि इंग्रेजांचें कांहीं बोलणें झालें तें.

शिवाजीनें गोंवळकोंडयामध्यें स्वारी केली असतां, त्याचे पाठीमागें जंजिऱ्याहून आणि सुर्तेहून लढाऊ गलबतें येऊन समुद्रतीरचे त्याचे गांव लुटले.

विजापुरचा बादशाह अल्ली आदिलशाह याचा मृत्यु.

शिवाजीनें हुबळी शहर लुटलें; आणि विजापुरचे सरकाराशीं युद्ध केलें.

शिवाजी आणि प्रतापराव यांमध्यें कांहीं वैमनस्य पडलें.

शिवाजीनें कांहीं क्रोधेंकरून निरोप पाठविला म्हणून तो प्रतापराव विजापुरचे लश्कराशीं अविचारानें युद्ध करून मृत्यु पावला.

त्या युद्धांत मराठे सरदार कोण कोण होते त्याणीं आपलें लश्कर वांचवून विजापुरकरांचा लश्कराचा पराभव केला; आणि शिवाजीनें त्यांचा संमान केला.

शिवाजीला राज्याभिषेक झाला.

त्याणें इंग्रेजलोकांशीं तह केला, व कित्येक नवे किल्ले बांधिले.

त्या शिवाजीचा शरीरीं सातान्यामध्यें समाधान नाहींसें झालें.

भाग आठवा.

सन सोळाशें सत्तर सुमारें, असें दिसत होतें कीं इतःपर दक्षिणेंत बहुत दिवस गडबड होणार नाहीं; कांकीं विजापुरकर व मोंगल यांचा सल्ला झाला, आणि शिवाजीस जें मिळालें आहे तितक्यानेंच तृप्ति होऊन तो स्वस्थ राहील; हा एक सुमार. असें असतां औरंगजेबास समजलें कीं आपला पुत्र सुलतान माजुम जो दक्षिणेचा मुख्य अधिकारी केला तो व जशवंतशिंग हे शिवाजीपासून कांहीं पैका घेतात; यावरून त्याणें शिवाजी कांहीं घात करील, असें समजून पुत्रास लिहिलें कीं शिवाजी व त्याचे कित्येक सरदार व मुख्य

ख्य कारभारी धरून अवश्य कैद करावे.

तेव्हां शिवाजी औरंगजेबाचा दीर्घद्वेष समजून पुनः पहिल्या प्रमाणें सावध पणानें वागूं लागला. ते समयीं त्याचे मनांत आलें कीं पहिल्यानें पुरंदर आणि सिंहगड हे दोन्हीं किल्ले घ्यावे. कांकिं पुणें आणि चाकणेस आपली येण्याजाण्याची सोय नाहीं. त्यावेळेस सिंहगडचा सरदार उदेभान नामें होता, त्याचे हाताखालीं निवडक रजपुत लोक होते. आणि तो मोठा विख्यात शूर होता; आणखी तो किल्ला फार अवघड, ह्मणून लोक असें समजत कि या किल्ल्याचा घेण्याचा उद्योग व्यर्थ आहे. परंतु तो किल्ला घ्यावयास सुलभ होण्याचें कारण हेंच कीं किल्ला सुदृढ ह्मणून ते किल्लेकरी असावध होते; यावरून शिवाजीनें तानाजी मालुसरे सरदार याशीं मसलत केली, कीं छापा घालून किल्ला घ्यावा; तेव्हां असें ठरलें कीं, तानाजी मालुसरे याणीं आपला कनिष्ठ बंधू व एक हजार मावळे लोक बरोबर घेऊन त्या कामास जावें.

तो सिंहगड सह्याद्रि पर्वताचा पूर्वेचे आंगीं पुरंदर किल्याचा डोंगराचें टोंक लागलें आहे. तेथें आहे. त्याचे दक्षिणेस व उत्तरेस, सह्याद्रीचा संबंध नाहीं, अर्ध अर्ध कोस उंच कडा तुटलेला आहे. त्यास पूर्वकडे आणि पश्चिमेकडे, मोटे मोटे पर्वत यांचा धाकट्या धाकट्या टेंकड्या लागलेल्या आहेत; तो अर्धकोस चढून गेल्यावर, केवळ भिंती प्रमाणें सभोंवता सारखा तीस तीस हात पर्यंत उंच असा काळा दगड आहे. त्यावर चिरेबंदी भिंत आणि जागोजाग बुरूज आहेत. त्यांचे आंत किल्ल्यावरची जागा त्रिकोण आहे, तीचे सभोंवता भिंतीच्या घेर कोश सवा कोश सुमारें आहे. अशा अवघड किल्ल्यांत दरवाजावांचून प्रवेश होणार नाहींसें दिसतें. त्या किल्ल्या वरून पूर्वेकडे पहावें तों, तेथें एक लहानसें लवण आहे; त्यांतून नीरा नदी चालल्ये, तें ठिकाण पाहोन मनास आनंद वाटतो. उत्तरेकडे मोठें मैदान आहे. तिकडे समूर्‍ पुणें शहर दिसतें; तें पुणें पूर्वी लहानसें गांव होतें, परंतु त्या स्थानाचा योग असा होता कीं, काळें करून ती मोठ्या राजाची राजधानी होईल. त्या सिंहगडाचे दक्षिणेस आणि पश्चिमेस मोठे मोठे पर्वत आकाशास लागल्यासारिखे उंच दिसतात, त्या लगत्यास रायगड आहे.

त्या रायगडाहून तानाजी मालुसरे, माघ कृष्ण नवमीस, एक हजार मावळे लोक बरोबर घेऊन चोरवाटेनें रात्रीस सिंहगडाजवळ येऊन पोंहचतांच, त्या हजार लोकांचे दोन भाग करून, एका भागाचे पुढें चालविले. ते जेथें भिंती सारिखा काळा दगड तीसतीस हात उंचीचा आहे तेथे जाऊन पोंहचले, आणि दुसऱ्या भागाचे अंमळसे मागून चालविले; ते कांहींसे मागें राहिले. जे पुढें जाऊन पोंहचले. त्यांतील कोणी एक चतुर माणूस आपल्ये कमरेस दोरीची शिडी बांधून घेऊन वर चढला; मग त्या शिडी वरून एक एक माणूस जाऊन तीनशें लोक चढले; आणि

लपून राहिले; आणखी लोक चढत होते तों किल्ल्यांत कांहीं तयारीची गडबड होत आहे असें समजून ते मावळे लोक एक माणूस आपल्याकडे येतो आहे असें दृष्टीस पडतांच, त्याला आपल्ये लोकांस कांहीं शब्दादिखुणेनें वर्तमान कळवायास वेळ नसांपडूं देतां मावळे याणीं तत्काळ मारिला. असें अम्हांही किल्लेकरी अधिक सावधगिरीत आहेत असें मावळ्यांस वाटलें, तेव्हां जे जवळ मावळे होते, ते घेऊन, तानाजी मालुसरा जिकडे ती गडबड होत होती तिकडे चालिला; तो कांहींसा पुढें गेला तों, त्या किल्लेकऱ्यानी अकस्मात् दिलालांचा व चुडींचा मोठा उजेड केला. तेव्हां ते रजपूत लोक तयार होऊन येतात, व कित्येक कंबरा बांधितात, व मावळे त्यांवर चालून जातात, तों ते सारे एकसमयावच्छेदें करून, दृष्टीस पडले. तेव्हां तें युद्ध मोठ्या निकराचें झालें. त्यांत मावळ्यांपेक्षां रजपूत फार होते, तरी मावळ्यांच्या जय होईलसें दिसूं लागलें; इतक्यांत तानाजी मालुसरा पडला, तेव्हां मावळे लोक जिकडे दोरीची शिडी होती तिकडे पळून गेले, ते त्या भिंतीशीं जाऊन पोंहचतात तों सुऱ्याजी मालुसरा तानाजीचा भाऊ. बाकी मावळे लोकांसहित येऊन पोंहचला; तो हे लोक पळतात असें पाहून मोठ्यानें ओरडून निषेध करून बोलिला, कीं तुमचा बापाचें प्रेत महार नेऊन अमंगळ जागीं टाकितील; त्या दोषाचे अधिकारी मात्र तुह्मीं व्हाल; आह्मी तर दोरीची शिडी तोडिली, आतां मोंगल तुह्माला मारितील. किंवा तुह्मीं त्यांला माराल. असें ह्मणून आपल्या बरोबरचे लोकांसहित त्या लोकांस पुनः युद्धास नेले; तेव्हां ते लोक एकदांच हरहर महादेव ह्मणून मोंगलांचा पराभव करिते झाले, असा तो किल्ला घेतला. मग दिवस उगवल्यावर असा ठिकाणा लागला कीं मावळे लोक तीनशें पडले; व रजपूत पांचशें पडले, यांखेरीज दोन तीनशें सुमारें रजपूत जीव घेऊन पळाले. ते किल्याचे भिंतीवरून बाहेर उड्या टाकून मृत्यु पावले.

त्या मावळे लोकांचा असा नेम होता कीं जय झाला ह्मणजे घर किंवा दुसरें कांहीं आग घालून पेटवून जय झाल्याची खूण करावी, त्याप्रमाणें त्याणीं तेथें एक मोठें छापरी घर होतें तें जाळिलें, तेव्हां शिवाजी आपल्या लोकांचा जय झाला असें समजून बहुत आनंद पावला, परंतु तानाजी पडला असें ऐकिल्यावर कष्टी होऊन बोलिला कीं गड सांपडला पण सिंह गेला, नंतर त्याणें सर्व मावळे लोकयांस एकेक रुप्याचें कडें दिलें; व सुर्याजीस किल्लेदार केला.

यानंतर एका महिन्यानें सुर्याजीला पाठवून छापा घालून पुरंदर किल्ला घेतला; तेथें फारसें युद्ध करावें लागलें नाहीं. कोंकणांत माहुली किल्ला घ्यावयास बरोबर फौज देऊन मोरोपंत पाठविला, त्याला तेथें दोन महिने युद्ध करावें लागलें त्या युद्धांत मोरोपंताचें एक हजार माणूस मेलें; नंतर किल्ला हस्तगत झाला.

यानंतर करनाळा किल्ला घेतला. आणि त्या वर्षाचा सहाव्या महिन्यापर्यंत कालियानीचा संपूर्ण परगणा हस्तगत केला. त्याच वर्षांत शिवाजीनें लोहगड ही घेतला, आणि जंजिरा घ्यावयास फौज घेऊन चालिला; त्यापूर्वी त्याणें नऊ वर्षें मोरचा लावून, प्रतिवर्षी त्या किल्ल्याशीं युद्ध चालविलें होतेंच; परंतु या वेळेस जितकें सामर्थ्य असेल तितकें खर्चून किल्ला घ्यायाचाच, असा निश्चय केला; आणि तेथें जाऊन युद्ध चालविलें. तेव्हां तेथें फत्तेखान शिद्दीचा मुख्य होता, तो किल्ला द्यावयास तयार झाला, परंतु दुसरे तेथें तिघे जण मोठे मोठे शिद्दी होते, ते असें समजले कीं, याणें किल्ला दिला ह्मणजे, धणी आह्मास देहांत दंड करील; यास्तव त्याणीं आपले जातीचे लोक वश करून घेतले, आणि फत्तेखानास कैद करून किल्ला दिला नाहीं; आणि सुर्तेस एक मोठा मोंगलांचा सरदार होता त्याला लिहिलें, कीं या समयीं जर तुह्मीं आमचे कुमकेस याल तर आह्माकडे विजापुरकरांचा मुलुख आहे हा, आणि जितकीं लढाऊ गलबतें आह्माजवळ आहेत तीं तुह्माला देऊं. तें त्याणीं मान्य केलें, तेव्हां किल्ला हातास न येतां शिवाजी उठून गेला. त्या तिघां शिद्दींचीं नावें, एक शिद्दी संभोळ, एक शिद्दी याकुद, एक शिद्दी खैरू.

त्या वर्षी पर्जन्यकाळ पुरता गेला नव्हता, तोंच शिवाजी पंधरा हजार फौज घेऊन सुर्तेस आला; त्या वेळेस तेथें फौज नव्हती ह्मणून, तीन दिवस सावकाशपणें शहर लुटून मनास येईल तसें पुष्कळ द्रव्य जमा केलें; चवथे दिवशीं बऱ्हाणपुराहून त्याला कांहीं लिहिलें आलें, त्यावरून आपली सारी फौज घेऊन, साल्हेर किल्ल्याचे वाटेनें आपल्या मुलुखीं चालिला, तो सुर्तेहून निघताना तेथचा लोकांस पत्र देऊन निघाला, त्यांत असें लिहिलें होतें कीं, तुह्मीं प्रतिवर्षी बारा लक्ष रुपये खंडणी द्याल तर मजपासून तुह्माला उपद्रव होणार नाहीं.

शिवाजी लशकर सुद्धां चांदोर पावेतों पोहचला तेव्हां, त्यास समजलें कीं, एक मोंगलांकडचा पांच हजार स्वारांचा सरदार आपल्ये पाठीमागें लागला आहे, या खेरीज समूर एक मोठी फौज नाशिकाचे वाटेवर, पिंपरीच्या घाटाशीं येऊन वाट पाहात बसली आहे. ते समयीं शिवाजीनें आपल्या फौजेच्या चार टोळ्या करून, एकीस तें सारें द्रव्य संभाळून न्यावयाचें संपविलें; इतरांस त्या सरदारांवर जावयाचें काम नेमिलें, त्या तीन्हीं तिहीं कडे जाऊन मोंगलांशीं युद्ध करूं लागल्या इतक्यांत त्या एका टोळीनें तें द्रव्य नेऊन कोंकणांत पोंहचविलें. नंतर शिवाजी समूरचे फौजेस आणि पाठीस लागलेल्या सरदारांस जिंकून कोंकणांत गेला. त्या मोंगल लोकांत एक मराठी फौजेची टोळी होती, तीमध्यें मुख्य मकुरच्या देशमुखाची स्त्री असे, तीचा भ्रतार पूर्वींच गत झाला होता; शिवाजीनें त्या बाईचा संमान करून तिला तीचे मुलखीं पाठविली.

यानंतर

यानंतर शिवाजीनें आपला सरदार प्रतापराव गुजर याजबरोबर फौज देऊन खानदेश लुटावयाकरितां पाठविला; तेथेंही मोंगलांचें लश्कर नव्हतें, ह्मणून यथेच्छ लूट केली. या लोकांचे जाण्यांत विशेष हा, कीं याणीं जातांना गांवोगांव लोकांपासून लिहून घेतलें कीं, आह्मीं शिवाजीस व शिवाजीचा सरदारांस वसुलाची चवथाई देऊं; आणखी आपण लिहून दिलें कि, जे चवथाई देतील त्यांस दुसरा कोणी उपद्रव करील तर त्यापासून संरक्षण करूं. आणि चवथाई दिल्याची पावती देत जाऊं. त्यापुढें मराठे लोक मोंगलांचे मुलखीं चवथाई घेत होते. परंतु त्याचा आरंभ तोच.

सन सोळाशें एकाहत्तराचे प्रारंभीं, मोरोपंतानें कित्येक किल्ले घेतले, त्यांत औंडा, पट्टा आणि साल्हेर हे तीन श्रेष्ठ.

असा शिवाजीचा जय होत चालिला असतां, मोंगल लोक कसे उगे राहिले. असें कोणी ह्मणेल तर त्याचें कारण असें समजावें कीं, शिवाजी आणि सुलतान माजूम. यांची मैत्री आहे, असें लोकांस दिसत होतें. आणखी जशवंतशिंग शिवाजीचा हितकर्ता होता; तें सर्व लोक जाणत असत. तो सुलतानास मसलत देई कीं, दिल्लीहून कुमकेस फौज मागावी; कुमकेस दुसरी फौज आल्यावांचून युद्ध करूं नये; आणि तो पक्कें जाणत होता कीं मागीतली असतांही घातशंकेनें ओरंगजेब देणार नाहीं. त्या सुलतान माजुमानेंही, त्याची मसलत ऐकिली; त्यावरुन लोकांस असें वाटूं लागलें कीं, शिवाजीशीं मिळून बापाशीं युद्ध करून, स्वतंत्रपणानें असावें, असें सुलतानाचे मनांत आहे. हें खरें असेल कीं नसेल हें समजत नाहीं; परंतु इतकें खरें असेल, कीं बाप मेल्यावर आपण तक्ताधिपती न झालों तर दुसरा होईल तो आपल्यास मारील; ही एक शंका होती यास्तव शिवाजीचें बंड उपयोगी पडेल ह्मणून तें तसेंच रक्षिलें; आणि त्याचे पारिपत्याचे मिषेंकरून, आपले जवळ पुष्कळ फौज असावी; कांकिं समयीं आपल्या कामावर पडेल. हा मनसोबा त्याला शेवटास न्यावयास अवकाश पडला नाहीं, कांकिं थोडकेच दिवसांत ओरंगजेबानें. जशवंतशिंगास आपल्ये जवळ बोलावून नेला; आणि मोहाबतखान नामें दुसरा एक सरदार चाळीस हजार फौज बरोबर देऊन, दक्षिणेंत पाठविला. तो सुलतान माजुमास विशेष मानीत नसे.

त्या मोहाबतखानानें दक्षिणदेशीं येतांच औंडा, पट्टा, हे किल्ले घेतले; मग पर्जन्यकाळ गेल्यावर, दिलीरखानाबरोबर अर्धे लश्कर देऊन, चाकणचा किल्ला घ्यावयास पाठविला; आणि आपण अर्धें लश्कर घेऊन साल्हेर किल्यास वेढा घातला. हें वर्तमान सन सोळाशें बहात्तरांत घडलें. तेव्हां शिवाजीनें मोरोपंत व प्रतापराव गुजर यांजबरोबर वीस हजार स्वार देऊन, आज्ञा केली कीं मोंगलांस हांकून

कून घ्यावे, ही बातमी मोहाबतखानास कळल्यावर, त्याणें आपल्याबरोबरचे लोक आपल्याजवळ थोडकेसे ठेवून बहुतेक युद्धास पाठविले; त्या दोहों लष्करांची साल्हेर किल्ल्याजवळ गांठ पडली. तेसमयीं प्रतापराव पुढें होता, त्याणें आपल्या लोकांस आज्ञा केली कीं मोंगलांनीं हल्ला केला असतां, आपण मोड झाल्याप्रमाणें कांहींसें पळाल्यासारिखें करून ते आंगावर घेऊन त्यांचा बंदोबस्त मोडला म्हणजे, आपण हल्ला करावा; मग त्या लोकांनीं तसेंच केलें; तेणेंकरून मोंगलांचा फार नाश झाला तेव्हां मोंगल आपला मोडलेला बंदोबस्त नीटकरीत करीत मोठ्या शौर्येंकरून लढले; परंतु उपाय चालेना. त्या युद्धांत त्यांचे मोठमोठे सरदार वेर्थीस मेले. आणि कित्येक जखमी झाले; कित्येक कैदेंत सांपडले. मराठ्यांकडचा एक, सरराव कांकडे नामें, पांच हजार स्वारांचा सरदार पडला, आणि पांचशें लोक मेले.

त्यापूर्वीं कधींही मोंगलांशीं मराठे लोक असे झटून लढले नव्हते. म्हणून त्या युद्धापासून मराठे मोठे विख्यात झाले. त्या लढाईचें फळ असें कीं, साल्हेर किल्ल्यासभोंवता मोंगलांचे लष्कराचा वेढा होता, तो काढून मोंगल लोक पिटून लाविले. ते औरंगाबादेस पळून गेले.

जे लोक शिवाजीचे कैदेंत सांपडले ते रायगडास नेऊन ठेविले; मग त्यांचा जखमा बऱ्या झाल्यावर जे चाकरीस राहिले ते ठेविले, आणि जे नराहीत, त्यांस मोठ्ये संमानानें आपले ठिकाणीं जाऊं दिले. त्या दिवसापासून विजापुरकराचे लश्करी लोक, व मोंगल लोकांचे लश्करी लोक, त्यांची चाकरी सोडून शिवाजीस भेटून, त्याचे चाकरीस राहूं लागले.

यानंतर शिवाजी पोर्तुगीस लोकांपाशीं खंडणी मागूं लागला; तेव्हां त्याणीं मान्य नकेलें, म्हणून वसईजवळचा साष्टी परगण्यांत घोडबंदर किल्ला आहे तो घ्यावयास गेला, परंतु तो त्याचे हातीं लागला नाहीं; त्या लोकांनीं त्यास मागें हटविला. त्यावेळेस मुंबैमध्यें इंग्रेज लोक इतकाजवळ शिवाजी आला म्हणून भिऊन, आपल्या किल्याच्या बंदोबस्त करूं लागले. इतके दिवस इंग्रेज व शिवाजी यांचें कधीं युद्ध झालें नव्हतें; कांकीं परस्परें दोघांस एकमेकाची गरज होती. ती अशी, मुंबईचे लोक, धान्य आणि जळण शिवाजीचा मुलखांतून आणीत असत; आणि मराठे लोकांस त्यांपासून असा उपयोग होई, कीं ते लोक मोंगलांचीं लढाऊ गलबतें मुंबैवरून पुढें शिवाजीचा मुलखाकडे जाऊं देत नव्हते; म्हणून त्यांचा व शिवाजीचा सल्ला होता. यामागें एकवेळ सन सोळाशें एकसष्टांत शिवाजीनें राजापुर लुटलें. तेव्हां इंग्रेजाचें द्रव्य दहा हजार होन सुमारें गेलें होतें; तें घ्यावयाकरितां त्याणीं उद्योग कित्येक वेळा केला, परंतु त्याणें दिलें नाहीं; मग यावेळेस त्याशीं तह करून

पैका घ्यावयाचा उद्योग नवीन केला. त्यांस शिवाजी ह्मणाला कीं आह्माला जंजिरा घ्यावयास तुह्मीं कुमक कराल तर होन देईन; हें जर मर्जीस येइना तर राजापुरीं फिरून कोठी करून पहिल्या प्रमाणें व्यापार चालवावा; ह्मणजे होन देतों. त्यावर इंग्रेजानें उत्तर केलें कीं मी व्यापार करावयासच एथें आलों, जो आमचे वाटेस जातो त्यावर मात्र आह्मीं शस्त्र धरितों. निर्निमित्त उपद्रव करावा, असें आमचा धर्मांत नाहीं. आतां आह्मीं राजापुरीं व्यापार चालवूं, परंतु इतःपर उपद्रव होणार नाहीं असा पक्का जामीन पाहिजे; तेव्हां ती गोष्ट तशीच राहिली.

इतक्यांत मोंगलांचे मुलखांत कांहीं विशेष बंदोबस्त झाला. तो असा, औरंगजेबानें सुलतान माजूम व मोहाबतखान यांस आपल्याजवळ बोलावून नेले, आणि गुजराथेचा अधिकारी खानजहान बहादुर तो दक्षिणेचा अधिकारी करून पाठविला. तो दक्षिणेस येउन असें समजला कीं, शिवाजीचा वाटेस जावयाजोगें आपल्या जवळ सैन्य नाहीं; यास्तव आपल्या मुलखाचें मात्र संरक्षण करावें. ह्मणून त्याणें कित्येक देशांत जावयाच्या घाटांच्या वाटा बंद केल्या. तेव्हां शिवाजी दुसरी नवीच वाट काढून फौजेसहित घाटावर जाऊन अहंमदनगर व औरंगाबाद यांचे आसमंतात लुटूं लागला; तेव्हां त्याचे पारिपत्याकरितां खानजहानानें चहूंकडे लोक पाठविले, परंतु त्याची कुठेहीं गांठ पडली नाहीं. मग पर्जन्यकाळ जवळ आला ह्मणून, भीमेचे कांठीं पेडगांवापाशीं छावणी करून राहिला, तेथें एक किल्ला बांधून त्याचें नाव बहादरगड ठेविलें. तो मोंगलांचा सरदार किल्ला बांधित असतां शिवाजी गुप्तरूपें लश्करसहित गोंवळकोंडयांत शिरला. आणि तेथून पुष्कळ खंडणी घेऊन स्वस्थपणें रायगडास गेला. यानंतर मोंगलांचाही मुलखांत शिवाजीनें स्वार पाठविले, त्याणीं जेथें बळ चालेल तेथें लुटावें, आणि मोंगलाचे लश्करार्ची गांठ पडली असतां, ती लूट बरोबर घेऊन पळावें, यांतच त्या लोकांस पुरुषार्थ आहे, असें वाटत असे.

शिवाजी गोंवळकोंडयांत होता इतक्यांत समुद्रतीरचे त्याचा गांवाचा फार नाश जाला; तो असा, सुर्तेचीं आणि जंजिऱ्याचीं लढाउ गलबतें येऊन, ते गांव लुटले; परंतु तेणेंकरून त्याचें बळ किमपि उणें झालें नाहीं; कांकीं त्या हानिपेक्षां गोंवळकोंडयांत लाभ विशेष झाला.

सन सोळाशें बहात्तरांचा बाराव्या महिन्याचे पंधराव्ये तारिखेस, विजापुरचा बादशाह अली आदिलशाह याचे शरीरास वायूचा उपद्रव होऊन, एकाएकीं हातपाय गेले; तेव्हां त्याणें आपल्या राज्याचा कांहीं बंदोबस्त करून मग थोड्केच दिवसांनीं मरण पावला. त्याला पुत्र एकच पांच वर्षांचा सुलतान शिकंदर नामें होता, आणि एक कन्या होती. त्या वेळेस त्याचा वजीर अबदुल-

महंमद

महंमद तो मोठा कुलीन आणि सुज्ञ होता, परंतु त्या कालानुरूप त्यामध्यें सामर्थ्य नव्हतें, दुसरे मोठे मोठे तिघे मुत्सद्दी होते. एक खवासखान, दुसरा अबदुल करीम त्यालाच बालोलखान ह्मणत, तिसरा मजाफेरखान, हे तिघेही सरकारचें हित न पहातां आपलें मात्र प्राबल्य असावें असें इछीत होते. तो वजीर अल्पसामर्थ्य होता, यामुळें त्याला त्या मोठमोठ्या तिघांस आज्ञेंत वागवावयाची शक्ति होईना; आणि ते तर आपलें माहात्म्य वाढवावें ह्मणून अमार्गवर्ती झाले, तेणेंकरून आंतल्यें आंत वैमनस्यें पडलीं. यास्तव त्या राज्याची दशा अशी जाली कीं बाहेर शिवाजी आणि मोंगल तें राज्य घ्यावयास टपलेले; आणखी आंत फितुर होता. यावरून असें दिसूं लागलें, कीं हें राज्य शीघ्र लयास जाईल. असें असतां अबदुल महंमद याणें बादशाह मरते समयीं, मसलत दिली कीं सुलतान शिकंदर प्रौढ होई तों पर्यंत, खवासखान यास मुख्य करावा. आणि जे दुसरे दोघे मुख्य राहिले, त्यांस व मला, मुलखामध्यें जागोजाग वेगळा वेगळा अधिकार द्यावा. तेव्हां बादशाह निरुपाय होऊन मान्य केलें; आणि खवासखानाला जवळ बोलावून त्याचे हातांत पुत्राचा हात दिला; आणि वजिरानें मसलत दिली होती, त्या प्रमाणें वागावयाची आज्ञा दिली. मग बादशाह मृत्यु पावल्यावर तो खवासखान मुख्य झाला; त्याणें तिघां मुख्यांतील, एक मजाफेरखान यास मात्र कर्नाटकांत पाठविला; दुसरे दोघे मोंगलांचे आश्रयेंकरून प्रबळ होतील, अशा भयानें ते आपल्याजवळ ठेविले, यां चौघांजवळ ब्राह्मण आश्रित होते. त्या योगेंकरून तेथचें बारीक वर्तमान शिवाजीला कळत असे. त्या शिवाजीला विजापुराची अशी अवस्था समजतांच, त्याणें असें मनांत आणिलें कीं, पूर्वीं जो अबदुल महंमद याशीं तह ठरविला होता, तो बादशाह याचें मरण पर्यंत झाला; आतां आपला लाभ साधावा हेंच मुख्य.

या प्रमाणें निश्चय करून सन सोळाशें ब्यहात्तरांचा तिसऱ्या महिन्यांत, शिवाजीनें विशाळगडास मोठें सैन्य जमा केलें. त्यांतून कित्येक लोक पाठवून पन्हाळा किल्ला छापा घालून घेतला, परंतु त्याचे मनांत हुबळी नामें मोठें शहर जामध्यें व्यापार मोठा चालतो आहे. तें लुटावयास फार अगत्य होतें. तें काम त्याणें आनाजी दत्तो यास सांगीतलें; त्याणें तेथें जाऊन तें शहर लुटून असें द्रव्य जमा केलें कीं, ज्याचा अदमास करितां येत नाहीं. मग ते लोक तेथून गेल्यावर, तेथें संरक्षणार्थ पूर्वींपासून राहिलेले, जे विजापुरकरांचे लोक होते. त्याणीं जें शेष राहिलें द्रव्य तें सर्व नेलें. या खेरीज शिवाजीनें विजापुरकरांच्या समुद्राचे तीरच्या मुलुख लुटावयास लढाऊ गलबतें पाठविलीं; आणि गांवोगांव देशमुखादि अधिकाऱ्यांस मस-

लत

लत दिली कीं विजापुरकरांचे लोकांस हांकून तुह्मीं स्वतंत्रपणानें वागावें. त्या वेळेस वेदनूरच्या राणा याणें हुबळी शहराची ती दशा पाहून शिवाजीला शरण आला आणि खंडणी द्यावयास कबूल करून अभय मागीतलें.

त्यावर दिडा महिन्यानें मावळे लोक पाठवून शिवाजीनें परळी किल्ला घेतला. त्यानंतर सातारा किल्ला, जास विजापुरचे सरकाराचा बंदोबस्त असे, त्यास वेढा घातला; तो चार महिने लढला मग शिवाजीचे हातीं लागला. त्या किल्ल्याचा एक विशेष आहे तो असा, जापासून फितूर इत्यादि अन्याय झालेले, असा जो सरकारचा महा अपराधी त्याला सातान्यावर + बंदींत ठेवावा. अशी चाल कित्येक पिढ्या विजापुरकरांची होती. ती आदिलशाई वंशापासून. किंवा त्याचे अगोधर पासून चालत आली. तो किल्ला याणें घेतला आणि मोठा हर्ष पावला परंतु त्याचे वंशज त्यांत पुढें बंदीस पडतील तें त्याला समजलें नाहीं.

त्या वर्षीं पर्जन्यकाळामध्येंच. चंदन. वंदन, पांडवगड, नांदगिरी, आणि ताटोरा हे पांच किल्ले शिवाजीचे हस्तगत झाले.

इकडे विजापुरांत सुलतान शिकंदर बादशाह लहान ह्मणून जो मुख्य केलेला, खवासखान होता; त्याणें शिवाजीचें असें सामर्थ्य आणून एक फौज पाठविली. ते लोक जाऊन पन्हाळ्या किल्ल्याचा आसमंतात मुलुख घेतला. इतक्यांत शिवाजी कडचा प्रतापराव गुजर विजापुराचे सभोंवता लुटूं लागला; आणि मोठा उपद्रव करूं लागला. तेह्वां विजापुरकरानें आपलें लश्कर माघारें बोलाविलें. प्रतापराव याणें त्या लश्कराची वाटच बंद केली, आणि त्यांस दाणापाणी मिळेना असें नानाप्रकारें दमविलें. तेह्वां त्या विजापुरकरांचा लश्करांत मोठा सरदार अबदुल करीम होता, तो त्या प्रतापरायाशीं आर्जवाच्या गोष्टी बोलून आपलें लश्कर वांचवून विजापुरीं गेला. त्यावरून शिवाजीला मोठा राग येऊन, त्याणें त्यास निर्भर्त्सना करून लिहिलें तेणें करून प्रतापराव फार खिन्न होऊन शिवाजीची आज्ञा नसतां, वराडांतील पैनघाट मुलखांत सैन्य चालविलें.

त्यापुढें आबदुल करीमानें प्रतापराव दूर गेला असें समजून सन सोळाशें चौऱ्याहात्तरांचा दुसऱ्या महिन्यांत, पुनः सैन्य घेऊन पन्हाळ्या किल्ला घ्यावयास चालिला. तो त्या किल्ल्याचे जवळ जाऊन पोहचला तों प्रतापराव पुष्कळ सैन्य सहित तेथे त्याचे दृष्टीस पडला. त्यास त्यापूर्वी शिवाजीचा निरोप आला होता की, असा अमार्गवर्ती जो तूं, तो विजापुरकरांचें लश्कर लुटल्या वांचून मला तोंड दाखवुं नको; यास्तव तेणेंकरून तो आपला बंदोबस्त न पहातां, एकाएकीं त्या

+ अपराधी लोकांस बंदींत ठेवावयाचा असा चाल सातारा विजापुरकरांचा; तसाच पूर्वी लोहगड अहमदनगरकराचा होता.

लश्करावर

लश्करावर उडी घालून आपण मृत्यु पावला; आणि त्याचें सैन्याची दुरदशा झाली. ते लोक पळाले ते पन्हाळ्याचे तोंकेरखालीं गेले. तेव्हां त्यांस आश्रय सांपडला. ते वेळेस एक मराठा हंसाजी मोहिते नामें पांच हजार स्वारांचा सरदार होता, तो अकस्मात आला, त्याणें विजापुरकर यांचे लोक मराठे लोकांचे पाठीस लागलेले आणि बंदोबस्त रहित असे पाहून आपण हल्ला केला, मग त्यांचा मोड होऊन मराठी लोकानीं माघारें उलटून आपल्यें पाठीस लागणारांस पळविले ते समयीं विजापुरकरांचा सरदार मोठ्या लज्जेनें माघारा विजापुरी गेला.

त्या हंसाजी मोहित्याचे लोकांत, दोन सरदार, मोठ्या शौर्येंकरून लढले; तो एक संताजी घोरपडा; आणि दुसरा धनाजी जाधव; त्यापुढें ते दोघे अशा आचरणें करून मोठे विख्यात जाले.

जेंजें हंसाजी मोहित्यानें कार्य केलें तें तें शिवाजीला मोठें हर्षास्पद जालें; तेणें करून त्याणें त्याचें हंबीरराव असें नवें नांव स्थापून, लश्करचे सरनोबतकीचा अधिकार दिला. त्या प्रतापराव गुजरानेंही पूर्वीं मोठीं मोठीं कामें केलीं होतीं आणि या वेळेस तर मृत्युच पावला; यास्तव त्याची फार फार प्रशंसा करून, शिवाजीनें त्याचे सोयरे धायरें सहित त्याचा मुलां माणसांचें पोषण केलें; आणखी त्याची कन्या व आपला पुत्र राजाराम, यांशीं विवाह केला.

तो प्रतापराव मृत्यु पावला त्याच सुमारें आबाजी सोनदेवाचा काळ जाला त्याचा पुत्र रामचंद्रपंत तो मुजूमदार केला. त्या शिवाजीची चाल अशी होती कीं गुणी असल्या वांचून पुत्रास बापाचा अधिकार देऊं नये.

शिवाजी फार दिवस आपणास राजा महाराज ह्मणवीत असे, आणि आपले राज्यांत त्याणें नव्या टंकशाळा घातल्या होत्या; आणखी तो ब्राह्मणास ह्मणूं लागला कीं तुह्मीं मला राज्याभिषेक करून जा दिवशीं मी छत्राधिपती होईन तो वर्षारंभ दिवस करावा; त्या वेळेस काशीहून एक गागाभट नामें मोठा विद्वान ब्राह्मण आला होता; त्यास तें काम सांगीतलें, त्यास, त्याणें शास्त्रार्थ बहुत पाहून सन सोळाशें चौऱ्याहात्तरांचे सहाव्ये महिन्याचे सहाव्ये तारिखेस शके पंधराशें चौऱ्याण्णवांचे ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीचे दिवशीं सुमुहूर्तीं रायगडीं शिवाजीस यथाविधि राज्याभिषेक केला.*

पूर्वी कारभारी यांचीं अधिकार संबंधी नावें फारशी शब्दांनीं होतीं; मग शिवाजीला राज्याभिषेक झाल्यावरतीं बदलून नवीं संस्कृत ठेविलीं. तीं नावें शिवाजी जीवंत होता तोंपर्यंत चालत होतीं, त्यापुढें अष्टप्रधानाचीं नावें राहिलीं;

---

* त्यापुढें पंधरा दिवसानीं शिवाजीची आई जिजाबाई मेली ह्मणून त्यास पुनः राज्याभिषेक केला, परंतु वर्षारंभ दिवस जो पहिला राज्याभिषेक झाला तोच ठेविला दुसरा न केला.

त्या नावांचा तपशील आणि त्या अधिकाऱ्यांचीं नावें अशीं.

फारशी	संस्कृत	मूळचें
पेशवा	मुख्यप्रधान	मोरोपंत पिंगळे
मजीमदार	पंत अमात्य	रामचंद्रपंत बहूतकर
सुरणीस	पंत सचीव	आनाजी दत्तो
वाकनीस	मंत्री	दत्ताजी पंत
सरनोबत	सेनापती	हंबीरराव मोहिते
डबीर	सुमंत	जनार्दनपंत हणमंते
न्यायाधीश	न्यायाधीश	बाळाजी पंत
न्यायशास्त्री	पंडितराव	रघुनाथ पंत

यानंतर शिवाजीनें सुवर्णतुलापुरुषदान‡ केलें, आणि मोठा विधी करवून आपणास उत्तम रजपूत म्हणविलें; आणखी नाना गुणयुक्त महत्वप्रतिपादक श्रीमंत इत्यादिपद विशिष्ट आपलें नाव लिहावयाची चाल केली.

पूर्वी शिवाजी सत्तोळाशें त्र्यहात्तरांत जेव्हां विजापुरकरांशीं युद्ध करूं लागला तेव्हेस, त्याणें मोंगल लोकांशीं तह केला होता म्हणून ते लोक त्यास उपद्रव करित नव्हते; परंतु सन सोळाशें पंचहात्तरांत मोंगलांचा दिलीरखान नामें सरदार याणें शिवाजीचा मुलखास उपद्रव केला; तेंच तह मोडावयास शिवाजीला मिस झालें; त्याणें मोरोपंतास पाठवून पुनः औंडा, पटा हे किल्ले घेतले, आणि हंबीरराव सेनापती याणें सुर्तेजवळच्या घाटावर जाऊन आपल्ये फौजेच्या वेगळ्या वेगळ्या टोळ्या करून बऱ्हाणपुर पावेतों मुलुख लुटला; तेथून पुढें माहूर पर्यंतही लुटित गेला. त्यांतलीच एक टोळी जाऊन भडोज परगणा लुटला. त्या पूर्वी कोणी मराठा नर्मदा उतरून पलीकडे गेला नव्हता. त्या शिवाजीनें आरण अंगें जाऊन पन्हाळा व तातोरा यामध्यें ठाणें बसवून कोंकणांत पोंडा किल्ल्यास घेरा घातला. तो शिवाजी फौजेसहित कोंकणांत गेला असें पाहून, विजापुरकरांकडचे सरदार निंबाळकर व घाटगे व फलटनराव मलावरींचे देशमुख यांनीं शिवाजीनें बसविलेलें ठाणें उठवून त्या संबंधीं मुलुख घेतला.

हंबीरराव गोदावरी उतरून माघारा आल्यावर दिलीरखान मोठ्या निकरानें त्याचे पाठीस लागला; परंतु त्याणें जी लूट मिळविली होती ती मोठ्या

‡ ज्या वर्षी शिवाजीला राज्याभिषेक झाला, ते समयीं इंग्रेज लोकांशीं आणि शिवाजीशीं तह झाला. त्या कामास मुंबईहून एक साहेब गेला होता, त्याणें शिवाजीचा तुळेस सोळा हजार होन लागलेले पाहिले.

कष्टानें वांचवून रायगडास नेली. त्यासमयीं मोंगलांनीं कालीयानी परगणा लुटला; शिवाजीनें पोंडा किल्ल्याचा बुरूज सुरुंगानें उडवून तो किल्ला घेतला. त्यानंतर त्याणें दक्षिण कोंकणांत जाऊन कित्येक ठिकाणें लुटून, कित्येकांजागची खंडणी घेऊन, घाटावर जाऊन सुंडाप्रांतांतील द्रव्य घेऊन रायगडीं फिरून आला.

विजापुरांत जो मुख्य झालेला खवासखान होता, तो शिवाजीचा भयानें राज्याचे रक्षणाचें अगत्य सोडून केवळ आपल्याच हितासाठीं खानजहानाबरोबर तहाचें बोलणें करूं लागला, कीं इतःपर आम्हीं तुमचे म्हणवून राहूं आणि सुलतान शिकंदर बादशाह याची बहीण पादशाह बिबी, औरंगजेबाचा पुत्रास देऊं. हें वर्तमान विजापुरकरांचे मानकरी लोक यांस समजतांच त्याणीं मारेकरी घालून त्या खवासखानास मारून टाकिला. नंतर अबदुलकरीम कारभार चालवूं लागला, त्याणें मुलखाचे रक्षणाविषयीं आज्ञा केलेली खवासखानापेक्षां सरदार लोक विशेष मानीत होते. नंतर जेव्हां दिलीरखान विजापुरचे मुलखांत गेला तेव्हां अबदुलकरीम लशकर सुद्धां युद्धास सिद्धच होता, मग त्याची आणि याची कित्येक वेळा लढायी झाली, आणखी विजापुरकरांचा कांहींसा जय झाला, तेव्हां दिलीरखानही तो अबदुलकरीम त्याचे जातीचा म्हणून त्यास कांहीं अनुकूळ झाला; तेणें करून त्यास तह करणें सुलभ पडलें.

सन सोळाशें शाहात्तरांत, तादोरा व पन्हाळा यांचे मधला मुलुख शिवाजीनें तिसऱ्यानें घेतला. आणि विजापुरचे जहागिरदारांचा उपद्रव नलागावा, म्हणून किल्ले बांधिले. त्यांचीं नावें वर्धनगड, भूषणगड, सदाशिवगड, मचिंद्रगड, हे चार किल्ले फार मोठे नव्हते, परंतु मुलखाचे रक्षणास मोठे उपयोगी पडत, अशा जागीं बांधिले होते; आणि त्यांचे संबंधीं जे मुलुख त्यांचा वसूल पुष्कळ उत्पन्न होत असे. असा बंदोबस्त करित असतां त्या शिवाजीचा शरीरीं समाधान नाहींसें झालें; तेणेंकरून तो सातारयास कांहीं महिने पडला होता, तेव्हां त्याणें बहुत देवसेवा अनुष्ठानें करविलीं; आणि त्या दुखण्यांतच त्याणें कर्नाटक प्रांतीं जाऊन तें राज्य घ्यावयाची अशी मोठी मसलत केली. कीं त्यापूर्वीं कधीं केलीच नव्हती. ती सुलभ करावयास त्याणें काय काय कामें करून शेवटास न्यावयास उद्युक्त झाला, तें पुर्तेपणें समजावयाकरितां पूर्वीं लिहिलेल्या वर्तमानांतील कांहीं प्रकरणाची सूचना लिहिली पाहिजे; ती या भागाचे पुढचा भागीं लिहिण्यांत येईल.

सन

सन सोळाशें शहात्तरांपासून, एंशी पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग नववा.

अनुक्रमणिका.

शिवाजी कर्नाटकप्रांत घ्यावयास गेला तो प्रकार.

तो शिवाजी तिकडे जाताना, वाटेनें देवस्थान पाहून, तपस्या करावयास गेला.

त्याणें कर्नाटकीं आऊन युद्ध कोणे प्रकारें केलें तें.

आणि त्याचा सावत्र भाऊ व्यंकाजी याशीं बोलणें झालें तें प्रकरण.

मोंगल आणि विजापुरकर मिळून, गोवळकोंडेकर यांचें राज्य बुडवायास सैन्य पाठविलें.

परंतु तें कार्य शेवटास गेलें नाहीं.

अबदुल करीमाचा मृत्यु आणि त्याचे जागीं मसाउदखानाची स्थापना.

व्यंकाजी शिवाजीचा लश्करावर छापा घालून आपणच पराभव पावला तो प्रकार.

जनार्दनपंत, व हंबीरराव, व मोरोपंत, याणीं युद्धें कशीं केलीं.

सुलतान माज़ूम यास दक्षिणेचा अधिकार मातस्यान दिला तें वर्तमान.

मोंगलांचें लश्कर विजापुर घ्यावयास आलें म्हणून मसाउदखानानें शिवाजीपाशीं कुमक मागीतली.

तो शिवाजी मोंगलांचे मुलखीं आऊन उपद्रव करिता झाला.

आणि तेथून लूट घेऊन माघारा येत असतां वाटेंत मोंगलांचा लश्करापासून मोठें संकट पावला.

नंतर, महत्त्वशौर्यें करून, आणि जासुदांचे चातुर्यें करून, तो, व त्याचें सैन्य वांचलें.

संभाजीची वागणूक.

मोंगलानीं विजापुरचा घेरा उठविला, नंतर शिवाजीनें विजापुरकरांस कुमक केली होती, तीपासून कायलाभ पावला.

तेणें करून व्यंकाजी निरुत्साह झाला, यास्तव त्यास शिवाजीनें हितोपदेशार्थ पत्र लिहिलें.

त्या शिवाजीचा मृत्यु, व त्याचा स्वभावाचें वर्णन.

तो मेल्यानंतर तख्ताधिपती कोण कोण झालें तें वर्तमान.

भाग नववा.

पूर्वी औरंगजेबानें आपल्ये मनांत निश्चय केला कीं सर्व दक्षिणेचें रा-
य आपल्ये सत्तेंत ठेवावें, मग तो आपलें राज्य संभाळीत असतां कालें करून
ां विसरला असेल. असें समजूं नये. पहिल्या पासून त्याची मसलत अशी
ोती कीं, दक्षिणचे अधिकारी व राजे, हे आप आपल्यांत कलह करून हीनब
ः झालेले तसेच राखावे; नंतर जेव्हां आपले चित्तास येईल त्या समयीं आ-
ण जाऊन घेतां येईल. तें काम त्याला दुसऱ्यास सांगतां येईना, कां कीं ज्या-
ा हातीं तें राज्य लागेल तोच प्रबळ होईल. अशी मनांत शंका होती; या वरू-
च समजतें, कीं शिवाजीनें एवढी धाम धूम केली असतां मोंगलांनीं तत्का-
ः बुडविला नाहीं. शिवाजी गोंवळकोंडकरांशीं आणि विजापुरकरांशीं कल-
करी त्यांतही औरंगजेब आपलें हितच जाणत असे; आणि या कामासाठीं
ाचा उद्योगही असाच होता, कीं आपले वकील राज्यांत पाठवून कांहीं युक्तीं-
वैमनस्यें पाडावीं; त्याला असें वाटे कीं अशाच आचरणें करून आपलें क-
याण होईल. परंतु याणें करूनच आपलें अहित आहे असें न समजला; कां
ो कुकर्में अंगीकारिलीं असतां, कोणे के समयीं तींच त्या कारणास बाधक हो-
ात. शेवटीं त्याचीं कुकर्में त्याला घातक झालीं. याचरून अर्थ असा दिसतो
ीं उत्तमाचरण केवळ एकाचेच उपयोगीं पडतें असें नाहीं मोठ्या बादशाहा-
ासून गरीबगेरे पर्यंत सर्वांचे उपयोगीं सारिखें पडतें.

विजापुरीं अबदुलकरीम याणें मोंगलांशीं आणि आपणाशीं सल्ला रा-
वला होता परंतु त्यांशीं बहुत काळ पर्यंत मैत्री ठेवावी असें त्याचे मनांत नव्ह-
; कां कीं त्याणें आपले हिताचा युक्ती वेगळ्याच कल्पिल्या होत्या. त्याचे लोक
मोंगलांचे लोक एका जातीचे होते, त्याणें मोंगलांशीं सल्ला केला त्याचें कारण
च असेल; नाहींतर तो आपल्या शहाणपणानें, शिवाजीशीं तह करता, कां
ीं शिवाजीचा हिताचें आणि त्याचा हिताचें कारण एकच होतें. आणखीं
ोंगल त्यास बुडवावयास पहात होते.

गोंवळकोंडें तेथील मानकरी लोक बहुतां दिवसांपासून, मोंगलांस
ाश झालेले होते; जा समयीं कुतुबशाह मेला, त्या समयीं औरंगजेब समज-
ा कीं आतां आपणास हित होईल, कां कीं तेथचा नक्ताधिपती होणार कु-
ुबशाहाच्या जांवाई अबूहुसेन तो केवळ विषयी होता. मग तो बादशाह
ााल्यावर त्याणें आपले सर्व दुर्गुण टाकून उत्तम प्रकारें राज्य कारभार चालवूं ला-
ाला. तेव्हां औरंगजेबाची निराशा झाली; त्या अबूहुसेनाजवळ मसलत

देणार

देणार ब्राह्मण दोघे भाऊ होते, एक अकण्णापंत, एक मादण्णापंत, त्यांत मादण्णापंत फार चतुर होता परंतु त्याचा स्वभाव ब्राह्मणाचे जातीप्रमाणेंच, कुटिल मार्गानुसारी असे. त्या दोघांचे मसलतीनेंच तो अबूहुसेन बहुधा वागे. याप्रमाणें दक्षिणेचा राज्यांत वर्तणुकी झाल्या, त्या बहुतेक लिहिल्या आतां शिवाजी कर्नाटकांत गेला तें प्रकरण.

सन सोळाशें शहात्तरांचे अखेरीस शिवाजी तीस हजार स्वार आणि चाळीस हजार पायदळ बरोबर घेऊन गोंवळकोंडयास जाऊन पोंहचल्यावर तेथच्या बादशाहाशीं मादण्णापंताचे योगेंकरून तह केला; आणि त्यापासून तोफा वगैरे सरंजाम घेऊन. सन सोळाशें सत्याहत्तरांचा तिसऱ्या महिन्यांत तेथून निघून कृष्णेचे पलिकडे उतरून गेला; तिकडे जाताना त्या वाटेच्या एके बाजूस देवस्थान श्रीशैल नामें आहे, तेथें आपण लश्कर सोडून एकदा देवसेवा करावयाकरितां गेला, तो बारा दिवस पर्यंत मोठें दुर्घट तप करून शेवटीं तरवार काढून प्राण देऊं लागला; ते समयीं भवानी प्रत्यक्ष येऊन वारण पूर्वक बोलिली कीं, राजा प्राण देणें योग्य नाहीं, कांकीं तुझा हातून अद्यापि हिंदुधर्म वाढावयाचा आहे; असें त्या वेळेचे लोक बोलत होते. इकडे इतक्यांत तें लश्कर कर्नाटकचा पेनघाट मुलखांत पोंहचलें होतें, तेथें शिवाजी जाऊन त्यास मिळाला. मग जिंजी नामें विजापुरकरांचा किल्ला होता तेथचे सरदारानें विजापुरचे मुख्याचे आज्ञेवरून किल्ला दिल्हा. तेथे कोणी मावळा सरदार शिवाजीनें ठेविला, आणि आपल्या देशचा कायद्याप्रमाणेंच तेथें वसुलादिकाची रीति चालविली, त्या कामावर ब्राह्मण ठेविला.

यानंतर विजापुरकरांचा एक पांच हजारां स्वारांचा सरदार तो शिवाजीचा निवारणाचा उद्योग करूं लागला. तेव्हां शिवाजीनें त्याचा पराभव करून त्याचे घोडे घेतले. त्या शिवाजीनें आपल्ये पाठिमागें कांहीं सैन्य ठेवून आपण पुढें आला होता. त्या सैन्यानें विल्लोर किल्ल्यास वेढा घातला असतां, शिवाजी तंजोर प्रांत हस्तगत करावयाचा यत्न करीत होता; त्याणें आपला सावत्र भाऊ व्यंकोजी यास त्रिवाडें येथे भेटावयास बोलाविलें. कीं तुह्मीं एथे येऊन भेटावें, ह्मणजे वडिलांचे मुलखाचा विभाग करून घेऊं. तेव्हां तो निरुपाय होऊन आला; त्यास शिवाजी मोठ्या समारंभानें भेटला, आणि त्याजवळ मुलखाची अर्धी वांटणी मागीतली; परंतु तो ऐकेना तेव्हां शिवाजीचे मनांत आलें कीं बलात्कारावांचून मसलत सिद्धीस जात नाहीं; तथापि तो आपले संतोषेंकरून भेटीस आला ह्मणून शिवाजीनें त्यास माघारा तंजोरास जाऊं दिला; परंतु मनांत असा निश्चय धरिला कीं, एक तंजोर नघेतां जितका शहाजीच्या

जहागीर

जहागीर मुलुख आहे तो सारा घेऊं. त्या वेळेस त्याणें व्यंकार्जीस पत्र पाठविलें कीं माझेजवळ मुलुख पुष्कळ आहे, आणखी मुलखाची इछा नाहीं. परंतु माझी वतनाची जागा जर मी न घेतली तर मला योग्य नव्हे. त्यास कलह नकरितां तंजोराचा अर्धा भाग व आरणी किल्ला व अणीक किल्ले व वर्कड मुलखांतील अर्धा भाग बरोबर द्यावा.

यानंतर शिवाजी विल्लोरास आला, आणि थोडकेच वेळांत त्याणें तीन किल्ले घेतले; आणखी एक वेदोभास्कर नामें ब्राह्मण आरणी किल्ल्याचा अधिकारी शहाजी पासून होता, तो येऊन शिवाजीस किल्ला देऊन आपण त्याचे चाकरीस राहिला; मग त्याच वर्षी शहाजीचे जहागीर प्रकरणी कोल्हार व बंगलोर, व उसकटा, व बाळापूर, व शेरा, हे सर्व घेतले; आणि त्याचे स्वार सर्व कर्नाटक प्रांतांत जाऊन, विजापुरकरांचा मुलखीं सरदेशमुखी व चौथनिमित्तेंकरून लुटते झाले.

शिवाजी या मोहिमेस निघाल्याचे पूर्वी, त्याणें खानजहान नामें मोंगलांचा सरदार होता त्याशीं स्नेहाचा तह केला होता; हें तहाचें वर्तमान ओरंगजेबास कळलें तेव्हां तें त्यास मान्य वाटलें नाहीं. त्या वेळेस त्याचा दिलीरखान नामें दुसरा सरदार याणें मसलत केली कीं आह्माला विजापुरकरांचें लश्कर सहाय झालें असतां, आह्मीं गोंवळकोंड्याचें राज्य अगदीं निर्मूळ करूं. तेव्हां ओरंगजेबानें त्या खान जहानास बोलावून आणून त्याचे जागीं दिलीरखानास पाठविला. याप्रमाणें मोंगल आणि विजापुरकर मिळून गोंवळकोंडकरांचा द्वेष करावयाचें कारण असें; गोंवळकोंडकरांनीं शिवाजीशीं स्नेह केला होता त्यांचा मादण्णापंतानें हीं दोन्हीं लश्करें एकदांच येऊन मोठा अनर्थ करितील असें समजून मोठें सैन्य जमा केलें होतें; मग ती दोन्हीं लश्करें आलीं तेव्हां, त्याणें आपल्या सैन्याचे सामर्थ्येंकरून त्या दोहीं लश्करांचा पराभव केला. त्यांत विजापुरकरांचा असा नाश झाला किं, त्यांतले कित्येक लोक लश्कर सोडून पळाले आणि जे राहिले ते रोजमुरा मिळेना ह्मणून युद्धास झटेनासे झाले. या खेरीज अबदुलकरीम याचे शरीरीं समाधान नाहींसें होऊन सन सोळाशें अठ्याहात्तरांचे पहिले महिन्यांत तो मरण पावला. तेव्हां दिलीरखानाचा योगेंकरून शिद्दी जोहराचा जांवाई मसाउदखान शिद्दी तो अबदुलकरीमाचा अधिकार चालवूं लागला. नंतर दिलीरखान पेरगांवीं लश्कर सुद्धां गेला.

हें सर्व वर्तमान शिवाजीला कळल्यावर तो आपल्या मुलखाकडे जाऊं लागला तेसमयीं त्याणें आपला भाऊ संताजी नामें, तो शहाजीचा दासीपुत्र

सीपुत्र यास आणि रघुनाथनारायण व हंबीरराव सेनापती, यांस तें कर्नाटकचें काम संपवून, आपण मायारा चालिला; तो बिल्लारी जवळ येऊन पोंहचला, तेथचा देसाई अधिकारी तो मरन गेला होता, आणि त्याचीस्त्री तें स्थान संभाळून असे. तेथें त्या शिवाजीचा लष्करचें बुणगें मारिलें गेलें; तेव्हां शिवाजीनें तिला तें वर्तमान कळविलें; परंतु तिणें तें मनावरच आणिलें नाहीं. तेव्हां शिवाजीनें त्या किल्ल्यास घेरा घालून सत्तावीस दिवस युद्ध करून घेतला. मग कोपाळ नामें दुसरा किल्ला आणि बहादुरबेडा हे घेतले; तेव्हां जनार्दनपंत सुमंत यास तेथचा बंदोबस्त राखावयास सांगून, पुढें चालिला. तो तुरगल शहरीं पोंहचल्यावर व्यंकोजीनें पाठिमागें राहिलेल्या लष्करावर छापा घालून तोच पराभव पावला. असें वर्तमान शिवाजीला कळलें तेव्हां त्याणें त्यास लिहिलें किं तुमचे योग्यतेस्तव मला बलात्कारें करून मुलुख घ्यावा लागला; आणि आता तुमचे दांडगाई मुळें माझा सरदारांसही तुमचें पारिपत्य करावें लागलें आतां तुम्हीं सावधपणानें विचार केलात, तर तुमचा आणि माझा स्नेह असावा याणें करूनच कल्याण; असें तुमचे ध्यानांत येईल; आतां मी तुम्हाशीं स्नेह करावयास सिद्ध आहें. परंतु तुम्हास वडिलांचा जितका मुलुख आहे तो सर्व माझे स्वाधीन करावा लागेल; आणि मग मी तुम्हांस योग्य असा दुसरा कांहीं मुलुख देईन. त्यानंतर व्यंकोजीनें रघुनाथ नारायणाचे योगेंकरून, वडिलांचे वेळेचा अळंकारादिकांचा आणि मुलखाचा अर्धभाग करून दिला, आणि कांहीं द्रव्य देऊन शिवाजीस वश केला. तेव्हां त्याणें तंजोर आणि दुसरा संपूर्ण वडिलांचे परगण्यांतील कर्नाटकचा मुलुख त्याकडे राखिला; नंतर शिवाजी रायगडीं आगोठीस पोंहचला. इतकें काम करावयास त्याला दीड वर्ष लागलें होतें.

तिकडे कर्नाटकांत हंबीरराव व जनार्दनपंत यांणीं विजापुरकरांचें लष्कर तुंगभद्रा व कृष्णा या दोहीं मध्यें होतें तेथें जाऊन छापा घातला; आणि पांचशें घोडे व पांच हत्ती आणिले. त्यांकडील कोपाळ व बिलारी, याचे सभोंवतें मोठे मोठे प्रबळ जे दंगा करणारे देशमुख होते, ते शिवाजीनें वश करून घेतले.

शिवाजी करनाटकांत होता ते वेळेस मोरोत्रिंमल पेशवे याजकडे जो मुलुख संपविला होता तो युक्तीनें संभाळून जंजिरा याचा शिद्दीशीं मोठ्या निकरानें लढत होता त्या शिद्दीस मोंगलांचा आश्रय असे; ते समयीं त्या ठिकाणीं शिद्दी संभोळ होता, तो औरंगजेबानें दूर करून त्याचे जागीं शिद्दी कासीम नामें दुसरा ठेविला. आणि त्याचे नावास याकुदखान असें पद जो-

डिलें तें पूर्वी शिद्दी संभोळ याचेही नावास होतें.

त्या वेळेस विजापुरकरांनीं रजा दिलेले स्वार मोरोपंत ठेवूं लागला. कां कीं त्यास दिलीरखान येउन छापा घालील असें भय होतें; परंतु दिलीरखानानें जो दक्षिणेचा बंदोबस्त केला होता, तो औरंगजेबाचे मनास न येऊन त्याणें त्याचा तो अधिकार काढून सुलतान माजुमास दिला; आणि मालक्यान त्यास दक्षिणेंत पाठविला; परंतु युद्धादिकामें दिलीरखानाकडेच राखिलीं होतीं. त्या वेळेस विजापुरचे मानकरी लोकांत वैमनस्यें पडलीं होतीं, ते लोक आपला मुख्य मसाउदखान याशीं वक्र होते; परंतु मोंगलाशीं फारच द्वेष करीत असत, असें असतां औरंगजेब याचा वकील विजापुरीं होता, तो मसाउदखानाचे स्थापनसमयीं जो करार केला होता, त्या प्रमाणें बादशाह बिबी अली आदिलशाह याची कन्या मागूं लागला, आणि बोलिला कीं, न द्याल तर आमचें लश्कर आणून राज्य घेऊं. तेव्हां तो मसाउदखान तें मान्य करीना, यास्तव औरंगजेबाचें लश्कर विजापुरावर येऊं लागलें. इतक्यांत ती बादशाह बिबी आपल्ये सुशीलपणेंकरून मनांत समजली कीं मी जर संतोषानें मोंगल्यांस जाऊन मिळाल्यें तर माझे भावाचे जीवास आणि राज्यास भय नाहीं, म्हणून दिलीरखान औरंगजेबाचें लश्कर घेऊन येत होता, त्यांत जाऊन मिळाली. हें वर्तमान सनसोळाशें एकुणऐशींत घडलें, याप्रमाणें तिणें अनर्थोपशम यत्न केला परंतु तो उपयोगी पडला नाहीं; कांकीं त्या दिलीरखानानें तिचाबरोबर कांहीं लोक देऊन औरंगाबादेस पाठवून आपण पुढें चालिला.

अशा संकटसमयीं त्या मसाउदखानानें शिवाजीस मदत मागीतली. तेव्हां त्याणें मान्य करून पन्हाळ्यास पुष्कळ स्वार जमा करून विजापुराकडे चालिला; तो जवळ येऊन पोंचला तेव्हां त्यास समजलें कीं मोंगलांचें लश्कर बहुत मोठें आणि त्यांत पठाण फार आहेत. त्यापुढें एकाएकीं युद्ध करावयाचा उपाय नाहीं; यास्तव तो भीमाउतरोन पलिकडे जाऊन मोंगलांचे मुलखांत दंगा करूं लागला. मग पुढें जाऊन गोदावरीचे उत्तरेस जालनें शहर लुटलें; त्या शिवाजीला त्याचे जासुदांनीं जिथें जिथें द्रव्य होतें त्याचा ठिकाणा लावून कळविलें होतेंच; त्यावरून त्यासमयीं त्याणें द्रव्याविषयीं पिराचींही स्थानें सोडिलीं नाहींत. असें तीन दिवस झालें. सुलतान माजुम तेसमयीं औरंगाबादेस होता. त्याणें तेव्हांच त्याचें पारिपत्य करावें परंतु तें घडलें नाहीं मग तो शिवाजी तें द्रव्य घेउन रायगडास जाऊं लागला असतां संगमनेरास पोंचला; तेसमयीं त्याचे पाठिमागें मोंगलांचें सैन्य आलें तेथें मोठें युद्ध झालें. त्यांत मराठे लोकांचा पराभवच व्हावा इतक्यांत शिवाजीनें अत्यंत शौ-

र्यकरून

येंकरून अडून युद्ध केलें आणि त्यास मागें हटवून आपण वाट चालूं लागला; तो बहुत दूर गेला नाहीं तों आणिक मोंगलांचें लश्कर आलें; त्यापुढें त्याचा उपाय चालेना. तेसमयीं त्याचे जासुदानीं मोंगलांचा लश्करास सांपडेना अशा चोर वाटानीं नेऊन, त्या शिवाजीचें लश्कर वांचविलें; तें पद्मा किल्ल्यास स्वस्थपणें पोंचलें. मग मोंगलांचें सैन्य औरंगाबादेस माघारें परतलें. त्यानंतर शिवाजीनें चांगला समय पाहून पद्म्याचे जवळ आसमंतात किल्ले होते ते घ्यावयाचा उद्योग केला तें काम मोरोपंतास नेमिलें.

शिवाजी पद्माकिल्ल्यावर असतां मसाउदखानानें त्याला बहुत आर्जवाचें पत्र लिहिलें, कीं तुह्मी यासमयीं कृपाकरून मला कुमक केलीत तरच, माझें राज्य राहील नाहींतर मोंगलांचें कार्य शेवटास जाईल अवकाश राहिला नाहीं. तेव्हां शिवाजी लश्कर सुद्धां उठून विजापुरीं जाऊं लागला, तेव्हां त्याला वाटेनें असें वर्तमान समजलें कीं आपला वडील पुत्र संभाजी, जाणें ब्राह्मणस्त्रीस बळात्कारें भोगिली यास्तव पन्हाळा किल्ला यावर बंदींत ठेविला होता; तो तेथून पळून जाऊन, दिलीरखानास मिळाला, यास्तव शिवाजीनें विजापुरीं जावयाचें काम हंबीररावास सांगीतलें. आणि आपण संभाजीला माघारा आणावयाकरितां पन्हाळ्याकडे गेला.

तो संभाजी दिलीरखानानें प्रीतिपूर्वक संभाळिला, आणि औरंगजेबास पत्रीं लिहिलें कीं, हा संभाजी आपल्या हातीं लागला आहे, याचें खूळ माजविलें असतां, हे दोघे पिता पुत्र युद्धें करितां करितां हीनबळ होऊन मराठे लोक सहज निःसत्व होतील. ही कल्पना औरंगजेबाचे मनास आली नाहीं; त्याणें उत्तर पाठविलें कीं असें केलें असतां, बंड मात्र वाढेल; तें कामाचें नाहीं.

या उत्तरावरून असें दिसतें कीं औरंगजेब पहिल्यापेक्षां शहाणा झाला; परंतु पूर्वीं बंड करणारे मराठे लोक प्रबळ झाले नव्हते, तेव्हांच त्याणें आपल्या मुसलमान लोकांचीं राज्यें रक्षुन, बंडें मुळींच वृद्धिंगत होऊं दिलीं नसतीं; तर मराठे लोक इतके सामर्थ्यवंत झाले नसते; शेवटीं तो औरंगजेब त्या बंडांचा याबल्यें करूनच नाश पावला.

त्या दिलीरखानानें औरंगजेबाकडून पत्राचें उत्तर आलें नाहीं, तोंच आपल्ये कल्पनेनें वागावयास प्रारंभ केला; तो असा संभाजीचें नाव ठेविलें कीं. हा मराठ्यांचा राजा, आणि आपलें कांहीं सैन्य देऊन शिवाजीचा किल्ला गोपाळगड. यास घ्यावयास पाठविला तो त्याणें किल्ला घेतला.

हंबीरराव जो लश्कर सुद्धां विजापुरकरांचे कुमकेस जात होता, त्याला वाटेनें मोंगलांचे स्वार नउहजार भेटले. तेव्हां तेथें युद्धप्रसंग होऊन मोंगलांचा

स्वारांचा

स्वारांचा अगदीं पराभव झाला. त्यानंतर हंबीरराव तेथून पुढें जाऊन दिलीरखानाचे लश्कराजवळ राहिला, आणि त्यांस नाना प्रकारें उपद्रव देऊं लागला.

मोरोपंत यास किल्ले घ्यावयाचें काम सांगीतलें होतें त्याणें आडुंत किल्ला, आणि नळदुर्गगड. हे दोन्हीं घेतले; नंतर आपल्या लश्कराच्या लहान लहान टोळ्या करून अवघा खानदेशभर पसरल्या. आणि ते लोक जेर केले.

दिलीरखान विजापुर घ्यावयाविषयीं यत्न करीत होता फारच परंतु, लश्करास अन्नादि सामग्री शिवाजीच्या उपद्रवामुळें कमी येऊं लागली यास्तव उपाय चालेना; तेव्हां निराश होऊन विजापुरचे सभोंवता घेरा घातला होता तो उठवून, मुलुख लुटूं लागला. तो कर्नाटक प्रांतांतही जाऊन उपद्रव करूं लागला. तेथे जनार्दनपंत होता त्याणें कोणे एके वेळेस, त्या दिलीरखानाजवळ फार फौज नाहीं अशी संधी पाहून, सहा हजारां स्वारांनशीं छापा घातला. तेणें करून त्याचा फार नाश झाला आणि तो पळाला.

दक्षिणेंत असें वर्तमान झालेलें ऐकून, औरंगजेबानें सुलतानमाजुमास माघारा बोलावून नेला; आणि त्याचे जागीं पुनः खानजहान पाठविला त्याच वेळेस दुसरी आज्ञा आली, कीं संभाजीला कैद करून दिल्लीस पाठवून द्यावा; परंतु दिलीरखान संभाजीला अनुकूळ होता म्हणून ती औरंगजेबाची आज्ञा शेवटास जावयाचे पूर्वींच, त्याला पळून जावयास अवकाश सांपडला. मग शिवाजी आणि संभाजी एकचित्त झाले; परंतु संभाजीचा दुःस्वभाव गेल्याची संशयनिवृत्ति होई तों पर्यंत, त्याला शिवाजीनें पन्हाळ्या किल्ल्यावर रहावयाची आज्ञा दिली.

शिवाजी जा समयीं विजापुरकरांस वश झाला, ते समयीं असा नेम ठरला होता कीं कोपाळ, व बिलारी, या दोहों ठिकाणां संबंधें जो मुलुख आहे तो शिवाजीचे स्वाधीन व्हावा; या खेरीज द्रविड देशांतील जितका मुलुख शिवाजीनें घेतला होता त्याविषयीं विजापुरकरानीं स्पर्धा न करावी; आणखी तंजोर वगैरे जितका मुलुख शहाजीच्या कर्नाटकांत जहागीर असेल तितका तसाच असावा. या प्रमाणें बंदोबस्त झाल्यावर शिवाजी विजापुरीं जाऊन त्या मसाउदखानाशीं व त्याशीं एकांत झाला.

त्या शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकाजी त्याला असें वाटलें कीं विजापुरकर शिवाजीला इतके अनुकूळ झाले, त्यास आतां आपला स्वतंत्रपणा राहिला नाहीं; मग निश्चिंत झाला आणि राज्यकारभार टाकून विरक्ताप्रमाणें वर्तूं लागला; ते समयीं शिवाजीनें त्याला हितोपदेशार्थ पत्र लिहिलें त्या पत्रांतील अर्थ लिहिला आहे.+

+ तुह्माकडून फार दिवस पत्र आलें नाहीं, तेणें करून आमचे चित्तास सुख वाटना-

सें

यानंतर [illegible] काळ गंभीर आजारी [illegible] असा रायगडीं असतां त्याला गुडघी [illegible] झाला. तो प्रतिदिवशीं वृद्धिंगत होऊन, मग त्याचा च प्राबल्येंकरून फार मोठा ज्वर आला; तो सहा दिवस सोसून सातव्या दिवशीं मृत्यु पावला. तो दिवस सन सोळाशें ऐशींच्या चवथ्या महिन्याची पांचवी तारीख. तो मेला त्या वेळेस त्याचें वय त्रेपन्न वर्षांचें होतें.

शिवाजी मोठा चमत्कारिक पुरुष होता, त्याचीं कित्येक कृत्यें सदोष होतीं तथापि त्याचे शौर्यादि गुण लेखांत असून लेख पूर्ण व्हावा हें उत्तम दिसतें, त्यास त्याचे गुण पूर्तेपणें ध्यानांत आणावयाकरितां, पहिल्यापासून त्याच्या कृत्यांचा विचार केला पाहिजे. प्रथमतः मावळे लोक अर्धे नग्न आणि अरण्यांत रहाणारे, अशांची संगत धरून त्या शिवाजीनें आपल्या मोठेपणाचे वृद्धीस आरंभ केला तो असा, त्याणें शीतोष्ण पर्जन्य यांचें सहन करून आपल्या कार्यासाठीं त्या रानवट लोकांचीं मनें वश करून घेतलीं. याप्रमाणें आपले अर्थसिद्धीस न्यावयाकरितां, ज्या ज्या कल्पना त्याणें केल्या, त्या पुढें दुसरा कोणी करील असें दिसत नाहीं. तो युद्धप्रसंगांतही प्रजेच्या बंदोबस्तांत अंतर पडूं देत नसे; अणखी प्रजांच्या हितार्थ त्याणें नवे नवे कायदे केले होते; आणि संकटसमयीं त्याणें आपला जीव बहुत युक्तीनें वांचविला. चोरघस्तीनें किल्ला घेणें, किंवा मुलुख हस्तगत करणें, आणखी धाकट्या परगण्यांचा बंदोबस्त राखणें, इत्यादि लहान मोठ्या सर्व कामाविषयीं त्याचें चातुर्य सारिखें होतें. तो मोठ्या योग्यतेस आला आणि त्याजवळ बहुत द्रव्य झालें तरी, त्याणें आपल्या कायद्याखेरीज खर्च केलाच नाहीं. अणीक जें विशेष द्रव्य मिळविलेलें त्यापैकीं शिपाई लोकांस देऊं केलें, लोभेंकरून आपणास ठेविलें नाहीं. या गुणावरून असें वाटतें कीं तो अद्वितीय पुरुष होता. परंतु राज्यकार्य करण्यांत, त्याचे बुद्धीस सरळमार्गापेक्षां कुटिलमार्ग चांगला वाटे; हा एक त्याचा दोष,

---

से झालें, तुम्हाविषयीं आम्हास रघोपंतानें लिहिलें आहे कीं तुम्ही निरिच्छ होऊन पहिल्याप्रमाणें आपल्या शरीरास जपत नाहीं; आणि मनोत्साह योग्य दिवसही मानीत नाहीं; तुमचें लष्कर उगेंच बसलें आणखी तुम्ही राज्यकारभार टाकून, विरक्ताप्रमाणें वागूं लागलां. यांणेंकरून मला मोठी चिंता वाटते; आम्ही असें म्हणतों कीं आपले वडील किती सावध होते आणि तुमचा असा स्वभाव कसा झाला; हें तुम्हास योग्य नव्हे. त्यास आजपासून हें विरक्तपण टाकून स्वस्थपणें प्रजेचें पालन करावें. आणि आपलें सैन्य चांगलें राखून उत्तम कामामध्यें मन ठेवावें. सर्व कारभारी यांजपासून चाकरी घेऊन आपली प्रतिष्ठा संभाळावी; जो माझा कनिष्ठ बंधू तूं आहेस त्या तुझी स्तुती मी कानानें ऐकेन तर मला बहुत आनंद होईल. रघुनाथपंत तुम्हाजवळ आहे तो माझाप्रमाणें तुमचा उपयोगी पडेल; जें करणें तें त्याशीं विचारून करावें, मागेंशिं आळशीपणा करूं नये, तारुण्य बहुत उपयोगाचें आहे, यांत वैराग्य कामाचें नाहीं; आतां तुम्ही सावधपणा धरून मला त्याचा प्रत्यय दाखवा.

आणि

आणि त्याणें किति एक वेळा आपलें क्रौर्य, आणखीं घातकपणा प्रसिद्ध करून दाखविला.

त्या शिवाजीची स्तुती करणारे जे मराठे लोक ते ह्मणतात कीं तो अवतारी पुरुष होता. तो आपल्ये कुटुंबांत केवळ साधा, आणि भिडस्थपणानें वागत असे; बाहेर तर सर्वांशीं प्रिय भाषण करी, परंतु कोणाच्या वर्चडपणा होउं देत नसे. त्याचा स्वभाव शीघ्रकोपी असे, परंतु त्याचे सोयरे धायरे व पदरचे लोक यांचे हिताचें फार अगत्य बाळगी. त्याची आकृति लहान. आणि बळापेक्षां चापल्य विशेष होतें; त्याचें मुख सुरेख होतें त्यावरूनच तो गुणवानसा वाटे. त्याचे उंचीपेक्षां हात लांबीस अधिक होते. त्याणें आपल्ये तरवारेचें नांव भवानी ठेविलें होतें, ती तरवार अद्यापि साताऱ्यांत त्याचे वंश्य देवी प्रमाणें पूजितात.

शिवाजीला चौघी स्त्रिया होत्या. एक सईबाई निंबाळकरांची कन्या, एक सोयराबाई ती शिर्के यांची कन्या, एक पुतळाबाई मोहित्यांची कन्या, आणि चवथी एक होती. त्यांत दोघी शिवाजी असतांच मरण पावल्या; आणि सोयराबाई व पुतळाबाई या दोघी होत्या; त्यांत पुतळाबाई शिवाजीचा मरणानंतर महिनां+दीड महिन्यानें सती गेली; सोयराबाई तिचा पुत्र राजाराम, संभाजीची आई सईबाई ती अगोदरच मेली होती. शिवाजीचे मरणापूर्वी आनाजीदत्तो व मोरोपंत वगैरे कोणी मोठे मोठे लोक जवळ असतां शिवाजी बोलिला कीं, माझा मरणानंतर संभाजीचा दुष्टस्वभावेंकरून राज्यास अपाय होईल, असें दिसतें. ही गोष्ट सोयराबाईस कळली तेव्हां तिचे मनांत आलें कीं संभाजी एकीकडेस करून आपला पुत्र राजाराम यास तक्ताधिपती करावा; यास्तव तिणें सर्व प्रधान वश केले, त्यावरून असें ठरलें कीं ते प्रधान ह्मणाले, राजाराम लहान आहे तों पर्यंत त्याचे नावें आह्मी राज्य कारभार चालवूं. ही मसलत सिद्धीस न्यावयाकरितां जनार्दनपंत सुमंत, यास पन्हाळा किल्ल्यास लश्कर सुद्धां पाठविला. आणि रायगडास शिबंदी नवी ठेविली; आणीकही लश्करांचा कांहीं कांहीं बंदोबस्त ठेविला. त्या वेळेस पन्हाळ्यावर संभाजीचा बंदोबस्तास जो हिराजी फरजंत होता, त्यास या साऱ्या मसलतीचें पत्र पाठविलें; तें जासूद किल्ल्यांत देत असतां त्या संभाजीचे हातीं लागलें; तेणेंकरून त्याला सर्व विदित झालें. तेव्हां त्याणें तेथची शिबंदी ब-

---

\+ दीड महिन्यानें सती जावयाचें कारण असें, शिवाजी मरण पावला हें वर्तमान त्याचे कारभारी याणीं संभाजीस न कळावें ह्मणून गुप्त रक्षिलें. त्याचाच कोणी भाउबंद शहाजी भोंसला नामें होता त्याचे हातून त्याचें दहन वगैरे अत्यंत गुप्तपणें करविलीं.

श करून घेतली आणि जे तेथें मुख्य सरदार दोघे होते ते जिवें मारिले; आणखी आपण किल्ल्याचें स्वामित्व करूं लागला. तेव्हां कोणी शत्रु मित्र नजाणतां किल्ल्याचा बंदोबस्त ठेविता झाला. तेव्हां जनार्दनपंत सैन्यासहित आला त्याणें किल्ल्या सभोंवता घेरामात्र घातला, आणि तेथें उगाच महिना दोन महिने राहून, शेवटीं आपण जाऊन कोलापुरांत राहिला. इतक्यांत रायगडीं राजारामास तक्ताधिपती करून राज्यकारभार चालविला, तो सुमार सन सोळाशें ऐशींचा सहावा महिना. नंतर थोडक्यांच दिवसांनीं पेशवे आणि सचिव यांमध्यें वैमनस्य पडलें.

इकडे पन्हाळ्यावर संभाजी होता त्याणें जनार्दन पंताचे लश्करांतले कित्येक लोक वश केले, आणि आपल्या किल्ल्यांतील कित्येक मावळे लोक बरोबर घेऊन, रात्रीस त्या लश्करांतून कोलापुरांत जाऊन जनार्दन पंतास धरून पन्हाळ्यावर नेला. हें वर्तमान मुलखांत प्रसिद्ध झालें तेव्हां हंबीरराव सेनापती संतुष्ट होऊन बोलिला कीं हा शिवाजीचा पुत्र खरा, आणि त्यापासून त्या सेनापतीनें त्या संभाजीची चाकरी धरिली. तसाच मोरोपंतही त्यास अनुकूळ झाला; हंबीरराव संभाजीचे भेटीस गेला तेव्हां तो पन्हाळा सोडून रायगडीं जावयास निघाला. तो तेथें जाऊन पोंचला नाहीं तोंच तेथील शिबंदीनें त्याचें अगत्य धरिलें; आणि इतरही लश्करें त्यास राजी झालीं, तो संभाजी सन सोळाशें ऐशींचा सहाव्या महिन्यांत रायगडीं दाखल झाला.

सन सोळाशें ऐशींपासून, सोळाशें एकुणनव्वद पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून, भाग दहावा.

अनुक्रमणिका.

संभाजी राज्य घेत असतां, त्याणें काय काय निर्दयपणा केला.

त्याणें स्वदेशापासून शिद्दीला हांकून द्यावयाचा उद्योग केला, परंतु तो व्यर्थ गेला.

औरंगजेबाचा पुत्र सुलतान महंमद आकबर, तो आपल्या संरक्षणार्थ, संभाजीजवळ राहिला.

त्या संभाजीचा सावत्र भाऊ राजाराम यास अधिपती करून संभाजीला काढावा असें त्याचे जवळच्या लोकांहीं योजिलें, त्यावरून संभाजीनें कित्येक लोक जिवें मारिले.

मोंगलांनीं

मोंगलांचें लश्कर कोंकणांत गेलें, तें संभाजीनें मागें हटविलें.

त्याणें शिद्दीचा जंजिऱ्यास घेरा घातला; आणि उठून गेला.

मग पोर्टुगीस लोकांशीं युद्ध करूं लागला.

त्याचा वजीर कलुशा याची गोष्ट.

पूर्वी शिवाजीचे वेळेस जो लश्कराचा बंदोबस्त होता, तसा संभाजीचे राज्यांत चालिला नाहीं; त्याचा परिणाम कसा झाला तें प्रकरण.

औरंगजेब दक्षिणेस आला त्या वेळेस, देशाचा प्रकार काय होता तो.

औरंगजेब अहमदनगरास आला त्या वेळचें त्याचे संपत्तीचें स्वरूप कथन, केलें तें प्रकरण.

मोंगलांचे लश्करानें काय आचरण केलें तें.

औरंगजेबानें गोंवळकोंडकरांशीं सल्ला केला.

विजापुर मोंगलांनीं घेतलें तो प्रकार; त्यावर तें राज्य बुडून शहर ओस पडलें.

पहिला झालेला सल्ला मोडून गोंवळकोंडें औरंगजेबानें घेतलें, त्यावरून तें राज्य बुडालें.

हंबीरराव मराठा सेनापती शिरजीखानास जिंकून आपण मरण पावला तो प्रकार.

कर्नाटकांत काय काय वर्तमान झालें तें.

संभाजी केवळ अयोग्य, असें समजून सुलतान महंमद आकबर निघोन गेला.

नंतर दक्षिण देशाची दुर्दशा झाली, तें प्रकरण.

इंग्रेज लोकांनीं समुद्रांत उपद्रव केला, तो प्रकार.

संभाजी आपल्या वजिरासुद्धां औरंगजेबाचे कैदेंत सांपडला.

त्या दोघांचें मरण.

भाग दहावा.

संभाजी शिवाजीचें मरण कळल्यावर केवळ पराक्रमें करून वागूं लागला; त्यावरून लोक कल्पना करूं लागले, कीं आतां याणें आपलें दुर्लक्षण टाकिलें; आणि त्याप्रमाणें त्याची स्तुतीही करीत होते; परंतु तो गयगडीं पोंचतांच त्याचें क्रूरपण लोकांत प्रसिद्ध झालें. तें असें आनाजी दत्तो, याचे बिडी घालून बंदींत टेविला; आणि त्याची सारी दवलत घेतली; आणखी आपला सावत्र भाऊ राजाराम, त्यालाही बंदींत टेविला. आणि त्याची आई

सोयराबाई

सोयराबाई, ती आपल्या समूर आणून तिला नानाप्रकारें अमर्याद बोलून, असें ठरविलें कीं, हिणें आपला पती विष घालून मारिला; त्यास आतां हीचे हाल करून मारावी, अशी आज्ञा केली. तेणें करून ती मरण पावली. आणखीजे तिजकडचे सरदार होते, त्यांचीं डोकीं मारिलीं. आणि एक सरदार फारच तिचा अगत्याचा होता, त्याचा कडेलोट केला. अशा क्रूरपणानें तो लोकांचा मनांतून उतरला. तेव्हां ते लोक याचा प्रारंभच दुःशकुन असें ह्मणूं लागले, मग सन सोळाशें ऐशींचा आठव्या महिन्यांत त्याला राज्याभिषेक झाला, त्यापासून मुलखांत लोकांसही दुःशकुन दिसूं लागले.

संभाजीस राज्याभिषेक झाल्यावर, प्रथम त्याणें जंजिऱ्याचा शिद्दीशीं युद्ध केलें. तें युद्ध पूर्वी शिवाजी असतांही, निरंतर चालत होतें: शिवाजीनें आपल्या मरणाचे पूर्वी एक वर्ष, मुंबईचे जवळ लहान लहान दोन बेटें आहेत, एकाचें नाव उंदेरी, एकाचें नाव खांदेरी, त्यांत शिवाजीनें उंदेरी बेटावर किल्ला बांधिला, तो शिवाजी पासून घ्यावयास उद्युक्त झाले; परंतु तो अर्थ सिद्धीस गेला नाहीं. नंतर दुसऱ्या खांदेरी बेटावर शिद्दीनें किल्ला बांधिला; तो घ्यावयाचा उद्योग शिवाजीनें केला, तोही सिद्धीस गेला नाहीं. असे ते दोघे किल्लेदार लढत होते.

सन सोळाशें एक्यायशींत संभाजी पन्हाळ्यास जाऊन राहिला; तेथेत्यास असें वर्तमान समजलें कीं, औरंगजेबाचा पुत्र महंमद आकबर याणें बंड करून बापाशीं लढणार होता तें त्यास कळलें, तेव्हां पळून आपणाकडे आश्रय मागावयास आला; यास्तव आपला कोणी मोठा मानकरी त्याचे भेटीस पाठवून, त्याची दत्तसे गांवीं राहावयाची सोय केली; परंतु आपण कांहीं कामानिमित्त गेला नाहीं. इतक्यांत, आनाजीदत्तो याचा पक्षपाती लोकांनीं, त्या महंमदाशीं राजाराम याचा हिताविषयीं संभाजीचा घाताची कांहीं मसलत केली. तें वर्तमान संभाजीस कळून, त्याणें महंमदास अपराधी जाणला; इतक्यांत त्याणेंच संभाजीस कळविलें कीं, इकडे याप्रमाणें वर्तमान आहे; तेव्हां संभाजी मोठ्या समारंभानें त्याचे भेटीस गेला. मग त्याणें आनाजीदत्तो व, शिरके कुळांतील जे मुख्य सांपडले, ते व परभू बाळाजी आजी चिटनीस वत्याचा पुत्र, व त्याचा दुसरा कोणी एक भाऊबंद, इतके हत्तींचा पायीं दिले. यानंतर शिरके कुळांतील जे कोणी मोठे मोठे राहिले, ते भयें करून पळाले; आणि कित्येक मोगलांचा चाकरीस राहिले. त्याचा अशा अन्याय कर्मांहीं सारे लोक त्यास कंटाळले. कां कीं आनाजीदत्तो शिवाजीचे वेळेस बहुत उपयोगीं पडला; आणि तो जातीचा ब्राह्मण होता.

त्या

त्यावेळेस संभाजीचे जवळ हिंदुस्थानांतून आलेला कन्होजा एक ब्राह्मण कलूषा नामें होता, तो गुप्तपणें संभाजीस मसलत देत असे, त्याप्रमाणें संभाजी वागे. त्याणें शिकविलें कीं, मोरोपंत पिंगळा पेशवा, यास बंदीस घालावा; कांकिं, त्याणें आनाजी दत्तो, याचा मरणावरून तुमची फार निर्भत्सना केली, आणि आपणही कंटाळला असें दर्शविलें म्हणून.

त्यासमयीं रघुनाथ नारायण हणमंते, याणें आपलें संस्थान, दुसऱ्यास संभाळावयास सांगून, कर्नाटकांतून निघोन, संभाजीचे भेटीस रायगडीं आला. त्याणें आपल्ये बरोबर कांहीं वसुलाचें द्रव्य आणिलें होतें, म्हणून संभाजी त्याचा संमानास मोठें दरबार जमाकरून भेटला. तो रघुनाथ नारायण, मोठा धैर्यवान होता; त्याणें त्याच समयीं अनीतीविषयीं संभाजीस निषेधिलें, आणि बोलिला कीं, जर तुम्हीं पुरातन सेवकांचा असा घात कराल तर लवकरच नाश पावाल.

तो रघुनाथ नारायण एवढ्या धैर्यानें बोलिला त्या गोष्टीचें आश्चर्य वाटेलच; कांकीं त्याचा भाऊ जनार्दन पंत तोही संभाजीचा बंदीत होता; परंतु विचारें करून पाहिलें असतां, संभाजीस अशी शंका होती कीं, जर यास कांहीं उपद्रव केला, तर, कर्नाटक प्रांत हातचा जाईल. यास्तवच त्याणें जनार्दन पंत व मोरोपंत पिंगळे, यांस सोडिलें. आणि रघुनाथ नारायणाचा संमान करून कर्नाटकांत जाऊं दिला. तो जातांनां वाटेनेंच मृत्यु पावला; तरी जनार्दन पंताला संभाजीनें त्याचे जागीं स्थापिला. याशिवाय संभाजीनें त्यावेळेस कर्नाटकचा हरजी राजा, जास रघुनाथ नारायणानें आपल्ये जागीं ठेविला होता, तो तसाच रक्षिला. यावरून संभाजीचें आचरण कांहींसें बरें दिसूं लागलें. परंतु तें टिकलें नाहीं; त्या कलुषाचा संगतीनें नष्ट झालें.

संभाजी आणि महंमद आकबर, यांची मैत्री झाली त्यावेळेस, लोक कल्पना करूं लागले कीं, हा औरंगजेबाचें राज्य घेऊन, महंमदास स्थापील. परंतु त्याणें आपल्या नीचपणाप्रमाणें केवळ क्रोधवश होऊन गर्विष्ठतेनें, मोठीं मोठीं कामें टाकून शिद्दीचा अनिष्ट करावा हेंच मोठें कार्य. असें मानून, जंजिरा मात्र घ्यावयाविषयीं बहुत श्रम केले. परंतु तोही अर्थसिद्धीस गेला नाहीं. त्यानंतर त्याणें लढाऊ गलबतें जमा करून, शिद्दीचा लढाऊ गलबतांशीं युद्धें केलीं; त्यांतही ठाण्याचे खाडीजवळ संभाजी पराभव पावला. तेव्हां तो क्रोधयुक्त होऊन, तेथें इंग्रेज व पोर्तुगीस लोक होते, त्यांस बोलूं लागला कीं, तुम्हीं माझा पक्ष स्वीकारीत नाहीं, आणि माझा शत्रूला आश्रय देतां; यास्तव तुम्हांही शत्रूच आहांत. हें वर्तमान सन सोळाशें च्यायशींत घडलें.

नंतर

नंतर पोर्तुगीस लोकांचे गांवांस तो उपद्रव देऊं लागला; आणि मुंबेचा वांकणांत घारापुरी नामें एक बेट आहे. तेथें मुंबेस उपद्रव करावयाकरितां किल्ला बांधित होता; परंतु त्यास असें वर्तमान समजलें कीं, औरंगजेब मोठ्या तयारीनें येतो आहे; तेव्हां तें काम तसेंच राहिलें.

संभाजीचा कारकिर्दीत मोरोपंत पिंगळा बंदीस घातल्यापासून मुख्य कारभारी कलूषा झाला. पुढें बंदांतून सुटल्यावर मोरोपंत लवकरच मेला. कलूषाशिवाय संभाजी दुसऱ्याचें ऐकत नसे; आणि त्याचे वर्गा वांचून कोणी समूर आला असतां, त्यावर रागें भरून त्याचें पारिपत्य करी. संभाजी इतका त्या कलूषाचा स्वाधीन झाला, त्यावरून लोक ह्मणत कीं यास कांहीं तरी, पक्कें वशीकरण साधलें आहे. त्या कलूषास लोक फार निंदीत होते, परंतु तो मोठा मनमिळाऊ होता, आणि तो कवी असे, परंतु राजकारभारास अयोग्य होता; त्यास संभाजीनें प्रधानांमध्यें पंडितराव असें पद दिलें. प्रधान असा दुष्ट, आणि राजा याप्रकारचा, तेणेंकरून शिवाजीचे वेळेस जे बंदोवस्त होते, ते सर्व मोडूं लागले. त्यांत प्रथमतः लष्कराचा बंदोबस्त बिघडला, तो असा, जे लष्करचे चाकर शिपाई लोक होते, त्यांखेरीज लोकांतही ज्याचा मनास येईल त्याणें स्वारी निघाली ह्मणजे बरोबर जावें. कोणास कांहीं लूट सांपडली असतां, त्याणें ती संभाजीस कळवूंच नये; आणि लष्करामध्यें बायकाही बरोबर न्याव्या; आणखी लोकांचा बायका धरून नेऊन विकाव्या. स्वारी माघारी आली ह्मणजे लोकांस पैका द्यावयास मिळेना ह्मणून, लूट करावयाची आज्ञा दिली होती.

संभाजी भलत्याच जागीं खर्च करीत होता यामुळें, थोडक्याच दिवसांत खजिना संपला असतां, त्या कलूषानें त्यास बुद्धि शिकविली कीं, स्वारी केल्यानें द्रव्य मिळत नाहीं, तर रैतेपासून वसूलच अधीक घ्यावा. तेव्हां त्याणें तसेंच केलें, परंतु जमाबंदीचे वेळेस असें समजलें कीं, शिवाजीचे वेळेपेक्षां जितका चढ केला, तितका तोटा आला. त्यावरून तो समजला कीं, यांत सुभेदार, व पाटील, व जमेदार, इत्यादिकांचें कांहीं कृत्रिम आहे; यास्तव त्यांस दूर करून, सर्वकामें मरयत्यानें सांगीतलीं; तेव्हां रैतेनें त्रासें करून गांव टाकिले; येणेंकरून संभाजीचा राज्यांत नाशप्रसक्ति झाली. या खेरीज त्याचवेळेस औरंगजेब दक्षिण घ्यावयाकरितां दिल्लीहून बऱ्हाणपुर पावेतों आला होता. तें वर्ष सन सोळाशें व्यायशीं. त्यावेळेस गोंवळकोंडकरांचें व विजापुरकरांचें काय काय वर्तमान होतें तें समजलें पाहिजे.

हैदराबादेंत अबूहुसेन बादशाह होता. त्याजवळ बहुत द्रव्य आणि

सेना

सेना मोठी होती; व त्याचा कारभारी अत्यंत शहाणा, हिंदू ब्राह्मण, मादण्णापंत नामें होता, तो त्या राज्यांत जितके हिंदुलोक होते, त्यांस अत्यंत प्रिय वाटे; परंतु तेथचा मुसलमानास तो जातीचा ब्राह्मण, आणि डोयजड ह्मणून फारच विषमवाटे; या खेरीज औरंगजेबाचा वकिलानीं, तेथचा कारभारी लोकांतवेम नस्यें पाडिली; तथापि, अबूहुसेन त्या मादण्णापंताची योग्यता जाणून, त्या वांचून दुसऱ्याचा विश्वास धरीत नव्हता.

या पूर्वी गोंवळकोंडयाचें राज्य ह्मटलें आहे, तें, हैदराबादचें असें समजावें.

विजापुरास औरंगजेबाचा वकील होता, त्याचें नाव, मलिकबेरखोर दार, त्याणें त्या दरबारचे कित्येक कारभारी, व कित्येक सरदार लोक वश केले; त्यांमध्यें एक मुसलमान शिरजीखान नामें सरदार तो त्या सर्वांपेक्षां प्रतापी होता, त्याशीं पूर्वी मसाउदखानाचें, सेनेसंबंधें कांहीं वांकडें पडलें होतें, ह्मणून, त्याणें एक सैयद मखदूम मानकरी यास मसाउदखानाचे जागीं स्थापावयाची योजना केली होती; आणि तो मसाउदखान, राज्यकारभार टाकून, शिवाजी मेल्यावर एका वर्षानें विजापुर सोडून आंदोणीस जाऊन राहिला होता, तेव्हां तेथचा राज्यकारभार कोणी चालविला तें कळत नाहीं; परंतु इतकें समजतें कीं, औरंगजेबाचा वकिलानें, विजापुरकर, व मराठे लोक यांशीं स्नेह नसावा ह्मणून, शिवाजीनें घेतलेला, कृष्णेचे कांठचा मुलुख होता, तो, त्यांस माघारा घ्यावयास शिकविलें; त्यावरून त्याणीं फौज पाठवून, तो मुलुख घेतला, तेणेंकरून त्यांचे स्नेहांत तूट पडली; असें त्या वकिलाचें छल शेवटास न जातें तर, हैदराबादचा कारभारी मादण्णापंत याचे बुद्धीस आलें होतें कीं, हे दोन्हीं एकचित्त करून औरंगजेबाचें कांहीं चालूं देऊं नये, ती मसलत उपयोगास पडती परंतु तें नघडलें. या खेरीज विजापुरचे राज्याचा नाशाचें कारण अणिक एक झालें, तें असें, शिवाजी असतां, त्या मसाउदखानानें कित्येक स्वार दूर केले, ते, शिवाजीकडे जाऊन राहिले; तो निवर्तल्यावर, ते संभाजीजवळ होते; त्याच वेळेस विजापुरचे मनसबदारही कित्येक संभाजीकडे राहिले होते, असेंच मराठे मनसबदार निजामशाहींत होते जे त्यांचे कित्येक भाऊबंद संभाजीचा लश्करांत चाकरीस राहिले होते, यावरून, कित्येक ते लोक आपल्या वतनासाठीं निरंतर भांडत, आणि त्यावादाकरितां जो सबळ पक्ष असेल, तिकडे मिळोन वतन घ्यावयाचा अभिमान शेवटास न्यावा ह्मणून, कित्येक आपला धर्मही टाकीत असेत.

औरंगजेब बऱ्हाणपुरास येऊन कित्येक महिने मुलखाचा वसुलाचा

बंदोबस्त

बंदोबस्त व हिंदुलोकांवर जिजीयानामें कर बसविणें, व दक्षिणेंत स्वारी घालाव-याची तयारी करीत होता. प्रथम त्याणें सुलतान माजूम यास शाहअलं असें मोठें पद देऊन, संभाजीचा मुलखांतील दक्षिणे कडचा मुलुख घ्यावयास पाठविला, आणि त्याचे उत्तरे कडे खानदेश लगत्याचे किल्ले व मुलुख घ्यावयास, सुलतान आजीम यास पाठविला, आणि आपण बह्राणपूर सोडून ओरंगाबादेस आला. मग सुलतान माजूम आंबेदराघाटानें कोंकणपट्टींत आऊन, कालियानी परगण्यांतून, रायगडापासून वेंगुर्लें व मालवण पर्यंत मुलुख लुटून जाळून टाकिला, सुलतान् आजिम साल्हेर किल्ला घ्यावयास गेला, त्याचे हातीं तो किल्ला दग्यानें सहज लागला; परंतु पुढें पुढें त्याचें काहीं कार्य सिद्धीस गेलें नाहीं तेंव्ह ओरंगजेबानें, त्यास माघारां बोलावून, त्याचे जागीं शाबूदिन खान नामें दुसरा सरदार पाठविला. तो फार गर्वानें आला, परंतु जय न पावला. रामशेज किल्याजवळ त्याचा फार नाश होऊन तो मागें हटला.

इतक्यांत सुलतान माजूम आपण मुलुख ओस पाडिल्यानें, आणि संभाजी विशाळगडीं होता, त्याचा लोकांचा उपद्रवामुळें, उपाशीं मरूं लागला. तेह्मां ओरंगजेबानें शाबूदिनखान यास घाटाचा वाटा मोकळ्या करायास पाठविला, आणि सुरतेचा जो मुख्य अधिकारी त्यास आज्ञा केली, कीं गलबतांत दाणा भरून दंडाराजपुरी व वेंगुरलें, यास पोंचता करावा. तें निकडीचें काम ह्मणून त्या सुरतवाल्यानें एकक गलबत भरून पाठविलें, तें वर्तमान संभाजीचा लढाऊ गलबतांस कळून, त्याणीं तीं गलबतें बहुतेक लुटलीं; त्यांतली कांहींशीं गलबतें जाऊन पोंचलीं, तितक्यानें साहित्य पुरेसें झालें नाहीं, ह्मणून सुलतान माजुम सैन्यसुद्धां आंबेघाट चढून कृष्णेचे कांठीं वळवें गांव यास पर्जन्य काळीं राहिला; हें वर्तमान सन सोळाशें चोन्यायशींत घडलें.

जो शाबूदिन खान सुलतानाचे कुमकेस पाठविला, त्याची व संभाजीची गांठ पडली, तेह्मां त्या दोघांचें कांहींसें युद्ध होऊन, शाबूदिन जय पावला. हें वर्तमान ओरंगजेबास कळून, तो मोठा लाभ नसतांही शाबूदिन, त्याचे कृपेंतला व त्याजवळ अस्सल मोंगल होते त्यांचें मन संतुष्ट व्हावया करितां, त्या शाबूदिनाचा मोठा संमान करून, त्यास गाजीबुदिन, असें नवें नाव दिलें; त्या पुढें दक्षिणेंत जें निजामउलमुलुख नामें कुळ विख्यात झालें, त्याचा तो शाबूदिनखान मूळपुरुष.

मग पाउसकाळ गेल्यानंतर ओरंगजेब दक्षिणेंत मोठ्या समारंभा-

+ जिजियाकर ह्मणजे, आजवळ हजार रुप्ये त्याणें वर्षास साडेसाहा रुपये द्यावे.

नें चालूं लागला.

तेव्हां त्याणें आपल्या राज्यांतल्या सर्व प्रांतांतील सैन्य बळकून जमा केलें होतें. त्यांत उत्तरेकडचे लोक यांचीं शरीरें मोठीं आणखी आंगांतून चिलखतें चढविलेलीं तीं जड लोखंडाचीं व त्यांचे घोडेही, मोठे मोठे आणि पुष्ट, असें पाहिलें असतां दक्षणी लोक त्यांपुढें केवळ सुकुमार दिसत; तसेंच पायदळांमध्यें, कित्येक चापाचे बंदुकवाले, व कित्येक तोडयाचे बंदुकवाले, व कित्येक तीरकमाणवाले असत. त्यांचा सरंजाम बहुत उत्तम होता, आणि लहान व मोठया तोफा पुष्कळ असत; व गोलंदाजांमध्यें फिरंगी होते; याखेरीज कित्येक ओझीं वहावयाचे, व कित्येक लढाऊ असे हत्ती बहुत होते. त्या औरंगजेबाचा दिल्लीमध्यें जसा बेत चालत होता, त्यांत किमपि अंतर न पडतां, प्रवासांतही तसाच चालत असे. त्याचा शिकारखानाही बरोबर होता. त्याचा डेऱ्यांचा सभोंवती लावायाची कनाथ सोळाशें हात लांब होती; त्याचा कचेरीचा डेऱ्यांत व एकांतीं मसलत करावयाचा डेऱ्यांत, त्याचें बसावयाचें रत्नजडीत सुवर्णाचें अत्यंत सुंदर सिंहासन मांडलेलेंच असे, याखेरीज अंतःपुरसंबंधी विषयोपभोगार्थ, कित्येक डेरे असत; आणि स्नान संध्येसारिखें त्या लोकांचें कांहीं नित्यकर्म आहे, त्या कामाचेही कित्येक होते, तितक्या ठिकाणींही विलायती सखलादा व मखमालेचीं आस्तरणें, इत्यादिक व सुवर्णयुक्त नानाप्रकारचीं वस्त्रें मोठीं मोठीं उंच परिपूर्ण, ज्यांचा तोटाच नाहीं.

त्यांत जावयाचे वाटेवर दोहीं बाजूनें, तोफा ओळीनेंच उभ्या केलेल्या; त्यांमधून आंत जातांच पहिला डेरा नगारखान्याचा लागावा; त्याहून पुढें गेलें ह्मणजे खासगीचा चवकीचा लोकांची पहारा करावयाची जागा, त्या कामावर नित्य नवा उमराव जात असे.

त्याचे भोजनसंबंधीं डेरे, मेवा मिठाई खावयाचा व पाणी गार करून ठेवावयाचा, व तांबूल भक्षणाचा या सर्व प्रकरणीं निरनिराळे डेरे असत. त्याचा वाटेनें याप्रमाणें सरंजाम होता ह्मणून आश्चर्य वाटेल; परंतु असें समजावें कीं, असेच त्याचे लहान मोठे सर्व पदार्थ दुहेरी होते; तेणेंकरून त्याची स्वारी कधीं मुकाम सोडून दुसरे मुकामीं गेली असतां, कोणत्याही गोष्टीची त्यास न्यूनता नसे. स्वारी मुकामीं येऊन पोंचली ह्मणजे पन्नास तोफा सोडाव्या असा नेम होता. याखेरीज तो आपल्ये राजधानींत असतां, त्याचा ज्या ज्या रीति चालत होत्या, त्या मार्गानेंही सर्व तशाच चालत असेत.

त्यास अशी संपत्ती असोन, तो स्वयें सर्व विषयोपभोग लोकप्रशंसे

साठीं

साठीं. गरिबाचे प्रमाणें करी; तेणेंकरून, त्याची प्रजा त्यास फार मानीत असे. याप्रमाणें खटलें त्याणें प्रवासांतही बरोबर चालविलें, त्यावरून त्याचे सरदारही आपआपलें खटलें वाढवितें झाले. त्या योगानें लष्कराचा पसारा भारी होऊन, खर्च फार लागूं लागला; यास्तव थोडक्याच अवकाशानें द्रव्याचा तोटा आला; आणि लष्कराची कांहीं मसलत त्वरेनें होइनाशी झाली.

सुलतान माजूम वाळव्यामध्यें राहिला असतां, त्या गांवाचे जवळचा आसमंतात् मुलुख त्याचे हातीं लागला तितका त्याणें घेतला. त्यापासून, विजापुरकरानीं दिलेल्या वतनादिकांचा सनदांत, त्याणें आपलें नांवमात्र घातलें; आणि पूर्वींचा नेमाप्रमाणें चालविलें, तें हा काळमर्याद चालत आलें.

त्या सुलतान माजुमाचे लष्करांत, पर्जन्यकाळाचे शेवटीं, कांहीं रोगेंकरून लोक बहुत मेले तेणेंकरून, लष्कर कमी झालें. असें असतांही बादशाहाची अशी आज्ञा आली कीं, विजापुरकरांचा शिवाजीनें घेतलेला निर्ऋती दिशेचा मुलुख, संभाजी कडे आहे, तो सर्व घ्यावा. असें लिहिलें येतांच तो तेथून निघोन गेला; त्याणें गोकाक व धारवाड व हुबळी हीं तीन्हीं घेतलीं. अणीकही, मुलुख घ्यावा परंतु रोगामुळें माणसांचा तोटा पडला; आणि घेतलेल्या मुलखांत जागोजाग रक्षणार्थ, माणसें ठेवून, त्यास आपलेंच संरक्षण करावयाचें कठीण पडलें. यास्तव कंटाळून तो माघारा अहंमदनगरास आला. हें वर्तमान सन सोळाशें पंचायशींत घडलें.

त्याच वर्षीं संभाजीचा, हंबीरराव कोंकणांत लष्करसहित होता; त्यास वर्तमान कळलें कीं, खानदेशांत कोणी रक्षक नाहीं; त्यावरून त्याणें लष्कराचा लहान लहान टोळ्या करून, उत्तरे कडे जाऊन ते सर्व लोक बह्राणपुरावर एकेजागीं मिळविले, आणि तें शहर लुटलें. तेथें त्यास बहुत द्रव्य मिळालें, नंतर तो तेथून माघारें येतांना त्याणें बह्राणपुरापासून, नाशिकपर्यंत, मुलुख लुटून जाळून टाकिला. तेव्हां औरंगाबादेहून, खानजहान नामें सरदार आला, तो त्याचे पाठीस लागला; परंतु त्याची व याची गांठ पडली नाहीं.

त्यापुढें कांहीं एक महिने गेल्यानंतर, औरंगजेब लष्करसुद्धां सोलापुरास+ गेला; आणि जुनरास जें लष्कर मोंगलांचें होतें तें औरंगाबादेस पाठविलें. तेणेंकरून उत्तरेची वाट मोकळी सांपडली ह्मणून, मराठे लोकांनीं मोठ्या त्वरेनें तापी व नर्मदा उतरून जाऊन, भडोच लुटली. त्यावेळेसही तेथचें द्रव्य ते स्वस्थपणें आपल्या मुलखीं घेऊन गेले. आणि त्यांबरोबर

\+ तें सोलापुर पूर्वीं, सुलतान आजिमानें घेतलेलें होतें.

होता

होता जो महंमद आकबर, त्याला बादशाहाचें पद देऊन, हाच बादशाह,औरंगजेब नव्हे, असें लोकांत प्रसिद्ध केलें.

वऱ्हाणपूर व भडोज हीं दोन्हीं औरंगजेबाच्या अविचारानें लुटलीं गेलीं; कांकीं, तो दुसरीं राज्यें घ्यावयाचा उद्योग करीत असतां त्याणें आपल्या राज्याचा बंदोबस्त चांगला ठेविला नाहीं.

औरंगजेबाचे मनांत पूर्वीपासून फार दिवस होतें कीं, विजापुरकरांचें राज्य बुडवावें; यासाठीं, त्याणें सन सोळाशें शायशींचा प्रारंभीं, आपला पुत्र, आजिमशाह, यास बरोबर सैन्य देऊन विजापुरावर पाठविला. त्याचे आदले वर्षी तेथें पर्जन्य कमी पडला, तेणेंकरून त्या मुलखीं पीक थोडें झालें होतें; तेंही त्याणीं जमाकरून किल्ल्यांत नेलें. म्हणून आजिमशाह याचे लष्करास अन्न मिळेनासें झालें. तेव्हां बादशाह याणें सोलापुराहून पाठवावें. परंतु तें घडेना कांकीं तिकडेही तोटा पडला होता; यारवेरीज, विजापुरकरांचे लष्करी लोक आजिमशाहाचा लष्करावर त्यांच्या घालीत; त्यामुळें त्या लश्कराचा फार नाश झाला. असें पाहून बादशाहानें अहंमदनगरास गाजिवदिन सरदार होता. त्यास आज्ञा केली कीं, वीसहजार बैल गोण्या भरून, त्यांबरोबर आपण सैन्यसुद्धां जाऊन विजापुरावर सुलतानआजिमास पोंचत्या कराव्या. अशी आज्ञा पोंचतांच तो तेथून धान्य घेऊन निघाला. तें वर्तमान विजापुरकर यांस कळलें. तेव्हां त्याणीं तो अर्थ सिद्धीस गेला असतां, आपणास बाधक होईल, असें जाणून त्यांवर सैन्य पाठविलें. त्या दोहीं लश्करांची गांठ पडतांच, मोठें युद्ध होऊन, विजापुरकर पराभव पावले; तेणेंकरून आजिमशाह याजवरचें मोठें अरिष्ट टळलें; त्याची बायको जानी बेगम, ती त्या लश्कराबरोबर त्याकडे जात होती, ती त्या लढाईत हत्तीवर बसून, मध्यें शिरून, आपल्या लोकांस धीर देत होती; हा येक त्या युद्धांत मोठा चमत्कार झाला.

यानंतर औरंगजेबही विजापुरास येऊन पोंचला; तें शहर मोठें विस्तीर्ण यास्तव सर्वसैन्यानें त्याचा तट वेष्टिला. नंतर त्याणें तो कोट ढांसळावयाकरितां, जागोजाग मोरचे लावून, खंदारें पाडिलीं.परंतु हल्ला नकेला; कांकीं त्यास असें पक्कें समजलें होतें कीं, या लोकांस अन्न मिळेनासें झालें म्हणजे, थोडकेच दिवसानीं कंटाळोन आपल्याआपण किल्ला देतील. शेवटीं त्याच वर्षाचा दहाव्या महिन्यांत त्याणीं आपल्या संतोषानें किल्ला दिला. औरंगजेबानें शिरजीखान नामें एक विजापुरकरांचा मोठा सरदार होता, त्याला मोठी मनसब देउन रुस्तुमखान असें

सें त्याचें नवेंच नांव करून, आपल्ये चाकरीस ठेविला. त्याखेरीज त्याचे दुसरे जे कोणी मोटे मोठे सरदार होते तेही ठेविले.

यानंतर तें राज्य बुडून, तेथचे रहाणारे लोक लागलेच निघून गेले. आणि शहर ओस पडलें. त्या नगराचा तट चिरेबंदी आहे, तो अद्यापि नवा केल्यासारिखा दिसतो; आणखी त्यांत मोठे मोठे मनोरे व उंच उंच घुमट आहेत ते फार दूरून दिसतात. तेथें जाणारास तें शहर बाहेरून पाहून असें वाटतें कीं एथें वस्ती मोठी दाट आहे; मग आंत जाऊन पाहिलें असतां, जिकडे तिकडे कोस कोस पर्यंत ओसाडी आणि मोठ मोठ्या हवेल्या मोडक्या, त्यांतून रानें वाढलेलीं दृष्टीस पडतात; तेणेंकरून चित्त उदास होतें; तेथें रहाणारे लोक केवळ गरीब, आणि ती वस्ती अगदीं थोडी. त्या शहराचा घेरा पंधरा कोसांचा, त्याचा मध्यभागीं किल्ला आहे, त्याला दुहेरी तट, आणि त्या सभोंवता खंदक आहे. त्या किल्ल्यांत मुख्य बादशाह रहावयाची जागा पुरातन बांधलेली अति सुंदर आहे, ती आतां मोडलेली दिसत्ये; +शहरासभोंवता एकेरी कोट, त्याचे बाहेरून खंदक आहे.

असा विजापुरचा नाश करून औरंगजेबानें गोंवळकोंड्याचा नाशाविषयीं उद्योग केला. त्यापूर्वी नुक्ताच सुलतान माजुमानें त्यांशीं सल्ला केला होता, तो न मानितां त्याणें अयुक्त केलें, तें असें, त्याचा वकील तेथें होता त्यास लिहिलें कीं, अबूहुसेनास कांहीं भय प्रदर्शनादि करून, त्यापासून कांहीं द्रव्य व अलंकारादि, आह्मासाठीं घ्यावें; त्यावरून त्याणें त्या प्रमाणें केलें. तेव्हां त्याणें भिऊन आपल्या बायकोचा अंगावरचा अळंकारांसहित जामदारखान्यांतले, सर्व अळंकार व द्रव्य आपणास बादशाह प्रसन्न होईल अशा आशेनें दिले. तथापि औरंगजेबानें तें सर्व घेउन, युद्धाची तयारी केली; आणि मुलखांत असें विदित केलें कीं, अबूहुसेन बादशाहपदवीस केवळ अयोग्य; जाणें आपल्ये जातीखेरीज ब्राह्मण मुख्य प्रधान केला; आणि आमचा धर्म मानित नाहीं असा जो संभाजी त्याशीं सख्य केलें, यास्तव आह्मीं त्याशीं युद्ध करणार. हें वर्तमान सन सोळाशें सत्यायशींत घडलें. त्यासमयीं, अबूहुसेनाजवळचे कित्येक लोक त्यास सोडून गेले; आणि कोणी इमानी चाकर होते तेमात्र थोडके

\+ तें शहर बाजिरायाचें राज्य गेल्यापासून, सातान्याचा राजाचे स्वाधीन झालें, त्यापासून त्याणें आपल्या महत्वानुरूप, तेथचा कांहीं बंदोबस्त करून त्यांतील उत्तम स्थळांची डागडुजी केली; त्यांत महंमद आदिलशाह याची कबर आहे तिची एकशें चवतीस हात उंची, आणि एक्यायशीं हात रुंद घुमट आहे.

से त्याजवळ राहिले.

मग तो अबूहुसेन, त्या राहिलेल्या लोकांसह वर्तमान गोंवळकोंड्यांत राहून, सात महिने पर्यंत मोठ्या शौर्येंकरून लढला. शेवटीं तो किल्ला मोंगलानीं दगा करून घेतला. आणि तो अबूहुसेन धरून दौलताबादच्या किल्ल्यामध्यें औरंगजेबानें बंदींत ठेविला. तो मेल्यावर, प्रौढप्रतापी, सदय, तानाशा असें त्याचें नांव पडलें. त्याचें मूळ काय तें आतां समजत नाहीं, परंतु असें वाटतें कीं, कोणी एक हुसेनाचा अत्यंत हितकर्ता त्या नावाचा त्याचा गुरू असेल.

पूर्वी औरंगजेब गोंवळकोंड्यास घेरा घालूं लागला, त्यासमयीं, विजापुरास त्याणें आपला एक फौजदार+ ठेविला होता. आणि दुसरा फोजदार, काशीमरवान नामें कृष्णेचे दक्षिणेस पाठविला. आणीक विजापुरकरांचा पहिला चाकर, शिरजीरवान नामें होता तो, संभाजीला जिंकावयास नेमिला, दुसरा एक, गाजीवदिन, त्याला विजापुरचे अग्नायी दिशेस योजिला. अशाप्रकारें विजापूर व गोंवळकोंडे संबंधें मुलुख, आपल्ये हातीं लागावा ह्मणून, औरंगजेबानें यत्न केला. त्याचा फोजदारानीं काय काय केलें तें वर्तमान आधीं लिहिलें पाहिजे; मराठी लोकांचें वृत्त पुढें लिहिण्यांत येईल.

मोंगलांचा सरदार गाजीवदिन यास आंदोणी किल्ल्यांत विजापुकरांचा पुरातन मुख्य कारभारी मसाउदरवान होता, त्याणें युद्ध करून परिणाम नीट होणार नाहीं सें जाणून किल्ला दिला. परंतु औरंगजेबाचे चाकरीस राहिला नाहीं. विजापूर व कलबुरगा, या दोहोंमध्यें सगर नामें किल्ला आहे, तेथें एक बाराहजार बेरडांचा नाईक पाळेगार होता, आणि तो किल्ला मोठा सुदृढ असे. आणखी ज्याचे सभोंवती झाडी व दाट रान बहुत होतें. असें असतांही, त्या नाइकानें मोंगलाचें नांव ऐकूनांच भिऊन किल्ला दिला. त्या औरंगजेबाची रीति अशी होती कीं, कोणी आपल्या संतोषेंकरून स्थान दिलें तर, त्याचा मोठा संमान करावा. ह्मणून त्याणें मोठे मोठे लोक व मनसबदार हासतील, हा अर्थ मनांत न आणितां, त्यास मनसबदारांचे पदवीस चढविला. नंतर तो बेरड थोडकेच दिवसानीं, कांहीं आजार होऊन मृत्यु पावला. त्याचा पुत्र फेमनाईक, त्यास मोठ मोठ्या माणसांत वाग-

+ फोजदार ह्मणजे ज्यास लश्करांत चाकरी असून प्रांतांतील वसुलाची जमाबंदी त्याचे हातून होत असावी.

णें ठीक पडेना, यास्तव त्यांतून निघून वाकीणकेरा गांवीं राहून पाळेगारपणा करूं लागला. त्यापुढें विसांवर्यांनीं असें झालें कीं, एवढा मोठा औरंगजेव, परंतु त्यासही त्याचा पारिपत्या करितां स्वारी करावी लागली. ती त्याची शेवटची मोहीम.

गोंवळकोंडें घेतल्यानंतर, बादशाहाचें लश्कर विजापुराकडे येऊन उतरलें. मग तेथून चहूंकडे राज्याचा संपूर्ण बंदोवस्तास निरनिराळ्या स्वांऱ्या नेमिल्या. या योगेंकरून व पूर्वी जा स्वांऱ्या पाठविल्या होत्या, त्यामुळें गोंवळकोंड्याचा पूर्वेचा मुलुख, व राजमंड्री शहर, व वंदर मासुलीपटन, बंदर गांजाम, त्याचे स्वाधीन झालें. आणि खडपा, व खोनजेबेराम, व पुनामाळी, यांचे कारभारी येऊन मिळाले. याखेरीज विजापूर व गोंवळकोंड संबंधीं जो मुलुख कर्नाटकांत होता, तोही बादशाहाचे हातीं लागला.

मोंगललोक याणीं जेव्हां नवा प्रांत हस्तगत केला, तेव्हां जा प्रकारें त्याणीं प्रजापालन केलें तो विस्तार असा. फौजदार याणें, लश्करचें काम संभाळावें; आणि शहरामध्यें चोरादिकांचा उपद्रव होऊं देऊं नये. त्यास सर्कारचा वसुलापैकीं चवथाई देत असत, दुसरा खालसा दिवाणनामें एक कारभारी होता, त्याणें सर्व जमाबंदीची चौकशी करावी; त्याकडे लश्कर संबंधीं काम नाहीं.

औरंगजेव असा मुलुख घेत असतां संभाजीनें अंगें कांहीं उद्योग केला नाहीं; त्यावरून त्या वेळचे लोक कल्पना करूं लागले, कीं कलूषाचे जादुगिरीमुळें, तो उगाच राहिला. परंतु असें नव्हे; तो संभाजी आपले दुष्ट स्वभावेंकरून, आणि मद्यपानादिव्यसनेंकरून अप्रयोजक झाला होता. तो कोणे एके समयीं सावध होई, त्याजवळ त्याचा वडिलांचे वेळेचे शाहाणे माणूस त्याचे चाकरी वांचूनही त्याजपाशींच राहिलेले होते, परंतु त्या कलूषाचे भयानें आणि याचे अव्यवस्थितपणेंकरून, ते आपआपले ठिकाणीं उगीच राहिले.

जेव्हां औरंगजेवानें विजापूर घेतलें, ते समयीं तेथचे सर्व मराठे मनसवदार याणीं पत्र लिहिलें कीं आम्हीं तुमचे चाकरीस रहावयास सिध्द आहों; तेव्हां औरंगजेवानें त्यांस आज्ञा दिली कीं, संभाजीला जिंकावयास पाठविला जो शिरजीखान, त्यास वांई पाशीं जाऊन मिळावें. शिरजीखान आला तो वांईस पोंचला. परंतु ते लोक संकेताप्रमाणें आले नाहींत. तेव्हां संभाजीच्या हंबीरराव, याणें त्यास जिंकिला. परंतु त्याच युद्धांत तो मरण पावला. याप्रमाणें मराठ्यांचा जय झाल्यानंतर त्याणीं

णीं त्याच्यापाठवून विजापुरसंबंधें कित्येक मुलुख घेतला; आणि त्यांतील कांहीं स्वार औरंगजेब गोंवळकोंडयास घेरा घालीत होता, तेथें जाउन पोंचले. परंतु युद्ध नकरिता मागें फिरले. या खेरीज संभाजीनें मोरोत्रिंमळ पिंगळे याचा भाऊ केसोपंत पिंगळा पेशवा, मुख्य सरदार याचा हाता खालीं संताजी घोरपडा देऊन कर्नाटकांत पाठविला. नंतर त्याणें हरजी राजा महारीक यास मिळून शहाजीचा जहागीर संबंधें कर्नाटकांतील व्यंकाजी भोंसलेकडे आहे तो मुलुख घ्यावा अशी आज्ञा होती, तें लश्कर जिंजी पर्यंत पोंचलें.

तिकडे व्यंकाजी पूर्वींच समजला कीं आपणास वडिलांची जहागीर संभाजी जिरूं देणार नाहीं ह्मणून, तें लश्कर आलें नाहीं तोंच त्याणें ह्मैसुरचा चिक्कदेवो नामें राजा, यास, तीन लक्ष रुपयानां बंगलोर शहर विकत देऊं केलें. तें वर्तमान जिंजीस पोंचलें, तेव्हां ते लोक अशी इछा करूं लागले, तो अर्थ सिद्धीस गेला नाहीं. तोंच आपण जाऊन शहर घ्यावें, असेंच मोंगल लोक इछीत होते; अशा समयीं केसोपंत व त्याचा पुतण्या, निळोपंत, या दोघांच्या कांहीं कज्जा होऊन मराठे लोक लवकर न पोंचले, इतक्यांत मोंगल जाऊन पोंचले. त्याणीं शहर घेऊन, त्या राजाला तीन लक्षांस विकलें तेव्हां मराठे लोक तें बंगलोर हातीं लागत नाहींसें समजून ह्मैसुर प्रांतीं जाऊन, तेथची खंडणी घेत कांहीं महिने राहिले. नंतर मोंगलानीं गोंवळकोंडें घेतलें. असें त्यांचें प्राबल्य जाणून ते माघारें जिंजीस गेले.

नंतर सन सोळाशें अठ्यायशींत हरजी राजा यास कळलें कीं, मोंगलांस मोठे मोठे जहागिरदार व मनसबदार मिळाले, त्यावरून तो भ्याला; आणि केसोपंताशीं त्याणें सख्य केलें. मग ते दोघे जाऊन, कांहीं मुलुख घेतला; परंतु मोंगल येतात आणि आपल्ये मंडळींत वैमनस्यें पडलीं आहेत, असें समजून तो घेतलेला मुलुख सोडून, पालियानदीचे कांठीं कित्येक महारिकाचे किल्ले होते तेथें जाउन राहिले.

यानंतर त्याचवर्षीं कर्नाटकचा बहुतां दिवसांचा उसकटा परगणा होता, तो ह्मैसुरचा राजानें व्यंकाजी पासून घेतला. तेवेळेस संभाजीचें लश्कर जवळच होतें, परंतु त्याणीं व्यंकाजीला कुमक केली नाहीं; कांकीं मराठे लोक भाउबंदकी संबंधें, भांडत असले ह्मणजे द्वेषास्तव ते आपला नाश जरी झाला तरी होऊं देतात. हा त्यांचा जातिस्वभाव आहे. अशा द्वेषामुळें, कर्नाटकांत गेलेले जे मराठे होते, तेही नबळ होऊं लागले. इकडे देशामध्येंही ते लोक एकचित्त नसतां, तें

राज्य

राज्य दुसऱ्या कांहीं कारणानें राहिलें. नाहींतर तेव्हांच राज्य बुडून औरंगजेबाची मसलत सिद्धीस जाती; आणि ते पूर्वीप्रमाणें अप्रसिद्ध झाले असते.

संभाजीनें राज्यकारभारांत चित्त ठेविलें नव्हतें; तो विशाळगडास अथवा पन्हाळ्यावर किंवा संगमेश्वरीं, एक बाग होती, तेथें राहून काळक्रमणा करी. आणि त्याचा वजीर कलूषा राज्यकारभारापेक्षां संभाजीची मर्जी संभाळावयास फार जपत असे; आणखी, जो याचा आश्रय करून राहिला होता, आणि समयविशेषीं, यास कांहीं वर्तमान कळवून, याचें मोठें हित केलें तो महंमद आकबर, याचा स्वभावास कंटाळून, त्याणें याला सोडिलें. आणि राजापुराजवळ एका इंग्रेजी जाहाजावर बसून फारशी लोकांचें एक इसपाहान नामें शहर आहे, तेथें जाऊन त्या बादशाहाचा आश्रय करून वीस वर्षें त्यापाशीं राहून, सन सत्राशें सहांत, तेथेंच मृत्यु पावला.

शिवाजीचा मरणापासून लश्कराचा बंदोबस्ताची अनवस्था झाली, तो प्रकार उत्तरोत्तर वृद्धिंगत झाला; तेणेंकरून संभाजीचें राज्य बुडूं लागलें. तें संभाजीस हित नव्हतें; परंतु मुलखांत बंड उत्पन्न करायास मोठें उपयोगी झालें; कांकीं ज्याजवळ भाला व घोडा असे, तो त्या मराठा लोकांत शिरून, एकाच दिवसाचे लुटीनें द्रव्यवंत होई, याप्रमाणें जिकडे तिकडे बहुत दिवस युद्ध प्रसंग पडल्यामुळें, अशी फौज झाली कीं, मुलखाचा सर्व वसूल रोजमुऱ्यास पुरेना. यास्तव रजा द्यावी लागली, ते लोक बहुतकरून मराठे होते; त्यांस शिवाजीचा पराक्रमेंकरून, व राज्यांत किल्ले पुष्कळ, या योगें व आपले जातीचे मराठे नामांकित फार होते त्यांस बुद्धि शिकविणार ब्राह्मण, यास्तव ते गर्वास चढले असत. आणि एक वर्तमान असें होतें कीं, हिंदूंचा मनुष्यमात्रीं, मोंगल कर बसविणार ह्मणून. मराठे मोंगलांशीं वक्र होते. ह्या सर्व गोष्टींचा उपाय करावयास औरंगजेबाला सामर्थ्य होतें, कांकि त्याजवळ द्रव्य बहुत व फौज मोठी, आणि सर्व मुलखांतील वृत्त त्यास विदित होत असे, आणखीं कोणासही पदास चढवावयाची शक्ती त्यास होती. परंतु तो स्वजातिधर्माभिमानी, आणि मोठा गर्विष्ठ होता; ह्मणून त्याची शक्ति हितोपयोगी झाली नाहीं. व त्यास बंडांचा बळाचा सुमार सांपडला नव्हता, तीं बंडें आपले स्थापित राजांचे हातूनच त्याणें मोडवावीं, तें न करितां बहुतां दिवसांचीं संस्थानें बुडूं दिलीं. आणि त्यांचे जागीं दुसरे कोणी न स्थापितां

तां गर्वेंकरून असें मानिलें कीं, आपणच सर्व संभाळूं. आणि त्याणें आपले जवळचे कित्येक फौजेसही रजा दिली. तेव्हां ते तात्काळ जाऊन बंडाला मिळून त्याचे शत्रू झाले. या खेरीज कित्येक अंमलांतून ब्राह्मण ठेवावयाचे जागीं, त्याणें आपल्ये जातीचे मुसलमान ठेविले; तेणेंकरून जी अव्यवस्था झाली, ती, त्याला आटोपेना. जे त्याचे जातीचे, आश्रयी होते, ते, त्याची कीर्ति वर्णीत. परंतु ब्राह्मण, व मराठे लोकांतील जे श्रेष्ठ होते, ते समजले कीं, आतां मोंगल लवकरच बलहीन होतील; तेव्हां मोठे मोठे मानकरी, डफळे, व घाडगे, व माने, व निंबाळकर, वगैरे, सर्व मिळून, आपल्ये शिबंदीसहवर्तमान, बंडास अनुसरले. ते समयविशेषीं, मोंगलांस, अनुकूळ किंवा प्रतिकूळ होत असत. ते सर्व लोक संभाजी व मानकरी लोक यांचे पदरचे होते; यास्तव तेवेळेस पेंढार बहुत नव्हतें; तेवेळेस मोंगलांचा फौजदारांची शिबंदी होती, ती फुटकळ लुटारूंच्या उपाय चालूं देत नव्हती; जे फुटकळ लुटारू, तेच पेंढारी.

ते समयीं असें झालें कीं, मराठे मानकरी लोकांनीं, औरंगजेबाकडे वकील पाठवून त्यास असें समजाविलें कीं, आम्ही जन्मभर तुमचे सेवेविषयीं तत्पर असूं; परंतु त्यांचा मुलखांत लोक पाठवून ते मुलूख लुटीत. तें कदाचित् प्रकट झालें असतां वकिलाकडून तेथचा कोणा मोठ्या माणसास, लांच देऊन छपवीत. बादशाहानें फौजदारांस आज्ञा केली होती कीं, मराठे मानकरी चाकरींत वागत असतां, त्यांचा मान रक्षावा. मानकरी फौजदारांशीं स्नेहाच्या गोष्टी सांगत, आणि वकील तर, बादशाहाचे दरबारीं त्यांणीं केलेलीं कृत्यें छपवीत. त्याणेंकरून त्यांचे मुलूख निरुपद्रव असत; आणि जेव्हां ते मोंगलांच्या मुलखीं जाऊन लूट करीत, तेव्हां त्यास समजे कीं, हे मराठे आहेत; परंतु कोणाकडचे, तें समजत नसे.

याशिवाय औरंगजेबानें दक्षिणेंत कित्येक अमलदारांस फौजेच्या खर्चास मुलूख आपलें स्वामित्व ठेवून दिला होता. तेथचा वसूल पुरेसा येईनासा झाला; ह्मणून ते लोक लांचादिककर्मेंकरून पैका जमा करूं लागले. तेणेंकरून देशाची दुर्दशा झाली.

मोंगलांच्या राज्यांत अशी रीति होती कीं, एखादी वतनी जहागीर सरकारीं आली असतां, त्याचा अधिपती दुसरा केला तर, त्याला तदुपभोगार्थ पत्र दिल्याचे पूर्वीं, त्यापासून साडेसात वर्षांचें उत्पन्न अगोदर घ्यावें. त्यांत चौथाई प्रथम घेऊन बाकी ऐवज हप्तेबंदीनें घेत. याप्रमाणें सर-

कारांत

कागद यावें लागे. रवरीज दस्तुरी वगैरे निमित्तें करून कारभारी लोक, पैका काय घेत होते. अशा अनीती मुळें, हा अनर्थ झाला कीं, निरंतर वतनास - जप्ती इत्यादि उपद्रव होऊं लागले. तेणेंकरून लोक बेजार झाले, बादशाह वृद्ध दशेनें अशक्त झाला होता, त्याच्यानें पहिल्याप्रमाणें चवकशी राखवेना; त्याणें एकादी आज्ञा केली असतां, लिहिणारांनीं त्या कामासही वर्षवर्ष लावावें. अशी बंडाळी विजापुर व गोंवळकोंडें घेतल्यापासून बारा वर्षें पर्यंत होती. नंतर तीं सर्व अनर्थकारणें वृद्धिंगत होऊन, मोंगलांचें राज्य-नाश पावूं लागलें. असें उत्तम प्रकारें बांधलेलें मोठें उंच घर प्राचीन असलें तरी चांगलें दिसतें, परंतु त्याला डागडुजी करून उपयोग नाहीं, कां कीं, तें आपल्या जीर्णतेनेंच पुढें थोडक्याच दिवसांनीं पडावयाचें. असें तें राज्य जहालें होतें.

औरंगजेब विजापुरीं एक वर्ष लश्कर सुद्धां राहिला होता, त्याणें जा फौजा तेथून चहूंकडे पाठविल्या होत्या, त्या जय पावल्या; त्यांत संभाजीचा मुलखांत मात्र बळकट बळकट कित्येक किल्ले राहिले होते; तेही घ्यावयास औरंगजेब कांहीं सिद्धता करीत होता, ती अशी कीं ते किल्ले निश्चित हातीं लागावे; इतक्यांत त्याचे फौजेंत कांहीं मोठा रोग उत्पन्न होऊन, फार लोक मेले; तेव्हां तो तेथून अकलूज नामें शहर निरेचे कांठीं आहे तेथें जाऊन राहिल्यावर तो रोग गेला. असें सन सोळाशें एकुणनवदांत घडलें.

त्याच सुमारें समुद्रांत इंग्रज लोक उपद्रव करीत होते. ह्मणून औरंगजेबानें तिकडे मन लाविलें; आणि त्यांचा व्यापारांची कित्येक स्थानें, त्याचा मुलखीं होतीं, तीं जप्त केलीं. व जंजिऱ्याचा शिद्दी, याकुदखान, त्यास आज्ञा केली कीं. मुंबईतून इंग्रजांस घालवून दे. त्याणें जाऊन माजगांव व शिवचा किल्ला. व माहीम. घेतलें; आणि मुंबई किल्ला घ्यावयास नऊ दहा महिने झटला, परंतु कांहीं उपाय चालेना; शेवटीं इंग्रजलोकांचें व औरंगजेबाचें कांहीं बोलणें ठरून. तो निघून गेला.

औरंगजेब अकलुजेस जाऊन राहिल्यावर बहुत वेळा मराठी लोकांचे उपद्रवाचें वर्तमान त्याला कळलें; त्यांत नाशिकाजवळ मोठा समुदाय जमला होता. त्याचा पारिपत्यास तिकडे फौज होती ती पुरेना; तेव्हां औरंगजेबानें त्या बंदोबस्ताकरितां आपला पुत्र आजिमशाह यास बरोबर फौज देऊन रवाना केला; आणि वजिराचा पुत्र आसदखान याजबरोबर दुसरी फौज देऊन कोंकणप्रांतास पाठविला. आणखी कोल्हापूर पन्हाळा आसपास अ

बहुतेकांचा

नाचा तकरीबखान नामें. कोणी एक मोठा सरदार होता; त्यास तेथची फौजदारी द्यावयाचा करार करून पाठविला. त्या पूर्वींच कोल्हापुर संबंधें जो सोपा मुलुख, तो मोंगलांनीं घेतला होता. परंतु पन्हाळा आदिकरून अवघड जागीं. मराठे लोक होते.

तकरीबखान तेथें जाऊन तो सर्व ठिकाणांची बातमी घेत असतां, असें त्याला समजलें कीं. संभाजी थोडकेसे लोक बरोबर घेऊन. केवळ असावधपणें संगमेश्वरीं राहिला आहे, त्यावरून त्याणें त्यास धरून आणावा, असा बेत केला नंतर त्याणें आपला पुत्र. इखलासखान. व मोठे मोठे अत्यंत विश्वासू, असे थोडकेच स्वार व बाटाडे बरोबर घेऊन. कोल्हापुराहून मोठ्या धैर्येंकरून निघाला; तो संभाजीचा लोकोंस बातमी कळूं न देतां, संगमेश्वराजवळ पोंचला; तेव्हां संभाजीचा जासुदानीं, त्यास वर्तमान कळविलें कीं. मोंगल जवळ आला. ते समयीं तो मद्यपानें करून, उन्मत्त झाला होता. यास्तव त्यांस ओरडून बोलिला कीं. मूर्ख हो. अशा वेडेपणानें कां बडबड करितां, मुसलमान येथें काय येणार आहेत. असें फिरून बोलिलां तर मी तुमचीं नाकें कापीन. इतकें झाल्यावर थोडक्याच वेळांत तकरीबखानाचा पुत्र कांहीं स्वारांसहित मोठ्या त्वरेनें बापाचा पुढें घोडी पिटील संभाजीचा वाड्यांत जाऊन पोंचला ते वेळेस जे लोक तेथें सांपडले ते मारून टाकिले; इतक्यांत मागून तकरीबखानही आला; तेव्हां उरलेले लोक बहुतेक पळाले. परंतु कलूषाजवळ कांहीं होते. ते संभाजीचा रक्षणार्थ लढूं लागले; मग कलूषास तिराची जखम लागतांच, तेही पळाले ते समयीं संभाजी सावध होऊन आपला वेष बदलून तेथून निघावयास सिद्ध झाला; परंतु त्याच्या अंगावर मोठे उंच उंच अळंकार होते ते त्याला टाकवेनात. त्यामुळें हाच संभाजी असें समजून त्यास धरिला. त्या बरोबर कलूषा आणि दुसरे चोवीस असामी धरले गेले.

मग तकरीबखानानें त्यास कोल्हापुरीं नेऊन औरंगजेबास कळविलें नंतर तेथून आज्ञा आली कीं. त्यास बहुत बंदोबस्तानें हुजूर आणावा तेव्हां बादशाह अकलूजेहून निघून, इंद्रायणी व भीमा यांचा संगमाजवळ तुळापुरीं+ आऊन उतरला होता. तिकडे तकरीबखानानें त्यास नेलें; ते

+ तुळापुराचें पहिलें नागरगांव असें नांव होतें. मग शहाजीच्या मनांत आलें कीं. हत्तीचें वजन किती असतें तें पहावें म्हणून, तेथें नदीमध्यें नावेंत हत्ती घालून त्याचा भारानें जितकें नावेचा अंगाला पाणी लागलें तितकी खूण करून हत्ती काढून, त्या खुणे बरोबर पाणी येईतोंपर्यंत दगड घालून. त्या दगडांचें वजन केलें तो हत्तीची तुळा झाली. त्या दिवसापासून त्या गांवाचें नांव तुळापुर ठेविलें.

कलूषा वगैरे

लष्करजवळ पोंचल्यावर ते सारे बंदिवान, तुम्बड्या बांधून उंटावर बसवून, बरोबर वाद्यें वाजवीत लष्करांतून बादशाहाचे हुजूर नेले; ते पाहून औरंगजेबानें आज्ञा केली कीं, एव्हां कैदेंतच असूं द्यावे. मग विचार करून यांचा अन्यायानुरूप पारिपत्य केलें जाईल. नंतर ते तसेच कैदेंत ठेविले.

त्यापुढें मोंगलांत जे श्रेष्ठ माणूस होते त्यांणीं बादशाहास असें समजाविलें कीं, संभाजीचा जीव रक्षावा; तेणेंकरून, त्याचा राज्यांतले अवघड किल्ले सर्व आपल्ये हातीं येतील. ही मसलत औरंगजेबाचाही मनास येऊन, त्याणें संभाजीला निरोप पाठविला कीं, तूं मुसलमान हो म्हणजे तुझा जीव वांचेल. त्यावर त्याणें उत्तर दिलें कीं, बादशाहाला सांगा कीं, जर तू आपली कन्या देशील तर बाटेन, असे दुष्ट जे तुम्ही मुसलमान लोक, त्या तुमचा पैगंबरास धिक्कार असो. मग तो आपली अन्यायकर्में स्मरून, पश्चात्ताप पावून; जे जवळ दरबारास मागल होते, त्यांस नानाप्रकारें शिव्या देऊं लागला; त्या अशा कीं, [illegible] त्यांतला एखादा कोठें करून मारीलच.

हें उत्तर औरंगजेबाला समजतांच, त्याला बहुत राग येऊन त्याणें अशी आज्ञा केली कीं, त्याला लष्करचा बाजारांत नेऊन, प्रथम त्याचे डोळे तापल्या लोखंडाचे डागण्यानें भाजावे; नंतर जीभ कापावी; मग डोकें मारावें. अशी आज्ञा देण्याचें कारण, केवळ बादशाहाचा रागच नव्हे, असें केलें असतां हिंदुलोकांत दहशत पडेल असेंही त्याचे मनांत होतें. त्यावरून त्याला तुळापुरीच, लष्कराच्या बाजारांत नेऊन आज्ञेप्रमाणेंच मारिला. त्याचा वजीर कलुषा तोही त्याबरोबरच मारिला; हें वर्तमान सन सोळाशें एकुणनव्वदांत घडलें.

संभाजीची गोष्ट लिहिली आहे, त्यावरून असें दिसतें कीं, त्यामध्यें कांहींसें शौर्य होतें; आणि चातुर्य तेमस्तच असेल; परंतु हे त्याचे गुण, क्रूरपण आणि व्यसनें करून व्यर्थ गेले. असें वाटतें कीं, तो जर आणीक कांहीं वांचता, तर आणखीही पापच करता. तो मेल्याचे पूर्वींच तीन वर्षे त्याच्या जातीचे मराठे लोक त्याला कंटाळले होते; परंतु जा समयीं त्याच्या मरणाचा प्रकार समजला, ते समयीं तो शिवाजीचा पुत्र याजस्तव सर्वांस क्रोध आला; औरंगजेब तर चिंतित होता कीं, हिंदूंत दहशत पडावी. परंतु तें सिद्ध न होतां, केवळ द्वेषमात्र वाढला.

सन सोळाशें एकुणनव्वदापासून सत्राशें सात पर्यंत, झालेलीं वर्तमानें मिळून भाग अकरावा.

अनुक्रमणिका.

मराठ्यांनीं रायगडीं मसलत करून संभाजीचा पुत्र शिवाजी, तो मोठा होई तो पर्यंत राजाचा सावत्र भाऊ राजाराम तो धणी केला.

मोंगलानीं रायगड घेतला तेथें संभाजीची स्त्री येसुबाई, व पुत्र शिवाजी उभयतां सांपडलीं, तीं त्यांणीं औरंगजेबाकडे नेलीं.

राजाराम जिंजीस गेला तेथें त्याणें शिवाजी प्रमाणें, अष्टप्रधानादि करून, आपलें माहात्म्य वाढविलें.

मोंगलानीं जिंजीस घेरा घातला तें काम कांहीं निमित्तानें राहिलें.

मराठे मोंगलांचा मुलखीं, घांस दाणा घेऊं लागले; तन्निमित्त औरंगजेब ब्रह्मपुरीं जाऊन राहिला.

इंग्रेज लोक व पोर्तुगीस लोक यांचें कांहीं वर्तमान.

संताजी व धनाजी उभयतां कर्नाटकांत जाऊन मोंगलांशीं युद्ध करून जय पावले.

मोंगलांचा सरदारास जिंजी घेणें आवश्यक पडलें ह्मणून, त्याणें राजारामास काढून लाविला; आणि जिंजी घेतली.

मराठ्यांनीं साताऱ्याची राजधानी केली.

राजारामाचा अष्टप्रधानांत कांहीं बदली झाली.

कान्होजी आंगरे व शिधोजी गुजर यांची गोष्ट.

संताजी घोरपडा कोणे प्रकारें मरण पावला तें प्रकरण.

राजाराम मोठें लष्कर जमा करून, खानदेशांत व वराडांत खंडणी घेऊं लागला.

औरंगजेबानें कर्नाटकांतून जुल्फिकारखान बोलावून आणून राजारामाचे पाठीस लाविला.

औरंगजेब फौजसुद्धां साताऱ्यास आला त्याणें युद्ध करून किल्ला घेतला.

राजाराम याचा मृत्यु.

त्याची स्त्री ताराबाई तिणें राज्य चालविलें.

मराठ्यांचें प्राबल्य व मोंगलांची बलहीनता.

मराठे लोक कोणकोणत्या कारणार्थ, एकचित्तें करून वागले तें प्रकरण

करणं

औरंगजेब विजापुरीं येऊन, मग त्याणें वांकिणकेरा गांवास घेरा घात
ला ती गोष्ट.

मोंगलानीं घेतलेले किल्ले मराठ्यांहीं लढून माघारे घेतले.

औरंगजेब अहंमद नगरीं येऊन मृत्यु पावला.

भाग अकरावा.

शिवाजीची स्त्री सोयराबाई मेल्यापासून, तिचा पुत्र राजाराम त्यापा
सून आपणास कांहीं विघ्न नव्हावें ह्मणून संभाजीनें त्याला रायगडीं बंदींत
ठेविला. पुढें कांहीं दिवसानीं त्याची स्त्री मृत्यु पावली; नंतर दोन करून
दिल्या. पहिली ताराबाई मोहित्यांची कन्या; दुसरी राजसबाई घाटगे यां
ची मूल. ते घाटगे कागलकर. राजाराम बंदींत होता त्याच किल्ल्यावर संभा
जीची स्त्री. येसुबाई, व पुत्र शिवाजी असे, त्या उभयतांशीं, तो राजाराम स्ने
ह पूर्वींपासूनच करीत होता. पुढें संभाजी मेल्यावर मराठ्यांचे मुख्य मान
करी होते, ते सर्व मिळून. येसुबाईच्या विद्यमानें, रायगडीं मसलत ठरली
कीं शिवाजी प्रौढ होई तों पर्यंत, राजाराम धणी करावा. ते समयीं मुला
चें वय सहा वर्षांचें होतें. त्याचेंच पुढें शाहू असें नाव चालिलें. त्या मस
लतींतील मानकरी यांचीं नावें; जनार्दनपंत हणमंते, प्रल्हादनीराजी
तो न्यायाधीशाचा पुत्र. रामचंद्रपंत बहुरकर, खंडोबल्लाळ चिटनीस
महादाजी नाईक पानसंबळ. संताजी घोरपडे, धनाजी जाधव. ख
डेराव दाभाडे.

असें आहे, संकटसमयीं थोरलोक एकत्र मिळून विचार करितात
त्यांत जो उत्तम बुद्धिमान असतो, तो सर्वांचीं चित्तें स्वाधीन करून घेतो, म
ग ते सर्व त्याचे आज्ञेप्रमाणें वागूं लागतात. तशीच, या आठांमध्यें प्रल्हा
दनीराजीची बुद्धि विशाळ होती; ती अशी कीं तेथें नानाप्रकारचीं संकटें
असतां. त्याणें स्वस्थचित्तें करून संपूर्ण बंदोबस्त केला. तीं संकटें अशीं
कीं. जामदारखान्यांत द्रव्य नव्हतें; आणि कोठींतलें धान्यही सरलें होतें;
व लष्कराचा बंदोबस्त नाहींसा झाला होता; आणखी शत्रूचें प्राबल्य;
याप्रमाणें अडचण असून त्याणें प्रथम किल्ल्यांत शिबंदी ठेवून शिवाजी
च्या रीतिप्रमाणें बंदोबस्त केला; आणि कोठींत दाणा भरला.

त्यानंतर असा नेम ठरविला कीं, शत्रूंच्या बातमीदारांस ठिकाणा न
लागावा ह्मणून, राजारामानें सर्वदा एके ठिकाणीं राहूं नये; रायगडापास

न

न विशाळगड पर्यंत जे शिवाजीचे बांधलेले किल्ले आहेत तेथें चाळून पाळून रहावें. अशी मसलत झाल्यावर येसुबाई पुत्रासुद्धां रायगडीच राहिली; आणि राजाराम कुटुंबसुद्धां विशाळगडास गेला. ते समयीं लष्करच्या सरदारांस आज्ञा जहाली कीं, कालानुरूप सावधपणानें वर्तावें; आणखी स्वार लोक यांणीं बहुत करून राजाराम यापासून दूर राहू नये.

ते समयीं मोंगलांचें लश्कर, औरंगजेबानें कोंकण घ्यावयास पाठविलें होतें, तें पर्जन्यकाळ गेल्यावर रायगडास येसुबाई व तिचा पुत्र शिवाजी आहेत अशी बातमी घेऊन, किल्ल्यास वेढा घातला. तेव्हां त्याचे कुमकेस जंजिऱ्याचा शिद्दीही आला होता; त्यांणीं तेथें कित्येक महिने श्रम केले परंतु कांहीं उपाय चालेना; शेवटीं कोणी एक मराठा शिवाजीचे वेळचा जुना चाकर होता, त्याला बाईचा देशमुखी संबंधें कांहीं खट त्यानिमित्त राग येऊन त्याणें कित्येक निवडक मावळे लोक हाताखालीं घेऊन, मोंगलांशीं सख्य करून बाईचा देशमुखी विषयीं करार करून घेतला, नंतर त्याचे छतीनें तो किल्ला थोडकेच दिवसांनीं मोंगलांचे हातीं लागला. असें सन सोळाशें नव्यदांत घडलें.

तेव्हां तेथें संभाजीची स्त्री येसुबाई व पुत्र शिवाजी, उभयतां मोंगललोकांचा हातीं सांपडलीं; तीं त्याणीं औरंगजेबाचा लश्करांत नेलीं. त्यावरून औरंगजेबानें त्या सरदारांचा संमान केला; आणि त्या पुत्राचे ठिकाणीं प्रीति ठेवून, त्याचें शाहु असें नाव चालविलें. येसुबाई व औरंगजेबाची कन्या, बेगमसाहेब. यांचा स्नेह झाला.

यानंतर मोंगलांनीं मिरज व पन्हाळा घेतला; तेव्हां मराठालोकांत असें ठरलें कीं, राजारामानें जिंजीस जावें. त्यावरून राजाराम याणें, प्रल्हाद निराजी, व संताजी घोरपडे, व खंडेराव दाभाडे, व धनाजी जाधव, व खंडो बल्लाळ, व दुसरीं केवळ विश्वासू अशीं एकवीस माणसें बरोबर घेतलीं; आणि वाण्याचा वेषानें निघाला. तो निर्विघ्नपणानें तेथें जाऊन पोंहचावा, असा त्यांणीं शहाणपणानें बंदोबस्त केला होता; तथापि औरंगजेबास तें कांहीं वर्तमान कळलें. ते समयीं त्याचा फौजदार कर्नाटकांत होता, त्यास व दुसरे त्याचे सरदार जे तिकडे होते त्यांना, त्याणें आज्ञा केली कीं, राजाराम तुमचे मुलखांत गेला आहे त्यास धरून आणा. त्यावरून बंगलोर शहराजवळ राजाराम उतरला; आणि तो आपले पाय माणसा करून धुववीत होता; तेव्हां लोकांनीं वळखिला कीं, हा कोणी मोठा माणूस आहे; मग त्यांणीं तेथचा सरदारास बातमी कळविली. इतक्यांत

खंडोबल्लाळ

खंडोबल्लाळ समजला कीं. आता आह्मास मोंगल येऊन धरितील; यास्तव तेसमयींच राजारामाबरोबर संताजी घोरपडे व धनाजी जाधव देऊन तेथून पळविले. व आपण मंडळीसुद्धा तेथेंच सैंपाक करीत बसून. बेत केला कीं. जर कोणी आपल्यास धरून नेऊन विचारूं लागले तर सर्वांचें उत्तर एक व्हावें: कीं आह्मांस कांहीं ठाऊक नाहीं. असा निश्चय ठरल्यावर मोंगल आले. आणि त्यांस धरून मारझोड करून पुसूं लागले; परंतु ते सर्व एकचित्त. यास्तव त्यांस कांहीं ठिकाणा लागूं दिला नाहीं. तेव्हां त्यांणीं त्यांस सोडिले; नंतर ते सर्व संकेतानुरूप जिंजींत एके जागीं जमले.

राजाराम मुलुख सोडून गेल्याचे पूर्वी. प्रल्हाद निराजीचे मसलतीनें असा बेत झाला होता कीं. मोरोत्रिंमलाचा पुत्र निळोपंत यास पेशवा करून; रामचंद्र पंत बहुतकर यास हुकुमतपणाचें पद देऊन. विशाळगड,व रांगणा. व इतर जे मराठ्यांचे किल्ले, व मुलुख त्यांचा बंदोबस्त सांगितला. शिधोजी गुजर. व कान्होजी आंगऱ्या यां दोघांस लढाऊ गलबतांचें काम सांगितलें आणि एक म्हातारा महादाजी नाईक पानसंबळ नामें शिलेदार मराठी लोकांत मोठा विख्यात होता. तो सेनापती केला. मग थोडकेच दिवसानी तो मरण पावला; नंतर संताजी घोरपडे यास तो अधिकार दिला.

राजाराम जिंजीस पोंचल्यावर थोडकेच दिवसांत, तो अल्पवळ असूनही. त्याणें आपलें महत्व वाढावें ह्मणून. शिवाजीप्रमाणें आपल्या जवळ मोठे मोठे अष्टप्रधानादि असावे. असें आणून त्याणें नवे अष्टप्रधान केले. ते असे जनार्दनपंत हणमंते अमात्य; शंकराजी मल्हार सचिव; रामचंद्र त्रिंबक पुंडे मंत्री महादाजी गदाधर सुमंत; निराजी रावजी न्यायाधीश. श्रीकराचार्य पंडितराव; पेशवा व सेनापति ते पूर्वीच केलेले होते. ते व हे मिळून आठ झाले. त्यांत प्रल्हाद निराजी मोठा चतुर असे. आणि राजाच्या उपयोगी पडून पडला होता. यास्तव त्याला पेशवेपणाचें पद असावें परंतु ते रिकामें नव्हतें. ह्मणून प्रतिनिधी असें नवेंच पद करून. त्याला सर्व प्रधानावर्ती स्थापिला. संताजी घोरपडे सेनापति यांस नवें हिंदुराव ममलकतमदार असें नांव ठेवून, नगारा व जरिपटक्याचें निशाण दिलें; धनाजी जाधव यास जयसिंगराव असें नवें नांव ठेवून. तो आणि संताजी घोरपडे यां दोघांस माघारें महाराष्ट्र मुलखीं फौज ठेवून मोगलाचा मुलुख लुटावयाकरितां पाठविले.

असा बंदोबस्त झाल्यावर त्या प्रधानानीं जिंजीमध्यें राजाराम तक्ताधिपती करून. ते आप आपल्या कामांत मोठ्या सावधपणें करून वागूं लागले

गले; आणि गुप्तरूपेंकरून आपल्ये जातीचे मराठे मानकरी लोक, यांस सोन्याचीं कडीं व मोठे मोठे पोषाक व गैरे पाठवून, त्यांस राजाराम तक्ताधिपति केला, हें आनंदाचें वर्तमान कळविलें. या खेरीज जो आपला मुलुख मोंगलानीं घेतला होता, त्यांत व जो मोंगलांच्याच मुलुख होता त्यांत कित्येक ठिकाणें जाहागीर इनामें करून त्यांचा सनदाही, कित्येक मानकरी यांस पाठविल्या. तें देणें ते वेळेस लोकांचे उपयोगी पडलें नाहीं, परंतु राजारामास उपयोग झाला, तो असा ते लोक संतुष्ट होऊन आपणास याप्रमाणेंच पुढें मिळेल या आशेनें त्यांचे वकील व लोक कित्येक जिंजीस गेले आले असें होऊं लागलें; तेणेंकरून तो महत्वास चढला.

हें वर्तमान औरंगजेबास कळून त्याणें जुलफिकारखान सरदार कर्नाटकांत अशा अभिप्रायानें पाठविला कीं, एक जिंजी शहर घेतलें म्हणजे सारे मराठे एकेजागीं सांपडतील. परंतु ती त्याची कल्पना व्यर्थ गेली; कांकीं, ते समयीं विजापुरकरांचें व गोवळकोंडकरांचे कित्येक लोक, मराठेलोकांचा नावेंकरून, नाशीक, व बेदर, व भीर, एतत्संबंधें संपूर्ण मुलखीं एकसमयावच्छेदें करून, उपद्रव करीत होते. याशिवाय जे स्वार शिवाजीचे पहिले चाकर होते तेही येऊन संताजी व धनाजी यांस मिळाले.

औरंगजेबाचा सरदार जुलफिकारखान जिंजीस गेला तो तें मोठें शहर पाहून, समजला कीं याचा वेढयास आपलें इतकें लश्कर पुरणार नाहीं; ह्मणून त्याणें औरंगजेबास लिहिलें कीं, सैन्य अणीक पाहिजे तें येई तोंपर्यंत आपण जिंजीजवळ थोडकीशी फौज ठेवून, दक्षिणेंत स्वाऱ्या घालून खंडणी घ्यावयास निघोन, तंजोर, व त्रिचनापालीचे राजे यांपासून खंडणी घेतली.

याप्रमाणें कर्नाटकाचें वर्तमान असतां महाराष्ट्र देशांत रामचंद्रपंत किल्ल्याचा वसुलाच्या व शिबंदीच्या बंदोबस्त उत्तम प्रकारें करीत होता. त्याणें मोंगलांचा लश्कराचा कित्येक जागीं टोळ्या होत्या त्या खराब केल्या; नंतर जिंजीहून संताजी घोरपडे व धनाजी जाधव येऊन मिळाले. तेव्हां त्याणें विचार केला कीं मोंगलांचा फौजदार वांईस आहे तो धरून आणावा; त्यावरून ते संतुष्ट होऊन तात्काळ तें काम त्या सरदारानीं शेवटास नेलें. तें असें तो फौजदार व त्याचे सर्व लोकही छापा घालून धरून आणिले. नंतर रामचंद्रपंत, व संताजी, व धनाजी, या तिघानीं आपले कित्येक लोक मोंगलांचे मुलखांत चौथ व सरदेशमुखीचा भाग घ्यावयास पाठविले; त्याणीं आज्ञेप्रमाणें येऊन, आपणास घांस दाण्याचा निमित्तेंकरून सर-

कार

कार आजेग्वेराज स्वतंत्रपणें कांहीं घेऊं लागले. असे वागणारे जे त्यांत मुख्य तीन पवार, व थोरात, व आठवले; त्यांस राजाराम उंच वस्त्रें वगैरे कांहीं बक्षिसें कामानुरूप पाठवीत असे. त्याणें पवाराचें विश्वासराव असें नवें नांव ठेवून, थोरातास दिनकरराव असें ठेविलें; व आठवले यांस समशेरबहादर असें नांव दिलें.

रामचंद्रपंतानें आपल्या लश्करांत धनगर लोकांवर बहुत प्रीति ठेविली होती; त्यांत कित्येक त्याचा आश्रयें करूनच मोठया पदवीस चढले. त्याचा कारकून संकाजी नारायण नामें मोठा शहाणा होता, त्याणें त्याचवर्षी सन सोळाशें ब्याण्णवांत मोंगलांपासून राजगड घेतला; ह्मणून रामचंद्रपंतानें त्यास वांई परगण्याची मामलत सांगितली. त्याच सुमारें परशुराम त्रिंबक याणें मोंगल असावध पाहून, त्यांपासून पन्हाळा किल्ला घेतला. ते समयीं संताजीही निरुद्योग बसला नाहीं; त्याणें जाऊन मिरज घेतली; तेव्हां रामचंद्रपंत समजला कीं, याला तेथची देशमुखी द्यावयाजोगें धण्यानें आपणास सामर्थ्य दिलें आहे, आणि यांत स्वामीचें हित होईल ह्मणून, तो अधिकार त्यास दिला. मग संताजी व धनाजी यांणीं आपली पूर्तता होई असें सैन्य जमा करून आपला धणी राजाराम यास हितावह व्हावया करितां, गोदातीरीं मोंगलांचा मुलुख होता, तेथें उपद्रव करावयास गेले; तो मुलुख स्वस्थ होता आणि तेथें दाणे सस्ते असत; त्याप्रमाणें इतर मुलखीं कांहीं कारणामुळें मिळत नव्हते; ते तेथें जाऊन प्रकट होतांच औरंगजेबानें त्यांवर सैन्य पाठविलें; परंतु ते लोक पहिल्याप्रमाणें न भितां युद्धास उभे राहून तीन वेळा मोंगलांचा पराभव करून त्रनियुद्धीं त्यांचे मोठे मोठे सरदार यांस धरिले; आणि त्यांपासून बहुत द्रव्य घेऊन सोडिले. त्यावरून औरंगजेब समजला कीं, हे पूर्वीचे अल्पसार असून, होतां होतां मोठे प्रबळ झाले. त्या मराठी लोकांमध्यें संताजी मोठा योग्य सरदार असे, तो तारतम्य व्यवस्था निपुण, आणि रागीट होता; तसाच धनाजी जाधवही मोठा योग्य असून, कांहीं मासोसक असे; यास्तव तो संताजीपेक्षां लघु असतांही, त्यावर लोक मोठी प्रीति करीत होते.

असे मराठयांचे सरदार उत्तरेकडे उपद्रव करीत असतां, औरंगजेब आतां काय करावें असा सचिंत होऊन लश्करसहित भीमातीरींच दुसरे जागीं जाऊन उतरला; मग त्याणें असा निश्चय केला कीं, अगोदर जिंजी घ्यावी, तेव्हां कामबक्ष नामें आपला पुत्र याजबरोबर फौज देऊन त्यास आसदखान वजीर याचे आज्ञेप्रमाणें वागावयास सांगून, त्या दोघांस जिंजीवर पाठविले.

ले. त्यांणीं तेथें जाऊन शहरास वेढा घातला; असें सन सोळाशें त्र्याण्णवांत घडलें.

जुलफिकारखान बादशाहानें जिंजीवर पहिला नेमला असतां, त्यावर आपला पुत्र मुख्य करून पाठविला; तें त्यास अपमानास्पद होऊन, त्याचें चित्त उदास झालें; आणि वजीर जो पाठविला तो त्याचा पक्षपाती होता तो समजला कीं, ही एवढी अनीति बादशाहाची प्रियजी बायको तिजकडून झाली.

जुलफिकारखान उदासचित्त झाला असें वर्तमान ऐकून, राजारामराजाचा प्रधानांनीं मोठ्या हर्षानें यांतच आपला अर्थ साधून घ्यावा ह्मणून उद्योग केला; शेवटीं जुलफिकारखान व राजाराम यांचा आंतून गुप्तपणें तह ठरला, कीं, कामबक्ष जी मसलत करूं लागेल ती युक्तीनें मोडावी; तें न साधलें तर त्याणें राजारामास ती बातमी कळवावी. असें सन सोळाशें चौऱ्याण्णवांत घडलें. त्याच वर्षी औरंगजेब भीमेचा कांठ सोडून, गलगल्यास गेला. त्या जाण्यांत मसलत अशी असेल कीं, आपण दक्षिणेंत शिरलों ह्मणजे मराठे लोक तिकडे येतील, परंतु तसें न झालें. घोरपडा सैन्यसहित उत्तरेसच होता; रामचंद्रपंत सेनेसुद्धां पूर्वेकडे सोलापुरपर्यंत मुलुख लुटीत राहिला. मग औरंगजेब ती कल्पना सिद्धीस गेली नाहीं ह्मणून पुनः भीमातीरीं ब्रह्मपुरीस जाऊन उतरला; तो तेथें लश्कराचे उपयोगी पडतील अशीं कितिएक मोठीं मोठीं घरें बांधून, कांहीं वर्षे राहिला. तेव्हां त्या औरंगजेबानें तेथूनच आपला सर्व राज्यकारभार चालविला.

त्यापुढें दोनवर्षे पर्यंत महाराष्ट्र मुलखीं कांहीं विशेष वर्तमान झालें नाहीं; पोर्तुगीस लोकांवर औरंगजेबाचा राग होऊन, कोंकणांत मात्र त्यांचे कित्येक गांव लुटले; तेसमयीं कितेक ते लोक समुद्रतीरीं दमन व वसई, या दोहों किल्ल्यांत राहून वांचले. त्याच वेळेस औरंगजेब समुद्रतीरांतील उपद्रवामुळें इंग्रेज लोकांसही कोठेंकरून मुंबईंतून हाकून द्यावयास इच्छीत होता; परंतु मुंबई स्थान घ्यावयास अतिशय अवघड याकरितां औरंगजेबानें तो उद्योग केला नाहीं.

नंतर महाराष्ट्र मुलखांत संताजी घोरपड्यानें फार उपद्रव केला, आणि जे मोंगल त्याचे पाठीस लागले होते, त्यांस, समयविशेषीं जिंकून त्यांपुढें उपाय नचाले अशा समयीं पळून त्याणें आपल्या सामर्थ्याप्रमाणें त्यांचा नाश केला. शेवटीं वीस हजार स्वार बरोबर घेऊन औरंगजेबाचें थोरलें लश्कर पूर्वेकडे टाकून सातान्यावरून कर्नाटकांत शिरला. मग जिंजीजवळ गेला तेव्हां त्या लश्कराचा निमरा थोडा लश्कर, धनाजी आधीच बरोबर देऊन, जिंजीस मोंगलां

घेरा

घेरा घातलेल्या लश्करावर छापा घालावयाकरितां जलद पुढें पाठविला. तो जातांच प्रथम जिंजीजवळचें एक मोंगलांचें ठाणें त्याणें मारिलें; तेणेंकरूनच मोंगल समजले कीं मराठे जवळ आले; त्यावेळेस त्या शहरांत जे राजारामाचे लोक होते तेही बाहेर निघून मोंगलांस मारूं लागले; तेव्हां आसमंतात त्यांचीं ठाणीं होतीं तीं एकत्र करून बंदोबस्त करावयास त्यांनां अवकाश सांपडला नाहीं. त्यायोगें त्यांचा फार नाश झाला; इतक्यांत संताजी घोरपडा जिंजीकडे हळूहळू येत होता, तो, खोबरपाकपर्यंत पोंचला, तेथें अलीमर्दनामें मोंगलांचा फौजदार होता तो मोठें सैन्य जमाकरून त्याशीं लढला; परंतु त्याचा अगदीं मोड होऊन, तो संताजीनें धरून, त्यापासून द्रव्य घेऊन सोडिला. मग जिंजीच्या सभोंवतीं दूर दूर जितकीं मोंगलांचीं ठाणीं होतीं तितकीं संताजी व धनाजी या दोघांनीं मिळून मारून हटवलीं. तीं जिंजीजवळ गेलीं तेव्हां कामबक्ष याचे जवळचे जे स्वार होते ते कांहीं वैमनस्यामुळें लढेनात, आणि त्यांस बाहेरचें वर्तमान मराठे लोक कळूं देइनात; आणखी वदंता अशी उठविली, कीं औरंगजेब मेला; त्यावरून त्यालोकांचा मनांत भय आणि संशय एकदांच उत्पन्न झालें. त्यासमयीं जिंजींतले मराठे लोकही त्यांवर स्वाऱ्या घालून, मागित होते. तेव्हां जसे जिंजीसभोंवता वेढा घालून मराठे लोक मोंगलांनीं पूर्वीं कोंडले होते, तसेच, तेही मराठ्यांचा वेढ्यांत सांपडले. यास्तव उदास चित्त होऊन, शहरास भोंवते मोरचे होते ते मोडून त्या तोफा लढाईचा उपयोगी नाहींतशा करून, तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां असें ठरलें कीं, मोंगलांस न अडवितां, वांदिवाश गांवांपावेतों जाऊं द्यावे, मग तेथें औरंगजेबाचें लिहिलें येई तोंपर्यंत, त्यांस त्याच जागीं राहूं द्यावे.

तो तह औरंगजेबाचा मनास न आला. त्याणें कामबक्षनामें आपला पुत्र व आम्मदखान वजीर, माघारें बोलाऊन, पुनः जुल्फिकारखानास जिंजी घ्यावयाचें काम सांगीतलें; आणि आपण भीमातीर सोडून लश्कर सुद्धां विजापुरास गेला.

तेसमयीं संताजी घोरपडा कर्नाटकांत स्वाऱ्या घालून विजापुरसंबंधें मुलुख उद्ध्वस्त करीत होता; त्याचा शासनार्थ बादशाहानें विजापुरांतून मोठें सैन्य पाठविलें. त्याशिवाय त्या मुलखीं काशीमखाननामें मोंगलांचा फौजदार होता, त्याला आज्ञा दिली कीं, तूं त्या सैन्यास कुमक कर. त्यावरून तें लश्कर व तो फौजदार हे सर्व मिळून संताजीला शोधूं लागले असतां, तो त्या लश्करावर अकस्मात येऊन पडला, आणि बहुत लोक मारिले; त्यापुढें मोंगल लोकांचे लश्करांत मोठे मोठे सरदार फार होते, त्यामुळें त्यांचें एकचित्त वागणें

गणें होईना; तें आपणास मोठें हितावह, असें समजून, मराठे लोक त्या लश्करा-
वर दिवसा छापा घालीत, आणि रात्रीं बाणानीं भाजीत; असा उपद्रव त्या लोकां-
नीं तीन दिवस सोसला; नंतर दादेरी नामें एक लहानसा किल्ला आहे तेथें जा-
ऊन त्या आश्रयानें आसमंतात् राहिले. मग थोडकेच दिवसानीं त्यांस अन्ना
दिकाचा तोटा पडला, तेव्हां त्या किल्ल्यांत काहीं धान्यादि होतें तें लुटलें जाईल
ह्मणून त्या किल्लेकर्यानीं दरवाजा बंद केला असतां, तेथचा वाण्यानीं भिंतीवरू-
न फार महाग विकलें; तरी सरलें. त्या लश्कराचे कुमकेस औरंगजेबानें दुसरें
लश्कर पाठविलें तें त्यास जाऊन मिळालें नाहीं तोंच, संताजीनें वाटेंतच त्याशीं
लढाई करून जिंकिलें. तें वर्तमानही मोंगलांस कळूं दिलें नाहीं, नंतर ते
लोक अगदीं निराश होऊन, मराठ्यांस शरण गेले; त्यांत कासीमखान प्र-
माणिकपणें मोठ्या योग्यतेनें स्वामिसेवा केलेला होता; त्याला तें शरणजाणें
फार वाईट वाटलें ह्मणून, विषखाऊन मेला. इतर जे मोठे मोठे सरदार हो-
ते, त्यांपासून खंडणी घेऊन लुटून सोडिले, ते औरंगजेबाकडे गेले असतां,
त्यांवर त्याची इतराजी होऊन, त्याणें ते पदच्युत करून तेथून दूर देशीं अल्पा-
धिकारीं योजिले. इतक्यांत जुलफिकारखान जिंजीस जाऊन त्या शहरास
वेढा घालावयाचें काम आळसत करीत होता, त्यावरून औरंगजेब समजला
कीं, त्याचा राजारामाशीं कांहीं स्नेह असेल, हें वर्तमान जुलफिकारखानास
कळलें तेव्हां त्याणें राजारामाला सांगीतलें कीं, आतां मला या शहरास घेरा
अवश्य घातला पाहिजे; त्यास तुह्मीं पळा मीं तुह्माला अनुकूल आहें; तेव्हां
राजाराम आपले सोयरे शिरके बरोबर घेऊन, विशाळगडीं गेला, ते समयीं
जुलफिकारखान व राजाराम यांचा असा करार ठरला होता कीं, शहर घेत-
ल्यावर राजारामाचीं मुलें व स्त्रिया कांहीं निमित्तें करून शिरक्यांचे स्वाधीन
करावीं, असें सन सोळाशें सत्याण्णवांत झालें. मग सन सोळाशें अठ्याण्ण-
वांचे पहिल्या महिन्यांत जुलफिकारखानानें जिंजी शहर भिंतीला शिडी लावु-
न घेतलें; त्यांत राजारामाची बायका, मुलें, व मोठे मोठे सरदार सांपडले; त्यां
तील तीं मुलें आणि बायका तेथें कोणी शिरके कुळाचे गृहस्थ होते त्यांचे
स्वाधीन केलीं तीं त्याणीं राजारामाजवळ पोंचवलीं. आणखीं जे उरले
थोर सरदार माणूस त्यांत कित्येक कैद केले, ते असे कीं जन्मभर. कित्ये-
क जिवें मारिले. कांकीं आपणाविषयीं बादशाहाचे मनांत फितुराचा सं-
शय आलेला गेला पाहिजे ह्मणून. जे मारिले त्यांत प्रल्हाद निराजीचा पु-
त्र नारो प्रल्हाद होता. प्रल्हाद निराजी, प्रतिनिधी, तो तर आगोदरच मर-
ण पावला.

राजाराम जिंजीहून गेल्याचा अगोदर पासूनच संताजी व धनाजी यांचें वांकडें पडलें होतें; परंतु तें प्रकट झालें नाहीं. कांकीं प्रह्लादनिराजीचा मसलतीनें राजाराम कोणाचाही पक्षपात धरीत नसे, मग तो प्रतिनिधी मेल्यावर जे संताजीचे शत्रू होते त्यांचा बुद्धीस लागून राजारामानें धनाजीचा पक्ष धरिला. त्या वेळेस औरंगजेबानेंही मराठ्या लोकांत वैमनस्य पडलेलें ऐकून आपल्या वकिलादिकांकरून त्या वैमनस्याची वृद्धी करविली, अशा निमित्तेंकरून संताजीचा लश्कराचे लोकही त्या संताजीवर प्रीति करिनात असे झाले; ते कोणे एके दिवशीं धनाजीचा लोकांस मिळून, संताजीला धरून कैद करावयाचे मसलतींत पडले; तें संताजीस कळलें तेव्हां तो आपले विश्वासू लोक थोडकेसे बरोबर घेऊन पळाला. त्या वेळेस मराठ्यांचा लश्कराचे दोन भाग झाले, त्यांतील एक भाग कर्नाटकांत जुलफिकारखानावर गेला; आणि दुसरा सातान्यास गेला. तेथे राजाराम विशाळगडाहून आला असे, त्याला रामचंद्रपंतानें मसलत दिली होती कीं, सातान्याची राजधानी करावी. संताजी पळाल्या तेव्हां राजारामानें कांहीं लोक त्याचे पाठीस लाविले.

अष्टप्रधानांतला अमात्य जनार्दन पंत हणमंत्या मेला, तेव्हां त्याची पदवी रामचंद्रपंतास देऊन, त्याचा मुख्य कारभारी संकाजी नारायण त्याला सचिव पद दिलें. पहिला सचिव जेव्हां मोंगलांनीं पहिल्यानें जिंजीस वेढा घातला, तेव्हांच तो आपला अधिकार टाकून काशीस गेला.

जनार्दन पंत हणमंत्या पहिला अमात्य, त्याचा पुत्र तिमोजी हणमंत्या, तो मोंगलांचे कैदेंत जिंजीमधें सांपडला होता, तथापि कांहीं चातुर्यकरून, पळाला तो राजारामास येऊन भेटला; त्याचा बापाचा अगत्यास्तव आणि कल्पनेस आलें कीं, हा मोठा चतुर होईल म्हणून तो प्रतिनिधी केला.

मराठ्यांचा लढाऊ गलबतांचा सरदार, शिधोजी गुजर तो त्याच संधीस मरण पावला; तो जंजिऱ्याचा शिद्दीशीं निरंतर लढत असे, त्याचा सोबतीनीं कानोजी आंगऱ्या, त्याणें शिद्दी व मोंगल वगैर कोणी लोक यांचीं कित्येक मोठीं मोठीं जहाजें घेतलीं होतीं; आणखी मुंबेपासून मलबार लगत त्रावनकोर पर्यंत गांवे लुटून बहुत द्रव्य मिळविलें. तो बहुधा सुवर्णदुर्ग आणि विजेदुर्ग या दोहों ठिकाणीं राही. परंतु त्याचें शिवाजीचे वेळेचें रहावयाचें मुख्य ठिकाण कुलाबा. वाडीचे देशमुख सावंत ते समयविशेषीं मोंगलांचा पक्ष स्वीकारीत; परंतु आंतून राजारामाकडचे असत. कारवारच्या देसाई, तो कोणाचा पक्ष न धरिता, स्वतंत्रपणें आपण राजा असें म्हणवीत होता.

संताजी घोरपड्याचे पाठीस लोक लागले असतां तो फार दिवस कोणाचा हातीं सांपडला नाहीं तेव्हां बहुतेक लोक कंटाळून, त्या यत्नाचा आव्हेर करूं लागले; परंतु एक नागोजी मान्या नामें म्हसवडचा देशमूख होता, तो आपल्याच द्वेषामुळें त्याची पाठ सोडिना, तेव्हां तो संताजी कोणे एके दिवशीं पळतां पळतां फार श्रमी होऊन, शत्रु दूर असेल, अशी अटकळ करून ओढ्यामध्यें स्नानास उतरला; ते समयीं नागोजीनें तो असावध गांठून, त्याचें डोकें कापून औरंगजेबाचा लश्करांत नेऊन बादशाहाचे हुजूर ठेविलें. तेव्हां औरंगजेबानें त्याची प्रशंसा करून, त्याचा संमान केला, आणि तो आपल्ये चाकरीस ठेविला. संताजी अशा दुर्मरणानें मेल्यावर, कित्येक जे त्याचे जुने चाकर पहिले त्याला सोडून राहिलेले होते, ते परम क्रोधाविष्ट होऊन सर्व एकत्र मिळून, त्याचे दोघे पुत्र राणोजी व पिराजी, यांस घेऊन संताजीचा कुळाचा झेंडा लाविला. आणि स्वतंत्रपणेंच मोंगलांचा मुलखीं उपद्रव करूं लागले.

सन सोळाशें नव्याण्णवांत राजाराम सातान्यांतून लश्कर सुद्धां उत्तरेकडे आवयाकरितां निघाला, त्याला वाटेनेंच खानदेश, व गंगथडी, व वराड, या मुलखांतून उपद्रव करीत राहिलेले जे मराठे सरदार लोक होते ते सर्व येऊन मिळाले. त्यांचीं नांवें, परसाजी भोंसले. हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदा, आठवले समशेर बहादर, वगैरे जमून शिवाजीचा वेळेपेक्षां राजारामाचें लश्कर मोठें झालें. मग ते गंगथडींत शिरून चौथ व सरदेशमुखीचा अधिकार संबंधें वसूल घेऊं लागले; तेव्हां जा रेतेनें तें मान्य केलें ते वजे मोंगलांचे ठाणें करी शिबंदिवाले त्याणींही तें मान्य केलें असतां, त्यांशीं त्याणीं द्वेष न केला. आणखी जे कोणी मानिनात ते मारून टाकिले. त्या वेळेस त्या वसुलाचा बंदोबस्त शिवाजी प्रमाणें ठेविला होता, तो असा. जेथें वसूल उगवला तेथें उगवून घेतला, जेथें हातास लागेना तेथचा करारनामा करून घेतला. या प्रमाणें नांदेर, व वराड, व खानदेश. इतक्या जागीं केलें. तें काम थोडकेंसें राहिलें असतां, राजाराम तेथून माघारें परतला; तो वाटेनें येताना, त्याणें बागलाण मुलखींची बाकी राहिलेली घ्यावयास, खंडोजी दाभाडा ठेविला; खानदेशांतली घ्यावयास नेमाजी शिंदा, आणि वराडचे करितां, परसाजी भोंसला; आणि गंगथडीचे साठीं, हैबतराव निंबाळकर, असे ठेविले. त्यांत परसाजी भोंसल्याचें सेनासाहेबसुभा, असें नांव ठेविलें. आणि हैबतराव निंबाळकर याचें सरलश्कर असें नांव ठेवून, त्या दोघांस जरिपटक्याचीं निशाणें दिलीं. मग तेथून माघारें येत असतां वाटेनें जालना शहर लुटूं लागला होता; इतक्यांत जुलफिकारखान कर्नाटकांतून अकस्मात येऊन त्यावर पडला,

पडला त्याणें परम पौरुषें करून मराठे पिटून लाविले.

राजारामाचा लश्करावर जुलफिकारखान अकस्मात् येऊन पडण्याचें मूळ असें: धनाजी जाधव कर्नाटकांत शिरून उपद्रव करूं लागला असतां, त्यावर औरंगजेबानें मोठा सरदार जास मराठे लोक फार भीत होते असा जुलफिकारखान पाठविला; त्याणें कित्येकवेळा धनाजीचा पराभव केला, इतक्यांत खानदेशामध्यें राजारामानें बहुत उपद्रव केला असें वर्तमान औरंगजेबास कळलें तेव्हां त्याणें आपणाजवळ ब्रह्मपुरीं जुलफिकारखानाला बोलाविला; आणि आपला नातू आजिमशाहाचा पुत्र, व तो जुलफिकारखान यांजबरोबर सैन्य देऊन, मुलखांत मराठ्यांचा स्वाऱ्या जा फिरत होत्या त्यांचा बंदोबस्तास पाठविले; आणि आपण किल्ले घ्यावयाचें काम स्वीकारलें. अशीं दोन लश्करें दोहींकडे निघालीं, जुलफिकारखान जालनास जाऊन, राजारामाशीं लढला आणि औरंगजेबानें जाऊन वसंतगडास घेरा घातला; तेथें मोठे मोठे मोरचे लावून निहीं दिवसांत किल्ला हस्तगत करून, मोठ्या हर्षानें तेथून साताऱ्यास आला. त्या किल्ल्यावर जे मराठे होते त्यांची अटकळ अशी होती कीं, बादशाह आधीं पन्हाळा किल्ला घ्यावयास आईल, म्हणून तेथें अन्नाची मात्र दोन महिन्यांची बेजमी केली होती.

तेसमयीं औरंगजेबानें साताऱ्यास घेरा घातला तो असा, उत्तरेचे आंगीं आपण उतरला; त्या जागीं आतां कर्जे गांव आहे; आजिमशाह पश्चिमेस उतरला तेथें एक लहानसा गांव आहे, त्याचें नांव तेव्हांपासून शहापूर असें पडलें. दक्षिणेस शिरजीखान उतरला होता, आणि पूर्वेस तरबीयत् खान सरदार उतरला; अशीं चहूं दिशांस चार ठाणीं बसवून, त्यांचा मधून कोणाचेंही जाणें येणें न व्हावें म्हणून दुसऱ्या लहान लहान टोळ्या मध्यें मध्यें जागोजाग बसविल्या. तेसमयीं त्या किल्ल्यावर प्रयागजी नामें शिवाजीचा वेळेचा एक परभू असे. त्या किल्ल्याचा डोंगराची उंची नेमस्तच आहे; परंतु वरून सभोंवता तीस तीस हात कडा तुटलेला सारिखा, काळा दगड आहे; त्यावर तट फारसा उंचा नाहीं; त्या किल्ल्याचा एक ईशानी दिशेचा कोन, लांबीस आणि उंचीस अंमळसा अधिक आहे; त्याचा आकार बुर्जासारिखा दिसतो; आणि सभोंवता तुटलेल्या कड्यापेक्षां, त्या जागचा कडाही अधिक तुटलेला दिसतो. त्या टोंकावर बुरूज बांधला आहे, तें ठिकाण किल्ल्याचा साऱ्या जाग्यापेक्षां मोठें अवघड. असें असून तरबीयत् खानानें नेम केला कीं, हा कोंपरा सुरुंग लावून पाडून वाट करीन; अशी त्याची प्रतिज्ञा झाल्यावर, युद्धास आरंभ होऊन; साडेचार महिने लोटले; तो प्रयागजी

परभू

परभू असा पराक्रमी होता कीं, मोंगलांस एक पाऊलभर जागा आटोपायाला, महत्प्रयास पडे, जापुढें उपाय चालेना. कदाचित मोंगल हल्ला करूं लागले तर, तो आपले सारे लोक जमा करून मोठमोठाले दगड किल्ल्याचे भिंतीवरून खालीं टाकी, त्या दगडानीं तोफांपेक्षां त्याचें काम अधिक होई. तो असा पराक्रमें करून लढत असतांही आंतली बेजमी सरली; म्हणून किल्ला द्याव यास सिद्ध झाला परंतु तेथून जवळच परळी किल्ला, त्यावर परशुराम त्रिंबक होता. त्याणें आजिमशाहास कांहीं युक्तीनें वश करून किल्ल्यावर अन्नादिक साहित्य पोंहचतें केलें; हें वर्तमान सन सत्राशें भरतां घडलें. ते समयीं राजाराम सिंहगडीं दुखण्यां पडला होता.

तरबीयतखान याणें नेम केल्याप्रमाणें साडेचार महिन्यांत त्या ईशानीच्या कोंपऱ्या खालीं दोन सुरुंग तयार केले; तेणेंकरून मोंगलांस असें वाटलें कीं, निःसंशय कार्य आतां सिद्धीस जाईल; आणि तो चमत्कार पहावयास औरंगजेबही बसला होता, आणि त्या बेताप्रमाणें तो कोंपरा उडाला म्हणजे, त्वरित हल्ला करावयाकरितां, लोक तयार करून डोंगराच्या एका बाजूस लपून बसविले. याशिवाय अशी कांहीं युक्ति केली, कीं, त्या किल्ल्यावरचे बहुतकरून लोक औरंगजेबाची स्वारी पहावयाकरितां, त्या बुरजावर जमावे. त्याप्रमाणें तेही तसेच त्या ठिकाणीं जमले; त्यांत प्रयागजीही आला होता; ते समयीं मोंगलांनीं त्यांतल्या एका धाकट्या सुरुंगाला आग लाविली; तेव्हां त्या दारूच्या जोरानें त्या जागीं डोंगरास तडा गेला. आणि त्या धक्क्यानें त्या आंगची वरली भिंत वरच आंतल्या आंगीं पडून, तीजखालीं सांपडून, माणसें बहुत मेलीं. इतक्यांत ते हल्ला करून वर जावयास सिद्ध केलेले लोक कांहींसे जवळ गेले; तों दुसऱ्या मोठ्या सुरुंगास आग घातली, तो सुरुंग तयार करतानां कांहीं बेत चुकला होता, यास्तव त्याचा नेट वरचे आंगीं बुरजाकडे न पोंहचला, आणि मोठा भयंकर शब्द होऊन बाहेरच्या आंगीं तो सुरुंग मोंगलांकडे उडाला; तेणेंकरून मोंगल दोन हजारांवरही, कांहीं मेले गेले.

पहिल्या सुरुंगानें वरची भिंत पडली तेव्हां तो प्रयागजी तेथेंच देवीच्या देवळाजवळ त्या भिंतीखालीं सांपडला, तेव्हां त्याला तेथून खणून बाहेर काढिला; त्याचा आंगास कांहीं लागलें नव्हतें, आणि देवीजवळ होती, म्हणून त्या सर्व मराठ्यांनीं तो उत्तम शकून मानून निश्चय केला कीं, आपणास देवी अनुकूळ आहे, यास्तव त्यांस किल्ला द्यावयाचा नाहीं. इतकें झाल्यावर आजिमशाह पुनः त्यांस धान्यादि पोंचतें होऊं देईनासाज

झाला;

झाला; तेव्हां त्या आजिमशाहाचेच द्वारें किल्ला घ्यावा, असा मराठ्यां लोकांचा विचार होऊन त्याच वर्षाचा चवथ्या महिन्यांत त्यांणीं मोंगलांस किल्ला दिला; तेव्हां औरंगजेब समजला की, आजिमशाहाचे योगें किल्ला हस्तगत झाला. म्हणून बहुत संतुष्ट होऊन त्याचा कांहीं मान केला आणि किल्ल्याचें नांव आजिमतारा असें ठेविलें.

सातारा हस्तगत झाल्यावर, औरंगजेबानें परळी किल्ल्यास घेरा घातला; तेथचे किल्लेकरी मोठ्या शौर्यानें दीड महिना लढून शेवटीं किल्ला रिकामा टाकून पळाले; ते समयीं पर्जन्यानें बहुत उपद्रव केला तेव्हां मोंगलांनीं तात्काळ तो डोंगरांचा मुलुख सोडिला आणि माननदीचा कांठीं कवासपुरामध्यें जाऊन राहिले.

पूर्वी लिहिलें कीं, राजाराम सिंहगडीं दुखण्यांस पडला, त्या दुखण्याचें कारण असें, जालनाहून जुलफिकारखान त्याचे पाठीस लागला होता त्यामुळें त्याला रात्र दिवस पळावें लागलें; तेणें करून त्यास बहुत श्रम होऊन, तो उरीं भरला; त्या विकारानें तेथेंच तो एका महिन्यानें मरण पावला. नंतर एका महिन्यानें सातारा मोंगलांचे स्वाधीन झाला.

राजाराम कांहींसा शूर होता, त्यास मुलखी कारभाराचें चातुर्य नव्हतें; त्याणें प्रल्हाद निराजीच्या शहाणपणानें राज्य केलें; आणि संताजीचा नाश केला, हा मात्र त्यापासून अधर्म घडला. एरवीं तो दयाळू आणि उदार होता. त्याचा मरणाचें वर्तमान औरंगजेबाचा लशकरांत कळलें तेव्हां त्यांस असें वाटलें कीं, आतां मराठे सहज जिंकले जातील; म्हणून मोठा आनंद पावले परंतु त्या आनंदाप्रमाणें तें त्यांचा उपयोगीं न झालें. राजारामाचे दोन पुत्र होते त्यांत वडील शिवाजी तो राजाराम मेला ते समयीं दहा वर्षांचा होता; त्याची मातुश्री ताराबाई ती मोहित्यांची कन्या, धाकटा संभाजी तो त्यावेळेस तीन वर्षांचा, त्याची माता राजसबाई ती घाटगे यांची कन्या. रामचंद्रपंत अमात्य, व शंकराजी नारायण, व धनाजी जाधव, यांचा विचारानें ताराबाईनें आपला पुत्र गादीवर बसवून, राजसबाईला बंदींत ठेविली.

निमाजी हणमंत्या मोठा चतुर निघेल म्हणून, राजारामानें त्यास प्रतिनिधी केला होता; परंतु तो तसा झाला नाहीं म्हणून ताराबाइनें तें पद परशुराम त्रिंबकास दिलें; त्यापुढें ताराबाई एकाच किल्ल्यांत निरंतर रहात नसे, असाच धनाजी जाधवही कधीं एके जागीं राहिला नाहीं, आणि चोहींकडे स्वार पाठवून मुलखांत त्यांच्या घालीत असे; या खेरीज निंबाळकर

व

व भोंसले व गैरे मोठे मोठे सरदार सर्वत्र चौत व सरदेशमुखी व फौजेस घासदा-णा अशीं निमित्तें करून खंडणी घेत होते.

असा निरंतर उपद्रव होऊन दक्षिणेचा पैसा फार थोडा होऊं लागला तो औरंगजेबाचा लश्करास पुरेना तेव्हां त्याणें कधीं कधीं फौजा पाठवून हिंदुस्थानांतून आपलें खासगीचें द्रव्य आणविलें; तेंहीं कित्येक वेळा मराठ्यांनीं छापा घालून नेलें, ते वेळेस मोंगल लोक आपल्या पहिल्या चालीप्रमाणें लढत नव्हते.

या पुढें औरंगजेब वार्धक्यामुळें राज्याचे उपयोगी नाहींसा झाला; त्याचा पुत्र तोही राज्य कारभारास ठीक नव्हता. त्यामुळें बादशाह निवर्तल्यावर राज्य कोणे रीतीचें होईल तें कळेना; म्हणून जे कोणी कारभारी होते ते पहिल्याप्रमाणें राज्यकारणीं तत्पर असेनातसे झाले. अशानें त्यांची आंतून बलहीनता, व मराठे लोक पराभव पावतां पावतां युद्धनिपुण झाले; या निमित्तांहीं तें राज्य बुडूं लागलें होतें. त्या वेळेस जर मराठे लोक एकचित्त होऊन, उत्तम प्रकारें प्रजासंरक्षणाचा विचार करते, तर सर्वत्र त्यांचीच सत्ता झाली असती, परंतु तें झालें नाहीं; ते लोक बहुधा लुटीचा कामास मात्र एकत्र मिळून मसलत करीत; आणखी जास वाटे कीं मोंगलांस मिळावें यांत आपलें हित आहे; तो तिकडचा पक्ष स्वीकारी, त्या योगें त्या लोकांचें कांहींसें महत्व राहिलें होतें.

त्या काळीं मराठ्यांत कोणी स्वहितावांचून प्रजेचें किंवा स्वामीचें हित पाहिलेंच नाहीं. तो प्रकार असा, मोंगलपक्षी मराठे व ताराबाईचा पक्षाचे मराठे यां उभयतांची मार्गानें जात असतां जर कधीं गांठ पडली तर परस्परें मोठा सत्कार होऊन, एकत्र भोजनें होत आणखी उठून जातां जातां थट्टेनें मुसलमान लोकांप्रमाणें, अलहमदिलिल्लाहे असें म्हणत; आणि देवासही प्रार्थीत कीं, असा उपयोगी जो औरंगजेब बादशाह तो, बहुत दिवस वांचो.

औरंगजेबानें बहुतेक मोठे मोठे किल्ले घेतल्यावर तो कित्येक महिने जुनरास राहिला होता; मग पूर्वेस मराठ्यांनीं असा दंगा केला कीं, जाचा कर्नाटका पर्यंत उपद्रव लागेल, म्हणून त्याचा निवारणार्थ तो लश्कर सुद्धां तेथून निघून विजापुरीं गेला. ते समयीं त्याज बरोबर त्याचा प्रिय कामबक्ष नामा पुत्र होता, त्याची इच्छा अशी होती कीं आपण स्वतंत्रपणें विजापुरचें राज्य करावें; या हेतूस्तव त्याणें औरंगजेबास मसलत दिली, कीं मराठी लोकांशीं सल्ला असावा, मग धनाजी जाधवाचा द्वारें तें सल्ल्याचें बो-

लणें

ऊन लाविलें. त्यावेळेस दक्षिणेचा सहा सुभ्यांतील वसुलापैकीं दहावा भाग चौथ व सरदेशमुखी संबंधें, मराठ्यांस औरंगजेब देणार होता. ते समयीं धनाजीजवळ मराठे लोक फार जमले असत ते आपण प्रबळ असें जाणून, बादशाहापाशीं त्या खेरीज आणखी कांहीं मागूं लागले; तेव्हां त्याणें जाणलें कीं, मराठ्यांची मसलत दगा करावयाची असेल. म्हणून पहिले सख्याचें बोलणें करावयास पाठविलेले जे वकील त्यांस माघारें बोलावून नेलें; मग तें सर्व काम तसेंच राहिलें.

इकडे कर्नाटकांत लुटारू फार झाले, त्यांत वाकिणकेराचा नाईक मोठा प्रबळ. आणि त्याचा मराठे लोकांशीं अत्यंत स्नेह असे; यास्तव औरंगजेबानें विजापूर सोडून लश्करसुद्धां तिकडे स्वारी केली; तो जागा विशेष दृढ नव्हता. त्यास भुय् कोट मात्र होता, तथापि त्या नायकानें औरंगजेबाच्या कांहीं उपाय चालूं दिला नाहीं. बाहेरून धनाजी जाधव मोंगलांस चैन+ पडूं देईनासा झाला, तेव्हां औरंगजेब बादशाह याणें जुलफिकारखान वगैरे आपले मोठे मोठे सरदार बोलावून महल्वयास मांडिला; ते समयीं तो नाईक किल्ला रिकामा टाकून पळाला.

इतक्यांत मराठ्यांनीं देशामध्यें बहुत उपद्रव केला तो असा; रामचंद्र पंतानें पन्हाळा किल्ला व पवनगड घेतला; आणि परशुराम त्रिंबक याणें वसंतगड व सातारा घेतला; तेव्हां ताराबाई पन्हाळ्यावर आपणास रहावयाची जागा करून तेथें राहिली. त्या पासून तीचें मन त्या रामचंद्र पंताविषयीं सुप्रसन्न झालें; इतके किल्ले मराठ्यांनीं घेतले, त्यांत सातारा किल्ला घेण्याचा पर्याय असा; पहिला मावळे लोकांची कारकुनी केलेला आनाजी पंत नामें एक ब्राह्मण होता, तो मोंगलांनीं जिंजी घेतली तेव्हां तेथें बंदींत सांपडला असतां कांहीं युक्तीनें तेथून पळाला; त्याला वाटेनें मोंगलांचे लोक साताऱ्याचे बदलीस जात होते ते भेटले, त्यांस त्याणें कांहीं गोष्टी सांगून व कांहीं गाणें गाऊन. त्यांचीं मनें वश केलीं; त्याणें करून त्यांणीं त्याला आपल्या बरोबर नेऊन, त्यास राहायाला जागा साताऱ्यावर दिली. तो तेथें राहिला. त्याणें मोठ्या युक्तीनें मावळे लोक वर घेऊन, मग तेथचे सर्व मोंगल मारून टाकिले.

यापुढें सिंहगड व राजगड वगैरे कित्येक किल्ले मराठ्यांनीं मोंगलांपासून घेतले तो विस्तार विशेष लिहावासा नाहीं. त्या समयीं औरंगजेब

\+ त्या वेळेस मोंगल लोक आपल्यामध्यें कधीं घोडा पाणी पियावयास नेला असतां तो पाणी न पियी तर थट्टेनें त्यास म्हणत कीं, तूं पाणी कां पीत नाहींस तुला धनाजी पाण्यांत दिसला कीं काय. ते लोक इतकें धनाजीचें भय बाळगीत होते.

मरण पावला हें मात्र मोठें प्रकरण झालें.

तो औरंगजेब फार वृद्ध झाला, आणि त्यापासून मराठ्यांचा हातीं किल्ले लागले तेणें करून ते प्रबळ झाले; यास्तव बादशाह मनांत बहुत खिन्न होऊन सन सत्राशें सातांत तो माघारा अहंमदनगरीं+ आला आणि पूर्वीं वीस वर्षांचे पाठिमागें मोठ्या थाटानें ज्या जागीं उतरला होता, त्याच जागीं डेरा दिला, परंतु ते समयीं तें माहात्म्य नव्हतें. तो तेथें त्या डेऱ्यामध्यें येतांच आपल्या जवळचा लोकांशीं बोलिला कीं, या भूतळावर माझें जें हिंडणें होतें तें आज संपलें; याच जागीं माझा मृत्यु जगदीशानें नेमिला आहे. मग पुढें थोडकेच दिवसांनीं सनसत्राशें सातांचा दुसऱ्या महिन्याचे एकविसाव्ये तारिखेस, तो तेथेंच मृत्यु पावला. जर कोणी ह्मणेल कीं, औरंगजेबाचे गुण व स्वभाव कसे होते, तर त्याणें समजावें कीं, तो मोठा चतुर असून पापास भीत नसे. त्याचें अर्थींच लक्ष्य, परमार्थीं चित्त ठेविलेंच नाहीं. जाणें आपला लोभीपणा साधूचा सोंगानें छपविला, असा जो तो, प्रथम राज्य करूं लागला तेव्हां त्याची राज्यकारभाराविषयीं दक्षता व त्याची विद्या, व पर्याप्त संपत्ती असून जाचें स्वयें अनपेक्षासारिखें वागणें, इत्यादि प्रकारांहीं त्यावेळचे लोक त्याला बहुत मानीत; पुढें त्याणें ती वर्तणूक टाकिली तरी, त्याचा पहिल्या आचरणाचें स्मरण लोकांस होतें त्यावरून त्याचा शेवटपर्यंत लोकांत मान राहिला. त्याणें शहाणपणेंकरून विजापुरकर व गोवळकोंडकर या दोघांचा बळानें पृथ्वीतळीं बंडें मोडावीं, तें नकरितां तींच राज्यें बुडविलीं; तेणें करून बंडें प्रबळ झालीं, हा त्यापासून राजनीतीविषयीं मोठा प्रमाद घडला.

औरंगजेब निवर्तला ते समयीं त्याचे पुत्र तिघे होते; एक सुलतान माजुम, एक आजिमशाहा, एक कामबक्ष; त्यांतला सुलतान माजूम उत्तरेकडे काबुलमुलखीं अधिकार करीत होता. आजिमशाह बाप मेल्याचे पूर्वीं त्याजवळ येऊन राहिला होता. आणि ते समयीं कामबक्ष बादशाहानें विजापुरीं पाठविला होता. मग बादशाह मरण पावला त्यासमयीं आजिमशाह जवळ होता यास्तव बादशाहाचें तें सारें सैन्य त्याचे स्वाधीन झालें. जुलफिकारखान तर मुलखांत उपद्रव करणारे धनाजी वगैरे मराठे यांचा पाठीस लागला असे. तो औरंगजेब मेल्याचें वर्तमान ऐकतांच त-

---

+ औरंगजेब लष्कर सुद्धां अहंमदनगरीं आला तेवेळेस मराठ्यांनीं त्याला वाटेस गाठला, तेव्हां त्यांचें व याचें युद्ध झालें, ते समयीं मोंगलांस युद्ध करतां करतां दम धरवेनासा झाला, तेव्हां ते लढतां लढतांच तेथून पाय काढून अहंमदनगरीं गेले, तेव्हां मराठे असे प्रबळ झाले होते.

काळ त्यास सोडून आजिमशाहास जाऊन मिळाला.

सन सत्राशें सातांपासून सनसत्राशें वीसपर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग चारावा.

अनुक्रमणिका.

शाहूला शाहू असें नांव कोणेप्रकारें प्राप्त झालें तें प्रकरण.

तो शाहू दिल्लीतून सुटून आपल्या राज्यावर आला, तेसमयीं ताराबाईनें तो खोटा. म्हटला म्हणून युद्ध झालें.

अक्कलकोटचा राजाची मूळपीठिका.

बाळाजी विश्वनाथ याचा उद्भव.

मोंगललोक व शाहू यांची वर्तणूक.

धनाजी जाधवाचा मृत्यु.

ताराबाईनें पन्हाळा किल्ला घेतला, आणि कोल्हापुराची राजधानी करून तेथें राहिली.

ताराबाईचा पुत्र शिवाजी याचा मृत्यु.

संभाजी राजा होऊन ताराबाई बंदीस पडली.

चंद्रसेन जाधव आणि बाळाजी विश्वनाथ यांचा वाद होऊन जीं जीं वर्तमानें झालीं तें.

निजामउल्मुलुख याची गोष्ट.

मोंगल व मराठे यांचें युद्ध.

निजामउल्मुलुखानें कोल्हापुरकरांचा पक्ष धरिला, आणि शिधोजी घोरपड्यानें संभाजीचा पक्ष स्वीकारिला.

मराठेलोक यांमध्यें फार अव्यवस्था झाली.

कान्होजी आंग्र्यानें बहिरोपंत पेशव्याचा पराभव केला.

नंतर बाळाजी विश्वनाथानें कान्होजीशीं तह केला. तेणेंकरून मराठ्यांस हित होईल असें जाणून, शाहूनें बाळाजीला पेशवाई दिली.

मग तो पुरंदरचें आधिपत्य पावला.

नंतर मराठ्यांची कांहीं व्यवस्था दिसूं लागली तो तपशील.

शाहूचे स्वभावाचें निरूपण.

फेरुकसेर बादशाहानें मराठे लोक आपणास अनुकूळ करावयाचा

उद्योग-

उद्योग केला तो पर्याय.

त्याणें सैयदहुसेन अलीखानाशीं कत्रिम केलें तो विस्तार.

शाहू व सैयदहुसेन यांशीं तह होउन सैयद दिल्लीस गेला आणि फेरुकशेरास पदच्युत करून दुसरा बादशाह स्थापिला.

बाळाजी विश्वनाथ चौथ व सरदेशमुखी व स्वराज्य यांचा सनदा घेउन साताऱ्यास आला.

नंतर मराठे लोक राज्यांतील वसूल जमा करूं लागले तो प्रकार.

कान्होजी आंग्र्याची गोष्ट.

भाग बारावा.

पूर्वी मोंगलांनीं रायगड घेतला तेसमयीं तेथें संभाजीचा पुत्र व स्त्री सांपडलीं, तीं त्याणीं बादशाहाकडे नेलीं; असें मागें लिहिलें. तीं उभयतां औरंगजेबानें आपल्या कुटुंबाचा माणसांत ठेविलीं. त्यांवर बादशाहाची कन्या बेगमसाहेब अत्यंत प्रीति करूं लागली; आणि त्या पुत्राला सारा वेळ आपल्याजवळ बाळगीत असे; तेथें औरंगजेब येई तेव्हां त्या मुलास पाहून बहुत संतुष्ट होत्साता, त्याचा बापाचा चोरटेपणा मनांत आणून, त्याला साबाचा नावें, शाहू म्हणून थट्टेनें हाक मारी; मग तो मोठा झाला, तरी त्याणें आपलें तेंच नांव चालविलें. पुढें औरंगजेबानें त्या मुलाचीं दोन लग्नें केलीं; तीं एक संबंध शिंदकेरचा जाधवांचा कन्येशीं, दुसरा कण्हेरखेरचे पाटील शिंदे यांची कन्या. मग बादशाहानें ते उभयतां जाधव व पाटील यांचा संमान करून पदवीस चढविलें. शाहूयास अक्कलकोट, व इंदापूर, व नेवासें, व सुपें, जहागीर करून दिली. याशिवाय आपल्या कमरेची एक तरवार, व दुसऱ्या दोन तरवारा दिल्या; त्यांत एक शिवाजीजवळ भवानी नामें पहिली तरवार होती ती, व दुसरी आपझुलखानाची, शिवाजीनें त्यास दग्यानें मारून घेतलेली; या दोन्ही रायगडीं सांपडलेल्या होत्या; अशा तीन झाल्या. त्या अद्यापि साताऱ्याचा राजाजवळ आहेत. पुढें औरंगजेब बादशाह मरण पावला ते समयीं आजिमशाहानें त्या शाहूला आपल्या बरोबर नर्मदेचा उत्तरेस नेला; तो आजिमशाह, सुलतान माजूम नामा त्याचा भाऊ, त्याशीं युद्ध करावयास जात होता.

मोंगलांचें लश्कर देशांतून उठून गेलें, तें ताराबाई व तिचे अष्टप्र-

धान

धान यांस मोठें हितावह झालें; तें असें. पुण्याचा फौजदार लोदीखान, त्यास धनाजी जाधवानें जिंकून चाकण किल्ला घेतला; आणि जे इतर मराठे सरदार होते ते मोंगलांचा मुलखीं उपद्रव करीतच होते. हें वर्तमान आजिमशाहास कळलें. तेव्हां त्याणें जुलफिकारखानाचा मसलतीनें, शाहूची आई व भाउ व बायका यांस आमिनकीस ठेविलीं. कीं दंगा नव्हावा, अशा बेतानें शाहूस सोडिला. त्या वेळेस त्याणें बादशाहाजवळ कबूल केलें कीं, जर मी राज्यपदवी पावलों तर तुमचा आज्ञेंत वागेन. त्यावरून आजिमशाह ही बोलिला कीं, तूं जर तसा वागलास, तर तुझा बापानें घेतलेला विजापुरचा मुलुख, तो, व भीमा, आणि गोदावरी या दोहों मध्यें जितका मुलुख आहे, त्यांतील कांहीं तुला देईन. असा नेम ठरवून आजिमशाहानें शाहूला सोडिला.

तो शाहू तेथून मुक्त झाला, नंतर त्याणें दोन मराठे सरदार वराड, व खानदेश, यांत अधिकारी होते; त्यांस निरोप पाठविला कीं, मीं तुम्हाकडे येतों तुम्हीं मला अनुकूळ व्हावें; असें त्याचें सांगणें जातांच ते येऊन शाहूला भेटले; तेव्हां त्याणें ते वश करून घेतले. यानंतर हैबतराव निंबाळकर, व नेमाजी शिंदा, व गैरे कित्येक मराठे सरदार त्यास तसेच अनुकूळ झाले. मग शाहूनें ताराबाईला पत्र लिहिलें कीं, मी आपल्ये जागीं येतों, माझें पद माझे स्वाधीन करावें; तेव्हां ताराबाईचा मनांत त्यास तें पद द्यावेसें नव्हतें, म्हणून ती म्हणे कीं हा शाहू नव्हे; दुसरेंच कांहीं थोतांड असेल. आणि तिणें आपले अष्टप्रधान मिळवून त्यांपासून शपथ घेतली कीं, तुझा पुत्राचा पक्ष स्वीकारूं. इकडे शाहूचा मनांत अगोदर असें होतें कीं ताराबाईनें ठरविलें कीं, हा शाहू नव्हे, तें लोकांचा मनांतील जावयाकरितां कांहीं दिवस गोदावरीचा कांठीं राहून, आपण शाहू खरा असें लोकांस कळवावें; परंतु त्याजवळ पंधरा हजार फौज जमली यास्तव तो युद्धासच निघाला. इकडून ताराबाईकडचे प्रतिनिधी व धनाजी जाधव दोघेजण सैन्य घेऊन निघाले. तेवेळेस रैतेचें चित्त ताराबाईकडेसच होतें; याकरितां शाहूचें लश्कर वाटेनें येत असतां कोणे एके गांवीं त्यावर तेथच्ये गांवकरी यांणीं तोफांचे बार केले. तेव्हां तो गांव त्याणें लढून घेतला. तें युद्ध होत असतां त्या गांवांतून कोणी एक बायको आपला मूल कडेवर घेऊन बाहेर निघाली ती शाहूसमूर जाऊन त्यापुढें मूल ठेवून बोलिली कीं, मी हा आपला मूल तुमचा सेवेस अर्पिला. तो शाहूनें घेऊन, त्याजागीं आपणास प्रथम जय प्राप्त झाला म्हणून, त्या+ मुलाच्यें नांव फत्ते-

+ त्या मुलाचें पहिलें जन्मनांव लोखंडे असें होतें.

शिंग

शिंग ठेविलें; आणि त्यास भोंसले असें आपलें उपनाव दिलें. नंतर अक्कलकोटचा राजा त्यास केला. तो फत्तेशिंग अक्कलकोटकर भोंसले यांचा मूळ पुरुष.

शाहूचें व ताराबाईचें लष्कर यांची एकत्र गांठ पडतांच, शाहूचें व धनाजीचें कांहीं बोलणें होऊन, असा निश्चय ठरला कीं समयविशेषीं धनाजी शाहूचा पक्ष स्वीकारील; मग पुण्याचे उत्तरेकडे पंधरा कोसांवर लढाई झाली; त्यांत प्रतिनिधी होता त्याणें पाहिलें कीं, धनाजी तत्पक्षी झाला तेव्हां तो आपले लोक एकीकडे निराळे जमवून साताऱ्याकडे पळाला. मग शाहू व धनाजी मिळून चंदन व वंदन हे दोन्ही किल्ले घेतले, तेथें ताराबाईकडचा कित्येकां सरदारांचीं मुलें माणसें सांपडलीं; तीं त्याणें बंदींत ठेविलीं. नंतर पुढें जाऊन सातारा किल्ला घेतला, तो असा; तेथें एक मुसलमान सरदार होता, त्याणें युद्ध नकरितां तेथचा अधिकारी ब्राह्मण असे त्यास कैद करून किल्ला दिला. हें वर्तमान सन सत्राशें आठांत घडलें. तो शाहू साताऱ्यास पोंहचतांच त्याणें आपली गादी स्वीकारिली. आणि आपणास मराठयांचा राजा ह्मणवूं लागला, आणखी त्याणें गदाधर प्रह्लादास प्रतिनिधी करून बहिरोपंत पिंगळा याला पेशवा केला; सेनापती धनाजी जाधव होताच, त्याला प्रांतांतील वसूल जमा करावयाचें काम सांगितलें. त्यावेळेस दंग्यामुळें, मुलखाची लावणी नीट झाली नव्हती ह्मणून, जेथें सांपडे तेथें कांहीं घेत; भर वसूल उत्पन्न होइना. त्या कामावर धनाजीनें दोन कारकून ठेविले; एक आबाजी पुरंदरे, सासवडचा कुळकरणी, दुसरा श्रीवर्धनचा कुळकरणी त्याचें नाव बाळाजी विश्वनाथ भट, तोच पुढें पेशवा झाला; तें श्रीवर्धन चोलप्रांतीं आहे.

इकडे मोंगलांकडे काय काय वर्तमान झालें तें प्रकरण असें सुलतान माजूम व आजिमशाह हे दोघे आग्राजवळ लढले; त्या युद्धांत सुलतान माजूम जय पावला, आणि आजीमशाह व त्याचे दोन पुत्र व कित्येक मोठे मोठे सरदार मरण पावले. कामबक्ष तर बादशाह मेल्यावर आपणास, आपणच बादशाह ह्मणवूं लागला; तेव्हां मोंगल व कित्येक मराठे लोकही त्यास अनुकूळ होते. परंतु त्याची वृत्ती ठीक नाहीं असें पाहून, त्या लोकांनीं पुढें त्याचा पक्ष सोडिला. सुलतान माजूम तर जय पावला असतांही उत्संकळ नव्हता, मोठ्या धिमेपणानें दक्षिण जिंकावयास निघाला; तो आपला भाऊ कामबक्ष यास विजापुर व हैदराबाद या दोहों संस्थानांची बादशाही देणार होता; परंतु तो तें कांहीं ऐकेना आणि युद्धास सिद्ध झाला तेव्हां सुलतानानें

त्यावर

त्यावर जुलफिकारखान पाठविला; तो व कामबक्ष उभयतां हैदराबादेजवळ लढले, त्या युद्धांत कामबक्ष मेला.

तो जुलफिकारखान आग्राजवळचे लढाईंत आजीमशाह याचा लश्करांत होता; त्याणें त्या वेळेस मोठें शौर्य केलें; शेवटीं आजीमशाहाचा अगदीं नाश झाला तेव्हां तो युद्ध टाकून निघून गेला; त्यावरून मग सुलतान माजुमानें त्याला बोलावून आणून सर्व दक्षिणेचा अधिकार त्यास दिला. आणि,मीरउल अमराव असें त्याचें नांव नवें केलें. असा त्यास सुलतान प्रसन्न झाला म्हणून, तो सुलतान माजुमाकडचा झाला. तो जुलफिकारखान हैदराबादचे लढाईस गेला तेसमयीं शाहुराजानें त्याचे कुमकेस फोज पाठविली; तोही शाहूचें इष्ट चिंतित असे; त्याणें बादशाहास असें समजाविलें कीं, जर तुम्हीं शाहूला अनुकूळ व्हाल तर तो आपल्या प्रजेमध्यें मान्य होईल,तेणेंकरून आपलें हितच घडेल. त्यावरून बादशाह शाहूला दक्षिणेचा सरदेशमुखीची सनद द्यावयास सिद्ध झाला; मराठे पहिले सरदेशमुखी बळेंच करीत होते.परंतु जुलफिकारखानाचा बोलण्यावरून, बादशाह शाहूला त्या अधिकाराची सनद देत होता; तेव्हां ताराबाईचा वकिलांनी बादशाहाचा वजिरास समजाविलें कीं ताराबाईचा पुत्र मुख्य धणी, यास्तव सुलतानानें ताराबाईचा पुत्र शिवाजी याचे नावें सनद तयार केली, आणि तेसमयीं असा नेम केला कीं, तुर्त सनद द्यावयाची नाहीं; उभयतां लढून जो ठरेल त्यास देऊं.

त्याच वर्षीं पर्जन्यकाळीं शाहूनें ताराबाईशीं युद्ध करावयास चंदन व वंदन येथें लश्कर तयार करून ठेविलें; मग दसरा झाल्यावर लढाईची सिद्धता केली,तोंच प्रथम पन्हाळा व विशाळगड हे दोन्हीं किल्ले शाहूचा स्वाधीन झाले. मग रांगणा किल्ला घ्यावयास गेला तेथें ताराबाई होती. ती शाहू जवळ आला असें समजून तेथून पळून माल्वणास गेली. पाठिमागें तेथचा किल्लेकरी रांगणा किल्ला देइना म्हणून युद्धाचा उद्योग मांडिला तोही सिद्धीस जाइना; कांकीं, तो किल्लेकरी मोठा शूर होता आणि पर्जन्यकाळही समीप आला असे, याकरितां शाहू तेथून निघून कोल्हापुरीं गेला. त्यावर पाउसकाळ गेला नंतर पुनः तो कल्प निघाला होता, परंतु मोंगलांचा कांहीं सांगण्यावरून, त्याला ताराबाईस जिंकणें आवश्यक न पडलें; त्या बोलण्याचा प्रकार असा; तेसमयीं सुलतान माजूम माघारा हिंदुस्थानांत गेला त्याजबरोबर जुलफिकारखानही निघाला; तेव्हां त्याणें आपल्या अधिकारीं दाउदखान पनी नामें दुसरा एक

मुसलमान

मुसलमान ठेवून, त्याला दक्षिणेच्या सर्व अधिकार असून त्यासे शाज दक्षाणपुरच्याही अधिकार दिला. आणि शाहूचे पक्षी जे मराठे त्यांस सांगीतलें कीं, तुह्मास दाउदखान प्रतिवर्षी दस्तुलापैकीं चतुर्थांश देत जाईल. त्यावरून अर्थात् ताराबाईचें स्वामित्व नाहीं असें सिद्ध झालें, ह्मणून शाहू समजला.

नंतर सन सत्राशें नवांचा समाप्तीस शाहू कोल्हापुर सोडून माघारा सातान्यास आला; मग त्याणें आपणास दोन बायका केल्या, एक शिरके यांचा कुळाची दुसरी मोहित्यांची; त्याचा पहिल्या दोघी स्त्रिया दिल्लींतच होत्या; मग पुढें थोडक्याच दिवसांत त्यांतली एक मेली. ती शिंद्यांची कन्या होती. धनाजी जाधव यास फार दिवस बरें वाटेनासें होऊन कोल्हापुराहून माघारा साताऱ्यास येत होता तो वाटेनें वारणेचे कांठीं त्याच वेळेसच मृत्यु पावला. त्याजबरोबर बाळाजी विश्वनाथ श्रीवरधनकर होता; तो त्याचा शरीरास बरें नाहींसें होतांच, त्याचा सर्व अधिकार आपण संभाळूं लागला. तेह्मां धनाजीचा पुत्र चंद्रसेन जाधव व कित्येक त्याचे पदरचे ब्राम्हण ते त्याविषयीं मात्सर्य करूं लागले.

तो शाहू कोल्हापुर सोडून साताऱ्यास येतांच पन्हाळ्याचा हवलदाराशीं त्याचें कांहीं बोलणें झालें त्यावरून आणि पुढें सावंत यांचा साहाय्यें करून ताराबाई मालवणाहून निघून पन्हाळ्यास आली. ती तेथें येऊन पोंहचतांच त्या हवलदारानें किल्ला तीचा स्वाधीन केला; मग ती माघारी मालवणीं नजातां कोल्हापुरच आपलें संस्थान करून राहिली. वे समयीं रामचंद्रपंत व शंकराजी नारायण हे दोघे तिचा पक्षाचे होते, त्यांत शंकराजी नारायण, हा सचिव, याचा मुलखांत शिवाजी प्रथम राज्य करूं लागला ह्मणून मराठे लोक यांस असें वाटे कीं हें आपल्या राज्याचा आरंभाचें मूळ ठिकाण, यास्तव शाहूला तो मुलुख घ्यावयाचें काम आधीं करावें लागलें. याकरितां त्याणें पुण्याहून लश्कर पाठवून पहिल्यानें राजगड घेतला, त्या शिवाय जे त्याचे दुसरे किल्ले राहिले होते, त्यांतून सामान फार भरलेलें आणि शिबंदी मावळे लोक बहुत असत, ह्मणून असाध्यसें समजून तें काम टाकिलें. असें असतां शाहूला वर्तमान कळलें कीं, सचिव पंतानें ताराबाईचा पक्ष स्वीकारीन ह्मणून शपत वाहिली. तेणेंकरून त्यास महत्पश्चात्ताप होऊन, त्याणें सन्यास करून जळसमाधि घेतली. हें वर्तमान सन सत्राशें बारांचा पहिल्या महिन्यांत घडलें. त्याच महिन्यांत ताराबाईचा पुत्र शिवाजी यास देवी येऊन मेला. तेह्मां रामचंद्रपंत ताराबाईला राज्य कार्यांतून काढून, राजसबाईचा पुत्र संभाजी यास शिवाजीचे जागीं स्थापून मोठ्या

दक्षतेनें

दक्षतेनें आपण कारभार करूं लागला.

सचिव पंत मेला. तें शाहूस हर्षास्पद होऊन, करवीरस्थ ताराबाई वगैरे यांस विघ्न झालें. शाहूनें चतुरपणानें आपला भलेपणा व स्वामित्व लोकांत प्रकट व्हावें याकरितां, तेवेळेस नारोशंकर नामें त्या सचिवाचा पुत्र दोन वर्षांच्या असतां, त्याचा नावें सचिवपणाचीं वस्त्रें पाठवून, त्याचा कारभाऱ्याचा हातून तें काम घेऊं लागला.

त्याचा अशा आचरणानें, सचीव आज्ञेंत वागूं लागले, परंतु प्रतिनिधी वागेना; तो वश झाला पाहिजे ह्मणून शाहूनें उद्योग केला तो असा. त्याणें परशुराम त्रिंबक प्रतिनिधी याला केदेंतून सोडून, आपला प्रतिनिधी गदाधर प्रल्हाद यास दूर करून त्याचे जागीं परशुराम त्रिंबक यास नेमित असतां त्याणें त्या अधिकारीं आपला पुत्र योजिला. त्याणें विशाळगडीं जाऊन, त्याचा सारा मुलुख त्याचे हातीं लागतांच ताराबाईचा पक्ष स्वीकारिला; तेव्हां तीणें त्यास कोल्हापुरच्या प्रतिनिधी केला. असें होतांच शाहू समजला कीं, हें कृत्रिम परशुराम त्रिंबकाचेंच असेल; याकरितां त्यास पुनः केदेंत ठेवून जिवानशीं मारावा असें शाहूचा मनांत होतें, परंतु त्याजवळचे कारभारी याणीं त्यास असें समजाविलें कीं, जर तुह्मीं यास माराल तर लोकांचें मन तुह्मावरचें उतरेल; त्यास जरी त्याचा अन्याय असला तरी न मारावा हेंच योग्य तें शाहूच्या विचारास येऊन त्यास केदेंत ठेविला.

दिल्लीचा दरबारांत कांहीं प्रकरणीं, व्यत्यय आला ह्मणून दाउदखानाला दक्षिणेच्या अधिकार टाकून गुजराथेंत जावें लागलें; यास्तव मोंगल व मराठे यांचा तह होऊन मोंगल मराठ्यांस चौथ व सरदेशमुखी संबंधें जें देत होते, त्यांतही कांहीं अंतर पडलें. ह्मणून शाहूनें चंद्रसेन जाधव सेनापती यास मोंगलांचा मुलखांतून, तो चौथ व सरदेशमुखी व घांसदाणा संबंधें ऐवज जमा करून आणावयाकरितां फौज देऊन पाठविला. त्याबरोबर त्याचा बापाचा कारकून, बाळाजी विश्वनाथ यास देखरेख करावयास दिला; त्या दोघांचें वैमनस्य पूर्वीं धनाजीला समाधान नाहींसें झालें तेव्हांपासूनच पडलें होतें. मग या चौकशीचा निमित्तें करून फारच द्वेष वाढला. नंतर कोणे एके दिवशीं बाळाजी विश्वनाथाचे स्वार हरणाचे पाठीस लागले असतां त्यांशीं जाधवाचा स्वारांचा कांहीं कलह उत्पन्न होऊन, जो त्यांचा द्वेष गुप्त होता तो प्रकट झाला. तेव्हां बाळाजी विश्वनाथ आपला जीव रक्षावयाकरितां पळाला. तो सासवडांत सचिवाच्या कारभारी होता, त्याजवळ जाऊन त्याचें बहुत आर्जव करून पुरंदर किल्यावर आपणास

पणास आश्रय मागूं लागला; त्याणें जाधवाचा भयेंकरून त्यास किल्ल्यावर चढ़ दिला नाहीं. त्यावेळेस त्याचे पाठीस लागलेले जाधवाचे स्वार ही त्याचे दृष्टीस पडले; तेव्हां तो बाळाजी विश्वनाथ व त्याचे दोघे पुत्र बाजिराव आणि चिमणाजी, व थोडकेसे लोक त्याबरोबर होते. ते समुद्राच्या खोऱ्यांत पांडवगड आहे, त्या ठिकाणीं जावयाच्या विचारें करून कांहींसे तिकडे गेले; तेथेंही जाधवाचे लोक त्यांचा शोध करीत होते, ते त्यांस उमगले; मग थोडकेसे दिवस कुठेतरी दडून राहिले. त्यांत एक पिलाजी जाधव, एक दुमाल नामा, असे दोघे मराठे होते. त्याणीं कबूल केलें कीं, आम्हीं आपल्या भाउबंदांकडचे कांहीं शिपाई जमाकरून तुम्हाला पांडवगडास पोंहचवून देऊं; या कार्याकरितां मरून जाऊं. अशी शपथ दिली. नंतर त्याणीं त्याप्रमाणें लोक मिळविले. आणि बाळाजी विश्वनाथास घोड्यावर नीट बसतां येत नव्हतें असें असतांही, त्यास अश्वारूढ करून दोहींबाजूनें माणसांकडून धरवून, जाधवांचा लोकांशीं वाटेनें लढत लढत त्याला पांडवगडीं पोंहचविला. तेथें किल्लेकरी होता त्याणें शाहूचे आज्ञेस्तव, तो संरक्षिला. तेव्हां चंद्रसेन जाधव याणें त्या किल्लेकऱ्यास फार निकड लाविली, कीं याला लवकर माझा स्वाधीन कर; नाहीं तर मी शाहूचा पक्ष टाकीन. तेव्हां शाहूनें हैबतराव निंबाळकर सरलष्कर अहंमदनगरीं होता त्याला सातान्यास बोलाविला आणि पांडवगडास लिहून पाठविलें कीं, बाळाजी विश्वनाथाला जाधवाचे हातीं देऊं नये; नंतर जाधवास कळलें कीं, हैबतराव फलटनास येऊन पोंहचला; तेव्हां तो पांडवगड सोडून देउरास गेला. तेथें निंबाळकर हैबतराव आणि चंद्रसेन जाधव या उभयतांचा लष्करांची गांठ पडून, मोठें युद्ध झालें; त्यांत जाधव पराभव पावला. तो कोल्हापुरास गेला, त्याजबरोबर सरजेराव घाटगा होता; त्याचें वडिलांचे वेळेचें कांहीं वेतन कागल प्रांतीं होतें, त्या विषयीं सनद राजसबाईच्या पुत्र संभाजी याणें त्यावेळेस दिली. त्यापुढें घाटगे व जाधव उभयतां मिळून, चेनकुलिचखान नामें दक्षिणेचा नवा अधिकारी आला होता त्याचे भेटीस निघून गेले. त्याणें जाधवाचा मान केला; आणि आपल्ये चाकरीस रहावयास सांगितलें. तें त्याणें मान्य केलें. म्हणून त्याचे जवळचा लोकांचा पोषणार्थ भालकी शहर संबंधें मोठा मुलूख जहागीर करून दिला. याप्रमाणें सन सत्राशें तेरांत घडलें.

तेवेळेस मोंगलांतजें वर्तमान झालें, तो प्रकार असा. सुलतान मोअज्जम सन सत्राशें बारांत मेला तेव्हां त्या तक्ताचा आधिपत्याविषयीं, त्याचे पुत्र

भांडूं लागले; त्यांत कोणासही तें प्राप्त न होतां तेथें दोघे सैय्यद होते ते मोठे शूर असत; एकाचें नांव आबदुल्लखान, एक हुसेन अल्लीखान, त्यांणीं सुलतान माजुमाचा नातू (पुत्राचा पुत्र) फेरुकशेर, यास तक्ताधिपती केला. त्याच कलहांत, जुलफिकारखान याचें डोकें मारलें गेलें. नंतर दक्षिणेचा अधिकारी दाउदखान याची बदली होऊन त्या जागीं चेनकुलिचखान याची योजना झाली; त्यांत विशेष हाच कीं, तो चेनकुलिचखान दक्षिणेचा अधिकारी मोठा विख्यात झाला. तोच हैदराबादच्या तक्ताधिपतींचा मूळपुरुष, त्याचें मोठ्या पदवीस चढणें, याचा विस्तार असा. त्याचा बाप गाजीवदीन नामा, त्याचें पूर्वींचें नांव मीरकमर अदीन तो तरुण होता तेव्हांच औरंगजेबानें चेनकुलिचखान असें त्याचें नवें नांव ठेवून त्याला पांचां हजारां स्वारांची मनसब, आणि विजापुरची सुभेदारी दिली; पुढें औरंगजेब मेल्यावर, फेरुकशेराचा स्थापनाविषयीं, त्या सैय्यदांची कुलिचखानानें मदत केली; त्याचा आणि जुलफिकारखानाचा द्वेष होता, ह्मणून फेरुकशेर याणें हा आपला हितकर्ता असें जाणून याला जुलफिकारखानाचा अधिकार दिला; आणि त्याचा नांवास निजाम उल मुलुख, असें पद जोडिलें. यावरून असें दिसतें कीं, एकाचा द्वेष करणारे किंवा प्रीति करणारे असे जे दोघे ते परस्परें एकमेकाचे मित्र होतात; याप्रमाणें गरीब व संपन्न यांची रीति सारिखीच आहे.

आधव सेनापती व घाटगे उभयतां चेनकुलिचखानाकडे गेले; त्यांचे बरोबर रंभाजी निंबाळकर नामें तिसरा एक मराठा गेला होता, तो थोडक्या दिवसांत मोठा विख्यात होऊन, रावरंभा असें नांव पावला.

दक्षिणेचा अधिकारी निजाम उल मुलुख औरंगाबादेस जाऊन पोंहचला, त्याणें त्यासमयीं शाहूच्या हैबतराव निंबाळकर सरलश्कर याचा उपद्रवशमनार्थ, फौज पाठविली. तें वर्तमान ऐकून हैबतराव सरलश्कर गोदावरीचा कांठ सोडून भीमातीरीं गेला. त्याचा पुष्टीकरणार्थ शाहूनें बाळाजी विश्वनाथ याजबरोबर सैन्य देऊन त्याचा नावास सेनाकृत असें नवें पद जोडून पाठविला. तो हैबतराव सरलश्करास भेटतांच उभयतांचा विचार ठरला, असा कीं, पुरंदर किल्ल्याजवळ जाऊन, मोंगलांचा लश्कराची वाट पहात रहावें; नंतर त्याप्रमाणेंच पुरंदराजवळ युद्धप्रसंग होऊन, मराठे आपला जय झाला असें ह्मणूं लागले; परंतु त्यांचें लश्कर तेथून मागें हटून, साल्ह्याच्या घाटाजवळ गेलें; तेसमयीं मोंगलांचा लश्करांत रंभाजी निंबाळकर मराठा व त्याचे लोक होते त्याणीं लढाई झाल्यावर पुणें परगणा घेतला; त्यावरून निजाम उल मुलुखानें त्यास पु

ण्या

ण्याजवळच जहागीर दिली; यानंतर शाहूचा आणि मोंगलांचा कांहीं तह होऊन, मोंगल माघारे औरंगाबादेस गेले.

त्यावेळेस दक्षिणेचा राज्याची फार अव्यवस्था झाली; ती अशी कोणी सरदार शाहूकडचे, आणि कोणी संभाजीकडचे; असे दोन पक्ष होऊन, आणखी जो कोणी बलाढ्य मराठा असे, तो स्वतंत्रपणेंच वागे. अशास्वसत्तेनें वागणारा दमाजी थोरात नामें सरदार रामचंद्रपंताचे पदरचा; तो पाटसे जवळचा हिंगणगांवची गढी नीट करून, त्याचा आसमंतात वीस कोस पर्यंत सत्ता करीत असे. त्याचा स्वभाव द्वाड होता, अद्यापि मराठी लोकांत त्याची कथा अशी आहे कीं त्याणें कोणे एके समयीं बाळाजी विश्वनाथाशीं बेल भंडार करून अभयवचन दिलें असतां, पुढें त्या प्रसंगीं असें उत्तर केलें कीं, भंडार म्हणजे हळद ती काय? आम्हीं नित्य खात नाहीं? तसाच बेल म्हणजे वृक्षाचीं पानें, तीं माझें काय करितील?

दुसरा एक स्वतंत्रपण करणारा उदाजी चव्हाण नामें बत्तीसशिराळेचा गढींत असे; त्याणें असा उपद्रव केला कीं, शाहूला त्याचा शमनार्थ शिराळें व वराड यांची चवथाई द्यावी लागली. त्या दोघांखेरीज दुसरेही कित्येक लहान, मोठे मराठे होते ते आपणास संभाजीचे पक्षी म्हणवीत; त्यांत कान्होजी आंग्र्याही होता. त्याचे हातीं सावंताचे वाडीपासून, मुंबईपर्यंत मुलुख असतांही, तो कल्याण परगणा घ्यावयाचा उद्योग करीत होता. त्या संकटसमयीं, बाळाजी विश्वनाथानें शाहूशीं मसलत केली कीं, या वेळेस मोठा पराक्रम केला पाहिजे, नाहीं तर राज्य बुडेल. त्यास आधीं दमाजी थोरात जिंकावा, अशा बेत होऊन तो सैन्य घेऊन निघाला. त्यास थोरातानें कांहीं तहाचें बोलणें व्हावयाचें म्हणून बोलाविलें, मग दग्यानें तो बाळाजी विश्वनाथ व त्याचे दोघे पुत्र एक बाजीराव, व एक चिमणाजी, व त्याचा मित्र आबाजी पुरंदऱ्या, इतके बंदींत ठेविले. नंतर त्यांस सोडावयाकरितां बहुत द्रव्य मागों लागला, आणि फार उपद्रव केला. तो त्याणीं सोशीला, तेव्हां शाहूनें त्यांचा मुक्ततेसाठीं मुर्दंड मागितल्या प्रमाणें भरून, त्यांची सुटका केली, उपरांत सचिवपंतास आज्ञा दिली कीं, तुम्हीं थोरातास जिंका; तो तेथें जाऊन युद्ध झालें, तेव्हां थोरातानें सचिव व त्याचा मुतालीक, उभयतां धरून हिंगणगांवचा किल्ल्यांत कैद केले.

इकडे सातान्यास शाहूनें दोन स्वाऱ्या तयार केल्या, त्यांत एक बहिरोपंत पिंगळ्या पेशवा नेमला; त्याणें कोंकणांत जाऊन कल्याण परगणा रक्षावा. दुसरा बाळाजी विश्वनाथ याणें शंभुमहादेवाचा डोंगराकडचा उपद्रव

द्रव

द्रव करणारा. कृष्णराव खटावकर, त्यावर जावें. तो ब्राह्मण असा धीट झाला होता कीं जो शाहूचा लश्करावर ओढा पावेतों चालून आला. त्याचा बाळाजी विश्वनाथानें अगदीं पराभव केला असतां, शाहूनें तो शरण आलासा पाहून त्याचा अन्यायाची क्षमा केली. आणि खटाव गांव त्यास इनाम करून दिला. तो अद्यापि त्याचे वंश्य अनुभवितात. त्या लढाईत बाळाजी विश्वनाथ जय पावला, त्याचें मुख्य कारण परशुराम त्रिंबकाचा दुसरा पुत्र श्रीपतराव त्याचें शौर्य. तो जा वेळेस निघाला त्यासमयीं त्याचा बापानें त्याला साताऱ्यांतच सांगितलें कीं, तुझा वडील भावानें दगा करून ताराबाईचा पक्ष स्वीकारिला; तेणें करून हा एवढा अनर्थ प्राप्त झाला; त्यास जर तूं या वेळेस, मोठें शौर्य करिशील, तरच माझी येथून सुटका होईल. असें त्यास पित्याचें सांगणें होतें, म्हणून तो मनापासून लढला; त्यावरून शाहू प्रसन्न होऊन, त्याचा बापाला सोडून त्याची प्रतिनिधी पणाची पदवी पुनः त्यास दिली.

बहिरोपंत पिंगळा आंग्र्यावर गेला होता, त्याची व आंग्र्याची लढाई कोंकणांत झाली. त्या युद्धांत आंग्र्यानें तो बहिरोपंत धरून कैदेंत ठेविला. आणि शाहूचे किल्ले, लोहगड व राजमाची हे दोन्ही घेतले; आणखी लोकांत वर्तमान उठविलें कीं. आतां सातारा घ्यावयास जाणार. तेव्हां शाहूनें आपले सर्व लोक साताऱ्याजवळ जमा केले. त्यांत मुख्य बाळाजी विश्वनाथ केला, तो आंग्र्याचा पराक्रम जाणत होता, म्हणून युद्धापेक्षां तह करावा हेंच चांगलें असें समजून, त्याणें आंग्र्याशीं तह केला. तो प्रकार असा, शाहूनें मोठे आवघड असे दहा[+] किल्ले, आणि अंमलसें सवघड, असे सोळा किल्ले व त्यांसंबंधें गांवें दिलीं. या खेरीज त्यास लढाऊ गलबतांचें मुख्यत्वही दिलें; आणि त्याचें पूर्वींचें नाव सरखेल असें होतें. तें तसेंच स्थापिलें. आंग्रे याणीं, बहिरोपंत पेशवा सोडावा. आणि राजमाची खेरीज जे शाहूचे किल्ले घेतले ते द्यावे, आणि शाहूचा पक्ष धरावा, संभाजीचा धरूं नये.

या प्रमाणें शाहूचा व आंग्र्याचा तह होऊन शाहूचा मुलुख आंग्र्यानें माघारा दिला. त्यांत आंग्र्याबरोबर कांहीं मुलुख शिद्दीनें घेतला होता, तोही शाहूकडे गेला. त्यावरून शिद्दी आंग्र्याशीं लढूं लागला, तेव्हां आंग्र्याचा कुमकेस बाळाजी विश्वनाथ गेला. मग ते शिद्दीचा मुलखांत शिरले तेव्हां तो लवकरच शरण आला.

असें उत्कृष्ट कार्य करून बाळाजी विश्वनाथ माघारा शाहूकडे साता-

---

+ त्यांतील कुलाबा सुवर्णदुर्ग विजेदुर्ग जयगड देवदुर्ग कनकदुर्ग फत्तेगड उचितगड यशवंतगड.

त्यास

त्यास सन सत्राशें चवदांत गेला. तेव्हां शाहूनें त्याचा मोठा मान करून, त्याला पेशवाई दिली; आणि त्या बाळाजीचा मित्र आबाजी पुरंदऱ्या तो त्याचा मुतालीक केला. आणखी +रामचंद्रपंत भानू, त्यास पेशवा याची फडणिशी दिली. पहिला पेशवा बहिरोपंत पिंगळा तो दूर केला.

चंद्रसेन जाधव सेनापती त्याणें शाहूचा पक्ष टाकिल्या पासून, तें पद मानाजी मोऱ्यास दिलें. परंतु तो तादृश नव्हता म्हणून बाळाजी विश्वनाथ पेशवे व हैबतराव निंबाळकर उभयतां पुनः थोरातास जिंकाव्या करितां नेमिले. ते समयीं बाळाजी विश्वनाथास विचार पडला कीं, जर आम्हीं एथें युद्ध प्रसंग केला तर तो थोरात सचिव पंताला मारून टाकील. हें भय, व सचिवाची मातुश्री येसूबाई तीणें बाळाजीची फार प्रार्थना केली होती, यास्तव, त्याणें थोराताशीं कांहीं युक्तीचें बोलणें करून आधीं सचीव सोडिवला. नंतर युद्ध केलें, तेव्हां थोरातास तें लश्कर मोठें म्हणून मैदानांत लढवेना, याकरितां तो किल्ल्यांत जाऊन लढूं लागला, मग तोफा लावून किल्ल्याचा तट पाडून, आंत शिरले; आणि थोरातास कैद करून, किल्ला पाडून अगदीं नाहीं असा केला. येसूबाई आपला पुत्र सुखी आला असें पाहून, बहुत उपकारी होऊन, पुणे परगण्यांत जितके सचिव पंताचे हक्क होते, ते सारे बाळाजी विश्वनाथास दिले. तेवेळेस बाळाजीचीं कुटुंबाचीं माणसें सासवडीं होतीं. या देण्याखेरीज कधीं संकटसमयीं फार उपयोगीं पडेसा अत्यंत सुदृढ असा पुरंदर किल्ला, समयविशेषीं, मुलां माणसांचा संरक्षणासाठीं दिला. तो शाहूचा आज्ञेवांचून देवेना, म्हणून बाळाजीनेंही शाहूला हेंच निमित्त समजाविलें कीं, समयीं हा किल्ला आमच्या माणसांचा रक्षणास उपयोगी; त्यावरून शाहूनें किल्ला पेशव्यास द्यावा म्हणून आज्ञा दिली. तो शाहू इतका वश झाला, आणि पेशव्यास पुरंदर दिला हीं, आपल्या वंशाचा बंधाचे सांखळीची, पहिली कडी त्याणें आपल्या हातें घडली.

सन सत्राशें पंधरांत, सरलश्कर राजानें आपणास सेनापतित्व दिलें नाहीं म्हणून, राजाशीं कलह करून निघाला; तो गोदावरी तीरीं जाऊन राहिला; त्यावर पुनः त्याचें सख्य झालें नाहीं. त्यावेळेस पुणे परगण्यांत, मोंगलांकडचा बाजीकदम नामें, मुख्य अधिकारी होता. तो पेशव्यानीं आम्हीं रंभाजी निंबाळकरास उपद्रव करणार नाहीं, असें कबूल करून वश केला. नंतर त्या अधिकाऱ्यानें पेशव्याचा पक्षपात धरिला. तेव्हां तो परगणा पेशव्यांचा हातीं लागला; त्या पासून पेशवे उत्तम प्रकारें प्रजापालन करूं ला-

---

\+ रामचंद्र पंत भानु नाना फडनीसाचा मूळ पुरुष.

गले

गले असता चोराचें पारिपत्य प्रथमतः केलें.

बाळाजी विश्वनाथ पेशवा, याचें बळ त्यादिवसापासून वाढलें; आणि कोणतेंही मोठें कार्य त्याचे मसलतीवांचून होईना असें झालें; व शाहू राज्यकारभारांत मनांतून कोणाशीं वक्र नसे. त्यावरून बाळाजी विश्वनाथही तसाच वागे; त्याणें शिवाजीचे कायदे मनांत उत्तम मानिले होते. परंतु संभाजीपासून अशी चाल पडली होती कीं, कोणी मोठ्या सरदारानें पराक्रमें करून घेतलेला मुलुख त्यास देत; त्या प्रमाणें निरुपाय होऊन हाही कोणास सदा देई. या निमित्तें राज्य बळहीन असतें.

त्या वेळेच्या प्रतिनिधी व अष्टप्रधान यांचीं नांवें.

प्रतिनिधी, परशुराम त्रिंबक.

पेशवा, बाळाजी विश्वनाथ.

अमात्य. अंबाराम बापू राव हणमंते.

सचिव. नारोशंकर.

मंत्री, नारोराम शेणवी.

सेनापती. मानशिंग मोरे.

सुमंत, आनंदराव.

न्यायाधीश. होनाजी अनंत.

पंडितराव, मुद्गलभट्ट उपाध्याय.

त्याच वर्षीं, परसोजी भोंसले व हैबतराव निंबाळकर मेले; तेव्हां शाहूनें परसोजीच्या पुत्रास त्याचा मुलुख देऊन, त्याचें सेनासाहेब सुभा असें पदही दिलें. त्या प्रमाणें हैबतराव निंबाळकराचा पुत्रास देईना; त्याचें पद व मुलुख दावलजी सोमवंशी, यास दिला. यास्तव तो विमनस होऊन त्याणें शाहूच्या पक्ष टाकिला, आणि मोंगलांच्या सरदार चंद्रसेन जाधव, याचा पक्ष धरिला. त्या पुढें तो हैदराबादच्या निजामउल्मुलुखापासून, बारशी आदिकरून मुलुख जहागीर पावला.

त्या वेळेस शाहू राज्यकारभार आपल्या कारभाऱ्यांकडे संपवून, आपण स्वस्थपणें महालांत असे किंवा शिकारीस हिंडे; तो बाळपणीं औरंगजेबाचे घरीं मद्यद्वियोपभोगांत होता; त्यावरून ती सवय त्याला लागली; ती त्याचे मोठेपणीं ही जाईना; म्हणून तो स्वसंतोषें वागण्यांत प्रीति ठेवी. त्याला शिवाजी प्रमाणें, घाटमाथा किंवा कोंकणांत आंगेंच संचार करणें आवडत नसे; आणि त्याचे वकील व मानकरी लोक व कारभारी. आपआपल्या कामासाठीं फार नम्रतेनें, आर्जवी गोष्टी बोलत; त्या तो सत्य मानून. सर्व

कामें

कामें त्यांचे हातून करवी; तो असें न समजला कीं, सर्व कामें दुसऱ्याचे हातीं दिलीं असतां, तोच प्रबळ होऊन, आपल्या महत्वाची हानि होईल. याप्रमाणें वर्तमान असतांही, मराठे लोक त्यावेळेस प्रबळ होऊं लागले. शाहू चातुर्याविषयींतर मध्यम होता, परंतु मोठा धार्मिक असे, आणि ब्राह्मणाचें फार पालन करी. आणखी मोंगल लोक त्या शाहूचा बहुत मान राखीत, तेणेंकरून मराठ्यांचें विशेष प्राबल्य झालें; आणि त्याची प्रजा त्यास बहुत मानूं लागली. शाहूचा पूर्वी शिवाजीपासून, जितके तक्ताधीश झाले; ते स्वतंत्रपणा करीत, परंतु शाहू आपण हिंदूंचा तक्ताधिपति असून आपणास दिल्लीचा बादशाहाचा आश्रित ह्मणवी.

त्यासमयीं मोंगलांचा फेरुकशेर बादशाह यास जा दोघां सेयदांचा आश्रयानें पूर्वी तक्त प्राप्त झालें, ते आपणास डोयजड होतील; अशा शंकेनें त्याचा मनांत आलें कीं, दोघे वेगळे करून बळहीन करावे. यास्तव त्यांत अल्पवयस्क जो सेयद हुसेन अली खान नामें होता, त्याला दक्षिणेचा अधिकारी करून रवाना केला. आणि पहिला दक्षिणेच्या अधिकारी दाउदखान मोठा शहाणा, त्याणें मराठी लोकांशीं स्नेह ठेविला असे; त्याला आपण गुजराथेच्या अधिकारी केला होता, त्यास गुप्त लिहिलें कीं, मीं एथून सेयद पाठविला आहे, तर तुह्मीं दक्षिणेचें अधिष्ठान त्याचे हातीं लागूं देऊं नये; ह्मणजे सहा सुभे दक्षिण तुह्मास मिळेल. त्यावरून दाउदखानानें कुमकेस मराठे सरदारांस बोलावून, युद्धाची तयारी केली. तेव्हां मराठी सरदारांपैकीं नेमाजी शिंदा मात्र दाउदखानास मिळाला, त्याला बरोबर घेऊन सेयदाशीं लढला. तेवेळेस शिंदा एकीकडे उभा राहिला; लढला नाहीं कांकीं, त्याचा मनांत जो सबळ पक्ष दिसेल, तिकडे मिळावें असें होतें. नंतर युद्ध होऊन दाउदखान पडला; तेव्हां तो शिंदा सेयदास भेटून त्याजवळ राहिला. हें वर्तमान सन सत्राशें सोळांत घडलें.

सेयद हुसेन अली याणें दक्षिण सुभा येतल्यावर, प्रथम खंडेराव दाभाडे याचा पारिपत्यास फोज नेमिली; कारण, कीं, त्याणें सुर्तेपासून बऱ्हाणपुरपर्यंत वाटसरू लोकांस बहुत दिवस उपद्रव केला तो असा; कीं, त्याणें जागोजाग आपल्या लोकांचा टोळ्या करून ठेविल्या असत, ते लोक कोणी वाटेनें जाई, त्यापासून खंडणी घेऊन, त्यास पुढें जाण्याचें दस्तक देत; तें न केल्यास लुटीत. त्यांचा पारिपत्यास फोज पाठविलेली आठ हजार होती. ती जवळ आली हें वर्तमान कळतांच, दाभाड्याचे लोक त्यांचे तोंडावर आऊन, भ्याल्या सारिख्या आकार दाखवून पळाले; आणि त्यांस आगा

वर

वर घेऊन त्यांचा बंदोबस्त विस्कळीत झाला असा पाहून, मागें उलटले आणि एकाएकीं हल्ला करून, त्यांचा असा पराभव केला कीं, त्या सैनिकांचीं वस्त्रें देखील लुटलीं. यापुढेंही दाभाडयाची मोंगलांशीं लढाई अहंमदनगराजवळ झाली. तेथेंही तो जय पावोन, मग सातान्यास जाऊन शाहूला भेटला. तेव्हां शाहूनें त्याचा मोठा मान करून, त्यास सेनापतित्व दिलें. व पहिला सेनापति मानशिंग मोऱ्या होता, तो योग्य नव्हे ह्मणून दूर केला.

फरुकशेर सैयदाचा अनिष्टाविषयीं दाउदखान मेल्यावर मराठ्यांसही गुप्त लिहीत असे; याप्रमाणें बादशाहाचें कृत्रिम आणि दाभाडयाचा जय, या दोहों कारणानीं मराठे प्रबळ होऊन सरदेशमुखी बळेंच करूं लागले. पूर्वीं दाउदखानानें त्यांस चौथाई मात्र दिली होती.

याप्रमाणें बादशाह कृत्रिमी आणि मराठीलोकांचा मोठा उपद्रव, या दोहों अडचणीमुळें, सैयदहुसेनाचा मनांत आलें कीं, शाहूशीं स्नेह करावा, त्या वेळेस त्याजवळ शंकराजी मल्हार नामें कारकून होता, तो पहिला शिवाजीजवळ असे; त्याला राजारामाचे वेळेस सचिव पद प्राप्त झालें होतें, परंतु तो संकटसमयीं राजारामास जिंजींत सोडून, आपण वाराणशीस गेला. त्यानंतर त्यास तेथें उगेंच रहावेना, ह्मणून सैयदहुसेन दक्षिणेस आला, तेव्हां त्यास मिळून मातब्बान दक्षिणेस आला. त्याचे स्नेही सातान्यांत बहुत होते, यास्तव हुसेन अल्लीनें त्याला शाहूशीं तहाचें बोलणें करावयाकरितां पाठविला. तेव्हां सहासुभे दक्षिणेची चौथ व सरदेशमुखी व हैदराबाद आणि विजापुर संबंधें कर्नाटक, व म्हैसूर, व त्रिचनापल्ली, व तंजोर, या संबंधें मुलुख, व खानदेश खेरीज करून, दक्षिणेंत शिवाजीनें जो मुलुख घेतला होता, त्याची सनद शाहू मागूं लागला. याशिवाय गोंडवण, व वराड यांतील मुलुख, सेनासाहेबसुभा, व कान्होजी भोंसला याणीं घेतलेला; तोही मागीतला; आणि आपलीं मुलें माणसें दिल्लींत होतीं तीं लवकर आह्माजवळ पोंहचतीं करावीं असें सांगीतलें; आणखी आपण कबूल केलें, कीं याप्रमाणें सारीं कामें झालीं असतां, मोंगलांस मुलुख संबंधें वर्षास दहा लक्ष रुपये खंडणी देऊं; आणि सरदेशमुखी बाबद मुलखांत चोरीचा उपद्रवाचा बंदोबस्त ठेवुं; कदाचित चोरी झाली तर तें नुकसान भरून देऊं. याशिवाय सरदेशमुखीचा उत्पन्नापैकीं, शेंकडा+, सहाशें एकावन्नाचा मानेंकरून, नजर देऊं. चौथबाबद पंधरा हजार फौजेनिशीं बादशाहाची

\+ मोंगललोकांची रीति अशी होती कीं, कोणास अधिकार दिला, ह्मणजे त्यापासून याप्रमाणें नजर घ्यावी.

चाकरी करूं, याशिवाय कोल्हापुरकर संभाजी, राजारामाचा पुत्र; याचे लोक विजापुर सुभा व हैदराबाद या दोहों जागीं उपद्रव करीताहेत ते हाकून देऊं, हें न घडे तर तत्संबंधें जें नुकसान असेल तें भरून देऊं, म्हणून करार केला, हे सर्व शाहूचें बोलणें सैयद हुसेन अल्लीखानानें प्रायः मान्य केलें, असें सन सत्राशें सत्रांत वर्तलें.

असा तह झाल्यावर, सैयद अल्लीहुसेनाकडे शाहूनें मराठे स्वार दहा हजार पाठविले. त्यांजबरोबर सरदार संताजी व परसाजी भोंसले, व उदाजी पंवार, व विश्वासराव वगैरे होते, हा तह दिल्लीचा बादशाह फेरुकशेर यास कळल्यावर, सैयदाच्या द्वेषास्तव त्याला ठीक वाटलें नाहीं; त्यावरून सैयदास समजलें कीं, बादशाह आपला पुर्तेपणें द्वेष करितो, यास्तव त्याणें नेम केला, कीं हा बादशाह पदच्युत करील, म्हणून आपल्या कुमक मागीतली. शाहूनें ही ते आपल्यास मोठें हितावह असें समजून खंडराव दाभाडे व बाळाजी विश्वनाथ, हे दोघे सरदार बरोबर मोठी सेना देऊन त्याचे कुमकेस योजिले. ते निघते समयीं शाहूनें बाळाजी विश्वनाथास सांगीतलें, दौलताबाद वचांदा किल्ला कसेंही करून घ्यावा व बहुत दिवस मराठे गुजराथ, व माळवा, या दोहों जागचीं खंडणी वर्षास कांहीं एक प्रकारें घेत आले; त्याची सनद मिळवावी.

सैयद हुसेन मराठी फौज बरोबर घेऊन दिल्लीस चालिला; दिल्लींत फेरुकशेर बादशाह होता त्यास कृत्रिमाचें शहाणपण होतें, परंतु संकटसमयीं त्याची बुद्धि स्थिर नसे; यास्तव जेणेंकरून आपणास उपयोग होईल, तें त्याला समजेना; आणि कोणाचा विश्वासही वाटेना, यास्तव त्याणें सारे हितकारक लोक दूर केले. मग दोघे सैयद मिळून बादशाहास धरून मारून टाकिला. त्यानंतर सातां महिन्यांत दिल्लीमध्यें दोन बादशाह होऊन मृत्यु पावले.

त्यानंतर सन सत्राशें एकोणिसांत, रोषनइख्त्यार नामें, सुलतान माजुमाच्या नातू (पुत्राचा पुत्र) त्याचें महंमदशाह असें नवें नांव ठेवून, दोघां सैयदानीं तो बादशाह केला. परंतु त्या दोघांवांचून कांहीं एक कार्य होत नसे. ते उभयतां प्रायः दुसऱ्यांचे बुद्धीनें चालत नसत. इतकेंमात्र असे कीं, मोठे मोठे सरदार यांस आपले अगत्य असावें हें त्यांचे मनांत होतें याकरितां निजामउलमुलुख मोठा नामांकित म्हणून, त्यास वश करावयाचा उद्योग केला. तेव्हां तो त्यांस मनापासून वश न झाला, याचें कारण असें कीं, तो दक्षिणेंत अधिकारी असतां बादशाहानें त्याचा अधिकारावर सैयद नेमिला, आणि

आणि त्याला मुरादाबादेस पाठविला.

तो निजामउलमुलुख मुरादाबादेस राहून त्या प्रांताचे कित्येक उन्मार्गवर्ती जमेदार यांची पारिपत्यें करून मोठ्या योग्यतेस चढला. मग फेरुकशेर याणें त्यास दिल्लींत आपल्याजवळ बोलावून नेला. तो तेथें कित्येक दिवस बेरोजगार होता; नंतर त्याला बादशाहानें माळवे प्रांतीं सुभेदारी देऊन पाठविला. तो मोठा शहाणा आणि धैर्यवंत असे, त्याला अधिक योग्यतेस चढावयाची आशा होती, परंतु त्याचे अटकळींत आलें कीं, थोडक्याच दिवसांनीं नवी मुद्रा होइल. ह्मणून तो तेथें कांहीं गडबड नकरितां, तो समय येण्याची वाट पाहात उगाच राहिला.

बाळाजी विश्वनाथ फोजेसहित, महंमदशाह बादशाह होई तों पर्यंत दिल्लींत राहिला. नंतर तेथून निघावयाची आज्ञा घेतली, आणि सेनारवर्च सेयदापासून घेऊन, शाहूचीं मुलें माणसें तेथें होतीं तीं बरोबर घेऊन निघाला. ते समयीं पूर्वी तह केल्याप्रमाणें चौथ व सरदेशमुखी, व स्वराज्य, यांचा सनदा घेतल्या; आणि वराड संबंधीं मुलुख व गुजराथ व माळवा यांचे खंडणीचा सनदांविषयीं, आपला वकील तेथें ठेविला, परंतु त्यास त्या प्राप्त जाल्या असतील. असें दिसत नाहीं.

बाळाजी विश्वनाथ दिल्लीस निघाला ते समयीं, त्याणें आपला दिवाण आबाजी पुरंदऱ्या, तो मुतालिक+ केला. तथापि त्या मुतालिकानें सर्व कारभार बाळाजी विश्वनाथाचा नावेंच चालविला. नंतर पेशवा दिल्लीहून सनदा घेऊन सातारयास आल्यावर, वसुलाचा बंदोबस्ताविषयीं कांहीं कांहीं नवे कायदे करूं लागला. तो प्रकार ध्यानांत आणिला असतां असा अर्थ दिसतो, कीं. जे लेखनविद्यानिपुण ब्राह्मण असतील ते श्रेष्ठ व्हावे, आणि तद्विधारहित सैनिक शूद्रादि त्यांणीं त्यांचे स्वाधीनपणें वर्तावें, व समयविशेषीं हिंदूनीं मोंगलांसही उलट गोष्ट सांगावी.

त्या वसुलाचे कायद्याचा विस्तार असा, प्रथम दक्षिण सहा सुभ्यांची सरदेशमुखी‡ ती राजाचें वेतन असें केलें; तेणेंकरून राजा बहुत संतुष्ट व्हावा, आणि दुसरेही मराठे राजे त्याचे वंशांत होतील ते प्रसन्न व्हावे ह्मणून केलें; कांकिं, मराठे लोक वेतनाविषयीं अत्यंत लुब्ध असें बाळाजी विश्वनाथास ठाऊक होतें.

\+ मुतालिक ह्मणजे, मोठा अधिकारी याणें आपल्या कामावर सरकारास बदलदिला तो.

---

‡ सरदेशमुखी ह्मणजे ओऐन वसुल त्यापेकीं दहा रुपये शेंकडयास देणें.

त्यासमयीं

त्यासमयीं उत्पन्न पूर्वीचा ठरलेल्या नेमाची चवथायी, जमा द्यावयास अवघड पडे; परंतु मराठे लोक यावत् जमेचा ठरावाप्रमाणें आह्माला आमची चौथायी द्यावी असें बोलत. आणि जितका ऐवज देत तितका घेऊन बाकी ऐवज आमच्या सरकाराकडे येणें राहिला ह्मणून सांगत; तेणेंकरून मराठ्यांनीं मोंगलांस समयविशेषीं आर्जवेंकरून किंवा बलात्कारेंकरून मागावें; असा मार्ग नीट जाला. याप्रमाणें चतुर्थांश जाऊन बाकी तीन भाग राहिले त्यांपैकीं एक फौजदाराचा हक्कास जायी; मग दोन उरत तो ऐवज कोणी एकठिकाणचा बादशाहाचे खजिन्याकडे सर्व जायी. कांहीं एक जागींचा जहागिरदाराचे देण्यासच खर्चे, कांकिं बादशाहानें त्यांस खर्चास देविला होता. त्याचनिमित्तेंकरून पेशावे व निजामउलमुलुख यांचे राज्यांत जहागिरसंबंधें मुलुख जप्त करणें किंवा माघारा देणें, याची रीति अशी पडली होती किं, कोणी एकमुलखीं जहागिरदारच तें सर्व घेई; कोणे एके जागीं बादशाहच घेई; यापुढें काळेंकरून, पेशव्यांचा मुलुख सरकार इंग्रेज बहादुर यांणीं घेतला, तेव्हां कोणे एके गावीं, कुळकरणी यांस बोलावून मागले लेख काढविले, त्यांत दोन भाग जहागीर, असें लिहिलें होतें; परंतु ह्याचे कोणास व त्याचें निमित्त काय तें त्या लेखांत नाहीं ह्मणून कुळकरणी यांस विचारिलें किं, हे दोन भाग द्यावे कोणास व देण्याचें निमित्त काय; त्यावरून त्यांणीं उत्तर केलें किं, आह्मास हें कांहीं ठाऊक नाहीं; आमचे वडिलांनीं लिहिलें आहे इतकें मात्र जाणतों. यावरून असें वाटतें किं, जे दोन भाग राहिले ते सर्व कोणी एकठिकाणीं पूर्वीं जहागिरदारच घेत असेल; मग कांहीं निमित्तेंकरून, बादशाह याणें तो मुलुख घेतला तरी तो लेख राहिला.

जितका मुलुख स्वराज्य, त्याचा वसुलाची चौथ तिला राजाची बापती असें नवें नांव ठेवून, तो राजाचा हक्क ठरविला. आणि तीन हिस्से राहिले, त्यास मोकासा नाव ठेविलें. याशिवाय साहोत्रा+ व नारगोंड⊞, नामें दोन हक्क राजाचे होते ते स्वराज्याचे यावत् जमेवर असत, त्यापैकीं साहोत्रा शाहूनें पंतसचिवास दिला; आणि नारगोंड दुसऱ्या कोणास दिला.

त्या वेळेचे प्रधान व प्रतिनिधी यांचीं वेतनें राजा आपल्या खजिन्यांतून देई. या खेरीज त्यांस कांहीं गांव इनाम होते.

+ साहोत्रा ह्मणजे शेंकडा साहा रुपये. ⊞ नारगोंड ह्मणजे शेंकडा तीन रुपये.

सन सत्राशें विसांपासून सत्राशें सवीसपर्यंत जालेलीं वर्तमानें मिळून भाग तेरावा.

अनुक्रमणिका.

निजामउलमुलुखानें सैयदाचे आज्ञेंत वागणें सोडून, मनांत दक्षिण यावयाचा निश्चय केला.

त्यानंतर तो सैयदाचा सरदाराशीं युद्ध करून जय पावला.

सैयद हुसेन अल्लीखान, आपल्या बादशाहासहित, निजामउलमुलुखाचा पारिपत्यास दिल्लीहून निघाला. तो वाटेनें शत्रूचा मारेकऱ्यानीं मारिला.

मग सैयद अबदुलखान. तो निजामउल्मुलुखाशीं युद्ध करीत असतां पराभव पावून त्याचे कैदेंत सांपडला.

त्यावरून दिल्लीमध्यें लोकांनीं बादशाहाचे प्रसन्नतेसाठीं मोठा उत्साह केला.

परशुराम त्रिंबक, व बाळाजी विश्वनाथ, व खंडेराव दाभाडे, यांचा मरणामुळें मराठी दरबारांत काय काय वर्तलें तें.

बडोदेकर गाइकवाड यांचा मूळ पुरुष, दमाजी गाइकवाड, याचे मरणाचा प्रकार.

निजामउलमुलुख, यास बादशाहानें वश करून आपली वजिरी दिली.

त्यानंतर तेथील दरबारी लोकानीं त्याचा नाशाचा उद्योग केला.

गुजराथेचा अधिकारी, हैदर कुलीखान, त्याचा नाशाविषयीं निजामउलमुलुखास बादशाहानें गुप्तपणें आज्ञा केली.

तो निजामउलमुलुखाचे हातून पराभव पावला.

मग बादशाहानें निजामउलमुलुखास वकीलमुतलख, नामें मोठी पदवी दिली.

बाळाजी विश्वनाथाचा पुत्र, बाजिराव याचें वागणें.

होळकर व शिंदे यांची उत्पत्ती.

उदाजी पंवाराची वर्तणूक.

बाजिराव बाळाजी विश्वनाथाचा पुत्र याणें काय काय मसलत केली; तीचा प्रतिपंथी जाला श्रीपतराव, तें प्रकरण.

शकरखेराजवळचे लढाईचा प्रकार.

सुरतेचा अधिकारी, रुस्तुमअल्ली, तो पिलाजी गाइकवाडाचे घातास प्रवर्तला.

प्रवर्तला.

अंमदाबादचा अधिकारी आमेदखान, तो कांताजी व पिलाजी यांस चौथ देता जाला.

तो ऐवज जमा करते समयीं, त्या उभयतांचा कलह होऊन, कांताजीचा विभाग मायीनदीचे वायव्येस ठरला; व आग्नेयीकडचा विभाग पिलाजीचा ठरला.

अंमदाबादेस, शाहाबागेजवळ लढाई जाली तें.

गुजराथचे व्यवस्थेचा प्रकार.

बाजिरावानें माळव्या मुलखीं स्वारी घातली.

भाग तेरावा.

सन सत्राशें विसांत, दिल्लीमध्यें जे दोघे सैयद फेरुकशेराचे जागीं, दुसरा बादशाह करून, आपण मुख्यत्वें करून राजकारभार करीत होते; त्यांवर मानकरी लोक व बादशाह यांची मनापासून प्रीती नव्हती. कांकिं, त्यांचा स्वतंत्रपणें वागण्याचा उद्योग होता; ते दुसर्यांचें मन वश करण्याविषयीं तत्पर नव्हते. यास्तव मानकरी लोक व बादशाह, हे त्यांचा बाह्यात्कारें मान करीत; परंतु रयत, त्यांस मनापासून मानित असे; तेव्हां माळव्याचा मुख्य अधिकारी, निजामउलमुलुख, याणें तें सर्व वर्तमान जाणून नेम केला किं, आपण सैयदाधीनत्व टाकून, आपण स्वतंत्रपणें वागावें. असा निश्चय होऊन त्याणें आपल्या नावास, आसीफजा, असें पद जोडून बरोबर बारा हजार सैन्य घेऊन नर्मदा उतरून, आशीरगडचे किल्लेदारास, कांहीं द्रव्य देऊन तो किल्ला घेतला. त्यानंतर बह्राणपूर व खानदेश सुभाही त्याचे हातीं लागला. आणि शाहूचे कित्येक सरदार + बिथरलेले होते, ते व कोल्हापुरकर संभाजी याजकडचे ही कित्येक सरदार जाऊन, त्या निजामउलमुलुखास मिळाले.

त्यासमयीं दोघां सैयदांचीं दोन लश्करें वेगळीं वेगळीं होतीं, तीं थोडक्या अंतरानें असत; त्यांत एक माळवालगत लश्कर होतें, त्याचा मुख्य सरदार दिलावरखान असे, दुसरें औरंगाबादेस होतें, त्याचा मुख्य सरदार, अलंअह्लीखान, तीं दोन्हीं लश्करें एकत्र मिळालीं असतीं तर, निजामउलमुलुखास भारी जालीं असतीं; परंतु तो दिलावरखान अभिमानें करून औरंगाबादचा अलंअह्लीखानास, न मिळतां एकटाच निजामउलमुलुखावर बह्राणपुरीं चालून गेला.

\+ शाहूचे जे सरदार, निजामास मिळाले त्यांत चंद्रसेन जाधव निंबाळकर, हैबतराव सरलश्कराचा पुत्र; व रायरंभा निंबाळकर हे दोघे मुख्य.

त्याचा

त्याच्या युद्धांत जयन होतां. तो मृत्यु पावला.

हें वर्तमान औरंगाबादेस कळलें ते समयीं, अलंअह्लीखानानें आपलें लष्कर तयार करून बऱ्हाणपुरावर चालिला. त्याजबरोबर शाहूचें + मराठी लष्कर, शंकराजी मल्हार जो शाहूकडचा औरंगाबादेस वकील होता, त्याणें जमा करून पाठविलें; या खेरीज, सातार्याहून खंडोजी दाभाड्या, बरोबर स्वार देऊन पाठविला.

निजामउलमुलुखयास मोंगलाचें लश्कर येतेंसें कळतांच, तो लश्कर सुद्धां तेथून निघोन, यांच्या लष्करावर चालून आला तेव्हां त्या लश्करांचा युद्ध प्रसंग, वराड पैनघाट संबंधी बाळापुराजवळ जाला. त्यांत निजामउलमुलुखानें कांहीं युक्ती करून, त्याचें लश्कर अडचणीच्या जाग्यांत नेऊन, मग उलटून मारून जिंकिलें. ते समयीं अलंअह्लीखानानें मोठें शौर्य केलें; परंतु त्याचे बहुतेक लोक पळाले, व कित्येक शत्रूस मिळाले, व त्याचे कुमकेस आलेले परमविश्वासू मराठे लोक होते, ते त्यासभोंवते असून लढून मरून गेले, तेव्हां तो मृत्यु पावला. त्या लढायींत मराठे उत्तम प्रकारें लढले, त्यांत कोणी मोठा सरदार नमेला; एक शंकराजी मल्हार मात्र फार जखमी होऊन, केवळ मरणोन्मुख होत्साता शत्रूंच्या हातीं लागला.

हें वर्तमान दिल्लीस गेल्यावर दोघां सैयदांस भय वाटलें; परंतु बादशाह अंतःकरणीं आनंद पावला. तेव्हां त्या सैयदांच्या बहुत विचार होउन असें ठरलें कीं, सैयदहुसेन अह्लीखान, धाकटा भाऊ याणें बरोबर सेना घेउन निजामउलमुलुखाच्या पारिपत्यास बादशाहासहित निघावें; नंतर तो त्या प्रमाणें सिद्धता करून वडील भाउ सैयद आबदुलखान याच्या पांयीं पडून, धणी बादशाह यास घेऊन निघाला. तो कांहीं मजला चालून पुढें गेला; तेव्हां, निजामउलमुलुखाचे कोणि मित्र व त्याचे मुलखीं राहाणारे मोठे मोठे लोक, एकत्र मिळून मसलत करून, सैयदहुसेनास मारेकरी घालून, मारून टाकिला. नंतर त्या मसलत करणारांनीं तें सर्व लश्कर वश करून घेतलें, आणि त्यांतील सैनिकांस असें समजाविलें कीं, बादशाह धणी, यास प्रतिबंधक असा जो चाकर तो मारावा हेंच उचित; कांकिं स्वामीच्या स्वतंत्रपणास, व्यत्यय नसावा. त्यास थोरला सैयद आबदुलखान यास मारिला असतां बादशाह सुख पावेल. अशी मसलत देऊन, ते लोक त्या लश्करांत मिळून, सैयद आबदुल्लास मारावयाकरितां बादशाहाबरोबर दिल्लीस जाऊं लागले.

\+ त्या लष्करांत सेनासाहेबसुभा कान्होजी भोंसला, व हैबतराव निंबाळकर, हे मोठे सरदार.

तेव्हां त्या सैयदाजवळ बहुत दवलत होती, त्यास हें वर्तमान कळतांच त्याणें पुष्कळ खर्च करून, थोडकेदिवसांत मोठें सैन्य जमा केलें; आणि महंमद शाह बादशाह नव्हे. असें करून, तो सैयद आणी धाकट्या सैयदास मारिला; त्यांचा पारिपत्यासाठीं दिल्लीहून निघाला. त्याची व याळोकांची बह्राणपुराजवळ गांठ पडली, तेथें मोट्या निकरानें युद्द जालें; तें असें कि, आंत जय कोणाचा होईल तो सुमार कळेना, शेवटीं आबदुलखानाच्या लश्कराचा पराभव जाला. आणि तो घायाळ होऊन शत्रूंच्या हातीं लागला. तेसमयीं बादशाह निरंकुश होत्साता. परम हर्ष पावोन, त्या मारेकरी मंडळांत एक महंमद आमीनखान नामें होता तो वजीर केला. आणखी दुसरेहि त्या समुदायांतील कितिएक पदवीस चढविले. नंतर बादशाह मोठ्या उत्साहेंकरून, आपल्या राजधानीस गेला. तेव्हां तेथचा नागरिकांहीं, बादशाहाचे संतोषार्थ कितिएक दिवस मोठा उत्साह केला, तो असा किं जामध्यें आनंदावांचून दुसरा शब्द कानीं पडेना; याशिवाय कितिएक मुलखींच्या मोठ्या मोठ्या लोकांनीं, उत्साहपूर्वक सेवातत्परतेच्या अर्थाचीं पत्रें, बादशाहास पाठविलीं. त्यांत निजामउलमुलुखाचेंहि पत्र होतें, आणि शाहूच्या वकिलहि स्वामीचें कल्याण चिंतित होता. त्यानंतर त्या सर्व लोकांचा पत्रानुरूप उत्तरें, बादशाहाचे दरबारी लोक याणीं महंमदशाह याचे नावें लिहून पाठविलीं.

तेसमयीं तो नवा केलेला वजीर अकस्मात मेला. त्याचा अधिकार बादशाहानें निजामउलमुलुखास दिला. त्याणें पूर्वी बंडउत्पन्न केलें तें बादशाहाचे उपयोगी पडलें. तो निजामउलमुलुख यास वजिरी प्राप्त जाली तरी तो आपल्या जहागिरीच्या बंदोवस्ताकरितां, सन सत्राशें बेवीसपर्यंत दक्षिणेंत राहिला.

त्या मारेकरी मंडळींत, एक हैदरकुलीखान होता, त्यास गुजराथेचा अधिकार दिला. दुसरा सादटखान त्याला आधीं आग्रें शहर दिलें, नग बंगाल्यासंबंधी उद्प्रांत दिला. त्या दोघांत, सादटखान पुढें मोठा विख्यात जाला; तोउदच्या बादशाहाचा मूळपुरुष; त्याची संतती अद्यापि आहे.

मोंगलांकडचें वर्तमान असें असतां मराठ्यांचे मुख्य प्रधान, परशुराम त्रिंबक, व खंडेराव दाभाडे, व बाळाजी विश्वनाथ, हे मृत्यु पावले. त्यामुळें त्यादरबारचे व्यवस्थेत कांहीं अंतर पडलें, तो प्रकार असा, प्रतिनिधीचा दुसरा पुत्र-श्रीपतराव, तो बापाचे जागीं स्थापिला. बाळाजी विश्वनाथाचा वडील पुत्र बाजिराव, त्यास ती पदवी बाळाजीचा पाठिमागें सातां महिन्यांनीं प्राप्त जाली. बाळाजी विश्वनाथ सन सत्राशें वेविसांचे दहावे महिन्यांत, कारभाराचा

या शीण होऊन मरण पावला.

खंडेराव दाभाडा मेल्यावर, त्याचा पुत्र त्रिंबकराव, त्यास सनसत्राशें एकविसांचे पांचव्या महिन्यांत, बापाचा अधिकार मिळाला. खंडेराव दाभाडे मेल्याचे अगोधर, त्याचा सरदार दमाजी गाइकवाड होता; त्याणें मोठें शौर्य केलें, ह्मणून खंडेरायानें शाहूस सांगीतलें, यास्तव शाहूनें त्यास खंडेरावाचा हाताखालीं दुसरा अधिकार देऊन, समशेर बहादर असें नाव ठेविलें. तो बडोद्याचा गाइकवाडांचा मूळपुरुष; अद्यापि त्याचे वंश्य बडोद्याचे अधिकारी आहेत. तो दमाजी खंडेराव दाभाडा मेला त्याच सुमारें मृत्यु पावला. त्याचे जागीं त्याचा पुतण्या पिलाजी गाइकवाड यास बशिवला.

सन सत्राशें बेविसांत, निजामउलमुलुख आपल्या जहागीर मुलखाचा बंदोबस्त करून दिल्लीमध्यें वजिरीचा अधिकारावर गेला. तो स्वभावें करून तिरसट होता; त्याला हास्यविनोदादि प्रीति नसे, आणि बादशाह व त्याचे दरबारी लोक यांस विनोदादि प्रकार प्रिय होते; त्यामुळें तो त्यांस आवडेना. पुढें त्याणें ती बादशाहाची चाल मोडावयाचा उद्योग आरंभिला; तेव्हां ते दरबारी लोक व बादशाह यांचे मनांत आलें किं तो दूर करावा; यास्तव मसलत केली. तो प्रकार असा, त्यावेळेस कुलीखान गुजराथेमध्यें अमदाबादेस अधिकार करीत होता; त्यापासून कांहीं चूक जाली यास्तव बादशाहाचे दरबारी लोकांनीं त्यास असें भय दाखविलें किं, वजीर निजामउलमुलुख तुझें पारिपत्य करील. इकडे निजामउलमुलुखास त्याचा कांहीं चाहाड्या सांगीतल्या, याप्रकारें ह्या उभयतांचें वांकडें पाडून ते लोक व बादशाह मिळून निजामउलमुलुखास आज्ञा दाखविली किं, तुला गुजराथचा अधिकार देऊं; त्यावरून तो फौज घेऊन कुलीखानाचा पारिपत्यास निघाला त्या युद्धास बहुत दिवस लागतील, किंवा त्यांत निजामउलमुलुख मेला जाईल, अशी बादशाहाची, व त्या मुत्सदी लोकांची अटकळ होती. ते वेळेस हैदरकुलीखानाजवळ फौज व सरंजाम चांगला होता; परंतु त्याचे कित्येक विश्वासू लोक निजामउलमुलुखानें वश करून घेतले. तेव्हां तो वेड्याचें सोंग घेऊन दिल्लीस पळून गेला हें वर्तमान निजामउलमुलुख समजून, तो उज्जनीस राहिला; तेथें त्याचे भेटीस कित्येक गुजराथचे मोठे मोठे मानकरी लोक आले, ते समयीं त्याणें त्या मुलखाचा बंदोबस्तास जामध्यें धान्यादि उत्पन्न पुष्कळ असे त्यांतीलच पांच परगणे आपल्याकडे खासगत जहागीर करून ठेविले; त्यांत एक ढोळका, दुसरा भडोज, तिसरा जंबूसर, चवथा मखबुलाबाद, पांचवा बळसार, याप्रमाणें केलें. आणि अमदाबादेस आपलें काम चालवावयाकरितां, आपला

पला हस्तक पुतण्या ठेवून आपण सन सत्राशें तेविसांत माघारा दिल्लीस गेला. तेथें त्याचा व बादशाह याचा स्वभावास पडेना ह्मणून तो नें वजिरीचें काम टाकून, वकील मुतलख नामें, दुसरा अधिकार स्वीकारून राहिला; तथापि त्याचे चित्तास तेथें राहाणें आवडेनासें जालें, ह्मणून पुढें थोडकेच दिवसानीं कोणे एके समयीं शिकारीचें निमित्त करून दिल्ली बाहेर निघाला, आणि दक्षिणेंत आपले मुलखीं जाऊन राहिला. त्यानंतर तो आपणास बादशाहाचा चाकर ह्मणवी, परंतु तेव्हांपासून स्वतंत्रपणें वागूं लागला, व त्यापुढें पुनः दिल्लीस गेला नाहीं. ते समयीं नर्मदेचे उत्तरे कडचा जितका मुलुख, पूर्वीं मोंगलानीं यत्नें करून घेतला होता, तो सर्व निजामउल मुलुखाचे हातीं लागला.

असें हिंदुस्थानचें वर्तमान असतां, बाजिराव पेशवे पण पावला. नंतर कांहीं अवकाशानें तो लश्कर घेऊन दक्षिणेंतून खानदेशीं जाऊन, तेथच्या मोकासेपणाचा वसूल घेत होता; त्याचे मनांत होतें कि, माळवा मुलुख आपले हस्तगत व्हावा, परंतु त्यास प्रतिवर्षीं सातान्यास एकवेळ जावें लागत होतें, त्या अडचणीमुळें तो त्याच्या मनसोबा अकरा वर्षें शेवटास गेला नाहीं. त्याणें पूर्वीं सन सत्राशें चोविसांचे सुमारें किति एक वेळा वऱ्हाणपुरच्या सुभेदार व माळव्याहून आलेले मोंगलांचे मोठे सरदार यांचा पराभव केला; त्यांतल्या एका लढाईमध्यें, बाजिरायाचे दोघे सरदार पुढें सरून मोठ्या शौर्यें करून लढले, ते कांहीं दिवसानीं पुढें विख्यात जाले; त्यांत एक मल्हारजी होळकर, दुसरा राणोजी शिंदा. त्यावेळेस मल्हारजी होळकर शिलेदारी करित होता, तो जातीचा धनगर असे, त्याचा बाप निरानदीचे कांठचा होळ गांवचा चौघुला. राणोजी + शिंदा याचे पूर्वज सातान्याजवळ कण्हेरखेडीं रहात होते, तो शिंदा पूर्वीं मोंगलांची चाकरी विश्वासूपणेंकरून मोठ्या पदवीस चढला असतांहि, पुढें दरिद्रदशा प्राप्त आली तेव्हां तो बाळाजी विश्वनाथा जवळ बारगिरी करीत होता, त्या नंतर बाजिरायाजवळ त्याची जोडा उचलावयाची चाकरी स्वीकारून राहिला; मग त्याची वर्तणूक चांगली पाहून, त्याणें त्यास उत्तरोत्तर पदवीस चढविला. त्याच सुमारें धारेचे पवार योग्यतेस चढले. त्यांचा मूळ पुरुष उदाजी पवार, विश्वासराव त्याचा बाप, तो रामचंद्रपंत अमात्यानें योग्यतेस चढविला होता. ती धार ह्मणजे, माळव्यांत पुरातन मोठा किल्ला आ-

---

\+ शिंद्याचीं कुळें दोन आहेत, एकाचें नाव कण्हेरखेडकर, दुसऱ्याचें नाव रविराव ह्मणतात.

हे

हे.

बाजिराव फार दिवस असें इछित होता कीं, हिंदुस्थानांत जाऊन मोंगल जिंकावे, परंतु त्यास अवसर सांपडला नाहीं मग जेव्हां पिलाजी गाइकवाड गुजराथेंत स्वतंत्रपणें वागूं लागला, व उदाजी पवार माळवा मुलुख आणि गुजराथ प्रांत लुटूं लागला व दिल्लीचा दरबारांत बादशाहाशीं आणि निजामउलमुलुखाशीं बिघड जाला; तेव्हां तो असें समजला कीं, हा समय आपल्या कार्यसाधनास योग्य आहे, परंतु त्यास कोणी बाहेरचा प्रतिपंथी नसतां, प्रतिनिधीच त्याविषयीं कांहींसा वक्रपणा करीत असे. बाजिराव शूर होता, आणि त्याचे बाळपणापासून बापानें त्यास राज्यकारभारांत शहाणा करून तो लहान असतां आपले बरोबर दिल्लीस नेला; तेसमयीं कांहीं मसलतसंबंधें बाळाजी विश्वनाथ व जयपुरकर राजा जयशिंग, या उभयतांची गांठ पडली, त्या योगें बाजिरायाचा व जयशिंग याचा परिचय जाला होता. असा बाजिराव राज्यकारभार, व मसलत, व शौर्य, या तिहिं प्रकरणीं निपुण असे. तो जातीचा कोंकणस्थ ब्राह्मण यास्तव गोड बोलणें हा त्याचा निसर्गसिद्ध गुण होता. आणि शिपाईपणांत तर मराठ्यां सरदारांप्रमाणें प्रवीण असे; आणि अल्पोपायसाध्य जें तें टाकून महदायाससाध्य आणि जांत लाभ मोठा असें जें कार्य त्यास इष्ट वाटे; अशी त्याची बुद्धी होती. त्याणें एखादी मसलत केली तर ती शेवटास नेण्याविषयीं तो मोठा अभिमान बाळगी. त्यासारिखा मसलत शेवटास नेणारा ब्राह्मणजातींत केवळ दुर्लभ. तो नित्य शाहूस ह्मणे कीं मोंगल अत्यंत आळशी, आणि अशक्त जाले आहेत त्यांस हिंदूचा मुलखांतून हांकून द्यावयाचा समय हाच, हल्लीं मराठे लोक वेगळीं वेगळीं बंडें करिताहेत ते सारे एकत्र होतील तर मोंगलांस लाऊन देतां येतील, आणि मराठे विख्यात होतील. अशी तो मसलत देत असे परंतु प्रतिनिधी राजास ह्मणे कीं, असें करणें तें केवळ वेडेपणाचें काम. शिवाजीनें करनाटकांतील घेतलेला जो मुलुख आपल्या हातचा गेला तो घेऊन, मग या उद्योगास लागावें. याप्रमाणें त्याचें बोलणें पडत असतां, शाहूजवळ कोणे एके दिवशीं ते दोघे आपापल्या प्रकारें बोलतांनां, बाजिरायानें शाहूचा वडिलांचें शौर्य बहुत वर्णिलें; आणि बोलला कीं, शिवाजीची बुद्धि प्रतिनिधीसारिखी असती तर त्याणें करनाटक घेतल्याचे पूर्वी त्याचे मनांत येतें कीं आधिं विजापूर व गोंवळकोंडें घ्यावें मग हळूच युक्तीनें करनाटकांत प्रवेश करावा. परंतु तें न झालें, तो थोर बुद्धीचा, त्याणें एकदांच करनाटक सर केलें. त्यास, जसा पुरातन आणि मोठा विस्तार

वंत

वंत वृक्ष असतो, तो बुडाशीं तोडिला ह्मणजे त्याचा सर्व विस्तार पानां फुलां सहित हातीं लागतो, तसें हें राज्य प्राप्त होईल. त्यास जर मला आज्ञा याल तर कृष्णेपासून अटकनदीपर्यंत, तुमचा झेंडा मी लावीन. हें बोलणें ऐकून शाहू फार संतुष्ट होऊन शाबासयुक्त होत्साता बोलिला किं, तुमचे वडील मोठे कुलीन, आणि तुह्मींही त्यांचे पुत्र योग्यच आहांत, त्या तुह्माला अटकेचा पलिकडेही कदलीखंडपर्यंत झेंडा लावावयास माझी आज्ञा आहे.

इकडे मुसलमानांत निजामउलमुलुख बाहेर गेल्यानें दिल्लीचे दरबारी लोक व बादशाह यांचा मनांत घातशंका उत्पन्न होऊन, हैदराबादचा सुभेदार मबारीजखान, त्यास लिहिलें किं तुह्मीं फौज ठेवून निजामउलमुलुखास त्याचे स्थानीं जाऊं देऊं नका; हें काम तुमचे हातून शेवटास गेलें तर तुह्मास दक्षिणसहा सुभे अधिकार मिळेल. असें पत्र, व त्या अधिकाराची सनद बरोबर पाठविली.

नंतर मबारीजखानानें फौज तयार केली, तेव्हां निजामउलमुलुखानें त्याशीं तह करावयाविषयीं फार उद्योग केला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं सन सत्राशें चौविसांचे आठव्या महिन्यांत, शकरखेराजवळ उभयतांची लढाई जाली, तेसमयीं मबारीजखानानें मोठें शौर्य केलें परंतु त्याचा जय जाला नाहीं. तो लढतां लढतां मेला, आणि त्याचे दोघे पुत्र मेले व दोघे फार जखमी जाले. तो पडला तेव्हां निजामउलमुलुखानें त्याचें शिर कापून दिल्लीस पाठविलें, आणि पत्र लिहिलें किं, स्वामींचा दैवयोगें करून आह्मीं हा बंडवाला मारिला.

यानंतर निजामउलमुलुख हैदराबादेस गेला तेथें ख्वाजाआहमद नामें एक मबारीजखानाचा पुत्र होता त्याशीं सल्ला करून, गोंवळकोंडा वसर्व इतर किल्ले हस्तगत केले. हें वर्तमान ऐकून दिल्लीचा बादशाहानें निजामउलमुलुखाचे दोहों जागचे अधिकार मागें घेतले; एक गुजराथचा व एक माळव्याचा. त्या दोनजागीं दोघे नवे अधिकारी पाठविले. गुजराथेस सरबुलंदखान, व माळव्यांत राजा गिरधर, ते जाऊन त्या स्थानीं पोहोचले. त्यांत राजा गिरधर यास माळवा घ्यावयाचें अवघड नपडलें, कां किं, तेथें फौज नव्हती; परंतु गुजराथेंत निजामउलमुलुखाचा पुतण्या आमेदखान होता, त्याला तें स्थान युद्धावांचून देववेना; आणि आपलें बळ कमी, यास्तव तो नीं राजधानी अमदाबाद टाकून दोहदास गेला; तेथें कांताजी कदम बांडे नामें, एक शाहूचा सरदार होता, त्यास गुजराथचे चवथाईची

ची आज्ञा दाखवून आपल्या कुमकेस घेतला; आणि माघारा उलटून अमदाबादेजवळ येऊन सरबुलंदखानाचे लश्करा बरोबर लढून त्याचा पराभव केला, व सजायतखान नामें अमदाबादेंत सरबुलंदखानानें आपला हस्तक ठेविला होता तो मारून टाकिला. त्यानंतर त्या सजायतखानाचा भाऊ सुरतेमध्यें फौजदारी करीत होता, त्याणें पिलाजी गाइकवाड तेसमयीं सुरतेजवळ होता त्याशीं सख्य करून निश्चय केला किं, आपण उभयतां मिळून आमेदखानास मारूं. त्या वेळेसच पिलाजी गाइकवाड यास निजाम-उल्मुलुखाचें सांगणें आलें, किं माझा पुतण्या आमेदखान याचें साहाय्य करावें. गाइकवाडानें तें ऐकून घेऊन मनांत विचार ठरविला किं, आपण जो सबळ पक्ष पाहूं तिकडे मिळूं. मग सुरतवाल्याबरोबर निघोन मायीनदीचे पलिकडे आरासगावीं पोहोंचला. तेथें आमेदखानाचा लश्कराची व त्याची गांठ पडली; तेसमयीं सुरतवाल्याजवळ तोफा फार होत्या त्यामुळें आमेदखानाचा पराभव होऊं लागला, तेसमयीं पिलाजीनें त्यास सांगितलें कीं, तुम्हीं त्याचे पाठीस लागा मी तोफा संभाळितों. मग ते त्याचे पाठीस लागले तेव्हां याणें तोफांचे गाडे उलटे फिरवून आमेदखानाचा पक्ष धरिला. तेव्हां त्या सुरतवाल्यावर दोन्ही लश्करें पडलीं, तरी त्याणें मोठें शौर्य केलें, परंतु त्याचे लोक फार मेले गेले, आणि थोडकेसे राहिले त्यांसह वर्तमान पळावयास अवसर सापडेना, असें पाहून, तो आपणास तोडून घेऊन मेला.

त्यापुढें सन सत्राशें पंचविसांत कांताजी व पिलाजी दोघे मिळून, गुजराथची चवथाइ घेऊं लागले, परंतु त्या दोघांत मुख्यत्वें कोणी वागावें या विषयीं निरंतर कलह असे. शेवटीं खंबायतचे जवळ दोघे लढले त्या युद्धांत पिलाजी पराभव पावला. तेसमयीं आमेदखानानें विचार केला किं, एखादे वेळेस या दोघांतून कोणी तरी माझा पक्ष सोडील यास्तव त्याणें असा ठराव केला किं, मायीनदीचे आग्नेयी दिशेचा विभागाची चवथायी पिलाजीनें घ्यावी व वायव्येचा विभागाची कांताजीनें घ्यावी. या प्रमाणें नेम जाल्यावर पिलाजी सुरतेकडे निघाला. आणि कांताजी खानदेशामध्यें आपले जहागिरीचे जागीं गेला.

असें आमेदखानाचें प्राबल्य पाहून दिल्लीचा बादशाहानें तें बंड मोडावयास सरबुलंदखानाबरोबर लश्कर देऊन पाठविला. तो मोठा समर्थ होता, आणि आमेदखानानें आपल्या कुमकेस मराठे सरदार बोलाविले, ते येऊन पोहोंचले नव्हते, असून आमेदखान अमदाबादेंत थोडकीशी

फौज

फौज ठेवून, आपण तें ठिकाण सोडून मागें हटला. तो कांहींसा दूर गेल्यावर त्याला वर्तमान कळलें किं मराठे माही नदी उतरून आलिकडे आले; मग ते व आपण मिळून पुनः माघारा उलटून अमदाबादेवर आला, तो शाहराजवळ शाहाबागेंत आऊन उतरला. त्याच दिवशीं सरबुलंदखानाचा लश्कराची बिनी आदालजच गांवीं येऊन पोहोंचली. मग ते आमेदखान जवळ आहेसा समजून, आपल्या भोंवता चर खणूं लागले. त्यावरून मराठे सरदार समजले किं, ते आमचा भयानें हें काम करितात. नंतर आमेदखानानें मराठे सरदारांसहित एकाएकी हल्ला करून त्या बिनीवाल्यांचा पराभव केला; परंतु याचे लोक व मराठे बहुत मेले त्यावरून मराठे हल्ला करावयास त्याला पुनः अनुकूळ होइनातसे जाले. मग आमेदखान पेंढारी लोकांप्रमाणें वागूं लागला; त्याबरोबर कांताजी दपिलाजीहि पर्जन्यकाळपर्यंत लुटित होते मग पांदर्या कावळ्यांकडे गेले.

याप्रमाणें गुजराथचें वर्तमान असतां, व मोंगल लोकांत कलह असतानां, बाजिरायानें दोनवेळा माळव्यांत स्वार्या घातल्या. तेथें राजा गिरधर होता त्याणें कांहीं अडचण केली ती नमानितां, दोन्ही वेळा लुटून बहुत द्रव्य नेलें.

सन सत्राशें सत्ताविसांपासून, सत्राशें चौतीसपर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग चौदावा.

अनुक्रमणिका.

निजामउलमुलुखानें, आपलें बळ वाढवायाकरितां, मराठी सरदार लोकांत कलह उत्पन्न व्हावा म्हणून काय काय उद्योग केला तें प्रकरण.

त्याणें प्रतिनिधीचा योगें शाहूशीं तह करून; हेंदराबादचे चौथाईची सोडचिठ्ठी घेतली.

तो तह पेशव्याचे मनास आला नाहीं.

निजामउलमुलुखानें शाहू आणि संभाजी या उभयतां बंधूंत वैमनस्य पाडावयाचा यत्न केला तो पेशव्यानीं व्यर्थ पाडिला.

त्यावरून पेशवे व निजामउलमुलुख यांचें युद्ध झालें.

नंतर निजामउलमुलुख याचा बाजिराव पेशवे यांचा शहाणपणापु-

हें

हें उपाय चालेना ह्मणून तहाचें बोलणें करूं लागला.

बाजिराव गुजराथची चौथ व सरदेशमुखीची सनद पावला.

कोल्हापुरचा राजा संभाजी व प्रतिनिधी हे उभयतां युद्ध करून संभाजी पराभव पावला.

पेशवे बाजिराव व सेनापती दाभाडे या दोघांचें युद्ध झालें त्यांत बाजिरायाचा जय होऊन दाभाडा मृत्यु पावला.

निजामउलमुलुखाची वर्तणूक.

गुजराथ मुलखांत पिलाजी गाइकवाड, व जोतपुरचा राजा आभीशिंग, यांचा युद्धप्रसंग घडला.

त्यापुढें आभिशिंगानें पिलाजीशीं तह करावयाचे निमित्तें करून, मारेकरी पाठवून त्यास मारिला.

बुंदलखंड मुलखीं राजा चतुरसाल्ल याणें पेशव्यास कुमक घेऊन मोंगलास बुंदलखंडांतून पार केला, यास्तव त्याणें बाजिरावाला कांहीं मुलुख बक्षीस दिला.

राजा जयशिंग यास माळव्याचें आधिपत्य प्राप्त झालें, तें त्याणें बाजिरावास दिलें.

भाग चौदावा.

निजामउलमुलुखास दिल्लीचा बादशाहाचें भय तादृश नव्हतें; परंतु मराठे लोक प्रबळ होऊन, मुलखांतून मनस्वी वसूल घेऊं लागले, त्यामुळें त्याचा मनांत भीति उत्पन्न झाली; तिचा निवारणार्थ अंतःकरणांत विचार करूं लागला कीं, कोणे प्रकारें मराठे लोकांत वैमनस्यें पडतील, आणि आपल्या राज्याचा बंदोबस्त चांगला होईल; अशी योजना करित असतां प्रथमतः त्याचा कल्पनेस आलें कि हैदराबाद आपली राजधानी एथची चौथाई मराठे घेतात, तीचा बद्दल दुसरें कांहीं द्यावयास कबूल करून त्यांचें एथें चौथाईसंबंधें येणें जाणें आहे तें बंद करावें. मग त्याणें प्रतिनिधीचा द्वारें, शाहूशीं बोलणें करून असें ठरविलें कीं, शाहूनें हैदराबाद संबंधें चौथ व सरदेशमुखी बद्दल कांहीं द्रव्य व इंदापुराजवळ कांहीं मुलुख जहागीर करून घ्यावा. याशिवाय त्याणें प्रतिनिधीलाही वऱ्हाड मुलखीं कांहीं जहागीर करून दिली. हें वर्तमान ऐकून बाजिरायास मोठा राग आला त्याचा मनांत होतें कि, निजामउलमुलुखाचा राज्यांत आपला प्रवेश आहे, तो नाहींसा नव्हावा. तद्विपरीत प्रतिनिधीनें केलें. त्यामुळें त्याचें व प्रतिनिधी-

चें

चें वैमनस्य पडलें; तें वर्तमान निजामउलमुलुखाला कळतांच, त्याणें मनांत विचार केला किं, आपणास यासमयीं चंद्रसेन जाधव, व रावरंभा निंबाळकर, व दाभाडे, व पिलाजी गाइकवाड, हे सरदार अनुकूळ आहेत, व कोलापुरचा मुख्य संभाजी तोही वश आहे; त्यास शाहू व संभाजी यांमध्यें पुनः कलह उत्पन्न करावयास हा उत्तम समय प्राप्त झाला. यास्तव त्याणें संभाजीला निमें वसूल मागावयास शिकवून, तो कज्जा मोडावयाचा मिषेंकरून तिऱ्हाइतपणें आपण मध्यें शिरून; उभयतांस सांगीतलें कीं मला तुह्मीं दोघे सारिखे. त्यास वसूल तुर्त मजकडे जमा असूं द्या; मग मी तुमच्या न्याय करीन. या प्रमाणें बोलून, त्याणें शाहूकडचे मोकासेदार व सरदेशमुखी जमा करणारे दूर केले.

असें निजामउलमुलुखाचें कृत्रिम बाजिरायापुढें चालेना; त्याणें शाहूला समजाविलें कीं हा पक्का वंचक आहे; न्याय करणारा नव्हे. तुमच्या कलहांत आपला लाभ समजून आपणच हें काम उत्पन्न करून, युक्तीनें आंत शिरला आणि तुमचा मुलुख हाताखालीं घातला. त्यावरून शाहूस बहुत राग येऊन त्याचा मनांत आलें किं निजामाशीं युद्ध करावयास आपण आंगें जावें यास्तव बाजिरायास बोलिला किं, मी करितों या कामास अंतःकरणपूर्वक तुमचें अनुमोदन असावें. त्यावर त्याणें उत्तर केलें किं, आपण हिंदूंचे राजे, त्यास आपल्या सारिख्यानीं प्रसंग पडल्यास, बादशाहाशीं लढावें; या कामाविषयीं आज्ञा केल्यास मी सर्व बंदोबस्त करीन. तेह्मां शाहूनें त्या युद्धाविषयीं त्यास मुख्यत्व दिलें. या प्रकरणावरून असें दिसतें किं, बाजिरायाची मसलत हीच, कीं निमित्तमात्र राजा असून राज्यसुख आपणास असावें. हा तर ब्राह्मणजातीचा स्वभावच आहे किं, आपणास चाकर ह्मणवून, मुख्यत्वें वर्तावें.

यानंतर तिकडे निजामउलमुलुख्याची तयारी होत असतां बाजिराव त्याचा अगोधर तयार झाला; मग निजामाचा लश्कराची गांठ पडल्यावर बाजिरायानें त्याशीं थोडकीशी लढाई करून पळाला; आणि असें दाखविलें कीं बऱ्हाणपूर लुटावयास जातो; तो खानदेशांत शिरल्यानंतर आपले पाठिमागें निजामउलमुलुख जवळच आहेसा समजून, कांहींसे लोक बऱ्हाणपुरचा वाटेकडे त्याला ठकवावयास पाठविले. आणि आपण अतित्वरेनें मोठ्या सैन्यासहित गुजराथेंत शिरून, तो मुलुख अगदीं लुटला. आणि तेथच्या अधिकारी सरबुलंदखान यास समजाविलें कीं, आह्मीं निजामउलमुलुखाचे मसलतीनेंच हें काम करितों.

हिकडे वऱ्हाणपुरचा वाटेवर, निजामउलमुलुख याचे दिवस किमपि यत्नसिद्धि नहोतां व्यर्थ गेले. मग तो समजला कि, आपणास मराठयांनीं ठकविलें, नंतर माघारा फिरून निश्चय केला कि, आतां दक्षिणेंतजाऊन पुणें जाळून टाकावें; तो आमेदनगरास येऊन पोंहचला नाहीं तों त्यास वर्तमान कळलें कि, बाजिराव लश्कर सहित कांसारबारीचा घाटानें येऊन मुलुखउद्ध्वस्त केला. तेव्हां निजामउलमुलुख माघारा फिरून गोदावरी उतरून पलिकडे गेला; तेथें बाजिरायानें त्याशीं हलकी हलकी लढाई करून, त्यास आपल्या आंगावर घेऊन, अशा जागीं नेला कि जा स्थळीं अगदीं पाणी नाहीं त्या ठिकाणावर त्याचा लश्करास घेरा घालून, त्याचे लोक जे-धान्य, तृणादिसामग्री, आणावयास जाणारे त्यांस उपद्रव करूं लागला. मग निजामउलमुलुखाला तह करणें प्राप्त जालें. तो प्रकार असा, बाजिराव त्यासम्हणूं लागला कि, कोलापुरकर संभाजी आमचे हातीं द्यावा; व आमचे मराठे वसूल जमा करणारे त्यांस कोणतीहि अडचण नपडावी याकरितां त्या मुलखांतील किल्ले आमचे स्वाधीन असावे. नंतर निजामानें संभाजी खेरीज करून वरकड कबूल केलें. तेसमयीं बाजिरायानें त्यास सांगीतलें कीं संभाजी आमचा स्वाधीन असल्यास कांहीं चिंता नाहीं. कां कि, तो आमचा धण्याचा भाउ; त्यास तो आह्माजवळ धण्याचा मानानेंच असेल. तेव्हां निजामानें कबूल केलें कि, आह्मीं त्यास पन्हाळ्यावर पोंहचवून देऊं. नंतर शाहू व संभाजी उभयतां एकचित्त होऊन, कलह मिटावा. हें वर्तमान सन सत्राशें अठ्ठाविसांत घडलें. त्यापुढें बाजिराव व निजामउलमुलुख एकमेकास भेटले, तें त्या उभयतांचें परस्परें प्रथमदर्शन.

गुजराथेचा सरबुलंदखान याणें दिल्लीचा बादशाहास बहुतप्रकारें विनंतीकरून बोलणें लाविलें कीं, माझा मुलखाची हेराणगत जाली, यामुळें वसूल जमा होत नाहीं, त्यास स्वामींनीं द्रव्य देऊन यासमयीं माझें रक्षण करावें. परंतु बादशाहानें त्या मागण्याचें कांहीं उत्तर दिलें नाहीं, आणि बाजिरायाचा भाउ चिमणाजीआपा याणें लश्करसहित पिटलादेस येऊन त्या शहराची खंडणी घेतली, व ढोलका परगणा लुटला. व आपल्या भाव्याचें सांगणें आणविलें कि, आह्मास गुजराथेची चौथ व सरदेशमुखी द्याल तर माझा भाऊ तुमचा मुलखाचें संरक्षण करील, त्यावरून सरबुलंदखानास तें कबूल करणें प्राप्त जालें. मग त्याणें सुरतखेरीज करून सर्व मुलखीं वसूल व जखातवसूल, यांची चौथ व सरदेशमुखी दिली,

दिली, आणि अमदाबाद शहर संबंधें कांहीं दिलें व कांहीं न दिलें. असें सन सत्राशें एकुणतिसांत झालें. तेसमयीं चौथीचा नेम गेनजमेचा ठरावाप्रमाणें नव्हता; जे वर्षीं जें उत्पन्न होई त्याची चौथायी देत असत. याबदल बाजिरायानें अडीच हजार स्वांर ठेवून मुलखाचा बंदोबस्त राखावा असें कबूल केलें.

मग बाजिराव चिमणाजीचा पुष्टीकरणार्थ उत्तरेकडे गेला; तेसमयीं कोल्हापुरकर संभाजीला बाहेर निघावयास संधि सांपडली. तो बरोबर लश्कर घेऊन आपल्या परिवारासहित वारणानदीचा उत्तर कांठीं उतरला, आणि मुलुख लुटूं लागला. तेसमयीं शाहूजवळ प्रतिनिधी पूर्वी निजामउलमुलुखाशीं मसलत केल्यामुळें आपल्या किमतींतून उतरलेला होता, त्यास असें वाटलें कि, हे समयीं संभाजीचा पराभव केला तर आपली योग्यता कमी झालेली पुनः वाढेल. यास्तव तो जाऊन संभाजीचा छावणीवर पडला. आणि संभाजी व उदाजी यांस पन्हाळ्याकडे पिटून लाविलें; व त्यांचीं कुटुंबाचीं माणसें धरून आणिलीं, त्यांत ताराबाई व तिची सून राजसबाई सांपडल्या त्या सातार्यावर नेऊन ठेविल्या. नंतर शाहू व संभाजी यांचा तह झाला त्यांत त्याणें कित्येक मुलुख शाहूला दिला, शाहूनेंही त्यास दिला; तो प्रकार असा तुंगभद्रेजवळचें कोपाळ शहर शाहूनें संभाजीस दिलें, त्याबदल आपणास कोंकणचा रत्नागिरी किल्ला घेतला; मग साळशीपासून आंकोलेपर्यंत कोंकणपट्टी कोलापुराकडे लावून दिली; संभाजीनें मिरज व तासगाव व आथणी व इतरही कृष्णेचे उत्तरेकडचे गांव व विजापुराचा खालचा कित्येक गढ्या शाहूस दिल्या. हें वर्तमान सन सत्राशें तिसांत घडलें.

नंतर सन सत्राशें एकतिसांत असें झालें कि, निजामउलमुलुख पूर्वीं बाजिरायास भेटला असतांही, त्याला याणें नाश केल्याचें स्मरण होतें; यास्तव तो आपलें आग न दाखवितां, दुसर्याकडून तो सूड उगवावयाविषयीं विचार करायास लागला असतां, त्यास खंडेराव दाभाडा त्या कामाचे उपयोगीसा वाटला. त्याचें व बाजिरायाचें पहिलेंच वांकडें पडलें होतें, बाजिराव चौथायी, व सरदेशमुखीची सनद पावला त्या दिवसापासून दाभाडा फौज ठेवायास लागला होता, त्याणें सेना पसतीस हजार जमविली. आणि निजामउलमुलुखाचा आनुकूल्यें करून पुढें कुमक मिळेल असें समजून, तो दक्षिणेकडे निघावयास सिद्ध झाला. त्याणें लोकांत विदित केलें कि आमच्या धणी मराठा याचें राज्य बाजिरायानें घेतलें, तें स्वामीचें स्वामीस देववयास जातों; याविषयीं पिलाजी गाइकवाड व कांताजी वर-

घुजी

पुजी कदम बांडे, व उदाजी, व आनंदराव पवार+ व चिमणाजी पंडित‡ वगैरे कित्येक लोक मला सहाय आहेत.

या प्रमाणें सेनापती दाभाडे यांकडील वर्तमान असतां, बाजिरायानें लोकांस विदित केलें किं, सेनापती निजामउलमुलुखास मिळून मराठ्यांचा राज्याचे दोन विभाग करूं इछितो; हें कर्म केवळ हिंदु धर्मास विरुध्द आहे; त्यास यासमयीं माझे जवळ फौज आहे ती त्याचे निमेही होईलशी नाहीं तथापि त्याचे पारिपत्यास मी विलंब न करितां जाईन. इतकें करून बाजिराव पुण्याहून निघाला तो नर्मदा उतरोन पलिकडे गेला, तेव्हां त्याची बिनी पुढें चालून होती तीवर पिलाजीचा पुत्र दमाजी गाइकवाड याणें हल्ला करून त्या बिनीवाल्याचा पराभव केला. तो त्यास प्रथम अपशकून जाला तथापि, तो नमानून त्याणें नेम केला किं, इतःपर समूर लढावयाचें; तेव्हां दाभाडे यांचे नवे नवे ठेविलेले लोक उभे राहिनांत, त्यांबरोबर कांताजी पळाला; तेव्हां खंडेरावाचे पुरातन चाकर होते ते त्याचा पुत्राचा संरक्षणार्थ युद्ध करीत राहिले. तो त्रिंबकराव दाभाडा हत्तीवर बसला होता त्याणें आपले लोक पळतात असें पाहून आपल्या हत्तीचे पाय सांखळ्यानी बांधिले आणि धैर्यकरून त्याच जागीं युद्धास उभा राहिला. तेव्हां बाजिराव हिकडे घोडयावर बसला होता त्याणें आपल्या सामर्थ्याप्रमाणें बहुत यत्न केला, परंतु जय कोणाचा होईल हें फारवेळ समजेना; शेवटीं त्रिंबकराव धनुष्याची दोरी ओढित असतां, त्याला दैवयोगेंकरून गोळी लागून मेला. तेव्हां त्याचे लोक पळाले, आणि बाजिराव याचा जय सांग जाला. ती लढाई बडोदें व दुभाय या दोंहीमध्यें जाली; त्यांत दाभाडे यांचा पक्षाचे जे पडले त्यांत एक जाउजी दाभाडा, दुसरा मलोजी पवार तिसरा पिलाजी गाइकवाडाचा पुत्र, व खंडेराव* दाभाडाही पडला आणि उदाजी पवार व चिमणाजी पंडित, हे दोघे कैदेंत सांपडले; आनंदराव पवार व पिलाजी गाइकवाड वगैरे जखमी जाले परंतु धरले नगेले ते वेळेस बडोदें व दुभाय हीं दोन्हीं पिलाजीचे स्वाधीन होतीं, तीं आपणास असावीं असें

\+ त्यापूर्वी पिलाजी व पवार यांचीं युद्धें होतीं परंतु ते या कामाकरितां त्यासमयीं एकचित्त जाले.

---

‡ चिमणाजी पंडित तो मोठा उत्पाती असे त्याणें गुजराथेंत लुटालूट बहुत केली त्यास चिमणाजी दामोदरही ह्मणत.

---

* खंडेराव दाभाडा सेनापती मेल्यावर त्याचा पुत्र यशवंतराव तो लहान ह्मणून तो अधिकार त्याचा आईनें संभाळिला.

बाजिरावाचा

बाजिरावाचा चित्तांत आलें परंतु कांहीं तह होऊन तो पर्जन्यकाळ गेल्यावर माघारा सातार्यास आला. निजामउलमुलुखानें बाजिरायाचा नाशाविषयीं असें कृत्रिम केलें, तें सिद्धीस नजाऊन उलटी त्यासच नाशशंका प्राप्त झाली. ती अशी त्याचा कपटावरून बाजिरायाचा मनांत आलें किं, निजामाचें पारिपत्य करावें, परंतु तो मोठा सामोपायचतुर त्याणें कांहीं युक्ती करून बाजिरायाचें चित्त मोंगल जिंकावयास गुंतवून आपल्यावरचा तो राग दूर केला, मग त्याउभयतांचा तह जाला त्यांत असें ठरलें किं, निजामउलमुलुखानें आपल्यामुलखीं निश्चिंतपणें रहावें; व बाजिरावयाणें दक्षिणेंत मुख्य पेशवा होऊन वागावें.

दिल्लीमध्यें बादशाह याणें ऐकिलें किं, सरबुलंदखानानें गुजराथची चवथाई व सरदेशमुखी मराठ्यांस दिली. तेणेंकरून तो बहुत क्रुद्ध होऊन, त्याणें जोतपुरचा राजा आभीशिंग याज बरोबर लष्कर देऊन गुजराथेंत पाठविला, आणि सरबुलंदखानाला माघारा बोलाविला, तो दिल्लीस पोंचल्यावर त्याचा अपमान केला.

माळवे मुलखीं राजा गिरधर होता, तो उदाजी पवार, व चिमणाजी पंडित यांशीं युद्ध करून मृत्यु पावला होता; परंतु त्याचा कोणी आप्त दया बाहादूर नामें असे तो मराठ्यांशी लढून बहुत वेळा त्याणें मागें हटविले. शेवटीं सन सत्राशें बत्तिसांत बाजिरायाचा भाउ चिमणाजी आपा, व पिलाजी गाइकवाड, व मल्हारराव होळकर, यां बरोबर लढाई करून मृत्यु पावला. यानंतर बाजिराव नर्मदा उतरला, आणि माळव्याचें लष्कर आपल्या स्वाधीन करून घेतलें; मग आपला भाउ, व पिलाजी जाधव, यांस आपल्या हितार्थ सातार्यास पाठविलें. त्यांसच कोंकणाचा बंदोबस्त राखावयास सांगीतला.

गुजराथेंत पेशवा गेल्यानंतर आभीशिंग राजाचा फोजदारानें वडोदें किल्ला पूर्वीं मोंगलानीं गाइकवाडापासून घेतलेला होता, तो घेतला. तथापि तेथचे प्रजेस त्यापेक्षां पिलाजीचें अगत्य असे. त्याणें कित्येक जागीं आपलीं ठाणीं बसविलीं होतीं याकरितां त्याशीं तह करावयाचा निमित्तें करून त्याणें कित्येक माणसें पाठविलीं. त्याहीं कित्येकवेळा त्याशीं बोलणें करून कोणे एके दिवशीं त्याशीं त्याचें बोलणें होऊन त्याचा निरोप झाल्यावर बाहेर निघोन कांहीं वस्तु आंत राहिल्याचें मिष करून, त्यांतील कोणी एक वाड्यांत जाऊन तो कांहीं गोष्ट पिलाजीचे कानांत सांगावयाचा आकार दाखवून, त्याजवळ गेला आ

णि

णि अकस्मात् खंजीर काढून त्याचा काळजांत खुपसला; तेणें तो मृत्यु पावला. त्या वेळेस तो मारेकरीही तेथें कोणी पिलाजीचा होता त्याणें मारिला. तेव्हां ते वर्कड लोक पळाले. हें कृत्य तारसरा परगण्यांतील डाकुर गावीं झालें.

आभीशिंगानें पिलाजीचा मरणें करून आपणास जो लाभ चिंतिला होता, तो त्यास प्राप्त न जाला; कांकि पिलाजीचा मित्र पाद्रागांवचा देसाई दिला नामें होता. त्याणें त्या सर्व मुलखांत भिल्ल व कोळी उठविले; मग चांगला समय पाहून, देसायानें पिलाजीचा भाऊ महादाजि गाइकवाड, यास निरोप पाठविला किं बडोदें घ्यावयास हा वेळ उत्तम आहे. त्यावरुन तो आला आणि बडोदें घेतलें. त्यापासून त्याचे वंश अद्यापि बडोद्यांत आहेत. त्यावेळेस पिलाजीचा वडील पुत्र होता, तो, सोनगडाहून मोठें लश्कर घेऊन आला आणि बडोद्याचा पूर्वेस जोतपुर पर्यंत स्वाऱ्या घातल्या. तेव्हां आभीशिंगानें अमदाबादेंत आपला कोणी विश्वासू ठेवून आपण आपल्या जोतपुर मुलखीं जाऊं लागला.

माळव्याचा सुभेदार दयाबहादुर मेल्यानंतर त्याचे जागीं दिल्लीचा बादशाहानें महंमदखान बंगश नामें एक नवा सुभेदार पाठविला, तो बुंदेलखंडीं जाऊन राजा चतुरसाल याचा मुलखात उपद्रव करूं लागला. तेव्हां त्या चतुरसालानें बाजिरावाकडे कुमक मागीतली; ते समयीं पेशवा त्याचे साहाय्यास जाऊन बंगषाला त्याचा मुलखांतून पार केला. त्यावरून तो राजा प्रसन्न होऊन, त्याणें बाजिरावयास आपला पुत्र मानिला. आणि त्यास एक किल्ला व झांशीजवळ कांहीं प्रांत असा दिला किं ज्याचें उत्पन्न वर्षास सवादोन लक्ष रुपये होत. पुढें काहीं अवकाशानें तो राजा मेला, ते समयीं त्याचे पुत्र दोघे होते, त्यांचे प्रमाणेंच बाजिरावाला त्याणें आपल्या राज्याचा तिसरा वांटा दिला.

माळव्यामध्यें महंमदखान बंगष मेल्यावर तो अधिकार व आग्रें या दोहों अधिकारांवर बादशाहानें राजा जयशिंग सन सन्नाशें चवतिसांत पाठविला; त्याचा व बाजिरावाचा पूर्वीं पासून स्नेह होता; म्हणून ती जागा त्यास मिळाल्यानें मराठे हर्ष पावले; परंतु तो बादशाहाचा हस्तक म्हणून मराठ्यांचें बोलणें सारें स्वीकारीना. नंतर त्याचा पुढचे वर्षीं बाजिरायाचें व त्याचें कांहीं बोलणें होऊन, त्याणें माळव्याचें राज्य बाजिरायास दिलें, आणि बादशाहास समजाऊन तोही वश केला.

सन सत्राशें चवतिसांपासून, सत्राशें चाळीस पर्यंत, झालेलीं वर्तमानें मिळून, भाग पंधरावा.

अनुक्रमणिका.

मराठी लोकांची वर्तणूक.

रघुजी भोंसल्यास सेनासाहेब सुभा पदवी, प्राप्त झाली.

वाडीचे सावंत, व आंग्र्या, व शिद्दी, यांचें वर्तमान.

बाजिराव पेशवा माळव्या मुलखांतून; माघारा आला तें वृत्त.

मल्हारजी होळकर याणें मुलखांत स्वाऱ्या घातल्या तें प्रकरण.

दिल्लीचा बादशाहानें, निजामउल्मुलुख आपणास वश व्हावा म्हणून उद्योग केला तो विस्तार.

बाजिरावास खर्चाची अडचण पडली; यास्तव त्याणें बादशाह याशीं तह करून माळव्या मुलखीं कांहीं अधिकार पावला.

त्याशिवाय त्यास दक्षिणेंतही सरदेशपांडेपणा मिळाला.

मोंगल व बाजिराव, या दोहीं पक्षीं युद्धाची सिद्धता जाली, तेव्हां निजामउल्मुलुखानें मोंगलांचा पक्ष स्वीकारिला.

बाजिरावानें पराक्रमें करून दिल्लीचा दरवाजा पर्यंत प्रवेश केला तो प्रकार.

आंग्र्याची हकिगत.

बाजिरावानें निजामउल्मुलुखाचा लष्करास भोपाळाजवळ घेरा घालून असा उपद्रव केला कीं, त्यास याशीं तह करावा लागला.

पोर्तुगीस लोक, व इंग्रेज लोक, यांची वर्तणुक.

पेशवे, व रघुजी भोंसले यांचें युद्ध जालें तें.

दिल्लीमध्यें व्हारशी मुलखाचा नादरशाह नामा बादशाह, आला; त्यामुळें मोंगल लोक संकट पावले तें प्रकरण.

मग थोडकेच दिवसांनीं त्याणें दिल्लीचें तक्त मोंगलांस माघारें देऊन; आपण आपले मुलखीं गेला.

मराठ्यानीं वसई किल्यास घेरा घातला ती कथा.

पेशव्यांनीं दक्षिण घेतल्याचे पूर्वी माळवा व बुंदेलखंड या दोहों मुलखीं काय काय बंदोबस्त केला तो प्रकार.

पेशवा हिंदुस्थानांत संचार करूं लागला.

मराठ्यांनीं

मराठ्यानी संभाजी आंग्र्यावर कांहीं मसलत केली होती ती, बाजिरायाचा मरणामुळें सिद्धीस न गेली.

हिंदुस्थान व दक्षिण देश आदिकरून सर्व मुलखांचा राज्याचीं वर्तमानें.

बाजिरायाचा स्वभावाचें स्वरूप कथन, व त्याचे पुत्र बाळाजी बाजिराव, व रघुनाथराव, व जनार्दनबावा समशेरबहादुर यांची गोष्ट.

भाग पंधरावा.

एथपर्यंत मराठे लोक यांणीं गुजराथेंत कोण कोणत्या प्रकारें प्रवेश केला; तें व माळव्यांत आपल्या आधिपत्याचा पाया घातला तें सांगीतलें. आतां वराड व कोंकण यामध्यें त्याणीं कसकसा संचार केला तो प्रकार समजला पाहिजे, नंतर माळव्यांत उत्तरें कडे जीं मराठ्यानीं मोठीं मोठीं कार्यें केलीं तीं लिहिलीं जातील.

पेशवा शाहूचा जवळ नसतां, सेनासाहेब सुभा कान्होजी भोंसला याणें त्याची कांहीं आज्ञा मानिली नाहीं यास्तव शाहूनें त्यास सातार्यामध्यें कैद केला; आणि त्याच्या भाउबंद रघुजी भोंसला यास ती पदवी दिली. त्या रघुजीनें पूर्वीं गोंडवणांत कोणि एका मुसलमानाजवळ कांहीं दिवस थोडक्या लोकानशीं चाकरी केली होती; तो अधिकार लहान म्हणून तो पुरुष प्रसिद्धीस आला नाहीं; परंतु त्यास कांहीं काम संपविलें असतां, तो तें काम चांगलें करित असे; आणि तो शिकारीचा कामाविषयीं मोठा धीट असे; यास्तव शाहू त्याला आपल्याबरोबर शिकारीस नेई. मग त्यावर त्याची फार प्रीति बसली; नंतर त्याणें आपल्या बायकोची बहीण शिर्क्यांची कन्या त्यास देवविली; आणि वराडची सुभेदारी सांगीतली. त्याबदल त्याकडून कबूल करविलें किं, नेहेमीं पांच हजार स्वारानशीं चाकरी करावी; व वर्षास नऊ लक्ष रुपये सर्कार पोत्यास पोहोंचवावे. शिवाय कधीं पेशवा मोहिमेस निघेल, तेसमयीं त्याबरोबर दहाहजार स्वारांसहित जावें; याप्रमाणें त्याणें कबूल केलें. त्यावेळेस त्याचा परम मित्र श्रीपतराव प्रतिनिधि, तो राजानें कोंकणांत पाठविला होता, तो जर त्यासमयीं जवळ असता तर आपल्या स्नेहास्तव रघुजीला इतकें कबूल करूं न देता.

कान्होजी आंग्र्याचे दोघे पुत्र कोंकणांत असत, त्यांत वडिल सखाजी तो कुलाब्यांत होता; धाकटा संभाजी तो सुवर्णदुर्गीं रहात असे. कान्होजी

न्होजी आंग्र्या जीवंत असतां मुंबैचा इंग्रेजानीं त्यास जिंकावयाचा मोठा उद्योग केला; परंतु सिद्धीस गेला नाहीं. मग कान्होजी+ मेल्यानंतर त्याचा थोरला पुत्र सखाजी तोही मेला. त्यामागें धाकटा संभाजी याणें आपले सावत्र भाऊ तिघे होते, त्यांतला वडील आपल्यापाशीं ठेविला आणि त्यापेक्षां धाकटे दोघे येसाजी व मानाजी ते कुलाब्यास पाठविले; त्यांत येसाजीला मुलखाचा बंदोबस्त सांगीतला, आणि मानाजीस किल्याचा व फौजेचा बंदोबस्तास नेमिला. मग त्याउभयतांमध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन, मानाजीनें कपटेंकरून पोर्टुगीस लोकांस किल्यांत आणून येसाजीचे डोळे काढवून बंदींत ठेविला. नंतर संभाजी मानाजीचा पारिपत्यास गेला, तेव्हां त्याणें पेशव्याचा आश्रय केला, यास्तव संभाजीला माघारें जावें लागलें. पेशव्यानें मानाजीची कुमक केली, त्याबद्दल त्याणें त्यास, कुतब्या व राजमाची हे दोन किल्ले दिले.

त्यावेळेस जंजिर्यामध्यें, शिद्दीचा अंमल बसला होता; त्याशिद्दीस मोंगलानीं शिद्दी याकुट असें नवें नाव दिलें होतें, त्याशीं व मराठ्यांशीं निरंतर युद्धप्रसंग होई, परंतु त्या याकुटानें कधींहि औरंगजेबानें दिलेला आपला मुलुख मराठ्यांचा हातीं लागूं दिला नाहीं. आणि तो कधीं कधीं शाहूचा मुलखांतून स्वार्या घालून खंडणी घेत असे; त्याला जिंकावयाविषयीं शाहू व त्याचे दरबारी लोक फार इछित होते; परंतु त्यापुढें कांहीं बळ चालेना तेव्हां कांहीं कपटें करून जिंकावा अशी प्रतिनिधीनें मसलत केली, तो प्रकार असा, त्याशिद्दीजवळ त्याचा परम विश्वासू याकुबखान नामें मुसलमान असे, तो समुद्रांत चांचेपणा करून मोठा विख्यात जाला होता; त्याचे वडील व तो गुहागरचे पाटील; ते जातीचे कोळी, याचे लहानपणी याला मुसलमानानीं स्वारींत पाहून धरून नेला, आणि आपला धर्म शिकविला. त्यास प्रतिनिधीनें वश केला मग सांगीतलें कीं, शिद्दीचें आधिपत्य नाहींसें जालें असतां यांतले कांहीं किल्ले आह्मास देऊन बहुतेक राज्य तूंच संभाळावेंस. ही मसलत सिद्धीस न्यावयाकरितां प्रतिनिधीबरोबर लष्कर देऊन सन सत्राशें तेत्तिसांमध्यें कोंकणांत पाठविला. तेव्हां शिद्दीचा मुलखांत गरीब गुरीब रयत लोकांस मात्र उपद्रव जाला परंतु किल्ला त्याचे हातीं लागला नाहीं. आणि त्याशिद्दीपुढें प्रतिनिधीचें बळ कांहींच चालेनासें जालें. तेव्हां तो तेथून चिपोळणास जाऊन उतरला; आणि गोवळकोट किल्यामध्ये

+ कान्होजी आंग्र्या सन सत्राशें अठ्ठाविसांत त्यानार्यामध्यें मृत्यु पावला.

आपले

आपले लोक ठेविले. तेथेंही शिद्दीनें छापा घालून गोवळकोट घेतला. अशी त्याणें प्रतिनिधीची दुर्दशा केली; हें वर्तमान समजून शाहूनें त्याचे कुमकेविषयीं चिमणाजी आपास आज्ञा केली परंतु तो ऐकेना, शेवटीं प्रतिनिधी रुष्ट होऊन माघारा सातार्यास आला.

त्याच सुमारें जंजिर्याचा शिद्दी मेला. त्याचे पुत्र पुष्कळ होते, त्यांत वडील शिद्दी आबदुलखान नामें होता; त्याचे धाकटे भाउ सारे एक शिद्दी+ रहिमान खेरीज करून मिळाले; आणि त्यास जिवें मारून टाकिला; हें वर्तमान याकुबास कळल्यावर त्याणें शिद्दी रहिमानाचा पक्ष धरून शाहूलासन सत्राशेंपस्तिसांत कुमक मागीतली, त्यास शाहू अनुकूळ जाला; त्या वेळेस बाजिराव माळव्याहून येत होता त्यास आज्ञा केली कीं दंडाराजपुरीं जावें; याशिवाय दुसरे जे रिकामे लश्करी लोक होते त्यांस सांगीतलें, कीं, तुह्मीं जाऊन बाजिरावास मिळावें. तो बाजिराव कोंकणांत गेल्यावर शिद्दी रहिमान व याकूब हे त्यास मिळाले. मग तळें व घोंसाळें हे दोन किल्ले घेतले. इतक्यामध्यें प्रतिनिधीही मागून येऊन पोंहोंचला; त्याणें येतांच रायगड घेतला कांकिं तेथचा किल्लेदारास याकुबानें अगोदरच किल्ला द्यावयास सांगीतला होता.

त्यानंतर जांहीं आबदुल मारिला; त्यांतील एक भाऊ शिद्दी रत्यान नामें येऊन बाजिरावाशीं लढला, तो मेला गेला. नंतर पेशव्यानें जाऊन जंजिर्यास खुसकीवरून मोरचे लावून तोफांचा मार चालविला; ते समयीं मानाजी आंग्र्याही येऊन समुद्रांतून किल्ल्यास तोफा मारूं लागला. असें असतांही बाजिरावानें सुमार पाहिला किं, हा किल्ला लवकर सर्वथा, हातीं लागणार नाहीं आणि आपण फार दिवस कोंकणांत राहिलों असतां मोठ्या मोठ्या मोहिमेचीं कामें रहातील. यास्तव त्याणें तेथचे शिद्दी सल्ला करावयास सिद्ध जालेले पाहून सल्ला केला. तो प्रकार असा, तेथें शिद्दी रहिमानाचें मुख्यत्वअसावें, व त्याणें अकरा महालांचें उत्पन्न अर्धें द्यावें. व मराठ्यांस, रायगड व तळें व घोंसाळें व उचितगड व बिरवाडी, हे किल्ले असावे. बाजिराव तें युद्ध असें शेवटास नेऊन मोठा विख्यात होऊन सातार्यास गेला. तेथें शाहूनें त्या बाजिरावानें घेतलेल्या रायगड, इत्यादि ठिकाणांची सुभेदारी दिली.

माळव्याहून बाजिराव निघाल्यावर त्याचा सरदार मल्हारराव होळकर लष्करसहित तेथें होता तो आग्र्याचे पलिकडेही स्वार्या घालून लुटित

+ शिद्दी रहिमान त्यावेळेस जंजिर्यांत नव्हता.

गेला

गेला. तेसमयीं दिल्लीचा बादशाहाचा वजीर खानडौराणनामा होता, याचे मनांत आलें कीं, सल्ला करून मल्हारराव यास मागें फिरवावा; परंतु तो हें नसमजला कीं, बंडाचें पारिपत्य केल्यावांचून आधीं तह करणें ठीक नव्हे; मग त्याचा मनांत विचार होऊन त्याणें आपला भाऊ बरोबर फौज देऊन मोठा भयंकर आकार दाखवून शत्रूस नर्मदेचा पार करावयास पाठविला. तो निघाला तेसमयीं दिल्लीचा सर्वलोकांस हा जय पावेल, असा भरंवसा होता; परंतु त्याचा तो खटाटोप व्यर्थ जाला. तें लश्कर सरोंज पर्यंत जाऊन मागें फिरलें; आणि दिल्लीचा लोकांस दाखविलें कीं आपण मोठा पराक्रम केला. इकडे मल्हारराव त्याबरोबर सहज हलकें हलकें लढावयास थोडकेसे लोक पाठवि, ते दिवसा त्याशीं कांहींसे लढत, आणि पळत; मग रात्रीस जाऊन त्याचा डेऱ्यावर बाण टाकीत. तो मल्हारराव आपणतर सैन्याचा मोठ्या समुदायासुद्धा उद्योग करून त्या मुलखाचा वसुलाची जमा आपला धनी बाजिराव यास पाठवावयाचें काम चालविलेंच होतें; माळवे मुलखीं व चंबळानदीचे दक्षिणेस मोंगलांचे हातीं कित्येक किल्ले होते, तथापि मुलखाचा नाशाचा बंदोबस्त त्यांचानें करवेना; मराठ्यांखेरीज रोहिले लोकही त्यामुलखीं स्वाऱ्या घालित होते. याशिवाय गुजराथेंतही मल्हारजीनें एकाएकी स्वाऱ्या घालून अमदाबादेचे उत्तरेकडचे कित्येक गांव लुटून माघारा फिरला.

बाजिरावानें फौज फार ठेविली यास्तव तो बहुतां लोकांचा कर्जभरू जाला; मग जा सावकारानीं पहिलें पुष्कळ दिलें होतें ते अणिक देइनातसे जाले. व त्याचे लश्करी लोकांचा रोजमुरा थकला, तेणेंकरून ते लोक त्याचा आज्ञेंत अंतर पाडूं लागले; असें सन सत्राशें छत्तिसांत + पडलें. नंतर त्याणें माळव्याची चौथ व सरदेशमुखीच्या ऐवज जमा करून राजा जयशिंग याचा योगें बादशाहापासून माळवा मुलुख आपणास पृथक मागीतला. याखेरीज सरबुलंदखानानें गुजराथची सरदेशमुखी देऊं केली होती, तिची आज्ञा व्हावी असें मागीतलें. तेव्हां बादशाह वजीर याउभयतांचा मनांत आलें कीं याप्रमाणें द्यावें, परंतु त्याचे सरदार तुराणी मोंगल यांचा मनास येईना; म्हणून खानडौराणानें आपला वकील कांहीं बोलणें करावयास बाजिरावाकडे पाठविला; त्याचे

\+ त्यावेळेस त्याणें कोणाएका महापुरुषास पत्र लिहिलें कीं, हालीं मीं बहुतांचा देणेदार होऊन माझी कुतरओढ जाली, हीच मला नरकयातना शी वाटते, आणि सावकार व शिलेदार यांच्या पायां पडतां पडतां माझा कपाळाचें कातडें गेलें.

हातीं चौथ व सरदेशमुखीची सनद गुप्त देऊन सांगीतलें कीं समयविशेष पाहून त्यास सनद द्यावी. असें असतां खानडौराणाजवळ बाजिरावयाचा वकील होता, त्यास तें वर्तमान कळलें; त्याणें पेशव्यास बातमी पोंहचविली. तें समजतांच बाजिरायाचा मनांत आलें किं, ते आपणास भीतात; त्यास आणखीहि कांहीं मागावें. हातर ब्राह्मणजातीचा स्वभाव आहे, किं कोणी मनुष्य कांहीं द्यावयास सिद्ध जाला ह्मणजे अणीक अणीक मागावें. त्यावर बाजिराव त्यापाशीं फारच मागूं लागला, तो प्रकार असा, प्रथम संपूर्ण माळवा जहागीर द्यावा; व किल्ला मांडु व किल्ला धार व किल्ला रेभीन, व चंबळा नदीचे दक्षिणेचा मुलखाची जहागीर, व फौजदारी; व पन्नास लक्ष रुपये बादशाहानें आपल्या खजिन्यांतून द्यावे. याशिवाय दक्षिण सहासुभ्यांची सरदेशपांडेपणाची सनद द्यावी असें मागीतलें.

त्यानंतर बादशाहानें सहासुभे दक्षिणेचें सरदेशपांडेपण+ मात्र दिलें, आणि सहा लक्ष रुपये नजर घेतली. केवळ सहासुभ्यांचें देशपांडेपणच पेशव्यास मिळालें हें तरी निजामउलमुलुखाचा द्वेषास्तव खानडौराण याणें देवविलें. कांकिं सहासुभे दक्षिणेंत निजामउलमुलुखाची सत्ता होती; मग निजामास फार वाईट वाटलें तेसमयीं त्याला बादशाह व मोंगल यांणीं लिहिलें किं, तूं दिल्लीस लवकर ये; न आलास तर मुसलमानाचें राज्य बुडेल. तेव्हां निजामउलमुलुखानें विचार केला किं आपणास बहुतां दिवसांचे सहाय जे मराठे लोक त्यांशीं लढावें असें आलें, इतकें होऊन तो दिल्लीस गेला. तेथें अनेकप्रकारें त्याचें मन वशकरावयाविषयीं बादशाहानें उद्योग केला तो असा; त्याचा वडीलपुत्र गाजिवदिन त्यास गुजराथ व माळव्याचा अधिकार दिला, त्याशिवाय सर्व मांडलिकांनीं त्याचा हाताखालीं वागावें असें सांगीतलें. याप्रमाणें होऊन निजामऊलमुलुखाजवळ फौज चवतीस हजार जमली. त्यारवेरीज तोफखानाहि फार चांगला होता.

इकडे बाजिरायानेंहि आपली फौज जमा करून निघाला तो नर्मदेस जाऊन पोंहचला तोंपर्यंत त्याजवळ ऐशीं हजार फौज जमली, तरी त्यांत रघुजी भोंसला व दाभाडे व यशवंतराव व सेनापतीचा कोणी सरदार इतके नव्हते.

बाजिरायानें बादशाहापाशीं अमर्याद मागणें केलें, त्यावरून त्यादर-

---

+ सरदेशपांडेपणाचा हक्क सरदेशमुखीसारिखाच आहे, परंतु त्यांत प्राप्ति शेंकडा पांच रुपये.

बारीं

वारीं असें ठरलें कि, फार मोठें लश्कर तयार करून त्यास भय दाखवावें. नंतर त्याणीं दिल्लीचा सभोंवतें पुष्कळ लश्कर जमा केलें; तें ऐकून बाजिरावानें आपल्या लश्करचें जड सामान आपला मित्र जगतराज नामा बुंदलखंडचा राजा, त्याजवळ ठेवून बरोबर हलकें सामान घेउन आग्रापासून विसां कोसांवर दक्षिणदिशेस यमुनेचे कांठीं उतरला. तेसमयीं त्याचा सरदार मल्हारराव होळकर व दुसरेही मराठे सरदार यमुने पलिकडे दुवाब, येथें उपद्रव करीत होते; तेथें अकस्मात मोंगलांचें लश्कर येऊन त्यांस यमुनापार केले. त्यावेळेस बाजिरावहि ती जागा ठिक नाहींशी समजून तेथून निघोन ईशानी दिशेस चालिला. तेव्हां ते मोंगलांचे सरदार याणीं बादशाहास लिहिलें कि आह्मीं सर्व मराठे चंबळानदीपार केले ते आपल्या मुलखीं गेले. तेव्हां दिल्लीमध्यें लोकांस मोठा आनंद जाला; आणि खानडोराणाजवळ, बाजिरावाचा वकील होता त्यास निघोन जा अशी आज्ञा जाली. त्याणें जाऊन तें वर्तमान बाजिरावास कळविलें, तेव्हां तो बोलिला कि, आमचे मराठे लोक दिल्लीचा दरवाजाजवळचीं घरें जाळितील, तें पाहून बादशाहास कळेल कि, अद्यापि मराठे हिंदुस्थानांत आहेत. मग तसाच निश्चय करून, रोज वीस वीस कोस मजला करीत आडवाटेनें एकाएकीं दिल्लीचे दरवाजाजवळ लश्करसहित जाऊन डेरा दिला. तेव्हां कित्येक हत्ती व कित्येक उंट शहराबाहेर आले होते ते धरले, व कित्येक हिंदुलोक हि दिल्लींतून बाहेर देवदर्शनास जाणारे ते धरून लुटले. परंतु कोणाचीं घरें जाळिलीं नाहींत; कांकिं असें केल्यास बादशाहाचा राग होऊन पुढें तह करावयास अवघड पडेल; आणि लूट जमा केल्यानें पळून जातां येणार नाहीं, यास्तव बादशाहास पत्र पाठवून सल्ल्याचा प्रकार दर्शिवला. अशी त्याची सुशीलता पाहून दिल्लीचे कित्येक मानकरी लोक धैर्येंकरून आठहजार लश्कर बरोबर घेऊन युद्धास निघाले. त्या युद्धांत मोंगलांचा पराभव जाला, मराठ्यांचा इंद्राजी कदम नामें एक सरदार व थोडकेसे लोक पडले. याप्रमाणें बाजिरावाचा जय जाला, तरी तो असें समजला कि, मोंगलांचे लोक चहूंकडून लवकर जमा होतील यास्तव रात्रीसच निघोन गेला. तो ग्वाल्हेरचे वाटेनें रेवारी व मंदावराकडून चालिला. त्याचे पाठिमागें मोंगलांचे कोणी सरदार लागले नाहींत, मग त्यास कळलें कि, या वेळेस आपण दक्षिणेंत अवश्य जावें त्यावेळेस खानडोराणानें बाजिरावास सांगून पाठविलें कि, माळव्याचा अधिकार व तेरा लाख रुपये कबूल आहेत. तेव्हां पेशव्यानें त्याजवळ आ-

पला वकील फिरून पाठविला. मग आपण सातान्यास जाऊन राजाची भेट घेतली, आणि तत्काळ तेथून निघोन कोंकणांत गेला.

तेथें सन सत्राशें सत्तिसांत कुलाबा घ्यावयाकरितां मानाजीला पोर्टुगीस लोक अनुकूळ होऊन कुलाबा त्याचा हातीं लागला, परंतु त्याणें त्यांस द्यावयाकरितां जो मुलुख कबूल केला होता तो देइना. यास्तव पोर्टुगीस लोक संभाजी आंग्र्यास मिळोन मानाजीपासून कुलाबा घ्यावयास सिद्ध जाले. त्यांचा निवारणार्थ पेशवा गेला; तो तें कार्य सिद्धीस नेऊन त्यांपासून सातहजार रुपये रोख, व तीन हजार रुपयांचें सामान, कांहीं विलायती व कांहीं चिनाय्री, प्रतिवर्षी द्यावें असा करार ठरविला.

सन सत्राशें अठतिसांत बाजिराव नर्मदापार गेला; त्यावेळेस निजामउलमुलुख सरोंजेस होता, त्याणें तेचसमयीं शत्रूवर चालून जावें हें योग्य परंतु तसें नकरितां तो चांगला जागा पाहून भोपाळाजवळ बाजिरावाची वाट पाह्यात राहिला. तेथें त्याचा लश्कराला पुढचे आंगीं ओढा होता; पाठिमागें मोठें तळें असे, याप्रमाणें आश्रय पाहून राहिल्यामुळेंच तो पराभव पावला असें दिसतें. कांकिं, मराठेलोक तेथें जाऊन पोंहचतांच त्यांस वाटलें किं, याणें सुदृढ स्थळ धरिलें; तस्मात् याचा मनांत भय आहे. त्यावरून त्यांहीं त्याच वेळेस हल्ला केला; तेव्हां निजामाकडचे रजपूतलोक पांचशें पडले; व घोडे सातशें मेले मराठ्यांकडील शंभर पडले, व तीनशें अखमी जाले. तेसमयीं बाजिराव तेथून जवळच दोन बाणाचा टप्यावर उभा राहून संधी पहात होता; ती अशी किं, निजामउलमुलुख आपली जागा सोडून निघाला असतां, त्यावर लश्करासुद्धां एकाएकी पडून त्याचा अगदीं पराभव करावा. अशी आशा धरून राहिला असे, परंतु त्याणें ती जागा सोडिली नाहीं. मग याचा हातून इतकें मात्र जालें किं, याणें आपल्या लश्कराचा टोळ्या सभोंवत्या बसवून निजामाचा लश्करास धान्य तृणादि मिळेनासें केलें. असें निजामास संकट प्राप्त जालें तें वर्तमान दिल्लीस कळल्यावर त्याचे मुक्ततेविषयीं तेथें तयारी होऊं लागली; परंतु बाजिरावास विदित होतें किं, तेथचा मुख्य कारभारी खानडौराण तो निजामाचा द्वेषी यास्तव तेथून धांवणें लवकर येणार नाहीं कदाचित हैदराबाद व ओरंगाबाद यांतून कोणी मदत येतील; तन्निवारणार्थ मात्र बाजिरावानें रघुजी भोंसल्यास बहुत आर्जवेंकरून लिहिलें किं, सोनगडीं सेनापती आहे त्याला माझे मदतीस लवकर पाठवावा. असेंच शाहूनेंही बाजिरावाचा पुष्टीकरणार्थ आज्ञापत्र आपल्याहातचें भोंसल्यास पाठविलें; परंतु

त्याणें

त्याणें ऐकिलें नाहीं. बाजिरावाचा भाऊ चिमणाजी आपा तोमात्र लोकजमा करून तापीचा कांठीं राहिला होता. त्यास बाजिरावानें लिहिलें कीं हे समयीं तुला फौज मिळेल तितकी जमा कर, व दक्षिणेंत बोलावणीं पाठवून फत्तेशिंग भोंसले व संभुशिंग जाधव व सरलश्कर यांस आण. बांडे व दाभाडे व गाइकवाड, हे मजकडे येत नसल्यास तूं आपल्याजवळ ठेवून घे आणि तापीवर ऐस; जर या वेळेस सर्व मराठे एकचित्त होऊन मला अनुकूळ झाले तर मुसलमान लोकांस दक्षिणेंतून हांकून द्यावयाची संधी हीच आहे.

निजामउलमुलुख अशा अडचणींत पडला तेव्हां ती जागा सोडून दूर गेला, परंतु त्याजवळ तोफखाना वगैरे बहुत सरंजाम होता त्यामुळें निघून जावयास ठिक पडेना म्हणून तो माघारा फिरून भोपाळ किल्याचे कोटांत गेला; ती जागा पुरेशी नव्हती म्हणून कांहीं लोक बाहेर राहिले. तेसमयीं बाजिरावाजवळ तट पाडावयाजोग्या तोफा नव्हत्या, तथापि त्याणें बाण टाकून व बंदुकांचा भडमार करून त्यास असा बेजार केला कीं त्याणें कोणत्याहि प्रकारें निघून जावेंसें आलें. तेव्हां त्याणें आपलें जड सामान भोपाळ व इसलाम गड येथें ठेवून आपणाबरोबर कांहीं तोफा व उंटावरचा जेजाला घेऊन बाहेर निघाला तेवेळेस मराठ्यांनीं त्याचा तोफखाना हल्ला करून घ्यावयाचा उद्योग केला परंतु तो सिद्धीस नजातां त्या तोफा व जेजाला यांचा आश्रयेंकरून ते मोंगललोक रोज दोन कोस असें धिमे चालीनें जातां जातां, दोराईसराई गावां पावेतों पोंहचले. तेथें मोंगल व बाजिराव यांचा तह जाला त्यांत असें ठरलें कि, बाजिरावास चंबळा व नर्मदा या दोहों नद्यांमध्यें जो मुलुख आहे त्याचें आधिपत्य प्राप्त व्हावयास बादशाहास अनुकूळ करावा. याशिवाय पन्नास लक्ष रुपये हि बाजिरावास देव्यावे.

यानंतर बाजिराव चंबळानदीचे दक्षिणेस मुलखाची खंडणी घेत राहिला. इतक्यांत व्यंकटराव घोरपडा कोंकणामध्यें पोर्तुगीस लोक यांचें पारिपत्य करावयास कित्येक स्वार घेऊन गोव्यांकडे चालिला. दुसरा खंडोजी मानकर कोंकणचे उत्तरेस लश्करसुद्धां त्या लोकांचे किल्ले घ्यावयास निघाला. त्याशीं त्या पोर्तुगीसानीं फार शौर्येंकरून युद्ध केलें, परंतु मराठ्यांचे कित्येक मुख्य सरदार चिमणाजी आपा व होळकर व शिंदे वगैरे सरंजाम घेऊन कोंकणांत गेले. त्याशीं युद्ध करतां करतां पोर्तुगीस लोक बहुतेक मेले गेले; तेसमयीं प्रायः त्यांचे किल्ले मराठे

लोक

लोक यांणीं घेतले.

त्या वेळेस मुंबई शहर हें लहानसें गांव होतें, त्यांत इंग्रेज लोक असत, त्यांशीं व पोर्टुगीस लोकांशीं कांहीं वैमनस्य पडलें यास्तव त्यांस गुप्तपणें मराठ्यांचा पक्ष होता, त्या वैमनस्याचें कारण असें. सोळाशें एकसष्टांत इंग्रेजांच्या बादशाह याणें पोर्टुगाल मुलखाचा बादशाहाचे कन्येशीं विवाह केला. तेव्हां त्याणें त्या जांवयास मुंबई व त्यासंबंधें मुलुख आंदणामध्यें दिला. त्यानंतर दुसरे वर्षीं इंग्रेज लोक पांचशें मुंबईस आले आणि पोर्टुगीस लोकांपाशीं साष्टी मागूं लागले तेव्हां ते ह्मणाले कीं साष्टीशीं आणि मुंबईशीं संबंध नाहीं, हें बेटच निराळें आहे. असें बोलून देईनात शेवटीं त्यांपासून मराठे साष्टी घेऊं लागले तेव्हां इंग्रेज कांहींसा हर्ष पावले; कांकिं, ते असें समजले किं, मराठ्यांपासून पुढें कधीं तरी हें स्थान आपणास प्राप्त होईल. आणि हालीं याचें पारिपत्यहि जालें.

याप्रमाणें कोंकणांत पोर्टुगीस लोकांशीं आणि मराठ्यांशीं युद्ध होत असतां सेनासाहेबसुभा याचा पुतण्यानें कोणाची आज्ञा न घेतां हिंदुस्थानांत अल्हाबादपर्यंत स्वाऱ्या घालून मुलुख लुटला. तेणेंकरून बाजिरावास फार राग येऊन त्याणें त्याचा पारिपत्यास ओजी कावरे नामें सरदार पाठविला, त्याला रघुजी भोंसल्यानें जिंकिला; मग बाजिराव त्याचा सूड घ्यावयास निघाला. तेसमयीं त्याला वर्तमान कळलें किं फारशी लोकांचा नादरशाह नामा बादशाह दिल्लीस येऊन, त्याणें मोंगलांचा पराभव करून दिल्ली शहराची खंडणी बादशाहाकडे मागूं लागला. व खानडोराण मृत्यु पावला, मग तेथून पुढें गेला तों दुसरें वर्तमान समजलें किं, त्या नादरशाहानें दिल्लीचा बादशाहास कैद करून तेथचे राहाणारे लोक आठ दहा हजार सुमारें मारिले. आणि शहर लुटलें हें ऐकून बाजिरावास मोठा विचार पडला, आणि त्यास असें वाटूं लागलें किं, हा कोण मोठा शत्रू आला आहे, यापुढें सेनासाहेबसुभ्याचा पुतण्या रघुजी भोंसला याचें पारिपत्य करावयास जाणें हें केवळ कनिष्ठ कार्य, व पोर्टुगीस लोकांशीं युद्ध करणें तेंही अल्प कृत्य. कदाचित् तो बादशाहास मारून आपणच गादीचा अधिष्ठाता होईल, त्यापुढें तिसरें वर्तमान आलें किं, एक लक्ष फारसी जमा होऊन दक्षिणेस येताहेत. तरी तो किमपि न भितां पुढें गेला, तेसमयीं त्याणें आपला भाऊ चिमणाजी आपाहि कोंकणांतून बोलावून बरोबर घेतला; आणि सर्व लोकांत विदित केलें किं, जे कोणी हिंदू व मुसलमान असतील

त्या

त्या सर्वांहीं येऊन माझें साहाय्य केलें असतां शत्रूस घालवून देतां येईल. मी तर आपले मराठे लोक या कार्याकरितां नर्मदानदीपासून चंबळा नदीपर्यंत पसरणार. अशी बाजिरायानें तयारी केली; तों होळकर व शिंदा हे दोघेहि त्यास येऊन मिळाले. तेव्हां असें वर्तमान आलें किं, तो नादरशाह आपल्या संतोषानें दिल्लीचें तक्त बादशाहास माघारें देऊन लश्कर सुद्धां निघोन आपले मुलखीं गेला. तेसमयीं त्याणें बाजिराव व शाहू व दुसरे जे कोणी हिंदूंचे मांडलिक होते, त्यांस पत्रें पाठविलीं किं, मी हा बादशाह पुनः तक्ताधिपती केला. इतःपर हा मला बंधूसमान यास्तव तुह्मीं सर्वांहिं याचे आज्ञेंत वागावें. जर कोणीं याची आज्ञा मान्य न करिल तर पुनः मी माघारा येऊन त्याचें पारिपत्य करीन.

पोर्तुगीस लोकांची व मराठ्यांचीं कोंकणांत युद्धें जालीं, त्यांत मराठ्यांहीं वसई किल्ला घेतला. त्या युद्धांत परस्परें युद्धनिपुणतेची पराकाष्ठा जाली; त्यानंतर तसा यत्न मराठ्यानीं केलाच नाहीं. सन सत्राशें एकुणचाळिसांचा दुसऱ्या महिन्याचे सत्राव्ये तारिखेस चिमणाजीआपाच्या विनीवाला शंकराजीनारायण याणें वसई किल्यास खुसकीवरून घेरा घातला; व त्या किल्ल्यास जा आंगीं पाणी आहे, तेथें मानाजी आंग्र्या येऊन त्याणें तो घेरा पुरा केला. तेव्हां तेथचा किल्लेदारानें आर्जवें करून विनंती केली किं, तुह्मीं जंजिऱ्याचा शिद्दीशीं जसा करार केला तसाच आह्माशीं कराल तर किल्ला देतों, परंतु चिमणाजीचा मनास ती गोष्ट येईना; कांकिं, त्यास असें वाटलें किं. असलें सुदृढ स्थळ यांचे हातीं असतां आह्मीं घेतलेला जो मुलुख आहे तो हे आमचे मागें घेतील, आणि पर्जन्यकाळाचा पूर्वीं हें काम शेवटास न गेलें तर हा सर्व उद्योग व्यर्थ जाईल. याकरितां अनेकप्रकारें यत्न चालविला; तो असा मैदानामध्यें जागोजाग मोर्चे बांधून एका मोर्चाहून दुसऱ्या मोर्चास किल्लेकरांचा तोफांचा मार चुकवून जावया करितां जमीन खणून मोठे मोठे चर पाडून वाटा केल्या. तेव्हां किल्लेकरानीं त्यांवर गरनाळांतून कुलपी गोळे, वदगड वगैरे त्या चरांचा वाटेवर टाकून रोज रोज ते लोक बहुत मारिले. व त्या किल्ल्यांत तोफा बहुत होत्या, तथापि मराठ्यांनीं फार तोफा आणून त्यांचा तोफांचा उपाय चालेनासा केला. आणि किल्ल्याचा तटाला भोंक पाडिलें; परंतु त्यांतून आंत शिरतां येईना. तेव्हां किल्ल्यांत जावयास कोणती वाट नाहीं ह्मणून त्या कोटाखालीं सुरुंग पाडूं लागले.

ले, तेव्हां किल्लेकरानीं त्या सुरुंगाचा सुमारें आंतून सुरुंग पाडून त्यांचा यत्न व्यर्थ केला. असें बहुत वेळा झालें शेवटीं मराठयांनीं मसलत केली कि, एकदांच पांच सुरुंग उडवून तरास मोठें खेंडार पाडलें ह्मणजे मार्ग मोठा होईल.

नंतर पांच सुरुंग तयार केले त्यांत तीन जवळ आणि दोन दूर; त्या दोहोंतल्या एकाला पहिल्यानें आग घातली, तो चांगला न उडाला. मग जे सरसे सरसे तीन होते त्यांस एकदांच आग घातली. तेव्हां त्यांतील दोन उडून त्यांचें खेंडार मोठें पडलें. तेसमयीं मराठे किल्ल्यांत शिरावयाकरितां जवळ गेले; तों तिसरा सुरुंग उडाला त्यांत सांपडोन ते फार मेले गेले व किल्लेकरानींही गरनाळांचा गोळ्यानीं व बंदुकांचा मारानें फार हैराण केले, त्यावेळेस ते सर्व मराठे मागें हटले. तेव्हां किल्लेकरानीं त्या खेंडारांतून चढून जावयाचा उपाय चालेनासा बंदोबस्त केला. त्यानंतर पांचां सुरुंगांपैकीं एक राहिला होता, त्याचें काम मल्हारराव होळकरानें पक्कें केलें होतें; त्यास आग घातली. तेव्हां तो चांगला उडाला त्याणें अर्धा बुरूज कोसळला. तेसमयीं मराठयांनीं मातब्बान हल्ला केला तेव्हां पोर्टुगीस लोकानीं मातीचा टोपल्या भिंती सारख्या रचून तेथून तोफा लागू करून आपला जीव वांचविला, व मराठयांस जवळ येऊंच दिले नाहींत मग त्यांस खाण्यापिण्याचा तोटा पडून अकृत श्रमी जाले आणि त्या युद्धास आरंभ होऊन, तिसरा महिना भरला अशासमयीं त्यांहीं मराठयांशीं तहाचें बोलणें लाविलें त्यांत असें ठरलें कि, आठां दिवसांत, पोर्टुगीस लोक आपलीं मुलें माणसें काढून किल्ला रिकामा करून देतात. त्या किल्ल्याच्या युद्धामध्यें मराठयांचे लोक पांच हजारांवर मेले गेले. पोर्टुगीस लोकांचे मेलेले व जखमी मिळून आठशें जाले. या युद्धाशिवाय कोंकणांत मराठे व पोर्टुगीस लोक यांचीं युद्धें जालीं, तीं व हें मिळून मराठयांचें माणूस बारा चौदा हजार सुमारें मेलें.

इराणी लोकांचा बादशाह याणें दिल्ली सोडल्यानंतर बाजिरावानें दिल्लीचा बादशाहाचे प्रसन्नते विषयीं पत्र लिहिलें व एकशें मोहरा नजर पाठविल्या. नंतर बादशाहाकडून बाजिरावास बहुमानाचें उत्तर व वस्त्रालंकारादि उत्तम प्रकारचें प्राप्त जालें. परंतु निजामाचा बोलण्याप्रमाणें माळव्याची सनद न मिळाली. त्यावरून पेशवा याणें निजामास घातकीसा जाणून, मनांत विचार केला किं, सर्व दक्षिणेंत

निजामाची

निजामाची सत्ताच नाहींशी करावी. त्या वेळेस निजाम आणि त्याचे बहुतेक लोक हिंदुस्थानांत होते; यास्तव त्या कार्यास ती संधी उत्तम, परंतु तेस- मयीं बाजिरावाचे मोठे मोठे सरदार लश्करासहित कोंकणांतून आले नव्हते; ह्मणून बाजिराव माळव्याचा बंदोबस्त करीत राहिला, व त्या मुलखाचे पश्चिमेस चंबळेचे कांठीं कोटापासून आल्हाबादपर्यंत मुलखाचा अधिकारी रजपूत त्याशीं स्नेह रक्षित होता; त्यांत विशेष इतकाकिं, बुदलखंडचा राजानें समयीं बाजिरावाचा मागें मोंगलांस बुदलखंड न देतां, दोन महिनेपर्यंत बाजिरावाचे कुमकेची मार्गप्रतीक्षा करीत लढावें, तों पावेतों कुमक न पोंहचल्यास, तह करून मग कुमक मिळाल्यावर पुनः लढावें. याप्रमाणें ठरलें, असा उत्तरेचा बंदोबस्त करून त्याच वर्षाचे समाप्तीस, बाजिराव दक्षिणेंत ओरंगाबादेजवळ निजामउलमुलुखाचा पुत्र नाशिरजंग नामा, दहाहजार सैन्यासहित होता, तेथें जाऊन त्यासभोंवता घेरा घातला, परंतु थोडक्याच दिवसांत त्या नाशिरजंगाचे कुमकेस एक मोठें सैन्य येऊन तो मराठ्यांचा हातचा सुटोन गोदावरीपलिकडे अमदानगरचे वाटेनें मुलखांस उपद्रव देत चालिला. तो अमदानगरीं जाऊन पोंहचला नाहीं तोंच बाजिरावाचे मदतीस चिमणाजी आपाचें मोठें लश्कर येऊन पोंहचलें. मग बाजिरावानें त्याशीं युद्ध करून त्यास पुढें जाऊं न देतां माघारा गोदावरीकडे परतविला. त्यावर कित्येक महिने त्या उभयतांचें युद्ध तसेंच होत असून त्यांतील एकासहि किमपि अर्थलाभ न होतां दोघांचा तह होऊन ठरलें, किं इतःपर रैतेस कोणी उपद्रव करूं नये, व मोंगलांनीं बाजिरावास नर्मदेचे कांठीं जहागीर द्यावी. मग बाजिराव मनोदयानुरूप अर्थसिद्धी पावला नाहीं ह्मणोन फार खिन्न होऊन पुण्यास व सातान्यास न जातां एकाएकी त्या लश्करासहित हिंदुस्थानांत जावयास निघाला. तेसमयीं त्याचा पुत्र बाळाजी बाजिराव, त्यास नानासाहेब ह्मणत, तो कोंकणांत आंग्र्याशीं लढत होता त्याचे कुमकेस चिमणाजी आपा गेला; तेथें त्या नानासाहेबाशीं रेवदंडा किल्ला घ्यावयाची मसलत करीत बसले होते, तेवेळेस वर्तमान आलें किं, बाजिरावास नर्मदेचे कांठीं सन सत्राशें चाळिसांचे चोथ्या महिन्याचे अठ्ठाविसावे तारिखेस देवाज्ञा जाली. असें ऐकतांच शंकाजी नारायण बिर्नीवाला त्यास कोंकणची सुभेदारी दिली. आणि खंडोजी मानकर यास लश्करचा मुखत्यार केला; मग चिमणाजी आपा व त्याचा पुतण्या नानासाहेब पेशवा हे उभयतां बाजिरावाचें उत्तरकार्य करून सातान्यास आले.

बाजिरायाचें

बाजिरायाचें मरण तें मोठें प्रकरण यास्तव त्यासमयीं मराठ्यांची हकिगत काय काय होती ती समजायाविषयीं, तेव्हांचे हिंदुस्थानचे सर्व अधिकारी कसकसे वागत होते तें प्रथम समजलें पाहिजे.

दिल्लीमध्यें तेवेळीं महंमदशाह नामें बादशाह होता त्यास नादरशाहानें बंदीस घालून त्या राजधानींतले कित्येक लोक मारिले व शहर लुटून द्रव्य नेलें; त्या शहराचे उत्तरेकडील काबूल व तारा, व मुलतान, हे मुलख घेऊन त्याणें आपल्या मुलखाकडे लाविले होते; त्यावरून बादशाहाचें तेज कमी होऊन दिल्लीचाजवळ दुसरीं कित्येक नवीं नवीं राज्यें होऊं लागलीं होतीं, तीं प्रबळता पावतीलसें दिसूं लागलें, त्यांत एक रोहिला असे; त्याचा मुळ पुरुष हिंदुस्थानचे अहीर जातीचा होता, जसा मराठ्यांमध्यें धनगर तसा त्यांत तो. त्याचे लहानपणीं कोणी एका अफगाणानें आपल्याजवळ त्यास अल्लीमहंमद रोहिला असें नाव ठेवून, बाळगला. मग तो मोठा जाल्यावर अफगाणाचा स्वारांची सरदारी करीत होता. त्यानंतर त्याणें कित्येक मुलखाचा उत्पन्नाचा चढ पत करून मुलख आपल्या हातारवालीं घातला मग पैका द्यावयाचा समयीं युद्धास सिद्ध जाला. त्याचा पारिपत्याविषयीं वजिरानें आपला कोणी मुखत्यार पाठविला; त्याचा त्याणें पराभव केला. हें वर्तमान दिल्लीपासून पन्नास पंचावन्न कोसांवर दक्षिणेस जालें.

दुसरा शूद्रामध्यें जाट नामें जाति, असा कोणी एक इंदसकांठचा राहाणार; त्याणें येऊन आग्रे व जयपूर यांचें आधिपत्य औरंगजेबाचे समाप्तीस केलें. पुढें त्याचे मरणानंतर त्याणें त्याच गडबडींत आपलें आधिपत्य सुदृढ करून, मग जेव्हां मराठे चंबळा नदी उतरून पलिकडे गेले तेव्हां त्यांचा व आपला एक लाभ पाहून त्यांशीं स्नेह केला.

दक्षिणेंत व करनाटकांत स्वराज्य व जहागीर सोडून निजामउलमुलख आणि मराठे निमेनिमे वाटून घेत होते, बाजिराव मेल्यानंतर तो निजामउलमुलख कित्येक दिवस दिल्लींत होता; त्याचे नावास बादशाहानें अमीरउलउमरा असें पद जोडिलें होतें; त्याला वर्तमान कळलें, किं, आपला पुत्र नाशीरजंगनावाचा दक्षिणेंत आहे तो माझी सत्ता नाहींशी करून, आपण कारभार करणार. तें बंड मोडावयाकरितां निजाम दक्षिणेस निघाला; तेसमयीं त्याणें बादशाहास विनंती केली किं, मला जें पद दिलें तें माझा वडील पुत्र गाजीउद्दिन यास असावें.

करनाटकांत विजापूर, व गोंदळकोंडें येथें जे पहिले मुख्य अधि-

कारी

कारी होते त्यांची संतती पुष्कळ झाली असे; त्यांस स्वतंत्रपणें वागण्याची चाल पडली होती.

इंग्रेज व फ्रांशीसही या मुलखांत असत, परंतु ते आपला पराक्रम न जाणतां किंवा जाणत असून स्वार्थसाधनास युद्धादिकेंकरून झटत नव्हते; आर्जवानें अथवा लांच देऊन कार्य करून घेत. त्यांशीं कोणी वक्र झाला तर तात्काळ युद्धास सिद्ध होत. त्यावेळेस असें असतां पुढें त्यांचा योग असा होता कीं, या मुलखीं सर्व मोठमोठ्या कामांत त्यांहीं प्रवीण व्हावें.

पूर्वी सन सत्राशें एकुणचाळिसांत इंग्रेजानीं आपल्या व्यापाराच्या साधनास चिमणाजी आपाचा स्नेहानें पेशवा अनुकूळ करून घ्यावयास वसईमध्यें चिमणाजीशीं कांहीं तह केला होता.

पोर्तुगीस लोक मराठ्यांलोकांशीं बहुत युद्धें करून केवळ बळहीन झाले होते.

बाजिराव रूपानें फार चांगला होता, त्याची बोलण्याची किंवा कोणत्याही कार्य करण्याची ढब शिपायाप्रमाणें दिसे; आणि तो लष्करावरोबर असतां ऐश्वर्याचा उपभोगासाठीं आपल्या सेवेंत बहुत माणसें बाळगीत नसे. जें त्याचा शिपायास दुःख तें तो अंगें अनुभवीत असे. याविषयीं कथा आहे कि पूर्वी त्याची आणि निजामउलमुलुखाची भेट झाली नव्हती तेव्हां निजाम याणें कोणा एका मोठ्या चितार्यास सांगितलें कीं, तूं जाऊन बाजिराव पेशवा यास पाहा आणि तो तुझा दृष्टीस जें काम करताना जसा पडेल तसें त्याचें चित्र काढून मला आणून दे. मग त्या चितार्यानें तसें चित्र काढून आणिलें तें असें होतें कि, बाजिराव घोड्यावर बसून भाला आंगाशीं धरून जोंधळ्याचीं कणसें हातावर चोळून खात खात चालिला आहे, व त्याचा घोड्याचे पायबंध व मेखा तोबर्यांत भरून तोबरा घोड्यावर बांधून घेतलेला होता. त्याचा जातीचे ब्राह्मण ह्मणतात कीं, तो द्रव्यलोभी असे, आणि आपल्या कित्येकां जातिधर्मासही मानीत नसे; व तो शिपाईपणांत विशेष प्रीति ठेवून दुसरीं राज्यकारभारादि कामें तुच्छ मानी. हें त्या लोकांचें बोलणें सत्य जरी असलें तरी त्याकडे दोष नाहीं; कांकि त्यावर बहुतवेळां संकट पडलें होतें. तो राज्य मिळवण्याविषयीं लोभी खरा, परंतु मराठे एकचित्त वागविणें व निजामाच्या मनसोबा समजून त्याचें निवारण करावयाचे कामांत दक्ष होता यास्तव त्याणें आपल्या मराठ्या लोकांचें फार हित केलें. त्याचे मरणानंतर त्याचे जागीं बाळाजी बाजिराव नाना त्याचा वडील पुत्र, तो स्थापिला. दुसरा रघुनाथराव तो इंग्रेजांचीं कार्यें करून नामांकित झाला. तिसरा जनार्दन बाबा तो लहानपणींच मेला.

चौथा

चौथा यवनीचाराचीं झाला तो समशेर बहादूर.

सन सत्राशें चाळिसांपासून सत्राशें एकुणपन्नास पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग सोळावा.

अनुक्रमणिका.

कर्नाटकांत मराठ्यांचा प्रवेश.

रघुजी भोंसला याणें बाळाजी बाजिराव यास पेशवाई नमिळावी म्हणून राजाजवळ उद्योग केला तो शेवटास न गेला.

चिमणाजी आपा याचा मृत्यु.

पेशवा राजापासून महल्लाभाची सनद पावला.

भास्करपंत बंगाल्यांत शिरला.

दमाजी गाइकवाडानें माळव्यांत स्वाऱ्या घातल्या.

अल्लीवरदीखानानें भास्करपंतास बंगाल्यांतून काढून दिल्यावर, रघुजी भोंसला याणें स्वयें स्वारी केली.

तेव्हां दिल्लीचा बादशाहानें पेशव्यास माळव्याचा अधिकार व इतर लाभाची आशा दाखविली यास्तव त्याणें अल्लीवरदीखानाचा पक्ष स्वीकारून रघुजीला तेथून घालविला.

मग पेशवा बादशाहापासून माळव्याची सनद पावोन साताऱ्यास आला.

त्यापुढें रघुजी भोंसले आणि बाळाजी बाजिराव पेशवे यांची कांहीं समजूत पडली.

निजामउलमुलुख याची कांहीं गोष्ट.

रघुजीचा भास्करपंत, व मोठे मोठे मानकरी मराठे सर्दार पुनः बंगाल्यांत गेले ते अल्लीवरदीखानाचा कपटानें घातेंकरून मारिले गेले.

आफगाणाचा बादशाह आमेदशाह अबदाली याची गोष्ट.

दिल्लीचा बादशाहाचा मृत्यु, आणि त्याचा पुत्राचें स्थापन.

निजामउलमुलुखाचा मृत्यु.

नाशिरजंग मोठें सैन्य घेऊन कर्नाटकास चालिला.

राजाराम राजा कसा प्रकट झाला तें प्रकरण

त्यानंतर साताऱ्यास सकवारबाईची व ताराबाईची काय वर्तणूक झाली ती.

बाळाजीनें

भाग सोळावा.

रघुजी भोंसले व पेशवे यांमध्यें कलह उत्पन्न झाला तो, खारसी लोकांचा नादरशाह नामा बादशाह, दिल्लीस आल्यामुळें कांहीं दिवस राहिला होता; पुढें त्या उभयतांची गांठ पडली तेव्हां तो कज्जा अगदीं मोडला. त्यासमयीं त्या दोघांची काय मसलत झाली ती पुरतेपणें समजत नाहीं, परंतु असें वाटतें कि, बाजिरावाचा मनांत हिंदुस्थान घ्यावयाचें, व कर्नाटक, आणि बंगाला, आपल्या सत्तेंत आणावा अशीं मोठ मोठीं कार्यें करावयाचीं होतीं, त्या मसलतींत त्यास घेतला असेल. त्यानंतर कर्नाटकांत लश्करसुद्धां रघुजी भोंसला शिरला त्याचें कारण तेंच दिसतें.

त्या लश्करांत राजा, व पेशवे, व प्रतिनिधी, व फत्तेशिंग भोंसला, व इतर मराठे सरदार यांचे शिपाई होते त्यांत संताजी घोरपड्याचा वंशय मुरारराव घोरपडा असे. त्याणें राजाचा पक्ष तेसमयीं नूतन स्वीकारिला; पूर्वीं राजानें त्याचा वडिलांस विटविले होते. तो यांस मिळाला तेवेळेस आपलें सेनापतित्व मागूं लागला. तें नदेतां तुंगभद्रेजवळ कांहीं परगणे देऊन वश केला. मग तें लश्कर पन्नास हजार जमून कर्नाटकांत गेलें; तें दामलचरीचा घाटाजवळचे आडवाटेनें जाऊन एकाएकी दोस्तअल्लीनवाब+ जेथें लश्करसहित होता तेथें प्रकट झालें. नंतर त्यांशीं युद्ध होऊन दोस्तअल्ली मेला, आणि त्याचा दिवाण मीरआसद नामा तो धरला गेला. त्यानंतर मराठे त्या मुलखीं जिकडे तिकडे पसरले, आणि खंडणी घेऊं लागले; शेवटीं दोस्तअल्लीचा वडील पुत्र सफदरअल्ली त्याणें द्रव्य देऊन मराठे तेथून निघावे असें केलें. तेसमयीं सफदर अल्लीचें व भोंसल्याचें बोलणें झालें त्यांत करार ठरला किं त्रिचनापलीचा अधिकारी चंदासाहेब यास मराठ्यांनीं मात्क्यान येऊन जिंकावा. त्या चंदासाहेबाविषयीं सफदरअल्लीचा मनांत पूर्वीपासून कांहीं शंका होती. त्यानंतर मराठे करारप्रमाणें सफदरअ-

---

\+ दोस्त अल्ली सादतउल्ला खानाचा पुतण्या, पूर्वीं सन सत्राशें सहांत कर्नाटक पेनघाट मुलखीं दाउदखानानें आपल्या अधिकारावर सादतखान कारभारी यास ठेवला; नंतर तो सादतखान मेल्यावर दोस्त अल्ली दिल्लीच्या बादशाह यांचें व निजामउलमुलुख याचें आज्ञा वांचून आपल्या मुलखाची जागा पावला.

ल्लीचा

ल्लीचा मुलुख सोडून माघारे महाराष्ट्र मुलखीं सवायशे कोस जाऊन, शिवगंगेचे कांठीं उतरले; परंतु त्यांचा मनसोबा होता कीं, आपण येथें कांहीं दिवस राहून तो चंदासाहेब असावध आहे असा जाणून एकाएकी जाऊन जिंकूं.

इतक्यांत रघुजी भोंसला तेथून निघोन सातान्यास आला, आणि बाळाजी बाजिराव यास पेशवे पदवी नदेतां *बापुजी नाईक बारामतीकर, यास पेशवा करावा असा राजाजवळ उद्योग करूं लागला; परंतु त्यास प्रतिनिधी अनुकूळ नव्हता; व चिमणाजी आपा आपल्या पुतण्याचें हित करणारा ह्मणोन शाहूला समजाविलें कीं, बापुजी नाईक पेशवाई करितां, द्रव्य पुष्कळ देईल; इतका यत्न केला तो शेवटास नजाऊन सनसत्राशें चाळिसांचा आठव्या महिन्यांत शाहूनें बाजिरावाचे जागीं बाळाजी बाजिराव स्थापिला. बापुजी नाईक बारामतीकर आपल्या मनोदयानुरूप कार्य सिद्ध न झालें यास्तव बाळाजीस बाजिरावाचा कर्जाविषयीं फार तगादा करूं लागला; त्यामुळें त्यास बहुत संकट प्राप्त झालें, तेव्हां त्याचा दिवाण महादाजी पंत पुरंधऱ्या याणें त्या संकटापासून बाळाजीची मुक्तता केली, यास्तव तो त्याचा मोठा उपकार मानून, त्याचे ठायीं अत्यंत प्रीति करूं लागला.

रघुजी भोंसला याणें योजिलेलें कार्य सिद्धीस नगेलें ह्मणून बापुजी नाईक बारामतीकर यास आपले बरोबर घेऊन त्रिचनापल्लीचे मोहिमेसंबंधें लाभ साधावयास पुनः कर्नाटकास चालिला. त्या बरोबर प्रतिनिधी श्रीपतराव, व फत्तेशिंग भोंसला हेही गेले. तें लष्कर तंजोरास पोहचलें तेव्हां त्या मुलखीं मराठे होते ते आपल्या मनांतील वैमनस्यें टाकून दक्षिणदेशींचे मराठे आपले भाउबंद यांस ⊞मिळाले. त्यानंतर कर्नाटकीं काय काय युद्धें झालीं तें समजत नाहीं; परंतु इतकें ठाऊक आहे कीं, सन सत्राशें एकेचाळिसांचा तिसऱ्या महिन्यांत त्रिचनापल्ली म-

---

* बापुजी नाइकाशीं आणि बाजिरायाशीं कांहीं वैमनस्य पडलें होतें, त्याचें कारण असें, बापुजी नाईक मोठा द्रव्यवान होता; त्यापासून बाजिरायानें कर्ज घेतलें तें माघारें द्यावयास मिळेना.

⊞ त्या वेळेस दिसण्यांमध्यें त्या प्रांताचा धणी शिवाजीचा भाउ व्यंकाजी त्याचा नातू (पुत्राचापुत्र) होता परंतु मुख्यत्वें मुसलमान असे, तो व्यंकाजी याचा धाकटा पुत्र तुकाजी याचा वेळेपासून तंजोरांत शिलेदारी करीत होता, असें समजावें.

राठ्याचे हातीं लागला. तेव्हां तेथचा धणी चंदासाहेब होता, तो रघुजी भोसल्यानें कैद करून सातान्यास पाठविला; आणि मुरार राव घोरपडा त्या किल्ल्याचा मुख्त्यार करून ठेविला. त्या जयकळचें शिबंदीस दरमहा शाहूकडून पोंहचत असे; परंतु ते लोक पेशव्याचे होते. कर्नाटकचे खंडणी पैकीं प्रतिवर्षी वीस हजार रुपये बाळाजी बाजिरावास देत जावें, असें ठरलें हा एक पेशव्यास त्यावर्षी लाभ झाला.

त्याच वर्षाचा पहिल्या महिन्यांत चिमणाजी आपा मृत्यु पावला. तो मराठे सरदारांत मोठा नान्य असे, कांकिं, त्याणें पोर्टुगीस लोकांचा पराभव करून आपल्या जातींत लौकिक मिळविला. परंतु एवढी त्याची योग्यता असेलच असें म्हणतां येत नाहीं. त्याणें जाणिलें किं, पायदळ व तोफा यांचा बंदोबस्त चांगला असल्या वांचून युद्धाचें साहित्य ठीक नाहीं, ती कल्पना बहुधा बरी दिसल्ये, परंतु ती मराठ्यांस योग्य नव्हे; ते आंगधट्टाईनें मारामारीविषयीं समर्थ. चिमणाजीचा पुत्र +सदाशिव चिमणाजी भाऊ याणेंही ती बापाची कल्पना उत्तम मानून, पुढें विसांवर्षांनीं आपले मोठेपणीं, त्या प्रमाणें सिद्धता करून पानपतचे लढाईत त्याच चुकीनें लश्करसहित नाश पावला, असें दिसतें. चिमणाजी आपा मेल्याचे आगोदर खंडोजी मानकर याणें त्याचे आज्ञेवरून पोर्टुगीस लोकांचा रेवदंडा किल्ला राहिला होता तो घेतला, तेणेंकरून दमान व गोवें यांमध्यें त्या लोकांची सत्ता किमपि राहिली नाहीं.

बाळाजी बाजिराव आपल्या चुलत्याचा मरणानंतर एक वर्ष सुमारें मुलखाचा बंदोबस्त करीत सातारा व पुणें येथें राहिला होता. त्याणें शाहूस आपली गरिबाई दाखवून, पोर्टुगीस लोकास जिंकून घेतलेला मुलुख होता त्याची सनद पावला. व गुजराथ खेरीज करून नर्मदेचा उत्तरे कडचा मुलखाची खंडणी जी घ्यावयाची ती व वसूल जमा करावयाचा जो तो त्याचा हातून व्हावा असेंही शाहूनें केलें.

शाहूनें त्याच समयीं एवढें दिलें तेणेंकरून पेशव्याचा प्रबळतेस फार उपयोग झाला. तो ध्यानांत यावयाकरितां आधीं बंगाल्यांतील वर्तमान कांहीं लिहिलें पाहिजे तें असें. सन सत्राशें चाळिसांत बंगाल्याचा नबाब सुजाउद्दीन खान नामें होता; त्याणें बाहार सुभ्यामध्यें कोणी एक आपला हस्तक अल्लीवेरदी खान नामें ठेविला. तो सुजाउद्दीन मेल्यावर त्याचा पुत्र तक्ताधिपती झाला; परंतु अल्लीवेरदी खान त्यास

+ सदाशिव चिमणाजीस भाउसाहेब म्हणत.

मानीना

मानीना; पुढें त्या उभयतांचें युद्ध होऊन तक्ताधिपती मरण पावला. आणिअ-ह्ली वेरदीखान यास तें आधिपत्य प्राप्त झालें. त्यावेळेस उरसासुभ्यामध्यें कोणीएक पहिल्या नवाबाचा हस्तक मुरशेद कुली नामें असे त्याचा दिवाण मीरहबीब नामें होता; त्याशीं अह्लीवेरदीखानानें युद्ध करून सुभ्याचापार घालविला; तो तेवेळेस पळूनजाऊन मग थोडकेशा दिवसानीं पुनः येऊन अह्ली वेरदी खानाजवळच चाकरीस राहिला. त्या पुढें बंगाल्यांत मराठे लोकांची सत्ता व्हावयास तो उपयोगी पडला, त्याचा प्रकार असा, मुरशेद कुली अह्ली वेरदीखानानें मुलखांतून पारकेल्यावर मीरहबीबानें वराडांत रघुजी भोंसल्याचा हस्तक भास्कर पंत होता, त्यास मसलत दिली किं, कटा सुभा लुटावा; तेव्हां भास्कर पंतानें आपला धणी करनाटकांत गेला, त्याचे आज्ञेसाठीं वाट पाहिली इतक्यांत अह्लीवेरदीखान लश्कर सहित येऊन, तो सुभा घेतला. तों मीरहबीब जाऊन त्यास मिळाला. यावरून त्या वेळेस बंगाल्याचा मर्यादेंत शिरणें राहिलें; परंतु भास्कर पंताचा मनांत ती इच्छा होऊन थोडक्या वेळानें लश्कर घेऊन कांहीं एक निमित्तेंकरून पूर्वेकडे चालिला. तो निघून गेला तेव्हां पेशवा हिंदुस्थान आपल्यासत्तेंत आणावयाची वाट पहात होता, तो त्याच समयास उत्तम मानून निघाला, आणि गराव मंदेला किल्ला हस्तगत केला. तेव्हां पाउसकाळ जवळ आला म्हणून नर्मदेचा कांठीं छावणी केली. मग दसरा झाल्यावर आल्हाबादेस स्वारी घालावी अशीमसलत होती, इतक्यांत दमाजी गाइकवाड व बाबुराव सदाशिव माळव्यामध्यें पेशव्याचे मुलखीं लुटूं लागले; यास्तव पेशवा आल्हाबादेची मोहिम टाकून माळव्याकडे गेला. त्यासमयीं पेशवा पूर्वेस न जातां माळव्यांत गेला, तें रघुजी भोंसल्याचें चातुर्य; कांकिं, पेशवे पूर्वेस नजावे आणि तो सर्व लाभ आपणच घ्यावा अशी त्याची मसलत होती.

इकडे भास्करपंत बंगाल्याकडे जात असतां, बाहार परगणा यामध्यें स्वारी प्रथम घातली, त्यावेळेस अह्ली वेरदीखानाचा पुतण्याचा पुत्र कटा प्रांता मध्यें कांहीं बंड करीत होता, तें मोडावयास अह्लीवेरदीखान बाहारांतून कांहीं सैन्य घेऊन कटा प्रांताकडे गेला. मग तें बंड मोडून तो मोरशेदाबादेस जाणार होता, परंतु मराठे बाहारांत शिरल्याचें वर्तमान ऐकून, त्यांचा पारिपत्याकरितां त्वरेनें आला; तेसमयीं मराठी लश्कर सुमारें दहा बाराहजार होतें, परंतु लोकांमध्यें पन्नास हजार अशी आवाई असे.

अह्ली

अल्लीवेरदीखान यापाशीं तीन साडेतीन हजार सुमारें स्वार व चार हजार सुमारें पायदळ असें तरी त्याणें मराठ्यांवर चालून जावयाविषयीं विलंब नकेला. परंतु त्याचा जय नझाला; त्याचा लश्करास भोंवता मराठ्यांचा वेढा पडून त्याचें सर्व सामान लुटलें; तेणेंकरून ते बहुत कष्ट पावले, आणि कित्येक मेले गेले; व कित्येक पळाले. शेवटीं स्वार व पायदळ मिळून त्यापाशीं तीन हजार उरले. तेव्हां त्याणें विचार केला किं, मराठ्यांचे हातीं लागावें त्यापेक्षां युद्ध करून मरावें अथवा त्यांस मारून वाट धरावी, यांत उत्तम आहे. असा निश्चय करून मोठ्या निकरानें युद्ध करतां करतां खटवा पर्यंत पोंहचला. त्या युद्धांत अल्लीवेरदीखानाचा लश्करांत मीरहबीब होता, तो पहिलेदिवशींच युद्धाचे प्रसंगीं प्रारंभींच धरिला; त्यानंतर त्याणें मराठ्यांचा पक्ष स्वीकारून अशीं उत्तम कामें केलीं किं, भास्करपंतनामें त्या लोकांत मोठा सरदार होता त्याचा तो परम विश्वासू जहाला. अल्लीवेरदीखान खटव्यास पोंहचला.त्यासमयींचमीरहबीब याणें त्यापासून कांहीं शिपाई मागून घेऊन मोरशेदाबादेस चालिला; तेथें त्याचा भाउ केदेंत होता त्यास सोडविला, आणि त्या शहरचा रहाणारा जगतशेट अलंचंद नामें मोठा सावकार होता, त्याचें घर लुटून पंचवीस लक्ष रुपये काढून भास्करपंतास जाऊन मिळाला. त्यास द्रव्याचा लोभ दाखवून बंगाल्यांत राहून घेतला.

तेव्हां त्याचा मसलती प्रमाणें भास्करपंत माघारा फिरून कांहीं युक्तीनें हुगळी शहर हस्तगत केलें. त्यापुढें खटव्यापासून मिदनापूर पर्यंत बहुतेक मुलुख त्याचे हातीं लागला. त्यावेळेस हुगळीचे नदींत पाणी भरून आलें; यास्तव नदी उतरून पार जाघेना तेणेंकरून मोरशेदाबाद परगण्यामध्यें प्रवेश झाला नाहीं. असें असतां दिल्लीहून बादशाहाचा कोणी कारभारी बंगाल्याची खंडणी मागावयास अल्लीवेरदीखानाजवळ आला. तेव्हां त्याणें उत्तर केलें किं, जोंपर्यंत मला मराठ्यांचा उपद्रव असेल, तावत्काळपर्यंत अनुकूलता नाहीं यावेळेस हेंच योग्य किं, स्वामीनीं माझा पुष्टीकरणार्थ लश्कर पाठवून रक्षण करावें. असें त्यास बोलून वराडप्रांतांतील रघुजी भोंसल्याचा मुलुख लुटावयाकरितां पेशव्यांस सुचना केली,आणि त्या कामाकरितां कांहीं द्रव्य पाठविलें तें त्यास नपोंहचतां उद्प्रांताचा नवाबानें मध्येंच लुटून नेलें.

अल्लीवेरदीखान याणें पेशव्यास आणि बादशाहास कुमक मागीतली, तथापि आपल्या कामांत अत्यंत सावधपणें राहिला तो असा.

आपले

आपले मुलखाचे शिपाई आज्ञेंत वागणारे असे सारे जमा करून पाउसकाळ जातांच, खटव्यामध्यें भास्करपंताचा लश्करावर एकाएकी जाऊन पडावयाची तयारी सर्वप्रकारें केली. आणि नदीचें पाणी उतरलें नसतांहि हुगळीची नदी व आजीनदी यांमध्यें होडयांचे पूल बांधून दोन्हीं नद्या उतरून पलिकडे जातांना आजीनदीचा पूल कांहींसा तुटला तेणेंकरून पंधराशें माणसें वाहून गेली; एवढें विघ्न झालें तरी, तो रात्रीसच भास्करपंताचा लश्करावर अकस्मात् छापा घालून, मग त्याणें मराठ्यांस असें भयप्रदर्शन केलें किं ते लोक लढाई नकरितां पूर्वेकडे रानांत पळून गेले. त्यांचा कित्येकवेळ अल्लीवरदीखानास ठिकाणा लागला नाहीं, मग तो तेथून माघारा गेल्यावर ते मराठे मिदनापूर परगण्यांत शिरले; मग अल्लीवरदीखान आपल्या पाठीस लागला असें पाहून ते त्याशीं विशेष युद्ध नकरितां, आपले स्थानीं वराडांत माघारे गेले. ते ठिकाणीं पोंहचल्याचे पूर्वींच रघुजी भोंसला आपल्या लश्करासुद्धां करनाटकांतून येऊन वराडास पोंहचला होता; त्याचा दिवाण भास्करपंत याणें बंगाल्यांत सत्ता केली त्या पुष्टीकरणार्थ निश्चय करून तो ज्या वाटेनें पूर्वीं बंगाल्यांत गेला होता, त्याच वाटेनें भोंसलाहि जाऊं लागला. हें वर्तमान दिल्लीचा बादशाहास कळलें त्याणें उदयाचा नवाब सफदरजंग यास आज्ञा केली किं, मराठ्यांस आपली मर्यादा सोडून, बाहेर जाऊं देऊं नये; याशिवाय त्या कामास पेशव्यानें अनुकूल व्हावयाविषयीं बोलणें लाविलें, व तो वश व्हावा ह्मणून अल्लीवरदी खानाकडील आजिमाबादेचा खंडवसूल व्हावयाचा होता त्यापैकीं चवथाई ऐवज घ्यावयाविषयीं बाळाजी बाजिराव यास पत्र पाठविलें. त्याखेरीज माळव्याची सनद देऊं असें वचन दिलें. या आशेनें पेशवा माळवा मुलुख सोडून सन सत्राशें त्रेचाळीसांत आल्हाबादेवरून मोरशेदाबादेस पोंहचला. तो तेथें असतां त्याणें अल्लीवरदीखानास बादशाहानें आपणास देवविलेल्या पैक्याची निकड लाविली. कांकि, त्यास ठाउक होतें किं, राजास जें कांहीं मागणें तें संकटसमयीं मागीतलें असतां, तो उदारपणें देतो. दुसरें रघुजी भोंसला मोठया सैन्यासहित मोरशेदाबादेवर युद्धास येणार हेंहि त्यास कळलें होतें, तेव्हां अल्लीवरदीखानानें हिशेब चुकवून देतों असें कबूल केलें; ही बातमी रघुजीस कळली तेसमयीं रघुजी भोंसला मोरशेदाबादेकडे येत होता तो डोंगराकडे पळून माघारा गेला. ते समयीं अल्लीवरदीखान मोठ्या त्वरेनें त्याचे पाठीस लागला. त्यावरून बाळाजी बाजिरावानें कल्पना केली किं, मराठे

यांचे

यांचें लश्कर बंगालीलोकांचे हातीं लागणार नाहीं; ह्मणून आपण लश्कर सुद्धां निराळ्या वाटेनें बंगाल्याचा लश्करापुढें जाऊन रघुजीचा पाठीस लागला. नंतर त्यास गांठून उभयतांचें युद्ध होऊन रघुजी पराभव पावला. त्यानंतर बाळाजी आपणास पादशाहानें माळव्याचा अधिकार देऊं केला होता, ती सत्ता सुदृढ करावयास सन सत्राशें चाळिसांत गेला. तो माळव्यास जाऊन पोंहचला तेव्हां, महंमदशाह बादशाह यास बाळाजीला तो अधिकार द्यावयाचें अगत्य मोठें पडलें कांकिं, बाळाजीनें त्याचे सेवेंत अंतर किमपि नकेलें; तथापि त्यास एवढा मुलुख दिल्यानें, आपला मान हलका होईल ह्मणून, आमदनामें आपला पुत्र तो त्या अधिकारीं नाममात्र मुख्यत्वें करून माळव्याची सनद बाळाजीस दिली. त्यानंतर पेशवा बाळाजी सातान्यास येऊन, त्याणें आपल्या मर्यादेप्रमाणें राजास हिशेब दिला. ते वेळीं आपण राजाचा मुख्य सरदार अशा अर्थें समजाविलें; परंतु पुढेंही त्या राजाची तादृश सत्ता नाहींशी झाली तरी प्रतिवर्षीं स्वयें जाऊन त्याप्रमाणें हिशेब समजावीत असे.

पेशव्यानें रघुजी भोंसल्याचा पराभव केला तेव्हां रघुजीनें पेशव्याकडे वकील पाठवून स्नेह करण्याचें बोलणें लाविलें, किं, तुह्मीं राजनीतिप्रमाणें जी कांहीं वर्तणूक करितां ती माझा व सर्व मराठे लोक यांचा हितास फार उपयोगी, असें मला आतां समजलें. याप्रमाणें बोलण्यांत अंतःकरणाची निर्मळता दाखविली असतांही तो भोंसला पुण्यावर लश्कर सहित येत होता. अशासमयीं प्रतिनिधी शरीर प्रकृतीनें असावध झाला असे; त्याचा मुतालीक यमाजी शिवदेव, तो रघुजीस अनुकूळ न होतां दाभाडयास अनुसरोन पेशव्याशीं वक्र झाला असे, आणि दाभाडा पुण्यावर येणार होता. तेव्हां पेशव्यानें हा सर्व प्रकार ध्यानांत आणून विचार करूं लागला किं, रघुजीला यासमयीं बंगाला द्यावा किंवा सर्व मोठे मोठे मानकरी मराठे सरदार लोक यांशीं लढावें; असें मनन करून या दोहोंमध्यें रघुजीस बंगाला द्यावा हेंच बरें पडेल, याप्रमाणें निश्चय ठरून रघुजी आणि पेशवा यांचा तह राजा मध्यस्थ होऊन झाला. त्यांत पेशव्यानें आपला पूर्वींचा संपादित जो मोकासा व आपण मिळविलेली जहागीर आणि पूर्वजार्जित जा जहागिरी त्या व कोंकण आणि माळव्याचें आधिपत्य, याशिवाय आल्हाबाद, व आग्रे, व आज्मीर, यांची खंडणी आणि पाटणाप्रांतांतील तीन तालोके व अर्काटपरगणा यांतील जमेपैकीं वीस हजार रुपये; याखेरीज रघुजीचे सत्तेंतील कित्येक गावें, हें सर्व पेशव्यानें अनुभवावें

गावें अशी राजानें सनद दिली. रघुर्जीस सनद दिली किं, लखनाऊ, व पाटणे, व पेन बंगाला, याचा वसूल, व खंडणी त्याणें घ्यावी. याखेरीज वराडा पासून कटाक पर्यंत खंडणी जमा करावयाचें काम रघुजी भोंसल्यानें करावें. याप्रमाणें राजानें उभयतांस दोन संदा दिल्या, त्यावेळेस असें ठरलें किं, दमाजी गाइकवाडानें माळव्यांतील खंड घेतल्याचा हिशेब पेशव्यास दाखवून तो ऐवज त्याचे हवालीं करावा. असेंच दाभाडयाकडेही राजाचें देणें पुष्कळ होतें परंतु त्यावेळेस ती चौकशी झाली नाहीं.

मराठयांमध्यें असें वर्तमान असतां, निजामउलमुलुखाचा पुत्रानें बंड केलें, तें मोडावयाकरितां तो निजाम दिल्लीहून निघोन औरंगाबादेस गेला, तेथें युद्धप्रसंगें महत्प्रयासेंकरून पुत्र स्वाधीन करून घेतला. नंतर असें पाहिलें किं, कृष्णेचे दक्षिणेस मोंगलांचे सत्तेंतील मुलखीं अव्यवस्था, व कर्नाटक प्रांतांत अर्काटचा नबाब सफदर अली, यास त्याचा मेव्हणा मोर्तिजाखान. याणें घातेंकरून मारिला, हें सर्व ध्यानीं आणून ऐसें समजला किं, यासमयीं आपलें आधिपत्य स्थापावयास संधि ठीक हीच आहे. म्हणून सन १७४३ चे आक्टोबरांत हैदराबादेहून मोठें लश्कर जमा करून कर्नाटकांत चालिला, तो तेथें कित्येक मुलुख घेऊन एका वर्षानंतर त्याणें मराठे साताऱ्यास मोठी सेना जमा करिताहेत असें जाणून त्याचा मनांत कांहीं शंका उत्पन्न झाली यास्तव तो तेथून माघारा फिरून हैदराबादेस निघाला; तेसमयीं आपला हस्तक अनवारउदीन याला कर्नाटकपेन घाटीं ठेविला, आणि आपला नातू हीदायत मोयदीन खान, त्यासच मजफरजंग म्हणत. त्या नामें तो मोठा विख्यात होता; त्याला कर्नाटक उंच प्रदेश जास बालाघाट म्हणतात, तेथें स्थापून त्यास आदोणी परगणा जहागीर देऊन त्याचें रहावयाचें मुख्य स्थान विजापुर+ केलें. आणि आपण हैदराबादचा वाटेनें जात असतां त्यास असें वाटलें किं, आपल्यावर मराठे यांची मसलत नाहीं म्हणून आपल्या राज्याचा बंदोबस्त करीत तेथेंच राहिला. तेव्हां निजामउलमुलुख आपली मर्यादा सोडून दूर आहे असें समजून मराठयांहीं त्या मुलखीं जाऊन कांहीं स्वार्थ साधावा परंतु तें न झालें, कांकिं, रघुजी भोंसला याणें आपल्या सत्तेंत आणिलेला जो बंगाल्यासंबंधी मुलुख होता तो त्याचे हातून गेला असें त्यास तो मातक्यान हस्तगत कराया-

---

\+ अनवारउदीन याचें पहिलें रहावयाचें ठिकाण, दाउदखान वनेवायते नामें यवनजाति विशेष नबाब याचे वेळेपासून झालेली अर्काट प्रांतीं पुरातन राजधानी होती, तीच त्याला रहावयास मुख्य जागा केली.

विषयीं

विषयीं उद्युक्त झाला. पेशव्यास शंका उत्पन्न झाली कि, आपण कबूल केल्याप्रमाणें रघुजीचें निवारण नझालें यास्तव आपणास बादशाहाचा शब्द लागेल. याकरितां दक्षिणेंत कामें बहुत आहेत असें मिष करून उत्तरेस गेला नाहीं.

रघुजी भोंसला वराडांत पाउसकाळीं पोंहचला, मग पर्जन्यकाळ गेल्यावर त्याणें आपला प्रधान भास्करपंत व कित्येक नामांकित सरदार यांजबरोबर वीस हजार स्वार देऊन उरसा प्रांतांतून बंगाल देशांत पाठविले. तेथें अल्लीवरदीखानानें त्यांशीं युद्धाविषयीं आपल्या लश्कराची तयारी केली, परंतु कपटानें आपलें कार्य साधावयाकरितां त्यास तुमचा आमचा तह असें समजावून, भास्करपंत व त्याचे बरोबरचे मोठे मोठे सरदार वीस आसामी मेजवानीस बोलावून त्यांवर मारेकरी घालून ते एकवीसही मारून टाकिले. तेणेंकरून मराठयांचें लश्कर युद्ध नकरितां जा वाटेनें आलें त्या वाटेनें माघारें गेलें; तें जातानां त्यांतील कित्येक लोक वाटेच्या निराळे सांपडले ते गांवकरी लोकानीं आसास्तव मारिले.

त्यासमयीं मराठे यांचें कार्य सिद्धीस नगेलें तथापि ते आपला समय पाहात बसले, मग पुढें थोडक्याच वेळानें त्यास तसाच समयअढळला. तो असा, अल्लीवरदीखानाचा लश्करांत आफगाण लोक होते ते कांहींसा दंगा करूं लागले; त्यांचा पारिपत्यास अल्लीवरदीखान उरसाप्रांतीं बंदोबस्तास ठेविलेल्या शिपायांतील कांहीं लोक बरोबर घेऊन तेथें हिंदू अधिकारी ठेवून आपण त्यांवर गेला. हें वर्तमान रघुजीला जासुदानीं कळवितांच त्याणें उरसाप्रांतीं स्वारी घालून कित्येक परगणे हस्तगत केले; आणि बाकी मुलखाची खंडणी तीस कोटी रुपये मागूं लागला. तेवेळेस अल्लीवरदीखान याणें कांहीं युक्तीनें त्यास भुलवून, कित्येकदिवस पैका नदेतां घालविले; मग आफगाण लोक स्वाधीन जह्यात्यावर त्यास असें उलट उत्तर दिलें किं, जेणेंकरून उभयतांचा तह राहिला नाहीं. मग दोघांचा युद्धास प्रारंभ होऊन कित्येकावेळानें मराठे लोकांचा कांहींसा मोड होऊन युद्ध राहिलें. कांकिं, त्यावेळेस रघुजीस आपल्या मुलखीं जावें लागलें, त्याचें कारण असें कीं, गोंडवणांतील देवगडचा तक्ताविषयीं तेथचा राजाचे पुत्र भांडूं लागले; त्यासमयीं तो राजा मेला होता, त्याचें नाव बखतबुलंद, तो पूर्वी औरंगजेबानें बाटविलेला असे; त्याचा पुत्रांत एक वलीशाह नामा होता त्याणें आपले दोघे भाऊ कैद केले, आणि दुसरा एक चांदाचा राजा नीळकंठशाह होता,

तोही

तोही औरंगजेबानें बाटविलेला होता त्याला आपल्या स्नेहांत घेऊन, मराठे यांस चौथ व सरदेशमुखी नद्यावी असें केलें याप्रमाणें ते दोघे स्वतंत्रपणें वागूं इच्छित असतां, त्याचा शेवट असा झाला कि, रघुजी भोंसला याणें उभयतांचा मुलुख घेतला. तेव्हां वलीशाहानें आपले दोघे भाऊ बंदींत ठेविलेले होते, त्या एकास रतनपूर दिलें; आणि त्याचा खर्चाप्रमाणें कांहीं पैका आपल्या खजिन्यांतून द्यावयाचा कबूल केला असें सन सत्राशें चव्वेचाळिसांत जालें. अद्यापि त्याचे वंशय नागपुरांत आहेत, त्यांस आजून त्या देण्यापैकीं कांहीं मिळतें. दुसरा भाऊ अकबरशाह तो निजामाचा आश्रयानें कांहीं वर्षे सुख पावोन मेला गेला.

त्यापुढें सन सत्राशें सत्तेचाळिसांत आफगाण लोकांचा बादशाह आमेदशाह अब्दाली,+ तो प्रथम हिंदुस्थानांत स्वाऱ्या घालूं लागला, त्याला पूर्वीं नादरशाह नामा फारशी लोकांचा बादशाहाचा आश्रय असे मग काळेंकरून तो आफगाण लोकांचा बादशाह झाला. त्यानंतर त्याणें सन सत्राशें अठ्ठेचाळिसांत दिल्लीवर स्वारी केली, तेव्हां दिल्लीचा बादशाहानें आपल्यापुत्राबरोबर फौज देऊन त्यास काबुलपर्यंत मागें हटविलें, आणि तो माघारा दिल्लीस येई तोंपर्यंत त्या बादशाहाचा काळ झाला. नंतर तो आमेदशाह त्याच वर्षाचा एप्रेलाचे समाप्तीस तक्ताधिपती झाला. त्याणें निजामउलमुलुखास वजिरीचा अधिकाराविषयीं बहुत आग्रह केला. परंतु तो स्वीकारीना. कांकिं, त्याचें वय फारां दिवसांचें होतें, यास्तव तो ह्मणे कि, फार वृद्ध मी झालों आतां या कामास कसा योग्य होईन; तेव्हां आमेदशाहानें ती पदवी सफदरजंगनामा उदचा⊕ नवाब यास दिली. त्यानंतर दीड महिन्यानें जून महिन्याचे एकुणतिसावे तारिखेस, निजामउलमुलुख बह्मणपुरीं मृत्यु पावला. तेवेळेस त्याचा वयाला एकशें चार वर्षे झेतीं, त्यामागें त्याचे पुत्र सहा होते, त्यांत एकाचें नाव गाजीवदिन, दुसरा नासिरजंग, तिसरा सलाबतजंग, चवथा निजामअल्ली, पांचवा महंमदसरीफ, सहावा मीरमोंगल, यांत प्रथम दोघे एका आईचे दुसरे चार त्यांचा आया निरनिराळ्या होत्या. निजामउलमुलुख मरण पावला, त्यावेळेस गाजीवदिन दिल्लीस होता ह्मणून दुसरा नासिरजंग तोच तक्ताधिपतीपणा करूं लागला. त्यानंतर दोन तीन महिन्या-

+ जे आफगाण लोक यांचा नावें हिंदुलोकामध्यें तीन प्रसिद्ध आहेत, एक दुराणी, अब्दाली, गिलजा.

⊕ उदप्रांतास अयोध्या ह्मणतात.

नी दिल्लीचा बादशाहानें आपल्या हातचें मान पुरःसर पत्र नासिरजंगाला पाठविलें किं, तुह्मीं भेटीस यावें तेव्हां नासिरजंग नर्मदा पावेतों पोहंचला नंतर त्यास बादशाहाचें मनायीपत्र आलें; त्याचें कारण काय तें समजत नाहीं. तें पत्र त्याला पावलें असतांही, तो नाशिरजंग उदासचित्त न झाला; कांकि, त्याचा पुतण्या, मुजाफरजंग याणें चंदासाहेबाचे साहाय्यें व फ्रांशीस लोकांचा आश्रयें करून दंगा आरंभिला होता, तें वर्तमान त्यास कळलें त्यानंतर त्यास दुसरें वर्तमान कळलें किं, निजामउलमुलुखानें आपला हस्तक अनवारउदीन कर्नाटकपेन घाटीं ठेविला होता तो मृत्यु पावला, त्यानंतर नाशिरजंगानें रघुजी भोंसल्यास पत्र लिहिलें किं, यासमयीं तुह्मीं लश्कर पाठवून जर माझें साहाय्य कराल तर मी तुह्माला कांहीं मुलुख देईन. याखेरीज जे कोणी मोंगल संबंधीं लोक होते त्यांस लिहिलें किं, मी तिकडे येतों, त्यास तुह्मीं मला येऊन मिळायास सिद्ध असा. मग तो दक्षिणेस कर्नाटकाकडे चालिला तेव्हां, ते जाऊन मिळाले; त्यांत मुरारराव घोरपडा असे, त्यास निजामउलमुलुखानें घुटीची जहागीर दिली होती ह्मणून त्याला त्याकडे जाणें अवश्य पडलें. दुसरा म्हैसुरचा राजा, व कित्येक नवाब व अनवारउदीनाचा दुसरा पुत्र महंमद अल्ली तो.

हे सर्व लोक अंगें किंवा लश्कर पाठवून त्याचें साहाय्य करीत असत. महंमद अल्लीचा स्नेहास्तव मद्रासचे इंग्रेज लोकही, त्या नाशिरजंगाचे उपयोगी पडले.

याप्रमाणें निजामाचें लश्कर कर्नाटकीं गेल्यानें पेशव्यास आपलें कार्य साधन करावयाचा अवसर बरा होता, परंतु सातान्यांत कांहीं विशेष वर्तमान झाल्यामुळें त्याला अवकाश सांपडला नाहीं; तो प्रकार असा. शाहुराजा कित्येक वर्षें भ्रांत झाला होता, त्याचा शरीरीं समाधान नाहींसें होऊन ती भ्रांती गेली; तेसमयीं त्याजवळ कोणी लोक होते त्यांहीं मसलत केली किं, राजानें दत्तपुत्र घ्यावा. त्याणें तर भ्रांत व्हायाचे पूर्वीच आपला पुत्र मेला तेवेळेस सांगीतलें होतें किं, कोलापुरकर संभाजीयास जर संतती होऊं लागली, तर मी त्यास आपल्या गादीचा अधिपती करीन. मग संभाजीला पुत्र झाला नाहीं, ह्मणून विचार ठरला किं, मालोजीचा बंधू शहाजीचा चुलता होता, त्याचा कोणी वंश घ्यावा. मग त्याचा शोध बहुत केला परंतु तो कोणास सांपडेना. त्यावर शाहूनें महादाजीपंत पुरंद-न्या, व गोविंदराव चिटणीस, यांस सांगीतलें किं, हालीं ताराबाई सातान्यास आहे तीणें आपला नातू दुसऱ्या शिवाजीचा पुत्र, तो सत्रारोंवारांत आ-

पले

पले बापाचे पाठिमागें जन्मला; त्यास कुठेतरी लपवून ठेविला त्याचा शोध करून आणावा. तेव्हां ताराबाईस विचारिलें, तिणें सांगीतलें किं, शिवाजी मेला तेव्हां त्याची स्त्री भवानी बाई गरोदर होती; तिला पुत्र झाला मग शिवाजीचे पाठिमागें राजाराम राज्य करीत असतां त्याला कळलें तर तो त्या पुत्रास मारून टाकील यास्तव मी त्याला पन्हाळ्याहून काढून गुप्तपणें नेऊन तुळजापुरीं त्याचा मावशीचे स्वाधीन केला; तिणें तेथून बारशीस नेला, तथेंही तो अप्रसिद्धपणेंच राहिला. तो अद्यापि आहे.

हें वर्तमान शाहूची थोरली बायको शिरक्यांची कन्या सकवार बाई नामें होती तिला कळलें, तेव्हां ती फार रुष्ट झाली; कांकिं, तिची वासना अशी होती किं, कोणी एखादा लहानसा मूल तक्ताधिपति निमित्तमात्र करून आपण सर्व कारभार चालवावा. तिणें ताराबाईची गोष्ट ऐकून त्याचा निवारणार्थ पत्र लिहिलें किं, हालीं ताराबाईचा नातू निघाला हा खोटा, त्यास तुह्मीं त्याचा निवारणास अनुकूळ व्हाल तर मी तुमचें साहाय्य होईल तितकें करीन; आतांच मला यमाजी शिवदेव, व श्रीपतरावाचा पुत्र, जगजीवनराव प्रतिनिधी, व दमाजी गाइकवाड, हे अनुकूळ आहेत. याशिवाय घाटमाथा व कोंकणांत शिबंदी ठेवावयास कारभारी लोक पाठविले आहेत. याप्रमाणें सकवार बाईनें बंदोबस्त केला, आणि आपला मनोरथ सिद्धीस जावया करितां त्याची प्रसिद्धी लोकांत नव्हावी ह्मणून, ती नित्य बोलत असे किं, मी आपल्या धण्याचे बरोबर सती जाईन.

असें असतां बाळाजी बाजिराव, पंस्तीस हजार लष्कर बरोबर घेऊन साताऱ्यास आला. तो सकवारबाईचा मनसोबा जाणत असे, आणि ती त्यास मारेकरी घालून मारणार हेंही त्यास कळलें होतें; तथापि त्याणें तो द्वेष प्रसिद्ध नकेला. कांकिं, ब्राह्मणाचें माहात्म्य फार वाढलें, तें अधिक नव्हावेंसें मराठ्यांचा मनांत आहे, अशी त्याचा चित्तांत शंका होती. यास्तव तो विचार करी किं, आपण सर्वसत्ता करावी किं, ताराबाईचा पक्ष स्वीकारावा; मग तसेंच केलें. सकवारबाई तर सारावेळ राजाजवळच असे कदाचित् ती जवळ नसल्यास तीचा पक्षाचे लोक कोणी तरी जवळ असत; तथापि बाळाजीनें राजाशीं एकांत करून त्यापासून सनद घेतली, किं, मराठ्यांचा सर्व राज्याचा कारभार पेशव्यानें करावा, आणि लौकिकांत राजाचा मान मात्र रक्षावा. ताराबाईचा नातू अधिपती करून, तोव त्यास पुढें संतती होईल तिचा उत्तम रीतीनें सांभाळ करावा. याशिवाय त्या सनदेंत लेख होता किं, कोलापुर संस्थान संभाजीचें तें पृथक्.

त्यानंतर

त्यानंतर लवकरच राजाचा काळ झाला. तेसमयीं सातान्यांत बाळाजीचा स्वारांची टोळी धांवत धांवत येऊन, प्रतिनिधी व त्याचा मुतालिक या उभयतांचा पायांत बिड्या घालून दोघास दोहों किल्ल्यांवर दूर दूर ठेविले. तेवेळेस पेशव्याची शिबंदी सातान्याकिल्ल्यावर चढली; आणि रामराजा ताराबाइचा नातू तो कोलापुराहून येत होता त्यास आणावयाकरितां कित्येक लोक सामोरे गेले. असें झालें तेव्हां सकवार बाई समजली कि, मीजें मनांत योजिलें तें लोकांत प्रसिद्ध झालें आतां तें कांहीं एक सिद्धीस जात नाहीं बाळाजीनें तर तीणें पहिल्यानें ह्मटलें कि, मीं सती जाईन, त्यापासूनच मोठ्या मेहनतीनें तें लोकांत प्रसिद्ध केलें; कांकिं, तीचें सती जाणें त्यास अत्यंत हितावह; यास्तव तिला तें आवश्यक पडावयाकरितां त्याणें तो उद्योग केला. मग शाहू मेल्यावर बाळाजीनें सकवार बाईला कपटानें विनंती पूर्वक आग्रहाचा निरोप पाठविला कि, मीं तुमचे आज्ञेंत वागणारा इमानी चाकर असतां तुह्मीं कां सती जातां; आपण न जावें. असें तिला सांगोन तिचे भाऊ शिरके, कुवारजी त्यांस बोलाऊन सांगीतलें कि, तुमची बहीण सती न गेली तर तुह्मीं व तुमचे जातीचे मराठे यांचा मान रहाणार नाहीं; त्यास तिणें तें अवश्य केलें पाहिजे, जर तुह्मीं करवाल तर तुह्मास कोंकणांत जहागीर देऊं, अशा कृत्रिमें करून, बाळाजी बाजिराव पेशवा याणें आपली मसलत सिद्धीस नेली. ती सकवारबाई अशा अडचणी उत्पन्न करून सती घालविली. त्यापेक्षां जर निजकडे कांहीं अन्याय आहे असें मिष करून तिचा शिरछेद करविता तर लोकांत त्याचा पौरुषास एवढें दूषण नलागतें; जां शास्त्रजाणत्यांस हें यावत् वर्तमान ठाउक आहे, ते ह्या केवळ अधर्मसा जाणून या कर्मास अश्लाघ्य मानितात.

सन सत्राशें पन्नासां पासून, सन सत्राशें छप्पन्न पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून, भाग सत्रावा.

अनुक्रमणिका.

पेशव्यानें रघुजी भोंसला व इतर सरदार वश केले.
पुणें मराठे लोकयांची राजधानी झाली.
पेशवा व सदाशिवराव भाऊ यांमध्यें कांहीं कलह उत्पन्न झाला.

रामचंद्र

रामचंद्रबाबा शेणवी याचा उद्भव.

पेशव्यानें गाजीवदिन निजामउलमुलुखाचा वडील पुत्र, याचा पक्ष अंगीकारिला; आणि फ्रांशीस लोकांनीं मुजाफरजंगाचा पक्ष धरून त्यास निजाम पदवी दिली.

मुजाफरजंगाचा मृत्यु, व सलाबतजंगास निजाम पदवीचा लाभ.

पेशवा गाजीवदिनाचा कामासाठीं कृष्णेपर्यंत गेला, परंतु ताराबाई व गाइकवाडाचा कृत्रिमामुळें माघारा आला.

राजाराम मोठ्या अडचणीनें बंदींत पडला.

सलाबतजंग फ्रांशीस लोकांचा आश्रयेंकरून गांवें लुटित पुण्याकडे गेला.

रघुजी भोंसल्यानें काय काय संपादन केलें तें प्रकरण.

मीरहबीब याचा मृत्यु.

दिल्लीकडील कांहीं वर्तमान व मराठे त्या कामांत शिरले तो विस्तार.

गाजीवदिन शिंदा व होळकर यांचा आश्रयेंकरून दिल्लीहून दक्षिणेस चालिला. तो आपली निजाम पदवी पावेल असें सिद्ध झालें असतां आपण मृत्यु पावला.

सलाबतजंग निजामपदवी पावल्यावर त्याणें पेशव्यास काय काय दिलें तो प्रकार.

पेशव्यानें कर्नाटकीं स्वारी केली.

पेशव्यानें आपला भाऊ रघुनाथराव गुजराथेंत पाठविला तो तें कार्य करून हिंदुस्थानांत गेला.

रघुजी भोंसल्याचा मृत्यु व त्याचा चौघां पुत्रांची गोष्ट.

पेशवा व ताराबाई यांची समजूत झाली ती कथा.

दिल्लीकडचें कांहीं वर्तमान.

दिल्लीचा आमेदशाह पादशाह याचे गाजीवदिनाचा पुत्रानें डोळे काढून त्यास कैदेंत ठेविला, आणि जानदारशाह ह्मणून पूर्वींचा बादशाह याचा नातू तक्ताधिपती केला.

पेशव्यानें आंग्र्याचा मुलुख घ्यावयाविषयीं इंग्रेजांशीं कांहीं बोलणें करून तें काम झाल्याचे पूर्वींच, त्याला सावनूर घ्यावयाकरितां तिकडे जावयाचें अगत्य पडलें.

इंग्रेजाचीं लढाऊ जाहाजें जाऊन सुवर्णदुर्ग किल्ला घेतला, तो मराठे यांस सोंपविला.

मराठे

मराठे यांणीं आंग्र्याचा मुलुख व किल्ले घेऊन विजयदुर्गास घेरा घातला असतां त्यांचे कुमकेस इंग्रेजांचीं जहाजें जाऊन त्यांहीं मराठे लोक आपल्या लोकांत नघेतां तो किल्ला घेतला.

मराठे लोक जाऊन त्यांणीं सावनूर किल्ला घेतला.

फ्रांशीस लोक यांस दक्षिणेंतून काढावयासाठीं पेशवा व सलाबतजंग यांणीं मसलत केली, ती बसीचा युक्तीपुढें सिद्धीस गेली नाहीं.

पुण्यामध्यें पेशवे, आणि मुंबईचे इंग्रेज यांची समजूत झाली तो प्रकार.

भाग सत्रावा.

शाहूच्या मृत्यूचे अगोदर पेशव्यानें राजाचें नांव करून यशवंतराव दाभाडे, व रघुजी भोंसले, व इतर जहागीरदार सरदार यांस बोलाविले; तेसमयीं रघुजी भोंसले आणि जहागिरदार आले, परंतु दाभाडे व त्यांचा मुख्य सरदार दमाजी गाइकवाड न आला. या सर्वांस बोलावण्याचें कारण हेंच किं, यांत आपणाविषयीं कोणकोणाचीं मनें कसकशीं आहेत तें समजावें; व आपला जो कर्तव्यार्थ त्यास ते अनुकूल व्हावे. त्यांत रघुजी भोंसला तर आपली वृद्ध दशा व बाळाजीचा प्रारब्धाची चढती, व आपणास प्रतिवर्षी बंगाल्यांत स्वारी करावयाची आवड, व नासिरजंगाबरोबर आपला पुत्र दहा हजार फौज घेऊन करनाटकांत गेला, त्या योगें स्वसामर्थ्याची न्यूनता; या सर्वप्रकारांहीं पेशव्यास प्रतिकूळ होणें ठीक नाहींसें समजून त्यास वश झाला. परंतु त्याणें एकदां राजारामराजा याग भोंसल्याचा वंशज नव्हेसा मानिला; मग ताराबाईचें व त्याचें एकताटीं भोजन झालेलें पाहून मानूं लागला. तेव्हां बाळाजी बाजिराव पेशवा याणे आपली मसलत सिद्धीस गेली तें व रघुजी भोंसला आपणास वश झाला तें प्रसिद्ध व्हावयाकरितां सातान्यांत ठेविला, आणि आपण पुण्यास गेला. तेसमयीं रघुजीस बोलिला किं, तूं दुसरे सर्व जहागिरदार घेऊन पुण्यास ये; मग राजानें सांगितलेल्या यादीपैकीं राहिलेलीं सर्व कामें करूं. नंतर तो त्याप्रमाणें सर्वांस जमा करून ते व आपण मिळून त्याजवळ गेले. त्यापासून पुणें मराठे लोक यांची मोठी राजधानी झाली. हें वर्तमान सनसत्राशें पन्नासांत झालें.

याप्रकारें बाळाजी बाजिराव पेशवा याचा मनोदयानुरूप सर्व कार्यें झाल्याचे आनंदेंकरून तो पुढें ताराबाई कांहीं गडबड करील किं, नकरील

तें समजलाच नाहीं. ती सत्तर वर्षांची म्हातारी होती, तिणें सूज्ञ आणि जातीची उंच अशा स्त्रीचा अपमान करणारा निःसंशय धोका पावेलसें समजावून त्यास सावध केला. तो प्रकार असा, सिंहगडीं तिचा भर्त्याचें थडें होतें, त्याचें दर्शन घ्यावयाचें मिष करून तेथें गेली. आणि पंत सचिव यास आपल्याकडे अनुकूळ करून घेऊन आपण स्वतः धनीपणा करावयाची मसलत योजिली. तेव्हां बाळाजीनें त्यास फार आग्रह करून पुण्यास बोलावून, तुम्हाला राज्यकारभारांतील बहुत कामें मिळतीलसें सांगून महत्प्रयासें वश केला. आणि सांगीतलें कीं, माझा मसलतीप्रमाणें राजारामाला वागवावा.

त्यासमयीं वराड व गोंडवण व बंगाला यांची सनद बाळाजीनें रघुजी भोंसल्यास दिली. या खेरीज प्रतिनिधीची जहागीर वराड प्रांताशीं, लागून होती तीही, रघुजीस दिली. यशवंतराव दाभाडे यास गुजराथेचा निमे भाग दिला. राणोजी शिंदा त्यावेळेस मृत्यु पावला, त्याचा वडील पुत्र यास बापाचा अधिकार दिला. माळवा मुलुख याची जमा दीड कोट रुपये वर्षास होत, त्यांतून चौऱ्याहात्तर लक्ष होळकारास दिले. आणि साडेपांसष्ट लक्ष शिंद्यास दिले. बाकी साडेदहा लक्ष उरले, ते इतर जहागीरदार यांस वांटून दिले. त्यांत मुख्य आनंदराव पंवार हे सर्व पेशव्यास अनुकूळ होते; यांपासून त्यास विपरीत भावाचें भय नसे, सरलश्कर पदवी सोमवंशीचे कुळांत होती ती घेऊन लिंबाजी निंबाळकर यास दिली.
हा सर्व बंदोबस्त राजाचे नावें झाला, परंतु लोकांत प्रसिद्ध होतें कीं, हें कर्तृत्व पेशव्याचें.

जगजीवनराव प्रतिनिधी पेशव्यानें कैद केला होता, तो सोडून त्या बरोबर यमाजी शिवदेवही सोडिला. तो सुटका पावल्यानंतर त्याणें पंढरपुराजवळ सांगोळा किल्ला आहे तेथें जाऊन बंड उत्पन्न केलें. मग सदाशिव चिमणाजीनें जाऊन त्यास जिंकिला. राजाराम सदाशिव चिमणाजी बरोबर सांगोळ्यास होता तेथें त्याणें असें पत्र दिलें कीं, सर्व राज्याचा कारभार पेशव्यानें करावा; आणि आपणास साताऱ्या भोंवता थोडकासा मुलुख खासगीकडे असावा; तें पेशव्यानें कबूल केलें परंतु राजाचा खासगीकडे किमपि न दिलें. तो विस्तार पुढें लिहिण्यांत येईल, त्या समयीं राजारामराजा याबरोबर बंदोबस्ताकरितां पुष्कळ सैन्य देऊन साताऱ्यास पोंहचविला.

इकडे पुण्यास पेशवा व त्याचा चुलत भाऊ, सदाशिवराव या उभयतां

तों मध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन त्या पेशव्यानें आपल्याहितार्थ सावधपणें जो जो नेम केला तो तो व्यर्थ होईलसा दिसूं लागला. त्या कलहाचें निमित्त असें, कोणी एक सावंताचे वाडिप्रांतांत आरवली गांवचा कुळकर्णी, रामचंद्र बाबा शेणवी, त्याचें पहिलें नांव रामचंद्र मल्हार होतें, तो आपल्या कुळकर्णी पणाचा हिशेबांत कांहीं न्यून पडलें म्हणून तेथून पळोन साताऱ्यास आला. त्यासच कचेश्वर बावा अतीतकर याणें आपल्ये चाकरीस ठेविला; त्यानंतर त्यापासून त्याणें बाळाजीच्या बापाचा आश्रय संपादिला होता, पुढें तो कारकुनी व शिपाईगिरी या दोहीं कामांत निपुण असा पाहून त्यास बाजिरावानें शिंद्याचा दिवाण केला. मग राणोजी शिंदा मेल्यावर त्याचा पुत्र जयाप्पा शिंदा याचीही दिवाणगिरी आपण करावी म्हणून सदाशिवराव भाऊ यांस कांहीं लांच दिला, परंतु त्या जयाप्पाचें व याचें वैमनस्य असे आणि मल्हारराव होळकर त्या रामचंद्र बाबास प्रतिकूळ म्हणून बाळाजीनें त्यास दूर केला. तेव्हां सदाशिवरावानें रामचंद्रास आपला दिवाण केला, आणि त्याचे मसलतीनें आपल्या बापाची पदवी मागूं लागला. तें मागणें बाळाजी मान्य करिना, कांकिं, त्यावर महादाजि पंत पुरंदऱ्याचा मोठा उपकार होता त्यास दूर करून ती जागा सदाशिव भाऊला यावी लागली. अशा हलक्याकारणानें पुढें द्वेष मोठा वाढला; मग सदाशिव भाऊ व होळकर आणि पेशवा व रामचंद्र यांचीं परस्परें वैमनस्यें पडण्याचें कारण तेंच. त्यामुळें तात्काळ कुप्रसंग आला असता, परंतु महादाजी पंत याचा उत्तमाचरणानें राहिला, तो प्रकार असा, सांगोळी किल्ला घेतल्यानंतर सदाशिवरावानें त्या वैमनस्यासंबंधें कोल्हापुरकर संभाजी याचा पक्ष धरिला, त्याणें त्यास आपला पेशवा करून त्यास पारगड व कलानिधी व चंदगडी हे तीन किल्ले आणि वर्षास पांच हजार रुपये उत्पन्न होत असी जहागीर दिली, तेव्हां महादाजी पंत पुरंदऱ्यानें आपला अधिकार सोडून आगारिकाना केला मग तो पेशव्यानें सदाशिव भाऊस दिला. नंतर तो कोल्हापुरकराची चाकरी सोडून पुण्यास येऊन बाळाजी बाजिरावाजवळ मुख्यलें कारभार करूं लागला.

शाहूचा मरणाचे पूर्वीं नाशिरजंग निजामाचा दुसरा पुत्र याणें बापाचा अधिकार चालविला होता, तो नाशिरजंग कर्नाटकीं मोठें सैन्य घेऊन चालिला. असें पूर्वीं लिहिलें आहे; त्यामध्यें गाजीउद्दिन निजामाचा वडील पुत्र तो मल्हारराव होळकर याचा द्वारें आपल्यास स्वतः निजाम पदवी प्राप्त व्हावी म्हणून, पेशव्यास सहाय मागूं लागला. तेव्हां पेशवा याणें ती

गोष्ट मानून त्याविषयीं दिल्लीचा बादशाहास पत्र लिहिलें, आणि आपण सैन्य बरोबर घेऊन औरंगाबादेकडे गेला. तेव्हां ताराबाईची प्रसन्नता राखावयासाठीं सिंहगड देऊन त्याबदल तुंग व तिकोना, हे दोन किल्ले पंतसचीव यास दिले. त्याखेरीज सातान्यांतून आपले लोक काढून जे तेथचे पुरातन गडकरी होते त्यांचे स्वाधीन सातारा किल्ला करून, त्याहीं ताराबाईचे आज्ञेनवागावेंसें केलें. त्यावेळेस राजाराम राजा याला किल्ल्याचा खर्च खेरीज करून, खर्चास पांसष्ट लक्ष रुपये वर्षास देऊन मोठ्या संमानानें सातार्यां शहरांत मोकळेपणें ठेविला होता.

त्याच समयीं नाशिरजंग कर्नाटकांत गेला होता, त्याचा आश्रित रामदास नामें एक ब्राह्मण असे त्याचे द्वारें फ्रांशीस लोकांचा डुपळे नामें कोणी एक सुरवृत्याग होता, त्याणें त्या नाशिरजंगाचा लष्करांत दंगा उत्पन्न केला. त्या दंगा करण्यांत कोणी एक महंमदरखान नामें पठाण, स्वर्पाचा नवाब होता, त्याणें गोळी घालून नाशिरजंगास मारून टाकिला. त्यानंतर फ्रांशीस लोकांनीं त्याचा भाऊ मुजाफरजंग यास त्या नाशिरजंगाचे जागीं सत्ता असावी असें केलें, आणि त्यास बरोबर घेऊन हैदराबादेकडे चालिले, परंतु त्याणें तें पद बहुत दिवस अनुभवावेंसें न झालें; कांकिं, नाशिरजंगास मारून जो अर्थ व्हावा तो आला नाहीं म्हणून ते पठाण लोक पुनः कांहीं बंड करूं लागले, त्यांचा पारिपत्याकरितां मुजाफरजंग युद्ध करूं लागला, त्यांत तो जय पावला परंतु त्या क्षणांतच मेला गेला. त्यानंतर त्याचा भाऊ सलाबतजंग यास त्याचीजागा मिळाली; असें सर्व सत्वरों एकावल्यांत झालें. त्यानंतर तो सलाबतजंग, फ्रांशीस लोकांसहित हैदराबादेकडे जाऊं लागला, तेव्हां तो पेशव्यानें कृष्णेचे कांठीं गांठला. ते समयीं युद्धप्रसंग व्हावाच परंतु त्याच वेळेस सातान्याहून असें कांहीं वर्तमान आलें किं, जेणें करून बाळाजी बाजिराव युद्ध न करितां सलाबतजंग याणें जो तह केला त्यासच मान्य होऊन मोठ्या त्वरेनें सातान्यास निघाला.

तें वर्तमान असें, पेशवा औरंगाबादेस चालिला तेव्हां ताराबाईनें असें केलें किं. राजाराम याचें मन स्वतंत्रपणें वागावयाचें आहे किंवा नाहीं, तो शोध केला त्यांत असें दिसूं लागलें किं, तो केवळ अयोग्य, मग तिणें त्यास समजाविलें किं मी सहज विचारिलें; आणि त्याच समयीं दमाजी गाइकवाड यास पत्र लिहिलें किं, सांप्रत तुम्हास कोण एथें प्रतिपंथी नाहीं, त्यास तुम्हीं लवकर येऊन राजा व मराठे यांचें राज्य ब्राह्मचा हातचें सोडवावें, ही गोष्ट दमाजीनें मान्य केली आणि सातान्यास चालिला तो जवळ आलासा समजोन,

ताराबाईनें

ताराबाईनें राजारास शहरांतून आपल्याजवळ साताऱ्याचे किल्ल्यावर बोलावून नेला; आणि त्याची भेट होतांच त्यास अत्यंत निर्भर्त्सना करून बोलिली, कीं, अरे तूं शिवाजीचा वंशज नव्हेस, मीं आपला मूल गोंधळ्याचे घरीं लपवून ठेविला होता, त्याणें तो ठेवून आपला पुत्र दिला असेल; त्या तुला वोळखीं न करितां मी एवढ्या पदावर बसवून, आतां परम पश्चात्ताप पावल्यें. जो गोंधळ्याचा पोर तो शिवाजीचा वंशज मी केला, त्या पापाचें प्रायश्चित्त मला कोणेकाठीं जाऊन केलें पाहिजे. असें भाषण करून मग त्याला बंदींत ठेवून किल्ल्याचा हवालदारास आज्ञा केली कीं, जे लोक याजबरोबर आले आहेत त्यांवर बंदुकांचा मार करून घालवून द्या. आणि शहरांत कोंकणस्थ ब्राह्मणाचे जे पक्षी असतील त्यांच्या घरावर तोफांचा मार चालेसा बेत करून ठेवा. हें वर्तमान त्रिंबकपंत ज्यास नानापुरंदऱ्या म्हणत, तो व गोविंदराव चिटणीस, व इतर जे पेशव्याचे पक्षी सरदार साताऱ्यास होते त्यांस कळलें; परंतु ते समजले कीं, ही म्हातारी वेडी झाली म्हणून तें प्रकरण त्यांहीं तुच्छ मानिलें. मग जेव्हां असें वर्तमान आलें कीं, दमाजी गाइकवाड फौजेसहित साताऱ्यास येतो, तेव्हां ते आपले सारे लोक जमा करून कृष्णेचे कांठीं अरळें गांव आहे तेथें जाऊन उतरले. ती सेना वीस हजार मिळाली; मग दमाजी गाइकवाड पंधरा हजार फौज घेऊन साल्प्याचा घाटानें आरळ्याजवळ आला, तेव्हां त्या उभयतां लष्करांची गांठ पडतांच पेशव्याचे लोक त्यांवर जाऊन पडले, परंतु तें पडणें हिमतीनें न झालें; आणि कांहींसें युद्ध करून लिंबास मागें हटून गेले. दुसरे दिवशीं गाइकवाडाचे लोक त्यांवर पडून त्यांचा अगदीं मोड के- त्यानंतर दमाजी साताऱ्यास जाऊन ताराबाईस भेटला तेव्हां ताराबाईनें साताऱ्याजवळचे कित्येक किल्ले हस्तगत केले, तिला प्रतिनिधी अनुकूल होता, हें वर्तमान ऐकून पेशव्याला मोठ्या त्वरेनें साताऱ्यास यावें लागलें. तो येऊन पोंहचल्याचे पूर्वींच नानापुरंदऱ्यानें गाइकवाडाचे फौजेशीं लढून त्यास साताऱ्याहून जोरखोऱ्यापर्यंत घालविला होता. मग त्या दमाजी गाइकवाडानें असें पाहिलें कीं, फौजेसहित पेशवा जवळ आला आणि प्रतिनिधीनें बोलिल्याप्रमाणें साहाय्य न केलें, यास्तव त्याणें पेशव्याशीं तहाचें बोलणें लाविलें; तेव्हां तें पेशव्यानें मान्य केलेंसें दाखवून, त्या बोलण्याचा कामानिमित्त दमाजीनें आपल्याजवळ उतरावयास यावेंसें केलें. नंतर तो त्याप्रमाणें त्याचाजवळ उतरल्यावर मग पेशवा त्यास आपले हातीं पुरता सांपडला असा समजून त्याजवळ गुजराथेबाबद जो पैका यावयाचा होता तो व गुजराथसंबंधी कित्येक मुलुख मागूं लागला. ते समयीं त्याणें उत्तर केलें कीं,

या कामास मी आंगचा धणी नव्हे. त्यानंतर पेशव्यानें गाइकवाडाचीं व दाभाड्याचीं मुलें माणसें तळेगांवीं होतीं त्यांस आज्ञा पाठवून कैद केलीं आणि तेथून काढून लोहगड किल्ल्यास पाठविलीं. मग दमाजी गाइकवाडयाच्या लश्करावर छापा घालून दमाजीस कैद करून पुण्यास पाठविला. त्यानंतर पेशवा आपणास ताराबाई वश होऊन सातारा किल्ला हस्तगत व्हावा म्हणून उद्योग करूं लागला परंतु ती ऐकेना, आणि सर्व मराठे लोकही मानीत कीं, स्वतः कारभार संभाळावा हा अधिकार ताराबाइचाच; या शांकेस्तव पेशव्यानें बलात्कारें करून तिला बाहेर न काढिली. असें संकट पेशव्यास प्राप्त झालें तथापि राजास कैद प्रथमच केला त्याचा दोष, त्याजकडे न आला हा एक त्यास लाभच झाला. जसा मोठा अपराधी चोरादि, यास कैदेंत ठेवितात तसाच राजाराम राजा यास ताराबाइनें प्रतिबंधांत ठेविला, त्याचा पायांत बिडीमात्र घातली नव्हती.

त्यानंतर बाळाजी गाजीउद्दिनाशीं कबुलात केल्याप्रमाणें औरंगाबादेस चालिला, तो पुढें वाटेनें जाजा जागीं सलाबतजंगाची सत्ता होती. त्या त्या जागची खंडणी घेत चालिला. त्यासमयीं सलाबतजंग फ्रांसिसांचा सरदार मोठा सावध बसीनामा होता; त्याजवळ फ्रेंच् मुलखीं म्हणारे गोरे लोक शिपाई पांचशें होते, त्याशिवाय हिंदू शिपायी पलटणी लोकही पांच हजार असत, त्याचें सलाबतजंग यास बळ असे, यास्तव तो त्याचे मसलतीनें वागे त्यावरून बाळाजी आपले मुलखीं उपद्रव करितो म्हणून तो आपला मुलुख नरक्षितां मराठ्यांचे मुलखांत जाऊन दंगा करूं लागला आणि ताराबाई व कोल्हापुरकर संभाजी यांहीं आपला पक्ष स्वीकारावासा केला. हें वर्तमान समजून बाळाजीस कांहीं आश्चर्य वाटलें त्याणें येऊन आपले चाळीस हजार स्वार जमाकरून मोंगलांचे लश्करावर जाऊन, आपल्या रीतीप्रमाणें समोर नलढतां त्यांस भोंवता घेरा घालून नानाप्रकारें उपद्रव देऊं लागला. परंतु त्या मोंगलांस फ्रांसिसांचें लश्कर व तोफा यांचें बळ चांगलें होतें; त्यायोगें त्यांहीं तो उपद्रव नगणितां वाटेनें गांव जाळीत पुण्याकडे चालिले. शेवटीं मराठे यांणीं मोठ्या निकरानें त्यांवर हल्ला केला. त्यासमयीं मोंगलांचा लश्कराचा नाश वक्त झाला, परंतु फ्रांसिसांच्या तोफांचे आश्रयें करून ते वांचले. त्या लढाईंत कोण्हेर त्रिंबक एकबुटी नामें मराठयांचा एक सरदार होता, त्याणें असा पराक्रम केला कीं, त्या दिवसापासून तो पारखेर नांव पावला; त्याचा घोड्याचे पायांत रुप्याचें कडें असे. या प्रमाणें मराठे जय पावले तरी मोंगलांचें लश्कर भीमेचेकांठीं

कोरे

कोरेगावांपर्यंत पोंहचलें. तेथें सलाबतजंग याशीं पेशवा तहाचें बोलणें करूं लागला, परंतु सलाबतजंगाचा मुलखाचें कांहीं वर्तमान आल्यामुळें पुरता तह न होतां तो मराठ्यांचा उपद्रव सोशीत, माघारा जुनराकडे गेला. नंतर बसीचा मसलतीनें तो पेशव्यानें तहाचें बोलणें लाविलें होतें तें मान्य करून लष्करसहित हैदराबादेस चालिला. हें वर्तमान सन सत्रांशें बावन्नांत घडलें.

याप्रमाणें हिंदुमुलखाचे पश्चिमेस वर्तमान असतां, पूर्वेकडे रघुजीनें आपला पुत्र कर्नाटकीं गेला होता तो माघारा आल्यावर त्यास बंगाल्यांत स्वारी करावयास, आणि मीरहबीब याचे साह्यास पाठविला; त्या समयीं अल्लीवेरदीखान निरुपाय होऊन कटकप्रांतांतील मुलुख उत्तरेकडे बालासोरपर्यंत मीरहबीबाचे स्वाधीन केला. परंतु लौकिकांत आपल्या मानाचा संरक्षणार्थ असें केलें कि, मीरहबीब आपला हस्तक आहे. असें सन सत्रांशें एकावन्नांत झालें, तो मीरहबीब एवढ्या योग्यतेस येऊन तीच योग्यता त्याचा नाशास कारण झाली; तें प्रकरण असें, रघुजीचा पुत्र जानोजी याशीं व त्याशीं परस्परें स्पर्धा उत्पन्न होऊन, जानोजीनें त्यावर कांहीं पैका खाल्ल्याचें निमित्त ठेवून त्या मीरहबीबास कैदेंत ठेविला. तेव्हां त्यास तो प्रतिबंध सोसेना ह्मणून त्याजवळ जितके लोक होते तितक्यांसहित त्या चौकिदारांवर पडून मृत्यु पावला. अल्लीवेरदीखानानें रघुजीस कटक प्रांतांतील मुलुख दिला तेवेळेस बंगाला व बहार यांचा चवथाईबदल बारा लक्ष रुपये घेतले; या थोडक्या घेण्याचें कारण असें, पेशवा व सलाबतजंग युद्ध करूं लागले त्यांत आपला अर्थ साधावा असें मनांत आणून, बंगाल्यांत शिरून त्याणें किल्ला गावेलगड व नरनाला व माणिकदुर्ग हे तीन किल्ले घेतले, त्यानंतर मोंगलांचें लष्कर पुण्याकडे चालिलें. असें वर्तमान ऐकून पैनगंगा व गोदावरी या दोहों नद्यां मधच्या मुलखाची खंडणी घेऊन मोंगलांचीं ठाणीं उठवून, जागोजागीं आपलीं ठाणीं बसविलीं.

आतां आधीं दिल्लीकडे काय काय वर्तमान झालें तो प्रकार ध्यानांत आला पाहिजे. आमेदशाह तेथचा तक्ताधिपती झाल्यावर आफगाण लोकांचा बादशाह पुनः दिल्लीस येऊं लागला. त्यास मध्येंच लाहोरचा अधिकार्यानें आपल्या मुलखाची खंडणी देऊन मागें फिरविला. त्यासमयीं दिल्लीमध्यें सफदरजंग नामें वजीर होता त्याचा मनांत आलें कि, रोहिले लोक मोठ्या योग्यतेस येऊन फार उन्मत्त झाले. आणि त्यांमध्यें

तक्ताधिपत्याविषयीं

तक्काधिपत्याविषयीं तिघे भाऊ भांडतात तस्मात् हा समय त्याना जिंकावयास उत्तमसा समजून तो लष्कर सहित तिकडे जाऊन त्याणें तो मुलुख घेतला. आणि तेथें कोणी एक आपला हस्तक नेवलराई नामें कायत जातीचा ठेवून माघारा दिल्लीस गेला. मग रोहिल्यांहीं मिळून त्या कायताला मारून टाकिला; तेव्हां तो वजीर दुसर्यानें त्यांवर गेला परंतु जय न पावला. अशा अवस्थेंत त्याणें मल्हार राव होळकर व जयापा शिंदा व जाटांचा राजा सुरजमल्ल नामें होता तो, या इतक्यांस सहाय करून माल्यान रोहिले जिंकून तो मुलुख घेतला. आणि त्या साहाय्या बदल होळकर व शिंदे यांस त्याच मुलखाचा बहुतेक भाग दिला. असें कार्य झालें ते समयीं आफगाणाचा बादशाह दिल्लीकडे पुनः आला आणि लाहोर व मुलतान मुलुख घेतला. ते वेळेस दिल्लीचा बादशाहानें आपला वजीर सफदरजंग जवळ नव्हता यास्तव त्यास लवकर यावें ह्मणून बोलावलें. परंतु त्याचें येणें होई तोंपर्यंत दम न धरितां शत्रूस लाहूर व मुलतान मुलुख दिला. मग तो वजीर आल्यावर बादशाहास समजलें कि, आफगाणांचा बादशाह काढून द्यावयाकरितां वजिरानें मराठ्यांस बहुत देण्याची आशा दाखवून सहाय केले होते; त्यांहीं त्या वजिराचा कामासाठीं रोहिल्यांपासून पन्नास लक्ष रुपयांचा कबुलातीचें पत्र घेतलें आणि त्यांचा मुलुख सोडिला. नंतर जेव्हां समजलें कि, आपण केलेला प्रयत्न व्यर्थ गेला; तेव्हां तो सफदरजंग अशा अडचणींत पडला, किं मराठ्यांनां बक्षीस काय द्यावें, व त्यांस काम कोणतें सांगावें. तोंच पेशव्यांकडून सलाबतजंगाला जिंकावयाकरितां आपल्या पुष्टीकरणार्थ शिंदे व होळकर यांस बोलावणें आलें; तेव्हां सफदरजंगानें पेशवे व गाजिवदीन यांचा तहामध्यें, गाजीवदिनास निजांपदवी द्यावयाची कबूल केली होती, तें स्मरून त्या मराठ्यांबरोबरच गाजीवदिनास पाठविला, आणि त्यांस असें सांगितलें कि, तुह्मीं गाजीवदिनाचा कार्याविषयीं पेशव्याचें साहाय्य करा.

इकडे औरंगाबादेंत सलाबतजंग होता त्याणें असें पाहिलें किं, आपला भाऊ गाजीवदिन पूर्णबळ झाला, आणि त्यास वक्षाणपुरच्या मोंगलही अनुकूळ आहे. ह्मणून त्या सलाबतजंगानें पेशव्याशीं तहाचें बोलणें लाविलें. त्यापूर्वी पेशव्यानें गाजीवदिनाशीं बोली केली होती किं, तुमची पदवी तुह्मास देवविली असतां वराडाचे पश्चिमेस तापीपासून गोदावरीपर्यंत मुलुख तुह्मीं आह्माला द्यावा. त्यावरून त्यासर्वांस

आप

आपआपलीं योजिलेलीं कार्यें सिद्धीस आणील असा भरंवसा होता. परंतु कालानुकूल्य नव्हतें यास्तव गाजीवर्दीन त्या शहरांत निजमअलीच्या मातुश्रीकडे भोजनास गेला तिणें त्याला विष घातलें तेणेंकरून तो त्याच रात्रीस मरण पावला.

यानंतर सलाबतजंग मराठ्यांस गाजीवदिनानें द्यावयाचें कबूल केलें होतें तें न द्यावें अशी इच्छा करूं लागला; परंतु त्यांचा सामर्थ्यापुढें निरुपाय होऊन कबूल करिता झाला किं, रघुजी भोंसल्यानें पैनगंगेचा अलिकडचें आपलें ठाणें उठविलें म्हणजे माझा भावानें करार केल्याप्रमाणें मी पेशव्यास देईन; मग तें रघुजीनें मान्य केलें. नंतर सलाबतजंग निर्बाधपणें निजामपदवी अनुभवूं लागला, आणि होळकर व शिंदे लष्कर सुद्धां हिंदुस्थानांत गेले, नंतर पेशवा पुण्यास आला याप्रमाणें सन सत्राशें त्रेपन्नांत घडलें.

पेशवा गाजीवदिनाचा कामाकरितां औरंगाबादेस गेला असतां. ताराबाईनें मराठे व रामोशी मिळून पांच सहा हजार लोक ठेवून. वांई व सातारा हे दोनही परगणे स्वसत्तात्मक केले. मग पेशवा पुण्यास आला तेव्हां त्याणें असा निश्चय केला किं. करनाटकीं स्वारी घालावी परंतु त्यास ताराबाईचा बंदोबस्त आधीं करावा हें उत्तम वाटलें. नंतर त्याणें सातार्यास मोठी फौज पाठविली, आणि तेथचा शिबंदीस बाहेरून अन्न न पोंहचेसें करून किल्ला घ्यावा असें केलें. त्यासमयीं त्या किल्ल्याचा हवालदार आनंदराव जाधव नामें होता, त्याणें असें पाहिलें किं. आतां युद्ध करून परिणाम ठीक नाहीं म्हणून विचार करिता झाला किं, राजास काढून ताराबाईचा हद्दी बाहेर न्यावा; हें वर्तमान तिला कळलें तेव्हां तिणें तेथचा शिपायांस आज्ञा देऊन, त्या हवालदाराचा शिरच्छेद केला.

यानंतर पेशवा ताराबाईकडील बंदोबस्ताचें काम तसेंच ठेवून, करनाटकांत गेला. तो तेथें पहिल्यापेक्षां स्वल्पपणें खंडणी घेऊन श्रीरंगपट्टनाचाही खंड घेता झाला. आणि किल्ला हुळी औनोर, तो त्याणें युद्ध करून स्वसत्तात्मक केला. मग सन सत्राशें त्रेपन्नांत पर्जन्य काळाचा सुमारें पेशवा पुण्यास आला पुढें पाऊसकाळ गेल्यावर तो गुजराथ घ्यावयास उद्युक्त झाला. तेव्हां त्याणें आपला भाऊ रघुनाथराव याजबरोबर सेना देऊन गुजराथेंत पाठविला.

तेवेळेस दमाजी गाइकवाड पुण्यामध्यें बंदींत होता. त्यास सोडून आपल्या कामांत घ्यावा असा निश्चय करून पेशव्यानें त्याशीं तहाचें बो-

लणें

लणें लाविलें. त्यांत असा नेम ठरला कि. गाइकवाडानें पहिलें देणें खंडणी बाबद पंधरा लक्ष रुपये पेशव्यास द्यावे, आणि आपला गुजराथेंतील मुलुखही निमे द्यावा; त्याखेरीज दुसरा कांहीं मुलुख घेतला असतां त्यासंबंधें जो लाभ होईल तोही अर्धा द्यावा. याशिवाय जे समयीं स्वारीचें काम पडेल ते समयीं दहा हजार फौज चाकरीस पाठवावी. यावेगळे दाभाडे सेनापती यांचे मुतालकी बाबद पांच लक्ष रुपये द्यावे; आणि जितका मुलुख गुजराथेंत आपला भाग आहे त्याबद्दल पंचवीस हजार रुपये द्यावे, याशिवाय गुजराथेंत पेशव्याचे भागीं पेशव्यांस ठाणीं बसवावयाविषयीं सहाय व्हावें; आणि सातारांचा राजाला प्रतिवर्षी कांहीं खर्चास द्यावें. असें कबूल करून दमाजी मुक्तता पावला. तो मग गुजराथेंत जाऊन, नवें लष्कर ठेवून पुढें पेशव्याचा भाऊ रघुनाथराव तिकडे गेला तेव्हां. तो त्यास मिळून ते दोघे स्वस्थचित्तें मुलखाची खंडणी घेत चालिले. ते अमदाबादेस पोंहचले तेव्हां तेथचे किल्लेकरी त्यांशीं युद्ध करूं लागले; तो मोठा संग्राम होऊन शेवटीं त्या मोंगलांहीं किल्ला पेशव्यांस दिला, तथापि त्या किल्ल्यांत जवान मर्द नामें त्या मोंगलांचा मुख्य होता त्याचा शौर्येंकरून त्यास अमदाबादेचे उत्तरेकडे कित्येक मुलुख मिळाला, त्यांत पटन व वरनगर व राधनपूर व दुसरेही कांहीं परगणे होते; परंतु पुढें दहा वर्षांनीं दमाजीनें त्यांतील बहुतेक परगणे माघारे घेतले. त्या युद्धांत पेशव्याकडचा नारोशंकर+ होता त्याचे स्वाधीन बहुत आरब असत; तो त्या वेळेस आपल्या शौर्येंकरून मोठी योग्यता पावला. याप्रमाणें सन सत्राशें पंचावन्नांत गुजराथची राजधानी अमदाबाद मराठ्यांचे हातीं पुरतेपणें लागली. तेथें पेशव्यानें श्रीपतराव नामें आपला हस्तक ठेविला. आणि असा नेम ठरला कि, तो सर्व वसूल पेशावा व गाइकवाड या उभयतांहीं समसमान वांटून घ्यावा; आणि त्या किल्ल्याचा एका दरवाजावर मात्र गाइकवाडाचे शिपाई ठेवून वरकड सर्वजागीं पेशव्याचे लोक ठेविले. असा बंदोबस्त झाल्यानंतर रघुनाथराव व दमाजी बडोद्यास जाऊन एकमेकांचा परम सत्कार करून मग ते दोघे परस्परें वियोग पावले तो प्रकार असा. रघुनाथराव आपल्या बरोबर दत्ताजी शिंदा यास घेऊन. हिंदुस्थानांत गेला. आणि दमाजी बडोद्यासच राहिला. पेशवा हिंदुस्थानांत गेल्यावर मल्हारराव होळकराचा पुत्र खंडेराव होळकर त्यास मिळाला मग ते दोघे मिळून अजमीर प्रांतांत पसरले, आणि तेथें लुटालूटक-

+ नारोशंकरानें त्यापूर्वीं खानदेशांत मालेगांव किल्ला बांधिला होता.

रून चौथ व सरदेशमुखी घेतली, आणि शत्रु व मित्र समान मानून जेथें जेथें सांपडे तेथ तेथची खंडणी घेत चालिले. तेव्हां जाटलोक यांसही खंडणी द्यावी लागली, परंतु ते युद्धावांचून देइनात. त्यांचा किल्ला कुंभेर तेथचे लढाईत खंडेराव होळकर मृत्यु पावला. नंतर सन सत्राशें चौपन्नांत रघुनाथ राव पुण्यास आला.

असें पश्चिमेकडे वर्तमान होत असतां पूर्वेकडे सन सत्राशें त्रेपन्नांत रघुजी भोंसला कैलासवासी झाला. त्याचे चौघे पुत्र एकाचें नांव जानोजी, एक साबाजी एक मुधोजी आणि एक बिंबाजी, त्यांत दोघे वडील जानोजी व साबाजी ते धाकट्या बायकोचें मूल; आणि दुसरे जे मुधोजी व बिंबाजी लहान होते ते थोरल्या बायकोचे. रघुजीनें आपल्या मरणाचे वेळेस त्या चौघां पुत्रांस आपले जवळ जमा करून, चौघांस दौलत व मुलुख वांटून देऊन त्यांत वडील जानोजी तो मुख्य करून त्यास सेनासाहेब सुभा पदवी, पेशव्यानें द्यावी असें केलें; आणि उपदेश केला किं तुह्मां चौघांत कलह नसावा, आणि आपल्ये मराठ्ये जातींत कोणी भांडूं लागले तर तो कज्जा तुटेसा उद्योग तुह्मीं करावा, व सर्वांहीं एकचित्त असून राज्य करावें हेंच श्रेयस्कर होईल. त्यांत विभाग नव्हावे. असें त्याणें सांगितलें होतें परंतु सर्व जनास विदित आहे किं, जसे अनुभवानें प्राणी सावध होतात. तसे केवळ उपदेशानें सावध होत नाहींत, याचें उदाहरण हेंच किं, रघुजीचा मृत्यूनंतर एकाच महिन्यानें जानोजीस कलहामुळें असें अगत्य पडलें किं, सुधोजीला बलात्कारेंकरून आपल्या आज्ञेंत वागवावा.

यानंतर जानोजी पुण्याकडे आपली सेनासाहेब सुभा पदवी संपादन करावयास निघाला. तो जवळ आला असें वर्तमान सातान्यांमध्यें ताराबाईला कळतांच, तिणें पेशव्याचें अभय पत्र घेऊन, राजाराम राजा यास किल्ल्यांत बाबुराव जाधव याचे स्वाधीन ठेवून आपण निघोन पुण्यास आली. तिजबरोबर जानोजीचा भाऊ बिंबाजी भोंसला होता; त्याणें तिचा पक्ष स्वीकारिला असे. आणि तिचें माहेर मोहितेकूळ त्यांचा कोणा सोयऱ्या धायऱ्याचा कन्येशीं विवाह केला होता. ती ताराबाई पुण्यास येऊन पोंहचली तेव्हां पेशव्यानें तिचा असा संमान केला किं. त्याणें जें जें समजाविलें तें तें तिणें संतोषेंकरून मान्य केलें. परंतु प्रथम तिणें जेजोरीचा खंडोबाजवळ पेशव्यास नेऊन कृत्रिम करणार नाहीं अशी शपथ करविली ते समयीं पेशव्यानेंही कबूल करविलें ताराबाई कडून, कीं. बाबुराव जाधव यास दूर करावा; त्या पेशव्यांनें ताराबाईला पक्की जाणली कीं, ही विपरीतकरीअहे;

हे; त्या तिचा स्वभावापासून त्याणें आपला अर्थ साधिला. तो असा; त्याचे मनांत होतें कीं, राजाराम राजा बंदींतून सुटूं नये यास्तव तो पेशवा ताराबाईजवळ त्या राजारामाचा मुक्ततेविषयीं वारंवार विनंती करीत असे, ती तिणें कधींही अंगीकारिली नाहीं.

जानोजी भोंसला याणें सरकारांत राजाचा खर्चाकडे नऊ लक्ष रुपये प्रतिवर्षी यावे व जासमयीं आज्ञा होईल त्यासमयीं दहा हजार फौज चाकरीस पाठवावयाची कबूल करून आपली सेनासाहेब सुभा पदवी मिळवून माघारा वराडांत गेला. त्याचा भाऊ बिंबाजी तोही त्याचे बरोबरच होता. तो जानोजी माघारा जातांना मोंगल व मराठे यांचा मुलखांतून गावोगांव घास दाणा घेत चालिला. तेणेंकरून सलाबतजंग त्यावर रुष्ट झाला; त्यावरून जानोजी त्याचा मुलूख लुटूं लागला. तेव्हां सलाबतजंगानें आपला एक सरदार बरोबर थोडकीशी फौज देऊन मराठ्यांवर पाठविला; त्याशीं व जानोजीशीं युद्ध होऊन जानोजी भोंसला पराभव पावला. तो मागें हटून नागपुरपर्यंत गेला, आणि त्याचा दिवाण कैदेंत सांपडला. त्या जानोजीनें जी लूट पहिली जमा केली होती ती नागपुराकडे जातांना त्यास बहुतेक माघारी द्यावी लागली, नंतर तो जानोजी भोंसला नागपुरीं आश्रय पावला.

इकडे दिल्लीमध्यें कारभारी लोकांत वैमनस्यें पडल्यामुळें मराठ्यांस मध्यस्थपणें त्यांत शिरावयाची संधि सांपडली. गाजीउद्दिन मृत्यु पावल्यावर त्याचा पुत्र मीरशाबुद्दिन याणें आपणाविषयीं वजिरास मोह उत्पन्न व्हावयासाठीं आपल्या बापाचा शोकेंकरून अत्यंत व्याकुळपणा दाखविला. तेणेंकरून त्या वजिरास त्याची दया आली, त्या योगें तो आपल्या बापाचें गाजीउद्दिन नाम पद आणि त्याचा अधिकार अमीर उलउमरा नामें होता तो मिळविला. नंतर तो आपला परम उपकारकर्ता असा जो वजीर त्याचा नाशाविषयीं उद्युक्त झाला; आणि त्याची वजिरीही आपल्या आज्ञेचा भर्ता यास देवविली. तेव्हां तो पहिला वजीर व बादशाह यांशीं युद्ध होऊं लागलें, तें सहा महिनेपर्यंत दिल्लीचा आसमंतात होत होतें, शेवटीं त्यास कंटाळा येऊन, तो वजीर तें युद्ध टाकून आपलें पहिलें ठिकाण लखनाऊ तेथें जाऊन राहिला. त्याचे पूर्वी मीरशाबुद्दिन बळेंच त्या युद्धांत शिरला होता; त्याणें आपल्या कुमकेस मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांस बोलाविलें, परंतु ते आल्याचे पूर्वीच तो वजीर युद्ध सोडून गेला; मग ते होळकर व शिंदे आल्यावर त्यांना बरोबर घेऊन वजिराचा पक्षपाती सुरजम

ळु याचा पारिपत्यास गेला. तेव्हां सुरजमल्ल आपल्या किल्ल्यात शिरून युद्ध करूं लागला; तेवेळेस शाबुदिनानें बादशाहाजवळ तोफांविषयीं विनंती केली. तेसमयीं बादशाहास त्या नव्या वजिराचें मागणें पडलें कीं, हा शाबुदिन सर्व सामर्थ्य आपणासच असावें असें इछितो. अशा पुरुषास अनुकूळ होणें ठीक नाहीं. त्यावरून बादशाह याणें तोफा न दिल्या. आणि तेच समयीं त्या सुरजमल्लानेंही बादशाहास शरणागतासारिखें विनंतीपत्र पाठविलें; तेणेंकरून तो बादशाह तो शाबुदिन व मराठे यांचा निवारणार्थ फौजेसहित निघाला. हें वर्तमान मल्हारराव होळकरास कळतांच त्याणें शाबुदिन व जयाप्पा शिंदे हे केवळ अल्पसारसे जाणून त्यांस नविचारितां तो एकाएकीं बादशाहाचा सैन्यावर जाऊन पडला. तेसमयीं बादशाह सावध नव्हता. आणि तोतर बाण टाकूं लागला; तेव्हां तेलोक भयभीत होत्साते पळूं लागले. तेवेळेस होळकराला त्या लश्कराची लूट सांपडली. नंतर तो होळकर दिल्लीस गेला. तेसमयीं शाबुदिनानें बादशाहापाशीं आपणास वजिरी मिळवून आपल्या आतेचा भर्ताजो होता त्यास पदच्युत केला. त्यानंतर त्याणें तो आमेदशाह बादशाह याचे जागीं पूर्वींचा जहानदार बादशाह याचा नातू त्याचें दुसरें अलंगीर असें नाव ठेवून सन सत्राशें चोपन्नांत पांचव्या मे महिन्यात तो तक्ताधिपती केला. तेचसमयीं त्या पहिल्या आमेदशाह बादशाहाचे डोळे काढून त्यास बंदींत ठेविला. तेच सधींत पहिला वजीर सफदरजंग मरण पावला; त्याचा पुत्र सुजाउद्दवला तो आपल्या बापाचे जागीं उदप्रांताचा अधिकारी झाला.

पेशवा स्वभावेंकरून धिमा असे. आणि दुसऱ्यांस कामें संपवून आपण स्वस्थ असावें यांत त्याची आवड होती. त्याणें आपला भाऊ रघुनाथराव यास लश्कराचें काम सांगीतलें. आणि सदाशिव चिमणाजी आपला चुलतभाऊ तो मुलखाचा बंदोबस्तास नेमिला; त्याणें रामचंद्रबाबा शेणवी याणें ठरविल्या प्रकारें तो बंदोबस्त रक्षिला. मग तो रामचंद्र मेल्यावरही सदाशिव चिमणाजीनें त्या शेणव्यानें स्थापिलेले जे मार्ग होते, ते आणि दुसरेही कांहीं उत्तम प्रकारचे नवेनवे नेम केले; तेणें करून प्रजा बहुत दिवसपर्यंत लुटालूट किंवा दुसरा कांहीं दंगा न होतां सुख पावली.

तो पेशवा करनाटकांतून आल्यावर एक वर्षपर्यंत पुण्यांत होता; तेव्हां त्याणें आंग्र्याचा सुलुख घ्यावयाविषयीं इंग्रेजांशीं कुमके-

साठीं

साठीं कांहीं बोलणें लाविलें होतें मग सन सत्राशें पंचावन्नांत पर्जन्यकाळ गेल्यावर तो पेशवा आपलें जें कोंकणांत लश्कर होतें तें वाढवून आंग्र्यावर जावयास तयार झाला; इतक्यांत करनाटकीं कांहीं बंड उत्पन्न झालें तें मोडावयास त्याला आधीं तिकडे जावें लागलें. त्या बंडाचें मूळ असें, सलाबत जंगाजवळ हिंदी पलटनें होतीं. त्यांस पूर्वीं हैदराबादेंत निरोप दिला; नंतर त्यांचा मुख्य सरदार मुजाफिरखान नामें होता, त्याणें ते लोक आणून पेशव्याचे चाकरीस ठेविले; मग तो सरदार करनाटकांत गेल्यावर कांहीं रुसव्यामुळें पेशव्याचा पक्ष सोडून सावनुरचा नवाबाची चाकरी धरिली. तेसमयीं पेशव्यानें त्या नवाबास तो आपला सरदार मागीतला; त्याला घुटी व सोंडुरचे घोरपडे मराठे लोक यांचें साहाय्य असे तेणेंकरून तो धीटपणें सरदारास पेशव्याचे स्वाधीन करीना. त्यासाठीं पेशवा याणें, आपलें मोठें लश्कर जमा करून, जानोजी भोंसल्याचे दहा हजार स्वार बलावून आणून, कृष्णेपलिकडे जाऊन बागलकोट घेतला. तेथून पुढें सावनुरास जावयाकरितां हैदराबादेस वकील पाठवून, त्यांस तुह्माला व आह्माला या सावनूर संबंधें धक्का समान बसेल; असें समजावून त्या तक्ताधिपतीचीही कुमक घेतली. मग ती व आपली सेना एकत्र करून पुढें जाऊन सावनुरास घेरा घातला.

इकडे कोंकणचे आंग्रे प्रकरणीं पेशव्यांहीं इंग्रेजांशीं कांहीं बोलणें लाविलें होतें तो प्रकार असा; तुळाजी आंग्र्यानें आपला सावत्र भाऊ संभाजी आंग्र्या तो मरण पावल्यानंतर त्याचा मुलुख, बाणकोट, व सावंताची वाडी यांमध्यें होता, तो आपण बहिवाटीत असे; आणि समुद्रांत स्वतंत्रतेनें चांचेपणाही करीत होता. तो अनर्थ शमवावयाकरितां सन सत्राशें पंचावन्नांत बाळाजी बाजिराव पेशवा व इंग्रेज या दोघांमध्यें असें ठरलें कीं, पेशव्याचीं सारीं लढाऊ गलबतें इंग्रेजांहीं आपल्याकडे घेऊन आपलीं जहाजें एक चव्वेचाळिसां तोफांचें, व एक सोळा तोफांचें, व दोन गरनाळांचीं जहाजें, इतक्यांसहित जाऊन, आंग्र्याचे समुद्रकांठचे किल्ले घ्यावे. असा बेत झाल्यावर मार्च महिन्याचे सव्विसाव्ये तारिखेस त्या कामाविषयीं इंग्रेजांचीं जहाजें निघालीं; परंतु पेशव्यांचा गलबतांस कांहीं निमित्तेंकरून यावयास उशीर लागला. त्या योगें आंग्र्याचीं लढाऊ जहाजें सुवर्णदुर्गाजवळ होतीं तीं इंग्रेजांचा हातीं न लागलीं. त्यानां तीं पळवावयास अवसर सांपडला. मग इंग्रेजांचा मुख्य सरदार कामांडोर जेम्स नामें होता तो जयगड पर्यंत त्याचे पाठीस लागला. नं-

तर

तर त्यास तें कांहीं नसांपडतां तो माघारा येऊन, एप्रेलाचे चवथ्ये तारिखेस त्याणें सुवर्णदुर्ग घ्यावयाचा उद्योग आरंभिला. तो प्रकार असा. किल्ल्याचा तटाजवळ त्याणें आपलीं जहाजें नेऊन नांगर केले, नंतर चवथे दिवशीं जंजिरा सुवर्णदुर्ग. व त्याजवळचे खुसर्कीवरील किल्ले ते त्याचा स्वाधीन झाले. पेशव्यांचीं गलबतें मागून आलीं तीं त्या किल्ल्यांतील तोफांचे मारगिरीखालीं पोंहचलींच नाहींत, त्या जहाजांवरील शिबंदीचा मुख्य नारोपंत नामें होता, त्याणें कित्येक वेळा परमशौर्येंकरून खुस्कीवर युद्धें केलीं होतीं; परंतु तो समुद्रांत युद्ध करावयाविषयीं केवळ भित्रा असे. तेसमयीं पर्जन्यकाळामुळें विजयदुर्ग घ्यावयास अवसर होइना; तेव्हां इंग्रेजांनीं सुवर्णदुर्ग किल्ला पेशव्याकडील कोंकणचा सरसुभेदार याचा स्वाधीन करून आपलीं जहाजें घेऊन माघारें मुंबईस आले या कामाचा बोलण्यामध्यें असें ठरलें होतें कि, बाणकोट व त्या बाणकोटचा खाडीचे कांठचीं पांच गांवें पेशव्यानीं इंग्रेजास द्यावीं; तीं पर्जन्यकाळ गेल्यानंतर त्यांहीं त्यांचे स्वाधीन केलीं. मग दुसरे वर्षीं विलायतेहून बादशाहाचीं कित्येक मोठीं मोठीं जहाजें मुंबईस येऊन, तीं व दुसरीं मुंबईसंबंधीं लढाऊ जहाजें मिळून चौदा जहाजें विजयदुर्ग घ्यावयास रवाना झालीं. त्यांवर आठशें विलायती लोक, व एक हजार हिंदू पलटनी लोक चढले होते; तीं जहाजें विजयदुर्गा समोर जात तों पर्यंत मराठ्यांहीं आंग्र्याचे दुसरे कोंकणचे किल्ले होते ते घेतले; आणि विजयदुर्गासही घेरा घालून, इंग्रेजी कुमकेची वाट पहात होते; इतक्यांत तीं गलबतें जवळ येतांच त्या किल्ल्यांत तुळाजी आंग्र्या होता, तो मराठ्यांचा लश्करांत जाऊन, इंग्रेजांखेरीज मराठ्यांशीं मात्र तहाचें बोलणें करूं लागला. त्या तहास पेशव्याचे लोक अनुकूळ होऊन त्या किल्ल्यांत बहुत द्रव्य होतें तो सर्व लाभ आपणास घ्यावयाविषयीं इंग्रेजांची कुमक नघेतां, त्यास युक्तीनें माघारें लावावयास उद्युक्त झाले. हें सर्व वर्तमान इंग्रेजांचा त्या सरदारास कळलें, त्याणें तात्काळ समुद्रांतून किल्लेकरांशीं युद्ध आरंभिलें, आणि आपले शिपायी लोक कांठीं उतरून पेशव्याचें लश्कर व किल्ला या दोहोंमध्यें आपले ठाणें बसवून, किल्ला खुसर्कीवरून व समुद्रांतून आपण वेढला. आणि त्या किल्ल्यावर बहुत द्रव्य आहे त्यांत आपली कांहीं वांटणी असावी म्हणून मराठ्यांकडील रामाजीपंत नामें तेथें कोणी मुख्य होता, त्याणें आपले थोडके तरी लोक किल्ल्यांत जावे यासाठीं फार उद्योग केला; त्यांत इंग्रेजांचा कोणी चौकीचा बंदोबस्त राखणारा सरदार होता त्यास युक्तीनें आमचे कांहीं लोक आंत जाऊं दिले असतां, तुम्हांस मुंबईहून ऐशीं हजार रुपयांची हुंडी देऊं असें गुप्त सांगितलें,

के असा लांच देत असतां तो ऐकेना. इतकें होऊन शेवटीं तो किल्ला इंग्रेजांचे अधीन झाला. त्यांत मराठ्यांचें माणूस कोणीही गेलें नाहीं, त्यावरून इंग्रेजांचा सरदारांनीं तेथें द्रव्य दहा लक्ष होतें. त्यांपैकीं मराठ्यांस किमपि न देतां त्या लोकांहीं आपणांत वांटून घेतलें. असें झाल्यावर मुंबईचा मुख्य इंग्रेज होता, त्याणें विजयदुर्ग किल्ला फार सुदृढसा जाणून तो आपणाकडे घ्यावा आणि मराठे यांस बाणकोट द्यावा असें केलें. या कृत्रिमाविषयीं पेशव्यानें इंग्रेजांचा मुख्य बादशाह याजवळ, आणि मद्रासचा मुख्य इंग्रेजांचा कारभारी साहेब होता त्याज पाशीं फिर्याद केली. त्यावरून दोहींकडचें लिहिलें मुंबईचा मुख्यास आलें, तेव्हां त्याणें मराठेही तहामध्यें जो नेम ठरला त्याप्रमाणें वागले नाहींत असें समजावून, त्यावेळेस तें प्रकरण तसेंच रक्षिलें.

करनाटकांत सलाबतजंगाचें लश्कर व मराठे लोक मिळून सावनूर किल्ला बहुधा फ्रांशिसांचा तोफा चालवायाचा कौशल्यें करून घेतला. आणि दुसराही त्याचा मुलुख घेऊन त्या नवाबाशीं त्यांहीं स्नेह केला. तेव्हां जानिमित्त इतका कलह झाला तो मुजाफरखान पुनः सलाबतजंगाचे चाकरीस राहिला. असा सलाबतजंगाशीं आणि पेशव्याशीं स्नेह पडला, त्याचें कारण हेंच दिसतें किं. फ्रांशीसलोक मोठ्या योग्यतेस आले. ते सर्व कांहीं आपल्या सत्तेंत येतील अशा शंकेनें त्यांस काढून द्यावेसें त्यांचा मनांत होतें. त्यावरून ते सावनूर स्थान त्यांचे हातीं येतांच फ्रांशिसांचा मुख्य बसी नामें साहेब होता, त्याला सलाबतजंगानें सांगितलें कीं. आतां आह्मास तुमचें प्रयोजन नाहीं; तुह्मीं आमचे मर्यादे बाहेर आह्मीं तुह्मास मुलुख+ दिला आहे तिकडे जा. असा निरोप झाला त्यावेळेस बसीजवळ त्याचा जातीचे फ्रांशीस घोडेस्वार दोनशें, व पायदळ सहाशें, याशिवाय पांच हजार पलटणीं हिंदुलोक व उत्तम सरंजामयुक्त त्याचा सेनेप्रमाणें त्यास पुरतशा तोफा होत्या; असें त्याचें सामर्थ्य असतां तो बसी समजला कीं, हे मला काढून द्यावयास मिळाले आहेत. आणि जर मी यावेळेस यांची आज्ञा नमानावी तर, मुजाफरखान याजकडे आहे, त्याचे व आपले हिंदी पलटनाचे शिपायी लोक यांचें इष्टत्व आहे; यास्तव निःशंक युद्ध होणार नाहीं, त्यास हेंच उत्तम कीं, आपल्ये मर्यादेंत जातों. असें दाखवून, हैदराबादेस जाऊन तेथें

+ सन सत्राशें पन्नासांत बसीला लश्करखर्चास दक्षिणेचे पूर्वेकडे समुद्राचे कांठीं राजमंद्री शहर, व शिकेकोळ, व एलोर, इतका मुलुख सलाबतजंग याणें दिला होता.

आपला बंदोबस्त चांगला करावा आणि आपल्या मुख्य ठिकाणाची कुमक आणावी; नंतर मागें उलटावें. असें मनांत आणून तो तें सांगणें अवश्य मानून मोठ्या त्वरेनें जाऊन हैदराबादेस पोंहचला. तेथें चांगली बंदोबस्ताची जागा पाहून आपण त्या आपल्या लोकांसहित त्यांत राहून युद्धाची तयारी करूं लागला. आणि तेथें सलाबतजंगाकडचे मुख्य सरदार रामचंद्र जाधव व जानोजी निंबाळकर होते ते वश केले. इतक्यांत मासुलीपट्टनाहून त्याची कुमकही येऊन पोंहचली. त्यानंतर त्याचा असा बंदोबस्त झालेला जाणून, सलाबतजंग त्यास दूर करावयाची मसलत टाकून त्याशीं स्नेह रक्षिता झाला. मग तो बसी सलाबतजंगाजवळचा कारभाऱ्यांत पहिल्यापेक्षां मान्यता पावोन त्याणें मुजाफरखानाला सलाबतजंगाचे चाकरींतून काढिला. मग त्या मुजाफरखानानें पुण्यास जाउन पेशव्यास बहुत आर्जवून कबूल केलें कीं, इतःपर कृत्रिम न करीतां इमानीपणें चाकरी करीन. त्यावरून तो पेशव्यानें आपणापाशीं रक्षिला, परंतु सदाशिव चिमणाजी याचा मनास ती गोष्ट आली नाहीं.

पेशवा कर्नाटकांतून जुलाईचे विसाव्ये तारिखेस पुण्यांत आला; नंतर त्याणें मुंबैचा अधिकारी बौचेर साहेब त्याला बहुत स्नेहयुक्त पत्र लिहून, त्यांत असें समजाविलें कीं, आह्मीं पुण्यांस आलों, आतां पूर्वोक्त कामांपेकीं कांहीं बंदोबस्त राहिला आहे तो आपला कोणी साहेब एथें आला ह्मणजे त्याचे विद्यमानें केला जाईल. त्यावरून बेफील नामें व स्पेनसर नामें दोघे साहेब मुंबईहून गेले; ते पुण्यांत पेशवा व रघुनाथराव व सदाशिव चिमणाजी यांस भेटले. मग अकटोबराचे बाराव्ये तारिखेस असा निश्चय ठरला कीं इंग्रेजानीं विजयदुर्ग पेशव्यांस द्यावा; आणि पेशव्यानीं इंग्रेजांस बाणकोट व त्याजवळचे खाडीचा कांठचे दहा गांव द्यावे, याखेरीज आमचें कांहीं मागणें सरकार कंपनी बहादुराकडे राहिलें नाहीं, असें लिहून द्यावें या प्रमाणें तीं सर्व कामें उलगडून ते दोघे साहेब माघारे मुंबईस आले.

सन सत्राशें छप्पनापासून सन सत्राशें साठपर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग अठरावा.

अनुक्रमणिका.

रघुनाथराव लष्करसुद्धां हिंदुस्थानांत स्वारीस गेला. व पेशवा कर्नाटकांत जाऊन श्रीरंगपट्टनचा खंड घेतला.

खडापाजवळचे लढाईचा प्रकार.

म्हैसुरच्या सरदार हैदर अल्ली याचा उत्कर्ष.

हैदराबादचे दरबारीं कांहीं आभ्यंतरीय कृत्रिम झालें. तें व त्याचा शेवट.

इंग्रेज लोकानीं सुरत घेतली तें प्रकरण.

पुनः मराठे याणीं कर्नाटकांत संचार केला तो व हैदराबादचें कांहीं विशेष वर्तमान.

सदाशिवरावाचा स्वभावाचें निरूपण.

त्या सदाशिवरावास मारेकरी घातला असतां तो वांचला तें प्रकरण.

आमेद नगर मराठ्यांहीं कृत्रिमेंकरून घेतलें.

सदाशिवरावसेनेचें मुख्यत्व पावोन रघुनाथराव कारभार करूं लागला. तो प्रकार.

दक्षिणेंत मराटेव मोंगल यांशीं युद्ध होऊन मराठ्यांस काय लाभ झाला तो पर्याय.

भाग अठरावा.

सन सत्राशें छप्पन्नाचा पर्जन्यकाळ गेल्यावर. पेशव्यानें आपला भाऊ रघुनाथराव याजबरोबर फौज देऊन त्याची दिवाणगिरी सखारामबापूला सांगून हिंदुस्थानांत पाठविला; आणि आपण मोठें सैन्य जमा करून. कर्नाटकास चालिला. तो सन सत्राशें सत्तावन्नांत अकस्मात श्रीरंगपट्टणाचे किल्ल्याजवळ प्रकट होऊन. आमचा बाकी खंड राहिला असें निमित्त करून अमर्याद पैका मागूं लागला. तो तिकडे जात असतां खर्पोंचा नवाब खेरीज करून कृष्णेचा दक्षिणकांठचे नवाब त्याला अनुकूळ झाले; आणि घोरपडाही सहा हजार स्वारांनिशीं येऊन त्यास मिळाला. तंजी राजनामें म्हैसुरचा राजाचा दिवाण तो बळेंच श्रीरंगपट्टणचा अधिकार.

आपण

आपण चालवीत होता; त्याणें तें पेशव्याचें मागणें पहिल्यानें मान्य केलें नाहीं; परंतु तोफांचा मारापुढें निरुपाय होऊन, आर्जवानें त्याशीं बोलून, तें देणें फार हलकें ठरवून तात्काळ नगद पांच लक्ष रुपये दिले, बाकी ऐवज जमा होई तोंपर्यंत त्यांहीं कांहीं मुलुख वहिवाटावासा केला. यानंतर पेशव्याचा मनांत आलें कीं, पूर्वीं मराठेंचा स्वाधीन जितका कर्नाटकच्या मुलुख होता तो आपल्या सत्तेंत आणावा. मग त्याणें शेरा परगणा घेऊन पाउसकाळ पुढें समीप आला ह्मणून तें लश्कर बहुतेक बरोबर घेऊन, माघारा पुण्यास येऊं लागला; तेह्वां बाकी फौज बळवंतराव मेहेंदळ्याचे स्वाधीन करून उसकटा, व बंगळोर, व बाळापूर, व कोल्हार, इतकें घ्यावयासाठीं तेथें ठेविली. त्यानंतर खरपाचा नवाबापासून बळवंतरावानें उसकटा घेतला; आणि अर्काटचा नवाबापाशीं चौथ व सरदेशमुखीबद्दल बहुत वाद प्रतिवाद करून दोन लक्ष रुपये नगद व अडीच लक्ष मुलखांतून वसूल करून घ्यावे असा निश्चय ठरला. त्या अर्काटचा नवाबास मद्रासचे इंग्रेज लोक अनुकूळ होते, त्यांहीं त्यास खंडणी न पडावी ह्मणून यांस सांगितलें कीं, तुह्माला फ्रांशिसांचा मुलखीं स्वारी करावयास हा उत्तम समय आहे. असें त्या इंग्रेजांचें सांगणें बळवंतरावानें न मानितां, जें मागणें केलें होतें तो पैका त्या नवाबास द्यावा लागला. यानंतर खडापापाशीं खरपाचा व करनोळचा या दोहों नवाबानीं मिळोन त्या मेहेंदळ्याशीं युद्धप्रसंग केला; परंतु ते जय नपावतां खरपाचा नवाब मृत्यु पावला, आणि मराठ्यांहीं त्याची राजधानी लुटली. तथापि तत्पक्षी जे लोक होते त्याणीं युद्ध करून तो मुलुख मराठ्यांचे हातीं लागूं दिला नाहीं, इतक्यांत स्रेंगपुरचे दरबारीं हेदरअली पुढें मोठ्या योग्यतेस येणारा त्याचे मसलतीनें त्यालो कांहीं पूर्वील खंडणीपैकीं कांहीं नगद पैका देऊन बाकी ऐवजास मुलुख लावून दिला तो माघारा घेतला. त्यावरून पुण्यामध्यें पेशव्यानें सैन्य तयार करून गोपाळहरीस त्याबरोबर देऊन, मेहेंदळ्याचे कुमकेस पाठविला परंतु औरंगाबादेंत मुख्य प्रधान शानवाजखान याणें कांहीं मसलत करून बादशाहास कैदेंत ठेवून त्याचे जागीं त्याचा भाऊ स्थापावा, व त्याचें साहाय्य करणारे फ्रांशीस लोक दक्षिणेंतून काढून द्यावे, अशी योजना करिता झाला. त्या मसलतीस पेशवे मुळापासून अनुकूळ असतील ह्मणून गोपाळहरी श्रीरंगपट्टणीं हेदरअलीवर जात होता, तो मनाकरून औरंगाबादेकडे पाठविला, नंतर त्या नवाजखानानें कल्पिलेलें कृत्रि-

\- फ्रांशीस व इंग्रेज यांशीं त्यासमयीं युद्ध लागलें होतें.

न गवटास न जातां तो फ्रांशीस लोकांचे हातून मेला गेला. त्याचे जागीं प्रधान बादशाहाचा भाऊ सलाबतजंग यास केला. दुसरा भाऊ निजामअली, तो पळून गेला. आणि फ्रांशीस लोक यांचें बळ वाढलें इतक्यांत ते फ्रांशीस यांचा कोणी नवा मुखत्यार येऊन त्याणें इंग्रेजांचें युद्ध संभाळावयास त्या फ्रांशिसांस बोलाविलें. तेव्हां तो बसी फौजेसहित स्वसंतोषें दौलताबाद किल्ला सोडून दक्षिणेंतून निघाला. ते समयीं त्याशीं स्पर्धा करणारे हिंदु व इतर त्यांस मोठा चमत्कार व आनंद वाटला. आणि सलाबतजंगास त्यांपासून उपयोग होई तो आश्रयरहित होऊन, फार श्रमी झाला. ते वेळेस मराठे लोक पुण्यास चालिले असें औरंगाबादेकडचें वर्तमान असतां मुंबईचा इंग्रेजानीं सुरत घ्यावयाची मसलत करून त्याप्रमाणें तयारी करीत होते. त्या वेळेस पेशवा औरंगाबादेचा कामांत गुंतून, त्याला त्या इंग्रेजांचें निवारण करावयास अवकाश सांपडला नाहीं, म्हणून त्याणें चातुर्य करून तें काम सिद्धीस जाऊं न दिलें, तो प्रकार असा. कल्याणचा सुभेदार शंकराजीपंत त्यास आज्ञा केली कीं, हालीं आम्हाला रिकामपणा नाहीं, तोंपर्यंत तुम्हीं इंग्रेजांस भुलथापी देऊन तसेंच रखावे. त्यावर त्याणें विनंती केली कीं, तें चालावयाचें नाहीं, कां कीं, ते लोक आपल्या अर्थ शेवटास नेतील. त्यावरून बाळाजी बाजिरावानें आपलें लष्कर कित्येक मजला पश्चिमेकडे चालविलें, आणि पुण्यामध्यें इंग्रेजांचा वकील हिंदू होता त्याकडून इंग्रेजांस असें कळविलें कीं पेशवा लष्करसुद्धां मुंबईवर आला, त्यावेळेस इंग्रेजानीं दक्षिणी कारभार किमपि न जाणल्यामुळें तें वर्तमान खरें मानून मुंबैचा बंदोबस्तास लढाऊ गलबतें कांहीं सुरतेस होतीं तींही आणवून, मोठ्या तयारीनें पेशव्याची मार्गप्रतीक्षा करीत तेथेंच राहिले. अशा कारणानें त्यावेळेस तें काम न झालें; परंतु पुढें थोडकेसे महिने गेल्यावर त्यांहीं सुरत घेतली, त्या कामांत इंग्रेजांचे शिपाई व सरदार बहुत मेले गेले. याप्रमाणें सन सत्राशें एकुणसाठांचा चौथा महिना मार्च याचे चवथ्ये तारिखेस इंग्रेजांचे हातीं सुरत लागली.

पेशवा माघारा पुण्यास आल्यावर पर्जन्यकाळ गेल्यानंतर सेगुणकरानें खंडणी पैकीं ऐवजास लावून दिलेला मुलुख त्याणें माघारा घेतला होता तो घ्यावयाकरितां गोपाळहरीस पाठविला त्याणें तें कार्य करून बंगलोरास घेरा घातला. ते समयीं सेगुणच्या लष्कराचा मुख्य हैदर अली झाला होता. त्याणें पहिल्याकरारप्रमाणें सोळा

लक्ष

लक्ष रुपयांचें सोनें तोलून दिलें, आणि सोळा लक्षांचा हुंडी चिठ्या दिल्या. ते व्हां बाकी वसुला विषयीं वहिवाटावयास लावून दिलेला मुलुख सोडून, मराठ्यांहीं त्याशीं सल्ला केला.

यानंतर गोपाळहरी तेथून निघाला तो मद्रासेस इंग्रेज होते, त्यांस भोंवता वेढा घालून फ्रांशीस त्यांशीं युद्ध करीत होते, तेथें जाऊन त्या दोघांपासून खंडणी घ्यावयाचा उद्योग करूं लागला, परंतु त्या उभयतांहीं त्याचा धिक्कार करून त्यास लावून दिला. तो खूड उगवावयाकरितां फ्रांशिसांचे स्वाधीन त्रिपुटीचें देवस्थान होतें तें त्याणें घेतलें. तेथचे यात्रेंत पैका बहुत वसूल होत असे. तो जमा करणार होता. परंतु त्याला पुण्याहून माघारें बोलावणें गेलें तेव्हां तेथें थोडकेसे लोक ठेवून तो तेथून निघाला, नंतर अर्काटचा नवाबानें ते लोक तेथून काढून दिले.

फ्रांशीस लोक दक्षिणेंतून गेल्यावर सलाबतजंगाचा भाऊ निजामअल्ली तो पदवीस चढूं लागला; त्यास पेशवा अनुकूळ होता. याशिवाय निजामउलमुलुखाशीं आणि फ्रांशिसांशीं पहिलाच द्वेष असे, त्या निजामाचा हा पुत्र म्हणून इंग्रेज लोकही त्याची कृपा संपादन करावया कारणें इच्छीत होते. नंतर त्या निजाम अल्लीला समजलें कीं, सलाबतजंग बादशाह इंग्रेज व फ्रांशीस हे दोघे लढत असतां आपण हैदराबाद सोडून फ्रांशिसांचे कुमकेस चालिला. तेव्हां तो निजामल्ली आधीं औरंगाबाद घेऊन पुढें हैदराबादेस जाऊं लागला, तेसमयीं सलाबतजंग माघारा आपल्या ठिकाणीं आला. नंतर निजामअल्लीस प्रधानकी प्राप्त झाली, आणि सलाबतजंग आपलें पहिलें ठिकाण आदोणी तेथें गेला.

पुण्यामध्यें मुख्यत्वें कारभार सदाशिवराव भाऊ करित होता, त्याचा कारभारी रामचंद्रबाबा शेणवी तो पूर्वी चार पांच वर्षें मेला त्याचें द्रव्य पुष्कळ होतें, तें त्याणें आपल्या भावाजवळ दिलें असे; त्यांतलें तिसरा वांटा त्या भावानें धर्मकृत्यास लाविलें; आणि उरले जे दोन वांटे तो एक रामचंद्रबाबाचा पुत्रास दिला आणि एक आपण घेतला.

सदाशिवराव मोठा लोभी आणि उतावळा परंतु सावध व सुदृढ व स्वभावेंकरून अहंकारी आणि कांहींसा निर्दय असे, तथापि तो सुबुद्धी आणि स्वकीयांविषयीं सुशील होता. तो लोकांपासून पैका खाऊन कामें करी, हा एक त्यास मोठा दोष होता, कांकिं, सरकारचा जो चाकर त्याणें चांगलेंही काम करून मध्यें खाऊं नये. परंतु मराठ्यांमध्यें कारभाऱ्यानें चांगल्या कामांत पैका खाल्ला असतां, तो दोष मानित नाहींत, ही चाल सर्वथा

अनुचित

अनुचित. असें आहे कि, जो उत्तम कामें करून द्रव्य खाईल तो समयविशे-
षीं लोभेंकरून वाईट कामही करील.

रघुनाथराव हिंदुस्थानांतून आल्यावर तो व सदाशिवराव यांमध्यें युद्धसाहित्य व सेनाखर्चसंबंधें कांहीं भांडण लागलें. कांकिं, तो सरकार खजिन्यास कांहीं द्रव्य न आणितां कर्ज घेऊन माघारा आला. त्या कलहांत रघुनाथराव कोपेंकरून बोलिला कीं, एवढें चातुर्य तुह्मामध्यें असेल, तर दुसरे स्वारीस तुह्मींच जा. त्या दिवसापासून तो कलह वाढतां वाढतां त्या कुळांतही दोन फळ्या होऊन त्या गोष्टी लोकांत प्रसिद्धीस येऊं लागल्या. शेवटीं ज्यास पेशवा चाकरीस ठेवतेसमयीं हा माणूस योग्य नव्हे असें सदाशिवरावानें ह्मटलें होतें, तो मुजफरखान याचा कोणी शिपायी संगमावर सदाशिवराव भाऊ आपल्या कचेरीचा डेर्यांत बसला होता तेथें हळूच त्याचा जवळ जाऊन एकाएकीं खंजीर काढून मारूं लागला. तों त्याचा कोणी माणूस जवळ होता त्याचा हात धरून पलिकडे सरला, त्या योगें त्या सदाशिवरावाचें शरीर वांचलें कांहींसें पाठीसमात्र तें शस्त्र लागलें. तेव्हां तो मारेकरीयास मारहाण करून पुसतांच तो कबूल झाला कीं, मला मुजफरखानानें सांगीतलें. त्यावरून मुजफरखानास आणून विचारिलें, तेसमयीं तो किमपि नाकबूल न जातां हें मी केलें ह्मणाला. मग तो मारेकरी व तो मुजफरखान, या दोघांस तेथून बाहेर काढून मारिले. ते वेळेस कोणी एक परभू त्या मुजफरखानाचा चाकर होता त्याजकडेही या प्रकरणीं कांहीं अन्याय लागू झाला; त्यावरून त्याला किल्ल्यावर टाकिला. त्यापुढें त्याचें कांहीं वर्तमान प्रसिद्धीस नआलें, यांत कांहीं आश्चर्य नाहीं, कांकीं, मराठेलोक यांची पूर्वापर चाल अशीच आहे कीं, जो सरकारच्या अपराधी तो एकदां किल्ल्यावर टाकिला ह्मणजे पुनः त्याचें कांहीं वर्तमान दुसर्यांस कळत नाहीं.

मग पेशव्याचे दरबारीं असा नेम ठरला कीं, रघुनाथरावानें पुण्यांत राहून मुलखी कामें करावीं, आणि सदाशिवरावानें स्वारीस जावें. नंतर सदाशिवराव लश्कर सहित उत्तरेकडे जावयास सिद्ध झाला, तेसमयीं असें वर्तमान आलें कीं, पूर्वी सदाशिवरावानें कपटेंकरून आमेदनगर घ्यावयाची मसलत केली होती त्याप्रमाणें मोंगलांचा किल्लेदारानें लांच खाऊन तो जागा सदाशिवरावाचा कारकुनाचे स्वाधीन झाला. हें वर्तमान सलाबतजंग व निजामअल्ली यांस कळलें तेव्हां ते फार क्रुद्ध होऊन पेशव्याशीं युद्ध करावें असें मनावर घेते झाले, परंतु तेसमयीं त्याजपाशीं

युद्धा

युद्धाजोगा बंदोबस्त नीट नव्हता; तथापि तें नगर निजामशाही पादशाहींतली पुरातन राजधानी, आणि महत्प्रयासेंकरून आपल्या हातास आली. ती व्यर्थ गेली हा मोठा अपमान जाणून निश्चय केला कीं, हेच समयीं विलंब नकरितां युद्धास जावें. तेवेळेस जे लोक मिळाले ते लागलेच पुढें रवाना केले. त्याज बरोबर मोठया मोठया तोफाही चालत्या केल्या. ते लोक बेदरावरून धारूरास जाऊन पोंहचल्यावर मागून सलाबतजंग व निजाम अल्ली हे दोघे सात हजार फौज बरोबर घेऊन जात होते. ते समयीं सदाशिवराव याणें भीमातीरीं जाऊन बहादुरगड घेतला; इतक्यांत त्यास हे दोघे भाऊ थोडकें सैन्य बरोबर घेऊन जाताहेत असें वर्तमान कळलें तेव्हां त्याणें त्यांस नधूनच धरून न्यावयाकरितां आपली एक फौजेची टोळी पाठविली. तेवेळेस त्या दोघां भावांनीं मोठी त्वरा करून आपल्या थोरल्या फौजेंत जाऊन मिळावें तें नकरितां, उदगीर येथें ठाणें धरून राहिले. तेथें सदाशिवरावाचे बिनीवाले पुढें येऊन पोंहचले. त्यांशीं त्या दोघां भावांहीं लढाई करून आपली दारू व गोळी उगीच खरचली. ते बिनीवालेतर मागून सदाशिवराव येऊन पोंहचावा म्हणून कालक्रमणार्थ हलकें हलकें युद्ध करीत होते. मग सदाशिवराव येऊन पोंहचला त्याजबरोबर चाळीस हजार स्वार व +इभ्राहिमखान गार्दी नामें पलटणीचा सरदार. त्याजवळ पलटणी शिकविलेले लोक ५००० होते त्यांस गारदी म्हणत तो ही येऊन पोंहचला. त्यासमयीं ते दोघे भाऊ समजले कीं, आह्मीं ठाणें धरून राहिलों हें ठीक न झालें; मग निजाम अल्ली तह करावयास सिद्ध झाला परंतु सदाशिवराव ऐकेना. तेव्हां त्या दोघां भावांहीं मोठया निकरानें इभ्राहिमाचा पलटनांवर हल्ला केला आणि त्याचीं अकरा निशाणें घेतलीं ते समयीं ते पलटनी लोक फार नाश पावले आणि बहुतेक मेले गेले. तथापि त्या जयाचें फळ त्यांहीं फारवेळ न भोगिलें, कांकिं, इतकें होतें तों मराठयांची मोठी एक टोळी येऊन त्यांचे मोंगल सुमारें तीन हजार मारिले. इतकें झाल्यावर निजाम अल्लीनें आपलें अधिकाराचें मोर्तब सदाशिवरावास पाठविलें. त्यांत अर्थ असा किं, आतां तुमचा चित्तास येईल तें करावें; तेव्हां सदा-

---

\+ इभ्राहिमखान फरांशिसांचे हाताखालीं शिकलेला आणि मुजफिरखान याचा कोणि सोयरा होता. तो पूर्वी सलाबतजंग व निजाम अल्ली यांचें वांकडें पडलें त्यासमयीं निजाम अल्लीजवळ होता मग ते दोघे एक झाल्यावर निजाम अल्लीनें त्यास निरोप दिला, त्यासमयीं त्या इभ्राहिमखानाला सदाशिवरावानें आपल्या चाकरीस ठेविला.

शिवरावानें तह केला तो असा. किल्ला दौलताबाद, व शिवनेरी, व आशीरगड व विजापूर, इतके मराठ्यांकडे असावे. याशिवाय मराठ्यांही आमेदनगर जें घेतलें त्याविषयीं मोंगलांनीं वाद करूंच नये. याखेरीज विजापूर परगण्यांतील व बेदरचा कांहीं भाग, व औरंगाबाद शहरावांचून तो प्रांत, हरसोल व शीतारा रहित इतके मराठ्यांचा स्वाधीन असावें. याप्रमाणें तह होऊन जितका मुलुख मराठ्यांचे स्वाधीन झाला, तितक्याचें उत्पन्न वर्षास बासष्ट लक्ष रुपये होत असे, त्यांतून एकेचाळीस लक्ष रुपये पेशव्यानें आपल्या लष्करी सरदारास जहागीर करून त्याबद्दल चाकरी फौजेसहीत करावी असें कबूल करून घेतलें. त्याची अशी चाल होती कीं, आपणास मुलुख मिळाला असता त्यांतील कांहीं विभाग आपल्या सरदारांस असावा; यांत अर्थ इतका कीं, तो सरदार आपली चाकरी व मुलखाचा बंदोबस्त चांगला ठेवील आणि सावध असेल.

याप्रमाणें तह झाल्यावर दक्षिणेंत मुसलमानाचा विभाग होता, तो त्यांचा मुलखापासून बहुत दूर, आणि त्यास भोंवता मराठ्यांचा मुलुख त्यावरून असें दिसूं लागलें कीं, तो जागा किमपि विलंब न लागतां मराठ्यांचे हातीं जाईल. आणि तो सारा मुलुख एकत्र झाल्यानें पूर्वीं शेंकडो वर्षें दुसर्यांचे आज्ञेंत वागलेले जे ब्राह्मण लोक, ते स्वतंत्रपणें वागतील असाही अर्थ दिसूं लागला.

असें मराठ्यांचें प्राबल्य झाल्यानें प्रजेस सुख किंवा स्थैर्य न झालें कांकिं, जेथें जेथें त्यांची सत्ता होई तेथें तेथें लूट व जुलुम व नाश हीं तीनही व्हावयाचींच ते लोक धर्मेंकरून प्रजापालन करावयाचा अर्थ मनास आणीतच नसत; अशा अनर्थांत रैतेस सुख कोठून; परंतु जे लोक लष्कराशीं संबंध न ठेवितां शेतें करून आपल्या नीतीनें वागतात ते जें मिळेल तें खाऊन सुखी असतात; आणि ते आपआपल्यांत एकमेकाविषयीं प्रीतिमंत असून परस्परें विश्वास ठेवितात ते लोक आपल्याखेरीज दुसऱ्याशीं व्यवहार करूं लागले असतां दुसरे लोक त्यांचा रीती सारिखे न चालिले तरी त्यांस दूषण ठेवित नाहींत.

बाळाजी बाजीराव आपल्या पुतण्याचा उद्योगें करून इच्छेसारिखा जय पावला असतां हिंदुस्थानांतून पराजयसूचक कांहीं वर्तमान आलें तें पुढचे भागीं विदित होईल.

सन

सन सत्राशें साठां पासून
एकसष्ट पर्यंत आलेलीं वर्तमानें मिळून
भाग एकुणिसावा.

अनुक्रमणिका.

आफगाणाचा बादशाह आमेदशाह अबदाली याणें हिंदुस्थानांत येऊन दिल्ली व मथुरा शहर लुटलें.

रघुनाथराव याणें मुलतान व लाहोर पेशव्याचे सत्तेंत आणिलें तें प्रकरण.

राणोजी शिंदा याचा पुत्रांचें कांहीं वर्तमान.

दिल्लीचा बादशाह अलमगीर यास शाबुदिन वजीर याणें मारून टाकिला.

अबदाली बादशाह याणें मुलतान व लाहोर यांतून मराठयांस घालविलें आणि आपण दिल्लीकडे चालिला.

त्याणें मराठे सरदार यांचा पराभव केला; त्यावरून सदाशिवराव त्याच्या पारिपत्यास दक्षिणेहून निघाला.

तो पुढें जात असतां त्यास कित्येक सरदार येऊन मिळाले, त्या योगें त्याचें सैन्य फार वाढलें.

मग त्याणें निकडें जाऊन दिल्ली हस्तगत केली. आणि नवा बादशाह स्थापिला.

पानपता जवळची लढाई.

त्यांत मराठयांचा बहुत नाश झाला.

आफगाण लोकांचा क्रूरतेचें निरूपण.

बाळाजी बाजिराव पेशवा याचा मृत्यु.

त्याचा स्वभावाचें कथन.

भाग एकोणिसावा.

सन सत्राशें चोपन्नांत दिल्लीमध्यें शाबुदिन याणें कृत्रिमें करून दुसरा अलमगीर नामें नवा तक्ताधिपती केला; त्यास दिल्लींत ठेवून त्याचा पुत्र अल्लीगोर नामें होता त्यास बरोबर घेऊन, मुलतान व लाहोर यांजकडे गेला त्याचा मनांत होतें कीं, आफगाणाचा बादशाह आमेदशाह अबदाली याणें हे दोन्हीं प्रांत आमचे घेतले आहेत ते माघारे घ्यावे. ते अबदालीनें घेत-

ले ते समयीं तेथें दिल्लीचा बादशाहाचा ठेवणाईत, मीरमनु नामें होता त्याणें तर ते दोन्ही प्रांत पहिल्यानें रक्षिले; मग त्याचा उपाय चालेनासा झाला, तेंव्हां त्या आमेदशाह अबदालीचीच चाकरी स्वीकारून त्याकडून ते प्रांत आपणाकडेसच रक्षून त्याच ठिकाणीं राहिला. पुढें तो मेल्यावर त्याचा पुत्र लहान होता ह्मणून अबदालीनें ते प्रांत मीरमनूचे स्त्रीचे स्वाधीन ठेविले. मग तीचें स्वामित्व असतां, त्या प्रांतांची फार अव्यवस्था होऊन, तेथचे रैयत लोक निर्धन झाले. तेंव्हां त्यांतील कित्येकां लोकांहीं ते प्रांत टाकून दुर जाऊन, शीख लोकांचा मंडळींत मिळाले. त्यासमयीं त्या बाईला तीचाच कोणी एक सरदार याणें कैद करून तिणें आपणास निमें राज्य द्यावें असा करार झाल्यावर सोडिली; आणि त्याप्रमाणें केलें. हें वर्तमान शाबूदिनाला समजलें तेंव्हां तो तें राज्य घ्यावयास हा उत्तम समय आहे असें जाणून त्या प्रांताकडे चालिला. तो तेथें जाऊन पोंहचतांच त्याणें तेथें एक फितुरी माणूस याची मैत्री केली; अबदालीची स्वारी त्या मुलखीं प्रथम होण्याचें कारण तोच मनुष्य. त्याचें नाव आदीनाबेगो, त्याशीं स्नेह करून ती मीरमनूची स्त्री धरून दिल्लीस पाठविली; आणि तो आदीनाबेगो तेथचा सुभेदार केला.

हें वर्तमान त्या आमेदशाह अबदालीला कळतांच तो फार क्रुद्ध होऊन मोठें सैन्य बरोबर घेऊन निघाला. तो अटकनदी उतरून निर्भयपणें दिल्लीस पोंहचला, तेथें मुख्य वजीर मीरशाबूदिन याणें आपली गरीबाई दाखवून त्याचें बहुत आर्जव केलें, ह्मणून त्या आमेदशाहानें क्षमा केली. परंतु त्याणें तें शहर लुटून फार नाश केला, आणि मथुराशहराचीही तीच दशा केली अणखी आग्रें शहर याचीही तीच वाट झाली असती परंतु त्या आफगाणाचा लश्करांत असा रोग उत्पन्न झाला कीं, त्या अबदालीला तें वारें बदलायाकरितां आपल्या काबुलप्रांतीं जावें लागलें. तेसमयीं त्या आमेदशाह अबदाली बादशाहानें आपला पुत्र तिमोरशा त्याला मुलतान व लाहोर सहित पंजाब मुलखाचा अधिकारी आपला हस्तक करून पाठविला. आणि दिल्लीमध्यें कोणी मोठ्या योग्यतेस आलेला रोहिला नजीबअदावला नामें होता, त्यास मीरउलउमरा पद देऊन मीरबक्षाची जागा दिली होती तें शाबूदिनाचे मनास ठीक वाटलें नाहीं, याकरितां अबदाली गेल्यावर त्यास पदच्युत करून तें पद आपला कोणी इष्ट यास द्यावें अशी इछा शाबूदिनानें धरिली; परंतु अलमगीर बादशाह त्यास अनुकूळ होता, आणि दिल्ली शहर त्या दोघांचे स्वाधीन असे. ह्मणून शाबूदिनानें आपला अर्थ शेवटास न्यावयासाठीं असा निश्चय केला किं, आधीं दिल्ली शहर आपण घ्यावें.

इतकें

इतकें होतें तों रघुनाथराव सतलजाशीं छावणीचें सत्तावीस मासांत गेला. त्याशीं कांहीं बोलणें लावून त्यास आपून दिल्ली घेतली; आणि अलमगीरबादशाह यासही आपल्या स्वाधीन ठेविला. मग तो अबदालीचा देवणाईत नजीब आदवला त्यास होळकर याचा आश्रयानें जीवसंरक्षणाकरितां पळूनजावें लागलें.

यानंतर रघुनाथराव कित्येक दिवस दिल्लीजवळ डेरे देऊन राहिला होता. तों लाहोरीं आदीनाबेगानें आजेंत कांहीं अंतर करून तें लाहोर ठिकाण सोडून तेथून जवळचाच डोंगरीं जाऊन राहिला. तेथें राहून जांस पहिलें योगाभ्यासावांचून दुसरें कांहीं ठाऊक नव्हतें असे जे शीख लोक त्यांस युद्धकुशळ करून मग आपणास धरावयाकर्तां आले जे अबदालीचे लोक त्यांस मागें हटवून रघुनाथराव यास निरोप पाठविला कीं, यासमयीं तूं माझें साहाय्य कर आणि हा सारा मुलुख घे. त्यावरून तो संतोषानें तात्काळ तिकडे गेला मग अबदालीचे जे मुख्य होते ते सर्व जिंकून मोठा जयवंत होत्साता लाहोरांत शिरला, असें सन सत्रागें अठ्ठावन्नांत झालें, त्या काळीं रघुनाथराव त्या आदीनाबेगास मुलतान व लाहोरच्या सरसुभेदार करून त्याचा पुष्टीकरणार्थ कित्येक मराठे लोक ठेवून आपण तेथून निघोन पुण्यास आला. त्याणें हिंदुस्थान सोडिल्याचे पूर्वीं दिल्लीजवळ जनकोजी नामें जयापाशिंद्याचा पुत्र त्याजपाशीं कित्येक लश्कर समयविशेषीं लाहोरच्या लोकांस कुमक करावयास, व रजपुतांपासून खंडणी घ्यावयास ठेविलें. माळव्याचा बंदोबस्तास मल्हारराव होळकर व दत्तोजी शिंदा यांस ठेविले. तो रघुनाथराव सर्वत्रजय पावोन त्याणें आपणास व मराठ्यांस मोठी योग्यता संपादिली; परंतु त्याजवळ ऐवज किमपि नव्हता; ऐशीं लाख रुपये कर्ज होतें, त्यावरून त्याशीं आणि सदाशिवरावाशीं भांडण लागलें.

यानंतर जोतपुरचा राजा आभीशिंग मेला तेव्हां त्याचे दोघे पुत्र रामशिंग व बेजीशिंग हे दोघे तख्तासाठीं भांडूं लागले. तेव्हां रामशिंगानें पेशवा सहाय केला, त्याणें राणोजी शिंदा+ जो पूर्वीं बाजिरावाचे वेळेस मोठा विख्यात झाला होता त्याचा पुत्र जयापाशिंदा त्यास आज्ञा केली कीं, रामशिंगाची पुष्टी करून कलह तोडावा. मग त्या शिंद्याचा आश्रयानें तो रामशिंग असें करिता झाला कीं, नागोर किल्ल्यांत आपला भाऊ असतां त्या

+ राणोजी शिंदा शाहू महाराज मेल्यावर पुढें थोडक्या अवकाशानें मेला त्याचे तीन पुत्र एक जयापा एक दत्ताजी एक जोतिबा हे तिघे आणि दोघे दासीपुत्र एक तुकोजी एक महादाजी तुकोजी तो असतांच मेला होता.

किल्ल्यास

किल्ल्यास घेरा घातला. तेसमयीं त्या बेजीशिंगानें आपला बाप आभीशिंग याणें पिलाजी गाइकवाड जसा घातानें मारिला, तसाच आपला भाऊ रामशिंग मारेकरी घालून मारविला. त्यावर अथापाचें लश्कर मागें हटलें. परंतु पुढें रघुनाथरावानें अजमीर घेऊन आंतपुरची खंडणी ठरविली.

रघुनाथरावानें हिंदुस्थान सोडिलें तेसमयीं तेथें दत्ताजी व मल्हारजी शिंदे ठेविले; त्यांस शाबुद्दिनानें रोहिले जिंकावयास योजिले त्यानां प्रथम नजीबअदवला जिंकावा लागला. तो आपणावर एवढें मोठें सैन्य आलेसें पाहूनआपल्या रोहिल्यांसहित गंगेच्या कांठीं ठाणें धरून राहिला; आणि अयोध्येचा नवाब सुजाउदवला यास आपल्ये कुमकेस बोलाविला. तो व रोहिले यांचें पुरातन वैमनस्य होतें. परंतु मराठ्यांचें प्राबल्य त्या उभयपक्षीं समान बाधक असें समजून त्याणें त्यास सहाय मागीतलें. तो त्यास मान्य होऊन, समीप आल्यावर दत्ताजी शिंद्यानें बुदेलखंडचे सुभेदार पेशव्यांचे ठेवणाईत गोविंदपंत बुंदेले, यांस सांगीतलें कीं, रोहिल्यांचे मुलखीं जाऊन त्या मुलखाचा अगदीं नाश करावा. त्यावरून तो त्या मुलखीं जाऊन तात्काळ त्याणें गंगेच्या पूर्वेकडचे त्यांचे मुलख व दुवाबनामें एक त्यांचा मुलुख होता तो ही लुटून उद्वस्त केला. तेवेळेस तेथचा मुख्याला तेथून जाऊन कमाऊ नामें डोंगर आहे तो आश्रय करावा लागला. परंतु त्यासमयीं सुजाउदवला याणें गोविंदपंताचें लश्कर जवळ नेटलें असें पाहून आपल्या लश्करची गोसावी लोकांची मोठी टोळी पाठवून त्याचा अगदीं मोड केला. आणि त्यास गंगेचे पार घालविला.

त्यावेळेस दत्ताजीला असें वर्तमान समजलें कीं, आमेदशाह अबदाली तो मोठें सैन्य घेऊन मुलतान व लाहोर गाघारें घ्यावयास येतो; त्यावरून त्याणें त्या रोहिल्यांशीं तह केला, आणि आपण लाहोरचे मराठे यांचे पुष्टीकरणार्थ निघाला.

असें रोहिले व मराठे व अयोध्येचा नवाब यांचें वर्तमान असतां, दिल्लीमध्यें शाबुद्दिन याणें अलमगीर बादशाह व आपला सोयरा इंतिजाम आदवला व हल्लीं दिल्लीवर येतो आहे जो आमेदशाह अबदाली, हे तिघे एकमत्त आहेत असें लोकांस विदित करून तो बादशाह व आपला सोयरा या दोघांस मारून टाकिले; आणि त्या बादशाहाचे जागीं ओरंगजेबाचा कनिष्ठ पुत्राचा पुत्र त्याचें शहाजहान असें नांव ठेवून तो तक्ताधिपती केला. एवढें दुष्कर्म करून मग मराठे व अबदाली यांचा युद्धांत कोण जय पावेल तें पहावयाकरितां जाटांचा राजा सुरजमल्ल यास तो शरण

रण गेला आणि त्याचा आश्रयानें राहिला.

तिकडे लाहोरामध्यें रघुनाथरावाचे मराठे लोक होते. त्यांस होळकर व दत्ताजी शिंदा यांची कुमक येऊन पोंचल्याचे अगोधरच त्या आमेदशाह अबदालीनें त्यांचा पराभव करून हटविले आणि आपल्या लष्कराची बिनी त्यांचे पाठीस लाविली होती; मग दत्ताजी शिंदे व मल्हारराव होळकर आपल्या मराठ्यांचा कुमकेस येऊन पोंहले आणि तेथें सुमार पाहुं लागले, तों आपली दोघांची फौज तीस हजार आणि ते अबदालीचे बिनीवाले पाठीस लागून आले जे तेंच मुख्य लष्कर; असें समजून मागें हटले. ते यमुनेचा पश्चिमकांठीं चालतानां त्यांचें लक्ष आपल्यासमूरचा बिनीवाल्याकडेसच असतां दिल्लीजवळ आमेदशाह अबदाली याणें यमुना उतरून एकाएकी दत्ताजी शिंद्याचा लष्करावर पडोन त्या सैन्याचे दोन भाग मारून टाकिले; बाकी एक भाग उरला. त्या युद्धांत दत्ताजी शिंदा व त्याचा भाऊ जोतिबा हे दोघे मारले गेले.

असें ऐकतांच होळकर आपल्या सेनेसहित लवकर लवकर मागें हटूं लागला तो यमुनेचा पूर्वेकडे शिरवंद शहर तेथें पोंहचल्यावर तें स्थळ निर्बाध असें समजला; तथापि त्या ठिकाणींही आफगाणाची एक टोळी आपलें मोठें सैन्य सोडून त्याचे पाठीस लागत फार लांबून आली ती एकाएकी त्यावर पडली. आणि त्याचा बहुत नाश केला.

मागल्या भागीं लिहिलें की, पेशव्यास पराजयसूचक कांहीं वर्तमान समजलें तें पुढचे भागीं लिहिलें जाईल, तो प्रकार हा. हें वर्तमान पेशवा हैदराबादसंबंधें मोठा लाभ मिळवून संतोषें करून सदाशिवरावासहित मांजरा नदीतीरीं डेरा देऊन राहिला होता. तेथें त्यास समजलें. तेव्हां सदाशिवराव नुकता बहुत जय पावला त्यामुळें तो अत्यंत हृष्ट आणि सगर्व ऐसा होत्साता बोलिला कीं. मी व विश्वासराव यांस हे समर्थी हिंदुस्थानांत नेमले असतां आम्ही गेलेलें स्वरूप पुनः मिळवून आफगाण लोकांस अटकेचे पार घालवून देवूं. असें म्हणतांच पेशव्यानें त्यांस आज्ञा दिली तेव्हां सैन्य तयार होऊं लागलें. ते समर्थी लोकांस असें वाटलें कीं, हे मोठा जय मिळवितील; परंतु असें न समजलें कीं. हा एवढा मोठा सैनिक होऊन चालिला, याचे युद्धकौशल्य किमपि नाहीं. अनायासें सिद्ध जो जय नितक्यानेंच तो गर्वास चढला; त्या सदाशिवरावास एकाएकी महत्पदवी प्राप्त होऊन यश आलें, जर लहान कार्यें करून त्याचा पराजय झाला असता तर तो पुढें सावधपणानें वागता. तस्मात् महत्पदारूढ जो मनुष्य त्याचें जें अज्ञान तें त्याची सेना व राज्य यांस परम अपायकारक झाल्यावांचून नष्ट होत नाहीं.

सदाशिवराव व विश्वासराव यांज बराबर हिंदुस्थानांत सरदार व फौज गेली ती प्रकार असा. निवडक घोडेस्वार मराठे वीस हजार. व कवाईत शिकविलेले पायदळ गार्दी लोक, इब्राहिमखान गार्दी याचे व नौकरखान्याचे लोक मिळून दहा हजार. याखेरीज ते चंबळानदीचे कांठीं पोंहचले नाहींत तों, बाळाजी बाजिरावाचे आज्ञेनें मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदा व दमाजी गाइकवाड व यशवंतराव पवार व आपाजिराव आटवले व अंताजी माणकेश्वर व गोविंदपंत बुंदेले व गैरे सरदार आपआपली सेना घेऊन त्यांस मिळाले. याशिवाय बहुतेक रजपूत राजानीं आपआपल्या स्वारांची एक एक टोळी पाठविली. याखेरीज पेंढारी पुष्कळ होते.

सदाशिवरावाबरोबरचे जे सरदार होते त्यांत बळवंतराव गणपत मेहेंदळे व समशेर बहादूर व नारोशंकर व विठ्ठल शिवदेव विंचुरकर व त्रिंबक सदाशिव पुरंदरे व कित्येक मराठे कुळांतील श्रेष्ठ लोक होते; आणि होळकराचा स्नेहास्तव. जाटांचा राजा सूरजमल्ल तो तीस हजार सैन्यासहित येऊन मिळाला. तेसमयीं भाऊचा लष्करचा सरंजाम असा थाटाचा केला होता कीं, जसा पूर्वी औरंगजेबानें केला त्या प्रमाणें कांहींसा असे; त्यापूर्वी मराठे तसा सरंजाम कधीं घेत नव्हते कामापुरता मात्र घेत. तें लष्कर पुढें चालतें झालें असतां, युद्धाविषयीं परम कुशळ असा सूरजमल्ल याणें जाणलें कीं, भाऊचे स्वाधीन मोठमोठ्या तोफा फार व पायदळ बहुत आणि बुणगेंही पुष्कळ, यामुळें स्वारांस त्यांबरोबर रहावें लागेल आणि युद्धांत त्यांस अडचण पडेल म्हणून त्याणें अशी मसलत केली कीं, मोठ्या मोठ्या तोफा व बुणगें एखाद्या किल्ल्याच्या आश्रयानें ठेवावें, आणि आपले व भाऊचे स्वार मिळून पुढें जाऊन त्या अबदालीचा लष्कराचा आसमंतात उपद्रव करून त्याचा धान्यादि बेगमी साहित्याचा नाश करावा; तेणेंकरून तो आपल्या आपणाच मागें हटेल. या मसलतीस होळकरही मिळाला होता, परंतु सदाशिवरावाचा स्नेही रामचंद्रबाबा शेणवी त्याचें व होळकर यांचें वैमनस्य होतें म्हणून त्या होळकराची सदाशिवरावावर प्रीति नव्हती, यास्तव त्या होळकराची मसलत सदाशिवरावास आवडेना; आणि जाटाचें व होळकराचें इख्लास होतें, त्यावरून त्या सुरजमल्ला विषयींही भाऊचा मनांतून कांहींशी अप्रीति झाली. अणखी त्याणें कवाईत शिकविलेले पलटणी लोक फ्रांशीस लोक यांस बहुत उपयोगी पडलेले पाहिले होते, या सर्व कारणानीं कट्टास पेटून, होळकर आणि जाट यांची अत्यंत हितावह अशीजी मसलत ती न घेतां. स्वबुद्धीनें वागूं लागला. मग तो त्या लष्करासहित पुढें जाऊन प्रथम तोफांचे मोर्चे लावून दिल्ली घेतली. नंतर पुढें जावें परंतु यमुनेला पाणी ब-

हुत

हुत आलें होतें तेणेंकरून पलिकडे आवयाची सोय नाहींशी झाली म्हणून तेथेंच डेरे देऊन राहिला. त्यावेळेस त्याचा मनांत आलें कीं, विश्वासराव यास दिल्लीचा बादशाह करून सुजाउदवला यास त्याची वजिरी द्यावी परंतु त्या समयीं तें काम कांहीं निमित्तेंकरून राहिलें.

यानंतर त्या भाऊसाहेबाचें लष्कर बेसुमार, व बुणगेंही पुष्कळ यामुळें थोडक्याच दिवसांनीं दिल्लीचा आसमंतात धान्यादिकांचा तोटा पडूं लागला. आणि भाऊपाशीं द्रव्याचा तोटा पडेल असा सुमार झाला त्याणें आपल्याबरोबर दक्षिणेंतून येते समयीं दोन कोटि रुपये आणिले होते. याशिवाय होळकर व शिंदे व गोविंदपंत व रजपूत यांजवळ तीन कोटि रुपये होते. तथापि भाऊस वाटलें कीं, खर्चास तोटा पडेल; याकरितां त्याचा मनांत आलें कीं,- बादशाह याचा दिवाणखान्यांत सोन्या रुप्याची शोभा केली आहे ती मोडून द्रव्य करावें; त्यावरून होळकर व सुरजमल्ल यांस फार वाईट वाटून, त्याहीं आग्रहानें विनंती केली कीं, हें आचरण केवळ अयोग्य, आणि नाशकारक होय, असें बहुत प्रकारें सांगितलें तरी तो ऐकेना, मग त्याणें ती सर्वशोभा नष्ट करून त्यास फार लाभ न झाला, अवघे सत्रा लक्ष रुपये उत्पन्न झाले. त्या भाऊचा अशा दुष्टाचरणानें तो सुरजमल्ल आपलें लष्कर घेऊन तेथून निघून चालिला; त्यानंतर त्या लष्करचे रजपूत लोक यांचे मोंगलांचा लष्करांत कोणी स्नेही होते, तेही त्यांचा बोलण्यावरून तें लष्कर सोडून निघोन गेले.

इतक्यांत आमेदशाह अबदाली लष्कर सुद्धां गंगेचे कांठीं येऊन, अनूपशहरसमोर डेरे देऊन उतरला. तो तेथें असतां त्याणें सुजाउदवला आपणाकडे करून घेतला.

मग पर्जन्यकाळ कांहींसा शांत झाल्यावर त्या सदाशिवरावानें अलम्गीरनामें दिल्लीचा बादशाह तो ते समयीं तेथें नसतां त्याचा पुत्र मीरजवानखान यास तक्ताधिपती करून सुजाउदवला+ याचा वजीर असें लोकांस विदित केलें. त्यानंतर नारोशंकरास दिल्लीचा किल्ल्यांत ठेवून आपण लष्करासहित गंजपुरानामें कोणी एक कोट आहे त्यामध्यें पुष्कळ शिपाई लोक व सामान यथास्थित होतें, तेथें जाऊन तोफा लावून तो कोट पाडून तें स्थान घेतलें. इतक्यांत आमेदशाह त्या ठिकाणचा लोकांचे पुष्टीकरणार्थ फार उ-

---

\+ सुजाउदवला तेवेळेस आमेदशाह अबदाली याचा पक्षपाती झाला असतांही, तो त्या युद्धांत पहिल्यापासून तहाचें द्वार आला होता म्हणून त्याची प्रीती संपादन करावयासाठीं सदाशिवराव उद्योग करीत असे.

त्सुक

मुक झाला, परंतु यमुनेस उतार नव्हता तथापि तो लश्करसहित यमुनेच्या कांठाजवळ जाऊन राहिला. तेथें तह करावयाचें निमित्त करून भाऊला बहुत भुलथापा दिल्या, नंतर दिल्लीपासून दहा कोसांवर एक यमुनेंत उतार शोधून काढिला. आणि आपलें लश्कर बहुतेक यमुनेच्या पार उतरून लाविलें. त्या समयीं कोणी तें वर्तमान भाऊस कळविलें. परंतु त्याचें लश्कर बहुतेक उतरून येई तोंपर्यंत भाऊ सत्य मानीना; शेवटीं सन सत्राशें साठांचा महिना दहावा अकटोबर याचे पंचविसाव्ये तारिखेस ते सर्व मुसलमान लोक यमुनेच्या अलिकडे आले.

मग दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्या दोहीं लश्करांच्या विनीवाल्यांचा मोठा युद्धप्रसंग झाला. त्यांत दोघेही आपआपला जय झाला असें म्हणत होते, परंतु ते दोन्ही पक्ष समानच असत; ते समयीं मराठ्यांच्या लश्करांत मसलत झाली कीं, उद्यां मुसलमान लोकांवर एकाएकी हल्ला करावा परंतु होळकर म्हणे कीं, हें ठीक नव्हे, प्रथम त्यांस अनेकप्रकारें उपद्रव करून त्यांस धान्यादिकांचा तोटा पाडावा, या मसलतीस तात्काळ इभ्राहिमखान गारदी अमान्य होऊन बोलिला कीं, ही तुमची मसलत माझें पायदळ व तोफा शत्रूचे हातीं शीघ्र सांपडावयास कारण होईल, अशीच आहे, यास्तव जो कोणि या मसलतीस मान्य होईल त्याजवर मी तोफांचा भडमार करीन. असें त्या इभ्राहिमखानाचें बोलणें होतांच तो व होळकर यांचें वितुष्ट मोठें पडलें. तें महत्प्रयासें मिटविलें. तोंपर्यंत मराठ्यांचें लश्कर मागें हटत हटत पानपतपर्यंत गेलें. तेथें इभ्राहिमखानाचे मसलतीनें सदाशिवराव भाऊ याणें आपल्या लश्करास भोंवता खंदक पाडिला. तो खोल आठ हात, आणि रुंद तेहतीस हात. याप्रमाणें केला. तेवेळेस आमेदशाह अबदालीही त्या लश्कराच्या जवळ येऊन उतरला त्याणें आपल्या लश्करास भोंवता आश्रय मोठीं मोठीं झाडें पाडून आंत शत्रूचा प्रवेश न व्हावा अशी अडचण केली.

ते समयीं मुसलमानाचें सैन्य एकेचाळीस हजार आठशें स्वार व पायदळ अठ्ठतीस हजार इतकें निवडक सैन्य होतें; याखेरीज स्वतंत्र शिपाई लोक जे त्याचा पक्षाचे तेही त्या निवडकां खालोखाल होते, त्याशिवाय तोफा सत्त्याहात्तर होत्या.

मराठ्यांकडे पंचावन्न हजार स्वार व पंधरा हजार पायदळ आणि दोनशें तोफा, याखेरीज पेंढारी, व बुणगे मिळोन दोन लक्ष सुमारानें असतील.

याप्रमाणें दोन्हीं लष्करें बंदोबस्तानें ठाणें धरून राहिल्यानंतर गोविंदपंत बुंदेला यास मोंगलांच्या धान्यादिक सामग्रीचा नाश करावयाकरितां सदाशिवरावानें पाठविला; तो तेथें जाऊन एका आम्राईंत आपण हजार लोकांसहित गुप्त राहून बाकीच्या लोकांकडून तें धान्यादिसाहित्य लुटावयाचें काम बहुत युक्तीनें करवीत असतां, कोणी एक आमदशाह अबदालीचा सरदार येऊन एकाएकी त्यावर पडोन उभयतांची मोठी तोडातोडी होऊन गोविंदपंताचें डोकें तोडून आमदशाह अबदालीकडे पाठविलें. मराठ्यांचा ते वेळेस इतकाच नाश झाला असें नाहीं, त्या गोविंदपंताचा मरणानंतर कित्येक स्वार आम्हांसी एकेक रुपयांची थैली घेऊन, दिल्लीहून आपल्या मराठ्यांचा लष्करांत येत होते; ते रात्रीस वाट चुकोन आफगाण लोकांचा लष्करांत गेले; ते त्या लोकांमधें शिरतांच त्यांणीं त्यांस मारून तें द्रव्य घेतलें. ज्यासमयीं गोविंदपंत बुंदेला मारला गेला, त्यापूर्वी मराठे व मुसलमान यांचा तह होईलसा दिसत होता, कांकि, त्या दोहीं लष्करचे सरदार येऊन एकामेकास भेटत होते; मग तो मेल्यानंतर युद्धाखेरीज उभयपक्षीं दुसरा उपाय नाहींसा झाला. मग तें युद्ध सन सत्राशें साठांचा महिना अकराव्यानंबर याचे एकोणतिसाव्ये तारिखेस सुरू झालें. तो प्रकार असा, मराठे लोक पंधरा हजार सुमारें मोठ्या धैर्येंकरून अबदालीचा लष्कराचे डाव्ये बाजूस जेथें आमदशाह अबदालीचा वजीर ठाणें धरून राहिला होता, त्यावर पडून आपल्या मोठ्या मारा पुढें त्यास उभें राहावेनासें केलें; त्यांत त्या अबदालीचे लोक आफगाण दोन हजारांवर मेले गेले, यानंतर त्या वजिरास अबदालीची कुमक चहुंकडून आली तेसमयीं मराठ्यांस मागें हटावें लागलें. ते वेळस त्यांचेही हजार सुमारें लोक मेले गेले. त्या लढाईंत मुख्यत्वें होळकर होता. त्या दिवसापासून रोज रोज शिपाई व सरदार यांत ज्याचा मनास येईल, तो इकडून व तिकडून कोणी बाहेर येऊन लढत; असें नित्यशः डिसेंबराचे तेविसाव्ये तारिखेपर्यंत होत गेलें. मग एके दिवशीं त्या अबदालीचा वजीर शाववलीखान तो आपल्या बरोबर स्वारांची टोळी घेऊन तेथून निघोन जवळ एक मशीद होती तेथें जात असतां, त्यास पाहून सदाशिवराव व बळवंतराव मेहेंदळे व विश्वासराव व होळकर वगैरे लष्करसहित कित्येक सरदार त्यावर जाऊन पडावयास त्यासभोंवता घेरा घातला. तें पाहून त्याचे कुमकेस अबदालीकडचे लोक, व नजीब अदवला व दुसरेही कित्येक सरदार त्यांवर जाऊन पडले. तेव्हां त्या उभयतांचें युद्ध मोठ्या निकराचें झालें. त्यांत नजीब अदवला त्यासमयीं आपल्या लोकांपेक्षा फार पुढें हो-

ऊन लढत होता; तेव्हां बळवंतराव मेहेंदळा त्यावर मोठ्या त्वरेनें जाऊन पडला. ते समयीं त्याजवळचे तीन हजार रोहिले मारिले गेले; आणि तोही मराठ्यांचे हातीं लागता लागतां, त्यास गोळी लागून तो मेहेंदळा मृत्यु पावला. तेव्हां सदाशिव रावास ती मोठी हानी वाटली त्या योगें तो फार कष्टी होऊन युद्ध न करितां, तें प्रेत माघारें छावणीस नेलें तेव्हां नजीबअदवला यास मागें सरावयाची संधी सांपडली तेवेळेस युद्ध तसेंच राहिलें; नंतर नित्य नित्य उभयपक्षीं टोळ्यां टोळ्यांचीं युद्धें होत. असें असतां रोहिले लोक व सुजाउदवला हे सर्व मिळून एकदांच उठून मोठें युद्ध व्हावें ह्मणून, बादशाहाजवळ फार आग्रह करीत होते; परंतु तो बादशाह फार शहाणा आणि सावध होता. त्याणें आपल्या लश्करांत धान्य पुरें नाहीं तथापि मराठ्यांपेक्षां अधिक आहे असें असून, आपले लोक युद्धाविषयीं अस्थिर, यावरून मराठे तर फारच उतावळे असें समजून, तो युद्धाविषयीं दिरंग लाविता झाला. त्याची कल्पना ठीक होती कीं, मराठे यांजकडील धान्यादि साहित्य अगदीं खर्चून पुढें उपाशीं मरणार आहेत असें असतां कोणे एके रात्री त्यांचा लश्करांतील बुणग्याची टोळी आपल्या बायका मुलांस अन्न नाहीं याकरितां धैर्य करून खंदकांतून पलिकडे उतरले; नंतर पुढें जाऊन धान्याचा शोध करीत असतां आफगाण लोकांनी येऊन त्यांस भोंवता वेढा घालून ते सर्व मारून टाकिले. त्यावर सर्व म- मराठे लोक आपल्या सरदारांस बोलूं लागले कीं, आतां आह्मीं एथें उपाशीं मरावें हें ठीक नाहीं; आह्मास ह्या युद्धांत मरूं द्या. असें त्यांचें बोलणें ऐकून सरदारानीं भाऊला सांगीतलें; तेव्हां त्याणेंही तें मान्य केलें आणि सांगीतलें कीं, उद्यां लढाई करावी. अशी आज्ञा देऊन ते दिवशीं रात्रीस सरकार कोठींत जितका धान्यसंग्रह होता तितका सर्वत्रांस वांटून दिला कांकीं, इतके दिवस धान्याचा तोटा होता आतां आज रात्री सर्वांनीं स्वस्थ भोजन करून युद्धास सिद्ध व्हावें. मग दुसरे दिवशीं उजेडावयाचे पूर्वीं दोन घटिका रात्रीस सन सत्राशें एकसटांचा पहिला महिना जानेवारी त्याचे साहाव्ये तारिखेस सर्व लश्कर सिद्ध होऊन आपले छावणीपासून डावे बाजूनें निघालें. तें असें पुढें तोफा व जेजाला व उंटावरचे जंबुरे व बाणदार असें चालतें करून त्याबरोबरच इभ्राहिमखान गारदी व त्याचीं पलटनें, त्यामागून दमाजी गाइकवाडाचे स्वार चालिले, त्यामागून वरकड जे मराठे सरदार यांचे स्वार अशा बंदोबस्तानें ते अबदालीचा लश्करावर जाते वेळेस मराठे असे दिसत होते कीं, ते लोक केवळ मरणाचाच निश्चय करून जाताहेत; आपण जय पावों ही गोष्ट त्यांचा मनांत आहे असें त्यांचें चिन्ह दिसत नव्हतें, कांकिं, त्यांचीं पागोटीं पदर सुटलेलीं, आणि तोंडास व हातास हळद लाविलेले असे होते. ते त्यांवर चालून जात असतां तिकडे

कडे अबदालीचा लश्करांत वर्तमान कळलें तेसमयीं बादशाह तो शोध घ्यावयास घोड्यावर बसून आपला तळ सोडून अर्धा कोस पुढें जाऊन पाहिलें. तंव त्याचा मनांत आलें कीं, मराठी लश्कर फार बंदोबस्तानें तळ सोडून निघालें तसेंच उभें एथें आहे. असें पाहिलें. त्यांत तोफामात्र पुढें समूर केल्या होत्या; आणि जनकोजी शिंदा तो लश्करचे उजवे बाजूवर होता. आणि इभ्राहिम गार्दी तो डावे बाजूवर होता. मग इकडे अबदालीचें लश्कर तयार आलें त्याचा बंदोबस्त असा; त्यांनीही तोफा समूर लाविल्या. आणि त्याचा लश्कराचे उजवे बाजूस आमदखान बंगष, व रोहिले, व कित्येक मोठे मोठे सरदार होते; मध्यभागीं शाहवलीखान वजीर. व डावे बाजूस आफगाण लोक, व सुजाउदवला, व नजीबअदवला; या सर्वांचे डावे बाजूस एक आफगाणाची निवडक टोळी होती, तिचा सरदार शाहपसंद खान नामें होता. याप्रकारें लश्करी उभयपक्षीं बंदोबस्त असतां प्रथम परस्परें दोहींकडून तोफा चालू झाल्या. इतक्यांत तीं दोन्हीं लश्करें एकामेकांवर चालून येऊं लागले. ते उभयपक्षीं लोक तोफा टाकून पुढें सरले असतां मराठ्यांनीं एकाएकी मोठा हरहर असा शब्द केला; ज्याची ध्वनी आकाशांत भरली. तेव्हां इभ्राहिमखान गार्दी दमाजी गाइकवाडासहित आपल्या समूरचा रोहिल्यांवर धैर्यानें चालून गेला; तेवेळेस तो आपल्या डाव्या बाजूनें शत्रूचे लोक येतात असें पाहून, त्यांकडे दोन पलटणें यांचा रोख दाखवून आपण पुढें सरला; तो रोहिल्यांवर पडून त्यानें आठ हजार रोहिले मारून टाकिले, परंतु त्याचेही अर्धे अधीक लोक मारिले गेले; आणि त्या इभ्राहिमखानासही जखमा लागल्या. परंतु जय पावला. मध्यभागीं सदाशिवरावानें आपल्या समूर मुसलमानाचा लश्कराचे मध्यभागीं शानवाजखान होता त्यावर मोठ्या वेगानें चाल केली. तेसमयीं त्या शानवाजखानाचे जवळ दहा हजार स्वार होते त्यांणीं त्या सदाशिवरावावर चालून जावें तें नकरितां ते आपल्या ठिकाणींच उभे राहिले; तेणेंकरून ते स्वार व त्यांतील पायदळ याचा अगदीं मोड करून मराठे त्यांतून पार गेले त्यात मराठ्यांचेही स्वार दोहीं लश्करी लोकांचे धक्काधक्कीनें कित्येक पडले तेसमयीं स्वकीय किंवा परकीय असें त्या उभयपक्षीं लोकांस समजेना. आणि जी धूळ उडाली तेणेंकरून कांहीं त्या गर्दींत दिसेना; तेव्हां मराठे व मुसलमान हातघाई करून संपूर्ण एकत्र होऊन आपआपल्यांसच मारूं लागले; तेसमयीं कोणी कोणास वळखिना असें झालें. तेव्हां त्यांतील शब्दखूण अशी कीं, मराठ्यांकडील हरहर आणि मुसलमानाकडील दीन दीन असा शब्द होई तेणेंकरून मात्र वळखून मारीत; तव्हां कोणाचें

तोंड कोणास दिसेना. शेवटीं त्या गर्दींत आफगाण लोक कांहींसे मागें हटूं लागले तें पाहून शाहूवलीखान आंगांत चिलखत चढविलेला होता तसाच घोड्यावरून उडी टाकून मोठी हारोळी देऊन बोलिला कीं, हे मित्रहो तुह्मीं पळता कोठे, तुमचा मुलुख एथून जवळ आहे किं काय. असें बोलून ते लोक आपले बरोबर घेऊन तेसमयीं त्याणें आपल्या जिवाचें संरक्षण केलें. याप्रमाणें मुसलमान लोकांचे लश्करचा मध्यभागची व उजवे बाजूची अवस्था झाली परंतु त्याची डावी बाजू हाल्ली नव्हती; त्यांतील सरदार शापसंदखान याणें चालून येते वेळेस असें पाहिलें कीं, कदाचित् मोड झाल्यास पाठिमागें येणें जालें तर कांहीं आश्रयाकरितां जागोजागीं चर खणून मातीचा वर्वंड्या करून भिंतीसारिखे आश्रय जागोजागीं करून ठेविले होते, असें असतां बादशाहास लश्करची खबर दोनप्रहरीं कळली, तेव्हां त्याणें आपले खासगीचा शिपायांतून निवडक जे होते त्यांस लश्करचे छावणीचे जागीं पाठवून, त्यांस सांगीतलें कीं, जे कोणी पळून जाऊन छावणीचे जागीं उभे असतील त्यांस हांकून युद्धास पाठवावे; आणि उजवे बाजूचे लोकांस पुष्टीकरणार्थ कित्येक लोक पाठविले, आणि शाह नवाजखानास निरोप पाठविला कीं, दहा हजार स्वारांची एकेक टोळी करून मोठ्या वेगानें मराठ्यांचे लश्कराचा मध्यभागावर हल्ला करावा. अशी आज्ञा झाली तेसमयीं त्याणें तसेंच केलें; आणि त्याचे बरोबर शापसंदखान व नजीबअदवला याणींही हल्ला केला, तो वेग मराठ्यांहीं बहुतवेळ सोसून, आफगाण लोकास कित्येक वेळा मागें हटविले. शेवटीं हानघाईचे वेळेस ते आफगाण लोक शरीरानें पुष्ट आणि सुदृढ असे जे त्यांपुढें मराठ्यांचा उपाय चालेना; तथापि त्यादिवशीं मल्हारराव होळकरास खेरीज करून मराठे सरदार आपआपल्या सामर्थ्यानुरूप लढले. आणि मल्हारराव आपल्या शक्तीप्रमाणें न लढला ह्मणून कोण कोणाचा मनांत आलें हा होळकर कांहीं कृत्रिमी आहे.

याननर अडीज प्रहर दिवस सुमारें विश्वासराव यास असाध्य जखम लागली. तें पाहून सदाशिवराव भाऊ आपल्या हत्तीवरून खालीं उतरून होळकरास निरोप पाठविला कीं, मीं तुह्मास पहिलें जें सांगीतलें होतें तें आतां करावें; याप्रमाणें सांगणें गेल्यावर मग तो भाउसाहेब आपल्या घोड्यावर बसून युद्धाचा गर्दींत शिरला. तेव्हां लोकांस दिसेनासा झाला. त्याचा निरोप होळकरास पोंहचला, तेव्हां तो रणभूमी सोडून निघाला, त्याजबरोबर दमाजी गाइकवाडही निघाला. तेवेळेस मराठे लोक युद्ध करणें टाकून आपल्या जीवाचा रक्षणासाठीं पळूं लागले तेव्हां हजारों शिपाई तरवारानीं तोडले

गेले

गेले, व कित्येक छावणीकडे पळाले. त्यांस गर्दीमुळें त्या ठिकाणांत जावयाची वाट सांपडेना; तेव्हां त्या खंदकांत एकमेकावर पडून दडपून मेले गेले; त्या स्थानाजवळ पानपत नामें गांव होतें तेथें त्या मराठी लश्करचा बायका व मुलें व कित्येक बुणग्यांतील लोक व कित्येक शिपाई एकदांच शिरले. त्या योगें तो सगळा गांव भर दाटी झाली. मग दिवस मावळला तेव्हां आफगाण लोक येऊन त्या पानपता सभोंवता घेरा घालून रात्रभर तेथें होते. मग प्रातःकाळीं ते सर्व लोक बाहेर काढून त्यांस आफगाणांहीं आपल्ये ठिकाणीं नेऊन त्यांतील बायका व मुलें वांटून घेतली; आणि पुरुषांचा दावणी करून त्यांचा मस्तकांचे ढीग आपल्या डेर्यांपुढें घातले. अशा निर्दयाचरणानें त्या लोकांची या पृथ्वींत निरंतर निंदा राहिली; व त्या योगें मनुष्य जातीसही बट्टा लागला. कांकिं, असे निर्दय प्राणी मनुष्यांत उत्पन्न होतात इतकें कळलें.

नंतर त्या लढाईत विश्वासरावाचें प्रेत सांपडलें तें आमेदशाह अबदाली याणें पहावयास आपलेजवळ आणविलें. तेसमयीं त्यास पहावयाकरितां, आफगाणलोक मोठा शब्द करीत येऊन बहुत जमले तेवेळेस त्या लोकांची फार दाटी झाली. त्यांत असा उठला कीं, आमचा धर्माहून बाह्यजे त्यांचा बादशाहाचें हें प्रेत; यास्तव आम्हीं याला वाळवून यामध्यें गवत भरून आपल्या काबुलप्रांतीं घेऊन जाऊं. असें नानाप्रकारें बोलत असतां, गेहिले लोक व सुजाउदवला याणीं बादशाहाजवळ अर्ज करून तें प्रेत हिंदूंचे स्वाधीन करविलें. मग तें हिंदूंनीं जाळून टाकिलें. त्यासमयीं सुजाउदवला याणें जनकोजी शिंदा व इभ्राहिमखान गार्दी हे दोघे जखमी होऊन बादशाहाचे कैदेंत सांपडले होते त्यांचाही प्राण वांचवायाविषयीं अर्ज करावयासाठीं उद्युक्त झाला परंतु तें सिद्धीस गेलें नाहीं. तेव्हां त्या लोकांहीं असें केलें कीं, इभ्राहिमखान गार्दी याणें असत्यधर्मी लोक यांचा पक्ष स्वीकारून सत्यधर्मी लोकांशीं लढला, हें त्याचें मोठें दुष्कर्म जाणून त्याचा शिरच्छेद केला.

शिंदा आणि नजीबअदवला या उभयतांचा फार द्वेष होता यास्तव तो ही मारिला गेला. मग त्या रणभूमीचा एके बाजूस एक शिर कापलेलें धड सांपडलें तें सदाशिवरावाचा आकृती प्रमाणेंच दिसत होतें; त्यासमयीं हेंच भाऊचें शरीर असेल असें म्हणूं लागले. याशिवाय त्या भाऊचें विशेष कांहीं वर्तमान नाहीं. दुसरें जशवंतराव पंवार तो त्या रणभूमींतच पडलेला होता. तो सांपडला. समशेरबहादूर तो त्या रणभूमींतून जखमी होऊन जिवाचा भयास्तव पळतां पळतां त्यास कोणी गावकरी याणीं मारिला. मग विठ्ठलशिवदेव विंचुरकर व दमाजी गाइकवाड व नारो शंकर आणि कित्येक शिपाई हिंदुस्था-

न

न माघारें आपले मुलखीं स्वच्छपणें आले त्या मराठी लष्करचे जे लोक आले त्यांचा सुमार असा आहे कीं. जितके गेले तितक्यांचा चतुर्थांश माघारें आले. याप्रमाणें बुणग्यांचाही तोच प्रकार. याबद्दल असें वाटतें कि, त्या भाऊसाहेबाचे लढाईसंबंधें दोन लक्ष सुमारें मराठी लोक मेले गेले. त्यांतून पळून कित्येक लोक सूरजमल्लाकडे गेले; त्यांस त्याणें आपल्या मुलखीं कृपाकरून रक्षिले. ती त्याची कीर्ति अद्यापि मराठे लोकांत आहे.

असा वृत्तांत हिंदुस्थानांत झाला तें वर्तमान पेशव्यास कांहींसें कळलें तेव्हां तो आपले खासगीचें सैन्य व दहा हजार सैन्यासहित जानोजी भोंसला यास बरोबर घेऊन, हिंदुस्थानांत आवयाकरितां निघाला. तो त्या वर्षाचा जानेवरीचे मध्यभागीं नर्मदा उतरत होता तेव्हां त्याच्या लोकांस कोणि एक सावकार याचा जासूद औरंगाबादेस जात होता तो सांपडला. त्याणें मराठ्यांचा पराभवाचें वर्तमान सांगितल्यावरून त्याला पेशव्याजवळ नेला तेव्हां पेशवा याणें त्याजवळचे कागद उघडून पाहिले, त्यांत खुणेचें लिहिलें होतें की.दोन मोतीं गळून गेलीं. आणि सत्तावीस मोहरा सांडून गेल्या; आणि रुपये व खुर्दा किती हरवला त्याची संख्या लागत नाहीं. यावरून सदाशिवराव व विश्वासराव आदिकरून मंडळीची दशा काय झाली ती पेशवा समजला. त्यानंतर थोडक्याच अवकाशानें त्यास त्या लढाईंतून आलेले लोक भेटले. त्यांत बापुरावाचा पुतण्या बाळाजी जनार्दन, तो प्रथम; पुढें नाना फडनवीस या नावें तोच लोकांत प्रसिद्ध झाला. मग पेशवा त्या अनर्थाचा प्रकार पुरतेपणें समजून घेऊन हळूहळू माघारा पुण्यास येऊं लागला. मग त्या दुखेंकरून, त्याचे बुद्धीस कांहीं अंतर पडलें; आणि त्यादिवसापासून त्याचा शरीरास दिवसानदिवस असमाधान होत चाललें.मग त्याच वर्षाचा पांचव्या महिन्यांत जुनाचे अखेरीरीस. तो पर्वतीचा देवळांत मरण पावला; तें देऊळ त्याणेंच बांधिलें होतें.

तो सदाशिवराव भाऊचा अनर्थ सर्व मराठी लोकांस दुखादिक होण्याचें कारण झाला. मग पेशवाही मरण पावला त्यायोगें अधिकच अवघड पडलें.

तो बाळाजी बाजिराव फार योग्यतेस चढला, परंतु केवळ आपल्या सामर्थ्यानें योग्य झाला असा नाहीं, त्याचे आगोधरचे पुरुषांचें कृत्य त्याचे बळेस शेवटास गेलें; तो राजनीति इत्यादि कामांत निपुण.असें त्यास त्याचे लोक ह्मणत परंतु बहुधा कुटिल वर्तनास ते लोक बुद्धिकल्पना असें मानितात; ही त्यांचे बुद्धीस चूक आहे, सत्यतेनें जें वागावें तीच बुद्धि.

बाळाजी

बाळाजी बाजिरावाचे वेळेस प्रजेला कायकाय सुख होतें तो शोध केला असतां, असें दिसतें कीं, मखल्याचा मामलतीची चाल मोडिली, व कोणी लुटारू आला असतां गांवकरी यांणींच मारावा असें शिकविलें, तेणेंकरून प्रजा सुख पावली असेल; मग पेशव्यानें प्रांतांत जागोजाग सुभेदार व मामलतदार ठेवून त्यांचे चवकशीवर सरसुभेदारही केले; आणि वसूल जमा करणारांची पहाणी क्षावी असाही त्याणें बेत ठेविला होता, याशिवाय जो हिशेब देइना त्याचें पारिपत्य करून हिशेब घेत असत. पुण्यांत बाळकृष्ण गाडगीळ मोठा कुलीन शास्त्री तो न्यायाधीश केला; त्या योगें शहरचे लोक फार सुख पावले, या सर्व उत्तम रीतीचें मूळ रामचंद्र बावा शेणवी तो मेल्यानंतर सदाशिवरावानेंही तसेंच चालविलें. त्या राज्यांत ब्राह्मणांचीं कुळें बहुतेक योग्यतेस आलीं, आणि त्या राज्यांत प्रजाही सुख पावोन लोक नाना साहेब पेशवा धन्य असें ह्मणूं लागले. ती कीर्ति अद्यापि त्या लोकांत आहे.

सन सत्राशें एकसष्टांपासून सासष्टपर्यंत
झालेलीं वर्तमानें मिळून
भाग विसावा.

अनुक्रमणिका.

माधवराव बल्लाळ पेशवा झाला तें प्रकरण.

ताराबाईचा मृत्यु.

निजामअल्ली, मराठी लोकांत वैमनस्यें पडलीं अशी संधी पाहून त्यांस जिंकावयाकरितां निघाला.

टोंक्याचा देवस्थानाचा भंग, निजामअल्लीनें केला तें प्रकरण.

तो निजामअल्ली पुण्याजवळ येऊन त्याशीं व पेशव्याशीं तह झाला.

रघुनाथराव, व माधवराव पेशवे, यांचा बिघड झाल्यामुळें रघुनाथराव औरंगाबादेस गेला तेथें त्यास, मोंगलांची कुमक मिळून तो माघारा पुण्यावरयेत असतां, माधवराव पेशवा आपल्या सुज्ञपणानें त्याचा स्वाधीन झाला.

रघुनाथराव मुख्यत्व पावोन त्याचा अनुचित आचरणेंकरून, मोठमोठ्या लोकांचीं मनें विटलीं; तेणेंकरून ते कित्येक जाऊन मोंगलांस मिळाले.

त्यावर मोंगल ब्राह्मणाचें राज्य बुडवावयास उद्युक्त झाला.

मोंगल पुण्यास येऊन तें शहर लुटून तेथचा कित्येकांघरांचा खंड घेऊन

कित्येक

कित्येक घरें जाळिलीं.

शेवटीं रघुनाथराव चांगला समय पाहून, मोंगलांचा लश्कराचा अगदीं पराभव करिता झाला.

नंतर औरंगाबादेस पेशवे आणि मोंगल यांचा तह झाला.

हेदर अल्लीचा उत्कर्ष.

माधवराव फार युक्तीनें त्या हेदराचा पराभव करिता झाला.

पेशवा व निजाम अल्ली मिळून जानोजी भोंसला याशीं युद्ध करून, त्यापासून दिलेला मुलुख कित्येक माघारा घेतला.

भागविसावा.

सन सत्राशें एकसष्टांचा महिना नव्वा सप्तेंबर, याचे अखेरीस रघुनाथराव याणें आपला पुतण्या बाळाजी बाजिरावाचा दुसरा पुत्र माधवराव यास बरोबर घेऊन, सातार्यास जाऊन राजापासून त्या मुलाचे नावें पेशवाई संपादिली; ते समयीं त्या माधवरावाचा वयास सत्रावें वर्ष होतें.

त्यापुढें तीन महिन्यांनी ताराबाई मृत्यु पावली. ते वेळेस तिचें वय शायशीं वर्षांचें होतें; तिणें राजाराम राजा यास कैदेंत ठेविला, तो त्या दिवसापासून तसाच होता. ती ताराबाई मरणपर्यंत बाळाजी बाजिराव पेशवे व सदाशिवराव भाऊ यांचा द्वेष करीत होती; ती मरणसमयीं बोलली कीं, हे दोघे दुर्दशा होऊन मेले तेणेंकरून माझे मनोरथ पूर्ण झाले.

बाळाजी बाजिराव मेला हें वर्तमान सलाबतजंग व निजाम अल्ली यांस बेदर मुकामीं कळलें तेव्हां निजाम अल्ली तो आपणास दिवाण म्हणवी आणि सलाबतजंगयास नाममात्र धनी असें करून आपण सर्व राज्य सुखानुभव घेत होता, तेव्हां तो समजला कीं, आपला मुलुख मराठ्यांहीं घेतला आहे तो या समयीं सोडावयाविषयीं सुलभ पडेल म्हणून कांहीं एक निमित्त करुन औरंगाबादेचा आसमंतात् मोठी फौज जमा केली. ही त्याची कल्पना खरीच होती कांकिं, त्यापूर्वी चाळीस वर्षें त्यास अशी संधी सांपडली नाहीं तो प्रकार असा. पानपताचे लढाईत मराठे पराभव पावले त्यामुळें ब्राह्मण व मोठे मोठे मराठे सरदार एकमेकांत परस्परें त्या नाशाचें कारण करुन भांडूं लागले; त्या योगें आपआपल्यांत फार वैमनस्यें पडलीं आणि रघुनाथराव तो आपला पुतण्या माधवराव पेशवा याचें वय लहान म्हणून राज्यकारभार आपण चालवीत असे, आणि त्यापाशीं सैन्य त्या निजाम अल्लीचा निवारणास पुरेसें नव्हतें; हें वर्तमान त्यास कळतें तर तो मोठा लाभ पावता,

परंतु

परंतु तें त्याला पुरतेपणें न समजलें; याशिवाय त्याणें दक्षिणेंत येऊन प्रथम दोंक्यामध्यें हिंदूंचीं देवस्थानें होतीं तीं फोडलीं तेव्हां त्याचे मुसलमान लोकं व तो असें समजला कीं, हें आह्मीं केलेलें कर्म ईश्वरसंतोषकारक झालें. परंतु तेणेंकरूनच त्या निजाम अल्लीचा नाश झाला. कांकिं, त्याचे लश्करांत रामचंद्रआधव सरदार वगैरे हिंदू जे चाकर होते, ते रुष्ट होऊन बहुतेक त्यापासून निघून गेले; आणि पेशव्याकडे जाऊन राहिले. त्याणीं मीरमोंगल नामें निजामउलमुलुखाचा कनिष्ठपुत्र त्यासही बरोबर नेला.

त्यानंतर निजाम अल्लीचें लश्कर पुण्यावर येऊं लागलें त्याचे निवारणार्थ दिवसंदिवस, मराठ्यांचा उद्योग वृद्धिंगत होत गेला. शेवटीं तो पुण्याजवळ एका मजलेवर आला. तेव्हां त्याचें पहिलें मानस होतें कीं, मराठ्यांपासून आपला सर्व मुलुख सोडवावा; तें टाकून इतकें मात्र केलें, कीं, बेदर व औरंगाबाद यांपासून सत्तावीस लाख रुपये घेत होते ते त्यांहीं घ्यावे. त्यावर निजाम अल्ली बेदराकडे मागें गेला; तो तेथें जाऊन त्याणें आपला भाऊ सलाबतजंग यास सन सत्राशें बासष्टांचा जुलाई महिन्यांत कैद करून त्यापुढें पंधरा महिन्यानीं जिवें मारून टाकिला. अशी त्याणें बंधुहत्या केली ती व्यर्थ केली - असें दिसतें; कांकिं सलाबतजंग केवळ गरीब होता. त्याचा हातून किमपि नाश झाला नसता.

ते मुसलमान लोक पुण्यापासून दूर गेल्यावर, सदाशिव चिमणाजी भाऊ याचा मामा त्रिंबकराव तो दक्षिणेंतील वसूल जमा करून माघारा पुण्यास आला नंतर पेशव्याचा चुलता रघुनाथराव यास ह्मणूं लागला कीं, तुह्मींच सर्व कारभार करितां यांत कांहीं माझा भाग असावा; तेव्हां त्या उभयतांचा वाद पडला, मग तो रघुनाथराव व सखाराम बापू वगैरे जे मुख्य कारभारी होते ते आपल्या मनांत समजले कीं, आपणावांचून कारभार चालणार नाहीं ह्मणून क्रुद्ध होऊन त्यांस हा श्रेष्ठ मानी असें समजून, ते सारे कारभार सोडून आपले घरीं उगेच बसले; आणि दुसरें समजले कीं, आह्मावांचून कामांत अडचण पडूं लागली ह्मणजे हा आपणाच आमचें आर्जव करूं लागेल. परंतु त्या मामास तात्काळ जवळ बोलावून दिवाणगिरीचें काम सांगीतलें तेव्हां त्याणें गोपाळराव गोविंद पटवर्धन मिरजकर याचे साहाय्यानें कबूल केलें तें सर्व समजून रघुनाथराव[+] व सखाराम बापू यांचा मनांत त्या मामाविषयीं द्वेषाव

+ रघुनाथरावाचा मनांतील द्वेष वाढवयाचें कारण आनंदी बाई, ती रघुनाथरावाची स्त्री, माधवरावाचा मनांतील द्वेष वाढवायास कारण गोपिकाबाई, ती त्याची मातुश्री, तिचा तो माधवराव पुत्र.

द्वेष

द्वेष उत्पन्न झाला. त्यावरून रघुनाथराव पुणें सोडून नाशिकास गेला मग तो ते-थून पुढें औरंगाबादेस जाऊन त्या शहरचा मुख्य मुगल स्वान होता त्याणें त्या-चा मोठा संमान करून त्यास मोंगलांची कांहीं फौज दिली; त्यानंतर त्याला म-राठेही पुष्कळ जाऊन मिळाले. त्यावर तो पुण्यास येऊं लागला तेव्हां त्याचा लश्कराची आणि माधवराव पेशव्याचा लश्कराची गांठ पुणें व आमेदनगर यांचे मध्यभागीं पडली; ते समयीं पेशव्याचें लश्कर रघुनाथरावाचा लश्करापे-क्षा फार कमी असें समजून ते लोक त्याशीं युद्धास उभे न राहिले. त्यावेळेस तो रघुनाथराव याचे पुष्टीकरितां निजाम अल्लीही येत होता आणि वराडांतून जा-नोजी भोंसला तोही सेनेसहित पुण्याकडे येऊं लागला होता, परंतु तो कोणा-चा पक्ष स्वीकारील तें समजलें नाहीं. हें सर्व जाणून माधवराव याणें परमदक्ष-ता व शहाणपणें करून मनांत निश्चय केला कीं, यानंतर आपण काकाचे स्वा-धीन व्हावें; मग आपल्या बरोबरचा लोकांस सांगितलें कीं, आपआपले प्राण संरक्षणास पाहिजे तिकडे जावें. नंतर आपण जाऊन काकास भेटून त्याचा समूर उभा राहून बोलिला कीं, आपल्या राज्यांत विभाग व कलह नसावा याक-रितां मी तुमचे स्वाधीन झालों. तेव्हां रघुनाथरावानें त्यास बंदींत ठेविला, परंतु त्याचा असा मान रक्षिला कीं, तो बंदींत असतांही त्याची जेवढी प्रतिष्ठा हो-ती तेवढी पुढें रघुनाथराव मोठी योग्यता मिळवून निरंकुशपणें महत्पदारू-ढ झाला तरी त्यास मिळाली नाहीं.

यानंतर मोंगलांनीं कुमक केली यास्तव रघुनाथरावानें कबूल केलें हो-तें कीं, दवलताबाद व शिवनेरी व आशिरगड व आमेदनगर व एकावन्न ल-क्ष रुपये प्रतिवर्षी उत्पन्न होत असा मुलुख देईन; त्याप्रमाणें त्यास यावया-ची तात्काळ आज्ञा दिली, परंतु तें त्यांचे स्वाधीन झालें नाहीं तो कांहीं मध्यें-च निमित्त उत्पन्न झालें, तो प्रकार पुढें लिहिण्यांत येईल. ते वेळेस तर मों-गलांस दवलताबाद मात्र दिली. मग निजाम अल्ली पेरगावीं येऊन रघु-नाथराव यास मिळाला तेव्हां त्याला समजलें कीं, हे चुलते पुतणे मिळाले; त्यावरून त्याणें असें दर्शविलें कीं, हें तुमचें ऐक्य पाहोन मी संतुष्ट जहा-लों.

याप्रमाणें रघुनाथरावाची सत्ता झाल्यावर त्याणें सखाराम बापू व नी-ळकंठ महादेव पुरंधरे हे दोघे आपले मुख्य कारभारी केले. त्यावेळेस जग-जीवनराव प्रतिनिधीचा पुतण्या श्रीनिवासराव तो प्रतिनिधी असतां त्यास दूर करून रघुनाथरावानें आपला पुत्र भास्करराव तो फार लहान बालक होता त्यास प्रतिनिधी करून, नागेशंकर यास त्याचा मुतालिक केला; आणि कान्हो-

जी

जी मोहिते यांस सरलष्कर पदवी दिली. पेशव्याचे फडनवीस बाळाजी जनार्दन- नाथापासून भानूच्या कुळांतले झाले; त्यांनीं मोरोबाबुराव भानू यापासून तो फडनविशी घेऊन चिंतो विठ्ठल यास दिली.

याप्रमाणें रघुनाथरावानें प्रतिनिधी आदिकरून नवे केले; तेणेंकरून तो श्रेष्ठांचा मनांतून उतरला. असें असतांही आपला पूर्वीचा सूड उगवावयासाठीं. गोपाळराव पटवर्धन याचा किल्ला मिरज लढून घेता झाला; त्यायोगें मोठ्मोठ्या लोकाचें मन फारच विटून. मग गोपाळराव पटवर्धन व जे त्या रघुनाथरावापासून दुःख पावलेले सरदार ते निजामअल्लीचा वजीर विठ्ठलसुंदर[+] याचा बोलावण्यावरून निजामअल्लीस जाऊन मिळाले, त्यांत रामचंद्र जाधवही होता; तो धनाजीचा नातू त्यास रघुनाथरावानें सेनापतित्व दिलें असतांही. गुजराथेचा आधिपत्याविषयीं त्याला इच्छा होती त्याप्रमाणें तें न मिळालें म्हणून तो तिकडे गेला; मग त्या मुरादखानानें केलेला पेरगांवचा तह मोडून, मराठे लोक व मुसलमान लोक पुनः सनसत्राशें सट्सष्टांत युद्धाचा प्रसंग करिते झाले.

ही एवढी घटना होईलशी त्या रघुनाथरावाची अटकळ आली नाहीं; त्यावरून त्याणें युद्धाची तयारी केली नव्हती; त्यावेळेस माधवराव बंदींत असतांही त्याणें आपल्या शक्तीप्रमाणें काकाची पुष्टी केली. आणि मल्हारराव होळकर व दमाजी गाइकवाड हे दोघे रघुनाथरावाकडेस होते असें असतांही तें लष्कर मुसलमानांचा सन्मुख लढावयाजोगें नव्हतें म्हणून त्या लोकांचा सन्मुख युद्धास गेल्यासारिखें भासऊन मग एकीकडे जाऊन मोंगलांचें लष्कर आपल्ये पाठीमागें टाकून औरंगाबादेस जाऊन त्या शहराचे तटास शिडी लावून आंत शिरावयाचा उद्योग केला; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. नंतर तो निजामअल्ली पाठीस लागला असा पाहून वराड प्रांतीं जाऊन जानोजी भोंसल्याचा मुलुख लुटतां लुटतां मलकापुराची खंडणी रुपये साठ हजार घेतले. त्यानंतर मोंगलांचा प्रांतीं जाऊन फार नाश केला; ते समयीं तो निजामअल्ली त्या रघुनाथरावाचे पाठीस लागोन बहुतवेळ झाल्यावर समजला कीं, हा आपल्ये हातीं लागत नाहीं; तेव्हां तो सूड उगवावयास त्याणें निश्चय केला कीं, पुण्यास जाऊन तें शहर अगदीं लुटून जाळून टाकावें. हें वर्तमान रघुनाथरावास कळलें तेस-

[+] विठ्ठलसुंदर यजुर्वेदी ब्राम्हण होता त्यास निजामानें आपला भाऊ बंदींत घातला ते समयीं दिवाणगिरी दिली पुढें मुरादखानाचा योगें मराठे व मुसलमान यांचा तह झाला. त्यापासून तो विठ्ठलसुंदर त्या मुरादखानाचा द्वेषास्तव पुनः नवें युद्ध उत्पन्न करावयास उद्युक्त झाला होता.

मर्थी त्याणें तो सूड घ्यावयासाठीं हैदराबाद जाळावयाची मसलत केली, आणि तिकडे चालिला.

हे वर्तमान पुण्याचा लोकांस कळलें कीं, मोंगल पुणें शहर जाळावयास येतो. तेव्हां तेथचे बहुतेक लोक आपलीं घरें टाकून, आपल्या सामर्थ्याप्रमाणें संसार खटलीं घेऊन डोंगरी किल्ल्यांतून व कोंकणांत जाऊन राहिले. मग निजाम अल्ली येऊन पुण्याजवळ उतरला नंतर जा गा घरांची खंडणी त्यास न मिळाली तीं तीं घरें कांहीं मोडून कांहीं जाळिलीं; मग पुरंदराकडे जाऊन भीमा नदीपर्यंत मुलुख उद्वस्त केला. त्यानंतर पाउसकाळ जवळ आल्यामुळें तो बेदरास जाणार होता परंतु जानोजी भोंसल्याचे मसलतीनें औरंगाबादेस जावयाचा नेम ठरला.

इकडे रघुनाथराव हैदराबादेस गेला तेव्हां त्या शहरास भोंवता तट होता त्याजमुळें तें शहर घेतां येईना; तेव्हां बाहेरचा पेठेची खंडणी एक लक्ष ऐशीं हजार रुपये घेतली, मग हैदराबाद सोडून निजाम अल्लीचें काय वर्तमान आहे तो शोध घ्यावयास आला, त्याणें त्या वेळेस निजाम अल्लीचे जे मराठे सरदार होते त्यांशीं कांहीं बोलणें करून सुमार पाहिला जो त्यांजकडील मराठ्यांतील मुख्य जानोजी तो आपलेकडचा होईल कां कीं, तो निजामास मिळाला ते समयीं असा त्याचा मनोरथ होता त्याप्रमाणें त्यास लाभ न झाला. तेव्हां रघुनाथरावानें कबूल केलें कीं, प्रतिवर्षी तुम्हास बत्तीस लक्ष रुपये देऊं. आणि तो समयीं आपल्या पक्षाचा होईलसा करून ठेविला.

मग मोंगलसहित निजाम अल्ली औरंगाबादेस जात असतां, तीन चार मजली त्याचे पाठिमागें होता, तो गोदावरीस जाऊन पोंहचला ते समयीं आपण व बहुतेक लोक मिळून पलिकडे उतरून गेला, तेव्हां अलिकडे आपला दिवाण व कांहीं लोक राक्षसभुवन गांवांजवळ तो सर्व खटला उतरून पार जाई तों पर्यंत ठेविले. ते वेळेस जानोजी भोंसला आपले फौजेस कांहीं दरमहा न पोंहचल्याचें निमित्त करून त्या दिवाणास सोडून त्यापासून कांहीं अंतरानें उतरला तें वर्तमान रघुनाथरावास कळोन तो समजला कीं, हें चिन्ह आपल्या स हितावह आहे; त्यावरून मोठमोठ्या मजला करून अकस्मात मोंगलांचा लष्करावर पडोन तें मोठ्या निकरानें दोन दिवस युद्ध[+] होऊन त्याचे मोंगल लोक बहुतेक मेले गेले. त्यांत तो दिवाणही मृत्यु पावला. त्या प्रसंगीं माधवराव होता तो आपल्या शौर्येंकरून व सावधपणानें आणि चातुर्येंकरून मोठा विख्यात झाला; ते समयीं निजाम अल्ली गोदावरीचे पलिकडे होता,

---

[+] त्या युद्धास मराठे तेदळजाचें युद्ध म्हणतात.

त्याच्यानें

त्याचानें त्या दिवाणास पुष्टि करवेना आणि त्याचा लश्कराचा नाश पाहून आपण औरंगाबाद शहरांत शिरला; त्याचेही पाठीस मराठे लागून त्यांहीं औरंगाबादेवर पुनः हल्ला केला, तेव्हांही त्यांचे लोक फार मेले गेले, परंतु अर्थ सिद्धीस गेला नाहीं. त्यानंतर निजामअल्ली फार पश्चात्ताप पावल्याचा आकार करून रघुनाथरावाचे भेटीस आला, आणि आपण जें कृत्य केलें तें सर्व दिवाणानें करविलें असें रघुनाथरावास समजावून त्याचें मन असें सुप्रसन्न केलें कीं, त्याणें जानोजी भोंसल्यास जो बत्तीस लक्ष रुपये उत्पन्न होतसा मुलुख देऊं केला होता तो वजा करून एकावन्न लक्ष रुपये उत्पन्न होतसा जो पूर्वीं लाऊन दिलेला मुलुख होता, तो द्यावयास सिद्ध झाला; परंतु त्याचा कारभारी लोकांहीं हें ठीक नव्हे असें समजाविलें त्यावरून त्याणें त्यास दहा लक्ष रुपये मात्र उत्पन्न होईसें दिलें, याप्रमाणें पूर्वीचा करारापेक्षां नऊ लक्ष रुपयांचा मुलुख निजामास न दिला, तो पेशव्यास लाभला. मग त्या निजामअल्लीशीं आणि पेशव्याशीं अकटोबर महिन्यांत नवा तह झाला. तेसमयीं जानोजी भोंसल्यास बत्तीस लक्षांचा मुलखाची सनद देतांना रघुनाथराव त्यास बोलिला कीं, तूं आपल्या वडिलांचें महत्व जेणेंकरून वाढलें, असें जें मराठ्यांचें राज्य तें बुडवावयाचें कृत्य केलेंस आणि निजामाचा आश्रय संपादिलास मग त्याचाही घात केलास, याप्रमाणें त्यास निषेधून कराराप्रमाणें सनद दिली. त्यावेळेस भास्करराव प्रतिनिधी मरण पावला तेव्हां ती जागा भवानराव प्रतिनिधी यास पुनः प्राप्त झाली; आणि गोपाळराव पटवर्धन यास मिरजेचा किल्ला रघुनाथरावानें पुनः माघारा दिला. तेसमयीं मोरोबा फडनवीस यास याचे जागीं न स्थापिला परंतु त्याचा चुलत भाऊ बाळाजी जनार्दन भानु यास तो अधिकार दिला.

पूर्वीं म्हैसुरचें वर्तमान लिहिलें त्यांत हैदरअल्लीचा प्रकार आला, तो हैदर कोणे प्रकारें विख्यात झाला तो विस्तार असा. मराठे लोक पानपतचा लढाईला दक्षिणेहून उत्तरेस गेले, तेसमयीं सलाबतजंग आपणास स्वतंत्रपणें राज्य मिळवावयास हाच उत्तम समयसा जाणून करनाटकांत गेला आणि तेथचा हैदरअल्लीशीं स्नेह केला तंतर त्या सलाबतजंगानें किमपि मुलुख घेतला नाहीं तोंच त्या हैदरअल्लीनें त्याला शेराप्रांतीचा नवाब केला; मग ते दोघे बरोबर जाऊन उसकटा व शेरा व बडाबाळापूर इतकीं घेतलीं. तंतर तो सलाबतजंग याणें आपला भाऊ निजामअल्ली याचा भयास्तव हैदरअल्ली याची संगत सोडिली, आणि आदोणी नामें आपलें रहावयाचें पहिलें ठिकाण तेथें गेला; परंतु हैदरअल्ली त्यासारखा न भिऊन तेथेंच

राहिला

राहिला, आणि तें राज्य आपल्या साधावयास उद्युक्त झाला मग त्याणें कित्येकां पाळेगारांपासून खंडणी घेऊन बेदनूर प्रांत आपल्या सत्तेंत आणिला. त्यापुढें सनसत्राशें चौसष्टांत त्याणें सावनुरच्या नवाब जिंकिला; मग कांहीं कारणानिमित्त त्या हैदराला बेदनुरीं जावें लागलें, म्हणून तेथें एक सरदार ठेविला; त्याणें धारवाड घेतलें आणि हैदराचें ठाणें कृष्णातीरानजिक बसविलें हैदर अल्ली.

तो हैदर अल्ली असा पराक्रम करीत असतां, मराठे उगेच नबसले; त्यांहीं त्याचा उत्कर्ष आपल्या नाशास कारण असें समजून सन सत्राशें चौसष्टांतच पुण्यामध्यें मोठें सैन्य जमा केलें. मग सेमहिन्यांत ती फौज घेउन माधवराव करनाटकांत शिरला. तसमयीं हैदराचें लष्कर मोठें सुदृढस्थळ करून अनवतीनामक जाग्यावर छावणी करून राहिलें होतें. माधवराव आपल्या सैन्यासुद्धां तेथून पुढें दुसरी एक युद्धोपयोगी सुदृढ अशी चांगली जागा पाहून राहिला, त्या हैदराजवळ वीस हजार घोडेस्वार व पायदळ चाळीस हजार होतें, त्यांत वीस हजार कवाईत शिकविलेले पलटणी लोक असत; तेथें मराठ्यांचें लष्कर जवळ येऊं लागलें तेव्हां त्या मराठा लोकांनीं मसलत केली कीं, याचें ठाणें सुदृढ आहे यास्तव सन्मुख जाऊन लढूं नये. त्याणें वर्धानदीचे उत्तरेस ठाणीं बसविलीं आहेत तीं उठवावीं म्हणजे तो बाहेर निघून मोठी लढाई झाली असतां त्यांत आपलें हित होईल तें ऐकून त्या हैदरानें मसलत केली कीं, आपण ठाणें सोडून जातों असें दाखवून, बाहेर निघून मराठे आंगावर आले असतां मागें हटून त्यांस पुरते आंगावर घेऊन, एकदांच हल्ला करून मारून टाकावे. अशी कल्पना करून तो त्याप्रमाणें उद्योग करूं लागला, मराठेही तेसमयीं तो त्याचा संपूर्ण मतलब जाणून आपण भितों असें दाखवून मागें मागें हटूं लागले याप्रमाणें करतां करतां याणीं त्यास पुरता आपल्या आंगावर घेऊन मग एकाएकी त्याचा लष्करासभोंवती आपले स्वारांची दाटी करून त्याचा बहुत नाश केला; तो असा कीं, शेवटीं त्याला आपलें पहिलें ठिकाण अनवतीजागची छावणी, महत्प्रयासें करून प्राप्त झाली. असा हैदर अल्लीचा पराभव झाल्यानंतर, मुरारराव घोरपडा पेशव्यास जाऊन मिळाला त्या मुराररावाचा मूळ पुरुष संताजी घोरपडा, त्याचें स्वरूप राजाराम राजा याचा वेळेस अनीतीमुळें प्रकट झालें नाहीं यास्तव हे समयीं तद्वंश्य मुरारराव जाणोन सेनापतित्वपदवी यास द्यावी ही सुनीती असें ठरून, तो मुरारराव घोरपडा सेनापती केला.

यानंतर तें युद्ध समाप्तीस जाऊन मराठे यश पावतील असें निश्चित स-

मजलें

मजकूर असतांही, माधवरावानें आपल्या काकास निरोप पाठविला कीं, आपण येवून हें काम शेवटास न्यावें; यांत त्या माधवरावाची परमसुशीलता नकट झाली परंतु ती राजनीती नव्हे, कांकिं, आपणास यश येत असतां त्याचा अधिकार दुसऱ्यास करणें हें साधुमार्गास फार योग्य आहे, आणि राजास अहित, असा त्या माधवरावाचा निरोप गेल्यावर तो रघुनाथराव येऊन त्यास मिळाला, ते वेळेस तें लश्कर वरदा नदी उतरून पलिकडे जाऊं लागलें असें सत्राशें छप्पन्नांत घडलें.

तें मराठ्यांचें लश्कर वरदानदी पलिकडे जाऊन, अनवतीसमीप दाट रान होतें तें तोडून आपणास तिकडे जावयाची मोठी वाटकरून हैदरअल्लीचें लश्कर व बेदनूर यांचा मध्यभागीं ठाणें घालावयाचा येत करीत होते; तें वर्तमान हैदरास कळतांच तो मोठ्या त्वरेनें बेदनुराकडे जाऊं लागला. त्यासमयीं मराठे तो मुलुख झाडीमुळें आंत शिरायास फार कठीण म्हणून हैदराचा लश्करास दोन दिवस फारसा उपद्रव न देतां, यथाशक्ति कांहींशी खटपट करीत राहिले; मग तिसरे दिवशीं मैदान मुलुख लागला तेव्हां मराठ्यांचा लश्कराची एक टोळी त्याच्या लश्करा पलिकडे आऊन बेदनुराचा आलिकडे अगोदरच उभी राहिली होती, तेथें जाऊन पोंहचला तेसमयीं त्या हैदरास युद्धाविषयींउभें रहाणें प्राप्त झालें, तेव्हां मराठे त्यावर मोठ्या वेगेंकरून हल्ला करूं लागले असतां, तो हैदरअल्लीचे बहुतेक लोक रानांत पळून गेले, मग हजार पायदळ व अडीच हजार स्वार इतक्या फौजेनिशीं तो बेदनुरास पोंहचला; त्याचे पाठिमागून मराठेही मुलुख घेत घेत गेले, शेवटीं रघुनाथराव याणें हैदराकडून कबूल करविलें कीं, पेशव्यास बत्तीस लक्ष रुपये द्यावे, व घोरपडे यांचा मुलुख त्याणें घेतला होता तो त्यांस माघारा द्यावा; याशिवाय सावनुरचा नवाबापासून खंडणी वगैरे कांहीं घेऊं नये. असा तह रघुनाथराव याणें केला तो माधवराव याचा मनास आला नाहीं, परंतु त्यावर सर्व कार्यभार सोंपविला होता म्हणून त्यावेळेस त्याला किमपि प्रतिकूळ न बोलतां त्याचे दुसरे वर्षीं फेब्रुवारी महिन्यामध्यें तो माधवराव कर्नाटक सोडून कृष्णेपलिकडे गेला. मग त्याच वर्षीं निजाम अल्ली व पेशवा हे दोघे एकचित्त होऊन वराडास जाऊन जानोजी भोंसला याशीं युद्ध करून, तो अगदीं नम्र केला; आणि त्याणें पेशव्याशीं व निजाम अल्लीशीं दगलबाजी करून मुलुख संपादिला तो बत्तीस लक्षांचा होता त्यापैकीं त्याला चवथाई ठेवून बाकी सर्व घेतला. त्यांतून पंधरा लक्षांचा मुलुख माधवरावानें निजाम अल्लीस दिला; तो त्याचे मैत्रीसाठीं दिला असें पुण्याचे बखरींत लिहिलें आहे, परंतु

असें

असें दिसतें कि, करनाटकीं आपण स्वारीकरून हैदर अल्लीला जिंकणार त्या कार्यास निजाम अल्लीनें सहाय व्हावें म्हणून माधवरावानें त्याशीं गुप्तपणें कांहीं बोली केली त्यावरून पंधरा लक्षांचा मुलुख दिला, त्यांतही तो संबंध असेल.

सन सत्राशें सासष्टांपासून
बाहात्तर पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग एकविसावा.

अनुक्रमणिका.

इंग्लीश सरकार कंपनी बहादुर या नामाचें अर्थसूचन व त्या इंग्लीशलोकांहीं हिंदुमुलखीं कोणे निमित्तें प्रथम प्रवेश केला तें प्रकरण.

पुढें त्यांहीं आपल्या रक्षणार्थ राजमंडळी घेतली.

मग त्यांशीं आणि निजाम अल्लीशीं स्नेह पडला ती गोष्ट.

माधवराव पेशवा करनाटकीं जाऊन तेथचा खंडणीचें बहुत द्रव्य घेऊन माघारा पुण्यास आला.

रघुनाथरावानें हिंदुस्थानांत स्वारी केली.

मल्हारराव होळकर याचा मृत्यु.

रघुनाथराव गोहदचा राण्याचें स्थान घ्यावयास गेला तो तेथें सिद्धीस न पावतां माघारा पुण्यास आला तेथें आपला पुतण्या माधवराव पेशवा याविषयीं त्याचा मनांत कांहीं अविश्वास उत्पन्न होऊन तो होळकर व दमाजी गाइकवाड व जानोजी भोंसला यांचा साहाय्यानें युद्धेंकरून सर्व राज्य आपणास इच्छिता झाला.

मग मोठा युद्धप्रसंग होऊन रघुनाथराव माधवरावाचे कैदेंत सांपडला तो प्रकार.

माधवराव व निजाम अल्ली एकचित्त होऊन जानोजी भोंसल्याचे मुलखीं गेले तो त्यांस शरण आल्यावर पेशव्यांस हितावह असा जानोजीशीं तह झाला तोविस्तार.

माधवराव करनाटकांत जाऊन हैदरअल्लीचा बहुत मुलुख घेतला.

मनवगळच्या किल्ला घेतेसमयीं पाडुंग कुळांचे दोन भाग यांचा पुरातन वाद उत्पन्न पुनः झाला ती कथा.

करनाटकांत माधवराव आपलें लश्कर त्रिंबकराव मामाचा स्वाधीन

करून

करून आपण माघारा पुण्यास आला.

त्या त्रिंबकराव मामानें हैदरास जिंकून त्याशीं तह केला.

पानपतचे लढाईनंतर हिंदुस्थानांत काय काय वर्तमानें झालीं त्यांचा विस्तार.

विसाजी कृष्ण सैन्यासहित हिंदुस्थानांत गेला.

दिल्लीचा बादशाहानें इंग्लिशांचा आश्रय धरिला.

नजीबअदवला याणें मराठ्यांशीं तह केला.

दिल्लीचा बादशाह इंग्लीश लोकांचा आश्रय सोडून मराठी लोकांकडे गेला.

सुजाउदवला व रोहिले मिळून मराठे लोक यांस मुलखांतून बाहेर घालवावयास सिद्ध झाले.

दिल्लीचा बादशाह दक्षणी ब्राह्मणाचा अतिसम्भावास कंटाळोन, त्याणें आपल्या सरदाराला सर्व मराठे हांकून द्यावयास सांगितलें.

माधवराव पेशवा याचा मृत्यु, व त्याचें गुण कथन.

रामशास्त्री याची गोष्ट.

भाग एकविसावा.

पूर्वी हिंदूंचा मुलखांत इंग्लीश+ व फ्रेंच, यांचें कित्येकवेळा युद्ध होऊन शेवटीं इंग्लीशांहीं फ्रेंच लोकांस जिंकिलें. ते इंग्लीश आपली विलायत सोडून प्रथम हिंदूंचा मुलखीं आले तो प्रकार असा. तेथचे कित्येक द्रव्यवंत लोक मिळून एकचित्त होऊन त्याहीं असा संकेत केला कीं, हिंदूंचा मुलखीं जाऊन, कांहीं उदिम करावा; मग त्या साधनार्थ ते आपल्या बादशाहाजवळ जाऊन विनंती करिते झाले कीं, आम्हीं इतकेजण मिळून आपलें द्रव्य एकत्र करून, हिंदुस्थान मुलुख तेथें जाऊन उदीम करूं इछितों; त्यास या आमचा मंडळी खेरीज दुसरा कोणी तिकडे न जावा, आणि आम्हास या कामाविषयीं अनेक प्रकारें सरकाराश्रय पाहिजे; अशास कृपा करून आमचा उद्योग निर्बाधपणें चालेशी सनद द्यावी; त्यावरून बादशाहाची तशी सनद होऊन ते मंडळीचे लोक* तेथून निघोन हिंदूंचा राज्यांत कलकत्ता व मद्रास व मुंबई या तिहीं ठिकाणीं आपलीं

+ इंग्लीश लोकांस मराठे लोक इंग्रेज असें म्हणतात, आणि फ्रेंचांस फ्रांसीस असें म्हणतात. परंतु इंग्लीश व फ्रेंच हें शुद्ध.

* ती सनद पावलेल्या मंडळीचें नांव विलायतेंत असें पडलें कीं, अनरबल ईस्त इंडिया कंपनी म्हणजे हिंदुलोकांशीं संबंध ठेवून व्यवहार करणारी श्रेष्ठ मंडळी.

स्थळें

स्थळें करून राहिले; मग तथें कांहीं कर्दीम कठिन असता त्यांस त्या मुलखाच्या रहाणाराशीं त्या कामाविषयीं कांहीं संबंध पडला; तेव्हां त्या हिंदुलोकांच्या कापट्यामुळें त्या इंग्लीश लोकानां, आपल्या अभिमानें व प्राणानें रक्षण व्हावें ह्मणून शिपाई लोक बाळगून किल्ले बांधावे असें अगत्य पडलें. मग तेथच्या राजाशीं संबंध पडून त्यांचे हातीं कित्येक मुलुख सांपडला; तेव्हां त्यांस तें काम श्रेष्ठ असें न वाटतां. राजाप्रमाणें वर्तावें लागलें. फ्रेंच जिंकिले तेसमयीं बहुतेक मुलुख त्यांचा हातास लागला तेणेंकरून ते परम विस्मय पावोन, मनांत विचार करूं लागले कीं. यांत कांहीं एक भाग, आपल्या कामापुरता ठेविला आणि बाकी टाकिला तर आपणास बरें पडेल कीं नाहीं; तेव्हां असें ठरलें कीं, अर्धेमर्धें टाकावें आणि अर्धेमर्धें भोगावें हें ठीक नव्हे; त्यास टाकणें तर अगदीं सारेंच टाकून विलायतेस जावें; किंवा उत्तरोत्तर जसें कारण पडेल, तसें अधिक अधिक घेऊन. आपण त्या लोकांचे आचरणानुरूप वर्तावें हें योग्य त्यावरून बंगाल्यांत क्लैव नामें लाट+ तो विलायतेचे बादशाहापासून सरकार आज्ञेनें मुलखाच्या बंदोबस्तास सन सत्राशें छप्पन्नांत आला, त्याणें असें पाहिलें कीं, आपल्या रक्षणास उगेंच बसणें ठीक नव्हे, कांकिं, तशानें रक्षण ठीक होत नाहीं दुसरा मारूं लागे तों पर्यंत उपेक्षा करण्यांत मोठी हानी आहे; यास्तव पुढें होऊन अवश्य कांहीं उद्योग करावा. असा निश्चय करून त्यास प्रथम दोन कार्यें साधवायाचें अगत्य पडलें; त्यांत एक कार्य असें, साष्टी व करंजें व मुंबईजवळच्या अणखी एक टांपू आपले स्वाधीन व्हावा. दुसरें कार्य असें, पूर्वीं फ्रेंच लोकांस निजामानें शिबंदीचा खर्चास दिलेले पांच परगणे मद्रासेजवळ आहेत ते आपल्या सत्तेंत आणावे. तेव्हां साष्टी आदि टांपू मराठे देइनात, कांकिं पूर्वीं विलायतचे पोर्तुगीस लोक यांस जिंकून त्यांहीं घेतलेले, ते जर या इंग्लिशांस दिल्हे तर आपली मानहानी होईल; व यांची वृद्धी आपणास बाधक होईल असें त्यांचा मनांत आलें. मद्रासेजवळचे परगणे निजाम अलीकडे होते त्या पांचां परगण्यांतील एक गंठूर नामें परगणा तो त्या निजामाचा भाऊ सलाबतजंग यास जहागीर होता; ह्मणून तो निजाम देईना. तेव्हां त्यास लाट ह्मणाला कीं, या गंठूरा खेरीज चार परगणे आहेत ते तुह्मीं पूर्वीं अर्काटचे नवाबास मरवत्यानें देत होतां, तेव्हां त्यांचें उत्पन्न त्यापासून जें घ्यावयाचा नेम ठरविला असेल त्यापेक्षां षड्गुणित आह्मीं तुह्मांस देऊं. त्यास ते चारी परगणे आह्मास तुह्मीं द्यावे; असें मागीतलें असतांही तो निजाम ऐकेना, तेव्हां त्या लाटानें निश्चय केला किं, बलात्कारें करून आपल्या रक्षणार्थ घेतले पाहिजेत; त्यावरून त्याणें दिल्लीचा बादशाहाची

\+ लाट ह्मणजे मोठ्या उमरावासारिखें पद आहे.

सनद त्या परगण्याविषयीं संपादन करून, मद्रासेंत जो कोणी मुख्य साहेब होता त्यास आज्ञा देऊन त्याणें राजमंड्री शहर घेतलें. त्यावरून निजाम अल्लीस राग येऊन बोलिला कीं, आतां आम्हीं इंग्लिशांला अगदीं निर्मूळ करून टाकूं; त्यानंतर त्याणें हैदरास शिकविलें कीं, तुम्हीं कर्नाटकांत जाऊन इंग्लिशांहीं घेतलेला मुलुख सोडवा; तेव्हां तो अनर्थ चुकवावयाकरितां हैदराशीं स्नेह करावयास कांहीं बोलण्यानिमित्त वकील पाठविला. परंतु तो हैदर वकिलास आपल्याकडे येऊंच देईना. हें वर्तमान त्यादास समजलें तेव्हां त्याणें मद्रासच्या साहेबास लिहिलें कीं, हल्लीं हैदर व निजाम व मराठे यांची एकचित्तता आहे, त्यांत मराठे व निजाम यांचें पहिलें वैमनस्य होतें, त्यावरून असें दिसतें कीं निजामाशीं स्नेह करावा मग त्याचा साहाय्यें करून हैदर व मराठे यांचा मर्यादेंत वागावयास फार सुलभ पडेल. मग तो स्नेहाची गोष्ट निजामास कळविली तेव्हां त्यास तें बरें वाटलें, कांकिं, त्याचा मनांत होतेंच कीं, हैदरास जिंकून मर्यादेंत ठेवावा. परंतु त्याचा मनांत आलें कीं. एकदांच उभयतांशीं न बिघडावें; मराठ्यांशीं गुप्तपणें जो तह केला आहे तो तसाच राखून आधीं हैदर जिंकावा त्यावरून त्या निजामानें इंग्लिशांशीं स्नेह करून चारी परगण्यांची सनद दिली; आणि त्यांपासून प्रतिवर्षी सात लक्ष रुपये घ्यावे असा करार करून, त्याशिवाय जा वेळेस गरज लागेल ते वेळेस आपल्या चाकरीस इंग्लिशांचीं दोन पलटनें व सहा तोफा सिद्ध असाव्या; त्याचा खर्च चाकरी पडेल ते समयीं आम्ही देऊं; असें निजामानें कबूल केलें.

इकडे मराठ्यांचे दरबारीं इंग्लिश व निजाम यांचे मनांतील संकेत कळले असतील असें वाटतें; कांकिं, सन सत्राशें सदसष्टांचे जानेवारींत माधवराव आपल्यास निजामानें पूर्वील संकेताप्रमाणें येऊन मिळावयाची वाट न पहातां एकाएकी कृष्णेपलिकडे लष्करसहित जाऊन दोहों महिन्यांत शिरा, व उसकटा घेतला व हैदरापासून तीस लक्ष रुपये घेऊन करनाटकचे दुसरे जे कोणी मोठे मोठे होते त्यांपासून सत्रा लक्ष रुपये घेतले, आणि तें सर्व द्रव्य जमा करून. निजामाची सिद्धता आली नाहीं तोंच आपण आपले मुलखीं माघारा आला. नंतर निजाम व इंग्लिश या दोघांहीं पेशव्यास त्या नेलेल्या द्रव्याची वांटणी मागीतली; तेव्हां तो त्यांस तुच्छ मानून मान्य झाला नाहीं.

नंतर निजामअल्ली तो इंग्लिशांचा पक्ष सोडून हैदराकडे मिळून इंग्लिश जिंकावयाची मसलत बांधूं लागला. मग सन सत्राशें अडसष्टाच्या फेब्रुवारीचे तेविसाव्ये तारिखेस तो निजाम हैदराचा पक्ष सोडून पुनः इंग्लिशांशीं स्नेह करिता झाला. त्यांत पूर्व स्नेहापेक्षां इतके अधिक झालें, तें असें.

निजाम

निजाम आणि इंग्लीश या उभयतांचा मतें असें ठरलें कीं, हैदर अल्ली ह्मणजे केवळ बंड याचा मानरक्षणाचें आपणास प्रयोजन नाहीं, त्यास याचा मुलुख घेऊन चित्तास येईल तो प्रकार केल्यास दोष किमपि नाहीं. त्यावरून निजामानें नेम केला कीं, हा हैदर दिल्लीचा बादशाहाचा ह्यानंचा दक्षिणेचा अधिकारी स्थापित आहे; त्यापेक्षां कर्नाटक बालेघाट घेऊन किंवा, त्या स्थानांतून हैदरास भ्रष्ट करून, तेथचें वहिवाटीस इंग्लिशाला दिवाण करीन. याशिवाय बसालतजंगास गंटूर परगणा जहागीर आहे तोही बसालतजंग मेल्या असतां, अथवा त्याचे वर्तणुकेंत अंतर पडलें असतां मीं इंग्लिशास देईन. त्याचे पाठिमागचे वर्षी रघुनाथराव मल्हारराव होळकरास बरोबर घेऊन हिंदुस्थानची स्वारी करावयास गेला; तेसमयीं तो +मल्हारराव मृत्यु पावला. त्या योगें रघुनाथरायानें कल्पिलेले अर्थ सिद्धीस न गेले, व पूर्वी पानपतचे लढाई नंतर गोहदचा राणा एक जाट होता, त्याणें पेशव्याचा पक्ष सोडून विपरीत वर्तणूक केली यास्तव रघुनाथरावानें त्याचा पारिपत्यासाठीं त्याचा शहरास घेरा घातला, आणि कित्येक वेळा युद्ध प्रसंग करून शेवटीं तो किल्ला हातास येत नाहींसा समजून त्यापासून तीन लक्ष रुपये खंड घेऊन माघारा दक्षिणेस आला. त्याचे आगोधरच माधवराव पेशवा कर्नाटकांत जाऊन गोहचला होता, त्याणें काकास निरोप पाठविला कीं, आपण टोक्यास येऊन मला भेटावें. तेव्हां काकानें तर आनंदीबाईचा सांगण्यावरून मुलखाचा अर्धा भाग घ्यावा अशी मसलत केली होती, त्यावरून त्यास वाटलें कीं, माझी मसलत फुटली; त्यास तेथें गेलों तर माधवरायाचा कैदेंत सांपडेन. या शंकेनें तो टोक्यास जाईना, मग गोविंद शिवरामाचा योगें करून निर्भयपणें तेथें गेला. तेव्हां पेशव्याचा मनांत होतें कीं, त्या काकास बारा तेरा लक्ष रुपये वर्षास उत्पन्न होतील अशी गोदावरीचे उगमीं जहागीर करून द्यावी; तीचा उपभोग करून, काकानीं कारभार न करितां स्वस्थ असावें. परंतु त्या रघुनाथरायास राज्याचा अर्धभाग पाहिजे होता, ह्मणून तें देणें त्याचा मनास येईना; तरी त्याणें त्याप्रमाणें घेतलें, तथापि त्याचें मन संतुष्ट न झालें. त्यापुढें पर्जन्यकाळ समीप आला तेसमयीं रघुनाथरावानें पंधरा हजारांवर सैन्य जमा करून चांदोरचा डोंगरांत धोरप ह्मणोन किल्ला आहे तेथें त्या लश्करासहित जाऊन आपणास जानोजी भोंसला येऊन मिळावा अशी त्याची मार्गप्रतीक्षा करून त्याठिकाणीं राहिला.

\+ मल्हारराव होळकर मृत्यु पावला तेव्हां त्याचे जागीं त्याचा नातू मल्हारराव स्थापिला तोही लवकरच मेला. मग त्या मल्हाररावाचा दिवाण, व अहल्याबाई खंडेराव होळकराची नायका, याच्या त्या अधिकाराविषयीं वाद पडला. शेवटीं अहल्याबाईनें आपला भाऊबंद नव्हे असा कोणी एक पराक्रमी शिलेदार होता, तो त्या अधिकाराचा धनी केला.

त्याचे

त्याचें मनांत होतें कीं, आपणास पाहिजे तितकें राज्य बलात्कारें करून घ्यावें. त्या मसलतीस दमाजी गाइकवाड व होळकराचा दिवाण गंगाधर यशवंतराव होते त्यांत गंगाधर यशवंत रघुनाथरावाविषयीं अनुरक्त आणि पेशव्याविषयीं तो आंतल्या द्वेषी असे. कांकिं, पूर्वीं ज्यासमयीं रघुनाथरावानें राज्यकारभार टाकिला होता, तेसमयीं कोणे एके दिवशीं पेशव्याचे घरीं सभेमध्यें बोलतां बोलतां त्या गंगाधर यशवंतरावानें रघुनाथरावाची स्तुती व माधवरावाची निंदा दर्शिविली तेव्हां माधवराव कांहीं न बोलतां आपल्या आसनावरून उठून त्याजवळ जाऊन मोठ्या वेगानें एक त्याचा तोंडांत मारिली होती.

रघुनाथराव यास त्या डोंगरी ठिकाणीं पेशव्यानें फार दिवस राहूं दिला नाहीं कांकिं, त्यास भय उत्पन्न झालें कीं, काकाला जानोजी भोंसला येऊन कुमक करील, म्हणून मोठी त्वरा करून लश्कर सहित एकाएकीं जाऊन त्या रघुनाथरावावर पडून त्याचा लश्कराचा अगदीं पराभव केला. तेव्हां तो रघुनाथराव त्याधोरप किल्यामध्यें शिरला. मग तो किल्लाही घेऊन त्या काकाला धरून पुण्यास आणिला.

त्या वेळेस पर्जन्यकाळामुळें पेशव्यास जानोजीचा पारिपत्याकरितां पुढें जावयास अवसर झाला नाहीं; परंतु दुसरे वर्षीं सन सत्राशें एकुणसत्तरांत पेशवा आपल्या सैन्यासहित बरोबर रुकनउदवला नामें मोंगलांचा वजीर फौजेसुद्धां घेऊन नागपुरास चालिला. तेसमयीं जानोजी आपल्या संरक्षणार्थ युद्धाचे तयारीच्या चांगला बंदोबस्त करिता झाला. तो पेशव्याचा समूर युद्धास उभा राहिना, आणि आमेदनगरा पलिकडे जाऊन, पुण्याचे आसमंतात लुटता झाला. इतक्यांत माधवराव पेशवा याणें त्याचा प्रांतांत जाता सर्व जागीं ठाणीं बसवून वसूल घेतला. मग चांदा किल्ला यास घेरा घालून गोपाळराव पटवर्धन व रामचंद्र गणेश यांजबरोबर बत्तीस हजार स्वार देऊन जानोजी भोंसल्याचे पाठीस लाविले. तथापि पुण्याचे आसमंतात जो उपद्रव होत असे त्याचा प्रतिबंध न झाला. कांकिं, त्या दोघांहीं त्या जानोजीशीं आंतून गुप्तपणें स्नेह ठेविला होता, त्यावरून पेशवा चांदाचा घेरा उठवून, गोदावरीकडे आला तेसमयीं त्या जानोजीनें असा आकार दाखविला कीं आतां त्याचा समूर जाऊन लढतों, परंतु त्याचा मनांत तसें नव्हतें. कांकिं, त्याणें पेशव्याचें लश्कर माहुरासमीप एकीकडे टाकून वाट धरिली. तेवेळेस त्याचा कोणी एक सरदार बापू करंद्या नामें होता, तो त्या जानोजी कडून येऊन पेशव्याचे लश्करचा बुणग्यावर पडून कांहीं लूट घेऊन गेला. त्या पुढें पेशव्यास जानोजी भोंसला हे उभयतां युद्ध ठीक नव्हे असें समजून मार्चाचे तेविसाव्ये तारिखेस तो

ना

चा नद भीमेचे उत्तरकांठीं कंकापुरीं झाला. त्यांत असें ठरलें कीं, पूर्वीचा दिलेल्या बत्तीस लक्षांचा मुलुखापैकीं आठां लक्षांचा मुलुख पेशव्यानें त्याकडे राखिला होता. तो घ्यावा; आणि अक्कलकोटचा राजा फत्तेशिंग भोंसला याचे जमीनीचा कांहीं वसूल होईल तोही पेशव्यानें घ्यावा. याशिवाय पेशव्याचे लष्करचा कोणीशिलेदार रुसून येईल तो जानोजीनें आपल्याजवळ बाळगूं नये. याखेरीज दक्षिणी सुभेदार, व दिल्लीचा बादशाह, व अयोध्येचा नवाब, व इंग्लीश व रोहिले, यांतून कोणा एकाशींही त्या भोंसल्यानें राजकारणीं मसलत करूं नये. याप्रमाणें कबुलात होऊन त्यादिवसापासून पांचांवर्षीनीं पांच लक्ष व एक रुपया पेशव्यास द्यावे. असें ठरलें. या करारांत आणखी प्रकार पुष्कळ होते. परंतु जे त्यांत मुख्य ते लिहिले. पेशव्यानीं करार केला कीं, कधीं हिंदुस्थानांत सैन्यासहित जावें लागल्यास वाटेनें जानोजी भोंसल्याचा मुलखास उपद्रव देऊं नये. जर दुसरा कोणी तिकडे स्वारी करील तर लष्कर पाठवून जानोजीचें साह्य करावें.

या प्रमाणें पेशव्यास जो लाभ झाला त्यांपैकीं निजामास तीन लक्ष रुपये वर्षास पावूं लागले; व त्याचा वजीर रुक्कण अदवला, यास प्रतिवर्षीं एक लक्ष रुपये माधवरावापासून पावूं लागले.

इकडे कर्नाटकांत, हैदर अल्लीनें इंग्लिशांशीं कांहीं स्नेह करून आपल्ये पुष्टीकरणार्थ समयविशेषीं ते आपल्ये उपयोगी पडतील असें जाणोन तो मराठ्यांचें भय मानिनासा झाला. मग तो आपण मराठ्यांस खंडणी न देतां, पेशवेपक्षाचा कोणी पाळेगार होता त्यापासून खंडणी घेता झाला. असें त्याचें विपरीताचरण कळलें तेव्हां माधवराव पेशव्यानें बहुत स्वार जमा करून गोपाळराव पटवर्धन व मल्हारराव रास्ते वगैरे सरदार यांस त्यांबरोबर देऊन, त्याहैदरावर पाठविले. मग थोडक्याच अवकाशानें आपण वीस हजार स्वार व पंधरा हजार पायदळ बरोबर घेऊन त्यांचे पाठिमागून गेला; तो तात्काळ दोन्हींबाळापुरें व कोल्हार व नंदीदुर्ग व मनवगळ, यांखेरीज सोळा किल्ले व पंचवीस भुइकोट घेता झाला. असें वर्तमान सन सत्राशें सत्तरांत घडलें.

मनवगळचा किल्ला घेतांना असें झालें कीं, घाडगे कुळाचे विभागी दोघे एक बुधकर नामें, दुसरा मलावरीकर नामें, या दोहीं कुळांचा वाद वतनाविषयीं बामणी वंश्य बादशाहापासून चालत आला होता तो, तेसमयीं नव्यानें उत्पन्न झाला. त्याची पंचाईत होऊन नागोजी नामें घाडगा होता, तो त्या घाडगेवतनाच्या अधिकारीसा ठरला, त्याचा प्रतिवादी, वाजी घाडगा नामें होता, तो जुझारराव घाडग्याचा वंश्य, त्याचा मनास ती पंचाईत येईना. तेव्हां तो माधवराव पेशवे यांजवळ बोलिला किं, आमचा वादास पंचाइत उपयोगी नाहीं

हीं, भाल्यानें जो जिंकील तो आमचा वतनाचा अधिकारी होईल. तेव्हां माधवराव याणें तशी आज्ञा न दिली. मग त्या किल्ल्याचा हल्ल्याचे वेळेस, असा नेम ठरला कीं, या दोघां वाघांत ज्याचें निशाण जरीपटक्याचा निशाणापुढें जाऊन, या किल्ल्याचा तटावर आधीं चढेल तो वतनाचा अधिकारी होईल. याप्रमाणें कल्पना निघाल्यानंतर बाजी घाडगा प्रतिवादी याचा निशाण धरणारा सरदार हल्ला करतेसमयीं पडला, आणि जरिपटक्याचा धरणारा ढमढेरे नामें सरदार होता तोही पडला. तेव्हां नागोजी आपलें निशाण घेऊन पुढें सरोन, तो जरिपटका उचलून मोठ्या वेगानें किल्ल्यांत शिरून, त्याचा तटावर जाऊन तेथें आपलें निशाण उभें करून त्याचाच काठीवर जरिपटका उभारिला. तें पाहून सर्व मराठे लोक मोठ्या हर्षानें नागोजीची प्रशंसा करित होत्साते परम जय जयकार शब्दानें करिते झाले. याप्रमाणें शौर्येंकरून मराठ्यांहीं तो किल्ला घेतला; परंतु त्यांत एक मोठी अपकीर्ती झाली ती अशी; तो किल्ला घेतल्यावर जे त्यांत शिपाई लोक होते ते सर्व मारून टाकिले.

यापुढें माधवरावाचे प्रकृतीस बरें वाटेनासें होऊन, त्यास जून महिन्यांत माघारें पुण्यास यावें लागलें; परंतु तेथचें कार्य सिद्धीस न्यावयासाठीं वीस हजार स्वार व सारें पायदळ त्याणें तेथें त्रिंबकराव मामाचे स्वाधीन करून ठेविलें. मग पर्जन्यकाळ गेल्यावर माधवराव सैन्य घेऊन त्रिंबकराव मामास जाऊन मिळावें ह्मणून पुनः निघाला. तेव्हांही त्याचे प्रकृतीस समाधान नाहीं असें झालें, यास्तव पूर्वीं पानपतचे लढाईंत मृत्यु पावला जो बळवंतराव त्याचा पुत्र आपा बळवंत, यास तें कार्य सांपवून आपण माघारा पुण्यास आला. त्यानंतर सनसत्राशें एकाहात्तरांत तो आपा बळवंत जाऊन त्रिंबकराव मामास मिळाला, ते समयीं त्या दोघांचें मिळून सैन्य तोफखाना खेरीज करून चाळीस हजार स्वार व दहा हजार पायदळ जमा झालें; त्यावेळेस हैदराकडे बारा हजार स्वार व पंचवीस हजार पायदळ व चाळीस तोफा होत्या; तरी तो मराठ्यांचा भयास्तव युद्धास निघेना, तेव्हां त्रिंबकराव मामा याणें तो हैदर अलीस बाहेर निघावयासाठीं युक्तीनें लटकेंच वर्तमान उठविलें कीं, त्रिंबकरावानें आपलें अर्धें लश्कर दुसऱ्या कामास पाठविलें; तें त्यास सत्य वाटून तो हैदर धैर्येंकरून बाहेर आला, परंतु युद्धसमयीं त्यास पुरतेपणें समजलें कीं, आह्मी फसलों, तेव्हां तो आपलें पूर्वींचें शौर्य टाकून युद्ध न करितां केवळ घाबरेपणानें पळाला, आणि श्रीरंगपट्टणीं स्थान धरून राहिला. तेवेळेस त्याचा सर्व तोफखाना, व राहुट्या, डेरे वगैरे सरंजाम व पंचवीस हत्ती हें सर्व मराठ्यांचे हातीं लागलें. यानंतर त्रिंबकरावानें

त्या

त्या श्रीरंगपट्टणासही घेरा घातला, आणि तेथें त्या स्थानाविषयीं सवा महिन्यापर्यंत अटून पाहिलें; परंतु तें स्थान हातीं लागेना तेव्हां तें सोडून त्या मुलखाची खंडणी घेत चालिला; तेसमयीं त्याची मसलत होती कीं, सुंदाव बदनूर हे दोन परगणे घ्यावे, परंतु त्याचे आरंभींच असें वर्तमान आलें कीं, पुण्यांत माधवराव पेशव्याचे प्रकृतीसफार अजार झाला आहे, असें एकून त्याला पुण्यास माघारें जावें अशीउत्कंठा लागली. वास्तव तो त्या वेळेस हैदराने तहाचें बोलणें लाविलें होतें, त्यास आपण मान्य होऊन तह करिता झाला. त्यांत असें ठरलें की, पूर्वी शिवाजीचे वेळेस कर्नाटकचा मुलुख जितका मराठ्याकडे होता, तो त्योंहीं घ्यावा. याशिवाय मदगिरी व गरमकोंडा हे दोन्ही किल्ले त्रिंबकराव मामानें घेतले होते, तेही मराठ्याचे स्वाधीन असावे. याखेरीज तुर्त लश्करखर्च हैदरानें मराठ्यांस छत्तीस लक्ष रुपये द्यावा आणि प्रतिवर्षी चवदालक्ष रुपये खंडणी द्यावे यास अंतर करूं नये. याप्रमाणें ठराव सन सत्राशें बहात्तरांत झाला.

इकडे माधवरावास पुणेंयेथें कफोद्रव होऊन हैराण होता, तो कफपर्जन्यकाळांत उपशम पावोन, त्याची प्रकृती बरी होईल अशी दिसायाला लागली.

मग हिंदुस्थानांत पानपतचे लढाई पासून काय काय वर्तमान झालें तो प्रकार असा. तें युद्ध सनसत्राशें एकसष्टांत झालें; त्यांत अब्दाली बादशाह जय पावला, नंतर त्याणें दिल्लीचा पहिल्या बादशाहाचा औरसपुत्र, शाह अलं, तो तेसमयीं दिल्लीपासून दूर बंगाल्याचा नवाब व इंग्लीश याउभयतांशीं युद्ध करीत होता, म्हणून तो येई तोंपर्यंत त्याचा पुत्र जवानबक्त नामें होता त्याणें तें आधिपत्य चालवावें असें केलें. आणि त्याची वजिरी अयोध्येचा नवाब सुजाअदवला यास सांगीतली व नजीबअदवल्यानें पूर्वी अमीरउलउमरावपदवी संपादिली होती; ती पुनः त्यास दिली. इतकीं कार्यें करून तो दिल्लीस गेला. तेसमयीं नजीबअदवला दिल्लीचा बादशाहाजवळ राहिला, आणि सुजाअदवला तो आपल्या अयोध्येस जाऊन तेथचा बंदोबस्त करून काशीस गेला. तेथें शाहअलं बादशाह येऊन तो व आपण उभयतां मिळून बुंदलखंडांत जाऊन झांशी घेतली. आणि त्या प्रांतांतून मराठे लोक यांस काढून द्यावयाचें काम आरंभिलें; तें सिद्धीसच गेलें असतें, परंतु मीर काशीम नामें बंगाल्याचा अधिकारी तो इंग्लिशांचे भयेंकरून पळाला. तो सुजाअदवला यास शरण आला; त्याचा अभिमानास्तव त्याणें इंग्लिशांशीं विरोध बांधिला; त्यायोगें तें काम तसेंच राहिलें. नंतर सन सत्राशें चौसष्टांत अकटोबराचे तेविसाव्ये तारिखेस बकसार शहराजवळ, त्याची व इंग्लिशांची गांठ पडली

तेव्हां

तेव्हां त्या उभयतांचें युद्ध होऊन सुजाअदवला पराभव पावला. आणि शाहअलं बादशाह इंग्लीश यांचा आश्रय करून राहिला. त्यापुढें दुसरे वर्षी आगष्ट महिन्यांत सुजाअदवला याणें इंग्लिशांशीं तह करून त्यांहीं आपला मुलुख घेतला होता, त्यापैकीं आल्हाबाद व ग्वोरा या दोहों खेरीज अयोध्येचें राज्य संपादिलें, आणि अबदालीनें दिल्ली दिल्लीचा बादशाहाची वजिरी तिला अडथळा न होईसा केला.

दिल्लीमध्यें जवानबख्त तो अबदालीनें तख्ताधिपती केला होता, तेथें नजीबअदवला याणें तें सर्व काम आपले हातीं ठेविलें; यास्तव शाहअलं बादशाह निर्बळ होऊन इंग्लिशापासून आल्हाबाद व ग्वोरा यांचें उत्पन्न खाऊन खाऊन राहिला, त्यास आशा होती कीं, इंग्लिशांचा आश्रयानें आपलें तख्त आपणास मिळेल.

जाटांचा राजा सुरजमल्ल तो हळू हळू बळाढ्य होऊन नजीबअदवला यास युद्धेंकरून मर्यादेंत ठेवावयाविषयीं त्याशीं लढून मृत्यु पावला. त्याचा पुत्र मल्हारराव होळकर याचा आश्रयेंकरून कांहीं दिवस दिल्ली सभोंवता घेरा घालिता झाला, परंतु त्या नजीबअदवल्यानें होळकराशीं कांहीं बोलणें करून त्याणें त्या सुरजमल्लाचा पुत्राचा पक्ष सोडून जावें असें केलें. तेव्हां तो मूल होळकर यास सोडून निघोन गेला. हें वर्तमान सन सत्राशें चोसष्टांत घडलें.

होळकराचा या स्वारी शिवाय सन सत्राशें एकसष्टांपासून सत्राशें एकुणहात्तरपर्यंत चंबळानदी पलीकडे मराठ्यांची स्वारी गेली नव्हती. त्या वर्षाचे समाप्तीस माधवराव याणें विसाजी कृष्णा यास सेनानायक करून, पन्नास हजार स्वार व पुष्कळ पायदळ व मोठा तोफखाना सिद्ध करून चंबळानदीपलीकडे पाठविता झाला. त्या विसाजी कृष्णानें सन सत्राशें सत्तरांत रजपुतांचा राजापासून खंडणीचा बाकी ऐवज राहिला असें निमित्त करून दहा लक्ष रुपये घेतले. त्यानंतर तो जाटाचे मुलखीं जाऊन खंडणी घेत घेत, भरतपुरसमीप गेला असतां, तेथें मोठें युद्ध होऊन जाटास जिंकिला, आणि त्यापासून दहा लक्ष रुपये रोख घेऊन पंचावन्न लक्ष रुपये हप्त्यानें घ्यावे असें केलें. यानंतर मराठ्यांचें लष्कर डिगचा किल्ल्याजवळ पर्जन्यकाळीं छावणी करून राहिलें असतां नजीबअदवला याणें तेसमयीं असा विचार केला कीं, मराठेलोक आपला बाप, व मेंगल्यापासून मृत्यु पावल्याचा सूड उगवतील असें जाणून पुढें अनर्थ न व्हावा यास्तव त्याशीं मैत्री करावयाविषयीं वकील पाठविला, आणि बोलणें लाविलें; त्यास विसाजी कृष्णा समजला, कीं,

या

या सलुख्यांत मराठ्यांचें हित आहे परंतु त्याजवरोवर रामचंद्र गणेश व महाद्जी शिंदा हे दोघे होते ते रोहिल्यांचा सूड घेण्याविषयीं फार आग्रह करिते झाले. मग असें ठरलें कीं. धण्याचे आज्ञेप्रमाणें वागावें त्यावरून तें वर्तमान त्याहीं पेशव्यास विदित केलें. त्याचें उत्तर आलें कि. नजीबअदवला व मराठे यांशीं शुद्ध स्नेह होणार नाहीं. परंतु दिल्लीचा बादशाह शाहअलं. तो सांप्रत इंग्लिशांचा आश्रयास आहे; त्यास आपल्या आश्रयांत आणावयाची मसलत नजीबअदवल्याचे द्वारें शेवटास जाईल; यासाठीं तूर्त विसाजी कृष्णाचे विचारें चालावें. त्यावरून मराठे व मोंगल यांचा तह ठरला; मग त्या नजीबअदवल्यानें विश्वासार्थ आपला पुत्र जाबितारवान यास विसाजी कृष्णाजवळ पाठविला. त्यापुढें सन सत्राशें सत्तरांचे अकटोबरांत तो नजीब अदवला मृत्यु पावला. त्या वेळीं त्याचे जागीं त्याचा पुत्र दिल्लीस जाऊन आपल्या बापाचें काम चालविता झाला.

यानंतर मराठे त्यादिगचा छावणी पासून उठून दिल्लीवर कांहीं मोहीम नकरितां रोहिल्यांचा मुलुख सहज घेते झाले. त्यावरून इंग्लिशांला कांहीं आश्चर्य वाटलें; त्यांस ठाउक नव्हतें कीं मराठ्यांचें व शाहअलं याचें ऐक्य आहे. पुढें त्या शाहअलमानें इंग्लिशांस समजाविलें कीं, मराठ्यांचा आश्रयास जातों. मग मराठे रोहिलखंड सोडून सन सत्राशें एकाहात्तरांत पर्जन्यकाळाचे अगोधर दिल्लीस आले, त्यांहीं त्या जवान बख्ताचे मर्यादेस्तव दिल्लीचा आंतील किल्ला मात्र आपल्या सत्तेंत न आणिला, वरकड सर्व जागीं आपलें ठाणें घातलें. यानंतर महादजी शिंदा याणें इंग्लिशांकडे जाऊन शाहअलमास भेटून आपल्या लश्करांत विसाजी कृष्णाजवळ आणिला; तो बादशाह त्याच वर्षीचा दिसेंबराचे समाप्तीस मराठ्यांचा आश्रयानें दिल्लीचा तक्ताचा अधिपती झाला.

सुजाअदवला दिल्लींत मराठे होते तोंपर्यंत आपण त्या बादशाहाचे वजिरीचा कामास अंगें आला नाहीं, तथापि त्याची व मराठ्यांची ऐक्यता होती, कांकि, नजीब अदवल्याचा पुत्रास मराठे बुडविणार होते आणि सुजाअदवला याचा मनांत होतें कीं, रोहिले निर्बळ करून पुढें संपूर्ण मुलुख आपले सत्तेंत आणावा. त्यावरून मराठ्यांहीं जाबितारवान नजीबअदवला याचा पुत्र याचा बहुतेक मुलुख घेतला, ते समयीं रोहिले लोक त्यांस असे भीत होते, कीं. ते मोठ्या सुदृढ किल्ल्यांत असले तरी त्यांहीं मराठे येतात असें ऐकूनच तें ठिकाण सोडून पळावें. त्यापुढें सुजाअदवला समजला कि, जर मराठ्यांहीं रोहिले अगदीं जिंकिले तर आपलीही दशा नीच होईल. यास्तव त्याणें

रोहिले

रोहिले यांचे सरदार यांपासून चाळीस लक्ष रुपये घेऊन, त्या रोहिल्यांशीं संकेत केला कीं, तुह्मीं व आह्मीं मिळून मराठ्यांस रोहिलखंडांतून बाहेर घालवावयाचें.

इकडे दिल्लीमध्यें बादशाह याणें विसाजी कृष्ण व दुसरे कोणी ब्राम्हण होते ते केवळ अतृप्तस्वभाव असें जाणून फार पश्चात्ताप पावला आणि मनांत निश्चय करिता झाला कीं, कसेंही संकट प्राप्त झालें तरी या लोभी लोकांचा संबंध टाकावा. मग त्याणें आपल्या लश्करचा मुख्य सरदार नजीफखान यास सांगितलें कीं, मराठे युद्ध करून आपल्या मुलखांतून काढून द्यावे, हें सर्व वर्तमान विसाजीकृष्णास समजून तो विचार करिता झाला कीं, शेवटचा उपाय युद्ध, त्यावांचून दुसरी कांहीं युक्तीकरून जें कार्य साधेल तें बरें ह्मणून त्याणें तेथचा सर्व वृत्तांत पुण्यास लिहून पाठविला; त्यांत सुचविलें कीं, आतां कोणत्याप्रकारें वर्तावें, ती आज्ञा द्यावी.

त्या उत्तराची मार्गप्रतीक्षा करीत असतां, त्यास वर्तमान कळलें कीं, माधवराव थेऊरास मृत्यु पावला; ते समयीं त्याचे वयास अठ्ठावीस वर्षें झालेलीं होतीं. त्यास पुत्र किंवा कन्या कोणी अपत्य नव्हतें त्याची स्त्री रमाबाई तिचीव त्याची फार प्रीती असे; ती त्याबरोबर सती गेली. असें वर्तमान सन सत्राशें बहात्तरांचा नवेंबराचे अठराव्ये तारिखेस घडलें.

तो माधवराव अनेकगुणसंपन्न होता; त्याणें युद्धादिकार्यनैपुण्येंकरून मोठी ख्याति मिळविली, परंतु त्याची राजनीतिदक्षता अशी होती कीं, तिचापुढें त्याची शौर्यप्रशंसा हलकी. तो राज्य करूं लागला तेवेळेस त्याचा मुख्य कारभारी फारादिवसांचा आणि मोठा चतुर असा सखाराम बापू नामें होता तो लोभी असूनही त्याचा चातुर्यामुळें लोकांस त्याची भीड फार असे; त्याचापुढें माधवराव राज्यारूढ असतांही त्याचा मान तादृश होइना, आणि रघुनाथराव तोही मोठा पराक्रमी त्यामुळें त्याची प्रशंसा होइना. पुढें त्याणें रघुनाथरावाला बंदीस घातला त्यापासून त्यास कांहींसे लोक मानूं लागले; मग त्याणें त्या सखाराम बापूला आपल्ये प्रतिष्ठेस प्रतिपंथी असा जाणोन एक दिवस एकांतीं त्याला नेऊन विचारिलें कीं, या लोकांत माझा मान किमपि दिसत नाहीं; त्यास मी अयोग्य आहें किंवा दुसरें कांहीं कारण आहे तें सांगा, व यास उपाय काय तो सांगा, त्यावर त्याणें त्याचे मनांतील अर्थ समजून उत्तर केलें, कीं, याचें कारण मीच आहें त्यास मोरोबा फडनवीस याला कारभार सांगावा. असें त्याणें शहाणपणाचें उत्तर केलें त्यावरून माधवराव प्रसन्न होऊन, त्या सखाराम बापूनें आपली जहागीर खाऊन स्वस्थ रहावें असें केलें; आणि मोरोबा

फडनवीस

फडनवीस यास कारभार सांगितला.

याप्रमाणें माधवराव मोकळेपणा पावल्यावर पुढें तो कांहीं मोठें कार्य करणें तर तें आपल्ये आज्ञेवांचून करूं देत नसे. त्याणें त्यावेळेस लोकवृत्त समजावयास अनेकप्रकारचे उत्तम कायदे केले. तो माधवराव राज्य करीत असतां, त्यास सुद्धा रंदरोज कधीं रिकामपण सांपडलें तर त्या अवकाशांत तो आपल्या प्रजेस कोणेप्रकारें सुख होईल तो अर्थ पहात असे, कोणेही ठिकाणीं फिर्याद झाल्यास त्याचा न्याय शुद्ध करण्याविषयीं त्यास मोठी आवड होती; याविषयीं त्याणें कोणी एक रामशास्त्री नामें ब्राह्मण बाळगला होता; तो फार उपयोगी असे, त्या रामशास्त्र्यानें जाजा युक्ती करून पंचाइती ठरविल्या ते ठराव अद्यापि त्याचे उपयोगी पडतात. तो रामशास्त्री चांगल्या वागणारास सुमार्गदर्शी आणि खळास यमसदृश होता; तो सातान्यानजीक माहुली क्षेत्रीं जन्मला. त्याचें अडनाव परभुणे तो तरुणपणीं विद्याभ्यास करावया करितां काशीस गेला होता. त्यास बाळकृष्ण शास्त्री याचा मृत्यु झाला तेसमयीं पुण्याचे दरबारीं त्याजकडून कांही यत्न नसतां बोलावून सर्वशास्त्री यांचा तो मुख्य केला; पुढें माधवराव योग्यतेस येऊं लागला तेसमयीं, तो त्यास नीतिविचार सांगत असे; त्याविषयीं एकगोष्ट आहे. तो प्रकार असा, कोणे एके समयीं माधवराव यास पंडितांचे भाषणेंकरून इछा झाली कीं, कांहीं तपस्या करावी. त्यामुळें माधवराव जप करूं लागला, मग एकदिवस तो जपास बसला असतां, रामशास्त्री कांहीं कामानिमित्त त्याजकडे गेला तेव्हां त्याजवळचा शिष्यांहीं सांगितलें कीं, यावेळेस श्रीमंताची गांठ पडणार नाहीं. कांकिं ते जपास बसले आहेत; त्यावरून तो आपल्या घरीं जाऊन विचार करिता झाला, कीं, जर याविषयीं वाद करावा तर ठिक नव्हे; त्यास याचा आश्रय सोडून जावें हेंच बरें. मग दुसरे दिवशीं तेथें जाऊन बोलिला कीं, मला काशीस जावयाची आज्ञा द्यावी. तें ऐकून माधवराव बोलिला कीं, आपण येऊन गेला तेसमयीं मी जपकरित होतों. त्यानिमित्तें आपली गांठ पडली नाहीं, त्यावर त्याणें उत्तर केलें कीं, आपण जें निमित्त सांगतां तें ब्राह्मणास योग्यच आहे; परंतु ब्राह्मण जर आपलें कर्म सोडून राज्य करूं लागले तर त्याणीं प्रजापालन करावें; तें टाकून जप करीत बसले तर तो अन्याय. त्यास जर आपल्या चित्तांत जपकरावा असें आहे तर हें सर्व राज्य टाकून मज बरोबर चलावें; मी तें आपणास पुर्तेपणें शिकवीन. त्यावरून माधवराव मनांत समजून त्याणें तें कृत्य टाकिलें.

सन

सन सत्राशें बहात्तरापासून
सत्राशेंपंचेहत्तरपावेतंव आलेलीं वर्तमानें
मिळून भाग येविसावा.

अनुक्रमणिका.

रघुनाथराव बंदींतून सुटला, परंतु नारायणराव पेशव्याचा कांहीं तंट्यामुळें पुनः बंदींत पडला.

नारायणरावाला मारेकरी यांणीं मारिला.

मराठ्यांचें सैन्य हिंदुस्थानांतून माघारें फिरलें. रघुजी भोंसल्या यास सेनासाहेब सुभा पदवी प्राप्त झाली.

निजाम अल्लीवर रघुनाथराव याचें युद्ध होऊन निजाम पराभव पावोन त्याणें रघुनाथरावास दिलेला मुलुख याणें त्यास माघारा दिला.

रघुनाथराव कर्नाटकांत गेला असतां, कारभारी लोकांहीं त्यास अहित अशी कांहीं मसलत केली.

त्रिंबकराव मामा रघुनाथरावाशीं युद्ध करून पराभव पावला.

मग रघुनाथरावानें हिंदुस्थानांत जाऊन इंग्लीश व होळकर व शिंदे यांशीं आपल्या साह्याच्यार्थ कांहीं बोलणें लाविलें.

पुण्यांत कारभारी लोकांमध्यें वैमनस्य पडून त्यांच्या दोन फळ्या झाल्या.

हैदर अल्लीनें कर्नाटकांतील मुलुख मराठ्यांचा घेतला.

विलायतेंतून कंपनी सरकारचे आज्ञेनें मुंबैहून कोणी वकील साहेब, पुण्यांत रहावयास गेला.

इंग्लिशांहीं सडोज किल्ला घेतला.

ठाणें नामें साष्टीचा किल्ला इंग्लिशांहीं घेतला.

शिंदा व होळकर, यांहीं रघोबाचा पक्ष सोडिला; यास्तव रघोबा बडोद्यास गेला.

गाइकवाडाचे कुमकेचें कांहीं वृत्त.

रघोबा व इंग्लीश यांचें बोलणें होऊन तह झाला.

त्याप्रमाणें त्याचे कुमकेस इंग्लिशांचें लष्कर आलें.

तेंव रघुनाथराव याचें लष्कर मिळून कसें कसें वर्तलें तो विस्तार.

आरासाजवळचे लढायांचा प्रकार.

जहाजांची लढाई.

फत्तेसिंग गाइकवाड याचा इंग्लीश व रघोबा यांशीं तह झाला.

रघुनाथराव

रघुनाथराव याचा उत्कर्ष, व माधवराव नारायण पेशवा याचा र्‍हास लोकांमध्यें दिसूं लागला.

भाग बेविसावा.

माधवराव पेशवा तो आपला अंतकाळ समीप आला असें जाणून पुढें रघुनाथराव याचें आनुकूल्य नसल्यास आणि कारभारी लोकांत वैमनस्य असल्यास आपला भाऊ नारायणराव यास राज्य संभाळावयाचें अवघड पडेल; असें समजून, त्याणें सखाराम बापूला जवळ बोलावून आपली दिवाणगिरी सांगितली. आणि रघुनाथराव काका यास बंदींतून काढून आपल्याजवळ नेला, आणि सखारामबापूचा देखतां मोठ्या अगत्यानें, कारभारी व धणी यांची एकचित्तता असल्यानें राज्यास फार हित आहे असें समजाविलें, मग आपल्या भाव्याला त्या दोघांचा स्वाधीन+ केला, नंतर तो माधवराव पेशवा मेल्यावर त्याचें उत्तरकार्य झाल्यानंतर त्याचा भाऊ नारायणराव तो सातान्यास जाऊन, राजाराम राजा याचे हातून पेशवे पदवीचीं वस्त्रें पावला. तेसमयीं त्या नारायणरावाचा नावास राजानें नवें कारभारी असें पद जोडून बजाबा पुरंधऱ्या यास त्याचा दिवाण केला, आणि नाना फडनविसास त्याची पूर्वजार्जित फडनविशी दिली.

तो नारायणराव पेशवा व त्याचा काका रघुनाथराव यांचा कांहीं दिवस स्नेह राहिला; मग रघुनाथराव याची बायको व नारायणराव याची आई या दोघींचें मन मिळेना, त्या योगें या दोघांचा द्वेष पडला. तेव्हां त्या नारायणरावानें आपले कारभारी मिळवून मसलत केली कीं, काकाला पुनः बंदीस घालावा. त्या कृत्यास सखाराम बापूचें मात्र अनुमोदन नव्हतें, तो ह्मणाला कीं, हें केवळ अनुचित कर्म दिसतें. मग एप्रेल्याचे अकराव्ये तारिखेस पुण्यांत नारायणरावजा वाड्यांत रहात होता त्यांतच एका खोलींत रघुनाथराव काका याचा प्रतिबंध केला.

या पुढें पेशवा याणें आपल्या कारभारी मंडळीचा लोकांमध्यें बजाबा पुरंदरे व नाना फडनवीस व हरिपंत फडके यांवर विश्वास ठेवून बहुतेक राज्यकारभार यांचे हातून चालवित होता. हे तिघे कारभारी यांचें व सखाराम बापूचें वैमनस्य असे; परंतु ते सारे शहाणे ह्मणून बाहेर असें दिसत होतें. कीं, मुख्य कारभारी सखाराम बापू.

जानोजी भोंसला तोही माधवरावाचे मरणसमयीं थेउरास होता. त्या

\+ स्वाधीन केला हा सर्व वृत्तांत थेउरास माधवरावाचे शरीरीं समाधान नसतां झाला.

णे पूर्वींच माधवरावाचे आज्ञेनें आपला भाऊ मुधोजी भोंसला याचा पुत्र रघुजी भोंसला तो दत्तक घेतला.

त्या मुधोजी शिवाय जानोजीला आणखी भाऊ होते; त्यांस संतती नव्हती. जानोजीनें तो मूल घेतल्यावर त्या मुलाचा बाप मुधोजी तोच त्याचा रक्षक केला असेल असें वाटतें, परंतु तो अर्थ निश्चित होत नाहीं. त्यापुढें दुसरे वर्षीं मे महिन्यांत. तुळापुराजवळ जानोजी भोंसला मरण पावला. तेव्हां त्याचा पुत्र रघुजी भोंसला याचा रक्षक कोण म्हणून जानोजीचे भाऊ मुधोजी भोंसला व साबाजी भोंसला हे दोघे भांडूं लागले; तेसमयीं जानोजीची स्त्री दर्याबाई भोंसली ती त्या दोघांपैकीं कोणासही मुलाचा रक्षक न करितां आपणच भोंसल्याचे राज्याचा कारभार करिती झाली. त्यावेळेस तिणें साबाजीला आपलें लष्करचें काम मुख्यत्वें सांगितलें; तेव्हां तो मुधोजी भोंसला आपणास हे समयीं युद्धावांचून दुसरा उपाय नाहींसा समजून लष्कर जमा करून युद्धास सिद्ध झाला. मग तो व त्याचा भाऊ साबाजी भोंसला यांची गांठ पडून कुंभारी गांव आकोल्याजवळ आहे तेथें युद्ध झालें. त्या प्रसंगीं मुधोजी भोंसला याचा अगदीं पराभव होऊन, तो आपल्या जीवाचे रक्षणासाठीं पळून गेला. मग पेशव्याचे योगें ते दोघे भाऊ युद्ध करणें टाकून, एकमेकांस भेटले असतां, त्या दर्याबाईनें एकाएकीं साबाजीला टाकून मुधोजीचा पक्ष अवलंबिला. असें झाल्यावर मुधोजी इलीचपुरचा कोणी मुख्य पठाण होता त्याचे साहाय्यें करून पुनः युद्धास उद्युक्त झाला, आणि साबाजी निजाम व पेशवे यांचा साहाय्यसंपादनार्थ यत्न करूं लागला. इतक्यांत असें झालें किं. नारायणराव पेशवा गारदी यांणीं मारिला; त्या अनर्थामुळें इतर सर्व मोठमोठीं कार्यें राहिलीं. असें सन सत्राशें त्र्याहात्तरांचा आगष्ट महिन्याचे तिसाव्ये तारिखेस झालें

गारदी यांणीं नारायणराव पेशवा मारिला, तो विस्तार असा. नारायणराव भोजन करून आपल्या महालांत त्यादिवशीं निजला होता, तेसमयीं त्या वाड्यांत एकाएकी गडबड मोठीच झाली ती ऐकून तो जागृत होऊन, पाहूं लागला, तों वाड्यांत गारदी लोक शिरले, त्यांत सुमेरशिंग, व महंमद यूसफ हे दोघे होते ते आपला रोजमुरा बाकी राहिला म्हणून कांहीं दांडगाई करितात. असेंही त्याचे दृष्टीस पडलें, आणि ते आपल्या अंगावर येतात असें पाहून तो पळत पळत आपल्या काकाचे खोलींत गेला. त्याचे पाठीस गारदी लोक लागले. त्यांत सुमेरशिंग फार निकट होता; तेव्हां तो आपल्या काकाचे शरीरास मिठी मारून बोलिला कीं, काका माझा प्राण रक्षण करावा. असें ऐकून रघुनाथराव मध्यें होऊन सुमेरशिंगास त्याचे रक्षणार्थ पुष्कळ प्रकारें बोलिला.

तेव्हा

तेव्हां सुमेरशिंग बोलिला कीं, मीं हें कार्य येथपर्यंत केलें तें जर आतां सोडिलें तर माझा नाश मी आपल्या हातें केला असा होतो. आतां तुम्हीं याची आशा सोडा, आणि यापासून लवकर दूर व्हा; नाहीं तर दोघे मेले जाल. तेव्हां रघुनाथरावानें आपल्या शरीराची मिठी सोडवून गच्चीवर पळून गेला; त्याचे पाठिमागें फिरून त्यास धरावयास नारायणराव तिकडे त्वरेनें जाऊं लागला असतां, कोणी एक हत्यारबंद रघुनाथरावाचा चाकर +तल्या पंवार होता, त्याणें त्या नारायणरावाचे पाय धरून मागें ओढून पालथा पाडिला. त्याच क्षणीं नारायणरावाचा चाकर परमविश्वासू *छापाजी टिळेकर नामें, तो हत्याररहित असूनही मोठ्या त्वरेनें धावोन आपला धणी आपल्या अंगाखालीं घालून, त्याचा रक्षणार्थ आपण त्यावर पडला. तेसमयीं सुमेरशिंग व तल्या पंवार या दोघांहीं एके जागीं बरोबर ते दोघे धणी व चाकर तरवारीनें ठार मारिले. हें वर्तमान बाहेर कळल्यावर सखाराम बापूनें हरिपंत फडक्याचे हातचें पत्र झालेल्या प्रकाराचें शोधास वाड्यांत रघुनाथरावाकडे पाठविलें, त्याणें उत्तर असें दिलें कीं, हें कृत्य गारदी लोकांनीं केलें. त्यावरून रघुनाथरावानेंच हें कृत्य केलें असा मनांत संशय उत्पन्न होऊन. हरिपंत फडके तेच वेळेस बारामतीस पळून गेले. आणि सखारामबापू याणें शहरचे लोक फार गडबडले होते. त्यांस धैर्य देऊन स्वस्थ केले. मग त्रिंबकराव मामा त्या वाड्यांत जाऊन, त्याणें तें पेशव्याचें प्रेत नेऊन जाळिलें.

रघुनाथराव त्या गारदी लोकांचे बंदीस बाकी रोजमुरा देण्याचे निमित्तें करून राहिला असतांही वकील व कारभारी लोक त्याजकडे जात होते. नंतर सर्व कारभारी लोकांचे मतें असें ठरलें कीं, नारायणरावास रघुनाथरावानेंच मारविला असेल; परंतु याचा निश्चय होत नाहीं, त्यास हाली याला पेशवे पदवी प्राप्त झाली ती याणें भोगावी.

याविचारास रामशास्त्रीही अनुमोदन देता झाला, परंतु तो बहुत युक्तीनें गुप्तपणें त्याचा आंतून बारीक शोध काढूं लागला. त्यावर दीड महिन्यानें त्यास पुरतेपणें तें सर्व विदित झालें. तेव्हां रामशास्त्री रघुनाथरावापाशीं जाऊन बोलिला कीं, हें अकर्म तुम्हींच करविलें; मी याचा पुरतेपणें शोध करून तुम्हाकडे आलों. असें त्याचें भाषण ऐकून रघुनाथराव याणें इतकेंच मान्य केलें कीं, मी त्यास धरावा असें मात्र पत्र दिलें होतें, हें वर्तमान खरेंच असेल कांकिं, पुढें तो रघुनाथरावाचा हातचा अस्सल कागद रामशास्त्री यास सां-

---

\+ तल्या ह्मणजे तुळाजी असेल.

---

* छापाजी ह्मणजे चांफाजी.

पडला, त्यांतील केवळ मुळच्या असा होता कीं, तो धरावा. त्या धकारावर कोणी आणीक शाई घालून मारावा असें केलें. तेंकृत्य आनंदीबाईचेंच असेल, असें सर्वांच्या मनांत आलें. नंतर रघुनाथरावानें त्यास धरण्याविषयीं पत्र लिहिलें हा अन्याय आपणापासून घडला असें मान्य करून रामशास्त्री यास विचारिलें कीं, या दोषास प्रायश्चित्त काय करावें; त्यावर त्याणें उत्तर केलें कीं, यास देहांत प्रायश्चित्त पाहिजे; कांकीं, तुमचें बाकी उरलें जें आयुष्य त्यांत तुह्मापासून सद्वर्तन होणार नाहीं. आणि यापुढें तुह्मी व तुमचें राज्य यांचा धडगतीं मला दिसत नाहीं, यास्तव इतःपर मी तुह्मी राज्य करित असाल तोंपर्यंत पुण्यास येणार नाहीं; आजपर्यंत सरकाराश्रित झालों होतों तोंनीं आतां नको. इतकें बोलोन तो शास्त्री तेथून निघोन वाई क्षेत्राजवळ एक लहानशा गावीं राहून कालक्षेप करिता झाला.

इकडे त्या गारदी लोकांचा बाकी रोजमुरा देऊन रघुनाथराव मोकळा झाल्यावर त्यास सातार्‍याहून पेशवे पदवीचीं वस्त्रें आलीं.

ज्या समयीं नारायणराव मारिला गेला तेव्हां त्याचें वय केवळ अल्प अठरा वर्षांचें होतें; तितक्यांत त्याचे गुण अथवा दुर्गुण हे लोकांस दिसून आले नाहींत, परंतु त्याचा धैर्याविषयीं एक कथा आहे ती अशी. माधवराव पेशवा असतां हे दोघे भाऊ पुण्यामध्यें गुलटेकडीकडे हत्तींची लढाई पहात बसले असतां त्यांतून एक हत्ती मोठ्या त्वरेनें जेथें ते दोघे बसले होते तेथें समोर धांवोन आला तेव्हां त्यांजवळचे जे चाकर लोक वगैरे ते सर्व पळाले. तेसमयीं तो नारायणरावही उठून पळावयास सिद्ध झाला. इतक्यांत माधवराव त्याचा हातास धरून बोलिला कीं, तूं जर पळालास तर तुजविषयीं आकबर लिहिणारे काय लिहितील. तें ऐकतांच तो त्याजवळ स्थीर बसला. नंतर तो हत्ती केवळ निकट येऊन पोंहचला असतां कोणी एक आपाजीराव पाटणकर नामें मराठा शिलेदार तो मोठ्या धैर्यानें धांवत येऊन, नारायणरावाचे पुढें होऊन हत्तीचा सोंडेंत खंजीर खुपसून त्याणें त्या हत्तीला एकीकडेस केला.

हिंदुस्थानांत लष्कर सुद्धां विसाजी कृष्ण होता तो असें इच्छित असे कीं, मोगलांशीं युद्ध न होतां, सलुख्यानेंच कार्य साधावें; परंतु तें न होतां सन सत्याशें बहात्तरांचा डिसेंबराचे एकुणिसाव्ये तारिखेस दिल्लीजवळ त्याचा व मोगलांचा युद्धप्रसंग आला. त्यांत मराठे जय पावले, नंतर त्यांशीं व बादशाहाशीं तह झाला, त्यांत असें ठरलें कीं, पेशव्यास बादशाहापासून वक्षीपदवी असावी आणि त्याचा हस्तक जो कोणी त्याणें त्या कामावर ठेवावा, आणि

... जाप्यापासून बादशाहानें सरंपूर घेतलेले होतें ते त्याचे त्यास द्यावें. याखेरीज निजामअल्ली नवीन अदवन्यापासून खाग व खगा हे दोन परगणें घेतले ते बादशाहाकडे अमल लेहून द्यावें. याप्रमाणें करार झाल्यावर विसाजी कृष्ण लष्कर सुद्धां पर्जन्य काळाचे अखेरीस पुण्यांत दाखल झाला.

जानोजी भोसल्या याचा दत्तपुत्र रघुजी भोसला तो रघुनाथराव पेशवे पदवी प्राप्त झाली असता आपली माता जानोजीची स्त्री दर्याबाई व मुधोजी भोसल्या यांसहित जाऊन पुण्यास मिळाला; त्या रघुजीस सेनासाहेब सुभा पदवी प्राप्त झाली. नंतर रघुजी व दर्याबाई तेथून निघोन वराडाकडे गेली परंतु मुधोजीनें पाहिलें कीं, साबाजी आपणापेक्षां बळाढ्य म्हणोन तो पुण्याजवळ राहिला.

याप्रमाणें दक्षिणेंतील वर्तमान असतां हैदर व निजाम यांचा राज्यांत समजली होत्या कीं, मराठ्यांत वैमनस्यें पडोन फार अव्यवस्था झाली आहे, त्यास यासमयीं कांहीं आपला लाभ पहावा. त्यांत निजाम याची सिद्धता अझाली नाहीं तोंच रघुनाथराव मोठी त्वरा करून त्या निजामावर चालून गेला. तेव्हां त्यास असें अगत्य पडलें कीं, जो प्रतिवर्षीं वीस लक्ष रुपये द्यावे असा मुलूख देऊन तह करावा. अशी लक्ष्मी त्या रघुनाथरावास मिळाली ती जर तो आपले मराठे मुख्य सरदार यांस वांटून देता तर त्याचे पेशवे पदवीस दृढता येता; परंतु तें न करितां त्याणें निजामाचा गोड गोड गोष्टी अशा ऐकिल्या कीं, तुम्ही व आम्ही बहुतां दिवसांचे सोबती त्यावरून मोहित होऊन तो वीस लक्ष रुपयांचा मुलूख घेतला होता तो त्यास माघारा दिला. त्यावेळेस जे त्याचे अनिष्टचिंतक होते त्यांस मोठा हर्ष झाला कीं, हा एवढा मूर्खपणा झाला यायोगें हा लवकरच बुडेल. असेंच आणीक एक त्यांस हर्ष होण्याचें कारण झालें तें असें, औरंगाबादेजवळ साबाजी भोसला लष्कर सहित होता त्यावर त्र्यंबकराव मामास पाठविला, आणि आपण कर्नाटकांत जाऊन हैदर व इंग्लीश यांशीं युद्ध प्रसंग करावयाची मसलत केली. त्यावरून त्या अनिष्टचिंतकास त्याचे पेशवे पदवीस कांहीं विघ्न उत्पन्न करण्यास तो दूर गेल्यावर पाठिमागें सुलभ पडेलसें वाटलें. त्यावरून सखाराम बापू व नाना फडनवीस हे दोघे त्या रघुनाथरावाचें लष्कर सोडून माघारे पुण्यास आले. मग थोडक्या अवकाशानें मालोजी पवार व रास्त्या, व बाबूजी नाईक बारामतीकर, व मोरोबा फडनवीस, व बजाबा पुरंदरे, वगैरे लष्कर सोडून कांहीं निमित्त करून माघारे पुण्यास आले. तेसमयीं त्या रघुनाथरावाचे निकटवर्ती लोक आणि तो रघुनाथराव यांखेरीज सर्व लोक समजले कीं, रघुनाथरावास अहित अशी कांहीं मोठी

मसलत

मसलत आहे, त्यावेळेस पुण्याचा कारभार चालविणारे सखाराम बापू व त्रिंबकराव मामा व नाना फडनवीस व मोरोबा फडनवीस व बजाबा पुरंदरे व आनंदराव जिवाजी व हरिपंत फडके इतके असत, ते पेशवे कुळाचे योगें वाढले. शाहु महाराजाचे अष्टप्रधान त्यांशिवाय दुसरे होते. असें असतां तेवेळेस त्या अष्टप्रधानास बसवून कारभार हे चालवित होते. यांहीं ज्या मसलत केली लोकांस पहिल्यानें कळली नाहीं, शेवटीं या कारभाऱ्यांनीं असें केलें कीं, नारायणरावाची स्त्री गंगाबाई गरोदर होती ती, आणि दुसऱ्या कांहीं गरोदर स्त्रिया तीज बरोबर नेऊन तिला त्यांसहित पुरंदर किल्यावर ठेविली, आणि जे रघुनाथरावाचे पक्षी होते त्यास बंदीस घालून कारभार त्या गंगाबाईचे नावें चालविला, तेव्हां लोक समजले कीं, गंगाबाईस पुत्र होईल अथवा त्यांतून एकीचा पुत्र तो गादीचा अधिकारी करून रघुनाथरावास भ्रष्ट करावा अशी मसलत आहे. या कारभारी लोकांहीं त्यावेळेस निजामअली व साबाजी भोंसला हे आपल्ये मसलतीस अनुकूल केले; आणि रघुनाथरावाचा लश्करांत मुख्य कारभारी कृष्णराव बळवंत तोही इकडून कांहीं सुचना झाली असतां, या मसलतीस अनुसरलेला केला. असें सनसत्राशें चवऱ्याहात्तरांत झालें.

याप्रमाणें पुण्यांचें वर्तमान असतां, रघुनाथराव कर्नाटकांत बलारीपलीकडे जाऊन त्याणें हैदराशीं कांहीं बोलणें लाविलें होतें ते समयी त्यास अशी द्रव्याची गरज लागली कीं, त्या हैदरानें कांहीं नगद रुपये देऊन पुढें पंचवीस लक्ष रुपये पर्यंत द्यावयाचा करार केला असतां, त्या रघुनाथरावानें करनाटकांत मराठ्यांचे तीन परगणे होते ते त्या हैदरास दिले. त्यानंतर त्यास पुण्याची मसलत कळली तेव्हां त्याचे मनांत होतें कीं, अर्काटच्या नवाबाच्या मुलुख लुटावा तें सोडून त्याणें त्या हैदराशीं तह करून ठरविलें कीं, वर्षास सहा लक्ष रुपये खंडणी तुह्मासच देऊं आणि पेशवे तुह्मीच. मग त्या रघुनाथरावास कोणी सांगितलें कीं, तुमचा लश्करांत सरदार लोक कृत्रिमी आहेत. त्यात भवानराव प्रतिनिधी मुख्य; त्यास तुह्मीं आपली सावधगिरी करा. त्यावरून प्रतिनिधीस त्याणें विचारिलें कीं, तुह्मीं तीनशें स्वारांनिशीं आपल्या अधिकाराप्रमाणें चाकरी करावी असें असतां तुह्मास चार हजार स्वार ठेवायाचें प्रयोजन काय. त्यावर तो कांहीं उत्तर देइना तेव्हां मुरारराव घोरपडे सेनापती यांस सांगितलें कीं, भवानराव प्रतिनिधी याचें लश्कर लुटा; त्यावर त्याणें उत्तर केलें, कीं, तुमचा जो दुष्ट असेल त्यावर आह्मी जाऊं. हा आपले घरचा खटला यांत आह्मी शिरणार नाहीं. मग वामनराव गोविंद पटवर्धन व दुसरे सरदार यांला क्रमेंकरून तेंच सांगितलें असतां, त्यांणीही तेंच उत्तर केलें तेव्हां त्याणें आप-

ले

ले खासगीचे लोक व कांहीं तोफा घेऊन त्या लश्करांतून बाहेर निघाला; तरी प्रतिनिधी त्याणें पुसल्याचें उत्तर देइना. आणि त्या प्रतिनिधीचा जवळचे शिपाई लोक बहुतकरून मानव येरव्या नदीचे कांठीं रहाणारे होते. त्यांहीं प्रतिज्ञा केली कीं, आमचा धन्याचे जिवास जर बरें वाईट होईल. तर आम्हीं इतकेही मरोन जाऊं. हें वर्तमान कळतांच रघुनाथराव युद्धोपाय टाकून आपण त्या भवानरावाकडे एकांत करावयास गेला. तेव्हां प्रतिनिधी त्याचा संमान करून एकांतीं दोघे बसते समयीं आपली तरवार दोघांमध्यें ठेविली; तेव्हां रघुनाथरावानें त्यास विचारिलें. कीं, तुह्मास येवढ्या दूरदृष्टीचें प्रयोजन काय आहे, त्यावर तो बोलिला कीं. कदाचित् पंत+ प्रधान प्रतिनिधीशीं बोलताहेत त्यांत विसर पडेल. मग त्या एकांतांत एकमेकांस प्रमाणवचनें होऊन त्या रघुनाथरावानें प्रतिनिधीला कांहीं द्रव्य द्यावयाचें कबूल केल्यावर, उभयपक्षीं युद्धादिप्रकार नाहींसा झाला, नंतर रघुनाथरावानें आपल्या बरोबर मुराररात्र घोरपडा व प्रतिनिधी यांस बरोबर घेऊन पुण्यास येऊं लागला. तेव्हां वामनराव पटवर्धन वगैरे सरदार तेही त्याबरोबर चालत होते, परंतु त्याचा लश्करांत ते नमिळतां वेगळेच उतरत आणि रात्रौ रघुनाथरावाचा छापा पडेल ह्मणोन फार सावधपणा राखीत असत. तेसमयीं रघुनाथरावावर हरिपंत फडका लश्कर सहित पुण्याहून येत होता, आणि त्रिंबकराव मामा व साबाजी भोंसला परिंड्याहून येत होते व निजाम अल्ली तो कलबुर्ग्याहून येत होता, या तिघांतून जो कोणी प्रथम येईल त्यास मिळून रघुनाथरावाशीं युद्ध करावें अशी वामनरावादि सरदार मंडळीची मसलत होती. त्या तिघां येणारांत त्रिंबकराव मामा याचा मनांत आलें कीं, रघुनाथराव मोठा शूर आहे; त्यास जिंकिलें असतां आपली मोठी कीर्ति होईल. आणि साबाजी भोंसला तर आपल्या कामाकरितां विलंब करितो या कामांस, असें मनांत आणून आपण एकटाच पुढें लश्कर सहित येऊन भीमानदीचे पार उतरून पंढरपुराजवळ मोठ्या मेदानांत रघुनाथरावास गांठून त्यावर एकाएकी पडला. त्यासमयीं मामापेक्षां त्याजवळ फौज कमी असतांही त्या रघुनाथरावानें त्याचा पराभव करून तो मामाही फार जखमीं झाला. तेसमयीं रघुनाथरावानें त्यास धरून कैदेंत ठेविला. त्या लढाईत रघुनाथरावाचे दहाहजार सुमारें स्वार होते, त्यांत पुढचे तोंडीं आपण होऊन मोठ्या वेगानें लढला. तेसमयीं मामाकडच्या सरदार गंगाधरराव रास्ता तोही जखमी झाला परंतु रघुनाथरावाचे कैदेंत नसांपडतां वांचला. प्रतिनिधी व मुरारराव घोरपडा हे दोघे रघुनाथरावाकडचे होते. परंतु ते त्या युद्धांत

\+ पंत प्रधान ह्मणजे रघुनाथराव. त्यास प्रतिनिधीनें तुह्मी व आह्मी सारिखेच असें दर्शविलें.

नशिरतां एकीकडे उभे राहिले; मग थोडक्याच दिवसांनी प्रतिनिधी हरिपंताचा लष्करांत जाऊन त्यास मिळाला. आणि मुरारराव घोरपडा आपलें स्थान गुटी तेथें जाऊन राहिला. मग हरिपंत फडका साबाजी भोंसला व निजामअल्ली यांस जाऊन मिळाला परंतु त्या दोघांचें मनांत लवकर जाऊन रघुनाथरावावर पडावें असें नव्हतें. असा तो राघोबा जय पावल्यावर त्याचे मसलतींत कांहीं जीव आहेसें कांहीं दिवस दिसत होतें कांकिं, विसाजी कृष्णानें हिंदुस्थानांतून आणिलेलें जवाहीर होतें तें त्याणें पंढरपुरांत लोटिलें. आणि तेथची खंडणी घेऊन द्रव्य जमा केलें. त्यावरून त्याजपाशीं फौज जमा होऊं लागली, तेव्हां तो रघुनाथराव पुण्याची वाट धरिता झाला. मग कांहीं मजला तिकडे गेला असतां, त्याचा मनांत आलें कीं, माझाजवळचें द्रव्य या एवढ्या लष्करास पुरणार नाहीं; आणि हें द्रव्य सरल्यावर लष्कर आपल्याजवळ टिकेलसा विश्वास नाहीं. यास्तव तो पुण्याचा मार्ग सोडून बऱ्हाणपुरास चालिला. आणि इंग्लीश व होळकर व शिंदा यांची कुमक घेऊन कार्य साधावें असें त्याचा मनांत आलें. याविषयीं त्याणें पूर्वी पासूनच, यातियांशीं कांहीं बोलणें लाविलें होतें. तो रघुनाथराव पुण्यावर येऊं लागला त्यावेळेस पुण्यांतील कारभारी लोक फार भ्याले कांकिं, कदाचित् साबाजी भोंसला व निजामअल्ली हे रघुनाथरावाचा पक्ष धरितील असा संशय होता; यास्तव त्याहीं विचार ठरविला कीं, सातारयांचा राजा मुक्त करून त्याचे मुख्यत्वें रघुनाथरावाचा पराभव करावा. परंतु तो बऱ्हाणपुरास जाऊं लागला त्यावरून ते निर्भय होत्साते लष्कर जमा करून त्याचे पाठीस लागते झाले, त्यावर निजामअल्ली व हरिपंत फडका तेही त्याचे पाठीस लागले, हें सर्व मिळून पन्नास हजार लष्कर होतें.

रघुनाथराव बऱ्हाणपुरीं शिंदा व होळकर यांची गांठ पडायाचे आशेनें थोडकेसे दिवस राहिला मग तें न झालें म्हणोन तेथून निघाला; त्यास त्याचे लोक ते वेळेस बहुत प्रकारें निषेधित असतां, तो तें न मानितां नर्मदापार गेला. तेव्हां त्याजवळ सात हजार स्वार मात्र राहिले, त्यांखेरीज मुधोजी भोंसला वगैरे सरदार त्याला सोडून निघोन गेले. नंतर तो राघोबा इंदुरास पोंहोंचला तेथें शिंदा व होळकर होते त्यांहीं त्याचा मोठा मान करून त्यास आपल्या लष्करामध्यें घेतला त्यावरून अशी वदंता उठली कीं, या दोघांहीं रघुनाथरावाचा पक्ष धरिला; आणि गोविंदराव व फत्तेसिंग गाइकवाड, हे दोघे भाऊ गुजराथचा आधिपत्याविषयीं भांडताहेत, तेही आपला कज्जा शिंदा व होळकर यांजकडे नेऊन ते सांगतील त्यास मान्य होऊन त्यांचे विचारें रघुनाथरावाचें साहाय्य करितील.

परंतु त्यापूर्वी एप्रेलाचे अठरावे तारिखेस नारायणरावाची स्त्री गंगाबाई गरोदर होती तिला पुत्र जन्मला. तेणेंकरून रघुनाथरावास पेशवेपदवी प्राप्त

होणार

होणार नाहींसा निश्चय ठरला, त्यामुलाचें नांव माधवरावनारायण असें ठेविलें,त्याचा जन्मदिवसापासून चाळिसावे दिवशीं त्यास मानार्याहून पेशवे पदवीची वस्त्रें येऊन तो राज्यावर स्थापिला.

इकडे रघुनाथरावाचा पाठीस लागलेले निजाम अल्ली व हरिपंत फडके त्यांत निजाम अल्ली तो पुण्यांतील कारभारी लोकांहीं मुलुख द्यावयाचा कबूल केला होता, त्याप्रमाणें मिळाला नाहीं व शिंदे आणि होळकर यांणीं रघुनाथरावाचा संमान केला हें वर्तमान ऐकून त्याची पाठ सोडून आसम नजीक छावणी धरून राहिला; आणि हरिपंत फडके यांणीं बऱ्हाणपुराजवळ मुकाम केला. यानंतर पुण्यांत कारभारी लोकांमध्यें ईर्ष्या उत्पन्न होऊन एकमेकांचा विश्वासांत कांहीं अंतर पडून, यांमध्यें दोन फळ्या झाल्या. त्यांत एक फळी अशी. मोरोबा फडनवीस, व बाबुजी नाईक बारामतीकर, व बजाबा पुरंदरे, हे तिघे रघुनाथरावाचे पक्षपाती झाले. यांहीं मसलत केली कीं, सखारामबापू व नाना फडनवीस व गंगाबाई व तिचा पुत्र यांस धरून कैद करावे. त्यावेळेस पुरंदर किल्ल्यावर पर्जन्यकाळामुळें धुकें फार ह्मणून ते सारे त्या किल्ल्याखालीं उतरून सास्वडांत राहिले होते त्यांस तें वर्तमान जूनमहिन्याचे तिसाव्ये तारिखेस कळलें. तेह्मां ते तात्काळ पुरंदरावर चढले.

कर्नाटकीं, हैदर अल्लीनें दक्षिणेंतील हें सारें वर्तमान ऐकून तुंगभद्रेचे दक्षिणेस जितका मराठ्यांचा मुलुख होता तो सर्व हस्तगत केला. आणि बसालत जंग, मराठी मुलखांत शिरून आथणी व मिरज पर्यंत खंडणी घेत आला.

रघुनाथराव बरोबर तीस हजार फौज घेऊन इंदूर सोडून तापी नदीचे कांठीं आउन उतरला; त्यासमयीं त्याजवळची फौज बहुत करून शिंदे व होळकर यांजकडची होती त्याचे मनांत होतें कीं, मुधोजी भोंसले व गोविंदराव गाइकवाड हे येऊन आपणास मिळतील; त्या आशेनें त्यांची मार्ग प्रतीक्षा करीत असतां त्याणें इंग्लिशांशीं पुनः तहाचें बोलणें लाविलें. त्या इंग्लिशांचा मनांत पूर्वीं पासून फार दिवस असें होतें कीं, मुंबई जवळचे लहान टापू व साष्टी व वसई हीं घ्यावीं आणि याविषयीं ते फार उद्युक्त असत, परंतु त्यांची ती मसलत सिद्धीस गेली नाहीं; मग रघुनाथराव यास जेह्मां त्यांचें कारण पडलें तेह्मां ते समजले कीं, या रघुनाथरावाचा द्वारें आपला अर्थ सिद्धीस जाईल ह्मणून त्यांहीं आपला वकील+

+ वकील मोस्तीन साहेब तो माधवराव पेशवा याचा मरणाचे कांहींसा आगोधर पुण्यास पोंहोंचला होता, त्यास विलायतेंतून कंपनी सरकारची आज्ञा होती कीं, हिंदुमुलखीं आपले उदमी लोक आहेत त्याचा व तेथचा आपल्या मुलखाचा बंदोबस्त ठेवून त्या लोकांशीं सलुख मात्र असावा; परंतु कोणाशीं देणे घेणें वगैरे कोणत्याही गोष्टीचा संबंध करूं नये.

मोस्तिन

मोस्तिन साहेब नामें होता त्यास आज्ञा दिली कीं, हें कार्य तुह्मी साधावें. त्यापूर्वी सनसत्राशें बहात्तरांत ज्या दिवशीं माधवरावाचा मृत्यु झाला तेच दिवशीं इंग्लिशांहीं भडोज घेतली. त्या घेण्याचें कारण असें, इंग्लिशांकडे सुर्तेचें आधिपत्य असतां त्यांस भडोजचा नवाबाकडची खंडणी यावयाची होती ती तो देइना; तेव्हां इंग्लिशांहीं सनसत्राशें एकाहात्तरांत पर्जन्यकाळाचे कांहींसें पूर्वी तोपेका मागावयास फौज पाठविली, तरी त्याणें खंडणी दिली नाहीं. मग तो नवाब पर्जन्यकाळानंतर मुंबईस येऊन इंग्लिशांशीं कांहीं तह करून गेला. पुढें तो तह त्याचे मनास ठीक वाटला नाहीं ह्मणोन त्याणें तेथें इंग्लिशांचा वकील होता त्याचा कांहीं अनादर केला. त्यावरून त्या वकिलास मुंबईसरकारची आज्ञा झाली कीं, तुह्मी भडोजेहून निघोन सुर्तेस जावें; आह्मी लश्कर पाठवून तो किल्ला घेऊं. त्यावरून वकील तेथून गेल्यावर मुंबईहून फौज येऊन तो भडोज किल्ला घेतला.

रघुनाथराव पुण्यास येत होता तो ती वाट सोडून बऱ्हाणपुरास गेला, त्यामुळें साष्टी वगैरे स्थानें हस्तगत करण्याविषयीं मोस्तिन साहेबास रघुनाथराव दूर पडला यास्तव त्याचा योगें तें कार्य सिद्धीस जाइना; परंतु पुढें रघुनाथराव तापी उतरला तेव्हां सुर्तेचा अधिकारी साहेब होता तद्द्वारा त्या मसलती संबंधें बोलणें पुनः लाविलें; परंतु तो साष्टी वगैरे द्यावयास कबूल होइना, ह्मणोन तें सिद्धीस गेलें नाहीं. आणि दुसरें कांहीं बोलणें होत होतें तों पोर्तुगीस लोकांचा विलायतेंतील बादशाहाकडून साष्टी वगैरे स्थानें हिंदुलोकांपासून माघारीं घ्यावयास फौज गोमंतकीं आली. त्यावरून मुंबई सरकारांत असें ठरलें कीं, ठाणें नामें साष्टीचा किल्ला तो आपण न घेतल्यास पोर्तुगीस घेतील; यास्तव त्वराकरून तें ठाणें आपण घ्यावें. तेव्हां सहाशें गोरे लोक व एक हजार पलटणी शिपाई तोफांसुद्धां त्या कामावर नेमिले; ते सनसत्राशें चौऱ्याहात्तराचा दिसेंबराचे बाराव्ये तारिखेस मुंबईहून निघाले. त्याचे दुसरे दिवशीं पोर्तुगीस लोकांचीं जहाजें येऊन मुंबईजवळ नांगरलीं; आणि ते लोक इंग्लिशांस ह्मणाले कीं, साष्टी वगैरे ठिकाणें पूर्वीपासून आमचीं तीं आह्मी घेऊं. त्यास तुमचे जे लोक तिकडे रवाना झाले ते मागें फिरवा. असें त्यांचें बोलणें इंग्लिश ऐकेनात, तेव्हां ते लोक तेथूनच माघारे गेले. आणि इंग्लिशांचा लोकांहीं तेथें गेल्यापासून सातवे दिवशीं ठाणें घेतलें नंतर थोडक्याच दिवसांत संपूर्ण साष्टी आणि उरणटांपूही त्यांहीं हस्तगत केला.

असें मुंबईकडचें वर्तमान असतां, पुण्यांतील कारभारी लोकांहीं गुप्तपणें शिंदे व होळकर यांस रघुनाथरावाचा पक्ष नाहींसा करून स्वपक्षानुसारी केले. आणि तीस हजार स्वार जमा करून, पुरंदराहून निघाले ते रघुनाथरावाव

र

[illegible] तीं तारीख नवेंबराची [illegible]विसावी. असें झालें असतां. रघुनाथराव याणें शिंदे व होळकर यांचें कृत्रिम समजून पुरंदराकडील लश्कर घेऊन तापीवर येऊन पोंचलें नाहीं तोंच तें शिंदे व होळकर यांचें लश्कर टाकून निघाला. तो तेथून पुढें तापीनदीचे काठीं तालनेर नामें किल्ला आहे. त्यांत आपले खासगीचे लोक भरून आपण गुजराथेकडे निघाला. तेव्हां त्याची स्त्री आनंदीबाई बहुतां दिवसांची गरोदर होती. तिला धारेचा किल्ल्यांत नेऊन ठेविली; आणि थोडकेसे दिवस तेथें राहिली असतां, ती प्रसूत होऊन पुत्र झाला. तो बाजिराव रघुनाथ त्याचा योग असा होता कीं ब्राह्मणाचा राज्याचा शेवट तो पुरुष असतांच व्हावा.

यानंतर रघुनाथराव सनसत्राशें पंचाहात्तरांत जानेवारीचे तिसऱ्ये तारिखेस बडोद्यांत पोंहोंचला; तेसमयीं त्याबरोबर दहा हजार स्वार व चारशें पायदळ होतें; तो बडोद्यास आवयाचें कारण असें. त्याचा मनांत आलें कीं, गोविंदराव गाइकवाड याशीं स्नेह करावा आणि इंग्लिशांशीं बोलणें लाविलेलें शेवटास न्यावें. इकडे पुण्यांतील कारभारी लोकांनीं तो तालनेर किल्ला घेऊन रघुनाथरावाचे पाठीस हरिपंत फडका यास फौज देऊन लाविला, आणि सखाराम बापू व नाना फडनवीस, हे दोघे तेथून माघारे पुरंदरास येऊन तेथेंच कारभार चालविला.

रघुनाथराव बडोद्यास गेला तेव्हां गोविंदराव गाइकवाड तो आपला भाऊ फत्तेशिंग बडोदे शहरांत असे, त्या शहरास घेरा घालून लढत होता, पूर्वी सनसत्राशें अडसष्टांत रघुनाथरायाचें व माधवराव पेशव्याचें वैमनस्य पडलें तेव्हां दमाजी गाइकवाडानें रघुनाथरायाचा साहाय्यास आपला पुत्र पाठविला, तोच हा गोविंदराव गाइकवाड.

माधवरावानें रघुनाथरावास जिंकिल्यावर पुढें थोडक्याच दिवसांनीं तो दमाजी मृत्यु पावला; त्यासमयीं त्याचे पुत्र चार होते. त्यांत एक सयाजी दुसरा गोविंदराव, तिसरा माणिकजी, चवथा फत्तेशिंग. इतक्यांत सयाजी वडील, परंतु तो दमाजीचा दुसरे स्त्रीचा पुत्र. गोविंदराव तो दुसरा पुत्र, परंतु पहिले स्त्रीचा माणिकजी व फत्तेशिंग हे दोघे तिसरीचे. दमाजी मेला तेसमयीं गोविंदराव यास हा रघुनाथरावाकडचा म्हणून पुण्यांत प्रतिबंधांत होता, तथापि त्यास त्याचे बापाचें स्थान व त्याची पदवी सेनाखासखाईल नामें होती ती त्याला प्राप्त होण्यास कोणी प्रतिपक्षी नव्हते. कांकीं, त्याणें आपण रघुनाथरावाचा पक्ष स्वीकारिला या अन्याया बदल तेवीस लाख रुपये दिले आणि नजर एकवीस लाख; याशिवाय आणीक कांहीं कारणास्तव साडेसहा लाख मिळून साडे पन्नास लक्ष रुपये दिले; आणि प्रतिवर्षी सात लक्ष एकुणऐशीं हजार द्यावयाचें कबूल केलें.

या

याखेरीज पुणें मुकामीं निरंतर त्याजकडील सरदारांहीं चाकरी तीन हजार स्वारानिशीं करावी आणीक कधीं मोहिमेचे समयीं चार हजार स्वारानिशीं चाकरीस असावें, असें त्याणें मान्य केलें. यास्तव तें स्थान व ते नाम त्यास मिळालें. इकडे बडोद्यांत त्याचा वडील भाऊ सयाजी तो वेडसर होता, तथापि त्याचा कनिष्ठ बंधू फत्तेसिंग त्याणें पुण्यास येऊन त्या सयाजीचें मुख्यत्व स्थापिलें; आणि आपण त्याचा मुतालिक झाला. त्यावरून तो फत्तेसिंग व गोविंदराव यांचें वांकडें पडलें; तें त्यांचें वैमनस्य माधवराव पेशव्यास इष्ट असेल. त्याची मसलत होती कीं, गाइकवाड यांस वाढूं देऊं नये आणि तो संकल्प सिद्धीस न्यावयासाठीं त्या भावांत युद्ध करवावें, तोच उपाय श्रेष्ठ असें मानीत होता.

नारायणराव पेशवा याचा मृत्यूनंतर राघोबा पेशवा झाला तेव्हां पुनः ती पदवी गोविंदरावास दिली, त्यावर गोविंदराव गुजराथेंत जाऊन आपल्या भावास जिंकावयाचा उद्योग करूं लागला; रघुनाथराव तिकडे जाई तंव पर्यंत तें त्याचें कार्य शेवटास गेलें नव्हतें. मग तो गोविंदराव व रघुनाथराव त्या कामाविषयीं एकत्र झाले.

याशिवाय रघुनाथरावानें तेच समयीं सुरतेचा अधिकारी साहेब होता त्याशीं पूर्वींचें आरंभिलेलें बोलणें चालविलें तें बहुतेक होऊन शेवटीं सन सत्राशें च्याहात्तरांचा मार्च महिन्यांत समाप्तीस गेलें; तो प्रकार असा. रघुनाथरावाचे कुमकेस मुंबईसरकारांतून पांचशें गोरे व एक हजार पलटणी शिपाई लोक तशाच त्या बेताप्रमाणें तोफा त्वरित द्याव्या; मागून अणखी कांहीं गोरे लोक व पलटणी शिपाई पाठवून तीन हजारांची भरती करावी, त्या सेनाखर्चास दर माहा दीड लाख रुपये राघोबानें द्यावयास कबूल केले. आणि त्या देण्याबदल इंग्लिशांकडे गहाणादाखल गुजराथचा आमोद परगणा, व हानसोठ, व वरसाल, व आखलेशीर यांतील कांहीं विभाग इतकें दिलें. त्याशिवाय साष्टी व वसई व मुंबई जवळचे लहान लहान सर्व टापू सनद करून दिले; यांखेरीज गुजराथेंतील जंबूसर परगणा व उल्पार परगणा दिला, आणि आखलेशीर परगण्याचा जमेंतून वर्षास पाउण लाख रुपये द्यावयाचा करार केला. आणीकही इंग्लिशांस उपयोगी अशा कांहीं बाबती त्या करारांत होत्या, परंतु तो विशेष लिहावयास नाहीं. त्यावेळेस रघुनाथरावाजवळ रोकड द्रव्य नव्हतें म्हणून +महालक्ष्मीचें जवाहीर मुंबईमध्यें इंग्लिशांकडे तूर्त सेनाखर्च निमित्त ठेविलें. असा राघोबाच्या व इंग्लिशा-

---

+ महालक्ष्मीचें जवाहीर मुंबईमध्यें ठेविलें तें पुढें अठ्ठाविसां वर्षांनीं बाजिराव रघुनाथ पेशवा लोककरीं दंगा उलगडल्यावर पुनः स्थापिला त्यासमयीं इंग्लिशांहीं त्याला बक्षीस पाठवून दिलें.

चा नष्ट झाला त्याच कारणानें पुढें इंग्लिशांचे व मराठे लोक यांचें प्रथम युद्ध उत्पन्न झालें.

हरिपंत फडके रघुनाथरावाचे पाठीस लागून गुजराथेंत गेले तेव्हां त्यांजवळ फौज तीस हजार होती तीजवळ आली असें समजून रघुनाथराव व गोविंदराव हे दोघे घेरा घालून बडोद्याशीं लढत होते ते युद्ध टाकून त्यांस माही नदी पलीकडे जावे लागलें. ते तेथें वासद गांवाजवळ डेरे देऊन राहिले; मग फेब्रुवारीचे सत्राव्ये तारखेपर्यंत हरिपंत फडके यांजबरोबर फत्तेशिंग गाइकवाडही आला असतां त्याचे मसलतीनें आपल्या लष्कराच्या तीन टोळ्या करून तीन ठिकाणीं एकदांच माही नदी उतरले, आणि त्या तीन टोळ्यांचे मधली टोळी रघुनाथरावावर पडली; तीजबरोबर तो युद्ध करीत असतां, त्याचे मागून गोविंदराव गाइकवाड व खंडेराव+ गाइकवाड हे दोघे येऊन पोहोंचले नाहींत तों त्या दोहीं कडच्या दोन टोळ्या रघुनाथरावावर येऊन पडल्या तेव्हां रघुनाथरावाचे दोघे उत्तम सरदार सखाराम हरी व मानाजी फाकडे यांस फार जखमा लागल्या आणि त्या रघुनाथरावानें आरबांची एक टोळी नवी ठेविली होती ती कांहीं दरमहा थकल्याचें निमित्त करून युद्ध न करितां एकीकडे ऊभी राहिली; आणि ती लढाईची जागा फार अडचणीची होती त्या योगें बहुत अव्यवस्था होऊन रघुनाथरावास असें वाटलें कीं, आतां माझेही लोक मला धरतील, म्हणोन त्याभयेंकरून तात्काळ हजार स्वार बरोबर घेऊन मोठ्या त्वरेनें घोडें पिटीत खंबाइती कडे गेला. त्या खंबाइतचा नवाबाचे मनांत पूर्वी होतें कीं, रघुनाथरावास मिळावें, परंतु तो पळून आलासा पाहोन त्यास आश्रय करावयास भिऊं लागला. ते समयीं तेथें इंग्लिशांचा वकील मालेट साहेब नामें होता, त्याणें त्याला भावनगरास पोहोंचविला. मग तो तेथून सुरतेस दाखल झाला, नंतर चौं दिवसानीं सन सत्राशें पंचाहात्तरांचा फेब्रुवारी महिन्याचे सत्ताविसाव्ये तारखेस मुंबईहून इंग्लिशांचें लष्कर सवाचारशें गोरे व साडे नऊशें पलटनी लोक तोफांसहित सर्व मिळून पंधराशें योद्धे त्याला कुमक येऊन पोहोंचले. तेव्हां रघुनाथरावाचे लोक पराभव झालेले उत्तरेस पाळपुरी गेले होते त्यांस मिळावयाविषयीं सुरतेहूनही, पुढें खंबाइतेस जाऊन तसें असा त्यांचा विचार ठरला. आणि रघुनाथरावही त्यांजबरोबर तिकडे गेला.

ते लष्कर खंबायतेंत असतां, त्यास आणीकही कुमक मुंबईहून मद्रास प्रांताचा शिपाई लोकांचें एक पलटण, आणि पावणे दोनशें सुमारें गोरे लोक आले. यानंतर एप्रेलमासीं पालणपुराहून रघोबाचें लष्कर इंग्लिशांस मिळावयाकरितां निघालें तें व इंग्लिश लोक यांची खंबायतेपासून पांचा कोसांवर गांठ पडली.

\+ खंडेराव गाइकवाड तो गोविंदराव गाइकवाडाचा चुलता.

त्या

त्या लश्करांत सखाराम हरी व मानाजी फांकडे यांचे लोक सहा हजार किंवा आठ हजार चांगले होते. परंतु त्यांस रोजमुरा नमिळाल्यापासून दोडगाई करीत; बकीचे बारा किंवा पंधरा हजार सुमारें आणखी होते. ते केवळ लुटारू त्यांपासून उपयोग न होतां नाशास मात्र कारण असे असत. त्यास पाहून इंग्लिशांचा जो मुख्य कारभारी किटिंग नामें होता, त्याला मराठ्यांचा लश्कराचा अनुभव नव्हता, म्हणोन तो तें लश्कर एवढें मोठें, आणि त्यामध्यें निशाणें व डेरे फार पाहिले; इतक्यावरूनच मोठा संतुष्ट झाला, आणि आपल्या लोकांसाठीं बरोबर द्रव्य नेलें होतें तें ही त्या किन्येकांस वांटिलें. त्यानंतर एप्रेलाचे नविसाव्ये तारिखेस तेथून तें लश्कर उत्तरेकडे मातर गावीं गेलें. त्यास तेथें पोंहचावयाचे पूर्वीं वाटेनें दोनवेळा हरिपंताचा लशकराची गांठ पडून कांहीं कांहींसें युद्ध झालें; त्यांत पहिलें असामली गांवाजवळ झालें, तें इंग्लिशांचे लोकांशीं, त्यांत इंग्लिशांचे लोक पडले नाहींत. दुसर्‍या मध्यें रघुनाथरावाकडचे जखमी व मेले मिळून पन्नास साठ सुमारें पडले इतक्यानेंच रघुनाथरावाकडचे लोक अधीर होऊन यापुढें युद्धास झटेनातसे झाले, त्या युद्धांत रघुनाथरावाचा लोकांचा पराजय झाला असतां त्यांचे डाव्ये बाजूस इंग्लीश लोक होते, त्यांवर हरिपंताचा लोकांहीं हल्ला केला परंतु रघुनाथरावाचा लोकांपेक्षां त्यांचा अधिक नाश होऊन निघुन गेले. त्यापुढें राघोबाचा मनांत आलें कीं, पर्जन्यकाळ जाई तोंपर्यंत अमदाबादेंत रहावें; परंतु इंग्लिशांची मसलत होती कीं, त्याच वेगानें पुण्यावर जाऊन पडावें यास्तव त्या रघुनाथरावानें तिकडे चाल केली; परंतु कोणे रितीची मसलत त्या कामास असावी ती नीट नव्हती; आणि त्या गुजराथेंतील मार्ग संकोचित असे, ज्यास दोहीं बाजूनें उंच उंच कुडणें केलेलीं, त्या मुळें तें लश्कर फार हळू हळू जाऊं लागलें असतां नापार गांवाजवळ मे महिन्याचे अठराव्ये तारिखेस पोंहचलें; त्यास इतका विलंब लागला.

त्या लश्करानें खंबायत सोडिल्यापासून त्याबरोबर किटिंग साहेब होता त्याणें रघुनाथरावाचा लोकांस सांगितलें कीं, तुम्हीं दोहीं बाजूनीं चालून मध्यें बुणगें घेऊन बंदोबस्तानें चालवा. परंतु ते त्या कामास नपडतां कधीं शत्रु येतो असें ऐकिलें असतां ते लोक बुणग्यामध्यें शिरून चालत; अथवा इंग्लिशांचे टोळीचा आश्रय धरीत असें आलें असतां रघुनाथरावाचा सांगण्यावरून त्या साहेबानें त्या लोकांस धैर्य यावयाकरितां शंभर गोरे लोक व शंभर पलटणी शिपाई अशा दोन दोनशें लोकांच्या दोन टोळ्या करून त्यांस दोन तोफा देऊन त्यांतली एक टोळी मागें चालावयास ठेविली, एकास दोहीं बाजूनीं चालविली, आणि समयविशेषीं त्या दोहीं टोळ्याहीं एकमेकांस कुमक करावी अशी आज्ञा केली.

या

या प्रमाणें बंदोबस्तानें तें लश्कर चालत असतां, अठराव्ये तारिखेस तापार सोडून एका कोसावर गेलें तों तेथें वाटेचा डाव्ये बाजूस एक मोठ्या मोठ्या वृक्षांची झाडी होती. तीतून एकाएकीं सहा तोफांचा मार त्या मागल्या टोळीवर चालू झाला, आणि त्या झाडींतूनच शत्रूचा लश्कराची एक मोठी टोळी धांवोन येत्ये असें पाहिलें. तेव्हां त्या किनिङ्‌ साहेबानें लोक पुढें चालत होते ते उभे केले, आणि आपण एक तोफ व एक करनाळ बरोबर घेऊन मागें आला इतक्यांत ती बाजूची टोळी पाठिमागचे टोळीस येऊन मिळाली. तेव्हां शत्रूनें तोफांचा मार बंद करून ती आपली टोळी मागें फिरविली. ते समयीं त्या सहांपैकीं त्याचा दोन तोफा तेथें राहिल्या त्या घ्याव्या असा बेत होऊन इंग्लिशांचे लोक तिकडे जाऊं लागले असतां ती वाट अडचणीची आणि ते फार त्वरेनें गेले तेणें करून त्यांचा चालण्याचा बंदोबस्तांत कांहीं अंतर पडलें. मग त्या तोफांचे जवळ पोंहचल्यावर आपला बंदोबस्त नीट करावयास गुंतले असतां त्यांवर शत्रूंची एक टोळी मोठ्या वेगानें येऊन पडली. तेव्हां ते इंग्लिशांचे लोक त्यांशीं लढूं लागले तों त्या किनिङ्‌ साहेबानें आपल्या लोकांस तोफांची कुमक करून शत्रूचे लोक मागें हटविले. नंतर इंग्लिशांचे लोक त्या तोफा घ्यावयास पुनः उद्युक्त झाले ते समयीं त्यांवर पूर्वीचे पेक्षां मोठी स्वारांची टोळी फार वेगानें येऊन पडली, तेव्हांही त्यांणीं त्यांचे कित्येक लोक मारून त्यांस मागें हटविले. परंतु ते समयीं इंग्लिशांचेही कितिएक लोक मेले गेले, तेव्हां राघोबाचा कोणी कारकून होता त्याणें छत्रिम करून त्या अडचणींत दोन हत्ती घालून ती वाट बंद केली. आणि शत्रूस धैर्य देऊन मागून हल्ला करविला. तेव्हांही त्या पलटणी लोकांहीं त्यांकडे तोंड करून त्यांशीं लढून त्यांस दूर केलें. इतक्यांत राघोबाचे स्वार व आरब व शिंदे लोक मिळून आले ते इंग्लीश लोक यांचें लश्कर व पुढची टोळी या दोहीं मध्यें शिरले तेव्हां शत्रूचा पक्षाचे कोण व रघुनाथरावाचे कोण ते इंग्लिशांस समजेना असें झालें. मग ती गोरे लोकांची एक टोळी कांहीं कारण न दिसतां आज्ञेवांचून मागें हटूं लागली+: तेव्हां काळे लोकही आपला मोड झाल्याचे भ्रांतीनें तसेच मागें हटूं लागले. ते हटत हटत थोडक्याशा वेळानें आपल्या लश्कराकडे बंदोबस्तरहित पळूं लागले. ते समयीं शत्रूचे लोक त्यांमध्यें शिरून ते लोक आपल्या ठिकाणीं पोंहचत तों पर्यंत त्यांतील कित्येक मारिले. परंतु ते त्या ठिकाणाजवळ पोंहचले तेव्हां इंग्लिशांचा तोफांचा व त्या सर्व पलटणी लोकांचा मार त्यांवर पडोन त्यांचा फार नाश होऊन ते पळाले. या प्रमाणें अरासाज-

---

\+ त्या टोळीस सरदारानीं आज्ञा दिली कीं, बाजूस व्हावें ते समजले कीं, मागें सरावें असें चौकशी करून पुढें समजण्यांत आलें.

वळची

वळची लढाई झाली. त्यांत इंग्लीश जय पावले; परंतु त्यांत अनर्थ न झाला असें नाहीं; कांकिं, त्यांचे गोरे लोक जखमी झाले व मेले गेले मिळून शायशीं, आणि पलटणी लोक जखमी व मेले गेले मिळून एकशें छत्तीस. असें सर्व मिळोन दोनशें बेवीस पडले.

यानंतर किटिङ् साहेब भडोजेस जाऊन आपले जखमी लोक तेथें ठेवून आपण तेथून निघोन नर्मदेच्या उगमाकडे त्या भडोजे पासून बारा चौदा कोसांवर बहुपीरास एक मजल करून गेला. तेव्हां तेथें नवें वर्तमान आलें कीं, हरिपंताचें लश्कर नदी उतरोन गेलें नाहीं; आपल्या पासून पांच कोसांचे अंतरानें आहे. तेव्हां किटिङ् साहेब त्याच दिवशीं मध्यरात्रीं निघाला आणि मनांत आणिलें कीं एकाएकी हरिपंताचा लश्करावर जाऊन छापा घालावा, ती त्याची कल्पना शेवटास जाती परंतु रघुनाथरावाचे स्वारांस कांहीं एका दोहों रोजांचा पैका भडोजेस मिळाला होता तितक्यानेंच कांहीं धैर्य उत्पन्न झालें असेल किंवा कांहीं त्यांस लूट मिळे या अर्थानें ते मागें राहिनात; आणि इंग्लिशांचा लोकांत शिरून त्यांहीं अशी अव्यवस्था केली कीं, त्या साहेबास आपल्या पलटणी लोकांचा बंदोबस्त नीट करितां तो दिवस उगवे तोंपर्यंत पुढें जावयाची सधी सांपडली नाहीं; त्याणें करून ते हरिपंताचे लोक सावध झाले आणि त्यांहीं आपल्या तोफा वगैरे जड सामान नर्मदेंत बुडवून रवदले पुढें चालतें केलें मग ते येऊन, मिळून तोंपर्यंत आपणही निघोन गेले. तेव्हां त्यांचे दहापांच उंट व एक हत्ती तळावर होते ते रघुनाथरावाचा लोकांहीं वळवून नेले. असें वर्तमान जुनाचे आठव्ये तारिखेस आलें. ते समयीं पर्जन्यकाळ जवळ आल्या मुळें पुढें जावयाची सोय नाहींशी पाहोन इंग्लिशांचें लश्कर बडोद्या पासून दहा कोसांवर दुभाई शहर आहे तेथें छावणी करून राहिलें. आणि रघुनाथरावाचें लश्कर बडोदें व दुभाई यांमध्यें भीलापूर नामें गांव आहे तेथें उतरलें. तेव्हां गोविंदराव गाइकवाडाचा बोलण्यावरून असें ठरलें कीं, पर्जन्यकाळ गेल्यावर फत्तेशिगाशीं लढोन बडोदें घ्यावें.

याप्रमाणें युद्ध खुसकीवर होत असतां. समुद्रांतही युद्ध चालतें झालें. तो प्रकार असा. त्या युद्धाचे प्रारंभीं मराठ्यांचीं पांच जहाजें मोठीं होतीं. त्यांत एकशें चाळीस तोफांचें. एक अठ्ठावीस तोफांचें आणि बत्तिसांचें एक. व दोन सव्वीसांचीं. या खेरीज दहा फत्तेमाऱ्या. एक एकीस दोहोंपासून नऊ तोफांपर्यंत होत्या, अशा पंधरा. याप्रमाणें असतां एके दिवशीं इंग्लिशाची व त्यांची समुद्रामध्यें गांठ पडली तेव्हां इंग्लिश लोकांचा जहाजाचा मुख्य सरदार कामोदोर जानसुर नामें होता. तो त्या मराठी लोकांस न जातां त्यांजवर चालून. गे-

ला.

आजवर दोन जहाजें+ मात्र होतीं असें असतांही त्यास पहातांच मराठे आपल्या गलबतांचा स्वारी भिडं हाकारून मागें पळून जाऊं लागले, तेव्हां तीं त्यांचे पाठीस लागलीं. मग त्या इंग्लिशांचा दोहीं जहाजांतील एक मोठ्या तयेनें चालणारें मुंबई गुराब नामें मोठें होतें तें पुढें जाऊन मराठ्यांचा जहाजांतील मोठें समशेरजंग नामें एकशें चाळीस तोफांचें जहाज होतें त्यास गांठून त्यांशीं तें साहेब लढूं लागलें. तों त्याचें दुसरें ही जहाज येऊन पोहचलें नंतर एक प्रहर पर्यंत युद्ध झाल्यावर त्या समशेरजंग जहाजावरचा दारूखान्यास तोफेचा गोळा लागून ती दारू पेटली; तेव्हां त्या जहाजाचे तुकडे तुकडे होऊन ऊंच उडाले. तेवेळेस त्या जहाजावरचा मुख्य व दुसरे त्याचे लोक बहुतएक मेले गेले, आणि त्यांतून थोडकेसे वांचले.

याप्रमाणें इंग्लिशांची कुमक राघोबाचे उपयोगीं पडली असतां, त्याणें आमोद परगणा व हनस्रोट परगणा हे दोन्हीं इंग्लीश लोकांला सनद करून दिले; तेसमयीं त्या दोहीं परगण्याची जमा दोन लक्ष सत्याहात्तर हजार रुपये वर्षास उत्पन्न होत.

इकडे बडोद्यांत गोविंदराव व फत्तेसिंग गाइकवाड यांचा कलह होता तोही इंग्लिशांचा योगानें मिटला. त्यांत राघोबास तीन महिन्यांत सव्वीस लक्ष रुपये मिळतील असें ठरलें. आणि गोविंदरावास रघुनाथराव याणें दहा लक्षांची जहागीर दक्षिणेंत द्यावी असा नेम केला. आणि कंपनी सरकारास भडोज शहराचा वसुलांतील जितका भाग गाइकवाडाचा होता तो व कित्येक गांवांचा सनदा मिळून वर्षास दोन लक्ष तेरा हजार रुपये उत्पन्न होत असा मुलुख गाइकवाडानें द्यावा असा निश्चय झाला.

याप्रकारें राघोबाचा उत्कर्ष होत असतां पुण्यांत माधवराव नारायणाचा ह्रास दिसूं लागला. तो असा, इंग्लिशांचा भयेंकरून हरिपंत फडका लष्करसुद्धां बहुपिरापासून माघारा दक्षिणेस आला. असा स्वसेनापराभव झाला असतां सखाराम बापू व नाना फडनवीस उद्विग्नचित्त झाले. आणि बर्कड मंडळीचा मनांत येऊं लागलें कीं, रघुनाथरावाचा उत्कर्ष झाला असतां वराडचा राजाही तत्पक्षानुसारी होईल. त्यापूर्वीं शिंदे व होळकर ही त्या कारभारी मंडळीचा पक्षसो-

+ दोहीं जहाजांत एकाचें नाव रिवेंज. त्या तारवाचें बारदान १३०२ सुरती खंडी होतें त्यावर तोफा १२ रतली गोळ्यांचा २० व ४ रतली गोळ्यांचा ८ होत्या, व त्यावर दर्यावर्दी लोकांचा भरणा सर्वमिळोन १६८ आसामीचा होता, त्यामध्यें सत्तर गोरे लोक होते. दुसरें मुंबे गुराब त्या तारवाचें बारदान १६० सुरती खंडी होतें. त्यावर तोफा ९ रतली गोळ्यांचा १६, व ३ रतली गोळ्यांचा ८ होत्या, व त्यावर दर्यावर्दी लोकांचा भरणा सर्वमिळोन १६६ आसामीचा होता, त्यामध्यें गोरे लोक ६० होते.

डून निराळे झाले होते. आणि निजामअली तोही त्या मंडळीस भयप्रदर्शनार्थ रघुनाथरावाशीं कांहीं बोलणें लाऊन त्यांस म्हणूं लागला कीं, नारायणरावास पुत्र झाला तो खरा नसेलसा आम्हास वाटतो. त्यावरून त्या कारभारी मंडळीनें त्यास सत्रा लक्ष पंचायशीं हजारांचा मुलुख देऊन, तो अनुकूळ केला. या सर्व गोष्टीवरून लोकांस असें वाटलें कि, पुढें पर्जन्य काळ गेल्यावर रघुनाथराव येऊन त्याचा यत्किंचित् जय झाला तरी ते सर्व कारभारी त्यास अनुकूळ होऊन तो आधिपत्य पावेल अथवा माधवराव नारायणाचें रक्षण मुख्यत्वें आपण करील, परंतु इंग्लिशांमध्यें कांहीं अकल्पित खटला उत्पन्न झाल्यामुळें तें प्रकरण तसेंच राहिलें. तो खटला उत्पन्न झाल्याचा विस्तार पुढचे भागीं लिहिण्यांत येईल.

सन सत्राशें पंचाहात्तरां पासून
एकुणऐंशीं पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग तेविसावा.

अनुक्रमणिका.

रघुनाथराव मुंबईसरकारापासून आपलें कार्य करून घेत होता. तें कलकत्ता याचे मुख्य साहेब आणि त्यांचें मंत्रदायक मध्यें पडल्यामुळें सिद्धीस गेलें नाहीं.

कलकत्त्याहून कोणी वकील साहेब पुरंदरास आला त्याचें व पुरंदरचे कारभारी लोक यांचें वागणें व त्या वकीलाशीं त्या कारभारी मंडळानें तह केला तो विस्तार.

हैदरअलीनें पेशव्याचा कांहीं मुलुख घेतला.

सदाशिवराव भाऊचें सोंग घेणारा सदोबा याच्या उत्कर्ष व पराभव आणि मृत्यु.

राजाराम राजा याचा मृत्यु व त्याचे जागीं त्रिंबकजी भोंसला याचा पुत्र शाहूमहाराज नामें करून स्थापिला.

कोल्हापुरकर व मुधोजी भोंसला यांचें कांहीं मागील वर्तमान.

पुण्यांत कारभारी लोकांमध्यें वैमनस्य पडून दुफळी झाली.

मोरोबा फडनवीस याची मंडळी मुख्यता साधून रघोबास आणवून तो मुख्य करावा अशी मसलत ठरली.

नाना-

नाना फडनवीसानें आपला अर्थ साधावयासाठीं सकपट युक्ती केल्या तो प्रकार.

त्यावरून राघोबाविषयीं मोरोबाचें मन फिरून त्यास रघुनाथरावाविषयीं इंग्लीश बोलत असतांही त्याणें रायोबाचें अगत्य टाकिलें.

नाना फडनवीस व त्याची मंडळी श्रेष्ठता पावोन तो मोरोबा फडनवीसव त्याची मंडळी कैद केली.

फ्रेंचांचा वकील पुण्यांत येऊन प्रतिष्ठेनें वागला तो प्रकार.

त्यानिमित्तें कलकत्याहून सहा पलटणें लश्कर मुंबईस येऊं लागलें.

नंतर मुंबईसरकारांत मसलत ठरली कीं, रायोबास बळेंच पुण्यांमध्यें स्थापावा.

त्यावरून नाना फडनवीस याची तयारी.

इकडे मुंबईसरकारचे मंडळींत वैमनस्य पडल्यानें रायोबाचा कार्यास इंग्लिशांचें लश्कर विलंबें करून बोरघाटावर जमा झालें.

मग तेथून पुढें तळेगांवांजवळ मराठी लश्कराची गांठ पडली असतां त्या मुख्य साहेबांस कांहीं भय वाटोन, ते पुढें नजातां त्याहीं मागें हटावें असा नेम केला; त्या संबंधें वडगांवांजवळ त्या इंग्लीश लोकांवर कांहीं अनर्थ पडला तो प्रकार.

बंगाल्याहून इंग्लिशांचें लश्कर मुंबईस येत होतें तो विस्तार.

महादजी शिंद्यानें रघुनाथरावाविषयीं काय काय वर्तणूक केली, त्या गोष्टीचें कथन.

त्या शिंद्यानें सखाराम बापू, व चिंतो विठ्ठल, हे दोघे नाना फडनवीसाचा स्वाधीन केले.

ते त्यास अनिष्टकारक म्हणोन त्याणें त्यांस बंदींत ठेविलें असतां, त्या प्रतिबंधांतच ते उभयतां मृत्यु पावले.

भाग तेविसावा.

सन सत्राशें चवऱ्याहात्तरांत विलायती सरकार आज्ञेनें बंगाल्याचा मुख्य साहेब व त्याचे मंत्रदायक मिळून, मुंबई व मद्रास हीं दुमुलखांत इंग्लिशांचीं मुख्य स्थानें तेथील मुख्य व त्यांचे मंत्रदायक कसे कसे वागतात; ती चवकशी प्रथम करूं लागले. तेव्हां त्यांस असें समजलें कीं, मुंबईसरकारानें मराठे यांशीं संबंध करून कांहीं मुलुख संपादिला; त्यावरून त्याहीं त्यांस सांगीतलें, कीं, तुम्हीं हें काम सरकारहुकुमाखेरीज केलें, त्यास तें लवकर टाकून द्या, आणि

जें लष्कर मराठ्यांचा कुमकेस पाठविलें आहे तें माघारें आपल्या कंपनीचा मर्यादे मध्यें आणवा; आणि साष्टी व वसई मात्र आपल्याकडे ठेवा; आह्मी वकील पाठवून पुण्याचे गादीचा जो मुख्य असेल त्याशीं स्नेह करूं; राघोबा हत्याकरणारा तस्मात् तो अयोग्य असेल. त्यावर मुंबई सरकारानें आपण केलेल्या कृत्यास पुष्टिकारक अशीं अनेक प्रकारचीं साधनें बोलण्यांत आणिलीं. आणि राघोबाचा हातून हत्या घडली नाहीं, असें आह्मास पुर्तेपणें ठावुक आहेसें समजाविलें तरी कलकत्त्याचा मुख्य व त्याचे मंत्रदायक ऐकेनात. तेव्हां ते निरुपाय होऊन त्यांहीं किनिड साहेबास लिहिलें कीं, पत्र पावतांच युद्ध मनाकरावें आणि मार्ग चालू झाले ह्मणजे कंपनीचा मर्यादेंत सुर्तेजवळ लष्कर सुद्धां येऊन रहावें. यानंतर दिसेंबर महिन्यांत बंगाल्याहून आप्तन् साहेब नामें वकील पुरंदरास आला. त्याजबरोबर सरवाबापूला गवरनर जनरालाचें पत्र होतें; त्यांत लिहिलें कीं, आह्मीं विलायतेहून बादशाहापासून आपल्या कामावर मुख्यत्वें आलों. त्या आमचे आज्ञेवांचून मुंबई सरकारानें कोणाशीं तह किंवा युद्ध करूं नये; तें नसून त्यांहीं राघोबाचा पक्ष स्वीकारिला, ह्मणोन आह्मी तें सर्व मोडून तुमचा स्नेहाकरितां तुह्माकडे वकील पाठविला आहे. हें वर्तमान राघोबास कळलें परंतु असें होण्याचें कारण काय तें तो नसमजला; ह्मणोन त्यास आश्चर्य वाटलें. मग त्याचा मनांत आलें कीं, मीं जें इंग्लिशांस द्यावयाचें कबूल केलें तें त्यांस थोडकें असें वाटत असेल, याकरितां तो आणखीही बहुत द्यावयास सिद्ध झाला.

इकडे पुरंदरीं कारभारीलोक हें गवर्नर जनराल याचें कृत्य आपणास फार उपयोगी असें जाणोन हर्ष पावले. आणि तो वकील त्यांशीं नम्रतेनें वागे त्यावरून त्यांस वाटलें कीं, इंग्लिश आह्माला भीतात. तेव्हां ते त्याशीं बहुत वर्चढपणा करून त्यास बोलूं लागले कीं, साष्टी वगैरे स्थानें लवकर आमचे स्वाधीन करा आणि राघोबाल्हाही आह्माकडे त्वरित पोंहचता करून द्या. याप्रमाणें केल्यावर आह्मीं कृपाकरून तुमचा मुंबई सरकारास खर्चानिमित्त बारा लक्ष रुपये देऊं. या बोलण्यांतच त्यांस कांहींशी धमकीची गोष्टी दर्शविली. त्यावरून त्या वकिलानें कलकत्त्यास लिहून पाठविलें कीं, आह्मीं यांशीं नम्रतेनें वागतों, तेणेंकरून यांस वाटतें कीं, आपणास इंग्लिश भीतात. आणि साष्टी वगैरे स्थानें यांचा सनदा मागाव्या अशी मला आज्ञा होती, तें कांहीं घडत नाहीं; आणि याशीं स्नेह करणें तेंही शेवटास जात नाहीं. तें पत्र कलकत्त्यास पोंहचल्यावर पहिली मसलत फिरून असें ठरलें कीं आतां महत्वयासेंकरून राघोबाचा पक्ष स्वीकारावा. त्यावरून गवर्नर व जनराल आणि त्याचे मंत्रदायक यांणीं निजामअल्ली आणि हैदर याचे द्वारें राघोबाल्हा अनु

कूळतेचें

कूळनचें पत्र पाठविलें. आणि शिंदा व होळकर व मुधोजीभोंसला यांस लिहिलें कीं तुम्ही रघुनाथरावास अनुकूळ असा हें कदाचित न झालें तर त्यास प्रतिकूळ न व्हावें. याखेरीज त्यांहीं कित्येक द्रव्य व कांहीं सेना मुंबईस जावयाकरितां सिध्द केली; आणि मद्रासचें पलटणीलोकांहीं मुंबईस जावें अशी आज्ञा झाली. हें वर्तमान ऐकून राघोबास मोठा आनंद झाला, परंतु याप्रमाणें सिध्दी न पावला. कांकीं पुरंदरचे कारभारीलोकांहीं हें सर्व जाणून एकाएकीं नम्र होऊन तें इंग्लीशांहीं मागीतल्याप्रमाणें द्यावयास सिद्ध झाले. तेव्हां तो अपटनसाहेब वकील तोकलकत्याचे आज्ञेची वाट न पाहातां तह करिता झाला त्यांत असें ठरलें कीं, सार्ष्टी इंग्लीशांहीं घेतली आहे ती त्यांकडेसच असावी. आणि भडोंचशाहराचा पेशव्याचा जो भाग असेल तोच त्या शाहराचे आसमंतात तीन लक्षांचें उत्पन्न होयसा मुलुख इंग्लीशांस द्यावा. याशिवाय बारालक्षरुपये द्यावे. आणि फत्तेसिंगानें इंग्लीशांस दिलेला मुलुख तो आपल्या गाइकवाडांची सत्ता नाहीं असें ठरलें तर इंग्लीशांहीं तो मुलुख पेशव्यास द्यावा; आणखी राघोबाशीं मुंबईसरकाराचा तह झाला आहे तो इतःपर नसावा; या तहास रघुनाथराव अनुकूळ झाल्यावर त्याणें महिना पंचवीसहजार रुपये खर्चास घेऊन गोदातीरीं कोपरगांवीं रहावें, त्याजवळ एक हजार स्वार शोभार्थ असावे.

याप्रकारें तह ठरल्यावर मुंबईसरकारास बहुत विषम वाटलें; कांकीं ते मराठीलोकांचे माहितगार झाले असतां, त्यांस न विचारितां बंगालेकर सरकारानें ठराव केला तो मराठ्यांस फार हितकारक होईल.

तें तहाचें वर्तमान ऐकून राघोबाचें बोलणें पडलें कीं या तहास अनुकूळ व्हावें त्यापेक्षां मला कोणी दुसरा सहाय नसतां हीमी एकटाच युध्द करीन. परंतु त्यास कोणी मराठा अंतःकरणपूर्वक सहाय मिळेना, आणि कलकत्याची मसलत झालेली पुनः न फिरेल असें समजून त्याणें आपल्या सेनेस रजा देऊन दोनशें माणसांनशीं तो रघुनाथराव सुरतेंत, इंग्लीशांच्या आश्रयानें राहिला. त्यावेळेस कोणी सदोबानामें ब्राह्मण होता, त्याणें पानपतची लढाई झाल्यावर आठां नवां वर्षांनीं आपण सदाशीवरावचिमणाजी असें सोंग केलें; त्यावेळेस माधवरावानें त्याची चवकशी करून तो खोटासा ठरविला; आणि त्यास बंदींत घातला होता. तो एके ठिकाणीं ठेवीत नसत. त्याचें स्थानांतर करतां करतां, तेवेळेस तो रत्नागिरीस ठेविला. तेव्हां तेथचा सुभेदार रामचंद्रनाईक परांजपे नामें होता त्याणें पुण्यांतील अव्यवस्था जाणून, त्यास मुक्त केला तर आपणास मो-

ठा

ठा लाभ होईल असें समजून त्यास सोडिला. आणि लोकांस विदित केलें कीं, सदाशिवराव भाऊ हा खरा असतां, कारभारी लोकांनीं यावर जुलुम करून उगाच याचा प्रतिबंध केला, ही गोष्ट लोकांस सत्य वाटोन त्याजवळ वीस हजार फौज जमा होऊन त्याणें कोंकणांतील वीस बेवीस किल्ले घेतले असें झालें असतां मुंबईचा सरकारास तो खरा वाटला मग त्यांहीं त्याजकडे वकील पाठवून त्याचा मोठा संमान केला. शेवटीं तो सदोबा आपल्या सैन्यासुद्धां बोरघाटानें वर चढून त्याणें राजमाचीचा किल्ला हस्तगत केला. तेव्हां तो त्या राजमाचीस असतां, पुरंदरचा कारभारी लोकांहीं तो तेथें कांहींसा ठरावया करितां सुलथापीनें तहाचें बोलणें लाविलें; आणि त्यास नकळतां शिंद्याचा सरदार रामजी पाटील नामें व भिवराव पानशा यांस लश्कर सुद्धां राजमाचीस पाठवून एकाएकीं त्याजवर हल्ला करविला. तेसमयीं त्याचे लोक व तो भयभीत होऊन कोंकणांत पळाले; त्यांतून कित्येकांनीं साष्टीचे ठाण्याचा भिंतीचा आश्रय केला, आणि तो मुंबईस गेला, परंतु तेथें मुख्य साहेब नव्हता म्हणोन तो बोलिला कीं, एव्हां आम्हीं कुलाब्यास जातों मग मुख्य साहेब आल्यावर पुनः येऊं. असें म्हणोन तो कुलाब्यास गेला. तेथें रघुजी आंग्र्या होता त्याणें त्यास दोबास कैद करून पुण्यास पाठविला; तेथें त्यास हत्तीचे पायीं देऊन मारिला.+

इकडे मुंबई सरकारानें त्या सदोबाचा संमान केला आणि राघोबा सनसत्राशें शाहात्तरांत नवेंबराचे अकराव्ये तारिखेस सुरतेहून मुंबईस आला; त्यास इंग्लिशांहीं दरमहा दहा हजार रुपये खर्चास देऊन आपल्या आश्रयांत ठेविला. त्यावरून पुरंदरचा कारभारी मंडळीनें बंगाल्याचा मुख्य गवरनर जनराल व त्याचे मंत्रदायक साहेब यांस शब्द लावून लिहिलें कीं, तुमचा व आमचा तह असतां, मुंबई सरकारानें याप्रमाणें कृत्रिम केलें. त्यावरून मुंबई सरकारही त्या कारभारी लोकांस शब्द लावी कीं, तुम्हीं आम्हास जो तीन लक्षांचा मुलुख दिला त्याचें उत्पन्न आतां तसें होत नाहीं असा वाद कित्येक वेळ होत राहिला.

फत्तेसिंग गाइकवाड तो आपणास पेशव्याचा ताबेदार म्हणवीत असे परंतु पेशव्याचे कारभारी लोक इच्छित होते कीं, आपल्या आज्ञेवांचून कोणाशीं युद्ध किंवा तह करणार नाहीं, व मुलुखही आज्ञेवांचून कोणास देणार नाहीं असें गाइ-

---

\+ मारिला तो ब्राह्मण होता, यास्तव पुण्यांतील ब्राह्मण आपल्याकडे ब्रह्महत्येचा दोष नयावा म्हणून कोणी म्हणत कीं, तो सोनार होता. कोणी म्हणत कीं, तो ब्राह्मण होता. यास्तव तो हत्तीचा पायीं दिला नाहीं परंतु त्या अन्यायाची शिक्षा लोकांस दाखवायासाठीं आमेदनगरचा किल्ल्यांत त्यास पाठवून तेथें कोणि एक सोनार महत् अपराधी होता. त्यास जिवें मारावें अशी आज्ञा झाली असे, त्याला त्या सदोबाबद्दल उपोषणादि दुःख देऊन मारिला. आणि तो सदोबा सोडिला.

कवाड यापासून लिहून घ्यावें; याप्रमाणें त्यांचा मनांतील अर्थ जाणोन फत्तेशिंग याणें पेशवे यांचा धनीपणा मानिला, परंतु युद्ध करणें किंवा मुलुख देणें या कामास मला दुसऱ्याचे आज्ञेची गरज नाहीं असें बोलोन त्याणें इंग्लिशांस मुलुख दिला होता तो माघारा इंग्लिशांजवळ मागीतला. तें मागणें त्या कारभारी मंडळीचा मस्लतीनेंच झालें असा अर्थ नाहीं; कांकिं, राघोबानें गाइकवाडास मुलुख देऊं केला होता तो त्याप्रमाणें त्यास प्राप्त न झाला म्हणोन त्याणें इंग्लिशांस आपला दिलेला मुलुख माघारा मागीतला.

इकडे पुरंदरचा कारभारी लोकांहीं तो सदाशिवराव भाऊचें सोंग करणार याचें पारिपत्य केल्यावर कोंकणांत फौज पाठवून त्या सदोबानें घेतलेले किल्ले सर्व हस्तगत केले.

यानंतर सन सत्राशें सत्त्याहात्तरांत पर्जन्यकाळ गेल्यावर हरिपंत फडका फौज घेऊन हैदराशीं युद्ध करावयास कर्नाटकांत गेला, परंतु तदनुसार लाभ न पावला; त्यावेळेस त्या हरिपंताचा लश्करांतील मानाजी फांकडा नामें सरदार व कित्येक मराठे मानकरी लोक त्या हैदर अल्लीनें फितविले होते; तें समजून हरिपंत फडका तेथून माघारा लवकर निघूं लागला, नंतर त्या लोकांतलाच एक म्हसवाडचा देशमुख यशवंतराव नामें फितुरी होता त्यास हरिपंतानें तोफेचा तोंडीं दिला त्यावरून तो दंगा शांत झाला. त्याच वर्षीं सातार्यांत रामराजा फार वृद्ध झालेला होता तो दिसेंबराचे बाराव्ये तारिखेस मृत्यु पावला. त्याच सुमारें भवानराव प्रतिनिधीही मरण पावला; त्याचे जागीं परशुराम श्रीनिवास नामें त्याचा पुत्र स्थापिला; त्यापूर्वीं सन सत्राशें साठांत कोल्हापुरचा राजा संभाजी तो दिसेंबर महिन्यांत मरण पावला होता. त्यानंतर दोन वर्षांहीं त्या राजाची स्त्री जिजाबाई तिणें इंदापुर परगण्यांतील खानवत गांवचा पाटील शाहाजी भोंसला याचा पुत्र दत्तक घेऊन, तो गादीचा धणी करून, तो कारभार आपण चालवूं लागली. तेव्हां त्या राज्यांत पूर्वीचा रीतीस फार अंतर पडूं लागलें. तें असें तिणें पेशव्याचा राज्यास उपद्रव दिला, आणि निजामाशीं कांहीं संबंध ठेविला; तेणें करून माधवराव बळवंत त्यावेळेचा पेशवा त्यास राग येऊन त्या कोल्हापुरकरांचा कित्येक मुलुख घेऊन आपले सोईरे पटवर्धन यांचे जाहागिरीकडे लाविला. याशिवाय तिणें समुद्रांत चांचेपणा केला म्हणोन इंग्लिशांहीं तिचा मालवण किल्ला व सावंतवाडी संबंधें रेडी किल्ला घेतला.

वराडांतील वर्तमान असें, सन सत्राशें पंचाहात्तरांत साबाजी भोंसला व मुधोजी भोंसला या दोघांचें युद्ध होऊन त्यांत साबाजीचा जय झाला त्याचा लोकानीं मुधोजीस वेढून धरिला आणि कैद करीत होते, इतक्यांत साबाजी त्या

जयाचा

जयाच्या आनंदांत आपला हर्ली मुधोजीच्या हर्ली जवळ नेऊन बोलिला कीं आतां कशास लढतां असें ह्मणत असतां त्या मुधोजीनें त्यास किमपि उत्तर न देतां जवळचा पिस्तुलाच्या गोळीनें त्यास मारून टाकिलें मग तो मुधोजी आपला पुत्र रघुजि भोंसला याचा रक्षक होऊन कारभार चालवूं लागला.

इकडे बडोद्यांत फत्तेसिंग गाइकवाड याणें पेशवे सरकारास पांच लाख रुपये नजर व खंडणी बाकी ऐवज साडे दहा लक्ष रुपये नाना फडनवीस व सखाराम बापू यांस दरबार खर्च एक लक्ष रुपये देऊन आपलें सेनाखासखेल पद पावला.

इकडे राजाराम मृत्यु पावल्याचे कांहीं सें पूर्वी त्याचा वृद्धपणा ह्मणून वावीगांवचा पाटील त्रिंबकजी राजा भोंसला तो मालोजीचा भाऊ विठोजी भोंसला याचा वंशज.

त्याचा पुत्र राजारामास दत्तक दिला, तो विठोजी तो शहाजीचा काका, त्या शहाजीचा पुत्र शिवाजी महाराज राजारामाचा दत्तकाचें नाव शाहू महाराज ठेविलें.

सन सत्रासें अठ्याहत्तरांत पुण्यामध्यें कारभारी लोकांत वैमनस्य पडलें तें उत्तरोत्तर वृद्धिंगत झालें तो प्रकार असा, नाना फडनवीस तो आपला चुलत भाऊ मोरोबा फडनवीस याचे बुद्धीस तुच्छ मानून द्वेष करीत होता, त्या मोरोबास राघोबाचे पक्षी जे मानीत होते त्यांत मुख्य बजाबा पुरंदरे व सखाराम हरी व चिंतो विठल व विष्णू नरहर याहीं मिळून तुकोजी होळकर आपल्याकडे घेतला असे. आणि मोरोबा फडनवीस व सखाराम बापू यांशीं मसलत होऊन पुनः राघोबास स्थापावा असें ठरलें परंतु त्याचे पूर्व वर्षीं माधवराव नारायणाची माता गंगाबाई मरण पावली तेव्हां पासून मोरोबा विषयीं कांहीं मनांत शंका उत्पन्न झाल्या मुळें सखाराम बापू त्या कामांत पुर्तेपणें शिरेना, ही गोष्ट यावरून समजते कीं जा वेळेस मोरोबानें हें वर्तमान मुंबई सरकारास विदित केलें त्यावरून ते इंग्लीशही अनुकूळ होऊन सखाराम बापू पुरंदरच्या तहकरणास मुख्य त्याची अनुकूळता या कामास पाहिजे असा आक्षेप त्याहीं धरिला, तेव्हां तो तसें पत्र देईना, यास्तव तें सिद्धीस गेलें नाहीं. यावरून नाना फडनवीस याणें मनांत आणिलें कीं मोरोबास धरून कैद करावा परंतु तो त्याचा मतलब मोरोबास कळला तेव्हां तो पुण्याहून पळून गेला तेव्हां नाना फडनवीस समजला कीं हें कृत्य ना एव्हांच केलें हें ठीक झालें नाहीं, नंतर सखाराम बापूच्या द्वारें युक्तीनें तो माघारा यावयास कारभारी मंडळी नवीच होणार त्यांत मोरोबा व बजाबा पुरंदऱ्या हे असावे असा आकार घातला,

तेव्हां

तेव्हां मोरोबा वश होऊन पुण्यास माघारा आला; परंतु बजाबा पुरंदऱ्या नानाच्या कृत्यास विश्वासेना, आणि सखाराम हरी मोठ्या धैर्यानें स्पष्ट बोलिला कीं मोठा शूर आणि प्रमाणिक व भोळा असा जो रघुनाथराव त्याचा पक्ष सोडून मी कदापि कृत्रिमी व भित्रा असा जो नाना फडनवीस याचा पक्ष धरणार नाहीं.

या पुढें मोरोबाचे पक्षपाती जिनकें होते त्यांवर नाना फडनविसाची शक्ति होळकराचा बळा पुढें चालेनाशी झाली. ह्मणून तो पुरंदरास निघोन गेला मग थोडक्याच दिवसानीं त्या मोरोबास त्याणें असें दर्शविलें कीं जर मला अभय असेल तर मिही रघुनाथरावास अनुकूळ आहें. इतकें करून त्याणें सखाराम बापूच्या व मोरोबाच्या बद्दल मान रक्षून त्यांची प्रसन्नता संपादिली. त्यानंतर पुण्यांत पुनः विचार होऊं लागला कीं रघुनाथरावास त्या पदावर स्थापावा किंवा नस्थापावा. असें असतां तो मोरोबा आपल्या भोळेपणानें समजला कीं आतां मि मुख्य झालो आणि त्यास नाना फडनवीस वारंवार समजाऊं लागला कीं रघुनाथरावाचें आचरण नीट नाहीं आणि तो पदारूढ असतां त्याणें बहुत द्रव्य व्यर्थ खर्चिलें. त्यावरून त्याचा मनांत आलें कीं आतां रघुनाथरावाचें महत्व झालें असतां माझी योग्यता उतरेल. ह्मणून त्यास रघुनाथरावा विषयीं इंग्लीश बोलिले असतांही त्यास तो आळस करूं लागला आणि त्याचे मनांत तें कार्य शेवटास जावेंसें नव्हतें. त्यावरून इंग्लीश यांणींही ती गोष्ट सोडिली.

यानंतर नाना फडनवीस मोठ्या आर्जवें करून त्या कारभारी मंडळीची सुप्रसन्नता राखीत असतां त्याचे पक्षी महादजी शिंदे व हरिपंत फडके हे फौजेसुध्धां कर्नाटकीं हैदरअल्लीशीं युद्ध उरकून मिरजेस दोघे एकत्र मिळून तेथून पुढें निरनिराळे निघून पुरंदरास जूनमहिन्याचे आठवे तारिखेस उभयतां येऊन पोंहचले. तेव्हां नाना फडनवीस आपली मुख्यता पूर्वींच्या प्रमाणें साधूं लागला आणि मुख्य मुख्य स्थानीं आपलीं ठाणीं बसऊन शिंद्याचे द्वारें होळकरास रघुनाथरावाच्या पक्ष नाहींसा केला. त्यावरून मोरोबा फडनवीस मात्र त्यांनी आपणास इंग्लीश सहाय व्हावया विषयीं उद्युक्त झाला परंतु तें कार्य सिध्धीस जाईल असा अवकाश नव्हता; कांकीं जून महिन्याचे अकरावे तारिखेस महादजी शिंद्याच्या स्वारांची एक टोळी येऊन अकस्मात त्या मोरोबास धरून नानाजवळ नेला. त्याणें त्यास आमेदनगराचा किल्यांत बंदीस घातला; ते समयीं त्याचे पक्षपातीही सांपडले ते कैद केले. सखाराम बापूनें इंग्लीशांशीं पुरंदरचा तह केला त्यास प्रतिबंध केला तर तो तह रहाणार नाहीं ह्मणून तो तसा-

तसाच मोकळा ठेविला. त्यासमयीं सखाराम हरी + तो राघोबाचा मोठा अभिमानी आणि विश्वासू असा सेवक होता, यास्तव त्याचे पायांत अशी जड बिडी घातली कीं, तो पुरुष बलाढ्य असतांही, त्याला ती उचलेनाशी होती. आणि त्याचे खाण्यापीण्यांत असे हाल केले कीं, चौदा महिन्यांत त्याला उठावयाची शक्ति राहिली नाहीं. तरी तो आपल्या स्वामीचा अभिमानें करून बोलत असे कीं, माझें बळ गेलें आणि प्राणही लवकरच जातील. परंतु मी मेल्यावर माझी निमीस हाडेंही, रघुनाथरावाचा कल्याणाचे शब्द करीत रहातील.

या प्रकारें नानाफडनवीस आपल्या कुटिल युक्तींनीं त्या कारभारी मंडळींत आपली श्रेष्ठता पावला असतां; तो मनात आणूं लागला कीं, अशाच छत्रिमानें इंग्लीशही ठकतील. आणि त्यापूर्वी सन सत्राशें सत्त्याहात्तरांत कोणी एक फ्रेंच वकिलाचा वेषें करून पुण्यांत आला होता, त्या लोकांशीं व इंग्लिशांशीं हिंदुस्थानचे राज्याविषयीं परस्परें फार स्पर्द्धा पुरातन आहे, असें त्या नाना फडनविसास ठाउक होतें; त्यावरून त्याणें युक्ती कल्पिली कीं, आपण फ्रेंच लोक हातीं धरिले असें इंग्लिशांस भय दाखवून कांहींएक प्रकारें ते वश करावे, म्हणोन त्यादिवसापासून तो त्या फ्रेंचांचा बहुमान रक्षिता झाला; आणि त्या पूर्वी पुरंदरचा तहासंबंधें कांहीं खटलें पडलें तेंही तसेंच होतें असें असतां, तो नाना फडनवीस व शिंदे व होळकर यांस कलकत्त्याहून इंग्लिशांचें लिहिलें आलें कीं, आमचें व फ्रेंच लोकांचें विलायतेमध्यें युद्ध असतां, ते लोक सांप्रत तुमचा राज्यांत संमानानें वागतात; त्यास ते कदाचित् आमचा मुंबई सरकारास प्रतिपंथी होतील; याविषयीं आमचीं पलटणें खुसकीचा मार्गानें कलकत्त्याहून मुंबईस येतील त्यांस तुमचा अडथळा नहोईशी सनद द्या. त्या गोष्टीस शिंदे व होळकर तात्काळ मान्य झाले; परंतु नाना फडनविसास असा विचार पडला, कीं, जर हें मीं मान्य करीन तर ते लोक इकडे येऊन प्रबळ होतील. आणि जर मान्य न करावें तर ते युद्धास सिद्ध असतील. तस्मात् आपण त्या इंग्लिशांस भयप्रदर्शनार्थ फ्रेंच लोकांची प्रतिष्ठा वाढविली; तो उद्योग बहुत नहोता तर बरें असतें. आतां यांत फसलों असें दिसतें; इतका विचार करून तोही निरुपाय होऊन वश झाला; परंतु त्याचे सरदार बुंदेलखंडांत होते त्यांस गुप्तपणें लिहिलें कीं, माझें अंग न दर्शवितां, होईल तितका इंग्लिशांस अडथळा करावा. यानंतर मुंबई सरकार याणींही त्या कारभारी मंडळीस स्पष्ट सांगितलें कीं, जे तुम्हीं

\+ तो सखाराम हरी जातीचा परभू होता; त्याशिवाय त्या जातीचे कित्येक पुरुष परम अभिमानें करून मराठ्यांची चाकरी करीत आले; असें मराठ्यांचा बखरीवरून विदित होतें.

नंतर

नवे कारभारी आहांत. तो पुरंदरचा तह झाला आहे त्याप्रमाणें मान्य आहांत कीं नाहीं तें उत्तर द्या. व त्यापैकीं कांहीं अंश राहिला तो आमचा आह्मास प्राप्त होण्यास विलंब नसावा. आणि तुह्मीं पुण्यांत फेंच लोकांचा वकील ठेविला यावरून तुमचा चित्तांत काय आहे तें आह्मास समजत नाहीं त्यास पुढें कर्तव्य काय असेल तें आह्माला कळविलें पाहिजे. त्यावरून नाना फडनविसानें पुण्यांत लुबीन नामें फेंचांचा वकील होता, त्यास निघोन जावयाची आज्ञा दिली. परंतु त्या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर विलंबानें कुटिल मार्गाचें आणि अस्पष्ट केलें; त्यावरून मुंबईस ठरलें कीं, हे पुरंदरचा तहाला मान्य नाहींत, त्यापेक्षां यांबरोबर युद्ध करावें.

असें झाल्यावर नाना फडनवीस समजला कीं, हा मजवर मोठा अनर्थ येऊन पडेल; यास्तव कांहीं मदत उपाय केला पाहिजे. ह्मणोन त्याणें मुंबईमध्यें या प्रकरणीं युद्धाची गोष्टमात्र निघाली तोंच कांहीं एक युक्ती करून कालक्षेपार्थ कोणी एक वकील मुंबईस पाठविला; आणि मुलखीं मुलखींचा शिलेदारांहीं दसऱ्यास पुण्यावर येऊन मिळावें अशी आज्ञा केली. याशिवाय कोंकणांत जेथें जेथें त्याचीं जहाजें होतीं, तेथें तेथें त्या जहाजांवर धान्यादि साहित्यें भरून युद्धाची सिद्धता करविली. याप्रमाणें नाना फडनविसाची तयारी होत असतां, मुंबईमध्यें त्या युद्धास जावयाची गोष्टमात्र निघोन तयारीस विलंब लागला, याचें कारण असें कीं, तेथचे मुख्य व त्यांचे मंत्रदायक, यांचा विचार एकचित्त होईना. मग असें ठरलें कीं, रघुनाथरावाबरोबर कांहीं फौज देऊन त्यास पुण्यांत पाठवून तो माधवराव नारायणाचा मुख्य रक्षक करून, स्थापावा. ही गोष्ट सिद्धीस न्यावयाकरितां त्याबरोबर सेना दिली तिचा सरदार व दोघे तिक्काईत साहेब त्या कामास नेमून तो अर्थ शेवटास जावासा केला. त्या फौजेंत सहाशें सुमारें गोरे लोक व दोन हजार दोनशें पलटणी लोक तोफखान्यासहित होते; ते त्या राघोबाबरोबर निघोन, दिसेंबराचे तेविसाव्ये तारखेस बोरघाटावर सारे जाऊन एके जागीं मिळाले, त्यांत पलटणी सरदार साहेब व ते दोघे तिक्काईत साहेब यांचें कांहीं वैमनस्य पडलें आणि तो पलटणी साहेब हिंदूंशीं युद्ध करण्याविषयीं माहित नव्हता; ह्मणोन त्यास खंडाळ्यापासून कारल्यापर्यंत आतांना, शत्रूंची फारशी अडचण नसतांही आठ दिवस लागले. तेथून पुढें तळेगांवांवर पोंहचले तेव्हां जांत महादजी शिंदे व हरिपंत फडके मुख्य असें मराठे यांचें मोठें लष्कर त्याची गांठ पडली. तें सैन्य सुमारें पन्नास हजार होतें, तेसमयीं प्रथम मराठे याहीं युद्ध करणार असें दर्शविलें; परंतु इंग्लीश आपल्या बंदोबस्तानें त्यांवर चालून जात असतां,

ते समूर उभे राहिनातसे झाले. नंतर तेतळे गांवाजवळ आऊन पाहतात तों तेंच गांव उजाड झालेला होता; आणि त्यांस दुसरें वर्तमान कळलें कीं या गांवाप्रमाणेंच चिंचवड व पुणें ओस पाडावयाविषयीं नानाची आज्ञा आहे. त्यावरून मराठे फार निकरानें लढतील, अशी अटकळ करून ते साहेब माघारें मुंबईस जावयास सिद्ध झाले. इतकें होईतोंपर्यंत लहान लहान युद्धें कोणी पाग व पतकी लोक यांशीं झालीं त्यांत इंग्लीश जय पावले आणि त्यांचे जवळ अठरा दिवस पुरेशी सामग्री होती असतांही राघोबाव ते पलटणांतले कित्येक सरदार यांच्या मनास तीं माघारें जावयाची मसलत येईना. असें असतां ते तसेच पुढें आऊन जर तात्काळ पुणें घेते तर तें कार्य सहज झालें असतें, परंतु तें न करितां तेच रात्रीं इंग्लीश आपलें मोठ्या तोफा वगैरे जड सामान तेथच्या तळ्यांत बुडवून डेरे पाडून मागें फिरले. तेव्हां त्यांस वाटलें कीं आम्हीं शत्रूस नकळतां एक मजल पार होऊं. परंतु मध्यरात्रीनंतर दोन अडीच घटिकांनीं त्यांच्या पिछीस शत्रूचा मार होऊं लागला; आणि त्यावेळेस त्यांचें कांहीं सामान लुटलें गेलें. मग थोडक्या शिपायांनीं त्यांच्या पाठीमागची दोन तोफांसहित पलटणी सहाशें काळ्या लोकांची एक टोळी होती. तीवर शत्रूनें हल्ला केला असतांही तें लष्कर शत्रूशीं लढतां लढतां उजेडल्यावर पुढें चालतें झालें. ते समयीं त्यांच्या दृष्टीस पडलें कीं आपल्या सभोंवतीं शत्रूच्या स्वारांची मोठी दाटी झाली आहे. आणि ते आपणावर हल्ला करणार आहेत असें समजून तो हल्ला आपणावर घ्यावयास बंदोबस्तानें उभे राहिले. त्यावेळेस मराठे लोक यांणीं शाहाजहाना पासून चालत पडल्याप्रमाणें त्यांच्या समोर न लढतां त्यांवर मागून हल्ला केला. तेव्हां ते मागचे शिपाई लोक सर्व काळे होते. त्यांचा मुख्य साहेब हार्नलि नामें युद्धनिपुण होता त्याची आज्ञा वारंवार मानून ते मोठ्या स्थिरतेनें तेथेंच असून त्यांहीं तो शत्रूचा स्वारहीं हल्ला केलेला व्यर्थ केला; आणि त्यांस पिटून त्यांचे पाठीमागें जावें. अशी आज्ञा ते पलटनी लोक मागत होते. मग सूर्योदयाचे समयीं, मराठ्याचें पायदळ आणि स्वार मिळून पुनः मागच्या टोळीवर चाल केली. आणि मोठ मोठ्या तोफा आणून त्या लष्कराच्या थोरल्या भागावर मार टाकिते झाले. तेव्हां इंग्लीश यांणीं ही आपल्या तोफा सुरू केल्या; आणि मागचे टोळीचे कुमकेस चारशें सुमारें गोरे लोक व दोनशें काळे लोक पाठविले. ते त्यांस मिळून मग त्या मागल्या टोळीच्या लोकांहीं दोन प्रहरपर्यंत आपणावर मराठे फार निकरानें हल्ला करित होते तो निष्फळ केला. तेव्हां मराठे यांचा बंदोबस्तांत कांहींसें शिथिल पडलें; अशी संधी पाहून ते लोक आपल्या थोरल्या भागास जाऊन

आश्रय

आश्रय पावले. तेसमयीं ते थोरल्या भागाचे लोक वडगांवांत ठाणें धरून मराठ्यांशीं तोफानीं लढत होते; ते त्या गांवांत शिरल्यावेळेस त्यांचें बुणगें त्या पल्टणाचे टोळींत शिरलें. त्यायोगें त्यांच्या बंदोबस्ताची कांहींशी न्यूनता झाली ती संधि पाहून, मराठ्यांहीं त्यावेळेस मात्र हल्ला करून त्यांच्या कांहींसा नाश केला; मग तिसरे प्रहरीं मराठ्यांहीं युद्ध बंद करून सोडिलें. त्यासंधींत साहेब लोक समजले कीं आम्हीं एथपर्यंत आपलें सर्व संभाळून आणिलें; आतां यापुढें नीट संभाळून जाणें होणार नाहीं. ह्मणून त्यांहीं तहाचें बोलणें करावयासाठीं मराठ्यांकडे वकील पाठविला. आणि राघोबानेंही आपल्याविषयीं शिंद्याशीं तहाचें बोलणें लाविलें. त्यांत इंग्लीशांहीं कबूल केलें कीं संन सत्राशें ब्याहत्तरांपासून जो हिंदूंचा मुलूख घेतला आहे तो माघारा द्यावा. बंगाल्याहून लश्कर मुंबईस येतें आहे तें माघारें फिरवावें. आणि राघोबा तर स्वमर्जेनेंच शिंद्याच्या स्वाधीन झाला. याशिवाय इंग्लीशांहीं आपला भडोज शहरचा भाग शिंद्यास द्यावा. आणि त्या शिंद्याचे कारभारी लोक यांस एकेचाळीस हजार रुपये दरबारखर्च द्यावा. असा करार झाल्यावर मराठ्यांहीं त्या इंग्लीशांस जाऊं दिले.

बंगाल्याहून लश्कर निघून मुंबईस येत होतें तें मे महिन्यांत यमुना पार उतरलें. त्यांस आज्ञा होती कीं वाटेनें निट मुंबईस जावें. परंतु मराठ्यांच्या सरदारांहीं वाटेंतच त्यांनां अडिविलें त्यावरून त्यांचा पारिपत्या करितां त्या लश्करास विलंब लागला. तेसमयीं त्या लश्करी लोकांहीं मराठ्यांशीं युद्ध करून काल्पीचा किल्ला घेतला, आणि बुंदेलखंडच्या रजपूतांशीं लढतानांही कांहीं उशीर लागला. त्यावरून कलकत्त्याच्या मुख्य साहेबास राग येऊन त्या लश्करच्या मुख्य सरदार साहेब यास माघारें बोलाऊन करनेल गाड्ड नामें साहेब त्या कामावर नेमिला. तो त्या लश्करांत जाऊन पोहचतांच तेथून पुढें सुरतेस चालता झाला त्यास वाटेनें कोणी मराठ्या सरदारांहीं उपद्रव केला असतां तो त्यांस जिंकून पुढें जाऊन नर्मदा पार उतरला. नंतर त्याणें मुधोजी भोसल्याशीं कांहीं तहाचें बोलणें करावयासाठीं कांहीं दिवस तेथें मुकाम केला. तो तह कलकत्त्याचे साहेब याणीं मुधोजी भोसला आपणास वश होऊन त्याणें पेशव्याचा पक्ष सोडावा या आशेनें केला. आणि मुधोजीही तदनुरूप वागणार होता परंतु पुण्यांतील तयारीचें वर्तमान ऐकून तें घडलें नाहीं. मग तो गाड्ड साहेब नर्मदा सोडून फेब्रुआरीचे सहाव्ये तारिखेस बऱ्हाणपुरावरु-

न

न सुरतेस जाऊन पोंहचला; तेव्हां त्याशीं मार्गीत मराठे सरदार जसे प्रतिपक्षी पणें वागत होते तसा न वागतां भोपाळचा नवाबानें त्या इंग्लिशांचा मोठा संमान करून पुढें मराठ्यांचा राग आपणावर होईल असें न मानितां त्याणें इंग्लिशांस जोजो पदार्थ पाहिजे तोतो आपल्या शक्तीप्रमाणें अनुकूळ करून त्याशीं स्नेह ठेविला. त्या स्नेहास्तव इंग्लिशांनींही त्यास अभर केला, तो लाभ अद्यापि त्याचे वंश्य अनुभवितात.

महादजी शिंदा तो नानाफडनविसाचा पक्षपाती असून त्याचा मनांत होतें कीं, आपण नानाचा हातारवाळचा वागणारा असें न व्हावें; किंबहुना स्वतंत्रपणें त्यापेक्षां आपली श्रेष्ठता असावी; म्हणोन त्याणें रघुनाथरावास हातीं धरिला, आणि त्यास खर्चासाठीं बुंदलखंडीं बारा लक्षांची जहागीर नेमिली. आणि त्या राघोबास सांगीतलें कीं, हें तुह्मास अविछिन्न पोंहचेल; न पोंहचल्यास मी देईन. आणि नानाजवळ बोलिला कीं, हा रघुनाथराव कांहीं अनर्थ उत्पन्न करील तर त्याचा जाबसाल मला पुसावा. असा तो उभयपक्षीं आपण मध्यस्त झाला. त्याचा मतलब असा होता कीं, नानाफडनवीस याचा उत्कर्ष नसावा; आणि त्याशीं व इंग्लिशांशीं विरोध असला तर नानाफडनवीस यास वारंवार आमची गरज लागोन आपली श्रेष्ठता राहील, यास्तव त्याणें इंग्लिशांशीं द्वेष पडावयासाठीं कांहीं मस्लत देऊन, नानाफडनविसाकडून त्या इंग्लिशांचा किल्ला बाणकोट याजवर हल्ला करविला.

याशिवाय राघोबा बुंदलखंडांत आपली जहागीर घ्यावयास पाठविला तेवेळेस त्याचे बरोबरचे जे लोक होते ते, तोफखाना वगैरे सरंजाम सुध्धां त्यास मागमें जाऊं दिले. आणि त्या रघुनाथरावाचा चवकशीस जे आपले लोक त्याबरोबर पाठविले ते, त्याचा लोकांपेक्षां कांहीसे अधिक होते. तो राघोबा तिकडे जात असतां नर्मदेसमीप पोंहचला तेव्हां त्यास कोणी समजाविलें कीं, तुह्मास झांशीचा किल्ल्यामध्यें शिंदा बंदीस घालणार आहे. त्यावरून रघुनाथरावानें आपल्याबरोबर चवकशी करितां जे शिंद्यानें पाठविलेले लोक होते त्यांवर चोळीमहेश्वरीं नदी उतरते समयीं एका एकीं हल्ला करून त्यास पळविले. आणि आपण मोठ्या त्वरेनें भडोजेस जाऊन इंग्लीशांचा आश्रय केला. या सर्व प्रकाराचा विचार पाहिला असतां, असें दिसतें कीं शिंद्यानें राघोबास बंदीस घालण्याचें भय आपणाच दाखविलें असेल. कांकीं तें सत्य मानून त्याणें पळून जावें. आणि इंग्लीशांचा आश्रयास रहावें तेणेंकरून इंग्लीश व नानाफडनवीस यांमध्यें पक्का विरोध उत्पन्न होऊन, आपली श्रेष्ठता सुदृढ व्हावी. याच अर्थे त्याणें राघोबाबरोबर चवक-

शीस

शीस लोक थोडे पाठविले. असा राघोबा पळून आल्यास अशीक एक मसलत असेल की अशीकीं समयविशेषीं आपणास इंग्लीशांची प्रसन्नता संपादन करण्याचें कारण पडल्यास हें कृत्य उपयोगास येईल; हा एक अर्थ दिसतो. कांकीं त्यापूर्वी त्याणें कित्येक वेळा साहेबलोकांपाशीं भाषण प्रसंगीं तुमची व आमची मैत्री असावी असें दर्शविलें. त्यांपैकीं एक गोष्ट अशी आहे कीं वडगांवच्या तहानंतर कोणे एके समयीं तीघेच वघे साहेब व तो महादजी शिंदा बोलत बसले असतां, त्या समेंत महादजी शिंदा इंग्लीशांच्या लष्करी मागल्ये टोळीशीं पूर्वी लढलेल्याचें स्मरण करून स्तुतिपूर्वक बोलिला कीं धन्य तुमची युद्ध शिक्षा. जो मी एवदा लढणारा त्या मजपुढें तुमचें पलटनीलोक, एक सारिखे तोवड्याभिंती प्रमाणें मला दिसत; ती भिंत एखादे जागीं तुटली असतां तात्काळ पुनः बांधली जाई. असें बोलतां बोलतां, त्यांतील एक शीबाल्द नामें साहेब याचा कानांत सांगीतलें कीं, असें युद्ध करणारे तुमचे लोक व माझे शिपाई एकमत झाले असतां, फार चमत्कार होईल; यास्तव तो समय यावा असें मी इछितो.

राघोबा पळाला तसमयीं नानाफडनवीसाबरोबरीचा सखाराम बापू व रघुनाथरावाचा मुख्य कारभारी चिंतो विठ्ठल हे शिंद्यापासून नानाफडनवीसानें मागून घेतले. तेव्हां त्याणेंही त्याप्रमाणें त्यास त्याचे स्वाधीन केले; त्यावरूनच कोणी म्हणतील कीं तो महादजी शिंदा अंतःकरणपूर्वक नानाफडनविसास अनुकूल होता, तर ती चूक आहे कांकीं, त्याणें आपलें आंग राघोबास पळवावयाविषयीं किमपि नव्हतें, असें त्या नानाला समजावयासाठीं ते त्याचे हातीं दिले असतील. यानंतर नानाफडनवीसानें तो सखाराम बापू मोठा शहाणा मनुष्य तो कोणे वेळेस काय करील तें समजून देतां, आपणाच सर्व आटपील या भयास्तव त्याला एके ठिकाणीं न ठेविला; तो कांहीं दिवस सिंहगडीं व प्रतापगडीं व दुसऱ्या किल्यांवरून ठेवितां ठेवितां, शेवटीं तो सखाराम बापू हाल होऊन त्या बंदीमध्यें रायगडीं मृत्यु पावला. आणि चिंतो विठ्ठलही तसाच कोणे एके किल्यांत मरण पावला.

सन सत्राशें एकुणऐंशीं पासून
पंचायशीं पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग चौविसावा.

अनुक्रमणिका.

जनराल गाडुड साहेब व नाना फडनवीस यांचें तहाविषयीं कांहीं बोलणें झालें.

इंग्लीश दुसऱ्याचा पक्ष न धरितां स्वयेंच मराठ्यांलोकांशीं युद्ध करूं लागले.

मग बडोद्याजवळ दुभाय शहर आहे तेथें इंग्लिशांचें लश्कर जाऊन, तें ठिकाण घेतलें.

फत्तेशिंग गाइकवाड याशीं तह केल्याचा प्रकार.

पेशव्यांचा लोकांपासून अमदाबाद कोट इंग्लिशांहीं लढोन घेतला.

मग गाडुड साहेब यास जिंकावयाकरितां शिंदे व होळकर गुजराथेंत गेले. ते कोणकोणत्या प्रकारें वागले तें प्रकरण.

बंगाल्याहून लश्कर येऊन ग्वाल्हेर व लाहोर हे दोन्ही किल्ले घेतले.

कोंकणांत इंग्लीश व मराठे युद्ध करिते झाले तो प्रकार.

दुघाराजवळची लढाई.

वसयी किल्ला इंग्लीशांहीं हस्तगत केला.

जनराल गाडुड साहेबकच्या मसलतीनें बोरघाटास ठाणें धरून राहिला; मग मुंबईकडे त्यास हटून जाणें प्राप्त झालें.

त्यांत त्याचा कांहींसा नाश झाला.

बंगाल्याचें लश्कर शिंद्याच्या मुलखांत शिरलें तो प्रकार.

मद्रासचे कुमकेस कलकत्याहून लश्कर पायवाटेनें पाठविलें तेसमयीं मुधोजी भोंसल्याचें लश्कर त्यालकत्यास होतें तत्संबंधें आपल्या लश्करास अडथळा न होण्याविषयीं कलकत्याचा साहेबानें तो मुधोजी स्वपक्षानुसारी केला.

सर्व मराठे व इंग्लीश यांच्या महादजी शिंद्याच्या द्वारें तह झाला.

दिल्ली कडील कांहीं वर्तमान.

हैदरअल्ली मरण पावल्यावर त्याचा पुत्र टिपू याचें वागणें, मद्रासेचा इंग्लीशांहीं साळप्याचा तहाचा बेत ध्यानांत न आणितां टिपूशीं वेगळा तह केला.

नाना-

नाना फडनवीस व निजाम यांची दिष्ट्वर काहीं मसलत आली.

रघुनाथरावाचा मृत्यु व त्याच्या पुत्रांची कांहीं गोष्ट.

सनसवाशें त्याहत्तरें पासून दिल्लीकडे काय काय वर्तमान आलें तें प्रकरण.

मुजाअद व त्याचा मृत्यु.

नजीफखानाच्या दत्तपुत्र याणें शिंद्याची कुमक मागीतली.

तेणेंकरून तो शिंदा दिल्लीमध्यें फार योग्यता पावला.

त्यायोगें शिंदा उन्मत्त होऊन त्याणें इंग्लीशांस कांहीं अमर्याद मागणें केलें, त्यावरून ते रुष्ट होऊन त्यांहीं शिंद्याची मध्यस्थता दूर करून, आपला कोणी साहेब नेहेमी पुण्यास असावा असा नेम केला.

भाग चौविसावा.

गाड्ड साहेब सुरतेस जाऊन पोहचला, नंतर त्याचा कलकत्याचा साहेबानीं मोठा मान वाढवून त्यास जनराल पदवी देऊन त्याला आज्ञा केली कीं नानाफडनवीस व मुंबई सर्कार यांशीं स्नेह पडेल असा उद्योग करावा; त्यांत पुरंदरचा तह प्रमाणें तेंत असावा. अशी आज्ञा झाली. त्यांत विशेष इतकाच कीं, फ्रेंच लोकांस हिंदूच्या मर्यादेंत येऊं देऊं नये. त्यावरून त्या साहेबाचें व नानाफडनवीसाचें बोलणें चाललें असतां, सनसत्यांशें एकुणऐशीं मध्यें पर्जन्याचे समाप्ति समयीं त्या साहेबास वर्तमान कळलें कीं एक समयावछेदें करून इंग्लीशांचीं स्थानें कलकत्ता व मद्रास व मुंबई हीं हल्ला करून घ्यावीं, आणि इंग्लीशांस घालवून द्यावे, आणिखी हें वर्तमान ऐकिल्याचे पूर्वींच त्याणें नानाफडनवीसास मैत्री संबंधें कांहीं स्पष्ट प्रश्न केला असतां नानानें विलंब न करितां उत्तर दिलें कीं, सास्टी व राघोबा आमचे स्वाधीन केल्यानंतर तहाच्या विचार करितां येईल. या दोहों कारणास्तव तो गाड्ड साहेब कांहीं उत्तर न देतां, मुंबईस गेला. तेथचा मुख्य साहेब व त्याचे मंत्रदायक यांचा विचारें असें ठरलें कीं. मलबार प्रांतीं समुद्रतीरीं मद्रास स्थानें संबंधें लष्कर आहे तें आपल्या कुमकेस बोलावून युद्धाची तयारी करावी. याशिवाय मुंबईस फौज तयार करून गुजराथेंत पाठवावी.

राघोबा भडोजेस पळून गेला. ते समयीं इंग्लीशांहीं त्याचा पहिल्यानें फार सन्मान केला नाहीं, परंतु त्यास आश्रय मात्र दिला. मग जून महिन्याचे बाराव्ये तारिखेस तो राघोबा आपले पुत्र अमृतराव व बाजीराव हे

दोघे

दोघे बरोबर घेऊन सुर्तेस जनराल गाडुड साहेब याचे भेटीस गेला. तेव्हां त्या साहेबानें त्यास दरमहा पन्नास हजार रुपये खर्चास देऊन ठेविला; आणि त्यास पुढें जें विशेष कर्तव्य तें किमपि सांगितलें नाहीं, कांकीं, तो मराठे लोकांचे मनांतून उतरला त्यास बळेंच मुख्य करून स्थापणें ही सुबुद्धि नव्हे; आणि आपण याची नाहक प्रतिष्ठा न वाढविली असतांही, ते कारभारी लोक पुरंदरचा तहाप्रमाणें न वागले तरी आपण आपल्या मानरक्षणार्थ स्वयेंच युद्ध करावें हें उचित असा विचार त्यांहीं ठरविला होता.

यानंतर तो गाडुड साहेब याणें सन सबाशें एकुणऐशींचा शेवटीं, सुर्तेस माघारा येऊन तेथें नानाफडनवीसाचा वकील होता, त्यास निरोप दिला; आणि आपल्या लश्कराची तयारी करूं लागला, तेच समयीं त्या साहेबानें फत्तेशिंग गाइकवाड यास मैत्री संबंधें कांहीं प्रश्न केले, त्याचें उत्तर विलंबें करून अस्पष्ट दिलें; त्यावरून तो गाइकवाड पूर्वींचा बोलण्या प्रमाणें वागणार नाहींसा समजून, गाडुड साहेब आपल्या लश्करासुद्धां तापी उतरून, सन सबाशें ऐशींचा जानेवारीचे पहिले तारिखेस, उत्तरेकडे गेला. तो बडोद्याजवळ दुभाय शहर आहे तेथें किल्लेदार ब्राह्मण दोन हजार लोकांसहित त्या कोटांत होता; त्यापाशीं तें ठिकाण साहेबानें मागितलें असतां, त्याणें दांडगाईचें उत्तर केलें; आणि आंतून जे आला यांचे वार मारूं लागला. तेव्हां इंग्लीश रात्रीमध्यें मोर्चा बांधून, प्रातःकाळीं पाडूं लागले तों कोट रिकामा टाकून ते लोक रात्रीसच निघून गेले होते; असें तें शहर हस्तगत झालें. नंतर फत्तेशिंग गाइकवाड कृत्रिम टाकून सरळपणें तहाचें बोलणें करूं लागला. तेव्हां असें ठरलें कीं, मार्या नदीचे उत्तरेस पेशव्याचा जो भाग आहे तो फत्तेशिंगास असावा. त्याबद्दल फत्तेशिंगानें अठ्ठाविशी नामें तापी नदीचे दक्षिणेस अठ्ठावीस महाल आहेत ते व भडोजचा जो गाइकवाडाचा भाग होता तो, व त्या परगण्यांत त्याचे कांहीं गांव होते ते, व नर्मदेच्या कांठीं शिनोर नामें परगणा आहे तोही इंग्लीशांस द्यावा; परंतु इंग्लीशांहीं पेशव्याचें अमदाबाद शहर घेऊन गाइकवाडास अगोदर दिलें पाहिजे.

असा करार झाल्यावर, जनराल गाडुड साहेब मोठ्या त्वरेनें अमदाबादेवर गेला, तें शहर मोठें आणि त्याचा कोट परम सुदृढ असे तेवेळेस तें शहर ओस होतें तथापि त्यांत एक लक्ष मनुष्यांची वस्ती होती, आणि तेथचा किल्लेदार ब्राह्मण असे, त्यास तो किल्ला इंग्लीशांहीं मागितला. तेव्हां त्याणें उत्तर केलें कीं, मी एव्हांच द्यावयास सिद्ध आहें. परंतु म-

जपाशीं

जपाशीं आरब व शिंदी लोक मिळून सहा हजार व दोन हजार मराठे स्वार आहेत. इतके वश करावयास कांहीं विलंब लागेल असें बोलणें लागलें असतांही, दुसरे दिवशीं इंग्लिशांचे कांहींसे लोक त्या कोटाजवळ गेले, त्यांस त्या कोटकर्यांहीं तोफांचा भडमार करून, त्यांतील कित्येक लोक मेले गेले. त्यावरून त्या गाड्डसाहेबानें मोर्चा लावून एके जागीं तो कोट पाडून मोठें खिंडार आंत जावयाजोगें एकादिवसांत केलें; मग दुसरे दिवशीं प्रातःकाळीं इंग्लिशांच्या लष्करांतील टोळी त्या कोटांत जावयास सिद्ध झाली. असतां, आरब व शिंदी लोक त्या खिंडारावर चढून त्यांस प्रतिबंध करावयास उभे राहिले, तेव्हां त्या उभयपक्षीं युद्धप्रसंग झाला तेव्हां त्यांस आंतून ते फार निकरानें आडवीत होते, तेसमयीं त्यांचे तीनशें लोक पडले तोंपर्यंत ते मागें न सरले, तेव्हां इंग्लिशांचे जखमी व मेले मिळून एकशें सहा पडले. असें तें शहर इंग्लिशांहीं घेतलें तेव्हां त्या साहेबानें फार बंदोबस्त ठेविला तो असा, कीं, आपण आंत शिरल्यावर शहरांतील कोणाएकाही माणसास उपद्रव न व्हावा तरी ते आंत गेल्यावर तेथच्या शिपायांखेरीज त्या शहराचीं दोन माणसें मात्र मारिलीं गेलीं.

याप्रमाणें गुजराथेंत इंग्लीश जय पावत असतां शिंदे व होळकर वीस हजार स्वारांसहित नर्मदा उतरून बडोद्याजवळ येऊन मुकाम केला. हें वर्तमान ऐकोन जनराल गाडुड साहेब अमदाबादेहून निघाला तो फाजिलपुराजवळ मार्यानदी उतरून बडोद्याकडे चालिला. तेव्हां शिंदे व होळकर बडोद्यापासून निघोन पवनगडास गेले, तेसमयीं शिंद्याजवळ वडगांवचा तहासंबंधें जामिनादाखल दोघे साहेब होते, ते त्याणें गाडुडसाहेबाकडे पाठवून त्यास समजाविलें कीं. मीं तुमचा स्नेही आहें. त्याचा मनांत आलें असेल, कीं, आपण इंग्लीशांशीं स्नेह ठेवून पेशव्यांकडे भारीपणानें वागावें, परंतु इंग्लीश असें इच्छित होते कीं, आपला मान किमपि कमी न होतां, त्या लोकांशीं निर्गुण स्नेहभाव असावा, कांहींएक निमित्तें दुसऱ्याशीं संबंध ठेवून आपलें राज्य वाढवावें, अशी त्यांची वासना नव्हती. यानंतर शिंद्यानें त्या जनरालाकडे वकील पाठविल्यावर, त्याजवळ गाडुडसाहेब बोलिला कीं, तुमचें तहाचें बोलणें तीन दिवसांत व्हावें उगाच विलंब कामाचा नाहीं. त्यावरून तो वकील माघारा शिंद्याकडे जाऊन त्याणें तेथून उत्तर आणिलें कीं राघोबानें वडगांवचा तहामध्यें कबूल केलें होतें कीं आम्ही झांशीकडे बारा लक्ष रुपयांची जहागीर खाऊन राहूं; आमचा पुत्र बाजीराव यास माधवराव नारायण पेशवा याचा दिवाण करावा त्याप्रमाणें झालें पाहिजे. त्यावर इंग्लीशांचें बोलणें पडलें कीं, राघोबाचे मनास आलें तर तो झांशीस जाईल. त्यावर बलात्कार कर्तव्य नाहीं

ही. या प्रमाणें उभयपक्षीं विचार परस्परें थोडक्याच दिवसांत विदित झाले नंतर तो महादजी शिंदा समजला कीं या गाडर्डसाहेबाशीं आपल्या कुं-लकुर्की चालावयाच्या नाहींत. आणि नर्मदेच्या सिमेस कालक्रमणा होईल-शी नाहीं. म्हणून त्याणें गोविंदराव गाईकवाडाशीं बोलणें चालविलें की, मी तुम्हाला गुजराथेच्या राज्याचा अधिकारी करितों. असें असतां त्या शिंद्या-नें आपणावर त्या साहेबाच्या लष्कराचा छापा एकाएकीं येऊन न पडावा. म्ह-णून आपल्या लष्करासभोंवत्या लहान लहान टोळ्या बसवून तोफा वगैरे जड सामान पवनगडाचे तटाखालीं पाठवून सावधपणें राहूं लागला. असा बंदोबस्त झाल्यावर इंग्लीशांचें लष्कर त्याच्याजवळ तीन कोसांवर उतरलें असतां, त्याणें त्यास किमपि अडथळा न केला. मग तीं दोन्हीं लष्करें एकमेकांचीं चवकशी सात दिवस करीत राहिलीं होतीं; नंतर एप्रेलाचे दुसऱ्ये तारिखेस गाडर्डसाहेब याणें कांहीं एक लोकांची टोळी तयार करून आपल्याबरोबर घेउन गुप्तपणें रात्रीस शिंद्याच्या लष्करावर चालून गेला तो त्याच्या लष्कराचे सभोंवत्या टोळ्या त्याणें ठाणें मांडून ठेविलेल्या होत्या त्यांस कळूं न देतां, त्याच्या थोरल्या लष्करा ज-वळ जाउन पोहोंचला; परंतु दिवस उगवावयाचा समय झाला त्यामुळें ते लोक घोड्यावर तयार होते त्यांहीं प्रथम त्या इंग्लीशांचा समोर उभे राहून त्यांस चा-लून येतात असें त्यांस दाखविलें मग ते इंग्लीश त्यांजवर भडमार करूं लागले तेव्हां ते तेथून मागें सरून त्यांचा गोळ्यांचा मार चुकवून दूर उभे राहिले. तेव्हां इंग्लीशांहीं आपल्याकडचे अयोध्येचा नबाबाचे स्वार त्यांचे पाठीस लाविले तेव्हां ते तेथूनही दूर पळून गेले. त्या प्रसंगीं इंग्लीशांचा पलटणी लोकांपैकीं को-णीएकही पडला नाहीं. नबाबाचे पंधरा स्वार मात्र पडले. त्यावेळेस यापेक्षां मराठ्यांचा नाश फार झाला असेल, या प्रमाणें मराठ्यांचें लष्कर पळाल्यानें तो गाडर्डसाहेब समजला कीं आपला जय झाला; परंतु मराठे तेथून पळाले ते तो साहेब जेव्हां डेरे देउन उतरला तेव्हांच ते ही पहिल्या प्रमाणें त्यापासून तीन कोसां-च्या अंतरानें डेरे देउन उतरले, आणि पूर्वीपेक्षां विशेष सावध झाले. त्यानंतर मुंबईहून मद्रासवाल्याचे कांहीं लोक येउन त्या साहेबास मिळाले तेव्हां त्याणें त्या समहिन्याचे एकोणिसाव्ये तारिखेस पुनः मराठ्यांवर छापा घालावयाचा उद्योग केला. ते समयीं मराठे उभे राहून इंग्लीशांस आपल्याजवळ बाणाच्या टप्यांत येउं देउन एकाएकीं त्यांजवर बाणांची सरबत्ती करून मागें सरले.

ते समयीं मुंबईकडे युद्धाचें कांहीं प्रयोजन लागलें यास्तव त्या साहेबास लिहून आलें कीं, तुम्हांजवळ कारनेल हार्टली साहेब आहे त्याजबरोबर कां-हीं लोक देउन आम्हांकडे पाठवून द्यावा मग त्यास पाठविल्यावर गाडर्डसाहेब

उतरले

उरलेले लोक घेउन पर्जन्यकाळ जाई तोंपर्यंत नर्मदेच्या कांठीं जाउन राहिला. त्या पूर्वी फर्नेचा साहेबानें गाडुड साहेबास लिहिलें कीं, एथें कोणी मराठा गणेशपंत नामें लष्करसहित आला आहे. त्यावरून त्या साहेबानें बंगाल्याच्या स्वारांचें एक पलटन, व अयोध्येच्या नवाबाचे स्वार व कित्येक पायदळ पाठवून, एप्रेलाचे ते विसाव्ये तारिखेस त्या गणेशपंताच्या लष्करावर छापा घातला. तेव्हां त्याचे शें सवाशें लोक मारिले गेले, आणि त्या गणेशपंतालाही फार जखमा लागल्या त्यांस कांहीं उपाय चालेनासा होत्या, त्याच्या तीन तोफा व त्या लष्करचें बुणगें लुटून त्यांनीं सर्व सामान घेतलें. मग त्या लोकांहीं पारनेर, व बगवारा, व इंद्रगड, हे तीन किल्ले घेतले. त्याचसुमारें गाडुड साहेबानें नर्मदेच्या कांठीं शिनोरा समीप एक शिंद्याच्या लष्करची टोळी होती, तीवर बंगाल्याचे पलटनी लोक पाठवून त्या लोकांस तेथून हांकून दिलें; त्यायोगें इंग्लिशांहीं गुजराथेंत नवा मुलुख जिनका संपादिला होता त्यास पर्जन्यकाळ जाई तोंपर्यंत कांहीं उपद्रव न व्हावासा आला.

हार्टली साहेब कोंकणांत गेल्या नंतर मराठे लोक इंग्लिशांहीं घेतलेला कल्याणगांव तो घ्यावयास फार जमून आले होते, ते मे महिन्याचे पंचविसाव्ये तारिखेस हल्ला करून कल्याण घेणार होते; परंतु त्याचे आगोदर चौविसाव्ये तारिखेस मध्यरात्रीं हार्टली साहेब येउन पोंचला. तो एकाएकीं त्या लष्करांत शिरून त्यानें त्यांचा कांहीं नाश करून, त्यांस पळविलें. त्यापासून फार दिवसपर्यंत मराठ्यांचें मोठें लष्कर कोंकणांत गेलें नाहीं.

असें मुंबईकडचें वर्तमान असतां बंगाल्यांत मसलत झाली कीं, माळव्याचे ईशान्येस लष्कर पाठवून मराठ्यांशीं युद्ध करून, त्यांचें चित्त आपणाकडे गुंतवून मुंबईसरकारास सुलभ पडेलसें करावें. त्यावरून दोन हजार चारशें पलटनी लोक पायदळ, व पलटनी स्वार यांची एक टोळी व लहान लहान तोफा गोरे गोलंदाज सहीत असें तयार करून पाठविलें. ते फेब्रुवारी महिन्यांत यमुनापार उतरले. तेव्हां गोहद शहराचे आसमंतात मराठ्यांची फौज कांहीं लुटित होती ती जिंकिली. नंतर त्या गोहदच्या राण्याच्या बोलण्यावरून काल्पीच्या पश्चिमेस, एक ग्वाल्हेर नामें किल्ला आहे तो, घ्यावयास उद्युक्त झाले. तेव्हां त्या इंग्लिशांजवळ भिंत पाडावयाजोग्या तोफा नव्हत्या; तरी त्या लष्करचा फाफम नामें कपतान मुख्य साहेब होता, तो आपल्या लोकांच्या शौर्याचा विश्वासावर थोडकीशी भिंत पाडून हल्ला करिता झाला. तेव्हां तो किल्ला हातीं आला, परंतु जे लोक हल्ला करायास पुढें गेले होते त्यांतील दोन सरदार साहेब, व सवाशें शिपाई लोक मेले गेले. असा त्या साहेबानें तो किल्ला घेतला.

त्यायोगें

त्या योगें त्याची प्रशंसा झाली परंतु त्याणें त्यापूर्वी ग्वाल्हेर नामें किल्ला तो त्याहून फार सदृढ होता तथापि आपलें एकही मनुष्य न मरतां तो किल्ला हस्तगत केला तेव्हांच तो मोठा नामांकित झालेला होता. तो किल्ला घेण्याचा प्रकार असा की पाफमसाहेब त्या किल्ल्यापासून पांच कोसांवर पाउसकाळ जाईतोंपर्यंत छावणी करून राहिला होता, तो तेथें गेल्यापासून हा किल्ला कोणत्या प्रकारें हातीं लागेल असा विचार करूं लागला. त्यास तेथचें कांहीं वर्तमान गोहदच्या राण्याचे लोक कळवीत होते त्याप्रमाणें दोन महिन्यांनीं त्याणें तो किल्ला हातीं लागावयास मसलत योजिली कीं, पलटणी काळ्यालोकांच्या कंपनी+ दोन त्यांजबरोबर चार साहेबलोक सरदार देऊन रात्रीसच पुढें जावें, त्यांचे पाठोपाठ वीस* गोरेलोक शिपाई व त्यामागून काळ्याशिपायांचीं पलटनें पाठवावीं अशी कल्पना करून त्याप्रमाणें रात्रीसच निघाले ते तेथें जाऊन पोहचतांच त्यांहीं त्या किल्ल्याचे तळची भिंत दहा हात उंच होती तिला शिडी लावून सर्व चढून आंत उतरले मग त्या भिंतीच्या आंत त्यांस ऐशीं हात सुमारें चढाव लागला तोही चढून गेले; त्यापुढें दुसरी भिंत वीसहात उंचीची लागली तेव्हां त्यांजबरोबर जे त्यांस माहितगारी करून देणारे लोक होते ते बहुत युक्तीनें त्या भिंतीवर चढले, आणि तेथून दोरीची शिडी लाविली; मग त्यावरून एकेक शिपाई चढून आंत उतरून त्या भिंतीजवळच बसले. याप्रमाणें वीस शिपाई व एक साहेब आंत उतरून बसले, इतक्यांत त्यांतल्या तिघां शिपायांहीं फार वेडेपणा केला तो असा, तेथें कोणी शत्रूचे लोक निजले होते त्यांवर बंदुकेचे बार टाकिले त्या योगें ते आंतले लोक जागे होऊन त्यांवर चालून आले तेव्हां ते वीस शिपाई व तो साहेब त्या लोकांशीं चांगले लढूं लागले तोंच त्यांचे मागून दुसरे लोक मोठ्या त्वरेनें येऊन येऊन विशेष जमाव होत चालिला तो पाहोन ते लोक पळाले, नंतर सूर्योदयसमयीं आगष्ट महिन्याचे चवथ्ये तारिखेस तो किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन झाला.

तेच गर्वी कोंकणांत पनवेलीजवळ मोठा सदृढ बावा मलंगड नामें किल्ला आहे तो मुंबईच्या बंदरांतून फार चमत्कारिक दिसतो; त्यावरही इंग्लिशांहीं जाऊन छापा घातला, परंतु त्याप्रमाणें ते समयीं तो किल्ला हस्तगत न झाला. ते छापा घालणार लोक त्या किल्ल्याचे माचीस गेले, परंतु त्या किल्ल्याच्या लोकांत मिसळल्याचे पूर्वींच ते लोक सावध होऊन पळोन चाल किल्ल्यावर चढले; तेव्हां त्यांचे पाठीस लागोन इंग्लिशांच्या शिपायांस वर जावेना असा तो डोंगर कठीं-

---

+ कंपनी म्हणजे एकापासून शंभरपर्यंत शिपाई असतात.

---

* त्यासमयीं वीस गोरे पुढें न चालविले याचें कारण असें कीं, पुढें गेल्यास कदाचित् शत्रू सावध होतील.

त

न आहे. यास्तव ते ग्वाल्हींच राहोन त्यावर गेलेल्या लोकांला वरच कोंडितेज झाले.

त्यावर्षी मुंबईसरकारांत द्रव्याचा तोट्यामुळें पुढें व्यवस्था कोणे प्रकारची होईल असा विचार पडला. त्यावरून त्यांहीं बंगाल्यास लिहिलें; त्याचें उत्तर आलें कीं, यासमयीं हैदरअल्ली मोठ्या लष्करासहित अर्काट प्रांतीं आला आला आहे. यासंकटामुळें आम्हाकडून वित्ताची तरतूद होणार नाहीं. तेव्हां मुंबईसरकारांत असें ठरलें कीं, मराठ्यांचा कोंकणांतील मुलुख घेऊन, वसुलाचा ऐवज जमा करावा. तेवेळेस मुंबईचा कोठींत दहाबारा लक्षांचें तांबें होतें तें विकून पैका केला. मग जनराल गाडड साहेब यास वसई किल्ला घ्यावयाची आज्ञा झाली. नंतर पर्जन्यकाळ गेल्यावर त्याणें येऊन वसई किल्ल्यास घेरा घातला; आणि कारणेल हाटली साहेब यास पांच पलटणें देऊन कोंकणांतील मराठ्यांचीं ठाणीं उठवून, वसुलाचा बंदोबस्त करावयास सांगितला. परंतु जे लोक बावामलंगगड घ्यावयास घेरा घालून त्यावरचा लोकांस प्रतिबंध करून राहिले होते त्यांवर मराठ्यांचे तीन हजार लोक येऊन त्यांहीं त्यांसभोंवता वेढा घातला होता; यासाठीं त्या कारणेलास ते लोक सोडवावयाचें काम आधीं करावें लागलें. हाटली साहेबानें तें कार्य फार युक्तीनें करून मराठ्यांचें लष्कर कोंकणांतून पार घालवून आपण थोरघाटाखालीं जाऊन आपल्या लोकांसहित राहिला. नंतर तेथून कोंकणचा वसूल मुंबईसरकाराकडे जमा होऊं लागला

इकडे पुण्यांत हरिपंत फडके व नाना फडनवीस मिळून कोंकणांतील मुलुख इंग्लिशांपासून सोडवावा, व वसई किल्ल्याचा घेरा उठवावा याविषयीं फार उद्युक्त झाले. परंतु त्यांची तयारी तशी न झाली म्हणून तेवेळीं त्यांहीं रामचंद्र गणेश, आनंदराव रास्ते व परशुरामभाऊ यांस कोंकणांत पुढें पाठवून मग त्यांमागून जो जो सरदार आला तो तो एक एकटाच त्यांचा कुमकेस पाठवूं लागले. त्यामुळें कारणेल हाटली साहेब त्यांचे वाटेवर होता म्हणोन त्याचा लष्करास प्रतिदिवशीं युद्ध करावें लागलें असा एक महिना गेला, तेव्हां त्याचा लोकांत जखमी व आजारी मिळून सहाशें लोक अनुपयोगी झाले. आणि त्याणें वसुलाचा कामास कोंकणांत जागोजाग लहान लहान टोळ्या पाठविल्या होत्या त्यायोगें त्याजवळ दोन हजारांवर कांहींसे अधिक लोक मात्र राहिले. तेसमयीं तो साहेब मराठ्यांस जिंकोन वसुलाचा आटोप आपणास होणार नाहीं असें जाणोन थोरघाटाहून निघोन वसईचें पूर्वेस साडेचार कोसांवर दुगाडापाशीं ठाणें धरून राहिला. तेव्हां रामचंद्र गणेशास समजला कीं, कारणेल वसईकडे गेला यास्तव तो घेरा उठवायाचें कार्य शेवटास जाणार नाहीं, त्याबद्दल तो मोठ्या रागानें कारणेलाचा लष्कराचा ना-

श

श करावयास उद्युक्त झाला. तो दिसेंबराचे दहाव्ये तारिखेस पायदळ व स्वार मिळून वीस हजार फौजेसहित येऊन तीन वेळा त्या कार्णेल साहेबाचा लश्करावर हल्ला करिता झाला. परंतु त्या इंग्लिशांहीं तिनकेवेळां मागें हटविला. त्यांनीं एका हल्ल्यांत तो रामचंद्र गणेश याची पांच हजार स्वारांची टोळी इंग्लिशांचे पलटनीचे डावे बाजूवर चालून मोठ्या वेगानें येऊन पडली. तेव्हां इंग्लिशांचे जखमी व मेलेले मिळोन अठ्ठा शिपाई व दोघे साहेब पडले, असें तें युद्ध झालें ; परंतु ते इंग्लिशांचे लोक मोठ्या स्थिरतेनें वागले, त्यायोगें त्यादिवशीं त्यांचा आणखी नाश न झाला.

दुसरे दिवशीं मराठ्यांचे स्वार यांहीं त्यांजवर हल्ला न केला, तथापि त्यांचा मोठ मोठ्या तोफांचा मारानें इंग्लिशांचे मेले व जखमी मिळोन शें सवाशें शिपाई लोक व दोघे साहेब पडले. त्यादिवशीं इंग्लिशांहीं आपल्या लश्कराचा डाव्या व उजव्या बाजूचा दोहों टेंकड्यांवर लश्कराचा संरक्षणार्थ दोन टोळ्या ठेविल्या, त्या युद्धाचा कामास बहुत उपयोगी झाल्या. परंतु त्यांचा नाशाविषयीं मराठे अति उद्युक्त झाले असें इंग्लिशांस दिसूं लागलें त्यावरून कार्णेल हार्टली साहेब याला समजलें कीं, उद्यां निःसंशय शत्रू या दोहों टोळ्यांवरच हल्ला करितील; यास्तव त्याणें तेच रात्रीं त्यांचा बंदोबस्तास त्या दोहों टेंकड्यांवरून एकेक तोफ ठेविली: आणि त्यांसभोंवते नट व खंदक केले, दुसरे दिवशीं सूर्योदयानंतर तीन घटिका दिवसास त्यांतील उजवे टेंकडीवरचा लोकांस समजलें कीं, आपणावर मराठे यांची तयारी झाली; परंतु त्यावेळीं धुकें फार होतें त्या योगें ते लोक केवळ त्यांचा समीप आले, तेव्हां, एकाएकीं तें धुकें जाऊन सूर्यप्रकाश स्पष्ट होऊन त्यांस असें दिसलें कीं, आपल्या पाठिमागें व पुढें आपल्या शत्रूचे स्वार व उजवे बाजूनें पायदळ व कवाईत शिकविलेले पेशव्याचे पलटनी लोक चालोन आपणावर येतात. ते समयीं ते इंग्लिशांचे टेंकडीवरचे लोक याणीं त्या मराठ्यांवर फार त्वरेनें गोळ्या घातल्या असतां, त्यांचा मोठ्या लश्कराचा तोफांचाही मार त्यांवर पडोन त्यांचा फार नाश झाला, तरी ते मागें हटेनांत. आणि त्यांचे पायदळ लोकही वारकरीत करीत पुढें चालोन येऊं लागले असें असतां, एकाएकीं ते मराठे लोक झटोन लढेनातसे झाले; आणि कोणा मोठ्या सरदाराचें प्रेत मराठे माघारें घेऊन जातात असें इंग्लिशांहीं पाहिलें. मग त्यांस तो रामचंद्र गणेश असें समजलें, तो पडला तेव्हांच त्यांचा पलटनी लोकांचा सरदार पोर्तुगीस तोही जखमी झाला. यास्तव मराठे तें युद्ध सोडून निघोन गेले; अशी दुघाराजवळची लढाई झाली; त्यांत मुंबईचे शिपाई लोक यांचा जय होऊन मोठा मान पावले. त्याचे पूर्वदिवशीं गाडुडसाहेब यास वसई किल्ला तेथचा किल्लेदार निरुपा-

य होऊन देता आला. मग तो साहेब तेथून उठोन कर्णेल हारली साहेबाचे कुमकेस गेला, तेव्हां तीं दोन लश्करें एकत्र झालीं त्यांत आपल्यापेक्षां दुसरे मोठमोठे साहेब आलेले पाहोन तो कर्णेल हारली साहेब सरकाराज्ञा घेऊन विलायतेस गेला.

त्यानंतर जनराल गाड्डसाहेब यास वर्तमान कळलें कीं, कलकत्यांतील मुख्य साहेब याणें मुधोजी भोंसल्याचा द्वारें मराठ्यांशीं स्नेह करून तद्वारा इंग्लिशांस बुडविणारे हेदर व निजाम यांस जिंकायाविषयीं उद्युक्त झाला. याप्रमाणें समजतांच त्याचा मनांत आलें कीं, जर मीं यासमयीं पुण्यांस गेलों तरही बंगाल्याची मसलत सिद्धीस लवकर आईल. त्यावरून तो आपलें लश्कर घेऊन बोरघाटावर चालिला, तेसमयीं हरिपंत फडका कोंकणांत होता तो पुण्यास गेला, त्याणें जातांजातां बोरघाटांत वाटेचा प्रतिबंधार्थ कांहीं लोक ठेवून आपण पुढें गेला. त्यामागून इंग्लिश येऊन त्याघाटांतील लोकांचा तात्काळ पराजय करून त्याचे लोक घाटावर चढून खंडाळ्याजवळ डेरे देऊन उतरले; परंतु तो जनराल गाड्डसाहेब आपण कित्येक लोकानशीं त्या घाटाखालींच खोंपवलीस राहिला. त्यावेळेस इंग्लिशांचें लश्कर साडेसाहाशें सुमारें गोरे लोक व साडे पांचहजार सुमारें काळे लोक होते.

पुण्यांत नानाफडनवीस याणें इंग्लिश जवळ आल्याचें किमपि भय न मानितां, आपल्या लश्कराची तयारी आरंभिली; आणि कित्येक नवेनवे लोक ही ठेयाचे व कारण पडल्यास पुणेंशहर व तेथपासून खंडाळ्यापर्यंत सुखरुख उद्ध्वस्त करावयाचा बेत केला; तेव्हां जनराल गाड्डसाहेब याणें मुधोजी भोंसला याशीं व कलकत्याचा साहेबाशीं तह केल्याचा प्रकार त्या नानाफडनविसास लिहून समजाविला; तो त्याणें न मानून उत्तर दिलें कीं, हे वर्तमान आम्हास मुधोजीनें लिहिलें नाहीं; आणि हेदरअल्लीखान आमचा विश्वासींच आहे. त्यावरून जनराल गाड्डसाहेब मनांत असें योजित होता कीं, आपणास पुण्यास जाऊन पुणें घ्यावयाचें सामर्थ्य नसतांही मराठ्यांस उगीच धमकी दाखवि त्यानेंच बंगालची मसलत सिद्धीस जाईल परंतु तें न झालें.

त्यावेळेस नानाफडनवीस याणें परशुरामभाऊ बरोबर बाराहजार फौज देऊन त्याणें कोंकणांत जाऊन गाड्डसाहेबाचे लश्करी कोठीस उपद्रव करावा आणि मुंबईची वाट बंद करावी या कामास योजिला, आणि आपल्या बरोबर हरिपंत फडके व तुकोजी होळकर यांस मोठ्या लश्करासहित घेऊन सह्याद्रीकडे चालिला. तेव्हां माधवराव पेशवा पुरंदरीं पाठविला, तेसमयीं तो सात वर्षांचा होता.

ते

तेवेळेस मद्रासेकडे हैदरअल्ली बहुत उपद्रव करीत होता; त्यासारिखा श-त्रू त्या इंग्लिशांस त्यापूर्वी कधींही भेटला नाहीं, ह्मणून त्यांहीं मुंबई सरकारास लिहिलें कीं, हे समयीं तुह्मीं आमची कुमक करावी; हें न होय तर आमचें जें लष्कर पूर्वी तुह्माकडे आलें आहे तें, आमचें आह्मांकडे पाठवावें. असें ऐकून मुंबई-सरकारांत असें ठरलें कीं गाडुडसाहेब घाटावर गेला आहे त्यास मुंबईकडे बोलावून समुद्रकांठीं हैदर अल्लीचा मुलखीं दोन पलटणें पाठवून त्या हैद-राशीं युद्ध चालवावें, व मद्रासेचे लोक मद्रासेस नेमावे; असें होऊन गाडुडसा-हेबास आज्ञा गेली. ते समयीं तो साहेब आपलीं तीन पलटनें तोफखा-न्यासहित व सातशें स्वार मुंबईहून लष्करी सामान आणावयाकरितां प-नवेलीस पाठविलेल्यांची मार्गप्रतिक्षा करीत होता; मग तें लष्कर सा-मानरूद्धां येऊन एप्रिलाचे चवथे तारिखेस खोपवलींत येऊन पोंहोचले* नंतर तो साहेब तेथून निघून मुंबईस जावयाची तयारी करूं लागला; त्यांत प्रथम त्याणें आपले लोक मोठ्यामोठ्या तोफा व बुणगें या सहित, खंडाळ्या-हून खोपवलीस चोहों दिवसांत आणिले. तेव्हां तो गाडुडसाहेब समजला कीं, मी एथून निघून जाणार, हें वर्तमान कोणास ठाऊक नाहीं परंतु तो तेथू-न दुसरे दिवशीं विसाव्ये तारिखेस निघाला तेवेळेस त्याचें सर्व खटलें मुकामा-हून निघालें नाहीं तोंच, खंडाळें व कारलें या दोहींचा मध्यभागीं हरिपंत फडका पंचवीस हजार स्वार व तोफखान्यासहित चार हजार पायदळानशीं, उत-रला होता, तो अकस्मात तेथें येऊन पोंहचला. तेव्हां त्या हरिपंतानें त्या सा-हेबाचे कित्येक डेरे व बंदुकांचे दारू गोळी भरलेल्या तोट्यांचे बस्ते व दोनह-जार तोफांचे गोळे वगैरे सामान लुटुन नेलें. ते समयीं वरकड मराठे सर-दारही इंग्लिशांचा नाशाविषयीं पूर्वीपासून त्यासमयाची वाट पाहात होते; त्यांत तुकोजी होळकर पंचवीस हजार स्वारांसहित कुरूर घाटाचे पायीं उत-रला होता, आणि परशरामभाऊ तो बारा हजार स्वारांसहित भिमाशंकरा-जवळ पडला असे; तरी त्या हरिपंत फडक्या बरोबर इंग्लिशांचा पाठीस लागले. ते दिवशीं दोन प्रहरांवर दोन घटिकापर्यंत, तो गाडुडसाहेब या

---

* तें सामान आणणारे लोक यांस लुटावयाकरितां परशरामभाऊ याचे कुमकेस नाना फडनवीसानें तुकोजी होळकर पाठविला; तो जाऊन त्यास मिळाला, तेव्हां ते दोघे मिळून लष्कर स्वार पायदळ व बाणदार येरीज करून पंचवीस हजार स्वार जमा झाले, त्यांशीं लढतां लढतां इंग्लिशांचे लोक तें आपलें सामान संभाळून पनवेलीहून निघाले ते तीन दिवसांनीं खोपवलीस पोंहचले. तों पर्यंत त्या युद्धप्रसंगें करून त्या लष्करांतील लोक मेले व जखमी मिळून, एकंदर सहा पलटनी शिपाई काळे व पांच साहेब पडले.

स त्या लोकाशीं युद्ध करितां करितां त्या खोंपवलीहून चोकापावेतों पोंहचे तों पर्यंत, डेरे देऊन उतरावयास अवसर सांपडला नाहीं. मग दुसरे दिवशीं त्या साहेबास त्याहून मोठ्या निकरानें युद्ध करावें लागलें, त्याप्रसंगीं त्याणें बंगाल्याचें लोक आपल्या लष्कराचा पृष्ठभागीं चालविले होते, त्यांवर मराठ्यांचा मार विशेष पडला. मग त्या दिवशीं मध्यें एक मुकाम करून दुसरे दिवशीं तेविसाव्ये तारिखेस तो गाडुडसाहेब आपल्या पलटनासहित पनवेलीस पोंहचला. ते वेळेस बंगाल्याचें सहावें पलटन व मुंबईचें तेरावें पलटन, हीं दोन्हीं त्या लष्कराचा पाठिभागचे टोळींत बुणग्याचा रक्षणार्थ नेमिलीं होतीं, तीं विशेष युद्धप्रसंगेंकरून मोठ्या योग्यतेस चढलीं. त्या दोहीं पलटनांचा मुख्य बंगाल्याचा कर्नेल, पारकर नामें साहेब होता, तो त्या लढाईंतच मृत्यु पावला; आणि गाडुड साहेबाचे मेले व जखमी झाले मिळून चारशें अडेचाळीस, काळे शिपाई व अठरा साहेबलोक पडले असा नाश पावोन इंग्लीश खोंपवलीहून मुंबईकडे गेला, त्यावरून मराठे आपण जय पावल्याची प्रसिद्धी लोकांत करूं लागले; परंतु त्यांत त्यांचा नाश न झाला असा नव्हता.

यानंतर इंग्लीश महिना दीड महिना पनवेलीस राहून मग तेथून कल्याणास जाऊन पर्जन्यकाळ आईतोंपर्यंत तेथें छावणी करून राहिला. इतकें होईतोंपर्यंत मराठ्यांचा लष्करांतील सरदार माधवराव रामचंद्र याजबरोबर दहाहजार स्वार देऊन गुजराथेंत पाठविला, आणि कोंकणचा किल्याचा बंदोबस्तास प्रतिकिल्यावर पहिल्यापेक्षां शिबंदी वाढवून, बाकीउरलेले लष्करी लोक सर्व निघोन आपआपल्या ठिकाणांस गेले.

असें मुंबईकडचें वर्तमान असतां गोहदचा राण्याचे कुमकेस जाऊन, ग्वाल्हेर घेतली, मग माळव्यांत शिरून शिप्री हस्तगत करून सरोजपर्यंत गेलेलें इंग्लीशांचें लष्कर, तें बाहेर घालवावयास महादजी शिंदा येऊन त्याणें त्या इंग्लीशांचा लष्करास आसमंतात कोंडून, सात दिवस त्यांचा डेऱ्यांवर मोठमोठ्या तोफांचे गोळे टाकिता झाला. तेणेंकरून इंग्लीशांस तें स्थळ सोडून जाणें प्राप्त झालें. तेव्हां तो कोणास न कळतां मार्चाचे सातवे तारिखेस मध्यरात्रीं उठून निघून गेला. मग दिवस उगवल्यावर, तो साहेब गेलासा समजून शिंदा लष्कर सुद्धां त्याचे पाठीस लागला. तो बारेनें दिवसास त्याबरोबर युद्ध करी आणि रात्रीस त्यापासून दोन कोसांचा अंतरानें मोठ्या सावधपणें राहत असे; याप्रमाणें चोविसाव्ये तारिखे पर्यंत इंग्लीश आपलें लष्कर मात्र संभाळून त्या शिंद्यावर हल्ला न करिता झाला; त्यावरून तो शिंदा जसा रात्रीस सावध-

पणा

पणा ठेवीत असे, तसा ठेविनासा झाला; तेव्हां इंग्लीशानंतर त्याचा अगावधपणाची संधी पहातच होता, त्यास ती संधी सांपडतांच त्याणें चोविसाव्ये तारिखेस रात्रीं त्या शिंद्याचा लश्करावर छापा घालून, त्याचे बहुतेक लोक मारिले, आणि त्याचा तेरा तोफा, व तीन हत्ती, व थोरला झेंडा; व कित्येक उंट, व कित्येक घोडे, लुटून घेतले; आणि तें सर्व लश्कर हाकून दिलें. मग पर्जन्यकालीं ते इंग्लीश त्या शिंद्याचा मुलखांतच राहिले. आणि त्यांहीं पूर्वीं ग्वाल्हेर किल्ला घेतला होता, तो गोहदच्या राण्याचे स्वाधीन केला, त्यासमयीं कलकत्याचा मुख्य साहेब यांणींही त्या मुलुखासमीप राहणारे जे रजपूतलोक यांस मराठ्यांचा पक्ष नखून ते आपणास वश व्हावयासाठीं उद्योग केला, परंतु तो शेवटास गेला नाहीं. गोहदचा राणा मराठ्यांशीं वक्र व्हावा या आशेनें, त्यास ग्वाल्हेर किल्ला दिला, तरी तो आपल्या सामर्थ्याप्रमाणें मराठ्यांशीं विरोध करीना.

त्यावेळेस कलकत्यांत मसलत ठरली कीं, मद्रासेचे कुमकेस सहा पलटनें पाठविलीं त्यास अडथळा न होण्याविषयीं मुधोजी भोंसला व कलकत्याचा साहेब यांची कांहीं गुप्त समजून पडली होती. तो मुधोजी भोंसला पेशवे व वरकड मराठे सरदार यांस आपण इंग्लीशांचा पक्ष धरिला हें कळूं न द्यावें म्हणून त्याणें आपला पुत्र चिमणाजी याजबरोबर आपलें लश्कर तीस हजार स्वार देऊन कटाकप्रांतीं पाठविला; परंतु त्या मुधोजीनें इंग्लीशांपासून सोळा लक्ष रुपये घेऊन गुप्तपणें त्यांशीं स्नेह केला. हें वर्तमान पुण्यामध्यें थोडक्याच दिवसांनीं प्रसिद्धीस आलें असेल, कांकी, जनराल गाड्ड साहेब पनवेलीस पोंहचल्यानंतर त्या मुधोजी भोंसल्यास नानाफडनवीसाचें पत्र गेलें कीं, इकडे असा पेशव्यांचा जय झाला, हे समयीं तुह्मी यांचा पक्ष सोडिला, यास्तव सरकार तुमचें पारिपत्य करील. हें वर्तमान त्या मुधोजीनें कलकत्याचा साहेबास कळविलें आणि लिहिलें कीं, असें असतांही माझे द्वारें पेशवे व सर्व मराठे सरदार हैदरअल्लीला हाकून द्यावयास तुह्मास अनुकूळ होतील, याविषयीं आपला दिवाण दिवाकरपंत पुण्यास पाठवितों. यास्तव त्याची व तुमची प्रथम भेट झाली असतां उत्तम आहे. त्यास हा काशीमध्यें तुमची भेट घेईल. असें मुधोजीचें बोलणें झालें परंतु तें शेवटास न गेलें कांकीं, त्याचा दिवाण तो काशीस जातांना मार्गांतच मृत्यु पावला; आणि त्यासमयीं कलकत्याचा मुख्यास वर्तमान आलें कीं, महादजी शिंदा पराभव पावल्यानंतर, त्याणें त्या लश्करच्या साहेबास तहाविषयीं प्रार्थना केली आहे तीच सल्ला करण्यास कारण होईल. त्यावरून कलकत्याचा मुख्यानें

त्यानें तो अर्थ सिद्धीस न्यावयासाठीं एंडरसन नामें कोणी एक साहेब पुण्यास पाठविला, तो आणि महादजी शिंदा यांची साल्पेगांवीं भेट होऊन उभयताचा भाषणेंकरून सर्व मराठे व इंग्लीश यांचा तह झाला. त्यांत उभयपक्षी जामीनकी त्या महादजीनें स्वीकारली. त्या तहाचा प्रकार असा; पुरंदरचा तह झाल्यापासून इंग्लीशांहीं जितका मराठ्यांचा मुलुक घेतला तो सर्व माघारा द्यावा. व भडोंचेजवळचा तीन लक्षांचा मुलुख पुरंदरचा तहामध्यें पेशव्यांहीं इंग्लीशांस देऊं केला होता, तो इंग्लीशांहीं मागूं नये. याशिवाय गाइकवाडाचा मुलुख व गुजराथ हीं दोन्हीं सनसत्राशें पंचाहत्तरांत युद्ध झालें त्या पूर्वी ज्याकडे होतीं त्याकडेसच असावीं. आणि पेशव्यांहीं गाइकवाडयास खंडणीची बाकी न मागावी. व रघुनाथराव यास दरमहा पंचवीस हजार रुपये खर्चास देऊन त्याचा मनास येईल तें एक ठिकाण त्यास रहावयाचें नेमावें. याखेरीज आणिक ठरलेकीं सर्व मराठे व इंग्लीश मिळून हैदर अल्लीला पराक्रान्त करून, त्याणें अरकाटचा नबाबाचा व इंग्लीशांचा जो मुलुख घेतला तो अवश्य सोडवावा. व इंग्लीशलोक जे मराष्ट्रमुलुखीं सावकारी करतील त्यांपासून सरकार दस्तुरी, इतर सावकारांपेक्षा विशेष न घेता, इतरांप्रमाणेंच त्यांचे व्यापारास अडथळा नसावा. व पोर्तुगीस लोकांखेरीज कोणी फिरंगी मुलुखाचा पुरुष येऊन त्यास मराठ्यांचा मुलुखीं ठाणें धरून राहूं देऊं नये.

असा तह कलकत्याचा साहेबानें सन सत्राशें ब्यायशींचा जून महिन्यांत ठरविला. परंतु नानाफडनवीस याचा मनांत असें कीं हा तह लोंबवून, आपण हैदराचा पक्ष स्वीकारितों; असें इंग्लीशास भय दाखवून, त्यांपासून साष्टी हस्तगत करून मग तह शेवटास न्यावा, याप्रमाणेंच हैदर अल्लीसही आपण इंग्लीशांकडचा होणार असें कल्पना दाखवून त्यापासून कांहीं लाभ संपादावा यास्तव त्याणें त्या तहाचा पत्रावर आपली मान्यता लिहावयास तें वर्ष शेवटास जाई तोंपर्यंत विलंब केला; परंतु तो हैदर अल्ली दिसेंबराचे सातवे तारिखेस मृत्यु पावला; तेणेंकरून त्या नानाफडनवीसास तेविसावे तारिखेस त्या पत्रावर मान्यता लिहिणें प्राप्त झालें.

याच अवकाशांत इंग्लीशांहीं वडगांवचा तहांत शिंद्यास भडोंचा किल्ला, देऊं केला होता, त्याप्रमाणें त्याचे स्वाधीन केला.

हैदरअल्ली मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र टिपू यास त्याचे जा-

गी

र्गी स्थापिला; तो मराठ्यांस दाखवी कीं, आपण सालभ्याचा तहास मान्य आहोंत. परंतु इंग्लीशांशीं युद्धप्रसंग करण्याविषयीं त्याणें अंतर न केलें. मग महादजी शिंदा त्या हैदराचा पुत्रास निर्धीन असतां त्याणें तें न मानिलें. त्यावरून महादजी शिंदा मराठ्यांचें व इंग्लीशांचें लष्कर एकत्र करून त्यांवर जावें अशी मसलत करूं लागला. ते समयीं नानाफडनवीसासही त्या कामांत आपलें हित आहेसें समजत होतें, परंतु त्या महादजी शिंद्याचा उत्कर्षाविषयीं त्या नानाफडनवीसास मत्सर उत्पन्न झाला; यास्तव त्याणें ती मसलत लांबविली. इतक्यांत, मद्रासचे इंग्लीश यांहीं केवळ आपल्याच हितार्थ टिपूचा उपद्रव आपणास न लागावा म्हणून सालभ्याचा तहाप्रमाणें तो बेत न ठेवितां त्या निराळा त्या टिपूशीं तह केला. हें वर्तमान कलकत्याचा मुख्यास कळतांच तो क्रुद्ध होऊन त्याचा मनांत आलें कीं, ते मोडावें. परंतु मद्रासकरानें तें काम बहुतेक शेवटास नेलें, त्यामुळें त्याचा उपाय चालेनासा झाला. ती गोष्ट सालभ्याचा तहा निराळीशीं जाणून मराठे रुष्ट झाले; ते समयीं तद्दोष शमनार्थ कलकत्याचा साहेबानें मराठ्यांची समजूत पडली कीं, मद्रासकर यांहीं माझे आज्ञेचा भंग केला.

नानाफडनवीस याचा मनांत पूर्वींपासून होतें कीं, टिपूला सामर्थ्यहीन करावा; यासाठीं त्याणें निजामाशीं स्नेह करून त्या उभयतांहीं संकेत ठरविला कीं, निजामास खंडणीची बाकी मागावयाचे मिषें करून नानानें फौजेसहित आपले देशाचे मर्यादेपर्यंत जावें. आणि निजामानेंही त्या खंडणीबाबद कांहीं बोलण्याचें निमित्त करून फौज सहित त्या ठिकाणीं येऊन मग ते उभयतां एकत्र मिळून हैदरावर स्वारी करावी. त्यांत जो लाभ होईल त्यापैकीं इंग्लीशांस भाग न द्यावा. यासाठीं त्यांची कुमक कहीं घेऊं नये. या प्रमाणें गुप्तमसलत ठरवून नानानें निजामास व टिपूस एकदांच खंडबाकीचें मागणें केलें; तें टिपूनें मान्य करून उत्तर दिलें कीं, सांप्रत आपणाजवळ ऐवज नाहीं. निजामानें लिहिलें कीं या प्रकरणीं बोलणें करावयास आपण फौजेसहित यदगिरास यावें; आम्हीही लष्करसुद्धां तेथें येतों, मग दोघांचा बेताप्रमाणें ठराव होईल. असें झाल्यावर नाना व निजाम हे उभयतां संकेताप्रमाणें लष्करसुद्धां भीमा व कृष्णा यांचा संगमाजवळ त्या संकेतस्थलीं यदगिरास एकत्र मिळाले. ते समयीं त्या उभयतांचें बोलणें त्या बाकी प्रकरणीं मात्र प्रसिद्धपणें झालें, आणि दुसरें बोलणें हैदरानें निजामाचा व मराठ्यांचा मुलुख घेतला हो-

तः तो भागाग घ्यावा व टिपूवर मोहीम करावी, याविषयीं जो संकेत झाला तो गुप्त राखिला. आणि ते समयीं तें काम तसेंच राहिलें, कांकीं निजाम आपलें सामर्थ्य विशेषसें जाणून नानास अगोदरच असा विभाग मागूं लागला कीं, त्या प्रमाणें नानास कबूल करवेना. मग इतकेंच ठरलें कीं, तुर्त हें काम असेंच रहावें; पुढें जेव्हां उभयतां एकमतें ठरेल तेव्हां करतां येईल. नंतर ते दोघे आपआपले ठिकाणीं गेले. त्यांत निजामअल्ली आपली राजधानी हैदराबाद येथें पोंहचतांच त्यास वर्तमान कळलें कीं, टिपू फौजेसहित येऊन, कृष्णेचे दक्षिणेस मोंगलांचे मुलखीं स्वारी घालणार आहे. आणि त्यावेळेस त्या टिपूनें निजामास खेद उत्पन्न होईसा निरोप पाठविला कीं, तुह्मीं विजापुरचा स्वामीपणा करितां तो खोटा, त्यास तें स्थळ माझे स्वाधीन करा. यावरून असें वाटतें कीं, निजामाचा व नाना फडनविसाचा गुप्त तह झाला तो टिपूला कळला असेल.

तो निरोप पोंहचतांच निजामअल्लीनें नाना फडनविसास आपल्या कुमकेस बोलाविला. परंतु तो नाना आपल्या राज्यांत कांहीं कामास गुंतला, आणि त्याचा लश्कराचीही तयारी तादृश नव्हती. ह्मणोन निजामानें आपला वकील टिपूजवळ ठेवून तद्द्वारा तो अनर्थ शमविला. नाना फडनवीस कामास गुंतला ह्मटलें तें असें; त्यास वर्तमान कळलें कीं, माधवराव नारायण यास पदच्युत करून गादीचा अधिकारी रघुनाथरावाचा पुत्र बाजिराव यास स्थापावा. अशी मसलत बहुतां लोकांहीं फार दिवसांपासून केलेली आहे, ती सिद्धीस जाईल यास्तव तें मोडावयाविषयीं त्यास यत्न करावा लागला. त्यावेळेस रघुनाथराव याचें कुटुंब साल्व्याचा तहाप्रमाणें कोंपरगांवीं होतें. आणि तो रघुनाथराव तेथें गेल्यावर दोनतीन महिन्यांनीं मृत्यु पावला होता. ते समयीं त्याची स्त्री आनंदीबाई गरोदर होती. ती त्याचा मरणानंतर थोड्याच दिवसांनीं प्रसूत झाली, तो पुत्र जन्मला; त्याचें नाव चिमणाजीआपा. रघुनाथरावाचे मृत्युसमयीं बाजिराव नवांवर्षांचा लहान असतांही त्या रघुनाथरावाचे पक्षपाती व नाना फडनविसाशीं रुष्ट झालेले जे लोक होते ते सर्व मिळोन त्या बाजिरावाला गादीचा अधिकारी करावयास उद्युक्त झाले असत. तेव्हां नाना फडनवीस याणें त्या कोंपरगांवप्रकरणीं मंडळीस किमपि उपद्रव न देतां, त्यांचा विश्वासमात्र न ठेविला. मग पुढें रघुनाथरावाचे पुत्र बाजिराव व चिमणाजीआपा यांचा आणि नाना फडनविसाचा द्वेष पडला त्याचें कारण हेंच.

रघुनाथरावाचा पुत्रास गादीचा अधिकारी करणारे लोक, यांत महा-

दजी

दजी शिंदा मुख्यत्वें आहे, अशी त्यावेळेस वदंता उठली होती; परंतु ती खरीच असेल असा निश्चय करितां येत नाहीं. त्यांत इतकेंमात्र खरें कीं, नाना निरंतर चिंतेंत असावा, याविषयीं महादजी शिंदा यास मोठी आवड होती; परंतु तें सिद्धीस न्यावेंच असा त्याचा मनोरथ नसेल; उगेंच त्या नानाला भय मात्र असावें इतकेंच असेल. कांकिं, त्याचें मन पुण्याचा कारभारांत फारसें नव्हतें, तो हिंदुस्थानांत आपली श्रेष्ठता वाढवावयाविषयीं अत्यंत उद्युक्त होता; त्याचा उद्योगाचा प्रकार समजावयासाठीं सनसत्राशें व्याहात्तरांत मराठ्यांहीं हिंदुस्थान सोडिलें. त्यापासून तिकडे काय काय वर्तमान झालें तें ध्यानांत आलें पाहिजे.

मराठ्यांहीं दिल्ली घेतली तेसमयीं तेथचा बादशाहाचा सेनापती नजीफखान यास पदच्युत केला. मग मराठे दक्षिणेस आल्यावर तो पुनः अधिकारारूढ होऊन तिकडे मराठ्यांचीं ठाणीं होतीं तीं उठवूं लागला, आणि बंगाल्याचा नवाब सुजाअदवला तोही तसाच वागत असतां, त्याचा मनांत आलें कीं, आपण नजीफखान यास मिळून, नर्मदेचा उत्तरेस जितके मराठे असतील तितके हांकून द्यावे; परंतु तो सुजाअदवला सनसत्राशें पंचाहात्तराचा जानेवारींत मृत्यु पावला त्यामुळें तें तसेंच राहिलें.

त्यापुढें नजीफखान दिल्लीचा बादशाहाचा सर्व कारभार फार चातुर्यें करून मुख्यत्वें आपण करूं लागला. तो सनसत्राशें ब्यायशींचा एप्रेल महिन्यांत मृत्यु पावला. तेव्हां त्याचा दत्तपुत्र होता तो व तेथचे दरबारी लोक यांचीं बहुत भांडणें होऊन मग त्याशीं विरोध करणारे ते बहुतेक लयास गेले; त्यांपैकीं साऱ्याचा तहाचे वेळेस एकमात्र त्याचा विरोधी राहिला होता. मग दुसरे वर्षीं तो दत्तपुत्र याचा स्वाधीन तो बादशाहही असतां, त्याणें त्या शत्रूपेक्षां आपलें सामर्थ्य कमीसें जाणोन दुसऱ्या कोणा बळवानाचें इष्टत्व संपादन करून, त्यास जिंकावयाचा उद्योग आरंभिला. त्यांत प्रथम त्याणें इंग्लिशाकडे यत्न केला, तो साधेना यास्तव शिंद्याकडे यत्न करिता झाला; तेव्हां शिंद्यानें तात्काळ तें अंगिकारून तो महादजी शिंदा व तो दत्तपुत्र यांची आग्र्यामध्यें भेट झाली; परंतु थोडक्याच दिवसांत तो दत्तपुत्र मारेकरी याणीं मारिला. त्यानंतर शिंदा मुख्यत्वें दिल्लीचा कारभार करूं लागला. त्यावर बादशाहाची कृपा होऊन बादशाहानें त्यास आपला सेनापती करून दिल्ली व आग्रें हीं दोन्हीं त्याचे स्वाधीन केलीं. असा शिंद्याचा उत्कर्ष झाल्याचें वर्तमान पुण्यास येऊन पेशवे व नाना फडनवीस वगैरे कारभारी यांस विस्मययुक्त आनंद झाला; त्यावरून पेशव्यांहीं एक फौजेची टोळी त्या शिंद्याकडे पाठविली; त्यांत अर्थ असा कीं, या लाभांत पेशवे यांचा अंश आहेसें सर्वांत प्रसिद्ध व्हावें. याप्रमाणें तो शिं-

दा

दा योग्यतेस आला, तेव्हां त्यास असा गर्व झाला कीं, नाना फडनवीस व होळकर हे आपला मत्सर करितील हा अर्थ त्याचा मनांतच न आला; आणि तो केवळ उन्मत्त होऊन त्याणें इंग्लिशांकडे बंगाल्याचीही चौथ मागीतली. तेव्हां तेथचा मुख्य साहेब याणें त्याचा धिक्कार करून, त्यापासून उलटें असें लिहून घेतलें कीं, तुम्हाजवळ आम्हीं मागणें केलें हा आम्हांपासून चूक झाली. त्या शिंद्याचा मान हलका कराया विषयीं नाना फडनवीस इंग्लिशांस म्हणत होता, कीं, तुमचा कोणी एक साहेब आम्हाजवळ असावा, केवळ शिंद्याचाच द्वारें कारभार न चालावा; असें असताही ते इंग्लीश आपला साहेब देत नव्हते, परंतु तो शिंदा उन्मत्त जेव्हां दिसला तेव्हां त्यांहीं ती गोष्ट मान्य केली. ते समयीं त्यांहीं पुण्यास मालिट साहेब नामें आपला वकील पाठवावयाचें मान्य केलें, असें वर्तमान सन सत्राशें पंचायशींत घडलें.

सन सत्राशें पंचायशीं पासून
नव्वद पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून.
भाग पंचविसावा.

अनुक्रमणिका.

टिपू नरगुंदचा देसायाबरोबर कसकसा वागला तें प्रकरण.

त्या टिपूनें हिंदूवर जुलुम करून मुसलमान केले.

नाना फडनवीस याणें टिपूला जिंकावयाविषयीं इंग्लिशांचे कुमकेविषयीं यत्न केला परंतु तो सिद्धीस गेला नाहीं.

पुण्याहून मराठ्यांचें लष्कर निघालें तें निजामअल्ली व मुधोजी भोंसले यांस मिळून टिपूवर चालिलें.

बदामी किल्ला युद्ध करून मराठ्यांहीं घेतला.

तुकोजी होळकर कितुरास जाऊन काय काय करिता झाला तो प्रकार.

सावनूरचा नबाबाची कांहीं गोष्ट.

टिपूनें एकाएकी मराठ्यां तहाचें बोलणें लाविलें तो विस्तार.

महादजी शिंदा दिल्लीमध्यें योग्यतेस चढूं लागला असतां, त्याणें अन्याय कर्मे केलीं त्यामुळें मुसलमान लोक त्याचा द्वेष करूं लागले.

त्या शिंद्यानें रजपुतांकडे खंडणी मागीतली असतां, ते सारे एकत्र मिळून त्याशीं युद्ध करिते झाले.

त्या-

त्या युद्धाचा प्रकार व त्याचा शेवट कसा झाला तें प्रकरण.

त्या शिंद्यास संकट प्राप्त झालें असतां तो कस कसा वागला तें प्रकरण.

त्यास पुण्याहून कुमक येऊन पोंहचली.

आग्र्याजवळची लढाई.

इस्मायलबेगाचा पराभव.

कोणी गुलाम कादर मामा याचें आचरण व त्याचा मृत्यु.

शिंदा दिल्लीमध्यें पुनः मोठी योग्यता पावला.

त्याणें आपल्या लश्कराचा काय काय बंदोबस्त केला तो विस्तार.

भाग पंचविसावा.

टिपूनें निजामास जें लिहिलें होतें कीं विजापूर माझे स्वाधीन करा, या धमकावणींत अर्थ इतकाच कीं, तुह्मीं व पेशवे मिळून जाजा मस्लती करितां त्या सर्व मी जाणतों; कांकिं, ते समयीं टिपूनें निजामावर चालून जावें अशी त्या जवळ फौजेची तयारी नव्हती; आणि निजामानेंही त्यास मोठी गोष्ट सांगावी अशी त्या निजामास शक्तीही नव्हती, ह्मणोन त्या उभयतांचा तह श्रीरंगपट्टणाजवळ झाला, तो त्या उभय पक्षीं निर्बळते मुळेंच ठरला. परंतु तो फार दिवस टिकणार नाहींसा ते दोघे जाणत होते, यास्तव तो तह झाला तरी युद्धोपयोगी लश्कर सिद्धता व आपल्या मुलखांतील किल्ल्यांचा बंदोबस्त यत्नपुरःसर करीत होता, ती सिद्धता आल्यावर त्या टिपूनें ते समयीं युद्ध उत्पन्न होण्यास कांहीं निमित्त केलें तें असें; मलप्रभेचे दक्षिणेस सहा कोसांवर नरगुंद नामें किल्ला व त्याचा आसमंतात मुलुख, तो कोणी देसाई ब्राह्मण याचा स्वाधीन होता. तो देसाई पूर्वीं मराठ्यांस त्या देशाची खंडणी देत होता; मग हैदरानें कृष्णेचे दक्षिणेकडचा मराठ्यांकडचा मुलुख घेतला, त्यांतच तो देसायाचाही मुलुख त्याजकडे गेला. तेव्हां तो देसाई त्या हैदरास मराठ्यांप्रमाणें खंडणी देऊं लागला. पुढें तो हैदर मेल्यावर टिपू त्या देसायाकडे अमर्याद मागों लागला. तेव्हां तो ब्राह्मण पेशव्यांस शरण गेला त्यावरून त्या टिपूस त्यांहीं निषेधून सांगितलें कीं, जहागिरदार आपल्या मार्गानें वागत असतां दुसरी मुद्रा झाली तरी त्यापासून अधिक घेणें हें ठिक नव्हे. त्यावर टिपूनें उत्तर केलें कीं, मी आपल्या राज्यांत इच्छेस येईल तसें आपल्या प्रजेपासून घेईन. असें उत्तर पेशव्यांस करून तिकडे लश्कर पाठवून त्यास आज्ञा दिली कीं, जर तो देसाई ब्राह्मण आह्मीं सांगितल्या प्रमाणें न देईल तर तो किल्ला घ्यावा. यानंतर तें लश्कर जाऊन किल्ल्यास घेरा घातला असतां, त्या ब्राह्मणाचे कुमकेस मराठ्यांकडून गणेशपंत

णेशपंत बेहेरे व परशुराम भाऊ पटवर्धन हे लश्करसुद्धां तिकडे गेले. त्यासमयीं टिपूचा वकील पुण्यांत होता. ह्मणोन नाना फडनविसानें त्याउभयतांस सांगितलें कीं,आधीं मराठ्यांहीं युद्धाचा आरंभ न करावा; मग ते दोघे सरदार नरगुंदास पोंहचल्यावर त्यांस टिपूचा सरदारांकडून विनोदयुक्त कांहीं थट्टाईचा निरोप आला त्यावरून ते गणेशपंत बेहेरे व परशुराम भाऊ हे क्रुद्ध होऊन नानाचें सांगणें न मानितां, टिपूचा लश्करावर चालून जाऊन त्यालश्करासभोंवत्या लहान लहान टोळ्या त्यांहीं बंदोबस्तास ठेविल्या होत्या त्यांवर पडोन त्या टोळ्या त्यांचा थोरल्या लश्करांत मिळविल्या तेव्हां त्यांतून टिपूचीं दोन पलटनें व कित्येक स्वार पुढें होऊन लढूं लागले, ते समयीं मराठ्यांचे वीस शिपाई व एक हत्ती मेला गेला इतकें होतांच ते मराठे मागें हटले हें वर्तमान नानास कळतांच त्याणें दुसरें लश्कर मोठें तयार करून तो गणेशपंत व परशुराम भाऊ यांचा कुमकेस पाठवून, त्याटिपूला लिहिलें कीं, हा कलह मजकडून उत्पन्न झाला नाहीं हे चाकर लोकच भांडतात; त्यास हा कलह जर मिटेल तर मी फार संतोष पावेन. त्यावर टिपूनें उत्तर केलें कीं, मीही तेंच इछितों, आणि जर तुह्मीं या नरगुंदसंबंधें माझा स्वामीपणा मात्र मानाल तर मी याची खंडणी तुह्मास दोन वर्षांची देईन. असें उत्तर गेल्यावर नानानें निजाम अल्लीचा मसलतीप्रमाणें मान्य करून आपलें लश्कर कृष्णेचा उत्तरेस नेलें, आणि टिपूनें आपल्या बोलीप्रमाणें खंडणीचा ऐवज सत्तावीस दिवसांत पोंहचना करून देतों ह्मणोन कबूल केलें. याप्रमाणें मराठ्यांचें लश्कर दूर झालें असतां टिपूनें तो नरगुंद किल्ला घेऊन त्या देसायाला कुटुंबसुद्धां अक्षय बंदीत ठेविला, आणि त्याची कन्या आपली स्त्री केली; तीशिवाय त्याचा पहिल्या बायका होत्या. असें असतां त्याणें एवढें अन्याय कर्म केलें, आणि मराठ्यांस जें द्यावयाचें कबूल केलें होतें तेंही दिलें नाहीं. यांत टिपूचा कुटिलपणा स्पष्ट दिसून आला. याशिवाय कित्तूर किल्ला याचा खंड मराठे घेत होते तोही नरगुंदासारिखा हेदरकडे गेला, नंतर त्याटिपूनें तो हस्तगत केला, मग त्याणें जितकीं अन्यायकर्में केलीं तितक्यानेंच मराठ्यांस कदाचित् पुरा खेद न होईल ह्मणोन त्याणें कृष्णेचा दक्षिणेचे बहुतेक हिंदू धरून बलात्कारानें त्या हिंदुलोकांचा सुंता करून मुसलमान केले. असा टिपूनें अनर्थ केला तेव्हां शंकराचार्यांचे शिष्य दोन हजार ब्राह्मण यांस तो जुल्म सोसेना यास्तव त्यांहीं अनेक प्रकारानें प्राणत्याग केले.

नाना फडनवीस याणें मनांत निश्चय केला होता कीं, टिपूला जिंकून तत्संबंधी इंग्लिशांस किमपि भाग त्या लाभापैकीं न द्यावा तथापि यासमयीं टि-

पू

पू प्रबळ झाला आणि त्याचा पलटन बंदोबस्त फार चांगला आहे; अणखी आ-पला सहाय जो निजाम अल्ली त्याचें लष्कर केवळ अव्यवस्थित असें जाणून त्याणें इंग्लिशांकडे कुमक मागावयाकरितां मनांत कल्पना आणिली कीं, टिपू व इं-ग्लिश यांमध्यें पहिलेंच वैमनस्य आहे यास्तव तो जिकायाविषयीं यत्किंचि-त् लाभ दाखविल्यानेंच आपले सहाय इंग्लिश होतील. म्हणोन मुंबई सर-कारांत त्याणें आपला वकील पाठविला, तेव्हां त्यांहीं त्या वकिलाचें बोलणें अळ-सत अळसत ऐकून, त्याचा अंगिकार न करितां, तें प्रकरण कलकत्त्याच्या मुख्या-कडे लोटून दिलें. तेव्हां तेथचा मुख्यानेंही तें काम स्वीकारिलें नाहीं. इत-क्यांत पुण्यामध्यें मराठ्यांचें लष्कर त्या टिपूवर जावयास सिद्ध झालें; ते सम-यीं पेशवे व मुधोजी भोंसले यांचा तह झाला कीं, इंग्लीश पेशव्यावर चालून येत असतां मुधोजीनें त्यांस अनुकूळ नव्हावें; व पूर्वी माधवराव पेशवे व जानोजी भोंसले यांचा तह झाला आहे त्यांत अंतर न करितां, मुधोजी भोंस-ल्यानें वागावें.

त्यावर्षी पर्जन्य फार लांबला म्हणोन मराठ्यांचा लष्करास दिसेंबराचे पहिले तारिखेपर्यंत निघावयास अवसर सांपडला नाहीं. मग हरिपंत फड-का लष्करासुद्धां पुण्याहून निघोन भोंसले व निजाम यांचा लष्करास मिळाव-यासाठीं पूर्वींचे संकेत स्थळीं येदगिरास जाऊं लागला. त्याबरोबर नानाफ-डनवीसही निजामअल्लीशीं कांहीं बोलणें करावयास निघाला. नंतर तीं स-र्व लष्करें एकत्र मिळाल्यावर निजामाशीं आणि मराठ्यांशीं मसलत ठरली कीं, टिपूचें सर्व राज्य घ्यावें, आणि त्याचे सहा विभाग करून त्यांतील दोन वि-भाग पेशवे याणीं घ्यावे. व दोन निजाम अल्लीनें स्वीकारावे; व एक शिंद्यास द्या-वा, व एक होळकरास द्यावा. असा नेम होऊन तुकोजी होळकर व गणेशपं-त बेहेरे. या दोघां बरोबर पंचवीस हजार फौज देऊन टिपूचें कांहीं लष्कर कितुरापाशीं होतें त्यावर नेमिलें; आणि थोरलें लष्कर टिपूचा मुलखांत बदा-मीवर चालिलें. ते समयीं मसलत झाली कीं, बदामीजवळ जाऊन पर्जन्यका-ळपर्यंत युद्धाचा उपक्रम न करितां उगेंच रहावें पुढें पर्जन्यकाळीं नद्या भरल्याव-र तेथें टिपूची कुमक पोंहचेनाशी झाली म्हणजे युद्ध आरंभावें. त्या मसलती-स निजाम अल्ली मान्य झाला होता, परंतु पर्जन्यांत युद्ध करणें त्यास आवडे-ना, यास्तव तो आपला सेनापती पंचवीस हजार सैन्यसहित हरिपंताच्या स्वा-धीन करून, आपण हैदराबादेस माघारा गेला. त्यानंतर मराठ्यांहीं टिपू-ची अडचण न होईलसें, समजून त्या किल्ल्यास वेढा, सनमजकुरीं शाबुदी-च्या मे महिन्याचे पहिले तारिखेस घातला. तो बदामी किल्ल्याचें शहर

मोठ्या मैदानात असून त्यासभोंवता तट आहे त्याचा मध्यभागीं गढी आहे, आणि त्या तटाच्या दोहों बाजूंस बाहेरचे आंगीं दोन डोंगरी किल्ले आहेत; त्या तटाशीं मराठे वीस दिवस तोफांचा मार करून लढले, तथापि तो तट फारसा ढासळला नाहीं. तेव्हां असें ठरलें कीं याच्या आंत जावयास शिडी शिवाय दुसरा उपाय नाहीं; मग विसाव्ये तारिखेस मोंगल व मराठे त्या कृत्यास सिद्ध झाले. तेव्हां त्या कोटांतील साडेतीन हजार लोक त्यांचा निवारणार्थ, आंतून त्या भिंतीवर चढले त्यांहीं पूर्वींच त्या तटासभोंवते दारू भरलेले बुधले जागोजाग पुरून ठेविले होते, मग ते मराठे व मोंगल त्यांवर हल्ला करीत असतां ते केवळ त्या पुरलेल्या बुधल्यांवर येउन पोंचले. तेव्हां अकस्मात त्या बदामीकराहीं त्या बुधल्यांस बत्ती देउन त्यांचा फार नाश केला तथापि ते मराठे, व ते मोंगल यांमध्यें मोठी ईर्षा उत्पन्न झाली होती, त्यायोगें ते तो नाश न मानितां, तसेंच मोठ्या वेगानें पुढें सरून त्या तटास, जागोजाग शिड्या लाउन वर चढून आंत उतरले. नंतर त्या शहराचा आंतील गढीशीं मात्र कांहींसा विलंब लागला. ते समयीं त्या तटांतील लोकांचे पाठीस शत्रू लागले असतां, ते बहुतेक पळून त्या दोहों बाजूंचा दोहों किल्यावर चढून स्वस्थपणें राहिले; नंतर ते त्यांचा पाठीस लागलेले मराठे व मोंगल, यांवर त्यांहीं त्या दोहों किल्यांवरून मोठमोठे दगड लोटून, त्यांवर बंदुकांचाही भडमार करून त्यांचा बहूत नाश केला तरी ते मराठे व मोगल यांचे अतृट उद्योग व मोठा वेग पाहून, ते किल्लेकरी अत्यंत भीत होउन, केवळ जीवदान मात्र मागून त्यांस ते दोनी किल्ले त्यांहीं दिले.

असें झाल्यावर नाना फडणवीस तें युद्धाचें काम हरीपंत फडके यांस सोंपुन आपण पुण्यास माघारा गेला. तसा मुधोजी भोंसलाही आपले बहुतेक लोक आपला दुसरा पुत्र खंडोजी भोंसला यांचा स्वाधीन करून, तें कृत्य हरीपंतास सोंपुन त्यास कबूल केलें कीं मी दसरा झाल्यावर आणीक फौज घेउन, तुमचे कुमकेस येतों. इतकें करून तो माघारा नागपुरास गेला. ते समयीं होळकर अगोधरच कितुरास गेला होता त्याणें त्या परगण्यांतील सर्व टिपूचीं ठाणीं उठवून त्या किल्याशीं लढत होता त्यावर कांहीं वेळानें तो किल्ला घ्यावयाचें काम तसेंच ठेउन तो होळकर तेथून एका दिवसांत तीस बत्तीस कोस जाउन, सावनुरास पोंचला; तो तेथे टिपूचा एक मोठा सावकार, राघवेंद्रराव नामें होता, त्यास धरावयाचा बेतानें गेला परंतु तो तेथून पळून गेला होता. तेव्हां त्या होळकरानें तेथचे दुसरे दोन तीन सावकार धरून, त्यांपासून दोन लाख रुपये खंडणी घेतली. सावनुरीच्या नबाबास पूर्वीं टिपूनें आपली बहिण देउन त्याचे पहिले घेतलेले बारा परगणे त्यास माघारे दिले होते; तथापि ते समयीं टिपूनें त्या नबाबास कांहीं उपद्रव दिल्यामुळे, तो टिपूचा पक्ष सोडून होळकरास मिळाला.

हरी

हरीपंत फडका तो बदामी किल्ला घेतल्यानंतर गजेंद्रगड वगैरे आणीक कि ल्ले घेउन, मग तो हरीपंत कोपाळ किल्यास गेला असतां, त्यास वर्तमान कळलें कीं, आपणावर टिपू मोठ्या लश्करासहीत टोंकऱ्याच्या नावांत बसून तुंगभद्रा नदी उतरून आलीकडे आला. तेव्हां हरीपंत फडका त्या टिपूवर जावयास सिद्ध जहाला परंतु तो मुलुख स्वारीच्या युधास उपयोगी नाहीं सा समजून, तो सावनुरास गेला, तो तेथें टिपूही येउन मराठे व मोगल यांच्या लश्करापासून तीन कोसांवर उतरला; तेव्हां तीं दोन्हीं लश्करें सावनुरच्या दोहींकडे होतीं; मग पंधरा दिवस पर्यंत ते उभयपक्षीं लोक आपआपले तळावर उगेच होते, नंतर टिपूनें पहांटेची पांच घटका रात्र असतां मराठ्यांचा तोफख्यान्यावर छापा घातला परंतु तत्संबंधें त्या टिपूचा हातीं कांहींन लागलें. त्यावेळेस मराठ्यांचा लश्करांत कांहीं धान्यादिकांचा तोटा पडला आणि टिपूचानेंही मैदानांत येवणार नाहीं या दोहीं कारणास्तव तो हरीपंत फडका सावनूर टाकून लश्कर स्थळांपांच कोस मागें जाउन दुसरी मैदानाची जागा धरून राहिला. तेव्हां टिपूला त्याचे पाठीस लागवेना ह्मणून, तो सावनुरांत शिरून राहिला. याप्रमाणें त्या दोहीं लश्करांचा युद्धप्रसंग न होतां व त्यांतील एकासही विशेष लाभ नसतां, एकाएकी टिपूनें सनसत्राशें सत्यायशींच्या फेब्रेवारींत, मराठ्यांशीं तहाचें बोलणें करावयाकरितां हरीपंताकडे तुकोजी होळकराचे द्वारें, वकील पाठविला. त्याचा बोलण्याचा विश्वास हरीपंत धरीना, ह्मणून एप्रेलपर्यंत तें तहप्रकरणीं बोलणें चाललें होतें. मग तो तह ठरून मराठ्यांस, कितूर व बदामी व नरगुंद प्रांत झाले. याशिवाय पंचेतालीस लक्ष रुपये टिपूनें मराठ्यांस देतों ह्मणून कबूल केलें; आणि सावनुरचा नवाबासही आपल्या मुलखाचा कांहीं भाग द्यावयास तो कबूल झाला, परंतु त्यासही टिपूचा विश्वास येईना ह्मणून तो मराठ्यांचा लश्कराबरोबर पुण्यास गेला.

टिपूनें एकाएकी मराठ्यांशीं तह करून कलह मिटविला, याचें कारण असें. बदामीस नाना फडनवीस असतां, इंग्लीशांचा वकील मालीट साहेब तो मराठ्यांकडे नेहेमी राहावयास पूर्वसंकेताप्रमाणें आला, तेव्हां त्याची व नाना फडनवीसाची प्रथम भेट त्या बदामीस होउन मग तो नानाबरोबर होता, आणि कलकत्यास तेसमयीं नवा मुख्य साहेब आला, त्याणें कलकत्ता, व मद्रास, व मुंबै, इतक्या जागीं आपल्या पलटनींचा बंदोबस्त चांगला आरंभिला या सर्व प्रकारें करून, टिपूला वाटलें कीं मराठे व इंग्लीश निःसंशय, एकचित्त आहेत; तेंच भय मानून त्याणें युद्ध सोडिलें.

महादजी शिंद्यास दिल्ली व आग्रें प्रांत झाले, तथापि तेथें पूर्वीं अव्यवस्था झाली होती, त्यामुळें त्या बंदोबस्तास जो खर्च लागला त्याप्रमाणें तेथें उत्प

न्न

न आलें नाहीं. लौकिक दिसण्यानंतर तो त्यास मोठा लाभ झाला असा प्रसिद्ध झाला, परंतु निश्चितार्थ तसा नव्हता. मग थोडक्याच दिवसांत त्यास द्रव्याचा तोटा पडला, यास्तव त्याला, जोंत मसलत नाहीं असें अन्याय कर्म करावें लागलें; त्यांत जे मुसलमान सरदार त्या शिंद्यास मिळाले होते, त्या बहुतेकांच्या जहागिरी त्याणें जप्त केल्या, आणि ज्यांच्या जप्त केल्या नव्हत्या, त्यासही शंका उत्पन्न होऊन ते त्याचा द्वेष करूं लागले. असें असतां शिंद्यानें बादशाहाचें नांव करून त्या रजपूतांस खंडणी मागीतली आणि आपण लष्कर सहीत जयपूरच्या दरवाजापाशीं जाऊन तेथें डेरा देऊन उतरला. आणि त्यां सर्व रजपूतांस साठ लक्ष रुपये खंडणी मागीतली. त्याप्रमाणें त्यांहीं बहुतेक पैका देऊन बाकी राहिला तो कांहीं अवकाशानें देऊं ह्मणून कबूल केलें. मग त्या अवकाशाप्रमाणें ती वेळ आल्यावर, महादजी शिंद्यानें तो ऐवज मागायास रयाजी पाटील नामें आपला सरदार पाठविला, तेव्हां त्या जयपूरकरास बादशाहाचे मुसलमान सरदार आंतून अनुकूळ होते, यास्तव ते रजपूत याणीं त्या रयाजीशीं लढून त्याचा पराभव केला. ते वेळेस दिल्लीचा बादशाह जो कोणी बलवान होईल त्यास आपलें कार्य करून घेण्यास निमित्त कारणाचे परी झालेला असे, आणि केवळ दुसऱ्यानें दिलें खाऊन गरीबासारिखा होता, तोही त्या संधींत शिंद्याचा तिरस्कार करून ह्मणूं लागला कीं, या शिंद्यानें माझा किमपी मान ठेविला नाहीं; असे हे मराठे लोक केवळ रानवट आहेत. ते समयीं तो महादजी शिंदा समजला कीं मी रजपूतांशीं वांकडा झालों आणि मज विषयीं बादशाहाचे लोक रुष्ट झाले. याशिवाय आपलें लष्कर व बादशाहाचें लष्कर यांचा रोजमुऱ्याची बाकी देणें पुष्कळ थकली, अशा समयीं युद्ध करून जय न झाला तर, माझा समूळ नाश होईल; एवढें संकट त्याजवर पडलें असतांही, त्या महादजी शिंद्यास युद्धावांचून दुसरा उपाय दिसेनासा झाला; तेव्हां त्याणें आपा खंडेराव नामें आपला सरदार जवळ बोलाविला आणि पूर्वी दिवायन नामें फ्रेंच जातीचा मोठा नामांकित सरदार याणें शिकविलेलीं त्याचीं दोन पलटणें नुकतींच बुंदेलखंडांतून आलेलीं होतीं, त्यांसही जवळ बोलाविलीं. मग तें आपलें लष्कर व बादशाहाचें लष्कर बरोबर घेऊन सन् १७८७ शांत दिल्लीहून निघोन रजपूतांवर चालिला. तो जयपुराजवळ पोंहोंचला असतां, त्याचा मनांत आलें कीं रजपूतांशीं युद्ध करून आपला परिणाम नीट होणार नाहीं; ह्मणून त्याणें त्या जयपूरकराशीं तह करावयाचा उद्योग आरंभिला, परंतु तो जयपुरचा राजा प्रतापसिंग, यास जोधपुरचा राजा व दुसरेही कित्येक रजपूत राजे मिळून तेथें मोठें सैन्य जमा झालें होतें ह्मणून ते सर्व रजपूत तो तह न मानून त्या शिंद्याच्या लष्करचे कोटीस उपद्रव करून अनेक प्रकारें त्यास बेजार करूं लागले.

असा

असा थोडकासा वेळ गेल्यावर त्या महादजी शिंद्याकडचे मोंगल व मराठे त्या उपद्रवास कंटाळून बादशाहाकडच्या सर्व सरदारांत मोठा सरदार महंमदबेग अमदानी नामें होता, तो व त्याचा पुतण्या इसमायलबेग, तो ही त्या शिंद्याचा पक्ष सोडून रजपूतांस मिळाले. तेव्हां तो महादजी शिंदा समजला कीं, जर आतां युद्धास विलंब करील तर हे बादशाहाचे सर्व लोक रजपूतांस जाउन मिळतील, ह्मणून तात्काळ मोठ्या निकरानें परस्परें युद्ध होउन, त्यांत महंमदबेग मोठ्या तोफेच्या गोळ्यानें मृत्यु पावला तेसमयीं, अशी संधी उत्पन्न झाली कीं, त्या महंमदाचें सर्व लष्कर पळून जावें आणि मराठ्यांचा जय व्हावा, परंतु इसमायलबेग याणें मोठा उद्योग करून त्या सर्व लोकांची थोपाथोपी केली आणि युद्ध चालविलें; तेसमयीं शिंद्यास मागें हटावें लागलें. त्यानंतर तिसरे दिवशीं शिंदा फिरून रजपूतांशीं लढावयास सिद्ध झाला; तेसमयीं बादशाहाचे सर्व पायदळ लोक ऐशीं तोफांसहीत अकस्मात त्या इसमायलबेगास मिळाले. अशा ह्या संकटसमयीं शिंद्यानें आपलें धैर्य किमपि न सोडितां फार युक्तीनें वागणूक केली, ती अशी. त्यासमयीं त्याणें आपलें सर्व जडसामान व बहुतेक बुणगें कुशळगडाकडून ग्वाल्हेरास पाठविलें; मग आपल्या लष्करासुद्धां मोठ्या त्वरेनें दीग किल्यापर्यंत हटत गेला. तो तेथें राहून आपल्या लष्कराच्या लहान टोळ्या आसमंतात गेलेल्या, जमा करिता झाला. मग आपणास जाटलोक सहाय करून घेण्याविषयीं त्या जाटाचा दीग किल्ला त्यास माघारा दिला, आणि आपल्या मोठमोठ्या तोफा त्या जाटाचा दुसरा भरतपुर नांवें किल्ला आहे तेथें ठेविल्या; मग आपण आग्र्याजवळ जाउन तो किल्ला व त्या आग्र्याखेरीज अलीगड नामें दुसरा किल्ला आहे, त्या दोहीं जागीं शिबंदी पाठविली.

तेसमयीं ते रजपूत लोक यांचा मनांत मराठे समूळ बुडवावे असें नव्हतें. ह्मणून ते निरनिराळे होउन आपआपले ठिकाणास गेले. मग इसमायलबेग तो बादशाहाचा मुलुख मराठ्यांहीं घेतलेला सोडवावयास एकटाच उद्युक्त झाला. तो प्रथम आग्र्याजवळ जाउन उतरला आणि शिंद्याशीं मोठें युद्ध करून आग्रें घेणार होता परंतु शिंदा हलकें हलकें युद्ध करून मोठ्या युद्धास न उठता असे आठ दिवस गेले; नंतर शिंद्याला असें वर्तमान कळलें कीं, इसमायलबेगाचे कुमकेस गुलाम कादर नामें रोहिला, जाबितारवान रोहिला याचा पुत्र येतो; असें ऐकतांच तो शिंदा आपल्या लष्करासहित निघोन ग्वाल्हेरास गेला. तथें त्याणें पूर्वीं पेशव्यांस कुमक मागीतली होती ती पोंहोचली नाहीं ह्मणून [illegible] पुनः मोठ्या आग्रहानें लिहिलें कीं माझें कार्य अद्यापि नष्ट झालें नाहीं; परंतु [illegible] मोंगल व इंग्लीश रजपूतांस मिळतील असें दिसतें; हें झालें तर मराठ्यांचा समूळ नाश होईल; त्यास ह्यासमयीं सर्वांहीं आपला धनी एकच आहे असें ध्यानांत आणून निर्म

त्सरपणें एकचित्त होउन, आपलें राष्ट्र संभाळायाचा अभिमान धरिला पाहिजे. असें त्या महादजी शिंद्यानें नाना फडनवीसास कुमकेविषयीं लिहिलें असतां, स्वतः उद्योग किमपि न टाकिला. त्या शिंद्याचे लोक आग्र्यामध्यें इस्मायल्बेगाशीं लढत आहेत आणि जाटलोक यांची इस्मायल्बेग स्पर्धा करितो ह्मणून ते आपल्या लोकांच्या सहायार्थ इस्मायल्बेगाला उपद्रव करिताहेत; असें जाणून त्या महादजी शिंद्यानें मनांत आणिलें कीं, इस्मायलबेगास गुलामकादर जरी मिळाला आहे तरी ये समयीं आपण जाउन ते आपले आग्र्याचे लोक यांस कुमक करावी. त्यावरून त्याणें आपला सरदार राणेखान, व आपाजी खंडेराव या दोघांबरोबर लश्कर देउन त्यांत दिबायनाचीं दोन पलटनें हीं नेमिलीं. तो राणेखान भरतपुरास जाउन तेथून जाटाचें लश्कर घेउन ते सर्व आग्र्यावर जावयास निघाले. तों इस्मायल्बेग व तो गुलामकादर आग्र्याची लढाई कांहीं शी राखुन तेथून निघोन त्यांवर आले. त्यांची व राणेखानाची भेट त्या भरतपुरापासून आठ कोसांवर होतांच, त्या उभयपक्षी लश्करांचें युद्ध मोठ्या निकराचें झालें. तेव्हां महादजी शिंद्याचीं पलटनें फार सदृन लढलीं; त्यांवर इस्मायलबेग आपल्या रीतीप्रमाणें मोठ्या त्वरेनें स्वयें चालून आला असतांही, फार वेळपर्यंत त्याचा उपाय त्या पलटनापुढें चालला नाहीं; त्याप्रमाणेंच दुसरा एक लिस्तेनो नामें, फ्रेंच जातीचा मोठा नामांकित सरदार जाटाकडचा असे त्याचीं पलटनें फार सदृन गुलामकादराशीं लढलीं; त्यापुढेंही त्या गुलामकादराचा इलाज चालेना: परंतु त्या जाटाचीं दुसरीं तीन पलटनें कोणी जहानगीरखान नामें मुसलमान सरदार याचे स्वाधीन होतीं, तो एकही वार न करितां इस्मायल्बेगास जाउन मिळाला; हें न होतें आणि त्या लश्करचे स्वार, तीं युध्य करणारीं पलटनें यांस सदृन कुमक करिते तर, ते समयींच शिंदा जय पावला असता, परंतु तें न झालें. ह्मणून त्या पलटनी लोकांचा बहूत नाश होउन त्यांस युद्ध सोडून रात्रीच्या आश्रयानें आपल्या जीवाचें संरक्षण करून माघारें भरतपुरास जावें लागलें. असा मुसलमानाचा जय झाल्यावर जाटांचा मुख्य रंजितशिंग यास इस्मायल्बेग ह्मणूं लागला कीं, आग्रें घेतलें ह्मणजे मीं तुझें पारिपत्य करावयास चुकणार नाहीं. असें त्या इस्मायल्बेगाचें फुशारकीचें बोलणें शेवटास न गेलें; कारण, लखबा दादा नामें आग्र्याचा किल्लेदार होता, त्याणें आपल्या किल्याच्या संभाळण्याचा उद्योग निरंतरपणें केला, त्यामुळें तें कार्य फार लांबलें. तेव्हां त्या मुसलमान लोकांत परस्परें अविश्वास उत्पन्न होउन, वैमनस्यें पडत गेलीं; या वेळेस त्या समयीं राणेखानास वर्तमान कळलें कीं शिख लोक यांणीं उत्तरेकडून येउन गुलामकादराच्या मुलखावर स्वारी घातली. तेव्हां त्या राणेखानानें आपल्या लश्कराची एक टोळी त्या शिखांचे कुमकेस पाठवून त्यांस सांगितलें

कीं,

कीं, गुलामकादरानें जहागिरीचा नाश करावा. तें समयीं त्यानीं तसेंच केलें असतां, तो गुलामकादर आपलें सैन्य घेउन तो उपद्रव मोडावयासाठीं आपल्या मुलखास गेला. तेंच समयीं शिंद्यानें राणेखानाच्या लष्करास कुमक पाठविली तेव्हां तो पुनः इस्मायल्बेगास जिंकावयाकरितां आग्र्यास गेला. मग सन सत्राशें अठ्यायशींच्या जुनमहिन्यांत अठराव्ये तारिखेस त्या आग्र्याजवळ मोठें युद्ध होउन त्या इस्मायल्बेगाचा पराभव जाला; त्या युद्धांत तो इस्मायल्बेग हा फार जखमी जाला; परंतु त्याचा घोडा बहूत चांगला होता म्हणून तो त्या घोड्यासुद्धां यमुनेंत उडी घालून आपला जीव वांचवून पार निघोन गेला. मग तसेंच त्या बरोबर यमुनेंतून पार गेले त्या थोडक्याशा लोकानिशीं तो गुलामकादराच्या लष्करांत गेला; आणि त्याचे जे लोक पळाले ते बहुतेक दिल्लीस गेले. त्या समयीं शिंद्याच्या दिवायन यांचीं पलटनें मोठीं योग्यता पावलीं।

असा जय पावल्यावर तो महादजी शिंदा आग्र्याच दिल्लीस न गेला म्हणून ते वेळचे लोक ती त्याची मोठी चूक शी मानूं लागले; परंतु त्या न जाण्यांत शिंदा आपलें हित असें समजला असेल कीं, इस्मायल्बेग व गुलामकादर हे दोघे दिल्लीमध्यें आपल्या लष्कराचा बंदोबस्त करीत असतां, यांचा स्नेह फार दिवस टिकणार नाहीं; मग दुफळी जाल्यावर एक आपणास अनुकूळ होईल. याखेरीज पुण्याहून नानाफडनवीसाकडून कुमक ही तोंपर्यंत येईल. मग त्याप्रमाणें पुण्याहून तुकोजी होळकर व अलीबहादर हे दोघे लष्कर घेउन आले; नंतर शिंद्यानें राणेखान व आपाजी खंडेराव व अलीबहादर व दिवायन यांचीं दोन पलटनें इतके दिल्लीस पाठविले.

इकडे दिल्लींत गुलामकादर व इस्मायल्बेग यांनीं आपल्या लष्कराचा बाकी ऐवज घ्यावयाकरितां बादशाहाचें घर लुटलें; नंतर तो गुलामकादर दिल्लींत प्रबळ होउन त्याणें दोन महिने पर्यंत त्या बादशाहास व त्याच्या कुळास अत्यंत दुःख दिलें* कीं तें पाहून इस्मायल्बेगास बहूत खेद वाटून त्या उभयतांचें वांकडें पडलें, मग मराठ्यांचें लष्कर दिल्लीस येउन पोंचलें. तेव्हां तो इस्मायल्बेग व दुसरे तेथचे लोक मोठ्या हर्षेंकरून त्यांस आंत घेते जाले. नंतर त्यांहीं एक मोठी शिबंदी सिद्ध करून गुलामकादरास धरावयाचा उद्योग आरंभिला. तेव्हां तो आपल्या लोकांसुद्धां पळून जाउन मीरतनामें किल्ल्यांत शिरला, मग त्याचे पाठीस लागले त्या लोकांशीं तो तेथून मोठ्या निकरानें लढला. परंतु त्या किल्ल्यांतली धान्यादिकांची बेगमी सरली. तेव्हां तो चांगल्या घोड्यावर बसून एक

* तो गुलामकादर दिल्लींत प्रबळ होउन त्याणें तेथचा बादशाह शहाअलम यास तख्तावरून उठवून त्याचा पुत्र बेदारबख्त यास त्याचे जागीं स्थापून त्या बादशाहाचा फार अपमान करून खंजिराच्या अग्रानें आपल्या हातें त्याचे डोळे काढिले, आणि त्याच्या स्त्रिया व कन्या व त्यांचे वंशांतले लोक व त्यांच्या स्त्रिया यांची अनिर्वाच्य अमर्यादा केली; आणि त्या कित्येकांस अन्नावांचून उपाशीं मारिले.

तेथ

टाच तेथून पळाला. तो कित्येक दूर गेल्यावर रात्रीं अंधारांत, त्याचा घोडा पडला; तेव्हां त्यास अगाध कांहीं लागलें कीं, त्या योगें त्याला गतप्राणाचे परी मूर्छा येउन तो अचेतन पडला. मग दिवस उगवल्यावर कोणी शूद्र तेथें आला त्याणें त्यास पाहिलें मग तेथून उचलून त्यास मराठ्यांचा लष्करांत नेला. नंतर तो त्या लष्करांत बंदीस असतां कांहीं दिवसांनीं शिंद्यानें त्याचे हातपाय तोडून तो थोटा केला; मग तो कांहीं दिवसांनीं मृत्यु पावला. नंतर त्या गुलाम कादरानें शहाअलें बादशाहाचा पुत्र बेदरबख्त यास दिल्लींतून आपण पळतांना आपल्याबरोबर मिरत किल्यांत नेला होता तो मग त्यांचा हातीं लागला त्यांहीं त्यास किमपि दुःख न देतां मर्यादेनें बंदींत ठेविला; शेवटीं त्याचा बडिलास शिंद्याचे योगें तख्ताधिपत्य आल्यावर त्याणें त्या आपल्या पुत्रास जिवें मारून टाकिला, असें वर्तमान सन १७९०चा शेवटीं पुढे आलें.

त्यानंतर महादजी शिंदा याणें गुलाम कादर याची जहागीर व बहुतेक दुवाब प्रांत व दिल्ली व आग्रे हे दोन परगणे घेतले. एवढें यश त्यास प्राप्त झालें तथापि तो निर्भय झाला नव्हता. तेवेळेस अफगाणाचा बादशाह तिमोरशाह अब्दाली याचे लोक मुलखांत स्वाऱ्या घालीत होते ते आपणावर येतील असें त्या महादजी शिंद्यास वाटत होतें; याखेरीज रजपुतामध्यें ही मोठमोठे त्याचे द्वेष्टे असत. याशिवाय त्याचें साहाय्य होळकर व अलीबहादर यांस त्यानें कार्य शेवटास नेण्यापेक्षां त्याणें संपादिलेल्या मुलखाचा भाग घेण्याविषयीं आशा फार होती तो हें सर्व जाणून आपल्या वृद्धीचा उद्योग त्याणें टाकिला नाहीं. तो प्रकार लिहिण्याचे पूर्वी शिंद्यानें आपल्या लष्कराचा काय काय बंदोबस्त नवा केला तो समजला पाहिजे.

प्रथम त्याणें पहिल्यापेक्षां रजपूत व मुसलमान चाकरीस बहुत ठेविले, आणि त्याचे स्वार पूर्वी चौकणे घालीत असत, ती चाल मोडून स्वारांहीं खोटपर्यंत तोंगीचा विजारा घालाव्या याची चाल पाडिली; आणि त्या पूर्वी मराठ्यांचा लष्करांत गोसावी लोक फारसे नव्हते ते अधिक ठेवून त्यांचा एक समुदाय नवाच मोठा साकरून हिमत बहादर नामें त्यांचा गुरू होता त्यास त्या मंडळीची मुख्यता दिली. यासर्वांपेक्षां त्याणें त्या दिबायनाची दोन पलटनें होतींतीं प्रतिपलटनास सातशें लोक याप्रमाणें पलटनें चोवीस केलीं आणि त्या प्रतिपलटनास मैदानांत लढाईचा उपयोगी अशा हलक्या हलक्या तोफा पांच पांच दिल्या. त्या चोविसा पलटनातील आठ आठा पलटनांचा बृगेडनामें एक एक भाग करून, एकेका बृगेडास पांच पांच शें स्वार नेमिले. या इतक्या समुदायाचें मुख्यत्व दिबायनास दिलें, आणि त्या पलटनांचा खर्चास पुरेसा मुलुख देउन त्या मुलुखाचे उत्पन्नांत शेंकडा दोन रुपये प्रमाणें त्या दिबायनानें आपलें स्वामित्वसंबंधें घ्यावे, व त्यास जातीनें दरमहा दहा हजार रुपये

केला

केला. त्यापलटणींत लोकांत त्या दिवाणानें आपल्या हाताखालीं विलायतेचे कित्येक मुलुखचे मोटमोठे चतुर साहेबलोक ठेविले होते; त्यांत एक रांगरस नामें साहेब होता तो बंगाल्याचा मुख्य साहेबापाशीं होता; मग त्याणें गोहदच्या राण्याची चाकरी कांहीं दिवस करून शिंध्याचा पलटणींत राहिला. तो तोफा ओतावयाच्या कामांत अत्यंत कुशळ असे; त्याणें फार चांगल्या साहेतोफा शिंध्यास ओतून दिल्या, मग शिंध्याचा तोफखाना वाढतां वाढतां त्यांत अनेक प्रकारच्या तोफा दोनशांवर जमल्या; एवढा त्या महादजी शिंध्याची दवलत वाढली.

सन सत्राशें नव्वदांपासून त्र्याण्णव पर्यंत झालेलीं वर्तमानें मि-
ळून भाग नव्विसावा

अनुक्रमणिका

टिपूनें पेशव्यांशीं तह केलेला मोडून फौजेची तयारी केली.

नंतर टिपूनें इंग्लिशांचा मित्र त्रावणकोरचा राजा याशीं युद्ध केलें असतां त्याच्या पारिपत्याविषयीं इंग्लीश व मराठे, व मोगल, यांचें ऐक्य झालें.

इंग्लीशांनीं टोळी परशुरामभाऊस मिळून टिपूशीं युद्धाचा उपक्रम केला.

धारवाड किल्याच्या युद्धाचा प्रकार.

मद्रासेकडून इंग्लीशांचें लश्कर आलें त्याचें वागणें.

मोगलांचीं वर्तणूक.

हरिपंत फडके व परशुरामभाऊ यांचें लश्कर इंग्लीशांस मिळालें तो विस्तार.

लार्ड कार्नवालिसानें टिपूचा पराभव करून श्रीरंगपट्टणास घेरा घालावयाची तयारी केली असतां, अन्नतृणादि तोटयामुळें त्यास तो उद्योग सोडावा लागला.

यानंतर इंग्लीश व मराठे व मोगल यांचा टिपूच्या मुलखीं कसकसा संचार झाला तो प्रकार.

लार्ड कार्नवालिसानें पुनः श्रीरंगपट्टणास घेरा घातला. मग तह झाला त्यावर इंग्लीश व मराठे व मोगल यांस कायकाय लाभ झाला ती कथा.

परशुरामभाऊ श्रीरंगपट्टणास विलंबें करून आला तो विस्तार.

त्यासतेथून माघारा पुण्यास जातांना वाटेनें बहुत उपद्रव सोसावा लागला.

भाग सव्विसावा.

सन सत्राशें सत्यायशीं मध्यें टिपूनें फार मस्ती न करतां तह केला तथापि हरिपंत फडके यांचें लश्कर नुस्तें च कृष्णेचे पलीकडे पोहचलें न पोहचलें तोंच, त्याणें कित्तूर मराठ्यांपासून घेतलें; व बेदनुरास कांहीं लश्कर जमा करून कोंकणपट्टी मराठ्यांपासून घेणार असें दर्शविलें. असें त्याचें एकसमयींच तह करणें आणि तद्विपरीत वागणें याचें मूळ कारण त्या टिपूचा स्वाभाविक चांचल्या वांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं; परंतु त्यासमयीं कित्येक इंग्लीश असें समजले कीं, टिपू व नाना फडनवीस व निजामअल्ली व फ्रेंच हे सर्व मिळून आह्मास बुडविणार आहेत. आणि नाना फडनवीस समजला कीं, मराठे बुडवावे असेंच टिपूचा मसलतीचें तात्पर्य. त्यावरून त्या नानानें कलकत्याचा मुख्य लार्ड कार्नवालीस नामें साहेब याकडे वकील पाठवून सूचविलें कीं, टिपूचें प्राबल्य न होण्यास तुमचें व आमचें ऐक्य असावें. त्यावर त्या साहेबानें उत्तर दिलें कीं, यांत आमचें हितच आहे परंतु आमच्या सरकारची आज्ञा अशी आहे कीं जो आपणाशीं विरोध करील त्याशींमात्र वक्र असावें. टिपूनें पूर्वी आह्मांशीं जें बोलणें केलें आहे त्यांत जर त्याकडून कांहीं अंतर पडेल तर आह्मी तुह्मास मिळूं.

यानंतर टिपूचें आचरण इंग्लीशांविषयीं विपरीत नाहीं असें समजून कलकत्याचा मुख्यानें मनांत निश्चय केला कीं, पूर्वी सन सत्राशें अडसष्टांत निजामअल्लीनें करार केला कीं, बसालतजंग मृत्यु पावल्यावर त्याची जहागीर गंटूर परगणा इंग्लीशांस मी देईन. त्याप्रमाणें तो बसालतजंग सन सत्राशें ब्यायशींत मृत्यु पावला; त्यास हे समयीं त्याला मागावयास योग्य आहे. असें समजून त्याकडे त्या साहेबानें वकील पाठवून मागतांच त्या निजामानें तो परगणा त्यांस दिला. तो प्रांत अति उत्कृष्ट असून त्याणें उगाच दिला असें नाहीं, तो समजला कीं, हाली हिंदुस्थानांत मराठे व इंग्लीश व टिपू व आह्मी सत्ता करितों यां सर्वांमध्यें न्यूनबळ असा मीच आहें; त्यास यांतील कोणा एकाचा आश्रय केल्यावांचून माझें राज्य टिकणार नाहीं.

त्या निजामाच्या मनांत होतें कीं, टिपूशीं स्नेह करावा; कांकीं, तो आपल्या जातीचा मुसलमान आहे. परंतु त्याचे वजीर वगैरे मुत्सद्दी यांणीं त्यास मसलत दिली कीं, हे समयीं तुह्मी पूर्वीच्या तहाप्रमाणें इंग्लीश यांस गंटूर परगणा देऊन दोन पलटणें व सहा तोफा सरंजामी पहिल्या करारप्रमाणें त्या इंग्लीशांस मागून, मग त्यांशीं स्नेह केला तो उपयोगी होईल. असें ठरवून त्या निजाम अल्लीनें

अल्लीनें कलकत्त्यास वकीलही पाठविला; परंतु सरळपणानें वागणें त्याच्यानें होईना तें असें. त्याणें कलकत्त्याचा मुख्याकडे वकील पाठविला असतांही, टिपूशीं स्नेह साधावयाकरितां दुसरा वकील पाठविला. त्याचें बोलणें आलें कीं, तुमचा स्नेह मला मान्य आहे, आणि तुमचा व आमचा कांहीं शरीरसंबंधही व्हावा; त्यावर निजामास राग येउन तें मान्य न करितां तसेंच राहिलें. असें असतांही इंग्लीशांकडे टिपूचा वकील बोलणें करीत असतां त्यास त्या लाट्‌कानवालिसानें उत्तर दिलें कीं, पूर्वीच्या कराराप्रमाणें तुह्मास आह्मीं पलटनें व तोफा वखंडनीही देतों; परंतु टिपूला जिंकावयाविषयीं या वेळेस आह्मीं तुमचे साहाय्यास विलायतेचे आज्ञेवांचून येणार नाहीं. आणि पुढें कधींही कर्नाटक, बालेघाट, आमचा स्वाधीन झाल्यावर त्याविषयीं जो तुमचा व आमचा पूर्वी करार ठरलेला आहे त्याप्रमाणें तो मुलुख तुह्मास देउं. असें त्या लाटाचें उत्तर निजामास गेल्यावर टिपूला समजलें कीं, आह्मास जिंकावयाविषयीं निजामाला इंग्लीश अनुकूळ झाले. यावरून तो टिपू क्रुद्ध झाला आणि पूर्वी त्याणें इंग्लीशांचा साहाय्याचा वचनी कोरच्या राजावर मोहिम करून तो मुलुख घ्यावयाचा बेत केला होता, तो सिद्धीस न्यावयाचा उद्योग करूं लागला.

तो टिपू सन १७९० सत्राशें एकुणनव्वदांचा डिसेंबर महिन्यामध्यें त्या वचनी कोरास जाउन त्या राजाचा लश्करावर हल्ला करिता झाला. त्या युद्धामुळें नाना फडनवीस याचा पूर्वील बोलण्याप्रमाणें सन १७९० सत्राशें नव्वदांचा जून महिन्याचे पहिले तारिखेस पुण्यामध्यें इंग्लीश व नाना फडनवीस, व निजामअल्ली, यांचें ऐक्य झालें. त्यासमयीं असें ठरलें कीं, निजामअल्ली व नाना फडनवीस मिळून पंचवीस हजार फौज घेउन या पर्जन्यकाळांतच जाउन उत्तरेकडचा टिपूचा मुलुख घ्यावा त्यानंतर पर्जन्यकाळ गेल्यावर त्या तिघांहीं मिळून होईल तितकें लश्कर जमा करून टिपूचा सर्व मुलुख घ्यावा त्या कामास इंग्लीशांहीं दोन पलटनें मराठ्यांस द्यावीं, व दोन निजामास द्यावीं; त्या पलटनांचा खर्च त्या उभयतांहीं द्यावा.

त्या मुलुखांत या तिघांतील कोणा एकाचेंही पूर्वील स्वामित्व नाहीं असा जो मुलुख असेल तो तिघांहीं वांटून घ्यावा. याशिवाय कोणी पेशव्यांकडील किंवा निजामाकडील पाळेगार अथवा जमेदार हे दरानें घालवून दिलेला असेल त्यास त्याचे जागीं स्थापून त्याजपासून कांहीं द्रव्य नजर घ्यावें; तें तिघांहीं वांटून घ्यावें; आणि या तिघांतील जो कोणाचा मुलुख पूर्वीचा असेल त्याचें स्वामित्व त्याणें करावें. असा नेम ठरल्यावर इंग्लीशांचें लश्कर मद्रासेहून निघालें, आणि मुंबईहून दोन पलटनें व सहा तोफा निघाल्या; त्या अंबेघाटानें वर चढून तासगांवीं जवळून जून महिन्याचे अठराव्ये तारिखेस पोंहोंचल्या. त्यांचा मुख्य कप्तान लिट्‌ल नामें साहेब होता; त्या बरोबर मराठ्यांहीं

ठ्यांहीं आपल्या कारकून संगमेश्वरापासून दिला होता. त्याणें त्या साहेबाचा जाण्यास कांहीं युक्ति करून अनेक प्रकारें विलंब लाविला; आणि टिपूचा वकील पुण्याहून अद्यापि गेला नाहीं असें त्या साहेबास वर्तमान कळलें; त्यावरून त्या साहेबाला कांहीं चमत्कार वाटला. जेव्हां तो तासगावांस पोहचला तेव्हां तेथें मराठ्यांच्या स्वारांची तयारी त्यांहीं ह्मटल्याप्रमाणें नाहींशी पाहून तो समजला कीं, कारकुनानें विलंब लाविल्याचें कारण हेंच. तो तेथ पोहचला तेव्हां मराठ्यांचे स्वार दोन हजार मात्र जमले होते. मग ती तयारी न होण्याचें कारण शोधितां इंग्लीशांस असा ठिकाण लागला कीं, मराठे टिपूस ह्मणतात कीं, आह्मीं व निजामअल्ली व इंग्लीश एकमत झालों आहों तरी तुह्मीं आह्मास कांहीं द्रव्य द्याल तर आह्मीं तें मोडून तुमचा पक्ष स्वीकारूं. असें त्याशीं बोलणें मात्र करून त्या टिपूपासून द्रव्य घेतल्यानंतर त्यावर उलटून त्यास बुडवावयाचा मसलतींत आहेत; इतकें इंग्लीशांस समजलें. ते मराठे टिपूकडून द्रव्य येईल ह्मणून फार दिवस वाट पहात होते, परंतु तें सिद्धीस जात नाहींसें पाहून मग त्यांहीं आगरमहिन्याचे पांचवे तारखेस त्या वकीलाला निरोप दिला.

यानंतर परशुरामभाउ पुण्याहून निघोन कृष्णा उतरावयास त्याला आगष्टाची अकरावी तारीख लागली. त्याबरोबर पांच हजार स्वार व दीड हजार पायदळ होतें. त्यानंतर थोडकेच दिवसांत प्रतिनिधी कांहीं स्वारांसहित येउन त्या परशुरामभाउस मिळाला; याशिवाय विजयदुर्गचे बंद्राच्या कामावर धोंडोपंत गोखला नामें होता तो एक हजार स्वारांसहित येउन त्या भाउला मिळाला. त्या धोंडोपंतानें इंग्लीशांचे आज्ञेत वागावें असें परशुरामभाउचा मनांत आलें, परंतु ती मसलत कांहीं कारणामुळें सिद्धीस न गेली; तथापि त्या दिवसापासून इंग्लीश व गोखले यांचा परिचय झाला; मग त्या इंग्लीशांच्या द्वारें त्या धोंडोपंतांचा पुतण्या बापू गोखला तो पुण्याचे दरबारीं मोठी योग्यता पावला; नंतर कालेंकरून त्याशीं व इंग्लीशांशीं द्वेष पडला, तें प्रकरण पुढें लिहिण्यांत येईल.

यानंतर पंचविसाव्ये तारिखेस मराठ्यांहीं टिपूचा लहानसा कोदाचागांव घेतला. त्यापासून परस्परें युद्ध चालू झालें, आणि मराठ्यांचें लष्कर तेथून पुढें चालतां चालतां टिपूच्या मुलुखचे रयतलोक हा टिपूचे शिबंदीस घालवून मराठ्यांकडे मिळावयास सिद्ध आले. मग त्या शिबंदीलोकांहीं आपला धणी कोण हा विचार मनांत न आणितां, त्या परशुरामभाउची चाकरी धरून मुलखाची बाकी घेण्यास त्याला साहाय्य झालें. नंतर थोडक्याच वेळांत आणखी मराठे लोक थोडथोडे येउन, त्या परशुरामभाउस मिळतां मिळतां, इंग्लीशांचीं दोन पलटनें खेरीज करून, मराठ्यांचें लष्कर सुमारें दहा हजार स्वार व तीन हजार पायदळ अ

सलें

मलें. मग त्या लश्करासहित तो परशुरामभाउ सतेंबराचे अठराव्ये तारिखेस, धारवाडाजवळ जाउन तो किल्ला घ्यावयाचा उद्योग करूं लागला. त्यांत दिवसास दुरून तोफांचे गोळे त्या किल्ल्यास मारावे, आणि रात्रीस त्या तोफा माघाऱ्या नेउन तोफखान्यांत ठेवाव्या; असें अनुपयुक्त आणि उपहासास्पद युद्ध दीड महिनापर्यंत त्या परशुरामभाउनें चालविलें. मग तो कांहींसा उपयुक्त वर्तला; तो असा. किल्येक लोक त्या किल्ल्यांतून बाहेर येउन युद्धाविषयीं राहिले होते, त्यांवर हल्ला करून त्यांस किल्ल्यांत घालवून, त्यांच्या तीन तोफा घेतल्या. तेसमयीं इंग्लीशांचीं पलटनें उपयोगी पडलीं, त्यांहीं मराठ्यांच्या साहाय्यावांचून त्या किल्ल्याची पेंठ जिडीलावून घेतली तेसमयीं त्या पलटनाचा लिटल साहेब व दुसरा कोणी येक साहेब हे दोघे सर्वांच्यापुढें त्या भिंतीवर चढले तेव्हां त्या दोघांसही जखमा लागल्या, आणि त्या पलटनांतील शिपाई लोक मेले व जखमी मिळोन बासष्ट पडले. मग ती घेतलेली पेंठ इंग्लीशानें परशुरामभाउच्या पुत्र आपासाहेब याच्या स्वाधीन करून आपण आपल्या छावणीस गेला. तेव्हां त्या पेंठेंत मराठ्यांवर आंतले किल्लेकरी चालून येउन त्या उभयतांचें मोठ्या निकरानें युद्ध झालें. तेसमयीं मराठे मेले व जखमी मिळोन पांचशें पडले; त्यापेक्षां त्या किल्लेकराचा अधिक नाश झाला, आणि ते माघारे गेले, असें असतांही तो आपासाहेब तेथून निघून आपल्या लोकांसहीत माघारा लश्करांत गेला. तेव्हां ती पेंठ त्या किल्लेकरांच्या स्वाधीन सहज झाली. नंतर उभयपक्षीं मेलेल्या लोकांस जाळावयासाठीं कांहीं दिवसांचा सल्ला झाला. असे त्या युद्धाचा आरंभ दिवसापासून, मराठ्यांहीं तीन महिने कच्चामसलतीनें घालविले; नंतर पुनः ती पेंठ घ्यावयाचा अभिमान धरून, लाजेनें इंग्लीशांची कुमक न घेतां, मराठ्यांहीं लढून लढून ती पेंठ घेतली. यापुढें मराठे व इंग्लीश त्या किल्ल्याशीं लढतां लढतां. तेथच्या किल्लेदारानें परमशौर्येंकरून किल्ला साडेसहा महिनें संभाळिला. शेवटीं निरुपाय होउन सन् सत्राशें नव्वदांच्या एप्रेलाचे चवथ्ये तारिखेस त्याणें मराठ्यांच्या स्वाधीन केला.

असें धारवाडाचें वर्तमान असतां. इंग्लीशांचें लश्कर मद्रासेहून निघालें तें दक्षिणेकडून टिपूच्या मुलखांत शिरून कारुळ, व दिंडीगाळ. व कुविंबतूर व पालघाट इतका मुलुख जानेवारीचे समाप्तीपर्यंत हस्तगत करून ते लोक माघारे मद्रासेस गेले. इतक्यांत मुंबैकडून फौज निघोन समुद्रकांठीं कालीकटनामें बंदराजवळ टिपूचें कांहीं लश्कर होतें, त्याचा पराभव प्रथम करून टिपूचे लोक मलबारांतून घालवून तो मुलुख घेतला.

इकडे मद्रासेस, पाहिलें लश्कर माघारें आल्यावर विलंब न करितां लाटकानवालिस नामें साहेब आपले बरोबर लश्कर घेउन पुनः टिपूच्या मुलखास चालिला.

तो बिलोगवरून बंगलोरास जाउन मार्चाचे पांचव्ये तारिखेस घेरा घालून युद्ध करून तें शहर घेतलें. तेसमयीं मोगलांचें लश्कर मद्रासेच्या दोहों पलटनांच्या साहाय्यें करून कोपाळाशीं लढत होतें. मग इंग्लीशांहीं तें शहर घेतलें सें ऐकून तो किल्लेदार अधीर होउन, निजामास किल्ला देता झाला.

त्यापूर्वी पुण्यांहून जानेवारीचे पहिले तारिखेस पंचवीस हजार स्वार व पांच हजार पायदळ घेउन हरिपंत फडका पंढरपुराकडून भीमा व कृष्णा यांच्या संगमापाशीं पार उतरून, गेंडावळापर्यंत गेला. मग तेथून आपलें दोन हजार लश्कर रवेगीज करून बाकी सर्व लश्करानें करनोळापर्यंत चालावें अशी आज्ञा देउन आपण त्या दोन हजार लश्करासहीत निघाला तो निजामअल्ली आपल्या मुलुखाचे मर्यादेच्या पांगलगावीं होता तो तेथून आपल्या लश्कराची वर्तणूक करवितों असें दाखवीत होत्साता, तेथें मुकाम करून राहिला असे; त्याच्या भेटीस गेला त्या भेटींत असें ठरलें कीं, इंग्लीशांशीं तहाप्रमाणेंच वागावें, परंतु टिपूचा समूळ नाश न करावा. यानंतर हरिपंत फडका याणें लाटकानवालिस याचे कुमकेस दहा हजार फौज पाठविली. ते लोक अनंतपुरास पोंहचले तेव्हां, त्यांस कळलें कीं, मोंगलांची दहा हजार फौज त्या लाटाच्या कुमकेस जात असतां, वाटेंत टिपूचा कोणी कुतुब आदीन नामें सरदार यास जिंकून मग लाटास मिळून ते सर्व श्रीरंगपट्टणास गेले. यास्तव आपलें तिकडे जाण्याचें प्रयोजन नाहीं सें समजून हरिपंताची मार्गप्रतिक्षा करित तेथें मुकाम करून राहिले.

तो लाट्कानवालिस श्रीरंगपट्टणावर निघाला असतां टिपूनें त्या आपल्या राजधानीपासून लाटाच्या लश्करापर्यंत मुलुख आळून उद्ध्वस्त करून शत्रूच्या लश्करास धान्य तृणादि मिळेनासें करून ठेविलें होतें. मग तें लश्कर त्या श्रीरंगपट्टणाजवळ येउन पोंहचलें असतां, टिपू युद्धास उभा राहिला. तेसमयीं तो पराभव पावून त्यास श्रीरंगपट्टणाच्या आंत पळून जाणें प्राप्त झालें. तेव्हां लाट्कानवालिस साहेब याणें श्रीरंगपट्टणाजवळ मे महिन्याचे एकोणिसाव्ये तारिखेस डेरे दिले. तेसमयीं पर्जन्यकाळ जवळ आला आणि त्याच्या लश्करास वाटेनें अन्न तृणादि मिळालें नव्हतें त्यायोगें लोक बहुत हैराण आले; याजमुळें त्यास हें बास वाटलें कीं हें कार्य शेवटास जात नाहीं, याशिवाय मराठ्यांचें लश्कर साहाय्यास येणार होतें त्याचें ही कांहीं वर्तमान कळत नाहीं. हा सर्व विचार मनांत आणून त्या लाटानें मुंबईहून लश्कर येत होतें त्यास आज्ञा केली कीं, हे वेळेस तुम्हीं माघारें जावें, आणि आपण आपल्या मोठ्या मोठ्या तोफा नासून टाकून तें युद्धाचें काम सोडून तेथून निघोन मेलगोटाची पहिल्या मजल करावयाच्या बेतानें तिकडे चालिला, तो तेथें पोंहचला नाहीं तोंच त्याचे दृष्टीस पडलें कीं, मोठ्या मोठ्या स्वारांच्या टोळ्या आपल्या

कडे

कडे चोहींकडून येतात; तेव्हां त्यास वाटलें कीं, हें आपल्यावर कोणी शत्रूचे लोक चालून आले, ह्मणून त्याणें युद्धाविषयीं तयारी केली; मग त्यास समजलें कीं, हें लश्कर आपल्या कुमकेस परशुरामभाउ व नाना फडनवीस यांचें आलें. त्यांत परशुरामभाउचें लश्कर धारवडाकडून आलें, आणि नानाकडून हीं येउन पोहचलें; तीं दोनीं लश्करें चोविसांव्ये तारिखेस एकत्र मिळून दुसरे दिवशीं त्यांचा यलाटाची पंचविसाव्ये तारिखेस गांठ पडली. ती कुमक आपणास येत्ये असें ल्याटास पूर्वीं न समजण्याचें कारण असें, कोणी टिपूकडचे पेंढारी लोक व बेरड यांहीं बहूत चातुर्य करून जे त्या लाटास बातमी पोहचविणारे जासूद त्यांस वाटेंतच मारून टाकिले, यास्तव त्यास वाटलें कीं, आपणास कोणी कुमक येत नाहीं. ह्मणून त्याणें तें काम सोडिलें आणि तेथून निघाला, नंतर ती कुमक पोहचल्यावर त्या लाट कानवालिसास पश्चात्ताप झाला कीं, आपण श्रीरंगपट्टणास घेरा घातलेला उठवून निघालों हें दैवगतीनें विसंगत पडलें. मग त्या लाटास मराठ्यांचा लश्करी बाजारांत धान्य तृणादि सर्व सामग्री मिळती असें पाहून फार संतोष झाला. यानंतर असें ठरलें कीं, तिघांहीं मिळून बारामहाल हस्तगत करावे; तें कार्य लाट कानवालीस याणें सिद्धीस नेलें, आणि मराठे व मोगल यांहीं आणखी कांहीं किल्ले घेतले. नंतर दिसेंबराचा शेवटास त्या साहेबानें फिरून त्या श्रीरंगपट्टणावर जावयाची तयारी केली परंतु परशुरामभाउ आपल्या कांहीं लाभसाधनास चित्रदुर्गापाशीं गुंतून त्यास लाटाकडे जावेना आणि मोंगलांचें लश्कर गरमकोंड्याजवळ छावणी करून होतें, त्याचा ही येण्याची त्वरा दिसेना. हरिपंत फडका तर त्या लाटाचा जवळच होता परंतु त्याणें आपल्या लाभासाठीं युद्धाचें निमित्त करून मुलखाचा वसूल जमा करावयास आगोजाग लश्कर पाठवून आपले बहुतेक लोक गुंतविले होते, या अडचणीमुळें तें श्रीरंगपट्टन घेण्याचें काम तसेंच ठेवून तिकडे जावयाचा मार्गांतील किल्ले घ्यावयाचा उद्योग आरंभिला. मग त्याणें पांच किल्ले हस्तगत केल्यावर, सन् सत्राशें ब्याण्णवांच्या जानेवारीचे पंचविसाव्ये तारिखेस तो उत्तरदुर्ग किल्याजवळ गेला असतां, तेथें मोंगलाचें लश्कर येउन त्यास मिळालें. इतक्यांत हरिपंत फडक्याचें ही लश्कर येउन त्या लाटास मिळालें. तेव्हां तो लाट कानवालीस व हरिपंत फडका व निजाम अल्लीचा पुत्र शिकंदर जा, हे तिघे मिळून फेब्रुवारीचे पांचव्ये तारिखेस श्रीरंगपट्टनाजवळ जाउन पोहचले. मग दुसरे दिवशीं टिपूचे लोक त्या पट्टनाचा तटाबाहेर जे होते त्यांवर हल्ला करून माघारे कोटांत घालविले, आणि त्या शहरास घेरा घालावयाची तयारी केली. नंतर मुंबई सरकारचें लश्कर सोळाव्ये तारिखेस येउन पोहचलें. तें त्या घेरा घालण्याच्या कामास फार उपयोगी पडलें.

आणि

आणि तेविसावे तारिखेस टिपूनें त्यांवर आंतून मोठी स्वारी घातली असतां त्यांहीं आपला बंदोबस्त नीट राखून त्यास मागें हटविला. त्यापूर्वीपासूनच टिपूनें तहाचें बोलणें लाविलें, परंतु तें त्या लोकांच्या मनास येईना. शेवटीं टिपूनें त्या मुंबईचे टोळीवर हल्ला केला तो व्यर्थ झाल्यावर दुसरे दिवशीं टिपू त्या लोकांच्या मनास येईसा तह करिता झाला तो प्रकार असा. त्या युद्धप्रसंगाच्या पूर्वी जितका मुलुख टिपूचा होता त्यापैकीं निमें त्या तिघांजणांस द्यावा; आणि एक कोटि पांसष्ट लक्ष रुपये तूर्त द्यावे; नंतर एका वर्षांत आणखी तितकें द्रव्य तीन हप्त्यांनी द्यावें. याप्रमाणें भरणा पुरता होई तोंपर्यंत टिपूनें आपले दोघे पुत्र ओलीस दिले. असें झाल्यावर त्या टिपूकडून आलेलें वित्त त्या तिघांहीं वांटून घेतलें; आणि त्यापासून घेतलेल्या मुलखाची वांटणी करून घेत असतां, एकेकास चाळीस चाळीस लक्षांचा विभाग आला. त्यांत मराठ्यांस भाग वरदानदी व कृष्णा या दोहींच्यामधला बहुतेक मुलुख, आणि बिळारीपाशीं सोंडूर नामें खोरें आहे तीं जमीन आली. निजामाचे वांटणीस गुटी व कडपा या दोन जागा व यांच्यामधला मुलुख आला त्याची पश्चीमसर्यादा† मुद्गल व कनकगिरी व कोपाळ. इंग्लीशांस वांटणी आली ती बारामहाल व कुर्ग व मलबार.

यानंतर मार्चाच्या शेवटास ते तिघेही मुख्य एकमेकांचा परस्परें संमान करून एकमेकांची आज्ञा घेउन आपआपल्या ठिकाणास गेले.

परशुरामभाउ तो तह होईपर्यंत त्या श्रीरंगपट्टणास लष्करमध्ये पोंहचला नव्हता; त्यास कित्येक वेळा हरिपंत फडके याणें तेथें येण्याविशीं बोलावणें केलें, आणि त्यास लाटकानवालीस याची मसलत ही कळली होती; परंतु ते समर्थी तो समजला कीं, हे वेळेस आपल्याजवळ इंग्लीशांचीं पलटनें आहेत, यायोगें बेदनूर हस्तगत होईल; अशा अर्थे तो त्या श्रीरंगपट्टणाकडे न जातां बेदनुराकडे चालिला. तेव्हां त्यास वाटेंत होळीआनोर नामें किल्ला लागला, तो त्या पलटणांहीं घेतला. मग तो परशुरामभाउ तेथून पुढें तुंगेच्या कांठानें चालत असतां त्यास शिमोगा नामें दुसरा किल्ला लागला, तो घ्यावयाचा नेम केला; तेव्हां त्या किल्याचे निर्ऋतीदिशेस दोन कोसांवर एक मोठ्या झाडीचा मुलुख होता त्यांत, टिपूचा कोणी भाउबंद सात हजार पायदळ व आठशें स्वार व दहा तोफा इतक्यांसहित ठाणें धरून राहिला असे; त्यास जिंकावयाकरितां परशुरामभाउनें आपला पुत्र आपासाहेब याजबरोबर स्वार देउन पाठविला आणि त्या पलटनांतील आठ कंपनी आपल्या लष्कराच्या तळावर ठेवून बाकी लोकांसहित त्या लिटलसाहेबांसही त्याचा साह्यास नेमिला. ती शत्रूची जागा स्वारांनी आंत जा

† यासर्यादेमध्यें आनागोंदीसंबंधें थोडकासा मुलुख आहे तो टिपूनें आपल्याकडे ठेविला.

वयास

वयास फार कठीण होती ह्मणून त्या लिट्लसाहेबास आपल्याजवळ आठशें लोक मात्र असतांही, त्या युद्धाचा सर्व भार संभाळावा लागला. तेव्हां फार वेळपरम शौर्य करुन अतूट उद्योग केल्यानें, त्यास तीजागा प्राप्त झाली. मग थोडक्याच वेळानें तो किल्ला हस्तगत झाला. नंतर परशुराम भाउ त्यागनचे वाटेनें बेदनुरास आउन त्या किल्याला घेरा घालणार. होता, परंतु त्यास वाटेतच वर्तमान कळलें कीं, आपणावर टिपूचा कोणी मोठा सरदार श्रीरंगपट्टणाकडून येतो आहे, ह्मणून तो बेदनूर घेण्याचें काम टाकून श्रीरंगपट्टणास आउन लार्ड कार्नवालिस याला मिळावयास चालिला. तो तेंतहाचें काम पूर्ण झाल्यावर तेथें पोंहचला. नंतर ते श्रीरंगपट्टण घेणारे तिघेही आपआपल्या ठिकाणास जाउं लागल्यावर मराठ्यांचें तोफखाना वगैरे जड सामान व इंग्लीशांहीं मराठ्यांस मोठ्या मोठ्या सत्रा तोफा दिल्या होत्या त्या हें सर्व त्या परशुराम भाउला पुण्यास पोंहचवावयाचें काम पडलें. त्यामुळें तो वाटेनें हळू हळू जात असतां तो टिपूशीं व मराठ्यांशीं तह झालेला असूनही, त्या भाउला टिपूकडचे पेंढारी व बेरड यांचा बहुत उपद्रव लागला; आणि तो परशुराम भाउ पूर्वी तिकडे गेला तेव्हां त्याचा लोकांहीं त्या वाटेचा मुलुख उद्ध्वस्त केला होता ह्मणून तो त्या श्रीरंगपट्टणाहून तुंगभद्रेस पोंहोंचे पर्यंत असा बेजार झाला कीं. त्याप्रमाणें मराठ्यांचे हाल कधीं हीं न झाले.

सन सत्राशें ब्याण्णवांपासून
पंचाण्णव पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग सत्ताविसावा.

अनुक्रमणिका.

महादजी शिंदा पुण्यांतील कारभारी मंडळी पेशांवर्चढ होण्याविषयीं पुण्यास गेला.

पेशव्यांस वश करून घ्यावयाविषयीं त्याणें उद्योग कसकसा केला तो प्रकार.

पेशव्यास वकीलमुतलकनामें पदवी प्राप्त होउन पेशव्यानेंही महादजी शिंद्यास आपल्या हस्तक करून दिल्लीचा कामावर स्थापिला. तो विस्तार.

रजपूतांचा मुलखांत शिंदे व होळकर यांचा सरदारांसरदारांचा लखेरीज

वळ

वळ लढाई झाली तें प्रकरण.

त्यामुळें पुण्यांतील वहिवाटींत कांहीं अंतर पडलें.

नाना फडणवीस याणें पेशव्यांशीं एकांत करून आपली मुख्यता दृढ केली.

महादजी शिंद्याचा मृत्यु.

त्याचा स्वभावाचें व बुद्धीचें वर्णन.

त्याचे आगीं त्याचा भावाचा नातू दवलतराव शिंदा याची स्थापना.

बडोद्यांचें वर्तमान.

गोविंदराव गाइकवाड यास बडोद्यांत अधिकार प्राप्त झाला.

महाराष्ट्र मुलखाचा पश्चिम भाग समुद्रतीर तेथचे मंडलाधिपति त्यांचीं वर्तमानें.

त्यांहीं चांचेपणा केला तो व त्याचें निवारण.

मराठी लोक पहिल्या लढाईची चाल टाकून पलटणाचा भरवशावर लढूं लागल्यानें कायकाय परिणाम झाला तो प्रकार.

होळकरानें पलटनें चाकरीस ठेविलीं.

मराठी समुदाय मिळून निजामाशीं बाकी ऐवज मागावयाचे निमित्तें युद्धास सिद्ध आले, व खरड्याची लढाई.

निजामाचा पुत्र अलीजहा तो मृत्यु पावला, नाना फडनवीस याची कांहीं गोष्ट.

भाग सत्ताविसावा.

महादजी शिंदा हिंदुस्थानांत असतां त्याचे साहाय्यास आलेले होळकर व अलीबहादर हे त्याचा कामास नाहरकत करीत राहिले, त्यायोगें त्यांशी व त्याशीं मासलत करून कलह होई. ते समयीं तो महादजी त्यांस म्हणे कीं, मीं आतां पुण्यास जाउन तुह्मास माघारें बोलावणें करीन; असें बोले, परंतु त्या दोघांस ठाउक होतें कीं, नानाचा मनांत शिंदा फार वाढूं देउं नये, आणि हा शिंदा इतके लांब याद्विहून पुण्यापर्यंत जाईतोंपर्यंत, इकडचा बंदोबस्त बिघडेल. म्हणून याला तिकडे जावयास अवकाश होणार नाहीं, हें समजून शिंद्याचें तें भाषण लक्ष्यांत आणीनात, मग तो उज्जनीस जाउन, तेथून पुण्यास जावयास निघाला तेव्हां त्यास तें मान्य वाटलें; आणि या जाण्यांत कांहीं मोठी मसलत आहे ती कोणती असेल असा विचार करितां त्यांचा मनांत आलें कीं, पुण्यांत व हैदराबादेंत इंग्लीशां

इंग्लीशांचें प्राबल्य होईल, त्याचा निवारणार्थ हा जातो. कदाचित् आपण जो हिंदुस्थानांत संपादिलेला मुलुख यांत किमपि भाग यांस न द्यावा; असें ही असेल. ते अशा कल्पना करूं लागले परंतु वास्तविक पाहिलें असतां पुण्यांतील ब्राह्मण्याचा बंदोबस्त राखून पेशव्याजवळ आपण मुख्यत्वें वागावयाचा मसलतीनें तो निघाला. ते समयीं त्याणें लोकांत असें प्रसिद्ध केलें कीं, पूर्वी वकील मुतलक नामें पदवी बादशाहापासून आह्मीं पेशव्यांचे नामें संपादिली; त्याचा अभिषेक पेशवे यांस करावयाकरितां बादशाहाचे आज्ञेनें पुण्यास जातों. त्या सनदे बरोबरच त्याणें बादशाहापासून मोंगलांचा सर्व मुलुखांत इतःपर गोवध न व्हावा अशा बंदोबस्ताची दुसरी सनद घेतली होती, तीही मराठे लोक यांस दाखवावयाकरितां आपल्या बरोबर नेली.

तो महादजी शिंदा पुण्यास येतो असें वर्तमान नाना फडनवीसास कळलें तें त्याणें प्रथम सत्य मानिलें नाहीं; मग जेव्हां निश्चय समजला कीं, तो शिंदा पुण्यास येतो खरा. तेव्हां त्या नानानें लाट्कानवालीसास लिहिलें कीं, पूर्वी लिट्लसाहेब आपल्या पलटनासहीत मजपाशीं होता, तो हल्लीं श्रीरंगपट्टनची मोहिम करून मुंबईस गेला आहे; त्यास त्या पलटनासहीत हे समयीं जर मजकडे पाठवाल तर मी त्याचा खर्च चालवीन, आणि तुमचा मजवर तो मोटा उपकार होईल. असें नाना फडनवीसानें लिहिलें गेलें असतां, त्यावेळेस तो लाटकानवालिस त्याचे कुमकेस तीं पलटनें पाठवीना.

तो नाना फडनवीस आपणास इंग्लीशांपासून कुमक आणील, आणि तीं आपणास बाधक होईल, असें समजून तो महादजी शिंदा नाना फडनवीसास इंग्लीशांपाशीं कुमक मागावयाचें काम न पडावें ह्मणून आपल्या बरोबर एक पलटनमात्र घेउन पुण्यास गेला. तो तेथें मुळा व मुठा या नद्यांचा संगमाजवळ सन् सत्राशें ब्याण्णवांचा जुन महिन्याचे अकराव्ये तारिखेस डेरे देउन उतरला.

मग तो महादजी शिंदा आपला उद्योग चालवूं लागला, तेव्हां तें पद पेशव्यानें न स्विकारावें याविषयीं. नानानें श्रीमंतांस असें समजाविलें कीं, या सनदेमध्यें जें महाराज आदिराज असें लिहिलें आहे हें पद आपल्ये पेशव्याचे योग्य नव्हे. या प्रमाणें तो सांगत होता, परंतु शिंदा तो उद्योग टाकीना[‡]; शेवटीं त्याणें त्या अभिषेकाविषयीं सातारेंयाचा राजाची आज्ञा घेउन त्या कार्याची सिद्धता केली.

‡ तो उद्योग न योजण्याचें कारण असें कीं त्यानंतर कोणी भुतलकीचा सनदेंत पेशव्यांचें नांव मात्र दिलें आणि तत्त्वतः ये सर्व कारभार महादजी आपण पेशव्यांचा दस्तक होऊन करणार.

महादजी शिंदा पुण्यास आल्यावर नवां दिवशीं तो नाना फडनवीस त्याच्या भेटीस गेला. तेव्हां तो शिंदा मोठ्या संभ्रमानें त्याला भेटून त्याचे स्वतां आपण गादीवर बसला नाहीं. अशी त्याची मर्यादा राखिली. नंतर दुसरे दिवशीं महादजी शिंदा पेशव्याचे भेटीस गेला. ते समयीं त्याणें हिंदुस्थानचे कित्येक चमत्कारीक पदार्थ श्रीमंताच्या भेटीस दिले, आणि त्या वेळेसच उद्यां वकीलमुतलखच्या पदवीचा अभिषेक श्रीमंतांस करावा असा नेम ठरविला. नंतर त्या अभिषेकाचा थाटास असा समारंभ केला कीं, त्याणें आपल्या तळापासून जवळच फार चांगल्या चांगल्या मोठ्या मोठ्या राजडेऱ्यांची पंगत उभी केली. त्या सर्व डेऱ्यांचा मागला डेरा मुख्य होता, त्यामध्यें मोंगलांच्या बादशाहाचा तक्तासारिखें एक आसन करून ठेविलें. त्यावर ती बादशाही सनद व त्या पदवीसंबंधें बादशाहाकडील वस्त्रालंकारादि पदार्थ मांडिले. नंतर पेशवा मोठ्या समारंभाच्या स्वारीनें तेथें येऊन मग त्या डेऱ्यांत त्या गादीसमोर आला असतां त्या आसनास तीन वेळां नमस्कार करून, मग त्यावर एकशें एक मोहरा टेविल्या; आणि तें आसन उजवें घेऊन त्याचे डावे बाजूस बसला. तेव्हां शिंद्याजवळ कोणी फारशी लिहिणार मुख्य होता त्याणें ती वकीलमुतलकी अधिकाराची सनद वाचून सर्वांस ऐकविली. आणि गोवधन होण्याविषयीं बंदोबस्ताची जी सनद होती तीही वाचून दाखविली. नंतर ते वस्त्रालंकारादि पदार्थ पेशव्यानें घेतले. त्यांत वस्त्रें नऊ आणि जडावाचे अलंकार पांच. त्यांत शिरपेंच दोन व तुरा एक आणि बाहूभूषण जोड एक व पोंच्यांचा जोड एक, याशिवाय कंठी, कुडक्या, भिकबाळी, वकडीं, तोडे, असे अलंकार होते; आणि एक कलमदान, व एक दौत, व एक मोरतब, व दोन मोरचेलें, आणखी एक ढाल व तरवार; याखेरीज एक घोडा व एक हत्ती, त्याशिवाय बादशाही झेंड्याचे हत्तीसुद्धां, व एक नालखी व एक पालखी, याप्रमाणें होतें. त्यांतील वस्त्रें व अलंकार तेथून दुसऱ्या डेऱ्यांत नेऊन मग ते अलंकार आंगावर घालून आणि तीं वस्त्रें नेसून, पेशवा पुनः आपल्या त्या पहिल्या जाग्यावर येऊन बसला. तेव्हां तो महादजी शिंदा व नाना फडनवीस वगैरे कारभारी मंडळीपैकीं जे त्या सभेंत होते, त्यांहीं श्रीमंतांस +नजरा दिल्या. मग पेशवा तेथून माघारा पुण्यांत येऊं लागला. ते समयीं हरिपंत फडके व महादजी शिंदे हे दोघे तीं दोन मोरचेलें त्यावर ढाळीत त्याला लष्करपर्यंत पोहोंचविला. मग तो त्याला लकींत बसून पुण्यास मोठ्या समारंभानें आला. ती स्वारी दहा व यास नाग

+ नजरा दिल्या त्या वेळेस जे कोणी आपणास साताऱ्याच्या राजाचे पुरातन चाकर म्हणविणारे, शिलेदार व मानकरी यांस, ती पदवी पेशव्यास प्राप्त झाल्यानें असहन होऊन; कित्येकांहीं नजरा न दिल्या. व कित्येक त्या डेऱ्यांत न गेले.

तरिक

शिकलेलोकांची फार दाटी झाली. ते लोक अनेक प्रकारें जयशब्द उच्चारित असतां. सहस्रावधी वाद्यांचा ध्वनि, व बंदुका आणि तोफांच्या सरबत्या. हे सर्व ध्वनि मिळून मोठा गजर झाला. तो असा थाट होता कीं, त्यापूर्वीं पुण्यांतील लोकांनीं कधीं हा असा समारंभ पाहिला नाहीं.

पेशव्यास बादशाहाकडची वकीलमुतलकी अधिकाराची सनद आली त्यांतच असें लिहिलें होतें कीं, दिल्लीमध्यें पेशव्यांचा हस्तक महादजी शिंदा व त्याचा कोणी वंश्य असावा. त्यावरून पेशवा महादजी शिंद्याचा डेऱ्यांत तो अभिषेक समारंभ होऊन आपल्या वाड्यांत येतांच त्याणें त्यास तो अधिकार दिला. त्यावेळेस शिंद्यास मोठी योग्यता मिळाली असतां, तो मोठ्या नावास चढला असूनही त्या सभेंत तो बोलिला कीं मी श्रीमंतांचा जोडा उचलणारा चाकर आहे, त्या मला पाटीलबावापेक्षां दुसरें मोठें नाव योग्य नाहीं. असें बोलून त्याणें आपली लीनता+ दाखविली, तेणेंकरून लोक वश व्हावे. परंतु त्या सभेस जे गृहस्थ होते, ते त्याचा हलक्या बोलण्याचा अतिशय झालासा समजून त्यांचीं मनें तादृश प्रसन्न झालीं. कोकीं, हा मुळचा कसा होता, आणि या वेळेस किती योग्यतेस चढला आहे. अणखीं भाषण तर केवळ दीनासारिखें करितो; तस्मात् हा सरळ पुरुष नव्हे. असें त्यांस दिसलें.

मग शिंदा आपले तळावर आला. तेव्हां त्याचा सरदारांहीं त्यास नजरा दिल्या. परंतु दुसरे सर्व मराठे आपणास अनिष्ट आहेत असें त्या महादजीला समजलें. त्यावरून त्याणें मनांत निश्चय केला कीं, इतःपर आपली मसलत परम सावधपणें शेवटास न्यावी. त्यानंतर पेशव्यास आपण नानाफडनवीसापेक्षां प्रिय होण्याविषयीं त्या महादजी शिंद्यानें त्या श्रीमंतास गोडगोड गोष्टी सांगून युक्तीनें त्यास शिकारीचें व्यसन लावून आपल्या बरोबर स्वारीस नेऊं लागला. तो त्या शिंद्याचा मतलब समजून नानाफडनवीसानें त्या शिंद्या व श्रीमंतांशीं बहुधा एकांत न होण्याविषयीं यत्न चालविला. तो माधवराव पेशवा तर उत्तम स्वभावाचा होता त्यास वाटे कीं नाना बोलतो तें हितावह आणि तो विश्वासूही खरा, परंतु त्याचें वागणें शिंद्यापेक्षां क्रूरतेचें दिसे आणि तो कधींही आनंदित नसे; शिंदा तर दर्शनेंकरून व भाषणानें व वागणुकेनें हा उल्हासकारक होता, म्हणून त्या श्रीमंतांचें मन शिंद्याकडे लागे.

दरबारांत शिंद्याचें कार्य बहुधा हिंदुस्थानसंबंधें होतें; तो महादजी शिंदा नानाफडनवीसास म्हणे कीं, मी मोठी खटपट करून पेशव्यांचा मान वाढ

+ ते समयीं व्यवहारांत मागून चालत आलेलीं शिंद्याचीं नावें तीन पडलीं होतीं; तीं असीं; एक राजमहाराज माधवराव शिंदा; दुसरें मदारुलमहाम, तिसरें अलीजाहबहादूर.

तो ना

विला. आणि मराठे ही मोठ्या योग्यतेस चढविले. त्यास आम्ही खर्च केला तो तुम्ही सरकारांतून द्यावा. या गोष्टीस नाना फडनवीस किमपि मान्य होईना. तो म्हणे कीं. तुम्हीं जो मुलुख घेतला त्याचा वसूल होउन त्यापैकीं जें उरलें असेल, तें आम्हास द्या; अशी पुण्यांत खटपट होत असतां ही नाना व शिंदा हे दोघे एकमेकांचा मान रक्षून वागण्यांत अंतर करीत नव्हते. शेवटीं हिंदुस्थानांत नानाच्या पक्षाचा तुकोजी होळकर याशीं व शिंद्याचा दिवाण नामें सरदार याशीं रजपूत लोकांच्या राज्यांतील कांहीं लुटीचे वांटणी संबंधें कलह उत्पन्न होउन मोठें युद्ध झालें; त्यांत होळकराचीं नवीं चार पलटनें टिकलीं होतीं त्यांचा शिंद्याचा पलटनांहीं अगदी पराभव करून त्याचा अठ्ठतीस तोफा दिवाणाकडे गेल्या. तो सूड घ्यावयास त्या होळकरानें शिंद्याची राजधानी उज्जनी तेथें जाउन तें शहर लुटलें. असें वर्तमान पुण्यास आल्यावर नाना फडनवीस व शिंदे यांचा मर्यादेंत अंतर पडलें. तेव्हां नानानें आपणास कोणे समयीं दगा होईल गें समजून, परशुराम भाउ पटवर्धन यास फौजेसुद्धां आपणाकडे बोलाविला. तो दोन हजार स्वारां सहित आला, तें पाहून शिंदा आपणास फौज आणावयास निमित्त चांगलें झालें असा हर्ष पाउन, एक बृगेद पलटनें आणविलीं. नंतर त्याणें नानाशीं विपरीत वागणूक केल्यानें व पेशवा प्रसिद्धपणें आपणाकडे व्हावा साउद्योग केल्यानें त्याशीं व नानाशीं असा द्वेष पडला कीं, तो हरिपंत फडक्यानें मध्यस्थें करून मिटविला नसता तर मोठा संग्राम होता. त्यानंतर ते दोघे ही आपआपल्याजवळ फौजा असतां युद्धापेक्षां पेशव्याचा मध्यस्थीनें, आपआपलें कार्य साधन इच्छित होते. कोणे एके समयीं शिंदा पेशव्यांशीं कांहीं एकांत करित असतां तीं भाषणें ऐकून कोणी नानास कळविलीं. तेव्हां त्यास कांहीं भ्रांति उत्पन्न होउन त्या नानानें मनांत विचार केला कीं पेशव्यास एकांतीं स्पष्ट पुसावें कीं, तुम्ही त्याजकडे आहांत किंवा मजकडे आहांत, तें सांगा. या प्रमाणें विचार केल्यावर तो नाना फडनवीस पेशव्याजवळ जाउन एकांतीं बोलिला कीं, आजपर्यंत मी तुमची सेवा विश्वासपणें कोणे रीतीची कशी केली; तो अर्थ मनांत आणून शिंद्याचें वागणें कोणे रितीचें, आणि त्याणें आपल्या लश्करांत परदेशी लोकांचा करीस ठेवून त्यांचा रीतीप्रमाणें नवेंच कायदे केले; आणि तो ब्राह्मणास अगदी बुडवून सर्व मराठा राज्यांत आपण मुख्य त्वें वागावें असा त्याचा मनोरथ आहे; ऐशियास मला तुमची अनुकूळता असल्यावांचून त्याची बरोबरी करितां येत नाहीं. त्यास हा सर्व विचार मनांत आणून मा झा मसलतीनें वागावयाचें असल्यास, तशी आज्ञा व्हावी, नाहीं तर मला काशीस जाण्याचा निरोप द्यावा. असें बोलतांनां त्या नानाचा नेत्रांस पाणी आलें, आणि श्रीमंत जर शिंद्याचे मसलतीनें वागूं लागेल तर राज्य बुडेल म्हणून

खेद

खेद करूं लागला. हें पाहून त्या माधवरावाचें मन फारच दुखलें, आणि तो ही श्रमी होऊन बोलिला कीं, तुम्हीं गेल्या गोष्टी मनांत आणूं नये. इतःपर मी विचारेंच वागेन; आपण कां काशीस जातां. असा नानाचा विचार श्रीमंतांच्या मनांत भरून मान्य केल्यानंतर त्या नानाची मुख्यता ठरली; असें असतांही त्या शिंद्याच्या युक्तीं पुढें थोडक्याच दिवसांत नानाचें कांहीं चालेनासें झालें असतें; परंतु तो शिंदा आपल्या मतलबास फार जपून असतांही, थोडक्याच दिवसांत त्यास मोठा ज्वर होऊन, तो पुण्याजवळ वानवडी गांव आहे तेथें सन सत्राशें चवऱ्याण्णवांचा फेब्रुवारीचे बारावे तारिखेस मृत्यु पावला.

तो महादजी शिंदा फार योग्यतेस चढला होता, त्यायोगें त्याचा मृत्यु सर्व हिंदू लोकांत कोणास हितावह आणि कोणास दुःखदायक झाला. त्या महादजीच्या मनांत होतें कीं, आपण मुख्यत्वें वागावें, असें असतां त्याची इच्छा असे कीं, समयविशेषीं बाहेरच्या शत्रूस मारावयाकरितां मानकरी लोक सबळ असावे; आणि ब्राह्मणाची मुख्यता त्यास अगदीं प्रिय नव्हती. तो योग्यतेस चढत असतां दोहों ब्राह्मणांच्या कलहांत शिरून त्याणें त्यांतील एकाचा पक्ष स्वीकारून त्यास वाढविलें; तथापि तो महादजी शिंदा आपण वाढविलेल्या नानास आपणच बुडवावयाचा उद्योग करिता झाला. तो शिंदा ज्या समयीं कांहीं कार्यवशात् पुण्याहून दूर राहूं लागला आणि माळव्यामध्यें त्याचें लश्कर इंग्लीशांहीं जिंकिलें तेच समयीं ब्राह्मणांनीं इंग्लीशागा दुगा देवयास वश केला होता; तेव्हां दिसण्यामध्यें असें आलें कीं, महादजी शिंदा ब्राह्मणापेक्षां न्यून बळ आहे. परंतु सालप्याच्या तहांत इंग्लीशांहीं ठरविलें होतें कीं, महादजी शिंदा स्वतंत्र; आणि त्यापुढें तो मराठ्यांस व इंग्लीशांस तहाचें द्वार झाला; तेव्हां ती आपली न्यून बळता टाकून योग्यतेस चढतच चढत स्वतंत्रपणा करून, आपल्या इच्छेस येईल तसें वागावयाची त्याला शक्ति आली. तो सूक्ष्म बुद्धी आणि राजनीति कुशल असे, तसाच कुटिल व स्वराज्य वृद्धिविषयीं उत्कंठित, आणि दीर्घद्वेषी होता. त्याचें मुख पाहिलें असतां असें वाटे कीं, हा सदानंदी आणि सद्बुद्धी पुरुष आहे, तो शरीरानें पुष्ट आणि ठेंगणा होता, त्याचा रंग काळा असे. त्याच्या पायास पानपतच्या लढाईंत जखम लागून तो लंगडत चालत असे; त्याचे सेवक त्यावर प्रीती करीत होते. तो आपल्या लोकांस परभारां गावांवर देणें द्यावयास तत्पर होता, परंतु स्वजीन्यांतून किंवा खासगीपैकीं देण्यास जड असे. हा तर मराठ्यांचा प्रायः जातिस्वभावच आहे. मराठे लोकांत कोणी अक्षर वाचणारे व कोणी लिहिणारे असतात, परंतु वाचणें व लिहिणें व जमाखर्चाचें कौशल्य, व हिशोबीं निपुणता इतके गुण एकत्र असा पुरुष मराठ्यांत दुर्लभ आहे; असें असतां महादजी शिंद्यांत हे सर्व गुण होते. तो मेला तेव्हां त्याची पुत्रसंतती नव्हती. त्या महादजीचा सख्खा भाऊ तुकोजी शिंदा तो पानपतच्या

लढा

लढाईंत मेला होता, त्याचे तिघे पुत्र एक केदारजी, व खेळोजी, व आनंदराव, यांस महादजी शिंद्यानें आपल्या लष्करांत ठेविले. त्यांतील केदारजी तो महादजी असतांनाच मृत्यु पावला होता; त्यास संतती नव्हती. खेळोजीस दोन पुत्र होते; आणि आनंदरावाचा पुत्र एक, दवलतराव नामें होता, तो त्या तिघां भावांतील कनिष्ठाचा पुत्र असें असतांहि, महादजीनें नेम केला होता कीं मी या दवलतरावास दत्त घेईन; परंतु तो प्रकार त्याचा मृत्यु समयीं शेवटास न गेला, तरी ती गोष्ट त्याच्या जवळच्या लोकांत प्रसिद्ध होती. म्हणून तो निवर्तल्यावर त्या दवलतरावाची स्थापना महादजीच्या जागीं होत असतां, लक्ष्मीबाई महादजीची स्त्री ती आपल्या शक्तीप्रमाणें त्या कार्यास अडथळा करूं लागली. तथापि तें स्थान दवलतरावास प्राप्त झालें. त्यावेळेस तो पंधरा वर्षांचा होता.

महादजी शिंद्याच्या अंतकाळीं नागपुरीं व बडोद्यांत कायकाय वर्तमानें होत आलीं तीं अशीं. ते समयीं नागपुरामध्यें रघूजी भोंसला राज्य करीत असे, त्याचा बाप सन सत्राशें अठ्यायशींत मेला, ते समयीं रघूजीचे धाकटे त्याचे पुत्र खंडोजी व व्यंकाजी हे दोघे, त्या व्यंकाजीस मन्याबापूही म्हणत.

त्यांत खंडोजीस बापानें आपल्या राज्याचा उत्तर भाग दिला, आणि व्यंकाजीच्या स्वाधीन दक्षिण भाग केला; रघूजी भोंसला तो त्याचा ज्येष्ठ पुत्र त्यास जानोजी भोंसला चुलता याची मराठी राज्यांतील सेनासाहेबसुभा पदवी प्राप्त झाली होती, परंतु तो त्याचा बाप असतां त्याजकडे वगैरेची मुख्यता नव्हती.

ज्या वेळेस टिपूच्या नाशाविषयीं मराठे व निजाम व इंग्लीश यांचें ऐक्य झालें, ते समयीं पेशव्यांचा सादर बोलावण्यावरून त्या रघूजी भोंसल्याला पुण्यास जावें लागलें. तो तेथें असतां त्या मोहिमेस न जावें हें त्याच्या मनांत होतें, यास्तव त्याणें पेशवा स्वतां त्या कामास जात नाहीं हें निमित्त जमेस धरून मला ही तिकडे जाणें आवश्यक नाहीं असें युक्तीनें सुचविलें परंतु तो आपला मनोरथ शेवटास जात नाहीं सा समजून, श्रीमंतापाशीं एकांतीं बोलिला कीं, जर मीं इतका दूर टिपूच्या मुलखीं गेलों तर माझा भाउ खंडोजी माझें राज्य आटपील. त्यावरून पेशव्यानें त्या मोहिमेचा खर्चाबद्दल दहा लक्ष रुपये घेउन त्यास माघारें जावयाची आज्ञा दिली. मग तो नागपुरीं पोंचल्यावर थोडक्याच दिवसांहीं त्याचा भाउ खंडोजी मृत्यु पावला. तो त्या रघोजीस मोठें शल्य होतें, तें निवारण झाल्यावर त्याणें आपला दुसरा भाउ व्यंकाजी यास चांदा व छत्तीसगड याची जहागीर दिली.

बडोद्यांमध्यें फत्तेशिंग गायकवाड राज्य करित होता तो सन् सत्राशें एकुणावदांच्या दिसेंबरचे एकविसाव्ये तारिखेस माडीवरून पडून मृत्यु पावला. त्यावेळेस त्याचा धाकटा भाउ मानाजीराव याणें सयाजीला आपलें स्वाधीन

ठेउन

ठेवून राज्य चालविलें; तेव्हां सयाजी व तो मानाजीराव गाइकवाड याचा मधला भाउ गोविंदराव तो अनधिकारी होत्साता, पुण्याजवळ एक खेडेगावीं रहात होता. त्याणें तो फत्तेसिंग मेल्याचें वर्तमान ऐकून पेशव्यास अर्ज केला कीं, हें राज्य माझें मला असावें, त्याप्रमाणें करण्यास तो अधिकारीच होता परंतु, मानाजीराव याणें पेशव्यास तेहतीस लक्ष तेराहजार एक रुपया नजर केला; आणि फत्तेसिंगाकडे छत्तीस लक्ष रुपये खंडणीची बाकी राहिली होती असें कबूल केलें. त्यावरून नाना फडनवीसानें त्या राज्याविषयीं पेशव्याची सनद त्या मानाजीरावास देवविली. तेव्हां गोविंदराव याणें महादजी शिंदा पुण्यास आल्यावर त्याद्वारा आपल्यास त्या राज्याची सनद संपादिली. तेसमयीं मानाजीराव इंग्लिशांस कुमक मागत असतां इंग्लिशांहीं त्याचा समजुत पाडावयाविषयीं नानाशीं बोलणें लाविलें असतां, मानाजीराव मृत्यु पावला. तेव्हां तो तंटा सहज नाहींसा होउन, गोविंदराव गायकवाड आपल्या अधिकारावर जावयास सिद्ध आला, परंतु नाना फडनवीस वगैरे कारभारी त्यास पूर्वील देणें जें ठरलें होतें त्याचा कबूलात करून घेतल्यावांचून जाउं देईनात, आणि तापीचे दक्षिणेकडचा मुलुख त्याणें पेशव्यास द्यावा, याप्रमाणें त्या गोविंदरावास मागत होते. परंतु ही गोष्ट त्याणें इंग्लिशांस कळविली तेव्हां त्या इंग्लिशांहीं सालब्याचा तहाविरुद्ध ही गोष्ट, असें समजाविलें असतां नानानें तें सोडिलें. नंतर तो गोविंदराव सन सत्राशें त्र्याण्णव याचा डिसेंबराचे एकोणिसाव्या तारिखेस आपल्या अधिकारावर आवयास निघाला. असें महादजी शिंद्याचा मरणसमयीं वराडांत आणि बडोद्यांत वर्त्तलें.

कोंकणांत तुळाजी आंग्र्या इंग्लिशांशीं फार चोचेपणा करीत असतां त्यांहीं त्यास सन् सत्राशें छपन्नांत अगदीं हीनबळ केला.

कुलाबकर मानाजी आंग्र्या सन् सत्राशें एकुणसाठांत मृत्यु पावला होता. त्याचा पुत्र रघुजी आंग्र्या तो आपल्या बापाप्रमाणेंच आपणास पेशव्याचा चाकर म्हणवी आणि कांहीं त्यांची आज्ञा असतां मान्य करावयाचें कारण पडलें तर मानित असे. तो रघुजी सन् सत्राशें त्र्याण्णवांत मृत्यु पावला. तेसमयीं त्याचा कोणी भाउबंद जयसिंग आंग्र्या याणें पुण्याची आज्ञा नघेतां त्या रघूजीचा पुत्र मानाजी यास रघुजीचा जागीं बसवून कारभार चालविला, त्यायोगें पुण्याचे दरबारी लोक तो जयसिंग आंग्र्या व तो मूल मानाजी यांचा द्वेष करूं लागले.

जंजीऱ्याचा शिद्दी याचे राज्यांत कांहीं प्रकार आला तो असा. त्या राज्यांत शिद्दी इब्राहिम नामें होता तो त्या सर्वांत मुख्य असे; तो सन सत्राशें बासष्टांत मृत्यु पावला. त्याचा स्थानीं अबदुल रहीम नामें शिद्दी अधिकारी होता.

त्यास

त्यास तो अधिकार प्राप्त होतां शिदि याकुट नामें होता त्याणें तो अधिकार मिळविला. ते व्हां तो अबदुलरहिम याणें तें आपलें पद घ्यावयास कांहीं यत्न करित असतां तो सिद्दीस जाधीना ते व्हां तो पुण्यास जाउन आश्रय पावला. शिदी याकुटानें तर त्यास पेशव्या अनुकूळ नहोण्याविषयीं पुण्यास लिहून मग जून केली कीं, तुर्त दंडाराजपुर अबदुलरहिमास दें तो आणि मी मृत्यु पावल्या वर अंजीरा ही त्याचाच आहे. त्याप्रमाणें मान्यता होउन पुढें शिदी याकुट मे त्यावर शिदी अबदुल्‌रहिम यास तें स्थान प्राप्त झालें. परंतु शिदी याकुट याणें आपल्यें मृत्युसमयीं लेख करून ठेविला होता कीं, हें राज्य अबदुलरहिम याणें करावें, आणि याचे मागें याचा दुसऱ्या पुत्रानें करावें. तो लहान असतां मा शा मित्र शिदी जोहर याणें तें काम संभाळावें.

यानंतर अबदुल्‌रहिम सन्‌ सत्राशें चव्याण्यशींमध्यें मृत्यु पावला. त्याणें तें शिदी याकुटाचें पत्र मानितां आपला वडील पुत्र अबदुल करीम त्यास बाळुमियां म्हणत असत, त्याला आपले जागीं स्थापावा असा आपले मरणसमयीं नेम करून ठेविला मग तो अबदुल्‌रहिम मेल्यावर याकुटाचा मित्र शिदी जोहर तो त्या गादीमाचें दोघे पुत्र आपले स्वाधीन करून घेण्याविषयीं उद्योग करित असतां, त्या बाळुमियानें आपल्या धाकट्या भावास घेउन पुण्यास जाउन नानाफडनवीसाचें आश्रयानें राहिला. नंतर त्या वादाविषयीं इंग्लीशमग त्यांशीं शिदी जोहर पक्षीं बोलत असतां नानाफडनवीसास कार आशा होती कीं, हें लहान तें राज्य आपणास असावें त्यास बहुत वेळ पर्यंत इंग्लीशांची अनुकूळता होयीना मग जावेळेस टिपूचा नाश करिता मराठे व निजाम व इंग्लीश यांचें ऐक्य झालें, त्यावेळेस असा नेमदर ठरला कीं. तो बाळूमियां व त्याचा भाउ यास स्करतें जवळ पाउण लक्ष रुपये वर्षा स जमा होत सा मुलुख धावा, आणि एकदोंचाळीस हजार रुपये देउन तो अंग्र्याचा मुलुख पेशवे याहीं द्यावा. असें करारपत्र सन्‌ सत्राशें एक्याण्ण वाचा जूनमहिन्याचे सहाव्ये तारिखेस सिद्ध झालें. आणि तें राज्य लहान असें असतांही हस्तगत करावयास पेशव्यांना फावलेंच नाहीं म्हणून तें अद्याप राहिलें आणि पेशव्यांचें गेलें. यास दृष्टांत. असें नदीचा कांठीं लव्हाळे असतात ते मोठें पाणी आलें तरी लवून राहातात; आणि मोठे मोठे वृक्ष त्या पाण्याचा नेटानें उपटून वाहून जातात.

मालवण व सावंताचे वाडीकडील वर्तमान असें. मालवण कर व सावंतवाडीकर याहीं चाचेपणा करून इंग्लीशांस बहुत उपद्रव केला असतां, इंग्लीशांहीं लढाउ जहाजें पाठवून, कोल्हापुरकराचें मालवण व सोंव

तोंचा रेडी किल्ला सन सत्राशें छपन्नांत घेतला. नंतर दुसरे वर्षी कोल्हापुरकरापासून तीन लक्ष्यायशीं हजार रुपये घेउन, मालवण किल्ला त्यांस माघारा दिला. आणि तेच वर्षी वाडीकरांपासून दोन लक्ष रुपये घ्यावयाचा करार करून त्यांचा रेडी किल्ला त्यांस माघारा देत होते तेसमयीं वाडीचा दरबारांत फार अव्यवस्था झाली असे. त्यायोगें तो दोन लक्षांचा भरणा व्हावयास वेंगुर्लें परगण्याचा वसूल तेरा वर्षेपर्यंत गहाण ठेविल्यावांचून दुसरा कांहीं उपाय दिसेनासा झाला. मग कोणी कुमटेनामें मध्यस्थ होउन, त्या वाडीकरांचे दोन जामीन घेउन त्यांस तेरा वर्षेपर्यंत वेंगुर्ल्याचा किल्यामध्यें ठेउन त्याचा बंदोबस्तास व वसुलाचे कामास उपयोगार्थ इंग्लीशांचे शिपाई त्या वेंगुर्ल्यांत असून तेथें इंग्लीशांहीं आपला झेंडा लाविला. तेव्हां त्या मध्यस्थानें इंग्लीशांस दोन लाख रुपये एकदांच दिले. तेसमयीं इंग्लीशांहीं रेडी किल्ला सावंतास माघारा दिला. त्यानंतर थोडक्याच वेळानें ते दोघे ही जामीन पळून गेले, तेव्हां कुमट्यास वाडीचे लोक वसूल घेउं देईनात, आणि छापा घालून तो वेंगुर्लें किल्ला ही त्यांहीं घेतला. त्यांचे पारिपत्य इंग्लीशांहीं करावें, परंतु ते कांहीं देशाचा कामास गुंतले, म्हणून तें तसेंच राहिलें. त्यावरून कोल्हापुरकर ही पुनः चोंचेपणा करूं लागला; मग कित्येक वर्षें तो उपद्रव सोसून इंग्लीशांहीं शेवटीं त्याचा पारिपत्यास मुंबईमध्यें लष्कर तयार केलें. तेव्हां त्याहीं इंग्लीशांस कांहीं पैका देउन माळव्यांत कोठी करावयास जागा दिली; त्यायोगें तें काम तसेंच राहिलें. असा इंग्लीशांहीं अर्धवट उपाय केल्यामुळें पुढें ही सन अठराशें बारापर्यंत तो त्या वाडीकराचा व कोल्हापुरकराचा व जंजिरेकराचा व पेशव्यांचा ही चोंचेपणा कांहीं कांहीं होता.

एथपर्यंत (सन सत्राशें चवऱ्याण्णवसुमारें) मराठेलोक युद्धाविषयीं कुशळ आणि धैर्य करून लढत असत, परंतु यासमयीं ते लोक पायदळ व तोफखाना यांचा भरंवशावर लढूं लागले; त्यायोगें पूर्वीसारिखा त्यांचा स्वारहीं मोठ्या धट्टपणें जाउन छापा घालून, एकाएकीं शत्रूचा नाश करावा आणि मागें पळावें, तें होईना. पायदळ पुढें करून स्वारांनीं त्यांस पाठबळ व्हावें अशी चाल पडली. याच पद्धतीनें पानपतच्या लढाईत स्वारांस पायदळ व तोफखाना सोडून पळतां येईना, म्हणून जय होईल अथवा न होईल असा संशय असतां ही, त्या मराठेलोकांस तेसमयीं युद्ध करावें लागलें. पूर्वीं अशी चाल होती कीं जय होईलच असा निश्चय असल्यास युद्धास उभें रहावें.

त्यानंतर पुढें कधीं मराठेलोकांत पलटणें चाकरीस ठेवावयाचा कल निघाला असतां, सरदार म्हणत कीं हे मराठ्यांचा उपयोगी नाहीं कांकीं जे लोक त्यापाशीं कवाईत शिकलेले ते त्यांप्रमाणें कार लढतील. त्यास

नर

जर आपला जय झाला पाहिजे तर पूर्वीच्या प्रकारानें लढल्यास होईल, आणि त्या लोकांच्या चालीनें लढल्यास हिंदू अगदीं बुडतील. हा अर्थ मनांत धरून होळकरानें बहुत दिवसपर्यंत आपल्या लष्करांत पलटनें बाळगलीं नाहींत. परंतु जा वेळेस शिंद्यानें रजपुतांचे किल्ले घेतले ते वेळेस तो समजला कीं जर हीं पलटनें याजवळ नसतीं तर हें काम होतें ना. म्हणून त्या होळकरानें एका फ्रेंचाच्या सरदारचार पलटनांसहीत चाकरीस ठेविलीं. तीं पलटनें लखेरी जवळ शिंद्याच्या पलटनाशीं लढून नाश पावलीं. तथापि त्यांहीं फार चांगलें युद्ध केलें म्हणून होळकरानें त्या सरदारास पुनः तयारी करावी म्हणून सांगीतलें.

अशीं मराठी लोकांत पलटनें ठेवुन लढाईची चाल पडली होती. परंतु रघोजी भोंसला याणें पलटनें इतके दिवस चाकरीस ठेविलीं नाहींत.

महादजी शिंदा जीवंत असतां मराठ्यांची मसलत होती कीं, निजाम अल्लीकडे चौथ व सरदेशमुखी याबद बहुतां दिवसांची बाकी राहिली आहे तीं मागून घ्यावी. यावर कोणी कल्पना करील कीं ते समयीं मराठी लोकांत वैमनस्यें पडलीं असतां, या कामासाठीं सारे एकमत कसे झाले. तर असें समजावें कीं निजामाकडील कांहीं प्राप्त झालें असतां, तें साऱ्यांहीं वांटून घ्यावें, असें पूर्वीपासून चालत आलेलें त्या सर्वांस ठाउक होतें. मग महादजी शिंदा मृत्यु पावल्यावर, तो सर्व बंदोबस्त नाना फडनवीसास करावा लागला. ते समयीं इंग्लीशांहीं नानास व निजामास सांगीतलें कीं, हे समयीं आम्हीं कोणाचाही पक्ष स्वीकारीत नाहीं.

हैदराबादेस पेशव्यांकडचे गोविंदराव काळे व गोविंदराव पिंगळे नामें दोघे वकील नानानें पाठविले त्यांशीं व निजामाशीं त्या मागण्या प्रकरणीं बोलणें झाल्यानंतर आणखी त्या वकीलांजवळ मराठ्यांहीं जेव्हांच त्याचा मुलुख त्याच्या नरसूल घेतला, व जो वसूल आपल्या मुलखांतून त्या निजामास देणें तो न दिला; त्यांस पेंढाऱ्यांचा फार उपद्रव लागला. इत्यादि चोविसा कलमांची याद देउन पेशव्याकडे पाठविले. त्या कलमांचीं उत्तरें नानानें फार चातुर्य करून त्वरित लिहिलीं; आणि त्या बरोबरच दुसरी अठ्ठावीस कलमांची याद त्यावर तयार करून पाठविली. त्यांत असें दर्शिविलें कीं दोन कोटी तीन लक्ष रुपये पेशव्याचे निजामावर आहेत. त्याजवरून निजामाचा मशीर उल् मुलख नामें कारभारी, याच्या आणि ते दोघे पेशव्याचे वकील यांच्या बहुत वादसंवाद; शेवटीं तो मशीर उल् मुलख त्या वकीलांस सभेमध्यें बोलिला कीं, हिशेब निपुण आणि अति कुटिल, असा जो तुमचा धणी त्याणें अंगें

येउन

येऊन या दरबारांत आपल्या कलमाचा अर्थ सांगितल्यावांचून कोणाच्याही ध्यानांत येणार नाहीं. त्यावर त्या वकिलांनीं उत्तर केलें कीं, आमच्या नानास कामें बहुत आहेत, त्यामुळें त्यांचें एथें येणें घडतें कसें. त्यावर त्या मशीरउल्मुल्कानें प्रतिउत्तर दिलें कीं, त्याचें येणें येथें कसें होईल तें तुम्हाला दाखवावयास उशीर नाहीं. या धमकीच्या बोलण्यानें मग दोहीं युद्धाचें आकरण मानून उभयपक्षीं लढाईची तयारी होऊं लागली. तरि तें वादमिटवावयाचें बोलणें आरंभिलेलें होतें तें शेवटपर्यंत चालत गेलें.

मोंगलांचा रेतेंत तीं युद्धाची कल्पना उत्पन्न झाल्यापासून मोठ्या हर्षानें तें घडावेंच असें इच्छित होते. मग निजामानें बेदरास मोठें लष्कर स्वयें जमा केलें; तेथें अनेक प्रकारें युद्धसाहित्य फार मनःपूर्वक तयार होत आहे, असें दिसून आलें; परंतु त्या लष्करचे शिपाई अव्यवस्थित असून आपल्या सरदाराच्या आळयांत नव्हते, आणि युद्धोपयोगी शस्त्रादि पदार्थ व सरंजाम यथास्थित नसे. तरी त्या लोकांमध्यें उग्याच पोकळ गोष्टी होत होत्या कीं, आतां पुण्यास जाऊन तें शहर लुटून जाळून टाकूं. अशाच त्या लष्करांतील कलावंतिणी ही त्या बोलण्याच्या आकारप्रमाणेंच त्या लष्कराचें वर्णन व मराठ्यांचें अल्प बुडावयाच्या गोष्टी गाण्यांत आणून गात होत्या. तो मुख्य कारभारी मशीर उल्मुल्क हाही त्या दरबारांत सभेमध्यें बोलिला कीं, इतःपर मोंगल मराठ्यांच्या नगाऱ्यांतून मुक्त झाले; आणि विजापुर व खानदेश ही आतां मराठ्यांपासून सोडवून घेईन. तें कार्य झालें नंतर पेशव्याचें सर्वस्व घेऊन त्यास लंगोटी लावून [illegible] ण्यास हातीं देऊन त्याला स्नानसंध्या करावयाकरितां काशीस पाठवून दिल्या वांचून सल्ला करावयाचा नाहीं.

नाना फडनवीसानें थोडक्याच वेळांत मोठें लष्कर जमा केलें. तें समयीं दवलतराव शिंदा व तुकोजी होळकर हे दोघे पुण्यासच होते. आणि भोंसले इकडे व गायकवाडानें ही कांहीं लष्कर पाठविलें. त्याशिवाय वऱ्हाडचा भोसला लष्कर घेऊन येत होता; आणि दक्षिणेकडचे मोठेमोठे जहागीरदार पटवर्धन, व रास्ते, व विंचुरकर, व नाळेगांवकर, व प्रतिनिधि, व पंतसचीव, व मराठे मानकरी लोक, निंबाळकर, व घाटगे, व चव्हाण, व दफळे, व पवार, व थोरात, व पाटणकर, वगैरे यांस पेशवे आणा [illegible] त्यावरून ते सर्व आप आपल्या सैन्यासहित पुण्यास येऊन मोंगलांच्या [illegible] अगोदर तयारी होत आहे तों निजामाचें लष्कर आधींच आपल्या जाग्यांतून निघून सरहद्दींत बाहेर निघालें.

तो निजाम वेदराहून निघोन मांजरा नदीचे कांठानें हळु हळु मराठयांचा मुलुखाचे मर्यादेकडे चालूं लागला. मग एका महिन्यानें सन सत्राशें पंचाण्णवांत जानेवारींत पेशवा पुण्याहून लश्कर एकदा निघोन मोंगलांवर चालिला. तें लश्कर फार मोठें म्हणून त्यास धान्यतृणादि सोयी साठीं त्या लश्कराचे कांहीं विभाग करून बहुत वाटांनीं चालूं लागला. तेसमयीं तें मराठी लश्कर स्वार व पायदळ मिळून एक लक्ष तीस हजारांवर होतें; आणि दहा हजार पेंढार त्याखेरीज असे. या एवढ्या समुदायांत दवलतराव शिंद्याचा जमाव फार मोठा होता. त्याचें बहुतेक लश्कर माळव्यांत व हिंदुस्थानांत असतांही तो पंचवीस हजार सैन्यासहीत पेशव्याकडे आला. त्यांत दहा हजार पल्टनी लोक असत. रघुजी भोंसला याचें लश्कर स्वार व पायदळ मिळून पंधरा हजार असे. तुकोजी होळकर याचे लोक दहा हजार होते; त्यांत दोन हजार पलटनी लोक असत. परशुरामभाउ पटवर्धन याचे लोक सात हजार मात्र होते. परंतु त्यास सर्व सरदारांहीं मिळून त्या सर्व लश्कराचा मुखत्यार केला. तेव्हां त्याणें सर्व पेंढारी व त्यांज बरोबर कित्येक स्वार देउन त्यानां पुढें पाठवून मोंगलांचा आसमंतात मुलखाचा नाश करावयाविषयीं आज्ञा दिली. नंतर आपण त्या सर्व लश्करासहित दीड शें तोफा बरोबर घेउन निजामावर चालिला. तेव्हां त्या निजामाचें ही लश्कर एकलक्ष दहा हजार होतें.

तो निजाम त्या सैन्यासहित खरड्यावर येत होता तो मोरी घाट उतरत असतां पेशव्यांचा लश्करची खासगी फौजेची टोळी त्यांत हरिपंत फडक्याचा पुत्र बाबूराव फडका मुख्य होता, त्याणें तेथें जाउन त्या मुसलमानावर एकाएकीं हल्ला केला. तेसमयीं त्याचा कांहीं नाश होउन त्या फडक्यास मागें हटावें लागलें; त्यावरून तो निजाम अल्ली समजला कीं, आतां आपला जय आहे. म्हणून ते दिवशीं (मार्चाचे अकराव्ये तारिखेस) अस्तमानीं, त्याणें आपलें मोठें दरबार भरवून जयाचा नजरा घेतल्या. मग दुसरे दिवशीं मोंगलाचें लश्कर त्या खर्ड्याहून निघोन परिंड्याकडे जात असतां, उजवे बाजूस फार मोठें मराठ्यांचें लश्कर जमून आलेलें पाहिलें. तेव्हां त्या निजाम अल्लीनें तेथेंच आपला हत्ती उभा करून आधीं आपल्या लश्कराचें सर्व बुणगें डाव्ये बाजूस केलें मग आसनु ख्यान नामें आपल्या स्वारांचा सरदार याज बरोबर सत्रा हजार पलटनी लोक देउन मराठ्यांवर हल्ला करावयास नेमिला. ते वेळेस परशुराम भाउनें ही आपल्या लश्कराचा बंदोबस्त केला. तो प्रकार असा. पेशव्याचे व होळकराचे लोक आपल्या जवळ घेउन आपण त्या लश्कराचा मध्यभागीं उभा राहून, रघूजी भोंसल्याचें लश्कर उजवे बाजूस

करून

करून डावे बाजूस दवलतराव शिंदा लश्कर रुंद उभा केला. याप्रमाणें बंदोबस्त होउन आपण हरिपंत फडक्याचा पुत्र बाबूराव व तुकोजी होळकराचा पुत्र काशीराव, हे दोघे व कांहीं लोक बरोबर घेउन शत्रु कशा रीतीनें आपणावर चालून येतो तें पहावयास पुढें निघाला. तो थोडकासा दूर गेल्यावर मोंगलांच्या लश्करांतील एक पठाणांची टोळी त्या परशुराम भाऊवर पडली. त्यामध्यें उत्तर मुलखां बलुचिस्थानचा लालखान नामें मुख्य सरदार होता त्याणें मोठा पराक्रम करून आपल्या हातें बहुत शिपाई मारून, त्या परशुराम भाऊस ही जखमी करून घोड्यावरून खालीं पाडिला. तेसमयीं त्या भाऊचा ज्येष्ठ पुत्र हरिपंत पटवर्धन तो बापाची अशी अवस्था पाहून तात्काळ आडुन त्या लालखानावर फारस टून पडला आणि त्यास तेथेंच मारून टाकिला; परंतु त्यांचे पठाण होते ते तोमेलातरी लढतानां राहीनांत; आणि त्यांचे पुशीस कर्नोळचा नवाबाचा पुत्र, बइलिचपुरचा नवाबाचा पुत्र, हे दोघे येउन असे लढले कीं, तेवेळेस मराठ्यांची अव्यवस्था होउन, त्यांस मागें हटावें लागलें. तेव्हां ते आपल्या लश्करांत माघारे येउन पोंहचत तोंपर्यंत त्यांची अशी घालमेल झाली कीं, कांहीं कारणावांचून त्या लश्कराच्या मोठ्या भागाचे ही लोक हजारों भिउन उगीच पळूं लागले. तेसमयीं बाबूराव फडका याचे स्वाधीन जरीपटका होता; तो ही शत्रूस पाठ दाखवून पळावयास सिद्ध झाला. तें पाहून जीउबा बक्षी नामें दवलतराव शिंद्याचा मोठा सरदार तो आपला घोडा मोठ्या वेगानें पिटून त्या बाबूरावाजवळ गेला. आणि त्यास शिव्या देउन बोलिला कीं, अरे भितऱ्या तुला जर निर्भय जागा पाहिजे तर शिंद्याचा लश्कराचे पाठीमागें जाउन स्वस्थ रहा. तेव्हां तो बाबूराव मोठें धैर्य धरून तेथेंच राहिला.

इतक्यांत त्या दोहीं लश्करांतील पलटणें आपआपल्या गोळीच्या टप्यांत येउन पोंहचलीं तेव्हां मोंगलांकडील पलटणांचे पाठीवर स्वार बहुत बंदोबस्तानें येताहेतसें दिसलें; तेसमयीं रघूजी भोंसल्यानें त्यास्वारांवर बाणांची सरबत्ती केली. याशिवाय पेरण नामें फ्रेंच जातीचा कोणी शिंद्याच्या पलटनीलोकांचा मुख्य सरदार होता, त्याणें एका टेंकडीवर छत्तीस तोफा चढवून तेच क्षणीं त्या तोफांचा भडमार त्या स्वारांवर केला. तेव्हां त्यांस तें दानमार सोसेनातसें होउन ते मागें पळाले. तेव्हां निजामाचीं पलटणें आपल्या पुढीचे स्वार पळून गेले असें पहात असतां ही, ते लोक मागें न हटले; आणि त्यांहिं शिंद्याचा पलटनाशीं लढून कांहींसा जयही मिळविला; परंतु तेसमयीं तो निजाम अली खरड्याकडे जावयास मागें हटूं लागला; आणि त्या पलटनीलोकांस ही मागें फिरावया विषयीं वारंवार

निक

निकराचें निरोप पाठविना झाला, म्हणून त्यांस ही तें युद्ध टाकून मागें फिरणें प्राप्त झालें. नंतर तो निजाम मागें फिरल्याचें वर्तमान त्याचा सर्व लश्करास विदित होउन. तेसारेच लोक मागें हटले. इतक्यांत सूर्य मावळला त्यायोगें अंधार पडून त्या लश्कराची अशी अव्यवस्था झाली कीं, त्यांतील पलटनी लोक मात्र खेरीज करून बाकीचा लोकांस आपआपलीं ठिकाणें ही सांपडेनांत शीं झाली. मग फार रात्र होयी तोंपर्यंत त्या दोहीं लश्करांत आगोआग राहून राहून बंदुकांचे बार होत होते; शेवटीं त्या उभय पक्षी लोकांत एकमेकांस हाकामारमारून, इतस्ततः धांवतां धावतां ते लोक फार श्रमी होउन आगोआग जेथें जेथें पडले तेथें तेथें निजून राहिले. नंतर बहुतेक रात्र गेल्यावर सर्वत्र स्थिरता झाली. तेव्हां मराठ्यांचे दहा बारा स्वार आपल्या घोड्यांस पाणी पाजावयाकरितां जलस्थान शोधीत दैवगतीनें मोंगलाचा लश्कराची एक टोळी पडली होती तेथेंच पोंहचले. त्यांस पहातांच त्या मोंगलाचा लोकानीं शत्रु आला असें जाणून बंदुकांचे बार केले; तेवेळेस त्यांचे पलटनी लोक ही त्यांपासून जवळच होते. त्यांचा पहारेकऱ्यांहीं तो आवाज ऐकून आपण ही बार केले. तेणेंकरून ते पलटनी लोक निजले होते ते एकाएकी घाबरे होउन उठले, आणि त्यापाशीं बंदुका भरलेल्या होत्या त्यांचा भडमार उगाच विचार न करितां मोठ्या त्वरेनें वारंवार करिते झाले. तो मोठा शब्द ऐकून मोंगलाचे सर्व लोक जागृत होउन, हें काय होतें नें मनास न आणितां घाबरे होउन बहुतेक पळाले. मग पूर्व दिवशीं संध्याकाळीं जी गर्दी झाली होती, त्यापेक्षां ही मोठी गर्दी होउन त्या सर्व लश्कराची अव्यवस्था झाली. आणि त्या पलटनाची ही तारंबळ होउन, ते लोक कित्येक पळाले. इतक्यांत चंद्रोदय झाला, ते समयीं तो निजाम अली आपल्या लश्कराची अव्यवस्था पाहून फार भयभीत होत्साता, जाउन खरड्याचा लहानशा किल्ल्याचें आंत शिरून आश्रय करून राहिला. ते समयीं त्याचा रक्षणार्थ त्याबरोबर धावले लोक त्याचा लश्कराचा दशांश त्या किल्ल्याचा सभोंवते राहिले, आणि बर्कंड सर्व आपलें बुणगें लुटून आपल्या शक्तिप्रमाणें दूर पळून गेले. हें वर्तमान मराठ्यांचे पेंढारी लोक यांस कळतांच ते त्यांमागून धावून त्यांहीं नेलेली ती सर्व लूट पाडवून आणिते झाले.

मग सूर्योदयानंतर मराठे लोक पुढें चालतांना त्यांस मोंगलाचा लश्कराचा नळावर आगोआग तोफा वगैरे नानाविध युद्धसाहित्य पडलेलें पाहून मोठा चमत्कार वाटला. आणि ते त्या खरड्याचा किल्ल्याजवळ

गेले

गेले. तेव्हां निजाम अल्ली त्या किल्ल्यांत आपणास कोंडून घेउन राहिला. आणि त्याचे लक्ष फौजेंतील दशांश लोक मात्र त्या किल्ल्यास भोंवते आहेत असें पाहून ते फारच हर्ष पावले. हें हर्षाचें वर्तमान मराठ्यांच्या लश्करी टोळ्या जा मागें होत्या त्यांस लवकर समजून, ते लोकही मोंगलांस लुटायाकरितां मोठ्या त्वरेनें आले, आणि त्या किल्ल्यास भोंवते जे लोक यांस घेरा घातला. मग दुसरे दिवशीं आगोआग मोर्चे उभे करून, त्या मोंगलांच्या लोकांवर तोफांचा मार करून, तो किल्ला घ्यावयाचा उद्योग चालविला. तेव्हां तो मार निजाम अल्लीनें दोन दिवस सहन करून तिसरे दिवशीं (मार्चाचे पंधराव्ये तारिखेस) त्याणें आंतून सांगून पाठविलें कीं, आतां मारूं नका; इतःपर तुमचा व आमचा तह असावा. मग मराठे तें मान्य करून त्या निजामास ह्मणाले कीं, जो तुमचा मशीर उल्मुलुख नामें मुख्य वजीर, जो नानाची निंदा दरबारांत करून फार अमर्याद बोलिला, त्याचा सूड उगवावयास आधीं तो आमचे स्वाधीन करावा, आणि जो मुलुख सदाशीवराव भाउनें सन सत्राशें साठांत घेतला होता तो तुह्मास पुनः दिला तो सर्व आह्मांस द्यावा. व तुमच्या मुलुखाची मर्यादा परिंड्यापासून तापीपर्यंत आहे. त्यांत आमचा कांहीं भाग होउन त्यांतच दवलताबाद किल्ला आह्मास असावा. याशिवाय तीन कोटी रुपये आमचे तुह्माकडे बाकी आहेत ते आह्मास द्यावे, व आजपर्यंत सेनाखर्च झाला तो तुह्मीं द्यावा. याखेरीज आमचा रघोजी भोंसला याचा गंगथडीमध्यें घासदाण्याबद्दल बाकी ऐवज राहिला आहे तो एकुण तीस लक्ष रुपये द्यावे. आणि याणें पुनः गंगथडींत घासदाणा न मागावा याकरितां त्यास तीन लक्ष अठरा हजार रुपये वर्षास उत्पन्न होतसा मुलुख द्यावा. आणि वराडांत जो तुमचा भाग आहे त्याचा वसूल पहिल्याचाली प्रमाणें तुह्मी घेत जावा.

असें त्या मराठ्यांचें मागणें त्या निजामास कठीण वाटलें नाहीं. परंतु तो वजीर मात्र त्यांचे स्वाधीन करावयाचें अवघड पडलें. अशा संकटसमयीं तो मशीरउल्मुलुख त्या निजामास बोलिला कीं, यांत हांत मराठ्यांहीं बहुत मागीतलें नाहीं, आणि मला ही देण्याविषयीं आपण श्रमी होउं नये. मीं त्यास राजी आहें. तेव्हां निजामानें दोन शें मराठे त्या वजीरास न्यावयाकरितां आले होते त्यांच्या स्वाधीन तो मशीर उल्मुलुख यास केला. तेव्हां त्या मराठ्यांहीं त्यास आपल्यात [illegible] नेला. ते समयीं पेशवा मोठ्या समारंभानें आपल्या तळावरून उठून पुढें

जाउन

आडुन भेटला. नंतर मराठे आपल्या लक्करांत मोठ्या आनंदें करून उत्साह करिते झाले कीं, आज आम्ही मोठा जय संपादिला.

त्या मशीरउल्मुलुखाची व पेशव्याची भेट झाली ते समयीं पेशव्यानें मुख्य स्थान झालें. तें पाहून मग त्या उत्साहसमयीं नानानें श्रीमंतांस विचारिलें कीं, आपणास त्याचे भेटीसमयीं श्रम होण्याचें कारण काय; त्यावर पेशव्यानें उत्तर केलें कीं, मोंगलांहीं मित्रपणें आपली एवढी अमर्यादा करून घेतली, आणि आमचे लोक यत्नांवांचून जय पावले असतां आपणास आपणच विजयी असें मानितात. तस्मात् हे समयीं उभयपक्षीं पुरुष अप्रयोजक पाहून, मासें मन फार विव्हळ झालें. हें पेशव्याचें उत्तर परम योग्य पडलें कां कीं, त्या प्रसंगीं उभयपक्षीं लक्षलक्षसंख्येवर सैन्यें असतां केवळ युद्ध करूनच, दोन्हीं लक्करें मिळून दोनशें ही मनुष्य पडले असें नाहीं. याशिवाय रात्रीस घाबरेपणानें अव्यवस्था होउन, खर्ड्याकिल्यास त्यांहीं घेरा घालून मोरचे बांधून तोफा चालविल्या त्यायोगें ही मोगल फार मेले गेले ते तरी युद्ध करून पडले असें म्हणतां येतनाहीं.

याप्रमाणें खरड्याची लढाई झाली असतां, मराठी शिलेदार लोक त्यांत होते ते त्या दिवसापासून ती गोष्ट निघाल्यास आम्हीं त्या प्रसंगीं केवढा मान पावलों; त्या युद्धासारिखें यशस्वी युद्धच नाहीं, अशी प्रशंसा अद्यापि करताहेत.

नंतर पेशवा पुण्यास आला आणि नानाफडनवीस त्यानें संपादिले त्या मुलखाची व्यवस्था करावयास गुंतला. परशुराम भाउ पटवर्धन व रघोजी भोसले हे पुण्याबाहेर डेरे देउन राहिले; होळकर जेजोरीस उतरला, शिंदा आमगांवापाशीं राहिला; असें असतां पुण्यास वर्तमान आलें कीं निजामअल्लीचा पुत्र अलीजाह, तो हैदराबाद सोडून बाहेर जाउन आपल्या बापाचें स्थान आपण घ्यावयासाठीं मोठें बंड करून राहिला आहे; हें वर्तमान ऐकून होळकर व शिंदे पुण्यास आले. त्यावरून त्यावेळेचे मुसलमान लोक बोलत कीं, हे सर्व मराठे त्या बंडास अनुकूळ आहेत, परंतु याचा काहीं ताळा पडत नाहीं. तो अलीजाह यास निजामाच्या पलटनीं सरदार पाठीस लागून धरून हैदराबादेस त्यास घेउन जात होता, तेव्हां तो आपल्या वडिलाचे समूर जावयाचे लाजेस्तव वाटेंतच विष खाउन मृत्यु पावला.

यानंतर दवलतराव हिंदुस्थानांत गेला, परशुरामभाउ नासगांवास गेला, होळकर पुण्यांत होता, आणि रघोजी भोसला दवलतराव गेल्यावर एक

महिना

महिना पुण्यास राहून मग त्याला नर्मदेचे दक्षिणेकडे कितिएक मुलुखाच्या सनदा पेशव्यानें देउन तो मोठा संमान पावून अक्टोबर महिन्यांत तो तेथून आपले मुलुखीं जावयास निघाला. इतके दिवस नानानें जें जें कार्य केलें तें तें सिद्धीस गेलें; आणि तो आपल्या पराक्रमाची परम सीमा पावला, कां कीं त्यास दवलतराव शिंदा आदिकरून सर्व सरदार लोक वश होते. त्या योगें असें दिसूं लागलें कीं जसें माधवराव पेशव्याचे वेळेस मराठ्यांचें राज्य योग्यतेस चढलें होतें, तसें आतांही चढेल; परंतु त्या नानास आपली सर्वत्र आज्ञा कुंठित न झाली पाहिजे, अशी फार आवड होती; आणि दुसरा कोणी आपणास प्रतिस्पर्धी होईल असें भय ही वाटे. त्यामुळें शेवटीं त्याचा सर्व पराक्रम नष्ट होउन त्याच दुःखानें पुढें तो मरण पावला.

सन सत्राशें पंचाण्णवांपासून
नव्याण्णव पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग अठ्ठाविसावा.

अनुक्रमणिका.

नाना फडनवीस माधवराव नारायण पेशवा यास कोणत्या प्रकारें बंदोबस्तानें वागवीत होता तें व साताऱ्याचा राजा व रघुनाथरावाचें कुटुंब यांस कशा बंदोबस्तांत रक्षिलें तें प्रकरण.

रघुनाथरावाचा औरस पुत्र बाजीराव वडील त्याचे गुण व स्वरूप यांचें वर्णन.

त्या बाजीरावाविषयीं नानानें फार मत्सर केला तो पर्याय.

माधवराव नारायण पेशवा व बाजीराव रघुनाथ हे दोघे नानाच्या बंदोबस्तांत होते यास्तव ते सम दुःखी होउन त्या उभयतांची मैत्री झाली.

तें नानास विदित होउन त्याणें त्या उभयतांचा विशेष बंदोबस्त केला.

तें माधवरावास सहन न होतां त्याणें माडीवरून उडी टाकिली, आणि मृत्यु पावला.

नानानें बाजीराव गादीचा अधिकारी न व्हावा म्हणून यत्न केला तो प्रकार.

बाजिरावानें

बाजीरावानें बाळोबा नान्या व शिंदा यांस आपल्या पक्षाचे करून नानाची मसलत मोडावी असें केलें तें समजून नाना आपणच बाजीरावाला गादीवर बसवावयास उद्युक्त झाला.

तेव्हां बाळोबा नान्यानें बाजीरावाला शिंद्याच्या बंदींत ठेवून चिमणाजी आपास गादीवर बसवून परशुराम भाउ पटवर्धन तो मुख्य कारभारी केला.

त्या कारभारी मंडळीनें नानास मुख्य कारभारी करितों असें मिष करून त्यास दगा करावयाची मसलत केली तें कृत्य नानास विदित होउन तो सावध झाला त्यांत तो नाना आणि बाजीराव यांचें एकच कार्य पडलें.

सरजेराव घाडगा व बाळोजी कुंजर हे नानाचा उपयोगी कसे पडले तें प्रकरण.

नंतर बाजीरावास गादीचा धणी करावयाकरितां त्या नानानें शिंदा अनुकूळ केला.

तीगोष्ट सिद्धीस गेली नाहीं तोंच बाळोबा नान्यास विदित होउन त्यानें बाजीरावास हिंदुस्थानांत पाठवावयाचें योजिलें. तें अमलांत न येण्यासाठीं बाजीरावानें काहीं युक्ति केली तो प्रकार.

नानानें शिंद्याचे द्वारें बाळोबा नान्यास कैद केला.

परशुराम भाउ पुण्याहून पळाला तेसमयीं त्याचे पाठीस लोक लागले त्यांहीं त्यास धरिला.

बाजीरावास पेशवे पदवी प्राप्त झाली.

नंतर चिमणाजी आपा यास काहीं प्रायश्चित्त देउन तो गुजराथचा अधिकारी केला तो प्रकार.

नानानें करार केल्याप्रमाणें शिंदा व रघोजी भोसला यांस तें तें प्राप्त केलें.

परंतु निजामास कबूल केल्याप्रमाणें बाजीराव देईना म्हणून मशीरउल्मुलुख फार रुष्ट होउन तेथून निघोन गेला.

तुकोजी होळकर याच्या मृत्युनंतर त्याचा पुत्रांत गादीविषयीं वाद पडला.

मल्हारराव होळकर युद्ध करून मृत्यु पावला.

काशीराव होळकर यास शिंद्याचे द्वारें आपाच्या सर्व अधिकार प्राप्त झाला.

नाना व शिंदा या दोघांस दूर करावयाविषयीं बाजीराव यत्न करूं ला
गला.

गेला.

त्यांत शिंद्याच्या हातून नानास कैद करून तो नाना व त्याचे पक्षपाती लोक यांचीं घरें लुटावयाची आज्ञा दिली त्यायोगें सर्व शहरांत दंगा झाला.

त्यानंतर बाजीराव पेशवा याचा मुख्य कारभारी अमृतराव झाला.

सखाराम घाटगा यानें आपली कन्या शिंद्यास दिली आणि त्याचा मुख्यत्वें कारभार आपण करूं लागला.

तो सर्जेराव घाटगा व बाळोजी कुंजर हे दोघे बाजीरावाच्या अनुकूलतेनें पुण्यांतील कित्येक मोठमोठ्या गृहस्थांस अत्यंत पीडा करून त्यांपासून पैका घेते झाले.

अमृतरावानें शिंद्यास धरावयाची मसलत केली त्यास बाजीरावाची अनुकूलता होउन शेवटीं त्या बाजीरावाच्या भित्रेपणामुळें सिद्धीस गेली नाहीं.

नानानें त्याचें काम परशुरामभाऊ पटवर्धनास सांगून त्यायोगें तो बंदींतून मुक्त झाला.

भाग अठ्ठाविसावा.

सवाई माधवराव पेशव्यास नाना फडनवीसानें त्याच्या लहानपणापासून आपल्या हातीं फार बेतानें ठेविला होता. तो एकवीस वर्षांचा मोठा झाला तरी त्याचा बंदोबस्तांत किमपि न्यून पडूं दिलें नाहीं. आणि त्यासमयीं जे कोणी कांहीं राज्यकारणी बंदीस पडले होते, त्यांस मात्सर्य करून फार जपूं लागला. तो प्रकार असा. साताऱ्याचा राजा बंदींत होता त्याच्या खर्चास नेमणूक केलेली होती. ती कमी केली; आणि त्याचे भाऊबंद सोयरे धायरे यांस त्यांची भेट न होई असें केलें.

रघुनाथराव यांचें स्त्रीपुत्रादि कुटुंब कोंपरगांवास, सन सत्राशें ब्याण्णवपर्यंत होतें; मग ती रघुनाथरावाची स्त्री आनंदीबाई तीच्या प्रकृतीस कांहीं आजार झाला म्हणून, तिला तिच्या परिवारासहवर्तमान, नाशिका जवळ आनंदवल्लीस नेउन ठेविली. ती, तेथें सन सत्राशें ब्याण्णवांच्या एप्रिल महिन्यांत मृत्यु पावली; नंतर निजाम अल्लीच्या युद्धप्रकार उत्पन्न होईतोंपर्यंत, तिचा परिवार तेथेंच होता; मग कांहीं बंड न व्हावें यासाठीं त्यास शिवनेरीच्या किल्ल्यांत नेऊन ठेविला. त्यांत अमृतराव नामें रघुनाथरावाचा दत्तपुत्र व दोघे औरसपुत्र त्यांत वडील बाजीराव धाकटा चिमणाजीआपा. हे तिघे होते.

ते. मग तें निजाम अल्लीशीं व मराठ्यांशी युद्ध होऊन तो गवगवा उरकल्यावरही त्यांस मोकळे न सोडितां रघोपंत गोडबोले व बळवंतराव नागनाथ हे दोघे आपले कारकून त्यांजवळ ठेवून, पहिल्यापेक्षां विशेष बंदोबस्त केला.

ते तिघेही रूपेंकरून उत्तम आणि तरुण व सुस्वभावाचे होते; त्यांस नानाफडनवीस असा उपद्रव देत असे कीं, तें पाहून तो बहुत लोकांचे मनांतून उतरला; कांकीं त्यांपासून किमपि उपद्रव न होतां त्यांस अति बंदोबस्तांत ठेवणें हा त्या नानाचा क्रूरपणा स्पष्ट दिसून आला. या खेरीज जे लोक पहिले रघुनाथरावाच्या पक्षाचे होते ते याचें असें आचरण पाहून या नानाची निंदा करीत. आणि ते तिघे रघुनाथरावाचे पुत्र यांची प्रशंसा करीत; या प्रमाणें त्या गृहस्त मंडळीची वृत्ती जाणून तो नानाफडनवीस आपल्या वृद्धदशेमुळें अधीरपणें त्यांचा बंदोबस्त अधिकच करूं लागला. त्यांत रघुनाथरावाचा औरसपुत्र थोरला बाजीराव, याविषयीं तर भयेंकरून फार मात्सर्य करूं लागला.

बाजीराव तारुण्येंकरून युक्त, आणि त्याची अवयवसंस्था फार निटस, व मुखश्री तर अशी दिव्य कीं, ज्याचें तोंड पहातांच माणसाचें मन त्याकडे लागावें. आणि त्याचा बोलण्यांत असा कांहीं रस कीं, तें भाषण ऐकून मनुष्यानें मोहित व्हावें. ते वेळ त्याच्या वयास एकोणीस वर्षे होतीं; आणि तो घोड्यावर बसणें व तलवार धरणें व तीरंदाजी करणें या कामांत परम कुशल असून, त्यासारिखा भालाखेळणार सार्‍या गंगथडींत दुसरा कोणी नव्हता. याशिवाय तो शास्त्रनिपुण असून, याज्ञिक कर्मांतही फार उत्तम होता. तो माधवराव नारायण पेशवा याचा चुलत चुलता त्याची प्रशंसा ऐकून माधवराव पेशवा बहुत संतुष्ट होऊन त्याला मुक्त करून त्यास भेटावयाविषयीं फार इच्छित असे. म्हणून त्याविषयीं माधवरावानें नानाफडनवीसाजवळ कधीं ती गोष्ट काढिली असतां तो आपल्या अतिसावधपणानें पेशव्यास समजावी कीं, तो कितीजरी चांगला असला तरी तुमचा शत्रू असें समजा; त्याचा बाप रघुनाथराव व आनंदीबाई त्याची माता हें स्मरण धरून असावें. असें अनेक प्रकारें नाना पेशव्यास समजावीत असतां तें सर्व व्यर्थ गेलें. कांकीं, तो जों जों त्यास विपरीत समजावी तों तों त्यास बाजीरावाच्या भेटीची इच्छा अधीकच उत्पन्न होई; परंतु त्या पेशव्यानें कांहीं एखादी गोष्ट आपले मनें केली तर तें वर्तमान आपणास कळविणारे नानानें आपले चाकर गुप्तपणें त्याजवळ ठेविले होते. आणि बाजीराव तर त्याचे बंदींत असे. त्यामुळें परस्परें त्या दोघांची मैत्री साधेना. असें असतांही आपणावर पेशवा प्रीति करितो, हें वर्तमान ऐकून त्या बाजीरावानें आपणाजवळ नानाफडनवी

सानें

त्यानें ठेविलेला कारकून बळवंतराव नागनाथ याम आपलासा करून त्याचे मुखानें माधवराव पेशव्यास निरोप पाठविला कीं, सांप्रत मी शिवनेरी किल्ला येथें नानाचे बंदींत आहें, आणि आपण आसनाधिष्ठित असून, त्याचा बंदोबस्तामुळें हल्लीं मजसारिखेच आहांत. ऐशीयास याचा बंदोबस्त देहापुरताच आहे, मनाचा बंदोबस्त याच्या हातीं नाहीं. त्यास तुमचा व आमचा स्नेह मात्र असावा. इतक्यानें जसे आपले उभयतांचे वडील पूर्वी नामांकित झाले तसेच आपणही समयविशेषीं होऊं. त्यावरून पुढें त्या दोघांमध्यें त्या बळवंतराव नागनाथाचे द्वारें एकमेकांचीं पत्रें एकमेकांस पोहोंचूं लागलीं. तें वर्तमान कांहीं अवकाशें करून नानास कळतांच, त्यास असा राग आला कीं, तो पाहून लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. त्या नानानें प्रथम बळवंतराव नागनाथ याचा पायांत बिडी घालून किल्यावर टाकिला, आणि बाजीरावाभोंवता पहिल्यापेक्षां विशेष बंदोबस्त ठेवून माधवराव पेशवा याची बहुत निर्भर्त्सना केली.

तो माधवराव पेशवा नानाफडनवीसाचा सूत्रानें वागण्यास आधींच कंटाळला होता; आणि त्याचा मित्र बाजीराव यास अधीक उपद्रव झालेला ऐकिल्यानें फार कष्टी होउन, त्याणें आपली बसायाची खोली सोडून बाहेर जाणें अगदीं टाकिलें; व कधीं दरबारासही येईना, त्यावरून लोकांत असें प्रसिद्ध झालें कीं, श्रीमंतांस ज्वर येतो म्हणून ते दरबारास येत नाहींत. त्या वर्षी (सन सत्राशें पंचाण्णवांत) दसरा अकटोबराचे बेविसाव्ये तारिखेस पडला; त्याचा समारंभ फार चांगला केला होता, ते दिवशीं माधवराव पेशवा सीमोल्लंघनास बाहेर निघोन संध्याकाळीं त्याणें आपल्या रीतीप्रमाणें सर्व मानकरी लोकांच्या भेटी घेतल्या; ते समयीं तो कोणासही अजारी सारिखा नाहीं, परंतु त्याचें मन सर्वांशें उदास झालें होतें. इतक्यानेंच त्याणें मगवयाकरितां त्याचे शरीरीं कांहीं विकार नसून एकाएकी पंचविसाव्ये तारिखेस माडीवरून खालीं कारंजावर उडी टाकिली. तेव्हां त्याचे हातपाय मोडून त्या कारंजाच्या नळाची जखम त्याचे अंगास फार लागून तो तिसरे दिवशीं मृत्यु पावला. त्याणें मरते समयीं फार आग्रह करून सांगीतलें कीं, माझे पाठीमागें गादीवर बाजीरावाची स्थापना करा. असें बोलून मग त्याचा परममित्र हरिपंत फडक्याचा पुत्र बाबूराव फडका याणें त्यास धरून बसविल्या असतां तो त्याच्या अंगावर टेंकलेला मृत्यु पावला.

हें माधवरावाचें मरण नानाफडनवीस ऐकून फार कष्टी झाला. परंतु न भ्याला; त्याचें कारण असें तो पूर्णपणें समजला होता कीं, याचा मरणें

करून

करून आपल्या मोठेपणास धका आहे म्हणून तो आपल्याच दुःखांत गुंतला. त्याणें प्रथम असा उपाय केला कीं, माधवरावानें फार आग्रहें करून सांगीतलें कीं, बाजीरावास गादीचा धणी करा. तें गुमराग्वें लागला कीं, बाजीराव यास स्थापिला असतां केवळ आपल्या मोठेपणासच हानी होईल असें नाहीं; कदाचित प्राणासही धका पोंहचेल. हें भय मानून त्याणें माधवराव पेशव्याचा उडीचें वर्तमान ऐकतांच परशुरामभाउ पटवर्धन यास सांगून पाठविलें कीं, हे वेळेस तुह्मा जवळ जितकी फौज असेल तितकी व दुसरी लवकर मिळेल तितकी घेउन त्वरित पुण्यास या. नंतर पेशव्याचा मृत्यूचे दुसरे दिवशीं रघूजी भोसला व दवलतराव शिंदा यांस नाना फडनवीसानें पुण्यास माघारें बोलाविलें कीं, आतां धणी कोण करावा तो विचार करावयास लवकर या. ते वेळेस तुकोजी होळकर पुण्यासच होता. त्यास नानानें बहुत गोष्टी सांगीतल्या कीं. पहिल्यापासून रघुनाथराव याणें इंग्लीशांशीं संबंध ठेविला तसाच हल्लीं बाजीराव धणी झाला असतां जर इंग्लीशांशीं स्नेह करील तर फार नाश होईल. इतकें त्यास समजावून शिंदा व भोंसला यांचें मन आपणाकडे लावून घेतलें, आणि आपला मतलब त्यांस सांगीतला कीं, यशोदाबाई माधवरावाची स्त्री तीजरी लहान आहे तरी तीचा मांडीवर दत्तक बसवून त्याचा नावानें राज्य यथास्थित चालवावें. हें ऐकून सर्व मराठे सरदार मान्य झाले; त्यांत बाळोबा तात्या नामें शिंद्याचा मोठा कारभारी होता तो मात्र प्रतिकूळ बोलिला. तेव्हां जीउबा बक्षी नामें शिंद्याचा मोठा दुसरा सरदार होता तो बोलिला कीं, आपला धणी शिंदा तो तरुण आहे यास्तव त्याचें सांगणें उपयोगी नाहीं. बरकड जे भोंसले वगैरे पुरातन मोठे मोठे सरदार आहेत ते सांगतील तें योग्य. नंतर सत्रा शें शाहाण्णवांचा जानेवारींत नानाचा मसलतीप्रमाणें त्या सर्व सरदारांची मान्यता होउन त्या पत्रावर शिका झाला. नंतर ते सारे सरदार आप आपल्या ठिकाणास जाउन कारभार चालविते झाले.

त्यापुढें तो दत्तक शोधून आणून स्थापावा एवढेंमात्र राहिलें, परंतु हें सारें वर्तमान बाजीरावास कळलें होतें आणि तो बाळोबा तात्याही आपल्यापक्षाचा आहे असें समजून त्याजकडे कागदपत्राची वहिवाट करून थोडक्याच महिन्यांत तो वश केला. त्याच समारें जीउबा बक्षी याचे शरीरीं समाधान नाहींसें होउन, तो केवळ आसन्नमरण झाला असतां, त्याणें दवलतराव शिंद्यास जवळ बोलावून आपल्या पलंगावर बसवून घेउन बोलिला कीं, बाळाजी विश्वनाथाचा प्रत्यक्ष वंश असतां मीं दत्तक घेण्याविषयीं अनुमोदन दिलें हें मला मोठें खेदास्पद झालें. असें त्याचें भाष

ण

ण झाल्यानंतर तो जीउबाबर्क्षी मृत्यु पावला. हें वर्तमान बाजीरावयास समजतांच तो हें आपणास हितावह आहे असें जाणून, त्याणें दवलतराव शिंद्याकडे बोलणें लाविलें. तेव्हां असें ठरलें कीं, बाजीरायानें चार लक्षांच्या मुलुख शिंद्यास द्यावा; आणि शिंद्यानें बाजीरावास आसनावर स्थापावयाकरितां, जो सेनाखर्च लागेल तो ही बाजीरायानें द्यावा; ह्मणजे त्यास पेशवे पदवी प्राप्त होईल. हें वर्तमान तात्काळ नानाला कळलें तेव्हां तो फार भिउन त्याणें परशुराम भाउ पटवर्धन, नासगावांस होता त्यास आपल्याजवळ मोठ्या त्वरेनें बोलाविला. तो आपलें स्वार जमा करून घेउन, नासगांव सोडिल्यापासून, दोन दिवसांत पुण्यास येउन पोंहचला, मग त्याचें व नानाचें बोलणें झालें तेव्हां असें ठरलें कीं, शिंदा जें करणार तें आह्मीं प्रथम करावें हें उत्तम. त्यानंतर परशुराम भाउ शिवनेरी किल्ल्यास जाउन ती गोष्ट बाजीरावास त्याणें विदित केली. तेव्हां त्या बाजीरावाचा भाउ अमृतराव तो बाजीरावास ह्मणे कीं, हें काम शिंद्याच्या हातून होउं द्यावें; याची त्वरा करूं नये. तेव्हां त्या परशुराम भाउनें बाजीरावास अनेक प्रकारें अगत्याच्या गोष्टी सांगून शेवटीं त्यास विश्वासार्थ गायीचें शेंपूट हातांत धरून शपथ दिली. तेव्हां तो बाजीराव आपला धाकटा भाउ चिमाजी आपा यासुद्धां त्या किल्ल्यावरून उतरून पुण्यास गेला, आणि त्याचा वडील भाउ अमृतराव तो तेथेंच राहिला.

मग बाजीराव व नाना फडनवीस यांची भेट होउन परस्परें नेम ठरला कीं, यापूर्वीं उभयपक्षीं जा अनुचित गोष्टी झाल्या असतील, त्या कोणीच मनांत आणू नये. असें झाल्यावर त्यांचा बेत ठरला कीं, बाजीरावानें राज्य नानानें मुख्यत्वें करून चालवावें. याप्रमाणें करारपत्र ही झालें. ही झालेली गोष्ट बाळोबा तात्यास कळल्यावर त्याला मोठा राग येउन त्याणें मनांत निश्चय धरिला कीं, नानाची मसलत अगदीं पाडून टाकीन. तो अर्थ सिद्धीस न्यावयाकरितां त्याणें आपला धणी शिंदा त्यावेळेस गोदावरीचे कांठीं होता, तो वश करून त्याचें सैन्य पुण्यावर चालतें केलें.

नाना फडनवीस मसलती विषयीं स्फट होता. परंतु आंगधटाई विषयीं तो तादृश नव्हता. शिंद्याचें लश्कर आपल्या लश्करापेक्षां प्रबळ. आणि बाजीरावाचाही विश्वास येत नाहीं; व आपण जर बाळोबाच्या हातीं सांपडलों तर प्राणासही भय आहे, असें समजून तो नाना बाजीरावास परशुराम भाउच्या स्वाधीन करून आपण तेथून निघोन पुरंदरावरून साताऱ्यास गेला. बाळोबा तात्या व बाजीराव यांची पुण्यांत भेट झाली. तेव्हेंस हे दोघे परमस्नेही आहेत असें दाखविलें असतां, बाजीरावानें अविश्वास आचरण ज्या

बाळोबा

बाळोबा तात्याचा स्मरणांत आहे, सें लोकांस भासलें. नंतर तो बाळोबा तात्या आपल्या मनांत बहुत विचार करून ठरविता झाला कीं, बाजीराव धणी न करावा; जो आपल्या विचारास येईल तो धणी करून नाना फडनवीस यांचेशिवाय कारभारी ही दुसराच करावा. मग त्याणें परशुराम भाऊस कळविलें कीं, माधवरावाची स्त्री तीचे मांडीवर चिमणाजी आपा यास बसवून, बाजीराव बंदींत ठेवून, सर्व कारभार तुह्मी संभाळावा; अशी माझी मसलत आहे, त्यास तुमचा विचारांत कसें येतें. तेवेळेस परशुराम भाऊ, नाना आंगधटायीपणांत कमी सा जाणून, त्याची कांहींशी अवगणना करित असे; तथापि तो नाना फार शाहणा ह्मणून त्याचा विचार ध्यानास आणिल्यावांचून त्याणें त्यास उत्तर न दिलें. नानाची मसलत झाली कीं, या गोष्टीस अनुमोदन द्यावें; परंतु बाजीराव आपल्या बंदींत ठेवावा. नंतर त्याप्रमाणें ठरलें. मग बाळोबानें त्या नानास दर्शविलें कीं, तुमची व आमची मैत्री असावी, त्याप्रमाणें नानाही मान्य झाला.

बाजीराव आपल्या बंदींत असावा ही परम हितकारक नानानें दिलेली मसलत, परशुराम भाऊला उपयोगी नाहींशी वाटून, तो उत्तर देते समयीं त्याविषयीं कांहींच न बोलिला; त्यावरून बाजीराव शिंद्याचे स्वाधीन राहिला. हें वर्तमान नानाला, वाईहून पुण्यास जावयास सिद्ध होते समयीं समजलें; तेव्हां तात्काळ त्याचे ध्यानांत आलें कीं, हें सर्व कृत्य मला दगा करावयाचें आहे, त्यास हे समयीं पुण्यास जाउं नये. मग तो नाना वाईस राहून, त्याणें अगोधरच साताऱ्याचा राजापासून, नव्या पेशव्याचीं वस्त्रें आपल्या जवळ घेउन ठेविलीं होतीं, तीं पुण्यास पाठवून दिलीं.

त्यावेळेस परशुराम भाऊ व शिंदा आपला घात करितील असें बाजीरावाचे मनांत न आलें; असें असतां तें वर्तमान कोणे प्रकारें त्यास कळलें, तें समजलें पाहिजे, कां कि, ते वेळेस पुण्याचे दरबारची गती कशी होती, ती त्यावरून समजेल; आणि त्यापुढें हीं चाल तशीच पडत आली, तें ध्यानांत येईल.

प्रथम शिंद्यानें बाजीराव आपल्या लष्करांत यावा ह्मणून अशी युक्ति केली कीं, त्यास गादीचा धणी करावयाचा कामाबद्दल कांहीं खर्च लागल्याचें निमित्त करून, त्यास पैका मागीतला. तेव्हां तो बाजीराव बोलला कि, आह्मास देववत नाहीं. त्यावर शिंदा आग्रहाचें बोलणें करित असतां, कांहीं संवाद होतां होतां शिंद्यानें दर्शविलें कीं, बाजीरावाचा करार रद्द करून आपलें मन दुखावलें, ह्मणोन त्यास निरोप पाठविला कीं, मी माघारा हिंदुस्थानात जातों, त्यास कृपा करून मला आज्ञा झाली पाहिजे. त्यावरून,

बाजीराव

बाजीराव शिंद्याच्या कल्पनेप्रमाणेंच तात्काळ त्याच्या लष्करांत जाउन त्याशीं एकांत करूं लागला. तेव्हां शिंद्यानें अस्तमान होईतोंपर्यंत, युक्तीनें त्या गोष्टी लांबविल्या. इतक्यांत एकाएकीं असें वर्तमान आलें कीं, परशुरामभाउ चिमणाजी आपास घेउन पळाला परंतु त्यास कोठें नेला तो कळत नाहीं. इतकेंमात्र त्याला मानात्यास तेला अशी शहरांत यदेता आहे. तेव्हां बाजीराव अत्यंत भययुक्त होत्साता, शिंद्यास म्हणूं लागला कीं, तूं पाठीमागून जाउन त्यास धरून आण. त्यावर त्याणें उत्तर दिलें कीं, तो कोठें गेला तें कळत नाहीं. तेव्हां रात्रीचें धावणें हा उपयोगी नाहीं; असें त्याचें बोलणें एकून बाजीराव बोलिला कीं, असें आहे त्यास मी आजची रात्र एथेंच रहातों. असें एकतांच शिंद्यानें तें अवश्य मानून त्यास ठेवून घेतला, मग दुसरे दिवशीं शिंद्याचे लोक त्या बाजीरावास म्हणूं लागले कीं, आपण येथेंच स्वस्थ रहावें. एथून दुसरे जागीं जातां, नाश आहे. त्यावरून तो समजला कीं, घात झाला.

चिमणाजी आपाला परशुरामभाउ व बाबूराव फडके याणीं पळविला खरा. परंतु त्यास पुण्यांतच लपविला. नंतर त्याला सांगूं लागले कीं, तुला आह्मीं गादीचा अधिकारी करितों तेव्हां तो आपल्या भावाखेरीज आपण धणी होईना. शेवटीं बळेंच त्याला पेशवा करून चिमणाजी माधवराव असें त्याचें नाव ठेविलें. ही गोष्ट सन १७९६ शाण्णवाच्या मेमहिन्याचे सव्हिसाव्ये तारिखेस घडली. दुसरे दिवशीं परशुरामभाउनें नानास सांगितलें कीं, तुह्मीं पुण्यास येउन बाळोबा तात्याचा स्नेह होत अंतर पडलें आहे. तें नीट करून मुलुखाचे कामावर रहावें; आह्मी लष्कराचें काम संभाळितों. त्यावर नानानें परशुरामभाउस उत्तर लिहिलें कीं, कांहीं बोलणें व्हावयाचें आहे त्यास तुमचा पुत्र हरिपंत यास आधीं पाठवून द्यावा त्याप्रमाणें हरिपंतही आला, परंतु केवळ वकीलासारिखा न आला; त्याजबरोबर चारपांच हजार निवडक स्वार होते. आणि तेसमयीं बाबूराव फडके यांचें नानास गुप्त पत्र आलें कीं, आपण क्षणमात्र विलंब न करितां, आपल्या रक्षणाचा उपाय करावा. त्यावरून त्याणें वाई सोडून प्रतापगड कि त्यामध्यें शिबंदी नवी वाढवून कोंकणांत, महाडास गेला. तेथें रायगडाची बंदोबस्ती फार चांगली केली.

बाळोबा तात्याच्या मनांत होतें कीं तात्काळ नानास धरावा यास्तव आपला धणी शिंदा याचे पदरचे लोक त्या कामास नेमणार होता. परंतु नानाच्या पक्षाचे कोणी लोक होते ते परशुरामभाउशीं कांहीं बोलून त्याचे मतें करून

परशुराम भाउ हा बोलिला कीं, बलात्काराचा उपाय हे समर्थी न करावा; परंतु परशुराम भाउ त्या नानास प्रतिकूळ नव्हता, असें न समजावें कां कीं. थोडके दिवस झाल्यानंतर त्याणें नानाच्या जहागिरीचा मुलुख होता तो शिंद्यास दिला. आणि त्याचा वाडा पुण्यांत होता तेथें राहून जें त्यानें द्रव्य सांपडलें त्याचा व्यय करूं लागला.

त्या समर्थी नानाचें द्रव्य अपार आहे, अशी लोकांत अवाई होती; व कोणी ह्मणत कीं, पेशव्यांचा बहुतां पिढ्यांचें द्रव्य जमलेलें होतें, तें सर्व नाना बरोबर घेउन गेला. त्यांत नानानें द्रव्य बहुत नेलें हें खरें, परंतु तें पेशव्याचें नसेल; कांकीं. सवाई माधवराव पेशवा होय तोपर्यंत. पेशवे कर्जभरू होते. त्याणें त्या नेलेल्या द्रव्याच्या बंदोबस्त कोणेप्रकारें केला व कोण कोणत्या सावकारांकडे ठेविलें. त्याचा अद्यापि ठिकाण नाहीं, ह्मणून सर्व मराठे लोक आश्चर्य करितात.

परशुराम भाउ पुण्यांत पेशव्याचा कारभारी झाला ते समर्थी शिंद्यास लष्करी खर्चाचा फार तोटा पडला होता, ह्मणून परशुराम भाउनें त्यास वचन दिलें कीं. मीं पुष्कळ द्रव्य उत्पन्न करून देतों. यास्तव तो परशुराम भाउ महशीर उल् मुलुखास बोलिला कीं, तुमच्या धण्याकडे आमचें सरकारी रुपये तीन कोटी येणें आहेत, त्यापैकीं त्यापासून यावेळेस कांहीं अंश देविल्यावर. तुह्मांस त्याकडे जावयाची मुक्तता केली जाईल; त्यावर त्या महशीर उल् मुलुखानें उत्तर दिलें कीं, मीं या कामाचा उद्योग यथाशक्ती करीन. असें त्याचें वचन झाल्यावर तो पुण्यांजवळ डेरा देउन रहावयाची आज्ञा पावला. नंतर थोडक्याच वेळानें त्याचा तळावर पुष्कळ लोक घेउन, तो तेथें मोठ्या समारंभानें राहिला.

या प्रकारें पुण्याच्या दरबारांत कारभारी मंडळ नवें झाल्यानें, बाजीराव व नाना फडनवीस यांचा परस्परें स्नेह वृद्धिंगत होउं लागला. मग ते एकमेकास कागदपत्रें पाठवूं लागले. त्या कामांत कोणी शूद्र बाळोजी कुंजर नामें शिलेदार मध्यस्थ होता; तो महाडास जाउन नानास बाजीरावाच्या हिताविषयीं आग्रहानें कित्येक गोष्टी सांगता झाला, त्यायोगें नानाचें मन पहिलें बाजीरावाकडे होतें, तें अधिकच झालें. मग त्या नानानें कांहीं युक्ती करून पेशव्याची खासगी फौज बाबूराव फडक्या याचे स्वाधीन होती, ती त्या फडक्यास कह्यांत वश केली, आणि तुकोजी होळकर ही आपल्या सर्व लोकांसह वश होउन. त्या नानाचा खुणेची मात वाट पहात होता. यानंतर त्या नानानें रायाजी पाटील नामें कोणी शूद्र बाळोबा तात्या

चा

त्याचा द्वेषी होता, त्याचे द्वारें शिंद्याशीं बाजीरावाच्या कार्यार्थ योजणें केलें. तो प्रकार असा. नानानें शिंद्यास निरोप पाठविला कीं, जर तुम्ही बाळोबा तात्यास बंदींत घालून बाजीरावास गादीवर बसवाल तर, तुम्हास हिंदुस्थानांत जाते समयीं, परशुराम भाउंची सर्व जहागीर व आमेदनगर किल्ला व दहा लक्ष रुपये वर्षास उत्पन्न होतसा मुलुख देऊं.

याशिवाय नानानें तें कार्य सिद्धीस न्यावयाकरितां आणीक एक मसलत योजिली, तो प्रकार असा. सखाराम घाडगा नामें कोणी शूद्र कागलकराचा वंशज होता. तो मोठा चतुर आणि उमेदवार असे; यामुळें रायाजी पाटलाची त्यावर प्रीति बसली; आणि शिंदाही त्यास प्रसन्न होता, कांकीं, त्याची कन्या अतिसुंदर असे ती आपली स्त्री करावयाविषयीं दवलतराव शिंदा इच्छित असे. यास्तव नानानें तो सखाराम घाडगा वश करून शिंदा अनुकूळ आपणास व्हावयाविषयीं तेंही प्रकरण आपल्या अर्थसाधनास उपयोगीं केलें.

असे सहाय करून नानानें तो शिंदा वश केला, हें वर्तमान बाबूराव फडके वगैरे जे नानाचे पक्षपाती होते त्यांस कळलें. तें त्यांनां तादृश गुप्त रक्षितां न आलें त्यामुळें बाळोबा तात्यास तो सर्व वृत्तांत विदित होउन त्याणें तात्काळ बाबूराव फडक्यास बंदींत घातला, आणि नीलकंठराव परभू व मानाजी घोरपडे यांस धरावयाकरितां लोक पाठविले, परंतु ते अगोधरच सावध होउन त्यांहीं बाजीरावाच्या कार्याकरितां लोक ठेविले होते, त्यांसहीत त्या धरणारांशीं लढून वायांकडे निघोन गेले. तेथें मानाजी फांकडा होता, तो त्यांचा कुमकेस देउन, नानानें त्यांस कांहीं द्रव्य देउन, साळश्याच्या घाटास पाठविले. तेथें नानाचा कोणी इष्ट, बजाबा शिरवळकर होता त्याची त्यास कुमक होउन, दहा हजार फौज जमा झाली. मग त्यांहीं आपण बाजीरावाचे पक्षी असें प्रसिद्ध केलें.

नानानें एवढें लांबलांब पल्ले बांधलेले, पुण्यांत बाळोबा तात्यास कळले नाहींत त्यास हें दहा हजार फौजेचें मात्र बाजीरावाचें कृत्य मेसें वाटलें. त्यावरून त्या बाळोबा तात्यानें कल्पना केली कीं, बाजीरावास जर हिंदुस्थानांत पाठविला म्हणजे त्याची मसलत मोडेल. असें मनांत ठरवून त्याणें सखाराम घाडगा यास कांहीं फौजेसहीत बाजीरावाबरोबर देउन हिंदुस्थानाकडे रवाना केला. तो नर्मदा नदीचे कांठीं जाई तोंपर्यंत बाजीरावानें तो घाडगा वश केला; तेव्हां त्याणें निश्चित सांगितलें कीं तुमचें हिंदुस्थानांत जाणें च न होतां शिंद्यानें तुम्हांस गादीवर बसवावें या कार्यासाठीं मी आपली कन्या [illegible]

शिं

शिंद्यास देउन, आणीकही यथाशक्ति उद्योग करीन; परंतु हें काम झालें असतां, कागलगांव मला इनाम करून द्यावें आणि शिंद्याचा कारभार मुख्यत्वें मासें स्वाधीन असावा; याशिवाय सद्यः दोन कोटि रुपये शिंद्यास देउं केले पाहिजेत. इतक्या ही गोष्टी बाजीरावानें मान्य केल्या नंतर आपल्ये शरीर प्रकृतीस बरें नाहीं असें निमित्त करून त्या प्रवरातीरींच मुक्काम केला.

इतकें होई तोंपर्यंत नानानें आपल्या नव्या नव्या मसलती परम दक्षतेनें चालविल्या होत्या, तो प्रकार असा. मशीर उल् मुलुखाचे द्वारें नानानें गुप्तपणें निजामअल्ली वश केला; तसाच रघूजी भोंसल्याही कांहीं बोलणें करून अनुकूळ करून घेतला; आणि परशुरामभाउच्या मुलुख लुटावयाविषयीं कोल्हापुरकरांस बुद्धि दिली.

असें असतां पुण्यांत वर्तमान होतें कीं, साळप्यांचा घाटाजवळ बाजीरावाची दहा हजार फौज जमा झाली आहे, ते बंड मोडावयाचें मिष करून, परशुरामभाउची आज्ञा घेउन, मशीर उल्मुलुख नानाच्या हितार्थ फौज जमा करूं लागला.

याप्रमाणेंच तेवेळेस शिंदा व होळकर ही बाळोबातात्या व परशुरामभाउ यांस ठकवावयाचे मसलतीनें, ते बंड मोडावयाचेंच मिष करून कांहीं लोक साळप्यांकडे पाठवून कांहीं नाना फडनविसास धरावयाचें निमित्त करून रायगडाकडे योजिले. मग ती बाजीरावाची गोष्ट नानाच्या पक्षपात्यांनी कांहीं इंग्लीशांस कळविली असतां तेही मान्य झाले. याप्रमाणें सर्वसिद्धता होउन, अक्टोंबराचे सत्ताविसाव्ये तारिखेस शिंद्यानें बाळोबातात्यास कैद केला. आणि मशीर उल्मुलुखाची व आपली फौज एकत्र करून परशुरामभाउ पटवर्धनास धरावयाकरितां पाठविली. तेव्हां तो परशुरामभाउ सावध होउन बरोबर चिमणाजी आपास घेउन कांहीं लोकांनिशीं शिवनेरी किल्ल्यास गेला, परंतु त्याचे पाठीस लोक लागले होते त्यांस तो थोडक्या दिवसांत सांपडला. त्याला आनंदराव रास्त्याचा स्वाधीन ठेविला.

इतक्यांत बाजीरावास भीमेच्या कांठीं कोरेगावीं आणिला, आणि अमृतराव व बापूराव फडके हे दोघे कैदेंत होते ते मुक्त केले. ते समयीं नाना फडनविस साळप्याच्या लष्करांत मिळून पुण्यास जात होता, त्यास वाटेंत कांहीं बाजीरावाकडून लिहिलें आलें; त्यावरून त्यास कांहीं भीति उत्पन्न होउन तो तेथेंच राहून, त्याणें बाजीरावास लिहिलें कीं, जर तुमचें मला अभय असेल तर मीं येथून पुढें पुण्यास येईन, नाहींतर असाच जाईन. त्यावरून बाजीरावानें त्या नानाला अभय देउन आज्ञा दिली कीं तुमच्या मरजीस

आलें

आलें तर त्याकरितां करावी नाहींतर न करावी. ते समयीं शिंदा व निजाम अल्ली यामध्येंही बाजीरावास आसनावर बसवावयाचा बेत होउन, मुख्य कारभारी नाना असावा असें ठरलें; नंतर नानाफडनवीस पुण्यास आउन नवेंबराचे पंचविसाव्ये तारिखेस पुनः आपलें काम करूं लागला. त्यापुढें दिसेंबराचे सत्ताविसाव्ये तारिखेस सातार्‍याहून वस्त्रें येउन गादीवर बाजीरावाची स्थापना झाली. ते समयीं सभेमध्यें मोठेमोठे पंडीत बसवून त्यांकडून ठरविलें कीं, माधवराव नारायण मृत्यु पावला, आणि रघुनाथरावाचे पुत्र आहेत, असें असतां केवळ भाउबंदकीसंबंधें माधवरावाचे स्त्रीनें दत्तक घ्यावा हें अशास्त्र, म्हणून होणार नाहीं. आणि चिमणाजी आपा याचा वडील भाउ असतां याला बलात्कारें गादीवर बसविला, तें ही अयोग्य कर्म झालें. याजकरितां त्यास कांहीं प्रायश्चित्त पाहिजे. असें म्हणून त्याला कांहीं हलकेंसें प्रायश्चित्त देऊन तो गुजराथचा अधिकारी केला; परंतु तो तिकडे न जातां नांवमात्र त्याचें केलें आणि आबा शेलूकर नामें त्याकामावर कारभारी पाठविला.

नानाफडनवीस आपलें कार्य पुनः चालवूं लागला तेव्हां त्यानें आपल्या साहाय्यास त्रिंबकराव परशुराम यास घेतला; आणि नारोपंत चक्रदेव यास सेनेचें काम सांगीतलें. शिंद्यास आमेदनगर किल्ला देउं केला होता त्याप्रमाणें त्याचा स्वाधीन करून, परशुरामभाउ पटवर्धन याची जहागीर द्यावी लागेल तशी घ्यावी म्हणून आज्ञा देवविली. रघूजी भोंसला ही नानानें कबूल केल्याप्रमाणें सर्व पावून सन् सत्याण्णवाचा जुलई महिन्यांत नागपुरास गेला; परंतु नानानें निजाम अल्लीशीं तह केला होता त्याप्रमाणें बाजीराव एकेना. त्यावरून मशीर उल्मुलख्यास राग येउन पेशव्यांची आज्ञा न घेतां हैदराबादेस रुसून गेला. त्यामुळें नानाफडनवीसानें मोठ्या यत्नें करून संपूर्ण बंदोबस्ताविषयीं मसलत केली होती तींत अंतर पडलें, असें समजलें. त्यानंतर निजामाचे दरबारीं पेशव्यांचा कोणी वकील नव्हता. गोविंदराव पिंगळा मात्र पुण्यास होता. परंतु त्याचा कारभारी सदाशिव माणकेश्वर नामें तेथें आकबरनवीशीचें काम करून राहिला असे. तो मशीर उल्मुलुख्याचें वैमनस्य नीट करण्याविषयीं उपयोगी केला.

बाजीरावास नंतर त्या बंदोबस्ताचा न्यूनतेकरून अवघड वाटलें. कांकि, त्याचा मनांत नानाचें तेज कमी पडावें असें होतें; आणि ते समयीं (आगस्त महिन्याचे पंधराव्ये तारिखेस) तुकोजी होळकर मृत्यु पावला. तेंही बाजीरावाच्या मनोदयानुरूप झालें, तो प्रकार असा. तुकोजी निवर्तला ते समयीं त्याचे दोघे औरस पुत्र काशीराव व मल्हारराव. आणि

दोघे

दोघे दासीपुत्र यशवंतराव व विठोजी, असेच वधे. त्यांत काशीराव तो बुद्धीनें आणि शरीरें करून अप्रयोजक होता. मल्हारराव शूर आणि सुज्ञ असे. मग थोडक्याच दिवसांत त्या दाघा भावामध्यें कलह उत्पन्न होउन ते दोघे दासीपुत्र मल्हाररावाचे पक्षपाती झाले. नंतर मल्हारराव याणें आपल्या बापाचा तळ सोडून पुण्याजवळ भांबवडें गांव आहे तेथें थोडक्याशा लोकानिशीं जाउन राहिला. त्यास गुप्तपणें नाना अनुकूळ होता. काशीराव आपल्या भावास जिंकावयाकरितां शिंद्यास शरण जाउन कुमक मागूं लागला. तो शिंदा तर त्या गोष्टीची वाटच पहात होता, त्यास हें समजतांच मोठ्या हर्षानें तो मल्हारराव होळकर यास धरावयाकरितां फौज देता झाला. तेव्हां मल्हारराव होळकर आपल्या भावाचे स्वाधीन न होतां युद्ध करून मृत्यु पावला. तेव्हां यशवंतराव व विठोजी हे दोघे राहिले त्यांत यशवंतराव नागपुरास गेला आणि विठोजी तो कोल्हापुरास गेला. ते वेळेस मल्हाररावाचे लोक बहुतेक त्या युद्धांत मृत्यु पावले. त्यांत एक लोणीकर रविराव शिंदा नामें मोठा शूर होता त्याचा मृत्यूनें वर्तमान त्याचा स्त्रीचे कानीं पडतांच तीउभी होती तशीच पडून प्राण सोडिती झाली.

शिंद्यानें काशीराव होळकरासारिख्या अप्रयोजकास हातीं धरल्यामुळें होळकराचें कूळ यास शिंद्याचा हाताखालीं वागावें लागलें. तेणेंकरून नानास होळकराचें बळ होतें तें शिंद्यास जाउन नानाचे योग्यतेचा समूळ नाश झाला, आणि शिंदा पुण्याचा कारभारांत शिरून स्वतंत्रपणें धण्यासारिखा वागूं लागला. तेव्हां काहीं वेळां त्याणें असा जुलुम केला कीं, त्यापूर्वीं पेशव्याचे दरबारीं कधींही तसे घडलें नाहीं. त्यांत कुलाबकर मानाजी आंगऱ्या यास बंदींत घालून कुलाबा किल्ला बलात्कारें घेउन बाबूराव आंगऱ्या नामें कोणी आपला आप्त यास दिला इतकें झालें तरी बाजीरावास त्संबंधी दूषण लागलें नाहीं. कां कीं, त्यावर पूर्वीपासून लोकांची प्रीति बसली होती.

बाजीराव तर आपल्या कार्यासाठीं शिंद्यास स्वतंत्रपणें वागावयाकरितां गुप्त अनुकूळ होता, परंतु त्याचा मनांत असें कीं, शिंदा व होळकर या दोघांतून एकासही न लागतां आपण निराळें असावें. दुसरें त्याचा मनांत होतें कीं, शिंदा कोणे एके समयीं आपल्या हिंदुस्थानांत जाईल तेव्हां सहज त्याचा उपद्रव नाहींसा होईल; परंतु नाना जवळचे जे रहाणारे तत्संबंधीं उपद्रवाचा आधीं बंदोबस्त केला पाहिजे. ही मनांतील गोष्ट बाजीरावानें अमृतराव आपला बंधू व गोविंदराव काळे आदिकरून स्वपक्षपाती मंडळीस विदित

केली

केली. परंतु त्याचा परम विश्वास घाटग्यावर होता, त्या घाटग्यानें बाजीरावाच्या कार्यासाठीं दौलतरावास आपली कन्या देऊं केली होती त्याचा नावास सर्जेराव असें पद जोडिलें होतें. त्यास बाजीरावानें समजाविलें कीं, तुम्हीं मुख्यत्वें शिंद्याचा कारभार करणार त्यास नाना अडथळा करितो. अशा युक्ती करून त्याशीं व नानाशीं द्वेष पाडिला. नंतर बाजीराव आणि तो घाटगा यांची मसलत झाली कीं, आधीं नानाला अवश्य बंदींत घातला पाहिजे. मग दिसेंबराचे एकतिसाव्ये तारिखेस नाना शिंद्यास परत भेट करावयाकरितां कांहींशा बंदोबस्तानें शिंद्याकडे गेला, तेव्हां तेथें शिंद्याचा पलटणी लोकांचा कोणी सरदार याणें नानास कैद केला; ते समयीं त्या बरोबर हजार स्वारें स्वारीचे लोक होते ते कित्येक मारून पिटून लावून दिले. त्या वेळेस नाना बरोबर आबा शेलूकर व बजाबा शिरवळकर व नारोपंत वैद्य वगैरे बंदींत सांपडले. तेच वेळेस तो सर्जेराव घाटग्या याणें आपले शिपाई नाना फडनवीस व त्याचे पक्षपाती गृहस्त यांचीं घरें लुटावयास पाठविले. ते समयीं जसा शत्रु एखाद्या किल्यास घेरा घालून फार लढून मग त्या किल्यांत शिरला म्हणजे मोठा अनर्थ करितो, तशी पुण्यांत गर्दी झाली, तो प्रकार असा. एकदांच चहूंकडे सर्व शहरांत नाकेबंदी होऊन लुटालूट होऊं लागली. आणि मोठा गलबला होऊन तोडातोडी ही कित्येक ठिकाणी झाली. तसेच एक रात्र दिवस बंदुकांचे बार होत राहिले; ते समयीं शहरचे लोक आपआपले दरवाजे लावून माडीवर चढून खिडक्यांतून बंदुकांचे बार करून त्या लुटारू लोकांशीं लढत होते; आणि कोणास बाहेर पडणें तर दहा वीस जमून ढाल तरवार हातीं घेऊन बाहेर पडत. अशी ते वेळीं पुण्यांत धामधूम झाली.

जे समयीं शिंद्याचा तळावर नाना धरला गेला, ते वेळेस बाजीरावानें नानाचे पक्षपाती जे कारभारी यांस कांहीं कामाच्या निमित्तें बोलाऊन बंदीस घातले; त्यांत मुख्य बाबूराव फडके व आबा बळवंत व नारोपंत चक्रदेव व नारो नीलकंठ मजीमदार व गोविंदराव पिंगळे इतके होते, शिंद्यानें नाना फडनवीसास बंदींत घातला तो आमेदनगरच्या किल्यास पाठविला. नंतर बाजीरावानें आपला भाऊ अमृतराव तो मुख्य कारभारी करून गोविंदराव काळे व शिवराम नारायण थत्ते, हे दोघे त्याचे सहाय केले; आणि बाळाजी पंत पटवर्धन तो लष्करी कामांत केवळ अनभिज्ञ असें असतां ही सर्जेराव च त्याला लष्कराचा मुखत्यार केला. याप्रमाणें बाजीरावानें आपल्या मनें नानाला अगदीं नष्ट केला सा जाणून मग शिंद्यास आपणापासून दूर करावयाची योजना आरंभिली, तेव्हां त्याचा मनांत आलें कीं, शिंदा येथें दंगा या

शीं

शीं जो पहिला करार केला आहे त्याप्रमाणें दिल्यावांचून हे दूर जाणार नाहींत; परंतु सांप्रत तदनुसार वागावयाची शक्ती नाहीं त्यास सावकाशपणें तें काम करितां करितां कांहीं युक्तीनें तो उद्योग सिद्धीस न्यावा, असें मनांत आणिलें.

शिंद्यानें घाडग्याची कन्या (सन् सत्राशें अठ्याण्णव यांचे मार्च महिन्यांत) वरिली, तो मोठा समारंभ केला. त्यास खर्च ही बहुत लागला आणि त्याचें लश्कर पुण्यांत होतें त्यास दरमहा वीस लक्षांवर खर्च लागत असे; त्यामुळें खर्चास तोटा पडून थोडक्याच दिवसांत शिंद्याजवळ द्रव्याविषयीं फार अडचण पडली. तेव्हां त्याणें बाजीरावास पहिलें घाडग्यानें गुप्त कबूल केलेले दोन कोटी रुपये मोठ्या निकडीनें मागूं लागला. तेव्हां बाजीरावानें त्यास उत्तर केलें कीं, सांप्रत आह्मास एवढी शक्ती नाहीं, परंतु तुह्मी जर घाडग्यास आपला मुख्य कारभारी कराल तर तो आणि बाळोजी कुंजर मिळून माहितगारीनें पुण्यांतील द्रव्य उत्पन्न करून तुह्मास देतील. त्यास शिंद्यानें ही अनुमोदन दिलें नंतर घाडग्यानें बाजीरावाचे वाड्यांत जे नानाचे पक्षी बंदींत घातले होते ते बाहेर काढून त्यांस द्रव्यासाठीं मारूं लागले; नंतर मोठमोठे पुण्यांतील गावकार व कोणी द्रव्यवंत गृहस्थांस धरून नानाप्रकारें दुःख देते झाले. त्यास त्यांहीं द्रव्य ही देउन कित्येक त्या दुःखानें मृत्यु पावले त्यांत गंगाधरपंत भानू नामें कोणी नानाचा भाउबंद होता त्यास तापविलेल्या तोफेवर बांधिला ते समयीं तो तत्काळच मृत्यु पावला. याप्रमाणें सरजेराव घाडगा आपल्या जांवायाचा दिवाण होउन लोकांस नानाप्रकारें दुःख देता झाला, आणि बाजीराव ही त्यास अनुकूळ असून आपली प्रजा फार कष्टविता झाला.

तो सरजेराव घाडगा एवढा दुष्टपणा करील सें बाजीरावाचे कल्पनेंत आलें नसेल परंतु त्या अनर्थास कारण तो बाजीरावच झाला. मग त्या सर्जेरावाचा क्रूरपणाविषयीं बाजीराव शिंद्याजवळ त्याचा उपद्रवाची मनाई करित असतां, शिंदा तें कांहीं ऐकेना; त्यास वाटलें कीं, बाजीराव केवळ लौकिकार्थ दांभिकपणें बोलतो.

अमृतराव यास बाजीरावानें पूर्वीं शिंद्याशीं गुप्त बोलणें करून दोन कोटी रुपये त्यास देउं केले होते व पुढें लोकांस मारून पैका द्यावयाची मसलत आली, तें किमपि ठाऊक नव्हतें; ह्मणून तो सर्जेराव घाडग्याविषयीं फार क्रुद्ध झाला आणि त्याणें असें पाहिलें कीं, सर्व प्रजा शिंद्यास कंटाळली त्यावरून तो बाजीरावाजवळ बोलिला कीं, एकाएकीं शिंद्यास धरून कैद करावा; त्या गोष्टीस ही बाजीराव अनुकूळ होउन तो अर्थ

सिद्धी

सिद्दीस त्याबयाविषयीं संधी पाहूं लागला. असें असतां अमृतरावयाणें आबाका ळेनामें कोणी पेशव्यांच्या पलटनी लोकांचा सरदार यास सांगितलें कीं, शिंदा आमचे भेटीस आला असतां आम्ही तुला कांहीं खूण करूं, तेवेळेस तुम्हीं गर्दी करून शिंदा धरून कैद करावा. मग बाजीराव पेशवा याणें कांहीं कामासाठीं अवश्य यावें म्हणून शिंद्यास आज्ञापत्र पाठविली. मग तो आल्यावर त्यास बाजीराव बोलिला कीं, तुमच्या आचरणाचा शोध करावयाविषयीं तुम्हास बोलाविलें. इतकें म्हणून एकाएकीं धनीपणाचा नात्यानें डोळे वटारून शिंद्यास स्पष्ट विचारिता झाला कीं, या राज्याचा धणी मी किंवा तूं, तें सांग. तेव्हां शिंदा बाजीरायाचें असें भाषण ऐकून अत्यंत विस्मित होत्साता, नम्रतेनें उत्तर करिता झाला कीं, मी पेशव्यांचा चाकर पेशवा आज्ञा करील त्याप्रमाणें वागणुकेंत अंतर करणार नाहीं. त्यावर बाजीराव बोलिला कीं तूं माझा रयतेस व चाकर लोकांस केवढी पीडा केलीस. आणि माझा शहरांत व माझा वाड्यांत माझा अती अनादर केलास, यापुढें मला हें सहन होणार नाहीं तूं यावेळेस एथून निघोन जांबगावास जा. त्यावरही दवलतरावानें शांतपणें उत्तर दिलें कीं, मी तुमच्या आज्ञेप्रमाणेंच वागावयास इच्छितों परंतु मला माझा फौजेचें देणें फार झालें आहे त्यामुळें माझें एथून जाणें कसें होईल. मला तुम्हांस गादीवर बसवावयाकरितां बहुत खर्च लागून मी लोकांचा ऋणी झालों तें द्रव्य मला द्या म्हणजे हे वेळेस मी पुणें सोडून जातों. असें त्या शिंद्याचें उत्तर होतांच अमृतरावानें भावास खुणेनें विचारिलें कीं, मी आतां आबा काळ्यास खूण करूं कीं काय. तेव्हां बाजीराव भित्रेपणानें त्यास खूण कर असें म्हणेना. हें त्याचें स्वाभाविक अधीरपण त्याचा पक्षपाती लोकांस प्रथम समजून आलें; यापुढें त्याचा तो दुर्गुण बहुतवेळा प्रसिद्धीस आला. मग शिंदा त्यापासून उठोन दिमण्यांत केवळ गरीबपणानें आपल्या ठिकाणीं गेला परंतु त्याचा मनांत बाजीरावाचा अविश्वास आणि राग भरला होता.

यावरूनच बाजीरायाचा केवढा अप्रयोजकपणा होता तो विदित होतो. परंतु त्यानंतरही कोणे एके वेळेस बाजीरावाची व शिंद्याची गांठ पडली. तेव्हां अमृतरावानें शिंद्यास धरून कायकाय करावयाची मसलत केली होती. ती संपूर्ण बाजीरावानें शिंद्यास कळवून, यापुढें तुम्हीं सावध रहा असें समजाविलें

त्यावेळेस शिंद्यास लष्कराच्या खर्चाचें असें संकट पडलें होतें तसेंच पेशव्यास हात पडलें; असें असतां साताऱ्यास कांहीं कामानिमित्त लष्करास जातों आस आलें परंतु ते अपुरा थकल्यामुळें ते सरदार पुणें सोडीनात. त्या

होतां

योगें पुण्यांत मोठी धामधूम झाली ती निवारण बाळाजीपंत पटवर्धनास करतां येईना. ते समयीं बाळोजी कुंजर तो पेशव्याचा मर्जींतला म्हणून फार गर्वास चढून त्यास वाटलें कीं, आपण या गोष्टीचा बंदोबस्त सहज करूं यास्तव तो शिपाई लोकांत जाऊन कांहीं अमर्याद बोलूं लागला. तेव्हां त्यांहीं त्याचा उपहास करून त्याची अनेक प्रकारें अमर्यादा करून शेवटीं त्याच्या पागोट्यावर धबल मारून पागोटें रस्त्यांत पाडून शिपाई लोक लाथालाथानीं तें एकमेकांच्या अंगावर उडवूं लागले.

अशी पुण्यांत धुराई झाली ते समयीं गोविंदराव पिंगळा बंदींत असतां, त्याणें बाजीरावास निरोप पाठविला कीं, या वेळेस जर नारोपंत चक्रदेव यास मुक्त केला तर हा सर्व बंदोबस्त होईल; नाहीं तर फारच अनर्थ पडेल. ती गोष्ट बाजीरावाच्या मनास येऊन त्याणें नारोपंत चक्रदेव यास मुक्त करून गोविंदरावासही सोडिला. तो नारोपंत चक्रदेव याची शिपाई लोकांत मोठी मान्यता होती त्याणें बंदींतून मुक्त होतांच एका दिवसांत संपूर्ण बंदोबस्त केला. परंतु तें लश्कर साताऱ्यास न गेलें कां कीं, नारोपंत चक्रदेवास बाजीरावाचा विश्वास वाटेना. यास्तव तो फौजेस आपल्यापासून दूर करावयास इच्छित नव्हता; आणि पुण्यांतही शिपाई लोकांची गरज होती. यामुळें लश्कराची साताऱ्यास योजना झाली. त्यावरून पुढें परशुराम भाऊ पटवर्धनाच्या सुटकेचाही योग घडला. तें प्रकरण असें. बाजीराव ज्या वेळेस गादीवर बसावयाचे योजनेंत होता त्या वेळेस त्याणें साताऱ्याचे राजाशीं मसलत केली कीं, नानाच्या ठेवणाईत तुम्हांजवळ बाबूराव कृष्ण आहे तो बंदीस घालून किल्ला आपले स्वाधीन ठेवावा आणि मला पुण्याचा गादीचा अधिकार प्राप्त झाला असतां मी पहिल्या बाजीरावाच्या प्रमाणें वागेन. तें तात्काळ मान्य करून राजानें तो बाबूराव कैद करून किल्ला आपले स्वाधीन राखिला. नंतर नाना फडनवीस भ्रष्ट झाल्यावर बाजीरावानें शिवराम नारायण थथे यास साताऱ्याचे राजाकडे किल्ला मागावयास पाठविला. तेव्हां राजानें उत्तर दिलें कीं, मीं किल्ला संभाळितों आणि पेशव्यानें आपल्या वचनाप्रमाणें वागावें; हें वर्तमान ऐकून बाजीराव आपल्या कृत्रिमाचा परिणाम नीट न झाला असें समजून भययुक्त होत्साता माधवराव रास्ता यास बोलिला कीं, साताऱ्याच्या राजापासून किल्ला माझे सत्तेंत येईसा करा. तेव्हां तो माधवराव साताऱ्यास गेला ते वेळेस राजा आपल्या सख्या सोयऱ्याच्या मसलतीनें रास्त्याची नम्रतायुक्त गोष्ट व धमकीची गोष्ट हीं मानीना. असें बाजीरावाचें आचरण शिंद्यास विदित होऊन तो समजला कीं, बाजीराव मजशींही कुटिल मार्गानें वागतो, म्हणून त्याणें साताऱ्याच्या राजास

गुप्त

गुलमसलत दिली कीं, तुह्मीं किल्ला देऊन का आह्मीं आपलीं पांचपन्नास तोफा सकट तुह्मांस पाठवून देऊं तुह्मीं आलगणाचा उपद्रवापासून मुक्त असावें हेंच योग्य. असें झाल्यावर तो राजा फौज ठेवूं लागला त्यास माधवराव रास्ता अडथळा करावयास उद्युक्त झाला असतां, राजाच्या लोकांहीं सातान्यांतून पिटून त्या माधवरावास मालगांवांपर्यंत घालविला. असें असतां त्या माधवरावाच्या भाउ आनंदराव रास्ता याचे स्वाधीन परशुरामभाउ पटवर्धन वाईस होता. त्याणें आनंदरावास सुचविलें कीं, मला जर आज्ञा होईल तर मीं लोक ठेवून सातान्याचे धामधुमीचा बंदोबस्त करीन. ती गोष्ट बाजीरावास कळवून त्याचे आज्ञेनें आनंदराव रास्ता व परशुरामभाउ या दोघांहीं वाईजवळ फौज जमा केली. इतकें होईतों सातान्याचा राजाचे लोक त्या शहरांत स्वस्थ राहिले होते कांकिं, ते समयीं पर्जन्य प्रबळ होता ह्मणून ते समजले कीं, या वेळेस वेणीनदी उतरून लश्कर येणार नाहीं; परंतु परशुरामभाउला एक उताराची जागा सांपडली तेव्हां तो कोणांस कळूं न देतां दहा हजार फौजेसहीत वेणी उतरून अकस्मात् सातान्याजवळ जाउन पोहोंचला. ते समयीं ते राजाचे लोक असे असावध होते कीं, त्यांहीं कोणी येईल ते वर्तमान कळावयास नाक्यानाक्यांनीं टोळ्या ठेविल्या नव्हत्या, मग ते परशुरामभाउचे लोक शहराजवळ भिडले असतां राजाची फौज ते वेळेस अडीच हजार सुमारें शहरांत होती, ते लोक पळूं लागले असतां राजाचा भाउ चतुरशिंग तो राजाच्या मसलतींत मुख्य होता, तो व त्याचे सोयरे धायरे एलोजीमोहिते व सेनाजीमोहिते वगैरे होते त्यांहीं त्या पळणारांची थोपाथोपी करून, परशुरामभाउच्या लश्कराचे तोंडावर गेले. इतक्यांत राजाला आपल्यामाणसांसुद्धां किल्यावर चढावयाकरितां अवसर सांपडला. इकडे जे लोक परशुरामभाउच्या तोंडावर गेले होते ते वेगें करून कांहींसे पुढें जाउन युद्ध करिते झाले, परंतु त्यांचा उपाय चालेना. त्यांतील एलोजीमोहिता ठार पडला, आणि कुशाबा राजा महारीक व दुर्गाजी राजा महारीक हे फार जखमी झाले; तेव्हां चतुरशिंगाच्या आज्ञेनें राजाचे लोक मागें फिरले तरी सेनाजीमोहिता शत्रूस पाठ दाखवीना, त्याणें चहूंकडे पाहून पाहून माधवराव रास्ता त्याचे दृष्टीस पडतांच त्यास भोंवते त्याचे लोक असतांही तो त्यावर एकटाच धांवला; तेव्हां त्या रास्त्याचा लोकांहीं त्याचे तोडतोडून तुकडे तुकडे केले.

यानंतर परशुरामभाउचे लोक सातान्यांत शिरून लुटालूट करूं लागले. तेव्हां चतुरशिंग आपल्या बरोबर कांहींसे लोक घेउन सातारा सोडू

न निघाला तेव्हां समर्यां परशुराम भाउचे कांहीं लोक त्याचे पाठीस लागले असतांही तो कोल्हापुरच्या राजास जाउन मिळाला.

इकडे राजाला मानाप्रमाणें वागवीत नाहीं, ह्याविषयीं राग येऊन तो राजाच्या अनुज्ञेवांचून स्वतंत्र झाला. याप्रमाणें तें कार्य सिद्धीस गेल्यावर परशुराम भाउचा आज्ञा झाली कीं, आतां कोणी सुद्धां अपराध धरूं नये; त्यावर परशुराम भाउनें उत्तर केलें कीं, ही गोष्ट मान्य होत नाहीं. कां कीं, या लोकांचें मला बहुत देणें झालें आहे; म्हणून विषयीं स्वामींनीं शंका धरूं नये. मी सरकारच्या विश्वासांचा चाकर आहें. त्यावरून बाजीरावानें त्यापासून दहा लक्ष रुपये गुन्हेगारी घेउन त्याच्या पहिल्या अन्यायांची क्षमा केली.

सन् सत्राशें अठ्याण्णवां पासून अठराशें पर्यंत
आलेलीं वर्तमानें मिळून
भाग एकोणतिसावा.

अनुक्रमणिका.

शिंद्याच्या बायांचें वर्तमान.

त्या बायांहीं दंगा उत्पन्न केला आणि अमृतरावाचे लष्करांत आश्रय पावल्या.

पेशवे व शिंदे यांचें वैमनस्य पडलें.

शिंद्यानें नानास मुक्त केलें.

नंतर शिंदा आणि पेशवा यांचें पुनः ऐक्य झालें.

सरजेराव घाडगा यास शिंद्याच्या आज्ञेनें प्रतिबंध झाला.

इंग्लीश व निजाम अली यांचा तह.

नाना फडनवीस व बाजीराव यांचा कांहीं गोष्टी.

बाजीरावाचें कुटिल वृत्त.

इंग्लीशांहीं श्रीरंगपट्टण घेतलें.

त्या मुलखाची वांटणी केली तें प्रकरण.

इंग्लीश आणि निजाम अली यांमध्यें नवा तह झाला.

बायांचें फार वाढलेलें बंड तें मोडावयास शिंद्यानें बाळोबा तात्यास बंदींतून मुक्त केला.

कोल्हापुरचें कांहीं वर्तमान.

चतुरसिंग राजा याणें युद्ध केलें तो प्रकार.

परशुराम भाऊ पटवर्धन युद्धांत पराजय पावोन मृत्यु पावला.

भाग एकोणतिसावा.

पुण्यामध्यें शिंद्याची दुर्दशा होत गेली तिच्या वृद्धीचें कारण असें उद्भवलें कीं, तें शिंद्याच्या कल्पनेंत आलें नव्हतें.

महादजी शिंदा मेला तेसमयीं त्याच्या तिघी स्त्रिया होत्या त्यांत धाकटी भागीरथीबाई ही रूपवती आणि तरुण असे.

पुढें दौलतराव शिंदा त्या गादीचा अधिकारी झाला तेव्हां त्याणें निश्चय केला

कीं मी या तिघी बायांचा मान चांगला रक्षीन; नंतर त्या दवलतरावानें त्या तिघींस आपल्या जवळ ठेवून त्यांचा खर्च चालविला परंतु त्या खर्चीचा नेम बांधिला नव्हता. त्यावरून थोडक्याच वेळानें असें झालें कीं, त्या बायांस कांहीं पदार्थाचें अगत्य पडलें असतां तो त्यानां प्राप्त न झाला. तेव्हां त्या बायांहीं तो बोभाट शिंद्यापर्यंत जाऊं न देतां. त्यांत वडील जी होती तिणें लोकांत असें प्रसिद्ध केलें कीं, हा दवलतराव शिंदा आह्मापेक्षां जी धाकटी बायी तिसीं बलात्कारें संग करूं इछितो आणि दुसरें सांगूं लागली कीं, जो असा मातृगामी तो उत्पन्न होण्यास शुद्धबीज नसतें. तेव्हां सरजेराव घाटग्यानें दवलतराव शिंद्याचा पक्ष स्वीकारून त्या बायांशीं बोलणें करावयास इछिलें, परंतु त्या बाया त्यास आपले जवळ येऊं देईनात. तेव्हां तो दुष्टबळेंच त्यांचा रावटींत शिरून त्या बायांस हातीं धरून बाहेर ओढून कोरड्यांचा मार देता झाला. या प्रकारें त्या बायांचा त्याणें अपमान केला.

त्या महादजी शिंद्याचा राज्यांत मुख्य कारभारी शेणवी होते ते व त्यांचे कित्येक सोयरे धायरे यांहीं त्या सरजेरावाची योग्यता वृद्धिंगत पाहून आधींच मत्सर आरंभिला होता; त्यावर त्याचें हें अनुचित कर्म पाहून त्या बायांचे पक्षपाती होऊन त्या सरजेरावाशीं बहून वादविवाद करून शेवटीं ठरविलें कीं, शिंद्यानें बायांच्या खर्चीचा बंदोबस्त त्यांचा माना प्रमाणें करून द्यावा, आणि बायींनीं एथून जाऊन ब्रह्माणपुरीं स्वस्थ असावें, या प्रमाणें नेम ठरून त्या बायांचे बरोबर काहींसे स्वार मनुष्यें देऊन सत्राशें अठ्याण्णवांचा में महिन्याचे चवदाव्ये तारिखेस त्या बायांस पुण्याहून शिंद्यानें रवाना केल्या, त्या भीमेचे कांठीं कोरेगांवीं पोंहचत तोंपर्यंत, पुण्यामध्यें त्या शेणवी मंडळीस वर्तमान कळलें कीं, शिंद्यानें एथून त्या बाया ब्रह्माणपुरीं पोंहचवावयाचें निमित्त करून काढिल्या त्या आमेदनगरचा किल्यांत बंदीस घालावयाकरितां नेल्या. तेव्हां त्यांहीं तात्काळ एक आपला पक्षपाती केलेला शिंद्याजवळ हिंदुस्थानी स्वारांचा सरदार मुजफिरखान नामें पठाण होता त्यास त्या बायांनां सोडवून आणावयाकरितां पाठविला. तो तेथें त्वरेनें जाऊन त्याणें त्या सोडवून पुण्याजवळ माघाऱ्या आणिल्या. नंतर त्या मुजफिरखानाचा पारिपत्याविषयीं सरजेरावानें शिंद्याजवळ फार आग्रह धरिला तेव्हां त्या घाडग्यास त्या पठाणावर जावयाची आज्ञा झाली, हें वर्तमान समजून त्याणें बाजीरावाचा भाऊ अमृतराव याचा तळ जुंनरचे वाटेस भीमेचे कांठीं होता तेथें त्या बायांस नेऊन मोठ्या बंदोबस्तांत ठेविल्या. ते समयीं तो घाडगा त्वरें त्या पठाणाचे पाठीस लागलेला होता. त्यावर तो पठाण माघारा उलटून त्याचा पराभव करून मोठ्या मानानें त्या बायांकडे पुनः गेला. त्या दिवसा पासून पुढें जून महिन्याचे सातवे तारिखे पर्यंत त्या बायांवर तो मुजफिरखान स्वस्थ तेथेंच होता, त्या रात्रीं अमृतरायाचा तळावर छा-

पा घालावया करितां शिंद्याचीं पांच पलटनें घेऊन गेली, परंतु ते लष्करी लोक सावध होऊन त्यांहीं त्या पलटनी लोकांस मागें फिरविलें.

त्यानंतर शिंदा याणें पुनः त्या शेणवी मंडळाशीं कबूल केलें कीं, त्या बायांच्या मर्जीस येईल तेथें त्यांहीं रहावें; मी त्यांचा माना प्रमाणें चालवितों; असें दुसऱ्यानें त्या बायांचें आणि शिंद्याचें ऐक्य झालें. तेव्हां तो शिंदा पुनः घात करील असें न जाणून अमृतराव त्या बायांस घेऊन लष्कर सुद्धां खडकीच्या पुला जवळ येऊन राहिला. तो कित्येक दिवस तेथें असतां त्यास शिंद्याचा पुरता भरवसा वाटल्यावर, जा दिवशीं त्या अमृतरावाचे लष्करी मुसल्मान लोक ताबूत पाण्यांत बुडवायास सिद्ध झाले. ते दिवशीं सरजेराव घाडगा तो शिंद्याचें व अमृतरावाचें लष्कर यांचा तंटा नव्हावा म्हणून त्यांचा बंदोबस्ताचा मिषें करून आपल्या बरोबर तोफा व पलटनी लोकांचे दोन बृगेद घेऊन त्या लष्करा जवळ नदीचे कांठीं जाऊन पोंहचला, तेव्हां अमृतरावाचे लष्करी लोक यांस त्या शिंद्याचें कृत्य किमपि विदीत नहोतां ते विश्वासें करून स्वस्थ राहिले असतां एकाएकीं त्या घाडग्यानें त्यांवर पंचवीस तोफांचा मार चालविला. नंतर पलटनी लोकही पुढें घालवून हल्ला करून त्यांची अगदीं उधळाउधळी होऊन त्यांचा नळ लुटला, त्यावेळेस त्या बाया अमृतरावाचें लष्कर सोडून अगोधरच विठलवाडी गावीं राहिल्या होत्या, त्यायोगें तें युद्ध बायांसंबंधें झालेंसें दिसलें नाहीं; पेशवे व शिंदे हे आपआपल्याच आस्थानें लढले असा अर्थ झाला. त्यादिवसापासून शिंदे व पेशवे यांचीं युद्धें निःसंशयपणें चालू झालीं. असें दिसण्यांत आलें. तेव्हां काशीराव होळकर अमृतराव यास मिळाला. आणि मोट मोठे मानकरीही त्या अमृतरावाच्या पक्षासच अनुसरले, नंतर पेशवे व निजाम यांचें ऐक्य झालें. असें असतां शिंदा यास मोठी भीति उत्पन्न होऊन त्यास वाटलें कीं, आतां कसेंही करून आपल्या हिंदुस्थानांत जावें, परंतु शिपायी लोकांचें देणें त्यास फार झालें होतें त्यामुळें पुण्याहून त्याचें निघणें होईना; म्हणून पेशव्याहीं जसा निजामाशीं स्नेह केला तसाच त्या शिंद्यानेंही बाजीरावास भय उत्पन्न व्हावया करितां टिपूशीं स्नेह करावा म्हणून वकील पाठविला. तें समजून बाजीरावानेंही त्या टिपूकडे आपला वकील पाठविला. नंतर दवलतरावानें बाजीरावास भय व्हावयासाठीं नानाफडनवीसास सोडावा, हेंच उत्तम असें जाणून नानाशीं बोलणें लाविलें, शेवटीं ठरलें कीं, दहा लक्ष रुपये नानानें दिले असतां त्याची मुक्तता होईल, तें मान्य करून नाना त्या आमेदनगराहून सुटून निघाला, ही गोष्ट बाजीरावास अनिष्ट तथापि अगोधरच त्यास समजलें होतें कीं, नानाफडनवीसास शिंदा सोडील.

तो नाना सुटतांच बाजीराव पेशवा याणें निजामाशीं तह केलेला टाकून

शिंद्यानीं

शिंद्यांशीं वकानाशीं तहाची बोलणीं आरंभलीं. त्यादिवसापासून बाजीराव व शिंदे यांचीमैत्री वाढूं लागली. त्यावृद्धीस एक कारण उपयोगीं पडलें तें असें. सर्जेराव घाडगा यानें फकीरजी गाढवे नामें कोणी एक सरदार अनुकूल करून प्रजेस अनेकप्रकारें उपद्रव देत होता. त्याचें निवारण शिंद्यास ही होईना. आणि तो घाडगा क्रूरपणा करितां करितां त्यास त्या दुष्कर्मांचा असा अभ्यास झाला कीं, त्याच्या निर्दयपणास अंत नाहीं. त्याणें कोणे एके वेळेस शिंद्याच्या लष्करचें चार सरदार धरून त्यांतील तिघे तथा यांचे पक्षपाती असें निमित्त करून त्यांस तोफांचे तोंडीं देऊन उडविले; आणि चवथ्याच्या डोकीवर मेख ठोकून मारिला. असा त्या सर्जेरावाचा निःसीम दुष्टपणा पाहून शिंदा त्यावर कोपला, आणि त्या घाडग्याला फकीरजी गाढव्यासहित बंदींत घालावयाची आज्ञा दिली. त्याप्रमाणें ते कैद केल्यावर शिंद्याशीं व बाजीरावाशीं स्नेह होण्यास पूर्वींचें तें एक द्वेष कारण नाहींसें झालें. यांखेरीज त्यावेळेस कलकत्त्याच्या मुख्याची बदली होऊन त्याचे जागीं लार्ड मिंटो नेमून आला; त्यास मारकीस वेलस्ली असें ह्मणत, त्या लाटानें पहिल्या इंग्लिशांच्या रीतींत कांहीं अंतर केलें, तें असें. त्यांची अशी धरसाल होती कीं, तादृश अडचण पडल्यावांचून परक्याच्या मसलतींत शिरूं नये; तें तोडून त्यास हे थाने हैदराबादप्रमाणें थाही दरबारांशीं स्नेह करावयाचा उद्योग पुनः आरंभिला. कांकीं, [illegible] होतें कीं, टिपूफ्रेंचांचें साह्य घेऊन निजाम व शिंदा यांशीं स्नेह [illegible] सबळ होईल, त्यावरून त्यास हे बाची मसलत होती कीं, [illegible] अशी [illegible] हिंदुस्थानांत घालवावा, ह्मणून त्या शिंद्यास असें समजाविलें कीं, [illegible] हिंदुस्थानांत तुह्मावर येता है न. आणि [illegible] कळविलें कीं, शिंदा हिंदुस्थानांत गेला ह्मणजे तुमच्या गल्याचा बंदोबस्त करणें आह्मीं आपली फौज तुमचे चाकरीस पाठवून देऊं.

हें काम बाजीरावसाहेबांस इंग्लिशांस सांगत होता. तेव्हां तें त्यास अनुकूल होईनात. त्यावरून त्याचा जाणा वाचा न आले कीं, एकाएकीं, आपणास इंग्लिशांचा [illegible] यांत कांहीं नानानें इच्याची मसलत केली असेल. तो न समजला कीं [illegible] हे दर्ये उन पहिल्याच्यांतीत अंतर पडलें. बाजीराव अ[illegible] शिंद्यास हिंदुस्थानांत जाण्याचा निरोप झाल्यावर [illegible] असें दिसलें, आणि बाजीरावाच्या व नानाचा स्नेह झाला असें [illegible] असतां ही शिंद्यास हिंदुस्थानांत जाण्याविषयीं बाजीराव [illegible], हे समयीं तुम्ही पुणें सोडून जाऊं नये; कोंकीं, नाना इं[illegible] असें शिंद्याशीं बोलणें होत असतां बाजीराव नानाफडणीसास ह्मणत असत कीं, तुम्ही शिंद्याचा नक्षा तोडून [illegible] आलें काम

झालें

भाळाल तर मोठा उपकार होईल. त्यावरून नाना पुण्यांत येऊन राहिला परंतु त्याणें असा आग्रह धरिला किं, तुह्मापासून माझ्या शरीरास आणि द्रव्यास भय होणार नाहीं असें निजाम आणि इंग्लीश यांचें तारण सांगणें पाहिजे. तेव्हां मी तुमच्या कारभारांत शिरेन हें घडलें असतां माला आधीं शिंदा हिंदुस्थानांत लाऊन द्यावा लागेल.

नंतर नानानें शिंदा हिंदुस्थानांत जावयासाठीं आपल्याजवळचें पंधरा लक्ष रुपये दिले व दहा लक्ष रुपये आपल्यामुक्ततेविषयीं दंड केले होते ते त्या शिंद्यास पूर्वींच दिले. नंतर बाजीरावपेशवा समजला कीं, शिंदा निश्चित जाणार आहे, यास्तव त्याचा मनांत आलें कीं, कोणास नकळतां एकांतीं नानाची गांठ घालून त्यास समजावें कीं, मी तुमचें कांहीं वांकडें केलें नाहीं. अशा युक्तीनें तो वश करावा, यावरून त्याणें आपल्या बरोबर एक मनुष्य घेऊन मध्यरात्रीं नानाचे घरीं जाऊन त्यास भेटला. तो बाजीराव बोलण्यामध्यें पक्का मायावी होता; त्याणें शिंद्यास सांगून नानास उपद्रव दिला होता. त्यांत आपली कृति किमपि नाहीं असें समजावून बोलिला कीं, तुमचे कारभारी यास मी आपल्या बंदींत ठेविले, हेंही त्यांच्या हितार्थच केलें; कांकीं, त्यास शिंद्याचा उपद्रव न लागावा. शेवटीं आपलें सांगणें नानास खरें वाटलें असें निश्चित जाणून त्या बाजीरावानें नानाच्या पायांवर डोकें ठेवून बोलिला कीं, तुमच्या पायांचीच शपथ, मी इतःपर तुह्मास आपल्या बापाप्रमाणें मानीन आणि तुमच्या सांगण्यावांचून कांहीं करणार नाहीं, इतकें बोलून तात्काळ डोळ्यांत पाणी आणून ह्मणूं लागला कीं, हे समयीं ब्राह्मणाच्या राज्यास अपायकारक दोन कारणें झालीं आहेत. त्यांत एक तर आमच्या मराठ्यांत परस्परें वैमनस्यें पडलीं. आणि दुसरें इंग्लीश लोकांस या राज्याविषयीं लोभ उत्पन्न झाला. यास्तव यावेळेस तुह्मी आपल्या बुद्धिकौशल्येंकरून या सर्व अव्यवस्थेचें आकलन केलें पाहिजे.

असें बाजीरावपेशव्याचें कृत्रिम असतां नाना फडनवीसास सत्य वाटून तो प्रथम निजामअली व शिंदा यांची जामिनकी मागत होता तें सोडून. सन सत्राशें नव्याण्णवांचा अक्टोंबराचे पंधराव्ये तारिखेस, निःसंशयपणें कारभार चालवूं लागला, त्यांतच त्याची बुद्धि चुकली; कांकी, तो आपलें काम करूं लागतांच त्यास यशवंतराव घोरपडा याणें जाऊन सांगितलें कीं, हल्लीं तुह्मांस बंदींत घालावयाविषयीं बाजिराव पुनः शिंद्याजवळ आग्रहाचे निरोप पाठवितो, ही गोष्ट नानानें शिंद्यास विचारून खरीशी मानिली. तेव्हां तो नाना फडनवीस लागलाच बाजीरावाकडे जाऊन त्यास बोलिला कीं, तुह्मीं मला मोठा विश्वास देऊन दगा करावयास कसे प्रवृत्त झालां, मी आपल्या वृद्धपणानें व दुर्दशेनें मृतप्राय झालों, त्या माझ्या प्राणाचा नाश कां चिंतितां, मी तुमच्या कारभारांत आपल्या सद्दच्छासाठीं न शिर-

लों. केवळ सरकारहितार्थ या कामाचा स्वीकार केला, त्यास जर तुम्हाला माझें भय वाटत असेल तर अगदीं जेथें दरबारी कारभारी नाहीं अशा रिकामे जागीं जावयास मला सांगा, मी तेथें स्वस्थ राहीन, त्यावर बाजीरावानें उत्तर केलें कीं, यांतील किमपि मला ठाऊक नाहीं आणि मजपासून कदापि असें घडावयाचें नाहीं. असें असतां जाणें तुम्हांस माझें नाव सांगीतलें असेल तो मला दाखवा. हें वर्त्तमान शिंद्यास कळतांच त्याणें बाजीरावाचे मुख्य कारभारी गोविंदराव काळे व शिवराम नारायण थथे यांस धरून कैद केलें; कांकीं, बाजीरावानें आपल्यावरला शब्द उडविला तो त्यांवर आला. त्यायोगें ते बंदींत पडून त्यांचें सर्वस्व गेलें. तथापि त्यांहीं बाजीरावाचें नांव सांगीतलें नाहीं, हा एक मराठी लोकांचा जातिस्वभावच आहे कीं, कसेंही संकट प्राप्त झालें असतां तें सहन करून आपल्या स्वामीवर शब्द येऊं देऊं नये. तें बाजीरावाचें कृत्य त्या दोघां कारभाऱ्यांहीं आपल्यावर घेतलें यास्तव नाना फडनवीसास कांहींसा विश्वास वाटून त्याणें कारभार चालविला. यापूर्वीं सन सत्राशें अठ्याणवाच्या सप्तेंबर महिन्यांत निजामाशीं आणि इंग्लीशांशीं असा तह झाला होता कीं, निजामानें आपल्या जवळचीं फ्रेंचलोकांहीं शिकविलेलीं पलटनें दूर करावीं, आणि फ्रेंचलोक चाकरीस न ठेवावे याबद्दल एकाएका पलटनास हजार हजार लोक, अशीं इंग्लीशांकडचीं सहा पलटनें चाकरीस ठेवावीं. या तहामध्येंच इंग्लीशांहीं सुचविलें कीं, पेशव्याशीं व तुम्हाशीं कांहीं एक संबंधें वाद पडला असतां आम्हीं तो कलह तोडावयाचा उद्योग करूं. याप्रकारेंच तह इंग्लीशांहीं पेशव्यास दर्शविला परंतु बाजीरावास त्यांचा विश्वास वाटेना म्हणून तो तह त्याचा मनास येईना, असें असतां नानाची मसलत ऐकून त्याणें उत्तर दिलें कीं, हा तह माझा मनोदयानुरूप न झाला, तथापि आजपर्यंत तुम्हाशीं व आम्हाशीं जो तह झाला आहे त्यांत मजकडून अंतर पडावयाचें नाहीं. कदाचित् टिपूशीं आणि तुम्हाशीं युद्ध झालें तर मी तुमचें साहाय्य करीन, असें बाजीरावानें इंग्लीशांस उत्तर दिलें तें योग्य दिसलें, परंतु त्याचे आंगीं एवढी धीरता व प्रामाण्य नव्हतें. नानानें त्यावेळेसही बाजीरावास सांगीतलें कीं, इंग्लीशांशीं प्रमाणिकपणेंच वागावें तें न केल्यास नाशच होईल. यानंतर इंग्लीशांहीं टिपूशीं युद्ध आरंभिलें असतां, नानानें इंग्लीशांचा कुमकेस मराठी लश्कर पाठवावयाची योजना केली, परंतु बाजीराव दवलतराव शिंद्याचा मसलतीनें चाले म्हणून तें न घडलें, आणि बाजीराव याणें आपले मनांत कल्पना केली कीं, टिपू व इंग्लीश या दोघांत एकाचा जय होई तोंपर्यंत दोघांशीं समान स्नेह ठेवून, शेवटीं आपण जयवंतास मिळावें, परंतु त्याचें लक्ष इंग्लीशांपेक्षां टिपूकडे विशेष असे, त्याणें नाना फडनवीसास नकळतां टिपूपासून तेरा लक्ष रुपये घेतले होते; याशिवाय त्याणें शिंद्याशीं मसलत केली होती कीं,

समय

समयविशेषीं आपण दोघांहीं मिळून निजामाचे मुलखीं जाऊन त्याचा पराभव करून लोकांत असें प्रसिद्ध करावें कीं, आपण टिपूचेच सहाय इंग्लिशांचे नव्हे, अशा पुण्यांत बाजिराव पेशवा व दवलतराव शिंदा हे दोघे मसलत करीत असतां अकस्मात वर्तमान आलें कीं, इंग्लीश व टिपू यांचें युद्ध होउन टिपूची राजधानी श्रीरंगपट्टनसुद्धां तें सर्व राज्य इंग्लिशांचे हातीं लागलें. त्याप्रसंगीं टिपूही मृत्यु पावला, हें वर्तमान मोठें आश्चर्यकारक ऐकून शिंदा आणि बाजिराव हे तात्काळ मोठा हर्ष पावल्याप्रमाणें दर्शवूं लागले. व आपण आपले लोक इंग्लिशांच्या साहाय्यास न पाठविले तो दोष नानाकडून घडला असें ठरवून तात्काळ धोंडोपंत गोखला तो कर्नाटकचा सरसुभेदार यास इंग्लिशांचे साहाय्यास पाठविला, तो तिकडे जाऊन पोंहचतांच त्याणें टिपूचा मुलख इंग्लिशांकडे गेला होता तो कांहीं कांहीं लुटला. याशिवाय त्याणें कांहीं उपयोगी असें एक काम केलें तें असें. कोणी धोंडीवाघ नामें त्यामुलखींचा लुटारू श्रीरंगपट्टनाहून पळालेला तो रयतेस फार उपद्रव देत होता, त्यावर या धोंडोपंतानें छापा घालून त्याचा लोकांचा बेत विसकटला. त्यानंतर तो धोंडिवाघ तेथून निघोन कोलापुरचा राजा पेशव्याशीं लढत असतां त्याचे चाकरीस जाऊन राहिला.

दवलतराव शिंदा याणें टिपूचा नाशाचें वर्तमान ऐकून तात्काळ श्रीरंगपट्टनास लोक पाठवून त्यांस आज्ञा दिली कीं, कोणी टिपूचे पक्षपाती असतील त्यांस अभय देऊन पुनः युद्ध सिद्ध करावें. असें असतां कर्णेल पालमेरनामें साहेब इंग्लिशांचा वकील पुण्यांत होता त्यास शिंद्यानें निरोप पाठविला कीं, तुह्मीं मोठे जयवंत झालां त्यायोगें आह्मीं अत्यंत हर्ष पावलों.

टिपूचा मुलुख निजामअल्ली आणि इंग्लिश या दोघांहीं मिळून घेतला असतां त्याचा वांटणीविषयीं निजामअल्लीनें किमपि चवकशी न करितां केवळ इंग्लिशांचाच छतीवर विश्वास ठेविला, तेव्हां मारक्कीस वेलसली साहेब याणें त्या वांटणीप्रकरणीं बंदोबस्त केला, तो प्रकार असा. म्हैसुरचा पुरातन राजा त्यास हैदर अल्लीनें जिंकिला होता त्याचा वंशाचा शोध करून त्यास त्याचे गादीवर बसविला. तेसमयीं टिपूचा मुलखाचा वसूल तीस लक्ष चाळीस हजार होन उत्पन्न होता, त्यापैकीं त्या राजास तेरा लक्ष साठ हजार होन नेमिले, आणि निजामअल्लीस पांच लक्ष तीस हजार. आणि आपणास पांच लक्ष सत्तीस हजार, हैदर व टिपू यांचा परिवारास दोन लक्ष चाळीस हजार देऊन ते दोन्हीं आपले स्वाधीन ठेविले होते; आणि टिपूचा कोणी कमरदीन नामें सरदार होता, तो व त्याचा परिवार निजाम अल्लीचा स्वाधीन असे त्यास सत्तर हजार होन मिळोन सत्तावीस लक्ष सत्तीस हजार होन झाले, बाकी तीन लक्ष तीन हजार होन राहिले, ते निजाम अल्ली आणि इंग्लिश या दोघांचे मतें ठरलें कीं. पेशवा आपल्या करारप्रमाणें कामास आला नाहीं, तथापि तुमचा

व

व आमच्या तहामध्यें हमसयीं मिळत असल्यास तें उरलेलें द्रव्य त्यास द्यावें नाहींतर त्याचे तीन भाग करून त्यांतील दोन निजामानें घ्यावे, तिसरा इंग्लीशांहीं घ्यावा.

नंतर बहुतेक वादविवाद होऊन पेशवे व इंग्लीश यांचा तह होईना, तेव्हां तो उरलेला भाग पहिल्या नेमाप्रमाणें इंग्लीश व निजाम यांणीं वांटून घेतला, ते समयीं निजाम व इंग्लीश यांचा दुसरा कांहीं तह झाला, त्यांत असें झालें कीं, इंग्लीशांहीं निजामाच्या मुलुखाचें रक्षणार्थ आणिक दोन पलटनें दिलीं. आणि नेम केला कीं, जो कोणी निजामाच्या राज्यास अन्यायेंकरून उपद्रव करील, तो इंग्लीशांहीं आपला शत्रूगा आणून त्यास जिंकावा. या लश्कराच्या खर्चास निजामअलीनें म्हैसुर प्रांताचा सर्व आपले वांटणीचा विभाग इंग्लीशांस दिलेला असे.

याप्रमाणें निजामाकडचें व इंग्लीशांचें वर्तमान असतां, शिंद्याच्या राज्यांत फार अव्यवस्था होऊं लागली ती अशी, सरजेराव घाटगा याणें दुष्टपणें दग्याचा छापा अमृतरावावर घातल्यानंतर त्या बाया विठ्ठलवाडीहून निघून कोल्हापुरच्या राजाचे आश्रयास गेल्या, त्यावेळेस तो राजा पेशव्याशीं लढत होता त्यापाशीं त्या बाया जाऊन राहिल्या, नंतर शिंद्याजवळचा नारायणराव बक्षी व कित्येक शेणवी मंडळ त्या शिंद्याचें लश्कर सोडून कोल्हापुरकरास जाऊन मिळाले, त्यामागून कित्येक स्वारही जाऊन मिळाले, मग त्याजवळ फार फौज जमल्यावर तो तेथून निघोन कृष्णेच्या उत्तरेस गोदावरीपर्यंत शिंद्याचे गांव लुटित गेला, मग पुण्यासही येऊन कित्येक वाटा बंद करून तेथें शिंद्याच्या तळास उपद्रव देऊं लागला. तेवेळेस शिंद्याचे स्वार त्याशीं लढावयास अशक्त होते. तेव्हां त्याचे पलटनी लोकमात्र त्या राजास अडथळा करीत, त्यापासून मुलुखांत फार अव्यवस्था होऊन सर्वत्र हत्यारबंद स्वार जमा होऊन रयतेस उपद्रव होतां होतां तो दंगा हिंदुस्थानपर्यंत पोंहचला, तेथें लखबादादा शेणवी तो बाळोबा तात्याचा इष्ट म्हणून शिंद्यानें तो विश्वास योग्य नव्हेसें जाणून त्यास भ्रष्ट केला होता, तो शिंद्याच्या शत्रूस मिळून त्याणें कित्येकवेळां आपणास धरावयाकरितां शिंद्याचे लोक आले ते जिंकून उज्जनीपासून सरोजपर्यंत मुलुख हस्तगत केला. याशिवाय यशवंतराव होळकर तो नागपुरास गेला होता, त्यास नागपुरकराहीं शिंद्याच्या सांगण्यावरून बंदीत घातला होता तो, त्या बंदीतून पळून जाऊन माळव्यांत शिरून लुटालुट करूं लागला. तेवेळेस शिंद्याच्या पलटनांचा मुख्य सरदार दिबायन तो विलायतेस गेला. त्याचे जागीं मुखत्यार पेरणा नामें फ्रेंच असे, तो आग्रें नामें किल्ला घ्यावयाकरितां युद्ध करीत होता, त्या आग्र्यामध्यें लखबादादा आश्रय करून राहिला होता, म्हणून तो पेरणा फ्रेंच शिंद्याजवळ कुमक मागीत असे.

असें असतां शिंद्यानें त्या बायांशीं पुनः तह करावयाचा बेत केला, परंतु त्या बाया आपण मुख्यत्वें राज्य करणार आणि त्या शिंद्यास कारभाऱ्याचा नात्यानें वागविणा-

रयाशिवाय दुसरें कांहीं एकेनात. अशा संकटसमयीं शिंद्यानें आपले दोघे नवे मुख्य का रभारी केले ले. रायाजी पाटील व आबा चिटनीस यांस. न समजून विचारिल्यां असतां त्यांहीं फार चातुर्य करून प्रमाणिकपणें स्वहित न पाहतां त्यास उत्तर दिलें कीं, बाळोबा तात्या स सोडून जर तो मुख्य कारभारी केला तरच हा बंदोबस्त होईल. तेव्हां त्या शिंद्यानें त्या प्रमाणें तें शेवटास नेलें; व ते बंड करणारे बंड सोडून त्या बाळोबा तात्यास जाऊन मिळा ले आणि त्या बायांहीं त्या बाळोबाच्याच द्वारें बऱ्हाणपूर व अकरा लक्षांची जहागीर घेऊन स्वस्थ राहावयास सिद्ध झाल्या. तो लखबा दादा त्या आग्र्यामध्यें युद्ध करीत असे. तोही न लढावा असें सिद्ध झालें. आणि त्या बाया विश्रामानें पुण्यास जातांना जेजुरी स पोहचल्या इतक्यांत त्या बायांच्या पक्षाचा कोणी होता त्यास शिंद्याच्या लोकांहीं मा रिला. हें वर्तमान त्या बायांहीं ऐकून तेथूनच फिरल्या, त्या माघाऱ्या पंढरपुरास गेल्या. आणि तो सर्व बंदोबस्त मोडून तो तंटा पुनः उत्पन्न झाला.

पेशवे व कोल्हापुरकर हे युद्ध करीत असतां कोल्हापुरकरांस चतुरसिंगाची कु मक मिळाल्यानें तें युद्ध वाढलें. त्या चतुरसिंगास पूर्वी सातारच्या लढाईचे समयीं रास्ते व प्रतिनिधी यांच्या शिपाई लोकांहीं कोल्हापुरकराच्या मुलखांत हांकून लाविला. आ णि ते लोक वारणा नदीचे कांठीं उतरले ते समयीं जे सातारच्याहून पळाले ते पांचशें सु मारें लोक एके जागीं जमून त्यांहीं चतुरसिंगास ते वारणा नदीचे कांठीं शत्रूचे लोक उ तरल्याचें वर्तमान कळविलें, तेव्हां त्या चतुरसिंगानें तें वर्तमान कळविणार लोक यांस लपून राहावयास सांगून आपण कोल्हापुरकरांकडून कुमक आणून ते व ते पांचशें लो क एकत्र मिळून रास्ते व प्रतिनिधी यांच्या लोकांवर एकाएकीं असा छापा घातला कीं, त्यांतील एखाद दुसरा वांचला असेल. त्यानंतर परशुरामभाऊचेही लोक असाव ध पाहून त्या चतुरसिंगाचे लोक त्यांवर जाऊन त्यांस हांकून दिलें. त्यापुढें त्या चतुरसिं गास वर्तमान कळलें कीं, रास्त्यांची दोन तीन हजार फौज तोफांसुद्धां गातात्याजवळ डे रे देऊन उतरली आहे; तेव्हां तो आपल्या बरोबर सहाशें पायदळ घेऊन डोंगराचे धारेनें पार्लीस गेला, ते रात्रीं तेथें राहून त्या देवाची पूजा केली, आणि त्या देवाच्या भंडारक पाशीं जाऊन तेथून मोठ्या वेगानें धांवला तो वेग असा कीं, त्या रास्त्यांचे लोक साव ध असतांही, त्या चतुरसिंगाच्या लोकांहीं त्यांच्या तोफा घेऊन नासून टाकिल्या, आणि त्यांचे कित्येक लोकही मारून निघाले, ते दुसरा कोणी त्यांवर आला नाहीं तो सोडीच राकरून तो चतुरसिंग वारणा नदीस जाऊन पोहचला. त्यानें अशी धरपकड करून लढ तां लढतां आपल्याजवळ बहुत लोक जमा केले मग रास्त्यांची फौज सहा हजार होती तिला वारणा व तिरया दोहोंत्यामध्यें कधीं हि एके ठिकाणीं स्थिर राहूं दिली नाहीं. असें असतां कोणे एके समयीं त्या चतुरसिंगाजवळ पांचशें मनुष्य असतां त्यावर रास्त्यांचे पांच हजार शिपाई लोक चालून येऊन पांचीवर त्यांची गांठ पडली तेव्हां त्या लोकांहीं

त्यास

त्यास आसमंतात वेढिला असतांही तो परमशौर्य करून त्यांतून पार झाला. ते समयीं त्याचे लोक अर्धे अधिक मेले गेले.

असें रास्ते व चतुर्सिंग राजा यांचे युद्धप्रसंग होत असतां. कोल्हापुरचा राजा याणें परशुराम भाउचें मुख्य ठिकाण तासगाव तें लुटून तेथें बहुत द्रव्य खर्चून नवा बांधलेला त्या परशुराम भाउचा वाडा होता तो जाळून टाकिला.

याखेरीज त्या राजानें कर्नाटकांत कित्येक ठिकाणची खंडनी घेतली, तेथें सरसुभेदार धोंडोपंत गोखला होता तो मोठ्या शौर्यानें मुलुख संभाळित असतांही, त्याचा कित्येक वेळां पराभव केला, याप्रमाणें कोल्हापुरवाल्यांसंबंधीं मुलुख यामध्यें वर्त्तमान नाना फडनवीस कारभार करूं लागे तोंपर्यंत झालें.

बाळोबा तात्या व नाना फडनवीस यांची पुनः मैत्री होउन ते आपआपल्या धण्याचा बोलण्यावरून इंग्लीश आणि निजाम यांशीं कसें वागावें ती मसलत एकांतीं करूं लागले. ते वेळेस. त्यांचा मनें ठरलें कीं. प्रथम दक्षिणेचा बंदोबस्त अगत्य केला पाहिजे. त्या कामास पेशवे व शिंदे व जहागीरदार मिळून तीस हजार फौज जमा झाली ह्मणजे दसरा होतांच परशुराम भाउला त्या कामास योजावा.

ते समयीं तो परशुराम भाउ कोल्हापुरकरांचा हेपास्त व त्यांशीं पर्जन्यांतही युद्ध करीत होता. त्याणें घटप्रभा व मलप्रभा नदीपर्यंत कोल्हापुरकरांचीं कित्येक ठाणीं लुटविलीं आणि आपण नाना कडील फौजेची वाट न पहातां एकटाच कोल्हापुरास जाउन तें युद्ध शेवटास न्यावें असा नेम बांधून तो परशुराम भाउ गोकाकेहून कोल्हापुरावर जाउं लागला, त्यास वाटेनें पटनकुडी गावांजवळ कोल्हापुरचा राजा व चतुर्सिंग या दोघांची गांठ पडली तेव्हां त्यांचें व याचें मोठें युद्ध होउन, त्या परशुराम भाउचा अगदीं पराभव होउन त्यास मोठमोठ्या जखमा लागून. तो परशुराम भाउ शत्रूच्या हातीं सांपडून मृत्यु पावला.

असें झाल्यावर नाना फडनवीस व बाळोबा तात्या यांहीं त्या परशुराम भाउचा पुत्र आपासाहेब याजबरोबर पांच पलटनें आणि विंचुरकर व प्रतिनिधी यांचे लोक देउन, त्यास आस जिकावयाकरितां कोल्हापुरास नेमिले. तेव्हां तो राजा पन्हाळा किल्ला याचे खालीं डेरे देउन आश्रयास राहिला होता; तेथेंही आपासाहेबाचे लोक त्यांवर पडून ते कित्येक पन्हाळ्यावर चढले, आणि बहुतेक कोल्हापुरास शिरले. ह्मणून त्या आपासाहेबानें कोल्हापुरास घेरा घालून कित्येक वेळा युद्ध होउन तो किल्ला त्या आपासाहेबाचे हातीं लागत होता परंतु ते वेळेसच पुण्यांत असें नवें नवें कांहीं कार्य उद्भवलें कीं, ते कोल्हापुराचें काम सोडून त्या आपासाहेबाला पुण्यास जावें लागलें, तेणेंकरून कोल्हापुरचें राज्य राहिलें तें अद्यापि त्या राजाचे स्वाधीन आहे.

सन अठराशें पासून
अठराशें तीन पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग तिसावा.

अनुक्रमणिका.

नाना फडनविसाचा मृत्यु व त्याचा स्वभावाचें वर्णन.

बाळोबा तात्या याचा मृत्यु व धोंडिबा व नारायणराव बक्षी यांस निर्दयपणें पेशव्यानें मारिलें तें प्रकरण.

दक्षिणेंत धामधूम झाली तो प्रकार.

धोंडीबाबाचें बंड व त्याचें पारिपत्य इंग्लिशांहीं केलें तें.

पुण्यांतील कांहीं वर्तमान.

शिंद्याची माळव्यांतील कांहीं गोष्ट.

यशवंतराव होळकराचा प्रादुर्भाव.

शिंदा पुणें सोडून हिंदुस्थानांत चालिला नंतर त्याशीं व होळकराशीं युद्ध झालें तो विस्तार.

सर्जेराव घाटगा पुणें सोडून शिंद्यास मिळून, इंदुरावर जाऊन तेथें यशवंतराव होळकराचा पराभव केला.

यशवंतराव होळकर याणें दक्षिणेंत संचार केला; नंतर तो पुण्याजवळचे लढाईंत जय पावला.

बाजिराव पेशवा सिंहगडाहून निघोन कोंकणांत जाऊन तेथें इंग्लिशांच्या जहाजांत बसून वसईस गेला.

सन सत्राशें त्र्याण्णवांपासून सन अठराशें दोहोंपर्यंत बडोद्यांत काय काय झालें तो प्रकार.

भाग तिसावा.

पुण्यांत मोठें कांहीं कार्य उत्पन्न जालें असें मागल्या भागांत लिहिलें. त्यांत प्रथम नाना फडनविसाचा मृत्यु; दुसरें शिंद्यानें मसलत केली कीं, सर्व पटवर्धनांची जहागीर आपणास द्यावी. हें वर्तमान ऐकून आपासाहेब पटवर्धन याणें कोल्हापुरचा वेढा उठवून आपल्या बरोबर धोंडोपंत गोखल्यास घेऊन कर्नाटकांत गेला. या गोष्टीचा विस्तार लिहिण्याचे पूर्वी नानाफडनविसाच्या कांहीं एक दोन गोष्टी समजल्या पाहिजेत.

तो नाना सन अठराशेंच्या मार्चाचे तेराव्वे तारखेस मृत्यु पावला. त्या

समयीं

बरोबरच मराठी लोकांचें राज्यकारणी कौशल्य गेलें. तो नाना राजनीतीतप रम दक्ष होता; त्याचें बाळपणापासून सर्व वय राजकारभारांत गेलें. तो आपल्या प्रजेची वहिवाट व मुलखाचा वसूल येणें आदिकरून कामें माधवराव बल्लाळ याचे रीती प्रमाणें चालविणार होता; परंतु मोठमोठ्या कामांचे अडचणीमुळें त्यास अवसर सांपडला नाहीं. आणि तादृश मुलखाची पाहणीही होत नसे; त्यायोगें चवकशीची मंदी फार पडली होती. याविषयीं एक गोष्ट आहे ती अशी पुण्यांमध्यें त्यावेळेस घाशिरामब्राह्मण हिंदुस्थानचा राहाणार कोतवाल होता; त्यास मोठी योग्यता प्राप्त जहाली असतां तो अंतःकरणास भयकारक असें हत्याकर्म करी. असें असतां कित्येक गृहस्थ अकस्मात कांहीं कारणावांचून नाहींसे झाल्यावर, त्यांचा घाताचा संशय त्या घाशिरामाविषयीं उत्पन्न झाला. मग ती गोष्ट नाना फडनविसाचा कानावर पडली असतां, तो म्हणे कीं, असें दुष्कर्म करणारा या पृथ्वीवर नसेल. त्यानंतर असें एके दिवशीं वर्तमान उठलें कीं, घाशिराम कोतवाल कोणाएका गृहस्थास कोंडून ठेवून त्यास अन्नोदकावांचून उपाशीं मारितो आहे. तेव्हां मानाजी फांकडा याणें आपल्याबरोबर कांहीं शहरचे लोक घेऊन, तेथें जाऊन तें बंद केलेलें दार फोडून तेथून उपोषणानीं मृतप्राय झालेला एक ब्राह्मण होता त्यास मुक्त केला. त्यादिवसापासून त्या कोतवालाचें पापकर्म असें प्रसिद्धीस येत गेलें कीं. शेवटीं त्यास शहरचा लोकांहीं त्याचा घरांतून त्याला बाहेर काढून दगडमार करून जिवें मारून टाकिला.

नाना फडनवीस याची आकृती उंच आणि सडपातळ असे, आणि त्याची अंगकांति काळसर होती; व तो प्रकृतीनें रुष्टासारिखा दिसे. परंतु त्याचे नेत्र पाहिले असतां तो मोठा धूर्तसा भासे; आणखी तो आपल्या कुळांत प्रमाणिकपणें व सद्यांतःकरणेंकरून वागे. तो राज्याची आशा ठेवी परंतु आपल्या मंडळींत सर्वपदार्थाविषयीं थोडक्यानेंच तृप्त असे. तो दिवसामध्यें असा कारभार आटोपी कीं, ती गोष्ट कोणासही सांगितली असतां आश्चर्य वाटेल. तो नाना मेला तेसमयीं त्याची स्त्री फार लहान होती; आणि त्यास संतती नव्हती.

तो नाना फडनवीस मरण पावल्यानंतर, पेशवा व शिंदा यांमध्यें कलह उत्पन्न होण्याचें एक कारण जालें तें असें कीं, त्या दोघांसही नानाचें द्रव्य बहुत असेल तें आपणास असावें अशी इच्छा उत्पन्न झाली. त्यावरून शिंदा याणें नानाकडे आपले कोटि रुपये येणें आहेत असें निमित्त करून त्याची सर्व जहागीर जप्त केली. आणि बाजिरावाचा हेपास्तव त्या शिंद्यानें

नाना

नाना फडनविसाचे स्वीस दत्तपुत्र घ्यावयास अनुमोदन दिलें.

असा शिंदा बाजिरावाविषयीं विपरीतवर्ती असे त्याणें तेंच कृत्य विशेष नकरितां बाळोबा तात्याचा द्वारें सखबादाप्रमाणें बंद मोडिले; त्या आपल्या कारभाऱ्याचा नाशास प्रवृत्त झाला तो असा, त्याणें आपला सासरा सर्जेराव घाटगा याचे मसलतीनें त्या बाळोबास धरून आमेदनगरच्या किल्यांत कैद केला. तो तेथें थोडक्याच दिवसांत आपल्या मृत्युनेंच मरणपावला. त्याबरोबरच बंदीस घातलेले त्याचे दोघे भाऊ होते त्यांचें असें भाग्य नव्हतें कीं, त्यांहीं आपल्या मृत्यूनेंच मरावें. त्यांत एक धोंडिबा त्याला तर तोफेचा तोंडीं देऊन उडविला; दुसरा नारायणराव बक्षी त्यास तो दुष्ट घाटगा याचे कल्पने प्रमाणें त्याचा हातांपायांस बाण बांधून आग लाविली तेव्हां तो त्या बाणाचा नेटानें जिकडे तिकडे उलथा पालथा वांकडा तिकडा होऊन बहुत पीडा पावोन मेला.

यानंतर बाजिराव पेशवा नाना फडनविसाचे पक्षपातीलोक यांचा नाशाविषयीं आणि परशुराम भाऊची जहागीर घ्यावयाविषयीं उद्युक्त झाला. यासाठीं नाना फडनविसाचे स्वीस त्याणें दत्तक घ्यावयाचें अनुमोदन देतों असें मिष करून, त्यामंडळीस तो विचार करावयाचे निमित्तें आपल्या वाड्यांत बोलाविले; नंतर ते सारे एकेजागीं जमा आल्यावर त्यांसर्वांस असा दोष ठेविला कीं, तुह्मीं नाना फडनविसास दत्तक देऊन तो मला प्रतिबंधकरणार, यास्तव त्यां तुह्मांस शिक्षा असावी. असा त्या मंडळीस दोष लावून ते सारे किल्यावर टाकिले. त्या गोष्टीस शिंदाही अनुकूळ झाला, कांकिं, पेशवा पूर्वीं शिंद्याचा हितार्थ जेणव्यांचा नाशास प्रवृत्त झाला होता.

याप्रमाणेंच पटवर्धनाचा नाशाविषयीं शिंदा पेशव्यास अनुकूळ झाला त्या शिंद्याचा कारभारी सर्जेराव घाटगा तो कोल्हापुरचा राजाकडे जाऊन तो राजा पटवर्धनाचा नाशाविषयीं शिंद्यास अनुकूळ होय असें केलें. तेव्हां त्या शिंद्याचीं कित्येक पलटनें शिधोजीराव निंबाळकर निपाणीचा देसाई याचे स्वाधीन होऊन पटवर्धनाचा मुलुख घ्यावयास निघालीं. तीं पलटनें फारवेळ त्याजवळ नराहिलीं; परंतु त्याशिधोजीचा स्वारांहीं मिर्जेपासून विजापुरपर्यंत मुलुख उद्ध्वस्त केला.

ते समयीं संपूर्ण दक्षिणेंत धामधूम झाली ती अशी. धोंडीवाघ याणें कोल्हापुरचा राजाची चाकरी सोडून निघाला, तो इंग्लिशांहीं संपादिलेल्या मुलखीं जाऊन लुटालूट करून पेशव्याचाही कर्नाटकमुलखीं कित्येक ठिकाणची खंडनी त्याणें घेतली. त्यावरून इंग्लिशांहीं पेशव्याची आज्ञा घेऊन त्या

[illegible] राहिल्यानें आपली फौज नेमिली. त्या पूर्वीच त्या धोंडीवाघानें कर्नाटकांत धोंडोपंत गोखले आपला शत्रु आला आहे असें समजून शपथ केली. कीं, त्या धोंडोपंताचा काळजाचें रक्त काढून त्या रक्तानें आपल्या मिशा रंगवीन. त्या वाघानें तो धोंडोपंत गोखले जेथें होता त्यासमीप कोणे एके झाडीमध्यें लपून राहून त्याचा प्राणहरणार्थ छापा घालावयाचा बेत करून, त्या धोंडोपंताजवळ अगदीं थोडकेसे लोक असीं संधी पाहून, त्यावर अकस्मात छापा घालून त्या धोंडोपंत गोखल्यास ठार मारिला. आणि आपल्या शपथेप्रमाणें त्याचा काळजाचें रक्त काढून आपल्या मिशांस लाविलें. त्या छाप्यामध्येंच धोंडोपंत गोखल्याजवळ त्याचे दोघे पुतणे होते त्यामध्यें थोरला मारिला गेला. आणि धाकटा तो बापु गोखले त्याचा डाव्या डोळ्यांत मोठी जखम लागली.

यानंतर इंग्लिशांहीं त्या धोंडीवाघाचा पारपत्यास फौज पाठविली तीं त्यावर पडोन त्याचा लोकांचा अगदीं पराभव होऊन तो धोंडीवाघही मेला गेला. हें वर्तमान सन अठराशेंचा सप्तेंबर महिन्याचे दहाव्ये तारिखेस घडलें.

शिंदा पुण्यामध्यें राहिला असतां त्याचा मुलुख माळवें व हिंदुस्थान याच्या बंदोबस्तांत अव्यवस्था जाली होती. ती असी. यशवंतराव होळकर नागपुराहून पळून धारेस जाऊन तेथें आनंदराव पवार याचा आश्रयास कांहीं दिवस राहिला. नंतर त्या आनंदरावानें शिंद्याचा भयास्तव त्या होळकरास कांहीं द्रव्य व कित्येक घोडे देऊन त्याला तेथून पुढें मार्गस्थ केला. तो होळकर तितक्याच द्रव्यसाधनानें आपल्याजवळ कांहीं लोक जमा करून, मग कोणी एक अमीरखान नामें पठाण मुलखांत [illegible] त्याला जाऊन मिळाला. आणि त्यायोगें मोठी योग्यता पावोन लोकांस असें प्रसिद्ध केलें. कीं, आपण खंडेराव होळकर याच्या पुतण्या [illegible] होळकर पर्यंत मंडळ होतें तितकें बोलाविलें तें कित्येक जना झाल्यावर होळकराचा कुळास शिंद्याचा हातून सोडवावयाकरितां त्यास हित मिळाले. नंतर शिंद्याचे मुलखीं नर्मदातीरीं जाऊन कित्येक शिंद्याचे गांव लुटूं लागला. तेव्हां काशिराव होळकराचें पलटण कोणी एक फ्रेंच जातीचा सरदार त्याचे स्वाधीन असे तो त्यावर पाठविला. त्याचा त्या यशवंतरावानें पराभव केला तेव्हां ते [illegible] यशवंतरावाच्या पक्षपाती होऊन, आपले पलटणी लोक व तोफा घेऊन [illegible] मिळाल्या. तेव्हां त्या यशवंतरावास हा खंडेरावाच्या [illegible] [illegible] यावें. आणि तो मोठ्या राजासारखें वागूं लागला. असें [illegible]

र तो शिंदा याणें लश्करसुद्धां तात्काळ तिकडे जाऊन आपल्या मुलखाचा बंदोबस्त करावा; परंतु तेसमयीं त्याचे कारभारीमंडळींत वैमनस्यें पडलीं होतीं. त्यामुळें तो प्रकार घडेना कांकीं, कोणे एके वेळेस त्या कारभारी मंडळीनें होळकरास धमकीची गोष्टसांगावी व कोणे एके समयीं प्रार्थनाही करावी असें होऊं लागलें; नंतर ते कारभारी लोक काशिरावाचा नाशाविषयीं होळकरास मिळून त्या यशवंतरावानें काशिरावापासून आपणास भीति न व्हावयासाठीं शिंदा अनुकूळ करून घेतला, आणि त्या बदल शिंद्याचा बायांस धरून कैद करावयाचा नेम केला. त्यापूर्वीं होळकरानें त्या बायांशीं मैत्रीचें बोलणें लावून समजाविलें कीं, मीं तुमचा पक्षपाती आहें. तथापि हे समयीं तो नेम सोडून होळकर त्या बायांचा लश्करावर पडोन त्या बायांनां तेथून पिटून बऱ्हाणपुरीं लावून दिल्या, आणि त्या शहरासभोंवता घेरा घातला; परंतु त्या बाया तेथून सुटून पळाल्या असतां त्या शिंद्यास वाटलें कीं, होळकराचा कृत्रिमानेंच पळाल्या. त्यास आपण हिंदुस्थानीं जाऊन बंदोबस्त केल्यावाचून राज्य टिकणार नाहीं, असा त्या शिंद्यानें मनांत निश्चय करून पुणे मुकामीं पांच पलटणें व दहा हजार स्वार तयार केले, आणि त्यांस सरजेराव घाडगा याचे स्वाधीन करून पेशव्याचे चाकरीस ठेविले, आणि आपण तेथून निघाला तेसमयीं त्याणें बाजिराव पेशव्यापासून सत्तेचाळीस लक्षांचा हुंडया घेतल्या.

तो शिंदा हळू हळू तेथून निघोन बऱ्हाणपुरीं जाऊन राहिला. तोंपर्यंत होळकर माळव्यामध्यें स्वाऱ्या घालून, तेथची खंडणी घेत असे आणि कुठकुठे लुटित असे. त्याशिंद्याचें सैन्य फार मोठें आणि तो केवळ समीप आला असें समजून त्या होळकरानें आपले सर्व लोक उज्जनी पाशीं मोठ्या त्वरेनें जमा केले, कांकिं, त्याचा मनसोबा असा होता किं, शिंदा येऊन पोंहचला नाहीं तोंच उज्जनी लुटावी. हें वर्तमान त्या शिंद्यास कळलें तेव्हां त्याणें आपलीं पलटणें चार कोणी एक करणेल हेशिंग नामें आपला सरदार याचे स्वाधीन करून, त्यास बऱ्हाणपुराहून पुढें त्वरित पाठविला. नंतर त्याचे पुष्टीकरणार्थ दुसरा सरदार व दोनपलटनावर कांहीं पायदळ लोक पाठविले. तेव्हां होळकरानें उज्जनी जवळ पुढें आलेल्या लोकांशीं युद्धाचा आरंभ थोडक्याशा लोकानिशीं केला, आणि त्यास नकळतां त्याचे पाठिमागें आपल्या लश्कराचा मोठा भाग नेऊन जे लोक त्याचा पुष्टीकरणार्थ मागून येत होते ते जिंकून ते लोक पुनः युद्धास उभे न रहातील असें केलें. नंतर आपले लोक त्यांशीं लढून धैर्यवंत झालेले माघारे आणून त्या हेशिंगाचा चार पलटनावर एकाएकीं हल्ला केला. ते समयीं तें युद्ध फार निकराचें झालें त्यांत ते पलटनी

टनी लोक एक वांटा राहोन चार वांटे लोक जखमी व मेले मिळून पडले. त्यांत त्याचे सरदार साहेब लोक होते ते सात मेले गेले व तीन साहेब त्या शत्रूचा हातीं सांपडले, आणि एकटा हेशिंग मात्र राहिला. असा होळकराचा जय सन अठराशें एकाचा जून महिन्यांत होऊन मग त्याणें त्या उज्जनीची मोठी खंडनी घेतली. नंतर त्या शिंद्याचा तोफखाना नर्मदा उतरून पलिकडे गेला होता. त्याचे रक्षणार्थ शिंद्याचे कितेक स्वार व चार पलटनें होतीं त्यांवर जाऊन तो तोफखाना पाडाव करून घ्यावयास होळकरानें मोठा उद्योग केला परंतु त्याचा उपाय चालेना. तेव्हां त्या शिंद्यास कांहीं धैर्य उत्पन्न होऊन तो आपलें लश्कर बऱ्हाणपुराहून उठवून नर्मदापार जावयास फार प्रयत्न करूं लागला.

इकडे पुण्यामध्यें शिंदा निघोन गेल्यावर बाजिराव जे कोणी मोठमोठे थोर कुलीन लोक जांहीं आपणाविषयीं किंवा आपला बाप रघुनाथराव. त्याविषयीं विपरीत आचरण केलें होतें, असे जे त्यांचा सूड उगवावयास उद्युक्त झाला. तेव्हां प्रथम त्याणें रास्त्यांचा कुळांतील माधवरास्ता यास स्नेहानें भेटीस बोलावून तो आपल्या वाडयांत आल्यावर त्यास धरून रायगडास पाठविला. याशिवाय जे कोणी त्याचे हातीं सांपडले ते अनेक प्रकारें लुटले, त्याणें इतकी रास्त्याची अमर्यादा अन्यायाविणें केली त्यावरून तो बाजिराव लोकांचे मनांतून उतरला; त्यायोगें त्याचा कोणासही विश्वास येईना आणि मुलखांत जागोजाग बंडें उत्पन्न झालीं. त्या बंडांचा एक टोळींत बाळकृष्ण गंगाधर मुख्य होता, आणि विठोजी होळकरही त्यास मिळाला असे. त्या टोळीचा पराभव गणपतराव पानशा याणें केला. तेव्हां तो विठोजी होळकर यशवंतराव होळकराचा भाऊ धरला गेला; त्यावेळेस बाजिराव पेशवा याणें त्यास जिवें मारून टाकावयाचा नेम केला; कांकिं, तो बंडांत सांपडला तस्मात तो प्राणांत दंड करावयाचा अपराधी खरा परंतु तेवेळेस मराठी लोकांत चाल होती कीं, जो अत्यंत क्रूरपणें हिंसाकर्मेंच करील त्यास मात्र प्राणांत दंड करावा. केवळ स्वाऱ्या घालून लूट करणारास तसा दंड नाहीं. असें असतां आणि त्याचा बाप तुकोजी होळकर त्या एवढ्या थोराचा तो पुत्र त्यास मारावें हेंही योग्य दिसत नव्हतें, परंतु बाजीरायाच्या मनांत आलें कीं, हा नानाचा परम मित्राचा पुत्र म्हणून त्याणें त्यास जिवें मारविला तो प्रकार असा. आपण (बाजीराव पेशवा) व आपला मित्र (बाळोजी कुंजर) हे दोघे खिडकींत बसून आपल्या समोर अंगणामध्यें हत्ती आणून त्या विठोजी होळकराला हत्तीच्या पायांस बांधविला, तेसमयीं त्याणें आपल्या प्राण रक्षणाविषयीं बाजीरायाची प्रार्थना केली; परंतु त्या बाजीरावास त्या विठोजीविषयीं किमपि दया न येतां तो स्वस्थ बसून पाहूं लागला. मग तो हत्ती तें सारें अंगण फिरला, तितक्यानें

त्याचा

त्याचा प्राण गेला नाहीं. तेव्हां तो हत्ती तेथून बाहेर नेवविला; नंतर त्या बाहेरचा मैदानांत तो हत्ती फिरतांनां त्या विठोजीचें प्राणोत्क्रमण झालें.

दवलतराव शिंदा आपल्या लष्कराचें सामर्थ्य न्यून असें समजून पुण्यांत पेशव्याच्या चाकरीस पूर्वी सर्जेराव घाडगा यास ठेविला असतांही, त्याला हिंदुस्थानांत आपल्याजवळ बोलाविला. तो तिकडे जाऊन त्या शिंद्याजवळ पोंहचल्यावर त्या दवलतरावानें त्याजबरोबर दहा हजार स्वार व चवदा पलटनें देऊन आपली राजधानी उज्जनी होळकरानें लुटली होती, तो सूड उगवावयास इंदुर नामें त्या होळकराची राजधानी लुटावयास पाठविला. त्या वेळेस त्या होळकराबरोबर गोरे सरदार यावांचून काहीं पलटनें व स्वार पंचवीस हजार, व पलटनीलोकांखेरीज पांचहजार पायदळ, इतकें सैन्य होतें, त्यासहित तो यशवंतराव त्या आपल्या इंदुराचा संरक्षणास आला. नंतर काहीं दिवस त्या दोहीं लष्करांचें युद्ध हलकें हलकें होत होतें. मग त्या होळकरानें एकाएकीं त्या शिंद्याचा लष्करावर हल्ला करावयाची कांही उत्तम कल्पना काढिली होती, परंतु त्यांतील काहीं बेत बिसकटून शेवटीं तो होळकर त्या युद्धांत पराभव पावला. ते समयीं त्याच्या अठ्याणव तोफा सर्जेराव घाडग्याचा हातीं लागल्या, आणि त्याची राजधानी इंदूर तेंही त्या घाडग्यानें अगदीं लुटलें. ते समयीं त्या दुष्टानें आपल्या क्रूरपणाची परम सीमा केली.

त्याची पुणें सोडून गेल्याचें पूर्वीची त्याचा धोर्त्याविषयीं काहीं गोष्ट आहे ती अशी. तो सर्जेराव घाडगा याणें बाजीराव पेशवा याचा मित्र बाळोजी कुंजर त्याचे घरीं धरणें द्रव्यानिमित्त बसवून वरकडजे दरबारी लोक होते त्यांचा फार अनादर आरंभिला. तेव्हां तो बाळोजी कुंजर याणें आपल्या मनांत विचार केला कीं, तो घाडगा आपणाकडे आला असतां त्याचा मोठा संमान करून तो जें ह्मणेल त्यास राजी झाल्यासारिखा आकार दाखवून मग त्यास युक्तीनें धरून बंदींत ठेवावा. अथवा जिवें मारून टाकावा. अशी योजना करून आपल्या लोकांस सांगून ठेविलें कीं, तो सर्जेराव घाडगा आणि मी एकांतीं बोलत बसलों असतां, जेव्हां मी तेथून उठून बाहेर येईन तेव्हां तुह्मी त्यास युक्तीनें धरा अथवा मारून टाका. अशी तयारी करून तो सर्जेराव आपले घरीं आला असतां तो आणि आपण उभयतां खोलींत एकांतीं बोलत बसले तेव्हां बोलतां बोलतां तो बाळोजी कुंजर तेथून उठून बोलिला कीं, मी पैक्याचा हुंड्या आणवितों इतकें ह्मणून त्या खोलींतून बाहेर निघूं लागला. तेव्हांच तो सर्जेराव

मनांत

मनांत समजला कीं. ही कार्दी आपणास दग्याची खूण आहे; त्यावरून त्या सरजेरावानें एक हात त्या बाळोजी कुंजराच्या मानेवर टाकून दुसऱ्या हातांत तरवार घेऊन त्यास गचांड्या देत त्या खोलींतून बाहेर काढून तेथून तसाच दरवाजापर्यंत धक्के देत नेऊन मग त्या दरवाजाबाहेर रस्त्यांत जातांच तेथें आपल्या घोड्यावर पटकर उडी मारून बसला, आणि तेथून त्वरेनें पळत पळत आपल्या लोकांत जाऊन मिळाला.

हिंदुस्थानांत होळकर पराभव पावल्यानंतर त्यास वेडावांचून दुसरा उपाय दिसेनासा झाला. असें असतांही त्याचें धूर्तपण व स्वाभाविक शौर्य पाहून शिपायी लोकांचें मन त्याकडे लागे ह्मणून त्या शिंद्याचें कित्येक शिपायी लोक त्या यशवंतराव होळकरास मिळाले. असें झाल्यावर त्या होळकरानें मसलत केली कीं, हा मुलुख सोडून पुण्याचे आसमंतात संचार करावा. तेव्हां शिंद्यास तिकडे गुंतवावयासाठीं आपलीं पलटनें महेश्वरास ठेऊन आपण उत्तरेचा मार्ग धरिला. कां कीं त्या शिंद्यास ती आपली दक्षिणेस जाण्याची मसलत कळूं नये; याकरितांच फत्तेसिंग मान्या बरोबर मात्र काहीं स्वार देऊन पुण्याकडे पाठविला. तो मान्या गोदावरी तीरीं येऊन, कित्येक गांव लुटून त्या मुलुखीं कित्येक ठिकाणची खंडनी घेऊं लागला. इतक्यांत तो होळकर स्वयें महेश्वरास येऊन, तेथून आपलीं पलटनें बरोबर घेऊन शिंद्याचा मुलुख खानदेशांत जाऊन, मोठ्या क्रोधानें तो मुलुख उद्ध्वस्त करूं लागला. इतकें होई तोंपर्यंत त्याणें शहाआमेदखान नामें कोणी आपला सरदार यास पुण्याचा आसमंतात लुटालूट करावयास पुढें नेमिला; त्याचा पारिपत्याकरितां पेशव्याचा सरदार नरसिंह खंडेराव नामें विंचुरचा जहागिरदार तो पंधराशें स्वारांनिशीं त्यावर चालून गेला; त्याचा त्या शहाआमेदखानानें असा पराभव केला कीं, त्या विंचुरकराचा पंधराशें स्वारांतील क्वचित् वांचले असतील. हें वर्तमान बाजीराव पेशव्यास कळतांच तो फार भ्याला आणि इंग्लीशांच्या सरकाराशीं आपल्या कुमकेविषयीं बोलणें लाविलें, परंतु ते वेळेस तो बाजीराव इंग्लीशांनां आपल्या मुलुखांत फौजेसहित रहावयास अनुमोदन देईना; आणि इंग्लीश व निजाम अली यांची मैत्री झाली होती त्यांतीलही कित्येक गोष्टी स्वीकारीना ह्मणून तो कल्प शेवटास गेला नाहीं. नंतर पेशव्यानें होळकर गोदावरी उतरून आलीकडे न यावा ह्मणून त्याशीं बहुत प्रकारें तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां त्याणें उत्तर दिलें कीं, माझा भाऊ तुह्मीं मारिला तो तर तुमच्यानें मागें देववत नाहीं; परंतु त्याचा पुत्र खंडेराव यास बंदींत घातला आहे

तो

तो सोडून द्यावा; आणि जितका आमचा होळकर मंडळीचा मुलुख आपणा कडे आहे तो सर्व सोडावा: इतकें झालें असतां आपण ह्मणतां ही गोष्ट कदाचित् घडेल. त्या गोष्टीस बाजीराव याणें मान्य केल्याप्रमाणें दाखविलें आणि होळकरास निश्चित सांगून पाठविलें कीं, आह्मीं तुमचा खंडेराव यास सोडावयाची आज्ञा दिल्ही. असें असतां इकडे त्या खंडेरावाला आशीरगडावर पक्क्या बंदोबस्तांत ठेवावा असें सांगून पाठविलें, आणि तेच वेळेस दवलतराव शिंदा याकडून सदाशिवराव भास्कर नामें सरदार दहा पलटनें व कांहीं स्वार घेऊन येत होता त्यास निरोप पाठविला कीं, हे समयीं आह्मीं होळकराशीं कांहीं तहाचें बोलणें करून तो स्थिर केला आहे; अशा संधीस तुह्मीं त्वरा करून आपला अर्थ साधावा.

यानंतर बाजीराव पेशव्याकडून पांडोजी कुंजर तो कांहीं लोकांसहित गारदोंडेस जाऊन होळकराकडचा फत्तेशिंग मान्यायावर हल्ला करिता झाला. तेव्हां तो पांडोजी पराभव पावला. ते समयीं त्या मान्यानें मोठी त्वरा करून बारामतीस जाऊन तेथें पेशव्याचा तळ होता त्यांत नाना पुरंदरे व गणपतराव पानशे मुख्यत्वें असत; त्यांवर पडून त्याणें त्यांचाही पराभव केला; व तेथच्या तोफखानाही त्या मान्यानें घेतला. बाजीरावानें पूर्वीं आपले सरदार रास्ते यांचा अपमान केला यास्तव पटवर्धन व वरकड जे दक्षिणेंतील जहागीरदार यांहीं त्या पांडोजी कुंजराचे व फत्तेशिंग मान्याचे लढायींत मन घातलें नाहीं: जर ते मनावर घेते तर एवढा अनर्थ न होता. ते वेळेस सर्व पटवर्धनांपैकीं एकटा चिंतामणराव मात्र बाजीरावाचा पक्षपाती होता: परंतु तोही थोडक्याच वेळांत श्रीमंतांचा पक्ष सोडिता झाला.

होळकर लश्करसुद्धां ऐलीबेला खेडेकडे चालिला असतां, शिंद्याकडचा सदाशिवराव भास्कर लश्करासहित त्या होळकराची वाट सोडून आळनें व भीरेचे वाटेनें पुण्यास येऊन, पेशव्याच्या लोकांत मिळाला. नंतर ते पेशव्याचे लोक व शिंद्याचे लोक मिळून ऐलीबेलापाशीं त्या होळकराच्या तोंडावर गेले. तें वर्तमान समजून होळकर आमेदनगरचे वाटेनें जेजोरीस जाऊन फत्तेशिंग मान्यास मिळून तेथून सन अठराशें दोहोंचा अक्टोबरचे तेविसाव्ये तारिखेस राजवाडीचा घाट उतरून पुण्याजवळ लोणी व हडप्सर या दोहोंमध्यें उतरला. ते वेळेस पेशवे व शिंदे यांचें लश्कर त्या ऐलीबेल्याहून निघोन माघारें पुण्यास येऊन गारपिरावर राहिलें. असें असतां उभयपक्षीं दोन दिवस तहाचें बोलणें झालें त्यांत पेशवे बाजीराव तें होळकरास ह्मणत कीं, तुला आमचा राजधानीवर शत्रूसारिखें फौज घेऊ

न चालून येण्याचें प्रयोजन नाहीं; यासतूं एथून निघोन जा. त्यावर त्या होळ
करानें उत्तर केलें कीं, मीं स्वामीचा आज्ञेंत अंतर करावयाचा मनुष्य नव्हे; प-
रंतु आमचा धण्याची आज्ञा शिंदा मानीत नाहीं. जास स्वामीनीं स्वदेशगवास
सोडायाची आज्ञा दिली असतां त्याणें त्याचा बंदोबस्त पहिलेपेक्षां अधिक केला; याशि
वाय मीव माझे धणी पेशवे तुह्मी हे आपण उभयतां एकपतेंच वागणार होतों
परंतु शिंदा मजबरोबर युद्धास सिद्ध आला; यास्तव हे समयीं मीं शिंद्याचें
पारिपत्य करून आपल्या स्वामीचा मान रक्षीन. या प्रमाणें त्या होळकराचें
व बाजिरावाचें बोलणें दोन दिवस होऊन अरवटोंबराचे पंचविसाव्ये तारिखे
स प्रातःकाळीं उभयपक्षीं लश्करें सिद्ध झाली, ते वेळेस त्या होळकराकडे चवदा
पलटनें होतीं त्यांत एक कार्नेल व दोन मेजर असे तिघे मुख्य साहेब लोक हो
ते; व त्या पलटनाखेरीज पांच हजार पायदळ असे व पंचवीस हजार स्वार
होते. शिंद्याकडे पलटनें होतीं, परंतु त्यांचा बंदोबस्त होळकराचा पलटनापेक्षां क-
मी व त्यांची संख्या कमी असे. वरकड स्वार व पायदळ त्या होळकराचा बरोबरी-
नें होतें. याप्रमाणें त्या दोहीं कडची सेना उभी राहिली असतां एक प्रहर दिवसा
नंतर उभयपक्षीं तोफांचा मार चालू झाला. तो सहा घटिका पर्यंत एकसारखा
चालत होता, नंतर त्या होळकराचा पठानी स्वारांची टोळी पेशव्याकडचा स-
रदार विंचुरकर यांचा स्वारांवर पडून यश पावली; परंतु तेच वेळेस फत्तेशिंग
मान्यानें पेशव्याचे हुजूर पागेवर हल्ला केला असतां, त्या मान्याचा बहुत नाश
होऊन त्या पाग्याचा जय झाला. हें पाहून शिंद्याचे वरकड जे स्वार होते त्यांस
विशेष अवसान येऊन, त्यांहीं होळकराचा स्वारांवर हल्ला केला, तेव्हां होळक-
राचा स्वारांचा पराभव होयील सा दिसून आला. ते समयीं होळकर आपल्या स-
र्व सैन्याचा पाठिमागें होत्या त्याणें तो सुमार पाहिला आणि तात्काळ आपल्या घोड्या
वर बसून मोठा शब्द करून बोलिला कीं, हे समयीं जे कोणी माझे असतील त्यां-
हीं मजबरोबर यावें. यापुढें उपयोग नाहीं, असें सांगून जे तेथून पळणार लोक
होते त्यांस मोठें धैर्य देऊन निवडक स्वारांसहित स्वयें पुढें सरसून त्या शिंद्याचे स्वा-
र मागें हटविले, इतकें होई तोंपर्यंत जांत इंग्रेजांचा सरदार नाहीं अशी शिंद्याचीं
सहा पलटनें होतीं, त्यांचानें त्या होळकराचा पलटना सन्मूर उभें रहावेना परं-
तु त्याशिवाय त्या शिंद्याचीं चार पलटनें दिवायन साहेबाचा हातचीं त्याचा चा-
लेलीं पुरातन होतीं, त्यांत मुख्य सरदार चवघे साहेब असत, त्या पलटनाहीं
मात्र आपली जागा न सोडितां परम शौर्य करून युद्ध केलें. शेवटीं त्या होळक-
रानें त्या शिंद्याचा सर्व स्वारांचा पराभव करून त्यांतील तोफांचे सर्व गोलंदा-
ज मारून मग त्या आपल्या संपूर्ण लश्करी समुदाया सुद्धां त्याचार पलटनां

वर मोठ्या वेगानें हल्ला करित करीत होवटीं त्या युद्धें करून त्यांतील कोणी साहेब नऊरनां त्या पलटनाचा बहुत नाश होऊन तें युद्ध समाप्त झालें. तेव्हां त्यांशिंद्याच्या सात्या तोफा व पुणगें होळकराच्या हातीं लागलें, त्याचा असा जय झाल्यावर त्या यशवंतरावानें पुणें शहराचा नाश न व्हावा म्हणून आपल्या सर्व लश्करास तेथून मागें फिरावयाची आज्ञा दिली. त्यांतील कोणास हीं शहरांत जाऊं देईना, तेव्हां त्यांतील कोणीं लोक त्या होळकराची आज्ञा न मानितां त्या शहरांत शिरूं लागले. त्यांवर त्याणें तोफांचा मार चालू करून त्यांस मागें फिरविले. असें युद्ध पेशव्याकडचे सरदार त्या होळकराशीं करीत असतां बाजीराव पेशवा, निःसंशय आपला जय होयीलसा समजून जिकडे युद्ध समारंभ होता तिकडे जावयास आपल्या वाड्यांतून बाहेर निघाला. परंतु तोफांचा आवाजास भिऊन शहरा बाहेर दक्षिणेचा आंगीं दूर उभा राहून तेथूनच त्या युद्धाचा परिणामाची वाट पहात राहिला. मग आपला पराभव झालासा समजून सात हजार लोकांसहित तेथून निघोन सिंहगडास गेला. नंतर त्याणें तेथून कर्णेल क्लोस नामें साहेब इंग्लीशांचा वकील ते समयीं पुण्यांत होता, त्यास निरोप पाठविला कीं, इंग्लीशांहीं हे समयीं आमचें साहाय्य केल्यास, सहा पलटनांसहित त्यांहीं आमाचा मुलुखीं रहावें.

पुण्यांचा लढायांत यशवंतराव होळकर जय पावल्यावर त्याणें तेथें संगमावर कर्णेल क्लोस साहेब इंग्लीशांचा वकील रहात होता, त्यास दुसरे दिवशीं आपल्या भेटीस बोलाविला. त्या युद्धांत होळकर व पेशवे या उभय पक्षीं लश्करचे स्वार त्या कर्णेल क्लोस साहेब याचा हवेलीजवळच लढले तथापि त्यास कांहीं उपद्रव न लागला. मग दुसरे दिवशीं तो साहेब होळकराचे भेटीस गेला, तेव्हां त्याणें त्या होळकराचा जसा डौल पाहिला त्याप्रमाणें लिहिलें आहे, तें असें, तो यशवंतराव होळकर विजयी झाला असून घोंट्या इतक्या चिखलांत एक लहानशी राहुटी उभारलेली होती त्यांत त्या साहेबानें त्यास पाहिला, त्या होळकराचा आंगास एक भाल्याची जखम आणि त्याचे मस्तकीं एक तलवारेचा वार लागलेला असे, त्यास भेटावयाचे वेळेस तो होळकर त्या साहेबाशीं बहुत नम्रतेनें वागला आणि त्याचें बोलणें केवळ मोकळ्या मनाचें होतें त्यास त्या साहेबानें त्याचा जखमाची गोष्ट काढिली असतां, तें दुःख त्याचा गणनेंत नव्हतें सें दिसलें, आणि शिंदे व पेशवे यांशीं व त्या होळकराशीं वैमनस्य होतें ते मिटावयाविषयीं यशवंतराव इंग्लीशांची मध्यस्थी इच्छित होता, आणि ते वेळेस त्या साहेबाशीं तशा गोष्टीही निघाल्या.

होळकर प्रथम पेशव्याशीं बहुत नम्रतेनें वागे, व त्यास पुण्यांत बोलावीत

वीत असतां तो बाजीराव ऐकेना; मग तो पेशवा तीन दिवस त्या शिंहगडीं राहून तेथून पुढें रायगडीं* आउन तेथेंही कित्येक दिवस राहून मग पुढें महाडास जाउन तेथून मुंबई सरकारास पत्र पाठविलें कीं, तुम्हीं कांहीं गलबतें पाठवून मी व माझे बरोबरचे लोक यांस आपल्याकडे घेउन जावें. असें लिहिलें असतां त्याचें उत्तर यावयाचे पूर्वीं वसईच्या सरसुभेदार खंडेराव रास्ता तो महाडामध्यें बाजीरावास येउन मिळाला; त्याचा पाठीस लागलेले यशवंतराव होळकराचे लोक तें जवळ आले असें बाजीरावास कळतांच तेथून पळून सुवर्णदुर्गास गेला. तेथेंही आपला टिकाव निघणार नाहीं असें समजून तें स्थळ टाकून रेवदंड्यास गेला. ते ठिकाणीं इंग्लीशांचीं जहाजें येउन त्यास खंडेराव रास्त्यासुद्धां बाजीरावास दिसेंबराचे सहाव्ये तारिखेस वसईत नेउन पोंहचविला. त्यापुढें त्या वसईमध्यें इंग्लीश व बाजीराव यांचा विशेष तह झाला त्याचें मूळ तेंच. तो विस्तार लिहावयाचे पूर्वीं बडोद्यामध्यें सन् सत्राशें ब्याण्णवांपासून जीं वर्तमानें झालीं तो प्रकार समजला पाहिजे.

सन् सत्राशें ब्याण्णवांत गोविंदराव गाइकवाड यास बडोद्याचा अधिकार प्राप्त झाला, असें पूर्वींचे भागीं लिहिलें आहे; आणि आबा शेलूकर तो नाना फडनवीसाबरोबर बंदींत पडला असें लिहिलें आहे. तो आबा शेलूकर पुढें सन् सत्राशें अठ्याण्णवांत दवलतराव शिंद्यास दहा लक्ष रुपयांचें करारपत्र देउन आपली मुक्तता करून घेतली आणि तेथून अमदाबादेस जाउन तेथचा कारभार चालविला; परंतु तो आबा नानाचा पक्षपाती यास्तव बाजीरावानें गोविंदराव गाइकवाड यास गुप्तपणें अनेक प्रकारें शिकवून त्याशीं व आबा शेलूकराशीं वैमनस्य पाडिलें. त्यापासून लवकरच त्या दोघांचा युद्धप्रसंग होउन ते उभयतां एकमेकांच्या नाशाविषयीं अनेक प्रकारें एकमेकास उपद्रव देउं लागले; त्यांत प्रथम आबा शेलूकराचें प्राबल्यसें दिसलें, मग दुसरे वर्षीं (सन् सत्राशें नव्याण्णवांत) सुर्तेचा नवाब मृत्यु पावला; ते समयीं त्याचा भावास तो अधिकार व्हावा, तत्संबंधें कांहीं बंदोबस्ताविषयीं डंकन साहेब नामें मुंबईचा गवरनर सुर्तेस गेला. ते वेळेस गोविंदराव गाइकवाड याचे दोघे वकील त्या साहेबाच्या बहुमानास्तव सामोरे गेले. तेव्हां तो समय स्वकार्यसाधनोपयोगी सा जाणून त्या साहेबानें सुर्तेंत चवथाई भाग गाइकवाडाचा होता तो व त्यालगत चवऱ्याशीं नामें एक परगणा मागीतला. तेव्हां ती गोष्ट गोविंदरावानें तात्काळ कबूल केली.

---

* रायगडीं माधवराव रास्ता बंदींत होता त्यास मुक्त करून त्याची जहागीर त्यास माघारी देउन आपल्याकडे नवे लोक ठेवावयाचे कामावर बाजीरावानें त्यास नेमिला.

त्या

त्यावरून असें दिसून आलें कीं, हे समयीं इंग्लीशांस गाईकवाडानें इतका सुदुग्वरूणा-च दिला; परंतु असें न समजलें कीं, त्याणें थोडक्याच दिवसानीं त्या आबाशेलकराचा नाशाविषयीं कुमक मागावयाचा मसलतीनें दिला.

सन अठ्ठाशेंत तो गोविंदराव गाईकवाड मृत्यु पावला, ते समयीं त्याचे औरसपुत्र चवघे व दासीपुत्र सात होते याशिवाय कांहीं कन्याही होत्या; त्या चवघा पुत्रांत वडील आनंदराव, त्यास मुख्य मानकरी, तो आपला धनी असें मानीत, परंतु त्या आनंदरावाचा ज्ञानांत कांहीं कमीपणा होता म्हणून कित्येक त्या राज्यांतील मंडळ आपलें महत्त्व स्थापावयाविषयीं उद्युक्त झालें. त्या गोविंदरावाचा दुसरा पुत्र कान्होजी तो कांहीं बंड करील अशे अटकळीनें, गोविंदराव त्यास बंदींत ठेविता झाला; मग तो गोविंदराव मेल्यावर त्या कान्होजीनें आनंदरावास बहुत नम्रतेचा गोष्टी सांगून आणि लष्करी लोक यांस मध्यस्थ करून आपण बंदींतून सुटका पावला; नंतर तो तेथचा मुख्य कारभारी झाला. परंतु इतक्यानेंच त्यास तृप्ति नसे, यास्तव तो सर्व अनेकप्रकारें राजाप्रमाणें सत्ता करूं लागला. असे चार महिने गेल्यावर कोणी एक रावजी आपा नामें गोविंदराव गाईकवाडाचा मुख्य कारभारी होता, तो प्रबळ होऊन त्याणें त्या कान्होजीला पदच्युत केला. तेव्हां तो कान्होजी व तो रावजी आपा परभू आपणास इंग्लीशाची कुमक मागीत होते, त्यांत रावजी परभू इंग्लीशांस अशी आशा दाखवी कीं, गोविंदराव याणें तुम्हांशीं जो करार केला तो मी शेवटास नेईन; आणि कान्होजीही इंग्लीशांस तेंच सांगून त्याखेरीज चिखली परगणा देतों, म्हणून कबूल करिता झाला. तो रावजी परभू याचा भाऊ बाबाजी परभू तो बडोद्यांतील संपूर्ण स्वारांचा सरदार असे, त्याचे पुष्टीस त्या बडोदे शहरांत सात हजार आरब होते ते अनुकूळ असत.

तो कान्होजी गाईकवाड याची पुष्टी करणारा मल्हारराव गाईकवाड तो कडीचा जहागिरदाराचा पुत्र, तो शूर आणि मोठा दक्ष होता; त्याणें लष्कर जमा करून त्या आनंदरावाचे कित्येक किल्ले व जितकीं ठाणीं होतीं तीं घेतलीं; तेव्हां त्या आनंदरावाचा मुख्य कारभारी रावजी याणें विलंब न करितां मुंबई सरकारास अर्जी केली कीं, आम्हांस हे समयीं मल्हाररावाचा उपद्रव शमनार्थ पांच पलटनें पाठविलीं पाहिजेत; आम्ही त्यांची चाकरी घेऊन रोजमुरा देत जाऊं. ते समयीं मुंबई सरकारास ती गोष्ट उत्तम शी वाटली आणि त्यांत आपलें हित आहे असें समजलें, परंतु कलकत्याचा मुख्य साहेब याची आज्ञा झाल्यावांचून त्या मुंबईचा साहेबास त्या गाईकवाडाला तादृश अनुकूळ होतां येईना म्हणून ते पत्र येतांच त्यांहीं मोकळे लोक मात्र त्याचे कुमकेस पाठविले. त्यांत मेजर वाकर साहेब नामें मुख्य केला होता; तो सन अठ्ठाशेंचा फेब्रुआरीचे अखेरीस त्या लोकांसहीत गाईकवाडाचा लष्करांत मिळून तो कडीवर चालिला. तेव्हां तो मल्हारराव गाईकवाड याणें आम्हांपासून चूक झाली असें बोलून जीं ठिकाणें घेतलीं होतीं तीं माघारीं देतों असें कबूल करून त्याशीं लढाई करावयाचा आकार घालता, परंतु ना-

नी

ची ममलत समय पाहून घात करावयाची होती, त्याप्रमाणें त्याणें कोणे एके समयीं त्यावर छापा घातला तो इंग्लीशांच्या बंदोबस्तामुळें शेवटास न गेला, परंतु थोडक्याच दिवसांत असें दिसून आलें कीं, त्याणें गाईकवाडाचें बहुतेक वश केलें. असें असतां मेजर वाकर साहेब यांचा कांहीं उपाय चालेना. त्याणें कडीपाशीं राहून आपलें संरक्षणमात्र केलें आणि आपल्ये पुष्टीकरितां मुंबई सरकारास फौज मागून त्याची मार्गप्रतीक्षा करीत राहिला. मग एप्रिलाचे तेविसाव्ये तारिखेस मुंबईहून नवे लोक येऊन त्या कडीकिल्याच्या तटाखालीं उतरून आपल्यासमूर खंदक करून त्याची माती आगोजाग तटाप्रमाणें उंच करून तेथें बळ धरून राहिले होते. त्यांवर गाईकवाडाचे व इंग्लीशांचे लोक जाऊन जय पावले. त्या युद्धांत इंग्लीशांचे लोक मेले व जखमी मिळून एकशें त्रेसष्ट पडले.

यानंतर मल्हारराव तें युद्ध टाकून इंग्लीशांच्या स्वाधीन झाला ते समयीं तो कडीचा किल्ला गाईकवाडाचे स्वाधीन झाला, तेव्हां मल्हाररावास प्रतिवर्षीं सवा लक्ष रुपये निर्यादाच्या वसूलापैकीं देऊन तेथें त्याणें रहावें असें केलें.

हें काम झाल्यावर कोणी गणपतराव नामें गाईकवाडाचा भाउबंद, तो बडोद्यापाशीं संकेरा नामें किल्ला आहे तेथें मल्हाररावाच्या पक्षानें लढत असून तो किल्ला देईना; तेव्हां तें स्थान इंग्लीशांहीं बलात्कार करून घेतलें. ते समयीं त्या गणपतरावाजवळ मुरारराव नामें आनंदरावाचा दासीपुत्र होता ते दोघे तेथून निघोन धारेस जाऊन तेथच्या पवाराचा आश्रय पावले.

त्यापुढें अणीक एक मोठें काम राहिलें होतें तें थोडक्याच वेळांत शेवटास गेलें. तो प्रकार असा, बडोद्यामध्यें आरब लोक होते त्यांहीं आपला रोजमुरा थकल्याचे निमित्तें आनंदराव गाईकवाड यास कैद करून त्या शहरांत सत्ता करूं लागले आणि कान्होजीस बंदींतून सोडून दिला. ही अव्यवस्था इच्छितं नव्हावी म्हणून त्या लोकांस मेजर वाकर साहेब याणें बहुत प्रकारें सांगीतलें, परंतु त्या सांगण्याचा उपयोग नाहीं सा पाहून त्या साहेबानें बडोद्यास भोंवता घेरा घातला. तेव्हां ते आरब आंतून दहा दिवसपर्यंत लढले; त्या लढाईंत कित्येक साहेब सरदार मेले गेले. नंतर तसेंच युद्ध चाललें असतां, इंग्लीशांच्या मोर्चा लागू होऊन त्या किल्ल्याची भिंत ढांसळून मोठें खिंडार पडतांच, ते आरब लोक युद्ध टाकून तहाचें बोलणें करूं लागले; तेव्हां गाईकवाडानें त्या आरब लोकांची वाजवी बाकी साडेसत्रा लाख रुपये राहिली ती देऊन त्याहीं आपल्या राज्याचे मर्यादे बाहेर जावें असें कबूल करवून, त्यांस तेथून बाहेर घालविलें. ते बहुतेक आपल्या बोलीप्रमाणें निघून गेले, त्यांतील एक आबू असाहार नामें होता तो मात्र त्या कराराप्रमाणें न चालतां, आपले बहुतेक लोक बरोबर घेऊन राजपिंपळीस जाऊन कान्होजीला मिळाला.

तो कान्होजी कित्येक लोक जमा करून आगोजाग सुलुख लुटित असे, आणि खंडनी ही घेत असे, तेव्हां (सन अठ्ठाशेंतिहींमध्यें) मेजर होमस नामें साहेब एक टोळी घेऊन आला त्याची व त्या कान्होजीची लढाई होऊन इंग्लीश जय पावल्यावर त्यांहीं कान्होजीचा पाठीस लागून, कापडवंजेस त्याला गांठून त्याचा सर्व लोकांची दाणादाण केली. तेव्हां तो कान्होजी तेथून पळून उज्जनीस जाऊन राहिला.

सन अठराशें दोहोंपासून अठराशें आठ पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग एकतिसावा

अनुक्रमणिका

होळकर पुणें मुक्कामीं जय पावल्यानंतर तेथच्या लोकांस उपद्रव न दे-तां नम्रतेनें वागल्याचें कारण.

त्याणें बाजीराव पेशवा याच्या गादीवर अमृतरावाचा पुत्र विनायकरा-व यास बसविला.

वसईंत पेशवा व इंग्लीश यांचा तह झाला तो प्रकार.

त्या तहास विघ्न करावयाविषयीं, शिंदे व रघुजी भोंसले एकमत्त होऊन गुप्तपणें सैन्य जमा केलें.

इंग्लीशांच्या बळानें बाजीराव पेशवा आपल्या गादीवर पुनः बस-ला.

रघुजी भोंसला व शिंदा, यांशीं इंग्लीशांहीं तहाचें बोलणें लाविलें तें सि-द्धीस न जातां उभयपक्षीं मैत्री तुटली.

आमेदनगर किल्ला इंग्लीशांहीं घेतला.

असाई जवळची मोठी लढाई.

असीरगड व भडोंच व पवनगड हे किल्ले इंग्लीशांहीं घेतले.

हिंदुस्थानांतील युद्धप्रकार.

दिल्ली व आग्रे व लासवारी यांजवळच्या लढाईची गोष्ट.

दक्षिणेंत आरगांवाजवळ लढाई झाली तें प्रकरण.

देवगांवच्या व सर्जीअंजिणगांवच्या तह.

होळकर व इंग्लीश यांचें वैमनस्य पडून जनराल लेक साहेब सैन्यास-ह त्याचे पाठीस लागून त्यास त्याचे मुलखीं चालविला.

त्यानंतर तो होळकर पुनः येऊन त्याणें कर्णेल मानसन साहेब याचा हाताखालचे एके टोळीचा पराभव केला.

मग तो होळकर मोठ्या सैन्यासहित हिंदुस्थानांत शिरला.

त्या होळकराचें लष्कर दिल्लीजवळ पराभव पावलें.

डिगाजवळची लढाई.

तो किल्ला इंग्लीशांहीं घेतला.

होळकराचे दक्षिणेंतील किल्ले व त्याची राजधानी इंदूर इंग्लीशां

नीं लागले.

जनराल लेकसाहेबानें भरतपुर किल्ला घ्यावयाचा उद्योग केला तो शेवटास न गेला, तथापि त्या राजानें वकील पाठवून इंग्लीशांशीं तह केला.

शिंद्यानें होळकराचा पक्ष स्विकारिला यास्तव त्याशीं व इंग्लीशांशीं वैमनस्य पडलें.

होळकर पंजाबाकडे पळाला, त्याचे पाठीस लेकसाहेब लागल्यामुळें त्या उभयतांचा तह झाला.

तेच समयीं शिंद्यानेंही इंग्लीशांशीं तह केला.

होळकर पंजाबांतून आल्यावर त्यास वेड लागून तो मृत्यु पावला. त्याचा स्वभावादिकाचें वर्णन.

भाग एकतिसावा.

बाजीराव वसयींत आश्रय पावला इतक्यांत पुण्यामध्यें काय काय वर्तमान झालें तें प्रकरण असें. होळकरानें आपल्या लोकांपासून पुणेंशहर यास उपद्रव न लागावा म्हणोन कारबंदोबस्त ठेविला, तो केवळ तेथच्या लोकांसच उपयोगीं असा नव्हता; त्यांत अशी मसलत होती कीं, बाजीराव आपल्या हातीं सांपडावा, नंतर ती मसलत सिद्धीस जात नाहीं असें समजून त्याणें अमृतराव पेशवा जुन्नरास होता त्यास पुण्याचें राज्य चालवावयाकरितां बोलाविला; तेव्हां तो कित्येक दिवस मान्य होईना; शेवटीं सन अठराशें दोहोंच्या नवेंबराचे बाराव्ये तारिखेस पुण्यांत येऊन आपला डेरा भामवड्यास देऊन तेथेंच राज्यकारभार मोरोबा फडनवीस व बाबूराव फडके वगैरे नानाफडनवीसाचें पक्षपाती मंडळ यांच्या साहाय्येंकरून चालविला. नंतर होळकर याणें त्या अमृतरावास गादीवर बसून राज्य करावयाची मसलत दिल्ही असतां तो ऐकेना, म्हणून त्याचा पुत्रास होळकर गादीवर बसविणार होता, तेंही त्याणें न ऐकिलें. परंतु त्यास जेव्हां समजलें कीं, बाजीराव पेशवा याणें इंग्लीशांचा आश्रय धरिला, तेणेंकरूनच तो पेशवेपणास मुकला, असें आपलें तेव्हां त्या अमृतरावानें होळकराचें बोलणें मान्य केलें, नंतर त्या अमृतरावाच्या पुत्र विनायकराव यास पेशवेपदवीचीं वस्त्रें आणविलीं; तीं साताऱ्याचा राजा त्यास प्रथम देत नव्हता, मग त्या राजाचा भाऊ चतुरसिंगराजा तो त्या होळकराचा पक्षपाती झाला, असें त्या-

चा

त्या सांगण्यावरून राजानें विनायकरावास तें पद दिलें. याप्रमाणें त्या होळकरांची मसलत सिद्धीस गेल्यानंतर त्याणें आपल्या दुष्ट स्वभावासारिखें कृत्य आरंभिलें. त्यांत प्रथमतः दोघे बाजीरावाचे कारभारी चिंतोपंतदेशमुख व वैजनाथभटमामा भागवत. यांस हातांखालीं घेतलें. तेव्हां त्यांहीं त्यास लष्करखर्चासाठीं शहरच्या लोकांस पुढें होळकराचा उपद्रव न लागावा ह्मणून, त्या सर्वांकडून खंडणीसारिखें द्रव्य देवविलें. नंतर तें असें उत्तम कार्य करणारे जे पुरुष त्यांसच कैद करून आपल्याजवळचे अत्यंत क्रूर हरिपंत भावे व हरिनाथ नामें दोघे ब्राम्हण होते, त्यांचे स्वाधीन त्या दोघां जणांस करून सांगीतलेंकीं, तुमच्या इच्छेस येईल तसें यांस छळून द्रव्य घ्यावें. तेव्हां त्यांहीं त्या दोघांस व त्यांशिवाय दुसरेही त्या शहरचे सर्व थोर कुलीन लोक त्यांस अनिर्वचनीय दुःख देऊन त्यांचें सर्वस्व हरण केलें.

बाजीरावपेशवा ज्या दिवशीं वसईंत पोंहचला त्याच दिवशीं कर्णेल क्लोससाहेब तेथें अगोदरच पुण्याहून आऊन राहिला, होता तो व बाजीराव यांची दिसंबराचे सहाव्ये तारिखेस भेट झाली, तेव्हां त्या कर्णेलक्लोससाहेबानें बाजीरावास पूर्वींच तहाचा प्रकार लिहून पाठविला होता, ती गोष्ट तो साहेब बोलतांच बाजीराव त्यास मान्य झाला. नंतर आणखी कांहीं त्या उभयतांचें बोलणें होऊन एकतिसाव्ये तारिखेस तो तह ठरला. त्याचें निमित्त असें कीं पेशवे व इंग्लीश यांहीं परस्पर एकमेकाचा व जे आपले सहाय असतील त्यांचा संरक्षणाकरितां बाहेरचा शत्रू जिंकावा. त्या कामास इंग्लीशांचें सहा हजार पलटणी लोक व त्या बेताप्रमाणें गोरे गोलंदाज यांसहित तोफखाना, आपल्या राज्यांत पेशव्यांहीं राहूं द्यावा. त्यांतील दोन हजार लोक नेहमीं पेशव्याजवळ असावे; याखेरीज पेशव्याकडचे दहा हजार स्वार व सहा हजार पायदळ याप्रमाणें कुठेंही युद्धप्रसंग पडल्यास   असावें; आणि विलायतेंत कोणे एके मुलखीं इंग्लीशांचे द्वेष्टे रहातात, त्या मुलखच्या कोणी पेशव्यानें आपल्या चाकरीस ठेवूं नये, याशिवाय इंग्लीशांच्या लष्करखर्चास बाजीरावानें तिसा लक्षांचा मुलुख द्यावा, आणि पेशवे पूर्वीं सुरतेंत आपला कांहीं हक्क घेत होते तो न मागावा, असेंही कबूल करून निजाम व गायकवाड यांजकडून पेशवे बाकी ऐवज घेणार होते तो इंग्लीशांच्या द्वारें घ्यावा, याप्रमाणें मान्य होऊन दुसरेंही कबूल केलेंकीं, पूर्वीं निजामाशीं महाडचा तह ठरला होता त्यास आम्हीं मान्य आहोत; आणखी नुकसानच आ-

नंदगाव

[illegible]यकत्यानें इंग्लीशांशीं तह केला आहे त्यासही कबूल आहोत. याशिवाय दुसऱ्या कोणाशीं तह करणें तर, तोही इंग्लीशांचे मसलतीवांचून करणार नाहीं.

याप्रमाणें वसईत बाजीराव मोठ्या अडचणीमुळें पूर्णपणें तह करून इंग्लीशांस मिळाला असें झालें, परंतु तो एक बुद्धीचा मनुष्य नव्हे त्याचा स्वभाव होता कीं, कोणाशींही निष्कपटपणें स्नेह न करितां दुसऱ्यांस फसवावें; यास्तव तुकताच तो तह ठरून तें करारपत्र होऊन त्यावर मोर्तब होतें तोंच, त्याचा मनांत आलें कीं, शिंदा व रघुजी भोंसला यांस होळकराचा पारिपत्याचें मिषें करून पुण्यास बोलावून आणून मग त्यांकडून इंग्लीशांस घालवून द्यावें. त्यांतच दुसरें त्याचा मनांत आलें कीं, तें युद्ध होऊन कदाचित इंग्लीश जयपावलेनंतर आपण यांशीं स्नेह केला आहे हाच वृत्तिगत करूं, असें मनांत आणून त्याणें शिंद्याकडे बाळोजी कुंजर आणि रघुजी भोंसल्या यांकडे नारायणराव वैद्य पाठविला, तो पर्यायें दिसण्यांत असा केला होता कीं, इंग्लीशांशीं व आम्हाशीं तह झाल्याचें वर्तमान कळवावयाकरितां हे दोघे वकील या उभयतांकडे पाठविले; परंतु आंतून अर्थ असा कीं, मी बहुत अडचणीमुळें इंग्लीशांशीं तह केला या गोष्टीचा राग मनांत न धरितां त्वरेकरून माझा कामास यावें. हे वर्तमान त्या उभयतांस कळतांच ते दोघे एकमत होऊन त्यांनी विचारिलें कीं, हा तह आम्हां सर्व मराठ्यांस बाधक होईल, त्यास तो सिद्धीस जाऊं देऊं नये.

नंतर कलकत्त्याचा गवरनर जनरलसाहेब याणें शिंदे व रघुजी भोंसले यांचा मनास बाजीरावानें केलेला तह, कदाचित येणार नाहीं असें समजून आपले वकील त्यांकडे पाठविले; कीं, बाजीरावाच्या व आमच्या परस्परें एकमेकांचीं राज्यें संभाळावयाकरितां तह झाला आहे, तसेंच तुम्हांशीं व आम्हांशीं ऐक्य एकमेकांचा राज्य रक्षणार्थ असावें. त्याजवरून शिंदा मोठी फौज घेऊन बऱ्हाणपुरीं होता, त्याणें तें इंग्लीशाच्या वकिलाचें बोलणें ऐकून उत्तर केलें कीं, हे समयीं ही गोष्ट माझ्या मनास येत नाहीं, तथापि माजकडून इंग्लीशांशीं किमपि द्वेष नाहीं, असें निश्चित समजावें. याप्रमाणें त्याचें बोलणें होऊन पुढें समजण्यांत आलें कीं, त्याणें व रघुजी भोंसल्यानें इंग्लीशांशीं युद्धाविषयीं मोठी तयारी आरंभिली; आणि दुसरें ही विदित झालें कीं, हे समयीं बाजीराव व शिंदा व रघुजी भोंसला यांचें ह्याविषयीं अन्योन्य पत्रद्वारें ऐक्य झालें आहे, त्यापुढें इंग्लीशांहीं बाजीरावपंताच्या फौजबरोबर ज्यामध्यें बाराशें गोरेलोक होते असें

होत

दोनहजार तीनशें सैन्य देऊन पुण्यास आणवून सन अठराशें तिहींच्या मे महिन्याचे तेरावे तारिखेस मोठ्या समारंभानें गादीवर बसविला. त्या पूर्वी कलकत्त्याचा गवरनरजनरलानें आपली फौज हैदराबादेस होती ती आणि मद्रासेची आणून निजामाची व दक्षिणेंतील जहागीरदार यांजकडची सेना घेऊन होळकरास दक्षिणेंतून घालवून राज्याचा बंदोबस्त केला होता. तसा अगोधरच अमृतरावही पुणें सोडून गेला असे; तेव्हां त्याणें जातांना प्रथम संगमनेरगाव लुटून तेथून तो घाट सोडून चाकडा नाशिकास जाऊन तेथेंही पुण्याप्रमाणेंच लोकांस बहुत दुःख देऊन तें क्षेत्र लुटलें; तसेंच याणें सर्व गांव लुटीत गेला. त्यानंतर त्याणें लिहायाजोगें कृत्य केलें नाहीं; आणखी त्याशीं व बाजीरावाशीं ऐक्य होईना ह्मणून तो कित्येक स्वारांसहित कांहीं वर्षे इंग्लीशांच्या चाकरीस जाऊन राहिला; त्यानंतर त्या इंग्लीशांहीं प्रतिवर्षी त्यास आठलक्ष रुपये देऊन काशींत ठेविला. त्याचा पुत्र विनायकराव तो अद्यापि तेथें आहे.

रघुजी भोंसले व शिंदे यांहीं इंग्लीशांस दक्षिणेंतून घालवावयाचा मसलतींत होळकरास त्याविषयीं फार बोलणें लाविलें; तेव्हां त्याणें प्रथम मी तुम्हांस अनुकूळ होत नाहीं असें त्यांस न भासवितां त्यांकडून आपला माळव्याचा मुलुख पुरातन जहागीर तो सोडवून बाजीराव पेशवा याचा कैदेंत खंडेराव होळकर नामें आपला पुतण्या असे, तोही मुक्त करून मग आपणास अवश्य हिंदुस्थानांत जावयाचें काम आहे असें निमित्त करून त्यांस न मिळतां माळव्यास जाऊन राहिला.

यानंतर इंग्लीशांचा मुख्य गवरनर जनराल साहेब यास शिंदे व भोंसले मोठमोठीं सैन्यें घेऊन निजामाचा मुलुखाचे मर्यादेसमीप दोघे जवळजवळ राहिले असें विदित होऊन, त्याणें त्या उभयतांस विचारिलें कीं, तुमच्या मनांत काय असेल तें स्पष्ट सांगा. त्यावेळेसच त्या साहेबानें आपली फौज अमेदनगरापाशीं आणून ठेविली होती. तेव्हां त्याणीं कालक्रमणार्थ मात्र तुम्हांशीं आमची वकता नाहीं असें बहुतवेळ उत्तर दिलें असतां शेवटीं त्या साहेबाचे फौजेचा मुख्य जनराल वेलस्ली नामें साहेब याणें त्या उभयतांस सांगितलें कीं, जर तुम्ही ह्मणतां हें सत्य आहे तर तुम्ही दोघे आपआपली फौज घेऊन परतून जा; आम्हीही आपली फौज माघारी नेऊं, असें कित्येक दिवस गेल्यावर त्या दोघांहीं इंग्लीशांच्या वकीलास विपरीत उत्तर केलें. तेव्हां तो वकील त्यांपासून निघोन

तेव्हां

गेल्या तीन उभयपक्षीं युद्धाची तयारी करावयास रुजू झाली, असें सन अठराशें तिहींचा आगस्टाचे तिसऱ्ये तारिखेस घडलें.

ते समयीं त्या युद्धाविषयीं इंग्लीशांजवळ पन्नास हजार रुमारें फौजेची तयारी झाली होती; त्यांतील साडेसाहा हजार लोक हिंदुस्थानांत नेमिले; त्यांचा मुख्य जनराल लेक साहेब केला; बाकी फौज गुजराथेंत व दक्षिणेंत होती. त्यां सर्वांचा एक मुख्य जनराल वेलसली साहेब होता, त्याणें साडेसातहजार रुमारें लोक गुजराथेंत ठेवून कित्येक पुण्याचा रक्षणास व हैदराबादचा बंदोबस्तास नेमून एकभाग कृष्णा व तुंगभद्रा नदी यादोहींचा मध्यभागीं ठेवून, सत्राहजार रुमारें फौज आपल्याबरोबर सर्वत्र संचारार्थ घेतली.

दवलतराव शिंदा व रघुजी भोंसला या उभयतांमिळोन एकलक्ष रुमारें सेना होती. त्यांत शिंद्याचे गोरे सरदार सहित पलटनीलोक तीस हजारांवर असत, आणि स्वार रुमारें पन्नास हजार होते. बाकी कित्येक तोड्याचे बंदुकवाले व कित्येक बाणदार, आणि गोरे सरदार विरहित, अर्धवट कवाईत शिकविलेले रघुजी भोंसल्याचे पलटनीलोक असत. त्या दोहीं लश्कराचा तोफखाना मिळून दोन तीनशें तोफा होत्या; त्यांत शिंद्याचे गोलंदाज फार चतुर होते, त्या शिंद्याचा पलटनांतील सत्राहजार रुमारें पायदळ व आठहजार रुमारें स्वार हिंदुस्थानांत शिंद्याचा मुलुख रक्षित असत.

याशिवाय इंग्लीशांस विपरीत असा आपणास पेशव्याचा पक्षपाती ह्मणविणारा कोणीएक समशेर बहादर नामें बाराहजार लश्करासहित बुंदेलखंडांत होता.

इंग्लीशांचा मुख्य सरदार वेलसली साहेब तो समजला कीं, हे समयीं युद्धाशिवाय दुसरा उपाय नाहीं, तेव्हां आमेदनगर घ्यावयास कांहीं लश्कर पाठविलें. त्या आमेदनगरच्या किल्ला याची बांधणी चिरेबंदी आणि त्या सभोंवता मोठा खंदक आहे; त्यावरून पूर्वी चांदबिबी नामें बादशाहाची स्त्री होती, तीचा वडीवारीपासून तें स्थळ मोठें दुःप्राप असें लोक मानीत होते. त्या किल्ल्यापासून पेठ निराळी; तीचा सभोंवता मातीचा तट आहे. त्यांत ते वेळेस आरबलोक यांचा एक समुदाय व शिंद्याचें एक पलटन होतें, आणि किल्ल्यांत पंधराशांवर रुमारें शिपायीलोक असत. याशिवाय तो किल्ला व ती पेठ यांचा मध्यभागीं एक स्वारीचा जमाव होता; असें असतां इंग्लिशांचे लोक त्या पेठेजवळ जाऊ-

न

न त्यांहीं विलंब न करितां तत्काळ शिडी लाऊन त्या भिंतीवर चढून आं-त उतरून ती पेंठ हस्तगत केली, नंतर मोठे मोठे मोर्चे लावून किल्या-च्या तटास खिंडार पाडिलें, तें पाहातांच तेथचा किल्लेदार भयभीत होऊ-न आपल्या लोकांकडून निघोन जावयास मार्गमात्र मागून किल्ला देता झाला.

त्यानंतर जनराल वेलसलीसाहेब आपल्या लष्करचे लोक त्या किल्यांत ठेऊन, आपल्या बरोबरचे लोक आठ हजार स्वमारें मुलखां-त संचाराच्या हेतानें दुसऱ्या कोणा सरदाराच्या स्वाधीन करून बाकी लोकांसहित आपण आगष्ट महिन्याचे एकोणतिसाव्ये तारिखेस औरंगाबादेस गेला. इतक्यांत मराठ्यांचें लष्कर अजिंट्याच्या घा-टानें जाऊन जालनास उतरलें. मग तेथून उठोन अग्नायी दिशेस चालिलें, त्यावरून तें हैदराबादेस जाईल अशी वदंता उठली; यास्तव वेलसली साहेब औरंगाबाद सोडून गोदावरीकडे चालिला. तें वर्त-मान ऐकून मराठे तीवाट सोडून तेथून उत्तरेस निघालें. त्या लष्क-रांत युद्धाविषयीं बंदोबस्त ठीक नव्हता; कांकीं, दवलतराव शिंदे व रघु-जी भोंसले हे दोघेही युद्ध निपुण नसून दोघांचें वागणें एकामताचें न व्हतें.

यानंतर जनराल वेलसली साहेब याणें मुलखांत संचार क-रावयाकरितां जो आपल्या लष्कराचा भाग वेगळा केला होता तो व त्या बराबरचें लष्कर, सप्तेंबराचे एकविसाव्ये तारिखेस एकच मिळालें, तेसमयीं वर्तमान आलें कीं, मराठ्यांचें लष्कर जाफराबादे-पाशीं बोरवरदनामें गांव आहे तेथें येऊन उतरलें; त्यावरून त्या सा-हेबाचा विचारास आलें कीं, पुनः दोन्हीं भाग निरनिराळे करून वेग-ळ्या वेगळ्या वाटांहीं जाऊन एकाएकीं त्यावर हल्ला करावा. मग ते-विसाव्ये तारिखेस तो साहेब तेथून उठला नंतर दुसरे दिवशीं मुकाम करते वेळेस त्या साहेबास कळलें कीं, आपणापासून जवळ तीन को-सांवर शत्रूचें लष्कर आहे, तेव्हां त्याणें आपल्या लष्करचें बुणगें तेथें ठेविलें आणि त्याचा रक्षणास एक पलटन ठेवून बाकीचे लोक ब-रोबर घेऊन आपल्या लष्कराचा दुसऱ्या भागाची वाट न पाहता त्वरेनें शत्रूवर चालिला, तो कांहींसा तिकडे गेला असता शत्रूचें लष्कर प-न्नास हजार स्वमारें शंभर तोफांसहित खेळणा नदीच्या पलीकडच्या कां-ठीं, जुवा नदी संगमाजवळ उतरलेलें त्याचा दृष्टीस पडलें. तेथें [illegible]

उभयतां

लष्कराचे डाव्ये बाजूस आग्रायनामें एक भुयींकोटाचा गांव पाहिला, तेसमयीं त्या साहेबाजवळ साडेचार हजार सुमारें सैन्य होतें आणि त्याबरोबर पेशवे व म्हैसूरचा राजा यांकडचे कांहीं स्वारही होते परंतु ते इंग्लिशांस त्यांचा विश्वास येईना म्हणून त्यांपासून युद्धोपयोग विशेष होऊं दिला नाहीं. आणि आपली टोळी तर शत्रूच्या सैन्यापेक्षां फार लहान म्हणून व शत्रूचा तोफखाना प्रथम हातीं लागल्यास मोठा उपयोग होईल असें जाणून त्याचा तोंडावर समोर न जातां डाव्ये बाजूस जेथें त्याचा तोफखाना होता त्यावर चाल केली, तेव्हां मराठ्यांहीं आपला तोफखाना सुरू करून प्रथम इंग्लिशांच्या पायदळाचा नाश बहुत केला; शेवटीं इंग्लिशांचे गोरे स्वार वेगेंकरून चालून त्यांवर गेले, ते वेळेस मराठ्यांचे स्वार व पायदळ यांस त्यापुढें उभें राहवेना, आणि त्या गोरे लोकांचे कुमकेपुढें सरून सढून लढत असतां मद्रासचे पलटणी स्वार येऊन पोंहचले नंतर तें पायदळ मराठ्यांचें मागें हटले, त्यास जागेचा संकोचामुळें ते एकीमागें एक अशा दोन ओळी धरून उभे होते, त्यांतील पुढची ओळ इंग्लिशांच्या नेटानें मागचे ओळीस मिळून, त्यांचा बंदोबस्त दिसकटून इंग्लिश त्यांवर पडले, तेव्हां मराठ्यांच्या लोकांस इंग्लिशांहीं जुयानदींत घालविलें. त्यांतून जे ती नदी उतरून पळूं लागले त्यांतल्या कित्येका लोकांस इंग्लिशांच्या स्वारांहीं मारिलें.

रघुजी भोंसल्यानें या युद्धाच्या आरंभींच पळाला, आणि शिंदाही थोडक्याशा वेळानें तसेंच करिता झाला; त्या युद्धांत सर्व मराठी सैन्यांतील शिंद्याचीं कित्येक पलटणें व त्यांचे गोलंदाज यांणींमात्र, उत्तम प्रकारें युद्ध केलें, तेव्हां मराठ्यांचे लोक बहुत जखमी झाले आणि बारशें ठार पडले, त्यांत शिंद्याचा प्रधान यादवराव भास्कर नामें होता तोही मेला गेला. असा मराठ्यांचा मोड होऊन, त्यांच्या अठ्यांण्णव तोफा इंग्लिशांच्या हातीं लागल्या. याप्रमाणें आसाईच्या जवळच्या युद्धांत इंग्लिशांहीं विजयी होऊन, मोठा मान संपादिला. ते समयीं इंग्लिशांच्या समुदायांतील लोक मेले व जखमी मिळून, तिसऱ्या चारश्यांवर सुमारें पडले. त्या युद्धांत एक विशेष झाला तो असा, मराठ्यांहीं आपल्याजवळ इंग्लिश येऊन भिडले असें पाहतांच, भूमीवर वेडीवांकडीं अंगें टाकून अगदीं मृतप्राय पडले, नंतर त्यांस आपल्या अंगावरून पुढें जाऊं देऊन एकाएकीं उठून त्यांचा मागून तोफांचा मार केला.

त्या साहेबानें आपल्या लष्कराचा भाग वेगळा केला होता त्या-

स

स वाटेनें कांहीं अडचण पडून दुसरे दिवशीं संध्याकाळपर्यंत येऊन पोंहचला नाहीं; मग तो येऊन मिळाल्यावर त्यास वेलसली साहेबानें नर्मदेकडे शिंद्याचे पाठीस लाविला, तेव्हां शिंद्याचीं पलटणें त्याशीं लढावयास उभीं राहिनांत, यास्तव त्यां मागून नर्मदापार जाऊन त्या लोकांच्या सरदारानें त्यांची पाठ सोडून त्याचें बऱ्हाणपुर व आशीरगड नामें किल्ला घेतला.

असें दक्षिणेंत वर्तमान असतां आगष्ट महिन्याचे एकुणतिसाव्वे तारिखेस इंग्लीशांहीं गुजराथेंतील भडोंच घेतली, नंतर पवनगड नामें किल्ला आहे तेथें जाऊन तोही हल्ला करून घेतला.

हिंदुस्थानांत शिंद्याचा अलिगड नामें परम रुंदद किल्ला आहे तोही जनराल लेकसाहेबानें मोठें युद्ध करून हस्तगत केला; त्या युद्धांत इंग्लीशांचे लोक मेले व जखमी मिळून पावणेतीनशें रुमारें पडले. आणि मराठ्यांचे लोक खंदकांत पडून बुडाले व मेले व जखमी मिळून दोन हजार रुमारें पडले. मग लेकसाहेबानें तो किल्ला सोडून दिल्लीपासून तीन कोसांच्या अंतरानें मुकाम केला, तेथें तुकने डेरे उभे करितात तोंच शत्रू समूर दृष्टीस पडला. त्याचा शोध करितां असा ठिकाण लागला कीं, शिंद्याकडचा कोणी पुरनन फ्रेंच सरदार नऊ हजार रुमारें पलटनीलोक व पांच हजार रुमारें स्वार व सत्तर तोफा, इतकें समजून त्या लेकसाहेबास जिंकावयाकरितां आला. तेव्हां त्या साहेबानें तेथें आपल्या बुणग्याचा रक्षणापुरते लोक ठेऊन बाकी उरलेले साडेचार हजार रुमारें होते तितक्यांसहित शत्रूशीं युद्ध करून जय पावला, त्यांत मराठ्यांचे तीन हजार रुमारें, आणि इंग्लीशांचे सहाशें पडले, तेव्हां दिल्ली शहर इंग्लीशांस सहज प्राप्त होऊन, तेथचा बादशाहही त्यांच्या हातीं लागला.

यानंतर लेकसाहेबानें आग्या किल्ल्यावर चालून जाऊन त्यास भोंवतीं शिंद्यांचीं कित्येक पलटणें होतीं त्यांस तेथच्या किल्लेकरीयास त्यांचा विश्वास येईना यास्तव त्याणें ते आंत घेतले नाहींत त्यांस जिंकतांच त्या किल्लेदारानें इंग्लीशांस किल्ला दिला.

पुनः इंग्लीश व शिंद्याचीं पलटनें यांची लढाई लासवारी गावांजवळ झाली, तो प्रकार असा. इंग्लीश शत्रूच्या पाठीस लागून रात्रींत बावीस कोसांची मजल करून सूर्योदयसमयीं शत्रूची सेना त्याच्या दृष्टीस पडली; तेव्हां त्यांस वाटलें कीं, शत्रू वाटेनें चालतो आहे, म्हणून जे स्वार तेथें पोंहचले होते ते पाठीमागचे लोक यांची वाट न पाहतां त्वरा करून त्यांवर जाऊं लागले, ते केवळ त्यांना समीप गेले, तेव्हां त्या इंग्लीशांस

असें समजलें कीं, तें रुद्ध स्थान धरून राहिले आहेत; आणि असें दृष्टीस पडलें कीं, पुढें एक तोफांची ओळ उभी करून त्या तोफा रांखलीनें गुंतविलेल्या; तेव्हां ते त्यांस तो तोफखाना घ्यावयास उद्युक्त झाले परंतु, त्या तोफांचा मारापुढें त्यांचा उपाय चालेना यास्तव त्यांस आपल्या स्वारांची व पायदळांची वाट पहावी लागली; ते येऊन पोंहचल्यावर इंग्लीशांहीं त्या तोफा घेऊन मराठ्यांचा पराभव केला. त्या युद्धांत शिंद्याकडे बहुतेक फ्रेंचजातीचे सरदार असत, आणि कित्येक दिवायनानें शिकविले पुरातन पलटनीलोक होते ते फार झटून लढले, व मागें न सरता जेथे उभे होते तेथेंच पडले, नंतर थोडके राहिले तेव्हां युद्ध टाकिलें. असें झालें ह्मणून इंग्लीशांचे लोक सद्या आठशें त्यांत बहुतेक सरदार असे नाश पावले.

इंग्लीशांच्या याजवरून शिंद्याचीं हिंदुस्थानांतील सर्व पलटनें हीनबळ होऊन त्याच्या चंबळानदीचे उत्तरेचा मुलुख इंग्लीशांच्या हातीं लागला.

असें हिंदुस्थानचें वर्तमान असतां कटाक व बुंदलखंड या मुलखीं इंग्लीशांचें सैन्य जाऊन तीं ठिकाणेंही त्याहीं हस्तगत केलीं.

ते समयीं दक्षिणेंत कायकाय वर्तमान झालें तो प्रकार असा, शिंदे व रघुजीभोंसले यांस वर्तमान कळलें कीं, जनराल वेलसली साहेब दक्षिणेंत औरंगाबादेवर चालिला, आणि त्याचा लष्कराचा एक भाग बऱ्हाणपुरास गेला; त्यावरून त्यांहीं त्यास अडथळा करावयाची सिद्धता केली; तेव्हां जनराल वेलसली साहेब फिरून उत्तरेस जाऊं लागला, हें समजून शिंदा आपल्या लोकांसहित ठिकाण धरून राहिला, आणि रघुजीभोंसला तो उत्तरेस अनकाटनक्याचा घाटाकडे चालिला. तेव्हां तो रघुजीभोंसला निजामाच्या मुलुख उद्ध्वस्त करील, या शंकेनें जनराल वेलसली साहेब पुनः दक्षिणेस त्या मागें निघाला तो त्याजवळ पोंहचल्यावर रात्रीस इंग्लीशांच्या छापा आपणावर पडेल अशा भयास्तव आपल्या नळाची बदली दोहों दिवसांत पांचां जागीं केली, ते समयीं त्या दोहीं लष्करांच्या युद्धप्रसंग पडला नाहीं; इतकेंमात्र झालें कीं, रघुजीभोंसल्यानें पांच हजार स्वार इंग्लीशांचे चौदा हजार बैल दाणा भरून जात होते, ते पाडून आणावयास पाठविले, त्या वेळां बरोबर इंग्लीशांचे पलटनीलोक यांचा तीन कंपनी व पायदळ व म्हैसूरचा राजाचे कांहीं स्वार होते त्यांची व यांची आंबेरगांवापाशीं गांठ पडली. तेव्हां त्या उभतांचे

तांचें बहुत युद्ध होऊन त्यांतील दोनशें बैल मात्र नेले; वर्कड त्यांहीं संभाळून इंग्लीशांचा लष्करांत पोंहचविले.

रघुजी भोंसला आपल्या मुलखाकडे जाऊं लागला तेव्हां वेलस्ली साहेब आपल्या दुसऱ्या भागाचा सरदार गावेलगडास घेरा घालून लढत होता त्याचे कुमकेस गेला.

इतकीं कामें होयातों पर्यंत शिंद्यानें कित्येकवेळा वकील पाठविले. नंतर नवेंबराचे तेविसाव्ये तारिखेस (सन १८०३) शिंद्याचें व वेलस्ली साहेबाचें युद्ध तहाचा बोलण्यासाठीं कांहीं दिवस मना झालें; परंतु रघुजी भोंसल्याचा कोणी वकील न आला ह्मणून तो वेलस्ली साहेब आरगांवाजवळ भोंसल्याचें लष्कर होतें तेथें जाऊन, त्यावर पडून त्याचा पराभव केला, नंतर भोंसल्यानें इंग्लीशांशीं दिसेंबराचे सत्राव्ये तारिखेस तह ठरविला. तो विस्तार असा, वरदानदीचे पश्चिमेस रघुजीचा कांहीं हक व मुलुख होता तो आणि नरनाला व गावेलगड हे दोन किल्ले जा डोंगराचे धारेवर दोहों बाजूंस आहेत, त्या सगळ्या पर्वताचे दक्षिणेचा मुलखांतील प्रतिवर्षी चार लक्ष रुपये उत्पन्न होत असा मुलुख, व दोन्हीं किल्ले खेरीज करून बाकी सर्व मुलुख इंग्लीश व त्यांचे पक्षपाती यांजकडे असावा. याशिवाय कटकप्रांत व बल्लेसोरही, इंग्लीशांकडेसच असावा. आणि निजामानें पूर्वीं रघुजी भोंसला चौथ व घांसदाणा वगैरे जें घेत होता, तें त्यानें इतःपर न मागावें, अणखी निजाम व सेनासाहेबसुभा (भोंसला) व पेशवे, यांत कांहीं कलह उत्पन्न झाल्यास त्याचें निवारण इंग्लीशांच्या मध्यस्थानें व्हावें; यावरही दुसरें ठरलें कीं, इंग्लीश व भोंसले यांच्या दरबारांत परस्परें वकील असावे, तेव्हां इंग्लीशानें आपला वकील एल्फिन्स्टन नामें साहेब पाठविला, तो नागपुरीं जाऊन राहिला.

हा तह देवगांवीं झाला ह्मणून याचें देवगांवचा तह असें नांव पडलें. नंतर थोडक्याच दिवसांनीं सुर्जी अंजनगांवीं शिंद्याचाही तह ठरला. त्यांत भागीरथी व यमुना या दोहों मध्यें जो मुलुख आहे तो व जयपूर जोतपूर, हे रजपूतांचे मुलुख, आणि गोहदचा राणा याचा उत्तरेस जो मुलुख आहे तोही, आणखी अमेदनगर व भडोंच किल्ला व तत्संबंधीं मुलुख इतके इंग्लीशांचे स्वाधीन करून, अजिंठ्यांचा घाट व गोदावरी, यामध्यें जो मुलुख त्याचा होता, तोही त्यांस देऊन कबूल केलें कीं, मोंगलांच्या बादशाहाकडे आह्मी कांहीं न मागूं; व जयपूर व जोतपूर व बुंदी व माचेरी एथचे राजे वगैरे जो ही इंग्लीशांचा पक्ष स्विकारिला असेल,

त्यांस

त्यास आमचा उपसर्ग न लागतां त्यांहीं स्वतंत्रपणें वागावें.

असा करार झाल्यावर इंग्लीशांहीं घेतलेलें बऱ्हाणपुर व आशीरगड व पवनगड व दोहद व तत्संबंधें मुलुख, आणि पूर्वी दिल्लीचा बादशाहानें महादजी शिंद्यास ढोलपुरबारी व राजखेडा, हे परगणे इनाम करून दिले होते ते दिले. याप्रमाणें तह झाल्यावर मेजरजानमालकमसाहेब यास शिंद्याजवळ वकील नेमिला; तो जाऊन त्याचा लश्करांत राहिला.

असा इंग्लीश व निजाम व पेशवे यांहीं एकमतें मुलुख संपादिला, त्यांतील वरदानदीचे पश्चिमेचा व नरनालगड व गावेलगड यांचा डोंगराचे दक्षिणेस जो मुलुख तो निजामाचा भाग ठरला. पेशवा आपल्या शक्तिप्रमाणें युद्धास झटला नाहीं व त्या युद्धेंकरून त्यास नानाप्रकारें उपयोग झाला होता म्हणून आमेदनगर किल्ला व तत्संबंधीं मुलुखमात्र त्याचा भाग ठरून बाकी इंग्लीशांकडे राहिला.

याप्रमाणें वांटणी ठरल्यानंतर इंग्लीशांचे दक्षिणेंतील लश्कराचा एक भाग जाफराबादेस गेला, दुसरा पुण्यांत पेशव्याचा रक्षणास राहिला; तेवेळेस त्या मुलखीं लुटारूंचा दंगा बहुत होता.

इंग्लीशांचें हिंदुस्थानांतील लश्कर यास होळकराचा विश्वास नव्हता म्हणून त्याचे चवकशींत ते तयार राहिले, त्याणेंहीं पूर्वी सांगितलेलीं युद्धें होत असतां, माळव्यामध्यें शत्रूंची व आपली प्रजा सतात मानिली आणि त्या सर्वांपासून अतिशयित खंडणी घेत राहिला. मग इंग्लीशांहीं शिंदे व भोंसले यांस विलंब न लावितां जिंकिलें. त्या योगें तो होळकर परम विस्मय पावला आणि त्यास त्रासकाळही प्राप्त झाला, तथापि त्याचा मनांत पहिल्यापासून इंग्लीशांस घालवावयाचा बेत होता तो सोडीना, यासाठीं त्याणें उत्तरेस जाऊन भरतपुरचा राजा व रजपूत राजे व रोहिले व शीखलोक हे आपणास मिळवावयाचा उद्योग आरंभिला. याशिवाय इंग्लीशांचा व शिंद्याचा तह झाला होता तो मोडून शिंद्यासही आपल्याकडे घ्यावयास वकील पाठविला. याप्रमाणें आचरण करीत असतांही होळकर इंग्लीशांस मित्रत्व दाखवीत असे, परंतु पुढें थोडक्याच दिवसांहीं गवरनर जनरलसाहेबास त्याचें कापट्य स्पष्ट कळून इंग्लीशांचा पक्षपाती लोकांचे देशमर्यादेजवळ त्या होळकराचें लश्कर होतें, त्यास तेथून दूर जावयास त्याणें जनराल लेकसाहेबाकडून पत्र पाठविलें.

त्यांत

त्यांतच सूचना केली कीं, जें तुमचें बोलणें असेल त्यास वकील पाठवावा, नंतर तो येऊन असें मागणें करूं लागला कीं, त्याप्रमाणें साहेबास कबूल करवेना; मग तें बहुतेक बोलणें होऊन होळकरानें दावाची गोष्ट सांगितली असतां त्या जनराल लेकसाहेबानें उत्तर केलें कीं, तुह्मी जशी युद्धाची गोष्ट कुशारकीनें सांगतां तशी आमची चाल नाहीं. कदाचित् तुह्मी युद्ध करूं लागलां तर आपल्या कल्पनेपेक्षां आपण अशक्त असें ध्यानास येईल.

यानंतर सन अठराशें चौदांत एप्रिलांत, होळकर देवदर्शनाचें मिष करून शिंद्याचें शहर अजमीर तेथें जाऊन तो किल्ला घ्यावयास उत्सुक झाला. परंतु तें झालें नाहीं, तेव्हां त्या गोष्टीचा राग शिंद्यास न यावा ह्मणून त्याच्या वकीलाजवळ बोलिला कीं, आह्मीं किल्ला घ्यावयाचा यत्न केला, तो केवळ स्वहितार्थच असा नव्हे, सर्व मराठ्यांहीं स्वतंत्रपणें वागावयाकरितां आरंभिला.

यावरून इंग्लिशांचा मनें ठरलें कीं, अवश्य युद्धोपाय चालवावा तेव्हां एप्रिलाच्या महिन्यांत गुजराथेमध्यें कर्णल मरे साहेब याजवळ इंग्लिशांची कांहीं फौज होती त्यास होळकराचे मुलखीं स्वारी घालावयाची आज्ञा झाली, ते वेळेसच जनराल लेकसाहेबही होळकराचे पाठीस लागला; आणि शिंदा कबूल झाला कीं, होळकरास बुडवावयाविषयीं मी सहाय करीन.

जनराल लेकसाहेब होळकराचे पाठीस लागला असतां त्याणें पुनः तहाचें बोलणें लाविलें, परंतु साहेब ऐकेना यास्तव तो मागें हटत हटत चंबळा नदी उतरून आपल्या मुलखीं गेला. तेव्हां तो साहेब पुढें पर्जन्यकाळ जवळ आला, ह्मणून त्याची पाठ सोडून तेथून माघारा आपल्या छावणीस गेला; आणि पांच पलटणें व तीन हजार मराठे स्वार इतकें सैन्य मुलखांत त्या होळकराचा उपसर्ग आपल्या कोणास लागूं देऊं नये ह्मणून ठेविलें; त्याचा मुख्य कर्णल मानसन साहेब केला.

नंतर मुंबईचें लष्कर गुजराथेंतून येतें असें त्या साहेबास कळून त्याणें नेम केला कीं, तो मरे साहेब आणि आपण एकच मिळून होळकराशीं स्पर्धा चालवावी. अशी कल्पना करून तो मुकुंद घाटाचे वाटेनें होळकराच्या मुलखांत शिरून चंबळा नदीकडे चालिला; त्यास जुलई महिन्याचे सातवे तारिखेस वर्तमान कळलें कीं, होळकर आपलें पायदळ व स्वार व तोफखाना सर्व सैन्य घेऊन इंग्लिशांचा नाशास येतो, आ-

णि

णि दुसरें वर्तमान आलेंकीं, कर्णेल मरे साहेब गुजराथेंतून लष्कर रुधा निघाला, त्याणें कांहीं कारणामुळें इकडे येण्याची मसलत टाकिली, अशासमयीं त्या साहेबाजवळ भक्षण सामग्री दोन दिवस पुरेशी मात्र होती, त्या सर्वकारणामुळें त्यास पुढें जावयाचा मोठा विचार पडला; तेव्हां त्याणें तसेंच धैर्यकरून पुढें होऊन होळकराचें लष्कर चंबळानदी उतरतेसमयीं त्यावर हल्ला करावा तें न होतां, त्याचा दुर्दैवानें त्यास बुद्धी रुचली कीं, हे वेळेस आल्यावाटेनें मागें फिरावें; मग तसेंच केलें. तेव्हां तो तेथून निघोन मुकिंद घाटास पोंहचला, तों त्याचा पाठीमागें होळकराची फौज जवळ येऊन त्यास पत्र आलेंकीं, तुह्मीं युद्ध टाकून आमचे स्वाधीन व्हावें याखेरीज तुह्मास दुसरा उपाय नाहीं. तेव्हां तें त्याणें न मानिलें असतां, होळकरानें आपल्या स्वारांच्या तीन टोळ्या करून एक त्याचा समूर व दोहों बाजूंस दोन योजून हल्ला केला, तें युद्ध प्रातःकाळापासून अस्तमानपर्यंत झालें, तथापि त्या इंग्लीशांचा बंदोबस्त त्या स्वारांस मोडवेना. मग ते होळकराचे लोक युद्ध सोडून दोनकोसांवर मागें जाऊन उतरले. तेथें त्याचें पायदळ व तोफा मागून येऊन पोंहचल्याह्मणजे तें सर्व सैन्य त्या मानसन्साहेबाच्या लष्करावर पडून त्यास अगदीं नाहींसा करावयाचा बेत होता; तें इंग्लीशांच्या सरदारास समजून, दुसरे दिवशीं उजेडतां तेथूनही तो मागें जाऊं लागला, त्यास शत्रूंचा असा उपद्रव असून, पर्जन्यही बहुत लागतअसतां तो गामचनामें चंबळेचा उतार आहे तेथपर्यंत पोंहचला, तेसमयीं मोठ्या पर्जन्यामुळें तो उतार मोडला होता, नंतर तें पाणीं उतरल्यावर तो मानसनसाहेब नदीपार गेला, त्यास तेथें जावयास विलंब लागला, आणि त्याचा असमंतात गावांतून अन्न सांपडेना, ह्मणून फार हैराण झाला, आणि मार्गांतील चिखलामुळें त्याचा तोफा चालेनात, तेव्हां त्या टाकूनपुढें चंबेलीनामें ओढा आहे तेथें पोंहचला; तोही पाण्यानें भरला होता, तेथून पारजावयास दहा दिवस खोळंबा झाला. इतकें होईतोंपर्यंत होळकराचे स्वार निरंतर हल्ला करीत होते, आणि त्या साहेबाच्या लष्करास धान्यादिकांचा फार तोटा, त्यायोगें त्याची मोठी दुर्दशा झाली, आणि तो ओढा पार होतांनां त्याचे कित्येक शिपाई वाहून गेले; व बुणग्यांतील जे ओढा उतरून पलीकडे आपली जाण्याची पाळी येईलह्मणून वाटपाहतअसतां मागें राहिले, ते होळकराचे पक्षी भिल्ल यांणीं मारिले. इतकें झालेंतरी त्या पलटनांचा बंदोबस्त होळकराच्या स्वारांस मोडवेना. आणखी ते पलटनी लोक त्या ओढ्याचे कांठीं असतां जुलाईचे एकविसाव्येतारिखेस संध्याकाळीं

ध्याकाळीं ते होळकराचा सैन्यांत शिरून त्यांचा कित्येक लोकांस मारून माघारे आपल्या ठिकाणास आले. नंतर आठा दिवसांनीं रामपुरा नांवे किल्ला पूर्वी लेक साहेब्यानें होळकराचे पाठीस लागतांना घेतला होता त्याठिकाणास पोंहचला. तेथें जनराल लेकसाहेबाकडून त्याच्या कुमकेस दोन पलटनें व त्यांबरोबर कांहीं दाणा आला तो त्यास प्राप्त झाला, मग त्यानीं दीड पलटन ठेऊन तेथून पुढें बनासनामें नदीजवळ पोंहचले, तेथें हा उतार नाहींसा झाला होता, यास्तव ती नदी उतरून पलीकडे जावयास उशीर लागला, तितक्यांत मराठ्यांच्या तोफा व पायदळ येऊन पोंहचलें, तेव्हां इग्लीशांचे बहुतेक लोक उतरून पलीकडे गेले, आणि बुणग्याच्या रक्षणास एक पलटनावर कांहींसे लोक राहिले; त्यांवर त्यांहीं तोफांचा मार चालवून हल्ला केला, ते समयीं त्यापलटनाचा साहेबानें वेगें करून त्यांवर चालून घेऊन एकक्षणभर त्या तोफा हस्तगत केल्या; परंतु होळकर अंगें मोठ्या सेनेसहित येऊन त्याणें त्या बहुतेकांस मारून टाकिलें, त्यांत बागगोर साहेब सरदार पडले. बाकीजे त्यापलटनांचे शिपाई व सरदार राहिले ते आपल्या नदी उतरून पलीकडे गेलेल्या लोकांचा मार चालू झाल्यानें वांचले.

यापुढें तो मानसन साहेब याणें शिद्याचीं सहा पलटनें व एकवीस तोफा आपल्या कुमकेस कुशाळगड नामें जयपुरच्या राजाचें ठिकाण आहे, तेथें येऊन त्याची व आपली गांठ पडावयाचा नेम केला होता म्हणून तेथें गेला, परंतु ते आगीं पोंहचतांच ती कुमक नाहींसें समजलें, तेव्हां आग्र्यापर्यंत जावयाची मसलत ठरली. मग तें ठिकाण सोडून निघाल्यावर वाटेंत मराठे स्वार तोफांसुद्धां येऊन त्यांहीं त्या पलटनाच्या नाश आरंभिला, परंतु त्यांचें बळ चालेना; कांकीं, ते स्वार जोपर्यंत त्या पलटनी लोकांचे बंदुकांचा तोंडासरसे येऊन भिडत, तोंपर्यंत त्यांहीं वार न केले; मग ती सरबत्ती होतांच ते चहूंकडे उधळले, असें बहुतवेळां झालें, परंतु शेवटीं मराठ्यांच्या तोफांचा मारानें व ते शिपाई निरंतर वाट चालून थकलेले होते, त्यायोगें एके रात्रीस फार अंधारामुळें त्यापलटनींत बुणगे शिरून, बयानानामें पर्वतांनीहि वाटेचा अडचणीमुळें त्यांचा सर्व बेत विसकटला, तेव्हां ते असके शिपाई आपआपल्या सामर्थ्याप्रमाणें आग्र्यास जाऊन पोंहचले, तोंपर्यंत कित्येक मराठ्यांहीं मारिले परंतु त्याचा पाठीस लागलेले सरादि थोडके होते म्हणून ते बहुतेक वांचले.

त्यावरून होळकर साठहजार स्वार व पंधराहजार पायदळ व एकशें

त्यापणार

ख्याणावतांफांसहित यानें फार धामधूम करीत मथुरेस आला, परंतु जनरल लेक साहेबानें या गोष्टीचा बंदोबस्त अगोदरच केला होता त्यायोगें इंग्लीशांहीं एका महिन्यांत मराठ्यांस तेथून पिटून आपण त्या मथुरेंत मुकाम केला. तेव्हां होळकर तें स्थान सोडून गेला, तो दिल्ली घ्यावयाचा उद्योग करूं लागला; त्याणें तेथें सहा दिवस युद्ध करून तें काम सिद्धीस न जातां जनरल लेकसाहेब येतो असें त्यास समजून तो भरतपूरचा राजा यास मिळावयाकरितां त्या राजाचा दिग नामें किल्ला आहे तेथें गेला. तेव्हां त्याचे पाठीस लागलेले इंग्लीश येऊन पोंहचले, त्यांहीं त्यांवर हल्ला केला, ते समयीं मराठ्यांचा पराभव होऊन त्यांच्या सत्यायशीं तोफा इंग्लीशांच्या हातीं लागल्या, आणि ते होळकराचे लोक त्या किल्ल्यांत आश्रय पावले. मग त्या लेकसाहेबानें भिंती पाडावयाजोग्या मोठ्यामोठ्या तोफा आग्र्याहून आणून तो किल्ला घ्यावयास आरंभ केला. त्यादिवसापासून दहाव्या दिवशीं त्या किल्ल्याचे बाहेरचा धाकटा तट ढासळून खिंडार पडून मध्यरात्रीं इंग्लीशांचा हल्ला चालून तें ठिकाण हस्तगत होऊन दुसऱ्या दिवसाची रात्र उजाडतां त्या किल्ल्यांतील शिबंदी व होळकराचे लोक तो किल्ला सोडून तेथून भरतपुरास जाऊन आश्रय पावले. ते वेळेस होळकराचे स्वार भरतपुरीं न जातां फरकाबादेस जाऊन पोंहचले तोंपर्यंत लेकसाहेबानें त्याचे पाठीस लागून त्यांतील तीन हजार मारिले.

इतकें होईतोंपर्यंत मुंबईच्या फौजेंतील एक टोळी गुजराथेंतून माळव्यांत जाऊन होळकराची राजधानी इंदूर हस्तगत केलें, आणि त्या माळवेप्रांतीं जे होळकराचे मोठमोठे किल्ले होते ते सारे घेतले. या शिवाय दक्षिणेंतीलही त्याचे चांदोर व जालनें वगैरे किल्ले आणि त्याचा मुलुख हस्तगत केला. असें झालें असतां त्या होळकरास भरतपूर मात्र आश्रय उरला; तोही घ्यावयाची मसलत ठरली, म्हणून मुंबईच्या सेनाभाग हिंदुस्थानांत पाठविला तो कोट्यापर्यंत पोंहचला होता, त्यास आज्ञा गेली कीं, बंगाल्याचा लष्करास येऊन मिळावें.

जनरल लेकसाहेब याणें यापूर्वीं जीं जीं कामें आरंभिलीं तीं तीं सहज सिद्धीस गेलीं, म्हणून भरतपुर घ्यावयाचा बेत झाला, ते वेळेस त्याजवळ तोफखाना वगैरे किल्ला घ्यावयाचें साहित्य यथास्थित नसतांही तो [illegible] त्या कामास लागला; त्या भरतपुराचा घेरा साडेतीन चार कोसांचा आणि त्यास परमसकट असा मातीचा तट व त्यास भोंवता मोठा खंदक पाण्यानें भरलेला, तें पाणी पुरतें भरल्यास एका पुरुषापेक्षां अधिक

झालें

व्हावें. असें असतां त्या किल्ल्यास धरणें घालिलें एके मार्गानेच दोन वेळ हल्ला न करतां दुसऱ्या वेळेस एक महान सैंडाय पडलींच हल्ला केला, तो सिद्धीस गेला नाहीं, नंतर आणखी दोन वेळा लढाई गर्दी केली, तरी कार्यसिद्धी न झाली.

नंतर त्या साहेबानें तसाच दम धरून, आणीक सरंजाम आणविला असतां तेथचा राजा होळकराची कुमक न होय असें न आत नाहीं, असें समजून त्याणें स्वहितार्थ त्याचा पक्ष सोडून इंग्लिशांशीं तह केला. त्यांत असें ठरलें कीं, वीस लक्ष रुपये त्या राजानें इंग्लिशांस द्यावे, आणि तो कोणी इंग्लिशांचे द्वेषी असतील त्यांचा पक्ष धरावा; याशिवाय पूर्वी लेक साहेबानें त्या भरतपुरकराशीं तह केला, त्यांत कांहीं त्याचा हिताचीं कलमें होतीं तीं इतःपर नाहींत असें समजावें; आणि इंग्लिशांहीं वचन दिलें कीं तह्याप्रमाणें तुम्ही सन्मार्गानें वागतां असें, आमच्या मनांत येईल तेव्हां, तुमचा दिग किंवा तुम्हास माघारा देऊं.

असा तह झाल्यानंतर शिंद्यानें आपल्या वकीला बरोबर कित्येक स्वार व सर्व पेंढारी मंडळ त्या राजाचे कुमकेस पाठविलें, ते समयीं त्याणें त्या वकीलास भेट न देतां त्या बरोबर आलेल्या लोकांसहित त्याला माघारा फिरविला. त्या बरोबर होळकर आपले राहिलेले स्वार× व बुंदेलखंडांतून आलेला अमीरखान यास आपल्या बरोबर घेऊन शिंद्याचा लष्करांत गेला.

तेथें शिंद्यानें त्याचा मोठा सन्मान केला, आणि इंग्लिशांचा वकीलाची समजूत केली कीं, याणें तुमचे मुलखीं जाऊन उपद्रव न करावा यासाठीं आम्हीं याचा मान रक्षिला. तें साहेबाचे मनास न आलें, (त्या जनराल लेक साहेबास तेसमयीं विलायतेहून लार्ड असें नवें पद प्राप्त झालें होतें) तेव्हां तो साहेब भरतपुराहून शिंद्याकडे चालिला. तेवेळेस शिंदा व होळकर हे लार्ड जवळ आला असें समजून कोटापर्यंत गेले. ते समयीं पर्जन्यकाळ समीप आला, असें म्हणून त्या साहेबानें नियम केला कीं, या देशांस थांचे पाठीस न लागतां छावणी करून राहावें तेव्हां आपल्या बंगाल्याच्या लष्कराचा मोठा भाग तो आग्रें व मथुरा एथें ठेऊन,

---

× भरतपुरच्या किल्ल्याची लढाई होत असतां होळकराचा व इंग्लिशांचा स्वारांचीं युद्धें वारंवार होत असत, तेव्हां तो एके वेळ इंग्लिशांवर छापा घालून आपले एकही मनुष्य न पडतां त्याचे एक हजार मनुष्य मारून आपल्या देशास गेले

मुंबईच्या लष्कराची टोळी समपूर्ण ठरविली. असें सन अठराशें पांचांत प-र्जन्याच्या आरंभापर्यंत झालें.

नंतर शिंदे व होळकर कोटा सोडून अजमीरच्या वाटेनें चालिले, ते समयीं शिंद्याच्या मुख्य कारभारी सरजेराव घाटगा तो आणि होळकर एक-मत होऊन इंग्लीशांशीं युद्ध करावें अशी मसलत होतहोती, परंतु तो सर-जेराव घाटगा थोडक्याच दिवसांत पदच्युत होऊन अंबुजी इंगळ्यास तें मुख्यत्व प्राप्त झालें. त्याची मसलत युक्तीनें काळ हरण करावयाची होती, व शिंद्याच्या मनांत येऊं लागलें कीं, आम्हीं व होळकर दोघे मिळूनही इंग्लीशांस घालवून देणें घडत नाहीं. याशिवाय ते शिंदे व होळकर यांम-ध्येंच कांहीं ईर्ष्या उत्पन्न होऊन दोघांहीं आपआपलें लष्करांचे तळ निरनि-राळे केले; नंतर शिंद्यानें आपल्या हितार्थमात्र इंग्लीशांशीं तह करावयाची मसलत आरंभिली असतां होळकर अजमीर सोडून आपल्याबरोबर बारा ह-जार स्वार व दोनतीन हजार पायदळ व तीस तोफा घेऊन शीख व अफगाण लो-क यांची कुमक संपादन करावयास पंजाब मुलखीं गेला.

नंतर लार्ड लेक साहेब त्याचे पाठीस लागला असतां आणि त्यास शी-खलोकांची कुमक न मिळतां तो होळकर फार संकटांत पडला. तेव्हां त्या-णें बियानदीचे कांठीं ल्याडाचें लष्कर होतें तेथें आपला वकील तहाचें बोलणें करावयास पाठविला.

इतक्यांत शिंद्याणें तहाचें बोलणें आरंभिलें होतें तें नवंबराचे बे-विसाव्ये तारिखेस कर्णेल माल्कमसाहेब व शिंद्याकडच्या मुनशी काविल ते-नतानें होता, याचे विद्यमानें शेवटास गेलें.

या तहांतील मुख्य प्रकार इतकाच कीं, शिंद्याचे इनाम परगणे ढोल-पुरबारी, राजखेडा, हे इंग्लीशांहीं द्यावे, आणि सर्जी अंजिणगांवच्या तहा-संबधें इंग्लीश प्रतिवर्षी शिंद्याचे कित्येक मानकरी व सरदार यांस पंध-रा लक्ष रुपये देत होत्या, ते न द्यावे; व कंपनी आणि शिंदा यांच्या मुलखाची मर्यादा नवी असावी, ती अशी. या दोहोंमध्यें चंबळा नदी मर्यादा, पश्चि-मेस कोटा पर्यंत, तशीच पूर्वेस गोहदच्या राण्याच्या मुलखाचे पलीकडचे सी-मेपर्यंत.

इंग्लीशांहीं शिंद्याचा स्वासगी खर्चाच्यास प्रतिवर्षी साडेचार लक्ष रुपये द्यावे, आणि त्याचे स्त्रीस व कन्येस आपल्या मुलुखीं जहागीर द्यावी; त्यांत दोन लक्षांच्या मुलुख स्त्रीस आणि एक लक्षाच्या कन्येस द्यावा. त्या शिवाय गोहदच्या राण्यास कांहीं मुलुख देऊन त्याकडून ग्वाल्हेर किल्ला इंग्ली-

शांहीं

त्यांहीं शिंद्यास द्यावयाचा.

होळकराशीं व इंग्लीशाशीं तह झाला तो प्रकार असा. कोटा रामपुरा व बुंदी, व त्या बुंदीच्या डोंगराचे बाहेरच्या उत्तरेस जो मुलूख आहे, तेथें होळकराची सत्ता नसावी; आणि इंग्लीश व त्यांचे सहाय यांपाशीं कांहीं मागूं नये, व आपले चाकरीस गोरे लोक न ठेवावे; याशिवाय सरजेराव घाडगा हा इंग्लीशांचा दुष्ट यास्तव याला आपल्या कारभारांत शिरूं देऊं नये, याखेरीज लार्डलेकसाहेबानें सांगितले वाटेनें माळव्यास जावें. इंग्लीशांहीं कबूल केलें कीं, चंबळेच्या दक्षिणेस होळकराचा मुलूख आहे तेथच्या कारभारांत आम्ही शिरणार नाहीं. याखेरीज चांदोर किल्ला व आंबेर* व शिवगांव इतके खेरीज करून परकड दक्षिणेंतील जितके होळकराचे किल्ले व प्रांत असतील तितके इंग्लीशांहीं त्यास माघारे द्यावे.

त्यानंतर होळकर पंजाबाहून आल्यावर कोणी उदयपुरचा राजा याचे कन्येनिमित्त जयपुरकर व जोतपुरकर या दोघां राजांचा कलह लागला होता तेव्हां त्या दोघांचे वकील शिंदा व होळकर यांकडे कुमक मागावयास आले; ते समयीं शिंद्यानें त्या दोघांकडे सरजेराव घाडगा व बापुजी शिंदा यांजबरोबर पंधरा हजार फौज देऊन पाठविले. होळकरानें अमीरखान यास पठाणासुद्धां जयपुरच्या राजाकडे नेमिला. नंतर कित्येक वेळपर्यंत जयपुरच्या राजाचें प्राबल्य होतें, परंतु तो अमीरखान त्या राजाचा पक्ष सोडून केवळ स्वहितार्थ त्या दोघांचाही मुलुखांत लुटालूट करूं लागला; नंतर त्याणें जोतपुरच्या राजाच्या अभिमान धरिला. शेवटीं त्या दोघां भांडणारांत आपण मध्यस्थ होऊन कित्येक मारेकरी घालून, उभयपक्षीं दंगे करून तो कलह शमविला.

इतकें होईतोंपर्यंत होळकराचे बुद्धीस चळ होऊन त्याचे मुत्सद्दी लोक यांस त्याला प्रतिबंधांत ठेवावा लागला. त्यास वेड लागल्याचे पूर्वी त्याच्या पुतण्या खंडेराव होळकर यास कोणी फितुरी लोक मिळून तो मुख्य असा मानून त्यांहीं त्याचा झेंडा उभा केला; तेव्हां त्या यशवंतरायानें तो फितुर मोडून त्या खंडेरायास मारेकरी घालून मारून टाकिला. परंतु त्या एकास च मारिल्यानें त्याचा राग शमेना म्हणून त्याणें आपला भाऊ त्याच क्रोधानें काशीराव तसाच मारविला, तेणेंकरून त्याचा राग शांत होऊन तो निर्भय झाला. त्यास खूळ लागल्यावर तो सन अठराशें आठापासून

* आंबेर वगैरे ठिकाणें खेरीज केलीं तीं पुढें होळकराची वर्तणूक नीट असल्यास माघारें द्यावीं.

अठराशें अकरापर्यंत दंडावरतीं होता. मग त्यावर्षी अकटोबराचे वेविसा‑वे तारिखेस त्यावेडांतच मृत्यु पावला.

तो होळकर मनाचा धीट आणि शरीरें करून रुदद असे; याचा जय झाला असतां तो आपल्या जातीच्या मराठ्यांप्रमाणें उछृंखल होता, परंतु विपत्तीसमयीं घावरा नहोतां धैर्यें करून आपल्या अर्थसाधनाचा उपाय चालवीत असे; तो बोलण्यांत व आचरणांत केवळ साबडा होता; असें असून समयानुसार राजाप्रमाणें वागणें, आणि दुसऱ्यापासून आपली मर्यादा ठेवणें, याविषयीं परम सुज्ञ, आणि विनोदी असे, यास्तव शिपाई लोक त्यावर प्रीति करीत. तो पुरुष इतरां मराठ्यांपेक्षां मोठा उद्योगी, त्याणें फारशी व मराठी या दोन्हीं लिहिण्याचा अभ्यास केला होता. त्याचे आंगीं असे गुण असून, कित्येक गोष्टीविषयीं त्याचें वागणें लोभी व निर्दय व क्रूरपणायुक्त होतें; याशिवाय तो समयविशेषीं मोठा उग्रस्वभाव होता. त्याची आकृति ठेंगणी आणि शरीर पुष्ट व रंग काळसर मुखश्री चांगली, त्या योगें तो कांहींसा हस्तमुख दिसे; त्याच्या हातांत बंदुक फुटून त्याचा एक नेत्र गेला असे, तथापि त्याचें तोंड विशोभित झालें नव्हतें.

सन अठ्राशें तिहांपासून अ-
ठ्राशें सत्रांपर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग बत्तिसावा

अनुक्रमणिका

यशवंतराव होळकर मेल्यानंतर त्याचा कारभार अमीरखानानें मुख्यत्वें केला तें प्रकरण.

शिंदे व नागपुरकर भोंसले यांचें वर्तमान.

पेंढारी लोकांची कांहीं गोष्ट.

बाजीराव पेशवा पुनः गादीवर बसल्यानंतर, कसकसा वागला तें.

प्रतिनिधीचें बंड.

सदाशिव माणकेश्वर व कुसुरुजी मोदी यांचा वहिवाटीचा प्रकार.

बाजीराव पेशवा याणें माधवराव रास्त्याशीं व वरकड जहागीरदार यांशीं कोणे प्रकारें कृत्रिम ठेविलें तो विस्तार.

त्रिंबकजी डेंगळा योग्यतेस चढल्याचा प्रकार.

बाजीरावानें आपल्या जवळ द्रव्य जमा केलें तें.

त्याणें इंग्लीशांस बुडवावयाविषयीं कशी मसलत केली ती.

त्या बाजीरावाशीं व बडोदेकराशीं वहिवाट झाली तें.

गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा वध.

त्यापुढें त्रिंबकजी डेंगळा इंग्लीशांचा बंदींत पडलेला पळून जाऊन त्यास बाजीराव पेशव्यानें गुप्तपणें आश्रय दिला.

त्यावर इंग्लीशांहीं काय काय केलें तें प्रकरण.

भाग बत्तिसावा

रजपूत राजाचा कलह शांत झाल्यावर अमीरखान मोठ्या त्वरेनें रामपुरास आला, तेथें ठरलें कीं, राजकारभार चालवावयास मंडळी नवी करावी, त्यांत मुख्यत्वें अमीरखान असावा परंतु बाह्यात्कारें यशवंतरावाची प्रिय स्त्री तुळसाबाई ही मुख्य केली. ती दुर्व्यसनी आणि मोठी खुनशी असे, यास्तव त्या एवढ्या कारभारास ती केवळ अयोग्य होती, तिणें यशवंतराव मृत्यु पावल्यावर आपल्ये रावतीचा दोलतराव नामें चहूं वर्षांचा मूल आणून ता गादीवर बसवून त्याचे नांवें

कारभार

कारभार चालविला. त्यानंतर थोडक्याच दिवसांनीं त्या अमीरखानानें वाईजवळ गफूरखाननामें कोणी आपला भाऊबंद यास ठेवून आपण आपल्या पठाणांचा हितार्थ रजपुतांचे मुलखीं गेला.

त्यापुढें होळकराचा राज्यकारभाराची अशी अव्यवस्था झाली कीं, त्या योगें प्रतिवर्षी मुलखाचा वसूल घ्यावयाचा नियमाप्रमाणें उत्पन्न होईना आणि त्या कारभारी मंडळांत कोणास अशी शक्ती नव्हती कीं, फौजेस फांटा देऊन खर्च तोडावा या शिवाय सरकार खजिन्यांत शिबंदीचा खर्चास पुरेसें द्रव्य नव्हतें म्हणून त्या लष्कराचा वेगळ्या वेगळ्या टोळ्या करून त्यास सरदार देऊन कोणत्याही प्रकारें त्यांचा खर्च चालवावयाचा बेतानें त्यांस आपल्या मुलखांत जागोजाग पोट भरावयास पाठविले. त्यांतील कित्येक बंडास अनुसरले; त्यांत एक महंमदअलीखानबंगषनामें होता त्याणें खानदेशाचे बहुतेक परगणे लुटून निजामाचा मुलखांतून होळकराचा अंबेर परगण्यांत जाऊं लागला; परंतु पुणें व हैदराबाद यां मध्यें इंग्लीशांचीं पलटनें होतीं त्यांहीं त्यावर जाऊन त्याला कैद करून मुंबईस पाठविला. तो तेथें बंदींत ठेविला.

शिंद्याचे मुलखीं होळकरापेक्षां कांहींसा बंदोबस्त विशेष होता, तेथेंही खर्चाचा तोट्यामुळें त्यांस होळकराप्रमाणेंच मुलखांत फौज पाठवावी लागली त्या पूर्वी त्या फौजा मुलुखभर पसरून युद्धादिकामास गुंतल्या असत; त्या योगें प्रजेस बहुत उपद्रव होत नसे; मग त्या रिकाम्या होऊन एके जागीं बहुत असूं लागल्या तेव्हां रयतेस परम दुःसह असें दुःख प्राप्त होऊन ते लोक चांगल्या पेरण्या झालेलीं स्थळें टाकून गेले.

एवढी अनीति प्रसक्त झाली असतांही शिंदे व होळकर यांचा सैन्यांत शत्रूचा उपाय चालेना, कां कीं, ते लोक युद्धकुशल होते; असाच रघोजी भोसल्याचा राज्याचाही बेत कांहींसा विसकटला. आणि त्याचे लोक तादृश युद्धनिपुण नव्हते, म्हणून अमीरखान याणें रजपुतांचा मुलखांत आपली सत्ता स्थापून सन अठरासें नवांमध्यें वराडांत स्वारी केली; त्या बरोबर त्याचा पठाणांखेरीज पेंढारी फार आले, मग त्या सर्वांहीं रघुजीचा मुलुख लुटावयाचा आरंभ केला, परंतु इंग्लीशांचे लोक त्या मुलखासमीप होते त्यांहीं ते निरंकुशपणें लूट करितात असें समजून त्यांहीं युद्ध करून त्यांस नर्मदापार घालविलें.

पेंढारीलोक यांचा निर्दयपणास अंत नाहीं; ते पहिल्यापासून मराठी लष्कराचा संगतीस असत. पुढें पहिला बाजीरावपेशवा हिंदुस्थानांतून पुण्यास येऊं लागला ते समयीं, ते माळव्यांत येऊन राहिले; नंतर कांहीं दिवसांनीं होळकर व शिंदे भोसल्याचा मुलखांत जाऊं लागले असतां, त्या दोघांत ज्याचा पक्ष ते धरी-

त

न त्याप्रमाणें आपणास शिंदेशाही, किंवा होळकरशाही असें ह्मणवीत. मग स-न् सत्राशें चवऱ्याणवांत शिंद्यानें त्या पेंढाऱ्यांस नर्मदेजवळ कांहीं मुलुख दिला. त्यापुढें कोणी मोठा धूर्त खरीमखान आणें खरड्याचा लढाईंत निजामास लुटून बहुत द्रव्य मिळविलें होतें, तो त्या पेंढाऱ्यांचा मुख्य होऊन त्याणें अमीरखान पठानाची सुप्रसन्नता संपादून, सुजाहलपूर नामें परगणा त्यापासून मिळविला. याशिवाय शिंद्याचे जहागिरदार यांचा माळव्यांतील मुलुख कांहीं युक्तीनें हाताखालीं घालून त्यास प्रतिवर्षी पंधरा लक्ष रुपये जमाबंदी होऊं लागली. तेव्हां शिंद्यास त्याविषयीं शंका उत्पन्न होऊन, कांहीं भुलथापीनें त्याला धरून ग्वाल्हेर किल्यांत बंदीस घातला, तो सन् अठराशें दहांपर्यंत तेथें राहिला. मग बहुत द्रव्य देऊन त्या प्रतिबंधांतून सुटून जे कोणी मध्येंच चितू, व दोस्त महंमद, व नामदारखान, व शेखदलू नामें, चवघे पेंढाऱ्यांचे मुख्य झाले होते, ते येऊन त्यास मिळाले, तेव्हां त्याचे पंचवीस हजार स्वार जमले. ते समयीं त्याची मसलत होती कीं, कांहीं पायदळ चाकरीस ठेऊन पुनः वराडांत जाऊन लुटालूट करावी; परंतु रघोजी भोंसला याणें त्या चवघांतील चितूनामें मुख्य तो आपल्याकडे घेऊन त्यांस तेथून काढून दिलें. ते वेळेस तो खरीमखान आपला पुरातन आश्रयभूत अमीरखान याजपाशीं आश्रयास गेला, तेथें त्याणें शिंद्याचा मसलतीवरून त्यास बंदीस ठेविला. तो सन् अठराशें सोळापर्यंत तसाच होता.

पेंढारी लोकांची चाल होती कीं, प्रतिवर्षीं दसऱ्याचे सुमारें आपला कोणी मुख्य याचे मसलतीनें एखादे ठिकाणीं बंदोबस्त ठीक नाहींसें समजून, तेथें गीं चोरवाटानीं जाऊन पोंहचल्यावर जसा पर्जन्यकाळीं नदीस लोंढा येतो त्यासारिख्या वेगानें एकाएकीं त्या मुलखावर पडून तेथें वेगळ्या वेगळ्या टोळ्या होऊन त्या देशांतील सारीं ठिकाणें लुटून सर्व प्रकारें अनर्थ करावा; मग ती लूट घेऊन आपण प्रवेश केलेल्या ठिकाणापासून दूर, दुसऱ्या एखाद्या संकेतस्थळीं जाऊन सर्वांहीं एकत्र मिळून आपल्या ठिकाणास जावें.

ते पेंढारी प्रथम माळवें व मारवाड व मेवाड व रजपूताना व वराड इतक्या मुलखीं उपद्रव करीत होते; मग कधीं कधीं निजाम व पेशवे यांचा मुलखांत शिरूं लागले,

इकडे पुण्यामध्यें बाजीराव पेशवा यास इंग्लीशांहीं गादीवर बसविल्यानंतर, थोडक्याच अवकाशानें त्याची कृतघ्नता व कुटिलवृत्ति इत्यादि दुर्गुण दिसून आले.

तो इंग्लीशाचा द्वेषी मंडळाशीं पत्रादिद्वारा गुप्तस्नेह ठेवूं लागला त्यांस नमस्त्र करून वण्याविषयीं त्यांची अशी समजूत करी कीं, तुम्हीं सर्व द्रु गे-

ळा

ला. आणि दक्षिण सीमेचे जहागीरदार सारे फितलेले; या मुळें मी एकटा पडलों ह्मणून अडचणी करितां इंग्लीशांशीं तह केला. या शिवाय जेह्मां पटवर्धन जनराल वेलसली साहेबास मिळून त्याचे बरोबर सेने सहित युद्धास आणार होता. तेह्मां त्याणें कोल्हापुरचा राजास त्याचे मुलखीं स्वारी घालावयाची मसलत गुप्तपणें दिली.

या कृत्यापासून त्या बाजीरावानें आपलीं दोन हितें कल्पिलीं होतीं त्यांत एक तर शिंद्याचे शत्रू इंग्लीश यांचासाहाय्यास पटवर्धन जाईनासा केल्यानें शिंद्याची आपणाविषयीं सुप्रसन्नता होईल. दुसरें असें, परशुरामभाऊ पटवर्धन यांचें आणि आपलें वांकडें पडलें आहे यास्तव इंग्लीशाचासाहाय्यास तो न गेला हेंच निमित्त करून, साहेबलोकांस समजवावें कीं, तुमचा व आमचा तह झाला यास पटवर्धन अनुकूळ नाहीं; इतकें करून त्याची जहागीर आपण जप्त करावी.

बाजीराव यासराज्यकारभारचालवावया विषयीं कोणा एकाचाही विश्वास नसे ह्मणून आपणच संपूर्ण तीं कामें वहिवाटीत असे तो आपणास सर्वांहून प्रवीण असें मानी; परंतु इंग्लीशांचा वकील व आपण भाषण करीत असतां त्याचा व आपल्या विचारांत अंतर दृष्टीस पडून कदाचित् बोलण्याचा बेत चुकून कलह उत्पन्न होईल ह्मणून तें काम दुसऱ्याचे हातून घ्यावें असा निश्चय करून कोणी इंग्लीशांचा द्वेष्टा असा सदाशिव माणकेश्वर यास इंग्लीशांचा वकीलाशीं बोलण्याचा कामास नेमिला.

तो माणकेश्वर टेंबुर्णीगावचा देशपांड्या; त्याणें प्रथम पुण्यामध्यें कांहीं दिवस कीर्तन करून निर्वाह केला. त्याचे अंगीं कविताशक्ति चांगली, आणि तो वाद्यें वाजिवण्याविषयीं कुशल होता. पुढें हैदराबादेंत पेशव्याचा वकील गोविंदराव पिंगळा याची त्याणें चाकरी धरिली. मग बाजीराव पेशवा व दवलतरावशिंदा जे समयीं एकमत होऊन इंग्लीशांस अगदीं बुडविणार होते, तेह्मां त्या मसलतींत निजामासही घ्यावया करितां तो माणकेश्वर त्याकडे पाठविला.

त्या बाजीरावाची अनीति कशी होती ती ध्यानांत यावयास एक दोन गोष्टी आहेत; त्यांत खंडेराव रास्ता याणें बाजीरावास विपत्ति समयांतही सोडिलें नाहीं, आणि तो बाजिराव पुनः पुढें गादीवर बसल्या नंतर दुसऱ्या वर्षीं बाबूराव फडक्यानें मोठें बंड केलें होतें तें बहुत युक्तीनें खंडेराव रास्ता मोडिता झाला, असाही परमविश्वासू चाकर त्याणें इंग्लीशांचा पक्ष धरून माणकेश्वराशीं वाद केला असें ऐकून त्याची चवकशी न करितां एवढ्याच

निमित्तानें

निमित्तानें त्यास पदच्युत करून त्याची जहागीरही बाजीरावानें जप्त केली. असेच जे बहुतदिवस सेवा केलेले जुने चाकर होते त्याचा उपजीविकेचा विचार न ठेवितां त्याचें स्मरणही टाकिलें. तो बाजीराव असा दुर्बुद्ध असून त्यास इंग्लीशांचा साहाय्यामुळें त्याचा राज्यांतील संपूर्ण बंड मोडून लोक सुखीसे दिसूं लागले; आणि त्याची आज्ञा त्या राज्याचा मर्यादेंत सर्वत्र अकुंठित चालती झाली. त्यांत प्रतिनिधीचा बंडापर्यंत अंतर नपडलें, त्या बंडाचा प्रकार असा. इंग्लीश व बाजीरावपेशवे यांचा स्नेह झाल्याचा पूर्वी,पुण्यांत परशुराम श्रीनिवास नामें प्रधानराव प्रतिनिधीचापुत्र होता; त्यास बाजीरावानें धरून कैद करावयाची मसलत केली. ती सिद्धीस नआली तो प्रतिनिधी तेथून निघून आपली जहागीर कऱ्हाड तेथें जाऊन राहिला. ते समयीं त्या जहागीरीची वहिवाट त्याची मातुश्री व बळवंतराव फडनवीस नामें त्या जहागीरीचा मुतालिक यां दोघांही चालविली होती; तो प्रतिनिधी यास ती वहिवाट आपण चालवावयासी इच्छा होऊन तो वाद बाजीरावाकडे गेला, त्यास पूर्वीच प्रतिनिधीला बलहीन करावा अशी वासना झाली होती, त्यावरून हा समय उत्तम असें जाणून तें काम बळवंतराव फडनवीसानें वहिवाटावें असा ठराव केला; आणि त्या बरोबरच कांहीं फौजेसहित बापुगोखला यास पाठवून त्या प्रतिनिधीला बंदीस घातला. मग तो कलह मिटून त्या मुलखांत स्थिरता झाली,असें पाहून तो गोखला पुण्यास आला, तेव्हां लोकांहीं अटकळ केली कीं इतःपर प्रतिनिधी जन्मभर बंदींतच राहील, परंतु त्याचा योग तसा नव्हता; पूर्वीं त्या प्रतिनिधीची महासाध्वी स्त्री तिजबरोबर त्याचा कांहीं कलह होऊन तिला दूर ठेवून त्याणें आपल्याजवळ एक तेलीण बाळगिली होती; तिणें त्या संकट समयीं कांहीं युक्तीनें वासोटा किल्ला हस्तगत करून, कित्येक लोक चाकरीस ठेवून लहानशी गढी किल्ला मसूर तेथें प्रतिनिधी बंदीस होता, त्या ठिकाणीं जावून हल्ला करून त्यास तिणें तेथून मुक्त केला. नंतर त्या प्रतिनिधीनें आपला झेंडा उभा करून लोकांत प्रसिद्ध केलें कीं, मी पंत प्रधानाचा अंकित नव्हे, माझा धनी सातार्याचा महाराज. त्यावरून त्याचा मुलखांतील शिपायीलोक व त्याचे संबंधी कित्येक मोठेमोठे कुलीन गृहस्थ त्या कडे जाऊन राहिले. त्या योगें कदाचित त्याचा मनोरथ सिद्धीस गेला असता परंतु तो प्रतिनिधी कांहींसा क्रूर असून त्याचा स्वभाव उग्र आणि अत्यंत अविचारी असे, त्यास त्याचा आईचा पक्षाचा अथवा त्या मुतालिका कडचा कोणी सांपडला असतां, त्यावर दया नकरितां त्या विषयीं अत्यंत क्रूरपणा करी, त्यावरून तो लोकांचा मनांतून उतरला, आणि खर्चास द्रव्य जमा करावयासाठीं प्रजेस पेंढाऱ्या प्रमाणें

उपद्रव

उपद्रव करूं लागला. असें झाल्यानंतर बापूगोखला पुनः फौजेसहित त्यावर जाऊन युद्ध व्हावें असें ठरलें. ते समयीं त्याचे कोणी पुरातन विश्वासू चाकरलोक यांची मसलत होती कीं, हे समयीं गोखल्यासमोर युद्धास उभें न राहतां, डोंगरांत जाऊन तेथें रामोशी सहाय करून जे वेळेस आपला हात चालेल ते समयीं युद्धप्रसंग करावा, तो प्रकार न ऐकतां त्याणें वसंत गडाजवळ गोखल्याची वाट पाहिली, नंतर तो गोखला येऊन युद्ध होऊं लागलें असतां, पहिल्याच हल्यामध्यें प्रतिनिधीचे लोक पळून थोडकेसे उरले, आणि तो प्रतिनिधी जातीनेंही लढला; ते समयीं त्याचा उजवा हात तुटून तो शत्रूचा हातीं लागला; मग बाजीरावाचा राज्याचे समाप्तीपर्यंत त्यास प्रतिबंध होता. त्याचा सर्व मुलुख बापू गोखल्यानें वासोटा किल्ला खेरीज करून, तात्काळ घेतला. नंतर त्या वासोट्यामध्यें तेलीण होती ती आठ महिने लढून शेवटीं तेथचा दाण्याचे कोठीस आग लागल्यामुळें निरुपाय होऊन तिणें तो किल्ला दिला.

या प्रमाणें बाजीरावानें प्रतिनिधीला अगदीं बुडविला, या विषयीं लोकांस असें विदित न वाटावें कीं, आम्हीं केवळ स्वहितार्थच प्रतिनिधीचें सर्वस्व हरण केलें, यासाठीं त्याचा मुलुख व त्याची वस्तवानी गोखल्याचे हातीं लागली होती. ती सरकारांत न नेतां त्याकडेसच राहूं दिली. त्या योगें व त्या मुलखाची अमर्याद खंडणी घेतल्यानें, तो बापूगोखला इतर सरदारांपेक्षां थोडक्याच दिवसांत मोठा धनवंत झाला. असें सन अठरासें आठांत घडलें.

बाजीराव आपली निर्बंधसत्ता झाली असें समजून मग प्रतिनिधीचा मुलुख बापूगोखल्याकडे होता तो सरकारांत मागूं लागला, आणि पूर्वीपासून त्यास परम प्रिय असें संपूर्ण जहागिरदार यांचा सूड उगवावयाविषयीं त्याचे मनांत होतें तें कृत्य यथास्थित साधावयास उद्युक्त झाला, तेव्हां कित्येक लहान लहान जहागिरदार यांहीं आपली आज्ञा न मानिली, असें निमित्त ठेवून, त्यांचीं स्थानें आपल्याकडे जप्त ठेविलीं. या प्रमाणें सर्वांस बुडवायाची त्यास वासना झाली, परंतु तें इंग्लीशांचा मना वांचून घडेना; असें असतांही तो आपल्या मनांतील अर्थ अनेक प्रकारें गोड बोलून लोकांस फसवून कधीं कधीं शेवटास नेत असे. त्यांत माधवराव रास्ता यास इंग्लीशांहीं आपल्या कांहीं कामाकरितां फौज पाठवावी म्हणून आज्ञा केली, ती त्याणें न मानिली; त्या योगें तो अपराधीसा ठरवून, त्यास शिक्षा व्हावी असें झालें असतां, बाजीरावानें त्यास मसलत दिली कीं, इंग्लीशांस सांगून तुझें पारिपत्य करणें मजकडे येऊंदे, म्हणजे तुला तसा दंड होणार नाहीं; या गोष्टीस तो माधवराव मान्य झाला, नंतर बाजीरावानें त्याचा सर्व मुलुख घेऊ-

न

न त्यास कांहीं उरूं दिलें नाहीं, असेंच आपा देसायी यास इंग्लीशांहीं कांहीं आज्ञा केली असतां त्यांत अंतर करावयाविषयीं त्या बाजीरावानें गुप्त मसलत दिली आणि त्याचेंही पारिपत्य करावयाचें आपल्याकडे घेऊन त्याचा जहागिरीचा चतुर्थांश घेतला.

सदाशिव माणकेश्वर तो श्रीमंताचा पक्ष करून इंग्लीशांशीं वागत असतां त्याणें ते वेळेस कार्नेल क्लोससाहेबाचा वकील फारशी जातीचा कुसरूजी नामें होता. त्यासच मोदीही म्हणत, त्याला वश करून आपल्याकडे घेतला, तो, व माणकेश्वर हे दोघे निरंतर एकविचारें वागत असतां बहुतवेळा त्यांहीं आपल्या कार्यसाधनास भलतीच गोष्ट साहेबाचा मनांत आणून स्वहित संपादावें. असें कित्येक दिवस चालिलें मग सन अठरशें अकरांत त्या कामावर एलफिन्स्तन साहेब येऊन त्या मोदीचें तेज बहुत कमी पडलें, आणि तेच समयीं माणकेश्वर व मोदी यांचाही स्नेहामध्यें कांहीं अंतर आलें. त्यावरून बाजीरावास त्या दोघांचें ऐक्य समजून त्याचा मनांत आलें कीं, हे दोघे आपल्या ऐक्यामुळें कदाचित् माझा उपयोगास पडले असतील, परंतु तेच जर विपरीत वर्ती झाले, तर तेंच ऐक्य माझा समूळ नाशास कारण होईल. एशीयास हीच मसलत कीं. यां दोघांत वांकडें पाडून मोदी आपणाकडे घ्यावा. असें ठरवून त्याणें मोदीस उत्तम पदवी कर्नाटकची सरसुभेदारी दिली, तेव्हां त्याणें बापूसाने नामें गृहस्थ आपल्या हाताखालीं घेऊन तो पेशव्याकडील अधिकार व इंग्लीशांची चाकरीही, दोन्ही कामें चालविलीं. असें कांहीं दिवस गेल्यावर, सदाशीव माणकेश्वराकडून मोदीचा त्या अधिकार संबंधें अनीतिवर्तन प्रकरणीं बोभाट श्रीमंताजवळ आला, तो ऐकून त्यास पुरें समजलें कीं, त्या दोघांत पक्कें वितुष्ट पडलें. या शिवाय त्या बाजीरावानें आपणास दुसरा एक लाभ कल्पिला कीं, मी यास मोठा अधिकार देऊन आपलासा केला. परंतु त्या एलफिन्स्तन साहेबानें तो अर्थ सिद्धीस जाऊं दिला नाहीं, कांकीं, साहेबाची चाकरी, व बाजीरावाकडचा अधिकार, हीं दोन्ही कामें एकानेंच करावीं हें योग्य नव्हे, असें त्याचा मनांत येऊन त्या मोदीचें दुसरें कांहीं अयोग्य आचरण पाहून त्याणें त्यास दोहों कामांतून एक टाकावयास सांगितलें असतां, मोदीनें श्रीमंताकडचा अधिकार टाकिला.

नंतर तो मोदी पुण्याहून दूर करावा असें त्याचें कृत्य साहेबाचा दृष्टीस येऊन त्याला गुजराथेंत वेतन देऊन स्वस्थ बसवावा असें केलें होतें; तेव्हां तो तेथून निघून तिकडे जावयास सिद्ध झाला; अशा संधींत रात्रीमध्यें तो

चिप

विषप्रयोगानें मेला गेला. तें विष त्याणें स्वयें घेतलें किंवा, दुसऱ्याचे हातून घात झाला, याचा शोध बहूत केला असतांही सिद्धांत झाला नाहीं.

कर्नाटक सरसुभा त्या मोदीनें टाकिल्यावर, बाजीरावानें तें काम त्रिंबकजी डेंगळ्यास सांगीतलें. नंतर तो मोदी मृत्यु पावल्यावर कांही दिवसांनीं इंग्लीशांशीं वहिवाटीचें कामही श्रीमंतानें त्रिंबकजीस दिलें. तो त्रिंबकजी पूर्वी श्रीमंत महाडास पळून गेले ते वेळेस जासूदगिरी करीत असे; त्याणें पुढें बाजीरावाचें मन आपणाकडे किती लावून घेतलें तें यावरून समजण्यांत येईल. शेवटीं तो अशी प्रतिष्ठा पावला कीं, पेशव्याचा घरीं त्या वांचून कोणतेंही काम होऊंच नये, असें असतां एके समयीं कोणी सराफ मखतेकरास आमीन झाला नंतर त्या मखतेदारापासून सरकार कामांत अंतर पडल्यानें त्या त्रिंबकजी डेंगळ्यास मोठा राग येऊन त्या सराफास ओढून आणिला. तो येतांच त्याचा डोक्यावर त्रिंबकजीनें स्वयें ठोंसरा मारिला; तेव्हां त्याचा हातांत मोठमोठ्या सोन्याचा आंगठ्या व जोडवीं होतीं, त्यांचा रट्टा मर्मी लागून तो ब्राह्मण तेथेंच मृत्यु पावला. असा त्या दुष्टापासून अपराध झाला तरी बाजीरावानें त्या विषयीं मनांत किमपि खेद न केला. तो बाजीराव आपलीं अनेक प्रकारचा खर्चाचीं कामें मखत्यानें करवी; नशाच मामलतीही मखत्यानेंच देत असे, त्यावरून त्रिंबकजी तर मखत्यांत अंतर पडल्यास असें शासन करीत असे, तसें चोरीस किंवा हत्येसही करीत नव्हता.

असा कारभार चालत असतां बाजीरावानें पांच कोटि रुपये आपल्याजवळ जमा केले होते; त्यास प्रतिवर्षी राज्यांत उत्पन्न एक कोटि वीस लक्ष रुपये जमा होत असत; त्यांतील पन्नास लक्ष रुपये मागें ठेवून बाकी खर्च करी. तो याज्ञिककर्मांत बहुत प्रीति ठेवून आपण अंगें त्या कृत्यांत शिरून आपल्यास विद्वान ह्मणवी; आणि त्याचा बापानें नारायणरावास मारिला ह्मणून तो उपद्रव शमनार्थ त्याणें पुण्यास भोंवतीं कित्येक लक्ष आंब्याचीं झाडें लाविलीं; व पंढरपुरचा देवास बहूत द्रव्य दिलें. या शिवाय त्याचा गुरुनें त्यास सांगीतलें कीं, माझा स्वप्नांत नारायणराव प्रत्यक्ष येऊन बोलिला की बाजीरावानें लक्ष ब्राह्मण जेऊं घालावे तें ऐकतांच तसें त्याणें केलें.

बाजीराव राज्य करीत असतां त्याणें सन् अठराशें चवदांमध्यें. त्रिंबकजीचा मसलतीवरून शिंदे व रघुजी भोंसले यांजकडे वकील पाठवून गुप्त तह केला कीं, तुह्मी व आह्मी एकमत असून, समय विशेषीं इंग्लीशांस

काढून

काढून देऊं. असाच पेशव्याचा मुख्याकडेही आपला वकील निरंतर रहावया- स पाठविला. नंतर आपण कोपरगांवीं जाऊन पेशव्यांचा किल्लेकी मुख्यांशीं एकांत केला. ही गोष्ट दुसरे वर्षी साहेबाचा समजण्यांत आली परंतु त्याचा शो- ध पुर्तेपणें कळावयाचा उद्योग न झाला, त्याणून त्या बाजीरावास गादीवरून उठविला नाहीं.

त्या वेळेस इंग्लीशांस घालवून द्यावयाचा बेतासेरीज दुसरी एक त्या- ची मसलत होती, ती अशी, गुजराथेंत आपलें मुख्यत्व असावें. त्या ठिकाणीं गोविंदराव गाइकवाड अधिकारी झाल्यापासून त्यावेळपावेतों गाइकवाड व पे- शवे या दोघांचा देण्याघेण्यासंबंधीं हिशेब झाले नव्हते. नंतर बापूमैराळ या- स त्या कामाकरितां गाइकवाडानें पुण्यास पाठविला असतां, त्यास बाजीरावा- नें एक कोटि सुमारें द्रव्य गाइकवाडसरकारांतून आमचें यावयाचें आहे असें समजाविलें. तें देणें तितकेंही झालें असेल, कांकीं, सनअठरांशांचा वर्षी अ- मदाबादचा मक्ता ठरला. त्या खेरीज सनअठरांशें चहूंमध्यें गुजराथेंतील दुसऱ्या कांहीं मुलखाचा मक्ता साडेपांचलक्षरुपये ठरण्यांत आला होता, प- रंतु बाजीरावाचा बाप रघुनाथराव याचा पक्ष स्वीकारिल्यानें बडोदेकरास विशेष- ऋणझालें होतें म्हणून त्या कोटींतून साठलक्षरुपये पेशव्यानें स्वसंतोषेंकरून त्यांस सोडावे असें कबूल केलें.

तो एवढ्या धार्मिकपणानें वागत असतां त्याचा उपकार मनांत न आ- णितां बडोदेकर त्याचा मागणीस उत्तरस्थानीं भडोजचें उत्पन्न पेशवे घेत आले त्यापैकीं आपला भाग राहिला तो व आबा शेलुकराचें बंड मोडिलें त्या कामास खर्च लागला तो, आणि गुजराथेंतील पेशव्याचा मुलखाचा बंदोबस्तास नवी शिबंदी ठेविली, त्या खर्चाचा आकार झाला असेल तो पैका, हे तिन्ही प्रकार मनांत आणून जें तुम्हांकडे फिरलें तें आमचें द्या; असें म्हणूं लागले. त्याव- रून जाचा उलगडा होऊंच नये, असा वाद वाढला आणखी बाजीरावांचाही मनांत होतें कीं. हा कज्जा लवकर संपवूं नये कांकीं, युक्तीनें इंग्लीश विपरीत वर्तनांत गाइकवाडास घ्यावा याचा कामास वादावांचून जर वकीलांचें जाणें येणें घडेलतर इंग्लीशास संशय वाटेल.

अशीच हैदराबादचा निजामाकडेही बाकी राहिली होती, त्या निमित्तें करून तोही वाद त्या अर्थी ओढविला. त्या विषयीं; इंग्लीश समजूत पा- डीत असतां, पेशवा ऐकेना. अशी बाजीरावाची कुटिलवृत्ती बापूमैराळ नामें महाकुलीन यास कळतांच, पेशव्यानें बडोदेकरास लिहिलें कीं, हा वकील या कामास अयोग्य आहे, याजबदल दुसरा कोणी गृहस्थ लवकर पाठवून द्यावा,

तो

ते समयीं बडोद्यात धनी असून राज्यकारभार चालविणारा फत्तेसिंग होता, त्याणें आपल्याजवळ खासगीच्या कामावर गंगाधरशास्त्री पटवर्धन नामें कारकून ठेविला होता. तो योग्यतेस चढतचढत, त्याचें नाममात्र मुख्यत्व झालें नव्हते. बाकी सर्व कामाची वहिवाट तो करी; त्याला पुण्यास पाठवावयाचा निश्चय करून त्या फत्तेसिंगाच्या मनांत हिशेबाचा गोष्टी खेरीज, दुसरें काम करून घ्यावयाचें होतें कीं, गुजराथेंतील पेशव्याचे महाल जे आपण मक्त्यानें घेतले आहेत, तत्संबंधी मुदत भरली यासाठीं पुनः मक्ता कबूल करावा, या प्रमाणें नेम होऊन गंगाधरशास्त्री यास योजून त्यावर त्रिंबकजी डेंगळ्याकडून एखादा अनर्थ न पडावा अशा अर्थे त्या गाइकवाडानें इंग्लीशांचें अभयवचन घेऊन शास्त्रीबावाला पुण्यास पाठविला. नंतर त्या दोन्हीं गोष्टींतून एकही सिद्धीस जात नाहीं, असें पाहून तो शास्त्री याणें मनांत ठरविलें कीं, हीं दोन्हीं कार्यें साहेबास सोंपऊन आपण माघारें जावें. यावरून पेशवा व त्रिंबकजी डेंगळा या उभयतांहीं शास्त्री याचा विशेष मान आरंभिला कां कीं, तीं कामें जर साहेबाकडे जातील तर बडोदेकराशीं व आह्माशीं बोलण्याचा प्रकार चालतो हे तो बंद होईल. असें समजून शास्त्री वश करावयाचे मसलतीनें प्रथम त्यांहीं तो माघारा जावयास मुहूर्त योजित होता तो टाकवून दुसऱ्या मुहूर्तानें त्याचें जाणें व्हावें असें करून त्यास राहून घेतला. मग ती वेळा येई तोंपर्यंत त्रिंबकजी डेंगळ्यानें त्याची अशी स्तुती केली कीं, तुह्मी या कामास बहुत योग्य आहांत, आणि श्रीमंतही तुमची योग्यता जाणून तुह्मास मुख्यत्वें कारभार द्यावयास इछितात. असें त्रिंबकजीचें बोलणें त्याला सत्य वाटावें ह्मणून बाजीरावही त्यास बोलूं लागला कीं. तुमच्या पुत्रास आमची मेहुणी पुंडरीकनायकराल्ले यांची नात देणार.

अशा युक्तीनें शास्त्री याचें मन मोहित करून आपण पंढरीचे यात्रेला जाते समयीं त्यासही बरोबर नेला. ते वेळेस पुण्यामध्यें बापु मैराळ होता त्याणें त्यास नाना प्रकारें समजाविलें कीं, हे समयीं तुह्मी श्रीमंतांबरोबर यात्रेस जाऊं नका; ही माझी मसलत ऐकावी नाहीं तर मला आपल्या बरोबर न्यावें. असें त्या मैराळानें ह्मटलें असतां तो शास्त्री कालपाशबद्ध होत्साता, त्याणें तें हितवाक्य एकही मानिलें नाहीं. नंतर पंढरपुरीं जाऊन जुलाईचे चवदाव्या तारिखेस (सन १८१५) तो गंगाधरशास्त्री याणें त्रिंबकजी डेंगळ्याशीं संकेत केला कीं, आज रात्रीस आह्मी भोजन केल्या नंतर तुह्मासहित देवदर्शनास जाऊं, या प्रमाणें तेच रात्रीस श्रीमंताचे पंगतीस त्याचें भोजन होऊन तो देवदर्शनास जाणार होता, मग तो संकेत समय जवळ आला तों त्याचा शरीरास कांहींसें असमाधान होऊन त्रिंबकजी डेंगळ्यास सांगू-

न

न साठविलें कीं, हे समयीं माझानें येववत नाहीं. परंतु त्यास त्रिंबकजीनें अ-त्याग्रहकरून चालविलें; ह्मणून त्याचा मिंडस्तव बरोबर हत्यारें रहित थोडकेसे लोक घेऊन देवास गेला. नंतर दर्शन करून त्रिंबकजीशीं कांहीं गोष्टी बोलून तेथेंच माडीवर श्रीमंत बसले होते त्यांजपाशीं जातांच त्यांची सुप्रसन्नता पाहून तो शास्त्री आणि तोपशास्त्री यांची आनंदमय भाषणें होऊन मोठ्या संतोषानें श्रीमंतांची आज्ञा घेऊन तो गंगाधरशास्त्री तेथून निघून आपले घरीं जात असतां, तीनशें साडेतीनशें पावलें चालून गेल्यावर, रस्त्यामध्यें अकस्मात कोणी हत्यारबंद असे मारेकरी येऊन त्याचे तुकडे तुकडे केले.

असें दुष्कर्म कोणीं केलें तो शोध इंग्लिशांचा वकील करूं लागला असतां, बाजीराव व त्रिंबकजी डेंगळा हे दोघेही आपल्या अंगीं लागूं देईनात परंतु सर्व लोकांचा मतें असें ठरलें कीं, हे त्रिंबकजीचेंच कर्म आणि त्या मारेकऱ्यांनींही त्याचेंच नाव सांगितलें, नंतर तो निःसंशय अन्यायी असा समजून साहेब बाजीरावास ह्मणूं लागला कीं, त्या त्रिंबकजीला धरून आमचा स्वाधीन करा तें त्याणें बहुतवेळ पर्यंत एकिलें नाहीं. शेवटीं त्यास न दिला तर युद्ध करावें लागेल, असें समजून सप्तेंबराचे पंचविसावे तारिखेस तो इंग्लिशांचे स्वाधीन केला. मग त्यांहीं त्यास मुंबईजवळ ठाण्याचा किल्यांत ठेविला. तो दुसऱ्या वर्षाचे सप्तेंबराचे बारावे तारिखेपर्यंत त्या बंदींतच राहिला; नंतर ते दिवशीं चार पांच घटका रात्र झाली असतां, तो आपला वेष बदलून बाहेर त्याचे सहाय आले होते त्यांत मिळून त्याबरोबर पळून जाऊन, नाशिक व संगमनेर एथचे भिल्ल व रामोशी यास मिळून आश्रय पावला. मग खानदेश व बागलाण व सातान्याजवळ शंभुमहादेवाचा डोंगर, याचा आसमंतात राहिला असे; परंतु जा जा ठिकाणीं शिवाजी महाराज याणें महत्व संपादिलें होतें, तेथें जावयास भीत असे. तिकडचे लोक यांस तेव्हांही शिवाजीचा गुणाचें फार स्मरण असून त्याचा वंश्यचतुर्शींग तो त्रिंबकजीनें धरून कैद केला तेही ते आठवीत होते, यास्तव जर तो तेथें जाता तर तात्काळ मारिला गेला असता.

---

* बाजीरावानें गंगाधरशास्त्री यास मारविला असें पूर्णपणें त्याकडे लागू झालें नाहीं. परंतु तें कर्म झाल्यावर त्याचा मनास चांगलें वाटलेंच, आणि त्रिंबकजी डेंगळा ठाण्यांत बंदीस असतां तेथें पहाऱ्यास जे साहेब असत त्याशीं भाषण करितांकरितां त्याणें कित्येक वेळा सांगितलें कीं, मी आपल्या धन्याचे आज्ञेप्रमाणें वागलों.

तो चतुरशिंग पुण्याची लढाई झाल्यानंतर होळकर व अमीरखान व रजपूत यांचा आश्रयानें मुलुखांत त्रास घालीत असे; मग सन् अठराशें बारांत तो खानदेशांतून आपल्या मुलुखास येत होता तेव्हां त्रिंबकजीनें त्याला भेटीस बोलावून कपटानें कैद करून कांगोरी किल्यावर ठेविला, तो सन् अठराशें अठरांचा एप्रिलांत मृत्यु पावला. त्याचा भाऊ शाहू नामें असे, तो त्याचे अगोधरच सन अठराशें आठांचा मे महिन्याचे तिसरे तारिखेस साताऱ्यांत मेला; त्याचे जागीं त्याचा पुत्र प्रतापसिंह नामें स्थापिला. तो अद्यापि तें राज्य करीत आहे.

त्रिंबकजी डेंगळा गेल्यावर पेशव्याचा कारभार सदाशिवभाऊ माणकेश्वर पुनः चालवूं लागला; त्यास मोरदीक्षित वसईकर व चिमणाजी नारायण हे दोघे सहाय होते. ते वेळेस पेशव्याचे दरबारी लोक व इंग्लीशांचा वकील यांशीं अति स्नेह आहे असें लोकांस दिसून आलें, परंतु निश्चितार्थ तर बाजीरावाचा मनांत अनेक प्रकारें दगे करावयाची मसलत होती; त्यांत त्याणें होळकर व शिंदे व नागपुरकर भोंसले व पेंढारी यांशीं पत्र द्वारा ऐक्य ठेवून गुप्तपणें त्रिंबकजीला पैका पाठवून अनेक ठिकाणीं लोक ठेवावयाची आज्ञा दिली असे; आणि पुण्यामध्येंही आपण कित्येक फौज ठेवूं लागला हें सर्व वर्तमान साहेबास कळून तो त्या कारभारी लोकांस म्हणे कीं, तुमची दग्याची मसलत आहे. त्यावर ते उत्तर करीत कीं, हें दगा करणें किमपि नाहीं; आणि बाजीराव पेशवा तर नुकताच फुलगावीं त्रिंबकजीला भेटला असून, सांगे कीं, आम्हास त्रिंबकजीचा ठिकाणा नाहीं. असें त्याचें कुटिल वर्तन बहुत वेळ चालिल्यानें ती मसलत सिद्धीस जाऊन कदाचित अनर्थ होईल असें पाहून साहेबानें बाजीरावास स्पष्ट सांगीतलें कीं, आजपासून एका महिन्यांत त्रिंबकजी डेंगळ्यास आणून द्याल तर तुमचा व आमचा स्नेह राहील.

असें होऊन इंग्लीशांचें लश्कर जमूं लागलें. तें भय मानून बाजीरावानें त्रिंबकजी डेंगळ्यास धरून आणावयाविषयीं जाहीरनामा लावून सिंहगड व पुरंदर व रायगड हे तीन किल्ले डेंगळ्या येईतोंपर्यंत इंग्लीशांचा स्वाधीन मागीतल्याप्रमाणें ठेविले. या शिवाय पेशव्याचा व इंग्लीशांचा ते समयीं नवा तह झाला, त्यांत विशेष इतकाच कीं, पेशव्यांही इतःपर गाईकवाडास कांहीं मागूं नये, आणि जी बाकी राहिली आहे ती बदल साडेचार लाख रुपये गाईकवाड प्रतिवर्षी देतील ते घेत जावे; व अमदाबादेचा मक्त्याचे साडेचार लक्ष रुपये पेशव्यानें गाईकवाडा

पासून

पासून घ्यावे. व वसयीचा तहांत असें ठरलें होतें कीं, पांच हजार स्वार व तीन हजार पायदळ इंग्लीशांचा कामास बाजीरायानें ठेवावे, त्या बद्दल चवतीस लक्षांचा मुलुख पेशव्यानें इंग्लीशांस द्यावा; या खेरीज आमेद नगरकिल्ला व नरमदेच्या पलीकडची जितकी पेशव्याची प्राप्ति असेल तितकी इंग्लीशांही घ्यावी, आणि माधवरावरास्त्याची जहागीर बाजीरावानें उगीच जप्त केली होती ती त्यास माघारी द्यावी.

असें पुण्यांत ठरल्यावर बडोद्याचा गाईकडास पहिल्यापेक्षां विशेष लाभ झाला त्याशीं इंग्लीश वाकर साहेब याणें तहकरून सन् अठराशें पांचांत ठरविलें कीं त्याणें इंग्लीशांचीं तीन पलटनें व एक गोलंदाजाचीकंपनी आपल्याजवळ बाळगून त्याचा खर्च आपण चालवावा; या शिवाय हे समयीं आणखी एक पलटन पायदळ व दोन पलटनें स्वारांचीं नवीं ठेवावीं असें ठरलें.

सन् अठराशें पंधरापर्यंत पेंढारी यांचा बहूत उपद्रव झाला* व अमीरखानाचे पठानही मुलुखांत मोठा दंगा करीत असत, तेव्हां कलत्याचा गवरनर जनराल साहेब याणें निश्चय केला कीं या सर्वानर्थांचा उपशम करून दक्षिण मुलुखीं बंदोबस्त नीट रक्षावा.

या साठीं शिंदे व होळकर व नागपुरकर वगैरे हिंदुचा मुलुखांतील सर्व मोठे मोठे यांस कळवावें कीं आह्मी हें कार्य करितों यास तुमची सहायता असावी. या प्रमाणें केल्यास जो सिद्ध न होईल तोच या अर्थाचा घटक शत्रू असा जाणावा.

मग ही गोष्ट प्रसिद्ध करीत असतां, मुंबईचें व मद्रासचें व कलकत्याचें या तिहीं लश्करांची तयारी होऊन यांतील कित्येकांहीं जाऊन ते बहुतेक पेंढारी मारिले, वरकड लश्कर त्या साहेबानें कार्योपयोगी कल्पिलेलीं ठिकाणें धरून. त्याचे आज्ञेची मार्गप्रतीक्षा करीत राहिले.

पुढें या उद्योगाचें असें सार्थक झालें कीं, नागपुरांत रघुजी भोंसला❋ मृत्यु पावल्यावर तेथचा कारभाराची वहिवाट व्यंकोजी मन्या बापूच्या पुत्र मु-

---

* पेंढारी यांचा उपद्रव इंग्लीश व निजाम याचे मुलखीं विशेष होता म्हणून बाजीरायाचें व ते पेंढारी याचें एक आहे असा इंग्लीशांस संशय न व्हावा याकरितां त्याणें आपल्या लश्कराचाएकभाग कोंकणांत पाठवून त्यांहीं आपणास पेंढारी असें म्हणून आपलाही मुलुख लुटावयाची आज्ञा दिली त्या वरून त्या लोकांहीं तसेंच केलें.

❋ रघुजीभोंसला सन् अठराशें सोळांचा मार्च महीन्याचे बेविसाव्ये तारिखेस मृत्यु पावला; त्याचें आसन त्याचा पुत्र परसाजी भोंसला यास प्राप्त झालें, परंतु तो अल्पबुद्धी यास्तव

धोंजी

धोजी याणें मुख्यत्वें चालविली, आणि तो इंग्लीशास अनुसरून त्याणें आपल्ये मुलुखीं त्यांची पलटणें बाळगावयाचें कबूल केलें. तसाच भोपाळचा नबाबही इंग्लीशांचा सहाय झाला. शिंदा व अमीरखान हेही कलकत्याचा गवरनर जनराल साहेब याचे आज्ञेप्रमाणें वागूं लागले. तेव्हां बाह्यात्कारें दिसण्यांत आलें कीं हा बंदोबस्त सिद्धीस जायील, परंतु नागपुरकर व शिंद्याचीं चित्तें आंतून बाजीरावाकडे होतीं, तें कापट्य साहेबास विदित होऊन त्याणें त्याच वकशींत अंतर केलें.

मन्याबापूचा पुत्र मुधोजी याणें तेथचा कारभाराची वहीवाट मुख्यत्वें चालविली, त्यास आपासाहेब ह्मणत.

सन अठराशें सत्रांच्या आरंभापासून समाप्तीपर्यंत झालेलीं वर्त्तमानें मिळून भाग तेहेतिसावा.

अनुक्रमणिका.

बाजिरावपेशवा व बापू गोखला यांणीं एकमत्तें इंग्लिशांच्या नाशाविषयीं मसलत केली.

इंग्लिश व पेशवे यांच्या स्नेह तुटून पुण्याजवळ युद्ध झालें.

कोरेगांवची लढायी.

बापूगोखला अष्ट्याजवळ इंग्लीशांवर हल्ला करून मृत्यु पावला.

नागपुरकरांचें कृत्य.

सीताबर्डीजवळची लढायी.

नागपुरकर आपासाहेब तो इंग्लीशांशीं स्नेह करून आपल्ये गादीवर बसला.

चितूपेंढारी यास होळकरानें आश्रय दिला यास्तव मेहदपुरापाशीं होळकराची व इंग्लीशांची लढायी झाली.

मग तो होळकर शरण येऊन त्याच्या व इंग्लीशांच्या तह झाला.

पेंढारी यांचे मुख्य सरदार इंग्लीशांहीं धरिले.

सेवनीपाशीं बाजिरावाची व इंग्लीशांची गांठ पडली.

आपासाहेब पुनः गादीवर बसल्यानंतर कसकसा वर्त्तला तें.

बाजिरावपेशवा इंग्लीशांचे हस्तगत होऊन, त्यांहीं त्यास ब्रह्मावर्त्तीं ठेविला.

मराठीराज्य इंग्लीशांहीं घेतल्यानंतर कसकसा बंदोबस्त केला तें प्रकरण.

भाग तेहेतिसावा.

सन अठराशें सत्रांच्या जुलाई महिन्यांत बाजिरावपेशवा पंढरपुरचे यात्रेस गेला तो तेथून कृष्णा वेकांठीं माहुली क्षेत्रीं येऊन त्या जागीं सप्टेंबरचे समाप्तिपर्यंत राहिला. त्याणें इंग्लीशांशीं विपरीत वागणुकेविषयीं नाना कल्पना केल्या होत्या त्या त्या सिद्धीस न्याव्या असा विचार तो अवसरीं करीत होता. त्याचे मसलतींत बापूगोखला मुख्य झाला असे त्यास बाजिरावानें लिहून दिलें कीं, मी तुझ्या मसलतीबाहेर चालणार नाहीं; आणि त्याचा मनोद-

यानुरूप त्याची सर्व कामें शेवटास न्यावयाचेंही कबूल केलें. नंतर त्या उभयतांच्या मनें विचार ठरला कीं, आपली सर्व तयारी झाली ह्मणजे प्रसिद्धपणें एकाएकीं इंग्लीशांवर हल्ला करावा. ही गोष्ट साताऱ्याच्या राजा यास विदित करून त्याचा परिवारसुद्धां त्याला वासोट्या किल्यावर ठेविला. इतकें होई तोंपर्यंत त्याणें आपल्या राज्यांतील बहुतेकां किल्यांवरून संपूर्ण युद्धसाहित्य यथास्थित भरून सिद्धता केली. याखेरीज शिंदे व होळकर व नागपुरवाले यांजकडे वकील पाठविले. यानंतर अक्टोंबराचे एकोणिसाव्ये तारिखेस दसरा पडला; त्याचा समारंभ फार उत्तम झाला, त्या दिवसापासून पुण्यामध्यें पेशव्याची फौज पुष्कळ जमा होऊं लागली, ते लोक गारपिरावर इंग्लीशांची छावणी होती तिचा सभोंवते केवळ निकट उतरले.

ते वेळेस इंग्लीशांच्या लष्कराचा मोठा भाग घोडनदीहून कोठें दूर गेला होता ह्मणून पुणें मुकामीं इंग्लीशांचे लोक होते ते फार थोडे असें दिसून आलें; परंतु त्यांचे कुमकेस मुंबईहून एक गोरे लोकांचें पलटन पुण्यांवर जात होतें तें वर्तमान पेशव्यास कळून त्याची मसलत होती कीं, तें येऊन पोंहचलें नाहीं तोंच कोणे एके रात्रीस त्या इंग्लीशांच्या पलटनांवर अकस्मात छापा घालावा. मग अठ्ठाविसाव्ये तारिखेस तोफाना बेलजुंपून स्वार व पायदळ सिद्ध होऊन मध्यरात्रीस पेशव्याचे आज्ञेनें पुण्याचे दक्षिणेस उभे राहिले होते, ते समयीं इंग्लीशांच्या छावणींतील कोणा एकासही तें वर्तमान कळलें नाहीं, ह्मणून ते सर्व लोक गाढनिद्रानिमग्न झाले होते; परंतु संगमावर एल्फिनस्तन साहेब होता त्यास तो सकळ वृत्तांत कळला. तेव्हां त्याणें आपल्या माडीवरून कानवसा घेतला असतां, त्यास त्यां लोकांची मोठी गडबड आहे असें समजलें; तेव्हां प्रथम त्याचा मनांत आलें कीं, आपले लोक सावध करून आपणच त्यांवर एकाएकीं चालून जावें, मग दुसरें त्याचा मनांत आलें कीं, युद्धाचा उपक्रम आधीं बाजीरावाकडून व्हावा. इतक्यांत त्याचा जासुदानीं येऊन सांगीतलें कीं, ते लोक काहीं मसलतीस गुंतले आहेत, आणि ती गडबडही कांहिंशी कमी झाली असें त्या साहेबास वाटलें ह्मणून त्याणें आपल्या छावणींच्या लोकांस सावध न करितां ती रात्र तशीच जाऊं दिली. नंतर दुसरे दिवशीं ते छावणीचे लोक सावध झाले असें समजून बापूगोखला तात्काळ छापा घालणार होता परंतु बाजीरावानें पूर्वीपासून केलेली मसलत चालत आली होती कीं, ते छावणीचे पलटनी लोकही कांहीं द्रव्य देऊन वश करावे तो अर्थ पुरतेपणें सिद्धीस न्यावयाकरितां त्याणें गोखल्यास आज्ञा द्यावयाविषयीं विलंब केला; असें होतां ती दुसरीही रात्र गेली, मग तिसरे दिवशीं मुंबईहून निघा-

लेलें

लेले गोरे लोक (ते पेशव्याचा मनें अजून दूर असतील) त्यांहीं मोठमोठ्या मज-
ला करून तेदिवशीं तिसरे प्रहरीं छावणीचें ठिकाण आटपलें. नंतर ती जागा
शहराच्या सान्निध्येंकरून संकोचित यास्तव आपल्या लोकांस हितकारक न-
व्हे, असें समजून तें स्थान टाकून खडकीच्या पुलाजवळ मोकळे जागीं जाऊन
प्रशस्तपणें उतरले. असें नवेंबरचे पहिले तारिखेस वर्तमान झालें.

नंतर एल्फिनस्तन साहेबानें एक पलटन व कित्येक मराठे स्वार घोड-
नदीवर होते त्यांस बोलाविलें तें ऐकून इतःपर विलंब कामाचा नाहीं असें
पेशव्याकडे ठरलें. त्यावरून त्याच महिन्याचे पांचव्ये तारिखेस तिसरे प्रहरीं
पेशव्याचे लोक शहरांतून बाहेर निघोन युद्धास येऊं लागले. तेव्हां त्या शहरा-
जवळ जितक्या उंच जागा तितक्यांवरून पायदळाचा थाट जमला, आणि मै-
दानांत जिकडे तिकडे स्वारांची दाटी झाली; तेसमयीं त्या शहराकडे पाहिलें
असतां, पाण्याचे धारेसारिखी तिकडून येणारे स्वारांची अतूट रघ पडली हो-
ती. तें सर्व वर्तमान इंग्लीशांस विदित झालें, त्यावेळेस त्यांचे सवातीन हजा-
र+ पायदळमात्र असतां; त्यांची मसलत ठरली कीं, मराठे आपणावर येऊन प-
डले नाहींत तोंच, आपण पुढें होऊन त्यांवर हल्ला करावा. तेव्हां ते आपल्या
तळाच्या रक्षणार्थ सुमारें पांचशें लोक ठेवून बाकीचे सर्व तें ठिकाण सोडून पु-
ढें पाऊण कोस सरल्यावर दोहींकडून युद्धारंभ झाला. तेसमयीं प्रथम मरा-
ठ्यांच्या तोफा व बाणांचा मार चालू होऊन मग गोखल्यानें आपले सहा हजा-
र निवडक स्वार जरीपटक्या बरोबर ठेविलेले त्यांस इंग्लीश उभे होते त्यांचा डा-
व्या बाजूच्या पलटनावर जावयास नेमिलें. तेवेळेस ते पलटनी लोक याणीं पे-
शव्याचे कोणी कवाइत शिकलेले पायदळलोक होते त्यांवर जाऊन त्यांस पि-
टून आपल्या बंदोबस्तांत कांहीं न्यूनता झाली होती, परंतु ते आपणावर शत्रू
मोठ्या वेगानें येतो असें पाहून, तात्काळ समयविशेषानुरूप बंदोबस्तानें उ-
भे राहिले. मग ती मराठ्यांची निवडक टोळी त्या इंग्लीशांचे उजव्ये बाजू-
कडून वेगानें त्यांवर निरकस चालून येतांना त्यांचा व इंग्लीशांचा परस्परें
भडमार होत असतां ते स्वार केवळ समीप आले तेव्हां, त्या पलटनी लोकांहीं
एकदांच भडमार केला व त्या जागीं दैवयोगेंकरून मोठा चिखलही होता
त्यामुळें, घोड्यांस त्यांतून जावयाचें मोठें अवघड पडून एकमेकांवर पडत
पडत त्यांतील थोडकेसेमात्र त्या पलटनापर्यंत पोंहचले व दरकडां स्वारां-

---

+ पूर्वी पेशव्यानें एका पलटनासहित फोर्ड साहेबनामें इंग्लीश आपल्ये
चाकरीस ठेविला तो खडकीच्या पुलाजवळ छावणी करून राहिला असे; तो
युद्धप्रसंगीं इंग्लीशांस मिळाला तेव्हां सवातीन हजार इंग्लीशांचें पायदळ जमलें.

चौ

ची उधळा उधळी झाली; त्यांतील कित्येक इंग्लीशांचा पाठीमागून जाऊन त्यांना छावणीकडे वळले परंतु तेथें त्यांच्या मोठ्मोठ्या दोन तोफा होत्या त्यांच्या मार पाहातांच, त्याहीं तो बेत टाकिला. नंतर इंग्लीश त्याहून पुढें सरले असतां, पेशव्याचें लोक जे ठिकाण धरून उभे होते, त्यांहीं तें युद्ध सोडून आपल्या तोफांस बैल जुंपून शहराकडे चालिले. त्यामागें इंग्लीश कांहींसे त्यांस घालवीत जाऊन, मग रात्रीच्या अंधार पडूं लागला ह्मणून त्यांची पाठ सोडून माघारें आपल्या छावणीस आले.

तें युद्ध अगदीं स्वल्प झालें याचें कारण असें असेल कीं, बाजिरावपेशवा व बापूगोखला यांहीं इंग्लीशांचें पलटनी लोक आपणांस अनुकूळ आहेत, ते एकही गोळी न मारितां, मुकाट्यानें त्या युद्धसमयीं आह्मामध्यें येऊन मिळतील; असें आपल्या सर्व लोकांस सांगीतलें होतें; मग त्यांचें विपरीत वर्तन पाहून ते परम विस्मय पावले, याखेरीज ते लोक युद्धास पुण्यांतून बाहेर पडतांनां, त्यांच्या जरीपट्क्याची काठी कांहीं धक्का लागून मोडली; तो त्यांस मुळींच अपशकुन झाला.

त्या प्रसंगीं पुण्यांत बाजीरावाजवळ राहिलेल्या लोकांखेरीज, मराठी लष्कर अठरा हजार स्वार व आठ हजार पायदळ होतें; त्यापैकीं मेले व जखमी मिळून सुमारें पांचशें पडले, आणि इंग्लिशांचे मेले व जखमी मिळून आयशीं निरुपयुक्त झाले.

नंतर दुसरे दिवशीं प्रातःकाळीं घोड नदीहून इंग्लीशांचें एक पलटन व कित्येक स्वार येऊन पोहचले, तेव्हां गोखला युद्धास पुनः उभा राहीनासा झाला. त्यावर आठ दिवसानीं इंग्लीशांचें लष्कर जें जनरालस्मित साहेबाबरोबर दूर गेलें होतें तेंही येऊन मिळालें असतां, तो साहेब दुसरे दिवशीं हल्ला करणार होता त्यावरून बाजीराव पेशवा पुणें सोडून साताऱ्याकडे पळाला. त्याचे पाठीस स्मित साहेब लागला असतां, तो तेथून निघून पंढरपुराकडे गेला; तेव्हां त्याणें वासोट्याहून साताऱ्याच्या राजाही, आपल्या बरोबर पळावयास आणविला. तो त्यावाटेंतच येऊन त्यास मिळाला. नंतर पेशवा जुनराकडे जाऊन ब्राह्मणवाडींत कांहीं दिवस राहिला असतां, तेथें कित्येक लोकांसहित त्रिंबकजी डेंगळाही येऊन दाखल झाला, इतक्यांत जुन्नराकडे स्मित साहेब आला असें समजून तो पेशव्या आपल्या मंडळासुद्धां तेथून दक्षिणेकडे पळाला. त्यावरून वर्तमान उठलें कीं, बाजीराव पुण्यावर हल्ला करावयास येणार; ह्मणून कर्णेल बर साहेब जो ते समयीं पुण्यांत मुख्य होता त्याणें घोड नदीहून पहिल्या रेजमिंटाचें दुसरें पल-

टन

टन आपल्या कुमकेस बोलाविलें (त्या पलटनास हल्लीं सेकंद ग्रेनेडेर असें ह्मणतात) ती पलटन पांचशें बंदुकांची व निजवगेवर पंचवीस गोरे गोलंदाजसुद्धां दोन तोफा, व नवे ठेविलेले तीनशें मराठी स्वार, इतक्यां सहित सन अठराशें सत्रांचा शेवटल्या दिवशीं रात्रीस आठ वाजतांना निघून सारी रात्र चालून सकाळीं दहा वाजतांना, भीमेचे काठीं कोरेगावांवर पोहचले. तेथें नदीपलीकडे पंचवीस हजार स्वार व पांच हजार पायदळासहित, पेशवा उतरला होता, त्यास पाहून त्या पलटनाचा मुख्य कप्तान स्टांतन् साहेब याणें, त्या ओसाड पडलेल्या कोरेगावांमध्यें आश्रय धरिला. तोंपर्यंत बापू गोखला व आपा देसायी निपाणकर व त्रिंबकजी डेंगळा यांचा मसलतीनें आरब व गोसावी यांच्या तीन टोळ्या नदी उतरून तिहींकडून इंग्लीशांचा नाशार्थ त्या गावांवर जाऊं लागल्या. तो उद्योग शेवटास न्यावयाकरितां त्यांचा कुमकेस दोन तोफा सुरू करून बाणांचाही मार चालविला. नंतर त्या गावांचा रस्त्यांत उभयपक्षी लोक झटून मोठ्या निकराचें युद्ध झालें. तेव्हां त्या कित्येका रस्त्यांतून आरबांहीं इंग्लीशांस बाहेर घालविलें, व त्या त्या बाटानीं इंग्लीशांही नेटानें शिरून, त्या आरबांसही बाहेर काढिलें; असें त्या गावांत जागोजाग बहुत वेळां झालें. शेवटीं त्या गावांचे मध्यभागीं एक गढी मोरिखी जागा होती ती त्या साहेबास न कळतां रिकामी राहिली, तींत आरब शिरलें, तेव्हां त्यांस बाहेर काढितां येईना; इतकें होई तोंपर्यंत मराठ्यांचे स्वारही येऊन त्या गावांसभोंवते जमले, त्यामुळें नदीची वाट बंद होऊन इंग्लीशांचा लोकांस पाणी मिळेनासें होऊन, ते फार हैराण झाले. तोंपर्यंत इंग्लीशांचा दोन तोफा टेंकडीवर ठेविल्या होत्या त्या मोठ्या उपयोगी पडल्या, परंतु त्यांचे साहेबसरदार व बहुतेक गोरे गोलंदाज मेले गेले असें पाहून त्या आरबांनीं सवेग चाल करून त्यांतील एक तोफ घेतली. तेसमयीं त्या पलटनाचा पेटीसन् नामें साहेब असे त्याणें फार शौर्य केलें, त्याचा उरास गोळी लागून पाठींतून पार होऊन त्या जखमेनें मूर्छित सा पडला; तो तें वर्तमान एकतांच आपल्या जवळचे लोक होते ते त्वरित जमा करून आपल्या हातीं उफराटी बंदुक घेऊन, त्या आरबामध्यें घुसून कित्येकांस बंदुकेचा दस्त्यानेंच ठार मारित मारित त्याणें ती तोफ माघारी घेतली. त्या संधींतच त्याचे छातींतून दुसरी गोळी पार होऊन तो निरुपयुक्त होत्साता भूमीवर पडला. याप्रमाणें तें युद्ध अस्तमानपर्यंत झालें असतां, रात्रीचा आरंभीं मराठ्यांकडून कांहींसे हल्लके पडले; तेव्हां त्यांस पाणी मिळावयाजोगा अवसर सांपडून, मग नऊ वाजतां मराठे अगदीं युद्ध सोडून गेले. दुसरे दिवशीं उजाडतांना, मराठ्यां-

स्वें

नें लश्कर दक्षिणेकडे निघून जातें असें दृष्टीस पडलें तेसमयीं पेटतन्साहेबा-नें त्यांवर आपल्या दोहीं तोफांचा मार चालविला असतां, त्यांतील कोणी मा-घारा न फिरतां ते सर्व निघोन गेले. तेव्हां तो साहेब आपल्या सामर्थ्याप्रमा-णें आपले पडलेले जखमी लोक नेवविले तितके त्या दोहीं तोफांसुद्धां बरोब-र घेऊन, माघारा घोडनदीस गेला. त्या लढायींत इंग्लीशांचे मेले व जखमी मिळून एकशें छप्पन शिपाई, व वीस गोरे गोलंदाज पडले. इतकें होऊन तो उरांतून दोन गोळ्या पार झालेला पेटीसन साहेब आपल्या तळावर पों-हचल्यानंतर मेला. त्याशिवाय दुसरे दोघे साहेब त्या लढायींत मृत्यु पाव-ले व दोन जखमी जाले, आणि नवे टेनिलेले मराठे तीनशें त्यांपैकीं दोडशें उरले वरकड काहीं मेले व कित्येक जखमी झाले व काहीं पळाले. मराठ्यां-चे सुमारें पांच सहाशें पडले.

बाजीराव पेशवा याजवळ इतका बंदोबस्त असतां, तो कोरेगांव सोडू-न गेला याचें कारण काय, असें कोणी ह्मणेल तर समजावें कीं, जनरल स्मि-तसाहेब त्याजवळ पोंहचला. मग तो पेशवा तेथून दक्षिणेस गेल्यावरति-कडच्याही मुलुख मद्रासेच्या लोकांही घेतला असें त्यास कळून, तो सालप्या-च्या घाटानें सोलापुरास जाऊन राहिला, आणि तेथची कित्येक खंडनी घेतली. नंतर नागपुरकराचा गणपतराव सुभेदारही त्यास मिळून पंढर-पुरास जावयाचा बेत झाला. तेव्हां पेशव्या बरोबर बापू गोखलाही होता.

असें असतां फेब्रुआरीचे एकोणिसाव्ये तारिखेस त्या गोखल्यासहित बाजीराव आष्टेगावीं जाऊन उतरला असतां, जनरल स्मितसाहेब एकाएकी येऊन पोंहचला असें वर्तमान त्यास समजलें असतां, त्याणें गोखल्यास गे-पेंकरून निरोप पाठविला कीं, तुह्मीं आमचें रक्षण कोणप्रकारें करितां, व आ-त्यांवर छापा कसा पडला तें सांगा. तेव्हां गोखल्यानें उत्तर दिलें कीं, हे समयीं तुमची पाठ संभाळण्यांत चुकणार नाहीं. असें सांगितल्यावर त्याणें आपा दे-साई निपाणकर याचे चार हजार लोक आपल्या पाठीमागें रक्षणास ठेऊन, आपण पांचशें स्वारांनिशीं इंग्लिशांची वाटपहात राहिला.

तेसमयीं त्या स्मितसाहेबाजवळ स्वारांचीं काळीं पलटनें दोन व गोरें पलटन एक, व थोडे जुंपिलेल्या काहीं तोफा; इतकेंमात्र होतें, आणि त्याचें पा-यदळ मागें राहिलें असे. मग त्या उभयपक्षीं गांठ पडली असतां मराठ्यांहीं स्वारांनीं मार चालविला आणि त्या गोखल्याचें दृष्टीस पडलें कीं, ओढ्याचे अ-लीकडील इंग्लीशांचें पलटन बंदोबस्त रहित येत आहे, ह्मणून तो तीनशें लोकां-निशीं हल्ला करुन त्यांवर चालिला. त्यामुळें त्या पलटनाची काहीं अव्यवस्था

झाली,

झाली, परंतु तेच वेळेस गोरे पलटनाची टोळी त्या उभ्या पलटनाचे पाठीमागून मोठ्या वेगानें जाऊन, एकीकडून त्या मराठ्यांमध्यें शिरून गोरखन्यास ठार मारिला. नंतर इंग्लीश त्या लोकांचे पाठीस लागला असतां, त्यांचें कित्येक सामान व कित्येक हत्ती व घोडेही त्यास सांपडले. त्यांत विशेष इतकाच कीं, साताऱ्याचा राजा आपल्या परिवारासुद्धां इंग्लीशांच्या हातीं लागला.

पुण्यांत बाजीराव पेशवा याणें इंग्लीशांशीं सकृत्रिम स्नेह ठेऊन शेवटीं त्यांशीं युद्धही केलें तें वर्तमान ऐकून नागपुरकर इंग्लीशांजवळ त्या पेशव्याची निंदा करूं लागला परंतु त्याच महिन्याचें सत्ताविसाव्यें तारिखेस तेथें इंग्लीशांचे लोक होते त्यांवर एकाएकी सेना पाठविली. तें त्याचें लष्कर नऊ हजार स्वार व नऊ हजार सुमारें पायदळ, त्यांत तिनचार हजार आरब कित्येका तोफांसहित होतें. ते समयीं तेथें इंग्लीशांचें +चवदाशें पायदळ व गोरे गोलंदाजसहित चार तोफा होत्या, आणि दोनशें सुमारें बंगाली पलटनाचे स्वार असत. तें युद्ध शितावल्डी नामक एक टेंकडी नागपूर शहराजवळ आहे तीचा आसमंतात पडलें; त्याचा आरंभ अस्तमानीं होऊन दुसरे दिवशीं दोन प्रहरपर्यंत मोठ्या निकरानें चालिलें. त्यांत आरब व इंग्लीश यांहीं कोरेगांवच्या लढायीप्रमाणेंच परम शौर्य केलें. तसेंच इंग्लीशांकडे बंगालच्या त्यांतील सहाव्या रेजमिंटाचे स्वार होते, ते तर बहुतच उपयोगी पडले. त्यांहीं नागपुरकराचे स्वार यांच्या मोठ्या समुदायांत वेगानें प्रवेश करून, त्यांची उधळाउधळी होऊन त्यांतील कित्येक पायदळही मारून त्यांच्या दोन तोफा हिरून आणिल्या तोंपर्यंत इंग्लीशांच्या पायदळास जयाविषयीं संशय होता. मग हें कृत्य त्यांहीं टेंकडीवरून पहातांच, त्यांस विशेष धैर्य उत्पन्न होऊन, ते मोठेनेकार गुरुस्वर मोठा शब्द करून, वेगानें पुढें सरून मराठ्यांचा मोड झाला. त्या प्रसंगीं इंग्लीशांचे मेले व जखमी मिळून सवातीनशें पडले; तितकेच मराठ्यांचेही निरुपयुक्त झाले.

तो आपासाहेब नागपुरकर याणें दग्याचें आचरण केलें तें सिद्धीस न गेलें म्हणून आपला अनर्थ टळावयाकरितां इंग्लीशांस सांगून पाठविलें कीं, ही गोष्ट माझे आज्ञेनें न झाली. त्यावर साहेबानें उत्तर केलें कीं, मी तुमच्याजवळचे सर्व लोक दूर केल्याशिवाय तुमचा व आमचा व्यवहार चालणार नाही. नंतर चहूंकडून त्या साहेबाच्या साहाय्यार्थ आणिखी आणिखी फौजा येऊं लागल्यावर, डिसेंबरचे पंधराव्यें तारिखेस, त्याणें त्या आपासाहेबास

\+ चौदाशें पायदळांत दोन कंपनी तेथें इंग्लीशांच्या वकीलाच्या रखवालीच्या असत बाकी सर्व मद्रासेचे होते.

निरोप पाठविला कीं, तुह्मांस आमचा स्नेह पाहिजे असल्यास, आपली सर्व फौज दूर करून मुलुखाचा रक्षणाचें काम आह्मांकडे ठेवावें; आणि तुमचा दुसऱ्या कोणापासून दगा न होण्यास तुह्मीं आमचे जवळ येऊन रहावें. या गोष्टीचें उत्तर करावयास तुह्माला या वेळेपासून पाहांटेची दोन घटका रात्र उरे तोंपर्यंत, अवकाश दिला.

असें होऊन ती वेळ गेल्यानंतर इंग्लीशांचें लश्कर त्या नागपुरकरावर चालिलें. तें समजून तो आपासाहेब स्वयें निघून साहेबाचे भेटीस आला, तेव्हां इंग्लिशांचें लश्कर तेथेंच उभें राहिलें असतां, त्याणें आपल्या तोफखान्यांतील संपूर्ण तोफा आणवून त्यास दिल्या; परंतु त्याचा ज्या तोफा बाहेर होत्या त्या जेव्हां इंग्लीश हस्तगत करूं लागला तेव्हां त्याचे मराठे लोक तयार होऊन इंग्लीशांवर चालिले. ते समयीं इंग्लीशांची फौज पुनः त्यांवर चालून होऊन मोठ्या बलात्कारानें त्याही तोफा घेतल्या.

शेवटीं त्या बाहेरच्या तोफा इंग्लिशांस न देणारे असे त्या नागपुरकराचे गणपतराव सुभेदार व मनभट नामें दोघे सरदार होते, त्यांतील गणपतराव तो बाजीरावास जाऊन मिळाला, आणि मनभट तो आपल्या आरबांसहित नागपुरच्या किल्यांत बळधरून राहिला. तें ठिकाण इंग्लीश शिडी लाऊन एकदांच घेणार होते, तें सिद्धीस न जाऊन, थोडक्याच दिवसांनीं ते आरब आपल्या परिवारासुद्धां इंग्लिशांचा अभयवचनानें निघून गेले असतां, तो मनभट त्यांचे स्वाधीन झाला. त्यापुढें नागपुरकर व इंग्लीश यांचा तह ठरला कीं, इंग्लीशांहीं नागपुरकराचा संपूर्ण मुलुख संभाळून त्यानां चोवीस लक्ष रुपये प्रतिवर्षी उत्पन्न होतसा मुलुख त्या खर्चास द्यावा.

याप्रमाणें दक्षिणेंत व पूर्वेस दंगा होत असतां माळवा व हिंदुस्थानांत बंगाला व मद्रास यांच्या फौजा एकत्र मिळतानां त्यांहीं कित्येक जागीं पेंढाऱ्यांचा मोड केला होता, त्यांतील एक चितू नामें त्या पेंढाऱ्यांचा मुख्य त्याचा पाठीस जनराल मालकमसाहेब लागला तेव्हां, त्या चितूला होळकरानें आपल्या लश्करांत घेतला. याशिवाय अणखी कित्येका प्रकारांहीं होळकर आपला प्रतिपंथी, असें त्या मालकमसाहेबास विदित झालें. तेव्हां त्याणें त्या चितूची पाठ सोडून मायारा मद्रासेचा मुख्याची फौज होती, तींत जाऊन मिळाला. नंतर तेथून होळकरास कांहीं वागणुकीचे प्रकार गवरनर जनरलाच्या कल्पनें प्रमाणें मागून पाठविले. त्याचें उत्तर अधीगीकार सद्श होळकराकडचे गफूरखान वगैरे पठाणाचे सरदार यांहीं मल्हारराव होळकराचे आर्ये देऊन, ऐक्य होईल असें कित्येक वेळा दर्शविलें; परंतु तेथें वे-

ळेस

लेस त्यांचे स्वार आऊन इंग्रिशांचा कित्येक बुणग्याचा नाश करून ह्मैसुरचा राजा तत्पक्षी ह्मणून त्याचाही स्वारांवर हल्ला केला, त्यावरून तेथें जो इंग्रिशांचा मुख्य होता त्याणें निश्चय केला कीं, आतां या अनर्थाचा उपशम केलाच पाहिजे. ते समयीं त्या पठानांहीं आपल्या मंडळांत फितुराचा शंकेनें यशवंतराव होळकराची स्त्री तुळसाबाई तीला मारून टाकून तिचा मुख्य कारभारी गणपतराव नामें होता त्यास बंदींत घातला. असें असतां तो शिप्रानदीपलीकडे होळकराचा तळ होता, त्यावर इंग्लीश चालिला.

ते समयीं होळकराचें लश्कर दहा हजार स्वार व दहा हजार पायदळ होतें. त्यांहीं त्या शिप्रा नदीचा वळनानें कोंपरा झालेली जागा, ती परम सुदृढ असें पाहून, तेथें स्थान धरून राहिले होते. त्या लश्कराचे डाव्ये बाजूस नदीची मोठी दरड, आणि उजवे बाजूनें मोठा ओढा असे; आणखी त्याणीं आपल्या लश्कराचें तोंड नदीकडे करून त्याआंगीं आपल्या पुढून मोठमोठ्या सत्तर सुमारें तोफा ओळीनें ठेविल्या होत्या. तेथें इंग्लीश त्यावर जाऊन पडल्याचे पूर्वीं, त्यास ती नदी उतरावी लागली. तिचा प्रवाहापासून आठशें साडेआठशें पाउलें होळकराचा लश्करास अंतर होतें. तें स्थान असें दुर्गम आणि होळकराचे स्वार ही आपल्या समुदायांतून बाहेर निघून जिकडेतिकडे पसरून उत्तम प्रकारें लढत होते, तथापि इंग्लीश मोठ्या नेटानें त्या नदीचा उतार पार झाले; तेव्हांच शत्रूवर जाऊन पडावयाचे पूर्वीं आपल्या कवायदीचा बंदोबस्त राखणें त्यांस आवश्यक, त्यास कांहीं वेळ पाहिजे, आणि आपल्या तोफा होळकराचा मोठमोठ्या तोफांपुढें निरुपयुक्त ह्मणून ते त्याच ठिकाणीं उभे राहिले असतां शत्रूकडील तोफांचा भडमारानें त्यांतील कित्येक मेले गेले. त्यांची तयारी झाल्यावर जनराल मालकम साहेबानें आपल्या लोकांसहित मोठ्या वेगानें त्यांवर चाल केली असतां, त्यापुढें शत्रूचा पक्षाचे पायदळ व स्वारांतील कोणी एकही टिकला नाहीं. त्याचे गोलंदाज मात्र आपआपल्या तोफांस टाकून जाईनात. तेणेंकरून ते बहुतेक त्या ठिकाणींच मेले गेले, इतर जे उधळून गेले होते त्यांचे पाठीस इंग्लीशांचे स्वार व पायदळही लागून त्यांचे तीन हजार लोक मारिले.

तेव्हां शत्रूनें आपल्या तोफांतील लहान लहान तोफा सहा नेऊन वरकड इंग्लीशांस प्राप्त झाल्या. त्या युद्धांत इंग्लीशांचें सैन्य पायदळ, एक पलटन गोरे लोक, व सात पलटनें काळे लोक, आणि काळे स्वार चार पलटनें, व गोरे स्वार सुमारें दोनशें, व कित्येक साधे बारगीर, या इतक्यांतून पावणें आठशें निरुपयुक्त झाले. तें युद्ध मेहदपुर नामें गावांजवळ झालें ह्मणून त्यास

मेहदपुरची लढाई असें नांव पडलें. त्या युद्धांतून होळकराचें एक पलटन आपल्या बंदोबस्तानें रामपुरापर्यंत गेलें होतें, तेथें बंगाल्याच्या लष्कराचें एके टोळीची गांठ पडून, त्याची उधळाउधळी झाली.

असा जय आल्यानंतर तो मालकम साहेब त्या शत्रूच्या पाठीस लागला असतां मंदीसुरास होळकराचा पुत्र मल्हारराव तो इंग्लीशांच्या स्वाधीन झाला. तसमयीं इंग्लीशांचें व त्याचें ऐक्य होऊन ठरलें कीं, अमीरखानानें पूर्वीं जो तह होळकराच्या नांवानें केला होता, तो मान्य. त्या खेरीज त्या होळकरानें इंग्लिशांचा पक्षी कोट्याचा राणा यास ही कित्येक परगणे दिले. व पूर्वीं होळकर रजपुतांपासून खंडणी घेत होता ती इंग्लिशांही घ्यावी, आणि बुंदीपर्वताचे उत्तरकडे व सातपुड्याचे दक्षिणेकडे जितकी त्याची सत्ता होती, तो मुलूखही इंग्लीशांस दिला. या खेरीज इंग्लिशांहीं होळकराचा मुलखाचें रक्षण करावें त्याजकरितां त्याची तीन हजार फौज असावी.

मराठे मेहदपुरचे लढाईनंतर आपला अर्थ सिद्धीस जात नाहीं असें समजून त्याही तो उद्योग टाकिला. आजिराबाजवळ मात्र थोडकेसे लोक उरले असतां त्यास कर्तव्यार्थ सुचेना त्याप्रमाणें तो मुलखोमुलखीं पळत सुटला. त्यावर चहूंकडून इंग्लीशांच्या टोळ्या जात होत्या.

शिंद्यास मेहदपुरचें वर्तमान कळून तो इंग्लीशांच्या सूत्रानें वागूं लागला त्याच्या कोणी सरदारांहीं बळ धरून इंग्लीशांस किल्ले द्यावयाचा अडथळा केला, त्यांवर फौजा पाठवून थोडक्याच वेळानें इंग्लीशांही त्यांस जिंकिलें.

अमीरखान व पेंढारलोक पूर्वींच शितावलदीचे लढाईपासून सामुद्याचें बळ चालणार नाहीं असें समजून साहेबानें ठरविलेल्या तहाप्रमाणें वर्तूं लागले.

पेंढारी लोकांवर बंगाला व मद्रास व मुंबईच्या सैन्याच्या टोळ्या जाऊन त्यांतील कित्येकां पेंढाऱ्यांस मारून त्या लोकांहीं जे जे मुलुख घेतले होते ते सोडवून त्यांस माघारे देऊन, त्यांचे मोठमोठे सरदार धरून आणिले. त्यांपैकीं नामदार ख्यातनामा करीमखान त्यानें अशा अशा जंगलांत फेब्रुआरींत मालकम साहेबाचे स्वाधीन झाले. तिसरा वासिलमहमद त्यानें शिंद्याचें स्थान ग्वाल्हेर येथें आश्रय मागितला होता त्यास इंग्लीशांच्या सांगण्यावरून शिंद्यानें त्यांचे स्वाधीन केला. अप्पाचा चितु यास बहुत संकटें प्राप्त होऊन शेवटीं तो अशीरगड किल्ला येथें त्याणें आश्रय धरिला तेंही स्थान इंग्लीशांकडून घेऊं लागले असतां, तेथून तो चितु एकटाच रानांत पळाला;

ला; त्यास एका व्याघ्रानें त्या अरण्यांत मारिला असें निश्चित समजण्यांत आलें.

पश्चिमेकडे मुंबईच्या सरकारानें पूर्वीच फौजा पाठवून रायगडवगैरे कोंकणांतले लहान मोठे किल्ले सर्व घेतले; असें असतां बाजीरावमात्र साहेबांचे हस्तगत व्हावयाचा राहिला. तेंही त्याच वर्षाच्या जुलाई महिन्यांत सिद्धीस गेलें. तो प्रकार लिहिल्याचे पूर्वी नागपुरकराचें कांहीं वर्तमान समजलें पाहिजे.

तो आपासाहेब नागपुरकर शिताबल्दीच्या लढाईनंतर इंग्लीशांच्या स्नेहानें पुनः आपल्या गादीवर बसल्यापासून त्याणें अनेक प्रकारें विपरीत वर्तणुकी गुप्तपणें केल्या. त्यांत गोंड नामें कोणी रानवट लोक यांस बंड उठवावयाची मसलत दिली; आणि आपण इंग्लीशांस किल्ले द्यावयास कबूल होऊन किल्लेदारांस आंतून सांगीतलें कीं, किल्ले न द्यावे. याशिवाय तो बाजीरावासही ह्मणत असे कीं, तुमची कुमक असल्यास आह्मी इंग्लीशांस उलटून गोष्ट सांगूं. हें सर्व प्रकरण इंग्लीशांच्या वकीलास विदित झालें होतें, त्यावरून बाजीरावयाणें गणपतराव सुभेदार याजबरोबर फौज पाठविली असतां त्यावर इंग्लीशांची पलटणें जाऊन त्यांची वरदानदीचे कांठीं गांठ पडून एप्रिलाचे चवथे तारिखेस त्याचा पराभव झाल्यानंतर तो आपासाहेबही नागपुरीं इंग्लीशांहीं कैद केला.

त्यापूर्वीच बाजीराव नागपुरच्या मुलखीं आश्रयार्थ वरदानदीच्या पश्चिमेस जाऊन उतरला असतां तेथूनही एका रात्रीं [illegible] कों-ऊन उठून सेवनीपाशीं इंग्लीशांच्या दुसऱ्या फौजेच्या टोळीची गांठ पडली ते-व्हां त्याच्या लोकांचा नाश होऊन ते त्याचे बरोबर शिपाई व आरब [illegible] होते तेही बहुतेक आपआपल्या ठिकाणास गेले.

यानंतर बाजीरावानें [illegible] परंतु सर्वत्र इंग्लीशांचा बंदोबस्त आहे असें पाहून [illegible] बाजीरावानें [illegible] न, मालकमसाहेब इंदुराजवळ [illegible] होता त्यास [illegible] लिहून पाठविलें; नंतर जुलाई महिन्याचे तिसरे तारिखेस त्याचें व साहेबांची भेट होऊन तो राज्याशा रहित होत्साता इंग्लीशांचे स्वाधीन [illegible]. ते समयीं ठरलें कीं, त्याणें एकमार्गें, इंग्लीश टेरिटोरी तो मागेल त्या [illegible] राहावें. तेव्हां त्या मालकमसाहेबानें कृपा करून त्याचा भाऊ अमृतराव यास [illegible] वर्षीं आठ लक्ष रुपये कंपनी सरकारांतून पोहचत जावें, तसेंच [illegible] असें केलें. ही गोष्ट कलकत्याचा मुख्य गवरनर जनराल साहेब यांच्या [illegible]

पेऊन

येऊन त्याणें त्या बाजीरावास बंगाल्याकडे कानपुरापाशीं बेदूर नामें क्षेत्र आहे ती जागा रहावयाची नेमिली, त्याठिकाणास मराठे ब्रह्मावर्त ह्मणतात.

त्रिंबकजी डेंगळा याचे पाठीस इंग्लीशांची टोळी लागून त्यास खानदेशांमध्यें अहीर गांवाजवळ धरिला, तो तात्काळ बंगाल्यांत चुनारगड नामें सुदृढ किल्ला आहे तेथें बंदीस घातला.

नागपुरकर आपासाहेब यास कैदकरून बंगाल्यांत पाठवितानां, तो कांहीं सवड पाहून पळाला, त्याणें शिखलोकांचे मुलखीं जाऊन आश्रय धरिला. तो कपटी व अविचारी व पराक्रमशून्य ह्मणून साहेब लोक त्याची गणना करीत नाहींत.

असें उत्तरेकडे वर्तमान असतां एप्रेलाचे अकराव्ये तारिखेस इंग्लीशांहीं सातान्याचा राजा मोठ्या समारंभानें गादीवर बसविला, त्यास मुलुख पश्चिमेस सह्याद्रीपासून वर्ती पंढरपुरापलीकडे कांहींसा, व दक्षिणोत्तर वारुणानदी व निरानदी यांची मर्यादा करून दिला. त्यामुलुखांत बाजीरावाचे कांहीं उरलेले पायदळ लोक सुमारें साडेचार हजार व तेरा तोफा इतक्यांसहित गणपतराव सुभेदार उपद्रव करीत असे तें समजून मद्रासेच्या फौजेंतील जनराल मनरो नामें साहेब मोठा विख्यात होता, ज्याणें कर्नाटक सरसुभा घेतला. तो साहेब तेथून उत्तरेस जाऊन सोलापुरच्या किल्यापाशीं त्याची गांठ पडून युद्ध होऊन त्या गणपतरावाचे बहुतेक लोक मारून त्यास हांकून दिला. नंतर थोडक्याच दिवसांनीं तो किल्लाही घेतला.

याप्रमाणें संपूर्ण दक्षिण मुलुख इंग्लीशांच्या सत्तेंत येऊन मग तेथील जहागिरदार वगैरे जे इंग्लीशांस अनुसरून किंवा तद्विपरीत होते, त्यांस कोण कोणत्या प्रकारें देण्याघेण्याच्या योगें वाढवावे किंवा बलहीन करावे त्या योजनेचा विचार इंग्लीश करूं लागले.

प्रथम बुंदीचा राजा रजपूत याचा पहिल्यापासून इंग्लीशांशीं स्नेह होता, त्याला पूर्वी शिंद्यास खंडणी द्यावी लागत असे तें चुकलें; व शिंदे आणि होळकर यांहीं बलात्कारें जो त्याचा मुलुख घेतला होता तो त्यास पुनः प्राप्त झाला. असाच भोपाळच्या रजपूत राजाही पूर्वी इंग्लीशांच्या उपयोगीं पडलेला त्यास आष्टा, व इच्छावर, व सेहोर, व दोराहा, व देवीपुरा नामें पांच परगणें, व माळव्यांतील जप्त केलेल्या विंचुरकराच्या कांहीं मुलुख आणि सुजालपूर परगण्यांतील कांहीं भाग व किल्ला इस्लामनगर नामें तो, शिंद्याकडे असे त्याबद्दल दुसरा कांहीं मुलुख देऊन तें स्थान त्यास दिलें.

निजाम याला बाजीरावाचे देशीं संहाकोटी रुपये होते तें फिटावयासा

टीं

ठीं त्याचा पेशव्यास दहा लक्षांचा मुलुख द्यावा लागता, तो न लागला. व पेशवा किंवा त्याचे लोक त्या निजामाच्या राज्यांतील बारा लक्षांचा मुलुख इंग्लीशांशीं व मराठ्यांशीं युद्ध लागेतोंपर्यंत वहिवाटीत होते, तो त्याचा त्यास प्राप्त झाला. याखेरीज होळकर व नागपूरकर यांच्या मुलखांतील सहा लक्षांच्या सुमारें मुलुख इंग्लीशांहीं त्यास दिला. तेव्हां त्या युद्धाचे पूर्वी जें त्या राजास मिळत होतें त्यापेक्षां अठ्ठावीस लक्ष रुपये अधीक मिळूं लागले असतील अशी अटकळ होते.

दक्षिणेंत जितकीं वेतनें व अग्रहारें व इनामें पुरातन चालत आलीं होतीं, तीं इंग्लीशांहीं तशींच रक्षिलीं. आणि जहागिरदारही बहुतेक तसेंच रक्षिले. कोल्हापुरकरास पहिल्यापेक्षां विशेष, चिकोडी व मनोळी हे दोन परगणे मिळाले. याखेरीज जे कोणी इंग्लीशांचा पक्ष धरिलेले गृहस्थ लोक होते, त्यांस अनेक प्रकारें संतुष्ट केलें. दुसरें जे सरकारचे कारभारी नेमणुके वांचून बाजीरावाजवळ उगेच आश्रयमात्र धरून राहिलेले, यांस व नाना फडनवीसाचे वेळेपासून जे मोठेमोठे दरिद्री झालेले होते, त्यांस योग्यतानुसार कोणास कांहीं जमीनी व कोणास कांहीं द्रव्य देऊन, एलफिनस्तन साहेबानें सुखी केलें. तसेंच कित्येक सरदारही दारिद्र्यानें पीडिलेले पाहून, त्यांस कांहीं निर्वाहाच्या कल्पना योजिल्या, व पुण्यामध्यें सर्व हिंदू लोकांस आपआपल्या रीतीप्रमाणें गणितादि विद्या शिकावयाची शाळा घातली.

इंग्लीशांहीं युद्धयत्नेंकरून मराठी राज्य संपादिलें असतां, कोणाचेंही अनिष्ट न होय अशी कल्पना योजून त्या राज्यांतील संपूर्ण प्रजेस सुखकारक अशा वरलिहिलेल्या मर्यादा करून ठेविल्या. यांचे मुख्य कर्ते, महासमर्थ परम दयावंत ऐसे इंग्लीशांचे गवरनरजनराल मारक्कीस हेसतिङ्स साहेब, व त्यांचे सहाय सत्समानशील मोठे नामांकित एलफिनस्तन साहेब; हे पुरुष सुकीर्तिसाधनदक्ष यांणीं हिंदूंच्या मुलखांतील संपूर्ण प्रजेचें हित साधिलें; त्यायोगें यांचें स्मरण लोकांच्या मनांतून भ्रष्ट न व्हावें.

समाप्त

इंग्रेजांचा इसवीसन निघाल्यापासून, पुढें, हिंदूंचा शालीवाहन शक कोणत्या वर्ष चालू झाला, तें, व इंग्रेजी आणि हिंदी भाषाभेदेंकरून महिन्यांचीं नावें व त्यांचा रंभ कसकसा होतो, तें प्रकरण. जर कोणी इच्छा करील कीं इंग्रेजांचा इसवीसन नि ल्यापासून, पुढें किती वर्षांनीं हिंदूंचा शालीवाहन शक चालू झाला; तें वर्ष ध्यानांत वें, तर त्याणें इसवीसनाचीं अठ्याहत्तर, किंवा एकुणऐशीं वर्षें वजा करावीं, म्हण शालीवाहन शकाच्या आरंभाचें वर्ष कळेल. यासप्रमाण; हल्लीं इसवीसन अठरा एकुणतिसांच्या चवथा महिना, एप्रेल याची तारीख चवथी; त्या दिवशीं, हिंदूंचा श लीवाहन शकाचें सत्राशें एकावन्नावें वर्ष निघालें; यावरून अर्थात सिद्ध झालें कीं इसवीसन अठराशें एकुणतिसांत शालीवाहन शकें सत्राशें एकावन वजा दिल्या अठ्याहत्तर उरतात. त्या अठ्याहत्तराव्या वर्षीं, मार्चाची समाप्ति, व एप्रेलाचा रंभ असा संधींत, शालीवाहन शक निघाला. सन अठराशें एकुणतिसांचा एप्रे च्या चवथे तारिखेच्या पूर्वीं, शकें सत्राशें पन्नास होते; त्यावरून असा अर्थ झाला कीं न अठराशें एकुणतिसांत शकें सत्राशें पन्नास वजा दिले असतां; एकुणऐशीं शे रहातात. त्या एकुणऐशाव्या वर्षीं मार्चाची समाप्ति व एप्रेलाचा प्रारंभ असा स र्षीं शालीवाहन शकाचा प्रारंभ झाला.

यासदृश प्रमाण इंग्रेजांचें इसवीसन अठराशें एकुणतिसांत, हिंदूंचें श लीवाहन शकें सत्राशें पन्नासाची समाप्ति व सत्राशें एकावन्नाचा आरंभ.

इंग्रेजी आणि हिंदी महिन्यांचीं नावें व त्यांच्या आरंभाचा प्रकार असा.

१ जानेवारी यांत	१० पौषयाची समाप्ति व	११ माघयाचा आरंभ.
२ फेब्रुवारी यांत	११ माघाचा शेवट आणि	१२ फाल्गुनाचा आरंभ.
३ मार्च यांत	१२ फाल्गुनाची समाप्ति व	१ चैत्राचा आरंभ.
४ एप्रेल यांत	१ चैत्राचा शेवट व	२ वैशाखाचा आरंभ.
५ में यांत	२ वैशाखाची समाप्ति व	३ ज्येष्ठाचा आरंभ.
६ जून यांत	३ ज्येष्ठाचा शेवट व	४ आषाढाचा आरंभ.
७ जुलई यांत	४ आषाढाची समाप्ति व	५ श्रावणाचा आरंभ
८ अगष्ट यांत	५ श्रावणाचा शेवट व	६ भाद्रपदाचा आरंभ.
९ सप्तेंबर यांत	६ भाद्रपदाची समाप्ति व	७ आश्विनाचा आरंभ.
१० अक्टोंबर यांत	७ आश्विनाचा शेवट व	८ कार्तिकाचा आरंभ.
११ नवेंबर यांत	८ कार्तिकाची समाप्ति व	९ मार्गशीर्षाचा आरंभ.
१२ दिसेंबर यांत	९ मार्गशीर्षाचा शेवट व	१० पौषाचा आरंभ.

शुद्धिपत्र

सर्वभागानुक्रमणिकादि

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध	पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३	+६	त्यांणेंकरून	तेणेंकरून	१६	११	वेतला	घेतला
४	७	पांचव्ये	चवथ्ये	१९	४	सागीतलें	सांगीतलें
१०	२	फौजेसुद्धा	फौजेसुद्धां	२१	१४	फत्तेशिग	फत्तेशिंग
१०	११	नांव	नाव	२१	२२	मसुलतीनें	मसलतीनें
१४	११	भांसला	भोंसला	२१	२९	पक्षानुसारीं	पक्षानुसारी
१४	२०	खाच्या	खानाच्या	२२	२३	मराठ्यांतह्राचें	मराठ्यांशींतह्राचें
१५.	२३	च	व	२३	२	कादरमामा	कादरनामा
१५.	२६	जा	जों				

मुख्यप्रकरणें संपूर्ण यांचें

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध	पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	१७	दिल्ला	दिला	८	१८	नांव	नाव
३	७	यास्तवं	यास्तव	९.	५	दिल्लेल्या	दिलेल्या
३	८	माघारें	माघारे	९.	७	दिल्लें	दिलें
४	१९.	कामांकरितां	कामाकरितां	९	१२	नांव	नाव
४	२०	दिल्ली	दिली	९	*१	नांव	नाव
४	२२	नांवास	नावास	९	१७	नांव	नाव
४	२४	नांव	नाव	९	२९	होनें	होंनें
४	२९	कित्येकं	कित्येक	१०	६	गजमंडी	राजमंड्री
५	१	दिल्लीं	दिलीं	१४	३२	दिल्ली	दिली
६	१	वेंदर	बंदर	१५.	९	दिल्लें	दिलें
६	४	दिल्ला	दिला	१६	५.	दिल्ली	दिली
७	१०	दिल्ली	दिली	१९	२	वंदीन	वंदींन
७	१२	नांव	नाव	१९	२८	दिल्लें	दिलें
८	१३	नांव	नाव	२०	१२	सांठें	मांठें

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२०	१३	जाहालें	झालें
२२	९	किल्ला	किल्ले
३०	२	बालकिला	बाळेकिल्ला
३२	१३	मार्ग	मार्ग
३६	१४	त्याणेंकरुन	तेणेंकरुन
४१	२१	घुडलें	घडलें
४३	२४	मांडावर	माडीवर
४३	३२	जवचा	जवळचा
४५	३२	आणिक	अणीक
४५	३२	फामकर	फामलकर
४६	२१	पंताचों	पंताचा
४७	२	ती	तीं
४८	११	नाहीं	नाहींत
५१	८	औरंगजंबानें	औरंगजेबानें
५२	६	एकाएकीं	एकाएकी
५३	२३	माजन	माजुम
५३	२३	किल्लेचा	किल्याचा
५९	३	पोंचला	पोंहचला
६३	४	फडनीस	फडनवीस
६३	५	फडनीस	फडनवीस
८२	१८	दिल्ला	दिला
८४	९	लश्वगावर	लश्करावर
८९	४	मावडा	मावडा
९०	५	कोल्लापुरांत	कोल्हापुरांत
९०	११	कोल्लापुरांत	कोल्हापुरांत
९६	२१	वळवेंगाव	वाळवेंगांव
१०१	११	आणीक	अणीक
१०१	२५	एकूतांच	एकतांच
१०२	२०	पोंचला	पोंहचला
१०३	३	पोंचले	पोंहचले
१०३	३	मोसलेकडे	भोसल्याकडे
१०३	१२	पोंचले	पोंहचले
१०३	१५	पोंचले	पोंहचले
१०३	१६	पोंचले	पोंहचले
१०५	१३	पेंढारी	पेंढारी
१०५	२१	त्याणेंकरुन	तेणेंकरून
१०५	३०	रिकामी	रिकामी
१०६	३३	कोल्लापुर	कोल्हापुर
१०७	२	कोल्लापुर	कोल्हापुर
१०७	९	कोल्लापुर	कोल्हापुर
१०७	२५	कोल्लापुर	कोल्हापुर
११४	२	आठवले	अटवले
११४	४	आठवले	अटवले
११४	४	नांव	नाव
११४	८	संक्राजी	शंक्राजी
११७	२२	पोंचाविल्लीं	पोंहचविल्लीं
११८	३	पक्षपात धरीत नसे	पक्ष धरीत नसे
११८	६	अशां निमित्तें करुन	अशा निमित्तें करून
११८	१६	संक्राजी	शंक्राजी
११९	१७	आठवले	अटवले
११९	२५	माघारें	माघारा
११९	२९	नांव	नाव.
११९	३०	नांव	नाव
११९	३१	माघारें	माघारा
१२०	१९	नांव	नाव
१२२	४	नांव	नाव
१२४	२५	त्याणेंकरुन	तेणेंकरुन
१२४	२८	किल्ले	किल्ले
१२५	२८	जहालें	झालें
१२५	३१	तत्काळ	तात्काळ

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१३०	७	नांव	नाव
१३१	२२	शाहूंच्या	शाहूच्या
१३४	१०	नांव	नाव
१३४	२०	नांव	नाव
१३६	५	लढाईत	लढाईत
१३७	३	फडनीशीं	फडनवीशी
१३७	३०	पक्षपातधरिला	पक्षधरिला
१३८	८	असतें	असें
१४१	२६	नाव	नाव
१४९	२६	उंचलावयाची	उचलावयाची
१५७	११	कोलापुराकडे	कोल्हापुराकडे
१६२	२३	त्यांगेनशीं	त्यांगेनिशीं
१७०	२५	हाकोण	हाकोणी
१७४	१६	मुखनयार	मुखत्यार
१७८	१	मयायशें	मद्याशें
१८०	२७	कटाप्रांतीं	कटाकप्रांतीं
१८१	२८	कटाप्रांतीं	कटाकप्रांतीं
१८२	२९	केले	केलें
१८७	२६	कोलापूरकर	कोल्हापूरकर
१८९	४	जानागबाईच्या	जीनागबाईच्या
१८९	५	कोलापुराहून	कोल्हापुराहून
१९३	२१	कोलापुराहून	कोल्हापुराहून
१९६	२१	कोलापुराहून	कोल्हापुराहून
२०२	२३	गाजीदिननामें	गाजीवदिननामें
२०४	१०	पुंटी	पुटी
२०६	१७	मर्नेत	सर्नेत
२०९	५	मराठेच्या	मराठ्यांच्या
२१०	३२	हैदरअली	हैदरअली
२१६	८	निमें	निमें
२१८	३०	नांव	नाव
२२०	६	आठवलें	अठवलें
२२३	१	आसामी	असामी
२२६	२५	अईज	अईन्च
२२७	१५	असाउठल्या	असाशब्दउठल्या
२३४	१८	आंला	आला
२४०	१	अधेंमर्धे	अधेंमुधें
२४०	१०	अधेंमर्धे	अधेंमुधें
२४०	२४	गंहूर	गंदूर
२४०	२६	गंठूर	गंदूर
२४३	१०	नुर्ने	नूर्ने
२४६	३२	दफनार	दफ्तार
२५५	२८	कार्यसाधार्ये	कार्यसाधायें
२५५	३२	जाधिनास्थान	नाधिनास्थान
२६७	१६	त्यापेंकरून	तेणेंकरून
२७१	११	मखाबापू	मख्यानमबापू
२७४	२५	उपद्रव	उपद्रव
२८१	२८	बालकिल्ला	बालेकिल्ला
२९७	५	जाचें	जायाचें
२९८	१४	कुकेस	कुमकेस
३००	२५	मराठ्यांतहाचें	मराठ्यांशींतहाचें
३०४	१	गडी	गद्दी
३०८	७	येसमयीं	इसमयीं
३१५	११	विशीं	विपयीं
३१८	३१	साहेबांसही	साहेबासही
३२०	१३	भरवशावर	भरंशावर
३२६	१२	नागपुरमध्यें	नागपुरामध्यें
३२६	३०	गायकवाड	गाईकवाड
३४०	२७	हाईल	होईल
३४१	१७	अगदी	अगदीं
३४२	१३	हली	हलीं
३४३	२३	अगदी	अगदीं
३४५	३	वर्तमान	वर्तमान

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३४५	२२	संभाळितां	संभाळितों
३४७	८	वंश	वंश्य
३४८	११	साळयांचा	साळयाचा
३४८	१७	साळयांचा	साळयाचा
३५८	२०	मडळीस	मंडळीस
३५९	७	भगवसा	भरंसा
३५९	१७	आस्कानें	आक्सानें
३६५	७	संकटींसमयीं	संकटसमयीं
३७५	२२	खेडेकडे	खेंडेकडे
३७६	२२	होत्या	होता
३७९	१२	तोसर्व अनेक प्रकारें	तो अनेकप्र कारें
३८२	२१	भासवड्यास	भांबवड्यास
३८४	१३	यांकडे	याकडे
३८७	११	अगनायीं	अग्नायीं
३८८	४	युत्योपयोग	युद्धोपयोग
३८८	११	त्या गोरेलोकां चा कुमकेंपुढें सरून इस्तून लढत अस तां मद्रासेचें	त्या गोरेलोकां चें कुमकेंस मद्रासेचें प लटनी सांरये ऊन पोहचले
३९०	१२	याजवरून	याजयावरून
३९१	*२	माघारें	माघारीं
३९९	२२	दंगे	दगे
४०३	१५	तो स्वर्गीमस्था न आपला पु रातन आश्र यभूत स्वर्गी मस्थान	तो आपला पुरातन आ श्रयभूत स्व र्गीमस्थान
४२३	१	कित्यंब	कित्यक
४२५	१०	गांडनामें	गोंडनामें
४२६	१२	वारुणा	वारणा

459

DS 432 M2D818
Duff, James Grant
History of the Marathas

PLEASE DO NOT REMOVE
CARDS OR SLIPS FROM THIS POCKET

UNIVERSITY OF TORONTO LIBRARY

"बाजिंद"

भाग 1

"बाळ्या"

....

लेखक/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती मल्लविद्या

Www.kustimallavidya.blogspot.in
Www.facebook.com/kustimallavidya
whatsapp 9850902575

(सदर कथा लेखकाच्या नावासहित share करणे आवश्यक आहे

....

रायगड च्या डोंगरदरीत "धनगरवाडी" हे खुप जुने गाव.

सखाराम चा जन्म याच गावचा.

शिवाजी महाराजांनी रायगड स्वराज्याची राजधानी म्हणून निवडला आणि आसपास च्या छोट्या छोट्या खेड्यांचं सोनं झाला.

जीवन स्थिर झालं.

नाहीतर कोण कुठला विजापूर,दिल्लीचा बादशहा कुठल्या सरदाराला पाठवून गावाची राखरांगोळी करेल सांगता येत नव्हते.

रायगड किल्ल्यावर "टकमक" टोक नावाचा एक प्रचंड सुळका आहे,या सुळक्यापासून खाली हजारो फूट खोल दरी असायची.

स्वराज्याशी हरामखोरी करणारे फितूर याच टोकावरुन खाली पाताळात ढकलून दिले जायचे.

टकमकाच्या बरोबर खाली बाजूच्या 10 कोसावर दाट जंगलात धनगरवाडी हे गाव.

स्वराज्याशी फितुरी करणारे हरामखोर टकमकावरून खाली फेकले जायचे तेव्हा हजारो फूट खाली धनगरवाडी जवळ पडायचे.

अक्षरश चिखल व्हायचा त्यांच्या देहाचा..!

काही दिवस कोलह्या कुत्र्यांची मेजवानी झाली,पण जंगली जनावरांचा सुळसुळाट झाला त्या मुळे..!

जंगलातील जनावरं माणसाच्या रक्ताला चाटवली आणि मग जेव्हा टकमकावरून कोणी हरामखोर खाली येईना,त्यावेळी भुकेने कासावीस असणारी जनावरे शेजारच्या धनगरवाडीत हल्ले करु लागली..!

शे दोनशे घरट्यांचे गाव त्यामुळे भयभीत झाले.

मग गावचा कारभारी असलेला सखाराम हे गाऱ्हाणे घेऊन रायगडावर सरकारी दफ़्तरी सांगायला जायला निघाला.

सोबत पाच दहा जोडीदार सोबत घेऊन दिवस उगवायला घरातून बाहेर पडायच्या बेतात होता.

सखाराम च्या दोन बायका होत्या,राधिका आणि अंबिका.

दोघींचा पण सखाराम वर जीव होता.

राधिकेला मूल बाळ नसल्याने पाचाड पलीकडच्या धनगरवाडी वरच्या नातलगांची मुलगी अंबिका त्या घरात सखाराम ची कारभारीन बनून आली.
अंबिका ला मुलगा झाला.
वंशाला दिवा झाला म्हणून आवडीने बाळकृष्ण नाव ठेवले.
शिवाजीराजे रायगडावर राज्याभिषिक्त झाले त्याच दिवशी बाळकृष्णाचा जन्म झाला म्हणून सारी धनगरवाडी हरखून गेली होती.
बाळकृष्णाला बाळ्या म्हणून सगळी हाक मारत होती.
बघता बघता बाळ्या 7-8 वर्षाचा झाला होता.
बाळ्याचे वडील सखाराम अंगापिंडांने मजबूत गडी.
शेजार च्या वाड्या वस्त्यात सर्वांच्या मदतीला धावून जाणारा सखाराम कारभारी म्हणूनच काम करत होता.
गावातील सारे लोक धनगर.
मेंढ्या,शेळ्या चरायला नेणे,कोंबड्या पाळणे,जंगलातून लाकूड तोडून आणणे हा सर्वांचा प्रमुख उद्योग.
गावातल्या ज्या कुटुंबाकडे शेळ्या मेंढ्या जास्त तो गावचा सावकार माणूस.
सखाराम कडे 700 मेंढ्या,300 शेळ्या आणि 200 कोंबड्या होत्या.
सर्वात जास्त जीतराप असल्याने तो गावचा सावकार पण होता.
पण गेल्या 5-10 वर्षात बादशाही आक्रमणे महाराजांच्या मुळे बंद झाली,पण टकमक वरुन खाली येणारी मढी हे नवे दुखणे रायगड परिसराला जडले होते.
वर स्वर्गात डोके खुपसून महाराष्ट्राला सुखी करणारा रायगड,खाली मात्र नरक यातना देत असे.
कित्येक वेळा अनेकांनी रायगड वर जाऊन ही बातमी सांगितली होती,पण दखल घ्यायलाच कोणी नव्हता,म्हणून सखाराम हे गाऱ्हाणे घेऊन खुद्द महाराजांना भेटायला निघाला होता.
त्याचे कारण पण गंभीर होते...!

"पावसाळा नुकताच संपला होता,सारा रायगड परिसर हिरवागार शालू नेसून नटल्यासारखा झाला होता.
जनावरांना खायला प्यायला वैरण पाणी मोप मिळत होते.
सखाराम चा बाळ्या सकाळी उठून टकमकाच्या खाली शेळ्या घेऊन जायला निघाला होता.
सखाराम ने त्याच्या सोबतीला घरचा नोकर पांडू ला पाठवून दिले..!
परवाच्या मध्यरात्रीला टकमकाच्या बाजूने एका माणसाच्या जिवाच्या आकांताने किंचळण्याच्या आवाजाने सारा वाडा जागा झाला होता.
अजून एक मराठेशाहीचा फितूर,गद्दार बहुतेक टकमकवरून खाली आला असणार हा अंदाज सर्वांनी बांधला होता,सकाळी जाऊन सखाराम पाहून आला होता,पण ते मढ कुठं नजरेस पडलं नव्हतं.
त्या दिवशी बाळ्या शेळ्या हिंडवायला गेला होता,माघारी येता येता संध्याकाळ होत आली आणि दाट जंगलात भुकेने व्याकुळ दोन बिबळ्या वाघ ते परवाच मढ तोडून खात होते,हे दुरुनच पाहून बाळ्याला घेऊन पांडू वाड्याकडे धावत सुटला,तितक्यात एका फांदीला पाय अडकून पांडू खाली पडला आणि मावळतीच्या बाजूला एक काळाकिभिन्न मनुष्य हातात मजबूत काठी घेऊन,गळ्यात चांदीची पेटी घालून पांडू आणि बाळ्या कडे पाहून

हसत उभा होता...!

••● क्रमश : ●••

लेखक/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती मल्लविद्या

Www.kustimallavidya.blogspot.in
Www.facebook.com/kustimallavidya
whatsapp 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावासहित share करणे आवश्यक आहे)

■◆●■◆●■◆●■◆●■◆●■◆●■

'बाजिंद'

भाग २ रा

....
लेखक/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती मल्लविद्या

Www.kustimallavidya.blogspot.in
Www.facebook.com/kustimallavidya
whatsapp 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावासहित share करणे आवश्यक आहे)

....
पांडू आणि बाळ्या धडपडत उठले.

शेळ्या,मेंढ्या तिथेच सोडून जीवाच्या आकांताने धावू लागले.धापा टाकत ते वाड्यात पोहोचले आणि जोरजोरात सखाराम कारभाऱ्याला हाक मारू लागले .

त्यांचा आरडाओरडा ऐकून सारे गाव एकत्र जमा झाले.घडलेली हकीकत त्यांनी सखाराम ला सांगितली.

सखाराम आणि गावकार्यांनी आता हि गोष्ट रायगडावर जातीने सांगून याचा बंदोबस्त केला पाहिजे असे मनोमन योजले होते.

सर्व गावकर्यांच्या मनात भीतीने काहूर माजले होते.काहीही करून या जनावरांचा बंदोबस्त झालाच पाहिजे असे सर्वांना वाटले.

रात्री झोपताना बाळ्या अंबिका आईला घडलेली सर्व कहाणी सांगू लागला,आणि सांगता सांगता त्याला एकदम आठवले कि आपण जिथे फांदीत पाय अडकून पडलो होतो तिथे एक काळाकभिन्न माणूस आपल्याकडे पाहत उभा होता.

त्याने हि हकीकत सखाराम ला सांगितली.

निर्मनुष्य टकमक दरीच्या खाली,आपल्या वाड्यावरच्या मेंढपाळ गड्याव्यतिरिक्त दुसरा मनुष्य कसा येऊ शकतो

याचे सर्वांना नवल वाटले.
असेल कोण तरी गुराखी,जो वाट चुकून तिथे आला असावा असे म्हणत सखाराम ने विषय टाळला आणि सकाळीच रायगड च्या वाटेला निघायचे असे ठरवून सोबत कोणाकोणाला न्यायचे हे जाहीर करत सर्वांना तयारीचे आदेश दिले.
वाड्यावरचे सखाराम चे लहानपणाचे मैतर मल्हारी,सर्जा आणि नारायण याना घेऊन जायचे नक्की केले.
तिघेही अंगाने मजबूत आणि एका विचाराचे होते.सखाराम वर त्यांचा फार जीव होता.सर तयारी झाली आणि ती रात्र भूतकाळात जमा झाली.
सकाळच्या पहिल्या प्रहरी कोंबड्याने पहिली बांग दिली.
सखाराम च्या दोन्ही कारभारनी लौकर उठून स्वयंपाकाला लागल्या.
पहाटेच्या धुक्यात रायगड खूपच सुंदर दिसत होता.टकमकापासून वरचा सारा भाग धुक्यात झाकून गेला होता.
दुरून पहिले कि एखादा पैलवान कानाला पांढरी कानटोपी घालून बसल्या बसल्या गुडघ्यात मान खुपसून डुलकी मारत आहे असा भास होत होता.
राधिका आईने कोंबड्याची डालगी (खुराडी) चे झाकण काढले आणि आत विसाव्या घेणाऱ्या कोंबड्या बाहेर पडल्या..आणि मग त्या कोंबड्यांचे आवाज ऐकून गावातील इतर घरातील खुरुडे जोरात ओरडू लागली.
सखराम ने भरडलेल्या नाचणीच्या पोत्यातून काही नाचणी काढून अंगणात टाकली तशी कोंबड्यांचे थवे त्यावर तुटून पडले.
लहान लहान कोंबड्या तर सखाराम च्या खांद्यावर,डोक्यावर बसल्या.सखाराम ने त्या बाजूला करत अजून काही नाचणी टाकली.
समोरच्या शेळ्यांच्या कुंपणात शेळ्या,मेंढ्या सुध्दा आशेने त्याच्याकडे बघत होत्या.
समोर असलेली गवताची गंजी सोडून त्यांच्याही चारा पाण्याची सोय केली.
गोठ्यातला गाई,म्हैशी,बैल सर्वांना चारा टाकला.
एव्हाना तांबड फुटायला लागले होते.
सोबत येणारे मैतर अंगावर घोंगड,खायला भाकर्या बांधलेली झोळी आणि कुर्हाड घेऊन सखाराम च्या दारात हजर झाली.
सखाराम ने न्याहारी आटपली आणि कपाळाला भंडारा लावत त्या साथीदारांच्या कपाळी सुधा भंडारा लावला आणि राधिका,अंबिका ला सांगून जायला निघाले.नारळाच्या काथ्यापासून बनवलेले जाड गोणपाट निमुळते करत पावसापासून वाचण्यासाठी त्याचे गोंचे करून चौघांनी डोक्यावर घेतले होते.
एव्हाना बारीक रिमझिम पाऊस सुरूच होता.
सोबत असावा म्हणून एक घोडा चौघात घेतला आणि त्यावर आणलेले जेवणाची थैली बांधत सखाराम ने एकवार टकमक टोकाकडे पाहिले.
सखाराम ला आठवले कि शेवटच्या वेळी ‘शिवाजीराजे भोसल्यांच्या’ राज्याभिषेकाला रायगडावर जाऊन खुद्द महाराज पहिले होते.
सरसर भूतकाळ त्याच्या नजरेपुढे येऊ लागला.
आजवर ज्याच नुस्त नावच ऐकून लहानाचा मोठा झालो तो शिवाजी त्या दिवशी राजा झाला होता.

जावळीच्या मोरे आणि पुण्याच्या भोसल्यांच्या दंग्यात रायरी परिसर एककाळी हादरून गेला होता.महाबळेश्वर पासून ते महाड पर्यंतचा पूर्ण दाट जंगल जाळीचा पट्टा जावळीकर मोऱ्यांच्या ताब्यात होता.काय घडले देव जाणे पण एके दिवशी भगवे झेंडे घेतलेले हजारो हशम रायगडला भिडले आणि तेव्हापासून ते आजवर कधीही रायगड परिसराला अवकळा लागली नव्हती.सर्व काही आनंदात होते.

महाराजांनी पाण्यासारखा पैसा ओतून हा रायरीचा किल्ला 'रायगड' केला होता.

त्यावेळी आमच्या वाड्यानेच जंगलातल्या वाटा,चोरवाटा महाराजांच्या फौजेला दाखवून दिल्या होत्या.

आणि एक दिवस महाराज राजे झाले होते.

मुठीत मावेल तितके सोन महाराज सर्व रयतेला वाटत होते..एक नाहीतर दोन क्षण त्या महाराष्ट्राच्या महादेवाचे दर्शन झाले होते..!

टकमकाकडे पाहत सखाराम हे सारे आठवत होता.

सर्वजन जायला निघाले.

वाड्यापासून टकमकाच्या खालूनच रायगडाच्या 'चीत' दरवाज्याकडे जायला वाट होती.वाटेत महाराजांचे मोर्चे,मेटे होतेच,पण ह्या असल्या मुसळधार पावसात तिथ कोण असेल का नाही सांगता येणार नाही.

मल्हारी,सर्जा,नारायण आणि सखाराम हे चौघे त्या वाड्यातून चालू लागले.

वर रिमझिम पाउस होता ,पण गोंच्यामुळे डोक्याला न लागला बारीक तुषार तोंडावर पडत होते.

जेवण भिजू नये म्हणून त्यावर घोंगडे टाकले होते.

मल्हारी ने घोड्याचा लगाम पकडला होता आणि हे चौघे चिखल तुडवत टकमक दरीकडे चालत जात होते.

साधारण दोन प्रहर चालून झाले.सूर्य चांगलाच वर आला होता.

१-२ कोसावर टकमक दरी येईल असा अंदाज लागला आणि चौघांच्याही अंगावर शहरा आला.

एक प्रकारची अनामिक भीती होती मनात.

आजवर इतकी माणसे वरून खाली आली ,काय झाले असावे त्यांचे ?

माणूस मेल्यावर नक्की जातो कुठे ...आणि इतक्या वरून पडल्यावर किती बेकार जीव जात असल एकेकाचा..!

चोघांच्याही डोक्यात अनामिक भीती होतीच....आणि तितक्यात टकमकावरून आणखी एक आकाशपाताळ भेदणारी जीवघेणी किंचाळी ऐकू आली..!

चौघेही सावध होऊन वर पाहू लागले तर त्याना दिसले कि टकमकावरून आज आणखी कोणाला तरी कडेलोट झाली आहे..!

भीतीने सर्वांग थरारून उठले होते....कमी आवाज...हळूहळू मोठा झाला आणि अवघ्या काही अंतरावर धड्ड असा आवाज करत जंगलाच्या दाट जाळीत ते मढ पडलं आहे याचा चौघानाही अंदाज आला.....चौघेही एकमेकाकडे पाहू लागली.

खूप विचार करून उसन्या आवसानान सखाराम बोलला.....गड्यानो...आपण ते कोण आहे बघून येऊया का र...?

••● क्रमशः ●••

बाजींद"
भाग 3 रा
••••••••••••••••••••••••
लेखक/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती मल्लविद्या
Www.kustimallavidya.blogspot.in
Www.facebook.com/kustimallavidya
whatsapp 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावासहित share करणे आवश्यक आहे)
••••••••••••••••••••••••••••

मल्हारी,सर्जा आणि नारायण प्रश्नार्थक मुद्रेने सखाराम कडे पाहू लागली.
सारा गाव ज्या गोष्टीमुळे गेली 5-6 वर्षे भीतीच्या दडपणाखाली आहे,त्या गोष्टीजवळ येऊन हा माणूस त्या गोष्टीला जवळून पाहूया कसा काय म्हणत असेल हा प्रश्न तिघांना पडला होता.

सखाराम ने तिघांच्याकडे पाहत उचश्वास टाकत बोलला..!

अरे आजवर घर-संसार पाहतच आलोय आपण,देवाच्या दयेने आसपास च्या बारा वाड्यात चांगलं नाव हाय आपलं.
ही असली मेलेली मढी किती दिस भ्या घालणार आपणाला.
हे बगा, खंडोबाचा भंडारा लावलाय आपण भाळाला, जरा धीर धरुन ती मढ बघुया,म्हणजे वर गडावर गेल्यावर बोलायला तोंड मिळलं आपणाला,राजा देवमाणूस हाय आपला,आपल संकष्ट नक्की त्यांच्या ध्यानी येईल...चला,खंडेरायाच नाव घ्या आणि या माझ्या मागं...!

सखाराम च्या असल्या बोलण्याने तिघांनीही धारिष्ट्य केले आणि मान हालवून टकमक दरीकडे पाय वळवले.

एव्हाना रिमझिम पाऊस थांबला होता,आणि कोवळे उन्ह अंगावर पडू लागले होते.
घोड्याला पण उन्हामुळे चांगली उब मिळत होती,तो पण मनोमन सुखावला होता.
रायगड ची उंची स्वर्गाला भिडली होती.
वर पडलेला पाण्याचा थेंब न थेंब सरळ खाली येत होता.
त्यामुळे वरुन धबधबणारे पाणी ओढ्यात मिळून छोटे छोटे नाले तुडुंब भरुन वाहत होते.
पायात कातडी पायतान पाण्याने आणि चिखलाने जास्तच जड झाल्याने चौघांनी ते काढून मधोमध कासरा बांधून घोड्याच्या पाठीवर बांधले आणि एका मोठ्या चिंचेच्या झाडाला घोडा बांधून,कुऱ्हाडी आणि घोंगडे अंगावर घेऊन ते ओढ्यातून वाट काढत टकमक दरीकडे निघाले.

चौघेजण ओढ्यातून पुढे पुढे जाऊ लागले,चांगले मध्यावर गेले आणि चिंचेला बांधलेला घोडा दोन्ही पाय वर करत जोरजोराने किंचाळू लागला..!
काय होतय चौघांना कळेना,आसपास पहिले तर गार वाऱ्याशिवाय चिटपाखरु पण नव्हतं..मग घ्येला काय झाले ओरडायला समजेना...!

त्याने हिसका मारुन लगाम,दावे तोडले आणि सुसाट वेगाने बाजूच्या जंगलात पळून गेला..!

घोड्याच्या या विलक्षण वागण्याने नारायण मात्र पुरता घाबरला,तो म्हणाला ..."गड्यानो, मला काय लक्षण ठीक दिसणा...माझा घोडा आजवर असा कवाच वागला नाय...माझं ऐका,मागं फिरुया..चार दोन दिसान पाचाड ला सांगावं धाडून सगळी हकीकत महाराजांच्या खासगीत सांगूया...पण आत्ता बाहेर पडूया...!

सखाराम त्यावर रागात बोलला..."महाराजांची खासगी तुझ्यासारख्याच ऐकून घ्यायलाच बसली हाय जणू...सारा महाराष्ट्र सांभाळायचा हाय त्यास्नी...तुझ्या घोड्यान साप-पान बघितलं असलं म्हणून तो गेला पळून... दरीकड जाऊन लौकर मागं येऊन त्याला शोधूया...चला पाय उचला लौकर...!

सारे जण त्या भयाण ओढ्यातून पुन्हा चालू लागली.
चांगलं छातीपर्यंत पाणी आलं आणि पाण्याचा जोर जाणवू लागला.
चौघांनी एकमेमेकांना हात देऊन कड केलं..!
ओढ्याच्या बरोब्बर मध्यावर आलं तस वाघांच्या एका गगनभेदी किंचाळीने पावसाने गारठून अंग चोरून बसलेली चिमणी पाखर आभाळात उडू लागली आणि चौघांच्या अंगावर भीतीने शहारे आले....ओढ्याच्या पाण्याच्या वेगाने ते एकसारखे वाहू लागले आणि चौघांची हाताची कडी तुटली आणि ते उत्तरेकडे वाहू लागली...! जो तो आता जीव वाचवायचा प्रयत्न करु लागला..!

मल्हारी पूर्वी महाड ला सुभेदार तान्हाजी मालुसरे यांच्या तालमीत 3-4 वर्षे राहून आलेला गडी होत.
सिंहगड लढाईत सुभेदार गेलं आणि तालमीतल्या पैल्वाणांच्या वर उपासमारी आली..म्हणून चौघांनी पण कुस्तीला रामराम ठोकून गाव गाठला होता.
पण त्या कुस्ती मुळे पुरात पोहायचे कसे त्यांला चांगलेच ठाऊक होते,त्याने सर्वांना ओरडून सांगितले की काठावर असलेल्या वडाकडे बघत पोहा....!

पुरात जर फसला तर हात पाय हलवून काय उपयोग नसतो..अश्यावेळी एक करायचं की काठावर असलेलं कोणतही मोठं झाड त्याकडे लक्ष देत तिरकस पोहत पोहत जायचं...पाण्यात साप,विंचू,काटे काहीही येवो लक्ष द्यायचे नसते...चौघेही पुराची धार तोडून एका महाकाय वडाच्या झाडाजवळ पोहोचले...!

चिंब भिजलेल्या चौघांच्या कुऱ्हाडी पाण्यात वाहून गेल्या होत्या.
घश्यात पाणी गेले होते त्यामुळे चौघेही ठसके देत देत काठावर दम खात पहुडले होते...!

साधारण दम कमी कमी झाला आणि सखाराम क्षणात सावध झाला आणि मल्हारी,नारायण,सर्जा कुठे आहेत पाहू लागला..!
हाकेच्या अंतरावर तिघेही दम खात पहुडले होते.
सावकाश पावले टाकत तो तिघांच्या जवळ जाऊन तिघांना सावध केलं..!

नारायण,दम खात बोलला...तुम्हाला म्या सांगत हुतो,आरं जनावरं ते बघू शकट्यात जे तुम्हाला आमाला दिसत नसतया... खण्डेरायचा आशीर्वाद म्हणून वाचलो,पण आता हिकडं वाघाची डरकाळी ऐकली नव्ह...आता काय करायचं...?

सखाराम ने धीर देत त्याला सांगितले,अरे नको काळजी करु.. या सगळ्या भाकडकथा आहेत.
तस जर नसत तर 350 वर्षे महाराष्ट्र गुलामगिरीत राहिलाच नसता...देव देवरस पण काय कमी होत काय आपल्याकडं....पण शिवाजीराजानं तलवारीच्या जोरावर संपवलीच ना गुलामगिरी...पण विचारांची गुलामगिरी कवा संपणार आपली देव जाणे...चला धीर धरा...वाड्या जवळची हजारो घरटी आपल्या चौघांच्या नजरेला नजर लावून बसली असतील...या असल्या फालतू गोष्टीत भिऊन बसला तर शेण घालतील लोकं आपल्या तोंडात..ऊठा बिगीन आणि चला...!

सखाराम च्या निर्वाणीचा बोलणे तिघांनाही ऊर्जा मिळाली,चौघेजण पुढे चालू लागले...!

तो महाकाय वडाचा बुंधा पाहून कोणीही भयकंपित होईल.
त्याच्या त्या विशाल पारंब्या पाहून जणू ब्रम्हराक्षस वाटेत ठाण मांडून बसला असावा असा भास होत होता.

चौघे जण वर टकमक टोकाकडे पाहत दरी कुठे असेल अंदाज बांधत त्या वडाला बगल देऊन चालू लागले..!

ओढ्याच्या काठापासून जंगली भाग फारसा दूर नव्हता,म्हणायला म्हणून ते पठार होते,पण सारी जंगली झाडे फार.
एव्हाना सूर्य माथ्यावर आला होता,पण पावसाळी ढगाने इतकी गर्दी केली होती की संध्याकाळ झाल्याचा भास होत होता..!

तिघेही जंगलात घुसणार इतक्यात वाघांची ती प्रचंड डरकाळी समोरच्या झाडा झुडपातून येऊ लागली..!
चौघांची सर्वांगें थरारली.
जंगलातील झुडपे हालवत ती श्वापदे बाहेर पडत होती.
किती होती काय माहित,नक्कीच एक पेक्षा जास्त होती हे नक्की.
आता मात्र सखाराम च्या धीराच्या गोष्टी ऐकण्यात नारायण,सर्जा,मल्हारी तिघांनाही रस नव्हता...आणि त्या गोष्टी सांगायला सखाराम कडेही वेळ नव्हता...आल्या पावली ते वडाच्या झाडाकडे धावू लागली...!

डरकाळी चा आवाज मोठा होत गेला आणि सखाराम चा पाय फांदीत अडकून सखाराम पडला...नारायण ने ते

पहिले आणि सर्जा व मल्हारी ला थांबवत त्याला उचलायला गेली तितक्यात ते पावसाने भिजलेले वाघाचे प्रचंड धूड जंगलाबाहेर पडले...त्यापाठोपाठ अजून एक..अजून एक...चौघांची डोळे विस्फारली गेली आणि हात पाय गाळून चौघे बसल्या जागी भीतीने गारठून ओरडू लागली...

किमान 5 ते 6 धिप्पाड वाघ छलांग मारत मारत चौघांचा वेध घेत येत होती...चौघांनी जगण्याचा धीर सोडला आणि डोळे मिटून त्यांचा इष्ट देव खंडेरायचा धावा सुरु केला.....वाघ चवताळत आले...बस्स आता एकच झेप आणि खेळ संपला...तितक्यात.......

सुं.. सुं... सुं.... करत एकापाठोपाठ एक बाण वडाच्या झाडापाठीमागून कोणीतरी सोडले....वाघांचा तो वादळी आवेग आणि वाऱ्यासारखा वेग क्षणात कमी झाला...ते बाण बरोबर सखाराम आणि त्या तिघांच्या पुढे काही अंतरावर जमिनीत घुसले...ज्याने ते बाण सोडले त्याकडे भयभीत नजरेने ते 5-6 वाघांचे प्रचंड धूड पाहत..आल्या पावली वाऱ्याच्या वेगाने पुन्हा जंगलात पळून गेली...!

चौघांनी डोळे उघडून ते पळून जाणारे वाघ पाहिले आणि आश्चर्यकारक नजरेने उभे राहिले व समोर घुसलेल्या बाणाकडे पाहत एकदम मागे फिरले...!

••● क्रमश ●••

"बाजींद"

भाग 4 था
••••••••••••••••••••
✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
●•••••◆•••••••••●●••••••••••◆•••••●

आभाळातून वीज चमकावी तसे ते दोन बाण वाऱ्याच्या वेगाने येऊन समोर जमिनीत घुसले अन जिवाच्या आकांताने ते वाघांचे धूड पळताना पाहून सखाराम व मित्रांना आश्चर्य वाटले.
एव्हाना जिवाच्या भीतीने पळत सुटलेले ते चौघेही जणू काही झालेच नाही अश्या आवेशात उठली आणि आपल्या बचावासाठी एवढया पावसात आणि या दुर्गम जंगलजाळीत कोण आला आहे याचा कानोसा घेऊ लागली.
तो कोणीही असो,त्यांच्यासाठी देवदूत होता.

एक दीर्घ श्वास घेत ते चौघे वडाच्या झाडाकडे पाहू लागले...आणि त्यांना हातात धनुष्य घेतलेल्या एका योध्याचे दर्शन घडले...!

सहा साडेसहा फूट ऊंच,अनवाणी पण भव्य पाय,दोन्ही पायात काळा दोरा,अंगात धोतर आणि काळा अंगरखा ज्यावर रक्ताचे डाग...गळ्यात चांदीची पेटी लटकत होती.
कमरेला समशेर व पाठीला ढाल होती.
कमरेला पांढरा शेला बांधला होता,डोक्याला मराठी पद्धतीचे मुंडासे व भव्य कपाळावर भंडारा लावला होता..आग ओकणारे लाल भडक डोळे,सरळ सळसळीत नाक,कल्लेदार मिशा....एक विशी पंचविशीत तो तरुण धिप्पाड मल्ल भासत होता...!
चेहऱ्यावर एक प्रकारची गंभीरता स्पष्ट जाणवत आपले भव्य अनवाणी पाय त्या ओढ्याच्या भिजलेल्या मातीवर ताकत तो एक एक पाऊल त्या चौघांच्याकडे येत होता.

चौघांनाही कुतूहल,आश्चर्य,अनेक प्रश्न पडले होते...कोण असावा हा धीरगंभीर पुरुष...!

चौघांनीही धीर एकवटून त्या पुरुषांकडे जायला पावले उचलली आणि तितक्यात आभाळातून सरसर मेघधारा बरसू लागल्या..!

तो धिप्पाड पुरुष तसाच मागे सरकला आणि वडाच्या डोलीत थांबत त्या तिघांनी तिथे येण्यासाठी खुणावले..!

ती खून मिळताच तिघेही धावत त्या डोलीकडे धावू लागली...धावताक्षणी एवढ्या मुसळधार पावसातही वाघांच्या डरकाळ्या मात्र पुन्हा एकदा ऐकू येत होत्या....!

चोघेही त्या युवकाजवळ आले,निशब्द शांतता भंग करत सखाराम त्याला बोलला...!

"पाव्हणं... कुण्या गावचं तुमी ?
लय उपकार झाले बगा तुमचे,माझ्या खंडेरायानेच तुम्हाला हित पाठवलं बगा..तुमचे लय उपकार झाले"
सखाराम च्या शब्दाला मान डोलवत तिघेही सुरात सुर मिसळून मान हलवू लागली..!

क्षणभर शांतता पसरली,अन काही क्षणात त्या युवकाचा धीरगंभीर आवाज ऐकायला मिळाला..."कोण तुम्ही ? का आला आहात तुम्ही इकडे ?"

निर्धारी प्रश्न विचारत त्याचे ते अंगार ओकणारे डोळे त्या चौघांवर पडले अन चौघांनाही काय बोलावे क्षणभर समजेना...!

आम्ही धनगरवाड्याचे,रायगड ला निघालो आहोत...सखाराम बोलून गेला...!

रायगडी ? कशासाठी ?

क्षणाचाही विलंब करता त्या युवकाने प्रतिप्रश्न केला...!

मग,सखाराम ने त्यांच्या येण्याचे कारण सांगितले.
टकमकावरुन येणाऱ्या मढ्यांच्या मास रक्ताला चाटवलेले वाघ,जनावरे माणसावर हल्ले करत आहेत..सारे पंचक्रोशीतील गाववाले हैराण आहेत या गोष्टीवर...म्हणून आम्ही हे प्रकरण रायगड च्या सरकारी लोकांच्या कानावर आणि गरज पडली तर महाराजांना भेटून सांगायचे म्हणून घराबाहेर पडलो आहोत...!

मूर्ख आहात तुम्ही...मोठ्या आवाजात तो युवक बोलला...तुमची गाऱ्हाणे ऐकायला असे कसेही भेटतील काय सरकारी अधिकारी आणि महाराज ?

आणि रायगड सोडून या दरीत का आलाय मरण्यासाठी ?

त्याच्या या प्रश्नाने नारायण बोलला...आर कोण र तू ?
मगापासून ऐकून घेतोय तुझं..वाघापासून वाचवलं म्हणून तुझं उपकार मानायला लागलो तर आम्हाला कायदा शिकवायला लागलास काय ?
आधी तू सांग कोण आहेस,आणि हे अंगावर रगात कसलं ?

नारायण च्या या बोलण्याने तो युवक थोडा आकसला....!
मोठा श्वास घेऊन बोलला...मी ...मी कोण ?
हाच प्रश्न जन्मापासून स्वतःला विचारत लहानाचा मोठा झालोय....!
अजून उत्तर सापडत नाही,आणि आता सापडून पण उपयोग नाही..!

खंडोजी नाव माझं..!
महाराजांच्या हेर खात्यात बहिर्जी नाईकांच्या समवेत 10 वर्ष काम केलंय... पण...पण आता भटकतोय या दरीत एकटाच..!
वाट बघतोय कोणाची तरी...!

खंडोजी च्या या बोलण्याने चौघेही आश्चर्यचकित झाले..!
चौघांना चूक झाल्याची जाणीव झाली आणि सखाराम ने खंडोजी ला माफी मागत बोलू लागला....

"माफ करा सरकार,आम्ही गरीब लोक,ह्यो नारायण,ह्यो मल्हारी,ह्यो सर्जा आणि आन म्या सखाराम"
मल्हारी पण महाराजांच्या फौजेत जायला गेला हुता सुभेदार तान्हाजी मालुसरे यांच्या तालमीत,पण हत्यारे शिकत व्हता आणि सिंहगड च्या दंग्यात सुभेदार गेलं आण मग ह्यो परत आला गावाकडं...आमची लय इच्छा व्हती की राजांच्या फौजेत सामील व्हावं पण एवढं नशीब कुठलं ओ आमचं...पण खंडेरायाच्या कृपेनं गावगाडा सांभाळतो आमी.. गावसाठीच सरकार ला हे टकमक वरची मढी काढायला कोणाची तरी नेमणूक करा म्हणून आर्जव करायला निघालोय आम्ही...तुम्ही नाईकांच्या जवळचे म्हणजे महाराजांचे पण जवळचेच... आम्ही हात

जोडतो एवढं पुण्य घ्या पदरात....आमची गाऱ्हाणी सांगा सरकारी दरबारी..."

चौघांनी खन्डोजी ला हात जोडलेलं बघितलं आणि खन्डोजीने हातातलं बाण खाली टाकत सखाराम चा हात पकडत म्हणाला....नका हात जोडून अजून पापात पाडू मला....आधीच लय पापाचे ओझं घेऊन वावरतोय मी....चला मी तुम्हाला मदत करतो..."

खंडोजी च्या आश्वासनाने चौघांना धीर आला.

खंडोजी म्हणाला...पण गड्यानो..मी फक्त तुम्हाला मार्ग दावीण आणि युक्त्या सांगीन...मी स्वता काय बी करणार नाही...मला कोणीही प्रश्न विचारायचा नाही..मी सांगल तस जर वागायचं वचन देत असशील तर मी नक्कीच या कामात तुम्हाला मदत करीन.."

चौघांनीही होकारात्मक मान हलवली.
खंडोजी ने वडाच्या डोलीत ठेवलेली एक कानाबरोबर उंचीची काठी काढली आणि चौघांकडे पाहत बोलला....चला निघूया, आता जोवर तुमच काम होत नाही तोवर माघे यायचे नाही..."

सखाराम,नारायण,सर्जा,मल्हारी चौघांनाही खंडोजी च्या रुपाने आशेचा किरण दिसू लागला.

ते चौघे खंडोजी च्या पाठोपाठ पावले टाकत त्या जंगलात निघाली..!
एव्हाना पाऊस बंद झाला होता,सूर्य मावळतीला झुकत निघाला होता.
"मंडळी,रात्र होण्याच्या आधी इथून तीन कोसावर एक चोरवाट आहे दाट जंगलात,पण गेल्या 15-20 वर्षात तिकडं कोणी फिरकला नसेल.
आपल्याला रात्र काढायला चांगलं ठिकाण आहे,आजची रात्र तिथं काढूया आणि सकाळी दिवस उगवायला रायगड च्या हमरसत्याला लागूया...!
मोर्चे,मेटे आडवे आहेत,पण तिकडं गेला तर परवाने,ओळख सगळं विचारतील आणि विनाकारण तुरुंगात पण डांबून ठेवतील जर ओळख नाही पटली तर...!
मला ह्यो परिसर घरच्या वाणी आहे,मी तुम्हास्नी निम्म्या वक्तात चित दरवाजा जवळ नेतो...आणि मग पुढ काय करायचं मी संगतोच...चला लौकर पाय उचला...!

खंडोजी तरातरा चालू लागला.पायात पायतान नसताना त्याचा चालायचा वेग बघून चौघेही पाहातच राहिले,त्यांना पायात पायतान असून चालन जमत नव्हतं एवढया वेगाने...!

आणि केवळ अर्ध्या एक तासात एका दाट अरण्यात त्यांचा प्रवेश झाला.इतके दाट की झाडाला झाड लागून असावे इतकी झाडांची गर्दी...!
जमिनीवर लाकडे कुजून काळा थर चढला होता,त्यावरून खंडोजी च्या मागे ते निघाले होते.
त्या भयप्रद जंगलाला बघून मल्हारी बोलला...सखा,लगा हयात गेली मेंढर चरवण्यात इकडं कधी येन झालं

नाही,कितीतरी येळा जवळन गेलोय मी,इतकी दाट झाली आईच्यान सांगतो बघितली नव्हती,ही झाडी कशी काय आली असलं इथं ?
गप र...भिऊन काय बी बरळु नको,महाराजांचा हेर आहे खंडोजी, असलं त्याला गुप्तवाट माहिती..चला गुमान.."

जंगलाच्या मध्यावर येताच जंगली किड्यांची किरकिर आवाज अतिशय वाढला,सूर्य मावळातील गेल्याने पुढचं काय दिसत नव्हतं..!
एका पाऊलवाटेने ते चालत होते आणि एका वळणावर खंडोजी बाजूला गेला आणि सखाराम पुढे आला तर खंडोजी कुठे नजरेस पडेना..!
त्याने मागे पाहिले आणि सर्जा,नारायण,मल्हारी ला सांगितले की खन्डोजी कुठे गेला ?
एव्हाना पूर्ण रात्र झाली होती,ते चालत चालत जंगलाच्या मध्यावर एका पडक्या मंदिराजवळ पोह्चली.
या इतक्या दाट जंगलात हे मन्दिर कुठले असावे हा प्रश्न चौघांना पडला..!
पावसाने मंदिराच्या शिखरापर्यंत हिरवे शेवाळ दाटले होते,समोर दगडी नंदी सुद्धा पावसाने भिजून त्यावर सुद्धा शेवाळाची हिरवी झालर चढली होती..!

सखाराम म्हणाला...अरे ह्यो खन्डोजी कसा आणि कूट गेला ?
आता र काय करायचं ?
एक काम करुया आजची रात्र या मन्दिराचा आसरा घेऊया आन उद्या आपण आपलं हमरस्ता हुडकून आपल्या मार्गानं जाऊया...!
तिघांना हे ऐकण्याशिवाय पर्याय नव्हता...!

ते चौघे आत शिरले.
ते प्राचीन दगडी मन्दिर महादेवाचे होते.
कित्येक वर्षे हे दुर्लक्षित असावे असे वाटले,पावसाने पाणी आत थेंब थेंब झिरपत होते..!

नारायण बोलला,चला माझ्या महादेवाच्या गाभाऱ्यात तर आसरा मिळणार..म्हणत ते मंदिरात घुसणार इतक्यात शेकडो वटवाघळे एकाच वेळी मंदिराच्या बाहेर पडली.
चौघांनी डोळे बंद करून डोळ्यासमोर हात ठेवत मागे पाय घेतले पण तितक्यात सर्व वटवाघळे उडून गेली....!
त्यामन्दिरात चौघे जाऊ लागले..पूर्ण अंधारात असलेल्या त्यामन्दिरात थोड्याच अंतरावर आत निरंजनाचा प्रकाश दिसला...!
चौघांनी डोळे विस्फारले...अंगावर काटे आले आणि भीतीने गागारुन गेले ...अरे इतक्या पडक्या मंदिरात निरंजन लावायला कोण आले .असा प्रश्न पडून ते धावत मागे पळणार इतक्यात बाहेर धो धो पाऊस सुरु झाला होता....आता मंदिराच्या आत प्रवेश करुन काय प्रकार आहे हे पाहिल्याशिवाय पर्याय नव्हता....!
धीर धरुन ते आत आत सरकू लागले...धूप ,अत्तराचा सुगंध आणि निरंजनांच्या सोनेरी प्रकाशात महादेवाचे शिवलिंग झळाळत होते आणि उजव्या अंगाला एक जातीवन्त कुळवंत स्त्री फुलांची माळ करण्यात व्यस्त होती.....!

चौघांची भिवये वर झाली...पडके मन्दिर,वटवाघळे आणि आत इतकी सुंदर आरास करणारी हि बाई कोण ? मल्हारी ची बोबडी वळण्याचा मार्गावर होती,त्याने सखाराम चा हात घट्ट पकडला.....!

क्षण दोन क्षण...त्या स्त्री चे लक्ष दरवाज्या कडे गेले आणि तिने खुंटी ला अडकवून ठेवलेली तलवार उपसून अंधारात लपलेल्या त्या चौघांच्यावर तलवार रोखत लढाईचा पवित्रा घेत बोलली....कोण आहे दरवाज्यात...सरळ पुढं या नाहीतर खांडोळी करीन.....!

●●◆•••••••••●••••••••••◆●●

"बाजींद"

भाग 5 वा
●●◆•••••••••●••••••••••◆●●
✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
••••••••••••••••••••••••••••••

आभाळातून वीज चमकावी तशी त्या स्त्री च्या एकाकी आव्हानाने सखाराम व त्याचे मित्र पुरते गांगारुन गेले.

धीर धरुन सखाराम एक पाऊल पुढे आला व बोलू लागला....

"आमी धनगरवाडी चे गावकारभारी हाओत,रायगडावर निघालोय,पावसाचा जोर वाढला म्हणून निवाऱ्याला हिकडं आलो..."

"खोटं नगा बोलू..नायतर एकेकांची खांडोळी करीन... इकडं कोणीही फिरकू शकत नाही,बिकट चोरवाट फक्त हेरांना ठाऊक आहे याची..."
ती स्त्री बोलली...!

नारायण बोलला...महादेवाची आण घेऊन सांगतो,आम्ही स्वताहून हिकडं नाय आलो...त्यो खंडोजी म्हणून एकजण भेटला,महाराजांचा हेर आहे म्हणून सांगत होता..."

काय ..?

खंडोजी ...कुठं भेटला तो तुम्हाला ?
स्त्री उदगारली....!

मग,घडलेली सारी हकीकत व ज्या कारणाने ते चौघे रायगड वर निघालेत ते त्यांनी त्या स्त्रीला सांगितले.

चौघांची कथा ऐकून त्या स्त्री ने तलवार खाली केली आणि चौघांना आत या म्हणून खुणावले...!

चौघेही आत आली...जवळच एका मडक्यात पाणी होते,ते घेऊन त्या स्त्री ने चौघांना दिले..!

सारे जण पाणी पिऊ लागले,आणि मल्हारी ने जड शब्दात त्या स्त्री ला प्रश्न केला....ताई,एवढया भयंकार जंगलात,या पडक्या देवळात,या असल्या जीवघेण्या पावसात तुम्ही एकल्या कशा ?
कोण हाय तुम्ही?

किंचित स्मितहास्य करत ती बोलू लागली.....
मला साऊ म्हणतात.....महाड चे सरदार शिर्के यांची मी मुलगी...!
आमचे वडील आदिलशाही चे सरदार.
शिवाजीराजांनी रायगड जिंकला आणि आसपास चे सारे आदिलशाहीचे सरदार त्यांना मिळाले,फक्त आमचे वडील सोडून...पण...शेवटी त्यांनी पण महाराजांना साथ द्यायचे ठरवले...हम्म.. खूप मोठी कथा आहे दादा...वेळ आली की सांगीन...!

पण,खंडोजी तुम्हाला कुठं भेटला...?
आणि,तो कसा आला नाही इकडे...त्यालाच तर शोधायला मी इथवर आली आहे...!

काय ?
त्याला शोधायला...सर्जा बोलला..!
अहो,तो आम्हाला चोरवाट दाखवतो म्हणून हिकडं घेऊन आला आणि स्वता गायब झाला...कुठं आणि कसा गेला काय माहिती...आमाला फकस्त या रात्री हित आसरा द्या...सकाळी येरवाळी आमी आल्या पावली निघून जाऊ..."

का ?
साऊ बोलली...अहो,आजवर कोणालाच आम्हाला मदत करता आली नाय,खंडोजी आणि आम्ही सारे या जंगलात खूप दिवसापासून दबा धरून आहोत...तुमची मदत करायला आम्हाला आवडेल...इथून फक्त 10 कोसावर माझ्या वडिलांची फौज आहे,तिथं आपण जाऊया...माझे आबा तुम्हाला मदत करतील...त्यांचा आणि महाराजांचा संबंध खुप जवळचा आहे....मी नेईन सकाळी गुप्त वाटेने तिकडे...तोवर तुम्ही विश्रांती घ्या....मी जरा बाहेर जाऊन येते...!

सखाराम व त्याचे मित्र खूप आनंदले....चला खंडेरायाची कृपा...आता तर सरळ शिर्के सरदार आपल्याला मदत करणार म्हणल्यावर काम झालं....गाव आणी बारा वाड्याच दुःख कायमच संपलं... चला घ्या दर्शन देवाचं आणि झोपा...."

सर्जा,नारायण आणि मल्हारी त्वरित झोपी गेले.
दिवसभर खूप हाल झाले होते त्यांचे...पण मल्हारी ...?

त्याला बिलकुल झोप येईना...उलट त्याची विचारचक्रे सुरु झाली होती....!

कोण ह्यो खंडोजी...हे जंगल या आधी आम्हाला का नजरेस पडले नाही,हे मन्दिर जर एवढे पुरातन आहे,तर मग शिवाजी महाराजांसारखा शिवभक्त राजा आजवर इथं येऊन या मंदिराची डागडुजी का केली नाही?

तारुण्याने मुसमुसलेली ही सौंदर्यवाण साऊ इतक्या भीषण काळरात्री एकटी इथं काय करते आहे ?
आणि शिरक्यांची फौज 10 कोसावर ?
10 कोसावर तर नुसतं जंगलच आहे....फौज कशी आणि कुठे असेल....!

हे विचार चक्रे चालू असतानाच मंदिरा बाहेर एक जीवघेणी वाघाची डरकाळी सखाराम च्या कानावर पडली आणि दचकून तो उठला...आसपास पहिले पण ते तिघे तर घोरत होते...हिम्मत करुन त्याने त्या खुंटीवर असलेली तलवार घेतली आणि समोर असलेल्या महादेवाच्या पिंडाला नमस्कार करत मनात प्रार्थना केली...."माझ्या देवा...गावासाठी आम्ही जीवावरचा खेळ खेळतोय,तू काय पदरात टाकशील ते खर,फकस्त आमच्या हातून काय चूक होऊ देऊ नगो,तुझा आशीर्वाद नेहमी पाठीशी असावा"

सखाराम तडक मागे फिरला आणि त्या निमुळत्या मंदिराच्या गाभाऱ्यातून बाहेर निघाला....बाहेर निळसर चांदणे पडले होते,पाऊस बिलकुल नव्हता,झाडांच्या पानावरुन निथळणारे पाणी चेहऱ्यावर झेलत तो बाहेर आला,व वाघाच्या आवाजाचा कानोसा घेत,तो पुढे गेला व पाहतो तर काय ?
वाघाचे ते भयानक धूड रक्ताच्या थारोळ्यात निपचिप मरुन पडले होते......तो त्या वाघाकडे निरखून पाहू लागला,त्याच्या हृदयाची कम्पने वाढली,जो हळू हळू मागे जाणार इतक्यात...पाठीमागून त्याच्या पाठीवर कोणीतरी कोणीतरी हात ठेवला...."

जिवाच्या आकांताने तो ओरडला आणि मागे वळून पाहतो,तर ती साऊ होती...!

दीर्घ श्वास घेत त्याने तिच्याकडे नजर टाकली आणि म्हणाला...खर सांगा बाईसाहेब तुम्ही कोण आहे ?
ह्या वाघाला कुणी मारलं ?
आम्ही गावासाठी हिकडं आलोय...तुम्ही कस काय ऐकलंच हित हाय ?

अस बोलताना भीतीने सखाराम चा घसा कोरडा पडला व अश्रू येऊ लागले..."

स्मितहास्य करत साऊ बोलली....घाबरु नका भाऊ....मी इथं कशी हे ऐकायचं आहे ना तुम्हाला...?

तर मग ऐका........!

मी "सावित्री येसाजीराव शिर्के"
आदिलशाहीचे नेकजात सरदार राजे येसाजीराव शिरक्याची एकुलती एक मुलगी.......लहानपनापासून हौस मौज करत वाढलेल्या माझ्या आयुष्याला कधी न संपणारे दुःख ज्या हरामखोराने दिले त्याच्यामुळेच मी आज इथे आहे......!

माझ्या सार्‍या जीवनाची कथा मी तुम्हाला सांगते....ऐका आणि मग विश्वास ठेवा न ठेवा तुमची मर्जी......!

"यशवंतमाची"हे माझे जन्म गाव...!

●•••••••●●◆◆●●•••••••••••••●
धन्यवाद

"बाजींद"
भाग क्र.६
~~~~~~~~~~~~~~~~
✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
••••••••••••••••••••••••••••••
सर्व गोष्टीत संपन्न असणार्‍या गावात आणि असे गाव संपन्न बनवण्यासाठी पडेल तडजोड करायला प्रसंगी प्राणाची बाजी लावायला तयार असणार्‍या शिर्के घराण्यात माझा जन्म झाला.

वडील "राजे येसजीराव शिर्के" आदिलशाही साम्राज्याचे नेकजात,निष्ठावान मनसबदार.
आमचे सारे घराणे विजापूर च्या गादीची इमाने इतबारे सेवा कित्येक पिढ्या करत होती..!
पण,पुण्याचे शिवाजीराजे भोसले यांनी "हिंदवी स्वराज्याचा" डाव मांडला आणि केवळ आदिलशाही नव्हे तर हिंदुस्थानातील पाची पातशाह्या हादरुन गेल्या.
अफझलखानासारखा बलाढ्य सरदार फाडून जावळी पासून महाड पर्यंत असणारा जावळीच्या चंद्रराव मोर्यांचा प्रदेश एकहाती शिवाजी राजांनी जिंकला...केवळ आमची माची सोडून....!
वास्तविक आमच्याकडे लक्ष देण्याइतपत आमचे सैन्य जास्त नव्हते,पण आमचे वडील फार शूर,इमानी आणि
~~~~~~~~~~~~~~~~

एकनिष्ठ सेनानी म्हणून पंचक्रोशीत नाव होते,
दुसरी गोष्ट तळकोकणात सर्व हालचाली वर सहज लक्ष ठेवता येईल असे मोक्याचे ठिकाण म्हणजे "यशवंतमाची"...!
शिवाजी महाराजांच्या धाकाने आसपास ची कित्येक बलाढ्य घराणी शिवाजीराजांचा कौल घेऊन स्वराज्यात सामील झाली,फक्त आमचे घराणे सोडून....!
बस्स...हिच गोष्ट आमच्या घराण्याच्या नाशाला कारणीभूत ठरली...!
आमच्या वडिलांची फौज फार शूर व चिवट होती.
कुस्ती,तलवार,भाला, दांडपट्टा,घोडा या सर्वांचे प्रशिक्षण आमच्या वाड्यातच मिळत असे..!
आमच्या गावच्या "काळभैरव" यात्रेला कुस्तीचा फार मोठा आखाडा भरत असे.

त्यादिवशी पण गावाच्या यात्राचा फार मोठा आखाडा भरला होता ......

"राजे येसाजीराव शिर्के" यांनी अनेक मल्लांना आश्रय दिला होता.महाराष्ट्रातील एक एक तगडे मल्ल त्यांच्या तालमीत सराव करत होते.
बदाम,काजू,खारीक,सुके फळे यासह अनेक खुराकाचे पदार्थ दर महिन्याला बैलगाड्या भरून भरून तालमीत येत असे.
स्वता येसाजीराव कुस्ती मेहनत खूप करत असत.
पंचक्रोशीतील एखाद्या मैदानात चांगला लढवय्या मल्ल दिसला कि त्याच्या सार्या आयुष्याची जबाबदारी घेऊन त्याला सांभाळत असे.
असे आमचे शिर्के घराणे कुस्तीचे फार नादिष्ट्य..!
काळभैरवाच्या यात्रेत महाराष्ट्रातील अनेक मल्ल कुस्ती खेळायला येत असत.मोठमोठ्या बक्षिसांच्या रकमा,खुराकाचे साहित्य,तलवार,घोडा अशी बक्षिसे मिळवून परत जात असे.
पंचक्रोशीतील लाखो लोक त्या कुस्त्या पहायला बैलगाड्या जुंपून,घोड्यावरून,पालखीतून,पायी येत असत.
त्यांच्या जेवणा खाण्यापासून ते मुक्कामाची सोय सारे "राजे येसाजीराव शिर्के" करत असे.

शिवाजी महाराज आणि आदिलशाही चे राजकारण वेगळे आणि हा कुस्त्यांचा फड वेगळा असे समजून अनेक शिवशाहीचे सरदार सुध्दा या मैदानाला आवर्जून हजर असे.
त्या दिवशी सुध्दा असाच माणसांचा लोंढा यशवंतमाची ला पडला.
हशम हत्यारे पेलून येसाजीरावांच्या फौज्या चहू बाजूनी गस्त घालून संरक्षण करताच होत्या.
अनेक पैलवान हातात बर्चे भाले पेलून जंगलात तळ ठोकून येणाऱ्या पाहुण्यात कोणी शत्रू तर नाही याची दाखल घेत होते .....चिलट सुध्दा राजे येसाजीरावांच्या परवानगी शिवाय आत येणार नाही अशी संरक्षण व्यवस्था होती ,आणि जर आलेच तर त्याची खांडोळी करायचे आदेश होते.

दुपारी सूर्य मध्यावर आला आणि पश्चिमेकडे झुकू लागला आणि 'काळभैरवाच्या नावान चांगभल' च्या आरोळीने आसमंत दुमदुमून गेला.

लाखो लोकांनी यशवंतमाचीच्या काळभैरव डोंगराच्या खाली तयार केलेल्या कुस्ती मैदानाला कडे करायला सुरवात केली.

अनेक गावाचे,अनेक नावाचे ,अनेक पदांचे सरदार ते दंगल पहायला आले होते.अनेक वस्ताद- खलिफा आपापले पठ्ठे या मैदानात लढवायला घेऊन आले होते.

एव्हाना हलगी घुमक्याच्या ,शिंग तुताऱ्याच्या निनादात दांडपट्टा,लाठीकाठी चा खेळ मैदानात सुरु झाला. अनेक वीर आपले कसब दाखवत होते ,आणि एखादा धारकरी आवडला कि उपस्थित प्रेक्षकातील एखादा "विजापुरी सरदार"त्याला मागेल तेव्हडे धन देऊन आपल्या पदरी येण्यासाठी व्यवहार करत असे..!

असे एक ना अनेक धारकरी आपल्या कर्तुत्वावर अनेक सरदार लोकांचे मांडलिक झाले ,अजूनही होत होते.

मर्दानी शस्त्रांचा खेळ संपून लहान मोठ्या कुस्त्याना प्रारंभ झाला ,महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून आलेले अनेक मल्ल आपले कसब दाखवून उपस्थित धनाढ्य लोकांच्याकडून आणि खुद्द येसाजीरावांच्या खजिन्यातून रोख बक्षीस जिंकत होते ...!

सूर्य मावळतीला झुकणार इतक्यात राजे येसाजी शिर्के यांच्या खास तालमीत तयार केलेला "भीमा जाधव" हा लढवय्या मल्ल लांघ-लंगोट चढवून अंगाला तेल लावून मैदानात ''जय बजरंगाची'' आरोळी ठोकून उतरला.त्याच्या शड्डूच्या घुणत्काराने सार्या मैदानाच्या कानठीळ्या बसल्या..!

सारेच त्याची शरीरयष्टी पाहून थक्क झाले.

शे-दीडशे किलोचा तो भीमा नावाप्रमाणे भीम भासत होता.कल्लेदार मिशा.काळाकिभिन्न दिसणारा भीमा हा पैलवान नव्हे तर प्रतिस्पर्ध्याचा यमदूत आहे असे वाटत होते.

अनेक ठेकेदार भीमावर रोख रकमा,सोने चांदी,तलवार ढाली,बैलजोड्या,घोडे,गदा.यासःह हिरे मोती सुध्दा बक्षीस लाऊ लागली,

बक्षिसांचा आकडा चांगलाच फुगला तरीपण उपस्थित वस्ताद,खलिफा खाली मान घालून उभे होते.

भीमाला जोड काही मिळेना.

कशी मिळणार जोड ?अहो त्या भिमाशी लढणे म्हणजे साक्षात मृत्यूशी लढणे होय.कधी काय मोडून टाकल नेम नाही....!

राजे येसाजी उठले आणि मोठ्या रवात बोलू लागले......!

माझ्या भिमाशी चार हात करायला महाराष्ट्रात कोणी नाही ?

वऱ्हाड,खानदेश,कृष्णाकाठ,देश,कोकण सारे इथे जमले आहेत.कोणाच्याही तालमीत नाही का एखादा सुरमा मल्ल ?

आणि नसेल त्याला जोड तर मानाने त्याला बक्षीस देऊन सर्वांनी मान्य करा कि राजे येसाजींच्या पदराचा मल्ल महाराष्ट्रात अजिंक्य आहे ...!

पूर्वेकडून हलगी,घुमके,शिंग तुताऱ्या कल्लोळ करू लागल्या...लाखांची गर्दी कुजबुजू लागली...!

सर्व बक्षीस एका हारकार्याने एका पोत्यात फिरून गोळा करून मैदानाच्या मधोमध आणले..स्वता राजे येसाजीनी ५ शेर वजनाचे सोन्याचे कडे भीमाला बक्षीस देऊ केले ...ते मनोमन खुश होते...!

भीमा बेजोड मल्ल म्हणून विजयी ठरणार होता.

पण...पण तितक्यात मैदानाच्या उजव्या अंगाकडून एका गंभीर आवाजाने मैदानात शांतता पसरली...!
‘थांबा.....’
माझा पठ्ठा लढेल भिमाशी तुमच्या....!

कोण ?..

एकाने विचारपूस करून ठावठीकाणा माहिती आणली...!

गुंजनमावळातील शिळमकर देशमुख सरदारांच्या पदरी असणारा एक लढवय्या मल्ल खंडेराव सरदेसाई आणि त्याचे वस्ताद काकासाहेब जेधे आले आहेत..!
दोन्ही वस्ताद पैलवानांचे गुळ पाणी देऊन स्वागत झाले आणि कपडे काढून राजे येसाजीना मुजरा करून तो मल्ल मैदानात आला....!

घोटीव,पिळदार शरीर...मजबूत मांड्या,बलाढ्य बाहू....ओठावर किंचित काळी रेघ आणि स्मितहास्य..गोरापान नितळ चेहरा,सरळ सळसळीत नाक ....आणि पायात काळा दोरा बांधलेला खंडेराय सहीसही साक्षात "मल्हारी मार्तंड" वाटत होता..!
त्याच्या देखणेपणा आणि शरीराचे कौतुक गर्दीत होऊ लागले...!

एक मुठी माती त्याने हातात घेऊन कपाळाला लावली....आणि राजे येसाजींच्या कडे पाहत प्रचंड शड्डू ठोकला...सारे मैदान हादरले......!
मान्यवरांच्या हस्ते हातसलामी झडली ...आणि काही क्षण भूतकाळात जमा झाले..!

भीमा आणि खंडेराय यांची कुस्ती म्हणजे जणू दोन वादळे एकमेकांशी भिडणार होती.
निकाल काय होईल याचा अंदाज बंधने मुश्कील होते..!
भीमा-आणि खंडेराय मनगटाला मनगटे भिडली...गर्दनखेच सुरु झाली..!

बघता बघता मैदानांत डावांची वलये सुरु झाली
भीमाने वर्षभर कसून तयारी केलेला एक एक डाव खंडेरायावर मारत होता,आणि त्याची सहजच उकल करत खंडेराय सुटत होता...दोन्ही मल्ल चिखलाने माखले..!

कुस्तीचे पारडे कधी भीमा तर कधी खंडेराय च्या बाजूला झुकत होते.

भीमा एखाद्या भरपावसात भिजत उभा असलेल्या बुरूजासारखा वाटत होता तर खंडेराय गोऱ्या रंगावर तांबड्या मातीच्या चिखलाने केशरी आंब्याप्रमाणे भासत होता ...!

आणि ,
आता मात्र खंडेरायाने आक्रमक पवित्रा घेतला आणि भीमा चा उजवा हात बगलेत दाबून "आतली टांग" डाव

इतक्या जोरात मारला आणि अक्षरश सुदर्शन चक्र फिरावे तसे भीमा गर्दीशी फिरून मैदानावर आडवा झाला.....सपशेल चीतपट कुस्ती...!

सारे प्रेक्षक आनंदाने बेभान झाले ....खंडेरायाला डोक्यावर घेऊन सारे लोक आनंदाने नाचू लागले.
हे सर्व पाहत राजे येसाजी उठले....शेजारी उभे असलेल्या कारभार्याला बोलले...या पोराला आणि त्याच्या वस्तादाला घेऊन वाड्यावर या....असे म्हणत राजे निघून गेले....!
खंडेराय गळ्यात फुलांच्या माळा,गुलाल आणि रोख बक्षिसात न्हावून गेला ....!

सर्व जण बेभान आनंदात होते...पण खंडेरायाची गूढ नजर मात्र वेगळीच भाषा बोलत होती...चेहऱ्यावर एकप्रकारची गंभीर शांतता दिसत होती......!
सारे लोक आनंदात होते....फक्त राजे येसाजीराव मात्र मनस्वी दुखी.
आजवर त्यांच्या गावात येऊन खुद्द राजांच्या मल्लाच्या छातीवर बसून विजयी आरोळी ठोकणारा खंडेराय त्यांच्या नजरेसमोरून हटत नव्हता..........त्याना ओढ होती त्यांच्या भेटीची...आणि खंडेरायाला ओढ होती...'यशवंतमाचीची'...?

धन्यवाद

"बाजींद"
भाग क्र.७
~~~~~~~~~~~~~~~~
✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
••••••••••••••••••••••••••••••
राजे येसजीरावांच्या मस्तकात फुटाणे उडत होते.
साऱ्या महाराष्ट्रातील मनसबदारांच्या पुढ्यात नाचक्की झाली होती.
काय कमी केलं होत "भीमा" च्या कुस्ती-मेहनत-खुराकात ?
रोज सकाळी पाच रात्री पाच शेर दूध.
दररोजचा 6-6 तास व्यायाम.
तगड्या मल्लांसोबत लढती.मालीश, मसाज करायला नोकर चाकर...मेहनत मोजून घ्यायला मुनीम.. सगळं राजेशाही असून शिळमकर देशमुखांच्या मल्लाला ऐकला नाही...!
~~~~~~~~~~~~~~~~

डोकं भनभनत होत.
तेवढ्यात एका हुजऱ्यान वर्दी दिली..."राजे,ते मैदानातले पैलवान आणि वस्ताद आल्यात भेटाया"

राजे सावरुन बसले,भोवताली दिगग्ज सल्लागारांचे पथक दिमतीस होतेच....."बोलवा,त्यांना" राजांनी आदेश दिला....!

काही क्षण भूतकाळात विलीन झाले आणि चारचौकी शिर्के वाड्यातील सदरेत पैलवान खंडेराय आणि त्याचे वस्ताद आले...!

खंडेराय....अगदी वीस-पंचवीशीतला उमदा जवान गडी.ओठावर नुकतीच काळी रेघ दिसत होता.अंगापिंडाने धिप्पाड खण्डेराय पाहून कोणीही त्याच्या प्रेमात न पडावे तर नवल.
डोईला मराठेशाही पगडी,कमरेला तलवार असलेल्या खंडेराय व त्याच्या वस्तादांनी राजाना मुजरा केला.

उजवा हात वर करत राजांनी पण मुजरा स्वीकारला आणी बोलू लागले...."पैलवान,आम्ही तुमच्या कुस्ती वर निहायत खुश झालो आहोत,आमच्या भीमाला इतक्या सुंदर डावपेचात अडकवून चित करणारा पैलवान साधासुधा नाही हे आम्ही जाणतो,बोल काय बक्षीस देऊ तुला आम्ही "?

राजांचे स्तुतीपर ते शब्द ऐकून खंडेराय किंचित स्मित करत वस्तादांच्या हातात असलेले बक्षिसाने भरलेले पोते एका हातात धरून राजे येसजींच्या पुढ्यात ओतले...आणि बोलू लागला..."

"राज... मला द्यायचच असलं तर तुमच्या तालमीत आश्रय द्या,कुस्ती-मेहनत करुन गावोगावच्या यात्रा जत्रा मारुन वैतागलोय आमी, ही माज वस्ताद आणि म्या तुमच्या तालमीत राहिलो तर तुमचं लय नाव करुन दावीन..."

काय ?
राजे प्रश्नार्थक बोलून गेले ..!
अरे तुम्ही गुंजनमावळातील शिळमकर देशमुखांचे मल्ल,म्हणजे एकाअर्थी भोसल्यांच्याच हद्दीतले...!
भोसले-आदिलशाही दुष्मनी विकोपाला आली असताना तुला आम्ही आमच्या पदरी ठेवणे योग्य नाही...."

तेवढ्यात खंडेराय बोलला...."तस नव्ह राज...शिळमकर आणि आमचं संबंध जावळीच्या दंग्यावेळीच तुटलं,आणि शिळमकर तर चंद्रराव मोर्यांचा सख्खा भाचा हुता...त्यांना तर कुठं शिवाजीराजांच अभय हाय...?
हिकडं आड, तिकडं हिर नगासा करु... नायतर मग तुम्ही नाय म्हणला तर सरळ रायरी गाठून शिवाजीराजांची चाकरी पत्करायची का आमी ??

राजे,क्षणभर विचारात पडले.
खंडेराय चांगला पैलवान आहे यात शंकाच नाही,उद्या जर शस्त्रांचे चार हात शिकला तर चोखट धारकरी बनू

शकेल,शिरक्याची दौलत सांभाळायला मजबूत मनगट मिळेल..."

"ठीक आहे खंडू....आम्ही ठेवू तुला आमच्या तालमीत...,असे म्हणत येसजीराजानी नोकराला हाक मारून,त्यांचे सामान उचलून वाड्याच्या मागे असलेल्या भव्य तालमीत ठेवायला लावले..!

ते म्हणाले...तुमची तात्पुरती सोय पुढे घोड्याच्या पागेभोवती असलेल्या घोडेवानाच्या खोलीत करु... चार दोन दिसानी तालमीत रहा..."
काही हवं नको याची सोय करुन राजे..वाड्याच्या आत निघून गेले...!

नोकरांनी खंडेराय व वस्तादांची साहित्याची पोती उचलून घोडेवानाच्या खोलीत ठेवली....!

"यशवंतमाची" च्या यात्रेत खुद्द येसाजीराजांच्या मल्लाला पराभूत केले ही बातमी वाऱ्यासारखी येसाजीराजांच्या अंतरमहालात गेली.
राजांना एकच मुलगी.
"सावीत्री"तिचे नाव.रुपाने अतिशय रूपवान.
गोरापान चेहरा,सतेज कांती,सरळ सळसळीत नाक..पांढरे शुभ्र मोत्यासारखे दात,सहीसही राजलक्ष्मी भासत असे...!
शिर्के घराण्याची "सावित्री"म्हणजे यशवन्तमाचीचे नाकच होते...लाडाने सर्व तिला "साऊ"म्हणत असे....खूप खूप लाडात वाढली होती ती..!
राजांना कधी आपल्याला मुलगा नाही याची उणीव तीने भासुन दिली नव्हती..!
नाजूक रुसव्या फुगव्यात कधी ती अडकलीच नव्हती.
भरधाव घोड्यावर मांड ठोकून वाऱ्याच्या वेगाने घोडा फेकत सह्याद्रीच्या दर्याखोऱ्यात स्वच्छंद भरारी मारणे,तलवार,भाला,गदा,धनुष्यबाण सर्वकाही लीलया चालवत असे...आणि एवढे असूनही शिरक्यांच्या वाड्यात नजरेने कधी जमीन सोडत नसे...!
जशी यशवन्तमाची साऊ जीव मानत असे किंबहुना त्यापेक्षाही जास्त यशवन्तमाचीची इज्जत साऊ ला प्रिय होती...!

आजचा घडलेला प्रकार तीला जिव्हारी लागला होता.
दस्तूरखुद्द शिरक्यांच्या गावात येऊन शिरक्यांच्या पैलवानाला आव्हान देऊन चितपट करणारा कोण हा ऐरा गैरा आहे त्याला चांगलाच धडा शिकवायची मनीषा साऊ च्या मनात आली होती...!

दिवस उगवला,सह्याद्रीच्या कडेकपारीत सहस्रोसूर्यनारायणाची सहस्रो किरणे आपल्या सुवर्ण किरणांनी दाही दिशा उजळून टाकू लागली...पण राजे शिरक्यांच्या वाड्यामागील तालमीत भल्या पहाटेच शड्डू घुमू लागले होते.
खंडोजीच्या जोराचा ठेका पाच हजाराच्या वर गेला होता...!
घामाने निथळत असलेले त्याचे शरीर एखाद्या चिरेबंद बुरुजाप्रमाणे भासत होते.

सकाळ होताच राजे स्वता तालमीत आले.
सर्व जवान धारकरी नुकताच कुस्तीचा सराव आटोपून आपापली हत्यारे परजत तालमीबाहेरच्या मैदानात तलवार-पट्टयांचा सराव करु लागली..."

"खड्या... उचल तो पट्टा ,अन घे पवित्रा...."
राजे खंडेराय ला बोलले.

त्यांच्या बोलण्याने खंडेराय बोलला...."नाय राजं... म्या पैलवान गडी...ही धारकऱ्याची कामं, मला नाय जमायचं.."

यावर हसून राजे बोलले..."अरे, माझ्या भीमाला चित केलंस त्यापेक्षा सोप्प काम आहे हे...चल उचल "

भीत भीत खंडेरायाने पट्ट्याच्या खोबणीत हात घातला..आणि एक एक हात करु लागला...सारे मल्ल त्यावर हसू लागले..."

खंडेराय ला काही केल्या पट्टा चालवता येईना,दमून त्याने त्याचा नाद सोडला व राजे येसजींची मालीश करतो म्हणाला...."

राजांचे सर्वांग तेलाने माखून खंडेराय आपल्या मजबूत हाताने मालीश करत होता,सारे मल्ल आसपास हत्यारांचा सराव करत होती....खंडेराय घामाने ड्बडबला होता अन तितक्यात तालमीच्या दरवाजावर थाप पडली..!

"बघ रे,कोण आहे ते....
खंडेराय उठला आणि घाम पुसत तालमीचा दरवाजा उघडला....सुर्याची किरणे एकदम तालमीच्या दरवाजातून आत प्रवेशली आणि त्याच्या आडवी उभी असणारी एक जातीवन्त देखणी स्त्री हातात दुधाचा तांब्या घेऊन उभी होती.....खंडेराय तीचे ते जातिवंत सौंदर्य पाहू लागला.....आणि ती ....ती सुद्धा त्याचे देखणेपण न्याहळत होती....,काही क्षण तसेच निघून गेले अन....राजे येसाजी गर्जले...कोण आहे रे ?

"आबा,दूध आणले आहे.....साऊ चा नाजूक आवाज आला,"

"खंड्या...तांब्या घे तो"....राजे बोलले.

खंडेराय निशब्द होता,त्याच्या हृदयाची कंपने अतीतीव्र झाली होती...आणि साऊ...तिचीही अवस्था काहीशी तशीच होती...अजून काही क्षण भूतकाळात गेले आणि ते दोघेही नजरभेटीचे सुख अनुभवत तिष्ठत उभेच होते...."

"साऊ..........पाठीमागून कोणीतरी हाक मारली आणि दोघेही सावध झाले...सावित्री ने दुधाचा तांब्या खंडेराय च्या हातात देऊन धावत मागे गेली"

राजांच्या हाती तांब्या देऊन खंडेराय उभा होता...5 शेर दुधाचा पितळी तांब्या बघता बघता राजानी रिचवला...आणि अंघोळीला निघून गेले..."

खंडेराय मात्र त्या गूढ डोळ्यांची आठवण कितीतरी वेळ काढत तालमीत बसला होता...."

साऊ च्या मनाची घालमेल पण अशीच होती...कोण होता तो ?
याआधी कसा पाहिला नाही ...कित्येक प्रश्नांनी मनात काहूर माजले होते...."

अंघोळ पाणी आटोपून खंडेराय राजे येसजींच्या परवानगी ने गावात जाऊन येतो म्हणून निघाला......"

सकाळचा सूर्य माथ्यावर आला नी खंडेराय यशवन्तमाची पासून 5-6 कोसावर एका डोंगररांगेतल्या जंगलात गेला.
एक मेंढरांचा कळप चरणाऱ्या मेंढपाळाला पाहून त्याने हाक मारली.........."जय मल्हारी"
त्याची ती हाक ऐकून त्या मेंढपाळणे प्रतिउत्तर दाखल दुसरी हाक मारली........ "जय रोहिडेश्वर"

आणि दुसऱ्याच क्षणी दोघेही खदखदून हसू लागली...!

खंडेराय त्या मेंढपाळाला बोलला....खेडेबाऱ्याला निरोप द्या.....सांबाच्या पिंडीवर नाग पोहचता झालाय....लौकरच पंचमी खेळायला आवतण धाडतो......असे म्हणत पुनश्च एकदा...."जय मल्हारी...जय रोहिडेश्वर गजर झाला".....!

खंडेराय दुपारच्या प्रहरी पुन्हा यशवंतमाचीत राजे येसाजी शिर्के यांच्या तालमीत दाखल झाला...."

••●क्रमश●••

"बाजींद"
भाग क्र.८
~~~~~~~~~~~~~~~~
✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
••••••••••••••••••••••••••••
~~~~~~~~~~~~~~~~

त्या दिवशी दिवसभर "साऊ"ला काही सुचत नव्हते,सतत सकाळचा प्रसंग तिच्या डोळ्यासमोर तरळत होता.

पण,राजे येसाजीरावांच्या एकुलत्या एक मुलीला असे विचार करणे शोभत नाही,म्हणून तिचे मन तिलाच समजावत होते.भावना आणि कर्तव्य यांचा मनात झालेला महापूर प्रथमच साऊ अनुभवत होती.

इकडे,खंडेराय आणि त्याचे वस्ताद काकासाहेब मोठ्या गूढ चर्चेत व्यस्त होते..!
ती चर्चा कोणती त्या दोघांनाच माहिती ..!

एव्हाना तालमीत चीटपाखरू नव्हते..शिर्क्यांची शिबंदी येसाजीरावंच्या आदेशाना त्यांच्यासोबत घाटमाथ्यावर टेहळणी ला गेली होती,जेमतेम शे दोनशे धारकरी वाडा राखत होते.
फौज टेहळणी करून यायला अजून बराच अवकाश होता.
शिर्क्यांचा आजवर कोणी पाडाव करू शकले नाहीत याचे कारण म्हणजे त्यांच्याकडे नेकजात,इमानदार मराठ्यांची फौज,त्यात कुस्तीचा प्रचंड नाद असलेले राजे एक एक माणूस तोलून मापून दिमतीस घेत असत ..!
फंद फितुरीला स्थानच नव्हते.

पण,त्या दिवशी......!

शेजारच्या डोंगरातल्या दरोडेखोरांचा मोठा छापा यशवंतमाचीवर पडला...!
खंडेराय आणि वस्ताद चर्चेत व्यस्त होते तितक्यात गावात दंगा-गोंगाट ऐकू येऊ लागला.
दोघेही उठले...खुंटीला टांगलेली तलवार खंडेरायाने हातात घेतली आणि धावत तालमीतून बाहेर पळत सुटला...!

यशवंतमाची आणि पलीकडच्या डोंगरातील दाट जंगलातील "बेरड" यांची पिढ्यानपिढ्यांची दुष्मनी..!
अशी पिढी जात नव्हती कि एकमेकांचे मुडदे पडत नव्हते.मागच्या वेळेस तर याच बेरडानी शिर्क्यांचे सारे लग्नाचे वऱ्हाड कापून काढले होते.

त्याचे कारण असे,कि येसाजीराजांचे वडील आणि यशवंन्तमाची पलीकडच्या "मोऱ्यांची" हद्द एकमेकाला लागून होती.
जहागिरी,वाटणे यासाठी स्वकीयांच्यात होणार्या मारामाऱ्या कमी नव्हत्या,त्यात शिर्के –मोरे वैर महाभयानक.

आजवर ज्यांनी ज्यांनी मध्यस्ती केली त्यांचीही मुंडकी शाबूत राहिली नव्हती..!

मोऱ्यांचे पिढ्यानपिढ्यांचे कारभारी हे जाधववाडी चे "लखुजी बेरड"पाहत होते.

लखुजी बेरड मोठे बुद्धिमान आणि शूर.सारी जाधववाडी त्याना देव मानत होती,आणि लखुजी मोर्यांना देव मानत असे.
त्या दिवशी मैत्रीची खोटी आश्वासने देऊन येसाजीरावांचे वडील पिराजीराव शिर्के यांनी हद्दीसाठी मोर्यांशी दगा

केला.घाटमाथ्यावरची सारी फौज कापून काढली...मात्र लखुजी बेरड आणि त्याची शे दोनशे चिवट धारकरी काही केल्या मागे हटेनात.

बरीच शिर्के मंडळी त्यांच्या हातून कत्तल होत आहे हे पाहून पिराजीरावांनी जाधववाडीवर छापा मारायला सांगून लखुजीच्या गावाची राख केली होती.....हे ऐकून लखुजीने तलवार टाकली आणि हताश होऊन कोसळला..हि संधी साधून पिराजीने त्याचे मुंडके कापले.......बस्स...तो दिवस मोरे-शिर्के वैर संपले आणि शिर्के-बेंरड वादाला तोंड फुटले...!

लखुजीच्या गावात ज्यांच्या ज्यांच्या स्त्रिया मृत्युमुखी पडल्या त्यांच्या त्यांच्या मुला-बाळांनी हातात तलवारी-कुर्‍हाडी घेऊन शिर्के घराणे संपवायचा विडा घेऊन गाव सोडले आणि जाधववाडी-यशवंतमाची दरम्यान च्या घनदाट जंगलात गुहेत राहून लुटालूट,जाळपोळ करून आयुष्य जगणे पसंद केले...!

त्यावेळी त्यांचा म्होरक्या होता लखुजीचा मुलगा रायराव.
रायरावाने अवघ्या २ ते ३ वर्षातच शिरक्यांच्या एका शुभ प्रसंगात चिवट बेरड फौजांनी पिराजीराव शिर्क्यांना ठार केले....आणि त्याचा बदला म्हणून काहीच दिवसात जंगलात छापा मारून रायरावाचे मुंडके शिर्क्यांनी तोडून आणले ...!

या अश्या कत्तलींचा लेखाजोखा पहिला तर साक्षात चित्रगुप्ताला शहारा येईल.....!

मुंडक्याला मुंडकी तोडली नाही तर ते शिर्के – बेरड वैरच नव्हे .....पण जेव्हापासून राजे येसाजीनी शिर्क्यांची गादी सांभाळली आहे त्यांनी बेरड आणि शिर्के यांच्या एकजूटीसाठी खूप प्रयत्न केले होते.
पण,दुहीचा शाप अजूनही संपला नव्हता......"रायराव" च्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्याचा तरुण मुलगा "सूर्यराव"आता बेरडांचा म्होरक्या होता.

अतिशय शांत,शूर,मुत्सद्दी असलेला हा सूर्यराव जणू काही शपथ घेऊन होता कि शिर्के कुळ संपवले पाहिजे.

त्याने आजवर अनेक प्रयत्न केले पण ‘यशवंतमाची’ ला काही केल्या खिंडार पडत नव्हते.

राजे येसाजीनी माचीची सुरक्षा इतकी कडवी केली होती कि बेरडच काय कोणालाही अशक्य होते ते ...जर माची जिंकायचीच असा चंग बांधला कोणी तर मुंडक्यांची रास नक्कीच पडणार हे जगजाहीर होते,आणि एवढ्याश्या माचीसाठी एवढी मोठी किमत चुकवणे कोणाही मुत्सद्दी राजकर्त्याला परवडणारे नव्हते......!

पण,त्या दिवशी घात झाला होता.

राजे येसाजी सारीच फौज घाटमाथ्यावर घेऊन गेले ,अगदी थोडी फौज गावात होती ,आणि हीच खबर सूर्यराव बेरडच्या भयानक फौजेच्या कानी लागली आणि वाऱ्याच्या वेगाने ते यशवंतमाचीवर तुटून पडले.
गावातील सावकार,व्यापारी लोकांची घरे फुटू लागली.

खूप लुट जमा करून सूर्यराव बेरडाने लुट जंगलात धाडली आणि कडवे हशम बरोबर घेतले आणि त्याने त्याचा मोर्चा शिर्क्यांच्या वाड्यावर वळवला...!

डोळ्यात वडिलांच्या मृत्यूची आग घेऊन तो बेफाम घोड्यावर स्वार होऊन निघाला होता......!
खंडेराय हातात तलवार घेऊन बाहेर आला आणि त्याला जाणवले कि हातात पेटते पलिते घेऊन समोरून दौडत येणारी सारी फौज आता वाड्यावर कोसळणार...!

त्याने प्रसंगावधान राखले आणि वस्तदाना घेऊन सरळ वाडा गाठला..!

शिर्क्यांचा वाडा जणूकाही भुईकोट किल्लाच होता.
आत प्रवेश करून वाड्याचे मुख्य लाकडी द्वार बंद करायला सांगून वाड्यात मौजूद असणारी सारी फौज एकत्र केली...जेमतेम ३०/३५ लोक असतील ते ..!

प्रत्येकाला कामे वाटून देऊन वाड्याचे संरक्षण करायला सांगितले आणि तडक आपला मोर्चा वाड्यातील शिर्क्यांच्या कुटुंबाकडे वळवला.
घरातील आया-बाया आकस्मित हल्ल्याने हादरून गेल्या होत्या.
त्याना धीर देऊन तो निघणार इतक्यात शिर्क्यांची पत्नी रखमाईबाईसाहेब मोठ्या आवाजात रडत म्हणाली......थांबा...!

"माझी लेक हातात तलवार घेऊन मगाशीच चोरवाटेने बाहेर गेली आहे.काहीही करा पण माझ्या साऊला मागे आणा...बेरड –शिर्के वैर मला विचारा काय आहे ते .....एकवेळ आमच्या साऱ्यांचा जीव गेला तरी बेहत्तर पण माझ्या साऊ ला काही होता कामा नये तिने माझे काही न ऐकता १०० पैलवानांची फौज घेऊन वाड्याच्या चोरवाटेने बेरड फौजेवर चालून गेली आहे...."

हे ऐकून खंडेराय मात्र पुरता थक्क झाला......सकाळी दुध घेऊन आलेली नाजूक "सावित्री" हि शिर्क्यांची मुलगी होती तर ..!

आणि जीला नाजूक समजतोय ती रणांगण गाजवायला निघाली आहे ....!
तो खरोखर सावित्रीच्या या कामगिरीवर मनोमन खुश झाला ..!

‘’बाईसाहेब’.....राजांच्या फौजेला निरोप धडायला कोणाला तरी पाठवाल का ?

खंडेराय रखमाई बाईसाहेबाना बोलला....!

‘होय...निरोप घेऊन एक निशाणबारदार गेला आहे....फक्त काही तासात शिर्क्यांची फौज येईल...पण तोवर काही आक्रीत घडू नये ...तुम्ही जा...माझ्या साऊ ला तेवढे मागे आणा ....!

तुम्ही काळजी नका करू बाईसाहेब ....मी नक्की त्याना मागे आणतो...असे म्हणत खंडेरायाने तलवार पेलली आणि छलांग मारत तो वाड्याबाहेर दौडत गेला...!
एव्हाना माचीच्या पूर्वेकडून आर्त किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या होत्या...सावित्रीच्या नेतृत्वाखाली पैलवान फौजेने सुर्यरावाच्या फौजेवर हल्ला चढवला असावा बहुतेक.....!

सूर्याजीने पागेतील काळेभोर चांगले घोडे निवडून त्यावर मांड ठोकली..आणि वस्ताद काकाना बोलला.....काका ...प्रसंग बाका आहे,मला आई भवानी जसे सुचवते आहे तसे वागतो...ही खबर मात्र लौकर खेडेबारयाला पोहोच करा....!

मान हलवत काका बोलले...काळजी घे..आणि काका सुध्दा निघून गेले ...!

खंडेराय बेफान दौडत चालून गेला ...!

गावाच्या नदीपात्राजवळ सावित्री आणि पैलवानांच्या एकत्रित फौजेने सुर्यरावाच्या फौजेवर हल्ला चढवला...आकस्मित हल्ल्याने बेराडांची ती चिवट फौज मात्र पुरती हादरली...पण त्वरित सावरली...!

हल्ला कोणी आणि कोणाच्या नेतृत्वाखाली केला समजले....!
शिर्क्यांची लेक सावित्री.....!

सुर्यरावाने इशारा केला.....सावित्री जिवंत पकडा.

बस्स ..हजारांच्या फौजेपुढे सावित्रीचा तो हल्ला तोकडा पडला ,सावित्रीच्या घोड्याला दोर टाकून बांधून खाली पाडले..सावित्रीच्या डोक्यावर आघात झाला आणि ती बेशुद्ध झाली......!|
मासे पकडायची जाळी टाकून तिला कैद केले...!
आल्या पावली सुर्यरावने माघारी फिरायची आज्ञा केली....!

जे साधायला आलो होतो,त्यापेक्षा कितीतरी पट गवसले अशी भावना सुर्यरावच्या मनात थैमान घालू लागली...अवघ्या काही क्षणात यशवंतमाची ओसाड झाली.......सावित्रीला जिवंत कैद करून सूर्यराव जंगलात निघून गेला...!

काही क्षणात खंडोजी तिथे पोहचला.....पण वेळ निघून गेली होती.

आता ?
आता काय...विचार करून काय होणार नव्हते...त्याने लगाम खेचला आणि बेरडांच्या फौजेमागे त्यानेही पाठलाग सुरु करायचा ठरवत घोडे जंगलात घातले.

वार्यासारख्या वेगाने खंडेराय सुर्यरावाचा पाठलाग करू लागला.

अगदी काही अंतरावर सुर्यरावाची फौज आहे याची त्याला जाणीव झाली.
त्याने घोड्याचा वेग अजून वाढवला आणि मजल दरमजल करत एका भव्य पठारी प्रदेशात त्याचे घोडे आले आणि दुसऱ्याच क्षणांत घोड्याच्या खुरात आधीपासून पेरून ठेवलेली वाघर अडकली आणि घोडा कोसळला.....सूर्यरावांच्या फौजेला क्षणात समजले होते की कोणतरी पाठलाग करतोय..!

खंडेराया जमिनीवर पडणार इतक्यात त्याने स्वताला सांभाळत सावध पवित्रा घेतला आणि उठणार इतक्यात हजारो तलवारी त्याच्या नरड्यावर आल्या......पाच पंचविस धिप्पाड हशमानी खंडेरायाला जेरबंद केले....!

क्रमश

"बाजींद"
भाग क्र.९

•••••••••••••••••••••••••
✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
•••••••••••••••••••••••••
कोणीतरी पाठीमागून खंडेरायाच्या डोक्यात जोराचा दणका दिला अन खंडेराय शुद्ध हरपला....!
खंडेराय ला घेऊन सूर्यराव व त्याचे पथक दाट जंगळजाळीत घुसले.
जंगलाच्या मधोमध एका गुप्तठिकाणी सूर्यरावच्या फौजेचा अड्डा होता.
गंभीर मुद्रेच्या "सूर्यरावाच्या" चेहऱ्यावर आनंद दिसत होता.
ज्या "पिराजी" शिरक्याने साऱ्या जाधववाडीच्या हातात हत्यारे घ्यायला भाग पाडले त्याची इज्जत,त्याची नात आता त्याच्या ताब्यात होती.
त्याच्या मनात कल्पनेचे खेळ सुरु होते.
एक हशम धावत आला आणि त्याने वर्दी दिली...,

सरदार,आपण माची लुटून येताना एका घोडेस्वाराने पाठलाग चालवला होता,त्याला जेरबंद केला आहे.

सूर्यराव उठला,बोलला..."कोण आहे तो ?"

शिरक्यांच्या वाड्यातील हशम किंवा त्याच्या कुटुंब कबिल्याचा अंगरक्षक असावा बहुतेक...त्याला आणा इथे

"....त्याच्या आज्ञेने खंडेराय ला समोर आणले गेले...!

एव्हाना साऊ ला शुद्ध आली होती,पण तिचे हात पाय बांधल्याने ती हलू शकत नव्हती.
ती जोरजोरात किंचाळून त्या साऱ्यांना आव्हान देऊ लागली....."हिम्मत असेल तर एकदा माझे हात पाय खोला,ही शिरक्याची अवलाद काय आहे तुम्हाला दाखवते..."

तिच्या आकस्मित आव्हानाने सूर्यराव चे डोके भडकले....तो तडक सावित्री जवळ गेला आणि तिला जोरात थप्पड मारली,एक,दोन,तीन....त्याच्या प्रहाराने सावित्रीच्या तोंडातून रक्त येऊ लागले...."

"हरामखोर शिरक्याची अवलाद....तोंड बंद ठेव...तुझ्या साऱ्या घराण्यात गद्दारी,क्रूरता भरली आहे.
गरीब,भोळ्या जनतेला लुबाडून,त्यांची कत्तल करून सत्ता मिळवलेले तुझे बापजाडे काय लायकीचे आहेत आम्हाला माहित आहे..."

असे बोलत तो निघणार तितक्यात सावित्री ने बांधलेल्या हाताने सूर्यराव वर झडप घातली....आकस्मित हल्ल्याने सूर्यराव तोल जाऊन खाली पडला.....तितक्यात बाजूला उभे असलेल्या हशमानी सावित्रीला धरून बाजूला केले...."

आता मात्र सूर्यराव बेभान झाला...त्याने कमरेला असलेली तलवार म्यानातून उपसली आणि सावित्रीचे केस धरुन तिचे हात बांधलेला दोरखंड तलवारीने तोडला,पाय खोलले आणि पुन्हा एक जोरात थप्पड देऊन तीला ढकलून दिले....सावित्री तोल जाऊन पडली.....तडक सूर्यराव ने बाजूला उभे असणाऱ्या हशमाच्या हातातील तलवार हिसकून घेऊन सावित्रीच्या पुढ्यात टाकली.....आणि बोलू लागला....

चल,उचल ती समशेर आणि दाखव तुझ्या रक्ताची उसळी...मला ही पाहुदे, ज्या शिरक्यांनी निशस्त्र आजवर बाया बापड्यावर हत्यार उचलले,त्यांच्या घरातल्या स्त्रिया हत्यारे कशी चालवतात....उठ,आता बोलू नको,तुझी तलवार बोलू दे..."

सूर्यराव चे वाक्य पुरे होते न होते इतक्यात विजेच्या वेगाने सावित्रीने तलवार हातात घेऊन क्षणाचाही विलंब न करता सूर्यराववर हल्ला चढवला...!

तितक्याच चपळाईने सूर्यरावने बचावात्मक तलवारीचे हात सुरु केले....आणि मग त्यानेही आपला हात चालवायला सुरु केली...!

एव्हाना खंडेराव ला शुद्ध आली,आणि समोर सावित्री आणि सूर्यरावची लढाई तो पाहू लागला,त्याचे रक्त एक सळसळले...पण त्याचे हात पाय बांधून ठेवल्याने तो सावित्रीची मदत करायला असमर्थ होता,पण प्रचंड ताकतीने त्याने हात सोडवायचा प्रयत्न सुरु केला पण दोर काही सुटत नव्हता...!

समोर मात्र तलवारी तलवारीवर आपटून खणखणाट वाढू लागला आणि सूर्यराव ला सवित्रीचा तलवार

चालवायचा हातखण्डा मनोमन आवडला....तो पण कच्चा नव्हता...त्यानेही प्रचंड प्रतिहल्ला करत सावित्रीला हुलकावणी दिली...क्षणभर सावित्री फसली,ती संधी घेत सूर्यराव ने तलवारीच्या मुठीचा वर्मी घाव सावित्रीच्या तोंडावर मारला....तिच्या तोंडातून रक्त येऊ लागले...पण क्षणात सावरुन तिनेही प्रतिहल्ला केला आणि झुकत सूर्यराव च्या मांडीवर प्रहार केला...मांडीतून रक्त येऊ लागले...हे पाहताच बाजूचे पथक तलवार उपसून सवित्रीवर धावून आले...मात्र,सूर्यराव ने थांबायचा हातवारा केला.....आता मात्र सूर्यराव बेभान झाला...एक स्त्री म्हणून सावित्रीच्या तलवार हल्ल्याला त्याने नगण्य समजले होते,त्याचा तो भ्रमनिसरण झाला आणि आता मात्र त्याने प्रचंड वेगात तलवारीचे वलये,डाव-प्रतिडाव,हूल सुरु करत सावित्रीला बरेच मागे रेटले
...पण सावित्रीने सर्व हात धुडकावत लावले आणि प्रतिहल्ला सुरूच ठेवला....आणि एक क्षण..सूर्यराव ने हवेत झेप मारत गोल घिरकी घेत वार केला,ज्याने दुप्पट वेगाने हल्ला वाढला आणि तो वार सावित्रीच्या तलवारीवर लागला व तलवार हातातून खाली पडली...बस हाच क्षण सूर्यराव ने प्रचंड ताकतीने तलवार सावित्रीच्या दंडावर वर्मी मारली...रक्ताचे फवारे उडाले अन सावित्री किंचित मूर्च्छित होऊ लागली अन खाली पडली...."

बरेच वेळ प्रयत्न करून खंडेराय चे हात सुटले,त्वरित पाय सोडवून त्याने विजेच्या वेगाने सूर्यराव वर झेप घेतली....गरुड जसा सर्पावर झेप घेतो,त्यासारखीच व्याकुळता खंडेरायाच्या डोळ्यात होती.

सावित्री थोडी शुद्धीवर आली आणि समोर सुरू असलेला प्रकार पाहत तशीच पडून होती...अधीर वेदना तिला उठून देत नव्हत्या....!

खंडेराय च्या आकस्मित हल्ल्याने सूर्यराव तोल जाऊन खाली पडला,खंडेराय त्याच्या छातीवर बसून तोंडावर प्रहार मारु लागला,पण इतक्यात सावध झालेले सूर्यराव चे जवान खंडेराय वर तुटून पडले...त्याने सूर्यराव ला खंडेराय च्या तावडीतून सोडवले आणि ओढत बाजूला आणले...20-25 जणांनी करकचून धरलेल्या खंडेरायाने एकाच हिसड्यात सर्वांना भुईवर आदळले.... रागाने लालबुंद झालेला त्या वीराने समोर सावित्रीच्या हातून गळून पडलेली तलवार उचलली....क्षणभर डोळे मिटून तलवार कपाळाला लावली आणि तो समोरच्या 20-25 जणांच्या तुकडीवर तुटून पडला...!

प्रचंड रणकंदन सुरू झाले.खंडेराय च्या आडवे येणारा तुटून पडू लागला...कोणाचे हात तुटले तर कोणाचे पाय...कोणाची शिरे धडावेगळी होऊ लागली तर कोण उभा चीरु लागला...!!

काही दिवसापूर्वीच याच खंडेराय ला हातात तलवार धरायला येत नव्हती,अन आज हा इतक्या सफाईने तलवार चालवत आहे हे पाहून साऊ आश्चर्याने थक्क झाली,ती वेदना विसरून विचार करु लागली...हा खंडेराय नव्हे तर समशेरबहाद्दर वाटतो...!
ती उघड्या डोळ्यांनी खंडेराय चे शौर्य पाहू लागली...!

सैन्याची ही कापाकापी पाहून सूर्यराव लाव्हारसाप्रमाणे उसळून हाती तलवार घेऊन खंडेराय च्या आडवा आला.......आणि मग दोन महावादळे एकमेकांवर प्राणपणाने तुटून पडले...!

खंडेराय चा त्वेष,हल्ला जोमाने आडवत आडवत सूर्यराव तलवारीचे हात करु लागला....!

सूर्यराव ही कच्चा नव्हता....तोही चिवट धारकरी होता,त्यानेही प्रचंड प्रत्युत्तर दिले....ते दोन्ही वाघ रक्ताबंबाळ होऊन लढू लागले....!

अखेर खंडेराय चा आवेश पाहून सूर्यराव ने रणनीती बदलत....झुकते माप दिले अन तिथेच खंडेराय फसला....त्याचा तोल जाता क्षणीच सूर्यराव ने त्याच्या मांडीवर वर्मी घाव मारला....रक्ताचा कारंजा उसळला.....खंडेराय आलेली वेदना सहन करायला एकदम खाली बसला.....हे पाहताच सूर्यराव ने आपली समशेर खंडेराय च्या मानेवर ठेवली.....एक क्षण...त्याने प्रचंड ताकतीने तलवारीने खंडेरायाचे मुंडके तोडायला तलवार मागे नेली आणि ....सु सु सु करत एक बाण पलीकडच्या जंगलजाळीतुन सूर्यराव च्या खांद्याचा वेध घेत आला आणि समुद्रात उल्का पडावी तशी सूर्यराव च्या खांद्याचा वेध घेऊन सूर्यराव अक्षरश मागे उचलून पडला....!

दुसऱ्याच क्षणी त्या जंगलातून शेकडो बाण सूर्यराव च्या फौजेवर तुटून पडले अन फौज जखमी होऊ लागली......आणि जंगलाच्या पूर्वेकडून आरोळी घुमली..... हर हर हर महादेव......छत्रपती शिवाजी महाराज कि जय...."

भगव्या जरीपटक्यांचे निशान डोलवत शिवछत्रपतींच्या मावळ्यांची एक तुकडी हातात नंग्या तलवारी घेऊन सूर्यराव बेरड च्या फौजेवर तुटून पडली...."

सूर्यराव सावध झाला...खांद्याच्या घुसलेला बाण काढत बाजूच्या हशमाला बोलला..ही तर महाराजांची तुकडी आहे....पांढरे निशाण दाखवून थांबायला सांगा सर्वाना.....सूर्यराव मनात विचार करु लागला,आपण शिवाजी महाराजांच्या कोणत्याच गुन्ह्यात नसताना हा छापा कशासाठी असावा ?

"बाजींद"

भाग १० वा

~~~~~~~~~~~~~~~~~~~~

लेखक/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती मल्लविद्या

Www.kustimallavidya.blogspot.in
Www.facebook.com/kustimallavidya
whatsapp 9850902575

(सदर कथा लेखकाच्या नावासहित share करणे आवश्यक आहे)

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

हातात पांढरे निशाण घेऊन एक हशम क्षणात झेपा टाकत निघून गेला.

हातात पांढरे निशाण पाहताच मावळ्यांच्या तुकडीचा बाणांचा वर्षाव कमी झाला..!
सूर्यराव च्या भोवती अंगरक्षकांचे कडे पडले.
बाजूच्या दाट झाडीतून निथळती तलवार घेतलेला,आश्वावर स्वार असलेला एक शिलेदार घोड्याचा लगाम खेचत खेचत सूर्यराव च्या पुढे आला..!
त्यांच्या मागे केस पांढरे झालेला वयोवृद्ध मावळाही घोड्यावर स्वार होऊन आला होता.
त्या वृद्ध माणसाची नजर काहीतरी शोधत होती,आणि त्याने एका व्यक्तीला हेरले आणि घोडे त्याच्या जवळ नेत बोलला....."खंडोजी.....बरा हायसं नव्ह "
मांडीवरची जखम धरत,वेदना सहन करत तो बोलला..."होय वस्ताद काका...! ठीक आहे मी "
असे बोलत त्याने एक कटाक्ष समोर अर्धमूर्च्छित असलेल्या सवित्रीकडे पहिले

मागे उभे असलेला स्वार एकदम पुढे आला आणी सूर्यराव ला बोलला.....!
"सूर्यराव तुम्हीच ना ?"

त्या स्वाराच्या आकस्मित बोलण्याने सूर्यराव आश्चर्य व्यक्त करत बोलला...."होय जी,मीच सूर्यराव "

पण,आम्ही महाराजांच्या कोणत्याच गुन्ह्यात नसताना आमच्या तुकडीवर महाराजांच्या जरीपटक्याच्या तुकडीचा न सांगता छापा का शिलेदार ?
महाराजांच्या कोणत्याही वाटेला आम्ही नसतो,तर आज कसे का ?

सूर्यराव बोलला...!

यावर तो स्वार उत्तरला...!

"सूर्यराव.... आपण ज्यावर शस्त्र रोखले होते,तो मराठेशाहीचा अधिकारी आहे,महाराजांच्या हेरखात्यातील एक प्रमुख हेर...बहिर्जींचा खास हेर...खंडोजी "

हे ऐकून सूर्यराव बाजूला उभा राहिला

त्या स्वाराच्या या बोलण्याने समोर अर्धमूर्च्छित असलेली सावित्री अवाक झाली,ज्या खंडेराय ला तलवार भाला चालवता येत नाही,जो केवळ नोकरीसाठी आमच्या वाड्यात आला,हे केवळ नाटक होते तर....तिला त्याच्या पराक्रमावर खुश व्हावे हे समजेना की त्याच्या खोटे बोलून वाड्यात येण्यावर राग व्यक्त करावा हे समजेना"

तो स्वार घोड्यावरून पायउतार झाला आणि समोर उभ्या खंडेराय उर्फ खंडोजी ला मुजरा करत बाजूला नेले आणि बोलू लागला..."

"नाईक.....हे काय करुन बसला आपण?
तुम्ही स्वराज्याच्या कामगिरीवर असलेले सैनिक आहात,असा जीव धोक्यात घालणे आपणास शोभत

नाही....बहिर्जी नाईकांनी आपणास घेऊन येण्यास पाठवले आहे "

काय ?
मला घेऊन यायला मी कोणती चूक केली आहे ?

असे बोलताच तीन चार शिलेदारांनी खंडोजी च्या दंडाला धरले....

नाईक...आम्हाला माफ करा,आम्ही हुकमांचे गुलाम आहोत....!

खंडोजीने पुन्हा सवित्रीकडे पहिले....त्याच्या मनाची घालमेल सुरु झाली....एक कर्तव्यदक्ष सैनिक असून असा आततायीपना खरच त्याला शोभत नव्हता,पण सावित्रीला सूर्यराव च्या फौजेने पकडून नेले तेव्हापासून त्याचा मनावरचा ताबाच सुटला होता....!

खंडोजी ला पकडून ते शिलेदार नेऊ लागले इतक्यात बाजूच्या जंगलातून शिंगे-कर्णे गर्जू लागली.....हजारो हशमांच्या किंचाळण्याचा आवाज आणि घोड्यांच्या टापांचे आवाज घुमू लागले....."

कोणाचा हल्ला असेल हा ?
सूर्यराव,खंडोजी आणि वस्ताद काकासह तो स्वर विचारात पडला,पण सावित्रीने ओळखले......"

ही फौज राजे शिरक्याची नेकजात फौज..."

आपल्या एकुलत्या एक लेकीला चार दोनशे लोकांनी पळवून न्यावे,हे त्यांच्या मनाला अतिशय झोम्बले होते,त्यांच्या डोळ्यात केवळ आग होती,त्यांच्या हातातील तलवार आणि मनगटे केवळ शत्रूच्या रक्तासाठी आसुसली होती......

खंडोजीलाही समजले की नक्कीच राजे येसाजीची घाटमाथ्यावर टेहळणी ला गेलेली फौज सावित्री साठी येत आहे...त्याने पटकन त्या स्वराला ही गोष्ट सांगितली....माझं ऐका,ही शिरक्याची लेक सावित्री या सूर्यराव च्या पळवून आणली आहे.
आपण जर तिला परत शिरक्यांच्या हाती सुपूर्द केले तर शिरक्यांचा जास्तच विश्वास आपल्यावर बसेल..."

यावर तो स्वार उत्तरला...सूर्यराव व शिरक्यांच्या वादात पडणे हे आपले काम नव्हे...तुम्हाला बहिर्जी नाईकांच्या पुढे उभे करणे हे माझे काम आहे..."

त्या स्वरांच्या त्या बोलण्याने खंडोजी पुरता चवताळला,त्याने क्षणात आपल्या दंडाला हिसडा मारला आणि दंड धरुन नेणारे मावळे धरणीवर पडले,दुसऱ्याच क्षणी त्या स्वरांच्या कमरेला लावलेली तलवार उपसली आणि त्याच्याच नरड्यावर धरत तो बोलला......मला माझ्या हिशोबाने काम करु दे ....नाईकांना सांगा,काम जोवर होत नाही,खंडोजी परत येणार नाही..."

बाजूला उभे असलेल्या वस्ताद काकांनी पुढे येत खंडोजीला बोलले....खंडोजी,तुझे डोके आहे का ठिकाण्यावर ? आपण कोणत्या कामगिरीवर आहोत,आणि तू करत काय आहेस...?

काका...माझ्यावर विश्वास ठेवा मी करतो ते ठीकच करतो..तुम्ही निघा इथून...शिरक्यांच्या पदरी कडवे धारकरी आहेत....निभाव लागणे कठीण आहे..."

इतक्यात शिरक्यांच्या पहिल्या तुकडीने हल्ला चढवला....सूर्यराव आणि मावळ्यांची तुकडी दुहेरी लढत सुरु झाली.
खंडोजी ने त्वरित त्या स्वराला बाजूला केले आणि प्रसंगावधान राखत तो सवित्रीजवळ आला,आणि तिच्या हाताला धरुन उठवू लागला,तितक्यात तिने तो हात झिडकरला आणि त्याच्यावर हाताने प्रहार करु लागताच त्याने तिचा हात पकडून मुरगळला आणि तिला उचलून पलीकडच्या जंगलातून निघून गेला....

शिरक्यांच्या कडव्या फौजेपुढे सूर्यराव आणि मावळे तोकडे पडू लागले....क्षणात त्यांनी काढता पाय घेत माघार घेतली आणि वाटा चोरवाटेने निघून गेले...."

इकडे खंडोजीने सावित्रीला उचलून जंगलातून बरेच बाहेर आणले होते...पुढे डोंगराची कडेतुट होती आणि हजारो हात खाली नदीचे विशाल पात्र......खंडोजीने एकदा मागे पाहिले आणि ताडले की शिरक्याची फौज पाठलाग करत आहे....त्याने कशाचाही विचार न करता सवित्रिसह स्वतःला त्या कडेतुट वरुन त्या विशाल नदीच्या पात्रात झोकून दिले...."

ही गूढ कथा ऐकता ऐकता सखाराम ला कधी झोप लागली त्यालाच समजले नाही, सकाळी कोमल सूर्यकिरणांनी त्याची झोप मोड केली....सखाराम सह त्याच्या साथीदारांना जाग आली आणि समोरच खंडोजी ते कधी उठतात याची वाट पाहत होता..."

खंडोजीला पाहताच त्यांची झोप उडाली...."

उठा...किती वेळ झाला वाट पाहतोय तुमची..."

खंडोजी बोलला...!

सखाराम ने आजूबाजूला पाहिले तर केवळ गर्द दाट झाडी......त्याच्या मनात प्रश्नाचा काहूर माजला..!

कुठे गेले ते महादेवाचे मन्दिर ?
कुठे गेली ती सुंदर सावित्री ?
कुठे गेला तो मेलेला वाघ ?
हा खंडोजी रात्रभर गायब होता,आता कुठून आला ?

त्यां चौघांच्या डोक्यात प्रश्नांनी थैमान घातले होते,खंडोजी मात्र धीरगंभीर मुद्रेने त्या चौघांकडे पाहत होता..!

•●क्रमश :●•

लेखक/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे
कुस्ती मल्लविद्या
Www.kustimallavidya.blogspot.in
Www.facebook.com/kustimallavidya
whatsapp 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावासहित share करणे आवश्यक आहे)

•••••••••••••••••

बाजींद

भाग क्र.११ वा..!

••••••••••••••••••••••••

✍लेखन/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)

••••••••••••••••••••••••••

कुठे गायब झालात तुम्ही काल रात्री मला सोडून ?

खंडोजी ने प्रश्नार्थक मुद्रेने त्या चौघांना सवाल केला...!

यावर सखाराम बोलला...गायब..आणि आम्ही ..?

तुम्हीच काल संध्याकाळी त्या दाट जंगलाच्या जाळीत आम्हा चौघाना गुंगारा देत गायब झालात...!

आणि हो.....रात्री तुमची सावित्री पण भेटली होती आम्हाला....तिनेच आम्हाला तुमची पूर्ण कथा सांगितली

..पण आम्हाला कशी झोप लागली आम्हालाच समजेना...!

आम्हाला इथे कोणी कसे आणले तेवढे सांग बाबा ....नसता डोक्याला ताप झाला आहे...!

कुठली अवदसा सुचली आणि तुझे ऐकून तुझ्या मागे आलो असे झाले आहे ...!

काहीसा वैतागल्यागात सखाराम खंडोजी ला बोलला...!

‘’काय...?
सावित्री होती काल तिथे ?
अहो, मी तिलाच शोधायला काल जंगलात बाजूला गेलो,काळ सकाळीच मला ती तुम्ही भेटला त्या वडाच्या झाडाजवळ भेटणार होती,तिच्या वडिलांची फौज पण १० कोसावर आपली वाट पाहत आहे..!

तिथेच तुम्हाला नेऊन तुमच्या प्रश्नाचा निवडा करण्यासाठी आमचे वस्ताद काका तुम्हाला महाराजांच्या जवळ घेऊन जातील आणि आम्ही आमच्या वाटेने जाऊ असे नियोजन होते माझे ..पण..तुम्ही अचानक कुठे दिसेनासे झालात आणि रात्रभर तुमचा शोध घेत मी पहाटे त्या महादेवाच्या पडक्या मंदिराजवळ पोहोचलो तर तिथे एक वाघ रक्ताच्या थारोळ्यात मरून पडलेला दिसला....मला वाटले इथे अजूनही वाघ असतील,आपल्या जीवाला धोका आहे, म्हणून मी मंदिरात आलो,तर तिथे तुम्ही चौघे झोपला होतात.

मग एका एका खांद्यावरती घेऊन पहाटेच या डोंगरावर आणले .....म्हणून तुम्ही चौघे आणि मी जिवंत आहे...आणि तुम्ही उलट मलाच प्रश्न विचारताय ?

खंडोजी चे ते बोलणे ऐकून त्या चौघाना जरा धीर आला.
अहो,खंडोजीराव आम्हाला माफ करा,पण भीतीने आमची बुद्धी काम करेना,त्यात रात्रभर तुमच्या सावित्रीने तुमची जी कथा सांगितली,त्यावरून तर जास्तच शंका आली.
आम्ही साधी जंगलात राहणारी शेतकरी धनगर लोक,तुमच्या थोरा मोठ्यांच्या भांडणाची शिकार नको व्हायला....आम्ही जातो माघारी,...राहिला सवाल आमच्या वाडीच्या सुरक्षेचा,तर बघू..सगळ्यांना घेऊन काहीतरी निवडा होईलच...!
सखाराम निर्धारी आवाजात बोलून गेला....!

अहो,आता ३-4 कोसावर वस्ताद काकांचे गुप्त ठिकाण आहे आमच्या ...कशाला मागे जाता ?

सरळ महाराजांच्या कानावर तुमचा विषय घाला,तुमची समस्या कायमची मिटेल आणि सारा वाडा सुखी होईल...माझ ऐका ,माघारी फिरून रात्रभर चाललेली मेहनत वाया जाईल...!

खंडोजी च्या त्या प्रश्नावर चौघांनी पण विचार केला ...मागे जाऊन काय प्रश्न सुटणार नाही.
खंडोजी तर महाराजांचा हेर आहे,तो तर किमान खोट बोलायचा नाही....साधले तर सगळेच चांगले साधले

जाईल....असे म्हणत चौघांनी होकारार्थी मान हलवत खंडोजी सोबत जायचा निर्णय घेतला....!

एव्हाना सूर्य चांगलाच वर आला होता,भुकेने ते चौघेही हैराण झाले होते.

त्यांनी खंडोजी ला प्रश्न केला....
खंडोजी राव ...कुठतरी न्याहारी मिळेल का बघूया का ?

यावर त्वरित खंडोजी म्हणाला, चला चला....या डोंगराच्या खालीच मझा घोडा बांधला आहे ,त्यावर खाण्यापिण्याचे साहित्य आहे ..चला आपण निघू...असे म्हणत टे पाचही जण डोंगर उतरू लागले...!

घोड्याचे नाव घेताच सखाराम ला त्याचा घोडा आठवला,काल ओढा पार करताना काय दिसले त्याला काय माहिती ,कुठे पळून गेला.
पण,माझा घोडा खूप इमानदार आहे,अशी साथ सोडून जाणार नाही कधी,नक्कीच काय तरी आक्रीत बघितलं असणार त्याने...येईल तो नक्की परत,मला विश्वास आहे...आपल्या मनाशीच सखाराम बोलत होता...!

बराच वेळ डोंगर उतरत असताना त्याना दुरूनच खंडोजीचा घोडा दिसू लागला...आणि खंडोजी ला पाहून त्याचे खिंकाळणे सुरु झाले....!

खंडोजी ने घोड्याच्या मानेवर,तोंडावर मायेने हात फिरवला.

रात्रभर पावसात भिजून गारठलेल्या घोड्याला त्याने दिलासा मिळाला.
त्याने घोड्यावर एका घोंगडयात बांधलेली चटणी,कांदा आणि नाचणीची भाकर काढली.

खंडोजी ने घोड्याचे दावं सोडलं आणि त्याला चरायला सोडलं...!

पाचही जण भाकरीचा तुकडा मोडून खावू लागले ...!

खाता खाता दूरवर सखाराम चा काल गायब झालेला घोडा दूरवर दृष्टीस पडला.
त्याला पाहताच सखाराम आनंदाने उठून उभा राहिला..!
त्याने जोरजोरात त्याच्याकडे पाहत हाका मारायला सुरवात केली आणि त्याच्या रोखाने चालू लागला.
आपल्या धन्याची हाक ऐकून सखाराम चा घोडा धावत त्याच्याकडे येऊ लागला...सखाराम खूप आनंदी झाला.
पाठीमागून खंडोजी ने सखाराम च्या पाठीवर हात टाकला,आणि "जातीवन्त जनावर दिसतंय"

व्हय...लय जीव हाय माजा हेज्यावर...!

पण,काय झाले कोणास ठाऊक,समोरून धावत येणारा सखाराम चा घोडा क्षणात थांबला,सखाराम कडे पाहत पाहत मागे सरकू लागला,आणि क्षणात सुसाट वेगाने मागे पळून गेला...!

त्याचे धावणे पाहताच सखाराम पण मागे लागला,पण घोडा क्षणात जंगलात गायब झाला.

खिन्न मनाने सखाराम खन्डोजी जवळ आला,म्हणाला...काय याला आक्रीत दिसतय समजना... मला सोडून कवाबी असा वागला नव्हता आजवर....नक्कीच कायतरी आक्रीत हाय"

जाऊदे,जातोय कुठं...येईल माघारी,चला चार घास खाऊन घेऊया...असे बोलत खंडोजी व सखाराम माघारी आली.

सर्वजण भाकरी चटणी कांदा खाऊ लागली..!

सखराम बोलला.....खन्डोजीराव ,रात्री सावित्री बाईनी तुमची कथा सांगितली...खरच मला अभिमान वाटला कि मी एका मराठेशाहीच्या हेरासोबत हाय.
पण,मला पुढ काय झाल तुमच सांगशीला का ?
त्या डोंगरावरून तुम्ही दोघांनीही खाली नदीत उडी का मारली ?

त्यानंतर काय झाले....!

किंचित हसत खंडोजी बोलू लागला......

काय सांगू मंडळी,आयुष्यात केवळ व्यायाम,धाडस आणि मेहनत याच्या जीवावर महाराजांच्या सैन्यात प्रवेश मिळवला होता.
ऐन तारुण्यात खुद्द बहिर्जी नाईकांचा खास मर्जीतला हेर झालो होतो..आयुष्यात प्रेम म्हणजे काय असते हे कधी समजून घ्याला वेळच मिळाला नव्हता...!
पण,शिर्क्यांच्या लेकीला जेव्हा पहिल्यांदा पहिले ,तेव्हा त्या रात्री डोळ्याला डोळा लागला नव्हता.....सारख तिचा तो चेहरा आठवायचा प्रयत्न करत होतो..!

मनात एकप्रकारची ओढ निर्माण झाली होती....!

त्या रात्री बेरडांच्या हल्ल्यात तिने एकाकी चढाई केल्याचे समजताच माझा तोल गेला..मी वस्ताद काकाना सांगून तिचा जीव वाचवायला सुर्यरावांच्या फौजेचा एकट्याने पाठलाग केला...मी जाणून होतो सूर्यराव आणि महाराजांचे कोणतेच वैर नव्हते...पण साऊ साठीची तळमळ स्वस्थ बसून देत नव्हती...!

मी धोक्यात असल्याची खबर काकांनी खेडेबार्याला पोहोच केली आणि २०० मावळ्यांची तुकडी माझ्यासाठी धावून आली.....मी जर साऊ ला तिथेच सोडून गेलो असतो तर नक्कीच सूर्यरावाने तिला एकतर मारून टाकले असते नाहीतर यातना देत शिर्क्याना झुकवले असते..आणि जर शिर्क्यांच्या हाती दिले असते तर माझे गुपित तिला समजले होते ,आणि ती सुध्दा जातिवंत होती,तिने नक्कीच हे सर्व तिच्या बापाला सांगितले असते आणि आमचा शिर्क्यांच्या राज्याचा पाडाव करायचा बेत फसला असता ,म्हणून मी कोणताही विचार न करता वस्ताद काकांचाही हुकुम डावलून तिला घेऊन त्या भयान कड्यावरून नदीत उडी मारली....!

दुथडी भरून वाहणाऱ्या त्या नदीत आम्ही दोघेही पडलो.....साऊ च्या नका तोंडात पाणी गेल्याने तिची शुद्ध हरपली...पण मी शुद्धीत होतो...तिचा हात धरून कसा बसा पोहू लागलो...पण पाण्याच्या वेगाने मी खूप दूरवर वाहत वाहत एका भयान जंगलात पोहोचलो....!

खंडोजीने साऊचा हात धरून तिला नदीच्या काठावर पण जंगलाच्या तोंडावर असलेल्या एका विशाल दगडावर झोपवले आणि कमरेला असलेले कट्यार,खंजीर काढून बाजूला ठेवला आणि शेल्याने तोंड पुसत साऊ च्या डोक्याखाली शेला ठेवला.......सावित्रीचे ते सौंदर्य खंडोजी कितीतरी वेळ पाहत होता.....त्याच्या हृदयाची कंपने तीव्र होत होती...आयुष्यात पहिल्यांदाच कोणत्या तरी स्त्रीचे सौंदर्य तो पाहत होता.

तितक्यात अचानक सावित्रीला जाग आली.

डोक्यावर हात ठेवत ती वेदना सहन करत उठली आणि बाजूला उभा असलेल्या खंडोजीकडे कटाक्ष टाकला आणि दोन्ही हात छातीवर नेत बोलले....दूर व्हा...!

क्षणात खंडोजी ने शेला तिच्या हातात देत बोलला....घाबरू नका बाईसाहेब..तुम्ही सुखरूप आहात...!

त्वरित हाताला हिसडा मारत तो शेला घेऊन तिने खांद्यावर छातीवर झाकत सावरत बोलली.....मी सुखरूप राहीनच...तुम्ही तुमची काळजी करा....!

आमच्या वडिलांचा विश्वास घात करून त्यांच्या वाड्यात प्रवेश मिळवला आणि आमच्या खबरा शिवाजी महाराजाना देता ?
एका पैलवानाला शोभत का ही गद्दारी ?

खंडोजी बोलला......गद्दारी...आणि आम्ही ?

गद्दारी केली तुमच्या वडिलांनी......सारा महाराष्ट्र शिवाजीमहाराजांच्या मागे ठाम असताना तुटपुंज्या फौजेच्या जीवावर मराठेशाहीशी वैर शोभते का शिर्क्यांना ?

सूर्यराव बेरडांच्या हातात शस्त्र घ्याला मजबूर करणारे तुमचे बापजादे शिवाजी महाराजांची महती काय समजणार ..?

यावर सावित्री खवळून बोलली....ते काहीही असो....शिर्क्यांची जरी दौलत महाराजांच्या सैन्यापुढे तोकडी असली तरी आमच्या राज्यापुरते आम्ही सुखी आहोत....कोणीही दुखी नाही...आमच्या आबांच्या वर निष्ठा बाळगणारी कित्येक जण तरी आहे....!

निष्ठा ..?

खंडोजी सुध्दा संतापाने बोलला ...!

निष्ठा सत्कारणी असावी....आगलाव्या आगंतुक आदिलशाहिवर कसली निष्ठा ?

ज्यांना माणुस आणि जनावरे यातला भेद माहिती नही...ज्यांचा इतिहास हा कत्तली आणि जाळपोळी ,बलात्कार,लुटालूट यांनी भरलेला आहे.
350 वर्ष जुलूम जबरदस्ती करणारे तुमचे आदिलशाही हात तोडून टाकले आमच्या महाराजांनी..!

आज महाराष्ट्र सुखात आहे,तो केवळ महाराजांच्या पुण्याईमुळे...बस्स...आम्ही त्यांच्यासाठी जीवही देऊ...!

बोलून ताकत वाया घालवू नका...क्षणात सावित्री बोलून गेली...असेल हिमत तर माझ्याशी चार हात कर आणि तुझा प्राण वाचव...मी पण माझ्या राज्यासाठी प्राण देऊ शकते...!

सावित्रीच्या आकस्मित आव्हानाने खंडोजी सावध झाला,तितक्यात सावित्री ने खंडोजी वर जबरदस्त प्रहार सुरु केले...खंडोजीचा तोल गेला,पण क्षणात सावध होऊन त्याने गिरकी घेत,सावित्री चा हात मुरगळुन मागे आवळत बोलला....बाईसाहेब...आम्ही शिवछत्रपतींचे शिपाई आहोत,स्त्रिया वर कधीच हात उगारत नसतो...बऱ्या बोलान गप्प बसा नाहीतर हात पाय बांधून उचलून न्यावं लागेल...!

सवित्रीचा हात घट्ट मागे धरल्याने तिचा आवेश पूर्ण मावळला...!

हे सर्व सुरु असताना जंगलातून एक बाण वेगाने बाहेर आला ज्याने खंडोजी च्या पायाचा वेध घेतला,एका आर्त वेदनेने खंडोजी ला भोवोळ आली,आणि तो सावीत्री ला सोडून खाली पडला...!
क्षणात सावित्री सावध होऊन पळून जायच्या बेतात होती,
तितक्यात जंगलातून पाच पन्नास काळीकभिन्न नरभक्षक आदिवासी जमात हातात भाले, बरचे घेऊन बाहेर आली...त्यांचे ते उग्र कुरूप चेहरे पाहताच सावित्री भयकंपित झाली....!

क्रमश

बाजींद

भाग क्र.१२
••••••••••••••••••••••••
✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575

(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
••••••••••••••••••••••••••
सडसडीत देहाचे,अंगावर,शरीरावर चित्रविचित्र पांढरे पट्टे ओढलेले,केवळ लज्जारक्षणाएवढे कपडे घातलेले ते भिल्ल जमातीचे लोक कमालीचे क्रूर असावेत हे त्यांच्या चेहऱ्यावरुनच दिसत होते...!

एकाने पुढे होऊन सावित्रीच्या दंडाला पकडायचा प्रयत्न केला,पण सावित्रीने त्याचा हात वरच्यावर पकडून हिसडा मारला,त्याचा तोल जाऊन तो खाली पडला.आपल्या साथीदाराला खाली पडलेले पाहताक्षणी ते भिल्ल बेताल किंचाळत सावित्रीच्या रोखाने धावत सुटले आणि ते पाहताच सावित्री सुद्धा पुन्हा नदीच्या दिशेने धावू लागली...पुढे नदी,पाठीमागे भिल्ल अश्या विचित्र परिस्थितीत तिने कशाचाही विचार न करता नदीच्या प्रवाहात उडी टाकली.
नदीच्या वेगवान धारेत ती वाहून जाऊ लागली,आणि तिच्यापाठोपाठ ते सर्वच्या सर्व भिल्लही नदीत उडी मारून सवित्रीचा पाठलाग सुरु ठेवला.

बराच वेळ पाण्यात वाहत गेल्यानंतर एका वळणावर असलेल्या गुंफेत सावित्रीने पोहणे सुरु केले आणि काही वेळ पोचल्यानंतर गुंफेत पोहचली...!

पोहून दमलेली सावीत्री त्या गुहेत दमछाक होऊन पडली,पण आपल्या पाठीमागून भिल्ल येत आहेत याची जाणीव तिला होताच ती गुहेतील पाण्यात हळू हळू चालू लागली...!

बराच वेळ चालून झाला आणि गुहेतील पाणी कमी होत जमीन लागली...क्षणात ती आत धावत सुटली.
बराच वेळ तिने धावणे सुरु ठेवल्यानंतर सूर्यकिरणांचा दूरवर प्रकाश दिसू लागला.

ती त्या प्रकाशाकडे धावली आणि तिला जाणवले की आपल्या पाठीमागे भिल्लांचा पाठलाग अजूनही होत आहे.
ती त्या प्रकाशाजवळ आली.
एक पुरुष आत जाईल इतक्या उंचीची ती एक वाट होती जी जंगलाच्या दुसऱ्या टोकाकडे निघत होती..!
ती त्या वाटेतून बाहेर पडली आणि जंगलात पोहचली...!

समोर एक विशाल शिळेवर चित्रविचित्र आकृत्या कोरल्या होत्या....एका उंच झाडाच्या फांदीवर एक मनुष्याच्या हाडाचा सांगाडा लटकत होता,ज्याचे पाय वर आणि हात खाली अशी स्थिती होती...!

सवित्रीचा पाय एका दगडाला थडकला व तिचा तोल गेला आणि पडली...!

काहीच अंतरावर ते भिल्ल तिचा पाठलाग करत तिच्या पर्यंत पोहचले होते....ते मनस्वी खुश झाले की बऱ्याच दिवसांनी त्यांची भूक मिटणार होती,पण...पण तितक्यात एका चित्रविचित्र आवाजाने त्या सर्वांचे लक्ष समोरच्या दगडावर गेले.
आणि भीतीने त्यांचे डोळे विस्फारले गेले....!

त्या भिल्लांचा म्होरक्या हात जोडून भीतीने बोलू लागला...ब... ब...ब बाजींद.... बाजींद...!

असे बोलत बोलत अक्षरश वाऱ्याच्या वेगाने आल्या पावली परत धाऊ लागले.

धावताना कोणी धडपडत होते,कोणी किंचाळत होते,तर कोणी जीव वाचावा म्हणून फक्त धावतच होते...त्या गुहेतून ते कोणताच विचार न करता पुन्हा नदीत उडी टाकून पोहत पोहत मागे येऊ लागले.......!

इकडे,सावित्रीला समजेना,की या भिल्लानी असे काय पाहिले ज्याला बघून हे इतके घाबरले आहेत....!

तिने स्वतःला सावरले.मन खंबीर केले आणि समोर च्या भव्य पाषणाकडे पाहू लागली आणि क्षणात अनेक वटवाघुळ पक्षी एकाच वेळी बाहेर पडले....!

दोन प्रचंड वाघ हळू हळू सवित्रीकडे येऊ लागले...!
एखाद्या राजाच्या ऐटीत,आणि राजबिंड्या चालीत ते दोघे चालत होते,आणि त्यांच्या मधोमध एक धिप्पाड युवक,सिंहासमान चालीने चालत होते,ते दोन वाघ जणू त्याच्या अंगरक्षकासारखे त्याच्या बरोबर चालत होते. सरळ नाक,आग ओकणारे त्याचे घारीसारखे डोळे,चेहऱ्यावर एखाद्या राजपुत्रासारखी चमक,कमरेला लटकत असलेली तलवार,एखाद्या पुराणपुरुषांसारखे अजस्त्र बाहू,पिळदार दंड,भरीव छाती......पाहताक्षणीच कोणाच्याही हृदयाचा थरकाप उडावा असे त्या युवकाचे एकंदरीत व्यक्तिमत्व पाहत सावीत्री उभी होती...!

जंगलात सर्वत्र पक्षांचा किलबिलाट सुरु झाला,आसपास सरपटणारे निशाचर एकाच वेळी बाहेर आले....जंगली प्राणी अस्वस्थ होऊन किंचाळू लागली....जणू काही तो युवक या सर्व जंगलाचा नव्हे तर सभोवतालच्या अणूरेणुचा स्वामी होता....!

तो महत्वकांक्षी नजरेचा युवक जसाजसा सावित्रीच्या जवळ येऊ लागला,तसे तसे रात्रकिडे,पक्षी,वटवाघुळे,असंख्य लहान मोठे जीवांचा गोंगाट प्रचंड वाढू लागला,सावित्रीच्या कानाला ते सहन होईना,तिने तिचे दोन्ही हात कानावर ठेवले....तो आवाज वाढू लागला.......बस्स आता काही पावले...एकतर ते वाघ सवित्रीवर तुटून पडणार नाहीतर,हे जंगली जीव तरी सवित्रीचा प्राण घेणार....तिला हे सर्व असह्य झाले आणि तिने डोळे बंद करत प्रचंड किंचाळी फोडली........!

तीची किंचाळी ऐकताच तो युवक जाग्यावर थांबला...एक स्मित हास्य करत त्याने चहूबाजूला नजर फिरवली तसे सर्व पशुपक्षी,जीवजंतू शांत झाले....एका क्षणात सारा गोंगाट मौन झाला....!
सावीत्री ने डोळे उघडले...तिथे फक्त तो पुरुष तिच्याकडे स्मितहास्य करत उभा होता...!

इकडे,जिवाच्या आकांताने ते भिल्ल पुन्हा जिथे खंडोजी बेशुद्ध होता,तिथे आले...!
धडपडत,धापा टाकत ते खंडोजी कुठे दिसतो का ते पाहू लागले,अन क्षणात सपा-सप वार त्या भिल्लांच्या वर कोसळू लागले.

कोणाचा हात तुटून पडतो,तर कोणाचा पाय...काही क्षणात 10/12 भिल्ल कर्दळीसारखे तुटले गेले...काही जंगलात पळून गेले ,उर्वरित तिघे चौघे हे जीवाची भिक्षा मागत जमीनीवर लोळू लागले....!

समोर पाहतो तर,खंडोजी ने विरासन घालून त्या भिल्लांच्यावर तलवार रोखून उभा होता....!

जे जीवाची भीक मागत होते,त्यातल्या एकाच्या छातीवर पाय ठेवत खंडोजी गर्जून बोलला....सांग,माझ्याबरोबर असणारी मुलगी कुठे आहे,काय केले तुम्ही...?

जिवाच्या भीतीने थरथर कापत त्यातल्या एकजण बोलला.....बाजींद......बाजींद...बाजींद.....!

असे म्हणत ते उर्वरित तिघे चौघे जंगलात धाऊ लागले...!

खंडोजी ने त्यांचा पाठलाग करायचा प्रयत्न केला आणि एकाला पकडले आणि बोलू लागला....!

बाजींद काय ??
बोल नाहीतर ही खंजीर तुझ्या छातीत घुसवेन...!

त्याचे ते बोल ऐकताच त्या भिल्लाने स्वतावर रोखलेले खंजीर धरले आणि खसकन स्वतःच्या छातीत खुपसले...आणि मान नाकारार्थी हालवत,डोळ्यात एका भीषण संकटाची खून देत तो पुटपुटू लागला...बाजींद....बाजींद...!

••••••••••••••••••••••••••••••••

बाजींद
भाग क्र.१३ वा..!
~~~~~~~~~~~~~~~~~~~~
✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~
भिल्ल जाग्यावर गतप्राण झाला.त्याच्या छातीत घुसलेला खंजीर उपसून तो कमरेला लावत खंडोजी ने त्याला खाली ठेवले.
सावधपणे चौफेर नजर फिरवत खंडोजी विचार करु लागला......"बाजींद"...काय असेल हे बाजींद...?

एव्हाना सुर्य मावळतीकडे झुकला होता,संध्याकाळच्या संधीप्रकाशाने जंगलातील झाडे झुडपे सुवर्णाची झळाळी

मारत होती..!
एक दीर्घ श्वास घेऊन खंडोजी ने पायात घुसलेल्या बाणामुळे झालेल्या जखमेची वेदना सहन करत त्याला जंगलातील पाला बांधला...!

तो चालत जंगलाच्या बाहेर आला,मृत भिल्लांचे शव उचलून एका बाजूला ठेवत तो नदीच्या पात्राकडे पाहू लागला ?
मनात विचारांचे काहूर माजले.
सावीत्री कुठे गेली असेल..?
हे भिल्ल जिवाच्या आकांताने का धावत होते ?
बाजींद ....?
काय असेल हा प्रकार,ज्याचे नाव घेताच त्या भिल्लाने मरण पत्करले पण गूढ नाही सांगितले....!

हा काय प्रकार आहे,हे मात्र आता शोधून काढ्लेच पाहिजे,असा निर्धार करत खंडोजी ने त्या नदीच्या विशाल पात्रात उडी घेतली...!

नदीच्या पाण्याच्या ओढीने तो वाहू लागला,तिरकस पोहत पोहत तो किनाऱ्याकडे पाहू लागला.

बराच वेळ पोहून झाले अन त्यालाही ती गुंफा दिसली.
या स्मशान जंगलात,नदीच्या कडेला गुंफा असणे हे नक्कीच नवल आहे हे त्याने जाणले आणि त्याने त्या गुंफेकडे पोहणे सुरु केले.....!

काही वेळात गुहा जवळ आली आणि खंडोजी चे पाय जमिनीला लागले,दम खात तो गुंफेकडे चालू लागला...!

ती गुहा खूप अंधारी होती,एकेक पाऊल तोलून मापून टाकत खंडोजी गुहेच्या आत जाऊ लागला...एव्हाना गुहेतील पाणी संपून जमीन लागली होती.

बराच वेळ चालून झाले आणि गुहेच्या त्या बाजूला मंद प्रकाश दिसू लागला,नक्कीच त्या बाजूने बाहेर पडायची वाट असेल असा विचार करत खंडोजी ने कमरेची तलवार ,खंजीर उपसली आणि एका हातात तलवार,दुसऱ्या हातात खंजीर पेलून सावध पावले टाकत खंडोजी त्या गुहेतून बाहेर आला.

सुर्य पूर्ण अस्ताला गेला होता,खंडोजी जखमी होता,त्याच्या वेदना सहन करत तो सावीत्री चा माग शोधत तिथे आला होता...!

ते अगदी घनदाट अरण्य होते,रात्रपक्षी भिरभिरत होती,रातकिड्यांचा आवाज मेंदूला झिणझिण्या आणत होता..पाय पडेल तिथे टाकत खंडोजी पुढे चालू लागला आणि अचानक त्याला कोल्हेकुई सोबत रानकुत्रें केकाटल्याचा आवाज आला...त्याच्या सर्दिशी अंगावर काटे आले...आजवर इतक्या मोहिमेत हेरगिरी केली पण

या जंगलातील भयनकता खरोखर अंगावर काटा आणणारी होती...!

आवंढा गिळत खंडोजी चालत होता,प्रत्येक पाऊल सांभाळून टाकत होता तितक्यात समोरच मोठ्या वडाच्या झाडामागून कोणीतरी एकदम वेगात धावत त्याच्याकडे येत होते,त्याच्या पावलांचा आवाज स्पष्ट कानी येताच खंडोजी ने विरासन पवित्रा घेतला आणि समोर पाहू लागला,त्याच्या हृदयाचे ठोके वाढले,सर्वांग घामाने भिजले...त्याने मनोमन विचार केला,ही पावले जर माणसाची नसून एखाद्या जनावराची असली,तर आपला खेळ सम्पला आज...आणी नक्कीच ते जनावर असेल,असल्या भयाण जंगलात कोण मनुष्य येतो मरायला....!

त्याने डोळे मिटून एक क्षण शिवछत्रपतींचे स्मरण केले ,ज्यांनी केवळ खंडोजीची नव्हे तर साऱ्या महाराष्ट्राची भीती घालवून आयुष्याला अर्थ प्राप्त करून दिला होता,त्यांचे क्षणभर स्मरण करुन तो मरायला,मारायला तयार झाला..!
आता क्षण दोन क्षण बस्स...काहीही होणार हे त्याने ताडले..अन...

क्षणार्धात त्याच्या मागून त्याचे कोणीतरी तोंड दाबले आणि त्याला ओढत ओढत एका झाडाच्या मागे नेले.....त्याचे तोंड दाबणार हात खूप शक्तिशाली वाटला,पण एकप्रकारची नाजूकता होती त्या हातात....त्याने ताकतीने त्या हाताची मिठी सोडवली आणि क्षणात सावध होऊन मागे पाहतो,तर ती प्रत्यक्ष "साऊ" होती...त्याने डोळे वठारले आणि भीतीने मागे सरकू लागला....तो मागे हटतोय हे पाहताच तिने त्याचा हात पकडला आणि त्याच्या ओठावर हात ठेवत मान नाकारार्थी हलवू लागली..!

हा प्रसंग सुरु असतानाच तो आवाज पुन्हा तीव्र झाला आणि झाडामागून दौडत गेला आणि जोरदार मोठ्या आरोळीने तो आवाज शांत झाला..!

आकस्मित घटनेने भांबावून गेलेल्या खंडोजीला नेमके काय सुरु आहे समजेना,त्याने प्रश्नार्थक नजरेने सवित्रीकडे पाहिले,सावित्रीने त्याच्या ओठावर दाबून ठेवलेला हात सैल करत बोलली....तुम्हाला माहिती नाही किती महाभयानक धोक्यात फसलोय आपण..!

लहानपणापासून या भागाबद्दल मी केवळ ऐकून होते,इथे घडत असणारे चित्रविचित्र प्रकार,आकस्मित घटना जे काही ऐकले होते ते आज नशिबाने भोगणे माझ्या वाटेला आले,आणि भरीस भर म्हणून तुम्हीही इथे आलात...मला खात्री आहे आपल्या दोघांपैकी कोणी जिवंत राहील असे वाटत नाही,पण नेमके आपले मरण कसे असेल याचाच मी विचार करत आहे,असे बोलत सावीत्री धाय मोकलून रडू लागली...!

तिला सावरण्याचा प्रयत्न करत खंडोजी बोलला,बाईसाहेब शांत व्हा,नेमका काय प्रकार आहे मला सांगा..असे काय आक्रीत घडले जे तुम्ही धीर सोडून बोलत आहात ते....?
मी शिवछत्रपतींचा शिलेदार आहे..संकटांशी लढणे हा माझा छंद आहे...सांगा....काय आहे इथे ....?

आलेला हुंदका आवरत ती बोलू लागली...आपण अनावधानाने एका महाभयानक जंगलात आलोय,जिथून परत

जाणे यमलाही अशक्य आहे...हे जंगल "बाजींद" चे आहे..........बाजींद नाव उच्चारताच वाऱ्याची मोठी झुळूक आली,आणि सावित्रीचे केस वाऱ्यावर उडवुन गेली.....!

"बाजींद"...?
काय आहे हा प्रकार ?
मगाशी तुमच्या पाठीमागे लागलेल्या भिल्लाने जीव दिला पण बाजींद बाजींद बोलत प्राण सोडला..!
मला सांगा नेमके बाईसाहेब...मला जाणून घ्यायचे आहे ते...!

सावीत्री गूढ आवाजात सांगू लागली....बाजींद...!

असेल ही 100 एक वर्षापूर्वीची गोष्ट,मी खूप लहान होते तेव्हा माझ्या आजीने सांगितली होती.
तशी ती आमच्या गावातल्या सर्व लोकांना माहिती आहे.

मोगलांच्या टोळधाडी महाराष्ट्रावर कोसळू लागल्या होत्या आणि गावेच्या गावे होरपळत होती...अन्याय,अत्याचार याने कहर माजला होता..!
यशवंतमाची पलीकडे 100 कोसावर असलेल्या चंद्रगड गावात तो राहत असे..!

एक अजिंक्य मल्ल, सावध नेता,कुशल राजकारणी,मुत्सद्दी सरदार..!
"बाजीराव सरदेशमुख"
त्याच्या बेडर स्वभावामुळे आणि कधीच पराभूत न होणाऱ्या चालीमुळे त्याला पंचक्रोशीतील "बाजींद" म्हणत होते...!

एक दिवस मोगली सरदार हुसेनखान आपल्या 4 हजार स्वारांना घेऊन तळकोकणात उतरला आणि त्याचा मुक्काम पडला चंद्रगड पासून अवघ्या 10 कोसावर...!

धन्यवाद

•●क्रमश●•

✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)

बाजींद

भाग क्र.१४ वा..!

~~~~~~~~~~~~~~~~~~~~

✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या

Www.facebook.com/kustimallavidya

Whatsapp - 9850902575

(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

"चंद्रगड"

एक हजार दोन हजार लोकवस्तीचे गाव.

महाबळेश्वर महादेवाच्या घनदाट अरण्यातील शेवटचे टोक.

सह्याद्रीच्या दर्याखोऱ्यात बिकट अडचणीत वसलेले हे गाव.

अशा घनदाट अरण्यात राहण्याचे धाडस केवळ वाघातच असते.

चंद्रगड ची माणसे पण काही वाघापेक्षा कमी नव्हती.

अश्या हजार दोन हजार वाघांचा म्होरक्या होता चंद्रभान सरदेसाई..!

बाराव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात ज्ञानेश्वर माऊली समाधिस्त झाल्या आणि सर्व महाराष्ट्रावर जणू अवकळा पसरली.

राजे रामदेवराय यादवांचा वैभवसंपन्न महाराष्ट्र गनिमांच्या परकीय सत्ताधाऱ्यांच्या टोळधाडींची रतीबाने शिकार होऊ लागला.

कर्तृत्ववान मनगटांची कित्येक राजघराणी परकीय सत्तेची मांडलिक बनू लागली.!

सत्ता,जहागिरी,स्वार्थ यासाठी स्वकीयांच्या माना तलवारीने उडवणे म्हणजे पोरखेळ होऊ लागला होता..!

स्वाभिमान,स्वत्व नावालाही शिल्लक नव्हते असे म्हटले तरी वावगे ठरणार नव्हते.

पण अशा प्रतिकूल परिस्थितीत मूळचे क्षत्रिय तेज असणारी काही छोटी छोटी राजघराणी आजही महाराष्ट्रात नावापुरते का होईना आपले अस्तित्व टिकवून होती.

आजून परकीय किंवा स्वकीय मांडलिकांच्या नजरा त्यांच्यावर पडल्या नव्हत्या...आणि पडल्याही असत्या तरी ही घराणी स्वाभिमानासाठी मरणही पत्करणारी होती.

अशा अगदी बोटावर मोजण्याइतपत शिल्लक असणाऱ्या राजघराण्यापैकी एक छोटेसे घराणे होते...चंद्रगड चे सरदेसाई घराणे..!

चंद्रभान सरदेसाई म्हणजे गावातील प्रमुख कारभारी.

गनिमांचा अन्याय,अत्याचार राजे चंद्रभान ऐकून होते.
म्हणून त्यांनी गावातील शे पाचशे तरुण पोरांची फौज तयार केली होती.
गावचे ग्रामदैवत भैरवनाथाचे अतिप्राचीन मन्दिर गावात होते,त्याच्या मागे भव्य तालीम उभी केली होती.
त्यामध्ये कुस्ती,तलवार,भाला,गदा,धनुष्य यासह अनेक युद्धप्रकारचे प्रशिक्षण सुरु होते...!

बाजीराव सरदेसाई हा चंद्रभान सरदेसाई यांचा तरुण मुलगा.
आपल्या गावावर,देवावर,वाडीलांच्यावर त्याचे खूप प्रेम होते.
ऐन तारुण्यात कुस्तीसह इतर युद्धकला त्याने लीलया आत्मसात केल्या होत्या.
नेहमी स्वप्नात वावरणाऱ्या बाजी ला एकटे राहणे खूप आवडत असे.
दिवासदीवस भर घनदाट जंगलात तो फिरत असे.
वेगवेगळ्या जंगली प्राण्यांचे आवाज त्याला समजू लागले होते.
पशुपक्ष्यांच्या अदभूत दुनिया तो समजून घेऊ लागला होता.
किडा,कीटक मुंगी पासून ते क्रूर वाघ सिंहासारखे हिंस्त्र पशूंची गूढ भाषा त्याला अवगत झाली होती.
चिमणा चिमण्यायांचे भांडण सुद्धा त्याला समःत असे.
अस्वले,हत्ती सारेच त्याच्या ओळखीचे बनले होते.

सुर्य उगवण्याआधी बाजी उठत असे.
अंघोळ पाणी आवरून तालमीत कुस्तीचा सराव करत असे..अगदी दोन दोन तासांची लढत झाली की मग जोराचा ठेका सुरु होत असे.
जोराचा आकडा पाच हजार ओलांडत असे मग कुठेतरी त्याला दम लागत असे.
त्यानंतर तलवारीचे हात,दांडपट्टा याचा सराव झाला की शेरभर तुपातला शिरा न्याहारीला येत सोबत पाच शेर देशी गाईचे आकरी दूध रिचवून बाजी धनुष्यबाण अडकवून आपल्या आवडत्या "पक्ष्या" घोड्यावर मांड ठोकून जंगलात जात असे...!

आणि जे व्हायचे तेच झाले.
गनिमांची नजर या चंद्रगड वर पडली.
चंद्रगड मारल्याशिवाय तळकोकणात जाणे अवघड होते हे जाणून मोगली सरदार हुसेनखान हा त्याच्या चार हजार कडवट स्वारासह आणि कुटुंबकबिल्यासह उतरला होता.

हुसेनखान ची खबर त्वरित चंद्रभान ला समजली आणि त्याने त्वरित बाजी व सहकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली.
आता आपले गाव गनिमांची खास शिकार होण्याच्या भीतीने चंद्रभान हतबल होऊन बोलू लागला.
चार हजार सैन्यापुढे आपला टिकाव लागणे अवघड आहे त्यामुळे त्याच्या सैन्यात फूट पाडून त्याला जंगलात संपवणे हे उचित होईल त्यामुळे बाजी ला या कामाचा विडा दिला गेला.
बाजी ने आपल्या वडिलांना धीर देत आपण ही कामगिरी चोख बजावू अशी ग्वाही दिली.

बाजी ने त्याच्या विश्वासातील शंभर चिवट धारकरी निवडले आणि मध्यरात्री हुसेनखानाच्या छावणीत घुसायचे ठरवले..साधलेच तर खुद्द हुसेन ला ठार करु आणि मागे येऊ असा बेत ठरऊन ते 100 वीर वाघाच्या काळजाने निघाले.
काळा पोषाख, तलवार घेऊन ती 100 भुते जंगलाची वाट चालू लागली.

दरम्यान छावणी जवळ आल्याची चाहूल लागली.
मोगली चंद्रचांदणी चा ध्वज फडकत असलेली छावणी हुसेनखानाची आहे असे बाजीने ताडले आणि सर्व धारकर्यांना वेगवेगळी कामे सांगून स्वतासोबत 5 अंगरक्षक घेऊन तो स्वता छावणीकडे निघाला.

छावणी जवळ आली आणि त्याने मांजराची पावले टाकत, परिस्थितीचा अंदाज घेत छावणीच्या मागून चाल करायचे ठरवले.
छावणीच्या जवळ पोहचल्यानंतर बाजी ने कमरेची तलवार उपसली आणि छावणीच्या कणातीत घुसवून आत घुसला...!

हुसेनखान कुठे झोपला असावा याचा अंदाज बांधत त्याने तंबूच्या एका विभागात पाऊल टाकले तितक्यात मागून कोणीतरी त्याला घट्ट पकडले..!
क्षणात ती मिठी सोडवून त्याने समोरासमोर पवित्रा घेतला आणि समोर तोंड बांधलेला एक हशम दिसला आणि त्यांची लढाई ऐन तंबूतच जुंपली.

तलवारीच्या खनखनाटने सारी छावणी जागी झाली आणि तंबू कडे धाऊ लागली.

बाजी ने बगल देताच पुढचा हशम झुकला आणि तितक्यात त्याने आपली तलवार त्याच्या तोंडावर बांधलेल्या अवलानात घुसवली आणि ते कापड फाडले......तो हशम नसून एक स्त्री आहे हे बाजी ने पहिले...!
तिचे केस विस्कटले गेले आणि मशालीच्या उजेडात तिची सतेज कांती आणि बोलके डोळे दिसले आणि बाजींच्या हृदयाचा ठाव घेतला...!

आपण लढाईत आहोत याचे भान हरपून तो तिचे मूर्तिमंत सौंदर्य न्याहाळू लागला...इतक्यात शेकडो हशम एकाच वेळी त्याच्यावर तुटून पडले आणि दोरखंडाने त्याला बांधून मैदानात आणले गेले.

हुसेनखान स्वता युद्धाचा पोषाख घालून हातात नंगी तलवार घेऊन बाहेर आला आणि त्या स्त्री ला उद्देशून बोलला...बहुत खूब नूरजहा... हमे फक्र है की आप हमारी बेटी हो...!

बाजी ला कळले की ती मुलगी हुसेनखान ची मुलगी आहे.

चवताळलेल्या हुसेनखानाने रागाने बाजीकडे पाहत त्याची समशेर त्याच्यावर रोखली तितक्यात सारी छावणी थरारली.

सार्‍या जंगलात किडा,कीटक,साप,मुंगी पासून हत्ती,सिंह,वाघ एकाच वेळी प्रचंड गर्जना करत बाहेर पडले आणि समोर जो जो दिसेल तो तो त्यांची शिकार होऊ लागला.

हुसेनखान ला समजेना समोर काय होत आहे.
त्याची शूर फौज साप चावून, हत्तीच्या पायाखाली,अस्वलांच्या हल्लात ,वाघाच्या तोंडी मरु लागली...उरलेली वाट दिसेल तिकडे पळत सुटली....सारी फौज अस्ताव्यस्त होऊन गेली.....!

काय घडत आहे बाजीला सुद्धा समजेना...एकटा तो सोडून सर्वाना कीडा मुंगी चावत होत्या....क्षणात एक हिंस्त्र वाघ छलांग मारत नूरजहा च्या समोर आला आणि तिच्यावर हल्ला करणार इतक्यात बाजी सावध झाला आणि क्षणात एका हाताने त्या मुलगी ला बाजू करत आपली तलवार त्या वाघावर रोखली....!

बाजी ची तलवार पाहताच त्या वाघाने सपशेल माघार घेतली.
हे पाहताच बाजी ला नवल वाटले...तो सर्वत्र पाहू लागला...ही सारी जनावरे माझ्यासाठी इथवर आली आहेत याचे त्याला खूपच नवल वाटले...!
त्याने पुढे होऊन सर्वांच्याकडे पाहत जोरात आरोळी ठोकली..."थांबा".....!

त्याचा तो गगणभेदी आवाज ऐकून सारे पशु पक्षी स्तबद्ध झाले...हे पाहताच हुसेनखान सुद्धा भारावून गेला...!

चला मागे...जावा निघून...यांना आपली चूक समजली आहे....जावा निघून...!

बाजीचे हे शब्द ऐकताच सर्व सर्व किडा कीटक मुंगी,सर्प,हत्ती,वाघ,अस्वल,सिंह जसे आले होते तसे निघून गेले ....!

एव्हाना हुसेनखानाची निम्म्यापेक्षा जास्त फौज मृत्युमुखी पडली होती,उरलेली जखमी होती...!

या हिंस्त्र प्राण्यांना केवळ शब्दाने मागे घालावंणारा हा वीर कोण याचे कुतूहल हुसेनखानाला लागले होते.
त्यांने बाजी च्या रुपात दैवी अवलीयाला पाहिले आणि त्याच्या पुढे गुडघे टेकून त्याच्या समोर नतमस्तक होऊन तलवार आडवी धरली...!

बोलला...ज्याच्या केवळ नावाने मोगली दरबारातील मोठमोठे सरदार अदबीने झुकतात, ज्याची तलवार शत्रूचे रक्त पिऊन मगच म्यानात जाते असा मी हुसेनशहा महम्मदशाही तुझ्यासारख्या विरासमोर शरण जात आहे....!

क्रमश
✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या

Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)

बाजींद

भाग क्र.१५ वा..!

~~~~~~~~~~~~~~~~~~~~

✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या

Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

समोर काय आक्रीत घडत आहे हे खुद्द बाजी ला सुद्धा समजत नव्हते.
केवळ कुतूहल,करमणूक म्हणून वन्य प्राण्यांशी आजवर त्याने संवाद साधला होता,ते वन्य प्राणी आज त्याच्यासाठी धावून आलेच पण चंद्रगड वर आलेल्या आस्मानी संकटाला त्याच्या पायाशी लोळण घ्यायला लावत होते हे पाहून तो मनोमन थक्क झाला होता...!

एक श्वास घेत त्याने समोर गुडघे टेकून तलवार दोन्ही हातात आडवी करुन मान झुकवून बसलेल्या हुसेनखानाच्या दोन्ही खांद्याना धरुन उठवले व बोलू लागला...उठिये खांनसाहेब..किसीके सामने झुकना एक वीर को शोभा नही देता...और आप तो महावीर है..!

बाजींचे ते आपुलकीचे बोलणे ऐकून हुसेनखानाने तलवार फेकून देऊन बाजी ला मिठी मारली....तो बोलू लागला..

काबुल से लेकर कंदाहार तक,और काश्मीर से लेकर कन्याकुमारी तक मेरी पुरी जिंदगी जँग मे चली गयी लेकिन आप जैसा तीलस्मी सुरमा बहाद्दर नही देखा जिसके एक इशारो पे माशाअल्ला जंगल के बेरहम जानवर भी चूप हो जाते है... अल्लाह के शरीफ बंदे कौन है आप ?

बाजी गालात किंचित हसला व बोलू लागला...

खानसाहब.. मै राजे चंद्रभान सरदेसाई का पुत्र बाजी सरदेसाई हु...चंद्रगड सलतनत का रखवाला...!

चंद्रगड.....मै तो समझा था की चंद्रगड जैसी मामुली सलतनत के लिये बादशाह हमे भेज कर मेरा अपमान कर रहे है...लेकिन आप जैसे सुरमा से मिलकर मेरा यह भरम टूट गया....आज से केवल चंद्रगड ही नही ये पुरा इलाका आज से आपका है...आ जाओ हमारे गले लग जाओ...!

दोन्ही वीरांची कडकडून मिठी झाली आणि दोघेही शाही तंबूत गेले.
जनावरांच्या हल्ल्यात शेकडो मेलेली प्रेते एका बाजूला,जखमी एका बाजूला अशी प्रतवारी करत विल्हेवाट व उपचार सुरु झाले.

नुराजहाँन ही हुसेनखानाची लेक.
हुसेनखानाला मुलगा नसल्याने त्याने आपल्या मुलीला मुलासारखे वाढवले होते.
मोगली मोहिमेत नूरजहान स्वता वडिलांच्या सोबत येत असे.
तिला तर रात्रीच्या प्रकरणाचा खूप धक्का बसला होता.
वरवर शांत,हिरवेगार दिसणारे हे जंगल किती महाभयानक आहे तिचा प्रत्यय तिला आला होता.
मोगलांची शूर सेना ते राक्षसी हत्ती सोंडेने उचलून धुणे आपटतात तसे आपटून मारत होते,वाघसिंहांनी कित्येक वीरांच्या नरडीचा घोट घेतला होता,काळवीटाची शिंगे पोटातून आरपार जाऊन आतडीच बाहेर काढत होता,कित्येक अजगरे सैनिकांना पिळखा देऊन हाडांचा चुरा करत होते,कित्येक अस्वलांची नखे हृदय फाडून हातात घेत होती...साप,विंचू कीटकांची तर किती शिकार झाली असतील त्याची मोजदाद नव्हती.
आणि ती क्रूर जनावरे किंबहुना किडे मुंगी साप सुद्धा ज्याच्या आज्ञेने माघारी गेले तो "बाजी" काय प्रकार असेल असा विचार करत ती उभी होती.

जिवाच्या भीतीने त्या रात्री कित्येक सैनिक बिथरले होते,त्यांना धीर देण्याची ती काम करत होती तितक्यात खुद्द बाजी तिथे आला,आणि त्याला पाहून पुढचे सैनिक भीतीने पळूनच गेले....!

बाजी ला पाहताच नुराजहान ने पदर सावरत मागे हटली....!

बाजी बोलू लागला....

आप औरत होकर इतनी अच्छि तलवार चलाती है..यह देखकर हम बहुत खुश हुये....!
आमच्या पुऱ्या हयातीत एखादी स्त्री सुद्धा इतकी अप्रतिम लढू शकते हे पाहून खरोखर नवल वाटले..."

शुक्रिया...पण काल रात्री आम्ही तुमची जी करामत पहिली ती केवळ दैवी करामत होती...कुठून शिकलात ही विद्या...?

नूरजहान चे मराठीवर प्रभुत्व पाहून बाजी आश्चर्याने बोलला....तुम्ही मराठी सुद्धा बोलता हे नवल आहे...!

नूरजहान बोलली...हो माझ्या खूप मैत्रिणी मराठी आहेत व गेली 5 वर्षे महाराष्ट्रात आहे...मराठी बोलू,समजू शकते मी...."

खूप छान....तुमची तलवार आणि भाषा दोन्हीही आम्हाला आवडल्या...आमच्या गावचा आपण पाहुणचार स्वीकारावा यासाठी मी आपणास आमच्या गावी चंद्रगड ला तुम्हास व तुमच्या वडील फौजेसह उद्याचे आमंत्रण देतो..!

किंचित लाजून ती बोलली...जरुर...आम्ही सर्व येऊ..असे बोलून ती निघून गेली...!

बाजी ने दस्तुरखुद्द हुसेनखानला फौजेसह गावात येण्याचे आमंत्रण देऊन बाजी त्याच्या पक्षा घोड्यावर त्याच्या अंगरक्षकासह दौडत गेला....!

इकडे सारे चंद्रगड राजे चंद्रभान च्या महाला समोर गोळा झाले होते.
रात्रभर गगनभेदी किंचाळ्यांनी साऱ्यांच्या काळजाचा ठाव घेतला होता.
4 हजाराच्या विरुद्ध शे दोनशे धारकरी कसे टिकणार ?
रात्रीच फन्ना उडाला असणार अशी काळजीची कुजबुज सुरु झाली होती.
आता सारे संपणार...300 वर्षे रक्ताचे पाणी करुन स्वाभिमान जपत मानाने चंद्रगड चे स्वातंत्र्य अबाधित ठेवलेले चंद्रभान व त्यांचे वंशज त्यांच्या त्यागाची हि निर्वाणीची वेळ..!
उद्या हुसेनखान व मोगली फौजेचा लोंढा चंद्रगड वर कोसळणार आणि सारे सारे नष्ट होणार..!
डोळ्यांच्या कडा ओलावत, आवंढा गिळत,मोठा श्वास घेऊन राजे चंद्रभान सार्या गावकर्यांना उद्देशून बोलले.

"गड्यानो,प्रसंग बाका आहे.आपला स्वाभिमान,स्वातंत्र्य जर टिकवायचे असेल तर आता सर्वांनी हातात शस्त्रे घ्या...जर जिंकाल तर इतिहासात अमर व्हाल आणि हारलात तर हुतात्मा व्हाल...आपली तरणी ताठी पोर काल त्या छावणीवर तुटून पडली...त्यांचे जीवाचे काही बरे वाईट झाले असेल आणि नसेल ही... आपण सर्वांनी मरेपर्यंत लढायचे....बोला....आहे मंजूर ????

मंजूर....मंजूर.....

सारा गाव एका सुरात बोलला आणि तितक्यात चंद्रगड च्या समोरच्या डोंगरातून धुळीचे लोट उडू लागले...चौताड थडाडत घोड्यांच्या टापा कानावर येऊ लागल्या....सर्वांनी नजर रोखून पाहिले आणि काळजातून आनंदाची लकेर उडाली.......बाजी......बाजी....बाजी.......!

राजे चंद्रभान धाय मोकलून रडू लागले...त्यांना विश्वास बसेना की दौडत येणारे अश्वपथक चंद्रगड च्या विजयाचे निशाण आकाशात फडफड करत येत होते....!

सारा गाव त्यांच्या स्वागताला पुढे गेला.......

बाजी व त्याचे सहकारी गावातील मुख्य प्रवेशद्वारातून आत आले आणि गावकऱ्यासमोर घोड्यावरून पाय उतार झाले.
सुवासिनी हळद कुंकू लावून त्यांचे औक्षण करु लागल्या....गावकरी फुले उधळू लागली....!

चंद्रगड चे स्वातंत्र्य अबाधित राखून विजयाची परंपरा प्रतिकूल परिस्थितीत कायम ठेवत वाघासमान चालत आणि सार्या गावचे अभिनंदन स्वीकारत बाजी चंद्रभान राजांच्या दर्शनाला निघाला.....!

बाजीने वडिलांचे दर्शन घेतले व सविस्तर घडलेला प्रकार त्यांच्या कानावर घातला.
चंद्रभान ला विश्वास बसेना की उद्या हुसेनखान फौजेसह आपल्या गावात भोजनास येणार आहे.
त्यांने सर्व गावकर्यांना बोलावून उद्या भोजनाचे नियोजन करायचा आदेश दिला...!

दिवस उगवला ,कोंबड्याने बांग दिली आणि चंद्रगड च्या समोरच्या डोंगरावरून चांद सितारा असलेला मोगली ध्वज व मागे समुद्रासारखी मोगली फौज दिसू लागली....!

सारा गाव आनंदात होता,येणाऱ्या पाहुण्यांचा पाहुणचार करण्यात जे ते व्यस्त होते...!

आणि मजल दरमजल करत हुसेनखान मोगली फौजेसह चंद्रगड मध्ये डेरेदाखल झाला.
गावाला यात्रेचे स्वरुप आले.
प्रत्येक गावकरी तळमळीने आपल्या पाहुण्यांचा पाहुणचार करण्यात व्यस्त होता.

हुसेनखान व नूरजहान राजे चंद्रभान यांच्या महालात आदरातिथ्य स्वीकारत गेल्या.
शिंग,तुताऱ्या,हलगी या मराठ्मोठ्या पद्धतीने त्यांचे स्वागत झाले.
राजे चंद्रभान व हुसेनखान यांच्या राजकीय चर्चेला रंग चढला....!

बाजी ने नूरजहान ला सारा महाल फिरवून दाखवला.

नूरजहान बोलली....राजाजी,तुमच्या पाहूनचाराने आम्हाला आमच्या आईची आठवण झाली.
खूप चांगले लोक आहेत तुमच्या गावात,आम्ही हा तुमचा पाहूनचार कधीही विसरणार नाही...!

नूरजहान च्या बोलण्याने बाजी किंचित हसला व बोलू लागला.....

पाहुणा हा चंद्रगड वासियांना देव असतो,आणि देवाचा पाहूणचार करणे हे पुण्याचे काम आहे...!

दोघांचीही नजरेला नजर भिडली आणि एका अनामिक आकर्षणात दोघेही बांधले गेले,आणि दुनियेचा विसर पडला,दोघेही एकमेकांच्या मिठीत विसावले....देहभान विसरुन ते क्षणभर तसेच बाहुपाशात अडकले गेले होते...!
जगाचा त्यांना विसर पडला होता....शरीरे दोन मात्र मने एक झाली होती...एक अशी अनुभूती ज्यात आता मिळवायचे असे काहीच राहिले नाही असा अनुभव येतो....यालाच प्रेम म्हणतात का ?
नक्कीच....प्रेम प्रेम म्हणतात ते हेच....आयुष्यात ज्याने केले आहे त्यालाच हे समजणार...!
नाही..बिलकुल नाही...ज्याने कधी केलेच नाही फक्त त्यांनाच हे समजणार....!

•●●क्रमश: ●●•
✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)

बाजींद
भाग क्र.१६ वा.
~~~~~~~~~~~~~~~~~~~~
✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

वर्षानुवर्षे पावसाच्या केवळ एका थेंबाची तहान घेऊन आसुसलेल्या जमिनीवर एकाकी धुव्वाधार पावसाने सुरवात करावी,जमीनीच्या धुंद सुवासाने आसमंत दरवळून जावा आणि सारी सृष्टी तृप्त व्हावी...अगदी असेच काहीसे नुराजहाँ आणि बाजी च्या अंतर्मनात घडत होते.
एक आनंदाची अनामिक लकेर त्यांच्या सर्वांगात उठली होती.
एकमेकांच्या मिठीत स्वर्गीय सुखे अपुरी पडावीत अशी अवस्था....!

असेच काही क्षण गेले अन बाजी भानावर आला,त्याने नुराजहाँ चे बहुपाश मोठ्या मुश्किलीने सोडवले आणि एक स्मित हास्य करत बोलू लागला...!

राजकुमारीजी.. क्या जमीन और आस्मान कभी एक हो सकता है...?
माझी आणि तुमची भेट या जन्मात तरी शक्य आहे ?

यावर नुराजहाँ बोलली...!

क्यो नही राजाजी....नक्कीच...आजवर आयुष्यात जणू काही तुमचीच वाट पाहत मी जगत होते की काय असे वाटत आहे...!

दिघेही स्मितहास्य करत महाराज व हुसेनखान जिथे चर्चेत बसले होते तिथे पोहचले..!

एव्हाना सार्या गावाला यात्रेचे स्वरूप आले होते.
सर्व गावकरी मोठ्या आनंदाने हुसेनखानांच्या फौजेच्या पाहूनचारात व्यस्त होते.!

आजची रात्र सारे इथेच मुक्काम करणार होते,व उद्या दिवस उगवण्याआधी गाव सोडून जाणार होते ते कायमचेच....परत कधीही चंद्रगडवर कोणताही बादशाही अंमलदार येणार नव्हता..!
चंद्रगड चे स्वातंत्र्य अबाधित राहणार होते...!
सर्व गावकरी आनंदात होते.

राजे चंद्रभान यांच्या महालात हुसेनखान सह बाजी व नुराजहाँ यांची चर्चा रंगली होती.

हुसेनखान बाजीला बोलला...!

राजाजी..आप जितने बहादूर है,आपके पिताजी भी आपसे ज्यादा बहाद्दर है...!
राजनीती के बारे मे इनके जैसा ज्ञान मैंने आजतक किसीसे नही सुना...!

हमे फक्र है,इस दख्खन की मूहीम मे हमे आप जैसे दोस्त मिले..!
जब हम आग्रा जायेंगे आपके लिये बादशाह से जरुर दरख्वास्त करेंगे...!

यावर राजे हसत उत्तरले....!

जरुर खानसाहेब...आजवर मोगलांच्या अन्याय,अत्याचाराच्या कथा ऐकत आम्ही मोठे झालो.
आपल्यासारखा नेकदील सिपेसालार भी मोगल फौज मे हो सकता है...सचमुच हम सारे हैराण है...आपकी दोस्ती का कर्ज हम चंद्रगड के लोग कभी नही भुलेंगे...!

सर्व हसत उठले...!

बाजी राजे..क्यो न आप हमारी बेटी को आपका चंद्रगड नही दिखा लाते...!
आपकी जानवरोन की भाषा का रहस्य जरुर बताईये..!
हम और राजसाब अभी खूब बाते करेंगे..!

नक्की खानसाहब...हम राजकुमारीजी को चंद्रगड घुमाकर लाते है...शाम होणे तक हम लौट आयेंगे..!

असे म्हणून बाजी व नूरजहा निघून गेली..!

आपल्या "पक्षा" घोड्यावर मांड ठोकली आणि नुराजहाँ ने तिच्या घोड्यावर मांड ठोकून ते दोघेही दौडत चंद्रगड च्या जंगलात निघाले....!

बाजी च्या जंगलात येताच सर्व पशु पक्षी जनावर कीटकांनी एकच कल्लोळ माजवला...!

जे ते त्याच्या जवळ येऊ लागले...!

त्या जनावरांना पाहून बाजी स्मित हास्य करत नुराजहाँ ला बोलला.....!

राजकुमारीजी हे सर्व माझे सवंगडी पहा...यांच्याशिवाय मी काहीच नाही.
माझा दिवस-दीवस या सर्वांच्यासोबत जातो.
चंद्रगड ची खरी दौलत म्हणजे ही जनावरे आहेत...या सर्वांची भाषा मला समजते.
यांचे सुख दुःख सर्वकाही हे मला सांगतात व मी त्यांची माझ्या माझ्या परीने मदत करतो..!
खूप मजा येते यांच्यासोबत जीवन जगण्यात...!

यावर आश्चर्य व्यक्त करत नुराजहाँ बोलली...पण राजसाहब...या हिंस्त्र पशूंची भाषा तुम्हास कशी काय अवगत

आहे ?
खरोखर हा केवळ चमत्कार आहे.
एखाद्या देवदूतालाच ही भाषा समजु शकते..खरोखर आम्ही सर्व तुमच्यापुढे नतमस्तक आहोत.

यावर हसत बाजी उत्तरला.
काही नाही राजकुमारी...एकदा एकमेकांची मने समजू लागली की जगातल्या सर्व भाषा एकच आहेत याची अनुभूती येते..!
प्रत्येक प्राण्यांचे एक वेगळे विश्व असते,प्रत्येकाला समस्या,संकटे असतात...पण मन मोकळे करायला कोणीच नसते...ज्याला आपले आपले म्हणत असतो...ते सुद्धा आपल्या माणसांची मने ओळखायला अपुरे असतात..!
बघा ना...हा ची ची करणारा प्रचंड हत्ती..पण मनाने खूपच हळवा आहे....बिचारा सर्व गोष्टी मला सांगत असतो.
हे वाघ,सिंह,सर्प,विंचू....सर्वच्या सर्व बोलू शकतात.
त्यांनाही मन आहे...फक्त मनुष्य आणि ते यांच्यातील अहंकाराचा अभेद्य पडदा जोवर लंघून आपण पुढे जात नाही...तोवर..बोलणाऱ्या माणसांचीही मने आपण समजू शकणार नाही.....!

त्यांच्या दोघांची ही चर्चाच सुरु असतानाच एक घार उंच आकाशात घिरट्या घालत घालत मोठ्याने आवाज करत खाली येऊ लागली आणि बाजींच्या अंगावर सर्दिशी काटा आला...त्याने कान टवकारून त्या घारीकडे पहिले आणि बेभान होऊन तो पक्षा घोड्यावर स्वार झाला आणि बेताल दौडत चंद्रगड च्या वाटेला लागला...!

त्याच्या पाठोपाठ नुराजहाँ पण निघाली...तिला काही समजेना की बाजी असा बेभान होऊन का निघाला आहे...ती त्याला हाका मारत होती ,पण काहीच ऐकण्याच्या मनस्थितीत तो नव्हता..!

त्याला घारीच्या एकसारख्या ओरडण्याचा अर्थ समजला होता......बाजी...तुझ्या चंद्रगड ची राखरांगोळी उठली आहे.
हजारो पठाण एका दिवसात जंगल पार करुन तुझ्या राज्यावर तुटून पडले आहेत...तुझी माणसे मरत आहेत....तुझ्या गावात आलेला हुसेनखान तुझा मित्र नसून तुझा घात करायला आलेला तुझा शत्रू आहे..."

बाजी च्या डोळ्यात आग होती.
त्याचे दौडणे बेभान झाले आणि लांबूनच लोकांच्या गगनभेदी किंचाळया त्याच्या कानी पडल्या...असंख्य लोक मोगली तलवारीखाली कापले गेले होते...शेकडो पठाण हातात नंग्या तलवारी घेऊन मुलाबाळांच्या कत्तली करत होते.
बाजी चा राहता महाल पेटला होता....सारे नष्ट झाले होते..!
राजे चंद्रभान हे हुसेनखानाशी लढता लढता गतप्राण झाले होते....!

काहीच शिल्लक नव्हते...केवळ मोगली अत्याचार दिसत होता...!

बाजी च्या डोळ्यात आता रक्त उतरले होते...समोर ते धिप्पाड मोगली हशम हातात रक्ताळलेल्या तलवारी घेऊन चंद्रगड वासीयांची कत्तल करत होते.
गोड बोलून आपला व आपल्या वडिलांचा केलेला हा विश्वासघात त्याला जिव्हारी लागला होता.

बाजी ने कमरेची तलवार उपसली आणि तुफान दौडत असलेल्या घोड्यावरून झेप टाकली ती सरळ समोर कत्तल करत असलेल्या हशमाच्या छातीवर.

तलवार छातीतून आरपार करत बाजी ने आकाशाकडे पाहत एक गगनभेदी किंचाळी फोडली आणि समोर दिसेल त्याचे तुकडे करु लागला..!

सळसळत्या नागिणीसारखी तलवार फिरू लागली आणि जो आडवे येईल त्याची खांडोळी उडू लागली.
बाजी ने केवळ एकट्याने तुफान कत्तल मांडलेली पाहून नुराजहाँ ने सुद्धा समशेर उपसली आणि तिनेही लढा सुरु केला.
आता हि लढाई केवळ बाजी ची नव्हती...तिची सुद्धा होती.
प्रत्यक्ष तिच्या बापाने असा घोर विश्वासघात केलेला तिला मनस्वी दुःखी करून गेला होता.
आता मरण आले तरी बाजी सोबत मरायला ती सिद्ध झाली आणि तिची समशेर तिच्याच फौजेचे रक्त पिऊ लागली..!

बाजी च्या किंचाळन्याने जंगलातील सर्व प्राणी चंद्रगड कडे दौडू लागली.
विषारी सर्प,काटे फेकणारी साळींदर, चित्ते,वाघ,सिंह,अस्वले,हत्ती...शेकडो प्राणी आपल्या जिवलग मित्रासाठी चंद्रगड वर तुटून पडले....आणि बाजी च्या एकाकी लढ्याला बळ मिळाले...!

हत्तीच्या पायाखाली कलिंगड फुटावे तसे मोगली सैनिकांची मुंडकी फुटू लागली.
सर्पां चावल्याने तोंडात फेस येऊन सैनिक मरु लागले...!
वाघ सिंह तर चिंध्या फाडाव्यात तशी माणसे फाडून टाकू लागळी.
साळींदराची काटे गळ्यात घुसत प्राण घेऊ लागली...!

आणि बाजी व नुराजहाँ ची तलवारी तुफान कत्तल करु लागली.

बघता बघता निम्म्यापेक्षा जास्त फौज कत्तल झाली होती.
जवळपास दोन तास चाललेले हे महाभयानक थरारनाट्य आता रंगात आले होते.

नुराजहाँ पुरती दमली होती.
तिच्या सर्वांगातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या होत्या.
तिला चक्कर आली आणि ती तोल जाऊन पडली.

कत्तल आणि मरणाच्या भीतीने सारी फौज डोंगरवाटेने पळू लागली आणि बाजी चे लक्ष नुराजहाँ कडे गेले..!

त्याने क्षणात तलवार टाकली आणि तिची मान आपल्या हाती धरुन तिला सावध करु लागला...!

आता तिच्याशिवाय बाजी चे कोणी नव्हते....ती सावध झाली.

प्रचंड जखमेने रक्त खूप गेले होते..!

ती बोलू लागली.....राजे,मला माफ करा.
माझ्या वडिलांनी तुमचा क्रूर विश्वासघात केला ,तुमच्यासाठी मला मरण आले,मी माझे पाप माझ्या रक्ताने धुवून जात आहे......तुमच्यासारखा वीर मी आजवर पहिला नाही....तुम्ही बाजी नाही...तर बाजींद आहात....बाजींद....बाजींद....!

असे बोलत नुराजहाँ ने डोळे मीटले...!
सार्‍या चंद्रगड बरोबर आयुष्यात प्रथमच केलेले प्रेमही बाजींच्या आयुष्यातून कायमचे गेले म्हणून तो उठून उभा राहून जोरजोराने रडू लागला....!

इतक्यात एक बाण सु सु करत आला आणि त्याने बाजींच्या छातीचा वेध घेतला......!
गतप्राण होऊन बाजींचे तो देह खाली कोसळला.

सारे संपले.

तेव्हापासून ते आजतागायत हे जंगल शापीत झाले आहे.
इथे येणारा प्रत्येक माणूस आजवर जिवंत माघारी गेला नाही.
आज 100 वर्षे होऊन सुद्धा बाजींद चे भूत या जंगलात भटकते..!

केवळ आम्हीच नव्हे तर मोठमोठे सत्ताधीश सुद्धा बाजींद च्या जंगलात पाऊल ठेवत नाही...!

आणि आज केवळ तुमच्या अल्लड पणामुळे एका भयानक संकटात आपण अडकलो आहोत...आपण आता बाजींद च्या जंगलात आहोत...आपले मरण नक्की...!

सावीत्री मोठ्या चिंतेत हि सारी कथा खंडोजी ला सांगत होती आणि तो लक्षपूर्वक ते ऐकत होता...!

बाजींद
भाग क्र.१७ वा.
~~~~~~~~~~~~~~~~~~~
✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~~~~~
हुंदका देत रडत असणार्‍या सावित्रीच्या खांद्याला धरत खंडोजी निर्धारी शब्दात बोलला....

सावीत्री....रडू नको.
हा खंडोजी तुझ्या सोबत असताना बाजींद काय..साक्षात यम जरी आला तरी त्याला चार हात करावी लागतील या खंडोजी बरोबर...!

शिवछत्रपतींचा धारकरी आहे मी,आम्हाला भुते लागत नाहीत...उलट भुतानाच आम्ही लागतो.
या खुळचट मनाच्या कल्पना असतात साऊ... असे म्हणत खंडोजी ने तलवार उपसली आणि बोलू लागला...!

आता मला हा बाजींद व त्याचे झपाटलेले जंगल काय आहे याचा उलगडा केलाच पाहिजे..असे म्हणत तो उठला..!

त्याच्या नजरेत त्याच्या विचारांचा ठामपणा होता,दृढ निश्चय होता तो स्वतःच्या मनगटावर आणि चित्तात होते ते शिवछत्रपती.

ही हिम्मत,ही ताकत त्याच्यात आली होती ती शिवाजी महाराजांच्या उत्तुंग जीवनप्रकाशामुळे..केवळ खंडोजीच नव्हे...त्यांचे सारे सारे सवंगडी उरात अशी जग जिंकायची उमेद ठेवत होते...!
मूर्तिमंत जिद्द,प्रेरणेचा झरा...महाराज शिवछत्रपती.

एव्हाना तांबडं फुटलं होत..!
त्याने पुढे होऊन रात्री ज्या आर्त किंकाळीने त्याचे लक्ष वेधून घेतले तिकडे मोर्चा वळवला.

समोरच एक मनुष्याचा देह गतप्राण होऊन पडलेला होता.
जरा निरखून पहिले अन जाणवू लागले की तो भिल्ल असावा.

कदाचित सावित्रीच्या पाठलागात तो इथवर पोचला असावा आणि "बाजींद" च्या येण्याने घाबरुन इकडे तिकडे लपला असावा व रात्री त्याला कोणीतरी ठार केले असावे...!

एक मोठा श्वास घेत खंडोजी ने सावीत्री चा हात धरला.
हातावर शिरक्याचे वैभवाचे प्रतीक उगवता सुर्य गोंदनाने गोंदले होता...!

खंडोजी बोलला...साऊ मला सांग...जर बाजींद तुझ्या समोर होता,तर त्याने तुला का ठार केले नाही ??

काहीशी घाबरत ती बोलली,

काल मी इथे पोहोचले आणि ती भयानक घटना घडली.
वेगवेगळी हिंस्त्र जंगली प्राणी किंचाळत होती.
मी क्षणात ओळखले की भिल्लांच्या भीतीने मी बाजींद च्या हद्दीत पाऊल ठेवले आहे.
आणि काल मी त्याला पाहिले.
घारे डोळे,कोवळी दाढी,अनामिक असे गूढ हास्य आणि सभोवतालच्या अणुरेणुचा स्वामी असल्याची एक प्रकारची मग्रुरी दिसत होती त्याच्या स्वभावात..!

माझी भीतीने गाळण उडाली होती,समोर दोन वाघ माझ्याकडेच येताहेत हे पाहताच मला मूर्च्छा आली..!
परत तो कुठे गेला मला काहीच आठवत नाही..!

जेव्हा जाग आली तेव्हा 2 भिल्ल अजूनही माझ्या मागावर होते,ते माझ्या शुद्धीवर येण्याची वाटच पाहत बसलेले होते.
मी सावध होताच वासनात्मक नजरेने ते हसू लागले,मी त्यांच्यावर हल्ला करत मागे पळून जाण्याचा तयारीत होते तितक्यात जंगलात पुन्हा जनावरांच्या किंचाळया पडल्या व माझ्याअगोदर तेच भिल्ल धाऊ लागले..!

धावता धावता मी इथे पोहोचले तर दुरुनच तुम्ही येताना दिसला आणि माझे हृदय अक्षरशः आनंदाने भरुन गेले,जणू माझे आपलं कोणी माझ्यासाठी इथवर आले आहे..!
मी क्षणात तुमच्या मागे येऊन तुमचे तोंड दाबत इथे लपवले आणि समोर या भिल्लाला कदाचित बाजींद किंवा त्याच्या जनावरांनी मारुन टाकले असावे...!

सर्व प्रसंग सांगत असताना सावीत्री गहिवरून रडू लागली अन खंडोजीच्या मिठीत विसावली..!
तिच्या आकस्मित मिठीने खंडोजीच्या सर्वांगातून जणू वीज थरारली...!
त्याने तिला समजवत तिची मिठी सोडवली...तो बोलू लागला...!

"साऊ... तुला पहिल्यांदाच पहिले अन आयुष्यात प्रेम कशाला म्हणतात याची अनुभूती आली.
तु बेरडाशी एकटी सामने गेलेले ऐकले आणि माझ्या हातातून काही सुटत आहे असे वाटू लागले आणि मी कोणताही विचार न करता मोहिमेवर असूनही कर्तव्य विसरुन तुझ्यामागे आलो...मी जर तुला जंगलातून घेऊन आलो नसतो तर तुलाही गमावून बसलो असतो आणि माझे कर्तव्य सुद्धा...!
माझे जितके तुझ्यावर प्रेम आहे तितकेच माझ्या कर्तव्यावर...असे म्हणत त्यानेही साऊ ला मिठी मारली...दोघेही काही क्षण तसेच उभे होते...!
माझ्यावर विश्वास ठेव..मी सर्व ठीक करेन..!

काही क्षण गेले आणि जंगलात पुन्हा बाजींद च्या येण्याची चाहूल लागली.
पशु पक्षी जनावरे किंचाळू लागली...!

सावित्रीने क्षणात खंडोजीचा हात धरला आणि म्हणाली...चला...जवळच गुहा आहे...लौकर बाहेर पडूया.... बाजींद च्या तावडीतून जिवंत राहणे सोपे नाही...!

धीराच्या शब्दात खंडोजी बोलला....
साऊ माझ्यावर विश्वास ठेव...मी सामने होते त्याच्या...साधले तर 100 वर्षाची तुमची कल्पना खोटी ठरेल..आणि तू म्हणतेस तसे खरेच निघाले..तर मात्र असा अनुभव माझ्या हेरखात्याला सांगेन...दोन्ही साधले जाईल..!

असे म्हणत तो जिकडून आवाज येत आहे तिकडे जाऊ लागला....!

दाट जंगलात किर्र झाडीत चित्रविचित्र आवाज येत होते..पुढे जाईल तसे आवाज तीव्र होत होते...आणि एक वळण घेतले तो पुढे ते विहंगम दृश्य दिसले..!

कमरेला तलवार अडकवून तो धीरगंभीर पुरुष एका मोठ्या दगडावर उभा होता..आसपास जंगली जनावरे बसली होती...!

खंडोजी व सावीत्री ला पाहताच बाजींद ने स्मित हास्य केले आणि जोरात गर्जना केली....!

"स्वागत आहे योध्या ,तुझे मी माझ्या जंगलात स्वागत करतो...असे बोलत तो दगडावरून खाली झेपावला...!

खंडोजी ला काहीच समजेना काय घडत आहे ते...हे भूत असेल तर हवेत का उडत आले नाही...जर नाही तर 100 वर्षे जगलेच कसे...डोक्यात प्रश्नांचे काहूर माजले...सावित्रीच्या तर हृदयाची घालमेल सुरु झाली...!

प्रसंगाचे गांभीर्य राखत खंडोजी ने तलवार समोरून चालत येत असलेल्या बाजींद वर रोखली...!
ते पाहताच पक्षी,कीटक आणि प्राण्यांनी पुन्हा जोरात आवाज वाढवला..वाघांच्या डरकाळ्या फुटल्या...पण शांत बाजींद ने हात वर केला तसे सर्व प्राणी शांत झाले....!

त्याने मोठ्या आवाजात एक गूढ आवाज काढला...तो एक सांकेतिक आवाज होता,क्षणात सारी जनावरे,पशु,पक्षी तिथून निघून जाऊ लागले...जंगल एकदम मोकळे भासू लागले..!

समोर चालत येत असलेल्या बाजींद ने पुन्हा दोन्ही हात वर केले आणि डोळे मिटून पुन्हा एक गूढ आवाज केला...क्षण,दुसरा क्षण...जंगलाच्या बाजूने शेकडो घोडेस्वार हातात तलवारी,भाले घेऊन हजर झाले..!

सारे जंगल स्वारांच्या गर्दीने भरून गेले...त्यातल्या एका स्वाराच्या हातात भव्य असा परमपवित्र"भगवा ध्वज" होता...!

खंडोजीने हातातील तलवार टाकली...तो पुटपुटला...भगवा जरीपटका ...?

ज्याच्यासाठी हजारो वीरांनी आयुष्याची होळी करुन ,रक्त सांडून हिंदवी स्वराज्य शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली निर्माण केले...असा स्वराज्याचा भगवा ध्वज त्या स्वाराच्या हातात पाहताच...खंडोजी कमरेत झुकला....एक ...दोन...तीन....मानाचे तीन मुजरे त्याने त्या परमपवित्र ध्वजाकडे पाहून केले...!

•●●क्रमश●●•

✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)

बाजींद चे पूर्वीचे भाग खालील लिंकवरुन वाचा..!
https://facebook.com/kustimallavidya/albums/583649891795060/?ref=content_filter

बाजींद
भाग क्र.१८ वा.
~~~~~~~~~~~~~~~~~~~~
✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~
खंडोजी ने एक दीर्घ श्वास सोडला आणि त्या चौघांकडे एक दृष्टिक्षेप टाकला.
सर्जा,सखाराम,नारायण आणि मल्हारी गंभीर पणे खंडोजी भूतकाळ त्याच्याच तोंडून ऐकत होते..!

एव्हाना खूप दूर आपण चालत आलो आहोत याची जाणीव त्या पाचही जणांना झाली.

सखाराम बोलला....खंडोजीराव,तुमची कथा लईच भारी वळणावर गेली हाय गड्या.
जित्रापांच आवाज बी वळकता येत्यात हि मातूर नवालच हाय...!

नवाल ?
नवाल नव्हे...महाआश्चर्य होते ते.
खंडोजी बोलून गेला.

सर्जा मध्येच थांबवून सखाराम ला बोलला...कारभारी हि कथा ऐकत लई लांब आलूया आपण..निदान खंडोजीराव निदान सांगा तरी अजून कितीसा दूर जायाचं हाय आपणासनी ?

खंडोजी बोलला...झालं..अजून एक दोन कोसावर जंगलात एक गुहा लागेल..!
तिथे पोहचला कि आमचे वस्ताद काका भेटतील.
तेच तुम्हाला पुढे शिवाजी महाराजांच्या खासगीत घेऊन जातील आणि तुमचे काम मार्गी लागेल..!

यावर मल्हारी बोलला...वस्ताद घेऊन जातील म्हणजे तुम्ही नाही का येत सोबत ?
खंडोजीकडे पाहत मल्हारी बोलला.

मी नाही येऊ शकणार गड्यानो...माफ करा.
मला माझ्या कर्तव्यात कसूर नाही करता यायची.
मी मोहिमेवर असलेला शिपाईगडी,अजून मला सावित्रीला शोधायची आहे.

पण,तुम्हाला मी वाट दाखवतो गुहेची...तिथं गेलात की मी,सावीत्री तुम्हाला भेटलो होतो हे सांगू नका काकांना.
विनाकारण आमची काळजी करत बसलेले असतात,उलट त्यांना सांगा...खंडोजी आणि सावीत्री आयुष्यभर
स्वराज्य आणि भगव्यासाठीच जगतील... आणि त्यासाठीच मरतील..!
खंडोजी खिन्न पणे बोलला..!

पण,नकाच बोलू त्यांना की मी तुम्हाला इथवर आणले आहे.

यावर सखाराम बोलला..अहो,पण ते विचारतील ना की एवढया गुप्त वाटेने तुम्ही कसे काय आला ते ?

थोडा वेळ शांत राहून खंडोजीने त्याच्या दंडावर बांधलेली चांदीची पेटी काढली आणि सखाराम च्या हातात देत
बोलला...वस्ताद काका काही विचारायच्या आत ही पेटी त्यांना दाखव आणि परवलीचा एक शब्द सांग
त्यांना......"चंदन"

सखाराम ने ती पेटी जवळ घेतली आणि खंडोजीकडे पाहत बोलला...

बर मग आम्ही चौघेच जाऊन येऊ म्हणता वस्तदाना भेटायला ?

होकारार्थी मान हालवत खंडोजी बोलला ,होय सखाराम ..तुम्ही तुमची टकमकाची समस्या बोला त्यांना...ते
लगेच तुम्हाला खाजगीकडे पत्र देऊन रवाना करतील.
तिकडे गेला की तुम्हाला शिवाजी महाराजांना भेटायला मिळेल आणि तुमची समस्यां कायमची सुटेल...!

हे ऐकताच चोघांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहू लागला...!

चला,अजून 1-2 कोस मी तुमच्यासोबत येतो,मग तिथून मी येऊ शकत नाही.
तुमचे काम झाले की मलाही सुटका मिळेल.
आता तुमचे काम ते माझे काम आहे असे वाटू लागले आहे...!

ते पाचही जण पुन्हा जंगलातील ती वाट चालू लागले...!

काही क्षण गेले आणि मल्हारी बोलला...खंडोजीराव पुढे काय झाले हो ,मगाशी सांगता सांगता थांबला....!

खंडोजी हसला आणि पुन्हा भूतकाळात रममाण झाला....!

बाजींद च्या फौजेचा भगवा ध्वज मला व सावीत्री ला धक्का देणारा होता.
तो ध्वज केवळ मराठ्यांची फौज वापरत होती आणि बाजींद तर भूतच आहे असे माझे आणि सावित्रीचे मत
होते.
मग हा काय प्रकार असावा असे माझ्या मनात आले..!

मी मुजरा करुन होताच बाजींद माझ्या समोर आला..

आणि बोलू लागला..

खंडोजी राव...आम्ही तुम्हास व सावित्रीला ओळखतो,जणू काही आजवर आम्ही तुमचीच वाट पाहत आहोत..!

सावीत्री...काल तुझ्या मागे भिल्ल होते आणि तू इथे आलीस तेव्हा तुझ्या हातावर शिरक्याचे चिन्ह पाहताच मी समजलो की तू शिरक्याची सावीत्री आहेस,आणि खंडोजी तुम्ही बहिर्जी नाईकांच्या खास मर्जीतले....!

हे सर्व ऐकताच खंडोजी व सावीत्री थक्क झाली.
आश्चर्याने ते बाजींद कडे पाहू लागले...खंडोजी बोलला...!

पण,तुम्ही कोण आहात ?
100 वर्षे झाली बाजींद च्या कथेला...तुम्ही भूत आहात ??

यावर हसत बाजींद बोलला...भूत ?
होय,जगासाठी आम्ही भुताची फौज आहोत.
भूत म्हणून जगण्यातच आमचे खरे वैभव आहे...!
पण,आम्ही भूत नाही.....!
तुमच्यासारखीच आम्हीही माणसे आहोत.
आम्हालाही 100 वर्षे ज्या गोष्टीसाठी असे जीवन स्वीकारले त्यातून मुक्ती पाहिजे खंडोजीराव,म्हणून आम्ही आजवर तुम्हा दोघांची वाट पाहतोय...!

काय ?
आम्हा दोघांची वाट पाहताय?
खंडोजी आश्चर्याने बोलला....!
मला खरोखर इथे काय घडतंय सांगा...तुम्ही आमची वाट पाहताय याचा काय अर्थ ?
मला जाणून घ्यायचे आहे सर्व...!

बाजींद शांतपणे बोलू लागला..........

त्या दिवशी हुसेनखान व त्याच्या फौजेने केलेली गद्दारी चंद्रगड च्या विनाशाला कारणीभूत ठरली होती.
नूरजहा आणि बाजींद दोघेही गतप्राण झाले होते...चंद्रगड च्या जंगलातील झाडून सारे प्राणी हुसेनखानाच्या फौजेचा बळी घेत होते.
चंद्रगड चे वैभव जळून खाक होत होते...!

दिवस उगवला....सार्‍या चंद्रगड ची मसणवाट झाली होती..!

कोणीही जिवंत नव्हते...ठायी ठायी गतप्राण झालेले वीर दिसत होते...तितक्यात एक पोरगासावळा मुलगा जखमी अवस्थेत बाहेर पडला...!

त्याचे सुर्यकांत नाव ....!

चंद्रगड च्या सरदेसाई घरण्यातलाच त्याचाशी जन्म..!
बाजींद चा चुलत भाऊ...बाजींद म्हणजे सार्‍या चंद्रगड ची शान होती...!
पण,आता सर्व संपले होते.

तो मुलगा हेलखावे खात बाजींद ला शोधू लागला,रात्रीच त्याची लवलवणारी तलवार त्याने पाहिली होती...! दुरुनच ती चमकली आणि त्याने ओळखले, की बाजींद इथेच आहे...!

काळजातुन आरपार गेलेला बाण त्यांने ताकतीने उपसला...रक्ताचा धबधबा सुरु झाला आणि एक आर्त किंकाळी फुटली...!

सुर्यकांत ने जाणले की बाजींद जिवंत आहे.
त्याने धावत जाऊन पाणी आणले आणि बाजींद ला पाजले....बाजींद ने डोळे किंचित उघडले...एक क्षण त्याने सुर्यकांत कडे पाहिले...बाजूला गतप्राण होऊन पडलेल्या नुराजहाँ कडे पाहिले...त्याच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या.....त्यांने क्षणात गळ्यात बांधलेला ताईत काढला व तो सुर्यकांत च्या हातात ठेवला....एका विलक्षण अपेक्षित नजरेने तो त्याच्याकडे पाहत होता आणि डोळे उघडे ठेऊनच तो गतप्राण झाला...!

आपल्या हाती काय देऊन बाजींद गतप्राण झाला आहे,याचे आश्चर्य सुर्यकांत ला वाटले ,त्याने खूप लक्षपूर्वक तो ताईत हाती घेतला.
त्या ताईत च्या आत नक्कीच काहीतरी गूढ होते,त्याने त्या ताइतच्या आत असणारा एक कागद बाहेर काढला...!

त्यावर काही गूढ सांकेतिक चित्रलिपी मध्ये संदेश लिहला होता...!
त्याला काहीच समजत नव्हते,त्याने तो कागद तसाच जपून ठेवला व बाजींद आणि नुराजहाँ च्या पार्थिवाला अग्नी दिला..!
इतर हजारो मृतदेह तो एकटा 4-5 दिवस पुरत होता.

जंगलातील कंदमुळे खाऊन तो जगू लागला.
रोज रात्री झोपताना तो त्या कागदाचा अर्थ लावत होता पण समजत नव्हते...!

एक हत्ती....दोन वाघ....एक नागमोडी वळण घेतलेला साप....पाण्याचा धबधबा......आणि मुंग्यांचे वारूळ..!
बरोबर मध्ये एक सोनेरी रंगात वहीचे चित्र होते..!

ज्याअर्थी मरत असताना बाजींद ने ते त्याला दिले होते त्याअर्थी नक्कीच काहीतरी ते विलक्षण असणार म्हणून तो रोज ते पाहत असे....!

एके दिवशी तो जंगलात फळे,कंद गोळा करत होता आणि पाठीमागून वाघाची डरकाळी त्याच्या कानावर पडली....भीतीने सर्वांग थरारले...चुकून आपण वाघाच्या परिसरात पाऊल ठेवले असावे,त्याने त्वरित तिथून

जाण्यासाठी मागे वळणार इतक्यात वाघाचे ते प्रचंड धूड समोरच उभे होते...!

त्याला पाहताच सुर्यकांत जिवाच्या आकांताने धावू लागला आणि धावता धावता तो एका ओढ्यावर बांधलेल्या लाकडी सेतुवर चढला आणि कडाड कड आवाज करत तो सेतु तुटला...तो ओढ्यात पडला आणि पोहत ओढ्याच्या किनारी लागला.

दम खात तो बसला होता,तेव्हा त्याच्या हाताला एक लालभडक मुंगी चावली...१,२,३,४.....१० हजारो मुंग्या तिथे होत्या....जणू ते जंगल मुंग्यांचे होते...त्या मुंग्यातून जायला एकच वाट होती...ती नागमोडी वाट पाहिल्यावर त्याला काहितरी आठवले...मुंग्या,नागमोडी वाट....क्षणात त्याला गळ्यात बाजींद ने दिलेला ताईत आठवला....त्याने तो काढला...तर बरोबर तसेच चित्र त्या कागदावर होते जसे समोर दिसत आहे....!

त्याने तो कागद समोर धरुन चालू लागला तर समोर एक गुहा दिसली ज्या गुहेवरून पाण्याचा धबधबा पडत होता......!

त्यांने त्या गुहेत प्रवेश मिळवला...अंधारी गुहेत तो धाडसाने चालू लागला.....खूप वेळ चालला आणि त्याला अंधारात दोन हिरे चमकल्याचा भास झाला....त्याने लक्ष देऊन पाहिले आणि अंगावर सर्दिशी काटा आला....ते दोन जिवंत वाघ होते....!

बाजींद

भाग क्र.१९

~~~~~~~~~~~~~~~~~~

✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या

Www.facebook.com/kustimallavidya

Whatsapp - 9850902575

(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)

~~~~~~~~~~~~~~~~~

सुर्यकांत ची चाहूल लागताच ती वाघांची प्रचंड धुडे शरीर झिंझाडत उठू लागली,जणू खूप दिवस ती तिथेच बसून असावीत.

सुर्यकांत ला पाहून त्यांनी मान वर करत प्रचंड डरकाळ्या फोडल्या...गुहेतील अणुरेणु शहारले...!

सुर्यकांत च्या पायाखालची जणू जमीन सरकू लागली असे ते दृश्य होते.

पण,आता माघारी फिरुन धावणे अशक्य होते..एका झेपत त्याचा घास झाला असता.

तो तसाच तटस्थ उभा राहिला.

ते दोनही वाघ बाजूला सरकू लागले..जणू ते काहीतरी खून सांगत असावेत.

सुर्यकांत ला समजेना काय घडत आहे,तितक्यात गुहेच्या प्रवेशद्वारातून भलामोठा हत्ती चित्कार करु लागला.

सुर्यकांत ची विचारशक्ती क्षीण होऊ लागली...पुढे मागे दोन्हीकडून जणू यमादेवाशी गाठ पडली होती.

तो तसाच पुढे धावु लागला...धावता धावता पायाखाली असलेल्या दगडाला ठेचकाळून तो पडला....जमिनीवर वाळलेल्या गवताची गंजी असल्याने त्याला फारसे लागले नाही.
तो उठणार इतक्यात समोर एका चौकोनी दगडावर त्याला काहीतरी वस्तू असल्याचा भास झाला...!

तो धाडस करुन समोर जाऊ लागला आणि बाजू उभा असलेल्या वाघांचे अन बाहेर उभ्या हत्तीचे किंचाळने जास्तच सुरु होते....त्याने त्या दगडावर पाहिलं...!

एका हरणाच्या कातडीमध्ये चौकोनी वस्तू बांधून ठेवल्याचे त्याच्या निदर्शनास आले.
त्याने ते हरणाचे आवलण सोडवले ,आत त्याला एक मजबूत वही दिसून आली...!

कोणत्यातरी प्राण्याच्या कातडीचे पाने असणाऱ्या त्या वहीवार नैसर्गिक रंगाने चित्रविचित्र आकृत्या कोरलेल्या होत्या..!

मोठ्या कुतूहलाने त्याने पहिले पान उघडले...तो वाचू लागला...वाचू लागला....आणि वाचतच राहिला...!

निमिषें,पळे, घटिका भूतकाळात विलीन होऊ लागल्या..तहान भूक विसरुन तो सर्वांगाने जणू डोळे करुन ती वही वाचू लागला...!
पहिला दिवस संपला... दुसरा...तिसरा...चौथा....पाचवा...!

तब्बल पाच दिवस तो आणि ती वही जणू एकरूप,एकजीव झाले होते...!

जेव्हा तो भानावर आला...तेव्हा त्याच्या डोळ्यातून धारा वाहत होत्या...अंगावरील रोमरोम पुलकीत झाले होते..!

तीच दुनिया जी पाच दिवसापूर्वीची होती..तो विचित्र नजरेने पाहत होता..!

भोवताली बसलेले ते वाघ असे का बसले होते इतके दिवस त्याचे रहस्य त्याला समजू लागले...!
विचित्र आवाज करुन त्याने त्या वाघांना जवळ बोलवले...मायेने कुरवाळले व तो थकल्या पावलांनी गुहेच्या बाहेर आला....!

समोर जो बलाढ्य हत्ती उभा होता तो शतश त्याच्यासमोर झुकून उभा होता...

तो त्या विस्तीर्ण जंगलात सर्वत्र मोठ्या आनंदाने पाहू लागला.
ते निर्जीव,निर्मनुष्य,भयप्रद जंगल त्याला विलक्षण सजीव वाटू लागले..!
आनंद अवर्णनीय होता..!

काय असे घडले होते त्याच्यासोबत ??
ती वही, साधी वही नव्हती ती बाजींद ने त्या वन्य प्राण्यांची भाषा समजून घेण्याचे जणू तंत्रच त्यात लिहले होते.
जशी माणसांची दुनिया असते,तशी प्रत्येक जीवांची पण दुनिया असते,भावभावनांचे अनेक खेळ जसे मानवी आयुष्यात होतात,अगदी तसेच पण वेगळ्या पद्धतीने प्राण्यांच्या दुनियेत होतात.
ती त्यांची भाषा शिकायचे जणू सांकेतिक स्फुट विज्ञानच बाजींद ने पुढील पिढीसाठी लिहून ठेवले होते.

ते कुठे व कसे लपवले याची माहिती कोणाला तरी दिल्याशिवाय त्याने प्राण सोडले नव्हते याची जाणीव सुर्यकांत ला झाली.
त्याचे डोळे अश्रूंनी भरुन गेले.

मग मात्र त्याने कंबर कसली.
उजाड झालेल्या चंद्रगड मध्ये पुन्हा जीव फुंकण्याचे ध्येय धरुन त्याने काम सुरु केले.
जंगली जनावरे त्याच्या एका शब्दावर काहीही करु लागली.

पण,जोवर शूरवीर मनुष्याची फौज उभी होत नव्हती तोवर बाजींद ज्या ध्येयासाठी खस्त झाला त्याच्या बलिदानाचे चीज होणार नव्हते,ज्या पवित्र भावनेने त्याने प्राण्याच्या गूढ भाषेचे ज्ञान लिहून ठेऊन त्याचा उपयोग समाजाला करता यावा ती भावना घेऊन उठलेले अनेक स्नातक निर्माण केल्याशिवाय होणार नव्हती.

या गोष्टीचा विचार करत महाराष्ट्रभरातून निस्वार्थी भावनेने प्रतिकूल परिस्थितीत लढत असलेले अनेक वीर सुर्यकांत ने एकत्र जमवले.
प्राण्यांच्या गूढ भाषा जाणणाऱ्या त्याच्या विलक्षण कौशल्याने सर्व त्याला जणू देवाचाच अवतार मानू लागले,पण प्रत्यक्षात तसे नव्हतेच...तो साधाच मनुष्य होता.
पण ज्याने जे काम उभे केले ते मात्र महान होते.
चंद्रगड ला "बाजींद" चे झपाटलेले जंगल बनवले.
इथे पाऊल ठेवणारा परका माणूस परत जिवंत जाणार नाही असा नियम बनवला गेला.
केवळ महाबलेशवर जंगल नव्हे तर अवघ्या महाराष्ट्राच्या आख्यायिकेत बाजींद बद्दल बऱ्याच अंधश्रद्धा पेरल्या गेल्या आणि ती शे दोनशे वीरांची टोळी देशासाठी जगू लागली.
पण,मर्यादा राखून..!
उभा आडवा महाराष्ट्र पारतंत्र्यात असताना शे दोनशे वीर उठून बंड कसे उभा करतील.
अशक्य होते ते,आता ते सर्व शोधत होते एक संधी.
सुर्यकांत ब्रम्हचारी राहिले व त्यांच्या फौजेतील सर्वात निस्वार्थी व पात्र धारकऱ्याला ते गूढ ज्ञान देत असत व त्याला "बाजींद" म्हणून सेनेचे नेतृत्व देत असत..!
100 वर्षे झाली हाडमांस शिंपून आम्ही हे बाजींद चे जंगल व दहशत टिकवून आहोत.

मी सध्याचा "बाजींद" या नात्याने नेतृत्व करत आहे.
गुप्तपणे सारा महाराष्ट्र फिरला ,जागोजागी अन्याय,अत्याचार पाहून काळीज तुटत होते.

महाराष्ट्रावर परकीय आक्रमकांच्या टोळधाडी आळीपाळीने तुटून पडत होत्या.
वतने,जहागिरी यासाठी स्वकीय बांधवांचे अगदी आनंदाने गळे चिरणारी पिढी तयार होत होती.
आपण परकीय सत्तेच्या अधीन आहोत हेच लोकांना समजत नव्हते.
धर्म,मानवता नावालाही शिल्लक नसताना ,एक बाल क्रांतिकारक उठला पुण्यातून ज्याने भागवत धर्माचा भगवा पताका आपल्या राज्याचा ध्वज म्हणून जाहीर केला आणि हिंदुस्थानातील पाचही जुलमी राजवटी विरुद्ध प्रचंड लढा उभा केला ते पण कोणतीही परिस्थिती अनुकूल नसताना..!
त्यांचे नाव ..."पुण्यश्लोक शिवाजी"

महाराजांच्या या पवित्र कार्याची महती आमच्या रक्तारक्तात भिनली गेली.
तेव्हाच आम्ही ठरवले..हे बाजींद चे गूढ गुप्त ज्ञान आता फक्त आणि फक्त हिंदवी स्वराज्यासाठी द्यायचे...!

मी गेली ६ महिने आमच्या जंगलातील घरी गिधाडे खंडोजी तुझ्यावर पाळत ठेऊन आहेत.
जेव्हा तू यशवंतमाचीत कुस्ती खेळायला जाणार होतास तेव्हा स्वराज्याचे गुप्तहेर बहिर्जी नाईक यांनी तुझ्यावर सोपवलेली यशवंतमाचीची जबाबदारी हे देखील मला या पशु पक्ष्यांनी सांगितले...!
तुझा या सवित्रीवर बसलेला जीव आणि बेरडाच्या हल्ल्यात तू कर्तव्य सोडून तू चूक करणार हे मी आधीच जाणले होते, तुम्हाला नाईलाजास्तव त्या दरीत उडी टाकून पळावे लागले आणि भिल्लांच्या भीतीने तुम्हाला इथवर आणण्या इतपत सर्वच्या सर्व घटना.....आपोआप घडल्या नसून...त्या मी घडवल्या आहेत..!

तुम्ही इथे आला नसून....आणले गेला आहात...!

असे म्हणताच बाजींद पुन्हा हसू लागला...आणि त्याच्या त्या हसण्याने जंगलातील सर्व प्राणी प्रचंड कल्लोळ करु लागले...!

सायंकाळच्या संधीप्रकाशात डोक्यावर धो धो पडणारा पाऊस वाचवण्यासाठी....खंडोजी,नारायण,सखाराम,मल्हारी व सर्जा पाचही जण एका विस्तीर्ण झाडाखाली उभे होते...अंगावरील बोचरी थंडी सोसत ते चौघेही खंडोजी च्या तोंडून ती बाजींद ची विलक्षण कथा ऐकण्यात गढून गेले होते...!

सुर्य अस्ताला जाऊ लागला अन खंडोजी उठला....!
त्याला जाणवले की कथा सांगायच्या नादात सुर्य अस्ताला जात आहे...तो ताडकन उठून भर पावसात भराभर पावले टाकत जाऊ लागला....!

त्याला त्या भर पावसात बाहेर जाताना पाहताच ते चौघेही त्याला हाक मारु लागले..पण विजेचा कडकडाट आणि मुसळधार पाऊस यामुळे क्षणात तो दिसेनासा झाला...!

सखाराम ने दीर्घ श्वास घेतला आणि मल्हारी,सर्जा व नारायण कडे पाहत बोलू लागला.....!

गड्यानो,ह्यो खंडोजी साधासुधा माणूस नक्कीच नाय.
त्यो ज्या बाजींद ची कथा सांगतोय,त्यात नक्कीच कायतरी लपले आहे...चला...आजच्या रातीला निवारा हुडकुया...उद्या येरवाळी त्यो येडा नक्की हजर असलं....!

•●क्रमश●•

बाजींद
भाग क्र.20
~~~~~~~~~~~~~~~~~
✍🏻लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~~

पावसाचा जोर कमी झाला आणि अंधाऱ्या रस्त्याचा मागोवा घेत सखाराम व त्याचे साथीदार चालू लागले.
मध्येच वीज चमकायची आणि त्याच्या लख्ख प्रकाशात त्या रायगड परिसरातील भयान जंगलाचे स्वरूप समोर दिसायचे आणि क्षणात पुन्हा काळोख पसरायचा..!

जवळपास एक प्रहर होत आला ते चालत चालत एका विस्तीर्ण पठाराजवळ आले होते.
दूरवर काहीतरी ऐकू येत आहे याची चाहूल सखाराम ला लागली आणि त्याने कान देऊन ऐकले व बोलला...गड्यानो..दूरवर माणसांची वस्ती असण्याची दाट शक्यता आहे,मला माणसे असल्याचा आवाज येत आहे.
चला...तिकडे जाऊया..!

असे म्हणताच..सर्वजण त्या आवाजाच्या बाजूने चालू लागली.

हळूहळू तो आवाज तीव्र होऊ लागला आणि सोबत घोड्याच्या खिंकाळन्याचाही आवाज येऊ लागला...!

सखाराम ने पाहिले कि समोर कोणाची तरी छावणी पडली आहे.
पिवळा ध्वज त्यावर गरुडाचे चिन्ह असणारे निशाण समोर डौलत होते.

सावधपणे ते हळूहळू छावनिकडे सरकू लागले इतक्यात त्या चौघांच्या पाठीला कोणीतरी तलवारी लावल्या....एक म्होरक्या उच्च रवात बोलू लागला......कोण र तुम्ही ?
राजे येसाजीराव शिर्क्यांच्या छावणीची टेहळणी करता काय ?

तोवर दुसरा बोलला.....आर बोलून ताकत काय वाया घालवतोस...घाल रपाटा डोस्क्यात...!

सावध झालेल्या सखाराम ने जाणले कि ही छावणी सावित्रीच्या वडिलांची आहे ...त्याने प्रसंगावधान राखत त्या शिलेदाराला सांगितले...,

आओ शिलेदार आम्ही राजकुमारी साहेब सावित्रीबाईंचे पाहुणे आहोत....सोडा आमास्नी...!

काय...?
राजकुमारीसाहेबांचे पाहुणे ...?
एक जण बोलून गेला...!

होय,त्यांनीच रात्री इकडे बोलावले म्हणून आलोय आम्ही..!

त्याचे ते बोल ऐकताच त्या म्होरक्याने तलवारी खाली घेतल्या आणि त्या चोघांच्याकडे बघत बोलू लागला....,

तुम्हाला राणीसाहेबांचे नाव माहिती आहे म्हणजे नक्कीच तुमची ओळख असेल....चला आमच्या सोबत आम्ही राजकुमारी साहेबाना वर्दी देतो...त्यांनी जर तुम्हाला ओळखले नाही,तर तुमचे मरण नक्की...चला...!

त्या चौघांना धक्का देत छावणीकडे आणले गेले..!

ठायी ठायी हातात नंग्या तलवारी घेऊन पहारा देणाऱ्या त्या छावणीत केवळ शे-पाचशे वीर उभे होते.

मुख्य छावणीवर शिर्क्यांचा गरुडध्वज वार्यावर हिंदोळे देत होता..!
पलीत्यांच्या प्रकाशात छावणी उजळून निघाली होती.नुकत्याच झालेल्या पावसाने गारठलेली घोडी ,बैल अंग झिन्झाडत होती..!

त्या शिलेदाराने सावित्रीच्या कक्षात जाऊन वर्दी दिली आणि ते ऐकताच आत बिछान्यावर पहुडलेली सावित्री धावतच बाहेर आली.....!

सखाराम ने सावित्रीला पाहताच सुटकेचा उच्श्वास टाकला..!

सकाळी कुठे गायब झालात तुम्ही सारे ?

गंभीर मुद्रेने सावित्रीने त्या चौघांना प्रश्न केला.

काय ?
आम्ही गायब ?
बाईसाहेब रात्री आम्ही त्या मंदिरात झोपलो ,पण आम्हाला जाग आली ते एका डोंगरावर..ऐन वेळी खन्डोजीराव तिथे आले नसते तर त्या भुकेल्या वाघांनी आमची न्याहारीच केली असती....!
सखाराम उत्तरला...!

काय ?
खंडोजी आलेला.....कुठे आहे तो..?
त्याला शोधून शोधून आमच्या सर्वांचा उर फाटला आहे आणि तो असा लपंडाव खेळतोय...?

माझे डोके बधीर होत आहे बाईसाहेब....आज दिवसभर खन्डोजीराव आमच्या सोबत या जंगलातल्या डोंगरकापर्यातून इथवर चालत आले आणि सूर्य अस्ताला गेल्यावर कुठेतरी गायब झाले .....आता लिहून ठेवा तो सकाळी इथे उगवणार नक्की...!

खंडोजी दिवसभर तुमच्या सोबत होता ?
सावित्रीने प्रतिप्रश्न केला ..?

तो का असा वागत आहे समजेना..मी व माझ्या यशवंतमाचीची सारी फौज त्याला शोधत आहोत ..!

चला...मी तुम्हाला माझ्या वडिलांची ओळख देते करून..असे म्हणून सावित्री व ते चौघे महाराज येसाजीरावांच्या कक्षात गेले.....!

एका उंच अशा माचानीवर भरजरी कपडे घालून एका पुराणपुरुषाप्रमाणे बैठक घालून सोबत २-३ वीरांसोबत बैठकीत व्यस्त असलेल्या राजे येसाजीरावानी सावित्री आणि त्या चौघाकडे पाहिले...तसे काही न सांगता समोर बसलेले २-३ वीर उठून राजे येसाजी आणि सावित्रीला मुजरा करत निघून गेले...!

या या ...बसा ....समोर असलेल्या बैठक व्यवस्थेकडे बसायची खून करत राजे येसाजी बोलू लागले ...!

कालच मला आमच्या साऊ नी तुमची व्यथा सांगितली...!
तुमच्या गावाची अडचण खूप मोठी आहे गड्यानो....नक्कीच राजे शिवाजी भोसले यात लक्ष घालतील तर हा त्रास कायमचा मिटेल....पण तुमचे अभिनंदन कि इतक्या मुसळधार पावसात जीव मुठीत धरून तुम्ही लोक गावासाठी बाहेर पडलात...तुमच्यासारखी समाजाची सेवक लोक हल्ली बघायला मिळत नाहीत रे ..!

सावित्री..यांचा चांगला पाहुणचार कर आणि उद्या मात्र खन्डोजीला शोधूनच काढले पाहिजे....!

खन्डोजीचे नाव घेताच सावित्री आणि राजे येसाजींच्या डोळ्यात पाणी आले ....ते सावरत राजे बोलले....साऊ

वेळ फार नाही ग आता......फक्त उद्याची रात्र...काय करायचे असेल ते आजच करा......परवाचा सूर्योदय आणि शिर्के साम्राज्य..........!

बोलता बोलता राजे येसाजीचा शब्द जड झाला आणि ते उठून पाठमोरे झाले....!

डोळ्यावर आलेले पाणी पुसत सावित्री निर्धारी आवाजात बोलत उठली.....आबा ,काळजी करू नका..!
मी तुमचीच लेक आहे ......उद्या खंडोजी ला घेऊनच मी इकडे येते....तुम्ही विश्रांती घ्या...!

असे बोलून सावित्री त्या चौघांना घेऊन वेगळ्या छावणीत परतली..!
नोकर चाकाराना बोलावून घेतले आणि सखाराम व त्याच्या सहकार्यांच्या भोजनाची व्यवस्था केली ..!

दिवसभर मर मर चालून पोटात भुकेने काहूर उठले होते..!
जेवणाचे नाव उच्चारताच चौघांचेही चेहरे कमळासारखे फुलले...!
पंचपक्वान्न ठेवलेली थाळी चौघांनी संपवायला प्रारंभ केला...!

साऊ समोर बसूनच ते पाहत होती.......
ती म्हणाली...सावकाश होऊदे भाऊ...ठसका लागेल...!

घोटभर पाण्याचा घुटका घेत सखाराम बोलला....बाईसाहेब दिसभर खंडूजी न काल रातीची तुमची कथा सांगितली आमास्नी.....लय लय पुण्यवान मानस हायसा तुम्ही म्हणून तुम्हास्नी बाजिंद न तेच्या राज्यात बोलावून घेऊन १०० वर्षाचे आक्रीत उलघडून सांगितले ते......!

क्षणभर गंभीर होऊन सावित्रीने किंचित हास्य केले आणि बोलू लागली...!

होय,पुण्य तर केलेच होते माझ्या बाप जाद्यानी पण....आम्हाला काय माहिती होत कि नियती आमच्याशी इतका क्रूर खेळ खेळत आहे ...!
सावित्री पुन्हा तिच्या आयुष्याच्या गूढ गर्भात विसरून बोलू लागली.....!

बाजिंद ने आम्हाला तिथे बोलावून घेतले आहे याची जाणीव आम्हाला झाली,पण त्यापेक्षाही त्याच्यावर अभिमान एका गोष्टीचा होता कि १०० वर्षे हि वेडी माणसे स्वताचे जीवन न जगता ,इतके गूढ ज्ञान असून देखील त्याचा गैरवापर न करता प्रसिद्धी पासून दूर राहून देशाचे काम करत होती...!

त्या रात्री आम्हाला बाजिंद ने सारे चंद्रगड फिरवून दाखवले,पाहुणचार केला आणि रात्र होताच एका गंभीर विषयाचे बोलणे करायला सुरवात केली....!

खंडोजी....१०० वर्षे आम्ही ज्या संधीच्या शोधात आहे ,ती आम्हाला तुमच्या रूपाने मिळाली आहे....!

माझे एक काम कराल ?

बाजिंद ने मोठ्या गंभीर मुद्रेने प्रश्न केला ..!

खंडोजी ने होकाराठी मान हलवत म्हणाला......बाजिंद ....मला माहिती नाही आपले जन्मोजन्मीचे काय नाते असावे ...पण तुमचे हे जे कार्य आहे ते महाराजांच्या कार्यापेक्षा कमी नाही आहे ...!

नाही,नाही खन्डोजीराव.....महाराज हिमालय तर आम्ही कुठली तर भुरटी टेकडी..ते गरुड तर आम्ही डास..!

अरे ३५० वर्षाची गानिमांची भीती सामान्य माणसांच्या मनातून काढून असामान्य कामगिरी करवून घेणारे शिवाजीराजे हे जणू शिवाचे अवतार वाटतात कधी कधी...!

माझे एक काम कराल ?

हो नक्कीच..आदेश द्या ..खंडोजी बाजिंद ला म्हणाला....!

ऐक,खंडोजी....मी बाजिंद च्या तपस्येची,संघर्षाची कमाई असलेले ते गूढ विज्ञान लिहलेली वही हिंदवी स्वराज्याच्या महान कार्याला देऊ इच्छितो...!

तू ती वही स्वराज्याचे गुप्तहेर बहिर्जी नाईक यांच्याकडे देशील का /

खंडोजी चे डोळे विस्फारले गेले...हृदयाची कंपने अतितीव्र झाली...!
निसर्गाच्या अनंत किमयेच्या एका कुलपाची चावी माझ्याकडे मिळत आहे हे ऐकूनच तो भान हरपून गेला....!

त्याला सावध करत बाजिंद बोलला.....बोल खंडोजी..माझ्यापुढे तुझ्या इतका प्रामाणिक आणि विश्वासू माणूस दुसरा कोणीच नाही....कारण......बहिर्जी नाईक हे गुप्तहेर शिवाजी महाराज,जिजाऊ मासाहेब व्यतिरिक्त माहिती असेल तर तो फक्त तू आहेस ...आणि हि वही फक्त आणि फक्त नाईकांच्या हाती गेली तरच स्वराज्याचे काम अनंत पटीने वाढेल.........!

बोल....करशील एवढे काम ?
क्षणात खंडोजी उत्तरला......!
होय....करेन हे काम मी...!

बाजींद

भाग क्र.21
~~~~~~~~~~~~~~~~~~
~~~~~~~~~~~~~~~~~~

✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~

खंडोजी ने मोठ्या धाडसाने बाजींद चे ते गूढ ज्ञान लिहलेली वही शिवछत्रपतीचे गुप्तहेर प्रमुख बहिर्जी नाईक यांना सोपवून ते ज्ञान हिंदवी स्वराज्याच्या कामी यावे यासाठी ती जिवावरची जोखीम पत्करली.

त्या रात्री बाजींद ने चंद्रगड ची ती मूठभर मात्र चिवट फौज आमच्या रक्षणास ठेवली व तो जंगलात काहीतरी उद्देशाने निघून गेला.

सावीत्री बोलत होती आणि सखाराम व त्याचे साथीदार जेवण आटोपून थंडगार हवेच्या झुळकात ढगाळलेल्या रात्री ती रहस्यमय कथा ऐकत होते....!

सखाराम बोलला...."बाईसाहेब...बहिर्जी नाईक यांचे नाव मी पण ऐकले आहे,स्वराज्याचे गुप्तहेर प्रमुख......पण,बाईसाहेब पुढे काय घडले..."

सावित्रीने पुन्हा दीर्घ श्वास घेतला आणि ती बोलू लागली.....!

खंडोजी व मी मोठ्या उत्सुकतेने सारा चंद्रगड परिसर न्याहळत होतो व बाजींद च्या परतण्याची वाट पाहत होतो पण,तितक्यात जंगलात काहीतरी चमकले....क्षणाचाही विलंब न करता बाजींद ची फौज त्या दिशेने दौडू लागली...पाहतो तर एक किडकिडीत बांध्याचा ,काळा पोषाख परिधान केलेला "निशाणबारदार हारकारा" वाऱ्याच्या वेगाने नदीकडे धावू लागला...बघता बघता त्याने नदीत उडी मारुन पलीकडच्या दाट जंगलात पसार झाला...!

सर्वांच्या काळजाचा ठाव चुकला होता...हा हारकारा नेमका कोणाचा असावा ??
याने बाजींद व गूढ ज्ञानाच्या वहीच रहस्य तर नाही ना ऐकले....सर्व फौज काळजीत पडली व बाजींद कडे काही शिलेदार पाठवून दिले....!
काही वेळ तसाच गेला अन बाजींद च्या येण्याची ती भयानक चाहूल पुन्हा लागली...वाघ,सिंह,हत्ती,चित्ते..अगणित हिंस्त्र पशूंची भयानक डरकाळी व आसमंत गर्जून सोडणारा चित्कार पाहून सावीत्री व खंडोजी चे पण सर्वांग शहारले...!

बाजींद समोर येताच सर्व फौजेचे मुजरे झडले...खंडोजी व साऊ यांनी पण मुजरा केला..!

त्यांच्याकडे गंभीर नजरेने पाहत बाजींद बोलला....
~~~~~~~~~~~~~~~~

"खंडोजी...तुम्ही शिर्के व सूर्यराव बेरड यांच्या युद्धात दरीवरून उडी मारुन नदीत पोहत जेव्हा इकडे येत होता तेव्हा सूर्यराव चा हारकारा तुमच्या मागावर होता...त्याने बाजींद च्या जीवनाचे व गूढ वहीचे रहस्य ऐकले आहे व तो वाऱ्याच्या वेगाने सूर्यराव पर्यंत पोहचला पण असेल..."

मोठा घात झाला आहे खंडोजी...आता सूर्यराव च्या एकाही माणसाला जिवंत ठेवणे म्हणजे साक्षात बाजींद च्या 100 वर्षाच्या परंपरेला मूठमाती देणे ठरेल...!

हे धर....असे बोलत बाजींद ने हातातून घेऊन आलेली ती गूढ ज्ञानाची वही खंडोजी कडे देत बोलू लागला...!

खंडोजी...मला वचन दे...ही वही फक्त बहिर्जी वाचतील व त्यांनाच तू देशील...तुला आई भवानीची आण आहे "

क्षणात खंडोजी उत्तरला...काळजी नसावी...प्रसंगी जीव द्यावा लागला तरी बेहत्तर ही जबाबदारी मी पार करीनच...तुम्ही बिनधास्त रहा.."

ठीक आहे...मला त्वरित सूर्यराव वर छापा मारायला हवा....तुम्ही निघा....तुम्ही आता थेट यशवंतमाची गाठा... सावित्रीचे वडील तुमची दोघांचीही काळजी करत आहेत...साऊ ला तिथे ठेव व संधी शोधून तिथून निघ व ही जबाबदारी पार पाड...तुझ्या प्रत्येक हालचाली आमचे घार, गिधाडे मला देतच राहतील...निघा आई भवानी तुम्हास यश देवो...!

आणि बघता बघता ती शे दोनशे चिवट वीरांची ध्येयवेडी सेना सूर्यराव चा खात्मा करायला निघून गेली....!

साऊ आणि खंडोजी ने पण शस्त्रे कमरेला अडकवली,खंडोजी ने ती गूढ वही मस्तकाला लावून नमस्कार केला व हरणाच्या कातडी अवलानात गुंडाळून पाठीवर बांधली व ते चंद्रगड चा निरोप घेऊन जंगलमार्गे यशवंतमाची कडे जाऊ लागले....!

चालत चालत बरेच जंगल पार करत ते खूप आत गेले होते.
सावीत्री खंडोजी ला बोलली......बहिर्जी नाईक ?
बहिर्जी नाईक कोण आहेत....बाजींद सारखा महायोद्धा ज्या माणसाची इतकी स्तुती व विश्वास ठेवतोय तो माणूस कोण आहे खंडोजीराव...?

खंडोजी हसला व बोलला....व्यक्ती ???
बहिर्जी नाईक व्यक्ती नाही...हात पाय तोंड आहे म्हणून त्यांना व्यक्ती म्हणता येईल...नाहीतर ते ना माणसात मोडले जातात ना जनावरांत....हिंदवी स्वराज्य पूर्णत्वास जावे म्हणून राजश्री शिवाजीराजे यांच्या सोबतीला ईश्वराने जणू आपला दूतच पाठवला असावा ....जसे हनुमंताविना रामायण अपूर्ण.....श्रीकृष्णाशिवाय महाभारत अधुरे.....अगदी तसेच बहिर्जी नाईक यांच्याशिवाय शिवभारत अपुरे होय....!

बहिर्जींचे वर्णन करताना खंडोजीच्या अंगावर काटे उभे राहिले होते तर डोळ्यात अश्रू....जड शब्दाने तो बोलू लागला...

साऊ...त्या महान अवलीयाने सारे जीवन शिवाजी नावाच्या देवावरुन अक्षरश ओवाळून टाकले ग....स्वतःचे आयुष्य काय जगलेच नाहीत ते.....आयुष्य सारे हिंदवी स्वराज्यासाठी वेचले.....माझ्यासारख्या शेकडो पैल्वानाच्यात देशभक्ती निर्माण करुन शिवाजी महाराजांच्या पवित्र कार्यात आणून आयुष्याचे सोनं केलं..!

बस्स...आता जगायचं तर शिवाजी राजांच्या कामासाठी...याच कामासाठी मरण जरी आलं तरी हसत स्वीकारायचं...आणि जर पुनर्जन्म खरा असेल तर याच शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या कामासाठी मला पुन्हा पुन्हा जन्म मिळूदे अशी प्रार्थना आई भवानीला करेन...!

खंडोजी चे बोलणे साऊ शांतपणे ऐकत होती आणि तिचेही डोळे भरून आले.
ज्या बाजींद च्या कथा ऐकून रायगड पंचक्रोशी 100 वर्ष भीतीने गांगरून जायची असा बाजींद स्वतःच्या आयुष्याची ठेव एका अनोळखी माणसाच्या हाती देतोय कारण तो शिवाजीराजांचा माणूस आहे.....बहिर्जी नाईक सारखा माणूस स्वतःचा जीव ओवाळून टाकतो त्या स्वराज्यावर...हा खंडोजी जन्मोजन्मी सुख न मागता शिवाजीची चाकरी मिळू दे म्हणतोय...तिचेही डोळे पाणावले...तिला समजून चुकले की शिवाजी महाराज व त्यांचे कार्य किती थोर आहे ते....आबासाहेब पोकळ स्वार्थाला कवटाळून महाराजांशी वैर घेत आहेत याचीही जाणीव तिला झाली होती...तिला हुंदका आवरत नव्हता....!

तिने खंडोजी ला आश्वासन दिले की मी स्वता वडिलांना सांगेन की महाराजांचे कार्य किती उदात्त व पवित्र आहे ते...मी काही करुन त्यांना शिवाजी म्हाराजांच्या कार्यात सामील करीन....तिने तसा दृढ निश्चयच केला होता...!

यशवंतमाची....!

खंडू व साऊ गेल्यापासून सारी यशवंतमाची काळजीत होती.
सूर्यराव बेरडाच्या हल्ल्याने साऊ मरता मरता वाचली,जर खंडोजी नसता तर आज शिरक्याची अब्रू संपली असती.
सारे जंगल शोधून काढूनही ते दोघे सापडत नव्हते,राजे येसजीराव चिंतेत होते दरम्यान एका शिलेदाराने वर्दी दिली....राजे बाईसाहेब आणि खंडू राजवाड्यात आले आहेत....!

•●●क्रमश ●●•

बाजींद

भाग क्र.२२
~~~~~~~~~~~~~~~~~
✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन
~~~~~~~~~~~~~~~~~

पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~
राजे येसाजीरावांच्या पत्नीला रखमाई बाईसाहेबाना सावीत्री येत आहे हे ऐकून आनंदाला पारावर राहिला नव्हता. तिने वाड्यातील बायका एकत्र करुन पंचारती घेऊन खंडू आणि साऊ ला ओवाळून वाड्यात घेण्यासाठी घाई केली.
राजे येसाजीराव निहायत खुश होते.
शिरक्याची अब्रू सहीसलामत परत येत होती,आणि तो घेऊन येणारा खंडू आपल्या पदरी असलेला पैलवान आहे ही भावना त्याला मनस्वी आनंद देत होती..!

अनेक जखमा घेऊन व गेली कित्येक दिवसांची दगदग त्यासोबत बाजींद सारख्या आख्यायिकेतून प्रसिद्ध असलेल्या मात्र आजवर कोणी न पाहिलेल्या अवलीयाला भेटून ,त्यांचे रहस्य ऐकून सोबत त्याच्या शंभर वर्षाच्या तपस्येचा ठेवा सोबत घेऊन आपण आलो आहोत याच्या जाणिवेने सावीत्री व खंडोजी मनात एक जबाबदारीच्या भावनेत होते..जखमा व दगदग याची चिंता उरली नव्हती..!
मोठ्या आनंदात ते यशवंतमाचीत प्रवेशले..!

शिंगे तुतारीच्या निनादात आणि यशवंतमाचीच्या हजारो लोकांच्या साक्षीने सावीत्री आणि खंडोजी वाड्यात आले.
येसजीरावांच्या पत्नी व सावित्रीची आई रखमाबाईसाहेबानी दोघांना ओवाळून वाड्यात घेतले.
राजे येसजीरावांनी खंडोजी ला आनंदाने मिठीच मारली..जड शब्दात ते बोलले...खंडू आज शिरक्याची अब्रू,इज्जत केवळ तुझ्यामुळे सहीसलामत आम्ही पाहत आहोत..तुझे उपकार शिर्के कधीही विसरणार नाहीत..!
त्यांचे जोडलेले हात हातात धरत खंडोजी उद्गारला..."राजे...हे तर माझे कर्तव्य होते,तुम्ही सांगाल ते काम मी मोठ्या आनंदाने करेन"
खंडोजी चे बोलणे ऐकून राजे येसजींनी त्याला पुन्हा मिठी मारली..!
त्याच्या अंगावरच्या जखमा पाहून त्यानी त्वरित वैद्यांना बोलावून आणले...!
वैद्यांनी जखमा पाहिल्या आणि शिरक्यांच्या वाड्याच्या मागे असलेल्या विहिरीत वर्षानुवर्षे ओतून जुने घट्ट बनवलेले तूप आणून त्याच्या जखमाना लावले...कित्येक दिवसांच्या वेदना शांत होताना पाहून खंडोजी दीर्घ श्वास घेत झोपी गेला....!
सावित्रीची तिच्या क्कक्षात पहुडली आणि गेली कित्येक दिवसांची चित्तथरारक घडत गेलेल्या गोष्टी आठवण्याचा प्रयत्न करु लागली....बेरडाच्या जीवघेण्या हल्ल्यात जीवाची बाजी लावून तिला वाचवणारा खंडोजी तिला वारंवार आठवत होता...ती दरीतून मारलेली उडी...भिल्लांचा हल्ला...बाजींद चे जंगल...खंडोजी ची बहाद्दुरी आणि ज्या प्राणप्रिय ध्येयासाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता तो यशवंतमाचीत पैलवान म्हणून आला,त्याचे ते काम सावित्रीला मनोमन आवडले होते..!
~~~~~~~~~~~~~~~~

गेली कित्येक दिवस खंडोजी सहवासाची जणूकाही सवय तिला लागली होती...ती त्या रम्य आठवणीत झोपी गेली...!

खंडोजी यशवंतमाचीत आला आहे ही बातमी वाऱ्याच्या वेगाने वस्ताद काकांच्या कानावर गेली.
बहिर्जींच्या परवानगी शिवाय खंडोजी ने सावीत्री ला वाचवण्यासाठी सूर्यराव बेरडाचे जे वैर घेतले होते ते बहिर्जींच्या कानावर गेले होते.
खंडोजी ला गिरफ्तार करण्याचे आदेश वस्ताद काका व त्यांच्या तुकडीला मिळाले होते.
पण,खंडोजी सोबत आजवर शेकडो मोहिमा केलेल्या वस्ताद काकांचा खंडोजीवर जीव होता,कसेही करुन खंडोजी ला यशवंतमाचीच्या फौजेला पांगवून हिंदवी स्वराज्याचा भगवा झेंडा यशवंतमाचीवर फडकवायला जर आपण भाग पाडले, तर मात्र बहिर्जींचा राग शांत होईल असे त्यांना वाटत होते...त्यांनी त्वरित खंडोजीला भेटण्यासाठी राजे येसजीरावांच्या वाड्यातील तालमीत निघाले..!

तिकडे सूर्यराव बेरडाँच्या हेजीबाने बाजींद च्या जंगलात ऐकलेली बित्तबातमी खडानखडा सूर्यराव च्या कानी घातली.
हेजीबाने सांगितलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवावा कसा हा प्रश्न सूर्यराव ला पडला !!
ठेवावा तर जे काही त्याने सांगितले ते वस्तुस्थितीला मान्य नव्हते आणि न ठेवावा तर जीवावर खेळून ही माहिती काढलेला हेजीब खोट बोलणार नव्हता...द्विधा मनस्थितीत सूर्यराव पुढच्या योजना डोक्यात आखत होता.

पण,त्याच्या डोक्यातून कृती होण्याआधीच ते डोके धडावेगळे करण्याच्या दृढ निश्चयाने "बाजींद" व त्याची चिवट फौज वायू वेगाने सूर्यराव च्या फौजेवर छापा घालण्याचा तयारीत होती.

पहाटेच्या मंद वाऱ्याची झुळूक खंडोजीच्या सर्वांगाला स्पर्श करुन गेली,गाढ झोपेतून तो उठला..!
सावित्रीच्या अनामिक ओढीने त्याला अस्वस्थ केले होते.
कित्येक संकटे सावित्रीच्या साक्षीने त्याने पार केली होती..अंगावरच्या जखमांच्या वेदना कमी झाल्या होत्या,तो तसाच उठला आणि तालमीतून बाहेर जाऊ लागला..तालमीचा दरवाजा उघडला आणि बाहेर वाड्याकडे पाहिले..!
सावित्रीला भेटलोच नाही कालपासून...त्याचे मन त्याच्याशीच बोलू लागले...चंद्रचांदण्यांचा प्रकाश आणि पहाटेचा मंदवारा....दूरवर पाहरेकर्याचा आरोळीचा बारीक आवाज आणि उरात सवित्रीबद्धलची घालमेल....खन्डोजी निश्चय करुन वाड्यात शिरला....सांधीसपाटीत बोटे घालून त्याने वाड्याची दगडी भिंत चढली आणि सावित्रीच्या कक्षाजवळ प्रवेश मिळवला..!
समोरुन दरवाजा बंद होता म्हणून पाठीमागून तो जेमतेम एक पाऊल बसेल इतक्या निमुळत्या जागेतून चालत सावित्रीच्या कक्षाजवळ असलेल्या खिडकीत गेला आणि खिडकीतून आत झेपावला..!

समईच्या सोनेरी प्रकाशात सारे दालन उजळून गेले होते,कक्षाच्या मध्यावर असलेल्या भव्य मंचकावर सावीत्री पहुडली होती..!

तिला पाहताच खंडोजीच्या हृदयाचा आवेग पुन्हा वाढला...!
तो धाडस करुन मंचकाजवळ जाणार इतक्यात सावीत्री ला कोणीतरी असल्याची जाणीव झाली आणि तिने उशाला ठेवलेला जंबिया उचलून...सावध पवित्रा घेतला आणि ओरडली..कोण आहे...?

समईच्या मंद प्रकाशात खंडोजी चा तो धिप्पाड देह तिला दिसला..!
ज्याच्या आठवणीने रात्रभर ती अस्वस्थ होती तो समोर उभा पाहून तिच्या हातातील खंजीर गळून पडले..!
बेभान होऊन तिने खंडोजीला मिठी मारली..!
खंडोजीनेही तिच्या मिठीने होणाऱ्या जखमेच्या वेदना सहन करत तिला बाहुपाशात घेतली..!
त्या वेदनेत सुद्धा मोठा आनंद होता...!

पहाटेचा मंद वारा खिडकीतून आत आला आणि समई विझली..!

पहाटेच्या रम्य वातावरणात..चंद्राच्या शीतल प्रकाशात..अंधाऱ्या खोलीत ते दोन जीव एक झाले होते...!
ना भूतकाळाची काळजी ना भविष्याची चिंता...अश्या मिठीत काळाचे भान उरत नसते..ती एक समाधी अवस्था होऊन जाते...!
अनेक योगातून असाध्य असणारी ही अवस्था केवळ प्रेमयोगातच समजते..!
केवळ आनंद...केवळ आनंद....!
त्या मिठीत स्वर्गाचे सुखही अपुरे पडावे..!

सारी यशवंतमाची पहाटेच्या वेळी गाढ निद्रा घेत होती आणि हे दोन शरीरे जणू एक जीव झाले होते...!

त्या रेशमी आठवणी डोळ्यातून अश्रुवाटे घळाघळा वाहत होत्या आणि सावीत्री आपला भूतकाळ त्या चौघांसमोर कथन करत होती...!

क्रमश
~~~~~~~~~~~~~~~~~

बाजींद
भाग क्र.२३
~~~~~~~~~~~~~~~~~~~

✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~~~~~
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

सखाराम व त्याचे सवंगडी सर्वांगाचे कान करुन सावित्रीच्या तोंडून तीचा भूतकाळ ऐकत होते.
सावीत्री भरल्या नेत्रांनी तिच्या भूतकाळात रममाण झाली होती..!

"बाईसाहेब....पुढे काय झाले ?"

धाडस करुन मल्हारीने सावित्रीला प्रश्न केला.

पुढे..?
डोळ्यात आलेले अश्रू पुसत सावीत्री बोलली..!

"दैव अशी विचित्र परीक्षा का घेतो देव जाणे... जेव्हा असे वाटते की आयुष्यात सर्व संपले तेव्हा नवीन अध्याय समोर मांडते,तर जेव्हा वाटते की आता काही नको...अगदी त्याचवेळी नियतीची वाईट चपराक बसते.."

खंडोजी च्या मिठीत मी जग विसरले होते , सकाळच्या कोवळ्या सूर्यकिरणांनी पहाटेचे शीतल चांदणे विरुन गेले,रायगड च्या बाजूने आलेल्या गार वाऱ्याने आम्हीं दोघेही भानावर आलो...

खंडोजी म्हणाला....साऊ..आता तुझा विरह सहन करणे मला अशक्य आहे...!
मी आजच बहिर्जी नाईकांच्या खासगीत वर्दी धाडून त्यांची भेट घ्यायला निघतो...बाजींद ची बहुमूल्य जबाबदारी त्यांच्या हाती सुपूर्द करुन मला तुला कायमचे घेऊन जायचे आहे...

खंडोजीची मिठी सैल करत साऊ बोलली....ठीक आहे...मलाही तुमच्याशिवाय जगणे आता मुश्किल आहे..मी पण आजच आबासाहेबांची समजूत काढते..घडलेले सर्व कथन करते..शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याच्या पवित्र कामात आता शिरक्याची तलवार चालावी...मी नक्कीच आबांना समजून सांगेन..."

सावित्रीचे दोन्ही खांदे घट्ट पकडून खंडोजी बोलला...

साऊ.. असे जर घडले तर माझ्यावर नाईकांनी सोपवलेली कामगिरी फत्ते होईल...रक्ताचा थेंब न सांडता यशवंतमाची स्वराज्यात आली,तर तू आणि मी जन्मोजन्मी एकत्र राहू ही शपथ मी तुला देतो...मी त्वरित खेडेबाऱ्याकडे रवाना होतो..."

सवित्रीचा निरोप घेऊन घाईने खंडोजी तालमीकडे जाऊ लागला.."

दरम्यान,हत्यारबंद शिबंदी जंगलमार्गत पेरुन खंडोजी सोबत शेवटची वाटाघाटी करायच्या उद्देशाने वस्ताद काका रात्रीच यशवंतमाची च्या हद्दीत आले होते.

खंडोजी तालमीत आला व लपवून ठेवलेली ती गुढ वही घेतली,कमरेला तलवार,पाठीला ढाल अडकवली..ढालीच्या आत ती वही लपवली आणि क्षणभर जगदंबेचे समरण केले...आता पुढचे काही तास त्याच्यासाठी खूप महत्वाचे

होते..!

तिकडे सूर्यराव बेरडाने यशवंतमाची वर निकराचा हल्ला चढवायचे नियोजन केले,आजवर च्या अपमानाचा बदला राजे येसजीरावांच्या रक्ताने धुतला जाईल असे त्याने मनोमन योजले.
यशवंतमाची व बाजींद ची ती गूढ ठेव दोघांचीही तहान त्याला लागली होती..ही तहान आता केवळ शिरक्यांच्या रक्ताने शमणार होती..!

पण,सूर्यराव चे मनसुबे धुळीस मिळवण्यास बाजींद ची चिवट फौज वाऱ्याच्या वेगाने जंगलात घुसली होती...घुसली नव्हे आलीच....!

हर हर महादेव च्या गर्जनेने जंगल दुमदुमून गेले..यशवंतमाचीकडे रोखलेले सूर्यराव चे भाले मागे वळाले....तुफानी युद्धास प्रारंभ झाला...!

हल्ला कोणी केला,का केला विचार करायला सूर्यराव ला सवडच मिळाली नाही...त्याने बाजींद च्या फौजीशी निकराची लढत द्यायला सुरवात केलली.
बाजींद च्या येण्याने जंगलातील सर्व प्राणी कमालीचे बिथरले होते..त्यांच्या गोंगाटाने आसमंत दुमदुमून गेला होता...समोरुन अनोळख्या शत्रूचा हल्ला व जंगलातील प्राण्यांनी,पक्ष्यांची,कीटकानी चालवलेला गोंगाट याने सूर्यराव ची फौज भेदरून गेली व वाट दिसेल तिकडे धावू लागले...सूर्यराव सर्वांना ओरडून थांबायचे आदेश देत होता,पण भीतीने गंगारलेली त्याची सेना काही ऐकून घ्यायच्या मनस्थितीत नव्हती..!

इकडे खंडोजी तालमीतून बाहेर पडणार इतक्यात वस्ताद काकानी तालमीचे दार उघडले...!

काकांना पाहताच खंडोजी आनंदाने बेभान झाला..त्याने वेगाने जाऊन काकांच्या चरणांना स्पर्श केला ..काकांनी त्याला उठवत मिठी मारली..!

खंडू....कसा आहेस तू ?
आणि काय करुन बसला आहेस तू ?
आपण यशवंतमाची ची रसद पांगवून यशवंतमाची स्वराज्यात आणण्यासाठी येथे आलो होतो...पण तू,शिरक्यांच्या मुलीसाठी खुद्द बहिर्जी नाईकांचा आदेश डावललास ?
मी ज्या खंडू ला ओळखतो,तो नक्कीच तू नव्हेस..."

शांतपणे ऐकून घेत खंडोजी बोलला...वस्ताद काका मला माफ करा...मला माझे कर्तव्य पूर्ण माहिती आहे..पण..पण सावित्रीच्या प्रेमात मी आकंठ बुडालो आहे...मला कर्तव्य बजावू दे...मी सवित्रीशी लग्न करणार आहे..!

घडलेला सर्व वृत्तांत खंडेराय ने वस्ताद काकांना सांगितला...बाजींद ची गूढ वही ..सर्व काही त्याने वस्ताद

काकांना कथन केले...खंडेराय चा वस्ताद काकांच्यावर खूप विश्वास होता...तो बोलला
मला त्वरित खेडेबऱ्याला पोहोच करा काका..माझी आणि नाईकांची भेट झाली पाहिजे लौकर...साऊ पण त्यांच्या वडिलांना सर्व समजून सांगून यशवंतमाची स्वराज्यात सामील करण्यास भाग पाडणार आहे...चला काका..सूर्यराव बेरडाचा निकराचा छापा कधीही यशवंतमाची वर पडणार आहे अशी खबर आहे..!

दीर्घ श्वास सोडत काका बोलले....खंडू...अरे केवळ मनपरिवर्तन करुन जर यशवंतमाची स्वराज्यात येणार असती,तर नाईकांना ही जीवघेणी कामगिरी तुझ्यावर का सोपवलिह असती...?
काही गोष्टी शब्दांनी नव्हे तर तलवारीने सुटत असतात...!
बाजींद च्या गूढ कथा आजवर मी ऐकून होतो,पण तू केलेल्या उलघड्यावरून मला तुझ्यावर कसा विश्वास ठेवावा हा प्रश्न पडला आहे..!

हे ऐकताच खंडोजीने कशाचाही विलंब न करता पाठीवर अडकवलेल्या ढालीतून ती गूढ वही काढून वस्ताद काकांच्या हाती ठेवली...काका..मी आजवर तुमच्याशी कधीही खोटे बोललो नाही..हे बघा हा पुरावा..!

त्या वहीचे अवलोकन करत वस्ताद काका कमालीचे गंभीर झाले..त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखले...त्यांनी त्वरित खंडोजीला ती वही परत केली आणि बोलु लागले...

खंडोजी...खूप वेळ झाला तुझ्या येण्याला...काही क्षणात मराठ्यांची फौज यशवंतमाचीवर तुटून पडेल...तू इथे थांबू नकोस..तुला गिरफ्तार करायचे आदेश आहेत नाईकांचे....तू थांबू नकोस इथे....!

असे ऐकताच ज्वालामुखी भडकावा तसा खंडोजी भडकला...यशवंतमाचीची रसद न पांगवता जर हल्ला चढवायचा होता तर मला या कामगिरी वर का नियुक्त केले काका..?

मी सावित्रीला सांगून रक्ताचा थेंब न पडता माची स्वराज्यात आणणार होतो आणि नाईकांनी अशी आज्ञा दिलीच कशी...?

कशी दिली हे विचारायची पात्रता कोणाचीच नाही खंडोजी ..!

काका गर्जले....रक्त शिंपून उभे केलेले हे स्वराज्य असेतु हिमाचल असेच वाढावे यासाठी नाईकांनी सर्वस्वाची होळी केली आहे हे तू जाणतोस...आजवरच्या तुझ्या कामगिरीवरून तुला यशवंतमाचीची कामगिरी दिली...पण,मराठेशाहीचा शिरस्ता माहिती असूनदेखील तू स्त्री मोहात पडून कायदे मोडलेस ते कोणाला विचारून..?

ठीक आहे,तुझ्यासोबत जे घडले ते गूढ व विलक्षण आहे खंडेराय..पण..पण आता तू जर इथे मराठ्यांच्या हाती लागलास तर तुला गिरफ्तार केले जाईल...माझे एक...नाईकांचा निर्णय देव सुद्धा बदलत नाही..तिथे मी कोण आहे...वातावरण शांत होईपर्यंत तू बाहेर रहा..योग्य वेळ आल्यावर मी मध्यस्ती करीन...मग हा अनमोल ठेवा

स्वराज्याच्या कामी येईल यासाठी प्रयत्न करु...!

मी निघतो आता....मला इशारत करुन फौजेला सांगावा धाडला पाहिजे....तू निघ इथून...उतरतीच्या डोंगरावर गुहेत रहा...तिथे मी येऊन भेटेन....!

असे बोलून वस्ताद काका निघून गेले होते..!

खंडोजी च्या मनात विचारांचे महावादळ सुरु झाले होते...!

इकडे सावित्रीने घडलेला सर्व वृत्तांत येसजीरावांच्या कानी घातला..व शिवाजी महाराजांना सामील होण्यासाठी कळकळून सांगितले...!

येसजीरावांच्या मनात बाजींद ची कथा ऐकून मोठी खळबळ सुरु झाली होती...!
त्याचे मन म्हणू लागले की किती वेळ महाराजांशी वैर धरायचे...सारा मुलुख शिवाजीराजांचा पोवाडा गातोय..आपणही सामील व्हावे....त्यांचे मन पालटू लागले.....पण,इतक्यात...

एक निशाणबारदार धावत आला....बोलू लागला...

राजे घात झाला...भगव्या झेंड्याच्या निशानाचची फौज यशवंतमाची वर तुटून पडली आहे...वेशीच्या रक्षकांची कत्तल उडवत ते आत घुसत आहेत...मराठ्यांचा छापा पडला आहे....

काही वेळापूर्वीच मराठ्यांना सामील होण्याचे स्वप्ने पाहणारे राजे सवित्रीवर ओरडले...पाहिलेंस...आणि तू त्यांना जाऊन मिळायला सांगत होतीस मला ?....आता मारु किंवा मरु... तू वाड्या बाहेर पडू नकोस....

असे बोलून राजे बाहेर पडले...युद्ध डँका वाजू लागला...शिरक्यांचा सेना सागर जमा झाला....

आता युद्ध....आता मोठमोठे अलंकारिक शब्द मौन राहतील...आता तलवारी बोलतील...तलवारीच चालतील...राजे येसजीरावांच्नी युद्धाचा पोषाख चढवून घोड्यावर स्वार झाले..पाठोपाठ शिरक्याची चिवट फौज....

क्रमश
~~~~~~~~~~~~~~~~~~

बाजींद
भाग क्र.२४
~~~~~~~~~~~~~~~~~~~
✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~
दरम्यान मराठ्यांनी यशवंतमाची च्या पूर्वेकडून हल्ला चढवत पूर्व वेस कब्जात घेतली.
मराठ्यांच्या त्या निकराचा लढ्यात अग्रभागी स्वता वस्ताद काका नेतृत्व करत होते.
छत्रपती शिवाजी महाराज की जय, हर हर महादेव च्या घोषणांनी रायगड चे खोरे दुमदुमून गेले होते.
भगव्या जरी पटक्यांचे निशाण हिंदोळे घेत शिरक्यांच्या काळजात घुसत होते.
राजे येसजीरावांनी घोडदळाला आज्ञा केली व ते सुद्धा काळभैरवाच्या नावानं चांगभल आरोळी देत मराठ्यांच्या फौजेवर तुटून पडले.
तलवारीच्या खणखणाटाने यशवंतमाची हादरुन गेली होती.
कमजोर योद्धे गतप्राण होत होते,वीरांचे तांडव सुरु होते...!
इतक्यात मराठ्यांचा एक जंबियाचा गोळा फिरवणाऱ्या बहाद्दराने राजे येसजीरावांच्या रोखाने गोळा भिरकावला...!
सुदर्शन फिरावे तसा तो गोळा सुसाट वेगाने राजे येसजीरावांच्या छातीवर येऊन आदळला..!
घाव वर्मी बसल्याने ,प्रचंड तडाख्याने राजे येसजीराव घोड्यावरून खाली पडले..!
शिरक्याची फौज ते चित्र पाहून भयभीत झाली...!
घोडदळ मागे फिरू लागले.
हे पाहताच मराठ्यांच्या फौजेला अवसान शिरले...तुफान कत्तल करत ते पुढे सरकू लागले.
घोड्यावरून पडलेल्या येसजीरावांना काही अंगरक्षकांनी उचलून सावध केले.
ते शुद्धीवर आले,पण समोर शिरक्याची पीछेहाट पाहताच ते जखमी अवस्थेत पुन्हा घोड्यावर स्वार झाले.
पण,गोळ्याच्या प्रहाराने त्यांना शुद्ध टिकवणे कठीण होते...!
मराठ्यांनी जवळपास शिरक्यांच्या फौजेला कोंडीत आणले होते...आजवर अजिंक्य असलेली यशवंतमाची आज मराठे जिंकणार अशी लक्षणे दिसू लागली ..!

दूरवर यशवंतमाची च्या राजे येसजीरावांच्या वाड्यावरून "साऊ" हे सारे पाहत होती इतक्यात वाड्याच्या मागे असलेल्या तालमीतून "काळ भैरवाच्या नावाने चांगभल" च्या आरोळ्या उठल्या...राजे येसजीरावांच्या पदरी असलेले निष्ठावान शे दोनशे पैलवान युद्ध पोषाख घालून दौडत युद्धभूमीकडे धावत होते...त्यांचा म्होरक्या होता एक धिप्पाड पैलवान....दुरुनच साऊ ने त्या म्होरक्याला ओळखले होते...!

"भीमा जाधव"

खंडेराय ने यशवंतमाची च्या यात्रेत चित करुन सपशेल पराभव केलेला राजे येसजीरावांच्या खासगीतला मल्ल.
पराभवाचे उट्टे मातृभूमीचे रक्षण करुन काढण्याच्या मनसुब्याने त्वेषाने बाहेर पडला होता..!
ते शे दोनशे पैलवानांचे टोळके हातात तलवारी भाले घेऊन मराठ्यांच्या हल्ल्याचा प्रतिकार करावयास दौडू
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

लागले...!

मजल दरमजल करत धुळीचे लोट उडवत त्या पैलवानांची पहिलीच टक्कर निकराची दिली.
पैलवानी घाव वाया जातच नव्हता..ज्यावर पडेल त्याची खांडोळी होत होती.
एक एक पैलवान 10-10 धारकरी कापू लागला.
घोड्यासकट योध्याना उचलून आपटू लागले.
जणू महाभारतात घटोत्कचाने जसा संहार पांडव सेनेचा मांडला होता तसाच संहार त्या शिरक्यांच्या नेकजात पैलवानांची मराठ्यांच्या सेनेविरुद्ध मांडला होता...!

आता थांबण्यात राम नव्हता...थांबलो तर जीव जाणार ..झाले...इशारतीची कर्णे वाजू लागली...विजयाची माळ गळ्यात पडता पडता भीमा ने ती हिसका मारुन आपल्या हाती घेतली होती.

पुढे पळणाऱ्या फौजेची त्रेधातिरपीट बघत राजे शिर्के व पैलवानांची फौज उभी होती....भीमा ने डोक्याला चढवलेले शिरस्त्राण उतरवले...आणि राजे येसजीरावांच्या समोर येऊन मुजरा केला...!
राजे निहायत खुश झाले...ते बोलले...."भीमा...अरे तू आज धावून आला नसतास तर शिरक्याची अब्रू,परंपरा सर्वकाही मोडीत निघाले असते..संपले असते सारे...असे म्हणत त्यांनी भीमाला मिठी मारली ,पण छातीवरील आघाताने त्याच्या मिठीतच मूर्च्छित येऊन पडले....सारे सैन्य राजे येसजीना घेऊन वाड्याकडे जाऊ लागले.... एक योद्धा मात्र जाणीवपूर्वक मागे उभा होता...त्याचे बलदंड बाहू घामाने डबडबले होते..हातातील नंगी समशेर रक्ताने निथळत होती....त्या रक्ताकडे पाहत त्या वीरांच्या डोळ्यात अश्रू तरळले होते....त्याने डोक्याला घातलेले शिरस्त्राण काढले व एकवार भरल्या नेत्रांनी त्या पळणाऱ्या सेनेला पाहू लागला....आणि पुन्हा यशवंतमाची कडे वळला...........

ओळखले....ओळखले.....

जँगलाट उंच झाडावर हिरव्या पाल्याची झालर अडकवून हेरगिरी करणाऱ्या शिवछत्रपतीच्या निशाणबारदार हेजीबाने ओळखले...तो वीर कोण आहे ते.....

खंडेराय.....!

होय...खंडेराय सरदेसाई...!
ज्यांनी बहिर्जींच्या खांद्याला खांदा लावून अनेक युद्धात महाराजांना यश मिळवून दिले होते....तो स्वराज्याचा गुप्तहेर...बहिर्जींचा उजवा हात...स्वराज्याशी फितूर झाला आहे...आपल्याच बांधवांची कत्तल उडवून तो अजूनही यशवंतमाचीत आहे...!

विजेच्या वेगाने ही खबर दस्तुरखुद्द बहिर्जी नाईकांच्या कानी पोचली ...!

कानात उकळते तेल ओतल्यासारखे झाले..!

डोळ्यात पश्चाताप उतरला होता...!
रायगड परिसरात एका गुप्त ठिकाणी हजारो मावळ्यांच्या पुढे बहिर्जी बसले होते आणि हेजीब खंडेरायाच्या कत्तलीचे वर्णन करत होता...!

समोर वस्ताद काका मान खाली घालून सर्व ऐकत होते...!

वा काका...चांगले शिक्षण दिले तुम्ही तुमच्या पठ्ठयाला...!
बहिर्जी नाईक ओरडले...सारी सेना भीतीने कापू लागली...बहिर्जींचा राग काय आहे सर्वांना ठाऊक होते...!

आजवर शेकडो जीवघेण्या मोहिमा करुन मेलेली माझी नजर खंड्या सारख्या फितुराला कशी ओळखू शकली नाही याचा मला पश्चात्ताप होतोय....

उद्याचा दिवस मावळ्याच्या आत स्वराज्याचा गद्दार आणि दिमाखाने महाराजांशी वैर करणारी यशवंतमाची जर स्वराज्यात आली नाही...तर तुमच्यापैकी एकाने सुद्धा मराठेशाहीचे नाव घेऊ नका..!
खंडू च्या जीवावर मोठ्या विश्वासाने माझी जीभ लवलवली होती की यशवंतमाची एका महिन्यात स्वराज्यात येईल म्हणून...आज महिना होत आला तर पदरात काय पडले ?
अपयश ....? कत्तल....? गद्दारी...?

मी जातीने उद्या माचीवर हल्ला चढवणार....

इतक्यात समोर उभे असलेले वस्ताद काका धावत समोर आले....

त्यांनी बहिर्जींच्या पायाला मिठी मारली...ते बोलले...नाईक...आम्ही जिवंत असताना तुम्ही मोहिमेवर जाणार..?
मराठेशाही शेण घालेल तोंडात...महाराज कधीही माफ करणार नाहीत...!
आजवरची माझी नोकरी रुजू धरावी आणि मला अखेरची संधी द्यावी...!
शिकस्त करुन माची स्वराज्यात घेऊन नाहीतर...हे तोंड परत कधीही तुम्हाला दाखवणार नाही नाईक....."

वस्ताद काकांच्या डोळ्यातील आग पाहून नाईकांना त्यांना उठवले...

ते बोलू लागले....काका माफ करा मला मी जहाल बोलतो.
पण,आज मराठ्यांचा धाक अवघ्या पातशाहीला आहे कारण महाराज दिलेला शब्द पाळतात.
जर शब्द पाळू शकत नसेल तर तो मराठा नव्हे....!
उद्या सायंकाळ पर्यंत वाट बघू....

नाहीतर...शिरक्याची शिबंदी पांगु अथवा न पांगु...आपल्या तलवारी यशवंतमाची वर वळल्या पाहिजेत..ज्याचे

नेतृत्व मी स्वता करणार....जय भवानी...!

कराकरा पावले टाकत नाईक निघून गेले..!

इकडे यशवंतमाचीवर आनंदी आनंद होता...!
भीमा जाधव माचीचा खरा नायक ठरला होता...!

राजे येसजीरावांना शुद्ध आली होती,त्यांनी भीमा ला बोलावून घेतले होते..!
सारा दरबार भीमावर कौतुकाचा वर्षाव करत होता.

राजे बोलले.....भीमा...आज तुझ्या पराक्रमामुळे यशवंतमाची ची अब्रू वाचली.
बोल..डोंगरा एवढे उपकार आहेत तुझे माझ्यावर....काय देऊ तुला...?

धीरगंभीर मात्र मुत्सद्दी मुद्रेत उभा असणारा भिमा शांत उभा होता.

राजे मोठ्या आवाजात गर्जले..आजपासून मी शिरक्यांच्या सेनेचे सेनापती पद भीमाला बहाल करत आहे...!

हे ऐकताच सारी यशवंतमाची भिमावर फुले टाकू लागली...

बोल भीमा अजून काय हवे तुला....

भीमा शांतपणे पुढे आला....
राजे येसजीरावांना मुजरा केला व बोलू लागला...."

राजे जेव्हापासून तारुण्यात पदार्पण करुन प्रेम म्हणजे काय समजले आहे...माझ्या मनात,बुद्धीत श्वासात एकच मुलगी आहे...सावीत्री....राजे मला जर काही द्यायचेच असेल तर साऊ चा हात द्या...माझ्या प्रणापेक्षा जास्त मी तीला जपीन.....

हे ऐकताच वरच्या मजल्यावर स्रीयांच्यात उभी असलेल्या सावित्रीच्या हृदयाचे ठोके वाढले....डोळ्यात आग उतरली...ती बेभान होऊन भिमाकडे पाहू लागली...व दुसऱ्या क्षणात निघून गेली.....

राजे येसजीरावांना भीमाला काय उत्तर द्यावे समजेना....!

ते बोलले...भीमा..मी स्वता जातीने साऊ बरोबर चर्चा करुन उद्या तुला होकार-नकार सांगीन... तुझ्या सारख्या वीरांच्या हाती माझी मुलगी देणे मी भाग्याचे समजतो....असे म्हणताच सारा दरबार टाळ्या वाजवू लागला....जनतेचा कौल भीमाच्या बाजूने होता...!

दरबार बरखास्त झाला आणि भीमा तालमीत आला....पाठमोऱ्या अवस्थेत उभा असणाऱ्या खंडेरायाला मिठी

मारुन भीमा बोलू लागला....खंडोजी...आज केवळ तुमच्या मुळे या भीमाचे स्वप्न पूर्ण होत आहे. माझी गेलेली इज्जत तुम्हीच मला परत मिळवून दिली...कसे आभार मानू तुझे मला समजेना....!

हे ऐकताच खंडोजीला युद्धाच्या वेळेचा प्रसंग समोर दिसू लागला...

वस्ताद काका घाईने निघून गेले आणि यशवंतमाची ची पूर्व वेस मराठ्यांनी जिंकली होती..!
मराठ्यांची शुरता फक्त खंडोजीलाच माहिती होती....पण काही करुन ही गूढ वही सुरक्षित रहावी म्हणून त्याने यशवंतमाची बाहेरच्या डोंगरातील गुप्त गुहेत ती लपवली आणि पुन्हा यशवंतमाची त आला तर राजे येसजीराव जखमी असून यशवंतमाची हारण्यात जमा होती...!

खंडोजी ने साऊ ला भेटायला थेट वाडा गाठला व वस्तुस्थिती सांगितली....

अश्रूंनी भरलेल्या नेत्रांनी साऊ बोलली....खंडोजीराव...मला माझे राज्य आणि वडिलांचा प्राण गमावून स्वतःचा संसार थाटायचा नाही...!
एकतर मला तुमच्या तलवारीने मारुन टाका...नाहीतर माझ्या वडिलांचे प्राण वाचवा....आणि हुंदका देत ती रडू लागली....तो पोलादी पुरुष साऊ च्या प्रेमाने विरघळला आणि तडक तालमीत आला व तालमीतल्या शे दोनशे पैलवानांना जागे केले व बोलू लागला....."

अरे मर्दांनो...ज्याच्या जीवावर आजवर दूध तूप खाऊन पैलवान झालात तो तुमचा धनी तिथे बेशुद्ध पडला आहे....ज्या मातीत कुस्ती खेळाला ती माती धोक्यात आहे....भीमा सारखा भीमकाय मल्ल इथे असताना राजे येसजीराव स्वता युद्ध खेळतात हे बरे नव्हे...चला उचला समशेर आणि गाजवा मर्दुमकीचे तडाखे....जिंकलात तर नाव होईल हारलात तर अमर व्हाल....भीमा तू स्वता नेतृत्व कर आमचे...

असे म्हणत ते शे दोनशे पैलवान चवताळून मराठ्यांच्या फौजेवर तुटून पडले...स्वता खंडेराय पण होता त्यात...ज्याच्या सोबत तलवार चालवायला शिकला तीच तलवार आपल्या बंधूंच्या पोटातून आरपार करताना त्याचे काळीज तुटत होते..पण सवित्रीचा विरह मात्र यापेक्षा जीवघेणा होता म्हणून तो अखे घोडे उचलून फेकू लागला होता......

भरल्या नेत्रांनी खंडेरायला सारे आठवत होते

•●●··········●●•
क्रमश

बाजींद
भाग क्र.२५

~~~~~~~~~~~~~~~~~~~~

✍🏻लेखन/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या

Www.facebook.com/kustimallavidya

Whatsapp - 9850902575

(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)

~~~~~~~~~~~~~~~~~~~~

एव्हाना दिवस उजाडला होता.
सकाळची कोवळी सूर्यकिरणे घनदाट धुक्याला जाळत वातावरणात उब निर्माण करत होती.

सुर्याची कोवळी सुर्यकिरणे सखाराम च्या मुखावर पडली आणि त्याला जाग आली.
सुर्यनारायणाच्या झिलमीत किरणात समोरच खंडोजी बसला होता.
जणु सुर्य त्राटक लावले आहे..त्याच्या डोळ्यातून घळाघळा अश्रु येत होते.

सखाराम दचकून जागा झाला व त्याच्या साथीदारांना जागे केले.

आसपास केवळ माळरान होते,ते जिथे झोपले होते तिथे केवळ सपाट खडक होता..!

सखाराम व त्याच्या साथीदारांना काहीच समजत नव्हते...रात्री सावीत्री समोर व शिरक्यांच्या छावणीत बसून खंडोजी व सवित्रीचा भुतकाळ ऐकत कधी डोळा लागला समजला नाही,आणि जाग आली या पठारावर..आणि समोर खंडोजी ला पाहुन तर त्याहून अधिक धक्का बसला...!

मोठ्या आवाजात सखाराम,सूर्याकडे पाहत बसलेल्या खंडोजीला बोलला.....

तुम्ही कधी उगवला खंडोजीराव ??

सखाराम च्या बोलण्याने भानावर आलेल्या खंडोजीने सावध होत आपले अश्रूंनी डबडबले डोळे पुसले व चौघांकडे पाहुन बोलू लागला...

"मी ?
हे काय तुम्ही उठायच्या अगोदर इथे येऊन बसलो होतो..."

आणि रात्री अचानक कुठे गायब होता तुम्ही ?
रात्री आम्ही राजे शिरक्यांच्या छावणीत होतो आणि आता इथे कसे काय आलो..? सखाराम बोलला...!

अहो,रात्री हेरगिरी करावे लागते...मी शिवरायांचा निष्ठावान गुप्तहेर आहे...असतात न सांगण्यासारख्या

कामगीरी...!
तुम्ही गाढ झोपेत होता आणि शिरक्याची छावणी इथून दूर गेली...मला भेटले ते सारे...फक्त तुमची झोपमोड करणे त्यांना ठीक वाटले नाही...!
सावीत्री व मी उद्या भेटणार आहे..त्या अगोदर तुम्हाला वस्ताद काकांच्याकडे घेऊन जातो...म्हणजे तुमचे काम मार्गी लागेल..व मी सवित्रीसह आमच्या मार्गाने जाऊ..."

खंडोजीच्या स्पष्टीकरनाणे मात्र सखाराम ची शन्का दूर झाली.
आसपास च्या परिसरात सुद्धा रात्रीच्या छावणीच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या त्यामुळे शंका दूर झाली...."

समोरच एका गाठोड्यात खाण्याचे पदार्थ पाहून सखाराम बोलला...

हे जेवण तुम्ही आणलं काय खंडोजीराव ?

नाही...हे सावित्रीने तुमच्यासाठी ठेवले आहे...दोन घास खाऊन घ्या...आपण पुढचा प्रवास करु..!

जेवनाकडे पाहताच चौघांचेही चेहरे खुलले..ते चौघेही भाकरीचा तुकडा मोडून खाऊ लागले...."

पोटात थोडी भर गेल्याने सखाराम व त्याचे सोबती तरतरीत झाले.

मल्हारी,सर्जा,नारायण व सखाराम चौघेही आनंदी होते.

खंडोजी बोलला...गड्यानो आज फक्त एक दिवस..आज मी तुम्हाला वस्ताद काकांच्या सुपूर्द करतो,तुम्ही उद्याच राजश्री शिवाजीराजांच्या खासगी विभागात पोचते व्हाल..तुमची समस्यां कायमची मिटली जाईल......फक्त रात्र होण्याच्या आधी आपल्याला त्या गुप्तवाटेने जंगलात केवळ मला व काकांना माहिती असलेल्या गुहेत पोहचायचे आहे....

खंडोजीच्या बोलण्याने चौघे अजून आनंदी झाली...!

ते पाचही जण चालू लागले....!

धाडस करुन सखाराम बोलला....

खंडोजीराव..रात्री सावीत्री बाईसाहेब बोलत होत्या तुम्ही शिवाजीराजांशी गद्दारी केली असे बहिर्जी नाईकांचे मत झाले होते....ती कथा ऐकता ऐकता झोप आली...तुम्हाला राग येणार नसेल तर ती कथा पुढे संगशीला का ??

एक दीर्घ श्वास घेऊन मल्हारी बोलला....

राग ..?

कसला राग गड्यानो...आता खन्डोजी च्या आयुष्यात मानवी रुसवे फुगवे उरलाच नाहीत...आता जगतोय ते केवळ उपकारासाठी...
"

असे बोलून खंडोजी त्याचा भविष्यकाळ पुन्हा कथन करु लागला....!

यशवंतमाची

राजे येसजीराव शिरक्यांच्या तालमीत रात्रभर विचारात मग्न असलेल्या खंडोजीला काहीच सुचत नव्हते....भीमाला लढायला आपण उद्युक्त करुन चूक केली असे त्याला वाटत होते...!
एकतर स्वराज्याशी हरामखोरी आणि सवित्रीचा विरह दोन्ही गोष्टी त्याला सतावत होत्या....!
डोळ्यात पश्चात्तापाचे अश्रू ओघळत होते..!

सूर्यराव बेरड आपल्या नेकजात इमानदार कडव्या फौजेला घेऊन यशवंतमाची शेजारच्या डोंगरदरीत लपला होता. त्यांच्यावर कोणी हल्ला चढवला याचे रहस्य मात्र त्याला उलगडत नव्हते.

इकडे बाजीन्द व त्याच्या फौजेला सूर्यराव ला शोधून मारल्याशिवाय चैन पडणार नव्हता...एकदा जर का "बाजींद" चे गूढ दुसऱ्या व्यक्तीला समजले तर मात्र 100 वर्षाच्या तपस्येची राखरांगोळी होणार हे मात्र नक्की होती.!

दुसरीकडे वस्ताद काका मात्र यशवंतमाची उद्याच्या उद्या स्वराज्यात आणण्यासाठी मावळ्यांच्या प्रमुख शिलेदारांची बैठक घेत होते....ते मोठ्या आवेशाने बोलू लागले....

गड्यानो,उद्या जर यशवंतमाचीवर भगवा नाही फडकला तर सारी मराठेशाही शेण घालेल तोंडात आपल्या....यशवंतमाचीवर हल्ला चढवायला आपली फौज अपुरी आहे,पण ज्यादा कुमक यायला खूप वेळ जाईल...त्यापेक्षा एक युद्धनीती वापरायची आहे.....

शत्रूचा शत्रू तो आपला मित्र...हाकेच्या अंतरावर सूर्यराव बेराडाँची फौज आहे.
त्यांचा पण यशवंतमाची बरोबर जुना बदला आहे,याचा फायदा उठवत त्यांना सोबत घेऊया...यशवंतमाचीच्या हद्दीत असल्याने जंगलवाटा त्यांना चांगल्याच ठाऊक आहेत...!

गड्यानो,तयारीला लागा....!

वस्ताद काकांचा आदेश मिळताच हजार एक मावळ्यांचे पथक क्षणात तयार झाले.
केवळ पायी हल्ला चढवायचा असल्याने पायीच यशवंतमाचीकडे कूच करावी लागणार होती.

वस्ताद काकांनी फौजेचे दोन भाग केले.

यशवंतमाचीच्या पाठीमागून अर्धी सेना जाऊन रात्रीच्या अंधारात दबा धरुन बसेल,इशारतीची खून मिळताच वाऱ्याच्या वेगाने यशवंतमाचीवर मागून हल्ला चढवायचा..उर्वरित सेना घेऊन सूर्यराव बेरडला गाठून मदतीची विनंती करुन समोरुन हल्ला करायचा..!

बस्स,अशी चोख योजना आखून पुढच्याच क्षणात सारी सेना वाटेला लागली..!
प्रत्येक मावळा शिस्तबद्ध होता.
शिस्त हा शिवरायांच्या फौजेचा आत्मा होता..!

दरम्यान,बाजींद च्या सेनेने प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही सूर्यराव सापडत नसल्याने,अर्ध्या धारकर्यांना चंद्रगड कडे जाण्याची आज्ञा केली व पाच पन्नास धारकरी सोबत ठेऊन त्याने सूर्यराव ला शोधून काढण्यासाठी आपल्याजवळ असलेल्या बाजींद च्या गूढ विद्येचा वापर करुन माकडे,घारी-गिधाडे,किड्या मुंग्यांना सांकेतिक आवाज काढून बोलावण्याचा निर्णय घेतला....

बाजींद ने एकाग्र ध्यान करुन आत्मसात केलेल्या गूढ ज्ञानाने सांकेतिक आवाज आसपासच्या वातावरणात सोडले..........
कीटक,मुंगी,घार, गिधाड यांच्या पर्यंत त्यांच्या भाषेत बोलून त्यांना आपले कार्य करायला लावणारे गूढ ज्ञान...खरोखर विलक्षण होते सर्वकाही...!

बघता बघता जंगलातील अणुरेणु शहारले आणि मुंग्यांनी,घार गिधाडांची गर्दी बाजींद च्या भोवताली जमली.....

एक विलक्षण हास्य त्याच्या चेहऱ्यावर दिसत होते...जणू सृष्टीचा एक अशक्य भाग त्याचे स्वामित्व त्याच्याकडे असावे असे एकप्रकारचे हास्य होते ते....

त्याने त्या गूढ व विचित्र आवाजात सभोवतालच्या प्राण्यांना संदेश देणे सुरु केले....

सूर्यराव बेरड कुठे लपला आहे...त्याच्याकडे किती लोक आहेत...त्याच्याकडे लौकर जाण्याचा मार्ग काय...त्यांना जिथे आहे तिथे थोपवण्यासाठी मुंग्यांनी हल्ला चढवाव.. आणि या बदल्यात सर्व प्राण्यांना ताज्या मांसाची मेजवानी मिळेल असेही त्याने सांगून टाकले....."

त्याच्या त्या आदेशाने सर्व प्राणी त्वरित कामाला लागले व मजल दरमजल करत त्या गुप्त जागेत जिथे सूर्यराव यशवंतमाचीवर हल्ले करायची नियोजने करत होता तिथे पोचते झाले...

त्यागोदरच वस्ताद काकांच्या हेरांनी बातमी आणली की सूर्यराव बेरड कुठे लपला आहे...टाकटोक वस्ताद काका व धारकरी हाती पांढरे निशाण घेऊन सूर्यराव च्या गुप्त जागेत शिंग तुताऱ्या फुंकून सूर्यराव ला खून सांगू लागले...

शिवरायांची फौज ...?

नुकत्याच बाजींद च्या आकस्मित हल्ल्यातून वाचत गुप्त जागेत पुढे नियोजन करत बसलेल्या सूर्यराव ला शिवरायांच्या खूनेची चाहूल लागली व त्याने त्वरित निशाणबारदार पाठवून कोण,कुठून,कशासाठी आले आहे बातमी काढली.....,

बहिर्जी नाईकांची खास फौज वस्ताद काकांसह चर्चेसाठी सूर्यराव बेरड यांना भेटायला आली आहे...!

निरोप मिळाला...,

मोठ्या इतमामाणे सर्वांचे स्वागत झाले..!

इकडचे तिकडचे विषय संपवत काकांनी मूळ मुद्द्याला हात घातला...!

आमच्या एक हजार फौजेंसोबत जर तुमची हजार पाचशे फौज मिळाली तर यशवंतमाची सहज पडणार...!

उद्या सकाळी हिंदवी स्वराज्याचा भगवा झेंडा माचीवर फडकला तर तुम्हाला त्याचे सरदार नेमु हा शब्द आहे आमचा....!

हे ऐकून सूर्यराव च्या चेहऱ्यावर हास्य उमलले व तो बोलू लागला...!

काका,मला आपला कौल बिलकुल स्वीकार आहे..पण,यशवंतमाचीचा पाडाव करणे इतकी सोपी गोष्ट नाही. शेकडो चोरवाटा,निष्ठवान पैलवानांची फौज यासह अजून एक खास गोष्ट त्यांच्या ताफ्यात नुकतीच सामील झाली आहे ती म्हणजे तुमचे गुप्तहेर म्हणून माचीत शिरलेल्या खंडूकडे प्राण्यांचे गूढ आवाज व त्यांना आपल्या सारखे काम करायला लावणारे विलक्षण ज्ञान लिहलेली वही आहे....आता आधीच बिकट असलेली माची अजून बिकट झाली आहे..."

हे ऐकताच काकांना खंडू ने बोललेले शब्द खरे वाटू लागले...पण ती वही केवळ बहिर्जींला देईन असे त्याचे वचन पण आठवले...ज्या खंडोजी ला मी ओळखतो..तो प्राण देईन पण वचन तोडणार नव्हता....पण,पण आता काय उरले होते...स्वतःच्या बांधवांच्या खांद्याला खांदा लावून कुस्ती खेळाला त्यांचे गळे चिरायला ज्याला काही वाटत नव्हते तो स्वराज्याशी हरामखोरी करायला मागे पुढे कसा पाहिलं याची खंत काकांना होती...दीर्घ श्वास घेऊन ते बोलले....

सूर्यराव..यावर दुसरा पर्याय ..??

सूर्यराव उत्तरला....

यावर पर्याय एकच...माचीच्या आतून कोणी जर गुप्तवाट दाखवली तर माची संपली म्हणून समजा....!!

हे विषय सुरु असताना आभाळात घारी गिधाडांची गर्दी होती..आसपास मुंग्यांची दाटी उडाली होती आणि पुढच्याच क्षणी सर्व फौजेवर मुंग्यांची तिखट डंके बसू लागले आणि सर्वच्या सर्व अंग झाडून धावू लागले....एकेकाला पन्नास पन्नास मुंग्या....सर्वजण ती जागा सोडून धावून पठारी भागात आले व त्या मुंग्यापासून सुटका करुन घेऊ लागले....

दुसऱ्याच क्षणी घारी गिधाडांनी वस्ताद काका व सूर्यराव यांच्यात झालेली बातचीत व सूर्यराव चे ठिकाण बाजींद ला सांगितले....

क्षणात बाजींद ने सोबतच्या धारकर्यांना तयारीचे आदेश दिले आणि तो वीरांचा लोंढा पुन्हा सूर्यराव वर पडणार होता...पण आता अजून एक शत्रू वाढला होता तो म्हणजे वस्ताद काका...!

पण असो....बाजींद च्या गुप्ततेशिवाय जगात काहीं महत्वाचे नाही...चला रे....तलवार उचलणारे हात धडापासून वेगळे झाले पाहिजेत.....त्यांच्या सोबत जन्गलातील साप,विंचू,अजगर,वाघ सिंह,हत्ती चे थवेच्या थवे चवताळून ,बेताल ओरडत,किंचाळत धाऊ लागले......असे वाटत होते की आता यांच्या आडवे जो कोणी येईल त्याचे तुकडे पण वाटणीला यायचे नाहीत.......!

इकडे यशवंतमाची अजूनही विजयाच्या धुंदीत होती.
वास्तविक शत्रू पुन्हा येईल म्हणून योजना करायच्या सोडून भीमा स्वतःच्या लग्नाची स्वप्ने पाहत होता...!
सकाळीच तो राजांना भेटायला गेला होता...समोर राजकुमारी सावीत्री पण होती....!

भीमाला पाहून राजे बोलले....!

भीमा,तू यशवंतमाचीची अब्रू ,मान काल राखलास.
प्रत्यक्ष शिवाजीराजांच्या सेनेला पराभूत करणे म्हणजे आदिलशाही दरबारी मानाची गोष्ट..!
पण,तुझी सावित्रीची अट मला मान्य नाही मला माफ कर....!
सावित्रीला सूर्यराव बेरदडाच्या हल्ल्यातून वाचवणारा खंडेराय हा तिने पती म्हणून स्वीकारला आहे...!

हे ऐकताच भीमा संतापला....काय...?
खंडेराय ..?
राजे...जीवावर उदार होऊन केवळ साऊ साठी मी लढलो...आजवर फक्त तीच्यासाठी जगलो..!
नाही...मी लग्न करेन तर साऊ शी....भलेही मला खंडेराय चा खून करायला का लागू नये...असे बोलून त्याने समशेर उचलली आणि तरातरा तालमीकडे खंडेराय ला गाठून मारायच्या उद्देशाने तो निघाला....!

जाताना सावीत्री फक्त माझी आहे अश्या आरोळ्याने सारी माची तालमीजवळ आली होती..!

धाडदिशी त्याने तालमीच्या दरवाजाला लाथ मारली आणि तो आत गेला....!

राजे व साऊ सोबत हजारो यशवंतमाचीचे नागरिक धावत तालमीजवळ आले होते...आता भीमा खंडेराय ला जीव मारणार...ते तालमीच्या दरवाज्यातून आत जायला जाणार इतक्यात त्याच दरवाजातुन एकाच वेळी 3-4 पैलवान धाडकन बाहेर फेकले गेले...आणि आपल्या प्रचंड हातात भीमा ला अंतराळी उचलून खुद्द खंडेराय तालमीतून बाहेर आला व त्याला सावित्रीच्या पायात आदळून त्याच्या छातीवर पाय ठेऊन बोलू लागला..

सावीत्री......सावीत्री तुझी नव्हे...जन्मोजन्मी फक्त या खंडेरायाची आहे....तिच्यासाठी मी माझ्या देवाला विसरेन एकवेळ हरामखोर कुत्र्या...!

असे म्हणत त्याने तलवार त्याच्या छातीवर रोखली...पण त्वरित साऊ पुढे झाली व ती रोखत म्हणाली...नको खंडोजीराव...याला प्राणदान द्या....

याने माची वाचवून उपकार केलेत सर्वावर....याला प्राणदान द्या.....राहिली गोष्ट या सावित्रीची....हि साऊ फक्त आणि फक्त तुमचीच राहील ..

असे म्हणत तिने घट्ट मिठी खंडेरायाला मारली....!

उपस्थित नागरिकांनी टाळ्या वाजवल्या व त्या विवाहाला जणू अप्रत्यक्ष संतमती दिली...!

भीमा व त्याच्या पाच पन्नास साथीदारांना यशवंतमाचीच्या फौजेने हाकलून माची बाहेर काढले..!

साऊ व खंडेरायाचे लग्न उद्याच सकाळी लावून दिले जाईल असे राजे यशवंतरावांनी जाहीर केले....!

सारी माची आनंदात होती पण अपमानाचा सूड घेण्याची तीव्र इच्छा मनी बाळगून भीमा व त्याचे साथीदार माचीबाहेर पडले......!

•●●क्रमश●●•

बाजींद

भाग क्र.२६

~~~~~~~~~~~~~~~~~

✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या

Www.facebook.com/kustimallavidya

Whatsapp - 9850902575
~~~~~~~~~~~~~~~~~

(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~~~
वाऱ्याच्या वेगाने जंगलातील हिंस्त्र प्राणी व किडा कीटक मुंग्यापासून ते बलाढ्य हत्ती पर्यंत सर्वच्या सर्व प्राणी बाजींद च्या हुकमाचे "बाजींद" होते..!
ज्यावर बाजींद ची तलवार रोखली जाईल त्याचा प्राण त्याच्या शरीरातून बाहेर काढणे हेच एकमेव काम त्यांचे होते.

वस्ताद काका व सूर्यराव बेरड यशवंतमाची वर हल्ल्याच्या वाटाघाटीत मश्गुल असताना दूरवर जंगली श्वापदांचा आवाज कानावर येऊ लागला,प्रत्येक क्षणी तो आवाज वाढतच होता.
त्या आवाजाने बेरड व काकांची तुकडी भयकंपित होऊन वर खाली आजू बाजू पाहू लागली.!
काही वीरांनी जुमानून उसण्या अवसानाने तलवारी उपसल्या... क्षण..दुसरा क्षण...मोठमोठी झाडे उपटून समोर दिसेल त्याच्यावर आदळत हत्तीचे कळप ,या झाडावरुन त्या झाडावर मुक्त झेपा घेत व त्याबरोबर आकाशपातळ दनानून सोडणाऱ्या डरकाळ्या फोडत वाघ सिंह दिसू लागले..सर्वच्या सर्व प्राणी बेफाम दौडत होते आणि मागोमाग बाजींद चे अश्वदल चौखूर दौडत येत होते..!

ते चित्र पाहताच भल्याभल्या सुरमा वीरांची छाती कचदिल होत होती..!

त्या वाघ सिंहाचा एका झेपत शेकडो वीर मरु लागले होते...हत्ती सोंडेत धरुन एका एका वीराला नारळ आपटून फोडतो तसे आपटत होते....!
केवळ मरणासन्न आर्त किंकाळ्या..आणि यातून जे वाचत होते ते बाजींद च्या तीरकमठयाचे शिकार बनत होते....!

अशा वेळी जो तो एकच शब्द बोलत होता...पळा..!
सारेच पळत सुटले होते...पण वेळ आणि काळ याचे गुणोत्तर इतके अचूक होते की पळणारा काही क्षणात भक्ष बनत होता.!

साराच गोंधळ..!
वस्ताद काका व सूर्यराव ला समजेना की काय प्रकार होत आहे...ते सुद्धा समजून घेण्याच्या अवस्थेत नव्हते...कुठेतरी गुप्त जागा शोधत ते सुद्धा धाऊ लागले....!
एक प्रचंड हत्ती सूर्यराव च्या मागे लागला.
त्याने त्याच्या घोड्याचा मागचा पाय उचलून घोड्याला हवेत भिरकावले.
सूर्यराव घोड्यावरून बाहेर फेकला गेला...!
सूर्यराव ने तलवार उपसली आणि त्या चवताळलेल्या हत्तीच्या सोंडेवर जोरदार हल्ला केला...!
सपदिशी झालेल्या वाराने हत्तीची सोंड तुटून पडली...!
शांतपणे वाहणारे नदीचे पाणी वादळी पावसाच्या पाण्याने लालभडक होऊन वहावे अगदी तसेच हत्तीच्या सोंडेतून रक्त पडू लागले...!
~~~~~~~~~~~~~~~~~~

हत्ती ची ची ची ची करत मागे फिरला व गिरकी घेऊन खाली कोसळला... जागीच गतप्राण झाला होता..!
हत्ती मारला याचा उरात अभिमान घेऊन सूर्यराव ती रक्ताळ लेली समशेर घेऊन छाती फुगवून हसू लागला....

इतक्यात

बाजींद च्या तिर कमठयातुन सूर्यराव च्या मस्तकाचा वेध घेतलेला बाण सु सु सु करत आला व क्षणात सूर्यराव चे मुंडके धडावेगळे करत खाली कोसळला...!

इतक्या वेगाने आलेल्या बाणामुळे सूर्यरावला त्याचे शिर कधी तुटले हेच समजले नाही..!

शरीराशिवाय ते तलवार घेतलेले शरीर तसेच उभे होते.
ते दृश्य पाहून भल्याभल्यांची बोबडी वळाली.

आता सर्व संपल्यात जमा होते.
बाजींद ने सूर्यराव चा खात्मा करायची केलेली प्रतिज्ञा पूर्ण झाली होती.
त्याच्या मुखावर समाधान होते की बाजींद च्या गूढ ज्ञानाचा साक्षीदार आता संपला आहे...!

वस्ताद काकांनी सूर्यराव चे शिरावेगळे धड पहिले आणि त्यांचे क्षत्रिय रक्त उचंबळून आले..!
त्यांनी दोन्ही हातात पट्टे चढवले आणि आता मारु मरु युद्धाची आरोळी ठोकली....!

सुदर्शन फिरावे तसा पट्टा फिरत होता..!
जो आडवा येत होता त्याची खांडोळी उडत होती.
आसपास बिथरलेली जन्गली जनावरे सुद्धा त्या पट्ट्याच्या वर्तुळात जाऊ शकत नव्हती...!
वस्ताद काकांच्या आक्रमणामुळे बाजींद व काकांच्यातील अंतर कमी होऊ लागले..!

आता,बाजींद ला युद्धासाठी सज्ज व्हावे लागणार होते....त्यांनीही हातात पट्टे चढवले व काकांशी सामोरा गेला...!

पट्ट्या वर पट्टे आपटून ठिणग्या पडू लागल्या...कोण कोणाला कमी नव्हते...पण बाजींद ची निष्पाप श्रद्धा व तपश्चर्या नक्कीच काकांपेक्षा मोठी ठरली आणि एका वर्मी घावाने काकांचा पट्टा खोबणीतुन तुटला....!
संधी मिळताच काकांच्या छातीवर जोरदार लाथ घालून बाजींद उभा राहिला...!
त्या लाथेने तोल जाऊन काका खाली पडले....!
काका खाली पडते न पडते इतक्यात आसपास उभे असणाऱ्या वाघ,सिंह,लांडगे,कोल्हे एकाच वेळी त्यांच्यावर तुटून पडले...काकांनी आता आपले जीवन संपले आशा आवेशात डोळे घट्ट मिटले आणि मृत्यूस तयार झाले...!

ति जनावरे आता काकांच्यावर हल्ला चढवणार...

इतक्यात

जंगलाच्या पूर्व दिशेला तोंडाला काळे अवलान बांधून पांढऱ्याशुभ्र घोड्यावर उभा असणाऱ्या एका धीरगंभीर योध्याने चित्रविचित्र आवाज काढून जन्गलातील त्या बिथरलेल्या प्राण्यांना जागीच स्तब्ध केले....अजून अधिक तीव्र व गूढ आवाज ऐकून ते सारे हिंस्त्र प्राणी गुमान मागे सरकू लागले....!
अजून काही वेळ गेला आणि ते सारे प्राणी दाट जंगतलात निघून गेले.........

हे सारे दृश्य बाजींद पाहत होता..!
कोण...?
जो बाजींद च्या गूढ विद्येचा जाणकार आहे..?
जो मला माहिती नाही,पण बाजींद ची ती गूढ विद्या जाणतो....?

बाजींद ने हातातील पट्टे खाली टाकले आणि त्याच गूढ भाषेत केवळ त्या योध्याला समजेल असे विचारले...

"अरे,महान योध्या ?
तू कोण आणि काय तुझे नाव गाव....?
तुला हे बाजींद चे अती पवित्र ज्ञान कसे माहिती,जरा मला सांग कृपा करुन..."

त्याच्या प्रश्नावर त्या योध्याने त्याच भाषेत उत्तर दिले....."

मी कोण हे तुला सांगायची गरज नाही..आणि तू जसे म्हणतोस की हे ज्ञान बाजींद चे आहे...तर तुझ्या माहितीसाठी सांगतो....मला कुठल्या बाजींद ने ही भाषा शिकवली नाही.....ही भाषा मला शिकवली आहे ते माझ्या आत लपलेल्या योध्याने...माझ्या प्राणप्रिय ध्येयाने...या भाषेचा उगमच जर विचारशील.....तर ऐक........अश्या अनेक भाषा विद्या ज्या महान पुरुषापुढे थिटी पडतील असा पुरुष आहे..."राजा शिवछत्रपती "

राजा शिवछत्रपती......

खंडोजीच्या अंगावर काटे व डोळ्यात पाणी तरळत होते जेव्हा त्याच्या मुखातून शिवाजी महाराजांचे नाव येत होते...!
एकाग्र मनाने सखाराम व त्याचे सवंगडी ती कथा ऐकत होते.
भरल्या डोळ्यांनी ती कथा सांगत खंडोजी रडू लागला होता...!
काही क्षणात तो सावरला ...तो सावध झाला.....!

सखाराम बोलला....

खंडोजीराव...ज्या गूढ ज्ञानापाई तुमी सारं रामायण केलं ते गूढ ज्ञान बाजींद व्यतिरिक्त कुठल्या योध्याला माहिती होते ओ ??

कोण असा योद्धा होता जो वस्ताद काकांना वाचवायला एवढ्या जंगलात आला होता ज्याला पण बाजींद सारखी जनावरं बिथरुन टाकायची कला माहिती व्हती...?

खंडोजी शांतपणे सखाराम कडे पाहून हसू लागला....!

योद्धा....मी सांगतोय ना पहिल्या पासन....अरे त्यो योद्धा नव्हता....ना शिपाई होता....ना देव होता....ना राक्षस होता......तो साधा माणूसच होता रं...... फक्त त्याचा देव शिवाजी होता....त्या देवासाठीच त्यानं सार आयुष्य ओवाळून टाकलं होतं.....

ते होते...खुद्द बहिर्जी नाईक......

•●क्रमश●•

बाजींद

भाग क्र.२७

~~~~~~~~~~~~~~~~~~~~

✍लेखन/संकल्पना/शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या

Www.facebook.com/kustimallavidya

Whatsapp - 9850902575

(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)

~~~~~~~~~~~~~~~~~~~~

सखाराम आणि त्याचे सवंगडी स्तब्ध उभे होते.

गेले दोन चार दिस या खंडोजी आणि सावित्रीच्या तोंडून जे काही ऐकत आलोय त्याचे उद्यापन म्हणजे बहिर्जी नाईक होते कि असे वाटू लागले होते.

डोके सुन्न झाले होते चौघांची...!

ज्या माणसानं हिंदवी स्वराज्याची धुरा स्वतःच्या खांद्यावर पेलली पण कुठेही नाव प्रसिद्ध केले नाही.

काय विलक्षण माणूस असेल हा बहिर्जी...!

खंडोजी बोलू लागला..

लय अजब रसायन आहे बहिर्जी नाईक म्हणजे..!

10-10 दिस अन्नपाणी शिवाय राहतो,तर महिना महिना भर एकाच झाडावर दबा धरुन बसतो...!

धावायला लागला तर वाऱ्याच्या कानफाटीत मारल्यासारखे धावतो,पुराच्या डोहात खुशाल उडी मारतो..!

तलवार,भाला,फरीगगदा,पट्टा, विटटा,धनुष्य,असे काही चालवतो की समोर महासागर येऊदे शत्रूचा...!

शत्रूच्या राणीवशात जाऊन राहू शकतो,तर खुद्द औरंगजेबाच्या दरबारात जाऊन त्यालाच कव्वाली ऐकून बक्षीस

घेऊन येऊ शकतो...!
माणूस म्हणाल तर एकही माणसाचा गुण नाही,जनावर म्हणाल तर दिसतो माणसासारखा..!
मोठमोठ्या गोष्टीत अचूक निर्णय,सावध नियोजन आणि स्वतःच्या देखरेखीखाली प्रत्यक्ष घोडदौड...!
खर सांगतो गड्यानो...हा बहिर्जी नाईक जणू शिवरायांचा तिसरा डोळाच होता..!

आणि शिवराय त्याला इतके मानतात की महाराजांच्या राणीवशात एकमेव जिजाऊ माँसाहेब सोडून कोणी विना परवाना जाऊ शकत असतील ते म्हणजे बहिर्जी नाईक...!
गड्यानो,महाराजांचा नाईकांच्यावर इतका विश्वास की हा माणूस चुकून सुद्धा चूक करु शकणार नाही इतका दृढ विश्वास...!

पाची पातशाहिना रणांगणात चारी मुंडी चित करुन जेव्हा महाराज राज्याभिषिक्त झाले तेव्हा सुद्धा बहिर्जी नाईक समोर येऊ शकत नव्हते इतकी गुप्तता पाळत होते नाईक....!

महाराजांचा अभिषेक सुरु होता,महाराज मुक्त हस्ताने गरीब फकिराना ओंजळ भरभरून द्रव्य दान करत होते आणि एक म्हातारा फकीर त्या रांगेत उभा होता...!
जक्ख म्हातारा हुंदके देऊन रडत होता आणि डोळे भरून महाराजांना पाहत होता.....महाराजांनी जेव्हा त्या फकिरला पाहिले तेव्हा मात्र त्यांच्या अश्रूंचा बांध फुटला...!
ओठावर मिशा नव्हत्या तेव्हा पासून या बहिर्जी आणि मी हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले....आणि आज मराठेशाही स्थापन होत आहे,राज्य आनंदात आहे,आणि ज्याने आजवर सारी संकटे आपल्या छातीवर झेलली तो बहिर्जी फकीर होऊन याचकांच्या रांगेत उभा आहे...!
काय बोलावे या प्रकाराला....कसली वेडी माणस असतील ती...!
एका मंदिराला फरशी दान दिली की साऱ्या घराण्याची नावे टाकणारे तुम्ही आम्ही त्या बहिर्जी नाईकांच्या काळजाला कधी समजू शकू का ?
स्वतःच्या बायकोला सुद्धा अगदी शेवटपर्यंत माहिती नव्हते की ज्याच्या सोबत मी सात जन्माचे बंधन बांधले आहे....तो खुद्द स्वराज्याच्या गुप्तहेरप्रमुख बहिर्जी नाईक आहे....इतकी कमालीची गुप्तता...!
आणि एवढा विलक्षण त्याग करुन राजे त्यांना देत तर काय होते ओ ...?
काहीच नाही....उलट प्रत्येक मोहिमेत जीवाचा प्रश्न...माघारी येईल का नाही शाश्वती नव्हती...!
हि वेडी खुळी माणसे अशी का जगली असतील ??
बस्स...एवढ्या एका प्रश्नाचे उत्तर ज्याला समजून येईल त्याच्या आयुष्याचे सोनं झाल्याशिवाय राहणार नव्हते....!

पण,ज्याच्या खांद्याला खांदा लाऊन हे सारे ज्याने भोगले होते त्या खंडोजीला मात्र समजून पण उमजत नव्हते....!

यशवंतमाची अजूनही मराठ्यांशी वैर घेऊन दिमाखात मिरवत होती आणि त्याच माचीच्या राजकुमारी बरोबर

विवाहाच्या बोहल्यावर खंडोजी चढत होता...!

सारी यशवंतमाची आनंदात होती.
सर्वजण लग्न मंडपात जमा झाले होते.
राजकुमारी सावीत्री मनस्वी आनंदी होती.
खंडोजी चे स्वप्न पूर्ण होत होते...!
अंतरपाट धरुन पंडितजी मन्त्र म्हणू लागले.
देवा ब्राम्हणांच्या साक्षीने खंडोजी व सावीत्री कायमचे एक होणार होते.....!
सारा आनंदी आनंद होता....!

पण,इकडे बाजींद ने समोर उभ्या असलेल्या बहिर्जी नाईकांना पाहून मात्र स्वतःचे भान हरपले होते..! ज्याच्या केवळ गोष्टी ऐकून रक्त उसळत असायचे,असा महान गुप्तहेर चक्क माझ्या समोर उभा आहे,ही कल्पनाच त्याला आनंदित करत होती..!

बाजींद व त्याची सेना तलवार दोन्ही हातात आडवी धरुन गुडघ्यावर बसली व मान खाली घेत बहिर्जी नाईकांना शरण गेली...!

नाईक पाय उतार झाले...तोंडाला बांधलेले काळे अवलान त्यांनी सोडले व धीरगंभीर पाऊले टाकत बाजींद जवळ आले व दोन्ही खान्दे धरुन उठवत म्हणाले.....!

बाजींद.....तुमच्या शौर्याच्या कथा मी जाणून आहे.
कोनापुढे तुम्ही झुकने हे तुम्हास शोभा देत नाही...उठा.!

बाजींद उत्तरला....नाईक...तुम्ही कोण आणी काय आहात हे केवळ आम्ही जाणू शकतो इतर कोणीही नाही. केवळ आपली भेट घडावी या साठी आपल्या खंडोजी ला आम्ही चंद्रगड ला बोलवून घेतले व आमच्या पूर्वजांची व प्राण्यांचे अद्भुत आवाज ओळखण्याचे विज्ञान लिहलेली वही तुमच्या कार्यासाठी दिली...."

बहिर्जी हसले...ते मोठ्या विलक्षण पोट तिडकीने बोलू लागले......

गूढ ज्ञान....आणि स्वराज्य...!
माफ करा बाजींद......शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याला आजवर ना कोणत्या गूढ ज्ञानाची गरज भासली होती ना इथून पुढे भासेल....अहो 350 महाराष्ट्र गुलामगिरीत धडपड करत होता.
जुलमी अगंतुकानी महाराष्ट्राची मसनवाट करुन टाकली असताना आमच्या शिवाजी राजांनी साधारण माणसाना घेऊन असामान्य इतिहास निर्माण केला.
गुलामगिरी मातीत घालून स्वाभिमानाचे ,भगव्या झेंड्याचे राज्य आणले ते केवळ मृतवत अंतकरणात स्वाभिमान जागृत करुन....लाथ घालाल तिथे पाणी काढाल ही भावना आमच्यात जागवून आमची मने

मोठमोठी महायुद्धे जिंकायला तयार केली ती केवळ महाराजांनी....आणि अशी कणखर मने साक्षात कळीकाळाच्या सुद्धा हाका ऐकू शकतात तिथे ही जनावरांची भाषा जाणणे हे तर फार किरकोळ गोष्ट आहे गड्यानो....तुम्हाला जर शिकायचेच असतील ते देव,देश आणि धर्मासाठी हसत हसत मारु आणि मरु शकणारे शिवाजी शिकायला हवेत...!

बहिर्जी बेभान होऊन बोलत होते आणि बाजींद सर्वांगाचे कान करुन ते सर्व ऐकत होता.
आत्ता पर्यंत "बाजींद" हेच जगातील सर्वात श्रेष्ठ ज्ञान समजत असलेल्या बाजींद ला बहिर्जी नाईकांच्या तोंडून ब्रम्हज्ञान ऐकायला मिळत होते..!

पण,चंद्रगड ची गुप्तता आसेतु हिमाचल अबाधित राखणे हे बाजींद चे कर्तव्य होते.
नाईकांच्या हाकेला कधीही धावून येऊ असे आश्वासन देऊन बाजींद ने बहिर्जी नाईकांची रजा घेतली व टाकटोक तिथून चंद्रगड च्या रस्त्याला निघाले....!

नाईक मागे फिरले....आता त्यांची चवताळलेली नजर वळाली ते यशवंतमाचीकडे.....!

दरम्यान राजे येसजीरावांच्या व सावित्रीने केलेल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी भीमा जाधव व त्याचे सहकारी यशवंतमाची च्या जंगलात फिरताना मराठ्यांच्या हाती लागले...!
वस्ताद काकांनी ते कोण कुठले याची खडा न खडा माहिती काढली..एका शत्रूचा शत्रू जर आपल्याला मिळाला तर तो मित्र होतो....!
काकानी जर भीमाने आम्हाला यशवंतमाची कडे जाणारी गुप्तवाटेने नेले तर यशवंतमाची ची जहागिरी त्याला देऊ असे कबूल केले..!
सुडाच्या संतापात चवताळलेल्या भीमाने हा कौल त्वरित स्वीकारला....!

आणि भीमाने यशवंतमाची कडे जाणारी गुप्तवाट मराठ्यांच्या फौजेला दाखवून दिली....!

इकडे यशवंतमाची त साऊ आणि खंडोजी चे विधिवत लग्न पार पडले होते...!

एका उंच डोंगराच्या पायथ्याला खंडोजी व ते चौघे थांबले...!
दम खात खंडोजी बोलला....
बरं मंडळी...रामराम घ्या आमचा...!
वर डोंगरावर एक मंदिर हाय...तिथं जो कोणी आसल त्याला "उंबराच फुल" ह्यो सांकेतिक परवलीचा शबुद सांगा...त्यो तुम्हास्नी म्होरं वस्ताद काकाकडं घेऊन जाईल...त्यांना सांगा तुमची अडचण,ते महाराजांच्या कानी त्वरित घालतील तुमची व्यथा...पर एका गोष्टीच भान पाळा.... चुकून बी मी तुम्हाला हितवर आणलय सांगू नगासा...!
जातो म्या,
परत भेट होईल असं वाटत नाय...लय कामं पडली हायती स्वराज्याची...माझी आण तुमची साथ आता हितवर

च...!

सखाराम आश्चर्याने बोलला....अहो खंडोजीराव..आस का बोलताय ?
खंडोबाच्या आशीर्वादान जणू तुम्हास्नी आम्हा गरिबांच्या मदतीला धाडलय....तुमची कथा ऐकून रगात उसळतया गड्या....लय लय भोगलया तुम्ही खंडोजीराव.......पुढं काय झालं हे तर सांगा आण मग जावा...."

खंडोजी हासत बोलला....नाही सखाराम....सुर्य मावळला की मला जावे लागते रे.....आणि आजची ही माझी शेवटची रात्र...तुम्ही बिगीन वर जावा....तुमचा गाव कायमचा सुखी व्हणार....

डोळ्यात आलेले अश्रू पुसत खंडोजी तरातरा चालत जंगलात जाऊ लागला....त्याच्या त्या अधीर शब्दात एक प्रकारची उदासीनता जाणवली....सखाराम ला का कोणास ठाऊक असे वाटू लागले की जणू माझ्या कोणीतरी जवळचे मला सोडून जात आहे....!

•●क्रमश●•

बाजींद
भाग क्र.२८
~~~~~~~~~~~~~~~~~~~
✍लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~~~~

खंडोजी नजरे आड झाला आणि ढगातून सहस्रो जलधारा पृथ्वीवर कोसळू लागल्या..!
पावसाचे पडणारे थेंब सखाराम,सर्जा,नारायण व मल्हारी ला भिजवू लागले...!
पण,आता शरीर भिजले तरी त्याचे काहीच चौघांना वाटत नव्हते,खंडोजी च्या मुखातून रायगड च्या जंगलात घडलेल्या एका अद्भुत अध्यायाचे श्रवण करुन ते चौघेही आकंठ त्यांच्या भूतकाळात भिजून गेले होते...!

अंगावर चांगलाच गारठा वाढू लागला आणि ते चौघेही त्या डोंगराच्या चढणीला लागले होते.
कोणी कोणाबरोबर बोलत नव्हते...निशब्द शांतता.
वरुन कोसळनाऱ्या सरी आणि चढणीने लागलेला दम व त्यामुळे होणारा श्वास उचश्वासाचा आवाज एवढेच ऐकू येत होते...!

सखाराम विचार करत होता की काय अदभूत कथानक घडले खंडोजी च्या आयुष्यात....!
ज्या प्रेमामुळे त्याने कर्तव्यात कसूर केली त्याच प्रेमाच्या आड किती भयानक संकटे येतात.....ज्या बाजींद च्या गूढ ज्ञानाचे आम्हीही दिवाने झालो होतो ते ज्ञान तर बहिर्जी नाईकांच्या पुढे काहीच नाही...आणि असे बहिर्जी नाईक ज्या शिवाजी महाराजांसाठी जीवन सुद्धा ओवाळून टाकत आहेत...ते शिवाजी महाराज कसले असतील....सखाराम विचार करता करता रडू लागला होता....पावसाच्या पाण्यात त्याचे अश्रू वाहून जात होते....मनात मात्र शिवरायांना डोळे भरुन पहायची आस निर्माण झाली होती..!

एव्हाना डोंगराचा चढ संपून पठार लागले आणि समोर पावसात धूसर दिसणारे मंदिराचे शिखर दिसू लागले ...मल्हारी बोलला....आरं ते समोर दिसते ते मंदिर बगा आलं....आता ह्यात कोण भेटणार देवालाच ठाऊक बाबांनो.....आज रात्री हितं थांबू आणि उद्या मातूर मागं फिरायचं आता....लय दिस झालं ही दरीखोरी पालथी घालतोय बाबांनो....बास ,मला काय आपण शिवाजी राजांच्या पर्यंत पोचू असं वाटत नाय.....!
त्याचा शब्द मध्येच खोडत सखाराम बोलला....नाय मल्हारी,आता तर महाराजांचं दर्शन घेऊनच जायचं....बस्स काहीही होवो,आपलं काम भलेही न होवो...महाराजांच्या पायावर डोकं टेकवू आन मगच धनगरवाडी गाठू....चला....!

ते सर्व त्या भव्य दगडी मंदिराच्या नंदी समोर उभे राहून आत बघू लागले..!
पावसाने बाहेर पाणीपाणी झाले होते मात्र मंदिराच्या गाभाऱ्यात एक मशाल तेवत होती.....!
चौघेही आत गेले....डोके झटकून पाणी हाताने पुसू लागले इतक्यात डोईला मावळी मुंडासे बांधलेला एक वृद्ध माणूस हातात मशाल घेऊन त्या चौघांजवळ आला....त्यांना पाहून त्याने त्यांना विचारले....कोण हाय रं बाबांनो तुमी...इतक्या रात्रीच कसं काय ह्या डोंगरावर...?
वाटसरू हायसा का रस्ता चुकून वर आलायसा....?

त्याच्या प्रश्नाणने सखाराम समोर होत बोलला....म्हातारबा रामराम....आम्ही टकमक धनगरवाडी चे धनगर...गावचे गावकारभारी हावोत....असे म्हणत सगळी हकीकत त्यांनी त्या म्हाताऱ्याला सांगितली व महाराजांना भेटून मदतीची मागणी करायला आम्ही निघालोय असे बोलतो न बोलतो इतक्यात...त्या म्हाताऱ्याच्या मागून 3-4 धिप्पाड मावळे सपासप तलवारी उपसून सामने आले व चौघांच्या नरड्यावर तलवारी रोखल्या...तो वृद्ध माणूस जरा मोठ्या आवाजात बोलला....ए खर सांगा नायतर तुमच्या मुंड्या धडावेगळ्या झाल्या म्हणून समजायच्या.....ह्यो डोंगर सहजा सहजी कोणाला गवसत नाय....इथं यायला कितीतरी गुपीत वाटा पार कराव्या लागत्यात....फक्त आमच्या हेरांनाच या वाटा ठाऊक असतात...बोला तुम्ही कोण नाहीतर सम्पला तुम्ही...!

आधीच डोंगर चढून दमलेल्या त्या चौघांना त्या आकस्मित हल्ल्याने पाचावर धारण बसली...त्या खंडोजीच्या नादाला लागून मरणाच्या दाढेत आलो असे त्यांना वाटू लागले...भीतीने चौघेही काही बोलत नव्हते.....

त्यांच्या गप्प बसण्याने ते मावळे अजून चिडले व चौघांना बेदम हाणू लागले...लाथा बुक्क्याचे प्रहार तोंडावर

बसताच चौघेही जिवाच्या आकांताने ओरडू लागले ...इतक्यात नारायण ला अचानक खंडोजी चे शब्द आठवले...मंदिरात कोणी भेटले की परवली चा शबुद सांगा..."ऊंबराच फुल"

एका क्षणात नारायण ओरडू लागला.....ऊंबराच फुल....ऊंबराच फुल.....ऊंबराच फुल....!

तो शब्द कानी पडताच ते धारकरी जाग्यावर थांबले आणि नारायण कडे पाहत विचारु लागले...कोण कोण तुम्ही......?
पुढच्या क्षणी त्या चौघांनी हात जोडून त्या चौघांची माफी मागितली व तो वृद्ध माणूस बोलू लागला....

तुम्हाला अगोदर परवली शब्द सांगायला काय झाले होते ?
बिनकामी जीवानीशी गेला असता...चला आत या....असे म्हणून त्याने चौघांना आत घेतले..!
मंदिराच्या आत असणारी दांनपेटी त्या चौघांपैकी दोन मावळ्यांनी उचलली आणि एक मशालवाला आत उतरला....त्या पेटीच्या आत मधून दगडी पायर्या आत जाणाऱ्या होत्या...!

त्या चौघांनी सखाराम व त्याच्या साथीदारांना आत उतरवले आणि पेटीची दार लावून एका मागोमाग एक चालू लागले......बराच वेळ चालले आणि आत एका विस्तीर्ण कक्षात पोहचले...!

त्या कक्षात सर्वत्र समई तेवत होत्या,भिंतीवर ढाल तलवारी अडकवल्या होत्या...!
समोर लांबसडक बांबूच्या ठासणीच्या बंदुकीत दारू ठासत एक शिलेदार मग्न होता...
बाजूला एका मंचकावर ठेवलेल्या एका नकाशा भोवती मावळ्यांची बैठक सुरु होती...

सखाराम व त्याचे साथीदार भांभवल्या नजरेने सारे पाहत होते...एका कक्षातून दुसऱ्या कक्षात काही मावळे जडी बुटी कुटून औषध बनवत होते..तर काहींच्या समोर नकली दाढी मिशी..फकीर सन्याश्याची वस्त्रे पडली होती....!

ज्याने सखाराम व त्याच्या साथीदारांना त्या गुहेत गुप्तवाटेने आणले तो वृद्ध माणूस हसत हसत सखाराम ला बोलला....गड्यानो,ही आमची हेरांनी गुप्त जागा.
इथे आम्ही स्वराज्यातील सर्व हेराकडून आलेल्या निरोपाचे पृथकरण करतो व योग्य कारवाई करतो..!
इथून केवळ रायगड नव्हे तर साऱ्या स्वराज्यातील हेरांना काय हवे नको ते पोचवले जाते..!

येड्यानो,परवली शब्द सांगितल्या शिवाय आपले काम होत नाही,हे माहिती असून सुद्धा तुम्ही वेळ केला सांगायला...हकनाक जीव गेला असता कि...तो वृद्ध पुन्हा हसू लागला व ते सर्व चालत पुन्हा एका तिसऱ्या कक्षात वळाले....!

सखाराम ने मनात विचार केला की आपण हेरच आहोत असा बहुतेक सर्वांचा समज झालेला दिसतोय....पण,जर हेर नाही हे कळाले तर पुन्हा मारतील या विचाराने तो गप्प झाला....

त्या कक्षात काही फितूर हरामखोर दगाबाज लोकांना पकडून त्यांना उघडे करुन पट्ट्याच्ने मारले जात

होते...आर्त किंकाळ्या व रक्ताचे डाग याने तो कक्ष हादरुन गेला होता....

भयभीत नजरेने सखाराम ते पाहत त्या वृद्ध माणसाच्या मागे चालत परत दुसऱ्या कक्षात जाऊ लागले.....

त्या कक्षात समोर दोन भालाईत पहारा देत उभा होते...त्यांना पाहून त्या वृद्धांने त्यांना सवाल केला....

वस्ताद काकांना भेटायचे आहे.....नाईकांच्या खासगीतील परवली च्या शबुद घेतल्यात या चौघजनाणी...
नाईकांची खास माणसे असावीत...यांचे काही काम आहे महाराजांच्या कडे...वस्ताद काकांना वर्दी द्या.....उंबराच फुल उगवलं आहे....!

त्या पहारेकऱ्यांनी मान हलवली आणि दरवाजा उघडून आत गेले.....आणि काही क्षणात बाहेर आले व सांगितले की त्या चौघांना फक्त आत पाठवा बाकीजन निघून जावा वर मंदिरात...!

जी....असे म्हणत तो वृद्ध मागे फिरला व सखाराम व त्याचे साथीदार त्या कक्षात गेले व बाहेरुन कक्ष बंद केला गेला....!

समईच्या मंद प्रकाशात समोर आई तुळजाभवानीची मूर्ती दिसली...बाजूलाच तलवारी,भाले,बरचें,कट्यारी पूजल्या होत्या....!

वस्ताद काका हात मागे बांधून पाठमोरे उभे होते...त्या चौघांची चाहूल लागताच ते मागे वळाले.....अतिशय धीरगंभीर मुद्रा कल्लेदार मिशा,वार्धक्याने पंढरी पडलेली दाढी पण डोळ्यात विलक्षण तेज...अंगापिंडांने मजबूत असणारी काकांची शरीरयष्टी पाहिली आणि खंडोजीने काकांचे जे वर्णन सांगितले होते त्याची अनुभूती आली...!

रामराम गड्यानो....जय भवानी ...असे बोलत काकांनी त्या चौघांना नमस्कार घातला.
त्या चौघांनी पण रामराम घातला.
समोरच्या लाकडी मंचकावर बसायची खून करत काका बोलले....बसून घ्या.....उंबराच फुल कवा कवा तर उगवत आमच्या ठाण्यात...!

सखाराम व ते चौघेही हसू लागले....!

वस्ताद काका बोलले.....बोला मंडळी,काय काम आणले आहे तुम्ही ?
तुम्ही जो परवली चा शब्द घेताय त्या अर्थी तुम्ही बहिर्जी नाईकांच्या एकदम विश्वासातील लोक आहात....शब्द कसा व कोणी दिला हे विचारायचा सुद्धा आमचा हक्क नसतो जेव्हा हा शब्द घेऊन कोणी येतो...!
ज्या अर्थी हा शब्द तुम्ही बोलला,त्याअर्थी कोणतेही कारण न सांगता तुमचे काम केलेच पाहिजे...!

काकांच्या त्या बोलण्याने सखाराम व त्याच्या साथीदारांना कळून चुकले की खंडोजी जे बोलत होता त्यातील शब्द आणि शब्द खरा आहे....एक दीर्घ श्वास घेऊन सखाराम ने सारी कहाणी सांगितली...!

टकमक टोक-कडेलोट-नरभक्षक वाघ-वस्तीवर हल्ले...सर्व काही सांगून फक्त एकदा महाराजांची भेट घडवा अशी विनंती केली...!

काकांनी शांतपणे सर्वकाही ऐकून घेतले आणि मोठा उचश्वास टाकत बोलले....चला,तुमची समस्यां लय मोठी आहे,पण लई पुण्याचे काम आहे हे...तुमची वाडी वस्ती सुखी झाली पाहिजे...उद्या दिवस उगवायला आपण रायगड च्या चित दरवाजातुन गडावर जाऊ..
.!

आता काहीतरी खाऊन झोपी जा...सकाळी भल्या पहाटे निघू...!

सखाराम व त्याच्या मित्रांना आनंद गगनात मावत नव्हता...चार दिवस मरमर चालून इथवर आल्याचे चीज होईल असे वाटत होते आता...खंडोजी ला भेटून त्याच्या पण पायावर डोकं टेकवायच आपण...गावात बोलवून मिरवणूक काढायची त्याची असा विचार करत ते चौघेही झोपी गेले....!

पहाट झाली...हेरांचे ते मुख्य ठाणे मात्र रात्रदिवस जागेच असते.
कोणाला तरी पकडून आणून मारत असत तर कोणी हेर जखमी होऊन उपचाराला येत होता..कोणी भावी योजनांचे,युद्धाचे नियोजन करत होता तर कोणी कपडे काढून व्यायाम करत होता..!

वस्ताद काका व ते चौघे लवकर तयार झाले व त्या कक्षातून निमुळत्या होत गेलेल्या चोरवाटेने बाहेर पडू लागले..!

एका विस्तीर्ण गुहेत ती चोरवाट येऊन संपली..समोरच एक तपस्वी कुबडी घेऊन समाधिस्त झाला आहे असे दिसत होते...त्याच्याकडे पाहत वस्ताद काका बोलले.....जय रोहिडेश्वर....!

काकांच्या त्या आरोळीने समाधीचे ढोंग करुन बसलेला तो हेर जागा झाला व बोलला....जय जय रघुवीर समर्थ...."

आणि दुसऱ्या क्षणी ते दोघेही हसू लागले...!

ती गुहा बाहेरुन खुली होती.
सकाळची कोवळी किरणे गुहेच्या आत येत होती.
उगवणाऱ्या सुर्यनारायणाकडे पाहत वस्ताद काका बोलले...चला फक्त अर्ध्या फर्लांगावर चित दरवाजाच्या हमरस्त्याला आपण लागू....!

ते अवघड कडेकपारी ओलांडून चालत चित दरवाजाजवळ आले.
पाऊस रिमझिम कोसळत होता त्यामुळे वाटेवरचे गस्तीचे पथक दिसले नाही...पण चित दरवाजाजवळ कोणीही

दिसत नव्हते..!

काका समोर आले व त्यांनी मोठ्या आवाजात सूचना केली....कोण आहे का ???
दरवाजा खोला...?

हे शब्द कानी पडताच एक धिप्पाड मावळा दरवाज्यावरुन हातात असलेली ठासणीची बंदूक त्या पाच जणांवर रोखत बोलला.....

"खबरदार....पुढे यायचं नाय बिलकुल...बंदूक गच्च भरल्या दारुनं... फुडं ईशीला तर एका डागात ढगात पोचशीला....तुमास्नी एकदाच ईचारतो...परवली चा शबुद सांगा.....जर चुकलासा तर मेलासा... इचार करुन सांगा.....सरळ चित दरवाज्यात येतायसा....बगू सांगा शबुद.....

असे म्हणताच वस्ताद काका हसले व म्हणाले......पौर्णिमेचा चंद्र....."

•●क्रमश●•

बाजींद
भाग क्र.२९
~~~~~~~~~~~~~~~~~~~
✍️लेखन/संकल्पना/शब्दांकन
पै.गणेश मानुगडे
कुस्ती-मल्लविद्या
Www.facebook.com/kustimallavidya
Whatsapp - 9850902575
(सदर कथा लेखकाच्या नावसहित share करणे आवश्यक आहे)
~~~~~~~~~~~~~~~~~~~
वस्ताद काकांचा शब्द निशाण धरलेल्या शिलेदाराला ऐकू जाताच त्याने ठासणीची बंदूक खाली करत खाली आवाज दिला...." ए खोल रं दिंडी दरवाजा....परवली चा शबुद बरोबर हाय..."

रायगड च्या चित दरवाज्याचा दिंडी दरवाजा उघडला गेला आणि एक मावळा बाहेर येत म्हणाला..."रामराम शिलेदार.....काय बेत गडावर येण्याचा...?

त्याच्याकडे हसत वस्ताद काका बोलले...बहिर्जी नाईकांची खास माणसे आहेत ही...परवली चा शब्द उंबर फुल हाय..."

उंबर फुल...बर बर मग तुमास्नी कोण आडीवणार.....या या आत या...असे म्हणत तो मावळा आत गेला पाठोपाठ वस्ताद काका व सखाराम सह त्याचे साथीदार आत गेले....!

आत प्रवेशाताच मावळयाने दिंडी दरवाजा आतून बंद करुन घेतला.

आत निमुळती होत गेलेल्या दिवडीत धिप्पाड भालाईत उभे होते.
तोफांची तोंडे चिखलाने लिपुन बंद केली होती.
बाजूला पाच पन्नास पहारेकरी हशम तलवारी कमरेला अडकवून कामात गुंग होते...!
शिवशाही ची शिस्त पाहण्यासारखी होती.
कोणीही बेशिस्त नव्हते..!
समोरच एका धिप्पाड धारकऱ्याने वस्ताद काका ला ओळखले व लगबगीने धावत तो जवळ आला आणि मुजरा करत बोलला....मुजरा वस्ताद काका...!
लई दिसान गडावर येन केलासा ..!
बरं वाटलं तुमचं दर्शन घेऊन...!

वस्ताद काका हसत बोलले..आरं नाईकांची खास माणस हायती सोबत...जरा खासगीत वर्दी देऊन महाराजांची भेट घालायची हाय.....

व्हय व्हय घाला घाला...नाईकांच्या माणसासनी कोण आडीवनार...आस म्हणत तो धारकरी बाजूला झाला आणि काका तरातरा चालू लागले...सोबत सखाराम व त्याचे साथीदार पण चालू लागले...!

भर पावसात रायगड चढणे म्हणजे साक्षात स्वर्गाच्या पायऱ्या चढत देवाच्या दर्शनाला जाणे होय...!
राजधानी ला साजेसा किल्ला म्हणजे रायगड..!
सह्याद्रीचा मूर्तिमंत अविष्कार...!
धो धो पावसाने रायगडचे अभ्यंगस्नान पाहणे म्हणजे पर्वणीच..!
वळणा वळणा वर छोटे छोटे धबधबे निर्माण झाले होते.
अश्या मावळी पावसात पण ठायी ठायी काथ्याच्या गोंणपाटाची गोची करुन हातात भाला घेऊन राजधानीचे रक्षण करणारे शिवशाहीचे धिप्पाड भालाईत हिंदवी स्वराज्याच्या शिस्तीचे प्रदर्शन करत होते..!

अशा पावसात रायगड चा चढ चढून धाप तर लागत होती मात्र पावसाच्या पाण्यात येणारा घाम सुद्धा वाहून जात होता..!

अश्या पडत्या पावसात सखाराम मात्र मनोमन आनंदी होता.
ज्या शिवरायांची कीर्ती सारा हिंदुस्थान गातोय त्या माझ्या राजाच दर्शन व्हणार ही सखाराम साठी साधी गोष्ट नव्हती.
सात पिढ्या जरी प्रयत्न केला असता तर स्वराज्याच्या राजधानीत प्रवेश सुद्धा मिळवता आला नसता.

त्यो कोण कुठल्या जन्मीचा सोबती म्हणून खंडोजी भेटला वाटेत म्हणून हे दिवस बघायला मिळत होते. खरोखर सखाराम व त्याचे साथीदार खंडोजी ला मनोमन धन्यवाद देत होते...!
पण,त्याच्या आयुष्यात पुढे काय झालं हे मातूर ईचारायच राहिलंच... सखाराम ने अंदाज बांधला की बहुतेक सावीत्री आणि खंडोजी च लगीन झालं असलं आणि बहिर्जी नाईकांनी यशवंतमाची जिंकून खंडोजीलाच सरदार केला असलं तिथला...म्हणून तर रायगडच्या दऱ्या डोंगरात सारे शिर्के आणि खंडोजी फिरत बसल्यात...चला कायबी म्हणा..लक्ष्मी नारायणाची जोडी हाय खंडोजी आणि सावीत्रीची...!

लय खस्ता खाल्या बिचार्यांनी...पण,त्या "बाजींद" च्या वहीच काय झालं असलं पुढं....दिल असलं म्हणा ते बी खंडोजी नं परत बाजींद ला...तसा गप बसणारा नव्ह खंडोजी..."

विचारांची चक्रे फिरत होती आणि वस्ताद काका रायगडावरील सरकारी दफ़्तरात पोहोचले...!

अनेक जणांचे अनेक विषय ऐकत मोठमोठे हवालदार मश्गुल होते,तर टाक दवत समोर ठेऊन लिखाणाची कामे करणारी मुनिमजी पण व्यस्त होते...!

काका हेर खात्याच्या कक्षाकडे वळाले आणि अनेक हेर तिथे स्वराज्यातून आलेल्या माहितीची प्रतवारी करत बसले होते...!

वस्ताद काकांना पाहून समोर बसलेले पंत काका उठले व म्हणाले...वस्ताद यावे....काहीच वर्दी नसताना प्रत्यक्ष तुम्ही रायगडी येण्याची तसदी घेतली...नक्कीच कारण महत्वाचे असावे....!

पंतांच्या याबोलण्यावर काका म्हणाले....होय पंत... ही चार मंडळी गस्तीच्या हेरांना दिसली...चौकशी केली तर "उंबरफुल" हा परवली चा शब्द सांगितला...

उंबर फुल.....?
बापरे.....म्हणजे प्रत्यक्ष बहिर्जींच्या एकदम जवळची माणसे आहेत तर.....बोला काय करावे यांच्यासाठी.....

मग,वस्ताद काकांनी सखाराम च्या धनगरवाडी चे दुखणे,टकमक टोकाची व्यथा आणि नरभक्षक वाघांचा बंदोबस्त ही कहाणी सविस्तर सांगितली...व या लोकांना महाराजांना सुद्धा भेटायचे आहे....!

काकांनी टाक दवतेत बुडवून सारा मजकूर समोरच्या भूर्ज पत्रावर लिहला आणि सविस्तर मायना बनवला आणि खास बहिर्जी नाईकांचा शिक्का मारुन खाली परवली चा शब्द मोडी लिपीत लिहला आणि बोलले....

उद्या सकाळी महाराजांचा दरबार आहे... उत्तरेत पाठवलेल्या हेरांची माहिती आली आहे....त्याच्या जोडीलाच हा कागद महाराजांना दाखवतो....

आज रात्री सरकारी विश्रांती गृहात मुक्काम करुद्या या लोकांना....आपण चर्चा करु थोडी की टकमक टोकावरुन

कडेलोट बंद करावी...!
कारण बऱ्याच तक्रारी आल्या ज्यांना शिक्षा झाली त्यांच्या नातलगांच्या की आम्हाला अंतिम विधी ला किमान देह तरी मिळूदे...अजून महाराजांच्या कानी ही बातमी नाही...पण मागच्या महिन्यात केलेल्या कडेलोटा बद्धल स्वता बहिर्जी नाईक सुद्धा अस्वस्थ होते असे दिसून आले....!

मोठा श्वास घेत वस्ताद काका बोलले...ठीक आहे,कडेलोट शिक्षा कायमचीच बंद करायचा अर्ज करा...मुख्य हेर प्रमुख नात्याने पहिले अनुमोदन ची सही मी करतो...बाकी अंतिम निर्णय महाराज देतील सकाळी...!

सखाराम व त्याच्या साथीदारांना सरकारी दुकानातून नवीन मावळी कपडे,अंथरुणाचे पांघरुणाचे साहित्य देऊन त्यांच्या भोजनाची व विश्रांतीची सोय सरकारी अतिथी गृहात करुन वस्ताद काका पुन्हा सरकारी कचेरीत आले व पंत काकांच्या समवेत महत्वाच्या चर्चेत मश्गुल झाले....!

सकाळ झाली.....सूर्यनारायण नभोमंडळात दाखल झाला मात्र रायगड च्या डोक्याला वेढे देऊन बसलेले काळे कभिन्न पावसाळी ढग आणि धुक्याने सूर्यकिरणे रायगड ला स्पर्श करु शकत नव्हती..!

समोर हाताच्या अंतरावरील दिसणे मुश्किल इतके दाट धुके...!
पण,चांगले उजडले होते...!
अश्या दाट धुक्यात पण हातात मशाली घेतलेली मावळे मंडळी गस्त घालून रायगड ला पहारा देत होती...!

दरम्यान,एक हशम सरकारी अतिथीगृहात आला व सखाराम ला तयार रहा म्हणून सांगितले.
सरकारी दुकानातून दिलेले नवे कपडे घालून दरबारात जायचे आहे अशी वर्दी देऊन हशम निघून गेला..!

सखाराम व त्याचे साथीदार खूप खूप आनंदी होते..!

सखाराम व साथीदार तयार झाले व सरकारी अतिथीगृहातून बाहेर पडले व समोर उभ्या असलेल्या मावळयाला बोलले....शिलेदार...हित जगदीश्वर महादेवाचं देऊळ कुठं हाय जी...?
अमास्नी दर्शन मिळल का ओ ?

यावर तो हशम बोलला..सरळ समोर जावा...कोणी अडवलं तर परवली चा शबुद सांगा आणि दर्शन घ्यायला जायचं हाय अस सांगा...जावा सरळ होळीचा माळ लागलं...बाजारपेठ ओलांडली की समोरच जगदीश्वर मन्दिर...जावा..."

त्याचे उत्तर ऐकून ते चालू लागले....सखाराम च्या मनात आनंदाच्या किती लकेरी उठल्या असतील याची कल्पना करुन पहा...!
एक साधा मेंढपाळ हिंदुस्थानातील बलाढ्य राजसत्तेच्या राजधानीत खुद्द महादेवाचे दर्शन घ्यायला निघाला होता...

कोणत्या महादेवाचे दर्शन घ्यावे...ज्या महादेवाच्या आशीर्वादाने शिवरायांनी साधारण माणसे हाताशी धरुन दिल्ली हादरुन सोडली...भगव्या झेंड्याचा धाक असेतु हिमाचल बसवून रायगडी स्वाभिमानाचे सिंहासन निर्माण केले त्याचे दर्शन घ्यावे....की ज्याच्या अस्तित्वाने हिंदुस्थानातील बाराही जोतिर्लिंगे आजही टिकून राहिल्या त्या दस्तूरखुद्द राजश्री शिवाजीराजे भोसले नावाच्या महादेवाचे दर्शन घ्यावे....केवळ मनाची घालमेल....!

आजवर ज्याच्यामुळे मंदिराचे कळस,अंगणातील तुळस,गळ्यातल्या माळा, कपाळावरील टिळे आणि उरात जग जिंकायची ईर्षा टिकून राहिले ते शिवाजी राजे साक्षात तमाम हिंदुस्थानाचेच जगदीश्वर महादेव होते यात मात्र शँका नव्हती..!

डोळ्यात आलेले पाणी पुसत सखाराम होळीच्या माळावर आला.
अनेक कुणबी आपापल्या मंडई लावण्यात व्यस्त होते.
बाजारात शिस्तबद्ध गर्दी दिसू लागली.
धुक्यामुळे माणसे विरळ होती पण अस्तित्व जाणवत होते..!
पेठ ओलांडली आणि पेठेच्या डाव्या हाताकडून एक वाऱ्याचा मोठा झोत सखाराम च्या मुखावर आला तसा सखाराम व त्याचे साथीदार दचकले....पाठोपाठ त्यांच्या कानात कोणीतरी गुण गुंण गुणगुणल्याची जाणीव त्यांना वाटली तसे चौघेही घाबरलेल्या नजरेने त्या डोंगराच्या विस्तीर्ण टोकाकडे बघत उभे राहीले....तितक्यात समोरुन घोड्यावरून येत असलेल्या एका धारकऱ्याने चौघांना थांबवले व विचारले...ए कोण रं तुम्ही....?

त्याच्या बोलण्याने भानावर आलेल्या सखाराम ने " उंबर फुल..परवली शब्द सांगितला व जगदीश्वर दर्शन कारण सांगितले...."

हे ऐकताच धारकरी बोलला....बर बर नाईकांच्या खासगीतले लोक वाटतं... जावा जावा..."

थोडा वेळ थांबत पाठमोऱ्या झालेल्या घोडेस्वाराला थांबवत सखाराम बोलला.....शिलेदार....या बाजूचा रस्ता कुठशी जातो ओ....?

घोड्याचा लगाम खेचत गोल गिरकी घेऊन तो धारकरी त्या रस्त्याकडे पाहत बोलला....आर बाबांनो तिकडं नका बघू....तिकडं गेलेली माणस माघारी येत नाहीत.....टकमक टोक हाय तिकडं...टकमक टोक......

त्या शिलेदाराचे ते शब्द कानावर पडताच सखाराम व त्याच्या सवंगड्याच्या अंगावर भीतीने सर्दिशी काटा आला...!

•●क्रमश●•

"बाजिंद"

भाग 1

"बाळया"

....

रायगड च्या डोंगरदरीत "धनगरवाडी" हे खुप जुने गाव.

सखाराम चा जन्म याच गावचा.

शिवाजी महाराजांनी रायगड स्वराज्याची राजधानी म्हणून निवडला आणि आसपास च्या छोट्या छोट्या खेड्यांचं सोनं झाला.

जीवन स्थिर झालं.

नाहीतर कोण कुठला विजापूर,दिल्लीचा बादशहा कुठल्या सरदाराला पाठवून गावाची राखरांगोळी करेल सांगता येत नव्हते.

रायगड किल्ल्यावर "टकमक" टोक नावाचा एक प्रचंड सुळका आहे,या सुळक्यापासून खाली हजारो फूट खोल दरी असायची.

स्वराज्याशी हरामखोरी करणारे फितूर याच टोकावरुन खाली पाताळात ढकलून दिले जायचे.

टकमकाच्या बरोबर खाली बाजूच्या 10 कोसावर दाट जंगलात धनगरवाडी हे गाव.

स्वराज्याशी फितुरी करणारे हरामखोर टकमकावरून खाली फेकले जायचे तेव्हा हजारो फूट खाली धनगरवाडी जवळ पडायचे.

अक्षरश चिखल व्हायचा त्यांच्या देहाचा..!

काही दिवस कोलह्या कुत्र्यांची मेजवानी झाली,पण जंगली जनावरांचा सुळसुळाट झाला त्या मुळे..!

जंगलातील जनावरं माणसाच्या रक्ताला चाटवली आणि मग जेव्हा टकमकावरून कोणी हरामखोर खाली येईना,त्यावेळी भुकेने कासावीस असणारी जनावरे शेजारच्या धनगरवाडीत हल्ले करु लागली..!

शे दोनशे घरट्यांचे गाव त्यामुळे भयभीत झाले.

मग गावचा कारभारी असलेला सखाराम हे गाऱ्हाणे घेऊन रायगडावर सरकारी दफ़्तरी सांगायला जायला निघाला.

सोबत पाच दहा जोडीदार सोबत घेऊन दिवस उगवायला घरातून बाहेर पडायच्या बेतात होता.

सखाराम च्या दोन बायका होत्या,राधिका आणि अंबिका.

दोघींचा पण सखाराम वर जीव होता.

राधिकेला मूल बाळ नसल्याने पाचाड पलीकडच्या धनगरवाडी वरच्या नातलगांची मुलगी अंबिका त्या घरात सखाराम ची कारभारीन बनून आली.

अंबिका ला मुलगा झाला.

वंशाला दिवा झाला म्हणून आवडीने बाळकृष्ण नाव ठेवले.

शिवाजीराजे रायगडावर राज्याभिषिक्त झाले त्याच दिवशी बाळकृष्णाचा जन्म झाला म्हणून सारी धनगरवाडी हरखून गेली होती.

बाळकृष्णाला बाळ्या म्हणून सगळी हाक मारत होती.

बघता बघता बाळ्या 7-8 वर्षाचा झाला होता.

बाळ्याचे वडील सखाराम अंगापिंडांने मजबूत गडी.

शेजार च्या वाड्या वस्त्यात सर्वांच्या मदतीला धावून जाणारा सखाराम कारभारी म्हणूनच काम करत होता.

गावातील सारे लोक धनगर.

मेंढ्या,शेळ्या चरायला नेणे,कोंबड्या पाळणे,जंगलातून लाकूड तोडून आणणे हा सर्वांचा प्रमुख उद्योग.
गावातल्या ज्या कुटुंबाकडे शेळ्या मेंढ्या जास्त तो गावचा सावकार माणूस.
सखाराम कडे 700 मेंढ्या,300 शेळ्या आणि 200 कोंबड्या होत्या.
सर्वात जास्त जीतराप असल्याने तो गावचा सावकार पण होता.
पण गेल्या 5-10 वर्षात बादशाही आक्रमणे महाराजांच्या मुळे बंद झाली,पण टकमक वरुन खाली येणारी मढी हे नवे दुखणे रायगड परिसराला जडले होते.
वर स्वर्गात डोके खुपसून महाराष्ट्राला सुखी करणारा रायगड,खाली मात्र नरक यातना देत असे.
कित्येक वेळा अनेकांनी रायगड वर जाऊन ही बातमी सांगितली होती,पण दखल घ्यायलाच कोणी नव्हता,म्हणून सखाराम हे गाऱ्हाणे घेऊन खुद्द महाराजांना भेटायला निघाला होता.
त्याचे कारण पण गंभीर होते...!

"पावसाळा नुकताच संपला होता,सारा रायगड परिसर हिरवागार शालू नेसून नटल्यासारखा झाला होता.
जनावरांना खायला प्यायला वैरण पाणी मोप मिळत होते.
सखाराम चा बाळ्या सकाळी उठून टकमकाच्या खाली शेळ्या घेऊन जायला निघाला होता.
सखाराम ने त्याच्या सोबतीला घरचा नोकर पांडू ला पाठवून दिले..!
परवाच्या मध्यरात्रीला टकमकाच्या बाजूने एका माणसाच्या जिवाच्या आकांताने किंचळण्याच्या आवाजाने सारा वाडा जागा झाला होता.
अजून एक मराठेशाहीचा फितूर,गद्दार बहुतेक टकमकवरून खाली आला असणार हा अंदाज सर्वांनी बांधला होता,सकाळी जाऊन सखाराम पाहून आला होता,पण ते मढ कुठं नजरेस पडलं नव्हतं.
त्या दिवशी बाळ्या शेळ्या हिंडवायला गेला होता,माघारी येता येता संध्याकाळ होत आली आणि दाट जंगलात भुकेने व्याकुळ दोन बिबळ्या वाघ ते परवाच मढ तोडून खात होते,हे दुरुनच पाहून बाळ्याला घेऊन पांडू वाड्याकडे धावत सुटला,तितक्यात एका फांदीला पाय अडकून पांडू खाली पडला आणि मावळतीच्या बाजूला एक काळाकिभिन्न मनुष्य हातात मजबूत काठी घेऊन,गळ्यात चांदीची पेटी घालून पांडू आणि बाळ्या कडे पाहून हसत उभा होता...!
· · ● क्रमश : ●●●
'बाजिंद'
भाग २ रा
....
पांडू आणि बाळ्या धडपडत उठले.
शेळ्या,मेंढ्या तिथेच सोडून जीवाच्या आकांताने धावू लागले.धापा टाकत ते वाड्यात पोहोचले आणि जोरजोरात सखाराम कारभाऱ्याला हाक मारू लागले .
त्यांचा आरडाओरडा ऐकून सारे गाव एकत्र जमा झाले.घडलेली हकीकत त्यांनी सखाराम ला सांगितली.
सखाराम आणि गावकार्यांनी आता हि गोष्ट रायगडावर जातीने सांगून याचा बंदोबस्त केला पाहिजे असे मनोमन योजले होते.
सर्व गावकर्यांच्या मनात भीतीने काहूर माजले होते.काहीही करून या जनावरांचा बंदोबस्त झालाच पाहिजे असे सर्वांना वाटले.

रात्री झोपताना बाळ्या अंबिका आईला घडलेली सर्व कहाणी सांगू लागला,आणि सांगता सांगता त्याला एकदम आठवले कि आपण जिथे फांदीत पाय अडकून पडलो होतो तिथे एक काळाकभिन्न माणूस आपल्याकडे पाहत उभा होता.
त्याने हि हकीकत सखाराम ला सांगितली.
निर्मनुष्य टकमक दरीच्या खाली,आपल्या वाड्यावरच्या मेंढपाळ गड्याव्यतिरिक्त दुसरा मनुष्य कसा येऊ शकतो याचे सर्वांना नवल वाटले.
असेल कोण तरी गुराखी,जो वाट चुकून तिथे आला असावा असे म्हणत सखाराम ने विषय टाळला आणि सकाळीच रायगड च्या वाटेला निघायचे असे ठरवून सोबत कोणाकोणाला न्यायचे हे जाहीर करत सर्वांना तयारीचे आदेश दिले.
वाड्यावरचे सखाराम चे लहानपणाचे मैतर मल्हारी,सर्जा आणि नारायण याना घेऊन जायचे नक्की केले.
तिघेही अंगाने मजबूत आणि एका विचाराचे होते.सखाराम वर त्यांचा फार जीव होता.सर तयारी झाली आणि ती रात्र भूतकाळात जमा झाली.
सकाळच्या पहिल्या प्रहरी कोंबड्याने पहिली बांग दिली.
सखाराम च्या दोन्ही कारभारनी लौकर उठून स्वयंपाकाला लागल्या.
पहाटेच्या धुक्यात रायगड खूपच सुंदर दिसत होता.टकमकापासून वरचा सारा भाग धुक्यात झाकून गेला होता.
दुरून पहिले कि एखादा पैलवान कानाला पांढरी कानटोपी घालून बसल्या बसल्या गुडघ्यात मान खुपसून डुलकी मारत आहे असा भास होत होता.
राधिका आईने कोंबड्याची डालगी (खुराडी) चे झाकण काढले आणि आत विसाव्या घेणाऱ्या कोंबड्या बाहेर पडल्या..आणि मग त्या कोंबड्यांचे आवाज ऐकून गावातील इतर घरातील खुरुडे जोरात ओरडू लागली.
सखराम ने भरडलेल्या नाचणीच्या पोत्यातून काही नाचणी काढून अंगणात टाकली तशी कोंबड्यांचे थवे त्यावर तुटून पडले.
लहान लहान कोंबड्या तर सखाराम च्या खांद्यावर,डोक्यावर बसल्या.सखाराम ने त्या बाजूला करत अजून काही नाचणी टाकली.
समोरच्या शेळ्यांच्या कुंपणात शेळ्या,मेंढ्या सुध्दा आशेने त्याच्याकडे बघत होत्या.
समोर असलेली गवताची गंजी सोडून त्यांच्याही चारा पाण्याची सोय केली.
गोठ्यातला गाई,म्हैशी,बैल सर्वांना चारा टाकला.
एव्हाना तांबड फुटायला लागले होते.
सोबत येणारे मैतर अंगावर घोंगड,खायला भाकर्या बांधलेली झोळी आणि कुर्हाड घेऊन सखाराम च्या दारात हजर झाली.
सखाराम ने न्याहारी आटपली आणि कपाळाला भंडारा लावत त्या साथीदारांच्या कपाळी सुधा भंडारा लावला आणि राधिका,अंबिका ला सांगून जायला निघाले.नारळाच्या काथ्यापासून बनवलेले जाड गोणपाट निमुळते करत पावसापासून वाचण्यासाठी त्याचे गोंचे करून चौघांनी डोक्यावर घेतले होते.
एव्हाना बारीक रिमझिम पाउस सुरूच होता.
सोबत असावा म्हणून एक घोडा चौघात घेतला आणि त्यावर आणलेले जेवणाची थैली बांधत सखाराम ने एकवार टकमक टोकाकडे पाहिले.
सखाराम ला आठवले कि शेवटच्या वेळी ‘शिवाजीराजे भोसल्यांच्या’ राज्याभिषेकाला रायगडावर जाऊन खुद्द महाराज पहिले होते.

सरसर भूतकाळ त्याच्या नजरेपुढे येऊ लागला.
आजवर ज्याच नुस्त नावच ऐकून लहानाचा मोठा झालो तो शिवाजी त्या दिवशी राजा झाला होता.
जावळीच्या मोरे आणि पुण्याच्या भोसल्यांच्या दंग्यात रायरी परिसर एककाळी हादरून गेला होता.महाबळेश्वर पासून ते महाड पर्यंतचा पूर्ण दाट जंगल जाळीचा पट्टा जावळीकर मोऱ्यांच्या ताब्यात होता.काय घडले देव जाणे पण एके दिवशी भगवे झेंडे घेतलेले हजारो हशम रायगडला भिडले आणि तेव्हापासून ते आजवर कधीही रायगड परिसराला अवकळा लागली नव्हती.सर्व काही आनंदात होते.
महाराजांनी पाण्यासारखा पैसा ओतून हा रायरीचा किल्ला ‘रायगड’ केला होता.
त्यावेळी आमच्या वाड्यानेच जंगलातल्या वाटा,चोरवाटा महाराजांच्या फौजेला दाखवून दिल्या होत्या.
आणि एक दिवस महाराज राजे झाले होते.
मुठीत मावेल तितके सोन महाराज सर्व रयतेला वाटत होते..एक नाहीतर दोन क्षण त्या महाराष्ट्राच्या महादेवाचे दर्शन झाले होते..!
टकमकाकडे पाहत सखाराम हे सारे आठवत होता.
सर्वजन जायला निघाले.
वाड्यापासून टकमकाच्या खालूनच रायगडाच्या ‘चीत’ दरवाज्याकडे जायला वाट होती.वाटेत महाराजांचे मोर्चे,मेटे होतेच,पण ह्या असल्या मुसळधार पावसात तिथ कोण असेल का नाही सांगता येणार नाही.
मल्हारी,सर्जा,नारायण आणि सखाराम हे चौघे त्या वाड्यातून चालू लागले.
वर रिमझिम पाउस होता ,पण गोंच्यामुळे डोक्याला न लागला बारीक तुषार तोंडावर पडत होते.
जेवण भिजू नये म्हणून त्यावर घोंगडे टाकले होते.
मल्हारी ने घोड्याचा लगाम पकडला होता आणि हे चौघे चिखल तुडवत टकमक दरीकडे चालत जात होते.
साधारण दोन प्रहर चालून झाले.सूर्य चांगलाच वर आला होता.
१-२ कोसावर टकमक दरी येईल असा अंदाज लागला आणि चौघांच्याही अंगावर शहरा आला.
एक प्रकारची अनामिक भीती होती मनात.
आजवर इतकी माणसे वरून खाली आली ,काय झाले असावे त्यांचे ?
माणूस मेल्यावर नक्की जातो कुठे ...आणि इतक्या वरून पडल्यावर किती बेकार जीव जात असल एकेकाचा..!
चोघांच्याही डोक्यात अनामिक भीती होतीच....आणि तितक्यात टकमकावरून आणखी एक आकाशपाताळ भेदणारी जीवघेणी किंचाळी ऐकू आली..!
चौघेही सावध होऊन वर पाहू लागले तर त्याना दिसले कि टकमकावरून आज आणखी कोणाला तरी कडेलोट झाली आहे..!
भीतीने सर्वांग थरारून उठले होते....कमी आवाज...हळूहळू मोठा झाला आणि अवघ्या काही अंतरावर धड्ड असा आवाज करत जंगलाच्या दाट जाळीत ते मढ पडलं आहे याचा चौघानाही अंदाज आला.....चौघेही एकमेकाकडे पाहू लागली.
खूप विचार करून उसन्या आवसानान सखाराम बोलला.....गड्यानो...आपण ते कोण आहे बघून येउया का र...?

··● क्रमशः ●••
"बाजींद"
भाग 3 रा
· ·
मल्हारी,सर्जा आणि नारायण प्रश्नार्थक मुद्रेने सखाराम कडे पाहू लागली.

सारा गाव ज्या गोष्टीमुळे गेली 5-6 वर्षे भीतीच्या दडपणाखाली आहे,त्या गोष्टीजवळ येऊन हा माणूस त्या गोष्टीला जवळून पाहूया कसा काय म्हणत असेल हा प्रश्न तिघांना पडला होता.

सखाराम ने तिघांच्याकडे पाहत उचश्वास टाकत बोलला..!

अरे आजवर घर-संसार पाहतच आलोय आपण,देवाच्या दयेने आसपास च्या बारा वाड्यात चांगलं नाव हाय आपलं. ही असली मेलेली मढी किती दिस भ्या घालणार आपणाला.
हे बगा, खंडोबाचा भंडारा लावलाय आपण भाळाला, जरा धीर धरुन ती मढ बघुया,म्हणजे वर गडावर गेल्यावर बोलायला तोंड मिळलं आपणाला,राजा देवमाणूस हाय आपला,आपल संकष्ट नक्की त्यांच्या ध्यानी येईल...चला,खंडेरायाच नाव घ्या आणि या माझ्या मागं...!

सखाराम च्या असल्या बोलण्याने तिघांनीही धारिष्ट्य केले आणि मान हालवून टकमक दरीकडे पाय वळवले.

एव्हाना रिमझिम पाऊस थांबला होता,आणि कोवळे उन्ह अंगावर पडू लागले होते.
घोड्याला पण उन्हामुळे चांगली उब मिळत होती,तो पण मनोमन सुखावला होता.
रायगड ची उंची स्वर्गाला भिडली होती.
वर पडलेला पाण्याचा थेंब न थेंब सरळ खाली येत होता.
त्यामुळे वरुन धबधबणारे पाणी ओढ्यात मिळून छोटे छोटे नाले तुडुंब भरुन वाहत होते.
पायात कातडी पायतान पाण्याने आणि चिखलाने जास्तच जड झाल्याने चौघांनी ते काढून मधोमध कासरा बांधून घोड्याच्या पाठीवर बांधले आणि एका मोठ्या चिंचेच्या झाडाला घोडा बांधून,कुऱ्हाडी आणि घोंगडे अंगावर घेऊन ते ओढ्यातून वाट काढत टकमक दरीकडे निघाले.

चौघेजण ओढ्यातून पुढे पुढे जाऊ लागले,चांगले मध्यावर गेले आणि चिंचेला बांधलेला घोडा दोन्ही पाय वर करत जोरजोराने किंचाळू लागला..!
काय होतय चौघांना कळेना,आसपास पहिले तर गार वाऱ्याशिवाय चिटपाखरु पण नव्हतं..मग ह्येला काय झाले ओरडायला समजेना...!

त्याने हिसका मारुन लगाम,दावे तोडले आणि सुसाट वेगाने बाजूच्या जंगलात पळून गेला..!

घोड्याच्या या विलक्षण वागण्याने नारायण मात्र पुरता घाबरला,तो म्हणाला ..."गड्यानो, मला काय लक्षण ठीक दिसणा...माझा घोडा आजवर असा कवाच वागला नाय...माझं ऐका,मागं फिरुया..चार दोन दिसान पाचाड ला सांगावं धाडून सगळी हकीकत महाराजांच्या खासगीत सांगूया...पण आत्ता बाहेर पडूया...!

सखाराम त्यावर रागात बोलला..."महाराजांची खासगी तुझ्यासारख्याच ऐकून घ्यायलाच बसली हाय जणू...सारा महाराष्ट्र सांभाळायचा हाय त्यास्नी...तुझ्या घोड्यान साप-पान बघितलं असलं म्हणून तो गेला पळून... दरीकड जाऊन लौकर मागं येऊन त्याला शोधूया...चला पाय उचला लौकर...!

सारे जण त्या भयाण ओढ्यातून पुन्हा चालू लागली.
चांगलं छातीपर्यंत पाणी आलं आणि पाण्याचा जोर जाणवू लागला.
चौघांनी एकमेमेकांना हात देऊन कड केलं..!

ओढ्याच्या बरोब्बर मध्यावर आलं तस वाघांच्या एका गगनभेदी किंचाळीने पावसाने गारठून अंग चोरून बसलेली चिमणी पाखर आभाळात उडू लागली आणि चौघांच्या अंगावर भीतीने शहारे आले....ओढ्याच्या पाण्याच्या वेगाने ते एकसारखे वाहू लागले आणि चौघांची हाताची कडी तुटली आणि ते उत्तरेकडे वाहू लागली...!
जो तो आता जीव वाचवायचा प्रयत्न करु लागला..!

मल्हारी पूर्वी महाड ला सुभेदार तान्हाजी मालुसरे यांच्या तालमीत 3-4 वर्षे राहून आलेला गडी होत.
सिंहगड लढाईत सुभेदार गेलं आणि तालमीतल्या पैल्वाणांच्या वर उपासमारी आली..म्हणून चौघांनी पण कुस्तीला रामराम ठोकून गाव गाठला होता.
पण त्या कुस्ती मुळे पुरात पोहायचे कसे त्यांला चांगलेच ठाऊक होते,त्याने सर्वांना ओरडून सांगितले की काठावर असलेल्या वडाकडे बघत पोहा....!

पुरात जर फसला तर हात पाय हलवून काय उपयोग नसतो..अश्यावेळी एक करायचं की काठावर असलेलं कोणतही मोठं झाड त्याकडे लक्ष देत तिरकस पोहत पोहत जायचं...पाण्यात साप,विंचू,काटे काहीही येवो लक्ष द्यायचे नसते...चौघेही पुराची धार तोडून एका महाकाय वडाच्या झाडाजवळ पोहोचले...!

चिंब भिजलेल्या चौघांच्या कुऱ्हाडी पाण्यात वाहून गेल्या होत्या.
घश्यात पाणी गेले होते त्यामुळे चौघेही ठसके देत देत काठावर दम खात पहुडले होते...!

साधारण दम कमी कमी झाला आणि सखाराम क्षणात सावध झाला आणि मल्हारी,नारायण,सर्जा कुठे आहेत पाहू लागला..!
हाकेच्या अंतरावर तिघेही दम खात पहुडले होते.
सावकाश पावले टाकत तो तिघांच्या जवळ जाऊन तिघांना सावध केलं..!

नारायण,दम खात बोलला...तुम्हाला म्या सांगत हुतो,आरं जनावरं ते बघू शकट्यात जे तुम्हाला आमाला दिसत नसतया... खण्डेरायचा आशीर्वाद म्हणून वाचलो,पण आता हिकडं वाघाची डरकाळी ऐकली नव्ह...आता काय करायचं...?

सखाराम ने धीर देत त्याला सांगितले,अरे नको काळजी करु.. या सगळ्या भाकडकथा आहेत.
तस जर नसत तर 350 वर्षे महाराष्ट्र गुलामगिरीत राहिलाच नसता...देव देवरस पण काय कमी होत काय आपल्याकडं....पण शिवाजीराजानं तलवारीच्या जोरावर संपवलीच ना गुलामगिरी...पण विचारांची गुलामगिरी कवा संपणार आपली देव जाणे...चला धीर धरा...वाड्या जवळची हजारो घरटी आपल्या चौघांच्या नजरेला नजर लावून बसली असतील...या असल्या फालतू गोष्टीत भिऊन बसला तर शेण घालतील लोकं आपल्या तोंडात..उठा बिगीन आणि चला...!

सखाराम च्या निर्वाणीचा बोलणे तिघांनाही ऊर्जा मिळाली,चौघेजण पुढे चालू लागले...!

तो महाकाय वडाचा बुंधा पाहून कोणीही भयकंपित होईल.
त्याच्या त्या विशाल पारंब्या पाहून जणू ब्रम्हराक्षस वाटेत ठाण मांडून बसला असावा असा भास होत होता.

चौघे जण वर टकमक टोकाकडे पाहत दरी कुठे असेल अंदाज बांधत त्या वडाला बगल देऊन चालू लागले..!

ओढ्याच्या काठापासून जंगली भाग फारसा दूर नव्हता,म्हणायला म्हणून ते पठार होते,पण सारी जंगली झाडे फार.
एव्हाना सूर्य माथ्यावर आला होता,पण पावसाळी ढगाने इतकी गर्दी केली होती की संध्याकाळ झाल्याचा भास होत होता..!

तिघेही जंगलात घुसणार इतक्यात वाघांची ती प्रचंड डरकाळी समोरच्या झाडा झुडपातून येऊ लागली..!
चौघांची सर्वांगें थरारली.
जंगलातील झुडपे हालवत ती श्वापदे बाहेर पडत होती.
किती होती काय माहित,नक्कीच एक पेक्षा जास्त होती हे नक्की.
आता मात्र सखाराम च्या धीराच्या गोष्टी ऐकण्यात नारायण,सर्जा,मल्हारी तिघांनाही रस नव्हता...आणि त्या गोष्टी सांगायला सखाराम कडेही वेळ नव्हता...आल्या पावली ते वडाच्या झाडाकडे धावू लागली...!

डरकाळी चा आवाज मोठा होत गेला आणि सखाराम चा पाय फांदीत अडकून सखाराम पडला...नारायण ने ते पहिले आणि सर्जा व मल्हारी ला थांबवत त्याला उचलायला गेली तितक्यात ते पावसाने भिजलेले वाघाचे प्रचंड धूड जंगलाबाहेर पडले...त्यापाठोपाठ अजून एक..अजून एक...चौघांची डोळे विस्फारली गेली आणि हात पाय गाळून चौघे बसल्या जागी भीतीने गारठून ओरडू लागली...

किमान 5 ते 6 धिप्पाड वाघ छलांग मारत मारत चौघांचा वेध घेत येत होती...चौघांनी जगण्याचा धीर सोडला आणि डोळे मिटून त्यांचा इष्ट देव खंडेरायचा धावा सुरु केला.....वाघ चवताळत आले...बस्स आता एकच झेप आणि खेळ संपला...तितक्यात.......

सुं.. सुं... सुं.... करत एकापाठोपाठ एक बाण वडाच्या झाडापाठीमागून कोणीतरी सोडले....वाघांचा तो वादळी आवेग आणि वाऱ्यासारखा वेग क्षणात कमी झाला...ते बाण बरोबर सखाराम आणि त्या तिघांच्या पुढे काही अंतरावर जमिनीत घुसले...ज्याने ते बाण सोडले त्याकडे भयभीत नजरेने ते 5-6 वाघांचे प्रचंड धूड पाहत..आल्या पावली वाऱ्याच्या वेगाने पुन्हा जंगलात पळून गेली...!

चौघांनी डोळे उघडून ते पळून जाणारे वाघ पाहिले आणि आश्चर्यकारक नजरेने उभे राहिले व समोर घुसलेल्या बाणाकडे पाहत एकदम मागे फिरले...!

· ·● क्रमश ●••
"बाजींद"

भाग 4 था
· · · · · · · · · · · · · · · · · · · ·
आभाळातून वीज चमकावी तसे ते दोन बाण वाऱ्याच्या वेगाने येऊन समोर जमिनीत घुसले अन जिवाच्या आकांताने ते वाघांचे धूड पळताना पाहून सखाराम व मित्रांना आश्चर्य वाटले.
एव्हाना जिवाच्या भीतीने पळत सुटलेले ते चौघेही जणू काही झालेच नाही अश्या आवेशात उठली आणि आपल्या बचावासाठी एवढया पावसात आणि या दुर्गम जंगलजाळीत कोण आला आहे याचा कानोसा घेऊ लागली.
तो कोणीही असो,त्यांच्यासाठी देवदूत होता.

एक दीर्घ श्वास घेत ते चौघे वडाच्या झाडाकडे पाहू लागले...आणि त्यांना हातात धनुष्य घेतलेल्या एका योध्याचे दर्शन घडले...!

सहा साडेसहा फूट उंच,अनवाणी पण भव्य पाय,दोन्ही पायात काळा दोरा,अंगात धोतर आणि काळा अंगरखा ज्यावर रक्ताचे डाग...गळ्यात चांदीची पेटी लटकत होती.
कमरेला समशेर व पाठीला ढाल होती.
कमरेला पांढरा शेला बांधला होता,डोक्याला मराठी पद्धतीचे मुंडासे व भव्य कपाळावर भंडारा लावला होता..आग ओकणारे लाल भडक डोळे,सरळ सळसळीत नाक,कल्लेदार मिशा....एक विशी पंचविशीत तो तरुण धिप्पाड मल्ल भासत होता...!
चेहऱ्यावर एक प्रकारची गंभीरता स्पष्ट जाणवत आपले भव्य अनवाणी पाय त्या ओढ्याच्या भिजलेल्या मातीवर ताकत तो एक एक पाऊल त्या चौघांच्याकडे येत होता.

चौघांनाही कुतूहल,आश्चर्य,अनेक प्रश्न पडले होते...कोण असावा हा धीरगंभीर पुरुष...!

चौघांनीही धीर एकवटून त्या पुरुषांकडे जायला पावले उचलली आणि तितक्यात आभाळातून सरसर मेघधारा बरसू लागल्या..!

तो धिप्पाड पुरुष तसाच मागे सरकला आणि वडाच्या डोलीत थांबत त्या तिघांनी तिथे येण्यासाठी खुणावले..!

ती खून मिळताच तिघेही धावत त्या डोलीकडे धावू लागली...धावताक्षणी एवढ्या मुसळधार पावसातही वाघांच्या डरकाळ्या मात्र पुन्हा एकदा ऐकू येत होत्या....!

चोघेही त्या युवकाजवळ आले,निशब्द शांतता भंग करत सखाराम त्याला बोलला...!

"पाव्हणं... कुण्या गावचं तुमी ?
लय उपकार झाले बगा तुमचे,माझ्या खंडेरायानेच तुम्हाला हित पाठवलं बगा..तुमचे लय उपकार झाले"
सखाराम च्या शब्दाला मान डोलवत तिघेही सुरात सुर मिसळून मान हलवू लागली..!

क्षणभर शांतता पसरली,अन काही क्षणात त्या युवकाचा धीरगंभीर आवाज ऐकायला मिळाला..."कोण तुम्ही ?
का आला आहात तुम्ही इकडे ?"

निर्धारी प्रश्न विचारत त्याचे ते अंगार ओकणारे डोळे त्या चौघांवर पडले अन चौघांनाही काय बोलावे क्षणभर समजेना...!

आम्ही धनगरवाड्याचे,रायगड ला निघालो आहोत...सखाराम बोलून गेला...!

रायगडी ? कशासाठी ?
क्षणाचाही विलंब करता त्या युवकाने प्रतिप्रश्न केला...!

मग,सखाराम ने त्यांच्या येण्याचे कारण सांगितले.

टकमकावरुन येणाऱ्या मढ्यांच्या मास रक्ताला चाटवलेले वाघ,जनावरे माणसावर हल्ले करत आहेत..सारे पंचक्रोशीतील गाववाले हैराण आहेत या गोष्टीवर...म्हणून आम्ही हे प्रकरण रायगड च्या सरकारी लोकांच्या कानावर आणि गरज पडली तर महाराजांना भेटून सांगायचे म्हणून घराबाहेर पडलो आहोत...!

मूर्ख आहात तुम्ही...मोठ्या आवाजात तो युवक बोलला...तुमची गाऱ्हाणे ऐकायला असे कसेही भेटतील काय सरकारी अधिकारी आणि महाराज ?

आणि रायगड सोडून या दरीत का आलाय मरण्यासाठी ?

त्याच्या या प्रश्नाने नारायण बोलला...आर कोण र तू ?
मगापासून ऐकून घेतोय तुझं..वाघापासून वाचवलं म्हणून तुझं उपकार मानायला लागलो तर आम्हाला कायदा शिकवायला लागलास काय ?
आधी तू सांग कोण आहेस,आणि हे अंगावर रगात कसलं ?

नारायण च्या या बोलण्याने तो युवक थोडा आकसला....!
मोठा श्वास घेऊन बोलला...मी ...मी कोण ?
हाच प्रश्न जन्मापासून स्वतःला विचारत लहानाचा मोठा झालोय....!
अजून उत्तर सापडत नाही,आणि आता सापडून पण उपयोग नाही..!

खंडोजी नाव माझं..!
महाराजांच्या हेर खात्यात बहिर्जी नाईकांच्या समवेत 10 वर्ष काम केलंय... पण...पण आता भटकतोय या दरीत एकटाच..!
वाट बघतोय कोणाची तरी...!

खंडोजी च्या या बोलण्याने चौघेही आश्चर्यचकित झाले..!
चौघांना चूक झाल्याची जाणीव झाली आणि सखाराम ने खंडोजी ला माफी मागत बोलू लागला....

"माफ करा सरकार,आम्ही गरीब लोक,ह्यो नारायण,ह्यो मल्हारी,ह्यो सर्जा आणि आन म्या सखाराम"
मल्हारी पण महाराजांच्या फौजेत जायला गेला हुता सुभेदार तान्हाजी मालुसरे यांच्या तालमीत,पण हत्यारे शिकत व्हता आणि सिंहगड च्या दंग्यात सुभेदार गेलं आण मग ह्यो परत आला गावाकडं...आमची लय इच्छा व्हती की राजांच्या फौजेत सामील व्हावं पण एवढं नशीब कुठलं ओ आमचं...पण खंडेरायाच्या कृपेनं गावगाडा सांभाळतो आमी.. गावसाठीच सरकार ला हे टकमक वरची मढी काढायला कोणाची तरी नेमणूक करा म्हणून आर्जव करायला निघालोय आम्ही...तुम्ही नाईकांच्या जवळचे म्हणजे महाराजांचे पण जवळचेच... आम्ही हात जोडतो एवढं पुण्य घ्या पदरात....आमची गाऱ्हाणी सांगा सरकारी दरबारी..."

चौघांनी खन्डोजी ला हात जोडलेलं बघितलं आणि खन्डोजीने हातातलं बाण खाली टाकत सखाराम चा हात पकडत म्हणाला....नका हात जोडून अजून पापात पाडू मला....आधीच लय पापाचे ओझं घेऊन वावरतोय मी....चला मी तुम्हाला मदत करतो..."

खंडोजी च्या आश्वासनाने चौघांना धीर आला.

खंडोजी म्हणाला...पण गड्यानो..मी फक्त तुम्हाला मार्ग दावीण आणि युक्त्या सांगीन...मी स्वता काय बी करणार नाही...मला कोणीही प्रश्न विचारायचा नाही..मी सांगल तस जर वागायचं वचन देत असशील तर मी नक्कीच या कामात तुम्हाला मदत करीन.."

चौघांनीही होकारात्मक मान हलवली.
खंडोजी ने वडाच्या डोलीत ठेवलेली एक कानाबरोबर उंचीची काठी काढली आणि चौघांकडे पाहत बोलला....चला निघूया, आता जोवर तुमच काम होत नाही तोवर माघे यायचे नाही..."

सखाराम,नारायण,सर्जा,मल्हारी चौघांनाही खंडोजी च्या रुपाने आशेचा किरण दिसू लागला.

ते चौघे खंडोजी च्या पाठोपाठ पावले टाकत त्या जंगलात निघाली..!
एव्हाना पाऊस बंद झाला होता,सूर्य मावळतीला झुकत निघाला होता.
"मंडळी,रात्र होण्याच्या आधी इथून तीन कोसावर एक चोरवाट आहे दाट जंगलात,पण गेल्या 15-20 वर्षात तिकडं कोणी फिरकला नसेल.
आपल्याला रात्र काढायला चांगलं ठिकाण आहे,आजची रात्र तिथं काढूया आणि सकाळी दिवस उगवायला रायगड च्या हमरसत्याला लागूया...!
मोर्चे,मेटे आडवे आहेत,पण तिकडं गेला तर परवाने,ओळख सगळं विचारतील आणि विनाकारण तुरुंगात पण डांबून ठेवतील जर ओळख नाही पटली तर...!
मला ह्यो परिसर घरच्या वाणी आहे,मी तुम्हास्नी निम्म्या वक्तात चित दरवाजा जवळ नेतो...आणि मग पुढ काय करायचं मी संगतोच...चला लौकर पाय उचला...!

खंडोजी तरातरा चालू लागला.पायात पायतान नसताना त्याचा चालायचा वेग बघून चौघेही पाहातच राहिले,त्यांना पायात पायतान असून चालन जमत नव्हतं एवढया वेगाने...!

आणि केवळ अर्ध्या एक तासात एका दाट अरण्यात त्यांचा प्रवेश झाला.इतके दाट की झाडाला झाड लागून असावे इतकी झाडांची गर्दी...!
जमिनीवर लाकडे कुजून काळा थर चढला होता,त्यावरून खंडोजी च्या मागे ते निघाले होते.
त्या भयप्रद जंगलाला बघून मल्हारी बोलला...सखा,लगा हयात गेली मेंढर चरवण्यात इकडं कधी येन झालं नाही,कितीतरी येळा जवळन गेलोय मी,इतकी दाट झाली आईच्यान सांगतो बघितली नव्हती,ही झाडी कशी काय आली असलं इथं ?
गप र...भिऊन काय बी बरळु नको,महाराजांचा हेर आहे खंडोजी, असलं त्याला गुप्तवाट माहिती..चला गुमान.."

जंगलाच्या मध्यावर येताच जंगली किड्यांची किरकिर आवाज अतिशय वाढला,सूर्य मावळातील गेल्याने पुढचं काय दिसत नव्हतं..!
एका पाऊलवाटेने ते चालत होते आणि एका वळणावर खंडोजी बाजूला गेला आणि सखाराम पुढे आला तर खंडोजी कुठे नजरेस पडेना..!
त्याने मागे पाहिले आणि सर्जा,नारायण,मल्हारी ला सांगितले की खन्डोजी कुठे गेला ?
एव्हाना पूर्ण रात्र झाली होती,ते चालत चालत जंगलाच्या मध्यावर एका पडक्या मंदिराजवळ पोहचली.

या इतक्या दाट जंगलात हे मन्दिर कुठले असावे हा प्रश्न चौघांना पडला..!
पावसाने मंदिराच्या शिखरापर्यंत हिरवे शेवाळ दाटले होते,समोर दगडी नंदी सुद्धा पावसाने भिजून त्यावर सुद्धा शेवाळाची हिरवी झालर चढली होती..!

सखाराम म्हणाला...अरे ह्यो खन्डोजी कसा आणि कूट गेला ?
आता र काय करायचं ?
एक काम करुया आजची रात्र या मन्दिराचा आसरा घेऊया आन उद्या आपण आपलं हमरस्ता हुडकून आपल्या मार्गानं जाऊया...!
तिघांना हे ऐकण्याशिवाय पर्याय नव्हता...!

ते चौघे आत शिरले.
ते प्राचीन दगडी मन्दिर महादेवाचे होते.
कित्येक वर्षे हे दुर्लक्षित असावे असे वाटले,पावसाने पाणी आत थेंब थेंब झिरपत होते..!

नारायण बोलला,चला माझ्या महादेवाच्या गाभाऱ्यात तर आसरा मिळणार..म्हणत ते मंदिरात घुसणार इतक्यात शेकडो वटवाघळे एकाच वेळी मंदिराच्या बाहेर पडली.
चौघांनी डोळे बंद करून डोळ्यासमोर हात ठेवत मागे पाय घेतले पण तितक्यात सर्व वटवाघळे उडून गेली....!
त्यामन्दिरात चौघे जाऊ लागले..पूर्ण अंधारात असलेल्या त्यामन्दिरात थोड्याच अंतरावर आत निरंजनाचा प्रकाश दिसला...!
चौघांनी डोळे विस्फारले...अंगावर काटे आले आणि भीतीने गागारुन गेले ...अरे इतक्या पडक्या मंदिरात निरंजन लावायला कोण आले .असा प्रश्न पडून ते धावत मागे पळणार इतक्यात बाहेर धो धो पाऊस सुरु झाला होता....आता मंदिराच्या आत प्रवेश करुन काय प्रकार आहे हे पाहिल्याशिवाय पर्याय नव्हता....!
धीर धरुन ते आत आत सरकू लागले...धूप ,अत्तराचा सुगंध आणि निरंजनांच्या सोनेरी प्रकाशात महादेवाचे शिवलिंग झळाळत होते आणि उजव्या अंगाला एक जातीवन्त कुळवंत स्त्री फुलांची माळ करण्यात व्यस्त होती.....!
चौघांची भिवये वर झाली...पडके मन्दिर,वटवाघळे आणि आत इतकी सुंदर आरास करणारी हि बाई कोण ?
मल्हारी ची बोबडी वळण्याचा मार्गावर होती,त्याने सखाराम चा हात घट्ट पकडला.....!

क्षण दोन क्षण...त्या स्त्री चे लक्ष दरवाज्या कडे गेले आणि तिने खुंटी ला अडकवून ठेवलेली तलवार उपसून अंधारात लपलेल्या त्या चौघांच्यावर तलवार रोखत लढाईचा पवित्रा घेत बोलली....कोण आहे दरवाज्यात...सरळ पुढं या नाहीतर खांडोळी करीन.....!

●●◆••••••••●•••••••••◆●●
"बाजींद"

भाग 5 वा
. . . .

आभाळातून वीज चमकावी तशी त्या स्त्री च्या एकाकी आव्हानाने सखाराम व त्याचे मित्र पुरते गांगारुन गेले.

धीर धरुन सखाराम एक पाऊल पुढे आला व बोलू लागला....

"आमी धनगरवाडी चे गावकारभारी हाओत,रायगडावर निघालोय,पावसाचा जोर वाढला म्हणून निवाऱ्याला हिकडं आलो..."

"खोटं नगा बोलू..नायतर एकेकांची खांडोळी करीन... इकडं कोणीही फिरकू शकत नाही,बिकट चोरवाट फक्त हेरांना ठाऊक आहे याची..."
ती स्त्री बोलली...!

नारायण बोलला...महादेवाची आण घेऊन सांगतो,आम्ही स्वताहून हिकडं नाय आलो...त्यो खंडोजी म्हणून एकजण भेटला,महाराजांचा हेर आहे म्हणून सांगत होता..."

काय ..?
खंडोजी ...कुठं भेटला तो तुम्हाला ?
स्त्री उदगारली....!

मग,घडलेली सारी हकीकत व ज्या कारणाने ते चौघे रायगड वर निघालेत ते त्यांनी त्या स्त्रीला सांगितले.

चौघांची कथा ऐकून त्या स्त्री ने तलवार खाली केली आणि चौघांना आत या म्हणून खुणावले...!

चौघेही आत आली...जवळच एका मडक्यात पाणी होते,ते घेऊन त्या स्त्री ने चौघांना दिले..!

सारे जण पाणी पिऊ लागले,आणि मल्हारी ने जड शब्दात त्या स्त्री ला प्रश्न केला....ताई,एवढया भयंकार जंगलात,या पडक्या देवळात,या असल्या जीवघेण्या पावसात तुम्ही एकल्या कशा ?
कोण हाय तुम्ही?

किंचित स्मितहास्य करत ती बोलू लागली.....
मला साऊ म्हणतात.....महाड चे सरदार शिर्के यांची मी मुलगी...!
आमचे वडील आदिलशाही चे सरदार.
शिवाजीराजांनी रायगड जिंकला आणि आसपास चे सारे आदिलशाहीचे सरदार त्यांना मिळाले,फक्त आमचे वडील सोडून...पण...शेवटी त्यांनी पण महाराजांना साथ द्यायचे ठरवले...हम्म.. खूप मोठी कथा आहे दादा...वेळ आली की सांगीन...!

पण,खंडोजी तुम्हाला कुठं भेटला...?
आणि,तो कसा आला नाही इकडे...त्यालाच तर शोधायला मी इथवर आली आहे...!

काय ?
त्याला शोधायला...सर्जा बोलला..!
अहो,तो आम्हाला चोरवाट दाखवतो म्हणून हिकडं घेऊन आला आणि स्वता गायब झाला...कुठं आणि कसा गेला काय माहिती...आमाला फकस्त या रात्री हित आसरा द्या...सकाळी येरवाळी आमी आल्या पावली निघून जाऊ..."

का ?
साऊ बोलली...अहो,आजवर कोणालाच आम्हाला मदत करता आली नाय,खंडोजी आणि आम्ही सारे या जंगलात खूप दिवसापासून दबा धरून आहोत...तुमची मदत करायला आम्हाला आवडेल...इथून फक्त 10 कोसावर माझ्या वडिलांची फौज आहे,तिथं आपण जाऊया...माझे आबा तुम्हाला मदत करतील...त्यांचा आणि महाराजांचा संबंध खुप जवळचा आहे....मी नेईन सकाळी गुप्त वाटेने तिकडे...तोवर तुम्ही विश्रांती घ्या....मी जरा बाहेर जाऊन येते...!

सखाराम व त्याचे मित्र खूप आनंदले....चला खंडेरायाची कृपा...आता तर सरळ शिर्के सरदार आपल्याला मदत करणार म्हणल्यावर काम झालं....गाव आणी बारा वाड्याच दुःख कायमच संपलं... चला घ्या दर्शन देवाचं आणि झोपा...."

सर्जा,नारायण आणि मल्हारी त्वरित झोपी गेले.
दिवसभर खूप हाल झाले होते त्यांचे...पण मल्हारी ...?

त्याला बिलकुल झोप येईना...उलट त्याची विचारचक्रे सुरु झाली होती....!

कोण ह्यो खंडोजी...हे जंगल या आधी आम्हाला का नजरेस पडले नाही,हे मन्दिर जर एवढे पुरातन आहे,तर मग शिवाजी महाराजांसारखा शिवभक्त राजा आजवर इथं येऊन या मंदिराची डागडुजी का केली नाही?

तारुण्याने मुसमुसलेली ही सौंदर्यवाण साऊ इतक्या भीषण काळरात्री एकटी इथं काय करते आहे ?
आणि शिरक्यांची फौज 10 कोसावर ?
10 कोसावर तर नुसतं जंगलच आहे....फौज कशी आणि कुठे असेल....!

हे विचार चक्रे चालू असतानाच मंदिरा बाहेर एक जीवघेणी वाघाची डरकाळी सखाराम च्या कानावर पडली आणि दचकून तो उठला...आसपास पहिले पण ते तिघे तर घोरत होते...हिम्मत करुन त्याने त्या खुंटीवर असलेली तलवार घेतली आणि समोर असलेल्या महादेवाच्या पिंडाला नमस्कार करत मनात प्रार्थना केली...."माझ्या देवा...गावासाठी आम्ही जीवावरचा खेळ खेळतोय,तू काय पदरात टाकशील ते खर,फकस्त आमच्या हातून काय चूक होऊ देऊ नगो,तुझा आशीर्वाद नेहमी पाठीशी असावा"

सखाराम तडक मागे फिरला आणि त्या निमुळत्या मंदिराच्या गाभाऱ्यातून बाहेर निघाला....बाहेर निळसर चांदणे पडले होते,पाऊस बिलकुल नव्हता,झाडांच्या पानावरुन निथळणारे पाणी चेहऱ्यावर झेलत तो बाहेर आला,व वाघाच्या आवाजाचा कानोसा घेत,तो पुढे गेला व पाहतो तर काय ?
वाघाचे ते भयानक धूड रक्ताच्या थारोळ्यात निपचिप मरुन पडले होते......तो त्या वाघाकडे निरखून पाहू लागला,त्याच्या ह्रदयाची कम्पने वाढली,जो हळू हळू मागे जाणार इतक्यात...पाठीमागून त्याच्या पाठीवर कोणीतरी कोणीतरी हात ठेवला...."

जिवाच्या आकांताने तो ओरडला आणि मागे वळून पाहतो,तर ती साऊ होती...!

दीर्घ श्वास घेत त्याने तिच्याकडे नजर टाकली आणि म्हणाला...खर सांगा बाईसाहेब तुम्ही कोण आहे ?
ह्या वाघाला कुणी मारलं ?
आम्ही गावासाठी हिकडं आलोय...तुम्ही कस काय ऐकलंच हित हाय ?

अस बोलताना भीतीने सखाराम चा घसा कोरडा पडला व अश्रू येऊ लागले..."

स्मितहास्य करत साऊ बोलली....घाबरु नका भाऊ....मी इथं कशी हे ऐकायचं आहे ना तुम्हाला...?

तर मग ऐका........!

मी "सावित्री येसाजीराव शिर्के"
आदिलशाहीचे नेकजात सरदार राजे येसाजीराव शिरक्याची एकुलती एक मुलगी.......लहानपनापासून हौस मौज करत वाढलेल्या माझ्या आयुष्याला कधी न संपणारे दुःख ज्या हरामखोराने दिले त्याच्यामुळेच मी आज इथे आहे......!

माझ्या साऱ्या जीवनाची कथा मी तुम्हाला सांगते....ऐका आणि मग विश्वास ठेवा न ठेवा तुमची मर्जी......!

"यशवंतमाची"हे माझे जन्म गाव...!

●•••••••••●◆◆•••••••••••••••●
भाग क्र.६
~~~~~~~~~~~~~~
सर्व गोष्टीत संपन्न असणाऱ्या गावात आणि असे गाव संपन्न बनवण्यासाठी पडेल तडजोड करायला प्रसंगी प्राणाची बाजी लावायला तयार असणाऱ्या शिर्के घराण्यात माझा जन्म झाला.

वडील "राजे येसजीराव शिर्के" आदिलशाही साम्राज्याचे नेकजात,निष्ठावान मनसबदार.
आमचे सारे घराणे विजापूर च्या गादीची इमाने इतबारे सेवा कित्येक पिढ्या करत होती..!
पण,पुण्याचे शिवाजीराजे भोसले यांनी "हिंदवी स्वराज्याचा" डाव मांडला आणि केवळ आदिलशाही नव्हे तर हिंदुस्थानातील पाची पातशाह्या हादरुन गेल्या.
अफझलखानासारखा बलाढ्य सरदार फाडून जावळी पासून महाड पर्यंत असणारा जावळीच्या चंद्रराव मोर्यांचा प्रदेश एकहाती शिवाजी राजांनी जिंकला...केवळ आमची माची सोडून....!
वास्तविक आमच्याकडे लक्ष देण्याइतपत आमचे सैन्य जास्त नव्हते,पण आमचे वडील फार शूर,इमानी आणि एकनिष्ठ सेनानी म्हणून पंचक्रोशीत नाव होते,
दुसरी गोष्ट तळकोकणात सर्व हालचाली वर सहज लक्ष ठेवता येईल असे मोक्याचे ठिकाण म्हणजे "यशवंतमाची"...!
शिवाजी महाराजांच्या धाकाने आसपास ची कित्येक बलाढ्य घराणी शिवाजीराजांचा कौल घेऊन स्वराज्यात सामील झाली,फक्त आमचे घराणे सोडून....!
बस्स...हिच गोष्ट आमच्या घराण्याच्या नाशाला कारणीभूत ठरली...!
आमच्या वडिलांची फौज फार शूर व चिवट होती.
कुस्ती,तलवार,भाला, दांडपट्टा,घोडा या सर्वांचे प्रशिक्षण आमच्या वाड्यातच मिळत असे..!
आमच्या गावच्या "काळभैरव" यात्रेला कुस्तीचा फार मोठा आखाडा भरत असे.

त्यादिवशी पण गावाच्या यात्राचा फार मोठा आखाडा भरला होता ......
~~~~~~~~~~~~~~

"राजे येसाजीराव शिर्के" यांनी अनेक मल्लांना आश्रय दिला होता.महाराष्ट्रातील एक एक तगडे मल्ल त्यांच्या तालमीत सराव करत होते.
बदाम,काजू,खारीक,सुके फळे यासह अनेक खुराकाचे पदार्थ दर महिन्याला बैलगाड्या भरून भरून तालमीत येत असे.
स्वता येसाजीराव कुस्ती मेहनत खूप करत असत.
पंचक्रोशीतील एखाद्या मैदानात चांगला लढवय्या मल्ल दिसला कि त्याच्या सार्या आयुष्याची जबाबदारी घेऊन त्याला सांभाळत असे.
असे आमचे शिर्के घराणे कुस्तीचे फार नादिष्ट्य..!
काळभैरवाच्या यात्रेत महाराष्ट्रातील अनेक मल्ल कुस्ती खेळायला येत असत.मोठमोठ्या बक्षिसांच्या रकमा,खुराकाचे साहित्य,तलवार,घोडा अशी बक्षिसे मिळवून परत जात असे.
पंचक्रोशीतील लाखो लोक त्या कुस्त्या पहायला बैलगाड्या जुंपून,घोड्यावरून,पालखीतून,पायी येत असत.
त्यांच्या जेवणा खाण्यापासून ते मुक्कामाची सोय सारे "राजे येसाजीराव शिर्के" करत असे.

शिवाजी महाराज आणि आदिलशाही चे राजकारण वेगळे आणि हा कुस्त्यांचा फड वेगळा असे समजून अनेक शिवशाहीचे सरदार सुध्दा या मैदानाला आवर्जून हजर असे.
त्या दिवशी सुध्दा असाच माणसांचा लोंढा यशवंतमाची ला पडला.
हशम हत्यारे पेलून येसाजीरावांच्या फौज्या चहू बाजूनी गस्त घालून संरक्षण करताच होत्या.
अनेक पैलवान हातात बर्चे भाले पेलून जंगलात तळ ठोकून येणाऱ्या पाहुण्यात कोणी शत्रू तर नाही याची दाखल घेत होते .....चिलट सुध्दा राजे येसाजीरावांच्या परवानगी शिवाय आत येणार नाही अशी संरक्षण व्यवस्था होती ,आणि जर आलेच तर त्याची खांडोळी करायचे आदेश होते.

दुपारी सूर्य मध्यावर आला आणि पश्चिमेकडे झुकू लागला आणि ‘काळभैरवाच्या नावान चांगभल’ च्या आरोळीने आसमंत दुमदुमून गेला.
लाखो लोकांनी यशवंतमाचीच्या काळभैरव डोंगराच्या खाली तयार केलेल्या कुस्ती मैदानाला कडे करायला सुरवात केली.
अनेक गावाचे,अनेक नावाचे ,अनेक पदांचे सरदार ते दंगल पहायला आले होते.अनेक वस्ताद- खलिफा आपापले पठ्ठे या मैदानात लढवायला घेऊन आले होते.
एव्हाना हलगी घुमक्याच्या ,शिंग तुताऱ्याच्या निनादात दांडपट्टा,लाठीकाठी चा खेळ मैदानात सुरु झाला.
अनेक वीर आपले कसब दाखवत होते ,आणि एखादा धारकरी आवडला कि उपस्थित प्रेक्षकातील एखादा "विजापुरी सरदार"त्याला मागेल तेव्हडे धन देऊन आपल्या पदरी येण्यासाठी व्यवहार करत असे..!
असे एक ना अनेक धारकरी आपल्या कर्तुत्वावर अनेक सरदार लोकांचे मांडलिक झाले ,अजूनही होत होते.
मर्दानी शस्त्रांचा खेळ संपून लहान मोठ्या कुस्त्याना प्रारंभ झाला ,महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून आलेले अनेक मल्ल आपले कसब दाखवून उपस्थित धनाढ्य लोकांच्याकडून आणि खुद्द येसाजीरावांच्या खजिन्यातून रोख बक्षीस जिंकत होते ...!
सूर्य मावळतीला झुकणार इतक्यात राजे येसाजी शिर्के यांच्या खास तालमीत तयार केलेला "भीमा जाधव" हा लढवय्या मल्ल लांघ-लंगोट चढवून अंगाला तेल लावून मैदानात “जय बजरंगाची’ ’ आरोळी ठोकून उतरला.त्याच्या शड्डूच्या घुणत्काराने सार्या मैदानाच्या कानठीळ्या बसल्या..!

सारेच त्याची शरीरयष्टी पाहून थक्क झाले.
शे-दीडशे किलोचा तो भीमा नावाप्रमाणे भीम भासत होता.कल्लेदार मिशा.काळाकिभिन्न दिसणारा भीमा हा पैलवान नव्हे तर प्रतिस्पर्ध्याचा यमदूत आहे असे वाटत होते.
अनेक ठेकेदार भीमावर रोख रकमा,सोने चांदी,तलवार ढाली,बैलजोड्या,घोडे,गदा.यासःह हिरे मोती सुध्दा बक्षीस लाऊ लागली,
बक्षिसांचा आकडा चांगलाच फुगला तरीपण उपस्थित वस्ताद,खलिफा खाली मान घालून उभे होते.
भीमाला जोड काही मिळेना.
कशी मिळणार जोड ?अहो त्या भिमाशी लढणे म्हणजे साक्षात मृत्यूशी लढणे होय.कधी काय मोडून टाकल नेम नाही....!
राजे येसाजी उठले आणि मोठ्या रवात बोलू लागले......!
माझ्या भिमाशी चार हात करायला महाराष्ट्रात कोणी नाही ?
वऱ्हाड,खानदेश,कृष्णाकाठ,देश,कोकण सारे इथे जमले आहेत.कोणाच्याही तालमीत नाही का एखादा सुरमा मल्ल ?
आणि नसेल त्याला जोड तर मानाने त्याला बक्षीस देऊन सर्वांनी मान्य करा कि राजे येसाजींच्या पदराचा मल्ल महाराष्ट्रात अजिंक्य आहे ...!
पूर्वेकडून हलगी,घुमके,शिंग तुताऱ्या कल्लोळ करू लागल्या...लाखांची गर्दी कुजबुजू लागली...!
सर्व बक्षीस एका हारकार्याने एका पोत्यात फिरून गोळा करून मैदानाच्या मधोमध आणले..स्वता राजे येसाजीनी ५ शेर वजनाचे सोन्याचे कडे भीमाला बक्षीस देऊ केले ...ते मनोमन खुश होते...!

भीमा बेजोड मल्ल म्हणून विजयी ठरणार होता.

पण...पण तितक्यात मैदानाच्या उजव्या अंगाकडून एका गंभीर आवाजाने मैदानात शांतता पसरली...!
‘थांबा.....’
माझा पठ्ठा लढेल भिमाशी तुमच्या....!

कोण ?..

एकाने विचारपूस करून ठावठीकाणा माहिती आणली...!

गुंजनमावळातील शिळमकर देशमुख सरदारांच्या पदरी असणारा एक लढवय्या मल्ल खंडेराव सरदेसाई आणि त्याचे वस्ताद काकासाहेब जेधे आले आहेत..!
दोन्ही वस्ताद पैलवानांचे गुळ पाणी देऊन स्वागत झाले आणि कपडे काढून राजे येसाजीना मुजरा करून तो मल्ल मैदानात आला....!

घोटीव,पिळदार शरीर...मजबूत मांड्या,बलाढ्य बाहू....ओठावर किंचित काळी रेघ आणि स्मितहास्य..गोरापान नितळ चेहरा,सरळ सळसळीत नाक ....आणि पायात काळा दोरा बांधलेला खंडेराय सहीसही साक्षात "मल्हारी मार्तंड" वाटत होता..!
त्याच्या देखणेपणा आणि शरीराचे कौतुक गर्दीत होऊ लागले...!

एक मुठी माती त्याने हातात घेऊन कपाळाला लावली....आणि राजे येसाजींच्या कडे पाहत प्रचंड शड्डू ठोकला...सारे मैदान हादरले......!
मान्यवरांच्या हस्ते हातसलामी झडली ...आणि काही क्षण भूतकाळात जमा झाले..!

भीमा आणि खंडेराय यांची कुस्ती म्हणजे जणू दोन वादळे एकमेकांशी भिडणार होती.
निकाल काय होईल याचा अंदाज बंधने मुश्कील होते..!
भीमा-आणि खंडेराय मनगटाला मनगटे भिडली...गर्दनखेच सुरु झाली..!

बघता बघता मैदानांत डावांची वलये सुरु झाली
भीमाने वर्षभर कसून तयारी केलेला एक एक डाव खंडेरायावर मारत होता,आणि त्याची सहजच उकल करत खंडेराय सुटत होता...दोन्ही मल्ल चिखलाने माखले..!

कुस्तीचे पारडे कधी भीमा तर कधी खंडेराय च्या बाजूला झुकत होते.

भीमा एखाद्या भरपावसात भिजत उभा असलेल्या बुरूजासारखा वाटत होता तर खंडेराय गोऱ्या रंगावर तांबड्या मातीच्या चिखलाने केशरी आंब्याप्रमाणे भासत होता ...!

आणि ,
आता मात्र खंडेरायाने आक्रमक पवित्रा घेतला आणि भीमा चा उजवा हात बगलेत दाबून "आतली टांग" डाव इतक्या जोरात मारला आणि अक्षरश सुदर्शन चक्र फिरावे तसे भीमा गर्दीशी फिरून मैदानावर आडवा झाला.....सपशेल चीतपट कुस्ती...!

सारे प्रेक्षक आनंदाने बेभान झाले ....खंडेरायाला डोक्यावर घेऊन सारे लोक आनंदाने नाचू लागले.
हे सर्व पाहत राजे येसाजी उठले....शेजारी उभे असलेल्या कारभार्याला बोलले...या पोराला आणि त्याच्या वस्तादाला घेऊन वाड्यावर या....असे म्हणत राजे निघून गेले....!
खंडेराय गळ्यात फुलांच्या माळा,गुलाल आणि रोख बक्षिसात न्हावून गेला ....!

सर्व जण बेभान आनंदात होते...पण खंडेरायाची गूढ नजर मात्र वेगळीच भाषा बोलत होती...चेहऱ्यावर एकप्रकारची गंभीर शांतता दिसत होती......!
सारे लोक आनंदात होते....फक्त राजे येसाजीराव मात्र मनस्वी दुखी.
आजवर त्यांच्या गावात येऊन खुद्द राजांच्या मल्लाच्या छातीवर बसून विजयी आरोळी ठोकणारा खंडेराय त्यांच्या नजरेसमोरून हटत नव्हता..........त्याना ओढ होती त्यांच्या भेटीची...आणि खंडेरायाला ओढ होती...'यशवंतमाचीची' ...?

. . . .

"Bājīnda"
Part No. 6
. . . .

सर्व गोष्टीत संपन्न असणाऱ्या गावात आणि असे गाव संपन्न बनवण्यासाठी पडेल तडजोड करायला प्रसंगी प्राणाची बाजी लावायला तयार असणाऱ्या शिर्के घराण्यात माझा जन्म झाला.

वडील "राजे येसजीराव शिर्के" आदिलशाही साम्राज्याचे नेकजात,निष्ठावान मनसबदार.
आमचे सारे घराणे विजापूर च्या गादीची इमाने इतबारे सेवा कित्येक पिढ्या करत होती..!
पण,पुण्याचे शिवाजीराजे भोसले यांनी "हिंदवी स्वराज्याचा" डाव मांडला आणि केवळ आदिलशाही नव्हे तर हिंदुस्थानातील पाची पातशाह्या हादरुन गेल्या.
अफझलखानासारखा बलाढ्य सरदार फाडून जावळी पासून महाड पर्यंत असणारा जावळीच्या चंद्रराव मोर्यांचा प्रदेश एकहाती शिवाजी राजांनी जिंकला...केवळ आमची माची सोडून....!
वास्तविक आमच्याकडे लक्ष देण्याइतपत आमचे सैन्य जास्त नव्हते,पण आमचे वडील फार शूर,इमानी आणि एकनिष्ठ सेनानी म्हणून पंचक्रोशीत नाव होते,
दुसरी गोष्ट तळकोकणात सर्व हालचाली वर सहज लक्ष ठेवता येईल असे मोक्याचे ठिकाण म्हणजे "यशवंतमाची"...!
शिवाजी महाराजांच्या धाकाने आसपास ची कित्येक बलाढ्य घराणी शिवाजीराजांचा कौल घेऊन स्वराज्यात सामील झाली,फक्त आमचे घराणे सोडून....!
बस्स...हिच गोष्ट आमच्या घराण्याच्या नाशाला कारणीभूत ठरली...!
आमच्या वडिलांची फौज फार शूर व चिवट होती.
कुस्ती,तलवार,भाला, दांडपट्टा,घोडा या सर्वांचे प्रशिक्षण आमच्या वाड्यातच मिळत असे..!
आमच्या गावच्या "काळभैरव" यात्रेला कुस्तीचा फार मोठा आखाडा भरत असे.

त्यादिवशी पण गावाच्या यात्राचा फार मोठा आखाडा भरला होता ......

"राजे येसाजीराव शिर्के" यांनी अनेक मल्लांना आश्रय दिला होता.महाराष्ट्रातील एक एक तगडे मल्ल त्यांच्या तालमीत सराव करत होते.
बदाम,काजू,खारीक,सुके फळे यासह अनेक खुराकाचे पदार्थ दर महिन्याला बैलगाड्या भरून भरून तालमीत येत असे.
स्वता येसाजीराव कुस्ती मेहनत खूप करत असत.
पंचक्रोशीतील एखाद्या मैदानात चांगला लढवय्या मल्ल दिसला कि त्याच्या सार्या आयुष्याची जबाबदारी घेऊन त्याला सांभाळत असे.
असे आमचे शिर्के घराणे कुस्तीचे फार नादिष्ट्य..!
काळभैरवाच्या यात्रेत महाराष्ट्रातील अनेक मल्ल कुस्ती खेळायला येत असत.मोठमोठ्या बक्षिसांच्या रकमा,खुराकाचे साहित्य,तलवार,घोडा अशी बक्षिसे मिळवून परत जात असे.
पंचक्रोशीतील लाखो लोक त्या कुस्त्या पहायला बैलगाड्या जुंपून,घोड्यावरून,पालखीतून,पायी येत असत.
त्यांच्या जेवणा खाण्यापासून ते मुक्कामाची सोय सारे "राजे येसाजीराव शिर्के" करत असे.

शिवाजी महाराज आणि आदिलशाही चे राजकारण वेगळे आणि हा कुस्त्यांचा फड वेगळा असे समजून अनेक शिवशाहीचे सरदार सुध्दा या मैदानाला आवर्जून हजर असे.
त्या दिवशी सुध्दा असाच माणसांचा लोंढा यशवंतमाची ला पडला.

हशम हत्यारे पेलून येसाजीरावांच्या फौज्या चहू बाजूनी गस्त घालून संरक्षण करताच होत्या.
अनेक पैलवान हातात बर्चे भाले पेलून जंगलात तळ ठोकून येणाऱ्या पाहुण्यात कोणी शत्रू तर नाही याची दाखल घेत होते .....चिलट सुध्दा राजे येसाजीरावांच्या परवानगी शिवाय आत येणार नाही अशी संरक्षण व्यवस्था होती ,आणि जर आलेच तर त्याची खांडोळी करायचे आदेश होते.

दुपारी सूर्य मध्यावर आला आणि पश्चिमेकडे झुकू लागला आणि 'काळभैरवाच्या नावान चांगभल' च्या आरोळीने आसमंत दुमदुमून गेला.
लाखो लोकांनी यशवंतमाचीच्या काळभैरव डोंगराच्या खाली तयार केलेल्या कुस्ती मैदानाला कडे करायला सुरवात केली.
अनेक गावाचे,अनेक नावाचे ,अनेक पदांचे सरदार ते दंगल पहायला आले होते.अनेक वस्ताद- खलिफा आपापले पठ्ठे या मैदानात लढवायला घेऊन आले होते.
एव्हाना हलगी घुमक्याच्या ,शिंग तुताऱ्याच्या निनादात दांडपट्टा,लाठीकाठी चा खेळ मैदानात सुरु झाला.
अनेक वीर आपले कसब दाखवत होते ,आणि एखादा धारकरी आवडला कि उपस्थित प्रेक्षकातील एखादा "विजापुरी सरदार"त्याला मागेल तेव्हडे धन देऊन आपल्या पदरी येण्यासाठी व्यवहार करत असे..!
असे एक ना अनेक धारकरी आपल्या कर्तुत्वावर अनेक सरदार लोकांचे मांडलिक झाले ,अजूनही होत होते.
मर्दानी शस्त्रांचा खेळ संपून लहान मोठ्या कुस्त्याना प्रारंभ झाला ,महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून आलेले अनेक मल्ल आपले कसब दाखवून उपस्थित धनाढ्य लोकांच्याकडून आणि खुद्द येसाजीरावांच्या खजिन्यातून रोख बक्षीस जिंकत होते ...!
सूर्य मावळतीला झुकणार इतक्यात राजे येसाजी शिर्के यांच्या खास तालमीत तयार केलेला "भीमा जाधव" हा लढवय्या मल्ल लांघ-लंगोट चढवून अंगाला तेल लावून मैदानात ''जय बजरंगाची' ' आरोळी ठोकून उतरला.त्याच्या शड्डूच्या घुणत्काराने सार्या मैदानाच्या कानठीळ्या बसल्या..!
सारेच त्याची शरीरयष्टी पाहून थक्क झाले.
शे-दीडशे किलोचा तो भीमा नावाप्रमाणे भीम भासत होता.कल्लेदार मिशा.काळाकिभिन्न दिसणारा भीमा हा पैलवान नव्हे तर प्रतिस्पर्ध्याचा यमदूत आहे असे वाटत होते.
अनेक ठेकेदार भीमावर रोख रकमा,सोने चांदी,तलवार ढाली,बैलजोड्या,घोडे,गदा.यासःह हिरे मोती सुध्दा बक्षीस लाऊ लागली,
बक्षिसांचा आकडा चांगलाच फुगला तरीपण उपस्थित वस्ताद,खलिफा खाली मान घालून उभे होते.
भीमाला जोड काही मिळेना.
कशी मिळणार जोड ?अहो त्या भिमाशी लढणे म्हणजे साक्षात मृत्यूशी लढणे होय.कधी काय मोडून टाकल नेम नाही....!
राजे येसाजी उठले आणि मोठ्या रवात बोलू लागले......!
माझ्या भिमाशी चार हात करायला महाराष्ट्रात कोणी नाही ?
वऱ्हाड,खानदेश,कृष्णाकाठ,देश,कोकण सारे इथे जमले आहेत.कोणाच्याही तालमीत नाही का एखादा सुरमा मल्ल ?
आणि नसेल त्याला जोड तर मानाने त्याला बक्षीस देऊन सर्वांनी मान्य करा कि राजे येसाजींच्या पदराचा मल्ल महाराष्ट्रात अजिंक्य आहे ...!
पूर्वेकडून हलगी,घुमके,शिंग तुताऱ्या कल्लोळ करू लागल्या...लाखांची गर्दी कुजबुजू लागली...!

सर्व बक्षीस एका हारकार्याने एका पोत्यात फिरून गोळा करून मैदानाच्या मधोमध आणले..स्वता राजे येसाजीनी ५ शेर वजनाचे सोन्याचे कडे भीमाला बक्षीस देऊ केले ...ते मनोमन खुश होते...!

भीमा बेजोड मल्ल म्हणून विजयी ठरणार होता.

पण...पण तितक्यात मैदानाच्या उजव्या अंगाकडून एका गंभीर आवाजाने मैदानात शांतता पसरली...!
' Thāmbā..... '
माझा पठ्ठा लढेल भिमाशी तुमच्या....!

Angle?..

एकाने विचारपूस करून ठावठीकाणा माहिती आणली...!

गुंजनमावळातील शिळमकर देशमुख सरदारांच्या पदरी असणारा एक लढवय्या मल्ल खंडेराव सरदेसाई आणि त्याचे वस्ताद काकासाहेब जेधे आले आहेत..!
दोन्ही वस्ताद पैलवानांचे गुळ पाणी देऊन स्वागत झाले आणि कपडे काढून राजे येसाजीना मुजरा करून तो मल्ल मैदानात आला....!

घोटीव,पिळदार शरीर...मजबूत मांड्या,बलाढ्य बाहू....ओठावर किंचित काळी रेघ आणि स्मितहास्य..गोरापान नितळ चेहरा,सरळ सळसळीत नाक ....आणि पायात काळा दोरा बांधलेला खंडेराय सहीसही साक्षात "मल्हारी मार्तंड" वाटत होता..!
त्याच्या देखणेपणा आणि शरीराचे कौतुक गर्दीत होऊ लागले...!

एक मुठी माती त्याने हातात घेऊन कपाळाला लावली....आणि राजे येसाजींच्या कडे पाहत प्रचंड शड्डू ठोकला...सारे मैदान हादरले......!
मान्यवरांच्या हस्ते हातसलामी झडली ...आणि काही क्षण भूतकाळात जमा झाले..!

भीमा आणि खंडेराय यांची कुस्ती म्हणजे जणू दोन वादळे एकमेकांशी भिडणार होती.
निकाल काय होईल याचा अंदाज बंधने मुश्कील होते..!
भीमा-आणि खंडेराय मनगटाला मनगटे भिडली...गर्दनखेच सुरु झाली..!

बघता बघता मैदानांत डावांची वलये सुरु झाली
भीमाने वर्षभर कसून तयारी केलेला एक एक डाव खंडेरायावर मारत होता,आणि त्याची सहजच उकल करत खंडेराय सुटत होता...दोन्ही मल्ल चिखलाने माखले..!

कुस्तीचे पारडे कधी भीमा तर कधी खंडेराय च्या बाजूला झुकत होते.

भीमा एखाद्या भरपावसात भिजत उभा असलेल्या बुरूजासारखा वाटत होता तर खंडेराय गोऱ्या रंगावर तांबड्या मातीच्या चिखलाने केशरी आंब्याप्रमाणे भासत होता ...!

आणि ,

आता मात्र खंडेरायाने आक्रमक पवित्रा घेतला आणि भीमा चा उजवा हात बगलेत दाबून "आतली टांग" डाव इतक्या जोरात मारला आणि अक्षरश सुदर्शन चक्र फिरावे तसे भीमा गर्दीशी फिरून मैदानावर आडवा झाला.....सपशेल चीतपट कुस्ती...!

सारे प्रेक्षक आनंदाने बेभान झाले ....खंडेरायाला डोक्यावर घेऊन सारे लोक आनंदाने नाचू लागले.
हे सर्व पाहत राजे येसाजी उठले....शेजारी उभे असलेल्या कारभार्याला बोलले...या पोराला आणि त्याच्या वस्तादाला घेऊन वाड्यावर या....असे म्हणत राजे निघून गेले....!
खंडेराय गळ्यात फुलांच्या माळा,गुलाल आणि रोख बक्षिसात न्हावून गेला ....!

सर्व जण बेभान आनंदात होते...पण खंडेरायाची गूढ नजर मात्र वेगळीच भाषा बोलत होती...चेहऱ्यावर एकप्रकारची गंभीर शांतता दिसत होती......!
सारे लोक आनंदात होते....फक्त राजे येसाजीराव मात्र मनस्वी दुखी.
आजवर त्यांच्या गावात येऊन खुद्द राजांच्या मल्लाच्या छातीवर बसून विजयी आरोळी ठोकणारा खंडेराय त्यांच्या नजरेसमोरून हटत नव्हता..........त्याना ओढ होती त्यांच्या भेटीची...आणि खंडेरायाला ओढ होती...'यशवंतमाचीची' ...?

. . . .

"बाजींद"
भाग क्र.७
. . . .
राजे येसजीरावांच्या मस्तकात फुटाणे उडत होते.
साऱ्या महाराष्ट्रातील मनसबदारांच्या पुढ्यात नाचक्की झाली होती.
काय कमी केलं होत "भीमा" च्या कुस्ती-मेहनत-खुराकात ?
रोज सकाळी पाच रात्री पाच शेर दूध.
दररोजचा 6-6 तास व्यायाम.
तगड्या मल्लांसोबत लढती.मालीश, मसाज करायला नोकर चाकर...मेहनत मोजून घ्यायला मुनीम.. सगळं राजेशाही असून शिळमकर देशमुखांच्या मल्लाला ऐकला नाही...!
डोकं भनभनत होत.
तेवढ्यात एका हुजऱ्यान वर्दी दिली..."राजे,ते मैदानातले पैलवान आणि वस्ताद आल्यात भेटाया"

राजे सावरून बसले,भोवताली दिगग्ज सल्लागारांचे पथक दिमतीस होतेच....."बोलवा,त्यांना" राजांनी आदेश दिला....!

काही क्षण भूतकाळात विलीन झाले आणि चारचौकी शिर्के वाड्यातील सदरेत पैलवान खंडेराय आणि त्याचे वस्ताद आले...!

खंडेराय....अगदी वीस-पंचवीशीतला उमदा जवान गडी.ओठावर नुकतीच काळी रेघ दिसत होता.अंगापिंडाने धिप्पाड खण्डेराय पाहून कोणीही त्याच्या प्रेमात न पडावे तर नवल.
डोईला मराठेशाही पगडी,कमरेला तलवार असलेल्या खंडेराय व त्याच्या वस्तादांनी राजाना मुजरा केला.

उजवा हात वर करत राजांनी पण मुजरा स्वीकारला आणी बोलू लागले...."पैलवान,आम्ही तुमच्या कुस्ती वर निहायत खुश झालो आहोत,आमच्या भीमाला इतक्या सुंदर डावपेचात अडकवून चित करणारा पैलवान साधासुधा नाही हे आम्ही जाणतो,बोल काय बक्षीस देऊ तुला आम्ही "?

राजांचे स्तुतीपर ते शब्द ऐकून खंडेराय किंचित स्मित करत वस्तादांच्या हातात असलेले बक्षिसाने भरलेले पोते एका हातात धरून राजे येसजींच्या पुढ्यात ओतले...आणि बोलू लागला..."

"राज... मला द्यायचच असलं तर तुमच्या तालमीत आश्रय द्या,कुस्ती-मेहनत करुन गावोगावच्या यात्रा जत्रा मारुन वैतागलोय आमी, ही माज वस्ताद आणि म्या तुमच्या तालमीत राहिलो तर तुमचं लय नाव करुन दावीन..."

काय ?
राजे प्रश्नार्थक बोलून गेले ..!
अरे तुम्ही गुंजनमावळातील शिळमकर देशमुखांचे मल्ल,म्हणजे एकाअर्थी भोसल्यांच्याच हद्दीतले...!
भोसले-आदिलशाही दुष्मनी विकोपाला आली असताना तुला आम्ही आमच्या पदरी ठेवणे योग्य नाही...."

तेवढ्यात खंडेराय बोलला...."तस नव्ह राज...शिळमकर आणि आमचं संबंध जावळीच्या दंग्यावेळीच तुटलं,आणि शिळमकर तर चंद्रराव मोर्यांचा सख्खा भाचा हुता...त्यांना तर कुठं शिवाजीराजांच अभय हाय...?
हिकडं आड, तिकडं हिर नगासा करु... नायतर मग तुम्ही नाय म्हणला तर सरळ रायरी गाठून शिवाजीराजांची चाकरी पत्करायची का आमी ??

राजे,क्षणभर विचारात पडले.
खंडेराय चांगला पैलवान आहे यात शंकाच नाही,उद्या जर शस्त्रांचे चार हात शिकला तर चोखट धारकरी बनू शकेल,शिरक्याची दौलत सांभाळायला मजबूत मनगट मिळेल..."

"ठीक आहे खंडू....आम्ही ठेवू तुला आमच्या तालमीत...,असे म्हणत येसजीराजानी नोकराला हाक मारून,त्यांचे सामान उचलून वाड्याच्या मागे असलेल्या भव्य तालमीत ठेवायला लावले..!

ते म्हणाले...तुमची तात्पुरती सोय पुढे घोड्याच्या पागेभोवती असलेल्या घोडेवानाच्या खोलीत करु... चार दोन दिसानी तालमीत रहा..."
काही हवं नको याची सोय करुन राजे..वाड्याच्या आत निघून गेले...!

नोकरांनी खंडेराय व वस्तादांची साहित्याची पोती उचलून घोडेवानाच्या खोलीत ठेवली....!

"यशवंतमाची" च्या यात्रेत खुद्द येसाजीराजांच्या मल्लाला पराभूत केले ही बातमी वाऱ्यासारखी येसाजीराजांच्या अंतरमहालात गेली.
राजांना एकच मुलगी.
"सावीत्री"तिचे नाव.रुपाने अतिशय रूपवान.
गोरापान चेहरा,सतेज कांती,सरळ सळसळीत नाक..पांढरे शुभ्र मोत्यासारखे दात,सहीसही राजलक्ष्मी भासत असे...!

शिर्के घराण्याची "सावित्री"म्हणजे यशवन्तमाचीचे नाकच होते...लाडाने सर्व तिला "साऊ"म्हणत असे....खूप खूप लाडात वाढली होती ती..!
राजांना कधी आपल्याला मुलगा नाही याची उणीव तीने भासुन दिली नव्हती..!
नाजूक रुसव्या फुगव्यात कधी ती अडकलीच नव्हती.
भरधाव घोड्यावर मांड ठोकून वाऱ्याच्या वेगाने घोडा फेकत सह्याद्रीच्या दर्याखोऱ्यात स्वछंद भरारी मारणे,तलवार,भाला,गदा,धनुष्यबाण सर्वकाही लीलया चालवत असे...आणि एवढे असूनही शिरक्यांच्या वाड्यात नजरेने कधी जमीन सोडत नसे...!
जशी यशवन्तमाची साऊ जीव मानत असे किंबहुना त्यापेक्षाही जास्त यशवन्तमाचीची इज्जत साऊ ला प्रिय होती...!

आजचा घडलेला प्रकार तीला जिव्हारी लागला होता.
दस्तूरखुद्द शिरक्यांच्या गावात येऊन शिरक्यांच्या पैलवानाला आव्हान देऊन चितपट करणारा कोण हा ऎरा गैरा आहे त्याला चांगलाच धडा शिकवायची मनीषा साऊ च्या मनात आली होती...!

दिवस उगवला,सह्याद्रीच्या कडेकपारीत सहस्रोसूर्यनारायणाची सहस्रो किरणे आपल्या सुवर्ण किरणांनी दाही दिशा उजळून टाकू लागली...पण राजे शिरक्यांच्या वाड्यामागील तालमीत भल्या पहाटेच शड्डू घुमू लागले होते.
खंडोजीच्या जोराचा ठेका पाच हजाराच्या वर गेला होता...!
घामाने निथळत असलेले त्याचे शरीर एखाद्या चिरेबंद बुरुजाप्रमाणे भासत होते.

सकाळ होताच राजे स्वता तालमीत आले.
सर्व जवान धारकरी नुकताच कुस्तीचा सराव आटोपून आपापली हत्यारे परजत तालमीबाहेरच्या मैदानात तलवार-पट्टयांचा सराव करु लागली..."

"खडूं... उचल तो पट्टा ,अन घे पवित्रा...."
राजे खंडेराय ला बोलले.

त्यांच्या बोलण्याने खंडेराय बोलला...."नाय राजं... म्या पैलवान गडी...ही धारकऱ्याची कामं, मला नाय जमायचं.."

यावर हसून राजे बोलले..."अरे, माझ्या भीमाला चित केलंस त्यापेक्षा सोप्प काम आहे हे...चल उचल "

भीत भीत खंडेरायाने पट्ट्याच्या खोबणीत हात घातला..आणि एक एक हात करु लागला...सारे मल्ल त्यावर हसू लागले..."

खंडेराय ला काही केल्या पट्टा चालवता येईना,दमून त्याने त्याचा नाद सोडला व राजे येसजींची मालीश करतो म्हणाला...."

राजांचे सर्वांग तेलाने माखून खंडेराय आपल्या मजबूत हाताने मालीश करत होता,सारे मल्ल आसपास हत्यारांचा सराव करत होती....खंडेराय घामाने ड्बडबला होता अन तितक्यात तालमीच्या दरवाजावर थाप पडली..!

"बघ रे,कोण आहे ते....

खंडेराय उठला आणि घाम पुसत तालमीचा दरवाजा उघडला....सुर्याची किरणे एकदम तालमीच्या दरवाजातून आत प्रवेशली आणि त्याच्या आडवी उभी असणारी एक जातीवन्त देखणी स्त्री हातात दुधाचा तांब्या घेऊन उभी होती.....खंडेराय तीचे ते जातिवंत सौंदर्य पाहू लागला.....आणि ती ....ती सुद्धा त्याचे देखणेपण न्याहळत होती....,काही क्षण तसेच निघून गेले अन....राजे येसाजी गर्जले...कोण आहे रे ?

"आबा,दूध आणले आहे.....साऊ चा नाजूक आवाज आला,"

"खंडू...तांब्या घे तो"....राजे बोलले.

खंडेराय निशब्द होता,त्याच्या हृदयाची कंपने अतीतीव्र झाली होती...आणि साऊ...तिचीही अवस्था काहीशी तशीच होती...अजून काही क्षण भूतकाळात गेले आणि ते दोघेही नजरभेटीचे सुख अनुभवत तिष्ठत उभेच होते...."

"साऊ.........पाठीमागून कोणीतरी हाक मारली आणि दोघेही सावध झाले...सावित्री ने दुधाचा तांब्या खंडेराय च्या हातात देऊन धावत मागे गेली"

राजांच्या हाती तांब्या देऊन खंडेराय उभा होता...5 शेर दुधाचा पितळी तांब्या बघता बघता राजानी रिचवला...आणि अंघोळीला निघून गेले..."

खंडेराय मात्र त्या गूढ डोळ्यांची आठवण कितीतरी वेळ काढत तालमीत बसला होता...."

साऊ च्या मनाची घालमेल पण अशीच होती...कोण होता तो ?
याआधी कसा पाहिला नाही ...कित्येक प्रश्नांनी मनात काहूर माजले होते...."

अंघोळ पाणी आटोपून खंडेराय राजे येसजींच्या परवानगी ने गावात जाऊन येतो म्हणून निघाला......"

सकाळचा सूर्य माथ्यावर आला नी खंडेराय यशवन्तमाची पासून 5-6 कोसावर एका डोंगररांगेतल्या जंगलात गेला.
एक मेंढरांचा कळप चरणाऱ्या मेंढपाळाला पाहून त्याने हाक मारली........."जय मल्हारी"
त्याची ती हाक ऐकून त्या मेंढपाळणे प्रतिउत्तर दाखल दुसरी हाक मारली........ "जय रोहिडेश्वर"

आणि दुसऱ्याच क्षणी दोघेही खदखदून हसू लागली...!

खंडेराय त्या मेंढपाळाला बोलला....खेडेबाऱ्याला निरोप द्या.....सांबाच्या पिंडीवर नाग पोहचता झालाय....लौकरच पंचमी खेळायला आवतण धाडतो......असे म्हणत पुनश्च एकदा...."जय मल्हारी...जय रोहिडेश्वर गजर झाला".....!

खंडेराय दुपारच्या प्रहरी पुन्हा यशवंतमाचीत राजे येसाजी शिर्के यांच्या तालमीत दाखल झाला...."

··●क्रमश●••
· ·
"बाजींद"
भाग क्र.८
· ·

त्या दिवशी दिवसभर "साऊ"ला काही सुचत नव्हते,सतत सकाळचा प्रसंग तिच्या डोळ्यासमोर तरळत होता.

पण,राजे येसाजीरावांच्या एकुलत्या एक मुलीला असे विचार करणे शोभत नाही,म्हणून तिचे मन तिलाच समजावत होते.भावना आणि कर्तव्य यांचा मनात झालेला महापूर प्रथमच साऊ अनुभवत होती.

इकडे,खंडेराय आणि त्याचे वस्ताद काकासाहेब मोठ्या गूढ चर्चेत व्यस्त होते..!
ती चर्चा कोणती त्या दोघांनाच माहिती ..!

एव्हाना तालमीत चीटपाखरू नव्हते..शिर्क्यांची शिबंदी येसाजीरावंच्या आदेशाना त्यांच्यासोबत घाटमाथ्यावर टेहळणी ला गेली होती,जेमतेम शे दोनशे धारकरी वाडा राखत होते.
फौज टेहळणी करून यायला अजून बराच अवकाश होता.
शिर्क्यांचा आजवर कोणी पाडाव करू शकले नाहीत याचे कारण म्हणजे त्यांच्याकडे नेकजात,इमानदार मराठ्यांची फौज,त्यात कुस्तीचा प्रचंड नाद असलेले राजे एक एक माणूस तोलून मापून दिमतीस घेत असत ..!
फंद फितुरीला स्थानच नव्हते.

पण,त्या दिवशी......!

शेजारच्या डोंगरातल्या दरोडेखोरांचा मोठा छापा यशवंतमाचीवर पडला...!
खंडेराय आणि वस्ताद चर्चेत व्यस्त होते तितक्यात गावात दंगा-गोंगाट ऐकू येऊ लागला.
दोघेही उठले...खुंटीला टांगलेली तलवार खंडेरायाने हातात घेतली आणि धावत तालमीतून बाहेर पळत सुटला...!

यशवंतमाची आणि पलीकडच्या डोंगरातील दाट जंगलातील "बेरड" यांची पिढ्यानपिढ्यांची दुष्मनी..!
अशी पिढी जात नव्हती कि एकमेकांचे मुडदे पडत नव्हते.मागच्या वेळेस तर याच बेरडानी शिर्क्यांचे सारे लग्नाचे वऱ्हाड कापून काढले होते.

त्याचे कारण असे,कि येसाजीराजांचे वडील आणि यशवंन्तमाची पलीकडच्या "मोऱ्यांची" हद्द एकमेकाला लागून होती.
जहागिरी,वाटणे यासाठी स्वकीयांच्यात होणार्या मारामाऱ्या कमी नव्हत्या,त्यात शिर्के –मोरे वैर महाभयानक.

आजवर ज्यांनी ज्यांनी मध्यस्ती केली त्यांचीही मुंडकी शाबूत राहिली नव्हती..!

मोऱ्यांचे पिढ्यानपिढ्यांचे कारभारी हे जाधववाडी चे "लखुजी बेरड"पाहत होते.

लखुजी बेरड मोठे बुद्धिमान आणि शूर.सारी जाधववाडी त्याना देव मानत होती,आणि लखुजी मोर्यांना देव मानत असे.
त्या दिवशी मैत्रीची खोटी आश्वासने देऊन येसाजीरावांचे वडील पिराजीराव शिर्के यांनी हद्दीसाठी मोर्यांशी दगा केला.घाटमाथ्यावरची सारी फौज कापून काढली...मात्र लखुजी बेरड आणि त्याची शे दोनशे चिवट धारकरी काही केल्या मागे हटेनात.

बरीच शिर्के मंडळी त्यांच्या हातून कत्तल होत आहे हे पाहून पिराजीरावांनी जाधववाडीवर छापा मारायला सांगून लखुजीच्या गावाची राख केली होती.....हे ऐकून लखुजीने तलवार टाकली आणि हताश होऊन कोसळला..हि संधी साधून पिराजीने त्याचे मुंडके कापले.......बस्स...तो दिवस मोरे-शिर्के वैर संपले आणि शिर्के-बेंरड वादाला तोंड फुटले...!

लखुजीच्या गावात ज्यांच्या ज्यांच्या स्त्रिया मृत्युमुखी पडल्या त्यांच्या त्यांच्या मुला-बाळांनी हातात तलवारी-कुर्‍हाडी घेऊन शिर्के घराणे संपवायचा विडा घेऊन गाव सोडले आणि जाधववाडी-यशवंतमाची दरम्यान च्या घनदाट जंगलात गुहेत राहून लुटालूट,जाळपोळ करून आयुष्य जगणे पसंद केले...!

त्यावेळी त्यांचा म्होरक्या होता लखुजीचा मुलगा रायराव.
रायरावाने अवघ्या २ ते ३ वर्षातच शिरक्यांच्या एका शुभ प्रसंगात चिवट बेरड फौजांनी पिराजीराव शिर्क्यांना ठार केले....आणि त्याचा बदला म्हणून काहीच दिवसात जंगलात छापा मारून रायरावाचे मुंडके शिर्क्यांनी तोडून आणले ...!

या अश्या कत्तलींचा लेखाजोखा पहिला तर साक्षात चित्रगुप्ताला शहारा येईल.....!

मुंडक्याला मुंडकी तोडली नाही तर ते शिर्के – बेरड वैरच नव्हे .....पण जेव्हापासून राजे येसाजीनी शिर्क्यांची गादी सांभाळली आहे त्यांनी बेरड आणि शिर्के यांच्या एकजूटीसाठी खूप प्रयत्न केले होते.
पण,दुहीचा शाप अजूनही संपला नव्हता......"रायराव" च्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्याचा तरुण मुलगा "सूर्यराव"आता बेरडांचा म्होरक्या होता.

अतिशय शांत,शूर,मुत्सद्दी असलेला हा सूर्यराव जणू काही शपथ घेऊन होता कि शिर्के कुळ संपवले पाहिजे.

त्याने आजवर अनेक प्रयत्न केले पण 'यशवंतमाची' ला काही केल्या खिंडार पडत नव्हते.

राजे येसाजीनी माचीची सुरक्षा इतकी कडवी केली होती कि बेरडच काय कोणालाही अशक्य होते ते ...जर माची जिंकायचीच असा चंग बांधला कोणी तर मुंडक्यांची रास नक्कीच पडणार हे जगजाहीर होते,आणि एवढ्याश्या माचीसाठी एवढी मोठी किमत चुकवणे कोणाही मुत्सद्दी राजकर्त्याला परवडणारे नव्हते......!

पण,त्या दिवशी घात झाला होता.

राजे येसाजी सारीच फौज घाटमाथ्यावर घेऊन गेले ,अगदी थोडी फौज गावात होती ,आणि हीच खबर सूर्यराव बेरडच्या भयानक फौजेच्या कानी लागली आणि वाऱ्याच्या वेगाने ते यशवंतमाचीवर तुटून पडले.
गावातील सावकार,व्यापारी लोकांची घरे फुटू लागली.
खूप लुट जमा करून सूर्यराव बेरडाने लुट जंगलात धाडली आणि कडवे हशम बरोबर घेतले आणि त्याने त्याचा मोर्चा शिर्क्यांच्या वाड्यावर वळवला...!

डोळ्यात वडिलांच्या मृत्यूची आग घेऊन तो बेफाम घोड्यावर स्वार होऊन निघाला होता......!
खंडेराय हातात तलवार घेऊन बाहेर आला आणि त्याला जाणवले कि हातात पेटते पलिते घेऊन समोरून दौडत येणारी सारी फौज आता वाड्यावर कोसळणार...!

त्याने प्रसंगावधान राखले आणि वस्तदाना घेऊन सरळ वाडा गाठला..!

शिर्क्यांचा वाडा जणूकाही भुईकोट किल्लाच होता.
आत प्रवेश करून वाड्याचे मुख्य लाकडी द्वार बंद करायला सांगून वाड्यात मौजूद असणारी सारी फौज एकत्र केली...जेमतेम ३०/३५ लोक असतील ते ..!

प्रत्येकाला कामे वाटून देऊन वाड्याचे संरक्षण करायला सांगितले आणि तडक आपला मोर्चा वाड्यातील शिर्क्यांच्या कुटुंबाकडे वळवला.
घरातील आया-बाया आकस्मित हल्ल्याने हादरून गेल्या होत्या.
त्याना धीर देऊन तो निघणार इतक्यात शिर्क्यांची पत्नी रखमाईबाईसाहेब मोठ्या आवाजात रडत म्हणाली......थांबा...!

"माझी लेक हातात तलवार घेऊन मगाशीच चोरवाटेने बाहेर गेली आहे.काहीही करा पण माझ्या साऊला मागे आणा...बेरड –शिर्के वैर मला विचारा काय आहे ते .....एकवेळ आमच्या साऱ्यांचा जीव गेला तरी बेहत्तर पण माझ्या साऊ ला काही होता कामा नये तिने माझे काही न ऐकता १०० पैलवानांची फौज घेऊन वाड्याच्या चोरवाटेने बेरड फौजेवर चालून गेली आहे...."

हे ऐकून खंडेराय मात्र पुरता थक्क झाला......सकाळी दुध घेऊन आलेली नाजूक "सावित्री" हि शिर्क्यांची मुलगी होती तर ..!

आणि जीला नाजूक समजतोय ती रणांगण गाजवायला निघाली आहे ....!
तो खरोखर सावित्रीच्या या कामगिरीवर मनोमन खुश झाला ..!

‘ ’ बाईसाहेब’ .....राजांच्या फौजेला निरोप धडायला कोणाला तरी पाठवाल का ?

खंडेराय रखमाई बाईसाहेबाना बोलला....!

‘होय...निरोप घेऊन एक निशाणबारदार गेला आहे....फक्त काही तासात शिर्क्यांची फौज येईल...पण तोवर काही आक्रीत घडू नये ...तुम्ही जा...माझ्या साऊ ला तेवढे मागे आणा ....!

तुम्ही काळजी नका करू बाईसाहेब ....मी नक्की त्याना मागे आणतो...असे म्हणत खंडेरायाने तलवार पेलली आणि छलांग मारत तो वाड्याबाहेर दौडत गेला...!
एव्हाना माचीच्या पूर्वेकडून आर्त किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या होत्या...सावित्रीच्या नेतृत्वाखाली पैलवान फौजेने सुर्यरावाच्या फौजेवर हल्ला चढवला असावा बहुतेक.....!

सूर्याजीने पागेतील काळेभोर चांगले घोडे निवडून त्यावर मांड ठोकली..आणि वस्ताद काकाना बोलला.....काका ...प्रसंग बाका आहे,मला आई भवानी जसे सुचवते आहे तसे वागतो...ही खबर मात्र लौकर खेडेबारयाला पोहोच करा....!

मान हलवत काका बोलले...काळजी घे..आणि काका सुध्दा निघून गेले ...!

खंडेराय बेफान दौडत चालून गेला ...!

गावाच्या नदीपात्राजवळ सावित्री आणि पैलवानांच्या एकत्रित फौजेने सुर्यरावाच्या फौजेवर हल्ला चढवला...आकस्मित हल्ल्याने बेराडांची ती चिवट फौज मात्र पुरती हादरली...पण त्वरित सावरली...!

हल्ला कोणी आणि कोणाच्या नेतृत्वाखाली केला समजले....!
शिर्क्यांची लेक सावित्री.....!

सुर्यरावाने इशारा केला.....सावित्री जिवंत पकडा.

बस्स ..हजारांच्या फौजेपुढे सावित्रीचा तो हल्ला तोकडा पडला ,सावित्रीच्या घोड्याला दोर टाकून बांधून खाली पाडले..सावित्रीच्या डोक्यावर आघात झाला आणि ती बेशुद्ध झाली......!|
मासे पकडायची जाळी टाकून तिला कैद केले...!
आल्या पावली सुर्यरावने माघारी फिरायची आज्ञा केली....!

जे साधायला आलो होतो,त्यापेक्षा कितीतरी पट गवसले अशी भावना सुर्यरावच्या मनात थैमान घालू लागली...अवघ्या काही क्षणात यशवंतमाची ओसाड झाली.......सावित्रीला जिवंत कैद करून सूर्यराव जंगलात निघून गेला...!

काही क्षणात खंडोजी तिथे पोहचला.....पण वेळ निघून गेली होती.

आता ?
आता काय...विचार करून काय होणार नव्हते...त्याने लगाम खेचला आणि बेरडांच्या फौजेमागे त्यानेही पाठलाग सुरु करायचा ठरवत घोडे जंगलात घातले.

वार्यासारख्या वेगाने खंडेराय सुर्यरावाचा पाठलाग करू लागला.
अगदी काही अंतरावर सुर्यरावाची फौज आहे याची त्याला जाणीव झाली.
त्याने घोड्याचा वेग अजून वाढवला आणि मजल दरमजल करत एका भव्य पठारी प्रदेशात त्याचे घोडे आले आणि दुसऱ्याच क्षणांत घोड्याच्या खुरात आधीपासून पेरून ठेवलेली वाघर अडकली आणि घोडा कोसळला.....सूर्यरावांच्या फौजेला क्षणात समजले होते की कोणतरी पाठलाग करतोय..!

खंडेराया जमिनीवर पडणार इतक्यात त्याने स्वताला सांभाळत सावध पवित्रा घेतला आणि उठणार इतक्यात हजारो तलवारी त्याच्या नरड्यावर आल्या......पाच पंचविस धिप्पाड हशमानी खंडेरायाला जेरबंद केले....!

क्रमश
. . . .

"बाजींद"
भाग क्र.९

. . . .
कोणीतरी पाठीमागून खंडेरायाच्या डोक्यात जोराचा दणका दिला अन खंडेराय शुद्ध हरपला....!
खंडेराय ला घेऊन सूर्यराव व त्याचे पथक दाट जंगळजाळीत घुसले.
जंगलाच्या मधोमध एका गुप्तठिकाणी सूर्यरावच्या फौजेचा अड्डा होता.
गंभीर मुद्रेच्या "सूर्यरावाच्या" चेहऱ्यावर आनंद दिसत होता.
ज्या "पिराजी" शिरक्याने साऱ्या जाधववाडीच्या हातात हत्यारे घ्यायला भाग पाडले त्याची इज्जत,त्याची नात आता त्याच्या ताब्यात होती.
त्याच्या मनात कल्पनेचे खेळ सुरु होते.
एक हशम धावत आला आणि त्याने वर्दी दिली...,

सरदार,आपण माची लुटून येताना एका घोडेस्वाराने पाठलाग चालवला होता,त्याला जेरबंद केला आहे.

सूर्यराव उठला,बोलला..."कोण आहे तो ?"

शिरक्यांच्या वाड्यातील हशम किंवा त्याच्या कुटुंब कबिल्याचा अंगरक्षक असावा बहुतेक...त्याला आणा इथे "....त्याच्या आज्ञेने खंडेराय ला समोर आणले गेले...!

एव्हाना साऊ ला शुद्ध आली होती,पण तिचे हात पाय बांधल्याने ती हलू शकत नव्हती.
ती जोरजोरात किंचाळून त्या साऱ्यांना आव्हान देऊ लागली....."हिम्मत असेल तर एकदा माझे हात पाय खोला,ही शिरक्याची अवलाद काय आहे तुम्हाला दाखवते..."

तिच्या आकस्मित आव्हानाने सूर्यराव चे डोके भडकले....तो तडक सावित्री जवळ गेला आणि तिला जोरात थप्पड मारली,एक,दोन,तीन....त्याच्या प्रहाराने सावित्रीच्या तोंडातून रक्त येऊ लागले...."

"हरामखोर शिरक्याची अवलाद....तोंड बंद ठेव...तुझ्या साऱ्या घराण्यात गद्दारी,क्रूरता भरली आहे.
गरीब,भोळ्या जनतेला लुबाडून,त्यांची कत्तल करून सत्ता मिळवलेले तुझे बापजाडे काय लायकीचे आहेत आम्हाला माहित आहे..."

असे बोलत तो निघणार तितक्यात सावित्री ने बांधलेल्या हाताने सूर्यराव वर झडप घातली....आकस्मित हल्ल्याने सूर्यराव तोल जाऊन खाली पडला.....तितक्यात बाजूला उभे असलेल्या हशमानी सावित्रीला धरून बाजूला केले...."

आता मात्र सूर्यराव बेभान झाला...त्याने कमरेला असलेली तलवार म्यानातून उपसली आणि सावित्रीचे केस धरुन तिचे हात बांधलेला दोरखंड तलवारीने तोडला,पाय खोलले आणि पुन्हा एक जोरात थप्पड देऊन तीला ढकलून दिले....सावित्री तोल जाऊन पडली.....तडक सूर्यराव ने बाजूला उभे असणाऱ्या हशमाच्या हातातील तलवार हिसकून घेऊन सावित्रीच्या पुढ्यात टाकली.....आणि बोलू लागला....

चल,उचल ती समशेर आणि दाखव तुझ्या रक्ताची उसळी...मला ही पाहुदे, ज्या शिरक्यांनी निशस्त्र आजवर बाया बापड्यावर हत्यार उचलले,त्यांच्या घरातल्या स्त्रिया हत्यारे कशी चालवतात....उठ,आता बोलू नको,तुझी तलवार बोलू दे..."

सूर्यराव चे वाक्य पुरे होते न होते इतक्यात विजेच्या वेगाने सावित्रीने तलवार हातात घेऊन क्षणाचाही विलंब न करता सूर्यरावावर हल्ला चढवला...!

तितक्याच चपळाईने सूर्यरावने बचावात्मक तलवारीचे हात सुरु केले....आणि मग त्यानेही आपला हात चालवायला सुरु केली...!

एव्हाना खंडेराव ला शुद्ध आली,आणि समोर सावित्री आणि सूर्यरावची लढाई तो पाहू लागला,त्याचे रक्त एक सळसळळे...पण त्याचे हात पाय बांधून ठेवल्याने तो सावित्रीची मदत करायला असमर्थ होता,पण प्रचंड ताकतीने त्याने हात सोडवायचा प्रयत्न सुरु केला पण दोर काही सुटत नव्हता...!

समोर मात्र तलवारी तलवारीवर आपटून खणखणाट वाढू लागला आणि सूर्यराव ला सवित्रीचा तलवार चालवायचा हातखण्डा मनोमन आवडला....तो पण कच्चा नव्हता...त्यानेही प्रचंड प्रतिहल्ला करत सावित्रीला हुलकावणी दिली...क्षणभर सावित्री फसली,ती संधी घेत सूर्यराव ने तलवारीच्या मुठीचा वर्मी घाव सावित्रीच्या तोंडावर मारला....तिच्या तोंडातून रक्त येऊ लागले...पण क्षणात सावरुन तिनेही प्रतिहल्ला केला आणि झुकत सूर्यराव च्या मांडीवर प्रहार केला...मांडीतून रक्त येऊ लागले...हे पाहताच बाजूचे पथक तलवार उपसून सवित्रीवर धावून आले...मात्र,सूर्यराव ने थांबायचा हातवारा केला.....आता मात्र सूर्यराव बेभान झाला...एक स्त्री म्हणून सावित्रीच्या तलवार हल्ल्याला त्याने नगण्य समजले होते,त्याचा तो भ्रमनिसरण झाला आणि आता मात्र त्याने प्रचंड वेगात तलवारीचे वलये,डाव-प्रतिडाव,हूल सुरु करत सावित्रीला बरेच मागे रेटले
...पण सावित्रीने सर्व हात धुडकावत लावले आणि प्रतिहल्ला सुरूच ठेवला....आणि एक क्षण..सूर्यराव ने हवेत झेप मारत गोल घिरकी घेत वार केला,ज्याने दुप्पट वेगाने हल्ला वाढला आणि तो वार सावित्रीच्या तलवारीवर लागला व तलवार हातातून खाली पडली...बस हाच क्षण सूर्यराव ने प्रचंड ताकतीने तलवार सावित्रीच्या दंडावर वर्मी मारली...रक्ताचे फवारे उडाले अन सावित्री किंचित मूर्च्छित होऊ लागली अन खाली पडली...."

बरेच वेळ प्रयत्न करून खंडेराय चे हात सुटले,त्वरित पाय सोडवून त्याने विजेच्या वेगाने सूर्यराव वर झेप घेतली....गरुड जसा सर्पावर झेप घेतो,त्यासारखीच व्याकुळता खंडेरायाच्या डोळ्यात होती.

सावित्री थोडी शुद्धीवर आली आणि समोर सुरू असलेला प्रकार पाहत तशीच पडून होती...अधीर वेदना तिला उठून देत नव्हत्या....!

खंडेराय च्या आकस्मित हल्ल्याने सूर्यराव तोल जाऊन खाली पडला,खंडेराय त्याच्या छातीवर बसून तोंडावर प्रहार मारु लागला,पण इतक्यात सावध झालेले सूर्यराव चे जवान खंडेराय वर तुटून पडले...त्याने सूर्यराव ला खंडेराय च्या तावडीतून सोडवले आणि ओढत बाजूला आणले...20-25 जणांनी करकचून धरलेल्या खंडेरायाने एकाच हिसड्यात सर्वांना भुईवर आदळले.... रागाने लालबुंद झालेला त्या वीराने समोर सावित्रीच्या हातून गळून पडलेली तलवार उचलली....क्षणभर डोळे मिटून तलवार कपाळाला लावली आणि तो समोरच्या 20-25 जणांच्या तुकडीवर तुटून पडला...!

प्रचंड रणकंदन सुरू झाले.खंडेराय च्या आडवे येणारा तुटून पडू लागला...कोणाचे हात तुटले तर कोणाचे पाय...कोणाची शिरे धडावेगळी होऊ लागली तर कोण उभा चीरु लागला...!!

काही दिवसापूर्वीच याच खंडेराय ला हातात तलवार धरायला येत नव्हती,अन आज हा इतक्या सफाईने तलवार चालवत आहे हे पाहून साऊ आश्चर्याने थक्क झाली,ती वेदना विसरून विचार करु लागली...हा खंडेराय नव्हे तर समशेरबहाद्दर वाटतो...!
ती उघड्या डोळ्यांनी खंडेराय चे शौर्य पाहू लागली...!

सैन्याची ही कापाकापी पाहून सूर्यराव लाव्हारसाप्रमाणे उसळून हाती तलवार घेऊन खंडेराय च्या आडवा आला.......आणि मग दोन महावादळे एकमेकांवर प्राणपणाने तुटून पडले...!

खंडेराय चा त्वेष,हल्ला जोमाने आडवत आडवत सूर्यराव तलवारीचे हात करु लागला....!

सूर्यराव ही कच्चा नव्हता....तोही चिवट धारकरी होता,त्यानेही प्रचंड प्रत्युत्तर दिले....ते दोन्ही वाघ रक्ताबंबाळ होऊन लढू लागले....!

अखेर खंडेराय चा आवेश पाहून सूर्यराव ने रणनीती बदलत....झुकते माप दिले अन तिथेच खंडेराय फसला....त्याचा तोल जाता क्षणीच सूर्यराव ने त्याच्या मांडीवर वर्मी घाव मारला....रक्ताचा कारंजा उसळला.....खंडेराय आलेली वेदना सहन करायला एकदम खाली बसला.....हे पाहताच सूर्यराव ने आपली समशेर खंडेराय च्या मानेवर ठेवली.....एक क्षण...त्याने प्रचंड ताकतीने तलवारीने खंडेरायाचे मुंडके तोडायला तलवार मागे नेली आणि ....सु सु सु करत एक बाण पलीकडच्या जंगलजाळीतुन सूर्यराव च्या खांद्याचा वेध घेत आला आणि समुद्रात उल्का पडावी तशी सूर्यराव च्या खांद्याचा वेध घेऊन सूर्यराव अक्षरश मागे उचलून पडला....!

दुसऱ्याच क्षणी त्या जंगलातून शेकडो बाण सूर्यराव च्या फौजेवर तुटून पडले अन फौज जखमी होऊ लागली......आणि जंगलाच्या पूर्वेकडून आरोळी घुमली..... हर हर हर महादेव......छत्रपती शिवाजी महाराज कि जय...."

भगव्या जरीपटक्यांचे निशान डोलवत शिवछत्रपतींच्या मावळ्यांची एक तुकडी हातात नंग्या तलवारी घेऊन सूर्यराव बेरड च्या फौजेवर तुटून पडली...."

सूर्यराव सावध झाला...खांद्याच्या घुसलेला बाण काढत बाजूच्या हशमाला बोलला..ही तर महाराजांची तुकडी आहे....पांढरे निशाण दाखवून थांबायला सांगा सर्वांना.....सूर्यराव मनात विचार करु लागला,आपण शिवाजी महाराजांच्या कोणत्याच गुन्ह्यात नसताना हा छापा कशासाठी असावा ?

··● क्रमश : ●••
■◆●■◆●■◆●■

"बाजींद"
भाग १० वा
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

हातात पांढरे निशाण घेऊन एक हशम क्षणात झेपा टाकत निघून गेला.
हातात पांढरे निशाण पाहताच मावळ्यांच्या तुकडीचा बाणांचा वर्षाव कमी झाला..!
सूर्यराव च्या भोवती अंगरक्षकांचे कडे पडले.
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

बाजूच्या दाट झाडीतून निथळती तलवार घेतलेला,आश्वावर स्वार असलेला एक शिलेदार घोड्याचा लगाम खेचत खेचत सूर्यराव च्या पुढे आला..!
त्यांच्या मागे केस पांढरे झालेला वयोवृद्ध मावळाही घोड्यावर स्वार होऊन आला होता.
त्या वृद्ध माणसाची नजर काहीतरी शोधत होती,आणि त्याने एका व्यक्तीला हेरले आणि घोडे त्याच्या जवळ नेत बोलला....."खंडोजी.....बरा हायसं नव्ह "
मांडीवरची जखम धरत,वेदना सहन करत तो बोलला..."होय वस्ताद काका...! ठीक आहे मी "
असे बोलत त्याने एक कटाक्ष समोर अर्धमूर्च्छित असलेल्या सवित्रीकडे पहिले

मागे उभे असलेला स्वार एकदम पुढे आला आणी सूर्यराव ला बोलला.....!
"सूर्यराव तुम्हीच ना ?"

त्या स्वाराच्या आकस्मित बोलण्याने सूर्यराव आश्चर्य व्यक्त करत बोलला...."होय जी,मीच सूर्यराव "

पण,आम्ही महाराजांच्या कोणत्याच गुन्ह्यात नसताना आमच्या तुकडीवर महाराजांच्या जरीपटक्याच्या तुकडीचा न सांगता छापा का शिलेदार ?
महाराजांच्या कोणत्याही वाटेला आम्ही नसतो,तर आज कसे का ?

सूर्यराव बोलला...!

यावर तो स्वार उत्तरला...!

"सूर्यराव.... आपण ज्यावर शस्त्र रोखले होते,तो मराठेशाहीचा अधिकारी आहे,महाराजांच्या हेरखात्यातील एक प्रमुख हेर...बहिर्जींचा खास हेर...खंडोजी "

हे ऐकून सूर्यराव बाजूला उभा राहिला

त्या स्वाराच्या या बोलण्याने समोर अर्धमूर्च्छित असलेली सावित्री अवाक झाली,ज्या खंडेराय ला तलवार भाला चालवता येत नाही,जो केवळ नोकरीसाठी आमच्या वाड्यात आला,हे केवळ नाटक होते तर....तिला त्याच्या पराक्रमावर खुश व्हावे हे समजेना की त्याच्या खोटे बोलून वाड्यात येण्यावर राग व्यक्त करावा हे समजेना"

तो स्वार घोड्यावरून पायउतार झाला आणि समोर उभ्या खंडेराय उर्फ खंडोजी ला मुजरा करत बाजूला नेले आणि बोलू लागला..."

"नाईक.....हे काय करुन बसला आपण?
तुम्ही स्वराज्याच्या कामगिरीवर असलेले सैनिक आहात,असा जीव धोक्यात घालणे आपणास शोभत नाही....बहिर्जी नाईकांनी आपणास घेऊन येण्यास पाठवले आहे "

काय ?
मला घेऊन यायला मी कोणती चूक केली आहे ?

असे बोलताच तीन चार शिलेदारांनी खंडोजी च्या दंडाला धरले....

नाईक...आम्हाला माफ करा,आम्ही हुकमांचे गुलाम आहोत....!

खंडोजीने पुन्हा सवित्रीकडे पहिले....त्याच्या मनाची घालमेल सुरु झाली....एक कर्तव्यदक्ष सैनिक असून असा आततायीपना खरच त्याला शोभत नव्हता,पण सावित्रीला सूर्यराव च्या फौजेने पकडून नेले तेव्हापासून त्याचा मनावरचा ताबाच सुटला होता....!

खंडोजी ला पकडून ते शिलेदार नेऊ लागले इतक्यात बाजूच्या जंगलातून शिंगे-कर्णे गर्जू लागली.....हजारो हशमांच्या किंचाळण्याचा आवाज आणि घोड्यांच्या टापांचे आवाज घुमू लागले....."

कोणाचा हल्ला असेल हा ?
सूर्यराव,खंडोजी आणि वस्ताद काकासह तो स्वर विचारात पडला,पण सावित्रीने ओळखले......"

ही फौज राजे शिरक्याची नेकजात फौज..."

आपल्या एकुलत्या एक लेकीला चार दोनशे लोकांनी पळवून न्यावे,हे त्यांच्या मनाला अतिशय झोम्बले होते,त्यांच्या डोळ्यात केवळ आग होती,त्यांच्या हातातील तलवार आणि मनगटे केवळ शत्रूच्या रक्तासाठी आसुसली होती......

खंडोजीलाही समजले की नक्कीच राजे येसाजीची घाटमाथ्यावर टेहळणी ला गेलेली फौज सावित्री साठी येत आहे...त्याने पटकन त्या स्वराला ही गोष्ट सांगितली....माझं ऐका,ही शिरक्याची लेक सावित्री या सूर्यराव च्या पळवून आणली आहे.
आपण जर तिला परत शिरक्यांच्या हाती सुपूर्द केले तर शिरक्यांचा जास्तच विश्वास आपल्यावर बसेल..."

यावर तो स्वार उत्तरला...सूर्यराव व शिरक्यांच्या वादात पडणे हे आपले काम नव्हे...तुम्हाला बहिर्जी नाईकांच्या पुढे उभे करणे हे माझे काम आहे..."

त्या स्वरांच्या त्या बोलण्याने खंडोजी पुरता चवताळला,त्याने क्षणात आपल्या दंडाला हिसडा मारला आणि दंड धरुन नेणारे मावळे धरणीवर पडले,दुसऱ्याच क्षणी त्या स्वरांच्या कमरेला लावलेली तलवार उपसली आणि त्याच्याच नरड्यावर धरत तो बोलला......मला माझ्या हिशोबाने काम करु दे ....नाईकांना सांगा,काम जोवर होत नाही,खंडोजी परत येणार नाही..."

बाजूला उभे असलेल्या वस्ताद काकांनी पुढे येत खंडोजीला बोलले....खंडोजी,तुझे डोके आहे का ठिकाण्यावर ? आपण कोणत्या कामगिरीवर आहोत,आणि तू करत काय आहेस...?

काका...माझ्यावर विश्वास ठेवा मी करतो ते ठीकच करतो..तुम्ही निघा इथून...शिरक्यांच्या पदरी कडवे धारकरी आहेत....निभाव लागणे कठीण आहे..."

इतक्यात शिरक्यांच्या पहिल्या तुकडीने हल्ला चढवला....सूर्यराव आणि मावळ्यांची तुकडी दुहेरी लढत सुरु झाली.

खंडोजी ने त्वरित त्या स्वराला बाजूला केले आणि प्रसंगावधान राखत तो सवित्रीजवळ आला,आणि तिच्या हाताला धरुन उठवू लागला,तितक्यात तिने तो हात झिडकरला आणि त्याच्यावर हाताने प्रहार करु लागताच त्याने तिचा हात पकडून मुरगळला आणि तिला उचलून पलीकडच्या जंगलातून निघून गेला....

शिरक्यांच्या कडव्या फौजेपुढे सूर्यराव आणि मावळे तोकडे पडू लागले....क्षणात त्यांनी काढता पाय घेत माघार घेतली आणि वाटा चोरवाटेने निघून गेले...."

इकडे खंडोजीने सावित्रीला उचलून जंगलातून बरेच बाहेर आणले होते...पुढे डोंगराची कडेतुट होती आणि हजारो हात खाली नदीचे विशाल पात्र......खंडोजीने एकदा मागे पाहिले आणि ताडले की शिरक्याची फौज पाठलाग करत आहे....त्याने कशाचाही विचार न करता सवित्रिसह स्वतःला त्या कडेतुट वरुन त्या विशाल नदीच्या पात्रात झोकून दिले...."

ही गूढ कथा ऐकता ऐकता सखाराम ला कधी झोप लागली त्यालाच समजले नाही, सकाळी कोमल सूर्यकिरणांनी त्याची झोप मोड केली....सखाराम सह त्याच्या साथीदारांना जाग आली आणि समोरच खंडोजी ते कधी उठतात याची वाट पाहत होता..."

खंडोजीला पाहताच त्यांची झोप उडाली...."

उठा...किती वेळ झाला वाट पाहतोय तुमची..."

खंडोजी बोलला...!

सखाराम ने आजूबाजूला पाहिले तर केवळ गर्द दाट झाडी......त्याच्या मनात प्रश्नाचा काहूर माजला..!

कुठे गेले ते महादेवाचे मन्दिर ?
कुठे गेली ती सुंदर सावित्री ?
कुठे गेला तो मेलेला वाघ ?
हा खंडोजी रात्रभर गायब होता,आता कुठून आला ?

त्यां चौघांच्या डोक्यात प्रश्नांनी थैमान घातले होते,खंडोजी मात्र धीरगंभीर मुद्रेने त्या चौघांकडे पाहत होता..!

·●क्रमश :●•

. . . .

बाजींद
भाग क्र.११ वा..!
. . . .
कुठे गायब झालात तुम्ही काल रात्री मला सोडून ?

खंडोजी ने प्रश्नार्थक मुद्रेने त्या चौघांना सवाल केला...!

यावर सखाराम बोलला...गायब..आणि आम्ही ..?

तुम्हीच काल संध्याकाळी त्या दाट जंगलाच्या जाळीत आम्हा चौघाना गुंगारा देत गायब झालात...!

आणि हो.....रात्री तुमची सावित्री पण भेटली होती आम्हाला....तिनेच आम्हाला तुमची पूर्ण कथा सांगितली ..पण आम्हाला कशी झोप लागली आम्हालाच समजेना...!

आम्हाला इथे कोणी कसे आणले तेवढे सांग बाबा ....नसता डोक्याला ताप झाला आहे...!

कुठली अवदसा सुचली आणि तुझे ऐकून तुझ्या मागे आलो असे झाले आहे ...!

काहीसा वैतागल्यागात सखाराम खंडोजी ला बोलला...!

'' काय...?
सावित्री होती काल तिथे ?
अहो, मी तिलाच शोधायला काल जंगलात बाजूला गेलो,काळ सकाळीच मला ती तुम्ही भेटला त्या वडाच्या झाडाजवळ भेटणार होती,तिच्या वडिलांची फौज पण १० कोसावर आपली वाट पाहत आहे..!

तिथेच तुम्हाला नेऊन तुमच्या प्रश्नाचा निवडा करण्यासाठी आमचे वस्ताद काका तुम्हाला महाराजांच्या जवळ घेऊन जातील आणि आम्ही आमच्या वाटेने जाऊ असे नियोजन होते माझे ..पण..तुम्ही अचानक कुठे दिसेनासे झालात आणि रात्रभर तुमचा शोध घेत मी पहाटे त्या महादेवाच्या पडक्या मंदिराजवळ पोहोचलो तर तिथे एक वाघ रक्ताच्या थारोळ्यात मरून पडलेला दिसला....मला वाटले इथे अजूनही वाघ असतील,आपल्या जीवाला धोका आहे, म्हणून मी मंदिरात आलो,तर तिथे तुम्ही चौघे झोपला होतात.

मग एका एका खांद्यावरती घेऊन पहाटेच या डोंगरावर आणले .....म्हणून तुम्ही चौघे आणि मी जिवंत आहे...आणि तुम्ही उलट मलाच प्रश्न विचारताय ?

खंडोजी चे ते बोलणे ऐकून त्या चौघाना जरा धीर आला.
अहो,खंडोजीराव आम्हाला माफ करा,पण भीतीने आमची बुद्धी काम करेना,त्यात रात्रभर तुमच्या सावित्रीने तुमची जी कथा सांगितली,त्यावरून तर जास्तच शंका आली.
आम्ही साधी जंगलात राहणारी शेतकरी धनगर लोक,तुमच्या थोरा मोठ्यांच्या भांडणाची शिकार नको व्हायला....आम्ही जातो माघारी,...राहिला सवाल आमच्या वाडीच्या सुरक्षेचा,तर बघू..सगळ्यांना घेऊन काहीतरी निवडा होईलच...!
सखाराम निर्धारी आवाजात बोलून गेला....!

अहो,आता ३-4 कोसावर वस्ताद काकांचे गुप्त ठिकाण आहे आमच्या ...कशाला मागे जाता ?

सरळ महाराजांच्या कानावर तुमचा विषय घाला,तुमची समस्या कायमची मिटेल आणि सारा वाडा सुखी होईल...माझ ऐका ,माघारी फिरून रात्रभर चाललेली मेहनत वाया जाईल...!

खंडोजी च्या त्या प्रश्नावर चौघांनी पण विचार केला ...मागे जाऊन काय प्रश्न सुटणार नाही.

खंडोजी तर महाराजांचा हेर आहे,तो तर किमान खोट बोलायचा नाही....साधले तर सगळेच चांगले साधले जाईल....असे म्हणत चौघांनी होकारार्थी मान हलवत खंडोजी सोबत जायचा निर्णय घेतला....!

एव्हाना सूर्य चांगलाच वर आला होता,भुकेने ते चौघेही हैराण झाले होते.

त्यांनी खंडोजी ला प्रश्न केला....
खंडोजी राव ...कुठतरी न्याहारी मिळेल का बघूया का ?

यावर त्वरित खंडोजी म्हणाला, चला चला....या डोंगराच्या खालीच मझा घोडा बांधला आहे ,त्यावर खाण्यापिण्याचे साहित्य आहे ..चला आपण निघू...असे म्हणत टे पाचही जण डोंगर उतरू लागले...!

घोड्याचे नाव घेताच सखाराम ला त्याचा घोडा आठवला,काल ओढा पार करताना काय दिसले त्याला काय माहिती ,कुठे पळून गेला.
पण,माझा घोडा खूप इमानदार आहे,अशी साथ सोडून जाणार नाही कधी,नक्कीच काय तरी आक्रीत बघितलं असणार त्याने...येईल तो नक्की परत,मला विश्वास आहे...आपल्या मनाशीच सखाराम बोलत होता...!

बराच वेळ डोंगर उतरत असताना त्याना दुरूनच खंडोजीचा घोडा दिसू लागला...आणि खंडोजी ला पाहून त्याचे खिंकाळणे सुरु झाले....!

खंडोजी ने घोड्याच्या मानेवर,तोंडावर मायेने हात फिरवला.

रात्रभर पावसात भिजून गारठलेल्या घोड्याला त्याने दिलासा मिळाला.
त्याने घोड्यावर एका घोंगडयात बांधलेली चटणी,कांदा आणि नाचणीची भाकर काढली.

खंडोजी ने घोड्याचे दावं सोडलं आणि त्याला चरायला सोडलं...!

पाचही जण भाकरीचा तुकडा मोडून खावू लागले ...!

खाता खाता दूरवर सखाराम चा काल गायब झालेला घोडा दूरवर दृष्टीस पडला.
त्याला पाहताच सखाराम आनंदाने उठून उभा राहिला..!
त्याने जोरजोरात त्याच्याकडे पाहत हाका मारायला सुरवात केली आणि त्याच्या रोखाने चालू लागला.
आपल्या धन्याची हाक ऐकून सखाराम चा घोडा धावत त्याच्याकडे येऊ लागला...सखाराम खूप आनंदी झाला.
पाठीमागून खंडोजी ने सखाराम च्या पाठीवर हात टाकला,आणि "जातीवन्त जनावर दिसतंय"

व्हय...लय जीव हाय माजा हेज्यावर...!

पण,काय झाले कोणास ठाऊक,समोरून धावत येणारा सखाराम चा घोडा क्षणात थांबला,सखाराम कडे पाहत पाहत मागे सरकू लागला,आणि क्षणात सुसाट वेगाने मागे पळून गेला...!

त्याचे धावणे पाहताच सखाराम पण मागे लागला,पण घोडा क्षणात जंगलात गायब झाला.

खिन्न मनाने सखाराम खन्डोजी जवळ आला,म्हणाला...काय याला आक्रीत दिसतय समजना... मला सोडून कवाबी असा वागला नव्हता आजवर....नक्कीच कायतरी आक्रीत हाय"

जाऊदे,जातोय कुठं...येईल माघारी,चला चार घास खाऊन घेऊया...असे बोलत खंडोजी व सखाराम माघारी आली.

सर्वजण भाकरी चटणी कांदा खाऊ लागली..!

सखराम बोलला.....खन्डोजीराव ,रात्री सावित्री बाईनी तुमची कथा सांगितली...खरच मला अभिमान वाटला कि मी एका मराठेशाहीच्या हेरासोबत हाय.
पण,मला पुढ काय झाल तुमच सांगशीला का ?
त्या डोंगरावरून तुम्ही दोघांनीही खाली नदीत उडी का मारली ?

त्यानंतर काय झाले....!

किंचित हसत खंडोजी बोलू लागला......

काय सांगू मंडळी,आयुष्यात केवळ व्यायाम,धाडस आणि मेहनत याच्या जीवावर महाराजांच्या सैन्यात प्रवेश मिळवला होता.
ऐन तारुण्यात खुद्द बहिर्जी नाईकांचा खास मर्जीतला हेर झालो होतो..आयुष्यात प्रेम म्हणजे काय असते हे कधी समजून घ्याला वेळच मिळाला नव्हता...!
पण,शिर्क्यांच्या लेकीला जेव्हा पहिल्यांदा पहिले ,तेव्हा त्या रात्री डोळ्याला डोळा लागला नव्हता.....सारख तिचा तो चेहरा आठवायचा प्रयत्न करत होतो..!

मनात एकप्रकारची ओढ निर्माण झाली होती....!

त्या रात्री बेरडांच्या हल्ल्यात तिने एकाकी चढाई केल्याचे समजताच माझा तोल गेला..मी वस्ताद काकाना सांगून तिचा जीव वाचवायला सुर्यरावांच्या फौजेचा एकट्याने पाठलाग केला...मी जाणून होतो सूर्यराव आणि महाराजांचे कोणतेच वैर नव्हते...पण साऊ साठीची तळमळ स्वस्थ बसून देत नव्हती...!

मी धोक्यात असल्याची खबर काकांनी खेडेबार्याला पोहोच केली आणि २०० मावळ्यांची तुकडी माझ्यासाठी धावून आली.....मी जर साऊ ला तिथेच सोडून गेलो असतो तर नक्कीच सूर्यरावाने तिला एकतर मारून टाकले असते नाहीतर यातना देत शिर्क्यांना झुकवले असते..आणि जर शिर्क्यांच्या हाती दिले असते तर माझे गुपित तिला समजले होते ,आणि ती सुध्दा जातिवंत होती,तिने नक्कीच हे सर्व तिच्या बापाला सांगितले असते आणि आमचा शिर्क्यांच्या राज्याचा पाडाव करायचा बेत फसला असता ,म्हणून मी कोणताही विचार न करता वस्ताद काकांचाही हुकुम डावलून तिला घेऊन त्या भयान कड्यावरून नदीत उडी मारली....!

दुथडी भरून वाहणाऱ्या त्या नदीत आम्ही दोघेही पडलो.....साऊ च्या नका तोंडात पाणी गेल्याने तिची शुद्ध हरपली...पण मी शुद्धीत होतो...तिचा हात धरून कसा बसा पोहू लागलो...पण पाण्याच्या वेगाने मी खूप दूरवर वाहत वाहत एका भयान जंगलात पोहोचलो....!

खंडोजीने साऊचा हात धरून तिला नदीच्या काठावर पण जंगलाच्या तोंडावर असलेल्या एका विशाल दगडावर झोपवले आणि कमरेला असलेले कट्यार,खंजीर काढून बाजूला ठेवला आणि शेल्याने तोंड पुसत साऊ च्या डोक्याखाली शेला ठेवला.......सावित्रीचे ते सौंदर्य खंडोजी कितीतरी वेळ पाहत होता.....त्याच्या हृदयाची कंपने तीव्र होत होती...आयुष्यात पहिल्यांदाच कोणत्या तरी स्त्रीचे सौंदर्य तो पाहत होता.

तितक्यात अचानक सावित्रीला जाग आली.

डोक्यावर हात ठेवत ती वेदना सहन करत उठली आणि बाजूला उभा असलेल्या खंडोजीकडे कटाक्ष टाकला आणि दोन्ही हात छातीवर नेत बोलले....दूर व्हा...!

क्षणात खंडोजी ने शेला तिच्या हातात देत बोलला....घाबरू नका बाईसाहेब..तुम्ही सुखरूप आहात...!

त्वरित हाताला हिसडा मारत तो शेला घेऊन तिने खांद्यावर छातीवर झाकत सावरत बोलली.....मी सुखरूप राहीनच...तुम्ही तुमची काळजी करा....!

आमच्या वडिलांचा विश्वास घात करून त्यांच्या वाड्यात प्रवेश मिळवला आणि आमच्या खबरा शिवाजी महाराजाना देता ?
एका पैलवानाला शोभत का ही गद्दारी ?

खंडोजी बोलला......गद्दारी...आणि आम्ही ?

गद्दारी केली तुमच्या वडिलांनी......सारा महाराष्ट्र शिवाजीमहाराजांच्या मागे ठाम असताना तुटपुंज्या फौजेच्या जीवावर मराठेशाहीशी वैर शोभते का शिर्क्यांना ?

सूर्यराव बेरडांच्या हातात शस्त्र घ्याला मजबूर करणारे तुमचे बापजादे शिवाजी महाराजांची महती काय समजणार ..?

यावर सावित्री खवळून बोलली....ते काहीही असो....शिर्क्यांची जरी दौलत महाराजांच्या सैन्यापुढे तोकडी असली तरी आमच्या राज्यापुरते आम्ही सुखी आहोत....कोणीही दुखी नाही...आमच्या आबांच्या वर निष्ठा बाळगणारी कित्येक जण तरी आहे....!

निष्ठा ..?

खंडोजी सुध्दा संतापाने बोलला ...!

निष्ठा सत्कारणी असावी....आगलाव्या आगंतुक आदिलशाहिवर कसली निष्ठा ?

ज्यांना माणुस आणि जनावरे यातला भेद माहिती नही...ज्यांचा इतिहास हा कत्तली आणि जाळपोळी ,बलात्कार,लुटालूट यांनी भरलेला आहे.
350 वर्ष जुलूम जबरदस्ती करणारे तुमचे आदिलशाही हात तोडून टाकले आमच्या महाराजांनी..!

आज महाराष्ट्र सुखात आहे,तो केवळ महाराजांच्या पुण्याईमुळे...बस्स...आम्ही त्यांच्यासाठी जीवही देऊ...!

बोलून ताकत वाया घालवू नका...क्षणात सावित्री बोलून गेली...असेल हिमत तर माझ्याशी चार हात कर आणि तुझा प्राण वाचव...मी पण माझ्या राज्यासाठी प्राण देऊ शकते...!

सावित्रीच्या आकस्मित आव्हानाने खंडोजी सावध झाला,तितक्यात सावित्री ने खंडोजी वर जबरदस्त प्रहार सुरु केले...खंडोजीचा तोल गेला,पण क्षणात सावध होऊन त्याने गिरकी घेत,सावित्री चा हात मुरगळुन मागे आवळत बोलला....बाईसाहेब...आम्ही शिवछत्रपतींचे शिपाई आहोत,स्त्रिया वर कधीच हात उगारत नसतो...बऱ्या बोलान गप्प बसा नाहीतर हात पाय बांधून उचलून न्यावं लागेल...!

सवित्रीचा हात घट्ट मागे धरल्याने तिचा आवेश पूर्ण मावळला...!

हे सर्व सुरु असताना जंगलातून एक बाण वेगाने बाहेर आला ज्याने खंडोजी च्या पायाचा वेध घेतला,एका आर्त वेदनेने खंडोजी ला भोवोळ आली,आणि तो सावीत्री ला सोडून खाली पडला...!
क्षणात सावित्री सावध होऊन पळून जायच्या बेतात होती,
तितक्यात जंगलातून पाच पन्नास काळीकभिन्न नरभक्षक आदिवासी जमात हातात भाले, बरचैं घेऊन बाहेर आली...त्यांचे ते उग्र कुरूप चेहरे पाहताच सावित्री भयकंपित झाली....!

क्रमश
. . . .

बाजींद

भाग क्र.१२
. . . .
सडसडीत देहाचे,अंगावर,शरीरावर चित्रविचित्र पांढरे पट्टे ओढलेले,केवळ लज्जारक्षणाएवढे कपडे घातलेले ते भिल्ल जमातीचे लोक कमालीचे क्रूर असावेत हे त्यांच्या चेहऱ्यावरुनच दिसत होते...!

एकाने पुढे होऊन सावित्रीच्या दंडाला पकडायचा प्रयत्न केला,पण सावित्रीने त्याचा हात वरच्यावर पकडून हिसडा मारला,त्याचा तोल जाऊन तो खाली पडला.आपल्या साथीदाराला खाली पडलेले पाहताक्षणी ते भिल्ल बेताल किंचाळत सावित्रीच्या रोखाने धावत सुटले आणि ते पाहताच सावित्री सुद्धा पुन्हा नदीच्या दिशेने धावू लागली...पुढे नदी,पाठीमागे भिल्ल अश्या विचित्र परिस्थितीत तिने कशाचाही विचार न करता नदीच्या प्रवाहात उडी टाकली.
नदीच्या वेगवान धारेत ती वाहून जाऊ लागली,आणि तिच्यापाठोपाठ ते सर्वच्या सर्व भिल्लही नदीत उडी मारून सवित्रीचा पाठलाग सुरु ठेवला.

बराच वेळ पाण्यात वाहत गेल्यानंतर एका वळणावर असलेल्या गुंफेत सावित्रीने पोहणे सुरु केले आणि काही वेळ पोचल्यानंतर गुंफेत पोहचली...!

पोहून दमलेली सावीत्री त्या गुहेत दमछाक होऊन पडली,पण आपल्या पाठीमागून भिल्ल येत आहेत याची जाणीव तिला होताच ती गुहेतील पाण्यात हळू हळू चालू लागली...!

बराच वेळ चालून झाला आणि गुहेतील पाणी कमी होत जमीन लागली...क्षणात ती आत धावत सुटली.
बराच वेळ तिने धावणे सुरु ठेवल्यानंतर सूर्यकिरणांचा दूरवर प्रकाश दिसू लागला.

ती त्या प्रकाशाकडे धावली आणि तिला जाणवले की आपल्या पाठीमागे भिल्लांचा पाठलाग अजूनही होत आहे.
ती त्या प्रकाशाजवळ आली.
एक पुरुष आत जाईल इतक्या उंचीची ती एक वाट होती जी जंगलाच्या दुसऱ्या टोकाकडे निघत होती..!
ती त्या वाटेतून बाहेर पडली आणि जंगलात पोहचली...!

समोर एक विशाल शिळेवर चित्रविचित्र आकृत्या कोरल्या होत्या....एका उंच झाडाच्या फांदीवर एक मनुष्याच्या हाडाचा सांगाडा लटकत होता,ज्याचे पाय वर आणि हात खाली अशी स्थिती होती...!

सवित्रीचा पाय एका दगडाला थडकला व तिचा तोल गेला आणि पडली...!

काहीच अंतरावर ते भिल्ल तिचा पाठलाग करत तिच्या पर्यंत पोहचले होते....ते मनस्वी खुश झाले की बऱ्याच दिवसांनी त्यांची भूक मिटणार होती,पण...पण तितक्यात एका चित्रविचित्र आवाजाने त्या सर्वांचे लक्ष समोरच्या दगडावर गेले.
आणि भीतीने त्यांचे डोळे विस्फारले गेले....!

त्या भिल्लांचा म्होरक्या हात जोडून भीतीने बोलू लागला...ब... ब...ब बाजींद.... बाजींद...!

असे बोलत बोलत अक्षरश वाऱ्याच्या वेगाने आल्या पावली परत धाऊ लागले.

धावताना कोणी धडपडत होते,कोणी किंचाळत होते,तर कोणी जीव वाचावा म्हणून फक्त धावतच होते...त्या गुहेतून ते कोणताच विचार न करता पुन्हा नदीत उडी टाकून पोहत पोहत मागे येऊ लागले.......!

इकडे,सावित्रीला समजेना,की या भिल्लानी असे काय पाहिले ज्याला बघून हे इतके घाबरले आहेत....!

तिने स्वतःला सावरले.मन खंबीर केले आणि समोर च्या भव्य पाषणाकडे पाहू लागली आणि क्षणात अनेक वटवाघुळ पक्षी एकाच वेळी बाहेर पडले....!

दोन प्रचंड वाघ हळू हळू सवित्रीकडे येऊ लागले...!
एखाद्या राजाच्या ऐटीत,आणि राजबिंड्या चालीत ते दोघे चालत होते,आणि त्यांच्या मधोमध एक धिप्पाड युवक,सिंहासमान चालीने चालत होते,ते दोन वाघ जणू त्याच्या अंगरक्षकासारखे त्याच्या बरोबर चालत होते.
सरळ नाक,आग ओकणारे त्याचे घारीसारखे डोळे,चेहऱ्यावर एखाद्या राजपुत्रासारखी चमक,कमरेला लटकत असलेली तलवार,एखाद्या पुराणपुरुषांसारखे अजस्त्र बाहू,पिळदार दंड,भरीव छाती......पाहताक्षणीच कोणाच्याही हृदयाचा थरकाप उडावा असे त्या युवकाचे एकंदरीत व्यक्तिमत्व पाहत सावीत्री उभी होती...!

जंगलात सर्वत्र पक्षांचा किलबिलाट सुरु झाला,आसपास सरपटणारे निशाचर एकाच वेळी बाहेर आले....जंगली प्राणी अस्वस्थ होऊन किंचाळू लागली....जणू काही तो युवक या सर्व जंगलाचा नव्हे तर सभोवतालच्या अणूरेणुचा स्वामी होता....!

तो महत्वकांक्षी नजरेचा युवक जसाजसा सावित्रीच्या जवळ येऊ लागला,तसे तसे रात्रकिडे,पक्षी,वटवाघुळे,असंख्य लहान मोठे जीवांचा गोंगाट प्रचंड वाढू लागला,सावित्रीच्या कानाला ते सहन होईना,तिने तिचे दोन्ही हात कानावर ठेवले....तो आवाज वाढू लागला.......बस्स आता काही पावले...एकतर ते वाघ सवित्रीवर तुटून पडणार नाहीतर,हे जंगली जीव तरी सवित्रीचा प्राण घेणार....तिला हे सर्व असह्य झाले आणि तिने डोळे बंद करत प्रचंड किंचाळी फोडली........!

तीची किंचाळी ऐकताच तो युवक जाग्यावर थांबला...एक स्मित हास्य करत त्याने चहूबाजूला नजर फिरवली तसे सर्व पशुपक्षी,जीवजंतू शांत झाले....एका क्षणात सारा गोंगाट मौन झाला....!
सावीत्री ने डोळे उघडले...तिथे फक्त तो पुरुष तिच्याकडे स्मितहास्य करत उभा होता...!

इकडे,जिवाच्या आकांताने ते भिल्ल पुन्हा जिथे खंडोजी बेशुद्ध होता,तिथे आले...!
धडपडत,धापा टाकत ते खंडोजी कुठे दिसतो का ते पाहू लागले,अन क्षणात सपा-सप वार त्या भिल्लांच्या वर कोसळू लागले.
कोणाचा हात तुटून पडतो,तर कोणाचा पाय...काही क्षणात 10/12 भिल्ल कर्दळीसारखे तुटले गेले...काही जंगलात पळून गेले ,उर्वरित तिघे चौघे हे जीवाची भिक्षा मागत जमीनीवर लोळू लागले....!

समोर पाहतो तर,खंडोजी ने विरासन घालून त्या भिल्लांच्यावर तलवार रोखून उभा होता....!

जे जीवाची भीक मागत होते,त्यातल्या एकाच्या छातीवर पाय ठेवत खंडोजी गर्जून बोलला....सांग,माझ्याबरोबर असणारी मुलगी कुठे आहे,काय केले तुम्ही...?

जिवाच्या भीतीने थरथर कापत त्यातल्या एकजण बोलला.....बाजींद......बाजींद...बाजींद.....!

असे म्हणत ते उर्वरित तिघे चौघे जंगलात धाऊ लागले...!

खंडोजी ने त्यांचा पाठलाग करायचा प्रयत्न केला आणि एकाला पकडले आणि बोलू लागला....!

बाजींद काय ??
बोल नाहीतर ही खंजीर तुझ्या छातीत घुसवेन...!

त्याचे ते बोल ऐकताच त्या भिल्लाने स्वतावर रोखलेले खंजीर धरले आणि खसकन स्वतःच्या छातीत खुपसले...आणि मान नाकारार्थी हालवत,डोळ्यात एका भीषण संकटाची खून देत तो पुट्पुटू लागला...बाजींद....बाजींद...!

क्रमश
. . . .
बाजींद

भाग क्र.१३ वा..!
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

भिल्ल जाग्यावर गतप्राण झाला.त्याच्या छातीत घुसलेला खंजीर उपसून तो कमरेला लावत खंडोजी ने त्याला खाली ठेवले.
सावधपणे चौफेर नजर फिरवत खंडोजी विचार करु लागला......"बाजींद"...काय असेल हे बाजींद...?

एव्हाना सुर्य मावळतीकडे झुकला होता,संध्याकाळच्या संधीप्रकाशाने जंगलातील झाडे झुडपे सुवर्णाची झळाळी मारत होती..!
एक दीर्घ श्वास घेऊन खंडोजी ने पायात घुसलेल्या बाणामुळे झालेल्या जखमेची वेदना सहन करत त्याला जंगलातील पाला बांधला...!

तो चालत जंगलाच्या बाहेर आला,मृत भिल्लांचे शव उचलून एका बाजूला ठेवत तो नदीच्या पात्राकडे पाहू लागला ?
मनात विचारांचे काहूर माजले.
सावीत्री कुठे गेली असेल..?
हे भिल्ल जिवाच्या आकांताने का धावत होते ?
बाजींद ....?
काय असेल हा प्रकार,ज्याचे नाव घेताच त्या भिल्लाने मरण पत्करले पण गूढ नाही सांगितले....!

हा काय प्रकार आहे,हे मात्र आता शोधून काढ्लेच पाहिजे,असा निर्धार करत खंडोजी ने त्या नदीच्या विशाल पात्रात उडी घेतली...!

नदीच्या पाण्याच्या ओढीने तो वाहू लागला,तिरकस पोहत पोहत तो किनाऱ्याकडे पाहू लागला.

बराच वेळ पोहून झाले अन त्यालाही ती गुंफा दिसली.
या स्मशान जंगलात,नदीच्या कडेला गुंफा असणे हे नक्कीच नवल आहे हे त्याने जाणले आणि त्याने त्या गुंफेकडे पोहणे सुरु केले.....!

काही वेळात गुहा जवळ आली आणि खंडोजी चे पाय जमिनीला लागले,दम खात तो गुंफेकडे चालू लागला...!

ती गुहा खूप अंधारी होती,एकेक पाऊल तोलून मापून टाकत खंडोजी गुहेच्या आत जाऊ लागला...एव्हाना गुहेतील पाणी संपून जमीन लागली होती.

बराच वेळ चालून झाले आणि गुहेच्या त्या बाजूला मंद प्रकाश दिसू लागला,नक्कीच त्या बाजूने बाहेर पडायची वाट असेल असा विचार करत खंडोजी ने कमरेची तलवार ,खंजीर उपसली आणि एका हातात तलवार,दुसऱ्या हातात खंजीर पेलून सावध पावले टाकत खंडोजी त्या गुहेतून बाहेर आला.

सुर्य पूर्ण अस्ताला गेला होता,खंडोजी जखमी होता,त्याच्या वेदना सहन करत तो सावीत्री चा माग शोधत तिथे आला होता...!
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

ते अगदी घनदाट अरण्य होते,रात्रपक्षी भिरभिरत होती,रातकिड्यांचा आवाज मेंदूला झिणझिण्या आणत होता..पाय पडेल तिथे टाकत खंडोजी पुढे चालू लागला आणि अचानक त्याला कोल्हेकुई सोबत रानकुत्रे केकाटल्याचा आवाज आला...त्याच्या सर्दिशी अंगावर काटे आले...आजवर इतक्या मोहिमेत हेरगिरी केली पण या जंगलातील भयनकता खरोखर अंगावर काटा आणणारी होती...!

आवंढा गिळत खंडोजी चालत होता,प्रत्येक पाऊल सांभाळून टाकत होता तितक्यात समोरच मोठ्या वडाच्या झाडामागून कोणीतरी एकदम वेगात धावत त्याच्याकडे येत होते,त्याच्या पावलांचा आवाज स्पष्ट कानी येताच खंडोजी ने विरासन पवित्रा घेतला आणि समोर पाहू लागला,त्याच्या ह्रदयाचे ठोके वाढले,सर्वांग घामाने भिजले...त्याने मनोमन विचार केला,ही पावले जर माणसाची नसून एखाद्या जनावराची असली,तर आपला खेळ सम्पला आज...आणी नक्कीच ते जनावर असेल,असल्या भयाण जंगलात कोण मनुष्य येतो मरायला....!

त्याने डोळे मिटून एक क्षण शिवछत्रपतींचे स्मरण केले ,ज्यांनी केवळ खंडोजीची नव्हे तर साऱ्या महाराष्ट्राची भीती घालवून आयुष्याला अर्थ प्राप्त करून दिला होता,त्यांचे क्षणभर स्मरण करुन तो मरायला,मारायला तयार झाला..! आता क्षण दोन क्षण बस्स...काहीही होणार हे त्याने ताडले..अन...

क्षणार्धात त्याच्या मागून त्याचे कोणीतरी तोंड दाबले आणि त्याला ओढत ओढत एका झाडाच्या मागे नेले.....त्याचे तोंड दाबणार हात खूप शक्तिशाली वाटला,पण एकप्रकारची नाजूकता होती त्या हातात....त्याने ताकतीने त्या हाताची मिठी सोडवली आणि क्षणात सावध होऊन मागे पाहतो,तर ती प्रत्यक्ष "साऊ" होती...त्याने डोळे वठारले आणि भीतीने मागे सरकू लागला....तो मागे हटतोय हे पाहताच तिने त्याचा हात पकडला आणि त्याच्या ओठावर हात ठेवत मान नाकारार्थी हलवू लागली..!

हा प्रसंग सुरु असतानाच तो आवाज पुन्हा तीव्र झाला आणि झाडामागून दौडत गेला आणि जोरदार मोठ्या आरोळीने तो आवाज शांत झाला..!

आकस्मित घटनेने भांबावून गेलेल्या खंडोजीला नेमके काय सुरु आहे समजेना,त्याने प्रश्नार्थक नजरेने सवित्रीकडे पाहिले,सावित्रीने त्याच्या ओठावर दाबून ठेवलेला हात सैल करत बोलली....तुम्हाला माहिती नाही किती महाभयानक धोक्यात फसलोय आपण..!

लहानपणापासून या भागाबद्धल मी केवळ ऐकून होते,इथे घडत असणारे चित्रविचित्र प्रकार,आकस्मित घटना जे काही ऐकले होते ते आज नशिबाने भोगणे माझ्या वाटेला आले,आणि भरीस भर म्हणून तुम्हीही इथे आलात...मला खात्री आहे आपल्या दोघांपैकी कोणी जिवंत राहील असे वाटत नाही,पण नेमके आपले मरण कसे असेल याचाच मी विचार करत आहे,असे बोलत सावीत्री धाय मोकलून रडू लागली...!

तिला सावरण्याचा प्रयत्न करत खंडोजी बोलला,बाईसाहेब शांत व्हा,नेमका काय प्रकार आहे मला सांगा..असे काय आक्रीत घडले जे तुम्ही धीर सोडून बोलत आहात ते....?
मी शिवछत्रपतींचा शिलेदार आहे..संकटांशी लढणे हा माझा छंद आहे...सांगा....काय आहे इथे ....?

आलेला हुंदका आवरत ती बोलू लागली...आपण अनावधानाने एका महाभयानक जंगलात आलोय,जिथून परत जाणे यमलाही अशक्य आहे...हे जंगल "बाजींद" चे आहे..........बाजींद नाव उच्चारताच वाऱ्याची मोठी झुळूक आली,आणि सावित्रीचे केस वाऱ्यावर उडवुन गेली.....!

"बाजींद"...?
काय आहे हा प्रकार ?
मगाशी तुमच्या पाठीमागे लागलेल्या भिल्लाने जीव दिला पण बाजींद बाजींद बोलत प्राण सोडला..!
मला सांगा नेमके बाईसाहेब...मला जाणून घ्यायचे आहे ते...!

सावीत्री गूढ आवाजात सांगू लागली....बाजींद...!

असेल ही 100 एक वर्षापूर्वीची गोष्ट,मी खूप लहान होते तेव्हा माझ्या आजीने सांगितली होती.
तशी ती आमच्या गावातल्या सर्व लोकांना माहिती आहे.

मोगलांच्या टोळधाडी महाराष्ट्रावर कोसळू लागल्या होत्या आणि गावेच्या गावे होरपळत होती...अन्याय,अत्याचार याने कहर माजला होता..!
यशवंतमाची पलीकडे 100 कोसावर असलेल्या चंद्रगड गावात तो राहत असे..!

एक अजिंक्य मल्ल, सावध नेता,कुशल राजकारणी,मुत्सद्दी सरदार..!
"बाजीराव सरदेशमुख"
त्याच्या बेडर स्वभावामुळे आणि कधीच पराभूत न होणाऱ्या चालीमुळे त्याला पंचक्रोशीतील "बाजींद" म्हणत होते...!

एक दिवस मोगली सरदार हुसेनखान आपल्या 4 हजार स्वारांना घेऊन तळकोकणात उतरला आणि त्याचा मुक्काम पडला चंद्रगड पासून अवघ्या 10 कोसावर...!

·●क्रमश●•

....

बाजींद
भाग क्र.१४ वा..!
~~~~~~~~~~~~~~~~~~~
"चंद्रगड"

एक हजार दोन हजार लोकवस्तीचे गाव.
महाबळेश्वर महादेवाच्या घनदाट अरण्यातील शेवटचे टोक.
सह्याद्रीच्या दर्याखोऱ्यात बिकट अडचणीत वसलेले हे गाव.
अशा घनदाट अरण्यात राहण्याचे धाडस केवळ वाघातच असते.
चंद्रगड ची माणसे पण काही वाघापेक्षा कमी नव्हती.
अश्या हजार दोन हजार वाघांचा म्होरक्या होता चंद्रभान सरदेसाई..!
~~~~~~~~~~~~~~~~~~~

बाराव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात ज्ञानेश्वर माऊली समाधिस्त झाल्या आणि सर्व महाराष्ट्रावर जणू अवकळा पसरली.
राजे रामदेवराय यादवांचा वैभवसंपन्न महाराष्ट्र गनिमांच्या परकीय सत्ताधाऱ्यांच्या टोळधाडींची रतीबाने शिकार होऊ लागला.
कर्तृत्ववान मनगटांची कित्येक राजघराणी परकीय सत्तेची मांडलिक बनू लागली.!
सत्ता,जहागिरी,स्वार्थ यासाठी स्वकीयांच्या माना तलवारीने उडवणे म्हणजे पोरखेळ होऊ लागला होता..!
स्वाभिमान,स्वत्व नावालाही शिल्लक नव्हते असे म्हटले तरी वावगे ठरणार नव्हते.

पण अशा प्रतिकूल परिस्थितीत मूळचे क्षत्रिय तेज असणारी काही छोटी छोटी राजघराणी आजही महाराष्ट्रात नावापुरते का होईना आपले अस्तित्व टिकवून होती.
आजून परकीय किंवा स्वकीय मांडलिकांच्या नजरा त्यांच्यावर पडल्या नव्हत्या...आणि पडल्याही असत्या तरी ही घराणी स्वाभिमानासाठी मरणही पत्करणारी होती.

अशा अगदी बोटावर मोजण्याइतपत शिल्लक असणाऱ्या राजघराण्यापैकी एक छोटेसे घराणे होते...चंद्रगड चे सरदेसाई घराणे..!

चंद्रभान सरदेसाई म्हणजे गावातील प्रमुख कारभारी.
गनिमांचा अन्याय,अत्याचार राजे चंद्रभान ऐकून होते.
म्हणून त्यांनी गावातील शे पाचशे तरुण पोरांची फौज तयार केली होती.
गावचे ग्रामदैवत भैरवनाथाचे अतिप्राचीन मन्दिर गावात होते,त्याच्या मागे भव्य तालीम उभी केली होती.
त्यामध्ये कुस्ती,तलवार,भाला,गदा,धनुष्य यासह अनेक युद्धप्रकारचे प्रशिक्षण सुरु होते...!

बाजीराव सरदेसाई हा चंद्रभान सरदेसाई यांचा तरुण मुलगा.
आपल्या गावावर,देवावर,वाडीलांच्यावर त्याचे खूप प्रेम होते.
ऐन तारुण्यात कुस्तीसह इतर युद्धकला त्याने लीलया आत्मसात केल्या होत्या.
नेहमी स्वप्नात वावरणाऱ्या बाजी ला एकटे राहणे खूप आवडत असे.
दिवासदीवस भर घनदाट जंगलात तो फिरत असे.
वेगवेगळ्या जंगली प्राण्यांचे आवाज त्याला समजू लागले होते.
पशुपक्ष्यांच्या अदभूत दुनिया तो समजून घेऊ लागला होता.
किडा,कीटक मुंगी पासून ते क्रूर वाघ सिंहासारखे हिंस्त्र पशूंची गूढ भाषा त्याला अवगत झाली होती.
चिमणा चिमण्यायांचे भांडण सुद्धा त्याला समःत असे.
अस्वले,हत्ती सारेच त्याच्या ओळखीचे बनले होते.

सुर्य उगवण्याआधी बाजी उठत असे.
अंघोळ पाणी आवरून तालमीत कुस्तीचा सराव करत असे..अगदी दोन दोन तासांची लढत झाली की मग जोराचा ठेका सुरु होत असे.
जोराचा आकडा पाच हजार ओलांडत असे मग कुठेतरी त्याला दम लागत असे.

त्यानंतर तलवारीचे हात,दांडपट्टा याचा सराव झाला की शेरभर तुपातला शिरा न्याहारीला येत सोबत पाच शेर देशी गाईचे आकरी दूध रिचवून बाजी धनुष्यबाण अडकवून आपल्या आवडत्या "पक्ष्या" घोड्यावर मांड ठोकून जंगलात जात असे...!

आणि जे व्हायचे तेच झाले.
गनिमांची नजर या चंद्रगड वर पडली.
चंद्रगड मारल्याशिवाय तळकोकणात जाणे अवघड होते हे जाणून मोगली सरदार हुसेनखान हा त्याच्या चार हजार कडवट स्वारासह आणि कुटुंबकबिल्यासह उतरला होता.

हुसेनखान ची खबर त्वरित चंद्रभान ला समजली आणि त्याने त्वरित बाजी व सहकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली.
आता आपले गाव गनिमांची खास शिकार होण्याच्या भीतीने चंद्रभान हतबल होऊन बोलू लागला.
चार हजार सैन्यापुढे आपला टिकाव लागणे अवघड आहे त्यामुळे त्याच्या सैन्यात फूट पाडून त्याला जंगलात संपवणे हे उचित होईल त्यामुळे बाजी ला या कामाचा विडा दिला गेला.
बाजी ने आपल्या वडिलांना धीर देत आपण ही कामगिरी चोख बजावू अशी ग्वाही दिली.

बाजी ने त्याच्या विश्वासातील शंभर चिवट धारकरी निवडले आणि मध्यरात्री हुसेनखानाच्या छावणीत घुसायचे ठरवले..साधलेच तर खुद्द हुसेन ला ठार करु आणि मागे येऊ असा बेत ठरऊन ते 100 वीर वाघाच्या काळजाने निघाले.
काळा पोषाख, तलवार घेऊन ती 100 भुते जंगलाची वाट चालू लागली.

दरम्यान छावणी जवळ आल्याची चाहूल लागली.
मोगली चंद्रचांदणी चा ध्वज फडकत असलेली छावणी हुसेनखानाची आहे असे बाजीने ताडले आणि सर्व धारकर्यांना वेगवेगळी कामे सांगून स्वतासोबत 5 अंगरक्षक घेऊन तो स्वता छावणीकडे निघाला.

छावणी जवळ आली आणि त्याने मांजराची पावले टाकत, परिस्थितीचा अंदाज घेत छावणीच्या मागून चाल करायचे ठरवले.
छावणीच्या जवळ पोहचल्यानंतर बाजी ने कमरेची तलवार उपसली आणि छावणीच्या कणातीत घुसवून आत घुसला...!

हुसेनखान कुठे झोपला असावा याचा अंदाज बांधत त्याने तंबूच्या एका विभागात पाऊल टाकले तितक्यात मागून कोणीतरी त्याला घट्ट पकडले..!
क्षणात ती मिठी सोडवून त्याने समोरासमोर पवित्रा घेतला आणि समोर तोंड बांधलेला एक हशम दिसला आणि त्यांची लढाई ऐन तंबूतच जुंपली.

तलवारीच्या खनखनाटने सारी छावणी जागी झाली आणि तंबू कडे धाऊ लागली.

बाजी ने बगल देताच पुढचा हशम झुकला आणि तितक्यात त्याने आपली तलवार त्याच्या तोंडावर बांधलेल्या अवलानात घुसवली आणि ते कापड फाडले......तो हशम नसून एक स्त्री आहे हे बाजी ने पहिले...!

तिचे केस विस्कटले गेले आणि मशालीच्या उजेडात तिची सतेज कांती आणि बोलके डोळे दिसले आणि बाजींच्या हृदयाचा ठाव घेतला...!

आपण लढाईत आहोत याचे भान हरपून तो तिचे मूर्तिमंत सौंदर्य न्याहाळू लागला...इतक्यात शेकडो हशम एकाच वेळी त्याच्यावर तुटून पडले आणि दोरखंडाने त्याला बांधून मैदानात आणले गेले.

हुसेनखान स्वता युद्धाचा पोषाख घालून हातात नंगी तलवार घेऊन बाहेर आला आणि त्या स्त्री ला उद्देशून बोलला...बहुत खूब नूरजहा... हमे फक्र है की आप हमारी बेटी हो...!

बाजी ला कळले की ती मुलगी हुसेनखान ची मुलगी आहे.

चवताळलेल्या हुसेनखानाने रागाने बाजीकडे पाहत त्याची समशेर त्याच्यावर रोखली तितक्यात सारी छावणी थरारली.

साऱ्या जंगलात किडा,कीटक,साप,मुंगी पासून हत्ती,सिंह,वाघ एकाच वेळी प्रचंड गर्जना करत बाहेर पडले आणि समोर जो जो दिसेल तो तो त्यांची शिकार होऊ लागला.

हुसेनखान ला समजेना समोर काय होत आहे.
त्याची शूर फौज साप चावून, हत्तीच्या पायाखाली,अस्वलांच्या हल्लात ,वाघाच्या तोंडी मरु लागली...उरलेली वाट दिसेल तिकडे पळत सुटली....सारी फौज अस्ताव्यस्त होऊन गेली.....!

काय घडत आहे बाजीला सुद्धा समजेना...एकटा तो सोडून सर्वांना कीडा मुंगी चावत होत्या....क्षणात एक हिंस्त्र वाघ छलांग मारत नूरजहा च्या समोर आला आणि तिच्यावर हल्ला करणार इतक्यात बाजी सावध झाला आणि क्षणात एका हाताने त्या मुलगी ला बाजू करत आपली तलवार त्या वाघावर रोखली....!

बाजी ची तलवार पाहताच त्या वाघाने सपशेल माघार घेतली.
हे पाहताच बाजी ला नवल वाटले...तो सर्वत्र पाहू लागला...ही सारी जनावरे माझ्यासाठी इथवर आली आहेत याचे त्याला खूपच नवल वाटले...!
त्याने पुढे होऊन सर्वांच्याकडे पाहत जोरात आरोळी ठोकली..."थांबा".....!

त्याचा तो गगणभेदी आवाज ऐकून सारे पशु पक्षी स्तबद्ध झाले...हे पाहताच हुसेनखान सुद्धा भारावून गेला...!

चला मागे...जावा निघून...यांना आपली चूक समजली आहे....जावा निघून...!

बाजीचे हे शब्द ऐकताच सर्व सर्व किडा कीटक मुंगी,सर्प,हती,वाघ,अस्वल,सिंह जसे आले होते तसे निघून गेले ....!

एव्हाना हुसेनखानाची निम्म्यापेक्षा जास्त फौज मृत्युमुखी पडली होती,उरलेली जखमी होती...!

या हिंस्त्र प्राण्यांना केवळ शब्दाने मागे घालावंणारा हा वीर कोण याचे कुतूहल हुसेनखानाला लागले होते.
त्यांने बाजी च्या रुपात दैवी अवलीयाला पाहिले आणि त्याच्या पुढे गुडघे टेकून त्याच्या समोर नतमस्तक होऊन तलवार आडवी धरली...!

बोलला...ज्याच्या केवळ नावाने मोगली दरबारातील मोठमोठे सरदार अदबीने झुकतात, ज्याची तलवार शत्रूचे रक्त पिऊन मगच म्यानात जाते असा मी हुसेनशहा महम्मदशाही तुझ्यासारख्या विरासमोर शरण जात आहे....!

क्रमश

बाजींद
भाग क्र.१५ वा..!
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

समोर काय आक्रीत घडत आहे हे खुद्द बाजी ला सुद्धा समजत नव्हते.
केवळ कुतूहल,करमणूक म्हणून वन्य प्राण्यांशी आजवर त्याने संवाद साधला होता,ते वन्य प्राणी आज त्याच्यासाठी धावून आलेच पण चंद्रगड वर आलेल्या आस्मानी संकटाला त्याच्या पायाशी लोळण घ्यायला लावत होते हे पाहून तो मनोमन थक्क झाला होता...!

एक श्वास घेत त्याने समोर गुडघे टेकून तलवार दोन्ही हातात आडवी करुन मान झुकवून बसलेल्या हुसेनखानाच्या दोन्ही खांद्याना धरुन उठवले व बोलू लागला...उठिये खांनसाहेब..किसीके सामने झुकना एक वीर को शोभा नही देता...और आप तो महावीर है..!

बाजींचे ते आपुलकीचे बोलणे ऐकून हुसेनखानाने तलवार फेकून देऊन बाजी ला मिठी मारली....तो बोलू लागला..

काबुल से लेकर कंदाहार तक,और काश्मीर से लेकर कन्याकुमारी तक मेरी पुरी जिंदगी जँग मे चली गयी लेकिन आप जैसा तीलस्मी सुरमा बहाद्दर नही देखा जिसके एक इशारो पे माशाअल्ला जंगल के बेरहम जानवर भी चूप हो जाते है... अल्लाह के शरीफ बंदे कौन है आप ?

बाजी गालात किंचित हसला व बोलू लागला...

खानसाहब.. मै राजे चंद्रभान सरदेसाई का पुत्र बाजी सरदेसाई हु...चंद्रगड सलतनत का रखवाला...!

चंद्रगड.....मै तो समझा था की चंद्रगड जैसी मामुली सलतनत के लिये बादशाह हमे भेज कर मेरा अपमान कर रहे है...लेकिन आप जैसे सुरमा से मिलकर मेरा यह भरम टूट गया....आज से केवल चंद्रगड ही नही ये पुरा इलाका आज से आपका है...आ जाओ हमारे गले लग जाओ...!

दोन्ही वीरांची कडकडून मिठी झाली आणि दोघेही शाही तंबूत गेले.
जनावरांच्या हल्ल्यात शेकडो मेलेली प्रेते एका बाजूला,जखमी एका बाजूला अशी प्रतवारी करत विल्हेवाट व उपचार सुरु झाले.

नुराजहाँन ही हुसेनखानाची लेक.
हुसेनखानाला मुलगा नसल्याने त्याने आपल्या मुलीला मुलासारखे वाढवले होते.
मोगली मोहिमेत नूरजहान स्वता वडिलांच्या सोबत येत असे.
तिला तर रात्रीच्या प्रकरणाचा खूप धक्का बसला होता.
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

वरवर शांत,हिरवेगार दिसणारे हे जंगल किती महाभयानक आहे तिचा प्रत्यय तिला आला होता.
मोगलांची शूर सेना ते राक्षसी हत्ती सोंडेने उचलून धुणे आपटतात तसे आपटून मारत होते,वाघसिंहांनी कित्येक वीरांच्या नरडीचा घोट घेतला होता,काळवीटाची शिंगे पोटातून आरपार जाऊन आतडीच बाहेर काढत होता,कित्येक अजगरे सैनिकांना पिळखा देऊन हाडांचा चुरा करत होते,कित्येक अस्वलांची नखे हृदय फाडून हातात घेत होती...साप,विंचू कीटकांची तर किती शिकार झाली असतील त्याची मोजदाद नव्हती.
आणि ती क्रूर जनावरे किंबहुना किडे मुंगी साप सुद्धा ज्याच्या आज्ञेने माघारी गेले तो "बाजी" काय प्रकार असेल असा विचार करत ती उभी होती.

जिवाच्या भीतीने त्या रात्री कित्येक सैनिक बिथरले होते,त्यांना धीर देण्याची ती काम करत होती तितक्यात खुद्द बाजी तिथे आला,आणि त्याला पाहून पुढचे सैनिक भीतीने पळूनच गेले....!

बाजी ला पाहताच नुराजहान ने पदर सावरत मागे हटली....!

बाजी बोलू लागला....

आप औरत होकर इतनी अच्छि तलवार चलाती है..यह देखकर हम बहुत खुश हुये....!
आमच्या पुऱ्या हयातीत एखादी स्त्री सुद्धा इतकी अप्रतिम लढू शकते हे पाहून खरोखर नवल वाटले..."

शुक्रिया...पण काल रात्री आम्ही तुमची जी करामत पहिली ती केवळ दैवी करामत होती...कुठून शिकलात ही विद्या...?

नूरजहान चे मराठीवर प्रभुत्व पाहून बाजी आश्चर्याने बोलला....तुम्ही मराठी सुद्धा बोलता हे नवल आहे...!

नूरजहान बोलली...हो माझ्या खूप मैत्रिणी मराठी आहेत व गेली 5 वर्षे महाराष्ट्रात आहे...मराठी बोलू,समजू शकते मी...."

खूप छान....तुमची तलवार आणि भाषा दोन्हीही आम्हाला आवडल्या...आमच्या गावचा आपण पाहुणचार स्वीकारावा यासाठी मी आपणास आमच्या गावी चंद्रगड ला तुम्हास व तुमच्या वडील फौजेसह उद्याचे आमंत्रण देतो..!

किंचित लाजून ती बोलली...जरुर...आम्ही सर्व येऊ..असे बोलून ती निघून गेली...!

बाजी ने दस्तुरखुद्द हुसेनखानला फौजेसह गावात येण्याचे आमंत्रण देऊन बाजी त्याच्या पक्षा घोड्यावर त्याच्या अंगरक्षकासह दौडत गेला....!

इकडे सारे चंद्रगड राजे चंद्रभान च्या महाला समोर गोळा झाले होते.
रात्रभर गगनभेदी किंचाळ्यांनी साऱ्यांच्या काळजाचा ठाव घेतला होता.
4 हजाराच्या विरुद्ध शे दोनशे धारकरी कसे टिकणार ?
रात्रीच फन्ना उडाला असणार अशी काळजीची कुजबुज सुरु झाली होती.

आता सारे संपणार...300 वर्षे रक्ताचे पाणी करुन स्वाभिमान जपत मानाने चंद्रगड चे स्वातंत्र्य अबाधित ठेवलेले चंद्रभान व त्यांचे वंशज त्यांच्या त्यागाची हि निर्वाणीची वेळ..!
उद्या हुसेनखान व मोगली फौजेचा लोंढा चंद्रगड वर कोसळणार आणि सारे सारे नष्ट होणार..!
डोळ्यांच्या कडा ओलावत, आवंढा गिळत,मोठा श्वास घेऊन राजे चंद्रभान सार्या गावकर्यांना उद्देशून बोलले.

"गड्यानो,प्रसंग बाका आहे.आपला स्वाभिमान,स्वातंत्र्य जर टिकवायचे असेल तर आता सर्वांनी हातात शस्त्रे घ्या...जर जिंकाल तर इतिहासात अमर व्हाल आणि हारलात तर हुतात्मा व्हाल...आपली तरणी ताठी पोर काल त्या छावणीवर तुटून पडली...त्यांचे जीवाचे काही बरे वाईट झाले असेल आणि नसेल ही... आपण सर्वांनी मरेपर्यंत लढायचे....बोला....आहे मंजूर ????

मंजूर....मंजूर.....

सारा गाव एका सुरात बोलला आणि तितक्यात चंद्रगड च्या समोरच्या डोंगरातून धुळीचे लोट उडू लागले...चौताड थडाडत घोड्यांच्या टापा कानावर येऊ लागल्या....सर्वांनी नजर रोखून पाहिले आणि काळजातून आनंदाची लकेर उडाली.......बाजी......बाजी....बाजी.......!

राजे चंद्रभान धाय मोकलून रडू लागले...त्यांना विश्वास बसेना की दौडत येणारे अश्वपथक चंद्रगड च्या विजयाचे निशाण आकाशात फडफड करत येत होते....!

सारा गाव त्यांच्या स्वागताला पुढे गेला.......

बाजी व त्याचे सहकारी गावातील मुख्य प्रवेशद्वारातून आत आले आणि गावकऱ्यासमोर घोड्यावरून पाय उतार झाले.
सुवासिनी हळद कुंकू लावून त्यांचे औक्षण करु लागल्या....गावकरी फुले उधळू लागली....!

चंद्रगड चे स्वातंत्र्य अबाधित राखून विजयाची परंपरा प्रतिकूल परिस्थितीत कायम ठेवत वाघासमान चालत आणि सार्या गावचे अभिनंदन स्वीकारत बाजी चंद्रभान राजांच्या दर्शनाला निघाला.....!

बाजीने वडिलांचे दर्शन घेतले व सविस्तर घडलेला प्रकार त्यांच्या कानावर घातला.
चंद्रभान ला विश्वास बसेना की उद्या हुसेनखान फौजेसह आपल्या गावात भोजनास येणार आहे.
त्यांने सर्व गावकर्यांना बोलावून उद्या भोजनाचे नियोजन करायचा आदेश दिला...!

दिवस उगवला ,कोंबड्याने बांग दिली आणि चंद्रगड च्या समोरच्या डोंगरावरून चांद सितारा असलेला मोगली ध्वज व मागे समुद्रासारखी मोगली फौज दिसू लागली....!

सारा गाव आनंदात होता,येणाऱ्या पाहुण्यांचा पाहुणचार करण्यात जे ते व्यस्त होते...!

आणि मजल दरमजल करत हुसेनखान मोगली फौजेसह चंद्रगड मध्ये डेरेदाखल झाला.
गावाला यात्रेचे स्वरुप आले.
प्रत्येक गावकरी तळमळीने आपल्या पाहुण्यांचा पाहुणचार करण्यात व्यस्त होता.

हुसेनखान व नूरजहान राजे चंद्रभान यांच्या महालात आदरातिथ्य स्वीकारत गेल्या.
शिंग,तुताऱ्या,हलगी या मराठ्मोठ्या पद्धतीने त्यांचे स्वागत झाले.
राजे चंद्रभान व हुसेनखान यांच्या राजकीय चर्चेला रंग चढला....!

बाजी ने नूरजहान ला सारा महाल फिरवून दाखवला.

नूरजहान बोलली....राजाजी,तुमच्या पाहूनचाराने आम्हाला आमच्या आईची आठवण झाली.
खूप चांगले लोक आहेत तुमच्या गावात,आम्ही हा तुमचा पाहूनचार कधीही विसरणार नाही...!

नूरजहान च्या बोलण्याने बाजी किंचित हसला व बोलू लागला.....

पाहुणा हा चंद्रगड वासियांना देव असतो,आणि देवाचा पाहूणचार करणे हे पुण्याचे काम आहे...!

दोघांचीही नजरेला नजर भिडली आणि एका अनामिक आकर्षणात दोघेही बांधले गेले,आणि दुनियेचा विसर पडला,दोघेही एकमेकांच्या मिठीत विसावले....देहभान विसरुन ते क्षणभर तसेच बाहुपाशात अडकले गेले होते...! जगाचा त्यांना विसर पडला होता....शरीरे दोन मात्र मने एक झाली होती...एक अशी अनुभूती ज्यात आता मिळवायचे असे काहीच राहिले नाही असा अनुभव येतो....यालाच प्रेम म्हणतात का ?
नक्कीच....प्रेम प्रेम म्हणतात ते हेच....आयुष्यात ज्याने केले आहे त्यालाच हे समजणार...!
नाही..बिलकुल नाही...ज्याने कधी केलेच नाही फक्त त्यांनाच हे समजणार....!

·●●क्रमशः ●●•
बाजींद
भाग क्र.१६ वा.
~~~~~~~~~~~~~~~~~~~~
वर्षानुवर्षे पावसाच्या केवळ एका थेंबाची तहान घेऊन आसुसलेल्या जमिनीवर एकाकी धुव्वाधार पावसाने सुरवात करावी,जमीनीच्या धुंद सुवासाने आसमंत दरवळून जावा आणि सारी सृष्टी तृप्त व्हावी...अगदी असेच काहीसे नुराजहाँ आणि बाजी च्या अंतर्मनात घडत होते.
एक आनंदाची अनामिक लकेर त्यांच्या सर्वांगात उठली होती.
एकमेकांच्या मिठीत स्वर्गीय सुखे अपुरी पडावीत अशी अवस्था....!

असेच काही क्षण गेले अन बाजी भानावर आला,त्याने नुराजहाँ चे बहुपाश मोठ्या मुश्किलीने सोडवले आणि एक स्मित हास्य करत बोलू लागला...!

राजकुमारीजी.. क्या जमीन और आस्मान कभी एक हो सकता है...?
माझी आणि तुमची भेट या जन्मात तरी शक्य आहे ?

यावर नुराजहाँ बोलली...!

क्यो नही राजाजी....नक्कीच...आजवर आयुष्यात जणू काही तुमचीच वाट पाहत मी जगत होते की काय असे वाटत आहे...!
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

दिघेही स्मितहास्य करत महाराज व हुसेनखान जिथे चर्चेत बसले होते तिथे पोहचले..!

एव्हाना सार्या गावाला यात्रेचे स्वरूप आले होते.
सर्व गावकरी मोठ्या आनंदाने हुसेनखानांच्या फौजेच्या पाहूनचारात व्यस्त होते.!

आजची रात्र सारे इथेच मुक्काम करणार होते,व उद्या दिवस उगवण्याआधी गाव सोडून जाणार होते ते कायमचेच....परत कधीही चंद्रगडवर कोणताही बादशाही अंमलदार येणार नव्हता..!
चंद्रगड चे स्वातंत्र्य अबाधित राहणार होते...!
सर्व गावकरी आनंदात होते.

राजे चंद्रभान यांच्या महालात हुसेनखान सह बाजी व नुराजहाँ यांची चर्चा रंगली होती.

हुसेनखान बाजीला बोलला...!

राजाजी..आप जितने बहादूर है,आपके पिताजी भी आपसे ज्यादा बहाद्दर है...!
राजनीती के बारे मे इनके जैसा ज्ञान मैंने आजतक किसीसे नही सुना...!

हमे फक्र है,इस दख्खन की मूहीम मे हमे आप जैसे दोस्त मिले..!
जब हम आग्रा जायेंगे आपके लिये बादशाह से जरुर दरख्वास्त करेंगे...!

यावर राजे हसत उत्तरले....!

जरुर खानसाहेब...आजवर मोगलांच्या अन्याय,अत्याचाराच्या कथा ऐकत आम्ही मोठे झालो.
आपल्यासारखा नेकदील सिपेसालार भी मोगल फौज मे हो सकता है...सचमुच हम सारे हैराण है...आपकी दोस्ती का कर्ज हम चंद्रगड के लोग कभी नही भुलेंगे...!

सर्व हसत उठले...!

बाजी राजे..क्यो न आप हमारी बेटी को आपका चंद्रगड नही दिखा लाते...!
आपकी जानवरोन की भाषा का रहस्य जरुर बताईये..!
हम और राजसाब अभी खूब बाते करेंगे..!

नक्की खानसाहब...हम राजकुमारीजी को चंद्रगड घुमाकर लाते है...शाम होणे तक हम लौट आयेंगे..!

असे म्हणून बाजी व नूरजहा निघून गेली..!

आपल्या "पक्षा" घोड्यावर मांड ठोकली आणि नुराजहाँ ने तिच्या घोड्यावर मांड ठोकून ते दोघेही दौडत चंद्रगड च्या जंगलात निघाले....!

बाजी च्या जंगलात येताच सर्व पशु पक्षी जनावर कीटकांनी एकच कल्लोळ माजवला...!

जे ते त्याच्या जवळ येऊ लागले...!

त्या जनावरांना पाहून बाजी स्मित हास्य करत नुराजहाँ ला बोलला.....!

राजकुमारीजी हे सर्व माझे सवंगडी पहा...यांच्याशिवाय मी काहीच नाही.
माझा दिवस-दीवस या सर्वांच्यासोबत जातो.
चंद्रगड ची खरी दौलत म्हणजे ही जनावरे आहेत...या सर्वांची भाषा मला समजते.
यांचे सुख दुःख सर्वकाही हे मला सांगतात व मी त्यांची माझ्या माझ्या परीने मदत करतो..!
खूप मजा येते यांच्यासोबत जीवन जगण्यात...!

यावर आश्चर्य व्यक्त करत नुराजहाँ बोलली...पण राजसाहब...या हिंस्त्र पशूंची भाषा तुम्हास कशी काय अवगत आहे ?
खरोखर हा केवळ चमत्कार आहे.
एखाद्या देवदूतालाच ही भाषा समजु शकते..खरोखर आम्ही सर्व तुमच्यापुढे नतमस्तक आहोत.

यावर हसत बाजी उत्तरला.
काही नाही राजकुमारी...एकदा एकमेकांची मने समजू लागली की जगातल्या सर्व भाषा एकच आहेत याची अनुभूती येते..!
प्रत्येक प्राण्यांचे एक वेगळे विश्व असते,प्रत्येकाला समस्या,संकटे असतात...पण मन मोकळे करायला कोणीच नसते...ज्याला आपले आपले म्हणत असतो...ते सुद्धा आपल्या माणसांची मने ओळखायला अपुरे असतात..!
बघा ना...हा ची ची करणारा प्रचंड हत्ती..पण मनाने खूपच हळवा आहे....बिचारा सर्व गोष्टी मला सांगत असतो.
हे वाघ,सिंह,सर्प,विंचू....सर्वच्या सर्व बोलू शकतात.
त्यांनाही मन आहे...फक्त मनुष्य आणि ते यांच्यातील अहंकाराचा अभेद्य पडदा जोवर लंघून आपण पुढे जात नाही...तोवर..बोलणाऱ्या माणसांचीही मने आपण समजू शकणार नाही.....!

त्यांच्या दोघांची ही चर्चाच सुरु असतानाच एक घार उंच आकाशात घिरट्या घालत घालत मोठ्याने आवाज करत खाली येऊ लागली आणि बाजींच्या अंगावर सर्दिशी काटा आला...त्याने कान टवकारून त्या घारीकडे पहिले आणि बेभान होऊन तो पक्षा घोड्यावर स्वार झाला आणि बेताल दौडत चंद्रगड च्या वाटेला लागला...!

त्याच्या पाठोपाठ नुराजहाँ पण निघाली...तिला काही समजेना की बाजी असा बेभान होऊन का निघाला आहे...ती त्याला हाका मारत होती ,पण काहीच ऐकण्याच्या मनस्थितीत तो नव्हता..!

त्याला घारीच्या एकसारख्या ओरडण्याचा अर्थ समजला होता......बाजी...तुझ्या चंद्रगड ची राखरांगोळी उठली आहे.
हजारो पठाण एका दिवसात जंगल पार करून तुझ्या राज्यावर तुटून पडले आहेत...तुझी माणसे मरत आहेत....तुझ्या गावात आलेला हुसेनखान तुझा मित्र नसून तुझा घात करायला आलेला तुझा शत्रू आहे..."

बाजी च्या डोळ्यात आग होती.

त्याचे दौडणे बेभान झाले आणि लांबूनच लोकांच्या गगनभेदी किंचाळया त्याच्या कानी पडल्या...असंख्य लोक मोगली तलवारीखाली कापले गेले होते...शेकडो पठाण हातात नंग्या तलवारी घेऊन मुलाबाळांच्या कत्तली करत होते.
बाजी चा राहता महाल पेटला होता....सारे नष्ट झाले होते..!
राजे चंद्रभान हे हुसेनखानाशी लढता लढता गतप्राण झाले होते....!

काहीच शिल्लक नव्हते...केवळ मोगली अत्याचार दिसत होता...!

बाजी च्या डोळ्यात आता रक्त उतरले होते...समोर ते धिप्पाड मोगली हशम हातात रक्ताळलेल्या तलवारी घेऊन चंद्रगड वासीयांची कत्तल करत होते.
गोड बोलून आपला व आपल्या वडिलांचा केलेला हा विश्वासघात त्याला जिव्हारी लागला होता.
बाजी ने कमरेची तलवार उपसली आणि तुफान दौडत असलेल्या घोड्यावरून झेप टाकली ती सरळ समोर कत्तल करत असलेल्या हशमाच्या छातीवर.

तलवार छातीतून आरपार करत बाजी ने आकाशाकडे पाहत एक गगनभेदी किंचाळी फोडली आणि समोर दिसेल त्याचे तुकडे करु लागला..!

सळसळत्या नागिणीसारखी तलवार फिरू लागली आणि जो आडवे येईल त्याची खांडोळी उडू लागली.
बाजी ने केवळ एकट्याने तुफान कत्तल मांडलेली पाहून नुराजहाँ ने सुद्धा समशेर उपसली आणि तिनेही लढा सुरु केला.
आता हि लढाई केवळ बाजी ची नव्हती...तिची सुद्धा होती.
प्रत्यक्ष तिच्या बापाने असा घोर विश्वासघात केलेला तिला मनस्वी दुःखी करून गेला होता.
आता मरण आले तरी बाजी सोबत मरायला ती सिद्ध झाली आणि तिची समशेर तिच्याच फौजेचे रक्त पिऊ लागली..!

बाजी च्या किंचाळन्याने जंगलातील सर्व प्राणी चंद्रगड कडे दौडू लागली.
विषारी सर्प,काटे फेकणारी साळींदर, चित्ते,वाघ,सिंह,अस्वले,हत्ती...शेकडो प्राणी आपल्या जिवलग मित्रासाठी चंद्रगड वर तुटून पडले....आणि बाजी च्या एकाकी लढ्याला बळ मिळाले...!

हत्तीच्या पायाखाली कलिंगड फुटावे तसे मोगली सैनिकांची मुंडकी फुटू लागली.
सर्पां चावल्याने तोंडात फेस येऊन सैनिक मरु लागले...!
वाघ सिंह तर चिंध्या फाडाव्यात तशी माणसे फाडून टाकू लागळी.
साळींदराची काटे गळ्यात घुसत प्राण घेऊ लागली...!

आणि बाजी व नुराजहाँ ची तलवारी तुफान कत्तल करु लागली.

बघता बघता निम्म्यापेक्षा जास्त फौज कत्तल झाली होती.
जवळपास दोन तास चाललेले हे महाभयानक थरारनाट्य आता रंगात आले होते.

नुराजहाँ पुरती दमली होती.

तिच्या सर्वांगातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या होत्या.
तिला चक्कर आली आणि ती तोल जाऊन पडली.

कत्तल आणि मरणाच्या भीतीने सारी फौज डोंगरवाटेने पळू लागली आणि बाजी चे लक्ष नुराजहाँ कडे गेले..!

त्याने क्षणात तलवार टाकली आणि तिची मान आपल्या हाती धरुन तिला सावध करु लागला...!

आता तिच्याशिवाय बाजी चे कोणी नव्हते....ती सावध झाली.

प्रचंड जखमेने रक्त खूप गेले होते..!

ती बोलू लागली.....राजे,मला माफ करा.
माझ्या वडिलांनी तुमचा क्रूर विश्वासघात केला ,तुमच्यासाठी मला मरण आले,मी माझे पाप माझ्या रक्ताने धुवून जात आहे......तुमच्यासारखा वीर मी आजवर पहिला नाही....तुम्ही बाजी नाही...तर बाजींद आहात....बाजींद....बाजींद....!

असे बोलत नुराजहाँ ने डोळे मीटले...!
साऱ्या चंद्रगड बरोबर आयुष्यात प्रथमच केलेले प्रेमही बाजींच्या आयुष्यातून कायमचे गेले म्हणून तो उठून उभा राहून जोरजोराने रडू लागला....!

इतक्यात एक बाण सु सु करत आला आणि त्याने बाजींच्या छातीचा वेध घेतला......!
गतप्राण होऊन बाजींचे तो देह खाली कोसळला.

सारे संपले.

तेव्हापासून ते आजतागायत हे जंगल शापीत झाले आहे.
इथे येणारा प्रत्येक माणूस आजवर जिवंत माघारी गेला नाही.
आज 100 वर्षे होऊन सुद्धा बाजींद चे भूत या जंगलात भटकते..!

केवळ आम्हीच नव्हे तर मोठमोठे सत्ताधीश सुद्धा बाजींद च्या जंगलात पाऊल ठेवत नाही...!

आणि आज केवळ तुमच्या अल्लड पणामुळे एका भयानक संकटात आपण अडकलो आहोत...आपण आता बाजींद च्या जंगलात आहोत...आपले मरण नक्की...!

सावीत्री मोठ्या चिंतेत हि सारी कथा खंडोजी ला सांगत होती आणि तो लक्षपूर्वक ते ऐकत होता...!

·●●क्रमश●●•
बाजींद
भाग क्र.१७ वा.
~~~~~~~~~~~~~~~~~~~~
हुंदका देत रडत असणाऱ्या सावित्रीच्या खांद्याला धरत खंडोजी निर्धारी शब्दात बोलला....
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

सावीत्री....रडू नको.
हा खंडोजी तुझ्या सोबत असताना बाजींद काय..साक्षात यम जरी आला तरी त्याला चार हात करावी लागतील या खंडोजी बरोबर...!

शिवछत्रपतींचा धारकरी आहे मी,आम्हाला भुते लागत नाहीत...उलट भुतानाच आम्ही लागतो.
या खुळचट मनाच्या कल्पना असतात साऊ... असे म्हणत खंडोजी ने तलवार उपसली आणि बोलू लागला...!

आता मला हा बाजींद व त्याचे झपाटलेले जंगल काय आहे याचा उलगडा केलाच पाहिजे..असे म्हणत तो उठला..!

त्याच्या नजरेत त्याच्या विचारांचा ठामपणा होता,दृढ निश्चय होता तो स्वतःच्या मनगटावर आणि चित्तात होते ते शिवछत्रपती.

ही हिम्मत,ही ताकत त्याच्यात आली होती ती शिवाजी महाराजांच्या उत्तुंग जीवनप्रकाशामुळे..केवळ खंडोजीच नव्हे...त्यांचे सारे सारे सवंगडी उरात अशी जग जिंकायची उमेद ठेवत होते...!
मूर्तिमंत जिद्द,प्रेरणेचा झरा...महाराज शिवछत्रपती.

एव्हाना तांबडं फुटलं होत..!
त्याने पुढे होऊन रात्री ज्या आर्त किंकाळीने त्याचे लक्ष वेधून घेतले तिकडे मोर्चा वळवला.

समोरच एक मनुष्याचा देह गतप्राण होऊन पडलेला होता.
जरा निरखून पहिले अन जाणवू लागले की तो भिल्ल असावा.

कदाचित सावित्रीच्या पाठलागात तो इथवर पोचला असावा आणि "बाजींद" च्या येण्याने घाबरुन इकडे तिकडे लपला असावा व रात्री त्याला कोणीतरी ठार केले असावे...!

एक मोठा श्वास घेत खंडोजी ने सावीत्री चा हात धरला.
हातावर शिरक्याचे वैभवाचे प्रतीक उगवता सुर्य गोंदनाने गोंदले होता...!

खंडोजी बोलला...साऊ मला सांग...जर बाजींद तुझ्या समोर होता,तर त्याने तुला का ठार केले नाही ??

काहीशी घाबरत ती बोलली,

काल मी इथे पोहोचले आणि ती भयानक घटना घडली.
वेगवेगळी हिंस्त्र जंगली प्राणी किंचाळत होती.
मी क्षणात ओळखले की भिल्लांच्या भीतीने मी बाजींद च्या हद्दीत पाऊल ठेवले आहे.
आणि काल मी त्याला पाहिले.
घारे डोळे,कोवळी दाढी,अनामिक असे गूढ हास्य आणि सभोवतालच्या अणुरेणुचा स्वामी असल्याची एक प्रकारची मग्रुरी दिसत होती त्याच्या स्वभावात..!
माझी भीतीने गाळण उडाली होती,समोर दोन वाघ माझ्याकडेच येताहेत हे पाहताच मला मूर्च्छा आली..!
परत तो कुठे गेला मला काहीच आठवत नाही..!

जेव्हा जाग आली तेव्हा 2 भिल्ल अजूनही माझ्या मागावर होते,ते माझ्या शुद्धीवर येण्याची वाटच पाहत बसलेले होते.
मी सावध होताच वासनात्मक नजरेने ते हसू लागले,मी त्यांच्यावर हल्ला करत मागे पळून जाण्याचा तयारीत होते तितक्यात जंगलात पुन्हा जनावरांच्या किंचाळया पडल्या व माझ्याअगोदर तेच भिल्ल धाऊ लागले..!

धावता धावता मी इथे पोहोचले तर दुरुनच तुम्ही येताना दिसला आणि माझे हृदय अक्षरशः आनंदाने भरुन गेले,जणू माझे आपलं कोणी माझ्यासाठी इथवर आले आहे..!
मी क्षणात तुमच्या मागे येऊन तुमचे तोंड दाबत इथे लपवले आणि समोर या भिल्लाला कदाचित बाजींद किंवा त्याच्या जनावरांनी मारुन टाकले असावे...!

सर्व प्रसंग सांगत असताना सावीत्री गहिवरून रडू लागली अन खंडोजीच्या मिठीत विसावली..!
तिच्या आकस्मित मिठीने खंडोजीच्या सर्वांगातून जणू वीज थरारली...!
त्याने तिला समजवत तिची मिठी सोडवली...तो बोलू लागला...!

"साऊ... तुला पहिल्यांदाच पहिले अन आयुष्यात प्रेम कशाला म्हणतात याची अनुभूती आली.
तु बेरडाशी एकटी सामने गेलेले ऐकले आणि माझ्या हातातून काही सुटत आहे असे वाटू लागले आणि मी कोणताही विचार न करता मोहिमेवर असूनही कर्तव्य विसरुन तुझ्यामागे आलो...मी जर तुला जंगलातून घेऊन आलो नसतो तर तुलाही गमावून बसलो असतो आणि माझे कर्तव्य सुद्धा...!
माझे जितके तुझ्यावर प्रेम आहे तितकेच माझ्या कर्तव्यावर...असे म्हणत त्यानेही साऊ ला मिठी मारली...दोघेही काही क्षण तसेच उभे होते...!
माझ्यावर विश्वास ठेव..मी सर्व ठीक करेन..!

काही क्षण गेले आणि जंगलात पुन्हा बाजींद च्या येण्याची चाहूल लागली.
पशु पक्षी जनावरे किंचाळू लागली...!

सावित्रीने क्षणात खंडोजीचा हात धरला आणि म्हणाली...चला...जवळच गुहा आहे...लौकर बाहेर पडूया.... बाजींद च्या तावडीतून जिवंत राहणे सोपे नाही...!

धीराच्या शब्दात खंडोजी बोलला....
साऊ माझ्यावर विश्वास ठेव...मी सामने होते त्याच्या...साधले तर 100 वर्षाची तुमची कल्पना खोटी ठरेल..आणि तू म्हणतेस तसे खरेच निघाले..तर मात्र असा अनुभव माझ्या हेरखात्याला सांगेन...दोन्ही साधले जाईल..!

असे म्हणत तो जिकडून आवाज येत आहे तिकडे जाऊ लागला....!

दाट जंगलात किर्र झाडीत चित्रविचित्र आवाज येत होते..पुढे जाईल तसे आवाज तीव्र होत होते...आणि एक वळण घेतले तो पुढे ते विहंगम दृश्य दिसले..!

कमरेला तलवार अडकवून तो धीरगंभीर पुरुष एका मोठ्या दगडावर उभा होता..आसपास जंगली जनावरे बसली होती...!

खंडोजी व सावीत्री ला पाहताच बाजींद ने स्मित हास्य केले आणि जोरात गर्जना केली....!

"स्वागत आहे योध्या ,तुझे मी माझ्या जंगलात स्वागत करतो...असे बोलत तो दगडावरून खाली झेपावला...!

खंडोजी ला काहीच समजेना काय घडत आहे ते...हे भूत असेल तर हवेत का उडत आले नाही...जर नाही तर 100 वर्षे जगलेच कसे...डोक्यात प्रश्नांचे काहूर माजले...सावित्रीच्या तर हृदयाची घालमेल सुरु झाली...!

प्रसंगाचे गांभीर्य राखत खंडोजी ने तलवार समोरून चालत येत असलेल्या बाजींद वर रोखली...!
ते पाहताच पक्षी,कीटक आणि प्राण्यांनी पुन्हा जोरात आवाज वाढवला..वाघांच्या डरकाळ्या फुटल्या...पण शांत बाजींद ने हात वर केला तसे सर्व प्राणी शांत झाले....!

त्याने मोठ्या आवाजात एक गूढ आवाज काढला...तो एक सांकेतिक आवाज होता,क्षणात सारी जनावरे,पशु,पक्षी तिथून निघून जाऊ लागले...जंगल एकदम मोकळे भासू लागले..!

समोर चालत येत असलेल्या बाजींद ने पुन्हा दोन्ही हात वर केले आणि डोळे मिटून पुन्हा एक गूढ आवाज केला...क्षण,दुसरा क्षण...जंगलाच्या बाजूने शेकडो घोडेस्वार हातात तलवारी,भाले घेऊन हजर झाले..!

सारे जंगल स्वारांच्या गर्दीने भरून गेले...त्यातल्या एका स्वाराच्या हातात भव्य असा परमपवित्र"भगवा ध्वज" होता...!

खंडोजीने हातातील तलवार टाकली...तो पुटपुटला...भगवा जरीपटका ...?

ज्याच्यासाठी हजारो वीरांनी आयुष्याची होळी करुन ,रक्त सांडून हिंदवी स्वराज्य शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली निर्माण केले...असा स्वराज्याचा भगवा ध्वज त्या स्वाराच्या हातात पाहताच...खंडोजी कमरेत झुकला....एक ...दोन...तीन....मानाचे तीन मुजरे त्याने त्या परमपवित्र ध्वजाकडे पाहून केले...!

·●●क्रमश●●●
बाजींद
भाग क्र.१८ वा.
~~~~~~~~~~~~~~~~~~~
खंडोजी ने एक दीर्घ श्वास सोडला आणि त्या चौघांकडे एक दृष्टिक्षेप टाकला.
सर्जा,सखाराम,नारायण आणि मल्हारी गंभीर पणे खंडोजी भूतकाळ त्याच्याच तोंडून ऐकत होते..!

एव्हाना खूप दूर आपण चालत आलो आहोत याची जाणीव त्या पाचही जणांना झाली.

सखाराम बोलला....खंडोजीराव,तुमची कथा लईच भारी वळणावर गेली हाय गड्या.
जित्रापांच आवाज बी वळकता येत्यात हि मातूर नवालच हाय...!

नवाल ?
नवाल नव्हे...महाआश्चर्य होते ते.
~~~~~~~~~~~~~~~~~~~

खंडोजी बोलून गेला.

सर्जा मध्येच थांबवून सखाराम ला बोलला...कारभारी हि कथा ऐकत लई लांब आलूया आपण..निदान खंडोजीराव निदान सांगा तरी अजून कितीसा दूर जायाचं हाय आपणासनी ?

खंडोजी बोलला...झालं..अजून एक दोन कोसावर जंगलात एक गुहा लागेल..!
तिथे पोहचला कि आमचे वस्ताद काका भेटतील.
तेच तुम्हाला पुढे शिवाजी महाराजांच्या खासगीत घेऊन जातील आणि तुमचे काम मार्गी लागेल..!

यावर मल्हारी बोलला...वस्ताद घेऊन जातील म्हणजे तुम्ही नाही का येत सोबत ?
खंडोजीकडे पाहत मल्हारी बोलला.

मी नाही येऊ शकणार गड्यानो...माफ करा.
मला माझ्या कर्तव्यात कसूर नाही करता यायची.
मी मोहिमेवर असलेला शिपाईगडी,अजून मला सावित्रीला शोधायची आहे.

पण,तुम्हाला मी वाट दाखवतो गुहेची...तिथं गेलात की मी,सावीत्री तुम्हाला भेटलो होतो हे सांगू नका काकांना.
विनाकारण आमची काळजी करत बसलेले असतात,उलट त्यांना सांगा...खंडोजी आणि सावीत्री आयुष्यभर स्वराज्य आणि भगव्यासाठीच जगतील... आणि त्यासाठीच मरतील..!
खंडोजी खिन्न पणे बोलला..!

पण,नकाच बोलू त्यांना की मी तुम्हाला इथवर आणले आहे.

यावर सखाराम बोलला..अहो,पण ते विचारतील ना की एवढया गुप्त वाटेने तुम्ही कसे काय आला ते ?

थोडा वेळ शांत राहून खंडोजीने त्याच्या दंडावर बांधलेली चांदीची पेटी काढली आणि सखाराम च्या हातात देत बोलला...वस्ताद काका काही विचारायच्या आत ही पेटी त्यांना दाखव आणि परवलीचा एक शब्द सांग त्यांना......"चंदन"

सखाराम ने ती पेटी जवळ घेतली आणि खंडोजीकडे पाहत बोलला...

बर मग आम्ही चौघेच जाऊन येऊ म्हणता वस्तदाना भेटायला ?

होकारार्थी मान हालवत खंडोजी बोलला ,होय सखाराम ..तुम्ही तुमची टकमकाची समस्या बोला त्यांना...ते लगेच तुम्हाला खाजगीकडे पत्र देऊन रवाना करतील.
तिकडे गेला की तुम्हाला शिवाजी महाराजांना भेटायला मिळेल आणि तुमची समस्यां कायमची सुटेल...!

हे ऐकताच चोघांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहू लागला...!

चला,अजून 1-2 कोस मी तुमच्यासोबत येतो,मग तिथून मी येऊ शकत नाही.
तुमचे काम झाले की मलाही सुटका मिळेल.

आता तुमचे काम ते माझे काम आहे असे वाटू लागले आहे...!

ते पाचही जण पुन्हा जंगलातील ती वाट चालू लागले...!

काही क्षण गेले आणि मल्हारी बोलला...खंडोजीराव पुढे काय झाले हो ,मगाशी सांगता सांगता थांबला....!

खंडोजी हसला आणि पुन्हा भूतकाळात रममाण झाला....!

बाजींद च्या फौजेचा भगवा ध्वज मला व सावीत्री ला धक्का देणारा होता.
तो ध्वज केवळ मराठ्यांची फौज वापरत होती आणि बाजींद तर भूतच आहे असे माझे आणि सावित्रीचे मत होते.
मग हा काय प्रकार असावा असे माझ्या मनात आले..!

मी मुजरा करुन होताच बाजींद माझ्या समोर आला..

आणि बोलू लागला..

खंडोजी राव...आम्ही तुम्हास व सावित्रीला ओळखतो,जणू काही आजवर आम्ही तुमचीच वाट पाहत आहोत..!

सावीत्री...काल तुझ्या मागे भिल्ल होते आणि तू इथे आलीस तेव्हा तुझ्या हातावर शिरक्याचे चिन्ह पाहताच मी समजलो की तू शिरक्याची सावीत्री आहेस,आणि खंडोजी तुम्ही बहिर्जी नाईकांच्या खास मर्जीतले....!

हे सर्व ऐकताच खंडोजी व सावीत्री थक्क झाली.
आश्चर्याने ते बाजींद कडे पाहू लागले...खंडोजी बोलला...!

पण,तुम्ही कोण आहात ?
100 वर्षे झाली बाजींद च्या कथेला...तुम्ही भूत आहात ??

यावर हसत बाजींद बोलला...भूत ?
होय,जगासाठी आम्ही भुताची फौज आहोत.
भूत म्हणून जगण्यातच आमचे खरे वैभव आहे...!
पण,आम्ही भूत नाही.....!
तुमच्यासारखीच आम्हीही माणसे आहोत.
आम्हालाही 100 वर्षे ज्या गोष्टीसाठी असे जीवन स्वीकारले त्यातून मुक्ती पाहिजे खंडोजीराव,म्हणून आम्ही आजवर तुम्हा दोघांची वाट पाहतोय...!

काय ?
आम्हा दोघांची वाट पाहताय?
खंडोजी आश्चर्याने बोलला....!
मला खरोखर इथे काय घडतंय सांगा...तुम्ही आमची वाट पाहताय याचा काय अर्थ ?
मला जाणून घ्यायचे आहे सर्व...!

बाजींद शांतपणे बोलू लागला..........

त्या दिवशी हुसेनखान व त्याच्या फौजेने केलेली गद्दारी चंद्रगड च्या विनाशाला कारणीभूत ठरली होती.
नूरजहा आणि बाजींद दोघेही गतप्राण झाले होते...चंद्रगड च्या जंगलातील झाडून सारे प्राणी हुसेनखानाच्या फौजेचा बळी घेत होते.
चंद्रगड चे वैभव जळून खाक होत होते...!

दिवस उगवला....साऱ्या चंद्रगड ची मसणवाट झाली होती..!

कोणीही जिवंत नव्हते...ठायी ठायी गतप्राण झालेले वीर दिसत होते...तितक्यात एक पोरगासावळा मुलगा जखमी अवस्थेत बाहेर पडला...!

त्याचे सुर्यकांत नाव ....!

चंद्रगड च्या सरदेसाई घरण्यातलाच त्याचाशी जन्म..!
बाजींद चा चुलत भाऊ...बाजींद म्हणजे साऱ्या चंद्रगड ची शान होती...!
पण,आता सर्व संपले होते.

तो मुलगा हेलखावे खात बाजींद ला शोधू लागला,रात्रीच त्याची लवलवणारी तलवार त्याने पाहिली होती...!
दुरुनच ती चमकली आणि त्याने ओळखले, की बाजींद इथेच आहे...!

काळजातुन आरपार गेलेला बाण त्यांने ताकतीने उपसला...रक्ताचा धबधबा सुरु झाला आणि एक आर्त किंकाळी फुटली...!

सुर्यकांत ने जाणले की बाजींद जिवंत आहे.
त्याने धावत जाऊन पाणी आणले आणि बाजींद ला पाजले....बाजींद ने डोळे किंचित उघडले...एक क्षण त्याने सुर्यकांत कडे पाहिले...बाजूला गतप्राण होऊन पडलेल्या नुराजहाँ कडे पाहिले...त्याच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या.....त्यांने क्षणात गळ्यात बांधलेला ताईत काढला व तो सुर्यकांत च्या हातात ठेवला....एका विलक्षण अपेक्षित नजरेने तो त्याच्याकडे पाहत होता आणि डोळे उघडे ठेऊनच तो गतप्राण झाला...!

आपल्या हाती काय देऊन बाजींद गतप्राण झाला आहे,याचे आश्चर्य सुर्यकांत ला वाटले ,त्याने खूप लक्षपूर्वक तो ताईत हाती घेतला.
त्या ताईत च्या आत नक्कीच काहीतरी गूढ होते,त्याने त्या ताइतच्या आत असणारा एक कागद बाहेर काढला...!

त्यावर काही गूढ सांकेतिक चित्रलिपी मध्ये संदेश लिहला होता...!
त्याला काहीच समजत नव्हते,त्याने तो कागद तसाच जपून ठेवला व बाजींद आणि नुराजहाँ च्या पार्थिवाला अग्नी दिला..!
इतर हजारो मृतदेह तो एकटा 4-5 दिवस पुरत होता.

जंगलातील कंदमुळे खाऊन तो जगू लागला.

रोज रात्री झोपताना तो त्या कागदाचा अर्थ लावत होता पण समजत नव्हते...!

एक हत्ती....दोन वाघ....एक नागमोडी वळण घेतलेला साप....पाण्याचा धबधबा......आणि मुंग्यांचे वारूळ..!
बरोबर मध्ये एक सोनेरी रंगात वहीचे चित्र होते..!

ज्याअर्थी मरत असताना बाजींद ने ते त्याला दिले होते त्याअर्थी नक्कीच काहीतरी ते विलक्षण असणार म्हणून तो रोज ते पाहत असे....!

एके दिवशी तो जंगलात फळे,कंद गोळा करत होता आणि पाठीमागून वाघाची डरकाळी त्याच्या कानावर पडली....भीतीने सर्वांग थरारले...चुकून आपण वाघाच्या परिसरात पाऊल ठेवले असावे,त्याने त्वरित तिथून जाण्यासाठी मागे वळणार इतक्यात वाघाचे ते प्रचंड धूड समोरच उभे होते...!

त्याला पाहताच सुर्यकांत जिवाच्या आकांताने धावू लागला आणि धावता धावता तो एका ओढ्यावर बांधलेल्या लाकडी सेतुवर चढला आणि कडाड कड आवाज करत तो सेतु तुटला...तो ओढ्यात पडला आणि पोहत ओढ्याच्या किनारी लागला.

दम खात तो बसला होता,तेव्हा त्याच्या हाताला एक लालभडक मुंगी चावली...१,२,३,४.....१० हजारो मुंग्या तिथे होत्या....जणू ते जंगल मुंग्यांचे होते...त्या मुंग्यातून जायला एकच वाट होती...ती नागमोडी वाट पाहिल्यावर त्याला काहितरी आठवले...मुंग्या,नागमोडी वाट....क्षणात त्याला गळ्यात बाजींद ने दिलेला ताईत आठवला....त्याने तो काढला...तर बरोबर तसेच चित्र त्या कागदावर होते जसे समोर दिसत आहे....!

त्याने तो कागद समोर धरुन चालू लागला तर समोर एक गुहा दिसली ज्या गुहेवरून पाण्याचा धबधबा पडत होता......!

त्यांने त्या गुहेत प्रवेश मिळवला...अंधारी गुहेत तो धाडसाने चालू लागला.....खूप वेळ चालला आणि त्याला अंधारात दोन हिरे चमकल्याचा भास झाला....त्याने लक्ष देऊन पाहिले आणि अंगावर सर्दिशी काटा आला....ते दोन जिवंत वाघ होते....!

·●●क्रमश●●•
बाजींद

भाग क्र.१९
~~~~~~~~~~~~~~~~~~
सुर्यकांत ची चाहूल लागताच ती वाघांची प्रचंड धुडे शरीर झिंझाडत उठू लागली,जणू खूप दिवस ती तिथेच बसून असावीत.
सुर्यकांत ला पाहून त्यांनी मान वर करत प्रचंड डरकाळ्या फोडल्या...गुहेतील अणुरेणु शहारले...!

सुर्यकांत च्या पायाखालची जणू जमीन सरकू लागली असे ते दृश्य होते.
पण,आता माघारी फिरुन धावणे अशक्य होते..एका झेपत त्याचा घास झाला असता.
तो तसाच तटस्थ उभा राहिला.
~~~~~~~~~~~~~~~~~~

ते दोनही वाघ बाजूला सरकू लागले..जणू ते काहीतरी खून सांगत असावेत.
सुर्यकांत ला समजेना काय घडत आहे,तितक्यात गुहेच्या प्रवेशद्वारातून भलामोठा हत्ती चित्कार करु लागला.

सुर्यकांत ची विचारशक्ती क्षीण होऊ लागली...पुढे मागे दोन्हीकडून जणू यमादेवाशी गाठ पडली होती.

तो तसाच पुढे धावु लागला...धावता धावता पायाखाली असलेल्या दगडाला ठेचकाळून तो पडला....जमिनीवर वाळलेल्या गवताची गंजी असल्याने त्याला फारसे लागले नाही.
तो उठणार इतक्यात समोर एका चौकोनी दगडावर त्याला काहीतरी वस्तू असल्याचा भास झाला...!

तो धाडस करुन समोर जाऊ लागला आणि बाजू उभा असलेल्या वाघांचे अन बाहेर उभ्या हत्तीचे किंचाळने जास्तच सुरु होते....त्याने त्या दगडावर पाहिलं...!

एका हरणाच्या कातडीमध्ये चौकोनी वस्तू बांधून ठेवल्याचे त्याच्या निदर्शनास आले.
त्याने ते हरणाचे आवलण सोडवले ,आत त्याला एक मजबूत वही दिसून आली...!

कोणत्यातरी प्राण्याच्या कातडीचे पाने असणाऱ्या त्या वहीवार नैसर्गिक रंगाने चित्रविचित्र आकृत्या कोरलेल्या होत्या..!

मोठ्या कुतूहलाने त्याने पहिले पान उघडले...तो वाचू लागला...वाचू लागला....आणि वाचतच राहिला...!

निमिषें,पळे, घटिका भूतकाळात विलीन होऊ लागल्या..तहान भूक विसरुन तो सर्वांगाने जणू डोळे करुन ती वही वाचू लागला...!
पहिला दिवस संपला... दुसरा...तिसरा...चौथा....पाचवा...!

तब्बल पाच दिवस तो आणि ती वही जणू एकरूप,एकजीव झाले होते...!

जेव्हा तो भानावर आला...तेव्हा त्याच्या डोळ्यातून धारा वाहत होत्या...अंगावरील रोमरोम पुलकीत झाले होते..!

तीच दुनिया जी पाच दिवसापूर्वीची होती..तो विचित्र नजरेने पाहत होता..!

भोवताली बसलेले ते वाघ असे का बसले होते इतके दिवस त्याचे रहस्य त्याला समजू लागले...!
विचित्र आवाज करुन त्याने त्या वाघांना जवळ बोलवले...मायेने कुरवाळले व तो थकल्या पावलांनी गुहेच्या बाहेर आला....!

समोर जो बलाढ्य हत्ती उभा होता तो शतश त्याच्यासमोर झुकून उभा होता...

तो त्या विस्तीर्ण जंगलात सर्वत्र मोठ्या आनंदाने पाहू लागला.
ते निर्जीव,निर्मनुष्य,भयप्रद जंगल त्याला विलक्षण सजीव वाटू लागले..!
आनंद अवर्णनीय होता..!

काय असे घडले होते त्याच्यासोबत ??

ती वही, साधी वही नव्हती ती बाजींद ने त्या वन्य प्राण्यांची भाषा समजून घेण्याचे जणू तंत्रच त्यात लिहले होते.
जशी माणसांची दुनिया असते,तशी प्रत्येक जीवांची पण दुनिया असते,भावभावनांचे अनेक खेळ जसे मानवी आयुष्यात होतात,अगदी तसेच पण वेगळ्या पद्धतीने प्राण्यांच्या दुनियेत होतात.
ती त्यांची भाषा शिकायचे जणू सांकेतिक स्फुट विज्ञानच बाजींद ने पुढील पिढीसाठी लिहून ठेवले होते.

ते कुठे व कसे लपवले याची माहिती कोणाला तरी दिल्याशिवाय त्याने प्राण सोडले नव्हते याची जाणीव सुर्यकांत ला झाली.
त्याचे डोळे अश्रूंनी भरुन गेले.

मग मात्र त्याने कंबर कसली.
उजाड झालेल्या चंद्रगड मध्ये पुन्हा जीव फुंकण्याचे ध्येय धरुन त्याने काम सुरु केले.
जंगली जनावरे त्याच्या एका शब्दावर काहीही करु लागली.

पण,जोवर शूरवीर मनुष्याची फौज उभी होत नव्हती तोवर बाजींद ज्या ध्येयासाठी खस्त झाला त्याच्या बलिदानाचे चीज होणार नव्हते,ज्या पवित्र भावनेने त्याने प्राण्याच्या गूढ भाषेचे ज्ञान लिहून ठेऊन त्याचा उपयोग समाजाला करता यावा ती भावना घेऊन उठलेले अनेक स्नातक निर्माण केल्याशिवाय होणार नव्हती.

या गोष्टीचा विचार करत महाराष्ट्रभरातून निस्वार्थी भावनेने प्रतिकूल परिस्थितीत लढत असलेले अनेक वीर सुर्यकांत ने एकत्र जमवले.
प्राण्यांच्या गूढ भाषा जाणणाऱ्या त्याच्या विलक्षण कौशल्याने सर्व त्याला जणू देवाचाच अवतार मानू लागले,पण प्रत्यक्षात तसे नव्हतेच...तो साधाच मनुष्य होता.
पण ज्याने जे काम उभे केले ते मात्र महान होते.
चंद्रगड ला "बाजींद" चे झपाटलेले जंगल बनवले.
इथे पाऊल ठेवणारा परका माणूस परत जिवंत जाणार नाही असा नियम बनवला गेला.
केवळ महाबलेशवर जंगल नव्हे तर अवध्या महाराष्ट्राच्या आख्यायिकेत बाजींद बद्धल बऱ्याच अंधश्रद्धा पेरल्या गेल्या आणि ती शे दोनशे वीरांची टोळी देशासाठी जगू लागली.
पण,मर्यादा राखून..!
उभा आडवा महाराष्ट्र पारतंत्र्यात असताना शे दोनशे वीर उठून बंड कसे उभा करतील.
अशक्य होते ते,आता ते सर्व शोधत होते एक संधी.
सुर्यकांत ब्रम्हचारी राहिले व त्यांच्या फौजेतील सर्वात निस्वार्थी व पात्र धारकऱ्याला ते गूढ ज्ञान देत असत व त्याला "बाजींद" म्हणून सेनेचे नेतृत्व देत असत..!
100 वर्षे झाली हाडमांस शिंपून आम्ही हे बाजींद चे जंगल व दहशत टिकवून आहोत.
मी सध्याचा "बाजींद" या नात्याने नेतृत्व करत आहे.
गुप्तपणे सारा महाराष्ट्र फिरला ,जागोजागी अन्याय,अत्याचार पाहून काळीज तुटत होते.

महाराष्ट्रावर परकीय आक्रमकांच्या टोळधाडी आळीपाळीने तुटून पडत होत्या.
वतने,जहागिरी यासाठी स्वकीय बांधवांचे अगदी आनंदाने गळे चिरणारी पिढी तयार होत होती.
आपण परकीय सत्तेच्या अधीन आहोत हेच लोकांना समजत नव्हते.

धर्म,मानवता नावालाही शिल्लक नसताना ,एक बाल क्रांतिकारक उठला पुण्यातून ज्याने भागवत धर्माचा भगवा पताका आपल्या राज्याचा ध्वज म्हणून जाहीर केला आणि हिंदुस्थानातील पाचही जुलमी राजवटी विरुद्ध प्रचंड लढा उभा केला ते पण कोणतीही परिस्थिती अनुकूल नसताना..!
त्यांचे नाव ..."पुण्यश्लोक शिवाजी"

महाराजांच्या या पवित्र कार्याची महती आमच्या रक्तारक्तात भिनली गेली.
तेव्हाच आम्ही ठरवले..हे बाजींद चे गूढ गुप्त ज्ञान आता फक्त आणि फक्त हिंदवी स्वराज्यासाठी द्यायचे...!

मी गेली ६ महिने आमच्या जंगलातील घरी गिधाडे खंडोजी तुझ्यावर पाळत ठेऊन आहेत.
जेव्हा तू यशवंतमाचीत कुस्ती खेळायला जाणार होतास तेव्हा स्वराज्याचे गुप्तहेर बहिर्जी नाईक यांनी तुझ्यावर सोपवलेली यशवंतमाचीची जबाबदारी हे देखील मला या पशु पक्ष्यांनी सांगितले...!
तुझा या सवित्रीवर बसलेला जीव आणि बेरडाच्या हल्ल्यात तू कर्तव्य सोडून तू चूक करणार हे मी आधीच जाणले होते, तुम्हाला नाईलाजास्तव त्या दरीत उडी टाकून पळावे लागले आणि भिल्लांच्या भीतीने तुम्हाला इथवर आणण्या इतपत सर्वच्या सर्व घटना.....आपोआप घडल्या नसून...त्या मी घडवल्या आहेत..!

तुम्ही इथे आला नसून....आणले गेला आहात...!

असे म्हणताच बाजींद पुन्हा हसू लागला...आणि त्याच्या त्या हसण्याने जंगलातील सर्व प्राणी प्रचंड कल्लोळ करु लागले...!

सायंकाळच्या संधीप्रकाशात डोक्यावर धो धो पडणारा पाऊस वाचवण्यासाठी....खंडोजी,नारायण,सखाराम,मल्हारी व सर्जा पाचही जण एका विस्तीर्ण झाडाखाली उभे होते...अंगावरील बोचरी थंडी सोसत ते चौघेही खंडोजी च्या तोंडून ती बाजींद ची विलक्षण कथा ऐकण्यात गढून गेले होते...!

सुर्य अस्ताला जाऊ लागला अन खंडोजी उठला....!
त्याला जाणवले की कथा सांगायच्या नादात सुर्य अस्ताला जात आहे...तो ताडकन उठून भर पावसात भराभर पावले टाकत जाऊ लागला....!

त्याला त्या भर पावसात बाहेर जाताना पाहताच ते चौघेही त्याला हाक मारु लागले..पण विजेचा कडकडाट आणि मुसळधार पाऊस यामुळे क्षणात तो दिसेनासा झाला...!

सखाराम ने दीर्घ श्वास घेतला आणि मल्हारी,सर्जा व नारायण कडे पाहत बोलू लागला.....!

गड्यानो,हयो खंडोजी साधासुधा माणूस नक्कीच नाय.
त्यो ज्या बाजींद ची कथा सांगतोय,त्यात नक्कीच कायतरी लपले आहे...चला...आजच्या रातीला निवारा हुडकुया...उद्या येरवाळी त्यो येडा नक्की हजर असलं....!

·●क्रमश●•

बाजींद

भाग क्र.20
~~~~~~~~~~~~~~~~~~

पावसाचा जोर कमी झाला आणि अंधाऱ्या रस्त्याचा मागोवा घेत सखाराम व त्याचे साथीदार चालू लागले.
मध्येच वीज चमकायची आणि त्याच्या लख्ख प्रकाशात त्या रायगड परिसरातील भयान जंगलाचे स्वरूप समोर दिसायचे आणि क्षणात पुन्हा काळोख पसरायचा..!

जवळपास एक प्रहर होत आला ते चालत चालत एका विस्तीर्ण पठाराजवळ आले होते.
दूरवर काहीतरी ऐकू येत आहे याची चाहूल सखाराम ला लागली आणि त्याने कान देऊन ऐकले व बोलला...गड्यानो..दूरवर माणसांची वस्ती असण्याची दाट शक्यता आहे,मला माणसे असल्याचा आवाज येत आहे.
चला...तिकडे जाऊया..!

असे म्हणताच..सर्वजण त्या आवाजाच्या बाजूने चालू लागली.

हळूहळू तो आवाज तीव्र होऊ लागला आणि सोबत घोड्याच्या खिंकाळन्याचाही आवाज येऊ लागला...!

सखाराम ने पाहिले कि समोर कोणाची तरी छावणी पडली आहे.
पिवळा ध्वज त्यावर गरुडाचे चिन्ह असणारे निशाण समोर डौलत होते.

सावधपणे ते हळूहळू छावनिकडे सरकू लागले इतक्यात त्या चौघांच्या पाठीला कोणीतरी तलवारी लावल्या....एक म्होरक्या उच्च रवात बोलू लागला......कोण र तुम्ही ?
राजे येसाजीराव शिर्क्यांच्या छावणीची टेहळणी करता काय ?

तोवर दुसरा बोलला.....आर बोलून ताकत काय वाया घालवतोस...घाल रपाटा डोस्क्यात...!

सावध झालेल्या सखाराम ने जाणले कि ही छावणी सावित्रीच्या वडिलांची आहे ...त्याने प्रसंगावधान राखत त्या शिलेदाराला सांगितले...,

आओ शिलेदार आम्ही राजकुमारी साहेब सावित्रीबाईंचे पाहुणे आहोत....सोडा आमास्नी...!

काय...?
राजकुमारीसाहेबांचे पाहुणे ...?
एक जण बोलून गेला...!

होय,त्यांनीच रात्री इकडे बोलावले म्हणून आलोय आम्ही..!

त्याचे ते बोल ऐकताच त्या म्होरक्याने तलवारी खाली घेतल्या आणि त्या चोघांच्याकडे बघत बोलू लागला....,

तुम्हाला राणीसाहेबांचे नाव माहिती आहे म्हणजे नक्कीच तुमची ओळख असेल....चला आमच्या सोबत आम्ही राजकुमारी साहेबाना वर्दी देतो...त्यांनी जर तुम्हाला ओळखले नाही,तर तुमचे मरण नक्की...चला...!
~~~~~~~~~~~~~~~~~~

त्या चौघांना धक्का देत छावणीकडे आणले गेले..!

ठायी ठायी हातात नंग्या तलवारी घेऊन पहारा देणाऱ्या त्या छावणीत केवळ शे-पाचशे वीर उभे होते.

मुख्य छावणीवर शिर्क्यांचा गरुडध्वज वार्यावर हिंदोळे देत होता..!
पलीत्यांच्या प्रकाशात छावणी उजळून निघाली होती.नुकत्याच झालेल्या पावसाने गारठलेली घोडी ,बैल अंग झिन्झाडत होती..!

त्या शिलेदाराने सावित्रीच्या कक्षात जाऊन वर्दी दिली आणि ते ऐकताच आत बिछान्यावर पहुडलेली सावित्री धावतच बाहेर आली.....!

सखाराम ने सावित्रीला पाहताच सुटकेचा उच्श्वास टाकला..!

सकाळी कुठे गायब झालात तुम्ही सारे ?

गंभीर मुद्रेने सावित्रीने त्या चौघांना प्रश्न केला.

काय ?
आम्ही गायब ?
बाईसाहेब रात्री आम्ही त्या मंदिरात झोपलो ,पण आम्हाला जाग आली ते एका डोंगरावर..ऐन वेळी खन्डोजीराव तिथे आले नसते तर त्या भुकेल्या वाघांनी आमची न्याहारीच केली असती....!
सखाराम उत्तरला...!

काय ?
खंडोजी आलेला.....कुठे आहे तो..?
त्याला शोधून शोधून आमच्या सर्वांचा उर फाटला आहे आणि तो असा लपंडाव खेळतोय...?

माझे डोके बधीर होत आहे बाईसाहेब....आज दिवसभर खन्डोजीराव आमच्या सोबत या जंगलातल्या डोंगरकापर्यातून इथवर चालत आले आणि सूर्य अस्ताला गेल्यावर कुठेतरी गायब झाले .....आता लिहून ठेवा तो सकाळी इथे उगवणार नक्की...!

खंडोजी दिवसभर तुमच्या सोबत होता ?
सावित्रीने प्रतिप्रश्न केला ..?

तो का असा वागत आहे समजेना..मी व माझ्या यशवंतमाचीची सारी फौज त्याला शोधत आहोत ..!

चला...मी तुम्हाला माझ्या वडिलांची ओळख देते करून..असे म्हणून सावित्री व ते चौघे महाराज येसाजीरावांच्या कक्षात गेले.....!

एका उंच अशा माचानीवर भरजरी कपडे घालून एका पुराणपुरुषाप्रमाणे बैठक घालून सोबत २-३ वीरांसोबत बैठकीत व्यस्त असलेल्या राजे येसाजीरावानी सावित्री आणि त्या चौघाकडे पाहिले...तसे काही न सांगता समोर बसलेले २-३ वीर उठून राजे येसाजी आणि सावित्रीला मुजरा करत निघून गेले...!

या या ...बसा ....समोर असलेल्या बैठक व्यवस्थेकडे बसायची खून करत राजे येसाजी बोलू लागले ...!

कालच मला आमच्या साऊ नी तुमची व्यथा सांगितली...!
तुमच्या गावाची अडचण खूप मोठी आहे गड्यानो....नक्कीच राजे शिवाजी भोसले यात लक्ष घालतील तर हा त्रास कायमचा मिटेल....पण तुमचे अभिनंदन कि इतक्या मुसळधार पावसात जीव मुठीत धरून तुम्ही लोक गावासाठी बाहेर पडलात...तुमच्यासारखी समाजाची सेवक लोक हल्ली बघायला मिळत नाहीत रे ..!

सावित्री..यांचा चांगला पाहुणचार कर आणि उद्या मात्र खन्डोजीला शोधूनच काढले पाहिजे....!

खन्डोजीचे नाव घेताच सावित्री आणि राजे येसाजींच्या डोळ्यात पाणी आले ....ते सावरत राजे बोलले....साऊ वेळ फार नाही ग आता......फक्त उद्याची रात्र...काय करायचे असेल ते आजच करा......परवाचा सूर्योदय आणि शिर्के साम्राज्य.........!

बोलता बोलता राजे येसाजीचा शब्द जड झाला आणि ते उठून पाठमोरे झाले....!

डोळ्यावर आलेले पाणी पुसत सावित्री निर्धारी आवाजात बोलत उठली.....आबा ,काळजी करू नका..!
मी तुमचीच लेक आहे ......उद्या खंडोजी ला घेऊनच मी इकडे येते....तुम्ही विश्रांती घ्या...!

असे बोलून सावित्री त्या चौघांना घेऊन वेगळ्या छावणीत परतली..!
नोकर चाकाराना बोलावून घेतले आणि सखाराम व त्याच्या सहकार्यांच्या भोजनाची व्यवस्था केली ..!

दिवसभर मर मर चालून पोटात भुकेने काहूर उठले होते..!
जेवणाचे नाव उच्चारताच चौघांचेही चेहरे कमळासारखे फुलले...!
पंचपक्वान्न ठेवलेली थाळी चौघांनी संपवायला प्रारंभ केला...!

साऊ समोर बसूनच ते पाहत होती.......
ती म्हणाली...सावकाश होऊदे भाऊ...ठसका लागेल...!

घोटभर पाण्याचा घुटका घेत सखाराम बोलला....बाईसाहेब दिसभर खंडूजी न काल रातीची तुमची कथा सांगितली आमास्नी.....लय लय पुण्यवान मानस हायसा तुम्ही म्हणून तुम्हास्नी बाजिंद न तेच्या राज्यात बोलावून घेऊन १०० वर्षांचे आक्रीत उलघडून सांगितले ते......!

क्षणभर गंभीर होऊन सावित्रीने किंचित हास्य केले आणि बोलू लागली...!

होय,पुण्य तर केलेच होते माझ्या बाप जाद्यानी पण....आम्हाला काय माहिती होत कि नियती आमच्याशी इतका क्रूर खेळ खेळत आहे ...!
सावित्री पुन्हा तिच्या आयुष्याच्या गूढ गर्भात विसरून बोलू लागली.....!

बाजिंद ने आम्हाला तिथे बोलावून घेतले आहे याची जाणीव आम्हाला झाली,पण त्यापेक्षाही त्याच्यावर अभिमान एका गोष्टीचा होता कि १०० वर्षे हि वेडी माणसे स्वताचे जीवन न जगता ,इतके गूढ ज्ञान असून देखील त्याचा गैरवापर न करता प्रसिद्धी पासून दूर राहून देशाचे काम करत होती...!

त्या रात्री आम्हाला बाजिंद ने सारे चंद्रगड फिरवून दाखवले,पाहुणचार केला आणि रात्र होताच एका गंभीर विषयाचे बोलणे करायला सुरवात केली....!

खंडोजी....१०० वर्षे आम्ही ज्या संधीच्या शोधात आहे ,ती आम्हाला तुमच्या रूपाने मिळाली आहे....!

माझे एक काम कराल ?

बाजिंद ने मोठ्या गंभीर मुद्रेने प्रश्न केला ..!

खंडोजी ने होकाराठी मान हलवत म्हणाला......बाजिंद ....मला माहिती नाही आपले जन्मोजन्मीचे काय नाते असावे ...पण तुमचे हे जे कार्य आहे ते महाराजांच्या कार्यापेक्षा कमी नाही आहे ...!

नाही,नाही खन्डोजीराव.....महाराज हिमालय तर आम्ही कुठली तर भुरटी टेकडी..ते गरुड तर आम्ही डास..!

अरे ३५० वर्षाची गानिमांची भीती सामान्य माणसांच्या मनातून काढून असामान्य कामगिरी करवून घेणारे शिवाजीराजे हे जणू शिवाचे अवतार वाटतात कधी कधी...!

माझे एक काम कराल ?

हो नक्कीच..आदेश द्या ..खंडोजी बाजिंद ला म्हणाला....!

ऐक,खंडोजी....मी बाजिंद च्या तपस्येची,संघर्षाची कमाई असलेले ते गूढ विज्ञान लिहलेली वही हिंदवी स्वराज्याच्या महान कार्याला देऊ इच्छितो...!

तू ती वही स्वराज्याचे गुप्तहेर बहिर्जी नाईक यांच्याकडे देशील का /

खंडोजी चे डोळे विस्फारले गेले...हृदयाची कंपने अतितीव्र झाली...!
निसर्गाच्या अनंत किमयेच्या एका कुलपाची चावी माझ्याकडे मिळत आहे हे ऐकूनच तो भान हरपून गेला....!

त्याला सावध करत बाजिंद बोलला.....बोल खंडोजी..माझ्यापुढे तुझ्या इतका प्रामाणिक आणि विश्वासू माणूस दुसरा कोणीच नाही....कारण......बहिर्जी नाईक हे गुप्तहेर शिवाजी महाराज,जिजाऊ मासाहेब व्यतिरिक्त माहिती असेल तर तो फक्त तू आहेस ...आणि हि वही फक्त आणि फक्त नाईकांच्या हाती गेली तरच स्वराज्याचे काम अनंत पटीने वाढेल.........!

बोल....करशील एवढे काम ?
क्षणात खंडोजी उत्तरला......!

होय....करेन हे काम मी...!

· ●क्रमश●•
बाजींद

भाग क्र.21
~~~~~~~~~~~~~~~~~

खंडोजी ने मोठ्या धाडसाने बाजींद चे ते गूढ ज्ञान लिहलेली वही शिवछत्रपतीचे गुप्तहेर प्रमुख बहिर्जी नाईक यांना सोपवून ते ज्ञान हिंदवी स्वराज्याच्या कामी यावे यासाठी ती जिवावरची जोखीम पत्करली.

त्या रात्री बाजींद ने चंद्रगड ची ती मूठभर मात्र चिवट फौज आमच्या रक्षणास ठेवली व तो जंगलात काहीतरी उद्देशाने निघून गेला.

सावीत्री बोलत होती आणि सखाराम व त्याचे साथीदार जेवण आटोपून थंडगार हवेच्या झुळकात ढगाळलेल्या रात्री ती रहस्यमय कथा ऐकत होते....!

सखाराम बोलला...."बाईसाहेब...बहिर्जी नाईक यांचे नाव मी पण ऐकले आहे,स्वराज्याचे गुप्तहेर प्रमुख......पण,बाईसाहेब पुढे काय घडले..."

सावित्रीने पुन्हा दीर्घ श्वास घेतला आणि ती बोलू लागली.....!

खंडोजी व मी मोठ्या उत्सुकतेने सारा चंद्रगड परिसर न्याहळत होतो व बाजींद च्या परतण्याची वाट पाहत होतो पण,तितक्यात जंगलात काहीतरी चमकले....क्षणाचाही विलंब न करता बाजींद ची फौज त्या दिशेने दौडू लागली...पाहतो तर एक किडकिडीत बांध्याचा ,काळा पोषाख परिधान केलेला "निशाणबारदार हारकारा" वाऱ्याच्या वेगाने नदीकडे धावू लागला...बघता बघता त्याने नदीत उडी मारुन पलीकडच्या दाट जंगलात पसार झाला...!

सर्वांच्या काळजाचा ठाव चुकला होता...हा हारकारा नेमका कोणाचा असावा ??
याने बाजींद व गूढ ज्ञानाच्या वहीच रहस्य तर नाही ना ऐकले....सर्व फौज काळजीत पडली व बाजींद कडे काही शिलेदार पाठवून दिले....!
काही वेळ तसाच गेला अन बाजींद च्या येण्याची ती भयानक चाहूल पुन्हा लागली...वाघ,सिंह,हत्ती,चित्ते..अगणित हिंस्त्र पशूंची भयानक डरकाळी व आसमंत गर्जून सोडणारा चित्कार पाहून सावीत्री व खंडोजी चे पण सर्वांग शहारले...!

बाजींद समोर येताच सर्व फौजेचे मुजरे झडले...खंडोजी व साऊ यांनी पण मुजरा केला..!

त्यांच्याकडे गंभीर नजरेने पाहत बाजींद बोलला....

"खंडोजी...तुम्ही शिर्के व सूर्यराव बेरड यांच्या युद्धात दरीवरून उडी मारुन नदीत पोहत जेव्हा इकडे येत होता तेव्हा सूर्यराव चा हारकारा तुमच्या मागावर होता...त्याने बाजींद च्या जीवनाचे व गूढ वहीचे रहस्य ऐकले आहे व तो वाऱ्याच्या वेगाने सूर्यराव पर्यंत पोहचला पण असेल..."
~~~~~~~~~~~~~~~~~

मोठा घात झाला आहे खंडोजी...आता सूर्यराव च्या एकाही माणसाला जिवंत ठेवणे म्हणजे साक्षात बाजींद च्या 100 वर्षाच्या परंपरेला मूठमाती देणे ठरेल...!

हे धर....असे बोलत बाजींद ने हातातून घेऊन आलेली ती गूढ ज्ञानाची वही खंडोजी कडे देत बोलू लागला...!

खंडोजी...मला वचन दे...ही वही फक्त बहिर्जी वाचतील व त्यांनाच तू देशील...तुला आई भवानीची आण आहे "

क्षणात खंडोजी उत्तरला...काळजी नसावी...प्रसंगी जीव द्यावा लागला तरी बेहत्तर ही जबाबदारी मी पार करीनच...तुम्ही बिनधास्त रहा.."

ठीक आहे...मला त्वरित सूर्यराव वर छापा मारायला हवा....तुम्ही निघा....तुम्ही आता थेट यशवंतमाची गाठा... सावित्रीचे वडील तुमची दोघांचीही काळजी करत आहेत...साऊ ला तिथे ठेव व संधी शोधून तिथून निघ व ही जबाबदारी पार पाड...तुझ्या प्रत्येक हालचाली आमचे घार, गिधाडे मला देतच राहतील...निघा आई भवानी तुम्हास यश देवो...!

आणि बघता बघता ती शे दोनशे चिवट वीरांची ध्येयवेडी सेना सूर्यराव चा खात्मा करायला निघून गेली....!

साऊ आणि खंडोजी ने पण शस्त्रे कमरेला अडकवली,खंडोजी ने ती गूढ वही मस्तकाला लावून नमस्कार केला व हरणाच्या कातडी अवलानात गुंडाळून पाठीवर बांधली व ते चंद्रगड चा निरोप घेऊन जंगलमार्गे यशवंतमाची कडे जाऊ लागले....!

चालत चालत बरेच जंगल पार करत ते खूप आत गेले होते.
सावीत्री खंडोजी ला बोलली......बहिर्जी नाईक ?
बहिर्जी नाईक कोण आहेत....बाजींद सारखा महायोद्धा ज्या माणसाची इतकी स्तुती व विश्वास ठेवतोय तो माणूस कोण आहे खंडोजीराव...?

खंडोजी हसला व बोलला....व्यक्ती ???
बहिर्जी नाईक व्यक्ती नाही...हात पाय तोंड आहे म्हणून त्यांना व्यक्ती म्हणता येईल...नाहीतर ते ना माणसात मोडले जातात ना जनावरांत....हिंदवी स्वराज्य पूर्णत्वास जावे म्हणून राजश्री शिवाजीराजे यांच्या सोबतीला ईश्वराने जणू आपला दूतच पाठवला असावा ....जसे हनुमंताविना रामायण अपूर्ण.....श्रीकृष्णाशिवाय महाभारत अधुरे.....अगदी तसेच बहिर्जी नाईक यांच्याशिवाय शिवभारत अपुरे होय....!

बहिर्जींचे वर्णन करताना खंडोजीच्या अंगावर काटे उभे राहिले होते तर डोळ्यात अश्रू....जड शब्दाने तो बोलू लागला...

साऊ...त्या महान अवलीयाने सारे जीवन शिवाजी नावाच्या देवावरुन अक्षरश ओवाळून टाकले ग....स्वतःचे आयुष्य काय जगलेच नाहीत ते.....आयुष्य सारे हिंदवी स्वराज्यासाठी वेचले.....माझ्यासारख्या शेकडो पैल्वानाच्यात देशभक्ती निर्माण करुन शिवाजी महाराजांच्या पवित्र कार्यात आणून आयुष्याचे सोनं केलं..!

बस्स...आता जगायचं तर शिवाजी राजांच्या कामासाठी...याच कामासाठी मरण जरी आलं तरी हसत स्वीकारायचं...आणि जर पुनर्जन्म खरा असेल तर याच शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या कामासाठी मला पुन्हा पुन्हा जन्म मिळूदे अशी प्रार्थना आई भवानीला करेन...!

खंडोजी चे बोलणे साऊ शांतपणे ऐकत होती आणि तिचेही डोळे भरून आले.
ज्या बाजींद च्या कथा ऐकून रायगड पंचक्रोशी 100 वर्ष भीतीने गांगरून जायची असा बाजींद स्वतःच्या आयुष्याची ठेव एका अनोळखी माणसाच्या हाती देतोय कारण तो शिवाजीराजांचा माणूस आहे.....बहिर्जी नाईक सारखा माणूस स्वतःचा जीव ओवाळून टाकतो त्या स्वराज्यावर...हा खंडोजी जन्मोजन्मी सुख न मागता शिवाजीची चाकरी मिळू दे म्हणतोय...तिचेही डोळे पाणावले...तिला समजून चुकले की शिवाजी महाराज व त्यांचे कार्य किती थोर आहे ते....आबासाहेब पोकळ स्वार्थाला कवटाळून महाराजांशी वैर घेत आहेत याचीही जाणीव तिला झाली होती...तिला हुंदका आवरत नव्हता....!

तिने खंडोजी ला आश्वासन दिले की मी स्वता वडिलांना सांगेन की महाराजांचे कार्य किती उदात्त व पवित्र आहे ते...मी काही करुन त्यांना शिवाजी म्हाराजांच्या कार्यात सामील करीन....तिने तसा दृढ निश्चयच केला होता...!

यशवंतमाची....!

खंडू व साऊ गेल्यापासून सारी यशवंतमाची काळजीत होती.
सूर्यराव बेरडाच्या हल्ल्याने साऊ मरता मरता वाचली,जर खंडोजी नसता तर आज शिरक्याची अब्रू संपली असती. सारे जंगल शोधून काढूनही ते दोघे सापडत नव्हते,राजे येसजीराव चिंतेत होते दरम्यान एका शिलेदाराने वर्दी दिली....राजे बाईसाहेब आणि खंडू राजवाड्यात आले आहेत....!

· ●●क्रमश ●●●
बाजींद

भाग क्र.२२
~~~~~~~~~~~~~~~~~~
राजे येसाजीरावांच्या पत्नीला रखमाई बाईसाहेबाना सावीत्री येत आहे हे ऐकून आनंदाला पारावर राहिला नव्हता. तिने वाड्यातील बायका एकत्र करुन पंचारती घेऊन खंडू आणि साऊ ला ओवाळून वाड्यात घेण्यासाठी घाई केली. राजे येसाजीराव निहायत खुश होते.
शिरक्याची अब्रू सहीसलामत परत येत होती,आणि तो घेऊन येणारा खंडू आपल्या पदरी असलेला पैलवान आहे ही भावना त्याला मनस्वी आनंद देत होती..!

अनेक जखमा घेऊन व गेली कित्येक दिवसांची दगदग त्यासोबत बाजींद सारख्या आख्यायिकेतून प्रसिद्ध असलेल्या मात्र आजवर कोणी न पाहिलेल्या अवलीयाला भेटून ,त्यांचे रहस्य ऐकून सोबत त्याच्या शंभर वर्षाच्या तपस्येचा ठेवा सोबत घेऊन आपण आलो आहोत याच्या जाणिवेने सावीत्री व खंडोजी मनात एक जबाबदारीच्या भावनेत होते..जखमा व दगदग याची चिंता उरली नव्हती..!
मोठ्या आनंदात ते यशवंतमाचीत प्रवेशले..!

शिंगे तुतारीच्या निनादात आणि यशवंतमाचीच्या हजारो लोकांच्या साक्षीने सावीत्री आणि खंडोजी वाड्यात आले.
~~~~~~~~~~~~~~~~~~

येसजीरावांच्या पत्नी व सावित्रीची आई रखमाबाईसाहेबानी दोघांना ओवाळून वाड्यात घेतले.
राजे येसजीरावांनी खंडोजी ला आनंदाने मिठीच मारली..जड शब्दात ते बोलले...खंडू आज शिरक्याची अब्रू,इज्जत केवळ तुझ्यामुळे सहीसलामत आम्ही पाहत आहोत..तुझे उपकार शिर्के कधीही विसरणार नाहीत..!
त्यांचे जोडलेले हात हातात धरत खंडोजी उद्गारला..."राजे...हे तर माझे कर्तव्य होते,तुम्ही सांगाल ते काम मी मोठ्या आनंदाने करेन"
खंडोजी चे बोलणे ऐकून राजे येसजींनी त्याला पुन्हा मिठी मारली..!
त्याच्या अंगावरच्या जखमा पाहून त्यानी त्वरित वैद्यांना बोलावून आणले...!
वैद्यांनी जखमा पाहिल्या आणि शिरक्यांच्या वाड्याच्या मागे असलेल्या विहिरीत वर्षानुवर्षे ओतून जुने घट्ट बनवलेले तूप आणून त्याच्या जखमाना लावले...कित्येक दिवसांच्या वेदना शांत होताना पाहून खंडोजी दीर्घ श्वास घेत झोपी गेला....!
सावित्रीची तिच्या क्कक्षात पहुडली आणि गेली कित्येक दिवसांची चित्तथरारक घडत गेलेल्या गोष्टी आठवण्याचा प्रयत्न करु लागली....बेरडाच्या जीवघेण्या हल्ल्यात जीवाची बाजी लावून तिला वाचवणारा खंडोजी तिला वारंवार आठवत होता...ती दरीतून मारलेली उडी...भिल्लांचा हल्ला...बाजींद चे जंगल...खंडोजी ची बहाद्दुरी आणि ज्या प्राणप्रिय ध्येयासाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता तो यशवंतमाचीत पैलवान म्हणून आला,त्याचे ते काम सावित्रीला मनोमन आवडले होते..!
गेली कित्येक दिवस खंडोजी सहवासाची जणूकाही सवय तिला लागली होती...ती त्या रम्य आठवणीत झोपी गेली...!

खंडोजी यशवंतमाचीत आला आहे ही बातमी वाऱ्याच्या वेगाने वस्ताद काकांच्या कानावर गेली.
बहिर्जीच्या परवानगी शिवाय खंडोजी ने सावीत्री ला वाचवण्यासाठी सूर्यराव बेरडाचे जे वैर घेतले होते ते बहिर्जीच्या कानावर गेले होते.
खंडोजी ला गिरफ्तार करण्याचे आदेश वस्ताद काका व त्यांच्या तुकडीला मिळाले होते.
पण,खंडोजी सोबत आजवर शेकडो मोहिमा केलेल्या वस्ताद काकांचा खंडोजीवर जीव होता,कसेही करुन खंडोजी ला यशवंतमाचीच्या फौजेला पांगवून हिंदवी स्वराज्याचा भगवा झेंडा यशवंतमाचीवर फडकवायला जर आपण भाग पाडले, तर मात्र बहिर्जींचा राग शांत होईल असे त्यांना वाटत होते...त्यांनी त्वरित खंडोजीला भेटण्यासाठी राजे येसजीरावांच्या वाड्यातील तालमीत निघाले..!

तिकडे सूर्यराव बेरडाँच्या हेजीबाने बाजींद च्या जंगलात ऐकलेली बित्तबातमी खडानखडा सूर्यराव च्या कानी घातली.
हेजीबाने सांगितलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवावा कसा हा प्रश्न सूर्यराव ला पडला !!
ठेवावा तर जे काही त्याने सांगितले ते वस्तुस्थितीला मान्य नव्हते आणि न ठेवावा तर जीवावर खेळून ही माहिती काढलेला हेजीब खोट बोलणार नव्हता...द्विधा मनस्थितीत सूर्यराव पुढच्या योजना डोक्यात आखत होता.

पण,त्याच्या डोक्यातून कृती होण्याआधीच ते डोके धडावेगळे करण्याच्या दृढ निश्चयाने "बाजींद" व त्याची चिवट फौज वायू वेगाने सूर्यराव च्या फौजेवर छापा घालण्याचा तयारीत होती.

पहाटेच्या मंद वाऱ्याची झुळूक खंडोजीच्या सर्वांगाला स्पर्श करुन गेली,गाढ झोपेतून तो उठला..!
सावित्रीच्या अनामिक ओढीने त्याला अस्वस्थ केले होते.

कित्येक संकटे सावित्रीच्या साक्षीने त्याने पार केली होती..अंगावरच्या जखमांच्या वेदना कमी झाल्या होत्या,तो तसाच उठला आणि तालमीतून बाहेर जाऊ लागला..तालमीचा दरवाजा उघडला आणि बाहेर वाड्याकडे पाहिले..!
सावित्रीला भेटलोच नाही कालपासून...त्याचे मन त्याच्याशीच बोलू लागले...चंद्रचांदण्यांचा प्रकाश आणि पहाटेचा मंदवारा....दूरवर पाहरेकर्याचा आरोळीचा बारीक आवाज आणि उरात सवित्रीबद्धलची घालमेल....खन्डोजी निश्चय करुन वाड्यात शिरला....सांधीसपाटीत बोटे घालून त्याने वाड्याची दगडी भिंत चढली आणि सावित्रीच्या कक्षाजवळ प्रवेश मिळवला..!
समोरुन दरवाजा बंद होता म्हणून पाठीमागून तो जेमतेम एक पाऊल बसेल इतक्या निमुळत्या जागेतून चालत सावित्रीच्या कक्षाजवळ असलेल्या खिडकीत गेला आणि खिडकीतून आत झेपावला..!

समईच्या सोनेरी प्रकाशात सारे दालन उजळून गेले होते,कक्षाच्या मध्यावर असलेल्या भव्य मंचकावर सावीत्री पहुडली होती..!

तिला पाहताच खंडोजीच्या ह्रदयाचा आवेग पुन्हा वाढला...!
तो धाडस करुन मंचकाजवळ जाणार इतक्यात सावीत्री ला कोणीतरी असल्याची जाणीव झाली आणि तिने उशाला ठेवलेला जंबिया उचलून...सावध पवित्रा घेतला आणि ओरडली..कोण आहे...?

समईच्या मंद प्रकाशात खंडोजी चा तो धिप्पाड देह तिला दिसला..!
ज्याच्या आठवणीने रात्रभर ती अस्वस्थ होती तो समोर उभा पाहून तिच्या हातातील खंजीर गळून पडले..!
बेभान होऊन तिने खंडोजीला मिठी मारली..!
खंडोजीनेही तिच्या मिठीने होणाऱ्या जखमेच्या वेदना सहन करत तिला बाहुपाशात घेतली..!
त्या वेदनेत सुद्धा मोठा आनंद होता...!

पहाटेचा मंद वारा खिडकीतून आत आला आणि समई विझली..!

पहाटेच्या रम्य वातावरणात..चंद्राच्या शीतल प्रकाशात..अंधाऱ्या खोलीत ते दोन जीव एक झाले होते...!
ना भूतकाळाची काळजी ना भविष्याची चिंता...अश्या मिठीत काळाचे भान उरत नसते..ती एक समाधी अवस्था होऊन जाते...!
अनेक योगातून असाध्य असणारी ही अवस्था केवळ प्रेमयोगातच समजते..!
केवळ आनंद...केवळ आनंद....!
त्या मिठीत स्वर्गाचे सुखही अपुरे पडावे..!

सारी यशवंतमाची पहाटेच्या वेळी गाढ निद्रा घेत होती आणि हे दोन शरीरे जणू एक जीव झाले होते...!

त्या रेशमी आठवणी डोळ्यातून अश्रुवाटे घळाघळा वाहत होत्या आणि सावीत्री आपला भूतकाळ त्या चौघांसमोर कथन करत होती...!

क्रमश
~~~~~~~~~~~~~~~~~~

बाजींद
भाग क्र.२३
~~~~~~~~~~~~~~~~~~

~~~~~~~~~~~~~~~~~~~~
सखाराम व त्याचे सवंगडी सर्वांगाचे कान करुन सावित्रीच्या तोंडून तीचा भूतकाळ ऐकत होते.
सावीत्री भरल्या नेत्रांनी तिच्या भूतकाळात रममाण झाली होती..!

"बाईसाहेब....पुढे काय झाले ?"

धाडस करुन मल्हारीने सावित्रीला प्रश्न केला.

पुढे..?
डोळ्यात आलेले अश्रू पुसत सावीत्री बोलली..!

"दैव अशी विचित्र परीक्षा का घेतो देव जाणे... जेव्हा असे वाटते की आयुष्यात सर्व संपले तेव्हा नवीन अध्याय समोर मांडते,तर जेव्हा वाटते की आता काही नको...अगदी त्याचवेळी नियतीची वाईट चपराक बसते.."

खंडोजी च्या मिठीत मी जग विसरले होते , सकाळच्या कोवळ्या सूर्यकिरणांनी पहाटेचे शीतल चांदणे विरुन गेले,रायगड च्या बाजूने आलेल्या गार वाऱ्याने आम्हीं दोघेही भानावर आलो...

खंडोजी म्हणाला....साऊ..आता तुझा विरह सहन करणे मला अशक्य आहे...!
मी आजच बहिर्जी नाईकांच्या खासगीत वर्दी धाडून त्यांची भेट घ्यायला निघतो...बाजींद ची बहुमूल्य जबाबदारी त्यांच्या हाती सुपूर्द करुन मला तुला कायमचे घेऊन जायचे आहे...

खंडोजीची मिठी सैल करत साऊ बोलली....ठीक आहे...मलाही तुमच्याशिवाय जगणे आता मुश्किल आहे..मी पण आजच आबासाहेबांची समजूत काढते..घडलेले सर्व कथन करते..शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याच्या पवित्र कामात आता शिरक्याची तलवार चालावी...मी नक्कीच आबांना समजून सांगेन..."

सावित्रीचे दोन्ही खांदे घट्ट पकडून खंडोजी बोलला...

साऊ.. असे जर घडले तर माझ्यावर नाईकांनी सोपवलेली कामगिरी फत्ते होईल...रक्ताचा थेंब न सांडता यशवंतमाची स्वराज्यात आली,तर तू आणि मी जन्मोजन्मी एकत्र राहू ही शपथ मी तुला देतो...मी त्वरित खेडेबाऱ्याकडे रवाना होतो..."

सवित्रीचा निरोप घेऊन घाईने खंडोजी तालमीकडे जाऊ लागला.."

दरम्यान,हत्यारबंद शिबंदी जंगलमार्गत पेरुन खंडोजी सोबत शेवटची वाटाघाटी करायच्या उद्देशाने वस्ताद काका रात्रीच यशवंतमाची च्या हद्दीत आले होते.

खंडोजी तालमीत आला व लपवून ठेवलेली ती गुढ वही घेतली,कमरेला तलवार,पाठीला ढाल अडकवली..ढालीच्या आत ती वही लपवली आणि क्षणभर जगदंबेचे समरण केले...आता पुढचे काही तास त्याच्यासाठी खूप महत्वाचे होते..!
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

तिकडे सूर्यराव बेरडाने यशवंतमाची वर निकराचा हल्ला चढवायचे नियोजन केले,आजवर च्या अपमानाचा बदला राजे येसजीरावांच्या रक्ताने धुतला जाईल असे त्याने मनोमन योजले.
यशवंतमाची व बाजींद ची ती गूढ ठेव दोघांचीही तहान त्याला लागली होती..ही तहान आता केवळ शिरक्यांच्या रक्ताने शमणार होती..!

पण,सूर्यराव चे मनसुबे धुळीस मिळवण्यास बाजींद ची चिवट फौज वाऱ्याच्या वेगाने जंगलात घुसली होती...घुसली नव्हे आलीच....!

हर हर महादेव च्या गर्जनेने जंगल दुमदुमून गेले..यशवंतमाचीकडे रोखलेले सूर्यराव चे भाले मागे वळाले....तुफानी युद्धास प्रारंभ झाला...!

हल्ला कोणी केला,का केला विचार करायला सूर्यराव ला सवडच मिळाली नाही...त्याने बाजींद च्या फौजीशी निकराची लढत द्यायला सुरवात केलली.
बाजींद च्या येण्याने जंगलातील सर्व प्राणी कमालीचे बिथरले होते..त्यांच्या गोंगाटाने आसमंत दुमदुमून गेला होता...समोरुन अनोळख्या शत्रूचा हल्ला व जंगलातील प्राण्यांनी,पक्ष्यांची,कीटकानी चालवलेला गोंगाट याने सूर्यराव ची फौज भेदरून गेली व वाट दिसेल तिकडे धावू लागले...सूर्यराव सर्वांना ओरडून थांबायचे आदेश देत होता,पण भीतीने गंगारलेली त्याची सेना काही ऐकून घ्यायच्या मनस्थितीत नव्हती..!

इकडे खंडोजी तालमीतून बाहेर पडणार इतक्यात वस्ताद काकानी तालमीचे दार उघडले...!

काकांना पाहताच खंडोजी आनंदाने बेभान झाला..त्याने वेगाने जाऊन काकांच्या चरणांना स्पर्श केला ..काकांनी त्याला उठवत मिठी मारली..!

खंडू....कसा आहेस तू ?
आणि काय करुन बसला आहेस तू ?
आपण यशवंतमाची ची रसद पांगवून यशवंतमाची स्वराज्यात आणण्यासाठी येथे आलो होतो...पण तू,शिरक्यांच्या मुलीसाठी खुद्द बहिर्जी नाईकांचा आदेश डावललास ?
मी ज्या खंडू ला ओळखतो,तो नक्कीच तू नव्हेस..."

शांतपणे ऐकून घेत खंडोजी बोलला...वस्ताद काका मला माफ करा...मला माझे कर्तव्य पूर्ण माहिती आहे..पण..पण सावित्रीच्या प्रेमात मी आकंठ बुडालो आहे...मला कर्तव्य बजावू दे...मी सवित्रीशी लग्न करणार आहे..!

घडलेला सर्व वृत्तांत खंडेराय ने वस्ताद काकांना सांगितला...बाजींद ची गूढ वही ..सर्व काही त्याने वस्ताद काकांना कथन केले...खंडेराय चा वस्ताद काकांच्यावर खूप विश्वास होता...तो बोलला
मला त्वरित खेडेबऱ्याला पोहोच करा काका..माझी आणि नाईकांची भेट झाली पाहिजे लौकर...साऊ पण त्यांच्या वडिलांना सर्व समजून सांगून यशवंतमाची स्वराज्यात सामील करण्यास भाग पाडणार आहे...चला काका..सूर्यराव बेरडाचा निकराचा छापा कधीही यशवंतमाची वर पडणार आहे अशी खबर आहे..!

दीर्घ श्वास सोडत काका बोलले....खंडू...अरे केवळ मनपरिवर्तन करुन जर यशवंतमाची स्वराज्यात येणार असती,तर नाईकांना ही जीवघेणी कामगिरी तुझ्यावर का सोपवलिह असती...?

काही गोष्टी शब्दांनी नव्हे तर तलवारीने सुटत असतात...!
बाजींद च्या गूढ कथा आजवर मी ऐकून होतो,पण तू केलेल्या उलघड्यावरून मला तुझ्यावर कसा विश्वास ठेवावा हा प्रश्न पडला आहे..!

हे ऐकताच खंडोजीने कशाचाही विलंब न करता पाठीवर अडकवलेल्या ढालीतून ती गूढ वही काढून वस्ताद काकांच्या हाती ठेवली...काका..मी आजवर तुमच्याशी कधीही खोटे बोललो नाही..हे बघा हा पुरावा..!

त्या वहीचे अवलोकन करत वस्ताद काका कमालीचे गंभीर झाले..त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखले...त्यांनी त्वरित खंडोजीला ती वही परत केली आणि बोलु लागले...

खंडोजी...खूप वेळ झाला तुझ्या येण्याला...काही क्षणात मराठ्यांची फौज यशवंतमाचीवर तुटून पडेल...तू इथे थांबू नकोस..तुला गिरफ्तार करायचे आदेश आहेत नाईकांचे....तू थांबू नकोस इथे....!

असे ऐकताच ज्वालामुखी भडकावा तसा खंडोजी भडकला...यशवंतमाचीची रसद न पांगवता जर हल्ला चढवायचा होता तर मला या कामगिरी वर का नियुक्त केले काका..?

मी सावित्रीला सांगून रक्ताचा थेंब न पडता माची स्वराज्यात आणणार होतो आणि नाईकांनी अशी आज्ञा दिलीच कशी...?

कशी दिली हे विचारायची पात्रता कोणाचीच नाही खंडोजी ..!

काका गर्जले....रक्त शिंपून उभे केलेले हे स्वराज्य असेतु हिमाचल असेच वाढावे यासाठी नाईकांनी सर्वस्वाची होळी केली आहे हे तू जाणतोस...आजवरच्या तुझ्या कामगिरीवरून तुला यशवंतमाचीची कामगिरी दिली...पण,मराठेशाहीचा शिरस्ता माहिती असूनदेखील तू स्त्री मोहात पडून कायदे मोडलेस ते कोणाला विचारून..?

ठीक आहे,तुझ्यासोबत जे घडले ते गूढ व विलक्षण आहे खंडेराय..पण..पण आता तू जर इथे मराठ्यांच्या हाती लागलास तर तुला गिरफ्तार केले जाईल...माझे एक...नाईकांचा निर्णय देव सुद्धा बदलत नाही..तिथे मी कोण आहे...वातावरण शांत होईपर्यंत तू बाहेर रहा..योग्य वेळ आल्यावर मी मध्यस्ती करीन...मग हा अनमोल ठेवा स्वराज्याच्या कामी येईल यासाठी प्रयत्न करु...!

मी निघतो आता....मला इशारत करुन फौजेला सांगावा धाडला पाहिजे....तू निघ इथून...उतरतीच्या डोंगरावर गुहेत रहा...तिथे मी येऊन भेटेन....!

असे बोलून वस्ताद काका निघून गेले होते..!

खंडोजी च्या मनात विचारांचे महावादळ सुरु झाले होते...!

इकडे सावित्रीने घडलेला सर्व वृत्तांत येसजीरावांच्या कानी घातला..व शिवाजी महाराजांना सामील होण्यासाठी कळकळून सांगितले...!

येसजीरावांच्या मनात बाजींद ची कथा ऐकून मोठी खळबळ सुरु झाली होती...!
त्याचे मन म्हणू लागले की किती वेळ महाराजांशी वैर धरायचे...सारा मुलुख शिवाजीराजांचा पोवाडा गातोय..आपणही सामील व्हावे....त्यांचे मन पालटू लागले.....पण,इतक्यात...

एक निशाणबारदार धावत आला....बोलू लागला...

राजे घात झाला...भगव्या झेंड्याच्या निशानाचची फौज यशवंतमाची वर तुटून पडली आहे...वेशीच्या रक्षकांची कत्तल उडवत ते आत घुसत आहेत...मराठ्यांचा छापा पडला आहे....

काही वेळापूर्वीच मराठ्यांना सामील होण्याचे स्वप्ने पाहणारे राजे सवित्रीवर ओरडले...पाहिलेंस...आणि तू त्यांना जाऊन मिळायला सांगत होतीस मला ?....आता मारु किंवा मरु... तू वाड्या बाहेर पडू नकोस....

असे बोलून राजे बाहेर पडले...युद्ध डँका वाजू लागला...शिरक्यांचा सेना सागर जमा झाला....

आता युद्ध....आता मोठमोठे अलंकारिक शब्द मौन राहतील...आता तलवारी बोलतील...तलवारीच चालतील...राजे येसजीरावांच्नी युद्धाचा पोषाख चढवून घोड्यावर स्वार झाले..पाठोपाठ शिरक्याची चिवट फौज....

क्रमश
~~~~~~~~~~~~~~~~~~
बाजींद
भाग क्र.२४
~~~~~~~~~~~~~~~~~~~
दरम्यान मराठ्यांनी यशवंतमाची च्या पूर्वेकडून हल्ला चढवत पूर्व वेस कब्जात घेतली.
मराठ्यांच्या त्या निकराचा लढ्यात अग्रभागी स्वता वस्ताद काका नेतृत्व करत होते.
छत्रपती शिवाजी महाराज की जय, हर हर महादेव च्या घोषणांनी रायगड चे खोरे दुमदुमून गेले होते.
भगव्या जरी पटक्यांचे निशाण हिंदोळे घेत शिरक्यांच्या काळजात घुसत होते.
राजे येसजीरावांनी घोडदळाला आज्ञा केली व ते सुद्धा काळभैरवाच्या नावानं चांगभल आरोळी देत मराठ्यांच्या फौजेवर तुटून पडले.
तलवारीच्या खणखणाटाने यशवंतमाची हादरुन गेली होती.
कमजोर योद्धे गतप्राण होत होते,वीरांचे तांडव सुरु होते...!
इतक्यात मराठ्यांचा एक जंबियाचा गोळा फिरवणाऱ्या बहाद्दराने राजे येसजीरावांच्या रोखाने गोळा भिरकावला...!
सुदर्शन फिरावे तसा तो गोळा सुसाट वेगाने राजे येसजीरावांच्या छातीवर येऊन आदळला..!
घाव वर्मी बसल्याने ,प्रचंड तडाख्याने राजे येसजीराव घोड्यावरून खाली पडले..!
शिरक्याची फौज ते चित्र पाहून भयभीत झाली...!
घोडदळ मागे फिरू लागले.
हे पाहताच मराठ्यांच्या फौजेला अवसान शिरले...तुफान कत्तल करत ते पुढे सरकू लागले.
घोड्यावरून पडलेल्या येसजीरावांना काही अंगरक्षकांनी उचलून सावध केले.

ते शुद्धीवर आले,पण समोर शिरक्याची पीछेहाट पाहताच ते जखमी अवस्थेत पुन्हा घोड्यावर स्वार झाले. पण,गोळ्याच्या प्रहाराने त्यांना शुद्ध टिकवणे कठीण होते...!
मराठ्यांनी जवळपास शिरक्यांच्या फौजेला कोंडीत आणले होते...आजवर अजिंक्य असलेली यशवंतमाची आज मराठे जिंकणार अशी लक्षणे दिसू लागली ..!

दूरवर यशवंतमाची च्या राजे येसजीरावांच्या वाड्यावरून "साऊ" हे सारे पाहत होती इतक्यात वाड्याच्या मागे असलेल्या तालमीतून "काळ भैरवाच्या नावाने चांगभल" च्या आरोळ्या उठल्या...राजे येसजीरावांच्या पदरी असलेले निष्ठावान शे दोनशे पैलवान युद्ध पोषाख घालून दौडत युद्धभूमीकडे धावत होते...त्यांचा म्होरक्या होता एक धिप्पाड पैलवान....दुरुनच साऊ ने त्या म्होरक्याला ओळखले होते...!

"भीमा जाधव"

खंडेराय ने यशवंतमाची च्या यात्रेत चित करुन सपशेल पराभव केलेला राजे येसजीरावांच्या खासगीतला मल्ल. पराभवाचे उट्टे मातृभूमीचे रक्षण करुन काढण्याच्या मनसुब्याने त्वेषाने बाहेर पडला होता..!
ते शे दोनशे पैलवानांचे टोळके हातात तलवारी भाले घेऊन मराठ्यांच्या हल्ल्याचा प्रतिकार करावयास दौडू लागले...!

मजल दरमजल करत धुळीचे लोट उडवत त्या पैलवानांची पहिलीच टक्कर निकराची दिली.
पैलवानी घाव वाया जातच नव्हता..ज्यावर पडेल त्याची खांडोळी होत होती.
एक एक पैलवान 10-10 धारकरी कापू लागला.
घोड्यासकट योध्याना उचलून आपटू लागले.
जणू महाभारतात घटोत्कचाने जसा संहार पांडव सेनेचा मांडला होता तसाच संहार त्या शिरक्यांच्या नेकजात पैलवानांची मराठ्यांच्या सेनेविरुद्ध मांडला होता...!

आता थांबण्यात राम नव्हता...थांबलो तर जीव जाणार ..झाले...इशारतीची कर्णे वाजू लागली...विजयाची माळ गळ्यात पडता पडता भीमा ने ती हिसका मारुन आपल्या हाती घेतली होती.

पुढे पळणाऱ्या फौजेची त्रेधातिरपीट बघत राजे शिर्के व पैलवानांची फौज उभी होती....भीमा ने डोक्याला चढवलेले शिरस्त्राण उतरवले...आणि राजे येसजीरावांच्या समोर येऊन मुजरा केला...!
राजे निहायत खुश झाले...ते बोलले...."भीमा...अरे तू आज धावून आला नसतास तर शिरक्याची अब्रू,परंपरा सर्वकाही मोडीत निघाले असते..संपले असते सारे...असे म्हणत त्यांनी भीमाला मिठी मारली ,पण छातीवरील आघाताने त्याच्या मिठीतच मूर्च्छित येऊन पडले....सारे सैन्य राजे येसजीना घेऊन वाड्याकडे जाऊ लागले....
एक योद्धा मात्र जाणीवपूर्वक मागे उभा होता...त्याचे बलदंड बाहू घामाने डबडबले होते..हातातील नंगी समशेर रक्ताने निथळत होती....त्या रक्ताकडे पाहत त्या वीरांच्या डोळ्यात अश्रू तरळले होते....त्याने डोक्याला घातलेले शिरस्त्राण काढले व एकवार भरल्या नेत्रांनी त्या पळणाऱ्या सेनेला पाहू लागला....आणि पुन्हा यशवंतमाची कडे वळला...........

ओळखले....ओळखले.....

जँगलाट उंच झाडावर हिरव्या पाल्याची झालर अडकवून हेरगिरी करणाऱ्या शिवछत्रपतीच्या निशाणबारदार हेजीबाने ओळखले...तो वीर कोण आहे ते.....

खंडेराय.....!

होय...खंडेराय सरदेसाई...!
ज्यांनी बहिर्जींच्या खांद्याला खांदा लावून अनेक युद्धात महाराजांना यश मिळवून दिले होते....तो स्वराज्याचा गुप्तहेर...बहिर्जींचा उजवा हात...स्वराज्याशी फितूर झाला आहे...आपल्याच बांधवांची कत्तल उडवून तो अजूनही यशवंतमाचीत आहे...!

विजेच्या वेगाने ही खबर दस्तुरखुद्द बहिर्जी नाईकांच्या कानी पोचली ...!

कानात उकळते तेल ओतल्यासारखे झाले..!

डोळ्यात पश्चाताप उतरला होता...!
रायगड परिसरात एका गुप्त ठिकाणी हजारो मावळ्यांच्या पुढे बहिर्जी बसले होते आणि हेजीब खंडेरायाच्या कत्तलीचे वर्णन करत होता...!

समोर वस्ताद काका मान खाली घालून सर्व ऐकत होते...!

वा काका...चांगले शिक्षण दिले तुम्ही तुमच्या पठ्ठयाला...!
बहिर्जी नाईक ओरडले...सारी सेना भीतीने कापू लागली...बहिर्जींचा राग काय आहे सर्वांना ठाऊक होते...!

आजवर शेकडो जीवघेण्या मोहिमा करुन मेलेली माझी नजर खंड्या सारख्या फितुराला कशी ओळखू शकली नाही याचा मला पश्चात्ताप होतोय....

उद्याचा दिवस मावळ्याच्या आत स्वराज्याचा गद्दार आणि दिमाखाने महाराजांशी वैर करणारी यशवंतमाची जर स्वराज्यात आली नाही...तर तुमच्यापैकी एकाने सुद्धा मराठेशाहीचे नाव घेऊ नका..!
खंडू च्या जीवावर मोठ्या विश्वासाने माझी जीभ लवलवली होती की यशवंतमाची एका महिन्यात स्वराज्यात येईल म्हणून...आज महिना होत आला तर पदरात काय पडले ?
अपयश ....? कत्तल....? गद्दारी...?

मी जातीने उद्या माचीवर हल्ला चढवणार....

इतक्यात समोर उभे असलेले वस्ताद काका धावत समोर आले....

त्यांनी बहिर्जींच्या पायाला मिठी मारली...ते बोलले...नाईक...आम्ही जिवंत असताना तुम्ही मोहिमेवर जाणार..?
मराठेशाही शेण घालेल तोंडात...महाराज कधीही माफ करणार नाहीत...!
आजवरची माझी नोकरी रुजू धरावी आणि मला अखेरची संधी द्यावी...!
शिकस्त करुन माची स्वराज्यात घेऊन नाहीतर...हे तोंड परत कधीही तुम्हाला दाखवणार नाही नाईक....."

वस्ताद काकांच्या डोळ्यातील आग पाहून नाईकांना त्यांना उठवले...

ते बोलू लागले....काका माफ करा मला मी जहाल बोलतो.
पण,आज मराठ्यांचा धाक अवघ्या पातशाहीला आहे कारण महाराज दिलेला शब्द पाळतात.
जर शब्द पाळू शकत नसेल तर तो मराठा नव्हे....!
उद्या सायंकाळ पर्यंत वाट बघू....

नाहीतर...शिरक्याची शिबंदी पांगु अथवा न पांगु...आपल्या तलवारी यशवंतमाची वर वळल्या पाहिजेत..ज्याचे नेतृत्व मी स्वता करणार....जय भवानी...!

कराकरा पावले टाकत नाईक निघून गेले..!

इकडे यशवंतमाचीवर आनंदी आनंद होता...!
भीमा जाधव माचीचा खरा नायक ठरला होता...!

राजे येसजीरावांना शुद्ध आली होती,त्यांनी भीमा ला बोलावून घेतले होते..!
सारा दरबार भीमावर कौतुकाचा वर्षाव करत होता.

राजे बोलले.....भीमा...आज तुझ्या पराक्रमामुळे यशवंतमाची ची अब्रू वाचली.
बोल..डोंगरा एवढे उपकार आहेत तुझे माझ्यावर....काय देऊ तुला...?

धीरगंभीर मात्र मुत्सद्दी मुद्रेत उभा असणारा भिमा शांत उभा होता.

राजे मोठ्या आवाजात गर्जले..आजपासून मी शिरक्यांच्या सेनेचे सेनापती पद भीमाला बहाल करत आहे...!

हे ऐकताच सारी यशवंतमाची भिमावर फुले टाकू लागली...

बोल भीमा अजून काय हवे तुला....

भीमा शांतपणे पुढे आला....
राजे येसजीरावांना मुजरा केला व बोलू लागला...."

राजे जेव्हापासून तारुण्यात पदार्पण करुन प्रेम म्हणजे काय समजले आहे...माझ्या मनात,बुद्धीत श्वासात एकच मुलगी आहे...सावीत्री....राजे मला जर काही द्यायचेच असेल तर साऊ चा हात द्या...माझ्या प्रणापेक्षा जास्त मी तीला जपीन.....

हे ऐकताच वरच्या मजल्यावर स्रीयांच्यात उभी असलेल्या सावित्रीच्या हृदयाचे ठोके वाढले....डोळ्यात आग उतरली...ती बेभान होऊन भिमाकडे पाहू लागली...व दुसऱ्या क्षणात निघून गेली.....

राजे येसजीरावांना भीमाला काय उत्तर द्यावे समजेना....!

ते बोलले...भीमा..मी स्वता जातीने साऊ बरोबर चर्चा करुन उद्या तुला होकार-नकार सांगीन... तुझ्या सारख्या वीरांच्या हाती माझी मुलगी देणे मी भाग्याचे समजतो....असे म्हणताच सारा दरबार टाळ्या वाजवू लागला....जनतेचा कौल भीमाच्या बाजूने होता...!

दरबार बरखास्त झाला आणि भीमा तालमीत आला....पाठमोऱ्या अवस्थेत उभा असणाऱ्या खंडेरायाला मिठी मारुन भीमा बोलू लागला....खंडोजी...आज केवळ तुमच्या मुळे या भीमाचे स्वप्न पूर्ण होत आहे.
माझी गेलेली इज्जत तुम्हीच मला परत मिळवून दिली...कसे आभार मानू तुझे मला समजेना....!

हे ऐकताच खंडोजीला युद्धाच्या वेळेचा प्रसंग समोर दिसू लागला...

वस्ताद काका घाईने निघून गेले आणि यशवंतमाची ची पूर्व वेस मराठ्यांनी जिंकली होती..!
मराठ्यांची शुरता फक्त खंडोजीलाच माहिती होती....पण काही करुन ही गूढ वही सुरक्षित रहावी म्हणून त्याने यशवंतमाची बाहेरच्या डोंगरातील गुप्त गुहेत ती लपवली आणि पुन्हा यशवंतमाची त आला तर राजे येसजीराव जखमी असून यशवंतमाची हारण्यात जमा होती...!

खंडोजी ने साऊ ला भेटायला थेट वाडा गाठला व वस्तुस्थिती सांगितली....

अश्रूंनी भरलेल्या नेत्रांनी साऊ बोलली....खंडोजीराव...मला माझे राज्य आणि वडिलांचा प्राण गमावून स्वतःचा संसार थाटायचा नाही...!
एकतर मला तुमच्या तलवारीने मारुन टाका...नाहीतर माझ्या वडिलांचे प्राण वाचवा....आणि हुंदका देत ती रडू लागली....तो पोलादी पुरुष साऊ च्या प्रेमाने विरघळला आणि तडक तालमीत आला व तालमीतल्या शे दोनशे पैलवानांना जागे केले व बोलू लागला....."

अरे मर्दांनो...ज्याच्या जीवावर आजवर दूध तूप खाऊन पैलवान झालात तो तुमचा धनी तिथे बेशुद्ध पडला आहे....ज्या मातीत कुस्ती खेळाला ती माती धोक्यात आहे....भीमा सारखा भीमकाय मल्ल इथे असताना राजे येसजीराव स्वता युद्ध खेळतात हे बरे नव्हे...चला उचला समशेर आणि गाजवा मर्दुमकीचे तडाखे....जिंकलात तर नाव होईल हारलात तर अमर व्हाल....भीमा तू स्वता नेतृत्व कर आमचे...

असे म्हणत ते शे दोनशे पैलवान चवताळून मराठ्यांच्या फौजेवर तुटून पडले...स्वता खंडेराय पण होता त्यात...ज्याच्या सोबत तलवार चालवायला शिकला तीच तलवार आपल्या बंधूंच्या पोटातून आरपार करताना त्याचे काळीज तुटत होते..पण सवित्रीचा विरह मात्र यापेक्षा जीवघेणा होता म्हणून तो अखे घोडे उचलून फेकू लागला होता......

भरल्या नेत्रांनी खंडेरायला सारे आठवत होते

·●●●●●●●●●●●●●
क्रमश

भाग क्र.२५
~~~~~~~~~~~~~~~~~~~~
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

एव्हाना दिवस उजाडला होता.
सकाळची कोवळी सूर्यकिरणे घनदाट धुक्याला जाळत वातावरणात उब निर्माण करत होती.

सुर्याची कोवळी सुर्यकिरणे सखाराम च्या मुखावर पडली आणि त्याला जाग आली.
सुर्यनारायणाच्या झिलमीत किरणात समोरच खंडोजी बसला होता.
जणु सुर्य त्राटक लावले आहे..त्याच्या डोळ्यातून घळाघळा अश्रु येत होते.

सखाराम दचकून जागा झाला व त्याच्या साथीदारांना जागे केले.

आसपास केवळ माळरान होते,ते जिथे झोपले होते तिथे केवळ सपाट खडक होता..!

सखाराम व त्याच्या साथीदारांना काहीच समजत नव्हते...रात्री सावीत्री समोर व शिरक्यांच्या छावणीत बसून खंडोजी व सवित्रीचा भुतकाळ ऐकत कधी डोळा लागला समजला नाही,आणि जाग आली या पठारावर..आणि समोर खंडोजी ला पाहुन तर त्याहून अधिक धक्का बसला...!

मोठ्या आवाजात सखाराम,सूर्याकडे पाहत बसलेल्या खंडोजीला बोलला.....

तुम्ही कधी उगवला खंडोजीराव ??

सखाराम च्या बोलण्याने भानावर आलेल्या खंडोजीने सावध होत आपले अश्रूंनी डबडबले डोळे पुसले व चौघांकडे पाहुन बोलू लागला...

"मी ?
हे काय तुम्ही उठायच्या अगोदर इथे येऊन बसलो होतो..."

आणि रात्री अचानक कुठे गायब होता तुम्ही ?
रात्री आम्ही राजे शिरक्यांच्या छावणीत होतो आणि आत्ता इथे कसे काय आलो..? सखाराम बोलला...!

अहो,रात्री हेरगिरी करावे लागते...मी शिवरायांचा निष्ठावान गुप्तहेर आहे...असतात न सांगण्यासारख्या कामगीरी...!
तुम्ही गाढ झोपेत होता आणि शिरक्याची छावणी इथून दूर गेली...मला भेटले ते सारे...फक्त तुमची झोपमोड करणे त्यांना ठीक वाटले नाही...!
सावीत्री व मी उद्या भेटणार आहे..त्या अगोदर तुम्हाला वस्ताद काकांच्याकडे घेऊन जातो...म्हणजे तुमचे काम मार्गी लागेल..व मी सवित्रीसह आमच्या मार्गाने जाऊ..."

खंडोजीच्या स्पष्टीकरनाणे मात्र सखाराम ची शन्का दूर झाली.
आसपास च्या परिसरात सुद्धा रात्रीच्या छावणीच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या त्यामुळे शंका दूर झाली...."

समोरच एका गाठोड्यात खाण्याचे पदार्थ पाहून सखाराम बोलला...

हे जेवण तुम्ही आणलं काय खंडोजीराव ?

नाही...हे सावित्रीने तुमच्यासाठी ठेवले आहे...दोन घास खाऊन घ्या...आपण पुढचा प्रवास करु..!

जेवनाकडे पाहताच चौघांचेही चेहरे खुलले..ते चौघेही भाकरीचा तुकडा मोडून खाऊ लागले...."

पोटात थोडी भर गेल्याने सखाराम व त्याचे सोबती तरतरीत झाले.

मल्हारी,सर्जा,नारायण व सखाराम चौघेही आनंदी होते.

खंडोजी बोलला...गड्यानो आज फक्त एक दिवस..आज मी तुम्हाला वस्ताद काकांच्या सुपूर्द करतो,तुम्ही उद्याच राजश्री शिवाजीराजांच्या खासगी विभागात पोचते व्हाल..तुमची समस्यां कायमची मिटली जाईल......फक्त रात्र होण्याच्या आधी आपल्याला त्या गुप्तवाटेने जंगलात केवळ मला व काकांना माहिती असलेल्या गुहेत पोहचायचे आहे....

खंडोजीच्या बोलण्याने चौघे अजून आनंदी झाली...!

ते पाचही जण चालू लागले....!

धाडस करुन सखाराम बोलला....

खंडोजीराव..रात्री सावीत्री बाईसाहेब बोलत होत्या तुम्ही शिवाजीराजांशी गद्दारी केली असे बहिर्जी नाईकांचे मत झाले होते....ती कथा ऐकता ऐकता झोप आली...तुम्हाला राग येणार नसेल तर ती कथा पुढे संगशीला का ??

एक दीर्घ श्वास घेऊन मल्हारी बोलला....

राग ..?
कसला राग गड्यानो...आता खन्डोजी च्या आयुष्यात मानवी रुसवे फुगवे उरलाच नाहीत...आता जगतोय ते केवळ उपकारासाठी...
"

असे बोलून खंडोजी त्याचा भविष्यकाळ पुन्हा कथन करु लागला....!

यशवंतमाची

राजे येसजीराव शिरक्यांच्या तालमीत रात्रभर विचारात मग्न असलेल्या खंडोजीला काहीच सुचत नव्हते....भीमाला लढायला आपण उद्युक्त करुन चूक केली असे त्याला वाटत होते...!
एकतर स्वराज्याशी हरामखोरी आणि सवित्रीचा विरह दोन्ही गोष्टी त्याला सतावत होत्या....!
डोळ्यात पश्चात्तापाचे अश्रू ओघळत होते..!

सूर्यराव बेरड आपल्या नेकजात इमानदार कडव्या फौजेला घेऊन यशवंतमाची शेजारच्या डोंगरदरीत लपला होता. त्यांच्यावर कोणी हल्ला चढवला याचे रहस्य मात्र त्याला उलगडत नव्हते.

इकडे बाजीन्द व त्याच्या फौजेला सूर्यराव ला शोधून मारल्याशिवाय चैन पडणार नव्हता...एकदा जर का "बाजींद" चे गूढ दुसऱ्या व्यक्तीला समजले तर मात्र 100 वर्षाच्या तपस्येची राखरांगोळी होणार हे मात्र नक्की होती.!

दुसरीकडे वस्ताद काका मात्र यशवंतमाची उद्याच्या उद्या स्वराज्यात आणण्यासाठी मावळ्यांच्या प्रमुख शिलेदारांची बैठक घेत होते....ते मोठ्या आवेशाने बोलू लागले....

गड्यानो,उद्या जर यशवंतमाचीवर भगवा नाही फडकला तर सारी मराठेशाही शेण घालेल तोंडात आपल्या....यशवंतमाचीवर हल्ला चढवायला आपली फौज अपुरी आहे,पण ज्यादा कुमक यायला खूप वेळ जाईल...त्यापेक्षा एक युद्धनीती वापरायची आहे.....

शत्रूचा शत्रू तो आपला मित्र...हाकेच्या अंतरावर सूर्यराव बेराडाँची फौज आहे.
त्यांचा पण यशवंतमाची बरोबर जुना बदला आहे,याचा फायदा उठवत त्यांना सोबत घेऊया...यशवंतमाचीच्या हद्दीत असल्याने जंगलवाटा त्यांना चांगल्याच ठाऊक आहेत...!

गड्यानो,तयारीला लागा....!

वस्ताद काकांचा आदेश मिळताच हजार एक मावळ्यांचे पथक क्षणात तयार झाले.
केवळ पायी हल्ला चढवायचा असल्याने पायीच यशवंतमाचीकडे कूच करावी लागणार होती.

वस्ताद काकांनी फौजेचे दोन भाग केले.
यशवंतमाचीच्या पाठीमागून अर्धी सेना जाऊन रात्रीच्या अंधारात दबा धरुन बसेल,इशारतीची खून मिळताच वाऱ्याच्या वेगाने यशवंतमाचीवर मागून हल्ला चढवायचा..उर्वरित सेना घेऊन सूर्यराव बेरडला गाठून मदतीची विनंती करुन समोरुन हल्ला करायचा..!

बस्स,अशी चोख योजना आखून पुढच्याच क्षणात सारी सेना वाटेला लागली..!
प्रत्येक मावळा शिस्तबद्ध होता.
शिस्त हा शिवरायांच्या फौजेचा आत्मा होता..!

दरम्यान,बाजींद च्या सेनेने प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही सूर्यराव सापडत नसल्याने,अर्ध्या धारकर्यांना चंद्रगड कडे जाण्याची आज्ञा केली व पाच पन्नास धारकरी सोबत ठेऊन त्याने सूर्यराव ला शोधून काढण्यासाठी आपल्याजवळ असलेल्या बाजींद च्या गूढ विद्येचा वापर करुन माकडे,घारी-गिधाडे,किड्या मुंग्यांना सांकेतिक आवाज काढून बोलावण्याचा निर्णय घेतला....

बाजींद ने एकाग्र ध्यान करुन आत्मसात केलेल्या गूढ ज्ञानाने सांकेतिक आवाज आसपासच्या वातावरणात सोडले..........
कीटक,मुंगी,घार, गिधाड यांच्या पर्यंत त्यांच्या भाषेत बोलून त्यांना आपले कार्य करायला लावणारे गूढ ज्ञान...खरोखर विलक्षण होते सर्वकाही...!

बघता बघता जंगलातील अणुरेणु शहारले आणि मुंग्यांनी,घार गिधाडांची गर्दी बाजींद च्या भोवताली जमली.....

एक विलक्षण हास्य त्याच्या चेहऱ्यावर दिसत होते...जणू सृष्टीचा एक अशक्य भाग त्याचे स्वामित्व त्याच्याकडे असावे असे एकप्रकारचे हास्य होते ते....

त्याने त्या गूढ व विचित्र आवाजात सभोवतालच्या प्राण्यांना संदेश देणे सुरु केले....

सूर्यराव बेरड कुठे लपला आहे...त्याच्याकडे किती लोक आहेत...त्याच्याकडे लौकर जाण्याचा मार्ग काय...त्यांना जिथे आहे तिथे थोपवण्यासाठी मुंग्यांनी हल्ला चढवाव.. आणि या बदल्यात सर्व प्राण्यांना ताज्या मांसाची मेजवानी मिळेल असेही त्याने सांगून टाकले....."

त्याच्या त्या आदेशाने सर्व प्राणी त्वरित कामाला लागले व मजल दरमजल करत त्या गुप्त जागेत जिथे सूर्यराव यशवंतमाचीवर हल्ले करायची नियोजने करत होता तिथे पोचते झाले...

त्यागोदरच वस्ताद काकांच्या हेरांनी बातमी आणली की सूर्यराव बेरड कुठे लपला आहे...टाकटोक वस्ताद काका व धारकरी हाती पांढरे निशाण घेऊन सूर्यराव च्या गुप्त जागेत शिंग तुताऱ्या फुंकून सूर्यराव ला खून सांगू लागले...

शिवरायांची फौज ...?

नुकत्याच बाजींद च्या आकस्मित हल्ल्यातून वाचत गुप्त जागेत पुढे नियोजन करत बसलेल्या सूर्यराव ला शिवरायांच्या खूनेची चाहूल लागली व त्याने त्वरित निशाणबारदार पाठवून कोण,कुठून,कशासाठी आले आहे बातमी काढली.....,

बहिर्जी नाईकांची खास फौज वस्ताद काकांसह चर्चेसाठी सूर्यराव बेरड यांना भेटायला आली आहे...!

निरोप मिळाला...,

मोठ्या इतमामाणे सर्वांचे स्वागत झाले..!

इकडचे तिकडचे विषय संपवत काकांनी मूळ मुद्द्याला हात घातला...!

आमच्या एक हजार फौजेंसोबत जर तुमची हजार पाचशे फौज मिळाली तर यशवंतमाची सहज पडणार...!

उद्या सकाळी हिंदवी स्वराज्याचा भगवा झेंडा माचीवर फडकला तर तुम्हाला त्याचे सरदार नेमु हा शब्द आहे आमचा....!

हे ऐकून सूर्यराव च्या चेहऱ्यावर हास्य उमलले व तो बोलू लागला...!

काका,मला आपला कौल बिलकुल स्वीकार आहे..पण,यशवंतमाचीचा पाडाव करणे इतकी सोपी गोष्ट नाही.
शेकडो चोरवाटा,निष्ठवान पैलवानांची फौज यासह अजून एक खास गोष्ट त्यांच्या ताफ्यात नुकतीच सामील झाली आहे ती म्हणजे तुमचे गुप्तहेर म्हणून माचीत शिरलेल्या खंडूकडे प्राण्यांचे गूढ आवाज व त्यांना आपल्या सारखे काम करायला लावणारे विलक्षण ज्ञान लिहलेली वही आहे....आता आधीच बिकट असलेली माची अजून बिकट झाली आहे..."

हे ऐकताच काकांना खंडू ने बोललेले शब्द खरे वाटू लागले...पण ती वही केवळ बहिर्जींला देईन असे त्याचे वचन पण आठवले...ज्या खंडोजी ला मी ओळखतो..तो प्राण देईन पण वचन तोडणार नव्हता....पण,पण आता काय उरले होते...स्वतःच्या बांधवांच्या खांद्याला खांदा लावून कुस्ती खेळाला त्यांचे गळे चिरायला ज्याला काही वाटत नव्हते तो स्वराज्याशी हरामखोरी करायला मागे पुढे कसा पाहिलं याची खंत काकांना होती...दीर्घ श्वास घेऊन ते बोलले....

सूर्यराव..यावर दुसरा पर्याय ..??

सूर्यराव उत्तरला....

यावर पर्याय एकच...माचीच्या आतून कोणी जर गुप्तवाट दाखवली तर माची संपली म्हणून समजा....!!

हे विषय सुरु असताना आभाळात घारी गिधाडांची गर्दी होती..आसपास मुंग्यांची दाटी उडाली होती आणि पुढच्याच क्षणी सर्व फौजेवर मुंग्यांची तिखट डंके बसू लागले आणि सर्वच्या सर्व अंग झाडून धावू लागले....एकेकाला पन्नास पन्नास मुंग्या....सर्वजण ती जागा सोडून धावून पठारी भागात आले व त्या मुंग्यापासून सुटका करुन घेऊ लागले....

दुसऱ्याच क्षणी घारी गिधाडांनी वस्ताद काका व सूर्यराव यांच्यात झालेली बातचीत व सूर्यराव चे ठिकाण बाजींद ला सांगितले....

क्षणात बाजींद ने सोबतच्या धारकर्यांना तयारीचे आदेश दिले आणि तो वीरांचा लोंढा पुन्हा सूर्यराव वर पडणार होता...पण आता अजून एक शत्रू वाढला होता तो म्हणजे वस्ताद काका...!

पण असो....बाजींद च्या गुप्ततेशिवाय जगात काहीं महत्वाचे नाही...चला रे....तलवार उचलणारे हात धडापासून वेगळे झाले पाहिजेत.....त्यांच्या सोबत जन्गलातील साप,विंचू,अजगर,वाघ सिंह,हत्ती चे थवेच्या थवे चवताळून ,बेताल ओरडत,किंचाळत धाऊ लागले......असे वाटत होते की आता यांच्या आडवे जो कोणी येईल त्याचे तुकडे पण वाटणीला यायचे नाहीत.......!

इकडे यशवंतमाची अजूनही विजयाच्या धुंदीत होती.
वास्तविक शत्रू पुन्हा येईल म्हणून योजना करायच्या सोडून भीमा स्वतःच्या लग्नाची स्वप्ने पाहत होता...!
सकाळीच तो राजांना भेटायला गेला होता...समोर राजकुमारी सावीत्री पण होती....!

भीमाला पाहून राजे बोलले....!

भीमा,तू यशवंतमाचीची अब्रू ,मान काल राखलास.
प्रत्यक्ष शिवाजीराजांच्या सेनेला पराभूत करणे म्हणजे आदिलशाही दरबारी मानाची गोष्ट..!
पण,तुझी सावित्रीची अट मला मान्य नाही मला माफ कर....!
सावित्रीला सूर्यराव बेरदडाच्या हल्ल्यातून वाचवणारा खंडेराय हा तिने पती म्हणून स्वीकारला आहे...!

हे ऐकताच भीमा संतापला....काय...?
खंडेराय ..?
राजे...जीवावर उदार होऊन केवळ साऊ साठी मी लढलो...आजवर फक्त तीच्यासाठी जगलो..!

नाही...मी लग्न करेन तर साऊ शी....भलेही मला खंडेराय चा खून करायला का लागू नये...असे बोलून त्याने समशेर उचलली आणि तरातरा तालमीकडे खंडेराय ला गाठून मारायच्या उद्देशाने तो निघाला....!

जाताना सावीत्री फक्त माझी आहे अश्या आरोळ्याने सारी माची तालमीजवळ आली होती..!

धाडदिशी त्याने तालमीच्या दरवाजाला लाथ मारली आणि तो आत गेला....!

राजे व साऊ सोबत हजारो यशवंतमाचीचे नागरिक धावत तालमीजवळ आले होते...आता भीमा खंडेराय ला जीव मारणार...ते तालमीच्या दरवाज्यातून आत जायला जाणार इतक्यात त्याच दरवाजातुन एकाच वेळी 3-4 पैलवान धाडकन बाहेर फेकले गेले...आणि आपल्या प्रचंड हातात भीमा ला अंतराळी उचलून खुद्द खंडेराय तालमीतून बाहेर आला व त्याला सावित्रीच्या पायात आदळून त्याच्या छातीवर पाय ठेऊन बोलू लागला..

सावीत्री......सावीत्री तुझी नव्हे...जन्मोजन्मी फक्त या खंडेरायाची आहे....तिच्यासाठी मी माझ्या देवाला विसरेन एकवेळ हरामखोर कुत्र्या...!

असे म्हणत त्याने तलवार त्याच्या छातीवर रोखली...पण त्वरित साऊ पुढे झाली व ती रोखत म्हणाली...नको खंडोजीराव...याला प्राणदान द्या....

याने माची वाचवून उपकार केलेत सर्वावर....याला प्राणदान द्या.....राहिली गोष्ट या सावित्रीची....हि साऊ फक्त आणि फक्त तुमचीच राहील ..

असे म्हणत तिने घट्ट मिठी खंडेरायाला मारली....!

उपस्थित नागरिकांनी टाळ्या वाजवल्या व त्या विवाहाला जणू अप्रत्यक्ष संतमती दिली...!

भीमा व त्याच्या पाच पन्नास साथीदारांना यशवंतमाचीच्या फौजेने हाकलून माची बाहेर काढले..!

साऊ व खंडेरायाचे लग्न उद्याच सकाळी लावून दिले जाईल असे राजे यशवंतरावांनी जाहीर केले....!

सारी माची आनंदात होती पण अपमानाचा सूड घेण्याची तीव्र इच्छा मनी बाळगून भीमा व त्याचे साथीदार माचीबाहेर पडले......!

·●●क्रमश●●•
बाजींद

भाग क्र.२६
~~~~~~~~~~~~~~~~~
वाऱ्याच्या वेगाने जंगलातील हिंस्त्र प्राणी व किडा कीटक मुंग्यापासून ते बलाढ्य हत्ती पर्यंत सर्वच्या सर्व प्राणी बाजींद च्या हुकमाचे "बाजींद" होते..!
ज्यावर बाजींद ची तलवार रोखली जाईल त्याचा प्राण त्याच्या शरीरातून बाहेर काढणे हेच एकमेव काम त्यांचे होते.
~~~~~~~~~~~~~~~~~

वस्ताद काका व सूर्यराव बेरड यशवंतमाची वर हल्ल्याच्या वाटाघाटीत मश्गुल असताना दूरवर जंगली श्वापदांचा आवाज कानावर येऊ लागला,प्रत्येक क्षणी तो आवाज वाढतच होता.
त्या आवाजाने बेरड व काकांची तुकडी भयकंपित होऊन वर खाली आजू बाजू पाहू लागली.!
काही वीरांनी जुमानून उसण्या अवसानाने तलवारी उपसल्या... क्षण..दुसरा क्षण...मोठमोठी झाडे उपटून समोर दिसेल त्याच्यावर आदळत हत्तीचे कळप ,या झाडावरुन त्या झाडावर मुक्त झेपा घेत व त्याबरोबर आकाशपाताळ दनानून सोडणाऱ्या डरकाळ्या फोडत वाघ सिंह दिसू लागले..सर्वच्या सर्व प्राणी बेफाम दौडत होते आणि मागोमाग बाजींद चे अश्वदल चौखूर दौडत येत होते..!

ते चित्र पाहताच भल्याभल्या सुरमा वीरांची छाती कचदिल होत होती..!

त्या वाघ सिंहाचा एका झेपत शेकडो वीर मरु लागले होते...हत्ती सोंडेत धरुन एका एका वीराला नारळ आपटून फोडतो तसे आपटत होते....!
केवळ मरणासन्न आर्त किंकाळ्या..आणि यातून जे वाचत होते ते बाजींद च्या तीरकमठयाचे शिकार बनत होते....!

अशा वेळी जो तो एकच शब्द बोलत होता...पळा..!
सारेच पळत सुटले होते...पण वेळ आणि काळ याचे गुणोत्तर इतके अचूक होते की पळणारा काही क्षणात भक्ष बनत होता.!

साराच गोंधळ..!
वस्ताद काका व सूर्यराव ला समजेना की काय प्रकार होत आहे...ते सुद्धा समजून घेण्याच्या अवस्थेत नव्हते...कुठेतरी गुप्त जागा शोधत ते सुद्धा धाऊ लागले....!
एक प्रचंड हत्ती सूर्यराव च्या मागे लागला.
त्याने त्याच्या घोड्याचा मागचा पाय उचलून घोड्याला हवेत भिरकावले.
सूर्यराव घोड्यावरून बाहेर फेकला गेला...!
सूर्यराव ने तलवार उपसली आणि त्या चवताळलेल्या हत्तीच्या सोंडेवर जोरदार हल्ला केला...!
सपदिशी झालेल्या वाराने हतीची सोंड तुटून पडली...!
शांतपणे वाहणारे नदीचे पाणी वादळी पावसाच्या पाण्याने लालभडक होऊन वहावे अगदी तसेच हत्तीच्या सोंडेतून रक्त पडू लागले...!
हत्ती ची ची ची ची करत मागे फिरला व गिरकी घेऊन खाली कोसळला... जागीच गतप्राण झाला होता..!
हत्ती मारला याचा उरात अभिमान घेऊन सूर्यराव ती रक्ताळ लेली समशेर घेऊन छाती फुगवून हसू लागला....

इतक्यात

बाजींद च्या तिर कमठयातुन सूर्यराव च्या मस्तकाचा वेध घेतलेला बाण सु सु सु करत आला व क्षणात सूर्यराव चे मुंडके धडावेगळे करत खाली कोसळला...!

इतक्या वेगाने आलेल्या बाणामुळे सूर्यरावला त्याचे शिर कधी तुटले हेच समजले नाही..!

शरीराशिवाय ते तलवार घेतलेले शरीर तसेच उभे होते.

ते दृश्य पाहून भल्याभल्यांची बोबडी वळाली.

आता सर्व संपल्यात जमा होते.
बाजींद ने सूर्यराव चा खात्मा करायची केलेली प्रतिज्ञा पूर्ण झाली होती.
त्याच्या मुखावर समाधान होते की बाजींद च्या गूढ ज्ञानाचा साक्षीदार आता संपला आहे...!

वस्ताद काकांनी सूर्यराव चे शिरावेगळे धड पहिले आणि त्यांचे क्षत्रिय रक्त उचंबळून आले..!
त्यांनी दोन्ही हातात पट्टे चढवले आणि आता मारु मरु युद्धाची आरोळी ठोकली....!

सुदर्शन फिरावे तसा पट्टा फिरत होता..!
जो आडवा येत होता त्याची खांडोळी उडत होती.
आसपास बिथरलेली जन्गली जनावरे सुद्धा त्या पट्ट्याच्या वर्तुळात जाऊ शकत नव्हती...!
वस्ताद काकांच्या आक्रमणामुळे बाजींद व काकांच्यातील अंतर कमी होऊ लागले..!

आता,बाजींद ला युद्धासाठी सज्ज व्हावे लागणार होते....त्यांनीही हातात पट्टे चढवले व काकांशी सामोरा गेला...!

पट्ट्या वर पट्टे आपटून ठिणग्या पडू लागल्या...कोण कोणाला कमी नव्हते...पण बाजींद ची निष्पाप श्रद्धा व तपश्चर्या नक्कीच काकांपेक्षा मोठी ठरली आणि एका वर्मी घावाने काकांचा पट्टा खोबणीतुन तुटला....!
संधी मिळताच काकांच्या छातीवर जोरदार लाथ घालून बाजींद उभा राहिला...!
त्या लाथेने तोल जाऊन काका खाली पडले....!
काका खाली पडते न पडते इतक्यात आसपास उभे असणाऱ्या वाघ,सिंह,लांडगे,कोल्हे एकाच वेळी त्यांच्यावर तुटून पडले...काकांनी आता आपले जीवन संपले आशा आवेशात डोळे घट्ट मिटले आणि मृत्यूस तयार झाले...!

ति जनावरे आता काकांच्यावर हल्ला चढवणार...

इतक्यात

जंगलाच्या पूर्व दिशेला तोंडाला काळे अवलान बांधून पांढऱ्याशुभ्र घोड्यावर उभा असणाऱ्या एका धीरगंभीर योध्याने चित्रविचित्र आवाज काढून जन्गलातील त्या बिथरलेल्या प्राण्यांना जागीच स्तब्ध केले....अजून अधिक तीव्र व गूढ आवाज ऐकून ते सारे हिंस्त्र प्राणी गुमान मागे सरकू लागले....!
अजून काही वेळ गेला आणि ते सारे प्राणी दाट जंगतलात निघून गेले.........

हे सारे दृश्य बाजींद पाहत होता..!
कोण...?
जो बाजींद च्या गूढ विद्येचा जाणकार आहे..?
जो मला माहिती नाही,पण बाजींद ची ती गूढ विद्या जाणतो....?

बाजींद ने हातातील पट्टे खाली टाकले आणि त्याच गूढ भाषेत केवळ त्या योध्याला समजेल असे विचारले...

"अरे,महान योध्या ?

तू कोण आणि काय तुझे नाव गाव....?
तुला हे बाजींद चे अती पवित्र ज्ञान कसे माहिती,जरा मला सांग कृपा करुन..."

त्याच्या प्रश्नावर त्या योध्याने त्याच भाषेत उत्तर दिले....."

मी कोण हे तुला सांगायची गरज नाही..आणि तू जसे म्हणतोस की हे ज्ञान बाजींद चे आहे...तर तुझ्या माहितीसाठी सांगतो....मला कुठल्या बाजींद ने ही भाषा शिकवली नाही.....ही भाषा मला शिकवली आहे ते माझ्या आत लपलेल्या योध्याने...माझ्या प्राणप्रिय ध्येयाने...या भाषेचा उगमच जर विचारशील.....तर ऐक........अश्या अनेक भाषा विद्या ज्या महान पुरुषापुढे थिटी पडतील असा पुरुष आहे..."राजा शिवछत्रपती "

राजा शिवछत्रपती......

खंडोजीच्या अंगावर काटे व डोळ्यात पाणी तरळत होते जेव्हा त्याच्या मुखातून शिवाजी महाराजांचे नाव येत होते...!
एकाग्र मनाने सखाराम व त्याचे सवंगडी ती कथा ऐकत होते.
भरल्या डोळ्यांनी ती कथा सांगत खंडोजी रडू लागला होता...!
काही क्षणात तो सावरला ...तो सावध झाला.....!

सखाराम बोलला....

खंडोजीराव...ज्या गूढ ज्ञानापाई तुमी सारं रामायण केलं ते गूढ ज्ञान बाजींद व्यतिरिक्त कुठल्या योध्याला माहिती होते ओ ??
कोण असा योद्धा होता जो वस्ताद काकांना वाचवायला एवढ्या जंगलात आला होता ज्याला पण बाजींद सारखी जनावरं बिथरुन टाकायची कला माहिती व्हती...?

खंडोजी शांतपणे सखाराम कडे पाहून हसू लागला....!

योद्धा....मी सांगतोय ना पहिल्या पासन....अरे त्यो योद्धा नव्हता....ना शिपाई होता....ना देव होता....ना राक्षस होता......तो साधा माणूसच होता रं...... फक्त त्याचा देव शिवाजी होता....त्या देवासाठीच त्यानं सार आयुष्य ओवाळून टाकलं होतं.....

ते होते...खुद्द बहिर्जी नाईक......

·●क्रमश●●
बाजींद
भाग क्र.२७
~~~~~~~~~~~~~~~~~~~~
सखाराम आणि त्याचे सवंगडी स्तब्ध उभे होते.
गेले दोन चार दिस या खंडोजी आणि सावित्रीच्या तोंडून जे काही ऐकत आलोय त्याचे उद्यापन म्हणजे बहिर्जी नाईक होते कि असे वाटू लागले होते.
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

डोके सुन्न झाले होते चौघांची...!
ज्या माणसानं हिंदवी स्वराज्याची धुरा स्वतःच्या खांद्यावर पेलली पण कुठेही नाव प्रसिद्ध केले नाही.
काय विलक्षण माणूस असेल हा बहिर्जी...!

खंडोजी बोलू लागला..
लय अजब रसायन आहे बहिर्जी नाईक म्हणजे..!
10-10 दिस अन्नपाणी शिवाय राहतो,तर महिना महिना भर एकाच झाडावर दबा धरुन बसतो...!
धावायला लागला तर वाऱ्याच्या कानफाटीत मारल्यासारखे धावतो,पुराच्या डोहात खुशाल उडी मारतो..!
तलवार,भाला,फरीगगदा,पट्टा, विटटा,धनुष्य,असे काही चालवतो की समोर महासागर येऊदे शत्रूचा...!
शत्रूच्या राणीवशात जाऊन राहू शकतो,तर खुद्द औरंगाजेबाच्या दरबारात जाऊन त्यालाच कव्वाली ऐकून बक्षीस घेऊन येऊ शकतो...!
माणूस म्हणाल तर एकही माणसाचा गुण नाही,जनावर म्हणाल तर दिसतो माणसासारखा..!
मोठमोठ्या गोष्टीत अचूक निर्णय,सावध नियोजन आणि स्वतःच्या देखरेखीखाली प्रत्यक्ष घोडदौड...!
खर सांगतो गड्यानो...हा बहिर्जी नाईक जणू शिवरायांचा तिसरा डोळाच होता..!

आणि शिवराय त्याला इतके मानतात की महाराजांच्या राणीवशात एकमेव जिजाऊ माँसाहेब सोडून कोणी विना परवाना जाऊ शकत असतील ते म्हणजे बहिर्जी नाईक...!
गड्यानो,महाराजांचा नाईकांच्यावर इतका विश्वास की हा माणूस चुकून सुद्धा चूक करु शकणार नाही इतका दृढ विश्वास...!

पाची पातशाहिना रणांगणात चारी मुंडी चित करुन जेव्हा महाराज राज्याभिषिक्त झाले तेव्हा सुद्धा बहिर्जी नाईक समोर येऊ शकत नव्हते इतकी गुप्तता पाळत होते नाईक....!

महाराजांचा अभिषेक सुरु होता,महाराज मुक्त हस्ताने गरीब फकिराना ओंजळ भरभरून द्रव्य दान करत होते आणि एक म्हातारा फकीर त्या रांगेत उभा होता...!
जक्ख म्हातारा हुंदके देऊन रडत होता आणि डोळे भरून महाराजांना पाहत होता.....महाराजांनी जेव्हा त्या फकिरला पाहिले तेव्हा मात्र त्यांच्या अश्रूंचा बांध फुटला...!
ओठावर मिशा नव्हत्या तेव्हा पासून या बहिर्जी आणि मी हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले....आणि आज मराठेशाही स्थापन होत आहे,राज्य आनंदात आहे,आणि ज्याने आजवर सारी संकटे आपल्या छातीवर झेलली तो बहिर्जी फकीर होऊन याचकांच्या रांगेत उभा आहे...!
काय बोलावे या प्रकाराला....कसली वेडी माणस असतील ती...!
एका मंदिराला फरशी दान दिली की साऱ्या घराण्याची नावे टाकणारे तुम्ही आम्ही त्या बहिर्जी नाईकांच्या काळजाला कधी समजू शकू का ?
स्वतःच्या बायकोला सुद्धा अगदी शेवटपर्यंत माहिती नव्हते की ज्याच्या सोबत मी सात जन्माचे बंधन बांधले आहे....तो खुद्द स्वराज्याच्या गुप्तहेरप्रमुख बहिर्जी नाईक आहे....इतकी कमालीची गुप्तता...!
आणि एवढा विलक्षण त्याग करुन राजे त्यांना देत तर काय होते ओ ...?
काहीच नाही....उलट प्रत्येक मोहिमेत जीवाचा प्रश्न...माघारी येईल का नाही शाश्वती नव्हती...!
हि वेडी खुळी माणसे अशी का जगली असतील ??

बस्स...एवढ्या एका प्रश्नाचे उत्तर ज्याला समजून येईल त्याच्या आयुष्याचे सोनं झाल्याशिवाय राहणार नव्हते....!

पण,ज्याच्या खांद्याला खांदा लाऊन हे सारे ज्याने भोगले होते त्या खंडोजीला मात्र समजून पण उमजत नव्हते....!

यशवंतमाची अजूनही मराठ्यांशी वैर घेऊन दिमाखात मिरवत होती आणि त्याच माचीच्या राजकुमारी बरोबर विवाहाच्या बोहल्यावर खंडोजी चढत होता...!

सारी यशवंतमाची आनंदात होती.
सर्वजण लग्न मंडपात जमा झाले होते.
राजकुमारी सावीत्री मनस्वी आनंदी होती.
खंडोजी चे स्वप्न पूर्ण होत होते...!
अंतरपाट धरुन पंडितजी मन्त्र म्हणू लागले.
देवा ब्राम्हणांच्या साक्षीने खंडोजी व सावीत्री कायमचे एक होणार होते.....!
सारा आनंदी आनंद होता....!

पण,इकडे बाजींद ने समोर उभ्या असलेल्या बहिर्जी नाईकांना पाहून मात्र स्वतःचे भान हरपले होते..!
ज्याच्या केवळ गोष्टी ऐकून रक्त उसळत असायचे,असा महान गुप्तहेर चक्क माझ्या समोर उभा आहे,ही कल्पनाच त्याला आनंदित करत होती..!

बाजींद व त्याची सेना तलवार दोन्ही हातात आडवी धरुन गुडघ्यावर बसली व मान खाली घेत बहिर्जी नाईकांना शरण गेली...!

नाईक पाय उतार झाले...तोंडाला बांधलेले काळे अवलान त्यांनी सोडले व धीरगंभीर पाऊले टाकत बाजींद जवळ आले व दोन्ही खान्दे धरुन उठवत म्हणाले.....!

बाजींद.....तुमच्या शौर्याच्या कथा मी जाणून आहे.
कोनापुढे तुम्ही झुकने हे तुम्हास शोभा देत नाही...उठा.!

बाजींद उत्तरला....नाईक...तुम्ही कोण आणी काय आहात हे केवळ आम्ही जाणू शकतो इतर कोणीही नाही.
केवळ आपली भेट घडावी या साठी आपल्या खंडोजी ला आम्ही चंद्रगड ला बोलवून घेतले व आमच्या पूर्वजांची व प्राण्यांचे अद्भुत आवाज ओळखण्याचे विज्ञान लिहलेली वही तुमच्या कार्यासाठी दिली...."

बहिर्जी हसले...ते मोठ्या विलक्षण पोट तिडकीने बोलू लागले......

गूढ ज्ञान....आणि स्वराज्य...!
माफ करा बाजींद......शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याला आजवर ना कोणत्या गूढ ज्ञानाची गरज भासली होती ना इथून पुढे भासेल....अहो 350 महाराष्ट्र गुलामगिरीत धडपड करत होता.
जुलमी अगंतुकानी महाराष्ट्राची मसनवाट करुन टाकली असताना आमच्या शिवाजी राजांनी साधारण माणसाना घेऊन असामान्य इतिहास निर्माण केला.

गुलामगिरी मातीत घालून स्वाभिमानाचे ,भगव्या झेंड्याचे राज्य आणले ते केवळ मृतवत अंतकरणात स्वाभिमान जागृत करुन....लाथ घालाल तिथे पाणी काढाल ही भावना आमच्यात जागवून आमची मने मोठमोठी महायुद्धे जिंकायला तयार केली ती केवळ महाराजांनी....आणि अशी कणखर मने साक्षात कळीकाळाच्या सुद्धा हाका ऐकू शकतात तिथे ही जनावरांची भाषा जाणणे हे तर फार किरकोळ गोष्ट आहे गड्यानो....तुम्हाला जर शिकायचेच असतील ते देव,देश आणि धर्मासाठी हसत हसत मारु आणि मरु शकणारे शिवाजी शिकायला हवेत...!

बहिर्जी बेभान होऊन बोलत होते आणि बाजींद सर्वांगाचे कान करुन ते सर्व ऐकत होता.
आत्ता पर्यंत "बाजींद" हेच जगातील सर्वात श्रेष्ठ ज्ञान समजत असलेल्या बाजींद ला बहिर्जी नाईकांच्या तोंडून ब्रम्हज्ञान ऐकायला मिळत होते..!

पण,चंद्रगड ची गुप्तता आसेतु हिमाचल अबाधित राखणे हे बाजींद चे कर्तव्य होते.
नाईकांच्या हाकेला कधीही धावून येऊ असे आश्वासन देऊन बाजींद ने बहिर्जी नाईकांची रजा घेतली व टाकटोक तिथून चंद्रगड च्या रस्त्याला निघाले....!

नाईक मागे फिरले....आता त्यांची चवताळलेली नजर वळाली ते यशवंतमाचीकडे.....!

दरम्यान राजे येसजीरावांच्या व सावित्रीने केलेल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी भीमा जाधव व त्याचे सहकारी यशवंतमाची च्या जंगलात फिरताना मराठ्यांच्या हाती लागले...!
वस्ताद काकांनी ते कोण कुठले याची खडा न खडा माहिती काढली..एका शत्रूचा शत्रू जर आपल्याला मिळाला तर तो मित्र होतो....!
काकानी जर भीमाने आम्हाला यशवंतमाची कडे जाणारी गुप्तवाटेने नेले तर यशवंतमाची ची जहागिरी त्याला देऊ असे कबूल केले..!
सुडाच्या संतापात चवताळलेल्या भीमाने हा कौल त्वरित स्वीकारला....!

आणि भीमाने यशवंतमाची कडे जाणारी गुप्तवाट मराठ्यांच्या फौजेला दाखवून दिली....!

इकडे यशवंतमाची त साऊ आणि खंडोजी चे विधिवत लग्न पार पडले होते...!

एका उंच डोंगराच्या पायथ्याला खंडोजी व ते चौघे थांबले...!
दम खात खंडोजी बोलला....
बरं मंडळी...रामराम घ्या आमचा...!
वर डोंगरावर एक मंदिर हाय...तिथं जो कोणी आसल त्याला "उंबराच फुल" ह्यो सांकेतिक परवलीचा शबुद सांगा...त्यो तुम्हास्नी म्होरं वस्ताद काकाकडं घेऊन जाईल...त्यांना सांगा तुमची अडचण,ते महाराजांच्या कानी त्वरित घालतील तुमची व्यथा...पर एका गोष्टीच भान पाळा.... चुकून बी मी तुम्हाला हितवर आणलय सांगू नगासा...!
जातो म्या,
परत भेट होईल असं वाटत नाय...लय कामं पडली हायती स्वराज्याची...माझी आण तुमची साथ आता हितवर च...!

सखाराम आश्चर्याने बोलला....अहो खंडोजीराव..आस का बोलताय ?
खंडोबाच्या आशीर्वादान जणू तुम्हास्नी आम्हा गरिबांच्या मदतीला धाडलय....तुमची कथा ऐकून रगात उसळतया गड्या....लय लय भोगलया तुम्ही खंडोजीराव.......पुढं काय झालं हे तर सांगा आण मग जावा...."

खंडोजी हासत बोलला....नाही सखाराम....सुर्य मावळला की मला जावे लागते रे.....आणि आजची ही माझी शेवटची रात्र...तुम्ही बिगीन वर जावा....तुमचा गाव कायमचा सुखी व्हणार....

डोळ्यात आलेले अश्रू पुसत खंडोजी तरातरा चालत जंगलात जाऊ लागला....त्याच्या त्या अधीर शब्दात एक प्रकारची उदासीनता जाणवली....सखाराम ला का कोणास ठाऊक असे वाटू लागले की जणू माझ्या कोणीतरी जवळचे मला सोडून जात आहे....!

·●क्रमश●•

बाजींद
भाग क्र.२८
~~~~~~~~~~~~~~~~~~~~
खंडोजी नजरे आड झाला आणि ढगातून सहस्रो जलधारा पृथ्वीवर कोसळू लागल्या..!
पावसाचे पडणारे थेंब सखाराम,सर्जा,नारायण व मल्हारी ला भिजवू लागले...!
पण,आता शरीर भिजले तरी त्याचे काहीच चौघांना वाटत नव्हते,खंडोजी च्या मुखातून रायगड च्या जंगलात घडलेल्या एका अद्भुत अध्यायाचे श्रवण करुन ते चौघेही आकंठ त्यांच्या भूतकाळात भिजून गेले होते...!

अंगावर चांगलाच गारठा वाढू लागला आणि ते चौघेही त्या डोंगराच्या चढणीला लागले होते.
कोणी कोणाबरोबर बोलत नव्हते...निशब्द शांतता.
वरुन कोसळनाऱ्या सरी आणि चढणीने लागलेला दम व त्यामुळे होणारा श्वास उचश्वासाचा आवाज एवढेच ऐकू येत होते...!

सखाराम विचार करत होता की काय अदभूत कथानक घडले खंडोजी च्या आयुष्यात....!
ज्या प्रेमामुळे त्याने कर्तव्यात कसूर केली त्याच प्रेमाच्या आड किती भयानक संकटे येतात.....ज्या बाजींद च्या गूढ ज्ञानाचे आम्हीही दिवाने झालो होतो ते ज्ञान तर बहिर्जी नाईकांच्या पुढे काहीच नाही...आणि असे बहिर्जी नाईक ज्या शिवाजी महाराजांसाठी जीवन सुद्धा ओवाळून टाकत आहेत...ते शिवाजी महाराज कसले असतील....सखाराम विचार करता करता रडू लागला होता....पावसाच्या पाण्यात त्याचे अश्रू वाहून जात होते....मनात मात्र शिवरायांना डोळे भरुन पहायची आस निर्माण झाली होती..!

एव्हाना डोंगराचा चढ संपून पठार लागले आणि समोर पावसात धूसर दिसणारे मंदिराचे शिखर दिसू लागले ...मल्हारी बोलला....आरं ते समोर दिसते ते मंदिर बगा आलं....आता ह्यात कोण भेटणार देवालाच ठाऊक बाबांनो.....आज रात्री हितं थांबू आणि उद्या मातूर मागं फिरायचं आता....लय दिस झालं ही दरीखोरी पालथी घालतोय बाबांनो....बास ,मला काय आपण शिवाजी राजांच्या पर्यंत पोचू असं वाटत नाय.....!
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

त्याचा शब्द मध्येच खोडत सखाराम बोलला....नाय मल्हारी,आता तर महाराजांचं दर्शन घेऊनच जायचं....बस्स काहीही होवो,आपलं काम भलेही न होवो...महाराजांच्या पायावर डोकं टेकवू आन मगच धनगरवाडी गाठू....चला....!

ते सर्व त्या भव्य दगडी मंदिराच्या नंदी समोर उभे राहून आत बघू लागले..!
पावसाने बाहेर पाणीपाणी झाले होते मात्र मंदिराच्या गाभाऱ्यात एक मशाल तेवत होती.....!
चौघेही आत गेले....डोके झटकून पाणी हाताने पुसू लागले इतक्यात डोईला मावळी मुंडासे बांधलेला एक वृद्ध माणूस हातात मशाल घेऊन त्या चौघांजवळ आला....त्यांना पाहून त्याने त्यांना विचारले....कोण हाय रं बाबांनो तुमी...इतक्या रात्रीच कसं काय ह्या डोंगरावर...?
वाटसरू हायसा का रस्ता चुकून वर आलायसा....?

त्याच्या प्रश्नाणने सखाराम समोर होत बोलला....म्हातारबा रामराम....आम्ही टकमक धनगरवाडी चे धनगर...गावचे गावकारभारी हावोत....असे म्हणत सगळी हकीकत त्यांनी त्या म्हाताऱ्याला सांगितली व महाराजांना भेटून मदतीची मागणी करायला आम्ही निघालोय असे बोलतो न बोलतो इतक्यात...त्या म्हाताऱ्याच्या मागून 3-4 धिप्पाड मावळे सपासप तलवारी उपसून सामने आले व चौघांच्या नरड्यावर तलवारी रोखल्या...तो वृद्ध माणूस जरा मोठ्या आवाजात बोलला....ए खर सांगा नायतर तुमच्या मुंड्या धडावेगळ्या झाल्या म्हणून समजायच्या.....ह्यो डोंगर सहजा सहजी कोणाला गवसत नाय....इथं यायला कितीतरी गुपीत वाटा पार कराव्या लागत्यात....फक्त आमच्या हेरांनाच या वाटा ठाऊक असतात...बोला तुम्ही कोण नाहीतर सम्पला तुम्ही...!

आधीच डोंगर चढून दमलेल्या त्या चौघांना त्या आकस्मित हल्ल्याने पाचावर धारण बसली...त्या खंडोजीच्या नादाला लागून मरणाच्या दाढेत आलो असे त्यांना वाटू लागले...भीतीने चौघेही काही बोलत नव्हते.....

त्यांच्या गप्प बसण्याने ते मावळे अजून चिडले व चौघांना बेदम हाणू लागले...लाथा बुक्क्याचे प्रहार तोंडावर बसताच चौघेही जिवाच्या आकांताने ओरडू लागले ...इतक्यात नारायण ला अचानक खंडोजी चे शब्द आठवले...मंदिरात कोणी भेटले की परवली चा शबुद सांगा..."उंबराच फुल"

एका क्षणात नारायण ओरडू लागला.....उंबराच फुल....उंबराच फुल.....उंबराच फुल....!

तो शब्द कानी पडताच ते धारकरी जाग्यावर थांबले आणि नारायण कडे पाहत विचारु लागले...कोण कोण तुम्ही......?
पुढच्या क्षणी त्या चौघांनी हात जोडून त्या चौघांची माफी मागितली व तो वृद्ध माणूस बोलू लागला....

तुम्हाला अगोदर परवली शब्द सांगायला काय झाले होते ?
बिनकामी जीवानीशी गेला असता...चला आत या....असे म्हणून त्याने चौघांना आत घेतले..!
मंदिराच्या आत असणारी दांनपेटी त्या चौघांपैकी दोन मावळ्यांनी उचलली आणि एक मशालवाला आत उतरला....त्या पेटीच्या आत मधून दगडी पायर्या आत जाणाऱ्या होत्या...!

त्या चौघांनी सखाराम व त्याच्या साथीदारांना आत उतरवले आणि पेटीची दार लावून एका मागोमाग एक चालू लागले......बराच वेळ चालले आणि आत एका विस्तीर्ण कक्षात पोहचले...!

त्या कक्षात सर्वत्र समई तेवत होत्या,भिंतीवर ढाल तलवारी अडकवल्या होत्या...!
समोर लांबसडक बांबूच्या ठासणीच्या बंदुकीत दारू ठासत एक शिलेदार मग्न होता...
बाजूला एका मंचकावर ठेवलेल्या एका नकाशा भोवती मावळ्यांची बैठक सुरु होती...

सखाराम व त्याचे साथीदार भांभवल्या नजरेने सारे पाहत होते...एका कक्षातून दुसऱ्या कक्षात काही मावळे जडी बुटी कुटून औषध बनवत होते..तर काहींच्या समोर नकली दाढी मिशी..फकीर सन्याश्याची वस्त्रे पडली होती....!

ज्याने सखाराम व त्याच्या साथीदारांना त्या गुहेत गुप्तवाटेने आणले तो वृद्ध माणूस हसत हसत सखाराम ला बोलला....गड्यानो,ही आमची हेरांनी गुप्त जागा.
इथे आम्ही स्वराज्यातील सर्व हेराकडून आलेल्या निरोपाचे पृथकरण करतो व योग्य कारवाई करतो..!
इथून केवळ रायगड नव्हे तर साऱ्या स्वराज्यातील हेरांना काय हवे नको ते पोचवले जाते..!

येड्यानो,परवली शब्द सांगितल्या शिवाय आपले काम होत नाही,हे माहिती असून सुद्धा तुम्ही वेळ केला सांगायला...हकनाक जीव गेला असता कि...तो वृद्ध पुन्हा हसू लागला व ते सर्व चालत पुन्हा एका तिसऱ्या कक्षात वळाले....!

सखाराम ने मनात विचार केला की आपण हेरच आहोत असा बहुतेक सर्वांचा समज झालेला दिसतोय....पण,जर हेर नाही हे कळाले तर पुन्हा मारतील या विचाराने तो गप्प झाला....

त्या कक्षात काही फितूर हरामखोर दगाबाज लोकांना पकडून त्यांना उघडे करुन पट्ट्याच्ने मारले जात होते...आर्ट किंकाळ्या व रक्ताचे डाग याने तो कक्ष हादरुन गेला होता....

भयभीत नजरेने सखाराम ते पाहत त्या वृद्ध माणसाच्या मागे चालत परत दुसऱ्या कक्षात जाऊ लागले.....

त्या कक्षात समोर दोन भालाईत पहारा देत उभा होते...त्यांना पाहून त्या वृद्धांने त्यांना सवाल केला....

वस्ताद काकांना भेटायचे आहे.....नाईकांच्या खासगीतील परवली च्या शबुद घेतल्यात या चौघजनाणी... नाईकांची खास माणसे असावीत...यांचे काही काम आहे महाराजांच्या कडे...वस्ताद काकांना वर्दी द्या.....उंबराच फुल उगवलं आहे....!

त्या पहारेकऱ्यांनी मान हलवली आणि दरवाजा उघडून आत गेले.....आणि काही क्षणात बाहेर आले व सांगितले की त्या चौघांना फक्त आत पाठवा बाकीजन निघून जावा वर मंदिरात...!

जी....असे म्हणत तो वृद्ध मागे फिरला व सखाराम व त्याचे साथीदार त्या कक्षात गेले व बाहेरुन कक्ष बंद केला गेला....!

समईच्या मंद प्रकाशात समोर आई तुळजाभवानीची मूर्ती दिसली...बाजूलाच तलवारी,भाले,बरचें,कट्यारी पूजल्या होत्या....!

वस्ताद काका हात मागे बांधून पाठमोरे उभे होते...त्या चौघांची चाहूल लागताच ते मागे वळाले.....अतिशय धीरगंभीर मुद्रा कल्लेदार मिशा,वार्धक्याने पंढरी पडलेली दाढी पण डोळ्यात विलक्षण तेज...अंगापिंडांने मजबूत असणारी काकांची शरीरयष्टी पाहिली आणि खंडोजीने काकांचे जे वर्णन सांगितले होते त्याची अनुभूती आली...!

रामराम गड्यानो....जय भवानी ...असे बोलत काकांनी त्या चौघांना नमस्कार घातला.
त्या चौघांनी पण रामराम घातला.
समोरच्या लाकडी मंचकावर बसायची खून करत काका बोलले....बसून घ्या.....उंबराच फुल कवा कवा तर उगवत आमच्या ठाण्यात...!

सखाराम व ते चौघेही हसू लागले....!

वस्ताद काका बोलले.....बोला मंडळी,काय काम आणले आहे तुम्ही ?
तुम्ही जो परवली चा शब्द घेताय त्या अर्थी तुम्ही बहिर्जी नाईकांच्या एकदम विश्वासातील लोक आहात....शब्द कसा व कोणी दिला हे विचारायचा सुद्धा आमचा हक्क नसतो जेव्हा हा शब्द घेऊन कोणी येतो...!
ज्या अर्थी हा शब्द तुम्ही बोलला,त्याअर्थी कोणतेही कारण न सांगता तुमचे काम केलेच पाहिजे...!

काकांच्या त्या बोलण्याने सखाराम व त्याच्या साथीदारांना कळून चुकले की खंडोजी जे बोलत होता त्यातील शब्द आणि शब्द खरा आहे....एक दीर्घ श्वास घेऊन सखाराम ने सारी कहाणी सांगितली...!

टकमक टोक-कडेलोट-नरभक्षक वाघ-वस्तीवर हल्ले...सर्व काही सांगून फक्त एकदा महाराजांची भेट घडवा अशी विनंती केली...!

काकांनी शांतपणे सर्वकाही ऐकून घेतले आणि मोठा उचश्वास टाकत बोलले....चला,तुमची समस्यां लय मोठी आहे,पण लई पुण्याचे काम आहे हे...तुमची वाडी वस्ती सुखी झाली पाहिजे...उद्या दिवस उगवायला आपण रायगड च्या चित दरवाजातुन गडावर जाऊ..
.!

आता काहीतरी खाऊन झोपी जा...सकाळी भल्या पहाटे निघू...!

सखाराम व त्याच्या मित्रांना आनंद गगनात मावत नव्हता...चार दिवस मरमर चालून इथवर आल्याचे चीज होईल असे वाटत होते आता...खंडोजी ला भेटून त्याच्या पण पायावर डोकं टेकवायच आपण...गावात बोलवून मिरवणूक काढायची त्याची असा विचार करत ते चौघेही झोपी गेले....!

पहाट झाली...हेरांचे ते मुख्य ठाणे मात्र रात्रदिवस जागेच असते.
कोणाला तरी पकडून आणून मारत असत तर कोणी हेर जखमी होऊन उपचाराला येत होता..कोणी भावी योजनांचे,युद्धाचे नियोजन करत होता तर कोणी कपडे काढून व्यायाम करत होता..!

वस्ताद काका व ते चौघे लवकर तयार झाले व त्या कक्षातून निमुळत्या होत गेलेल्या चोरवाटेने बाहेर पडू लागले..!

एका विस्तीर्ण गुहेत ती चोरवाट येऊन संपली..समोरच एक तपस्वी कुबडी घेऊन समाधिस्त झाला आहे असे दिसत होते...त्याच्याकडे पाहत वस्ताद काका बोलले.....जय रोहिडेश्वर....!

काकांच्या त्या आरोळीने समाधीचे ढोंग करुन बसलेला तो हेर जागा झाला व बोलला....जय जय रघुवीर समर्थ...."

आणि दुसऱ्या क्षणी ते दोघेही हसू लागले...!

ती गुहा बाहेरुन खुली होती.
सकाळची कोवळी किरणे गुहेच्या आत येत होती.
उगवणाऱ्या सुर्यनारायणाकडे पाहत वस्ताद काका बोलले...चला फक्त अर्ध्या फर्लांगावर चित दरवाजाच्या हमरस्त्याला आपण लागू....!

ते अवघड कडेकपारी ओलांडून चालत चित दरवाजाजवळ आले.
पाऊस रिमझिम कोसळत होता त्यामुळे वाटेवरचे गस्तीचे पथक दिसले नाही...पण चित दरवाजाजवळ कोणीही दिसत नव्हते..!

काका समोर आले व त्यांनी मोठ्या आवाजात सूचना केली....कोण आहे का ???
दरवाजा खोला...?

हे शब्द कानी पडताच एक धिप्पाड मावळा दरवाज्यावरुन हातात असलेली ठासणीची बंदूक त्या पाच जणांवर रोखत बोलला.....

"खबरदार....पुढे यायचं नाय बिलकुल...बंदूक गच्च भरल्या दारुनं... फुडं ईशीला तर एका डागात ढगात पोचशीला....तुमास्नी एकदाच ईचारतो...परवली चा शबुद सांगा.....जर चुकलासा तर मेलासा... इचार करुन सांगा.....सरळ चित दरवाज्यात येतायसा....बगू सांगा शबुद.....

असे म्हणताच वस्ताद काका हसले व म्हणाले......पौर्णिमेचा चंद्र....."

·●क्रमश●●

बाजींद
भाग क्र.२९
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

वस्ताद काकांचा शब्द निशाण धरलेल्या शिलेदाराला ऐकू जाताच त्याने ठासणीची बंदूक खाली करत खाली आवाज दिला...." ए खोल रं दिंडी दरवाजा....परवली चा शबुद बरोबर हाय..."

रायगड च्या चित दरवाज्याचा दिंडी दरवाजा उघडला गेला आणि एक मावळा बाहेर येत म्हणाला..."रामराम शिलेदार.....काय बेत गडावर येण्याचा...?

त्याच्याकडे हसत वस्ताद काका बोलले...बहिर्जी नाईकांची खास माणसे आहेत ही...परवली चा शब्द उंबर फुल हाय..."
~~~~~~~~~~~~~~~~~~~~

उंबर फुल...बर बर मग तुमास्नी कोण आडीवणार.....या या आत या...असे म्हणत तो मावळा आत गेला पाठोपाठ वस्ताद काका व सखाराम सह त्याचे साथीदार आत गेले....!

आत प्रवेशाताच मावळयाने दिंडी दरवाजा आतून बंद करुन घेतला.

आत निमुळती होत गेलेल्या दिवडीत धिप्पाड भालाईत उभे होते.
तोफांची तोंडे चिखलाने लिपुन बंद केली होती.
बाजूला पाच पन्नास पहारेकरी हशम तलवारी कमरेला अडकवून कामात गुंग होते...!
शिवशाही ची शिस्त पाहण्यासारखी होती.
कोणीही बेशिस्त नव्हते..!
समोरच एका धिप्पाड धारकऱ्याने वस्ताद काका ला ओळखले व लगबगीने धावत तो जवळ आला आणि मुजरा करत बोलला....मुजरा वस्ताद काका...!
लई दिसान गडावर येन केलासा ..!
बरं वाटलं तुमचं दर्शन घेऊन...!

वस्ताद काका हसत बोलले..आरं नाईकांची खास माणस हायती सोबत...जरा खासगीत वर्दी देऊन महाराजांची भेट घालायची हाय.....

व्हय व्हय घाला घाला...नाईकांच्या माणसासनी कोण आडीवनार...आस म्हणत तो धारकरी बाजूला झाला आणि काका तरातरा चालू लागले...सोबत सखाराम व त्याचे साथीदार पण चालू लागले...!

भर पावसात रायगड चढणे म्हणजे साक्षात स्वर्गाच्या पायऱ्या चढत देवाच्या दर्शनाला जाणे होय...!
राजधानी ला साजेसा किल्ला म्हणजे रायगड..!
सह्याद्रीचा मूर्तिमंत अविष्कार...!
धो धो पावसाने रायगडचे अभ्यंगस्नान पाहणे म्हणजे पर्वणीच..!
वळणा वळणा वर छोटे छोटे धबधबे निर्माण झाले होते.
अश्या मावळी पावसात पण ठायी ठायी काथ्याच्या गोंणपाटाची गोची करुन हातात भाला घेऊन राजधानीचे रक्षण करणारे शिवशाहीचे धिप्पाड भालाईत हिंदवी स्वराज्याच्या शिस्तीचे प्रदर्शन करत होते..!

अशा पावसात रायगड चा चढ चढून धाप तर लागत होती मात्र पावसाच्या पाण्यात येणारा घाम सुद्धा वाहून जात होता..!

अश्या पडत्या पावसात सखाराम मात्र मनोमन आनंदी होता.
ज्या शिवरायांची कीर्ती सारा हिंदुस्थान गातोय त्या माझ्या राजाच दर्शन व्हणार ही सखाराम साठी साधी गोष्ट नव्हती.
सात पिढ्या जरी प्रयत्न केला असता तर स्वराज्याच्या राजधानीत प्रवेश सुद्धा मिळवता आला नसता.
त्यो कोण कुठल्या जन्मीचा सोबती म्हणून खंडोजी भेटला वाटेत म्हणून हे दिवस बघायला मिळत होते.
खरोखर सखाराम व त्याचे साथीदार खंडोजी ला मनोमन धन्यवाद देत होते...!

पण,त्याच्या आयुष्यात पुढे काय झालं हे मातूर ईचारायच राहिलंच... सखाराम ने अंदाज बांधला की बहुतेक सावीत्री आणि खंडोजी च लगीन झालं असलं आणि बहिर्जी नाईकांनी यशवंतमाची जिंकून खंडोजीलाच सरदार केला असलं तिथला...म्हणून तर रायगडच्या दऱ्या डोंगरात सारे शिर्के आणि खंडोजी फिरत बसल्यात...चला कायबी म्हणा..लक्ष्मी नारायणाची जोडी हाय खंडोजी आणि सावीत्रीची...!

लय खस्ता खाल्या बिचार्यांनी...पण,त्या "बाजींद" च्या वहीच काय झालं असलं पुढं....दिल असलं म्हणा ते बी खंडोजी नं परत बाजींद ला...तसा गप बसणारा नव्ह खंडोजी..."

विचारांची चक्रे फिरत होती आणि वस्ताद काका रायगडावरील सरकारी दफ़्तरात पोहोचले...!

अनेक जणांचे अनेक विषय ऐकत मोठमोठे हवालदार मश्गुल होते,तर टाक दवत समोर ठेऊन लिखाणाची कामे करणारी मुनिमजी पण व्यस्त होते...!

काका हेर खात्याच्या कक्षाकडे वळाले आणि अनेक हेर तिथे स्वराज्यातून आलेल्या माहितीची प्रतवारी करत बसले होते...!

वस्ताद काकांना पाहून समोर बसलेले पंत काका उठले व म्हणाले...वस्ताद यावे....काहीच वर्दी नसताना प्रत्यक्ष तुम्ही रायगडी येण्याची तसदी घेतली...नक्कीच कारण महत्वाचे असावे....!

पंतांच्या याबोलण्यावर काका म्हणाले....होय पंत... ही चार मंडळी गस्तीच्या हेरांना दिसली...चौकशी केली तर "उंबरफुल" हा परवली चा शब्द सांगितला...

उंबर फुल.....?
बापरे.....म्हणजे प्रत्यक्ष बहिर्जींच्या एकदम जवळची माणसे आहेत तर.....बोला काय करावे यांच्यासाठी.....

मग,वस्ताद काकांनी सखाराम च्या धनगरवाडी चे दुखणे,टकमक टोकाची व्यथा आणि नरभक्षक वाघांचा बंदोबस्त ही कहाणी सविस्तर सांगितली...व या लोकांना महाराजांना सुद्धा भेटायचे आहे....!

काकांनी टाक दवतेत बुडवून सारा मजकूर समोरच्या भूर्ज पत्रावर लिहला आणि सविस्तर मायना बनवला आणि खास बहिर्जी नाईकांचा शिक्का मारुन खाली परवली चा शब्द मोडी लिपीत लिहला आणि बोलले....

उद्या सकाळी महाराजांचा दरबार आहे... उत्तरेत पाठवलेल्या हेरांची माहिती आली आहे....त्याच्या जोडीलाच हा कागद महाराजांना दाखवतो....

आज रात्री सरकारी विश्रांती गृहात मुक्काम करुद्या या लोकांना....आपण चर्चा करु थोडी की टकमक टोकावरुन कडेलोट बंद करावी...!
कारण बऱ्याच तक्रारी आल्या ज्यांना शिक्षा झाली त्यांच्या नातलगांच्या की आम्हाला अंतिम विधी ला किमान देह तरी मिळूदे...अजून महाराजांच्या कानी ही बातमी नाही...पण मागच्या महिन्यात केलेल्या कडेलोटा बद्धल स्वता बहिर्जी नाईक सुद्धा अस्वस्थ होते असे दिसून आले....!

मोठा श्वास घेत वस्ताद काका बोलले...ठीक आहे,कडेलोट शिक्षा कायमचीच बंद करायचा अर्ज करा...मुख्य हेर प्रमुख नात्याने पहिले अनुमोदन ची सही मी करतो...बाकी अंतिम निर्णय महाराज देतील सकाळी...!

सखाराम व त्याच्या साथीदारांना सरकारी दुकानातून नवीन मावळी कपडे,अंथरुणाचे पांघरुणाचे साहित्य देऊन त्यांच्या भोजनाची व विश्रांतीची सोय सरकारी अतिथी गृहात करुन वस्ताद काका पुन्हा सरकारी कचेरीत आले व पंत काकांच्या समवेत महत्वाच्या चर्चेत मश्गुल झाले....!

सकाळ झाली.....सूर्यनारायण नभोमंडळात दाखल झाला मात्र रायगड च्या डोक्याला वेढे देऊन बसलेले काळे कभिन्न पावसाळी ढग आणि धुक्याने सूर्यकिरणे रायगड ला स्पर्श करु शकत नव्हती..!

समोर हाताच्या अंतरावरील दिसणे मुश्किल इतके दाट धुके...!
पण,चांगले उजडले होते...!
अश्या दाट धुक्यात पण हातात मशाली घेतलेली मावळे मंडळी गस्त घालून रायगड ला पहारा देत होती...!

दरम्यान,एक हशम सरकारी अतिथीगृहात आला व सखाराम ला तयार रहा म्हणून सांगितले.
सरकारी दुकानातून दिलेले नवे कपडे घालून दरबारात जायचे आहे अशी वर्दी देऊन हशम निघून गेला..!

सखाराम व त्याचे साथीदार खूप खूप आनंदी होते..!

सखाराम व साथीदार तयार झाले व सरकारी अतिथीगृहातून बाहेर पडले व समोर उभ्या असलेल्या मावळयाला बोलले....शिलेदार...हित जगदीश्वर महादेवाचं देऊळ कुठं हाय जी...?
अमास्नी दर्शन मिळल का ओ ?

यावर तो हशम बोलला..सरळ समोर जावा...कोणी अडवलं तर परवली चा शबुद सांगा आणि दर्शन घ्यायला जायचं हाय अस सांगा...जावा सरळ होळीचा माळ लागलं...बाजारपेठ ओलांडली की समोरच जगदीश्वर मन्दिर...जावा..."

त्याचे उत्तर ऐकून ते चालू लागले....सखाराम च्या मनात आनंदाच्या किती लकेरी उठल्या असतील याची कल्पना करुन पहा...!
एक साधा मेंढपाळ हिंदुस्थानातील बलाढ्य राजसत्तेच्या राजधानीत खुद्द महादेवाचे दर्शन घ्यायला निघाला होता...

कोणत्या महादेवाचे दर्शन घ्यावे...ज्या महादेवाच्या आशीर्वादाने शिवरायांनी साधारण माणसे हाताशी धरुन दिल्ली हादरुन सोडली...भगव्या झेंड्याचा धाक असेतु हिमाचल बसवून रायगडी स्वाभिमानाचे सिंहासन निर्माण केले त्याचे दर्शन घ्यावे....की ज्याच्या अस्तित्वाने हिंदुस्थानातील बाराही जोतिर्लिंगे आजही टिकून राहिल्या त्या दस्तूरखुद्द राजश्री शिवाजीराजे भोसले नावाच्या महादेवाचे दर्शन घ्यावे....केवळ मनाची घालमेल....!

आजवर ज्याच्यामुळे मंदिराचे कळस,अंगणातील तुळस,गळ्यातल्या माळा, कपाळावरील टिळे आणि उरात जग जिंकायची ईर्षा टिकून राहिले ते शिवाजी राजे साक्षात तमाम हिंदुस्थानाचेच जगदीश्वर महादेव होते यात मात्र शँका नव्हती..!

डोळ्यात आलेले पाणी पुसत सखाराम होळीच्या माळावर आला.
अनेक कुणबी आपापल्या मंडई लावण्यात व्यस्त होते.
बाजारात शिस्तबद्ध गर्दी दिसू लागली.
धुक्यामुळे माणसे विरळ होती पण अस्तित्व जाणवत होते..!
पेठ ओलांडली आणि पेठेच्या डाव्या हाताकडून एक वाऱ्याचा मोठा झोत सखाराम च्या मुखावर आला तसा सखाराम व त्याचे साथीदार दचकले....पाठोपाठ त्यांच्या कानात कोणीतरी गुण गुंण गुणगुणल्याची जाणीव त्यांना वाटली तसे चौघेही घाबरलेल्या नजरेने त्या डोंगराच्या विस्तीर्ण टोकाकडे बघत उभे राहीले....तितक्यात समोरुन घोड्यावरून येत असलेल्या एका धारकऱ्याने चौघांना थांबवले व विचारले...ए कोण रं तुम्ही....?

त्याच्या बोलण्याने भानावर आलेल्या सखाराम ने " उंबर फुल..परवली शब्द सांगितला व जगदीश्वर दर्शन कारण सांगितले...."

हे ऐकताच धारकरी बोलला....बर बर नाईकांच्या खासगीतले लोक वाटतं... जावा जावा..."

थोडा वेळ थांबत पाठमोऱ्या झालेल्या घोडेस्वाराला थांबवत सखाराम बोलला.....शिलेदार....या बाजूचा रस्ता कुठशी जातो ओ....?

घोड्याचा लगाम खेचत गोल गिरकी घेऊन तो धारकरी त्या रस्त्याकडे पाहत बोलला....आर बाबांनो तिकडं नका बघू....तिकडं गेलेली माणस माघारी येत नाहीत.....टकमक टोक हाय तिकडं...टकमक टोक......

त्या शिलेदाराचे ते शब्द कानावर पडताच सखाराम व त्याच्या सवंगड्याच्या अंगावर भीतीने सर्दिशी काटा आला...!

·●क्रमश●•

‘बाजींद’

भाग क्र.३०

लेखन,संकल्पना,शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या

www.facebook.com/kustimallavidya

wahtsapp 9850902575

ज्या टकमक टोकाचे नुसते नावच ऐकून अख्या धनगरवाडी रात्रीची झोप लागत नव्हती,त्या टकमक टोकाच्या जवळच आपण उभे आहोत ही कल्पनाच सखाराम,नारायण,सर्जा आणि मल्हारीच्या हृदयाचा थरकाप उडवणारी होती.

वेळ मारून नेत ते चौघेही जगदीश्वराच्या मंदिराकडे निघाली.मंजुळ घंटानिनाद आणि रुद्राचा घुमणारा आवाज कानी पडताच सखाराम ने जाणले कि श्रीजगदीश्वर मंदिर जवळ आले आहे.

मंदिराच्या सभोवताली ताशीव दगडांची पक्की तटबंदी बांधली होती.

कमरेला तलवारी,पाठीला ढाल आणि हातात उंचापुरा भाला घेतलेले कित्येक धारकरी तिथे पहारा देत होते.

जगदीश्वराची नक्षीदार दगडी कमान पार करून ते चौघेही आत प्रवेशले.

सकाळच्या गारव्यात आणि रिमझिम पावसात मंदिरातील सुगंधी धुपाचा सुगंध हे खरोखर एक रम्य चित्र होते.

सरकारी कार्यालयातील अनेक अधिकारी सकाळी सकाळीच दर्शन घेऊन दरबारी जायला गडबड करत होते.

सखाराम व चौघे पण जगदीश्वराच्या गाभाऱ्यात गेले.

समोर जगदीश्वराचे शिवलिंग शीतल जलधारेत न्हाऊन निघताना दिसत होते.

सभोवताली नाना तर्हेच्या शोभीवंत फुलांनी यथासांग पूजा केली होती.

समोर पुजारी मुखाने पवित्र मंत्र म्हणत येणाजाणाऱ्या भाविकांना तीर्थ देत होते.

सखाराम ने गुडघे टेकले आणि मन भरुन महादेवाचे दर्शन घेतले.

समुद्रमंथनातून निघालेले अतिजहाल विष प्राशन करून देवांचे प्राण वाचवणारा महादेव त्याचा दाह शांत करण्यासाठी जणू सह्याद्रीच्या त्या उंचच उंच गडकोट किल्ल्यात विसावला असावा अशी भावना सखाराम च्या हृदयात उचंबळून आली होती...त्याचे डोळे पाणावले होते.

त्या महादेवाने देवांसाठी विष प्राषण केले मात्र आमच्या महादेवाने सारे आयुष्य मृत्युच्या जिभेवर काढले होते.

धर्म,देव,नावालाही शिल्लक नव्हता,स्वत्व,अस्मिता,स्वाभिमान तर ऐकायलाही नवल वाटत होते.

माणुसकी नावाचा शब्द तर दुरापास्त झाला होता.

स्वार्थासाठी स्वकीयांचे गळे चिरणारा तो महाराष्ट्र जर शिवाजी महाराज जन्माला आले नसते आजही नरकात बुडून गेला असता.

आज माझ्यासारखा साधारण मेंढपाळ कष्टाची भाकरी समाधानाने खातोय ते केवळ महाराजांच्या मुळे याची जाणीव सखाराम च्या मुखावर होती.

नाहीतर आजवर कित्येक आदिलशाही,मोगलांच्या टोळधाडी आळीपाळीने महाराष्ट्रावर पडत होत्या.

आज आमच्या घरातील आया बाया,मुल,गुर ढोर सुखात आहोत यासाठी आमच्या महाराष्ट्राच्या महादेवाने प्रत्यक्ष महादेवापेक्षाही जहाल विष प्राशन केले आणि पचवले होते.

वयाच्या १४ व्या वर्षी रायरेश्वरासमोर हिंदवी स्वराज्याची शपथ घेऊन अखंड घोडा आणि तलवार हीच कुलदैवते मानून सतत हिंदवी स्वराज्याचा ध्यास उरात बाळगून हिंदुस्थानातील पाच पातशाहीना रणांगणात चारी मुंड्या चीत करून आज रायगडावर मराठेशाहीचे सुवर्ण सिंहासन स्थापन करून हिंदुस्थानातील कित्येक भंगलेल्या सिहासनाचा जणू बदला घेतला होता...!

आणि हे सारे कोणाला घेऊन तर साधी लंगोट वाली पोर बरोबर हेऊन.....अहो आज या पोरांचा धाक दिल्लीपर्यंत आहे याचे कारण केवळ शिवाजीराजे..!

सखाराम डोळ्यात आले पाणी पुसत बाहेर पडला.

सकाळच्या गार वाऱ्याने आणि बारीक तुषारासारख्या पावसाने त्याच्या डोळ्यात आलेल्या अश्रूला आणखीच थंड करत होते....!

ते चौघेही परत सरकारी अतिथीगृहात आले.

काही क्षण गेला खुद्द वस्ताद काका सोबत ३-४ धारकरी घेऊन आले.

येताच बोलले ...चला गड्यानो....महाराजांनी तुम्हाला भेटायची परवानगी दिली आहे.

दरबारी रीतरिवाज माहित नाही तुम्हाला म्हणून सांगतो दरबारात जास्त आवाज न करता बोलायचे आणि विचारेल तेवढीच उत्तरे द्यायची..!

चला...आवरा लौकर..!

असे म्हणत सखाराम व चौघे वस्ताद काकांच्या सोबत दरबाराकडे चालू लागले....!

नगारखान्यातून नगार्याचा आवाज येत होता.

सारे दरबारी वकील,भेटीसाठी परराज्यातून आलेले सरदार,सरकारी अधिकारी आणि केवळ महत्वाच्या व्यक्तींनाच नगारखान्याच्या आत असलेले शिलेदार माहिती विचारून,नावे व परवलीचे शब्द,ओळखीचे कागद तपासून ते लिहून घेऊन मगच आत सोडत असे.

नगारखाण्यातून आत प्रवेश करताच समोर असलेल्या भव्य दरबारात जाण्यासाठी असलेल्या कमानीतून आत प्रवेश दिला जात असे.

तिथे उभा असलेले हशम प्रतवारी करून कोण कुठे उभे राहायची सूचना करत होते.

आत माशालांच्या उजेडानी सारा दरबार उजळून निघाला होता.

समोर पाहताच चोपदार,भालदार हातात सुवर्णदंड घेऊन महाराज येण्याची वाट पाहत होते.

राजसदरेच्या बाजूलाच काही वकील,कारकून मंडळी समोर भूर्जपत्रे,टाक दवत घेऊन बसली होती.

आत साधारण पाच पन्नास लोक असतील पण कोणीही अजिबात मोठ्याने बोलत नव्हता.

कुजबूज मात्र सुरु असायची..!

राजसदरेच्या मधोमध महाराजांचे ३२ मण सोन्याचे आणि कित्येक हिरे,माणिक,मोती यांनी जडवलेले सुवर्णसिंहासन झळाळत होते..!

हेच ते सिंहासन ज्याचा धाक सारी पातशाही घेत होती.

सखाराम व त्याचे साथीदार वस्ताद काकांच्या बरोबर अगदी समोर उजव्या बाजूला जाऊन उभी होती.

त्यांच्या कामाचा व ओळखीचा कागद वस्ताद काकानी सदरेवर बसलेल्या वकिलांच्याकडे दिला व काहीतरी कानात सांगितले.

ते ऐकताच त्या वकिलाने तो कागद उघडून पहिला आणि सखाराम व त्याच्या साथीदारांच्याकडे पाहू लागले आणि समोर या अशी खून केली.

वकील बोलले.....सधारण किती दिवस झाले तुमच्या गावाला हा त्रास होत आहे ?

वकिलांच्या बोलण्याने सखाराम ने उत्तर दिले....जी...बरेच दिवस झाले ....पण या मागच्या धा-पंधरा दिसात जीत्राप आणि माणसांच्यावर पण वाघांनी हल्ला केला.

टकमकाच्या बाजूला जनावरे घेऊन हिंडवायाला जायला पण लोक घाबरत आहेत आता...!

मोठा श्वास घेऊन वकील बोलले..ठीक आहे .....!

वस्ताद काकांच्याकडे पाहत वकील बोलले की उत्तरेतून काही हेर महत्वाचा निरोप आला आहे.

त्या हेराना घेऊन महाराज काही वेळ खलबतखान्यात घालवत आहेत.

काही वेळात महाराज येतील....पहिला प्रश्न या चौघांचाच मांडूया....तुम्ही थांबा काही वेळ..!

सखाराम दरबारात चौफेर नजर फिरवू लागला.

अजूनही पटत नव्हते ,कधी स्वप्नातसुधा खुद्द शिवाजी महाराजांच्या समोर उभे राहता येईल ते...पण खंडोजी भेटला आणि सारे शक्य झाले आणि आम्ही मात्र त्याच्यावर नाही नाही त्या शंका घेतल्या....बिचारा परत भेटला की पाय धुवून पाणी पीइन त्याचे...पण कुठे असेल देव जाणे......

इतक्यात एक जोरदार आरोळी झाली.........

होशियार......होशियार ...होशियार......

प्रौढप्रतापकुलावातंस क्षत्रियकुलावतंस सिंहासनाधीश्वर महाराजाधीराज राजश्री शिवाजीराजे येत आहेत हो......... होशियार......होशियार ...होशियार......

महाराज....... प्रौढप्रतापकुलावातंस क्षत्रियकुलावतंस सिंहासनाधीश्वर राजा शिवछत्रपती कि .....

आणि सारा दरबार व सखाराम व त्याचे सहकारी अगदी बेंबीच्या देठापासून ओरडला......जय...जय ..जय ......!

महाराज सिंहासनाच्या पाठीमागून आले.

सोबत अनेक अंगरक्षक,शिलेदार,वकील होतेच......!

पांढरा शुभ्र अंगरखा,कमरेला दरबारी जगदंबा तलवार,डोक्यावर मंदील शिरपेचात रोवलेला मोत्याच्या तुरा आणि गळ्यात भोसले कुळाची आई तुळजाभवानीची कवड्यांची माळ.

कपाळावर शंभू महादेवाचे त्रिदळ व त्यातून शिवगंधाचा नाम.

कपाळातून निघालेले सरळ सळसळीत नाक,काळेभोर बोलके डोळे आणि ओठावर काहीसे स्मितहास्य मात्र चेहऱ्यावर कमालीची गांभीर्यता.......!

हेच ते शिवाजीराजे भोसले ज्यांनी वयाच्या १४ च्या वर्षी महाराष्ट्राला पारतंत्र्यातून मुक्ती देण्यासाठी रायरेश्वरी स्वराज्याची शपथ वाहिली...ज्या वयात आमची पोर पोराटकी खेळात मग्न असत्यात

त्यावेळी तोरणा किल्ला जिंकला...जावळीच्या मोऱ्यांची मिजास उतरवली..अफझलखानासारखा राक्षस समोरासमोर फाडला...पन्हाळगडाच्या वेढ्यातुन सिद्दीच्या हातावर तुरी देऊन निसटले....शाहिस्तेखानाला लाल महालात जाऊन बोटे तोडून शास्ता केली.....सुरतेसारखी मोगलांची आर्थिक राजधानी लुटून जाळून फस्त केली....आग्र्यात औरंगजेबाच्या नजरकैदेतून मिठाइच्या पेटार्यात बसून पळून आले....असे एक ना अनेक किस्से ऐकून सारा महाराष्ट्र गेली ३-४ दशके जगत होता.

महाराष्ट्राच्या दऱ्याखोर्यातून पहाटेच्या जात्याच्या ओव्यापासून ते लग्नाच्या मंगल अष्टकात शिवाजी राजांच्ये नाव घेतल्याशिवाय दिवस जात नसायचा की शुभकार्य होत असायचे..!

आया बायांची अब्रू,त्यांचे कुंकू निर्धास्त केलेला हा युगपुरुष वर्षावर्षांनी नव्हे तर युगायुगांनी जन्म घेतो........काय बोलावे आणि किती बोलावे......शब्द संपतात.....!

महाराजांनी सिंहासनाला वंदन केले आणि समोर उभ्या असलेल्या सभेकडे पाहताच ...सर्वांनी तीन मुजरे महाराजांना वाहिले.....

महाराजांनी आपला उजवा हात छातीशी नेत सर्वांचे मुजरे स्वीकारले आणि सिंहासनाकडे उजवा पाय पुढे टाकत आसनस्थ झाले.....!

समोर वकील हातात काही कागदे घेऊन आला व महाराजाना काहीतरी सांगू लागला......

समोर उभ्या असलेल्या हारकार्याने हाळी दिली........टकमक धनगरवाडीचे गावकारभारी सखाराम व त्याचे साथीदार समोर हाजीर हो......

त्याची आरोळी ऐकताच वस्ताद काकांनी सखाराम व चौघाना पुढे येण्यासाठी खुणावले..

सखाराम डोळे पुसत समोर गेला व सर्वानीही वाकून मुजरा केला.....

सखाराम व वस्ताद काकांच्याकडे पाहत महाराज बोलले......

वस्ताद काका ....काय समस्या आहे गावकऱ्यांची ...?

महाराजांच्या शब्दाने वस्ताद काका समोर झाले आणि खालच्या रवात बोलू लागले....

महाराज हे लोक टकमक खालच्या धनगरवाडीचे लोक...हा सखाराम गावाचा कारभारी...!

बहिर्जी नाईकांच्या खासगीतील परवलीच्या शब्दामुळे त्याना आपल्या पर्यंत आणले आहे...!

आणि वस्ताद काकांनी महाराजांच्या कानी टकमक टोक आणि खालच्या गावाची व्यथा सांगितली....!

क्षणभर विचार केला आणि महाराज बोलू लागले....

वस्ताद काका ..रायगड स्वराज्याची राजधानी.

साऱ्या महाराष्ट्रात रामराज्य आणायची स्वप्ने आपण पाहतोय आणि राजधानीखालची प्रजाच दुखी आहे हे बरे नव्हे ..बरे झाले नाईक यांना भेटले आणि त्यांनी ही बातमी आमच्यापर्यंत पोहोचवली नाहीतर ही आमची गरीब रयत इथवर येऊ तरी शकली असती का ?

काका...आजपासून टकमक चा राबता बंद करा.

गडावरून एकालाही कडेलोट करता कामा नाही आमची आज्ञा असल्याशिवाय.

न्यायाधीशांनी जर देहदंड सुनावला तर अंधारकोठडीत ठेवा मात्र कडेलोट करू नये.

समोर बसलेल्या वाकीलान्च्याकडे पाहत महाराज बोलले....पंत आजच एक आज्ञापत्र तयार करा आणि स्वराज्यातील सर्व गडकोटावर पाठवून द्यावे ...जर कडेलोट शिक्षा दिली तर सरकारी खर्चातून खाली गेलीली सर्व मृत शरीरे उचलून त्या त्या नातेवाईकाना द्यावी अन्यथा कोणीही कडेलोट न करता दुसरा मार्ग वापरावा आणि आजपासून स्वराज्याच्या राजधानीत टकमक कडेलोटासारखी शिक्षा कायमची बंद झाली असा आदेश काढावा.

जी महाराज.... असे म्हणत वकिलांनी महाराजांचा हुकुम कागदावर लिहून त्यावर शिक्कामोर्तब केला..!

क्षणभर थांबून महाराज बोलले.....

आता खुश झालात ना ?

सखाराम कडे पाहत महाराज बोलले .....

खुद्द महाराजांच्या बोलण्याने भाम्भेरी उडालेला सखाराम बोलला.....

जी महाराज....महाराज मला न्याव मिळूदे अगर न मिळूदेल ,तुमास्नी डोळभरून बघितल..आमच्या गरिबांच्या जल्माच सोन झाल...आमास्नी आता काय बी नगो......

सखाराम असे बोलताच महाराज म्हणाले....

अरे,तुम्ही तर हिंदवी स्वराज्याची खरी ताकत आहात.तुमच्यासारखी माझी बहिर्जी,तानाजी,बाजी,मुरारबाजी,शिवा काशीद,असे कितीतरी जण हासत हासत मरणाशी खेळत जगले म्हणून हे राज्य अवतरले...तुम्ही निर्धास्त गावी जा...आणि वस्ताद काका....यांच्या गावात सरकारी खर्चातून धान्य,बी-बियाणे,काय हवे नको हे बघितले जाईल.

यांचे नुकसान केवळ आपल्या चुकीमुळे झाले आहे त्याची भरपाई म्हणून हे सर्व आपण करावे....

जी महाराज....असे म्हणत वस्ताद काका मुजरे घालत बाजूला गेले आणि सखाराम ला घेऊन दरबाराच्या बाहेर पडले......!

साक्षात महाराष्ट्राच्या देवाच्या दर्शनाने सखाराम व त्याचे सहकारी अक्षरश रडू लागले होते.

नगारखाना ओलांडून ते चौघे महाराजांच्या दरबारातून बाहेर आले होते.....

हसत हसत वस्ताद काका म्हणाले.....

गड्यानो.....लई नशीबवान हायसा तुमी.

सात जन्मात मिळणार न्हाई एवढ दिल महाराजांनी..आता तुम्ही आणि गावकरी कायमचे सुखी झालात.

तुमच्या आजवरच्या नुकसानीचा खर्च सरकार देणार आहे.इथून पुढ गावात काही पण गरज लागली तर सरकारी कोतवाल,हवालदार पाटील स्वता येऊन मदत करणार असा आदेश आहे माझ्याकडे ज्यावर महाराजांची सही आहे......!

सखाराम व त्याच्या साथीदारांना मनस्वी आनंदी झाला ....

वस्ताद काकांनी महाराजांच्या आज्ञेचा कागद सरकारी दफ्तरात जमा केला आणि सोबत २ हशम घेऊन सखाराम च्या गावाकडे जाण्याचा निर्णय घेतला.

३ बैलगाड्या भरून बियाणे,नुकसान भरपाई म्हणून रोख रक्कम आणि धनगरवाडीच्या शेतकर्यांना कायमस्वरूपी रायगडावर बाजारासाठी भाजी पाला विकायचे परवाने दिले गेले......!

सखाराम व त्याचे सवंगडी मनापासून आनंदी झाले होते,आनंद ओसंडून वाहत होता......

वस्ताद काका आणि ते चौघे सोबत हशम हत्यार रायगड उतरून चीतदरवाजापासून खाली आले...!

सखाराम वस्ताद काकांना बोलला.....काका ..राहूदे कशाला तरास घेतासा..आम्ही निघतो पायीच...!

यावर काका बोलले...येड हायसा....तुम्हास्नी सहीसलामत गावात पोचवून टकमक खाली सरकारी पंचनामा केल्याबिगर आता मला आणि आमच्या माणसाना जाता येणार नाही.

तुम्हाला गावात सोडतो आणि मग आम्ही येऊ मागे...चला.....

एव्हाना दुपारचा प्रहर टाळून गेला होता.

आकाशात पावसाळी ढगांनी पुन्हा गर्दी केली आणि मुसळधार सरी कोसळू लागल्या......

काथ्याच्या विणलेल्या गोंच्या पांघरून ते सारे निघाले होते.

वस्ताद काका,सखाराम आणि त्याचे सोबती आणि सोबत दोन धारकरी होते.

वाटेत महाराजांचे अनेक गस्तीचे मेटे होतेच...सगळ्या मेटेवर वस्ताद काकांच्या ओळखीची मंडळी होती मात्र शेवटचा एका मेटा होता ज्यात ४ धिप्पाड पण नवीन धारकरी होते त्यांनी या साऱ्यांना हटकले..!

ए थांबा र ....कोण तुम्ही...कुठ्ना आलासा..?

वस्ताद काका समोर आले आणि त्यांनी त्यांची ओळख सांगितली...पण,त्या चौघांनी त्यांची ओळख साफ धुडकावली आणि बोलले....तुम्ही कोण बी असा ओ....पावसाळ्यात रायगड चा राबता बंद असतोय एवढ पण माहिती नाय काय स्वताला हेर म्हणून घेतायसा ते .....

त्या चौघांनी सोबत आणलेल्या धार्कार्यांच्या कमरेच्या तलवारी काढून घेतल्या आणि सर्वांना मोर्च्याखाली तयार केलेल्या कक्षात घेतले ...!

सांगा...कोणाचे हेर तुम्ही ..?

जाताना कसे दिसला नाही ......खर सांगा नायतर गस्तीच्या टेहळणी वेळी सापडला म्हणून जीवाशी जाशीला.......

वस्ताद काका मोठ्या आवाजात बोलले.......पौर्णिमेचा चंद्र......!

तो परवली चा शब्द ऐकताच त्या चार धारकरयाची बोबडी वळली....मागे सरकत ते बोलले.....माफ करा ...मगापासून सांगितला अस्तासा शब्द तर एवढी वेळ आली नसती....तुम्ही आणि हे दोन धारकरी जाऊ शकता पुढ...पण या चौघांना आम्ही सोडू नाही शकत...!

दरम्यान काकांनी खूप समजावून सुधा त्या गस्तीच्या मोर्च्यातून सखाराम सुटू शकला नाही.

शेवटी वस्ताद काका बोलले..अरे हे बहिर्जी नाईकांची खास माणसे नुकतीच महाराजांना भेटून आली आहेत.

मला वर जाऊन फक्त परवाने आणावे लागतील...माझे ऐका सोडा यास्नी....

पण,त्या चौघांनी यांना सोडले नाही.

ते म्हणाले माफ करा शिलेदार..पर मागच्या वेळी शिर्क्यांचा जो दंगा झाला तेव्हापासून कोणी पण तोंडी ओळखीने सोडू नका असा आदेश आहे बहिर्जी नाईकांचा...त्यामुळे परवली शब्द गडावर चालेल इथ नाही....खरच मला माफ करा.......

शिकर्यांचे नाव घेताच सखाराम ला खंडोजी आठवला....आणि त्याला आठवले कि सखाराम ने त्याला दंडावर बांधलेली चांदीची पेटी दिली होती...त्याने क्षणात चांदीची पेटी काढली आणि त्या शिलेदाराच्या हातात दिली...आणि परवलीचा शब्द उच्चारला......चंदन...!

ते चार शिलेदार....वस्ताद काका आणि सोबत आलेले दोन धारकरी त्या परवलीच्या शब्दाने आणि त्या चांदीच्या पेटीकडे पाहत डोळे मोठे करून सखाराम कडे पाहू लागले......भीतीने सर्वांगावर काटा उभा होता सर्वांच्या.....!

क्रमश

पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या

www.facebook.com/kustimallavidya

wahtsapp 9850902575

‘बाजींद’

भाग क्र.३१

लेखन,संकल्पना,शब्दांकन

पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या

www.facebook.com/kustimallavidya

wahtsapp 9850902575

चांदीची पेटी आणि परवलीच्या शब्दाने वस्ताद काका कमालीचे त्रस्त झाले.

त्यांनी त्वरित सोबत आणलेल्या हशमाना रायगडी परत जायला सांगितले.

चौकीच्या पहारेकऱ्यांना उद्देशून ते बोलले....तुमची ओळख पटली का ?

असेल पटली तर आम्हाला पुढे जायचे आहे ,सोडा त्यांना.

भयभीत शब्दात ते बोलले...शिलेदार आमची चांगलीच ओळख पटली,जावा तुम्ही याना घेऊन.....!

असे बोलताच,सखाराम व त्याचे सहकारी वस्ताद काकासोबत चौकीतून रायगडाखाली गेलेल्या वाटेने चालू लागले.

बराच वेळ चालून झाला मात्र कोणी कोणासोबत बोलत नव्हते.वस्ताद काका कसल्यातरी गंभीर विचारात होते...

चंदन.....चांदीची पेटी.......हा परवलीचा शब्द आणि चांदीची पेटी माझ्या खंडोजीची आहे....यांना कशी भेटली हि पेटी....!

वस्ताद काकांनी हमरस्ता सोडून जंगलातील एक गुप्तवाट पकडली आणि त्या निबिड अरण्यातील वाटेने ते रस्ता कापू लागले.

बराच वेळ गेला आणि वस्ताद काकांनी मौन सोडत सखाराम ला प्रश्न केला.....

सखाराम.....हि चांदीची पेटी आणि परवलीचा शब्द तुम्हाला कोणी दिला ?

आकस्मित प्रश्नाने सखाराम भानावर आला.....

जी...जी...सखाराम ला शब्द फुटेना

जी..जी..काय काय असेल ते खरे सांगा ....!

तुम्हाला काही वाटत नसेल या गोष्टीचे पण,ज्या गोष्टीमुळे स्वराज्याच्या हेरखात्याची झोप उडाली,अन्न पाणी गोड लागेना तोच विषय आज पुन्हा समोर येतोय ...माझी विचार करून करून बुद्धी गंजून गेली आहे...!

कोणी दिली चांदीची पेटी सांगा.....नाहीतर तुम्हाला कैद करून वदवून घ्यायची कला पण आहे आमच्याकडे....

कैदेची भाषा ऐकताच सखाराम बोलू लागला....

धनगरवाडी-नरभक्षक वाघ-टकमक टोक.....आणि वाघांच्या तावडीतून सुटका केलेला खंडोजी कसा भेटला हे सांगताच वस्ताद काका ओरडले....

काय ?

खंडोजी भेटला...?

मूर्ख आहात काय तुम्ही ?

का मला वेडा समजत आहात.....

खंडोजी या जगात नाही...... खंडोजी मेलेला आहे ....मेलेली माणसे कशी भेटतील तुम्हाला ...?

हे काकांचे शब्द ऐकताच सखाराम आणि त्याच्या साथीदारांनी डोळेच पांढरे केले...त्यांची पाचावर धारण बसली....

सखाराम ने मग मात्र घडलेला सारा वृत्तांत सविस्तर त्याना कथन करायला सुरवात केली ...

वाघांच्या तावडीतून केलेली सुटका...सावित्री आणि राजे शिर्के यांची भेट..खंडोजी च्या तोंडून ऐकलेली बाजींद ची कथा....

हे सर्व ऐकताच वस्ताद काका मटकन खालीच बसले.....

अरे हे कसे शक्य असेल ?

खंडोजी तर या जगात नाही.......

मेलाय तो....मारलाय त्याला......!

वस्ताद काकांचे हे बोल ऐकताच सखाराम बोलला....

काका...ही पेटी बघा....आम्ही साधी गरीब लोक...कशाला राजकारणात पडतोय..जे पाहिलं...ज्याने हे दिल ते तुम्हाला सांगितलं..खंडोबाची आन मी खोट नाय बोलत....

पण,काका खंडोजी मेलाय तर काय त्याचं भूत होत काय आमच्यासोबत...?

शक्यच नाही ओ..माणसासारखा माणूसच होता,किती साधा आणि सरळ.....

गप्प बसा.....काका ओरडले.....

काय माहिती काय आहे खंडोजीबद्धल तुम्हास्नी.....या हातानी लहानाचा मोठा केलाय ,कुस्ती शिकवली,हत्यारे शिकवली आहेत मी......!

पण,कर्तव्यापुढे हिंदवी स्वराज्यात कोणालाही मान नाही....

असे म्हणत वस्ताद काका बोलू लागले....

ती रात्र आमच्या आयुष्यातील सर्वात वाईट रात्र होती.

जनावरांची भाषा अवगत असणारा बाजिंद च्या तावडीतून प्रत्यक्ष आमच्या बहिर्जींनी जर आम्हाला वाचवले नसते तर आज आम्ही जिवंत नसतो...

जीवना-मरणाच्या दारात आम्ही सारे ज्याच्यामुळे उभे होतो तो मात्र लग्नाच्या बोहल्यावर आनंदाने उभा होता...!

पण,खुद्द बहिर्जी नाईक आमच्या सोबत होते ,त्यामुळे पुढे महासागर जरी आला असता तरी विजय आमचाच होता....!

एक राजकारण घडले त्या रात्री.....

यशवंतमाचीच्या जंगलात गस्तीवर असलेल्या मावळ्यांच्या हाती यशवंतमाचीचे पैलवान लागले....भीमा जाधव आणि त्याचे सहकारी.

त्याना कैद करून मावळ्यांनी आमच्या छावणीत बहिर्जी नाईकांच्या समोर आणले...

घाबरलेल्या भीमाने यशवंतमाचीचा सरदार मला करणार असाल तर मी तुम्हाला माचीत घुसायची वाट दाखवतो असे म्हणाला.....आणि त्याने दाखवलेल्या वाटेने मराठ्यांची सारी सेना यशवंतमाचीचा मार्ग त्या काळोख्या अंधारात चालू लागली....

खंडोजी आणि सावित्री विवाहाच्या बंधनात अडकल्याचीही बातमी भीमाने आम्हाला दिली होती.

ती रात्र खंडोजी साठी काळरात्र ठरली होती.

कर्तव्यात कसूर करून एका स्त्रीसाठी मराठ्यांच्या विरोधात शस्त्र उचलणारा खंडोजी ,बहिर्जी नाईकांच्या डोक्यातून जात नव्हता,यशवंतमाचीसारख्या छोट्याश्या राज्याला स्वराज्यात आणायला इतका अवधी कसा जातोय याची उत्तरे महाराजांना हवी होती.

त्यामुळे खुद्द बहिर्जी नाईकांनी या मोहिमेत स्वताहून भाग घेतला होता.

नाईक स्वता मोहिमेत असले कि मावळ्यांना प्रत्यक्ष शिवछत्रपती सोबत असल्याचा अनुभव येत असे...त्यामुळे जवळपास विजयाची माळ आमच्याच गळ्यात पडणार असे वाटत होते.

यशवंतमाचीच्या आत आम्ही सारे पोहचलो.

काही करून राजे येसाजीरावाना कैद करायची ही योजना आखली होती.

आत किती फौज आहे याची बित्तंबातमी भीमाने अगोदरच आम्हाला दिली होती.

मध्यरात्र उलटून गेली होती आणि त्या किर्र रात्रीत साखरझोप घेणाऱ्या यशवंतमाचीत मराठ्यांची पहिली आरोळी घुमली.....

हर हर महादेव...छत्रपती शिवाजी महाराज की जय ....

मराठ्यांच्या आरोळीने झोपलेल्या माणसांच्या अंगावर विस्तू पडून दचकून जाग यावी अशी यशवंतमाची जागी झाली.

शिर्के मंडळी सुध्दा युद्धाला तयार झाली.

हजारभर मराठे विरुद्ध कित्येक शिर्के मंडळी आता एकमेकाविरुद्ध तुटून पडणार होती...पण एवढ्या काळात मराठ्यांनी यशवंतमाचीची त्रेधा उडवणे सुरु केले होते.

कित्येक घरे जाळून टाकली होती,जीव वाचवून कित्येक लोक रस्त्यावरून धावत होते.

मराठ्यांच्या फौजेचे वैशिष्ट्य म्हणजे शत्रूच्या कुटुंब काबिल्याला कधीही प्राणदंड दिला जात नसे ...कित्येक शिर्के मंडळी रस्त्यावरून धावू लागली..

सारी यशवंतमाची भीतीने थरथर कापत होती...

दरम्यान यशवंतमाचीच्या बालेकिल्ल्यातून शूर शिर्क्यांची चिवट सेना नदीला पूर यावा तश्या त्वेषाने हातात नंग्या समशेरी घेऊन बाहेर पडल्या....

काळभैरवाच्या नांवान चांगभलं.......

तलवारीचे घाव एकमेकावर पडू लागले...!

मराठे विरुद्ध मराठे लढू लागले.

हेच शिवाजी महाराजांना नको होते म्हणून कित्येक वर्षे यशवंतमाचीकडे महाराजांचे दुर्लक्ष होते.

पण,परकीय शत्रूपेक्षा स्वकीय शत्रूच जास्त घातक हा अनुभव महाराज सारया आयुष्यभर घेत आले होते.

आता निर्वाणीचा क्षण होता,रामराज्य आणायचे असेल तर रावण स्वकीय आहे म्हणून गप्प बसता कामा नये.

आज शिर्के विरुद्ध मावळे घनघोर युद्धास प्रारंभ झाला होता.

खुद्द बहिर्जी नाईक या युध्दात होते.

कसे काय देव जाणे...आजवर बहिर्जी नाईक प्रत्यक्ष युद्धात फार कमी येत असत.

व्यवस्थित पूर्वनियोजन करून देत सारे तेच करत असायचे मात्र हातात तलवार घेऊन लढणे सहसा दिसत नव्हते...!

नाईकांच्या युद्धनीतीने मराठ्यांची सेना शिर्क्यांच्या विरोधात लढत होती.

यशवंतमाचीशी वैर करून त्यांच्याच विरोधात भीमा जाधवही लढत होता.

पण,या सार्या दंग्यात खंडोजी कुठे होता ?

तो तर सर्वात पुढे येऊन लढायला हवा होता,आतातर यशवंतमाचीचा जावई होता तो....

पण,खंडोजी कुठेच दिसत नव्हता....

पण त्याच्याकडे लक्ष द्यायला कोणाला वेळ होता....

जीवघेण्या लढाईला प्रारंभ झाला.

भीमा जाधवाने शिर्क्यांचा संहार मांडला होता,त्याच्या तलवारीच्या घावाखाली कित्येक शिर्के मंडळी मृत्युमुखी पडू लागली.

भीमाच्या भोवती अनेक शिर्क्यानी कडे केले होते...तरीही भीमा मागे हटत नव्हता...मारामारीत भीमा चांगलाच दूर गेला...दिसेनासा झाला..तरीही तलवारीचे खणखणाट ऐकू येतच होता.

बहिर्जी नाईकांनी यशवंतमाचीच्या राजवाड्यावर हल्ला चढवला..काही क्षण भूतकाळात जमा झाले आणि माचीवर हिंदवी स्वराज्याचा भगवा झेंडा फडकू लागला...

झाले.....अनेक वर्षे गुर्मीत राहून महाराजांशी अभिमानाने वैर मिरवणारी यशवंतमाची हिंदवी स्वराज्यात सामील झाली.

राजवाड्यात मात्र राजे येसाजीराव शिर्के,त्यांचा कुटुंबकबीला जाग्यावर नव्हताच....कदाचित युद्धाच्या घोषणा झाल्या त्यावेळी गुप्तवाटेने ते पसार झाले असावेत असे वाटते...पण माची स्वराज्यात सामील झाली.

एक मात्र घटना खूप वाईट तितकीच चांगलीही घडली.

खंडोजी मराठ्यांच्या हाती जिवंत गवसला.

खुद्द बहिर्जी नाईकांनी त्याला चोरवाटेने पळून जाताना पकडले होते.

तोंडावर काळे अवलान बांधून त्याला हात बांधून धक्के मारत त्यांनी सर्वांसमोर आणले....!

यशवंतमाची हिंदवी स्वराज्यात सामील झाल्याचे वृत्त रायगडावर रवाना झाले.

माचीच्या रक्षणाला मराठी फौज ठेवत नाईक आणि वस्ताद काका खंडोजीला घेऊन रायगडावर आले होते...!

कोणत्या तोंडाने सांगावे महाराजांना खंडोजी सारख्या निष्ठावान हेराची गद्दारी..!

महाराजांना अश्या गोष्टी न सांगणेच हितकारक असते...

खंडोजीने कर्तव्यात कसूर करून,एका स्त्री च्या मोहमायेत अडकून आपल्याच बांधवाना कित्येकदा धोक्यात आणले व त्यांच्याविरुद्ध शस्त्र चालवले,त्याच्या या वागण्याने मराठ्यांच्या गुप्त मोहिमेला आणि हेरखात्याच्या नियमांना तडा गेला..कित्येक मराठे मृत्युमुखी पडले,कित्येक बायका विधवा झाल्या.

असा ठपका त्याच्यावर ठेवला गेला आणि ....

साऱ्या रायगडच्या काळजात धस्स झाले अशी कठोर शिक्षा खुद्द बहिर्जी नाईकांनी फर्मावली.

कडेलोट......

होय.....अश्या फितुरांना स्वराज्यात एकाच शासन....मृत्युदंड.

भल्या पहाटेच खंडोजीचे हात मागे बांधून तोंड काळ्या वस्त्राने बांधून त्याला टकमक टोकावर आणले गेले होते.

वस्ताद काका स्वता पाठीमागे उभे होत.

ज्याला लहानाचे मोठे या हातानी केले ,कुस्तीसह हत्यारे शिकवली.

हेरखात्यात नोकरी मिळवून दिली अश्या पोराला आज स्वताच्या हाताने मरण द्यायचे होते....

वस्ताद काकांनी बहिर्जी नाईकांना हात जोडून विनवणी केली....

नाईक..माझी आजवरची सेवा चाकरी रुजू धरून एक डाव या खंडोजीला माफी करा.

या पोरांन आजवर जीवावरच्या कामगिऱ्या आपल्या सोबत केल्या आहेत.

अशीही यशवंतमाचीसुध्दा स्वराज्यात सामील झाली असताना त्याला इतकी भयानक शिक्षा कशासाठी...?

कशासाठी......आज खंडोजीला माफ केले तर हजारो हेर जे स्वराज्यात फिरत आहेत ते सुध्दा स्वार्थापोटी संसार थाटून बसतील वस्ताद काका.

साधारण माणसांचे आयुष्य वेगळे आणि स्वराज्याचे हेर खाते वेगळे आहे हे तुम्ही जाणता.

इथे उठता बसता मरणाशी सामना करत आपण जगतो...आणि आपल्या मुळेमहाराष्ट्राची प्रजा आज सुखात आहे.

महाराजांची शिस्त,त्यांची शिकवण....त्यांचा त्याग डोळ्यासमोर आणा काका ..तो एका पारड्यात टाका आणि खंडोजीचा गुन्हा ...कोणाचे पारडे जड होईल तुम्हीच ठरवा.

खंडोजीच्या वैयक्तिक सुखासाठी कित्येक मावळे तलवारीच्या घावाखाली मरून गेली.

ज्या शिर्क्यांच्या मुजोरीने आदिलशाही महाराजांना कमी लेखत होती त्या यशवंतमाचीची महत्वकांकाक्षी मोहीम आपण खंडोजी ला दिली आणि घात करून बसलो.

आज रायगड परिसरात अनेक स्वकीय राज्ये स्वराज्यात नाहीत....एका यशवंतमाचीला जिंकायला इतका वेळ तर मग इतर राज्यांचे कसे होईल..!

महाराजांच्या डोक्यात दक्षिण-दिग्विजय थैमान घालत आहे..आणि इकडे हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडच्या दिव्याखाली अंधार.

हा ठपका महाराजांच्यावर येतो काका...देशाचा विचार करा..म्हणजे वैयक्तिक खंडोजीवरील तुमचे प्रेम कुठे आहे समजेल.....

बहिर्जी नाईकांची नाकपुडी रागाने फुलली होती.

पाठमोरे उभे राहून ते भरल्या डोळ्याने सांगत होते..!

खंडोजीवर साऱ्यांचे प्रेम होते.

मनमिळावू स्वभाव,कुस्तीत-हत्यारे चालवण्यात पटाईत....महाराजांच्यावर अढळ श्रद्धा या गुणामुळे तो सर्वांच्या मनात बसला होता.

पण,असा योद्धा एका स्त्री साठी असा का वागू शकतो याचे कोडे सर्वांना पडले होते.

त्याला मृत्युदंडाची शिक्षा देऊनही महाराज गप्प का होते हे कोडे उलघडत नव्हते..!

कदाचित दक्षिण दिग्विजयाच्या तयारीमुळे त्यांना वेळ नसेल.....!

वस्ताद काका मात्र हुंदके देत देत सारे आठवत होते.

खंडोजीला टकमक टोकावर आणला गेला होता....

टकमकाखालून थंडगार वारे वर येत होते.

पहाटेच्या गर्द शांततेत सारे स्वराज्य झोपी गेले होते ,मात्र स्वराज्यासाठी अहोरात्र जगलेला पण कर्तव्यात चुकलेला एक हेर आता मरणाच्या दारात उभा होता...!

वस्ताद काकांनी डोळे पुसत त्याला धरून आणलेल्या हशमाना खून केली....एक क्षण..दुसरा क्षण.....खंडोजीला टकमक टोकावरून खाली ढकलून दिले गेले...!

हजारो हात खाली तो देह गेला आणि एका मोठ्या खडकावर आपटला आणि खाली खोल निबिड अरण्यात रक्ताने माखलेला खंडोजी गतप्राण झाला....

सूर्य उगवला.

हजारो सूर्यकिरणांनी रायगड उजळून निघाला ,पण गडावरील कोणाचेच लक्ष कामात नव्हते..सर्वांच्या मुखात एकच नाव होते खंडोजी...!

आज एक नवीन अध्याय लिहला गेला.

स्वराज्यात फितुरांना क्षमा नाही..इथे भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ असते.

खंडोजी चा अध्याय संपला.

यशवंतमाची वर भगवा ध्वज अभिमानाने डोलू लागला.

राजे येसाजीराव आणि जिच्यामुळे खंडोजीला प्राण गमवावे लागले ती सावित्री चोरवाटेने विजापूर कडे रवाना झाली होती.

भीमा जाधव शिर्क्यांच्य हातून ठार झाला होता.....!

यशवंतमाची च्या मोहिमेने खंडोजी सारख्या निष्ठ्वान हेराचा बळी मात्र नक्कीच घेतला होता.....एका स्त्रीच्या मोहपाशात कर्तव्य विसरलेला हेर....खंडोजी...!

वस्ताद काकांना हुंदके आवरत नव्हते ...सखाराम आणि त्यांच्या साथीदारांची मात्र पाचावर धारण बसली होती........खंडोजी मरून गेला आहे,तर आम्हाला इथवर आणले तरी कोणी....भीतीने त्यांचे सर्वांग थरथरत होते....!

क्रमश

पै.गणेश मानुगडे

कुस्ती-मल्लविद्या

www.facebook.com/kustimallavidya

wahtsapp 9850902575

आपल्या प्रतिक्रिया खालील लिंक क्लिक करून द्या....

https://www.facebook.com/kustimallavidya/photos/a.122208951272492.25462.121942101299177/625953350898047/?type=3&theater

छत्रपती संभाजीराजे विरचित
बुधभूषणम्

हे पुस्तक प्रताधिकार मुक्त असून ते जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहोचावे हा उद्देश आहे.

हे पुस्तक आपण जास्तीत जास्त लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवण्यासाठी आपण मदत कराल अशी अपेक्षा आहे.

टीम ई साहित्य प्रतिष्ठान ई

esahity@gmail.com

Government Oriental Series—Class C, No. 2

THE BUDHABHŪSANA OF KING SAMBHU

With an Introduction, Notes etc.

BY

H. D. VELANKAR, M. A.

Professor of Sanskrit, Wilson College, Bombay.

PUBLISHED BY

Bhandarkar Oriental Research Institute, Poona.

1926

OUP—902—26-3-70—5,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. S 172.2 Accession No. G. S 2156

Author S18B

Title શાંખૂટેપ બધ બુધણાય? 1966.

This book should be returned on or before the date last marked below.

GOVERNMENT ORIENTAL SEIRES

CLASS C, No. II

PREPARED UNDER THE SUPERVISION OF
THE PUBLICATION DEPARTMENT OF
THE BHANDARKAR ORIENTAL
RESEARCH INSTITUTE,
POONA.

POONA
Bhandarkar Oriental Research Institute
1926

Government Oriental Series—Class C No. 2

THE

BUDHABHŪṢAṆA

OF

KING ŚAMBHU

With an Introduction, Notes etc.

BY

H. D. VELANKAR, M. A.

Professor of Sanskrit, Wilson College, Bombay.

PUBLISHED BY

Bhandarkar Oriental Research Institute, Poona.

1926

Copies can be had direct from the Bhandarkar O. R. Institute, P. O. Deccan Gymkhana, Poona, India.

Price Re. 1-As. 8 per copy exclusive of postage.

POONA:

Printed from type set up at the Bhandarkar Institute Press Anandashram, Budhwar Peth, and published by V. G. PARANJPE, M. A., LL. B., D. Litt., Secretary, Bhandarkar Oriental Research Institute, POONA.

First Edition, One Thousand Copies.

श्रीमच्छंभुनृपविरचितम्

॥ बुधभूषणम् ॥

एम्. ए. इत्युपपदधारिणा
वेलणकरवंशोद्भवेन दामोदरसूनुना हरिश
आङ्ग्लभाषाप्रस्तावनया टिप्पनीभिश्च संपादित

पुण्यपत्तनस्थ—
भाण्डारकरप्राच्यविद्यासंशोधनमन्दिराधि
भाण्डारकरमन्दिरमुद्रणालये मुद्रयित्वा प्राकाश्यं नी
शके १८४८, खिस्ताब्दे १९२६
मूल्यं सार्धो रूप्यकः

TABLE OF CONTENTS.

	Pages
Author's Preface	viii
Introduction	ix-xv
Text	१-९६
Chapter I	१-२५
Chapter II	२६-८९
Chapter III	९०-९६
Notes	1-10

PREFACE

The present edition of the Budhabhūsana is based upon a single manuscript in the MSS library of the B. B R A Society of Bombay. The manuscript is incorrect in many places and has left some gaps here and there. From the writing and paper &c, the MS appears to have been written before 150 years, or so I am greatly indebted to the B B. R A. Society for allowing me to make use of their manuscript for this edition

I feel glad to express my obligations to Mr C A. Kincaid, C. I E, and also to the late Rao Bahadur Parasnis, both of whom gave me valuable information regarding Sambhaji.

I further acknowledge with gratitude, the assistance which I received from Mr Purushottam Vishram Mavji, J P., of Bombay. He showed me his own copy of a few selections from Sambhaji's Hindi poems, and permitted me to print them. These selections, however, have not been printed in this book as it is so desired by the Executive Board of the Bhandarkar Oriental Research Institute.

Lastly, I thank my friend Mr. G B Bapat, M A, who much helped me in preparing the press-copy, and others who similarly helped me in bringing out this edition.

H D VELANKAR

INTRODUCTION.

(A Reprint from J B. B. R. A S 1925)

In 1920 I was entrusted with the work of preparing a descriptive Catalogue of Sanskrit and Prakrit manuscripts of the Bombay Branch Royal Asiatic Society While doing this I came across an incomplete Sanskrit manuscript which on close inspection, was found to contain a Sanskrit work called "Budhabhūsana", claiming for its author King Śambhu, popularly known as Sambhaji, son of Shivaji the Great This was rather striking since nothing but vicious deeds, at the most brave and daring, are usually connected with the name of Prince Sambhaji On going through the whole work, however, I found that it scarcely contained anything of either literary or historical importance Nor could it decisively prove that Sambhaji was a man of letters. However, the mere fact that Sambhaji's name was connected with a literary work, has induced me to bring out an edition of the work

The wrok is apparently divided into three chapters, not clearly distinguished from each other The first contains 194 verses, mostly Subhāsitas, which are quotations from well-known authors, rendered popular owing to their strikingness, but often the sources of which are unknown. The first seventeen verses are introductory; they contain a brief history of the author's family, written in good easy Sanskrit and, together with the next eleven stanzas containing a hymn to Goddess Bhavānī, are the only few lines, which are directly from the author's pen. The first six of these contain praises offered to Gajānana, Śiva, Guru and Pārvatī The next ten are rather important I subjoin an English translation of these.

(7) There was a king called Shāha (Shahaji), who was the Indra of the earth, who was skilled in Politics and Fine Arts, whose deeds were brave and noble, whose fame was

extensive and who was the Moon rising from the midst of the ocean in the form of the family of Bhrśabalas;

(8) Who worshipped the earth with an offering of the multitudes of the heads of hostile princes, which were severed (from their trunks) by a volley of arrows discharged from his bow, which was drawn right upto the ear—to him, the lofty crest jewel of numerous princes, was born the primeval Lord (i e. Visnu) as his son, known widely by the name 'Śiva'.

(9) Victorious is Śiva, the invincible Chatrapati, ord of umbrella, who is (none but) the lord of the world (i. e God Visnu) who has assumed a partial incarnation, having seen the whole religion in distress, as it was bitten by the venomous serpent in the form of the Kali age

(10) [Śiva]—who in the course of the Buddha incarnation of Gopāla, while Kali was yet in his full strength on earth, (lit. had not yet declined) set up the Brahmans and other castes on a firm foundation in their respective walks of life, by vanquishing the enemies of the gods,—with a view to protect and revive the caste religion, which had been violently disturbed by the Mlechhas

(11) Having built fortresses for the protection of the earth on the best of the mountains inaccessible to the enemies, though called 'Sahya', between Karnātaka on the one hand and Bāgalāna on the other and between the river Krsnā and the ocean (western), the foremost among the kings, reigns victorious in the inaccessible fort called Rairi (or Raigad)

(12) He conquered the whole of the earth from the eastern mountain to the western ocean and from the Setu (Adam's Bridge) to the mountain of cold (i. e the Himalayas), and made all princes pay tribute to him Having learnt the duties prescribed by the Śrutis, declared to him by the learned, he shines, day by day, on his throne, after the Coronation ceremony, by means of such symbols of royalty as the Chatra etc

(13) Who being a victorious prince, satisfied, on the

festive occasion of his coronation, the Brahmans, who had come from different places, with countless gifts of coins, garments, elephants and horses; and thus spread in all directions his fame, fit to be sung by gods and resembling in its purity, the lustre, which shoots out from the Moon.

(14) He it is whose fort shines with palaces and mansions in which princes dwell, with arches and beautiful market-squares, with new lakes filled with water all around, with learned priests, physicians and astrologers, with honest hereditary ministers and with the numberless brave armies of four kinds

(15) His son who is the crest jewel of all the fudatory chiefs and who is well versed in (lit has crossed the ocean in the form of) Poetry, Rhetoric, Purānas, Music and Archery, is famous by the name Śambhu

(16) That King Śambhuvarman is compiling this excellent book, having carefully read the works of the ancient writers and having taken his material from them

(17) May the wise accept what is good and give up what is bad, having carefully gone through our work; Rājahamsas indeed accept milk having abandoned water mixed with it.

This is purely an introduction which is followed by the work proper.

This is, however, introduced by a hymn of eleven stanzas addressed to Bhavānī and composed by the author himself, who naturally begins his work with a hymn to his favourite deity in order to secure uninterrupted completion.

This hymn is followed by fifteen stanzas (29–43) in praise of different deities, then by eighteen stanzas (44–61) expressive of benediction, both culled out from well-known ancient works Last of all come the Anyoktis in 130 stanzas (62–191) followed by three stanzas which are instances of a kind of literary puzzle known as Antarlāpikā (192–194).

The second chapter, which forms the main body of the work, contains 632 verses treating of politics The author here deals with the following subjects, of course always in verses cited from other works, usually from the Matsya

and Visnudharmottara Purānas and the Kāmandakīyanītisāra :—The king and his qualifications (1–31); his assistants (32-46); the prime minister (47–71); the princes, their education and duties (72–91); King's advisers (92–96); the other componant parts of a kingdom, a–Kośa (97–106); b–Rastra (107–110); c–Durga and its equipment (111–186); d–Bala i. e. the Army (187–198); King's duties (199–203); spies (204–215); attendants (216–241); councillors and the counsel (242–273); ambassador (274–284); King's duties (285–321); King's vices (322–367); invasion (368–396); King's duties in general (397–632).

The third chapter contains miscellaneous information useful to princes and is, therefore, called Miśrakanītiprakarana. Our manuscript contains 57 stanzas of this chapter and a portion of the 58th.

As regards the authorship of the work, the general opinion of the reader of the Maratha history is against ascribing any literary activities to Prince Sambhaji. The writers of the chronicles of the Maratha history, both old and new, leave an impression on the mind of the reader that Sambhaji though brave, was incapable of anything worthy of praise There is, however, nothing in them to show that Sambhaji was illiterate. Direct references to his literary merits and achievements cannot, of course, be expected in these chronicles whose sole aim was to narrate the political events of a particular period. We may, at the most, expect to get some casual reference and as a matter of fact we do get some from which it is possible to conclude that not only had Sambhaji received education at the hands of learned Pandits, but he had also taste for Sanskrit literature and was occasionally in the habit of writing poetry in Hindi under the influence of Kavi Kalaśa or the celebrated Kalusha, especially when passing his leisure hours in the company of beautiful women. The most explicit passage in this connection is that occurring on page 75 of Chitragupta's chronicle of Shivaji the Great. It refers to an incident which took place after Shivaji's escape from Delhi, together with Prince Sambhaji. Being hotly pursued by Aurangzeb's men, Shivaji was compelled to leave the Prince with a Pandit

named Kashipant at Benares. The learned Pandit taught him together with other boys, as though he were a Brahman boy. But even this would not satisfy the crafty officers of the Mongul Emperor. The Pandit then had to eat in the same dish with Sambhaji, in order to convince them that Sambhaji was a Brahman and not a Maratha. " He then made atonements secretly (for the sin thus committed). He began to impart instructions to him in general Literature, and made him well versed in Sārasvata (grammar), Amarakośa Raghuvamśa, Siddhāntakaumudī, (Siddhānta-) Muktāvalī and other similar works. He, i e. Sambhaji became very clever"; according to another chronicle (Marāthī Sāmrājyāc Chotī Bakhara, i e. A short historoy of the Maratha Empire p. 32), the period during which he stayed there was about one year. If we believe in the Chroniclers, it is not impossible to maintain that Sambhaji obtained at least an elementary knowledge of the Sanskrit Language during this forced stay of his at Benares Another passage which refers to the care bestowed upon Sambhaji's education by King Shivaji, is found on page 20 of the 91 articled chronicle of King Shivaji. There one Umaji Pandit is said to have been appointed to teach the Prince who was kept at Shringarpoor

From the passages quoted above, we can safely conclude that Prince Sambhaji did receive at least an elementary knowledge of the Sanskrit Language and Literature during his boyhood. But there appear to have been original letters from which we can judge that he had kept up the habit of reading Sanskrit during his leisure hours till his advanced age. Thus for instance, Kincaid and Parasnis, in their History of the Maratha People, part II, p. 58, remark— " Although he (i. e. Sambhaji) spent most of his life campaigning he was by no means averse from study. He employed a learned man called Keshav Pandit Adhyaksha, a friend of the great king to read with him Vālmīki's celebrated epic, the Rāmāyana. As a reward he gave Keshava in 1684 A. D., 1600 small silver coins known as ladis. The king was moreover no mean versifier. He is known to have written two books of Hindi poetry. The first was

called Nakhashikha, in which he described the pleasures of love. The second was named Nayakabhad. In it he sang the varying charms of the beauties who beguiled his leisure moments" Even though the learned authors do not give the source of their information, we can presume that they have got it from some literary documents either in the form of letters or of chronicles

We are of course aware that the incident herein referred to, cannot go to prove that King Sambhaji was a good Sanskritist We do not surely expect a Sanskrit author to require the help of a Śāstri for reading Vālmīki's Rāmāyana It must on the contrary be conceded that this is not a reference to the mere employment of a Puranik—though this is not entirely impossible—as a special reward consisting of silver coins is said to have been given to him for the services. But even this meagre knowledge of the Sanskrit Language on the part of King Sambhaji, which at least we can safely presume from the incident, is enough for our purpose. For the compilation of a work of the type we have before us does not require profound knowledge of the language, especially when the author was a Prince who commanded the services of learned Pandits

All this, I hope, is sufficient to prove that King Sambhaji was the real compiler of the book before us He may have been assisted by his Pandits in the task of selecting and arranging the quotations of which the work consists, but he was the principal figure It proves at any rate that Sambhaji was fond of reading Sanskrit in the original and that he had the ambition of being called a Sanskrit poet

The second part of the quotation from "A History of the Maratha People" given above is rather curious It is based upon the recent researches of Mr. Purushottam Vishram Mavji, J. P of Bombay as I learnt from the learned authors themselves I am greatly indebted to Mr. Mavji, who very kindly handed over to me his own copy of a few stanzas selected from Sambhaji's two works of Hindi poetry From hese stray verses, we can judge about the contents and form of the two poems The first of these is called

" Nakhaśikha " in which the author gives a poetical description of the different parts of Rādhā's body from the nail of the foot (नख) to the crest (शिखा). In the second which is obviously a work on Rhetoric and is called " Nāyikābheda " (Nayakabhad in the quotation from the 'History' is evidently a misprint) we find a description of the different sorts of heroines such as Madhyamā, Praudhā, Khanditā etc., just after the fashion of Sanskrit writers on Rhetoric. The few quotations that we have got, disclose a close acquaintance on the part of our author with the Sanskrit works on Rhetoric.

Among the quotations we find one from the pen of the famous Kalusha. It is highly poetical and even though we unforunately do not possess any literary remains of this great favourite of King Sambhaji, we have grounds to believe that he was a literary man In the old chronicles he is described as Kavi Kalaśa or the poet Kalaśa It was popularly believed that this Kanuja Brahman had been purposely sent by the Emperor from Delhi and that he was a great enchanter As a matter of fact we know that this Kalusha did exert a wonderful influence upon the King but to what it was due we can simply guess The origin of this influence is shrouded in obscurity. We will not be, however, far from the truth in assuming that to a considerable extent his literary gifts helped Kalusha to maintain his influence with the Prince It is quite possible that this Kavi Kalusha may have composed several poems, which were not preserved owing to the general disfavour in which he was held, but stray copies of which may yet have existed and might one day be discovered by us We on our part, are inclined to believe that the two Hindi poems (there may be more to the kind) are really from the pen of Prince Sambhaji, composed by him under the literary influence of Kalusha, who was certainly gifted with poetic talents.

श्री

बुधभूषणम्

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीनृसिंहाय नमः ॥

देवदानवकृतस्तुतिभागं हेलया विजितदर्पितनागम् ।
भक्तविघ्नहनने धृतर(य)त्नं तं नमामि भवबालकरत्नम् ॥ १ ॥

शशाङ्कमौलिं भासितेन भासुरं पञ्चाननं शैलसुताधिनाथम् ।
त्र्यक्षं गिरीशं दशबाहुमण्डितं कुबेरमित्रं सततं नमामि ॥ २ ॥

विरिञ्चिविष्णुवन्दितं नगाधिराजकन्यका-
विभूषितार्धविग्रहं प्रभूतबन्दिसंस्तुतम् ।
लसज्जटातटस्फुरत्सुरापगाविनिःसर-
द्विशुद्धवारिशीतलं नमामि चन्द्रशेखरम् ॥ ३ ॥

अज्ञानकृष्णसर्पेण दंशिता भुवि मानवाः ।
तेषां जीवनहेत्वर्थं नौमि जाङ्गुलिकं गुरुम् ॥ ४ ॥

या भवेक्षणचका(को)र चान्द्रिका शांभवी निजजनस्य पालिका ।
या तुषारगिरिराजकन्यका सा ममास्तु शुभकालमालिका ॥ ५ ॥

सर्वदेवमयीमीशां नौमि भूषासमान्विताम् ।
यस्याः कटाक्षमात्रेण जायन्ते विबुधा नराः ॥ ६ ॥

भूशवदा(ला)न्वयसिन्धुसुधाकरः प्रथितकीर्तिरुदारपराक्रमः ।
अभवदर्थकलासु विशारदो जगति शाहनृपः क्षितिवासवः ॥ ७ ॥

येनाकर्णविकृष्टकार्मुकचलत्काण्डावलीकर्तित-
प्रत्यर्थिक्षितिपालमौलिनिवहैरभ्यार्चि विश्वंभरा ।
यस्यानेकवसुंधरापरिवृढप्रोत्तुङ्गचूडामणेः
पुत्रत्वं समुपागतः शिव इति ख्यातः पुराणो विभुः ॥ ८ ॥

कलिकालभुजंगमावलीढं निखिलं धर्ममवेक्ष्य विक्लवं यः ।
जगतः पतिरंशतोवतापोः(तीर्णः) स शिवच्छत्रपतिर्जयत्यजेयः ॥९॥

येन क्षोणितले कलावविकले बुद्धावतारं गते
गोपालेखिलवर्णधर्मनिचये म्लेच्छैः समासादिते ।
भूयस्तत्परिपालनाय सकलाञ्जित्वा सुरद्वेषिणः
स्वे स्वे वर्णपथे चिरेण विहिता विप्रादिवर्णाः क्रमात् ॥ १० ॥

आकर्णाटकदेशतो गिरिवरे सह्येप्यसह्ये परे-
र्दुर्गाणि क्षितिपालनाय नृपतेर्यो बागलाणावधि ।
आकृष्णातटमासमुद्रमभितः कृत्वा कृती दुर्गमे
दुर्गे रायरिसंज्ञके विजयते भूमीभृतामग्रणीः ॥ ११ ॥

आपूर्वाचलपश्चिमाम्बुधिमथाप्यासेतुशीताचलं
निर्जित्यावनिमण्डलं च करदीकृत्याखिलान्भूमिपान् ।
श्रौतं धर्ममवाप्य सद्भिरुदितं राजाभिषेके परं
छत्राद्यैर्नृपलक्षणैरनुदिनं सिंहासने राजते ॥ १२ ॥

नानादेशसमागतान् द्विजवरान्येनाभिषेकोत्सवे ।
संतर्प्यातुलतोलितैर्बहुधनैर्वस्त्रैर्गजैर्वाजिभिः ।
चन्द्रप्रेरितचान्द्रिकेव विमला गेया बुधैर्बन्दिभिः
कीर्तिः सर्वदिगन्तरेषु जयिना विस्तारिता भूभृता ॥ १३ ॥

सोयं यस्य गडो नरेन्द्रवहितैः प्रासादहर्म्यैरट्टै(?)
र्म्यरापपा (रम्यैरापण?)चत्वरैश्च परितः पूर्णैः सरोभिर्नवैः ।
विद्वद्वैदिकवैद्यवर्यगणकैरार्यैश्च सन्मन्त्रिभिः
सैन्यैश्चापि चतुर्विधैरगणितैर्भाति प्रतापान्वितैः ॥ १४ ॥

तस्यात्मजः शंभुरिति प्रसिद्धः समस्तसामन्तशिरोवसन्तः (वतंसः)।
यः काव्यसाहित्यपुराणगीतकोदण्डविद्यार्णवपारगामी ॥ १५ ॥

विविच्य शास्त्राणि पुरातनानामादाय तेभ्यः खलु सोयमर्थम् ।
करोति सद्ग्रन्थममुं नृपालः स शम्भुवर्मा बुधभूषणाख्यम् ॥ १६ ॥

विविच्य सन्तः कृतिमस्मदीयां गृह्णन्तु सच्चासदसच्च जन्तु (त्यजन्तु) ।
क्षीराद्वियुक्तं परिहृत्य नारीं (नीरं) क्षीरं भजन्ते खलु राजहंसाः ॥१७॥

निर्विघ्नसमाप्तये श्रीभवान्याः स्तुतिं स्वकृतामा —

स्फटिकरचितपीठे श्यामलाङ्गीं भवानी-
मरुणचरणकान्तिं भासयन्तीं स्वरूपम् ।
नखमणिगुणयुक्ता अङ्गुलीर्भासयन्तीं
विजितसितगरुद्भिर्नूपुरैर्गुल्फयुग्मम् ॥ १८ ॥

पद्मरागारुणश्रीकशिरःपुष्पेण शोभिताम् ।
हृतशीतांशुतेजस्कमुक्ताचन्द्रोपशोभिताम् ॥ १९ ॥

अतीव सुकुमाराङ्गीं प्रोल्लसच्चूर्ण(स्वर्ण)कुण्डलाम् ।
भ्रूवल्लिभङ्गिसौन्दर्यजितकामशरासनाम् ॥ २० ॥
मदिरामदसंघूर्णमदिराक्षीं मदालसाम् ।
निर्मलादर्शसंदर्शकपोलकफल(फलक)प्रभाम् ॥ २१ ॥

विलसद्भालतिलकां मुक्तागुणसमान्विताम् ।
विभासद्रत्नसंयुक्तां कर्णभूषणशोभिताम् ॥ २२ ॥

नानालङ्कारसंयुक्तां नासान्यस्तमयूरिकाम् ।
पूर्णेन्दुहृद्यवदनां प्रवालतुलिताधराम् ॥ २३ ॥

सुवर्तुलस्तनद्वन्द्वमुक्ताकञ्चुकिकावृताम् ।
चतुर्भुजां पद्महस्तां पद्मनेत्रविराजिताम् ॥ २४ ॥

रतिरक्तां शम्भुकान्तां निम्ननाभिं तनूदरीम् ।
कृशमध्यां कृशाङ्गीं च ध्यानयोगासने रताम् ॥ २५ ॥

विलस(द्र)क्तवसनां रक्तकाञ्चीपरिवृताम् ॥ ।
विशा(ल)जघनां रम्यां सौन्दर्यौदार्यमन्दिराम् ॥ २६ ॥

सुवर्णरम्भां दम्भारि(?)म(मृ)दुलोरुविराज(जि)ताम् ।
कामेषुधिसुहृज्जङ्घां जानुयुग्मोपशोभिताम् ॥ २७ ॥

इति चन्द्रचूडरमणीस्तुतिमेणा(नां)
धरणीशशम्भुरचितामतिभक्त्या ।
मनुजः पठेदनुदिनं स किलोच्चै-
र्भुवि भारतीजलधिजानिलयं स्या(त्) ॥ २८ ॥

अथ प्राचीननमस्कृतिः—

चलत्कर्णानिलोद्धूतसिन्दूरारुणिताम्बरः ।
जय(त्य)काले विसृजन्सन्ध्यामिव गजाननः ॥ २९ ॥

हरकण्ठग्रहानन्दमीलिताक्षीं नमाम्युमाम् ।
कालकूटविषस्पर्शजातमूर्च्छागता(मा)मिव ॥ ३० ॥

चन्द्राननार्धदेहाय चन्द्रांशुसितकीर्तये ।
चन्द्रार्कानलनेत्राय चन्द्रार्धशिरसे नमः ॥ ३१ ॥

तारानायकशेखराय जगदाधाराय धाराधर-
च्छायाधारककन्धराय गिरिजासङ्गैकशृङ्गारिणे ।
नद्या शेखरिणे दृशा तिलकिने नारायणेनास्त्रिणे
नागैः कङ्कणिने नगेन गृहिणे नाथाय नित्यं नमः ॥ ३२ ॥

नमस्तुम्ब(ङ्ग)शिरश्चुम्बिचन्द्रचामरचारवे ।
त्रैलोक्यनगरारम्भमूलस्तम्भाय शम्भवे ॥ ३३ ॥

वामाङ्गीकृतवामाङ्गी कुण्डलीकृतकुण्डली ।
आविरस्तु पुरो वस्तु भूतिभूत्यम्बराम्बरम् ॥ ३४ ॥

पिनाकपाणिबालेन्दुभस्ममन्दाकिनीयुता ।
तथापि भव ते मूर्तिरपवर्गानुसारिणी ॥ ३५ ॥

पुञ्जीभूतं प्रेम गोपाङ्गनानां
मूर्ति(र्ती) भूतं भागधेयं यदूनाम् ।
एकीभूतं गुप्तवित्तं श्रुतीनां
श्यामीभूतं ब्रह्म मे सन्निधत्ताम् ॥ ३६ ॥

नवनीलमेघरुचिरः पुरः (परः) पुमान्
अवनीमवाप्य धृतगोपविग्रहः ।
नवनीतकीर्तिरमरैरपि स्वयं
नवनीतभिक्षुरधुना स चिन्त्यते ॥ ३७ ॥

अतिविपुलं कुचयुगलं रहसि करैरामृशन्मुहुर्लक्ष्म्याः ।
तदपि हृतं निजहृदयं जयति हरिर्मृगयमाण इव ॥ ३८ ॥

मकरीविरचनभङ्ग्या राधाकुचकलशपीडनव्यसनी ।
ऋजुमपि लेखां लुम्पन्नटवरवेषो हरिर्जयति ॥ ३९ ॥

खिन्नोऽसि मुञ्च शैलं बिभृमो वयमिति वदत्सु(त्सु) शिथिलभुजः ।
गिरिवरभुग्नविततबाहुषु गोपेषु हसन्हरिर्जयति ॥ ४० ॥

वेदानुद्धरते जगन्निवहते भूगोलमुद्बिभ्रते
दैत्यं दारयते बलिं छलयते क्षत्रक्षयं कुर्वते ।
पौलस्त्यं जयते हलं कलयते कारुण्यमातन्वते
म्लेच्छान्मूर्च्छयते दशाकृतिकृते कृष्णाय तुभ्यं नमः ॥ ४१ ॥

तं वन्दे पद्मसद्मानमुपवीतच्छटाछलात् ।
गङ्गा स्रोतस्त्रयेणे(णे)व यं सदैव निषेवते ॥ ४२ ॥

शुकतुण्डच्छविसवितुश्चण्डरुचेः पुण्डरीकवनबन्धोः ।
मण्डलमुदितं वन्दे कुण्डलमाखण्डलाशायाः ॥ ४३ ॥

अथाशिषः—

सानन्दं नन्द(न्दि)हस्ताहतमुरजरवाहूतकौमारबर्हि-
त्रासान्नासाग्ररन्ध्रं विशति फणिपतौ भोगसंकोचभाजि ।
गण्डोड्डीनालिमालामुखरितककुभस्ताण्डवे शूलपाणे-
र्वैनायक्यश्चिरं वो वदनविधुतयः पान्तु चीत्कारवत्यः ॥ ४४ ॥

गण्डस्थलीगलदमन्दमदप्रवाह-
मायद्द्विरेफमधुरस्वरदत्तकर्णः ।
हर्षादिवालसनिमीलितनेत्रयुग्मो
विघ्नच्छिदे भवतु भूतपतिर्गणेशः ॥ ४५ ॥

अथ भवान्याः—

अनुकृतम(र)क(त)वर्णा शोभितकर्णा कदम्बमुकुलेन ।
नखमुखमुखरितवीणा मध्ये क्षीणा शिवा शिवं कुर्यात् ॥ ४६ ॥

स्वेदत्ते(स्ते ?) कथमीदृशः प्रियतमे त्वन्नेत्रवह्न्यर्चिषा ।
कस्माद्वेपितमेतदिन्दुवदने भोगीन्द्रभीतेर्भव ।
रोमाञ्चः कथमेष देवि भग(वन्)नागाम्भसां सीकरै-
रित्थं भर्तरि भावगोपनपरा गौरी चिरं पातु नः ॥ ४७ ॥

विद्राणे रुद्रवृन्दे सवितरि तरले वज्रिणि ध्वस्तवज्रे
जाताशङ्के शशाङ्के विरमति मरुति त्यक्तवैरे कुबेरे ।
वैकुण्ठे कुण्ठितास्त्रे महिषमतिरुषा पौरुषोपघ्ननिघ्नं
निर्विघ्नं निघ्नती वः शमयतु दुरितं भूरिभावा भवानी ॥ ४८ ॥

तव करकमलस्थां स्फाटिकीमक्षमालां
नखकिरणविभिन्नां दाडिमीबीजबुध्या ।
अनुकलमनुकुर्वन्येन कीरो निरुद्धः
स भवतु मम भूत्यै वाणि ते मन्दहासः ॥ ४९ ॥

अथ शंभोः—

जीर्णेप्युत्कटकालकूटकवले प्यु(प्लुष्टे) हठान्मन्मथे
नीते भास्क(स्व)रभालनेत्रतनुतां कल्पान्तदावानले ।
यः शक्त्या समलंकृतोपि शशिनं शैलात्मजां स्वर्धुनीं
धत्ते कौतुकराजनीतिनिपुणः पायात्स वः शङ्करः ॥ ५० ॥

केयूरीकृतकङ्कणीकृतजटाजूटावतंसीकृत-
ज्यावल्लीकृतकुण्डलीकृतकटीसूत्रीकृताहीश्वरः ।
पायाद्वस्तिलकीकृतप्रियतमादर्शीकृताक्षीकृत-
यूतारम्भपणीकृतेन्दुशकलः कात्यायनीकामुकः ॥ ५१ ॥

पातु वो नीलकण्ठस्य कण्ठः श्यामाम्बुदोपमः ।
गौ(री)भुजलता यत्र विद्युल्लेखेव राजते ॥ ५२ ॥

स धूर्जटिजटाजूटो जायतां विजयाय वः ।
यत्रैकापि लताभ्रान्तिं करोत्यद्यापि जाह्नवी ॥ ५३ ॥

अथ विष्णोः—

कृष्ण त्वं नवयौवनोसि चपला प्रायेण गोपाङ्गना
कंसो भूपतिरब्जनालमृदुलग्रीवा वयं गोदुहः ।
तद्याचेऽञ्जलिना भवन्तमधुना वृन्दावनं मन्दु(?) ना ।
मा यासीरिति नन्दगोपवचसा नम्रो हरिः पातु वः ॥ ५४ ॥

भ्राम्यन्मन्दरकन्दरोदरदरी व्यावर्तिभिर्वारिधेः
कल्लोलैरलमाकुलं कलयतो लक्ष्म्या मुखाम्भोरुहम् ।

औत्सुक्यात्तरलाः स्मराद्विकसिता भीत्या समाकुञ्चिताः
क्रोधेन ज्वलिता मुदा मुकुलिताः शौरेर्दृशः पातु(न्तु) वः ॥ ५५ ॥

अर्धोन्मीलितलोचनस्य पिबतः पर्याप्तमेकं स्तनं
सद्यः प्रस्नुतदुग्धदिग्धमपरं हस्तेन संमार्जता(त?ः) ।
मात्रा चाङ्गुलिचालितस्य चिबुकस्मेरायमाने मुखे
विष्णोः क्षीरकणाम्बुधामधवला दन्तद्युतिः पातु वः ॥५६ ॥

गच्छाम्यच्युत दर्शनेन भवतः किं तृप्तिरुत्पद्यते
किन्त्वेवं विजनस्थयोर्हतजनाः संभावयत्यन्यथा ।
इत्यामन्त्रणभङ्गिसूचिततवृथावस्थानखेदालसा-
माश्लिष्यन्पुलकोत्कराञ्चिततनुर्गोपीं हरिः पातु वः ॥ ५७ ॥

दृप्यद्दैत्यकुटुम्बिनीजनमनःसन्तोषसङ्कोचनः
कुर्याद्विश्वम(न)श्वरं स भगव(वा)न्कोलावतारो हरिः ।
यद्दंष्ट्राङ्कुरकोटिकोटरकुटीकोणान्तरस्थेयसी
पृथ्वी भात्यवदातकेतकदले लीनेव भृङ्गाङ्गना ॥ ५८ ॥

अथ लक्ष्म्याः—

उत्तिष्ठन्त्या रतान्ते भरमुरगपतौ पाणिनैकेन कृत्वा
धृत्वा चान्येन वासो विगलितकबरीभारमंसे वहन्त्याः ।
भूयस्तत्कालकान्तिद्विगुणितसुरतप्रीतिना शौरिणा वः
शय्यामालिङ्ग्य नीतं वपुरलसलसद्बाहु ल्याः(लक्ष्म्याः) पुनातु ॥५९॥

पायात्पयोधिदुहितुः कपोलामलचन्द्रमाः ।
यत्र संक्रान्तबिम्बेन हरिणा हरिणायते ॥ ६० ॥

अथ सूर्यस्यः—

सिन्दूरस्पृहया स्पृशन्ति किरणं कुम्भस्थमाधोरणा
भिल्ली पल्लवशङ्कया विचिनुते सान्द्रं द्रुमद्रा(द्रो?)णिषु ॥
कान्ताः कुङ्कुमशङ्कया करतले मृद्नन्ति लग्नं च यत्-
तत्तेजः प्रथमोद्भवं भवकरं सौरं चिरं पातु वः ॥ ६१ ॥

अथान्योक्तयः। तत्रादौ सूर्यस्य।

यत्पादाः शिरसा न केन विधृताः पृथ्वीधृतामग्रजे(भृतां मध्यतः)
तस्मिन्भास्वति राहुणा कवलिते लोकत्रयीचक्षुषि।
खद्योतैः स्फुरितं तमोभिरुदितं ताराभिरुज्जृम्भितं
घूकैरुत्थितमाः किमत्र करवै किं केन नो चेष्टितम्॥ ६२॥

तस्यैवाभ्युदयो भूयाद्भानोर्यस्योदये सति।
विकासभाजो जायन्ते गुणिनः कमलाकराः॥ ६३॥

देवो हरिर्वहति वक्षसि कौस्तुभं वा (त-)
तन्व्येव(मन्येव) काचन पुनर्द्युमणेः प्रतिष्ठा।
यत्पादसंगतिसमर्पितसौरभाणि
धत्ते स एव शिरसा सरसीरुहाणि॥ ६४॥

करान्प्रसार्य रविणा दक्षिणाशावलम्बिना।
न केवलं मनोरा(लँमनेनात्मा)दिवसोपि लघी(घू)कृतः॥ ६५॥

गते तस्मिन्भानौ त्रिभुवनसमुन्मेषविरह—
व्यथां चन्द्रो नेष्यत्यनुचितमितो नास्ति किमपि।
इदं चेतस्तापं जनयतितरामत्र यदमी
प्रदीपाः संजातातिं(स्ति?)मिरहृदि रद्दोधुर(?)शिखाः॥ ६६॥

पातः पूष्णो महति भवते(भवति महते) नोपतापाय यस्मात्
कालेनास्तं क इह न गता यान्ति यास्यन्ति चान्ये।
एतावत्तु व्यथयति यदालोकबाह्यैस्तमोभि-
स्तस्मिन्नेव प्रकृतिमहति व्योम्नि लब्धोऽवकाशः॥ ६७॥

अथ चन्द्रस्य—

हरमुकुटे सुरतटिनीनिकटस्थितिलोभतो द्विजेन्द्रेण।
अपि गरलं फणिफूत्कृतिरीक्षणतीक्ष्णाशुशुक्षाणिः क्षान्तः॥ ६८॥

विरम तिमिर साहसार(द)मुष्मायादि रविरस्तमितो गतस्ततः किम्।
कलयासि न पुरो महोत्सवोर्मिद्युतिनिधिरभ्युदिता (तो) यमं(?)
शशाङ्कः॥ ६९॥

अहो नक्षत्रराज्ञ(ज)स्य साभिमानविचेष्टितम् ।
परिक्षीणस्य वक्रत्वं संपूर्णस्य च वृत्तता ॥ ७० ॥

आलोकवन्तः सन्त्येव भूयांसो भास्करादयः ।
कलावानेव तु ग्रावद्रावकर्मणि कर्मठः ॥ ७१ ॥

शिरसा धार्यमाणोपि सोमः सौम्येन शंभुना ।
तथापि कृशतां धत्ते कष्टः खलु पराश्रयः ॥ ७२ ॥

लब्धं जन्म सह श्रिया श्रियमपि त्रैलोक्यभूषाकर-
स्थित्यर्थं परमेश्वरोभ्युपगतस्तेनापि मूर्ध्ना कृतः ।
वृद्धिं शीतकरस्तथापि न गतः क्षीणः परं प्रत्युत
प्रायः प्राक्तनमेव कर्म बलवत्कः कस्य कर्तुं क्षमः ॥ ७३ ॥

पीयूषं वपुषोस्य हेतुरुदयो विश्वस्य नेत्रोत्सवः
प्लुष्टं भानुकरैरिदं त्रिभुवनं ज्योत्स्नाभि(क)रैः सिञ्चति ।
सर्वाशाप्रतिरोधकान्धतमसो ध्वंसाय बद्धोद्यमे
धिग्धातारमिहापि लक्ष्म लिखितुं यस्य(स्या)य वृत्तं मनः ॥ ७४ ॥

वायोः—

अलिपटलैरनुयातां सहृदयहृदयज्वरं विलुम्पन्ति(न्तीम्) ।
मृगमदपरिमललहरीं समीर किं पामरेषु रे किरसि ॥ ७५ ॥

कोयं भ्रान्तिप्रकारस्तव पवन पदं लोकपादाहतानां
तेजस्विव्रातसेव्ये नभसि नयसि यत्पांसुपूरं प्रतिष्ठाम् ।
अस्मिन्नुत्थाप्यमाने जननयनपथोपद्रवस्तावदास्तां
केनोपायेन सह्यो वपुषि कलुषतादोष पि(ए)ष त्वयैव ॥ ७६ ॥

ये जात्या लघवः सदैव गणनां याता न ये कुत्रचित्
पद्भ्यामेव विक(म)र्दिताः प्र(ति)दिनं भूमौ विलीनाश्चिरम् ।
उत्क्षिप्ताश्चपलाशयेन मरुता पश्यान्तरिक्षे सखे
तुङ्गानामुपरि स्थितिं क्षि(ति)भृतां कुर्वन्ति ते पांसवः ॥ ७७ ॥

मेघस्य—

एकस्य तस्य मन्ये धन्यामभ्युद(भ्युन्न)तिं जलधरस्य ।
विश्वं सशै(ल)काननमाननमवलोकते यस्य ॥ ७८ ॥

प्रावृषेण्यस्य मालिन्यं को दोषोभीष्टवर्षिणः ।
शारदाभ्रस्य शुभ्रत्वं वशिष्यो(वद कुत्रो)पयुज्यते ॥ ७९ ॥

जलधर जलभरनिकरैरपहर परितापमुद्धुतं जगतः ।
नो चेदपसर दूरं हिमकरकरदर्शनं विक(त ?)र ॥ ८० ॥

शैलेयेषु शिलातलेषु च गिरेः शृङ्गेषु गर्तेषु च
श्रीखण्डेषु बिभीतकेषु परितः पूर्णेषु रिक्तेषु च ।
स्निग्धेन ध्वनिनाखिलेषु जगतीचक्रे समं वर्ततो
वन्दे वारिद सार्वभौमि भवतो विश्वोपकारि व्रतम् ॥ ८१ ॥

शे(शो)षं गते सरासि शैवलवल्लरीणा-
मन्तस्तिमिर्लुठति तापविषेष(शोषि ?)ताङ्गः ।
अत्रान्तरे यदि न वारिद वारिवृन्दै-
राप्लावयेस्तदनु किं मृतमण्डनेन ॥ ८२ ॥

किसलयानि कुतः कुसुमानि वा
क्व च फलानि ताद(तथा ?) वरवीरुधाम् ।
अयमकारुणि(रण)कारुणिको यदा
वितरतीह पयो न पयोधरः ॥ ८३ ॥

नभसि निरवलम्बे सीतदा(दता) दीर्घकालं
त्वदभिमुखविसृष्टोत्तानचञ्चूपुटेन ।
जलधर जलधारा दूरतस्तावदास्तां
ध्वनिरपि मधुरस्ते न श्रुतश्चातकेन ॥ ८४ ॥

क्षुद्राः सन्ति सहस्रशः स्वभरणव्यापारमात्रोद्यताः
स्वार्थो यस्य परार्थ एव परमा(स पुमा)नेकः सतामग्रणीः ।
दुःपूरोदरपूरणाय पिबति स्रोतःपतिं वाडवो
जीमूतस्तु निदाघसंभृतजगत्संतापविच्छित्तये ॥ ८५ ॥

आपो विमुक्ताः क्वचिदाप एव
क्वचिन्न किंचिद्गरलं क्वचिच्च ।
यस्मिन्विमुक्ताः प्रभवन्ति मुक्ताः
पयोद तस्मिन्विमुखः कुतस्त्वम् ॥ ८६ ॥

अमुं कालक्षेपं त्यज जलद गम्भीरमधुरैः
किमेभिर्निर्घोषैः सृज झटिति झाङ्कारि सलिलम् ।

अये पश्यावस्थामकरुणसमरिव्यातिकर–
ज्वलद्दावज्वालावलिजटिलमूर्तेर्विटपिनः ॥ ८७ ॥

हंसस्य—

अस्ति यद्यपि सर्वत्र नीरं नीरजमण्डितम् ।
रमते न मरालस्य मानसं मानसं विना ॥ ८८ ॥
एकेन राजहंसेन या शोभा सरसो भवेत् ।
न सा बकसहस्रेण परितस्तीरवासिना ॥ ८९ ॥

रे राजहंस किमिति ज्व(त्व)मिहागतोसि
योसौ बकः स इह हंस इति प्रतीतः ।
तद्गम्यतो(ता)मनुपदेन पुनः स्वभूमौ
यावद्वदन्ति न बकं खलु मूढलोकाः ॥ ९० ॥

अपसरणमेव शरणं मौनं वा तत्र राजहंसस्य ।
कटु रटति निकटवर्ती वाचालष्टिट्टिभो यत्र ॥ ९१ ॥

अम्भोजिनीवननिवासविलासमेव
हंसस्य हन्ति नितरां कुपितो विधाता ।
न त्वस्य दुग्धजलभेदविधिप्रसिद्धां ।
वैदग्ध्यकीर्तिमपहर्तुमसौ समर्थः ॥ ९२ ॥

मधुकरस्य—

अपसर मधुकर दूरं परिमलबहलेपि केतकीकुसुमे ।
इह नहि मधुलवलेशो भवति परं धूलिधूसरं वदनम् ॥ ९३ ॥

इह रूपमात्रसारे भित्तिविलिखितात्रि(तेत्र चि)त्रकल्हारे ।
न रसो नापि च गन्धो मधुकरबन्धो वृथा भ्रमसि ॥ ९४ ॥

भ्रमर भ्रमता दिगन्तराले क्वचिदासेवितमीक्षितं श्रुतं वा ।
कथयस्व विहाय पक्षपातं यदि जातीकुसुमानुकारि पुष्पम् ॥ ९५ ॥

अलिरयं नलिनी(वन)वल्लभः कुमु(दि)नीकुलकेलिमदालसः ।
विधिवशेन विदेशमुपागतः कुटजपुष्परसं बहु मन्यते ॥ ९६ ॥

अन्यासु तावदुपमर्दसहासु भृङ्ग
लोलं विनोदय मनः(नः) सुमनोलतासु ।

मुग्धामनाप्तरजसं कलिकामकाले
बालां कदर्थयसि किं नवमल्लिकायाः ॥ ९७ ॥

फुल्लेषु यः कमलिनीकमलोदरेषु
चूतेसि(षु) यो विलसितः कमलान्तरस्थः ।
पश्याद्य तस्य मधुपस्य शरद्व्यपाये
कृच्छ्रेण वेणुविवरे दिवसाः प्रयान्ति ॥ ९८ ॥

गौरीं चम्पककलिकामपहाय भ्रान्तदुर्बुद्धे ।
शाल्मलिकुसुमदलेषु स्वैरे(रं) गुञ्जन्न लज्जसे मधुप ॥ ९९ ॥

चातकस्य—

एक एव खगो मानी चिरं जीवति चातकः ।
म्रियते वा पिपासायां याचते वा पुरंदरम् ॥ १०० ॥

कूपे पानमधोमुखं भवति मे नद्यो वराक्यः स्त्रियः
मारङ्गैर्बकटिट्टिभैः सह सिरं(सरः) सेव्यं समालोकयन् ।
शुष्यत्तालुगतोपि कम्पिततनुः श्रुत्वा गभीरध्वनिं
धैर्यादुद्ध(द्धृ)तकन्धरो जलधर त्वां याचते चातकः ॥ १०१ ॥

कोकिलस्य—

रे रे कोकिल मा भज मौनं किंचिदुदीरय पञ्चमरागम् ।
नो चेत्त्वामिह को जानीते काककदम्बकपिहिते चूते । ।१०२ ॥

काकैः मह विरुद्धस्य कोकिलस्य कला गिरः ।
खलसङ्गेपि नैष्ठुर्यं कल्याणप्रकृतेः कुतः ॥ १०३ ॥

अस्यां मखे बधिरलोकनिवासभूमौ
किं कूजितेन खलु कोकिल कोमलेन ।
एते हि दैवहतकास्तदभिन्नवर्णं
त्वां काकमेव कलयन्ति कलानभिज्ञाः । १०४ ॥

यस्याकर्ण्य वचः सुधाकवलितं वाचंयमानामपि
व्यग्राणि व्यथयन्ति मन्मथकथाश्चेतांसि चैत्रोत्सवे ।

रे रे काक वराक साकममुना पुंस्कोकिलेनाधुना
स्पर्धाबन्धु(न्ध)मुपेयुषस्तव तु किं लज्जापि नो जायते ॥ १०५ ॥

रसालशिखरासीनाः शतं सन्तु पतत्रिणः ।
तन्मञ्जरीरसामोदं विदुरेव कुहूमुखाः ॥ १०६ ॥

मयूरस्य—

अये नीलग्रीव क्व नु खलु सखे तेद्य मुनयः
परं तोषं येषां तव रवविलासैर(र्वि) तनुते ।
अमी दूरात्क्रूराः क्वणितमिदमाकर्ण्य सहसा
त्वरन्ते हन्तुं त्वामहह शबराः पुङ्खितशराः ॥ १०७ ॥

एतस्मिन्मलयाचले बहुविधैः किं तैरकिंचित्करैः
काकोलूककपोतकोकिलरुके(रुत ?)रेकोपि पार्श्वस्थितः ।
केकी कूजति चेत्तदा विघटितव्यालावलीबन्धनः
सेव्यः स्यादिह सर्वलोकमनसामानन्दनश्चन्दनः ॥ १०८ ॥

केका कर्णामृतं ते सकुसुमकबरीकान्तिहाराः कलापाः
कण्ठच्छाया पुरारेर्गलरुचिरुचिरा सौहृदं मेघसङ्घैः ।
विश्वद्वेषिद्विजिह्वस्फुरदुरुपिशितैर्नित्यमाहारवृत्तिः
कैः पुण्यैः प्राप्तमेतत्सकलमपि सखे चित्तवृत्तं मयूर ॥ १०९ ॥

शुकस्य—

.........श्रेणीपरिवृढवृथा.. ......(?)

अमुष्मिन्नुद्याने विहगखल एष प्रतिकलं
विलोलः काकोलः क्वणति पटु या(व)त्कटुतरम् ।
सखे तावत्कीर दृ(द्र)ढय हृदि वाचं च सकलां
न मौनेन न्यूनो भवति गुणभाजां गुणगणः ॥ ११० ॥

इयं पल्ली भिल्लैरनुचितसमारम्भरसिकैः
समन्तादाक्रान्ता विषविषमबाणप्रणयिभिः ।
तरोरस्य स्कन्धे गमय सभयं कीर निभृतं
न वाणी कल्याणी तदिह मुखमुद्रैव शरणम् ॥ १११ ॥

काकस्य—

कृष्णं वपुर्वहतु चुम्बतु सत्फलानि
रम्येषु संचरतु चूतवनान्तरेषु ।
पुंस्कोकिलस्य चरितानि करोतु कामं
काकः कलध्वनिविधौ खलु काक एव ॥ ११२ ॥

पथि निपतितान्शून्ये दृष्ट्वा निरावरणान्...
दधिभृतघटान्गर्वोन्धर(?)समुद्ध(त)कन्धरः ।
निजसमुचिताश्चेष्टास्तास्ता विकारशताकुलो
यदि न कुरुते काणः काकः कदा नु करिष्यति ॥ ११३ ॥

बकस्य—

उभौ पक्षौ शुक्लौ भुवि वियति चावारितगतिः
सदा मीनान्भुङ्क्ते वसति शिरस(सकल)स्थाणुशिरसि ।
बके सर्वश्चान्द्रो गुणसमुदयः कश्चिदधिको ।
गुणाः स्थाने मान्या न तु नरवरस्थानरहिताः ॥ ११४ ॥

बकोट ब्रूमस्त्वां लघुनि श(स)रसि क्वापि शिरसि(शफरै)-
स्तव न्याय्या वृत्तिर्न पुनरथ गाढं समुचिता (तः) ।
इतश्चेतश्चाभ्रंलिहलहरिहेलातरलित-
क्षितिभृग्रासैकग्रहलतिमिपोतः पतिरपाम् ॥ ११५ ॥

खद्योतस्य—

अदृष्टव्यापारं गतवति दिनानामधिपतौ
यशःशेषीभूते शशिनि गतधाम्नि ग्रहगणे ।
तथान्धं संजातं जगदुपनते मेघसमये
यथामी गण्यन्ते तमसि पटवः कीटमणयः ॥ ११६ ॥

इन्दुः प्रयास्यति विनङ्क्ष्यति तारकश्रीः
स्थास्यन्ति लीढतिमिरा न मणिप्रदीपाः ।
अन्धं समग्रमपि कीटमणो(णे) भविष्य-
त्युन्मेषमेष्यति भवानिति दूरमेतत् ॥ ११७ ॥

गजस्य—

कर्णे चामरचारुचञ्चुकलिकाः कण्ठे मणीनां गणाः
सिन्दूरप्रकराः शिरःपरिसरे पार्श्वान्तिके किङ्किणी ।
लब्धश्चेन्नृपवाहनेन करिणि(रि)णा बद्धेन भूषाविधि-
स्तत्किं भूधरधूलिधूसरतनुर्मान्यो न वन्यो गजः ॥ ११८ ॥

केलिं कुरुष्व परिभुङ्क्ष्व सरोरुहाणि
गाहस्व शैलतटनिर्झरिणीपयांसि ।
भावानुरक्तकरिणीकरलालिताङ्ग
मातङ्ग मुञ्च मृगराजरणाभिलाषम् ॥ ११९ ॥

तापो नापगतस्तृषा न च कृशा धूली न धूता तनो-
र्न स्वच्छन्दमकारि केलिकवलः का नाम केलिस्पृहा ।
दूरोत्क्षिप्तकरेण हन्त करिणा स्पृष्टा न वा पद्मिनी
प्रारब्धो मधुपैरकारिणी(रण)महो झाङ्कारकोलाहलः ॥ १२० ॥

भो भोः करीन्द्र दिवसानि कियन्ति तावत्
तस्मिन्मरौ समति(वा)हय कुत्रचित्त्वम् ।
रेवाजलैर्निजकरेणुकरप्रयुक्तै-
र्भूयः शमं गमयितासि निदाघदाहम् ॥ १२१ ॥

दानार्थिनो मधुकरा यदि कर्णतालै-
र्दूरीकृताः करिवरेण मदान्धबुध्या ।
तस्यैव गण्डयुगमण्डनहानिरेषा
भृङ्गाः पुनर्विकचपद्मवने वसन्ति ॥ १२२ ॥

अथ सिंहस्य—

मृगेभ्यो रक्ष्यते क्षेत्रं नरैस्तृणमयैरपि ।
सिंहाक्रान्तं पुनर्मूढ न हयैर्न च दन्तिभिः ॥ १२३ ॥

अस्मिन्नम्भोदवृन्दध्वनिजनितरुषि प्रेक्षमाणेन्तरिक्षं
मा काक व्याकुलो भूस्तरुशिखरशवक्रव्यलेशानशान ।
धत्ते मत्तेभकुम्भव्यतिकरकरजग्रामवज्राग्रजाय
ग्रासव्यासक्तमुक्ताधवलितकवलो न स्पृहामत्र सिंहः ॥ १२४ ॥

क्षुत्क्षामोपि जराकृशोपि शिथिलप्राणोपि कष्टां दशा-
मापन्नोपि विपन्नदीधितिरपि प्राणेषु गच्छत्स्वपि ।
मत्तेभेन्द्रविभिन्नकुम्भदलनग्रासैकबध्दस्पृहः
किं जीर्णं तृणमत्ति मानमहतामग्रेसरः केसरी ॥ १२५ ॥

परिणतगर्भभरार्ता सिंहवधूः शल्लकीविपिने ।
अन्वेषयति मदान्धद्विरदेन सिक्तमवनितलम् ॥ १२६ ॥

मृगस्य—

दूर्वाङ्कुरतृणाहारा धन्यास्तात वने मृगाः ।
विभवोन्मत्तचित्तानां न पश्यन्ति मुखानि यत् ॥ १२७ ॥

रोमन्थमाचरय मन्थरमेत्य निद्रां
मुञ्च श्रमं तदनु संचर रे यथेच्छम् ।
दूरे स पामरजनो मुनयः किलैते
निष्कारणं हरिणपोत बिभेषि कस्मात् ॥ १२८ ॥

कालिम्ना न(न) गतं स्वनाम गलितं जाता कलङ्काभिधा
* * * * * त्रिभुवनं किं प्राप्तमुच्चैर्मृग ।
अस्माकं वसतां वनेपि वस(नि)धा वाञ्छन्ति नेत्रोपमां
कस्तूरीहरिणाभिधाजनि जने स्थाने विहारः स्थितिः ॥ १२९ ॥

वृक्षान्योक्तयः—

यद्यपि चन्दनविटपी विधिना फलपुष्पवर्जितो विहितः ।
निजवपुषैव परेषां तथापि संतापमपहरति ॥ १३० ॥

केचिल्लोचनहारिणः कतिपयाः सौरभ्यसंभारिणः
केप्यन्ये फलधारिणः प्रतिदिशं ते सन्तु हन्त द्रुमाः ।
धन्योयं हरिचन्दनः परिरसे(सरे) यस्य स्थितैः शाखिभिः
शाकोटादिभिरप्यहो मृगदृशामङ्गेषु लीलायते(यितम्) ॥ १३१ ॥

कुसुमस्तबका नम्राः सन्त्येव परितो लताः ।
तथापि भ्रमरभ्रान्तिं करोत्येकैव मालती ॥ १३२ ॥

न च गन्धवहेन चुम्बिता न च पीता मधुपेन मल्लिका ।
पिहितैर(व) कठोरशाखया परिणामस्य जगाम गोचरम् ॥ १३३ ॥

सूचीभिर्दलितं वपुः कवलितं धूलीभिरायुर्दृशो-
र्नीरन्ध्रैः क्रकचोपमैर्दलपुटैः पक्षद्वयं कीलितम् ।
पूर्णा एव मनोरथाः किमपरं कल्याणि कल्पायुतं
जीयाः केतकि देहि निर्गमपथं जीवत्वसौ षट्पक्षः(दः) ॥ १३४ ॥

कति पल्लविता न पुष्पिता वा तरवः सान्ति समन्ततो वसन्ते ।
जगतां विजयाय मीनकेतोः सहकारी सहकार एष एव ॥ १३५ ॥

दिङ्मण्डलं परिमलैः सुरभीकरोषि
सौन्दर्यमावहसि लोचनलोभनीयम् ।
हंहो रसाल फलवर्य तथापि दूये
यद् ग्रन्थिलं च कुटिलं च (वपु)र्बिभर्षि ॥ १३६ ॥

तालीतरोरनुपकारि फलं फलित्वा
लज्जावशादुचित एव विनाशयोगः ।
एतत्तु चित्रमुपकृत्य फलैः परेभ्यः
प्राणान्निजान् सपदि यत्कदली जहाति ॥ १३७ ॥

यद्यपि न भवति हानिः परकीयां चरति रासभे द्राक्षाम् ।
असमञ्जस तु मत्वा तथापि खलु खिद्यते चेतः ॥१३८ ॥

दासेरकस्य दासीयं बदरी यदि रोचते ।
एतावतैव किं द्राक्षा न साक्षादमृतप्रदा ॥ १३९ ॥

विशालं शाल्मल्या नयनसुभगं वीक्ष्य सुभगं (कुसुमं)
शुकस्यासीद्बुद्धिः फलमपि भवेत्तादृशमिति ।
चिरं तत्र स्थित्वा फलमपि न काले परिणतं
विपाके तूलोन्तः सपदि मरुता सोप्यपहृतः ॥१४० ॥

उच्चैरेष तरुः फलं च पृथुलं दृष्ट्वा शुको हर्षितः
पक्वं शालिवनं विहाय जडधीस्तां नारिकेलीं गतः ।
स्थित्वा तत्र बुभुक्षितेन मनसा यत्नः कृतो भेदने
आशा तस्य न केवलं बिगलिता चञ्चुर्गता चूर्णताम् ॥ १४१ ॥

मयि जीवति बीजाढ्ये किमन्ये बीजपूरकाः ।
इति संचिन्त्य मनसा विदद्रे दाडिमीफलम् ॥ १४२ ॥

निम्ब किं बहुनोक्तेन निष्फलानि फलानि ते ।
यानि संजातपाकानि काका निःशेषयन्ति हि ॥ १४३ ॥

गात्रं कण्टकसंकुलं प्रविरलच्छाया न चायासत्ह(नृ)
निर्गन्धः कुसुमोत्करस्त्व(तव) फलं न क्ष(क्षु)द्विनाशक्षमम् ।
बबूल(बब्भूल)द्रुम मूलमेति न जनस्तत्तावदास्तामहो
अन्येषामपि शाखिनां फलवतां रक्षार्थमानीयसे ॥ १४४ ॥

किं पुष्पैः किं फलैस्तस्य करीरस्य दुरात्मनः ।
येन वृद्धिं समासाद्य न कृतः पात्रसंग्रहः ॥ १४५ ॥

किंशुके शुकमातिष्ठ चिरभाविफलाशया ।
बाह्यरङ्गप्रसङ्गेन के के नानेन वञ्चिताः ॥ १४६ ॥

अयि कमलिनि तत्ते जन्मशुद्धिः सरस्यां
परिणयनविधानं भानुना तद्विधेन ।
इति कुलयुगशुद्धौ तत्समक्षं विशङ्कं
मधुपकुलसखित्वे ब्रूहि किं ते निदानम् ॥ १४७ ॥

किं वीरुधो भुवि न सन्ति सहस्रशोन्या
यासां दलानि न परोपकृतिं भजन्ति ।
एकैव वल्लिषु विराजति नागवल्ली
या नागरीवदनचन्द्रमलंकरोति ॥ १४८ ॥

अथ पर्वतान्योक्तयः—

रोहणाचल शैलेषु कस्तुलां कुरुते तव ।
यस्य पाषाणखण्डानि मण्डनानि महीभुजाम् ॥ १४९ ॥

कुम्भोद्भवस्य करपुष्करकोशकोणे
पाथोनिधौ विधिवशाद्विपदं प्रयाते ।

ये दुर्लभास्त्रिदशलोकविलासिनीनां
ते पङ्कसीमनि महामणयो लुठन्ति ॥ १५० ॥

समुद्रस्य—

पीत्वा गर्जन्त्यपस्ते दिशि दिशि जलदास्त्वं शरण्यो गिरीणां
सुत्रामत्रासभाजां त्रिदशविटपिनां जन्मभूमिस्त्वमेव ।
गाम्भीर्यं तच्च तादृक्तव सलिलपते किंतु विज्ञाप्यमेतत्
सर्वोपायेन मैत्रावरुणिमुनिकृपादृष्टयः काङ्क्षणीयाः ॥१५१॥

रत्नैरापूरितस्यापि मदलेशोऽस्ति नाम्बुधेः ।
मुक्ताः कतिपयाः प्राप्य मातङ्गा मदविह्वलाः ॥ १५२ ॥

रत्नानाम्—

भ्रष्टं नृपतिकिरीटाद्भूमौ पतितं तिरोहितं रजसा ।
विधिविलसितेन रत्नं जनचरणविडम्बनं सहते ॥ १५३ ॥

मुक्ताफलस्य—

रत्नाकरे परिहृता वसतिः किमन्य-
दङ्गीकृतः कठिनवेधनदुःखभारः ।
वक्षोजकुम्भपरिरम्भणलोलुपेन
किं किं न तेन विहितं नवमौक्तिकेन ॥ १५४ ॥

शङ्खस्य—

कीटगृहं कुटिलोऽन्तःकठिनः क्षाराम्बुसंभवः शून्यः ।
शङ्खः श्रीपतिनिकटे केन गुणेन स्थितिं लेभे ॥ १५५ ॥

तातः क्षीरि(र)निधिः स्वसा जलधिजा भ्राता सुरेशद्रुमः
सौजन्यं सह कौस्तुभेन शुचिता यस्य द्विजेशादपि ।
धिक्कर्माणि स एव कम्बुरधुना पाखण्डकान्ताकरे
विभ्रान्तः प्रतिवासरं प्रतिगृहे भैक्षेण कुक्षिंभरिः ॥ १५६ ॥

नदीनाम्—

यद्यपि दिशि दिशि सरितः परितः परिपूरिताम्भसः सन्ति ।
तदपि पुरंदरतरुणीसंगतिसुखदायिनी गङ्गा ॥ १५७ ॥

छायां प्रकुर्वन्ति नमन्ति पुष्पैः फलं नियच्छन्ति तद (था) द्रुमाये ।
उन्मूल्य तानेव नदी प्रयाति तरङ्गिणां क्व प्रतिपन्नमस्ति ॥ १५८ ॥

कतिपयदिवसस्थायी पूरो दूरोन्नतोपि भविता ते ।
तटिनि तटद्रुमपाटनपातकमेकं चिरस्थायी ॥१५९ ॥

सरोवरस्य—

(अ)यमवसरः सरस्ते सलिलैरुपकर्तुमार्थिनामनिशम् ।
इदमपि सुलभं ह्यम्भो भवति पुरो जलधराभ्युदये ॥ १६० ॥

कमलस्य—

आमूलादाकन्दापरिमलादाविकाशाश्च (?) ।
अयि कमल सेव्यसे अ(त्वम)लिभिर्मरन्देन तुन्दिलाः शरघाः ॥१६१॥

नालस्य प्रसरो जलेष्वपि कृतो वासः स्वकोशे रुचि-
र्दण्डे कर्कशता मुखेतिमृदुता मित्रे महान्प्रश्रयः ।
आमूलं गुणसंग्रहव्यसनता द्वेषश्च दोषाकरे
यस्यैषा स्थितिरम्बुजस्य वसतिर्युक्तैव तत्र श्रियः ॥ १६२ ॥

* * * *

* * * *

अथ कूपान्योक्तयः—

सगुणैः सेवितोपान्ते(न्तो) विनीतैः प्राप्तदर्शनः ।
नीचोपि कूपः सत्पात्रैर्जीवनार्थं समाश्रितः ॥ १६३ ॥

कस्तूरिकायाः—

अपि त्यक्तासि कस्तूरि पामरैः पङ्कशङ्कया ।
अलं खेदेन भूपालाः किं न सन्ति महीतले ।। १६४ ।।

नेपालभूपालविशालभाले मृच्छारि कस्तूरिकतामुपैति ।
अन्य(त्र) सैषा विपरीतभावं स्थानं प्रधानं खलु योग्यतायाः ।। १६५ ।।

आरभ्य सौरभ्यकथासु मौनं मालिन्यमात्रे वचसोवकाशः ।
दुर्लील * * पतिपुत्रहस्ते कस्तूरि कस्ते वद दुर्विपाकः ।। १६६ ।।

जन्मस्थानं न खलु विमलं वर्णनीयो न वर्णो
दूरात्पुंसां वपुषि रचना पङ्कश(ङ्कां) करोति ।
यद्यप्येवं सकलसुरभिद्रव्यवर्गा(गर्वा?)पवर्गो(र्गः)
को जानीते परिमलगुणः कोपि कस्तूरिकायाः ।। १६७ ।।

अथ जलस्य—

शैत्यं नाम गुणस्तवैव तदनु स्वाभाविकी स्वच्छता
किं ब्रूमः शुचितां व्रजन्त्यशुचयः सङ्गेन यस्यापरे ।
किं वातः परमास्तुषे स्तुतिपरं संजीवनं जीवतां
त्वं चेन्नीचपथेन गच्छसि पयः कस्त्वां विरोद्धुं क्षमः ।। १६८ ।।

प्रकीर्णान्योक्तयः—

युक्तोसि भुवनभारे मा वक्रां वितनु कन्धरां शेष ।
त्वय्येकस्मिन् दुःखि(नि) सुखितानि भवन्ति भुवनानि ।। १६९ ।।

दामोदरमुदराहितभुवनं यो वहति लीलया गरुडः ।
कस्य तनोरुपरिष्ठो खिन्नोसौ खेदमपनयतु १७० ।।

द्वात्रिंशद्दशनद्वेषिमध्ये भ्रमासि नित्यशः ।
तदिदं शिक्षिता केन जिह्वे संचारकौशलम् ।। १७१ ।।

भ्रातः काञ्चनलेपगोपितबहिस्ताम्राकृते सर्वतो
मा भैषीः कलश स्थिरो भव चिरं देवालयस्योपरि ।
ताम्रत्वं गतमेव काञ्चनमयी कीर्तिः स्थिता तेधुना
नान्तस्तत्त्वविचारणप्रणयिनो लोका बहिर्बुद्धयः ॥ १७२ ॥

दीर्घा नदी शिथिलबन्धविलम्बिनी नौ-
रभ्युन्नता जलमुचो विषमः समीरः ।
आरुद्धवान्निजयितो ध्वनिनः * * *
सत्कर्णधा(र कु)रु यत्सदृशं कुलस्य ॥ १७३ ॥

मलोत्सर्गं गजेन्द्रस्य मूर्ध्नि काकः करोति यः ।
कुलानुरूपं तत्तस्य यो गजो गज एव सः ॥ १७४ ॥

आकर्ण्य गर्जितरवं घनगर्जतुल्यं
सिंहस्य यान्ति वनमन्यमि(दि)हा(भा) भयार्ताः ।
तत्रैव पौरुषनिधिः स्वकुलेन सार्धं
दर्पोद्धुरो वसति वीतभयो वराहः ॥ १७५ ॥

रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातं
भास्वानुदेष्यति हासिष्यति पङ्कजश्रीः ।
इत्थं विचिन्तयति कोशगते द्विरेफे
हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार ॥ १७६ ॥

अमी तिलास्तैलिक नूनमेतां स्नेहादवस्थां भवतोपनीताः ।
द्वेषो भविष्यद्यदमीषु नूनं तदा न जाने किमु वाकरिष्यः ॥ १७७ ॥

कूर्मः—

नो चुम्बनं न चटु यद्यपि भाषितं वा
नाङ्के स्थितिर्न परिरम्भणमेवमेव ।
दृष्ट्वैव कूर्मरमणी रमणीयभावात्
स्तन्यं विनैव परिपोषयति स्म बालान् ॥ १७८ ॥

कुम्भः—

कुद्दालेन विदारणं तदुपरि(तत् ?)र्दुःखं खरारोहणं
तत्पापिष्ठकुलालपादहननं चक्रभ्रमस्तादृशः ।
दाहोऽग्नेर्मम दुःखदो न हि तथा सर्वंसहा पाहि मे (?)
ग्राम्यस्त्रीकरपृष्ठताडनमहो ह्येतच्च दुःखावहम् ॥ १७९ ॥

कार्पासः—

सेहे वातजलप्रतापतपनप्रोद्दामदाहव्यथां
पश्चादस्थिवियोजितोऽथ मुदितो यन्त्रे चिरं भ्रामितः ।
कार्पासो गुणजामवाप्य सहसा जातः स्वयं कञ्चुकी
वक्षोजं परिरब्धुमेष कृतवान् किं किं न कर्माद्भुतम् ॥ १८० ॥

हारः—

अन्योपि सन्ति गुणिनः कति नो जगत्यां
हार त्वमेव गुणिनामुपरि स्थितोसि ।
एणीदृशामुरसि नित्यमवस्थिता(तः) च ।
सद्वृत्तता च शुचिता च न खण्डिता च ॥ १८१ ॥

मीनस्य—

जलाधीनं हि मीनस्य जीवितं जीविताविधि ।
मीनो जगच्च जानाति जलं जानाति वा न वा ॥ १८२ ॥

दासेरकः—

दासेरकस्य दासीयं बदरी यदि रोचते ।
एतावतैव किं द्राक्षा न साक्षादमृतास्पदम् ॥ १८३ ॥

दुन्दुभिः—

चर्मणा समवगुण्ठिताननो रज्जुबन्धनकदर्थितोपि सन् ।
ताडितोपि लगुडेन निष्ठुरं भण्ड डिण्डिम नदन्न लज्जसे ॥ १८४ ॥

यूथी—

यूथि यथोचितविधिना विधेयमातिथ्यमेतस्य ।
माधविकाप्राणपतिः प्राघुणिकस्ते घुणाक्षरन्यायात् ॥ १८५ ॥

निम्बः—

चित्रं चित्रं बत बत महच्चित्रमेतद्विचित्रं
जातो दैवादहह सहसा संविधाता विधाता ।
यन्निम्बानां परिणतफलस्फीतिरास्वादनीया
यच्चैतस्याः कवलनविधा(धौ) कोविदः काकलोकः ॥ १८६ ॥

कनकम्—

अहो कनकमाहात्म्यं व्याख्यातुं केन शक्यते ।
नामसाम्यादहो चित्रं धत्तूरोपि मदप्रदः ॥ १८७ ॥

विषस्य—

अहमेव गुरुः सुदारुणानामिति हालाहल तात मा स्म दृप्यः ।
ननु सन्ति भवादृशानि भूयो भुवनेस्मिन्वचनानि दुर्जनानाम् ॥१८८॥

शङ्खः—

रत्नाकरस्तव सुता(पिता) भवतोतु(नु)षङ्गाद्
विश्वं पवित्रितमिदं सलिलेन यस्य ।
* * * कुटिलत्वमन्तः
किं कारणं वदसि शङ्ख ददं(?) न विद्मः ॥१८९॥

पाञ्चजन्यकुलोद्भूतमिति शङ्खं महाजनाः ।
पूजयन्त्यस्थिसामान्यं स्थापयित्वाग्रतो हरेः ॥ १९० ॥

सर्पस्य—

द्विजिह्वान् दुर्वर्णानसुकृतिसुवर्णाहृतमतीन्
समुद्गीर्णक्ष्वेडारवजनितपीडानवचनान् ।

जगत्प्राणाहारान् श्रुतिविरहिणो वक्रिमगतीन्
(वहन्) कर्णोपान्ते शिव कथमिव त्वं वद शिवः ॥ १९१ ॥

अन्तर्लापिका—

(का कान्ता) कालियारातेः पुनरर्थे किमव्ययम् ।
किं वन्द्यं सर्वलोकानां फलेषु च किमुत्तमम् ॥ १९२ ॥

वर्णो यस्य विराजते जलनिधिं योसौ बबन्ध क्षक्षा(णा)-
यो लङ्काशशिरोच्छिनद्वसुमतीं व्यापुर्यदीयाः शराः ।
तं वन्दे रघुनन्दनं यदनुगा रक्षांस्यनु(वा ?)घ्नन् बला-
ज्जम्बूवज्जलबिन्दुवज्जलजवज्जम्बालवज्जालवत् ॥ १९३ ॥

किंवद्भाति हरिस्तदीयगलके मुक्तामयी भासते ।
माला नेत्रयुगं विभाति च कथं * * * * ॥ १९४ ॥

द्वितीयोऽध्यायः

राजनीतिः

राजनीतेर्नृपाश्रयत्वात्प्रथमं नृपलक्षणमाह—

शास्त्राय गुणसंयोगः शास्त्रं विनयवृत्तये ।
विद्याविनीतो नृपतिः सतां भवति संमतः ॥ १ ॥

मेधावी मतिमान्दीनवदनो दक्षः क्षमावान् ऋजु-
र्धर्मात्माप्यनसूयको लघुकरः षाड्गुण्यविच्छक्तिमान् ।
उत्साही पररन्ध्रवित्कृतधृतिर्वृद्धिक्षयस्थानवित्
शूरो न व्यसनी स्मरत्युपकृतं वृद्धोपसेवी च यः ॥ २ ॥

बुद्धिशस्त्रः प्रकृत्यङ्गो धनसंवृतिकञ्चुकः ।
चारेक्षणो दूतमुखः पुरुषः कोपि पार्थिवः ॥ ३ ॥

वाग्मी प्रगल्भ्यः(ल्भः) प्र(स्मृ)तिमानुदग्रो बलवान्वशी ।
नेता दण्डस्य निपुणः कृतशिल्पः सुविग्रहः ॥ ४ ॥

पराभियोगप्रसहो दृष्टसर्वप्रतिक्रियः ।
परच्छिद्रानुपेक्षी च संधिविग्रहतत्त्ववित् ॥ ५ ॥

गूढमन्त्रप्रचारश्च देशकालविभागवित् ।
आदाता सम्यगर्थानां विनियोक्ता च पार्थिवः ॥ ६ ॥

क्रोधलोभभयद्रोहस्तम्भचापलवर्जितः ।
वृद्धोपदेशसंपन्नः शक्तो मधुरदर्शनः ॥
निर्वृतः पितरीवास्ते यत्र लोकः स पार्थिवः ॥ ७ ॥

आत्मसंपद्गुणैः सम्यक्संयुक्तं युक्तकारिणम् ॥
पर्जन्यमिव राजानं प्राप्य लोकोऽभिवर्धते ॥ ८ ॥

साधु भूतलदेवत्वं दुरापमकृतात्मभिः ।।
आत्मसंस्कारसंपन्नो राजा भवितुमर्हति ।। ९ ।।

लोकाधाराः श्रियो राज्ञां दुरापा दुष्परिग्रहाः ।
तिष्ठन्त्याप इवाधारे चिरमात्मनि संस्कृते ।। १० ।।

कुलं सत्वं वयः शौर्यं दाक्षिण्यं क्षिप्रकारिता ।
अविसंवादिता सत्यं वृद्धसेवा कृतज्ञता ।। ११ ।।

दैवसंपन्नताबुद्धिरक्षुद्रपरिवारता ।
शक्यसामन्तता चैव तथा च दृढभक्तिता ।। १२ ।।

दीर्घदर्शित्वमुत्साहः शुचिता स्थूललक्षिता ।
विनीतता धार्मिकता गुणाः साध्याभिगाभिनः ।। १३ ।।

गुणैरेतैरुपेतः सन्सुव्यक्तमभिगम्यते ।
तथा च कुर्वीत यथा गच्छेल्लोकाभिगम्यताम् ।। १४ ।।

अन्यच्च विष्णुधर्मोत्तरे सुंज(नृप ?)लक्षणमाह—

सर्वलक्षणलक्षण्यो विनीतः प्रियदर्शनः ।
अदीर्घसूत्रो धर्मात्मा जितक्रोधो जितेन्द्रियः ।। १५ ।।

ब्रह्मण्यश्चाविसंवादी दृढभक्तिः प्रियंवदः ।
अलोलुपः संयतवागगम्भीरः प्रियदर्शनः ।। १६ ।।

नातिदण्डो न निर्दण्डश्चारचक्षुरजिह्मगः
व्यवहारे समः प्राप्ते पुत्रेण रिपुणा सह ।। १७ ।।

रथे गजे च धनुषि व्यायामे च कृतश्रमः ।
उपवासतपःशीलो यज्ञयाजी गुरुप्रियः ।। १८ ।।

मन्त्रिसांवत्सराधीनः समरेष्वनिवर्तकः ।
पूज्ये पूजयिता नित्यं दण्ड्ये दण्डयिता तथा ।। १९ ।।

षाड्गुण्यस्य प्रयोक्ता च शक्त्युपेतस्तथैव च ।
नाहंवादी न निर्द्वन्द्वो न यत्किंचनकारकः ॥ २० ॥

कृते कर्मण्यमात्यानां कर्तामात्यजनप्रियः ।
संगृहीतजनस्तब्धः प्रसन्नवदनः सदा ॥ २१ ॥

सदा भृत्यजनावेक्षी क्रोधी (च ?) सुमहामनाः ॥ २२ ॥

षाड्गुण्यस्य प्रयोक्तेत्युक्तं तानेव षड्गुणानाह—

संधिश्च विग्रहश्चैव यानमासनमेव च ।
द्वैधीभावः संश्रयश्च षाड्गुण्यं परिकीर्तितम् ॥ २३ ॥

पणबन्धः स्मृतः संधिरपकारस्तु विग्रहः ।
जिगीषोः शत्रुविषये यानं यात्राभिधीयते ॥ २४ ॥

विग्रहेपि स्वके देशे स्थितिरासनमुच्यते ।
मारणं रध(न्ध्र)लाभस्तु द्वैधीभावस्तदुच्यते ।
उदासीने मध्यमे वा संश्रयात्संश्रयः स्मृतः ॥ २५ ॥

तेषां प्रयोगकालमाह--

समेन संधिरन्वेष्यो हीनेन च बलीयसा ।
हीनेन विग्रहः कार्यः स्वयं राज्ञा बलीयसा ॥ २६ ॥

तत्रापि तस्य पार्ष्णिस्तु बलीयान्न समाश्रयेत् ।
आसीनः कर्मविच्छेदी शक्यः कर्तुं रिपुर्यदा ॥ २७ ॥

अशुद्धपार्ष्णिर्बलवान् द्वैधीभावं समाश्रयेत् ।
बलिना विगृहीतस्तु यो संधेयेन पार्थिवः ॥ २८ ॥

संश्रयस्तेन कर्तव्यो गुणानामधमो गुणः ।
बहुक्षयव्ययायासं तेषां यानं प्रकीर्तितम् ॥ २९ ॥

बहुलाभकरं वा स्यात्तदा यानं समाश्रयेत् ।
सर्वशक्तिविहीनस्तु तदा कुर्यात्तु संश्रयम् ॥ ३० ॥

एवं च बोद्धा नृपतिर्गुणानां काले च देशे च तथा विभागे ।
समाश्रयेद्भार्गववंशमुख्य एतावदुक्तं नृपतेस्तु कार्यम् ॥ ३१ ॥

इति राजलक्षणम् । एवंविधैर्लक्षणैर्यु(क्तो)भिषिक्तो राजा राज्यं कुर्यात् ।

तद्राज्यं कीदृशमीदृशमित्याह—

स्वाम्यमात्यसुहृत्कोषदेशदुर्गबलानि च ।
स्वाम्यमात्यो जनपदो दुर्गं दण्डस्तथैव च ॥ ३२ ॥

कोशो मित्रं च धर्मज्ञः सप्ताङ्गं राज्यमुच्यते ।
सप्ताङ्गस्यापि राज्यस्य मूलं स्वामी प्रकीर्तितः ॥ ३३ ॥

तन्मूलत्वात्तथाङ्गानां स तु रक्ष्यः समन्ततः ॥ ३४ ॥

राज्यस्य सहायाधीनत्वात्सहायस्वरूपमाह—

अभिषेकार्द्रशिरसा राज्ञा राज्यावलोकिना ।
सहायावरणं कार्यं तत्र राज्यं प्रतिष्ठितम् ॥ ३५ ॥

यद्यप्यल्पतरं कर्म तदप्येकेन दुष्करम् ।
पुरुषेण(णा)सहायेन किमु राज्यं महोदयम् ॥३६ ॥

तस्मात्सहायान्वरयेत्कुलीनान्नृपतिः स्वयम् ।
शूरान्कु(न्कु)लीनजातीयान्बलयुक्तान् क्रियान्वितान् ॥ ३७ ॥

रूपसत्त्वगुणोपेतान्सज्जनान्क्षमयान्वितान् ।
क्लेशक्षमान्महोत्साहान्धर्मज्ञांश्च प्रियंवदान् ॥ ३८ ॥

हितोपदेशकान्राज्ञः स्वामिभक्तान्यशोर्थिनः ।
एवंविधान्सहायांश्च शुभकर्मसु योजयेत् ॥ ३९ ॥

याज्ञवल्क्योऽपि—

स मन्त्रिणः प्रकुर्वीत राजा मौलान्स्थिरान् शुचीन् ।
तैः सार्धं चिन्तयेद्राष्ट्रं विप्रेणाथ ततः स्वयम् ॥ ४० ॥

निवर्तेतास्य यावद्भिरितिकर्तव्यता नृभिः ।
तावतोतन्द्रितान्दक्षान्प्रकुर्वीत विचक्षणान् ॥ ४१ ॥

तेषां विनियोगमाह—

तेषां मध्ये नियुञ्जीत शूरान्दक्षान् कुलोद्भवान् ।
शुचीनाकरकर्मान्ते भीरूनन्तर्निवेशने ॥ ४२ ॥

धार्मिकान्धर्मकृत्येषु अर्थकार्येषु पण्डितान् ।
क्लीबान्स्त्रीषु नियुञ्जीत नीचान्नीचेषु कर्मसु ॥ ४३ ॥

अध्यक्षान् विविधान् कुर्यात्तत्र तत्र विपश्चितः ॥ ४४ ॥

सप्ताङ्गं राज्यमित्युक्तं तत्र स्वामिलक्षणस्योक्तत्वादमात्यलक्षणमाह—

प्रे(प्रे)ख(क्ष)कः पाठकश्चैव गणकः प्रतिबोधकः ।
गूढमन्त्रश्च तत्वज्ञो कालज्ञो दृष्टवित्तथा ॥ ४५ ॥

पितृमातामहाभिज्ञः स्मृतिसिद्धान्तगोचरः ।
संधिविग्रहविद्वांश्च मन्त्री ह्येष प्रकीर्तितः ॥ ४६ ॥

मन्त्रिणश्च ब्राह्मणादयः कार्याः ।तदेवाह । अन्यत्रामात्यलक्षणं ।विष्णुधर्मोत्तरे—

सर्वलक्षणलक्षण्यो मन्त्री राज्ञस्तथा भवेत् ।
ब्राह्मणो वेदतत्त्वज्ञो विनीतः प्रियदर्शनः ॥ ४७ ॥

स्थूललक्ष्यो महात्मा च स्वामिभक्तः प्रियंवदः ।
बृहस्पत्युशनःप्रोक्तं नीतिं जानाति तत्त्वतः ॥ ४८ ॥

रागद्वेषेण यः कार्यं न च हन्ति महीक्षितः ।
लोकापवादाद्राजार्थे भयं यस्य न जायते ॥ ४९ ॥

क्लेशक्षमस्तु धर्मात्मा विजितात्मा जितेन्द्रियः ।
गूढमन्त्रश्च तत्त्वज्ञः प्राज्ञो भक्तजनप्रियः ॥ ५० ॥

इङ्गिताकारतत्त्वज्ञ ऊहापोहविशारदः ।
शूरश्च कृतिविद्यश्च न च मानी विमत्सरः ॥ ५१ ॥

चारप्रचारकुशलः प्राणिभिः प्रणयात्मकः ।
षाड्गुण्यविधितत्त्वज्ञश्चोपायकुशलस्तथा ॥ ५२ ॥

वेत्ता विधाता कार्याणां नैव कार्यातिपातिता ॥
समश्च राजभृत्यानां तथैव च गुणप्रियः ॥ ५३ ॥

कालज्ञः समयज्ञश्च कृतज्ञश्च जनप्रियः ॥
यथानुरू(प)मर्हाणां पुरुषाणां नियोजिता ॥ ५४ ॥

राज्ञः परोक्षे कार्याणि संपराये भृगूद्वह ॥
कृत्वा निवेदिता राज्ञि कर्मणां गुरुलाघवम् ॥ ५५ ॥

शत्रुमित्रविभागज्ञो विग्रहस्य च तत्त्ववित् ॥
स राज्ञः सर्व कार्याणि कुर्याद्व भृगुकुलोद्वह ॥ ५६ ॥

विदितानि तथा कुर्यान्न(ज्ञा)ज्ञातानि महीक्षितः ॥
अज्ञातानि नरेन्द्रस्य कृत्वा कार्याणि भारत ।
अचिरेणापि विद्वेषं मन्त्री समधिगच्छसि(ति) ॥ ५७ ॥

करोति यश्च कार्याणि विदितानि महीपतेः ।
भेदो न तस्य भवति कदाचिदपि भूभुजा ॥ ५८ ॥

एवंगुणो यस्तु भवेच्च मन्त्री
वाक्ये च तस्याभिरतिश्च राज्ञः ।
राज्यं स्थिरं स्याद्विपुला च लक्ष्मी-
र्यस्य च(वंशस्य?) दीप्तिर्भुवनत्रयेपि ॥ ५९ ॥

इति अमात्यलक्षणम् । अथैतादृशामात्यनियोजने राज्ञः कार्यसिद्धिरन्यथा कार्य-हानिरधर्मश्चेत्याह कामन्दकः—

राज्ञा नियोजितेमात्ये राज्ञः सन्ति त्रयो गुणाः ।
यशः स्वर्गनिवासश्च पुष्टचे(पुष्टश्चैव) धनागमः ॥ ६० ॥

मूर्खे नियोजितेमात्ये त्रयो दोषा महीपतेः ।
अयशः कर्महानिश्च नरके पतनं ध्रुवम् ॥ ६१ ॥

तस्मान्महीपतिः सम्यग् विचार्य च पुनः पुनः ।
गुणवन्तं नियुञ्जीत गुणहीनं न योजयेत् ॥ ६२ ॥

अमात्यैर्व्यसनोपेतैर्ह्रियमाणो महीपतिः ।
अशक्त एवोत्पतितुं छिन्नपक्ष इवा(ण्ड)जः ॥ ६३ ॥

कामन्दकः—

व्यसनस्य प्रतीकारो राज्ञि राज्याभिषेचनम् ।
आयव्ययौ दण्डनीतिरमात्यप्रतिषेधनम् ॥
इत्यमात्यस्य कर्मेदं हन्ति स व्यसनान्वितः ॥ ६४ ॥

मन्त्रिणश्च ब्राह्मणादयः कार्यास्तदेवाह—

सर्वेषां तु विशिष्टेन ब्राह्मणेन विपश्चिता ।
मन्त्रयेत् परमं मन्त्रं राजा षाड्गुण्यसंयुतम् ॥ ६५ ॥

अन्यानपि प्रकुर्वीत शुचीन्प्राज्ञानवस्थितान् ।
सम्यगर्थं समाहर्तुं सामान्यान्सुपरीक्षितान् ॥ ६६ ॥

मौलान् शास्त्रविदः शूराल्लब्धलक्षान् कुलोद्भवान् ।
सचिवान् सप्त वा राजा कुर्वीत सुपरीक्षितान् ॥ ६७ ॥

कुलीनाः शुचयः शूराः श्रुतवन्तो न रागिणः ।
दण्डिनेः(दण्डनीतेः) प्रयोक्तारः सचिवाः स्युर्महीपतेः ॥ ६८ ॥

अन्तःसारैरकुटिलैः सद्वृत्तैः सुपरीक्षितैः ।
मन्त्रिभिर्धार्यते राज्यं सुस्तम्भैरिव मन्दिरम् ॥ ६९ ॥

अशृण्वन्नपि बोद्धव्यो मन्त्रिणा पृथिवीपतिः ।
यथा स्वदोषनाशाय विदुरेणाम्बिकासुतः ॥ ७० ॥

मि(स्मृ)तिसारेपि—

स्मृतिस्तत्परतार्थेषु वितर्को ज्ञाननिश्चयः ।
दृढता मन्त्रगुप्तिश्च मन्त्रिसंपत्प्रकीर्तिते(ता) ॥ ७१ ॥

अमात्यो राजपुत्रश्च भुजावेतौ महीपतेरिति राजपुत्रस्यापि अमात्र(त्य)मध्ये परिगणितत्वात् प्रसङ्गतः पुत्रशिक्षामाह—

प्रजार्थं श्रेयसे राजा कुर्वीतात्मजरक्षणम् ।
लोलुभ्यमानास्तेर्थेषु हन्युरेनमतन्द्रिताः ॥ ७२ ॥

आ(चा)र्य(र्यै)श्चार्यकर्तव्यं नित्ययुक्तैश्च रक्षणम् ।
धर्मार्थकामशास्त्राणि धनुर्वेदं च शिक्षयेत् ॥ ७३ ॥

रथे च कुञ्जरे चैनं व्यायामं कारयेत्तदा ।
शिल्पानि शिक्षते(ये)दाप्तैर्नास्य मिथ्याप्रियं वदेत् ॥ ७४ ॥

न चास्य सङ्गो दातव्यः क्रुद्धलब्धावमानितैः ।
तथापि विनयेदेनं यथा यौवनगोमुखे ॥ ७५ ॥

इन्द्रियैर्नावकृष्येत सतां मार्गात्सुदुर्गमात् ।
गुणाधानमशक्यं तु यस्य कर्तुं स्वभावतः ॥ ७६ ॥

बन्धनं तस्य कर्तव्यं गुप्ते देशे सुखान्वितम् ।
अविनीतकुमारं हि कुलमाशु विनश्यति ॥ ७७ ॥

अधिकारेषु सर्वेषु विनीतं विनियोजयेत् ।
आदौ स्वल्पे ततः पश्चात्क्रमेणापि बृहत्स्वपि ॥ ७८ ॥

कामन्दकोपि—

राजपुत्रा मदोद्धूता गजा इव निरङ्कुशाः ।
भ्रातरं स्वामिनं घ्नन्ति पितरं चातिमानिनः ॥ ७९ ॥

राजपुत्रैर्मदोद्धूतैः प्रार्थ्यमानमितस्ततः ।
दुःखेन रक्ष्यं राज्यं हि व्याघ्राघ्रातमिवामिषः(मिषम्) ॥ ८० ॥

रक्ष्यमाणा यदि च्छिद्रं कथंचित्प्राप्नुवन्ति ते ।
सिंहशावा इव घ्नन्ति ते हि राज्यमसंशयम् ॥ ८१॥

पितरं स्वमसंशयमित्यपि पाठः ।

इति राजपुत्रशिक्षा । प्रसङ्गाद्राजपुत्रस्य कृत्यमाह—

पितृसेवापरस्तिष्ठेत्कायवाङ्मानसैः सदा ।
तत्कर्म कुर्यान्नियतं येन तुष्टो भवेत्पिता ॥ ८२ ॥

तन्न कुर्याद्येन पिता मनागपि विषीदति ।
यस्मिन्पितुर्भवेत्प्रीतिः स्वयं तस्मिन्प्रियं चरेत् ॥ ८३ ॥

यस्मिन्द्वेषं पिता कुर्यात्स्वस्यापि द्वेष्य एव सः ।
असंमतं विरुद्धं च स्वयं नैव समाचरेत् ॥ ८४ ॥

प्राप्यापि युवराजत्वं प्राप्नुयाद्विकृतिं न च ।
स संपत्तिमदाच्चैव मातरं पितरं तथा ॥ ८५ ॥

भ्रातरं भगिनीं चापि अन्यान्वा राजवल्लभान् ।
महाजनांस्तथा राष्ट्रं नावमन्येन्न पीडयेत् ॥ ८६ ॥

प्राप्यापि महतीं वृद्धिं वर्तेत पितुराज्ञया ।
पुत्रस्य पितुराज्ञा हि परमं भूषणं स्मृतम् ॥ ८७ ॥

सोदरेषु च सर्वेषु नाधिक्यं संप्रदर्शयेत् ।
भ्रातृणामवमानेन बहवो हि विनाशिताः ॥ ८८ ॥

पितुराज्ञोल्लङ्घनेन प्राप्यापि पदमुत्तमम् ।
तस्माद्भ्रष्टा भवन्तीह दासवद्राजपुत्रकाः ॥ ८९ ॥

एवं गृहाविरोधेन राजपुत्रो वसन्गृहे ।
त्यागी च सत्त्वसंपन्नः सर्वान्कुर्याद्वशे स्वके ॥ ९० ॥

शनैः शनैः प्रवर्धेत शुक्लपक्षमृगाङ्कवत् ।
एवं वृत्तो राजपुत्रो राज्यं प्राप्याप्यकण्टकम् ।
सहायवान्महामात्यश्चिरं भुङ्क्ते वसुंधराम् ॥ ९१ ॥

सहायाः पूर्वोक्ता ज्ञेयाः । इति राजपुत्रकृत्यनिरूपणम्—

विनयोपग्रहान्भू(भू ?)त्यै कुर्वीत नृपतिः सुतान् ।
विनीतमौरसं पुत्रं यौवराज्येभिषेचयेत् ॥ ९२ ॥

इति अनेन विनीतस्यैव राज्याधिकारे सिद्धे पुनरविनीतं प्रत्याह—

राजपुत्रः स दुर्वृत्तः परित्यागं हि नार्हति ।
क्लिश्यमानः स पितरं परानाश्रित्य हन्ति हि ॥ ९३ ॥

व्यसने सज्जमानं हि क्लेशयेद्व्यसनाश्रयैः ॥ ९४ ॥

इति सप्रसङ्गममात्यनिरूपणम् । सुहृदः—

नृपस्य ते हि सुहृदस्त एव गुरवो मताः ।
य एनमुत्पथगतं वारयन्त्यनिवारिताः ॥ ९५ ॥

सज्जमानमकार्येषु सुहृदो धारयन्ति ये ।
सत्यं ते नैव सुहृदो गुरवो गुरवो हि ते ॥ ९६ ॥

कोशनिरूपणम्—

वर्धमानोल्पनिस्राव(वः)ख्यातः पूजितदैवतः ।
ईक्षितद्रव्यसंपूर्णो हृद्य आप्तैरधिष्ठितः ॥ ९७ ॥

मुक्ताकनकरत्नाढ्यः पितृपैतामहोचितः ।
यत्र राजा तत्र कोशः कोशाधीना हि राजता ॥ ९८ ॥

अर्थादयं परश्चोच्चैर्लोको लोकस्य निश्चितः ।
पुमानर्थेन रहितो जीवन्नपि न जीवति ॥ ९९ ॥

यस्यार्थास्तस्य सुहृदो यस्यार्थास्तस्य पौरुषम् ।
यस्यार्थास्तस्य सर्वेपि सहायाः संभवन्ति हि ॥ १०० ॥

आपदर्थे च संरक्ष्यः कोशः कोशवता सदा ।
पुत्रादपि हि संरक्ष्यो भार्यायाः सुहृदस्तथा ॥ १०१ ॥

नान्याय्यं च व्ययं कुर्यात्प्रत्यवेक्षेत ता(त्वा)न्वहम् ।
कृषिवाणिज्ययोर्दुर्गसेतुः कुञ्जरवन्द(बन्ध ?)नम् ॥ १०२ ॥

खन्यखरखनादानं(खन्याकरवनादानं) स्वस्थाचित्तोपि वर्धयेत् ।
कोशमूलोपि राजेति प्रवादः सार्वलौकिकः ॥ १०३ ॥

एतत्सर्वं जहातीह कोशे व्यसनवान्नृपः ।
क्षीणं बणं(लं) वर्धयति स्वतो गृह्णाति च प्रजाः ॥ १०४ ॥

कोशवान्पृथिवीपालः परैरप्युपजीव्यते ।

कोशो द्रव्यमित्यर्थः । कोशः संरक्ष्य इत्युक्तं रक्षणं चाधिकारिसापेक्षमिति कोशाधिकारिलक्षणमाह--

लोहवस्त्राजिनादीनां रत्नानामभिधानवित् ॥ १०५ ॥

विज्ञाता फल्गुसाराणां अनाहार्यः शुचिस्मितः ।
निपुणश्चाप्रवृत्तश्च धनाध्यक्षः प्रकीर्तितः ॥ १०६ ॥

इति कोशनिरूपणम् । अथ देशः--

यो राष्ट्रमनुगृह्णाति परिगृह्य स्वयं नृपः ।
संजातमुपजीवन्स लभते सुमहत्फलम् ॥ १०७ ॥

पौराञ्जानपदान्सर्वान्सांश्रितोपाश्रितांस्तथा ।
यथाशक्त्यानुकम्पेत सर्वानप्यधनानपि ॥ १०८ ॥

धर्माधर्मौ विजानन्हि सतां मार्गमनुस्मरन् ।
प्रजा रक्षेन्नृपः साधु हन्याच्च परिपन्थिनः १०९ ॥

राष्ट्रोपघातं कुर्वीरन्ये पापा राजवल्लभाः ।
एकैकशः संहतांस्तान्दूष्यान्वा परिचक्षते ।
दूष्यानुपांशुदण्डेन हन्याद्राजाविलम्बितम् ॥ ११० ॥

इति राष्ट्रम् । दुर्गस्वरूपनिरूपणम् । तत्र सामान्यतो दुर्गप्र(शं)सामाह मनुः--

एकः शतं योधयति प्राकारस्थो धनुर्धरः ।
शतं दशसहस्राणि तस्माद्दुर्गं समाश्रयेत् ॥ १११ ॥

सरीसृपविहीनं च व्यालतस्करसंयुतम् ।
एवंविधं यथालाभं राजा विषयमाविशेत् ॥ ११२ ॥

तत्र दुर्गं नृपः कुर्यात् षष्ट(ण्णा ?)मेकतमं बुधः ॥ ११३ ॥

षड्भेदानेवाह—

धन्विदुर्गं महीदुर्गं नरदुर्गं तथैव च ।
वार्क्षं चैवाम्बुदुर्गं च गिरिदुर्गं तथैव च ॥ ११४ ॥

षण्णां मध्ये गिरिदुर्गे विशेषमाह—

सर्वेषामेव दुर्गाणां गिरिदुर्गं प्रशस्यते ।
दुर्गं च परिखोपेतं वप्राट्टालकसंयुतम् ॥ ११५ ॥

शतघ्नीयन्त्रमुख्यै(श्च) शतशस्तु समावृतम् ।
गोपुरं सकपाटं च तत्र स्यात्सुमनोहरम् ।
सपताको गजारूढो येन राजा विशेत्सर्वं(शेत्स्वयम ?) ॥ ११६ ॥

तस्य मध्ये तु पर्याप्तं कारयेद्गृहमात्मनः ।
गुप्तं सर्वर्तुकं शुभ्रं जलवृक्षसमन्वितम् ॥ ११७ ॥

तदुक्तं मात्स्ये—

इत्येवमेतैः सकलैरुपेतैर्द्रव्यैः परार्ध्यैः परिरक्षितः स्यात् ।
राजा वसेत्तत्र गृहे सुशुभ्रे गुणान्विते लक्षणसंप्रयुक्ते ॥ ११८ ॥

तत्र दुर्गे इत्यर्थः । अथ दुर्गेषु स्थलविभागमाह—

चतस्रश्च तथा तत्र कार्यास्त्वायतवीथयः ।
एकस्मिंस्तत्र वीथ्यग्रे देववेश्म भवेद्दृढम् ॥ ११९

वीथ्यग्रे च द्वितीये तु राजवेश्म विधीयते ।
धर्माधिकरणं कार्यं वीथ्यग्रे च तृतीयके ॥ १२० ॥

चतुर्थे चैव वीथ्यग्रे गोपुरं तु विधीयते ।
आयतं चतुरस्रं वा वृत्तं वा कारयेत्पुरम् ॥ १२१ ॥

अन्तहीनं त्रिकोणं च यवमध्यं तथैव च ।
अर्धचन्द्रप्रकारं च वज्राकारं च कारयेत् ॥ १२२ ॥

अर्धचन्द्रं प्रशंसन्ति नदीतीरेषु तद्वसेत् ।
अन्यत्र तु न कुर्वीत प्रयत्नेन विजानता ॥ १२३ ॥

राज्ञा कोशगृहं कार्यं दक्षिणे राजवेश्मतः ।
तस्यापि दक्षिणे भागे गजस्थानं विधीयते ॥१२४ ॥

गजानां प्राङ्मुखी शाला कर्तव्या वाप्युदङ्मुखी ॥ १२५॥

आग्नेये च तथा भागे आयुधागारमिष्यते ।
महानसं च धर्मज्ञकर्मशाला तथापरा ॥ १२६ ॥

गृहं पुरोधसः कार्यं वामतो राजवेश्मनः ।
मन्त्रिदैवविदां चैव चिकित्साकर्तुरेव च ॥ १२७ ॥

तत्रैव च महाभाग गृहाणि च विधारयेत् ।
गवां स्थानं तथैवात्र तुरगाणां तथैव च ॥ १२८ ॥

उत्तराभिमुखा श्रेणी तुरगाणां विधीयते ।
दक्षिणाभिमुखा चाथ परिशेषास्तु गर्हिताः ॥ १२९ ॥

तुरङ्गशालाया विशेषमाह--

तुरङ्गास्ते तथा कार्याः प्रदीपः सर्वरात्रिकः ।
कुक्कुटान्वानरांश्चैव मर्कटांश्च नराधिप ॥ १३० ॥

गोगजाश्वादिशालासु तत्पुरीषस्य निर्गमः ।
अस्तंगते न कर्तव्यो देवदेवे दिवाकरे ॥ १३१ ॥

दुर्गे तत्र यथास्थानं राजा विज्ञाय सारथीन् ।
दद्यादावसथस्थानं सर्वेषामनुपूर्वशः ॥ १३२ ॥

योधानां शिल्पिनां चैव सर्वेषामविशेषतः ।
दद्यादावसथान्दुर्गे मन्त्रकालविदान्(दः) शुभान् ॥ १३३ ॥

गोवैद्यानश्ववैद्यांश्च गजवैद्यांस्तथैव च ।
आहरेत बलं राजा दुर्गे परबला रुज. ॥ १३४ ॥

कुशीलवानां विप्राणां दुर्गे स्थानं विधीयते ।
बहूनां च न वै दुर्गे विना कार्यं ततो भवेत् ॥ १३५ ॥

स्थलविभागमुक्त्वा दुर्गसंपत्तिमाह--

दुर्गे तु यन्त्राः कर्तव्या नानाप्रहरणान्विताः ।
सहस्रघातिनो राजंस्तैस्तु रक्षा विधीयते ॥ १३६ ॥

दुर्गद्वाराणि गुप्तानि कार्याण्यपि च भूभृता ।
संग्रहश्चात्र सर्वेषामायुधानां च शस्यते ॥ १३७ ॥

धनुषां क्षेपणीद्या(या)नामायुधानां च शस्यते ।
शराणामथ खड्गानां कवचानां तथैव च ॥ १३८ ॥

कणपानां त्रिशूलानां पट्टिशानां तथैव च ।
प्रासानां चैव शस्त्राणां शक्तीनां च तथैव च ॥ १३९ ॥

परश्वधानां चक्राणां चमणां वर्मभिः सह ।
कुठाररुजु(रज्जु ?) वेत्राणां पट्टिकानां तथैव च ॥ १४० ॥

हेतुकानां च देवानां मङ्गलानां च संशयः ।
सर्वेषां शिल्पिभाण्डानां संचयस्तत्र चेष्यते ॥ १४१ ॥

वादित्राणां च सर्वेषामोषधीनां तथैव च ।
यवसानां प्रभूतानां इन्धनानां तथैव च ॥ १४२ ॥

गुडस्य सर्वतलानां गोरसानां तथैव च ।
वसानामथ मज्जानां स्नायूनामस्थिभिः सह ॥ १४३ ॥

गोचर्मपटहानां च धान्यानां सर्वतस्तथा ।
तथैवाभ्रपठानां (?) च यवगोधूमयोरपि ॥ १४४ ॥

सणसर्जरसं भूर्जं जतुलाक्षा च टङ्कणम् ।
राजा संचिनुयाद्दुर्गे यच्चान्यदपि किंचन ॥ १४५ ॥

रत्नानां सर्वलोहानां वस्त्राणां चाप्यशेषतः ।
कोद्रवमुद्गमाषाणां चणकानां तिलैः सह ॥ १४६ ॥

तथा च सर्वसस्यानां पांसुगोमययोरपि ।
कुम्भाश्वाशीर्वि(ष)र्युक्ताव्यालसिंहादयस्तथा ॥ १४७ ॥

भृङ्गाश्च पक्षिणश्चैव रक्ष्यास्ते च परस्परम् ।
स्थानानि च विरुद्धानां सुगुप्तानि पृथक् पृथक् ॥ १४८ ॥

कर्तव्यानि महाभाग यत्नेन पृथिवीभुजा ।
उक्तानि चाप्यनुक्तानि राजा द्रव्याण्यनेकशः ॥ १४९ ॥

सुगुप्तानि पुरे कुर्याज्जनानां हितकाम्यया ।
उक्तानि चाप्यनुक्तानि ॥ १५० ॥

विषाणां वारकं कार्यं प्रयत्नेन महीभुजा ।
विचित्राः श्वापदा कार्या विषस्य शमनास्तथा ॥ १५१ ॥

रक्षोभूतपिशाचानां परघ्नाः पुष्टिवर्धनाः ।
कलाविदग्धपुरुषा दुर्गे धार्याः प्रयत्नतः ॥ १५२ ॥

भीतान्क्रुद्धान्प्रमत्तांश्च तथैव च विमानितान् ।
कुभृत्यान्पापशीलांश्च न राजा वासयेत्पुरे ॥ १५३ ॥

औषधानि च सर्वाणीत्युक्तं तानि मत्स्यपुराणोक्तानि ज्ञेयानि—

यन्त्रायुधाट्टालचयोपपन्नं समग्रधान्यौषधिसंप्रयुक्तम् ।
वणिग्जनैश्चावृतमावसेत दुर्गं सुगुप्तं नृपतिः सदैव ॥ १५४ ॥

इति दुर्गनिरूपणम् । दुर्गप्रसङ्गाद्दुर्गाध्यक्षलक्षणमाह—

अनाहार्यश्च शूरश्च वाग्मी प्राज्ञः कुलोद्गतः ।
दुर्गाध्यक्षः स्मृतो राज्ञ उद्युक्तः सर्वकर्मसु ॥ १५५ ॥

गजानां प्राङ्मुखी शालेत्युक्तं तदर्थं गजभेदांस्तत्प्रशंसामाह—

यतो गजैर्विना राज्ञां राजशोभा न जायते ।
जयप्रतापसैन्यस्य रक्षा तस्मादिहोच्यते ॥ १५६ ॥

पुरा स्वर्गे सुखेनासन् कामगाः खेचरा गजाः ।
मुनिशापाद्गता भूमौ ततो जाता वनेचराः ॥ १५७ ॥

गजभेदानाह—

भद्रो मन्द्रो मृगो मिश्रश्चतुर्धा जायते गजः ।
त्रयो युगत्रये भूवन्मिश्राः कलियुगे गजाः ॥ १५८ ॥

यतः सत्यं ततो धर्मो यतो धर्मस्ततो धनम् ।
यतो रूपं ततः शीलं यतो नागास्ततो जयः ॥ १५९ ॥

यद्वद्वदन(वनम)सिंहं च यद्वद्राष्ट्रमपार्थिवम् ।
यद्वच्छौर्यमशस्त्रं च तद्वत्सैन्यमकुञ्जरम् ॥ १६० ॥

प्राकारगोपुराट्टालकपाटोद्घाटनादिषु ।
भञ्जने मर्दने चैव नागा वज्रोपमाः स्मृताः ॥ १६१ ॥

शरजालाञ्चितमुखः कोन्यः शक्तः परं गजात् ।
हन्तुं प्राकारमुन्मथ्य रथाश्वनरकुञ्जरान् ॥ १६२ ॥

एकशक्तिप्रहारेण म्रियतेश्वो नरोपि च ।
सहेन्महाप्रहाराणां शतं युद्धेषु वारणः ॥ १६३ ॥

चीत्कारैर्नाशयन्तः स्वपतिभटमनो मोदयन्तो मदाढ्याः
संग्रामसीम्नि खिलबहलतां बाढमाढौकमानाः ।
शुण्डादण्डप्रहारैः परमपि च बलं कम्पयन्तः परेषां
येषां सर्वे गजेन्द्रा भुवि विजयविधौ ते मता भूमिपालाः ॥ १६४ ॥

चलन्ति येषां न शतं गजेन्द्राः पुरःप्रयाणे चलशैलतुल्याः ।
वाञ्छन्ति चैवं विजयं कथं ते राजेति शब्दं च कथं भजन्ते ॥१६५॥

तावद्गर्जन्ति वीर्यात्परनिधनविधौ युद्धमध्येपि वीरा-
स्तावद्धावन्ति वेगं परमपि दधतः संमुखीनास्तुरङ्गाः ।
शूरारूढः सुसज्जो मदमुदितमान(मनो ?) मानमानं विधुन्वन्
यावन्नायाति कोपात्कृतविविधरवाटोप एकोपि नागः ॥ १६६ ॥

मातङ्गैरपि यैर्महेन्द्रभवनं पुण्याधिकं जन्यते
यैः श्यामैरपि सर्वलोकमहिता कीर्तिः समातन्यते ।
यैर्मत्तैरपि सङ्गरे रिपुमदः शोषं समानीयते
तेमी भाग्यवतः प्रयान्ति पुरतः स्तम्बेरमा भूपतेः ॥ १६७ ॥

इति प्रशंसा। भद्रादिलक्षणानि—

प्रतिमानेषु विपुलश्चारुपृष्ठायताननः।
मुखे सुरभिनिश्वासस्ताम्रजिह्वोष्टतामुकः॥ १६८॥

तथास्य तुल्यसंस्थानौ दन्तौ शुभ्रौ विशेषतः।
मधुपिङ्गलनेत्रश्च महाकायो महाबलः॥ १६९॥

पुरस्तादुच्छ्रितश्चापि पश्चादवनतोपि यः।
धनुर्विनतविंशश्च(?)समपादतलः शुभः॥ १७०॥

विंशत्या च नखैर्युक्ता अष्टादशभिरेव वा।
विद्युद्दावाग्निसिंहेभ्यो न बिभेत्यंशुके(कुशा)दपि॥ १७१॥

अन्वर्थवेदी शू(र)श्च क्षमावान्नच कर्कशः।
कल्याणमेधास्तेजस्वी भद्रः स परिकीर्तितः॥ १७२॥

अथ मन्दः—

महाग्रीवो महावक्त्रो महाप्रोथो महोदरः।
पि(पी)नोरुवंशः सान्द्रत्वक्सुविभक्तो महासुरः॥ १७३॥

बहलैर्बहुभिर्दीर्घैर्युक्तः स्निग्धतनूरुहैः।
स्थिरैः स्थिराकृतितलैः पादैश्च पृथुभिः समैः॥ १७४॥

स्थिरस्निग्धे विशाले च पीने चापि प्रकीर्तिते।
विषाणे तस्य विद्वद्भिरोष्ठो दीर्घश्च रोमशः॥ १७५॥

कूर्मसंस्थानगमनो मन्दो मन्दगतिक्रमः।
संमील्य लोचने नित्यं निद्रान्ध इव गच्छति॥ १७६॥

मृगः—

तनुत्वक्कर्णपादो यः स्तब्धास्यस्तनुमेहनः।
तनुवंशोदरश्चैव तनुव्यक्ततनूरुहः॥ १७७॥

दीर्घजिह्वविषाणश्च दीर्घगात्रस्तथा च सः ।
प्रध्वस्तरोमकर्णश्च पुरस्ताच्चापि संवृतः ॥ १७८ ॥

निपाते गोचरस्थाने याया शय चा(?)निर्वृतः ।
ह्रस्वश्रवणलाङ्गूलो दीर्घं विक्रमते क्रमैः ॥ १७९ ॥

पुनः पुनश्च विनदन् दुर्गतिश्चापि धावति ॥ १८० ॥

अथ मिश्रलक्षणम्—

बह्वाशी बह्वलीकश्च दण्डपातेषु चाक्षमः ।
गच्छेत्प्रकृष्टवेगश्च भारं प्राप्यावसीदति ॥ १८१ ॥

कृच्छ्राच्चाप्यायते नागः क्षिप्रं च परिहीयते ।
बह्वम्ललवणैश्चापि रुक्षैश्चातुरतां व्रजेत् ॥ १८२ ॥

नित्यं च सान्त्वयेदेनं न चैनमभितापयेत् ।
सर्वेषां लक्षणैः कैश्चियुक्तो मिश्रो भवेद्गजः ॥ १८३ ॥

शरतोमरवज्रैश्च गजस्कन्धहता नराः ।
क्षणात्स्वर्गं प्रयन्त्येव तस्मात्स्वर्गोपमा गजाः ॥ १८४ ॥

इत्येवं पूर्वोक्तसंपत्तिसहिते दुर्गे राजा सुखं वसेत् । इति साङ्गदुर्गनिरुपणम् । अथ बलि(ल)निरूपणम् । तच्च(ब)लं षाड्वधम्—

षड्विधं तु बलं व्यूह्य द्विषतोभिमुखं व्रजेत् ॥ १८५ ॥

इति षाड्विधं बलम् । तदेवाह—

मौलं भूतं श्रेणि सुहृद् द्विषदाटविकं बलम् ।
पूर्वं पूर्वं गरीयस्तु बलानां विषमं स्मृतम् ॥ १८६ ॥

अस्यार्थः । मौलं परंपरागतम् । भूतं यावद्विभवस्थायि । श्रेणि गमनमार्गे स्थाने निवेशि(तं ?) । सुहृन्मित्रबलम् । द्विषदधीनं जातं यत्तद् द्विषत् । आटविकं अरण्यसंबन्धि । उक्तस्य च तस्य चतुरङ्गत(ता)माह—

हस्त्यश्वरथपादातं सेनाङ्गं स्याच्चतुर्विधम् ॥ १८७॥

इति बलम् । बलस्य सेनापत्यधीनत्वात् सेनापतिलक्षणमाह--

कुलीनः शीलसंपन्नो धनुर्वेदविशारदः ।
हस्तिशिक्षादिकुशलो नित्यं हि श्लक्ष्णभाषितः ॥ १८८ ॥

निमित्ते शकुनज्ञाने वेत्ता चैव चिकित्सके ।
कृतज्ञः कर्मणां शूरस्तथा क्लेशसहो रु(हस्त्वृ)जुः ॥ १८९ ॥

व्यूहतत्त्वविधानज्ञः फल्गुसारविशेषतः ।
राज्ञा सेनापतिः कार्यो ब्राम्हणः क्षत्रियोथवा ॥ १९० ॥

एवं ये कुशलं शूरं हिते स्थितमकल्मषम् ।
सेनापतिं प्रकुर्वन्ति ते जयन्ति रणे रिपून् ॥ १९१ ॥

बृहस्पतिसमं बुध्या क्षमया पृथिवीसमम् ।
समुद्रमिवगाम्भीर्ये हिमवन्तमिवाचलम् ॥ १९२ ॥

प्रजापतिमिवौदार्ये तेजसा भास्करोपमम् ।
महेन्द्रमिव शत्रूणां ध्वंसनं शरवृष्टिभिः ॥ १९३ ॥

इति सेनापतिलक्षणम् ।

हस्तिशिक्षाविधानज्ञो वनजाति(वि)शारदः ।
क्षेळा(क्लेश)क्षमस्तथा राज्ञो गजाध्यक्षः प्रशस्यते ॥ १९४ ॥

एतैरेव गुणैर्युक्तः स्थविरस्य(श्च) विशिष्यते ।
गजारोही नरेन्द्रस्य सर्वकर्मसु शस्यते ॥ १९५ ॥

अश्वाध्यक्षः--

हयशिक्षाविधानज्ञोऽश्वचिकित्सितपारकः(गः) ।
अश्वाध्यक्षो महीभर्तुः श्वा(स्वा)सनस्य(श्च)विशिष्यते ॥ १९६ ॥

अथ राजभूषणे सप्ताङ्गनिरूपणम् । अथ राजकृत्यनिरूपणम्—

विचिन्त्य कार्याणि निशावसाने विद्वत्सुहृन्मण्डलमिश्रितानाम् ।
बलार्थदेशेषु नियोजितानां समाश्रितानां च कृताकृतानि ॥ १९७ ॥

स वेणुवीणापटहस्वनानां गीतेन पूर्वं व्यपनीतनिद्रः ।
शय्यां त्यजेत्पूर्वनिशावसाने शृण्वन्गिरो मङ्गलपाठकानाम् ॥ १९८ ॥

तदुत्तरमाह्निकोक्तरीत्या शौचदन्तधावनानि कुर्यात् । तदुक्तं मनुना--

प्रातरुत्थाय नृपतिः कुर्याद्दन्तस्य धावनम् ॥ १९९ ॥

शृण्वन्गिर इत्यनेन प्राबोधिकादिपव(ठ)नमप(पि) ज्ञेयम् । ततश्चादर्शदर्शनपूर्वकं श्मश्रु-संस्कारः । अनन्तरं दैवज्ञमुखात्पञ्चाङ्गश्रवणम् ।

श्रुत्वा तिथीभग्रहवासरं च प्राप्नोति धर्मार्थयशांसि सौख्यम् ।
आरोग्यमायुर्विजयं जयं च दुःस्वप्ननाशं च तथा विदध्यात् ॥ २०० ॥

ततश्च—

प्रणम्य देवांश्च गुरूंश्च सर्वान्दत्त्वा च गां वत्सयुतां द्विजाय ।
दृष्ट्वा मुखं सर्पिषि दर्पणे च सर्पिश्च दद्यात्सहिरण्यमेव ॥ २०१ ॥

ततः प(पर)राष्ट्रभेदादिग्रहणार्थं चारान्प्रेषयेत् । तदाह कामन्दकः—

प्रेषयेच्च ततश्चारान् देशेष्वन्येषु सादरम् ॥ २०२ ॥

तेषां लक्षणमाह मात्स्यः (त्स्ये)—

अनाहार्यान्क्लेशसहान् नियुञ्जीत सदा नवान् ।
जनस्याविदितान्सौम्यांस्तथाज्ञातान्परस्परम् ॥ २०३ ॥

कथिताः सततं राजन् राजानश्चारचक्षुषः ।
स्वके देशे परे देशे ज्ञानशीलान्विचक्षणान् ॥ २०४ ॥

वणिजो मन्त्रकुशलान् सांवत्सराचिकित्सकान् ।
तथा प्रव्राजिताकारां(श्चारान्राजा नियोजयेत्) ॥ २०५ ॥

न च(चा)स्य रा(राजा)श्रद्दध्याच्चारस्य प्रियभाषितः(तम्) ।
द्वयोः संबन्धमाज्ञाय श्रद्दध्यान्नृपतिस्ततः ॥ २०६ ॥

परस्परस्याविदितौ यदि स्यातां चरावुभौ ।
तस्माद्राजा प्रयत्नेन गूढांश्चारान्नियोजयेत् ॥ २०७ ॥

तपस्विलिङ्गिनो धूर्ताः पण्याशिल्पोपजीविनः ।
चाराश्चरेयुः परितः पिबन्तो जगतो जनः (नान्) ॥ २०८ ॥

निर्गच्छेयुर्विशेयुश्च सर्ववार्ताविदो ह्यतः ।
चाराः सकाशं नृपतेश्चक्षुर्दूरचरं हि तत् ॥ २०९ ॥

सूक्ष्मसूत्रप्रचारेण पश्येद्विविधचेष्टितम् ।
स्वपन्नपि हि जागर्ति चारचक्षुर्महीपतिः ॥ २१० ॥

कामन्दकोऽपि--

अनेनासंपतोमूढा(तन्मार्गा)त्पतत्यन्ध(न्धः) समेपि हि ।
सर्वसंपत्समुदयं सर्वावस्थाविचेष्टितम् ।
चरेण विद्विषां विद्यादुद्देशप्रार्थनादि वा ॥ २११ ॥

इति । तन्नियोगे च तेषामपि स्वरूपज्ञानं भवति—
विश्रम्भेणापि च प्रेम्णा यदाज्ञापयति प्रभुः ।
तस्य कर्ता स एव स्याद्गुणीभूतस्तु शंकरः ॥ २१२ ॥

कर्तव्यं भृत्यवर्गाय स्वामी चेन्न समादिशेत् ।
अस्तिनास्तीति कस्तर्हि तस्य ज्ञास्यति पौरुषम् ॥ २१३ ॥

ततश्च—

ऋत्विक्पुरोहिताचार्यैराशीर्भिरभिनन्दितः ।
दृष्ट्वा ज्योतिर्विदो वैद्यान् दत्त्वा गां काञ्चनं महीम् ॥ २१४ ॥

सभां प्रविशेदिति । पुरोहितादीनां लक्षणान्याह—

वेदवेदाङ्गतत्त्वज्ञो जपहोमपरायणः ।
आशीर्वादपरो नित्यं एष राजपुरोहितः ॥ २१५ ॥

अ(थ) धर्माधिकारी—

समः शत्रौ च मित्रेच धर्मशास्त्रविशारदः ।
विप्रमुख्यः कुलीनश्च धर्माधिकरणि(णे) भवेत् ॥ २१६ ॥

अथ ज्योतिर्वित्—

यत्प्रोक्तं त्रिपुरान्तकेन बहुधा शास्त्रं स्वराणां द्विज-
स्तत्राभ्यासरतो जितेन्द्रियचयः शास्त्राभिभाषी च यः ।
स्पृष्टं कर्म दिवौकसां सुगु(ग?)णिनाज्जानाति निःसंशयम्
तस्यादेशविधायिनि क्षितिपतौ स्थैर्यं जयश्रीर्भवेत् ॥ २१७ ॥

व्यक्ताङ्कः फलकालवित् सुकृतवान्पूर्वापरस्माकरः(रकः)
पाटीकुट्टकबीजशास्त्रचतुरः सिद्धान्तवित्प्राञ्जलिः ।
वर्णावर्णसवर्णनैकगु(ग)णने भूयो महानुद्यमी
सम्यग्जातकसिद्ध एव गणकः श्लाघ्यो विदां नापरः ॥ २१८ ॥

भिषक्—

पारम्पर्यागतो यः स्यादष्टाङ्गेषु चिकित्सिते ।
अनाहार्यः स वैद्यः स्यात् धर्मात्मा च कुलोद्गतः ॥ २१९ ॥

प्राणाचार्यः स विज्ञेयो वच(स्तस्य च भू)भुजा ।
राजन्राज्ञा सदा कार्यं यथा कार्यं पृथग्जनैः ॥ २२० ॥

सभाप्रवेशः—

स्मितप्रसन्नः प्रथमाभिभाषितैः प्रसाददृष्ट्या(ष्ट्या) करसंग्रहैश्च ।
यथानुकूलं हृदयान्यपि द्विषां प्रसादयन्धर्मसभां प्रवेशयेत् ॥ २२१ ॥

तत्र स्थितः प्रजाः सर्वाः प्रतिनन्द्य विसर्जयेत् ।
विसृज्य च प्रजाः सर्वा मन्त्रयेत्सह मान्त्रिभिः ॥ २२२ ॥

खड्गधारिणो निकटवर्तित्वात्तल्लक्षणमाह—

सुरूपस्तरुणः प्रांशुर्दृढभक्तः कुलोद्भवः ।
शूरश्चैव सहश्चैव खड्गधारी प्रकीर्तितः ॥ २२३ ॥

अथ रक्षिणः—

प्रांशवो व्यायताः शूरा दृढभक्ता निराकुलाः ।
राज्ञा तु रक्षिणः कार्याः सदा क्लेशसहा हिताः ॥ २२४ ॥

ताम्बूलधारी—

अनाहार्योऽनृशंसस्य(श्च) दृढभक्तिश्च पार्थिवे ।
ताम्बूलधारी भवति नारी वाप्यथ तद्गुणा ॥ २२५ ॥

अत्रैव प्रसङ्गात्सकलसाधारणं सेवकलक्षणमुच्यते—

ताडितोपि दुरुक्तोपि दण्डितोपि महीभुजा ।
न चिन्तयति यः पापं स भृत्योर्हो महीभुजाम् ॥ २२६ ॥

भर्तुरर्धासनं रथैर्मुहुर्नान्यत्र तिष्ठति (निक्षिपेत्) ।
(ब्रूयान्न किंचिदन्योन्यं तिष्ठच्चास्यं विलोकयन्) ॥ २२७ ॥

कौन्तेत्यहमिति ब्रूयात्सम्यगाज्ञापयेति वा ।
आज्ञां चावितथां कुर्याद्यथाशक्त्यविलम्बितम् ॥ २२८ ॥

तेषा वृत्तमाह—

उच्चैः प्रहसनं कासं ष्ठीवनं कुत्सनं तथा ।
जृम्भणं गात्रभङ्गं च परी(र्व)स्फोटं च वर्जयेत् ॥ २२९ ॥

प्रविश्य सानुरागस्य चिरसङ्गः स्याच्च संमतः ।
समर्थयश्च सत्पक्षं साधु भाषेत भाषिते ॥ २३० ॥

नन्नियोगेन वा ब्रूयादर्थं सुपरिनिश्चितम् ।
सुखप्रबन्धगोष्टीषु विवादं वादिनां मतः ॥ २३१ ॥

विजानन्नपि न ब्रूयाद् भर्तुः क्षिप्तोत्तरं वचः ।
प्रवीणोपि च मेधावी वर्जयेदभिमानिताम् ॥ २३२ ॥

यदप्युच्चैर्विजानीयान्नीचैस्तदपि कीर्तयेत् ।
कर्मणां तस्य वैशिष्ट्यं कथयेद्विनयान्वितः ॥ २३३ ॥

आपद्युन्मार्गगमने कार्यकालात्ययेषु च ।
अपृष्टोपि हिना(ता)न्वेषी ब्रूयात्कल्याणभाषितम् ॥ २३४ ॥

ये शूरा ये च विद्वांसो ये च सेवाविपश्चितः ।
ये(ते)षामेव विकाशिन्यो भोग्या नृपतिसंपदः ॥ २३५ ॥

अनुकूलं प्रियं तस्य वक्तव्य जनसंसादि ।
रहोगतस्य वक्तव्यमप्रियं यद्धृतं भवेत् ॥ २३६ ॥

अन्तःपुरधनाध्यक्षैर्वैरिदूतैः पराकृतैः ।
संसर्ग न व्रजेत्प्राज्ञो विना पार्थिवशासनात् ॥ २३७ ॥

दुष्कृत्यं हि नरेन्द्रस्य न च संकीर्तयेत्क्वचित् ।
वस्त्रमस्त्रमलंकारं राज्ञा ध(द)त्तं च धारयेत् ॥ २३८ ॥

शाब्दलोल्यं च पैशून्यं नास्तिक्यं क्षुद्रता तथा ।
चापल्यं च परित्याज्यं नित्यं राज्ञोनुजीविभिः ॥ २३९ ॥

इति सर्वसाधारणसेवकवृत्तिः । अथ सभासदाः—

धर्मशास्त्रार्थकुशलाः कुलीनाः सत्यवादिनः ।
समाः शत्रौ च मित्रे च नृपतेः स्युः सभासदाः ॥ २४० ॥

तस्मात्सभ्यः सभां गत्वा रागद्वेषविवर्जितः ।
वचस्तथाविधं ब्रूयादन्यथा नरकं व्रजेत् ॥ २४१ ॥

नीतिशास्त्रस्य स्पष्टार्थत्वात्तत्कर्माभिनिवेशः कार्यः—

मेधावी वाक्पटुर्धीमाँल्लघुहस्तो जितेन्द्रियः ।
शस्त्रशास्त्रपरिज्ञाता एष लेखक उच्यते ॥ २४२ ॥

मन्त्रयेत्सहमन्त्रिभिरित्युक्तं तदेवाह—

गिरिपृष्ठं समारुह्य प्रासादं वा रहोगतः ।
अरण्ये नि(निः)शलाके वा मन्त्रयेन्नाभिभावितः ॥ २४३ ॥

मध्यंदिनेर्धरात्रे वा विश्रान्तो विगतक्लमः ।
चिन्तयेद्धर्मकामार्थान् साध्यं तैरेक एव वा ॥ २४४ ॥

कन्यानां संप्रदानं च कुमाराणां च रक्षणम् ।
दूतसंप्रेषणं चैव कार्यशेषं तथैव च ॥ २४५ ॥

अन्तःपुरप्रचारं च प्रणीधीनां च चेष्टितम् ।
कृत्स्नं चाष्टविधं कर्म पञ्चवर्गं च तत्त्वतः ॥ २४६ ॥

अनुरागापरागौ च प्रचारं मण्डलस्य च ।
उपेतारमुपेयं च सर्वोपायांश्च कृत्स्नशः ॥ २४७ ॥

एतत्त्रयं समाश्रित्य प्रयतेतात्मसिद्धये ।
एवं सर्वमिदं राजा सह संमन्त्र्य मन्त्रिभिः ॥ २४८ ॥

चत्वारि राज्ञा तु महाबलेन वर्ज्यान्याहुः पण्डितस्तानि(न्नि)बन्ध्यात् ।
अल्पप्रज्ञैः सह मन्त्रं न कुर्यान्न दीर्घसूत्रैरलसैश्चारणैश्च ॥ २४९ ॥

इति । भारतेपि—

धर्मः प्रागेव चिन्त्यः सचिवगतिमति(?) सर्वदा चिन्तनीयं
ज्ञेयं लोकानुवृत्तं वरवसूचने(?)र्मण्डलं वीक्षणीयम् ।
प्रच्छाद्यौ रागरोषौ मृदुकठिणरसौ योजनीयौ स्वकाले
आत्मा यत्नेन रक्ष्यो रणभुवि च परं सोपि नापेक्षणीयः ॥ २५० ॥

उक्तं च—

केन वृत्तेन वृत्तज्ञो वर्तमानो महीपतिः ।
सुखेनार्क्षा(?)न्सुखोदर्कानिह च प्रेत्य चाप्नुयात् ॥ २५१ ॥

चरेध(द्ध)र्मानकटुको युञ्जन्स्नेहं न नास्तिकः ।
आनृशंस्यश्चरेदर्थं चरेत्कालमनुद्धतः ॥ २५२ ॥

प्रियं ब्रूयादकृपणः शूरः स्यादविकत्थनः ।
दाता नापात्रवर्षी स्यात्प्रगल्भः स्यादनिष्ठुरः ॥ २५३ ॥

संदधीत न नाचार्यं विगृह्णीयान्न बन्धुभिः ।
नाभक्तं जनयेच्चारं कुर्यात्कार्यमपीडनम् ॥ २५४ ॥

अर्थं न वा सत्सु वदेद्गुणान्ब्रूयान्न चात्मनः ।
आदद्यान्न च साधुभ्यो नासत्पुरुषमाश्रयेत् ॥ २५५ ॥

नापरीक्ष्य नयेद्दण्डं न च मन्त्रं प्रकाशयेत् ।
विसृजेन्न स लुब्धेभ्यो विश्वसेन्नापकारिषु ॥ २५६ ॥

अनीर्षु गुप्तदारः स्याद्रौद्रः स्यादघृणी नृपः ।
स्त्रियः सेवेत नात्यर्थमिष्टं भुञ्जीत नाहितम् ॥ २५७ ॥

अस्तब्धः पूजयेदन्यान्गुरून्सेवेदमायया ।
अर्चेद्देवानदम्भेन श्रियमिच्छेदकुत्सिताम् ॥ २५८ ॥

सेवेदप्रणयं हित्वा दक्षः स्यात्तत्त्वकालवित् ।
सान्त्वयेन्न च मोघाय अनुगृह्णन्न च क्षपेत् ॥ २५९ ॥

प्रहरेन्नच विद्वत्सु न दहेन्न च शोषयेत् ॥ २६० ॥

तथा च कामन्दकः—

निस्तम्भे निर्गवाक्षेच निर्भेदान्तरसंश्रये ।
प्रासादोपर्यरण्ये च मन्त्रयेताविभावितः ॥ २६१ ॥

नावर्तयेन्नहु(प्रभु ?)र्मन्त्रं संरक्षेत्परितस्तु सन् ।
अरक्ष्यमाणं मन्त्रं हि भिनत्त्यात्मपरंपरा ॥ २६२ ॥

मदः प्रमादः कामस्तु सुप्तिः प्रलपितानि च ।
हन्ति मन्त्रं प्रविच्छि(च्छ)न्नाः कामिन्योवानिता(वमता)स्तथा ॥२६३॥

द्वादशेति मनुः प्राह षोडशेति बृहस्पतिः ।
उशना विंशतिरिति मान्त्रिणां मन्त्रमण्डलम् ॥ २६४ ॥

यथा समूह(संभव)मित्यन्ये तत्प्रविश्य यथाविधि ।
मन्त्रयेताहितमनाः कार्यसिद्धिवि(वृ)द्धये ॥ २६५ ॥

अकप्यनेन(?) कार्याणि संप्रधार्य पुनः पुनः ।
प्रावि(दि)शेत्स्वहितान्वेषी मतमेषां पृथक्पृथक् ॥ २६६ ॥

महापक्षो यथाशास्त्रं दृष्टकर्मा हितः सुधीः ।
यद्यथायान्नतारुढस्तत्तत्साधु समाचरेत् ॥ २६७ ॥

नातीयात् कार्य(कालं) हि कृत्वा मन्त्रविनिश्चयम् ।
अतिक्रान्तं तु तं भूयो यथायोगं प्रकल्पयेत् ॥ २६८ ॥

न कार्यकालं मतिमानतिक्रामेत कर्हिचित् ।
(कथं)चिदेव भवति कार्ये योगः सुदुर्लभः । २६९ ॥

सतां मार्गेण मतिमान् काले कर्म समाचरेत् ।
काले समाचरन् साधुरसव(कृ)त्फलमश्नुते ॥ २७० ॥

इति मन्त्रबलान्महीपतिर्महतो दुष्टभुजङ्गमानिव ।
विनयेन्नयमार्गमास्थितो वशमुद्योगसमान्वितो रिपून् ॥ २७१ ॥

ततश्च—

कृतमन्त्रस्तु मन्त्राज्ञो मन्त्रिणां मन्त्रसंमतम् ।
यातव्याय प्राहिणुयाद्दूतं दूत्याभिमानिनम् ॥ २७२ ॥

प्रगल्भः स्मृतिमान् वाग्मी शस्त्रे शास्त्रे च निष्ठितः ।
अभ्यस्तकर्मा नृपतेर्दूतो भवितुमर्हति ॥ २७३ ॥

स दूतः शासनाद्गच्छेद्गन्तव्यमुत्तरोत्तरम् ।
स्वराष्ट्रपरराष्ट्राणामिति चेति च चिन्तयन् ॥ २७४ ॥

नाविज्ञातः प(पु)रं शत्रोः प्रविशेच्च न संसदि ।
कालमीक्षेत कार्यार्थ अनुज्ञातस्य(श्च) निष्पतेत् ॥ २७५ ॥

सारवत्तां च राष्ट्रं यद्दुष्कृतिं गुप्तमेव च ।
छिद्रं शत्रोर्विजानीयात्कोशमित्रबलानि च ॥ २७६ ॥

दूतकारणमाह कामन्दकः—

पृच्छ्यमानोपि न ब्रूयात्स्वस्वामिप्रकृतिच्युतम् ।
ब्रूयात्प्रसृतया वाचा सर्वं वेद भवानिति ॥ २७७ ॥

कुलेन नाम्ना स्तोत्रेण कर्मणा च महीयसा ।
कुर्याच्चतुर्विधं स्तोत्रं पक्षयोरुभयोरपि ॥ २७८ ॥

तपस्वी व्यसनोपेतः स्वचरैः सह संवसेत् ॥ २७९ ॥

दूतकर्माह कामन्दकः—

तिष्ठन्वार्ताविशेषान्वै भर्तुः सर्वा निवेदयेत् ।
रिपोः शत्रुपरिच्छेदसुहृद्बन्धुविभेदनम् ॥ २८० ॥

दुर्गकोशबलज्ञानं ह्यपक्षोपसंग्रहः ।
राज्यान्तरगतानां च आत्मसंस्कारणं तथा ॥ २८१ ॥

युद्धाय सारभूज्ञानं दूतकर्मेति कथ्यते ।
दूतेनैव वरेक(नरेन्द्र)स्तु कुर्वीतारिविकर्षणम् ।
सपक्षे च विजानीयात्परदूतविचेष्टितम् ॥ २८२ ॥

इति दूतकर्म । दूतान्संप्रेष्य किं कुर्यादित्याह—

विश्रम्भी नित्ययुक्तोपि निगूढाकारचेष्टितः ।
प्रियाण्येवाभिभाषेत यत्कार्यं कार्यमेव तत् ॥ २८३ ॥

यदा मन्येत मतिमान् हृष्टं पुष्टं स्वकं बलम् ।
परस्य विपरीतं च तदा विग्रहमाचरेत् ॥ २८४ ॥

भूमिर्मित्रं हिरण्यं च विग्रहस्य फलत्रयम् ।
यदैतन्नियतं भावि तदा विग्रहमाचरेत् ॥ २८५ ॥

आगतं विग्रहं विद्वानुपायैः प्रशमं नयेत् ।
विजयस्य ह्यनित्यत्वाद्रभसेन न संपतेत् ॥ २८६ ॥

समाक्रान्तो बलवता काङ्क्षन्नभ्रंशिनीं श्रियम् ।
आश्रयेद्वैतसीं वृत्तिं न भौजङ्गीं कथंचन ॥ २८७ ॥

क्रमाद्वैतसवृत्तिश्च सा(प्रा)प्नोति विपुलां श्रियम् ।
भुजङ्गवृत्तिराप्नोति वधमेव तु केवलम् ॥ २८८ ॥

काले प्राप्ते तु मतिमानुत्तिष्ठेत्क्रूरसर्पवत् ॥ २८९ ॥

प्रसादवृत्त्या हितलोकवृत्तया प्रविश्य शत्रोर्हृदयं निरन्तरम् ।
नयाग्रहस्तेन हि कालछुच्छिते प्रसह्य कुर्वीत कचग्रहां श्रियम्॥२९०॥

कुलोद्गतं सत्यमुदारविक्रमं स्थिरं कृतज्ञं धृतिमन्तमूर्जितम् ।
अतीव दातारमुपेतवत्सलं सुदुःप्रसादं(धं) प्रवदन्ति विद्विषम्॥ २९१ ॥

असत्यता निष्ठुरताकृतज्ञता भयं प्रमादोलसता विषादिता ।
वृथाभिमानो ह्यतिदीर्घसूत्रता तथाङ्गनाक्षादि विनाशनं
स्त्रि(श्रि) यः ॥ २९२ ॥

इति स्म दोषान्वितमाशु विद्विषं त्रिशक्तियुक्तो विजिगीषया व्रजेत्
अतोन्यथा साधुजनस्य संमतः करोति विद्वानुपघातमात्मनः ॥२९३॥

समन्वितो राज्यपदोन्निनीषया चारेक्षणैर्वीक्षितमण्डलाक्ष(श)यः ।
इमं नृपो विग्रहमार्गमास्थितः स्थितोद्यमः संप्रयतेत सिद्धये ॥२९४॥

इति कामन्दकात् । विग्रहकाले विग्रहप्रसङ्गः (?) ।

धीमानुत्साहसंपन्नः प्रभुशक्त्या समन्वितः ।
श्रियः स्यात्परमं पात्रमपामिव महार्णवः ॥ २९५ ॥

नलिनीवाम्बुसंपत्त्या बुध्या श्रीः परिपाल्यते ।
उत्साहव्यवसायाभ्यां विस्तारमुपनीयते ॥ २९६ ॥

लक्ष्मीरुत्साहसंपन्नाद्बुद्धिशुद्धं प्रसर्पतः ।
नार्पेति कायाच्छायेव विस्तारं सोपगच्छति ॥ २९७ ॥

वीतव्यसनमग्रस्तं(श्रान्तं) महोत्साहं महामतिम् ।
प्रविशन्ति सदा लक्ष्म्यः सरित्पतिमिवापगाः ॥ २९८ ॥

सत्वबुध्युपपन्नोपि व्यसनग्रस्तमानसः ।
स्त्रीभिः षण्ढ इव श्रीभिरलसः परिभूयते ॥ २९९ ॥

उत्थानेनैधयेत्सत्वमिन्धनेनेव पावकम् ।
श्रेयो हि सततोत्थायी दुर्बलोऽपि समश्नुते ॥ ३०० ॥

व्यवसायं सदैवान्येर्न हि क्लीबवदाचरेत् ।
वसेच्छ्रियं सदोत्थायी सैंहीं वृत्तिं सदा प्रभुः ॥ ३०१ ॥

प्रयत्नप्रेर्यमाणेन महता चित्तहस्तिना ।
रूढवैरिद्रुमोत्खातमकृत्वेह कुतः सुखम् ॥ ३०२ ॥

हेलाकृष्ण(ष्ट)तडित्कान्तिखड्गांशुपरिपिञ्जरैः ।
श्रीमत्करिकराकारैराह्रियन्ते भुजैः श्रियः ॥ ३०३ ॥

उच्चैरुच्चैस्तरामिच्छन्पदान्यायच्छते महान् ।
नीचा नीचैस्तरां यान्ति निपातभयशङ्कया ॥ ३०४ ॥

प्रमाणाभ्यधिकस्यापि महः समधितिष्ठतः ।
पदं तु धत्ते शिरसि केसरी मत्तदन्तिनः ।
गतभीर्भीतिजननं वपुर्भोगीव दर्शयेत् ॥ ३०५ ॥

अथ स्वामिविषये पूर्वोक्तामात्यादिकर्माण्याह—

स्वाम्यादिमित्रपर्यन्तं प्राकृतं मण्डलं हि यत् ।
तत्र कर्म प्रवक्ष्यामि व्यसनं च यथाक्रमम् ॥ ३०६ ॥

तत्र अमात्यकर्माण्याह—

आयव्ययौ दण्डनीतिरमात्यप्रातिषेधनम् ।
व्यसनस्य प्रतीकारो राज्ञि राज्याभिषेचनम्(रक्षणम्) ॥ ३०७ ॥

इत्यमात्यस्य कर्मेदं हन्ति तद्व्यसनान्वितः ।
अमात्यैर्व्यसनोपेतैर्ह्रियमाणो महीपतिः ।
अशक्त एवोत्पतितुं छिन्नपक्ष इवाण्डजः ॥ ३०८ ॥

अमात्यकर्माण्याह—

हिरण्यं धान्यवस्त्राणि वाहनानि तथैव च ।
तथान्ये द्रव्यनिचयाः (प्रजातः संभवन्ति हि) ॥ ३०९ ॥

स्थैर्यं परोपजापश्च दुर्गसंस्कार एव च ।
सेतुबन्धो वणिक्कर्म प्रजामित्रपरिग्रहः ।
धर्मकामार्थसिद्धिश्च कोशादेतत्प्रवर्तते ॥ ३१० ॥

अन्वीक्षणं च विद्यानां स्ववर्णाश्रमरक्षणम् ।
ग्रहणं शास्त्रशस्त्राणां युद्धमार्गेऽपि शिक्षणम् ॥ ३११ ॥

व्यायामः शास्त्रविज्ञानं कर्मणां लक्षणानि च ।
गजाश्वरथपृष्ठेषु यथावत्संप्रवर्तनम् ॥ ३१२ ॥

नियुद्धकौशलं माया परचित्तप्रवेदनम् ।
धूर्ततासाधुयुक्तेषु सदसद्वृत्तदर्शनम् ॥ ३१३ ॥

मन्त्रोद्योगोऽनुमन्त्रित्वं तद्रक्षा स्वास्थ्यमेव च
उपेक्षा सामदानं च भेदो दण्डश्च साधनम् ॥ ३१४ ॥

प्रशस्ताध्यक्षसेनानीमन्त्र्यमात्यपुरोधसाम् ।
सम्यक्प्रचारविज्ञानं दुष्टानां चावरोधनम् ।
गतागतपरिज्ञानं दूतसंप्रेषणानि च ॥ ३१५ ॥

धर्मासने प्रतिष्ठानं राज्यकण्टकशोधनम् ।
अकार्यप्रतिषेधश्च कार्याणां च प्रवर्तनम् ॥ ३१६ ॥

अदण्ड्यतामदण्ड्यानां दण्ड्यानां चापि दण्डनम् ।
उपकार्योपकारित्वमिति वृत्तं महीपतेः ॥ ३१७ ॥

एतत्सर्वममात्यादि राजामात्यपुरःसरः ।
नयत्युन्नतिमुद्युक्तो व्यसनी क्षयमेव तु ॥ ३१८ ॥

तस्मिन्धर्मार्थयोर्व्यग्र(ग्रे) तथा चास्वस्थचेतसि ।
सर्वमेतद्दर्शनेन मन्त्री संधातुमर्हति ॥ ३१९ ॥

मन्त्रिव्यसनोपक्रमाद्राजादीनां व्यसनान्याह—

वाग्दण्डयोश्च पारुष्यमर्थदूषणमेव च ।
पानं स्त्री मृगया द्यूतं व्यसनानि महीपतेः ॥ ३२० ॥

मन्त्रिव्यसनम्—

आलस्यं स्तब्धता दर्पः प्रमादोनुपकारिता ।
इति पूर्वोक्तदिष्टं च सचिवव्यसनं स्मृतम् ॥ ३२१ ॥

राष्ट्रव्यसनम्—

अतिवृष्टिरनावृष्टिः शलभा मूषिकादयः ।
स्वचक्रकृतदण्डश्च परचक्राणि तस्कराः ॥ ३२२ ॥

राजानीकप्रियोत्सर्गो मरकव्याधिपीडनम् ।
पशूनां मर(णं) रोगो राष्ट्रव्यसनमुच्यते ॥ ३२३ ॥

अथ कोशव्यसनम्—

व्ययीकृतः परिक्षिप्तो भक्षितोऽसंचितस्तथा ।
मूषितो दूरसंस्थश्च कोशव्यसनमुच्यते ॥ ३२४ ॥

अथ दुर्गव्यसनम्—

विशीर्णपर्णप्राकारपरिखाम्बुविशुष्कता ।
क्षीणघासेन्धनानीह दुर्गव्यसनमुच्यते ॥ ३२५ ॥

अथ बलव्यसनम्—

उपरुद्धं परिक्षिप्तममानितविमानितम् ।
आहतं व्याधितं श्रान्तं दूरयातं नवागतम् ॥ ३२६ ॥

परिक्षीणं प्रतिहतं प्रहताग्रजवं तथा ।
आशानिर्वेदभूयिष्ठमहतप्राप्तमेव च ॥ ३२७ ॥

विच्छिन्नाविविधासारं शून्यमूलं तथैव च ।
दुःपार्ष्णिग्राहमन्धं च बलव्यसनमुच्यते ॥ ३२८ ॥

व्यसन्यधोऽधो व्रजति तस्मात्तत्परिवर्जयेत् ।
हुताशनो जलं व्याधिर्दुर्भिक्षं मरकास्तथा ।
इति पञ्चविधं दैवं व्यसनं मानुषं परम् ॥ ३२९ ॥

दैवं पुरुषकारेण शक्त्या च प्रशमं नयेत् ।
उत्थायित्वेन नीत्या च मानुषं कार्यतत्त्ववित् ॥ ३३० ॥

कोशव्यसनस्य पूर्वोपक्रमात् तद्व्यसने किं भवतीत्याह कामन्दकः—

कोशमूलो हि राजेति प्रवादः सार्वलौकिकः ।
एतत्सर्वं जहातीह कोशव्यसनवान्नृपः ॥ ३३१ ॥

क्षीणं बलं वर्धयति स्वतो गृह्णाति च प्रजाः ।
कोशवान्पृथिवीपालः परैरप्युपजीव्यते ॥ ३३२ ॥

मित्रामित्राहिरण्यानां भूमीनां (च) प्रसारणम् ।
दूरकार्याशुकारित्वं लब्धस्य परिपालनम् ॥ ३३३ ॥

कोशादेतत्प्रभवति याति तद्व्यसने क्षयम् ॥ ३३४ ॥

पूर्वोक्तव्यसनमध्ये अमात्यव्यसनं गुरुतरमित्याह—

अमात्याद्याः प्रकृतयो भिन्नं तद्राष्ट्रमुच्यते ।
अशेषराज्यव्यसनात्पार्थिवव्यसनं गुरु ।
तस्मादमात्यव्यसनोऽप्यते... (?) ॥ ३३५ ॥

चतुर्विधं व्यसनं परित्यज्य स्वयमेव राज्यं कुर्यात्—

राज्ञो व्यसनिराज्यस्य व्यवसायो हि न क्षमः ।
न राज्यव्यसनायेह समग्रं राज्यमूर्जितम् ॥ ३३६ ॥

अथामात्यव्यसनतः कोशानां दण्डामित्रयोः ।
व्यसनेभ्यः समुन्नेता राजा यः स त्रिवर्गभाक् ॥ ३३७ ॥

तान्येव व्यसनान्याह—

वाग्दण्डयोश्च पारुष्यमर्थदूषणमेव च ।
पानं व्यसनतत्त्वज्ञैश्चतुर्विधमुदाहृतम् ॥ ३३८ ॥

तत्र वाक्पारुष्यम्—

वाक्पारुष्यं परं लोके उद्वेजकमनर्थकम् ।
न कुर्यात्प्रियया वाचा प्रकुर्याज्जगदात्मसात् ॥ ३३९ ॥

अकस्मादेव यः कोपादक्षिणं बहु भाषते ।
तस्मादुद्विजते लोकः सस्फुलिङ्गादिवानलात् ॥ ३४० ॥

हृदये वागसिस्तीक्ष्णा मर्म च्छिन्दन्पतन्मुहुः ।
तेजस्विनो दीपयति स दीप्तो याति वैरिताम् ॥ ३४१ ॥

नोद्वेजयेज्जगद्वाचा रूक्षवाचाप्रियोभवेत् ।
प्रायेण प्रियकृत्कर्मा कृपणापि हि सेव्यते ॥ ३४२ ॥

अथ दण्डपारुष्यम्—

असिद्धसाधनं सद्भिः शासनं दण्डमुच्यते ।
तद्युक्त्यैव नयेद्दण्ड्यं युक्तदण्डः प्रशस्यते ॥ ३४३ ॥

उद्वेजयति भूतानि दण्डपारुष्यवान्नृपः ।
भूतान्युद्वेज्यमानानि द्विषतां यान्ति संश्रयम् ॥ ३४४ ॥

आश्रिताश्चैव लोकेन विवृद्धिं यान्ति विद्विषः ।
विवृद्धाश्च विनाशाय तस्मान्नोद्द्विजते प्रजाः ॥ ३४५ ॥

महत्स्वप्यपराधेषु दण्डं प्राणान्तिकं त्यजेत् ।
ऋते राज्यापहारात्तु युक्तदण्डः प्रशस्यते ॥ ३४६ ॥

अथार्थदूषणमाह—

दूष्यस्य दूषणार्थं च परित्यागो महीयसः ।
अर्थस्य नीतितत्त्वज्ञैरर्थदूषणमुच्यते ॥ ३४७ ॥

तदाकस्मात्समाविष्टः कोपेनातिबलीयसा ।
नित्यमात्महिताकाङ्क्षी न कुर्यादर्थदूषणम ॥ ३४८ ॥

अथ मृगयाव्यसनम्—

याने क्षोभो यानपातो यानाभिहरणं तथा ।
क्षुत्पिपासाश्रमायासः शीतवातोष्णपीडनम् ॥ ३४९ ॥

अभियानस्य संगत्या यानं व्यसनमुच्यते ।
दुःखं प्रतप्तासिकता कुशकण्टकभूमयः ॥ ३५० ॥

वृक्षसङ्कटतोद्देशाल्लताकण्टकपातनम् ।
वधबन्धपरिक्लेशः सामन्ताटविकादिभिः ॥ ३५१ ॥

स्वसैन्यैश्चास्वसैन्यैश्च परिभिन्नानिवारणम् ।
ऋक्षनागोथ(?)मातङ्गसिंहव्याघ्रभयानि च ॥ ३५२ ॥

वनाग्निधूमसंहारो दिङ्मोहभ्रमणानि च ।
इत्यादि पृथिवीन्द्राणां मृगयाव्यसनं स्मृतम् ॥ ३५३ ॥

मृगयायां गुणा अपि सन्ति कथं व्यसनमेवेत्युक्तम् । तदुक्तम्—

जितश्रमत्वमायाम आममेदकफक्षयः ।
चरस्थिरेषु लक्ष्येषु बाणसिद्धिरनुत्तमा ॥ ३५४ ॥

आमादयो हि जीर्यन्ते योगेनैव दिवानिशम् ।
चरेषु(ष्व)व(च)रलक्ष्ये(षु)बाणासिद्धिश्च जायते ॥ ३५५ ॥

तथाप्यन्ततो दुष्टत्वात्त्याज्येत्याह—

दोषाः प्राणहराः प्रायस्तस्मात्तद्व्यसनं महत् ।
अतः सा परिहर्तव्या राज्ञा भूतिं समीप्सता ॥ ३५६ ॥

अभ्यनुज्ञामप्याह —

अथ चेन्मृगयाक्रीडां वाञ्छेत नगरान्तिके ।
कारयेन्मृगयारण्यं क्रीडार्थ(हे)तोर्मनोरमम् ॥ ३५७ ॥

आयामपरिणाहाभ्यामर्धयोजनसंमितम् ।
गिरेरुपान्ते नद्या वा पर्याप्तजलशाद्वलम् ॥ ३५८ ॥

अकण्टकलतागुल्मविषयादपवर्जितम् ।
पादपैः पुष्पफलैर्दैर्विज्ञातैश्चित्तहारिभिः ॥ ३५९ ॥

स्निग्धशीतघनच्छायैर्विकोशैरुपशोभितम् ।
मृगसंघातनिपुणं हस्तिनीकलभान्वितम् ॥ ३६० ॥

अगम्यं रिपुसैन्यानां मानप्रीतिविवर्धनम् ।
तद्वनं चास्य चित्तज्ञैः क्लेशपाशसहैर्दृढैः ।
रक्षितं रक्षिभिः स्वामिर्भूभुजां भूरिभूतये ॥ ३६१ ॥

अन्यकार्याविरोधेन प्रातः संक्रमणक्षमः ।
क्रीडनाय विशेद्राजा तदाप्तैः सहजैर्मतः ॥ ३६२ ॥

यदा च प्रविशेद्राजा क्रीडनार्थं तदा बहिः ।
संनद्धं यत्नतास्तिष्ठेद्बलं वनवताश्चिरम् ॥ ३६३ ॥

विधिरेवं समुद्दिष्टो मृगयाक्रीडने परः ।
न गच्छेददन्यथा राजा मृगयायां कदाचन ॥ ३६४ ॥

अथ सर्वव्यसनै रहितो राजा पुरं प्रति यायात् । तदुक्तं कामन्दके—

नानाप्रकारैर्व्यसनैर्विमुक्तः शक्तित्रयेणाप्रतिमेन युक्तः ।
परं दुरन्तव्यसनेनपन्नं(नोपपन्नं) यायान्नरेन्द्रो विजयाभिकाङ्क्षी॥३६५

प्रायेण सन्तो व्यसने रिपूणां यातव्यमित्येव समादिशन्ति ।
य(दा) क्षमस्तु प्रसभं निहन्तुं पराक्रमादूर्जितमप्यमित्रम् ॥ ३६६ ॥

तदैव यायादहितान्हि कुर्वन्नप्यन्तराकर्षणपीडनानि ।
संपन्नसस्यं विषयं परस्य यायात्प्रमृद्नन्विजयाय राजा ॥ ३६७ ॥

सस्योपघातेन परस्य वृत्तिच्छेदः स्वसै(न्यो)पचयश्च साधु ।
सुवीवृधासारविशुद्धमार्गा विशेद्धरित्रीं द्विषतोप्रमत्तः ॥ ३६८ ॥

समे प्रदेशे विषमे च भूमेर्मिश्रे स्थले वा सुमुखेन यायात् ।
अनातुरः सन्नभयो हि विद्वान्संनद्धगल्फो(सैन्यो)
विहितान्नतोयः ॥ ३६९ ॥

ग्रीष्मे प्रभूतान्नबलेन यायान्निरासनार्थं करिणां यथाम्बु ।
ऋतेम्भसोद्ग्रीष्मकृतात्प्रतापाद्भवन्ति कुष्ठानि मतङ्गजानाम् ॥३७०॥

स्वस्थक्रियाणाममपि कुञ्जराणामुष्मा शरीरमभिजाज्वलीति ।
आयासयोगेन हि संप्रवृद्धः प्रसह्य हन्ति द्विरदान्प्रतापः ॥ ३७१ ॥

सर्वाणि सत्त्वानि खलूष्मकाले विनाम्भुना यान्ति परामवस्थाम् ।
सुगन्धिदानस्रुतिसीकरेषु दन्ताभिघातस्फुटितोपलेषु ॥ ३७२ ॥

गजेषु नीलाभ्रसमप्रभेषु राज्यं निरूद्धं पृथिवीपतीनाम् ।
संकल्पितः संयुगदृष्टमार्गो स्वधिष्ठितो धीरतरेण पुंसाम् ॥ ३७३ ॥

तुरंगमाणां प्र(ति)कल्पितानामेको गजः षट्शतानि हन्ति ।
तस्माद्यतो भूरिजलस्तु पन्था यतोन्नपानोपचितो विशङ्कः ॥ ३७४ ॥

तेनाभियायाज्जनयन्प्रतापं शनैः शनैरश्रमयन्बलानि ।
न ह्युन्नतानामणिनप्युदारं पश्चात्प्रकोपं जनयेदरीणाम् ॥ ३७५ ॥

तं चाप्रमत्तः प्रसमीक्ष्य यायान्न नाशयेद्दृष्टमदृष्टहेतोः ।
पश्चात्प्रकोपः पुरतः फलं हि पश्चात्प्रकोपश्च ततो गरीयान् ॥ ३७६ ॥

पुरश्च पश्चाच्च यदा समर्थस्तदाभियायान्महते फलाय ॥ ३७७ ॥

अवश्ययातव्ये रिपौ पश्चात्प्रकोपशङ्कायां किं कुर्यादित्याह—

अवश्ययातव्यतयोद्यतः सन्पश्चात्प्रकोपाहितयानशङ्कः ।
सेनापतिं वाप्यथवा कुमारं बलैकदेशेन पुरो निदध्यात् ॥ ३७८ ॥

अभ्यन्तराद्बाह्यकृताच्च दोषादभ्यन्तरस्त्वेव तयोर्गरीयान् ।
आदाय गच्छेत बहिःप्रचारांस्तान्मन्त्रिभिः सम्यगुपाददीत ॥ ३७९ ॥

सामादिभिः संशमयेत्प्रकोपं परस्परावग्रहभेदनैश्च ॥ ३८० ॥

एवं प्रस्थाय किं कुर्यादित्याह—

यायाद्वैरिपुराभ्याशे भूभागे साधुसंमते ।
स्कन्धावारनिवेशज्ञः स्कन्धावारं निवेशयेत् ॥ ३८१ ॥

चतुरस्रं चतुर्द्वारं नातिविस्तारसङ्कटम् ।
साट्टप्रतोलीप्राकारं महाखनिसमावृतम् ॥ ३८२ ॥

शृङ्गाटमर्धचन्द्रं च मण्डलं दीर्घमेव च ।
भूमिप्रदेशसामर्थ्यादाकारमुपकल्पयेत् ॥ ३८३ ॥

विभक्तैश्च विविक्तैश्च पार्श्वैरन्वितमायतैः ।
गुप्तं पक्षपुटाकारं महामात्रासमावृतम् ॥ ३८४ ॥

तस्य मध्ये मनोह्लादि महन्मेलवदाहृतः ।
अन्तःकोशबलोपेतं कारयेद्राजमन्दिरम् ॥ ३८५ ॥

मौलीभूतश्रेणिसुहृद्द्विषदाटविकं बलम् ।
राजहर्म्यं समावृत्य क्रमेण विनिवेशयेत् ॥ ३८६ ॥

अन्तश्चागणितक्रूरालुब्धकादुष्टकर्मणः ।
पर्याप्तवेतनानाप्तान्मण्डले विनिवेशयेत् ॥ ३८७ ॥

हस्तिनो बध्यमानास्तु तुरंगाश्च मनोजवाः ।
गृहोपकण्ठे नृपतेर्वसेयुः स्वामरक्षिताः ॥ ३८८ ॥

यामवृत्त्या सुसंनद्धं रात्रिंदिवमुदाहृतम् ।
अन्तर्वंशिकसैन्यं च तिष्ठेदारात्रिगुप्तये ॥ ३८९ ॥

युद्धयोग्यो महादन्ती संनद्धः साध्ववस्थितः ।
तिष्ठेन्नरपतेर्द्वारि वेगवांश्च तुरंगमः ॥ ३९० ॥

सैन्यैकदेशसंनद्धः सेनापतिपुरःसरः ।
प्रयत्नवान्परिपतेन्मण्डलेन बहिर्निशि ॥ ३९१ ॥

परसैन्यविनाशार्थं सर्वां भूमिं विनाशयेत् ॥ ३९२ ॥

क्वचित्कण्टकशाखाभिः क्वचित्कीलैरधोमुखैः ।
भू(दू)षयेत्परितो भूमिं प्रच्छन्नैः प्रदरैरपि ॥ ३९३ ॥

इति याननिरूपणं साङ्गतो निरूपितम् ।

अलब्धमीहेद्धर्मेण लब्धं यत्नेन पालयेत् ।
पालितं वर्धयेन्नीत्या वृद्धं पात्रेषु निक्षिपेत् ॥ ३९४ ॥

नातः परतरो धर्मो नृपाणां यद्रणार्जितम् ।
विप्रेभ्यो दीयते द्रव्यं प्रजाभ्यश्चाभयं सदा ॥ ३९५ ॥

तवाहं वादिनं क्लीबं निर्हेतिं परसङ्गतम् ।
न हन्याद्विनिवृत्तं च युद्धप्रेक्षणकं तथा ॥ ३९६ ॥

ब्राम्हणेषु क्षमी स्निग्धेष्वजिह्मः क्षोभनोरिषु ।
स्याद्राजा भृत्यवर्गेषु प्रजासु च यथा पिता ॥ ३९७ ॥

पुण्यात्षड्भागमादत्ते न्यायेन परिपालयेत् ।
सर्वदानाधिकं यस्मात्प्रजानां परिपालनम् ॥ ३९८ ॥

शत्रुतस्करदुर्वृत्तमहासाहसिकादिभिः ।
पीड्यमानाः प्रजा रक्षेत्कायस्थैश्च विशेषतः ॥ ३९९ ॥

अरक्ष्यमाणाः कुर्वन्ति यत्किंचित्किल्बिषं प्रजाः ।
तस्मात्तु नृपतेरर्धं यस्माद्गृह्णात्यसौ करान् ॥ ४०० ॥

ये राष्ट्रेधिकृतास्तेषां चारैर्ज्ञात्वा विचेष्टितम् ।
साधून्संमानयेद्राजा विपरीतांश्च घातयेत् ॥ ४०१ ॥

उत्कोचजीविनो द्रव्यहीनान्कृत्वा विवासयेत् ।
स दानमानसत्कारैः श्रोत्रियान्वासयेत्सदा ॥ ४०२ ॥

अन्यायेन नृपो राष्ट्रात् स्वकोशं योभिवर्धयेत् ।
सोचिराद्विगतश्रीको नाशमेति सबान्धवः ॥ ४०३ ॥

प्रजापीडनसंतापात्समुद्भूतो हुताशनः ।
राज्ञः श्रियं बलं प्राणानदग्ध्वा न निवर्तते ॥ ४०४ ॥

य एव नृपतेर्धर्मः स्वराष्ट्रपरिपालने ।
तमेव कृत्स्नमाप्नोति परराष्ट्रं वशं नयन् ॥ ४०५ ॥

किंतु यस्मिन्य आचारो व्यवहारः कुलस्थितिः ।
तथैव परिपाल्योसौ यथावंशमुपागतः ॥ ४०६ ॥

मन्त्रमूलं यतो राज्यमतो मन्त्रं सुरक्षितम् ।
कुर्याद्यथास्य न विदुः कर्मणामाफलोदयात् ॥ ४०७॥

दैवे पुरुषकारे च कर्मसिद्धिर्व्यवस्थिता ।
तत्र दैवमभिव्यक्तं पौरुषं पौर्वदेहिकम् ॥ ४०८ ॥

केचिद्दैवात्स्वभावाच्च कालात्पुरुषकारतः ।
संयोगे केचिदिच्छन्ति फलं कुशलबुद्धयः ॥ ४०९ ॥

यथा ह्येकेन चक्रेण न रथस्य गतिर्भवेत् ।
एवं पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति ॥ ४१० ॥

क्रोधं कुर्यान्न चाकस्मान्मृदुवागुपकारिषु ।
एवं च राजा राज्यस्थो यदि श्रेय इहेच्छति ॥ ४११ ॥

अतोन्यथा नरपतिर्भयमभ्येत्यनुत्तमम् ।
इति सर्वान्गुणानेतान्यथोक्तान्योनुवर्तते ।
अनुभूयेह भद्राणि प्रेत्य स्वर्गे महीयते ॥ ४१२ ॥

उक्तं च भारते—

न पुत्रायतमैश्वर्यं कुर्याद्राजा कथंचन ।
पुत्रार्पितप्रभुत्वो हि धृतराष्ट्रस्तृणोपमः ॥ ४१३ ॥

कामं क्रोधं मदं मानं लोभं हर्षं तथैव च ।
एते वर्ज्याः प्रयत्नेन सुतरां पृथिवीक्षिता ॥ ४१४ ॥

एतेषां विजयं कृत्वा कार्यो भृत्यजयस्ततः ।
कृत्वा भृत्यजयं राजा पौरजानपदान्व्रजेत् ॥ ४१५ ॥

तदुक्तम्—

आत्मानं प्रथमं राजा विनयेनोपपातयेत् ।
ततो भृत्यांस्ततोमात्यांस्ततः पुत्रांस्ततः प्रजाः ॥ ४१६ ॥

कृत्वा तु विजयं तेषां शत्रून्बाह्यांस्ततो जयेत् ।

तेषां क्रोधादीनाम् ।

बाह्यास्तु त्रिविधा ज्ञेयास्तुल्याभ्यन्तरकृत्रिमाः ॥ ४१७ ॥

षडङ्गरक्षा कर्तव्या तथानेन प्रयत्नतः ।

अङ्गान्युक्तानि ।

अङ्गेभ्यो यस्त्वथैकोपि द्रोहमाचरतेल्पधीः ।
वधस्तस्य तु कर्तव्यः शीघ्रमेव महीक्षिता ॥ ४१८ ॥

न राज्ञा मृदुना भाव्यं मृदुर्हि परिभूयते ।
न भाव्यं दारुणेनापि तीक्ष्णादुद्विजते जनः ॥ ४१९ ॥

काले मृदुर्यो भवति काले भवति दारुणः ।
राजा लोकद्वयापेक्षी तस्य लोकद्वयं भवेत् ॥ ४२० ॥

भृत्यैः सह महीपालः परिहासं च वर्जयेत् ।
भृत्याः परिभवन्तीह नृपं * * * संकथम् ॥ ४२१ ॥

व्यसनानि च सर्वाणि भूपतिः परिवर्जयेत् ।
सप्तदोषा सदा राज्ञा हातव्या व्यसनोदयाः ॥ ४२२ ॥

प्रायशोर्थे विनश्यन्ति धृतमूला अपीश्वराः ॥ ४२३ ॥

तानि च व्यसनानि—

स्त्रियोक्षा मृगया पानं वाक्पारुष्यं च पञ्चमम् ।
तथैव दण्डपारुष्यमर्थदूषणमेव च ॥ ४२४ ॥

कामं क्रोधं च वर्जयादुत्युक्त तत्र मूलमाह

मृगयाक्षा दिवास्वापः परिवादः स्त्रियो मदः ।
तौर्यत्रिकं वृथाट्याभः कामजो दशको गणः ॥ ४२५ ॥

पैशुन्यं साहसं द्रोह ईर्ष्यासूयार्थदूषणे ।
वाग्दण्डजं च पारुष्यं क्रोधजोपि गणोऽष्टकः ॥ ४२६ ।

दण्डस्य पातनं चैव वाक्पारुष्यार्थदूषणे ।
क्रोधजेऽपि गणे विद्यात्कष्टमेतत्त्रिकं सदा ॥ ४२७ ॥

पानमक्षाः स्त्रियश्चैव मृगया च यथाक्रमम् ।
एतत्कष्टतमं विद्याच्चतुष्कं कामजे गणे ॥ ४२८ ॥

व्यसनानि वर्जयेदस्यापवादमाह—

लोकसंग्रहणार्थाय कृतकव्यसनी भवेत्
शौण्डीरस्य नृपेन्द्रस्य नित्यमुत्सिक्तचेतसः ॥ ४२९ ॥

जनो विरागमायाति सदा दुःसेव्यभावतः ।
तस्मात्पूर्वाभिभाषी स्यात्सर्वस्यापि महीपतिः ॥ ४३० ॥

अदीर्घसूत्रश्च भवेत्सर्वकर्मसु पार्थिवः ।
दीर्घसूत्रस्य नृपतेः कर्महानिर्भवेद्ध्रुवा ॥ ४३१ ॥

अस्यापवादमाह—

रागे दर्पे च माने च द्रोहे पापे च कर्मणि ।
अप्रिये चैव कर्तव्ये दीर्घसूत्रः प्रशस्यते ॥ ४३२ ॥

पौरुषं दैवसंपत्त्या काले फलति पार्थिव ॥ ४३३ ॥

दैवं पुरुषकारश्च कालश्च मनुजोत्तम ।
त्रयमेतन्मनुष्यस्य पिण्डितं स्यात्फलप्रदम् ॥ ४३४ ॥

कृषिवृष्टिसमायोगाद् दृश्यन्ते फलसिद्धयः ।
ताश्च काले प्रदृश्यन्ते नैवाकाले कथंचन ।
तस्मात्सदैव कर्तव्यं सधर्मं पौरुषं नृभिः ॥ ४३५ ॥

साम भेदस्तथा दानं दण्डश्च मनुजोत्तम ।
उपेक्षा च तथा माया इन्द्रजालं च पार्थिव ॥ ४३६

द्विविधं कथितं साम तथ्यं चातथ्यमेव च ।
तत्राप्यतथ्यं साधूनामाक्रोशायैव जायते ।
तत्र साधुः प्रयत्नेन सामसाध्यो नरोत्तम ॥ ४३७ ॥

ये शुद्धवंशा ऋजवः प्रतीता धर्मे स्थिता धर्मरता विनीताः ।
ते सामसाध्याः पुरुषाः प्रदिष्टा अनुव्रता ये सततं च राजन् ॥४३८॥

अथ भेदः—

परस्परं ये (वि)द्विष्टाः क्रुद्धा भीता विमानिताः ।
तेषां भेदं प्रयुञ्जीत भेदसाध्या हि ते मताः ॥ ४३९ ॥

अन्तःकोपो बहिःकोपो यत्र स्यातां महीक्षिताम् ।
अन्तःकोपो महांस्तत्र नाशकः पृथिवीक्षिताम् ॥ ४४० ॥

सामन्तकोपो बाह्यस्थकोपः प्रोक्तो मनीषिभिः ।
महिषीयुवराजाभ्यां तथा सेनापतेर्द्विज ॥ ४४१ ॥

अमात्यमन्त्रिणां चैव राजपुत्रे तथैव च ।
अन्तःकोपो विनिर्दिष्टो दारुणः पृथिवीक्षिताम् ॥ ४४२ ॥

इति भेदः । अथ दानम्—

सर्वेषामप्युपायानां दानं श्रेष्ठतमं महत् ।
सुदत्तेन समायाति दानेनोभयलोकाजित् ॥ ४४३ ॥

न केवलं दानपरा जयन्ति भूर्लोकमेकं पुरुषप्रवीराः ।
जयन्ति ते राजसुरेन्द्रलोकं सुदुर्जनं(यं) यद्धनुषा तथैव ॥ ४४४ ॥

इति दानस्वरूपकथनम् । दण्डस्वरूपं निरूप्यते—

न शक्या ये वशीकर्तुमुपायत्रितयेन तु ।
दण्डेन तान्वशीकुर्याद्दण्डो हि वशकृन्नृणाम् ॥ ४४५ ॥

आश्रमी यदि वा वर्णी पूज्यो वाथ गुणि(रु)र्महान् ।
नादण्ड्यो नाम राज्ञोस्ति स्वधर्मे वाबातिष्ठति ॥ ४४६ ॥

एवं सांसिद्धिकं लोके सर्वं दण्डे प्रतिष्ठितम् ।
अन्धे तमसि मज्जेत यदि दण्डं न पातयेत् ॥ ४४७ ॥

यस्माद्दण्ड्यं दण्डयति दुर्मदान्दमयत्यपि ।
दमनाद्दण्डनाच्चैव तस्माद्दण्डं विदुर्बुधाः ॥ ४४८ ॥

तदवाप्य नृपो दण्डं दुर्वृत्तेषु निपातयेत् ।
धर्मो हि दण्डरूपेण ब्रह्मणा निर्मितः पुरा ॥ ४४९ ॥

स नेतुं न्यायतः शक्योऽलुब्धेन कृतबुद्धिना ।
सत्यसंधेन शुचिना ससहायेन धीमता ॥ ४५० ॥

यथाशास्त्रं प्रयुक्तः सन् सदेवासुरमानुषम् ।
जगदानन्दयेत्सर्वमन्यथा तत्प्रकोपयेत् ॥ ४५१ ॥

अधर्मदण्डनं स्वर्गकीर्तिलोकविनाशनम् ।
सम्यक्तु दण्डनं राज्ञः स्वर्गकीर्तिजयावहम् ॥ ४५२ ॥

साहसस्तेयपारुष्यगोभिशापात्ययं स्त्रियाम् ।
विवादयेत्सद्य एव कालोन्यत्रेच्छया स्मृतः ॥ ४५३ ॥

देशाद्देशान्तरं याति सृक्किणी परिलेढि च ।
ललाटं स्विद्यते चास्य मुखं वैवर्ण्यमेव(ति) च ॥ ४५४ ॥

परिशुष्यत्स्खलद्वाक्यो विरुद्धं बहु भाषते ।
वाक्चक्षुः पूजयति नो तथौष्ठौ निर्भुजत्यपि ॥ ४५५ ॥

स्वभावाद्विकृतिं गच्छेन्मनोवाक्कायकर्मभिः ॥
अभियोगे च साक्ष्ये वा दुष्टः स परिकीर्तितः ॥ ४५६ ॥

दण्डादेतत्प्रभवति याति तद्व्यसने क्षयम् ।
अरयोऽपि हि मित्रत्वं यान्ति दण्डवतो ध्रुवम् ॥ ४५७ ॥

दण्डप्रायो हि नृपतिर्भुक्त्वा चाक्रम्य मेदिनीम् ।
संस्तम्भयति मित्राणि अमित्रान्नाशयत्यपि ॥ ४५८ ॥

कामन्दकः—

अनुबन्धं परीक्ष्यादौ देशकालौ च तत्त्वतः ।
सारापराधावालोक्य दण्डं दण्ड्येषु पातयेत् ॥ ४५९ ॥

आगःस्वपि तथान्येषु ज्ञात्वा जातिं धनं वयः ।
दण्डं प्रकल्पयेद्राजा सामन्तब्राह्मणैः सह ॥ ४६० ॥

दण्डभेदानाह—

धिग्दण्डस्त्वथ वाग्दण्डो धनदण्डो वधस्तथा ।
योज्याः समस्ता व्यस्तास्तु ह्यपराधवशादिमे ॥ ४६१ ॥

वाग्धिग्वधः स्वकं चैव चतुर्धा वर्तितो दमः ।
पुरुषे दोषविभवं ज्ञात्वा संपरिकल्पयेत् ॥ ४६२ ॥

अपराधवशान्नियोजयेदित्युक्तं तत्र कस्मिन्कं नियोजयेदित्याह—

गुरून्पुरोहितान्विप्रान्वाग्दण्डेनैव दण्डयेत् ।
विवादिनो नरांश्चान्यान् दोषिणोऽर्थेन दण्डयेत् ।
महापराधयुक्तांश्च वधदण्डेन दण्डयेत् ॥ ४६३ ॥

किंच—

मित्रादिषु प्रयुञ्जीत वाग्दण्डं धिक् तपस्विषु ।
यथोक्तं तस्य तत्कुर्युरनुक्तं साधुकल्पितम् ॥ ४६४ ॥

अधार्मिकं त्रिभिर्न्यायैर्निगृह्णीयात्प्रयत्नतः ।
निरोधनेन बन्धेन विविधेन वधेन च ॥ ४६५ ॥

दण्डस्थानान्याह—

दशस्थानानि दण्डस्य मनुः स्वायंभुवोऽब्रवीत् ।
त्रिषु वर्णेषु तानि स्युरक्षतो ब्राह्मणो व्रजेत् ॥ ४६६ ॥

तानि दशस्थानान्याह—

उपस्थमुदरं जिव्हा हस्तौ पादौ च पञ्चमम् ।
चक्षुर्नासे च कर्णौ च धनं देहस्तथैव च ॥ ४६७ ॥

मौण्ड्य प्राणान्तिको दण्डो ब्राह्मणस्य विधीयते ।
पुरुषाणां कुलीनानां नारीणां च विशेषतः ॥ ४६८ ॥

अवध्यान्ब्राह्मणानाहुः सर्वपापष्ववस्थितान् ।
यदष्य(स्या)कुशलं यन्नान्न तद्राजा समाचरेत् ।
राष्ट्रादेनं बहिः कुर्यात्समग्रधनमक्षतम् ॥ ४६९ ॥

एवं धर्मप्रवृत्तस्य राज्ञो दण्डधरस्य च ।
यशोऽस्मिन्प्रथते लोके स्वर्गे वासस्तथाक्षयः ॥ ४७० ॥

ब्राह्मणप्रशंसामाह—

इयं वसुंधरा देवी धर्मेण खलु धार्यते ।
ध्रुवं स धार्यते वेदैस्ते धार्यन्ते द्विजातिभिः ॥ ४७१ ॥

अतः सर्वस्य लोकस्य मूलमेते द्विजातयः ।
पालनीयाः प्रयत्नेन पूजनीयाश्च सर्वदा ॥ ४७२ ॥

सुराणां भूसुराणां च सुरभीणां च पालनम् ।
युगे युगे च ये धर्मास्तेषु धर्मेषु ये द्विजाः ॥ ४७३ ॥

आक्रम्य ब्राह्मणैर्युक्तैः परिक्षीणैश्च बान्धवैः ।
गोभिश्च नृपशार्दूल राजसूयाद्विशिष्यते ॥ ४७४ ॥

अभिषिक्तस्य राज्ञः दण्डधारणप्रकारमाह—

अव्रता ह्यनधीयाना यत्र भैक्ष्यचरा द्विजाः ।
तं ग्रामं दण्डयेद्राजा चोरभक्तप्रियो हि सः ॥ ४७५ ॥

यो योनर्णो महीयेत यश्चैवेदेकमनुव्रजेत् ।
तं तं दृष्ट्वा स्वतो मार्गात्प्रच्युतं स्थापयेत्पथि ॥ ४७६ ॥

अशास्त्रोक्तेषु चान्येषु पापयुक्तेषु कर्मसु ।
प्रसमीक्ष्यात्मना राजा दण्डं दण्ड्येषु पातयेत् ॥ ४७७ ॥

कुलानि जातिश्रेणीश्च गणान्जानपदानपि ।
स्वधर्माच्चलितान्व्रात्यान्विनये स्थापयेत्पथि ॥ ४७८ ॥

पिताचार्यः सुहृन्माता भार्या पुत्रः पुरोहितः ।
नादण्ड्यो नाम राज्ञोस्ति धर्माद्विचलितः स्वकात् ॥ ४७९ ॥

दण्ड्यदण्डनप्रशंसामाह—

यो दण्ड्यान्दण्डयेद्राजा सम्यग्वध्यांश्च घातयेत् ।
इष्टं स्याद्यज्वभिस्तेन समाप्तवरदक्षिणैः ॥ ४८० ॥

अदण्ड्यान्दण्डयन्राजा दण्ड्यांश्चैवाप्यदण्डयन् ।
अयशो महदाप्नोति नरकं चैव गच्छति ॥ ४८१ ॥

प्रकारान्तरेण दण्डस्य द्वैविध्यमाह—

शारीरश्चार्थदण्डश्च दण्डः स्याद्द्विविधः स्मृतः ।
शारीरस्ताडनादिस्तु मरणान्तः प्रकीर्तितः ।
काकिण्यादिस्त्वर्थदण्डः सर्वस्वान्तस्तथैव च ॥ ४८२ ॥

अराजके हि लोकेस्मिन्सर्वतो विद्यते भयम् ।
रक्षार्थमस्य सिद्धस्य राजानमसृजत्प्रभुः ॥ ४८३ ॥

इन्द्रानिलयमार्काणामग्नेश्च वरुणस्य च ।
चन्द्रवित्तेशयोश्चैव मात्रा निर्हृत्य शाश्वतीः ॥ ४८४ ॥

यस्मादेषां सुरेन्द्राणां मात्राभिर्निर्मितो नृपः ।
तस्मादभिभवत्येष सर्वभूतानि तेजसा ॥ ४८५ ॥

दण्डप्रणयनार्थाय राजा सृष्टः स्वयंभुवा ।
देवभागानुपादाय सर्वभूतानुगुप्तये ॥ ४८६ ॥

तेजसा यदमुं कश्चिन्नैव शक्नोति वीक्षितुम् ।
तदा भवति लोकेस्मिन्राजा भास्करवत्प्रभुः ॥ ४८७ ॥

यदास्य दर्शनाल्लोकः प्रसादमुपगच्छति ।
नयनानन्दकारित्वात्तदा भवति चन्द्रमाः ॥ ४८८ ॥

यथा यमः प्रियद्वेष्यौ प्राप्ते काले नियच्छति ।
तथा राज्ञा विधातव्याः प्रजास्तद्धि यमव्रतम् ॥ ४८९ ।

वरुणेन यथा पाशैर्बद्ध एव प्रदृश्यते ।
तथा पापान्निगृह्णीयाद्व्रतमेतद्धि वारुणम् ॥ ४९० ॥

यथा सर्वाणि भूतानि धरा धारयते स्वयम् ।
तथा सर्वाणि भूतानि बिभ्रतः पार्थिवं व्रतम् ॥ ४९१ ॥

इन्द्रस्यार्कस्य वातस्य यमस्य वरुणस्य च ।
चन्द्रस्याग्नेः पृथिव्याश्च तेजोवृत्तं नृपश्चरेत् ॥ ४९२ ॥

वार्षिकांश्चतुरो मासान् यथेन्द्रोप्यभिवर्षति ।
तथाभिवर्षन्स्वं राज्यं काममिन्द्रव्रतं स्मृतम् ॥ ४९३ ॥

अष्टौ मासान्यथादित्यस्तोयं हरति रश्मिभिः ।
तथा हरेत्करं राष्ट्रान्नित्यमर्कव्रतं हि तत् ॥ ४९४ ॥

प्रविश्य सर्वभूतानि यथा चरति मारुतः ।
तथा चारैः प्रवेष्टव्यं व्रतमेतद्धि मारुतम् ॥ ४९५ ॥

ज्ञात्वापराधं पुरुषं च लोके विचार्य सभ्यैर्विबुधैः (?) समग्रम् ।
दण्ड्येषु दण्डं परिकल्पयेत पापस्य यद्यच्छमनं प्रकुर्यात् ॥ ४९६ ॥

दूषा(ष्या)नुपांशुदण्डेन हन्याद्राजाविलम्बितम् ।
अदृष्टघातं कुर्वीरन्ये पापा राजवल्लभाः ॥ ४९७ ॥

यः प्रमाणं न जानाति स्थाने वृद्धौ तथा क्षये ।
कोशे जनपदे दण्डे न स राज्येऽवतिष्ठते ॥ ४९८ ॥

यस्त्वेतानि प्रमाणानि यथोक्तान्यनुपश्यति ।
युक्तो धर्मार्थयोग्यानि स राज्यमधिगच्छति ॥ ४९९ ॥

न राज्यं प्राप्तमित्येव वर्तितव्यमसांप्रतम् ।
श्रियं ह्यविनयो हन्ति जरा रूपमिवोत्तमम् ॥ ५०० ॥

वनस्पतेरपक्वानि फलान्यवचिनोति यः ।
स नाप्नोति रसं तेभ्यो बीजं तस्य विनश्यति ॥ ५०१ ॥

यस्तु पक्वमुपादत्ते काले परिणतं फलम् ।
फलाद्रसं स लभते बीजाच्चैव फलं पुनः ॥ ५०२ ॥

यथा मधु समादत्ते रक्षन्पुष्पाणि षट्पदः ।
तद्वदर्थान्मनुष्येभ्य आदद्यादविहिंसया ॥ ५०३ ॥

पुष्पं पुष्पं विचिन्वन्ति मूलच्छेदं न कारयेत् ।
मालाकार इवारामे न यथाङ्गारकारकः ॥ ५०४ ॥

उत्खातान्प्रतिरोपयन्परिमितान्छिन्दन्लघून्वर्धयन्
प्रोत्तुङ्गान्नमयन्नतान्समुदयन्विश्लेषयन्संहतान् ।
क्षुद्रान्कण्टकिनो बहिर्विनिम * न्म्लानान्मुहुः सिञ्चयन्
मालाकार इव प्रयोगनिपुणो राजा चिरं नन्दतु ॥ ५०५ ॥

अपक्वः पक्वसंकाशो न च सीदेत कस्यचित् ।
सुपुष्पितः स्यादफलः फलितः स्याद्दुरारुहः ॥ ५०६ ॥

चक्षुषा मनसा वाचा कर्मणा च चतुर्विधम् ।
प्रसादयति यो लोकं तं लोकोऽनुप्रसीदति ॥ ५०७ ॥

यस्मादुद्भ्रश्यन्ति भूतानि मृगव्याधान्मृगा इव ।
सागरान्तामपि महीं लब्ध्वा स परिहीयते ॥ ५०८ ॥

पितृपैतामहं राज्यं प्राप्तं वा स्वेन तेजसा ।
वायुरभ्रमिवासाद्य भ्रंशयत्यनयास्थितः ॥ ५०९ ॥

धर्ममाचरतो राज्ञः षड्भिश्चरितमानसः ।
वसुधा वसुसंपूर्णा वर्तते भूतिवर्धिनी ॥ ५१० ॥

अथ संत्यजतो धर्ममधर्ममनुतिष्ठतः ।
प्रतिसंवेष्टते भूमिरग्नौ चर्ममिवाहितम् ॥ ५११ ॥

अकार्यकरणाद्भीतः कार्याणां च विवर्जनात् ।
अकाले मन्त्रभेदाच्च येन माद्येन्न तत्पिबेत् ॥ ५१२ ॥

धर्मार्थौ यः परित्यज्य स्यादिन्द्रियवशानुगः ।
श्रीप्राणधनदारेभ्यः क्षिप्रं स परिहीयते ॥ ५१३ ॥

वाक्सायका वदनान्निःपतन्ति यैराहतः शोचति रात्र्यहानि ।
परस्परो मर्मसु ते पतन्ति तान्पण्डितो नावसृजेषु * * * ॥ ५१४

यथा यथा हि पुरुषः कल्याणे कुरुते मतिः
तथा तथास्य सर्वार्थाः सिध्यन्ते नात्र संशयः ॥ ५१५ ॥

श्रीर्मङ्गलात्संभवति प्रागल्भ्यात्संप्रवर्धते ।
दाक्ष्यात्तु कुरुते मूलं संयमात्प्रतितिष्ठति ॥ ५१६ ॥

संभाव्यं गोषु संपन्नं संभाव्यं ब्राह्मणे तपः ।
संभाव्यं स्त्रीषु चापल्यं संभाव्यं ज्ञातितो भयम् ॥ ५१७ ॥

ब्राह्मणेषु च ये धीराः स्त्रीषु ज्ञातिषु गोषु च ।
वृक्षादिव फलं पक्वं धृतराष्ट्र पतन्ति ते ॥ ५१८ ॥

धूमायन्ते व्यपेतानि ज्वलन्ते संहतानि च ।
धृतराष्ट्रोल्मुकानीव ज्ञातयो भरतर्षभ ॥ ५१९ ॥

यस्मिन्यथा वर्तते यो मनुष्यस्तस्मिंस्तथा वर्तितव्यं स धर्मः ।
मायाचारो मायया बाधितव्यः साध्वाचारः साधुना प्रत्युपेयः॥५२०॥

द्यूतमेतत्पुराकल्पे दृष्टं वैरकरं नृणाम् ।
तस्माद्द्यूतं न सेवेत हास्यार्थमपि बुद्धिमान् ॥ ५२१ ॥

वाक्यं तु यो नाद्रियतेऽनुशिष्टः प्रत्याह यश्चापि नियुज्यमानः ।
प्रज्ञाभिमानी प्रतिकूलवादी त्याज्यः सदा दुर्धर एष भृत्यः ॥ ५२२ ॥

बलं पञ्चविधं लोके पुरुषाणां निबोध मे ।
यत्तु बाहुबलं नाम कनिष्ठं बलमुच्यते ॥ ५२३ ॥

अमात्यलाभो भद्रं ते द्वितीयं बलमुच्यते ।
तृतीयं धनलाभं तु बलमाहुर्मनीषिभिः(णः) ॥ ५२४ ॥

यत्त्वस्य सहजं राजन्पितृपैतामहं बलम् ।
अभिजातबलं नाम तच्चतुर्थं बलं स्मृतम् ॥ ५२५ ॥

येन श्वेतानि सर्वाणि संगृहीतानि भारत ।
यद्बलानां बलं श्रेष्ठं तत्प्रज्ञाबलमुच्यते ॥ ५२६ ॥

अमोघह ** षस्य स्वर्य(यं) कृत्यानुवेक्षिणः ।
आत्मप्रत्ययकोशस्य वसुदैव वसुंधरा ॥ ५२७ ॥

अतिसंक्षीणकोशोपि लभते परिवारणम् ।
धृतिः शमो दमः शौचं कारणं वारनिश्रुराः (?) ॥ ५२८ ॥

मित्राणां चानभिद्रोहः सप्तैताः समिधः श्रियः ।
असंविभागी दुष्टात्मा कृतघ्नो निरपत्रपः ॥ ५२९ ॥

तादृङ्नराधिपो लोके वर्जनीयो जनाधिप ।
न शत्रुरङ्कमा(साय) मोक्तव्यो वध्यतां गतः ॥ ५३० ॥

आहताद्धि भयं तस्मात्संभवत्यचिरादिह ।
यत्र स्त्री यत्र कितवो बालो यत्रानुशासिता ॥ ५३१ ॥

मज्जन्ति तेवशा राजन् नद्यामश्मप्लवा इव ।
न वृत्तिर्बहुमन्तव्या या वृत्तिः क्षयमावहेत् ॥ ५३२ ॥

क्षयोपि बहुमन्तव्यो यः क्षयो वृद्धिमावहेत् ।
न स क्षयो महाराज यः क्षयो वृद्धिमावहेत् ॥ ५३३ ॥

क्षयः स इह मन्तव्यो यं लब्ध्वा बुद्धिमावहेत् ।
समृद्धा गुणतः केचित् भवन्ति धनिनोपरे ॥ ५३४ ॥

धनवृद्धान्गुणैर्हीनान् धृतराष्ट्र विवर्जय ।
ज्ञायेत वर्धनीयास्तैर्य इच्छन्त्यात्मनः परम् ॥ ५३५ ॥

कुलवृद्धिं च राजेन्द्र तस्मात्साधु समाचर ।
सुखानि सह भोज्यानि ज्ञातिभिर्भरतर्षभ ॥ ५३६ ॥

संबोधनं संकथनं संप्रीतिश्च परस्परम् ।
ज्ञातयस्तारयन्तीह ज्ञातयो मज्जयन्ति च ॥ ५३७ ॥

मन्त्रभेदस्य षट् प्राज्ञो ज्ञाता(द्वारा)ण्येतानि रक्षयेत् ।
अर्थसंततिकामश्च रक्षेदेतानि नित्यशः ॥ ५३८ ॥

मदः स्वप्नमविज्ञानमाकारं चात्यसंशयम् ।
दुष्टामात्येषु विश्रम्भं दूताचाकुशलादपि ॥ ५३९ ॥

द्वाराण्येतानि यो ज्ञात्वा संवृणोति सदा नृपः ।
त्रिवर्गचरणे युक्तः स शत्रूनधितिष्ठति ॥ ५४० ॥

न वै श्रुतमविज्ञाय वृद्धाननुपसेव्य च ।
धर्मार्थौ वेदितुं शक्यौ बृहस्पतिसमैरपि ॥ ५४१ ॥

राजोपसेवितं वैद्यं धार्मिकं प्रियदर्शनम् ।
मित्रवन्तं स्ववाक्यं च सुहृदं परिपालयेत् ॥ ५४२ ॥

दुःकुलीनः कुलीनो वा मर्यादां यो न लङ्घयेत् ।
धर्मापेक्षी मृदुर्ह्रीमान् स कुलीनः शताध्वरः ॥ ५४३ ॥

आपदां प्रतिकारज्ञो तदात्वे दृढनिश्चयः ।
अतीते कार्यशेषज्ञो नरोऽर्थैर्न प्रहीयते ॥ ५४४ ॥

कामं तदुपसेवेत न मूढव्रतमाचरेत् ।
दुःखार्तेष्वप्रशान्तेषु नास्तिकेष्वलसेषु च ॥ ५४५ ॥

न श्रीर्वसत्यदान्तेषु ये चोत्साहविवर्जिताः ।
अत्यार्यमतिदातारमतिशूरमतिप्रियम् ॥ ५४६ ॥

प्रज्ञाभिमानिनं चैव श्रीर्भयान्नोपसर्पति ।
न चातिगुणवत्स्वेषा नात्यन्तं निर्गुणेषु च ॥ ५४७ ॥

उन्मत्ता गौरिवान्धा श्रीः क्वचिदेवावतिष्ठते ॥ ५४८ ॥

अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः ।
चत्वारि तस्य वर्धन्त आयुः प्रज्ञा यशो बलम् ॥ ५४९ ॥

अतिक्लेशेन येर्थाः स्युर्धर्मस्यातिक्रमेण च ।
अरेर्वा प्रणिपातेन मास्मातबु(स्म तेषु) मनः क(कृ)थाः ॥ ५५० ॥

अविद्यः पुरुषः शोच्यः शोच्यं मैथुनमप्रजम् ।
निराहाराः प्रजाः शोच्याः शोच्यं राज्यमराजकम् ॥ ५५१ ॥

यस्य दानजितं मित्रं शत्रवो बुद्धिनिर्जिताः ।
अन्नपानजिता दाराः सफलं तस्य जीवितम् ॥ ५५२ ॥

आशा धृतिं हन्ति समृद्धिमन्तः क्रोधः श्रियं हन्ति कदर्यताम् * ।
अपालनं हन्ति * * * भूपे एकः क्रुद्धो ब्राम्हणो हन्ति राष्ट्रम् ॥५५३॥

अधीत्य वेदान्परिसंस्तर्यि चाग्नीनिष्ट्वा यज्ञैः पालयित्वा प्रजाश्च ।
गोब्राम्हणार्थे शस्त्रपूतान्तरात्मा हतः संग्रामे क्षत्रियः स्वर्गमेति॥५५४॥

प्रभावः शुचिता मैत्री त्यागः सत्यं कृतज्ञता ।
कुलं शीलं दमश्चेति गुणाः संपत्तिहेतवः ॥ ५५५ ॥

कामन्दकः—

सकामासक्तमनसां कान्तामुखविलोकने ।
गलन्ति गलिताश्रूणां यौवनेन सह श्रियः ॥ ५५६ ॥

ग्रीष्मसूर्यांशुसंतप्तं उद्वेजनमनाश्रयम् ।
मरुस्थलमिवोदग्रं त्यजेद्दुर्जनसंगमम् ॥ ५५७ ॥

ये प्रियाणि प्रभाषन्ते प्रियमिच्छन्ति तत्कृतम् ।
श्रीमन्तोवद्यचरिता देवास्ते नरविग्रहाः ॥ ५५८ ॥

याने शय्यासने भोज्ये पाने शस्त्रे विभूषणे ।
सर्वत्रैवाप्रमत्तः स्याद्बुद्धे न विपदूषणम् ॥ ५५९ ॥

संधिं च विग्रहं चैव यानमासनमेव च ।
द्वैधीभावं संश्रयं च षाड्गुण्यं चिन्तयेत्सदा ॥ ५६० ॥

पौरा जानपदाः सर्वाः शत्रुग्रहणसमयः ।
दीर्घाध्वानि परिश्रान्तं क्षुत्पिपासाहितश्रमम् ॥ ५६१ ॥

व्याधिदुर्भिक्षमरकपीडितं तद्वदेव हि ।
घोराग्निभयवित्रस्तं वृष्टिवातसमाहतम् ॥ ५६२ ॥

पङ्कपांसुजलस्कन्नव्यस्तं श्वासाकुलाकुलम् ।
प्रसुप्तं भोजने व्यग्रमभूमिष्ठमसनं स्थितम् ॥ ५६३ ॥

एवमादिषु जातेषु व्यसनेषु समाकुलम् ।
स्वसैन्यं साधु रक्षेत परसैन्यं च घातयेत् ।
विशिष्टो देशकालाभ्यां युक्तः प्रकृतिभिर्बलैः ॥ ५६४ ॥

निशि विश्रम्भसंयुक्तं तत [illegible]
इत्येवं कूटयुद्धेन हन्याच्छत्रून्लघुत्थितः ॥ ५६५ ॥

उपरुन्धन्ति राजानो भूतानि विविधानि च ।
त एव विनयं प्राप्य वर्धयन्ति पुनः प्रजाः ॥ ५६६ ॥

ता लुण्ठेत्पीडयेच्च शत्रोः प्रकृतयः स्वयम् ।
वशे जाते पुनस्तासु पितृवद्वृत्तिमाचरेत् ॥ ५६७ ॥

द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमण्डलभेदिनौ ।
परिव्राड्योगयुक्तश्च युद्धे चाभिमुखो गतः ॥ ५६८ ॥

आहवेषु मिथोऽन्योन्यं जिघांसन्तो महीक्षितः ।
युध्यमानाः परं शक्त्या स्वर्गं यान्त्यपराङ्मुखाः ॥ ५६९ ॥

द्वैपायनेन मुनिना मनुना च धर्मा
युद्धेषु ये निगदितास्तु तेग: (?) ।
स्वभर्य(र्भर्त्र)र्थगोद्विजहिते त्यजतां शरीरं
लोका भवन्तु विपुला: सुलभं यशश्च ॥ ५७० ॥

स्वर्गस्य मार्गा बहव: प्रदिष्टास्ते कृच्छ्रसाध्या: कुटिला: सविघ्ना: ।
निमेषमात्रेण महाफलोयमृजुश्च पन्था: समरे व्यसुत्वम् ॥ ५७१ ॥

द्विजा अपि न गच्छन्ति यां गतिं नैव योगिन: ।
स्वाम्यर्थे संत्यजन्प्राणांस्तां गतिं याति सेवक: ॥ ५७२ ॥

एतत्तपश्च पुण्यं च धर्मश्चैव सनातन: ।
चत्वारश्चाश्रमास्तस्य यो युद्धे न पलायते ॥ ५७३ ॥

यदि समरमपास्य नास्ति जन्तो-
र्भयमिति युक्तमतोन्यत: प्रयातुम् ।
अथ मरणमवश्यमेव जन्तो:
किमिति मुधा मलिनं यश: कुरुध्वम् ॥ ५७४ ॥

वृद्धो बालो न हन्तव्यो नैव स्त्री नैव वा द्विज: ।
तृणपूर्णमुखश्चैव तवास्मीति च यो वदेत् ॥ ५७५ ॥

ब्राह्मणार्थे समुत्पन्ने * भिनिसृज्य युध्यति ।
आत्मानं यूपमुत्सृज्य स यज्ञोनन्तदक्षिण: ॥ ५७६ ॥

यस्य पार्वति शस्त्राणि तनुं भिन्दन्ति संयुगे ।
तावत: सोश्नुते लोकान् सर्वान्कामदुघोक्षयान् ॥ ५७७ ॥

यदस्य रुधिरं गात्रादाहवेषु प्रवर्तते ।
सह तेनैव रक्तेन सर्वपापै: प्रमुच्यते ॥ ५७८ ॥

त्यागेन य: सहायानां स्वप्राणांस्त्रातुमिच्छति ।
संहन्यु: काष्ठलोष्ठैर्वा दहेयुर्वा कटाग्निना ॥ ५७९ ॥

अजामिव प्रजां हन्याद्यो मोहात्पृथिवीपतिः ।
तस्यैव जायते तृप्तिर्द्वितीयस्य कथंचन ॥ ५८० ॥

प्रजापीडनसंतापात्समुद्भूतो हुताशनः ।
राज्ञः श्रियं कुलं प्राणान्नादग्ध्वा विनिवर्तते ॥ ५८१ ॥

भूमिर्मित्रं हिरण्यं वा विग्रहस्य फलत्रयम् ।
नास्त्येकमपि यद्येषां तन्न कुर्यात्कथंचन ॥ ५८२ ॥

शपथैः संधितस्यापि न विश्वासं व्रजेद्रिपोः ।
राज्यलोको(भो)द्धतो वृत्रः शक्रेण शपथैर्हतः ॥ ५८३ ॥

कौर्मं संस्थानमास्थाय प्रहारानपि मर्षयेत् ।
काले काले च मतिमान् उत्तिष्ठेत्कृष्णसर्पवत् ॥ ५८४ ॥

तावद्भयाद्धि भेतव्यं यावद्भयमनागतम् ।
आगतं तु भयं दृष्ट्वा प्रहर्तव्यमभीतवत् ॥ ५८५ ॥

स्वगात्राण्यपि भाराय भवन्ति हि विपर्यये ।
मा त्वं तात बले स्थित्वा बाधेथा दुर्जनं जनम् ॥ ५८६ ॥

न हि दुर्बलदग्धानां बाल किंचित्प्ररोहति ॥ ५८७ ॥

यानि मिथ्याभिभूतानां पतन्त्यश्रूणि रोदताम् ।
तानि संतापकान्घ्नन्ति सपुत्रपशुबान्धवान् ॥ ५८८ ॥

बुद्धौ कलुषभूतायां विकारे प्रत्युपस्थिते ।
अनयो नयसंकाशो हृदयान्नोपसर्पति ॥ ५८९ ॥

न कालः खड्गमादाय शिरः कस्यापि कृन्तति ।
कालस्य बलमेतावद्विपरीतार्थदर्शनम् ॥ ५९० ॥

न तु हन्यान्महीपालो दूतं कस्यांचिदापदि ।
दूतं हत्वा तु नरकं प्राविशेन्मन्त्रिभिः सह ॥ ५९१ ॥

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन्द्रैः ।
इति महति विरोधे वर्तमाने समाने
तदुभयहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन्द्रैः ॥ ५९२ ॥

न कश्चिच्चण्डकोकानामात्मीयो नाम भूभुजाम् ।
होतारमभिजित्स्वन्ते दहत्येव हि पावकः ॥ ५९३ ॥

गृध्राकारोप(पि)सेव्यः स्याद्धंसाकारैः सभासदैः ।
हंसाकारोपि संत्याज्यो गृध्राकारैः सभासदैः ५९४ ॥

आसन्नमेव भजते नृपतिर्मनुष्यं विद्याविहीनमकुलीनमपण्डितं च ।
प्रायेण भूमिपतयो - - - - पार्श्वयोर्भवति तं परिवेष्टयन्ति ॥५९५॥

यस्मिन्सुधाधिकं चक्षुरारोपयति पार्थिवः ।
कुलीनो वाकुलीनो वा स श्रियो भाजनं भवेत् ॥ ५९६ ॥

धवलान्यातपत्राणि वाजिनश्च मनोरमाः ।
सदामत्ताश्च मातङ्गाः प्रसन्ने सति भूपतौ ॥ ५९७ ॥

आयाच्चतुर्थभागेन व्ययकर्म प्रवर्तयेत् ।
प्रभूततैलदीपोपि चिरं भद्राणि पश्यति ॥ ५९८ ॥

अबुद्धिमाश्रितानां च क्षन्तव्यमपराधिनाम् ।
न हि सर्वत्र पाण्डित्यं सुलभं पुरुषे क्वचित् ॥ ५९९ ॥

हन्तुमेवो(षो)पसर्पन्ति मृगेन्द्रः संकुचत्यपि ।
बुद्धिमन्तः सहन्त्येवं निधाय हृदि किंचन ॥ ६०० ॥

क्रतौ निवाहे व्यसने रिपुक्षये यशस्करे कर्मणि मित्रसंग्रहे ।
प्रियासु नारीष्वधनेषु बन्धुषु धनव्ययस्तेषु न गण्यते बुधैः ॥६०१॥

कोहं कौ देशकालौ समविषमगुणाः (केरयः के सहायाः
का शक्तिः कोभ्युपायः फलमिह च कियत् कीदृशी) दैवसंपत् ।

संपत्तौ को निबन्धः प्रविदितवचनस्योत्तरं किं नु मे स्या-
दित्येवं कार्यसिद्धावव्याहितमनसः संपदो हस्तसंस्थाः ॥६०२॥

परान्नं परवस्त्रं च परशय्यासनं स्त्रियम् ।
परवेश्मनिवासं च दूरतः परिवर्जयेत् ॥ ६०३ ॥

धनधान्यप्रयोगेषु विद्यासंग्रहणेषु च ।
आहारे व्यवहारे च त्यक्तलज्जः सुखी भवेत् ॥ ६०४ ॥

मूर्खस्तु परिहर्तव्यः प्रत्यक्षो द्विपदः पशुः ।
विध्यते वाक्यशल्येन अदृष्टः कण्टको यथा ॥ ६०५ ॥

कणशेषं शत्रुशेषमग्निशेषं तथैव च ।
पुनः पुनः प्रवर्धन्ते तस्माच्छेषं न धारयेत् ॥ ६०६ ॥

अशक्यं नारभेद्विद्वान्नैवाकार्यं च कारयेत् ।
अफलं नैव सेवेत तथासत्यं च(न) जल्पयेत् ॥ ६०७ ॥

भजन्त भजते प्राज्ञो नाभजन्तं कथंचन ।
प्रत्यक्षं दृश्यते लोके हस्तं हस्तेन क्षालयेत् ॥ ६०८ ॥

रिपुराजाग्निसर्पेषु विषे चाग्निषु शृङ्गिषु ।
शस्त्रपाणिषु मूर्खेषु विश्वासो न कदाचन ॥ ६०९ ॥

न क्लेशविरहे द्रव्यं द्रव्यहीने कुतः क्रिया ।
क्रियाहीने कुतो धर्मो धर्महीने कुतः सुखम् ॥ ६१० ॥

जीवितं मृतकं मन्ये देहिनां धर्मवर्जितम् ।
मृतो धर्मेण संयुक्तो दीर्घजीवी भविष्यति ॥ ६११ ॥

स धर्मो यत्र नाधर्मस्तत्सुखं यत्र नासुखम् ।
तज्ज्ञानं यत्र नाज्ञानं सा गतिर्यत्र नागतिः ॥ ६१२ ॥

सत्यं शौचं दया दानं परद्रव्यं न गृह्यते ।
ब्रह्मचर्यं तपोमूलमेतद्धर्मस्य लक्षणम् ॥ ६१३ ॥

क्षीयन्ते सर्वदानानि राज्ञां होमे बलिक्रिया ।
न क्षीयते महादानमभयं सर्वदेहिनाम् ॥ ६१४ ॥

राज्यं च संपदो भोगाः कुले जन्म सुहृष्टता ।
पाण्डित्यमायुरारोग्यं धर्मस्यैतत्फलं विदुः ॥ ६१५ ॥

आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ।
नास्त्युद्यमसमो बन्धुः कृत्वा य नावसीदति ॥ ६१६ ॥

उत्तमैः सह संयोगं पण्डितैः सह संकथाः ।
अलुब्धैः सह मित्रत्वं कुर्वाणो नावसीदति ॥ ६१७ ॥

अर्थनाशं मनस्तापं गृहे दुश्चरितानि च ।
नीचवाक्यं चापमानं मतिमान्न प्रकाशयेत् ॥ ६१८ ॥

पण्डिताश्च विनीताश्च धर्मज्ञाः सत्यवादिनः ।
बन्धनस्थापि तिष्ठेयुर्न तु राज्यं खलैः सह ॥ ६१९ ॥

अर्थेनापि हि किं तेन अन्यायोपार्जितेन च ।
न तेन गम्यते स्वर्गं दत्तेन बहुनापि वा ॥ ६२० ॥

अतिलौल्यप्रसक्तानां विपत्तिर्नैव दूरतः ।
गलिका इव लुब्धानां मीनानां तु यथाम्भसि ॥ ६२१ ॥

स्त्रीषु राजसु सर्पेषु स्वाध्याये शत्रुविग्रहे ।
भार्यादिष्वपि विश्वासो न कर्तव्यः कथंचन ॥ ६२२ ॥

न जातु गच्छेद्विश्वासं संधितोपि हि बुद्धिमान् ।
अद्रोहसमयं कृत्वा वृत्रमिन्द्रः पराबधीत् ॥ ६२३ ॥

बलीयसापि संधाय तं प्रविश्य प्रतापवान् ।
तथा साध्वनुगन्तव्यो यथा विश्रम्भमाप्नुयात् ॥ ६२४ ॥

नैकस्तु मन्त्रयेन्मन्त्रं न राजाबुद्धिभिः सह ।
नारोहेद्विषमां नावमपरीक्षितनाविकाम् ॥ ६२५ ॥

ये चास्य भूमिं जयिनो भवेयुः परिपन्थिनः ।
तानानयेद्वशं सर्वान्सामादिभिरुपक्रमैः ॥ ६२६ ॥

यथा न स्यात्कृशीभावः प्रजानामनवेक्षया ।
तथा राज्ञा वर्तितव्यं स्वराज्यं परिरक्षति(ता) ॥ ६२७ ॥

मोहाद्राजा स्वराष्ट्रं यः कर्षयत्यनवेक्षया ।
सोऽचिराद्भ्रश्यते राज्याज्जीविताच्च सबान्धवः ॥ ६२८ ॥

यो राष्ट्रमनुगृह्णाति स राज्य परिरक्षति ॥ ६२९ ॥

ग्रामस्याधिपतिं कुर्याद्दशग्रामाधिपं तथा ।
विंशतीशं शतेशं च सहस्रपतिमेव च ॥ ६३० ॥

इति श्रीमद्भूभृन्मण्डलान्वयमुकुटालंकारश्रीमच्छाहराजसुतश्रीमच्छिवच्छत्र-
पतिसुतश्रीमच्छम्भुराजविरचिते बुधभूषणे राजनीतिः ॥

तृतीयोऽध्यायः

प्रकीर्णनीतिः

उक्त्वा भूरिविभेदां बुधसंतुष्ट्यै राजनीतिमनवद्याम् ।
संप्रति मिश्रकनीतिर्विबुधविनोदाय तन्यते शिरसा ॥ १ ॥

क्षिप्रं विजानाति चिरं शृणोति विज्ञाय चार्थं भजते च कामात् ।
नासंस्पृष्टो ह्युपयुङ्क्ते परेषां तत्प्रज्ञानं प्रथमं पण्डितस्य ॥ २ ॥

नाप्राप्यमभिवाञ्छन्ति नष्टं नेच्छन्ति याचितुम् ।
आपत्सु न विमुह्यन्ति नराः पण्डितबुद्धयः ॥ ३ ॥

प्रवृत्तवाक्चित्रकथा ऊहवान्प्रतिभानवान् ।
आशुग्रन्थार्थवक्ता च यः स पण्डित उच्यते ॥ ४ ॥

स्वमर्थं यः परित्यज्य परार्थमनुतिष्ठति ।
मिथ्याचरति मित्रार्थे यश्च मूढः स उच्यते ॥ ५ ॥

अमित्रं कुरुते मित्रं (मित्रं) द्वेष्टि हिनस्ति च ।
कर्म चारभते दुष्टं तमाहुर्मूढचेतसम् ॥ ६ ॥

अनाहूतः समभ्येति अपृष्टो बहु भाषते ।
अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता नराधमः ॥ ७ ॥

एकः क्षमावतां दोषो द्वितीयो नोपलभ्यते ।
यदेनं क्षमया युक्तमशक्तं मन्यते जनः ॥ ८ ॥

सोऽस्य दोषो न मन्तव्यः क्षमा हि परमं बलम् ।
अक्षमावान्परं दोषैरात्मानं वापि योजयेत् ॥ ९ ॥

द्वे कर्मणी नरः कुर्वन्नस्मिँल्लोके महीयते ।
अब्रुवन्परुषं किंचिदसतो वर्जयंस्तथा ॥ १० ॥

षड्‌ दो.ाः पुरुषेणैव हातव्या भूतिमिच्छता ।
निद्रा तन्द्रा भयं क्रोध आलस्यं दीर्घसूत्रता ॥ ११ ॥

अष्टौ पूर्वाणि चिह्नानि नरस्य विनशिष्यतः ।
ब्राह्मणान्प्रथमं द्वेष्टि ब्राह्मणैश्च विरुध्यते ॥ १२ ॥

ब्राह्मणस्वानि चादत्ते ब्राह्मणांश्च जिघांसति ।
रमते निन्दया चैषां प्रशंसां नाभिनन्दति ॥ १३ ॥

नैतान्स्मरति कृत्येषु याचितश्चाभ्यसूयति ।
एतान्दोषान्नरः प्राज्ञो बध्ये बुद्ध्वा विवर्जयेत् ॥ १४ ॥

नाक्रोशी स्यान्नावमानी परस्य मित्रद्रोही नोत नीचोपसेवी ।
न चाभिमानी न च हीनवृत्तो रुक्षां न रमंति वर्जयन्तीम् (?)॥१५॥

अप्रशस्तानि कार्याणि यो मोहादनुतिष्ठति ।
स तेषां विपरिभ्रंशाद्भ्रश्यते जीवितादपि ॥ १६ ॥

दैवतेषु च यत्नेन राजसु ब्राह्मणेषु च ।
नियन्तव्यः सदा क्रोधी वृद्धबालातुरेषु च ॥ १७ ॥

निरर्थं कलहं प्राज्ञो वर्जयेन्मूढचेतसम् ।
कीर्तिं च लभते लोके न चार्थेन योजयेत् ॥ १८ ॥

विनयेन विना का श्रीः का निशा शशिना विना ॥
रहिता सत्कवित्वेन कीदृशी सा विदग्धता ॥ १९ ॥

आकारैरिङ्गितैर्गत्या चेष्टया भाषणेन तु ।
नेत्रवक्त्रविकारैश्च ज्ञायतेन्तर्गतं मनः ॥ २० ॥

सिद्धमन्त्रौषधं धर्मं गृहच्छिद्रं च मैथुनम् ।
कुभुक्तं कुश्रुतं चैव मतिमान्न प्रकाशयेत् ॥ २१

येषु दुष्टेषु दोषः स्याद्योगक्षेमस्य भारत ।
सदा प्रसादनं तेषां देवतानामिवाचरेत् ॥ २२ ॥

दुर्बुद्धिमकृतप्रज्ञं छन्नं कूपं तृणैरिव ॥
विवर्जयीत मेधावी तस्मिन्मैत्री प्रणश्यति ॥ २३ ॥

मार्दवं सर्वभूतानामनसूया क्षमा धृतिः ॥ २४ ॥

अवृत्तिं विनयो हन्ति हन्त्यनर्थं पराक्रमः ।
हन्ति नित्यं क्षमा क्रोधमाचारो हन्त्यलक्षणम् ॥ २५ ॥

नानीयात्प्रेषणे भृत्यान्बान्धवान्व्यसनागमे ।
मित्रं चापत्तिकाले च भार्यां च विभवक्षये ॥ २६ ।

स्वामिनि गुणान्तरज्ञे गुणमापि भृत्येनुवर्तिनि कलत्रे च ।
मित्रे चानुपवर्गे निवेद्य – – सुखी भवति ॥ २७ ॥

उत्पाद्य पुत्राननृणांश्च कृत्वा वृत्तिं च तेभ्योनुविधाय कांचित् ।
स्थाने कुमारीः प्रतिपाद्य सर्वा अरण्यसंस्थोथ मुनिर्बुभूषे ॥ २८ ॥

उत्थानं संयमो दाक्ष्यमप्रमादो धृतिः स्मृतिः ।
समीक्ष्य च समारम्भो वृद्धिमूलं भविष्यति ॥ २९ ॥

अतिक्लेशेन येर्थाः स्युर्धर्मस्यातिक्रमेण च ।
अरेर्वा प्रणिपातेन मा स्म तेषु मनः कृथाः ॥ ३० ॥

त्यागेन हीनस्य कुतोस्ति लक्ष्मीर्ध्यानेन हीनस्य कुतोस्ति सिद्धिः
अशुद्ध ॥ ३१ ॥

आर्तो वा यदि वा त्रस्तः परेषां यदि वागतः ।
अपि प्राणान्परित्यज्य रक्षितव्यः कृतात्मना ॥ ३२ ॥

देहे पातिनि का रक्षा यशो रक्ष्यमपातयन् ।
नरः पतितकायोऽपि यशःकायेन जीवति ॥ ३३ ॥

सुलभाः पुरुषा लोके सततं प्रियवादिनः ।
अप्रियस्य च पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभः ॥ ३४ ॥

दानोपभोगवन्ध्या या सुहृद्भिर्या न भुज्यते ।
पुंसां हि यदि सा लक्ष्मीरलक्ष्मीः कतमा भवेत् ॥ ३५ ॥

प्रियः प्रजानां दातैव न पुनर्द्रविणेश्वरः ।
आगच्छन्काङ्क्ष्यते लोकैर्वारिदो न तु वारिधिः ॥ ३६ ॥

याचितो * प्रहृष्येत दत्त्वा च प्रियवाग्भवेत् ।
तं दृष्ट्वाप्यथवा स्पृष्ट्वा नरः स्वर्गतिमाप्नुयात् ॥ ३७ ॥

पुत्रो वशी स्वार्थकरी च विद्या अरोगिता मित्रसमागमश्च ।
भार्या विनीता प्रियवादिनीच शोकस्य मूलोद्धरणानि पञ्च ॥ ३८ ॥

अविनीतो भृत्यजनो नृपतिरदाता * * नि मित्राणि ।
अविनयवती च भार्या मस्तकशूलानि चत्वारि ॥ ३९ ॥

कान्तावियोगः स्वजनापमानो ऋणस्य शेषः कुजनस्य सेवा ।
दारिद्र्यदावाभिमुखं तु मित्रं विनाग्निना पञ्च दहन्ति गात्रम् ॥ ४०॥

द्यूतं च मांसं च सुरा च वेश्या पापर्द्धिचौर्यं परदारसेवा ।
एतानि सप्त व्यसनानि सप्त नरं सुघोरं नरकं नयन्ति ॥ ४१ ॥

वाञ्छा सज्जनसंगमे परगुणे प्रीतिर्गुणे नम्रता
विद्यायां व्यसनं स्वयोषिति रतिर्लोकापवादाद्भयम् ।
भक्तिः शूलिनि शक्तिरात्मदमने संसर्गमुक्तिः खले ।
एते येषु वसन्ति निर्मलगुणास्तेभ्यो नरेभ्यो नमः ॥ ४२ ॥

कलासु यत्नः पुरुषेण कार्यो न किंचिदप्राप्यतमं कलानाम् ।
कलाप्रकर्षादुडुपेन शम्भोरनर्घ्यमासादितमुत्तमाङ्गम् ॥ ४३ ॥

दौर्मन्त्र्यान्नृपतिर्विनश्यति यतिः सङ्गात्सुतो लालनात्
विप्रोऽनध्ययनात्कुलं कुतनयाच्छीलं खलोपासनात् ।
मैत्री चाप्रणयात्समृद्धिरनयात्स्नेहः प्रवासाश्रयात्
स्त्री गर्भादनवेक्षणादपि कृषिस्त्यागात्प्रमादाद्धनम् ॥ ४४ ॥

उचितमनुचितं वा कुर्वता कार्यजातम्
परिणतिरवधार्या यत्नतः पण्डितेन ।
अतिरभसकृतानां कर्मणामाविपत्ते–
र्भवति हृदयदाहे शल्यतुल्यो विपाकः ॥ ४५ ॥

विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा सदसि वाक्पटुता युधि विक्रमः ।
यशसि चाभिरतिर्व्यसनं श्रुतौ प्रकृतिसिद्धमिदं हि महात्मनाम् ॥ ४६ ॥

यदिच्छसि वशीकर्तुं जगदेकेन कर्मणा ।
परापवादसस्येभ्यश्चरन्तीं गां निवारय ॥ ४७ ॥

अविवेकमतिर्नृपतिर्मन्त्री गुणवत्सु वक्रितग्रीवः ॥
यत्र खला(श्च) प्रबलास्तत्र कथं सज्जनावसरः ॥ ४८ ॥

राजा संपत्तिहीनोऽपि सेव्यः सेवागुणान्वितैः ।
भवत्यजीवनं तस्मात्फलं कालान्तरादपि ॥ ४९ ॥

मित्रं स्वस्थतया रिपुं नयबलैर्लुब्धं धनैरीश्वरं
कार्येण द्विजमादरेण युवतिं प्रेम्णातितीर्वं(र्थं ?) स्तवैः ।
बन्धुं च क्षमया गुरुं प्रणतिभिर्मूर्खं कथाभिर्बुधं
विद्याभी रसिकं रसेन सकलं शीलेन कुर्याद्वशम् ॥ ५० ॥

अर्थी लाघवमुच्छ्रितो नियतनं कामातुरो लाञ्छनम्
लुब्धोऽकीर्तिमसङ्गरः परिभवं दुष्टोऽन्यदोषे रतिम् ।

निःस्वो वञ्चनमुन्मना विकलतां शोकातुरो म्लानताम्
दुर्वागप्रियतां दुरोदरवशः प्राप्नोति कष्टं मुहुः ॥ ५१ ॥

कीर्तिर्भूमिभुजां रतिर्गुणवतां ह्रीरङ्गनानां धृति-
र्दम्पत्योः शिशवो गृहस्य कविता बुद्धेः प्रसादो गिराम् ।
विद्वांसः सदसोम्बुजानि सरसां सस्योन्नतिर्नीवृता-
मुद्यानं नगरस्य वारि सरितां स्वास्थ्यं (स्थ्यं) सतां मण्डनम् ॥५२॥

कार्पण्येन यशः क्रुधा गुणचयो दम्भेन सत्यं क्षमा
लोभेन प्रमदा हठेन जरया रूपं तमो ज्योत्स्नया ।
सेवाभिर्महिमा मदेन विनयः स्नेहः प्रवासैस्तथा
मानोनुव्रजनेन कर्म कपटैर्विद्या धनैर्गच्छति ॥ ५३ ॥

मूर्खः शान्तस्तपस्वी क्षितिपतिरलसो मत्सरी धर्मशीलो
दुःस्थो मानी गृहस्थः प्रभुरतिकृपणः शास्त्रविद्धर्महीनः ।
प्रज्ञाहीनो नरेन्द्रः स च सचिववशो नास्तिकः शास्त्रद्रष्टा
वृद्धो रोगी दरिद्रः स च युवतिपतिर्धिग्विडम्बप्रकारः ॥ ५४ ॥

स्त्रीणां यौवनमर्थिनामनुगमो राज्ञः प्रतापः सताम्
सत्यं स्वल्पधनस्य संततिरसद्वृत्तस्य वाग्डम्बरः ।
आचारस्य सुशीलता नयवतां स्थैर्यं कुलस्यैक्यता
पूजाया धनमुन्नतेर्गुणचते (रति ?) शान्तेर्विवेकोचयम् (?) ॥५५॥

विद्वान्संसदि पाक्षिकः परमतो मानी गृहस्थो व्ययी
भिक्षुर्भोगपरो यतिर्वसुमना मूर्खश्च पाण्डित्यकृत् ।
निःस्वः कामयतेथ कुप्यति मृषा वृद्धो विवाहोद्यतो
वेदान्ती हतसत्क्रियः किमपरं हास्यास्पदं भूतले ॥ ५६ ॥

को लाभो गुणिसंगमः किमपरं प्राज्ञेतरैः संगतिः
का हानिः समयच्युतिर्निपुणता का धर्मतत्त्वे रतिः ।
कः शूरो विजितेन्द्रियः प्रियतमा कानुव्रता किं धनम्
विद्या किं सुखमप्रवासगमनं राज्ञः किमाज्ञा फलम् ॥ ५७ ॥

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी-
र्दैवं प्रधानमिति कापुरुषा वदन्ति ।
दैवं विहाय कुरु पौरुषमात्मशक्त्या
यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ॥ ५८ ॥

लभेत सिकतासु तैलमपि यत्नतः पीडयन्
यवेच्य—

Notes

[K. N =Kāmandakīya Nītisāra, V. D.=Viṣṇudharmottara Purāṇa; M. P.=Matsya Purāṇa, M. B.=Mahābhārata.]

CHAPTER II

4-6 — K N. IV. 14-16. V. L. —स्वविग्रह in 4; परच्छिद्रान्ववेक्षी in 5, विनियोक्ता च पात्रवित् in 6.

7a — K. N. IV 17a

7b — K. N. IV 18a.

7c — K. N. IV. 19b

8 — K. N. IV. 20.

9-14 — K N IV. 4-9. V. L. दुर्धार्य in 9; साध्वा or साध्याभिगामिका in 13.

15 — V. D. II. 3. 1.

16-19a — V. D II 3 3-6a V. L. गेय गजश्वे धनुषि in 18.

19b — V. D. II. 3 7a.

20a — V. D II 3 7b.

32b-34 — M. P. 220. 19-20. V. L. धर्मज्ञ in 33a; प्रयत्नेन in 34.

35-39 — M. P. 215. 2-6 V. L. II, 24. 2-6.

40 — Yājñavalkya I. 312.

41-42 — Manu VII. 61-62.

47-59 — V. D. II 6. 1-14 V. L :—स्थूललक्षो महोत्साह in 48; यत्कार्य न वदन्ति महीक्षित in 49; क्लेशक्षमस्तथा यश्च in 50a; गूढमन्त्रश्च दक्षश्च in 50b; प्राणाधिप्रणयात्मवान् in 52a; वक्ता विधाता in 53a; विग्रहास्पदतत्त्ववित् in 56a; यस्तु कार्याणि विविधानि महीपते in 58a; तस्याभिरतस्य in 59b; वंशश्च दीप्तो in 59d.

63 — K. N. XIV. 25. V. L हि भूपाते in a.

64 — K. N XIV. 24a, 23b, 21b V. L. राजराज्याभिरक्षण in a; अमित्रप्रतिषेधनं in b; तद्व्यसना° in c.

65-67 — Manu VII. 58, 60, 54
68 — K. N IV 24 V. L. अनुरागिण: in a.
72 - K. N. VII 1. V. L. अतन्द्रिता in b.

73-78 — M P 220. 2-7. V. L. शिक्षयेच्चैनं नाप्तांश्चिन्त्या॰ in 74b; यौवनगोचरे in 75b; क्रमेणाथ महत्स्वपि in 78b. cf also V.D.II. 65. 3-9a. V. L रथेश्वे in 74a; च्चनमात्रैश्चिन्त्याप्रियंवदैः in 74b; यौवनगं सुखे in 75b; चिरयेत्तेन कृच्छ्रेण in 76a; विशीर्यते in 77b

79-81 — K N. VII 2-4 V L. मदोन्मत्ता in 79a; भ्रातरं वापि निघ्नन्ति पितरं वाभिमानिन in 79b; रक्ष्यते राज्यं in 80b; गश्चि-तागमसशाय in 81b.

92-94 — K N. VII. 5-8 V. L. परित्यागं सुदुर्वृत्तोपि नार्हति in 93a.
95-96 — K N IV. 42-43 V L वारयन्ति ये in 96a, which is surely better than our reading; न नाहि सुहृद in 96b.
97-98 — K. N. IV. 60-61 V. L. वद्धाशानो in 97a; इंगितं॰ संपन्नो॰ in 97b

103b-105 — K. N XIV 33-34. V. L. कोशमूलो हि in 103b; कोश-व्यसन॰ in 104a.

109-110 — K N. VI. 8-10. V. L. शामनोभिरत:सतां in 109a; राज्यांप॰ in 110a; सहसा वा तान् दूरयान्॰ in 110b.

111 — Manu, VII. 74.

112-113 — M. P. 117. 5-6a, V. L. व्याघ्रतस्करवर्जितं in 112a; V. D. II. 26, 5-6a.

114 — Manu, VII 70; M P. 117, 6b-7a; V D. II. 26. 6b-7a
151-116 — M. P. 217, 7b-9. V. L विशत्पुरं in 116c; V. D. II. 26 7b-9.
117 — Manu VII 76.
118 — M. P 218 38.
119-150 — M. P. 217. 10-42 V. L मुक्तिहीन or शुक्ति॰ in 122a; तद्गमन् or वशात् in 123a; तत्र कर्तव्यं प्रयत्नेन॰ in 123b; गजेन्द्रमत: in 124b मन्त्रिवेदाविदां in 127b; ours is better; तथाभागे कोष्ठागार विधीयते in 128a; मकटांश्च विशेषत.

in 130b ; तत्र तत्र in 132a ; विना शुभान् in 133b ; भूशी राजा in 134b : न बहुनामतो दुर्गं विना॰ in 135b ; भूभुजा in 137a ; संचयश्चात्र॰ in 137b ; तोमराणांच पार्थिव in 138a. For 139, M. P. reads :—लगुडाना गुडाना च हुडाना परिघै: सह । अश्मना च प्रभूताना मुद्गराणा तथैव च । त्रिशूलाना पट्टिशानां कुठाराणा च पार्थिव । प्रासानां च सशूलानां शक्तीना च नरोत्तम । ; कुद्दालरज्जु॰ and पीठकानां in 140b ; तुषाणा चैव शात्राणामङ्गाराणां च संचय: in 141a, our reading gives no sense. इन्धनाना च संचय: in 142b, The order of vv. 144-7 differs in M. P. मृगाश्च पक्षिण: in 148a, पृथिवीक्षिता in 149a ; द्रव्याण्यशेषत: in 149b 150b is a mere repetition of 149a. Also cf. V. D. II. 26. 10-42.

151-154 — M. P. 217. 84-87. V. L. धारणं कार्यं in 151a ; पिशाचघ्ना: पापघ्ना:॰ in 152a ; कलाविदश्च पुरुषा in 152b, भीतान्प्रमत्ता-न्कुपितान् in 153a, दुर्गसुप्तं॰ in 154d ; obviously our reading is the correct one.

155 — M. P. 216. 39 ; V. D. II. 24 38.

185-186 — K. N. XIX. 2a-3, V. L मौलं भृत्यं in 186a ; बलाना व्यसनं तथा in 186b.

188-190 — M P. 215. 8-10 ; V. L. फल्गुसारविशेषवित् in 190a.

194-195 — M. P. 215. 36-37. V. D स्थविरश्च विशेषत: in 195a.

196 — M. P. 215. 38. V L चिकित्सितविशारद: in a ; प्रशस्यते in b.

203 — V. D. II. 24. 64b-65a. सदा चरान् in a ; जनस्यापिततान् in b ; our reading is better. cf. also M. P. 215. 91b-92a.

204-207 — M. P. 215. 90c-91a ; 92-94, V. D. II 24. 63b-64a ; 65b-68a.

208-210 — K. N. XIII. 27-29. V. L. जगता मतं in 208b ; विरोन्वह in 209a ; हि ते in 209b, चरितैश्चेष्टितं in 210a.

211 K. N. XIII. 31a, 32. Perhaps कामन्दकोपि is to be read before v. 208.

216 — M. P, 215. 24.

219-220 — M. P. 215. 34-35.
222 — Manu VII. 146.
223 — M. P. 215. 18. V. L. कुलोचित: in a; शूर: क्लेशसहश्चैव in b.
224-225 -- M. P. 215. 14-15.
227-228 -- K. N. V. 21-22. V. L. भर्तुरर्थमिते वृत्तिं in 227a. कोत्रेत्य० in 228a.
229-234 — K. N. V. 23-28. V. L. हार्से in 229a; चानुरागेण चित्तं चित्तज्ञसंमत: in 230a; तत्पदं in 230b; वादे वा वादिनां म in 231b.
235 — K. N. V. 58.
236 -- M. P. 216. 3. तद्धितं भवेत् in b.
237-239 — M. P. 216 9, 16, 23.
243 — Manu, VII. 147.
244-247 -- Manu, VII. 151-154.
261 — K. N. XII. 47. V. L. निष्कुड्यान्तर० in a; प्रासादाग्रे ह्यरण्ये in b.
262-263 -- K. N. XII. 44a, 45b, 46. V. L. आवर्तयेन्मुहुर्मन्त्रं धारयेच्च प्रयत्नत in 262a, आप्तपरंपरा in 262b, भिन्दन्ति मन्त्रं प्रच्छन्ना: in 263b.
264-270 -- K. N. XII. 48-54. V. L. कार्यं बुद्धिविवृद्धये in 265b; एकेनापि कार्याणि प्रविचार्य० in 266a; प्रविशेत् in 266b; यथ-श्रयात् in 267b, अतिक्रमेत्कश्चन in 269a; कार्ययोग. in 269b; साधु रसवत् फलमश्नुते in 270b. My suggestion that it is असकृत् is not supported by the printed text. Nor is it absolutely necessary.
271 — K. N. XII. 58.
272-273 — K. N. XIII. 1-2. V. L. कृतमन्त्र. सुमन्त्रज्ञो मन्त्रिणं मन्त्रि-संमतम् in 272a; read दूत in 272b.
274-275 — K. N. XIII. 4, 6, 7. V. L. स भर्तु:० in 274a; स्ववाक्यपर-वाक्यानामिति in 274b; कार्यार्थमनु० in 275b.
277-279 — K. N. XIII. 11, 12, 14. V. L. वध्यमानोपि० in 277a; प्रश्रितया वाचा in 277b; द्रव्येण कर्मणा च in 278a; तपस्वि-व्यञ्जनोपेत: स्वचारै सह संपतेत् in 279.

280-282 — K. N. XIII 22b-25. V. L. वार्ता विशेषार्थी भर्त्रे in 280a. Read सर्व instead of सर्वा in the text; परिच्छेद्य सुहृत्° in 280b; कृत्यपक्षोप° in 281a, गष्ट्राटव्यन्तपालानामात्मसात्कर्ण° in 281b: युद्धापसार° in 282a; कर्मेति कीर्तितम् in 282a, °अग्निविमर्शनम् in 282b, स्वपक्षे च, which is better, in 282c

283 — K. N. IX 66. V L विश्रम्भे नित्यमुद्युक्तो in a.

284 — K. N. X 27 and Manu VII. 171.

285 — K N. X 31. V L फले त्रयम् in a.

286-288 — K. N X 31-36. V. L श्वेत वेतसी° in 287b; सन्माप्नोति in 288a.

289 — K. N X 39a

290-294 — K. N X. 40-44 V L. कालमास्थित: × × × × कचग्रहं श्रिय: in 290b, इतत मतिमन्तं in 291a; द्यतिदीर्घसूत्रता in 292b, करोत्यविद्वान् in 293b, the commentary in the printed text construes as असाधुजनस्य संमत:; मनीषानर्घ्याक्षितमण्डलाश्रिय. in 294a, श्रियोद्यम: in 294b.

295-300 — K. N XIV 4-9. V. L भाजनं परमं श्रीणा in 295b; उत्थानाध्यवसायाभ्या in 296b. Read संपन्नाद्बुद्धि° 297a; चोपगच्छति in 297b; प्रविशन्ति महालक्ष्म्य: in 298b; श्रीभि: षण्ड इव स्त्रीभि· in 299b, श्रियो हि सततोत्थायी in 300b.

301 — K. N. XIV 10b-11a. V L सर्वेच्छेत् in a, which is better, वशेश्रियं in b

302-305 — K N XIV. 13-17a V. L. स्फुरत्तीक्ष्णनखांशु° in 303a; नीचो° याति in 304b: महत्सत्वमधिष्ठित: in 305a; करोत्येव पद मूर्ध्नि केसरी मत्तहस्तिन· in 305b; भोग भोगीव in 305c.

306 — K. N. XIV. 22. V L. तस्य कर्म in b.

307-309 — K. N. XIV. 23b-26. V. L. अमित्राप्रति° in 307a; °हि भूपति. in 308b. हिरण्यवस्त्रधान्यानि वाहनानि तथैव च in 309a.

310 — K. N. XIV. 31a-32

311-315 — K. N. XIV. 41-46a. V. L. सद्वर्णाश्रम° in 311a; °मार्गानिशिक्षणे in 311b, धूर्तेना शाठ्ययुक्तेषु सत्सु सद्वृत्त° in

313b Read धूर्तेन असाधु०; °नुमन्त्रत्वं° नात्यर्थमेव च in 314a; प्रशास्त्रध्यक्ष° in 315a; °चावरोपणं in 315b

316a -- K N XIV. 47a V. L. धर्मासनप्रति°.

316b -- K. N. XIV 52a.

317a -- K N. XIV. 53a. V. L. अदण्ड्यमदण्ड्यानां.

317b — K. N. XIV. 58b.

318-319 -- K N XIV 59-60 V L राजा नयपुरःसरः in 318a; तथैवाप्यवस्य° in 319a, सन्तेतुमर्हति in 319b.

320-323 -- K. N. XIV. 61-64. V. L. प्रमादो वैरकारिता in 321a; पूर्वोपदिष्टश्च in 321b; सूचिका. शल्यमादयः in 322a; असत्कराश्च दण्डश्च in 322b.

324 -- K N XIV 66.

325 -- K N XIV. 65 V. L. विशीर्णयन्त्रप्राकारपरिखात्वमशास्त्रत in a, क्षीणवासेन्धनान्नत्वात in b.

326-327 — K N. XIV. 67-68. V. L विमानितममानित in 326a; अभृतं व्याधित° in 326b, अनूनप्राप्तमेव च in 327b.

328 -- K N. XıV 71a, 72a.

329-330 -- K, N. XIV 19b-21 V. L. दुर्भिक्षं मरणं तथा in 329b; शान्त्या वा प्रशम नयेत् in 330a.

331-334 -- K. N. XIV. 33-35, 36b. V. L जह्यात्याज्ञ in 331b; भूमीना च प्रसाधनं in 333b, दण्डाद्वितत्प्रभवाति in 334. In the printed text, the last two verses are construed in the context of दण्ड, while in our book all the four verses speak of कोश

335 — K N XV. 1 V L. मित्रान्ता राज्यमुच्यते in a I cannot guess what the third line was.

336-337 — K N. XV. 2-3. The printed text of K N. reads राजा त्वव्यसनी राजव्यसनापोहनक्षम for 336a; V. L. न राजव्यसनापोहे समर्थं in 336b; आत्मामात्यप्रजादुर्गकोशानां° in 337a.

338 — K N XV 7 338a is the same as K. N XV. 7a, 338b, however, seems to be made up of 7b

and 8b, the former reads :—मृग व्यसनतत्त्वज्ञे क्रोधज व्यसनत्रय, the latter reads :—व्यसन व्यसनार्थज्ञश्चतुर्विधमुदाहृतम्.

339-345 — K. N. XV. 9-15. V. L. न कुर्याद्विप्रिया वाचं प्रकुर्याज्जनमात्मनात् in 339b, मर्माच्छिन्निपतन्° in 341a, रूक्षया प्रियवाग् भवेत in 342a; प्रियवाक्क्षमा in 342b, न युक्त्येव नयेद्दण्ड in 343b. तस्मान्नोद्वेजयेत् in 345b.

346 — K. N. XV. 17 V L. तत्र दण्ड प्रशस्यते in b

347-353 — K. N. XV 18-22, 24-25 V L तदकस्मात् in 348a; अभियानस्य सपत्या यानव्यसनज महत् in 350a, वृक्षसङ्कटजा दिशा in 351a, स्वैमन्त्यैश्च स्वकुल्यैश्च परभिन्नैश्च मारणं in 352a, कृताजगर मातङ्ग° भयादि च in 352b; दवाग्निधूमसंरोधा in 353a

354 — K. N XV. 26 V. L. जितश्रमत्वे व्यायाम in a Read आमंमङ °.

355 — K. N XV. 28 V L योग्यैव दिवानिशम् in a; चलेषु यन्त्रलक्ष्येषु in b.

356a — K N XV 27b

357-360a — K. N. XV. 29. 30b-32 V. L °गुल्मे विपापादपवर्जिते in 359a. विविक्तरूपशोभिते in 360a

360b — K. N. XV 35a V. L. सुपात्यमृगसंपूर्णं°

361 — K. N. XV. 37b-38 V. L मन प्रीति° in a, तद्वेषचित्तैः कृशायास° in b, भुभुजामभिवृद्धये in c

362-364 — K. N. XV 40-41, 43 V L. प्रान्तश्रङ्क्रमण° in 362 a; महितं मनं in 362b, °तिष्ठत् मैन्ये द्रागन्तगोचरं in 363b; मृगया मृगयुर्येषा in 364b

365-377 — K. N. XVI 1-2a, 3-4; 5b-9a; 10-11, 13-15a, 16a. V.L. व्यसनैर्वियुक्त ° in 365 a, उत्थेवमुपादिशन्ति in 366a; तदापि यायाद्हितानि कर्तुं परस्य वा पीडनकर्शनानि in 367a, स्वर्वार्धबाधमार° in 368b, निर्मल स्याज्ञ वा स्वमुखेन° in 369a, प्रभुतामुपेनन° निर्वापणार्थ° in 370a, कुष्ठानि मतंगजानां in 370b; शरीरेषु हि जाड्य° in 371a, राज्यं निबद्ध° in 373a धीरतमेन पुंसा in 373b; परिकल्पितानां in 374a, यतोऽन्यानोपचयोऽविशङ्क in 374b, विश्रमयन्° in 375a अभ्युन्नतामजुगम्युदारे° in 375b.

378-379 -- K. N. XVI. 18-19 V L. गच्छद्रहि प्रचारान् वाद्यांश्च कृत्वा विहितार्थकल्पान् in 379b. The latter half of 379b, corresponds with the latter half of K. N. XVI. 21b. It is quite possible that the scribe of our MS may have left the intervening verses (i. e. K. N. XVI. 19b, 20, 21a) through oversight This is borne out by the fact that v 380 of our text is—K. N. XVI. 22a.

381-393 -- K. N. XVII 1-11 : 16b-17. V. L. यात्वा वैरि° in 381a, महारथानसमा° in 382b, सामर्थ्यादिगारमुप° in 383b; कक्षुद्राकारं महामार्गसना° in 384b, महन्मौलबलान्वितं in 385a; कोशगृहपेतं in 385b, मौर्य भृत in 386a, अन्त स्व-वर्गिण क्रूरानलुब्धान् दृष्ट° in 387a, मण्डलेन निवेश° in 387b; लब्धनामानस्तुरङ्गाश्च° in 388a: विबुद्धायुधे in 389a; निष्ठ द्राजाभिगुप्तये in 389b. नाश्वविहित in 390a; सन्याचितानाथ in 392, कश्चित्कुले in 393a.

394-410 -- Yajñavalkya, I 323, 326, 334-344. 349-351.

414-415 -- M. P. 220. 14-15

417 -- M. P 220 16.

418-422a — M. P. 220. 21-25 V L तथा तत in 418a; यस्तथैकस्य in 418b. दारुणानातिर्नीक्ष्णा° in 419b; नृपं हस्तवशं गतं in 421b

— V. D II 65 22a-27a V. L. हस्तलसत्कथं in 421b. This appears to have been the reading of our MS

425-428 — Manu VII 47-50. V. L II 65. 27-31.

429-432 -- M. P 220 26-27 : 29a-31a : दुःसह्यभावत in 430a; स्मितपूर्वाभिभाषी स्यात् in 430b.

-- V. D. II. 65. 27a-29a, 31-32. V. L. अक्षिप्तचेतस in 429b. otherwise this agrees with M. P.

433-435 — M. P. 221. 7b-10a V. L. फलावहं in 434b; नरे in 435c.

436 -- M. P 222. 2

437 — M. P. 222 3b-4

438 — M. P. 222. 10. V. L. ऋजव प्रणीता in a ; सत्यपरा विनीता in b ; मानोन्नता ये in d ; Also—V. D. II. 67-10 which agrees with M. P.

439 — M. P. 223. 1 V. L तु ये दुष्टा and भीतावमानिता in a.

440-442 — M. P. 223. 7-9. V. L. चाह्यन्तु and महीभृत. in 441a ; सेनापतेर्नृप in 441b.

443 — M. P. 224. 1. V. L. °तमं मतं in a ; सुदन्तेनेह भवति in b.

444 — M. P. 224. 8. V. L. सदुर्जयं यो विबुधाधिवासः in d.

445 — M. P. 225. 1.

446 — M. P. 225. 5 V. L. यः स्वधर्मेण तिष्ठति in b.

447-448 — M. P. 225. 16b-17.

453-456 — Yājñavalkaya, II. 12-15

457-458 — K. N. XIV. 36a-38a.

461 — Yājñavalkya, I, 367.

465 — Manu, VIII. 310

466-467 — Manu, VIII 124-125.

468a — Manu, VIII. 379a

479 — Manu, VIII 335

480 — Yajñavalkya, I. 359

483-485 — Manu, VII 3-5.

486-495 — M P. 226. 1-5 , 8-12.

496 — M. P 227 217

498-500 — M. B. V 34. 10-12.

501-504 — M. B. V 34. 15-18

506-511 — M B V. 34. 24-29

512 — M B V 34. 43

513 — M. B V 34 62

514 — M. B. V 34 80. In d, read नावसृजेत्परेभ्यः ।

515 — M. B V 35 41. V. L. सिध्यन्ते नात्र in b.

516 — M B. V. 35 51.

517 — M. B. V. 36. 58.

518 — M. B. V 36. 61.

519 — M. B. V. 36. 60.

520 — M. B. V. 37. 7.

521 — M. B. V. 37. 19.

ई-पुस्तक

मावळा

भाग-१

लेखक – श्री. दामोदर मगदूम

मावळा

ई-पुस्तक - मावळा

भाग - पहिला

आवृत्ती — ४ जुलै २०१२ (वीर बाजीप्रभू देशपांडे पुण्यतिथी)

लेखक - दामोदर मगदूम

प्रकाशक - ई साहित्य प्रतिष्ठान

मांडणी-सजावट - सचिन काकडे

रेखाटन — चेतन पाउलझगडे

संपर्क

ई साहित्य प्रतिष्ठान
जी ११०२, ईटर्निटी
मॅरेथान चौक
ठाणे - ४००६००४.

☎ ९८६९६७४८२०

www.esahity.com
www.marathiriysat.com

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

© २०१२
सर्व हक्क **ई साहित्य प्रतिष्ठान आणि लेखकाच्या** स्वाधीन.

मावळा

।। अर्पणपत्रिका ।।

हे ई पुस्तक पावनखिंडीच्या पवित्र स्मृतीस अर्पण. . .

ई साहित्य प्रतिष्ठान

मावळा

दोन शब्द . . .

छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या मराठी साम्राज्याचा विस्तार अटकेपार करताना अनेक मावळे धारातीर्थी पडले. सह्याद्रीच्या गडकिल्ल्यावरील बुरुजांसारखी अभेद्य निष्ठा असलेल्या मावळ्यांनी महाराजांवरील श्रध्दा आणि स्वराज्यप्रेमापोटी जीवाची पर्वा केली नाही. त्यांचे बलिदान , पराक्रम स्वराज्यासाठीचा त्याग आजही सर्वांसाठी स्फ़ुर्तीदायक आहे.

सदर पुस्तक मालिका असाच ज्ञात अज्ञात मावळ्यांच्या पराक्रमावरील आढावा आहे. या पुढील पुस्तकात आपण आणखी काही मावळ्यांचा पराक्रमाचा अनुभव घेउ.

जय भवानी !! जय शिवाजी !!

www.marathiriyasat.com

साहित्य प्रतिष्ठान®

मावळा

बाजी पासलकर

बाजी पासलकर हे मोस मावळखोऱ्याचे वतनदार.निगडे मोसे गावापासून ते सांगरून-डावजेपासून,धामन-ओव्होळपर्यंतची ८४ खेडी त्यांच्या वतनदारीत होती.अत्यंत शूर असलेले बाजी न्यायदानातही उत्तम होते.तंटे सोडविण्यात ते हुशार होते.इतिहासात बाजी पासलकर नावाच्या दोन व्यक्ती होत्या.पहिले बाजी बेलसरच्या युध्दात मरण पावले तर दुसरे सवाई बाजी काय सावंताबरोबरच्या युध्दात मारले गेले.

छत्रपती शिवरायांनी स्वराज्य स्थापनेस सुरूवात केली होती.शहाजीराजेंना पुणे जहागीर मिळाली होती.जिजाऊ आईसाहेब व शहाजीराजेंच्या मार्गदर्शनाखाली शिवबांनी मावळातील एक-एक किल्ला काबीज करावयास सुरुवात केली.तोरणा, सुभानमंगळ,रोहिडा असे किल्ले त्यांनी काबीज केले.विजापुरच्या अदिलशाही दरबारात शिवबांच्या स्वराज्य स्थापनेच्या खबरी येऊ लागल्या.शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी अदिलशाहने सन १६४८ साली फत्तेखानास धाडले.

फत्तेखानाने जेजूरीजवळील बेलसर येथे आपला तळ ठोकला होता.खानाच्या सैन्याने शिरवळजवळील सुभानमंगळ किल्ल्यावर हल्ला करून किल्ला काबीज केला.मराठ्यांचा हा पहिलाच पराभव होता.छत्रपतींनी कावजी मल्हार यास सुभानमंगळ भूईकोटावर चालून जाण्यास सांगितले.त्यांनी एका रात्रीत गड सर केला.तर फत्तेखानावर हल्ला करण्यासाठी बाजी पासलकर,कान्होजी जेधे,बाजी जेधे,गोदाजी जगताप बेलसरच्या छावणीवर गेले,अचानक हल्ला करून त्यांनी खानाच्या सैन्याची कत्तल केली व पुरंदरचा पायथा गाठला.

फत्तेखानचा सरदार मुसेखानाने पुरंदरावर हल्ला केला,पुरंदराला खानाच्या सैन्याचा वेढा पडला.गडाजवळ फत्तेखानाच्या सैन्याचे व मराठ्यांचे तुंबळ युध्द झाले.बाजी पासलकर,कान्होजी जेधे,गोदाजी जगताप यांनी गनिमांची कत्तल केली.फत्तेखानचा सरदार मुसेखान व गोदाजी जगताप एकमेकाला भिडले.दोघात तुंबळ युध्द झाले.अखेरीस गोदाजीच्या वाराने मुसेखानाच्या छाताडाचा वेध घेतला व खान

कोसळला.मराठ्यांनी स्वराज्याचा पहिला रणसंग्राम जिंकला पण बाजी पासलकर सारखा वीर रणी पडला.

ई साहित्य प्रतिष्ठान

मावळा

यदूनाथ सरकारांच्या मते काय सावंताच्या युध्दात बाजी मरण पावले(हे सवाई बाजी असावेत).सभासदाच्या बखरीत या युध्दाचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.राजपुरीहून काय सावंत म्हणोन पांच हजार फौजेनिशी युध्दास आला.युध्द मोठे होतां बहूत रणखंदल जाले.काय सावंत खासा व बाजी पासलकर महायोध्दा,याच्या मिशा दंडायेवढ्या,यांस पीळ घालून वरि केशांच्या आधारें निंबे दोहींकडे दोन ठेवीत होता,असा शूरमर्द ठेविला,याशी व त्याशी खासाखाशी गांठ पडली.एकास एकांनी पंचवीस जखमा करून ठार पडले.मग उभयतांकडील दळ आपले जागियास गेले.

बाजी पासलकरांच्या बलिदानामुळे स्वराज्यातील मावळ्यांत सर्वस्वाचा त्याग करण्याचा आदर्श निर्माण झाला.पुण्याजवळील वरसगाव धरणातील जलाशयाला बाजी पासलकर यांचे नाव देण्यात आले आहे.पण दुर्दैव असे की याच धरणाच्या जलाशयात त्यांचा चिरेबंदी वाडा तसेच त्यांच्या वंशजांची शेकडो एकर जमीन बुडाली आहे,याचा मोबदला त्यांना शासनाकडून अजूनही मिळाला नाही.त्यांचे वंशज आजही त्यांच्या स्मृती जतन करण्याचे काम करत आहेत.

।। शूरवीर बाजी पासलकर ।।

ई साहित्य प्रतिष्ठान®

मावळा

कान्होजी जेधे

कान्होजी जेधे आणि त्याचा पुत्र बाजी तथा सर्जेराव हे शिवकालातील जेधे घराण्यातील दोन कर्तबदार पुरूष होते.पुण्यापासून दक्षिणेस सुमारे पन्नास कि.मी.अंतरावर असलेल्या भोरजवळच्या कारी या गावचे देशमुख,कान्होजी जेधे होते.ही देशमुखी त्यांना अदिलशाहने दिली होती.शिवाजीराजेंच्या कारवायांनी त्रस्त झालेल्या अदिलशाहने फत्तेखान या सरदारामार्फत सन १६४८ साली शहाजीराजेंना अटक केली होती,तेव्हा कान्होजी व दादाजी लोहोकरे शहाजीराजेंसोबत होते.पुढे सर्वांची सुटका झाल्यावर शहाजीराजें अदिलशाहाच्या हुकूमानुसार बंगळूर या आपल्या नव्या जहागीरीच्या ठिकाणी निघाले असता त्यांनी कान्होजींना शिवाजीराजेंकडे पाठविले.

शहाजीराजें त्यांना बोलिले,"मावळप्रांती तुम्ही जबरदस्त आहा,राजश्री सिवाजी राजेपण आहेत.त्यांकडे जमेतीनिसी तुम्हास पाठवितो.तेथे इमाने शेवा करावी कालकला(बिकट प्रसंगी)तरी जीवावरी श्रम करून त्यापुढे खस्त व्हावे(मरण पत्करावे)तुम्ही घरोबियातील मायेचे लोक आहा.तुमचा भरोसा मानून रवाना करतो(जेधे करीना)

शहाजीराजेंचे हे बोल म्हणजे आज्ञा मानून कान्होजीं शिवाजीराजेंकडे आले आणि म्हणाले,"महाराजांनी(शहाजी)शफत घेऊन साहेबांचे शेवेसी पाठविले.तो इमान आपला खरा आहे.खासा व पाच जण लेक व आपला जमाव देखील साहेबापुढे खस्त होऊ."(जेधे करीना)

याच सुमारास सन १६४९ साली अफजलखानाने जावळीवर स्वारी करावयाचे ठरविले व अदिलशाहाच्या वतनदारांना फर्मान धाडिले व आपणा सोबत येण्यास सांगितले.खानाच्या फर्मानास घाबरून केदारजी व खंडोजी खोपडे खानास मिळाले.फलटणचे निंबाळकर पूर्वीपासून अदिलशाहसोबत होते.पण कान्होजीं जेधे आपले पाच पुत्रासह,सहकारी घेऊन राजापाशी आले आणि बोलिले,"यापुढे खस्त होऊ(मरण पत्करू)तेव्हा आमचे वतन कोण खावे आम्ही इमानास अंतर करणार नाही."यानंतर राजेंचा निरोप घेऊन कान्होजीं कारी या आपल्या गावी आले,व मावळातील समस्त देशमुखांना बोलावून शिवरायांची मदत करावयास सांगितले.

।। कान्होजी जेधे यांचे रोहिडा किल्ल्यावरील वाड्यातील देवघर ।।

कान्होजी समस्त देशमुखांना म्हटले,"अफजलखान बेईमान आहे.कार्य जालियावरी नस्ते निमित्य ठेऊन नाश करील हे मऱ्हाष्ट राज्य आहे.अवघियांनी हिंमत धरून जमाव घेऊन राजश्री..स्वामी सांनिध राहोन येकनिष्ठेने शेवा करावी यैश्या हिमतीच्या गोष्टी सांगितल्या."यावर सर्व देशमुखांनी राजेंकडे जाऊन आपले इमान व्यक्त केले.अडचणीच्या वेळी मावळातील सर्व देशमुखांना एकत्र करण्याचे काम कान्होजींनी करून राजांस मोठी मदत केली.

प्रतापगडाच्या लढाईत कान्होंजीचा पुत्र बाजी याने जीव महालासोबत राहून महाराजांचे प्राण वाचविले तर खानाचा पाडाव झाल्यावर कान्होजी आपल्या सहकाऱ्यांसोबत खानाच्या सैन्यावर तुटून पडला व हत्ती, घोडा, नौबती, नगारे, बिशादी, खजाना मिळविला.शिवाजीराजेंनी सन १६५५-५६ साली जावळीच्या मोऱ्यांस शासन केले,त्यावेळी कान्होजी,बांदल,सिलिंबकर व इतर देशमुखांनी त्यांना सहकार्य केले.

मावळा

शाहित्येखानाविरूध्द लढण्यासाठी बाजी व चंदाजी हे कान्होजीचे दोन पुत्र राजेंसोबत लालमहालात गेले होते.राजें तोरणा,राजगडच्या बांधणीत गुंतले असताना,विजापुरी सरदार फत्तेखान याने अचानक पुणे परिसरावर हल्ला केला.राजे तातडीने कान्होजीस घेऊन पुरंदर किल्ल्यावर आले.मराठ्यांचे गनिमाबरोबर धारोंधर युध्द जाहाले,अनेक मावळे मृत्युमुखी पडले,पराभव झाल्यास मराठ्यांचा ध्वज शत्रुच्या हाती लागू नये म्हणून बाजीने काही गनिमास यमसदनास धाडून ध्वज घेऊन पुरंदरावर आला.तेव्हा राजे निशाण सांभाळून आणले म्हणोन खूष जाहाले व त्यास सर्जाराई असा किताब दिला.पुढे बाजी,सर्जेराव या नावाने ओळखू लागला.

पुढे छत्रपती राजारामच्या कालखंडात सर्जेरावने आपल्या पित्याप्रमाणे कामगिरी करत औरंगजेबविरूध्द मावळातील देशमुखांना एकत्र केले.स्वराज्यासाठी जेधे घराण्याने मोठे योगदान केले आहे.

।। कान्होजी जेधे यांची रोहिडा किल्ल्यावरील समाधी ।।

ई साहित्य प्रतिष्ठान

नेताजी पालकर

नेताजी पालकर यांचा इतिहासामध्ये 'प्रतिशिवाजी',दुसरा शिवाजी असा उल्लेख आहे.नेताजी स्वराज्याचे दीर्घ काळ सरसेनापती होते.आपल्या कारकिर्दीमध्ये त्यांनी अनेक लढाया गाजविल्या.नेताजींचे मुळ गाव पुणे जिल्ह्यातील शिरूर हे होय.अफजलखान व छत्रपतींच्या भेटीवेळी नेताजींने मोठा पराक्रम गाजविला होता.प्रतापगडाच्या लढाईच्या वेळी छत्रपतींनी नेताजीस खास कामगिरी सांगितली होती.

सभासद म्हणतो,राजे मातुश्रींचा आशीर्वाद घेऊन प्रतापगडास निघाले.नेताजी पालकर सरनोबत यास लष्कर घेऊन वर घाटावरि येणे म्हणोन सांगितले.आणि अफजलखानास जावलीस बोलावितो,सला करून भेटतों,विश्वास लावून जवळ आणितों,तें समयी तुम्ही घाटमाथा येऊन मार्ग धरणें,असे सांगितले.खानाचा वध झाल्यानंतर,राजे गडावरि जातांच एक भांड्याचा आवाज केला.तेच गडाखालील लोक व घाटावरील लोक व लष्कर व कोकणांतून मोरोपंत व मावळे असे चौतर्फी चोहोंकडून चालोन खानाचे गोटावरि आले.मोठें घोरोंदर युध्द जाहाले.रक्ताच्या नद्या चालल्या.रणकंदन जाले.प्रतापगडाच्या या युध्दात नेताजींनी मोठा पराक्रम गाजविला.

पुढे मिर्झा राजेसोबत झालेल्या पुरंदरच्या तहानंतर शिवाजी महाराज,मिर्झा राजे, नेताजी पालकर आणि दिलेरखान विजापूरवर चालून गेले होते.पण आदिलशाही सेनापति सर्जाखान याच्यासमोर त्यांना अपयश आले.त्यामुळे विजापूरकरांचा पन्हाळगड जिंकण्यासाठी राजे विजापुरहून पन्हाळ्यास आले,राजेंनी रात्रीच गडावर छापा घातला.पण किल्लेदार सावध असल्यामुळे मराठ्यांचा पराभव झाला,सुमारे १००० मावळे मारले गेले.

सभासद म्हणतो,मग राजियांनी नेताजी पालकर यास बोलावून आणिला आणि "समयास कैसा पावला नाहींस?"म्हणून शब्द लावून,सरनोबती वरून दूर केले.मग नेताजी विजापूरकरांना जाऊन मिळाले.महाराज आग्र्याच्या भेटीस गेल्यानंतर मिर्झाराजांनी नेताजी पालकरांना विजापूरकरांकडून मोगलांकडे वळवले.

मावळा

महाराजांनी आग्र्याहून सुटका केल्यानंतर,शिवाजीराजे सुटले आता प्रतिशिवाजी सुटू नये या विचाराने औरंगजेबाने नेताजी पालकरांच्या अटकेविषयीचे फर्मान दि.१९ ऑगस्ट १६६६ रोजी आग्रा येथून सोडले.नेताजी पालकर यावेळी मोगलांच्या छावणीत बीड जवळ धारुर येथे होते.दि.२४ ऑक्टोबर १६६६ रोजी मिर्झा राजे जयसिंह यांनी नेताजी अन् त्यांचे चुलते कोंडाजी यांना अटक केली.दिलेरखानाने त्यांना आग्र्याला पाठविले.आग्र्यास त्यांचा अतोनात छळ करण्यात आला त्यामुळे दि.२७ मार्च १६६७ रोजी नेताजी मुसलमान झाले व त्यांचे 'महम्मद कुलिखान'असे नामकरण करण्यात आले.औरंगजेबाच्या हुकुमाप्रमाणे जून १६६७ मध्ये नेताजी काबूल कंदाहाराच्या मोहिमेवर रवाना झाले.लाहोरजवळ आल्यावर त्यांनी पळून जाण्याचा एक प्रयत्न केला पण त्यांना अपयश आले.पुढे ९ वर्षे नेताजी काबूल,कंदाहार येथील मोहिमेवर होते.

आग्र्याहून सुटका झाल्यानंतर राजेंनी एकामागोमाग एक किल्ले घेण्याचा सपाटा लावला होता.शिवाजी महाराजांसमोर औरंगजेबाचे सर्व सरदार अपयशी ठरत होते,अशावेळी त्यास 'प्रतिशिवाजीची'आठवण झाली व त्याने दिलेरखानासोबत नेताजीस महाराष्ट्राच्या मोहिमेसाठी पाठवले.पच्छाताप झालेले नेताजी मे १६७६ मध्ये मोगली छावणीतून पळून रायगडावर आले.शिवाजी महाराजांनी दि.१९ जून १६७६ रोजी त्यांना पुन्हा विधीवत हिंदू धर्मामध्ये घेतले.नेताजी पालकर यांची समाधि तामसा.जि.नांदेड येथे आहे.

।। नेताजी पालकर यांचा हिंदू धर्मात पुनःप्रवेश ।।

ई साहित्य प्रतिष्ठान

प्रतापराव गुजर

।। वेडात मराठे वीर दौडले सात ।।

वेडात मराठे वीर दौडले सात असे ज्यांच्याबद्दल म्हटले जाते ते शूर सेनानी म्हणजे,प्रतापराव गुजर,विसाजी बल्लाळ,दिपोजी राउतराव विठ्ठल,पिळाजी अत्रे,कृष्णाजी भास्कर,सिद्दी हिलाल व विठोजी होय.प्रतापराव गुजर या महान सेनापतीने मोठा पराक्रम केला होता.त्यांचे व बेलोलखान यामधील युध्द इतिहासात प्रसिध्द आहे.या सात वीरांनी सुमारे बारा हजारच्या बेलोलखानाच्या सैन्यावर चाल करून मोठा पराक्रम केला.ही लढाई कोल्हापूरजवळच्या नेसरी येथे झाली.

सभासदाच्या बखरीत प्रतापराव गुजर या महान सेनानीबद्दल पुढीलप्रमाणे लिहिले आहे.पन्हाळगडाच्या लढाईच्या समयी नेताजी पालकर समयास न आल्यामुळे मराठ्यांचे मोठे नुकसान झाले होते.यामुळे राजियांनी नेताजी पालकर यास बोलावून आणिला,आणि 'समयास कैसा पावला नाहींस?'म्हणून शब्द लावून,सरनोबती दूर करून,राजगडचा सरनौबत कडतोजी गुजर म्हणून होता,त्यांचे नाव दूर करून,प्रतापराव ठेविले,आणि सरनोबती दिधली.प्रतापरावांनी सेनापती करीत असतां शाहाण्णव कुळींचे मराठे चारी पादशाहींत जे होते व मुलखांत जे जे होते ते कुल मिळविले.पागेस घोडीं खरेदी केलीं.पागा सजीत चालिले व शिलेदार मिळवित चालिले.असा जमाव पोक्त केला.चहूं पादशाहीत दावा लाविला.

विजापूराहून आलेल्या बहलोलखान याने बारा हजार स्वारांनिशी स्वराज्यावर चाल करून मोठा धुमाकूळ घातला होता,रयतेवर अनन्वित अत्याचार केले होते.महाराजांनी प्रतापरावांना बहलोलखानास धुळीस मिळवा असा हुकूम केला.प्रतापरावांनी गनीमीकाव्याने बहलोलखानास जेरीस आणून त्याचा पराभव केला.बहलोलखान आपल्या सैन्यासह शरण आला.शरण आलेल्या बहलोलखानास मोठ्या मनांनी प्रतापरावांनी त्यांस सोडून दिले.रयतेचे हाल करणाऱ्या बहलोलखानास सोडल्यामुळे महाराजांनी प्रतापरावांस,'बहलोलखानाला मारल्याशिवाय मला तोंड दाखवू नका.'असे पत्र धाडिले.राजियांचे पत्र

मावळा

मिळताच प्रतापराव सैन्य घेऊन बहलोलखानाच्या मागावर निघाले.आपल्या छावणीच्या जवळच असलेल्या नेसरी येथे बहलोलखानाचा तळ पडला आहे.असे हेरांकडून त्यांना कळाल्यावर ते तडक घोड्यावर बसून एकटेच बहलोलखानाच्या छावणीवर चालून निघाले.त्यांच्या पाठोपाठ विसाजी बल्लाळ,दिपोजी राउतराव विठ्ठल,पिळाजी अत्रे,कृष्णाजी भास्कर,सिद्दी हिलाल व विठोजी हे वीर होते.या सात वीरांनी बारा हजाराच्या सैन्यामध्ये घुसून शेकडो गनीमांना ठार मारिले.पण अखेरीस प्रतापराव आणि सोबतचे सहा वीर मरण पावले.केवढे हे शौर्य या सात वीरांचे?साक्षात समोर मृत्यु आहे हे माहीत असून,हजारों सैन्यावरी सात वीर चालून गेले.पराकोटीची स्वामीनिष्ठा आणि स्वराज्यावरील प्रेमापोठी या सात वीरांनी स्वतःस मरणाच्या हवाली केले.ही घटना ऐकल्यावर महाराजांना अतीव दुःख झाले.या सात वीरांचे स्मारक महाराजांनी नेसरीजवळ उभारले.

सभासदाच्या बखरी मधील बहलोलखान बरोबरच्या युध्दाचे वर्णन

विजापुराहून बेलोलखान बारा हजार स्वारांनिशी इकडे चाल करून आला.तो फौजेनिशी हिकडे चालला ही खबर राजियास कळोन कुळ लष्कर प्रतापराव यास हुकूम करून आणविले आणि हुकूम केला की,'विजापूरचा बेलोलखान येवढा' वळवळ बहूत करीत आहे.त्यास मारून फत्ते करणें.'म्हणोन आज्ञा करून लष्कर नवाबावरि रवाना केलें.त्यांनी जाऊन उंबराणीस नवाबास गांठिले.चौतर्फा राजियाचे फौजेने कोंडून उभा केला.पाणी नाहीं असा जेर केला.युध्दही थोर जाहालें.इतक्यात अस्तमानही जाला.मग निदान करून नवाब पाणियावरि जाऊन पाणी प्याला.त्याजवरि प्रतापराव सरनौबत यास आंतस्त कळविले की,'आपण तुम्हावरि येत नाहीं.पादशाहाचे हुकूमानें आलों.याउपरि आपण तुमचा आहें.हरएक वक्तीं आपण राजियाचा दावा न करि.'असें कितीएक ममतेंचे उत्तर सांगोन सला केला.मग राजियांचे लष्कर निघोन गेले.

राजियांनी प्रतापराव यास पाठविले की,'तुम्ही लष्कर घेऊन जाऊन बेलोलखान येतो,यांशी गांठ घालून,बुडवून फत्ते करणें नाहीं तर तोंड न दाखविणें.'ऐसे प्रतापराव यास निक्षून सांगून पाठविले.त्यावरि प्रतापराव जाऊन बेलोलखाशीं गांठलें. नेसरीवरि नवाब आला.त्यांने गाठिंले.मोठे युध्द जालें.अवकाल होऊन प्रतापराव सरनोबत तरवारीचे वारानें ठार जाले.रण बहूत पडिले.रक्ताच्या नदया चालिल्या. प्रतापराव पडले,'ही खबर राजियांनी ऐकून बहूत कष्टी जाले,आणि बोलिले की,'आज एक बाजू पडली!'

ई साहित्य प्रतिष्ठान

या सात वीरांच्या बलिदानाने स्वराज्यातील मराठा मावळा पेटून उठला.या वीरांचा पराक्रम इतिहासात कायमचा अमर झाला.

।। सात वीरांचे स्मारक , नेसरी (कोल्हापूर) ।।

मावळा

हंबीरराव मोहीते

सेनापतीपदी निवड

आदिलशाही सरदार बहलोलखान याच्याबरोबरच्या लढाईत सेनापती प्रतापराव गुजर पडले.प्रतापराव पडल्याची वार्ता कळताच,प्रतापरावांच्या फौजेत असलेल्या हंबीरराव मोहिते यांनी सर्व सैनिकांत हिंमत निर्माण करून, बहलोलखान वर आक्रमण करून त्याच्या सैन्याची दाणादाण उडवून त्यांस विजापूरपर्यंत पिटाळले.

बहलोलखानाविरूध्द पराक्रमाने महाराजांना हंबीररावामध्ये शहाणा,सबुरीचा सेनानी दिसला.चिपळून जवळच्या श्रीक्षेत्र परशूराम येथे या सेनानीस महाराजांनी आपला सेनापती म्हणून निवडले.सभासद म्हणतो,'प्रतापराव पडले ही खबर राजियांनी ऐकून बहूत कष्टी जाले,सरनोबत कोण करावा?अशी तजवीज करून,आपण स्वस्थ लष्करांत येऊन,लष्कर घेऊन कोकणांत चिपळून जागा परशूरामाचें क्षेत्र आहे,तेथें येऊन राहिले.मग लष्करची पाहाणी करून लहान थोर लष्करास व पायदळ लोकांस खजीना फोडून वाटणी केली,आणि सरनोबतीस माणूस पाहातां हंसाजी मोहिते म्हणून पागेमध्यें जुमला होता;बरा शहाणा,मर्दाना,सबुरीचा,चौकस,शिपाई मोठा धारकरी पाहून त्यास 'हंबीरराव' नाव किताबती देऊन सरनोबती सांगितली.कुल लष्कराचा गाहा करून हंबीरराव यांचे ताबीज दिधले.

बहादूरखान,दिलेरखानादींना नजरेत धरले नाही

छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकानंतर हंबीररावांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांच्या फौजांनी दोन वर्ष मोघल व आदिलशाही भागातून मोठी लुट मारून आणिली.या कालातील हंबीररावांची कामगिरी वर्णन करताना सभासद म्हणतो,'राजियांनी आपले लष्करास हुकूम करून हंबीरराव सरनौबत फौज घेऊन मोंघलाईत शिरले. खानदेश, बागलाण, गुजराथ, अमदाबाद,बुऱ्हाणपूर,वऱ्हाड,माहूर मारून खंडणी करून जप्त केला.मालमत्ता अगणित जमा करून चालिले.तो बहादूरखान यांनी कुल जमाव घेऊन हंबीररायाचे पाठीवर चालून आले.राजियाची फौज तोलदार गाठली.मोंघल बहुत धास्तीने घाबरा होऊन सात-आठ गावांचे अंतराने चालिला.दिलेरखान उतावळा होऊन फौजेशी गाठ घातली.हंबीरराव यांनी नजरेत धरला नाही.तोलदारीने मत्ता घेऊन आपले देशास आले.मालमत्ता राजियास दिली.

साहित्य प्रतिष्ठान

।। रायगडावरील हंबीरराव मोहीतेंच्या वाड्याचे अवशेष ।।

व्यंकोजीराजांवर विजय

कर्नाटक मोहिमेवर असताना महाराजांनी व्यंकोजीराजाकडे कर्नाटकातील शहाजीराजांच्या जहागीराचा अर्धा वाटा मागितला पण वाटा न देताच त्यांनी हंबीररावांच्या सैन्यावर आक्रमण केले.व्यंकोजीराजांकडे ४००० घोडदळ व १०००० पायदळ होते.तर हंबीररावांच्या कडे ६००० घोडदळ व ६००० पायदळ होते.दोन्ही सैन्यात जोरदार लढाई होऊन हंबीररावांच्या सेनेचा पराभव झाला.विजय मिळाल्यामुळे व्यंकोजीराजे व त्यांचे सैन्य आराम करू लागले.याप्रसंगी हंबीररावांनी व संताजी भोसले यांनी मराठी सैन्यास एकत्र करून मध्यरात्रीच व्यंकोजीराजांच्या तळावर हल्ला करून त्यांच्या फौजेची दाणादाण उडविली.प्रचंड असा खजिना,हत्ती,घोडे मराठ्यांच्या हाती लागले.व्यंकोजीराजे सुध्दा हाती लागले होते. पण महाराजांच्या बंधूस कैद कसे करावे असा विचार करून त्यांनी व्यंकोजीराजांस सोडून दिले.हे युध्द १६ नोव्हेंबर,१६७७ साली झाले.यानंतर हंबीररावांनी कर्नाटकातील असा वेलोरचा बुलंद कोट काबीज केला(२२ जुलै, १६७८).

प्रधानांची बंडखोरी मोडली

छत्रपती शिवरायांच्या मृत्युनंतर अष्टप्रधान मंडळीतील काही जणांनी राजारामास गादीवर बसविण्याचे ठरवून संभाजीराजेंचा गादीवरील हक्क नाकारला.या मंडळीतील मोरोपंत पिंगळे,आण्णाजी दत्तो,प्रल्हाद निराजी या मंडळीना वाटले की राजाराम हा हंबीररावांचा सख्खा भाचा असल्यामुळे,आपल्या कटात हंबीरराव सामील होतील.पण हंबीररावांनी या तिघांना कैद करून कोल्हापूरास पन्हाळा किल्ल्यावर संभाजीराजें पुढे उभे केले.कारण हंबीररावांना माहित होते की मोघलांच्या प्रचंड अशा सेनेशी संभाजीराजांसारखा छावाच लढू शकतो.

पुढे संभाजीराजेंच्या राज्याभिषेकानंतर हंबीररावांनी मोघलांचे संपन्न असे बुऱ्हाणपूर शहर लुटिले.मोघल इतिहासकार खाफीखान म्हणतो,'देशोदेशीचे जिन्नस, जडजवाहीर,सोने-नाणे,रत्ने असा लक्षावधी रूपयांचा माल बुऱ्हाणपूरातील दुकानांत साठविला होता.तो सर्व मराठ्यांनी लुटला.मराठे अगदी अनपेक्षीतपणे आले. शहराच्या तटबंदीच्या बाहेर बहादूरपुरा आणि इतर सात पुरे होते.त्यांना मराठ्यांनी घेरले.विशेषतः बहादूरपुऱ्यावर ते इतक्या अनपेक्षीतपणे तुटून पडले की त्या पुऱ्यांतून एक माणूस किंवा एक पैसा हलविता आला नाही.'

अनेक लढ़ाया

पुढे मोघल सरदार शहाबुद्दीनखान याच्याबरोबरच्या नाशिकजवळच्या रामसेजच्या लढाईत हंबीरराव जखमी झाले(जुलै १६८२).त्यांनतर मोघल सरदार कुलीच खानाबरोबर भीमा नदीच्या परिसरात लढाई(ऑक्टोंबर,१६८२),शहाजादा आज्जम बरोबर पन्हाळ्याजवळ लढाई(१५ डिसेंबर,१६८२ व जाने-फेब्रु १६८३),मोघल सरदार बहादुरखान बरोबर कल्याण-भिवंडीच्या जवळ लढाई(२७ फेब्रुवारी, १६८३),शहाबुद्दीनबरोबर रायगडच्या परिसरात लढाई(जानेवारी,१६८५),मोघली मुलखात चढाया(सन १६८६),अशा अनेक लढाया केल्या.या अशा पराक्रमी सेनानीची शेवटची लढाई वाईच्या परिसरात सर्जाखान या मोघल सरदाराशी झाली(डिसेंबर १६८७).उभयपक्षी निकराची लढाई होऊन सर्जाखानाच्या फौजेची दाणादाण होऊन ती पराभूत झाली.पण लढाईच्या कालात गर्दीमध्ये तोफेचा गोळा लागून हंबीरराव धारातीर्थी पडले.अत्यंत पराक्रमी व शूर असलेले हंबीरराव पडल्यामुळे स्वराज्याची फार मोठी हानी झाली.ऐन धामधुमीच्या कालात हंबीरराव पडल्यामुळे संभाजीराजांचा मोठा आधार नाहीसा झाला.

।। हंबीरराव मोहीतेंचे गाव तळबीड (कराड) ।।

मावळा

तानाजी मालुसरे

कोंढाणा (सिंहगड)ची लढाई

आग्र्याहून सुटल्यानंतर छत्रपती शिवरायांनी मोठ्या मोहिमा आखून मुघलांच्या ताब्यातील तेवीस किल्ले घेण्याचे ठरविले.सुरुवातीला त्यांनी कोंढाणा किल्ला घ्यायचे ठरवले.कारण कोंढाणा किल्ला स्वराज्यातील मध्यवर्ती किल्ला होता,या किल्ल्याच्या साह्याने बारा मावळावर ताबा ठेवणे शक्य होते.कोंढाणा किल्ला जिंकण्याची जबाबदारी तानाजी मालुसरे यांनी आपल्या शिरावर घेतली.

रायगड जिल्ह्यातील उमरठ(पोलादपुरजवळ)गावचे असणारे तानाजी मालुसरे यांचे मुळ गाव सातारा जिल्ह्यातील,जावळी तालुक्यातील गोडोली होय.तानाजी मालुसरे छत्रपतींचे बालपणीचे सवंगडी होते.आपला मुलगा रायबा याच्या लग्नात व्यस्त असलेल्या तानाजींनी,"आधी लगीन कोंढाण्याचे मग लगीन रायबाचे" असे म्हणत कोंढाणा ताब्यात घेण्याचा विढा उचलिला.

कोंढाण्याचा किल्लेदार उदयभान राठोड हा एक शूर राजपूत होता.त्याच्या दिमतीला १५०० हशमांची फौज होती.४ फेब्रुवारीच्या रात्री(माघ वद्य नवमी)राजगडावरून निघालेले मराठा सैन्य गुंजवणी नदी पार करून सिंहगडाच्या पायथ्याला पोहचले.दिवसासुध्दा चढण्यास अवघड असणारा द्रोणगिरीचा कडा तानाजींनी कोंढाण्यावर चढाईसाठी निवडला.भयाण काळोखी रात्री मर्द मावळे दोरखंडाच्या साह्याने द्रोणगिरीचा कड्यावरून वर चढू लागले.कडा चढत असताना दोर तुटून कित्येक मावळे दरीत पडले पण शेवटी पाचशेवर मावळे कढा चढण्यात यशस्वी झाले.

मावळा

द्रोणागिरी कडा (सिंहगड), याच मार्गाने तानाजी मालुसरे आपल्या मावळ्यांसह दोरखंडाच्या सहाय्याने कोंढाण्यावर चढले होते.

किल्ल्यावर अचानक हल्ला केल्यामुळे मुघल सैनिकांत गोंधळ माजला.किल्ल्यावर मोठी हातघाईची लढाई झाली.किल्लेदार उदयभान राठोड व तानाजी मालुसरे यांच्यात मोठी लढाई झाली.लढताना हातातील ढाल तुटल्यामुळे तानाजीने डाव्या हातावर शेला गुंडाळून त्यावर तलवारीचे वार झेलेले.

शेवटी दोघेही जखमी झाल्यामुळे खाली कोसळले.तानाजी धारातीर्थी पडल्यामुळे मराठी मावळ्यांमध्ये गोंधळ उडाला,याचवेळी सूर्याजी मालुसरे आणि शेलारमामा यांनी मुख्य दरवाज्यातून प्रवेश करून निकराची लढाई करून किल्ला काबीज केला.रात्रीच्यावेळी गडावरील गवताच्या गंज्या पेटवून राजगडावर

छत्रपतींना किल्ला जिंकला गेल्याचा इशारा दिला.कोंढाणा इ.स.४फेब्रुवारी,१६७०रोजी मध्यरात्री मराठ्यांच्या ताब्यात आला. कोंढाण्याचे संपूर्ण युध्द हे रात्री झाले.

सभासदाच्या बखरीत या युध्दाचा पुढीलप्रमाणे उल्लेख आहे.तानाजी मालुसरा म्हणून हजारी मवळियांचा होता.त्याने कबूल केले की,'कोंडाणा आपण घेतो',असे कबूल करुन वस्त्रे,विडे घेऊन गडाचे यत्नास ५०० माणूस घेऊन गडाखाली गेला.आणि दोघे मावळे बरे,मर्दाने निवडून रात्री गडाच्या कड्यावरून चढवले.गडावर उदेभान रजपूत होता.त्यास कळले की,गनिमाचे लोक आले.ही खबर कळून कुल रजपूत कंबरकस्ता होऊन,हाती तोहा बार घेऊन,हिलाल (मशाल),चंद्रज्योती लावून बाराशे माणूस तोफाची व तिरंदाज,बरचीवाले,चालोन आले.तेव्हा मावळे लोकांनी फौजेवर रजपुतांचे चालून घेतले.मोठे युद्ध एक प्रहर झाले.पाचशे रजपूत ठार जाले.उदेभान किल्लेदार खाशा त्याशी व तानाजी मालुसरा यांशी गाठ पडली.दोघे मोठे योध्दे,महाशूर,एक एकावर पडले.तानाजीचे डाव्या हाताची ढाल तुटली.दुसरी ढाल समयास आली नाही.मग तानाजीने आपले डावे हाताची ढाल करुन त्याजवर वोढ घेऊन,दोघे महारागास पेटले.मोठे युध्द झाले,एकाचे हातें एक तुकडे होऊन फिरंगीच्या वारें पडले.दोघे ठार झाले.

मग सुर्याजी मालूसरा(तानाजीचा भाऊ),याने हिंमत धरून,कुल लोक सावरुन उरले राजपूत मारिले.किल्ला काबीज केला.आणि गडावर पागेचे खण होते त्यांस आग लाविली,त्याचा उजेड राजियांनी राजगडाहून पाहिला आणि बोलले की,'गड घेतला,फत्ते जाली'!असे जाहालें.तों जासूद दूसरे दिवशीं वर्तमान घेऊन आला कीं,'तानाजी मालसुरा यांनी मोठे युध्द केलें.उदेभान किल्लेदार यास मारिले आणि तानाजी मालसुरा पडला.'असें सांगितलें.गड फत्ते केला असें सांगताच राजें म्हणूं लागले की,'एक गड घेतला,परंतू एक गड गेला!'असे तानाजीसाठीं बहूत कष्टी जाहाले.

कोंढाणा किल्ला जिंकल्याची बातमी छत्रपतींना समजल्यानंतर अत्यंत दु:खी झालेल्या राजांनी"गड आला पण सिंह गेला"असे उद् गार काढले.त्यांनी कोंढाण्याचे नाव बदलून सिंहगड असे ठेवले.छत्रपतींनी आपल्या या सवंगड्याचे शव उमरठ या तानाजींच्या गावी पाठविले,ज्या मार्गावरून तानाजींचे शव गेले,तो मार्ग 'मढेघाट' या नावाने ओळखला जातो.आपल्या धन्याच्या वचनाला जागून किल्ला ताब्यात घेणारा तानाजी खरोखरच सिंह होता.

।। सिंहगडावरील तानाजी मालुसरे यांचे स्मारक ।।

मावळा

मुरारबाजी

पुरंदरचे युध्द

छत्रपती बसरूर मोहिम संपवून स्वराज्यात परत येत असताना त्यांना मिर्झाराजे जयसिंग याच्या आक्रमणाची बातमी समजली.स्वराज्यावर आलेल्या या मोठ्या संकटाशी सामना करण्यासाठी महाराज लगोलग राजगडावर पोहचले.शके १५८७ म्हणजेच १६६५ मध्ये मोगल सरदार मिर्झाराजे जयसिंग याच्या दिलेरखान या सेनापतीने पुरंदराला वेढा घातला.पुरंदरच्या माचीवर खानाचे आणि मुरारबाजीचे घनघोर युद्ध झाले.सभासदाच्या बखरीमध्ये याचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

'तेव्हा पूरंधरावरी नामजाद लोकांचा सरदार राजियाचा मुरारबाजी परभू म्हणून होता.त्याजबरोबर हजार माणूस होते.याखेरीज किल्ल्याचे एक हजारे असे दोन हजारे लोक होते.त्यात निवड करून मुरारबाजी याने सातशे माणूस घेऊन ते गडाखाली दिलेरखानावरी आले.दिलेरखान तालेदार जोरावर पठान पाच हजार याखेरीज बैईल वगैरे लोक ऐशी गडास चौतरफा चढत होती.त्यात होऊन सरमिसळ जाहले.मोठे धूरंधर युद्ध जहले.मावळे लोकांनी व खासां मुरारबाजी यानी निदान करून भांडण केले.पाचशे पठाण लष्कर ठार जाहले.तसेच बहिले मारले.'

मुरारबाजी देशपांडेचे हे शौर्य पाहून दिलेरखान बोलिला,'अरे तू कौल घे.मोठा मर्दाना शिपाई तुज नावाजितो.'ऐसे बोलीता मुरारबाजी बोलिला, 'तुझा कौल म्हणजे काय? मी शिवाजी महाराजांचा शिपाई तुझा कौल घेतो की काय?'म्हणोनि नीट खानावरी चालिला.खानावरी तलवारीचा वार करावा तो खानने आपले तीन तीर मारुन पुरा केला.तो पडला,मग खानाने तोंडात आंगोळी घातली,'असा शिपाई खुदाने पैदा केला.'

ई साहित्य प्रतिष्ठान

मिर्झाराजे जयसिंगच्या रूपाने स्वराज्यावर आलेले मोघलांचे आक्रमण, परतावण्यासाठी छत्रपती शिवरायांनी ११ जून १६६५ रोजी मिर्झाराजे जयसिंग बरोबर इतिहास प्रसिद्ध 'पुरंदरचा तह'केला.या तहान्वये तेवीस किल्ले मोघलांना द्यावे लागले.तह करून छत्रपतींनी स्वराज्यावरील संकट परतवून लावल्यामुळे तह करून सुध्दा राजे जिंकले.

।। पुरंदरावरील मुरारबाजींचे शिल्प ।।

ई साहित्य प्रतिष्ठान ®

मावळा

फिरंगोजी नरसाळा

शाहित्येखानाने स्वराज्यावर आक्रमण केल्यावर पुण्यात लालमहालात मुक्काम ठोकला.शाहित्येखानाच्या फौजा संग्रामदुर्गावर(चाकणचा भूईकोट किल्ला)चालून गेल्या.संग्रामदुर्गाचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा होता.फिरंगोजी महापराक्रमी वीर होता.

किल्ल्यावर अवघे ३००-३५० मावळे होते.पावसाळा चालू होणार म्हणून किल्ल्यावर भरपूर रसद भरली होती.मुघलांनी किल्यास वेढा घातला व किल्यावर तोफांचा भडिमार चालू केला.पण किल्ला काही दाद देत नव्हता.मुघल सैनिक किल्याच्या बुरूजाजवळ आले की त्यांना गोफनगुंडे बसत.गोफनच्या साह्याने त्यांनी मुघली सैन्यांस रक्तबंबाळ केले होते.अवघ्या ३००-३५० मावळ्यासह फिरंगोजीनी किल्ला ५५ दिवस लढविला.मुघलांना किल्यावर प्रवेश करता येईना.अखेर त्यांनी तटापर्यंत भूयार खणून किल्ल्याचा तट उडविला.किल्याची एक बाजू उघडी पडली. किल्याजवळ हातघाईची लढाई झाली.

मुघलांच्या प्रचंड सैन्यापुढे आपल्या सैन्याची वाताहत होणार ध्यानात आल्यामुळे त्यांनी माघार घ्यावयाचा निर्णय घेऊन किल्ला मुघलांच्या ताब्यात दिला व मावळ्यांचे होणारे नुकसान टाळले.कारण महाराज म्हणत,'आपण राखून गनीम घ्यावा.माणूस खराब होणार नाही याची काळजी घ्यावी.'फिरंगोजीच्या पराक्रमावर खुष होऊन राजेंनी त्याना भूपाळगडाची किल्लेदारी,एक भरजरी दुशेला व एक मानाची तलवार भेट दिली.

।। संग्रामगड , फ़िरंगोजींच्या पराक्रमाचा साक्षीदार ।।

साहित्य प्रतिष्ठान

मावळा

सुर्यराव काकडे

सुर्यराव हे,छत्रपती शिवरायांचे बालपणीचे मित्र होते.रोहिडा व जावळी सर करण्यात त्यांचा मोठा वाटा होता.शिवाजीने 'सुरराव काकडे दोन हजार हासम जावळीवर रवाना केले.'असा मोऱ्याच्या बखरीमध्ये उल्लेख आहे.सुर्यराव यांनी गाजविलेली साल्हेरची लढाई इतिहासात प्रसिध्द आहे.

शिवरायांनी १६७१ मध्ये बागलाण मोहिम काढली आणि साल्हेर जिंकून घेतला.त्या मोहिमेची वार्ता दिल्लीच्या पातशहाला मिळाली.ते एकून पातशहा कष्टी झाला,नि म्हणाला,' काय इलाज करावा,लाख लाख घोडाचे सुभे रवाना केले ते बुडवले नामोहरम होऊन आले.आता कोण पाठवावे 'तेव्हा पातशहाने 'शिवाजी जोवर जिवंत तोवर दिल्ली आपण सोडीत नाही'असा विचार केला आणि इखलासखान व बहोलोलखान यांस बोलावून वीस हजार स्वारांनिशी सालेरीस रवाना केले.

मग इखलासखानाने येऊन साल्हेरला वेढा घातला.हे वर्तमान जेव्हा राजांना कळले तेव्हा मोगलाईत पाठवलेले आपले सरनौबत प्रतापरावांना जासूदाकरवी कळविले 'तुम्ही लष्कर घेऊन सालेरीस जाऊन बेलोलखानास धारून चालविणे आण कोकणातून मोरोपंत पेशव्यांनाही हशमानिशी रवाना केले.'हे इकडून येतील तुम्हीही वरघाटी कोकणातून येणे असे दुतर्फा चालून येऊन गनिमास गर्दीस मिळवणे'अशी पत्रे पाठविली.

त्याप्रमाणे एकीकडून प्रतापराव,सुर्यराव तर दुसरीकडून पेशवे,उभयता सालेरीस आले,आणि मोठे युध्द झाले.सभासद बखरीत याचा उल्लेख् खालील प्रमाणे आढळतो ''चार प्रहर दिवस युध्द जाहले मोगल,पठाण,रजपूत,तोफांचे,हत्ती,उंट आराबा घालून युध्द जाहले.युध्द होताच पृथ्वीचा धुराळा असा उडाला की,तीन कोश औरस चौरस,आपले व परके लोक माणूस दिसत नव्हते.हत्ती रणास आले दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहले,पूर वहिले.रक्ताचे चिखल जाहले.मराठांनी इखलासखान आणि बेलोलखानाचा पाडाव केला.युध्दात प्रचंड प्रमाणावर हानी झाली.या युध्दात शिवरायांच्या एक लाख २०

साहित्य प्रतिष्ठान ®

हजार सैन्याचा समावेश होता,पैकी १० हजार माणसे कामीस आले.सहा हजार घोडे,सहा हजार उंट,सव्वाशे हत्ती तसेच खजिना,जडजवाहीर ,कापड अशी अफाट मालमत्ता शिवरायांच्या हाती आली.

या युध्दात मावळ्यांनी पराक्रमाची शर्थ केली.मोरोपंत पेशवे आणि प्रतापराव सरनौबत यांनी आणीबाणी केली.सूर्यराव काकडे यांना पराक्रम गाजवतांना आपला देह ठेवावा लागला.ते तोफेचा गोळा लागून पडले.'सूर्यराव काही सामान्य योध्दा नव्हे.भारती जैसा कर्ण योध्दा त्याचा प्रतिमेचा,असा शूर पडला.'विजयाची बातमी शिवरायांकडे गेली राजे खूप खूश झाले.खबर घेऊन आलेल्या जासूदांना सोन्याची कडी आणि प्रतापराव सरनौबत,मोरोपंत पेशवे, आनंदराव,व्यंकोजी पंत यांना अपार बक्षीस आणि द्रव्य देण्यात आले.हा पराभव दिल्लीच्या बादशहाच्या जिव्हारी लागला की सभासद म्हणतो,पातशहा असे कष्टी जाले.'खुदाने मुसलमानांची पातशाही दूर करून शिवाजीसच दिधली असे वाटते.

आता शिवाजी अगोदर आपणास मृत्यु येईल तर बरे.आता शिवाजीची चिंता जीवी सोसवत नाही.'असे बोलिले.मोगलांच्या सैन्याशी समोरासमोर लढाई करून तोपर्यंत महाराजांना विजय प्राप्त झाला होता,त्यात साल्हेरचा विजय प्रथम मानावर होता.असा मोठा विजय यापूर्वी कधीही मिळाला नव्हता.या युध्दात महाराजांच्या लोकांनी दाखवलेल्या युध्दकौशल्याची व शौर्याची किर्ती चहुकडे पसरली आणि त्यांचा दरारा अधिकच वाढला.साल्हेर जिंकल्यावर त्यासमोरील मुल्हेर किल्ला मराठांनी जिंकला आणि संपूर्ण बागलाण प्रांतावर त्यांनी आपला शह बसवला.त्यामुळे सुरत शहरास कायमची दहशत बसली.

।। सुर्यराव काकडे समाधीवरील चंद्रसुर्य ।।

चंद्रसुर्य असेपर्यंत तुमची किर्ती दिगंतात राहिल असा याचा अर्थ आहे

बाजीप्रभू देशपांडे

पन्हाळगडची लढाई

इ.स.२ मार्च १६६० रोजी सिद्दी जोहरने पन्हाळयास वेढा दिला होता यावेळी छत्रपती शिवाजीराजे पन्हाळा किल्ल्यावर अडकून पडले होते.मुसळधार पावसात सुध्दा सिद्दी वेढा सोडावयास तयार नव्हता.या कठीण प्रसंगी महाराजांनी सिध्दीस तहाचा निरोप धाडला त्यामुळे सिध्दी गाफील राहिला.शिवा काशीद नावाच्या मावळ्याने छत्रपतींच्या वेशात सिध्दी जोहर यास तहाची बोलणी करण्यात गुंतवून छत्रपतींना पन्हाळ्याहून निसटण्यास पुरेसा अवधी दिला.शिवा काशीद चे खरे रूप कळल्यावर सिध्दीने त्यांस ठार केले,तोवर छत्रपती विशाळगडाच्या वाटेवर होते.

छत्रपती शिवरायांनी पन्हाळ्यावरून,विशाळगडाकडे पलायन केल्याचे समजल्यानंतर,सिद्दीने,सिद्दी मसूदला छत्रपतींच्या मागावर पाठवले व त्यांचा पाठलाग चालू झाला.मसूदच्या सैन्याने मराठ्यांना घोडखिंडीत गाठले,अशावेळी बाजीप्रभूंनी छत्रपतींना विशाळगडावर पोहोचून तोफानी इशारा करत नाहीत तोवर ही खिंड लढवली जाईल असे सांगितले.घोडखिंडीतील अतिशय चिंचोळ्या वाटेमुळे मराठ्यांनी मसूदच्या सैनिकांची कत्तल आरंभली,शरीराला असंख्य जखमा झाल्या असतानाही बाजीप्रभू,फ़ुलाजी,संभाजी जाधव,बांदल यांनी मोठा पराक्रम गाजविला.

महाराज विशाळगडावर पोहोचल्यानंतर तोफांचा गजर झाला.इकडे घोडखिंडीत बाजीप्रभूने तोफांचा आवाज ऐकल्यानंतरच समाधानाने आपला जीव सोडला.या युध्दात मराठ्यांचे जवळपास सर्वच ३०० मावळे कामी आले तर मसूदचे जवळपास ३००० सैनिक मारले गेले.बाजीप्रभू व इतर मावळ्यांच्या पराक्रमाने घोडखिंड पावनखिंड म्हणून इतिहासात अमर झाली.

मावळा

।। पन्हाळगडावरील बाजीप्रभुंचे शिल्प ।।

ई साहित्य प्रतिष्ठान

मावळा

ई पुस्तकाचे लेखन – श्री दामोदर मगदूम

संशोधक अभियंता असलेल्या दामोदर मगदूम यांची ओळख

इतिहासाचे अभ्यासक,दुर्गप्रेमी,निसर्गछायाचित्रकार अशीही आहे. डी.वाय.पाटील अभियांत्रिकी कॉलेजमधून इलेक्ट्रॉनिक्सची पदवी प्राप्त केल्यानंतर,भारतीय अवकाश संशोधन संस्था(इस्त्रो) अहमदाबाद येथे संशोधन केले.उपग्रह दळणवळणातील उच्च पदवी प्राप्त केली,याच कालखंडात त्यांना अनेक सन्मान प्राप्त झाले.

त्यांना उपग्रह दळणवळणातील संशोधनासाठी इंटरनॅशनल युनियन ऑफ रेडिओ सायन्स,बेल्जियमचा यंग सायंटिस्ट पुरस्कार मिळाला,त्याच बरोबर इंडियन सायन्स कॉंग्रेसचा पुरस्कार मिळाला.मा.राष्ट्रपती डॉ.कलाम यांच्याकडून त्यांचा राष्ट्रपती भवनात विशेष गौरव झाला.त्याचबरोबर इतर अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत.

नुकताच त्याच्या मराठी देशा या संकेतस्थळाला महाराष्ट्र शासनाचा सर्वोकृष्ट मराठी संकेतस्थळाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.सध्या ते माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या संस्थेमध्ये कार्यरत आहेत.

अधिक माहितीसाठी खालील ईमेलवर संपर्क करावा
www.marathidesha.com
marathidesha@gmail.com
मोबाईल :9421051889

दोस्त...!!

हे पुस्तक कसं वाटलं ? आवडलं? अजून या विषयावर वाचायला आवडेल?

हे पुस्तक www.marathiriyasat.com या मेगासाईटचा एक भाग आहे. मराठ्यांचा दैदिप्यमान इतिहास आहे, मराठ्यांनी अटकेपार झेंडे गाडले, मराठ्यांनी स्वराज्य ही कल्पना भारतात प्रथमच सिद्ध केली. पण हे फ़क्त म्हणण्यापुरतं झालं. हा इतिहास आताच्या किती तरुणांना माहिती असतो. या इतिहासातले असंख्य शिलेदार आहेत ज्यांची नांवेसुद्धा आज लोकांना माहित नाहीत. बाजी पासलकर आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्यातला फ़रकही आजच्या तरुणांना माहित नाही. आपला हा भव्य इतिहास आपल्या आजच्या पिढीला कळला पाहिजे. आपल्या शरीरात दौडणाऱ्या रक्तात कोणता DNA आहे ते या तरुणांना कळायलाच हवे. पण कसे? हे काम करणार कोण? कोणी एकटा दुकटा हे करू शकेल का?

ई साहित्य प्रतिष्ठान या संस्थेने हा विडा उचलला आहे. मराठी देशा, गडवाट अशा अनेक वेबसाईट्सच्या सहाय्याने मराठी रियासत ही एक भव्य वेबसाईट उभी रहात आहे. या वेबसाईट मध्ये प्रत्येक शिलेदाराची ओळख असेल. प्रत्येक युद्धाची आणि तहाची माहिती असेल. प्रत्येक किल्ल्याची इत्थंभूत माहिती असेल. चाळीस तरुण लेखकांची एक फ़ौज, मोठ्या इतिहासकारांच्या मार्गदर्शनाखाली असे अभ्यासपूर्ण लेख आणि पुस्तके लिहून या वेबसाईटवर सादर करणार आहेत. ई साहित्य प्रतिष्ठानचया सव्वा लाख वाचकांच्या भॆटीला हे सर्व येत आहे.

आपण यात सहभागी होऊ इच्छिता. काही लिहू इच्छिता? काही माहिती देऊ शकता? फ़ोटो? चित्रे? आपल्या मित्रांना यात सामिल करू इच्छिता?

कृपया लिहा : esahity@gmail.com

वेबसाईटला भेट द्या : www.marathiriyasat.com

ई साहित्य प्रतिष्ठानच्या संपूर्ण माहितीसाठी www.esahity.com

साहित्य प्रतिष्ठान
शंभुराजे
लेखक
दामोदर मगदुम

ई पुस्तक	"शंभूराजे"
प्रकाशक	ई साहित्य प्रतिष्ठान
	छ. संभांजी महाराजांची ३५५ वी जयंती
ई आवृत्ती	१४ मे २०१२
लेखक	श्री. दामोदर मगदूम, कोल्हापूर
संकल्पना आणि संकलन	सचिन काकडे ,मुंबई
मुखपृष्ठ	अमृता ढगे , अंबरनाथ

esahity@gmail.com

।।अर्पणपत्रिका।।

“शंभूराजे” हे ई-पुस्तक नृपशंभूंच्या कवी मनाला अर्पण

esahity@gmail.com

दोन शब्द. . .

श्री शंभोः शिवजातस्य, मुद्रा द्यौरिव राजते ।
यदंकसेविनो लेखा, वर्तते कस्य नोपरि ।।

छत्रपती शिवाजी राजे यांचे पुत्र श्री. संभाजी राजे यांची मुद्रा आकाशाप्रमाणे शोभत आहे. तिचे अंकसेवन करणा-यांचा (आधार घेणा-यांचा) पगडा सगळ्यांवर पडेल.

छत्रपती संभाजीराजे, ज्यांचे वर्णन सिंहाचा छावा म्हणुन शोभते. आठ भाषांचा जाणकार असणारा हा महाराजा, ज्यांनी 'बुधभुषणम' हा संस्कृत तर 'नायिकाभेद' 'नखशिख' 'सातसतक' हे ब्रजभाषेतील तीन ग्रंथ लिहिले. हा थोर राजा जसा लेखणीतही श्रेष्ठ होता तसा तो रणांगणात श्रेष्ठ होता. बुध्दिमता आणि शौर्य श्री शंभूराजामध्ये भरले होते. आपल्या ९ वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी स्वराज्याचा विस्तार दुप्पट केला, स्वराज्यातील एकही किल्ला गमावला नाही. मराठ्यांचे आरमार शक्तीशाली केले. कर्नाटकातील मराठी राज्य वाढविले, पोर्तुगीजांचे तीन चतुर्थांश राज्य जिंकले, औरंगजेबाच्या सैन्याची दाणादाण उडविली, असा हा छावा . छत्रपती संभाजीराजे एकाच वेळी मोघल, इंग्रज , पोर्तुगीज, सिध्दिशी लढत होते.

श्री शंभूराजांचे निष्कलंक व्यक्तीत्व समजण्यासाठी, शंभूराजानी लिहिलेला खालील श्लोक पुरेसा आहे.
(बुधभूषणम, अध्याय दोन, श्लोक ४२२) यात त्यांनी राजाचे सात दोष वर्णिलेल आहेत.

व्यसनादि च सर्वाणि भूपतिः परिवर्जयेत ।
सप्तदोषा सदा राज्ञा हातच्या व्यसनोदयाः ।।४२२।।

हे सात दोष पुढीलप्रमाणे आहेत, वादण्ड, पारुष्य, दुरयातंच , पान, स्त्री, मृगया आणि दयुत, शंभूराजे यांनी राजांना या सात दोषापासून दूर रहावयास सांगितले आहे.

श्री शंभूराजांनी बुधभूषण या आपल्या संस्कृत ग्रंथात पानापानावर असे विचार मांडलेत त्याकाळी राजाकडे जनानखाना असणे प्रतिष्ठेचे असताना शंभूराजांनी त्याचा निषेध केला तसेच बहूपत्नीत्व नाकारले. महाराणी येसूबाईंना स्वतंत्र राज-मुद्रा देऊन राज्यकारभारामध्ये सामील करून घेतले. अशा थोर सेनानीचे कर्तुत्व झाकण्याचा प्रयत्न पेशवेकालीन बखरकारांनी केला. संभाजी राजांच्या कर्तुत्वाचे विकृतीकरण करणारी मल्हार रामराव चिटणीसांची बखर , संभाजी राजांच्या मृत्यूनंतर १२२ वर्षांनी , सन १८११ साली लिहिली गेली. मल्हार रामराव चिटणीसांचे खापरपणजोबा बाळाजी आवजी चिटणीस यांस संभाजीराजेंनी स्वराज्यद्रोहाच्या आरोपाखाली हत्तीच्या पायी दिले होते , त्याची मनात अढी ठेऊन मल्हार रामराव यांनी बखर लिहिली. आजच्या युगातील काही तथाकथित विद्वान लेखक, नाटककार, इतिहासकारसुध्दा संभाजीराजांच्या कर्तुत्वाचे विकृतीकरण करण्यात आघाडीवर आहेत. संभाजीराजांच्या पराक्रमाची गाथा या ई-पुस्तकाद्वारे आम्ही आपल्यापुढे मांडत आहोत.

लेखक-श्री. दामोदर मगदूम.

esahity@gmail.com

छत्रपती संभाजी महाराज . . .

सह्याद्रिचा छावा नृपशंभू राजा. . .

छत्रपती संभाजीराजेंचा जन्म इ.स. १४ मे, १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. संभाजीराजांच्या मातोश्री सईबाईंचे निधन संभाजीराजाच्या लहान वयात झाले. त्यामुळे पुरंदर किल्ल्याच्या जवळ असलेल्या कापूरहोळ गावातील 'धाराऊ' राजेंच्या दुधाई झाल्या. लहानपणापासूनच बुध्दिमान असलेल्या संभाजीराजेंनी युध्दाचे डावपेच , राजकारण लवकर आत्मसात केले.

।।किल्ले पुरंदर।।.

छत्रपती शिवरायांनी संभाजीराजे अवघे ९ वर्षाचे असताना त्यांना आग्रा भेटीसाठी सोबत नेले. आग्रा भेटीवेळी संभाजी राजेंनी मोघलांची पंचहजारी मनसबदारी मिळाली होती. त्यामुळे जेव्हा औरंगजेबाने कपटाने छत्रपती शिवरायांना कैदेत टाकले त्यावेळी संभाजीराजेंचा, छत्रपती शिवरायांना खुप उपयोग झाला.

सन १६७४ साली राज्याभिषेकानंतर १२ दिवसात जिजाउंचे निधन झाले. त्यामुळे संभाजीराजे पोरके झाले. तर छत्रपती राजारामाच्या जन्मामुळे सोयराबाई संभाजीराजेंकडे दुर्लक्ष करु लागल्या. संभाजीराजे अत्यंत देखणे व शूर होते, त्यांना भ्रष्टाचार खपत नसे. शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळीतील अण्णाजी दत्तोंसारख्या काही मंड्ळीचा भ्रष्टाचार संभाजीराजेंनी उघडकीस आणल्यामुळे ते संभाजी राजेंविरुध्द गेले. शिवरायांनंतर जर संभाजीराजे गादीवर आले तर आपले काही खरे नाही असे अष्टप्रधानातील भ्रष्ट लोकांना वाटू लागले. त्यामुळे

esahity@gmail.com

त्यांनी महाराणी सोयराबाईंना फूस लावून शिवरायांनंतर छोट्या राजारामाला गादीवर बसविण्याचे मनोरथ आखले.

छत्रपती शिवरायांनी जेव्हा दक्षिण भारतातील मोहिम आखली, तेव्हा त्यांनी संभाजीराजेंना सोबत नेण्याचा विचार केलेला होता, जेणेकरुन संभाजी राजेंना मोहिमेचा अनुभव येईल. पण छत्रपतीसोबत गेल्यावर राजेंचे कर्तुत्व शिवरायांच्या नजरेत भरेल व राजा म्हणुन ते संभाजीराजेंची निवड करतील असे वाटल्याने, अष्टप्रधान मंडळीनी.
सोयराबाईंकरवी महाराजांना, संभाजीराजेंना सोबत नेण्यास विरोध दर्शविला. महाराज त्या सर्वापुढे हतबल झाले व त्यांनी राजेंना शृंगारपूरचे सुभेदार म्हणुन पाठविले

शृंगारपूरचे शुभेदार

छत्रपती दक्षिण मोहिमेला गेल्यानंतर अष्टप्रधानांची कारस्थाने सुरु झाली. इकडे शृंगारपूरच्या निसर्गरम्य वातावरणात संभाजीराजेंतील कवी, लेखक जागा झाला. बुधभुषणम हा संस्कृत तर 'नायिकाभेद' 'नखशिख' 'सातसतक' हे ब्रजभाषेतील तीन ग्रंथ त्यांनी याच कालावधीत लिहिले. यावेळी त्यांना कवी कलश यांची चांगली साथ लाभली. शृंगारपूर परिसरात दुष्काळ पडल्यामुळे रयतेकडून एक वर्ष करवसुली न करण्याचा संभाजीराजेंनी निर्णय घेतला. पण अष्टप्रधानांनी संभाजीराजेंचा हुकुम पाळण्यास नकार दिला. संभाजीराजे राज्य चालविण्यासाठी अयोग्य आहेत, असा प्रचार अष्टप्रधान मंडळींनी आरंभिला, तशी पत्रे त्यांनी कर्नाटकात मोहिमेवर असलेल्या छत्रपतींना पाठविली.

आपल्या निर्णयाला स्वराज्यात किंमत नाही, असा समज झाल्याने संभाजीराजे निराश झाले. अशातच दिलेरखानाने संभाजीराजेंना पत्र पाठवुन आपल्याकडे येण्याचा निरोप दिला. मुघलांना मिळुन त्यांची गुपिते मिळवावी असा विचार करुन त्यांनी मुघलांना सामील व्हायचा निर्णय घेतला. सभासदाच्या बखरीमध्ये याचे पुढीलप्रमाणे वर्णन आहे.

'इतकियात संभाजीराजे राजियाचे पुत्र जेष्ठ राजियावर रुसुन मोघलाईत गेले'.

दिलेरखानाने संभाजीराजेंना ढाल करुन भुपाळगडावर हल्ला केला. शत्रुपक्षात संभाजीराजे असल्याने किल्लेदार फ़िरंगोजी नरसाळा तसेच इतर मावळ्यांनी शरणागती पत्करली. संभाजीराजेंनी सर्व मावळ्यांना सुखरुप जाऊ देण्याची मागणी दिलेरखानाकडे केली. पण दिलेरखानाने सर्वच मावळ्यांचे एक हात कलम करण्याचा आदेश दिला , तसेच त्याने आदिलशाहाच्या ताब्यातील अथणीवर हल्ला करून तेथील जनतेचा अनन्वित छळ केला. मोघलांना सामील होऊन आपण चूक केल्याचे संभाजीराजांना कळल्याने मोघलांच्या तावडीतून निसटून ते विजापुर मार्गे पन्हाळा किल्ल्यावर येऊन दाखल झाले.

॥ किल्ले पन्हाळा ॥

छत्रपती शिवरायांची व संभाजीराजेंची ऐतिहासिक भेट

छत्रपती शिवरायांना कर्नाटकाच्या मोहिमेवर असताना संभाजीराजे स्वराज्यात परत आल्याची वार्ता समजल्यानंतर ते त्वरेने संभाजीराजेंना भेटावयास पन्हाळा किल्ल्यावर आले. तो ऐतिहासिक दिवस होता १३ जानेवारी १६८०. संभाजीराजेंची पन्हाळा किल्ल्याचा सुभेदार म्हणुन नेमणूक करून ते रायगडला परतले.

रायगडावर आल्यानंतर छत्रपतींनी ७ मार्च, १६८० या रोजी राजारामाची मुंज केली. तर १५ मार्च १६८० रोजी, प्रतापराव गुजरांची कन्या जानकी बाई हिच्याशी राजाराम यांचा विवाह केला. मनात अढी असल्याने सोयराबाईंनी संभाजीराजेंना या विवाहासाठी बोलविले नाही.

राजारामाच्या विवाहानंतर काही दिवसातच, ३ एप्रिल १६८० या रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचे निधने झाले. महाराजांच्या निधनाची बातमी संभाजीराजेंना न कळवता, लहान असलेल्या राजारामला राज्याधिकारी करण्याचे अष्टप्रधान मंडळी व राणी सोयराबाईंणी ठरविले. महाराजांच्या मृत्युनंतर अठरा दिवसांनी, २१ एप्रिल रोजी राजाराम महाराजांचे रायगडावर त्यांनी मंचकारोहन केले.

अष्टप्रधानांची कारस्थाने

राजारामाचे मंचकारोहन झाल्यानंतर , प्रधान मंडळींनी सरसेनापती हंबीररावांस , ‘आम्हांस मिळुन राजारामाचा कार्यभाग साधावा’ या आशयाचे पत्र धाडले. हंबीरराव मोहिते हे सोयराबाईचे सख्खे बंधु होते त्यामुळे आपल्या भाच्यासाठी ते आपल्या कटात सामील होतील असे अष्टप्रधान मंडळींना वाटले.

मोरोपंत , प्रल्हाद निराजी आणि अण्णाजी दत्तो या मंडळींनी संभाजीराजेंना अटक करण्यासाठी रायगडाहुन पन्हाळा किल्ल्याकडे प्रस्थान केले. वाटेत कराड जवळ हंबीरराब मोहिते यांना सोबत घेऊन संभाजीराजेंना कैद करावयाचा त्यांचा मानस होता. पण कराडच्या छावणीत आल्यानंतर हंबीरराव मोहित्यांनी या प्रधान मंडळींनाच कैद करून कोल्हापूरला, पन्हाळा किल्ल्याकडे कूच केली.

संभाजीराजे हेच खरे गादीचे वारस आहेत तसेच मोघलांच्या प्रचंड असा फ़ौजेशी सामना करण्याची ताकद फ़क्त संभाजीराजेंकडे आहे. हे हंबीररावांना माहित होते . त्यातच मोघल सुभेदार बहादुर खान स्वराज्याच्या तोंडाशी आला होता. अशावेळी राजारामाला गादीवर बसवून स्वराज्याचा आत्मघात करण्यासारखे होते. या कठीण समयी संभाजीराजेंसारख्या खंबीर राजाची स्वराज्याला आवश्यकता होती . हे जाणुन हंबीरमामा सारखा मुत्सद्दी सेनानी संभाजीराजेंच्या बाजुने उभा राहिला. सेनापती संभाजीराजेंकडे गेल्यामुळे प्रधान मंडळींचे सर्व कारस्थान धुळीस मिळाले. पन्हाळा किल्ल्यावर मोठ्या उदार मनाने संभाजीराजेंनी या सर्व मंडळींना माफ़ केले.

esahity@gmail.com

संभाजीराजेंचा राज्याभिषेक

पन्हाळा किल्ल्याहून रायगडला रवाना होताना संभाजीराजेंनी स्वराज्यातील सर्व किल्ल्यावर दारुगोळा, धनधान्य, पाठविण्याची व्यवस्था केली . किल्ल्याची मजबूती करण्याकडे सर्व किल्लेदारांना लक्ष द्यावयास सांगून आवश्यक साधनसामग्री प्रत्येक किल्ल्यावर पाठविली. यानंतर संभाजीराजेंनी रायगडला प्रस्थान केले. रायगडची जनता आपल्या राजाचं स्वागत करावयास गडावर हजर होती. सन १६ जानेवारी १६८१ रोजी संभाजीराजेंचा राज्याभिषेक किल्ले रायगडावर झाला या प्रसंगी त्यांनी सर्व अष्टप्रधान मंडळींना माफ़ केले व परत सर्वांस अष्टप्रधानात स्थान दिले . पण पुन्हा काही महिन्याने या मंडळींनी बंडाळी केली, तेव्हा ही कायमची बंडाळी मोडून काढण्यासाठी अष्टप्रधान मंडळात असलेल्यांपैकी अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी चिटणीस त्यांचा मुलगा आवजी बल्लाळ आणि हिरोजी फ़र्जंद या सर्वांना छत्रपती संभाजींनी सुधागड परिसरात असणा-या परली गावात हत्तीच्या पायी दिले.

।। किल्ले सुधागड ।।

esahity@gmail.com

बु-हाणपूरची मोहिम

शत्रू तोंडाला आल्यामुळे ती वेळ स्वस्थ बसण्याची नव्हती. संभाजीराजेंनी लगेच बु-हाणपूरची मोहिम आखली. बु-हाणपूर हे मोघल राजवटीतील सुरतेनंतर असणारे दुसरे सधन शहर होते. त्यामुळे हे शहर लुटून मोघलांचे आक्रमण उधळून लावण्यासाठी , हंबीरराव मोहिते यांनी बु-हाणपूरवर चाल केली. मोघलांचा इतिहासकार खाफ़िखान याने या लुटीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

बु-हाणपूर शहराच्या बाहेर बहादूरपुरा आणि इतर सात पुरे होते, मराठ्यांनी ते पुरे घेरले. मराठ्यांनी शहरावर इतक्या अनपेक्षितपणे हल्ला केला की , शहरातील लोकांना एकही पैसा हलवता आला नाही. देशोदेशीचे जिन्नस , जडजवाहीर, सोने- नाणे , रत्ने यांनी भरलेली बाजारपेठ मराठ्यांनी लुटली.

मोघलांशी लढा

सन १६८१ साली औरंगजेबाचा पुत्र शहजादा अकबर , औरंगजेबाविरुध्द बंड करुन संभाजीराजेंना येऊन मिळाला. मराठ्यांचे राज्य जिंकणे आणि शहजादा अकबरास शासन करणे हे दोन हेतु मनात ठेऊन औरंगजेबाने दक्षिण मोहिम आखली. प्रचंड सैन्यासह व नामांकित सेनानींना घेऊन त्याने दक्षिणेला कूच केली. वाटेतील गावागावात विध्वंस करत तो नोव्हेंबर १६८१ च्या सुमारास औरंगाबादला पोहोचला. नासिकजवळ असलेल्या रामसेज किल्ल्याला मोघल सेनानी शहाबुद्दीनखानने वेढा दिला.

सिद्दिचा बंदोबस्त

मोघलांचे स्वराज्यावर आक्रमण आले होते याचा फ़ायदा घेऊन सिद्दिने कोकणकिनारपट्टीवर खूप उच्छाद मांडला होता. सिद्दिला मोघल, इंग्रज व पोर्तुगीज यांची मदत मिळत होती. १६८२ मध्ये संभाजी राजांनी सिद्दीचा कायमचा बंदोबस्त करण्याचा निश्चय केला. प्रथम संभाजीराजेंनी सिद्दीच्या हबशी मुलखावर हल्ला करुन तो जिंकुन घेतला कारण सिद्दिला तेथून रसद मिळत होती.

राजापुरी गावातुन नजरेच्या टप्प्यात असलेल्या जंजिरा किल्ल्याला दर्यात बुडविण्याचा विचार करून संभाजीराजेंनी आक्रमण केले. पण किल्ल्याच्या बुरुजापर्यंत मराठ्यांच्या तोफ़ेचा मारा पोहोचत नसल्यामुळे जंजिराच्या बुरुज शाबुत होता. सिद्दी खैरतने किल्ल्याचा बंदोबस्त मोठा चोख ठेवला होता. सिद्दी खैरतच्या कलाल बांगडी, लांडा कासम, चावरी या मोठ्या तोफ़ांच्या मा-यापूढे मराठ्यांची गलबते दर्यात बुडत होती.

अशा वेळी संभाजीराजेंनी धाडशी निर्णय घेऊन, ओहोटीच्या वेळी समुद्रात भराव टाकून पुल बांधण्याचे ठरविले, जेणेकरुन तोफ़ेचा मारा जंजिराच्या बुरुजापर्यंत पोहोचेल. समुद्रात काही अंतरावर भराव टाकल्यानंतर मराठ्यांनी आपल्या मोठ्या तोफ़ा काढुन किल्ल्यावर मारा चालु ठेवला त्यामुळे किल्ल्याचा बुरुज कोसळुन किल्ल्यामध्ये ठिकठिकाणी आग लागली. रात्रीच्या वेळी सिद्दि खैरत व कासम किल्ला सोडुन इंग्रजांच्या आश्रयाला मुंबईला पळून गेले. किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला असे वाटले असतानाच मोघल सरदार हसन अलिखान कल्याणमार्गे रायगडच्या दिशेने येत असल्याचे समजल्यामुळे संभाजीराजेंना ही मोहिम अर्धवट सोडावी लागली. पण संभाजी राजेंनी जंजिरा खिळखिळा केल्यामुळे , सिद्दिने पुन्हा मराठी मुलुखात पाय टाकण्याचे धाडस केले नाही. संभाजीराजेंनी एकाच वेळी मोघल , सिद्दी , इंग्रज, पोर्तीगीज यांच्याशी लढ़त होते.

॥ किल्ले जंजिरा ॥

रामसेजचा ऐतिहासिक लढा

इकडे नासिकच्या जवळ असलेल्या रामसेज किल्ल्याला मोघल सेनानी शहाबुद्दिनखानने वेढा दिला होता. औरंगजेबाला वाटले कि काहि तासातच किल्ला पडेल पण किल्ला जिंकायला त्याला तब्बल साडेसहा वर्षे लागली. या कालावधीत त्याने वेगवेगळे सेनानी किल्ला जिंकावयास पाठविले. रामसेजचा किल्लेदार सुर्याजी जेधे हा मोठा पराक्रमी होता. मराठ्यांनी हा किल्ला झुंजवत ठेवला. किल्ल्याला घातलेला वेढा मारण्यासाठी रुपाजी भोसले, मानाजी मोरे, हंबीरमामा यांना संभाजीराजेंनी पाठविले. या कालावधीत स्वतः संभाजीराजेंनी किल्ल्या वर रसद पुरविली. अखेरीस किल्ल्यावरची रसद संपल्यामुळे मराठ्यांनी किल्ला सोडुन दिला.

याच सुमारास संभाजीराजेंनी गोव्याचे पोर्तुगीज आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय यांच्याविरुध्द आघाडी उघडण्याचा निर्णय घेतला. मराठ्यांचे राज्य जिंकण्यात येत असलेल्या अपयशामुळे औरंगजेबने आदिलशाही जिंकून घेण्याचा विचार केला.

॥ किल्ले रामशेज ॥

म्हैसूरकर चिक्कदेवराजाचा बंदोबस्त

मराठ्यांची जहागीर एंकोजीरावांनी बंगलोरहून, तंजावरला हलविल्यापासूण म्हैसूरकर चिक्कदेवराजा खूप माजला होता. त्याचा बंदोबस्त करणे गरजेचे होते. रामसेजचा लढा चालू असल्यामुळे औरंगजेब नजीकच्या कालखंडात घाटमाथ्यावर उतरण्याची शक्यता कमी होती. त्यातच पावसाळ्याचे दिवस जवळ आले होते. औरंगजेबाबरोबरच्या निर्णायक युद्धात कर्नाटक, तामिळ प्रातांतुन येणारी रसद महत्वाची ठरेल हे संभाजीराजेंनी ओळखले होते. कर्नाटक, तामिळ प्रातांतील जहागीर त्यासाठी शाबुत ठेवणे गरजेचे होते. त्यामुळे संभाजीराजेंनी कर्नाटक, तामिळ प्रातांवरील मोहिमेचा बेत आखला.

चिक्कदेवराजाची ताकद पहिल्यापेक्षा वाढल्यामुळे म्हैसूरवर हल्ला करणे संभाजीराजेंना योग्य वाटले नाही. त्यामूळे शत्रुला गुहेतुन बाहेर काढुन त्याबरोबर लढ़ावे असा विचार त्यांनी केला, तामिळ प्रांतातील चिक्कदेवराजाच्या ताब्यात असलेल्या त्रिचनापल्लीच्या (सध्याचे त्रिची शहर) पाषाणकोट किल्ल्यावर आक्रमण करण्याचा निर्णय घेतला.

संभाजीराजेंच्या सोबतीला बसप्पा नाईक ह्क्केरी , गोवळकोंड्याचा दिवाण मादण्णा पंडीत तसेच तंजावरच्या एंकोजीरावांच्या सैन्याची कुमक होती. पहाटेच्या सुमारास होडीचा आधार घेत संभाजीराजेंच्या सैन्याणे दुथडी भरुन वाहणा-या कावेरी नदीत घोडी घालुन कावेरीचा किनारा गाठला. मराठ्यांच्या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे शहरात अफ़रातफ़री माजली. संभाजीराजेंनी पाषाणकोट किल्ल्यावर जोरदार हल्ला चढविला. गडावरील मदुरेकर नायकाच्या शिबंदीने जोरदार प्रत्युत्तर दिले. पण शेवटी कवी कलशाच्या नेतृत्वाखाळी तिरंदाजांच्या पेटत्या बाणांनी किल्ल्यावरील दारुगोळ्याला आग लागुन बुरुज उडाला व अखेर किल्ला मराठ्यांचा ताब्यात आला.

संभाजीराजेंनी चिक्कदेवराजाकडून मोठी खंडणी वसूल केली. या कालावधीत संभाजीराजेंनी कर्नाटक व तामिळ प्रातांत मोठा मुलुख मारला. या प्रांतातील बावीस किल्ले मराठ्याचंचा ताव्यात आले. मोठी खंडणी तसेच रसद स्वराज्याला मिळाली. कर्नाटकातील धर्मपुरी - होसुर पासुन तामिळ प्रांतातील जिंजी वेलुरापर्यंतचा प्रदेश मराठ्यांच्या घोड्याच्या टापाखाली आला.

।। त्रिचिचा पाषाणकोट किल्ला।।

संगमेश्वरला दगा

सन १६८५ साली एप्रिल महिन्यात मोघलांच्या सैन्याने विजापूरला वेढा घातला. औरंगजेबाजा शहजादा आज्जम याने हा वेढ़ा आणखी मजबूत केला. विजापुर वाजविण्यासाठी संभाजीराजेंनी आपले विश्वासू छंदोगामात्य कवी कलश यांना आदिलशाहाच्या मदतीस पाठविले. पण अखेरीस १२ सप्टेंबर १६८६ साली विजापूर मोघलांच्या ताव्यात पडले.

आदिलशाही जिंकल्यामुळे आता औरंगजेबला कोणताही शत्रु उरला नाही. त्याने आता पुर्ण शक्तीनिशी मराठी मुलुखावर वेगवेगळ्या आघाड्या उघडल्या. शत्रु अगदी रायगडाच्या पायथ्याशी आला होता. अशातच सन १६८७-८८ साली पडलेल्या दुष्काळाने रयतेचे हाल झाले. संकटे चोहोबाजुंनी आलेली होती, या संकटांच्या समयी स्वराज्यातील अनेक सरदार , वतनाच्या आशेने मोघलांना मिळाले होते यामध्ये खुद्द शिवरायांचे जावई गणोजी शिर्के , महादजी निंबाळकर आणि हरजीराजे महाडीक होते. समय खूप कठीण होता अशा वेळी पुढील

रणनीती ठरविण्यासाठी संभाजीराजेंनी सर्व सरदारांना बैठकीसाठी कोकणात संगमेश्वर येथे बोलविले यावेळी कोकणात यावयाच्या सर्व वाटांवर संभाजीराजेंनी बंदोबस्त ठेवला होता.

संगमेश्वरची बैठक संपवुन रायगडला निघतेवेळी, हेरांनी संगमेश्वरवर, संभाजीराजेंचा मेहुणा गणोजी शिर्के आणि औरंगजेवचा सरदार मुकर्रबखान यांनी हल्ला केल्याची बातमी आणली. गणोजी शिर्के हा पुर्वी शृगारपुरचा वतनदार होता त्यामुळे त्याला या भागातील दुर्गम वाटांची माहिती होती. याच दुर्गम वाटांनी तो मोघली सैन्याला घेऊन आला होता.

त्यावेळी संगमेश्वरला संभाजीराजेंसोबत महाराणी येसुबाई होत्या. अवघे चारशे-पाचशे सैन्य यावेळी राजांसोबत होते. शत्रुने अचानक हल्ला केल्याने मोठी हातघाई झाली. यासमयी येसूवाईंना , धनाजी जाधव व काही सैन्यासह त्यांनी पुढे पाठविले. शत्रुला गुंगारा देण्यासाठी संभाजीराजे, कवि कलश व काही निवडक साथीदार दुर्गम वाटेने गेले. पण याभागातील वाटांची माहिती गणोजी शिर्केस असल्याने ते पकडले गेले. संभाजीराजेंना त्यांच्या सहकायासह पकडुन दुर्गम जंगलातील वाटेने नेण्यात आले. वाटेत जाताना ते ओळखु नयेत म्हणुन सर्वांचे केस कापले गेले, तोंड बांधले गेले.

संभाजीराजेंची क्रुर हत्या

संभाजीराजे आणि कवि कलश यांची धिंड काढुन त्यांना औरंगजेबासमोर हजर करण्यात आले. या घटनेबद्दल मोघलांचा इतिहासकार खाफ़िखान लिहितो, “संभाजी व कवीकलश यांची धिंड जेव्हा परतली तेव्हा औरंगजेबने आपला दरबार भरवला आणि या कैद्यांना दरबारात आणले. त्यांना पाहताच औरंगजेब तख्तावरुन खाली उतरला. ईश्वराच्या या उपकाराप्रित्यर्थ दोन रुकात पढल्या. औरंगजेब गुडघे टेकुन ईश्वराची प्रार्थना करीत होता. हे पाहिल्यानंतर कवी कलश संभाजीराजेंकडे पाहून म्हणाला,

‘राजन हो तुम सॉंच खरे, खूब लढे तुम जंग ।

देखत तव चंडप्रताप जही, तखत त्यजत औरंग ।

हे संभाजीराजा तू सच्चा वीर आहेस, तुच जबरदस्त योध्दा आहेस. तुझा हा प्रचंड पराक्रम पाहून स्वतः औरंगजेबाने आपले राजसिंहासन त्यागून तुझ्यापुढे तो नतमस्तक झाला आहे.

संभाजीराजेंच्या मृत्युबद्दल ‘आलमगीर विजय’ या फ़ारशी ग्रंथात (हा औरंगजेबाचा मुख्य न्यायाधीश शेख उल इस्लाम याचा कारकून असलेल्या ईश्वरदास नागर याने लिहिलेला आहे) पुढीलप्रमाणे लिहिले आहे. “बादशाहाच्या आज्ञेने, इखलासखान आणि बहादूरखान हे संभाजीराजे, कवी कलश व इतर साथीदारांना घेऊन बादशहाच्या छावणीजवळ आले. बादशहाच्या आज्ञेवरुन या सर्वांची उंटावरुन धिंड काढण्यात आली. त्यानंतर त्यांना छावणीजवळ आणण्यात आले. इखलासखान आणि हमीदुद्दीन खान यांनी संभाजीराजेंना बादशहास ताजीम देण्यास सांगितले पण संभाजीराजेंनी त्यांचे ऐकले नाही. संभाजीराजे, कवी कलश व इतर साथीदारांच्या पायात बेड्या ठोकण्याचा बादशहाने आदेश दिला.

बादशहाने रहुल्लाखान करवी, मराठेशाहीतील खजिनाबद्दल तसेच बादशहाच्या सरदारापैकी ज्यांचे संभाजीराजेंशी संबध होते याची माहिती काढण्याचा खुप प्रयत्न केला पण संभाजीराजेंनी काही सांगितले नाही. अखेरच्या कालखंडात संभाजीराजे, कवी कलश व त्यांच्या सहका-यांचे खुप हाल करण्यात आले. सर्वांनी अन्नाचा त्याग केला. शेवटी चिडून जाऊन बादशाहाने पुण्याजवळील मौजे तुळापूर येथे सर्वांची क्रुर अशी हत्या करण्यात आली. हत्येनंतर संभाजीराजेंच्या शरीराचे अवषेश गोळा करून त्यांच्यावर अत्यंसस्कार केल्यावर वढू बुदुक येथील रयतेने त्यांची समाधी बांधली.

॥ तुळापूर ॥

छत्रपती संभाजीराजेंचा जीवनपट

१६७५	माघ वद्य ५ संभाजीराजांची मुंज झाली
१६७६	६ऑक्टोबर(अश्विन विजयादशमी) शिवाजीराजे कर्नाटक स्वारीवर रवाना ,संभाजीराजे शृंगारपुरला रवाना
१६७६	राजापुर वखार संदर्भात तडजोडीचे काम संभाजीराजेंवर
१६७७	१ ऑक्टोबर १६७७ इंग्रजाकडून आपल्या पत्रात संभाजीराजेंची स्तुती
१६७८	२३ मार्च शृंगारपुरला कविकलश ,शिवयोगी व इतर उपासक यांच्याकडून संभाजीराजेंना कलशाभिषेक
१६७८	एप्रिल छत्रपती शिवरायाचा दक्षिणेत प्रचंड दिग्विजय
१६७८	सप्टेंबर संभाजीराजे व येसुबाईंना शृंगारपुरला कन्यारत्न(नाव भवानीदेवी)
१६७८	३ सप्टेंबर(कार्तिक) छत्रपती शिवरायांच्या सांगण्यावरून संभाजीराजे परळीकडे रवाना
	३ डिसेंबर (मार्गशीर्ष) कृष्णा-वेण्णा संगमावरून (संगम माहुली) दिलेरखानाकडे रवाना
	१३ डिसेंबर कुरकूंभ येथे संभाजीराजे व दिलेरखान यांची भेट
१६७९	२ एप्रिल संभाजीराजेंची मदत घेऊन दिलेरखानाने भूपाळगड जिंकला
	२१ डिसेंबर मोघलाकडून निसटून विजापुरच्या मसूदखानाच्या मदतीने संभाजीराजे पन्हाळा गडावर परतले

१६८०	१३ जानेवारी संभाजीराजेची छत्रपती शिवाजीराजे बरोबर पन्हाळगडावर ऐतिहासिक भेट
	३ एप्रिल चै.शु.१५ छत्रपती शिवाजी महाराजांचे रायगडवर महानिर्वाण,संभाजीराजेना हे वृत्त कळवले गेले नाही
	२१ एप्रिल १० वर्षाच्या राजारामचे अष्टप्रधान मंडळी कडून रायगडावर मंचकारोहन,त्याच दिवशी मोरोपंत,अण्णाजी दत्तो
	संभाजीराजेंना कैद करण्यासाठी पन्हाळा किल्ल्याकडे निघाले पण कऱ्हाडजवळ हंबीरराव मोहितेकडून त्यांना कैद
	२७ एप्रिल संभाजीराजेंनी पन्हाळा किल्ल्यावरून राजकारभारास सुरूवात केली
१६८०	१८ जून संभाजीराजेंचे रायगडावर आगमन
	२७ जून (श्रावण एकादशी) पुतळाबाई सती गेल्या
	२० जूलै(नागपंचमी) संभाजीराजेंचे मंचकारोहन
१६८१	१६ जानेवारी संभाजीराजांचा रायगडावर राज्याभिषेक (१४-१५ माघ)
	९ मे औरंगजेबचा पुत्र शहाजादा अकबर संभाजीराजेकडे आश्रयास
	१० जून -१७ जून नेताजी पालकर व हिरोजी फर्जंद यांना अकबराच्या भेटीसाठी संभाजीराजेंनी पाली गडावर पाठविले
	ऑक्टोबर शहाजादा आजम(औरंगजेबचा तृतीय पुत्र) अकबरास पकडण्यासाठी बऱ्हाणपुरला रवाना
	१३ नोव्हेंबर संभाजीराजा व शहाजादा अकबर ची पाली धोंडसे येथे भेट

esahity@gmail.com

१६८३	२२ मार्च औरंगजेबाचे औरंगाबादला आगमन
	१८ मे संभाजीराजेंना पुत्ररत्न ,शिवाजी हे नामाभिमान(शाहूराजे सातारा)
	डिसेंबर संभाजीराजेंचे अंबरच्या राजारामसिंहास पत्र ,दिल्ली दरबारी धडक देण्याची योजना
१६८३	जानेवारी-फेब्रुवारी हंबीररावाकडून शहाजादा आजमचा पराभव
	१ नोव्हेंबर संभाजीराजेंनी फोंड्यास वेढा घातला.येसाजी कंक व कृष्णाजी कंक यांचा पराक्रम
	२३ डिसेंबर कवी कलश यांना कुलमुखत्यारपद
१६८४	७ जानेवारी भीमगडावर कवी कलशाचा फिरंग्याशी तह
	१५ शहाआलमकडून डिचोली शहर(गोवा) उध्वस्त
	१८ मे मराठ्यांच्या छुप्या हल्ल्याने त्रस्त शहाआलम अहमदनगरला रवाना
१६८५	फेब्रुवारी बादशाहकडून सफूल्लाखानास खिल्लत
	११ औरंगजेबाचा कुतूबशाहस खंडणी देण्याचा आदेश
१६८६	१३ सप्टेंबर औरंगजेबचा विजापुरवर विजय
	१६ डिसेंबर औरंगजेब गोवळकोंड्याकडे रवाना
१६८७	फेब्रुवारी शहाजादा अकबर इराणकडे जहाजाने रवाना
	२७ सप्टेंबर गोवळकोंड्याच्या कुतूबशाहीचा अस्त
	ऑक्टोबर सेनापती हंबीरराव मोहितेंचा मृत्यु

esahity@gmail.com

१६८८	ऑक्टोबर-नोव्हेंबर कवी कलश व गणोजी शिर्के यांच्यात संघर्ष शिरकाण शिर्केकडे
१६८९	१ फेब्रुवारी संभाजीराजेंकडून गणोजी शिर्केचा पराभव,संभाजीराजे संगमेश्वरला रवाना
	३ -७फेब्रुवारी मुकर्रबखानाने संभाजीराजे व कवी कलश यांना गणोजी शिर्के व रंगनाथ स्वामीच्या मदतीने कैद केले
	९ फेब्रुवारी राजारामचे रायगडावर मंचकारोहन
	१५ संभाजीराजे व कवी कलश यांना बहादूरगडावर औरंगजेबसमोर उभे केले गेले
	९ मार्च संभाजीराजेंच्या अटकेची वार्ता ऐकून हरजी महाडिक यांनी केसो त्रिमल यांनी जिंजीस अटक केली
	११ मार्च फाल्गुन अमावस्या संभाजीराजे व कवी कलश यांचे वडू येथे हनन

।। नृपशंभू ।।

संभाजीराजेंनी लिहिलेल्या 'बुधभूषणम्' या संस्कृत व 'नायिकाभेद', 'नखशिख', 'सातसतक' या ब्रजभाषेतील ग्रंथामधील काही निवडक श्लोक.

नायिकाभेद मधील निवडक श्लोक

सवैया

राधिका कान्ह विरंची रची सब । लोकनकी सुखमा सबे सैलै ॥
अंगके रंगन के ढिग जात व्हैं । जात है शंभु सबे रंग मैलै ॥
लालनसों परवालनसों बँधी । लालन जानि पेरे बहि गैलै ॥
पाय धरे जितही वह बाल । तही रंग लाल गुलालसों फैलैं ॥

अर्थ: राधा आणि कन्हैयाची जोडी विश्वनिर्मात्याने पृथ्वीवरील सर्व पहाडातील सौंदर्य एकत्र आणून तयार केली आहे.त्यांच्या शरीरावर सर्वात सुंदर अशा रंगाच्या छटा आलेल्या आहेत.शंभुराजे म्हणतात,'विधात्याने त्यावेळी सगळे रंग जवळ ठेवून या जोडीची निर्मिती केली आहे,त्यामुळे त्या सगळ्या रंगाचा मिलाप त्यांच्यात झालेला दिसतो.या जोडीला प्रवाळाने बांधले असावे.जिथे जिथे ही जोडी पाय ठेवते तेथे लाल गुलाबी रंगाची उधळण होत आहे'.

esahity@gmail.com

परकीय ऊहा

नलिनी विधू मध्यको औट करै । जूट फूटै जुटका उडावहिको ॥
मन चूंबक बीचको लोहा भयो । तहां दुसरो रूप दिरवावहिको ॥
कवि संभु सनहेकी रीति यही । विच्छुरें जल मीन जियावहिको ॥
गुनवारे गुपालकी आंखिनतें । अरूझे अखियाँ सार तजावहिको ॥

अर्थ: ब्याही पर प्रेम कमलिनीवासी चंद्राला पाहून फटून पडून मध्येच विकसीत झाली.तारांगणात चमकणारा तारा निखळून लोखंड झाला आहे.कवि शंभु म्हणतात, 'प्रेमाची हीच रीत असते,पाण्यातून बाहेर पडून तडफडणाऱ्या माशासारखी त्याची अवस्था असते.गोपाळकृष्णाना डोळयात साठवून,डोळयाच्या सरोवरात ते डुंबून गेले आहेत '.

सवैया प्रोषितपतिका

बालमके बिछुरे बढी बालकें । व्याकुलता विरहा दुखदानतें ॥
चौपरि आनि रची नृपशंभु । सहेलिनि साहिवनी सुखदानते ॥
तू जग फुटे न मेरि भटू यहो । बात कही सखियाँ सखियांनते ॥
कंजूसे पानिसे गिरे । असुंवा गिरे खंजनसी अँखियानते ॥

esahity@gmail.com

अर्थ: पतीच्या विरहामुळे,वयाने लहान असलेली नायिका दुखी झालेली आहे.तिला पतीचा विरह सहन होत नाही.विरहामुळे तिचा केससंभार विस्कटला आहे.

नृपशंभु (कवी) म्हणतात, 'तिने विरह विसरण्यासाठी आपल्या सखींसोबत खेळ सुरू केला आहे.आपल्या सखींमध्ये अश्रुभरीत नयनाने माझी जोडी फोडू नका अशी इच्छा ती व्यक्त करते.तिच्या नेत्रातून पाणी टपकत आहे जणू काही खंजन तुल्म सुंदर काळ्या कपाळी भोर डोळयातून हे अश्रू आले आहेत'.

नाइन दूती

राधिका के परवालसें हाथन । लाल हरी घिरी लालि लुनाइ ॥
देखत ही बनी आपत कान्ह कहा ।करिये कवि शंभु बढाई ॥
लालि लसै अंगुरीन के बीच । तहाँ नख चंदन की छबि छाई ॥
कोपन की अहनाई में आनि मिलि । मनो बीचहि बीच जुन्हाई ॥

अर्थ: प्रवाळासारख्या असणाऱ्या राधेच्या हातात श्रीलाल कृष्णाची सुंदरता वेढली गेली आहे.कवि शंभु म्हणतात, 'तिला पाहताच तिची प्रशंसा केली गेली .ती सुंदरता बोटांच्या नखामध्ये जणू चंदनाप्रमाणे सुगंधीत व सौंदर्य कोपराच्या आरशामध्ये एक झाली आहे.मधून मधून चांदण्याच्या चमचमण्याचा भास होत आहे.राधेच्या सुंदर हातात श्रीलाल कृष्णाचे प्रतिबिंब व कोपराजवळील आरशात या दोघांचे प्रतिबिंब (चंद्र व चांदणे)एक झाले आहे'.

नखशिख मधील निवडक श्लोक

श्री गणजूलिखिते संभूकृत नखशिख

पद पद पत्र सम चरण जंघ जिमी कनक कर मकर ॥
नाभी ललित गभीर, उदर लंबित विसाल वर॥
उर दीरघ अति मंजु चारि कर, देत चारि फल॥
एक दंत अरू सुंड लषत, हरि जात सकल मल॥
अति नैन चारू ढाली फलक श्रवन सीस छविसों मढत ॥
ग्यान होत अग्यान के सो गननायक गुन पढत ॥

अर्थ: गणेशाचे पाय हे कमलपात्राप्रमाणे समचरण ,जांघ सोनेरी माशांची बनविलेली असून ,नाभी खोल तर पोट लांब आहे.गणेशाची छाती अत्यंत विशाल असून चार हात धर्म,अर्थ,काम व मोक्ष आहेत.एक दात आणि सोंड ही सगळ्या पापाचे हरण करीत आहेत.अत्यंत सुंदर डोळे,मोकळे कान व शिर्ष सौंदर्याने नटवलेले आहे.गणेशाचे गुणगान केल्यामुळे अज्ञानी मनुष्यही ज्ञानी होतो.

रोडी वर्णन कवित्व

राधिका रोडी कोऊ कौंहरसी कहे सोन ।
मेरे चित्त दरगंध कहवाइ ॥
शंभुराज कोऊ कोऊ लालसी नरपानै तेतो ।
निपट निदानै वा कठौरता निघटवर ॥
यह तो नरम नैन देखत सुधासो पियैं ।
चुपरि अतर जों निसावति सुगंध झर ॥
रंजन मनाहि दुख भंजन सकल मनो ।
सुमन गुलाबकों दब्यो है कंजफूल तर ॥

अर्थ:राधिकेची रोडी(टाच) ही सुवर्णकमळाप्रमाणे आहे असे कोणी म्हणतात.कवि शंभुराज म्हणतात,माझे अंतकरण तिला चोहोकडून घेरलेला सुगंध धारण केला आहे असे म्हणते.कुणी तिला लाललाल श्रेष्ठ खंड म्हणतात.अत्तर शिपडून निर्माण झालेल्या सुगंधाच्या झऱ्याची उपमा तिला देत आहोत.सर्वांच्या दुखाचे निवारण ती अगदी आनंदाने करीत आहे.गुलाबांच्या फुलांनी दबवून टाकल्याप्रमाणे तसेच ओल्या बह्मकमळाप्रमाणे ती दिसत आहे.

पग वर्णन सवैया

कौहर कौल जपादल विद्रुम । का इतनीज बंधुकर्म कोति है ॥
रोचन रोरी रची मैहंदी । नृपशंभु कहे मुकता सम पोति है ॥
पाय धरैं ढरै इंगुरसो तिनमें । मनि पायलकी धनी जोति है ॥
हाथ व्हैं तीन लौ चारिह औरसो ।चांदणी चूनरीके रंग होति है ॥

अर्थ:राधिकांचे पाय लाल रंगाच्या (कौहर) फळासारखे तसेच लाल रंगाच्या कमळासारखे ,पुष्पाप्रमाणे पिवळेधमक तसेच पोवळयासारखे लाल दिसतात.जसे विविध दिशांना उमललेले दुपहरीयांचे फळच.सखीच्या गोंधळात पायास मेहंदी लागली आहे.कवी नृपशंभु म्हणतात, जणू काही मोत्यांचा लेप पायास लावला आहे व सिंदूरच पायातून ओघळत आहे. मण्याची माळ खुपच चमकत आहे,चारी बाजूंनी ती सहेलींनी घेरली गेली आहे.तिची बुनकीदार ओढणी चमकदार चंद्रप्रभेप्रमाने शोभत आहे.

मुख

राधिका के आनन को बरनन कहा कीजै ।
देखि नैन जै सो जुडावै सींची सुधा झर॥
संभुराज वृजराज प्रान को अधारे ताको ।
पावै कौन पार सो बखानै सोभा कौन वर ॥
सहसन कोटि जोति ओटि के इकठ्ठे कियो ।
कैधो चतुरान सभेत दियो बर हर ॥

esahity@gmail.com

फैलपट मंजु पर प्रफुल्लित कंज कैधों ।
बसि रह्यो ससि आइ कंचन की बेलि पर ॥

अर्थ: राधेच्या मुखाचे वर्णन काय करावे ? ज्याने ते पाहिले त्याला तो अमृताचा निर्झर प्रवाहीत आहे असे वाटू लागले.कवी शंभुराज म्हणतात
वृजराज श्रीकृष्णांना तो प्राणाधार आहे.तिच्या सौंदर्याचे वर्णन कोण करू शकेल?
सहस्त्र ज्योती एकत्र करून बह्मदेवाने ते निर्माण केले आहे.
साक्षात भगवान शंकराने शंभुराजास वर दिला आहे.
असे प्रफुल्लित कमळ कामदेवाने निर्माण केले आहे.तिच्या सुवर्ण वेलीवर राहण्यासाठी चंद्रच आला आहे.

सातसतक मधील निवडक श्लोक

सीता पग नष चंद की भजि कै संभ समाज ।
सातशतक ग्रंथहि रच्यो,संतन के हित काज ॥

अर्थ: सीतेच्या चरणाच्या नखचंद्रास आराधून शंभु राजांनी समाजाच्या व साधूसंताच्या हितासाठी सातशतक ग्रंथाची निर्मिती केली आहे.
शंभुराजे म्हणतात की माझे मन संताच्या हितासाठी भमर झाले आहे.

मो मन मधुकर संत हित भऱ्यो ग्रंथ रसविंद ।
चित्रकूट के सिर्लान जे फूल पग अरविंद ॥

अर्थ: यात चित्रकुटमधील प्रभु राम,सीता आणि लक्ष्मण यांच्या पवित्र चरणाच्या प्रभावाने जे पारिश्रमिक फूल तेथील दगडावर फुलले तोच प्रेम रस होय.

सो रस पाइ छके महा सनकादिक सुक सेस ।
संभराज षगराज ,मुनि ,गिरजा ,गिरा गणेश ॥

अर्थ: तो रस प्राशन करून शुक्राचार्य,शेषदेव,सनकादिक मुनि तसेच खगराज गरूड,गिरीवरकन्या पार्वतीदेवी,सरस्वती,गणेश तसेच शंभुराजे संतुष्ट झाले.

उपालंभ कहि विनै कहि ,जगत सीष कहि ध्यान ।
बह्म निरूपम कुछ कहरो,जाते बाढत ग्यान ॥

अर्थ:

उपहासात्मक बोलण्यापेक्षा जगाच्या शिकवणुकीकडे माझे लक्ष आहे.काही ब्रह्मनिरूपणात्मक सांगण्याची माझी इच्छा आहे.त्यामुळे ज्ञानवृध्दिदही वाढते.

छत्र,गज,चमर,तुरंग अगनित संग ।
एते पर मन ना गरूर गहियतु है ॥
असन विहूँने अंग वे वसन सूँने राषो ।
लोक निंदा भाषो सुष मानि सहियतु है ॥
दूषण तुम्है जे देत मुगुध अचेत प्रभु ।
करिहौ उहे पे जाको जैसो चहिअतु है ॥
सैंभ षोइ महीपाल कहै सुनिए गोपाल ।
हम हरि हाल तुम सौ निहाल रहियतु है ॥

अर्थ: छत्रपती असल्यामुळे संभाजीराजेजवळ छत्र,गज,चामर,असंख्य घोडे इ.ऐश्वर्याच्या वस्तू असल्यातरी त्याबद्दल शंभुराजेंच्या मनात अहंकार नव्हता.शंभुराजासारख्या क्षत्रिय राजामधील वैराग्य रूप पाहून काही लोकांनी त्यांची निंदाही केली पण त्यातच सुख मानुन ती त्यांनी सहन केली.दृढनिश्चयी शंभुनी त्यात सुख मानिले आणि स्वत:ला परमेश्वरास अर्पण केले.जो परमेश्वरास दूषण देतो ते मुढ अचेतन होते.त्यांना ही तो अचेतनाही सुंदर करतो.जो परमेश्वराची इच्छा धरितो त्याचे परमेश्वर समाधान करतात.शंभुराजे गोपाळास(श्रीकृष्णास) म्हणतात,'मी माझी सारी जबाबदारी तुझ्यावर सोपवितो'.

वृंदावन कुंजन में गुंजत मधुप कुंज ।
कुंज बनि रहे सुर लोक के अषारे से ॥
तहाँ संभुराज मैं विलोके वृजराज जा पैं ।
अंग अंग वरिए अनंग अंग छोर से ॥

अर्थ: वृंदावनतील कुंज वनात भ्रमरवृंद गोड गुंजन करीत आहेत.हे वृंदावन उद्यान देवाच्या भूमीतही शोभून दिसत आहे.तेथे कवि शंभुराजांना व्रजराज श्रीकृष्णांच्या अंग प्रत्यंगावर आपली गात्रे ओवाळून टाकावीत असे वाटते.

बुधभूषण मधील निवडक श्लोक

राजाची सामान्य कर्तव्ये

व्यसनानि च सर्वाणि भूपति: परिवर्जयेत् ।
सप्तदोषा सदा राज्ञा हातच्या व्यसनोदया: ॥

अर्थ: राजाने सात दोष टाळले पाहिजेत,हे दोष पुढीलप्रमाणे आहेत
वाग्दण्ड -राजाने कठोर बोलणे टाळावे
पारूष्य - इतरांचा अपमान करणे टाळावे

दुरयातंच-संरक्षणाशिवाय राजाने दुर जाऊ नये
पान-मद्यपानापासून दूर असावे
स्त्री-राजांस स्त्रीचे व्यसन नसावे
मृगया-गरीब प्राण्याची शिकार करू नये
द्युत-जुगारापासून राजाने दुर राहावे

काले मृदुर्यो भवति काले भवति दारूण: ।
राजा लोकद्वयापेक्षी तस्य लोकद्वंय भवेत ॥

अर्थ: राजामध्ये मवाळ व कठोर अशा दोन्ही वृती असाव्यात.वेळ आल्यावर राजाने कधी कठोर तर कधी मवाळ बनावे

भृत्यै: सह महीपाल: परिहासं च वर्जयेत् ।
भृत्या: परिभवन्तीह नृपे हर्षवशंगतम् ॥

अर्थ: राजाने नोकराबरोबर थट्टा मस्करी करू नये.नोकरांच्या वेढ्यातील राजा हर्षवश होऊन नंतर तिरस्कृत होतो.

esahity@gmail.com

छत्रपती शहाजीराजे यांचे सुबक

भृशबदान्वयसिन्धू सुधाकर: प्रथितकीर्तिरूदारपराक्रम:|
अभवतर्थकलासु विशारदो जगति शाहनृप: क्षितिवासव: ||

अर्थ: सर्वशक्तिमान,सामर्थ्थवान असलेला पृथ्वीतलावरील सर्वश्रेष्ठ असा राजा किंवा प्रत्यक्ष शिवाचा अवतार असलेला उदार ,पराक्रमी आणि अर्थकारण व राजकारणातील धुरंदर अशा विविध गुणांचा संगम झालेला हा नृपथोर राजा गुणसागरातील चंद्राप्रमाणे शोभत होता.
असे सिंधु सुधाकरासारखे प्रचंड पराक्रमी,कार्तिवान,उदार शहाजी राजे होऊन गेले.

श्रीमन् क्षत्रियकुलावतंस शिवछत्रपति यांचे सुबक

येनाकर्णविकृष्टकार्मूकचलत्काण्डावलीकर्ति |
प्रत्यर्थिक्षितीपालमौलिनिवहैरभ्यर्चि विश्वंभरा||
यस्यानेक वसुंधरा परिवृढ प्रोत्तुंग चूडामणे: |
पुत्रत्त्वं समुपागत: शिव इति ख्यात पुराणो विभु: ||

अर्थ: ज्यांनी वैर करणाऱ्या महिपालांची (अनेक राजांची)गर्वोन्मत मस्तके (मुंडमाला) विश्वंभरास अर्पण केली,अशा वसुंधरेस गवसणी घालणाऱ्यांमध्ये,उत्तुंग व श्रेष्ठ असणाऱ्या,पुत्र 'शिव'म्हणून पुराणांतरींचा

प्रभु(अंशावतार?)जन्मास आला.त्या शहाजीराजांना,महाशूर मुलखाचे धनी असलेले,लोकांना पर्वतासारखे(हिमालय)उत्तुंग म्होरके वाटणारे,पुराणातील पुरूषश्रेष्ठ,शिवासारखे राजे शिवाजी हे श्रेष्ठ पुत्र झाले.

श्रीशंभूराजे उर्फ संभाजीराजे यांचे सुबक

तस्यात्मज:शंभुरिति प्रसिध्द:समस्तसामन्त शिरोवतंस:|
य:काव्यसाहित्य पुराणगीतकोदण्डविद्यार्णव पारगामी ||

अर्थ: अशा त्या थोर शिवप्रभूंच्या समस्त मांडलिकामध्ये शिरोभूषण म्हणून शोभणारा आत्मज (आत्मन् चा अंश) शंभू(राजा)म्हणून प्रसिध्दीस आला.तो काव्य, साहित्य, संगीत,धनुर्विद्या इ.चा कलासागर पार केलेला होता.(पारंगतच झालेला होता.)

नृपशंभू...

जव निधर्म होता कौर्य
गाजवी धर्म, जागवी शौर्य
तख्त झुकवितो, सख्त मराठा
मर्द सिवाका छावा. . .!!

शंभू समशेरीचे पुण्य
जाहली स्वराज्य दौलत धन्य
बेशक, रणमर्द मराठा
मर्द सिवाका छावा. . .!!

काळ समोरी उभा
तरीही ललकारीतो नभा
धर्मवीर हा धर्म मराठा
मर्द सिवाका छावा. . .!!

पितृधर्मी अखंड यज्ञ
जरी आग, तरीही सुज्ञ
पुत्र असा जन्मावा जैसा
मर्द सिवाका छावा. . .!!

'बुधभुषणम' काव्य हा
'सात सतकी' दिव्य
'नखशिखां' त संस्कृत मराठा
मर्द सिवाका छावा. . .!!

-सचिन काकडे -मुंबई

तरंग उठतो नाम गुंजता
उरात फ़ुटतो खोल हुंदका
बिनशर्त बेदर्द मराठा
मर्द सिवाका छावा...!!

तुफ़ान गर्जतो, आग ओकतो
वाघ मराठी जान झोकतो
बुलंद सह्याद्री उभा पहाडी राजा
वो मर्द सिवाका छावा...!!

ही तोफ़ मराठी, पोत भवानी
अभिमान शिवाचा, शान जिजाई
साक्षात चंडीका त्या जगदंबेचा
टिळा
मर्द सिवाका छावा...!!

बिनशर्थ मराठी शान
उभ्या सह्याद्रिचा छावा...!!
खुब लढा बेदर्द मराठा
मर्द सिवाका छावा...!!

पोत शिवाजी तलवार
भवानी गनिमा ललकारी
उंच पताका हिंद सुभा
दख्खनचा भगवा छावा...!!

-सुधीर मुळीक- मुंबई

esahity@gmail.com

संदर्भ:

कृष्णाजी अनंत सभासद-विरचित शिवछत्रपतींचे चरित्र(सभासद बखर)

र.वि.हेरवाडकर

श्री शिव छत्रपतींची ९१ कलमी बखर -वि.स.वाकसकर

संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे -र.वि.हेरवाडकर

थोरले शाहू महाराज यांचे चरित्र -र.वि.हेरवाडकर

ताराबाईकालीन कागदपत्रे -आप्पासाहेब पवार

परमानंदकाव्यम -गो.स.सरदेसाई

मराठ्यांची इतिहासाची साधने- वि.का.राजवाडे

मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द(खाफीखानाचा साधनग्रंथ) -सेतूमाधव पगडी

बुधभूषण(छत्रपती संभाजीराजे शिवाजीराजे भोसले) -प्रभाकर ताकवले

शंभूराजेकृत नायिकाभेद,नखशिख,सातसतक -प्रभाकर ताकवले

राधामाधवविलासचंपू(जयराम पिंड्येकृत) -वि.का.राजवाडे

शिवकालीन-पत्रसार-संग्रह,खंड १ व २ - न.चि.केळकर,द.वि.आपटे

शिवछत्रपतींची पत्रे -डॉ अनुराधा कुलकर्णी

मराठा रियासत- गोविंद सरदेसाई.

मराठेशाहीचा मागोवा- डॉ.जयसिंगराव पवार.

छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ- डॉ.जयसिंगराव पवार.

श्री.शिवछत्रपती-संकलित शिवचरित्राची प्रस्तावना,आराखडा
व साधने -त्रं. शं शेजवलकर.

राजा शिवछत्रपति- बाबासाहेब पुरंदरे

गडसंच -बाबासाहेब पुरंदरे

esahity@gmail.com

आज्ञापत्रे- विलास खोले.
साक्ष इतिहासाची -निनाद बेडेकर.
औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार(ऐतिहासिक फारसी साहित्य खंड ६) - ग.ह.खरे,गो.त्र्यं.कुलकर्णी
बावडा दप्तर(खंड १ व २) - के.गो.सबनीस
मराठे व औरंगजेब(साकी मुस्तैदखानकृत मासिरे आलमगिरीचा मराठी अनुवाद) -सेतुमाधव पगडी
शिवराय:संस्कार आणि शिक्षण- आ.ह.साळुंखे .
Shivaji and his times -Jadunath Sarkar.
Shivaji, the great Maratha -H. S. Sardesai.

लेखन – श्री. दामोदर मगदूम

न्यू पॉलिटेक्निक, कोल्हापूर मधून इलेक्ट्रॉनिक्सचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर डी.वाय.पाटील इंजि.कॉलेज,कोल्हापूर मधून इलेक्ट्रॉनिक्स पदवी प्राप्त केली.नंतर भारतीय अवकाश संशोंधन संस्था(इस्त्रो),अहमदाबाद येथे उपग्रह दळणवळणातील संशोधनासाठी इंटरनॅशनल युनियन ऑफ रेडिओ सायन्स (URSI),बेल्जियम चा यंग सांयटिस्ट पुरस्कार मिळाला.त्याचप्रमाणे इंडियन सायन्स कॉंग्रेसचाही पुरस्कार मिळाला.मा.राष्ट्रपती अब्दूल कलाम यांच्याकडून राष्ट्रपती भवनात विशेष सन्मान प्राप्त झाला.त्याचबरोबरइतर अनेक सन्मान प्राप्त झाले.

सामाजिक कार्याच्या जाणिवेतून मराठी देशा व हरित भूमि फौंडेशन या दोन संस्था स्थापन केल्या.नुकताच मराठी भाषादिनी यांच्या मराठी देशा या संकेतस्थळाला महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्य मराठी संकेतस्थळाचा प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे.

सध्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या संस्थेमध्ये संशोधन विभागात कार्यरत आहे.

अधिक माहितीसाठी खालील ईमेल व संपर्क करावा

श्री. दामोदर मगदूम

www.marathidesha.com

marathidesha@gmail.com

Cell:9421051889

esahity@gmail.com

संभाजीराजे महान राष्ट्रवीर

संभाजीराजेंनी स्वराज्यासाठी,स्वराष्ट्रासाठी बलिदान केले.संभाजीराजा महान राष्ट्रवीर होते.अशा या राष्ट्रवीराचे महान कार्य पेशवेकालीन बखरींनी आणि आजच्या युगातील काही इतिहासकारांनी चुकीचे रंगविले आहे.याउपर संभाजीराजेंनी धर्मासाठी प्राण सोडिला, संभाजीराजें धर्मवीर होते असा चुकीचा इतिहास लिहिला गेला.चुकीचा इतिहास खरा मानून आपण या महान राष्ट्रवीराचे महत्त्व आपण कमी करत आहोत.याठिकाणी एक गोष्ट लक्षात घेण्याची सर्वांना गरज आहे.छत्रपती शिवराय व छत्रपती संभाजी हे हिंदू राजे होते पण त्यांचा लढा इस्लामी जनतेशी नसून जुलमी इस्लामी राजसत्तेशी होता.सर्व धर्मियात पुज्यनिय असलेल्या छत्रपती शिवराय व छत्रपती संभाजी या महान राष्ट्रपुरूषांना आज आपण एकाच धर्माच्या बंधनात अडकविले आहे.हे करून आपण त्यांच्या विचारांशी प्रतारणा करत आहेत हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

बारा लाख वाचकांसाठी ई चळवळ

तीन वर्षापूर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना दिडशेहन अधिक पुस्तके विनामुल्य दिली. मोरया , मीरा, कृष्ण, गुरूदेव रविंद्रनाथ, स्वामी विवेकानंद, विंदा करंदीकर, ना. धो. महानोर, ग्रेस, नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे ४०० नविन साहित्यिकांना लोकांसमोर आणले. इंटरनेट्वर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरीरीने पुढे नेली.

प्रेम आणि सौंदर्याबरोबरच आत्महत्या आणि दहशतवाद अशा विषयांवरच साहित्य मांडल. विनोदाला वाहिलेलं ई-श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीतासाठी संगीत कानसेनचे वर्ग चालवले.

नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातील किल्यांची माहिती देणा-या पुस्तिका "दुर्ग दुर्गट भारी" द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगातल्या मराठी मंडळींना उभारी दिली. लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामुल्य पोचवण्याची आमची परंपराआम्ही अधिक जोमाने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहूदे. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फक्त लाखभर लोकांपर्यंतच मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य साहित्य पोचलचं पाहिजे असं नाही वाटत आपल्याला ? आणि त्यासाठी काही फार करायची गरज नाही. आपल्या ओळखीच्या १२ लोकांची, १२ मराठी लोकांची ईमेल आयडी द्याल?? जास्त दिलीत तरी हरकत नाही पण निदान १२ लोकांची ईमेल आयडी पाठवा. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी १२ आयडी पाठवले तर लाखाचे १२ लाख व्हायला कितीसा वेळ लागणार ? बारा लोकांची मेल आयडी पाठवणा-या वाचकांना आम्ही ई साहित्य प्रतिष्ठानचे पाठीराखे म्हणून मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सुचना मागवत राहू. मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.

:अधिक माहितीसाठी :

संकेत स्थळ

www.esahity.com

फेसबुक

https://www.facebook.com/esahity

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

।। छत्रपती संभाजी महाराज समाधीस्थळ।।

esahity@gmail.com

| |शंभू चरित्र ||

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभूचरित्र भाग:- ०१

(सूचना:- "धर्मपंडित श्री छत्रपती संभाजी महाराज" यांचे चारित्र्य "प्राध्यापक माननीय श्री नितीन बानुगडे पाटील" यांचा व्याख्यानाच्या शब्दानिधीतून रेखाटण्याचा माझा प्रयत्न आहे. "संभाजी राजांचा" खरा इतिहास सर्वांना कळवा यासाठीचा माझा लेखन प्रपंच आहे. आजपासून ते शंभू राजांच्या बलिदान दिनापर्यंत "श्री शंभू चारित्र्य" या "भगवं वादळं" च्या माध्यमातून सर्वासमोर येईल तरी सर्वांनी वाचावे हि विनंती. खूप मोठं आहे वेळ नाही वाचायला असे बोलून कोणीही टाळाटाळ करू नका. अरे! आपले "शंभू राजे" आभाळापेक्षा मोठे होते आणि त्यांचा पराक्रम जाणून घेणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे कृपया शेअर करा..अरे! कळूद्या संपूर्ण जगाला आपला "संभाजी राजा" कसा होता ते. शेअर करा!!! .)

"इतिहास विसरणारी माणसं इतिहास घडवू शकत नाही आणि इतिहास घडवणारी माणसं इतिहास विसरू शकत नाही" हाही एक इतिहास आहे. 'निरक्षरं मराठ्यांचा' इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा इतका "तेजस्वी" आणि "ओजस्वी" इतिहास याच मातीत घडला मात्रं 'साक्षरं मराठे' त्यापासून बेदखल राहिले कि काय? अशी शंका अलीकडे येऊ लागली आहे. पण! "शिवशंभू" चरित्राचं कर्तृत्वं ऐकण्यासाठी आपण मोठ्या संख्येनं एकवटतो एवढी एकचं गोष्ट तुमच्या आमच्या काळजामध्ये "राजा शिवशंभू" अजूनही जिवंत आहेत. याचीच ती साक्षं.

"इथल्या मातीचा एखादा ढेकूळं कधी हातात घेतला तो पाण्यात टाकला,तरं पाण्यावरं जो तवंग उठेल तो तवंग सुद्धा या मातीसाठी खर्ची पडलेल्या मावळ्यांच्या रक्ताचा असेल". आजूबाजूच्या सह्याद्रीची उंची वाढली ती उगाच नाही,"या सह्याद्रीच्या पायाखाली काहीजणांनी स्वतःला गाडून घेतलयं तेव्हा तो सह्याद्री आसमानाशी स्पर्धा करायला गेला!"

या सह्याद्रीची सैरं करणं कोणा ऐऱ्याचं गैऱ्याचं काम नाही, सह्याद्रीची सैरं फक्तं तीघचं करू शकतात. पहिला"वाघ",दुसरा"वारा" आणि तिसरे"मराठे"!!! या तिघांशिवाय सह्याद्री पेलनं कुणाला जमलं नाही साधलं नाही. या सह्याद्रीच्या कुशीत पुन्हा कचरीलाचा जन्मं कधी झालाचं नाही. इथं जन्माला आले ते "शिवराय" आणि "शंभूराय". ३५० वर्षापूर्वीचा जागरं आजही घडतोय इथं. "छत्रपती शिवाजी महाराजांचं" नाव कानांवर पडतं आणि आमच्या शरीरावरं रोमांच उठतात, "छत्रपती शिवाजी महाराज कि जय" अशी किल्कारी कुठं निनादते आणि आमचं शरीरं पेटून उठतं. मनमनांमध्ये उर्मिजाप, निर्णाजाय, प्रेरणास्त्रोत तयार होतो. अरे! ३५० वर्ष झाली या राजाला आम्ही विसरू शकतं नाही. अरे! दूरवरं कुठेतरी किल्कारी ऐकू येते "छत्रपती शिवाजी महाराज कि" आणि आमच्या ओठातून कधी "जय" बाहेर पडतं आमचं आम्हाला कळतं नाही. जणू काय आमच्या धमन्यांतून सळसळनाऱ्या रक्ताच्या थेंबा-थेंबामध्ये तो "राजा शिवाजी" अजूनही जिवंत आहे. जणू काय इथल्या मातीमध्ये जन्माला येणाऱ्या प्रत्तेक पोराच्या भाळावरं इथली माती जन्मतःचं "शिवाजी" हे नाव कोरूनचं त्याला जन्माला घेते कि काय असं सांगावं इतकी जादू या राजाची आहे. असं काय केलं असेल या राजानं!!! असं काय निर्माण करून ठेवलं असेल!!!

३५० वर्षानंतर जर शिवरायांचं नाव घेऊन आमचं शरीरं पेटतं असेलं, ३५० वर्षानंतर जर शिवरायांचं नाव घेऊन आम्हाला स्फूरणं चढतं असेलं तर ३५० वर्षापूर्वी खुद्द "शिवछत्रपतींच्या" कुशीत जन्माला आलेला "संभाजी राजा" कसा असेलं !!!

अरे! कसा घडला असेलं!...कसा उभा राहिला असेलं!...कसं असेलं शौर्य!...कसं असेलं धैर्य!...कसं असेलं धाडसं!...कसं असेलं साहसं!...कसा असेलं अभिमान!...कसा असेलं स्वाभिमान!...कसा असेलं पराक्रम!

कसं असेलं नेतृत्वं, व्यक्तीत्वं, कर्तृत्वं!!!

कसा असेलं......""संभाजी""

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभूचरित्र भाग ०२ (वाचा आणि शेअरं करा)

ज्यावेळी कोणा एखाद्या गावरान माणसाला प्रश्नं विचारला जातो..."संभाजी राजे कसे होते तुम्हाला माहितीये का?" तो दोन शब्दांत उत्तरं देतो. "संभाजी महाराज रगेल होते" आणि "संभाजी महाराज रंगेल होते". दोन शब्दांत "संभाजी राजांचा" इतिहास बदलून जातो. इतिहासानं ना-ना आरोपांच्या फायरी झाडल्या त्यांच्यावरं. "संभाजी स्वर्याचारी, संभाजी रगेल, संभाजी रंगेल, संभाजी राजाने मराठेशाही बुडवली, संभाजी राजे म्हणजे शिवछत्रपतींच्या पोटाला आलेला नादान तख्तनंशील वारीस, संभाजी राजे म्हणजे स्वराज्यद्रोही, संभाजी राजे म्हणजे मुघलांच्या गोठात जाऊन मिळालेले, संभाजी राजे म्हणजे छत्रपतींचे पुत्रं असूनं युवराज असूनं मोघलांना सामील झालेले". ना-ना, ना-ना, ना-ना आरोपांच्या फायरी झाडल्या. बदनाम होत राहिला "संभाजी" गेली ३५० वर्ष. काय वस्तूस्थिती? काय खरा इतिहास?

इतिहासाची पानं ज्यावेळी चाळतो, पुरावे पाहतो, त्यावेळी लक्षात येतं १४ मे १६५७ पुरंदरवरं एका "शिवरत्नाचा" जन्मं झाला आणि आपल्या ज्येष्ठ पुत्राची याद म्हणून "माँसाहेब" जिजाऊनी त्यांचं नामकरणं केलं. बघता बघता संभाजींच्या बाललीलांनी सर्वांची मनं हरपू लागली. वय झाल सव्वा दोन वर्ष आणि त्याच वेळी नियतीनं गलती केली. संभाजी राजांच्या "मातोश्री सईबाई महाराणी साहेब" यांचं निधनं झालं. दहिवरचं मातृत्वाचं छत्रं हरपलं. पिता "शिवाजी राजे" तर सतत पाठीला मरण बांधून मुलुखभर दौड घेणारे,पित्याची छत्रछाया वाट्याला यावी कशी? पण! याचवेळी सामन्याला "माँसाहेब" जिजाऊ. अजून दुसरा "शिवाजी" घडवायचं सामर्थ्य जिजाऊत नक्कीच आहे. आणि जिजाऊ नावाच्या चालत्या बोलत्या विद्यापिठामध्ये "संभाजी" राजांचं शिक्षण चालू झालं. संभाजी राजे "लिहिणं-वाचणं शिकले", "चालणं-बोलणं शिकले", "पळणं-खेळणं शिकले". बघता बघता ना-ना कला, ना-ना विद्या, ना-ना गुण त्यांना आत्मसाद झाले. एक नाही, दोन नाही, तीन नाही, चार नाही तब्बल सोळा-सोळा भाषा संभाजी राजांना यायला लागल्या. मराठी येते, उर्दू येते, फारसी येते, कानडी येते, तामिळ येते, मल्ल्याळ येते, हिब्रू येते, पाली येते, संस्कृत सुद्धा संभाजी राजांना येतेय.

राज्यशास्त्र, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, अर्थशास्त्र, प्रभागशास्त्र या सगळ्या शास्त्रांमध्ये संभाजीराजे तेज तरबेज झाले. काव्यगुण सुद्धा त्यांनी जोपासला. संभाजी राजांनी वयाच्या चौदाव्या वर्षी "बुधभूषणम्" नावाचा ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिला. या "बुधभूषणम्" नावाच्या ग्रंथामध्ये संभाजीराजे "श्री गणेशाचं" वर्णन करताना लिहितात,

"पदपदम् पत्रं समचरणंजंग जिमीकलक् कलवकर् ....!!!

नाभीलालित् कबीरउदरलंबित विशालंवर् ....!!!

वरंदिर्घतिमुण्डी करंदेत् चारीफ़ल्....!!!

एकदन्तरुसुण्ड् लवतरिजत् सकलंमल्....!!!"

हे संभाजी राजांनी संस्कृत मधून "श्री गणेशाचं" केलेलं वर्णन आहे. 'नकशिका', 'नायिकाभेद', 'सातसतर्क' यांसारखे कैक ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध केले. आणि बघता बघता उत्तमं कवी म्हणून "संभाजी राजांचा" नावलौकिक झाला. बुद्धीचं कार्यक्षेत्र तर काबीज केलंच पण! त्याचवेळी शरीराचं, शरीरसंपदेचं, हा संभाजी ना-ना विद्यामध्ये, व्यायामामध्ये तेज तरबेज झाला. "मल्लविद्या",

"भालाफेक", "तलवारबाजी", "घोडेस्वारी" याच्यामध्ये संभाजी राजांनी मोठी हुकुमत पैदा केली. अरे! घोडेस्वारीमध्ये संभाजी राजांचा हात कोणी धरतं न्हवतं. तत्कालीन काळामध्ये पळत्या घोड्याला एका पायावर उभा करणारा आणि गर्रदिशी डोळ्याची पापणी मिटते तोवर फिरवणारा या जगाच्या पाठीवर एकचं योध्दा झाला. त्या योद्ध्याचं नाव होतं...."" संभाजी""

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभूचरित्र भाग ०३ (वाचा आणि शेअरं करा)

संभाजी राजांसारखी झेप बाकी कुणाला जमलीच नाही. बघता बघता संभाजींच्या या कर्तुत्व गुणांनी "स्वराज्य" मोहरत निघालं. संभाजी राजांचं येणं जणू स्वराज्याला भाग्यशाली ठरलं. संभाजी राजांचा जन्मं झाला आणि स्वराज्य वाढत-वाढत निघालं. प्रतिपदेच्या चंद्राच्या कलेकले प्रमाणं स्वराज्य संवर्धीत होत गेलं. बघता बघता साडे आठ वर्षाचे झाले संभाजी राजे. त्याचवेळी महाराष्ट्रावर "मिरझाराजे जयसिंगच" आगमन झालं आणि छत्रपती शिवरायांना नाईलाजानं तह करावा लागला. पुरंदरंसह तेवीस किल्ले बहाल करावे लागले आणि त्याच वक्ती मीरझा म्हणाला.."राजे! आपले पुत्रं संभाजी राजे आमच्याकडे ओलीस म्हणून राहतील..." नरसिंह व्याकुळला.."नाही राजे, हे राजकारणं नव्हे!" आणि मीरझा हसतं म्हणाला,"राजे! हे राजकारणंच आहे" आणि वयाच्या साडे आठव्या वर्षी संभाजी मोघालांकडे ओलीस म्हणून राहिले. आणि त्याचवेळी संभाजींचा राजकारण प्रवेश झाला. यताकाल शिवरायांनी मनसबी पत्करल्या, औरंगजेबानं मनसबी धाडल्या. शिवरायांना पंच हजारी मनसबदार तर संभाजी राजांना सप्त हजारी मनसबदार केलं. पित्यापेक्षा पुत्राला मनसब अधिक दिली जणू औरंगजेबाला कळून चुकलं होतं "पित्यापेक्षा पुत्रं सवाईचं निपजणारं आहे". त्याचवेळी औरंगजेबाचा खलिता आला, "शिवरायांना आग्र्यास बोलावलयं सोबत मनसबदार म्हणून संभाजी राजानाही न्यायचय". एका पित्याचं काळीज व्याकूळलं, अरे! नऊ वर्षाचं पोरं आहे,इवलासा पोरं आहे, कसं न्यावं त्याला. या मुलुखापासून त्या मुलुखापर्यंत वैराण वनवास भोगेल का त्याला? अरे! ऊन, वारा, वादळं, पाऊसं या प्रवासात कसा टिकेल? कसा जगेल? मग! त्याचवेळी शिवरायांच्या लक्षात आलं, अरे! संभाजी म्हणजे एकतरं शिवाजीच्या पोटाला आलेला पोरं नाही, "तो सह्याद्रीच्या कुशीत आणि महाराष्ट्राच्या मुशीत जन्माला आलेला मराठ्याचा पोरं आहे". ते धैर्य ते शौर्य त्याच्यातही आहेच. आणि शिवरायांनी त्यांना सोबत घेतलं. या मुलूखापासून आग्रा मथुरेपर्यंतच्या मुलूखापर्यंतचा सगळा प्रवास संभाजी राजांनी लीलयात झेलला. "राजे" आणि "संभाजी राजे" औरंगजेबाच्या दरबारात हजर झाले. पण! इथचं औरंगजेबाने गहरी चाल खेळली. शिवरायांना मागच्या रांगेत उभं केलं आणि महाराष्ट्राचा "नरसिंह" खवळला आणि बघता बघता बाणेदारपणे भर दरबारात औरंगजेबाला फटकारून उभा राहिला. सगळा दरबार कापतं राहिला. एवढा-एवढा-एवढा स्वाभिमान अरे! आत्तापर्यंत दिल्लीपतीची अशी नामुष्की कुणी केली न्हवती, असा अपमान कधी घडला न्हवता आणि या शिवरायांनी औरंगजेबाला भर दरबारामध्ये फटकारावं,उभा दरबार थरं- थरं कापतं होता. अरे!!! चुकूनं जरं शिवरायांकडे तलवार असती ना त्यावेळी तरं तिथंच औरंगजेबाचा यदाकदाचित शिरच्छेद सुद्धा झाला असता. मोघलांच्या दरबारात जाऊन मोघलांची दाणादाण शिवरायांनी उडवली आणि फटकारून सरळ चालते झाले. औरंगजेबाने समझौतीचा प्रयत्नं केला पण! राजा बदला नाही आणि त्याच वेळी औरंगजेबानं जहरी चाल खेळली.

शिवरायांच्या भोवतीचे पहारे कडक केले आणि बघता बघता शिवरायांच्या गळ्याभोवतीचा फास आवळायला सुरवात केली. शिवरायांना कळून चुकलं होतं औरंगजेबाच्या मगरमिठीतून सुटका नाही आणि त्याच वेळी शिवरायांच्या लक्षात आलं कि, सगळ्याच लढाया तलवारीच्या बळावरं नाही खेळल्या जात काही लढाया बुद्धीच्या बळावरं सुद्धा खेळाव्या लागतात.

"तलवारीच्या पात्याला एकदा का बुद्धीची धारं चिकटली कि मगं शौर्य लखलखतं आणि बघता बघता शिवरायांच्या तलवारीला बुद्धीची धार चिकटली आणि चाल आखली जाऊ लागली.

क्रमशः

ρ∂ʄ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ०४

(वाचा आणि शेअरं करा)

औरंगजेबाला भर दरबारात मराठी मातीचा दणका दाखवल्यानंतर त्या दिवसापासून "शिवराय" औरंगजेबाच्या दरबारात कधी गेले न्हवते.पण! शिवरायांचे प्रतिनिधी म्हणून "संभाजीराजे" मात्रं औरंगजेबाच्या दरबारात येत जात असत. एके दिवशी भर दरबारात औरंगजेबानी संभाजी राजांना विचारलं, "राजे!!! आपण उत्तमं मल्लविद्या जाणता असं आम्ही ऐकून आहे. आपण उत्तमं कुस्ती खेळता असाही आम्ही ऐकलयं. मगं! संभाजी राजे!!! आमच्या दरबारात सुद्धा चांगले चांगले मल्ल आहेत. आमच्या दरबारातल्या एखाद्या माल्लाशी कुस्ती खेळल का? तसा नऊ वर्षाचा छावा कडाडला...." आम्ही फक्तं आमच्या लायकीच्या माल्लांशीच कुस्ती खेळतो आणि तुझ्या दरबारात माझ्या लायकीचा एकही मल्ल नाही...सबब!!!"

हे महाराष्ट्राचं पाणी होतं. महाराष्ट्राचा स्वाभिमान संभाजी राजांनी वयाच्या नवव्या वर्षीच औरंगजेबाला दाखवला. पण! बघता बघता औरंगजेबाची मुठी आवळत गेली, शिवरायांचा गळा गुदमरू लागला आणि त्याचवेळी शिवरायांना बाहेर पडायला मुभा नाही. पण! संभाजीराजे मात्रं औरंगजेबाच्या महालापासून ते कुंभाराच्या वड्यापर्यंत बिंदोख येत जात होते. या सगळ्या सुटकेच्या चालीच्या सगळ्या जबाबदाऱ्या शिवरायांनी संभाजी राजांवर सोपविल्या आणि महालापासून कुंभाराच्या वड्यापर्यंत सगळी चाल संभाजी राजानं व्यवस्थित पेरली. आणि बघता बघता दिवस उजाडला जे स्वप्नांतही शक्यं होणारं नाही ते शिवरायांनी सत्यात उतरवलं आणि "महाराष्ट्राचा नरंसिंह" सुटला. औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन निसटला.

पण! आपला एकुलता एक पोरं "संभाजी" त्याला मागं ठेवून त्यावेळी एका पित्याचं काळीज गलबलंल नसेल का? जीव व्याकुळला नसेल का? अरे! नऊ वर्ष उमरीच पोरं कसं ठेवावं मागं, मृत्युच्या दारात, औरंगजेबाच्या दरबारात अरे!!! कसं ठेवावं. जरं जातेवेळी त्या संभाजी राजानं विचारलं असतं शिवरायांना, "आबासाहेब..आम्हाला सोडून एकटेचं जाणार?" अरे! तरी हा सुद्धा हटला असता मागं, धरणी कंपच झाला असता, फाटला असता बांध जरं विचारलं असतं संभाजीनी "आबासाहेब आम्हाला सोडून एकटेचं जाणार!!!". पण त्यावेळी हा "सर्जा संभाजी राजा" आपल्या पित्याचा हात हातात घेऊन सांगत होता, "आबासाहेब..आमची फिकीर करू नका, आमच्यापेक्षा महाराष्ट्राला आपली गरज अधिक आहे" आणि आपल्या पोराच्या परिपक्वतेवरं हा "नरंसिंह" खुश झाला. यताकाल राजे निसटले आणि राजगडावर पोहोचले आणि पोहोचल्या पोहोचल्या त्यांनी वार्ता उठवली "वाटेत संभाजी राजांचं निधनं झालं". वयाच्या नवव्या वर्षी संभाजी राजांच्या पाठीला जे मरण बांधलं गेलं ते इंद्रायणी भीमेच्या तीरावरं मरणा निधड्या छातीनं सामोरं जायीपर्यंत ते मरण तशीच त्यांची सोबत करत राहिलं. पण! शिवरायांनी उठवली होती हुलं. राजगडावर तर संभाजींचे अंत्यविधी सुद्धा झाले. येसूबाई सती जायला निघाल्या. जिजाऊ तरं रडून रडून थकल्या पण! सगळी चाल शिवाजींनी आपल्या काळजात मिटून ठेवली तोपर्यंत जोपर्यंत संभाजी राजे सुखरूप गडावर येत नाहीत. हुलं उठवली एवढ्यासाठी कि संभाजींच्या मृत्यूची बातमी औरंगजेबाला कळेल आणि औरंगजेब त्यांचा

पाठलाग सोडेल आणि मग सुरक्षित संभाजी राजे गडावर येतील आणि झालं तसचं संभाजी राजे सुरक्षित गडावर पोहोचले पण गेलेला शंभूराजा वेगळा होता आणि परत आलेला संभाजी राजा वेगळा होता. परत आला होता "धाकंला धनी","जाणता","परीपक्वं झालेला","मोघली रियासतीचा","राजकारणाचा" अभ्यास करून तयार झालेला......"संभाजी राजा"

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ०५ (वाचा आणि शेअरं करा)

"संभाजी राजांचं" वयं झालं दहा वर्ष. त्याचवेळी शिवाजीराजांनी संभाजी राजांना विचारलं, "संभाजी राजे आपण लेखणी तेज चालवता पण! आपली तलवारं?" अरे! उसळला छावा......"आज्ञा द्यावी आबासाहेब!!!" आणि आज्ञा दिली गुजरात खंबायप्रांत टिपण्याची आणि दहा हजाराची फौज घेऊनं बछड निघालं. दावेचा लोट काळ्या कबिनं धाकानं उरातं घ्यावा तसा शौर्याचा लोट घेऊन निघाला. कोसळला गुजरातवरं खंबाय टिपलं, बागानगर लुटलं, मामे जाधवरावं खासे कैद केले आणि स्वतःच्या शौर्याची मोहरं स्वराज्यावरं उमटवली आणि त्यांच्या युद्धनीतीनं अनेकांच्या नजरा विस्पारून गेल्या. शिवरायांना बातमी कळाली आणि कडाडले शिवराय..."द्या बत्ती तोफांना, आमचा बछडा जीत घेऊन रायगड जवळं करतोय!" आणि स्वराज्यावरं संभाजींचा पहिला पराक्रमं उमटला.

लेखणीच्या, बुद्धीच्याचं बळावरं न्हवे तरं मनगटांच्या परीक्षेत सुद्धा संभाजी राजे अव्वलं आले. यताकाल जिजाऊ माँसाहेबांनी मुलखी प्रशासनाच्या सगळ्या जबाबदाऱ्या संभाजी राजांवर सोपवल्या. दानंप्रमुख म्हणून त्यांना जबाबदारी दिली. मंत्र्यांच्या वरच्या ज्या तक्रारी यायच्या त्याचं निराकनं करण्याची जबाबदारी सुद्धा संभाजी राजांवर सोपविली. एवढचं न्हवे धर्माच्या बाबतीत जे जे खटले शिवरायांच्या न्यायालयापुढे यायचे ते सगळे खटले शिवराय आता "धर्मपंडित" असणाऱ्या संभाजी राजांच्या न्यायासनापुढं चालवायला देऊ लागले आणि संभाजी राजांच्या धर्माचे खटले बघता बघता त्यांचे न्याय लोकांमध्ये प्रियं होऊ लागले. "न्यायकठोरं संभाजी" म्हणून संभाजींची लोकप्रियताही वाढली. जनतेच्या कल्याणाचं सूत्रं संभाजी राजांनी आपल्या काळजात जपलं कारणं! शिवरायांनी दिला होता महामंत्र,""रयतेच्या डोळ्यातला एक अश्रूही राजाला एका बलवान शत्रूपेक्षा भारी वाटतो...एकवेळ शत्रूनं पराभव केला तरी चालेल पण! रयतेच्या डोळ्यातल्या अश्रूंनी राजाचा पराभव होता कामा नये""

आणि संभाजीराजे त्याचं शिवरायांच्या पाऊलावर पाऊल टाकून रयत जपत होते. अगदी मार्दवतेनं, पोटच्या लेकासारखे.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ०६

(वाचा आणि शेअरं करा)

यताकाल संभाजी राजाचं वयं होतं सतरा वर्ष. महाराष्ट्र एका नव्या जाणीवेच्या आनंदाला आतुरं झाला. रायगड आनंदानं न्हाला होता. कारण होतं "शिवरायांचा राज्याभिषेक". साडेसातशे वर्षापूर्वीचा घनदाट अंधार हटवून राजे "छत्रपती" होणारं होते. "या म्लेंच्छ बादशाहीमध्ये एक 'मराठा' एवढा पातशहा झाला" हि गोष्ट काही साधी झाली नाही. असं सभासदांनी लिहून ठेवलं. तो देखणा सोहळा शिवरायं "छत्रपती" होणारं. पण! त्याचं वेळी काहींनी शिवरायांच्या क्षत्रियत्वावरंच आक्षेप घेतला. शिवरायं क्षत्रीयं नाहीत. सबब! त्यांना राज्याभिषेकाचा अधिकारं नाही. यताकाल "गागाभट्ट" काशीवरून येते झाले आणि त्यांच्या सामोरं बसले. "धर्मपंडित" संभाजी राजेंनी "गागाभट्टाना" पटवून दिलं. गागाभट्टानी संमती दर्शवली आणि रायगडावर राज्याभिषेक झाला. साडेसातशे वर्षापूर्वीचा अंधार हटवला, लोकंशाही राज्यं निर्माण झालं, लोकंकल्याणकारी राज्यं निर्माण झालं, शिवंकल्याणकारी राज्यं निर्माण झालं, शिवशाही अवतरली. रयतेच्या डोळ्यांच्या कडा आनंदानं पाणावल्या. राजा "छत्रपती" झाला. पण! त्याचवेळी इतिहासात आणखी एक घटना घडली, आत्तापर्यंत मराठ्यांची पोरं फक्त सरदारं पुत्रं होती. "संभाजी राजे पहिले 'छत्रपती' पुत्रं ठरले", "संभाजी राजे पहिले 'युवराज' झाले.

या घटनेपर्यंत संभाजी राजांवर एकही आरोप नाही, एकही डाग नाही. पण! या घटनेनंतर संभाजी राजांच्या चारित्र्याचं पाणी असं काही वेगळ्या पाटेनं वळवून देण्यात आलं कि, मुळचा "संभाजी राजाच" हरवून गेला. 'मल्हारं रामराव चिटणीस' या बखरकारानं आपल्या खापरं पंजोबाला संभाजीनी हत्तीच्या पायी दिलं याचा राग मनात घेऊन "संभाजी राजांचं" अत्यंत विकृत चित्रणं केलं. सभासद बाखरानही तसंच केलं. या दोन बखरींचा आधार घेऊनच मग! पुढचं लेखन झालं आणि "संभाजी राजा" बदनाम होत राहिला. संभाजी राजांवर आत्तापर्यंत ६० नाटकं, आणि २७ चित्रपटं आले. खुद्द दस्तूरं खुद्द शिवरायांवर सुद्धा एवढे झाले नाहीत. आम्हाला चकचकीत जगण्याची सवयं लागलीये. चित्रपट निर्मात्यांनी, नाट्य निर्मात्यांनी, कादंबरीकारांनी, संभाजी राजाचं जगणं वास्तवतेनं न रेखाटता ते अधिक चकचकीत करण्याचा प्रयत्नं केला. थोरातांची कमळा, मोहित्यांची मंजुळा, गोदावरी अशी काय पात्रं आणली गेली "मोरेश्वरं आत्माराम पठारे" यांनी संभाजीवर पाहिलं नाटकं लिहिलं. या नाटकामध्ये त्यांनी तुळसा नावाचं पात्रं आणलं हीच तुळसा बेबंदशाही मध्ये औंधकरांनी आणली पण! नाटकाच्या प्रस्थावनेमध्ये औंधकर असं लिहितात कि या नाटकात योजलेलं "तुळसा" नावाचं पात्रं पूर्णपणे काल्पनिक असून तिचा इतिहासाशी काडीमात्र संबंध नाही. पण! तीन तास नाटकं बघताना आम्हाला प्रस्थावना वाचून दाखवली जात नाही, "तुळसा" खरी का खोटी याचा पत्ता आम्हाला लागतं नाही. पण! तीन तास नाटकात संभाजीबरोबर तुळसा दिसते आणि मग! नाटक संपल्यावर आम्ही म्हणतो, "एवढे आता दोघं तीन तास होते बरोबर म्हटंल्यावर असणार काहीतरी दोघांच.".....उगं दाखवत्यात काय!!!

सत्याच्या तळाशी, वास्तवाच्या मुळाशी आम्ही जात नाही आणि मग एखादं "नाहक व्यक्तीमत्वं" बदनाम होत राहतं हि आमची सगळ्यात मोठी शोकांतिका आहे.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтєву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ०७

(वाचा आणि शेअरं करा)

चित्रपटं काही बघितले आम्ही "थोरातांची कमळा", "मोहित्यांची मंजुळा" काय दाखवलं? "थोरातांच्या कमळा"मध्ये, "संभाजी राजे" या थोरातांच्या कमळावर जबरदस्ती करतात. तो आघात सहन न झाल्यामुळे थोरातांची कमळा "आत्महत्या" करते. चित्रपटाच्या शेवटी ती समाधी सुद्धा दाखवली आहे. पण! निवेदन आहे, हि त्या थोरातांच्या कमळाची समाधी निदान त्याच्यावरं काय लिहीलंय ते बघावं तरी! काय लिहीलंय ते वाचलं आश्चर्याचा धक्का बसला......!!! थोरातांच्या कमळाचं निधन पावल्याचं सालं होतं "१६९८ सालं" आणि संभाजी राजाचं निधन झालायं "१६८९ साली" म्हणजे संभाजी राजांच्या मृत्युनंतर नऊ वर्षांनी थोरातांची कमळा मेली. मग! तीच्यावरं जबरदस्ती करायला "संभाजी राजांच" भूत गेलं होत का?

अजूनही प्रश्नं नाही पडला आम्हाला. ३५० वर्षे झाली उघड्या डोळ्यांनी आमच्या राजाची बदनामी बघत बसतो आम्ही उघड्या डोळ्यांनी. अरे! शिव छत्रपतींचा पुत्रं आहे. कल्याणच्या सुभेदाराची सून आईच्या मानाने माघारी पाठवली त्या त्या राजाचा पुत्रं आहे. अरे! तत्कालीन काळात कईक स्त्रियांचा राणीवास असणं काही गैरं न्हवतं, ना कक्षाळा ठेवणं समाज संमत होतं. किती आहेत संभाजी राजांच्या चरित्रात, दोन नावं आढळतात "दुर्गाबाई" त्याही कैदेत आणि राहिल्या फक्तं "येसूबाई"..."स्त्री सखी राज्ञी जयती" महाराणी येसूबाई यांच्याशिवाय चरित्रातं नावं आढळत नाही कुणाचं. का? स्वतः संभाजी राजांनी राजारामाची तीन लग्नं केली, संभाजी राजांनी सहा तरी करावी.

अरे! तो अकबरं औरंगजेबाचा मुलगा महाराष्ट्रात आलाय संभाजींची मदत मागायला आणि त्याला मैत्रीचं प्रतीकं म्हणून संभाजी राजांनी "मोत्याचा कंठा" भेट म्हणून दिला. आणि या नादान अकबरानं तो "मोत्याचा कंठा" एका नर्तकीला भेट म्हणून दिला. संभाजी राजांना हि वार्ता कळली आणि धाडदिशी कडाडले संभाजी राजे, "ज्याला मैत्रीची कदरं नाही त्याच्याशी कसंलही पत्रं आम्हाला जोडायचं नाही, फिल्तोर सवलती बंद करा...!" का? तरं मी दिलेला मैत्रीचा कंठा त्या अकबरानं नर्तकीला दिला.

एवढी साधी गोष्ट ज्या "सर्जा संभाजी राजाला" सहन होत नाही तो चारित्र्याच्या बाबतीतं कसा असेल. बाजार गप्पा आहेत सगळ्या बाजार गप्पा...!!!

क्रमशः

ρ∂ƒ cяεαтє вү ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ०८

(वाचा आणि शेअरं करा)

"संभाजी महाराज" व्यसनी असं रेखटलंय काहींनी. काही काही नाटकात तरं इंट्रीच ग्लास घेऊन दाखवली. अरे! कुठून लागला शोधं?

काफिखान तो औरंगजेबाच्या दरबारात होता अख्बारी. आपल्या सातारंला "ग्रांन्डफ" नावाचा इतिहासकार होता. त्याने मराठ्यांचा इतिहास लिहीला. आधार त्या काफिखानाचा घेतला. त्या काफिखानानं "संभाजी राजांच" वर्णन करताना लिहून ठेवलयं, ""तो संभाजी स्वतःच्या बळावरं, शौर्याच्या बळावरं एवढा बुलंद आणि बलाढ्य झालायं कि कुणी शत्रू त्याच्यावरं आक्रमणं करायला धजावेनाच...! जणू संभाजी राजाला आता सत्तेची नशा चढलीए"" काय लिहीतोय तो? " संभाजी स्वतःच्या शौर्याच्या बळावरं एवढा बुलंद आणि बलाढ्य झालायं कि कोणी शत्रू त्याच्यावरं आक्रमणं करायला धजावेनाच जणू काय त्याला सत्तेची नशा चढलीए" याचंच भाषांतर "ग्रांन्डफ" नि इंग्रजीत केलंय "सत्तेची नशा चढलेला राजा"......"Antoxited With The Wine Of Volian Pride" भाषांतर अगदी बरोबर आहे. पण! आमचं इंग्रजी उत्तमं आहे त्यामुळं आम्ही वाचलं.

"Antoxited With The Wine Of Volian Pride"........"Antoxited With The Wine ??...Wine?? घेत होते संभाजी!!! लावला अनुमान.

एक पत्रं मिळालंय म्हणे, संभाजीराजांनी पोर्तुगीजांना पाठवलंय!!!......"आम्हाला दारूची दोन पिंप द्या". एकजण म्हंटला "मागवला असेलं Stock" अरे! कायं???......अरे!!! मागवलेली दारू प्यायची नाही, मागवलेली दारू तोफेला लागणारी दारू आहे. एवढं जरं तुम्हा लिहीणाऱ्या कळंत नसेल तरं तुम्ही लिहीताना घेतलेली का? याचं संशोधनं होणं गरजेचं आहे. सुपारीच्या खांडाचं व्यसनं नाही संभाजी राजाला......सुपारीच्या खांडाचं!!!...अरे!!! बत्तीस वर्ष झुंजत राहिलाय "छाव्यासारखा".

अजीबात नाही व्यसनी माणसाला नाही शक्यं होत. अरे! बेफाम अत्याचारं,अन्यायं सोसले. चाळीस दिवस औरंगजेबाच्या छावणीत!!! सहन होत नाही, शरीरंसंपदा तशी असावी लागते. आपल्या राजानं ती कमावलीये!!!...कमावलीये!!!. एकंही व्यसनं नाही त्याला एकंही.

क्रमशः

ρ∂ʃ cяєαтє ву ηιкнιɫ αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ०९

(वाचा आणि शेअरं करा)

आणखी काही आरोप केले गेले "संभाजी राजांवर". "संभाजी राजे" दीलेरंखानाला जाऊन मिळाले, संभाजीराजे फुटीर, छत्रपतींचा पुत्रं मोघलांना सामील......

नाही, "शिवाजीराजे" कर्नाटकच्या स्वारीवरं निघालेत, सगळं सैन्यं त्यांच्या सोबतं आहे. त्यावेळी बहादूरगडाला दीलेरंखान आलाय, तो स्वराज्यावरं आक्रमणं करायची भीती आहे. महाराजांनी "आदिलशाही" आणि "गोवळकोंड्यात" भांडणं लावून दिलीतं. त्यामुळे ते स्वराज्यावरं आक्रमणं करणारं नाहीतं. पण! दीलेरंखान मोकळा आहे. आपण कर्नाटकात निघाल्यावरं दीलेरंखान आक्रमणं करू नये यासाठी त्याला रोखण्याची जबाबदारी शिवरायांनी "संभाजी राजांना" दिलीये. त्यांना "शृंगारपुरचं" सुभेदारं म्हणून नेमलंय. आणि ससैन्यं शिवरायं बाहेरं असताना निव्वळं बुद्धीच्या बळावरं "संभाजी राजांनी" दीलेरंखानाला रोखलंय,राजे येईपर्यंत रोखलंय. आणि त्यावेळी पत्रंव्यवहारं केलायं..."आम्हाला पराक्रमाची संधी हवीयं, आम्हाला आमचा पराक्रमं दाखवायचायं, इथं स्वराज्यातं ते शक्यं होईना, मला संधी द्यावी!!!". दीलेरंखानाने लगेचं उलट टपाली पत्रं पाठवलं..."अरे! तू तिथं गप्पं काय बसलायं? औरंगजेबाची इच्छा आहे सह्याद्री जिंकायची, तू ये चंल ये माझ्याकडं. आपण दोघं मिळून सगळा दख्खनं जिंकू". संभाजी राजांनी त्याला उलट टपाली कळवलं, "या राज्याची जबाबदारी मझ्यावरं सोपवून माझे वडील परराज्यात गेले आहेत. ते परत येईपर्यंत मी तुझी जबाबदारी स्वीकारुं शकतं नाही". म्हणजे संभाजीराजे येतोही म्हणत नाही आणि संभाजीराजे येत नाही असंही म्हणत नाही. निव्वळं झूलवतं ठेवलंय. राजे परत आले. पन्हाळ्यावर दोघांची चर्चा झाली, बुत झालं आणि मग! राजे रायगडावर गेले. यताकाळं निरोप पाठवू सांगून मध्ये सहा-सात महिने गेले. आता संभाजीराजांना पळूनचं जायचं होतं तर राजे कर्नाटकात असतानाच ते सोपं होतं. आणि मग! एके दिवशी रायगडावरून राजाचं पत्रं येतयं. आपण रायगडास न येता परळीस जाने उचित. आणि मग! संभाजी राजे निघाले तिथून आता परळी म्हटंल कि पुन्हा " समर्थ रामदास स्वामींचा" उल्लेख आला. ""मग! संभाजी राजे बिघडलेले होते, त्यांना मार्गदर्शनाची गरजं होती म्हणून शिवरायांनी त्यांना समर्थांकडे पाठवलं"". पण! त्या क्षणी समर्थ परळीच्या किल्ल्यावर हजरंच न्हवते आणि राजांना हे माहिती

असंलचं पाहिजे,कानोकान खबरी असतात त्यांच्याकडं. मग! ज्या काळात समर्थ परळीच्या किल्ल्यावर नाहीत त्याच काळात संभाजीना तिथं पाठवायचा उद्देश्य काय? आणि परळीपासून तेरा मैलावरं माहुलीला दीलेरंखानची लोकं आलीत तिथून अवघ्या तेरा मैलावरं जाऊन संभाजीराजे मोघलांना सामील झाले. हा सगळा परिक्रमेचा भाग बघितला तर संभाजी राजांनी पाळूनच जावं यासाठी हे जाणीवपूर्वक केलेलं नियोजन आहे. कारण! वस्तूस्थिती ती आहे, शिवाजी राजे कर्नाटकावरून परत आलेत, सैन्यं थकलंय, शस्त्रं मोडलीत, दीलेरंखानाशी लगेच मुकाबला करू शकत नाही यासाठी आणखी काळं दीलेरंखानाला रोखनं गरजेचं आहे म्हणून शिवरायांनी संभाजी राजांना सांगितलंय...."''जा त्यांच्याकडं रोखून धरा"" आणि हीच चाल शिवाजीराजांनी आधी एकदा खेळली आग्र्याच्या भेटीवरून परत आल्यावरं. औरंगजेब आता हल्ला करणार हे बघितल्याबरोबर शिवरायांनी पुन्हा माफीचं पत्रं पाठवलंय, "आमच्याकडून चूक झाली, आम्ही तुम्हाला न सांगता आलो...असुद्या! आता माझा पुत्रं पुन्हा मनसबदारं म्हणून घ्या". आणि संभाजींना पुन्हा त्यांनी मुआजमकडं पाठवलंय आणि तेच याहीवेळी केलं संभाजींना त्यांनी पुन्हा दीलेरंखानाकडे पाठवलंय आणि जेवढा काळं संभाजी दीलेरंखानाकडे आहेत तेवढा काळं दीलेरंखानानं एकदाही स्वराज्यावरं हल्ला केला नाही. ""भूपाळगडाचा एकंच किस्सा पण! त्या भूपाळ गडाबद्दल संभाजी राजे बाकरे नावाच्या ब्राम्हणाला दानपत्रात ते स्वतः लिहितात...."तो दीलेरं भूपाळगडाची इच्छा धरूनं माझ्यासमोरं आला त्यावेळी शंकरासारखा मी माझा तिसरा नेत्रं उभारूनं क्रोधं प्रकटं केला". म्हणजे सरळं आहे संभाजी राजांची इच्छा नाही स्वराज्यावरं आक्रमणं करायची. एवढी एकचं घटना". पण! तोही गड मराठ्यांनी लगेच जिंकून घेतलाय. संभाजीराजे जोपर्यंत दीलेरंखानाकडे आहेत तोपर्यंत दीलेरंखानाने स्वराज्यावरं आक्रमणं केलेलं नाही आणि संभाजींनी ते जाणीवपूर्वक होऊ दिलं नाही. पण! याच काळात शिवाजीराजे मात्रं मोघालांचे किल्ले घेत निघाले.

क्रमशः

ρ∂ʃ cяєαтє вy ηιкнιɬ αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग १०

(वाचा आणि शेअरं करा)

"शिवाजीराजे" मोघालांचे किल्ले घेत निघाले असताना, दीलेरंखान काहीच हालचाल करेना म्हणजे त्याचे किल्ले घेत असून सुद्धा दीलेरंखान काही प्रतिकारं करत नाही. त्यामुळे तो मुआजम वैतागला आणि त्यानी दीलेरंखानाला पत्रं लिहिलं..."शिवाजी राजे" आपले किल्ले-किल्ले घेत आहेत, तू गप्प काय बसलाय!!!" तरीसुद्धा हालचाल नाही दीलेरंखानाची. आणि मग! शेवटी औरंगजेबाच पत्रं आलंय...."तू नोकर कुणाचा? माझा कि शिवाजीचा! आणि मग! दीलेरंखानाला हालचाल करणं भाग पडलं. दीलेरंखान पन्हाळ्याला आक्रमणं करायला निघाला आणि मध्ये "आसनी" ला मुक्कमं पडला. "भीमसेन सक्सेना" नावाचा इतिहासकारं लिहितो, ""शिवाजींची माणसं गुप्तंपणे संभाजीराजांकडे येत-जात असतं. एके दिवशी शिवाजी महाराजांच्या माणसांनी संभाजी राजांना बाहेर काढले. विजापुरला मह्सुद्खानाकड़े नेले आणि तिथून मग! संभाजी राजे पन्हाळ्यावरं आले. म्हणजे शिवाजी महाराजांच्या माणसांनीच संभाजीराजांना सोडवून नेलंय, आता संभाजी जर फितूरं असते तर शिवरायं त्यांना परत कसे आणतील?. "खंडोजी खोपडा फितूरं झाला, शिवरायांनी त्याचे हात पाय तोडले". "संभाजी कावळी मोघलांना जाऊन मिळाला, प्रतापराव गुजराकर्वी त्याला ठारं मारलं". मग! शिवरायं तो न्याय संभाजीराजांना का लावत नाहीत? साधी गोष्ट आहे हि चाल शिवरायांची आहे. हे जे केलंय संभाजीराजांनी ते शिवरायांच्या इच्छेनुसारच केलंय आणि शिवरायांच्या राजकीय चाली अशाच राहिल्यात. ते गणेवाडीला जातो म्हणून सांगतात आणि सुरतेची लुटं करून परत येतात, संभाजींच वाटेत निधन झालं म्हणून सांगतात आणि संभाजींना सुखरूप घेऊन येतात. आपण अलीकडे म्हणतोच कि आजकालचे

राजकारणी बोलतात एक आणि करतात एक. त्याचं राजकारणंच काही काळात नाही. आत्ताच्या राजकारण्यांच राजकराणं आम्हाला कळत नाही मग! ३५० वर्षापूर्वीच्या शिवरायांच राजकारण आम्हाला काय कळणार?

गुप्तं गोष्टी आहेत. गोपनीय भाग आहे. काही लोकं म्हणतात, "पण! आमच्याकडे पत्रं आहेत ना संभाजी राजांनी दीलेरंखानाला पाठवलेली, आम्ही तुमच्याकडे यायला आतूरलोय, आम्हाला तुमच्याकडे घ्या". आता मला एक सांगा हा जरं गुप्तं आणि गोपनीय कटाचा भाग असेल तर संभाजी राजे दीलेरंखानाला असं लिहितील का.....,"राजमान्य राजश्री दीलेरंखान साहेबांशी शीरसाष्टांग दंडवत", त्याचं काय झालं आमचे आबासाहेबं नुकतेचं कर्नाटकंवरनं परत आलेत. आमचं सैन्यं थकलंय, शस्त्रंपण नीट तयार नाहीत त्यामुळे आमचे आबासाहेब म्हंटले, आपण काय आत्ताच दिलेरंखानासोबत लढू शकत नाही, मग! संभाजी राजे करता का असं!!! जाता का दिलेरंखानाकडे जावा जरा वर्ष दीड वर्ष तिथं जाऊन त्यांना गाफील ठेवा, झाली तयारी कि आम्ही तुम्हाला कळवतो मग! या इकडं"...कसा काय वाटतो आमचा कट दिलेरंखान साहेबं तुम्हाला, मग! काय म्हणताय तुम्ही? मग! येऊ का तुमच्याकडं?

अहो! साधी गोष्ट आहे. एवढं पण आपल्याला कळायला नको. एवढचं नाही संभाजी परत आल्यावर शिवरायं त्यांना फ्रेन्चांशी वाटाघाटी करायचे अधिकार देतात. मोघलांच्या विरोधी आक्रमणाची जबाबदारी ते संभाजींवरच सोपवतात. त्यामुळे संभाजीराजे "स्वराज्यद्रोही" नाहीत हि वस्तुस्थिती आहे. हि खरी गोष्ट आहे. संभाजी राजांच्या चारित्र्यावरचे डाग सरळ सरळ आमच्या लक्षात येतात. काही अर्थ नाही त्यात. एक अत्यंत शिवरायांना अपेक्षित असणारा वारसदार या महाराष्ट्राच्या मातीनं महाराष्ट्राला बहाल केलायं. ज्यांनी "स्वराज्य-स्वराज्य" उभं केलयं.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ११

(वाचा आणि शेअरं करा)

३ एप्रिल १६८० शिवरायांच निधन झालं. त्यावेळी संभाजी महाराज नुकतेच पन्हाळ्याला आलेत. ते रायगडावर न्हवते याच कारण! ते बुऱ्हाणपुराच्या स्वारीत अडकले होते. राजारामाचं लग्नं ते स्वारीत असतानाच झालं. म्हणून ते लग्नाला येऊ शकले नाहीत. ते कैदेत वगैरे अजिबात न्हवते. हि वस्तुस्थिती आहे. आणि शिवरायांच निधन झाल्यावरं शिवरायांच्या निधनाची वार्ता लोकांना कळाली तरं रायतेतं गोंधळ माजेल आणि शत्रू आक्रमणं करायची भीती आहे. म्हणून शिवरायांच्या निधनाची वार्तासुद्धा गोपनीय ठेवण्यात आली. पण! त्याचवेळी मंत्री रायगडावर जमा झाले. मंत्र्यांचा नवीनच डाव सुरु झाला. कसंही झालं संभाजीराजे गादीवर येत उपयोगाचे नाहीत. कारण! संभाजीराजे "धर्मपंडित", "संभाजी संस्कृत चे ज्ञानी", "संभाजी निर्णय क्षमता असणारे", "संभाजी प्रचंड बुद्धिमान", "संभाजी प्रचंड शौर्यशाली". संभाजी जरं गादीवर आले तरं अत्ताच ते आपला मुलायजा ठेवत नाहीत, पुन्हा तरं आपल्यालाच ठेवणार नाहीत. त्यामुळे कसल्याही परीस्थितीत संभाजी गादीवर येत कामाच नयेत. त्यापेक्षा राजारामाला गादीवर बसवूया. राजाराम अल्पवयी आहे, त्याला कारभारं जमणार नाही म्हणजे कारभारं आपल्याच हातात येणारं. स्वार्थी मंत्र्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी कसल्याही परिस्थितीत संभाजीला गादीवर येऊ न देण्याचा चंग बांधला. त्यासाठी सोयराबाइंना सरळ सरळ हाताशी धरलं आणि तिकडं कराडला "हंबीरराव मोहिते" जे सोयराबाइंचे सख्खे

बंधू, मराठेशाहीचे सरसेनापती, सरलष्करं, त्यांना निरोप पाठवला, पन्हाळ्यावर संभाजीला कैद करण्यास जायचयं. आपण ससैन्यं तयार रहा. त्यांची भूमिका अशी कि कुणाला वाटणारं नाही, आपला भाचा गादीवर येऊ नये. आता राजारामाला गादीवर बसवतोय म्हंटल्यावर मामा "हंबीरराव" तरं लगेच तयार होतील आणि झालंही तसंच हंबीररावांनी लगेच कळवलं "मी तयारच आहे, तुम्ही या मिळूनच संभाजीला कैद करायला जाऊ". मंत्री आनंदले, निघाले, आले. तळबीडला आले हंबीररावांच्या पुढं. चला आता सैन्यं घ्या संभाजीला कैद करायचयं. आणि त्याच क्षणी हंबीररावांनी डाव बदलला, बुंबरान त्याचं त्यांच्यावर उलटवलं. आल्या मंत्र्यांना सरळ काढण्या चढविल्या. सगळे कैद केले आणि पन्हाळ्यावर नेऊन संभाजींच्या पायावर घातले आणि कडाडले सरलष्करं..."ही घ्या नादान हरामजाद माणसं"..."राजं! जाऊन अजून अकरा दिवस नाही झाले आणि त्यांच्या पोटच्या गोळ्याला कैद करायला आलेत....घ्या ताब्यात!!!" आणि मंत्री फ़िल्तोरं गिरफ्तार झाले. संभाजी राजांनी त्यांना कैदेत ठेवलं. एक महिना पन्हाळ्यावरचं कारभारं चालवला आणि मग! संभाजी रायगडावर आले.

पण! या काळात संभाजींनी हंबीररावांना विचारलं..."मामासाहेब, आपण राजारामांचे मामा असून, आमच्या मातोश्री सोयराबाई साहेबांचे सख्खे बंधू असून आपण त्यांच्यापाठीशी उभं राहण्यापेक्षा आमच्या पाठीशी कसं काय उभं राहिलात?" त्यावेळी हंबीररावांनी सांगितलं, "या मंत्र्यांचा डाव लक्षात येताच आणि मंत्री माझ्याकडे येताच सोयराबाइंनी मला कळवलं कि, कैसेही करून संभाजी राजांना वाचविणे. सोयराबाइंनी निरोप दिल्यामूळच मी आपल्याला वाचवू शकलो". दुर्दैवानं सोयराबाइंची भूमिका मराठ्यांच्या इतिहासात "कैकैयी" सारखी करून टाकल्यामुळं त्याही व्यक्तित्वावर अन्याय झालायं ही सगळ्यात मोठी वस्तुस्थिती आहे. त्यांना भिंतीत छिलून-बिलून मारले, असल्या काही गोष्टी कल्पोकल्पित रंगवल्यात. अजीबात नाही, सोयराबाइंना कुणीही भिंतीत छिलून मारलं नाही उलट या घटनेनंतर दीड वर्ष पुढं सोयराबाई जिवंत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. रायगडावर संभाजीराजे आले. शिवरायांचे अंत्यविधी सुद्धा नीट झाले न्हवते. संभाजी राजांनी पहिल्यांदा ते करवून घेतले. रायगडावर शिवरायांची समाधी उभारली आणि तब्बल स्वराज्याची घडी नीट बसवून तब्बल नऊ महिन्यांनी स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. "संभाजी राजे" स्वराज्याचे दुसरे "छत्रपती" झाले.

क्रमशः

ρ∂ʃ cяєαтєву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग १२

(वाचा आणि शेअरं करा)

एके दिवशी "संभाजी राजांनी" सरलष्करांना विचारले, "मामासाहेब स्वराज्याचा घाट बांधावा म्हणतो, पण! औरंगजेबाचाही थाट उतरला पाहिजे. जागा शोधा मौक्याची". आणि हंबीररावांनी जागा काढली अगदी मौक्याची..."राजं! एक जागा हाय "बुऱ्हाणपुरा दारंउक् मुल्खदख्खन". "बुऱ्हाणपुरा" म्हणजे औरंगजेबाची दख्खनेतील राजधानी. एखाद्या सुंदरीच्या गालावरं तीळं शोभावा असा "बुऱ्हाणपुरा" शोभतो. ऐश्वर्य, संपत्ती, सामर्थ्य...अफाट! अन त्याच वेळी कडाडला छावा!..."मग, टाका छापा त्या बुऱ्हाणपुरावर, करा कोळसा पुरा त्याचा". अरे! सुटले मराठे, बुऱ्हाणपुराचे सतराचे सतरा पुरे धुतले. काही काही ठेवलं नाही. अरे! बुऱ्हाणपुरा म्हणजे औरंगजेबाचं "हळवं काळीज पानं". परं चेंदा-मेंदा करून टाकला मराठ्यांनी. पहिला तडाखा सोसतो न सोसतो तोच संभाजी राजांनी दुसरा तडाखा दिला "औरंगाबाद". औरंगजेबाच्या नावानी बसवलेले "औरंगाबाद". संभाजी राजांनी त्यालाच हात घातला. इतकं लुटलं, इतकं धुतलं कि औरंगजेबाच्या नावाशिवाय तिथं काही ठेवलंच नाही. एखाद्या बागेचं सौंदर्य डोळ्यात साठवावं म्हणून डोळे मिटावे आणि पुन्हा उघडून बघावं तरं पुढं स्मशानं दिसावं अशी अवस्था "औरंगाबाद"ची केली होती. औरंगजेब चरफडला, तरफडला भयाण वैतागला पण! त्याचवेळी त्याला तिसरा

तडाखा बसला. दस्तूरं खुद्द औरंगजेबाचा मुलगा त्याचा शहजादा "अकबरं" औरंगजेबाच्या विरोधात उठला. आणि सरळ आला महाराष्ट्रात कारण! त्याला माहितीये, या पुऱ्या-पुऱ्या हिंदोस्थानात औरंगजेबाशी झुंज घेईल असा एकचं ""मर्द सर्जा"" आहे......""संभाजी""

तो आला सरळ संभाजी राजांकडचं. औरंगजेबाला दुसरं कोणी नमवू नाही शकत...औरंगजेबाला दुसरं कुणी झुकवू नाही शकत...औरंगजेबाला दुसरं कुणी मातीत गाडू नाही शकत......एकचं ""संभाजी""

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग १३

(वाचा आणि शेअरं करा)

संभाजी राजांजवळ मैत्रीचं फर्मान घेऊन आलेल्या अकबरला संभाजींनी हाताशी धरलं आणि आपल्या राजकारणाच्या पटावरच्या चाली खेळायला सुरवात केली. पण! लागोपाठ तीन तडाखे बसलेला औरंगजेब चवताळून उठला. आग्यामोहळं उठावं असा औरंगजेब पिसाळला आणि उचलली पाऊलं त्यांनी "खासे दख्खन" वरं औरंगजेबाचे "साम्राज्यं" म्हणजे आशिया खंडातलं सगळ्यात मोठं "साम्राज्यं". आणि संभाजींच "स्वराज्य" म्हणजे आशिया खंडातलं सगळ्यात छोटं "साम्राज्यं". मनंभर सैन्यं कणभर मराठ्यांना चिरडायला निघालं. औरंगजेबाच्या नुसत्या सरदारांची संख्या साडे चौदा हजार होती, कईक नातंलग, शहजादे, अफाट-अफाट सेनापती, चार लाखांचं सैन्यं, चौदा कोटींचा खजिना, चाळीस हजार घोडी, सत्तर हजार घोडी, पस्तीस हजार उंट. अरे! औरंगजेबाची छावणी पडली तरं तीन मैलांचा परिसर व्यापून जायचा. एवढं अफाट सैन्यं आलं चालून महाराष्ट्रावरं आणि सह्याद्रीच्या कड्यांवरनं कडाडला छावा!..."येऊद्या त्या औरंगजेबाला, अखेरं! त्याला त्याच्या मरणाची जागा कळली तरं...!!!" आता बघेल या छाव्याचा "गनिमी कावा". आणि बघता बघता संभाजी सज्ज झाला. वय वर्ष अवघं तेवीस. महाराष्ट्राचं आभाळ काळवंडून गेलं. औरंगजेबानं एकापाठोपाठ मोहिमी लगडल्या.

सरबुलंद खान, आलेखान, फ़तेह्खान, शहजादा अज्जम, बेदारबख्त मुअज्जम, शहाबुद्दीन खान, बहादूर खान, एक-एक नामचीन सेनापती अफाट ताकदीने महाराष्ट्राला कैचीत पकडायला चाहोबाजूंनी आत घुसवले आणि मराठे सज्ज झाले. संभाजी राजांच्या नेतृत्वाखाली त्यांनी मोघलांची लंगडेतोड चालू केली. मराठे सुसाट सुटले. जिथं भेटेल तिथं मोघलांना कपात राहिले. अरे! सरबुलंदखान मारं खाऊन परतला, फ़तेह्खान तोंड काळं करून गेला, तो बहादूर खान नुसता पळून पळून दमला, शहाबुद्दीन खानला तरं काही सुचेना. औरंगजेब चहोबाजूंनी नुसत्या शिखस्तीच्या बातम्या ऐकत राहिला. हार-पराभव, हार-पराभव. अरे! तेवीस वर्षाचा 'छावा' संभाजी मोघलांना पार सळो कि पळो करून सोडलं. तू महाराष्ट्रात येतो ना! संभाजी राजांनी विलक्षण युद्धनीती खेळली, मराठ्यांच्या फौजा सरळ मोघलांच्या प्रांतात घुसवल्या. इतकं इतकं फाडलं कि औरंगजेबाला काही कळेना, मराठे तिथं आले म्हणून सैन्यं पाठवावं तरं मराठे पुढं, मराठे तिथं गेले म्हणून सैन्यं पाठवावं मराठे त्याच्या पुढं, अरे! कुठं कुठं शिवावं? सगळीकडंच फाटत निघालंय. इथं शिवावं तरं तिथं मराठे फाडतायत, तिथं शिवावं तरं मराठे तिकडं फाडत निघालेत. कुठं कुठं? ठीगळं लावावी. वैतागून, संतापून गेला औरंगजेब. आपल्या सरदारांवर बरसत राहिला..."क्या करतें हो बंदोबस्त? खिल्लतें पेहेनके ख़ाली मारं खातें हो! इतनी फ़ौज दी दिमत ने कहाँ गयी ? कहाँ गया वों दख्खन का चुहाँ ?

तसा कुणी सरदार म्हणाला, "हुजुर वों संभा सैतान है!......अरे! फ़िर हम कहां सैतान से कम है!...फ़िर भी क्यों शिखस्त? फ़िर भी क्यों हार?" औरंगजेबानं मोठ्या थाटात मराठ्यांविरुद्धची मोहीम उघडली पण! संभाजी राजांनी त्याची पुरती वाट-वाट-वाट लावली. कडाडला संभाजी राजा,""आमच्याच वाटेवर येऊन...आमच्याशीच वाटमारी करणाऱ्याची...त्याच्या वाटेवर जाऊन...वाट लावल्याशिवाय...आमच्या वाटेवर परतत नाही आम्ही""..."तलवारीच्या टोकावर भाकरी भाजतात मराठे तुला भाजायला वेळं नाही लागणारं!!!" आणि बघता बघता मराठे भाजत-भाजत सुटले. त्या धगीनं औरंगजेब हैराण झाला.

क्रमशः

ρ∂ʃ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग १४

(वाचा आणि शेअरं करा)

संभाजी राजांना शिखस्त करण्यासाठी काय करावं? याच संतापानं औरंगजेब विचारं करू लागला. आणि कुणीतरी औरंगजेबाला सल्ला दिला, "हुजूरं! मराठों की जान है, उनके गड्किलोंमें...पहलें गड्किलें ले लेतें है! मराठें खुदबखुद आयेंगे घुटने टेंकते हमारें सामने!......बहुत खूब!!! ये बात सच है! आणि त्यानी विचारलं..."ऐसा कौनसा क़िला है? जो जल्द से जल्द लिया जा सकतां है!"

तरसला होता विजयासाठी औरंगजेब, तरसला होता. आणि मग! एकानं सांगीतलं, "हुजूरं! एक क़िला है! नाशिक जिल्ह्यातला". "दिंडोरी" पासून अवघ्या दहा मैलावरं असणारा "प्रभु श्री राम" तिथं विश्रांतीसाठी जायचे. त्यांची सेज तिथं आहे. म्हणून त्या किल्ल्याचं नावं पडलं "रामसेज"..."हुजूरं! छोटासा क़िला आहे. आणि मराठे?...अवघे सहाशे हुजूरं! , तोफखाना?...कुछ नहीं हुजूरं! , बज्मीयत?...कुछ नहीं हुजूरं!..."कौन जाएगा?" आणि उभा राहिला शाहबुद्दीन खान, "हुजूरं हम जायेंगे!!!"...कितने दिनों में ले लोगें क़िला? कितने दिनं?..."हुजूरं एक दिनं काफ़ी है! आज गया क़ल क़िला लेकें आया!". औरंगजेब खुश झाला, "बहुत खूब!!!"...दहा हजाराची फौज दिली. "ज़ाव ज़ाव हमें 'रामसेज' चाहिए!" आणि विजयाची खबर ऐकायला औरंगजेब आतुरला, निघाला शाहबुद्दीन खान. वेढा टाकला "रामसेज"ला. अरे! अफाट सेनासागर मराठ्यांचे अवघे सहाशे मावळे वरनं बघतायत. प्रचंड सैन्यं, तोफा, बारूद, बज्मीयत...अफाट!!! आणि बघता बघता शाहबुद्दीननं वेढा लावला, मोर्चे लावले आणि आदेश दिला. "यल्गारं...!!!" अनं निघाली मोघली फौज "रामसेज"वरं वेस ओलांडून पुढं-पुढं पारं निम्म्यापर्यंत पोहोचली. आमच्या मराठ्यांची हालचालं ना प्रतिकारं. शाहबुद्दीन खानाला वाटलं, बहुतेक न लढताच किल्ला देतायत वाटतं. मोठा उत्साह आला..."चलो आगे!...चलो आगे! ले लो क़िला. सैन्यं पुढं-पुढं-पुढं, सैन्यं निम्म्याच्या पुढं आलं तसे आमचे मराठे सावध झाले. किल्लेदारांची इशारत घुमली, मराठे उभे राहिले. हातातल्या गोफण्या थरारल्या, दगडं भरली...सुटली दगडं. "दणा-दणा-दणा-दणा,,थाड-थाड-थाड!!!" दगडं आदळू लागली. पत्थरांची बौछारं नुसती. त्या दगडांच्या मारांनी घायाळ झालं शहाबुद्दीनचं सैन्यं. पाठीला पाय लाऊन पळत सुटलं. त्या शाहबुद्दीनच्या मस्तकावर दगडं बसलेला ती जखम दाबीत शाहबुद्दिन म्हणाला..." कैसे है ये मराठें, पत्थरोंसे खेलतें है! " एका दिवसात किल्ला घेतो म्हणालेला तो शाहबुद्दीन खान रात्री खलबत खाण्यात जखमा शेकत बसला होता.

"क्या किया जाय अब?" त्यात एक सरदार होता मोठा त्याने युक्ति काढली, "हुजूरं ऐसा करतें हैं...बोलो!...नहीं काल आपण

चालत चालत गेलो दगडं डोक्यावरं बसली, उद्या चालत चालत नको जायला...मग!...सर्र्पटत, सर्र्पटत जाऊ म्हणजे दगडं आली तरी वरनं जातील आपल्याला लागणारं नाही. मोठी नामी कल्पना, फतेखानला पटलं..."ऐसा हि करेंगे!". दुसऱ्या दिवशी चढाई सुरु झाली. उरलं-सुरलं सैन्यं निघालं, निघालं-निघालं सरपंटत, सर्र-सर्र-सर्र करत पुढं, पुढं-पुढं-पुढं वेस ओलांडून पुढं पार निम्म्यापर्यंत. कुणी डोकं वरं करायला तयार नाही, चुकून डोकं वरं करायचो, डोक्यात दगड बसायचा, डोक्याला ताप नको बघ खाली आणि चाल पुढं, सर्र-सर्र करत निघालाय सैन्यं. आता जवळ-जवळ किल्ल्यावरं पोहोचणारचं. शहाबुद्दीन आनंदला "ले लिया किला...चलो आगे!" आणि हे सर्र्पटनारं सैन्यं टप्प्यात आलं तसे मराठे सावध झाले. रात्रंभर जागून तटबंदीवर मोठ-मोठ्या दगडी शीळा गोळा करून ठेवलेल्या. हे सैन्यं जवळ आलं तशा दगडी शीळा दिल्या नुसत्या ढकलून, गडगडा करत शीळा सुटल्या खाली. सर्र्पटणाऱ्या प्राण्यांना कायमचं सर्र्पटणारं करून मग! तळा जाऊन थांबल्या.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग १५

(वाचा आणि शेअरं करा)

शहाबुद्दीनला काही कळेना, "क्या किया जाय?" मग! त्यांनी स्वतःच्या तोफखाना प्रमुखाला बोलावलं, "क़ल तोफें लाना, डागों तोफें कीलें पर...बस्सं!!! तोफों सें कितने पंल में आएगा क़िला हाथ में?" तोफखान्याचा प्रमुख म्हणाला..."हुजूरं! दोन तासांत किल्ला तुमच्या पायावरं ठेवतो". आणि बघता बघता त्यानी तोफा लावल्या, रात्रं झाली आता सकाळी युद्धाला सुरवात होईल. सगळे मोघल निवांत झोपले, उद्या सकाळी उठायचं आणि तोफखाना लावायचा, बस्सं!!! तोफा चालू झाल्या कि किल्ला ताब्यात. पण! त्याचं रात्री सगळे निद्रादेत असताना दीड-दोनच्या सुमारास "मराठे" काही किल्ल्यावरून खाली आले. सरळ शहाबुद्दीनच्या छावणीत घुसले. सरळ-सरळ कापाकापी केली. सगळा हल्ल-कल्लोळ माजवला. मोघल जागे व्हायच्या आत "मराठे" परत गायब!

"छापा-छापा, मराठों का छापा"...निंद उडाली मोघलांची. शहाबुद्दीन चार्र्फडत राहिला. सकाळ झाली, तोफखाना प्रमुखाला तोफा लावायला सांगितलं, तोफा लागल्या, दारू ठासली आता फक्त पेटवायचं वातांन, अन तोफखाना प्रमुख पुढं गेला, तोफेला बत्ती लावणारं त्याचं वेळी वरनं "धाडं-धाडं" करत तोफेचा गोळा आला, शेजारीच "धाड्म-धूम" तसा तोफखान्याचा प्रमुख म्हणाला..."पीछे लो-तोफें पीछे लो" मोघलांचा तोफमारा सुरु व्हायच्या आधी मराठ्यांचा तोफमारा. त्या तोफखाना प्रमुखानं सगळ्या तोफा मागं घ्यायला लावल्या आणि पाठून गोळे सोडायला लागला, पण! तोफा मागे घेतल्यानं गोळे काय किल्ल्यावरं जाईनात. आता मागे आलो म्हणून गोळे जाईनात म्हणून पुढं यावं तर पुढं आलो कि मराठ्यांचे गोळे अंगावरं बरसतायत...करायचं काय?

शहाबुद्दीन खानानं विचारलं..."क्या हुआ?"......"काय होत नाही हुजूरं!, तोफा पुढं नेल्या कि त्यांचे गोळे अंगावर, तोफा मागं नेल्या तर आपले गोळे पोहोचेनात"......अरे! तुम्ही तर म्हणाले ना मराठ्यांकडे तोफा नाहीत!..."हुजूरं!, मराठ्यांकडे तोफा नाहीत पण! डोकं तर आहे"......म्हणजे?......"हुजूरं! मराठ्यांनी लाकडाच्या तोफा तयारं केल्यात,त्याला जनावराचं कातडं लावंलय आतनं"......"ठीक हैं,तोफ एक हि हैं!"......"साधी नाही तोफ हुजूरं!, आपल्या दहा तोफांना एक तोफ भारी आहे त्यांची"......"अरे! ठीक हैं, तोफा तयार केल्या पण! गोळे?, तोफगोळे कुठणं आणले त्यांनी?"..."हुजूरं!, मग "मराठे" रात्री कशाला आलते? हे गोळे आपलेच आहेत"

शहाबुद्दीन खानाला काही कळेना, काय?...काय?...काय?...करायचं!

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग १६

(वाचा आणि शेअरं करा)

महिना झाला, दीड महिने झाले, दोन महिने झाले, तीन महिने झाले, चार महिने झाले, पाच महिने झाले. सहाशे मावळे किल्ला अजिंक्य ठेवतायत. अरे! पुढं तसूभरं सरू देईनात. चार्‌फडला, वैतागला शहाबुद्दीन खान. शेवटी डोक्यातनं युक्ती निघाली तोफा मागे घेतल्या तर गोळे पोहोचत नाही ना...आदेश दिला सैन्याला, झाडं तोडा आजूबाजूची सगळ्या जंगलातली, सगळी लाकडं तोडली. दीड-दोन महिने काम चालू आहे.

शहाबुद्दीननं अफ्लात्म किमया केली. किल्ल्याच्या उंचीचा प्रचंड मोठा लाकडी बुरुंजच त्यांनी उभा केला, लाकडी दमदमा...का? तर तोफा आता या लाकडी बुरुंजावर नेउन ठेवायच्यात. किल्ल्याच्या उंची इतक्या, अन तितनं मग! खाली डागायच्या बस्सं!!!

साधी गोष्ट नाही, कौतुकं केलं पाहिजे शहाबुद्दीनचं कौतुकं!!! अरे! किल्ल्याच्या उंची इतका लाकडी बुरुंज आणि तोही केवढा पन्नास तोफा बसतील वरं आणि पाचशे सैनिक उभा राहतील वरं एवढा मोठा बुरुंज. सगळा बुरुंज बांधेपर्यंत मराठे शांत बघत राहिले. बुरुंज उभा राहिला, तोफाही वरं चढविल्या आता उद्या बुरुंजावरुन तोफमारी चालू करायची, किल्ल्यावरं किती दिवस लढतायत बघू?

रात्री सगळे थकले, मोघल शांत पडले आणि मराठे नेमके मध्यरात्री बाहेर पडले. त्या बुरुंजाच्या पुढं आले, दारुगोळा त्या बुरुंजाच्या कडेनी ठासून भरला. पूर्वी हुक्के असायचे हुक्के म्हणजे "गावठी बॉम्ब" हे मराठी हुक्के एका बाजूनी मोघलांना पत्ता लागू नये, मोघल छावणीमध्ये हुक्के टाकत राहिले. मोघलांचा कल्लोळ उडाला आणि तेवढ्या वेळात बुरुंजाभोवती सगळी दारू ठासली. सुरुंग पेरले, वातानी पेटवल्या आणि बघता बघता पेटली..."थुई-थुई-थुई" करत वातान पेटत गेली आणि "धाड्म-धूम" अवघा बुरुंज ढासळला, तोफांसकट खाली. मराठ्यांच्या किल्ल्यावर गोळे पडायच्या आधीच मराठ्यांनी बुरुंजाचाच निकाल लावला.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग १७

(वाचा आणि शेअरं करा)

वर्ष झालं, दीड वर्ष झालं, दोन वर्ष झाली. औरंगजेबानं शहाबुद्दीनला विचारलं, "तुम्हारा एक दिनं कितनें बरसों का होता है?"...अरे! एक दिवसात किल्ला घेतो म्हणालेला दोन वर्ष झाली,"आओ वापस!", शहाबुद्दीनला माघारी बोलवलं आणि पाठवला 'फ़तेह्खान'. "फ़तेह्खान" तुम्हारे नाम में हि फ़ते हैं! हमें फ़ते चाहिए!" वीस हजाराची फौज घेऊन आला, त्या "रामसेज" ला चिकटला, गोचीडीसारखा चिकटला, झुंजत राहिला, लढत राहिला. पण! मराठे टक्करां देत राहिले. अरे! टाप नाही मराठ्यांशी झुंजायचं, अजीबात नाही. तसूभरं पुढं सरकू देईनात. फ़तेह्खान वैतागला, संतापला काही काही करता येईना. अरे! सहाशे मराठ्यांनी सळो कि पळो करून सोडलं. त्या फतेह्खानला काही कळेना, शेवटी एक मांत्रिक त्याच्याकडं आला, म्हणाला..."हुजूरं! मी भूतं वश करायच्या कामात तरबेज आहे. मला फक्तं एक सोन्याचा नाग तयारं करून द्या, नाही तुम्हाला किल्ल्यावरं घेऊन गेलो तर मग विचारा...!

फतेह्खानानं या मांत्रिकावरं विश्वास ठेवला, त्याला सोन्याचा नाग तयारं करून दिला. मांत्रिकानं नाग छाती जवळ धरला आणि म्हंटला..."मी पुढं चालतो तुम्ही मागनं या...बघा माझी जादू!" मांत्रिक पुढं निघाला सैन्यं मागं. फतेहखानला वाटलं आता मराठे काही नाही करू शकत, मांत्रिकाची जादू आहे. तो वेस ओलांडून पुढं आला. मराठे नुसते बघतायत...एक नाही-दोन नाही येऊ द्या त्याला. निम्म्यापर्यंत आला,निम्म्यापर्यंत जसा आला तशी मांत्रिकाची छाती फुगली..."म्हंटलेलो कि नाय घेऊन जातो वरं, आलो कि नाय इतवर"...चला पुढं...पुढं-पुढं-पुढं टप्प्यात आला तसा वरनं गोफणीचा एक धोंडा असा "घुंग-घुंग-घुंग" करत आला त्या मांत्रिकाच्या छाताडावर, डोळं पांढरं करून मांत्रिक तिथंच पडला. नाग एकीकडं, मांत्रिक तिसरीकड, फतेह्खान पळत मागं!

अरे! जिथं माणसं काही करू शकत नाहीत तिथं भूतं काय करणारं? मराठ्यांनी फतेह्खानच्या भूतांचाही निकाल लावला.

क्रमशः

ρ∂ʃ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग १८

(वाचा आणि शेअरं करा)

तीन वर्ष झाली, साडे तीन वर्ष झाली, चार वर्ष झाली. औरंगजेबानी फतेह्खानला सांगितलं, "तूम सिर्फ़ नाम कें ही फ़तेहखान हो......आव वापस!"..."अब! कौन जाएगा?" आणि उभा राहिला कासम खान..."हम जायेंगे!"

पुन्हा झुंज चालू, पुन्हा लढाई चालू...चार वर्ष, पाच वर्ष, सहा वर्ष झाली. "रामसेज" अजिंक्यच राहिला. अरे! आपले शिवराय म्हणायचे..."माझा एक किल्ला मावळ्यांनी एक वर्ष लढवला, तरं माझे सगळे किल्ले घ्यायला औरंगजेबाला ३५० वर्षे लागतील". संभाजी राजांनी "रामसेज" नावाचा एकंच किल्ला सहावर्ष लढवला, सहा गुणिले साडे तीनशे. औरंगजेबाला सगळे किल्ले घ्यायला किती वर्ष लागतील???

अरे! टाप नाही टाप, वैतागला-संतापला औरंगजेब आणि त्यांनी त्याच रागात डोक्यावरची पगडी काढली...खाली आपटली, "जोपर्यंत त्या संभाजीला पराभूत करत नाही वा गिरफ्तारं करत नाही तोपर्यंत डोईवरं बादशाही पदाची पगडी घालणारं नाही". इथच महाराष्ट्रात मेला औरंगजेब पण! मरतेवेळी सुद्धा त्याच्या डोईवरं बादशाही पदाची पगडी न्हवती. मरेपर्यंत "संभाजी राजाने" त्याला ते भाग्यं मिळूच दिलं नाही. औरंगजेबाला मराठ्यांना पराभूत करताच आलं नाही.

सल..सल..सल करत होता औरंगजेब पण! काही काही उपयोग न्हवता. "अरे! औरंगजेब बोलत खूप होता,पण! सांगत काहीच न्हवता...औरंगजेब चालत खूप होता,पण! पोहोचत कुठचं न्हवता...औरंगजेब लढाया खूप खेळत होता,पण! जिंकत कुठचं न्हवता".

हि हि सगळी ताकद या सव्वीस वर्षाच्या "संभाजीची", अफाट ताकदीने औरंगजेबाला रोखलं, पुऱ्या दख्खनेमधला एक खण...एक खण नाही घेऊ दिला त्या औरंगजेबाला आपल्या "सर्जा संभाजीनं".

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग १९

(वाचा आणि शेअरं करा)

औरंगजेबानं जाळं टाकलं, "जंजीऱ्याच्या सिद्धीला" औरंगाजेबानी उकसवलं..."मराठ्यांवर चाल करा", पोर्तुगीजांना फितवलं..."चालून जा मराठ्यांवर", इंग्रज हाताशी धरंले..."आक्रमणं करा मराठ्यांवर"

पोर्तुगीज, इंग्रज, मोघल...बस्सं!!!

एक नाही,दोन नाही तब्बल बारा गडं उभारल्या स्वराज्याच्या विरोधात, आणि तब्बल बारा गड्यांवर निखराची पंजेफाड करत "सर्जा संभाजी राजा" झुंजत राहिला...झुंजत राहिला...बस्सं!!! औरंगजेबाच्या चेतावणीमुळं सिद्धीनं हैदोस मांडला. जंजीऱ्यातला सिद्धी, "राम पाटलानं" बांधलेला "जंजिरा" आदिलशाहीकडं आला आणि मग! सिद्धीकडं पोचला. आता हा सिद्धी म्हणजे "मुजोरं" आणि "माजोरं" झालेला. अरे! जंजीऱ्याला बेलाग संरक्षण दर्याचं, पोहोचणं कठीण तिथं. "शिवाजी महाराजांनी" कैक वेळा प्रयत्नं केला, "जिथं शिवराय तिथं विजय" पण! "जंजिरा" त्याला अपवाद ठरला. जंजिरा जिंकता आला नाही. त्याच्या भोवताली..."रोह्याची खाडी, दलदलीचा प्रदेश, आणि समुद्राचं बेलाग संरक्षण". जंजिरा जिंकणं सोपं न्हवतं.

हे हाप्शी सिद्धी जंजीऱ्यातून बाहेरं पडायचे, कटावरच्या गावातल्या बायका बाटवायचे, त्यांना समुद्रांत भरं तरवावरं आब्रू लुटत सोडायचे, आक्रोश किंकाळ्या तिथं वाऱ्यावरं भिजायच्या. माणसांना पकडायचे त्यांचे नाक, कान कापायचे, 'रक्ताळायचा'...'रक्ताळायचा' दर्या. अरे! किती बायका बाटवल्या असतील???...किती माणसं कापली असतील???...किती?किती? अकांत...अकांत मांडलाय. हि माणसं एकेदिवशी आली संभाजीकडं..."राजं!...राजं!, ह्यो सिद्धी माती करतूया पारं, बाया-बापड्या पळवतूया, भोगतूया, लुटतूया, माणसं बाटवतूया" आणि कडाडला छावा...!!! "आमच्याच मातीत येऊन आमचीच माती, त्या सिद्धीची एकदा माती केलीच पाहिजे! खेळू जंजीऱ्यावरं रक्ताची रंगपंचमी" आणि निघाला "सर्जा" जंजीऱ्यावरं पण! लढाया बुद्धीनं जिंकणारे "संभाजी" दंडराजपुरला आले, दंडराजपुरी ताब्यात घेतली. पण! त्याचं वेळी बघितलं "जंजिरा" बाहेरून जिंकता येणारं नाही. "जंजिरा" घ्यायचा असेल तरं त्याच्या पोटात हात आत घालूनचं कोतळा बाहेरं

काढला पाहिजे. आणि संभाजींची विलक्षण बुद्धी, विलक्षण चाल खेळू लागली.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग २०

(वाचा आणि शेअरं करा)

कोंडाजी पकडला गेला, कोंडाजीचे हात दारूगोळ्याच्या कोठाराला लागण्या आधीच कलम केले गेले. कोंडाजीला तोफेला बांधण्यात आलं. अरे! नगारंखाण्यावरं त्याच्या धडाचे तुकडे..तुकडे उडंवले, कोंडाजीच मस्तक नगारंखाण्याला टांगलं. अरे! त्या कोंडाजीच्या स्वामीनिष्ठ रक्ताचा अभिषेक दर्याला झाला आणि दर्या रक्ताळंला, 'चिंधड्या-चिंधड्या' उडवल्या. जे साथीदारं सापडले त्यांची मस्तकं मारली. मराठे कापले गेले, अरे! ज्या धडाक्याची वाटं संभाजी राजे बघत होते त्याच्या ऐवजी कोंडाजीच्या शरीराच्या 'चिंधड्या-चिंधड्या' करणाऱ्या धडाक्याचा आवाज त्यांच्या कानावरं पडला. अरे! चवताळला 'छावा..!' आणि सज्ज झाल्या मराठ्यांच्या तोफा..."द्या बत्ती तोफांना" आणि बघता बघता मराठ्यांच्या तोफेतून गोळे सुटू लागले. जंजीरा पाण्यात डचमळू लागला, नगारंखाणा पडला, सिद्धीचे सारे महाल आडवे झाले. "मराठ्यांचा एक तोफेचा गोळा...बलाढ्य!"

जंजीरा पारं उध्वस्त..उध्वस्त होत गेला. सिद्धी खैरतखान, सिद्धी कासमखान जीव मुठीत घेऊन पाळायला लागले. या संभाजीपुढं, या रौद्रापुढं टिकनं मुश्कीलं. तो सिद्धी खैरतखान एका टेकडीमागं लपून बसला आणि अचानक गोळा आला नजदीक बस्सं! काळजाचं पाणी..पाणी झालं, कळून चुकलं हा संभाजी आता सोडत नाही..बिलकुल सोडत नाही. पण! जंजीरा ताब्यात आता यायलाच निघाला, पण! ऐनवेळी दर्या सिद्धीच्या मदतीला आला, समुद्राला भरती आली, मराठ्यांना मागं सरावं लागलं. पण! थांबतील ते "संभाजीराजे" कसले.

अरे! मराठ्यांचा जन्म विजांच्या कडकडाटात आणि तोफांच्या गडगडाटातचं झालायं. आगीशी खेळणारी माणसं आम्ही पाण्याला भिउन पळणारं नाही. "संभाजी" आगीशी खेळणारा पाण्याला कुठंला घाबरतो. त्याचंवेळी विलक्षण युक्ती डोक्यातनं निघाली, "जे रामायणामध्ये प्रभू श्री रामांना सुचलेली"...."या दर्यालाच वेसण घातली तरं..?" आणि अंमल चालू झाला "दर्यातच पुलं बांधायचा"..कापसाच्या गाठी, लाकडाचे ओंडके, भलेमोठे दगड समुद्रात टाकले जाऊ लागले.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग २१

(वाचा आणि शेअरं करा)

बघता बघता सेतू तयारं व्हायला लागला पण! समुद्राच्या लाटां सेतू बंधू देईनात,लाकडाचे ओंडके किनाऱ्यावरं टाकू लागल्या,कापसाच्या गाठी बाहेरं फेकू लागल्या. पण! थांबतायत ते "संभाजी राजे" कसले. मोठ्या चिवटपणे काम चालू ठेवलं.

(कधी जंजीऱ्यावरं गेलात न तरं "संभाजी राजांनी" समुद्रात बांधलेला तो पुलं अजूनही दिसतो...दिसतो अजूनही)

दर्या बंधू देईना, पण! संभाजी हटायला तयारं न्हवते. सिद्धी खैरतखान, सिद्धी कासमखान पुरते उलथे..पालथे झालेले. आता! संभाजी सोडत नाही आणि आता जंजिरा जवळजवळ हातात आलाचं, मराठ्यांच्या तोफा आग ओकत होत्याच, "लांडा कासम", "कलाल बाघडी" या सिद्धीच्या तोफांनी कधीचं माना टाकलेल्या. मराठ्यांच्या तोफांची धग त्यांना सोसली नाही. आता जंजिरा हातात येणारचं पण! त्याचवेळी औरंगजेबानी जहरी चाल खेळली, "कल्याणला" हसन अली खान पाठवला आणि वार्ता संभाजी राजांना मिळाली..."कल्याणला हसन अली खान चालून आलाय" आणि संभाजींच्या काळजाचा ठोका चुकला. "कल्याण" म्हणजे "स्वराज्यं". जंजिरा घ्यायच्या नादात "स्वराज्यं" औरंगजेबाच्या घशात जायला नको. संभाजी राजांनी सरळं वेढा दादाजी पंत, वेसाजी पंतांवर सोपवला आणि संभाजी राजे कल्याणकडं चालते झाले. बघता बघता कल्याणला पोहोचले, हसन खानला तुडवं..तुडवं तुडवला आणि कल्याणवरं पुन्हा "भगवा" फडकला. पण! "जंजिरा" त्यापासून हातातनं गेला तो गेलाच, या घटनेमुळं "जंजीरा" काही हातात आलाच नाही.

पण! सिद्धीवरं अशी जरब बसवली संभाजी राजांनी की, संभाजींच नाव ऐकलं तरी जंजीऱ्याच्या काठंच दर्याचं पाणी चळाचळा कापायचं. इतकी अफाट!...अफाट! जरब बसवली "सर्जा संभाजी राजांनी"

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग २२

(वाचा आणि शेअरं करा)

अरब लोकं दर्यात यायचे कोकणातल्या बायका पळवायचे, बाटवायचे. "संभाजी राजांनी" आदेश दिला..."फ़िल्तोर गिरफ्तारं करा...!" आणि "कानोजी आंग्रेंनी" दोन-दोन जहाजं गिरफ्तारं केली. दोनशे अरब सापडले, संभाजी राजांच्यापुढं हाजीरं केले. संभाजी राजांनी बघितलं आणि सांगितलं......

(आपल्या साताऱ्याच्या शेजारी "वासोट्याचा किल्ला" आहे. दिवसा ढवळ्या तिथं कोणी जात नाही. इतकं प्रचंड जंगल, माणसाची बात सोडा पाखंरही तिथं फिरकत नाही. एकदा चुकूनं चार पाच पोरं गेली होती शेवटी "हेलीकॉप्टरं" नी शोधून..शोधून काढावी लागली. इतका भयाण आहे...खूप खूप भयाण, चिटंपाखरु नसतं, एखादा नुसता शांततेने मरेल तिथं इतकी भयाण शांतता)

संभाजींनी सांगितलं, "या दोनशे अरबांना त्या वासोट्याच्या किल्ल्यावर नेऊन ठेवा" आणि आमचा संताजी होता त्याला सांगितलं, "एक करायचं...ह्यांना इतकं मारायचं...इतकं मारायचं...इतकं मारायचं हे फक्त मेले नाही पाहिजेत. आणि दोन महिने मराठे अरबांना मारत होते, इतके कि फक्त मरूचं देत न्हवते. एका आठवड्यातच ते एकमेकांना ओळखेनासे झाले होते इतके सुजलेले. दोन महिने मराठ्यांनी तुडवं..तुडवं तुडवलं, सुजवलं, आणि मग! दोन महिन्यांनी संभाजी राजांनी सांगितलं "आता त्यांना बाहेरं काढा, त्यांच्या जहाजावर बसवा आणि द्या सोडून परत त्यांच्या देशाला".

संताजी म्हंटला..."महाराज!...सोडायचं होतं तरं धरलं कशाला?" महाराज म्हंटले..."दे रे सोडून!!!"

त्या दोनशे अरबांना त्यांच्या जहाजात बसवलं, त्यांच्या देशाला पाठवून दिलं आणि मग! संभाजी राजे संताजीला म्हणाले..."आता हे ह्यांच्या देशात जातील, त्यांच्या प्रांतात जातील, त्यांच्या गावात पोहोचतील, ह्यांच्या घरापुढं येतीलं, दारापुढं उभा राहतील, दारं ठोठावतील, यांच्या बायका दारं उघडतील, ह्यांना बघतील आणि म्हणतील..."आमचे हे घरात नाहीत,,,नंतर या!" ह्यांच्या बायकाही ह्यांना ओळखायच्या नाहीत इतके...इतके सुजवलेत, इतका नक्शा बदलवंलाय मराठ्यांनी...उद्या चुकून कोणी महाराष्ट्राकडं तिरक्या नजरेनी यायला निघालं तर पहिल्यांदा हा आवाज येईल..."कुठं निघाला?"......"महाराष्ट्रात"......"नको जाऊ, अजीबात नको जाऊ...माझी अवस्था बघितलेलीस ना...नको महाराष्ट्रात तेवढा नको"

उद्या तिरक्या नजरेनं कुणी येणारं नाही महाराष्ट्रात, संभाजी महाराजांनी जरब बसवलेली ती अशी. अरे! पोर्तुगीज 'थय्या..थय्या' नाचवले, गोव्यावरं हल्ला केला, पारं मांडवी नदी तुडवून संभाजी राजे गोव्यात घुसणारं,,अरे! तो "इब्राही व्हाईस राय" पारं वैतागला, गोवा हि राजधानी सोडून त्यानं दुसरीकडं राजधानी तयारं करायचा डावही मांडला. पोर्तुगीजांच उपर राज्यं संभाजीराजांनी उध्वस्त केलं. इंग्रजांशी तह केला,इंग्रजांची मस्ती पुरती जिरवली,सरळं केज्विन नावाच्या गव्हर्नरंला सांगितलं..."मुंबई विकत दे, अन चल चालू पडं!"...अरे! जर त्यावेळी "संभाजी राजांनी" तहात मुंबई विकत घेतली असती ना तर दीडशे वर्ष इंग्रजांचे पाय आमच्या छाताडावरं नाचलेच नसते. इंग्रजांचा धोका ओळखला होता ना तो या "सर्जा संभाजीनी"

औरंगजेब 'थय्या-थय्या' नाचवलाय...पोर्तुगीज वाकवंलाय...इंग्रज झुकवंलाय...सिद्धी पारं आडवा केलायं...एक नाही,दोन नाही तब्बल बारा गडांवर निखराची पंजेफाड करत "सेनाधुरंदर सर्जा संभाजी" अजिंक्यचं राहिलाय.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग २३

(वाचा आणि शेअरं करा)

वैतागला...वैतागला होता औरंगजेब. अरे! एकही चाल यशस्वी नाही एकही...

गडकिल्ले घेतो म्हंटल, हे "मराठे" गडकिल्ले सोडायला तयारं नाहीत. अरे! एक-एक मावळा साधा नाही, "संभाजी राजांनी" एक -एक मावळा असा घडवलाय जणू काय एक-एक बुलंद गडकोटंच. या महाराष्ट्राच्या छाताडावरं फक्त साडे तीनशे गडकोटं नाहीत. या महाराष्ट्रात उगवंलेला प्रत्त्येक जण एक-एक गड आहे. संभाजी राजांच्या..."राज्यासाठी", "स्वराज्यासाठी" झुंजतोय अफाट...अफाट ताकदीनं.

अरे!..."पाण्यावरचा पहिला तरंगता तोफखाना आपल्या संभाजी राजांनी चालू केला", "गुलामांच्या विक्रीला जागेवरं बंदी घातली", "कईक नव्यानं व्यापारी पेठा वसविल्यात", "शेतकऱ्यांची कर्ज माफ केलीत..त्यांना शेतीसाठी सोईसुधारणा करून दिल्यात..पाण्याचे प्रवाह प्रत्यक्ष वळवून पिकाच्या वाढीसाठी लक्ष्यं दिलंय", "पोटंच्या पोरासारखं रयतेवरं प्रेमं केलंय", "फक्तं तलवारं बाजीच नाही रयत कल्याणाच्या बाबीसुद्धा हा राजा अखंडपणे करत राहिलाय".

अरे!..."नऊ वर्ष संभाजी राजांनी तब्बल १४० लढाया केल्या, पण! एकाही लढाईत पराभूत न होणारा राजा म्हणून "गिनीज बुक" ला सुद्धा "संभाजी राजांचीच" नोंद घ्यावी लागली"..."कधी हरला नाही, मागं फिरला नाही, वाकला नाही...अजीबात नाही! जो झेपावत राहिला अदिम उत्साहानं...अफाट ताकदीनं...प्रचंड शौर्यानं...आपण "शिवछत्रपतींचे पुत्रं" आहोत याच धारणेनं...

जगवत राहिलाय "स्वराज्यं"...संवर्धीत करत राहिलाय "स्वराज्यं" अफाट ताकदीनं......

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग २४

(वाचा आणि शेअरं करा)

संभाजी कर्नाटकात गेलेत. कर्नाटक मुठीत घेतंलय. तंजावर पर्यंत पार मराठ्यांनी राज्याच्या सीमा बडविल्या. 'त्रिवेंद्रम', 'त्रिचनापल्ली', 'मद्रास', कावेरी नदी ओलांडली तो पाषाण कोट जिंकलाय.

चेष्टा नाही, 'आंध्रप्रदेश', 'कर्नाटक', 'तमिळनाडू', 'मद्रास'...कुठंवर-कुठंवर झेप मारली या "सर्जा संभाजीनी".

अरे! कधी रायगड, कधी पन्हाळा, कधी गोवा, कधी जंजिरा, कधी त्रिचनापल्ली, कधी पाषाणकोट......अरे! वाऱ्यासारखा फिरतोय नुसता. दिवसाच्या चोवीस तासातले वीस तास घोड्यावर मान टोकून लढायचा, प्रसंगी शाळूच्या मातीच्या भाकरी खायचा पण! मराठी राज्यासाठी अफाट ताकदीनं झुंजत रहायचा.

अरे! तलवारीच्या टोकावरं मरण घेऊन हिंडतात "मराठे"

""औरंगजेबा तूला मारायला वक्त नाही लागणारं. "आई भवानीचं" राज्यं हे नको हात घालूस""...गर्जत राहिला बरसत राहिला "संभाजी राजा".

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग २५

(वाचा आणि शेअरं करा)

अखेरं औरंगजेबानी आपल्या दरबारीयांना विचारलं..."क्या किया जाय?" आणि सगळे सरदारं म्हणाले..."हुजूरं! वापस लौट चलते है!" आणि अखेरं औरंगजेबाला महाराष्ट्र सोडवा लागला. संभाजी राजांच्यावर आक्रमण करायची वाट त्यानी बदलली, माघारं घेतली आणि गेला आदिलशाहीवरं. "आदिलशाही" अवघ्या सहा महिन्यांत त्यानं जिंकली. मग वळला "कुतूबशाहीकडं", "गोवळकोंडा" त्यानं अवघ्या एका महिन्यात जिंकलं. अरे! आदिलशाही जिंकायला सहा महिने लागतात, गोवळकोंडा जिंकायला एक महिना पुरतो आणि संभाजी राजांच "स्वराज्यं" जिंकायला त्याला नऊ वर्ष शक्यं होत नाही. हे शौर्य कुणाचं?...हा पराक्रम कुणाचा?...हे धाडसं कुणाचं?...हे साहस कुणाचं?..."सर्जा संभाजींच"

अरे! खजिना वाढवलाच नाही, अफाट..अफाट ताकदीनं संवर्धीत केलाय, मराठी फौजा शिवरायांच्या काळात जेवढ्या होत्या त्याच्या "पाचपट-सहापट" वाढवल्यात. अरे! पाच जहाज बांधणीचे कारखाने काढलेत, 'कुडाळ-डिचोळीला' दारूगोळ्याचे कारखाने उभारंलेत संभाजी राजांनी. साडेपाच हजार गलबतं दर्यात तरंगतेय दर्यात. अरे! "सरंखेल कान्होजी आंग्रा", "सरंखेल दौलतखान दर्यासारंग" बेपनाह हुकुमत गाजवतायत बेपनाह. काहीच वर्षांपूर्वी त्या "ताज हॉटेल" वर हल्ला झाला. समुद्रातून अतिरेकी आले. ३५० वर्षापूर्वी आपल्या संभाजी राजांनी सांगून ठेवलय..."महाराष्ट्राला धोका जमिनीवरनं नाही, महाराष्ट्राला धोका समुद्रावरनं आहे". हे त्या राजानं सांगितलय. अरे! दर्यावरं बेपनाह हुकुमत गाजवलिये राजांनी बेपनाह. साडेपाच हजार गलबतं दर्यात आहेत. टाप नाही महाराष्ट्रावरं तीरक्या नजरेनं कुणी यायची. चाहोबाजूंनी सुरक्षित ठेवलंय "स्वराज्यं". एक-एक गडकोट बुलंद बलाढ्य करून ठेवलाय. शिबंदी अफाट वाढवलीये. माणूस नाय तसा अफाट जिगरीचा...जिगरबाज!!!

अरे! इवलंस पोरं सुद्धा संभाजी राजाच्या पराक्रमानं मोहित झालंय. स्वराज्यासाठी मारायला उभं राहिलंय......हा हा "सर्जा संभाजी"

क्रमशः

ρ∂ʃ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग २६

(वाचा आणि शेअरं करा)

औरंगजेबानं आदिलशाही जिंकली, कुतूबशाही ताब्यात घेतली, आणि मग! औरंगजेबाला पुन्हा उत्साह आला..."पुरें हिंन्दोस्थान के आलमगीरं होना चाहतें हम!"...हा दख्खन फक्तं खुपतोय त्याला दख्खन! अनुमान तर बदलून घ्यावचं लागलं होतं, त्याला वाटलं होतं "संभाजी" म्हणजे "शिवाचा" नादान तख्तनशील वरीस...बदलला अनुमान. दहापटीनं तापदायक आहे संभाजी शिवाजीराजापेक्षा.

अरे! त्या शिवाजी राजांनी कधी "बुऱ्हाणपुरं औरंगाबादला" कधी हात घातला न्हवता...का तरं औरंगजेब चालून येईल. पण! हा संभाजी गादीवरं आला आणि त्यांनी पहिल्यांदा "बुऱ्हाणपुरा" धुतलं, औरंगाबाद लुटलं. अरे! सळो कि पळो करून सोडलं यांनी.

भर दरबारात औरंगाजेबानी विचारलं..."मेरे सब घराने में...हमारें तैमूरं के घराने में हुआ ऐसा कोई शख्स पैदा जो रणतर्रमर्रा हो" आणि सगळ्या सरदारांनी सांगितलं..."ना हुजूरं ना"......"याद रखों, ये औरंगजेब या ख़ुद मरेगा या उस "संभा" को मरेगा, ये पेहला आलमगीरं होगा जो रणपरं मरेगा...या उस "संभा" को मारेगा!" आणि चिवटपणे निघाला औरंगजेब पण! त्याला माहितीये संभाजीला उघड्या मैदानात पराभूतच नाही करू शकतं आपणं. मग! अखं लढाओ...फितुरांना पुन्हा मदतीला घेतलं. पन्हाळ्यावरं कैद केलेल्या मंत्र्यांना संभाजी राजांनी पुन्हा पदं देऊन सोडून दिलं. पण! संभाजी राजांचा मोठेपणा त्यांना पेलता नाही आला. या मंत्र्यांनी पुन्हा संभाजी राजांवर तीन वेळा विषप्रयोग केले, तिन्हीवेळा संभाजी वाचले, तिन्हीवेळा त्यांनी मंत्र्यांना माफी दिली. पण! मंत्र्यांचा कावा, कारस्थानी चालूच राहिला.

हे मंत्री अकबराकडं गेले...औरंगजेबाचा पुत्रं त्याला सांगायला लागले..."तुम्ही जरं संभाजीला ठारं मारायला आमची मदत करत असाल तरं आर्ध "स्वराज्यं" आम्ही तुम्हाला देऊन टाकू" यांच्या बापजाद्याची जाह्गीरं असल्यासारखी संभाजींच्या खुनाची सुपारी हे अकबरला द्यायला निघाले. तो अकबर प्रामाणिक निघाला, त्यांनी खलिता संभाजी राजांना पोहोचवला. नावं मिळाली आणि मग मात्रं संभाजींनी या सगळ्या मंत्र्यांना हत्तीच्या पायी दिलं, भिंतीत छिलून मारलं, रायगडच्या टकंमकं टोकावरनं खाली लोटून दिलं. जे केलं ते योग्यच केलं. त्यांना मारलं नसतं तरं संभाजींना मरावं लागलं असतं आणि स्वराज्याचा ग्रंथ कधीच आटोपला असता.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग २७

(वाचा आणि शेअरं करा)

न्यायासना पाठीमागं "सिंहासन" आणि सिंहासना पाठीमागं "धर्मासन" उभं राहिल्याशिवाय "राजाची" आणि "राज्याची" प्रगती होत नाही हे संभाजींना माहितीये. आणि संभाजी राजांचा कारभार तसाच आहे. पण! हे फितूरं पुन्हा...पुन्हा औरंगजेबाने फितवले. आता उघड्या मैदानात नाही आता काव्यानेच डाव मांडायचा. संभाजी राजे आहेत तेवढे रायगडावरं. रायगडं म्हणजे "गरुडाच्या बस्खनीसारखा", वाऱ्यालाही जिथं आत शिरता येणारं नाही, आणि आंत शिरलं वारं बाहेरं पडणारं नाही इतका बुलंद आणि बेदाग. या रायगडवरनं संभाजींना पकडनं, हरवन मुश्किल आणि मग! औरंगजेबाने डाव आखला..."संभाजीला रायगडच्या बाहेरं काढा!" आणि फितूरं मदतीला आले. "गणोजी शिर्के" संभाजी राजांचे मेहुणे, वतनाचा न दिल्याचा राग त्यांचा. त्यांचे खटले "कवी कालाशांकडे" होते. "देसाई सावंत" आणि "गणोजी शिर्के" यांचे खटले कवी कलशापुढं आले. या फितुरांनी शिर्केंची समजूत करून दिली कि, "कवी कलश तुमच्या विरोधात" आणि त्या दिवशी कवी कलशांनी नेमका खटल्याचा निकाल सावंतांच्या बाजूनं दिला आणि शिर्केंची खात्री पटली. कवी कलश विरोधकच आणि शिर्के सरळ कवी कलशांवर चालून गेले आणि कवी कलश पळून "खेळण्यावर" म्हणजे "विशाळगडावर" आले. संभाजीराजांना पत्रं लिहिलं. "शिर्केनी मार दिला......पळून खेळणीयांस आलो!"

संभाजी राजे कडाडले..."नात्याचे पदरं जरं स्वराज्याची कदरं करत नसतील तरं..काय करावं आम्ही?" विचारते झाले

येसूबाईना आणि येसूबाई म्हणाल्या..."सौभाग्याला स्वराज्यं आणि स्वराज्याला सौभाग्यं मानतो आम्ही, नात्यांचे पदर जरं स्वराज्याची कदर करत नसतील तरं राजे बिनघोरं निघा...भले ते आमचे बंधू असले म्हणून काय! आणि स्वराज्याची स्वामिनी कडाडली आणि स्वामी निघाला शिर्केंवर, तुटून पडला, शिर्केंच शिरकाण केलं, शिर्के पळून गेले आणि संभाजी राजे पन्हाळ्यावरं आले.

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग २८

(वाचा आणि शेअरं करा)

संभाजी राजांना कानोकान खबरं न्हवती, आपण औरंगजेबाच्या गहऱ्या चालीत फसत निघालोय. औरंगजेबाची चाल यशस्वी झाली होती. संभाजींना रायगडाबाहेरं काढण्यात यश आलं होतं. आता संभाजी गेले होते पन्हाळ्यावरं, पन्हाळ्यावरं होते सरलष्करं सेनापती "म्हालोजी घोरपडा" वयं वर्ष ६०, शरीरं थकलं असेलं पण! मनगटातली रग आणि छातीतली धग विझली न्हवती. आल्या आल्या संभाजी राजांनी विचारलं..."मालोजी काका मुकर्रब खानाची कोण हालचाल?" आणि कडाडला मालोजी गावराण बोलीत...

"राजं..! त्यो काय इतूयं,

आम्ही हाय न्हवं,

रेटतू की त्याला...!"

आणि संभाजी म्हणाले..."मालोजी तुमच्या खांद्यावरं तरं सुरक्षित आहे स्वराज्यं"...पण! त्याचं वेळी हेर धावत आला, संभाजींना सांगता झाला..."राजं ! .. राजं ! रायगडला यातीगात खानाचा घेरा पडलाय" आणि काळजाचा ठोका चुकला "रायगड" म्हणजे "राजधानी", महाराणी तिथं आहेत, बाळंराजे तिथं आहेत आणि "स्वराज्यं सिंहासन" तिथं आहे...कुणी डावेनं डाव मांडला? आणि संभाजी राजे निघाले. म्हालोजींना सांगितलं..."लागली गरजं तरं हाकं मारू, लगोलग येउन मिळा आम्हांस!" आणि संभाजी अवघ्या "शंभर" भालायतांसोबत निघाले रायगडाकडं.

पण! तत्पुर्वीचा औरंगजेबाचा खलिता मुकर्रब खानाकडं आलाय..."तो संभाजी रायरीचा जहागीरंदार शिर्केंशी भांडण केलंय म्हणून तिकडं आलाय, आता नामी संधी आहे". आणि ती बातमी घेऊनच मुकर्रब खानानं रायगडला जाणाऱ्या सगळ्या वाटा आधीच जेरबंद करून ठेवल्या. संभाजी राजांनी वाटा शोधल्या पण! वाटा सगळ्याच गिरफ़्तारं, जेरबंद मुकर्रबच्या तावडीत. एक वाट होती शिल्लकं, गर्दबिकटं, वहिवाट असलेली, निबिड, काट्या-कुट्याची, किर्र झाडांची, भयाण कडेकपाऱ्यांची, दऱ्या-खोऱ्यांची बिकट..संभाजी राजांनी तिचं वाट निवडली..."" संगमेश्वराची ""

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग २९

(वाचा आणि शेअरं करा)

बघता बघता मुकर्रब खान हाजीरं झाला संगमेश्वरंला आणि मराठ्यांचा पाचशे माणूसमेळं पहिला आणि कडाडला..."यल्गारं...!!!"

......"हर हर महादेव"ची आरोळी घुमली आणि बघता बघता तलवारी खणानू लागल्या. झाडा-पानांवरची पाखरं...फड..फड..फड करत उडाली. अरे! काळोखं थरारला, रात्रं थरारली आणि बघता बघता आक्रोश किंकाळ्यांनी परीसरं दुमदुमून गेला.

शौर्याची लाट!..लाट!..लाट! अवघं तुफान..तुफान झालं. अरे! एक-एक मावळा झुंजत होता शर्तीनं लढतं होता...बस्सं!!! मोघलांचा काताकुट करत होता.

शिवाजीराजे सांगायचे "माझा एक मावळा शंभराला भारी आहे". इथं एक मावळा पाचाशेला भारी पडतं होता. मोघलांना..बस्सं!!! कापत होता...सपासप्प्प!!!...मुकर्रब बघत होता पण! मराठ्यांच्या शौर्यापुढं काही..काही चालत नाही. आपल्या राजासाठी, स्वराज्यासाठी इथंला एक-एक गडकोटासारखा झुंजत होता. अरे! स्वतः साठ वर्षाचा "मालोजी" दोन्ही हातात समशेरं घेऊन लढतोय अफाट!..अफाट! ताकदीनं...येईल त्याला सरळं कापतोय. रक्ताच्या चिळकांड्या,,,मांसाचे लद्दे......अरे! खचं प्रेतांचा...! आणि मुकर्रबनं ते शौर्य बघितलं आणि कडाडला..."इस बूढें को पहलें लगाम डालों" तसं सगळं यौवनी सैन्यं महलोजी बाबांच्या भोवती गोळा झालं. अभिमन्यू चक्रव्यूव्हात अडकवा तसा मह्लोजी अडकला, दोन्ही हातात समशेरी. याच समयी मोघलांचे एकाचंवेळी वारं झाले, हातातल्या दोन्ही तलवारींनी ते पेलंले. मह्लोजी खाली बसला, साठं वर्षाचं रगदारं शरीरं...रक्तं उफाळल...वीज लखंलखंली सप्प्प्प्प ..!!! रक्ताच्या चिळकांड्या उडवीत पहिली फरी गारं झाली,,,दुसरी फरी,,,तिसरी फरी...अरे! तो जोश वेगळा, तो आवेश वेगळा...ते शौर्य बघितलं आणि मग! मुकर्रबला कळलं ""वाघ"" कसा असतो.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ३०

(वाचा आणि शेअरं करा)

मुकर्रब खानानं आपले पेरून ठेवले होते फितूरं तिथचं. आणि "संगमेश्वरला" शंभर भालायतांसोबत संभाजी राजे "संगमेश्वरंच्या" वाटेनं निघाले...निघाले आणि एवढीच बातमी मुकर्रब खानाच्या कानावर पोहोचवण्यात आली..."संभाजी राजे संगमेश्वरला सरदेसायांच्या वाड्यात मुक्कामाला थांबले"...मुकर्रबला पक्की बातमी, अवघ्या शंभर भालायतांसोबत राजे संगमेश्वरला सरदेसायांच्या वाड्यात आहेत. "नामी संधी आहे लगोलग निघा" आणि मुकर्रब खान पाच हजारांच सैन्यं घेऊन टाकोटाक निघाला, पन्हाळ्याला बगल देत निघाला संगमेश्वरच्या दिशेनं.

पन्हाळा अंधारात गुडूप झालेला. पहारेकरी पहारा देत होता. अचानक कायतरी दिसलं आणि चबकला..बेंबीच्या देठापासनं कडाडला..."मालोजी बाबा,,,काळोखं उजळंत तलुता चाल्याती" आणि मालोजीच्या काळजाचा ठोका चुकला..."कुण्या रोखानं?"......"जी संगमेश्वराच्या"......आरं!..राजं हायत...आरं! राजं हायत...कुणी गनिमानं डाव साधला, अरे! निघा..निघा शिबंदी उठवा...राजांची जान वाचवायला पायजे...आरं! निघा...!!!

आणि बघता बघता मावळा सज्ज झाला. मुकर्रब खानाच्या पाच हजार फौजेला बगल देत "मह्लोजी बाबा" पाचशे मावळ्यासैत दौवडू लागला...दौवडू लागला आपल्या राजासाठी, राज्याच्या रक्षणासाठी निघाला...निघाला आला संगमेश्वरामध्ये वेस ओलांडून धपापत्या उरानं..."राजं..!,,,राजं..!,,,राजं..! निघा..निघा राजं..! नावडी जवळं करा"...संभाजी खाली आले "का?..का? मालोजी...काय गडबडं?...कोण आफत?"......"राजं.! आफत लयं मोठी राजं.!,,,राजं.! निघा नावडी जवळं करा...गनिमानी गावं येरबाडलयं राजं.!,,,,,,राजं.! निघा...!!!

संभाजी राजे म्हणाले, "नाही मालोजी तुमच्या थकल्या खांद्यावर "स्वराज्यं" सोपवून जायला "राजे" नाही झालो आम्ही...मरू इथंच, झुंजू इथंच पण! रण टाकून पळणारं नाही"

..."नाही राजं.!,,,लाखं मेलं तरी चालतील पण! लाखांचा पोशिंदा वाचला पाहिजे...राजं!..निघा,,,नावडी जवळं करा राजं.......!"

पण! त्याचं वेळी मुकर्रबची फौज संगमेश्वरच्या वेशीला भिडलेली. पाचशे मावळा आमचा डोळ्यांत डोळा घालून बघत होता. बस्सं!!! अफाट...अफाट सेनासागरं आणि टिचंभर पाचशे मावळा राजाच्या रक्षणासाठी सिद्ध आहे.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ३१

(वाचा आणि शेअरं करा)

मह्लोजी बाबांचं अफाट!...अफाट!...अफाट! शौर्य पाहून त्याचवेळी मुकर्रब खानानं चालं खेळली. कमानमारं ला बोलावलं, हा मह्लोजी असा आवरणारं नाही आणि तिसऱ्या बाजूकडं लढत्या मालोजीवर नेम धरंला, तीरं सुटला...उजव्या दंडात घुसला हातातली तलवारं निखळंली...दुसरा तीरं कंठात...दुसरी तलवारं निखळंली...! निशस्त्र झाला मह्लोजी आणि गुळाच्या ढेपेला मुंग्या ढसाव्या असं यौवनी सैन्यं मह्लोजीला ढसलं.

अरे! शरीरावरं जागा शिल्लखं राहिली नाही जिथं वारं झाला नाही. रक्ताळंला मह्लोजी मातीत पडला. अखेरंचा श्वास फुलंला...डोळे लवले...ओठं हलले. त्या श्वासानं माती उंच उडाली आणि त्या उंच उडाल्या मातीला मह्लोजी सांगता झाला..."सांगा माझ्या राजाला, हा मह्लोजी गेला..मातीत मेला, पण! मातीत नाही मेला..."मातीसाठी मेला"......अरे! मातीत मारणारे कैक असतात, पण! "मातीसाठी मारणारे फक्तं मराठे असतात" हे सांगत गेला.

आणि मह्लोजी नावाचा बुरुंज ढासळला आणि यौवनांच सैन्यं सैरा..वैरा सुटलं,...सुटलं संभाजींच्या मागावरं, पण! संभाजी राजांनी तत्पुर्वीच आपल्या माणसांना सांगितलं...जमेल तसं, जमेल तिथून निसटायचं साऱ्यांनी. खंडो बल्लाळं, संताजी घोरपडा एका बाजूनी निसटले होते. "संभाजी राजे" आणि "कवी कलश" दुसऱ्या बाजूनी "नावडी नदीच्या" दिशेने दौडू लागले

होते. "कवी कलश" अचानक घोड्यावरून खाली पडले आणि जोरात गर्जना केली कवी कलशांनी..."राजा जी, मैं ग़िर गया हूँ!...मैं ग़िर गया हूँ!"

संभाजी वापस आले आणि कवी कलशांना सोबत घेतलं आणि दौडू लागली घोडं,,,नावडीच्या किनाऱ्याकडं......

आणि बघता बघता संभाजींचा घोडा नावडीच्या काठावरं आला, सामोरं काठावरं माणसं दिसली..आपली वाटली..संभाजी राजांनी काठं बघितला..........

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ३२

(वाचा आणि शेअरं करा)

संभाजी राजांनी काठावरंच्या नौका बघताच संभाजींची नजरं फिरली...पाहतो तरं काय! आत्तापर्यंत ऐकलं होतं नद्या समुद्राला येउन मीळंतात, पण! इथं उलटं...त्या नावडी नदीला मुकर्रब खानाचा सेनासागरं भेटायला आला होता. काठावरं होता "शिवपुत्रं संभाजी"...चाहोबाजूंनी "संभाजी राजा" रेकला गेला, चाहोबाजूंनी यौवनांच सैन्यं भरलं...मध्ये "संभाजी" आणि "कवी कलश" आणि कडाडला मुकर्रब..."खींचलों तलवारं उसकी!"......पण! तलवारं घ्यायचं कुणाचं धाडसं होईना, कुणीतरी एक पाऊलं उचलायचा आणि संभाजींची नुसती नजरं वर उठायची चारं पावलं मागं सारायचा तो...नाही जिगरं झाली!

अखेरं! मुकर्रब खानानं चाहोबाजूंनी दोरखंड फेकले आणि "संभाजी राजे जेरबंद झाले",,,"मराठ्यांचा छत्रपती अडकला",,,"छावा संभाजी राजा जेरबंद झाला",,,"शिवपुत्रं संभाजी मोघलांच्या कैदेत फसला",,,"फितुरांची चाल यशस्वी झाली",,,"मराठ्यांचा मुकूटं मोघलांच्या पायात पडला"......पण! मस्तकं ताठंच होतं, छातीही तशीच, रगही तशीच आणि बाणेदारंपणाही तसाच.

बघता बघता मुकर्रब खानानं दस्त केलं "संभाजी राजांना" आणि रहुल्ला खानाला तो म्हणाला, "जीतनी जल्द हों सकें उतनी जल्द निकलना चाहियें यहाँसे...अगर! पता चला इन मराठों को तो यंही कबरं बना डालेंगे अपनी"

आणि आश्चर्य वाटेल "संगमेश्वरं" ते "बहादुरं गडं" हे साडे तीनशे मैलांचं अंतर आहे. (एसटी नी जायचं झालं तरी दीड दिवस लागतो) मुकर्रब खानानं हे अंतर संभाजींना घेऊन चालत...अवघ्या साडे चारं दिवसांत कापून पुरा केलंय. कुत्रं मागं लागल्यासारखा पळतं होता.

पण! दुर्दैव मराठयांच...""किल्ल्याच्या तटाशेजारुनं संभाजींना नेलं जात होतं पण! तटावरंच्या धारंकऱ्याला माहिती न्हवतं आपला राजा कैद झालायं"",,,,,,""अरे! गावच्या वेशीवरनं संभाजींना नेलं जात होतं पण! गावातल्या वारकऱ्याला आणि गावकऱ्याला माहिती न्हवतं आपला राजा कैद झालायं""...कळेपर्यंत संभाजींना सुरक्षित ठिकाणी पोचवलं होतं.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтєву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ३३

(वाचा आणि शेअरं करा)

औरंगजेबाला खबरं द्यायला हेरं धावत आला होता..."हुजूरं!...हुजूरं!,,,बड़ी ख़ुशी की खबरं हैं, संभा गिरफ़्तार हुआ!"

आणि आल्या हेरला औरंगजेब विचारत होता..."पिक़े तों नहीं आयें, क्या बखतें हों!"......"हाँ...हुजूरं! संगमेश्वरं में मुकर्रब खानने दस्त कर लिया उन्हें!"

"आला ताला की मेहेरबानी, शब्बें रात के जश्न होना चाहिए, आख़िर आ ही गया दख्खन का चुहाँ शिकंज में, अब दिखायेंगे उसें...लाया जय उसें शानोशौखतसें, पेहना जाय तख्तांकुलाँ..."

आत्तापर्यंत त्यानी आपल्या खांद्यावर मराठी तख्त पेलंल असेल, आता त्याच्या खांद्यावरं "तख्ताकुलाँ" ठेवा. आत्तापर्यंत त्यानी "राजवस्त्र" घातली असतील, आता त्याला विदूषकी झबली घाला. आत्तापर्यंत त्यानी "मराठेशाहीचा मुकूटं" मिरवला असेल, आता त्याला घुंगरं असलेली विदूषकी टोपी बांधा. आत्तापर्यंत त्यानी "राजअलंकार" घातले असतील, आता त्याला "पोलादी साखळंदंडाने" जखडवा. आत्तापर्यंत राजा म्हणून..."घोड्यावरनं, मेण्यातनं, पालखीतनं, हत्तीच्या अंबारीतनं गेला असेल, आता त्याला उंटाला बांधा. आत्तापर्यंत राजाला म्हणून "नगारे" वाजले असतील, आता ढोल ताशे बडवायला सुरवात करा. कळूद्या महाराष्ट्राला..."आलमगीरं औरंगजेबनी "संभाजी" गिरफ्तारं केलायं"

आणि बरंहुकूम निघाली धिंड..."विदूषकी झबली" घातली,,,"घुंगरं असलेली टोपी" अडकवली,,,"काटेरी साखळंदंडाने" जखडवलं,,,"उंटाला बांधलं" आणि निघाली धिंड......वाजत गाजत!!!

अरे! कुठल्या राजाच्या वाट्याला आली हि विटंबना...??? कुणी सोसलं...???

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ३४

(वाचा आणि शेअरं करा)

अरे! मोघली छावणीत कल्लोळं...कल्लोळं माजला होता आनंदाचा, आतुरंले होते सारे......

अरे! नऊ वर्ष ज्याने औरंगजेबाच्या दिमाखात सैतानी गोंधळ घातला तो "संभाजी" आहे कसा...? कसा दिसतो...? कसा आहे तो...?...कोणं!..कोणं!..कोणं! अरे! कोणं कुणाच्या झाडांवर!,,,कोणं कुणाच्या घरांवर!,,,कोणं कुणाच्या डोक्यांवर!,,,कोणं कुणाच्या खांद्यांवर! उभा राहून बघत होते..कसा आहे?...कसा आहे?...""संभाजी""

आणि निघालीये धिंड वाजत गाजत!!!

अचानक कुठूनतरी भिरं-भिरंनारा दगडं यायचा...धप्प्प्प्! छातीवरं आदळायचा...रक्ताची चिळंकांडी यातनेचा कल्लोळं उठायचा!...कुणीतरी यायचं उंटाची शेपटी पिरगंळायचं!, उंट थय्या!...थय्या! नाचायचा अंगावरचे काटेरी साखळंदंड टोचायचे!,,,बोचायचे!,,,जागोजागी जखमा करायचे!. कुणीतरी यायचं अंगावरं थुंकायचं!...कुणीतरी यायचं एखादं शीवी द्यायचं!...कुणीतरी यायचं तलवारीच्या टोकानं संभाजींच्या अंगावरं रेषा उठवायचं!,,,रेषेबरोबर रक्ताची धारं लागायची...अरे! मातीवरं रक्तं..रक्तं मुद्रा उमटवीत जायंची!...अरे! कुणी सोसलं???

अरे! विंचवाच्या लवलव करणाऱ्या वेदना कुणाच्या वाट्याला आल्या?......का? अरे! झुकला असता, वाकला असता, नमला असता तरं ऐश मध्ये जगला असता...मग! का नाही केलं?...का सोसतं राहिला सगळं?...का सहन करत राहिला ही विटंबना?......"स्वराज्यं अस्मितेसाठी"..."स्वराज्यासाठी"..."मराठी दौलतीसाठी"

इतका इतका अनन्विक छळं!...इतके रक्ताळंले होते संभाजी,,,इतके "शेंदूर फासल्या हनुमानासारखे दिसत होते...बस्सं! इतके"...जागा ठेवली न्हवती रे शरीरावरं वारं..वारं करायची......

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ३५

(वाचा आणि शेअरं करा)

एवढं सगळं सोसून सुद्धा "छावा" होता ताठं...झुकली नाही मान...वाकला नाही कणा...तसाच बाणेदारंपणे आला औरंगजेबाच्या दरंबारात..."तख्तासीन झालेला आलमगीरं औरंगजेब", दरंबारात आल्या आल्या वजीरं आसद खान कडाडला..."संभा..!,,झूक जाओ आलंपना कें सामनें"...आणि कडाडला "कवी कलश"..."राजा हैं वो झुकेंगे नहीं...झूकाऐंगे !"...........खमोश्श्श्श्!!!............सर्रर्रदिशी समशेरं आली गर्दनेवरं......"चूप्प्प्!...चूप्प्प्!,,,याँद रखं कैद में हैं तू...आला ताला कें दरंबार में हैं......चूप्प्प्!!!

पण! त्याचवेळी आवाज ऐकू आला..."सबूरं!......आसद......सबूरं!,,,,,,अभीं बहोंत पूछना हैं इसे"...आणि " आस्तें क़दम, शेहंशाह हिंदोस्तां...आलमगीरं गाझी औरंगजेब"......तख्तावरनं खाली उतरला, संभाजीपुढं आला. तो रक्ताळंला "संभाजी" एकदा न्याहाळला आणि नजरं स्थिरावली डोळ्यांवर...तीचं नजरं..तेच तेजं आणि औरंगजेब म्हणाला......

"नौ बरस का था, तब ये मिलां था हमें आगरा में...तब पूछाँ हमनें इसें, क्यों रे संभा तुम्हे हमारा ड़रं नहीं लगतां???...और इस संभा नें ज़वाब दिया था,,,हमें किसी का ड़रं नहीं लागतां लेकिन हमारीं वजहं से सबकों ड़रं लागतां हैं!......सच कहाँ था काफ़रं ने, कभी ठंडक ना मिलने दी......लेकिन अब नहीं,,,अब नहीं आला ताला की मेहेरंबानी आखिरं आज कैद में हैं तू हमारें" आणि

त्या खुदाचे आभारं मानायला औरंगजेब गुडघे टेकून खाली बसला.

त्याची ती अवस्था बघून संभाजी राजांनी कवी कलशांना विचारंल..."कवीजी, कवी आहात आपण..मग! या प्रसंगावरं सुचते का एखादी कविता?"...आणि आश्चर्य वाटलं कवी कलशांना...अरे! काय माणूस हा,,,मृत्युच्या गोठात आहे, औरंगजेबाच्या दरंबारात आहे याला भीती नाही भयं नाही. हा माणूस म्हणतोय सुचते का एखादी कविता..ही काय कविता ऐकायची वेळं आहे!...कवी म्हंटला "हां हां राजन का नाही, ऐका!...."राजन तूम हो सांचे..खूब लढे हो जंग!!!..देखं तुम्हारा तेज...तखत त्यजत औरंग!!!"

अहो! राजे...काय लढलात तुम्ही जंग!...काय तुमचं तेज!...काय तुमचं शौर्य!....राजे! तुमचं तेज बघून औरंगजेब स्वतः स्वतःचे सिंहासन त्यागून तुमच्या पुढं येऊन गुढघे टेकून बसलाय..................बहोत खूब!!!

.............खमोश्श्श्!!! सर्रर्रदिशी औरंग ताडदिशी उठला,,,,चुप्प्!..चुप्प्!

"बता संभा...बताओ!,,,कहाँ रखां हैं ख़जाना?...कहाँ रखीं हैं लूँट?...कहाँ रखां हैं ख़जाना?"......तसा कडाडला संभाजी, "अरे! हिंदोस्थान आमचा ख़जाना, इथं मातीचा कण अन् कण मानतो मी सोनं...औरंगजेब तू गिळंलास खजाना, तू गिळंलास हिंदोस्थान...पण! आम्ही मागणारं नाही तुझ्यासारखे होणारं नाही भिखारी...अरे! हिंदोस्थान हाकं मारुनं भिकं देतो तुझ्यासारख्याला...घेत नाही असा, घेऊ मनगटाच्या बळावरं........बस्सं! चर्रर्रफडत राहिला औरंगजेब चर्रर्रफडत.........

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ३६

(वाचा आणि शेअरं करा)

औरंगजेब म्हणाला, "ये मराठें क्या खिलांतें हैं अपने बच्चों को, क्यों पैदा नहीं ऐसा एक भी शख्स हमारें जनाने में"..........."हे मराठे आपल्या पोरांना काय खायला घालतात, का? असलं एक तरी पोरगं माझ्या घरात नाही जन्माला आलं"......आणि संभाजी राजे म्हणाले, "अरे!...तुझ्या पोटी कसा जन्मेल संभाजी?......अरे!...कसा जन्मेल संभाजी तुझ्या कुशीत?......संभाजी जन्मेल तो "शिवछत्रपतींच्या कुशीत" आणि "महाराष्ट्राच्या मुशीतचं"

अरे! स्वतःच्या बापाला विष देणारा तू, स्वतःच्या भावाची खुलेआम कत्तलं करणारा तू...तुझ्या पोटी कसा येईल संभाजी?......संभाजी येईल सह्याद्रीच्या कड्यांवर आणि बस्सं!!! तुझ्या नरड्यावर...

याद राख, महाराष्ट्राच्या मातीत उभा आहेस तू इथंच माती करू......"आमच्याच वाटेवरं येउन,,,आमच्याशीच वाटमारी करणाऱ्याची,,,त्याच्या वाटेवरं जाऊन,,,वाट लावल्याशिवाय,,,आम्ही आमच्या वाटेवरं परतत नाही" हा इतिहास आहे आमचा.

आणि चमकला औरंगजेब त्याला काही कळेना,..."अरे! कैदेत कोण आहे तू का मी?"...पण! अखेरं विचारलं त्याने..."मेरें कौन कौन से सरदारं शामिल थे तुम्हें?"......आणि उसळला संभाजी, "अरे! तख्तासाठी रक्तावरं उलटणारी जात नाही आमची, आई भवानीचे भूतें आम्ही...विकणारं नाही इमान, होणारं नाही बेईमान, मरू इथंच...रक्ताचा अखेरंचा थेंब अन थेंब असेपर्यंत इथंच. याद राख,,,"सिंहाचे बछडे जगतात सिंहासारखे आणि मरतातही सिंहासारखेच...नको लागूस नादाला"

आणि अखेरं औरंगजेब संतापला......"ले जाव इसें हमारी नजरों के सामनें से, निकाल दो इसकी आँखें, इसकी आँखें जलाती हैं बहोत हमें!...काँट डालों इसकी जबान, इसकी जबान बोलती बहोत हैं!......जाsssव्!!!

आणि संभाजी राजांना औरंगजेबाच्या दरबारातनं नेलं गेलं.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє ву ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ३७

(वाचा आणि शेअरं करा)

आपल्याला आणखीन एक सांगितलं गेलं कि, औरंगजेब संभाजी राजांना म्हणाला, " तू जरं मुस्लिम व्हायला तयार असला तरं आम्ही तुला माफ करतो"...आणि संभाजी राजे त्याला म्हणाले, " तू जरं तुझी मुलगी मला देत असला तर मी मुस्लिम होतो"

संभाजींच चरित्रं असं तसं बदनाम केलंच आहे, पण! त्यांच्या शेवटच्या ज्वलाज्वलंत, तेजस आत्मबलिदानाच्या वेळी सुद्धा त्यांना असं बदनामीच्या आगात जाळावं हि केवढी मोठी शोकांतिका आहे. अरे! का जाळावं या आगीत त्यांना?...अरे! घडलंच नाही असं!,,,नाही झालं असं!

दोनचं सवाल विचारलेत औरंगजेबाने दोनचं, अरे! लिहिलंय औरंगजेबानी, त्याच्या मृत्युपत्रात लिहिलंय......"पहिली चूक केली शहाजाननी, त्यांनी "शहाजीला" जिवंत कर्नाटकात जाऊ दिलं, "शहजीच" मारला असता तरं "शिवाजी" उभाचं राहिला नसता...दुसरी चूक मी केली आग्र्याच्या भेटीतनं "शिवाजीला" जिन्दा जाऊ दिलं, "शिवाजी" मारला असता तर " संभाजी" खडाच राहिला नसता...दोन चुका केल्यात तिसरी चूक करणारं नाही..."

आणि राहिला सवाल..." तुझी मुलगी देत असला तरं मुस्लिम होतो वगैरे वगैरे हा बाजारं गप्पांचा, काही अर्थ नाही यात", कारण! औरंगजेबाला एकूण पाच मुली होत्या...पहिली मुलगी "झेबुन्निसा" ती शहाजान बरोबर आग्र्याला कैदेत होती, ती तिथंच मेली, ती महाराष्ट्रात कधी आलीच नाही. मधल्या तीन मुलींची औरंगजेबानं लग्नं केलेली. आणि पाचवी "झीनतुन्निसा" ती औरंगजेबाबरोबर महाराष्ट्रात आलेली. "संभाजी राजे" ज्यावेळी पकडले गेले त्यावेळी "संभाजी राजाचं" वय होतं "बत्तीस (३२) वर्ष...बत्तीस" आणि या "झीनतुन्निसा"चं वय होतं "४६ वर्ष"......ज्यावेळी संभाजी राजे पकडले गेले त्यावेळी संभाजींच वय "३२ वर्ष" आणि या "झीनतुन्निसा"चं वय आहे "४६ वर्ष", कुठंला तिशीतला पोरगा म्हणेल मी पन्नाशीतल्या बाईबरोबर लग्नं करतो?,,,कुठंला इतिहास ऐकतो?

औरंगजेब - संभाजींचा संघर्ष "धर्मसंघर्ष" नाही तो "सत्तासंघर्ष" आहे. शिवरायांनी सगळ्या जातीधर्माला समान न्याय दिलाय. संभाजी राजांनी तेच पत्थ्य पाळलंय अगदी!...पण! औरंगजेबासारखा जहरी सर्प त्यांनी ठेचलाय.

क्रमशः

ρ∂ƒ ¢яєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ३८

(वाचा आणि शेअरं करा)

अखेरं "वढबुद्रूकं तुळापूरंच्या वनस्तंभाला" संभाजींना बांधलं गेलं. औरंगजेबानं सुचवलेल्या सजेचा अंमल चालू व्हायचा. आणि बघितलं संभाजींनी आज्ञा आहे डोळे काढायची...""लालबुंद तापलेल्या तप्तं सळ्या"" घेऊन येताना दिसले हाप्शी. धुरांच्या रेषा हवेत सोडतायत सळ्या त्या...अरे! लालबुंद सळ्या...कळूनं चुकलं, डोळे जाणारं आता...संभाजींनी मिटले नेत्रं आणि डोळ्यापुढं उभा राहिले,,,"राजा शिवछत्रपती"..."माँसाहेब जिजाऊ"..."आई सईबाई"..."मावळे"...

"स्वराज्यं"..."गडंकोट"......अरे! याच डोळ्यांनी घेतलं स्वराज्याचं दर्शन,,,याचं डोळ्यांनी केलं इशर्त आपल्या मावळ्यांना,,,याचं डोळ्यांनी पाहिली स्वप्नें स्वराज्यं संवर्धनाची...अरे! याचं डोळ्यांनी घेतलं दर्शन..."आबासाहेबांच"...

"माँसाहेबांच"..."आऊसाहेबांच"...तेचं डोळे आणि उघडले डोळे संभाजींनी,,,डोळ्यापुढं दिसल्या "लालबुंद तप्तं सळ्या"...आल्या सामोरं घुसल्या आत...चर्,,,

यातनेचा नुसता कल्लोळं उठला.

सळ्या गेल्या आत...आत...आत निघाल्या त्याचं वेगानं बाहेरं,,,,,,डोळे न्हवते कुठंच उरल्या होत्या नुसत्या खोपन्या...काळ्या कबिंद...उग्रं तर्प बाहेरं फेकणाऱ्या......अरे! पायात काटा घुसला तरं आठ दिवस पाय धरुनं बसतो आम्ही,,,डोळ्यात लालबुंद तप्तं सळ्या गेल्या असतील...किती???...किती??? सोसलं असतील......अरे! किती??? सहन केलं असेल......किती???

अरे!,,,कुणाच्या वाट्याला आलाय हा अन्याय!...कुणी सोसला ह्या यातनांचा जहरी नंगा नाच???......का?......अरे! रगेल असते,,,रंगेल असते तरं झुकले नमले असते ना...कुठून आलं हे आत्मधैर्य???...कुठून आला हा आत्मसंयम???...कुठून आली हि जिगरंर्रर्र्र्र.....................

क्रमशः

ρ∂ƒ ¢яєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ३९

(वाचा आणि शेअरं करा)

पण! आता सजेचा दुसरा अंमल चालू झाला होता. सजा होती "जबान काटायची". हाप्शी आले लखंलखंती नंगी तलवारं घेऊन. पण! संभाजींच तोंड बंद जीभं छाटणारं कशी?...मग! हाप्शी पुढे आले जबडा उघडायची कोशिश करू लागले...पण! जबडा उघडेना......मग! दोघांनी कानावरं दाबूजोरं दिला...प्रचंssssड दाब दिला...प्रचंssssड दाब पण! उघडेना जबडा, मग! एकानी

मस्तकावरं प्रहारं केला,,,पण! जबडा उघडेना......

अरे! उघडेल कसा...वाघाचा जबडा आहे,,,,,,"वाघाच्या जबड्यात...घालूनी हात...मोजती दात...हि आमची औकात,,, सांगणारा संभाजीये"

पण! तोपर्यंत एकानं युक्ती केली, संभाजींच नाक दाबून धरलं...श्वासासाठी जीव गलबलंला,,,तळमळंला,,,श्वासासाठी ओठं हलले,,,जीभं लवलवंली आणि त्या संधीचा घेतला फायदा......सांडशी घुसली आत,,,सांडशीत पकडली जीभं,,,ओढली बाहेरं,,,नंगी तलवारं लखंलखंली सप्प्प्प्प्प्प्प्प ....

तोंडातनं ओघळलं नुसतं लालबुंद रक्तं......जीभं पडली होती समोरचं वळंवळंत,,,ती सुद्धा तयारं न्हवती संभाजी राजांपासनं पोरकं व्हायचं......अरे! ज्या जीभेनं उमटंवले..."जगदंब - जगदंब" चे बोल,,,ज्या जीभेनं दिली किल्कारी..."हर हर महादेव"ची,,,ज्या जीभेनं केला जागरं,,,"जय भवानी"चा,,,जी जीभं म्हणत राहिली..."आऊसाहेब"...

"माँसाहेब"..."आबासाहेब"...ती जीभं पडली होती समोरंच वळंवळंत...........

एक नाही,,,दोन नाही तब्बलं चाळीस दिवस अनन्वीत अत्याचारं चालला होता..............

अरे! बोकडं सोलावं असं संभाजींच कातडं सोलून काढलं, त्याच्यावर मिठाचं पाणी टाकलं......चर्र.....यातनांचा जाळं...जाळं झाला नुसता. कुणीतरी यायचं गुडघ्याच्या वाट्या काढून न्यायचं,,,कुणीतरी यायचं हाताची बोटं छाटायचं,,,कुणीतरी यायचं तलवारीच्या पात्यानं मांसाचे लगदे कापायचं...कुत्र्या, गिधाडांना खाऊ घालायचं......

अरे! कुणी बघितलं असतं तरं वाटलं नसतं..."मराठ्यांचा छत्रपती" आहे......अरे! भुतासारखी अवस्था झालेली. आणि एवढं सगळं होऊन सुद्धा आपला ""सर्जा"" सोसत राहिला,,,सहन करत राहिला...का???...आपण "शिवछत्रपतींचे पुत्रं" आहोत या "अस्मितेसाठी",,,"स्वराज्यासाठी",,,"राष्ट्रधर्मासाठी"......सहन करत राहिला चाळीस दिवस.

क्रमशः

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040

शंभू चरित्रं भाग ४०

(वाचा आणि शेअरं करा)

अखेरं! उगवंली "फाल्गुनी वद्य अमावस्या". ""११ मार्च १६८९"" औरंगजेबाची अखेरंची सजा, "संभाजींच मस्तक कलम करा". आणि संभाजींच मस्तकं छाटलं गेलं. भाल्याच्या फाळाला अडकवलं आणि ""गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी महाराष्ट्रात संभाजींच्या मस्तकाची गुढी उभारंली". निघाली वाजत...गाजत! आली "इंद्रायणी - भीमेच्या" तीरावरं त्या रेतीत रोवला तो भल्याचा फाळं आणि मस्तकातनं रक्ताचा एक थेंब पडला "इंद्रायणी - भीमेच्या" पात्रात आणि थरारली ""इंद्रायणी - भीमा""

अरे!!! याच "इंद्रायणी - भीमेनं" पाहिलं होतं ते शौर्य, ते धाडसं, ते साहसं, तो पराक्रम, ती ज्वलाज्वलन तेजसनिष्ठा, ते धैर्य, तो संयम, मानवी जीवनाच्या चिरंतन तत्वाशी जुळंलेलं "संभाजींच" ज्ञाननातं. ती "इंद्रायणी - भीमा" संभाजींच्या मस्तकाकडं

तिरक्या माना करून आसवं ढाळू लागल्या.

गेली ३५० वर्ष झाली "इंद्रायणी - भीमा" अजून रडतेचाय. सांगतेय! खरा "सर्जा संभाजीराजा" अजून कळंलाच नाही.

""शिवाजी महाराजांनी सांगितलं...कसं जगावं!!! आणि संभाजी महाराजांनी दाखवंल...कसं मरावं!!!...ती "इंद्रायणी - भीमा" आजही सांगतेय........

अखेरं! तो औरंगजेब म्हणत राहिला........

"सचमुच छावा हैं छावा शेरं का...

हमनें आँखें निकल दीं उसकी, लेकिन उसकी आँखें झुकी नहीं हमारें सामने"

"हमनें जबान काँट दी उसकी, लेकिन उस जबान से उसने मांगे नहीं रेहेम के दो लब्जं"

"हमनें हात तोड़ दिए उसके, लेकिन नहीं फैलाएं उसने अपने हात हमारें सामने"

"हमनें पांव काँट दिए उसके, लेकिन नहीं टेंकें उसने अपने घुटनें हमारें सामने"

"हमनें गर्दन काँट दी उसकी, लेकिन उसकी गर्दन नहीं झुकी हमारें सामने"

""सचमुच छावा हैं छावा शेरं का"

होंगे कामयाब कभीं या ऐसेही लौटना पड़ेगा ख़ाली हाथ देहेल्ली......

पण! दिल्लीला परत जाण्याचं भाग्यं औरंगजेबाच्या वाट्याला आलंच नाही.

संभाजींच्या रक्ताच्या थेंबाथेंबातून इथं पुन्हा जन्माला आला..."हजारों, लाखों"..."संभाजी"

अरे!!! संताजी,,,धनाजीसारखा एक-एक झुंजत राहिला, लढत राहिला...राजाशिवाय चौदा वर्ष महाराष्ट्र औरंगजेबाशी टक्करं घेत राहिला आणि अखेरं इथंच औरंगजेबाची कबरं बांधून मग शांत झाला.

हि प्रेरणा होती संभाजींच्या बलिदानाची, हि प्रेरणा होती संभाजी राजांच्या राष्ट्रप्रेमाची, राष्ट्रभक्तीची......

............!!जय शंभूराजे!!............

"छत्रपती संभाजी महाराज कि जय!!!"

"छत्रपती संभाजी महाराज कि जय!!!"

"छत्रपती संभाजी महाराज कि जय!!!"

ρ∂ƒ cяєαтє вy ηιкнιł αgнα∂є - 9763506040


शिवपुत्र धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज समाधी.

कृष्णाजी अनंत सभासद – विरचित

शिव-छत्रपतीचे चरित्र

श्रेय

टंकन:- मृणाल भिडे

मुद्रितशोधन:- राहुल प्रकाश सुवर्णा

मुखपृष्ठ:- मृणाल भिडे

मृणाल भिडे यांची ओळख:

माझी माहिती : मी मृणाल विद्याधर भिडे. मी राज्यशास्त्राची पदवी घेतल्यानंतर ग्रंथालयशास्त्रामध्ये पद्व्युत्तर पदवी(BLISc.) घेतली आहे. आता त्यातच पुढे शिक्षण(MLISc.) घेऊन करीयर करण्याचा मानस आहे. वाचनाची अत्यंत आवड, आणि मराठी वाचनसाहित्य इंटरनेटवर आणण्याची मनापासून इच्छा.! सुरुवात कुठुन करावी या विचारात असताना या वेबसाईटवरच्या एका कम्युनिटीवर या उपक्रमाविषयी कळलं. आणि हा माझा पहिला प्रयत्न...

अनुक्रमणिका

क्रम	शीर्षक	पृष्ठ
१	लेखनास आज्ञा.	६
२	मालोजीस दृष्टांत	६
३	शिवाजीचा जन्म.	६
४	‘ बारा मावळें काबीज केलीं ’	७
५	पुरंदर घेतला	७
६	जावळी काबीज	७
७	संभाजीचा जन्म	८
८	आदिलशहाचा शहाजीस जाब	९
९	अफजलखानाची रवानगी	९
१०	कृष्णाजी भास्कर ' हेजिबीस '	९
११	शिवाजीचा युध्दनिश्चय	१०
१२	नेताजी पालकरास कामगिरी	१०
१३	पंताजीपंत खानाकडे	११
१४	खानाच्या कपटाचा परिस्फोट	११
१५	शिवाजीचा खानास निरोप	१२
१६	खान प्रतापगडाखाली	१२
१७	भेटीची योजना	१२
१८	शिवाजीची तयारी	१३
१९	“शिवाजी म्हणजे काय?”	१३
२०	अफजलखानाचा वध	१३
२१	खानाच्या लष्कराचा पाडाव	१४
२२	राजे यांचा दिलासा	१५
२३	शिवाजी ‘ अवतारीच होता.’	१५
२४	विजापुरी शोक	१६
२५	प्रतापगडावर देवीची स्थापना	१६
२६	‘मोगलांईत धुंद उठविली.’	१६
२७	गडकोटांचा बंदोबस्त	१७
२८	पागांची व्यवस्था	१७

२९	लष्कराची रीत	१८
३०	पायदळास आज्ञा	१८
३१	मोकासे नाहीत	१९
३२	मुलकी कारभार	१९
३३	जमीन-मोजणी व महसूल	२०
३४	देवस्थानादिकांचा योगक्षेम	२०
३५	शास्ताखान पुण्यावर	२१
३६	खानाची बोटे उडाली.	२१
३७	खान 'दिल्लीस चालला.'	२३
३८	राजे खुशाल	२३
३९	जयसिंग-दिलेरखानास पाठविले.	२३
४०	जयसिंगाचे अनुष्ठान	२४
४१	श्रीभवानीचा दृष्टांत.	२४
४२	रघुनाथपंडित जयसिंगाकडे	२५
४३	जयसिंगाचे आश्वासन :	२५
४४	दिलेलखान कष्टी	२६
४५	मुरारबाजी पडला.	२६
४६	शिवाजी-जयसिंग भेट	२७
४७	दिल्लीस जाण्याचा करार	२८
४८	शिवाजी-जयसिंग विजापुरावर	२९
४९	राजे आगऱ्यास	२९
५०	शिवाजी पादशाही दरबारात	३०
५१	'रस-रंग राखून निघून जाणें'	३१
५२	पादशाहास अर्ज	३१
५३	औरंगजेबाचा विकल्प	३१
५४	शिवाजी जाफरखानाच्या भेटीस	३१
५५	शिवाजीभोवती चौकी	३२
५६	मेव्याचे पेटारे	३२
५७	राजांचे पलायन	३२
५८	हिरोजीही निघाला	३३
५९	रामसिंगाची कैफियत	३३
६०	शिवाजीचा शोध	३४

६१	राजे राजगडास	३४
६२	गड परत घेण्याची तजवीज	३५
६३	“एक गड घेतला, परंतु एक गड गेला!”	३५
६४	इतरही गड घेतले.	३६
६५	संभाजी राजगडास : नेमणुका	३६
६६	‘पतकें केलीं.’	३६
६७	पन्हाळा आदिलशाहीकडे	३७
६८	नेताजीस दूर करून कडतोजी सेनापती	३७
६९	संभाजी मोगलांचा सप्तहजारी	३८
७०	मोगलांशी सला	३८
७१	शाहाजाद्याशी भेट	३९
७२	बादशाहाचा हुकूम	३९
७३	शाहाजाद्याचा इशारा	३९
७४	पादशाहा थक्क	४०
७५	प्रतापरावाची भेट	४०
७६	रांगणा ‘रक्षिला’	४०
७७	मोगलाईत पाळत	४०
७८	सुरतेची लूट.	४०
७९	‘दर्यास पालाण घातलें.’	४२
८०	काय सावंत व बाजी पासलकर	४२
८१	शाहाजीचा मृत्यू	४२
८२	शिद्दीचा पराभव	४३
८३	‘कुल कोंकण काबीज.’	४४
८४	बनसूर ‘मारिलें.’	४५
८५	कारंजे-औरंगाबाद लुटली.	४५
८६	रायरी- ‘तक्तास जागा.’	४५
८७	राजारामाचा जन्म	४६
८८	कोळवण काबीज	४६
८९	कणेरागडचे युध्द	४६
९०	सालेरीचा वेढा	४७
९१	दिलेलखान पळून गेला.	४८
९२	“बहादुरखान पेंडीचें गुरूं आहे.”	४८

९३	पन्हाळा-रायबाग घेतले.	४९
९४	कारभाराचे हवाले	४९
९५	बेलोलखान शरण	४९
९६	नारोपंतास ‘मजुमदारी’	५०
९७	प्रतापराव ठार	५०
९८	हंबीररावास सरनोबती	५०
९९	रघुनाथपंत हणमंते शिवाजीकडे	५१
१००	हुसेनखान धरिला.	५१
१०१	‘कोपल घेतलें’	५१
१०२	हंबीरराव मोगलाईत	५२
१०३	राजे सिंहासनारूढ	५२
१०४	पातशाहाचा खेद	५४
१०५	भागानगर-भेटीचा विचार	५४
१०६	राजे भागानगरास	५५
१०७	पादशाहाचे समाधान	५६
१०८	“तुम्हीं सहाय असावें.”	५६
१०९	राजे श्रीशैल्यास	५६
११०	चंदीस वेढा	५६
१११	शिवाजी-व्यंकोजी भेट	५७
११२	राजे देशी	५७
११३	व्यंकोजीशी सला	५८
११४	जालनापूरास वेढा	५९
११५	संभाजी दिलेलखानाकडे	५९
११६	राज्याची मोजदाद	६०
११७	‘दोन प्रांत मिळून एक राज्य.’	६४
११८	राजारामाचे लग्न	६५
११९	राजांस ज्वराची व्यथा	६५
१२०	राजांचे देहावसान	६५
१२१	अशुभचिन्हे व उत्तरक्रिया	६६
१२२	राजा अवतारीच.	६७
१२३	फलश्रुती.	६७

॥ श्री ॥

श्रीमंत महाराज राजश्री राजाराम साहेब छत्रपती, साहेबांचे सेवेशी

१ .लेखनास आज्ञा.

विनंती सेवक कृष्णाजी अनंत सभासद कृतानेक विज्ञापना ऐसी जे .साहेबीं मेहेरबानी करून सेवकास पुसिलें कीं ,"आपले पिते थोरले राजे यांणीं इतका पराक्रम केला व चार पातशाहींशीं दावा लाविला . ऐसा पराक्रम केला .ऐसें असतां औरंगजेब येऊन [त्यानें] किंल्लोकिल्लीं अनर्थ मांडिला .याचा अर्थ काय ? तुम्ही पुरातन ,राज्यांतील माहीत [गार] लोक आहां ,तरि इस्तकबिल पासून चरित्र लेहून देणें." म्हंणोन आज्ञा केली .त्याजवरून वर्तमान ऐसी जे-:

२ .मालोजीस दृष्टांत

राजियांचे बाप थोरले महाराज राजश्री शाहाजी राजे ,यांचे बाप म्हंणजे राजियांचे आजे राजश्री मालोजी राजे व विठोजी राजे भोंसले;हे निजामशाही वजीर दौलता करून तोलदारीने होते .त्यांची निष्ठा श्रीशंभुमहादेव यांचे भजनीं बहूत होती .त्यास शिखरी यात्रा चैत्रमासीं भरते .पांच सात लक्ष माणसें मिळतात .पाणियाचें बहूत संकट .उदक नाहीं .तीन कोशांवरुन उदक आणतात .लोक श्रमी बहूत होतात.म्हणून राजश्री मालोजीराजे यांनी तेथें जागा पाहून तळें एक थोर बांधिलें .सर्वत्र लोकांस उदक कार्यास येई असें केलें .अपरमित द्रव्य खर्च केलें .तळें संपूर्ण उदकानें भरलें .हें करितांच रात्रौ श्रीशंभुमहादेव स्वप्नास येऊन ,प्रसन्न होऊन बोलिला जे ,"तुझ्या वंशांत आपण अवतार घेऊं .देव-ब्राह्मणांचे संरक्षण करून म्लेंछांचा क्षय करतों .दक्षण देशाचें राज्य देतों " म्हणोन त्रिवार वचन करून वर दिला .त्याजवरून राजे यांस [बहूत संतोष होऊन] त्यांनीं दानधर्म बहूत केला.

३ .शिवाजीचा जन्म.

पुढें राजश्री मालोजी राजे यांच्या पोटीं राजश्री शाहाजीराजे व राजश्री सरफजी राजे हे दोघे पुत्र जाहाले .दोघांनीं पातशाहीमध्यें दौलता केल्या .दौलत करीत असतां निजामशाही बुडाली .यावरि शाहाजी राजे इदलशाही वजीर जाले .महाराज हा किताब दिला .दाहाबारा हजार फौज चालूं लागली .शाहाजी राजियासि दोघी स्त्रिया .प्रथम स्त्री जिजाई आऊ .दुसरी स्त्री तुकाई आऊ .तिचे पोटीं एकोजी राजे पुत्र जाले . जिजाई आऊ तिचे पोटीं राजश्री शिवाजी राजे पुत्र होतांच श्रीशंभुमहादेव जागृतीं येऊन स्वप्न जालें कीं ,"

आपणच अवतरलों आहे .पुढें बहूत ख्यात करणें आहे .बारा वर्षेपर्यंत तुम्हीं आपले जवळ ठेवावें .पुढें न ठेवणें .जातील तिकडे जाऊं देणें .आटोप न करणें." ऐशी जागृति जाली.शाहाजी राजे कर्नाटक बेंगरुळ येथें होते .त्यांपाशी कारभारी राजश्री नारोपंत दीक्षित होते.त्यांच्या पोटीं रघुनाथपंत व जनार्दनपंत हे दोघे पुत्र बहूत शाहाणे जाले .शाहाजी राजे यांसि दौलतेमध्यें पुणें परगणा होता .तेथें दादाजी कोंडदेव शाहाणा , चौकस ठेविला होता .तो बेंगरुळास महारांचे भेटीस गेला .त्याबरोबर राजेश्री शिवाजी राजे व जिजाबाई आऊ ऐशीं गेलीं .ते समयीं राजियास वर्षे बारा होतीं .बराबर शामराव निळकंठ म्हणून पेशवे करून दिले व बाळकृष्णपंत ,नारोपंत दीक्षिताचे चुलत भाऊ ,मुजुमदार दिले .व सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ सबनीस ऐसे देऊन दादाजीपंतास व राजे यांसि पुण्यास रवाना केलें .ते पुण्यास आले.

४ .बारा मावळें काबीज केलीं.

येतांच बारा मावळें काबीज केलीं .मावळे देशमुख बांधून ,दस्त करून ,पुंड होते त्यांस मारिलें . त्याजवर ,कालवशात ,दादाजी कोंडदेव मृत्यू पावले .पुढें शिवाजी राजे आपणच कारभार करीत चालले .मग सुपें महाल येथें कोणे एके जागा संभाजी मोहिता म्हणोन सावत्र आईचा भाऊ ,मामा होता .तो महाराजांनी महालावरि ठेविला होता .त्याचे भेटीस शिमग्याचे सणास पोस्त मागावयास म्हणून गेले .मामास कैद करुन ठेविले .त्याचे तीनशें घोडे पागेचे होते व द्रव्यही बहूत होतें .वस्तभाव ,कापड हस्तगत करून सुपे देश साधिला तुकोजी चोर मराठा म्हणोन लष्करचा सरणोबत केला .शामराव निळकंठ पेशवे व बाळकृष्णपंत मुजुमदार व नारोपंत व सोनोजीपंत व रघुनाथ बल्लाळ सबनीस असे कारभारी करून बहूत सावधपणे चौकशीनें वर्तणूक करीत चालले.

५ .पुरंदर घेतला

पुढें जुन्नर शहर मारिलें .घोडे दोनशें पाडाव केले .तीन लक्ष होनांची मत्ता ,खेरीज कापड जिन्नस , जडजवाहीर हस्तगत करून पुण्यास आले. मग अहमदनगर शहर मारलें .मोंगलांशी मोठें युद्ध केलें .सातशें घोडे पाडाव केले .हत्तीही पाडाव केले .द्रव्य बहूत सापडलें. ते समयीं पागा बाराशें व शिलेदार दोन हजार जाहाले .अशी तीन हजार स्वारांची बेरीज जाली .तेव्हां माणकोजी दाहातोंडे सरनोबत लष्करचे केले .मग किल्ले कोंढाणा इदलशाही होता ,तो भेद करून घेतला.ठणे आपले ठेविले .सवेंच पुरंदरगड इदलशाही येथे निळकंठराव म्हणोन ब्राह्मण गडास खावंद होते ,ते मेले .त्यांचे पुत्र दोघे ,ते एकांत एक भांडूं लागले .त्यांची समजावीस करावयास म्हणोन राजे पुरंदरास गेले आणि ते दोघे भाऊ कैद करून तोही गड आपणच घेतला . आपलें ठाणें बसविलें.

६.जावळी काबीज

त्याजवरि कोंकणांत कल्याण भिवंडी मारिली .आणि माहुली किल्ला अदलशाही घेतला .मावळे लोक यांची संचणी करीत चालले .मुरबाद म्हणोन डोंगर होता त्यास बसविलें .त्याचें नांव राजगड म्हणोन

ठेविलें .त्या गडाच्या चार माच्या वसविल्या .कोंकणात चंदरराव मोरे म्हणून राज्य करीत होते .व शृंगारपुरीं सुर्वे राज्य करीत होते .त्यांचे प्रधान शिरके होते .असे जबरदस्त गड ,कोठ ,दाहा बारा हजार लष्कर ,हाशम समेत राज्य करित असत .त्यांजकडे रघुनाथ बल्लाळ सबनीस बोलावून पाठविले .विचार करितां ,“ चंदरराव मोरे यास मारल्या विरहित राज्य साधत नाहीं .त्यास तुम्हांवांचून हें कर्म कोणास न होय .तुम्ही त्यांजकडे हेजबीस जाणें.” ऐसें सांगितलें .बराबर निवडक धारकरी शे सवाशें माणूस निवडून दिले .ते स्वार होऊन जावली नजीक जाऊन पुढें चंदररायास सांगून पाठविलें कीं ,“ आपण राजियाकडून आलों आहों .कित्येक बोलणें चालणें तहरह कर्तव्य आहे.” असें सांगून पाठविलें .उपरि त्यांनी त्यांस आपणाजवळ बोलावून भेट घेतली .कित्येक बाह्यात्कारी बोलणें जाहालें .बिराड दिलें तेथें जाऊन राहिले . दुसरे दिवशीं मागती गेले .एकांती भेट घेतली .बोलणे जाहालें .प्रसंग पाहून चंदरराव व सूर्याजीराव दोघां भावांस कटारीचे वार चालविले .जमातीशी निघून चालिले .पाठीवर लाग जाहाला त्यास मारून निघून चालिले .खांसाच पडलियावरि लोक काय चालून येतात ?असें कर्म करून ,परतोन राजियाकडे भेटीस आले . तेच खांसा राजा चालोन जाऊन जावली सर केली.मावळे लोकांस कौल देऊन संचणी केली .प्रतापगड म्हणवून नवाच वसविला .हणमंतराव म्हणवून चंदररायाचा भाऊ चतुर्बेट म्हणून जागा जावलीचा होता , तेथें बल धरून राहिला .त्यास मारल्याविना जावलीचें शैल्य तुटत नाहीं .असें जाणून संभाजी कावजी म्हणून महालदार राजियाचा होता त्यास हणमंतराव याजकडे राज्यकारणास पाठवून ,सोइरिकीचें नातें लावून ,एकांती बोलीचालीस जाऊन ,संभाजी कावजी यानें हणमंतरायासि कटारीचे वार चालवून जिवें मारिलें .जावली काबीज केली .सिवतर खोरियांत बाबजी राऊ म्हणून पुंड होता .तोही कैद करून त्याचे डोळे काढिले.

७. संभाजीचा जन्म

पुढें सुर्वे राज्य करीत होते त्यांजवर चालून गेले .शृंगारपूर घेतलें .सुर्वे पळोन देशांतरास गेले .त्यांचे कारभारी शिर्के होते त्यांशी भेद करून राज्य हस्तगत केलें .त्यांसि महाल मुलूख देऊन त्यांची कन्या राजियानें आपलें पुत्रास केली .याप्रकारें जावलीचें राज्य व शृंगारपूरचें राज्य ऐशीं दोन राज्यें काबीज केली . तेव्हां मोरो त्रिबंक पिंगळे ब्राह्मण यांनी बहूत मेहनत केली .त्याजवरून शामराव निळकंठ यांची पेशवाई दूर करून मोरोपंतास पेशवाई दिली ,व निळो सोनदेव यांणीही मेहनत केली म्हणोन सुरनिशी सांगितली . गंगाजी मंगाजी म्हणोन होते त्यांस वाकनिशी सांगितली .प्रभाकरभट म्हणून थोर ब्राम्हण उपाध्ये होते त्यांचे पुत्र बाळंभट व गोविंदभट हे उपाध्येपण चालवीत होते .लष्करचा सरनोबत नेताजी पालकर केला . नेताजी सरनोबती करोत असतां सात हजार पागा व तीन हजार शिलेदार अशी दहा हजार फौज जाहाली . मावळे लोकांची संचणी दाहा हजार पावेतों जाली .यांसि सरनोबत येसाजी कंक म्हणून केला .ऐसें राज्य चौकशी बंदोबस्त करून राहिले .राजियाची स्त्री निंबाळकर यांची कन्या सईबाई केली होती ती प्रसूत जाहाली .पुत्र जाहाला .त्याचें नांव संभाजी राजा म्हणून ठेविलें .बहूत उत्साह केला .धर्म बहूत केला . राजगडीं राहिले.

८ आदिलशहाचा शहाजीस जाब

मग पुढें या खबरी दिल्लीस पातशाहास कळाल्या .विजापूर) येथें (अली इदलशाहा पादशाही करूं लागले व बडी साहेबीण सुलतान महंमद याची बायको ही कारभार कुल करीत असतां त्यांस हें वर्तमान कळून बहूत कष्टी जाहालीं .पातशाही किल्ले घेतले .देशही काबीज केला .एक दोन राज्यें बुडविलीं .हा पुंड जाहाला .त्यास मारून गर्दीस मेळविण्याचें कसें करावें ,म्हणून विचार करून ,राजश्री शाहाजी राजे बेंगरुळाकडे होते ,त्यांस पत्रें लिहिलीं .महालदार रवाना केले कीं ,"तुम्ही पादशाही चाकर आणि शिवाजी लेक पुण्याकडे पाठवून यांणीं पादशाहाशीं बदलून हरामखोरी केली .चार किल्ले पादशाही घेतले .देश ,मुलूख काबीज केला व मारिला .एक दोन राज्यें बुडविलीं व एक दोन राजे पादशाही रूजुवात होते ते मारिले .आतां लेंकास कैदवार ठेवणें .नाहीं तरि पादशाही हवाला घेतील." असें लिहून पाठविलें .मग महाराजांनी उत्तर दिलें कीं ,"शिवाजी आपला पुत्र ,परंतु आपणाजवळून पळोन गेला .तो आपल्या हुकुमांत नाही .आपण तो पादशाहांशी रुजुवात एकनिष्ठेनें आहों .शिवाजी आपला पुत्र याजवरि हल्ला करावी ,मन मानेल तें करावें , आपण दरम्यान येत नाहीं." असें उत्तर पाठविलें.

९ .अफजलखानाची रवानगी

त्याजवरून बडी साहेबीण हिणें कुल वजीर उमराव अदलशाही बोलावून आणून शिवाजी राजियावरि रवाना करावे म्हणोन पुसतां कोणी कबूल केलें नाहीं .अफजलखान वजीर यांणीं कबूल केलें कीं ," शिवाजी काय ?चढे घोडियानिशी जिवंत कैद करून घेऊन येतो." असें बोलिलियावरि पादशाहाजादी खुशाल होऊन वस्त्रें ,अलंकार ,हत्ती ,घोडे ,दौलत इजाफा देऊन नावांजिक बरोबर उमराव जमाव बारा हजार स्वार ,खेरीज पायदळ रवाना केलें.

१० .कृष्णाजी भास्कर हेजिबीस

तेव्हां अवघी फौज एकत्र होऊन औरस चौरस लष्कर उतरलें .आणि पुढें तुळजापुरास आलें .तेथें येऊन मुक्काम केला .श्रीभवानी कुलदेवता महाराजांची ,तीस फोडुन ,जातियांत घालून ,भरडून पीठ केलें . भवानीस फोडतांच आकाशवाणी जाहाली कीं ," अरे अफजलखाना ,नीचा ,आजपासून एकविसावे दिवशीं तुझें शीर कापून ,तुझें लष्कर अवघें संहार करून नवकोटी चामुंडास संतृप्त करितें." अशी अश्रणी जाहाली . पुढें लष्कर कूच करून श्रीपंढरीस आलें .भीमातीरीं उतरलें .देवास उपद्रव देऊन वाईस आलें .तेथें येऊन विचार केला कीं ,"राजियाकडे हेजिबीस पाठवून ,सला करून ,पातेजून जिवंत हातीं धरावा." अशी मनात योजना करून कृष्णाजी भास्कर हेजीब यास बोलावून आणून सांगितलें कीं ," तुमचे बाप महाराज त्यांचा आमचा भाईचारांत पुरातन स्नेह चालला आहे .त्याजमुळें तुम्ही कांही आपणांस इतर नाहीं .तुम्हीं येऊन आपल्यास भेटणें .आपण पादशाहा जवळून तुम्हांस तळकोंकणचें राज्य व जाहागिरी देववितों .गडकोट घेतले ते करार करवितों .वरकडही नावांजितों. जितके तुमचे मनांत असेल तेणेंप्रमाणें सरंजाम देववितों .

पादशाहाशीं भेट घेणें तरी घ्या ,नाहीं तरि मुलाजमत माफ करवितो.” ऐशा कित्येक गोष्टी सांगोन “ सल्यांत राजासि भेटीस आणावें. अगर आपण येऊं.” असें कृष्णाजीपंतापाशी सांगितलें .आणि त्यास पुढें रवाना करावें (असें केलें).

११ .शिवाजीचा युध्दनिश्चय

तों या खबरी राजियासि पावल्या कीं ,“विजापुराहून अफजलखान बारा हजार स्वारांनिशीं नामजाद जाहाला.” हें कळून राजानें आपली कुल फौज लष्कर मुस्तेद करावें ,आणि जावलीस युद्ध करावें ,आपण प्रतापगडास जावें ,हा विचार केला .तेव्हां सर्वांनीं निवारिलें कीं,जुंज देऊं नये ,सला करावा .त्यास राजे बोलिले जे ,“ संभाजी राजियास जसें मारिलें तसें आपणास मारितील .मारितां मारितां जें होईल तें करूं . सला करणें नाहीं.” हा विचार केला .तों रात्रीं श्रीभवानी तुळाजापूरची इणें मूर्तिमंत दर्शन दिलें आणि बोलिली कीं ,“ आपण प्रसन्न जाहालों .सर्वस्वें साह्य तुला आहे .तुझे हातें अफजलखान मारवितों .तुजला यश देतों .तूं कांहीं चिंता करूं नको.” म्हणून धीर भरंवसा देऊन अभय दिलें .राजे जागे होऊन जिजाबाई आऊस बोलावून आणून स्वप्नाचें वर्तमान सांगितलें .व गोमाजी नाईक पानसंबळ जामदार व कृष्णाजी नाईक व सुभानजी नाईक असे मातबर लोक व सरदार व सरकारकून मोरोपंत व निळोपंत व अण्णाजीपंत व सोनाजीपंत व गंगाजी मंगाजी व नेताजी पालकर सरनोबत व रघुनाथ बल्लाळ सबनीस व पुरोहित असे बोलावून सर्वांस स्वप्न सांगितलें .“श्रीप्रसन्न जाहाली ,आतां अफजलखान मारून गर्दीस मेळवितो.” असे म्हणाले .हें सर्वांचे मतें कठीण कर्म ,सिध्दीस गेलें म्हणजे बरें ,नाही तरि कसें होईल ? म्हणोन विचार पडला .मग राजे बोलिले कीं ,“सला केलियाने प्राणनाश होईल .युध्द केलियानें जय जाहालियास उत्तम ,प्राण गेलियाने कीर्ति आहे .येविषयीं श्लोक-:

जितेन [जयेन?] लभते लक्ष्मीं मृत्युनापि सुरांगना:।
क्षण-विध्वंसिनी काया का चिंता मरणे रणे॥१॥

असा नीतीमध्यें विचार सांगितला आहे .त्याजकरितां युध्द करावें हें खरें .आतां एकच तजवीज करावी . संभाजी राजे पुत्र व मातोश्री आहेत हीं राजगडीं ठेवावीं .जर अफजलखान मारून जय जाहाला ,तरि] माझा मीच आहे .एखादे समयी युध्दीं प्राणनाश जाहला तरि [संभाजी राजे आहेत ,त्यांस राज्य देऊन त्यांचे आज्ञेंत तुम्हीं राहाणें.” अशी निर्वाणूक करून सर्वांस सांगून आशीर्वाद दिला कीं,“शिवबा !विजयी होशील.”

१२ .नेताजी पालकरास कामगिरी

असा आशीर्वाद घेऊन मग राजे निघोन प्रतापगडास गेले .नेताजी पालकर सरनोबत यास लष्कर घेऊन वर घाटावरि येणें म्हणोन सांगितलें ,आणि अफजलखानास जावलीस बोलावितों ,सला करुन भेटतों , विश्वास लावून जवळ आणितों ,ते समयीं तुम्हीं घाटमाथा येऊन मार्ग धरणें.” असें सांगितलें .त्याजबरोबर रघुनाथ बल्लाळ सबनीस दिले .व मोरोपंत पेशवे व शामराव निळकंठ व त्रिबंक भास्कर यांसही समागमें

घेऊन तेही कोंकणातून यावे असें केलें.

१३ .पंताजीपंत खानाकडे

इतक्यांत कृष्णाजीपंत हेजीब खानाकडील आले .त्यांस प्रतापगडावर घेतलें .राजियाची भेट जाहाली .कित्येक खानांनी गोष्टी सांगितल्या होत्या त्या विदित केल्या ..लौकिक बोलणें जाहालें .राजे बोलिले कीं ,“ जसे महाराज तसे खान आपणास वडील आहेत .त्यांची भेट अलबत्ता घेऊ.” असे बोलून कृष्णाजीपंत यांस बिराड एक घर दिलें .तेथें जावयास निरोप दिला .दुसरे दिवशी राजे सदरेत बैसले . सरकारकून सर्व सरदार असे सर्वही बोलावून आणिले. व पंताजी गोपीनाथ म्हणवून राजियाजवळ विश्वासू मातबर होते ,त्यांस बोलावून आणून एकांतीं महालांत खलबत बैसले .राजे पंताजीपंतास बोलिले जे , “खानाचे हेजीब कृष्णाजीपंत हेजिबीस आले आहेत ,त्यांस निरोप देऊन रवाना करितों व तुम्हांसही अफजलखान याजकडे रवाना करितों .तेथें जाऊन ,खानाची भेट घेऊन बोलीचाली करणें .खानास क्रिया शपथ मागणें .तुम्हीं ते शपथ मागतील तरि देणें .अनमान न करणें .हर प्रकारे जावलीस घेऊन येणें . याखेरीज सैन्यामध्यें युक्तिप्रयुक्तीनें ज्या रितीनें शोध मनास आणावयाचा त्या रितीनें आणा .खानाचें चित्त आमच्या बरियावरि किंवा वाइटावरि आहे असा शोध करणें.” इतकें सांगून ,राजे सभेस आले . कृष्णाजीपंतास बोलावून आणिलें .राजे म्हणों लागलें कीं ,“ खानाची क्रिया पाहिजे .याजकरिता आमचे पंताजी गोपीनाथ यांस तुम्हीं आपणांसमागमें खानाच्या भेटीस नेणें .यांजवळ हस्तपंजराची आण देववणें . खानास जावलीस घेऊन येणें .काकाची भेट घेऊन येऊं .आमच्या मनात कांही कपट नाहीं.” असें सागितलें . त्यांस ही गोष्ट मानली .मग कृष्णाजीपंतास वस्त्रें देऊन रवाना केले .तसेच पंताजीपंतास वस्त्रें देऊन अफजलखानाकडे रवाना केले.

१४. खानाच्या कपटाचा परिस्फोट

त्यांणीं जाऊन खानाची भेट घेतली .खानांनी सन्मान केला .कृष्णाजी भास्कर यांनी अर्ज केला की , “ शिवाजीनें हेजिबीस पंताजीपंतास पाठविले आहेत .एकांती बैसून बोलावें.” असें सांगितल्यावरि खान एकांती बैसून कृष्णाजीपंत व पंताजीपंत यांस बोलावून आणून वर्तमान पुसिलें .कृष्णाजीपंत बोलिले की , “ राजे तुम्हांवेगळे नाहींत .जसे महाराज शाहाजीराजे तसे तुम्ही ,म्हणून शपथ दिली .राजे निर्भय होऊन जावलीस येतील .खानानीही शंका न धरतां जावलीस यावें .त्यांची तुमची मुलाजमत होईल .तुम्ही सांगाल तें ऐकतील.” हा भावार्थ खानास कळल्यावरि मनात नष्टाई धरून शपथ दिली .खान बोलिले कीं ,“राजा हरामजादा काफर ,जावली कुबल जागा ,येथें भेटीस यावें म्हणोन बोलावितो .यास्तव तूं ब्राह्मण मध्यस्थ होऊन शपथ देशील तरि शिवाजी राजियाचे भेटीस येईन .मुलाजमत घेऊं.” त्यास पंताजीपंतीं क्रिया दिली जे ,“राजे तुमच्या वाईटावरि नाहित .संदेह न धरणें .भेटीस यावयाचें करणें.” ऐसें सांगून सैन्यात लांच लुचपत देऊन ,मुत्सद्दी वजीर यांजवळ शोध करून विचारलें .त्यांनी सांगितलें कीं ,“शिवाजी हरामजादा आहे .याशीं युद्ध करितां सापडणार नाहीं .याजकरितां राजकारण लावून भेटी घ्यावी] ,आणि [भेटीचे समयीं

धरावा ,ऐसी खानांनी तजवीज केली] आहे.[" म्हणून कळलियावरि दुसरे दिवशीं पंताजीपंत खानाकडे येऊन ,राजियाकडे जातों म्हणून हुकूम मागितला .खानानें बहुमान करून राजाकडे पाठविलें.

१५.शिवाजीचा खानास निरोप

पंताजीपंत प्रतापगडास आले .राजाची भेट जाहाली .ते समयीं पंताजीपंतांस घरीं जावयास निरोप दिला .रात्रीं एकले पंताजीपंत भेटीस बोलाविले .राजे व पंत दोघे बैसून आण शपथ घालून ,एकांती वर्तमान पुसिलें कीं ," यथार्थ करीणा सांगणें .खानाच्या मनांत कसें काय आहे हें सागणें". ऐसें घरोबियांत घेऊन राजांनी पुसिलें. तेव्हा त्यांनी सांगितलें की,"खानाच्या मनांत दुष्ट बुध्दी आहे .सला करून तुम्हांस भेटीस आणून ,दगा करून कैद करून ,विजापूरास धरून न्यावें ऐसें आहे .जर तुम्हांस हिंमत असली तरि खानास नाना प्रकारें भेद करून जावलीस घेऊन येतों .तुम्हीं हिंमत धरून एकांती ,एकांगी करून मारणें आणि लष्कर सर्व लुटणें .राज्य सर्व आपलें करणें." ऐसा विचार सांगितला .[तो] राजांच्या मनांत आला .तेव्हां पंताजीपंतांस पांच हजार होन बक्षीस दिलें आणि खानास सांगणें जे ,"राजा बहूत भितो." "वाईस भेटीस यावयास धीर पुरत नाहीं .खान वडील आहेत ,मेहेरबानी करून जावलीस येऊन भेट देतात तरि आपण भेटीस येतों .आपण यास हातीं धरून ,धीर भरंवसा देऊन ,पादशाहाचे मुलाजमतीस घेऊन जाऊन उर्जित करतील तरी थोरपण आहे .ऐसे कित्येक मजकूर सांगून घेऊन येणें." म्हणोन विचार सांगोन पंताजीपंत यास रवाना केलें.

१६ .खान प्रतापगडाखाली

ते जाऊन वाईस खानास भेटले .करीणा जाहीर केला ."राजा कचदील आहे .येथें भेटीस येतां शंका धरितो .तुम्हींच तेथे जावलीस चलणें .तेथे भेटीस येतील ,दिलासा करून बराबर घेऊन जाणे." असें सांगितलें .त्यावरून खान बहूत खुशाल होऊन ,कुच करून जावलीस रडतोंडीचा घाट उतरून आला .तो प्रतापगडाखालीं डेरे देऊन राहिला .आसपास चौगर्दी बारा हजार लष्कर व बंदुखी ,आराबियाच्या गाडया , हत्ती सुतारनाल्याच्या गाडया , जागां जागां पाणी पाहून उतरले .पंताजीपंतांस गडावरि राजियाकडे पाठविले की ," भेटीस येणें."

१७ भेटीची योजना

त्याजवरून ते राजियासि जाऊन भेटले .लौकिक बोलणें जें बोलवयाचें तें बोलिले .एकांती मागती सर्व वर्तमान सांगितलें कीं ," आपण बोलल्याप्रमाणें खानास घेऊन आलों .आतां तुमची त्यांची भेटी एकांती खासे खासे यांची करवितों .तुम्ही हरीफी करून कार्यभाग करणें तो करावा." म्हणोन सांगितलें .भेटीस एक दिवस आड करून दुसरे दिवशी भेटावें असें केलें ."राजे गडावरून उतरावे ,खानांनी गोटांतून पुढें यावें , उभयतांनी दरम्यान डेरे देऊन खासे खासे भेटावे." ऐसा निर्वाद करून राजाचा निरोप घेऊन खानाजवळ गडाखाली माचीस उतरून गेले .खानास वर्तमान सांगितलें .खानानेंही मान्य केलें.

१८ शिवाजीची तयारी

मग दुसरे दिवशी गडाखालीं राजियांनी सदर केली .डेरे बिछाने व असमानगिरी ,तिवाशिया व मोतियांच्या झालरी लाविल्या .चित्रविचित्र बाडे व लोडें ,गाद्या ,पडगाद्या टाकिल्या .सदर सिध्द केली .घाट माथां लष्कर] सुध्दां [नेताजी पालकर आणविले होते ,त्यांसि इशारत सांगोन पाठविली कीं ,"उद्यां खानाचे भेटीस जातों ,फत्ते करितों आणि गडावरि येतों .तेव्हां एकच आवाज गडावरि करितों .तेव्हां तुम्ही घाटाखाली उतरोन लष्करांत खानाच्या चालोन येऊन मारामारी करणें." तैसेच कोंकणातून राजश्री मोरोपंत पेशवे आणविले .त्यांसही गडावरील आवाजाची इशारत सांगितली .आपण निवडक लोक गडावरून उतरोन जागां जागां झाडीत ठेविले .आणि खासां राजियांनी जरीची कुडती घातली .डोईस मंदील बांधिला त्यांत तोडा बांधिला .पायांत चोळणा घालून कास कसली ,व हातांत एक विचवा व वाघनख चढविलें .आणि बराबर जिऊ महाला म्हणून मरदाना होता त्याजवळ एक पट्टा व एक फिरंग व ढाल ,तैसाच संभाजी कावजी महालदाराजवळ पट्टा व फिरंग व ढाल ,ऐसे दोघे माणसें मर्दाना आपणा बराबरि भेटीस घेतलीं .वरकड आसपास धारकरी लोक जागां जागां जाळींत उभे केले .आणि राजियानें स्नान करून भोजन केलें .सिध्द होऊन गडाखालीं भेटीस जावयास उतरले.

१९ ."शिवाजी म्हणजे काय?"

गोटांतून भेटीस यावयास खानही सिध्द होऊन चालले .बराबरि लष्कर हजार दीड हजार बंदुखी मुस्तेद होऊन चालिले .मोठे मोठे धारकरी लोक समागमें निघाले ,चालिले .इतक्यांत पंताजीपंत पुढे होऊन अर्ज केला की ,"इतका जमाव घेऊन गेलियाने राजा धाशत खाईल .माघारा गडावरि जाईल .भेटी होणार नाहीं .शिवाजी म्हणजे काय ?यास इतका सामान काय करावा ?राजा दोघां माणसांनिशी तिकडोन येईल . तुम्हीं इकडोन दोघांनिशी चलावें .दोघे बैसोन भेटावें .तेथें तजवीज करणें ते करा." असें सांगितल्यावरि अवघा जमाव दूर बाणाचे टपियावरि उभे राहून खासा खान ,एक पालखी ,दोघे हुद्देकरी ,व कृष्णाजीपंत हेजीब असे पुढें चालिले .सैदबंडा म्हणोन पटाईत एक लष्करी समागमें घेतला .पंताजीपंतही बराबरि आहेत .असें सदरेंत गेले .सदर देखोन खान मनांत जळाला कीं ,"शिवाजी म्हणजे काय ?शाहाजीचा लेंक . वजीर यास असा जरी बिछाना नाहीं !अशी मोतीलग सदर म्हणजे काय ?पातशाहास असा सामान नाहीं , येणे जातीचा त्यानें सामान मेळविला." असें बोलतांच पंताजीपंत बोलिला जे ,"पादशाही माल पादशाहाचे घरीं जाईल .त्याची इतकी तजवीज काय?" असें बोलून सदरेस बैसले .राजियास सिताब आणवणें म्हणून जासूद हरकारे रवाना केले.

२० .अफजलखानाचा वध

राजे गडाचे पायीं उभे होते ,तेथून हळू हळू चालिले .समाचार घेता खानाबरोबर सैदबंदा मोठा धारकरी आहे हे ऐकून अभे राहिले आणि पंताजीपंतांस बोलावू पाठविलें .ते आले .त्यास म्हणूं लागले जे , "जैसे महाराज तैसे खान .आपण खानाचा भतीजा होय .ते वडील सैदबंडा खानाजवळ आहे त्याकरिता शंका

वाटते .हा सैदबंडा इतका यातून दूर पाठविणे.” म्हणोन पंताजीपंतांस सांगितलें.त्यावरून पंताजीपंत] यानें [जाऊन कृष्णाजीपंताकडून खानास सांगोन सैदबंडाही दूर पाठविला .खान व दोघे हुद्देकरी राहिले .तेव्हां राजेही हिकडून जिऊ महाला व संभाजी कावजी दोघे हुद्देकरी] यां [सहित गेले .खानही उभा राहून ,पुढें सामोरा येऊन राजियास भेटला .राजियानें भेटी देतां खानानें राजियाची मुंडी कवटाळून खांकेखालें धरिली आणि हातींची जमदाड होती तिचें मेण टाकून कुशीस राजियाचे चालविलीं .तों आंगांत जरीची कुडती होती त्यावरि खरखरली .आंगास लागली नाहीं .हें देखोन राजियांनी डावे हाताचें वाघनख होतें ,तो हात पोटात चालवला .खानानें आंगांत झगाच घातला होता .वाघनखाचा मारा करिताच खानाची चरबी बाहेर आली . दुसरा हात ,उजवे हातचे बिचवियाचा मारा चालविला ऐसे दोन वार करून मुंडी आसडून ,चौथरियाखालें उडी घालोन निघोन गेले .खानानें गलबला केला कीं ,“मारिलें !मारिलें !दगा दिधला !बेगी धावा!!” असें बोलताच भोयांनीं पालखी आणिली आणि पालखींत घालून ,उचलून चालविला .इतकियात संभाजी कावजी महालदार यानें भोयांचे पाय मारिले आणि पालखीवालें भोयांस पाडिलें .खानाचें डोचकें कापिलें .हातीं घेऊन राजियाजवळ आला .इतक्यांत सैदबंडा पटाईत धावला .त्यानें राजे जवळ केले .पट्याचे वार राजियावरि चालविले .तों राजियानें जिऊ महालियाजवळ हुद्दियाचा पट्टा] होता तो [घेऊन ,पट्टा व बिचवा असे कातर करून सैदबंडा याचे चार वार ओढले .पांचवे हातानें राजियास मारावें तों इतकियांत जिऊ महाला याणें फिरंगेनें खांद्यावरि सैदबंडियासि वार केला .तो पट्टियाचा हात हत्यारा-समेत तोडिला .आणि खानाचे शीर घेऊन राजे सिताब गडावरि जिऊ महाला व संभाजी कावजी महालदार असे गेले.

२१ .खानाच्या लष्कराचा पाडाव

गडावरि जातांच एक भांडयाचा आवाज केला .तेच गडाखालील लोक व घाटावरील लोक व लष्कर व कोंकणातून मोरोपंत व मावळे असे चौतर्फी चोहोंकडून चालोन खानाचे गोटावरि आले .आणि खान मारून , शीर कापून राजे गडावरि गेले ,ही खबर कळोन कुल खानाचे बारा हजार लष्कर धास्त घेऊन अवसान खस्त जाहालें .इतकियांत राजियाच्या फौजा चौतर्फा मारीत चालले .मोठें घोरांदर युध्द जाहालें .दोन प्रहर घोरांदर युध्द जाहालें .खानाकडील मोठमोठे वजीर व लष्करी महदीन व उजदीन पठाण ,रोहिले ,सुरनीस [?]व आरबी वगैरे मुसलमान आणि जातिवंत मराठे ,धनगर व ब्राह्मण तसेच तोफाची ,बैले व कर्नाटकी प्यादे बंदुखी ,आडहत्यारी रोचेवार [?]व लोकवार [?]येलंगेवार[?]बाजे जातचे इटेकरी हतुलवे [?]तिरंदाज व छडीवाले व पटाईत व बंकाईत व बाणाईत व तोफखाना ऐसे एकंदर जम निदान करून भांडण दिधलें .मोठें क्षेत्र जाहालें .राजियाचें लष्करी लोकांनी व मावळे लोकांनी पायउतारा होऊन मारामारी केल्या .हत्ती तोडिले , ते जागां ठार जाले .कित्येक हत्तींचीं पुच्छें तोडिलीं ,कित्येक हत्तींचें दांत तोडिले .कित्येक हत्तींचें पाय तोडिले . तसेच घोडे एकच वारानें जिवें मारिले .तसेच खानाचे लष्करी कित्येक ठार मारिले .कित्येकांचे पाय तोडून पाडिले .कित्येकांचे दात उडविले .कित्येकांची डोचकीं फोडिलीं .कित्येक मेले .युध्दास आले ते मारून भुईस रगडिले .तसेंच उंटे मारिलीं .मारीत असतां रण अपार पडलें .संख्या न करवें .रक्ताच्या नद्या चालल्या .

रणकंदन जालें .ऐसे मारामारी करून हत्ती ,घोडे ,उंट व मालमत्ता व पालख्या वजीर पाडाव करून आणिले.
बितपशील

६५ हत्ती व हत्तिणी सुमार	४००० घोडे सुमार
३००००० जड जवाहीर	१२००उंटे सुमार
२००० कापड वोझीं	७००००० नगद व मोहोरा व होन सोने रुपये.

भांडी तोफखाना सर्वही घेतलें.
कलम १

वजीर पाडाव जाहाले बितपशील-

१ सरदार व वजीर मातबर .१लां [कं?] बाजी भोसले .१ अफजलखानाचे पुत्र .१ नाटकशाळेचे पुत्र ,१ राजेश्री झुंझारराव घाडगे .१ यांखेरीज लोक .कलम १ येणेंप्रमाणें पाडाव केले. याखेरीजही जिन्नस मालमत्ता ,गुरें-ढोरें ,बैल,मबलग मत्ता पाडाव केलें .भांडते लोकांनी तोंडी तृण धरून शरण आले त्यांसि व बायकामुलें ,भट-ब्राह्मण ,गोरगरीब असे अनाथ करून सोडिले .राजा पुण्यश्लोक ,शरणागतास मारीत नाही ,याजकरितांत्याचे लोकांनींही कित्येक अनाथ सोडिले .अफजलखानाचा लेक फजल हा पायीं चिरगुटें बांधुन झाडींत पळोन गेला .तसेच कित्येक भले लोक पळोन गेले .संख्या न करवे.

२२ .राजे यांचा दिलासा

ऐसी फते करून जय जाहाला .मग राजे यांणी खानाचे पुत्रास व सरदार पळून गेले होते त्यांस धरून आणिलें .राजा खासा प्रतापगडाखाली उतरोन कुल आपले लोक व अफजलखानाचे लोक व त्यांचें पुत्र भांडते माणूस होते तितकियांस भेटून ,पोटांशी धरून ,दिलासा करून ,भांडते लोक जे पडले होते त्यांच्या लेकांस चालविलें .पुत्र नाहीं त्यांच्या बायकांस निमे वेतन करून चालवावें असें केलें .जखमी जाहाले त्यांस दोनशें होन व शंभर होन ,पंचवीस होन ,पन्नास होन दर असामीस जखम पाहून दिधले .मोठमोठे लोक धारकरी जुमले होते त्यांस बक्षीस हत्ती ,घोडे दिधले .हस्तकडीं ,कंठमाला ,तुरें पदकें ,चौकडे ,मोत्याचे तुरे , कित्येकांस बक्षीस फार दिलें .ऐसें देणें लोकांस दिधलें .कित्येकांस गावंमोकासे बक्षीस दिधले .लोक नांवजिले .दिलासा केला.

२३ .शिवाजी ‘ अवतारीच होता.’

मागें कौरवांचा क्षय पांडवी केला, [तेव्हां] असा वीरावीरांस झगडा जाहाला. खासां खान राजियानें एकांगी करून मारिला. अफजलखान सामान्य नव्हे. केवळ दुर्योधनच जातीनें होता. आंगाचा, बळाचाही तैसाच आणि दुष्टबुध्दीनें तैसाच. त्यास एकले भीमानें मारिला. त्याचप्रमाणें [येथें राजानें] केलें. शिवाजी राजाही भीमच त्यांनीच अफजल मारिला. हे कर्म मनुष्याचे नव्हे. अवतारीच होता. तरीच हें कर्म केलें. यश आलें. असें जाहालें. खानाकडील वजीर पाडाव केले होते

त्यांस वस्त्रे, भूषणे, अश्व देऊन अनाथ करून सोडिलें. त्या उपरि राजश्री पंताजीपंतासही उदंड वस्त्रे, अश्व, अलंकार दिधले. अपार द्रव्यही दिध्लें. खुशाली केली. राजगडास मातुश्रीस व सर्वांसही फत्तेची खबर लिहून पाठविली. त्यांनीही वर्तमान ऐकून साखरा वांटून नगारे – करणे केले. भांडी मारिलीं. मोठी खुशाली केली. येणें रितीनें राजियाकडील वर्तमान जाहालें.

२४. विजापुरी शोक

त्याउपरि विजापुरास चवथे दिवशीं जासूद, हरकारे यांणीं खबर पादशाहास व पादशाहा-जादीस जाहीर केली कीं, " अफजलखान खांसा मारून शीर कापून नेलें. कुल लष्कर लुटून फस्त केलें." ऐसें सांगताच अली अदलशाहा तक्तावरून उतरोन, महालात जाऊन, पलंगावरि निजला. [त्याणें] बहूत खेद केला. असेंच पादशाहा-जादीस खबर लागतांच पलंगावरि बैसली होती तेथेच " अल्ला अल्ला! खुदा खुदा!" म्हणुन आंग पलंगावरि टाकून रडत पडली. "मुसलमानाची पादशाही खुदानें बुडविली," ऐसा कित्येक विलाप करून बहूत शोक केला. पादशाहा-जादीनें तीन दिवस अन्न-उदक [घेतलें] नाहीं. तसेच कुल मोठमोठे वजीर व लष्कर व कुल शहर दिलगीर जाहालें. म्हणूं लागले कीं, " उद्यां राजा येऊन शहर मारील व कोट घेईल." ऐसे घाबरे जाहाले. "खुदानें मुसलमानाची पातशाही दूर करून मराठ्यांसि दिली असें वाटतें." असें म्हणो लागलें.

२५. प्रतापगडावर देवीची स्थापना

त्या उपरांत मग राजियासि स्वप्नास श्रीभवानी तुळजापुरची येऊन बोलूं लागली कीं, " आपण अफजल तुझ्या हातें मारविला व कित्येक पुढेंही आले त्यांस पराभवांत नेलें. पुढेंही कर्तव्य उदंड कारण करणें आहे. आपण तुझ्या राज्यांत वास्तव्य करावें. आपली स्थापना करून पूजा-पूजन प्रकार चालविणें." त्याउपरि राजियानें गंडकी नदीस द्रव्य गाडियावरि घालून, गंडकी पाषाण आणून, श्रीभवानी सिध्द करून, प्रतापगडा [वर] देवीची स्थापना केली. धर्मदान उंदड केला. देवीस रत्नखचित अलंकार भूषणें नानाप्रकारें करून दिलीं. महालमोकाशे देऊन सचंतर हवालदार व मुजुमदार व पेशवे देवीचे करून महोत्सव चालविला. नवस यात्रा सर्वदा तुळजापूरच्या प्रमाणें तेथें चालती जाली. आणि तुळजापूरचे यात्रेस लोक जातात त्यांस दृष्टांत स्वप्नें होतात कीं, " आपण प्रतापगडास आहें, तेथें तुम्हीं जाऊन दर्शन घेणें व नवस फेडणे." असें [देवी] बोलूं लागली. मोठें जागृत स्थान जाहालें.

२६. 'मोगलांईत धुंद उठविली.'

यानंतरि, विजापूरचा मातबर वजीर अफजलखान होता तो बुडविला, तेव्हा पातशाही कमतर पडली, असें समजून राजियानें विजापूरचे किल्ले तळ-कोकणांत होते ते सर्व घेतले. पन्नास साठ

गड घेतले. तळकोंकण काबीज केलें वर-घाटही घेतला. तेव्हां लष्कर पागा सात हजार व शिलेदार आठ हजार, एकूण पंधरा हजार व हशम लोक बारा हजार ऐसी तोलदार फौज जमा जाहाली. लष्कर कुल जमाव घेऊन नेताजी पालकर सरनोबत मोंगलाईंत स्वाऱ्या करून, बालेघाट, परांडे, हवेली, कल्याण, कलबुर्गे, आवसें, उदगीर, गंगातीर पावेतो मुलूख मारीत चालले. खंडण्या घेतल्या. मुलूख जप्त केला. औरंगाबादचे पुरे मारिले. मोंगलाकडील फौजदार औरंगाबादेत होता, तो चालून आला. त्याशीं युध्द जाहाले. हत्ती घोडे पाडाव केले. मोंगलाईत धुंद उठविली. ऐसा पराक्रम करीत चालले.

२७. गडकोटांचा बंदोबस्त

जे जे गड घेतले त्या गडांवर राजियानें कारभारी बंदोबस्ती ऐसी पध्दत घातली कीं, गडावरि हवालदार एक व सबनीस एक व सरनोबत एक, असे तिघेजण एका प्रतीचे. जो कारभार करणें तो तिघांनी एका प्रतीचा करावा. गडावरि गल्ल्याचे, सामानाचे अंबर करावें. त्यास कारखाननीस म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमानें सर्व कारखाने यांस जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथें, त्या गडाचा घेरा थोर, त्या जागां सात पांच तटसरनोबत ठेवावे. त्यास तट वाटून द्यावे. हुशारी-खबरदारीस त्यांनी सावध असावें. गडावरि लोक ठेवावे, त्यांस दाहा लोकांस एक नाईक करावा. ‘नऊ पाईक दाहावा नाईक ’, येणेंप्रमाणें जातीचे लोक ठेवावे. लोकांत बंदुखी व इटेकरी तिरंदाज व आडहत्यारी असे लोक मर्दाने चौकशीनें आपण राजियांनी नजरगुजर [करून] एक माणूस पाहून ठेवावें. गडावरि लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. त्यांस जामीन आपले हुजरातीस लोक असतील त्यांपैकी घेऊन मग ठेवावे. सबनीस ब्राह्मण हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखाननीस परभू ठेवावे. असे एकास एक प्रतिमेळ ठेवावे. एक हवालदाराचे हातीं किल्ला नाहीं. हर एक फितवा-फांदा यास किल्ला कोणाच्यानें देववेना. ये रितीनें बंदोबस्तीनें गड- कोटाचे मामलें केले. नवी पध्दत घातली.

२८. पागांची व्यवस्था

तसेंच लष्करांत पागा केली. पागेचें बळ तोलदार केलें. पागांच्या तोलदारीखालीं शिलेदार ठेविले. स्वतंत्र बंड कोणाचे चालेना. पागेमध्यें दर घोडयासि बारगीर एक. [असे] पंचवीस बारगिरांस मराठा धारकरी हवालदार एक केला. पांच हवाल्यांचा एक जुमला म्हणून नांव ठेविलें. जुमालदारास पांचशे होन तैनात व पालखी त्यास एक, व [त्याच्या] मुजुमदारास शें सवाशें होनांची [तैनात] करावी. पंचवीस घोडयांस एक पखालजी व एक नालबंद. असे दाहा जुमले म्हणजे एक हजारी. यास एक हजार होन तैनात, एक मुजुमदार व एक मराठा कारभारी व एक जमनीस परभू कायस्थ. त्यास पांचशें होन. याप्रमाणें असामींस तैनात [व] पालखी द्यावी. आला जमाखर्च चौघांचे विद्यमानें करावा. अशा पांचा हजारिया मिळोन एक पांचहजारी करावा. त्यास दोन हजार तैनात

तसेच म्जुमदार, कारभारी, जमनीस करावे. अशा पांच हजारिया सरनोबताच्या हुकुमांत. ये जातीचा मामला पागेचा. तसे शिल्दाराकडे सुभे वेगळाले तेहि सरनोबताचे आज्ञेत पागा [व] शिलेदार मिळोन सरनोबत यांचे आज्ञेत वर्तावें. दरहजारी, पंचहजारी, सरनोबत यांजवळून वाकनिसीचे कारकून व हरकारे व जासूद ठेवावे. सरनोबताजवळ बहिरजी जाधव नाईक, मोठा शहाणा, जासुदाचा नाईक केला. तो बहूत हुशार चौकस करून ठेविला.

२९. लष्कराची ' रीत '

लष्कर पावसाळिया दिवशीं छावणीस आपले देशात यावें. त्यास दाणा, रतीब औषधें. घोडियांस[व] लोकांस घरें, गवतानें शाकारून ठेवविलीं असावीं. दसरा होतांच छावणीहून लष्कर कूच करून जावें. जातेसमयीं कुल लष्करचे लहान थोर लोकांचे बिशादीचे जाबते करावे, आणि मुलुखगिरीस जावें. आठ महिने बाहेर लष्करांनी परमुलखात पोट भरावें. खंडण्या घ्याव्या. लष्करांत बायको व बटकी व कलावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी. पर मुलखात पोर बायका न धरावीं. मर्दाना सापडला तरि धरावा. गाई न धरावीं. बईल ओझ्यास मात्र धरावा. ब्राह्मणांस उपद्रव न द्यावा. खंडणी केल्या जागां ओळखियासि ब्राह्मण न घ्यावा. कोणी बदअमल न करावा. आठ महिने परमुलखांत स्वारी करावी. वैशाखमासीं परतोन छावणीस येतांच आपले मुलखाचे सरदेस कुल लष्कराचा झाडा घ्यावा. पूर्वील बिशादीचे जाबते रुजू घालावे. ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या हक्कात धरावी. थोर किंमतीची वस्तभाव असलियास दिवाणांत द्यावी. कोणी चोरून ठेवील आणि दाखल सरदारास जाहलियानें शासन करावें. लष्कर छावणीस आलियावर हिशेब करून सोनेंरूपे, जडजवाहीर व कापड वस्तभाव कुल सरदारांनी बराबर घेऊन राजाचे दर्शनास जावें. तेथें अवघे हिशेब समजावून माल हुजूर द्यावा आणि लष्कराच्या लोकांचे हिशेब देणें, [व] फाजील समजावीस जो ऐवज जो मागणें तो हुजूर मागावा. मग छावणीस यावें. कामकष्ट मशागत केलिया लोकांस सरंजाम करून द्यावा. बेकैद वर्तणूक कोणीं केली असेल आणि नामर्दी केली असेल त्यांची चौकशी करून, बहुतां मतें शोध करून त्यास दूर करून शासन करावें. वरचेवर शोध करावा. चार मास छावणी करावी आणि राजाचे भेटीस दसऱ्यास जावें. राजियाच्या आज्ञेने ज्या प्रांती स्वारी जावयाची होईल त्या प्रांती जावें. अशी लष्कराची रीत.

३०. पायदळास आज्ञा

तसेंच मावळे लोकांत एक नाईक. पन्नास लोक म्हणजे पंच-नायकी यांस एक हवालदार. दोन तीन हवाले मिळून एक जुमलेदार. दाहा जुमले मिळून एक हजारी. जुमलेदारास शंभर होन तैनात सालीना. एक सबनीस, त्यास चाळीस होन तैनात. हजारी यास पांचशे होन तैनात. [त्याच्या] सबनिसास शंभर सव्वाशें होन पर्यंत. ऐशा हजारियांस [नेमणुका केल्या.] सात हजारिया

मिळोन एक सरनोबत येसाजी कंक म्हणून केला. याचे आज्ञेंत सर्वांनी असावें.

३१. मोकासे नाहीत

सरनोबतास व मुजुमदारास व कारकुनांस व हुजुरांतील लोकांस तनखे वराता देत होते. शेत करीत होते त्याचा आकार रयतेप्रमाणे त्यांच्या हक्कांत धरीत होते. वरकड वांटणी हुजूर व मुलुकावरि वराता. येणेंप्रमाणें सालझाडा वरचेवर करीत होते. लष्करांत व हशमास व गडास एकंदर मोकाशे महाल गांव दरोबस्त देणें नाहीं. जें देणें तें वरातेनें द्यावें. अगर पोत्याहून रोख ऐवज द्यावा. मुलखांत साहेबी कारकुनाखेरीज कोणाची नाहीं. लष्करास व हशमास व गडास देणें तें कारकुनांनी द्यावें. मोकाशी जाहालियानें रयत अफरा होईल आणि बळावेल. कमाविशीची कैद चालणार नाही. रयत बळावली म्हणजे जागां जागां बंडे होतील. ज्यास मोकासे द्यावे तो व जमीदार एक जाहालियानें बेकैद होतील. म्हणून मोकाशे कोणास देणेच नाहीत.

३२. मुलकी कारभार

मुलूख काबीज होतो त्यास मुलखास सरबरा चौकशीस कारकून ठेवावा. आधीं लिहिणार चौकस दसरदारी करून, कागद घडणी करून, मोकासबा दिला म्हणजे दसरदारी मध्यें शाहाणा पाहून मुलुखांत ठेवावा आणि माहालची मजमू सांगावी. कोणास माहालचा हवाला सांगावा. कोणास सुभ्याची मजमू सांगावी. पुढें होतां होतां शाहाणा पाहून हवालदार चौकस पाहून सुभा द्यावा. सुभ्याचा मजमुदार लिहिणार, चौकस हिशेब जाणता त्यासच मामला माहालाचा सांगावा. केवळ लिहिणें येईना,कमाविशी न केली, त्यास मुलकीचा हुद्दा न सांगावा आणि पादशाहींत चाकरी करणें अगर घोडें घेऊन शिलेदारी करणें असें सांगोन निरोप द्यावा. मुलखास कारकून ठेवावे, त्यांस माहाल पाहून हवालदारास तीन होन तैनात अगर चार पांच होन इतकी तैनात; मजमुदारास तीन-चार पांच, पन्नास पाऊणशें होन, येणेंप्रमाणें करावें. दोन माहाल मिळोन लाख, सव्वा लाख, पाऊण लाख होन पाहून एक सुभेदार व एक कारकून करावा. त्यास दर असामीस चारशें होन तैनात करावी. मजमूदार सुभ्याचा करावा. त्यास शंभर सवाशें होन करावे. सुभेदारास पालखी चारशें होनांत करार करवावी. मजमूदारास अबदागिरी द्यावी. तैनात सरकारची द्यावी. पादशाहींत छत्री वजिरी उमराव मातबर लोकांस होती, तो शिरस्ता मोडून टाकिला; कीं पादशाहावर छत्र आणि चाकर लोकांवरही छत्र, ही गैर-पध्दत. याकरितां पादशाही कायदा छत्रीचा मोडून अबदागिरीचा घातला. सर्वत्र लष्कर, हशम मुलुखगिरीस [जातील] त्यांत भर सवाशें होन तैनात असेल त्यानें अबदागिरी बाळगावी. मुलुखांत देश पाहून लाख रुपयास सुभा ठेविला. धामधुमीचा मुलूख सरदेचा पाहून मुलूखगिरीच्या कारकुनासमागमें लष्कर, स्वार हशम जे जागां जितकी तोलदारी पाहिजे तितकी करून द्यावी.

३३. जमीन-मोजणी व महसुल

[तशीच] मुलखाची जमीन मोजणी करून धुरंग, झाड, चावर करून आकार केला. पांच हात व पांच मुठींची काठी. हात चवदा तसूंचा असावा. हात व मुठी मिळून बैंशी तसूंची लांबी काठीची. वीस काठया औरस चौरस त्यांचा बिघा एक. बिघे एकशे वीस त्यांचा एक चावर. अशी जमीन मोजून, आकारून गांवची गांवास मोजून चौकशी केली. बिघेयास पिकाचा आकार करून पांच तक्षिमा पिकाच्या करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या. दोन तक्षिमा दिवाणांत घ्याव्या. येणेंप्रमाणें रयतेपासून घ्यावें. नवी रयत येईल त्यास गुरेंढोरें द्यावीं. बीजास दाणापैका द्यावा. भक्षावयासि दाणे पैका द्यावा तो ऐवज दोहों चोहों वर्षांनी आयुर्दाव पाहून उगवून द्यावा. ये जातीचें रयतेचें पालग्रहण करावें. गांवचा गाव रयतेची रयत कारकुनानें कमावीस पाहून रयतेपासुन वसूल पिकाचे पिकावर घ्यावा. मुलखांत जमीदार, देशमुख व देसाई यांचे जप्तीखाली कैदेंत रयत नहीं. यांणी साहेबी करून नागवीन म्हटलियानें त्यांचे हातीं नाहीं. इदलशाही, निजामशाही, मोंगलाई देश कबज केला, त्या देशांत मुलकांचे पाटील, कुळकर्णी यांचे हाती [व] देशमुखांचे हातीं कुल रयत. यांणी कमाविसी करावी आणि मोघम टक्का द्यावा. हजार दोन हजार जे गांवीं मिरासदारानी घ्यावे, ते गांवी दोनशें तीनशें दिवाणांत खंडमक्ता द्यावा. त्यामुळें मिरासदार पैकेकरी होऊन गांवास हुडे, वाडे, कोट बांधून प्यादे बंदुखी ठेवून बळावले. दिवाणास भेटणें नाहीं. दिवाणानें गुंजाईस अधिक सांगितल्यानें भांडावयास उभे राहतात. ये जातीनें पुंड होऊन देश बळावले. त्यास राजियाने देश काबीज करून हुडे, वाडे, कोट पाडिले. नामांकित कोट जाहाला तेथें [आपलें] ठाणें ठेविलें. आणि मिरासदाराचे हातीं नाहींसें ठेविलें. असें करून मिरासदार इनाम इजारतीनें मनास मानेसारखें आपण घेत होते तें सर्व अमानत करून जमीदारास गल्ला व नख्त गांव पाहून देशमुखांस व देशकुलकर्णी यांस व पाटील कुळकर्णी यांसि हक्क बांधून दिला. जमीदारांनीं वाडा बुरजांचा बांधू नये. घर बांधून राहावें. ऐसा मुलकाचा बंद केला.

३४. देवस्थानदिकांचा योगक्षेम

मुलखांत देव देवस्थानें जागजागां होतीं त्यांस दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून यथायोग्या चालविलें. मुसलमानांचे पीर, मसिदी, त्यांचे दिवाबत्ती, नैवेद्य स्थान पाहून चालविलें. वैदिक ब्राह्मण यांसि योगक्षेम ब्राह्मण विद्यावंत, वेदशास्त्रसंपन्न, ज्योतिषी, अनुष्ठानी, तपस्वी गांवोगांवीं सत्पुरुष पाहून त्यांचे कुटूंब पाहून अन्नवस्त्र ज्यांस लागेल त्याप्रमाणें, धान्य द्रव्य त्यांस गांवचे गांवी माहाली नेमून देऊन, साल दरसाल त्यांस कारकुनांनी पाववावें. ब्राह्मणांनी तें अन्न भक्षुन, स्नानसंध्या करून, राजियासि कल्याण चिंतून सुखरूप असावें. असे गड, कोट, लष्कर, हशम, मुलूख हुजरातीची चौकशी करून राज्य करीत चालले.

३५. शास्ताखान पुण्यावर

मोंगलाईंत धुंद उठविली ही खबर दिल्लीस औरंगजेब पादशाहास कळोन, मनात बहुत चिंतातुर होऊन, “शिवाजी बळाविला;विजापूरच्या अफजलखानासारखी फौज, बारा हजार स्वार, बुडविले; गडकोट पादशाहाचे घेत चालिला; त्याचा तरतूद काय करावी?” म्हणून विचार करून, कुलवजीर उमराव बोलावून आणून एक लाख सुभा फौज घोडा राजियावर दक्षणेस रवाना करावा म्हणून विचार करितां, नवाब शास्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी, आणि नातलग, याची रवानगी करावी असा मजकूर करून नवाबास बोलावून आणून विचार केल. नवाब बोलला जे, “शिवाजी म्हणजे काय? त्यासि जातांच कैद करतों. गड कोट मुलूख घेऊन फत्ते करितों.” अशा कित्येक गोष्टी बोलून सिध्द जाहाले. उपरांत पादशाहा बहुत संतोष होऊन शिरची कलगी व पोशागी सनगें व घोडे, हत्ती, अलंकार देऊन खुशाली केली. बराबरि पाऊण लाख घोडा व हत्ती, यांखेरीज कित्येक लोक मुच्छदी वगैरे, तिरंदाज, बरखंदाज, रजपूत व सतीलीवाले तसेच हत्तीचा तोफखाना, उंटाचा तोफखाना, घोडियावरील तोफखाना, बरचीवाले, आडहत्यारी, पाईच्यांची गणतीच नाहीं.बराबरि फरासखाना त्यासि शंभर हत्ती, तसेच भांडते हत्ती चारशें, असे पांच सहाशें हत्ती, तैसेच अगणित उंट. याखेरीज बाजारबुणगे, दारुगोळी, बाणांच्या भांडत्या गाडया, आराबा. असें अमर्याद सैन्य दिलें. स्वारी म्हणजे कलयुगींचा रावणच ! जैशी रावणाची संपत्तीची गणना न करवे, तैसाच बरोबरी खजीना बे मोहिन हत्ती, उंटें, खेचरें, गाडियावर भरून नख्त व सोनें, रूपें, मोहरा, होन रुपये असे बत्तीस कोटी द्रव्य घेऊन दिल्लीहून निघाला. नवाब शास्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी. ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्तीनिशी दक्षणेस राजियावर चाल करून आला. लष्कर मुकाम करीत तेव्हां दोन गांवे लांब व गांव दीड गांव रुंद लष्कर राहात असे. मजल दरमजल चालून येऊन तीन महिन्यांनी पुणियास आला.

३६. खानाची बोटे उडाली.

हें वर्तमान दिल्लीहून रवानां होताच राजियासि कळलें. राजे राजगडास होते. कुल सरकारकून व मोठे मोठे लोक सरनोबत बोलावून विचार केला. सर्वांचे मतें कीं, “ सला करावा, भेटावें. युध्द करितां गांठ न पडे. आपली फौज काय, दिल्लीची फौज काय?” असा विचार जाला. राजियाच्या मतें सला करावा तरि कोणी मातबर रजपूत नाहीं, जे आपणही रजपूत, तेही रजपूत, हिंदूधर्म रक्षून आपले संरक्षण करील. शास्ताखान म्हणजे मुसलमान, पातशाहाचा नातलग, येथें लाच लुचपत चालेना.(अगर आपणास रक्षीना. सल्यानें भेटल्यानें नाश करील.) आपणास अपायच आहे. ऐशी तजवीज केली. तेव्हां निदानी मारतां जें होईल तें करावें अशी हिम्मत राजियानें धरिली. तों ते दिवशीं रात्रीं श्रीभवानी राजियाचे आंगांत बोलूं लागली कीं, “ लेंकरास म्हणावें कीं,

शास्ताखान येतो त्याची फिकीर न करणें. जैसा अफजलखान मारिला तैसा शास्ताखान येऊन उतरल्यावरि त्याचे गोटांत शिरून मारामारी करणें. पराभवातें पाववित्यें.” असें श्रीनें सांगोन मागती राजे सावध जाहाले. जवळ कारकून होते त्यांनी श्रीचीं वाक्यें लेहून ठेविलीं होतीं तीं राजियास सांगितली.राजियांनी श्री प्रसन्न जाहाली हें कळोन हिम्मत धरली. आणि आपले लष्करांत व मावळे व हुजुर लोकांत निवड करून, चखोट धारकरी माणूस निवडिले. निवडक हजार माणूस काढिले. वरकड लष्करामध्यें हजार दोन हजार सडे सडे राऊत फौजेंत निवडिले. शास्ताखान पुणियास आला ही खबर तहकीक आणविली, आणि राजे राजगडावरून सडे होऊन खालीं उतरून, निवडक लोक व लष्कर घेऊन चालिले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी देशकुलकर्णी.तर्फ खेड, हे दोघे बहुत शाहाणे व शुर, राजियाचे प्रीतिपात्र. हे दोघे बंधु बरोबरी घेतले. राजियांनी नेताजी पालकर व मोरोपंत पेशवे, यांच्या दोन फौजा केल्या. नेताजी पालकर पागादेखील एक फौज केली. शिलेदार व हशम मावळे मिळोन एक फौज पेशवे [यांची] अशा दोन फौजा शास्ताखानाच्या गोटाबाहेर अर्ध कोशावर दोन तर्फा उभ्या केल्या. आणि खासा राजियानीं ढाल तलवार हातीं घेऊन, तयार होऊन, हजार माणूस पायउतारा बरोबर घेतले. आणि नवाबाचे गोटांत चालिले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी खेडकर पुढें चालिले. त्यांचे पाठीवर कुल लोक व राजे चालिले. तांब्रांचे दळ थोर, जागां जागां लष्करांत राजियासि कोणाचे लोक? कोण? कोठें गेले होते? म्हणून पुसतात. “कटकांतील लोक, चौकी पहाऱ्यास गेलों होतों.” असें भाषण बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी बोलत चालिले. इतकियांत मध्यान्हरात्र जाहाली. नवाबाच्या डेऱ्याजवळ गेले. हजार माणसांच्या फौजा केल्या. डेऱ्यास जाऊन दोन तर्फांनी इभे राहिले. दोनशें माणूस त्यामध्ये निवडून खासा राजियानें आगेंच चिमणाजी बापूजीस सांगोन बाड कटारीनें चेरून आंत शिरले. तो डेरियांत डेरे, सात बाडांचे फेरे, तितकेही फ़ोडून चिरून आंत गेले. लोक चौकीचे निजले होते. त्यांस कळों दिलें नाहीं. तेव्हां राजा खासा नवाबाचे डेरियासी पावले. डेरियांत डेरे सात व दाया असा समुदाय बायका होत्या, त्यांस कळलें कीं गनीम डेरियात आला. हें कळोन नवाब शास्ताखान घाबिरा होऊन, मेणबत्या समया विझवून बायकांत लपून राहिला. राजा बायकांवर हात न करी असे दोन घटका होते. इतक्यांत सवड पाहून नवाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारीस हात घालावयासि गेला. ती नदर राजियानें धरून वार केला. खानाची बोटें तीन उडालीं, तेव्हां गलबा थोर जाहाला. गनीम आला असें कळून चौतर्फांनी लष्कर तयार जालें.मग राजे बाहेर निघाले. चौकीचे लोक व लष्करचे लोक गनीम कोठें म्हणून धाऊं लागलें. त्यांजबरोबर हेही गनीम कोठें म्हणून धांवत धांवत बाहेर निघाले! आणि आपली फौज सरनोबत व पेशवे होते त्यांत मिळून चालिले. गनिमाची फौज कुल तयार होऊन आपले गोटांतच शोध करूं लागले. यांचा मार्ग लागत नाहीं म्हणून नीट वाटेनें निघोन ठिकाणीं पावली.

३७. खान ‘दिल्लीस चालला.’

दिवस उगवलियावर उअप्रांत नवाबाच्या परमृषास कुल वजीर आले. पाहातात तों नवाबाची तीन बोटें तुटून गेलीं. वरकड कित्येक लोकांचा नाश व बायकांस व खोजेयासि जखमा जाहाल्या.कित्येक लोक मेले. असें कळून नवाब बोलेला जे, “गनीम इतका खाशा डेऱ्यापर्यंत येई तों कोणी वजीर हुशार जाले नाहींत, खबरदार कोणी नहीं. अवघे फितव्यांत मिळाले. आतां इतबार कोणाचा येत नही. आज राजा येऊन आपलीं बोटें तोडिलीं. उद्या मागती येऊन आपलें शीर कापून नेईल. शिवाजी मोठा दगेखोर आहे. दगा दिधला. आणखी दगा देईल.आमच्या लष्करचा इतबार येत नाहीं. आतां येथून कूच करून माघारां दिल्लीस जावें. या लोकांबरोबर आपणास राहावत नाहीं.” असा तूट विचार करून तिसरे दिवशीं कूच करून माघारा दिल्लीस चालला.

३८. राजे खुशाल

राजे राजगडास आले होते. बातमी खबर शत्रूच्या सैन्यांतून आणली कीं, “शास्ताखानाची तीन बोटें तुटोन गेलीं. उजवा हात थोटा जाहाला. वरकडही कित्येक लोक मेले. नवाब दहशत खाऊन पळोन दिल्लीस चालिला.” हें वर्तमान आलें. त्याजवरून राजे बहूत खुशाल जाले कीं, “फत्ते होऊन आलों, शास्ताखानास शास्त केली. पातशाहानें नांव ठेविलें. परंतु नांव यथार्थ ठेविलें नाहीं. तें नांव आपण शास्त करून नांव रुजू केलें.!” अशी खुशाली करून साखरा वाटल्या. भांडी मारलीं.

३९. जयसिंग-दिलेरखानांस पाठविले.

अशी फत्तेची खबर दिल्लीस पादशाहास अगोदरच जाहीर जाहाली होती. पातशाहा मनात आश्चर्य करून मनांत बेदील जाले. “नवाबाची फौज म्हणजे काय, आणि फौजेंत राजा आंगें शिरून [त्यानें] मारामारी केली म्हणजे काय? शिवाजी आदमी नव्हे, बडा सैतान होय.” ऐशी कित्येक गोष्टी बोलुन राहिला. पुढें नवाब आला ऐसें कळोन दर्शन वर्ज्य केलें. एकतर मसलत नामोहरम जाहाली, दुसरी शास्त केली. या दोन गोष्टींवरून भेटीस येऊं न दिलें. आपले हवेलींत जाऊन राहाणे म्हणून सांगितलें. त्याजबरोबरि वजीर गेले होते. त्यास आणून अपमान केला आणि दैलता मना केल्या. त्यांहीं उत्तर दिलें जें, “सरदार पादशाहांनीं दिला त्याच्या हुकमांत राहाणें म्हणून हुकूम केला. त्याकरितां सरदार नामोहरम होऊन आला. आम्हीं काय करावें? आता मर्दाना सरदार देणें. त्याजबरोबरि जाऊन जुंज जरून कस्त मशागत करूं” असें उत्तर देतांच मागती सर्वांचा दिलासा करून मनसबा करार केल्या. पुढें कोण सरदार पाठवावा? कोण फत्ते करून येईल? असा विचार करून सरदार निवडितां मिरजाराजा जयसिंग रजपूत निवडिला. त्यास आणून, घुशालखान्यात बसोन पादशाहांनी नानाप्रकारें सांगितलें कीं, “शिवाजीवर तुम्हीं जाणें. आपण पादशाहांनीं जावें किंवा तुम्हीं जावें. असें जाणोन तुम्हांस रवाना करितों. बरोबरि फौज देतों. नाना हुन्नरें शिवाजी

हस्तगत करून बरोबरि घेऊन येणें." म्हणोन हत्ती, घोडे, ढाला, फिरंगा, तर्कशकमान, दौलत, इजाफा देऊन, नांवाजून, तैसेच बरोबरि लढाईच्या तश्रीफा देऊन रवाना केले. दिलेलखान पठाण उमराव वजीर मोठा जोरावर त्यास पादशांहानीं कुल फौजेची हारोळी देऊन, पांच हजार पठाण बरोबरी दिले. दिलेलखानासही हत्ती, घोडे, वस्त्रें दिलीं. ऐशीं हजार स्वार बरोबरि दिले. याखेरीज जेजाला व तोफखाना असें नाना जातीचें दिलें. स्वार पठाण उन्माद रजपूत रवाना केले.पादशाहांनीं दिलेलखानास वेगळे वाटेनें अंतस्थीं बोलावून आणून सांगितलें कीं, " मिरजाराजा रजपूत आहे व शिवाजी हा हिंदू आहे. कांहीं फितवा करतील. त्यास तुम्ही आपले इतबारी, पादशाहाचे खानाजाद आहां. अशी बतमी राखोन दगा न खाणें." असें सांगितलें आणि पाठविलें.

४०. जयसिंगाचे अनुष्ठान

ते दिल्लीहून निघाले तेव्हां पूर्वी शास्ताखान चालेला त्याप्रमाणें दळभार निघाला. पृथ्वी-आकाशापर्यंत एकच धुरळा उठला. ऐसा सेनासमुद्र दक्षिणेस चालिला. मजल-दर-मजल चालिले. मुक्काम होय तेथें दीड गांव लांब, गांवभर रुंद, लष्कर राहात असे. तेव्हां जयसिंग राजियांनीं मनांत विचार केला कीं, " शिवाजी मोठा दगेखोर, मोठा हुन्नरवंत आणि मर्दाना शिपाई आंगाचा खासा आहे. अफजलखान आंगे मारिला. शास्ताखानाच्या डेऱ्यांत शिरोन मारामारी केली. आपणास यश कसे येईल? म्हणून चिंता केली. तेव्हां मोठमोठे ब्राह्मण पुरोहित यांनीं उपाय सांगितला. "देवी-प्रयोगीं अनुष्ठानें करावीं म्हणजे यश येईल." असे सांगितलें. मग मिरजा बोलिला जे, "कोटचंडी करावी आणि अकरा कोट लिंगें करावीं. कामनार्थ बगळामुखी कालरात्री प्रीत्यर्थ जप करावा. असें अनुष्ठान करावें." चारशें ब्राह्मण अनुष्ठानास घातले. प्रत्यही अनुष्ठान चालिलें.अनुष्ठानास दोन कोट रुपये अलाहिदा काढून ठेविले. आणि तीन मास अनुष्ठान चालून सिध्दकेलें. अनुष्ठानाची पूर्णाहुती करून, ब्राह्मणांस दान दक्षिणा देऊन संतर्पण केलें. मग मजल-दरमजल चालिले.

४१. श्रीभवानीचा दृष्टांत.

याउपरि महाराज राजगडीं होते तों जासूद हलकारे आले. त्यांनीं खबर सांगितली कीं, "जयसिंग मिरजाराजा ऐशीं हजार स्वार बरोबरि दिलेलखान पांच हजार पठाण ऐशी फौज येत आहे." ऐसें ऐकून राजश्री विचारांत पडले. आपले कारकून हुजूर आणून विचार केला. त्यांणीं सर्वांनीं सांगितलें कीं, "अफजलखान मारिला आणि शास्ताखानास दगादिला ते गैरहुशार मुसलमान होते. हुन्नरही नवाच केला. [तें] सर्वही रजपूतास जाहीर आहे. दगा करूं देणार नाहीं. याशीं सला करावा." ऐसें बोलिलें. राजे बोलिलें जे, "रजपूत कैसा तरी वळला जाईल, परंतु हा दिलेलखान मोठा हरामजादा, बेमान आहे. पादशाहाचा मेहेरबानीचा अंतर्गत आहे. तो कांहीं भला नाहीं. तोच काय करील तें न कळें. तो बराबरि नसता तरी आमचा मनोरथ पूर्ण होता. बरें आतांच काय आहे!

श्रीचें राज्य! श्रीवर भार घातला आहे. तिचे चित्तास येईल तें ती करील," असे बोलिले. त्यावर तो दिवस गेला. दुसरे दिवशीं श्रीभवानी येऊन बोलूं लागली कीं, "अरे मुला, यावेळेचा प्रसंग कठीण आहे. जयसिंगास मारवत नाहीं. तो सला करीत नाहीं, भेटावें लागतें. भेटून दिल्लीस जावें लागेल. तेथें कठीण प्रसंग होईल. परंतु आपण बराबर येईन. लेंकरास नाना यत्नें करून रक्षून, घेऊन येईन. यशस्वी करीन. चिंता न करणें. म्हणोन लेंकरास सांगणें. लेंकरास आपलें राज्य आपण वरदान दिलें तें आपण कांही एक पिढी दिलें नाहीं, सत्तावीस पिढी दिलें. दक्षणेचे [राज्य] नर्मदापर्यंत दिलें असे. राज्याची चिंता मला आहे. पूर्ण समजणें. लेंकरूं वेडीवांकडी वर्तणूक करील तें सर्व आपणास सावरणें लागतें. कोणेविशी चिंता न करणें." असें सांगोन श्री अदृश्य जाहाली. तीं वाक्यें लिहिणारांनीं लिहून ठेऊन ठेविलीं होतीं. त्याउपर राजे सावध जाहाले. मग श्रीचीं वाक्यें सर्वांनी निवेदन केलीं. त्याजवरून राजे बहूत संतोष होऊन, हिंमत धरली.

४२. रघुनाथपंडित जयसिंगाकडे

ऐशियांत जयसिंग [यानें] पुरंधर, कोंढाणा या दोहों गडांचे दरम्यान येऊन मुकाम केला. आणि राजियाकडे जासूद पत्रें पाठविलीं कीं, "तुम्ही शिसोदे रजपूत. आम्ही तुम्ही एकाचे एकच आहों. तुम्हीं भेटीस येणें. तुमचें सर्व प्रकारें बरें करूं." म्हणोन पत्रें पाठविलीं. ती पत्रें राजगडास आलीं. राजियांनीं वाचून हेजीब कोण पाठवावा ही तजवीज करून विचार करितां रघुनाथ पंडित थोर संनिध होते.त्यांस पाठवावें. "रजपुताजवळ प्रसंग पडला तर हे थोर शास्त्रज्ञ आहेत. रजपूतही शास्त्र जाणतो. त्याशीं व याशी गाठ बरी पडेल." असा विचार करून रगुनाथपंडितांस पंडितराव म्हणून किताब दिला. आणि त्यांबरोबर वस्त्रे, अलंकार देऊन मिरजाराजियापाशीं पाठविलें. ते शत्रुसैन्यांत गेले.

४३. जयसिंगाचे आश्वासन :

राजियाचा हेजीब आला. हें वर्तमान कळून मिरजाराजियांनीं बहूत सन्मान करून भेट घेतली. बोलणें जालें. जयसिंग बोलिला जे, "दिल्लीचा पादशाहा बहूत जोरावर, याशीं शत्रुत्व लावलियानें शेवट लागणार नाहीं. राजियांनीं आपले भेटीस यावें. आपण बराबर घेऊन जाऊन पादशाहाची भेट करवूं.जैसा रामसिंग आपला पुत्र, तैसे तुम्ही आपले आहां. आपण तुमचें वाईट करणार नाहीं." येविशीं श्रीकर्पूरगौराची पूजा करून बेल तुळशी दिल्या. आणि पंडितरायासि वस्त्रें दिलीं. व राजियासि वस्त्रें, अलंकार पाठविले आणि सांगोन पाठविलें कीं, "भेटीस येणें. साहाचार महिने गड, कोट भांडवणे. तोलदारी दाखवणें. मग भेटीस येणें." असें सांगून रघुनापंडितराऊ यांस गुप्तरूपें निरोप दिला. ते परतोन राजगडास राजियाजवळ येऊन वर्तमान सांगितलें. त्याजवरून राजे संतुष्ट जाहाले. जागां जागां गड कोट यांसि ताकीद करून तमाम मजबुदी करविली. आणि गड

भांडवणें म्हणून स्थळास्थळास सांगोन पाठविलें.

४४. दिलेलखान कष्टी

पुढें जयसिंगाच्या लष्करांत राजियाचा हेजीब आला होता हें वर्तमान दिलेलखानास कळून मनांत कष्टी जाहाला. “शेवटीं हिंदूस हिंदू मिळून काम जायां करतील.” ऐसें म्हणून दुसरे दिवशीं दिलेलखान मिरजाराजियाच्या भेटीस आला. आणि बोलू लागला कीं, “उगेच काय म्हणून बैसलेत? गोटाजवळ कोंढाणा व पुरंधर हे दोन किल्ले आहेत. पुरंधरास आपण सुलतानढवा करितों, आणि गड घेतों. तुम्हीं कोंढाणा गड घेणें. गड घेत चाललां म्हणजे शिवाजी येईल.” असें बोलतां मिरजाराजा बोलला जे, “गड आले तरि बरें. नाहीं तर नामोश जाईल. याजकरितां गडास न लागावें मुलूक काबीज करावा. गडास सामान चालों न द्यावें म्हणजे गड आपाप येतील.” असें बोलतां, दिलेलखान रागें उठून चालिला. “आपण आतांच जाऊन पुरंधर घेतों. तुम्ही कोंढाणा घ्याल तरि घेणें.” असें म्हणून उठोन, गोतास येऊन, नगारा करून ढाल, फिरंग घेऊन, पुरंधराखालें येऊन, मुकाम करून गडावरि येलगार केला. पायउतारा होऊन पांच हजार पठाण, व दाहा हजार बैले तोफाची पायउतारा जाहाले. पेंढारी [?] व आडहत्यारी व खलाशी लोक वीस हजार लहान थोर पायउतारा होऊन लगट चालले.

४५. मुरारबाजी पडला.

तेव्हां पुरंधरावरि नामजाद लोकांचा सरदार राजियाचा मुरारबाजी परभू म्हणोन होता. त्याजबरोबर हजार माणूस होते. याखेरीज किल्ल्याचे एक हजार होते. असे दोन हजार लोक होते. त्यांत निवड करून मुरारबाजी यांनी सातशें माणूस घेऊन [ते] गडाखालें दिलेलखानावरिं आले. दिलेलखान तोलदार, जोरावर पठाण पांच हजार, यांखेरीज बैले वगैरे लोक ऐशी फौज गडास चौतर्फा चढत होती, त्यांत जाऊन सरमिसळ जाहाले. मोठें घोरांदर युध्द जाहालें. मावळे लोकांनीं व खासा मुरारबाजी यांनी निदान करून भांडण केलें. पांचशें पठाण लष्कर ठार जाहाले. तसेच बहिले मारिले. खासा मुरारबाजी परभू दिलेलखानाच्या देवडी पावेंतों साठी माणसांनिशी मारीत शिरले. दिलेलखान देवडी सोडून माघारा जाहाला. आणि लोकांस सांगून तोफखाना व तिरंदाज बरच्या व आडहत्यारी एक हजार लोक यांजकडून मार करविला. त्यामध्यें साठी लोक पडिले. मुरारबाजी परभू यांनी ढाल फिरंगी घेऊन दिलेलखानावरि चालोन आले. महाराजांचे नांवाजलेले लोक ते खर्च जाहाले. आतां काय मुख दाखवावें? म्हणोन नीट चालोन जावें असें मनांत आणोन खानाशीं गांठ घातली. तेव्हां दिलेलखान बोलिला जे, “अरे तूं कौल घे. मोठा मर्दाना शिपाई तुज नांवाजितों.” ऐसें बोलतां मुरारबाजी बोलिला जे, “तुझा कौल म्हणजे काय? मी शिवाजी राजाचा शिपाई, तुझा कौल घेतों कीं काय?” म्हणून नीट खानावरि चालिला. खानावर तरवारीचा वार

करावा तों खानानें आपले आंगें कमाण घेऊन, तीर मारून, पुरा केला. तो पडला. मग खानानें तोंडांत अंगोळी घातली कीं, "असा शिपाई खुदानें पैदा केला." ऐसें आश्चर्य केलें. मुरार बाजीबरोबर तीनशें माणूस ठार जाहाले. वरकड चारशें माणूस गडावर गेले. दिलेलखानानें शीरची पगडी उतरली. आणि गडावर चालून घेतलें कीं, " गड घेईन तेव्हां पगडी बांधीन." ऐसा नेम करून चालिला तो दरवाज्याखालें येऊन, ढालेचा कोट करून बसला. किल्याचे लोक मुरारबाजी पडला म्हणोन गणना न करितां शरतीनें भांडूं लागलें, " एक मुरारबाजी पडला तरि काय जालें? आम्ही तैसेच शूर आहों. ऐशी हिंमत धरून भांडतों."

४६. शिवाजी-जयसिंग भेट

हें वर्तमान राजियासि राजगडीं कळलें कीं, "दिलेलखानाने पुरंधरास लगट केला.मुरारबाजी परभू पडला. तीनशें माणूस रणास आलें." हें कळोन मनांत चिंतातूर जाहाले कीं, "गड दिलेलखान जेव्हां घेतो, तेव्हा वरकड किल्ले आपाप जातात. मग आपण भेटल्यानें रूप नाहीं.जोंवर गड आहेत तोंवर भेटोन आपले होतें जे गड देणें ते देऊन सला करावा, हें उचित." म्हणोन रघुनाथभट पंडित राऊ मिरजाराजियाजवळ पाठविले कीं, "आपण तूर्तच भेटीस येतों. दिलेलखानानें गड घेतला, मग भेट जाहाल्यानें हलवारी [?] आहे." असें सांगोन पाठवून भेटीस जावेसें केलें. पंडितराऊ जाऊन जयसिंगास भेटले. वर्तमान श्रुत केलें. मग त्याणेंही उत्तम म्हणून मागती शफत क्रिया बळकटी केली आणि पंडितराव राजगडास आले. येतांच खासा राजा हजार माणूस निवडक करून बरोबर घेतले. श्री शंभूस व भवानीस नमस्कार केला व मातोश्रीस नमस्कार केला. भेटले. शिष्ट, तपस्वी ब्राह्मणांस नमस्कार केला. सर्वांचा आशीर्वाद घेऊन गडाखालीं उतरोन चालले. ते एकाएकीं मिरजाराजियाचे गोटात गेले. पुढे पंडितराव जाऊन सांगितले की, राजे आले. ही खबर कळतांच जयसिंग देवडीबाहेर पायउतारा खासा आला. राजे पालखींतून उतरून भेटले. उभयतां जाऊन एकासनीं बैसले आणि राजे मिरजाराजियासि बोलूं लागले कीं, " आपण जैसा रामसिंग तैसेच तुम्हांस, त्याचें रक्षण कराल तैसें आपलें करणें." असें बोलून बैसले. मग जयसिंग बोलला जे, "हीच गोष्ट खरी. आपण रजपूत, तुम्ही व आम्ही एकजाती आहों. अगोदर आपलें शीर जाईल, मग तुम्हांस काय होणें ते होईल." असा भरवसा बोलून शपत वाहिली. मग राजे बोलले जे, "तुम्हास जे गड पाहिजेत ते आपण देतो. दिलेलखानास बोलावून आणवणें. पुरंधर तुम्हास देतों. निशाण तुमचे चढवितों. परंतु मुसलमानास यश देत नाहीं." अशी गोष्ट बोलल्यावर जयसिंग खुशाल जाहाला आणि बोलिला जे, "दिलेलखान फामिंदा आहे, बादशाहाचे मेहेरबानीचा आहे. त्यास मुजरा हातीं करून लागतो. तुम्हींच दिलेरखानाचे भेटीस जावें लागतें. आपण रजपूत आप्तविषयीं तुम्हाबरोबरि देतों, ते तुमची भेट करून आणतील, फिकीर न करावी. तुमचे लवेस जडभारी तरि आपण पन्नास हजार फौज रजपूत [सुध्दां] स्वस्त होतों." ऐकून राजे म्हणों लागले जे, "[मी] शिवाजी आहें. दिलेलखानाचा गुमान धरितों कीं काय? तुमचे आज्ञेनें जातों. भेटतों." म्हणून

निरोप घेऊन मिरजाराजियांनीं सुभानसिंग, आपला मामा, थोर योध्दा मोठा बळाचा शूर, दिलेलखानाचे सवाईनें तोलदार, दिलेलखानही त्यास जाणे, असा बराबर दिला. आणि "राजा सांभाळोन घेऊन येणें. तुझे भरंवशावर पाठवितों." असें बोलून पाठविला. सुभानसिंग पन्नास रजपूत आपले जोडीचे समागमें घेऊन चालिला. जेथें दिलेलखान पुरंधरचे दरवाज्याजवळ होता तेथें राजे गेले. पुढें दिलेलखानास खबर पाठविली कीं, "शिवाजीराजे येऊन मिरजाराजियासि भेटले, तुमचे भेटीस येतात," हें कळोन दिलेलखान मनांत जळाला. मनगटें चाविलीं कीं, पुरंधर किल्ल्याचे यश आपणास आले नाहीं, आपले विद्यमानें बोलणेंही नाहीं. यश रजपूतासि आलें. म्हणून श्रमी होऊन पुढें सामोरा येऊन, रागें रागें राजियासि जोरानें आंवळोन धरून घडीभर भेटला. दिलेलखान म्हणजे मोठा बळकट एका हत्तीचें बळ किंवा जास्तीच होईल. आणि हत्ती बराबरि खाणें. दररोज हत्ती खातो तेणेंप्रमाणें वजनें खाणें. शरीर तरि दुसरा हेडंब राक्षसच ! ऐसा थोर. त्याणें रागें भरून एक घटकाभर रागें, जोरानें राजियास आवळून धरिलें. परंतु सरदार जोरावर, बळकट तैसाच. त्याणें खातरेस आणिलें नाहीं. मग भेटीची मिठी सुटून एकीकडे लोडाजवळ उभयतां बैसले. दुसरे बाजूस लोडाशीं सुभानसिंग बैसले. दिलेलखान कटारीजवळ करून, वर हात ठेऊन बैसला आणि क्रोधें करून सुभानसिंग यासि पुसिलें कीं, "राजाबरोबरि तुम्ही आलां आहां?" असें पुसिलें. तेव्हां मनामध्यें हाकारा धरून सुभानसिंग बोलिला जे, "खानजी, तुम्हांकडे आले. आतां उद्यां तुम्हांस जे गड पाहिजेत ते देऊं. तुम्हीं उतरून गोटास येणें. असा मिरजाराजियांचा हुकूम आहे." असें बोलिल्यावरि बहूत कष्टी जाहाला जे, आपला मनोरथ सिध्दीस गेला नाहीं. "तुम्हीं साहेब लोक आहां. तुमच्या हुकुमाने येऊं. परंतु हा किल्ला उदयीक आपणास घेऊन देणें. निशाण चढवून येतों." असें बोलतां सुभानसिंग म्हणूं लागला कीं, "गड आपणाकडे आला, तुम्हीं चलावें." त्यावरून दिलेलखान उतरोन खासा गोटांत आला. चौकी किल्ल्यास ठेविली. राजियासि पानविडे देऊन रवाना केलें. "तुम्हीं मिळोन मिरजारजियाजवळ जाणें, ते वडील आहेत. ते करतील त्यांत आपण आहों." [असें बोलला.]

४७. दिल्लीस जाण्याचा करार

असें बोलतांच राजे व सुभानसिंग मिरजाराजियाकडे आले. वर्तमान सांगितलें. मग जयसिंगांनीं व राजियांनीं एकपंक्तीं भोजन केलें. राजियास राहावयास डेरा दिला. रात्रीं उभयतांचें बोलणें जालें. "किल्ले अवघे पादशाहास द्यावे आणि दिल्लीस चलावें." असें बोलताच राजे म्हणूं लागले जे, "आपल्यापैकीं सत्तावीस गड देतों आणि आपण व आपला पुत्र संभाजी ऐसें पातशाहाचे भेटीस येतों. भेट करून इकडील दक्षणेच्या बादशाही इदलशाही व कुतुबशाही व निजामशाही वरि आपणास नामजाद करणें. तीन पादशांही फत्ते करू एक पादशाही निजामाशाही त्यांहीं फत्तें केलीच आहे. दोन पादशाही तुम्हांस घेऊन देतों." म्हणून बोलिले. मिरजारजियांनी कबूल केलें. आणि पुण्याहून कूच केलें. राजियांनी संभाजीराजेही आणविले. सतावीस किल्ले तांब्रास दिले. निशाणें

चढविलीं. वरकड राजगड व कोट मोरोपंत पेशवे व निळोपंत मुजमदार व नेताजी पालकर सरनोबत असे मातुश्रीच्या हवाले केले. आणि आपणही दिल्लीस जावें, पादशाहाची भेट घ्यावी असा करार केला. पुढें पादशाहास कळावें म्हणून जयसिंग राजियांनीं आपला वकील रवाना केला. त्याजबराबरि राजाचा जावा, त्यास सोनाजीपंत डबीर याचा मेहुणा रघुनाथपंत कोरडे यांस दिलें. हे उभयतां पुढे दिल्लीस रवाना केले. राजियांनीं अर्जदस्त पादशाहास दिली कीं, "आपण भेटीस येतों." म्हणून पत्र लिहून दिलें.

४८. शिवाजी-जयसिंग विजापुरावर

याउपरि मिरजारजियाबरोबरि आपली फौज घेऊन राजे विजापुराकडे चालले. मार्ग चालता मिरजाराजे व शिवाजीराजे एका हवद्यांत बैसले आणि चालिले. कुलवजीर येऊन सलाम करीत. दिलेलखान जोहार न करी. निमित्य कीं, राजे [व] ते एका जागीं, आणि आपण जोहार कैसा करावा? ये गोष्टीनें सलाम न करी. पुढें विजापूरासही सला केला. उपरि उभयतानीं दिल्लीस जावें, त्यास मिरजा बोलिला जे, "पादशाहा बहूत हुन्नरवंत आहे, बेइमान आहे. आम्ही तुम्ही बरोबरि गेल्याने दगा दोघांसि केलियानें कसें करावे? आपण मागाहून येतों. औरंगाबादेत राहातों. तुम्ही दिल्लीस जाणें. आपला पुत्र रामसिंग हुजूर आहे. तोही तोलदार, भिडेचा आहे. त्यांस सांगोन पाठवितों. त्याचे हातें भेट घेणें. सरंजाम करून दक्षणेस येणें. तुम्ही दिल्लीहून निघालां म्हणजे आपण दिल्लीस जाऊं. तोपर्यंत आपण बाहेर आहों." पादशाहास भेटल्यावर तो तुम्हांशी बैइमानी न करी म्हणवून तजवीज सांगून रामसिंगास पुढें पत्र पाठवून, ठीक करून, राजियांसि रवाना केले. राजियांनी बरोबरि घेतले. कारकून व हुजुरे तपशील:-

निराजी राऊजी शाहाणा १.त्रिंबकजी सोनदेव, सोनाजीपंताचे पुत्र, कलम १. माणको हरी सबनीस १. दताजी त्रिंबक १. हिरोजी फरजंद १. राघोजी मित्रा १. दावलजी घाडगे १. मावळे लोक १००० एक हजार, लष्कर ३००० तीन हजार.

४९. राजे आगऱ्यास

येणें प्रमाणें. यां-सहवर्तमान राजे राजगडास येऊन, सर्वांच्या भेटी घेऊन, सदर्हूप्रमाणें बरोबर घेऊन, राजे व पुत्र असे उभयतां मजल दरमजल दिल्लीस चालिले. पादशाहास राजे भेटीस येतात हें कळोन आपले कुलफौजदार व महालमोकासे यांसि ताकीदपत्रें पाठविलीं कीं, " शिवाजीराजे मुलाजमतीस येतात. जे जागां मुकामास राहातील तेथील फौजदारांनीं येऊन भेटावें. दाणापाणी जो लागेल तो द्यावा. शाहाजादें यांचेंप्रमाणें आदब चालवावी, ऐसे रोखे पाठविले. त्यावरून राजे मजलीस जात तेथे फौजदार भेटून दाणापाणी जो खर्च लागेल, तो द्यावा. असे दोन महिन्यांनीं दिल्लीस पावले.

५०. शिवाजी पातशाही दरबारात

राजे आले ही खबर पादशाहास समजून रामसिंग पुढें भेटीस पाठविले. रामसिंग येऊन भेटले. रघुनाथपंत कोरडे पहिले हेजीब पाठविले तेही येऊन भेटले. पादशाहाचें सर्व वर्तमान सांगितलें. बाह्यात्कार समाधान खुशाली सांगितली. "मनांत पादशाहाचे काय आहे न कळे" असें बोलिले. रामसिंग भेट घेऊन पादशाहापाशीं आले. वर्तमान सांगितलें. पादशाहांनीं एक हवेली जागा सचंतर शिवपुरा म्हणून बसवून [तेथें राजे] राहिले. मुहूर्त पाहून पादशाहाचे भेटीस चालिले. पादशाहांनी सदर करून पांच हत्यारे आपणाजवळ ठेवून कंबरबस्ती करून आंगांत जरीची कुडती घालून खासा तख्तीं बैसला. तैसेच तख्ताजवळ मोठे मोठे शूर मर्दाने व तख्ताचे आसपास दोन हजार माणूस उभे केले. तैसेच आमखास यामध्यें कुलवजीर मुस्तेद करून उभे केले. मनात कीं "शिवाजी सामान्य नाहीं. सैतान आहे. अफजलखान भेटीमध्यें मारिला. तैसेच उडोन तख्तावरि आला आणि आपणास दगा केला तरि काय करावें?" असें समजून मुस्तदेनिशी बसला. राजियासि भेटीस बोलाविलें. राजे व पुत्र संभाजीराजे व कारकून व हुजुरे अगत्याअगत्य दहाजण भेटीस रामसिंग घेऊन गेले. पादशाहाची नजर जाहाली. पादशाहा बोलला जे, "आवो, शिवाजी राजे." असें बोलताच राजियांनी तीन सलाम केले. मनांत भाव धरिला कीं., श्रीशंभुमहादेव एक , दुसरा श्रीभवानी, तिसरा महाराज पितियास, ऐसे तीन सलाम केले. आणि उजवे बाजूस जसवंतसिंगमहाराज, नवकोट मारवाडचा राजा, त्याचे शेजारी खालतें उभें राहावयासाठीं हुकूम [पातशाहांनी] केला. राजे व पुत्र उभे राहिले. रामसिंग यास पुसलें कीं, "आपणावर ते शेजारीं कोण?" असें पुसिलें. त्यास रामसिंग बोलिला जे, "महाराज जसवंतसिंग." असें ऐकतांच राजा क्रोधयुक्त होऊन बोलिला कीं, "जसवंतसिंगासारखा उमराव! याच्यापाठी माझ्या लष्करांनीं पाहिल्या असतील !! याचे खालें आपण उभें राहावें म्हणजे काय?" असें क्रोधें बोलून रामसिंगाची कटार माजेची घेऊन महाराजा यास मारितों म्हणवून कटार मागूं लागले. मग रामसिंग "धीर धरणें " म्हणून बोलूं लागले. शब्दाशब्दी होतांच पादशाहास कळलें. पादशाहा म्हणू लागले कीं, "काय जाहालें?" रामसिंग बोलिला कीं, "जंगली वाघ हयवान, त्यास गर्मा जाहाला. कांहीं करीणा जाहाला." असें बोलतांच पादशाहाचे मनांत शंका उत्पन्न जाहाली. काय होईल तें न कळे. म्हणून रामसिंगास पादशाहा बोलिले कीं, "राजियास घेऊन डेरियास जाणें. उद्यासांद्या सावकाश मुलाखत होईल." असें बोलतांच राजे व राजपूत्र व रामसिंग राजियाचे लोक देखील हवेलीस गेले. राजा बाहेर गेल्यावरि पादशाहा संतोष जाहाला आणि "मोठा अनर्थ चुकला. शिवाजीची व आमची नजर जाहाली होती," ऐसें बोलून राहिले.

५१. ‘रस-रंग राखून निघून जाणें’

राजे डेरियास गेलियावरि रामसिंग व आपण बैसोन बोलिले जे, “कोण पादशाहा? मी शिवाजी, मजला जसवंताखालतें उभें करावें! करीणा कांहीं पादशाहास समजत नाहीं.” ऐसें बोलिले. रामसिंग बोलिला जे, “तुम्ही भेटीस येऊं नये. आले तरि रस-रंग राखून निघून जाणें. तुम्ही येथून सुखरूप गेलेत म्हणजे आम्हांस मोठी जोड जाहाली.” असें बोलून रामसिंग आपले हवेलीस गेले.

५२. पादशाहास अर्ज

राजियांनी आपले कारकून, हुजुरे व रघुनाथपंत कोरडे यांसि बोलावून आणून विचार केला, “पुढें तजवीज काय करावी?” पादशाहाची मजलस कळली. तेथून यश पांवून निरोप घेऊन कैसें जावें? पादशाहाजवळ कांही एक कार्य कबूल करून गेलियाविना पादशाहा निरोप देत नाही. [मग] रघुनाथपंत कोरडे यांस सांगोन पाठविलें कीं, “तुम्हीं पादशाहास उद्यां जाऊन अर्ज करणें कीं, ‘स्वामीशीं आमचा दुसरा विचार नाहीं, आपण निखालस आपले पुत्र घेऊन देखील भेटीस आलों. सेवकाजवळोन चाकरी घ्यावी. दक्षणेस कुल अदलशाही व कुल कुतुबशाही दोनी पादशाही घेऊन हजरतीस देतों. वरकड सुभे रवाना करतां त्यांची कामगिरी पाहाणें आणि आपली कामगिरी पाहाणें.’ ऐसें कितीएक गोष्टी बोलून एकांती घुसलखानियात भेटीस बोलाविलें [म्हणजे] भेटी घेऊन कित्येक मजकूर बोलूं, म्हणून अर्ज करणें.” म्हणून सांगितले. त्याजवरून रघुनाथपंत कोरडे दुसरे दिवशीं पादशाहाजवळ जाऊन येणेंप्रमाणें करीणा लिहून पाठविला. पादशाहानें रोखा वाचून चित्तांत विकल्प धरिला. आणि पत्राचे पाठीशी जाब लिहिला कीं, “सबूरी करणें. तुमच्या मुद्यामाफक करूं.” असा जाब लिहिला. त्यांणी येऊन राजियासि सांगितलें कीं, सबुरी करणें. तेव्हा विकल्प आहे, दिलखुलाशाने जाब दिला नाहीं, असा तर्क राजियांनी केला.

५३. औरंगजेबाचा विकल्प

तेच दिवशी शास्ताखानाने जाफरखान दिवाण, पूर्वील पादशाहाचे वेळेसही त्यास दिवाणगिरी चालत होती, परंतु मुतालिकाचे हातून कारभार होता ऐसें, त्या जाफरखानास सांगून पाठविले कीं, “शिवाजी मोठा दगेखोर आहे. विद्यावत असे. आपल्या गोटांत शिरला तेव्हा चाळीस गज जमीन उडाला आणि बाडांत शिरला. असा पादशाहांनी भेटीस नेऊं नये. नेला तरि चाळीस पन्नास गज जमीन उडोन दगा देईल.” असें सांगून पाठविले. त्याजवरून जाफरखानानें पादशाहास हें वर्तमान जाहीर केलें. पादशाहा मनांत खोचून त्यानें खरें मानलें. बळकट मनांत विकल्प धरिला.

५४. शिवाजी जाफरखानाच्या भेटीस

दुसरे दिवशी राजे यांस कळलें कीं, जाफरखान दिवाणानें आपला गिल्ला पादशाहाजवळ

केला. असें कळोन रघुनाथपंत कोरडे यांस जाफरखानाकडे पाठविलें कीं, ‘आपले भेटीस येतों.’ म्हणून पाठविलें. त्याने बहूत वेळ मनांत तजवीज करून ‘बरें, येऊं द्या.’ म्हणोन सांगितलें. त्यावरून राजे जाफरखानाचे भेटीस गेले. सन्मान बहूत केला. कित्येक आपले सरंजामानिशी सांगितलें, परंतु मनांत आलें नाहीं. बाहेर ‘बहूत बरें’ म्हणून बोलिला. जाफरखानाची बायको ती शास्तखानाची बहीण; तिनें खानास आंतोन सांगून पाठविलें की, “शास्तखानाची बोटें तुटलीं. अफजलखान मारिला. तसे तुम्हांसही शिवाजी मारील. त्यास लवकर निरोप देणें.” मग राजांस वस्त्रें देऊन निरोप दिला. “पादशाहास अर्ज करून सरंजाम करवितों.” ऐसें बोलिला. मग राजे डेरियास आले. “जाफरखानही दिलखुलाशानें बोलिला नाहीं. बरें, श्री करील तें खरें.” म्हणून बोलून राहिले.

५५. शिवाजीभोवती चौकी

दुसरे दिवशीं पादशाहा यांणीं राजापाशीं ५००० हजार स्वार व पायदळ [नेमून] पोलादखान कोतवाल यास हुकूम केला कीं, “तूं राजाच्या डेऱ्याभोंवतीं चौकी देऊन खबरदारीनें राहाणें.” त्यावरून कोतवाल येऊन डेरा ठोकून राहिला. मग राजे घाबरे जाले. कष्टी होऊं लागले. संभाजी राजे यांस पोटाशी धरून बहूत खेद केला. निराजीपंत व दत्ताजीपंत व त्रिंबकपंत यांणीं बहूता प्रकारें समाधान केलें. तेंव्हा राजे बोलिले जे, “आतांकाय हुन्नर करावा?” असा विचार करिता रात्र जाली. मग श्रीभवानी स्वप्नांत येऊन साक्षात्कार जाला कीं, “कांहीं चिंता न करणें. येथून तुजला सर्व शत्रूंस भूल घालून, मोहनास्त्र घालून, पुत्रासहवर्तमान घेऊन जातें. चिंता न करणें.” म्हणोन अभय जालें. मग जागृत होऊन आप्तविषयीं लोकांस सांगितलें आणि समाधान मानिलें.

५६. मेव्याचे पेटारे

दुसरे दिवशीं नाना जिन्नस मेवा खरेदी करून आणविला. आणि वेळूचे पेटारे आणवून १० पेटारे मेवा भरिला. एका पेटाऱ्यास दोघे दोघे मजूर लावून, मध्यें लाकूड घालून मेवा वजिरांस पाठविला. चौकीच्या लोकांनी पुसलें कीं, “पेटारे कोणाचे? कोठें जातात?” मजूरांनीं उत्तर दिलें, कीं, “राजे यांणी चौघा वजिरांस मेवा पाठविला आहे.” त्यांणी एकदोन उघडून पाहिले. तों मेवा खरा. मग जाऊं दिले. असा राबता रोज लाविला. मग आठ चहूं राजांनी आपले स्वार व कित्येक कारकून लोक यांसही ‘ पळणें ’, म्हणून पाठविलें. मग ते कुल पळाले.

५७ राजांचे पलायन

मग एके दिवशी राजे व राजपूत्र एकच पेटाऱ्यांत बसले. पुढें मागें पेटारे करून मध्यें पेटारियांत बसून चालिले. ते वेळीं आपला साज सर्व उतरून, हिरोजी फरचंद यास घालून आपले

पलंगावरि निजविला. हात मात्र त्याचा उघडा बाहेर दिसूं दिला आणि शेला पांघरून निजवला. आणि एक पोरगा रगडावयास ठेविला. जवळील कारकून होते त्यांस अगोदर दिल्लीपलीकडे तीन कोसांवर एक गांव होता तेथें ठिकाण करून पुढें रवाना केले होते. आणि आपण उभयतां पेटारियांत बसून निघोन चालिले. चौकीचे लोक होते त्यांनी एकदोन पुढील पेटारे उघडून पाहोन वरकड पेटारे न उघडितां जाऊं दिले. शहराबाहेर दोन कोसांवरि जाऊन, पेटारे टाकून, पायउतार होऊन, कारकून ज्या गांवी होते त्या गांवास गेले. कारकून बराबरि घेतले. अवधियांनी रानात बसून विचार केला कीं, "आता जरि नीट आपले देशास जातों तरि तिकडे लाग करून फौजा धावतील. तिकडे जाऊं नये. दिल्लीपलीकडे जावें. वाराणशीकडे जावें." असे करून राजे व संभाजीराजे व निराजी राऊजी व दत्ताजी त्रिबंक व राघो मित्रा मराठा ऐसे निघोन चालिले. वरकडांस मनास मानेल तिकडे जाणें, म्हणून सांगितले. आपण व राजपुत्र व इतर लोक कारकून ऐसे वाराणशीकडे आंगास राखा लावून, फकिराचे सोंग घेऊन मथुरेकडे गेले.

५८ हिरोजीही निघाला

मागें दिल्लीमध्यें हिरोजी फरजंद पलंगावरि निजला होता. तो चार प्रहर रात्र व तीन प्रहर दिवस तैसाच निजला. चौकीचे पोलादखानाचे लोक कोठडींत येऊन पाहातात [तों] राजे शेला पांघरून निजले. पोर पाय रगडीत होता. पोरास लोक पुसतात कीं, "राजे आज फार वेळ निजले?" पोर म्हणतो कीं, "शीर दुखते." ऐसें पाहोन लोक जातात. तैसाच तीन प्रहर दिवस हिरोजी निजला होता. तों प्रहर दिवस असतां हिरोजी उठोन , आपलीं पांघुरणें, चोळणा, मुंडासें घालून पोर बरोबरि घेऊन, बाहेर आला. चौकीदारांनी पुसिलें त्यांस हिरोजीनें सांगितलें कीं, "शीर दुखतें, कोणी कोठडीत जाऊं लागेल त्यास मना करणें. आपण औषध घेऊन येतों." म्हणून चौकीदारास सांगून दोघे बाहेर गेले. रामसिंगाचे गोटास जाऊन त्यास एकांतीं वर्तमान सांगोन आपण तेथून निघोन देशाचा मार्ग धरिला.

५९. रामसिंगाची कैफियत

मग रामसिंग पादशाहाच्या दर्शनास गेला. पादशाहास अर्ज केला कीं, "शिवाजी आपले मार्फतीने आला होता. त्यास पादशाहाने चौकी आलाहिदा दिली. आपणांकडे कांही इलाखा नाहीं." पादशाहा बोलिले कीं, "तुम्हांसि त्याचा इलाखा नाहीं. पादशाही बंदा त्यास पादशाहा सर्फराजी करतील. तुम्ही त्याचे दरम्यान नाहीं." असें बोलल्यावर रामसिंगानीं तसलीम करून डेरियास आले.

६०. शिवाजीचा शोध

नऊ तास दिवस आला. नववे तासा चौकीचे लोक म्हणत होते कीं, "आज माणसाचा राबता नाहीं. राजा श्रमी जाहाला आहे म्हणून चाकर सांगतात. त्याजवर कोणी जात येत नाहीं, काय वर्तमान?" म्हणून कोठडींत पाहावयासि गेले तों पलंगावरि कोणी नाहीं. राजा पळाला ऐसें जाहालें. हें देखोन पोलादखानानें पादशाहाजवळ वर्तमान सांगितलें कीं, "राजा कोठडींत होता.. वरचेवर जाऊन पाहात असतां एकाएकीं गइब जाहला. पळाला किंवा जमिनीमध्यें घुसला कीं अस्मानमध्यें गेला, हे न कळे. आम्ही जवळच आहों. देखत देखत नाहींसा जाला. काय हुन्नर जाहाला नकळे." ऐसें जाऊन सांगतांच पादशाहास आश्चर्य वाटून बहूत तजविजींत पडला. आणि कुल फौजांत ताकीद करून चौतर्फा अष्ट दिशेस दोन लाख साठ हजार स्वार शोधावयास रवाना केले. त्यास सांगितलें कीं, "शिवाजी हुन्नरवंत आहे. एकादा वेष धरून जात असेल. तरि तुम्ही जंगम, जोगी, संन्यासी, तापसी, बैरागी, नानकपंथी, गोरखपंथी, फकीर, ब्राह्मण, कंगाल, ब्रह्मचारी, परमहंसी, वेडीं नानापरींचीं सोंगे शोध करून, राजा ओळखून, कैद करून आणणें." अशी इशारति सांगोन रवाना केले. फौजा चोहोकडे स्वार जाहाल्या. आणि पादशाहांनी मनात शंका, धरिली कीं, "राजा शहरांत कोठें दडून राहिला असेल. आणि रात्रीस आपणास दगा करील." म्हणून तजवीज करून, बहूत सावध चौकी पहारा ठेवून जागेच पलंगावर राहून बैसले. लोक कंबरबस्ती करून रात्रंदिवस जवळ ठेविले. ये जातीनें राहूं लागले.

६१. राजे राजगडास

पुढें राजे व राजपुत्र मजल दरमजल चालोन मथुरेस गेले. मथुरेमध्यें ओळखीचे माणूस शोधितां कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत हे त्रिवर्ग बंधू ब्राह्मण, मोरोपंत पेशवे यांचे मेहूणे, त्यांस निराजीपंत ओळखीत होते. त्यांणी जाऊन, त्यांची भेट घेऊन, वर्तमान सांगितलें. त्यांणी धैर्य धरून कबूल केलें. त्याजवर त्यांचे घरीं संभाजी राजे पुत्र ठेविले कीं, "आपण देशास आपल्या राज्यांत जाऊन पावलों म्हणून तुम्हांस पत्र व जासूद पाठवितों. तुम्हीं राजपुत्रास घेऊन देशास सर्व बंधू आपल्या कुटुंबानिशीं येणें. तुमचें सर्व प्रकारें चालवूं. ऊर्जित करून बक्षीस देऊं." असें सांगोन राजपुत्रास ठेविलें, आणि त्यांचा एक बंधू कृष्णाजीपंत समागमें घेऊन वाराणशीस गेले. "गयाप्रयागीं यात्रा तुमचे ओळखीनें तुम्हीं आपल्यास करून देणें", म्हणून सांगून, त्यास बरोबर घेऊन, वाराणशीस आले. तेथें गुप्तरूपें स्नान करून श्रीविश्वेवर-दर्शन करून प्रयाग स्नान केलें व गयावर्जन केलें. तेथें कर्जही उदंड घेऊन धर्मही केला. पुढें देशास आपले राज्यांत यावें असें केलें. नीट वाटे यावें तरि गोंडवणातून भागानगर विजापूरावरून राजगडास आले. मार्गी कित्येक जागां उदंड शोध पडला होता. अपाय होता दगाच व्हावा असें जालें होतें. परंतु श्रीभवानीनें संरक्षुन स्वस्तिक्षेम आणिलें. निराजीपंत व दत्ताजीपंत व राघोजी मराठा असे चौघे आले. राजगडास

आलियावर थोर धर्म, मोठा महोच्छाव केला. साखरा वांटल्या. तोफांचे आवाज केले. मातुश्रीनें व कारकूनांनीं व लष्कर गड, कोट, हशम, सर्वांनीं संतोष करून खुशाली केली.

६२. गड परत घेण्याची तजवीज

पुढें सत्तावीस गड मोंगलास दिले [होते] ते मागती घ्यावे ही तजवीज केली. मोरोपंत पेशवे व निळोपंत मजमदार व अंणाजीपंत सुरनीस यांसि सांगितलें कीं, " तुम्हीं राजकारण, यत्न करून किल्ले घ्यावे." आपण राजियांनी मावळे लोकांस सांगितलें कीं, "गड घेणें."

६३. "एक गड घेतला, परंतु एक गड गेला!"

त्याजवरून तानाजी मालसुरा म्हणून हजारी मावळियांचा होता. त्यानें कबूल केलें कीं, "कोंडाणा गड आपण घेतों." असें कबूल करून वस्त्रें,विडे घेऊन गडाचे यत्नास ५०० माणूस घेऊन गडाखाली गेला. आणि दोघे मावळे बरे, मर्दाने निवडून रात्रीं गडाच्या कडयावरून चढविले. जैसे वानर चालून जातात, त्याचप्रमाणें कड्यावर चालून गेले. आणि कडा चढून, गडावर जाऊन, तेथून माळ लावून वरकड लोक देखील तानाजी मालसुरा चढून गडावरि तीनशें माणूस गेले. गडावरि उदेभान रजपूत होता. त्यास कळलें की, गनिमाचे लोक आले. ही खबर कळून कुल रजपूत कंबरबस्ता होऊन, हातीं तोडा बार घेऊन, हिलाल, चंद्रज्योती लावून बाराशें माणूस तोफाची व तिरंदाज, बरचीवाले, पटाईत, सुऱ्या, आडहत्यारी ढाला चढवून चालोन आले. तेव्हां मावळे लोकांनी 'श्रीमहादेव!' असें स्मरण करून नीट फौजेवर रजपूतांचे चालून घेतले. मोठें युध्द एक प्रहर जालें. पांचशें रजपूत ठार जालें. चाळीस पन्नास मावळे ठार जाले. उदेभान किल्लेदार खासा त्यांशी व तानाजी मालसुरा सुभेदार यांशी गांठ पडली. दोघे मोठे योध्दे, महाशुर, एक एकावर पडले. वार करीत चालले. तानाजीचे डावे हातची ढाल तुटली. दुसरी ढाल समयास आली नाहीं. मग तानाजीने आपले डावे हाताची ढाल करून, त्याजवरि वोढ घेऊन, दोघे महारागास पेटले. मोठें युध्द केलें. एकाचे हातें एक तुकडे होऊन फिरंगीच्या वारें पडले. दोघे ठार जाले. मग सुर्याजी मालसुरा, तानाजीचा भाऊ, यानें हिंमत धरून, कुल लोक सांवरून, उरले रजपूत मारिले. कित्येक रजपूत कडे उडोन पळोन मेले. असें बाराशें माणूस मारिले. किल्ला काबीज केला. आणि गडावर पागेचे खण होते त्यांस आग लाविली. त्याचा उजेड राजियांनी राजगडाहून पाहिला आणि बोलिले कीं, "गड घेतला. फत्ते जाली!" असें जाहालें. तों जासूद दुसरे दिवशीं वर्तमान घेऊन आला कीं, "तानाजी मालसुरा यांनी मोठें युध्द केलें. उदेभान किल्लेदार यास मारिलें आणि तानाजी मालसुराही पडला." असें सांगितलें. गड फत्ते केला असें सांगताच राजे म्हणूं लागले कीं, "एक गड घेतला, परंतु एक गड गेला!" असें तानाजीसाठीं बहूत कष्टी जाहालें. पुढें गडावरि ठाणें घातलें. सुर्याजी मालसुरा भाऊ नावाजून त्याचा सुभा त्यास सांगितला. धारकरी लोकांस बक्षिसें सोन्याचीं

कडीं दिलीं. द्रव्य अपार दिलें. वस्त्रें जरी कुल लोकांस दिलीं. ये जातीनें प्रथम कोंडाणा घेतला.

६४. इतरही गड घेतले.

पुढें मोरोपंत पेशवे यांणी व निळोपंती व अंणाजीपंतीं व मावळे यांणी सव्वीस गड ऐसेच ख्यात करून चौ महिन्यांनी घेतले. सल्ल्यानें गड दिधले होते ते मागुती घेऊन आपलें राज्य करूं लागले.

६५. संभाजी राजगडास : नेमणूका

राजगडास वाराणशी होऊन सुखरूप पावलियावरि मथुरेस माणसें व पत्रें पाठविली. त्याजवरून कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत या त्रिवर्गांनी आपले कुटुंबांसहित संभाजीराजियास जानवे धोत्रें नेसवून, आपला भाचा म्हणवून राजगडास आले. आणि राजियासि भेटले. मग राजे पुत्रास भेटले. आनंद थोर जाहाला. मोठा दानधर्म केला. आणि कृष्णाजीपंत त्रिवर्ग बंधूंस 'विश्वासराव' म्हणवून नांव किताब दिला. लक्ष होन बक्षीस दिले. तिघां बंधूंस दहा हजार होन तैनात केली. मातबर लोकांत असामी घातली. मोकाशे महाल दिधले. नांवाजिलें. तसेच निराजीपंत हे बराबरी बहूत श्रमसाहस करून आले व दत्तजीपंत बरोबरी होते व राघो मित्रही बरोबरि होता. त्यांस निराजीपंत नीतिमान्य सर्व जाणते, चतुर, चौकस, निजामशाई ब्राह्मण, त्यांस न्यायाधिशी सरकारांतुन सांगितली. जितकी राज्यांतील न्याय मनसुबी तितकी त्यानें करावी. त्यांचे पुत्र प्रल्हादपंत धाकटे बारा चौदा वर्षांचे होते. शाहाणा, बुध्दीचा देखोन त्यास लष्करची सबनिशीची मुतालकी सांगोन लष्करासमागमें सरनौबताजवळ ठेविला. प्रल्हादपंत मोठे माणूस होतील, थोर भार घेतील, असें राजे बोलले. दताजीपंतास हुद्दा काय सांगावा म्हणून तजवीज केली. तों गंगाजीपंत वाकनीस मृत्यु पावला त्याची वाकनिसी दताजीपंतास सांगितली. सरकारकुनांमध्यें गणना केली. राघो मित्रा यासि हुजूर लोकांचा हवाला सांगितला. समागमें जे जे लोकीं श्रमसाहस केला त्यांस नांवाजिलें.

६६. 'पतकें केलीं.'

पुढें राजियांनीं आपले पालखीबरोबरि चाखोट माणूस पाहून निवडक असामी ठेविले. चहूं पादशाहांचे आपण दावेदार, एखादे वेळेस प्रसंग पडतो, तेव्हा जवळ आहेत ते कार्यास येतील. असें जाणून मावळे लोकांत पाहाणी परीक्षा करून, निवडक माणूस पाहून, पतकें केलीं. त्यांची [नावें] नांवनिशीवार.

१ शंभर लोक म्हणून नांव ठेविलें.   १ तीस लोक म्हणून नांव ठेविलें.

१ साठ लोक म्हणून नांव ठेविलें. १ वीस लोक म्हणून नांव ठेविलें.
१ चाळीस लोक म्हणून नांव ठेविलें. कलम १

येणेंप्रमाणें पतकापतकांची नावें ठेविलीं. मावळ्यामावळ्यामध्यें लोक उत्तम निवडिला निवडक भरती करून चार पतकें मिळून दोन हजार माणूस ठेविलें. त्यांत कांहीं बंदूखी, कांहीं विटेकरी, वरकड आडहत्यारी, फिरंग [वाले] असे माणूस सजले. तितके माणसांस साज करून दिले. डोईस मंदील, आंगास सखलादी फतू, दोहों हाती दोन सोन्याची कडी, कोणास रुप्याची कडीं, तरवारांस अबनाळ तैनाळ सोनेरुप्याचे, बंदुकीस कट रुप्याचे व विटियांसि कट तैसेंच, कानास जोडी कुडक्यांची येणेंप्रमाणें अवघे लोकांस साज सरकार-निसबतीनें देऊन लोक सजविले. अवघ्यांचे एकच साज मर्दानी म्हणावे तरि एकापेक्षां एक अधीक. अशी परीक्षा करून हमेशा २००० मावळे लोक पालखीबरोबर जवळ असावे. तसेच त्यांस तैनाती सरदार हजारी हशमांत केले. त्याप्रमाणें जुमलेदार प्रमाण केले. आणि दोन अडीच हजार माणूस हशम केला. रहस्ता असावें. चालते वेळेस पालखीबरोबरि चौतर्फा चालत असावें. ये जातीनें लोक ठेविले.

६७. पन्हाळा आदिलशाहीकडे

त्यावरि पनाळा किल्ला अदलशाईचा तेथें भेद करून गड घेतला. राजे गडावरि राहिले.मग विजापुराहून शिद्दी जोर वजीर, वीस हजार स्वार, [याणें]राजियासि वेढा घातला. गड नवाच घेतला होता.सामान करून, मजबूती करावयासि अवकाश जाहाला नाहीं. परंतु गड बरा भांडविला. नेताजी पालकर सरनोबत राजियाचा त्यास पत्रें जासूद पाठविले कीं, "तुम्ही लष्कर घेऊन उपराळ्यास येणें आणि शिद्दी जोर मारून चालवणें." म्हणून पत्रें पाठविलीं. त्यास लष्कर दूर लांबलें. समयास यावयासि फावलें नाहीं. आणि गडावर सामान नाहीं. मग राजियांनी विचार केला आणि गड शिद्दी जोरास दिला. आपण उतरोन आले. गड सिद्दी जोरांनीं घेऊन आपलें ठाणें बसविलें.

६८. नेताजीस दूर करून कडतोजी सेनापती

मग राजियांनी नेताजी पालकर यास बोलावून आणिला, आणि "समयास कैसा पावला नाहींस?" म्हणून शब्द लावून, सरनोबती दूर करून, राजगडचा सरनौबत कडतोजी गुजर म्हणुन होता, त्याचें नाव दूर करून, प्रतापराव नाव ठेविले, आणि सरनोबती दिधली. प्रतापरावांनी सेनापती करीत असतां शाहाण्णव कुळींचे मराठे चारी पादशाहींत जे होते व मुलखांत जे जे होते ते कुल मिळविले. पागेस घोडीं खरेदी केलीं. पागा सजीत चालिले व शिलेदार मिळवीत चालिले. असा जमाव पोक्त केला. चहूं पादशाईंत दावा लाविला.

६९. संभाजी मोगलांचा हसहजारी

राजे दिल्लीहून पळोन आपल्या देशास पितापुत्र सुखरुप आले. येऊन चहूं महिन्यांत सत्तावीस गड घेतले. मोठी ख्यात केली. हें औरंगजेबास कळोन मनात चिंतातूर जाला. तेव्हां शाहाआलम, वडील पुत्र, यास पादशाहांनी कित्येक विचार राजकारण सांगून त्यासि फौजेनिशीं रवाना केलें. शाहाजादियास सांगितलें कीं, “जोरावारीनें शिवाजी हातास लागत नाहीं.तुम्हीं जाऊन औरंगाबादेस राहाणें आणि सला मामला राजियासि करून त्याचे सख्य करणें आणि भेटी न ये तरि मुलाज माफ करणें आणि दौलत त्याचें नावें अगर मुलाचे नावें देऊन त्याची फौज चाकरीस आपणाजवळ आणणें. त्यास मुलूकमोकासा, पैकाटक्का, ठाणीं जें पाहिजे तें देऊन शिवाजी आपला चाकर जालासें करणें. येवढें यश तुम्ही घेणें. म्हणजे सर्व यश आलें. असें करणें.” म्हणून बुध्दिवाद सांगून शाहास फौजेनिशीं रवाना केलें. तो साठ सत्तर हजार स्वारांनिशी निघाला. तो मजल दरमजल औरंगाबदेस येऊन राहिला. आणि राजियाकडे पत्रें, जासूद, हलकारे, हेजीब, पाठविले. ते राजगडास दाखल जाहाले. शाहाजादियाचीं पत्रें दिलीं.तीं वाचून पाहिलीं. तेथें लिहिले होतें जें, “सला करून तुम्ही आम्हीं एक व्हावें.” असें लिहून पाठविलें. त्यावरि राजे बहूत संतुष्ट होऊन रघुनाथपंत कोरडे यांस औरंगाबादेस पाठविलें. कित्येक जडजवाहीर वस्त्रेहीं शाहास पाठविलीं. रघुनाथपंती जाऊन भेट घेतली. शाहाने बहूत सन्मान केला. एकांती कित्येक गोष्टी बोलिला कीं, “राजे व आपण भाऊ, तुम्ही व आम्ही एक विचारें राहून तुम्हीं भेटीसही येणें, तुमचे पुत्राचे नावें दौलत देतों. एक सरदार फौज चाकरीस देणें व एक ब्राह्मण मातबर देणें. मोकासा देऊन चालवू. तुम्हीं पातशाही रुजवातीने असणें.” संभाजी राजाचे नावें हसहजारी दौलत द्यावी, पंधरा लक्ष होनांचा मुलूख वऱ्हाड व खानदेश द्यावा, असें केलें. उत्तम भुषणें वस्त्रें देऊन रवाना केलें.

७०.मोगलांशी सला

ते परतून राजाच्या दर्शनास आले. भेट जाली. शाहाजादियाचे अलंकार वस्त्रें, पत्रें दिलीं. दौलतीच्या गोष्टी सांगितल्या. सर्व भावार्थ कळलियावरि राजियांनी विचार केला कीं, “आपणास एक विजापुरचे पातशाहीशी दावा, भागानगरकरांशीं दावा व मोगलाशीं दावा; असे तीन दावे सोसवत नाहींत आपलें राज्य नवीं त्याहीमध्यें दोन तीन चपेटे होऊन हलाखी जाली आहे. त्यास एक शत्रु तरी मित्र करावा आणि दोन वर्षे बळ धरून सावरावें, मग पुढें जे कर्तव्य तें करावें.” असा विचार करून, मोगलांशी सला करावा हा विचार करून, फौज प्रतापराऊ सरनोबत याबराबरि पाच हजार स्वार देऊन, समागमें निराजीपंत सरकारकून दिधले. व मोरोपंत पेशवे व मजमदार व सुरनीस यांचे मुतालीक दिले. प्रल्हादपंत, निराजीपंताचे पुत्र, यांस लष्करची सबनिशी दिधली. मुलूख मोकासा देतील त्यास सुभेदार राउजी सोमनाथ कारकून करून दिधले. ऐसे रवाना केले. मोगलाशीं सला केला. संभाजी राजे यास हसहजारी कबूल करोन निराजीपंत व प्रतापराव औरंगाबादेस गेले.

७१. शाहाजाद्याशी भेट

मग शाहानें बहूत सन्मानें भेट घेतली. सचंतर जागा दाखवून पुरा वसविला. हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रें सर्वांस दिधलीं. वऱ्हाड देश जागा जाहागीर पंधरा लक्षांचा होनांचा दिधला. त्या मुलखांत राउजी सोमनाथ सरसुभेदार ठेविले. हुजूर वांटणीही दिली. टक्कापैका लोकांस बहूत पावला. खुशाल राहिले.

७२. बादशाहाचा हुकूम

मग शाहाजादियानें दिल्लीस पादशाहास खबर लिहून पाठविली. त्यावरि पादशाहास कळतांच बहूत खुशाल जाला. आपला देश सुखरूप राहिला हा संतोष पादशाहास जाहाला. असे दोन वर्षे फौज [सुध्दां] औरंगाबदेस होते. आणि इकडे राजास फुरसत जाहाली. टक्कापैका मुलखांत मेळविला. कित्येक अदलशाही गड, कोट, देश काबीज केला. शाहाचा व राजियाचा घरोबा बहूत चालिला. परस्परें वस्ताभावा धाडूं लागले. याकरितां दिल्लीस औरंगाजेबास शंका उत्पन्न जाली कीं, "शाहाजादे व शिवाजी एक जाहाले. एखादे वक्तीं फितवा होऊन आपणास दगा करतील." अशी कल्पना केली कीं, आतां या उभयतांत कज्या वाढवावा. म्हणून शाहास लिहिलें कीं, "शिवाजी हरामी आहे, त्याचा सरदार प्रतापराव व निराजीपंत हे दोघे फौजेनिशीं आहेत. याकरितां त्यांस पातेजों नये. एखादे वक्तीं दौलताबादेस भेद करतील. तरि तुम्हीं त्या दोघांस कैद करणें. त्यांची घोडीं अवघी तबेल्यास लावणें.येविषयीं रयात न करणें." म्हणून लिहिलें. हें वर्तमान शाहाचा वकील पादशाहाजवळ होता, त्यांनीं टाकोटाक इशारतीने पुढें शाहास पाठविलें कीं, " येथें मजकूर असा जाहाला असें. तुम्हीं हुशार राहाणें."

७३. शाहाजाद्याचा इशारा

असें वर्तमान पादशाहाजादे यांनीं निराजीपंतास एकांतीं बोलावुन हें वर्तमान सांगितलें, आणि वस्त्रें अलंकार देऊन गुप्तरूपें निरोप दिधला कीं, "तुम्हीं उद्यां रात्रीचे कुल फौजेनिशी उठून पळून राजियाकडे जाणें. तुमची बिशाद राहिली तर पावेल. पायदळ लोक घरोघरीं ठेवणें. मागून वस्तभाव सावकाश नेणें. दोचौ रोजांत पादशाहाचे कागद येतील. मग तुम्हांस कैद करावें लागेल. याकरितां अगोदर निघून जाणें." असें सांगितलें. त्याजवरून निराजीपंत येऊन प्रतापराव यास व अवघे लोकांस सांगून, दुसरे दिवशीं तयारी करून, रात्रीस फौजेनिशी निघोन गेले. तेच मजलदरमजल राजियाजवळ आले. भेटी जाहाली. कित्येक खजिना व चित्रविचित्र वस्त्रें भूषणें घेऊन आले. राजे खुशाल जाहाले, आणि बोलिले कीं, "दोन वर्षे लष्करचें पोट भरलें.आणि शाहाजादा मित्र जोडला. ही बरी गोष्ट जाहाली. आतां मोगलाई मुलूख मारून खावयास वाव जाहाला." असें

बोलिले. मग औरंगाबादेस राजियाची फौज निघोन गेली.

७४. पादशाहा थक्क

यावरि आठा दिवशीं पादशाहाचीं पत्रें हुजूरचे लेख आले. वर्तमान कळलें. मग शाहा बोलिला कीं, "मराठे हरामजादे. आठ दिवस अगोदर पळाले. हजीर असते तरि कैद करतों." असें बोलिले. आणि दिल्लीस पादशाहास जाब लिहिला कीं, "हुकुमाप्रमाणें वर्तणूक करावी, परंतु मराठे आठ दिवस अगोदर पळाले, कैद करावयास विलंब नव्हता."म्हणून लिहून पाठविलें. त्याजवरून पादशाहास कळोन थक्क जाहाला. "मराठे हरीफ बहूत आहेत." असें बोलिले. ये जातीचें वर्तमान जालें.

७५. प्रतापरावाची भेट

प्रतापरावाची व राजियाची भेट जाहाली. पागा सजली. गनिमाची फौज आपले राज्यावर चालून आली त्यास मारून चालून मोगेंलदेश मारून धुंध उठविली.

७६. रांगणा 'रक्षिला'

मग रांगणा किल्ला राजियाचा होता, त्यांस विजापुराहून रुस्तूम जमा वजीर सात आठ हजार लष्कर घेऊन गडास वेढा घातला. ते वक्तीं गडकरी यांनीं थोर भांडण केलें, व राजियांनी लष्कर पाठवून उपराळा करून रुस्तुम जमा मारून चालविला आणि गड रक्षिला. रुस्तुम जमा नामोहरम जाहाल्यावर अबदुल करीम व बेलोलखान वजीर विजापुराहून बारा हजार जमाव स्वार घेऊन रांगणियास वेढा घातला. गडकरी यांणीं बहूत मारामारी केली व राजियांनीही लष्कर पाठवून बाहेरून उपराळा करून मारामारी केली. बेलोलखानांचा थोर वाखा केला. आणि पाऊस पडला, झड लागली. पावसाळियांत कित्येक मेले. हत्ती, घोडे, उंटे मेलीं. लष्कर सडलें. अशीं अवस्था जाहाली. बेलोलखान जीव वांचवून पळोन गेला. गड सुखरूप राहिला.

७७. मोगलाईत पाळत

पुढें जितकीं शहरें मोंगलाईंत होतीं ते जागां चार पांच माणसें वेषधारी करून पाळतीस ठेविली. पाळती घेऊन दोघे खबर सांगावयास यावे. दोघांनी तेथें हुशार राहावें. मग लष्कर पाठवून हवेलिया, शहरें मारावीं. ही तजवीज केली.

७८. सुरतेची लूट.

तों इतक्यांत सुरतेहून पाळती बहिरजी जासूद आला कीं, "सुरत मारिल्यानें अगणित द्रव्य सांपडेल." असें सांगितलें. त्याजवरून राजियांनी विचार केला, "लष्कर चाकरीनफरी, काम मनाजोगें होणार

नाहीं. याजकरितां जावें तरि आपण खासा लष्कर घेऊन जावें.” असा विचार केला. आणि मकाजी आनंदराव म्हणजे शाहाजी यांचा फरजंद पाळलेला व वेंकाजी दत्तो ब्राह्मण मोठे लष्करी नामोशाचे सरदार, हे महाराजांकडून सेवा सोडून राजियाकडे आले होते; त्यांस राजियांनीं नांवाजून पागेच्या पंचहजाऱ्या सांगितल्या. आणि प्रतापराव सरनौबत व वेंकाजी दत्तो व [मकाजी] आनंदराव व वरकड सरदार दहा हजार पागा व दहा हजार शिलेदार असे वीस हजार जमाव लष्कर, तसेच सातपांच हजार मावळे लोक निवडक व सरकारकून मोरोपंत पेशवे व निळोपंत व अंणाजीपंत व दत्ताजीपंत व बाळ परभू चिटणीस असे बरोबर घेतले. कोळवणांतून नीट सुरतेस पांच गांव, सात गांव एक मजल करून एकाएकीं सुरतेस पावले. सुरतेचे लोक गैरहुशार होते. चढे घोड्यानिशीं सुरतेच्या दरवाज्याजवळ पेठेंत लष्कर शिरलें. मोंगलांचीहे फौज पुढें आली. मोठी मारामारी जाहाली. तांब्राकडील लोक बहूत मारिले. आणि सावकारांचे वाडे काबीज करून सोनें, रूपें, मोतीं, पोवळे, माणीक, हिरे, पाचू, गोमेदराज, वैडूर्य, असे नवरत्नें; नाणें, मोहोरा, पुतळ्या, इभ्र्याम्या, सतराम्या असफ्या, होन, नाणें नाना जातीचें इतका जिनसांच्या धोंकटिया भरल्या. कापड भांडें तांब्याचें वरकड अन्य जिन्नस यास हात लाविलाच नाही. असें शहर दोन दिवस अहोरात्र लुटिलें. उत्तम घोडे जितके युध्दांत व सावकारांच्या घरात सापडले तितके घेतले आणि राजियांनी विचार केला कीं, लौकर निघून जावें. असें करून कुल लष्करांतून निमे घोडीं भांडावयास लष्करी ठेविलीं. निमे घोडियावरि घोंगटिया मालाच्या घातल्या. पाईंच्या लोकांस हमेण्या करून त्याजजवळ दिधल्या. अशी मुस्तेदी करून, वोझी घेऊन निघाले. सुरतेचा कोट घेतला नाहीं अवकाश थोडा म्हणून शहर मारून चालिले. ही खबर मोंगलाचें सुभेदार वीस उमराव व मोहबतखान व दाऊदखान असे सात गावची दवड करून, बराबर हजार स्वार एक एक सुभ्याबराबर, चालून आले. त्यांनीं राजियास गाठलें. गनीम आला ऐशी खबर कळली. राजा खासा घोड्यावर बसून बख्तर घुगी घालून, हातीं पट्टे चढवून मालमत्ता घोडीं, पाईंचे लोक पुढें रवाना करून आपण दाहा हजार स्वारांनिशी सडे सडे राऊत उभे राहिले. वणी दिंडोरी म्हणवून शहर आहे. तें जागां उभे राहून सुभ्यांचे लोक आले त्यांशी घोरांदर युध्द केलें. मोहबतखान व दाऊदखान यांनीं युध्द केलें. राजियांनीं आपली फौज पुढें करून पाठीवर आपण खासा राहून झगडा दिधला. प्रतापराव सरनोबत व व्यंकोजी दत्तो व आनंदराव वरकड सरदार पुढें होऊन मोठी कत्तल केली आणि मोंगल मारून मुरदे पाडिले. दोन प्रहर युध्द जालें. मराठे यांणी शर्त केली. तीन हजार मोंगल मारिले. तीन चार हजार घोडे पाडाव केले. दोन वजीर मोंगलाई सांपडले. असे फत्ते करून आले. तो पुढें उदारमा वजीर मोंगलांचा याचा लेंक जगजीवन [व] उदाराम [याची] बाईल रायबागीण असे व सरदार पांच हजार मोंगल घेऊन उंबर- खिंडीस आले. त्यांस मारून चालविले. रायबागीण कोंडली. तिणें दांती तृण धरून लेंक राजियाची म्हणून बोलून कौल घेतला. मग तीस कौल देऊन अनात करून सोडिली आणि माघारे राजे राजगडास आले.

७९. 'दर्यास पालाण घातलें.'

मालमत्ता सुरतेची आकार करितां सर्व बिशात पाच क्रोड होनांची आणली. चार हजार घोडीं आणिलीं. ती पागा केली. पागेस खूण चौकटीचा डाग घोड्याचे उजवे टिरीवर देऊन, अशी ओळखण करून, पुढें ज्या ज्या मुलखांत अदलशाही, निजामशाही गड होतें तितके घेतले. कित्येक डोंगर बांके जागेंत होते ते गड वसविले. जागोजागां गांवावरि मुलखांत नूतन गड वसविले.गडाकरितां मुलूख जप्त होतो असें समजून गड बांधिले, व कोंकणांत कल्याण, भिवंडी, राजापूर पावेतों देश काबीज केला. काबीज करितां करितां जागां जागां पुंड पाळेगार होते व देशमुख होते, त्यांमध्यें जे युध्दास आले त्यास मारून गर्दीस मेळविलें, आणि ज्यांनीं कौल घेतला, त्यांस यथायोग्य चालवून रक्षिलें. रेवदंडा, राजापुरी दर्यामध्यें किल्ला निजामशाही आहे. तेथें हबशी किल्लेदार जागियाचा खावंदच. याचीं पाणियांतील जाहाजें गुराबा चाळीस पन्नास आरमार त्यानें करून, मुलूख मारून, पैदा करून जागा जतन आहे. त्याचे लोकांनीं राजियाचे देशास उपद्रव मांडिला. मग राजियानें बाजी पासलकर यास लष्कर मावळा हजार दोन हजार [दिला]. तैसेच जाहाजें पाणियांतील जालीं. समुद्रास पालाण राजियांनीं घातलें. हा एक हात सजला. राजपुरी एक पाणियांत उरली, याकरितां अद्यापि निजामशाहाचें नांव चालतें. तें स्थळ हस्तगत करावें म्हणून राजियांनी जागां जागां डोंगर पाहून गड वसविले, कीं येणें कडोन दर्या जेर आहे, आणि पाणियांतील राजे जेर होतील. असें जाणून कित्येक पाणियांतील डोंगर बांधून दर्यामध्यें गड वसविले. पाणियांतील म्हणजे केवळ जंजिरे असे करून गड जाहाजें मेळवून दर्यास पालाण राजियांनी घातलें. जोंवर पाणियांतील गड असतील तोंवर आपलें नांव चालेल, असा विचार करून अगणित गड जंजिरे जमिनीवर व पाणियांत वसविले. असें कर्म केले.

८०. काय सावंत व बाजी पासलकर

त्याजवरि राजपुरीहून काय सांवत म्हणोन पांच हजार फौजेनिशीं युध्दास आला. मोठें युध्द होतां बहूत रणखंदल जालें. काय सांवत खासा व बाजी पासलकर महायोध्दा,- याच्या मिशा दंडायेवढया, यांस पीळ घालून वरि केशांच्या आधारें निंबें दोहींकडे दोन ठेवीत होता, असा शुरमर्द ठेविला- याशीं व त्याशीं खासाखाशी गांठ पडली. एकास एकानीं पंचवीस जखमा करून ठार पडले. मग उभयतांकडील दळ आपले जागियास गेलें.

८१. शाहाजीचा मृत्यू

इतकियांत राजियाचे बाप शाहाजी महाराज बेंगरूळी होते ते विजापुराकडे येत असतां एकाएकीं चित्रदुर्गांत[ल्या] विलायतीमध्यें बोगदरी गांवीं घोडियावरून पडून मृत्यू पावले. हें वर्तमान राजियास कळलें. बहूत शोक केला. सर्वही विधान करून दानधर्म अपार केले, आणि बोलले कीं, "मजसारख्या पुत्राचा पराक्रम महाराज पाहाते तरि उत्तम होतें. आपण आपला पुरूषार्थ कोणास

दाखवावा? मागें अफजलखान मारिला व शास्ताखानास शास्ते केली, पराभवातें पावविला, आणि मिरजा राजियाची भेट घेऊन दिल्लीस गेलों. पादशाहाची भेट घेऊन मागती आपल्या राज्यास आलों. मागती कित्येक गड घेतले व शहरें मारिलीं आणि पागा, शिलेदार लष्कर चाळीस हजार केलें. असें पराक्रमाचे वर्तमान ऐकून महाराज संतुष्ट जाले. समाधान-पत्रें आपणांस वरचेवर येत होतीं. तैशीच अलंकार वस्त्रें पाठवीत होते. याउपरि त्यांमागें आपणास कोणी आतां वडील नाहीं!" म्हणून मोठा खेद केला. त्याउपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती, तिचे मांडीवर बैसून, गळां मिठी घालून रहाविली. "आपला पुरुषार्थ पाहावयास कोणी नाहीं. तूं जाऊं नको." म्हणून मोठा यत्न करून राजियांनी व सर्व थोर थोर लोकांनी राहाविली. असें वर्तमान जालें.

८२. शिद्दीचा पराभव

पुढें राजियास राजपुरीचे शिद्दी, घरांत जैसा उंदीर तैसा शत्रू , यास कैसें जेर करावें म्हणून तजवीज पडली. तेव्हा रघुनाथ बल्लाळ सबनीस यांनी आंगें अर्ज केला की, आपण शिद्दीवर स्वारी करितों. असें म्हणून सातपांच हजार मावळे खकम पाईंचे घेऊन राजपुरीवरि चालिले. त्यांनीं जाऊन राजपुरी पावेतों तळें, घोंसाळें कुल, देश मारून राजपुरी पावेतों सरद दरियाकिनारा मोकळा केला. शिद्दीच्या एकदोन फौजा आल्या त्या मारिल्या. तेव्हां राजपुरीकडून रघुनाथपंताशीं राजकारण करून सला केला. देश थोडाबहूत मागून, पुढें सज्जन मनुष्य पाठवून, आणशफत देऊन रघुनाथपंतास भेटीस नेलें. भेट जाहाली. सल्याची बळकटी करून सख्य जाले. रघुनाथपंतास वस्त्रें, घोडा दिधला. आपले देशास आले. पुढें काळानुसार रघुनाथपंत मृत्यू पावले. त्यानंतर शिद्दीचे शैल तुटलें. यावरि हबशियांनीं बदल खाऊन देशास उपद्रव करूं लागले. मग राजियांनीं व्यंकाजी दत्तो फौजेनिशीं नामजाद रवाना केले. त्यांनी जाऊन, त्याचा मुलूख मारून तलफ केला. मग शिद्दीनें आपले जातीचे हबशी लष्कर घोडेस्वार व हशम नामजाद व्यंकाजी दत्तोवर रवाना केले. यांशी त्यांशीं युध्द जालें. तीनशें हबशी व्यंकाजीपंतीं मारिले. घोडे पाडाव केले. व्यंकाजीपंती कस्त फार केली. बारा जखमा व्यंकाजीपंतास लागल्या. असा चौका बसवून आले. शिद्दीनें सल्याचें नातें लाविलें होतें. परंतु राजियांनीं सला केलाच नाहीं. त्याचे देशांत जागां जागां कोट नवेच बळावून राहिले. राजपुरी नजीक डोंगर बळाविला होता, तो घेऊन, गड बांधून कुल देश काबीज केला. ठाणीं ठेविलीं. मग त्याचा इलाज चालेना. पांच सात हजार हशम व सुभे ठेविले. असें केलें. मग राजपुरीस मुलूख नाहीं. दाणे कोठून यावे? त्यास पाणियांतील जाहाजें होतीं. तेणेंकरून वरकड मुलूख मारून, सामान आणून खाऊं लागले. त्यास राजियांनीं जाहाजें पाणियांतील सजिलीं. गुराबा व तरांडी व तारवें, गलबतें, शिबाडें, पगार अशीं नाना जातींचीं जाहाजें करून दर्यासागर म्हणोन मुसलमान सुभेदार व मायनाईक म्हणोन भंडारी असे दोघे सुभेदार करून, दोनशें जाहाजें एक सुभा, असें आरमार सजलें त्यास व शिद्दीचे जाहाजांत युध्द होऊन शिद्दीचीं जाहाजें पाडाव केलीं. युध्द बहूत जाहालें. दर्यांत तरांडे फिरेना असें जालें. त्यावर हमेषा युध्द करीत चालले. मग चोरून

मारून हबशी सामान नेत होता. राजियाची जाहाजें जागां जागां बंदरें शहरें मोंगलाई व फिरंगी व वलंदेज, इंग्रज, किलाताब ऐशा सत्तावीस पादशाहा पाणियांत आहेत, त्यांची शहरें बेदनूर, सौंदें, श्रीरंगपट्टण ऐशीं दर्या किनारे नाना शहरें मारून पोट भरीत चालले. जागां जागां युध्द करीत मालमत्ता मेळवून, आपलें पोट भरून राजियास रसद द्रव्यें जिन्नस आणून देऊं लागले. ये रितीनें सातशें जाहाजें पाण्यांतील जालीं. समुद्रामध्यें ही एक लष्कर जालें. हा एक बेत सजिला. पाण्यांतील एक राजपुरी निजामशाही उरली. याकरितां अद्याप निजामशाहाचें नांव चालतें.

८३. 'कुल कोंकण काबीज.'

तें स्थळ जेर करावें म्हणोन, कोंकणात कुडाळीं लखम सांवत देसाई म्हणोन पुंड होता. बारा हजार हशमानिशीं राहात असे. कुडाळ म्हणजे आदलशाही, त्यानें विजापुरास सागून पाठविलें कीं, "फौज घोडा-राऊत हशम मेळवून आपण राजियावरि चालोन जातों आणि कोंकण सोडवितों." म्हणोन सांगोन पाठविले. त्याजवरून विजापुरींहून खवासखान सरलष्कर, मोठा योध्दा, दहा हजार स्वारांनिशीं कुडाळास आला. लखम सावंत बारा हजार हशमांनिशीं सामील होऊन कोंकण सोडवीत चालले. इतकियांत राजास खबर कळून लष्कर व हशम निवड करून नीट चालून त्याजवर घेतलें. खवासखानास विजापुराहून मदतीस बाजी घोरपडे, दीड हजार स्वार येत होते. घाट उतरोन कोंकणात राहिले. त्याजवर राजियांनीं लष्कर पाठवून छापा घालून, बाजी घोरपडे कुल भाऊबंद सहवर्तमान बुडविले. बाराशें घोडी पाडाव केलीं. मोठें युध्द जाले. पुढें कुडाळावरि खवासखानावरि जावें, त्यासही यासारखें बुडवावें, तों त्यांनीं हें वर्तमान ऐकिलें. बाजी घोरपडे दीड हजार घोडे समवेत बुडविले. ही खबर ऐकून, धास्त खाऊन घाटावर पळून गेला. नीट विजापुरास पावला. पुढे लखम सावंतावरि राजियांनी नामजादी केली. त्याचीही फौज कित्येक मारिली. यावरि लखम सांवत कुडाळ प्रांत सोडून फिरंगणात बाहेर देशांत पळाला. कुडाळ देश राजियांनी काबीज केला. फिरंगी यास राजियाचा धाक, तेथें त्यास ठेवून घेववेना असें जालें. जागा कोठें नाहीं तेव्हां राजियांशीं राजकारण लावून पितांबर शेणवी, मत्स्याहारी ब्राह्मण, म्हणून कुडाळी हेजीब पाठवून दिला. राजियाचा कौल घेऊन भेटीस आला. भेट जाली. "आपण सावंत म्हणजे भोंसले यांचा गोत्रज. आपलें तुम्हीं चालविणें उचित आहे." असे कित्येक बोलिल्यावरि राजियांनी देशमुखी कुडाळची करार करून तनका दाखल साहा हजार होन वेतन करार करून द्यावें असें केलें. वाडा-हुडा बुरजांचा बांधूं नये. कुडाळीं राहावें. जमाव करूं नये. असें करून ठेविलें. त्याचे सरदार राम दळवी व तान सावंत यांस हशमांच्या हजारिया देऊन आपले आलाहिदा चाकर तिघे तीन जागां नामजाद ठेविले. पुन: लखम सावंताची व यांची भेट होऊ न दिली. असा कुडाळ देश काबीज केला. फोंड कोट इदलशाही होता. तेथें मोहबतखान राजबिंडा सरदार जबरदस्त होता. ते जागां वेढा घालून, सुरूंग लावून हुडे बुरूज उडविले. फोंड घेतलें. मोहबतखानास कौल देऊन विजापुरास जावयास निरोप दिला. तेव्हां राजियाकडील सरदार इभ्रामखान मुसलमान मोठा धारकरी, लष्करचा हजारी, बरोबरि

होता. त्यानें कष्ट मेहनत बहूत केली. फोंड घेऊन कडवाड, शिवेश्वर, मिरज, अंकोलें, कदरें, सुपें, उडवें हे कोट कोंकणचे कुल घेऊन गोकर्ण महाबळेश्वर, वरघाट सुपें, येथवर सरद लाविली; व गोंवियाचें फिरंगी यांस दबावून त्याजवळून तोफा, नख्त, जडजवाहीर घेऊन, आपलेसे करून, त्यास उदमास कौल देऊन आलम दरफ्फी करावयासि निरोप दिला. असें कुल कोंकण काबीज केलें.

८४. बनसूर 'मारिलें.'

पुढें बिदनुरीं शिवापा नाईक जंगम होता. त्याचें शहर बसनूर म्हणून थोर नामांकित होतें. दर्याकिनारा, येथें पालती पाठवून पालती आणून, वरघाटें जातां मार्ग नाहीं म्हणून पाणियांतील आपलीं जाहाजें आणून सिध्द करून, आपण राजा खासा जाहाजांत बसून जाऊन बसनुरास एकाएकीं दिवस उगवावयासि गेले. शहरचे लोक बेहुशार होते. एकाएकीं जाहाजांतून उतरले. शहर मारिलें. एक दिवस शहर लुटून फन्ना केलें. जैसी सुरत मारून मालमत्ता आणिली, त्याप्रमाणें बसनूरची मत्ता आगणित माल जडजवाहीर कापड जिन्नस घेऊन आपले देशास आले. मत्ता सर्व पाहतां दोन कोटी होनांची आणली.

८५. कारंजे-औरंगाबाद लुटली.

याउपरि कारंजें मोंगलाईंत मोठें शहर होतें तेथून पालती आणून खासा राजियांनीं लष्कर बरोबर घेऊन चालिले. जातां जातां औरंगाबादेची पेठ मारिली. सात गांवची दौड करून जाऊन, कारंजियावरि तीन दिवस मुकाम करून, कुल शहरचे वाडे काबीज करून, मत्त खणती लावून काढली. नक्त, जडजवाहीर, सोनेंरूपें, उंच कापड असे घेऊन स्वारी करून चालिले. मोंगलांचे सुभे जागां जागां दिलेलखान व बाहादूरखान, एखलालखान व बेलोलखान व इंद्रमणी असे उमराव, जागां जागां, कोणी दहा हजार कोणी बारा हजार असे चौतर्फा चालून आले. त्यांशी युध्द करीत भांडत चालिले. मोठें मोठें झुंज करून मोंगल मारून, गर्दीस मेळवून, हत्ती घोडे उंट मालमत्ता पाडाव करून आणिली. आणि कुल गनिमाचे वजीर माघारे नामोहरम होऊन गेले. राजे आपले फौजेनिशीं सुखरूप देशास आले. पाठीवर दिलेलखान बारा हजार स्वारांनिशीं दहा बारा गावें अंतराने भीमातीर पावेतों आला. मग राजे राजगडास [गेले.] मालमत्ता संख्या पाहातां सात कोडीचा आकार जाला.

८६. रायरी- 'तक्तास जागा.'

पुढें रायरीगड अदलशाही होता तो घेतला. राजा खासा जाऊन पाहातां गड बहूत चखोट, चौतर्फी गडाचे कडे तासिल्याप्रमाणें, दीड गांव उंच, पर्जन्यकाळीं कडियावरि गवत उगवत नाहीं, आणि धोंडा तासींव एकच आहे, [असा चखोट.] दौलताबादही पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीनें थोडका. दौलताबादचे दशगुणीं गड उंच. असें देखोन बहूत संतुष्ट जाले आणि बोलिले,

तत्कास जागा गड हाच करावा. असें करारीं करून तेच गडी घर, वाडे, माडिया, सदरा, चौसोपे आणि अठरा कारखाने यांस वेगळाले महाल, व राणियांस महाल, तैशींच सरकारकूनास वेगळी घरें व बाजार, पंच हजारियांस वेगळीं घरें व मातबर लोकांस घरें व गजशाळा व अश्वशाळा व उष्टरखाने पालखी महाल व वहिली महाल, कोठी, थटीमहाल चुनेगच्ची चिरेबंदी बांधिले.

८७. राजारामाचा जन्म

राजियास प्रथम स्त्री संभाजीराजियाची माता होती, ती निवर्तली. त्याजवरि राजियांनी साहा स्त्रिया केल्या. त्यांमध्यें मोहित्यांची कन्या सोईराबाई गरोदर होती. तीस पुत्र जाहला. तो पालथा उपजला. राजियास वर्तमान सांगितलें. राजे म्हणू लागले कीं, “दिल्लीची पातशाई पालथी घालील.” असे बोलिले. मग ज्योतिषी म्हणों लागले कीं, “थोर राजा होईल.शिवाजी राजियाहून विशेष कीर्ती होईल.” असें भविष्य केलें. मग राजियांनी राजाराम म्हणोन नाव ठेविलें. आणि बोलिले कीं, “राजाराम प्रजा सुखी राखील. आपणापेक्षां याचा पराक्रम होईल, नांवाची कीर्त बहूत होईल. आपले नाव रक्षील तर एवढाच रक्षील.” असे बोलिले, आणि दानधर्म बहूत केला.

८८. कोळवण काबीज

पुढें मोरोपंत पेशवे यांनीं त्रिंबकगडापासून सालेरी किल्ल्यापावेतों किल्ले कित्येक घेतले. कितीएक नवे वसविले. असे चाळीस गड नवे कदीम त्यांणीं घेतले. कोळवण काबीज केलें. रामनगर, जवाहीर हा देश घेतला. त्या देशांतही गड वसविले. अशी ख्यात केली.

८९. कणेरागडचे युध्द

हें वर्तमान दिल्लीस पातशाहास सर्वही कळलें कीं, सुरत मारिली, बसनूर मारिलें, बराणपूर, औरंगाबाद मारिली. सालेरी आदीकरून सर्व किल्ले घेतले. खानदेश, बागलाण, गुजरात, वऱ्हाड देश बांधीत चालिले. असें ऐकून बहूत कष्टी होऊन बोलिले कीं, “काय इलाज करावा? लाख लाख घोड्यांचे सुभे रवाना केले ते बुडविले. नामोहरम होऊन आले. आतां कोण पाठवावें? शाहाजादे पाठवावे तरि तिकडेच फितवियांत मिळून दिल्लीच घेतील. याकरितां कोणी पाठवावयास दिसत नाहीं. याउपरि आपण खासा कंबर बस्ती करून शिवाजीवर जावें, तर शास्ताखानाचा न्याय जालियास काय करावें? याकरितां, शिवाजी जोंवर जिवंत, तोंवर दिल्ली आपण सोडीत नाहीं.” असा विचार केला, आणि इखलासखान म्हणजे केवळ शुर व बेलोलखान यांस बोलावून आणून वीस हजार स्वारांनिशीं सालेरीस रवाना केलें. सालेरी घेऊन फस्त करणें. तसें दिलेलखान यांस दाहा हजार स्वारांनिशीं अहिवंत [किल्ल्यावर] रवाना केलें. दिलेलखान येऊन रवळाजवळ्यास लागले. गडकरी बरे भांडले. मोठें युध्द जालें. गड हातास आला नाहीं. मोरोपंत पेशवे यांनीं उपराळियास मावळे लोक बारा हजार रवाना केले. त्यांनीं जाऊन छापे घातले. ऐसा घाबरा केला.

रामाजी पांगेरा म्हणून हशमांचा हजारी [त्यानें] हजार लोकांनिशी कणेरागड आहे. त्याखालें दिलेलखानाशीं युध्द केलें. हजार लोक थोडे देखून दिलेलखान यानें फौजेनिशीं चालून घेतलें. रामाजी पांगेरे यांनीं आपले लोकांत निवड करून, निदान करावयाचें आपले सोबती असतील ते उभे राहाणें, म्हणून निवड करितां सातशें माणूस उभे राहिले. तितकियांनी निदान करून भांडण दिधलें. दिलेलखान याची फौज [इनें] पायउतारा होऊन चालून घेतलें. चौफेरा मावळे लोक वेढिले. एक प्रहर टिपरी जैसी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडिले. दिलेलखानाचें बाराशें पठाण राणास आणिले. मग सातशें माणूस व रामाजी पागेंरा सर्वही उघडे बोडके होऊन एकएकास वीस वीस तीस तीस जखमा तिराच्या, बर्चीच्या लागल्या. लोक मेले. मोठें युध्द जालें. मग दिलेलखान यानीं तोंडात अंगोळी घालून एक घटका आश्चर्य केलें.

९०. सालेरीचा वेढा

त्याजवर इखलासखान नवाब याणीं येऊन सालेरीस वेढा घातला. आणि गडाखालें उतरला. हें वर्तमान राजियास कळोन राजियांनी प्रतापराव सरनोबत लष्कर देऊन मोंगलाईंत पांठविले होते, त्यांस पत्रें व जासूद पाठविलें कीं, “तुम्ही लष्कर घेऊन, सिताबीनें वरघातें सालेरीस जाऊन, बेलोलखानावरि छापा घालून, बेलोलखान मारून चालविणें; आणि कोंकणातून मोरोपंत पेशवे यांस हशमानिशीं रवाना केलें; हे इकडून येतील आणि तुम्हीं वरघाटें येणें; असे दुतर्फा चालून घेऊन, गनिमास मारून गर्दीस मेळविणें.” अशी पत्रें पाठविलीं, त्यावरून प्रतापराव लष्कर घेऊन वरघाटें आले. मोरोपंत पेशवे कोंकणांतून आले. उभयतां सालेरीस पावले. एक तर्फेनें लष्करानीं घोडीं घातलीं. एक तर्फेने मावळे लोक शिरले. आणि मारामारी केली. मोठें युध्द जाहालें. चार प्रहर दिवस युध्द जाहालें मोंगल, पठाण, रजपूत, रोहिले, तोफाची, हत्ती, उंटें आराबा घालून युध्द जाहालें. युध्द होतांच पृथ्वीचा धूराळा असा उडाला कीं, तीन कोश औरसचौरस आपलें व परकें माणूस दिसत नव्हतें. हत्ती रणास आले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहालें. घोडीं, उंट, हत्ती, [यांस] गणना नाहीं. रक्ताचे पूर वाहिले. रक्ताचे चिखल जाहाले त्यामध्यें रुतों लागलें. असा कर्दम जाहाला. मारतां मारतां घोडे जिवंत उरले नाहींत. जे जिवंत सापडले ते साहा हजार घोडे राजियाकडे गणतीस लागले. सवाशें हत्ती सांपडले. साहा हजार उंटें सांपडलीं. मालमत्ता खजीना, जडजवाहीर, कापड, अगणित बिछाईत हातास लागली. बेवीस वजीर नामांकित धरले. खासा इखलासखान व बेलोलखान पाडाव जाले. ऐसा कुल सुभा बुडविला. हजार दोन हजार सडे सडे पळाले. असें युध्द जालें. त्या युध्दांत प्रतापराव सरनोबत व आनंदराव व व्यंकाजी दत्तो व रुपाजी भोंसले व सुर्यराव कांकडे, शिदोजी निंबाळकर व खंडोजी जगताप व गोंदजी जगताप व संताजी जगताप व मानाजी मोरे व विसाजी बल्लाळ, मोरो नागनाथ व मुकुंद बल्लाळ, वरकड बाजे वजीर, उमराव असे याणीं कस्त केली. तसेंच मावळे लोक याणीं व सरदारांनीं कस्त केली. मुख्य मोरोपंत पेशवे व प्रतापराव सरनोबत या उभयतांनीं आंगीजणी केली. आणि युध्द करितां सूर्यराव

कांकडे पंचहजारी मोठा लष्करी धारकरी, याणें युध्द थोर केलें. ते समयीं जंबूरियाचा गोळा लागून पडला. सूर्यराव म्हणजे सामान्य योध्दा नव्हे. भारतीं जैसा कर्ण योध्दा, त्याच प्रतिमेचा असा शूर पडला. वरकडही नामांकित शूर पडले. असें युध्द होऊन फत्ते जाहाली.

९१. दिलेलखान पळून गेला.

हें वर्तमान प्रतापराव यांणीं व मोरोपंत पेशवे यांणीं राजियास पत्रें लिहून जासूद पाठविले. राजियांनीं खबर ऐकून बहूत खुशाल जाले. तोफा मारल्या. साखरा वांटल्या. खबर घेऊन जासूद आले त्यांचे हातीं सोन्याचीं कडीं घातलीं. आणि प्रतापराव सरनोबत व मोरोपंत पेशवे, आनंदराव, व्यंकाजीपंत, यांस बक्षीस अपार द्रव्य दिलें. सरदार हजारी, पंचहजारी लष्करचे, मावळे त्यांस बक्षिसें दिधलीं. नांवाजिलें. वजीर जे पाडाव जाले त्यांस वस्त्रें अश्व देऊन सोडणें म्हणोन हुकूम पाठविला. त्यावरून पेशवे व सरनौबत [व] सरदार खुशाल जाहाले. बेलोलखान व वजीर पाडाव जाले त्यांस वस्त्रें व अश्व देऊन सोडिलें. दिलेलखान सालेरीहून चार मजलींवर होता. त्याणें ही खबर ऐकून माघारा पळोन गेला.

९२. “बहादुरखान पेंडीचें गुरूं आहे.”

ही खबर दिल्लीस पादशाहास कळून बहूत दिलगीर झाले. तीन दिवस बाहेर आले नाहींत. आमखास [मध्ये] तीन दिवस आले नाहींत. असे कष्टी झाले. “खुदानें मुसलमानाची पातशाही दूर करून शिवाजीसच दिधली असें वाटतें. आतां शिवाजी अगोदर आपणांस मृत्यू होईल तरि बरें. आतां शिवाजीची चिंता जिवीं सोसवत नाहीं.” असें बोललें. मग बहादूर कोका, पातशाहाचा दूध-भाऊ. याणें येऊन पातशाहाचे समाधान केलें कीं, “तुम्हीं दिल्लीची पातशाई खुशाल करणें. आपण शिवाजीवरिं जातों. त्यास हालखुद ठेवितों. त्याचें लष्कर पातशाही मुलखांत न ये असें करितों. नाना हुन्नर करून त्यास जेर करितों. पातशाहांनीं फिकीर न करावी.” असें समाधान करून, पातशाहास आणून तख्तावर बसविलें. बहादूरखानास नांवाजून वस्त्रें अलंकार आपले गळ्यांतील पदक व शिरची कलगी जडावाची , दोन हत्ती व घोडे असें देऊन दौलत जाफा दिधली, आणि समागमें सत्तर हजार स्वार दिले. हारोलीस दिलेलखानास हुकूम करून दिल्हा. येणेंप्रमाणें फौज दक्षणेस राजियावर पाठविली. ती मजल दरमजल दिल्लीहून चालिली. राजियास ही खबर बातमी दिल्लीहून आली. राजे बोलिले कीं, “बहादूरखान पेंडीचें गुरूं आहे. त्याचा गुमान काय आहे? त्यास आपले मुलकांत यावयास दोन वर्षे लागतील !” असे बोलिले.

९३. पन्हाळा-रायबाग घेतले.

मग अंणाजी दत्तो सुरनीस यांनीं मालसांवत, मावळे यांचा हजारी, यास सांगून, हल्ला

करून पन्हाळा किल्ला अदलशाही होता तो घेतला, व सातारा, चंदन, वंदन नांदगिरी, परळी असे किल्ले घेतले. राजा खासा किल्ले देश पाहावयास रायरीहून निघोन आले. वांईचा कोट येतांच घेतला. तसाच कोट कऱ्हाडचा घेतला. सिरोळ, कोल्हापूर हे कोट घेतले. हुकेरी रायबागपर्यंत देश घेतला.

९४. कारभाराचे हवाले

मुलूख चौतर्फा सुटला. मुलकांत आटोप कैसा होय? तेव्हां मोरोपंत पेशव्याचा हवाला कल्याण-भिवंडीपासून देखील कोळवण सालेरीपर्यंत वरघाट व कोंकण, त्यांचे स्वाधीन देश केला. लोहगड व जुन्नर देखील बारा मावळें हाराळ्याचे घाटापासून पेशव्याचा हवाला केला. अंणाजी दत्तोचे स्वाधीन चेऊलपासून दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदें, फोंड, कोपलपर्यंत कोंकण अंणाजी सुरनीस याचे स्वाधीन केलें. वरघाट वाईपासून कोपल तुंगभद्रा पावेतों देश नेमून दत्ताजीपंत वाकनीस याचे स्वाधीन केला. दत्ताजीपंतास पन्हाळां ठेविलें. असा देश तीन सरकारकूनांच्या हवालां केला. याखेरीज मोंगलाई येथें सुभेदार ब्राह्मण सातपांच ठेविले. तेही पेशव्याचे आज्ञेंत ठेविले. गड कोट किल्ले येथें सरकारकूनांनी परामर्ष करावा. परंतु किल्लेदार कारकून लोक जे ठेवणें ते राजियांनीं आपले नजरगुजर करून ठेवावे. कामाचा माणूस पाहून तैनात जाजती हशमांस करणें ती सरकारकुनांनी करावी. ये जातीनें तह केला. सरकारकुनांचे मुतालीक राजियाजवळ असावे. वर्षास हिशेब मुलकाचा व रसद घेऊन सरकारकुनांनी राजदर्शनास यावें. येणेंप्रमाणें कारभार करीत चालले.

९५. बेलोलखान शरण

पुढें विजापुराहून अबदुल करीम बेलोलखान बारा हजार स्वारांनिशी इकडे चाल करून आला. तो फौजेनिशीं हिकडे चालला ही खबर राजियास कळोन कुल लष्कर प्रतापराव यास हुकूम करून आणविलें आणि हुकूम केला कीं, “विजापूरचा बेलोलखान येवढा वळवळ बहूत करीत आहे. त्यास मारून फत्ते करणें.” म्हणोन आज्ञा करून लष्कर नबाबावरि रवाना केलें. त्यांनी जाऊन उंबराणीस नबाबास गांठिलें. चौतर्फा राजियाचे फौजेने कोंडून उभा केला. पाणी नाहीं असा जेर केला. युध्दही थोर जाहालें. इतक्यात अस्तमानही जाला. मग निदान करून नबाब पाणियावरि जाऊन पाणी प्याला. त्याजवरि प्रतापराव सरनौबत यास आंतस्त कळविलें कीं, “आपण तुम्हांवरि येत नाहीं. पादशाहाचे हुकमानें आलों. याउपरि आपण तुमचा आहें. हरएक वक्तीं आपण राजियाचा दावा न करी.”असें कितीएक ममतेचें उत्तर सांगोन सला केला. मग राजियाचें लष्कर निघोन गेलें. राजियास खबर कळून लष्करास ताकीद करून फजीत केलें कीं, “सला काय निमित्य केला?” असे रागास आले. पुढें प्रतापराव फौजेनिशीं मोंगलाईंत भागानगरचा देश, देवगड, रामगिरी, बाजे देश

मारून लुटून माघारे आले.

९६. नारोपंतास 'मजुमदारी'

तों राजियाजवळ निळो सोनदेव मजमदार होते. त्यांस एकाएकीं मृत्यू जाहाला. त्यांची मजमदारी त्यांचे पुत्रास सांगावीं असें केलें. त्यांस वडील पुत्र नारोपंत होते ते कांहीं शाहाणे नाहीत. रामचंद्रपंत धाकटे पुत्र, तो शाहाणा. राजियाचा लोभ फार, कीं हा मोठा शाहाणा, दैवाचा, भाग्यवंत, बापापेक्षां लक्षगुणीं थोर होईल. असें म्हणून नारोपंतास मजुमदारी मात्र सांगून हुद्दा चालविला.

९७. प्रतापराव ठार

त्याजवरि मागतीं विजापुराहून बेलोलखान पन्हाळे प्रांतास पादशाहांनीं रवाना केला. तो सदर प्रांतांत आला. त्याजवरि राजियास कळलें कीं, बेलोलखान मागती आला आहे. मग राजे म्हणूं लागले कीं, " हा घडोघडीं येतो." याकरितां मागतीं प्रतापराव यास पाठविलें कीं, "तुम्हीं लष्कर घेऊन जाऊन बेलोलखान येतो, यांशीं गांठ घालून, बुडवून फत्ते करणें. नाहीं तर तोंड न दाखविणें." ऐसे प्रतापराव यास निक्षून सांगून पाठविलें. त्यावरि प्रतापराव जाऊन बेलोलखानाशीं गांठलें. जेसरीवरि नबाब आला. त्यानें गांठिलें. मोठें युध्द जालें. अवकास होऊन प्रतापराव सरनोबत तलवारीचे वारानें ठार जाले. रण बहूत पडिलें. रक्ताच्या नद्या चालिल्या. त्याजवर बेलोलखान विजापुरास गेला. आणि राजियाचें लष्कर पन्हाळ्याखालें आलें.

९८. हंबीररावास 'सरनोबती'

प्रतापराव पडले, ही खबर राजियांनीं ऐकून बहूत कष्टी जाले, आणि बोलिलें कीं, "आज एक बाजू पडली!" प्रतापराव यास आपण लेहून पाठविलें कीं, " फत्ते न करीतां तोंड दाखवूं नये, त्यासारिखें करून बरें म्हणविलें. आतां लष्कराचा बंद कैसा होतो? सरनोबत कोण करावा?" अशी तजवीज करून, आपण स्वस्थ लष्करांत येऊन, लष्कर घेऊन कोकणांत चिपळून जागा परशुरामाचें क्षेत्र आहे, तेथें येऊन राहिले. मग लष्करची पाहाणी करून लहान थोर लष्करास व पायदळ लोकांस खजीना फोडून वांटणी केली, आणि सरनोबतीस माणूस पाहातां हंसाजी मोहिते म्हणून पागेमध्यें जुमला होता; बरा शाहाणा, मर्दाना, सबूरीचा, चौकस, शिपाई मोठा धारकरी पाहून त्यास 'हंबीरराव' नांव किताबती देऊन सरनोबती सांगितली. कुल लष्करचा गाहा करून हंबीरराव यांचे ताबीज दिधलें. आणि फौज [सुध्दां] वरघाटीं रवाना केला.

९९. रघुनाथपंत हणमंते शिवाजीकडे

त्यानंतर शाहाजी राजे पडले. विजापूरचे पादशाहांनीं त्यांची दौलत त्यांचे धाकटे पुत्र

व्यंकाजी राजे होते त्यास दिधली. नारो दीक्षित कुल कारभारी महाराजांचे होते, ते मृत्यू पावले. त्यांचे पोटीं रघुनाथ नारायण व जनार्दन नारायण हे दोघे बंधू, सर्व विद्येनें निपुण व राजकारणी, बुध्दिवंत, चतुर, शाहाणे होते. त्यांचा व व्यंकाजी राजियाचा बनाव बसेना. मग ते उभयतां बंधू त्याजजवळून निघून राजियाकडे आले. येतांच रघुनाथपंत व जनार्दनपंत व बाळकृष्ण चुलतभाऊ व बाळकृष्णपंताचे पुत्र कमळाजीपंत व जनार्दनपंताचे पोटीं गंगाधरपंत म्हणोन सुबुध्द जाले. असे पांचजण व घरचीं माणसें, घोडीं व हत्तीं असें सामान बायकांसहवर्तमान राजियाकडे आले. हे वर्तमान राजियास कळताच राजे सामोरे जाऊन भेट घेतली. वरकडही सरकारकून जाऊन भेट घेऊन सन्मानें आणिले. त्यांस सर्वांस मिळून, देखील घोडीं, चाळीस हजार होन तैनात सालीना करून तनखे वरात देऊन, सरकारकुनांमध्यें श्रेष्ठत्व गौरवें देंऊन, त्यांचें चालवून ठेवून घेतले.

१००. हुसेनखान धरिला.

हंबीरराव लष्कर घेऊन संपगांवास गेले. इतकियांत विजापूरचा सरदार हुसेनखान मायाणा पठाण मोठा तोलदार, पांच हजार पठाण, तिरंदाज, बरचीवाले, आडहत्यारी असे पंचरूस तसे बहिले, बंदुकी, तोफखाना असा होता. हुसेनखान म्हणजे जैसा नबाब बेलोलखान याच्या जोडीचा सरदार. तो हंबीरराव याजवर चालून आला, मराठे म्हणजे मोठे हरीफ, त्यांनीं शर्त करून भांडण दिधलें. नीट ग च ड ते [?] घोडीं घालून मारामारी केली. हुसेंनखानाचे कित्येक लोक मारिले व हत्ती रणास आणिले. मोठे युध्द बळकट दोन प्रहर दिवसापासून चार प्रहर रात्र पर्यंत जालें. साहा प्रहरांत कुल फौज बुडविली. हुसेनखान खासा धरिला. चार साडेचार हजार घोडीं पाडाव केलीं. बारा हत्ती पाडाव केले. तसे उंट व बाजे जिन्नस, बिछाईत, खजीना, व कापड बेमुदिन सांपडलें. मोठें झुंज करून फत्ते केली. रण दुतर्फा अपार पडलें.

१०१. 'कोपल घेतलें'

यानंतर फत्तेची खबर [लिहून] राजियाकडे जासूदाबरोबर पत्रें पाठविलीं. त्यांनीं जाऊन वर्तमान सांगितलें. त्याजवरून राजे बहूत संतोष पावून खुशाल जाले. हुसेनखानाचा भाऊ किल्ले कोपल येथें होता त्याशीं राजकारण मोरोपंत पेशवे यानीं केलें आणि कोपल घेतलें. कोपल म्हणजे दक्षणेचा दरवाजा. तक्ताची जागा. असा किल्ला घेतला. मोठे स्थळ प्राप्त जाहालें. कोपल म्हणजे तुंगभद्रेचे कांठीं. तुंगभद्रा पावेतों देश हस्तगत जाहाला. कोपला-करितां, कनकगिरी, हरपनहल्ली, रायदुर्ग व चित्रदुर्ग व विद्यानगर, बुंदी कोट बाजे पाळेगार [रुजू] जाले. असें कार्य झालें.

१०२. हंबीरराव मोगलाईत

यानंतर पुढें दिल्लीहून बहादूरखान, देखील- हरोल दिलेलखान, हे फौजेनिशीं अहमदनगरास

येऊन राहिले. हें वर्तमान राजियास कळलियावर राजियानीं गड कोट किल्ले यांस खबर केली आणि मजबूतीनें राहिले. मग जासूद पत्रें नबाब बहादूरखान यांजकडे गुप्तरूपें पाठविलीं, "हरद्र सोधावें, पुढें तजवीज करणें ती करावी." असें केलें आणि राजियांनीं आपले लष्करास हुकूम करून, हंबीरराव सरनौबत फौज घेऊन मोंगलाईत शिरले. खानदेश, बागलाण, गुजराथ, अमदाबाद, बऱ्हाणपूर, वऱ्हाड, माहूर वरकड देश नर्मदा पावेतों, देखील- जालनापूर, या देशांत स्वारी करून, मुलूख मारून, खंडणी करून जप्त केला. मालमत्ता अगणित जमा करून चालिले. तों बहादूरखान यांनीं कुल जमाव घेऊन हंबीररायाचे पाठीवर चालून आले. राजियाची फौज तोलदार गांठली. मोंगल बहूत धास्तीनें घाबिरा होऊन सात आठ गांवचे अंतरानें चालिला. दिलेलखान उतावळा होऊन फौजेशीं गांठ घातली. हंबीरराव यांनीं दिलेलखान नजरेंत धरिला नाहीं. तोलदारीनें मत्ता घेऊन आपले देशास आले. मालमत्ता राजियास दिली.

१०३. राजे सिंहासनारूढ

पुढें वेदमूर्ति राजेश्री गागाभट म्हणून वाराणशीहून राजियाची कीर्ती ऐकून दर्शनास आले. भट गोसावी, थोर पंडित, चार वेद साहा शास्त्रे, योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलयुगींचा ब्रह्मदेव, असे पंडित-त्यांस राजे व सरकारकून सामोरे जाऊन, भेट घेऊन सन्मानें आणिलें. त्यांची पूजा नाना प्रकारें रत्नखचित अलंकार, पालखी, घोडे, हत्ती, देऊन द्रव्यही उदंड देऊन पुजिलें. गागाभट बहूत संतुष्ट जाले. भट गोसांवी यांचे मतें, मुसलमान बादशाहा तक्तीं बसून, छत्र धरून, पातशाही करितात, आणि शिवाजी राजे यांनींही चार पादशाही दबाविल्या आणि पाऊण लाख घोडा लष्कर गड कोट असें [मिळविलें] असतां त्यांस तक्त नाहीं, याकरितां मऱ्हाठा राजा छत्रपती व्हावा असें चित्तांत आणिलें. आणि [तें] राजियासही मानिलें. अवघे मातबर लोक बोलावून आणून विचार करितां सर्वांचे मनास आलें, तेव्हा भट गोसांवी म्हणूं लागले कीं, तक्तीं बसावें तेव्हां राजियाचे वंशाचा शोध करितां राजे शुध्द क्षत्री शिसोदे उत्तरेकडून दक्षिणेस एक घराणें आलें, तेंच राजियाचे घराणें असें शोधिलें. उत्तरेचे क्षत्रियांचे व्रतबंध होतात त्याप्रमाणे व्रतबंध करावा. हा विचार आधीं करून भट गोसावी यांनीं राजियाचा क्षेत्री व्रतबंध केला. शुध्द क्षत्रिय आधीं केला. अपार द्रव्य धर्म केला. कुल आपले देशांतून पन्नास सहस्त्र वैदिक ब्राह्मण थोर थोर क्षेत्रींहून मिळाले. तो सर्वही समुदाय राहून घेतला. प्रत्यहीं मिष्टान्न भोजनास घालूं लागले. पुढें तक्तारूढ व्हावें [म्हणून] तक्त सुवर्णाचें, बत्तीस मणाचें, सिध्द करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं त्यामध्यें शोध करून मोठीं मोलाची रत्नें तक्तास जडाव केलीं. जडित सिंहासन सिध्द केलें, रायरीचें नांव 'रायगड' म्हणोन ठेविलें. तक्तास स्थळ तोच गड नेमिला. गडावरि तक्तीं बसवावें असें केलें. सप्तमहानदियांची उदकें व थोर थोर नदियांची उदकें व समुद्रांचीं उदकें, तीर्थ क्षेत्र नामांकित तेथील तीर्थोदकें आणिलीं. सुवर्णाचे कलश केले व सुवर्णाचे तांबे केले. आठ कलश व आठ तांबे यांनीं अष्ट प्रधानांनीं राजियास अभिषेक करावा असा निश्चय करून, सुदिन पाहून

मुहूर्त पाहिला. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मासीं शुध्द १३ स मुहूर्त पाहिला. ते दिवशीं राजियांनीं मंगलस्नानें करून श्री महादेव व श्रीभवानी कुलस्वामी, उपाध्ये प्रभाकर भटाचे पुत्र बाळंभट कुलगुरू व भट गोसांवी, वरकड श्रेष्ठ भट व सत्पुरुष अनुष्ठित यांची सर्वांची पूजा यथाविधी अलंकार वस्त्रें देऊन [केली.] सर्वांस नमन करून अभिषेकास सुवर्ण चौकीवर बसलें. अष्ट प्रधान व थोर थोर ब्राह्मणांनी स्थळोस्थळचीं उदकें करून सुवर्ण-कलशपात्रीं अभिषेक केला. दिव्य वस्त्रें, दिव्य अलंकार घेऊन, सर्व पूज्य मंडळीस नमस्कार करून सिंहासनावर बसले. कित्येक नवरत्नादिक सुवर्ण-कमळें व नाना सुवर्ण-फुलें, वस्त्रें उदंड दिधली. दानपध्द्तीप्रमाणें षोडष महादानें इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्ट खांब जडित केले. त्या स्थानीं अष्ट प्रधानांनीं उभें राहावें. पूर्वी कृतायुगीं, त्रेतायुगीं, द्वापारीं, कलयुगाचे ठायीं पुण्यश्लोक राजे सिंहासनीं बैसले., त्या पध्दतीप्रमाणें शास्त्रोक्त सर्वही साहित्य सिध्द केलें. अष्ट खांबीं अष्टप्रधान उभे राहिले. त्यांचीं नावें बितपशील :-

१ मोरोपंत, त्रिबंकपंताचे पुत्र, पेशवे, मुख्य प्रधान.

१ नारो निळंकठ व रामचंद्र निळकंठ मुजुमदार, यांचे नांव अमात्य.

१ अण्णाजीपंत सुरनीस, यांचे नांव सचिव.

१ दताजी त्रिंबक वाकनीस, यांचें नांव मंत्री.

१ हंबीरराव मोहिते, सेनापती.

१ त्रिंबकजी सोनदेव डबीर, यांचे पुत्र रामचंद्रपंत, सुमंत.

१ रावजी पण्डितराव होते त्यांचे पुत्रास रायजीराज.

१ निराजी रावजी यास न्यायाधिशी.

येणेंप्रमाणें संस्कृत नांवें ठेविलीं. अष्ट प्रधानांची नांवें ठेविलीं. ते स्थळें नेमून उभे केले. आपापले स्थळीं उभे राहिले. बाळ प्रभू चिटनीस व नीळ प्रभू पारसनीस वरकड अष्ट प्रधानांचे मुतालिक व हुजरे, प्रतिष्ठित सर्वही यथाक्रमें पध्दतीप्रमाणें सर्वही उभे राहिले. छत्र जडावाचे मोतीलग झालरीचे करून मस्तकावर धरिलें. छत्रपती असें नांव चालविलें. कागदीं पत्रीं स्वस्तिश्री [राज्याभिषेक] शक, सिंहासनावर बसले त्या दिवसापासून नियत चालविला.पन्नास सहस्त्र ब्राह्मण वैदिक मिळाले. या वेगळे तपोनिधी व सत्पुरुष, संन्यासी, अतिथी, मानभाव, जटाधारी, जोगी, जंगम नाना जाती मिळाले. तितक्यांस चार मास मिष्टान्न उलफे चालविले. निरोप देतां पात्र पाहून द्रव्य, अलंकार, भूषणें, वस्त्रें अमर्याद दिधलीं. गागाभट मुख्य अध्वर्यू, त्यांस अपरमित द्रव्य दिलें. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेचाळीस लक्ष होन जाले. अष्ट प्रधानांस लक्ष लक्ष होन बक्षीस दर असामीस, त्याखेरीज एक एक हत्ती, घोडा, वस्त्रें, अलंकार, असें देणें दिलें. येणें प्रमाणें राजे सिंहासनारूढ जाले. या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशाहा. हा मऱ्हाटा पातशाहा येवढा छत्रपती जाला. ही गोष्ट कांही सामान्य जाली नाहीं.

१०४. पातशाहाचा खेद.

हीं वर्तमानें बहादूरखान कोका यासि कळलीं. त्यानें पुढें पेडगांव भीमातीर येथें घेऊन छावण्या केल्या. आणि दिल्लीस पातशाहास हें वर्तमान, सिंहासनाचें लिहिलें. पातशाहास कळून तक्तावरून उतरून अंतःपुरांत गेले. आणि दोन्ही हात भुईस घासून, आपले देवाचें नांव घेऊन परम खेद केला. दोन दिवस अन्न उदक घेतलें नाहीं. आणि बोलिले कीं, “खुदानें मुसलमानाची पादशाई दूर करून, तक्त बुडवून मराठियास तक्त दिलें. आतां हद्द जाली ! ” असो, बहूत खेद, दुःखाचे पर्वत मानिले. मग मोठे मोठे वजिरांनीं नानाप्रकारें समाधान करून आणा खुणा घालून तक्तावर बसविलें. ऐसेंच विजापूरचे पातशाहास व भागानगरचे पातशाहास वरकड सर्वांस वर्तमानें कळून खेद जाहाला. रूमशाम, इराण, दुराण व दर्यांतील पातशाहांस खबर कळून मनांत खेद करूं लागले. खेद करून आशंका मानिली. ये जातीचें वर्तमान जाहालें.

१०५. भागानगर-भेटीचा विचार

पुढें राजे तक्ती बसून राज्यकारभार करूं लागले. निजामशाही देश काबीज केला. मोंगलाईही जप्त केली. भागानगरच्या बादशाहांनीं राजे यांशी सल्ला करून, निराजीपंताचे पुत्र प्रल्हादपंत मोठे बुध्दिवंत यांस हेजिबीस ठेवून घेऊन, कारभार राजियास देऊन स्नेहांत मिळाले. वरकड किरकोळीं राज्यें होतीं तीं घेतलीं. कितीएकांनीं कारभार देऊन अंकित होऊन राहिले. तुंगभद्र देशापासून कावेरीपर्यंत कर्नाटक साधावें, हा बेत मनांत धरिला. त्यास लष्कर पाठवून साधावें, तरि दिवसगतीवर पडतें. म्हणून खुद्द राजियांनीं आपण जावें असें केलें. त्यास पेडगांवीं बहादुरखान गनीम पाठीवर येईल म्हणून निराजीपंत न्यायाधीश पाठविले. कित्येक द्रव्य अलंकार [भूषणें] रत्नखचित पाठविलीं. त्यास अंतरंगे सख्य [करून] “ एक वर्षपर्यंत आपणास कर्नाटक साधावयास लागेल, तुम्हीं राज्यास उपद्रव न करणें,” असें सांगून ठायीं ठेविलें. आणि कर्नाटकास जावयास समागमें निवडून पागे पतके पंचवीस हजार स्वार व सरकारकून रघुनाथ नारायण व जनार्दन नारायण हे कर्नाटकचे माहितगार यांस बरोबर घेतलें. वरकड पेशवे व सुरनीस व वाकनीस वरकड लष्कर राज्यास रक्षणास ठेविलें आणि विचार केला कीं, “कर्नाटक साधावयास द्रव्य लागेल त्यास खजिन्यांतील द्रव्य वेंचू नये. नूतन मिळवावे आणि वेंच करून देश साधावा.” असा विचार करितां भागानगरचे पातशाहीत द्रव्य उदंड आहे. तेथें निष्ठुरता करून द्रव्य मेळवावें, तरि वर्षास करभार भागानगरकर देतात. तेथें निष्ठुरता करू नये. सख्य करून त्यांची भेट घ्यावी. भेटीनंतर सर्वही अनुकूल करून देतील. असा विचार करून भागानगरीं प्रल्हादपंत हेजीब राजियाचे होते त्यांसि हें वर्तमान लिहून भेट घ्यावी हा विचार केला. तानाशाहा पातशाहा भागानगरकर यांनीं मनात बहूत शंका धरिली कीं, “जैसा अफजलखान बुडविला, कीं शास्ताखान बुडविला, दिल्लीस जाऊन अलमगरि पातशाहास पराक्रम दाखविला, ऐसा एखादा अनर्थ जाहाला तर काय करावें? भेट मात्र राजियाची न घ्यावी. जे मागतील तें देऊं.” असें बोलिला. मग पातशाहाशीं व अकंण्णापंत व मादंणापंत कारभारी यांशीं प्रल्हादपंतें आण, शपथ, क्रिया बहूत दिधल्या. अपाय नाहीं. स्नेहाची

भेट घेऊन जातील, अशी बळकटी केली.

१०६. राजे भागानगरास

येणेंप्रमाणें राजियाशी घटाई केली. उभयतांच्या भेटी व्हाव्या ऐसा नेम करून मग राजे मजल दरमजल लष्कर घेऊन भागानगरास चालिले. भागानगरची विलायत लागल्यावर ताकीद केली. एक काडी रयतेची तसनस न व्हावी ऐसें केलें. कित्येक गर्दांना मारून जाबता बसविला, आणि मजलीस जाऊन तेथें खुष-खरेदी सर्व पदार्थ घेऊन चालिले. लूट नाहीं. असे जातां पुढें पातशाहास खबर कळून बहूत संतुष्ट जाहाला. पातशाहा पुढें दोन चार गांव सामोरे यावे असें केलें. राजा मोठा साधक, आण घालून पातशाहास सांगून पाठविलें कीं, “तुम्हीं न येणें. आपण वडील भाऊ मी धाकटा भाऊं. आपण पुढें न यावें.” असें सांगून पाठविल्यावरि पातशाहा बहूत संतुष्ट जाहाले. आणि मादंणापंत व अकंणापंत म्हणजे बजया पातशाहा, सर्व पातशाही [मध्यें] धणी, हे उभयतां पुढें येऊन, राजियास घेऊन शहरास गेले. राजियांनीं आपले लष्करास कुल जरी सामान केलाच होता. सुमुहूर्त पाहून पातशाहाचे भेटीस नगरामध्यें चालिले. पातशाहांनीं कुल नगर श्रृंगारिलें. चौफेरी बिदीस कुंकुमकेशराचे सडे रंगमाळा घातल्या. गुढिया, तोरणें, पताका, निशाणें नगरांत लाविलीं. नगर-नागरिक लोक कोट्यानकोटी राजा पाहावयास उभे राहिले. नारींनीं मंगलआर्त्या अगणित उजळून राजियास वंदिलें. सोनें-रुपियाचीं फुलें राजियावरि उधळलीं. राजियांनीं लोकांस खैरात द्रव्य वस्त्रें अगणित दिलीं, आणि सर्व सैन्यासहित दादमहालास पावले. पातशाहास “खालतें उतरूं नका, आपण खासा येतों” म्हणून शफत घालून सांगून पाठविलें. पातशाहा महालावरि राहिले. राजियांनीं आपले लष्करचे लोक कंबरबंदी करून महालाखालीं बसविले आणि शिडीवरून चालिले. खासा राजा व जनार्दन नारायण व प्रल्हादपंत व सोनाजी नाईक दौलतबंदकी व बाबाजी ढमढेरे पांचजण चढलें. महालांत गेले. पादशाहा पुढें येऊन क्षेम आलिंगन केलें. उभयतां एकासनीं बसलें. मादंणापंत व अकंणापंत व जनार्दनपंत, प्रल्हादपंत, सोनाजी नाईक बंकी व बाबाजी ढमढेरे असे होते. पादशाहा व राजे व मादंणापंत त्रिवर्ग बसले, वरकड उभे राहिले. उभयतांचा स्नेह अतिशय. बोलणें जालें. पातशाहाच्या स्त्रिया झरोकियांतून जाळपालांतून राजा पाहातां बहूत थक्क जाहाल्या. पादशाहाही बहूत खुशाल जाहाले. एक प्रहर बसून राजियाच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकिल्या. कित्येक अलंकार रत्नजडित व वस्त्रें, हत्ती, घोडे राजियास व राजियाकडील लोकांस सर्वांस देऊन निरोप दिला. राजे व पातशाहा महालाखालीं येऊन राजे आपल्या स्थळास चालिले.

१०७. पादशाहाचे समाधान

महालाखालीं रघुनाथपंत व हंबीरराव वरकड सरदार लष्कर ठेविले होते, त्यांसही समागमें

घेऊन आपले जागियास आले. मार्गी येतां नगर लोकांस खैरात केली. राजे उठोन गेलियावरि पादशाहाचें समाधान जालें कीं, राजा प्रामाणिक, आपल्यास रक्षिलें, क्रिया जतन केली. ऐसें आश्चर्य मानून प्रल्हादपंतास कित्येक बक्षिसें पादशाहांनीं दिलीं कीं, तुम्ही प्रामाणिक, [असें] म्हणून नांवाजून राजियाकडे पाठविलें.

१०८. "तुम्हीं सहाय असावें."

दुसरे दिवशी मादंणापंतीं राजियास आपले घरास मेहमानीस नेलें. आणि आपले मातोश्रीचे हातीं पाक सिध्द करून मादंणापंत व अकंणापंत जवळ बसून राजियास भोजन घातलें. वरकड राजियाकडील समुदाय होता त्यासही भोजनास घातलें. आणि अलंकार, वस्त्रें, हत्ती, घोडीं देऊन स्थळास पोहोंचविलें. पातशाहांनीं मादंणापंतास बोलावून नेऊन विचारलें कीं, "राजियास काय पाहिजे तें देऊन, राजियास संतुष्ट करून निरोप द्यावा." असा विचार करून सुमुहूर्त पाहून मागती राजे भेटीस आणिले, आणि जडजवाहीर रत्नाचे अलंकार, हत्ती, घोडे अपरमित दिधले. कुल सरकारकून व हंबीरराव व वरकड सरदार यांचे मुजरे महालावरि उभयतां छत्रपती बैसून, मुजरे घेऊन, सरदारांचे पराक्रम नांव पाहून, सर्वांस अलंकार, वस्त्रें, हत्ती, घोडे, मनुष्य पाहून दिधले. आणि पातशाहा बोलिले कीं, "सर्वांप्रसंगी आपणांस तुम्हीं सहाय असावें." ऐशी बळकटी करून, राजियाची आण शपथ घेऊन निरोप दिला. प्रतिवर्षी करभार जो देणें तो येणेंप्रमाणें देऊन, प्रल्हादपंत नेहमीं आपणाजवळ ठेऊन आपले निजबतीनें आमचेजवळ असो देणे, ऐसें बोलिले. राजे आपले स्थळास आले.

१०९. राजे श्रीशैल्यास

त्याउपरि, राजियास भागानगरचे मोठमोठ्या सरदारांनीं मेहमान्या केल्या. ऐसे एक महिनाभर भागानगरीं होते. तेथीलद्रव्य वस्तभाव घेऊन चंदीकडे सेनासमुदाय घेऊन चालिले. मग श्रीशैल्यास आले. नीळगंगेचे स्नान करून श्रीचें दर्शन जालें. तीर्थविधी जाला. राजियांनीं स्थळ देखोन परम आनंद जाला कीं, केवळ कैलास दुसरें, असें स्थळ वाटलें. तेथें हें देह श्रीस अर्पण करावें, शिरकमल वाहावें, ऐसें योजिलें. [ते] समयीं श्रीभवानी अंगांत आविर्भवली आणि बोलिली जे, "तुज ये गोष्टी मोक्ष नाहीं. हें कर्म करूं नको. पुढें कर्तव्यही उदंड तुझे हातें करणें आहे." असें सांगून श्री गेली. हें वर्तमान सावध जाल्यावरि राजियास कारकुनांनीं सांगितलें. मग श्रीस शिरकमल वाहावें हा विचार राहिला.

११०. चंदीस वेढा

पुढें कर्नाटकचा देश साधावा म्हणोन चंदीस वेढा घेतला. चंदीमध्यें खानखान विजापूरकरांचा वजीर याचे पुत्र रुपलखान व नासरीखान हे उभयतां होते. त्यास राजकारण करून,

त्यास कौल देऊन बाहेर काढिलें आणि स्थळ साध्य केलें. त्रिमल महाल म्हणून आहे तेथें शेरखान विजापूरचा वजीर पाच हजार स्वारांनिशी होता. पठाण तोलदार, हत्ती सामान द्रव्य अगणित होतें. तो राजावर चालून आला. त्याशीं युध्द करून त्यास बुडविला. जिवंत खासा शेरखान धरिला. पांच हजार घोडे व बारा हत्ती पाडाव केले. द्रव्य जवाहीरही अपार हस्तगत जाले. मोठें युध्द केलें. असें कर्म करून त्रिमल महाल फत्ते केला.

१११. शिवाजी-व्यंकोजी भेट

त्या उपरि राजश्री व्यंकाजी राजे, धाकटे भाऊ राजियाचे, यांनीं चंदावरचे राज्य साध्य करून राज्य करीत असत. त्यांनीं आपले कारकून होते ते समागमें घेऊन राजियाचे भेटीस आले. भेट बंधूबंधूंची जाली. एकाजी राजाचे कारकून काकाजीपंत पेशवे भेटले व कोन्हेर महादेव मुजूमदार भेटले, जगंनाथपंत, व्यंकाजी दत्तोचे पुत्र, सर्व सैन्य भेटलें व भिवजी राजे व प्रतापजी राजे नाटकशाळेचे पुत्र महाराजांचे होते, तेही भेटले. बहूत संतोष जाला. उभयतां बंधूंची मेहमानी परस्परें जाली. देणेंही उभयतांनी उदंड दिलें. आठ दिवस एकत्र होते. मग राजियांनीं व्यंकाजी राजे यांसि प्रश्न केला कीं, “महाराज तुमचे आमचे पिते. आपण त्यांजकडून निरोप घेऊन पुण्याकडे जाऊन येवढें राज्य साधिलें. कीर्त केली. ऐशियासि वडिलांची बारा बिरदें तुम्हांजवळ आहेत. तीं तुम्ही चालवीतच आहां. ऐशियास आपण वडील पुत्र आणि पराक्रमी, तुम्हांहून पराक्रम विशेष केला. बारा बिरदें मात्र तुम्हांजवळ आहेत तीं आपणास देणें. आपण चालवूं. नवीं बिरदें करावयाची काय आशंका आहे? परंतु वडिलाचीं हातचीं आहेत तेवढीं आपणाजवळ असावीं म्हणून मागितली.” त्याजवरून त्यांनी विकल्प चित्तांत आणून दिलीं नाहीत. त्याजवर एकाजी राजे यांच्या कारकूनांनी व कारभारी यांनीं त्यांचे पोटात भय घातलें कीं, राजे तुम्हांशीं खटखट करून बिरदें जोरावारीनें घेतील असें सांगून, त्यास धास्त उत्पन्न करून रात्रीचें वेळेस व्यंकाजी राजे पळून चंदावरास बिरदें घेऊन गेलें.

११२. राजे देशी.

त्यास दुसरे दिवशीं राजियास वर्तमान कळलें कीं, व्यंकाजी राजे पळून गेले. त्याजवरून आश्चर्य केलें कीं, “काय निमित्य पळाले? आम्ही त्यांस धरीत होतों की काय? आम्हांस बिरदें काय करावयाचीं? आमची बिरदें अष्ट दिशेस लागलीं आहेत. समुद्रवलयांकित भूमंडळी कीर्त आपली जाली आहे. तेथें बिरदें काय करावयाची? वडलांची वस्त असावी म्हणून मागितलीं होतीं. पळावयाचें नव्हतें. द्यावयाचीं नव्हतीं तरि न देणें. उगेच उठून पळून गेले. अति धाकटे ते धाकटे, बुध्दीही धाकटेपणा योग्य केली.” असें बोलिले. मग त्यांचें कारकून व सरदार पळत होते ते राजियाचे लोकांस सांपडले. त्यांस धरून आणिलें. मग त्या अवघियांस वस्त्रें भूषणे, अश्व देऊन

चंदावरास बंधूसंनिध पाठविलें. संताजी राजे म्हणून महाराजांचे नाटकशाळेचे पुत्र होते. ते शूर पराक्रमी होते. ते राजियाच्या भेटीस आले. भेट जाली. त्यांस कर्नाटकांत घोड्यांची दौलत दिधली. महाल मोकाशे दिले. हत्ती, घोडे, वस्त्रें देऊन रवाना केले. आणि येळूरकोट यामध्यें इदलशाई ठाणें होतें. तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाहीं. कोटांत जीत पाणियाचा खदंक. पाणियास अंत नाही असें. उदकांत दाहा हजार सुसरी. कोटाचे फांजियावरून दोन गाडिया जोडून जावें ऐशी मजबूती. पडकोट तरि चार चार फेरियावरि फेरे. ये जातीचा कोट. त्या कोटास वेढा घालून कोट घेतला. वरकडही जागां जागां गढी कोट घेतले. कित्येक नवे बसविले. असे शंभर कोट त्या प्रातीं केले. वीस लक्ष होनांचे राज्य साध्य केले. चंदी म्हणजे जैसें विजापूर, भागानगर, तैसाच तक्ताचा जागा. येथें राजियांनीं राहावें. परंतु इकडेही राज्य उदंड. त्याचें संरक्षण जालें पाहिजें.याजकरितां चंदीस रघुनाथ नारायण ब्राह्मण त्यास मजमू संपूर्ण राज्याची सांगितली. आणि त्यास तो प्रांत स्वाधीन करून चंदीस ठेविलें. आणि राजियांनीं आनंदराव व मानाजी मोरे हे दोघे सरदार फौजेनिशीं बराबर घेऊन चंदीहून निघाले. घाट चढून वरतें आले. कोल्हार, बाळापूर हे कोट घेतले. देश काबीज केले. कित्येक गड वसविले. पुंडपाळेगार मारून गर्दीस मिळविले. त्या प्रांती रंगो नारायण म्हणून कारकून सरसुभेदार ठेविले. तोही प्रांत रघुनाथपंतांचे स्वाधीन केला. कोल्हार प्रांतें मानाजी मोरे सरदार फौजेनिशी ठेविले. आनंदराव राजियांनीं बराबर घेऊन कोपलास आले. तेथून लक्ष्मेश्वरास आले. तेथून मजल दरमजल संपगांव प्रांतीं आले. बलवाडा म्हणून कोट होता. तेथे देसाईण बायको होती. तिनें राजियाचे लष्करचे कहीकाबाडी बैल नेले. हें वर्तमान राजियास कळलें. बलवाडास वेढा घातला. कोट घेऊन देसाईण धरिली. तीस शिक्षा केली. मग पुढें पन्हाळियास आले. आणि राज्याचाही परामृष केला. मग राजे आले हें वृत्त सर्वांस कळलें. त्याजवरून निराजीपंत बहादुरखानाजवळ ठेविले होते, तेही दर्शनास आले, व खानांनीहीं जडजवाहीर, वस्त्रें राजियासि पाठविली.

११३. व्यंकोजीशी सला

त्या उपरि, कर्नाटकांत हंबीरराव फौजेनिशीं व रघुनाथ नारायण ठेविले होते हें वर्तमान व्यंकाजी राजे यांस कळोन राजियांनीं आपली फौज व पाळेगारांची फौज मिळविली, आणि हंबीरराव यावरि चालून आले. ते समयीं हंबीरराव याचे चौगुणी घोडा राऊत हशम अगणित व्यंकाजी राजे यांचे होते. मग यांस त्यांस युध्द जालें. मग राजियाचा पुण्य प्रभाव आधिक आणि भाग्योदय, हंबीरराव यांनीं व्यंकाजी राजियाची फौज मोडली. मोठें युध्द जाहालें. अगणित रण पडलें. आणि व्यंकाजी राजियाचे चार हजार घोडे पाडाव केले. व हत्ती जड जवाहीर बाजे सरदार भिवजीराजे व प्रतापजी राजे वरकडही नामांकित लोक पाडाव केले. अशी फत्ते केली. यश आलें. आणि पाडाव केले. सरदारांस वस्त्रें देऊन सोडिलें. यावरि रघुनाथपंत व हंबीरराव चालोन चंदावराकडे गेले. मग व्यंकाजी राजे यांनीं सभ्य मनुष्य मध्यस्त घालून सख्य करावें असें जालें.

त्याजवर रघुनाथपंतीं व हंबीररायांनीं राजियाकडे जासूद पत्रें देऊन पाठविलें. मग राजियास वर्तमान कळोन या उभयतांस उत्तर पाठविलें कीं, "व्यंकाजी राजे आपले धाकटे बंधू आहेत. मूलबुध्दी केली. त्यांस तोही आपला धाकटा भाऊ, त्यांस रक्षणें, त्याचें राज्य बुडवूं नका." अशीं उत्तरें आलियावरि उभयतांनीं व्यंकाजी राजे यांशी सला केला. आणि द्रव्यही उदंड घेतलें. मग रघुनाथपंतीं हंबीरराव यास लष्कर सहवर्तमान निरोप देऊन राजियाकडे पाठविलें. आणि रघुनाथपंत आपण तिकडे कर्नाटकांत फौज दहा हजार स्वार पागा व शिलेदार जमा करून तें राज्य रक्षून राहिले.

११४. जालनापूरास वेढा

हंबीरराव याची व राजियाची भेट जाहाली. कित्येक नांवाजिलें. बक्षिसें दिलीं. आणि पुढें खासा राजियांनीं अवघें लष्कर घेऊन जालनापूर मोंगलाईत त्यास वेढा घातला. पेठा मारिल्या. शहर लुटून फन्ना केलें. अगणित द्रव्य, सोनें रुपें, जडजवाहीर, कापड, घोडे, हत्ती, उंटें फस्त केलीं. मोंगलांचीं फौज [घेऊन] रणमस्तखान चालोन आला. युध्द जालें. सिदोजी निंबाळकर राजे याजकडील पांच हजार फौज, तीन दिवस युध्द केलें. रणमस्तखान यासि कैद करून आणिला. त्यासि बुडवावें तों त्याचे कुमकेस केसरसिंग व सरदारखान व बाजे उमराव असे वीस हजार फौज तीन कोसांवर राहिली. मग केसरसिंग यानें अंतरंगें सांगून पाठविलें कीं, उभयपक्षी भाऊपणा आहे. आमची गांठ पडली तोंवर तुम्हीं नाहीं कूच करून जाणें. हें वर्तमान कळतांच राजे तेथुन निघाले. लष्कर, जडगिरी मार्गाने जावें अशी तजवीज केली. ते समयीं बहीरजी जासूद यानें कबूल केलें कीं, "मोंगलांची गांठ न पडतां लष्कर घेऊन ठिकाणास जातों. साहेबीं फिकीर न करणें." तीन रात्री खपोन रात्रंदिवस अवकाश न करितां पावगड येथें लष्कर घेऊन आला. राजे बहिरजी नायकावर खुशाल झाले. त्याजकडे फाजील होतें तें माफ करून आणखीही बक्षीस दिलें. तेथून सावकास लष्कर घेऊन राजे पुरंदरास आले.

११५. संभाजी दिलेलखानाकडे

इतकियांत संभाजीराजे राजियांचे पुत्र ज्येष्ठ राजियावर रुसून मोंगलाईत गेले. ते जाऊन दिलेलखानास भेटले. मग त्यांनीं बहूत सन्मान करून चालविलें. पातशाहास दिल्लीस दिलेलखानांनीं लिहून पाठविलें कीं, "राजियाचा पुत्र संभाजी राजा रुसून आपणाजवळ आला आहें. त्यास गौरव करून आम्हीं ठेवून घेतला आहे. तर पादशाहांनीं मेहरबान होऊन त्यांस नांवाजावें म्हणजे राज्यांत दुई होईल. राज्यांतील लष्कर उठोन आपोआप येईल आणि किल्ले कोट साधतील." म्हणून लिहिलें. त्याजवरून पादशाहांनीं विचार केला कीं, "राजियाचा पुत्र आला आहे, त्यास नांवाजितां पातशाहींत फितवा करून पातशाही बुडवितील. नांवाजू नये. हुजूर आणून कैदेंत ठेवावा." ऐसा विचार करून दिलेलखानास लिहून हुकूम पाठविला कीं, संभाजी राजियास घेऊन

हुजूर येणें. असें लिहिलें. तों अगोदर दिलेलखानाचा वकील पातशाहाजवळ होता, त्यानीं हें वर्तमान खानास लिहून पाठविलें. तें वर्तमान खानास कळतांच संभाजी राजियास सुचना करून पळविलें. ते पळून पन्हाळियास आलें. हें वर्तमान राजियास पुरंधरास कळतांच संतोष पावून पुत्राचे भेटीस पन्हाळियास आलें. मग पितापुत्राची भेट जाहाली. बहूत रहस्य जाहालें. त्या उपरि राजे म्हणूं लागले कीं, "लेंकरा, मला सोडूं नको. औरंगजेबाचा आपला दावा. तुजला दगा करावयाचा होता, परंतु श्रीनें कृपा करून सोडून आणिला. थोर कार्य जालें.आतां तूं ज्येष्ठ पुत्र थोर जालास, आणि सचंतर राज्य कर्तव्य हें तुझ्या चित्तीं आहे असें आपणास कळलें. तर मजला हें अगत्य आहे. तरि तुजलाही राज्य एक देतों. आपले पुत्र दोघेजण एक तूं संभाजी व दुसरा राजाराम. ऐसियास हें सर्व राज्य आहे, यास दोन विभाग करतों. एक चंदीचे राज्य, याची हद्द तुंगभद्रा तहद कावेरी हें एक राज्य आहे. दुसरें तुंगभद्रा अलीकडे गोदावरी नदीपर्यंत एक राज्य आहे. ऐसीं दोन राज्यें आहेत. त्यास तूं वडील पुत्र, तुजला कर्नाटकीचें राज्य दिधलें. इकडील राज्य राजारामास देतों. तुम्हीं दोघे पुत्र दोन राज्यें करणें. आपण श्रीचें स्मरण करून उत्तर सार्थक करीत बसतों." असें बोलिले. तेव्हां संभाजी राजे बोलिले कीं, "आपणास साहेबांचे पायांची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायांचें चिंतन करून राहीन." असें उत्तर दिधलें. आणि राजे संतुष्ट जाहाले. मग पिता पुत्र बैसून कुल राज्य आपलें देखिलें. कर्नाटक किती आहे व खजीना काय आहे व मुत्सद्दी सरकारकून काय काय? गड कोठें? किती? हशम काय? समुद्रांतील जंजिरे, पाणियांतील जाहाजें किती? इसमांचा आकार केला. बितपशील:- कारखाने अठरा व महाल मुलूख नाना जिन्नसवार संख्या करणें तो केला. बितपशील:-

११६. राज्याची मोजदाद

अठरा कारखाने

१ खजीना. १ जव्हाहीरखाना. १ अंबारखाना. १ शरबतखाना. १ तोफखाना. १ दफ्तरखाना. १ जामदारखाना. १ जिरातखाना. १ मुदबखखाना. १ उष्टरखाना. १ नगारखाना. १ तालीमखाना. १ पीलखाना. १ फरासखाना. १ आबदारखाना. १ शिकारखाना. १ दारूखाना. १ शहतखाना.

बारा महाल

१ पोते. १ सौदागीर. १ पालखी. १ कोठी. १ इमारत. १ वहिली. १ पागा. १ सेरी १ दरुनी. १ थट्टी. १ टंकसाल १ छबीना.

खजीना नाणेंवार व कापड जिन्नसवार बी॥

सुवर्ण --नाणें

१००००० गंबार एक लक्ष. २००००० मोहरा दोन लक्ष. ३००००० पुतळ्या तीन लक्ष. १३६४४२५

पातशाही होन. १००००० सतलाम्या एक लक्ष. १००००० इमराम्या एक लक्ष. ४००००० शिवराई होन. १५००००० कावेरी पाक [होन.] १२७४६५३ सणगरी होन. २५४०३० अच्युतराई होन. ३००४५० देवराई होन. १००४०० रामचंद्रराई होन. १००००० गुती होन. २००००० धारवाडी होन. ३००००० फलम नाणेवार. २००००० प्रलखटी [?] होन. १००००० पाक व नाईकी होन. ३००००० आदवणी होन. ५००००० जडमाल होन. १४०००० ताडपत्री होन. १००००० साधें सोनें नग कांबी, वजन खंडी १२॥.

पुरवणी होनांची नांवें (फलम याचे पोटीं)

१ अफरजी. १ त्रिवाळुरी. १ त्रिसुळी. १ चंदावरी. १ बिलघरी. १ उलफकरी. १ महमदशाई. १ वेळुरी. १ कटेराई. १ देवजवळी. १ रामनाथपुरी. १ कुनगोटी.

रुपये--------------------------------------जड जव्हाहीर

५००००० रुपये. २००००० आसरपद्या. १०००००० आबाशा. २५००००० दाभोळी कबरी. १०००००० चुली कबरी. ५००००० बसरी कबरी. १०००००० रुपें साधें व मीनगारी व भांडीं नग वजन खंडी ५०. [जवाहीर] १ माणकें. १ पांच. १ वैडूर्ये. १ नीळ. १ पैराज. १ मोतीं. १ पोवळें. १ पुषकराज. १ हिरे. एकूण ९

कापड जरी व साधे व रंगाचे व खुमास जिन्नसवार छपन्न देश व दर्यावरील अजमासें किंमत होन १,००,००,००० ५०,००० निशाणी होन.	। । } । ।	धान्य संग्रह, रस संग्रह, अगणित होता. कोठार व देशांत अमर्याद होतीं.--- कलम एकूण चंद्रमे संख्या २५००५०० ५००००० येळूरी होन.

घोडे-राऊत संख्या पागा सिलेदार १,०५,००० एक लक्ष, पांच हजार तपशील.

पागा ४५,००० यांचे सरदार. नांवें :

१ हंबीरराव सरनौबत. १ संभाजी घोरपडे. १ मानाजी मोरे. १ येसाजी काटकर. १ संताजी जगताप. १ निंबाजी पाटोळे. १ जेतोजी काटकर. १ परसोजी भोसले. १ गणोजी शिरके. १ बाळोजी काटकर. १ निळोजी काटे. १ नेतोजी पालकर. १ तुकोजी निंबाळकर. १ गोंदजी जगताप. १ संभाजी हंबीरराव. १ धनाजी जाधव. १ शामाखान. १ वाघोजी शिरके. १ हरजी निंबाळकर. १

भवानराव. १ आनंदराव हशमहजारी. १ तेलंगराव. १ रुपाजी भोंसले. १ व्यंकटराऊ खांडकर. १ खंडोजी जगताप. १ उदाजी पवार. १ रामजी कांकडे. १ कृष्णाजी घाडगे. १ सावजी मोहिते. – एकूण २९.

शिलेदार व मुलखींचे सुभेदार:-

१ नागोजी बल्लाळ. १ गणेश शिवदेव. १ चंदो हिरदेव. १ नेमाजी शिंदे. १ रामाजी भास्कर. १ बयाजी गडदरे. १ बाळाजी निळकंठ. १ हिरोजी शेळके. १ त्रिंबक विठ्ठल. १ महादजी नारायण. १ बाळोजी शिवतरे. १ जानराव वाघमारे. १ संक्रोजी माने. १ अमरोजी पांढरे. १ रामाजी जनार्दन. १ मुधोजी थोरात. १ कृष्णाजी भांदडे. १ बहिरजी वडगरे. १ चंदो नारायण. १ खेमणी. १ खंडोजी आटोळे. १ राघो बल्लाळ १ बळवंतराव देवकांते. १ बहिरजी घोरपडे. १ मालोजी थोरात. १ बाळाजी बहिरव. १ देवाजी उघडे. १ गणेश तुकदेव. १ केरोजी पवार. १ उचाले. १ नरसोजी शितोळे.

हत्ती व हत्तीणी, छावे सुमार	पाणियांतील जहाजें	जहाजें आरमारचे सरदार,
१२६०	१ दर्यासागर (दर्यासांरग?)	१ इब्रामखान. १ मायनाईक.

हशम मावळे सरदार असामीं १०००,००० सरदार:-

१ येसाजी कंक सरनोबत. १ सूर्याजी मालसुरे. १ गणोजी दरेकर. १ मुग्बाजी बेनमणा. १ माल सांवत. १ विठोजी लाड. १ इंद्रोजी गावडे. १ जावजी महानलाग. १ नागोजी प्रल्हाद. १ पिलाजी गोळे. मुधोजी सोनदेव. १ कृष्णाजी भास्कर. १ कलधोडे. १ हिरोजी मराठे. १ रामाजी मोरे. १ हिरोजी भालदार. १ तुकोजी कडू. १ राम दळवी. १ दत्ताजी इडि(तु)लकर. १ पिलाजी सणस. १ जावजी पाये. १ भिकजी दळवी. १ कोंडजी वडखले. १ त्रिंबकजी प्रभू. १ कोंडजी फरजंद. १. तानाजी तुंदुसकर. १ तानसावंत मावळे. १ महादजी फरजंद. १ येसजी दरेकर. १ बाळाजीराव दरेकर. १ सोन दळवे. १ चांगोजी कडू. १ कोंडाळकर. १ ढवळेकर. १ तानसांवत भोंसले. एकूण ३६.

गड, कोट, जंजिरे व देशांतील जंजिरे, गड, कोट बितपशील.:-

१ कोंढाणा ऊर्फ सिंहगड. १ घनगड. १ येलबर्गीगड. १ रांगणा ऊर्फ प्रसिध्दगड. १ लिंगाणा. १ चंदन. १ मसीतवाडे ऊर्फ मानगड. १ जयगड. १ लोहगड. १ कोट फोंड. १ कोट लावड. १ रसाळगड. १ हडपसर ऊर्फ पर्वतगड. १ कोट केचर. १ सातारागड. १ परळीगड ऊर्फ सज्जनगड. १ वल्लभगड. १ जवळेगड. १ हरुषगड. १ कुरडू ऊर्फ मंदरगड. १ सालोभागड. १ रोहिडा. १ मदगिरीगड. १ जिवधण. १ कोट मंगळूर. १ कोपलगड. १ कोट कुष्टगी. १. पन्हाळगड. १.

नौबतगड. १ कोटसुपें. १ पुरंदरगड. १ पाली ऊर्फ सरसगड. १ अचलागिरीगड. १ भोरप ऊर्फ सुधागड. १ कोट अंकोलें. १ पांडवगड. १. वंदन. १ कोट शिवेश्वर १ खेळणा ऊर्फ विशाळगड. १ त्रिंबक ऊर्फ श्रीगड. १ कोट हलियाळ. १ बहादूरगड. १ तानवडा. १ सालेरीगड. १ मनोहरगड. १ अहिवंतगड. १ ठकरीगड. १ माहुलीगड. १ चाऊड ऊर्फ प्रसन्नगड. एकूण ४९.

नवे राजियांनीं गड वसविलें त्यांचीं नांव निशीवार सुमारी.
सुमार १११

१ राजगड चारी माच्या. १ तोरणा ऊर्फ प्रचंडगड. १ केळजा. १ वैराटगड. १ कमलगड. १ वर्धनगड. १ प्रतापगड. १ कांगोरी ऊर्फ मंगळगड. १ गहनगड. १ पताकागड. १ पद्मागड. १ सुबकरगड. १ सबलगड. १ बहिरवगड ऊर्फ सारंगा. १ गगनगड ऊर्फ बावडा. १ सारंगगड. १ सुरगड. १ जंजिरे विजयदुर्ग. १ जंजिरे सिंधुदुर्ग. १ जंजिरे खांदेरी. १ पावनगड. १ पारगड. १ भिंवगड. (भीमगड). १ भूधरगड. १ राजगड. १ सहन(ज)गड. १ नाकगडगड. १ लोणजागड. १ काचणागड. १ सिदीचा गड. १ वसंतगड. १ सुदंरगड. १ महीमानगड. १ मच्छंद्रगड. १ व्यंकटगड. १ माणिकगड. १ लोकलगड.(कलोल?) १ कोथळागड. १ श्रीवर्धनगड. १ कमरगड. १ वासोटा ऊर्फ व्याघ्रगड. १ खोलगड. १ प्रचितगड. १ प्रौढगड. १ वनगड. १ नरगुंदगड महदगड. १ रामदुर्ग ऊर्फ भुजबळ. १ बालेराजा. १ अंजनवेली. १ सरगड. १ मुरगोड. १ श्रीमंतगड. १ गजेंद्रगड. १ कोट येळूर. १ कनकाद्रिगड. १ रवळागड. १ नाचणागड. १ रामसेजगड. १ रुद्रमाळगड. १ समानगड. १ वल्लभगड. १ महीपालगड. १ मयोरगड ऊर्फ नवलगुंद. १ पटगड. १ सोनगड. १ कुंजरगड. १ तुंगगड ऊर्फ कठीणगड. १ महीपतगड. १ मदनगड. १ कांगोरीगड. १ वारूगड. १ भूषणगड. १ कोट बारगीर. १ कंबलगड. १ मंगलगड. १ स्वरूपगड. १ ढोलागड. १ मनरंजनगड. १ बहुलगड. १ महींद्रगड. १ रजेगड. १ बळवंतगड. १ श्रीगलडवगड. १ पवित्रगड. १ कलानिधीगड. १ गंधर्वगड. १ सुमनगड. १ गंभीरगड. १ मंदरगड. १ मर्दनगड. १ दहीगड. १ मोहनगड. १ गडागड. १ वीरगड ऊर्फ घोसाळा. १ तिकोना ऊर्फ वितंडगड. १ जंजिरे सुवर्णदुर्ग. १ जंजिरे रत्नागिरी. १ राजक्रोट. १ सेवणागड. १ सेवकगड. १ कोहजगड. १ कठोरगड. १ भास्करगड. १ कपलगड. १ हरिश्चंद्रगड. १ जंजिरे कुलाबा. १ सिध्दगड. १ मंडणगड. – एकूण सुमारे १०८.

कर्नाटक प्रांतींचे गड केले नवे एकूण सु॥ ७९ बितपशील :-

कोल्हार, बाळापूर-वरघाट

१ कोल्हार, बाळापूर भोर. १ नंदीगड. १ चंदनगड. १ ब्रह्मगड. १ गणेशगड. १ श्रीवर्धनगड. १ वज्रगड. १ मर्दनगड. १ कोट बिदनुर. १ भास्करगड. १ पिपला ऊर्फ प्रकाशगड. १ कोट ढमकूर. १ कोट कोलार कदीम. १ दुर्गमगड. १ भीमगड. १ सरसगड. १ अहिनिजादुर्ग. १ कट्टरगड. १

मकरंदगड. १ बुरवडगड. १ सोमशंकरगड. १ हातमलगड. १ भूमंडणगड. १ मेज कोल्हारगड. १ महीपालगड. १ भीमगड नजिक कपशेरी. १ बुंदीकोट. १ कोट येलूर. १ कैलासगड. १ महीमंडणगड. १ अर्जुनगड. १ अर्काटगड. १ पडवीरगड. १ भंजनगड. १ राजगड चंदी. १ मदोन्मतगड चंदी. १ मुखणेगड कोटवेल. १ भातुर. १ पालेकोट. एकूण ३८.

घाटाखालीं गड कोट

१ पतनगदनेगड. १ जगदेवगड. १ केवळगड. १ गगनगड. १ मदगड. १ कस्तुरीगड. १ रत्नगड. १ प्रबळगड. १ मार्तंडगड. १ कृष्णागिरी चंदी. १. शारंगगड चंदी. १ लागगड चंदी. १ कोट बिचंदी. १ सुदर्शनगड. १ महाराजगड. १ कृष्णागिरीगड. १ रंजनगड. १ शिदगड. १ मल्लकार्जुनगड. १ प्राणगड. १ कुजंरगड. १ आरकोटगड. १ कर्नाटकगड. १ बिगेवाळुंगड. १ बहिरवगड. १ कोटसुभा. १ मनगड. १ कोट त्रिकळूर. १ बेटवल ऊर्फ केमल. १ विशाळगड. १ कोट त्रिमल. १ चेलगड चंदी. १ कोट देवणापाटी. १ रामगड. १ चिंताहर कोट. १ वृध्दाचल कोट. १ चवीकोट. १ निलसाजितगड. १ यशवंतगड. १ देवगड. एकूण ४१.

एकदंर बेरीज ७९.

एकदंर गड बेरीज

५० प्रथम पन्नास. १११ नवे राजियांनी वसविले. ७९ कर्नाटक प्रांतीचें
एकूण २४०.

११७. 'दोन प्रांत मिळून एक राज्य.'

एणेप्रमाणें आपलें राज्य सालेरी किल्यापासून गोदावरी नदी अलीकडे कुल देश वरघाट तळघाट तुंगभद्रा पावेतों हा एक प्रांत, व तुंगभद्रे पलीकडे देखील कोल्हार, बाळापूर, चंदी, येलूर सरद कावेरी पावेतों हा एक प्रांत. असे दोन प्रांत मिळून एक राज्य आहे. ऐशी तजवीज करून संभाजी राजियास पन्हाळ्यास ठेविलें. त्याजवळ जनार्दन नारायण सरकारकून व सोनाजी नाईक बंकी व बाबाजी ढमढेरे असे ठेविले. आणि पुत्राचें समाधान केलें कीं, "आपण रायगडास जातों. धाकटा पुत्र राजाराम याचे लग्न करून घेतों. मग राज्यभाराचा विचार कर्तव्य तो करूं. तूं वडील पुत्र आहेस. सर्व प्रकारें भरंवसा तुमचा." असें बोलून रायगडास गेले.

११८. राजारामाचे लग्न

धाकटा पुत्र राजाराम यास वधू पाहातां प्रतापराव पूर्वील सेनापती होते. त्यांची कन्या नवरी नेमस्त केली. आणि लग्न सिध्दी तें पावविलें. वधूचें [नांव] सौभाग्यवती जानकीबाई असें ठेविलें.

मोठा महोच्छाह केला. दानधर्म अपार केले.

११९. राजांस ज्वराची व्यथा

मग कांहीं दिवसांनीं राजास व्यथा ज्वराची जाहाली. राजा पुण्यश्लोक. कालज्ञान जाणे. विचार पाहातां आयुष्याची मर्यादा जाली. असें कळून जवळील कारकून व हुजरे लोक होते त्यांमध्ये सभ्य, भले लोक बोलावून आणिले. बितपशील:-

कारकून : १ निळोपंत प्रधानपुत्र. १ प्रल्हादपंत १ गंगाधरपंत, जनार्दनपंतांचे पुत्र. १ रामचंद्र निळकंठ. १ रावजी सोमनाथ. १ आबाजी महादेव. १ जोतीराव. १ बाळप्रभू चिटणीस.

हुजरे लोक : १ हिरोजी फरजंद. १ बाबाजी घाडगे. १ बाजी कदम. १ मुधोजी सरखवास. १ सुर्याजी मालुसरा. १ महादजी नाईक पानसंबळ.

१२०. राजांचे देहावसान

असे मातबर लोक जवळी बोलावून आणिले. मग त्यांस सांगितले कीं, "आपली आयुष्याची अवधी जाली. आपण कैलासास श्रीचे दर्शनास जाणार. शरीर क्षीण देखून पन्हाळियावरि संभाजी राजे वडील पुत्र यांस सांगितलें [होतें] कीं, 'तुम्ही दोघे पुत्र आपणास यांस राज्य वांटून देतों. आणि उभयतां सुखरूप राहाणें.' म्हणोन सांगितलें. परंतु वडील पुत्र संभाजी राजे यांनीं ऐकिलें नाहीं. शेवट आपला तो निदानसमय दिसताहे. राज्य म्यां शिवाजीनें चाळीस हजार होनाचा पुणें महाल होता, त्यावरि एक क्रोड होनाचें राज्य पैदा केलें. हे गड, कोट व लष्कर पागा ऐसें मेळविलें, परंतु मज माघारें हें राज्य संरक्षण करणार ऐसा पुत्र दिसत नाहीं. कदाचित धाकटा कुंवार राजाराम वांचला तर तो एक हें राज्य वृध्दी तें पाववील. संभाजी राजे वडील पुत्र जाणता आहे, परंतु बुध्दी फटकळ आहे. अल्पबुध्दी आहे. त्यास काय करावें? आपण तो प्रयाण करतों. तुम्ही कारकून व हुजरे मराठे कदीम या राज्यांतील आहां. तुम्हांस या गोष्टी कळल्या असाव्या. आपणां माघारें संभाजी राजे पराक्रमानें राज्य सर्व आटोपतील. लष्करही थोरला राजा संभाजी म्हणून त्याजकडे डौल देऊन मिळतील. राजाराम धाकटा म्हणून याजकडे लष्कर येणार नाहीं. सरकारकून राजारामाचा पक्षपात करून उभयतां बंधूंस राज्य वाटून दोन राज्यें करूं म्हणतील. शेवट लष्करचे मराठे कारकुनांचे विचारांत येणार नाहीत. शेवट अवघे सरकारकुनांसि विश्वास देऊन धरतील. संभाजी राजे हे आपले वेळचे थोर थोर ब्राह्मण यांस मारील. ब्राह्मण हत्या करील. पुढें मराठे यास लष्करचे सरदारांसही मारील, धरील, इजत घेईल. लहान माणसें, गुलाम, यांचा पगडा पडेल, आणि थोर लोकांची चाल मोडील. संभाजी कैफ खाईल, गांज्या ओढील, इषकबाजी करील. गड-कोट-देशामध्यें अनाईक होईल. राजा परामृष करणार नाहीं. द्रव्य खजीना सर्व उडवील. सर्व राज्य गमावील. संभाजीचे गूण ऐकून औरंगजेब दिल्लीहून चालून येईल. भागानगर, विजापूर

मोंगल घेईल. हें राज्यही घेतील, आणि संभाजी शेवट दगा खाईल. जे गती मलिक अंबर निजामशाहा त्याचा पुत्र फत्तेखान मलिका माघारां जाहाला, आणि पातशाही बुडविली, तैशीच संभाजी राजा करील. मग राजाराम राज्य करूं लागेल. तेव्हां गमाविलें राज्य साधील. मजपेक्षां पराक्रम विशेष करील. हीं पुत्राची लक्षणें. आतां कारकूनांमध्ये माझे वेळचे थोरले कारकून यांस तो संभाजी वाचू देणार नाहीं. त्यांपैकीं एक प्रल्हादपंत निराजीपंतांचे पुत्र व रामचंद्रपंत निळोपंताचे पुत्र हे दोघे ब्राह्मण पराक्रमी होतील. निळोपंत, प्रधानाचापुत्र, हाही नांव धरील. या वेगळे कोणी होणार होतील. मराठ्यांमध्यें बहुतेक संभाजी मोडील. उरल्यापैकीं संताजी घोरपडे व बहिरजी घोरपडे व धनाजी जाधव हे जरि वांचले तरि मोठे पराक्रम करतील. मोडिलें राज्य हे तिघे ब्राह्मण व तिघे मराठे सांवरतील." असें बोललें. येणेप्रमाणें राजे बोलिले. सर्वांचे कंठ दाटून नेत्रांपासून उदक स्त्रवूं लागलें. परम दुःख जालें. त्या उपरि राजे बोलिले कीं, "तुम्ही चुकूर होऊं नका. हा तो मृत्युलोकच आहे. या मागें किती उत्पन्न जाले तितके गेले. आतां तुम्हीं निर्मळ सुखरूप बुध्दीनें असणें. आता अवघे बाहेर बैसा. आपण श्रीचें स्मरण करतों." म्हणोन अवघियांस बाहेर बसविलें. आणि राजियांनीं श्रीभागीरथींचे उदक आणवून स्नान केलें. भस्म धारण करून रुद्राक्ष धारण केलें. आणि योगाभ्यास करून, आत्मा ब्रह्मांडास नेऊन दशद्वारें फोडून प्राणप्रयाण केलें. शालिवाहन शके १६०२, रौद्रनाम संवस्तरे, चैत्र शुध्द १५ रविवारी दोन प्रहरीं काळ रायगडी जाला. त्या नंतर शिवदूत विमान घेऊन आले, आणि [राजे] विमानीं बैसून कैलासास गेलें. हें जड शरीर, (त्याचा) मृत्युलोकीं त्याग केला.

१२१. अशुभचिन्हे व उत्तरक्रिया

राजियाचें देहावसान जालें ते दिवशीं पृथ्वीकंप जाहाला. गगनीं धूमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून जाला. रात्रीं जोड-इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्री शंभुमहादेवीं तळ्याचें उदक रक्तांबर जालें. पाण्यांतील मत्स्य बाहेर पडून अमासवणी उदक जाहालें. ऐशी अरिष्टें जाहालीं. मग राजियाचें कलेवर चंदनकाष्टें व बेलकाष्टें आणून दग्ध केलें. स्त्रिया राजपत्न्या, कारकून व हुजरे सर्व लोकांनीं सांगितलें कीं, धाकटा पुत्र राजाराम यांनीं क्रिया करावीं. सर्वांनीं खेद केला. राजाराम यांनीं अत्यंत शोक केला. त्यानंतर उत्तरकार्य कनिष्ठानीं करावें असें सिध्द केलें. वडील पुत्र संभाजी राजे वेळेस नाहीत, याजकरितां धाकट्यांनीं क्रिया केली. ऐसें राजियाचें चरित्र-आख्यान उत्पन्न काळापासून देहावसानापर्यंत जाहालें.

१२२. राजा अवतारीच.

राजा साक्षात् केवळ अवतारीच जन्मास येऊन पराक्रम केला. नर्मदा पासून रामेश्वरपर्यंत द्वाही फिरली. देश काबीज केला. अदलशाही, कुतूबशाई, निजामशाई, मोंगलाई ह्या चारी पातशाह्या

व समुद्रांतील बेवीस पादशाहा असे जेर जप्त करून, नवेंच राज्य साधून मराठा पातशाहा सिंहासनाधीश छत्रपती जाहाला. प्रतिइच्छा मरण पावून कैलासास गेला. ये जातीचा कोणी मागें जाहाला नाहीं. पुढें होणार नाहीं. असें वर्तमान महाराजाचें जाहालें. कळलें पाहिजे.

१२३. फलश्रुती.

चरित्र पुण्यश्लोक राजियाचे जे घरीं लिहून ठेवतील. त्यांच्या भाग्यास पारावार नाहीं. व जे वाचतील त्यांस मोठें पुण्य जोडेल. निपुत्रियांस पुत्र होतील व दरिद्रियांस लक्ष्मीवंत होतील व अपेशियांस यशवंत होतील. व पुण्यश्लोक पराक्रमी होतील. जे पुत्रवंत असतील त्यांसही पुत्र होतील. जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील. यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील. येणेंप्रमाणें सर्व मनोरथ पूर्ण होतील. बरें समजणें ही. बखर संपूर्ण जाहाली. चैत्र शुध्द प्रतिपदा ते दिवशीं वर्णन समाप्त जाहालें. ईश्वर संवस्तर. मुक्काम चंदी. शालिवाहन शके १६१६ [त] जाहाली. कळलें पाहिजे. बहूत काय लिहिणें? हे विनंती.


कोल्हाट्याचं पोर
किशोर शांताबाई काळे

आदर्श आई म्हणून न जगता आलेल्या
पण आदर्श पत्नी म्हणून जगणाऱ्या
सौ. आईस

वेळोवेळी, अडीअडचणीत मला
मदत करणारे माजी खासदार
रामराव लोणीकर आणि
त्यांच्या पत्नी सौ. नागीणमावशी यांना

मनोगत

ही कथा आहे समाजाने नाकारलेल्या, आई-वडिलांच्या प्रेमापासून वंचित राहिलेल्या, गरिबीने लाचार झालेल्या, कोल्हाटी समाजात एका नाचाणारणीच्या पोटी जन्म घेऊन डॉक्टरी शिकलेल्या पोरांची. जन्मत:च मला 'नाजायज औलाद' हे सर्टिफिकेट समाजानं दिलं आहे. आई मास्तरीण होण्याच्या उंबरठ्यावर असतानाच समाजानं तिला नाचाणारीण होण्यास मजबूर केलं. आणि मास्तरीण होण्याचं तिचं गोड स्वप्न एका रात्रीत उध्वस्त झालं.

नाचाणारीण मेणबत्तीसारखी स्वत: जळते आणि दुसऱ्याला प्रकाश देते. काही समाजवर्ग तिचं नाचणं बघून आनंद लुटतो, तिचे नातेवाईक तिच्या पैशावर, आयतं बसून चैन करीत फिरतात; हाच समाजवर्ग तिला वेश्या म्हणायला कमी करीत नाही. आणि तिच्या पोटच्या पोराला असं 'सर्टिफिकेट' देऊन त्याचे धिंडवडे काढतो. तिची जवानी सगळ्या नातेवाईकांना सांभाळते, परंतु तिचं म्हातारपण सांभाळण्यास ह्याच नातेवाईकांना जड जातं! म्हातारी झाली की तिला रस्त्यावर टाकून देण्यास हे लोक सज्ज! खरंच, किती राक्षसी समाजवर्ग म्हणावा हा! हीच नाचणारीण आपली लोककला जिवंत ठेवते. पण तिच्या म्हातारपणाची काळजी सरकारदेखील करीत नाही. तिच्या सेवानिवृत्तीत तिला अन्न, वस्त्र, निवारा मिळालाच पाहिजे. नसता, महाराष्ट्राच्या लोककलेची इज्जत वेशीला टांगल्यासारखं होईल.

मी, माझी आई आणि माझा भाऊ रक्तानं एक आहोत, परंतु कागदोपत्री मात्र आम्हाला वेगळं केलं आहे. शाळेत माझं नाव किशोर शांताबाई काळे. कारण बापाचा पत्ता नाही! आईचं नाव शांताबाई कृष्णराव वडकर, कारण कोल्हाट्याची शांताबाई आता कृष्णराव वडकर (नाना) यांची पत्नी झाली आहे. आणि माझा लहान भाऊ, दीपक कोंडिबा काळे! कोंडिबा हे माझ्या आजोबाचं नाव. दीपकचं हे नाव नानांनीच शाळेत टाकलं, कारण पुढे चालून त्यानं आपला वारस-हक्कदार होऊ नये म्हणून! कोंडिबा काळे हे आईचे वडील. पण आजोबालाच दीपकचा बाप केला. हृदयाचे तीन तुकडे करावेत तसं आम्हा तिघांना वेगळं करण्यात आलं. आज मी डॉक्टर झालो. उद्या मला समाजात मान्यता मिळेल. पण माझा हा इतिहास पुसता येईल?

कोल्हाटी समाजात नाचणारणींच्या कित्येक मुलांना ना बापाचा सहारा मिळतो, ना आईचा. पितं बाळ आपल्या आई-बापाजवळ सोडून, त्यांच्या संसाराला ठिगळ लावण्यासाठी ती गावोगाव नाचायला जाते. मुलाला ती बरोबर बाळगत नाही. कारण मूल असलेल्या नाचाणारणीला कमी लेखलं जातं. त्या नाचणारणीमधलं आईचं हृदय मेलेलं असतं का? की समाजानं मारून टाकलेलं असतं? या समाजात कित्येक अशा मुलांना हलाखीचं जीवन जगावं लागतं. आणि त्यांच्यावर चांगले संस्कार न झाल्यामुळे पुढे आपल्या बहिणींना नाचण्यास तेच मजबूर करतात. नाचणारीण जर उमेदीत मेली तर तिची मुलं कुत्रीच्या पिल्लांसारखी सैरावरा फिरतात. यांच्यामधून गुन्हेगारीचा उगम होतो.

माझ्यासारखा एकदाच परिस्थितीशी झुंज देत डॉक्टर होऊ शकतो. मी बार्शीच्या कुंटणखान्यातून बाब्याबरोबर पुण्या-मुंबईला गेलो असतो, तर मी डॉक्टर होण्याऐवजी भडवेगिरी करीत अनेक जातींतील स्त्रियांचं शरीर मी विकलं असतं.

पुस्तक लिहिण्याचा माझा हेतू हाच आहे की, आमच्या समाजाला जाग यावी! मला कधी वाटलं नव्हतं की, मी पुस्तक लिहीन, लेखक होईन. परंतु समाजातील आसपासच्या अनेक व्यक्तींनी मला हे पुस्तक लिहिण्यास उद्युक्त केलं. कारण माझ्या होस्टेलवरच नव्हे तर जिथं जाईन तिथं, माझी जात कळली की त्यांच्यात चर्चा चालत असे की, याच्याच समाजातल्या स्त्रिया नाचतात आणि वेश्येचा धंदा करतात! परंतु फक्त कालहाटी समाजातल्या स्त्रिया नाचत नाहीत तर अनेक उच्च-नीच, गरीब-श्रीमंत घराण्यातल्या स्त्रियाही नाचतात. कोल्हाट्यांच्या बायांवर मात्र 'नाचाणारणी'चा शिक्का मारला जातो. नऊवारी साडीत सर्व शरीर झाकून, रात्रभर नाचूनदेखील दोनशे रुपये मिळत नाहीत, त्या नाचणारणीला इज्जतही नसते. परंतु सिनेमामध्ये सर्व उघड्या शरीराचं प्रदर्शन करून एका रात्रीत लाखो रुपये मिळवतात. त्याला मात्र 'कला' आणि 'फॅशन' म्हणतात.

वेश्या म्हणजे पैशांसाठी रोज अनेक व्यक्तींशी संबंध ठेवणे. पण या कोल्हाट्याच्या स्त्रिया; त्यांना कोणी सांभाळणारा असेल तर लग्नाची स्त्रीसुद्धा पवित्र वागणार नाही, इतक्या निष्ठेनं त्या वागतात. अशा नाचणारणीला तुम्ही वेश्या म्हणता! त्या वेश्या नसतात; तुमच्या नजरा वेश्या झालेल्या असतात.

बाहेरचा समाज काय म्हणेल, आपल्याला सुखानं जगू देईल का? या भीतीनं घाबरून कोल्हाटी समाजात अनेक हुशार हिरे लपून बसलेले आहेत. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंत्र दिलेला आहे, 'शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा'. शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे. ते प्यायल्यानंतर गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. या त्यांच्या मंत्रामुळे

मी लहानपणापासून कोणाला न घाबरता, नुसतंच रडत आपलं दुःख इतरांना सांगण्यापेक्षा आधी शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला, आणि करीत आहे. त्याचं फळ म्हणून मी या टप्प्यावर आलो. नसता, अंबाजोगाईला शिकत असताना जगणं कठीण झालं होतं. आणि सामाजिक, आर्थिक, कमजोरीला तोंड देत माझ्यासारख्या खेड्यातल्या मुलानं मुंबईसारख्या शहरामध्ये ग्रँट मेडिकल कॉलेजला प्रवेश मिळवला; सर्व आई-वडील आपला मुलगा डॉक्टर व्हावा म्हणून हजारो प्रयत्न करतात. या गोष्टीबद्दल माझं कौतुक होण्याऐवजी मुंबईमध्येदेखील तेच पाढेपंचावन्न. म्हणजे अंबाजोगाईमध्ये जो त्रास मला झाला तोच. श्रीमंत मुलं मला विचारायची की त्या मुजऱ्यावर माझी ओळख करून दे. त्या कोठ्यावर माझ्याबरोबर चल. हे माझं सर्व दुःख प्रा. रवींद्र ननवरे याला मी सांगितलं. त्यानंच मला पुस्तक लिहिण्यास सुचवलं. मी शरणकुमार लिंबाळे यांचं 'अक्करमाशी' आणि लक्ष्मण माने यांचं 'उपरा' वाचलं. मग मी शरणकुमार लिंबाळे यांच्याकडे गेलो. ते आणि त्यांची पत्नी कुसुमताई यांच्यामुळेच मी हे पुस्तक पूर्ण करू शकलो. त्यामुळे त्यांचे आभार जितके व्यक्त करावेत तितके कमीच. प्रा. रवींद्र ननवरे आणि प्रा. प्रकाश म्हस्के यांनी मला वेळोवेळी आर्थिक व इतर मदत करून आधार दिला. त्यांचा मी आभारी आहे. या पुस्तकाचं सर्व श्रेय ग्रंथालीचे श्री. दिनकर गांगल यांना जातं. त्यांचा मी आभारी आहे.

– किशोर काळे

माझी आई शांताबाई ही नाचणारी बाई होती. तिनं नाच सोडला. तिच्या पायातील घुंगरू सुटलं. मी मात्र तुटलेल्या घुंगरासारखा या कोल्हाटी समाजातच राहिलो, जिजीकडं. जिजीचं खरं नाव ताराबाई. आम्ही सारे, एवढंच काय, गावदेखील तिला जिजीच म्हणायचं.

जिजीपासूनच या कहाणीला सुरुवात होते.

जिजी ही साळी समाजाची. जिजी, जिजीची आई लक्ष्मी आणि तिचा भाऊ गंगाराम हे सोलापूरला राहात होते. लक्ष्मी भोळी होती, आणि लक्ष्मीचा नवरा महादेव हा थोडासा वेडसर होता. लक्ष्मीला तिची सासू आणि दीर मारहाण करीत; तिच्याकडून काबाडकष्ट करून घेत. महादेव वेडसर असल्यामुळे त्यालाही मारहाण होई. एके दिवशी हा महादेव घरातून निघून गेला. वर्ष झालं तरी तो परत आला नाही. म्हणून लक्ष्मी आपल्या दोन मुलांना –मुलगा गंगाराम आणि मुलगी ताराबाई उर्फ जिजी– घेऊन महादेवला शोधण्यासाठी घरातून पळून गेली. त्यावेळी गंगाराम बारा वर्षांचा होता, आणि ताराबाई दहा वर्षांची. लक्ष्मी सोलापूरहून करमाळ्याला आली. लक्ष्मी करमाळ्याच्या बसस्टॅण्डवर एका कोपऱ्यात बसली. बाजूलाच दोन्ही पाखरं होती. जणू कोंबडी पिलांचं पंखाखाली संरक्षण करीत आहे ! भुकेमुळे व्याकूळ झालेली लक्ष्मी आणि तिची मुलं सगळ्या दिशांना टकमक बघत होती. करमाळा बसस्टॅण्डजवळ कोल्हाट्याचा खेळ चालू होता. कोल्हाटी करमाळा बसस्टॅण्डजवळ उतरले होते. कृष्णा कोल्हाटी बसस्टॅण्डवर फिरत होता. कृष्णा कोल्हाट्यानं लक्ष्मीला उदास अवस्थेत बघितलं. त्यानं तिला विचारलं, 'कुठं जायचं बाई ?' लक्ष्मीनं भोळेपणानं सर्व काही सांगितलं. कृष्णा कोल्हाट्यानं लक्ष्मीला आणि तिच्या दोन्ही मुलांना हॉटेलमध्ये नेलं. त्यांना पोटभर खाऊ घातलं. लक्ष्मीच्या भोळ्या स्वभावाचा कृष्णा कोल्हाट्यानं फायदा उचलला आणि तिला आपल्यासारखं करून घेतलं.

कृष्णा कोल्हाट्याला लग्नाची पहिली बायको होती, आणि एक मुलगादेखील. त्याचं नाव कोंडिबा. लक्ष्मी कृष्णा कोल्हाट्याची बायको म्हणून राहू लागली. नंतर ती सोलापूरला गेलीच नाही, आणि तिला आयुष्यात तिचा महादेव काही भेटला नाही.

याच कोल्हाट्यांमध्ये गंगाराम ढोल वाजवण्यास शिकला. जिजी नाच, कोल्हाट्या उड्या मारणं, आणि इतर कला शिकली. कोंडिबा आयता खात होता. कारण तो लग्नाच्या बायकोचा मुलगा होता ! लक्ष्मीची इच्छा होती की जिजीचं लग्न करून द्यावं. पण कृष्णा

कोल्हाट्याला सोन्याची अंडी देणारी कोंबडी हातची जाऊ द्यायची नव्हती. त्यानं काही जिजीचं लग्न होऊ दिलं नाही. साळी समाजाची जिजी आता कोल्हाटी झाली. गावोगावी खेळ करीत, नाचत, कोल्हाटी फिरत. त्यांच्याबरोबर जिजीदेखील फिरू लागली. जिजी दिसण्यास देखणी होती. नाकाची दांडी सरळ होती. ती कोल्हांट्या उड्या मारण्यात आणि तारेवरून चालण्यात पटाईत झाली. गावची सगळी लोकं जिजीचा खेळ आणि नाच बघायला गर्दी करीत.

करमाळा तालुक्यातील नेरले मुक्कामी त्यांचा उड्या मारणं-नाचण्याचा कार्यक्रम चालू होता. नेरल्याचे माधवराव पाटील खेळ बघण्यासाठी आले होते. गंगाराम ढोल वाजवीत होता. आणखी दोन साथीदार होते. जिजी ढोलांच्या तालावर दोन हातरुमाल हातात घेऊन नाचत होती. लोकांची गर्दी जमली होती. कोणी शिट्या वाजवत होते तर कोणी रुपया-दोन रुपयं जिजीच्या दिशेनं फेकत होते. माधवराव पाटील जिजीच्या रूपाला भाळले. खेळ झाल्यानंतर माधवराव पाटलांनी कृष्णा कोल्हाट्याला वाड्यावर बोलावून घेतलं, आणि सांगितलं की ताराबाई मला आवडली. तुम्हाला पाहिजे असेल ते मागा. पण ताराबाईचं गावोगावी फिरणं बंद करा. कृष्णा कोल्हाट्याला वाटलं की गावोगावी फिरण्यापेक्षा जर आपल्याला इथंच पोटभर मिळत असेल तर काय हरकत आहे? त्यानं जिजीला पाटलाकडं राहण्याची परवानगी दिली.

माधवराव पाटलांनी जिजीला आपल्या राहत्या वाड्यावर ठेवली. जिजी पाटलाची बायको म्हणूनच वावरत होती, आणि गावातले लोक पण पाटलाची लाडकी बायको म्हणून तिला मान देत होते. माधवराव पाटलांना पहिल्या दोन बायका होत्या, पण त्यांना मूल नव्हतं. त्यांनी जिजीला पंचवीस एकर जमीन दिली, आणि कृष्णा कोल्हाट्याला राहण्यासाठी सहमजगी वाडा बांधून दिला. गंगारामचं ढोलकं वाजवणं सुटलं, पण शेतात काबाडकष्ट सुरू झाले. तो गुरं सांभाळीत असे. गंगारामला फेफरं येत असे. कोंडिबा हा पूर्वीसारखाच आयता बसून खात असे. एका वेळेस गंगाराम ओढ्यावर गुरं पाणी पाजवण्यासाठी घेऊन गेला. ओढ्याच्या कडेला बसल्याबरोबर त्याला फेफरं आलं, आणि तो पाण्यात बुडून मेला.

जिजीचा आधार घेऊन, खेळ करणारी कोल्हाटी कुटुंबं एकेक करीत नेरल्याला येऊन स्थायिक होऊ लागली. कोल्हाट्यांची अशी पाच-सहा घरं झाली. त्यांचा विस्तार वाढत चालला. जिजीला माधवराव पाटलापासून मुलगी झाली. पण लहान असतानाच ती मरून गेली. कोंडिबाचं बारामतीच्या मुलीशी लग्न झालं. तिचं नाव कलावती होतं. कोंडिबाला पुढे पाच मुली व तीन मुलं झाली. पहिली शांता. शांता ही माझी आई आहे. दुसरी शालन, तिसरी सुशिला, चौथी रंभा, पाचवा पोपट, सहावी बेबी, सातवा राजू, आठवा अंकुश. काही काळानं कृष्णा कोल्हाटी, लक्ष्मी व पहिली बायको -रमा- मरून गेली.

माधवराव पाटलांचा या घरावर रुबाब चालत असे. त्यांच्याच जिवावर तर कृष्णा कोल्हाट्याचा संसार चालू होता. ते जे सांगतील ती पूर्व दिशा, व ऐतखाऊ कोंडिबा पूर्णपणे जिजीवर अवलंबून होता. माधवराव पाटलांना वाटत असे की या घरातील एकाही मुलीनं खेळ करू नये, तिनं नाचायला जाऊ नये. म्हणूनच त्यांनी कोंडिबाची मोठी मुलगी, शांताला शाळेतदेखील टाकलं. दुसऱ्या मुलीपण शाळेत जाऊ लागल्या. शांताबाई, म्हणजे माझी आई, सहावी पास झाली. तिचं लग्न जमवलं, बिदरगावच्या बिल्डींग खात्यातल्या एका ऑफिसरबरोबर. त्याचं नाव अंबादासराव वाघमोडे. एक वर्षानंतर ती मास्तरीण होणार होती. माधवराव कोंडिबाला शेतात पाठवू लागले. कारण आता गंगाराम जिवंत राहिला नव्हता. आणि कोंडिबाची आयतं खाण्याची सवय त्यांना तोडायची होती. कोर्टकचेरीचं काम माधवराव कोंडिबालाच सांगत. माधवराव गावचे पाटील असल्यामुळे सगळं गाव त्यांना घाबरत असे. माधवराव आणि जिजी कधी सहाखणी वाड्याकडे गेले की घरातील सर्व मंडळी घराच्या बाहेर निघत नसत. शांताचे ते खूप लाड करीत. माझी मुलगी आहे शांता, असं ते म्हणत.

पण अघटित घडलं. माधवराव पाटील अचानक मरण पावले. कोणीतरी त्यांना विष घातलं असं म्हणतात. जिजी विधवा झाली. तिनं, माधवराव पाटील गेल्यावर, कपाळाचं कुंकू पुसलं; गळ्यातलं मंगळसूत्र तोडलं. विधवा बाईचं जीवन ती जगू लागली. जिजीनं परत कोणाशी संबंध ठेवला नाही. कारण माधवराव पाटलांनी पोटापुरतं सर्व तिला दिलं होतं. एखादी लग्नाची स्त्री असती तर तिनं मुलासाठी तरी दुसरं लग्न केलं असतं किंवा कोणाशी तरी संबंध ठेवला असता, पण जिजी नाचणारीण असूनही विधवा म्हणून जगली.

माधवराव पाटील मेल्यानंतर घरात पैशाची तंगी सुरू झाली. आणि आता कोंडिबाचा रुबाब चालू लागला. जोपर्यंत माधवराव पाटील जिवंत होते तोपर्यंत जिजीचा घरात रुबाब चालत होता. आता जिजीला कोंडिबा म्हणेल तसं वागावं लागत असे. कारण जिजीला वाटत असे की आपल्याला मूल नाही ! पाटलाच्या घरी राहावं तर पाटलाची भावकी विष घालून मारतील. म्हातारपणी भावाचा आणि भावाच्या मुलांचा सहारा मिळेल या हेतूनं, जिजी आता कोंडिबा म्हणेल तसं वागू लागली. आता जिजी शेतात जाऊ लागली ! माधवराव पाटील असताना जिजी वाड्याच्या बाहेर पडत नव्हती. जिजीला बुरख्यात ठेवली जात होती. बुरख्यातली जिजी शेतात शेत राखायला जाऊ लागली. वर्षातले उन्हाळे जसे बदलत जातात तसंच जिजीचं जीवन बदलत होतं.

माधवराव पाटील मेल्यानंतर कोंडिबाला मौजमजा करायला पैसा मिळत नसे. घरात पैशांची अडचण येऊ लागली. तेव्हा त्यानं शांताला जिथं द्यायचं होतं तिथं शालनचं लग्न लावून दिलं. लग्नात शांताला मंडपात बसविण्याऐवजी शालनला बसविली. अंबादास वाघमोड्यांना या गोष्टीची माहितीच नव्हती. कोल्हाटी समाजात मुली काळ्या असतील

किंवा दिसायला वाईट असतील तर त्यांचं लग्न करतात, आणि देखण्या मुली नाचायला सोडतात. शालन काळी होती, उलट शांता देखणी होती. त्यामुळे कोंडिबानं हा डाव केला. माधवराव पाटलांच्या पश्चात सारंच विपरीत घडलं.

इकडे अंबादास वाघमोडे यांना आपली फसवणूक झाल्याचं कळून चुकलं. पण ते समजुतदार होते. म्हणून त्यांनी शालनचा स्वीकार केला. पण लग्नानंतर ते नेहेमी कोंडिबाशी भांडण करीत, आणि म्हणत, शांताचं वाटुळं का केलं ? आईला अंबादासराव म्हणत की तू माझी बायको असतीस तर मी किती सुखी झालो असतो ! त्यामुळे आई त्यांच्यापुढे जाण्याचं टाळत असे. अंबादासरावांनी नंतर दारू पिण्यास सुरुवात केली. पूर्ण जीवन त्यांनी दारूत खर्च केलं. शेवटी दारूतच ते मरण पावले. शालन विधवा झाली. तिची मुलं बेवारशी झाली. नवऱ्याच्या पेन्शनवर ती घर चालवू लागली.

कोंडिबा म्हणजे आईचे वडील, माझे आजोबा. आईला नाचण्यासाठी ते मजबूर करू लागले; मारहाणदेखील करीत. त्यांनी आईला सातवीच्या वर्गातूनच, शाळेतून अर्धवट काढून टाकलं. आणि आईच्या नवीन आणि विचित्र जीवनास सुरुवात झाली. त्यांनी तिला नाचण्यासाठी चंद्रकलाबाईच्या जलसा पार्टीत पाठवलं. त्यावेळी चंद्रकलाबाईची पार्टी प्रसिद्ध होती. कोल्हाट्याची पार्टी म्हणजे पाच-सहा नाचणाऱ्या बाया, त्यापैकी एक मुख्य. तिला मालकीण म्हणतात. एक ढोलकी वाजवणारा, एक तबला वाजवणारा, एक हार्मोनियम वाजविणारा, एक कडी वाजविणारा व स्वयंपाकाला एक बाई. याशिवाय नाचणाऱ्या बायांची लेकरं सांभाळणारी माणसं असत. कारण स्वतःच्या मुलांना बघायलासुद्धा नाचणारणीला वेळ मिळत नसतो. चंद्रकलाबाई ही पार्टीची मालकीण. चंद्रकलाबाईची पार्टी गावोगावी जत्रा करीत फिरत असे. जत्रा असेल त्या दिवशी पार्टी शाळेत उतरत असे. एक कनात बांधत असत. त्या कनातीत नाच होत असे. नाच बघण्यासाठी तिकीट फाडावं लागत असे. कंधार-परभणी-मानवत-सेलू-सांगली-कोल्हापूर-सातारा-बार्शी अशा ठिकाणी बैलगाडीनं या पार्ट्या फिरत असत. पूर्वीसारखं कोल्हाट्या उड्या मारणं व खेळ करणं आता बंद झालं होतं. या पार्ट्या फक्त नाचकाम करीत.

नाचणाऱ्या बाया नाचत असताना कोणी खडे मारत असत, तर कोणी डोळा. एखादं गाणं त्यांना कोणी म्हणायला लावत असे. नाचणारीला चागलं नाचता नाही आलं तर बघे मोठमोठ्यानं ओरडत असत. कडीवाला पैसा जमा करीत असे. आईला चांगलं नाचता येत नव्हतं. कारण मोठी झाल्यानंतर तिला नाचायला पाठविलं होतं. त्यामुळे तिचं अंग लवत नसे. पण ती दिसत छान असे, आणि तिचा आवाज उत्तम होता. पेटीजवळ उभं राहून ती गाणं म्हणत असे. पण एखाद्या वेळेस काही अडचणीमुळे पार्टीतली चांगली नाचणारीण नसेल तर आईला नाचावं लागत असे. नाचता नाही आलं तर, "का ग नाचता नाही येत, तर आली कशाला ?" असे प्रेक्षकातले बघे ओरडत असत. कोल्हाटी समाजात जर नाचण्यास मुलगी पाठवायची असेल तर दुसरी-तिसरी पास झाल्याबरोबर लगेच रवाना करतात. किंवा कोणी कोणी त्यासाठी मुलींना शाळेत पाठवत नाहीत. त्या

मुलींला लहानपणापासूनच नाच शिकण्यासाठी पार्टीत पाठवतात; घरची नाचकामपार्टी असेल तर तिथंच पाठवतात. दुसऱ्याची पार्टी असेल तर दुसऱ्याच्या पार्टीत पाठवितात. तबला वाजविणारा वस्ताद नाचण्यास शिकवितो, आणि पेटीमास्तर गाणं शिकवितो. पिक्चरचं गाणं जर स्टेजवर म्हणायचं असेल तर पार्टीतल्या सर्व स्त्रिया आधी एकत्र येऊन सराव करतात; स्टेजवर चांगलं म्हणता येईल असं वाटलं तरच ते गाणं स्टेजवर म्हणत असत.

गावामध्ये नाचण्याची पार्टी उतरली की गावातली लहानथोरापासून सर्व सभोवताली येऊन बघत असत. गावातून शिधा येत असे. कोणी पीठ, तर कोणी डाळ देत असे. नाचणाऱ्या बाया थोडासा साडीचा किंवा ताडपत्रीचा आडोसा लावत आणि अंघोळ करत असत. पण बाहेरच्यांना थोडं थोडं दिसायचं, पोरं येऊन दुरून बघत बसायची. व म्हणायची, "आयला, हिचं अंग लई गोरं हाय. किती पैसे घेईल रं !" असं म्हणून मोठमोठ्यानं हसायची. हे सगळ्यांना ऐकू यायचं. मग नाचणाऱ्या बाया गडबडीनं अर्धवटच आंघोळ करायच्या, व लाजून तंबूत परत जायच्या. दिवसभर पार्टीतले सर्व लोक झोप घेत असत. सायंकाळचे पाच वाजले की त्यांचा दिवस उगवायचा. बाया उठायच्या, हातपाय धुऊन मेकपला बसायच्या. पावडर, काजळ, लाली, स्नो, सारं चेहऱ्यावर थापायचं. दिवसभर डोक्याला आकडे लावलेले असायचे, ते काढायचे. आकड्यामुळे हवं असेल तसं वळण केसाला राहात असे. नाचताना केसांचा बुचडा मागे बांधावा लागत असे. केसांच्या बुचड्यावर फुलांचा गजरा असे. नऊवारी साडी काश्टा घालून नेसायची. पायात जाड कपड्याचा पट्टा बांधून त्यावर घुंगरू बांधत असत. नाच होई. आणि आलेला पैसा सर्वजण हिश्श्याप्रमाणे वाटून घेत असत.

चंद्रकलाबाई दिसायला देखणी होती. चंद्रकलाबाईला खूप जणांनी विचारलं होतं की बाई, तुम्ही नाच सोडून कायमचं आमच्याजवळ राहाल का ? चंद्रकलाबाईच्या रूपाला खूपजण भाळत होते. पण चंद्रकलाबाई कोणाच्याच हाती लागत नसे. नुसतं गोड बोलून ती प्रेक्षकांना आपल्याकडे आकर्षित करीत असे. पण गोविंदराव पाटलानं तिला जाळ्यात घेतलीच. गोविंदराव पाटलानं चंद्रकलाबाईला जमीन दिली, सोनं-चांदी दिलं, घर बांधून दिलं. ठोकेवाडीला गोविंदराव पाटलांनी चंद्रकलाबाईचा नाच बंद करून तिला कायमची घरी ठेवली. कोल्हाट्याच्या बाया, कोणी कला म्हणून नाचतात तर कोणी मजबुरीनं नाचतात. ज्या मजबुरीनं नाचतात त्यांना कोणी कायमची पोटाची भाकरी देत असेल तर त्या नाचगाणं बंद करतात. कोणी कला म्हणून नाचतात त्या म्हाताऱ्या होईपर्यंत तशाच नाचतात. चंद्रकलाबाई घरी बसल्यामुळे पार्टीमधील सर्व साथीदार दुसऱ्या पार्टीला जाऊन मिळाले.

आईपण घरी आली, कारण आईला हे जीवन नको होतं.

कोंडिबा आजोबा हे आईला पार्टीत जाण्यास सांगत. पण आई जाण्यास तयार नसे. कारण त्या वातावरणाला बघून तिला घृणा येत असे. तिला नाच आवडत नसे. तिचं मास्तरीण होण्याचं स्वप्न होतं. आई रडून रडून आपला त्रास कोंडिबा आजोबाला सांगत होती. कारण तसेच अनुभव तिला आले होते. गावोगावी जत्रेला नाचत असताना बघ्यांनी आईचा हात दाबला होता. मानवतला असताना आईला गावातल्या दादानं पळवून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला होता. तिला तो खांद्यावर उचलून घेऊन जात असतानाच चंद्रकलाबाईच्या भावानं भांडण करून आईला त्याच्या जाळ्यामधून सोडवली होती. चंद्रकलेचा भाऊ शरीरानं दणकट होता. चंद्रकलेचा भाऊ वेळंवरती आला नसता तर आई त्या दादाच्या वासनेची भक्ष्य झाली असती. एक पोलीसदेखील मानवतला असतानाच म्हणाला होता की, ''तुला एक दिवस पळवून घेऊन जाईन.'' त्यामुळे आई पार्टीत जाण्यास घाबरत असे. ती कोंडिबाला रडून रडून सांगत होती, आता मी नाचणार नाही. मला शाळा शिकून मास्तरीण व्हायचंय. पण कोंडिबा आजोबा ऐकण्यास तयार नव्हता. कारण पैशांच्या लालचीनं कान असून तो बहिरा झाला होता. त्याला ह्रदय असूनदेखील ते मेल्यासारखं झालं होतं. पोपटाला जसं पिंजऱ्यात बंद करून ठेवतात तसंच आईला आणि आईच्या विचारांना घरात बंद करून ठेवलं होतं. पिंजऱ्यातल्या पोपटासारखी आई झुरत होती. तिची विचार करण्याची शक्तीच बंद झाली होती. आता तिला वाटू लागलं की पळून जावं तरी कुठं ? आता तिच्याशी लग्न कोण करणार ? कारण आई आता मास्तरणीच्या ऐवजी नाचणारीण झाली होती. पायातल्या घुंगरांनी तिला बेडी घातली होती. म्हणतात ना ! एकदा का चिखलाच्या दलदलीत फसलं की बाहेर येणं फार कठीण असतं. तशीच आई फसली होती.

करमाळ्याचे आमदार नागदेवराव जगताप एके दिवशी नेरल्याला मत मागण्यासाठी निवडणुकीच्या काळात आले होते. त्यांनी आईला बघितलं. आजोबाला आमदार म्हणाले, ''कोंडिबा, तुला काय पाहिजे ते सांग. पण तुझी पोरगी माझ्याकडे ठेव.'' ते आमदार असल्यामुळे आजोबा एका वाक्यापलीकडे काहीच बोलले नाहीत, ''तुमच्याशिवाय कोणाला येऊ देणार नाही आणि ती नाचणारपण नाही. शांता माझ्या घरी राहील. तुम्ही येत जा-जात जा.''

आमदारानं आईचा चिरा उतरला. चिरा म्हणजे लग्नाच्या सोहळ्यासारखाच. नाचणारणीच्या जीवनात जी पहिली व्यक्ती येईल, तिनं नाचणारणीच्या नातलगानं मागितली ती रक्कम द्यावी लागते किंवा रक्कम किती घ्यायची ती ठरवली जाते. रक्कम सोन्याच्या, रुपयाच्या किंवा जमिनीच्या स्वरूपात असू शकते. पहिल्या रात्री नाचणारणीला नवरीसारखं सजवतात. देवाची पूजा करतात. तिला सर्व नातलगांच्या पाया पडावं लागतं.

गळ्यात मंगळसूत्र, पायात जोडवी घालतात; सोन्याचे दागिने असतील तर ते देखील घालतात. 'सुहागरात'सारखी खोली फुलांनी सजवली जाते. नाचणारीण, जो चिरा उतरतो, त्या व्यक्तीस नवऱ्याचं स्थान देते. मग ते स्वतःच्या मर्जीनं असो वा कोणाच्या भीतीमुळे असो. जोपर्यंत ती व्यक्ती तिला सांभाळते तोपर्यंत त्याशिवाय नाचणारीण दुसऱ्याशी लैंगिक संबंध ठेवत नाही. जी व्यक्ती नाचणारणीशी लैंगिक संबंध ठेवते तिला मालक असं नाव देतात. किंवा कोल्हाटी शब्दात 'कजा' म्हणतात.

आजोबानं आपली परंपरा चालू ठेवली. कृष्णा कोल्हाटी म्हणजे माझे पणजोबा यांनी जिजीचं शरीर विकलं होतं. जिजी कृष्णा कोल्हाट्याच्या पोटची मुलगी नव्हती, पण कोंडिबा आजोबा यानं तर आपल्या स्वतःच्या पोटच्या पोरीचं शरीर विकलं. आईच्या मनातल्या विचारांना पिंजऱ्यात बंद करून ठेवलं. या नात्याला कोणतं नाव द्यावं ? बाप म्हणावं तर बाप हा शब्द बदनाम होईल, अपवित्र होईल.

आईचा चिरा उतरल्यापासून आमदार नेरल्याला येऊ लागले. आमदार आपल्या घरी येतात याचा कोंडिबा आजोबांना गर्व वाटत असे. कोंडिबा आजोबा आता आईची खूप माया करू लागला. कारण पैशाचा सडा दारात पडू लागला होता. रोज मटण-दारू मिळू लागली. आमदारापासून आईला दिवस गेले. आमदार असल्यामुळे आईला आजोबांनी गर्भ वाढविण्यास सांगितलं. दोन-अडीच महिन्यांतच आमदार आजोबाला म्हणाले, "शांताला करमाळ्याला माझ्याजवळ ठेवा." आजोबा आमदाराला म्हणाले, "मी माझ्या मुलीला करमाळ्याला ठेवू शकत नाही. ती नेरल्यालाच राहील." चंद्रकलाबाई पाटलाच्या घरी राहिल्यानंतर, तिथं कोणी तरी चंद्रकलाबाईला विष घालून मारलं होतं. अशी खूप उदाहरणं होती. नाचणारणीला गोड बोलून घेऊन जातात, आणि जाळतात किंवा विष घालून मारून टाकतात किंवा कोठेतरी विकून टाकतात. त्यामुळे आजोबा आईला दुसरीकडे कोठेच राहू देत नव्हता. आजोबा आई मरू नये म्हणून किती काळजी घेत होता ! पण तिच्या जीवनाची काळजी घेत नव्हता. चिता ही माणसाला मेल्यावर जाळते. त्यामुळे माणूस जळून कायमचा नाहीसा तरी होतो, पण चिंता ही माणसाला जिवंत असताना जाळून मारते. आई चिंता करून करून पोकळ आडासारखी होऊ लागली होती. कोंडिबा आजोबा आईला मरूही देत नव्हता, आणि जगूही देत नव्हता.

आमदारांनी आईकडे येण्याचं सोडून दिलं. किती सहजासहजी हे नातं तोडता येतं ना ? बरोबर आहे. शेवटी नाचणारणीला बाजारातली वस्तू समजतात ! पण बाजारातली वस्तू विकत घेऊन वापरल्यास परत करता येत नाही. आईनं काही दिवस आमदारांची वाट बघितली. तिला वाटायचं, आमदार नक्की येतील ! दोन महिने झाले, ते आले नाहीत. आईच्या पोटात गर्भ वाढत होता. आईला मोठा प्रश्न पडला होता की, ह्या जीवाचं काय करावं. कोंडिबा आजोबा आईला म्हणाला, "बाई, अब आमदार आवनेवाला नाही, पेट पाडी लार" (आता आमदार येणार नाही. गर्भ पाडून टाक) द्रौपदी मांगीण आईचं पोट चोळू लागली. पोट चोळताना आई किंकाळ्या फोडू लागली. मग द्रौपदी मांगिणीनं

पोट चोळणं थांबवलं आणि आजीला म्हणाली, ''तीन महिन्यांचा बाळ हाय पोटात. पोर पाडायला नाय जमायचं. शांता मरून जाईल.'' आईच्या जिवाची काळजी फक्त त्यांना होती. नाचणारणीच्या भावना, मन, जीवन यांच्याशी कोल्हाटी समाजात काही संबंध नसतो. नाचणारणीचं फक्त शरीर जिवंत असतं, मनाला मारून टाकलेलं असतं. पोटातला गर्भ पाडतात. कारण मुलामुळे नाचणारणीची कमी किंमत केली जाते.

आईच्या पोटात गर्भ वाढत असतानाच ती परत भावाच्या व बापाच्या संसाराला ठिगळ जोडण्यासाठी नाचायला गेली. आई नाचण्यासाठी नसती गेली तर कोंडिबा आजोबाचं कुटुंब उपाशी मेलं असतं. कारण भीक मागण्यासाठी सुद्धा ते कष्ट करू शकत नाहीत. काम करणं तर दूरच. कामाच्या पैशानं पोट भरणं म्हणजे ते पाप समजतात. फक्त कोंडिबा काळेंच्या घरात असं नव्हतं; सर्व कोल्हाटी समाजात असंच चालतं. बाईनं नाही कमावलं की त्यांच्याकडं दुष्काळ येतो. गर्भ वाढत होता, आणि आई नाचत होती. आठ ते साडेआठ महिने गर्भ वाढेपर्यंत आईला रात्रभर जागरण, गावोगावी गाडीनं फिरताना गाडीचे दणके; आणि पोटात गर्भ वाढत होता. हे सर्व आई गप्प बसून सहन करीत होती. बटण दाबलं की मशीन सुरू होतं, तसं आईचं जीवन होतं. नववा महिना चालू झाला आणि आई नेरल्याला आली. माझा तिथंच जन्म झाला.

मी एक-दोन महिन्यांचा झालो न झालो तोच परत आई नाचायला गेली. यावेळी आईबरोबर मला सांभाळण्यासाठी जिजीपण मालनच्या पार्टीत आली. कारण नाचणारणीला आपल्या बापाच्या आणि भावाच्या संसाराला ठिगळ जोडायचं असतं आणि ठिगळ जोडताना नाचणारणीला आपल्या पोटच्या पोराला बघायला वेळ मिळत नाही. नाचणारणीला बापाचं आणि भावाचं ठिगळ जोडता जोडता त्याची एवढी सवय झालेली असती की फक्त आई, बाप, भाऊ, भावाचं मूल तिच्या डोळ्यासमोर असतात. आपल्या स्वत:ला मूल आहे याचीपण नाचणारणीला आठवण राहात नाही. जिजीला आईबरोबर पार्टीत कोंडिबा आजोबानं पाठविली. साळी जिजी कोल्हाटीण झाली. कोल्हाट्याची जिजी नंतर पाटलीण झाली. पाटलाची बुरख्यातली जिजी आता जलसापार्टीत देखील पोरं सांभाळण्यासाठी जाऊ लागली. एकीकडे विधवा म्हणून जिजी जीवन जगत होती, आणि दुसरीकडे वांझ म्हणून जगत होती. भांडण झालं की समाजात जिजीला वांझ म्हणत असत, कारण जिजीला मूलबाळ नव्हतं. आईला माझ्याकडे बघायला वेळ मिळत नसे. कारण रात्रभर नाचगाणं, दिवसा झोप आणि माणसांची गर्दी असायची. कधी पाजलं-कधी नाही असं व्हायचं. म्हणून जिजी वरचं दूध बोळ्यानं पाजत होती. मी रडत असताना आई तशीच मला सोडून नाचायला जात होती. नाचताना माझा रडण्याचा आवाज बघ्यांना आणि आईला- पण पडद्यामागून ऐकू येत असे. नाचता नाचता आई मनात रडत असे. आणि वरून हसत असे. पण नकली हसण्यामागे किती दु:ख लपलं होतं याची बघ्यांना काय कल्पना ! अधिकच रडायला लागलं की नाचताना मला पाजायला ती आत यायची. लगेच बघे लोक मोठ्यानं ओरडत असत. त्या मोठमोठ्याने ओरडण्यामुळे मला अर्धवट पाजून आई

परत नाचायला जाई. कारण फार उशीर झाला की बघे लोक दगड मारायचे. जिजी मांडीवर घेऊन रडत रडत मला थोपटत असे. ही सगळी जिजीनं मला सांगितलेली हकीगत.

ढेबेगावाला जत्रेला मालनची पार्टी गेली. आईपण गेली. त्यावेळी चार ते पाच महिन्यांचा मी असेन. जिजी मला घेऊन आईचा नाच बघायची, कोणी शिव्यागाळ करतात का ते बघायची. ढेबेगावला किसन पाटलांनी दारूच्या नशेत, आई नाचत असताना, आईचा हात पकडून तिला ओढलं. आई खाली पडली. जिजीनं बघितलं आणि मला तसाच रडताना खाली ठेवला आणि किसन पाटलाला चपलेनं मारलं, "मेल्या, भाड्या, ही नाचणारीण हाय, वेश्या नाही. ही कला हाय." तिनं पाटलाची नशा उतरवली. पाटील म्हणाला, "तुला उद्या दावतो. इथं कशी नाचती ते बघतोच मी." मालननं तंबू सोडला. सामान बांधून रात्री ढेबेगाव सोडलं आणि पार्टी सांगलीला आली. सांगलीचे गुंडाप्पा हे जमीनदार आणि दादा होते. गुंडाप्पांनी जिजीला सांगितलं की, "शांताला माझ्याकडे ठेवा." जिजी म्हणाली, "माझ्या हातात काय नाही. तिच्या बापाला विचारून बघते." तो गुंड असल्यामुळे आई घाबरायची. म्हणून जिजीनं तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. पण चार-पाच गुंडांना घेऊन गुंडाप्पा आला आणि जिजीला बोलला की, "एक रात्र शांताला माझ्याकडे ठेवा. नाही तर तिला पळवून घेऊन जाऊ. तिचं हाड पण तुम्हाला नजर पडू देणार नाही." जिजी घाबरून गेली आणि होय म्हणाली. सर्व काळजीत पडले. पळून जावं की कसं ? त्यावेळी मी पाच महिन्यांचा. मालनचा भाऊ शिर्पा यानं डाव रचला की रात्रभर शेतात लपायचं आणि सकाळीच उठून चालत जायचं. आई-जिजी संडासच्या निमित्तानं बाहेर गेले. मी रडायचो. माझ्या रडण्याचा आवाज ऐकू नये म्हणून जिजी माझं तोंड दाबायची. दोघी रडून रडून थकल्या. सकाळीच बस पकडून जिजी आणि आई नेरल्याला आल्या. यमाच्या हातातून सुटका झाल्यासारखं आईला वाटू लागलं. ही हकिगत जिजी रडत रडत मला सांगत असे.

आई नेरल्याला आल्यानंतर आजोबाला सांगू लागली की, मी आता नाचायला जाणार नाही. आजोबानं मारहाण सुरू केली. आईची लहान बहीण सुशीला हिलापण नाच शिकायला पाठवायचं असं ठरलं. सुशीला म्हणजे माझी मावशी. सुशीलामावशी त्यावेळी दहा किंवा अकरा वर्षांची असेल. ती तिसरी-चौथी पास झाली होती. आई, जिजी आणि सुशीलामावशी हे सर्व अंधऱ्याच्या पार्टीत गेले. अंधऱ्याच्या पार्टीनं ठरवलं होतं की मराठवाड्यात फिरायचं. मराठवाड्यात कलेची इज्जत केली जाते असं म्हणत. आणि अंधऱ्याची पार्टी पश्चिम महाराष्ट्र फिरली होती. आता त्यांना मराठवाड्यात फिरायचं होतं. पार्टी फिरत फिरत धारूरला गेली. तिथं धारूरकर म्हणून वयस्कर व्यक्ती होती.

तो दारूपण पित होता. पार्टीत रोज येऊ लागला. तो खूप श्रीमंत होता. आईच्या प्रेमात पडला. त्याला आईचा स्वभावदेखील आवडायचा, म्हणून जिजीला धारूरकरांनी विनंती केली की, "जिजी, तुम्हाला असं फिरल्यानं-नाचल्यानं काय मिळतं ? चांगल्या पोरीचं कशाला तुम्ही हाल करता ? राजाच्या राजकन्येसारखी शांता वाटती. तुम्हाला जेवढं फिरून-नाचून मिळतं त्याच्यापेक्षा जास्त मी देतो. पण शांताला घरी घेऊन जा. तिला ह्या वातावरणात ठेवू नका." जिजी, आई घरी आले. सुशीलामावशीला नाच शिकायला अंधऱ्याच्या पार्टीतच ठेवली.

त्यावेळी मी एक वर्षाचा असेन. मला मुडदूस झाला होता. म्हणून धनगराच्या उकिरड्यात पुरलं होतं. अशी अंधश्रद्धा होती की मुलाला मुडदूस झाला की धनगराच्या उकिरड्यावर ठेवून मुलाच्या अंगावर उकिरड्यावरचा कचरा टाकतात आणि थोड्या वेळानं बाहेर काढतात. असं केल्यानं मुडदूस जातो, म्हणे.

आईनं धारूरकरांची दारू सोडली. आईला धारूरकरांपासून दिवस गेले. आई बाळंतीण झाली. मुलगा झाला. धारूरकरला खूप आनंद झाला होता. धारूरकर आठवड्यातून- पंधरा दिवसांतून त्यांच्या घरून म्हणजे धारूरवरनं नेरल्याला येत होते. कोंडिबा आजोबाचा सर्व संसार धारूरकर सांभाळीत होते. धारूरकर वयस्कर होते आणि दारूमुळे त्यांची प्रकृती खालावत चालली होती. आईनं धारूरकरांची दारू सोडली. पण फार उशीर झाला होता. दारूमुळे त्यांचं सर्व फुप्फुस खराब झालं होतं. आणि धारूरकरांचा मृत्यू झाला !

आईला परत नाचायला जावं लागणार होतं. कारण कोंडिबा आजोबाचं घर आईवर अवलंबून होतं. घरात सर्व लहान होते. आता सुशीला पण नाच शिकली. ती पण दिसण्यास देखणी होती. जणूकाही आकाशातली परी धरतीवर उतरली आहे ! घरात चर्चा चालू होती. आता दोघी खूप कमावतील. सुशीलामावशीला या नाचगाण्याची सवय झाली होती. शेतातली सुगी जवळ आली होती. जिजीला माधवराव पाटलानं दिलेलं शेत नेरल्यातल्या नामदेवला बटईनं दिलं होतं. बटई म्हणजे नामदेवनं शेतात काम करून पीक काढायचं. झालेलं पीक; अर्धं नामदेवला आणि अर्धं कोंडिबा कोल्हाट्याला. सुगी जवळ आली होती. म्हणून जिजीला पार्टीत जाता येत नव्हतं. कारण सुगीच्या दिवसात जिजी शेत राखायला जायची. रात्री तिथंच झोपायची. जिजीचं वय झालं होतं, पण शरीरानं दणकट होती. चाळीस-पंचेचाळीस वर्षांची जिजी असेल. जिजी पुरुषासारखी रात्री शेतात झोपायची आणि घरातले पुरुष बायांसारखे घरातच आयतं खात बसायचे. जिजीच्या स्वभावात काळानुसार बदल होत चालला होता. माधवराव पाटलाच्या काळात जिजीचा आवाज जरी आला तरी कलावती आजी कोपऱ्यात लपून बसायची. सर्व घराच्या भिंती थरथर कापायच्या. आता तीच कलावती आजी जिजीला वाटेल त्या शिव्या देई. कारण कलावतीच्या दोन मुली आता कमवायला आल्या. माझी आई आणि सुशीलामावशी. काही दिवस सासूचे आणि काही दिवस सुनेचे या म्हणीसारखं जिजीचं झालं होतं. पण जिजीला हे सहन होत नव्हतं. जिजीचं आणि आजीचं नेहमी भांडण चालायचं. आजी जिजीला बरोबर

जेवायला देत नसे. घरी मटण केलं की, रस्सा आणि मटणाच्या दोन-चार बोट्या शेतात जिजीसाठी पाठवायची. कधी चटणी तर कधी ठेचा. जिजी जेवण करायची नाही. पण भूक लागली की तीच चटणी-भाकरी खात होती आणि पोटाची रिकामी खळगी भरायची. जिजी शेतातच नदीला अंघोळ करायची. गावात, घरी पीक आल्याशिवाय येत नव्हती.

शेतातली ज्वारी घरी आली, सुगी संपली, जिजीचं शेतात काम संपलं, आता जिजी शेतातून घरी आली. पार्टीत जाण्याची तयारी सुरू झाली. आई, सुशीलामावशी, दीपकला आणि मला सांभाळण्यासाठी जिजी; सेलूला थिएटर बांधलं होतं तिथं निळाबाईच्या पार्टीत जायचं ठरलं.

कोल्हाट्यांच्या पार्ट्यांचं असं गावोगावी फिरणं आता बंद झालं आहे. आता गावात एक थिएटर बांधतात. त्या थिएटरच्या बाजूलाच कलावंतांना राहण्यासाठी पाच-सात खोल्या बांधतात. अंघोळ करण्यासाठी न्हाणी वगैरे सोय असते. ज्यानं थिएटर बांधलं तो थिएटरमालक. थिएटरच्या समोरच तिकिटाचं एक घर असतं. थिएटरच्या समोर चहा-नाश्ता करण्यासाठी छोटंसं हॉटेल आणि पानपट्टीचं दुकान असतं. एका थिएटरमध्ये चार ते पाच पार्ट्या उतरतात. प्रत्येक पार्टीला राहण्यासाठी एक खोली. प्रत्येक पार्टीला नाचण्यासाठी अर्धा ते पाऊण तास देतात. ज्याची पहिली पार्टी असते त्यांना शेवटी परत एकवेळेस नाचण्यास संधी देतात. कारण पहिली पार्टी साधारण रात्रीचे आठ किंवा नऊ वाजता सुरू होते. इतक्या लवकर बघे येत नसतात. म्हणून ही सोय. पहिल्या पार्टीची पंचेचाळीस मिनिटं झाली की घंटी वाजते. पहिली पार्टी स्टेजवरून उतरल्याबरोबर दुसरी पार्टी नाचण्यास सुरुवात करते. अशी, प्रत्येक पंचेचाळीस मिनिटाला घंटी वाजते.

पार्टी नाचण्याचा वेळ संपला की प्रत्येक पार्टी आपापल्या तबलापेटीची पूजा करतात. त्यांना फुलांचा हार घालतात. एका स्टेजवर चार-पाच पार्ट्या असतील तर थिएटर बंद होण्यासाठी रात्रीचा साधारण एक तरी वाजतो. थिएटर बंद झाल्याबरोबर सगळ्या प्रेक्षकांना थिएटरबाहेर जावं लागतं. रात्री बाराच्यानंतर किंवा एकच्यानंतर बैठक सुरू होते. चार-पाच माणसांचा ग्रुप असतो. बैठक म्हणजे चोखंदळ प्रेक्षकांची सोय. असे प्रेक्षक जादा पैसे देऊन विशिष्ट पार्टीचा किंवा विशिष्ट कलावतीचा नाच करतात. या बैठका रात्री एक-नंतरच रंगतात. त्या बैठकीचा रेट तीनशे रुपयांच्या वर असतो. त्या बैठकीत त्याचे चार-पाच मित्र येऊ शकतात. एक वाजल्यापासून बैठक सुरू होते. म्हणजे नाचगाणे पहाटे पाचपर्यंतदेखील चालू शकते. नंतर ते प्रेक्षक निघून जातात. बैठक आपापल्या खोलीमध्ये होऊ शकते, किंवा स्टेजवरसुद्धा. जेवढ्या रुपयांची बैठक झाली त्यापैकी अर्धे रुपये थिएटरमालकाला द्यावे लागतात, आणि अर्धे पार्टीतले लोक हिश्श्याप्रमाणे वाटून घेतात. नाचणाऱ्या बाया रात्रभर नाचून नाचून थकून जातात. एखाद्या नाचणारणीला झोप आली

तरी तिला बळंच नाचावं लागतं. पण ती सांगणार कोणाला ? नवीन नाचणारीण असेल तर तिला असलं जीवन नकोसं वाटतं. पळून जावंसं वाटतं. पण नंतर हळुहळू तिला सवय होऊन जाते. सर्वजण सकाळी अकरा वाजेपर्यंत झोपतात. नंतर उठून अंघोळी वगैरे करतात. दुपारचं जेवण करून पुन्हा झोपतात किंवा गाण्याचा-नाचण्याचा सराव करतात.

स्टेजवर नाचणाऱ्या नाचत असताना बघे नाचणारणीला पैसे देतात. कडी वाजविणारा त्या बघ्यांकडून पैसे आणत असतो, आणि नाचणाऱ्या बाईच्या ते स्वाधीन करतो. पैसा घेताना नाचणारणीला वेगवेगळ्या चालीत नाचून पैसा घ्यावा लागत असतो. अशीच एक चाल म्हणजे घोडा. घोडा नाचत असताना खूप त्रास होतो. घोडा नाचणं म्हणजे दोन पायांवर बसून घोड्याच्या चालीसारखं नाचायचं. घोडा नाचताना मांड्या दुखतात. कधी कधी कमान करून बंदा रुपया कपाळाला चिकटवून घ्यायला लावतात. अशा वेळी सकाळी कंबर फार दुखते. कधी बघ्याला एखादी नाचणारीण आवडली तर तो बघ्या कडीवाल्याजवळ एकेकच्या दोनदोनशे नोटा देऊन ठेवतो, आणि नाचणाऱ्या बाईला पळत येऊन एकेक न्यायला लावतो. त्यामुळे बाईची स्टेजवर पळापळ सुरू होते. ती नाचणारीण स्टेजच्या मागच्या पडद्यापासून ते स्टेजच्या कठड्यापर्यंत पळत येऊन एकेक रुपया घेत असते ! कडीवाला स्टेजच्याखाली कठड्याजवळ उभा असतो. नाचणारीण पळत पळत एकेक रुपया घेत असताना ढोलकीवाला आणि तबलेवाला एकाच चालीत मोठमोठ्यानं वाजवीत असतात आणि बाकीच्या सर्व नाचणारणी एकाच तालात पायातले घुंगरू मोठमोठ्यानं वाजवून साथ करतात. स्टेजवर असा मोठमोठ्यानं आवाज घुमत राहातो. कमीत कमी पंधरा ते वीस मिनिटं तरी त्या नाचणारणीला ही कसरत करावी लागते. शेवटी नाचणारीण थकून जाते, पण रुपये देणारा थकत नाही. त्याचा आनंद त्या रुपयांच्या मस्तीतच असतो ना ! रुपया माणसाला नाचवतो म्हणतात तो असा!

सेलूच्या थिएटरला चार-पाच पार्ट्या होत्या. सुशीलामावशी नाच चांगला करायची. जवानीत आली होती. शहाणी झाली होती. आईची आणि सुशीलामावशीची कमाई सुरू झाली. सुशीलामावशीसाठी जिजीजवळ चांगली चांगली श्रीमंत माणसं येऊन विचारायची की, सुशीलाला घरी ठेवा. पण जिजी तयार होत नसे. कारण आता चांगला अनुभव आला होता की घरी नाचणारणीला ठेवतात. पोर झालं की सोडून-निघून जातात. माझ्या आईचं असंच झालं होतं. म्हणून आईनं पण आता याच कलेत प्रगती करण्याची तयारी केली. आईच्या आता अंगवळणी पडलं होतं. ती धीट झाली होती. आता मनातली भीती निघून गेली होती. पार्टी बघण्यासाठी सेलूचे प्रतिष्ठीत लोक येऊ लागले, कलेची कदर करू लागले. सेलूचे सोपानराव गोळेगावकर हे रोज येऊ लागले. घरचे खूप श्रीमंत. दोनशे ते तीनशे एकर जमीन. लग्नाची बायको होती, पण मूल नसल्यामुळे सोपानराव खूप दुःखी होते. सोपानरावला सुशीलामावशी खूप आवडायची. वयानं वयस्कर, तरी

ते चाळीस वर्षांचे होते. सुशीलामावशी साधी आणि सरळ होती. सरळ भांग पाडायची. डोक्यावरनं नेहमी पदर असायचा. इतर बायांसारखे डोक्याला आकडे पाडत नव्हती. लक्ष्मीसारखी सुशीलामावशी दिसत होती. आई आणि सुशीलामावशी इतर बायांपेक्षा वेगळ्या दिसायच्या. त्यांचं बोलणंदेखील ब्राह्मणासारखं शालीन वाटायचं.

सोपानराव गोळेगावकर यांचे कधीच दुसऱ्या बाईशी लैंगिक संबंध नव्हते. त्यांची लग्नाची बायको, दुसरं लग्न करा म्हणून सोपानरावांना खूप आग्रह करायची. कारण मूल नसल्यामुळं वंश बुडेल याची त्यांच्या बायकोला काळजी वाटायची. पण चाळीस वर्षांचे झाले तरी त्यांनी दुसरं लग्न केलं नव्हतं. सुशीलामावशीला बघितल्यापासून मात्र त्यांचं मन बदललं. त्यांनी त्यांच्या बायकोला पण सुशीलामावशी दाखवली. जिजीला सोपानराव खूप आग्रह करीत असत की, सुशीलाला माझ्याकडे ठेवा. "माझ्या बायकोसारखं तिला सांभाळीन. तुम्ही जे मागाल ते मी देतो." पण जिजी म्हणत असे, "आताच पोरीचं काय वय आहे ! तिनं आताच नाचायला सुरुवात केली. मी तिचा नाच बंद करू शकत नाही. कारण सुशीलाच्या बापानं बजावून सांगितलंय, साहेब." सोपानराव जिजीला आणि सुशीलाच्या बापाला विनंती करून करून थकले. पण ते सुशीलामावशीचा नाच बंद करण्यास तयार झाले नाहीत. शेवटी सोपानराव म्हणाले, "ठीक आहे. सुशीलाला नाचू द्या. पण ती माझी राहील. तुम्हाला लागंल तेवढं मी पुरवत जाईन." सोपानराव यांनी सुशीलामावशीचा चिरा उतरला. तबला-पेटी घेऊन तिला स्वतंत्र पार्टी काढून दिली. आईच्या नावानं पार्टीचं लायसन्स काढून दिलं.

सुशीलामावशी फक्त नाचण्याच्या वेळी थिएटरला येत असे. आणि नंतर सोपानरावांच्या घरी राहात असे. सोपानरावांची बायकोच काय त्यांचे नातेवाईकदेखील सुशीलामावशीवर प्रेम करीत. सुशीलामावशी त्यांच्या घरची राणी झाली होती. सुशीलामावशीला सोपानरावपासून मुलगी झाली. सोपानरावाच्या बायकोला, त्यांच्या सर्व नातेवाईकांना खूप आनंद झाला. त्या मुलीचं नाव त्यांनी जया ठेवलं. मोठ्या आनंदानं बारसं साजरं केलं. सगळ्या गावाला जेवण दिलं गेलं. सोपानराव आनंदानं सुखावून गेले. त्यांचा आनंद गगनात देखील मावत नव्हता. सुशीलामावशी नाचत असून देखील सोपानराव सुशीलामावशीला लग्नाची बायको समजत. सुशीलामावशीला काहीच कमी पडू देत नव्हते ते. सोपानराव आईची खूप इज्जत करीत असत. आईला ते बहीण मानत.

सुशीलामावशीच्या पाठचा पोपट, म्हणजे माझा मामा, याचं लग्न जमलं. लग्नासाठी कोंडिबा आजोबानं सोपानरावांकडे पैशांची मागणी केली. सोपानराव म्हणाले, "सात-आठ महिने थांबा. भुईमुगाच्या शेंगा झाल्या की पैसे देतो. पुढच्या उन्हाळ्यात लग्न करू." पण कोंडिबा आजोबा ऐकण्यास तयार नव्हता. त्यानं आपला मुलगा, पोपटचं लग्न एका महिन्यात करायचं ठरवलं होतं. एक महिन्यात लग्न केलं नसतं तर कोंडिबा आजोबाची आणि

पोपटमामाची चार माणसांत इज्जत गेली असती. पण त्याला काय माहीत की इज्जत काय असते ! त्याला फक्त पैसा कशाला म्हणतात आणि तो कशाप्रकारे कमवावा एवढंच माहीत होतं. शेवटी कोंडिबा आजोबांनी जिजीला सांगितलं की, सेलूहून पार्टी दुसरीकडे घेऊन जा आणि सुशीलाला सोपानरावांच्या घरी जाऊ देऊ नका.

खडूनं काळ्या फळ्यावर लिहिलेलं जसं सहज पुसता येतं तसं फक्त पैशासाठी सोपानरावांचं स्वप्न तोडून टाकलं गेलं होतं. कोंडिबा आजोबाला फक्त पैसा पाहिजे होता. सोपानराव खूप रडले. माझ्या मुलीला तरी मला देऊन टाका, तो माझा वंश आहे असं सोपानराव म्हणत असत. सुशीलामावशीला काहीच कळत नसे. बाप जसं म्हणेल तसं वागायचं एवढंच तिला माहीत होतं. सेलूहून पार्टी परळीला आली. पोपटमामाचं लग्न एका महिन्यात करायचं होतं. ते जमलं नाही. लग्न सहा महिन्यांकरिता लांबवलं. शालनमावशीची नणंद कस्तूर हिच्याशी पोपटमामाचं जमलं होतं.

पार्टी परळीला आली. पार्टीत शोभामावशी, सुमितामावशी, आणि दुसऱ्या दोन डोंबाऱ्याच्या नाचणारीण बाया होत्या. शोभामावशी आणि सुमितामावशी ह्या कोल्हाट्याच्या, नेरल्याच्याच होत्या. भावकीच लागत होती. शोभामावशी दिसायला सुंदर होती, पण तिला कोणी जास्त विचारीत नव्हते. पैसे पण मिळत नसायचे. पार्टीचं नाव होतं शांता-सुशीला. मोठमोठाले श्रीमंत आणि चांगले लोक पार्टी बघायला येऊ लागले. स्वतंत्र पार्टी असल्यामुळे आई पार्टीची मालकीण होती. तिच्या आवाजात अजून सुधारणा झाली. आई आणि सुशीलामावशी यांचा चांगलाच जम बसला होता. आई गाण्यात पटाईत होती आणि सुशीलामावशी नाचण्यात. दोघींची जोडी जमली होती. आईचं आता गाण्यामध्ये मन रमलं होतं. गाण्यात अजून चांगली सुधारणा करावी असा विचार ती करू लागली. परळीच्या गणगवळण थिएटरला अजून तीन पार्ट्या होत्या. हौसाबाई म्हणून एक पार्टी होती. शांता-सुशीलाची पार्टी आल्यापासून सर्व पार्ट्या थंड झाल्या होत्या. पार्ट्या-पार्ट्यांमध्ये शर्यत चालायची की बघू कोणाच्या पार्टीवेळेस जास्त प्रेक्षक येतात ! आईनं गाणं सुरू केल्याबरोबर लोकांच्या अंगावर काटे उभे राहत असत. सांगली, कोल्हापूर, लातूर ह्या गावांवरून मोठमोठे श्रीमंत-गाण्याचे शौकीन, शांता-सुशीलाची पार्टी कोठे आहे, विचारीत येऊ लागले. आई गाणं म्हणू लागली की गाणं तोडण्याची शर्यत चालू व्हायची. गाणं तोडणं म्हणजे तेच गाणं परत गाण्यास सांगणं. मी आता चार वर्षांचा झालो होतो. मला सर्व समजत होतं. पार्टी चालू झाली की मी समोरच्या खुर्चीवर जाऊन बसत असे. कोण कसं नाचतं ते मी बघायचो आणि पार्टी संपली की कोण कशी नाचते ते नाचून दाखवायचो.

थिएटर गच्च भरलं होतं. आई 'दम मारो दम मिट जाये गम' गाणं गात होती. एका बघ्यानं दहा रुपये देऊन तेच गाणं परत गाण्यास सांगितलं. स्पेशल कॅबिन म्हणून थिएटरच्या बाजूला असतं. त्याचं तिकीट महाग असतं. कॅबिनमध्ये एका इन्स्पेक्टरनंदेखील ते गाणं मोडलं. पहिल्या वेळेस ज्या बघ्यानं गाणं मोडलं होतं त्या बघ्यानं तीस रुपये देऊन गाणं मोडलं. दोघांमध्ये गाणं मोडण्याची शर्यंत सुरू झाली. तीस ते चाळीस वेळेला गाणं मोडलं गेलं. दोघंही दारूच्या नशेत आणि पैशाच्या मस्तीमध्ये धुंद झाले होते. आईचा मधुर आवाज पूर्ण थिएटरमध्ये घुमत होता. बाकीच्या सर्व पार्टीच्या बाया थिएटरमध्ये येऊन आईचं गाणं ऐकत होत्या. दहा पैसे-रुपयाच्या नाण्यांचा थिएटरवर वर्षाव होत होता. सगळ्या बाया हक्का-बक्का होऊन बघत होत्या. आईला एवढे पैसे मिळतात म्हणून मी हरखायचो. दुसऱ्या नाचणारणीला पैसे मिळू लागले की मला राग येई. वाटायचं, माझ्याच आईला लोकांनी पैसे द्यावेत. माझ्या बाजूला बसणाऱ्या, नाचणाऱ्या बाया म्हणत होत्या, "नेरल्याची पार्टी कोणाला ऐकत नाही. सगळी गिऱ्हाईकं तिकडे जातात. या पोराची आई लय चांगलं गाणं म्हणती. बग ना ग किती पैशाची धार लागली ! थिएटरमध्ये टाळ्यांचा आवाज घुमतोय." मला खूप चांगलं वाटायचं.

आई तेच ते गाणं म्हणून थकली होती. मग कसंतरी म्हणू लागली. तो इन्स्पेक्टर नशेत आईला म्हणाला, "तुझ्या आईची पुच्ची. पैसे लय झालं का, गाणं चांगलं म्हण की !" आईनं पेटी मास्तरची चप्पल घेतली आणि तशीच भिरकावून मारली; म्हणाली, "तुझ्या मायला पुच्ची नाही का ? विनापुच्चीतून आलास का रं ?" आई खूप चिडली होती. ती आता धीट झाली होती. रोज रोज ह्या गोष्टीचा तिला वीट आला होता. जिजी, मी घाबरलो. दीपक दोन वर्षांचा होता. जिजीनं माझ्याजवळ दीपकला ठेवला आणि थिएटरमालकाला बोलावून आणलं. थिएटरमालकाच्या माणसांनी त्या इन्स्पेक्टरला खूप मारलं, आणि आईची माफी मागायला सांगितली.

आता आईचा आणि सुशीलामावशीचा चांगलाच जम बसला होता. नवीन नवीन श्रीमंत आणि चांगली माणसं पार्टीला येऊ लागली. गाण्याच्या बैठकी रोज होऊ लागल्या. कृष्णराव वडकर ऊर्फ नाना हे रोज पार्टीत येऊ लागले. ते आईला पैशाची धार सुरू करायचे. दुसऱ्या प्रेक्षकांचे पैसे घेण्यास वेळच मिळू देत नसत. पार्टी सुरू झाल्यापासून ते पार्टी बंद होईपर्यंत सतत पैसे आईला देत राहात. त्याशिवाय संध्याकाळी गाण्याची बैठक करू लागले. नाना हे सोनपेठचे. त्यांना गावातले लोक सावकार म्हणत. सोनपेठ परळीपासून तीस ते पस्तीस कि.मी.; त्यामुळे नाना रोज पार्टी बघण्यासाठी सोनपेठला येऊ लागले. त्यांच्याबरोबर त्यांचे मित्र पण असायचे; दत्तोपंत परळकर-राजूकर. नाना पांढरेशुभ्र कडक इस्तरीचे कपडे घालून येत असत. ते खोलीत आल्याबरोबर अत्तराचा वास येत असे. पार्टीतल्या सर्व बायांना वासामुळे कळायचं की सावकार (नाना) आले.

हातात दोन-तीन अंगठ्या, गळ्यात दोन-तीन तोळ्यांची सोन्याची साखळी. रोज येते वेळेस नाना खाण्यासाठी वेगवेगळे पदार्थ आणत. आई तब्येतीनं खूप सुकटी होती. आईसाठी नाना काजू-बदाम आणायचे. सांगलीचे, कोल्हापूर-लातूरचे श्रीमंत लोक आईची पार्टी बघायला येऊ लागले. आईला पैसे देण्यासाठी रोज स्टेजवर शर्यत सुरू झाली. आई सगळ्यांशी गोड बोलत असे. पण नानांना वाटायचं, आईनं फक्त त्यांच्याशी बोलावं. आई आणि सुशीलामावशी दारू पिणाऱ्या प्रेक्षकांशी कमीच बोलत. त्यामुळे दारू पिणाऱ्यांनी पण दारू सोडून दिली किंवा कमी केली; ते आईच्या आणि सुशीलामावशीच्या समोर दारू पिऊन येत नसत. दारू पिणाऱ्या माणसांचे आईला बरेवाईट अनुभव आले होते. आईची गाण्याची कला प्रसिद्धीला येऊ लागली होती. पैसा खूप मिळायचा. त्यांची पहिल्या नंबरची पार्टी झाली होती. पार्टीत नाचणारे कलाकार चांगले मिळाले होते. दोन-चार महिन्यांनंतर आई शास्त्रशुद्ध गाणं शिकण्यासाठी एका वडील गुरूकडे जाणार होती.

आईचं मन आता चांगलंच रमलं होतं. गीत गाणं हेच जीवन असं ती समजू लागली. पण चांगली श्रीमंत दारू पिणारी, न पिणारी माणसं आईला असा नाच सोडायला सांगू लागली. खूप जण आग्रह करून थकले. ते म्हणायचे की आम्ही तुम्हाला बंगला बांधून देतो. तुमच्या नेरल्याला म्हणाल ती जमीन घेऊन देतो. आईसाठी कोणी सोन्याचा चप्पलहार तर कोणी पाटल्या आणू लागले. आई सर्वांना स्पष्ट सांगायची, "हे बघा, मी आता माझं नाचगाणं सोडू शकत नाही, तुम्ही माझी कला बघण्यासाठी येत जा. तुम्ही माझं नाचगाणं बंद करण्यासाठी येत असाल तर कृपया तसदी घेऊ नका."

आईला नाचगाणं बंद करायचं, परत सुरू करायचं याचा तिटकारा आला होता. तिनं बघितलं पण होतं की ही श्रीमंत माणसं गोड बोलून, वाटेल ते आश्वासन देऊन नाचगाणं बंद करतात, घरी ठेवतात. काही दिवस येतात आणि बंद करतात. नाचणारणीनं नंतर काय करावं ? हे अंगावरच्या कपड्यांसारखं झालं, आज नवीन कपडा घातला, खराब झाला की दुसऱ्या दिवशी फेकून दिला. पण नाचणारीण ही अंगावरचा कपडा नाही की जोपर्यंत वापरावा वाटला तोपर्यंत वापरायचा, आणि नंतर टाकून द्यायचा !

कृष्णराव वडकर हे आईला रडून रडून विनंती करायचे. नानांबरोबर त्याचे मित्र येत असत. पैशाचा उधळवाट करायचे, पण दारू पित नव्हते. नानांचे मित्र आईला समजावून सांगत, "बाई, तुम्ही सावकाराचा स्वीकार करा. तुम्ही सोनपेठला चला. तुमच्यासारख्या देखण्या, सुशिक्षित बाईला हे चांगलं दिसत नाही. तुम्ही चुकून या व्यवसायात पडलात. तुम्हाला दोन मुलं आहेत. त्यांचं पुढे काय ? आम्ही आहोत तुम्हाला. कोण काय करतो ते बघून घेऊ. तुमच्या जीवनाचं सार्थक होईल."

पण आई नेहमी नकार देत असे. म्हणायची, "मला माफ करा, मी माझं नाचगाणं बंद करू शकत नाही. माझे वडील मला कुठंच राहू देत नाहीत" नाना सोनपेठहून रोज

सकाळीच येऊ लागले. दिवसभर खोलीमध्ये त्यांचे मित्र आणि नाना आईची परत परत विनंती करीत. नानांच्या डोळ्याला दिवसभर पाणी चालूच असायचं. रडून रडून नाना डोळे लाल करीत. सगळ्या पार्टीतल्या बाया, त्यातल्या त्यात सुमितामावशी, नानांना समजावून सांगायची, ''सावकार, असं वेड्यासारखं करू नका. आम्हाला नाच-गाण्यात आनंद वाटतो का ? आम्ही काय आमच्या स्वखुशीनं आलोत का ? आम्हालाही वाटतं की आम्हाला नवरा असावा. घरं असावं. पण हे आमच्या नशिबात नाही. आमच्या घरचे आम्हाला कुठंच राहू देत नाही. तुम्ही लोक पण नवीन असताना चांगलं वागतात आणि नंतर सोडून देता. फुलांचा वास जोपर्यंत येतो तोपर्यंत त्यांचा वास घेतात अन् टाकून देतात. मग त्या नाचणारणीनं काय करावं ? जी आपल्या सर्व घरच्यांचं नाव तोडून तुमच्या बरोबर येते. तिला घरचे पण घरी येऊ देत नाहीत. कारण नाचणारणीचं वय झालं की नाचणारणीला तुम्हीच काय पण नाचणारणीचे आई-वडील, भाऊ-बहिणी कोणीच नातेवाईक विचारत नाहीत. कित्येक नाचणारणींचं उदाहरण आहे की, तिला लग्नाचं वचन देतात, पैशाचं आमिष दाखवतात, ती बिचारी सर्व नाती सोडून तुमच्याशी नातं जोडते. आणि तिचं वय होत आलं की सोडून दिलं जातं. ज्या नाचणारणीला मुलं होतात, तिचं कसंतरी भागतं. पण जिचं मूलच नाही त्या नाचणाऱ्या रस्त्यावर भीक मागतात. कारण भीक मागण्याशिवाय किंवा जीव देण्याशिवाय नाचणारणीकडे दुसरं असतंच काय ? कारण कोणताच समाज तिला स्वीकारत नाही. अन् सावकार, शांता पैशाला भाळणारी बाई नाही. तिच्यापुढे पैशाचा ढीग ठेवतात. पण तिचं पाऊल वाकडं पडत नाही. शांताचं तर सोडूनच द्या, प्रत्येक नाचणारणीला तुमच्याबरोबर येण्यासाठी विचार करूनच यावं लागतं, सावकार. तुमच्या पुढे हात जोडते. शांताच्या पाठी लागणं सोडून द्या.'' सुमिता रडून नानाला सांगत होती. पण नाना आपलाच हट्ट घेऊन बसले. म्हणायचे, ''मी माझ्या मुलाची शपथ घेऊन सांगतो, मी शांताला धोका देणार नाही. शांता माझ्याबरोबर नाही आली तर मी इथंच विष पिऊन मरून जाईन.'' सगळ्या पार्टीतल्या बाया घाबरल्या.

इकडे रमेश पाटील नावाचा तरुण कॉलेजचा मुलगा रोज पार्टी बघायला येऊ लागला. सुशीलामावशीला तो विचारीत असे. पण सुशीलामावशीदेखील आईसारखीच नकार देत असे. पार्टी चालू झाली की, नाना आईला पैसे देत आणि रमेश पाटील सुशीलामावशीच्या पार्टीत पैशाचा धुमाकूळ उठवायचा. दोन हजार, तीन हजार पार्टीला येऊ लागले. पार्टीतल्या बाया नाचून-नाचून, पैसे घेऊन थकायच्या. दुसऱ्या पार्ट्या तोंडात बोट घालून बघायच्या. त्यांना वाटायचं, शांता-सुशीलानं बघ्यांवरती जादू केली असावी. सगळीकडे शांता-सुशीला पार्टीचंच नाव निघायचं. हौसाबाईची पार्टी त्याच थिएटरला होती. ती पण चांगली गाजलेली कलाकार होती. हौसाबाईचा नाचण्यात कोणी हात पकडू शकत नव्हता. पण शांता-सुशीलाची पार्टी आल्यापासून ती घाबरली; आईवर खूप जळायची. खोलीवर

मारलेले लिंबू, बावल्या टाकायची. आईनं हा प्रकार खूप वेळेस बघितला. पण ती गप्प बसत असे. हौसाबाईचा नखरा जास्तच वाढला. आईला बघितलं की बोटं मोडायची. आईसमोर तिनं खोलीवर लिंबू टाकलं. आईनं बघितल्याबरोबर तिच्या झिपऱ्याला धरलं आणि खाली पाडलं. लगेच पार्टीतल्या शोभा, सुमिता बाहेर आल्या. तिला त्यांनी तिच्या छातीवर, पोटावर बसून मारलं. तिनं त्या दिवशी परळीहून पार्टी बदलली आणि पार्टी लातूरला गेली.

सुशीलामावशीवर कॉलेजची मुलं लाईन मारायची. रमेश पाटलाचे डोळे लाल होत. कोंडिबा आजोबा परळीला आले. जिजी सर्व पैसा जमा करून ठेवी आणि कोंडिबा आजोबाला देत असे. हजारो रुपये कमावून आईला आणि सुशीलामावशीला पाच पैसेदेखील खर्च करायला मिळत नसत. सर्व पैसा जिजीकडे असायचा. जमा झालेला पैसा ती भावाच्या म्हणजे कोंडिबा आजोबाच्या स्वाधीन करायची. कोंडिबा आजोबानं जिजीला एवढा त्रास दिला तरीदेखील भाऊ आहे म्हणून ती त्याची माया करायची. त्याला खायला घेऊन जात होती. असं नाचणारणीचं जीवन असतं. सोन्याचे सर्व दागदागिने कोंडिबा आजोबाला जिजी देत असे. स्वतःच्या पोटाला ती खात नव्हती, पण भावाचा संसार उभा करीत होती. कोंडिबा आजोबा मात्र मटन, कोंबड्या, दारू पिऊन मजा करायचा. पाहुण्याला उसने पैसे देत असे, कारण त्याच्यामुळे त्याला चार पाहुणे विचारीत होते, किंमत देत होते. पण त्याला काय माहीत होतं की ही फुकटची, हरामाची शान आहे ! कोंडिबा आजोबानं आईला सांगितलं, "पोपटच्या लग्नाचा बस्ता बांधायला मी आलोय."

नाना त्यावेळेस तिथंच होते. नाना लगेच कोंडिबा आजोबाला परळीच्या बाजारात घेऊन गेले आणि कोंडिबा आजोबाच्या मनासारखा बस्ता त्यांनी बांधून दिला. कपड्यांचा गट्ठा बांधून घेऊन तो नेरल्याला गेला.

परळीचा एक वर्षाचा करार संपला. थिएटरला पार्टी लावण्यापूर्वी करार केला जातो. आता पार्टी लातूरच्या थिएटरला लावली. परळीहून जाताना थिएटरातली सर्व माणसं रडत होती. निरोप समारंभ झाला. लातूरला पार्टी परळीपेक्षा जास्त चालू लागली. अनेक लोक आईला मागणी घालत. पण आई नाही म्हणत असे. नाना लातूरलापण येऊ लागले. नाना पैशाची उधळपट्टी करत होते. आईला विष पिण्याची धमकी देत होते. आई नानाच्या प्रेमाला हळुहळू भाळू लागली. आई एवढा पैसा कमावायची, तेवढा कोंडिबा आजोबा गमावायचा. दारू पिऊन मजा करायचा. जिजी आईला कोणाशीच जास्त बोलू देत नसायची. आईच्या अंगावरचे दागिने ती काढून घेत असे आणि ते कोंडिबा आजोबाच्या हवाली करायची. आईनं पण विचार केला, शेवटी एवढं कमावून काय अर्थ आहे ? आई ह्या जीवनाला कंटाळली होती. जिजी आईला कधी कधी मारायची. कारण कोंडिबा आजोबानं सांगितलं होतं की पोरींना धाकात ठेव. नाहीतर पळून जातील. जिजीचा स्वभाव

बदलत चालला होता. कारण परिस्थतीच तशी आली होती. कोंडिबा आजोबाला पैसे कमी पडले की, तो जिजीशी भांडण करीत असे. जिजीला वाटेल ते बोलत असे. जिजी वैतागून आईवर राग काढायची. आईला पाच पैसे पण खर्च करू देत नव्हती.

दिवस मावळला की, खोलीत खूप माणसं यायची. कोणी कॉलेजची पोरं असायची तर कोणाच्या तोडात दातांचा पत्ता नसायचा. माणसं खोलीत आली की आई जिजीला म्हणायची, "याला बाहेर घेऊन जा". पण कधी कधी मी जात नसे. कारण आई दीपकला जवळ ठेवायची आणि मला जिजीजवळ. मी बाहेर गेलो नाही की, माणसं मला कधी पाच रुपये, खायला द्यायचे, कधी बाहेर फिरायला घेऊन जायचे. माणसं उठून गेली की, पार्टीतल्या बाया हसायच्या आणि म्हणायच्या, "काय ग बाई, त्या म्हाताऱ्याच्या तोंडात एकबी दात नव्हता. तरीबी आला होता. त्याला म्हातारपणी बी लय कंड हाय. अन् ज्याला मिश्या बी फुटल्या नाही तो बी येतो. काय देवानं जन्म दिला आपल्याला ? तो म्हातारा तुझ्याकडे लय बघायचा. आवडली वाटतं त्याला."

पार्टीत लाल्या नावाचा माणूस होता. त्याला बायको-पोरंबाळं नव्हती. बेवारशी होता. बायांसारखा बोलायचा. पार्टीतलं सर्व काम करायचा. पाणी भरायचा. पार्टी बघायला आलेल्या माणसांची कामं ऐकायचा. दळण दळून आणायचा. हात हलवत चालायचा. पार्टी बघायला आलेली माणसं त्याची चेष्टा करायची, "अगं बया, इकडे ये की, मला मुका दे." लाल्या म्हणायचा, "जाऊ द्या बया, तुम्हाला दुसरा धंदाच नाही." मी त्याला खूप हसायचो. त्याच्या चड्डीला पकडून खाली खेचायचो. लाल्या मोठ्यानं बोंबलायचा आणि जिजीला जाऊन सांगायचा.

आईनं मला नेरल्याला पाठवून दिलं. मी चार वर्षांचा झालो होतो. आईनं दीपकला तिच्याजवळ ठेवलं. माझ्यापेक्षा आई दीपकचे लाड जास्त करायची.

आई नानांच्या प्रेमाच्या जाळ्यात सापडली. नानांबरोबर पळून जाण्याचा तिनं विचार केला. कारण पळून गेल्याशिवाय जिजीनं आईला नानांबरोबर जाऊ दिलं नसतं. हे आईला चांगलं माहीत होतं. नानांना पहिली लग्नाची बायको होती. आणि तीन मुली व एक मुलगा एवढं नानांचं कुटुंब. आईनं नानांना विचारलं, "तुम्हाला पहिली बायको असताना मला तुमच्या घरी का ठेवत आहात ? माझ्याकडे का येता ? या जलसापार्टीवर का पैसा खर्च करता ? माझ्या ऐकण्यात आलं आहे. यापूर्वी एका नाचणारणीबरोबर तुमचे संबंध होते." नाना म्हणाले, "माझ्या बायकोपासून मला सुख मिळालं असतं तर मी ह्या जलसापार्टीत आलोच नसतो." नानांनी त्यांच्या मुलाची शपथ घेतली की आईला घर बांधून देईन, शेती घेऊन देईन. तिला सुखात ठेवीन. मग नानांनी आणि आईनं ठरवलं की कोणत्या दिवशी पळून जायचं.

पार्टीतल्या सर्व लोकांना शुक्रवारी पिक्चर बघण्यासाठी बाहेर जाण्यास थिएटर-मालकाकडून परवानगी होती. आई त्यावेळी बावीस-तेवीस वर्षांची होती आणि दीपक दोन वर्षांचा. शुक्रवारी सर्वजण पिक्चरला निघाले. 'श्री ४२०' हा पिक्चर लागला होता.

पार्टीतल्या सर्व -सुमिता, शोभा, सुशीलामावशी आणि आई. आईबरोबर दीपक होता. मला नेरल्याला ठेवलं होतं. सर्वांना 'श्री ४२०' हा पिक्चर बघायचा होता. आईनं मुद्दामच सांगितलं, ''मला त्या पिक्चरला नको. मला दुसऱ्या पिक्चरला जायचं. तुम्ही जा. मी आणि दीपक दुसरीकडे जातो.'' आईनं त्या दिवशी सोन्याचे सर्व दागिने बरोबर घेतले, जिजीकडून चावी घेतली. आई दीपकला घेऊन सरळ लातूरच्या बसस्टॅण्डवर गेली. नाना आईची वाटच बघत होते. आई, दीपक, नाना परळीला आले. परळीला टांगा आणला होता. टांग्यातून सोनपेठला गेले. सोनपेठला सिद्धेश्वर नावाचा देव होता. तिथं आई-नानांनी शपथा घेतल्या, नाना आईला टांग्यात घेऊन घरी गेले.

तो वाडा होता. एका कोपऱ्याला माडी होती. त्या माडीवर नानांची पहिली बायको राधाबाई आणि दोन मुली -जयश्री, राजेश्री- आणि मुलगा सुरेंद्र - त्याला बंड्या म्हणायचे - एका कोपऱ्यात राहात. मोठी मुलगी सुमिता हिचं लग्न झालं होतं. माडी आणि दुसऱ्या कोपऱ्याला पत्र्याच्या दोन खोल्या. मध्ये गायवाडा होता. एका पत्र्याच्या खोलीत पिठाची गिरणी होती. एका खोलीत आई राहू लागली. आतच नाहाणी होती. आईला सोनपेठला आणण्यापूर्वी नानांनी खोली सजवून ठेवली होती. जेवण करण्यापुरती भांडी होती. सर्व संसार भरला होता. खोलीत शेणाचा वास येत असे. कारण समोरच गायवाडा होता. त्यात म्हशी बांधल्या जात होत्या. आईच्या नवीन जीवनास सुरुवात झाली. सर्व गाव आईला बघण्यासाठी प्रयत्न करीत होते. पण आई खिडकीच्या बाहेर डोकावूनदेखील बघू शकत नव्हती; कारण तिला स्वत:ला आवडत नसे आणि नानांनादेखील आवडत नसे.

इकडे लातूरला, पार्टीतल्या सर्व बाया पिक्चरहून आल्या. सर्व एकमेकींना विचारू लागल्या, शांताबाई कुठं अजून आली नाही ती ! जिजी घाबरली. सर्वांनी रडायला सुरुवात केली. रात्रीचे आठ वाजले तरी आई आली नव्हती. जिजीनं थिएटरमालकाला सांगितलं. थिएटरमालकांनी पोलिसांना फोन केला. सर्व लातूर पालथं केलं. पण आई सापडली नाही. त्या दिवशी थिएटर बंद केलं. जिजी छातीवर हात मारून रडत होती. सगळ्या थिएटरमध्ये आरडाओरड सुरू झाली. जिजी पार्टीतल्या बायांना रागावायची, म्हणायची, ''रांडांनो, तिला एकटीला कशाला सोडलं ? माझ्या पोरीचं काय झालं असंल ग ?''

सगळ्यांना वेगवेगळा संशय येऊ लागला. तिला कोणीतरी पळवून घेऊन नेलं, तिला मारून टाकलं. सुशीलामावशी शुद्धीवर नव्हती. ती वेड्यासारखी करू लागली. जिजीचा घसा रडूनरडून कोरडा झाला. म्हणायची, ''आता मी माझ्या भावाला काय तोंड दाखवू ?'' जिजी दुसऱ्याच दिवशी सोनपेठला गेली. आईची आणि जिजीची भेट झाली. जिजीच्या जिवात जीव आला. आईनं जिजीला स्पष्ट सांगितलं, ''मी येऊ शकत नाही.'' नानांचा गावात दाब होता. कारण नाना गावचे सावकार होते. नाना हे साळी समाजाचे होते.

बघा, किती आश्चर्याची गोष्ट म्हणावी लागेल ! नानांचं नाव कृष्णराव वडकर. त्यांनी कोल्हाट्याच्या शांताला आता साळ्याची केली. आणि जिजीही साळी समाजाची होती. पण कृष्णाकोल्हाट्यानं – माझ्या पणजोबानी – साळ्याच्या जिजीला कोल्हाटीण केली होती. साळी समाज म्हणजे, कपडे विणणे–कापसापासून कापड तयार करणे हा त्यांचा व्यवसाय. पण नाना तो व्यवसाय करीत नव्हते, सावकारी करीत होते.

जिजी निराश होऊन लातूरला आली. आई गेल्यामुळे पार्टीत रंग राहिला नव्हता. आता सुशीलामावशी पार्टीची मालकीण झाली होती. पण आई गेल्यापासून पार्टी बरोबर चालत नसे. सुमितामावशीचाही आवाज चांगला होता. ती आईच्या जागी गाणं गाऊ लागली. आई गेल्यापासून पार्टीतली लक्ष्मी निघून गेल्यासारखं झालं. सुशीलामावशी नाचतानादेखील रडत असे. सुशीलामावशीची हिंमत खचली होती. दुसऱ्या पार्टीतल्या बायांना बरं वाटू लागलं. दोन महिने पार्टी लातूरला चालली. पोपटमामाचं लग्न जवळ आलं होतं. त्यासाठी रुपये पाहिजे होते. शेवटी पैशामुळे रमेश पाटलाचं स्थळ मावशीनं स्वीकारलं. पार्टी मोडली. तबला–पेटी सर्व सामान नेरल्याला आणलं. लग्नाचा सर्व खर्च करीन असं रमेश पाटलानं मान्य केलं.

कोंडिबा आजोबानी ठरवलं की सोनपेठला जाऊन आईला आणायचं. कोंडिबा आजोबा, आजी निघाले. सोबत मिजास मावशी होती. ती भावकीतलीच, पण धीट होती. बरोबर दोन–चार पैलवान घेऊन आईला बांधून जीपमध्ये घालून आणायचं असा डाव त्यांनी केला आणि ते सोनपेठला गेले. सोनपेठच्या बसस्टॅण्डवर जीप आलेली नानांनी बघितली आणि नाना पळत घरी गेले. त्यांनी आईला लपवून ठेवलं. जीप सरळ नानांच्या घरी गेली. पण आई कोंडिबा आजोबाला सापडली नाही. माडीवर आई लपली होती. कोंडिबा आजोबा आणि त्याचे पैलवान, मिजासबाई, आजी गायवाड्यात बसले. आजी, मिजासबाई मोठमोठ्यानं कोल्हाटी भाषेत ओरडत होते. सर्व गल्लीला आवाज ऐकू जात होता. ''मुड्द्या, भाड्या तुझं चांगलं होणार नाही. माझ्या पोरीला पळवून आला, माय–लेकराची ताटातूट केली. खाली ये, तुला चिरून काढते. बायल्यासारखा घरात लपून काय बसलायस ? गोड बालून माझ्या पोरीचा गळा कापला, ग.'' अशा, मोठमोठ्यानं आजी आणि मिजासबाई नानांना शिव्या देत होत्या. माडीच्या घराचं दार बंद होतं. त्यामुळे त्यांना वर जाता येत नव्हतं.

''अगं, रांड बाहेर ये, धगड्याला घेऊन काय बसलीस ? किती दिवस सांभाळणार हाय तुला ? तुझं हाड–मासं विकून टाकत्याल. अंगातली जवानी संपली की देत्याल तुझ्या गांडीवर लात. मग तू कशी येतीस ते बघतो. तू मेल्यास तुला मसणवट्यात कोणबी घेऊन जाणार नाही. कुत्र्याच्या पुढं टाकतील तुला''

आई माडीवर बसून सर्व ऐकत होती. आई, नानांची मोठी बायको राधाबाई, आणि

त्यांची मुलं माडीवर बसून सर्व ऐकत होते, त्यामुळे आईला मरून जावं असं वाटू लागलं. नेरल्याहून आलेली माणसं. सर्व इज्जतीची खोल खोलत होती. आता नेरल्याच्या माणसांची बोलणी आईला ऐकावीशी वाटत नव्हती. म्हणून कानाला हात लावून ती बसली होती. गल्लीतली लोकं काय म्हणतील, त्यापेक्षा नानांची भावकी काय म्हणेल, असं आईला वाटू लागलं.

दीपकला खेळायला बाहेर कोणी तरी मुलगा घेऊन गेला होता. म्हणून आई आणि नाना चिंतेत होते. दीपक नेरल्याच्या माणसांच्या हाती लागू नये म्हणून पाठीमागच्या मोठ्या दारानं दीपकला शोधण्यासाठी गड्याला पाठविलं. पण दीपक आणि भावकीचा एक मुलगा खेळत खेळत गायवाड्यातून आले. आजीला दीपक दिसल्याबरोबर, तिनं दीपकला उचलून जवळ घेतलं. त्याला माया लावली. दीपकपण आजीला चिकटला. कारण तो आजीला चांगला ओळखत होता आणि नानाच्या माराला दीपक घाबरत होता. आजी मोठ्यानं ओरडू लागली की, ''अग ये शांते, तुझं पोरगं माझ्याजवळ हाय. ए, मी चालले त्याला घेऊन. आता कशी नेरल्याला येत नाहीस ते बघती मी.''

आई घाबरली. आईचा सर्व जीव दीपकमध्ये होता. दीपकशिवाय आई कुठंच राहू शकत नव्हती. माझ्याविषयी तिला आवड नव्हती. आई नानांच्या पुढ्त पाया पडू लागली, ''माझ्या पोराला आणा, नसता माझं काहीच खरं नाही.'' आईनं खिडकीतून डोकावून बघितलं, तर दोन-चार पैलवान हातात काठ्या घेऊन उभे होते. मिजासबाईनं साडी वर बांधली होती. आजीजवळ दीपक होता अन् आजोबाजवळ वायरची मोठी काठी होती. हे सर्व बघून आईला चक्कर आली. ती खाली पडली. नानांना काय करावं हेच कळत नव्हतं.

नेरल्याची सर्व माणसं दीपकला घेऊन बसस्टॅण्डवर थांबली. कारण जीपमधलं पेट्रोल संपलं होतं. आई उठली आणि 'दीपक, माझा दीपक' म्हणून रडू लागली. सर्व तिचं सांत्वन करीत होते. नाना बसस्टॅण्डवर गेले. आजीजवळ दीपक होता. त्यावेळी तो तीन वर्षांचा असेल. नाना आजीच्या जवळ गेले आणि म्हणाले, ''अहो, त्या लेकरानं काय केलं ? दीपक माझ्याकडे द्या.'' आजी मोठ्यानं बोलू लागली. तिच्या बोंबलण्याचा आवाज सर्व बसस्टॅण्डवर ऐकू येत होता. आजी मोठमोठ्यानं ओरडून बोलत होती. ''मेल्या, तू माझ्या पोरीचं वाटुळं केलं. माझ्या घरातली लक्ष्मी घेऊन गेलास अन् लाज नाय वाटत. लेकराला बी घेऊन चालला.'' दीपकनं नानाला बघितल्याबरोबर तो आजीच्या पदराखाली लपला. कारण नानांना दीपक खूप घाबरत असे. नानांचा घरात रुबाबच तसा होता. दीपकपण नानांकडे येण्यास तयार नव्हता, आणि आजी बसस्टॅण्डवर नानांची इज्जत काढत होती. त्यामुळे नाना घरी परत आले. कोणत्या तरी पानपट्टीच्या दुकानावर थोडं पेट्रोल होतं. नेरलेकरांनी ते जीपमध्ये भरलं आणि दीपकला घेऊन ते नेरल्याला निघून आले. दीपक तीन वर्षांचा झाला, तरी आईला पितच होता. पित्या वासराला गायीपासून दूर केल्यासारखं दीपक आईपासनं दूर झाला.

मामाचं लग्न पंधरा दिवसांवर आलं होतं. आईला पण पत्र आणि लग्नपत्रिका पाठवली होती. नेरल्याला सगळ्या लोकांना वाटायचं, दीपकला नेरल्याला आणल्यामुळे आई पोपटमामाच्या लग्नाला नक्की येईल. दीपक आईची खूप आठवण करायचा. झोपेतून अचानक उठायचा आणि 'बाई' म्हणून रडायचा, कारण घरातले सर्व तिला बाई म्हणायचे.

लग्न दोन दिवसांवर आलं, सगळे म्हणत. "आता तुझी आई येणार आहे." मला एवढा आनंद होत असे ! मी सगळ्या गल्लीत उड्या मारायचो. आमच्या घरासमोरच्या पिंपळाखाली म्हसोबा होता. मी सकाळीच उठलो. नदीला गेलो. अंघोळ करून चरवीनं पाणी आणलं आणि देवाची पूजा केली, कारण माझी आई येणार होती !

घरात लग्नाची तयारी चालू होती. त्या दिवशी हळदी होत्या. म्हणून सगळे पाहुणे आले होते. मला सुशीलामावशीनं नवीन ड्रेस आणला होता. हळदी सुरू होणार होत्या.

ब्राह्मणात जशा मुंजी करतात, तशाच कोल्हाटी समाजात मुलं लहान असतानाच, दुसऱ्या कोणत्यातरी लग्नात त्यांच्या मुंजी करतात. कोल्हाटी भाषेत त्याला दाडी लावणं असं म्हणतात. दाडी लावली म्हणजे तो मुलगा पक्का कोल्हाट्याचा होतो. पंचाकडून त्याला हळद लावली जाते. नवऱ्यासारखा त्याला सजवतात. मी, अंकुश, राजुमामा, लहानमामा, दीपक आणि सुशीलामावशीचा मुलगा बालाजी, सर्वांची मुंज हळदीच्या कार्यक्रमात होणार होती. पण आई येणार आहे म्हणून परसाच्या पाठीमागे जाऊन मी आईची वाट पाहात बसलो होतो. इकडे हळदीची वेळ झाली. पाच वाजले होते. मला सगळेजण शोधत होते. वरकुटे नावाचं गाव होतं. ते नेरल्याहून दोन कि.मी. दूर. वरकुट्याला बस थांबत होती. त्यामुळे आईला आणण्यासाठी वरकुट्याला गडी गाडी घेऊन गेला होता. दुरून गाडी येत आहे असं थोडं थोडं दिसू लागलं. गाडी जशी जवळ येऊ लागली तसतसा माझा आनंद वाढत होता. बाई आली, बाई आली... मी एकटाच मोठ्यानं ओरडत होतो. आईनं मला नाव ठेवू नये, म्हणून माझ्या नाकाचा शेंबूड पुसला. चड्डी चांगली बांधली. गाडी जवळ आली. त्यात आईसारखीच दिसणारी माझी चुलत बदाममावशी होती. आणि अजून गाडीत भावकीतल्या नाचणारणी होत्या. त्या सर्व माझ्या मावशी लागत होत्या. मी एका हातात चड्डी पकडून गाडीकडे धाव घेतली, आणि 'बाई बाई' म्हणून पळत सुटलो. माझे डोळे पाण्यानं गच्च भरले होते. मावशीनं गाडी थांबवण्यास सांगितलं, मला गाडीत उचलून घेतलं. मला पाहताच तिच्याही डोळ्यात पाणी आलं. मी मावशीच्या मांडीवर जाऊन बसलो. मावशीनं मला छातीला लावलं. गाडी चालूच होती. मध्येच दुसऱ्या मावशीनं सांगितलं, 'ही तुझी आई नाही. ही बदाममावशी आहे.' मी फक्त हुंदके देत होतो. कारण रडायलासुद्धा येत नव्हतं. मला गाडीबरोबर घरी आणलं; सगळी माझी वाट पाहत होती. सगळ्या मावश्या आणि भावकीतली माणसं लग्नासाठी झाले होते. पाहुण्यांनी घर भरलं होतं. फक्त आई कमी होती. घरातले सर्वजण रडत

होते. लग्नाचा आनंद घरात कोणाच्याच चेहऱ्यावर नव्हता.

आम्हाला हळदी लावल्या. मुंडावळी बांधल्या, नवीन ड्रेस घातले. अगदी नवरदेवासारखं सजवलं होतं. आमची मुंज झाली. सगळा कार्यक्रम रडतच झाला. एकशे-एकावन्न रुपयांची मनीऑर्डर आईनं पाठवली. पण आई लग्नाला आली नाही. कारण आईला नानांचा विरोध होता. नाना आईला म्हणत असत, ''तू गेलीस तर कायमची तिकडे जा.''

नानांनी आपला रंग दाखवण्यास सुरुवात केली होती. कारण नानांनी आईच्या स्वभावाला चांगलं ओळखलं होतं. आई जिद्दी आहे, आणि तिला नेरल्याला जाण्यास आता तोंड नाही. ती मरून जाईल, पण आता परत नाचणार नाही.

आईला इकडे आड तिकडे विहीर झालं होतं. आईला रोज मटन खाल्ल्याशिवाय करमत नव्हतं. पण तिची मुलं परत यावी म्हणून आता मी मटणाकडेदेखील बघत नव्हती. देवाची उपासना करू लागली. 'दीपक दीपक' म्हणून आई तडफडत होती. जेवणदेखील बरोबर करीत नव्हती. मुलांना भेटण्यासाठी तिचा जीव व्याकूळ होत होता. पण तिनं आपलं कर्तव्य सोडलं नाही.

इकडे दीपकची प्रकृतीपण खालावत चालली. त्याचे गाल खोल गेले. कधीही उठला की तो 'बाई' म्हणून रडायचा. तो जेवण करीतच नव्हता. जिजीला हे बघवत नव्हतं. सुशीलामावशी पण त्याच्याकडे बघून विचार करायची. म्हणायची, मी शांताबाईच्या ठिकाणी असती तर ? ह्या मुलांनी काय पाप केलं ? पैसा किती माणसाला बदलतो ! यातलाच हा प्रकार.

तिकडे आई मुलासाठी तडफडत होती. हे सर्व का ? फक्त पैशासाठी ? नाचणारणीनं प्रेम करू नये, तिनं संसार करू नये, तिनं तिच्या मुलासाठी जगू नये ? तिचं जीवन फक्त आई, बाप, भाऊ यांच्यासाठी असतं का ? असं कोल्हाट्याच्या ग्रंथांमध्ये लिहिलं आहे का ? कोल्हाटी समाजात सुंदर मुलींनी जन्म घेणं म्हणजे पाप !

नेरल्याला घरात एकमेकांचं कोणाशीच जमत नव्हतं. मोठमोठ्यानं, काही कारण नसता भांडण सुरू व्हायचं. घरात कितीही पैसा आला तरी पुरत नव्हता. घरात लक्ष्मी बरोबर नांदत नव्हती, घरात दोन-तीन वेळा सापदेखील निघाले. घरात सगळे विचार करू लागले. असं का घडायला लागलं ? मी एका कोपऱ्यात दीपकला मांडीवर घेऊन झोपी घालत होतो. दीपक जेवत नव्हता म्हणून मी देखील जेवत नव्हतो. दीपकला ताप आला होता. मी रडत रडत 'बाई बाई' म्हणत होतो, आणि दीपकला थोपटत होतो. सुशीलामावशीचं आमच्याकडे लक्ष गेलं. मी रडतोय हे बघून सुशीलामावशी जवळ आली. ती पण मोठमोठ्यानं रडू लागली. आणि घरातल्या सर्व लोकांशी भांडू लागली. ''या मुलांना तुम्ही सोनपेठेतून आणलं कशाला ? झुरून झुरून मरून गेल्यावर तुम्हाला मुलंही मिळणार नाहीत, आणि त्यांची आई बी मिळणार नाही; यांचा आपल्या घरावर श्राप लागला आहे. आईला तडपवणं चांगलं नसतं. गायचा तळतळाट आपल्याला

लागल्याशिवाय राहाणार नाही. तुम्ही ह्या पोराला सोडून या, नाही तर मी बी या घरातून निघून चालले.''

घराच्या ओसरीत सगळे आमच्याजवळ येऊन बसले. जिजीपण शेतातून आली होती. सुशीलामावशीनं जिजीला सांगितलं, ''या पोरांना तुम्ही उद्याच सोनपेठला घेऊन जा. आपल्या घराला साडेसाती लागलीय.'' जिजी मला आणि दीपकला सोनपेठला घेऊन गेली. त्यावेळी सायंकाळचे पाच वाजले होते. आई आजारी होती. ताप असल्यामुळं आई कण्हत होती. 'दीपक दीपक' म्हणून बडबड करीत होती. आईजवळ नौकारण बनुखाला आणि शेजारीण मुस्लिम समाजाची बाई बसल्या होत्या. आम्हाला बघितल्याबरोबर त्या मुस्लिम बायांच्या जिवात जीव आल्यासारखा झाला आणि आनंदाच्या भरात त्या आईला उठवू लागल्या, ''बाई बाई, तुम्हारे बेटे आ गये, उठो'' आईला उठता येत नव्हतं. आईच्या शरीरात उठून बसण्याएवढीदेखील ताकत राहिली नव्हती. तरीपण आम्हाला बघताच तिनं उठायचा प्रयत्न केला. बनुखालानं आईला उठवून बसवलं. आम्हा दोघांना दोन्ही बाजूंना घेऊन आई रडू लागली, आनंदानं बेभान झाली. थोड्याच वेळानं नाना बाहेरून आले. त्यांचाही आनंद गगनात मावत नव्हता. दीपकला जवळ घेऊन त्याचा ते मुका घेत होते. कारण आई सुखी झाली होती. दीपकला नेरल्याला नेल्यापासून आईला खूप त्रास झाला होता. तो त्रास नानांनादेखील सहन होत नव्हता.

डॉक्टरांच्या औषधानं आईचा आजार जात नव्हता. पण आम्ही सोनपेठला आल्याबरोबर दुसऱ्याच दिवशी आईचा ताप गेला. आई कामपण करू लागली. तिनं आम्हाला अंघोळी घातल्या. आई आमचे एवढे लाड करू लागली की जशी गाय दिवसभर शेतात चरून, हंबरडा फोडतच संध्याकाळी घरी पळत येते आणि दूध काढते वेळेस वासरू दूध पीत असताना त्याला किती चाटून चाटून प्रेम करते ! तशी आई आम्हाला करीत होती. दीपकला अंघोळ घातल्याबरोबर आई दीपकला तिचं दूध पाजायची. पुढे दीपक आठ वर्षांचा होईपर्यंत आई दीपकला पाजत होती. दीपक दूध पीत असताना मी आईकडे बघायचो.

दोन दिवस झाले. आईचा आणि नानांचा काहीतरी विचार झाला आणि आईनं जिजीला सांगितलं की किशोरला नेरल्याला घेऊन जा. मी किशोरला माझ्याजवळ ठेवू शकत नाही. मी नेरल्याला जाणार नाही असा हट्ट धरला, पण आईनं नानांची भीती मला दाखवली. ''ते तुला मारतील, तू मोठा झाल्यानंतर मग मी तुला इकडे घेऊन येईन.''

जिजीनं विचारलं, ''का काय झालं ? हा मुलगा तुझा नाही ?'' आई म्हणाली, ''तसं नाही जिजी, दीपकचे नाना नको म्हणतात. खोली खूप लहान आहे.'' गल्लीतल्या लोकांना फक्त दीपक एकटा मुलगा आहे असंच माहीत होतं. मला सोनपेठला ठेवलं असतं तर नानांची आणि आईची इज्जत गेली असती. त्यांना समाजानं नावं ठेवली असती. माझ्यामुळे त्यांचं नाव गेलं असतं. आईची मजबुरी मला समजली नव्हती.

मी आणि जिजी तिसऱ्या दिवशी नेरल्याला आलो. मी परत आल्यामुळे सगळ्या घरात आनंद झाला. जिजीनं सगळ्यांना सांगितलं की त्याची आई किशोरला सोनपेठला ठेवायला तयार नाही. मी नेरल्याला परत आलो याचा आनंद सर्वात जास्त आजोबांना झाला होता. कारण त्यांना वाटलं, माझ्यामुळे तरी आई दर महिन्याला पैसे पाठवत जाईल.

माझ्याबरोबरची कोल्हाट्याची मुलं कांतीलाल, बेला, वंदना, लंका आणि दिलीप ही सर्व–शाळेत जाऊ लागली. परंतु मला कोणी म्हणत नसे की 'तू शाळेत जा, तुझं नाव शाळेत टाकतो.' आजोबा म्हणायचे, "तुला पार्टीत तबला, पेटी वाजवायला पाठवायचं. शाळा काय करायची." दुसरी मुलं शाळेत जाताना मी त्यांच्याकडे बघायचो. मला पण शाळेत जावं वाटायचं. नेरल्याच्या शाळेत आईचे क्लासमेट गवळी हे शिक्षक होते. ते मला नेहमी म्हणत असत, "लेका किश्या, तुझी आई फार हुशार होती, आज ती मास्तरीण म्हणून राहिली असती. पण बिचारीचं नशीबच फुटकं होतं." असं म्हणून ते डोळ्याला पाणी आणत असत. मी गवळी गुरुजींना सांगितलं, "मला शाळेत जावं वाटतं, माझं नाव शाळेत टाका ना ?" गवळी गुरुजींनी माझं शाळेत नाव टाकलं :

किशोर शांताबाई काळे.

नाचणारणीच्या मुलाच्या पुढे आईचं नाव लावलं जातं, कारण बापाचा पत्ता नसतो!

"उद्यापासून शाळेत ये" असं गवळी गुरुजी म्हणाले. जिजीनं मला पाटी घेऊन दिली. मी शाळेत जाऊ लागलो. मी जातो म्हणून आजोबांनी अंकुशमामाचं नाव शाळेत टाकलं. राजूमामाचं नाव शाळेत टाकलेलं होतं. पण तो शाळेत जात नसे.

गुरुजी रोज नावानं हजेरी घ्यायचे. माझा नंबर आला की म्हणायचे, "किशोर शांताबाई काळे !" सुरुवातीला मुलं हसायची, नंतर त्यांनी हसणं बंद केलं, कारण एका पौवळाच्या मुलानं माझ्या बापाचं नाव विचारलं. त्यावेळी मामांनी त्याला खूप मारलं होतं. त्यावेळेपासून अंकुशमामाला मुलं खूप घाबरायची, म्हणायची, "कोल्हाटी पोरं लय खराब हायत, त्यांच्या नादी नगं लागायला." मी गुरुजींना माझ्या बापाचं नाव विचारलं. तर गुरुजी मला म्हणाले, "अरे किश्या, शिकायचं ना ? मी म्हणालो, "हो." गुरुजी म्हणाले, "मग हेच नाव असू दे." मी रोज शाळेत जात असे. गुरुजी माझं नाव नेहमी घेत असत. मी रोजच्या रोज सर्व पाठ करीत असे. सर्व मुलांना गुरुजी माझं उदाहरण देत असत.

पोपटमामापेक्षा लहान रंभामावशी. तिला नाच शिकायला पाठविलं होतं आणि नंतर तिच्यापेक्षा लहान बेबीमावशीलादेखील नाचायला पाठवलं. त्या दोघी गेल्यापासून घरातलं सर्व काम मला करावं लागत असे. कारण बेबीमावशी किराणासामान, दळून आणणं, शेण लावणं, सडा टाकणं हे सर्व काम करीत असे. जिजी पण दोघींबरोबर बार्शीला

चित्रा-गुलजारच्या पार्टीत गेली. जिजी होती तोपर्यंत मला जिजीचा आधार होता. ती खायला पैसे देत होती. जिजी गेल्यापासून मला करमत नव्हतं.

जिजी नेरल्याला होती तोपर्यंत परसावरतीच राहात होती. परस म्हणजे अर्धा एकर जमीन होती. गावाच्या थोड्या बाहेर जमिनीला चहुबाजूंनी काट्या-कुपाट्या लावल्या होत्या. गुरांना राहण्यासाठी मध्ये पालापाचोळ्याची झोपडी बांधली होती. अशीच पाच-सहा घरं आमच्या परसाच्या शेजारी एक लाईनमध्ये होती. जिजी परसावर कोंबड्या पाळत होती आणि परसाचं सारवणपण करीत होती. सुगी असली की जिजीला शेतात जावं लागायचं आणि मावशी नाचायला गेली की मावश्यांचं संरक्षण करण्यासाठी किंवा मुलं असतील तर मुलं सांभाळण्यासाठी जिजीला मावश्यांबरोबर पार्टीत जावं लागायचं. सुगी नसेल किंवा मावश्या पार्टीत नसतील तर जिजीला परस राखण्यासाठी ठेवायची. एकाच जन्मी जिजीला तिची किती रूपं बघावी लागली !

जिजी बेबीमावशी आणि रंभामावशीबरोबर पार्टीत गेल्यामुळे परसावरच्या कोंबड्यांची राखण करणं माझ्यावर आलं. शाळा सुटल्याबरोबर मला परसावर जावं लागत असे. कोंबड्यांबरोबर गाय, बैल, म्हैस यांचीपण राखण करायचो. कोंबड्यांच्या घरट्यांतून परसासमोरच्या उकिरड्यावर कोंबड्या सोडायचो. दिवस मावळला की एकेक कोंबडी पकडायचो, कोंबडीच्या गांडीत बोट घालून अंडं आहे का तपासायचो, आणि पुन्हा कोंबड्याच्या घरट्यात तिला बंद करायचो. संध्याकाळ झाली की पोपटमामा परसावरती झोपण्यासाठी येत असत आणि मला सुटी देत असत. दळण दळून आणायचं असेल तर पोपटमामा परसावरती लवकर येत आणि लवकर सुटी देत. आणि म्हणत, "लवकर जा, दळून आणायचंय आज."

रविवार होता म्हणून मी दिवसभर परसावरच कोंबड्या राखत बसलो होतो. परसाच्या समोरच वीस फुटांवर सात-आठ झोपड्यांची रांग होती. ते कोल्हाटीच होते, पण नेरल्यास राहण्यासाठी नवीन आले होते. परिस्थितीनं फार गरीब होतं. त्यांच्याकडे नाचण्यासाठी मुली नव्हत्या. त्या झोपडपट्टीतली माणसं दारू काढून विकायची आणि पोट भरायची. बाकी नऊ-दहा कोल्हाट्यांची घरं नेरल्याला स्थाईक होती. ते लोक श्रीमंत होते, चिरेबंदे वाडेवाले होते. कोणाकोणाच्या वाड्यासमोर कार उभ्या असायच्या. वाटायचं, हे गाव किती श्रीमंत आहे !कारण, गावात जाताना सुरुवातीला कोल्हाट्याच्या या गल्लीतूनच जावं लागायचं. सकाळचे अकरा वाजले होते. कोंबड्या उकिरड्यावर चरत होत्या. मी परसासमोर सोडलेल्या बैलगाडीत बसलो होतो. एका हातात काठी होती आणि एका हातात पुस्तक. अचानक समोरच्या झोपडपट्टीत आवाज आला. सगळे आरडाओरड करीत होते. दहा-पंधरा पोलीस त्यांना मारत होते. झोपडी तपासत होते. झोपडपट्टीतल्या माणसांना मारत मारत परसाकडे आणत होते. सगळ्या परसांसमोरचे उकिरडे तपासत होते. कोणी पोलीस झोपडपट्ट्यांतल्या दारूच्या बाटल्या फोडत होते. एका पोलिसाला माळ्याच्या उकिरड्यात दारूच्या बाटल्या सापडल्या. बाटल्या फुटल्याचा आवाज ऐकू येत होता आणि मी बघत

होतो. झोपडपट्टीतली काही माणसं पळापळ करीत होती. काही लोकांना पोलीस बेदम मारीत होते. गूळ भिजू घातलेले मटके फोडत होते. माझ्याकडे पोलीस येऊ लागले असं पाहताच मी पळायला सुरुवात केली. पण पोलिसांनी मला पकडलं. परसात झोपडीतल्या माणसांनी मटक्यात गूळ भिजू घातला होता. तो पोलिसांना सापडल्यामुळे, त्यांनी मला बेदम मार द्यायला सुरुवात केली. कारण त्यांना वाटलं, मी झोपडपट्टीतलाच मुलगा असावा. अंगावर काठ्यांच्या वळा उठत होत्या. कंबरेत-पाठीत लाथा घालत होते. तितक्यात आमच्या परसाच्या शेजारी गंडल्या आला आणि त्यानं सांगितलं, ''लेकराला का मारता ? झोपडपट्टीतला नाय त्यो. कोंडिबाचा नातू हाय.'' पोलिसांनी मला सोडून दिलं. कारण कोंडिबाआजोबांना पोलीस ओळखत होते. रात्रभर मी रडत होतो. पाठीची आग होत होती. कंबर दुखत होती. डोक्यात रक्त साकाळलेल्या गाठी झाल्या होत्या.

झोपडपट्टीतली विमलाबाई खोकला लागला की कपभर दारू पाजायची, आणि खायलापण देत होती. म्हणून मी गुळाचा मटका माझ्या परसात ठेवायला देत होतो. पण पोलिसांनी मारल्यापासून त्या बाईच्या तोंडाकडेपण बघितलं नाही.

सुगी जवळ आली होती. म्हणून जिजी पार्टीतून नेरल्याला आली. जिजीबरोबर बेबीमावशी पण आली होती. कारण सोनारीची जत्रा जवळ आली होती. बेबीमावशी दिसायला सुंदर होती. पण माझ्या आईएवढी सुंदर नव्हती. रंभामावशीला बार्शीतच पार्टीमध्ये ठेवलं होतं. बेबीमावशीचं आणि माझं खूप जमायचं. ती स्वभावानं गरीब होती. सोनारीची जत्रा झाल्यानंतर ती परत बार्शीला चित्रा गुलजारच्या पार्टीत जाणार होती.

माझी पहिलीची परीक्षा पाच-सात दिवसांवर आली होती. सुगी असल्यामुळे जिजी शेतातच खोप करून झोपत होती. संध्याकाळच्या जिजीच्या भाकऱ्या घेऊन रोज शेतात जावं लागत असे. एके दिवशी रमेशकाका आले. ते सात-आठ दिवसांनी नेरल्याला येत असत. किंवा महिना महिना नेरल्यालाच थांबायचे. कारण सुशीलामावशी नाच सोडून नेरल्यालाच थांबली होती. कधीकधी पंधरा-पंधरा दिवस सुशीलामावशी आणि रमेश पाटील गावाला फिरत असत. रमेश पाटलांना मी काका म्हणायचो. त्यांचं घर कोठे आहे हे कोणालाच माहीत नव्हतं किंवा त्यांना बायको आहे का, हे पण कोणाला माहीत नव्हतं. कारण रमेशकाका, खरं काय आहे ते सांगतच नव्हते. सुशीलामावशी पण त्यांना त्यांच्या घरच्याविषयी जास्त विचारीत नव्हती. रमेशकाका कधीच कोणालाही त्यांच्या घरी घेऊन गेले नव्हते. पण रमेशकाका सुशीलामावशीवर खूप खूप प्रेम करीत असत. त्यांच्या प्रेमावरून मला असं वाटायचं की, सुशीलामावशीशिवाय त्यांच्या जीवनात दुसरी स्त्री आली नसेल ! किंवा त्यांना बायको असेल असं मला वाटत नव्हतं. सुशीलामावशी आणि रमेशकाका एका ताटात जेवण करीत. एकमेकांना घास भरवीत. मला वाटायचं, माझी आई पण अशीच करीत असेल. रमेशकाकांना सुशीलामावशीशिवाय पाच मिनिटंदेखील करमायचं

नाही. कोंडिबाआजोबाचा सर्व संसार रमेशकाकांवर चालत असे. रमेशकाकांनीच कोंडिबाआजोबाला बैलगाडी घेऊन दिली. शेतात विहीर बांधली. पाण्याचं इंजिन घेऊन दिलं. रमेशकाका दारू पित नव्हते. त्यांना दुसरं कसलंच व्यसन नव्हतं.

रमेशकाका आले म्हणून कोंबडी कापली होती. मटण खायची त्यांना एवढी आवड नव्हती. तरी पण आजोबा कोंबडी कापायचे, कारण त्यांना खायला मिळत असे. कोंबडी कापायला वेळ झाला होता. मी दुकानातून सर्व किराणा सामान आणलं. कोंबडी भाजली आणि कापण्यासाठी आजोबांना मदत केली. मटण तयार करायला अंधार पडला. जिजीच्या जेवणाची काळजी मला लागली होती. कारण मला माहीत होतं, माझ्याशिवाय जिजीची भाकरी घेऊन कोणीच जाणार नाही. म्हणून मामाला म्हणालो की, ''मी जिजीला भाकरी घेऊन जाऊ का ?'' कारण नंतर खूपच अंधार पडला असता. आणि रस्त्यात मसनवटे लागतात. कुत्रे असतात. पण पोपटमामा म्हणाले, ''तुझ्या सुशीलामावशीला जेवायला वाढून जा.'' त्यांना जेवायला वाढलं. जेवणं झाल्यानंतर खरकटं जमा करून ताट उचलून ठेवलं.

एका हातात जिजीची भाकरी आणि एका हातात पाटी घेऊन शेतात निघालो. अमावास्येची रात्र होती. तरीदेखील पोपटमामांनी मला बॅटरी दिली नव्हती. कारण यापूर्वी माझ्या हातून दोन बॅटऱ्या खराब झाल्या होत्या. हळुहळू जात होतो. माझ्या पायांना त्या रस्त्याची सवय झाली होती. कारण रोजच भाकरी घेऊन शेतात जावं लागत होतं. थोडंसं गावाच्या बाहेर गेलो. रस्त्यानं किर्रऽकिर्रऽ असा आवाज येत होता. सगळीकडे काळं काळं दिसत होतं. थोडंसं गावाच्या बाहेरच, रस्त्याला लागून महाराचा मसनवटा होता. रस्त्यानं जाताना मोठा खोल खड्डा लागत असे. त्या खड्ड्यातूनच रस्ता शेताकडे जात होता. मी त्या खड्ड्यात गेलो. हवा मोठ्यानं सुटली होती. बांगड्यांचा आवाज मला ऐकू येऊ लागला. मी मात्र कापत होतो; घाबरून गेलो होतो. पुढे जावं का मागे जावं, ते कळत नव्हतं. आजुबाजूला उगीच थोडंसं दिसत होतं. बांगड्यांचा आवाज जास्तच ऐकू येऊ लागला. मी डोळे फाडून इकडे-तिकडे बघत होतो. अचानक खड्ड्यात दगड पडला. मी मोठ्यानं ओरडलो. मी ओरडल्याबरोबर एक बाई खड्ड्याच्या बाजूनं गावाच्या दिशेनं पळू लागली. मी जास्तच घाबरलो. थोड्या वेळानं एक माणूस दिसला. तो शेताच्या दिशेनं पळू लागला. त्यानं पांढरी टोपी घातली होती. पण त्या दोघांचं खड्ड्याच्या बाजूला काहीतरी चाललं होतं.

मी हळुहळू चालत पुढे गेलो. गावाच्या थोडासा दूर गेलो. गावातल्या कुत्र्यांचा भुंकण्याचा आवाज मला ऐकू येत होता. महारांचा मसनवटा जवळ येत होता. रस्त्यात किरकिर चालूच होती. मी भीत भीत जात होतो. शर्ट घामानं भिजला होता. मसनवट्याच्या पलीकडे जाळ दिसत होता. आणि तो जाळ कोणीतरी घेऊन चाललंय असं वाटू लागलं होतं. मसनवट्यात माझ्याजवळून पांढराशुभ्र कुत्रा जात होता.

आता मात्र माझे पाय लकव्यासारखे पांगळे झाले. आपोआप मी खाली बसलो.

ओरडता येत नव्हतं आणि पळतादेखील येत नव्हतं. मी तसाच रस्त्यातच मुटका मारून खाली बसलो होतो. माझा मित्र बिड्या जोकी माझ्या वर्गात होता. त्याच्या वडिलांचा आवाज मला ऐकू आला. ''कोण हाय इथं ?'' मी त्यांना म्हणालो, ''बाबा. मी किसऱ्या हाय, कोंडिबा कोल्हाट्याचा नातू.'' बाबा म्हणाले, ''काय रं किसऱ्या, का बसलास इतक्या अंधारात गावाच्या बाहेर, शेतात चालला का ?'' मी म्हणालो, ''हां. जिजीला जेवन घेऊन चाललोय.'' बाबांनी मला उचललं आणि खांद्यावर घेतलं. कारण मी एवढा घाबरलो होतो की, खरंच मला लकवा आल्यासारखं झालं होतं. बाबा म्हणाले, ''काय रे, कोल्हाट्याच्या माणसाला काय मन हाय का नाय, पाच-सात वर्षांच्या पोराला अमोश्याच्या रात्री शेतात पाठवायला लाज नाय कारं वाटली ? मायचा, बायची भाडी खाऊन आयती झाल्यात आळसल्यागत'' बाबांनी मला शेतापर्यंत खांद्यावर घेऊन सोडलं. जिजीला बाबांनी हाक मारली. ''ये जिजे, तुमचा पोरगा आलाय भाकरी घेऊन.'' जिजीनं ''ओ'' म्हणून आवाज दिला. कुत्रा भुंकत होता. बाबांनी जिजीजवळ मला सोडलं आणि म्हणाले, ''काय जिजे, काय चाललं तुमचं ! माधवराव पाटलाच्या काळात तुमचं तोंडबी बघायला मिळाचं नाय. अन् आता ह्या पोरानं काय केलं बरं ! त्याची आई नाही म्हणून ह्या लहान पाखराला शेतात पाठवलंत व्हय. काय लाजबीज सोडून दिली कोंडिबा कोल्हाट्यानं. भीतीनं घाबरून पोरगं मरून गेलं असतं म्हंजी.'' जिजी हुंदके देऊन रडत म्हणत होती, ''काय सांगू बाबा ! माझा वनवास लावलाय या लोकांनी. ह्यांचं कधी चांगलं व्हायचं नाही.'' म्हणून हात चोळून शाप देत होती.

कोपीत चिमणी लावली होती. कोपीच्या बाजूला बांधलेला कुत्रा भुंकत होता. त्याचं नाव होतं खंड्या. बाबा निघून गेले. जिजी आणि मी जेवायला बसलो. ''कोंबडीचं कालवण हाय जिजी'' असं मी म्हणालो. जिजी म्हणाली, ''असलं तरी काय पाण्यासारखा रस्सा असंल आन दोन-चार मटनाची बोटकं असतील.'' आणि तसंच झालं. दोन-चार बोटकं होती. पण जिजीला आणि मला भूक लागली होती. कारण रात्रीचे अकरा वाजले होते. गपागपा दोघंही जेवू लागलो. जसं काही खूप दिवसाचे आम्ही उपाशी आहोत. कधी झोप लागली, कळली नाही.

मी शेतातून घरी आलो. आजी सोनारीच्या जत्रेची तयारी करत होती. कारण दुसऱ्याच दिवशी आम्हाला सोनारीच्या जत्रेला जायचं होतं. सर्व जत्रेसाठी आलेले होते. रंभामावशीपण जत्रेसाठी आली होती. रंभामावशीबरोबर एक उंच गोरापान देखणा तरुण होता. त्याला सर्व सेठ नावानं हाक मारत होते. मी जिजीला विचारलं, ''रंभामावशीबरोबर आलेला हा माणूस कोण हाय ?'' जिजी म्हणाली, ''तुझ्या रंभामावशीचा मालक हाय. ईमानात नौकरीला हाय बघ, लय पैसेवाला हाय.''

सर्वजण जत्रेला गेलो. रंभामावशीच्या मालकांनी आम्हा सर्व लहान लहान मुलांना पाच

पाच रुपये दिले. जत्रेत आम्ही मजा केली. सोनारीची जत्रा पाच दिवस चालत असे. आम्ही सर्व पहिल्याच दिवशी घरी आलो, कारण आजोबाला दुसऱ्या दिवशी जत्रेला जायचं होतं. जत्रेच्या दुसऱ्या दिवशी गावचे सर्व वयस्कर आणि तरुण कोल्हाटी सोनारीला येतात. कोणी गुन्हा केला असेल त्याला पंचाकडून शिक्षा देतात. प्रत्येकजण आपापली मतं मांडतात. कोणी कुणाची बायको पळवून आणलेली असते, तर कोणी खून केलेला असतो. कोणी चोरी केलेली असते. त्यांच्यावर कोल्हाटी समाजात कोर्ट केस करता येत नाही. त्या गुन्हेगाराला कोल्हाटी समाजच शिक्षा देत असतो. त्याला न्याय म्हणतात. गुन्हेगाराला पैशाचा दंड भरावा लागतो किंवा त्याला जातीच्या बाहेर काढून टाकतात. समजा, एखाद्या व्यक्तीला काही कारणामुळे खूप वर्षांपासून जातीच्या बाहेर काढलेले आहे. त्या व्यक्तीस किंवा कुटुंबाला पैशाचा दंड भरून जातीत घेतात. जातीच्या बाहेर काढणं म्हणजे त्याच्याबरोबर सोयरीक न करणं. लग्नात असो वा देवाच्या कार्यक्रमात असो, तो येऊ शकत नसे.

जमा झालेल्या पैशानं संध्याकाळी दारू, मटण आणतात. खाऊन-पिऊन मजा करतात. अशाच प्रकारची कोल्हाट्यांची जत्रा पुण्याजवळच्या जेजुरीला देखील भरते. तिथंदेखील न्याय केला जातो.

जत्रा संपली. रंभामावशी आणि तो सेठ दुसऱ्याच दिवशी बार्शीला गेले. कारण सेठला वेळ नव्हता. नोकरीला हजर व्हायचं होतं. बेबीमावशी जिजीकरता थांबली होती. सुगीपण वरचेवर लांबत चालली होती.

जिजी शेतात गुंतली होती. त्यामुळे बेबीमावशी मला म्हणाली, "किशोर, माझ्याबरोबर बार्शीला येतो का ?" मला फार चांगलं वाटलं, मावशीनं माझ्याबरोबर येतो का म्हटल्यावर. कारण घरच्या कामानं आणि मारानं मला जीव नकोसा झाला होता आणि मला बार्शी बघायला मिळणार होती ! मी आणि बेबीमावशी बार्शीला चित्रा गुलजारच्या पार्टीत गेलो. ती पार्टी बार्शीच्या रसिक थिएटरला लागली होती. ती डोंबाऱ्याची पार्टी होती. ते डोंबारी भाषा बोलत होते. मला त्यांची भाषा समजत नव्हती. सगळ्या बायांशी माझ्या ओळखी झाल्या. वेगवेगळ्या प्रकारची माणसं बघायला मिळायची.

मला सहा वर्षं पूर्ण झाली होती. मी लहान असल्यामुळे पार्टीतल्या मुली मला लाजत नव्हत्या. मी त्यांना आंघोळीचं पाणी बकीटानी द्यायचो. माझ्याकडून पार्टीतल्या बाया पाठ चोळून घ्यायच्या. माझ्यासमोरच अंघोळी करायच्या.

त्या थिएटरला अजून दुसऱ्या पार्ट्या होत्या. लहान लहान, माझ्या वयाच्या मुली नाच शिकायला आल्या होत्या. मी त्यांच्याबरोबर खेळायचो. काही बाया माझ्याकडून सगळं अंग दाबून घ्यायच्या. बेबीमावशीच्या मैत्रिणी मला कुठंही पाठवत होत्या. ह्या माणसाकडे जा, त्या माणसाकडे जा, यांना बोलावून आण. निलीनं एका मुलाला बोलवायला सांगितलं. तो कॉलेजला होता. त्याचं नाव मुकेश होतं. दोघंही एकमेकांवर खूप प्रेम करीत असत. पण तिची मावशी तिला मुकेशबरोबर बोलू देत नव्हती. त्यांना

एकमेकांशिवाय करमत नसे. रस्त्यावर एक पानपट्टीचं दुकान होतं. तिथं तो उभा राहात असे. निली माझ्याजवळ चिठ्ठ्या देई. मी त्या मुकेशला देत होतो. निली मुकेशबरोबर पळून जाणार होती. ते फक्त मला माहीत होतं. पण त्या दिवशी एक धनाढ्य माणूस आला. गळ्यात सोन्याचं लॉकिट, हातात अंगठी, बाहेर कार उभी होती. त्यानं निलीचा डान्स बघितला. ती दिसण्यास सुंदर होती, सोळा-सतरा वर्षांची होती. आणि तो माणूस पस्तीस-चाळीस वर्षांचा होता. निलीला त्या माणसानं पंसत केली. निली खूप रडत होती. निलीच्या मावशीनं निलीला मारलं. ती गप्प बसून सगळं सहन करीत होती. त्या माणसाला पाहून निलीचा चेहरा उतरला. त्यानं खूप सोनं निलीच्या अंगावर घातलं होतं. निलीच्या मावशीला त्या माणसानं खूप रुपये दिले.

मी मुकेशला सर्व सांगितलं. त्यामुळे मुकेश रडत होता. मनातच बडबड करीत होता... 'माझं मी काहीतरी करून घेतो. नाहीतर हिच्या मावशीला मारून टाकतो.'

निली रडायची. पण मावशीपुढे काय करणार ? तो धनाढ्य माणूस निलीचा मालक झाला होता. दर आठवड्याला तो येत होता. त्याला सगळे सेठ म्हणायचे. निलीनं मुकेशशी बोलणं सोडून दिलं होतं. मुकेश खूप नाराज झाला होता. तरी पण निलीशी बोलण्याचा तो प्रयत्न करायचा. रोज पानपट्टीजवळ येऊन निलीला बघायचा. पण निली खाली मान घालत असे. एके दिवशी निलीनं माझ्याजवळ मुकेशला चिठ्ठी दिली. मुकेश चिठ्ठी मोठ्यानं वाचत होता. मला ऐकायला येत होती. त्यात लिहिलं होतं, 'प्रिय मुकेश, मी तुझ्या लायकीची नाही. तू आता जलसापार्टीत येण्याचं बंद कर. तुझ्या आईवडिलांच्या मनाप्रमाणे चांगल्या मुलीशी लग्न कर. मला विसरून जा. आमचं जीवनच असं असतं. प्रेम करणं म्हणजे आमच्या समाजात पाप समजलं जातं. आम्हाला प्रेम ही भावना मनात ठेवता येत नाही. तिचा खून करावा लागतो. नाहीतर या समाजाचे लोक आम्हाला जगू देत नाहीत.'

मुकेशनं माझ्याजवळ त्या चिठ्ठीचं उत्तर दिलं. 'मी तुझ्यावर प्रेम करतो. तुझ्या शरीरावर नाही. अजूनपण मी तुला स्वीकारतो. आपण पळून जाऊ, लग्न करू.' पण निलीची आणि मुकेशची भेट होऊ शकली नाही.

मला आता तिथं करमत नव्हतं. तीच ती नाचगाणी बघून मला कंटाळा आला होता.

मांग समाजाची एक बाई होती. दिसायला साधारण. तिच नाव होतं सुमन. तिनं मेकअप केला होता. पायात चाळ बांधले होते. कारण आता पार्टीची वेळ झाली होती. तिला दोन ते अडीच महिन्यांचा मुलगा होता. बाळाला पाजत असतानाच घंटी वाजली आणि घंटी वाजताच त्या रडव्या बाळाला तसंच ठेवून ती मजबूर अवस्थेत स्टेजवर निघून गेली. जाताना मला म्हणाली, 'किशोर, बाळाकडे जरा लक्ष दे.' मी त्याला मांडीवर

घेऊन खेळवत होतो. आणि माझ्या डोळ्यातून पाणी वाहत होतं. कारण मला वाटलं, आपलंपण बालपण असंच गेलं असेल ! मी त्या मुलाला शांत करण्याचा प्रयत्न करीत होतो. माझ्या बाजूलाच मुसलमानाची एक बाई चाळ (घुंगरू) बांधून बसली होती. मी तिला विचारलं, 'आताच नाचून आलीस. घुंगरू का काढून ठेवले नाही ?' तिच्या डोळ्यांत पटकन पाणी आलं. ती म्हणाली, ''त्या मीनाच्या पार्टीतली एक नाचणारीण गावाला गेली. म्हणून मला त्यांच्याही पार्टीत दोन-चार दिवस नाचायचंय. आणि मला पैसे बी मिळत्याल. मुलांना शिकवायचं, बाप आजारी हाय.''

दोन-चार दिवसांनी माझी शाळा सुरू होणार होती. म्हणून मी नेरल्याला जाणार होतो. दिवस मावळला होता. चांगली चांगली माणसं येत होती. आपापल्या बायांना घेऊन गप्पा मारत होते. काही बाया मेकअप करीत असतानाच दोन-चार माणसं आली. ती रुबाबदार होती. त्यापैकी एक साठ ते पासष्ट वर्षांचा होता. त्याच्या डोक्याला लाल पटका होता. त्यानं पांढरंशुभ्र धोतर नेसलं होतं. त्याच्या तोंडात दात नव्हते. तो रुक्मिणी नावाच्या मुलीजवळ येऊन बसला. तिचं वय होतं सतरा. तो रुक्मिणीला जवळ घेऊन कुरवाळत होता. गालावरून हात फिरवत होता. रुक्मिणी गप्प बसली होती.

मी खोलीच्या बाहेर आलो. आणि बेबीमावशीला विचारलं, ''मावशी, तो लाल पटकेवाला म्हातारा रुक्मीचा बाप आहे का ? तिचे किती लाड करतोय तिचा बाप, आणि आपला आजोबा आपले लाड करीत नाही.'' बेबीमावशी माझ्यावर रागावली आणि म्हणाली, ''अरे, तो तिचा बाप नाही. तिच्या चिऱ्याचा मालक हाय. तू जा इथून बाहेर. बरं, बारीक लक्ष देतो सगळ्यांवर. थांब, दोन-चार दिवसांनी सोडून येते नेरल्याला.''

म्हाताऱ्यालापण जवानी फुटते म्हणतात ती अशी. रुक्मिणी बिचारी वरून हसत होती आणि मनातल्या मनात रडत होती.

शाळा सुरू झाली. जिजीदेखील बार्शीला आली होती. जिजीनं मला नेरल्याला आणलं.

संजयची आणि माझी चांगली मैत्री झाली होती. तो माझ्या वर्गात शिकत होता. संजय भावकीतलाच होता. त्याची आईदेखील नाचणारीण होती. संजयची आणि माझी अवस्था सारखीच होती. संजयच्या आईचं नाव होतं कुसुम. ती सर्व कोल्हाट्यांच्या नाचणारणींत पहिला नंबर होती म्हटलं तरी चालेल. दिसायला सुंदर होती. पायातल्या शंभर घुंगरांपैकी नाचताना फक्त एक घुंगरू वाजवीत होती. ती नाचत असताना सर्व थिएटर थरथर कापत असे. कितीतरी पिक्चरच्या ऑफर तिला आल्या होत्या. ती मुंबईमध्ये लालबागला हनुमान थिएटरमध्ये नाचत होती. त्यावेळेस, अनेक दिग्दर्शकांनी तिला पिक्चरमध्ये घेतो असं आश्वासन दिलं होतं. पैशांचा तिच्यावर वर्षाव होत होता. माझ्या

आईपेक्षा ती वयानं मोठी होती. कुसुमची पार्टी म्हटलं की ''आली नेरल्याची पार्टी. ह्या नेरल्याच्या बायांमधी जादू हाय की काय, कळतंच नाही. कोणालाबी जमू देत नाहीत. सगळ्याच नेरल्याच्या बाया'' असं दुसऱ्या गावच्या कोल्हाटणी आणि दुसऱ्या जातीच्या नाचणारणी म्हणायच्या.

कुसुमला मुलगा – संजय; शिवाय तीन भाऊ, एक बहीण आणि एक मावशी होती. एके दिवशी ह्या सगळ्या नात्यांना तिनं तोडलं. आपल्या पायातली घुंगरू तिनं कायमची सोडली आणि कांबळे नावाच्या व्यक्तीबरोबर मुंबईला संसार सुरू केला. माझ्या आईसारखाच तिचाही छळ झाला. माझ्या आईला तरी थोडा त्रास झाला. पण कुसुममावशीला तर सगळ्या समाजाशी तोंड द्यावं लागलं. कारण कांबळे हा जातीनं महार होता. मांग–महार समाजाच्या व्यक्तीशी नाचणारणीनं राहणं हा गुन्हा आहे असं कोल्हाटी समजत. जर नाचणारणीनं महाराजवळ राहणं हा गुन्हा आहे तर महाराजवळून नाचणारणी नाचताना पैसा घेतात तो कोल्हाटी समाजात खातात, त्या पैशावर मजा करतात. मग तो का गुन्हा समजला जात नाही ? नाचणारणीनं नाचताना जर महार, मांग, मुसलमानाकडून पैसे घेतले तर तोदेखील गुन्हा समजला पाहिजे. मग तो का गुन्हा समजला जात नाही ? फक्त त्या नाचणारणीनं महार, मांग, मुसलमानाबरोबर संसार केला तर त्याला गुन्हा समजतात. कारण त्यांच्याकडून पैसे मिळत नाहीत म्हणून !

कुसुमला तर कोल्हाटी समाजानं जातीच्या बाहेर काढलंच, पण सोनारीच्या जत्रेमध्ये कुसुमच्या सर्व भावांना आणि बहिणीला देखील गुन्हेगार म्हणून पंचांपुढे बोलावलं. त्यांना सांगितलं की, तुम्ही जर आता कुसुमला घरात घेतलं तर तुम्हाला देखील जातीच्या बाहेर टाकलं जाईल. मांग–महारांनी कोणता गुन्हा केला होता ? कोल्हाटी समाजासारखं मांग–महारांनी आपल्या लेकी–बहिणींना नाचायला तर पाठवलं नाही ना ? आपल्या लेकी–बहिणींचं शरीर तर विकलं नाही ना ? मग कुसुममावशीनं महाराबरोबर संसार केला तर कोणता गुन्हा केला ? कोणतं पाप केलं होतं ?

कुसुममावशीचा संजय दोन वर्षांपासून नेरल्यालाच होता. कुसुममावशीनं संजयला घेऊन जाण्यासाठी खूप प्रयत्न केले. पण संजयला कुसुममावशीच्या भावांनी जाऊ दिलं नाही. कुसुममावशी संजयसाठी रात्रंदिवस रडत होती. गाय–वासराची ताटातूट झाली होती. गाय तिकडे हंबरडा फोडत होती, आणि वासरू इकडे झुरत होतं.

संजयला माझ्याशिवाय करमत नसे. शाळेतदेखील आम्ही जवळ जवळ बसायचो. दोघंही दुसरीला होतो. एके दिवशी रविवार होता. म्हणून दुपारी आम्ही दोघंच परसाच्या कोट्यात खेळत होतो. तितक्यात हरीनाना आला. हरीनाना म्हणजे भावकीतलाच. त्याचे वडील रामदादा. त्यांना मी आजोबा म्हणायचो. अण्णा आणि मनाआज़ी यांचा तो सर्वात मोठा मुलगा.

हरीनाना वयानं पंचवीस वर्षांचे होते. हरीनाना संजयला म्हणाले की, चल, संजू, तुला खेळायला गोळ्या–बिस्कीटं घेऊन देतो. हरीनाना संजयला घेऊन गेले. मी संजयची

वाट बघत बसलो. पण संजय आलाच नाही. दिवस मावळला. मी घरी गेलो. संजयला आणि मला त्याचे मामा शोधत होते. ते माझ्या घरी आले आणि संजयच्या मामांनी मला विचारलं, "किसऱ्या, हमारा संजू कडे हाय ? (आमचा संजू कोठे आहे)" मी म्हणालो, "हरीनानांनी उसकू दुकानको दुपरी को लिए गया था. अजून ओ आयाच नाही. (हरीनाना संजयला दुपारी दुकानात घेऊन गेला. तो अजून आला नाही)". मी असं म्हणाल्याबरोबर संजयचा मोठा मामा ओरडला, "सत्यानास हुया ये, हाऱ्या को छोरे को मुंबई को लिय गये ये। (सत्यानाश झाला, हाऱ्या पोराला घेऊन मुंबईला गेला)." सगळ्यांनी आरडाओरड सुरू केली. सर्व कोल्हाटी समाज वाघासारखा चवताळून उठला होता. कोणाच्या हातात काठ्या तर कोणाच्या हातात कुऱ्हाडी. सगळ्या बायांचा आवाज गावात घुमत होता. सगळं गाव कोल्हाटी गल्लीत आलं होतं. सगळे कोल्हाटी रामदादाच्या घरी गेले. ते रामदादाबरोबर भांडत होते. म्हणायचे, "तुमच्या हाऱ्यानं आमच्या संजयला मुंबईला कुसुमकडे नेला. त्याला जिता सोडणार नाही आम्ही."

संजय गेल्यापासून मलाही करमत नव्हतं. संजयला त्याची आई मिळाली होती. मला वाटायचं, हरीनानानं मलादेखील माझ्या आईकडे पळवून घेऊन जावं. पण संजयच्या आईसारखी माझी आई माझा स्वीकार करीत नव्हती.

रामदादाला सोनारीच्या जत्रेत बोलावलं. सर्व कोल्हाटी एकत्र आले होते. रामदादाला गुन्हेगार म्हणून उभा केलं. सर्व कोल्हाटी समाज एका मैदानात झाडाखाली शांत बसला होता. एकेक जण करीत कोल्हाट्यातल्या वयस्कर व्यक्ती रामदादाला बोलत होत्या, "तुमच्या पोरानं गुन्हा केला आहे. कोल्हाट्याच्या पोराला महाराच्या घरी सोडलं." कोल्हाट्याचा संजय आता महार झाला होता. रामदादाला पंचानी सांगितलं की, "जर तुम्ही तुमच्या हऱ्याला घरी घेतलं तर तुम्हाला आम्ही जातीच्या बाहेर टाकू. हे मान्य आहे का ?" रामदादांनी मान हलवली. हरीनानांना घरचं दार बंद झालं होतं ! त्याला चोर म्हणत होते. या कोल्हाटी समाजानंच त्याला चोर बनवलं. हरीनानाला बायकोपासून, आई-वडील-बहीण-भाऊ यांच्यापासून दूर राहावं लागत होतं. हरीनानाची बायको हरीनानाच्या भेटीसाठी तडफडत होती. कारण हरीनानाचं नवीनच लग्न झालं होतं. तरी हरीनानाला नेरल्याला पाऊल टाकू देत नव्हते आणि आला असता तर कोल्हाटी समाजानं हरीनानाचे हातपाय तोडले असते. कित्येक वर्षं झाली, हरीनानाला नेरल्याला येऊ देत नव्हते. का ? त्यानं कोणता गुन्हा केला होता ?

हरीनानानं गाय-वासराला जवळ केलं हा गुन्हा होता. आई-लेकराला एकत्र आणलं म्हणजे पाप केलं का ? मग पुण्य कोणतं होतं ? गाय-वासराला कायमचं दूर बांधून ठेवणं हे पुण्य होतं की पाप ? हा गुन्हा नव्हता का ?

पैशाच्या पुढे पंचांनी पाप आणि पुण्याची भाषाच शिकली नव्हती.

संजय कायमचा कोल्हाटी समाजाला सोडून गेला होता. नंतर कधीही संजय नेरल्याला आला नाही. माझी आणि त्याची भेट झाली नाही.

कुसुममावशी मुंबईहून नंतर लातूरला राहण्यासाठी आली. कुसुममावशीच्या मुली लग्नाला आल्या आहेत. मुलींचा जन्म कांबळेपासून झाला आहे. म्हणून कोल्हाटी समाज त्यांनाही आपल्यात घेण्यास तयार नाही. आणि नाचणारणीच्या पोटी जन्म घेतला म्हणून त्यांना महार समाज स्वीकारीत नाही. मग या मुलींनी जावं कुठं ? त्या दिसण्यास साधारण आहेत; पण शिकलेल्या आहेत. कुसुममावशीला आणि त्यांच्या तिन्ही मुलींना मोठा प्रश्न पडला आहे की, आता या मुलींबरोबर लग्न कोण करील ?

कुसुममावशी आपल्या मुलींना घेऊन हा प्रश्न सोडविण्यासाठी नेरल्याला पहिल्या वेळेस आली. कांबळेबरोबर राहण्यास सुरुवात केली तेव्हापासून कुसुममावशीनं नेरल्याचं तोंड बघितलं नव्हतं. म्हणजे जवळजवळ वीस-बावीस वर्षं झाली होती. कोल्हाटी गल्लीत कुसुममावशी आली तर कोल्हाटी समाजातल्या काही माणसांनी कुसुममावशीला चहासाठी देखील बोलावलं नाही किंवा तिची विचारपूस केली नाही. कारण ती आता महारीण होती. तिच्या तिन्ही मुली रडून रडून सांगत होत्या, ''आम्हाला कोल्हाटी समाजात घ्या. आम्हाला कोल्हाटी समाजाच्या मुलांशी लग्न करायचं आहे.'' पण त्यांचं कोणीही ऐकलं नाही. रिकाम्या हातांनी कुसुममावशी परत लातूरला गेली.

मामी माहेरी गेल्या होत्या. म्हणून शाळा सुटल्याबरोबर बाहेरचं अंगण मी झाडत होतो. सायंकाळचे साडेपाच वाजले होते. समोरच्या पिंपळाखाली माझ्या वयाची मुलं-मुली खेळत होती. ती मला खेळायला बोलावत होती. परंतु मामी नसल्यामुळे घराच्या समोरचं अंगण झाडायचं होतं. परसावरून गवऱ्या आणायच्या होत्या. दिवे लावायचे होते. आजी घरात स्वयंपाक करीत होती. आजीला स्वयंपाकाला मदत करायची होती. लसूण सोलणं, कांदा कापणं; चपात्यांचं पीठ मळून द्यायचं होतं. ह्या सर्व कामांमुळे मी खेळायला जाऊ शकत नव्हतो.

अंगण झाडत असतानाच घरासमोर पांढरीशुभ्र कार उभी राहिली. आजोबा अंगणातच येऊन बसले होते. कारमधून बेबीमावशी-जिजी आणि सोबत एक गोरापान उंच धिप्पाड, चाळिशीचा गृहस्थ खाली उतरला. आजोबा त्यांच्याजवळ गेले आणि त्यांना घरात घेऊन गेले. पण जिजी मात्र माझ्याकडे आली. तिनं मला जवळ घेतलं. तितक्यात आजोबा बाहेर आले आणि मला म्हणाले, ''किसन्या, झाडते झाडते कारकमे दिख.''

मी लवकर अंगण झाडलं आणि कारजवळ जाऊन उभा राहिलो. कारण गल्लीतली मुलं खोड्या करायची. कारचं सामान काढून घेऊन जायची. कारजवळ मी उभा आहे म्हणून मला चांगलं वाटायचं, सर्व मुलं मला विचारायची, ''ये किसन्या, किसकी कार हाय.'' मी म्हणायचो ''मेरी''. सर्व पोरांचा घोळका जमायचा. ड्रायव्हर हात-पाय स्वच्छ करून बाहेर आला की, मी घरात गेलो. परसावर मी आणि जिजी गेलो. गवऱ्या, कोंबडी घेऊन मी परत आलो. परसावर मामा आणि जिजी थांबले होते. सर्व घर साफसूफ केलं.

बेबीमावशी एका कोपऱ्यात गप्प बसली होती. सुशीलामावशी आणि रमेशकाका गावाला गेले होते. गाद्या टाकल्या. मी काम करीत असताना तो धिप्पाड चाळिशीचा गृहस्थ माझ्याकडे टक लावून बघत होता. त्या गृहस्थाचं नावं होतं शिवाजीराव हांगे. ते अकलूजचे राहणारे होते.

बेबीमावशीनं लाल साडी, लाल बांगड्या आणि सोन्याचे दागिने घातले होते. मी बेबीमावशीकडे टक लावून बघत होतो. शिवाजीराव हांगे व आजोबा दारू पित होते. आजोबा मला म्हणाले, ''किसन्या, जेवायला आण.'' जेवायला वाढलं. खरकटं काढलं.

आजोबा म्हणाले, ''अब परसावर जिजी क्या रूट्या लीय जा अण मामा कु लगाय दे''. मी परसावर जिजीच्या भाकरी घेऊन गेलो, आणि पोपटमामाला घरी पाठवून दिलं. मी जिजीला विचारलं, ''हा माणूस कोण आहे ?'' जिजी म्हणाली, ''इने बिबीका चिरा उतऱ्या.'' (याने बेबीचा चिरा उतरवला)

बेबीमावशी घरीच राहिली. शिवाजीराव हांगे यांना मी शिवाजीकाका म्हणायचो. शिवाजीकाका गावावरून नेरल्याला कारमध्ये येत असत. त्यांच्याबरोबर दोन-चार माणसं असायची, आणि दारूच्या पाच-सहा बाटल्या. शिवाजीराव आले म्हणजे गावातील आणि भावकीचे लोक जमा होत असत. त्यांच्याबरोबर ते दारू पित असत.

शिवाजीकाकांना बसलेलं उठता येत नसायचं. कधी जेवण केलं तर कधी नाही. नशेत पैसे किती गेले आणि किती नाही, याची त्यांना पर्वा नसायची. बेबीमावशी शिवाजीकाकांजवळ मनानं कधीच जात नव्हती. बेबीमावशीचं शरीर फक्त त्यांच्याजवळ झोपत होतं. बेबीमावशी खूप रडायची. बेबीमावशी सोळा वर्षांची तर शिवाजीकाका चाळीस वर्षांचे होते. एक बाप आपल्या मुलीच्या मनाशी खेळत होता. पैशाच्या लालचीत आपल्या मुलीला जिवंत जाळल्यासारखं जाळत होता. पैशाच्या लालचीनं आणि आयतं खाण्याच्या सवयीनं बाप-मुलीचं जे नातं असतं त्याला फाशी दिली होती. साधं पिक्चरमध्ये जरी आपण बघितलं की, एक म्हातारा तरुण मुलीशी लग्न करतोय तरी आपल्याला किती वाईट वाटतं. वाटतं, त्या मुलीच्या बापाला मारून टाकावं. कोंडिबाआजोबा तर आपल्या पोटच्या मुलीला की जिनं जवानीची पहिलीच पायरी चढली, तिला चाळीस वर्षांच्या एका दारुड्या माणसाच्या हवाली करीत होता.

जर एखाद्या मुलीला कोणी शिटी वाजवत असेल तर त्या मुलीचा भाऊ नक्कीच त्या शिटी वाजवणाऱ्याचा खून करण्याचा प्रयत्न करील. पण नाचणारणीचे भाऊ बघा ! आपली बहीण नाचताना हजारो शिट्या वाजवतात; कित्येकजण तिचा हात दाबतात, पण तो शिट्ट्या वाजविणारा पैसेवाला असेल तर त्याचा खून करण्याऐवजी त्याला मखमलीच्या गादीवर झोपवून हात-पाय दाबण्याची तयारी या भावांची असते. कसलं नातं आहे हे ? कुठे गेलं बहीण-भावाचं नातं ?

शिवाजीकाका दर आठ दिवसांनी येत होते. पण दारू प्यायल्याशिवाय त्यांना करमत नव्हतं. शिवाजीकाका माझ्याशी चांगलं बोलायचे. म्हणायचे, ''बाळ, तुला कंटाळा कसा

येत नाही ? कधीही बघितलं की तू कामच करीत असतोस. शाळेत जातोस का ?" मी म्हणालो, "मी दुसरीला आहे." काका म्हणाले, "तुझ्या घरी कधी जातोस की नाही. तू कोणाचा आहेस ?" काकाला माहीत नव्हतं की मी बेबीमावशीच्या मोठ्या बहिणीचा मुलगा आहे म्हणून. कसं माहीत असणार ? त्यांना कोण सांगणार ? जरी सांगितलं तरी काका नेहमीच नशेत असायचे. पण आज मात्र काका नशेत नव्हते. म्हणूनच ते माझ्याशी बोलत होते. माझी चौकशी करीत होते. काकांचे मी नेहमी हातपाय दाबायचो. त्यांना मालीश करायचो. त्यांना मी सगळं सांगितलं– मी कोण आहे, माझी आई कुठं आहे ? शिवाजीकाका म्हणाले, "बाळ, तुझं चांगलं होईल, तुझ्या आईनं जे केलं ते चांगलं केलं. नाहीतर हे काय जीवन आहे का ?"

संडासला बाहेर जावं लागत असे. जवळपासच्या शेतामध्ये. शिवाजीकाका संडासला जाऊ लागले की आजोबा मला म्हणायचे, "कजे बरोबर जा भावकीके आदमी कन भरणे के" (भावकीची माणसं शिवाजीकाकांचे कान भरतील. बेबीमावशीविषयी खोटं काहीतरी सांगतील.) मी शिवाजीकाकांबरोबर संडासला जायचो. त्यामुळे शिवाजीकाकांना देखील इकडे–तिकडे हालचाल करता येत नसे.

बेबीमावशीला मुलगी झाली. मुलगी झाल्यानंतर दोन–अडीच महिने शिवाजीकाका नेरल्याला आले नाहीत आणि नंतर, त्यांनी येणं कायमचं बंद केलं.

बेबीमावशी शिवाजीकाकांची वाट पाहात राहिली. घरातले बेबीमावशीला टोचून बोलायचे. म्हणायचे, "कितने दिन कजे की बाट दिखनेवाली हाय." (किती दिवस शिवाजी पाटलाची वाट पाहाणार आहेस ?) बेबीमावशीला घरातल्या लोकांचं बोलणं सहन होत नसे. शेवटी वैतागून बेबीमावशीनं आपल्या चार महिन्यांच्या मुलीला बरोबर घेऊन आपल्या भावाचं पोट भरण्यासाठी पायात घुंगरू बांधले. बीडला केवडकरच्या पार्टीत ती नाचू लागली. कोणी बी यावं आणि टिकली मारून जावं, अशातला प्रकार झाला होता.

एके दिवशी माझ्या पोपटमामानं मला गड्याच्या व त्याच्या भाकरी घेऊन बोलावलं होतं. मला आजोबांनी शाळेत जाऊ दिलं नाही. मला म्हणाले, "आज भाकरी घेऊन शेतात जा." मी सकाळीच उठून भाकरी घेऊन गेलो. बरोबर पाटी घेऊन गेलो. डोक्यावर भाकरी, काखेत पाटीची पिशवी व एका हातात चड्डी पकडलेली. एक हात डोक्यावर. चटपट पावलं टाकत भाकरी घेऊन जात होतो. जात असताना रस्त्यावर एक वाडा होता. त्या मालकाचं नाव होतं बिट्या. त्याच्याकडे खूप कुत्रे होते. तेथून जाताना मला नेहमी भीती वाटत असे. मी भाकरी घेऊन जात होतो. रस्त्यानं क ख ग घ पाठ करीत जात होतो. पाठ करण्यात मी गर्क झालो होतो. मी विसरून गेलो की, बिट्याचा वाडा जवळ आला आहे. मी ओरडतच क ख ग घ म्हणत म्हणत जात होतो. अचानक माझ्या अंगावर कुत्रा आला. मी भीतीनं चड्डी हातात धरून पळत होतो. पळता पळता मी ठेच लागून

पडलो. कुत्रा माझ्या अंगावर आला. त्यानं माझ्या मांडीला चावा घेतला. मी मोठमोठ्यानं ओरडत होतो. मांडीतून रक्त गळत होतं. माझे पाय कापत होते. अचानक माझ्या तोंडातून 'आई, आई' असा शब्द आला. माझ्या आईची मला त्याच क्षणी खूप आठवण येत होती. माझी पाटी फुटली. भाकरी विस्कटून पडल्या. तितक्यात माझ्या मित्राचे वडील धावत आले व मला डॉक्टरकडे घेऊन गेले.

डॉक्टरांचा उपचार चालू होता. तशाच अवस्थेत सकाळी लवकर उठावं लागत असे. परसावर दूध आणावं लागत असे. मोठी जर्मनची चरवी भरून दूध मी आणत असे. दूध आणल्यावर आजोबा माझ्यासमोर माझ्या दुसऱ्या नंबरच्या मामाला तांब्याभर दूध देत असत. पण मला भाकरीबरोबर दूध घेण्यास परवानगी नसायची. जर घेतलं तर म्हणत असत, "तुझ्या आईनं गाठोडं पाठवून दिलं, काय रे ?" मी रडत-रडत कोपऱ्यात बसत असे. कधी शाळेला जाताना दुकानातून सामान आणावं लागत असे. शाळा बंद झाली होती. परीक्षा दोनच दिवसांवर आली होती. सुगीचे दिवस होते. मोठा मामा शेतात काम करत असे व दुसरे दोन मामा फिरत असत. पोपटमामांनी मला शेतात येण्यास सांगितलं. पण मी नाकारलं. मला मामानं खूप मारलं. मला इतकं मारलं की माझ्या पाठीची कातडी हिरवी झाली होती. परत मला धमकी दिली, "बघ, आजीला सांगशील तर अजून तुला मारीन." त्यावेळेस मी फक्त देवाला बोलावत होतो. कारण मला माहीत होतं, माझी आई मला कधीच मिळणार नाही.

त्या दिवशी रात्री मी गवळीगुरुजींच्या घरी गेलो. माझ्याकडून त्यांनी एक तास अभ्यास करून घेतला. त्यांना विश्वास नव्हता. मला सगळं येत होतं. ते म्हणाले, "किश्या लेका, तुला सगळं येत असताना तू कसा म्हणतो की मला अभ्यास करता येत नाही ?" पण माझ्या पायाकडे बघितल्यावर त्यांनी मला जवळ घेतलं, कारण माझ्या बोटाला ठेच लागली होती. त्यांनी जेवायला दिलं. मला म्हणाले, "परवा तुझी परीक्षा आहे. अभ्यास कर जा."

घरी आलो. आजीनं मला बघितलं. मी लंगडत होतो. आजी धावत आली. तिनं मला जवळ घेतलं. ती पाठीवरून हात फिरवत होती. परंतु ती हात फिरवत असताना मला वेदना होत होत्या. कारण पाठीची सगळी कातडी निघाली होती. रात्री जेवण केलं व झोपून राहिलो. रात्रभर कण्हत होतो. आजी आवाज ऐकत होती. तिला वाटलं, काटा मोडला असावा. दुखत असेल. सकाळ झाली. मला आजीनं दुधाला जाऊ दिलं नाही. सकाळीच उठून अभ्यास करीत बसलो होतो.

माझी बोटं फुटली होती. मला चालता येत नव्हतं. आजी म्हणाली, "इकडे ये. तुझे हात-पाय धुते. आपण कपडे बदलू. खूप घाण झाले आहेत." आजीनं कपडे काढताच पाठीवरचे हिरवे-पिवळे वळ बघितले. बघताच तिच्या काळजात चर्र झालं. घरात मामांचं आणि आजीचं भांडण सुरू झालं. त्या दिवशी सोमवार होता. रविवारी रात्री कोंबडी कापली होती. कोल्हाटी स्त्रिया सोमवारी मटण खात नाहीत. आजी अंगणात सडा घालत

होती. मी आजीला पाण्यात टोपलीभर शेण कालवून दिलं. आजी एका कोपऱ्याला सडा टाकत होती व मी दुसऱ्या कोपऱ्याला. रस्त्यानं येणारे-जाणारे हसत होते.

माझं नाव सगळ्यांनी 'किशोरदेव' असं ठेवलं होतं. रस्त्यावरच्या स्त्रिया, माझ्या बरोबरची मुलं मला 'किशोरदेव' म्हणून हाक मारत असत. हसून मला चिडवत असत. बायकांसारखी कामं करतो म्हणायचे. पण सांगणार कुणाला ? काम नाही केलं तर मला जेवायला कुठून मिळणार ? सडा टाकल्यावर आजी म्हणे, ''बेटा, जाऊन गवऱ्या आणल्यास तर फार चांगलं होईल.'' ती नेहमी कामाच्या वेळेस आशीर्वाद देत असे. मी गोवऱ्या लावत असे व वाळलेल्या गोवऱ्या टोपलीत घेऊन येत असे. आजी नेहमी अंकुशमामाकरिता तळलेलं मटण काढून ठेवत असे. अंकुशमामा मटणाचं रात्रीचं कालवण काढून खाई. एकदा मी खायला गेलो तर आजोबा म्हणाले, ''ते राजाला ठेवलं आहे. तो जोर काढतो, कुस्त्या खेळतो. तू काय करतोस ?'' मी तसाच पाठीमागे वळलो. चटणीचा डबा घेतला. पटपट भाकरी खाल्ली, कारण शाळेत जायचं होतं. दुसरे कपडे घातले. त्या दिवशी मला अंघोळ करायला वेळ मिळाला नाही.

मी शाळेची तयारी करीत होतो. आजोबा अंकुशमामाला विनवत होते, ''बेटा, जेवण आटप. किसऱ्या शाळेत चालला आहे. तू पण शाळेत जा ?'' पण तो 'नाही नाही' म्हणत होता. आजोबा त्याला विनवत होते. एक रुपया देतो, म्हणाले. मग तो तयार झाला. मला लेखणी नव्हती. म्हणून मी चार आणे मागितले, तर म्हणाले, 'माझ्याकडे चिल्लर नाही.' आजी घरात नव्हती. नाहीतर आजीनं मला दहा पैसे तरी दिले असते.

राजूमामा आणि अंकुशमामा लाडानं वेडे झाले होते. रोज रुपया घेतल्याशिवाय ते शाळेत जात नसत.

मी दुसरीत गेलो. दुसरीमध्ये माझ्या बरोबर वंदना, लंका व कोल्हाटी समाजाची दोन मुलं होती. दिलीप अंधारे व कांतिलाल काळे. दुसरी नापास होऊन ते माझ्या वर्गात आले. मला ते चांगला मुलगा समजत. मी गणित पटापट सोडवत असे. हळूहळू वाचण्या-लिहिण्यास शिकलो. ज्यावेळेस मी दुसरीत गेलो त्याचवेळेस माझ्यावर कामाचा बोजा वाढला. कारण माझ्या मोठ्या मावशीला त्याचवेळेस पार्टीत पाठवलं. ती करीत होती, ती सर्व कामं मला करावी लागत असत. किराणा सामान आणणं, दळण आणणं ही सर्व कामं माझ्यावर पडली. पाहुणे आले की, मीच सर्वांना जेवायला वाढत असे. जेवण झाल्यावर ताटं उचलण्याचंही काम माझ्याकडे आलं.

एकदा मला दळायला पाठवलं होतं. एक पायली दळण दिलं. सावंताची गिरणी रोकडेच्या घरासमोर होती. जाताना हागंदारी लागत असे. मला तिथे फारच भीती वाटत असे. कारण तिकडे भूत आहे असं सांगितलं होतं. दळण घेऊन गेलो. गिरणीत खूप गर्दी होती. रात्रीचे साडेनऊ वाजले होते. मला उभं राहून कंटाळा आला होता. साडेचार

वाजता दळायला आल्यामुळे संध्याकाळी काही खाल्लं नव्हतं. पोटात कावळे ओरडत होते. एकीकडे झोप येत होती. माझ्याबरोबर सोबत कोणीच नव्हतं. दळण घेऊन हागंदरीतून येताना तिथं डुकरांची भांडणं लागली होती. मी पटापट पावलं टाकत होतो. माझे पाय भीतीनं कापत होते. डुकरं भांडत अंगावर येतील म्हणून मी पळू लागलो. पण अंधार असल्यामुळे मला खड्डा दिसला नाही. मी खड्ड्यात पडलो. माझ्या पाठीमागूनच माझी चुलत मावशी येत होती. तिनं विचारलं, "कोण ?" मी म्हणालो, "मावशी, मी आहे." रडत रडत उठलो. तिनं पीठ भरण्यास मदत केली. माझे दोन्ही गुडघे फुटले होते. मला अंधारात काहीच कळलं नाही. असंच पीठ भरून मी भीत भीत घरी मावशीबरोबर गेलो. तिच्या डोक्यावरही दळण होतं. ती मला घरी घेऊन गेली. सर्व प्रकार सांगितला. पोपटमामा रागाला आला होता, पण त्यानं मला मारलं नाही. कारण घरी सुशीलामावशी व रमेशकाका आले होते.

रमेशकाका मला लहानपणापासून माया करीत असत. मामाला माझ्याकडून अजून काम करून घ्यायचं होतं. मी हातपाय धुतले. मामांनी आजीला काहीच कळू दिलं नाही. आजी आत स्वयंपाक करीत होती. मी आलो आहे हे कळल्याबरोबर तिनं मला घरात बोलावलं व जेवायला वाढलं. त्या दिवशी कोंबडी केली होती. माझं जेवणात लक्ष नव्हतं. कारण मला कधी एकदा काकाला भेटू असं झालं होतं. कारण माझ्यासाठी ते पुस्तक आणणार होते. अर्धवट जेवलो. मामा म्हणाला, "हे ताट तुझ्या काकाला व मावशीला दे." पाणी भरून तांब्या घेऊन आत गेलो. मावशीनं मला बघताच, "अरे किशोर, कुठे गेला होतास ?" म्हणून विचारलं व जवळ घेतलं. माझ्या अंगाला पीठाचा वास येत होता. मी गप्प बसलो. मावशीनंच ओळखलं. "दळण्यास गेला होता का ?" मी डोळ्याला पाणी आणून मान हलवली. माझा गळा दाटून आला होता. मावशीनं माझ्या भावना ओळखल्या. आणि ती तिकडे तोंड करून रडत होती. काकानं मला जवळ बोलावलं. तितक्यात मामांचा आवाज आला. त्यामुळे मी काकांकडे न जाता स्वयंपाकघरात गेलो. जेवणाचं ताट घेऊन जात असतानाच मला ठेच लागली. मी ताट घेऊन पडलो. मामा पटकन धावत आला, मारू लागला. तितक्यात मावशी आली. मावशीला राग आवरला नाही. मावशीचं व मामाचं भांडण सुरू झालं. मावशी मामाला म्हणाली, "का रं ? त्याची आई तुम्हाला काय देत नाही म्हणून तुम्ही त्याला त्रास देता का ?" दुसरे दोन मामा ओसरीवर बसून बघत होते. परंतु ते जेवणाचं ताट घेऊन गेले नव्हते, म्हणून मावशीला खूप राग आला. परंतु ती भावाला काहीच बोलू शकत नव्हती. गप्प बसून मोठमोठ्यानं हुंदके देऊन रडत होती. "मी जर नाही कमावलं तर माझ्या मुलाचे हेच हाल होतील" असं सुशीलामावशी म्हणत होती.

माझे पाय थरथर कापत होते. हुंदके चालूच होते. मावशी माझ्या आईला शिव्या देत होती. "तू या मुलाला जन्म का दिला ? जन्मताच मारून टाकायला पाहिजे होतं. तू आई आहे की कोण आहे ? तुला देव कधीच माफ करणार नाही" असं म्हणून ती

सारखी रडत होती. आजोबा खूप दारू प्यायले होते. त्यामुळे जेवण करून ते झोपले होते. दोन मामा राजासारखे होते. काम करणं म्हणजे त्यांना अपमान वाटत होता. मावशीनं मला बोलावलं. तिच्याबरोबर मला जेवू घातलं. काका मला आग्रह करत होते. आमचं जेवण झालं. सुशीलामावशी पोपटमामाला रागावल्यामुळे, मामा उपाशी गेला आहे हे मला माहीत होतं. माझं सगळं मन मामाकडे लागलं होतं. आजीनं दोन्ही मामांना सांगितलं की, ''पोपटचं जेवण घेऊन जा.'' पण दोघांनीही ऐकलं नाही. शेवटी आजी जेवण घेऊन निघाली. मला माहीत होतं की आजीला नीट दिसत नव्हतं. रस्त्यानं अंधार होता. मामी इतक्या रात्री बाहेर जाऊ शकत नव्हती. कारण रात्रीचे साडेदहा वाजले होते. मला परत माया आली. मीच डबा घेऊन भीत भीत गेलो. आजी व मावशी माझ्या समजुतदारपणानं सुखावल्या व म्हणाल्या, ''देव तुझं फार चांगलं करणार आहे.''

मी अंधारात रस्ता शोधत गेलो. मला मसणवाट्याची भीती वाटत असे. कारण परसाच्या बाजूलाच मराठ्यांचा मसणवाटा होता. रस्त्यानं एक व्यक्ती जात होती. तिच्याबरोबर मी गेलो. तो होता परसाचा शेजारी गंडल्या. मी मामाला आवाज दिला. माझा आवाज ऐकताच मामा परसाच्या बाहेर आला. मामा चप्पल न घालता माझ्याकडे पळत आला. पळत येताना त्याच्या पायात काटा मोडला. मी त्याच्याजवळ गेलो. त्याच्या हातातली बॅटरी घेऊन काटा काढला. माझ्या तोंडाची थुंकी टाचेला लावली. मामाला माझी खूप दया आली. तो मला छातीशी धरून रडायला लागला. त्याला पश्चाताप होत असावा. मला अजून त्याचे शब्द आठवतात. तो म्हणाला, ''कशी रे देवानं तुला एवढी बुद्धी दिली ?''

मी दुसरी पास झालो. माझ्या बरोबरचे सगळेच पास झाले. माझी उत्तरं सर्वजण बघत असत. कारण त्यांचा परीक्षेचा नंबर माझ्या पाठीमागे येत असे. जर नाही दाखवलं तर मळ्यात घेऊन जात व मला मारत. कांतिलाल काळे माझी खूप काळजी घेई. दिलीप अंधारे मला मक्याचं कणीस, भुईमुगाच्या शेंगा, चिंचा वगैरे खाण्यास देत असे. त्यांना माहीत होतं की मी त्यांच्यापुढे येणार. हे आज मी त्यांना सांगितलं तर ते खूप हसतात. एकदा कांतिलालला मी दाखवलंच नव्हतं. कारण गुरुजींनी मला तसं सांगितलं होतं. त्यानं मला गोड बोलून उसात नेलं व खूप मारलं.

मी तिसरीत गेलो. आता मला चांगलं लिहिता-वाचता येत होतं. मला आईचा पत्ता माहीत होता. रात्रंदिवस मी अभ्यास करीत होतो. दुधापासून ते दळणापर्यंत सगळी कामं करून थकत होतो. हिवाळ्याचे दिवस होते. आता सुशीलामावशी घरीच राहणार होती. कारण रमेशकाका घरीच येत होते. मावशी आल्यापासून मला आधार मिळाला. माझ्या अंगावर कामाचा बोजा जरी जास्त पडला, तरी प्रेमाचा वर्षाव तेवढाच पडत होता. मला जिनं तीन महिन्यांचा असताना दूध पाजलं ती जिजी पण आता घरात आली.

मला ती फारच आवडत असे. कारण तिला मुलगाच नव्हता. जिजी माझ्यावर खूप प्रेम करीत असे. जिजी आल्यापासून मी तिच्याजवळच झोपू लागलो. मला आईची आठवण येई. कारण मावशी आली होती. कधी कधी मला वाटत असे की, पंख असते तर मी आईला बघायला भरारी मारून गेलो असतो. तिसरीच्या वह्या-पुस्तकं घेणं भाग होतं. पण काय करणार ? मला मावशीला त्रास देणं आवडत नव्हतं. कारण ती सगळ्यांसाठी झटत होती. तिच्या एकटीवर सर्व घर होतं. रमेशकाका सर्व घराला पुरवत असे. तिच्यासाठी तिनं कधी स्वार्थ बघितला नाही. सगळ्यांकडं तिचं लक्ष होतं. कुणाचे कपडे फाटले, कुणाला काय कमी आहे हे तीच बघे.

मी आजोबांना म्हणालो, ''मला पुस्तक घेणं भाग आहे.'' ते म्हणाले, ''माहीत आहे, फार शहाणा होणार आहेस तू. तुझ्या मायेनं गाठोडं पाठवलं नाही. आईकडे जाऊन माग.'' मी रडत रडत कोपऱ्यात बसलो. मला रडू आवरत नव्हतं. कारण आता मला चांगलं कळत होतं. तसेच डोळे पुसून मी काकांच्या खोलीमध्ये गेलो. संध्याकाळची वेळ होती. काकांना माझं बोलणं फार आवडत असे. त्यांचे पाय दाबण्याकरिता ते मला नेहमी बोलावत असत. पाय दाबत माझ्याशी गप्पा मारत असत. ते झोपत असत आणि माझं पाय दाबणं चालूच असे. माझे हात दुखत असत. पण मी पाय दाबण्याचं बंद करीत नसे. नंतर मला ते पैसे देत. काकांच्या खोलीत गेल्यावर ते म्हणाले, ''किशोर, पाय दाब ना ?'' मला त्यावेळेस गुरुजींनी बोलावलं होतं, परंतु मी गेलो नाही. मी पाय दाबण्यास सुरुवात केली. कारण मला आज काकांकडून पुस्तक घ्यायचं होतं. मी काकांना पाय दाबतानाच भीत भीत म्हटलं. ''काका, आज मला पैसे नकोत.'' तर काका म्हणाले, ''का ?'' मी म्हणालो, ''मला पुस्तकं-वह्या घेऊन द्या.'' आणि मी म्हणालो, ''यापुढे पैसे न घेता मी पाय दाबीन.'' काका पटकन उठले आणि मला जवळ घेऊन बोलले, ''अरे किशोर, तुझं बोलणं मला आवडतं. म्हणून पाय दाबण्यास बोलावतो. तू पाय दाबतोस म्हणून मी तुला पैसे देत नाही. तू आल्यानंतर तेवढंच मला चांगलं वाटतं.'' ते म्हणत, ''तुझी आई किती चांगली होती, तिचं एक वेळेस तरी दर्शन घ्यावं असं वाटतं. ती किती महान आहे.'' हे ऐकून मी काकांवर चिडलो व म्हणालो, ''नाही काका, ती आई नाही. मला सोडून गेली. ती फार वाईट आहे.''

मला काका म्हणायचे, ''नाही किशोर, तुझी आई फार चांगली आहे. ती या दुनियेपासून दूर गेली असली तरी ती एक पत्नी म्हणून जगते आहे. नाहीतर तुझ्या मावशीसारखं येथे राहून तिला तुझ्या घरच्यांना पुरवावं लागलं असतं. वडिलांच्या हवाली पैसे करावे लागले असते. भावांना सांभाळावं लागलं असतं. तू बघतोस, हा बाळू किती रडतो. पण भावामुळं मावशीला त्याच्याकडं लक्ष देता येत नाही. आजोबाचं करावं लागतं. ती स्वत:ला पण काही खात नाही. शेवटी या बायकांच्या हातात काय असतं, माहीत आहे तुला ?'' मी म्हणालो, ''काय ?'' तर काका म्हणाले, ''लाथा ! तू जिजीला बघतोस ना, तिचा नवरा असताना तिचा काय रुबाब होता. आता तिचा वाडा असून, पंचवीस

एकर जमीन असून काल तुझा आजोबा तिच्या अंगावर धावून गेला होता. तुझी आजी आता तिला वांझ म्हणते. आजपर्यंत भावाकरता जगली तर तिला काय मिळालं ? लाथाच मिळाल्या की नाही ? तूच सांग, तिला जेवण्यास वेगळं देतात का ? आता तर ती कमावत नाही. ती आता म्हातारी झाली. आज तिचा नवरा जिवंत असता तर.. तसंच तुझ्या मावशीचं आहे. या पेक्षा तुझी आई या नरकापासून दूर राहते हे किती चांगलं आहे." मी म्हणालो, "ती मला घेऊन का जात नाही ?" तर काका म्हणाले, "तू थोड़ासा मोठा हो. मी तुला तिच्याकडं घेऊन जाईन." मला फार चांगलं वाटलं.

मला काकांनी आठ रुपये दिले, पुस्तकं आणि वह्या आणण्यासाठी. दुसऱ्या दिवशी मंगळवार होता. त्या दिवशी नेरल्याचा बाजार असतो. सकाळीच शाळेला गेलो. गुरुजींना विचारून मी बाजारात पुस्तकं व वह्या आणायला गेलो. शाळा सुटल्याबरोबर मी पळत पळत काकांच्या खोलीमध्ये गेलो, तर ते निघून गेले होते. मावशीदेखील त्यांच्याबरोबर गेली होती. मी उदास झालो. मला त्या दिवशी करमत नव्हतं.

त्या दिवशीच आजोबांचे वीस रुपये हरवले होते. खिशामधून कुणीतरी चोरले होते. आजोबांनी माझी पिशवी उघडून बघितली. त्यात पाटी–पुस्तकं व एक वही आणि एक रुपया दिसला. मला, आजोबांनी न विचारता मारण्यास सुरुवात केली. आणि म्हणू लागले, "माझे पैसे चोरले." सगळे माझ्याकडे एकटक बघत होते. आजीनं सोडवलं, तिनंपण मारलं. मला काहीच बोलू दिलं नाही. मी रडत रडत परसावर जिजीकडे गेलो. जिजीला सर्व सांगितलं. जिजी घरी आली. भांडण सुरू झालं. ते पैसे अंकुशमामानं चोरले होते. मामीपण म्हणाल्या, "अंकुशमामाकडे मी सकाळी वीस रुपये पाहिले." आजीनं ते ऐकल्याबरोबर मामाला मारण्यास सुरुवात केली आणि म्हणाली, "माझा मुलगा तसा नाही. याच पोरानं चोरले असतील." आजीचं आणि जिजीचं भांडण सुरू झालं. आजी म्हणाली, "एवढा लाडका आहे तर घेऊन का जात नाही ? त्याला कशाला आमच्या उरावर ठेवला आहे."

जिजीला राग आला. मलाच बदडत ती म्हणाली, "मेल्या, तू लहान असतानाच का मेला नाही ! माझ्या जिवाला ताप झालाय. ती रांड तुला इथं सोडून गार बसली आपल्या याराजवळ." ती म्हणाली, "तुला उद्या तुझ्या आईजवळ नेऊन सोडते."

मी दिवसभर घरी आलो नाही. जिजीजवळच परसावर होतो. मला आवाज दिला "किशोर किशोर," म्हणून. पण मी घरात गेलो नाही. काकांनी व मावशीनं विचारलं, "किशोर कुठे गेला ?" तितक्यात आजोबा म्हणाले, "पाटील, तुम्हाला काय सांगू, त्यानं माझ्या खिशातून वीस रुपये चोरले आणि पुस्तकं आणली." आजी तितक्यात म्हणाली, "मेल्याला खूप मारलं. सकाळपासून घरी आला नाही." काका म्हणाले, "मी त्याला पैसे दिले होते, पुस्तकं आणण्यासाठी. विचारा सुशीलाला," मावशी हातपाय धूत म्हणाली, "हो. माझ्यासमोर आठ रुपये दिले." आजीनं रडण्यास सुरुवात केली.

मावशी व आजी परसावर आल्या. रात्रीचे आठ वाजले होते. मी चिमणी लावून

कोपऱ्यात अभ्यास करीत बसलो होतो. आजीनं दुरूनच आवाज दिला. मला आवाज ऐकू न आल्यासारखं मी करत होतो. आजी व मावशी परसात आल्या. मावशीला बघताच पुस्तकं खाली टाकून दिली. तिच्याकडं पळत गेलो. तिनं मला कुशीत घेतलं व रडत रडत म्हणू लागली, "तू कोणतं पाप केलंस आणि या घरात जन्म घेतलास ?" माझ्या आईला शिव्या देत होती. "रांड धगड्यासाठी पोराला सोडून गेली. कशाला हाळजलं ग, म्हातारपणी तडपून मरशील. धगड्यानं हाकलून दिल्यावर कळंल." आजी म्हणत होती, "कारं किसऱ्या, माझ्याशी बोलत नाही ?" मला तिनं ओढून घेतलं. मला म्हणाली, "माझं चुकलं, माझ्याच पोरानं पैसे चोरले होते. तू नव्हते चोरले. तुझा जन्म मोठ्या घरात व्हायला हवा होता." असं म्हणून ती मला घरी घेऊन गेली.

एकदा सर्वजण घरी होते. बेबीमावशी, रंभामावशी ह्या पण घरी होत्या. उन्हाळा होता. मावशी शेत घेणार होती. त्या दिवशी काका व मावशी रुपयांचा गठ्ठा घरी ठेवून परगावाला गेले. बरोबर चार वर्षांचं बाळ होतं. त्या रात्री आजोबा अंगणात झोपले होते. सर्व ओसरीवर झोपले होते. मी जिजीजवळ झोपलो होतो. रात्री अचानक धाडधाड उड्या मारल्याचा आवाज आला. मामा उठले, त्यांना चार-पाच जण मिळून मारत होते. आम्ही सर्वजण उठून बसलो. मी ओसरीजवळ लपून बसलो. माझ्यासमोरच जिजी उभी होती. तिला दंडे मारत होते. मी मोठ्यानं चिरकलो. मलापण मोठ्यानं दंडा मारला. मी नंतर गप्प बसून बघत होतो. बाहेर बंदुकीचा आवाज येत होता. जवळजवळ चाळीस माणसं घरात घुसली. मी चिमणीसारखा कोपऱ्यात बसून एकटक बघत होतो. एकजण रंभामावशीच्या गळ्यातलं सगळं काढून घेत होता. एकजण लक्ष्मणला विचारत होता, "घरात कुठं काय ठेवलं ते सांग ?" पण त्याला काहीच माहीत नव्हतं. तो बिचारा पाहुणा म्हणून कालच आला होता. त्याला ज्वारीच्या अंबारीकडे घेऊन गेले व मारू लागले. सगळीकडे वातावरण शांत होतं. अचानक शिटी वाजताच सर्वजण पळाले, जाताना घराचं दार आपटून गेले.

सकाळ झाली, सर्व एकत्र आलो. आजोबांना खूप मार लागला होता. मामाचा पंचा फाटला होता. जिजीला मुका मार लागला होता. आजीच्या भावाला खूप लागलं होतं. चोर घराच्या बाहेर जाताच सर्वजण मोठमोठ्यानं रडत होते. हळहळत होते. सर्वजण बघायला आले होते. आजोबा मरता मरता वाचले. त्या चोरांनी तोंडाला काळं लावलं होतं व रुमाल बांधले होते. त्यामुळे ते ओळखू येणं शक्य नव्हतं. तितक्यात पोलीस आले. सर्व चौकशा चालू झाल्या. दोन दिवसांनी सर्व मावश्या घरी आल्या. करमाळ्याची मावशी, काका-त्यांची मुलं आली होती. परंतु सुशीलामावशी आली नव्हती. घरात वेगवेगळी बोलणी चालू होती. मावशीला पळवून घेऊन गेले, तिला मारून टाकलं अशी बोलणी चालू होती. एक दिवस मावशी आली. पण रमेशकाका आले नाहीत. रमेशकाका दुसऱ्या दिवशी येणार होते. सगळे आले होते, पण माझ्या आईची कमी होती. सगळे

तिच्यासाठी रडत होते. जिजीनं ठरवलं, तिला जाऊन आणायचं. सगळ्यांना माहीत होतं की, सगळे मेले तरी ती येणार नाही. तरीपण जिजी म्हणाली, मी जाऊन बघते.

मला फार आनंद झाला. जिजी सोनपेठला गेली. मी इकडे देवाची प्रार्थना करीत होतो. म्हसोबाला जाऊन मी नवस केला की, "आई आली तर पाच रुपयांचे पेढे वाटीन." मी आतुरतेनं आईची वाट पाहात होतो. आईबरोबर माझा लहान भाऊदेखील येणार होता.

दुसऱ्याच दिवशीच जिजी परत येणार होती. त्या दिवशी आजीनं मला नटूनथटून नवे कपडे घातले. मी परसावर जाऊन वाट पाहात होतो. मामा बैलगाडी घेऊन आईला आणण्यासाठी वरकुट्याला गेला होता. मी पाखरासारखा वाट बघत होतो. दुरून एक गाडी येत होती. गाडी जशी जशी जवळ येईल तसतसा मी उड्या मारत होतो. त्या गाडीत फक्त मामा होते. ते म्हणाले, "किसन्या, तुझी आई आली नाही. चल घरी." मामा कंटाळून कंटाळून आले होते. मी मामाबरोबर परसाहून घरी आलो. सगळेजण त्याला म्हणत होते, "अजून तू थांबायला पाहिजे होतं." तरीपण मला विश्वास होता. मी अंगणामध्ये जिबल्या खेळत होतो. तो पोरींचा खेळ. त्या गल्लीत मुली जास्त होत्या. मी मुलींबरोबर खेळत असे. मुलींसारखा बोलत असे. मी खेळत असताना अचानक जिजीचा आवाज आला. मी धावत धावत जिजीकडे गेलो. जिजीबरोबर एक सुंदर, लांब नाकाची गोरीपान स्त्री होती व तिच्याजवळ एक लहान मुलगा होता.

मी तिच्याकडे न जाता घरात पळालो. मोठमोठ्यानं ओरडू लागलो "बाई आली !" सगळेजण आनंदानं बाहेर आले. आईच्या अंगावरून भाकरी ओवाळून टाकली. मी आईला बाई म्हणत असे. कारण घरात तिला सर्व 'बाई' म्हणत असत. आईनं आधी मला जवळ घेतलं आणि रडू लागली. माझ्या बाजूला माझा भाऊ होता. त्याचं नाव दीपक होतं. घरातले सगळेजण रडू लागले. सगळा गाव माझ्या आईला बघण्यासाठी आला, कारण सात वर्षांनंतर ती आली होती. सगळे तिला 'शांता, शांता' म्हणत होते. आईनं माझ्यासाठी नवीन कपडे आणले होते. तिनं मला नवीन कपडे नेसवून, तेल लावून भांग पाडला. माझ्या चेहऱ्यावर एक तजेला दिसत होता. सगळेजण म्हणत होते, "बघ शांता, तू येताच पोरगा किती फुलला आहे !" मी पळत पळत गुरुजींकडे गेलो. मला बघताच गुरुजी म्हणाले, "काय किसन्या आज लय चांगला दिसतोस, काय भानगड हाय ?" मी पटकन म्हणालो, "बाई आली." गुरुजींना विश्वास वाटत नव्हता. पण माझा चेहरा सांगत होता की, आज माझ्या अंगावरून आईचा हात फिरला आहे ! गुरुजींना घेऊनच मी आलो. गुरुजींना पाहताच आई सर्व स्त्रियांमधून उठली व गुरुजींकडे आली. ते म्हणाले, "अग शांते, तुला काय बोलू ? याच्यासारखा पोरगा सोडलास आणि त्याचे तू हाल केलेस. आईचं मन तुला नाही का ?" आईचे डोळे भरून आले. ते डोळे सरळ सरळ तिची काहीतरी मजबुरी सांगत होते. गुरुजी म्हणाले, "जाऊ दे. रडू नको. फार चांगलं केलंस तू. माझ्या मनाला शांती मिळाली."

संध्याकाळ झाली. सर्वजण एकेक करून उठून जात होते. आम्ही सर्वांनी जेवण

केलं. झोपण्याची वेळ झाली. पण कोणी झोपत नव्हते. सर्व गप्पा मारण्यात रंगले होते. पाचही बहिणी खूप दिवसांनी एकत्र आल्या होत्या. मला झोप येत नव्हती. माझा छोटा भाऊ आईजवळच होता. तो मला आईजवळ येऊ देत नव्हता. तो आईचं दूध अजून पीत होता. मला आठवत नव्हतं की मी कधी आईचं दूध प्यायलं आहे ! लहान भाऊ मला आईच्या जवळ येऊ देत नव्हता. आईनं मला जवळ घेतलं, तेव्हा तो अचानक आईच्या अंगावर धावून आला आणि तिला मारू लागला. मला दूर करण्यास सांगू लागला. आई मला म्हणाली, ''किशोर, तू खेळण्यास जा.'' मी बाहेर आलो आणि रडत बसलो. मला वाटत होतं, किती दिवसांनी माझी आई मला मिळाली आणि तिच्याजवळ मी बसू शकत नाही. माझं एकच स्थळ म्हणजे पिंपळाजवळचा म्हसोबा. माझा त्याच्यावर फार विश्वास होता.

आईला येऊन दहा दिवस झाले. पण का कुणास ठाऊक, तिनं मला जास्त जवळ घेतलं नाही. पण मला वाईट वाटलं नाही. मी तिला बघितलं तरी मला फार चांगलं वाटत असे. दूर बसून मी आईकडं सारखा एकटक बघत असे. तेव्हा आजी म्हणायची, ''मेल्या, का रे बघतोस माझ्या लेकीकडे एकटक ? नजर लागेल माझ्या लेकीला.'' माझी आई म्हणाली, ''बघू दे ग माझ्या लेकराला ! किती दिवसांनी मला भेटला.'' मला फार चांगलं वाटलं. माझ्या आईनं मला 'लेकरा' म्हटलेलं. माझ्या आईची भाषा फार सुंदर होती. त्यामुळे मी बोलण्यास लाजत होतो. कारण माझी भाषा खेड्यातली होती.

एके दिवशी पोस्टमन पत्र घेऊन आला. त्यानं ते आईला दिलं. ते रजिस्टर पत्र होतं. आईनं पत्र वाचलं आणि रडण्यास सुरुवात केली. मी ते वाचून बघितलं. ते पत्र सोनपेठवरून आलं होतं. नानांचं पत्र होतं. त्यात नानांनी लिहिलं होतं, ''पत्र पाहताच लवकरात लवकर येणे. तू जर नाही आलीस तर मग परत इकडे येऊ नकोस.'' आई रडत होती. दुसऱ्या बहिणी तिला हसत होत्या. कारण त्यांनाही माहीत नव्हतं की, ते कुणाचं पत्र आहे. आई वडिलांना 'देव' समजत असे. कारण त्यांनीच तिला या व्यवसायापासून मुक्त केलं होतं. लग्नाच्या स्त्रियासुद्धा नवऱ्याला एवढी किंमत देत नाहीत, तेवढी आमची आई वडिलांना किंमत देत होती. आईनं पत्र वाचताच कपडे बांधाबांधीस सुरुवात केली. आवराआवर सुरू झाली. माझे आजोबा यावेळी काहीच बोलले नाहीत. कारण दहा दिवस झाले होते. घरावरती दरोडा पडला होता. सगळेजण तिला विनवत होते ''आता तू तिकडं जाऊ नकोस. तुझं तिकडं चांगलं होणार नाही. तो माणूस वाईट आहे. तुझ्या आधी त्यानं किती स्त्रियांना धोका दिला आहे.'' आईला हे सगळं माहीत होतं. तरीपण आई म्हणाली की, ''त्यांनी आता मला सोडलं तरी मी तिथंच राहीन. तुमच्यासाठी मी मेले असं समजा. मला परत इकडे आणू नका.'' ती खूप व्याकूळ होऊन बोलत होती.

त्या दिवशी सोमवार होता. देवाच्या मूर्ती तिनं बरोबरच आणल्या होत्या. संध्याकाळचे पाच वाजले होते. आईला भीती वाटत होती. तिचे वडील तिला विरोध करतील म्हणून ती देवाला प्रार्थना करीत होती. महादेवाच्या पिंडीसमोर व्याकूळ होऊन आई प्रार्थना करीत होती. मला तिचं रडणं बघवत नव्हतं. माझ्या डोळ्यांतून आपोआप अश्रू येत होते. मी आजारी होतो. ताप आला होता. माझ्या हाताला मोठं बेंड झालं होतं. ते ठसठस करत होतं. संध्याकाळचे सहा वाजले होते. तितक्यात पांढरेशुभ्र कपडे घातलेली, अंगानं धिप्पाड असलेली व्यक्ती आली. मी आणि आई समोरच देवाजवळ बसलो होतो.

आईचं रडणं चालू होतं. त्यांना बघताच आई झटकन उठली, त्यांच्याकडं धावत गेली. त्यांच्या हातातली बॅग घेऊन त्यांना बसण्यास तिनं चटई टाकली. आईचा चेहरा हसरा झाला होता. डोळ्यांची नदी अचानक कोरडी झाली होती. तिचा चेहरा सरळ सरळ सांगत होता की, तिला सहारा देणारा कोणीतरी आला आहे. तिला मोठी हिंमत आली. आई मला आतमध्ये घेऊन गेली. दुसरे कपडे बदलून त्यांच्यासमोर आणलं. मला त्यांना बघताच भीती वाटत होती. मी समोर जाण्यास तयार नव्हतो. आणि आई मोठ्यानं म्हणत होती, "चल किशोर, तुझे नाना आहेत ते. तुला काहीच करणार नाहीत." तितक्यात नानांचा आवाज आला. "अरे किशोर, ये इकडे." मी भीत भीत आईबरोबर गेलो. घाबरत त्यांच्यासमोर बसलो. आईला चिकटून बसलो. ते माझ्याशी मोकळ्या मनानं बोलत होते.

त्यांनी मला प्रश्न विचारला, "कितवीत आहेस !" मी त्यांना उत्तर दिलं, "तिसरीची परीक्षा दिली आहे. दोन-चार दिवसांनी निकाल लागणार आहे." मला त्यांनी बेरीज-वजाबाकीचं गणित दिलं. मी ते केलं. वाचण्यास सांगितलं व नंतर आईला म्हणाले, "मुलगा हुशार आहे." त्यांनी दीपकची आठवण केली. पण त्यांना बघताच दीपक पळून गेला होता. त्याला खूप शोधलं, पण तो सापडला नाही. मग संध्याकाळी हळूच येऊन तो आजीजवळ बसला. तो नानांना फार घाबरत असे.

नानांनी त्याला बोलावलं व दोन चापटा मारल्या, "कुठं गेला होतास मघापासून ? तुला माहीत नव्हतं मी आलो आहे म्हणून ?" दीपक मोठमोठ्यानं रडत होता. माझे पाय थरथर कापत होते. मी घाबरून आतमध्ये पळालो. नाना त्याला रागावत होते. "गप, नाहीतर अजून मारीन." भाऊ गप्प बसला. आई आतमध्ये आली. आईला मी म्हणालो, "जा ना, दीपकला आण." आई म्हणाली, "मी जर गेले तर मलाही मारतील." आजीनं कोंबडीचं जेवण तयार केलं. आईसाठी वेगळी भाजी तयार केली. कारण ती मटण खात नव्हती. नानांना मीच जेवायला वाढलं. कारण आई नानांजवळ बसली होती. माझी चपळता बघून ते माझ्यावर खूप खुश झाले. मला म्हणाले, "पुढच्या सुटीत तू ये सोनपेठला." मी त्यांच्यासमोर हो म्हणालो, त्यांनी माझ्या हाताकडे पाहिलं. ते म्हणाले, "काय झालं हाताला ?" मी म्हणालो, "बेंड." मला वाटत होतं, आता माझी आई मला घेऊन जाणार. आनंदाच्या भरात मी वेदना विसरून गेलो होतो. आई तर चक्क

मला विसरून गेली होती. मी बाहेर आलो. माझ्या कानात नानांचं वाक्य घुमत होतं. "तू पुढच्या वर्षी उन्हाळ्यात ये." म्हणजे मला आता ते घेऊन जाणार नाहीत ! मी बाहेर येऊन रडत होतो. कोणाचंही माझ्याकडं लक्ष नव्हतं. आईचं व नानांचं जेवण झालं. सर्व झाल्यावर आईनं आजीला विचारलं, "किशोरचं जेवण झालं का ?" आजी म्हणाली, "नाही. तो बघ कोपऱ्यात रडत बसलाय."

आई माझ्याजवळ आली. माझा ताप वाढला होता. माझ्या अंगाला हात लावताच आई घाबरली. मला तिनं जवळ घेतलं. तिच्या डोळ्यांचं पाणी थांबत नव्हतं. रडत रडत मला वसरीला सोडून आई नानांचं अंथरूण टाकण्यासाठी आतमध्ये गेली. मला झोपण्यास अंथरूण टाकलं. मी कण्हत होतो. ताप वरचेवर चढत होता. माझं कण्हणं ऐकून आई बाहेर आली. माझं डोकं तिच्या मांडीवर घेत भिंतीला टेकून बसली. रात्रभर ती माझं डोकं दाबत होती. रात्रीचा एक वाजला. माझ्या हाताचं बेंड फुटलं. रक्त गळत होतं. आई पट्ट्या बदलत होती. जवळजवळ एक रुपयाचं नाणं बसेल एवढं बेंड झालं होतं. माझा ताप उतरत नव्हता. आई घाबरत होती. आई परत आतमध्ये गेली व नानांना म्हणाली, "आपण परवा जाऊ". नाना म्हणाले, "तुला थांबायचं असेल तर थांब. मी पहाटे जाणार. मला कामं आहेत."

आई रडत रडत माझ्याजवळ आली. डोकं परत मांडीवर घेतलं व भिंतीला टेकून बसली. सगळे झोपले होते. मी आणि आईच जागे होतो. पहाट झाली. आई रडतच होती, रडून रडून थकली होती. आई काहीच बोलत नव्हती. रात्रभर मी आईच्या मांडीवर होतो. मला जरा बरं वाटत होतं. पहाटे आई व नाना उठले. कारण सकाळी त्यांना जायचं होतं. सर्वजण त्यांना विनंती करत होते की, तुम्ही उद्या जा. पण नाना ऐकण्यास तयार नव्हते. नाना बाहेर आले व आईला म्हणाले, "उठ, अंघोळ कर."

आई उठली. तिनं मला खाली ठेवलं. मी रडण्यास सुरुवात केली. नानांना राग आला. "गप्प. रडू नको. रडलास तर मार खाशील." तरीपण माझं रडणं चालूच होतं. नाना माझ्या अंगावर धावून आले व मला त्यांनी मारलं. मी मोठ्यानं "बाई, बाई" म्हणून ओरडलो. जिजी पळत आली. आजी आणि सर्वजण आले. जिजी म्हणाली, "सावकार, खबरदार माझ्या लेकराला मारलं तर ! मी इथंच जीव देईन. एकतर त्याला घेऊन जात नाही आणि तुम्ही त्याला मारता. तुम्हाला लेकरं आहेत की नाहीत, की असेच वनवासी आहात ?" मलाही जिजीनं दोन चापट्या मारल्या. "मुड्द्या, गप बस. तुझी आई नाही, ती मरून गेली. ही तुझी आई नाही. आम्ही उगाच म्हणतोय ही तुझी आई आहे. तुझी आई तू जन्म घेताच मरून गेली." आई माझ्याजवळ आली. ती मोठमोठ्यानं रडू लागली. जिजीनं मला हात लावण्यास आईला मनाई केली. जिजी तिला म्हणाली, "तू जर लेकराला हात लावशील तर मी या दगडावर डोकं फोडून घेईन. जा त्या गड्याच्या पाठीमागं, तुला यार पाहिजे, लेकरू नको. तू वांझ झाली असतीस तर बरं झालं असतं. देवानं मूल उगीचच दिलं."

जिजीनं मला हृदयाशी लावलं, आजी मला विनवत होती. सर्व मावश्या मला बघून रडत होत्या. माझा ताप उतरला नव्हता. हातातून रक्त गळत होतं. माझा दोन नंबरचा मामा नानांना मारण्यासाठी काठी घेऊन आला. सगळ्या मावश्यांनी मोठ्यानं ओरडून त्याला आवरलं. नाना घाबरले. ते आईला म्हणाले, ''यासाठी तुला इकडे येऊ देत नव्हतो.''

सकाळचे साडेचार वाजले होते. आईनं सर्व आटोपलं. सहा वाजले. आईचं पाऊल घराच्या बाहेर निघत नव्हतं. ती तशीच बाहेर निघाली. एका हातामध्ये पर्स व एका हातात लहान भाऊ. आई बाहेर निघाल्याबरोबर मी मोठ्यानं रडण्यास सुरुवात केली. आई माझ्याकडे नुसती बघत होती. आईनं हातातली पर्स गळ्यात ठेवली व आत येऊन मला जवळ घेतलं. माझा गाल चोळत होती. मुका घेत होती. परत माझा ताप बघत होती. तितक्यात नानांचा आवाज आला, ''येणार आहेस की जाऊ मी ?'' माझा हात धरून आईनं मला बाहेर आणलं. घरातील सर्व लोक, चार मावश्या, मामा, आजी व जिजी सोडण्याकरिता रडत रडत बाहेर आले.

माझं मोठमोठ्यानं रडणं चालूच होतं. वगळीपर्यंत सर्वजण आईला सोडवायला आले. सर्वजण वगळीत थांबले. आई परत परत मला जवळ घेत होती. ती रडत होती. मी आईला सोडत नव्हतो. तिचा हात घट्ट पकडला होता. मोठमोठ्यानं पाय आपटत होतो. उड्या मारत होतो. तितक्यात नानांचा आवाज आला, ''निघायचं तर लवकर चल. वेळ वाया घालवू नको.'' आईनं माझा हात सोडला. जिजीनं व आजीनं मला पकडलं. माझा हात सोडताच मी मोठ्या आवाजात सूर काढला. ''बाई बाई.. ग.'' मी रस्त्याच्या मातीत लोळत होतो. बेंडातून पाणी गळत होतं. पाय जमिनीवर आपटून माझ्या पायांची कातडी निघून गेली होती. अचानक दगडावर माझं डोकं आपटलं. रक्त गळण्यास सुरुवात झाली. आई परत माझ्याकडे येऊ लागली. तितक्यात नानांनी तिचा हात पकडला. दुसऱ्या हातात लहान भाऊ होता. त्याला काहीच समजत नव्हतं. जिजीनं तिची साडी फाडून माझ्या डोक्याला बांधली. आईला दिसलं नाही की माझं डोकं फुटलं म्हणून. मला ओरडता येत नव्हतं. नुसतं तोंड वासून पाय मोठमोठ्यानं आपटत होतो. जोरात तिच्याकडं धावण्याचा प्रयत्न केला. पण जिजीनं मला पकडलं होतं. आईला नानांनी पकडलं होतं. मी इकडं पाण्यातून काढलेल्या माशासारखा तडफडत होतो. आजी व जिजी मला ओढत होत्या व तिकडं नाना आईला ओढत होते. असं वाटतं की, गायीला बांधून घेऊन जात आहेत व ती परत परत आपल्या पिलाकडं बघत आहे, हंबरडा फोडत आहे. इकडे वासराला बांधलं होतं म्हणून वासरू ओरडून ओरडून धापा टाकत होतं. तोंड कोरडं पडलं होतं.

आई हळुहळू माझ्या डोळ्यांसमोरून नाहीशी होत होती. माझा गळा ओरडून ओरडून बंद झाला होता. जिजीनं मला खांद्यावर घेतलं व घरी घेऊन आली. सगळ्या मावश्या आईला शिव्या देत होत्या, शाप देत होत्या. पण त्या बिचाऱ्यांना काय माहीत की, आईची मजबुरी काय होती व मला तरी काय माहीत की आईला मला सोडून का जावं

लागतं ते ! मला त्या दिवशी डॉक्टरकडं घेऊन गेले.

आई गेल्यानंतर पाच–सहा दिवस मी आजारीच होतो. माझा परीक्षेचा निकाल लागला. मी चांगल्या मार्कांनी पास झालो. पण मला आनंद वाटत नव्हता. माझ्या बरोबरचे सगळेच पास झाले होते. सगळे म्हणत होते, "तुला सर्वात जास्त मार्क मिळाले." पण मला त्याचं काहीच वाटत नव्हतं. मला सारखी माझी आई आठवत होती. सारखा विचार करीत होतो. झुरत होतो. जेवण बरोबर करीत नव्हतो. बोर्डाचं वर्ष होतं. त्यावेळेस चौथीला बोर्ड होतं. आम्हाला सालस्याला चौथीची परीक्षा द्यावी लागत असे. पावसाळा सुरू होऊन पंधरा दिवस झाले होते. मला पुस्तकं घेऊन दिली नव्हती. आईनं पैसे दिले, ते खर्चून टाकले होते. मावशी गावाला गेल्या होत्या. काका पण नव्हते. जिजी दोन मावश्यांना घेऊन पार्टीत गेली होती. मी रोज पुस्तकांसाठी रडत होतो. परंतु आजोबा मला रोज म्हणत, "अरे थांब, मावशी येऊ दे." परंतु मावशी आली नाही.

काका आणि मावशी बाहेर गेले होते. शाळेत अभ्यासक्रम सुरू झाला होता. आता मला गवळीगुरुजी नव्हते. हंडेबाई होत्या, त्या रोज मला ओरडत, "किशोर, पुस्तकं आण." मला करमत नव्हतं. मी रोज मावशीची वाट बघत होतो. माझ्याकडे आठ रुपये होते. पण तेवढ्यात काही होत नव्हतं. मला अजून पंधरा रुपये पाहिजे होते. मी चुलत आजीकडं गेलो. त्या मला नेहमी बोलावून दूध, तूप खाऊ घालत. रामदादा हे माझे चुलत आजोबा. ते पण मला चांगले वागवत असत. मी त्यांच्याकडं जाऊन रडू लागलो. त्यांनी माझी सर्व कहाणी ऐकली. ते गवत विकत घेत असत. कारण त्यांच्याकडे म्हशी, शेळ्या व मेंढ्या होत्या. मी त्यांना म्हणालो, "मी तुम्हाला गवताचे सात गाठोडे देईन. तुम्ही मला पंधरा रुपये द्या." आजीनं मला जवळ घेतलं व म्हणाली, "किशोर, मी एवढी का कठोर आहे ? तू मला असं का बोलला ? मी तुला पंधरा रुपये दिले नसते का ?" मग त्यांनी मला पंधरा रुपये दिले. मी बाजारात गेलो. माझं मन सारखं त्या आजीनं दिलेल्या पंधरा रुपयांकडं होतं. मला समाधान मिळत नव्हतं. कारण फुकट पैसे घेणं मला आवडलं नव्हतं. काकानं पैसे दिले तरी मी त्याचं काम करूनच पैसे घेत असे.

मग एके दिवशी मी ठरविलं की शाळा सुटल्याबरोबर मनाआजीच्या सुनेबरोबर गवतासाठी जायचं. त्यांच्या सुना सकाळीच कामं करून गवताला जात असत. त्यांना दोन सुना होत्या. अरुणामामी आणि विजयामामी. मी त्यांना मामीच म्हणत असे. मी शाळेतून मध्यंतरातून पळून आलो. घरी गेलोच नाही. सरळ मनाआजीच्या शेतात गेलो. शाळेतून पळून येण्याची माझी ती पहिलीच वेळ. मला मामीनं बघितलं. "अरे किशोर, तू इकडे कसा काय ?" मी म्हटलं, "उगाच आलो." बापूमामा म्हणजे चुलत मामा. ते माझे खूप लाड करत असत. त्यांनी मला गेल्याबरोबर वाळूक दिलं. मी खाल्लं. मी

उपाशीच होतो. जेवण केलं नव्हतं. मला भूक लागली होती. मामीला विचारलं, "तुम्ही कधी आलात ?" त्या म्हणाल्या, "आत्ताच आलो आणि जेवण करून बसलोत. आता गवताला जायचं आहे." मी म्हणालो, "मी तुम्हाला मदत करू का मामी ?" मामा म्हणाला, "चल ! गवत काढता काढता आपण गप्पा मारू." मी मामीला म्हणालो, "मनाआजीला सांगू नका मी गवत काढलं म्हणून." त्या म्हणाल्या, "नाही."

आम्ही सर्वजण –म्हणजे विजयामामी, अरुणामामी, मी– गवत काढत होतो. मी पटापट गवत काढत असे. दोन दिवस मी गेलो. आजी म्हणत असे की दोन दिवस झाले गवत जास्त येतंय. तर बापूमामांनी सांगितलं, "अग, आपला किशोर गवत काढायला येतो." मला आजीनं बोलावलं, व खूप रागावली. "उद्यापासून तू गवताला गेलास तर घरी येऊ देणार नाही." माझा मामा (राजूमामा), त्यानं मला त्यादिवशी खूप मारलं. मला म्हणाला, "सांग तू रोज कुठे जात आहेस ते" कारण त्याला कळलं होतं की, मी कुठं जातो ते. मग घरातील सर्वजण मला रागावत होते. वाटेल ते बोलत होते. भिकारी वगैरे शब्द वापरत होते. मला आता त्याचं काहीच वाटत नव्हतं. कारण सहन करून घेण्याची सवयच झाली होती. पण मला समाधान मिळत होतं. कारण काम करून पैसे घेतले होते.

माझा अभ्यास नियमित सुरू झाला. घरातील सर्व कामं करून अभ्यास करावा लागत होता. दिवस निघून जात होते.

स्कॉलरशिप परीक्षेला बसलो होतो. परीक्षा जवळ आली होती. रात्रंदिवस अभ्यास करीत होतो. परीक्षा द्यायला करमाळ्याला जावं लागणार होतं. परीक्षा दोन–चार दिवसांवर आली. मला करमाळ्याला जाण्यासाठी पैसे नव्हते. मला त्याची काळजी होती. गुरुजींनी पैसे आणण्यासाठी सांगितलं होतं. मी गुरुजींना म्हणालो, "माझ्याकडं पैसे नाहीत. मावशी आली की, तुम्हाला पैसे देईन." गुरुजींनी पैसे भरले. माझ्या आजोबांचा परीक्षेला विरोध होता. कारण त्यांना माहीत होतं की पैसे द्यावे लागणार. मावशीनं जाताना, 'मला पैसे द्या' म्हणून आजोबांजवळ पैसे दिले होते. पण आजोबांनी ते दारू पिऊन घालवले होते.

मी चौथीला असताना दिवाळीला सर्वजण घरी आले होते. फक्त माझी आई आली नव्हती. सर्वांचं काम मला करावं लागत असे. सर्वांच्या तोंडात, 'अरे किशोर, अरे किशोर' असे. चारीही मावश्या आल्या होत्या. करमाळ्याच्या मावशीची मुलंही आली होती. कुणाचं काम ऐकलं नाही की त्यांना राग येत असे. ते टोचून बोलत असत. मी गप्प बसून सहन करीत असे. कारण काय करणार ? 'दिवसा ना आई, रात्री ना बाप' अशी अवस्था होती. दिवाळी जवळ आली. आदल्या दिवशी सर्व तयारी चालली होती. मला अजून आईनं कपडे पाठवले नव्हते. माझं सगळं लक्ष त्याकडेच होतं. कारण सर्वांनी नवीन कपडे घातले होते. सर्वजण चमकत होते. मोठ्या मावशी म्हणत होत्या, "तुझ्यासाठी

तुझे काका ड्रेस आणणार आहेत.'' माझ्याकडे कपडे बरोबर नव्हते. चड्डी सीटवर फाटली होती. पण ती शिवली होती.

रंभामावशी जरा वेगळीच होती. तिच्या अंगात देवाचं वारं येत असे. तिच्याशी कसं वागावं हेच कळत नव्हतं. ती कोणाला काहीही बोलत असे. तिचे मालक आले होते. ते मावशीला म्हणाले, ''तू सर्वांना कपडे आणलेस. पण यानं काय केलं होतं ?'' ती मावशी म्हणाली, 'ठेवलंन आईनं आमच्या उरावर'. मला फार वाईट वाटलं. पण काय करणार ? शालनमावशीची मोठी मुलगी, साधना हिनं मला चिमटे घेतले, कारण तिला मी पिण्यासाठी पाणी आणून दिलं नव्हतं. तिचं मला चिमटे घेणं साहजिकच होतं. कारण सर्वांना माझ्यावर अत्याचार करण्याचा परवाना मिळाला होता. काम नाही ऐकलं तर सर्वजण रागावत होते. तिनं मला चिमटे घेतल्याबरोबर मी पण तिला चिमटे घेतले. ती माझ्यापेक्षा एक वर्षानं मोठी होती. तो मोठ्यानं रडू लागली. तितक्यात रंभामावशी आली. तिनं बघितलं आणि माझ्या थोबाडीत मारलं. मला राग सहन झाला नाही. तिला मी उलट बोललो, ''तुम्ही मला का मारलं ? तुम्ही कोण मला मारणारे ?''

मी माझ्या हातातला ग्लास फेकून दिला. रंभामावशी खूप रागावली. तिनं लाथाबुक्क्यांनी मारण्यास सुरुवात केली. तिनं माझ्या कानशिलावर लाथ मारली. मी खाली पालथा पडून रडण्यास सुरुवात केली. आधीच मी आजारी होतो. इतक्यात आजी धावून आली. आजीनं मला उचललं. मी मोठ्यानं रडत होतो. दोघींचं भांडण लागलं. रंभामावशीनं माझ्यावर आरोप केला की, मी तिला मारलं. सर्वांचा माझ्यावर विश्वास होता. मी उलट मारू शकत नाही हे सर्वांना माहीत होतं. कोणीच तिचं मनावर घेतलं नाही. मला स्वयंपाकघरात घेऊन जाऊन आजी म्हणाली, ''तिचं मनावर घेऊ नको. ती वेडी आहे.'' रंभामावशी मोठ्यानं बडबड करीत होती. सर्वजण तिच्या बडबडीला कंटाळून चौकात आले. ती मला एकदम म्हणाली, ''भिकाऱ्या, ते पैसे आण. चाळीस रुपये दिलेले त्यांनी. कुणाचं हाळजलंय कुणाला माहीत, भिकाऱ्याचं रूप घेऊन ? त्याच्याकडून पैसे घेतोस ?'' मला तिच्या मालकांनी पैसे दिले होते. माझ्या अंगावरचे कपडे बघून त्यांनी मला कपड्यांसाठी पैसे दिले होते. मी ते पैसे माझ्याजवळ ठेवलेच नव्हते. आजीकडे ठेवले होते. ती बडबड करतच होती, ''जा आमच्या घराच्या बाहेर. तुझी आई काय मेली का ? धगड्याला घेऊन बसली. तिला धगडाच पाहिजे. हाळजून बसली अन् टाकून गेली.'' मला सहन झालं नाही. सर्वजण तिला विनवत होते. गप बस म्हणून. मी रागात उठलो व म्हणालो, 'गप्प बसा, यापुढे एक शब्द जरी बोललात, तर दगडच घालीन डोक्यात.'' आजीनं पैसे परत दिले. ती अजून चिडली. मला तिचं बोलणं सहन होत नव्हतं.

मी तसाच रागारागानं बाहेर निघालो. सर्वजण मला पकडत होते. पण मी ऐकतच नव्हतो. बाहेर येऊन बसलो. माझ्या कानात घुमत होतं; 'भिकाऱ्याचं रूप घेऊन त्यांच्याकडून पैसे घेतोस, जा आमच्या घरातून.' मला सर्व कळत होतं. बाहेर जाऊन विचार केला, मी जाऊ तरी कुठं ? कारण आईकडे तर शक्य नाही. आईची मजबुरी मला कळली

होती. मी रडत-रडत विचार करीत होतो. आपलं पुढं कसं व्हावं ? ''आपलं जीवन असंच जाणार का ? आपण कधी मोठे होऊ ? आपल्याला नोकरी लागेल, तेव्हा आपण सुखी होऊ. पण तोपर्यंत कसं जगायचं ? मला माहीत होतं, कोल्हाटी जातीला सवलती आहेत. करमाळ्याच्या बोर्डींगमध्ये राहावं व उरल्या वेळात हॉटेलचं काम करावं, असं ठरवलं.

मी डोळ्यांचं पाणी पुसलं. सरळ परसावर जिजीकडं गेलो. जिजीला मी भांडणाविषयी काहीच बोललो नाही. कारण परत भांडण झालं असतं. रंभामावशीपण समजूतदार नव्हती. मामानं माझं आणि जिजीचं जेवण परसावर आणलं. आम्ही जेवण केलं. मी रात्रभर विचार करीत होतो. जिजीकडे मी पाच रुपये मागितले. सकाळी मी करमाळ्याला पोचलो. बसस्टॅण्डवर गेलो. हॉटेलमध्ये काम मिळालं. दिवसभर काम केलं. मी नेरल्याच्या एका माणसाला बघितलं व आत लपलो. दिवाळी असल्यामुळं नेरल्याचं कुणीच आलं नाही. नाहीतर दहा-पंधरा माणसं तरी बसस्टॅण्डवर असतात. दिवसभर काम केलं. माझा जीव थकला होता. दिवसभर विचार करीत होतो. माझ्या डोक्यात विचार आला. मी बोर्डींगमध्ये चौकशी केली. दिवाळीपासून बोर्डींगमध्ये घेत नाहीत असं कळलं. सुरुवातीपासून, म्हणजे जूनपासून यावं लागतं. मी विचार केला, येथे राहून काय उपयोग ? मला भीती वाटत होती. मला कोणी बघितलं, तर मला माझे मामा खूप मारतील. करमाळ्यात आमचे पाहुणे राहात होते. मी परत विचार केला. चला, नेरल्याला. पाच वाजता गाडी होती. मी हॉटेलमालकाला काही न सांगता पळून आलो. त्यावेळी दोन रुपये तिकीट होतं. इकडे सर्वजण मला शोधत होते. जिजीनं जेवण केलं नव्हतं. घरी भांडण चालू होतं.

मी सरळ परसावरती गेलो. मला बघताच जिजी धावून आली. रडायला लागली. मावशी आल्यानंतर मी मावशीला म्हणालो, ''मावशी, मला गुरुजींचे पैसे द्यायचे आहेत.'' तर मावशीनं विचारलं. ''आजोबांनी दिले नाहीत का ?'' आजोबा जवळच होते. ते म्हणाले, ''काय गरज होती याला करमाळ्याला जाण्याची ? लय शहाणा होणार आहे. त्याला पैसे देऊ नका. जा तुझ्या आईकडे, आण जा पैसे.'' मावशी म्हणाली, ''का ? त्याच्या आईची मनीऑर्डर काय केली ?'' आजोबा म्हणाले, ''त्याला खायला-प्यायला लागत नाही का ?'' मी काही बोललो असतो, पण माझ्या तोंडातून शब्द निघू नयेत म्हणून मी बाहेर गेलो. कारण लक्ष देऊन कसं जमायचं ? एक दिवसाचं थोडंच होतं. 'रोज मरे त्याला कोण रडे' ! अशा बोलण्याची मला सवय झाली होती. त्याशिवाय मला माहीत होतं की मी किती दिवस त्यांच्याजवळ राहणार आहे. फार तर अजून तीन वर्षं. कारण सातवी पास झाल्यानंतर मला दुसऱ्या गावी शाळेला जावं लागणार होतं. सातवीपर्यंत नेरल्यात शाळा होती.

चौथीच्या बोर्डाची परीक्षा जवळ आली होती. फक्त वीस दिवस राहिले होते. अभ्यास करायचा होता. सुगीचे दिवस जवळ आले होते. संध्याकाळी गड्यांच्या भाकरी रोज देऊन

यावं लागत असे. कधी दिवसा राखण म्हणून बसावं लागत असे. जिजी दुसऱ्या दिवशी येणार होती. कारण सुगीचे दिवस आले की, तिला बोलावून घेत असत. ती रात्रंदिवस शेतामध्ये राहात असे. दुसऱ्या दिवशी ती आली. आल्याबरोबर मला शोधत होती. संध्याकाळची वेळ होती. मी शेतामध्ये भाकरी घेऊन गेलो होतो. परत येण्यास मला संध्याकाळचे साडेसात वाजत असत. येते वेळी अंधारात भीत भीत यावं लागत असे. घरी आलो त्यावेळी मोठमोठ्यानं आजीचा आणि जिजीचा आवाज येत होता. कारण, मला शेतात का पाठवलं म्हणून भांडण चालू होतं. घरी दोन्ही मामा मजा करीत होते. मला एकदा कुत्रा चावला होता. म्हणून ती घाबरत होती. तेव्हापासून त्या वाड्यावरच्या कुत्र्याला बांधून ठेवत असत. मी गप्प बाहेर उभा होतो. घरात मोठमोठ्यानं भांडण चालू होतं. आजोबा म्हणत होते, "एवढा लाडका आहे तर घेऊन जा बरोबर."

"माझ्या लेकराला एक शब्द बोलायचा नाही." जिजी मामाला, 'ऐतखाऊ लाडका' म्हणाली होती. मावशी गप्प बसून ऐकत होती. कारण ती भावाला काही बोलू शकत नव्हती. रात्रीचे आठ वाजले होते. मला घरात जाण्याची भीती वाटत होती. मी कोपऱ्यात तसाच उभा होतो. मला मावशीनं बघितलं. म्हणाली, "कोण आहे, किशोर का ?" मला मावशीनं पकडलं आणि घरात घेऊन गेली. मी जिजीकडं पळत गेलो. मावशीचं भांडण मिटलं होतं. आत गेल्यावर आजी म्हणाली, "मेल्या, इतका वेळ कुठं गेला होतास ?" मी गप बसलो होतो. "चल, जेवण वाढलंय" मी जेवण केलं आणि काहीही न बोलता चिमणी जवळ घेऊन अभ्यास करायला सुरुवात केली. माझ्यासाठी जिजीनं खाऊ आणला होता. पण सगळ्यांसमोर तो देण्यास ती तयार नव्हती. घाबरत होती. ती जेवून शेतात जाणार होती. मामाला सुटी देणार होती. म्हणजे गावावरून आल्यानंतर, तिला आराम करण्याससुद्धा परवानगी नव्हती. रात्री नऊ वाजता ती मला म्हणाली, "चल शेतात जाऊ." मला अभ्यास करायचा होता. सकाळी शाळेत जायचं होतं. परंतु मला माहीत होतं. जिजी मला शेतात गेल्यावर खाऊ देईल. मी मोह टाळला व नको म्हणून सांगितलं.

जिजी एकटी शेतात गेली. मी ठरवलं होतं, शाळा सुटल्यावर जिजीच्या भाकरी घेऊन शेतात जायचं. संध्याकाळी पाच वाजता माझी शाळा सुटत होती. शाळा सुटल्यावर मी घरी आलो आणि मामीला म्हणालो, "मामी, जिजीच्या व गड्यांच्या भाकरी बांधा, मला लवकर जायचं आहे." पण भाकरी झाल्या नव्हत्या. मी थांबलो, हातपाय धुतले व अभ्यासाला बसलो. भाकरी तयार झाल्यावर मी शेतामध्ये घेऊन गेलो. जिजी टेकडीवरून माझीच वाट बघत होती. मी जाताच 'जिजी' म्हणून आवाज दिला. जिजी टेकडीवरून खाली आली. माझ्याबरोबर ओढ्यापर्यंत आली. मला घेऊन गेल्याबरोबर तिनं माझा आवडता चिवडा काढला. आम्ही दोघं खात होतो. तिनं मी जाईपर्यंत जेवणाला हात लावला नव्हता, ती मला खाऊ घालत होती. आम्ही जेवण केलं. सोबत पाटी-पुस्तक घेऊन मी गेलो. कारण जिजी आल्यानंतर मी शेतातच झोपत होतो. जिजीशी जास्त न

बोलता मी अभ्यास करायला सुरुवात केली. गड्याला वेळ विचारली. रात्रीचे अकरा वाजले होते. मला झोप येत होती. पण काय करणार ? बोर्डाची परीक्षा होती. तसाच अभ्यास करीत होतो. परीक्षा जवळ आली होती.

आज मला सालस्याला परीक्षेला जायचं होतं. सकाळी दहा वाजेपर्यंत निघायचं होतं. कारण अकरा वाजता पेपर होता. मी सकाळी पाचलाच उठलो. आजीला व मामीला उठवलं. आजीनं चपात्या केल्या. मामीनं भाजी केली. मी अंघोळ करून अभ्यास करीत होतो. त्या दिवशी मी कोणतंच काम करायचं नाही असं ठरवलं होतं. पण काय करणार ? माझ्याशिवाय ते शक्य नव्हतं. कारण माझे दोन्ही मामा नऊ वाजेपर्यंत उठतच नव्हतं. आणि उठले तर काम असं त्यांना माहीत नव्हतं. त्यांनी शाळा सोडून दिल्या होत्या.

चहाचा पुडा आणायचा होता. आजोबा म्हणाले, ''जा. आता एवढा पुडा आण खाज्याच्या दुकानावरून.'' खाज्याची आई माझ्यावर खूप प्रेम करत असे. कारण तिला माझी परिस्थिती माहीत होती. मी तिला मुलासारखा वाटत होतो. तिनं विचारलं, ''कारं किसन्या, आज तुला परीक्षेला जायचं आहे ना ?'' मी म्हणालो, ''हो आता जाणारच आहे.'' तिला माहीत होतं, माझ्याशिवाय सामान आणायला कोणी येणार नाही.

पुडा घेऊन मी घराकडं धावत धावत येत होतो. कारण साडेसहा वाजले होते. मुलं शाळेकडे जाताना दिसत होती. पळत-पळत येत होतो. माझ्या पायाला ठेच लागली. बोटातून रक्त गळत होतं. पण मी तसाच घरी येत होतो. तितक्यात मला मनाआजीनं बघितलं. तिनं घरी नेऊन कुरमुडीचा पाला माझ्या बोटावर बांधला. दूध पाजलं. त्यांच्या घरून मी आजोबाच्या घरी गेलो. आजोबा माझ्या नावानं ओरडत होते. मी घरात पाऊल टाकताच त्यांनी धपाटा लावला, ''किती वेळ झाला, कुठं गेला होतास ?''

मावशीनं माझ्या अंगठ्याकडं बघितलं. मी लंगडत लंगडत जात होतो. तिनं जवळ घेतलं. मी रडत रडत चहाचा पुडा मामीला दिला. आजी चपात्या व डाळ बांधत होती. मी गल्लीत सर्वांना भेटण्यास गेलो. सर्वांना भेटून आलो. मला कांतिलाल, दिलीप, वंदना, बेला बोलावण्यास आले. त्यांचा नंबर माझ्या पाठीमागे होता. आम्ही सर्वजण पायी सालस्याला निघालो. मी गप्प होतो. एका पायानं थोडासा लंगडत होतो. सर्वजण मस्ती करीत होते. मी अगदी नवीन असल्यासारखा वागत होतो. चालता चालता मी पुस्तक वाचण्यास काढलं. दिलीप मला वाचू देत नव्हता. कांतिलाल म्हणाला, ''अरे, त्याला वाचू दे. मग आपलं कसं होणार ?'' मी वाचत वाचत निघालो. रस्त्यात एक तळं होतं. हांडेबाई म्हणाल्या, ''सर्वजण येथे थांबा. आपण येथे जेवण करू.'' सर्वांनी भाकरी काढल्या: कोणी धपाटे, कोणी चपाती, कोणी भाकरी. आम्ही सर्वांनी पोटभर जेवण केलं. हळुहळू सालसं गाठलं. आम्हाला साडेदहा वाजले होते. परीक्षेला आम्हाला एक मोठा हॉल होता. अकरा वाजता पेपर होता. पेपरची वेळ झाली. सर्वांना आवाज देत होते. तिथे वरकुट्याचा एक मुलगा मित्र झाला. मला सरांनी पूर्ण नावानं आवाज दिला. 'काळे किशोर शांताबाई'. त्या मित्रानं मला विचारलं, ''शांताबाई का रे ? मला वेगळंच वाटलं.''

मला त्यावेळेस काहीच बोलता आलं नाही. गप्प राहून परीक्षा हॉलमध्ये जाऊन बसलो. परत परत ते शब्द माझ्या कानामध्ये घुमत होते.

परीक्षा सुरू झाली. पेपर वाटण्यात आले. पेपर चांगला होता. असेच सर्व पेपर चांगले गेले. उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या. निकाल पंधरा दिवसांनी लागणार होता. मला सारखी आईची आठवण येत होती. कधी एकदा तिच्याकडे जाईन, असं झालं होतं. पण निकाल जवळ आला होता. सुगी चालू होती. जिजीदेखील रिकामी नव्हती. एकेक दिवस वर्षासारखा वाटत होता. मी एकेक दिवस मोजत होतो. माझं शरीर फक्त तिथं होतं, पण मन मात्र आईजवळ होतं. कुठंही बसलो की झुरत असे. विचार करीत असे. मावशीचं माझ्याकडं नेहमी लक्ष होतं. "किशोर, कसला विचार करत असतो ?" ती म्हणाली. मी म्हणालो, "काही नाही. उगाचच बसलो आहे." एकदा रात्री कोंबडी कापली होती. रमेशकाका आले होते. दिवसभर काम करून थकलो होतो. ओसरीला एका कोपऱ्यात बसलो होतो. आईच्या आठवणीनं मला खूप रडायला येत होतं. हळुहळू हुंदके सुरू झाले. मला वाटलं, आईनं मला का जन्म दिला ? माझं जीवन कुत्र्यासारखं होतं, कुणीही हट म्हटलं की पळायचं. रात्री झोपतेवेळी आजी, मावशी या सगळ्यांचे मला पाय दाबावे लागत. मावशी मला जास्त पाय चेपू देत नव्हती. पण कधी कधी आईच्या अधिकारानं माझ्याकडून पाय चेपून घेत होती. आणि मी स्वत:हून तिचे पाय दाबत होतो. कारण ती मला खूप माया देत होती.

आता पाचवीला कोल्हाटी समाजाचा मीच एकटा होतो. पास झाल्याबरोबर सर्व गल्लीत साखर वाटली. कारण जिजीनं मला पैसे दिले. सगळ्यांना आनंद झाला. सगळ्यांना भेटून घेतलं. सगळी गल्ली माझ्यावर जीव तोडून प्रेम करीत होती. आधी मी माझ्या देवाला साखर वाटली आणि प्रार्थना केली की, 'माझ्या आईची व माझी भेट होऊ दे.' सुगी संपली होती. जिजी मोकळी झाली होती. तिला सांगलीला जायचं होतं. मी पास झाल्यामुळे सगळेजण माझं कौतुक करत होते. मला सोनपेठला जायचं वेड लागलं होतं. मी जाण्याचा विचार केला. मावशीला न सांगता आजीला म्हणालो, "मला सोनपेठला जायचं आहे." हे वाक्य आजोबांनी ऐकलं. ऐकल्याबरोबर माझ्यावर भडकले. त्यांना वाटलं, कायमचाच जाणार म्हणून ! ते म्हणाले, "तू गेलास म्हणजे तुझी आई आम्हाला विचारणार नाही." कारण आई माझ्यासाठी मनीऑर्डर करीत होती ! शिवाय मी गेलो तर घरातलं काम कोण करणार ? आजोबांनी सरळ सांगितलं, "तू सोनपेठला जायचं नाही, तू कसा जातोस ते मी बघतो." आजोबा आतमध्ये आजीजवळ जाऊन पुटपुटत होते, "हा गेला की त्याची आई येणार नाही. त्याला जाऊ द्यायचं नाही." मी कोपऱ्यात बसून रडत होतो. मावशी व काका बाहेर आले. आता त्यांना समजलं की, माझ्या रडण्याचं व झुरण्याचं कारण काय होतं ते !

दुपारचे दोन वाजले. पोस्टमन आला, आणि त्यानं पत्र दिलं. मी म्हणालो, ''कुठून आलं ?'' तो म्हणाला, ''सोनपेठहून.'' मी पळत गेलो. पत्र वाचलं. वाचता वाचताच उड्या मारण्यास सुरुवात केली. मावशीला आनंद झाला. तिला आणि सर्वांनाच वाटलं आई येणार आहे की काय ? आजोबा तर हसायलाच लागले. पण ज्या वेळेस मी सांगितलं की, मला आणि जिजीला बोलावलं आहे. त्यावेळी आजोबा आणि आजी नाराज झाले. मी चाललो म्हणून आजोबा नाराज झाले व फक्त जिजीला बोलावलं म्हणून आजी नाराज झाली. मावशीला आनंद झाला होता. कारण मी पंधरा दिवस बाहेरगावी जाणार होतो ! त्या पत्रात लिहिलं होतं. यापूर्वी मी एक पत्र पाठवलं होतं. अजून तू आला नाहीस. मी तुझी वाट बघत होते. जिजीला किंवा मावशीला घेऊन ये.

मी पत्र घेऊन पळतच शेतात गेलो. मी जिजीला आनंदानं मिठी मारली. जिजीला काहीच कळत नव्हतं. तिला वाटलं, माझी आईच आली आहे. ती म्हणाली, ''काय रे किशोर, एवढा उड्या का मारतोस ?'' माझा आनंद बघून मामीपण पळत आली. तिलाही वाटलं की माझी आईच आली. कारण खूप दिवसांनंतर एवढ्या आनंदानं मी उड्या मारत होतो. मग मी पत्र दाखवलं व म्हणालो, ''तुला व मला बाईनं बोलावलं आहे.'' जिजीला खूप आनंद झाला. नंतर मामी म्हणाली, ''दहा दिवसांपूर्वी तुमच्या बाईचं पत्र आलं होतं. मामाजींनी, म्हणजेच आजोबांनी ते लपवून ठेवलं. तुम्हाला सांगितलं नाही. त्यांनी ते पोस्टमनकडून वाचून घेतलं. ते कोणालाच माहीत नाही. मी भांडी घासत होते म्हणून मला माहीत झालं. सांगू नको म्हणून मला त्यांनी बजावलं होतं.''

मला आजोबांचा खूप राग आला. पण गप्प बसणं भाग होतं. नाही तर मामीला खूप त्रास झाला असता. कदाचित तिला त्यांनी मारलं असतं. मी आणि जिजी संध्याकाळी घरी आलो व मावशीला सांगितलं, ''आम्ही उद्या निघालो.'' मावशीला मोठा आनंद झाला. ती म्हणाली, ''किशोर, तुला कपडे नाहीत. सर्व कपडे फाटले आहेत. तुझी आई आम्हाला काय म्हणेल ? तू परवा जा. मी उद्या करमाळ्याला जाऊन कपडे घेऊन येते.'' मला कपडेच काय, कोणी स्वर्ग जरी देतो म्हटलं असतं तरी मी मानलं नसतं. मी म्हणालो, ''नाही. मी उद्याच जाणार. मी आईला सांगीन की मी कपडे विसरून आलो म्हणून.'' मावशी हसली व म्हणाली, ''तसं काही म्हणू नकोस, तू उद्या जा. जाताना परळीहून एकतरी चांगला ड्रेस घे.'' एक ड्रेस होता तो मी रात्री धुतला.

सकाळी लवकर उठायचं होतं. आईकडं जाणार या आनंदात मला झोपसुद्धा लागली नाही. सकाळी चार वाजता झोप लागली. जिजीनं मला उठवलं व अंघोळ घातली. कपडे घातल्याबरोबर मी गवळीगुरुजींच्या घरी पळालो. त्यांना भेटलो. त्यांच्या पत्नीचंही दर्शन घेतलं. त्यांनी माझ्या तोंडात साखर घातली व हृदयाशी धरून ठेवलं. सर्व गल्लीत फिरून सर्वांना भेटून घेतलं. भावकीतले जवळजवळ सर्वजण माझ्याकडे बघून आनंदाश्रू गाळू लागले. कारण त्यानी माझं दलदलीतलं जिणं व फरफटबाजी पाहिली होती आणि माझी या जाळ्यातून आज मुक्तता होणार होती असं त्यांना वाटत होतं. सर्वजण मला

वगळीपर्यंत सोडायला आले. मोठ्या पोपटमामानं गाडी जुंपली. सुशीलामावशीचे पाय थरथर कापत होते. ती सारखी रडत होती. कोणालाच रडू आवरत नव्हतं. मामाही रडत होता. मामाला मामीनं पाणी दिलं व चूळ भरण्यास सांगितलं. आजी तर सारखी 'किश्या, किश्या' करीत होती, 'लवकर परत ये' म्हणत होती. रडतच मामांनी गाडी जुंपली. मावशी गाडी हलताच खाली बसली. ती मला तिचा मुलगाच समजत होती. जवळजवळ सर्वजण मला सोडायला आले होते. सर्वांना रडताना बघून मला रडू आवरत नव्हतं. मी रडत असलो तरी मी आईकडे जाणार हा वेगळा आनंद होता. वरकुटे आले. बसस्टॅण्डजवळ गाडी थांबवली. बस येण्यास पंधरा मिनिटं वेळ होता.

गाडी कधी येईल याची मी वाट पाहात होतो. मला तितक्यात सालस्याचा मित्र भेटला. त्याला भेटणार इतक्यात गाडी आली. दुरूनच मी त्याला टाटा केला. ती शेवटची भेट होती. कारण नंतर त्याची-माझी भेटच झाली नाही. त्याचे वडील शिक्षक होते. त्यांची बदली दुसरीकडे कुठेतरी झाली होती. मामाला खिडकीतून टाटा करीत होतो. मामाचे डोळे भरून आले होते. मला मात्र त्यावेळेस रडू येत नव्हतं. मी माझ्याच आनंदात होतो. मला असं वाटत होतं की, जेलमधून एखाद्या कैद्याला मुक्त केलं आहे ! पण परत विचार आला, आपल्याला पुन्हा परत यायचं आहे. कारण कुणाला माहीत की, आपली आई आपल्याला तिथं ठेवून घेईल की नाही ? जिजीला आजोबानं धमकी दिली होती, "तू जर किश्याला परत आणलं नाहीस तर तुला मी घरात येऊ देणार नाही." त्यामुळे मला परत नेल्याला जावं लागणार होतं.

एस.टी. पळत होती. खिडकीतून मी एकटक बघत होतो. गाडी पुढे चालली होती. गाडी प्रत्येक थांब्यावर थांबत होती. परंतु मला वाटायचं, गाडी कुठेच थांबू नये, भरभर जावी. आम्हाला कुर्डुवाडीला उतरून तिथून परळीला जाणाऱ्या गाडीत बसायचं होतं. सकाळी आठ वाजता गाडी होती. पावणेआठ वाजले होते. गाडी स्टॅण्डला लागली होती. मी पहिल्यांदा कुर्डुवाडी पाहात होतो. मी आणि जिजी गाडीत बसलो. थोड्या वेळानं गाडी हलली. जिजीनं तिकीट काढलं. गाडी भरभर जात होती. माझा जीव कासावीस झाला. एकेक क्षण मोजत होतो. जिजी मला आवडेल ते खायला देत होती. पण माझं खाण्यात लक्ष नव्हतं. कधी एकदा आईला भेटतो असं मला झालं होतं. खिडकीतून बाहेर बघत बघत मला झोप कधी लागली हे कळलंच नाही. मला जिजीनं उठवलं, "अरे किसन उठ, परळी आली. आपल्याला इथं उतरायचं आहे."

मी पटकन उठलो. पिशवी हातात घेतली. गाडी बसस्टॅण्डला थांबली. आम्ही खाली उतरलो. दुपारचा दीड वाजला होता. आम्हाला सोनपेठला लगेच गाडी होती. आम्ही सोनपेठला आलो. घराजवळ येताच जिजीनं घराची कडी वाजवली. आईनं खिडकीतून बघितलं. मला बघताच आई धावत आली व तिनं दार उघडलं. तिनं दार उघडताच

मला गच्च पकडलं. नंतर तिच्या लक्षात आलं की भाकरी ओवाळून टाकायची आहे. आई मला म्हणाली, "इथेच थांब." मी दारातच थांबलो. भाकरी आणून माझ्यावरून ओवाळून टाकली. मी घरात गेलो. भाऊ शाळेत गेला होता. नाना बाहेर गेले होते. आई एकटीच घरी होती. तिनं माझे हातपाय धुतले. भांग पाडला. मला आणि जिजीला जेवायला वाढलं. आई मला दूध-भाकरी खाऊ घालत होती. तिला वाटत होतं, किती खाऊ घालू आणि किती नको !

तिथं एकच खोली होती. दहा बाय वीसची. त्यातच कॉट, नहाणी, देवघर. खूपच अडचण वाटत होती. मी पोटभर जेवण केलं. मला झोप येत होती. जिजी व आई गप्पा मारत बसल्या. मला आईनं कॉटवर झोपवलं. मी झोपी गेलो. थोड्या वेळानं नाना आले. मी गाढ झोपलो होतो. नाना म्हणाले, "अरे, कधी आलात ?" जिजी समोरच होती. त्यांनी विचारलं, "किशोरला आणलं की नाही ?" त्यांनी मला पाहताच माझ्या पाठीवर हात थोपटला. धाकटा भाऊपण आला. तो माझ्याशी जास्त बोलत नसे. कारण मी खेड्यातला. तो चांगला राहात असे. त्याचे कपडे वगैरे सर्व व्यवस्थित होते. मला आई घराच्या बाहेर जाऊ देत नव्हती. असे आठ दिवस झाले. मला चांगले कपडे शिवले, चप्पल घेतली. मी पास झालो असं समजून आई आणि नाना माझ्यावर खूष होते. मला जे विचारलं त्याचं उत्तर मी देत असे. ते भावाला म्हणत असत, "बघ, खेड्यात राहूनसुद्धा तुझा भाऊ किती हुशार आहे." मी आनंदात दहा दिवस राहिलो. माझी कातडी गोरी पडली. मी माझ्या सावत्र आईकडे जात असे. त्या माझ्याशी चांगलं बोलत असत. सावत्र बहिणी राजेश्री आणि जयश्री पण चांगल्या बोलत असत. दहा दिवसांनंतर जिजी म्हणाली, "आपल्याला आता जायचं आहे. उद्या निघायचं आहे. आज कपडे पिशवीत भरून ठेव."

मला जावंसं वाटत नव्हतं. पण काय करणार ? अजून आई-नाना म्हणाले नव्हते की, किशोरला राहू दे. भाऊ नानांना खूप घाबरत असे. त्यांच्यासमोरच तो येत नसे. माझ्या सावत्र बहिणीदेखील नानांना खूप घाबरत असत. मला पण नानांची खूप भीती वाटायची. उद्या जाणार म्हणून आई शेवया वगैरे बांधून देत होती. जिजीला साडी घेतली. सकाळ झाली. मी अंघोळ केली. जिजीनं सर्व तयारी केली. मी रडत रडतच निघालो. आईपण सारखी रडत होती. मी बाहेर आलो. सर्वजण उंबरठ्याबाहेर आले. पण आईनं उंबरठा ओलांडला नाही. घरातूनच टाटा करत होती. नाना बसस्टॅण्डपर्यंत सोडायला आले. माझं मन उदास झालं होतं. तसाच बसमध्ये बसलो. सोनपेठहून नेरल्याला परत येताना माझ्या डोक्यात अनेक विचार येत होते. माझ्या नशिबात नेमकं काय लिहिलं आहे हे कळण्यास मार्ग नव्हता. एकदाचं परत नेरल्याच्या दलदलीत येऊन पोचलो.

सोनपेठहून परत नेरल्याला आल्यामुळे भावकीतल्या जवळजवळ सर्व लोकांना दुःख

झालं. म्हणायचे, ''किशोरदेव, नेरलं हे तुझ्या पाचवीला पुजलं आहे.'' आजोबांना मात्र आनंद झाला. कारण त्यांची घरातली कामं मी नसल्यामुळं अडत होती. ती चिंता, मी परत नेरल्याला आल्यामुळे दूर झाली. एकदा पावसाळ्यात रविवारी मामानं मला म्हशी घेऊन शेतात पाठवलं. सकाळीच शिळ्या भाकरी व लोणचं घेऊन पिराच्या शेतात गेलो. पिराचं शेत सर्वांत दूर होतं. जवळजवळ चार किलोमीटरवर होतं. तेथे ओढा होता. म्हशींना ओढ्याकडे घेऊन गेलो. सकाळपासून म्हशी चारत होतो. दुपार झाली. कडक ऊन पडलं होतं. म्हशी पाण्यात सोडल्या. ओढ्याला भरपूर पाणी आलं होतं. अचानक वादळ आलं. मी अंदाज केला की, आता पाऊस येणार. मी तसाच उठलो. न्याहरी केली नसल्यानं खूप भूक लागली होती. सकाळी अभ्यासामुळं मला जेवणाचं लक्षात राहिलं नव्हतं. दुसऱ्याच दिवशी घटक चाचणी होती. त्यामुळे मला अभ्यास करणं जरूरीचं होतं.

मी भाकरी बांधून म्हशी चारण्यास आलो होतो. तीन म्हशी होत्या. वादळ सुरू झालं. काळेभोर ढग आभाळात आले. वाऱ्यानं आणि धुळीनं मला काहीच दिसत नव्हतं. माझ्या एका हातात काठी होती व दुसऱ्या हातामध्ये दफ्तराची पिशवी होती. मी जोरात म्हशी पळवत होतो. कसातरी ओढ्याच्या बाहेर आलो. वावटळीच्या वेगानं मी खेचला जात होतो. पण म्हशीच्या आड जाऊन मी माझं संरक्षण करत होतो. माझा जीव बावरत होता. तितक्यात वीज चमकली. आणि जोरात आवाज झाला. मी मोठ्यानं ओरडलो. मी रडकुंडीला येऊन 'जिजी' म्हणून जोरानं हाक मारली. आसपास मला कोणीच दिसत नव्हतं. वीज माझ्या अंगावर पडते की काय, असं मला वाटत होतं.

तसाच रस्त्याला लागलो. जोरात पाऊस सुरू झाला. मोठमोठ्या गारा पडू लागल्या. मी म्हशी सोडून दिल्या व वाऱ्यासारखा सैरावैरा धावत सुटलो. म्हशी जास्त जोरात पळत नव्हत्या. कुठं जावं, काहीच कळत नव्हतं. जवळपास वस्ती नव्हती. गावापासून हे शेत फारच दूर होतं. मला पिराचं मंदिर दिसलं. मी मंदिराजवळ आलो व झाडाखाली थांबलो. विजेचा कडकडाट चालू होता. झाडावर वीज पडते हे मला माहीत होतं. म्हणून मी परत त्या मंदिरापासून दूर पळालो. थंडीनं माझं अंग थरथर कापत होतं. मी पुरता भिजलो गेलो होतो. दफ्तरपण भिजलं होतं. मी मोठमोठ्यानं ओरडत होतो. रडत होतो. पण माझा आवाज कुणालाच ऐकू येत नव्हता. मग म्हशी पुढं निघून गेल्या होत्या. पळून पळून मी थकलो. झाडं पडत होती. विजा जोरात चमकत होत्या. कुणीकडून या दिशेला आलो, असं मला वाटलं.

मी गावाच्या वगळीत येताच मला जिजी दिसली. पोपटमामा दुसऱ्या शेतात मला शोधण्यासाठी गेला होता. दुसरे दोन मामा घरी आराम करीत होते. मला बघताच जिजी मोठ्यानं ओरडली. तिनं 'किसन' म्हणून हाक मारली आणि वाऱ्याच्या वेगानं ती माझ्याकडे पळत आली. मी रडतच होतो. हळूहळू चालत होतो. मी खूपच थकलो होतो. जिजी पळता पळता खड्ड्यात पडली. तशीच ती उठली. जिजी खड्ड्यात पडलेली बघताच माझ्या अंगात वेग आला. मोठ्यानं ओरडतच मी जिजीकडे पळू लागलो. जिजीला पडल्याचं काहीच

वाटलं नाही. तशीच उठून ती माझ्याकडे लंगडत लंगडत येत होती. मी वेगानं पळत जिजीजवळ आलो. रडत रडत मी तिला मिठी मारली. 'किसन' म्हणून जिजीनं मला घट्ट पकडलं. जिजी मला घरी घेऊन गेली. सर्वजण माझी वाट पाहात होते. मी कपडे बदलले. दफ्तर वाळत घातलं. उद्या माझी घटक चाचणी होती. अभ्यास झाला नव्हता. मला आजीनं दूध-भाकरी जेवायला वाढली. सर्व शरीर थरथर कापत होतं. मला जिजी दुसऱ्या खोलीत घेऊन गेली व तिथं झोपवलं. माझ्या अंगात हळुहळू ताप चढत होता. सकाळी मला डॉक्टरकडे घेऊन गेले. माझी त्या दिवशी घटक चाचणी झाली नाही. चार दिवस मी आजारीच होतो.

एकदा मी शाळेतून आलो. मी उंबरठ्यात पाऊल ठेवताच आजोबा मला म्हणाले, ''इतका वेळ काय केलंस, बरं झालं लवकर आलास ते. हे बघ, आता दळून आण एक गव्हाचा डबा, एक ज्वारीचा. ज्वारी दीड पायली व गहू एक पायली. जा बेटा लवकर. गिरणी बंद होईल. मग उद्या आपल्याला कसलंच पीठ नाही. तुझी सुशीलामावशी व रमेशकाका आले आहेत.'' संध्याकाळचे साडेसात वाजले होते. पण मी येईपर्यंत कोणीच दळायला गेलं नव्हतं. मला हातपायसुद्धा धुऊ दिले नाहीत. दफ्तराची पिशवी ठेवल्याबरोबर आजोबांनी दळण माझ्या डोक्यावर ठेवलं. मी जर गेलो नसतो तर आजोबांनी मावशीला एकाचे दोन करून सांगितलं असतं. ''हा असाच द्वाड आहे. म्हणून आम्ही त्याला असं वागवतो'' असं म्हणाले असते. त्यामुळे मावशी व काकांनी मला कपडे, पुस्तकं दिली नसती. मी मुकाट्यानं दळण आणण्यास गेलो. माझ्या ताकदीपेक्षा दळण जास्त होतं. कामाची सवय असल्यामुळे काही वाटत नव्हतं. माझी मान खूप ताठून येत होती. तिथून अर्धा किलोमीटर अंतरावर गिरणी होती. गिरणीत एवढी गर्दी नव्हती. दहा-पंधरा दळणं होती. मला साडेआठ वाजले. आधी ज्वारीच्या पिठाचा डबा घेऊन मी निघालो व गव्हाच्या पिठाचा डबा गिरणीतच ठेवला. माझ्याबरोबर कोल्हाट्याचा एक मुलगा होता. तो थोडा आगाऊ होता. शाळेत जात नव्हता. त्याचं नाव होत पितांबर. दोघंही डबे घेऊन निघालो.

महाडिकाच्या घरापर्यंत आलो. तितक्यात एक वेडी बाई रस्त्यावरून जात होती. माझं तिच्याकडे लक्ष नव्हतं. कारण खूप अंधार होता. लाईटचा प्रकाश तिकडे जात नव्हता. पण थोडं थोडं दिसत होतं. पितांबरानं तिला थोडंसं दूर जाऊ दिलं व तिला म्हणाला 'रोकडी, ठोकडी'... एक मोठा आवाज काढला व पळून गेला. त्याच्याजवळ थोडं दळण असल्यानं तो पळून जाऊ शकला. मी मागेच राहिलो. ती वेडी बाई हातात दगड घेऊन माझ्या मागे लागली. मी पळण्याचा प्रयत्न केला. पण पळणं शक्य नव्हतं. तिनं मला जोरात दगड मारला. तो पायाला लागला. रक्त येऊ लागलं. मी जास्त घाबरलो. सर्व अंग लटलट कापत होतं. मी मोठ्यानं चिरकलो. डबा महाडिकाच्या कट्ट्यावर ठेवला व पळायला सुरुवात केली. ती परत माझ्या मागे पळत होती. तिनं आणखी एक दगड

मारला. तो माझ्या डोळ्याच्या अगदी वर लागला. परत रक्ताची धार लागली. दगड थोडासा खाली लागला असता तर डोळाच गेला असता. मला काहीच कळत नव्हतं; काय करावं. मी तसाच पळत होतो. ती शिव्या देत होती.

रस्त्यात मनाआजी भेटल्या. त्यांनी मला लंगडताना बघितलं. माझा एक हात डोळ्यावर होता. त्यांनी जवळ येऊन बघितलं. डोळ्यातून व पायातून रक्त गळत होतं. आजी घाबरली. तिनं विचारलं, ''कोणी मारलं ?'' मी रडतरडत म्हणालो, ''रोकडीनं.'' त्या मला घरात घेऊन गेल्या. त्यांना सर्व सांगितलं. मग मामांनी दळणाविषयी विचारलं. मी सांगितलं. मामा दळण आणायला गेले.

मी लहानपणापासून मुलींमध्ये वाढलो. शेजारच्या मुलींतच मी खेळत असे. जिवल्या, लंगडी, फुगडी, नवरा-बायकोचा खेळ खेळत असे. एक वेळेस मी नवरी झालो व अंकुश नवरा झाला. पांढरं धोतर मला नेसवलं. कारण या समाजात लग्नावेळेस पांढरा कपडा नेसतात. तसंच मला नेसवलं. खोट्या मुंडावळी बांधल्या. घरातून चोरून हळद आणली. ती मला लावली. अंकुशच्या अंगावर फाटक्या कपड्यांची शाल घातली. रंगीत दोरी होती. त्यालापण मुंडावळी बांधल्या. हे सर्व नाटक परसामध्ये चाललं होतं. त्या दिवशी परसात कोणीच नव्हतं. मग आम्हा दोघांना हळद लावली. मी घरचं धोतर आणलं होतं. धोतर हळदीनं भिजलं. छाया, संजय, विनायक असे दहा-बाराजण होते. आमच्या हळदी लावल्यानंतर परसाजवळ जी तोंडली येतात ती तोडून आणली. खेळण्याची सर्व भांडी होती. स्वयंपाक करताना सगळ्यांकडे वेगवेगळी कामं दिली. हे सर्व नाटक चालायचं. उगीचच जेवणाचं नाटक करायचं. घरून थोडी भाकरी चोरून आणायची. मग जेवण करायचं. मग दुसरं जोडपं म्हणजे अंकुश नवरा व संजय नवरी. मग वरातीसमोर नाचायचं.

मला साडी नेसवली. गंध-पावडर लावलं. पायात दोन-चार घुंगरू बांधले. परसात धिंगाणा चालू केला. विठ्या डबा वाजवत होता. मी नाचत होतो. सर्व पोरी माझ्याबरोबर नाचू लागल्या. एकदम आजी परसावर आली. ''किसन्या, पोरीचा जन्म का घेतला नाहीस रे मेल्या ?'' आजीला बघितल्यावर सगळे पळाले. आजीनं मला पकडलं. आजी खूपच चिडली होती. काठी काढली व दणादण मारत होती. तसाच मी आजीला हिसका देऊन पळालो. मनाआजीकडे जाऊन बसलो. गोड बोलून रात्री मला बोलावून घेतलं. घरी आल्यावर मामानं मला एवढं मारलं की बस्स ! सर्व अंगाची कातडी निघाली होती. आजोबा म्हणत होते, ''पोरीत खेळलास आणि साडी घालून नाचलास की, तुझा जीव घेईन.'' तरी पण मी पोरीत जाऊन फुगड्या, लंगडी खेळत असे. माझी खोड जातच नव्हती.

घरच्या वरकामाचा बोजा वाढतच चालला होता. आणि पाचवीची परीक्षा जवळ येत होती. घरचं काम, परसावरचं काम, शेतातलं काम आणि शाळा हे सगळं करून उरलेल्या वेळात मला अभ्यास करावा लागत असे. रविवारी सुट्टी असे. पण जनावरं राखण्यासाठी मला जावं लागतच असे. कधी कधी शाळेत जाऊ देत नसत आणि गुरं राखण्यासाठी पाठवत असत. गुरं राखते वेळेस अभ्यास करावा या विचारानं मी पुस्तक घेऊन जात असे. परंतु अभ्यास करताना माझं गुरांकडे लक्ष राहात नव्हतं. त्यामुळे गुरं दुसऱ्याच्या पिकाचं नुकसान करायची. शेतातले दुसरे गुराखी मला त्यांची दूर गेलेली गुरं परत आणायला पाठवायचे. माझी मजा करायचे.

परीक्षा जवळ आली. सुगीचे दिवस होते. परीक्षेलादेखील रोज नियमित काम केल्यानंतरच जाण्यास मिळत असे. परीक्षा संपली. आता उन्हाळ्याच्या सुटीत काय करावं हा विचार होता. सोनपेठला आईकडे जावंसं वाटायचं. आईची खूप आठवण येई. पण काय करणार ? आई मला सोनपेठला ठेवण्यास तयार नव्हती.

उन्हाळ्याच्या सुट्टीत रंभामावशी मला बार्शीला घेऊन गेली. तिच्या हाताखाली कोणी नव्हतं. कारण, जिजी सुगी असल्यामुळे शेतामध्ये गुंतली होती. मला जलसापार्टीत जायचं म्हणजे भीती वाटायची. कारण नेरल्याला तरी काम कमी करावं लागत असे. पण इथं अनेक प्रकारची माणसं येत–जात. तेच ते नाचगाणं बघण्यास मला कंटाळा येई. इज्जतीचं बोलणं देखील कधी मला मिळायचं नाही. नाचणाऱ्या बायांचं काम करून थकायचो. वेगवेगळ्या प्रकारची कामं असायची. वरून नाचणाऱ्या बाया हसायच्या, पण मनात त्या रडायच्या. त्यांचं दुःख बघून माझ्या दुःखाला मी विसरून जात होतो, एवढंच.

रात्रीचे बारा वाजून गेले होते. बैठकीची वेळ झाली होती. चित्रा गुलजारच्या पार्टीची बैठक ठरवली होती. बैठक सुरू झाली. पाच–सहा गृहस्थ होते. सगळ्यांकडे कार होत्या. समोर नाचणाऱ्या नाचत होत्या आणि गातदेखील होत्या. आणि हे गृहस्थ दारूचा ग्लास वाजवत होते. ही बैठक एका खोलीत चालली होती. पाच–सहा गृहस्थांपैकी एक–दोन गृहस्थ नाचणारणींच्या अंगावर रुपये उधळत होते. कोणी उठून नाचणारणींबरोबर नाचत होते. मी मात्र बाजूला उभा राहून बघत होतो. मला झोप येत होती. पण काय करणार ? त्या गृहस्थांना कमीजास्त लागलं तर मला द्यावं लागणार होतं. दारूच्या आणि बाईच्या नशेत आणि पैशाच्या मस्तीत हे गृहस्थ हवेत उड्या मारल्यासारखे करत होते. दारू संपली होती. रात्रीचे दोन ते तीन वाजले. त्यातला एक उठला आणि म्हणाला, ''चल लवंडे, मेरे साथ''

आम्ही कारमध्ये बसून एका दुकानात गेलो. कारमध्ये मला मजा वाटत होती. दुकानं बंद होती. पण आमची कार बघून एका दुकानदारानं थोडंसं दुकान उघडलं आणि दारूच्या बाटल्या दिल्या. आम्ही दारू घेऊन आलो. सकाळचे पाच वाजत आले, तरीदेखील

बैठक चालूच होती. आणि हे गृहस्थ दारूचा ग्लास एकामागून एक संपवत होते. त्या गृहस्थांपैकी काही पीत-नाचत-मस्ती करत जागच्या जागी झोपी गेले. नाचणारण्यांचा नाच मात्र चालू होता. मी उभा राहून झोपेचा झोका घेत होतो. शेवटी हे गृहस्थ जिथं बसले होते तिथंच झोपून गेले. दारूच्या बाटल्या आणि ग्लास उचलून मी एका कोपऱ्यात ठेवल्या. चिवड्याच्या कागदावरच एक गृहस्थ झोपला होता. त्यामुळे तो कागद उचलला नाही. सगळ्यांच्या गळ्यात लॉकिट, हातात अंगठ्या होत्या. रुपयांनी खिसे भरलेले होते. मी थिएटरवर जाऊन झोपलो.

सकाळचे नऊ वाजले तेव्हा उठलो. मी अंघोळ केली आणि नाचणारणींना अंघोळीचं पाणी काढून दिलं. तिथं नोकर होता. पण तो किराणा सामान आणायला गेला होता. दुसरा नोकर होता, तो आजारी होता. मंगळवार असल्यामुळे काही नाचणारणी आणि रंभामावशी देखील देवीच्या पाया पडण्यासाठी मंदिरात गेल्या होत्या.

हे गृहस्थ झोपून उठले. त्यातला एकजण मोठ्यानं ओरडला, माझं लॉकिट कुठे आहे? सगळेजण घाबरले. थिएटरमालकाला बोलावलं. काहीजणांना माझ्यावर संशय आला होता. कारण मीच रात्रभर त्यांच्याजवळ होतो. मी रडून सांगत होतो, ''साहेब, मी चोरी केली नाही.'' त्यांच्या पाया पडत होतो. त्यातलं कोणी म्हणायचं, ''पोलीस को बुलावो.'' तर कुणी म्हणायचं, ''ओ यार, ये लडका तो भोला है, काय को चोरी करेगा ?'' तितक्यात देवीच्या पाया पडून काही नाचणारणी परत आल्या. पण माझी मावशी आणि तिची मैत्रीण मीना या बाजारात गेल्या होत्या. त्या बायांना समजलं. त्यातली उषा म्हणाली, ''तुमचं लॉकिट आणि रुपये देखील माझ्याजवळ आहेत. रात्री तुम्ही उड्या मारून नाचत होता आणि दारूच्या नशेत तुम्हाला काहीच कळत नव्हतं. त्यावेळेस हे लॉकिट खाली पडलं होतं.''

सगळे गप्प बसले. मला त्या गृहस्थानं जवळ बोलावलं. माझ्या डोक्यावरून हात फिरवला. मला कारमध्ये बाहेर घेऊन गेले. त्यातला एक गृहस्थ मला म्हणाला, ''तू कोण आहेस, शाळा शिकतोस की नाही ?'' मी माझी सर्व कहाणी सांगून टाकली. त्यातला एक गृहस्थ म्हणाला, ''मेरे साथ तू आयेगा ?'' मी गप्पच बसलो होतो. त्यांनी मला कपड्याच्या दुकानात नेलं आणि मला एक ड्रेस घेतला. मला परत थिएटरला सोडलं आणि ते गृहस्थ निघून गेले. रंभामावशीला झालेला प्रकार कोणीच कळू दिला नाही आणि मलापण सगळ्यांनी सांगून ठेवलं होतं की, ''तुझ्या मावशीला सांगू नको. नाहीतर पूर्ण पार्टीत भांडण सुरू होईल.'' या भीतीनं मी रंभामावशीला सांगितलं नाही.

मी त्याच दिवशी बार्शीहून नेरल्याला गेलो. बसस्टॅण्डवर बब्या भेटला. तो दुसऱ्या पार्टीत कामाला होता. तो मला म्हणाला, ''कारं किसऱ्या, चालला का ? अरं, जाऊ नगं. आपण बंबईला जाऊन पैसे कमवू.'' मी त्याला म्हणालो, ''मला मुंबईला नको, मी चाललो माझ्या गावाला.'' तो माझा पिच्छा सोडत नव्हता. ''मुंबईला चल, मुंबईला चल'' असं म्हणायचा.

मी नेरल्याला आलो. दोन दिवसांनी जिजी बार्शीला गेली. माझा निकाल दोन दिवसांवर आला होता. मला माझ्या आईची आठवण येत होती. रोज पत्राची वाट बघायचो. पण पत्रदेखील यावेळेस आलं नव्हतं. निकाल लागला. पाचवी पास झालो. मी आईला पत्र पाठविलं. पण आईचं उत्तर आलं नाही.

उन्हाळा संपला होता. शाळा सुरू झाल्या होत्या. माझ्याजवळ पैसे होते. बार्शीला कमावलेले. सहावीची जुनी पुस्तकं मी अर्ध्या किमतीत विकत घेतली. सुशीलामावशीकडे यावेळेस पाटी-पुस्तकांसाठी रुपये मागण्याची वेळ आली नाही. आजोबा मला कधी कधी म्हणायचे, "बार्शीहून लय पैसे आणलेत वाटतं ? किसन्या, दारूला पैसे दे की." मी त्यांना म्हणायचो, "माझ्याकडे पैसे नाहीत. मी पुस्तकं घेतली. माझ्याजवळचे पैसे संपले." आजोबांचं माझ्याकडे लक्ष असायचं की, मी पैसे कुठे ठेवतो. माझ्याकडे अजून पन्नास रुपये होते. मी पैसे माळ्यावरच्या तुटलेल्या खपारीत ठेवायचो. परंतु मला पैशांची गरज होती. म्हणून मी पन्नास रुपये दफ्तराच्या पिशवीत ठेवले. पेन आणि कंपास विकत घेतली. उरलेले पैसे पुस्तकाच्या पानामध्ये ठेवले. शाळेतून आल्याबरोबर आजोबांनी मला परसातून गवऱ्या आणायला सांगितलं. मी दफ्तराची पिशवी तशीच खुंटीला अडकवली आणि गवऱ्या आणायला गेलो. परसावर गेल्यानंतर मला आठवण झाली की, पैसे पिशवीतच ठेवलेले आहेत. पटकन गवऱ्या टोपलीत भरल्या आणि घरी आलो. पिशवीतले पैसे कोणीतरी काढून घेतले होते. कोणाचं नाव घेतलं तर मार खावा लागला असता. मी गप्प बसलो. कोणाला काहीच बोललो नाही. रात्र झाली.

आजोबांनी दारूच्या दोन बाटल्या आणल्या. आजीदेखील कधी कधी दारू पित होती. त्या दिवशी मासे घेतले होते. आजी आणि आजोबा एका खोलीत दारू पित होते. माझं सर्व लक्ष आजोबांकडेच होतं. सुशीलामावशी त्यादिवशी गावाला गेली होती. आजीनं आजोबांना विचारलं, "दारू कु कडासे पैसे लाये." (दारूला पैसे कोठून आणले?) मी सर्व बोलणं ऐकत होतो. मला राग सहन झाला नाही. कारण एकेक रुपयासाठी मला बार्शीत पार्टीमध्ये काय करावं लागलं नव्हतं ? आणि चाळीस रुपयांत माझं वर्षाचं शिक्षणाचं भागलं असतं. आजोबांना मी म्हणालो, "माझे पैसे द्या. तुम्हाला लाज वाटत नाही. लोकांचे आजोबा नातवाला पैसे देतात आणि तुम्ही नातवाचे पैसे चोरता ?" आजोबांनी मला मारण्यासाठी काठी हातात घेतली व म्हणाले, "जीव जाईल एवढं मारीन. माझी लाज काढतो काय रे ? तुझ्या आईनं इथं गाठोडं पुरून ठेवलं नाही तुला सांभाळायला. आमचं खातोस आणि आमची लाज काढतूस. कर इतनं काळं तुझं."

मी म्हणालो, "आधी माझे पैसे द्या. मग जातो. नाही तर बघा, माझ्या इतका वाईट कोणी नाही." मला आजोबांनी काठीनं मारलं. मी पळत बाहेर गेलो आणि दगड फेकून मारला. आजोबा आहेत हे मी विसरून गेलो होतो. घरातली सगळी माझ्यावर धावून

आली. मी बाहेरच्या ओट्यावर दगड घेऊन उभा होतो. मामादेखील मला मारायला आले. आणि मला मारू लागले. मी मोठमोठ्यानं ओरडत होतो. गल्लीतली कोल्हाट्याची सगळी माणसं जमा झाली. मनाआजीनं मामाच्या हातातून मला हिसकावून घेतलं. आमचं भांडण सगळी गल्ली ऐकत होती. कोल्हाट्याची आणि मराठ्याची माणसं एकमेकांशी बोलत होती, "बिनआईचं लेकरू ! काय केलं बरं ह्या लेकरानं. याच्या आईचं आधी यांनी काय खालंच नाय का बरं, पण हे लेकरू दिवसभर ढोरासारखं काम करतोया. आरदं बायाचं काम बी करतोय, रात्री-बेरात्री या लेकराला शेतात पाठवत्यात आणि आपल्या पोराला या वळूसारखं सांभाळत्यात. अरं, काय सांगायचं ? वट्यावर सकाळीच उठून पोरगं बायांच्या वरती सडा टाकतू. की या पोराशिवाय घरातला पाला बी हालत नाय. ह्या कोंडदादानं पोराचं पैसे घेतल्यात आणि त्यालाच मारत्यात !"

मामा मोठ्यानं ओरडला, "काय, तमाशा लावला का इथं ? आमचं आम्ही बघून घेऊ. मधी बोलायचं तुमचं काय बी काम नाय."

मनाआजी मला त्यांच्या घरी घेऊन गेली. तिनं मला जेवण वाढलं. पण जेवण जात नव्हतं. सारखी आईची आठवण येत होती. वाटायचं, माझी आई असती तर.... वाटायचं आताच सोनपेठला जावं. पण जाऊन काय करणार ? चार-पाच दिवस राहून मला परत नेरल्याला यावं लागलं असतं. माझी आई तिच्याजवळ मला का ठेवत नाही ? मी तिचा मुलगा नाही का ? अनेक प्रश्नांनी माझं डोकं पागल झालं होतं.

मी कांताबाईकडे गेलो. त्यांच्याकडे कार होती. त्या कधी कधी परळीला जात होत्या. मी त्यांना म्हणालो, "मला सोनपेठला घेऊन जाता का ?" पण त्या म्हणाल्या, "तुझी शाळा आहे, एवढं वर्ष शिक. तुला उन्हाळ्यात घेऊन जाईन. तुझी आई तुला सोनपेठला ठेवत नाही. मग कशाला जातोस ?" मी मनाआजीच्या घरीच झोपलो. मनाआजीला मी म्हणालो, "आजी, तुमच्या घरीच मला एवढं वर्ष ठेवा ना !" मनाआजी 'हो' म्हणाल्या. मला खूप चांगलं वाटलं. मनाआजीचं घर आमच्या घराच्या शेजारीच होतं. फक्त एक रस्ता मधून जात होता. सकाळीच माझी आजी मनाआजीच्या घरी आली. रडून म्हणत होती, "चल घरी. आमच चुकलं" सुशीलामावशी देखील आली, त्यामुळे मी परत घरी गेलो. न जाऊन काय करणार होतो ? आईचा ना बापाचा सहारा अशी माझी अवस्था झाली होती.

सहावीची परीक्षा संपली. पास झालो. आता मी सातवीत गेलो होतो. आता फक्त एक वर्ष नेरल्याला काढायचं होतं. कारण तिथं सातवीपर्यंतच शाळा होती. नेरल्याला इंग्रजी शिकवणारे गुरुजी नव्हते. त्यामुळे मी सातवीत होतो तरीदेखील मला ए, बी, सी, डी ची साधी ओळख नव्हती.

सातवीच्या पुढे माझं शिक्षण कोण करील ? नेरलं सोडून करमाळा किंवा इतर दुसऱ्या

गावाला शिकायला जावं लागणार होतं. आणि आजोबा म्हणायचे, ''सातवीपर्यंत शिक्षण खूप झालं. पुढे शिकून काय करायचं. तुला नोकरी थोडीच लागणार आहे ? शेतात काम कर. नाहीतर जलसापार्टीत ढोलकी वाजवायला शिक. तुला दोन-चार म्हशी आणि पाच-सहा शेळ्या घेऊन देतो.'' असं आजोबा नेहमी म्हणत.

आईनं नाचगाणं सोडलं होतं. आता तिचाच मुलगा ढोलकी वाजवून नाचणाऱ्यांना नाचवणार ? या विचारानं माझं डोकं भणाणून जाई. कधी कधी झोपेमध्ये स्वप्न पडायचं, आई नाचत आहे आणि मी ढोलकी वाजवत आहे ! झोपेतून दचकन उठायचो. रात्रभर झोप येत नव्हती. माझ्या नशिबात काय लिहिलं आहे हे कळत नव्हतं.

प्रत्येक आई-वडिलांना वाटतं, आपला मुलगा शिकावा. समाजात त्यानं चांगलं नाव कमवावं. मग माझ्या आईला का वाटत नसावं की मी शिकावं ? पुढे माझ्या जीवनाचं काय होईल ? डाकू-चोर होईन की तमासगीर होईन, की गुराखी होईन ह्याविषयी माझ्या आईला माझी काळजी का वाटत नाही ? माझ्या जीवनाचा विचार आई का करीत नाही ? किती तरी विचार माझ्या डोक्यात घोळत होते. वर्षामधून एखाद्या वेळेस आई मनीऑर्डर पाठवायची. ती देखील मला बघायला मिळत नव्हती. कधी पायाला चप्पल नसायची. तसाच शाळेत, शेतात जात होतो. पाठीमागे चड्डी फाटलेली असायची. वरचेवर कामानं माझा जीव वैतागून जात होता. असाच सहावी पास झालो.

एके दिवशी विचार केला की, सोनपेठला जावं आणि आईला म्हणावं, ''मी तुझा मुलगा म्हणून तुला लाज वाटत असेल तर नौकर म्हणून तू तुझ्या समाजाला सांग. म्हणजे तुझी इज्जतही जाणार नाही आणि माझ्या जीवनाचं चांगलं होईल.'' नेरल्याला काम करण्यापेक्षा सोनपेठला काम केलं तर माझं शिक्षण तरी होईल. एवढं करूनही आईनं मला सोनपेठला ठेवलं नाही तर बाब्याबरोबर मुंबईला जाण्याचं ठरवलं. या दृष्टिकोनातून मी सोनपेठला जाण्याचं ठरवलं. पण जाण्याकरिता माझ्याकडे पैसे नव्हते. म्हणून मी सहावीची पुस्तकं अर्ध्या किमतीत विकली, परसावरच्या पाच-सात कोंबड्या विकल्या आणि दुसऱ्याच दिवशी मी सोनपेठला, कोणालाही काही न सांगता, नेरल्याहून पळून आलो. मला बघून आई बाहेरून हसत होती, परंतु आतमधून तिला काय वाटत असेल हे मला कळत नव्हतं. पाच-सहा दिवस झाले. मला भीती वाटत होती की, आई मला परत नेरल्याला पाठवील की काय ? माझी हिंमत नव्हती आईला म्हणायला की, मला सोनपेठला ठेव. कारण नानांना घरातले सर्व घाबरत होते. नानांसमोर उभं राहाण्याची कोणाची हिंमत होत नव्हती. आई पण एकाच पत्र्याच्या खोलीत राहात होती. त्या खोलीत एकच पलंग होता. तिथंच स्वयंपाक आणि तिथंच झोपणं. त्यामुळे नाना आले की, नानांसमोरच बसावं लागत होतं. बाजूच्या खोलीत पिठाची गिरणी. दोन खोल्यांच्यामध्ये फक्त एक भिंत होती. त्या भिंतीत मोठी खिडकी केली होती. त्या खिडकीतून आई गिरणीकडे लक्ष देई आणि पैसे घेई.

एकीकडे आईला स्वयंपाक करावा लागे. स्वयंपाक करताना गिरणी चालू झाली तर स्वयंपाक करता करता ग्राहकांकडून पैसे घ्यावे लागत असत. पिठाच्या गिरणीवर एक नोकर होता. तो मोठ्या आईच्या (सावत्र आई) गावचा होता. तरुणपणापासून तो नानांजवळच होता. त्याला आम्ही मामा म्हणायचो. घरचं सगळं काम त्याच्याकडे असायचं. राहणं-खाणं आमच्याकडंच होतं.

आईला मी मदत करायचो. आईला आणि नानांना कमाल वाटायची की, मला स्वयंपाक येतो. पाडव्याचा सण होता. आई विटाळशी होती. त्या दिवशी पुरणाच्या पोळ्या कराव्या लागत. शेतातल्या कामगारांना जेवायला बोलवावं लागे. आईला चिंता पडली होती, उद्या एवढ्या मोठ्या सणाचा स्वयंपाक कोण करील ! मी सकाळीच चार वाजता उठलो. अंघोळ केली. देवाची पूजा केली. नळाचं पाणी भरून ठेवलं. आईला म्हणालो, मी नानांच्या न्याहारीसाठी पोहे किंवा भाकरी करून ठेवतो.

पडद्याच्या मागे स्वयंपाक करावा लागत असे. त्यामुळे मी काय स्वयंपाक करत आहे हे आईला दिसत नव्हतं. नाना आणि दीपक पलंगावर झोपले होते. आणि घरात विटाळ होऊ नये म्हणून आई गिरणीत जाऊन बसली होती. मी हरभऱ्याची डाळ शिजायला टाकली. सणाचा बाजार केलेला होता. नऊ वाजेपर्यंत पुरणाच्या पोळ्या केल्या. आमटी केली, भात शिजायला टाकला. गिरणीवाले मामा घरात आले आणि पडदा बाजूला करून बघितलं की, कोण स्वयंपाक करीत आहे ? पुरणाचा स्वयंपाक बघितल्याबरोबर ते म्हणाले, ''अहो अक्का, किशोरनं पुरणाचा स्वयंपाक केला.'' आईला घरातले अक्का म्हणायचे. मामाला विश्वास वाटत नव्हता आणि आईला तर वाटतच नव्हता. गिरणीच्या खिडकीतून आईनं डोकावून बघितलं. आईला कमाल वाटली.

नाना उठले, आंघोळ केली, आणि आईला म्हणाले, जेवायला काय आहे ? आई म्हणाली, ''थोडं थांबा.'' आमच्या गल्लीतले बालाजी दहिवाळ, आईनं त्यांना जेवायला बोलावलं. पुरणाचं जेवण बघून नाना आश्चर्य करू लागले. ''कोणी स्वयंपाक केला ?'' आई म्हणाली ''किशोरनं.'' नानांना विश्वास वाटत नव्हता. कारण माझ्या आईलादेखील अजून पुरणाच्या पोळ्या येत नव्हत्या. सगळ्यांनी जेवण केलं. धोबिणीला, शेण काढणाऱ्या महारणीला, भांडीवाल्या बाईला, सगळ्यांना मी वाढून दिलं. माझ्या आमटीची आणि पुरणाच्या पोळीची सर्वजण स्तुती करत होते. मी, आई आणि दीपकनं जेवण केलं. दुसऱ्या दिवशी महारणीनं आईला विचारलं की, ''मालकीण, कालचा स्वयंपाक लय चांगला झाला होता, असली आमटी तर म्या कधी खाल्लीच नव्हती.'' आई मोठ्या अभिमानानं सांगत होती, ''माझ्या मोठ्या मुलानं केला होता.'' आईनं मला माझा मुलगा म्हटलेलं पहिल्या वेळेस मी ऐकलं. मला खूप चांगलं वाटलं.

विटाळशीचे चार दिवस संपले. आईला मी आंघोळ घातली. सकाळीच स्वयंपाक करून तिला जेवायला वाढलं. आता गिरणीचे पैसे देखील मी घेऊ लागलो. गिरणीत बसायचो. आईला माझा मोठा आधार झाला. नाना आईला म्हणायचे, ''किशोरला कधी

कंटाळा येतो की नाही ? तुझ्या लाडक्या दीपकला थोडं काम करायचं झालं की रडायला लागतो.'' नानांनी आणि आईनं ठरवलं की, मला सोनपेठलाच ठेवायचं. माझा आनंद गगनात मावेनासा झाला.

शाळा सुरू झाल्या. नेरल्याच्या शाळेला नानांनी पत्र पाठविलं की किशोरचा शाळेचा दाखला लवकरात लवकर पाठविणे. सोनपेठच्या शाळेनं देखील नेरल्याच्या शाळेला पत्र पाठविलं. परंतु दाखला काही आला नाही. कारण कोंडिबाआजोबांचा विरोध होता. पंधरा दिवसांनंतर नाना स्वतः नेरल्याच्या शाळेत गेले आणि त्यांनी दाखला आणला. शाळेत माझं नाव टाकलं. आई मला म्हणायची, ''तुला कोणी जात विचारली तर मी साळी आहे असं सांग.'' दाखल्यानुसार मी कोल्हाटी होतो, पण आईच्या म्हणण्यानुसार मी साळी समाजाचा आहे याचं नाटक करावं लागणार होतं. परंतु नाटक ते नाटक असतं. खरं कुठे लपत असतं का ? शाळेतले गुरुजी आणि विद्यार्थी एकमेकांत चर्चा करायचे की, ''हा मुलगा तर कृष्णराव वडकराचा आहे. मग याचं नाव किशोर शांताबाई काळे असं का ? कृष्णराव वडकर तर साळी जातीचे आहेत. पण याची हजेरीपटावर कोल्हाटी ही जात आहे.'' कोणी कोणी म्हणायचे, याला बाप नाही. सुरुवातीला शाळेत जायचं म्हणजे सर्व शरीरावर काटे उभे राहात होते. हळुहळू मला या गोष्टींची सवय झाली.

कोणीच माझ्याशी मैत्री करीत नव्हते. सुरुवातीला दीपक लांडे आणि संजय लांडे यांनी माझ्याशी मैत्री केली. नंतर काही दिवसांनी त्यांना शाळेतली दुसरी मुलं चिडवीत होती, माझ्यामुळे. म्हणून त्यांनी देखील माझी मैत्री सोडली. मला शाळेत इंग्रजी या विषयाचं काहीच ज्ञान नव्हतं. माझ्या वर्गातील मुलं इंग्रजी वाचत असत.. आणि मला ए,बी,सी,डी देखील ओळखता येत नव्हतं. मला शिक्षणच अवघड वाटत होतं. वर्गातले सर्व विद्यार्थी मला हसायचे. इंग्रजी शब्द मला पाठ होत नव्हते. म्हणून गुरुजींचा मला मार खावा लागत असे. बनसोडे गुरुजी हे माझे वर्गशिक्षक होते. ते नानांच्या भावकीतलेच होते. नानांनी त्यांना माझ्याकडे लक्ष देण्यास सांगितलं होतं. ते मला विज्ञान हा विषय शिकवायचे. परंतु इंग्रजीविषयी काही अडचण आली तर मी त्यांच्याकडे जात होतो. माझ्या घराच्या समोरच शेख नावाचे शिक्षक होते. ते नववीचे वर्गशिक्षक होते. परंतु मी नेहेमी इंग्रजीसाठी त्यांच्याकडे जात होतो. कारण ते शाळेत इंग्रजी शिकवीत असत. नेरल्याला सर्व विषय एकच शिक्षक शिकवित. परंतु सोनपेठला प्रत्येक विषयाला वेगवेगळे शिक्षक. प्रत्येक तासाला वेगळेच शिक्षक येत. मला जरा वेगळंच वाटायचं. पिठाच्या गिरणीत बसून मी अभ्यास करायचो. नाना रात्री आठ वाजता जेवण करून बाहेर जात. सकाळी चार वाजता परत येत. रात्रभर नाना पत्त्याच्या क्लबमध्ये बसून पत्ते खेळायचे. दिवसभर झोपून सायंकाळी पाच वाजता उठायचे. रोज माझ्याकडून गिरणीच्या पैशांचा हिशोब घ्यायचे. मी हिशोब लिहून ठेवत होतो. किती खर्च झाले आणि किती जमा.

कारण दोन्ही घरचा संसार गिरणीच्या पैशांवर चालत होता. दळण किती उधार गेलं, हे रोज लिहून ठेवायला लागत असे.

इंग्रजीमध्ये मी हळुहळू प्रगती करू लागलो. माझ्या वागण्यात-बोलण्यात सुधारणा होत होती. अंगाची कातडी गोरी झाली होती. परंतु माझ्या त्रासात आणि कष्टात कमी झाली नव्हती. त्यामध्ये देखील 'सुधारणा'च होत होती. कारण जितकं नेरल्याला काम करावं लागायचं तितकंच सोनपेठलादेखील.

नाना मटका खेळायचे. जिंकले तर त्यादिवशी आनंदित असायचे. ज्यादिवशी हरले त्यादिवशी मटक्यावरचा राग आमच्यावर काढायचे. पत्ते खेळायचे. हरले की, त्यादिवशी दिवसभर शिव्या, मार खावा लागत असे. मी नेरल्याला होतो त्यावेळेस मी माझं स्वत:चं दु:ख सहन तरी करू शकत होतो. परंतु आता माझ्यासमोर आईला त्रास झालेला सहन होत नव्हता. कारण नाना चार-चार दिवस बाहेरगावी जात होते. आईला खूप जण सांगायचे की, कृष्णराव सावकार जलसापार्टीत जातात. मावशीचं व इतर नाचणाऱ्या बायांचं आईला पत्र, निरोप येत होते. परंतु आई गप्प बसून सहन करीत होती.

माझा लहान भाऊ दीपक सकाळी चहाबरोबर ब्रेड खाई, परंतु नानांपासून चोरून. नाना झोपलेले असतील किंवा अंघोळीला गेले असतील त्यावेळेस आई म्हणायची, हे खा-ते खा. मला हे विचित्र वाटायचं. चोरून का खावं ? आईची काय मजबुरी आहे ? आई अशी का वागते ? असे अनेक प्रश्न माझ्या मनात येत. माझा भाऊ, दीपक जेवण कमी करीत होता. आणि तो चौथीत असूनदेखील आईचं दूध पित होता. कोणतंही फळ तो आवडीनं खाई. त्यामुळे आई मला दीपकसाठी रोज फळं आणायला सांगायची. आंबे, खारीक, मुरांबा. परंतु नानांपासून चोरून. दीपक माझ्यासमोर फळ वगैरे खायचा. परंतु त्यातलं मला चवीपुरतंही बघायला मिळत नव्हतं. आईदेखील दीपकवर जास्त प्रेम करायची. जणू काही मी तिचा सावत्र मुलगा आहे ! परंतु मला दु:ख वाटत नव्हतं. कारण माझं शिक्षण होत होतं. हीच माझ्यासाठी फार मोठी गोष्ट होती. आईला आणि नानांना नोकराची गरज होती. म्हणून मला सोनपेठला ठेवलं होतं.

सातवी पास झालो. जिजी आजारी आहे, असं कळल्यामुळे मी नेरल्याला गेलो. मला कोणीच पटकन ओळखत नव्हतं; इतका बदल माझ्यात झाला होता. नेरल्यातल्या लोकांना वाटायचं, किशोर सोनपेठला किती सुखी असेल; एकदाचा माझा वनवास संपला! परंतु माझ्या मनाला माहीत होतं की हा वनवास, जोपर्यंत मी मरत नाही तोपर्यंत संपणार नाही. माझ्या वागण्यात-बोलण्यात झालेला बदल बघून सुशीलामावशी म्हणाली की, "किशोर, जयाला तुझ्याबरोबर सोनपेठला घेऊन जा." जया ही सुशीलामावशीची मुलगी. जया त्यावेळेस तिसरीला होती. माझ्या आईला एखाद्या मुलीची गरज होती. मी नेरल्याला जाताना आई आणि नाना म्हणाले होते, एखाद्या म्हातारीला किंवा मुलीला घेऊन ये. कारण

घरात आईच्या हाताखाली कोणीतरी पाहिजे होतं. मला मात्र ह्यावेळेस जाणवलं की आताच मला सोनपेठला का ठेवून घेतलं. मी लहान असताना मला का ठेवलं नव्हतं ?

जयाला मी सोनपेठला घेऊन गेलो. जया असल्यामुळे मला थोडासा आधार मिळाला. अभ्यासाला वेळ मिळत होता. जयाला सोनपेठलाच शाळेत तिसरी शिकायला ठेवली. परंतु नानांचं बाहेरगावी जाण्याचं प्रमाण जास्त वाढत चाललं होतं. आईला कळत होतं की पाच-पाच दिवस नाना कोठे जातात. आई सारखी काळजी करायची. सर्वांचा राग आई माझ्यावर काढायची. घरात दोन सुंदर बायका असूनदेखील नाना जलसा पार्टीत जात होते. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही म्हणतात ते यालाच.

दोन-तीन दिवसांनी नाना परत आले. आई व नाना एकमेकांशी बोलत नव्हते. नाना मोठ्या आईकडे (नानांची पहिली बायको, आमची सावत्र आई) जेवायला जात. जास्त वेळ ते तिकडेच थांबत. त्यामुळे आईशी जास्त बोलण्याचा संबंध येत नव्हता. नंतर सात-आठ दिवसांनी जलसा पार्टी सोनपेठला आली. नाना जलसा पार्टीत रात्रंदिवस राहात असत. त्या जलसा पार्टीत शालन नावाची बाई होती. तिच्याशी नानांचा संबंध होता. नाना तिच्यावर फार पैसा उडवत. हळुहळू घरातील एकेक माल नाना विकत होते आणि जलसा पार्टीत उडवत होते. कितीतरी दिवस नाना घरी झोपले नाहीत. आईच्या भावना मला कळत होत्या. आई देवाच्या पूजेशिवाय काही करत नव्हती. जयाच्या मदतीनं घरातला स्वंयपाक मीच करत असे.

एके दिवशी मोठ्या आईनं व माझ्या आईनं ठरविलं की, नानांना जलसा पार्टीत पकडायचं. पण मोठ्या आई नानांना खूप घाबरत. त्यांचा हात कापत असे. मोठेपण आलं होतं, तरी नानांच्या माराला त्या घाबरत होत्या. त्या भीतीमुळे मोठ्या आई नको म्हणाल्या.

रात्रीचे अकरा वाजले होते. मी, आई व जया, तिघेजण तमाशाकडे निघालो. वारकाच्या बाळ्यानं पळत जाऊन नानांना सांगितलं की, बाईपण इकडेच येतात ! नाना नगरपालिकेच्या पलीकडून झपाझप चालत होते. आम्ही त्यांना बघत होतो. आम्ही घरी आलो. तेव्हा नाना अगोदरच येऊन बसलेले होते. ते आमची वाट बघत होते. आम्ही घरी जाताच ते एकदम भडकले आणि म्हणाले, "कुठे गेली होतीस झक मारायला ? इतक्या रात्रीचं घराच्या बाहेर पाऊल टाकशील तर तंगडी तोडून टाकीन." आई त्यावेळी विटाळशी होती, त्यामुळे त्यांनी जयाला मारायला सुरुवात केली. जातीवर जात जाणार असं म्हणून नानांनी जयाला खूप मारलं. अगदी तिचे डोळे पांढरे होईपर्यंत मारलं. शेवटी आईला राहावलं नाही. तिनं नानांची मान पकडली. आम्ही सर्व मोठमोठ्यानं ओरडायला लागलो. नानांनी आईला खूप मारलं. मी बाहेर दगड आणायला गेलो. तितक्यात नानांनी मला पकडलं व खूप मारलं. नाना म्हणत होते, "नाचणारणीची पोरं कशी निघणार ? हिच्या मायची गांड ! हिला कोणी सांगितलं मध्ये पडायला." म्हणून जयाला परत मारू लागले. जया घाबरून पळत सुटली. "आईसारखी पोरगी निघाली. वळणाचं पाणी वळणालाच जातं. गप्प बसा.

काय झालं सर्वांना बोंबलायला ? कोणी मेलं काय तुमचं ?''

नानांनी घरातले सर्व देव आणले व आईच्या अंगावर फेकले. आईला विटाळ होता. त्यामुळे ती घरात कुणालाच शिवत नव्हती. पण त्या दिवशी नाना आईच्या अंगावर देव फेकून मारत होते. आई गप्प बसून रडत होती.

आई म्हणत होती, ''आधी माझं सगळं करा आणि मग दुसरीकडे जाऊन चाटा. मी काय तुमच्या मागे लागून आले काय ? तुमच्यासारख्या माणसाला रोज ताजा माल खाण्याची सवय असेल, पण मी त्या बायांपैकी नाही. माझं सगळं सारखं करा आणि कुठंही जा. मला गरज नाही. दहा-बारा वर्षं झाली, मला शेती दिली नाही. या चार पत्र्यांच्या खोलीत ठेवलंत. फाटक्या साडीवर जगते. माझं सगळं सोनं गोड बोलून घेतलंत. आता मी कुठं जाऊ ? माझ्या पोरांना कसं सांभाळू ? मला पोटापुरती भाकरी द्या. मग तुम्हांला किती बाया ठेवायच्या तेवढ्या ठेवा. मी तुमच्या मागे लागून आले नाही. मला बरबाद करू नका.''

नाना म्हणाले, ''मला काय करायचं ? दुसरा बघ. तू आता जाऊ शकतेस. मी काय तुला अडवलं नाही.''

आई नानांच्या अंगावर धावून गेली व म्हणाली, ''तुम्ही मेलात तरी मी मसणवट्यात येईन. तुमची हाडं उगाळून खाईन. तुमच्या बापाला सोडणार नाही. निघून जाण्यासाठी सारं सोडून आले नाही. समाजाची पर्वा केली नाही. आई-बापाचा विचार केला नाही. पोटच्या गोळ्याला दूर ठेवलं. जाण्यासाठी एवढं केलं नाही. सारी जवानी तुमच्याजवळ घालवली. आता मला जा म्हणता ?''

आई अंगावर धावून गेल्याबरोबर परत आईला नानांनी मारलं. मला असा राग आला होता त्याक्षणी की, बस्स. नानांचा खून करावा असं वाटलं. पण आईमुळे गप्प बसलो.

रात्री दीड वाजता आई घराबाहेर पळतच गेली. आम्हीपण तिच्यामागं पळत होतो. आई नदीजवळ गेली. उडी मारणार इतक्यात मी तिच्या पदराला धरून खेचलं. मी म्हणालो, ''आम्हाला हाळजलं कशाला आमचा सांभाळ करता येत नाही तर ?''

नाना परत दुसऱ्या दिवशी गावाला गेले. आम्ही सर्व चिंतेमध्ये होतो. आम्हाला माहीत होतं की, नाना बाईला हाकलून देण्याच्या प्रयत्नात आहेत. आता काय करायचं ? कुठं जायचं ? हा मोठा प्रश्न पडला होता. आई गावातील प्रतिष्ठित लोकांना नानासाहेब जहागीरदार, दत्तोपंत परळकर, यांना बोलावून सांगत असे. भावकीतल्या काही लोकांनाही सांगितलं. नानांच्या काही मित्रांना सांगितलं. पण मध्ये पडण्याची कुणाची हिंमत नव्हती. कारण नानांना सर्व गाव घाबरत असे.

आम्ही रस्त्यात असतानाच नाना आले आणि आम्हाला घरी घेऊन गेले. घरी न जाऊन काय करणार ? कुठं जायचं हा प्रश्न होता. रागाच्या भरात जरी आम्ही कुठं गेलो असतो तरी समाजानं आम्हालाच दोषी ठरवलं असतं. ही बाई नाचणारीण होती. काहीतरी लफडं केलं असेल, म्हणून या माणसानं हाकलून दिलं असेल, असे आमच्यावरती आरोप

केले असते व सोनपेठमध्ये जगू दिलं नसतं. म्हणून, आई मुकाट्यानं घरी गेली. आईला मोठा प्रश्न पडला होता. आता जावं कुठं ? पोरं सांभाळावी कशी ? आई सारखी रडत होती.

नानांचं मधून मधून येऊन मारणं चालूच होतं. मला राग सहन होत नव्हता. मी आईला म्हणालो, "आमचा गळा दाबून मारून टाक. मग तुला काय करायचं ते कर. तुझ्या पाठीमागे आम्हाला कोण सांभाळणार ? आम्ही रस्त्यावर भीक मागू. नाहीतर डाकू बनू. आता मी ऐकणार नाही. त्यांना आता मारूनच टाकतो" असं म्हणून दगड घेऊन मी पळू लागलो, इतक्यात आईनं मला पकडलं. रडून म्हणू लागली, "अरे किशोर, असं करू नकोस. मला मारून टाक, पण त्यांना मारू नको." एवढा छळ करूनसुध्दा ती नानांची बाजू घेत होती. ती म्हणाली, "मी मोलमजुरी करीन. पण तुम्हाला शिकवून दाखवीन. त्यांच्या घरासमोर झोपडी बांधून राहीन. पण तुम्हाला शिकवीन. मोठं करीन."

दुसऱ्या दिवशी नाना परत गावाला गेले. शालनची जलसा पार्टी सोनपेठहून निघून गेली. आठ दिवस झाले. नाना आले नाहीत. जया काळजीनं खूप वाळली होती. ती आईशी खूप भांडली. आई काहीच उत्तर देत नव्हती. म्हणून जयानं तिच्या आईला, सुशीलामावशीला पत्र पाठविलं.

सुशीलामावशी आली. घरात स्वयंपाक करायला काहीच नव्हतं. स्टोव्हमध्ये रॉकेल नव्हतं. तांदूळ आणण्यासाठी मावशीनं पैसे दिले. मी तांदूळ आणले. चुलीवर खिचडी शिजवायला टाकली. घरात लाकडं नव्हती. मी चिपाड घालून जाळ लावत होतो. धूर माझ्या डोळ्यांत जात होता. डोळ्यांतून पाणी येत होतं. आई रडतच बसली होती. तिला दुसरं काहीच सुचत नव्हतं. सुशीलामावशी चुलीजवळ आली. तिनं जाळ लावला. म्हणू लागली, "माझ्यासारखी असती, तर जीवच दिला असता. काय हे कुत्र्यासारखं जगणं !"

नाना आले. त्यांनी मला साबुदाणा आणायला सांगितला. मी साबुदाणा आणला. नाना मला म्हणाले, "खलबत्त्यात कुटून बारीक कर." मी तो खलबत्त्यात कुटून बारीक करीत होतो. पण कच्चा साबुदाणा कसा कुटणार ? मावशी मला कुटताना बघत होती. ती म्हणाली, "काय रे किशोर, तुझी देव किती परीक्षा घेतोय ? इथं पण तुला कुत्र्यासारखं जगावं लागतंय."

सुशीलामावशीनं जयाला नेरल्याला नेलं. कारण इथं तिचा खूप छळ झाला होता.

आईनं ही गोष्ट गावातल्या प्रतिष्ठित लोकांच्या कानावर घातली होती. पण कुणीच मदत करायला तयार नव्हतं. म्हणून आम्ही खासदार रामराव लोणीकर यांच्याकडे परभणीला गेलो. रामराव लोणीकरांनी आई शेलूला पार्टीत असताना तिला बहीण मानली होती. नेरल्याजवळच परीत नावाचं गाव आहे. तिथल्या नागीणमावशी शेलूला नाचत असताना रामराव लोणीकरांनी नागीणमावशीला ठेवलं होतं.

नागीणमावशीचं त्यावेळचं वय सोळा वर्षाचं होतं. म्हणजे दोन महिने झाले नव्हते, नाचायला सुरुवात करून. पण नाच-गाणं बंद करून खासदार रामराव लोणीकर यांच्याबरोबर ती संसार करू लागली. आता त्यांना तीन मुलं -किशोर, राजू, मोहन आणि एक मुलगी आहे. नागीणमावशीची आणि आईची चांगली ओळख होती. त्यांना सर्व सांगितलं.

परभणीवरून आम्ही घरी आलो. तो दीपकचा चेहरा कोमेजला होता. तो गप्प होता. नाना गावाला गेले होते. आईनं दीपकला आंघोळ घालण्यासाठी त्याचे कपडे काढले. तर अंगावर कातडी निघाली होती. हिरवी-पिवळी झाली होती. रक्त साकळलं होतं. सगळ्या शेजारच्या बाया आल्या व आईला सांगू लागल्या, ''बया, काय जनावरासारखं मारलं या लेकराला, हे पोरगं गडागडा लोळायचं. बाहेर आल्यावर बी मारलं.जनावरासारखं मारलं, पण कुणीबी सोडवलं नाही.'' दीपकनं आईला काहीच सांगितलं नव्हतं. तो नुसता रडत होता. आम्ही सर्वच या प्रकारानं रडू लागलो.

नाना गावावरून आले. आई काहीच बोलली नाही. कारण त्यादिवशी सोमवार होता. आईचं व्रत होतं. ती दर सोमवारी नानांचे पाय एका ताटात ठेवून गंगेच्या पाण्यानं धूत होती. मग पायाला हळदकुंकू लावून परत पाय धूत होती व पाय धुतलेलं पाणी पीत होती. त्या दिवशी आईचा उपवास होता. व्रत असल्यामुळे आई नानांना काहीच बोलली नाही. नाना पलंगावर बसले होते. आईनं ताट आणि गंगेच्या पाण्यानं भरलेला तांब्या नानांच्या समोर आणून ठेवला. नानांनी लाथ मारली. परत आईचं व नानांचं भांडण सुरू झालं.

नंतर नाना तिकडच्या घरी बैठकीत झोपण्यासाठी निघून गेले. नाना झोपले. उन्हाळ्याचे दिवस होते. आई इकडे देवाचा धावा करीत होती व रडत होती. देवाला म्हणत होती, ''आता मी काय करू ?'' एकदम नाना धावत आले. ते खूप घाबरले होते. ते म्हणाले, ''मी झोपलो तिथं लाल साप फणा काढून बसलाय. दोन-चार वेळा त्यानं कागदावर फणा मारला.''

आई बैठकीत गेली. तिनं नागाचं दर्शन घेतलं. त्यानं फणा खाली केला. तितक्यात नारायणमामांनी नाग पकडणाऱ्याला बोलावून आणलं होतं. त्यानं नाग पकडला व तो घेऊन गेला. तेव्हापासून नानांनी आईला कधीच मारलं नाही. आजुबाजूच्या लोकांना ही गोष्ट ऐकून कमाल वाटत होती. ज्यांनी नागाला बघितलं ते तर कमालच करत होते.

तेव्हापासून नानांनी जलसा पार्टीत जाण्याचं सोडून दिलं. त्यांना कर्ज झालं होतं. कारण त्यांना पत्ते खेळण्याचा नाद होता. आईला नाना म्हणाले, ''इकडचं शेत विकतो व दुसरं घेऊन देतो.'' शेत विकलं. पैसे कपाटातच होते.

नगरपालिकेच्या निवडणुका आल्या होत्या. नाना नगरपालिकेचे मेंबर होते. पण त्यांनी काहीच काम केलं नव्हतं. म्हणून मतदार नाराज होते. आई आणि मी प्रचार करीत होतो.

रात्री मी भिंतीवर घोषणा रंगवत होतो. नानांच्या घरचे किंवा भावकीचे कुणीही प्रचारासाठी येत नव्हते. मी आणि आई रात्रंदिवस प्रचार करीत होतो. वडिलांना पाडण्यासाठी माजी आमदार उत्तमराव विटेकर, शिवाजी महाजन व अनेक मोठमोठे लीडर नानांच्या वॉर्डमध्ये फिरत होते. मतदारांच्या हातात ज्वारी देऊन शपथा घेत होते. शिवाजी महाजनांचं व्यक्तिमत्त्व फार चांगलं आहे. त्यांना सोनपेठचा मतदारसंघ खूप मानत असे. नाना एकदाही वॉर्डमध्ये फिरले नाहीत. कारण त्यांना माहीत होतं की ते पडणार आहेत. मतदान झालं. मतमोजणी सुरू झाली. आई देवाजवळ प्रार्थना करत होती. मतमोजणी झाली. नानांचे विरोधक विश्वनाथ बनसोडे, भाजपाचे उमेदवार व इंदिरा काँग्रेसचे नाना यांना सारखी मतं पडली. दहा पैशाचं नाणं घेऊन छाप-काट्यावर कोण जिंकणार ते ठरवणार होते.

नाना जिंकले. पळतच सर्व माणसं घरी आली. नानांनी आईला फुलांचा हार घातला व म्हणाले, ''तुझ्यामुळेच मी ही निवडणूक जिंकलो. तुझ्या शक्तीनं माझी इज्जत राखली गेली.'' नाना खूपच खूश होते. कपाटातले पैसे संपत होते. आईला काळजी वाटत होती. काय करावं ? आई नानांना व्याकूळ होऊन सांगत होती, ''तुम्ही शेती घ्या. मला देऊ नका. माझे दागिने मोडा. पण शेती घ्या. लोकांनी म्हणू नये की, या बाईच्या नादानं तुम्ही जमीन विकली.''

देशमुखांची जमीन विकायला काढली होती. गावातील लोकांची ही शेती घेण्यासाठी शर्यत लागली होती. आई देशमुखांच्या मावशीकडे गेली व तिनं त्यांना रडून सगळा प्रकार सांगितला. श्रीपादराव मामांनी आईला बहीण मानलं व सांगितलं की, तुमच्याशिवाय कुणाला जमीन देणार नाही. माझ्या नावावर सहा एकर व आईच्या नावावर सहा एकर जमीन केली. आता नानांचा आमच्यावर विश्वास बसला. इतके दिवस त्यांच्या मनात संशय होता. आम्ही निघून जाऊ, असं नानांना वाटायचं.

मी नववीला होतो. अभ्यासाला वेळ मिळत नव्हता. कारण मला पीठाच्या गिरणीवर बसावं लागे. शाळा बुडायची. मी शाळेत गेलो की, आई गिरणीवर बसायची. शाळा सुटल्यावर मी पुन्हा बसायचो. गिरणी रात्री दहापर्यंत चाले. कधीकधी रात्री बाराला माणसं दळण घ्यायला यायची. नानाही पत्त्याच्या क्लबमधून रात्री दोन वाजता यायचे. यालाच म्हणतात, 'जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही.' मला जागावं लागायचं. झोप खूप यायची. पण मी जागायचो. नाना म्हणायचे, 'किशोर फार मेहनती आहे.' नाना आले की, झोपेतून पटकन उठून दार उघडायचो. कारण दीपक हट्टी होता. घरातून दुसरं कोणी आलेलं नानांना पटत नव्हतं. आई नानांनादेखील घाबरत होती. आणि दीपकच्या हट्टीपणालादेखील. आडकित्यात सुपारी जशी सापडते तसं आईचं जीवन झालं होतं.

आई विटाळशी असली की घरचा स्वयंपाक मलाच करावा लागे. तेव्हा शाळा बुडायची. दीपकसाठी रोज खाऊ लागे. आंबा, खारीक, पेरू अशी फळं मी विकत आणी.

नानाला न कळता आणावी लागायचं, नाहीतर ते मारहाण करायचे. पण मला मात्र खायची परवानगी नव्हती. दीपकनं खाऊन उरलं तर मला खायला मिळे. आई मला चोरून खायला द्यायची. दीपक मला फळं देऊ देत नव्हता. मी म्हणायचो, ''मी आत्ताच जेवण केलंय. मला नको.'' एके दिवशी मी सफरचंद घेऊन येत होतो. मला सफरचंद खाण्याचा मोह झाला. मी सफरचंद खाणार इतक्यात रस्त्यात दीपक दिसला. मी सफरचंद न खाताच पिशवीत ठेवलं. दीपकनं ही गोष्ट आईला सांगितली. आईनं मला खूप मारलं. कारण रस्त्यात खाणं आईला आवडत नव्हतं.

दीपकनं सफरचंद खाऊन उरवलं होतं. आईनं उरलेलं सफरचंद मला खायला दिलं. मी नको म्हणालो. कारण आई दीपकचाच हट्ट पुरवत असे. तशी ती खवळली, ''खातोस की घालू डोळ्यात चटणी ?''

मी ते उष्टं सफरचंद खाऊ लागलो तोच दारावर थाप पडली. नाना आले होते. आईनं मला सफरचंद भरभर खाऊन संपवायला सांगितलं. पण सफरचंद संपलं नाही. ते मी तोंडात कोंबलं. डोळ्यांत पाणी आलं. नाना आत आले. मला खोकला आला. सफरचंद तोंडात असल्यामुळे माझा दम घोटत होता. नानांनी बघितलं. माझे हात-पाय थरथर कापू लागले. नानांनी मला सफरचंद खाताना पाहिलं. त्यांनी आईबरोबर भांडण काढलं. ''तुम्ही गिरणीच्या पैशाचं वाट्टोळं करीत असाल. हिशोब नाही. रोज काय काय खाता, कुणास ठाऊक ?''

नानांनी मला बोलावलं. त्यांनी हिशेब विचारण्यास सुरुवात केली. मी हिशोब लिहिला नव्हता. त्यांनी सारं घर डोक्यावर घेतलं. ''तुम्ही जातीवर जाणार. तुम्ही चोरच निघणार. तुम्ही कधी सुधारणार नाही.'' त्यांनी हंटरनं मला मारायला सुरुवात केली. माझ्या डोक्यावर फोड आले. माझं डोकं फुटलं. मी मार खात होतो. नाना ओरडत होते. आजुबाजूची माणसं घराभोवती जमा झाली. 'अहो, मुलगा मरून जाईल, कुणी तरी सोडवा' अशी माणसं बोलत होती. पण कोणीच मध्ये पडत नव्हतं. नानांनी स्टोव्ह पेटवला. सळई तापवली आणि 'पैसे कोठे लपवून ठेवले ते सांगा. नाहीतर डाग देईन' असं नाना म्हणत होते. मी खूप रडत होतो. दीपकनं चड्डी ओली केली. आई मात्र देवाजवळ जाऊन डोळे बंद करून बसली होती. त्या दिवशी आम्ही कुणीच जेवलो नाही.

एकदाची माझी परीक्षा झाली. आणि आईला न कळता मी नेरल्याला पळून जाण्याचं ठरविलं. त्यादिवशी गिरणीत दळणाचे खूप पैसे जमले होते. मी ते घेतले. आईचं मंगळसूत्रही चोरलं आणि घर सोडलं. स्टॅण्डवर आलो. नाना आठवले. ते आईला मारतील म्हणून परत घरी गेलो. मंगळसूत्र होतं तिथं ठेवलं. आईला शेवटचं पाहून घेतलं आणि घर सोडलं.

मी नेरल्याला आलो. रंभामावशी बार्शीला निघाली होती. ती बार्शीला जलसा पार्टीत नाचत होती. तिच्याबरोबर बार्शीला आलो. बार्शीला रसिक थिएटरमध्ये रंभामावशी

नाचकाम करायची. पार्टीतल्या सर्वांच्या ओळखी झाल्या. कोणीही मला कसलंही काम सांगत असे. मी ते करीत असे. गाणं रात्रभर चालायचं. जमलेली माणसं एक-दोन रुपये द्यायची. कुणासाठी दारूच्या बाटल्या, तर कुणासाठी सिगारेट आणायचो. झोप व्हायची नाही. कुणी मालिश करायला सांगत, तर कुणी अंग दाबायला सांगत. नाचणाऱ्या बायकांचंही काम ऐकावं लागे. कुणाला गजरा, पिना, पावडर आणून द्यायचो. तर कुणाच्या वेण्याही घालायला लागत. कुणी ब्लाऊजची बटणंही लावायला सांगत.

रसिक थिएटरजवळच बाब्या नावाचा एक मुलगा होता. त्याची-माझी ओळख होती. तो नेहमी मला मुंबईला चल म्हणायचा. पण तोही मुंबईला गेला नाही. उलट, इथंच विचित्र उद्योगाला लागला. पुन्हा त्याची-माझी मैत्री जमली. मी माझं दुःख त्याच्याकडे सांगत असे. त्यानं मला एकदा त्याच्याबरोबर नेलं. तो कुंटणखान्याजवळ काम करायचा. फिरणाऱ्या गिऱ्हाईकांना पटवून वेश्येकडे घेऊन जायचं. मोबदला म्हणून कमिशन मिळायचं. बाब्यानं कुंटणखान्यात नेलं. काम समजावून सांगितलं.

गल्लीत माणसं आली की, मी त्यांच्याजवळ जायचो. गोड बोलायचो. म्हणायचो, "साहेब, पोरगी लय चांगली हाय. एकदा चाखून बघा. मग रोज याल. सोळा वर्षांची हाय." बायका मेकअप करून बसलेल्या असायच्या. माणसं आली की, पुढं व्हायच्या. गिऱ्हाईक यायचं. पसंत पडेल तिला खोलीत घेऊन जायचं. गिऱ्हाईक झोपण्याअगोदर मी गादी साफ करायचो. कधी कधी गादी खूप खराब होत असे.

हमीदा नावाची पोरगी धंदा करत होती. ती माझी चेष्टा करायची. माझ्या गालाचा चिमटा घ्यायची. 'तू चिकणा है' म्हणायची. 'इधर क्यूँ आया. यहाँसे निकल जा' म्हणून सांगायची. मी माझी कहाणी तिला सांगितली. "मी धंदा करून तुला शिकवीन. आपण पळून जाऊ" असं तिनं मला सांगितलं. आम्ही दोघांनी पळून जायचं ठरवलं. पण बातमी फुटली. कुंटणखान्याच्या मालकानं मला व हमीदाला खूप मारलं. हमीदा रडत होती. ती म्हणत होती, "मालिक, मै कही नही जाऊँगी. मेरी गलती है. मैनेही किशोर को बोला था. उसे मत मारो."

कुंटणखान्याच्या मालकानं मला खूप मारलं, दम दिला आणि हाकलून काढलं.

मी नेरळ्याची बस पकडली. दीपक पण नानांच्या त्रासाला कंटाळून नेरळ्याला आला होता. मी आणि दीपक नेरळ्यात काम करू लागलो. काही दिवसांनंतर आईचं पत्र आलं. आई आजारी होती. तिनं आम्हाला "ताबडतोब या, तुमची सारखी आठवण येत आहे" असं लिहिलं होतं. मी व दीपक पास झाल्याचंही कळवलं होतं. आता माझं दहावीचं वर्ष होतं. मला आईची खूप आठवण येत होती. ती आजारी आहे, तिला जेवायला कोण देत असेल ? तिची सेवा कोण करीत असेल ? तिला दवाखान्यात दाखवलं असेल का ? या विचारानं मी वेडा होई. मी माझं दुःख रामा नावाच्या मित्राला सांगितलं. त्यानं मला

सोनपेठला जायला सांगितलं. "वेड्या, सोनपेठला जा. दहावी पास हो. डी.एड. कर. मास्तर होशील. नेरल्याला राहून मामाची जनावरं, शेतं का सांभाळतोस ?"

मी सोनपेठला जाण्याचं ठरवलं होतं. परंतु दुसऱ्याच दिवशी आम्हाला घेऊन जायला नाना आले. मला नानांची भीती वाटत होती. आईकडे जायला मिळणार याचा आनंदही होत होता. नाना आल्यामुळे कोल्हाटी समाजाचे सर्व लोक आमच्या घरी जमा झाले. स्त्रियादेखील आल्या होत्या. सर्वजण नानांना रागावत होते. नाना म्हणाले, "मला जास्त बोलू नका. पोरांना पाठवणार की नाही, ते सांगा. त्यांची आई मरायला टेकली आहे."

मध्येच कोणीतरी म्हणाले, "मेली तर कुत्र्यापुढे टाका."

मी दचकलो. इतक्यात आमच्या जातीच्या पंचानं सर्वांना शांत केलं. आणि म्हणाले, "सावकार, पोरांना विचारा. ते येतो म्हणाले तर घेऊन जा. पोराना जिवंत ठेवा, नाही तर मारून टाका. पण त्यांना विचारा."

नानांनी दीपकला विचारलं, दीपकनं सर्वादेखत नकार दिला. आणि म्हणाला, "मी येत नाही, मी तुमच्या जातीचा नाही, माझा विटाळ होईल तुम्हाला."

दीपकचं उत्तर ऐकून सर्वजण हसले. नाना चिडले होते. नानांनी मला विचारलं. मी पटकन उठलो, आणि नानांकडे गेलो. सर्वजण माझ्याकडे डोळे फाडून बघत होते. आणि म्हणू लागले, "का छोरा हाय. कजेने (नानानं) बल्या चल की उठ्या. कितना डरताय छोरा." कोणी म्हणत होते, "लय हुशार हाय किसऱ्या. उसकु मालूम हाय नेरले में रहीसन का होणेवाला हाय. कुते की मौतीवानी मारण्या का. सोनपेठको जाईसन एक तरी मरी जाण्या का नाही तर निका शिकसिन माँ कु सुख देणे का."

नानांनी माझा उजवा हात पकडला. त्यांनी मला बाहेर काढलं. आणि माझ्या हाताला पकडून झपझप चालत गेले. ओट्यावरून खाली उतरताना मी पडलो. नाना भीतीनं घाबरून तसेच मला खेचत चालले होते. तितक्यात माझ्या चुलत मामीनं मला पडलेला बघितला आणि मोठ्यानं ओरडली, "मऱ्या ये छोरा नहटो काई तरी." (पोरगा मेला. पळा कुणीतरी) कोल्हाट्याची सर्व माणसं तयार. कोणी काठ्या घेतल्या. कोणी कुऱ्हाडी तर कुणाच्या हातात दगड. मी आणि नाना पळत होतो. आणि आमच्या पाठीमागे तीस-चाळीस कोल्हाटी पुरुष आणि वीस-पंचवीस स्त्रिया आरडाओरड करीत पळत होते. गावात पिसाळलेल्या कुत्र्याला मारण्याकरता पळतात तसं. सर्व स्त्रियांचा रडण्याचा आणि मोठमोठ्यानं ओरडण्याचा आवाज येत होता. गावातील सर्व लोकदेखील आवाज ऐकून नानांच्या आणि माझ्या मागे पळत होते. मला जास्त पळणं होत नव्हतं. पाठीमागनं दगडांचा वर्षाव होत होता. आम्हाला दगड लागत. माझ्या डोक्यात दगड लागला आणि नानांच्या पाठीवर. एकामागे एक दगड आमच्या अंगावर पडू लागले. समोर खड्डा आला. नानांनी माझ्या हाताला पकडून खड्ड्यावरून पलीकडे उडी मारली. पण माराच्या भीतीनं नानांनी माझा हात सोडून दिला. मी खड्ड्यात पडलो. खड्ड्यात सगळीकडे काटे, कुपाटे होते. नाना मला सोडून पळाले आणि समोरच्या हिराजीमामाच्या घरात घुसले. दाराची कडी लावून

त्यांनी आश्रय घेतला. खूप वेळ गावातली सगळी माणसं हिराजीमामाच्या घरावर दगडफेक करीत होती. हिराजीमामा हे माझे चुलत मामा. हिराजीमामानं खिडकी उघडली आणि सगळ्यांना म्हणाले, "दगड मारू नका. मी बाहेर येत आहे." सगळेजण शांत झाले. हिराजीमामांनी सगळ्यांना समोरच्या मोठ्या घरात नेलं आणि सांगितलं, "हे बघा, तुम्ही वेड्यासारखे चाळे करू नका, आपण कृष्णा सावकाराला मारलं तर आपल्या शांताबाईचे हाल होतील. ती सोनपेठला आहे. सावकार रागाच्या भरात शांताबाईला मारून टाकतील."

सगळे शांत झाले आणि आपापल्या घरी गेले. मी ठाम निर्णय घेतला होता की, नानांनी मला मारून टाकलं तरी चालेल, पण मी सोनपेठला जाईन. कारण आईचे काय हाल असतील याची काळजी वाटत होती. आणि मी दुसऱ्याच दिवशी सोनपेठला गेलो. आई झोपूनच होती. आई झोपेतच 'किशोर-दीपक' करीत होती. आईला ताप आला होता. दीपक मात्र नेरल्यालाच राहिला. दोन-तीन वर्षांनंतर मीच जाऊन त्याला घेऊन आलो. मी दहावी पास झालो.

अंबाजोगाई सोनपेठहून जवळ असल्यामुळे मी अंबाजोगाईला योगेश्वरी कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. मला मेडिकलला जायचं होतं. या दृष्टिकोनातून मी जीवशास्त्र, भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र हे विषय घेतले. सातवीत असताना दीपक लांडे नावाचा मुलगा माझ्या वर्गात होता. त्यावेळी त्याची व माझी चांगली दोस्ती जमली. योगायोगानं आता अकरावीच्या वर्गात तोच दीपक माझ्या वर्गात आला. पण आता त्याचा नूर बदलला होता. माझ्याशी दोस्ती केली म्हणून इतर मुलं त्याला चिडवत. म्हणून मी त्याच्याशी बोलत नव्हतो. तो पण माझ्याशी बोलत नव्हता. एकाच वर्गात असूनसुद्धा आम्ही एकमेकांच्या तोंडाकडे बघत नव्हतो. मी एकदा बोलण्याचा प्रयत्न केला. तो काहीच बोलला नाही. विज्ञान शाखेत इंग्रजी माध्यम असल्यामुळे मला समजायला कठीण जात होतं. लेक्चरमध्ये काय चाललं आहे हेच मला कळत नव्हतं. साधं 'लिफ्' म्हणजे काय, माहीत नव्हतं. रोज कॉलेजहून आलो की, पुस्तकाकडे बघून मी रडत असे. मला वाटत होतं की, मी कधीच विज्ञान शाखा पास होणार नाही. दिवस कसे तरी जात होते. मी डिक्शनरी वाचून-समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. पण मला जास्त जमत नसे. त्यामुळे मी प्रगती करू शकणार की नाही याबद्दल शंका होती. पण मी प्रयत्न सोडले नाहीत. रात्रंदिवस अभ्यास करीत होतो.

मी गुरुवार पेठेत एका मुस्लिमाच्या वाड्यात भाड्यानं राहत असे. त्यांनी पाच-सहा खोल्या किरायासाठी ठेवल्या होत्या. तेथे डहाळे नावाचे एक गृहस्थ राहत होते. ते माझ्याशी चांगलं वागत असत. त्यामुळे आमची चांगली मैत्री झाली. खरं म्हणजे ते एम.एस्सी. करत होते. मी अकरावीला होतो. डहाळे मला नोट्स काढण्यास मदत करत, प्रत्येक शब्दाचा अर्थ सांगत. त्यांच्यामुळे मला मोठा आत्मविश्वास निर्माण झाला, नाहीतर मला

सायन्स सोडून कॉमर्स किंवा आर्टस् घ्यावं लागलं असतं. डहाळ्यांनी मला निस्वार्थीपणानं समजावून सांगितलं की सुरुवातीला सर्वांचंच असं होतं. दहावीचा आणि अकरावी सायन्सचा तसा काही संबंध नाही. जर तू प्रयत्न केलेस तर नक्कीच वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळवशील.

मला जातीमुळे बऱ्याच खोल्या बदलाव्या लागल्या. एक-दोन महिने गेले की, मला वाटायचं, माझ्याबद्दल यांना सर्व माहीत झालं असणार. त्यामुळे खोली बदलून घ्यायचो. अशा परिस्थितीत अकरावीला असताना बेबीमावशी नाचण्याकरिता केवडकरच्या पार्टीबरोबर अंबाजोगाईला आली. तिनं पत्रानं कळवलं. पण भीतीनं मी लगेच गेलो नाही. मी सहज त्या रस्त्यावरून जात होतो. माझ्याबरोबर माझे मित्र होते. अचानक बेबीमावशीनं मला बघितलं. पण माझे मित्र माझ्याबरोबर आहेत हे बघितल्यावर ती गप्प बसली. बेबीमावशीची मैत्रीण उषा होती. ती मला बघून हसली. मी माझ्या मित्रांना म्हणालो, ''अरे, चला लवकर, मला अभ्यास करायचा आहे.'' माझे मित्र मला चिडवत होते. अनेक प्रश्नांचा माझ्यावर भडिमार करीत होते. मी त्यांना काहीच उत्तर देऊ शकलो नाही. उत्तर देण्यासारखं माझ्याकडे काहीच नव्हतं. ते मला सारखं म्हणायचे की, 'तू तमाशाला जातोस.' त्यांना मी सांगितलं असतं की ती माझी मावशी आहे, तर त्यांनी ते सर्व खोल्यांमध्ये सांगितलं असतं. याची मावशी नाचणारीण आहे ! मग मला कॉलेज सोडून जावं लागलं असतं. शेवटी त्यांनी माझी मैत्री सोडली. मी पण त्यांच्याशी बोलणं सोडलं. मी माझ्या खोलीवर जाऊन रडायचो. माझी सख्खी मावशी असून मी तिच्याशी बोलू शकलो नाही, व तीही माझ्याशी बोलू शकली नाही. तिच्या डोळ्यांत आलेलं पाणी दिसलं होतं. मला वाटायचं, आपण रात्री चोरून जाऊन यावं.

एकदा संध्याकाळी ८ वाजता मी लोकनाट्य कलामंदिराकडे जाण्यास निघालो. वाटेत मला कॉलेजचा एक मित्र भेटला. त्यानं मला विचारलं, ''कुठे चाललास ?'' तेव्हा मी गप्प पुढे चालत राहिलो. मी तडक लोकनाट्य मंदिरात पोचलो. लोकनाट्य मंदिराच्या बाजूला एक खोली होती. त्या खोलीसमोर गेलो. तेथे उषा उभी होती. तिनं मला ओळखलं. मी घाबरलो होतो. मी उषाला म्हणालो, ''उषा, तुमच्या खोलीत शिरला तो मुलगा माझ्या कॉलेजमधला आहे.'' मला उषानं दुसऱ्या खोलीत नेऊन बसवलं. बेबीमावशी पळत तिच्या खोलीतून माझ्या खोलीत आली. मला पाहून रडू लागली. मलाही रडू येऊ लागलं. ती मला म्हणाली, ''अरे, तू आमच्या समाजात कशाला जन्मलास ?'' मी थोडा वेळ शांत बसून राहिलो. मला खूप भूक लागली होती. मावशीनं नंतर बिर्याणी मागवली. मी पोटभर खाल्ली. नंतर मी व मावशीनं मनमोकळ्या गप्पा मारल्या. मी दर रविवारी बेबीमावशीकडे जात होतो. एके दिवशी माझा मित्र डहाळे यानं मला लोकनाट्य कला मंदिरात जाताना बघितलं. तो आणि मी एकाच खोलीमध्ये राहात होतो. मी जेवण करून खोलीवर गेलो. त्यावेळी त्यानं मला विचारलं, ''कुठे गेला होतास ?'' मी म्हणालो,

''समाधान हॉटेलमध्ये गेलो होतो.'' तो म्हणाला, ''मी तर तेथूनच जेवण करून आलो.'' मी म्हणालो, ''मला जेवण करून खूप वेळ झाला. जेवणानंतर मी माझ्या मित्राकडे गेलो होतो.'' दोन-तीन दिवसांनंतर तो म्हणाला, ''किशोर, लोकनाट्य कलामंदिरामध्ये तुझ्यासारखी दिसणारी एक बाई आली आहे.'' मी खाली मान घातली. त्याला संशय येत असावा की, ती माझी आई आहे ! आणि म्हणून मी तिथं जातो.

तो माझ्याशी वाकडं बोलत असे. वेगळ्याच भावनेनं बघत असे. मी ती खोली सोडली व मी सदाशिव पेठेत गेलो. तो मला शोधायला आला. तो आल्यावर माझ्या डोळ्यांतून पाणी आलं. त्याचेही डोळे पाणावले होते. मी त्याला सांगितलं, ''त्या जातीत जन्म घेणं हा माझा दोष नाही. लोकनाट्य कलामंदिरामध्ये माझी आई नाही, मावशी आली आहे. तुला जात बघायची होती तर मैत्री करण्यापूर्वी मला विचारायचं होतं.'' त्यानं माझी माफी मागितली व म्हणाला ''माझं चुकलं, चल खोलीवरती.'' तो आता परळीला प्राध्यापक आहे.

बारावीला अंबाजोगाईला असताना मला खोली घ्यायची होती. मंगळवार पेठेत एका कोमट्याच्या घरी गेलो. त्यांनी माझं आडनाव विचारलं. मी म्हणालो, ''किशोर काळे.'' त्यानी विचारलं, ''मराठा आहेस की ब्राह्मण ?'' मी म्हणालो, ''मराठा.'' मला तिथं खोली मिळाली. एक-दोन महिने झाले. रंभामावशी अंबाजोगाईच्या लोकनाट्य मंदिरात आली. ती अंबाजोगाईला आहे हे मला माहीत नव्हतं. मी देवीच्या मंदिरात गेलो होतो. रंभामावशी व तिच्याबरोबर दोन-तीन स्त्रिया होत्या. अचानक तिची-माझी मंदिरात भेट झाली. माझ्याबरोबर शिवाजी नावाचा मित्र होता. तो उदगीर या गावाचा होता. त्यानं विचारलं, ''कोण आहेत त्या स्त्रिया ?'' मी म्हटलं, ''अरे, लग्नाला आल्या आहेत. आमच्या गावच्या आहेत.''

मावशीशी थोडं बोललो व म्हणालो, नंतर येतो. मी संध्याकाळी गेलो. रंभामावशी पायात घुंगरू बांधत होती. कारण तिच्या पार्टीची वेळ झाली होती. तरी मला म्हणाली, ''इथं बस. अर्धाएक तासात माझी पार्टी सुटते.'' मावशी नाचायला स्टेजवर गेली. मला दारात बसून सर्व दिसत होतं. मावशी, मी बघतोय का म्हणून, इकडे तिकडे बघत नाचत होती. तिचं नाचण्यात लक्ष नव्हतं. त्यांच्या पार्टीमध्ये मीना नावाची मुलगी होती. ती कोल्हाटी समाजाची होती. ती सोळा वर्षांची होती. शिकलेली होती. तीही नाचत नाचत पैसे घेत होती. दोघीही नाचत नाचत पैसे घेऊ लागल्या. तबला वाजत होता. मावशी नाचून नाचून थकली. तिला आता नाचण्याची ताकद राहिली नव्हती. तिच्या सर्व अंगाला घाम आला होता. शेवटचा रुपया त्या माणसाच्या हातात राहिला होता. मीना हातात पैसे घेत होती. नशेमध्ये प्यायलेल्या त्या म्हाताऱ्यानं मावशीचा हात हिसकावून हातात घेतला. म्हाताऱ्याच्या गालावर चापट मारण्यासाठी मावशीनं हात उगारला, तितक्यात

मीनानं तो हात पकडला. पार्टी सुटली. मावशी परत येताना पायातले घुंगरू वाजत होती. मी उठलो व खोलीत जाऊन बसलो. मावशीनं मला विचारलं, ''इथंच बसला होतास काय ?'' मी म्हणालो ''हो.'' मीना रंभामावशीला समजावत होती. ''आपण असं त्यांना मारल्यावर आपल्याला पैसे कोण देणार ?'' मावशी म्हणाली. ''अग, मग हात पकडायचा का ? मेले पिऊन येतात आणि त्रास देतात.'' अशी तक्रार रंभामावशी करीत होती. त्यांच्या रूममध्ये पंचवीस वर्षांचा एक मुलगा आला. विलास नाव होतं त्याचं. तो माझ्याकडे एकटक बघत होता. रंभामावशीनं मला जेऊ घातलं आणि मी खोलीवर गेलो.

दुसऱ्या दिवशी विलास मला हॉटेलमध्ये दिसला. मी त्याला बघून न बघितल्यासारखं केलं. पण तो जवळ येऊन मला म्हणाला, ''काय, कुठे चाललास ? अरे, रंभा तुझी मावशी का ?'' मी म्हणालो ''हो.'' नाकाला हात लावून तो म्हणाला, ''हे चालतं का ?'' मी म्हणालो, ''नाही.'' तो म्हणाला, ''का ?'' मी म्हणालो, ''तिचा चिऱ्याचा मालक आहे. तो येतो. त्याच्याशिवाय ती दुसरीकडे काही करत नाही.'' तो म्हणाला, ''मी मागेल ते देतो, तिचा मालक काय बघत बसलाय का ?'' मला खूप राग आला. मी त्याला बोललो, ''तुझी लग्नाची बहीण असेल ना ? तर मी पण तू मागशील ते देतो. तुझा भाऊजी काय चोवीस तास घरात बसतोय काय ?'' मला त्यानं शिवी दिली, ''तुझ्या मायेचा फोदा, तुमचा धंदा आहे म्हणून बोललो. तुला दाखवतो माझा इंगा.'' मी म्हणालो, ''नाचण्याचा धंदा आहे. ती एक कला आहे. तो वेश्यांचा धंदा नाही की रोज कुणाजवळही झोपायचं !''

मी खोलीवर गेलो. मला अंबाजोगाई सोडून द्यावी वाटत होती. पण काय करणार ? बारावी सायन्सचं वर्ष होतं. अर्धं संपत आलं होतं. मी रंभामावशीकडे गेलो. तिला सर्व सांगितलं व म्हणालो, ''तुम्ही इथून निघून जा. मला खूप अपमान सहन करावा लागतोय.''

मावशीला खूप वाईट वाटलं. मी असं बोलायला नको होतं. मावशी रडायला लागली. मीनाही रडायला लागली, ''त्यात अपमान कसला ? आमच्यामुळे तुझा अपमान होतो ? तू पण एका नाचणारणीच्या पोटी जन्म घेतला आहेस. आम्ही काय वाईट करतो का ? नाचणं आपला धंदा आहे. नाचणं ही कला आहे. किशोर, त्यांची चूक नाही. खूप जाती येथे आल्या. बघ, ती समोरची पोरगी वाण्याची. ती नाचून आपल्या भावाला शिकवते. मालकांकडून सुट्टी घेते व लॉजवर जाऊन झोपते. पैसे कमावते. आपण तसं काही करत नाही. या झोपतात. यांनी धंद्याचा चुथडा केला आहे. त्या दोन पोरी मुसलमानांच्या आहेत. रोज धंदा करतात. मला त्या लोकांचं विचारणं बरोबर आहे. एका आंब्याला कीड लागली की, आपल्याला वाटतं सगळ्या आंब्याला कीड लागली आहे काय ? पण सगळी फळं किडकी नसतात. किशोर, एक महिन्यानंतर आमची पार्टी इथून बार्शीला जाणार आहे. तू तोवर येत जाऊ नकोस. आता तर पाटलाच्या पोरी नाचतात. सिनेमात डिस्कोचं काम करतात. सगळं अंग उघडं करतात आणि पैसे कमावतात. सिनेमात किती हिरोंबरोबर काम करावं लागतं ! त्यांच्या अंगालाबी धक्का लागत नाही का ? मुका

द्यावा लागतो हिरोला, आणि आम्ही नऊवारी साडी नेसून नाचून-नाचून घाम गाळतो, तरी लोक आमच्याकडे वाईट नजरेनं बघतात. कारण आपला तर नाचायचा व्यवसाय आहे. नाचण्यात दोष नाही. आम्ही जलसा पार्टीत नाचतो. अन् त्या पडद्यावर नाचतात. आमच्या अंगावरील पदर थोडा जरी खाली पडला की 'नाचणारणीला हाय !' असं म्हणतात अन् त्या पडद्यावर सगळं अंग उघडं करतात, तरी ती फॅशन आहे असं लोक समजतात.''

मला खूप वाईट वाटलं, मी मावशीला इथून जा म्हणालो म्हणून. मी एका नाचणारणीचा मुलगा आहे हे विसरलो होतो. मी मावशीची माफी मागितली. मावशी रडत म्हणाली, ''मी काय खुशी म्हणून नाचते का ? आम्ही येथे मनानं आलो काय ? तुमच्या लोकांनी आमचा अपमान करावा असं आम्हाला वाटतं का ?''

मी तसाच दुःखी मनानं खोलीवर गेलो. नंतर मी लोकनाट्य कलामंदिरला गेलोच नाही. बाहेर जाण्याची लाज वाटत होती. त्या विलासची भीती वाटत होती. एक महिना मी खोलीच्या बाहेर गेलो नाही. कॉलेजलापण गेलो नाही. घरमालकिणीला सांगायचो, ''मला बाहेरून कुलूप लावा.'' मी गरज पडली की, खिडकी उघडून सांगायचो, ''कुलूप उघडा.'' ''माझ्या गावचं कोणी आलं तरच मी येथे आहे म्हणून सांगा.'' असं त्यांना बजावलं होतं.

एके दिवशी माझा सावत्र भाऊ सुरेंद्र वडकर आला. त्याला घरात बंड्या म्हणत. म्हणून त्याला मी बंडुदादा म्हणायचो. तो माझ्याशी जास्त बोलत नव्हता. मी स्वतःहूनच त्याच्याशी बोलायचो. मी चार शब्द बोललो तर तो एक शब्द बोलायचा. पण तो मनानं फार चांगला होता. कधीच तो आम्हाला वाईट मनानं बोलला नाही. माझ्या आईशी तर तो कधी बोलायचा नाही. पण माझ्या आईला व मला त्याची दया येत होती. का, कोणालाच माहीत नाही. आईनं खासदार लोणीकरला सांगून त्याला परभणीला प्राध्यापकाची नोकरी लावली होती. अंबाजोगाईला त्यानं एम. कॉम्. केलं होतं.

सुरेंद्र वडकर आला. त्या दिवशी माझ्या खोलीला कुलूप होतं. घरमालकिणीला त्यानं विचारलं, ''किशोर काळे इथेच राहतो का ?'' घरमालकीण म्हणा, ''हो !'' तो म्हणाला, ''मी त्याचा भाऊ आहे.'' मग लगेच मालकिणीनं कुलूप उघडलं. बंडुदादा व त्याचा मित्र हसायला लागले. बंडुदादा म्हणाला, ''बाहेरून कुलूप का लावून बसतोस ?'' मी म्हणालो, ''पोरं खोलीत येऊन बसतात व टाइमपास करतात. आता परीक्षा जवळ आलेली आहे.''

मी अभ्यास करतो, हे भाऊ त्याच्या मित्रांना अभिमानानं सांगत होता. नंतर विलास काही दिसला नाही. मी कॉलेजला नियमित जाऊ लागलो. बारावी परीक्षा जवळ आली होती. मी रात्रंदिवस अभ्यास करीत होतो. तरीदेखील माझा अभ्यास पुरा होत नव्हता. अजूनही मला वाटत नव्हतं की, मी बारावी पास होईन म्हणून. नाना मी अकरावीला

असताना वेळेवर पैसे पाठवायचे. पण मोजकेच पैसे देत होते. बारावीला दिवाळीपर्यंत नाना वेळेवर पैसे पाठवायचे. पण दिवाळीनंतर पैसे पाठविण्यात ते हलगर्जीपणा करू लागले. ट्युशनचे पैसे दिले नव्हते म्हणून मी ट्युशन सोडून दिली होती. मी गरीब आहे असं कधीच कोणाला दाखवलं नाही. नाना हे सोनपेठला सावकार म्हणून ओळखले जात होते.

मी बारावीला असताना श्रीकांत नावाच्या मुलाशी माझी मैत्री झाली. मी श्रीकांतच्या समोर श्रीमंतीचा आव आणायचो. मी मावशीकडून एकावेळेस तीनशे रुपये घेतले होते. मावशीनं किती अडचणीतून पैसे पाठविले असतील, त्याचा मी विचार केला नाही. श्रीकांतनं, ज्या हॉटेलमध्ये चल म्हटलं त्या हॉटेलमध्ये मी जात होतो. श्रीकांतला तरी काय माहीत की मी गरीब आहे ? परीक्षा जवळ येत होती. मला अजूनही अभ्यास समजत नव्हता. म्हणून वैतागलो आणि अभ्यास सोडून दिला. मी अभ्यास करीत नाही म्हणून श्रीकांत मला खूप रागावत असे. कधी कधी मला मारतदेखील होता. पण त्याला काय माहीत मी अभ्यास का करीत नाही ? माझ्या अडचणी काय आहेत ? अशा वेळी मात्र माझा मित्र डहाळे याची मला आठवण येई. वाटे, त्याच्या खोलीमध्येच मी राहिलो असतो तर बरं झालं असतं, त्यानं मला अभ्यांस समजावून सांगितला असता. पण डहाळे माझ्याशी चांगलं वागत नव्हता. म्हणून मला खोली सोडावी लागली होती.

मराठी आणि इंग्लीश हे दोन पेपर मी दिले. बाकीचे पेपर ड्रॉप केले. आणि सोनपेठला गेलो. नाना माझ्यावर शिव्यांचा वर्षाव करीत होते. बंडुदादाशी माझी तुलना करीत होते. म्हणायचे, ''बंड्याचा गु खा म्हणजे अक्कल येईल. प्रोफेसर झाला आहे. एम.कॉम. केलं त्यानं.'' आई मात्र रडून रडून हैराण झाली होती. नानांनी स्पष्ट सांगितलं की, ''आता मी तुमचं शिक्षण करू शकत नाही. तुमच्या नशिबात शिक्षण नाही. आता शेतात काम करा. एक गडी बंद करू.''

मी दोन दिवस विचार केला, काय करावं आणि काय नाही ? मी परभणीला नागीणमावशीकडे गेलो. नागीणमावशीला मी सर्व सांगितलं. नागीणमावशी म्हणाल्या, ''माझ्या जवळ तू रहा.'' नागीणमावशीनं जगतापसर आणि मोरसर यांना फोन केला. जगतापसर हे भौतिकशास्त्र शिकवत होते आणि मोरसर रसायनशास्त्र. नंतर तिनं जटेसरांनापण बोलावलं. ते जीवशास्त्र शिकवत होते. नागीणमावशीनं तिन्ही सरांना माझ्याविषयी सांगितलं की, किशोरकडे लक्ष असू द्या. खासदाराची पत्नी म्हणून नागीणमावशीला मान होता. माझ्याकडून पैसे न घेता तिन्ही सरांनी माझी ट्युशन घेतली. अभ्यासाला सुरुवात केली. कधी कधी मावशीला कामासाठी मदत करायचो. बाजारातून भाजीपाला आणायचो, पाणी भरायचो. नागीणमावशीनं मला त्यांच्या मुलाप्रमाणे सांभाळलं. मी एवढा अभ्यास करायचो की बस् ! मावशी आणि आसपासच्या काही व्यक्ती

मला वेडा म्हणायच्या. मावशीनं एक काम सांगितलं की दुसरंच करायचो. मावशी माझं उदाहरण मुलाला द्यायची. म्हणायची, ''बघा, तो किशोर गरीबघरचा आहे, पण किती अभ्यास करतो आणि तुम्हाला देवानं सगळं दिलेलं असून अभ्यास करावा वाटत नाही.''

काका खासदार असल्यामुळे घरी येणारे-जाणारे खूप होते. टी.व्ही. रात्र आणि दिवस चालू असायचा. कारण व्ही.सी.आर. घरचाच होता. कॅसेट आणून सर्वजण पिक्चर बघायचे. कधी कधी मलादेखील वाटायचं की, आपणही पिक्चर बघावा. पण माझ्या पुढच्या भवितव्याची भीतीदायक वाट दिसायची. आणि पिक्चर बघण्यासाठी उचंबळून आलेल्या भावनांचा खून करायचो. टी.व्ही.चा मोठा आवाज मला ऐकू येत असे. त्यामुळे माझा अभ्यास होत नव्हता. काकांच्या पाहुण्यांचा एक मुलगा होता. दीपक जाधव. तो देखील बारावी सायन्सलाच होता. आम्ही दोघंही एकाच सरांकडे ट्युशनला जात होतो. तो देखील माझ्याच खोलीत अभ्यास करायचा. मी त्याला एके दिवशी म्हणालो, ''दीपक, ह्या टी.व्ही. मुळे आणि इथं येणारे-जाणारे देखील खूप आहेत. इथं आपला अभ्यास होणार नाही. तू भाऊंना सांगून शिवाजी कॉलेजमधली एक खोली मागून घे.''

भाऊ म्हणजे खासदार रामराव लोणीकर, म्हणजे माझे काका. दीपकनं भाऊला विचारून शिवाजी कॉलेजमध्ये एक खोली घेतली. एक क्वार्टर होता. तिथं माझा सावत्रभाऊ बंडुदादा आणि भाऊंचे जावई विलास हे राहात होते. त्याच क्वार्टरमध्ये मला आणि दीपकला खोली दिली. बंडुदादा शिवाजी कॉलेजला हॉस्टेल वार्डला होता. दीपक आणि मी एकत्र अभ्यास करायचो. मी रोज जेवायला मावशीच्या घरी जात होतो. कधी कधी घर दूर असल्यामुळे उपाशीच राहात होतो. दीपक जास्त अभ्यास करत नसे. मला त्रास होऊ नये म्हणून तो बाजूच्या खोलीत झोपत असे. दोन वेळचं मला जेवण मिळत होतं; फुकटची ट्युशन, कितीतरी मोठा आधार मला मिळाला होता ! नानांशी बोलत नव्हतो आणि नानादेखील माझ्याशी बोलत नव्हते. माझ्याकडे पाच पैसेदेखील नसायचे. बंडुदादाकडे मी एके दिवशी कोरे कागद मागितले, त्यानं शिवाजी कॉलेजमधले उरलेले पेपरचे कागद मला दिले. बंडुदादाला माहीत नव्हतं की, नाना मला पाच पैसेदेखील देत नाहीत. कारण माझ्याच बाजूला बंडुदादा राहत होता. फक्त एक भिंत आडवी होती, पण कधी एकमेकांशी बोलत नव्हतो. महिन्यातून एखाद्या वेळेस मला वाटलं, आता बंडुदादाशी बोलावं तर बोलायचो. मी खोलीत बसलो की, बाहेर निघत नव्हतो. सकाळी पाचला ट्युशन असायची.. बंडुदादाच्या खोलीत कधी कधी माझ्या अभ्यासाविषयी चर्चा चालायची. म्हणायचे, 'काय अभ्यास करतो किशोर ! वेडा होईल' माझा आत्मविश्वास वाढत होता. मला वाटू लागलं, मी मेडिकल पास होईन. माझ्या जीवनाचं सार्थक होईल.

परीक्षा जवळ आली. परीक्षा फी भरण्यासाठी माझ्याकडे पैसे नव्हते. मावशीकडे पैसे मागण्याची माझी हिंमत होत नव्हती. कारण दोन वेळचे जेवण मिळत होते. राहाण्यासाठी निवारा. हेच मला खूप वाटत होते. मी मोठ्या अडचणीत सापडलो होतो. रात्र आणि दिवस परीक्षा फी हा विचार माझ्या डोक्यात घोळत होता. त्यामुळे माझं अभ्यासात

मन लागत नव्हतं. माझ्या जवळच्या सर्व मित्रांना पत्र पाठविलं. आणि माझी अडचण त्यांना सांगितली. बीडचा माझा मित्र श्रीकांत यालादेखील मी सांगितलं. पण कोणीही माझ्या मदतीला धावलं नाही. शेवटी नानांच्या चुलतभावाचा मुलगा दिलीप वडकर यांच्याकडे मी गेलो. ते शिवाजी कॉलेजच्या जवळच बँक कॉलनीत राहत होते. ते ॲग्रीकल्चर कॉलेजमध्ये नोकरीला होते. त्यांनी मला पाचशे रुपये दिले. त्यामुळे मी परीक्षा फी भरू शकलो आणि अंबाजोगाईला जाऊन परीक्षा देऊ शकलो. परीक्षा संपली. आईचा निरोप आला होता की, परीक्षा झाल्याबरोबर घरी ये. त्यामुळे मी सोनपेठला गेलो. अभ्यास करून करून माझी प्रकृती एवढी खराब झाली होती की, चालताना देखील माझ्या डोक्यात काहीतरी फिरत आहे असं वाटायचं आणि खाली पडायचो. त्यामुळे माझा मित्र बालाजी भाकरे हा सोनपेठपर्यंत माझ्याबरोबर आला.

दोन-चार दिवस झाले होते परीक्षा संपून. लगेच नागीणमावशीचा परभणीहून निरोप आला की, किशोरला परभणीला बोलावलं आहे. कारण मुलांच्या परीक्षा जवळ आल्या आहेत, त्यांना शिकवायचं आहे. सुधा सातवीला होती. मी परभणीला जाऊ शकत नव्हतो. कारण मी फारच अशक्त झालो होतो. नाक दाबलं की जीव जावा अशी माझी अवस्था झाली होती. तरी देखील मला जावं लागणार होतं. कारण मावशीनं मला सहारा दिला नसता तर माझी अवस्था कुत्र्यासारखी झाली असती. कोणीदेखील मला विचारलं नसतं. नागीणमावशीला मी देवीच्या रूपात बघत होतो.

रात्र आणि दिवस मी मुलांकडून अभ्यास करून घेऊ लागलो. मोहन माझ्याशिवाय कोणाला भीत नव्हता. मी असेन तरच अभ्यास करायचा. मुलांची परीक्षा संपली. मावशींनादेखील मी शिकवायचो. क, ख, ग.. मावशी वाचायला शिकल्या, पण जोडशब्द त्यांना लवकर कळत नव्हते.

माझी परीक्षा संपल्यानंतर फक्त चार दिवस मी सोनपेठला थांबलो आणि परत परभणीला आलो. नागीणमावशी मला आईपेक्षा जास्त प्रेम देत होती. तुपाशिवाय जेवण नव्हतं आणि सोनपेठला कधी कधी फोडणीला तेल नसायचं. तरीदेखील मला सोनपेठला आईकडे जावंसं वाटत असे. आईजवळची चटणी-भाकरी देखील मला गोड वाटायची. मला मावशी म्हणाल्या, "किशोर, सोनपेठला कशाला जातोस, थांब माझ्याजवळच. तू गेलास तर मला करमणार नाही." मी काही बोलू शकलो नाही. मी परभणीलाच थांबलो. करमणुकीची साधनं भरपूर होती. पण माझं मन लागत नव्हतं. शिवाय माझा निकाल कसा लागेल याची चिंता वाटायची. पिक्चर बघताना सुध्दा माझं मन दुसऱ्याच विचारात भरकटायचं. वाटायचं, माझा मेडिकलला नंबर नाही लागला तर... कधी कधी झोपदेखील येत नव्हती. रात्र जागून काढायचो. माझं शरीर एका जागी असायचं. पण मन मात्र अनेक ठिकाणी भटकत होतं. एके दिवशी टी.व्ही. वर सकाळीच, बारावीनंतर काय ? हा कार्यक्रम

होता. त्या कार्यक्रमाला हिंदी चित्रपटातील अभिनेत्री तनुजा होती. ती सांगत होती, सर्व बारावी सायन्सची मुलं मेडिकलचा विचार करतात. मेडिकलला नंबर नाही लागला म्हणून कित्येक मुलं आत्महत्या करतात. मेडिकलला नंबर लागावा हा विचार चुकीचा आहे. M.B.B.S. ला नाही लागला तर अजून दुसरे कोर्स आहेत. B.A.M.S., B.D.S. आहे. फिजोओथेरपी आहे, फूड टेक्नॉलॉजी आहे, पॅथॉलॉजी आहे, उ.खज. भी अच्छी आहे. Microbiology B.Sc.आहे. कोणताही विषय असू द्या. तो जर आपण मन लावून केला तर आपण जीवनात चांगल्या प्रकारे यशस्वी होतो. समजा, डॉक्टर झालात आणि प्रॅक्टीस नाही चालली तर... कधी B.A.M.S. डॉ. देखील M.B.B.S. डॉ. ला ऐकत नाहीत. B.Sc.करून आपण जर वेगवेगळ्या परीक्षा दिल्या तर आपण यशस्वी होऊ शकतो.

त्यांनी एक सत्यकथा सांगितली. तीन मित्र होते. त्यापैकी एकाचा मेडिकलला नंबर लागला. एकाचा D.M.L.T. कोर्सला नंबर लागला. आणि एकाचा कोठेच नंबर नाही लागला. म्हणून त्यानं B.Sc. केली. ज्याचा मेडिकलला नंबर लागला होता, तो डॉक्टर झाला. ज्यानं D.M.L.T.कोर्स केला तो डॉ.पेक्षा जास्त पैसे कमावू लागला. रक्त, मूत्र आणि संडास तपासणीसाठी फी डॉक्टरपेक्षाही तो जास्त घेत होता. कारण रक्त, मूत्र आणि संडासमध्ये काय बिघडलं आहे, याचा जोपर्यंत रिपोर्ट कळत नाही तोपर्यंत डॉ. काहीच करू शकत नाही. आणि तिसरा मित्र B.Sc. झाल्यानंतर त्यांन I.A.S.ची परीक्षा दिली. तो कलेक्टर झाला. मला असं म्हणायचं नाही की, डॉक्टर पेशा हा हलका आहे. मला एवढंच सांगायचं आहे की, कोणताही कोर्स असू द्या. मन लावून करा. तुम्ही नक्कीच जीवनात यशस्वी व्हाल. पण मेडिकलला नंबर नाही लागला म्हणून नाराज होऊ नका.

हे सर्व मी मन लावून ऐकत होतो. टी.व्ही. चा कार्यक्रम संपल्यानंतर मी विचार केला की, खरंच बारावीनंतर खूप कोर्स आहेत. आपला कुठेतरी नंबर लागेलच. निकालाविषयी विचार करणं मी सोडून दिलं.

निकाल लागला. अंबाजोगाईच्या कॉलेजमधून मी मागसवर्गातून दुसरा आलो. नानांना व आईला खूप आनंद झाला. आईला माझ्याविषयी अभिमान वाटत होता. सगळीकडे फॉर्म भरले. आई देवाला प्रार्थना करायची की, माझ्या मुलाचा मेडिकलला नंबर लागू दे. नाना माझ्याशी बोलत होते. पण मला त्यांच्याशी बोलावं असं वाटत नव्हतं.

मला मुंबईचा मेडिकलचा कॉल आला. मी आणि नाना मुंबईला माझी सावत्र बहीण जयश्रीअक्का हिच्याकडे गेलो. भाऊजींचा स्वभाव फार चांगला आहे. त्यांचं आडनाव कम्मे आहे. ते बँकेत सर्व्हिसला आहेत. फार मेहनती आहेत. आमच्याबरोबर ते चार ठिकाणी फिरले. त्यांना माझ्याविषयी अभिमान वाटत होता. ते मला चांगली वागणूक देत होते. जयश्रीअक्कापण चांगली बोलत असे. पण ती माझ्यावर नाराज असे. कारण मी नानांच्या प्रेमाचा वाटेकरी झालो होतो. हे कुणालाही वाईट वाटणं साहजिकच होतं.

एके दिवशी तिच्या शेजारणीनं विचारलं, "हा तुझा भाऊ आहे का ?" ती गप्प बसली. तिला लहान मुलगा आहे. तो मला मामा म्हणाला. मग तिनं डोळे हलवले. पण मला खरंच त्याक्षणी वाटलं, आपण बळंच येथे राहतो.

योगेश्वरी महाविद्यालयातील प्राचार्य ए. सी. चौधरी यांनी मुंबईला पत्र पाठविलं की, तुझा सत्कार ठेवला आहे, तू ये. मी त्या दिवशी अंबाजोगाईला गेलो. मला मोठा आनंद झाला होता. कारण कष्टाचं फळ मिळालं होतं. मी आनंदानं भारावून गेलो होतो. आपला आता सत्कार होणार... माझ्या आयुष्यातलं सर्वात चांगल्या क्षणांपैकी एक तो होता. सत्कार समारंभ सुरू झाला. प्राचार्यांचं भाषण झालं. त्यांनी माझा गौरव केला. "किशोर काळे आपल्या कॉलेजमधून मेडिकलला जातोय. त्यानं अत्यंत वाईट परिस्थितीतून हे मोलाचं यश मिळविलं आहे. त्याचा आदर्श घेण्यासारखा आहे. अशीच त्यानं भावी जीवनात प्रगती करावी, हीच अपेक्षा."

माझे डोळे आनंदानं भरून आले. मला कुठेतरी वाळवंटात हिरवळ दिसल्यासारखं वाटत होतं. मी थरथर कापत बक्षीस घेण्याकरता सरसावलो. सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. ते ऐकून माझे कान सुखावले. हे सर्व चालू असताना मला वाटायचं, मी स्वप्नात तर नाही ना ? प्राचार्य ए. सी. चौधरी यांनी मला बक्षीस दिलं होतं.

त्यांनी माझा आत्मविश्वास वाढविला. त्यांच्यापासून मला नवीन प्रेरणा मिळाली. मला चांगलं आठवतं की सोनपेठच्या शाळेत सत्कार समारंभ होता. त्यापैकी कोणी शिक्षक, कोणी इंजिनीअर व मान्यवर व्यक्तींना बोलावलं होतं. पण त्या ठिकाणी कोणी माझी चौकशी केली नव्हती. मी सोनपेठ या गावातून पहिलाच डॉक्टर होणार होतो, तरी पण माझ्याविषयी कोणाच्या तोंडून कौतुक झालं नाही. याला कारण एकच, मी ठेवल्या गेल्या बाईचा मुलगा होतो ! कार्यक्रमाला सर्व ब्राम्हण मंडळी होती. अंबाजोगाईला पण ब्राम्हणशाही फार चालते. पण हे सर्व घडणं जातीवर अवलंबून नसतं. तर हे माणसाच्या कर्मावर अवलंबून असतं असं प्राचार्य ए. सी. चौधरी यांनी पटवून सांगितलं. त्यांना माझी सर्व जन्मकुंडली माहीत होती.

मी एम. बी. बी. एस. च्या पहिल्या वर्षाला होतो. माझी परीक्षा सहा महिन्यांवर आली होती. स्कॉलरशिपची वाट पाहात होतो. घरी आई एका साडीवर दिवस काढत होती. कधी तेल नाही कधी भाकरी नाही. पण माझा बाप म्हणून नानांकडे बोट दाखविण्याचा अधिकार मला मिळाला होता. आई मेली असती तर मला दुःख झालं नसतं. पण आईवर परत नाचायचा प्रसंग आला तर ! तर ते मला सहन झालं नसतं. पैसे नसल्यामुळे मी विचार करीत असे. आपलं पुढचं शिक्षण कसं व्हायचं हा विचार माझ्या डोक्यात सतत येत असे.

सुशीला आणि बेबीमावशीनं दुसरी पार्टी काढली होती. सुशीलामावशीनं रमेश

पाटलाची दोन वर्षं वाट पाहिली. नंतर तिनं रमेश पाटलाची आशा सोडून दिली. तिला रमेश पाटलापासून एक मुलगा अनिल, आणि सेलूचे सोपानराव गोळेगावकर यांच्यापासून दोन मुलं, बालाजी आणि जया. जया सातवी पास होऊन एक वर्ष झालं होतं. ती घरीच बसली होती. तिचं पुढचं शिक्षण कसं करावं ? मुलांना कसं जगवावं ? घरचा खर्च कसा भागवावा ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले होते.

रमेश पाटील नेरल्याला दहा वर्षं आले. नंतर त्यांनी येणं बंद केलं. तेहतीस वर्षांच्या सुशीलामावशीनं परत भावाचा संसार उभा करण्यासाठी, मुलं जगवण्यासाठी नाचगाणं सुरू केलं. तिनं सर्व सामान दुरुस्त केलं, आणि पार्टी उभी केली. मोडलिंबला तिनं एक वर्ष नाचगाणं केलं होतं. पण आता तो जमाना राहिला नव्हता. अशा परिस्थितीत नुसत्या नाचगाण्यावर कुटुंब आणि स्वत:ची पोरं सांभाळायची जबाबदारी कठीण होती. पोरीला सांगलीला शिकायला ठेवलं. ती आठवीत शिकत होती. शहाणी झाली होती. सुशीलामावशीनं इस्लामपूरमध्ये नटराज लोकनाट्य कलामंदिरात पार्टी लावली.

बेबीमावशी पवारसाहेबांची वाट पाहत होती. दोन वर्षांपासून नाचगाणं बंद करून पवारसाहेबांनी बेबीमावशीला ठेवलं होतं. त्यांच्यापासून तिला एक मुलगा झाल्यावर त्यांचं येणं बंद झालं. बेबीमावशीला हा दुसरा धोका होता. ती वेड्यासारखी वाट पाहात होती. रडून रडून घायाळ होत होती. रडण्याशिवाय नाचणारणींच्या पदरात असतंच काय ? हाळजून ठेवलेली मुलं असतात. ती सांभाळावी लागतात. बिचाऱ्या बेबीमावशीनं परत नाचगाणं सुरू केलं. सुशीला, रंभा आणि बेबी परत एकत्र नाचायला लागल्या. इस्लामपूरला पार्टी चालू होती. मला त्या मदत करतील या अपेक्षेनं मी गेलो, पण त्यांची अवस्था बघितल्यावर माझं तोंडच बंद झालं. माझी गरिबी सांगण्यासारखी नव्हती. माझी गरिबी सांगण्याऐवजी मला त्यांची गरिबी बघावी लागली.

मी गेल्यावर त्या रडत होत्या. म्हणत होत्या, तुझ्या आईनं खूप चांगलं केलं. गरीब का असेना पण तिला आमच्यासारखी लाचारी करायची वेळ आली नाही. तू हुशार आहेस म्हणून मेडिकलला गेलास. नाहीतर तुझ्या आईचे जिजीसारखे हाल झाले असते. ती भाग्यवान आहे. तुझ्यासारख्या मुलाला तिनं जन्म दिला. आमचं जीवन आई-बापाची, बहीण-भावाची सेवा करण्यात गेलं. कारण आजोबा त्यांना आमच्यासारखं वेगळं राहू देत नव्हते. आजोबांना माहीत होतं, कोल्हाट्याच्या बायकांना विष घालून मारतात. म्हातारी झाली की हाकलून देतात.

आजोबांचं सर्व बरोबर होतं. फुलांचा जोपर्यंत वास येतो तोपर्यंतच ती वापरतात; जेव्हा वास संपतो त्यावेळी फेकून देतात. आईला नानांनी खूप त्रास दिला. हाकलून देण्याचाही प्रयत्न केला. पण आईनं लाचारीपेक्षा त्रास सहन केला. आई म्हणूनच नानांजवळ टिकली. आईच्या पूर्वी नानांनी बाया ठेवल्या होत्या, पण त्या टिकल्या नाहीत. माझ्या दुसऱ्या मावश्या जास्त शिकल्या नाहीत. त्या अज्ञान राहिल्या. जगात काय चाललंय हे त्या बघत होत्या. त्या नेरले सोडून दुसरीकडे 'रखेल' म्हणून राहण्यास घाबरत होत्या.

माझ्या कपड्यांकडे बघून त्यांनी माझी गरिबी ओळखली होती. पण त्या बिचाऱ्या काय करणार ? पार्टीत अजून चार बाया होत्या. सुमित्रा, वैजयंता, नंदा आणि डोंबाऱ्याची एक बाई. पेटीमास्तर, पाणीवाला यांना वीस रुपये द्यावे लागत. सर्वांना पैसे देऊन कधी कधी खायलाही पैसे उरत नसत.

जयाला सांगलीला शिकायला ठेवलं होतं. तिचं पत्र आलं की, खानावळीचे पैसे पाठवून दे. सुशीलामावशी सारखी विचार करायची. बेबीमावशीकडे तीन-चार महिन्यांचं बाळ होतं. ते सारखं रडायचं. त्याला वरचं दूध भरपूर मिळायचं नाही. नेरल्याहून पत्र आलं की किराणा दुकानवाला आता उधार देत नाही, कारण पहिलीच उधारी दिली नाही. तरी पैशाची सोय करणं. मी दोन-चार दिवसांत येत आहे.

सुशीलामावशीच्या मुलाचं पत्र आलं होतं, माझी परीक्षा फी भरायची आहे. दीडशे रुपये लवकर पाठवणं. सुशीलामावशी बाजूच्या पार्टीला शिव्या देत होती, ''झवाड्या तीनशे रुपयांवर दोन वेगवेगळ्या माणसांखाली झोपतात. आणि आम्हाला त्रास देतात.'' नटराज लोकनाट्य मंदिरात इस्लामपूरमध्ये पाच पार्ट्या होत्या : दोन कोल्हाट्याच्या, एक मांगाची व दोन डोंबाऱ्याच्या.

मी दुपारी स्टेजवर झोपलो होतो. एक बाई व एक माणूस गप्पा मारीत बसले होते. ती बाई त्याला म्हणत होती, ''मला दोनशे रुपये द्या. मला गावाहून पत्र आलंय. मी तुम्हाला नंतर देते.'' पण तो माणूस म्हणाला, ''आज होऊन जाऊ दे.'' ती 'हो' म्हणाली. लगेच ती दोघं पडद्यामागे गेली !

संध्याकाळ झाली. सगळ्या पार्टीतल्या बाया मेकअप करत होत्या. पान-सुपारीसाठी माणसं येत होती. जात होती. नंदाचा चिरा उतरला नव्हता. तिला सर्व पोरं विचारायची, 'दोन हजार देतो, एक हजार देतो.' मावशी चिडायची. पार्टी सुरू झाली होती. मी थिएटरमध्ये बघायला गेलो. सुशीलामावशी पेटीजवळ रडव्या चेहऱ्यानं उभी होती. वयानं चौतीस वर्षांची होती. बाया नाचत होत्या. बघे जमा झाले होते. कुणी म्हातारे, कुणी पोरं होती. काहीजण पिऊन आले होते. मध्येच कोणीतरी म्हणायचं, ''अग, चांगलं नाच. एक रुपया देतो.'' असं म्हणून हात दाबत होते. मला राग येत होता. पण काय करणार ? जमाना बदलला होता. बीडला मी पाहिलं होतं की, एक रुपयासाठी स्टेजवरून खाली बोलावतात, व मांडीवर बसवतात. इथं नुसता हात दाबत होते. माझ्या अंगातलं रक्त सळसळत होतं. कोणी शिट्या वाजवायचे. कोणी म्हणायचे, 'माझ्याबरोबर येशील का ? तुला चिवडा खाऊ घालीन.' मला असं वाटायचं की यांच्या डोक्यात दगड घालावा.

इस्लामपूरचा हंबीराव पाटील आला. तो थोडीशी प्यायला होता. बेबीमावशीला पैसे सोडत होता. त्यानं शंभर ते दोनशे रुपये सोडले. इस्लामपूरमध्ये पहिला दिवस होता. त्या दिवशी दीडशे रुपये मिळाले. हंबीराव पाटील येऊन रोज शंभर रुपये देत असे. त्यामुळे आता

त्या पार्टीला आधार मिळाला होता. त्यांना सगळेजण घाबरत असत. सुशीलामावशीला हंबीराव पाटलांनी बेबीमावशीविषयी विचारलं. मी तिथेच होतो. मी, सुशीलामावशी व बेबीमावशीनं एकत्र विचार केला. बाजूचे सर्व लोक सांगत होते. 'हंबीराव पाटलांच्या नादी लागू नका, तो गुंड आहे. बदमाश आहे.' सुशीलामावशीनं पाटलाला काहीच सांगितलं नाही. पण हंबीराव पाटील रोज येत असे. नाचगाणं बघून जात असे. बेबीमावशीशिवाय कोणालाच पैसे देत नसे.

दिन्या नावाचा अठरा वर्षांचा एक मुलगा रोज पार्टीत येत होता. अंगावरती मळलेले कपडे असायचे. मावशीला रोज नाचतेवेळेस पाच-दहा रुपये देत होता. पण हंबीराव पाटील जेव्हापासून येऊ लागले तेव्हापासून त्यानं रुपये देणं बंद केलं. रोज फुलाचा गजरा आणून देत असे. खायला आणून देत असे. मावशीला तो भावासारखा वाटत असे. पण नाचताना कसला भाऊ अन् काय ?

मी जेवण करत होतो. त्यानं एक किलो द्राक्षं आणली होती. बेबी म्हणाली, "दिन्या, कशाला इतका खर्च करतोस ? घरी आई काम करते, तिला थोडी मदत केली तर तुझं काही बिघडणार आहे का ? इथं मटका खेळतोस. तुझं वय तरी काय आहे ?" तो बेबीमावशीला म्हणाला, "तुम्हाला पाटील पाहिजे असतो. तुम्ही नाचताना पाटलाचे पैसे घेता, माझे नाही. माझ्याकडून तुम्हाला काय मिळणार ? त्या बाया तीनशे रुपयांवर झोपतात, तुम्ही स्वत:ला पतिव्रता समजता ना ! आम्हाला शंभर रुपयांत कॉलेजची पोरगी मिळते. तुमच्या मागे काय लागायचं. तुम्ही स्वत:ला शहाण्या समजता."

मावशी गप्प बसून ऐकत होती. तिला असं वाटत होतं की, याचा गळा दाबून ठार मारावं. पण इलाज नव्हता. आता हा व्यवसाय बदलत चालला होता. हे मला माहीत झालं होतं. मावशी दिन्याला म्हणाली, "मेल्या, काय म्हणतोस, तुझं डोकं ठिकाणावर आहे का ? भाड्या, तुला मी भाऊ समजत होते." मावशीच्या डोळ्यांत पाणी आलं. मी मात्र गप्प बसून ऐकत होतो.

माझं कॉलेज बुडत होतं. वीस दिवस झाले होते. यांच्या दु:खासमोर माझं दु:ख विसरलो होतो. मी आणि सुशीलामावशी इंदापूरला गेलो. माझी कॉलेजची फी व खानावळीचे पैसे द्यायचे होते. मावशी दररोज रडत होती. मला बघवत नव्हतं. असं वाटायचं की, मी कधी डॉक्टर होतोय आणि मावशीला या नरकयातनेतून मुक्त करतो ! पण काय करणार ? मी एम.बी.बी.एस. च्या फक्त पहिल्या वर्षाला होतो.

मावशीची इंदापूरला जाण्याची इच्छा होत नव्हती. असहाय्यता माणसाला काय करण्यास लावेल याचा नेम नाही. इंदापूरला नाना पाटील नावाची एक व्यक्ती होती. सुशीलामावशीची मोडर्लिबला पार्टी चालू असताना ते तिथं बघायला येत. मावशी नाचताना पैसे सोडत होते. त्यांनी मावशीला, माझ्याजवळ राहता काय म्हणून विचारलं होतं. पण

मावशीनं 'नाही' म्हणून सांगितलं होतं. आता मुलांना कसं शिकवावं हा प्रश्न पडला होता. मला मावशीनं त्यांचा पत्ता दिला. त्या बसस्टॅण्डवरती थांबल्या. मी त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो व विचारलं, "नाना पाटील कोण आहे ?" मी त्यांनाच विचारलं होतं. ते म्हणाले, "मी आहे." मी त्यांना सर्व सांगितलं. त्यांना मावशीचं नाव सांगितल्यावर आनंद झाला. ते लगेच माझ्याबरोबर स्टॅण्डवर आले. येते वेळेस त्यांनी मला विचारलं, "तू काय करतोस ?" मी सांगितलं, "एम.बी.बी.एस.च्या पहिल्या वर्षाला आहे." त्यांना विश्वास वाटत नव्हता. त्यांनी मला गळ्याला लावलं व मिठी मारली. मला म्हणाले, "मला वाटत नव्हतं, तू एवढा शिकला आहेस आणि तू डॉक्टर होतो आहेस." त्यांनी विचारलं, "तुझी आई नाचणारीण आहे का ?" मी त्यांना म्हणालो, "नाचणारीण होती. पण आता सोनपेठला माझ्या वडिलांजवळ आहे." ते म्हणाले, "तुझे वडील कोण आहेत ?" मी त्यांना सांगितलं. नंतर ते म्हणाले, "अरे वा, तुझी आई भाग्यवान आहे की, नाचणारीण असून मुलाला आपल्या वडिलाचं सुख मिळतं."

मला रडू येत होतं. कारण त्यांना काय माहीत की, माझी आई कशी जीवन जगते ? मी कसा शिकलो, हे काय त्यांना माहीत होतं ? पण माझी आई वडिलांजवळ आहे हे म्हटल्यावर मला बरं वाटलं होतं.

त्यांनी माझी पाठ थोपटली. आम्ही सर्व लॉजवर गेलो. मावशीनं त्यांच्याकडे दोन हजार रुपये मागितले. तिनं सर्व हकिकत नाना पाटलांना सांगितली. त्यांनी मावशीला पैसे दिले. त्यांनी दोन खोल्या लॉजवर बुक केल्या. मावशी व नाना पाटील एका खोलीत झोपले, व मी एका खोलीमध्ये झोपलो. मला रात्रभर झोप येत नव्हती. माझ्या डोक्यात अनेक विचार येत होते. मावशीविषयी माझ्या मनात घृणा निर्माण झाली होती.

मावशीचं तोंडपण बघावंसं वाटत नव्हतं. वाटायचं, या दोन हजार रुपयांसाठी मावशीनं असं कृत्य करावं, आणि तेही माझ्यासमोर ? त्याच क्षणी उठून मुंबईला जावं वाटत होतं. पण माझ्याकडं पैसे नव्हते. मला वाटायचं, मावशी मला पैसे देईल. सकाळ झाली, मावशी माझ्याकडे बघत नव्हती. डोळ्यांतून पाणी वाहत होतं. नाना पाटील दोन दिवसांनी अजून दोन हजार रुपये घेऊन येणार होते.

मावशीनं बसमध्ये बसल्यावर सर्व सांगितलं. "किशोर, मी त्यांच्याकडे कायम राहण्याचं ठरविलं आहे. त्यांनी भाकरी दिली तरी चालेल. पण मी आता नाचू शकत नाही. कारण या व्यवसायात काही उरलं नाही. कुणीही उठलेत आणि हा धंदा करायला लागलेत. त्यापेक्षा आता मी भांडी घाशीन, वाटेल ते करीन. माझी मुलं तुझ्यासारखी डॉक्टर करण्याची माझी इच्छा आहे. काय रे किशोर, माझी मुलं डॉक्टर होतील का रे ?"

सुशीलामावशीला समजत होतं की, हे भाऊ, बाप पैशाच्या मतलबापुरते आहेत. सुशीलामावशी फारच अडचणीत होती. बाळाजीला कपडे नव्हते. मी मेडिकलला होतो. माझी परिस्थिती त्यांना माहीत होती. मी जरी त्यांना सांगितलं नसतं की मी त्यांच्याकडे का आलोय, तरीदेखील त्यांना समजलं होतं. दोन हजार रुपयांसाठी मावशीला काय

करावं लागत नव्हतं ? सुशीलामावशीनं एक हजार रुपये आपल्या बापाला दिले. एक हजार रुपये आपल्याजवळ ठेवले. यावेळेस सुशीलामावशीचा राग आला. कोंडिबाआजोबा आणि माझ्या मामांचा मला राग नव्हता. कारण मी जे काम सुशीलामावशीसाठी करायला नको होतं ते काम केलं. दोन महिने कॉलेज बुडवत होतो. एवढं करूनही माझ्या मावशीनं मला मदत केली नाही, आणि बापाला मदत केली. बाप-भाऊ यांचा काहीच दोष नसतो. ही पैसे देते आणि ते खात बसतात. त्यांना सवय पडते.

मला काही नको. फक्त तुझ्या आईसारखं जगायचं आहे, असं सुशीलामावशी म्हणत होती. आता माझ्या आईचा खरा विजय झाला असं मला वाटत होतं. कारण आईनं बंड केलं त्यावेळी ही मावशी हसायची. तीच मावशी आता आईच्या पावलावर पाऊल टाकण्याची इच्छा दाखवते, व निश्चय करते !

आम्ही नेरल्याला गेलो. सगळे मामा होते. अंकुशमामा ओसरीवर बसून पांढरे शुभ्र इस्त्रीचे कपडे घालून तंबाखू चोळत होता. इकडे भाऊ इस्त्रीचे कपडे घालतो व तिकडे बहीण आपल्यासाठी काय काय करते याचा गंधसुद्धा याला नाही ! मी मावशीला सांगत होतो की, "तुम्ही त्यांना आयतं खाऊ घालून बैल केलं. तुम्हीच दोषी आहात. तुम्ही जर नाही पुरवलं तर ते आपोआप काम करतील." पण हे मावशीला तेव्हा पटत नव्हतं. उलट मावशीनं मामांना सांगितलं होतं, किशोर असं तुमच्याविषयी म्हणतो. मला आजोबा-आजी बोलले होते, "अरे बाबा, तुझी आई आम्हाला सोडून पळून गेली. तुझी आई आम्हांला काही देत नाही. कमीत कमी दुसऱ्यांना तरी आमच्याविषयी वाईट शिकवू नकोस."

दोन-तीन दिवस आम्ही नाना पाटलांची वाट बघितली. पण नाना पाटील काही आले नाही. मग मावशीनं मला इंदापूरला पाठवलं. पण नाना पाटील नव्हते. त्यांच्याकडे मी परत दुसऱ्या दिवशी गेलो. ते भेटले. मला हॉटेलमध्ये घेऊन गेले. व म्हणाले, "किशोर, तुला हे काम शोभत नाही. तू आता डॉक्टर होणार आहेस. तुला लाज वाटत नाही का ?" मावशीमुळे मला बोलणी खावी लागत होती. मला पाटील म्हणाले, "मला काम आहे. मी येऊ शकत नाही." मी नेरल्याला गेलो. मावशीला समजावून सांगितलं. "मला नाही वाटत, हा माणूस कायमचं सांभाळील म्हणून."

आम्ही सांगलीला शांतिनिकेतनमध्ये जयाकडे गेलो. जयाच्या सर्व मैत्रिणी मला बघायला आल्या. कारण मी मेडिकलला होतो ! मला सर्व सांगत होते. जया तुमची खूप स्तुती करते. माझा भैया डॉक्टर आहे. त्या सर्व मला विचारत होत्या, "तुम्ही अभ्यास कसा केला. आम्हाला पण सांगाल का ? आम्हाला पण तुमच्यासारखं डॉक्टर व्हायचं आहे" त्या मुलींपैकी दीपा नावाची मुलगी गावी गेली होती. ती मला भेटण्यासाठी खूपच उत्सुक होती. ती जयाला म्हणायची, "अग - तुझ्या भैयाला एक वेळ तरी बोलव."

पण मी जात नव्हतो. कारण मला एम.बी.बी.एस.च्या अभ्यासामुळे कुठेच जायला मिळत नव्हतं. जयाला खानावळीचे पैसे दिले. जया मला तिच्या गुरुजींकडे, हॉस्टेल वार्डनकडे घेऊन गेली. म्हणत होती. "हा माझा डॉक्टर भैया आहे" माझं पत्र तिच्या मॅडमनं वाचलं होतं. मला भेटण्याची तिचीपण खूप इच्छा होती. जयाचा मोठा भाऊ म्हणून मी ओळखला जात होतो. जयश्री सुशीला काळे असल्यामुळे ती जे.एस. काळे असं लिहीत असे. व माझं किशोर शांताबाई काळे असल्यामुळे मी के.एस. काळे लिहीत असे.

सांगलीहून आम्ही इस्लामपूरला गेलो. हंबीराव पाटील येत होते. बेबीमावशीचा मुलगा खूप आजारी पडला. त्याला निमोनिया झाला होता. संध्याकाळ झाली. पार्टीची वेळ झाली होती. सर्वजण मेकअप करीत होत्या. घुंगरू बांधत होत्या. बेबीमावशी मात्र विचारात होती. मुलगा धापा टाकत होता. मावशी तशीच उठली व रडत रडत नाचायला लागली. हंबीराव पाटील आले होते. ते बेबीमावशीला पैसे देत होते. ती बेभान होऊन नाचत होती. तिला वाटत होतं, माझ्या नाचण्याला बघून थिएटरमधील बघे खूष होतील. दिन्या दारात उभा होता. मावशी नाचत नाचत इशारा करीत होती. दिन्यानं बेबीमावशीला वीस रुपये टाकले. हंबीराव पाटलाला राग आला. रागात हंबीराव पाटलांनी पैशाची धार सुरू केली. पळत पळत मावशी पैसे घेत होती. पंचेचाळीस मिनिटं पार्टी चालणार होती. हंबीराव पाटील पैसे सोडत होता. दुसरीकडून पण बेबीमावशीला पैसे येत होते. पण तिला दुसऱ्यांचे रुपये घेण्यास वेळ नव्हता. नाचून नाचून बेबीमावशीला चकरा येत होत्या. घुंगरांचा मावशीच्या पायाला मार लागत होता. कारण घुंगराखालची जाड कापडाची पट्टी निसटली होती. रक्तानं पाय लाल झाले. ती नाचत होती. पण तिचं नाचण्याकडे लक्ष नव्हतं. एकीकडे पोटचा गोळा रडत होता. व इकडे बेबीमावशी पायातले घुंघरू तुटेपर्यंत नाचत होती. न नाचून काय करणार ? तिच्या मुलाला दवाखान्यात दाखवण्यासाठी पैसा पाहिजे होता. ती नाचत होती. पण तिच्या नाचण्याकडे बघे बघत नव्हते. तिच्या सौंदर्याकडे बघत होते. तिच्या कंबरेकडे बघत होते. तिच्या जवानीकडे बघत होते व म्हणत होते, "काय कवळी काकडी आहे. काय चिकना माल दिसतो. आयला पण झोपूच देत नाही. हिला उचलून घेऊन गेलं पाहिजे."

पार्टीची घंटी वाजली. नाचण्याची वेळ संपली होती. मावशी घाम पुसत पुसत खोलीमध्ये आली. हुंदके देऊन रडत होती. तिच्या पाठीमागे पार्टीतल्या दुसऱ्या बायका आल्या. बाळाला आता जास्त ताप आला होता. तिला रडता पण येत नव्हतं. हंबीराव पाटलांनी रिक्षा आणली व ते बाळाला दवाखान्यात घेऊन गेले. दोन दिवसांत बाळ चांगलं झालं. हंबीराव पाटील मदत करीतच होते. मावशीची त्यांना दया येत होती. ते प्रेमळ होते. बेबीमावशी मला म्हणाली, "किशोर, हंबीराव पाटील कसे वाटतात ? कसं का असेना बाळाला त्यांनी वाचवलं. आता नाचून तरी काय करू ? तू बघतोस ना ? कसं चाललंय

ते ? यापेक्षा मेलेलं बरं. पण असं जगणं काय कामाचं ? तुझ्या आईनं तुला डॉक्टर केलं. तुझ्या आईला असं बघायची वेळ आली नाही. तुझी आई बघ कशी जगते. खायला नाही मिळालं तरी चालेल, पण आता तुझ्या आईसारखं जगावंसं वाटतंय. मुलांना शिकवावं वाटतंय ?'' डोळ्यांत पाणी आणून बेबीमावशी सांगत होती. हंबीरराव पाटलाला 'हो' म्हणायला मी बेबीमावशीला सांगितलं. एक वर्षभर नाचून मग नाच बंद करायचा असं पाटलाला सांगितलं. बेबीमावशीला हंबीराव पाटलाकडून दिवस गेले. बेबीमावशीनं हे फक्त मला सांगितलं. व म्हणाली, ''चल, आपण डॉक्टरकडे जाऊन पाडून घेऊ'' नंतर मी हंबीराव पाटलांना सांगितलं. त्यांना आनंद झाला. म्हणाले, ''माझ्या लेकराची शपथ, मी तुला दगा देणार नाही.'' मग मावशीनं गर्भ वाढू दिला.

सुशीलामावशीकडे कोल्हापूरचे एक गुरुजी येत होते. त्यांचं वय चाळीस होतं. ते पहिली ते सातवी या वर्गांना शिकवत होते. ते मावशीच्या शरीरावर प्रेम करीत नव्हते, तर मावशीच्या स्वभावावर. त्यांना लग्नाची एक बायको होती. तीही मास्तरीण होती. गुरुजी रोज पार्टीला येऊ लागले. सुशीलामावशीला पैसे सोडत.

हंबीराव रोज येत होते. सुपारी खात होते. आता पार्टी चांगली चालली होती. पण नीता, वैजयंतामावशी व नंदा या तिघी पार्टी सोडून गेल्या. आता चौघीच पार्टीत राहिल्या होत्या. मग नाचायला पोरी नव्हत्या. मी दोन पोरी जामखेडहून आणल्या– सुमिता व अनिता. त्यांना दोन दोन हजार उचली दिल्या. हंबीराव पाटलांनी दोन हजार व गुरुजींनी दोन हजार दिले. मला येऊन दोन महिने झाले होते. परीक्षा जवळ आली होती. शिकायला पैसा नव्हता. काय करावं हा प्रश्न पडला होता. पण मावशीला माझी गरिबी सांगितली नाही. तसाच मुंबईला आलो. तो मला स्कॉलरशिप मिळाली म्हणून.

परीक्षा दिली व मला परत मावशीचं पत्र आलं की 'तू लवकरात लवकर ये.' मी इस्लामपूरला गेलो. मी हंबीराव पाटलांना सांगितलं, गुरुजींना पण सांगितलं, 'पार्टी मोडा व त्यांचं नाचगाणं बंद करा.' आता बेबीमावशी हंबीराव पाटलाकडे सुखानं संसार करीत आहे. त्यांच्यापासून बेबीमावशीला एक मुलगा झाला. आता हंबीराव पाटील इस्लामपूरमध्ये बेबीमावशीच्या दोघा मुलांना आपल्या मुलांसारखं सांभाळतात. व इकडे सुशीलामावशीला गुरुजी कोल्हापूरात आपल्या बायकोसारखं सांभाळतात. सुशीलामावशीची तिन्ही मुलं–जया, बालाजी व अनिल–कोल्हापूरला शिकत आहेत. आता दोघंही मला म्हणतात, ''किशोर, तुझ्यामुळे या बयांच्या डोक्यात हे चांगले विचार आले.''

शोभामावशी ही माझी चुलत मावशी होती. रूपानं देखणी, रंग गोरापान, घारे डोळे, नाक सरळ, अंगानं सडपातळ. आई परळीला नाचत असताना ती आईच्या पार्टीत नाचत असे. तिला एखादा कुणी आवडला की, त्याच्याशी ती संबंध ठेवत असे. त्यानं पैसे दिले किंवा न दिले तरी, ती त्या व्यक्तीला सोडायची नाही. घरी आई–वडिलांना पैसे पाठवत

नसे. घरचे तिच्यावर रागावत, तिला मारत, घराच्या बाहेर जा म्हणत. तिला दोन मुली व एक मुलगा झाला. एक मुलगी तर हेमामालिनीपेक्षाही देखणी आहे. तिचं माजलगावच्या एका व्यक्तीशी प्रेमप्रकरण होतं. प्रेम म्हटलं की, कोल्हाट्याच्या बायांना काटे असतात. त्यांना कुणाशी प्रेम करण्याचा अधिकार नसतो. फक्त नाचणं व पैसे कमावणं आणि आई, वडील, भाऊ यांना जगवणं, एवढंच त्यांच्या नशिबी असतं. स्वत:साठी तिला जगण्याचा अधिकार नसतो. जी कोल्हाट्याची बाई आई-वडिलांना जास्त पैसा देईल ती सर्वात चांगली अशी समजतात. म्हातारा जवळ केला तरी चालेल पण पैसा पाहिजे असतो.

माजलगावचा माणूस शोभामावशीला पैसे न देता चार वर्ष राहिला होता, संबंध ठेवत होता. पण वय झालं होतं. शोभामावशी ३३ वर्षांची होती. नंतर तो फुकटसुद्धा संबंध ठेवण्यास तयार नव्हता. ती बिचारी आठ दिवसांनी माजलगावला जायची. नंतर नंतर तिचं माजलगावला जाणं बंद झालं. तिचे आई-वडील तिला खूप बोलायचे. ती परत नाचायला गेली, पण आता तिला कोणी विचारत नव्हतं. बिचारीचे खूप हाल झाले. तिला दीड वर्षांची मुलगी होती. तिला घेऊन ती फिरायची. तिच्या अंगावरचं सगळं तेज निघून गेलं होतं. त्या माजलगावच्या माणसासाठी ती झुरत होती. विचार करून करून तिचं डोकं पागल झालं होतं. एके दिवशी बसल्या बसल्याच झटके देऊ लागली व मरून गेली. आजोबा, आजी आणि तिच्या बहिणी तिच्या मुलांचं पालनपोषण करतात. जर त्यांना आजोबा-आजी नसते, मावश्या नसत्या, तर तिची मुलं रस्त्यानं भीक मागत फिरून मेली असती. समाजानं त्यांना जगू दिलं नसतं. आणि जगली असती तरी त्या मुलांना समाजानं गुन्हेगार केलं असतं.

मी एकदा दिलीप वडकर यांच्या घरी गेलो होतो. त्या काळी माझ्याकडे पैसे नव्हते. सर्वांकडे पैसे मागून थकलो होतो. शेवटचा प्रयत्न म्हणून मी त्यांच्याकडं गेलो. तिथे त्यांच्या बायकोचा कोणीतरी नातेवाईक-गिरीश नावाचा मुलगा- बसला होता. त्यानं दिलीपला विचारले, "हे कोण आहेत ?" त्यावर त्यांनी ओळख करून दिली. "हे डॉक्टर किशोर काळे आहेत." मला म्हणाले, "हा बायकोचा भाऊ आहे. तो इंजिनीयरिंगला आहे." दुसऱ्या दिवशी माझी व त्याची भेट झाली. परभणीला त्याच्याच कॉलेजमध्ये माझा मित्र, चारुदत्त देशमुख होता. माझ्या मित्रानं विचारलं, दिलीपभाऊजी तुमचे कोण लागतात ? मी म्हणालो. "भाऊ." तो म्हणाला "कसे काय ?" मी त्याला म्हणालो, "मी आजीच्या ओटीत गेलो म्हणून माझं आडनाव काळे आहे ?" मी असं सांगून टाकलं. दुसऱ्या वेळेस तो भेटला, पण न बोलता निघून गेला. एकदा दिलीपदादानं मला पत्र पाठवलं. माझा मित्र कापसे याच्या आईला डॉक्टरांना दाखवायचं आहे, आम्ही कधी येऊ ? पण त्या पत्रावर तुझा भाऊ वगैरे काहीपण लिहिलं नव्हतं. एके दिवशी दिलीपदादा

व कापसे आले. गाववाला म्हणून ओळख करून दिली. मग मी कापसे यांच्या आईला दाखवलं. अॅडमिट केलं. त्यांना मी सर्व माहिती खरी सांगितली. कारण मला परत यांच्याशी भेटताना लाज वाटू नये.

नगरपालिकेच्या निवडणुका आल्या होत्या. आता वॉर्डमध्ये नाव टाकताना 'एका कुटुंबामध्ये किती व्यक्ती आहेत' ते लिहावं लागतं. तर आमच्या नावांची यादी अशी :

कृष्णराव भांगोजीअप्पा वडकर
सुरेंद्र कृष्णराव वडकर
राधाबाई कृष्णराव वडकर
शांताबाई कृष्णराव वडकर
किशोर शांताबाई काळे
दीपक कोंडिबा काळे

रेशनकार्डावर पण हेच नाव. आई म्हणत असे, लवकरात लवकर जमीन आपल्या नावावर करावी. नाना म्हणत असत, ''मी आता मरणार आहे का ?'' दीपक म्हणत असे, ''मरण्याचा प्रश्न नाही. आम्ही दोघे भाऊ आहोत हे सिद्ध होऊ शकत नाही व ही आमची आई आहे हे पण सिद्ध होत नाही. आम्ही कागदपत्रानं वेगवेगळे ओळखले जातो.'' दीपक नेहमी यावरून भांडत असे.

सहा महिन्यांचा असताना दीपक नानांकडेच होता. पण नानांनी दीपकचं नाव दीपक कोंडिबा काळे असं टाकलं. कारण पुढे चालून तो हक्कदार होऊ नये म्हणून ! कोंडिबा हे आजोबांचं नाव. आणि आता माझ्यापाठीमागे त्यांचं नाव लावण्यासाठी त्यांचे प्रयत्न आहेत. पण मी नाव बदलण्यासाठी तयार नाही. कारण नावावर किंवा जातीवर किंवा कोणाच्या पोटी जन्म घेतला याच्यावर आपलं शौर्य अवलंबून नसतं, तर आपल्या कृतीवर अवलंबून असतं. अशी माझी धारणा आहे.

मला कॉलेजच्या होस्टेलवर खूप त्रास होई. मी कोणालाच प्रतिकार करीत नव्हतो. कारण मी रखेलीचा मुलगा. मला लहानपणापासून भित्रा बनवलं होतं. मी सोनपेठला गेलो की, होस्टेलची मुलं माझ्या रूमच्या खिडकीची काच फोडत असत. लाथा मारून दार तोडत असत. मी दोन वेळेस पी.डब्ल्यू.डी. मध्ये जाऊन काचा बसवून घेतल्या. ते म्हणाले, ''का हो रूमच्या काचा कशा काय फुटतात ?'' मी म्हणायचो, ''मुलं मुद्दामून फोडतात.'' ते म्हणायचे, ''डीनला सांगा.'' पण सांगून काय उपयोग ? रात्री मी झोपलो की एक-दोन वाजता बाहेरून दार वाजवून मुलं पळून जात असत. मी एके दिवशी झोपलोच नाही. दार वाजल्याबरोबर मी दार उघडलं. हरीश राठोडला पळून जाताना बघितलं.

परीक्षा दोन दिवसांवर होती, दुसऱ्या वर्षाची. आणि माझ्या पॅथोलॉजीच्या नोट्स चोरीस गेल्या. मला परत सर्व पुस्तकं वाचून परीक्षा द्यावी लागली. तिसऱ्या वर्षी मी नवीन पाचशे रुपयांचं पुस्तक घेतलं. दुसऱ्या दिवशी पुस्तक गायब, कारण मी त्या दिवशी कुलूप लावून चावी खिडकीत ठेवली होती. कारण परेलचा माझा मित्र, रमण झंळे हा येणार होता. त्या दिवशी नाना आले. मी, नाना, डॉक्टर वाघमारे व प्रसाद पिक्चरला गेलो होतो. पिक्चर बघून आम्ही आलो तर खिडकीत चावीच नव्हती. नानांना त्या दिवशी सोनपेठला जायचं होतं. दोन तास उरले होते. मग नानांनी व मी कुलूप तोडलं. आतमध्ये येऊन बघतो तर नवीन पुस्तक चोरीला गेलं होतं. मी नानांना सांगितलं नाही.

अनेक गोष्टींना मला तोंड द्यावं लागत होतं. माझे मित्र म्हणायचे, "बोल्ड हो, तू जर कुणाला प्रतिकार केला नाहीस तर पोरं तुला त्रास देतील." पण प्रतिकार कसा करणार ? लहानपणीच माझी प्रतिकारशक्ती समाजानं हिसकावून घेतली होती. माझ्या मनालाच मी भीत होतो की, आपण एक नाचणारणीचा मुलगा आहोत, मी जर कोणाशी भांडण केलं तर चार माणसांत ते माझा अपमान करतील. माझ्या रूमच्या समोरच्या खोलीत माझ्या वर्गातला रत्नाकर शेळके असे. तो एके दिवशी माझ्या रूमवर आला व माझ्याकडे बघून म्हणाला, "कारे किशोर, कसला विचार करतोस ? तू गप्प का बसतो ? अत्याचार सहन करून का घेतो, तुझ्या काय अडचणी आहेत ?"

त्याला मी म्हणालो, "माझं जीवन फार दुःखाचं आहे. मी एका बिकट परिस्थितीतून बाहेर येत आहे. अनेक गोष्टींना मला तोंड द्यावं लागत आहे." रत्नाकर म्हणाला, "अरे किशोर, मला तुझ्याविषयी सगळं माहीत आहे. हे बघ, कित्येक जणांना बापाचा पत्ता नसतो. आणि तुझा काय दोष, त्या जातीत जन्म घेण्याचा. मागच्या झालेल्या गोष्टींना विसरून जा. आणि असं घाबरून वागत जाऊ नको, नाहीतर तुला होस्टेलवर जगू देणार नाहीत."

माझी परीक्षा दोन दिवसांवर आली होती. रात्रीचे दीड वाजले होते. मी नुकताच अभ्यास करून झोपलो होतो. अचानक दारावर धाडकन आवाज आला. कवाडावर लाथ मारून कुणीतरी पळालं. मी झोपेतच दचकलो व पटकन उठून दार उघडलं तर हरीश राठोड दारू पिऊन डुलत-पळत होता. तो दारू प्यायलेला होता म्हणून मी गप्प बसलो. सकाळी मी रत्नाकरला, प्रमोदला, बोर्डेला सर्व सांगितलं. इतक्यात रत्नाकरच्या रूमवर हरीश राठोड आला. मी त्याला म्हणालो, "तुला रात्री दोन वाजता काय पाहिजे असतं ? आणि तुला काही पाहिजे असेल तर दारावर लाथ मारून पळून का जातोस ? तू जर आता माझी कडी वाजवली तर बघ. तुझं हाडसुद्धा दिसू देणार नाही. माझी परीक्षा दोन दिवसांवर आहे, तुला माहीत आहे, तरीपण तू मला त्रास देतोस. अरे, लोकांचं चांगलं व्हावं या भावना असतात. चांगलं करता आलं नाही तर निदान वाईट तरी करू नये. आणि काय रे, दुसरं वर्ष एम.बी.बी.एस.चं कुणामुळे पास झालास ? मी निस्वार्थ मनानं परीक्षेत तुला मदत केली." त्यानं माफी मागितली व यापुढे असं करणार नाही म्हणून

सांगितलं. म्हणाला, "मला काय माहीत तुला एवढं वाईट वाटेल ? मी तुझी मजा करत होतो."

दुसऱ्या दिवशी रात्री दीड वाजता दाराची कडी मोठ्यानं तीन वेळेस वाजवून पळून गेला. मी कडी काढली व दार उघडून बघितलं, तर रत्नाकरची खोली उघडीच होती. खोलीसमोर भगत उभा होता. मला दारात उभा राहिलेला त्यानं बघितलं व म्हणाला, "या इतक्या रात्रीचं कोणाला त्रास देतोस का ?" लगेच हरीश राठोड रत्नाकरच्या रूममधून बाहेर आला. मला बघितल्याबरोबर माझ्याकडे पळत आला व म्हणाला, "काळे, मी दारू प्यायलो आहे, पण आई शपथ, तुझ्या दरवाज्याची कडी मी वाजवली नाही. दुसऱ्यानंच कोणीतरी वाजवली. कारण आपल्या दोघांमध्ये भांडण व्हावं अशी त्यांची इच्छा आहे."

मी लगेच दरवाजा बंद केला व झोपलो. कारण दुसऱ्या दिवशी माझी परीक्षा होती. परीक्षा झाली. मला आणि राम पवारला सर्वात जास्त मार्कस् मिळाले. मी वैतागून घरी जाण्याचं ठरवलं. अरुण, कल्याण, प्रसाद रोकडे, रमण इंगळे सर्वजण म्हणाले, "पळून जाण्यापेक्षा त्यांच्याशी भांडण करून गेलेलं बरं. तू जर पळून गेलास तर यापुढे तुला होस्टेलमध्ये राहू देणार नाहीत."

मी निश्चय केला, प्रतिकार करायचा. त्यानंतर मला कोणीच त्रास दिला नाही.

मुंबईमध्ये मेडिकल कॉलेजला मी कसं भागविणार होतो ? एम.बी.बी.एस. पूर्ण करायचं तर होतंच. मोठ्या अडचणीत सापडलो होतो. पैसे कोठून आणायचे ? मला कळून चुकलं होतं की नाना पैसे देऊ शकणार नाहीत. कारण मटक्यानं त्यांना बेड्या घातल्या होत्या व घर बांधून ठेवलं होतं. दुसरीकडे हालचालसुद्धा करता येत नव्हती, एवढं जखडून टाकलं होतं. वाटत होतं, घरी जाऊन भांडण करावं. मला पैसा द्या म्हणून हट्ट करावा. पण माझ्या या हट्टामुळे आईचं व नानांचं भांडण झालं असतं. त्यांनी आईला मारलं असतं. माझ्यामुळे दोघांत भांडण नको, म्हणून मी सोनपेठला गेलो नाही. दोघांच्या ताटातुटी झाल्या असत्या तर मी त्याला जबाबदार राहिलो असतो. आईच्या वीस वर्षांच्या तपश्चर्येचा भंग झाला असता व त्याचं पाप मला लागलं असतं. म्हणून मी घाबरून गेलो होतो. गप्प बसून त्रास सहन करीत होतो. आई नानावर रागावतील असा मी कधीच वागत नसे. रडणं, अपमान, लाचारी हे माझ्या पाचवीला पूजलं होतं. जोपर्यंत मी मरत नाही तोपर्यंत हे माझा पाठलाग सोडणार नाहीत असं वाटत होतं. मला माझ्या रामटेके आणि चिखलकर नावाच्या मित्रांनी ओळखीच्या डॉक्टरकडे नोकरी दिली. कसातरी मी त्याच्यावर भागवत होतो. रात्री १० ते सकाळच्या ७.३० वाजेपर्यंत राहावं लागत असे. जागरणानं डोळे लाल होत. दिवसा कॉलेज करताना मला झोप येत असे. म्हणून कॉलेज बुडवावं लागत असे. मला ही नोकरी परवडणार नाही हे कळून चुकलं. पण काय करणार ? काहीच नसल्यापेक्षा बरं होतं.

एके दिवशी माझ्या डोक्यात विचार आला. मुंबईला स्वस्त कपडे मिळतात तर ते घेऊन, व गावाकडे दोन–तीन दिवस जाऊन–विकून दुप्पट नफा मिळवावा. पण भांडवल तरी कोठून आणणार ? मी माझ्या भाऊजींकडे गेलो. ते माझ्या सख्ख्या मावस बहिणीचे पती होते. ही बहीण लग्न केलेल्या करमाळ्याच्या शालनमावशीची मुलगी. तिचं लग्न आमच्या जातीतल्या बाबासाहेब यांच्याबरोबर झालं. भाऊजी मात्र मनानं चांदण्यासारखे निर्मळ आहेत. म्हणून मी त्यांच्याकडे पाचशे रुपये मागितले. त्यांनी लगेच दिले. मोठा आधार झाला. देव प्रसन्न झाल्यासारखं वाटलं. माझ्याकडे तीनशे रुपये होते. सातशे रुपयांचे कॉलेजच्या मुलांचे रेडीमेड शर्ट घेतले व अंबाजोगाईला गेलो. तिथं घाबरत घाबरत मी शर्ट विकले. उरलेले परळीला विकले. कारण अंबाजोगाईच्या योगेश्वरी कॉलेजात लहान भाऊ, दीपक शिकत होता. अशोक मोडवे हा दीपकचा मित्र होता. त्याच्याशी माझी मैत्री झाली. दीपक आणि तो बारावी सायन्सला होते. नंतर एक महिन्यानं अशोकनं सायन्स सोडून आर्टस् घेतलं होतं. अशोकचा स्वभाव मला फार आवडला. त्याला मी माझी सर्व परिस्थिती सांगितली. त्या बिचाऱ्याच्या डोळ्याला पाणी आलं. तो म्हणाला, "तू फक्त शर्ट पीस आणून देत जा. मी कॉलेजला विकत जाईन." मला मोठा आधार वाटला. पण मी अशोकला सांगितलं होतं की दीपकला हे काहीच सांगू नको. कारण त्याला माहीत नाही की, नाना मला पैसे पाठवत नाहीत. कारण तो रागीट स्वभावाचा आहे. नाना पण त्याच्या स्वभावाला घाबरत होते. आणि मी नानांना सांगितलं होतं की एकवेळ मला पैसे नाही पुरवले तरी चालेल, पण दीपकला कमी पडू देऊ नका. त्यामुळे दीपकला उन्हाळा म्हणजे काय आणि पावसाळा म्हणजे काय, माहीत नव्हतं. आणि त्याला जर कळलं असतं की मला नाना पैसे देत नाहीत तर घरात नक्कीच भांडण झालं असतं व आईला त्रास झाला असता.

अशोकनं त्याला काहीच सांगितलं नाही. असाच मी एके दिवशी शर्टपीस घेऊन अंबाजोगाईला अशोककडे गेलो. दीपकच्या रूमवर गेलो नाही. कारण माझ्याकडे शर्टपीस होते. मला धंद्यात चांगले पैसे मिळत होते. काही शर्टपीस विकले. अशोकच्या रूमवर राहिलेले शर्टपीस घेऊन जात असे. एका मुलानं दीपकला जाऊन सांगितलं, "लेका, तुझ्या भावानं चांगले शर्टपीस आणले आहेत." तो अशोकच्या रूमवर आला. त्या बिचाऱ्याला काय माहीत की, दीपकला माहीत नाही म्हणून. त्यानं सहज जाऊन सांगितलं. दीपक रागातच अशोकच्या रूमवर आला. रागानं डोळे लाल झाले होते. रूममध्ये येताच त्यानं फायरिंग सुरू केली. तो म्हणाला, "मला वाटलं नव्हतं की, तू इतक्या खालच्या पातळीचा असशील, इतका हलकट असशील. तू भाऊ म्हणवून घेण्याच्या पण लायकीचा नाहीस. तू मला भाऊ म्हणायचं नाही. तुझ्यासाठी मी मेलो व माझ्यासाठी तू मेला."

मी त्याला काहीच बोललो नाही. कारण परिस्थितीनं माझ्या तोंडाला बांधून टाकलं होतं. ते सांगितलं असतं तर माझ्या घराचा सत्यानाश झाला असता. माझ्या आईला तिच्या नानांपासून मुकावं लागलं असतं. कारण दीपक आधीच नानांवर खूप रागावला होता.

अजूनही तो त्यांच्याशी जास्त बोलत नाही.

मग दीपक अशोकलाही बोलला. ''तूपण माझ्याशी बोलू नको. तुला सांगायला काय झालं होतं की, हा असं हलकट काम करतो म्हणून ?'' अशोक काहीतरी बोलणार तितक्यात मी डोळे वटारून त्याच्याकडे बघितलं. तो गप्प बसला. दीपक रागानं निघून गेला. मला मात्र काय करावं आणि कसं करावं हे कळत नव्हतं. माझ्यापेक्षा लहान असून दीपक मला रागानं बोलतो व माझा अपमान करतो, असे विचार माझ्या डोक्यात फिरत होते. माझं डोकं स्तब्ध झालं होतं. अशोक माझं सांत्वन करीत होता. म्हणत होता, ''किशोर, तुझ्यासारखा मला भाऊ असता तर मी त्याची पूजा केली असती.'' माझं मन भरून आलं होतं.

एके दिवशी अरुण माझ्या हॉस्टेलला आला. त्यानं माझी गरिबी, मी न सांगता, ओळखली होती. जाताना माझ्या हातात त्यानं पन्नास रुपये ठेवले. अरुणला बघितलं की, जिजीनं सांगितलेली कहाणी माझ्यासमोर चटकन येते. कस्तुरमावशी ही कोल्हाटी समाजाची. ती मास्तरीण होती. परंतु तिच्या नातेवाईकांनी कस्तुरमावशीला मास्तरीण होऊ न देता गावोगावी फिरणारी नाचणारीण बनवली.

बबितामावशी ही कस्तुरमावशीची बहीण. हिला देखील नाचण्यास तयार केलं. कोल्हाटी समाजात स्त्री मास्तरीण होऊ शकते, ही किती अभिमानाची गोष्ट आहे ! पण त्यांना अभिमान कसा वाटेल ? पैशाच्या लालचीनं, आयतं खाण्याच्या सवयीनं त्यांच्या अभिमानाचा खून केलेला असतो. कस्तुरमावशी पण मास्तरीण होती. तिचं लग्न झालं असतं आणि ती नवऱ्याच्या घरी गेल्यानंतर त्याच्या नातेवाईकांना पैसा मिळाला नसता, आयतं खाण्यास मिळालं नसतं. म्हणून दोघीही बहिणींना नाचण्यासाठी मजबूर करून त्यांच्या स्वप्नांना पुसून टाकलं. जणू काही मातीचं घरटं सहजासहजी मोडावं तसंच कस्तुरमावशीचं जीवन उध्वस्त केलं होतं.

नेरले गावची मास्तरीण गावोगावी नाचत फिरत होती. नेरल्यातल्या मराठा-पाटलांच्या, महार-मांगांच्या लोकांनादेखील हळहळ वाटू लागली. लाज वाटू लागली. गावची मास्तरीण नाचते, म्हणजे गावच्या लोकांना देखील वाटतं होतं की, गावाच्या इज्जतीला धक्का लागला ! गावची इज्जत गावोगावी नाचत आहे. या कोल्हाट्यांना मात्र आनंद वाटत होता. मनातल्या मनात दिवाळीच्या फटाकड्या वाजत होत्या. कारण त्यांच्या इज्जतीची आत्महत्या झालेली होती. कस्तुरमावशीनं नाचगाणं सोडून ती पठाण नावाच्या माणसाकडे परांड्याला राहू लागली. नेरलेगावची मास्तरीण आता रखेल म्हणून परांड्याला राहू लागली. तिला मुलगा झाला. त्याचं नाव अरुण ठेवलं. अरुणचा जन्म झाल्यानंतर पठाण कस्तुरमावशीला त्रास देऊ लागले, मारू लागले. कस्तुरमावशीनं पैसे मागितले की, पठाण दारू पिऊन कस्तुरमावशीला घराच्याबाहेर हाकलायचे आणि तिच्या नातेवाईकांकडे ती

आली तर तेदेखील तिला थारा देत नसत. म्हणायचे, ''पैसे आण.'' अडकित्यात सुपारी अडकल्यासारखी कस्तुरमावशीची गत झाली होती.

एके दिवशी नेरल्याला बातमी आली की, कस्तुरमावशी जळून मेली ! अजूनदेखील कळलं नाही की, कस्तुरमावशी स्वत:हून जळून मेली की, कोणी दुसऱ्यांनी तिला जाळून मारलं ? अरुण त्यावेळी एक वर्षाचा होता. अरुणची मावशी, बबितामावशी तमाशात नाचत होती. बबितामावशीनं अरुणचा सांभाळ केला. बबितामावशीचं वय झालं. नंतर ती घरीच राहिली. दारू काढून विकत होती. कोंबड्या पाळायची, अंडी विकायची, आणि स्वत:चं घर सांभाळून अरुणचं शिक्षण करीत होती. अरुण फार इमानदार होता. तो दरवर्षी पास होत गेला. करमाळ्याला बोर्डिंगमध्ये राहात होता. भावकीतल्या इतर श्रीमंत मामांचे कपडे तो घालत असे. सर्जेरावमामा हे त्याला कधीकधी पैसे देत. तो आपले कपडे अरुणला देत असे. कारण सर्जेरावमामाच्या इतर बहिणीही नाचत होत्या.

अरुण दहावी पास झाला. बी.ए. पास झाला. त्याला नोकरी लागली. बबितामावशीची मुलगी माझी पहिली ते सहावीपर्यंतची क्लासमेट. तिचं लग्न झालं. अरुणचं लग्न झालं. आता बबितामावशीला आपली आई म्हणून अरुण सांभाळतो. बबितामावशीचं दारू काढणं, कोंबड्या पाळणं अरुणनं बंद केलं.

मी नेरल्याला गेलो. जिजी झोपली होती. तिनं फाटकी गोधडी पांघरली होती. तिला मी आवाज दिला, ''जिजी.'' माझा आवाज ऐकताच ती खडबडून उठली. जणू काही तिच्या अंगात एक शक्ती आली. मला बघताच ती मोठ्यानं ओरडली, ''माझ्या बाळा, आलास कारे माझ्या गारीवर माती ढकलायला ?'' मी जवळ जाताच मोठमोठ्यानं ओरडून ती माझ्या पाया पडायला लागली. मी झटकन बाजूला सरकलो. तिला रडणं आवरत नव्हतं. ती म्हणत होती, ''बाबा, मला इथून घेऊन जा. मला दवाखान्यात दाखव. मी बरी होईन. ही माणसं मला मारून टाकतील.''

जिजी अशी दिसत होती की, किती दिवसांची ती उपाशी आहे. पोट खपाटीला गेलं होतं. माझ्या डोक्यावरून हात फिरवत होती. मी तिला आवडणारा शेवचिवडा घेऊन गेलो होतो. तो तिच्यासमोर ठेवताच ती मला खाऊ घालू लागली. अजूनही तिची मला खाऊ घालण्याची सवय सुटली नव्हती. तिनं मला शेवचिवडा खाऊ घातल्याबरोबर मला लहानपणची आठवण झाली. मग तिनं खाण्यास सुरुवात केली. खूप दिवसांनंतर खायला मिळाल्यासारखी ती खात होती. तिला संडासला लागली. ती हळूच अंगावरचं पांघरूण काढून खरडत खरडत कोपीच्या बाजूला जाऊ लागली. तिला खरडत जाताना बघून माझ्या पोटात गोळा आला.

जिजीच्या डोक्याला तेल नव्हतं. किती दिवसांत तिनं आंघोळ केली नव्हती, कोणाला माहीत ? मी ठरवलं, तिला जे. जे. हॉस्पिटलला मुंबईला घेऊन जायचं.

जिजीच्या नावावर पंचवीस एकर जमीन असूनसुध्दा तिला तिचा भाऊ चांगला वागवत नव्हता. तिला लकवा झाला होता. तिला कोणी दवाखान्यात दाखवत नाही. तिला परसावर ठेवलं आहे. मेली का जिवंत आहे हेसुध्दा बघायला कोणी तयार नसतात. कुत्रीला भाकरी टाकतात तसं तिला जेवण देतात. एवढी मोठी जमीन, घर असून तिच्यासाठी काहीच उपयोगाचं नव्हतं. पाटलाच्या नंतर तिनं भावासाठी जीवन खर्च केलं. मग एवढं असूनसुध्दा तिचे एवढे हाल ? मग आपल्या आईनं तर एवढं काहीच दिलं नाही. आपल्या आईची पण अशीच अवस्था होईल म्हणून मला भीती वाटली.

जिजी वेड्यासारखे चाळे करते. तिच्या भावाला ती शाप देत असते. मी तिला जे. जे. हॉस्पिटलला मुंबईला घेऊन जाऊ लागलो. रिझर्वेशनसुध्दा केलं होतं. तयारी झाली होती. आता जिजी निघणार इतक्यात घरातल्या लोकांनी माझ्यावर आरोप केला की, ''तिची जमीन तुझ्या नावावर तू करून घेणार आहेस व तू तुझ्या वडिलांना तिकडे बोलावलं आहेस. तुम्हा लोकांचा डाव ओळखला आहे.'' आणि त्यांनी जिजीच्या कानात काहीतरी सांगितलं. मग ती पण ''मला कोल्हापूरला घेऊन जा'' असं भावाला म्हणू लागली. म्हणजे त्यानं एवढे हाल करूनसुध्दा अखेर जिजीनं भावाचीच कड घेतली !

मी सोनपेठला गेलो. नानांना मी रडून सांगत होतो, ''माझी स्कॉलरशिप तुम्ही खर्च केली. एक-दोन महिन्यानं देतो म्हणालात. माझं कॉलेज बुडतं आहे. महिना-सव्वा महिना झाला मला येऊन. तुम्ही कसलेच प्रयत्न करीत नाही.'' नाना म्हणाले, ''शेतावर मोटर बसविण्याकरिता लोन काढलं असतं, त्यातले थोडेफार पैसे दिले असते. आणि मोटार बसवली की, मग शेतात पीक निघेल. पण काय करणार त्याच शेतावर खतासाठी अडीच हजार कर्ज काढलं आहे. ते कर्ज फेडलं की आपल्याला लोन मिळेल.

दीड महिना झाला होता. कॉलेज बुडत होतं. म्हणून मी पैशांची वाट पाहात होतो. मी हैराण झालो होतो. नानांच्या या वागण्यामुळे खूप त्रास होत होता. आईपण सहन करीत होती. अखेर ते आईचं कुंकू होतं. मी व आईनं रात्रभर विचार केला. जेवढं दोघांना रडता येत होतं तेवढं आम्ही दोघं रडलो व नाना पलंगावरती कुंभकर्णासारखे झोपले होते ! मी आईला म्हणत होतो, ''बाई, तुला आधी कळलं नव्हतं का या माणसाचा स्वभाव कसा आहे ते ! तू इथं कशाला आलीस ? आता आलीस तर सहन कर.''

मग आम्ही गंगाखेडला जयस्वालांच्याकडे गेलो. तिथे माझी चुलत उषामावशी पहिल्यापासून त्यांच्याजवळ राहात असे. गंगाखेडच्या बसस्टॅण्डच्या पाठीमागेच त्यांचं दारूचं दुकान आहे. आम्हाला माहीत होतं, माझ्या शिक्षणाला जयस्वालकाका पैसे देतील. त्या मावशीचं नाव होतं उषा. त्यांनी माझ्या शिक्षणाला तीन हजार रुपये दिले. आम्ही त्यांना म्हणालो, ''एक महिन्यात कर्ज मंजूर झाल्यावर परत देतो.'' नानांना आम्ही अडीच हजार रुपये दिले आणि मी मुंबईला आलो.

उषामावशीची मुंबईला दोन पत्रं गंगाखेडहून आली. "एक महिन्यात देतो म्हणालात, अजून पैसे दिले नाहीत." इकडे तर मला एकवेळेस जेवण घ्यावं लागत असे, एवढ्या अडचणीत सापडलो होतो. राहिलेल्या दुसऱ्या विषयाची परीक्षा जवळ आली होती. लोन अखेर मिळालंच नाही. कारण ते आमदार सुरेश वरपूडकरांच्या हातात होतं. खा. रामराव लोणीकरांनी त्यांना सांगूनसुध्दा त्यांनी लोन मंजूर केलं नाही. सोनपेठच्या नगराध्यक्षपदी निवड करण्याचे दिवस होते. कारण वडील नगरपालिकेचे मेंबर होते.

नाना आम्हाला जगूही देत नव्हते व मरूही देत नव्हते. त्या आमदाराला काय माहीत माझी अडचण ? गावातील लोक नानांचे विरोधक आमदार सुरेश वरपुडकरांचे कान भरत होते. मला मेडिकल सोडून द्यावं लागतं की, काय करावं असं वाटत होतं. कारण मुंबईला मी अपमानित जीवन जगत होतो. मी मेडिकल सोडून देण्याचं ठरविलं. कारण फक्त वीस दिवसांवर परीक्षा आली होती. मी पास होऊ शकत नाही हे मला माहीत होतं. तितक्यात स्कॉलरशिपची लिस्ट आली. माझं नाव त्यात होतं. मी पडता पडता वाचल्यासारखं झालं. स्कॉलरशिप मिळेपर्यंत मला प्रसादनं पैसे पुरवले. प्रसाद हा जवळचा मित्र. तो आणि मी एकाच खोलीमध्ये राहात होतो. आणि खोलीवरच M.B.B.S. च्या पहिल्या वर्षापासून हातानं स्वयंपाक करून खात होतो. कारण बाहेर जेवायला मला परवडत नव्हतं. प्रसादचे वडील बाबुराव रोकडे हे मिलिंद कॉलेज – औरंगाबाद इथले जीवशास्त्र विभागाचे मुख्य होते. त्यामुळे प्रसादला पैशाची अडचण नसायची. नेहेमी माझ्या अडचणीला प्रसाद मदत करायचा. रात्र आणि दिवस अभ्यास करून M.B.B.S. चं दुसरं वर्ष पास झालो.

दुसऱ्या वर्षाची परीक्षा पास झाल्याबरोबर मला साडेचार हजार रुपये स्कॉलरशिप मिळाली. मी बँकेत रुपये ठेवले. प्रसादला देखील स्कॉलरशिप मिळाली. आता माझी चिंता कमी झाली होती. एक वर्षाची अडचण दूर झाली होती.

लगेच पाच–सहा दिवसांनी दीपकचं पत्र आलं की, बाई (आई) खूप आजारी आहे. तू लवकर सोनपेठला ये. मी सोनपेठला गेलो. आई खूप आजारी होती. एक वर्षापासून दंडामध्ये इंजेक्शनची गाठ होती. त्या गाठीत पू झालेला होता. परंतु नानांनी आईला दवाखान्यात दाखवलं नव्हतं. आईचं काय दुखतं आहे हे सुध्दा बघायला नानांना वेळ नव्हता. आईला अंबाजोगाईला घेऊन गेलो. ऑपरेशन करावं लागणार होतं. कारण पूर्ण दंडात पू झाला होता. डॉक्टर म्हणाले की अजून पंधरा दिवस जरी दवाखान्यात आणलं नसतं तर आईचा हात तोडावा लागला असता. इंजेक्शनसाठी पैसा लागणार होता. कारण आईला सात दिवस तरी अंबाजोगाईला ठेवणार होते. मी परत मुंबईला आलो. आणि बँकेतून दोन हजार रुपये घेऊन अंबाजोगाईला आलो. वाटलं होतं, आता स्कॉलरशिप मिळाली. एक वर्षाची चिंता गेली. परंतु ती माझा पिच्छा काही सोडत नव्हती. सात दिवसांनंतर आईला घरी आणलं. अजून वीस दिवस मी आईजवळच थांबलो. कारण

दंडाचं ऑपरेशन झाल्यामुळे तिला स्वयंपाक करता येत नव्हता. आणि तिला वेळेवरती चांगलं जेवण कोण देणार होतं ? आईसाठी मी गाईचं अर्धा किलो तूप घेतलं. परंतु आई ते नानांना खाऊ घालायची. नाना रोज परळीला मटका खेळायला जात होते. मी मात्र गप्प बसून त्यांचं नाटक बघायचो. आईमुळे मी त्यांना काहीच बोलू शकत नव्हतो. डोळे असूनदेखील मी आंधळा झाला होतो. तोंड असून देखील मुका झालो होतो. कान असूनदेखील बहिरा झाला होतो.

घरात आईच्या दंडाच्या ऑपरेशनमुळे मी त्रासलो गेलो. त्यातच दीपकची चिंता लागली होती. टी.बी. झाल्यासारखी दीपकची प्रकृती झाली होती. कारण पैशाअभावी त्यानं बारावी सायन्स अर्धवट सोडलेलं होतं. तो परीक्षा देऊ शकला नाही. माझ्यासारखी लाचारी सहन करण्याची शक्ती त्याच्यात नव्हती. अडचणीवर कशी मात करावी याची त्याला कल्पनाच नव्हती. दीपक मनातच झुरत होता. आईला तिच्या स्वत:च्या दंडाची काळजी नव्हती. पण दीपककडे बघून आई जास्तच खालावत चालली होती. आई मला हात जोडून म्हणायची, "किशोर, दीपकचं काही तरी कर, त्याला कुठे तरी मार्गाला लाव." पण, मी किती अडचणीत शिकत आहे हे आईला दिसत नव्हतं. मी माझी अडचण कोणाला सांगणार होतो ? दीपक म्हणायचा, "किशोरभाऊ, मला अंबाजोगाईला मुलं विचारतात, तुझं नाव दीपक कोंडिबा काळे कसं काय ? त्यांना कसं सांगणार की, कोंडिबा काळे माझे आजोबा आहेत. ते समजतात, माझे दुसरे वडील आहेत. कारण खूप जणांना कॉलेजमध्ये माहीत आहे की, कृष्णराव वडकर माझे वडील आहेत. कारण सोनपेठची बरीच मुलं अंबाजोगाईला शिकायला आहेत. मी करमाळ्याला शालनमावशीकडे बारावी शिकायला जातो."

शालनमावशी ही विधवा होती. नवऱ्याच्या पेन्शनवर दोन मुलं शिकवत होती. आणि दोन लग्नाच्या मुली होत्या. एवढं कुटुंब पत्र्याच्या खोलीत राहत होतं. आणि अशा अवस्थेत दीपकनं शालनमावशीकडे करमाळ्याला जाणं मला आवडत नव्हतं. दीपकचं पुढचं शिक्षण नाना करतील अशी अपेक्षा करणंच मूर्खपणा होता. आणि दीपक माझ्यासारखा स्वत: कसं तरी करून शिकणं शक्य नव्हतं.

मी रात्रभर विचार करीत बसलो, दीपकचं पुढे कसं होईल ? रात्रभर मी झोपलो नाही. साडेचार हजारांतले माझ्याकडे फक्त अडीच हजार रुपये उरले होते. प्रसाद माझ्यावर नाराज होता. म्हणायचा, "तू दुसऱ्यांवर जीव तोडून प्रेम करतोस. परंतु तुझ्या अडचणीत कोणीच मदत करीत नाही. तू पुढचा विचार केलास का ? आता पुढच्या शिक्षणाचं कसं होणार ?" असे अनेक प्रश्न तो मला करीत होता. त्याचं बरोबर होतं. पण मी तरी काय करणार होतो ? मी जर दीपकला मदत केली नसती तर दीपकचं भवितव्य अंधारात राहिलं असतं. माझ्याकडे पैसे असताना मी त्याला मदत करू शकलो नसतो तर पूर्ण आयुष्य पश्चात्तापात घालवावं लागलं असतं. माझ्या आईचा हात तुटला असता तर मला पूर्ण जीवन दु:खात घालवावं लागलं असतं. माझ्याकडे पैसे असून, डॉक्टरी ज्ञान असून देखील

आईचं ऑपरेशन मी केलं नसतं तरी देखील ते माझ्या मनाला नेहमी बोचलं असतं.

माझ्यापुढे डोंगराएवढा मोठा प्रश्न उभा होता. कारण माझं आता शेवटचं वर्ष सुरू झालं होतं. आणि दीपकचं शिक्षण. शेवटी मी विचार केला, माझं कसंही होईल, कारण मला रस्ता तरी मिळाला होता. कधी ना कधी डॉक्टर होणारच होतो. परंतु दीपकचं बारावीचं वर्ष होतं. त्याला जर इथं ठेवला असता तर कायमचं तिथंच राहावं लागलं असतं. दीपकला घेऊन मी मुंबईला आलो. बँकेत आता माझ्याकडे फक्त अडीच हजार उरले होते. प्रसादकडून दोन हजार रुपये घेतले. आणि दीपकला तीन हजार रुपये दिले. करमाळ्याला बारावीला ॲडमिशन घेतलं. शालनमावशीच्या घरापासून थोडीशी दूर खोली किरायानं घेतली. मावशीला दीपकमुळे त्रास होऊ नये अशी दीपकची सोय करून दिली.

मेडिकलला असताना मधुमावशीकडे, अभिनेत्री मधू कांबीकर हिच्याकडे मी नेहमी जात असे. तिला माझ्याविषयी मोठा अभिमान वाटत असे. मलाही तिचा आधार वाटे. मी तिला रोज फोन करीत असायचो. सात-आठ दिवस जर माझा तिला फोन नाही मिळाला तर ती माझ्या हॉस्टेलवर फोन करायची. एके दिवशी असाच मधुमावशीचा फोन आला. मी हॉस्टेलला नव्हतो. सगळ्या हॉस्टेलभर चर्चा सुरू झाली. माझा रूम पार्टनर प्रसाद रोकडे खोलीवरून खाली फोनकडे आला. त्यानं फोन घेतला. मधुमावशी प्रसादशी बोलत होती; ''किशोर कुठे आहे, खूप दिवस झाले. त्याचा फोन आला नाही'' वगैरे. प्रसाद घाबरला होता, काय बोलावं आणि काय नाही हे त्याला समजेना ! त्यानं पटकन फोन ठेवून दिला. मी आल्यानंतर प्रसादनं मला सांगितलं की, किशोर, तुझ्या मावशीचा फोन आला होता. तुला फोन करण्यास सांगितलं आहे. मी मावशीला लगेच फोन केला. मावशीनं फोनवर विचारलं, ''का रे, काय किशोर, कुठे गेला होतास ? सात-आठ दिवस झाले, तुझा फोन आला नाही. तुझ्या पार्टनरनंपण अर्धवट बोलणं केलं आणि फोन ठेवून दिला. असं का केलं त्यानं ?'' मी मावशीला म्हणालो, ''तो तुम्हाला घाबरला.''

मावशी म्हणाल्या, ''दामोदर हॉलमध्ये परळला आज माझं नाटक आहे. 'कशी राहू मी तशीच ?' तुला वेळ असेल तर ये.'' आणि म्हणाल्या, ''तुझ्या मराठी भाषेचा टोन बदल. चांगलं बोलत जा.''

असं प्रत्येक वेळेस मला मावशी म्हणायच्या, ''अरे किशोर, मराठी भाषेत सुधारणा कर. कॅसेट लावत जा आणि आपला आवाज टेप करून टेपवर ऐक. म्हणजे आपल्या चुका आपल्यालाच कळून येतात. तसंच इतरांच्या मराठी भाषेच्या कॅसेट लावून त्यांच्या टोनकडे लक्ष दे.''

मी नाटकाला गेलो. मला जाण्यास उशीर झाला होता. मी सरळ मेकप खोलीमध्ये जाऊन बसलो सर्वजण मला विचारीत होते, ''कोण पाहिजे ?'' मी म्हणायचो, ''मधु

मावशी ! मी त्यांच्या बहिणीचा मुलगा आहे.

मग त्यांनी मला पुढच्या खुर्चीवर बसण्यास जागा दिली. नाटकाचा प्रयोग चालू होता. मावशी जीव ओतून अभिनय करीत होती. खरंच मला आश्चर्य वाटत होतं. एक तमाशातली बाई एवढी प्रगती करू शकते ! त्यावेळेस मला वाटत होतं की कष्ट केल्यानंतर अशक्य गोष्ट शक्य होऊ शकते. मावशी किती प्रयत्न करायची ते मी डोळ्यांनी बघायचो. कष्ट करण्याबाबतीत मी त्यांचा आदर्श माझ्यासमोर नेहमी ठेवतो. नाटकाच्या प्रयोगापूर्वी स्वत:च एकट्या आरशात बघून नाटकातलं वाक्य परत परत म्हणायच्या. मावशीचं नाटक चालू असताना, प्रेक्षक मावशीच्या अभिनयाला बघून टाळ्यांचा कडकडाट करीत असत. माझं मन अशावेळी आनंदानं सुखावायचं. मधु मावशीच्या ठिकाणी माझ्या आईचं चित्र मला दिसत असे. वाटायचं, माझी आईदेखील अशीच एक चांगली अभिनेत्री झाली असती ! मधुमावशी किती भाग्यवान आहे !

नाटकाचा प्रयोग संपला. मी मेकप खोलीमध्ये गेलो. मावशी मेकप पुसत होती. तिनं मला बघितलं. आणि म्हणाली, "कसं वाटलं नाटक ?" तिनं लगेच विजय कदम यांची ओळख करून दिली आणि मोठ्या आनंदानं आणि अभिमानानं म्हणाली, "हा माझ्या मोठ्या बहिणीचा मुलगा आहे, तो डॉक्टर आहे." तिनं नंतर नाटकातल्या सर्व कलाकारांच्या ओळखी करून दिल्या. सर्वांना आश्चर्य वाटलं.

मावशी लवकरच सर्व आटोपून आली. म्हणाली, "किशोर, माझ्याबरोबर लालबागपर्यंत चल. मला लालबागला सोड आणि तुला वेळ असेल तर थांब माझ्याबरोबर. कारण मला सुमनताईला भेटायचं आहे. नसेल तर तू तुझ्या होस्टेलला जा."

आम्ही टॅक्सीमध्ये बसलो, मावशीनं माझा चेहरा वाचला होता. माझ्या चेहऱ्यावर आनंदाचं तेज चमकत होतं. मावशी म्हणाली, "किशोर, हे जीवन सुखाचं नाही. अनेक प्रकारच्या लोकांशी प्रसंग येतो. हे इतकं यश मिळवलं आहे." मावशी कधी रडका चेहरा करायची तर कधी हसरा. खरंच मावशी भोळी आहे. तितकीच कर्तव्यतत्पर आहे.

मावशी म्हणाली, "किशोर, माझ्या आयुष्यात खूप वाईट प्रसंग आले. परंतु माझ्या परमेश्वरानं मला वाचवलं. काल-परवाच घडलेला प्रसंग सांगते. दादा (दादा कोंडके) शिवाय कोणालाच माहीत नाही. एक-दोन व्यक्तींचा मला रोज फोन येत होता. की बाई, आम्ही एक टी.व्ही. सिरियल काढत आहोत, त्यात आपण जर काम केलं तर आभारी होऊ. मी त्याला माझ्या घरी बोलावलं; त्यांनी मला त्यांच्या सिरियलबद्दलचा मजकूर वाचून दाखविला. मला थोडासा संशय आला की, ही माणसं जरा विचित्र दिसतायत. मी त्यांना विचारलं, मग आपलं मत काय आहे ? ते तिघं जण होते. ते म्हणाले, तुम्हाला आमच्या बंगल्यावर यावं लागेल, कारण तिथं सर्व कलाकार आले आहेत, सर्वांचं एकमत घेऊन शूटींगची तारीख ठरवायची आहे. मी ह्यांच्या एकंदरीत बोलण्यावरून आणि हालचालीवरून ओळखलं होतं की हे सर्व खोटं आहे. असला माझ्या जीवनात पहिलाच प्रसंग होता. पण ठरविलं की, यांना असं मोकळं जाऊ द्यायचं नाही. मी त्यांना म्हणाले,

तुमच्या बंगल्यावर जाण्याची सोय केली आहे ना ? ते म्हणाले, बाई, तुमच्यासाठी कार आणली आहे. मी लगेच मनात ठरवलं आणि म्हणाले, चला. मी पुढे ड्रायव्हरच्या बाजूला बसले. आणि ते तिघं मागे बसले. त्यांना मी म्हणाले, दादरकडून गाडी वळवा. मला काही वस्तू घ्यायच्या आहेत, आणि माझी एक मैत्रीण आहे, तिला भेटायचं आहे. मी दादरला उतरले आणि त्यांना सांगितलं की मी पंधरा मिनिटांत परत येते. ते म्हणाले, बाई लवकर या. मी सरळ दादांच्या बंगल्यावर गेले आणि दादांना हे सर्व सांगितलं.

दादा म्हणाले, ''मधू, तू त्यांना सांग की माझी मैत्रीण आपल्याला चहा घेण्यास बोलावते. आपण याल का ? मी त्यांच्याकडे परत गेले. आणि दादांनी जसं सांगितलं होतं. तसंच म्हणाले, ते माझ्याबरोबर आले. त्यांना सरळ दादांच्या बंगल्यात घेऊन आले. आणि बाहेरचं गेट बंद केलं. दादांशी मी त्यांची ओळख करून दिली. त्यांचं सर्व शरीर घामानं भिजलं होतं. दादांनी त्यांची कसून चौकशी केली. ते खरं सांगण्यास तयार होत नव्हते. दादांनी चार-पाच बलवान व्यक्तींना बोलावलं व दम दिला की ''तुम्ही जर खरं नाही सांगितलं तर इथं तुम्हाला जीव जाईपर्यंत मारू आणि पोलिसाच्या हवाली करून देईन, गजाआड टाकीन त्यापेक्षा तुम्ही खरं सांगा.

त्यांनी सर्व खरं सांगितलं. त्यांचं चित्रपट वगैरे सर्व खोटं होतं. खरंच किशोर, मोठ्या वाईट प्रसंगातून दादांमुळे वाचले. आणि तुला वाटत असेल तुझी मावशी किती सुखी आहे !''

हे सर्व मधुमावशी हसताहसता एकदम रडका चेहरा करून सांगत होती. मला तर वाटलं की माणूस हा कधीच सुखी राहू शकत नाही. सुख मानलं तरच आहे. नाही तर आयुष्यभर दुःखच आहे. मधुमावशीन हे सांगितल्यानंतर माझी आई किती सुखी आहे याची मला जाणीव झाली. साधी चटणी भाकरी असली तरी ती इज्जतीची होती. मधुमावशी किती सुखी आहे, हा गैरसमज दूर झाला होता.

दुसरा माझा गैरसमज होता तो मधुमावशी खूप श्रीमंत आहे असा. एके दिवशी मधुमावशीचा भाऊ रमण हा माझ्या होस्टेलवर आला. तो माझ्याकडे आठवड्यातून किंवा महिन्यातून येत असे. रमण एका अभिनेत्रीचा भाऊ असूनदेखील तो रात्रीची नोकरी करत असे. कारण मधुमावशी ही इतर कोल्हाटी स्त्रियांपेक्षा वेगळी होती. आपल्या भावाला किंवा इतर कोणत्याही नातेवाईकाला आयतं सांभाळण्यास ती तयार नव्हती. मात्र त्यांना अडचणीत मदत करण्यास ती तयार असायची. रमणनं सांगितलं, ''काय करू किशोर ? मला सिनेमात काम करण्याची इच्छा आहे. पण मधुताई माझी शिफारस कोणालाही करीत नाही. म्हणते, तू आधी कायमची नोकरी कर, स्वतःचं पोटभरण्या इतकी तरी नोकरी कर. आणि मग तुला वाटलं तर पिक्चरमध्ये काम कर. पण तू स्वतः प्रयत्न कर. मी कोणालाही तुझ्याविषयी सांगणार नाही, की हा माझा भाऊ आहे आणि ह्याला पिक्चरमध्ये छोटा-मोठा रोल द्या. मी पण ठरवलं आहे की, मी मधु कांबीकरचा भाऊ म्हणून ह्या क्षेत्रात उतरणार नाही. माझ्याकडून स्वतःहून शक्य झालं तर करीन'' आणि हे सगळं

रमण सांगत होता. तोच रमण आता बार्शीला रिक्षा चालवित आहे. खरंच धन्य ती मधुमावशी ! परमेश्वरानं उपजताच त्यांना ही वैचारिक बुद्धी दिली आहे.

एके दिवशी मी मधुमावशीच्या घरी गेलो. त्यावेळी ती तिचं सर्व सुख आणि दुःख सांगत होत्या. रमणविषयी ती तक्रार करीत होती. म्हणाली की, किशोर, मी सगळ्यांना आयतं कसं खाऊ घालू ? माझ्याकडे कोठून एवढा पैसा येणार ? ह्यांना का समजत नाही ? एक नाटकाचा प्रयोग म्हणजे तीन तास स्टेजवर बडबड करावी लागते आणि मोबदल्यात कधी तीनशे तर कधी पाचशे रुपये मिळतात. त्यात माझा खर्च. आणि पिक्चरमध्ये काम करते म्हणजे काय ? लाख-दोन लाख मिळत नाहीत.

खरंच, मला खूप वाईट वाटलं होतं. कारण त्यापूर्वी माझ्या अडचणीत मधुमावशीनं पाचशे रुपयांची मदत केली होती. ते पाचशे किती मोलाचे होते हे कळलं. मावशी म्हणायची की अडचण आली की मला कळवित जा. पण त्यानंतर मी त्यांना माझी अडचण कळू दिली नाही.

एम.बी.बी.एस.च्या शेवटच्या वर्षाला होतो. आर्थिक परिस्थिती अतिशय नाजूक होती. कॅण्टीन, खानावळ, मुलांचे उसने घेतलेले पैसे, थकलेलं भाडं... मला कर्जाचा डोंगर दिसत होता. अनेक ठिकाणी पार्टटाईम नोकरी केली. जीव थकून जात होता. वेळेवर जेवण मिळत नव्हतं. प्रकृती खराब झाली होती. तशीच नोकरी आणि कॉलेज यांची गाठ घालत होतो. मला चक्रा येत होत्या, दाढी वाढली होती. पण आता असं करून भागणार नव्हतं. पुन्हा एकदा कपडे विकण्याचा धंदा करावा असं मनाला वाटत होतं. कारण माझं शेवटचं वर्ष होतं. या पार्ट-टाईमवर मार्ग काढण्यासाठी मी पुण्याला माझ्या मित्राकडे, कल्याण नासे यांच्याकडे गेलो. मला मदतीची अपेक्षा होती. तो घरी नव्हता. माझा अपेक्षाभंग झाला. मला खूप-खूप वाईट वाटत होतं. या परिस्थितीत काय करावं, समजत नव्हतं. माझं डोकं विचारानं बधीर झालं होतं. कारण गरजवंताला अक्कल नसते. अशाही परिस्थितीत मी मनाचा निश्चय केला आणि पुण्याच्याच अभिनव कला महाविद्यालयात शिकत असलेला माझा मित्र नाऱ्या वाघमोडे याच्याकडे गेलो.

मला रात्रीचा निवारा आणि पोटाला भाकरी हवी होती. वेळ रिकामा होता. मनात आलं, कमलाकडे जावं. तिनं मला दोन-तीन पत्रं पाठवली होती. कमला माझ्या चुलत मावशीची मुलगी आहे. त्यावेळी ती आठवीला होती. सेवासदन हॉस्टेलला राहात होती. मी व अनिल तिच्याकडे गेलो. तिची शाळा सुटेपर्यंत थांबलो. शाळा सुटली होती. पण भेटण्याची वेळ संपली होती. तिनं मला दोनच शब्दांत सांगितलं, "किशोरभाऊ, तू उद्या अकरा वाजता ये." पण मला काय माहीत की मला उद्या आणखी एका नवीन संकटाला तोंड द्यायचं आहे !

दुसऱ्या दिवशी, ठरल्याप्रमाणे कमलला भेटण्यासाठी मी गेलो. तर तिथे लीलावती

भूमकर हजर होती. कोणीतरी तिचे कान भरले होते. लीलाची आई आदरणीय चंपावती भूमकर माझ्याकडे आली व मला म्हणाली, ''माझ्या मुलीच्या तीन सोयरीक तूच मोडल्यास ?'' मला मात्र आता भूकंप होतो की, काय असं वाटू लागलं. मी स्वप्नातही कोणाचं वाईट पाहात नाही. लीला तर माझ्या जातीची होती. मला काहीच कळत नव्हतं. कारण परिस्थितीनं माझं तोंड बंद केलं होतं. कर्जदाराकडे अक्कल गहाण होती. चंपावतीबाईंनी माझा अपमान केला. पण मला आता अपमानाची सवय झाली होती.

परंतु त्या चंपावती भूमकरविषयी मला आजही आदर वाटतो. कारण तिनं नाचगाण्याच्या रूपानं महाराष्ट्राची लोककला जिवंत ठेवली आहे. चंपावतीबाईला पाहताच मला माझ्या आईची आठवण येते. मन भरून येतं. नाच-गाणं करून आपला संसार तिनं उभा केला आहे. बिचारीनं खूप कष्ट केले आहेत. सिनेमात नुसत्या देहाचं प्रदर्शन करून दोन लाख रुपये मिळतात. पण नऊवारी साडी नेसून रात्रभर नाचलं तरी दोनशे रुपये मिळत नाहीत. अशाही परिस्थितीत या बाईचा आदर्श घेण्यासारखा आहे. समाज मात्र यांना कमी लेखतो आहे. कारण या कोल्हाट्याच्या बाया आहेत. यांना मान नसतो, मन नसतं, भावना नसतात, पोट नसतं, असतं ते फक्त शरीर; ज्याला समाज आपलं उपभोगाचं साधन समजतो. दोन मुलं, एक मुलगी शिकवून त्यांनी सुसंस्कृत केली आहेत.

कुठं जावं हेच कळत नव्हतं. मी भ्रमिष्ट झालो होतो. मी तसाच उदास मनानं मुंबईला आलो. होस्टेलवर पाऊल ठेवताच कॅण्टीनवाला भेटला. त्याला बघताच छिन्नविछिन्न झालो. जवळ जाताच मी बोलण्यापूर्वी तो म्हणाला, ''क्या काले, आप को कुछ है की नही ? किसी भी बात को मर्यादा होती है, अब हमे कबतक चूप बैठना पडेगा'' त्याचं बरोबर होतं. त्याच्याकडे पाहून मीच शरमेने मान खाली घातली. माझ्याकडे झोपेच्या गोळ्या होत्या. त्या खाण्याचा पूर्ण निर्णय घेतला. दार बंद केलं. गोळ्या घेणार इतक्यात माझा मित्र, प्रसादनं दाराची कडी वाजवली. मी दार उघडणार नव्हतो. पण वाटलं, अखेरचं त्याला भेटून तरी जावं व या जीवनाला नाहीसं करावं.

आत्महत्या करावी वाटे. पण माझी आई, भाऊ यांना नंतर कोण सांभाळील ? त्याचं चित्र माझ्या डोळ्यांसमोर दिसत होतं. माझ्यासाठी मला जगता नाही आलं तरी, माझ्या आईसाठी तरी मला जगावंच लागणार होतं. मला वाटत होतं, मी अनाथ असतो तर किती चांगलं झालं असतं. अनाथ असतो तर अनाथाश्रमात माझा कोणीतरी सांभाळ केला असता. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी स्थिती होती. जीव नकोसा झाला होता. झोपेची गोळी घेतल्याशिवाय मला त्या काळात झोप येत नसे. आईबद्दल विचार येत.. बिचारीनं खूप कष्ट केले आहेत.

प्रसाद हा माझा पहिल्या वर्षापासूनचा मित्र व रूमपार्टनर. बिचारा नेहमी हसत असतो. खूष असतो. तो हसतच आतमध्ये आला. व म्हणू लागला, ''किशोर माझी एम.ओ.

आली.'' माझ्या डोळ्याला पाणी आलं. पण डोळ्याच्या बाहेर ते पडू दिलं नाही. कारण सवय झाली होती. वाटत होतं, मला एम.ओ. कोण पाठवणार ? मला त्याचा थोडाफार आधार होता, पण त्या बिचाऱ्याला किती दिवस मी त्रास देणार होतो ? त्याला पण मोजकेच पैसे येत होते. प्रसादनं मला दोनशे रुपये दिले. मला असं वाटू लागलं की, देवानं माझा आवाज ऐकला. मला बघितल्यावर कधी-कधी त्याच्या डोळ्याला पाणी येत असे. त्याला रडणं म्हणजे काय हे माहीतच नव्हतं. पण माझी परिस्थिती त्याला रडायला भाग पाडत होती. पहिल्या वेळेस त्यानं दुःखाचे अश्रू डोळ्याबाहेर पडू दिले होते. माझं मन प्रसन्न राहावं म्हणून हसून-खेळून तो माझ्याशी गप्पा मारीत असे. तो मला एक क्षणही एकटा सोडत नसे, तो बोलतच होता. माझे डोळे त्याच्याकडे होते, मन मात्र दुसरीकडं होतं.

आता या दोनशे रुपयांचं काय करावं, एकाचेही पैसे पूर्ण देणं होत नाही. माझं डोकं म्हणजे एक पोकळी झाली होती. शेणातले किडे शेणाला पोखरून जसे भुगा करतात तसं माझं डोकं विचारानं पोखरलं होतं. सगळीकडे अंधार पडला होता, पण तशाही अवस्थेत मी प्रकाशाचा रस्ता शोधण्याचा प्रयत्न करीत होतो.

आर्थिक अडचणींना कंटाळून मी सोनपेठला गेलो. माझं अचानक येणं झालं होतं. कारण पावसाळा होता. सुट्या नव्हत्या. मग मी कसा घरी आलो ? आईला माझी काळजी वाटली. प्रकृती बघून आईच्या डोळ्यांत पाणी आलं होतं. आईला सर्व सांगितलं. नाना म्हणाले, ''थांब, काहीतरी करतो. इकडून तिकडून पैसे आणतो.'' मी घराच्या बाहेर निघत नसे. पाठीमागच्या दारानं बोळीमधून शेतामध्ये जात असे. एक महिना झाला. काहीच झालं नाही. नाना कधीतरी कोठेतरी जाऊन येत असत व म्हणत असत, ''काम झालं नाही.''

दीड महिना झाला. माझी दुसऱ्या सत्राची परीक्षा जवळ आली होती. दीड वर्ष म्हणजे आमचं एक वर्ष असतं, माझं तिसरं वर्ष होतं व दुसऱ्या सत्राची परीक्षा जवळ आली होती. त्यामुळे मला रात्रंदिवस झोप येत नव्हती. जेवण तर जातच नव्हतं. गावातील सर्व लोक चर्चा करीत होते की, किशोरनं मेडिकल सोडून दिलं आहे काय ! कारण दोन महिने झाले तरी मी घरीच होतो. पावसाळा असल्यामुळे सुट्या नसतात हे त्यांना माहीत होतं. घरात रोज भांडणं होत होती. आईचा जीव मात्र कासावीस होत होता.

नाना बाहेर गेले होते. धोबी आला होता. म्हणून वडिलांचे कपडे खिसे तपासून देत होतो, तर मला त्यांच्या खिशात मटक्याची चिठ्ठी दिसली. मटक्याची चिठ्ठी बघताच मी पटकन खालीच बसलो.

आता मला काही मार्गच नव्हता. कारण गावातील सर्व प्रतिष्ठित लोकांना मी सांगून बघितलं. मी डॉक्टर बाहेतीकडे गेलो. ते फार श्रीमंत होते. मोठ्या अपेक्षेनं गेलो होतो. त्यांनी

मला विचारलं, "अरे किशोर, खूप दिवसांपासून मी तुला येथेच बघत आहे." मी काही न बोलता रडण्यास सुरुवात केली. कारण आता रडण्याशिवाय मला बोलताच येत नव्हतं. कंठ दाटून आला होता. माझे ओठ थरथर कापत होते. त्यांना मी सर्व सांगितलं. त्यांच्या पत्नीच्या डोळ्याला पाणी आलं व बाजूला दोन व्यक्ती होत्या, त्यांच्याही डोळ्याला पाणी आलं. "कृष्णा सावकारांचा मुलगा आणि असे हाल ?" असं ते एकमेकांना म्हणू लागले. "मेडिकलला नंबर लावण्यासाठी तीन लाख रुपये दिले तरी नंबर लागत नाही आणि या मुलाला शिकायला पैसा नाही. काय देव अन्याय करतो बघा ?"

डॉक्टर बाहेती खूप वर्षांपासून सोनपेठला प्रॅक्टीस करतात. एक वर्षाचा कोणता तरी त्यांनी डिप्लोमा केला आहे. पण प्रॅक्टीस मात्र जोरात करतात. अमाप पैसा कमावतात. मोठमोठ्या बिल्डींग बांधल्या. मला मदत करण्याची त्यांची इच्छा होती. पण वडिलांना सर्व घाबरत असत. कृष्णा सावकारांकडे पैसे नाहीत असं कधी होणार नाही. इथं कुठंतरी पाणी मुरतं आहे. कारण मी ठेवलेल्या बाईचा मुलगा होतो ! यांच्या भानगडीत पडायला नको.

लोकांना काय माहीत की मटक्यानं आमच्या घरचा 'बडा घर पोकळ वासा' केलाय ? मटक्यामध्ये पैसे जात होते. नाना बेचैन असायचे. मटका न लागल्याचा राग आमच्यावर काढायचे. आमची अवस्था तोंड दाबून बुक्क्याचा मार अशी होती. त्यांच्या गल्लीतील माणसं मात्र माझ्याकडं रोज पाहत होते. कृष्णा सावकारांच्या रांडेचा पोरगा म्हणून माझी ओळख करून देत होते. त्यांच्या नजरेचे विषारी बाण मला घायाळ करीत होते.

माझ्या मनाला शांती मिळावी म्हणून गावातील संत बाबुदेवाकडे मी जाऊ लागलो. पण देवतांना झोप लागली होती. देव पळून गेले होते. माझ्या मदतीला कुणी धावत नव्हतं. संत बाबुदेवानं मला परभणीच्या पार्डीकर महाराजाकडे जा, तुला ते मदत करतील, असं सांगितलं. मी श्रीफड गुरुजींकडून पैसे घेऊन परभणीला गेलो. पार्डीकर महाराजांनी मला एक जप दिला. जप केल्यानंतर तुला पैसे मिळतील असं सांगितलं. काही असलं तरी माझा पार्डीकर महाराजांवर विश्वास बसला. मी जप करायचं ठरवलं. शेवटचा प्रयत्न म्हणून मी डॉ. बुराडे यांच्याकडे गेलो. त्यांना माझी सर्व परिस्थिती सांगितली. सावकाराकडे पैसे नाहीत असं कधी होणार नाही. पुन्हा पहिले पाढे पंचावन. डॉक्टरांजवळ अशोक चिमणगुंडे बसले होते. त्यांना माझी दया आली. त्यांनी माझी आस्थेनं चौकशी केली. 'तू एवढा शिकलास म्हणून बरं. नाहीतर या गावात तुमच्यासारख्या मुलांना जगू दिलं नसतं !' असं म्हणून सहानुभूती दाखवली. 'तुझ्या नावावर जर जमीन असेल तर मी तुला बँक मॅनेजरकडून गाडी, बैलासाठी कर्ज मिळवून देतो.' असं ते म्हणाल्यावर मला खूप आधार वाटला. मी रोज ७/१२ चा उतारा व इतर कागदपत्र घेऊन त्यांच्या घरी जात असे. पण त्यांची-माझी गाठभेट होत नव्हती. कारण ते मला टाळत होते.

खासदार लोणीकरांच्या घरी जाण्यास मला नको वाटत होतं. आईनं सावत्र भावाच्या लग्नासाठी लोणीकरांकडून दहा हजार रुपये आणले होते. ते अजून दिले नव्हते. मला लाज वाटत होती. पण मला त्यांची मुलगी सुधा हिनं पाहिलं, म्हणून नाईलाजास्तव मी लोणीकर निवासमध्ये गेलो. नागीणमावशी समोरच बसल्या होत्या. माझी त्यांनी आस्थेनं चौकशी केली. मुंबईहून कधी आलास म्हणून विचारलं. मी नागीणमावशीला खोटंच सांगितलं की, दोन दिवस झाले, मी आलो आहे. पण त्यांना सर्व माहीत होतं की, दोन महिने मी सोनपेठमध्येच आहे. त्या म्हणाल्या, ''मला सर्व माहीत आहे. तू मोठा माणूस आहेस. डॉक्टर झाला आहेस. आम्हाला विसरला आहेस.''

मला रडू आवरत नव्हतं. मी मनसोक्त रडलो. मावशीनं मला जवळ घेतलं. त्यांच्या पदराच्या सावलीत काही क्षणांसाठी का होईना मी सर्व दु:ख विसरून गेलो. मावशीला सर्व कहाणी सांगितली. तिला दया आली. ती म्हणाली, ''तू इतके दिवस का गप्प बसलास ? लगेच सांगायला काय झालं होतं ? थांब, तुझे काका झोपेतून उठू दे, त्यांच्या कानावर घाल. काहीतरी मार्ग निघेल.'' काका झोपेतून उठले. मी सर्व हकिगत त्याना सांगितली. त्यांना पण वाईट वाटलं. ते म्हणाले, ५ ऑक्टोबरपासून मी तुला महिना पंधराशे रुपये देतो. मला खूप-खूप समाधान वाटलं. तेहतीस कोटी देव मी खासदार लोणीकरांच्या रूपानं पाहात होतो. पण आज तर २० सप्टेंबर होता.

५ ऑक्टोबरला माझी दुसऱ्या सत्राची परीक्षा संपत होती. पुन्हा परभणीहून सोनपेठला आलो. आई-नानांना आनंद झाला. मला मुंबईला जाऊन परीक्षेला बसणं महत्त्वाचं होतं. मी आई-नानांना थोड्या पैशांची व्यवस्था करण्यास सांगितलं. आईचा नाईलाज होता. नाना मात्र भरपूर जेवण करून आरामात झोपत होते. आपण त्या घरचे नाही, असं ते भासवत होते. मटका मात्र रोज खेळत होते. माझं मन वाऱ्याच्या वेगानं मुंबईला धावत होतं. मला गाडीखर्चालासुद्धा पैसे नव्हते. आई-नानांवर मी मनातून धुमसत होतो. त्यांच्या वागण्याचा राग येत होता. आई नानांना म्हणाली, ''असं झोपेचं सोंग घेऊ नका. काहीतरी प्रयत्न करा.''

नानांचा स्वाभिमान डिवचला होता. त्यांना राग आला. त्यांनी आईला शिवीगाळ केली. म्हणाले, ''तुमच्याशी माझा काही संबंध नाही. तुमचं पैशाचं तुम्ही बघा.''

मग मात्र माझा राग अनावर झाला. एक पिता आपल्या कर्तव्यातून पळ काढत होता. मला सहन झालं नाही. मी आईवर रागावलो – माझ्यातला सैतान जागा झाला होता. मी आईला म्हणालो, ''तुला नवरा प्यारा आहे. तुला आमची गरज नाही. आमच्यासाठी तू काय केलं ? जे काही केलं ते सर्व नानांसाठी. जयश्रीअक्काच्या (सावत्र बहिणी) लग्नात स्वत:च्या पाटल्या तिच्या हातात टाकल्या. हातातल्या अंगठ्या नानांना मटक्यासाठी दिल्या. पेरणीला पैसा नाही म्हणून सोयऱ्याकडे भीक मागितली. बंडुदादा (सावत्रभाऊ) याच्या नोकरीसाठी खासदार लोणीकरांच्या पाया पडली. त्यांच्याकडून बंडुदादाच्या लग्नासाठी दहा हजार रुपये आणले. लग्नात बंडुदादाच्या बायकोच्या गळ्यात

स्वत:च्या गळ्यातलं अडीच तोळ्याचं गंठन घातलंस. आणि स्वत:च्या पोटच्या मुलासाठी फक्त रडण्याशिवाय तू काही करू शकत नाहीस.''

मी काय बोलतो त्याचं भान मला नव्हतं. अनेक दिवसांची मनातील जळमटं मी आज ओकत होतो. बेभान झालो होतो. पागल झालो होतो.

मी रागाच्या भरात माडीवर गेलो. दाराची कडी लावली. माडीवर आता कोणीच राहत नव्हतं. कारण मोठ्या आई (सावत्र आई) नानांच्या त्रासाला वैतागून नानांना सोडून माहेरी गेल्या होत्या. परभणीला मुलाजवळ (बंडुदादा) राहत होत्या. त्यामुळे माडी रिकामीच होती. माडीवर ढेकूण मारण्याचं औषध होतं. ते सर्व औषध मी प्यायलो. त्याबरोबर मला उलट्या होऊ लागल्या. मला त्रास सहन होत नव्हता. दीपक मोठमोठ्यानं ओरडत होता. दारावर लाथा मारत होता. मला त्रास सहन न झाल्यामुळे मी कडी उघडली आणि बाहेर येऊन पडलो. माझ्या तोंडाला फेस येत होता. आई–नाना पळत आले. आई रडू लागली. तिची दातखीळ बसली होती. तिला अंगावरच्या कपड्यांचं भान नव्हतं. नाना ओरडत होते : ''किशोरला वाचवा. माझ्या पोराला वाचवा.'' नाना तोंडावर मारून घेत होते. गल्लीला जत्रेचं स्वरूप आलं होतं. माझ्या तोंडाला फेस येत होता. मी बेशुद्ध पडलो. नाना बेभान झाले होते. मला वाचवण्यासाठी धडपड करीत होते. दीपक मोठमोठ्यानं बोंबलत होता. गाडी आणली. विष्णू दहिवाल, मनू दहिवाल आणि दीपक मला आरोग्य केंद्रात घेऊन गेले. डॉ. शेटे यांनी झालेला प्रकार ओळखला. ताबडतोब औषधोपचार केला. मी शुद्धीवर आलो. मी विष घेतलं, ही बातमी सर्व गावात पसरली. गावातील बरेच लोक मला भेटण्यासाठी दवाखान्यात येत होते. ते म्हणत, ''डॉक्टर, तुम्हाला कसलं दु:ख होतं. काय झालं होतं ? तुमच्यासारख्या डॉक्टरनं असं केल्यावर आम्ही काय करावं ?'' असे अनेक प्रश्न मला करीत होते. पण मी त्यांना काय सांगणार होतो ? कारण बऱ्याच जणांना आमच्या घरात काय चाललं आहे हे माहीत होतं. सगळेजण माझी समजूत काढत होते.

डॉ. शेटे पोलीसकेस करणार होते. पण आई रडत म्हणाली, ''किशोर, तुझ्या पाया पडते असं काही करू देऊ नको. माझ्या कुंकवाची इज्जत वाचव.'' आईला आईच्या कुंकवाच्या इज्जतीची काळजी लागली होती. परंतु पोटचा गोळा मरणाच्या दारी येऊन ठेपलाय याची तिला काळजी नव्हती. ''तू पोलिसाला खोटं बोल की, उंदराचं औषध शेंगदाण्यात अचानक खाण्यात आलं होतं.'' एवढा प्रकार होऊनदेखील आई नानांवर प्रेम करीत होती. एका भारतीय स्त्रीचं प्रतीक तिच्यात मला दिसत होतं. मी डॉ. शेटेंना विनंती केली की, ''कृपया पोलीस केस करू नका, माझ्या शेवटच्या वर्षाची दुसऱ्या सत्राची परीक्षा चालू आहे आणि मला लवकर मुंबईला जावं लागणार आहे.''

मी परभणीला गेलो. भाऊ रामराव लोणीकरांकडून पैसे घेतले. ते म्हणाले, ''तुला दर महिन्याला मी पैसे पाठवत जाईन.''

मी मुंबईला आलो तर दुसऱ्या सत्राची परीक्षा संपलेली होती. झालेला प्रकार माझ्या

डोक्यात सारखा घोळत होता. शेवटची परीक्षा जवळ आली. परंतु माझी हजेरी फारच कमी होती. कारण सोनपेठला येण्याजाण्यास, राहण्यास आणि नोकरीच्या कामात मी कॉलेज बरोबर करू शकलो नव्हतो. त्यामुळे मला कॉलेजनं परीक्षेला बसू दिलं नाही. अजून एक मोठा प्रश्न माझ्यापुढे उभा होता. कारण माझं एक वर्ष वाया जाणार होतं ! पण लोणीकरांचा आधार लाभला होता. माझी मुख्य विवंचना नाहीशी झाली होती.

मी १९९४ मध्ये एम.बी.बी.एस. झालो !

लावायला बापाचं नाव नाही म्हणून तिथं किशोर आईचं नाव लावतो. त्याच मायेचा दुसरा लेक, दीपक आजोबाचं नाव बापाच्या जागी लिहितो! आणि कोल्हाटी समाजातील ती माय मोठ्या मुष्किलीनं नाचण्याच्या धंद्यातून निसटली खरी; परंतु मानलेल्या नवऱ्याकडे राहू लागली तर तिच्या साऱ्या जीवनाचीच ससेहोलपट झाली...

येथे पुरुषमंडळी आयतं बसून खातात–पितात आणि त्यांच्या मायबहिणी त्यांची हौसमौज–खाणंपिणं भागविण्यासाठी नाचगाणं करतात...

मन विदीर्ण करून सोडील अशी मायलेकराची करुण कहाणी...

ग्रंथाली

श्रीमान योगी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रकाशक

सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ३०. ✆ ०२०-२४४७६९२४

Email : info@mehtapublishinghouse.com
website : www.mehtapublishinghouse.com

© सौ.मधुमती शिंदे / सौ. पारु नाईक

अक्षरजुळणी
इफेक्ट्स, २१/६ब, आयडिअल कॉलनी, कोथरूड, पुणे २९.

मुखपृष्ठ
रविमुकुल

मुद्रित-संस्करण
मोहन वेल्हाळ

मुद्रक
न्यु भारत प्रिंटर्स, ५२०, नारायण पेठ पुणे ४११०३०.

प्रकाशन-काल
नववी आवृत्ती : जानेवारी, १९८४ / दहावी आवृत्ती : एप्रिल, १९८८ /
अकरावी आवृत्ती : जानेवारी, १९९१ / बारावी आवृत्ती : मे, १९९४ /
तेरावी आवृत्ती : जानेवारी, १९९७ / चौदावी आवृत्ती : १ ऑक्टोबर, १९९८ /
पंधरावी आवृत्ती : ७ ऑक्टोबर, २००० / सोळावी आवृत्ती : जानेवारी, २००३ /
सतरावी आवृत्ती : एप्रिल, २००४ / अठरावी आवृत्ती : नोव्हेंबर, २००५ /
एकोणिसावी आवृत्ती : मे, २००७ / विसावी आवृत्ती : ऑगस्ट, २००८ /
एकविसावी आवृत्ती : जुलै, २००९ / बाविसावी आवृत्ती : जानेवारी, २०१० /
तेविसावी आवृत्ती : जानेवारी, २०११ / चोविसावी आवृत्ती : ऑक्टोबर, २०११ /
पंचविसावी आवृत्ती : मे, २०१२ / सव्विसावी आवृत्ती : जानेवारी, २०१३ /

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सत्ताविसावी आवृत्ती : सप्टेंबर, २०१३ / अठ्ठाविसावी आवृत्ती : जून, २०१४

ISBN 81-7766-640-1

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रणजित
देसाई

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रतिपश्चन्द्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।

प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढत जाणारी,
विश्वाने वंदिलेली, शहापुत्र शिवाची ही
मुद्रा लोककल्याणासाठी शोभत आहे.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

श्री

पायाखाली जाडजूड नागर- संस्कृती नये आचरणारी
माणसांचे जोडे उराशी कवटाळून
शांत- सरळ सौभाग्य- संपन्न
पुतळाबाई रावसाहेब सरनी गेल्या.
यांची आठवण- म्हणून
ही चरित कहाणी.

देशपांडे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।
यशवन्त, कीर्तिवन्त। सामर्थ्यवन्त, वरदवन्त
पुण्यवन्त, नीतिवन्त। जाणता राजा।।

शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप
शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं।।
शिवरायाचें कैसें बोलणें। शिवरायाचें कैसें चालणें
शिवरायाचें सलगी देणें। कैसी असे।।

सकळ सुखाचा केला त्याग। करूनि साधिजे तो योग
राज्यसाधनाची लगबग। कैसी केली।।

रामदास

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मनसुबा

सांजपाखरू अन् सायंतारा
व्यथित मनावर फुंकर मारी
माहित असता घरी न दारी
फुका शोधितो प्रिया हरवली

'श्रीमान योगी' वाचकांच्या हाती देत असता समाधान वाटत आहे. या पुस्तकाच्या नादात गेल्या काही वर्षांत अनेक नवे स्नेही जोडता आले. खूप पाहायला आणि वाचायला मिळाले. जीवनाची ही वर्षे सार्थकी लागली.

'स्वामी'नंतर सात वर्षांच्या दीर्घ कालाने आज 'श्रीमान योगी' प्रसिद्ध होत आहे. 'स्वामी'नंतर मी शिवचरित्रावर विचार करीन, या कहाणीचे काम हाती घेईन, असे मला वाटत नव्हते. 'राधेय' ही कर्णाची कथा मी पुरी करण्याचे ठरविले होते. 'राधेया'ची टाचणे पुरी करून जवळ जवळ निम्मे लिखाण मी पुरे केले होते.

एके दिवशी श्री. बाळासाहेब देसाई यांनी मला 'शिवचरित्र' लिहिण्यासाठी आवर्जून सांगितले. अनवधानाने मी त्या वेळी होकार देऊन टाकला; आणि शिवचरित्राची जबाबदारी माझ्यावर आली. 'राधेय' तसेच अपुरे राहिले. त्या दिवसापासून आजतागायत श्री. बाळासाहेब देसाई माझ्या कामाच्या प्रगतीची चौकशी करीत राहिले. 'श्रीमान योगी'ची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रेरणा त्यांनी मला दिली. त्यांच्याच प्रेमामुळे हे अवघड काम जिद्दीने पुरे करण्याचे बळ मला लाभले.

हाती घेतलेले काम फार मोठे. ते एकट्याने पुरे करणे अशक्य. या कामासाठी अनेकांची मदत लागली. अनेकांनी मार्गदर्शन केले. श्री. पांडुरंग पिसुर्लेकर, श्री. सेतुमाधवराव पगडी, श्री. सुंदरभाई बुटाला, प्रा. अ. रा. कुलकर्णी यांच्यासारख्या इतिहासतज्ज्ञांनी माझ्यासाठी आपली दारे सदैव मोकळी ठेवली. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. शिवभक्त श्री. भालजी पेंढारकर, कै. बाळशास्त्री हरदास, श्री. मु. गो. गुळवणी यांच्यासारख्या श्रद्धावान मंडळींनी अनेक वेळा मार्गदर्शन केले. म. म. दत्तो वामन पोतदारांनी आशीर्वाद दिले. या सर्व थोर मंडळींच्या परिचयात जाण्याचा योग लाभला, हेच मी आपले भाग्य समजतो. ज्या बाळशास्त्री हरदासांनी छत्रपतींच्या जीवनावर व्याख्यानमालेची सत्रे चालविली, ज्यांच्या वाणीने आणि लेखणीने एक राष्ट्रीय स्वाभिमानाची ज्योत पेटविली, ते आज 'श्रीमान योगी' पाहायला नाहीत, याचे फार मोठे दु:ख वाटते.

शिवचरित्राचा अभ्यास करीत असता सभासदांपासून शेजवलकरांपर्यंत उपलब्ध साहित्य वाचले. ही पुस्तके संदर्भग्रंथ राहिली नाहीत, तर ती जीवनसांगाती बनली. इतिहासाच्या जपणुकीसाठी या थोर अभ्यासकांनी घेतलेल्या अपार श्रमांची जाणीव झाली. या सर्व इतिहासप्रेमी माणसांपुढे नतमस्तक होण्याखेरीज माझ्या हाती आज काही नाही.

ही इतिहासाची पुस्तके उपलब्ध होण्यासाठी श्री. ब.र.काळे (जमखिंडी), श्री.सोनोपंत मराठे (बेळगाव), श्री. बोंद्रे (कोल्हापूर), श्री. अ.ह. लिमये (पुणे), इ. मंडळींनी खूप मदत केली. गोखले कॉलेज (कोल्हापूर), डेक्कन कॉलेज (पुणे), भारत इतिहास संशोधक - मंडळ (पुणे) या संस्थांची ग्रंथालये मला सदैव उघडी होती. त्याचा मला अभिमान वाटतो.

एवढे होऊनही एखादे दुर्मीळ पुस्तक हाती लागेनासे झाले, की श्री. तात्यासाहेब ढमढेरे यांच्याकडे मी धाव घेत असे; आणि आठ दिवसांत ते पुस्तक माझ्या हाती देण्याची धडपड तात्यासाहेब करीत. त्यांचे मी आभार मानले, तर तो त्यांच्या प्रेमाचा उपमर्द ठरेल.

इतिहासाचा अभ्यास करीत असताना एक गोष्ट माझ्या लक्षात आली- दुर्दैवाने शिवाजीविषयी अधिकृत व चांगले चरित्र आजतागायत उपलब्ध नाही. औरंगजेब त्या मानाने सुदैवी. त्याला जदुनाथ सरकारांच्यासारखा चरित्रलेखक मिळाला. शिवाजीला अजून

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तो योग आला नाही. युरोपियन इतिहासकार व बंगाली इतिहासकार यांच्यासारख्या थोर व्यक्तींना मराठी कागदपत्रांतील बारकावे माहीत नसतात; आणि महाराष्ट्रीयन संशोधकाला अजूनही निर्विकारपणे शिवाजीचा विचार करणे जमत नाही. शेजवलकर, शर्मा, कुलकर्णी, डॉ. बाळकृष्ण, वैद्य यांनाही अभिनिवेश टाळता येत नाही. श्री. ब.मो. पुरंदरे आणि कै. बाळशास्त्री हरदास तर भक्तिभावानेच छत्रपतींच्या जीवनाकडे पाहतात. त्या मानाने दत्तोपंत आपटे यांनी फार शिस्तशीर काम चालविले होते. घटनांपुरतेच बोलायचे झाले, तर हे कार्य माझ्या पाहण्यात आलेल्या पुस्तकांत श्री. दि. वि. काळे यांनी जास्तीत जास्त चोखपणाने केले आहे. कै.शेजवलकरांनी संकलित केलेली माहिती आणि काळे यांनी लिहिलेले शिवचरित्र यांची फार मदत झाली. आज श्री. द. वा. पोतदारांनी शिवचरित्राची जबाबदारी उचलली आहे. जेव्हा ते शिवचरित्र पुरे होईल, तेव्हा इतिहासातील एक मोठी उणीव भरून निघेल, असा मला विश्वास आहे.

इतिहास वाचीत असता त्यात दिसणारे शिवाजीचे रूप पाहून थक्क व्हायला होते. इतका अष्टपैलू, अष्टावधानी, संपूर्ण पुरुष माझ्या नजरेत नाही. आदर्श राज्यकर्ता, थोर सेनानी, प्रजादक्ष, धर्माभिमानी, परधर्मसहिष्णू, चारित्र्यसंपन्न, दूरदृष्टीचा असा जाणता राजा जगाच्या इतिहासात दुसरा सापडणे कठीण. मुलगा, पती, बाप, मित्र, शिष्य, इत्यादी संसारी नात्यांनीदेखील घडणारे या महापुरुषाचे दर्शन मन भारून टाकते. शिवाजी धार्मिक होता, धर्मभोळा नव्हता; व्यवहारी होता, पण ध्येयशून्य नव्हता. श्रींच्या राज्याचे स्वप्न पाहणारा स्वप्नाळू, आणि ते स्वप्न वास्तवात उतरविणारा कठोर वास्तववादी हे त्याचे स्वरूप आहे. विजयनगरसारखी हिंदू साम्राज्ये वैभवाच्या ऐन शिखरावर असता, मुसलमानी आक्रमणाच्या सामान्य धक्क्याने नामशेष झाली, त्यांचे पुनरुत्थान झाले नाही, ही इतिहासाची नोंद आहे. पण पुरंधरच्या तहाने धुळीला मिळालेले राज्य त्याच धुळीतून परत उठवून त्याला सुवर्णमय करण्याचे सामर्थ्य फक्त या एकाच महापुरुषाला साधले, हीही इतिहासाचीच नोंद आहे. हे राज्य उभे करीत असता जनतेच्या ऐहिक कल्याणाची जबाबदारी राजाची आहे, हे तो कधी विसरला नाही. अनेक लढाया तो लढला; पण त्यासाठी प्रजेवर त्याने कधी नवे कर लादले नाहीत. 'मी शत्रूशी शत्रू म्हणूनच वागलो, मित्राला दगा दिल्याचे दाखवा', असे त्याचे आव्हान होते. त्या आव्हानाला उत्तर नाही. कौल देऊन गावे वसविणे, शेतसारा निश्चित करणे, वतनदारीला आवर घालणे, किल्ल्यांची कोठारे भरून ठेवणे, शेतकऱ्यांना बी-बियाणे, नांगर-अवजारे यांसाठी कर्जाची सोय करणे, भाषा सुधारण्यासाठी राज्यव्यवहारकोष, पंचांग सुधारण्यासाठी करणकौस्तुभ, धर्म सुधारण्यासाठी प्रायश्चित्त देऊन हिंदू करून घेणे, नवे किल्ले बांधणे, वीरांचे कौतुक आणि

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पंडितांचा सन्मान या सर्व बाबतींत सदैव दक्ष असणारा शिवाजी इतिहासात ठायी ठायी आपणांस दिसतो; आणि एवढे करूनही त्याचे रूप एकाकीच भासते. असामान्य गोष्टी साध्य करूनही त्याची सुखदु:खे सामान्य माणसाचीच राहिली. ती त्याला एकट्याला भोगावी लागली.

शिवचरित्राचा शोध घेत असता वाचन-चिंतनाइतकेच पाहण्याला महत्त्व. आग्र्याचा ताजमहाल, अशीरगडची भूमी, वेरूळची दैवते, दौलताबाद व त्याच्या नजीकची औरंगजेबाची कबर, औरंगाबाद, जुन्नर, पुणे येथपर्यंतचा मुलूख, शिवनेरी, चाकण, सिंहगड, तोरणा, राजगड, पन्हाळा, प्रतापगड, पुरंधर आणि दुर्गदुर्गेश्वर रायगड यांच्यासारखे आकाशाला तोरण बांधणारे गड, तुळजापूर, पंढरपूर, शिखर-शिंगणापूर, श्री शैल यांसारखी देवस्थाने, विजापूर, गोवळकोंडा यांसारख्या राजधान्या, जंजिरा, सिंधुदुर्ग यांसारखी नामांकित स्थळे - थोडक्यात आग्र्यापासून जिंजीपर्यंतचा मुलूख फिरावा लागला. ही स्थळे पाहिली नसती, तर इतिहास डोळ्यांसमोर उभा राहिला नसता.

या स्थळांना भेटी देत असता अनेकांनी मदत केली. त्या सर्वांची नोंद करणे कठीण. शिवाजीचे गड पाहत असता रायगडचे तुकाराम शेडगे, सातारा एस्.टी. डिव्हिजनचे अधिकारी श्री. रेगे, एस्.टी. अधिकारी श्री. साठे यांनी सर्वतोपरी साहाय्य केले. तुळजापूर भवानीचे भोपे माणिकराव जाधव पाटील व प्रतापगडचे श्री. हडप, सिंधुदुर्ग, श्री शैल व शिखर-शिंगणापूरचे पुजारी या सर्व मंडळींनी दाखविलेला स्नेह सदैव स्मरणात राहील.

बेळगावचे माझे डॉक्टर श्री. करंबेळकर व नांदेडचे वैद्यराज काशिनाथराव बोर्डे यांनी मला हवी ती वैद्यकीय माहिती पुरविली.

जुन्या शस्त्रांचा वापर पाहायची माझी इच्छा होती. ती माझी इच्छा कोल्हापूरच्या महाकाली तालमीच्या लोकांनी पुरी केली. दांडपट्टा, विटा, बोथाटी, तलवार, भाला, जंबिया यांसारखी हत्यारे त्यांनी मला चालवून दाखविली.

दिल्ली, विजापूर, मुंबई, बडोदे येथील वस्तुसंग्रहालयांतून मला जुन्या महत्त्वाच्या वस्तू पाहावयास मिळाल्या. पुण्याचे राजा केळकर संग्रहालय माझ्या पूर्ण परियचयाचे झाले. श्री. केळकरांनी मला कधीच परके मानले नाही.

ही चरितकहाणी माझ्या हातून शक्यतो लवकर पुरी व्हावी, यासाठी आप्त, स्वकीय,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

स्नेहमंडळी सदैव जागरूक होती. माझ्या काकी ती. लक्ष्मीबाई भोसले सदैव माझ्या पाठीशी उभ्या होत्या. त्यांच्या वडीलकीच्या धाकाखाली काम करीत असता माझे पोरकेपण विसरले जाई. दूर असली, तरी माझी मावशी ती. सौ. इंदुमती घाटगे हिचा आधार वाटे. आज दोघींचीही आठवण तीव्रतेने होते.

श्री. एम्. एन्. शिंदे यांच्यासारखा सोबती मिळणे कठीण. कधी मोठ्या वयाच्या अधिकाराने, तर प्रसंगी मित्रत्वाच्या स्नेहभावनेने, माझ्या लिखाणात खंड पडू नये, म्हणून ते सदैव दक्ष राहत. किंबहुना, त्यांच्या प्रेमामुळेच हे मोठे काम एवढ्या लौकर पुरे झाले. या चार वर्षांच्या कालखंडात मला लिहायला स्वस्थता मिळावी, माझ्या अडचणी दूर व्हाव्या, यासाठी श्री. राजाभाऊ मराठे, नानासाहेब हेरवाडकर, विश्वनाथ शहापूरकर, भाऊसाहेब बेंद्रे, आर्टिस्ट रं. वा. पाठक, राजाभाऊ ठाकूर, बाळासाहेब खराडे, बी. डी. खांडेकर, रंगराव पाटील, रवि गोडबोले, खाडिलकर, इत्यादी मित्रमंडळींनी कसलीही कसूर ठेवली नाही. या स्नेहाचे मोल मी करू शकत नाही. माझे मित्र शाहीर द. ना. गव्हाणकर यांनी या कलाकृतीतील पोवाडे तयार करून देऊन हातभार लावला आहे. या कालात श्री. वसंतराव देशपांडे, श्री कुमार गंधर्व, सौ. किशोरी आमोणकर, श्री. संगमेश्वर गुरव या मित्रांचा जिव्हाळा त्यांच्या सुरांइतकाच मोहविणारा ठरला. आज हे ऋण फेडण्याचा विचारही माझ्या मनात येत नाही.

शिवचरित्राबाबत इतिहासकारांचे जेवढे दुमत आहे, तेवढे दुमत असलेले चरित्र मिळणे कठीण. शिवजन्मापासून शिवमृत्यूपर्यंत प्रत्येक घटनेबाबत इतिहासकारांचे दृष्टिकोन वेगळे. या अडचणींतून वाटा शोधणे महाकठीण काम. पण याहीपेक्षा इतिहासकारांना मान्य असलेल्या अशा काही घटना सापडतात, की ज्यांबाबत माझ्यासारखा ललितलेखक साशंक होतो. उदाहरणच द्यायचे झाले, तर शास्ताखानाचे प्रकरण देता येईल. सर्व इतिहासकारांना हा लाल महालातील प्रसंग मान्य असल्याने मला तो जसाच्या तसा स्वीकारावा लागला. जो शिवाजी अत्यंत सावध आहे, थोर सेनानी म्हणून ज्याचे चित्र परिपूर्ण आहे, ज्याच्या कोशामध्ये वेडे साहस मुळीच नाही, तो शिवाजी चाळीस हजारांच्या छावणीत निर्धास्त असलेल्या लाल महालात मोजक्या साथीदारांसह प्रवेश करतो आणि दंगल उसळवितो, ही घटना केवढीही थरारक वाटली, तरी ती शिवाजीच्या स्वभावरेखेशी संपूर्ण सुसंगत वाटत नाही. लाल महालात शिवाजीने आपली माणसे पाठविली असतील, पण स्वत: शिवाजी तेथे जाणे संभवत नाही, असे मला वाटते. सर्व इतिहासकारांना हा प्रसंग मान्य, म्हणूनच मला तो जसाच्या तसा स्वीकारावा लागला. मी इतिहाससंशोधक

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नव्हे. याबाबत निर्णय करण्याचा अधिकार माझा नव्हे.

'श्रीमान योगी' पुरे झाल्याचे समाधान आज वाटत आहे. ही कलाकृती म्हणजे शिवचरित्रावरील सर्वांगीण विचार, असा माझा दावा नाही. शिवाजी ही व्यक्तिरेखा फार मोठी आहे. तिचे शेकडो पैलू आहेत. एका माणसाला या विभूतीचे सर्वांगीण दर्शन होणे कठीण. नेपोलियनवर शेकडो चरित्रे, कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. त्या सर्वांतून नेपोलियन या व्यक्तित्वाचे अनेक पैलू नजरेत आले. शिवाजीच्या बाबतीत तसेच व्हायला हवे. तरच त्या एकमेवाद्वितीय महापुरुषाचे खरे दर्शन घडेल. शिवचरित्र हे कलावंतापुढे कालातीत राहणारे असे आव्हान आहे. या चरितकहाणीत अनेक उणिवा असतील; चुका राहिल्या असतील, काही प्रसंगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन चुकला असेल, त्यांतील चुका निदर्शनाला आणल्या गेल्या, तर त्या पुढे सुधारण्यात मला आनंदच वाटेल. ते मी माझे कर्तव्यच समजतो.

श्री. नरहर कुरुंदकरांनी या कहाणीला प्रस्तावना दिली असली, तरी त्यांचे आणि माझे ऋणानुबंध निराळे आहेत. माझ्याइतकेच त्यांना शिवाजीबद्दल प्रेम. त्यामुळे या कलाकृतीच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत त्यांची सोबत मला मिळाली. अनेक बाबतींत दुमत होऊनही त्यांचा जिव्हाळा कधी आटला नाही, ना मैत्रीला तडा गेला.

या कामासाठी मी नांदेडला जेव्हा गेलो होतो, तेव्हा अनेक मित्र मला मिळाले. श्री. भगवानराव गांजवे यांच्या कृपेने नांदेड येथील सर्वोदय केंद्रात माझी राहण्याची व्यवस्था झाली. सौ. ताराबाई परांजपे आणि श्री. नागनाथराव यांच्या कृपेने पोटाचा प्रश्न सुटला. नांदेड मुक्कामात प्रा. भा.गं. महामुनी, माणिकराव पाटील, प्रभाकर कानडखेडकर, आर्.डी. देशपांडे, अण्णासाहेब गुंजकर, तात्यासाहेब कानोले या मंडळींनी काही कमी पडू दिले नाही. त्यांच्या लोभाचे विस्मरण कसे होणार?

गेल्या चार वर्षांत माझी अखंड पाठराखण कुणी केली असेल, तर ती चौघांनी -माझे दादा ती. डी.जे. जाधव, माझ्या वहिनी ती. सौ. लीलावती जाधव, आणि देखमुख पतिपत्नी या त्या चार व्यक्ती. तुरुंग-अधिकारी असल्याने माणसाला बंदोबस्तात कसे ठेवावे व त्याच्याकडून काम कसे करून घ्यावे, हे माझे दादा पूर्णपणे जाणतात. गेल्या चार वर्षांच्या अनुभवाने मला ती खात्री पटली आहे. देशमुखांच्या संयमाला सीमा नाहीत. (इतरांना त्यांची शंका असेल; पण मला नाही.) वाढत्या पानांचा हिशेब त्यांनी केला नाही. या पुस्तकासाठी होणारा अफाट खर्च मनात आणला नाही. माझी सारी जिद्द त्यांच्याच

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बळावर टिकली; आणि शेवटास गेली. यात अतिशयोक्ती थोडीशीही नाही. या चार माणसांचा मला खूप आधार वाटतो. या कहाणीचे जे यश असेल, त्यात या चौघांचा वाटा मोठा आहे.

श्री. पांडुरंग कुंभार या माझ्या सहायकाचा उल्लेख मला स्वतंत्रपणे करायला हवा. टिपणे-टाचणे काढण्यापासून आपल्या सुरेख हस्ताक्षरात 'श्रीमान योगी'ची सिद्ध प्रत बनवीपर्यंत सर्व श्रम या साथीदाराने जिव्हाळ्याने उचलले. त्याचे साहाय्य नसते, तर हे काम इतके सुखकर वाटले नसते.

'श्रीमान योगी' या चरितकहाणीत घालण्यासाठी ऐतिहासिक चित्रांची परवानगी मिळवून देण्यात श्री. मधुकरराव चौधरी यांचे साहाय्य झाले. सदर चित्रांची परवानगी प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियम (मुंबई), भारत इतिहास संशोधक मंडळ (पुणे), पारसनीस म्यूझियम (सातारा) या संस्थांनी दिली. या कामी श्री. डहाणूकर आणि मराठा मंदिराचे गावडे यांची फार मदत झाली. मी या सर्वांचा ऋणी आहे.

या चरितकहाणीचा जेव्हा संकल्प सोडला, तेव्हा ती.भाऊसाहेब खांडेकर यांनी या कार्याला आशीर्वाद दिला. गेली वीस वर्षे भाऊंचे आशीर्वाद सदैव माझ्या पाठीशी आहेत.

'श्रीमान योगी'ला ती. आचार्य अत्रे यांचाही आशीर्वाद लाभला.

या दोघांचे आशीर्वाद मी आपले भाग्य समजतो.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार श्री. हेब्बर यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार केले, आणि त्याचबरोबर छत्रपतींचे एक रेखाचित्र दिले. यापरते दुसरे भाग्य ते कोणते? या पुस्तकातील सर्व चित्रे निर्दोष व कलात्मक रीत्या छापली गेली, याचे श्रेय श्री. सच्चित सहस्रबुद्धे यांना आहे.

श्री. अरविंद मंगरूळकरांनी 'श्रीमान योगी' ची संपूर्ण प्रत नजरेखालून घातली. तीत उणिवा राहू नयेत, म्हणून परिश्रम वेचले. त्यांचा माझा जुना परिचय. त्यांचा उल्लेख केला नाही, तर फार मोठी उणीव राहील, म्हणूनच हे सांगावे लागत आहे.

हे पुस्तक सुबकपणे छापले जावे, म्हणून 'कल्पना मुद्रणालया' चे लाटकर बंधू, श्री.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वाडकर या मंडळींनी परिश्रमाची पराकाष्ठा केली. त्यांना या कामी झालेला त्रास मी पाहिला आहे. मी या सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

श्री. बाळासाहेब शिंदे, बाइंडर यांनी पुस्तक-बांधणीच्या वेळी एखादा फॉर्म चुकू नये, म्हणून दक्षता घेण्याची पराकाष्ठा केली. मित्रप्रेम हेच याचे कारण.

ऋण मान्य करून कधी फिटत नाही, आणि नावांचा नुसता उल्लेख करून कार्याची सांगता होत नाही, हे मी जाणतो. 'श्रीमान योगी' च्या कामी ज्यांचे अमोल साहाय्य लाभले, त्या सर्वांचा उल्लेख करणे कठीण आहे. अति जिव्हाळा आणि अनवधान हीच त्याची कारणे. पण यासाठी कोणी गैरसमज करून घेणार नाही, ही माझी खात्री आहे.

माता भवानीची कृपा आणि वाचकांचे निर्व्याज प्रेम हेच माझे धन आहे. आजवर त्यात कधी कमतरता पडली नाही. ते धन अखंड राहो, ही एकच प्रार्थना श्री गजाननापुढे करून मी आपला मनसुबा आवरता घेतो.

रणजित देसाई

कार्तिक शुद्ध प्रतिपदा, शिवशक २९५ — मु. पो. कोवाड,
तथा २२ ऑक्टोबर, १९६८ — ता. चंदगड, जिल्हा : कोल्हापूर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रस्तावना

प्रिय रणजित देसाई,

स.न.वि.वि.

आपणांकडून निघून औरंगाबादमार्गे नांदेडला २४-३-६६ ला येऊन पोचलो. योग असा चमत्कारिक की, घरी मुलीचे आजारीपण चालू होते. आता प्रकृती सर्वांची ठीक आहे. म्हणून स्वस्थपणे हे पत्र.

पुण्यास आपली भेट अकल्पित झाली. आपण छत्रपतींवर कादंबरी लिहिणार आहा, ही गोष्ट सुद्धा मला अनपेक्षित होती. म्हणून शिवाजी या विषयावरचे बारकावे मी चर्चू शकलो नाही. ते संक्षेपाने मी आपल्या निदर्शनास आणले पाहिजेत, असे वाटल्यामुळे हे पत्र.

दुर्दैवाने शिवाजीविषयी अधिकृत व चांगले चरित्र उपलब्ध नाही. औरंगजेब त्या मानाने सुदैवी निघाला. कारण यदुनाथ सरकारांच्यासारखा लेखक त्याला उपलब्ध झाला. शिवाजीला अजून योग आलेला नाही व नजीकच्या भविष्यकाळात येण्याची शक्यताही नाही. दत्तोपंत पोतदार 'प्रमाणित' चरित्र लिहू शकणार नाहीत, असे वाटते. युरोपीय इतिहासकार व बंगाली इतिहासकार सेन, सरकार यांच्यासारख्या थोर व्यक्तींना मराठी कागदपत्रांतील बारकावे माहीत नसतात व महाराष्ट्रीय संशोधकांना अजूनही निर्विकारपणे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिवाजीचा विचार करणे जमत नाही. ब.मो. पुरंदरे व बाळशास्त्री हरदास तर सोडाच, पण शेजवलकर, शर्मा, कुलकर्णी, डॉ. बाळकृष्ण, वैद्य यांनाही अभिनिवेश टाळता येत नाही. त्या मानाने दत्तोपंत आपटे यांनी फार शिस्तशीर काम चालविले होते. घटनांच्यापुरते बोलायचे झाले, तर हे कार्य माझ्या पाहण्यात आलेल्या पुस्तकांत श्री. दि. वि. काळे यांनी जास्तीत जास्त चोखपणाने केले आहे. विवेचन हा त्यांचा प्रांत नव्हता, आपण हे पुस्तक बारकाईने पाहावे, अशी आग्रहाची सूचना आहे.

शिवाजीच्या चरित्रविषयक साधनांत रामदासी पंथाच्या बखरी या सर्वांत जास्त अविश्वसनीय आहेत. मेरुस्वामी व दिनकर हे दोनच शिष्य असे आहेत की, जे समर्थ वारले, त्या वेळी वयाने प्रौढ होते. इतर सर्वांचे ज्ञान ऐकीव व विपर्यस्त आहे. त्यापेक्षा मराठेशाहीच्या बखरी अधिक विश्वसनीय आहेत. पण त्यांतही सर्वांत अविश्वसनीय मल्हार रामराव चिटणीसाची बखर व सर्वांत विश्वसनीय सभासदाची बखर आहे. दुर्दैवाने वस्तुस्थिती अशी आहे की, शिवाजीच्या संदर्भात फारसी साधने सुद्धा, अस्सल कागदपत्र वजा जाता, विश्वसनीय नाहीत. यापेक्षा विश्वसनीय पोर्तुगीज, फ्रेंच व डच रेकॉर्ड आहेत; आणि मराठी अस्सल कागदपत्र सर्वश्रेष्ठ साधने आहेत. आपण कोणत्याही घटनेबाबत स्वत:चे मत निश्चित करताना विश्वसनीयतेचा हा क्रम ध्यानात असू द्यावा व बखरकारांत सर्वांत विश्वसनीय म्हणजे सभासद. तोही फार ढोबळ चुका करतो, ही बाब समजून घ्यावी. आपणांशी बोलताना चिटणिशी बखरीचा परिणाम सतत जाणवत होता. अविश्वसनीयतेत ह्या बखरीचा क्रम फार खाली आहे.

कादंबरी-लेखनाचा आधार वास्तवाचे अवलोकन व आकलन हा असतो, अशी माझी धारणा आहे. हे आकलन व अवलोकन कलाकृती बनताना सलग, एकजीव अनुभवांचा आकार धारण करते. सामाजिक कादंबरीत आकलन-अवलोकनाची कक्षा वर्तमान वास्तव आहे. ऐतिहासिक कादंबरीत तिचे स्वरूप ऐतिहासिक वास्तव हे आहे. ऐतिहासिक वास्तव फुटकळपणे उपलब्ध होते. त्यातील रिकाम्या जागा भरणे, हे सारे वास्तव समूर्त साकार करणे, इतकेच खऱ्या ऐतिहासिक कादंबरीत कल्पिताचे स्थान असू शकते. कल्पिताचा पसारा ही सीमा ओलांडू लागला, म्हणजे मग त्या वाङ्मयाचे स्वरूप रंजनात्मक होते. हे काम नाथमाधवांनी या पूर्वी करून ठेवले आहेच. हरिभाऊंनी सगळा शिवाजी घेतला नाही. पण उष:काल, सूर्योदय, गड आला पण सिंह गेला, मध्ये काही टप्पे घेतलेले आहेत. नाथमाधव आणि हरिभाऊ यांत हरिभाऊ चांगले, पण दोघांतील फरक प्रमाणाचा आहे, प्रकाराचा नव्हे. याच रांगेत आपणांस उभे राहायचे आहे, की स्वामीच्या रांगेत उभे राहायचे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहे, याचा निर्णय आपण स्वत: घेतला पाहिजे. शेवटी कलाकृती उभी राहते सामर्थ्यवान व्यक्तिरेखेवर. व्यक्तिरेखेचे हे सामर्थ्य वास्तवाच्या आकलनातून येईल. आदर, श्रद्धा या बाबी तिथे अपुऱ्या पडतात. वरील 'उपदेश' मी करणार नव्हतो. आपण सहज बोलताना म्हणालात 'मी इतिहास, कल्पित दंतकथा, आख्यायिका, सारेच घेणार आहे', म्हणून वरील सल्ला अनाहूत दिला आहे. छत्रपतींचा 'अवतार' अगर 'संत' करण्यापेक्षा त्यातले भव्य आणि सलग माणूसपण रंगविणे मला महत्त्वाचे वाटते.

याबाबत काही घटनांचा प्रथम निर्देश केला पाहिजे. पहिली घटना म्हणेज मालोजीचा व बाबाजी भोसले ह्यांचा उल्लेख कागदपत्रांतून पांडे पेडगावचा जागिरदार म्हणूनच येतो. मालोजीला मिळालेल्या जागिरीपैकी निदान काही भाग त्याला वारसा-हक्काने मिळालेला आहे. शहाजी इ.स. १६०२ मध्ये जन्मला. १६०७ ला मालोजी वारले. त्या वेळी शहाजी पाच वर्षांचे होते. शहाजीच्या लहानपणी मालोजी लखुजीराव जाधवाच्या पदरी बारगीर होता. ही, रंगपंचमीच्या रंगाची व डुकरे मारून मशिदीत टाकण्याची या सर्व बखरकारांच्या हकीकती अस्सल पुराव्याच्या विरोधी जाणाऱ्या, म्हणून रद्द आहेत.

जिजाबाईस एकूण सहा अपत्ये झाली. त्यांत संभाजी पहिला. शिवाजी दुसरा. असे दोन मुलगे वाचले. शहाजीचे जिजाबाईवर फार प्रेम नव्हते, असे दिसते. पण तिला, बेताचे का होईना, संसारसुख शहाजीने दिले आहे.

स्वत: शिवाजीमहाराजांनीही आपले संसार असेच केले आहेत. कोणतीच बायको त्यांची लाडकी दिसत नाही. लग्न करावे, पोटभर अन्न, भरजरी कपडे, अलंकार, सोयीनुसार अंगभोग यांपलीकडे शिवाजीने कुठल्याच राणीला महत्त्व दिले नाही. सोयराबाई ही अभिषिक्त पट्टराणी; पण तिलाही शिवाजीच्या मनात फारसे महत्त्व दिसत नाही. शिवाजीमहाराजांना एकूण बायका आठ. उपस्त्रिया असल्याचा उल्लेख रामदासी बखरीत आहे. त्याला महत्त्व देण्याचे कारण नाही. या पत्नींच्यापैकी अगदी शेवटचे विवाह १६५७ चे आहेत. शिवाजीच्यानंतर सती गेलेली पुतळाबाई हिचा शिवाजीशी विवाह १६५३ साली झाला, असे इतिहासकार मानतात. राज्याभिषेकाच्या वेळी या आठपैकी चार वारलेल्या होत्या. या मृत पत्नींत सगुणाबाई, सईबाई, काशीबाई, या तीन नक्की मृत . चौथी कोण मृत होती, हे नक्की नाही. सोयराबाई, पुतळाबाई नक्की हयात होत्या. राज्याभिषेकापूर्वी शिवाजीची मुंज लावण्यात आली. त्यानंतर पूर्वीच्याच पत्नींपैकी हयात असणाऱ्या चौघींशी वैदिक विधिपूर्वक लग्ने लावण्यात आली. या घटनेने अनेकांचा गोंधळ उडालेला आहे.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काही बखरींनी 'राज्याभिषेक प्रसंगी लग्न' या ऐकीव बातमीवर पुढील इमला रचला आहे. इंग्रज व डच यांच्या रिपोर्ट्समध्ये याचमुळे गोंधळ आहे. नेमक्या ह्याच ठिकाणी जदुनाथांनी चक्कर खाल्लेली आहे. शिवाजीबरोबर सती गेलेल्या पुतळाबाईंनी महाराजांशी यथासमय २७ वर्षे वहिवाट नांदणूक केली आहे.

भोसल्यांचे घराणे फार मोठे प्रतिष्ठित, असे त्या काळी मानले जात नसे. हे विधान तारतम्याने घ्यायचे आहे. मालोजींची पत्नी फलटणकरीण होती. शिवाजीची एक पत्नी निंबाळकर आहे. त्याची आई जाधव घराण्यातील. एक पत्नी जाधव घराण्यातील आहे. त्या वेळी शिर्के घराणेही वजनदार होते. तेही जागिरदार होते. तत्कालीन शहाण्णव कुळींची घराणी कोणती, हेही एकवार पाहिले पाहिजे. मालोजी लखुजीच्या पदरी बारगीर होता. त्याने जिजाबाई-शहाजी विवाह दडपणाने घडविला, हा संदर्भ चुकीचा आहे, म्हणून घराण्याचा प्रतिष्ठितपणा थोडा तारतम्याने स्वीकारला पाहिजे.

शिवाजीच्या कर्तृत्वाची पार्श्वभूमी म्हणून शहाजी व त्याचा वारसा म्हणून संभाजी या साखळीत तीन माणसे पाहण्याची पद्धत आता इतिहासात रूढ झाली आहे. संभाजी दारू पीत असे, की नसे, त्याला नाटकशाळा होत्या, की नव्हत्या, त्याने सोयराबाई, अण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे यांच्याशी जे वर्तन केले, ते समर्थनीय आहे का? त्याचा बदफैलीपणा स्वीकारार्ह, की नाही, हे प्रश्न अजून वादाचे आहेत. एका गोष्टीवर आता इतिहासकार वाद घालत नाहीत. ती म्हणजे मराठेशाहीला निर्णायक लढाई शेवटी मोगल सत्तेशी द्यायची आहे; विजापूरकर, कुतुबशाहीशी नव्हे, या निर्णयावर शिवाजी १६६० ते १६६४ या कालखंडात केव्हातरी आला. शाहिस्तेखानाची स्वारी हा केवळ आरंभ, ह्याची जाणीव शिवाजीला होती. आग्रा येथून सुटून आल्यानंतर, ही निर्णायक लढाई अजून पुढेच आहे, हे भान शिवाजीला होते. त्याच्या शेवटच्या काळात मोगल फौजा मराठी राज्याच्या सीमेवर जमत होत्या. (१६६९ पासून) व स्वतः औरंगजेब ह्या मोहिमेसाठी दक्षिणेकडे येत आहे, ह्याची खात्रीलायक बातमी १६८० च्या जानेवारीपासून येऊ लागली. कारण दिल्लीत तशा तयाऱ्या सुरू झाल्या होत्या. मरणाच्या शय्येवर त्याचा प्रमुख विचार हा होता. कारण एव्हाना दीड लक्षाच्या आसपास सेना सरहद्दीवर उभ्या होत्या. शिवाजी वारला, त्या पंधरवड्यात सीमेवर चकमकी सुरू झाल्या होत्या. मोरोपंत पिंगळे, हंबीरराव मोहिते, अण्णाजी दत्तो हे तिघेही या आक्रमणाला तोंड देण्याच्या तयारीत होते. १६७९ पासून शिवाजी सतत दारूगोळा विकत घेत आहे, साठवीत आहे, हेही महत्त्वाचे आहे. हा फार दिवसांचा अपेक्षित हल्ला शेवटी १६८१त सुरू होतो. तीन लक्ष फौजा, नवीन राजा,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सर्व बाजूंनी चढाई. सामनेवाला फोडाफोड कपटनीतींचा तज्ज्ञ व युद्धशास्त्राचा ज्ञाता. इतके असूनही १६८५ सालपर्यंतच्या अव्याहत लढाईचा निष्कर्ष काय? तर मराठी प्रदेशातून फौज मागे घेणे व विजापूर-गोवळकोंड्याकडे वळविणे. इथे संभाजीचे मुल्कीकारभार प्रवीणत्व, युद्धशास्त्रतज्ज्ञता, डावपेच, स्वत:च्या सेनेला प्रेरकत्व, हे सारेच पणाला लागले आहे. छत्रपतींच्या जीवनात प्रचंड फौजांशी धीमेपणे, कारभार विस्कळीत होऊ न देता लढण्याचा असा प्रसंग नाही. संभाजीचे मोजमाप करताना लहरी, रागीट, उतावळा, हट्टी ही बखरीची विशेषणे प्रमाण मानायची, की दीर्घसूत्री, धूर्त, खोल, धीमा, सावध ही डच, इंग्रज रिपोर्टातील विशेषणे प्रमाण मानायची, याचा निर्णय आपण केला पाहिजे. पुन: एकवार सांगतो की, मी संभाजी रंगेल, बदफैली होता, की नाही, यावर नव्हे, स्वभावविशेषावर लक्ष वेधीत आहे. या माणसाची पहिली २२-२३ वर्षे तुम्हांला रंगवायची आहेत. व्यक्तिश: माझ्या मते संभाजी चरित्रानेही फारसा वाईट नव्हता. मराठा सरदारांना हुक्का, गांजा, अफू, दारू अशी माफक व्यसने त्या काळी असत. राजाराम सदैव अफूच्या नशेत असे. संभाजीला दारूची सवय होती. औरंगजेब स्वत: दारू मरेपर्यंत पीत होता. तिचा परिणाम राजकारणावर नाही. तसाच संभाजीचा प्रकार. त्याला आजोबाप्रमाणे नाचगाण्याचाही शौक होता. राजाराम, शाहू, शहाजीप्रमाणे त्याला नाटकशाळाही होत्या. एखाद-दुसरी बाई पळविण्याचे प्रकरण त्याच्या जीवनात आले असण्याचा संभव आहे. पण त्याबद्दल विश्वसनीय पुरावा नाही. संभाजीच्या बदफैलीपणाचा पहिला उच्चार १६९० नंतरचा आहे. १६७४ पूर्वी संभाजीच्या जीवनात कोणतीही भानगड नाही. या काळी तो आजीजवळ असे. हा वेळपर्यंतच्या पत्रांतून स्तुतीखेरीज त्याच्याविषयी काही ऐकू येत नाही.१६८९ साली संभाजी पकडला व मारला गेला. हा वेळपर्यंतच्या लढाईचा निष्कर्ष असा : दरम्यान संभाजीने पोर्तुगीजांचे ३/४ राज्य जिंकून स्वत:च्या प्रदेशाला जोडले. कर्नाटकातील राज्य दुप्पट झाले. सेना मूळच्या दुप्पट झाली. महाराष्ट्रात पाच-सहा किल्ले गेले. तीन-चार नवीन मिळाले. औरंगाबाद व बऱ्हाणपूर लुटले. गुजरातमध्ये औरंगजेबाच्या ७५ हजारच्या फौजा नुसत्या अडकून ठेवल्या होत्या (धनाजीने). मराठी राज्य म्हणजे १६४५ चे नव्हे. १६७४ चे नव्हे. १६८० चेही नव्हे. १६८१ ते १७०७ च्या प्राणांतिक, निर्णायक लढाईनंतर जे शिल्लक उरले, ते मराठी राज्य. शिवाजीच्या राजकारणाचा विकास संभाजीत दिसतो. तो पाहून घेतला पाहिजे.

शिवाजीच्या कार्याला मागे शहाजीची परंपरा आहे. प्रथम राजवाडे यांनी ह्या घटनेचा उच्चार केला. नंतर आयुष्यभर या कल्पनेला शेजवलकरांनी विरोध केला. शेवटी स्वत:ही ही कल्पना मान्य केली. डॉ. बाळकृष्ण आणि काळे यांनीही ह्या कल्पना स्वीकारल्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहेत. ही कल्पना मान्य केल्यावाचून काही घटनांची संगती लागतच नाही. पहिली बाब म्हणजे, शहाजी निजामशाहीचा सरदार. त्याच्यासाठी निजामशाहीने लखूजी जाधव गमावला. तरी शहाजी १६२४ ला आदिलशहाकडे गेला. तिथे त्याने अफाट पराक्रम केला. पण १६२६ मध्ये तो निजामशाहीत परत आला. १६३० ला तो मोगल सरदार झाला. १६३२ ला पुन्हा निजामशाहीत आला. सर्व उलाढालींत आपली पुणे जहागीर त्याने संभाळली. फौजाही संभाळल्या. निष्ठा निजामशाही, आदिलशाही, मोगल यांच्याशी नव्हे, ती फक्त शहाजीशी. ही सवय आपल्या जहागिरीतील वतनदारांना त्यानेच लावली. दक्षिणेतील सर्व हिंदू-मुसलमानांचे हितसंबंध सारखे असून, निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही आणि सर्व सरदार यांनी परस्पर सहकार्याने मोगलांशी लढावे, त्यांना दक्षिणेत येऊ देऊ नये, ह्या धोरणाचा आरंभकर्ता शहाजी. पुढे खवासखान, मुरार जगदेव, अक्कण्णा, मादण्णा यांनी हे धोरण स्वीकारले. शिवाजीने वेळोवेळी ह्या धोरणांचा स्वीकार व उच्चार केला. संभाजी तर स्वत:ला कुतुबशाही-आदिलशाहीचा पालकच समजे.

शहाजीने पुणे जहागिरीचा कारभारी दादोजी कोंडदेव नेमला. स्वत:ला कर्नाटकची जहागिरी घेऊन, तिचा कारभार वडील मुलगा संभाजीसाठी व पुणे धाकटा मुलगा शिवाजीसाठी, ही वाटणी शहाजीने १६३६ लाच केली. दादोजीला ह्या भागात आदिलशाही सुभेदार करून १५-२० किल्ले, दोन-तीन हजार फौज, शिवाजीला उपलब्ध करून देण्याचा उद्योग शहाजीचाच. शिवाजीला पुण्याला पाठविताना पेशवे, मुजुमदार, डबीर, सबनीस शहाजीनेच दिले आहेत. दादोजीच्या उपस्थितीत रोहिडेश्वरावर शपथा-अहाणा झाल्या. हा प्रसंग ह्या पार्श्वभूमीवर समजून घेतला पाहिजे. शिवाजीच्या राजमुद्रेचे पहिले निर्णायक पत्र २८ जानेवारी, १६४६ चे आहे. १६ वर्षांच्या शिवाजीच्या मनात नवे राज्य निर्माण करण्याचा प्लॅन राजमुद्रेसकट तयार होता, ही गोष्ट जरा कल्पनेच्या पलीकडील आहे, पण खरी अडचण यापुढे आहे. राजवाडे यांनी पंधराव्या खंडातले, पत्र ४३७ छापले आहे. या पत्रावर शहाजीची राजमुद्रा आहे. पत्र २४ सप्टें., १६३९ चे आहे. पत्र अविश्वसनीय का? याचे उत्तर एकहीजण देत नाही. या वेळी शिवाजीचे वय ९ वर्षांचे आहे. इकडे शिवाजी रांगत होता. माती खात होता व तिकडे मराठी राज्याच्या उभारणीचा प्लॅन आखीत होता, असे तरी म्हणावे किंवा शहाजीच्या कर्तृत्वाची पार्श्वभूमी मान्य तरी करावी.

शहाजी कर्नाटकात एक स्वतंत्र राज्य जन्माला घालीत होता. इकडे महाराष्ट्रातही राज्य जन्माला घालीत होता. तो स्वत:ला राजा म्हणवीत होता. दरबार भरवीत होता. समकालीन

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

विजापूर दरबारने हे नीट ओळखून १६४८ साली शहाजी गिरफ्तार केला; आणि इकडे कर्नाटकावर व तिकडे पुण्यावर दोन स्वतंत्र स्वाऱ्या काढण्यात आल्या. इकडे विजापूरकरांचा पराभव शिवाजीने केला. याचे गोडवे आपण गातो. तिकडे संभाजीनेही विजापूरकरांचा कडवा प्रतिकार करून पराभव केला, याची नोंद घेणे विसरतो. दोन्हींकडील तयाऱ्या, शिस्त शहाजीच्या आहेत. अजून शिवाजीच्या तालमीत तयार झालेली मंडळी उदयाला यायची आहेत. कावजी मल्हार यांनी ही लढाई प्रमुखत: लढविली. ह्या मंडळींना तालीम शिवाजीची नव्हे. यानंतर तह होऊन इ.स. १६४९ मे ला शहाजीजी सुटका झाली. त्या तहात शिवाजीने सिंहगड रिकामा करावा, ही अट आहे. विजापूरच्या सेनेचा मोड करणे निराळे व बाप कैदेतून सोडविणे निराळे. बखरकारांना व त्यांच्यावर विसंबून मते बनविणाऱ्यांना काय वाटेल, याचा विचार न करता शिवाजीने ह्या वेळी मोगलांशी सामोपचाराचे बोलणे लावले. सिंहगड रिकामा केला. तिकडे संभाजीने बंगळूर व कंदर्पी हे किल्ले रिकामे केले व बाप सोडवला. बंगळूरला संभाजी व पुण्याला शिवाजी यांच्या सर्व वागणुकीमध्ये योजनाबद्धता व एकसारखेपणा दिसतो. त्याचे कारण मागे शहाजींची पार्श्वभूमी व त्यांच्या तालमीत तयार झालेले सरदार, कारभारी हे आहे. पुणे जहागिरीत शिवाजीच्या निर्णयाविरुद्ध शहाजींकडे अपील करण्याची प्रथा सर्रास रूढ होती. शिवाजीचा हुकूम कोणताही असो, अंमल अमुक प्रकारे व्हावा, असा निर्णय जिजाबाई देई. तोच पाळला जाई. हा प्रकार १६५३ पर्यंत दिसतो व शहाजीने दिलेला शेवटचा हुकूम १६५५ चा आहे. १६५५ पर्यंत बहुतेक महत्त्वाच्या प्रकरणी शहाजींचा निर्णय अंतिम मानला जाई. ह्या अनुमानास पुरावा आहे. शहाजीविरुद्ध विजापूरकरांकडे दाद मागण्याची प्रथा पुणे जहागिरीत नव्हती. या अनुमानालाही आधार आहे. शिवाजी अगदीच मोकळा नव्हता. मुलकी व लष्करी कारभारात त्यावर बंधन घालणारी, त्याला वळणावर ठेवणारी शक्ती होती. मुलकी कारभारात तर जिजाबाईच १६७४ पर्यंत महत्त्वपूर्ण काम करीत होती. शहाजीस घोरपडे याने दगा देऊन कैद केले, हा दंश जिजाबाई शेवटपर्यंत विसरली नाही. घोरपडेचा सूड घ्यावा, हा तिचा मनोदय पत्रद्वारे तिने शिवाजीला कळविला आहे. शिवाजीने बाजी घोरपडेला मारून मुधोळ लुटले. जिजाबाईला शहाजीचा अपमान किती झोंबत होता, याचा हा पुरावा जिजाबाईचे मन समजून घेताना महत्त्वाचा आहे.

चिटणिशी बखर म्हणते, कारभाराबाबत शिवाजी-जिजाबाई यांत मतभेद येत. शेवटी असे ठरले की, जिजाबाईने कारभारात लक्ष देऊ नये. पुराव्याने चिटणिसांचा मूर्खपणा दाखविता येतो.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मागे कर्तबगार शहाजी, पुढे कर्तबगार संभाजी, मध्ये महान निर्माता शिवाजी ह्या मानवी पद्धतीने शिवाजीचे मोठेपण समजून घेतले जावे. शिवाजीने स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला. पण आपण रजपूत आहोत, या भूमिकेचा प्रारंभ शहाजी हा आहे. घोरपडे स्वत:ला सिसोदियावंशीय रजपूत म्हणत. आपण त्यांचे बिरादर आहो; म्हणून त्यांच्या इस्टेटीत आपला वाटा आहे, हा दावा शहाजीने १६४० सालापूर्वीच सरकारमान्य करून घेतला. खरे म्हणजे, भोसले रजपूत असण्याचे काहीच कारण नव्हते. पण एकदा शिपाईगिरी पत्करल्यावर मालोजी स्वत:ला श्रीमंत मालोजी राजे म्हणवू लागला. शहाजीने आपण रजपूत क्षत्रिय आहो, ही भूमिका कायदेशीर करून घेतली. या मागच्या पुराव्याचा उपयोग पुढे शिवाजीला झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर शिवाजीने औरंगजेबाला पत्र पाठविताना, तो भारताचा सम्राट आहे, आपण सेवक आहो, असाच मायना लिहिला आहे. याचीही नोंद घ्यावी.

दादोजी कोंडदेव याने आत्महत्या केली, अशी भूमिका काही बखरींनी घेतली आहे. या भूमिकेचा उच्चार पुढे अनेकांनी केला आहे. सर्व पुरावा तपासून दि.वि. काळे यांनी आत्महत्या रद्द ठरविली आहे. शेजवलकरांनी पुन्हा एकवार आत्महत्या रद्द ठरविली आहे. उतारवयात आजारी पडून दादोजी स्वाभाविक मरणाने वारला, हीच गोष्ट अस्सल साधनांनी सिद्ध होते. म्हणून बखरीच्या भूमिकेत अर्थ नाही, असा शेजवलकरांचा निर्णय आहे. सध्या बेंद्रे आत्महत्या ठरविण्याच्या उद्योगात आहेत. आत्महत्येला अस्सल पुरावा ते कोणता देतात, पाहू. तूर्त तरी अस्सल साधने स्वाभाविक मरण, सभासद स्वाभाविक मरण. ९१ कलमी बखर स्वाभाविक मरण असे स्वरूप आहे. अस्सल साधनांत आत्महत्येला आधार नसेल, तर बखरींचे ढीग उपयोगाचे नाहीत.

आमचे बखरकार दंतकथेला फार महत्त्व देतात. एक सनपुरीची बखर म्हणून आहे. तिच्या मते महाराष्ट्रात पुंडावा फार झाला, म्हणून बाळाजी विश्वनाथने सुरक्षिततेसाठी येसूबाई व शाहू यांना दिल्लीला नेऊन औरंगजेबाच्या स्वाधीन केले. त्याची पुत्री बेगम म्हणाली : हा माझा धर्माचा लेक. बाबा हुजूर. तुमचा नातू. औरंगजेबाला बहुत खुशी झाली. त्याने पोराचे नाव सज्जन (शाहू) ठेवले. बाळाजीबरोबर फौजा दिल्या. त्या फौजा घेऊन बाळाजी महाराष्ट्रात आला. त्याने सर्व गुंडांचा बंदोबस्त केला. राज्य ठाकठीक केले. मग औरंगजेबाने शाहूचे लग्न केले व खूप इनाम देऊन महाराष्ट्रात पाठवून दिले व बाळाजीरावाला त्याचा प्रधान म्हणून काम पाहण्याची आज्ञा केली. सदर बखर मल्हार रामराव चिटणीस यांच्या बखरीपूर्वीची आहे.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ज्या घटना घडत होत्या, त्यांचा अन्वयार्थ बखरकारांना नीटसा कधी कळलाच नाही. मराठ्यांनी सारा भार वर्चस्वाखाली आणला, तरी बखरकारांचे मत की, 'मराठी फौज पाठीवर काठी उडेपावेतो लढणारी. एरव्ही झाडास बांधले, तर झाड घेऊन पळणारी. भारताचा सम्राट दिल्लीपती. त्याची फौज दोन लाख. त्याचा सम्राट वंदारचा पातशहा. त्याची फौज पाच लाख' ही त्याची समजूत. सदाशिवरावभाऊ शाहूचा प्रधान. ही त्यांची माहिती. ह्या घोर अज्ञानातून मल्हार रामराव मोकळा नाही. ९१ कलमी बखरीचा लेखकही मोकळा नाही. त्याची समजूत ही की, औरंगजेबाच्या दर बहिणीवर बलात्कार केल्यामुळे त्याने दारा मारला. शहाजहान कैदेत घातला. मोंगल राज्यात वारसा-हक्काची लढाई हे काय प्रकरण आहे, याची एकाही बखरकाराला दाद ना फिर्याद. शाहू मोगलांनी का सोडला, हे एकाही बखरकाराला समजले नाही. स्वत: सभासदाचे ज्ञान सुद्धा असेच. फारसी तवारीखकारांना निदान तपशीलवार माहिती होती. तीही या बखरकारांना नसे. अफजुलखान मारला गेला, ही बातमी येताच बडी साहिबीण रडू लागली. तीन दिवस अन्नोदक घेतले नाही. हे त्यांचे आकलन. सभासदाला शिवाजीच्या राजकारणाचे मर्म किती समजले होते, ते पाहावे, तर निराशेखेरीज काहीच पदरात पडत नाही.

चंद्रराव मोरे आणि शिवाजीने जावळीचे खोरे घेणे ह्याही ठिकाणी हाच प्रकार आहे. जावळीच्या खोऱ्याला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. यादवांचे राज्य पूर्णपणे जिंकल्यानंतर व समाप्त केल्यानंतर हा भाग जिंकण्याचा प्रयत्न मलिक काफूरने केला, पण परिणामी ३००० फौजा त्याला गमवाव्या लागल्या. महमूद गावाननेही या खोऱ्यात शिरण्याचा प्रयत्न केला होता. तो अयशस्वी झाला. अतोनात नुकसान झाले. म्हणून मुस्लिम राज्यकर्त्यांनी ही भूमिका घेतली की, येथील स्थानिक जहागिरदार आपले मांडलिकत्व नाममात्र स्वीकारतो, इतक्यावरच समाधान मानावे. यापुढे जाऊन जावळीच्या खोऱ्यात मुसलमानांचे पाऊल रोवले जाऊ शकले नाही. या भागाचे हे महत्त्व ओळखून आरंभापासून शिवाजीने मोरे घराण्याशी मैत्री ठेवली होती. दौलतराव मोरे ('चंद्रराव' ही पदवी) यांचा व शिवाजीचा चांगलाच मित्रभाव होता. दौलतरावांच्या मृत्यूनंतर त्याच्या बायकोने दत्तक घेतलेला कृष्णराव टाळून शिवाजीने यशवंतराव मोरे जावळीच्या खोऱ्यात अधिपती केला होता. ह्या घटना १६७४ इ.स. पर्यंतच्या आहेत. शिवाजीचे वय पाहता, ह्या राजकारणात दादोजीचा हात अधिक होता, हे दिसते. जावळीच्या खोऱ्यात शिवाजीचे वर्चस्व वाढते आहे. त्याला पायबंद बसावा, म्हणून १६४९ साली अफजुलखानास वाईचा सुभेदार करण्यात आले. हळूहळू यशवंतराव मोरेशी शिवाजीचे बिनसत गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

महंमद आदिलशहाच्या रुग्णतेमुळे आदिलशाहीत गोंधळ आहे. अफजुलखान कर्नाटकात आहे. त्याचा फायदा घेऊन, शिवाजीने सर्व बाजूंनी जावळीच्या खोऱ्यावर हल्ला केला. ही घटना १६५६ च्या जानेवारीतली आहे. मग मोरे रायगडावर बसला. हा गड तीन महिन्यांच्या लढाईनंतर पडला. शेवटी मे च्या सुमारास रायगड शिवाजीने जिंकला. हा यशवंतराव नजरकैदेतून पळण्यासाठी कारस्थाने करू लागला. ती कारस्थाने उघडी पडली. शिवाजीने यशवंतरावाची गर्दन आरोप ठेवून मारविली व जावळी हा आपला सुभा केला. या प्रकरणी पराक्रम आहे. योग्य वेळ साधून हल्ला करणे आहे, चिवटपणे लढून जिंकणे आहे. हा दुर्गम प्रदेश मराठेशाहीच्या संरक्षणाला फार आवश्यक होता, हे ओळखणे आहे. त्या भागात आपले मुख्य केंद्र ठेवणे आहे. घातपात, दगा, खून, लहान मुले मारणे हा भाग नाही. सोयरिकीचे बोलणे लावून दगा करणे हा बखरकारांचा शोध आहे. शिवाजी फार संत होता, दगा-फटक्याचे खूनी राजकारण न करणारा सत्पुरुष होता, असा ह्याचा अर्थ नव्हे. तर या प्रकरणी दगा-फटका दिसत नाही, इतकाच याचा अर्थ. मोऱ्याचे दोन पुत्र शिवाजीने पकडून आणले. खाऊपिऊ घालून निमजग्याजवळ मारले. ह्या घटनेला बखरीबाहेर पुरावा नाही. शिवाजीच्या दगाबाजीच्या घटना फारशी तवारीखकार देतात (खऱ्या आणि खोट्या); पण या घटनेचा तेही उल्लेख करीत नाहीत.

अफजुलखानाचा वध ह्या घटनेने कादंबरीकाराला आकर्षित करून घ्यावे, ही अगदी स्वाभाविक गोष्ट आहे. ती घटना फक्त एका विशिष्ट कामाचा भाग आहे, इकडे कादंबरीकाराचे फारसे लक्ष नसते. १६४५ पासून शिवाजीच्या कार्याला आरंभ झाला व त्याने प्रथम सिंहगड हा महत्त्वाचा किल्ला जिंकला. लौकरच पुरंदर ताब्यात घेतला. १६४८ ला शिवाजीचा बीमोड करावा, म्हणून विजापूरने सेना पाठविल्या. १६४९ ला शहाजीशी तडजोड झाली. त्याच वेळी शिवाजीचे प्रस्थ वाढू नये, म्हणून अफजुलखानाला वाईचा सुभेदार करण्यात आले. तरी शिवाजीने जावळीचे खोरे १६५६ ला घेतलेच. या पार्श्वभूमीवर अफजुलखान चाल करून येत आहे. शिवाजी शूर आहे. धाडसी आहे. प्रसंगी संधी साधून दगा-फटका करणारा आहे. आपले त्याचे जुने शत्रुत्व आहे. आपण त्याचा भाऊ मारला. आपला सूड घेणे ही शिवाजीची प्रतिज्ञा आहे, हे सारे ज्ञात असणारा अफजुलखान स्वत: शूर, धाडसी, कपटनीतिपटू होता. जावळीच्या खोऱ्यात सेना मागे सोडून, हा एकाकी शिवाजीस भेटण्यास तयार कसा झाला, हेच माझ्यासमोर कोडे आहे. शक्तीच्या मस्तीत, आढ्यतेत गाफिलगिरी करणे ही खानाची प्रकृती नव्हे. काही फारशी साधने सांगतात की, भेटीच्या वेळी दगा-फटका होणार नाही, असे आश्वासन जिजाबाईने शपथपूर्वक दिले होते व जिजाबाईची करारी, सत्यनिष्ठ अशी ख्याती होती. मुलगा तिच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ऐकण्यात आहे, अशी समजूत होती. वकिलामार्फत मिळालेल्या जिजाबाईच्या या आश्वासनावर विसंबून खान भेटीस तयार झाला. ही हकीकत समाधानकारक आहे; पण एकही विश्वसनीय साधनग्रंथ, बखर अगर तवारीख ही हकीकत देत नाही. उत्तरकालीन दुय्यम महत्त्वाच्या फक्त फारसी साधनांत या घटनेचा उल्लेख आहे.

शिवाजी सावधपणे अफजुलखानाच्या भेटीस गेला. अफजुलखानाने दगा देण्याचा प्रयत्न केला, म्हणून शिवाजीने आतडी बाहेर काढली, ही मराठी बखरकारांची भूमिका पुराव्यावर टिकणारी नाही. अफजुलखानाचा निकाल लावून, आपली दहशत व कीर्ती वाढविण्याचा व विजापूरला जन्मभर ध्यानात राहील, असा धडा देण्याचा शिवाजीचा हेतू दिसतो. खान दगा देवो, न देवो, त्याला जिवंत सोडावयाचा नाही, हा निश्चय मनात धरूनच शिवाजी सगळी योजना आखीत होता. खानाचा मूळ हेतू पुण्याकडे कूच करण्याचा, पण शिवाजी प्रतापगडावर येऊन बसला व खानाशी बोलणी करण्यास तयार झाला. त्यामुळे खानाला जावळीच्या खोऱ्यात जाणे भाग पडले. शिवाजी पुण्याकडे असता, तर लढणे सोपे होते. खानाने फोडाफोडीचे राजकारण केलेले होते. त्यात यश आले असते, तर मग शिवाजीचा पराभव सोपा होता. जावळीच्या खोऱ्यात वाटाघाटीच सोयिस्कर, असा काहीतरी अदमास खानाचा असावा. खानाचा मोर्चा आपल्याकडे वळतो आहे, याची बातमी शिवाजीला मार्चच्या शेवटी लागली. खान विडा उचलून, फौजा घेऊन निघाला, तो थेट शिवाजीच्या मुलखात. ही मांडणी नाटकी आहे. मे-जून १६५९ मध्ये ठिकठिकाणी आदिलशाही फर्माने रवाना झाली. त्यांत शिवाजीच्या समाप्तीसाठी खानाची पाठवणी होत आहे, तुम्ही खानाला मदत करा, शिवाजीला कोणतेही साहाय्य करू नका, असे आदेश आहेत. शिवाजी पावसाळ्यापासून जावळीच्या खोऱ्यात ठाण मांडून बसला होता. खानाचे आक्रमण सुद्धा व्यापक होते. त्याचे वेगळे सरदार शिवाजीच्या मुलुखात वेगळ्या भागांत ठाण मांडून होते. शिवाजीने या फौजांना कुठेही मैदानात तोंड दिलेच नाही. त्यामुळे वाटाघाटी भाग पडल्या.

शिवाजीची योजना अशी : प्रतापगडच्या पायथ्याशी खानाचा वध, प्रतापगडजवळील सेनेवर सिलीबकर व बांदल यांनी हल्ला करणे. जावळी-वाई मार्गावरील फौजा नेताजीने विध्वंस करणे, पारघाटकडील फौजांवर मोरोपंत पिंगळे यांनी हल्ला करणे. पन्हाळगड अचानक हल्ला करून घेणे, आणि शक्य त्या त्वरेने थेट विजापुरापर्यंत धडक देणे. या योजनेची पूर्ण आखणी निदान दोन महिने तरी चालू असावी. खानाने दगा दिला काय, न दिला काय, एवढी पूर्वतयारी वाया जाऊ देण्याइतका शिवाजी खचित मूर्ख नव्हता. प्रत्यक्ष

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भेटीच्या वेळी काय घडले, खानाने शिवाजीची मान बगलेत दाबली, की नाही, या चर्चा मेलोड्रामासाठी ठीक आहेत. शिवाजीने हत्यार कोणते वापरले? तलवार, वाघनखे; की बिचवा? माझ्या मते तलवार, पण बिचवा व वाघनखे यालाही हरकत नाही.

डच रिपोर्टाच्या मते इकडे शिवाजी विजापूरवर धडक देत आहे. त्या वेळी प्रचंड फौजा घेऊन शहाजीही विजापूरवर चालून येत होता. पण कुठेतरी योजना हुकली. शिवाजीच्या फौजा विजापूरपासून सोळा मैलांवर आल्या व तीन दिवस वाट पाहून परतल्या. कर्नाटकातील फौजा एक आठवड्यानंतर आल्या व २० मैल मागूनच परतल्या. या डच रिपोर्टाला पूरक असा मजकूर फारसी साधनांतून आहे. (असे म्हणतात.) शिवाजीच्या राजकारणात हा शहाजीचा शेवटचा उल्लेख अफजुलखान वधाच्या बातमीपाठोपाठ विजापूर दरबारने नवी स्वारी रुस्तुम जमानीच्या आधिपत्याखाली काढली. पण तिलाही फारसे यश आले नाही. शिवाजी हा हिंदूंच्या इतिहासातील अपूर्व आणि अद्वितीय माणूस. त्यामुळे त्याची ओळख मित्रांना तर लौकर झाली नाहीच, पण शत्रूंनाही झाली नाही. शिवाजी जास्तीत जास्त ओळखला असेल, तर औरंगजेबाने. त्याने आपल्या पहिल्या सुभेदारीच्या वेळीच आदिलशाहीला शिवाजीबद्दल इशारा दिला होता. दुसऱ्या सुभेदारीच्या वेळी तर शिवाजीने जुन्नर, भिवंडी मारून औरंगजेबाला चुणूक दाखविलीच होती. त्याच वेळी शहाजहान आजारी पडल्याने आलमगीर उत्तरेत गेला. जाताना शिवाजीशी सुलूख करून गेला. जून १६५९ ला औरंगजेबाचे राज्यारोहण झाले. तिथे शिवाजीने आपला प्रतिनिधी पाठविलेला होता. औरंगजेबाने जुलैमध्ये शिवाजीला पोशाखही पाठविला. अशी सगळी गोडागोडी होती. जून १६५९ ला शाहिस्तेखान दक्षिणेचा सुभेदार म्हणून आला. पण इकडे शिवाजीने अफजुलखान मारला व विजापूरशी त्याचे युद्ध जुंपले. हे पाहताच शाहिस्तेखान पुण्यावर चालून आला. विजापूरने शिवाजीला आवरण्याचा प्रयत्न म्हणून सिद्दी जोहारशी तडजोड केली व त्याला शिवाजीवर पाठविला. मराठी बखरकार, कादंबरीकार, अफजुलखान-शाहिस्तेखान-सिद्दी जोहार या राजकारणाचा परस्परसंबंध ध्यानात घेत नाहीत, ही माझी तक्रार आहे. या दृष्टीने पाहता, मी असे मानतो की, १६४५ ला जे सुरू झाले, ते १६४८ ला संपले, हा पहिला टप्पा. १६५६ ला जावळी खोऱ्यावरील आक्रमणापासून सुरू झाले, ते १६६६ ला संपले, हा दुसरा टप्पा. पहिल्या टप्प्यात सिंहगड घेणे, सोडणे, पुरंदर घेणे, फत्तेखान पराभव महत्त्वाचा. दुसऱ्या टप्प्यात विजापूरशी तह. १६६० अखेर, हा पूर्वार्ध. ज्यात मोरे वध, खानवध, बाजी प्रभू ही प्रकरणे व आग्र्याहून परत येणे हा उत्तरार्ध. यात शाहिस्तेखान शासन, सुरत-लूट, जयसिंग ही पोटप्रकरणे.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अफजुलखान-वध हा दगाबाजीचा एक प्रकार. शाहिस्तेखानाला शासन हा दगाबाजीचा दुसरा प्रकार. विश्वास देऊन, भेटीला बोलावून मारणे, गाफील सेनेवर हल्ला करणे, तहाची बोलणी लावून अंधारातून पळणे, यांतील काहीच रजपूत-धर्मात न बसणारे; पण झोपलेल्याला झोपेत मारणे, पळणाऱ्या नि:शस्त्रावर हत्यार चालविणे, आडवे आलेले हिजडे, दासी, स्त्रियांची कत्तल करणे हेही राजपूत-धर्मात न बसणारे. एकूण या कत्तलीत शाहिस्तेखानाचा मुलगा, जावई, खानाच्या काही बायका, काही सुना, काही मुली - एकूण ६ प्रतिष्ठित स्त्रिया, ६ सामान्य कुळंबिणी, ४० पुरुष, ज्यांत अनेक पहारेकरी खोजा (म्हणजे हिजडे) अशी मंडळी ठार झाली. हा शिवाजी परंपरागत क्षात्रधर्मात बसवू नये. त्यांची संगती कौटिल्याच्या राजधर्मात बसते.

परंपरागत क्षात्रधर्माच्या कल्पनेत शिवाजी बसविण्याचा उद्योग सिनेमात भालजी, कादंबरीत हरिभाऊ व नाथमाधव, नाटकात टिपणीस व औंधकरांनी केलेलाच आहे. या यादीत रणजित देसाईची वाढ होऊ नये, असे मला वाटते.

शाहिस्तेखानाची बोटे एप्रिलात कापली गेली (शिवाजीने रमजानचा फायदा घेतला. मुसलमानाचा हा न लढण्याचा, उपवासाचा महिना.); पण यामुळे शाहिस्तेखानाने धास्ती खाल्ली, हा बखरकारांचा तर्क. खानाने हा पराभव पुसण्याचा आटोकाट प्रयत्न पुढे सतत सहा महिने केला. या काळात पहिले तीन महिने त्याचा मुक्काम पुण्यासच होता. अनपेक्षित घाव घालून जग थक्क करता येते. लोकांना थक्क करण्याचे काम सर्कसपटू व गारुडी करीतच असतात. तो शिवाजीचा धंदा नव्हे. थक्क अवस्थेतून भानावर येण्यापूर्वी शिवाजी काही स्थिर कामे करीत असतो. विजयोत्सव करीत नाही. खान-वधामागोमाग पन्हाळा, कुडाळ जिंकून विजापूर मार्गे कूच आहे. शाहिस्तेखान प्रकरणामागोमाग राजापूर, कुडाळ, वेंगुर्ला जिंकून कोकणपट्टी साफ करणे आहे. स्थायी यश मिळणाऱ्या मोहिमेचा आरंभ म्हणून अनपेक्षित धक्क्याला अर्थ असतो. अनपेक्षित धक्का देऊन थक्क करणे व भानावर येण्यापूर्वी काही स्थिर विजय मिळविणे हा राजकीय वास्तववाद - म्हणजे शिवाजी. पुढच्या सहा महिन्यांत शिवाजीला आवर घालण्यास असमर्थ ठरल्यामुळे औरंगजेबाने शाहिस्तेखानास बंगालचा सुभेदार केले. 'सरप्राईजेस्' वर आलमगिराची तक्रार नाही. पण पुढे तरी काय? हा त्याचा वास्तववादी प्रश्न आहे. ऑक्टोबरमध्ये (१६६३) शाहिस्तेखान गेला. जानेवारीत शिवाजीने सुरत लुटली. अफजुलखानाच्या वधापूर्वी शिवाजीला अखिल भारतीय कीर्ती नव्हती. या प्रकरणामुळे शिवाजीची कीर्ती आसामपर्यंत गेली. सुरत लुटून शिवाजीने आपले औरंगजेबाशी युद्ध जाहीर केले. शाहिस्तेखान प्रकरण महत्त्वाचे खरे, पण

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ते भारतभर गाजले नाही. ह्या घटनेची भारतभर चर्चा दिसत नाही.

मिर्झाराजे जयसिंगाबाबत बखरकार, कादंबरीकार व इतिहासकार सर्वांनीच घोळ केलेला आहे. या कसलेल्या सेनानीच्या मनात कुठेतरी शिवाजीविषयी मृदुभाव सर्वांनी गृहीत धरला आहे. अगदी अलीकडे मिर्झाराजे यांची सुमारे २६ महत्त्वाची पत्रे उपलब्ध झाली आहेत. १६६५-६६ मधील. त्यांवरून असे दिसते की, मिर्झाराजे औरंगजेबाच्या अत्यंत विश्वासातील गृहस्थ. मिर्झाच्या शब्दांना आलमगीर फार मान देत असे. वारसा-हक्काच्या लढाईपासून त्यांची आलमगिराला मदत झाली. मिर्झाची शिस्त अत्यंत करडी - प्रत्यक्ष राजपुत्रांना त्यांनी शिक्षा दिल्या आहेत. पण बापाने दर वेळी पुत्रांच्या विरोधी जयसिंग उचलून धरला आहे. औरंगजेबाशी नात्याने निकट असणाऱ्या व जनानखान्यात वजन असणाऱ्या एका सरदाराला मिर्झांनी उन्हात उभे करून छड्या मारल्या; पण आलमगिराने ही वेळ आणल्याबद्दल त्या सरदाराची कानउघाडणी केली. शिवाजीला भेटीसाठी आग्ऱ्यास बोलवावे, हा सल्ला मिर्झाचा. तो आलमगिराने मान्य केला. शिवाजीस तिकडेच नजरकैद करावे, हाही मिर्झाचाच सल्ला, त्याच्या जिवाला धोका पोचू नये, हाही त्याचाच सल्ला. हा शेवटचा सल्ला त्या वेळी आपण ऐकला, ही आपली जन्मातली सर्वांत मोठी चूक झाली, असे औरंगजेबाने कैक वेळा म्हटले आहे. शेवटच्या काळात पुत्राला उपदेश करतानाही म्हटले आहे. मिर्झाराजे यांची भूमिका अशी : शिवाजी आग्रा येथे आहे, तोवर मराठे त्याचा जीव सुरक्षित राहावा, म्हणून गप्प बसतील. शिवाजी मारला, तर चिडून प्राणपणाने लढतील. शिवाजी सोडला, इथे महाराष्ट्रात असला, तर त्रास देईल, असे मिर्झांचे म्हणणे आहे. शिवाजीने आग्ऱ्याकडे कूच केले आहे. लौकरच तो दरबारात पोचेल, या जयसिंगाच्या पत्राला आलमगीर उत्तर देतो. ‘तुमच्या इच्छेप्रमाणे आम्ही त्याचा योग्य सन्मान करू. आदिलशाहाविरुद्ध लढण्यासाठी तुम्हांला त्याची गरज लागेल. आम्ही फार दिवस न लावता लौकरच त्याला निरोप देऊ.’ त्याच्या उत्तरी जयसिंग कळवितो, ‘मी प्रयत्नपूर्वक त्याला आपल्या पेशीत रवाना केला आहे. माझे पत्र आल्याविना त्यास इकडे येऊ देऊ नये. तिथेच बंदोबस्त ठेवावा. प्राणाला धोका होऊ नये’, इ.इ. जयसिंगाचे चित्र रेखाटताना हे ध्यानी घ्यावे. व्यक्ती जयसिंग वत्सल आहे.

९ वर्षांचा संभाजी ओलीस ठेवून घेणे त्यांना प्रशस्त वाटत नाही. बाल संभाजीच्या वागणुकीचे त्याला फार कौतुक वाटते. सेनानी, राजकारणी जयसिंग घणाघाती व कठोर आहे. शिवाजीने प्रथम त्याचा प्रतिकार करून पाहिला, तो शक्य नाही, हे कळल्यावर तह केला. मिर्झांनी मारेकरीही पाठविले आहेत. तहाची कलमेही पाहण्याजोगी आहेत. तेवीस

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

किल्ले, चार लक्षांचा प्रदेश मोगल राज्यात खालसा. बारा किल्ले व एक लक्षाचा मुलूख शिवाजीकडे राहावा- औरंगजेबाचा जहागिरदार सरदार म्हणून व शिवाजीने यापुढे मोगल राजाशी एकनिष्ठेने सेवा करावी. हा तह शिवाजीने मोडू नये, म्हणून मोगल छावणीत १८ जूनपासून संभाजी. तहाप्रमाणे प्रथम मिर्झाने किल्ले ताब्यात घेतले. मगच शिवाजीला आग्ऱ्याला पाठविले.

मिर्झा औरंगजेबाचा सरदार होता. सर्व शक्तीने व बुद्धीने तो एकनिष्ठ सेवा करीत आहे. त्याने शिवाजी समूळ समाप्त केला होता. ही शक्ती, हा एकनिष्ठ क्रूर कठोरपणा व खासगी जीवनात संभाजीविषयी वाटणारे वात्सल्य,हे कॅरेक्टर रंगविण्याला एक आव्हान आहे; आणि हा माणूस कट्टर धार्मिक व पूर्ण श्रद्धाळू हिंदू होता. शिवाजीविरुद्ध जय मिळाल्यास ९१ मणांची सोन्याची साखळी काशीविश्वेश्वरास वाहण्याचा त्याने नवस केला होता, अशी आख्यायिका आहे.

शिवाजी आग्रा येथे नजरकैद होता, म्हणजे काय, याचाही नीट अर्थ समजून घ्यावा. (शिवाजी-औरंगजेब भेट गुसलखान्यात झाली. गुसलखाना म्हणजे स्नानगृह नव्हे. 'परामर्शगृह', आजच्या पद्धतीप्रमाणे 'चेंबर'मध्ये भेट झाली.) बहुधा फारसी साधने म्हणतात, त्याला राजधानीत फिरण्याची परवानगी होती, त्याचा मुक्काम बागेत होता. शिवाजी पळाला कसा, हे न उलगडणारे कोडे आहे. तो पेटाऱ्यातून पळाला, असे म्हणतात. व्यक्तिश: माझा त्यावर विश्वास नाही. पुराव्याच्या विरोधी न जाणारे सर्वमान्य कल्पित म्हणून कादंबरीकार पेटाऱ्याच्या स्वीकारास मोकळा आहे. १७ ऑगस्टला शिवाजी पळाला. आग्रा येथून ११६ मैलांवर असणारी नरवीर घाटी त्याने २० ऑगस्टला ओलांडली, ती जाहीरपणे ३०० माणसांसह, बादशाही परवाना दाखवून त्याने ओलांडली, हे पुराव्याने सिद्ध आहे. याचा सोपा अर्थ असा, 'मी शिवाजी आहे' हे सांगून बादशहाची दक्षिणेत परतण्याची परवानगी दाखवून, इतमामाने शाही साधने दिमतीला घेऊन शिवाजीने नरवीराची घाटी ओलांडली. वेशपालट, काशीयात्रा, मथुरा, वृंदावन, प्रयाग, हा मार्ग बखरीचा. शिवाजी १२ सप्टेंबरपर्यंत रायगडला पोहोचला असावा, असे इतिहासकाराचे म्हणणे आहे. बरोबर संभाजी नव्हता, शिवाजीने त्याची उत्तरक्रियाही केली, ही बातमी औरंगजेबाला ऑक्टोबरअखेर मिळाली. या वेळेपर्यंत मोगल प्रदेशात शोधाशोध सुरू होती. त्यानंतर ती बंद झाली. नंतर संभाजी आला. (सुमारे २० नोव्हेंबर.)

यानंतरच्या प्रकरणातील आवडते प्रकरण तानाजीचे आहे. तानाजी हा शिवाजीचा एक

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शूर व निष्ठावान सरदार. हा सिंहगड घेताना मारला गेला. इतकेच या प्रकरणी सत्य आहे. तुळशीदासाच्या पोवाड्यामुळे या प्रकरणाला भलतेच महत्त्व आहे. हा शिवाजीचा बालमित्र होता, त्याला पुरावा नाही. शिवाजीच्या सैन्यात याला फार मोठे महत्त्व होते, असेही नाही. हशमाचा (पायदळाचा) एक सरदार. त्याच्यामुळे कोंडाण्याचे नाव सिंहगड ठेवले, ही थापच. सिंहगड हे नाव यापूर्वीच कागदपत्रांत आहे.

१६७० फेब्रुवारी ते ५ जून या महिन्यांत सिंहगड, पुरंधर, माऊली, कर्नाळा, लोहगड, हिंदोळा, रोहिडा, इत्यादी गड घेण्यात आले आहेत. बहुतेक ठिकाणी मराठे घोरपडी व माळा लावून चढले. ईर्ष्येने लढले. १६७६ साली अण्णाजी दत्तो यांनीही माळा लावूनच पन्हाळा जिंकला. त्या वेळी तर केवळ ६० लोक घेऊनच ते आत गेले होते. लगेच कापाकापीस आरंभ झाला. घोरपड आणि माळा लावून किल्ल्यात घुसणे व बेसावध मंडळींवर हल्ला करून त्यांना कापणे आणि मुख्य दरवाजा उघडून गड सर करणे, ही मराठी फौजेची नेहमीची रीत. इतिहास एखाद्या प्रकरणाची जादू समाप्त करतो, त्यांतील हे एक.

इ. स. १६७४ला शिवाजीने स्वत:ला राज्याभिषेक करण्यासाठी हजार प्रयत्न करून, आपले क्षत्रियत्व त्याने सिद्ध केले. मुंज केली. प्रायश्चित्ते घेतली. स्वत:च्या पत्नींशीच नव्याने लग्ने केली. अभिषेकाचा इतका खटाटोप शिवाजीने का केला, असा प्रश्न आहे. बेंद्रे यांचे म्हणणे असे की, ब्राह्मण गुन्हेगारांना शासन करणे, धार्मिक प्रश्नांवर निकाल देणे हा अधिकार यावा, म्हणून शिवाजीने राज्याभिषेक करून घेतला. माझे म्हणणे असे की, तो काळ धार्मिक प्रभाव आणि वर्चस्वाचा काळ आहे. हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे राज्याभिषेकाला पावित्र्य आणि प्रतिष्ठा आहे. राजा म्हणजे मुसलमान, ही त्या वेळची समजूत आहे. दिल्लीपती हा सर्व भारताचा स्वयंभू सम्राट मानला जाई. यामुळे बहामनी घराणे वैभवात असतानाही जनतेला व खुद्द बहामनी वजिरांना आपल्या राज्याचा सम्राट दिल्लीपती व त्याचा अधिपती इराणचा खलीफा वाटे. भारताचे आधिपत्य मिळाल्यानंतरही हे आधिपत्य इराणकडून मान्य करून घेणे अल्लाउद्दिनाला इष्ट वाटले. औरंगजेबाच्या वेळी खलीफा तुर्की होता. त्याची मान्यता आपल्या आधिपत्याला मिळावी, याचा आटोकाट प्रयत्न आलमगिराने केला. शेवटी ती मिळाली, तेव्हा आनंदोत्सव दरबार केला. आदिलशाही, कुतुबशाही, राजांना व सरदारांनासुद्धा दिल्लीपती हा आपल्या पादशाहीचा सम्राट वाटे. शिवाजीच्या वेळी अनेक रजपूत राजे होते. त्यांचे मंचकारोहण होई व तख्तनशीनीचा समारंभही होई. राज्याभिषेक नव्हता. विजयनगरचे साम्राज्य स्थापन झाले. वैभवाला चढले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पण वैदिक विधिपूर्वक राज्याभिषेक नाही. इ. स. १००० च्या नंतर हा वैदिक विधीच लुप्त झाला होता. गागाभट्टाने धर्मग्रंथ पाहून तो नव्याने सिद्ध केला व शिवाजीला राज्याभिषेक केला. ही एक क्रांतिकारक घटना होती. एकीकडे राम, नल, युधिष्ठिर, विक्रमादित्य या परंपरेशी या कृतीने शिवाजी आपला सांधा जोडीत होता. (पाहा सभासद.) दुसरीकडे अखिल भारतातील हिंदूंच्या धर्मनिष्ठा व धर्माचे सारे पूज्यत्व व पावित्र्य स्वत:मागे उभे करीत होता. आमच्या धर्मशास्त्राप्रमाणे सत्य युगात चार वर्ण असतात. द्वापरयुगात वर्णसंकराला आरंभ होतो. त्रेतायुगात तीन वर्ण राहून संकर वाढतो. कलियुगात ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण राहतात. आमच्या पुराणाप्रमाणे नंद घराणे संपले आणि क्षत्रिय संपले. तिथून पुढे शूद्रराजे आरंभ झाले. शिवाजी जणू इतिहासाचे चाक. मुस्लिमपूर्व जागेपर्यंत मागे सरकवून हिंदूंचा वेदपुराणांचा व स्मृतींचा व सर्व हिंदू वैभवाचा स्वत:शी सांधा जोडून, नवे युग सुरू झाल्याची द्वाही फिरवू इच्छीत होता. शिवराज्याभिषेकाकडे तात्कलिक सोयीचा भाग म्हणून न पाहता, त्यामागची भव्यता समजून घेतली पाहिजे. अभिषेक-विधी बेंद्रे यांनी संपादन केला आहे. (गागाभट्टविरचित शिवराज्याभिषेक प्रयोग, संपादक वा. सी. बेंद्रे, मूल्य ३-०० प्रकाशक, पी पी एच्. बुकस्टॉल, मुंबई ४) आपण आपल्या कादंबरीत या प्रसंगाची सर्व भव्य, पवित्र भूमिका ठसठशीतपणे मांडावी, असे मला वाटते.

स्वत:ला वैदिक मंत्रांनी अभिषिक्त करून घेण्याची कल्पना शिवाजीच्या मनात केव्हापासून आली असावी? मला वाटते, ती फार पूर्वीपासून असावी. कारण त्याने प्रधानाचा शिक्का असा घेतला आहे : शिवनगरपती हर्षनिधान सामराज मतीमत् प्रधान. हा शिक्का १६५३ पासूनचा आहे. यातील हर्षनिधान या विशेषणाला संस्कृत काव्यवाङ्मयाची पार्श्वभूमी आहे. अभिषिक्त राजा म्हणजे सर्वांना अभय व न्यायाची हमी, प्रजेच्या नियमाची व सुखाची हमी. मात्सन्यायातील दु:खापासून प्रजेची सुटका, अशी वर्णने कौटिल्यापासून आहेत. काव्यातही आहेत. अर्थात हे एक माझे अनुमान.

शिवाजीच्या शेवटच्या काळात गृहकलह बराच दिसून येतो. सर्व मंत्रिमंडळ व सोयराबाई ह्यांची एक बाजू. पट्टाभिषिक्त राणीचा मुलगा राजाराम, उत्तराधिकारी व्हावा, असे या फळीचे म्हणणे. सेनापती, सेना व संभाजी यांची एक बाजू. त्या संघर्षाचा उदय जिजाबाईच्या मरणानंतर आहे. संभाजीची आई त्याच्या जन्मापासून आजारी होती. अफजुलखान-वधाच्या प्रसंगी शिवाजीच्या एकुलत्या एका पुत्राची माता मरणशय्येवर होती. आईविना असलेल्या या मुलाचे सारे संगोपन जिजाबाईजवळ झाले.बिापाला घरात लक्ष

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

देण्यास वेळच नव्हता. त्यामुळे पितापुत्रांचे फारसे सामंजस्यही नव्हते. हे खरे मानले, तरी राज्याचे दोन वाटे करावे, कर्नाटकाचे संभाजीस, महाराष्ट्राचे राजारामास हा उत्तरकालीन प्रक्षेप आहे. शिवाजीच्या शेवटच्या काळात मोगलांच्या फौजा सरहद्दीवर जमत आहेत.

राज्याचे आधारस्तंभ मंत्री आणि वारस संभाजी, यांत सूत नाही. घरी सोयराबाईंची धुसफूस चालू आहे आणि शिवाजी रुग्ण आहे. ही परिस्थितीच फार भयावह आहे. आयुष्यभर खपून जो विजय मिळविला, त्याची फळे पदरात पडत असताना माधवराव मरणाच्या दारात प्रवेश करीत होता. या घटनेपेक्षा, जन्मभर मिळविले, त्याला निर्णायक आव्हान मिळण्याची वेळ आली. त्या वेळी आपण आजारी, मंत्री व युवराज यांत बेबनाव ही परिस्थिती अधिक दुःखाची आहे. इतिहासाने जे कर्तव्य शिरावर दिले, ते पार पाडून व पार पाडताना आपण मरतो आहो, याचे समाधान तरी माधवरावाला आहे. शिवाजीला तेही नाही. विशेषतः, आजारीपणाच्या शेवटच्या अवस्थेत (शेवटच्या पंधरवड्यात) त्याचा गडावर ताबा राहिला नव्हता. नाहीतर संभाजीला भेटीसाठी निश्चित बोलाविले गेले असते.

शिवाजीच्या मृत्युसमयी संभाजी पन्हाळा, प्रभावळी व दाभोळ या विभागाची सर-सुभेदार होता. नजरकैदेत नव्हता. ही बाब पुराव्याने सिद्ध आहे. ती ध्यानात असू द्यावी.

सोयराबाईने शिवाजीला विषप्रयोग केला होता, या मताला अस्सल पुरावा नाही. संभाजीने सोयराबाईवर असा आरोप केला व भिंतीत चिणून ठार केले, असे बखरीचे म्हणणे आहे. ते पुराव्याने खोटे सिद्ध करता येते. संभाजी गादीवर आल्यावर सोयराबाई १९ महिन्यांनी वारली. तिने आत्महत्या केली व संभाजीने शाही इतमामाने तिची उत्तरक्रिया केली, याला इंग्लिश रिपोर्ट्स मध्ये पुरावा आहे. १६७७ साली शिवाजीने विषप्रयोगावर उताऱ्याची औषधे इंग्रजांच्याकडून मागविली, हा पुरावा. यावरून महाराजांना आपणांस विषप्रयोग झाल्याची शंका असावी, हे अनुमान व त्यावरून कोणीतरी विषप्रयोग केला असेल, हे पुढे अनुमान. त्यावरून सोयराबाईने विषप्रयोग केला असावा, हा तर्क. शिवाजीला विषप्रयोग होऊन तो मेला, अशी बातमी १६७६ नंतर दर महिन्या-दोन महिन्याला उठे. हा उपोद्‌बलक पुरावा. माझ्या मते १६७७ ला जर असे काही झाले असते, तर शिवाजीने शंका आली, त्यावर कठोर इलाज केला असता. निदान सोयराबाईला कायम पुरंधर किंवा सिंहगडला हवा-पाण्याचे निमित्त म्हणून दूर ठेवले असते. उलट, असे दिसते की, १६८० त ७ मार्चला राजारामाची मुंज लावली. १५ मार्चला त्याचे लग्न लावले. या दोन्ही कार्यांस सोयराबाईची इच्छा नाही, म्हणून संभाजीला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बोलाविले नसले पाहिजे. म्हणजे सोयराबाई जवळ हवी व छोट्या प्रकरणी तिला दुखवणे नको, हीच शिवाजीची इच्छा आहे. मार्चच्या शेवटी शिवाजी आजारी पडला व तीन एप्रिलला तो वारला. या आजाराचे स्वरूप गुडघीचे नसून, 'ब्लडीफ्लुक्स' म्हणजे रक्ताची उलटी, परसाकडे असे आहे.

९१ कलमी बखरीने केलेले, 'शेवटी हरिकीर्तने, रुद्राक्षधारण' हे वर्णन मला विश्वसनीय वाटते. याखेरीज मी कुणीही न उल्लेखलेली बाब सुचवितो. ती म्हणजे, महामृत्युंजयाच्या जपासाठी काही ब्राह्मण बसविलेले असावेत. जीव जाताना पांढऱ्या घोंगडीवर ठेवणे, गंगाजळ, तुळशीपत्र तोंडात घालणे. जीव जाताच मांडी मोडून पद्मासन करणे ह्या सर्व बाबी त्या काळीही होत्या. भोसले घराण्यात सतीची प्रथा दिसत नाही. पुतळाबाई हा अपवाद. ती प्रत्यक्ष दहनावेळी सती गेली नाही. कारण प्रत्यक्ष दहन एक प्रकारे गुपचूप, घाईगर्दीने उरकले आहे. बहुधा शिवाजीस या मंडळींनी भडाग्नी दिला असावा. पुढे संभाजीने सर्व क्रिया १२ दिवसांपर्यंत- सुतक यांसह विधिपूर्वक केल्या आहेत. त्याने दर्भाच्या शिवाजीला मंत्राग्नी दिला.

शिवाजीविषयी कादंबरी लिहिताना शिवाजी-इंग्रज संबंध व शिवाजी-पोर्तुगीज संबंध यांकडे सदैव दुर्लक्ष होते. यामुळेच शिवाजीने आरमार उभे करण्याचा प्रयत्न १६५६-५७ पासून सुरू केला, याही गोष्टीकडे दुर्लक्ष होते. पहिला अखिल भारतीय कीर्तीचा पराक्रम करण्याआधीच इकडे आरमार-उभारणी व तिकडे राज्याभिषेकाचा मनात संकल्प, ही गोष्ट शिवाजीचे मन, आकलन व त्याच्या उद्योगाचा आवाका समजून घेण्यासाठी महत्त्वाची आहे. १६५९ पासून शिवाजीच्या आरमाराबाबत सावधगिरीचे हुकूम पोर्तुगीजांनी सोडलेले आढळतात. विजयनगर, बहामनी, आदिलशाही, निजामशाही, मोगल या राजवटींना डोळ्यांसमोर पोर्तुगीज दंडेली दिसत होती. पण कुणीही आरमाराकडे लक्ष दिले नाही. या मुसलमान शाह्यांचे आरमाराच्या प्रश्नाकडे लक्ष वळते, तर इतिहास बदलता. ११ व्या शतकातला चोलराजा राजराज हा आरमाराकडे लक्ष देणारा शेवटचा हिंदू राजा. त्यानंतर १५ व्या शतकात संगमेश्वराचा एक जखुराय नावाचा जागिरदार. पण आरमार या घटनेचे राजकीय महत्त्व ओळखणाऱ्या चोलराजा राजराज नंतर ६०० वर्षांनी फक्त शिवाजीच. या दृष्टीने १६६४ ला सिंधुदुर्गाची उभारणी, १६६५ ची बसनूरची स्वारी ह्या घटना महत्त्वाच्या आहेत. भारतात कायम झालेली पहिली युरोपीय सत्ता पोर्तुगीजांची. ती रोमन कॅथॉलिक असल्यामुळे धर्मच्छलासाठी फार प्रसिद्ध. शिवाजीच्या आधी ५० वर्षे पोर्तुगीजांनी इन्क्वीझिशनही सुरू केले होते. शिवाजीच्या वेळी तोही छळ चालूच होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१६६७ साली शिवाजीने पोर्तुगीजांना धडा शिकविला. हे पोर्तुगीजविरोधी राजकारण पुढे संभाजीने सदैव रेटीत नेले. या पोर्तुगीजविरोधी लढ्याचे कारण राजकीय होते, तसेच, स्पष्टपणे धार्मिकही होते. शिवाजीच्या काळी इंग्रजांची शक्ती अजून फारशी वाढली नव्हती. तरी शिवाजीने इंग्रजांवर दाब म्हणून खांदेरीला तटबंदी केलीच. पोर्तुगीज, इंग्रज, डच, फ्रेंच यांच्याशी शिवाजीची वागणूक पाहूनच स्वभावरेखन करताना शिवाजीच्या बुद्धीचा पल्ला ठरविता येईल. त्याच्या मनाची घडण सांगता येईल.

शिवाजीला कुणी बालमित्र असतील, असे वाटत नाही. 'शेषप्रश्न' या कादंबरीत सव्यसाचीची अशी स्वभावरेखा आहे, त्याच्याशी मिळतीजुळती शिवाजीची आहे. सव्यसाचीवर प्रेम करणारे आहेत, श्रद्धा ठेवणारे आहेत. त्याच्याशी वाद घालणारे आहेत. सर्वांच्या रक्षणाची जाणीव सव्यसाचीला आहे. चुका करणाऱ्यांबाबत त्याला अनुकंपा आहे. आपण जे काम करतो, त्याला सर्वांनी साहाय्य करावे, असे त्याला वाटत नाही. 'कवींनी क्रांतिगीते गाऊ नयेत. त्यांनी स्फुरतील, ती गाणी गावीत. सांसारिकांनी चोख संसार करावा. शोधकांनी शोध लावावेत. सर्वांची जीवनाला गरज आहे. पण माझे काम फक्त देश स्वतंत्र करण्याचे आहे.' असे सव्यसाची मानतो. देशहितासाठी गरज नसेल, तर मोठमोठ्या अपराधाला तो सहज क्षमा करतो; आणि गरज पडेल, त्या वेळी निरपराधांची कत्तल ही सुद्धा साहजिकच आहे, असे त्याला वाटते. या सव्यसाचीला जिवाभावाचा कुणी मित्र नाही. तो आदरणीय, पण एकाकी आहे. सव्यसाची एकवार बारकाईने वाचावा, अशी सूचना आहे.

शिवाजीने हिंदू सरदार, जहागिरदार यांना मित्र करण्याचा सदैव प्रयत्न केला. दौलतराव मोरे, यशवंतराव मोरे, लखम सावंत, शृंगारपूरचा सुर्वे अशी अनेक उदाहरणे आहेत. पण समकालीन वतनदारांनी शिवाजीला कधीच साथ दिली नाही. शिवाजीला व पुढे बाजीरावाला नवे सरदार आणावे लागले. संपूर्ण आयुष्यभर हिंदू सरदार नेकीने आदिलशाही, मोगल यांच्याशी वागले. त्यांच्या डोळ्यांसमोर एक हिंदू राज्य घडत होते. पण त्यांना आस्था वाटली नाही. शक्यतर वैषम्य व असूयाच वाटली. समकालीनांना त्याचा ध्येयवाद किती पेटवू शकला, याचे हे उदाहरण आहे. नवी तरुण पिढी मात्र पेटून उठलेली दिसते. १६६९ साली अफजुलखानाला, १६६५ साली जयसिंगाला फाडाफोडीच्या राजकारणात फारसे यश आले नाही, हा त्याचा अप्रत्यक्ष पुरावा. प्रत्यक्ष ३ लक्ष फौज घेऊन औरंगजेबाला महाराष्ट्र २७ वर्षे प्रयत्न करूनही जिंकता आला नाही, हा देखील.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जे शिवाजीच्या पदरी होते, त्यांची निष्ठा मान्य केली, तरी आकलन किती जणांना? छत्रपतींच्या मंत्रिमंडळालाही त्या ध्येयवादाचे व राजकारणाचे पुरेसे आकलन दिसत नाही. नाहीतर अण्णाजी दत्तोने शिवाजीला करार करण्यास भाग पाडले नसते. करार असा आहे. राज्य वाढवण्याइतकेच व्यवस्था संभाळणे महत्त्वाचे आहे. म्हणून नवी इनामे, वतने देताना, जहागिरी देताना व्यवस्थेचे काम करणाऱ्यांना १ फूल, लढणाऱ्यांना ३ फुले ही विभागणी असावी. शिवाजीचा सेनापती रुसतो व आदिलशाहीत जातो. शिवाजीचा मुलगा रुसतो व मोगलाईत जातो. व्यंकोजीशी त्याला लढावे लागते. तर प्रतापराव गुजर शत्रूचा पूर्ण मोड न करता तह करून बसतो. शिवाजीच्या सहवासात तीन वर्षे गेलेल्या कृष्णाजी अनंत सभासदालासुद्धा राजकारणाची सूत्रे ज्ञात असलेली दिसत नाहीत. ती अस्सल कागदपत्रांत ठिकठिकाणी दिसतात.

शिवाजीने वेळोवेळी आदिलशाही व कुतुबशाहीत तह केलेले आहेत. १६६० नंतर शिवाजीने प्रसंग पाहून पोर्तुगिजांशी तह मोडले. मोगलांशी तह मोडले. पण आदिलशाही-कुतुबशाहीशी आपण होऊन तह मोडले नाहीत. मोगलविरोधी आघाडी संघटित करण्याची त्याची इच्छा होती. तीत शिवाजीचे रक्षण होते. पण पोर्तुगीज, सिद्दी जोहर यांचा मोड, डच, इंग्रज संरक्षण आणि आदिलशाही-कुतुबशाही रक्षण अशी योजना. आदिलशाहीने आत्मघात पत्करला, तरी ही योजना पत्करली नाही. कुतुबशाहीने शिवाजीशी भांडण केले नाही, पण या योजनेचा उत्साहाने पुरस्कारही केला नाही. औरंगजेबाशी तह करून अदिलशाही जिंकण्याचा करार करण्यासही व परस्परांत वाटून घेण्यास शिवाजी तयार होता. सुन्नी-मोगल व शिया-आदिलशहा परस्परांचे प्राण घेऊ शकू, पण शिवाजीशी तह म्हणजे या देशातून मुस्लिम अधिसत्तेची समाप्ती, इतके आकलन त्यांना होते. हिंदू सरदारांना हे आकलन दिसत नाही.

शिवाजीपासून प्रेरणा घेणारा एक छत्रसाल बुंदेला दिसतो. याच काळात पंजाबात औरंगजेबाविरुद्ध शीख प्राणपणाने झगडत होते. आर्य समाजाच्या उदयानंतर व आर्य समाजीयांनी केलेल्या कठोर टीकेमुळे 'आपण हिंदू नव्हेत' अशी भूमिका शीखांनी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी घेतली, पण सोळाव्या-सतराव्या शतकांत शीख हिंदुधर्मरक्षणासाठीच लढत होते. दुर्दैवाने शिवाजी व शीख यांचा संबंध दिसत नाही. संभाजीने हा जोडला. शीखांचे दहावे गुरू गोविंदसिंग औरंगजेबाविरुद्ध लढतच होते. मराठ्यांशी संबंध जोडण्यासाठी ते दक्षिणेत आले. त्या वेळी १७०८ साली त्यांचा वध झाला. मराठे आणि शीख यांचा संबंध काहीच नसावा, ही एक दुर्दैवी घटना आहे.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिवाजीविषयी कादंबरी म्हटल्यावर अजून काही घटना निश्चित समजून घ्याव्या. पैकी एक, शिवाजी-तुकाराम संबंध आहे. तुकाराम १६०८ ते १६५१ या काळात होऊन गेला. त्याचे गाव देहू-पुणे जहागिरीत होते. शिवाजी तुकारामांच्या कीर्तनास जात असे. लोहगड येथील मंदिरात शिवाजी कीर्तन ऐकत होता. महंमद बंगशाने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, इ.इ. सर्व आख्यायिका थापा आहेत. तुकारामाने शिवाजीस रामदासांचा उपदेश घेण्याविषयी सांगितले, हीही थापच. रामदासी संप्रदाय १६४९ ला कायम झाला. चाफळच्या पंचक्रोशीबाहेर तुकारामांच्या हयातीत रामदासांचे नाव गेले नव्हते. तुकारामाचा पांडुरंगमंदिर इनामाचा खटला शिवाजीसमोर चालला. त्याचा निर्णय शिवाजीने तुकारामाविरुद्ध दिला आहे. देहूला असणारे मराठेशाहीचे योमिये शाहूकालीन आहेत. शिवाजीच्या चरित्रात तुकारामाला कुठे जागाच नाही. यासंबंधीचे गाथ्यात उल्लेख आहेत. ते सारे प्रक्षिप्त आहेत. उदा., ‘वानू किति रे सदया विठूराया दीनवत्सला’ हा अभंग, परंपरा मानते की, लोहगडमंदिर कीर्तनाच्या वेळचा आहे. पण हे खोटे आहे. तो अभंग प्रल्हाद चरित्रातील आहे. तुकारामांच्या हयातीत शिवाजीला वजनही आले नव्हते. मोठा पराक्रमही त्याने केला नव्हता. अजून रामदास प्रसिद्धीलाही आलेला नव्हता.

रामदास यापेक्षा निराळा आहे. शिवाजी-रामदास प्रत्यक्ष भेट इ.स. १६७२ साली झाली, हे निश्चित. १६७६ ला शिवाजीने समर्थांच्यासाठी सज्जनगड मोकळा करून दिला, हेही निश्चित. चाफळच्या यात्रेला त्रास होऊ नये, म्हणून १६६८ ला ताकीद दिली, हेही निश्चित. रामदासाची सर्वांत जुनी चरित्रे मेरुस्वामी, दिनकरस्वामींची. त्यांत शिवाजीचा उल्लेख नाही. शिवाजीचे सर्वांत जुने चरित्र सभासदाचे. तिथेही रामदासाचा उल्लेख नाही. ज्यांनी रामदासचरित्र जवळून पाहिले व रामदास-निधनसमयी जे प्रौढ होते, व ज्यांनी शिवाजी जवळून पाहिला, त्यांनी रामदास उल्लेखिलेला नाही. जिजाबाईच्या निधनसमयी रामदास तिथे होते, ही माहिती बखरीची आहे; आणि उत्तरकालीन बखरीची आहे. शिवाजीला समर्थांचा मंत्रोपदेश नाही. तो मंत्रोपदेश १६५३ साली गोपाळभट याचा आहे. स्वामींच्यामुळे आम्ही राज्यास अधिकारी झालो, असे शिवाजी सर्वांनाच म्हणतो. समर्थांना, कचेश्वरभटांना, बाबा याकूतला सुद्धा. शिवाजीच्या उद्योगाला आरंभ १६४५. त्याची मुद्रा असणारे नक्की पत्र १६४६. रामदासी पंथाची स्थापना १६४९. हा कालानुक्रम समजून घ्यावा. राजनिर्मितीची प्रेरणा समर्थांची नव्हे, हा ह्याचा अर्थ. दासबोध मी वाचलेला आहे. एम्.ए.ला शिकविलेलाही आहे. त्यात राजकारण फारसे नाही. सगळा भक्तिमार्गच आहे. फक्त राजकारण हा शब्द आहे. त्या नावाचे समास आहेत. पण त्यांतही राजकारण नाही. रामदासी पंथ आदिलशाहीत स्थापिला गेला व चाफळ देवस्थानचे पहिले विश्वस्त शिवाजीचे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शत्रू आहेत. याचा अर्थ १६४९ ला रामदासासमोर शिवाजी नव्हता, असा आहे; आणि ते स्वाभाविक आहे. कारण हा वेळपावेतो शिवाजीचा फारसा पराक्रम कुणाला दिसलेलाच नव्हता. पण एकनाथाप्रमाणे रामदासही हिंदूंच्या पुनरुज्जीवनाची स्वप्ने पाहत होता. हिंदुधर्माचा अभिमान म्हणून मुसलमानांचा राग त्यांच्या मनांत होताच. औरंगजेब- शिवाजी व रामदास- दोघेही मेल्यावर २७ वर्षे जिवंत होता. पण औरंग्या पापी बुडाल्याची स्वप्ने एकनाथानुसरण करीत रामदास आधीच पाहत होता. समोरचा पुरावा पाहून, अनुमान करायचे, तर रामदासाचे शिवाजीकडे उत्कटतेने लक्ष १६५९ नंतर गेले असावे. 'तुमचे देशी वास्तव्य केले. परंतु वर्तमान नाही घेतले' असा रामदासाचा दावा या अनुमानाला पोषक आहे. शिवाजीला साधुसंतांविषयी आदर व आत्मीयता होती. साधुसंत तृप्त करणे, धर्म बिनधोक करणे तो स्वत:चे कर्तव्यच समजत होता. हिंदू राज्य जन्मते आहे, हे पाहून रामदास स्वाभाविकच हर्षोत्फुल्ल झाला असावा. 'शिवाजीचा विजय, हा माझा विजय' व 'शिवाजीवर संकट, हे माझे संकट' असे रामदासाला वाटले असल्यास आश्चर्य नाही. शिवाजीचे काही हेर रामदासी म्हणून हिंडत असणे अगर रामदासी मंडळींनी काही समजले, तर लगेच कळविणे असेही घडत असावे. पण हा इतिहास १६६० नंतरचा. प्रत्यक्ष राजकारणाशी रामदासांचा संबंध नव्हे. रामदास-शिवाजी घनिष्ठता १६७४ नंतरची. हा क्रम ध्यानी असावा.

शिवाजी महाराजांना भवानीने एक तलवार दिली होती, अशी आख्यायिका आहे. एक होती तलवार. तिचे नाव भवानी तलवार. ती एकाकडून शिवाजीला मिळाली, हा आख्यायिकेचा सौम्य प्रकार. शिवाजीच्या तलवारीत भवानीने प्रवेश केला. हा दुसरा थोडा कडक प्रकार. भवानीने 'राक्षससंहारक शस्त्र अशी जी स्वत:ची तलवार ती आशीर्वाद म्हणून शिवाजीला दिली' हा पूर्ण कडक प्रकार. अशी आख्यायिकेची तीन रूपे आहेत. ह्या दैवी खड्ग मिळण्याचा धागा एकनाथात आहे. रामदासांच्या नावे प्रसिद्ध असणारा 'आनंदवनभुवन' हा शब्द एकनाथाचाच आहे. शिवाजीचे लहानपण पुराणकथा ऐकण्यात गेले, अशी एक समजूत आहे. हे पुराण एकनाथी 'भावार्थ रामायण' अशी कल्पना केली, तर शिवाजीला सर्व प्रकारची प्रेरणा मिळण्याचे ते एक हमखास ठिकाण आहे. वरील कल्पनेला काडीमात्र पुरावा नाही. पण ह्या कल्पिताला एक महत्त्व आहे. आपण म्हणतो, जिजाबाई शिवाजीला रामकृष्णाच्या कथा सांगी. त्या ऐवजी, दोघेही भावार्थ रामायण पुराणिकांकडून ऐकत, असे म्हटले, तर त्या ग्रंथाधारे सगळ्या शिवाजीच्या मनोधारणेची संगती लावता येते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिवाजी हा स्त्रियांच्या अब्रूबाबत फार दक्ष असे. तो स्वत: विलासी नव्हता. विलासीपणा त्याला आवडतही नसे. आपल्या राज्यात देवळे, स्त्रिया, गाई, ब्राह्मण यांना उपसर्ग पोचू नये, अशी त्याची ताकीद होती. शत्रूंच्या बायकांना सन्मानपूर्वक वागविण्याची त्यांची प्रथा तर खाफीखान यानेही वर्णन केली आहे. त्यामुळे कल्याणच्या सुभेदाराची सून शिवाजीच्या प्रकृतिधर्मात बसते. ऐतिहासिक प्रकरण तर ते नव्हेच. शिवाजीचे चरित्र खऱ्या नाट्यप्रसंगांनी भरलेले आहे. संभाजी मोहितेकडून पुरंधर घेणे, जिंकण्यास अवघड म्हणून प्रसिद्ध असणारे जावळीचे खोरे तीन महिन्यांत घेणे, अफजुलखान, पन्हाळगडाहून पलायन, शाहिस्तेखान, सुरतेची लूट, आग्ऱ्याहून सुटका असे एकाहून एक अद्‌भुत पण सत्य प्रसंग तिथे आहेत. तिथे नाट्याला कमीच नाही. मग खोटी सुभेदाराची सून, हिरकणी बुरूज, स्वराज्याच्या सनदा झोळीत टाकणे यांची गरज काय? आणि हे घ्यायचे, तर भवानी अंगात येणे, समर्थांसाठी वाघिणीचे दूध आणणे, का नको? एका रामदासी बखरीत म्हटले आहे की, शिवाजीची आपणांवर निष्ठा किती, हे पाहण्यासाठी स्वामींनी एकदा राजाची पत्नीच शृंगारून पाठविण्यास सांगितले. राजेही असे स्वामिभक्त की, त्यांनी तात्काळ पत्नी शृंगारून पाठविली. समर्थांनी आशीर्वादपूर्वक राजपत्नीची परत पाठवणी केली व राजाच्या निष्ठेची प्रशंसा केली. ही कहाणी का नको? अशी आख्यायिका सांगणारे एकमूर्ख व त्या ग्रंथबद्ध करून ठेवणारे शतमूर्ख. ह्या दंतकथा दोन्ही महापुरुषांची बदनामीच करतात, इतकेही त्यांना कळले नाही!

आख्यायिका, दंतकथांनी उभा केलेला महादेवाचा अवतार, भवानीचा वरदहस्त असणारा मातृभक्त, वैराग्यपरायण, धर्मनिष्ठ, गुरुनिष्ठ, दैववादी व भवानीच्या कौलाप्रमाणे राजकारण करणारा, बालमित्राच्या साहाय्याने शौर्य दाखवून राजा होणारा, भातुकलीचा शिवाजी रंगवायचा, की वास्तवाचे आकलन नीट करायचे, हा प्रश्न आहे. शिवाजीचे सारे आयुष्य लढण्यात व घोड्याच्या पाठीवर गेले, असे आपण म्हणतो. शेजवलकरांनी, पुराव्याने, शिवाजीची हयात मोजून, त्याचे गडावर किती दिवस गेले, हे दाखविले आहे. शिवाजी पटाईत घोडेस्वार होता, साहसी होता, यात वाद नाही. पण त्याचे नित्याचे वाहन कमी श्रमाचे- पालखी, मेणा हे होते. नित्य तो घोड्यावर नसे. सात-अष्टमांश जीवन त्याने किल्ल्यावर घालविले. तपशीलवार योजना आखणे, त्या पार पाडून घेणे, आवश्यक तेथे स्वत: धोका पत्करून साहस करणे ही त्याची पद्धत. निष्कारणची दगदग, अनाठायी साहसीपणा हा त्याचा स्वभाव नव्हे.

शिवाजीच्या जीवनाचा क्रमही नीट समजून घ्यावा. दादोजी होते, तोवर शिवाजीचे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पराक्रम म्हणजे, शिवाजीच्या नावे दादोजी व त्याचे सहकारी यांची योजना व पराक्रम. तसे तर कागदपत्रांत संभाजीच्या नेतृत्वाखाली १६६९-७० साली मराठी फौजांचे पराक्रम वर्णिले आहेत. त्याचे वय १२-१३. हे पराक्रम व युद्धनियोजन प्रतापराव गुजरांचे. १६७१ ते १६७४ संभाजीच्या मुलकी कारभाराचे स्तुतिस्तोत्र सर्वत्र आहे. ती स्तुती, खरी म्हणजे, जिजाबाईची. १६४८ साली लढाई झाली, तिचे श्रेय कावजी व सामराज यांचे. शिवाजीचा नजरेत भरण्याजोगा पहिला पराक्रम जावळीचा. त्या वेळी तो २६ वर्षांचा होता. पंधरा वर्षांचा शिवाजी भौगोलिक ज्ञान, सेनानियोजन, युद्धाची योजना आखतो, जावळीत आपला माणूस म्हणून दौलतराव मोरेशी संबंध जोडतो, हे अमानवी आहे; व १६४८ ते १६५६ ही आठ वर्षे ज्या धीमेपणाने शिवाजीने काढली, त्याला विसंगत आहे. शिवाजीसारख्या अलौकिक पुरुषाला सुद्धा राज्याभिषेकाला ४४ वर्षांचे व्हावे लागले. कारण ज्यांच्या विरोधी शिवाजीची झुंज होती, ते सामान्य लोक नव्हते. प्रचंड सेना, कसलेले सेनानी, योजनाकुशल माहितगार व विरोधक कपटनीती, व्यावहारिक मुत्सद्देगिरी यांचा पूर्ण अर्क असा आलमगीर ही सामान्य माणसे नव्हेत. अफजुलखान, शाहिस्तेखान, मिर्झाराजा जयसिंग, आलमगीर यांपैकी एकही शत्रू सामान्य नव्हता. ज्याच्यावर शिवाजीने मात केली, त्याचे कर्तृत्ववान व अजस्र व्यक्तिमत्त्व रंगवूनच शिवाजीचे मोठेपण वर्णन करता येते. सर्व देवांना बंदिवान करणारा रावण, महापराक्रमी कुंभकर्ण व इंद्रजित यांचा पराभव करण्यातच रामाचे मोठेपण असते. ढेकूण, मच्छर, उवा मारणे याला शिकार म्हणतच नाहीत. शिकार वाघ-सिंहांचीच. या दृष्टीने माधवरावापेक्षा शिवाजी रंगवणे अवघड. कारण इथे अनेक भव्य पुतळे उभे करावे लागणार आहेत. शिवाजीचे विरोधक रंगविण्यात अपयश आले, की अर्धा शिवाजी कोसळतो.

शिवाजीचा मोठेपणा व त्याच्या मर्यादा नीट समजून घेतल्या पाहिजेत. सतराव्या शतकातील युरोपच्या कोणत्याही राज्यकर्त्यामागे जसा युरोपचा रिनेसान्स आहे, तशी पार्श्वभूमी शिवाजीला नाही. वारकरी पंथाच्या हिंदुधर्माभिमानी उदारमतवादाची धार्मिक पार्श्वभूमी फक्त त्याला आहे. म्हणून क्रॉम्वेल या आधीच्या व नेपोलियननंतरच्या माणसांपेक्षा शिवाजी निराळा आहे. त्याची मनोभूमिका इहलोकवादी नव्हे. लोकशाहीवादी नव्हे. तो समाजवादी नाही. बहुजन समाज सुशिक्षित व साक्षर करावा, वा आपण छापखाने काढावे (शिवाजीने छापखाना काढण्याचा उद्योग केला होता, अशी एक समजूत मध्ये काही इतिहासकारांनी जोराने पुरस्कारलेली होती.) स्त्री दास्य विमोचन करावे, जातिभेद मोडावे, अस्पृश्योद्धार करावा, बालविवाह मोडावे, विधवाविवाह पुरस्कारावे, असले विचार शिवाजीजवळ नव्हते, एखाद्याने असला पापी विचार मांडला असता, तर शिवाजीने त्याचे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हातपाय मोडले असते. तो तोफा आणि दारूगोळा सदैव इंग्रजांकडून किंवा डचांकडून घेई. आपण दारूगोळा निर्माण करावा, याचा त्याने विचार केला नाही. हे युरोपियन आले कोठून? व का आले? याची फारशी माहिती शिवाजीला असणार नाही. त्याच्या जन्माआधी गॅलिलिओने आकाशात टेलिस्कोप लावला. कोलंबसने अमेरिका शोधली व मॅगेलिनने पहिली पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण केली, याची वार्ता छत्रपतींना नव्हती. जगातील सर्व थोर पुरुषांप्रमाणे शिवाजी आपल्या काळाचे अपत्य होता. या काळाच्या अंत:प्रवाहाचे आकलन त्याला किती झाले आणि आपल्या काळाच्या पुढे तो किती गेला, या कसोटीवर त्याचे मोठेपण ठरणार आहे.

पाच वर्षांपूर्वी 'हिंदू' या नियतकालिकात एक लेख आला होता. लेखक दाक्षिणात्य, अप्रसिद्ध म्हणून त्याचे नाव आठवत नाही आणि वर्षही आठवत नाही. पण त्या लेखातील मजकूर आठवतो. शिवाजीचा मोठेपणा समजून घेण्यासाठी इतका चांगला लेख पाहण्यात नाही. लेखाचे शीर्षक होते. `How Small Shivaji Was ?' लेखक म्हणतो, 'शिवाजी हे महाराष्ट्रीयांचे दैवत आहे. त्याला परमेश्वरापेक्षा मोठा ठरविताना महाराष्ट्रीयांना थोडाही संकोच वाटणार नाही. मानवजातीच्या पाच हजार वर्षांत एवढा मोठा राज्यकर्ता झाला नाही, ही भूमिका महाराष्ट्रीयांना केवळ अल्पोक्तीची वाटते. या स्तुतिगीतात मी भागिदार होऊ इच्छीत नाही. म्हणून मी, हा माणूस किती मोठा होता, हे पाहण्याऐवजी, तो किती छोटा होता, हेच पाहू इच्छितो. या दृष्टीने पाहताना पहिली गोष्ट ध्यानात येते, ती म्हणजे, शिवाजीने एक राज्य निर्माण केले. सर्व भारतभर सगळी मिळून ज्ञात इतिहासातील घराणी ५०० तरी असतील. त्या सर्वांना निर्माते होते. त्यांपैकी एक शिवाजी. पण ज्यांनी राज्य निर्माण केले, त्यांना राजकीय गोंधळामुळे राज्य स्थापन करण्याची संधी मिळाली. नालायक राजाच्या सुभेदारांनी केंद्र सत्तेचा दुबळेपणा पाहून स्वतंत्र व्हावे आणि मध्यवर्ती सत्तेला काहीही करता येऊ नये, नालायक राजा सेनापतीने पदच्युत करावा आणि स्वत: राज्य निर्माण करावे, असाच सर्व संस्थापकांचा मार्ग असतो. शाही सेना, कारभार चालविणारा अधिकारी-वर्ग या मंडळींना आयताच तयार मिळतो. पण ज्याला शून्यातून सारे निर्माण करावे लागले, कोणत्याही राजसत्तेच्या हजारोच्या फौजा वापरण्यास मिळाल्या नाहीत, ज्याने राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न करताच प्रबल शत्रूची चढाई झाली, शेजारच्या सत्ता उतारात नसून चढत्या वैभवात होत्या, विजापूर आणि गोवळकोंडा यांच्या भरवैभवाचा तो काळ. इकडे शिवाजी विजापूरचा प्रदेश कातरून आपले राज्य निर्माण करीत होता. त्याच्या १०-१५ वर्षे आधी विजापूरकरांनी अर्धी निजामशाही गिळंकृत केली आणि शिवाजीच्या काळात सगळा कर्नाटक जिंकीत आणला. मोंगल राज्य तर वैभवाच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिखरावर होते. आरंभापासून ज्याच्याजवळ कधीच शत्रूचा मैदानात पराभव करण्याचे बळ नव्हते, २० वर्षे जे मिळविले, ते १६६५ साली ज्याला चार महिन्यांत गमवावे लागले, तरी शेजारच्या वैभवात असणाऱ्या प्रबळ सत्तांशी झुंजून ज्याने २९ वर्षांच्या सतत परिश्रमाने राज्य निर्माण केले, असा शिवाजी आहे. भारताच्या राज्यसंस्थापकांत या मुद्द्यावर शिवाजीची तुलना कुणाशी करावी, हे समजले की, तो किती लहान आहे, हे सांगणे सोपे होऊन जाते.

'हिंदूंच्या राज्याचे काही विशेष आहेत. शत्रूशी लढताना त्यांचे विजय होत नाहीत, असे नाही. विजय होतातच. पण यांचा विजय झाला, म्हणजे शत्रूचा मोड होत नाही. त्याचे राज्य कमी होत नाही. त्याचे सामर्थ्य कमी होत नाही. या विजयी राजाचे राज्य वाढत नाही. विजय मिळाला, तरी याचे सामर्थ्य खच्ची झालेले असते. ते भरून निघत नाही. म्हणून असे दिसते की, पराजयात समूळ नाश. विजयात थोडे सामर्थ्य खर्ची होऊन दुबळे होणे हा हिंदू राजांचा क्रम आहे. विजयाने राज्य वाढावे, सामर्थ्य वाढावे, पराजयात प्रदेश कमी झाला, तरी सामर्थ्य व जिद्द टिकावी, हा हिंदूंचा नवा इतिहास शिवाजीपासून सुरू होतो. दुसरी गोष्ट अशी की, हिन्दू राजांना, शेजारी काय चालले आहे, याची वार्ताच नसे. शत्रूने सिद्धता करावी, आक्रमणाची वेळ साधावी, हे बेसावध असावेत, शत्रू ह्यांच्याच प्रदेशात शे-दोनशे मैल चालून यावा, मग हे जागे होणार! लढाई यांच्याच प्रदेशात, जय-पराजय काहीही होवो. प्रदेश यांचाच बेचिराख होणार. हा हिंदूंचा इतिहास शिवाजीवर बदलतो. लढण्याआधी सावधपणा व शत्रू बेसावध असेल, तर त्याच्या मुलूखात जाळपोळ, लुटालूट हा नवा इतिहास इथून सुरू होतो. तिसरी बाब म्हणजे, हिन्दू राजांनी विश्वास ठेवावा, करार करावे, शत्रूंनी दगे द्यावे, हा इतिहास बदलून, शिवाजीने दगे द्यावे व सर्वांनी थक्क व्हावे, असा इतिहास इथून दिसतो. हिंदूंच्या इतिहासात या मुद्द्यावर शिवाजीची तुलना कोणाशी करावी, हा शोध चालू आहे. अशी अजून एक-दोन माणसे सापडली की, हा किती लहान आहे, हे सांगणे सोपे होते.

'शिवाजी धार्मिक होता; पण धर्मभोळा नव्हता. कठोर होता; पण क्रूर नव्हता. साहसी होता; पण आततायी नव्हता. व्यवहारी होता; पण ध्येयशून्य नव्हता. उच्च ध्येयाची स्वप्ने पाहणारा स्वप्नाळूही. ही स्वप्ने वास्तवात उतरविणारा कठोर वास्तववादी हे त्याचे स्वरूप आहे. तो साधा राहत नसे. डौलदार, वैभवसंपन्न अशी त्याची राहणी, पण तो डामडौलात उधळ्या नव्हता. परधर्मसहिष्णुता त्याजजवळ होती. याबाबतीत अशोक, विक्रमादित्य, हर्ष, अकबर यांच्याशी शिवाजीची तुलना करता येणे शक्य आहे. पण सर्वांना प्रचंड जनानखाने

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होते. अकबराचा मीनाबाजार होता. अशोकाची तिष्यरक्षिता होती. शिवाजीने वासना मोकाट सोडलेली नव्हती, तरुण सुंदरी, रूपरत्ने, आस्वादासाठी गोळा करणारी सर्व हिंदू-मुस्लिम राजांची सत्तरीपर्यन्त टवटवीत राहणारी रसिकता शिवाजीजवळ नव्हती. चित्र, शिल्प, संगीत, काव्य यांना उदार आश्रय देणे, मोठमोठ्या इमारती बांधणे इतका पैसाही शिवाजीजवळ नव्हता. त्याला फुरसदही नव्हती. त्याच्या मनाचा तो कलच नव्हता. दुष्काळात लाख लोक अन्नान्न करीत मरत असताना, वेठबिगार आणि कोरडे यांच्या जोरावर वीस कोट रुपये खर्चून ताजमहाल बांधणारी रसिकता अगर सगळा भारत क्रमाने इंग्रजांच्या आहारी जात आहे, ही गौण बाब समजून भारतभर देवळे, घाट, धर्मशाळा बांधण्याइतकी पुण्यपावनता शिवाजीजवळ नव्हती. तो तुमच्या-माझ्यासारखा 'पापी' व 'उपयोगितावादी' माणूस होता. रसिक अगर पुण्यवान नव्हता. खाफीखान म्हणतो, तो नरकात गेला. मलाही वाटते, तो नरकातच गेला असावा. राज्य शिल्लक ठेवण्यापेक्षा वीरमरण पत्करणारे वीरपुरुष, सेना वाढविण्यापेक्षा यज्ञ करण्यावर भर देणारे पुण्यपुरुष, यांच्या सहवासात त्याला करमलेच नसते, आणि हे सर्वजण स्वर्गात होते. अकबराने हिंदूंच्या बाबतीत उदार धोरण स्वीकारले. त्याची बरीच स्तुती करून झाली आहे. पण बहुसंख्य प्रजेला संतुष्ट ठेवल्याशिवाय स्थिर राजवटीचा पाया घालता येत नसतो, हे साधे व्यवहारज्ञान आहे. ज्यांचे शौर्य साम्राज्य निर्माण करण्याकरिता होते, ते बळकट करीत होते, जे बहुसंख्य होते, कर देऊन वैभव निर्माण करीत होते, त्यांना अकबराने औदार्याने वागविले आणि हिंदूंना आक्रमणाचा इतिहास नव्हता. त्यांनी मशिदींचे विध्वंस केले नव्हते. मुसलमानांच्या कत्तली केल्या नव्हत्या. त्यांच्या बायका भ्रष्टविल्या नव्हत्या. सक्तीचे धर्मांतर लादले नव्हते. ज्यांना आक्रमणाचा इतिहास नाही, ज्यांच्याकडून आक्रमण होण्याची भीती नाही, त्यांना अकबराने औदार्याने वागविले. शिवाजीच्या प्रजेत मुस्लिम बहुसंख्या नव्हती. ती त्याच्या कराचा आधार नव्हती. मुसलमानांच्या तलवारी ज्यांचे राज्य निर्माण करीत नव्हत्या, त्यांना आक्रमणाचा इतिहास होता. पुन्हा आक्रमणाची भीती होती. शेजारी आलमगीर पुन्हा जिझीया बसवीत होता. तरी शिवाजीने मुसलमानांना औदार्याने वागविले. भोवतालच्या मुस्लिम राज्यांच्या भीतीने नव्हे, तर स्वयंभू औदार्य म्हणून!

'ह्या पार्श्वभूमीवर शिवाजी छोटा करून पाहण्याची माझी तयारी आहे. पण तो कुणापेक्षा छोटा ठरवावा? ते मोजमाप आहेच कुठे?'

वर दिलेला गोशवारा म्हणजे त्या लेखाचा अंदाजे सारांश. त्यात उदाहरणात कमी-जास्त असण्याचा संभव आहे. मुद्दे-लेखकाचे, शैली माझी.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वरील लेखात दोन मुद्द्यांचा अनुल्लेख आहे. त्याचा उल्लेख केला, म्हणजे शिवाजीच्या मोठेपणाचे ठळक स्वरूपात पुराण संपले. पहिली गोष्ट म्हणजे, शिवाजी कुशल सेनानी, युद्धतज्ज्ञ होता. यात वाद नाही. पण याखेरीज तो मुलकी कारभाराचा तज्ज्ञ होता. जनतेच्या इहलौकिक कल्याणाची जबाबदारी राजाची आहे, असे त्याला वाटे. इतक्या लढाया तो लढला, पण त्यासाठी प्रजेवर नवे कर त्याने लादले नाहीत. राज्याभिषेकाचा खर्चही वतनदारांवर कर लावून त्याने काढला. जनतेवर कराचा बोजा वाढविला नाही. 'मी शत्रूंना दगा दिला. मित्रांना दगा दिल्याचे दाखवा' असे आव्हान त्याने एका पत्रात दिले आहे. या आव्हानाला उत्तर नाही. कौल देऊन गावे वसविणे, शेतसारा निश्चित करणे, किल्ल्यावर धान्यकोठारे भरून ठेवणे, शेतकऱ्यांना बी-बियाणे, नांगर, बैल यांसाठी कर्जांची सोय करणे, भाषा सुधारण्यासाठी राज्य व्यवहारकोश, पंचाग सुधारण्यासाठी करणकौस्तुभ, धर्म सुधारण्यासाठी प्रायश्चित्त देऊन हिंदू करणे, नवे किल्ले बांधणे असा चौरस विधायक उद्योगही त्याने केला. तो नुसता सेनानी नव्हे.

दुसरी व माझ्या मते सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, शिवाजीने जे राज्य निर्माण केले, ते जपण्यासाठी २७ वर्षे जनता लढली. शिवाजी वारल्यावर संभाजीच्या नेतृत्वाखाली, तो मारला गेल्यावर १९ वर्षे, ज्याला जसे सुचेल, तसे सर्वजण लढत होते. या लढ्यात मोगलांची किमान पाच लाख माणसे मारली गेली असावीत, असा जदुनाथांचा अंदाज आहे. मराठ्यांची सुद्धा दोन-एक लाख माणसे मारली गेली असावीत; पण १७०७ साली भालेराई सुमारे दीडलाख होती. थोरले मोठे नेतृत्व नाही. पगार नियमित मिळण्याची सोय नाही. या २७ वर्षांत औरंगजेबाचा पराभव नाही. कारण ती शक्तीच मराठ्यांत नव्हती. (जदुनाथ म्हणतात, आलमगिराला विजयामागून विजय मिळाले. एकेका ठिकाणी, अनेकदा सर्व ठिकाणी तो विजयी झाला. या सर्व विजयांनंतर लाखो लोक मारून, कोट्यवधी रुपये खर्चून, अखिल भारतीय साम्राज्य खिळखिळे करून घेणे व स्वत: मरणे यापेक्षा पदरात काहीच पडले नाही. तो मराठ्यांचा पराभव करू शकला नाही) तरीही मराठे लढत राहिले. ज्या वेळी पेशवाई बुडाली, तेव्हा लोकांनी समाधानाचा नि:श्वास टाकला. चला, एकदाचे कायद्याचे राज्य आले. अंदाधुंदी संपली व शांतता आली. ही जनतेची प्रतिक्रिया होती. बक्सरच्या लढाईत इंग्रजांनी पूर्व बंगाल घेतला, तेव्हा हिंदूंनी सार्वत्रिक आनंदोत्सव केला. १५६५ नंतर जनता लढली असती, तर विजयनगर बुडालेच नसते. ११९८ नंतर जनता लढली असती, तर भारतावर मुसलमान राज्य आलेच नसते. राणा प्रतापने मोगलांविरुद्ध चिवट लढा दिला, पण सेना लढत होती. जनता उदासीन होती. सोमनाथला वाचविण्यासाठी लाख लोक मेले, पण आजूबाजूचा प्रदेश शांत होता. पृथ्वीराज चव्हाण,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राणा प्रताप, रामराजा ही माणसे धार्मिक नव्हती, असे नव्हे. कट्टर धार्मिक होती. त्या वेळी मुसलमान अत्याचारी नव्हते, असे नव्हे. अधिक अत्याचारी होते. आम जनता धर्माभिमानी, धर्मप्रेमी नव्हती काय? असेही नव्हे. जनताही कट्टर धर्माभिमानी होती; पण ते राज्य वाचविण्यासाठी जनता लढली नाही. राज्य टिकविण्यासाठी जनता लढण्याचा उल्लेख, भारताच्या इतिहासात प्रथम कलिंगला मिळतो. नंतर चौथ्या शतकाशेवटी यौधेयाचा आहे. हे दोन उल्लेख नक्की. कदाचित टोळीवाले शिकंदरविरोधी लढले असतील. जिथे जनता लढते, तिथे फौजा निकामी होतात. १२०० वर्षांनंतर शिवाजीच्या राज्यासाठी जनता लढली. ही आत्मीयता कशी निर्माण झाली, याचे उत्तर धर्माभिमान हे नव्हे. आपण लढू शकतो, हा आत्मविश्वास निर्माण करणे, छापे घालण्याचे तंत्र निर्माण करणे व वीरतेच्या खोट्या कल्पनांच्या आहारी जाऊन लढून मरणे यापेक्षा टिकणे, पळणे, थकवणे, नाश करणे हे नवे मूल्य प्रस्थापित करणे हे एक उत्तर व प्रजेच्या इहलौकिक सोयी सांभाळणे हे दुसरे उत्तर. धर्माभिमान क्रमाने तिसरा.

शिवाजीने कौटिल्य वाचला होता काय? ऐतिहासिकदृष्ट्या ह्याचे उत्तर सरळ 'नाही' असे आहे. पण अशी कल्पना जर केली की, त्याने कौटिल्य वाचला होता, तर कौटिल्याचा आदर्श राजा हे शिवाजीचे प्रयोजन आहे. कौटिल्य म्हणतो, प्रजेचे इहलौकिक व पारलौकिक कल्याण साधणे, हे राजाचे काम आहे. शांतता ठेवणे, परकीय आक्रमणापासून वाचविणे, ही कामे केली, की राजाचे कर्तव्य संपले नाही. दुष्काळ अधून-मधून येतात. नापिकीही होते. राजाने धान्यकोठारे सदैव भरून ठेवावीत. पिके येतात, तेव्हा राजाने धान्य विकत घ्यावे. या वेळी व्यापारी भाव पाडून जनतेचे नुकसान करतात. शेतकऱ्यांच्या जवळील धान्य संपले, म्हणजे भाव वाढून जनतेचे नुकसान होते. राजाने या वेळी धान्य विक्रीस काढून जनतेचे रक्षण करावे. ह्यामुळे एकीकडे प्रजारक्षण होते. दुसरीकडे सरकारी कोठारांतील धान्य नवे राहते. धान्य म्हणजे रत्न नव्हे. ती कुजतात, म्हणून सदैव जुने धान्य विकणे, नवे खरेदी करणे, हे काम चालू ठेवावे. त्यामुळे भाव आटोक्यात राहतात व प्रजारक्षण होते. मापे, वजने नेहमी पारखावी. कारण तेथेही व्यापारी फसवतात. व्याज किती घ्यावे, यावर नियंत्रण असावे. सावकारीला परवाना व कर असावा. माणसे व पशू यांना औषध देण्याचे काम पुण्याचे तर खरे, पण राजावर श्रद्धा बसण्यास उपयोगी व जनहिताचे आहे. दुष्काळात प्रजेला अन्न पुरवून वाचविणे, त्यानंतर बी, बैल, नांगर पुरविणे व त्याचा खर्च हप्त्याने वसूल करणे हे राजाचे काम आहे. चोरी पकडणे इतकेच राजाचे काम नाही. त्याने नुकसानभरपाई दिली पाहिजे. प्रत्येक धंद्यावर कर असावा. कर एकदाच घ्यावा. त्याचे प्रमाण कायम (कौटिल्याच्या मते उत्पन्नाचा १/४

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग) असावे व तो उत्पन्न कमी झाल्यास कमी व्हावा, सडका बांधणे, तळी दुरुस्त करणे, विहिरी पाडणे, कालवे खोदणे, नवेनवे कारखाने उद्योगधंदे उभारण्यास मदत देणे हे राजाचे काम आहे. शिक्षा कठोर असल्या, म्हणजे गुन्ह्याचे प्रमाण कमी होत नाही. प्रत्येकाचा गुन्हा लपणार नाही, शिक्षा चुकणार नाही, याची खात्री असली, म्हणजे गुन्हे कमी होतात. अशी प्रजेची सर्वांगीण काळजी घेणे हे राजाचे काम आहे. हे जर राजा करीत नसेल, तर कर नाकारणे, राजा हाकलून देणे, त्याचा वध करणे हा प्रजेला हक्क आहे. नव्हे, ते तिचे कर्तव्य आहे.

कौटिल्य म्हणतो, जर एकजण कारस्थान करू लागला, तर गुपचूप वध करावा. १० जण कट करू लागले, तर जाहीर फाशी द्यावी. १०० जण कट करू लागले, तर फाशी देऊन दहशत निर्माण करावी. अनुयायांना माफी देऊन दुवा घ्यावा व कारभार कोठे चुकला, याचा शोध घेऊन दुरुस्ती करावी. सुखासुखी प्रजा बंड करीत नसते. प्रजेत राजा अप्रिय असला, तर सेना त्याला वाचवीत नसते. सेनापती, सरदार कुणीतरी त्याचा वध करतो.

प्रजेचे सर्वांगीण कल्याण हे राजाचे कर्तव्य आहे. त्यासाठी लढावे, मरावे, पड खावी, स्पर्धा करावी, वेळ पाहून उचल करावी, भेद करावा, फितुरी करावी, घात करावे, वचने द्यावी, तोडावी, मारेकरी घालावे, विषप्रयोग करावा. प्रजेच्या हितासाठी हे सारे करणे राजाचे कर्तव्य आहे. जो कर्तव्य करतो, त्याची सर्व पापे प्रजा जो दुवा देते, त्याने धुतली जातात व प्रजेच्या पुण्याचा १/६ मिळून स्वर्ग मिळतो. राजाला खासगी प्रेम नसते. द्वेष नसतो. मान-अपमान नसतो. लोभ-वैर नसते. राजा हा बोकड आहे- ज्याने जिवंतपणी नाचून करमणूक करावी, दूध द्यावे, लोकर द्यावी, मरून मांस द्यावे, चमडे द्यावे, शिंग, हाडे, खूरही द्यावे. ज्यासाठी हे करायचे, तो धनगर, प्रजा आहे. हे कर्तव्य जो राजा करीत नाही, त्याचे पुण्य प्रजेत वाटले जाते व प्रजेच्या एकूण पापाचा १/६ मिळून तो नरकात जातो. राजदंड इतका जबाबदारीचा आहे. म्हणून लोभी, लंपटाच्या हाती तो पेलतच नाही. त्याला सावध संयमी राजा लागतो.

वैयक्तिक पुण्य व धर्माचरणाची राजाला अपेक्षा नाही. प्रजेचे धर्म, वित्त, जीवित यांचे रक्षण हे राजाचे काम. राजा चारचक्षू असतो. म्हणून इंद्राला सहस्राक्ष म्हणतात. हजार हेर हे त्यांचे हजार डोळे. हेरांनी तापसी, बैरागी, मुंडी या वेषात हिंडावे. हुजूर, दासी, न्हावी, तैलाभ्यंग करणारे ज्योतिषी, वेश्या, जुव्वारी हे चांगले हेर असतात. शत्रूच्या प्रदेशातील

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रत्येक बाब राजाला कळली पाहिजे. म्हणजे सदैव सावध राहता येते. शत्रूची बिंगे माहीत असणे हे राजाचे आद्य काम. शौर्याने लढावे, मरावे, पण मागे परतू नये, हा सैनिकाचा धर्म. लढावे, राज्य वाढवावे, पड घ्यावी, राज्य वाचवावे, काय वाटेल ते करून प्रजेचे रक्षण करावे, हा राजाचा धर्म.

राजाने नेहमी मला भूत-वेताळ वश आहेत, देवी-देवता प्रसन्न आहेत, त्यांचे दृष्टांत होतात, अशी माहिती सर्वत्र पसरावी. हेरांकरवी या कथा स्वत: पाहिलेल्या गोष्टी म्हणून प्रतिपादन कराव्या. हेरांनी आणलेल्या बातम्या कर्णपिशाचाने सांगितल्या, देवांचा दृष्टान्त होऊन त्याने सांगितल्या, असे म्हणावे.

आपण मूळ कौटिल्य एकदा नजरेखालून घालावे. वरील माहितीतून साकार होणारे स्वभावरेखाटन कलाकृतीत जिवंत कसे करावे, सारा ध्येयवाद व वास्तववाद, धार्मिकता व सावधपणा, सेनानीपणा व चौरसपणा, धूर्तता व उदारता, भव्यपणा व नाट्य, मानवीपणा, असामान्यत्व व मर्यादा स्वभावरेखाटनात याव्यात, हे महत्त्वाचे. हा प्रसंग व तो प्रसंग घेणे वा टाळणे गौण. भूतवास्तवाचे आकलन हे वाङ्मयीन सत्य. ते साकार करण्यासाठी आवश्यक ते काल्पनिक वापरण्याची कादंबरीला मुभा असते.

एवढे सविस्तर पत्र वाचणे कंटाळवाणे होणार, हे मला कळत होते. नाही, असे नाही. पण मराठीत ऐतिहासिक कादंबरीच्या प्रांतात वास्तवाचे आकलन करण्याचा पहिला यशस्वी प्रयोग करणारे आपण. शिवाजीला मराठी ललित वाङ्मयात वास्तवाच्या आकलनाचा योग प्रथमच येत आहे. म्हणून सविस्तर लिहिणे भाग पडले. शिवाजी या व्यक्तिरेखेविषयी ममत्व हा भाग अर्थातच आहे. आपण म्हणता, ‘इतिहास, दंतकथा, आख्यायिका, इत्यादी सर्व मी वापरणार.’ मला ही विलक्षण व्यक्तिरेखा काल्पनिकाच्या पसाऱ्यात गमावली जाण्याची भीती वाटते. शिवाजीची व्यक्तिरेखा आपणांसमोर आहे. ती क्रमाने बनली कशी, हा भाग १६५६ पर्यंत संपतो. हा भाग पूर्ण २५० पाने. १६३० ते १६४५-१५ वर्षे, १५० पाने. १६४५ ते १६५६-११ वर्षे, १०० पाने. या व्यक्तिरेखेचा चौरस विकास १६५६ ते १६६६, २५० पाने, १६६६ ते १६७८, १५० पाने हा काळ या व्यक्तिरेखेची खोली व उंची, आघात आणि दु:खे यांनी वाढण्याचा. १६७८-८० पूर्ण २०० पाने या व्यक्तिरेखेचा दैवदुर्विलास. १६३० पूर्वीची पार्श्वभूमी २५ पाने. या पद्धतीने व्यक्तिरेखेचा क्रमबद्ध विकास इतर व्यक्तिरेखांचे तितकेच प्रभावीपणे रंगविले, तर हमखास यशस्वी होईल, असा विश्वास वाटतो.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपला नम्र

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ही कादंबरी हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्येही भाषांतरित झाली आहे.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग पहिला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

शिवनेरी पायथ्याचे जुन्नर गाव पश्चिमेकडे झुकलेल्या सूर्याच्या तिरप्या किरणांत उठून दिसत होते. जुन्नरपासून थोड्या अंतरावर असलेल्या आंबराईत शहाजीराजांचे घोडदळ थांबले होते. एका डेरेदार आम्रवृक्षाखाली शहाजीराजे छोट्या संभाजीसह उभे होते. दुपार टळत येऊनही अद्याप वारा सुरू झाला नव्हता. झाडाचे पानही हलत नव्हते. रात्रीची थंडी उतरायला अजून सुरुवात झाली नव्हती. आंबराईतून दिसणाऱ्या रस्त्याकडे उभयतांचे सारखे लक्ष जात होते. कोणी दृष्टिपथात येत नव्हते. वाढत्या क्षणाबरोबर शहाजीराजे अधिक अधिक अस्वस्थ होत होते.

'आबासाहेब, मासाहेब आल्या.' शंभूराजे म्हणाले .

'कुठं?' मान वर करीत शहाजीराजे विचारते झाले.

शंभूबाळांनी बोट केलेल्या दिशेकडे शहाजीराजांनी पाहिले. तिरप्या सूर्यकिरणांत धुळीचे लोट उडवीत येणारे अश्वपथक दिसत होते. हळूहळू टापांचा आवाज स्पष्टपणे ऐकू येऊ लागला. आंबराई नजीक येताच येणाऱ्या पथकाची गती मंदावली. घोडी थांबली. तीन घोडी मंद गतीने पुढे येऊ लागली.

घोडदौडीने थकलेल्या जिजाबाईच्या चेहऱ्यावर संभाजीला पाहून क्षीण हास्य उमटले. जिजाबाई दासीच्या आधाराने पायउतार झाल्या. श्रमाने सारा चेहरा लालबुंद झाला होता. नेत्र आरक्त दिसत होते. तीन मासांच्या गर्भार जिजाबाईंनी आपला घाम टिपला. पदर सावरून त्या शहाजीराजांच्या सामोऱ्या आल्या.

'अशी ठायी ठायी थांबत आम्ही दौड करीत राहिलो, तर तुमच्या बापाच्या हाती सापडण्यास फार वेळ लागायचा नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तेच सांगणार होते मी!’

‘मतलब?’ शहाजीराजांनी विचारले.

‘आपण पुढं जावं.’

‘आणि तुम्ही?’

‘पुढचा प्रवास झेपेल, असं वाटत नाही.’

‘मग अशा आडवाटी आपल्याला टाकून...’

‘जवळच आपले व्याही विश्वासराव आहेत. त्यांच्याकडे थांबता येईल मला. आपण सुखरूप, तर आम्ही सुखरूप. क्षणाच्या अवधीला सुद्धा फार मोल आहे...’

शहाजीराजे एकदम संतापाने उफाळले, ‘हा आपल्या वडिलांचा प्रताप आहे. त्याला आम्ही काय करणार? जाधवांचं आणि भोसल्यांचं वैर पिढ्यान् पिढ्या चालवायला आम्हीही समर्थ आहोत, म्हणावं.’

‘मी काय बोलणार यात?’ जिजाबाई बोलून गेल्या.

‘तुम्ही म्हणता, तसं करू. तुमच्या बापाला रक्ताची लाज असेल, तर तो तुम्हांला सोडून देईल, अथवा पळवून नेईल. तुमचं नशीब आणि तुम्ही. आम्हांला जास्त विचार करायला आता उसंत नाही. बोला, हे ठरलं?’

आपले अश्रू कष्टाने आवरून, काही न बोलता जिजाबाई आपल्या घोड्याकडे वळल्या.

जुन्नरला खबर गेली. शहाजीराजांचे व्याही विजयराव सिधोजी विश्वासराव खुद्द सामोरे आले; जिजाऊ आणि शहाजी यांना सन्मानाने आपल्या वाड्यात घेऊन गेले. वाड्यात बैठकीवर जाताच शहाजीराजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘विश्वासराव, नाइलाजानं तुम्हांला ही तकलीफ देत आहो. त्याबद्दल आम्ही शरमिंदे आहो.’

‘राजे, असं बोलू नका. आपल्या कामी येण्याची संधी नशिबानं मिळाली, असं आम्ही समजतो. जिवाच्या बाजीनं आम्ही राणीसाहेबांची कदर करू.’

‘तो विश्वास नसता, तर आम्ही आलोच नसतो, आम्हांला आता थांबता येणार नाही. शंभूराजे, चलायचं ना? का राहणार?’

जिजाऊंची नजर चुकवीत शंभू म्हणाला, ‘आम्ही येणार.’

‘शाबास!’ शहाजीराजे म्हणाले.

‘थोडे दिवस बाळ राहिल्यावर आणि सर्व सुखरूपपणे पार पडल्यावर बाळाला पाठविला, तर नाही का चालणार?’ जिजाऊ म्हणाल्या.

‘ऐका, विश्वासराव. बाळाला धोका आहे, आणि आम्हांला नाही.’

‘तसं म्हटलं नाही मी.’ जिजाबाई गडबडीने म्हणाल्या.

‘आम्ही शंभूबाळांना नेणार. त्यांच्याकडून फार मनसुबे पार पाडायचे आहेत, राणीसाहेब. आपल्यासाठी आम्ही बाळकृष्ण हनुमंते, संक्रोजी नीळकंठ, सोनोजीपंत, कोरडे ही मंडळी ठेवून जात आहोत. थोडी शिबंदीदेखील आहे. आम्ही स्थिरस्थावर झालो, की तुम्हांला घेऊन जाऊ. तब्येतीला सांभाळा.’

शंभू जिजाऊंच्या पाया पडण्यासाठी वाकताच जिजाऊंनी त्याला उराशी कवटाळला. शंभू बाळाने त्या मिठीतून सुटका करून घेतली. जिजाऊंना शब्द फुटत नव्हता. त्या शंभूचे रूप डोळ्यांत साठवीत होत्या. डोळे भरताच तेही रूप अस्पष्ट झाले. जेव्हा डोळे पुसले, तेव्हा शहाजीराजांच्याबरोबर शंभू वाड्याबाहेर पडत होता- एकदाही मागे न पाहता.

जिजाऊंनी उभ्या जागी डोळ्यांना पदर लावला. विश्वासरावांच्या पत्नी लक्ष्मीबाई सदरेवर येऊन, जिजाऊंना हाताशी धरून आत घेऊन जात होत्या. पण आत जात

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

असताही बाहेर उठणारा घोड्यांच्या टापांचा आवाज कान थोपवू शकत नव्हते.

□

२

जुन्नरवर रात्र उतरली. घराघरांतून समया, पलोते पेटवले गेले. गावाच्या देवडीवरची दिवटी वाऱ्याने फरफरत होती. गावाच्या नजरेत नुकतीच झोप उतरत होती... आणि अचानक जुन्नरच्या चारी वाटांनी घोड्यांच्या टापांचा खडखडाट उठला. सारा गाव भयचकित झाला. गावाची झोप उडाली.

विश्वासराव नुकतेच जेवण करून सदरेवरच्या झोपाळ्यावर बसले होते. सदरेवरच्या भिंतींवर टांगलेली शस्त्रे पलित्यांच्या उजेडात चमकत होती. टापांचा आवाज कानांवर येताच विश्वासराव चटकन उभे राहिले. त्यांचे लक्ष दरवाज्याकडे वळले... आणि त्याच वेळी दरवाज्यातून जासूद धावत आला.

'घात झाला! लखुजी जाधवरावांनी सारा गाव वेढलाय्. ते इकडंच येत आहेत.'

'चांगल्या मुहूर्तावर आले..' म्हणत विश्वासरावांनी सदरेवरची तलवार उचलली. विश्वासरावांनी चार पावलांत दरवाजा गाठला; आणि सामोरे लखुजी जाधवराव आले. लखुजींच्या हाती तळपती तलवार होती. चेहऱ्यावर त्वेष होता.

'कुठं आहे तो भोसला?' लखुजी गर्जले.

'प्रथम तलवार म्यान करावी, आणि आत यावं...' विश्वासरावांनी सांगितले.

'मुकाट्यानं वाट सोड.' लखुजी म्हणाले.

शांतपणे विश्वासराव म्हणाले,

'सज्जनांच्या घरात नागव्या तलवारीने प्रवेश करता येत नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लखुजी तेथेच थबकले. संतापाने त्यांचे पांढरे कल्ले थरथरले. पुन्हा त्यांनी तोच प्रश्न केला,

‘कुठं आहे तो भोसला?’

‘ते इथं नाहीत.’

‘दडला असेल.’

‘दडून बसण्याइतकी भोसल्यांची कुळी अजून नामर्द झाली नाही.’

छद्मीपणाने हसत लखुजी म्हणाले, ‘पळून जाण्याइतपत झालेली आहे?’

विश्वासरावांचा संयम सुटला. ते म्हणाले,

‘खबरदार, जाधवराव! फार ऐकलं. हे भोसल्यांच्या व्याह्यांचं घर आहे. इथं भोसल्यांचा उपमर्द ऐकला जात नाही.’

‘हं:! अर्ज करीत नाही मी.’ लखुजी त्वेषाने समशेर उचलीत म्हणाले, ‘हाती समशेर आहे. हो बाजूला.’

क्षणात विश्वासरावांनी आपली तलवार झटकली. सरकन म्यान चौकात पडले आणि विश्वासरावांच्या हाती तलवार तळपू लागली.

‘ही हिंमत!’ म्हणत लखुजीरावांनी तलवार उचलली, तोच आवाज झाला,

‘आबा!’

त्या आवाजाबरोबर लखुजीरावांची नजर वळली. सदरेच्या सोप्यावर जिजाबाई उभ्या होत्या. पलोत्याचा उजेड अर्ध्या चेहऱ्यावर पडला होता. लखुजींचा हात खाली आला. विश्वासरावांनी वाट दिली, तरी लखुजींना पाऊल उचलण्याचे सामर्थ्य नव्हते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिऊ! केवढ्या आठवणी त्या नावाबरोबर साठवल्या होत्या! लखुजींची लाडकी लेक, जाधवरावांच्या घरची साक्षात लक्ष्मी! ही भोसल्यांच्या घरात गेली आणि जाधवांची कोण दुर्दशा उडाली...

लखुजींच्या हातातील तलवार गळून पडली. भ्रमिष्टासारखे ते पुढे सरकत असता, त्यांचे ओठ पुटपुटत होते. सारे बळ एकवटून ते बोलले,

'जिऊऽऽ'

'आबा!' म्हणत जिजाबाई पायऱ्या उतरल्या आणि चौकाच्या मध्यभागी आलेल्या लखुजीरावांना त्यांनी मिठी मारली. दोघांच्या पाठीवरची बोटे एकमेकांना समजावीत होती.

उभयता सदरेवर आले. लखुजीराव सदरेच्या बैठकीवर बसले, विश्वासराव पुढे होऊन पाय शिवत म्हणाले,

'मामासाहेब, क्षमा करा.'

'व्वा, विश्वासराव! क्षमा कसली मागता? उलट, तुमची तडफ पाहून आम्हांला आनंद झाला. भोसल्यांच्यामध्ये नसले, तरी भोसल्यांच्या आप्तस्वकीयांमध्ये वाघ आहेत, हे पाहून आम्हांला आनंद वाटतो.'

आपल्या बोलण्यावर खूश झालेले लखुजीराव मोकळेपणाने हसले; आणि आपण एकटेच हसतो आहोत, याची जाणीव होऊन हसता-हसता थांबले. जिजाबाईंना जवळ घेत ते म्हणाले,

'पोरी, तुझं बरं आहे ना?'

'बरं! काय विचारता, आबा?' बोलता-बोलता जिजाबाई थांबल्या.

लखुजीराव म्हणाले, 'बोल ना, पोरी. थांबलीस का?'

जिजाबाईंनी वडिलांच्या नजरेला नजर भिडवली. एक वेगळेच दुःख उन्मळून उठले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कळायच्या आत त्या बोलून गेल्या,

‘पोरीची जात म्हणजे हळदी-बुक्क्याची. कुणीही उचलावी आणि कुणाच्याही कपाळ केव्हाही चिकटवावी. रंगपंचमीच्या दरबारात तुमच्या जिऊची हळद अशीच उधळलीत. अजून ती वाऱ्यावर फिरते आहे.’

‘वाऱ्यावर का?’ लखुजी गर्जले. ‘या लखुजी जाधवाची कूस इतकी वारेमोल केव्हापासून झाली? त्याला बायकोचा भार वाटत असेल. मला माझी पोर जड नाही.’

‘पोरीवर एवढी माया आहे, तर हा दावा कसला? कुणाबरोबर? हा दावा साधला आणि तुमच्या पोरीचं कपाळ उघडं पडलं, तर बरं वाटेल तुम्हांला? आबा, ह्या जिऊची तुम्हांला शपथ...’

लखुजीरावांनी एकदम जिजाबाईंना जवळ ओढले. त्यांच्या तोंडावर हात ठेवीत भरल्या आवाजात ते म्हणाले,

‘नको, पोरी, बोलू नको! शपथेत मला गुंतवू नको. जसं रक्त तुझ्यात गुंतलं, तसाच हा देह जाधवरावांच्या कुळीला बांधला गेला आहे. वैर! ते आता माझ्या टाळण्यानं टळत नाही. यातच मरण दैवास आलं. ते भोगणं एवढंच माझ्या हाती आहे. पोरी, माझा तुला आशीवार्द आहे. अखंड सौभाग्यवती हो! या बापाची काळजी करू नको. गेला, तरी दुःख मानू नको.’

जिजाबाईच्या डोळ्यांतून पाणी निखळले. ते टिपत लखुजीराव म्हणाले,

‘रडू नको, पोरी! ऐक माझं. चारी बाजूंना बघ. दुष्काळी मुलूख. माणसाला माणूस ओळखत नाही. एक शाही स्थिर नाही. चौफेर बंडाळी उसळली आहे. अशा परिस्थितीत एकटी कशी राहणार तू? माझं ऐक! माझ्याबरोबर सिंदखेडला चल. ते तुझंच माहेर आहे. सगळं ठीक झाल्यावर, म्हणशील तिथं राहा.’

नकारार्थी मान हलवीत जिजाऊ म्हणाल्या, ‘नको, आबा, मी जाधवांची माहेरवाशीण असले, तरी भोसल्यांची सासुरवाशीण आहे. माहेर विसरायला हवं मला. अशा परिस्थितीत माहेरी आले, तर भोसल्यांच्या घराण्याशी बेइमानी होईल.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नि:श्वास सोडून लखुजी म्हणाले, ‘एक कोडं सोडवायला गेलं, की दुसरं पडतं. पोटची पोर तू. अवघडलेली. नवऱ्यानं सोडून दिलेली... आणि हा तुझा बाप, लखुजी जाधवराव नुसतं पाहण्याखेरीज काही करू शकत नाही.’

‘असं म्हणू नका, आबा. पुष्कळ करता येईल.’

‘सांग, पोरी... काय करू?’

‘आबा, तुम्ही जायच्या आधी मला शिवनेरीला ठेवून चला. तिथं मला बरं वाटेल.’

‘तुला काय म्हणायचं, कळतंय् मला... विश्वासराव!’

विश्वासराव सदरेवर आले. ‘जी.’

‘उद्या मेण्याची व्यवस्था करा. अशा धामधुमीत गडाखाली असण्यापेक्षा जिऊ गडावरच असलेली बरी.’

‘मी तेच करणार होतो. गड आपलाच आहे. आता एकच विनंती आहे.’

‘विनंती कसली? लहान असला, तरी आज्ञा करा. आमची लेक, जाधवांची अब्रू आज तुमच्या हाती आहे.’

‘लहान तोंडी मोठा घास घेऊन बोलतो. तुमच्या वैराचा तुम्हांला संताप असेल. पण भोसले-जाधवांचं वैर आज मला देवाचं देणं वाटतं आहे.’

‘काय म्हणता!’ लखुजी उद्गारले.

‘हे वैर नसतं, तर आपले पाय आमच्या घरी कशाला लागले असते? भोसले-कुळीची लक्ष्मी आमच्या घरी पायधूळ झाडायला कशाला आली असती?’

‘वा! विश्वासराव, शाही रिवाजात मुरलेली आम्ही माणसं. पण तुमच्या बोलानं आम्ही सुद्धा थक्क झालो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘माझ्या विनंतीचं काय?’

‘कसली विनंती?’

‘आपण आणि आपल्या शिबंदीनं इथंच हात ओले करावेत, एवढं मागणं आहे.’

‘शिबंदीचं खाणं मागच्या मुक्कामावरच झालं आहे. कदाचित सारी रात्र दौड करावी लागेल, या हिशेबानं आम्ही मांड ठोकली होती. आमचं वय झालं. आम्ही एक वेळ जेवतो. जनावरांची चंदी पाहिलीत, तर...’

‘ती व्यवस्था करूनच आलो. पण कधी नाही ते पाय घरी लागले. ...राणीसाहेब, तुम्ही सांगा ना....’

जिजाबाई संकोचाने म्हणाल्या, ‘तुम्ही दोघेही मला थोर. आबा...’

‘ठीक आहे. विश्वासराव, रात्र झाली. फार कष्ट देऊ नका. आम्ही थोडा दूधभात घेऊ.’

माजघरात चांदीच्या फुल्या मारलेल्या पाट मांडला होता. चांदीच्या समया प्रज्वलित झाल्या होत्या. विश्वासरावांनी लखुजीरावांना पाटापाशी नेले.

‘हे काय? एकच पाट? आणि तुम्ही?’

‘माझं झालं आहे. आपण यायच्या आधीच...’

‘हे खरं नाही! तुम्ही पण बसा. पुन्हा हा योग येईल, न येईल...’

आणखी पाट मांडले गेले. विश्वासरावांची मंडळी कौतुकाने पाहत होती. पुलाव्याचे ताट येताच लखुजीराव म्हणाले,

‘आता नको, फार झालं.’

विश्वासराव म्हणाले, ‘राणीसाहेब, हे तुमचं घरं आहे. तुम्हीच आबासाहेबांना वाढा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाऊंनी पदर कसला. त्यांनी पुलाव्याचे ताट घेतले, आणि ताटावर धरलेले लखुजीरावांचे हात आपोआप मागे झाले. लखुजी म्हणाले,

‘तुम्ही भोसल्यांची मंडळी डाव करण्यात भारी हुशार.’

सारे हसले. पुलावा वाढीत असता तो थांबवण्याकरिता लखुजींचे हात पुढे येईनात. जिजाबाईंनी वर पाहिले. लखुजींच्या चेहऱ्याकडे पाहताच त्यांचे हास्य कुठच्या कुठे गेले. लखुजींचे डोळे भरले होते. जिजाऊ म्हणाल्या,

‘आबाऽऽ’

डोळे टिपत लखुजी म्हणाले, ‘वाढ, पोरी. आज भूक पुरी होऊ दे. या राजकारणाच्या वणवणीत असं प्रेमळ जेवण फार दिवसांत मिळालं नव्हतं.’

-आणि पंगतीला एकदम नवे रूप प्राप्त झाले.

□

३

सकाळी वाड्यासमोर जाधवरावांचे घोडदळ उभे होते. भोसल्यांची कुमकही एका बाजूला उभी होती. बाळकृष्णपंत हनुमंते, शामराव नीळकंठ, रघुनाथ बल्लाळ, कोरडे ही भोसल्यांची सरदार मंडळी वाड्याच्या दरवाज्याशी उभी होती. एक शाही मेणा पहिल्या चौकात ठेवला होता. भोईपट बांधलेले भोई चौकाच्या एका कोपऱ्यात उभे होते. विश्वासरावांची मंडळी आत जिजाऊंची खणानारळाने ओटी भरत होती. भरल्या ओटीने आणि कपाळाने जिजाऊ सदरेवर आल्या. लखुजींच्या आणि विश्वासरावांच्या पाया पडून त्या मेण्यात बसल्या. जिजाऊंबरोबर विश्वासरावांची मंडळी मेण्यात बसली. मेणा उचलला गेला. जुन्नरच्या माळावरून मेणा गडाकडे चालू लागल्या. मेण्याच्या मागे-पुढे घोडेस्वार चालत होते. लखुजी, विश्वासराव मेण्याच्या दोन्ही बाजूंनी जात होते. गडाच्या पायथ्याशी घोडी थांबली. लखुजीराव पायउतार झाले. विश्वासराव म्हणाले,

‘घोडी चढतात.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो! पण वाट पायऱ्यांची आहे. मेणा सांभाळायला हवा. उगीच वर-खाली होतो.’

मेणा गड चढत होता. मेण्यावर हात टेकून साठीचे लखुजीराव चालत होते. गडाचा पहिला दरवाजा ओलांडला. हत्तीदरवाजा ओलांडून गड चढत असता मागे वळून पाहिले, तर जुन्नरखोरे एक भले थोरले वळण घेऊन पसरलेले दिसत होते. पीरदरवाज्यापुढे चढण सुरू झाली. भोई अलगद मेणा नेत होते. लखुजी ‘आस्ते, आस्ते,’ म्हणत चालले होते. मेण्याच्या कुंई कुंई आवाज फक्त येत होता. शिवाबाईचा दरवाजा ओलांडून जाताच मेणा शिवाईच्या देवळाकडे वळला. मंदिराजवळ मेणा थाबंला. मेणा जमिनीला टेकताच मेण्याचा पडदा सरकावला गेला. जिजाबाईंनी विचारले,

‘गड आला?

‘जिऊ,’ लखुजीराव म्हणाले, ‘शिवाईचं दर्शन घे; आणि मग गडावर जाऊ.’

जिजाबाई मेण्याबाहेर आल्या. त्यांनी देवळाकडे पाहिले. उभ्या कड्याच्या गर्भात वसलेले ते देवीमंदिर निरखून जिजाबाईंनी पाय उचलेले. पूजासाहित्य घेतलेल्या दासी पुढे गेल्या. लखुजीराव, विश्वासराव मागून जात होते.

देवळात जाताच विश्वासराव म्हणाले,

‘राणीसाहेब, हे जागृत देवस्थान आहे. इथं मागितलेलं वाया जात नाही.’

जिजाबाईंनी देवीचा प्रसाद घेतला. दंडवत घालून उठत असलेले लखुजी म्हणाले,

‘मुली, एक काम करशील?’ विचार एकदम बदलीत ते म्हणाले, ‘सांगेन! नंतर सांगेन.’

गडावर पोहोचायला उन्हे वर चढली होती. अंबारखाना मागे पडला आणि गडमाथा येताच समोरचा वाडा नजरेत आला. वाड्यासमोर मेणा थांबला. जिजाबाई गड निरखीत होत्या. लखुजी जिजाऊंनी घेऊन पुणेदिशेला गेले. तेथून दिसणाऱ्या डोंगराकडे बोट दाखवीत ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जिऊ, एकटी आहेस, असं कधी वाटून घेऊ नकोस. समोर लेण्याद्री आहे. त्याच्यासारख्या संरक्षक असता भीती कसली?’

जिजाऊंनी हात जोडले.

महाली जिजाऊला सोडून जाधवराव निघाले. जिजाऊंनी लखुजींचे पाय शिवताच लखुजींना अश्रू आवरेनात. जिजाऊंना जवळ घेऊन त्यांनी डोळे पुसले.

‘पोरी, खुळी का तू? तुझ्या नवऱ्यानं जरी बोलावलं नाही, तरी नातवाचं मुख पाहायला मी येईन... बरी आठवण झाली.’ म्हणत लखुजीरावांनी कमरेचा कसा काढून जिजाऊंच्या हाती दिला. ते म्हणाले, ‘हे एकशे एक होन आहेत. देवळात मी, नंतर सांगेन, असं म्हणालो होतो ना? तिथं मी नवस बोललो. मुलगा झाला, की हे देवीवरून ओवाळून टाक. पोरी, माझा तुला आशीर्वाद आहे. देवीकृपेनं असं पोर तुझ्या पोटी येईल, की जे जन्मजन्मांतरीचे पांग फेडील. त्याच्याकडे पाहून तुझी मान सदैव ताठ राहील. दुःखाचा लवलेशही तुझ्या मनाला शिवणार नाही. काळजी करू नको. येतो मी.’

वाड्याबाहेर येताच नारो त्रिमळ, हनुमंते, गोमाजी नाईक, पानसंबळ यांनी मुजरे केले. लखुजी म्हणाले,

‘तुमच्यासारखी कर्तव्यनिष्ठ माणसं राणीसाहेबांच्या जवळ असता आम्हांला चिंता नाही. त्यांना सांभाळा.’

‘जी!’ नाईक म्हणाले.

लखुजीरावांची नजर विश्वासरावांच्याकडे गेली.

‘विश्वासराव, तुमचे उपकार फिटायचे नाहीत; पण राहवत नाही, म्हणून...’

‘नको, मामासाहेब. काही सांगायचं नाही. माझ्यावर विश्वास ठेवून निश्चिंत असा.’

‘तुमच्यावर विश्वास ठेवायचा नाही, तर ठेवायचा कुणावर? अडचण असली, तर आमचं वैर मनात न आणता निरोप पाठवा. आम्ही गडावर हजर होऊ. रामराम...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

परत मुजरे झडले. विश्वासराव चार पावले पोहोचवायला गेले.

शिबंदीचे शिपाई गड न्याहळीत फिरत होते. सूर्य मस्तकावर आला होता.

□

४

महिने उलटत होते.

जिजाबाई पहाटे उठत. स्नान, पूजा-अर्चा आटोपायला सूर्योदय होई. त्यानंतर स्वयंपाकघरात लक्ष्मीबाईंबरोबर शिधा काढण्यात थोडा वेळ जाई. पोथीवाचन झाल्यावर भोजन, थोडी निद्रा. सायंकाळी पाय मोकळे करायला जात. एक-दोन दिवसांनी केव्हा तरी शिवाईच्या दर्शनाला उतरत. देवदर्शनाला त्या पायीच जात. मेण्यातून जाण्याबद्दल विनंती करूनही जिजाबाईंनी विश्वासरावांचे कधी ऐकले नाही.

जिजाबाईंना गडावर येऊन चार महिने होत आले होते.

दुपारच्या वेळी जिजाबाई आपल्या महालात झोपल्या होत्या. खाली जमखान्यावर लक्ष्मीबाई काही तरी शिवीत होत्या. दासी जिजाबाईंचे पाय रगडीत होती. सहज लक्ष्मीबाईंनी विचारले,

'राणीसाहेब...'

'लक्ष्मीबाई, असं परक्यासारखं 'राणीसाहेब' वगैरे म्हणत जाऊ नका. आपण बरोबरीच्या. 'जिजा' म्हणून म्हणत जा ना!'

'जिव्हाळा आला, म्हणून पायरी कशी सुटेल?'

'तुम्ही ऐकणार नाहीच... काय विचारीत होता?'

'सांगाल?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सांगेन ना!’

‘तुम्हांला अप्रुवाईनं काही खावंसं वाटतं का? मी पाहते, तुम्ही काही सांगत नाही.’

जिजाबाई हसल्या. ‘खरं सांगू, लक्ष्मीबाई? मला खाण्या-पिण्याचे काही डोहाळे नाहीत. वाटायचं, घोड्यावरून दौड करावी, तलवार कमरेला लटकवावी. गडाचा गार वारा खूप प्यावा. कड्यावर उभं राहून खालची माळवदं डोळे भरून पाहावीत. नशिबानंच माझे सारे डोहाळे पुरवले.’

लक्ष्मीबाई हसल्या. त्या शिवणकाम आवरीत उठू लागल्या. जिजाबाई म्हणाल्या,

‘उठता का?’

‘आपण विश्रांती घ्या. थोडं झोपा. बरं वाटेल.’

‘खरं सांगू? जिजाबाई म्हणाल्या, ‘आताशा मला दोन प्रहरी झोपच येत नाही.’

‘ते का?’

जिजाबाई लाजल्या. पोटाशी हात दाखवीत त्या म्हणाल्या,

‘हा खेळतो आहे ना?’

लक्ष्मीबाई गडबडीने उठल्या. त्यांना राहवले नाही. गर्भार जिजाऊंचा तेजदार चेहरा कुरवाळून, कानशिलांवर बोटे मोडून त्या म्हणाल्या,

‘कुठं तरी दृष्ट लागायची, बाई, तुला. असं काही सांगत जाऊ नको. झोप जरा.’ म्हणत लक्ष्मीबाई उठून गेला.

संध्याकाळी जिजाबाई, लक्ष्मीबाई दासीपरिवारासह फिरायला बाहेर पडल्या आणि दारातच सेवक विठू आला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘विठू, काय आहे?’ जिजाऊंनी विचारले.

‘राणीसरकार, आपण टकमककडे फिरायला जाणार?’

‘हो!’

‘दरखास्त आहे. आपण मावळतीकडे जावं!’

‘का?’

‘गुन्हेगारास कडेलोट फर्मावली आहे. त्याची तामिली आता होत आहे.’

‘कोण आहे बिचारा?’

‘राणीसरकार, मला माहीत नाही. टकमकच्या साऱ्या वाटा रोखल्यात, म्हणून बेअदबी केली.’

‘विठू, असाच जा, आणि विश्वासरावांना बोलावल्याचं सांग.’

‘जी...’ म्हणत विठू गेला.

जेव्हा विश्वासराव आले, तेव्हा त्यांच्याबरोबर वयोवृद्ध हनुमंतेही होते. दोघांनी राणीसाहेबांना मुजरे केले. जिजाबाई म्हणाल्या,

‘विश्वासराव! आज कुणाच्या कडेलोटाची तयारी चालवली आहे?’

‘कुणी सांगितलं?’

‘कळलं आम्हांला! पण ते खरं का?’

‘होय, राणीसाहेब. खालच्या वाडीत काल एकानं चोरी केली. एक मण धान्य लुटलं.’

‘त्यासाठी कडेलोट?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेब, हे दुष्काळचे दिवस. अशा चोऱ्या होऊ लागल्या, तर हवालदिल झालेला मुलूख परागंदा व्हायला वेळ लागायचा नाही.’

‘सत्ता तुमची. तुमच्या आड येणं आम्हांला उचित नाही. पण, विश्वासराव, रयतेला पुरेसं अन्न नाही, हा दोष आपल्यावरही येत नाही का? चोरीची का कुणाला हौस असते?’

‘आपला काय हुकूम आहे?’

‘हुकूम कसला? एक विनंती. आम्ही गडावर असेपर्यंत कुणाचा कडेलोट करू नका.’

‘जशी आज्ञा.’ म्हणून विश्वासराव निघून गेले.

हनुमंते म्हणाले, ‘मासाहेब! आपण होतात, म्हणून बिचाऱ्याचा जीव वाचला. हे श्रेय आपल्या विठूला.’

जिजाऊंनी विठूकडे पाहिले. विठू संकोचाने म्हणाला, ‘तसं नाही, राणीसरकार! सच बात बोलायची, तर त्यांनीच सांगितलं. दुपारी त्याला गडावर आणलं, बिचारा रडत होता. हनुमंते मला म्हणाले की, हे राणीसरकारना कुणी सांगेल, तर याचा जीव वाचेल.’

जिजाऊ हसल्या. म्हणाल्या, ‘आणि म्हणून तू सांगितलंस, असंच ना?... पाहिलंत, लक्ष्मीबाई, आमची माणसं कशी डाव खेळतात, ती?’

दोघी हसल्या. जिजाऊ म्हणाला, ‘चला, हनुमंतेकाका, फिरून येऊ.’

तटावरून खालचे जुन्नर दिसत होते. नदीचा पट्टा दिसत होता. तो मुलूख न्याहळीत चालत असता मध्येच जिजाऊ थांबल्या. तटाखाली बोट दाखवीत त्या लक्ष्मीबाईंना म्हणाल्या,

‘लक्ष्मीबाई, तो हिरवा ठिपका दिसतो, ती जुन्नरमाळाची आबंराई ना?’

‘जी.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाईंनी दीर्घ नि:श्वास सोडला. माघारी वळून तलावाजवळ येताच त्या तलावाकाठी बसल्या. पाठीमागे वाड्याचा सज्जा आकाशात चढल्यासारखा दिसत होता. सूर्यास्ताला सूर्यवंदन करून सारे वाड्याकडे परतले.

वाड्याच्या दरवाज्याशी एक इसम तीरासारखा समोर आला. काय होतेय्, हे कळायच्या आत त्याने जिजाबाईंच्या पायांवर लोळण घेतली. विठू धावला. त्याने त्या इसमाला उभे केले. वाढलेले केस, खोबणीत गेलेले डोळे. भकास चेहऱ्याचा तो काष्ठवत इसम रडत होता. शब्द फुटत नव्हता. विठू म्हणाला,

'हाच तो इसम, ज्याला कडेलोटाची शिक्षा झाली होती.'

जिजाबाई म्हणाल्या, 'परत चोरी करू नको, बाबा! देवाचे पाय धर.'

-आणि एवढे बोलून त्या आत गेल्या. महालात विश्वासराव उभे होते. जिजाबाई हसून म्हणाल्या,

'विश्वासराव, त्या माणसाला सोडलंत, फार बरं केलंत. गरीब बिचारा. आनंदानंही रडत होता.'

'जी.' विश्वासराव म्हणाले.

विश्वासरावांची गंभीर मुद्रा पाहून जिजाबाईंच्या काळजात चर्र झाले. त्यांनी विचारले,

'काय झालं, विश्वासराव?'

'राणीसाहेब! खबर तितकी चांगली नाही.'

'सांगा. वेळ लावू नका.'

'राजांनी विजापूरकरांचा मुलूख बळकावून बंडावा केला, म्हणून विजापूरकरांनी मुरार जगदेवाला पुण्यावर चाल करून पाठवलं. मुरार जगदेवानं पुणे नगरीचा होळी केली. वाडे भस्मसात झाले. एवढंच नव्हे, तर त्यानं भर दिवसा पुण्यावर प्रत्यक्ष गाढवाचे नांगर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

फिरविले. गावाचा मागमूसही त्यानं ठेवला नाही. पुण्याच्या काळजात, शहाजीराजांच्या जहागिरीत पहार ठोकून तो मोकळा झाला.'

'आणि स्वारीऽऽ?' जिजाबाई पुटपुटल्या. त्यांच्या घशाला कोरड पडली होती.

'राजे सुखरूप असल्याची बातमी आली आहे. फलटणच्या बाजूला सध्या राजे आहेत. दोन दिवसांपूर्वीच ही बातमी आली होती. राजांच्या खबरीची वाट पाहत होतो.'

जिजाबाईंनी घाम टिपला. त्या म्हणाल्या,

'विश्वासराव, दैव फिरलं, त्याला तुम्ही काय करणार? इकडून सुरक्षित राहणं झालं, हेच मोठं झालं. वाईटात चांगलं, ते हेच!'

मुजरा करून विश्वासराव गेले... आणि जिजाबाईंनी थोपविलेल्या अश्रूंना वाट दिली.

लक्ष्मीबाई त्यांना धीर देण्याचा प्रयत्न करीत होत्या.

बातम्या सुद्धा कधी एकट्या येत नाहीत. जिजाबाई हा आघात सहन करण्यासाठी सिद्ध झाल्या नाहीत, तोच बातमी आली : शहाजीराजांचे चुलतभाऊ खेळोजी भोसले यांच्या पत्नी, म्हणजे जिजाबाईंच्या जाऊ, नाशिकला गोदावरीस्नानाला गेल्या असता, महाबतखानाने त्यांना पळवून नेले. त्या वार्तेने जिजाबाईंच्या जिवाचा तडफडाट झाला. त्या दिवसापासून गडाखाली उतरून देवदर्शनाला जाण्याचेही त्राण त्यांच्या अंगी उरले नाही.

विश्वासराव, नारो त्रिमळ, गोमाजी पानसंबळ, हनुमंते वगैरे भोवतालची मंडळी सदैव चिंताचूर दिसू लागली. गोमाजी पानसंबळ हा जिजाऊंच्या माहेरचा खास माणूस. वडिलकीच्या आधाराने जिजांऊना सांगणारा तोच, पण त्याचे सुद्धा शब्द जिजाबाईंना रिझवू शकले नाहीत. लक्ष्मीबाई जिजाबाईंचे मन रमविण्यासाठी नित्य नवे मार्ग शोधीत होत्या. मनाच्या धीराने जिजाऊंच्या दु:खावर फुंकर घालू पाहणारी ही सारी मंडळी एके दिवशी चूपचाप झाली. काही ना काही कारणाने आजूबाजूला सदैव हसतमुखाने घोटाळणाऱ्या लक्ष्मीबाई नजर चुकवू लागल्या. दासींच्या पावलांना जडपणा आला. अकारण बोलणे लांबवीत राहणारे विश्वासराव, पानसंबळ, हनुमंते ही मंडळी तुटक उत्तरावर भलावण करू लागली. जिजाऊंच्या हे सारे ध्यानी येत होते. पण अर्थ समजत नव्हता. ते

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सोसणे जिजाबाईंना असह्य झाले. त्यांनी विश्वासरावांना बोलावून घेतले.

‘विश्वासरावऽऽ...’

‘जी, राणीसाहेब.’

‘आम्ही नुसत्या नात्यानं वा अधिकारानं तुमच्या आश्रयाला आलो नाही. तुम्ही आम्हांला पाठच्या भावासारखे. म्हणून आम्ही तुमच्या इथं राहणं मान्य केलं.’

‘ते माहीत आहे.’

‘मग आमच्यापासून तुम्ही काय लपवून ठेवीत आहा?’

‘काही नाही, राणीसाहेब.’ विश्वासराव गडबडीने म्हणाले, ‘कुणी सांगितलं?’

‘सांगायला कशाला हवं? गेले दोन दिवस एकजण सरळ बोलत नाही. आम्हांला पाहताच दातखीळ बसते.’

‘गैरसमज होतोय्. राणीसाहेब...’

‘विश्वासराव, आम्हीही चार पावसाळे पाहिलेत. आघात सहन केलेत. मला तुम्ही काही सांगणार नसाल, तर या महाली क्षणभरही राहण्याची आमची इच्छा नाही.’

‘पण, मासाहेब...’

‘घाबरू नका! या जिजाऊनं फार सहन केलंय्. काहीही सांगितलंत, तरी सहन करण्याची ताकद आहे आमची. पण कल्पनेच्या काहुरात जगणं कठीण होत आहे. सांगा...’

‘मासाहेब...’

‘बोलाऽऽऽ...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

विश्वासरावांच्या तोंडून हुंदका बाहेर पडला.

‘विश्वासराव, हे हुंदके आवरा.’ उतावीळ झालेल्या जिजाऊ भिंतीला टेकून उभ्या राहत आज्ञा देत्या झाल्या, ‘बोला...’

विश्वासरावांनी डोळे टिपले. ते भरकन बोलून गेले,

‘आपले आबासाहेब... लखुजीराव जाधवांचा खून झाला.’

‘खून? आबांचा खून? कुणी केला?’

ताठरलेल्या नजरेने जिजाऊ विश्वासरावांच्याकडे पाहत होत्या. विश्वासरावांना शब्द सुचत नव्हते. ओठांवरून जीभ फिरवीत ते बोलू लागले,

‘दौलताबादेच्या सुलतानाच्या दर्शनासाठी लखुजीराव दरबारी गेले होते. आधी कट शिजला आहे, याची त्यांना कल्पना नव्हती. अचलोजी, रघोजी, यशवंतराव या तिन्ही पुत्रांसह ते सुलतानासमोर गेले. मुजरे केले आणि भर दरबारातून सुलतान उठून गेले. हे सुलतानी वर्तन लखुजीरावांना नवीन होतं. अर्थ कळत नव्हता. तोच...’

‘बोला, विश्वासराव. आता क्षणभरही थांबू नका...’

‘...आणि तोच तलवारी उपसल्या गेल्या. प्रतिकार करण्याची पुरी संधीही लाभली नाही. नुसत्या जंबियानं प्रतिकार करणार, तो केवढा? मासाहेब, सुलतानाच्या सेवेत चारी जाधवांची वाट लागली. आईजवळ राहिलेला बहाद्दूरजी तेवढा वाचला. आपले दीर जगदेवराव गडाखाली होते, ते वाचले.’

विश्वासरावांनी मान वर केली. जिजाबाई पुतळ्यासारख्या भिंतीला टेकून उभ्या होत्या. डोळे तसेच तारवटलेले होते. भेसूर हास्य चेहऱ्यावर विलसत होते. विश्वासरावांच्या कानांवर शुष्क शब्द पडत होते...

‘आबा गेले! माझं माहेर संपलं. आमच्या पुण्यावरती स्वकीयांनी परकीयांच्यासाठी गाढवाचा नांगर फिरविला. ज्यांच्या दरबारचे आम्ही नोकर, त्यांनी आमच्या मुली

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पळवाव्यात! आणि ज्यांच्या बळावर सुलतानी उभी राहावी, त्याच जाधवरावांची कत्तल सुलतानी दरबारात व्हावी!'

-आणि एकदम जिजाबाई किंचाळल्या,

'विश्वासराव, या जगात देव आहे का, हो?'

भिंतीला टेकून उभ्या असलेल्या जिजाबाई उभ्या जागी जमिनीकडे ओघळत होत्या. विश्वासरावांनी सावरले, तेव्हा जिजाबाई बेशुद्ध झाल्या होत्या. वाड्यात एकच गोंधळ उडाला.

मध्यरात्रीच्या सुमारास वाड्यात पुन्हा रडण्याचा हलकल्लोळ उडाला.

□

५

लखुजीरावांच्या खुनाच्या बातमीने खचलेल्या जिजाबाई त्या आघातातून लौकर उठू शकल्या नाहीत. रात्री, अपरात्री त्या दचकून जाग्या होत. सारे अंग घामाने डबडबून निघे. घरात चुकून भांड्यांचा आवाज झाला, तरी त्यांना कापरा सुटे. सज्जातून दिसणाऱ्या लेण्याद्रीकडे पाहत त्या बसून असत. कुणी बोलायला गेले, तर डोळ्यांना पाझर सुटे. बोलणाऱ्याला शब्द सुचत नसत.

जिजाबाईंचे मन रमविण्याचे लक्ष्मीबाईंचे सारे प्रयत्न थकले.

एक दिवस लक्ष्मीबाई म्हणाल्या,

'राणीसाहेब, हे चालवलंय् काय? जे झालं, त्याचं मला वाईट का वाटत नाही? साऱ्यांनाच त्याचं दु:ख आहे. आपली काळजी वाटत नाही; पण त्या पोराची वाटते. निदान पोटातल्या बाळाकडे तरी लक्ष द्या. या त्रासाचा परिणाम बाळावर झाल्याखेरीज राहील का?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाईचे सारे अंग भीतीने शहारून गेले. पितृवियोगाच्या आघातात त्या मुलाला विसरून गेल्या होत्या. जिजाबाई म्हणाल्या,

‘नका, लक्ष्मीबाई, असं बोलू नका. हे पाहा पुसले डोळे. पुन्हा मी रडायची नाही. माझं दु:ख माझ्याबरोबर. त्याचा भार दुसऱ्याला कशाला?’

‘खरं?’

‘अगदी शिवाईशपथ! तुम्ही म्हणाल, तशी वागेन मी. काळजी करू नका.’

‘सुटली!’

त्या दिवसापासून जिजाबाई परत वाड्यात वावरू लागल्या.

नऊ महिने संपले.

लक्ष्मीबाईंना दिवसाला एक गोष्ट सुचत होती. विश्वासरावांनी देवाला अभिषेक चालू ठेवले होते. अनुष्ठानाला ब्राह्मण बसले होते. जाणत्या दासी जिजाऊच्या सेवेला होत्या. अनुभवी, चांगल्या हातगुणाच्या सुइणी व निष्णात वैद्य गडावर हजर होते.

बाळंतघरात चुना दिल्याने लखलखीत दिसणाऱ्या भिंतींवर स्वस्तिके काढली होती. छतावर मोत्यांच्या झालरी शोभत होत्या. खोली अंधारी भासू नये, म्हणून रौप्यसमया तेवत होत्या. ताज्या पाण्याचे सुवर्णकलश मंचकावर चकाकत होते. वास्तूला बाधा असू नये, म्हणून सर्वत्र पांढरी मोहरी फेकण्यात आली होती. उंची उदाचा वास आसमंतात दरवळत होता. नवीन जीवाची प्रतीक्षा करण्यात साऱ्या गडाचे जीव गुंतले होते.

दोन प्रहरचा सूर्य कलला होता. गार वाऱ्याची सुरुवात झाली होती. विश्वासराव, गोमाजी नाईक, वैद्यराज ही सर्व मंडळी सदरेत पान जमवीत बसली होती. पानाला चुना लावीत नाईक विश्वासरावांना म्हणाले,

‘सरकार, आज बोलत नाही?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय बोलू, गोमाजीपंत? मासाहेबांनी मागे एकाची कडेलोटाची शिक्षा रद्द केली होती, आठवतं?’

‘हो! मासाहेबांचं मन हळवंच आहे.’

‘ते खरं; पण दिवसेंदिवस हे प्रमाण वाढत आहे. तक्रारी येत आहेत. चालू वर्षी जर पाऊस वेळेवर आला नाही, तर पुढचं वर्ष कठीणच दिसतं.’

‘मी बोलू?’ शास्त्रीबुवांनी विचारले.

‘बोला ना.’

‘मला पुढची वर्षं ठीक दिसत नाहीत. ग्रहांवरून स्पष्ट दुष्काळ दिसतो.’

‘चांगलं सांगितलंत! ह्या असल्या भविष्यकथनापेक्षा राणीसाहेबांच्याबद्दल काही चांगलं सांगा ना!’

‘त्याची काळजी सोडा. मी निश्चिंत आहे.’ शास्त्री म्हणाले.

‘आजच नाडी पाहिली. फार वेळ लागायचा नाही आता. कोणत्याही क्षणी…’ वैद्यांनी पुस्ती जोडली.

त्याच वेळी सदरेच्या पायऱ्या चढून दासी आली. अदबीने म्हणाली,

‘सरकार, राणीसाहेबांच्या पोटात दुखाया लागलंय्. म्हणून आईसाहेबांनी सांगावा सांगितलाय्.’

‘अंदाज चुकायचा नाही.’ वैद्यराज पुटपुटले.

‘मीही तेच म्हणत होतो.’ शास्त्र्यांनी समाधानाचा नि:श्वास टाकला.

सारे गडबडीने उठले. उठून काहीही उपयोग नाही, हे ध्यानी आल्यावर पुन्हा सारे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बसले.

वेळ मुंगीच्या पावलांनी पुढे सरकत होती. प्रहर उलटले. संध्याकाळ झाली. दिवेलागणीची वेळ आली, तरी काही वार्ता आली नाही. उलटणाऱ्या क्षणाबरोबर चिंता वाढत होती. दिसत होती, ती सुइणींची, दासींची धावपळ. नारोपंत तर देवीच्या मंदिराकडे केव्हाच गेले होते.

दिवेलागण झाली. रात्र वाढत होती. चिंताग्रस्त विश्वासराव सदरेत येरझाऱ्या घालीत होते. पलोते वाऱ्याने फरफरत होते. भिंतीवर सावल्या खेळत होत्या. काय बोलावे, हे कुणालाच समजत नव्हते.

-आणि दासी धावत आली. आनंद चेहऱ्यावर ओसंडत होता. ती म्हणाली,

'सरकार, मुलगा झाला!'

विश्वासरावांना आनंद लपविणे कठीण गेले. त्यांनी कमरेचा कसा काढून दासीच्या अंगावर भिरकावला. शास्त्रीबुवा घटका, पळे मोजीत पुत्रजन्माच्या वेळेची नोंद करण्यात गुंतले. विश्वासराव म्हणाले,

'देवीची कृपा!'

विश्वासरावांना एकदम नारोपंत आठवले. त्यांना कळविण्यासाठी विश्वासरावांनी नोकर पाठवून दिला.

बाळ-बाळंतिणीला सुवासिनींनी कढत पाण्याने न्हाऊ घातले. वेदमूर्तींनी बाळाला आशीर्वाद दिले. स्वस्तिवाचन झाले. दासी-सुइणींच्या मुखांवर समाधान होते. अमाप मायेने आणि श्रद्धेने त्या जिजाबाईंना जपत होत्या.

शास्त्रीबुवांना घेऊन विश्वासराव जिजाबाईंच्याकडे गेले. बाळावरून सुवर्णमोहरांचा सतका केला. जिजाऊंना विश्वासराव म्हणाले,

'राणीसाहेब, शास्त्री आलेत.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाऊंनी झोपल्या जागेवरून कष्टाने नमस्कार केला.

शास्त्र्यांच्यासाठी मृगाजिन घातले होते. आशीर्वाद पुटपुटत शास्त्री आसनावर बसले. चांदीचा पाट समोर ठेवला गेला. दोन्ही बाजूंना समया प्रज्वलित करण्यात आल्या. शास्त्र्यांनी पंचांग उघडले. बाळंतघराच्या दाराशी मुलाचे भाकीत ऐकायला सारे आतुरतेने गोळा झाले होते. शब्द श्रवणी पडू लागले :

'श्रीगणेशाय नम:। शुभं भवतु...'

शास्त्रीबुवांनी बोटे मोजली. घटकापळांचे गणित मांडले. कुंडलीची घरे ग्रह भरू लागले. कुंडली मांडून होताच शास्त्रीबुवांनी जिजाबाईंच्याकडे पाहिले.

जिजाबाई म्हणाल्या,

'शास्त्रीबुवा, संकोच न करता सारं स्पष्टपणे सांगा. या पोराच्या वेळी दिवस गेले, आणि घरादाराचा थारा उडाला. कुणाचा मेळ कुणाला राहिला नाही. रक्ताच्या नात्यांनी वैर पत्करलं. जहागिरीवर गाढवाचा नांगर फिरला. आजोबांचं छत्र गमावलं. आज या मितीला या पोराचे वडील शत्रूमागे धावताहेत. याचा थोरला भाऊ लहान. त्याचीही या वणवणीतून सुटका नाही. साऱ्या मुलुखाची अन्नान्न दशा झालेली आहे... आणि परमुलुखात, परठिकाणी, ना माहेरी, ना सासरी आज मी याला जन्म देत आहे. पोटात असता ही तऱ्हा! आता याच्या पायगुणानं आणखी काय धिंडवडे निघणार आहेत, तेवढं सांगून टाका.'

ते ऐकून साऱ्यांची मने व्यथित झाली; पण शास्त्रीबुवांच्या चेहऱ्यावरची सुरकुती हलली नाही. हसरा चेहरा गंभीर बनला नाही. ते त्याच स्मितवदनाने म्हणाले,

'राणीसाहेब, असं अभद्र मनात आणू नका! अशुभाचा मनाला स्पर्शही होऊ देऊ नका. दुर्भाग्य संपलं. भाग्य उजाडलं. प्रत्यक्ष सूर्य पोटी आला आहे.'

जिजाबाई खिन्नपणाने हसल्या. त्या म्हणाल्या,

'मुलाची कुंडली मांडताना प्रत्येक शास्त्री हेच म्हणतो.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शास्त्री गंभीर झाले. ते निश्चल, खणखणीत आवाजात बोलते झाले,

'राणीसाहेब, अविश्वास धरू नका. आजवर या शास्त्र्याचं भाकीत खोटं ठरलं नाही. द्रव्यलोभानं नव्हे, पण ज्ञानाच्या अनुभवानं, आत्मविश्वासानं मी हे भाकीत केलं आहे. ते कालत्रयी चुकणार नाही. हे मूल जन्मजन्मांतरीचे पांग फेडील. राणीसाहेब, पापाचा भार वाढला असता, धरित्री त्रस्त झाली असता, देवकी-वसुदेव कंसाच्या बंदिशाळेत असतानाच श्रीकृष्ण जन्माला आला, हे कृपा करून विसरू नका.'

'आपल्या तोंडात साखर पडो!' जिजाबाई समाधानाने म्हणाल्या. त्यांची नजर कुशीतल्या बाळाकडे गेली. मुठी चोखीत ते शांतपणे झोपी गेले होते.

□

६

जिजाबाई प्रसूत झाल्यापासून गडावर नवे वारे संचारले होते. शहाजीराजांना हे शुभ वर्तमान कळविण्याकरिता एक घोडेस्वार तातडीने गडावरून रवाना झाला होता. देवधर्म, पूजाअर्चा, अभिषेक यांची गडावर गर्दी उसळली होती. पाचव्या दिवशी बाळंतघरात शस्त्रपूजा केली गेली. नांगरही पुजला गेला. पाचव्या, सहाव्या आणि आठव्या दिवशी अशाच पूजा झाल्या.

लक्ष्मीबाई बारशाची तयारी जोरात करीत होत्या. तातडीने घडविलेले नवीन दागिने, नवी वस्त्रे गडावर आणली जात होती. अंजिरी जरीबुट्टी शालूची घडी उघडीत लक्ष्मीबाई म्हणाल्या,

'राणीसाहेब, हा रंग चांगला आहे, नाही?'

'हो.'

'बारशाला हाच ठरवू.'

'लक्ष्मीबाई!' जिजाबाईंचा कंठ दाटला. 'किती करताय् तुम्ही!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पण आम्ही परके, ते परकेच!’ लक्ष्मीबाई हसत म्हणाल्या.

‘मी केव्हा म्हटलं परकं?’

‘तुम्ही विसरला असाल; पण मी नाही विसरले. बाळाचं भविष्य वर्तवायला शास्त्री आले, तर चारचौघांत म्हणालात... ना माहेरी... ना सासरी...’

‘ते मनावर घेऊ नका, बाई! सख्ख्या बहिणीनं सुद्धा एवढं केलं नसतं; पण अजूनही वाटतं...’

‘काय?’

‘बारशाच्या वेळी याच्या घरचं कोणी तरी हवं होतं.’

‘सांगा ना सरळ की, राजेसाहेब यायला हवेत, म्हणून.’

जिजाबाई लाजल्या.

दुसऱ्या दिवशी गडावर एक शाही मेणा येत असल्याची वर्दी आली. विश्वासराव सामोरे गेले. येताना वर्दी घेऊन आले : शहाजीराजांच्या मातोश्री, जिजाबाईंच्या सासूबाई उमाबाईसाहेब गडावर येत आहेत.

वाड्याच्या दरवाज्याशी साठीच्या उमाबाई उतरल्या. प्रवासाचा थकवा त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. वाड्यात उमाबाईंनी प्रवेश केला. विश्वासरावांनी मुजरा केला. बाळंतघराच्या आत येताच जिजाबाई पाया पडल्या. लक्ष्मीबाईंनीही वंदन केले. उमाबाई म्हणाल्या,

‘बेटा, बाज सोडून कशाला आलीस? मी नसते का आले?’

बाळ पाळण्यात झोपला होता. बारक्या नजरेने बाळाला निरखीत, त्यावरून सतका करीत उमाबाई म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तुझ्याच वळणावर गेलाय्, हो! बारसं केव्हा?’

लक्ष्मीबाई म्हणाल्या, ‘उद्याच! कालच राणीसाहेब म्हणत होत्या, की बाळाच्या घरचं कुणी तरी हवं, म्हणून.’

‘वाटणारच पोरीला!... जिऊ, चांगला आहे, हो, मुलगा. मनात आणशील, ते पुरं करणार, असं दिसतंय्...’ आणि एकदम गंभीर होऊन उमाबाई म्हणाल्या, ‘आणि याच्या बापाला कळवलं का?’

‘हो.’

‘कुठला येतोय् तो. घरचं सोडून लष्कराच्या भाकरी भाजीत फिरणार तो! जळ्ळं ते राजेपण!’

दोघी हसून उमाबाईंचे ऐकत होत्या.

थोडा वेळ गेला, आणि उमाबाईंनी विचारले,

‘केव्हा उठणार, ग, हा?’

जिजाबाईंना हसू आवरणे कठीण गेले. त्या म्हणाल्या,

‘सासूबाई! घ्या ना. उठला, म्हणून काय झालं? पुन्हा मांडीवर झोपेल.’

‘नको, ग. मी थांबेन. झोपमोड कशाला? आणि थोरला कुठं आहे, ग?’

‘स्वारीबरोबरच...’

‘तो एक गाढव; आणि लहान पोराला पाठवणारी तू सात गाढव! अशी पोराची वणवण करतात का? मी असते, तर सांगितलं असतं...’ निःश्वास सोडून त्या म्हणाल्या, ‘पण माझं तरी कुठं ऐकतोय् तो?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

उमाबाई बारीकसारीक गोष्टींचा तपास करीत होत्या. उत्तरे द्यायची दोघींना सुचत नव्हती. तेवढ्यात बाळाचे रडणे कानांवर आले. उमाबाई गडबडीने उठल्या. त्यांनी बाळाला उचलले. पटापट मुके घेतले. मांडीवर घेऊन त्या बाळाला उगी करू लागल्या; आणि संकटातून सुटका केल्याबद्दल जिजाऊंनी बाळाच्या रडण्याला धन्यवाद दिले.

पहाटे गड जागा झाला, तो सनई-चौघड्यांच्या आवाजाने. वाड्याच्या दारावर तोरणे बांधली होती. दासींनी सडा शिंपून रांगोळ्या भरल्या. पाकगृहासाठी गंगा-जमुना टाक्यांचे पाणी उपसले जाऊ लागले.

बाळाची जरी कुंची, दागिने, कपडे पाहून उमाबाईंनी पसंतीची मान डोलविली. शास्त्र्यांना बोलावून दिवसाची परत खात्री करून घेतली. सूर्योदयापासून गडावर माणसांची वर्दळ सुरू झाली. जुन्नर गावच्या प्रतिष्ठित घरांतील स्त्रिया डोलीमेण्यांनी गड चढत होत्या. गोरगरीब अन्नाच्या आशेने वर येत होते. उमाबाई सारे कौतुकाने पाहत होत्या.

साऱ्यांची जेवणे झाली. साऱ्याजणी पाळणा सजवू लागल्या; बाळाला सजवू लागल्या. गाण्याचे सूर उठू लागले. बारशाची वेळ झाली. जिजाऊंनी उमाबाईंना हळूच विचारले,

'बाळाचं नाव काय ठेवायचं?'

'तू काय ठरवलंस?'

'शिवाईला नवस बोलले होते. 'शिवाजी' ठेवू या.'

'ठेव! चांगलं आहे.'

सुवासिनींनी बाळाला, जिजाबाईंना ओवाळले. बाळाला लक्ष्मीबाईंनी हातांवर घेतला. 'गोविंद घ्या, गोपाळ घ्या, दामोदर घ्या,' झाले. जिजाऊ पाळण्यात वाकल्या. त्या बाळाच्या कानाशी म्हणाल्या,

'शिवाजी.'

जिजाऊच्या पाठीवर गोड बुक्क्यांचा वर्षाव झाला. तुताऱ्या-चौघड्यांच्या नादात सारा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गड भरून गेला. बाळाचे नाव ‘शिवाजी’ ठेवल्याचे साऱ्या गडाला ठाऊक झाले.

वाड्याबाहेर मेणा तयार होता. बाल शिवाजी देवीदर्शनासाठी निघाला. जिजाबाई बाळाला घेऊन मेण्यात बसल्या. लक्ष्मीबाई मेण्याबरोबर दासीपरिवारासह चालत होत्या. विश्वासराव, शास्त्री, वैद्यराज, नारोपंत, गोमाजी नाईक ही सारी मंडळी पुढे चालली होती. त्यांच्या पुढे मंगल वाद्ये वाजत होती.

देवीसमोर बाळाला ठेवण्यात आले. देवीचा अंगारा बाळाला लावला होता. भटजींनी आशीर्वाद दिले. विश्वासराव अंधार पडायच्या आत गडावर जाण्यासाठी म्हणून गडबड करीत होते. त्याच वेळी जिजाबाईंनी एक मखमली कसा विश्वासरावांच्या हाती दिला. नकळत विश्वासरावांनी विचारले,

‘काय हे?’

जिजाबाईंचे डोळे भरून आले. त्या म्हणाल्या,

‘आबा गड सोडताना नवस बोलले होते. मुलगा झाला, तर त्यांनी देवीवरून शंभर मोहरा उतरून टाकण्यासाठी दिल्या होत्या. नवस बोलणारा निघून गेला; नवस तेवढा मागं राहायला नको.’

जिजाबाईंनी पुढे बोलवेना. त्यांनी डोळ्यांना पदर लावला.

थरथरत्या हातांनी विश्वासरावांनी कसा उघडला. मुठींनी मोहरा भरून घेऊन ते देवीवरून ओवाळून टाकीत होते.

बाल शिवाजीच्या उशापायथ्याशी सुवर्णाचा सडा पडत होता.

□

७

बाल शिवाजी आजीच्या मांडीवर, आईच्या कुशीत, दासदासींच्या अंगाखांद्यांवर वाढत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होता. कुठल्याही वतारणीने दाराशी यावे आणि खुळखुळे पुढे करावेत; आणि विश्वासरावांनी ते खरेदी करावे. जुन्नरला गेलेले शास्त्री येताना पितळेचा वाळा घेऊन यावेत. सारे हसू लागले, की त्यांनी म्हणावे,

‘सरकार! चांदी-तोड्याच्या वाळ्यांनी बाळाला बाळसं चढत नाही. चढतं, ते याच पंचरसी वाळ्यांनी!’

उमाबाईंनी मान डोलवावी. म्हणावे, ‘खरंच, कुणाच्याच ध्यानी आलं नाही. आणा तो वाळा.’ आणि सोन्याचे वाळे उतरून पंचरसी धातूचा वाळा पायी चढविला जाई.

बाळाच्या कौतुकाने दिवस केव्हा उगवे आणि केव्हा मावळे, हेही समजत नसे. बाल शिवाजी प्रतिपदेच्या चंद्रासारखे दररोज नवे रूप धारण करीत होता. आपली माणसे ओळखून तो हसू लागला. कष्टाने कूस बदलू लागला. पालथा होऊन चार हातांवरचा खुळखुळा घ्यायला तो सरकू लागला; आणि त्यातूनच चारी साधनांचा उपयोग करून रांगण्याची किमया त्याला अवगत झाली. हाती पांगुळगाडा आला, आणि शिवाजीच्या आजूबाजूच्या साऱ्या वस्तू उंचावर ठेवण्याची दक्षता वाढू लागली.

मृग आला. पश्चिमेचे वारे सुरू झाले. हळूहळू ढग डोक्यावरून सरकू लागले; पण त्यांचे धरतीकडे लक्षही वळत नव्हते. वैशाखात तप्त झालेली धरित्री तसेच निःश्वास सोडीत होती. विश्वासरावांनी ही चिन्हे पाहून गडावर गंजीखाना रचला. गडाखालचे धान्य आणून अंबारखान्यात भरून घेतले.

एके दिवशी संध्याकाळी विश्वासराव अचानक जिजाबाईंच्या सदरेकडे आले. जिजाबाईंना वर्दी गेली. विश्वासरावांनी पाहिले, तो जिजाबाई कशिदा भरीत होत्या. बाल शिवाजी खेळण्याबरोबर खेळत होता. त्याचे लक्ष विश्वासरावांच्याकडे गेले; आणि तो झेपावला. विश्वासराव शिवाजीला उचलीत म्हणाले,

‘राणीसाहेब, बातमी आली आहे की, राजेसाहेबांची स्वारी गडाकडे येत आहे.’

‘केव्हा?’ आनंदाने मोहरून जिजाबाईंनी विचारले.

‘कोणत्याही क्षणी ते गडावर येऊन दाखल होतील. तेच कळवायला आलो होतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

विश्वासराव शिवाजीसह वळले. जिजाबाई म्हणाल्या,

‘त्याला इकडे द्या. कपडे बदलते.’

विश्वासराव शिवाजीला ठेवून बाहेर गेले. वाड्याच्या आतल्या चौकात सदरेखाली चांदीचे गंगाळ पाण्याने भरून ठेवण्यात आले. सदरेवर स्वच्छ बैठक अंथरली गेली. दुसऱ्या चौकाच्या सदरेवर खास बैठक अंथरली होती. गालिचे, लोड, तक्के, पानदाने यांनी सदर सजली होती.

जिजाबाईंनी गडबडीने कपडे बदलले. दागिने घातले. लक्ष्मीबाई शिवाजीला नटविण्यात गर्क झाल्या होत्या. शिवाजीला तयार करून, लक्ष्मीबाई जिजाबाईंना हुडकू लागल्या; पण त्यांचा पत्ता लागेना. त्या जिभेच्या दरवाज्याने बाहेर पडल्या; आणि त्यांची पावले थांबली.

जिजाबाई तटाजवळ उभ्या राहून पाहत होत्या. पाठीवर पडलेल्या सूर्यकिरणांत जरी वस्त्र चमकत होते. वाऱ्याने पदर उडत होता. जिजाऊंची नजर तटाखाली लागली होती. अलगद पावलांनी लक्ष्मीबाई तटाजवळ गेल्या. जवळ येईपर्यंत त्यांचा सफळ जिजाबाईंना लागला नाही. दचकून त्या वळल्या.

‘तुम्ही होय? काय भ्याले मी!’

‘हुडकलं; कुठं दिसला नाही.’

‘सहज आले. उभी राहिले. चला, जाऊ.’

‘नको. इथंच सहज राहू.’ लक्ष्मीबाई हसत म्हणाल्या, ‘एवढ्या लौकर वाड्यात जायचं तरी काय कारण आहे?’

‘भारीच छळता, बाई, तुम्ही!’ तटाच्या कट्ट्यावर बसत जिजाबाई म्हणाल्या.

दोघी तटाखालचा प्रदेश न्याहाळीत होत्या. अवर्षणामुळे सारा प्रदेश शुष्क वाटत होता. थोडा वेळ झाला; आणि जिजाबाई पदर सावरून उभ्या राहिल्या. ‘का उठता?’ म्हणून लक्ष्मीबाईंनी विचारताच त्यांनी बोट दाखविले. दूर अंतरावर धूळ उडत होती. तो लोट

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

क्षणाक्षणाला नजीक येत होता. घोडी दिसू लागली. अश्वपथके दृष्टिपथात आली. गडाला वळसा देऊन अश्वपथके भरधाव वेगाने जुन्नरकडे जात होती. टापांचा आवाज कानांवर येत होता.

'लक्ष्मीबाई!'

'काय?'

'काही नाही. उगीच चिडवाल!'

'सांगा ना! नाही चिडवायची. वचन!'

'आपण मावळतीकडे जाऊ या!'

'समजलं! चला ना! तलावाच्या पलीकडे जाऊ.'

वाड्यासमोरच्या तलावाच्या तटाकडे दोघी गेल्या. जिजाबाईंनी पाहिले... घोडी जुन्नरमध्ये शिरत होती. पाहता-पाहता जुन्नरमधून घोडी बाहेर पडून गडाकडे येऊ लागली. लक्ष्मीबाईंनी विचारले,

'राणीसाहेब! सामोरे गडाखाली जायचं, की वाड्यात जायचं?'

'पुरे झालं, बाई...! चला.'

दोघी वाड्यात परतल्या.

गडाच्या परवानगीच्या दरवाज्यावर नगारा वाजला. सदरेत विश्वासराव पागोटे चढवून उभे होते. नारो त्रिमळ, पंत वगैरे मंडळी पोशाख करून अदबीने उभी होती. दुसऱ्या दरवाज्याची नौबत ऐकू आली; आणि विश्वासराव सर्वांसह शहाजीराजांना सामोरे गेले. गंगा-जमुना टाक्यांजवळ शहाजीराजांची गाठ पडली. साऱ्यांच्या कमरा लवल्या. मुजरे झडले. स्मितवदनाने शहाजीराजे विश्वासरावांना मिठी मारते झाले. विश्वासराव म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘उडती बातमी आली होती; त्यामुळं गडाखाली आलो नाही. क्षमा असावी.’

‘व्याह्यांनी असं परकेपणाचं बोलणं आम्हांला आवडत नाही... काय, नाईक? सर्व ठीक ना?’

‘जी!’

सारे वाड्यात आले. सेवकांची गडबड उडाली. शहाजीराजांनी हात-पाय धुतले. बरोबरच्या मातबर माणसांनीही हात-पाय धुतले. सारे सदरेच्या बैठकीवर बसले. विश्वासरावांनी विचारले,

‘वाटेत तकलीफ तर नाही ना झाली?’

राजे मनापासून हसले. म्हणाले,

‘विश्वासराव, घोडदौड आणि पळापळ इतकी सवयीची झाली आहे, की रात्रीदेखील आम्ही घोड्यावरच स्वार असतो.’

सारे हसले. हसता-हसता थांबले. आतल्या दारातून शिवाजी रांगत बाहेर आला. साऱ्यांची नजर त्या गोंडस बाळाकडे वळली होती. शिवाजीकडे पाहत राजे म्हणाले,

‘छोटे राजे, या! तुम्हांलाच पाहायला आम्ही आलो होतो.’

शिवाजीने एकवार साऱ्यांच्याकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर हास्य विलसले; आणि झेप घेत तो शहाजीराजांकडे धावला. शास्त्री म्हणाले,

‘रक्तानं रक्त ओळखलं.’

प्रेमभराने शहाजीराजांनी शिवबाला उचलले. त्याचे मुके घेतले आणि त्याला मांडीवर घेतले. शिवाजी वडिलांच्या दाढीशी चाळा करीत होता. विश्वासराव हसून म्हणाले,

‘आपल्या दाढीला हात घालणारा पहिलाच वीर पाहिला.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नाही. हा दुसरा. पण आमचा असा समज आहे की, छोटे राजे आले आज्ञापत्रक घेऊन.’

‘आज्ञापत्रक?’

‘आम्ही आत जाऊन येतो.’

शहाजीराजे उठले; शिवाजीला घेऊन आतल्या चौकात गेले. जिजाबाईंच्याकडे पाहत शहाजीराजे म्हणाले,

‘आम्हांला पाहताच झेपावला.’

‘धीटच आहे. माणसाची पारख झाली, की झेपावतो.’

शहाजीराजे सदरेवर बसायला निघाले. स्मितवदनाने जिजाऊ म्हणाल्या,

‘सासूबाई वाट पाहत आहेत.’

‘भलतीच चूक होत होती. दाखवा वाट.’

शहाजीराजांनी उमाबाईंचे दर्शन घेतले. जेव्हा निवांतपणाने जिजाबाईंची आणि शहाजीराजांची गाठ पडली, तेव्हा त्यांनी विचारले,

‘सर्व ठीक आहे ना?’

जिजाबाईंच्या डोळ्यांत अश्रू गोळा झाले. हुंदका बाहेर पडला. आसनावरून उठत शहाजीराजे म्हणाले,

‘राणीसाहेब, आम्हांलाही ते समजलं. मामासाहेबांची अशी हत्या व्हावी, याचं आम्हांलाही दु:ख आहे. आमच्या काळजाला त्या वार्तेनं घरं पडली. आमचं वैर होतं खरं; पण ते घरचं. परक्यांनी केलेला हस्तक्षेप आम्ही कसा सहन करू? त्यानंच मन भडकलं; आणि आम्ही निजामशाही सोडून आदिलशाहीची नोकरी पत्करली.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हे असं किती दिवस चालायचं?’

‘ती का आम्हांला हौस आहे? बायकापोरांत राहावं, असं का आम्हांला वाटत नाही? पण, राणीसाहेब, शिवबाच्या पायगुणानं हे दिवस संपतील. आम्ही कुठं तरी स्थिर होऊ.’

त्यानंतर शहाजीराजे आठ-दहा दिवस गडावर होते. गडावरच्या मुक्कामात खलबत रंगत होते. शिवबाच्या संगतीनं हसण्याला ऊत येत होता. मेजवान्या झडत होत्या. शहाजीराजांनी साऱ्या गडाची व्यवस्था जातीने पाहिली. अंबारखान्यात भरलेले धान्य पाहून, गंजीखाना पाहून ते उद्गारले.

‘किती वर्षांची तयारी आहे?’

‘दुष्काळी चिन्हं दिसतात. खबरदारी घेतलेली बरी!’

‘खरं आहे. आपलंही वास्तव्य....’

‘राणीसाहेबांच्या बरोबरच आम्ही गडावर आलो.’

‘आमची तीच अपेक्षा होती. खजिन्याची रक्कम जमा घेतलीत ना?’

‘पण त्याची काही...’

‘विश्वासराव, करता, ते का थोडं आहे? तुम्ही घर संभाळता. मुलूखगिरी करून घर तरी भरू द्या.’

एक दिवस अचानक शहाजीराजांच्या नावाने मोगली ताकीद खलिता आला. शहाजीराजांनी तो उघडला; त्यांची नजर खलित्यावरून फिरू लागली. वाचून होताच, दीर्घ निःश्वास सोडून शहाजीराजे म्हणाले,

‘विश्वासराव! विश्रांतीचे दिवस संपले.’

‘का? काय झालं?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बादशहा दक्षिणस्वारीसाठी उतरले आहेत. बऱ्हाणपूरला छावणी आहे. मालक आलेल्याची वर्दी आहे, म्हणजे सेवकांनी टाकोटाक जायला हवं. उद्या आम्ही निघणार!’

‘चार-दोन दिवसांनी गेलं, तर चालेल ना?’

‘न चालायला काय झालं?’ शहाजीराजे म्हणाले. ‘पण ते आमच्या रक्ताला मानवत नाही. जिथं चाकरी करतो, तिथं वेठबिगार आम्हांला जमत नाही.’

दुसऱ्या दिवशी शहाजीराजे निघण्याच्या तयारीत होते. उमाबाईंना मुजरा करताच त्या म्हणाल्या,

‘ऱ्हायला असतास, तर बरं झालं असतं. जपून राहा.’

‘आपला मुक्काम आहे ना?’

‘छे, रे. ते जमायचं नाही. देवधर्म तसाच राहून गेलाय्. आपल्या कुलदैवताला, घृष्णेश्वराला आले होते. कळलं, मुलगी इथं आहे. भेटायला आले, ती तशीच गुंतून पडले, बघ.’

‘मग त्यांना तुमच्या बरोबर न्या.’

‘नको, रे, बाबा! माझे म्हातारीचे दिवस कसेही जातील. साऱ्या मुलुखात दुष्काळ आहे. त्यापेक्षा ती इथंच राहिलेली बरी.’

राजांनी जिजाबाईंचा निरोप घेतला; शिवाजीचे मुके घेतले; आणि विश्वासरावांच्या वर सर्व सोपवून शहाजहानच्या भेटीसाठी त्यांनी बऱ्हाणपूरला कूच केले.

□

८

बाल शिवाजी वर्षाचा झाला, त्या वेळी मुलुखात दुष्काळाने उग्र स्वरूप धारण केले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गावे ओस पडत होती. पोसायला अशक्य झालेली जनावरे सोडून दिल्यामुळे वैराण मुलुखातून ती जनावरे भटकताना दिसत होती. गावे सोडून चाललेल्या माणसांचे तांडे देशोधडीला लागत होते. धान्य ही संपत्ती बनली होती. सोन्याला कुत्रे विचारीत नव्हते. जिकडे जावे, तिकडे भुकेकंगाल लोकांच्या झुंडी वाटा अडवून बसलेल्या असत. जिवाची आशा सोडून मृत्यूच्या तयारीने सज्ज झालेले ते जीव मूठभर धान्यासाठी हवे ते अत्याचार करावयास मागे-पुढे पाहत नव्हते. सारा मुलूख असुरक्षित बनला होता. पक्ष्यांनी तर केव्हाच मुलूख सोडला होता. राहिली होती फक्त घारी आणि गिधाडे. ती मात्र सदैव आकाशात घिरट्या घालताना नजरेला येत होती. साऱ्या प्रदेशात धष्ट पुष्ट कोणी दिसत असतील, तर तेवढेच! मेलेल्या प्राण्यांना आणि माणसांना तोटा नव्हता! याच दुष्काळाबरोबर शहाजहानची स्वारी दक्षिणेत थैमान घालीत होती. दुष्काळातून तग धरून राहिलेल्या उरल्यासुरल्या वस्त्या मोगलाईच्या स्वारीखाली बेचिराख होत होत्या. सारा मुलूख दोन वर्षांत बेचिराख झाला.

विश्वासरावांनी गडाचा कडेकोट बंदोबस्त ठेविला होता. गडाचे दरवाजे सदैव बंद असत. आत येणाऱ्या माणसाची कसून चौकशी झाल्याखेरीज त्याला आत सोडले जात नव्हते. गडाची इतर टाकी केव्हाच कोरडी झाली होती. गंगा-जमुना अर्ध्या राहिल्या होत्या. पाण्याचा वापर कसोशीने होत होता. अंबारखाना आणि गंजीखाना जीवमोलाने राखला जात होता.

शिवाजी दोन वर्षांचा झाला. त्याचा वाढदिवस गडाच्या थंडीत साजरा झाला. थंडी संपली. उन्हाळा आला. सारे पावसाची प्रतीक्षा करीत होते. मनातून देवाला नवस बोलत होते...

एके दिवशी दोन प्रहरी पूर्वेला ढगांची कनात धरली गेली. वारा मंदावता-मंदावता थांबला. कनात आकाशात चढत होती. काळी भोर. लक्खन वीज चमकली; आणि मंद गडगडाट घुमला. बाल शिवाजीसह सारे तटाकडे उभे राहून त्या ढगांच्याकडे पाहत होते. एक चक्री वादळ धुळीचा भोवरा खेळवीत माळवदातून निघून गेले. पूर्वेचा गार वारा सुटला. शिवाजीने विचारले,

'पाऊस आला?'

'होय, राजा! आलाच तो.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुन्हा वीज चमकली. आसमंत त्या आवाजात कडाडून गेले. शिवाजी आईला बिलगला. जिजाबाई शिवाजीला घेऊन आत गेल्या. पावसाचा पडदा आदब बजावीत पुढे येत होता. ताड ताड गारा पडू लागल्या. तटाखालचे सारे वाड्यात आश्रयाला धावले. गारा फुटून उडत होत्या. शिवाजी त्या वेचण्यासाठी सदरेत धावत होता. गारांपाठोपाठ पाऊस कोसळायला लागला. सारी गटारे तुडुंब भरून वाहू लागली. सगळ्या वाडाभर गळत्या झाल्या. पण त्याचे कुणाला दुःख नव्हते. मातीच्या वासाने सारे वातावरण धुंदावले होते.

पाऊस थांबताच सारे वाड्याबाहेर पडले. एका पावसाने धरित्रीचे रूप पार बदलून टाकले होते. पूर्वेला इंद्रधनुष्य पडले होते. शिवाजीने तिकडे बोट दाखवले; व तो म्हणाला,

'आई, ते बघ!'

'बाळ, ते इंद्रधनुष्य!'

शिवाजी पुटपुटला; पण काही जमले नाही. तो लाजला.

वळवाचे पाऊस चांगले झालेले पाहताच एक दिवस जिजाबाई विश्वासरावांना म्हणाल्या,

'संकट टळलं! चालू साली मनाजोगा पाऊस पडेल.'

'असं दिसतं खरं.'

'पाऊस नव्हता, तो पाऊस आला. आता कशात अडलं?'

'राणीसाहेब! पाऊस पडला; पण गावं ओस पडली, तिथं जमिनी कसणार कोण?'

'कोण म्हणजे? जे आहेत, ते.'

'जुन्नरची उरली निम्मी वस्ती गडावरच आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मग गड खाली करू या.’

‘आँ!’

‘आँ काय? मुलूख सोडून गेलेली माणसं परत आपल्या घरी येईपर्यंत त्यांची जमीन, घरं-दारं यांचे तुम्हीच जबाबदार! आपण सगळे खाली जाऊ. तेवढी शेती पेरून घेऊ.’

साऱ्या गडावर उत्साह संचारला. शाही मेणे गडाखाली उतरले. जुन्नरचा वाडा गजबजून गेला. गावाच्या घरांवरून उगवलेले, जागच्या जागी वाळलेले गवत पाहून जिजाबाईंचे डोळे पाण्याने भरून आले. जनावरं हाताशी होती, तेवढी गोळा करण्यात आली. गडावरचा लोहार- जो आजवर अस्सल हत्यारे तयार करीत होता, तो नांगरांचे फाळ बसवू लागला. सुतारशाळेत कुळव, दिंडोरी तयार होऊ लागली.... आणि एके दिवशी सुमुहूर्तावर भूमिपूजन करून नांगरट सुरू झाली. उन्हावलेली माती फुलून जमिनीवर आली. पावसाच्या पाण्याने कुकडी नदी भरून गेली.

हंगाम पाहून पेरण्या झाल्या. शिवारावर हिरवी कळा दिसू लागली. डोंगरचे रान गर्द पालवीने परत एकदा सजले. लेण्याद्रीतून आणि आजूबाजूच्या डोंगरकपारींतून दुधाचे प्रवाह झिरपू लागले.

दुष्काळात परागंदा झालेली माणसे आशेने परत गावी येत होती. उभारलेल्या शिवाराने आनंदून कष्टांत सामील होत होती.

विश्वासराव वाड्याबाहेर पडले, की हट्टाने शिवाजी त्यांच्याबरोबर असे. उन्हातून, पावसातून तो विश्वासरावांच्या पुढे बसून घोड्यावरून फिरत असे. वाढती पिके कौतुकाने पाहत असे.

जिजाबाई म्हणत,

‘हा कुणबावा होणार, वाटतं.’

‘मग त्यात काय बिघडलं? आमच्यासारखे मालक सगळ्यांनाच मिळतात. पण शेतकरी मालक मिळणं कठीण.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाई समाधानाने हसल्या.

मुलूख जरा स्थिर झालेला पाहताच उमाबाई जायला निघाल्या. जिजाऊंना बरोबर चलण्याचा त्यांनी खूप आग्रह केला; पण जिजाबाई तयार झाल्या नाहीत. त्या म्हणाल्या,

‘सासूबाई! मला का इथं राहण्याची हौस आहे? पण स्वारींचं सांगणं झाल्याखेरीज मी कशी हालू?’

उमाबाई काही बोलल्या नाहीत. जिजाऊ-शिवाजींना आशीर्वाद देऊन एके दिवशी त्या वेरूळला निघून गेल्या.

वर्षभरात परत जिजाबाई गडावर आल्या. मोगलांची नोकरी सोडून शहाजीराजांनी निजामशाही उभी करण्याचा प्रयत्न केला. मोगलांनी दौलताबाद घेतले, तरी शहाजीराजे हताश झाले नाहीत. त्यांनी नव्या शहाला माहुलीवर नेऊन ठेविले. विजापूरकर आणि मोगल एक झाले. या दोन प्रचंड शाह्यांशी मुकाबला करणे इतके सोपे नव्हते. निजामशाहीचा अस्त झाला. शहाजीराजांनी स्वतः फौज उभारली; आणि मोगलांशी सामना दिला. एका जहागिरदाराने नवा बंडावा उभारून मोगली सत्तेला तोंड देणारे असे उदाहरण विरळा. दोन वर्षांत प्रबळ मोगली सत्तेने शहाजीराजांचा बंडावा मोडून काढला; आणि नाइलाजाने शहाजीराजांनी विजापूरकरांची नोकरी पत्करली. यात सहा वर्षांचा काल निघून गेला. सहा वर्षांच्या दीर्घ कालानंतर शहाजीराजांना स्वस्थता, स्थैर्य प्राप्त झाले.

या मधल्या काळात शिवाजी शिवनेरीवर मोठा होत होता; तट्टावरून रपेटी करीत होता. लेण्याद्री आणि आजूबाजूचा मुलूख त्याच्या नजरेखालून जात होता. शास्त्रीबुवांनी त्याला अक्षरांची ओळख करून दिली होती.

सात वर्षे गेली; आणि विजापूरहून खलिता आला. खलित्याबरोबर घोडदळ होते. शाही मेणे होते; काबाडीचे बैल होते.

जिजाबाईंनी खलिता उघडला. शहाजीराजांना पुण्याची जहागीर मिळाली होती. त्यांचा अत्यंत विश्वासू, चौकस व शहाणा माणूस दादोजी कोंडदेव त्यांनी पाठविला होता. दादोजींच्या बरोबर पुण्याला हलण्याची आज्ञा होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाईंनी दादोजींना बोलावणे पाठविले. दादोजींनी सदरेवर येऊन मुजरा केला. वार्धक्याकडे नुकतेच झुकलेले गौर कांतीचे दादोजी उभे होते. मस्तकी पागोटे, अंगात अंगरखा आणि पायी तलम धोतर होते. रुंद कपाळ आणि तीक्ष्ण नजर त्यांचा दरारा वाढवीत होती. जिजाबाईंनी वाकून नमस्कार केला. शिवबांना त्या म्हणाल्या,

'राजे, दादोजींना मुजरा करा.'

शिवाजीराजांनी मुजरा केला. दादोजी म्हणाले,

'राणीसाहेब, आम्ही मुजरा करायचा; राजांनी नव्हे.'

'इतरांत आणि आपल्यांत फरक आहे. आम्हांला का ते कळत नाही? आमची जबाबदारी उचलण्यासाठी इकडून ज्यांना पाठविण्यात आलं, ते का कमी विश्वासाचे असतील?'

'राणीसाहेब, केव्हा निघायचं?'

'आपण म्हणाल, तेव्हा! सध्या स्वारी कुठं आहे?'

'राजे कर्नाटकाच्या मोहिमेत गुंतले आहेत. ते मोकळे असते, तर तेच आले असते.'

'शेवटी ज्यांनी आपली जहागीर जाळली, त्यांच्याच पदरी नौकरी करायची पाळी आली ना!'

'राणीसाहेब, राजकारण एकपदरी नसतं. ते अनेकपदरी असतं. राजकारण येणाऱ्या प्रसंगाबरोबर बदलत असतं. ज्या मुरार जगदेवानं पुणं जाळलं, त्याच मुरार जगदेवाबरोबर राजांचं एवढं सख्य वाढलं की, नांगरगावाला महाराज जगदेव यांची तुला शहाजीराजांच्या देखरेखीनं पार पडली. नांगरगावचं 'तुळापूर' झालं. राजकारणाचे परत डाव फिरले. फासे उलटे पडले आणि मुरार जगदेव आदिलशहांच्या अवकृपेला बळी पडले. त्यांचा अत्यंत क्रूरतेनं वध झाला.'

'आणि स्वारी?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजांचं आदिलशाहीत जेवढं वजन आहे, तेवढं कुणाचंच नाही. राजांना बारा हजारांची मनसब आहे; ‘राजा’ ही किताबत आहे. पुणे-सुप्याची जहागीर त्यांच्याकडेच आहे. ऐश्वर्यसंपन्न, अधिकारसंपन्न, राजे बंगळुरात सुखाने वास्तव्य करीत आहेत; आपल्या पराक्रमानं आज कर्नाटक गाजवीत आहेत.’

दोन दिवसांत जिजाबाईंची तयारी झाली. सहा वर्षांच्या परिचयात गडावरचा प्रत्येक माणूस घरचा बनला होता. विश्वासराव, लक्ष्मीबाई यांसाारखी माणसे सोडून जात असता आतड्यांना पीळ पडत होता. गडावरच्या साऱ्या माणसांना जिजाबाईंनी शिवाजीच्या हस्ते देणग्या दिल्या. चांगल्या मुहूर्तावर लक्ष्मीबाईंनी जिजाऊंची ओटी भरली. भरल्या मनाने जिजाबाईंनी शिवाजीसह शिवाईचे दर्शन घेतले; आणि विश्वासराव-लक्ष्मीबाईंनी त्यांना निरोप दिला.

□

९

दुपार टळल्यानंतर शिवबाने उद्ध्वस्त पुण्यात प्रवेश केला. एखाद्या पुरातन शहरात प्रवेश केल्याचा भास होत होता. तटांचे ढासळलेले बुरूज एके काळचे वैभव सांगत होते. ढासळलेल्या जमीनदोस्त वास्तू ठायी ठायी दिसत होत्या. त्यांच्यावर घाणेरीची झुडुपे फोफावली होती. त्यांची तांबडी-पिवळी फुले जीवनाची आठवण देत होती. वाड्याचे उद्ध्वस्त अवशेष एके काळच्या दराऱ्याची खूण सांगत होते.

गावच्या नदीकाठाला झोपड्यांतून वस्ती करून राहिलेले लोक आलेल्या लवाजम्याने भयचकित झाले होते. दुरून ते भयभीत नजरेने कबिल्याकडे पाहत होते. एका मोकळ्या जागेत येताच पंतांनी हात वर करून इशारत दिली. कबिला थांबला. मेण्यातून जिजाबाई उतरल्या. दासीपरिवार गोळा झाला. काबाडीच्या बैलांवरून सामान उतरले जाऊ लागले. शिवबा भोवतालच्या ओसाड, भग्न वास्तूंवर नजर टाकीत होता. त्याने विचारले,

‘मासाहेब, हेच पुणं?’

‘होय!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘इथं तर आपल्याशिवाय कुणी दिसत नाही.’

‘बोलावलं, तर सारे येतील.’

‘राहायचं कुठं? कुठं आहे वाडा?’

‘वाडा हेरून राहायचं नसतं, राजे! मोठी माणसं वाडे बांधून राहतात.’

शामियाना उभारला गेला. भोवताली राहुट्या पडल्या. मुळामुठेच्या संगमावरचे पाणी मावळत्या सूर्यकिरणांत प्रकाशमान झाले होते. जहागिरीच्या वारसाने उद्ध्वस्त वास्तूवर प्रथम दिवा लावला होता.

दादोजी कोंडदेवांच्या समोर उद्याचे पुणे दिसत होते. दादोजींच्या बरोबर शिवाजी फिरत होता. बुजलेले लोक गोळा झाले होते.

एके दिवशी शिवबा धावत आला.

‘मासाहेब, पंतांना देव सापडला.’

‘कुठं?’

‘नदीजवळ.’

जिजामाता उठल्या. दासींच्यासह जिजाबाई जात होत्या. शिवबा वाट दाखवीत होता. जिजाबाई येत असताना दिसताच सारे अदबीने उभे राहिले; बाजूला झाले. पंतांच्या चेहऱ्यावर कौतुक होते. विटकरांच्या ढिगाऱ्याखाली लपलेला गणेश मोकळा झाला होता. मूर्ती सुंदर होती; अभंग होती. जिजाऊंनी हात जोडले. पंत म्हणाले,

‘मासाहेब! सुरुवात तर चांगली झाली.’

‘हो, ना! पंत, याच जागेवर सुंदर मंदिर बांधा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पंतांनी होकार दिला. ते म्हणाले, ‘पण, मासाहेब, अजून वाड्याची जागा नक्की ठरत नाही.’

‘वाड्याची जागा देवळाजवळच असू द्या.’

वाड्याची आखणी झाली. भूमिपूजन होऊन वाड्याच्या जागेवर दादोजी कोंडदेवांनी पहिली कुदळ मारली. दौलतीच्या मालकासाठी एकच वाडा असावा, हे दादोजींना मान्य नव्हते. सुरक्षिततेच्या दृष्टीते ते योग्यही नव्हते. त्यांनी खेडबारे खोरे दुसऱ्या वस्तीसाठी निवडले. वाड्यासाठी जागा निवडली. गावठाणाची मर्यादा घातली... आणि खेडबाऱ्यात दुसऱ्या वाड्याचे बांधकाम सुरू झाले. परगण्याचे हवालदार म्हणून बापूजी मुद्गल नऱ्हेकर यांना नेमले.

पावसाळा आला. तेव्हा पंतांना शिवाजी-जिजाबाईंच्या वास्तव्याची चिंता पडली. ती नऱ्हेकरांनी दूर केली. त्यांचा खेडबाऱ्यात वाडा होता; तो त्यांनी दिला. शिवबा जिजाबाईंसह खेडबाऱ्यात राहू लागला. पंतांच्या बरोबर पुणे-खेडबाऱ्यासह त्याच्या खेपा होत होत्या. नवीन उठणारे वाडे, होणाऱ्या वस्त्या तो पाहत होता. शास्त्रीबुवांच्याकडे सकाळ-संध्याकाळ शिकत होता. सवड मिळाली, तर आईला रामायण-महाभारत वाचून दाखवीत होता.

वाडे बांधले जात होते. विहिरी पाणी शोधीत उतरत होत्या. पुणे-खेडबाऱ्यात शेकडो माणसे या कामात गुंतली होती. मुलुखाचे गवंडी, सुतार, बारा बलुतेदार ही वार्ता ऐकून पुणे-खेडबाऱ्यात धाव घेत होते. कामाचे गरजू येत होते.

खेड-पुण्याचे वाडे तयार झाले. विहिरींना मुबलक पाणी लागले. खेडपेक्षाही पुण्याचा वाडा बुलंद, देखणा होता. दोन प्रशस्त चौक धरून दिवाण सदर होती. खासे सदर होती. राणीवशाचे महाल होते. कोठी, स्वयंपाकघर होते. सुबक देवघर होते. त्याखेरीज पागा, गोशाळा होती, ती निराळीच. वाड्याच्या वास्तूबरोबर गावठाणातल्या वास्तू उभारल्या जात होत्या. दादोजींनी पुण्याच्या वाड्याचे नाव ठेवले ‘लाल महाल’. लाल महालाला लागूनच होते ‘श्रीगजानन मंदिर.’

शिवाजीराजे पुण्याच्या वाड्यात आले. दादोजींनी फडाची निवडक माणसे गोळा केली. पागा सजली. पण गावचे वतनदार, हक्कदार बाहेरच होते. दादोजींनी त्यांना बोलावणे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाठविले. सारे गोळा झाले. पुण्यात वस्ती करण्याचे आवाहन दादोजींनी पुढे केले. एक पाटील म्हणाले,

‘पंत, तुम्ही म्हंतासा! पन किती डाव गाव मांडायचं आनी मोडायचं? वतन नको हाय व्हय आमास्नी? पन कसल्या धीरावर गाव जोडायचा?’

‘आम्ही नाही जोडला?’ सदरेच्या बैठकीवर हे ऐकत बसलेले शिवाजीराजे म्हणाले.

‘तुमांस्नी मानूसबळ हाय, धनी!’

पंत म्हणाले, ‘मोडलेला डाव मांडायला मराठा कधी भ्याला, असं मी पाहिलं नाही. पाटील, खरं सांगा...’

‘बोलू का?’ पाटील गलमिशांवरून पालथी मूठ फिरवीत म्हणाले, ‘हाय, तितं सुख न्हाई. पंत. गाव मिळालं, तर तेबी साऱ्यांस्नी पायजेच हाय. पन मन घाबरतं...’

‘कशाला?’

‘देवीच्या म्होरच्या चौकावर पार मारलिया न्हवं? घरटं उठवायला कोण धजंल?’

पंत विचारात पडले. त्यांनी साऱ्यांना निरोप दिला.

चार दिवस पंत गडबडीत होते. एके दिवशी साऱ्यांना परत पाचारण केले. शेकड्यांनी माणसे गोळा झाली. वाड्याच्या दारात वाजंत्रीवाले होते. जिजाऊंनी देवघरात सोन्याचा नांगर पुजला. देवाच्या पाया पडून नांगर उचलला गेला. नांगराबरोबर पंत, शिवबा चालत होते. जरी टोप, अंगरखा, पायांत सपाता, कमरेला छोटी तलवार आणि पाठीला ढाल लावलेली बालराजांची मूर्ती सारे कौतुकाने पाहत होते. वाड्याबाहेर देखणी बैलजोडी उभी होती. कलाबतूच्या झुली त्यांच्या पाठींवर होत्या. नांगर वाड्याबाहेर आला. हे पाहणाऱ्यांत वतनदार होते, पाटील होते, कुणबी होते, बारा बलुतेदार होते. नांगरासह मिरवणूक देवीच्या चौकात वाजत गाजत आली. चौकात भली थोरली पहार नजरेत येत होती. पंतांनी कुदळ उचलताच पाटील पुढे झाले. त्यांनी पहार खिळखिळी केली. पंतांनी सर्वांच्या वरून नजर फिरवली; आणि ‘हर हर महादेव’ म्हणून त्यांनी ती पहार उपसली. शेकडो मुखांतून ‘हर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हर महादेव'चा गजर उठला. सोन्याचा नांगर जोडीला जुंपला गेला; आणि शिवाजीराजांच्या हातून पुण्याची उद्ध्वस्त वास्तू नांगरली गेली. सोन्याचा फाळ जमिनीला लागला.

दुसऱ्या दिवसापासून निश्चिंत मनाने गाव वसू लागले. ओसाड शेतांवर औते जाऊ लागली. दिवस पावसाचे होते. एके दिवशी पंत जिजाऊंना म्हणाले,

'मासाहेब, आज राजांना घेऊन शिवापूरला जाऊन येतो.'

'का?'

'शिवापूरला वाड्यानजीक आंब्याची बाग उठवायचं ठरलं आहे. राजांच्या हातून बाग लावतो. काल रात्रीच रोपं आल्याची वर्दी आली. त्यामुळं कळविता आलं नाही.'

'साऱ्याच गोष्टी कुठं सांगता आम्हांला?'

चमकून दादोजींनी विचारले, 'असं कधी झालंय् का? कोणती गोष्ट लपवून ठेवलीय् मी?'

जिजाबाई हसून म्हणाल्या, 'स्वारींनी धाकट्या राणीसाहेब आणल्याची वर्दी कुठं दिलीत?'

'कुणी सांगितलं आपणांला?'

'पटलं ना? शिवनेरीवरच लक्ष्मीबाईंनी आम्हांला सांगितलं. एवढंच नव्हे, तर तुकाबाई राणीसाहेबांना मुलगा झाल्याचंही कळलंय् आम्हांला.'

'गडबडीत राहून गेलं खरं...' दादोजी पुटपुटले.

□

१०

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शहाजीराजांच्या पुणे जहागिरीत शिवाजीराजांच्यासह येताच दादोजी कोंडदेवांनी जहागिरीकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. वस्त्यांसाठी कौल दिला. जागा निवडली. शिवापूर, शहापूर यांसारखी गावे रूप घेऊ लागली. आंब्याच्या बागा उठवल्या गेल्या. वस्ती करण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांना मदत दिली जाऊ लागली. वाडा अशा माणसांनी सदैव भरला जाऊ लागला. जिजाबाईंच्याकडे बायाबापड्या येत होत्या. त्यांची दु:खे पाहून जिजाबाईंचे डोळे पाणावत.

बाल शिवाजी हे सारे पाहत होते. आपल्या बदलत्या जहागिरीचे रूप निरखीत होते. वाड्यात येणाऱ्या तंट्याच्या निर्णयाच्या वेळी हजर राहत होते. हे सारे पाहत असता शास्त्रीबुवांच्याकडे शिक्षण चालू होते. दादोजींनी निष्णात, पटाईत ढालकरी, पट्टेकरी बालराजांच्याकरिता आणविले होते.

सायंकाळी वाड्याच्या चौकात मर्दानी खेळाचे शिक्षण चाले. मावळ्यांची मुले शिवाजीच्या खेळात हिरिरीने भाग घेत.

एके दिवशी पंतांनी आत येऊन मुधोजीराव निंबाळकर आल्याची खबर दिली. मुधोजी निंबाळकर हे जुने आप्त. विजापूरकरांनी त्यांची जहागीर जप्त करून त्यांना साताऱ्याला कैदेत ठेवलेले जिजाबाईंनी ऐकले होते. जिजाबाईंनी त्यांची भेट घेतली. त्यांच्या बरोबर त्यांचा मुलगा बजाजी व मुलगी सईबाई पण आली होती.

मुधोजींनी मुजरा करताच बजाजीने मुजरा केला. सईबाई जवळ येऊन पाया पडली. तिला जवळ घेत जिजाबाई म्हणाल्या,

‘केव्हा आलात आपण?’

‘शहाजीराजांच्या कृपेनं कैद संपली. फलटण जहागीर पूर्ववत मिळाली. मुलुखाची लावणी संचनी करून आपल्या दर्शनाला आलो.’

‘बरं झालं आलात, ते. इथं सारंच नवं. आपल्यासारखी अनुभवी माणसं पाठीशी असली, तर तेवढाच आधार वाटतो.’

‘मासाहेब! पुणं परत उठवलंत. सारा मावळ माणसांनी सजला. हे काय थोडं केलंत?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मी काय करणार? दादोजींसारखी माणसं होती, म्हणून हे जमलं.’

‘करणारी करतात. पण त्यालादेखील देवीचा कौल लागतो.’ मुधोजी म्हणाले.

सईकडे बोट करीत, विषय बदलीत मासाहेब म्हणाल्या,

‘काय नाव हिचं?’

‘सईबाई... आणि हा मुलगा, बजाजी.’

सात-आठ वर्षांची सई आपल्या विशाल नेत्रांनी मासाहेबांकडे पाहत होती. गव्हाळ रंग असूनही तिच्या रूपाचा गोडवा नजरेत भरणारा होता. धारदार नाक, पातळ ओठ, रेखीव काळे नेत्र, उंच मान... चेहऱ्याच्या गोडव्यात भर घालीत होते.

मासाहेबांनी निंबाळकरांना थोडे दिवस राहायचा आग्रह केला. मुधोजी पुण्यात राहिले. मासाहेबांच्या बरोबर सई सावलीसारखी फिरू लागली. बजाजी शिवाजीबरोबर राहत होता.

संध्याकाळच्या वेळी वाड्याच्या पुढच्या चौकात मर्दानी खेळ चालले होते. पंत पाहत होते. लाठी, बोथाटी झाली; आणि शिवबाने हाती तलवार घेतली. उस्ताद तलवार घेऊन उतरले. डाव सुरू झाला. खणखण आवाज उठू लागले. सदरेच्या खांबाला रेलून हे पाहत उभी असलेली सई आत धावली. आत मासाहेब बैठकीवर बसल्या होत्या. मुधोजी निंबाळकर खाली बसले होते. सईबाई मुधोजींच्या कानाशी वाकली. मुधोजी म्हणाले,

‘नंतरऽऽ’

‘चला ना, आबा!’ गाल फुगवून सई म्हणाली.

‘सांगितलं ना, मध्ये बोलू नको, म्हणून?’

‘काय म्हणते, सई?’ जिजाऊंनी विचारले.

सईबाई चटकन मासाहेबांच्याकडे धावली. म्हणाली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मासाहेब, बघा ना! बाहेर खेळ चाललेत. आबा येत नाहीत पाहायला.’

‘भारी सतावते ही पोर!’ मुधोजी म्हणाले.

‘चला, मुधोजी! आम्हीही खेळ पाहायला येऊ. फार दिवसांत आम्हांलाही सवड मिळाली नाही.’

मासाहेब उठल्या. मुधोजींना उठावेच लागले. मासाहेबांचा हात धरून सई बाहेर आली. मासाहेबांना पाहून दादोजी उठले. सदरची मंडळी मुजरा करून बाजूला झाली. मासाहेब बैठकीवर बसल्या. दादोजी, मुधोजी अदबीने बाजूला बसले. चौकात चार जोड्या तलवार खेळत होत्या. उस्तादाने मुजरा करताच मासाहेबांनी विचारले,

‘नानू उस्ताद, आमच्या बाळराजांना नवीन काय शिकवलंत?’

नानू म्हातारा होता, तरी वाळल्या हाडांत तेज होते. तो म्हणाला,

‘मासाहेब! दावतोच की आता.’

नानूने सूचना केल्या. चौक मोकळा झाला. नानू म्हणाला,

‘राजे, लाठी घ्या.’

लाठी घेतली. राजांनी लाठी फिरवायला सुरुवात केली. साधी, बगली, चक्री सारे प्रकार करून दाखवले. चक्री लाठीच्या वेळी तर लाठीची गुणगूण ऐकू येत होती. तीन हात होताच नानूने काठी उचलली. राजांच्या समोर जात तो म्हणाला,

‘बेतानं, हं राजे! नाही तर मागच्यासारखा बावळा निखळून ठेवशिला.’

सारे हसले. नमन करून, हातांवर थुंकून नानूने काठी उचलली. बाळराजांनी त्याचे अनुकरण केले.

‘राजे, करा मोहराऽऽ!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी काठी उचलली. लाठीचे वार होत होते. ते वार नानू काठीवर झेलत होता. मागे सरकत होता. खाट खाट आवाज उठत होते. सारे कौतुकाने पाहत होते. मध्येच नानू ओरडला,

‘राजे, सांभाळा!’

-आणि नानूने मोहरा केला. नानूचे घाव राजे काठीवर झेलीत होते. भीतीने जिजाऊंचे डोळे ताठरले. नानू वेगाने चाल करीत होता. राजे मागे सरकत होते.... आणि राजांच्या हातची काठी सुटली. नानूने मासाहेबांच्याकडे पाहिले. नि:श्वास सोडून मासाहेब म्हणाल्या,

‘नानू, अरे बेतानं! पोराबरोबर खेळतोस तू, ते विसरलास वाटतं.’

‘नाही, मासाब! या खेळात न्हान-मोठं कुठलं? जो आधी साधंल, त्याचा डाव. अजून राजांचं हात बळकट झालं न्हाईत, म्हनून काठी सुटली. असंच शिकायचं.’

त्याच वेळी केळीचे मोने आणले गेले. चौकात खुंटीवर केळ उभी केली; आणि राजांच्या हाती विटा दिला. राजांच्या उंचीपेक्षा विटा दीड हात उंच होता. फाळाखाली चांदीचे कडे खुळखुळत होते. कड्याखाली भला थोरला गोंडा होता. विट्याच्या टोकाला रेशमी काढणी होती. राजांनी केळीपासून दूर जायला सुरुवात केली. दुसऱ्या टोकाला ते गेले. काढणी हाताला गुंडाळून पवित्रा घेऊन उभे राहिले. नानू ओरडला,

‘राजे, चाल करा!’

मस्ताड उड्या टाकीत राजे झेपावले. केळीपासून आठ हातांवर राजे आले; आणि एकबळाने त्यांनी विटा फेकला. सरसरत विटा सुटला; आणि हातावरच्या केळीत भसकन घुसला. ओढीबरोबर त्याच क्षणी विटा माघारी राजांच्या हाती आला. न राहवून मुधोजी ओरडले,

‘व्वा, राजे!’

सईबाई मासाहेबांच्या जवळ बसून हे सारे कौतुकाने पाहत होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चौकातून केळ हलविली; आणि चौकात दुसरे दोन मोने आणले गेले. मासाहेबांच्या बैठकीच्या समोर दोन्ही मोने आठ हातांच्या अंतरावर समांतर लावले गेले. शिवाजीराजांनी दोन्ही हातांत पट्टे चढविले. चौकात येऊन त्यांनी पट्ट्याचा पवित्रा घेतला. बाल शिवाजी करारी मुद्रेने खेळ खेळत होते, तरी त्यांच्या ओठांवरचे स्मित दडत नव्हते. आपल्या तीक्ष्ण नजरेने त्यांनी सदर निरखली. हाताचा अंदाज घेतला. चौरंग चौक फिरून त्यांनी उजवा गुडघा टेकला. उजव्या हातीचा पट्टा सरळ होता. डावा हात रुंदावला होता. शिवाजीराजांचे मस्तक झुकले होते. शिवाजीराजे मासाहेबांना मुजरा करीत होते. नजर वर झाली, तेव्हा सस्मित वदनाने मासाहेबांनी मानेने मुजरा स्वीकारल्याचे दिसले. शिवबाची नजर दादोजींकडे गेली. त्यांनीही मानेने मुजरा स्वीकारला. बाळराजे उठले. हात फिरवू लागले. हात फिरवीत ते केळींच्या मध्यभागी उभे राहिले. दोन्ही केळींचा त्यांनी अंदाज घेतला, आणि डोळ्यांचे पाते लवायच्या आत अत्यंत वेगाने दोन्ही केळींना वार केले. शिवाजीराजांनी परत मुजरा केला.

दोन्ही केळी तशाच उभ्या होत्या. सईबाई खुदकन हसली. मासाहेबांनी सईबाईकडे पाहिले. त्या म्हणाल्या,

‘नानू वस्ताद! आमच्या सईबाईंना, राजांनी काय केलं, ते दाखवा.’

नानू वस्ताद पुढे झाला. दोन्ही केळींना धक्के देताच दोन्ही केळी मधून तुटल्या. समान अंतरावर त्या छेदल्या गेल्या होत्या. तुटलेल्या केळी पाहताच सईबाईचे डोळे विस्फारले गेले. ती उद्गारली,

‘अगो बाई!’ आणि तिने पदर तोंडाला लावला.

सारे हसले. लाजलेल्या सईला जवळ घेत मासाहेब म्हणाल्या,

‘सई, हा नवरा चालेल का तुला?’

सईबाईने एकदा मासाहेबांच्याकडे पाहिले. दुसऱ्या क्षणी पट्टे उतरीत असलेल्या शिवबांच्याकडे पाहून मासाहेबांना ती मोठ्याने म्हणाली,

‘हो, चालेल.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मासाहेब गोऱ्यामोऱ्या झाल्या. सईला जवळ घेत त्या म्हणाल्या,

‘हात, गधडे! असं ‘हो’ म्हणून सांगतात का?’

मासाहेबांची उपस्थिती विसरून सारा चौक हसण्याने भरून गेला. हसणे शांत होताच दादोजी स्थिर आवाजात म्हणाले,

‘मासाहेब, एक अर्ज आहे.’

‘काय, दादोजी?’

‘गोष्ट निघालीच आहे. हरकत नसेल, तर ही गोष्ट पक्की करावी. राजेही आता दहा वर्षांचे होतील. जोडाही शोभून दिसेल.’

‘नानू वस्ताद! काय म्हणतात दादोजी?’

नानू म्हणाला, ‘खरंच आहे ते. देऊ या बार उडवून. समदं झालं... वाडा झाला, चौक झालं, लिवनं-वाचनं झालं. सूनबाईशिवाय घराला शोभा हाय, व्हय? आवंदा करून टाकू या.’

‘अहो, पण निंबाळकर मामा काय म्हणतात, ते तरी विचारा. पोर त्यांची.’

‘असे शब्द वापरू नका, मासाहेब! पोर आपली आहे. महाराजांच्या कृपेने जीव वाचला, जहागीर मिळाली, अन्नाला लागलो आम्ही. पोर पदरात घेतली, तर आजवरच्या उपकारांवर, ऋणानुबंधांवर कळस चढेल.’

‘जगदंबेच्या मनात असेल, तर होऊन जाईल. पूर्वीपासून चालत आलेला संबंध पुढं चालू होईल... दादोजी!’

‘जी?’

‘चांगली वेळ बघून बंगळूरला तातडीनं खलिता पाठवा. आमची इच्छा सर्वांना कळवा.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तिकडून होकार आला, की आपण हे कार्य पार पाडू.’

मासाहेब उठल्या. सई म्हणाली,

‘मासाहेब, एवढ्यात जायचं?’

मासाहेब हसल्या. कौतुकाने तिचा गालगुच्चा घेत म्हणाल्या,

‘एका बैठकीत जेवढं केलंस, ते का थोडं झालं? आता ऊठ, बाई. पुष्कळ कामं आहेत.’

सर्वांचे मुजरे झाले. सईबाईसह मासाहेब आत गेल्या. ओलावलेल्या पापण्यांनी मुधोजीराव समाधानाने परत बैठकीवर बसले.

दुसऱ्या दिवशी उन्हे माळवदीवर आल्यावर लाल महालातून दोन घोडेस्वार बंगळूरच्या वाटेला लागले. दोन दिवसांनी मुधोजीराव सई-बजाजींसह फलटणला गेले.

दिवस उलटत होते. बंगळूरच्या निरोपाची सारे वाट पाहत होते.

बंगळूरची थैली पुण्यात आली. दादोजींनी मस्तकी लावून थैली उघडली. मजकुरावरून नजर फिरत असता होणारा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. मासाहेबांनी अधीरतेने विचारले,

‘काय आज्ञा आहे?’

‘महाराजसाहेबांना हा संबंध मान्य आहे, एवढंच नव्हे; तर लग्नप्रसंगी मोकळेपणानं खर्च करण्याची आज्ञा झाली आहे. लग्नाची तिथी निश्चित झाली, की कळविण्याची आज्ञा झाली आहे. महाराजसाहेब जातीनं लग्नाला हजर राहणार आहेत.’

‘पंत, फलटणला मुधोजीरावांना कळवा. दिवस थोडे आहेत. सारं व्यवस्थित व्हायला हवं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सारी सूत्रे भराभर हलविली जाऊ लागली. फलटणहून मुधोजीराव कुटुंबपरिवारासह आले. एक शंका होती, तीही दूर झाली... शिवाजी-सईबाईंच्या कुंडल्या जमत होत्या. एक दिवस टिळा लावण्याचा समारंभ उरकून घेतला गेला. मुहूर्त काढायला शास्त्री बसले. सर्वानुमते शके १५६२ विक्रमनाम संवत्सर, वैशाख शु।।५ हा मुहूर्त धरण्यात आला.

शहाजीराजांना मुहूर्त कळविला गेला.

पंतांना आता क्षणाचीही उसंत नव्हती. कलाबूत चितारणारे कलावंत कोकणातून खास बोलावून आणले होते. अंबारखाना, वस्त्रघर नानाविध धान्यांनी आणि वस्त्रांनी भरले जात होते. फडातले कारकून येणाऱ्या प्रत्येक मालाची नोंद करीत होते.

पंतांनी चालवलेली तयारी पाहून जिजाबाई पंतांना म्हणाल्या,

'पंत, केवढा पसारा मांडणार आहात? हे लग्न बेतानं केलं, तरी चालेल.'

पंतांनी मासाहेबांच्याकडे पाहिले. ते म्हणाले, 'मासाहेब, या लग्नात खर्चाचा विचार करून चालणार नाही. नवी जहागीर वसते आहे. नुसती मदत घेऊन माणसं आपली होत नाहीत; ती आपलीशी करावी लागतात. असा मोका सोडून कसा चालेल? या निमित्ताने सारे एकत्र येतील. त्यांच्या मनातला जिव्हाळा वाढेल. जहागिरीचा पाया मजबूत बनेल.'

जिजाऊंना ते पटले. त्यांनी नंतर काही आढेवेढे घेतले नाहीत. मुधोजीही नुकतेच जहागिरीवर आलेले. एवढी मोठी सोयरीक कशी पार पडणार, याची चिंता त्यांना वाटत होती. फलटणला जाऊन लग्नाची प्राथमिक जुळवाजुळव करून, ते जिजाऊंच्या भेटीला पुण्यास परत आले.

'मासाहेब, मुलीचं लग्न वधूपित्याच्या घरी व्हावं, हा शिरस्ता आहे. लग्न फलटणला आमच्याकडं व्हावं, ही विनंती आहे.' मुधोजींनी अर्ज केला.

मासाहेब म्हणाल्या, 'मामासाहेब! अजून का आम्हांला परके समजता? हे घर कोणाचं? थोरल्या सासूबाई दीपाबाई फलटण-घराण्यातल्याच ना? राजांनी पुणं वसवलं. इथंच त्यांचा विवाह व्हावा, हे बरं वाटतं.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जशी आज्ञा! पण, मासाहेब, राग होणार नसेल, तर आणखीन एक विचारावंसं वाटतं.’

‘काय?’

‘सोयरीक ठरली. मुहूर्त ठरला; पण घेण्यादेण्याचं काही ठरलं नाही.’

‘घेणं-देणं व्यवहारात येतं, मामासाहेब! ही रक्ताची नाती! पोरगी देता, त्यापेक्षा मोठं देणं कुठलं? तुम्ही आणखीन थोडं द्यायचं आहे. ते दिलंत, की आमचं काही म्हणणं नाही.’

‘सांगा, मासाहेब!’

मासाहेब हसत म्हणाल्या, ‘आणखीन द्यायचे, ते आशीर्वाद! त्यांच्याच बळावर संसार सुखाचे होतात. तेवढं द्या, की सारं आलं.’

‘पण महाराजसाहेब काय म्हणतील?’

‘इकडून काही दोष लावला जाणार नाही. विचारलंच, तर बेलाशक आमचं नाव पुढं करा.’

मुधोजीरावांना शब्द फुटत नव्हता. गहिवरून ते म्हणाले,

‘मासाहेब, पोरीला पदरी घेतलंत, आणि साता जन्मांचं कल्याण केलंत. लग्नात आम्ही काही तरी केल्यासारखं वाटावं, म्हणून तरी काही काम सांगा.’

‘सांगू ना! जरूर सांगू. मामासाहेब, वऱ्हाड घेऊन येताना मोजकी माणसं आणू नका. तुमची सारी मंडळी... रयतेसहित साऱ्यांना निमंत्रण द्या. फलटण इथं उतरल्याचा आनंद आम्हांला होऊ द्या.’

जिजाबाईंनी सांगितले, त्यात काही खोटे नव्हते. लग्नाची तयारी तेवढ्याच मोठ्या प्रमाणावर होत होती. महाल सुबक रंगांनी रंगविले जात होते. स्वयंपाकघर मांडवात हलवले

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गेले होते. नाना तऱ्हेचे फराळाचे सामान तयार होत होते. राहुट्या उभारल्या जात होत्या. जानवसघर म्हणून पाटलांनी आपला वाडा आनंदाने दिला होता. मांडवासाठी वासे, वेळकाठ्या यांचे ढीग रचले जात होते. मांडवाचे कापड, कनाती, पडदे, आडपडदे यांबरोबरच हंड्याझुंबरांनी काचघर भरले जात होते. सोनारशाळेत कुशल कारागीर दादोजींच्या नजरेखाली सुबक दागिने घडवीत होते. हिरे, मोती, माणके, रत्ने यांची खैरात चाललेली होती. असलेला वेळ अपुरा वाटत होता. जिजाऊंना मदत करण्यासाठी उमाबाई, लक्ष्मीबाई येऊन दाखल झाल्या. घराला एकदम वेगळेपण आले. जिजाऊंचा भार एकदम कमी झाला.

अचानक शहाजीराजे लग्नाला येऊ शकत नसल्याची थैली विजापुराहून आली. शहाजीराजे मोहिमेत गुंतले होते. लग्न पार पाडण्याची आज्ञा दादोजींना झाली होती. साऱ्यांना शहाजीराजे येत नसल्याबद्दल वाईट वाटले. जिजाऊंचा विरस झाला. उमाबाई म्हणाल्या,

'मला वाटलंच होतं. त्याचं नेहमीच असं. लहान होता, म्हणूनच लग्नाला तरी सापडला... तो नाही आला, तर काय झालं? पुढं येईल.'

शहाजीराजे येणार नाहीत, म्हणजे संभाजी पण येणार नाही. संभाजीला पाहून फार दिवस झाले होते. अकरा वर्षे लोटली होती. जिजाऊंनी संभाजीसाठी कपडे काढले होते. दागिने केले होते. सारे तसेच राहून गेले. मनातले हे शल्य तसेच दाबून ठेवून जिजाबाई परत लग्नघाईत मिसळल्या.

पाचही देवांना कौल लावून मुहूर्तमेढ रोवली गेली. साऱ्या ठिकाणचे मांडव सजू लागले. खांब उभे राहिले. काठ्या आच्छादल्या गेल्या. छत चढले. पडदे, आडपडदे वाऱ्यावर झुलू लागले.

मुधोजीरावांचे वऱ्हाड वाजत-गाजत पुण्यात प्रवेश करते झाले. खेडबाऱ्यातून बैलगाड्यांची रीघ पुण्याच्या वाटेला लागली. सारे घरचे होते. मागे कोण राहणार? बैलगाड्यांनी, घोड्यांच्या टापांनी पुणे गजबजून गेले. निवाऱ्याच्या जागा संपल्या; आणि माणसांनी गाडीतळातच गाडीचा आसरा केला. हररोज हजार पान उठत होते.

लक्ष्मीबाई उसंत न घेता वावरत होत्या. जिजाऊ त्यांना काही म्हणाल्याच, तर त्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

म्हणत,

‘तुम्ही विसावा घ्या. काही आमच्याकडून राहिलं, तर सांगा.’

मुहूर्ताचा दिवस आला. लाल महालाचे आवार माणसांनी फुलून गेले. मंगलाष्टकांचे आवाज उठले; आणि गोरज मुहूर्तावर आशीर्वादासाठी हजारो हातांनी वधूवरांच्या वर अक्षत फेकली. वाद्यांचा गजर झाला.

मांडवातून शिवाजी वाड्यात आला. जरी टोप शिरी होता. कपाळी गंध होते. अंगात जरी बुट्टीचा अंगरखा होता. कमरेला तलवार लटकत होती. पाठीमागे सईबाई चालत होती. दोघेही नानाविध अलंकारांनी आलंकृत होते. दोघांच्या शालींना मारलेली गाठ दोघांच्या मध्ये हिंदोळे घेत होती. शिवाजी आत आला. दोघेही उमाबाईंच्या पाया पडली. उमाबाईंनी दोघांवरून ओवाळून कानशिलांवर बोटे मोडली. मोहरांचा सतका केला. जिजाऊंचा आशीर्वाद घेऊन दोघे सदर-सोप्यात आली. राजांनी दादोजींच्या पायांवर डोके टेकले. दादोजी गहिवरले होते. सारे अंग कापत होते. काही न बोलता त्यांनी शिवबांना कवटाळले.

वरातीची तयारी झाली. दागिन्यांनी सजविलेला देखणा घोडा समोर आला. सईबाई म्हणाली,

‘मी घोड्यावर बसणार!’

‘तुमच्याचकरिता आणलाय् हा घोडा.’

‘अंहं! मला दुसरा घोडा पायजे. मला घोड्यावर बसता येतं की!’

सारे थक्क झाले. कुणालाच हसू आवरेना. जिजाबाई म्हणाल्या,

‘ही काय रपेट आहे? वरात आहे ही! हवं तर नंतर दुसरा घोडा देईन तुला.’

वरात चालू लागली. शेकडो पलोत्यांच्या उजेडात वरात जात होती. पुढे दादोजी, मुधोजी, हनमंते, शास्त्री, कोरडे ही मंडळी चालत होती. त्यांच्या पुढे दांडपट्टा, लेझीम, तलवार खेळली जात होती. पुढे वाजंत्र्यांचे ताफे लागले होते. मुंगीच्या पावलांनी वरात पुढे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सरकत होती. होणाऱ्या बारांनी सई दचकून जागी होत होती. पेंगत होती; झोप येऊ नये, म्हणून शिवबाच्या डोळ्यांना पाणी लावले जात होते. जोगेश्वरीहून वरात माघारी वाड्यात यायला पहाट झाली. सईबाईला पुरे जागे करण्यात आले. वाड्याच्या दाराशी उंबरठ्यावर ठेवलेले माप सांडून भोसल्यांच्या घरात गृहलक्ष्मीने प्रवेश केला. दाराच्या आत धान्य विखुरले गेले.

❑

११

पावसाळा संपला. सुगी जवळ आली; आणि शहाजीराजांनी दादोजी कोंडदेवांना जिजाबाई-शिवाजीसह बंगळूरला येण्याची आज्ञा पाठविली.

तयारी सुरू झाली. लांबचा प्रवास असल्याने सईबाईंना फलटणला ठेवण्यात आले. अश्वपथके सज्ज झाली. मेणे सजले. वाटेतल्या मुक्कामाची व्यवस्था करण्यासाठी घोडेस्वार रवाना झाले. तंबू पाठविले गेले.

वडिलांचे दर्शन होणार, पाहायला मिळणार, म्हणून शिवबाला खूप खूप आनंद झाला होता. जिजाबाईंच्या उत्साहाला तर सीमा नव्हत्या. पतिदर्शनाबरोबरच थोरला संभाजी भेटणार होता. पंतांना जहागिरीची काळजी होती. ती जबाबदारी नऱ्हेकरासारख्या विश्वासू माणसावर ते सोपवीत होते. शहाजीराजांचा खजिना दादोजींनी बरोबर घेतला होता.

मोठ्या इतमामाने एके दिवशी काफिला बंगळूरच्या वाटेला लागला. बंगळूरच्या दीर्घ प्रवासात शिवबा नाना तऱ्हेची माणसे पाहत होता. अंतराबरोबर माणसांचे वेष, बोली भाषा बदलत होती. नवीन पक्षी दिसत होते. रानातून जाताना वन्य श्वापदे आढळत होती. प्रचंड फत्तरांनी सजलेले कर्नाटकचे डोंगर पाहून बाल शिवाजी थक्क झाला. थंडीवाऱ्याचे भान विसरून शिवबा हे सारे पाहत होता. बालमनावर वेगळ्या मुलुखाचे नवे संस्कार घडत होते.

एका मुक्कामावर असतानाच बंगळूरला मासाहेबांच्या आगमनाची वर्दी गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी बंगळूरच्या वेशीतून शिवाजीने प्रवेश केला. भक्कम तटबंदीने सजलेल्या त्या दरवाज्यावर आदिलशाही ध्वज फडकत होता. दोन्ही बाजूंच्या बुरुजांवर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पल्लेदार तोफा होत्या. वेशीत संभाजीराजे जातीनिशी मासाहेबांच्या स्वागताला उभे होते. दुरून त्यांना पाहताच दादोजींनी त्यांना खूण केली. दोघे पायउतार झाले. शिवबाने पुढे जाऊन मुजरा केला. प्रेमभराने शिवबाला मिठी मारीत शंभूराजे म्हणाले,

‘शिवबा, आम्ही तुमचीच वाट पाहत होतो. महाराजसाहेब गेले दोन दिवस तुमची वाट पाहण्यात बेचैन आहेत.’

मेणा आला. शंभूराजे पुढे आले. मेण्याचा पडदा सरकावला गेला. जिजाबाई आश्चर्यचकित नजरेने शंभूराजांना पाहत होत्या. पागोटे, चुणीदार विजार हा संभाजीचा वेष होता. कमरेला तलवार लटकाविली होती. वडिलांचा तोंडवळा असलेल्या संभाजीला कोवळी मिसरूड फुटली होती. गौर कपाळावर आडवे शिवगंध होते. संभाजीने पुढे होऊन मासाहेबांचे पाय शिवले. न राहवून मासाहेबांनी संभाजीला छातीशी ओढले, आणि त्याचा मुका घेतला. त्या मिठीतून सुटका करून घेत संभाजी म्हणाला,

‘महाराजसाहेब वाट पाहत आहेत.’

संभाजी, शिवाजी, दादोजी परत स्वार झाले; आणि बंगळुरातून स्वारी जाऊ लागली. दुतर्फा दिसणारे उंच वाडे, त्यांचे नक्षीदार सज्जे शिवाजी कौतुकाने पाहत होता. वेष निराळे, भाषा निराळी, सारे निराळे होते, थक्क करणारे होते.

वाड्याचे अस्तित्व न सांगताही कळत होते. त्या चिरेबंद वाड्यावर नजर टाकताच शिवाजीची नजर खिळून राहिली. मंद गतीने घोडी पुढे जात होती. वाड्यापुढे प्रशस्त मैदान होते. वाड्याच्या दरवाज्याशी तांबडे एकसारखे वेष घातलेले सेवक अदबीने उभे होते. तळपते तेगे त्यांच्या हाती शोभत होते. संभाजीसह शिवाजी वाड्याच्या दरवाज्यात आला. शिवाजीने खोगिरावर एका बाजूला दोन्ही पाय घेतले; घोड्याच्या पाठीवर डावा हात ठेवला; आणि जमिनीवर अलगद उडी मारली. शिवाजी पायऱ्यांजवळ आला. त्याने वर पाहिले- वाड्याच्या प्रवेशद्वारी उंची पुरी, रुबाबदार व्यक्ती उभी होती. केस मानेवर रुळत होते. डौलदार दाढी शोभत होती. संभाजीने शिवाजीला नाजूक ढोसणी दिली; आणि त्याने मुजरा केला. पण शिवाजी मुजऱ्याकरिता वाकले नाहीत. वडिलांचे रूप पाहत ते पायऱ्या चढून जात होते. वाड्याच्या दरवाज्याशी शिवाजीराजांच्या वरून भात ओवाळून टाकला गेला. पायांवर पाणी पडले. डोळ्यांना पाणी लावले गेले. संभाजी आश्चर्यचकित नजरेने शिवाजीकडे पाहत होते. शहाजीराजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'या, राजे!'

शिवाजीमहाराज पुढे गेले. वडिलांच्या जवळ जाताच ते गुडघ्यांवर बसले. दोन्ही हात जमिनीला टेकवून त्यांनी शहाजीराजांच्या पायांवर मस्तक ठेवले. मोठ्या प्रेमभराने शहाजीराजांनी त्यांना उठविले; कुरवाळले. शहाजीराजे म्हणाले,

'दादोजी! आमच्या छोट्या राजांना अजून मुजरा जमत नाही, वाटतं?'

'आम्हांला मुजरा येतो, आबासाहेब! पण मासाहेबांनी पाया पडायला सांगितलं.'

'अस्सं!... आणि राजे, थोराड घोड्यावर बसून आलात. तट्ट का नाही घेतलं? मोठं घोडं बसायला कठीण.'

त्याच धिटाईनं शिवाजीराजे म्हणाले, 'कसलं कठीण, आबासाहेब? घोड्यावर बसायला मांड बळकट लागते.'

'व्वा, राजे!'

तेवढ्यात दारी मेणा आला. सारे बाजूला झाले. स्त्रिया पुढे सरसावल्या. जिजाबाईंचा वाड्यात प्रवेश झाला. बाहेरून दिसत होता, त्याहीपेक्षा आत वाडा मोठा होता. जिजाबाई दुसऱ्या चौकात आल्या; आणि तुकाबाई सामोऱ्या येऊन पाया पडल्या.

'धाकट्या राणीसाहेब, पाया पडायची गरज नव्हती.'

'आपला मान मोठा! पण मला कसं ओळखलंत?'

'घरच्या लक्ष्मीला ओळखता येत नाही, असं कसं होईल?... पण छोटे राजे कुठं आहेत? त्यांना आम्हांला पाहायचं आहे!'

तोवर संभाजी-शिवाजींसह एकोजीराजे आले. एकोजी येऊन जिजाऊंच्या पाया पडले. तुकाबाई म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘किती वर्षांनी परत घर एक झालं!’

‘बारा वर्षांचा वनवास संपला, असं दिसतं.’ जिजाबाई हसून म्हणाल्या.

पहिले दोन-चार दिवस आपण कोठे वावरतो, हेही शिवाजीला कळत नव्हते. अनेक सदरा, अनेक दिवाणखाने, अनेक महाल त्या वाड्यात होते. सागवान-शिसव्याचे अप्रतिम कोरीव काम कमानींवर, खांबांवर, सज्जांवर दिसत होते. शेकडो माणसांची वर्दळ त्या वाड्यात होती; पण सारी कशी चूपचाप! वाड्यामागे मांसाहारी, शाकाहारी अशा दोन्ही पाकशाळा होत्या- आमोऱ्यासामोऱ्या. एकीत सोवळ्यात वर्दळ करणारे, मंत्र पुटपुटणारे ब्राह्मण दिसत, तर दुसऱ्या शाळेत स्वयंपाकाची धांदल दिसे. रात्री, अपरात्री जाग आली, तर पुढल्या चौकाच्या सज्जावरून घुंगरांचे, गाण्याचे स्वर कानांवर पडत. एखाद्या स्वप्ननगरीत वावरावे, तसे शिवाजीराजे त्या वाड्यात वावरत होते.

एके दिवशी दोन प्रहरी शिवाजीराजे शहाजीराजांच्या महालात गेले. शहाजीराजे बैठकीवर बसले होते. शिवाजीराजांच्याकडे पाहताच शहाजीराजे म्हणाले,

‘या, राजे!’

शिवाजीराजे जवळ गेले. एकदम म्हणाले,

‘आबासाहेब!’ शब्द उच्चारताच चूक ध्यानी येऊन ते गडबडीने म्हणाले, ‘महाराजसाहेब!’

शहाजीराजांनी शिवबाला एकदम जवळ ओढले. ते म्हणाले,

‘राजे, इतर आम्हांला ‘महाराजसाहेब’ म्हणत असतील; पण तुम्ही ‘आबासाहेब’च म्हणत जा.’

शिवबा हसला. महाराजांनी विचारले,

‘का आला होता, राजे?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज, आम्ही बंगळूर पाहायला जाऊ?’

‘कोण येतंय् बरोबर?’

‘दादामहाराज आहेत. धाकले राजे आहेत.’

‘आणि वशिला लावण्यासाठी मधले राजे आले! ठीक आहे. जाताना बरोबर स्वार घेऊन जा... पंत, यांना पाठविण्याची व्यवस्था करा. दिवस मावळायच्या आत परत या.’

शिवाजीराजे त्या नवलाईच्या शहरातून फिरत होते; नानाविध वस्त्रांनी, भांड्यांनी सजलेल्या पेठा पाहत होते. रस्त्याने जात असता अचानक शिवाजीराजांची नजर खिळली. ते जवळच्या संभाजीला म्हणाले,

‘दादा, ते पाहा.’

दोन गोरे, उंच पुरे इसम रस्त्याने जात होते. त्यांच्या डोक्यांवर केसांचे टोप होते. पायांतल्या बंद वहाणांच्या टाचा खूप उंच होत्या. संभाजीराजे म्हणाले,

‘राजे! ते फिरंगी व्यापारी!’

‘कुठं असतात हे लोक?’

‘साता समुद्रांपलीकडे असतात.’

‘मग इथं का आले?’

‘व्यापार करायला.’

‘व्यापार करायला त्यांचा मुलूख नाही?’

संभाजीराजांना त्याचे उत्तर सापडले नाही. न ऐकलेसे करून ते पुढे गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पण चार दिवसांनी त्या व्यापाऱ्यांना पुन्हा पाहण्याचा योग शिवाजीराजांना आला. एके दिवशी सायंकाळी शहाजीराजांचे शिवबाला बोलावणे आले. शिवाजीराजे सदरेत गेले, तेव्हा ते दोन्ही साहेब तेथे उभे होते. शहाजीराजांच्या समोर शस्त्रे पसरली होती. शिवाजी येताच शहाजीराजांनी शस्त्रांच्याकडे बोट दाखवीत म्हटले,

'राजे, पाहा एखादी फिरंग पसंत पडते का?'

शिवबांनी साऱ्या शस्त्रांवरून नजर फिरविली; आणि त्यांची नजर बंदुका ठेवल्या होत्या, त्यांवर खिळली. शहाजीराजांनी विचारले,

'तुम्हांला बंदूक उडवता येते?'

'आम्ही शिकू.'

'शाब्बास! आम्ही तुमच्यासाठी बंदूक घेऊ.'

व्यापाऱ्यांनी तत्परतेने बंदुका पुढे धरल्या. लांब झोकनळीच्या त्या बंदुका होत्या. पल्ला असूनही जड नव्हत्या. कामगिरी सुबक होती. शहाजीराजांनी बंदूक निवडली. शिवाजीराजांच्यासह ते वाड्याबाहेर आले. निवडलेली बंदूक भरण्यात साहेब गुंतला होता. नारळ आणून चौकात ठेविला गेला. भरलेली बंदूक घेऊन शहाजीराजे चौकात गुडघ्यावर बसले; आणि नेम धरून त्यांनी बार काढला.

नारळ फुटला. शहाजीराजे म्हणाले,

'राजे, हे हत्यार चांगलं आहे. धक्का फारसा देत नाही. ही बंदूक तुमची! आमची आठवण म्हणून बाळगा. उद्या शिकार-हवालदाराला सांगेन. तो बंदूक चालवायला शिकवील.'

महाराजांनी शिवबाला बंदूक दिल्याचे साऱ्या महालात झाले. शहाजीराजांना शिवबांचा सहवास फार आवडे. जे मातब्बर सरदार घरी येत, त्यांना ते शिवबाची ओळख करून देत असत. म्हणत,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हा जन्माला आला, आणि सगळं चांगलं झालं. आयुष्याची वणवण संपली.’

शहाजीराजे बाहेर निघाले, तरी शिवबाला घेऊन जात. शिवबांच्या शंकांना उत्तरे देता-देता त्यांना पुरे होऊन जाई.

तुकाबाई, जिजाऊ महालात असता अचानक शहाजीराजे आत आले. दोघी गडबडीने उठून उभ्या राहिल्या. जिजाऊंकडे पाहत शहाजीराजे म्हणाले,

‘दादोजी आम्हांला हिशेब सांगत होते. मोठं धामधुमीनं शिवबांचं लग्न केलंत, म्हणे.’

घाबरून जिजाबाई म्हणाल्या, ‘खर्च फार झाला का?’

‘आणखीन का केला नाही, याची तक्रार आहे. आम्हांला कळवायचं होतं. आम्ही आमचा हत्ती पाठविला असता वरातीला.’

‘आपण येणार, म्हणून सारे वाट पाहत होते.’

‘मनात असूनही ते आम्हांला जमलं नाही. शिवबांचं लग्न पाहायचं फार मनात होतं.’

‘मग आणखीन एक लग्न करू.’ तुकाबाई म्हणाल्या.

‘खरंच की! आम्ही नाही, ते लग्न कसलं? पण नवरी?’

‘ती मी पाहिलीय्. आपल्या मोहित्यांची सोयरा आहे ना! नक्षत्रासारखी मुलगी आहे.’

‘खरंच! ठरवून टाकू लग्न!’ म्हणत आनंदाने शहाजीराजे बाहेर गेले.

जिजाबाईंना एवढे तडकाफडकी ठरणारे लग्न आवडले नाही. त्या म्हणाल्या,

‘एक लग्न नुकतंच झालं. तोवर...’

‘राजांना अनेक लग्नं शोभून दिसतात. पहिली केली, ती निंबाळकरांची ना?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'हो!'

'मोहिते घराणं मोठं तोलाचं.'

तुकाबाईंच्यावर नजर रोखीत जिजाबाई म्हणाल्या,

'मालोजीरावांच्या दीपाबाई निंबाळकर घराण्यातल्याच.'

'हो! पण तेव्हा थोरले मामंजी बारगीर होते, हे विसरला.'

'बारगिराचे राजे झाले ना! वनवासी पडलेला चंद्रहास राजा अन्नाला लागला, सम्राट झाला. कूळ पराक्रमानं पाहिलं जातं, धाकट्या बाई!'

'सोयरीक नको, म्हणून इकडं सांगायचं का?'

'तसं केव्हा म्हटलं मी? मी आपलं बोलून दाखविलं.'

तुकाबाईंच्या चेहऱ्यावर मंद स्मिताची लाट उमटली.

राजा बोले, दळ हाले, तशी हां हां म्हणता सोयरीक ठरली. मोठ्या धूमधडाक्याने लग्नाचा बार उडाला. सुवर्णअंबारीतून नवरानवरीची वरात काढली. तोफांच्या, बंदुकांच्या आवाजांनी सारे बंगळूर शहर दुमदुमून गेले. शहाजीराजांची इच्छा पूर्ण झाली.

शहाजीराजांचा सारा थाट ऐश्वर्यसंपन्न!

स्नान, पूजा-अर्चा, काव्यचर्चा, आयुधघराची पाहणी, लष्करतपासणी, बागबगीचे, रात्री नाचरंग, नृत्यगायन, शृंगार यांत शहाजीराजांचे दिवस जात. पहाटे भाटांच्या आवाजाने जागा झालेला वाडा मध्यरात्रीला शृंगार रसात झोपी जाई. या दोन्हींत दिवसरात्रीचा फरक होता. मोहिमा, मृगया सोडली, तर दिनक्रम हाच असे. शिवाजीला प्रत्येक गोष्टीचे नवल वाटे. वाड्यावर भेटायला येत, ते सरदार, मानकरी, शास्त्री असत. कोणी घोड्यावरून, कोणी पालखीतून आपल्या इतमामाने भेटायला येई. कुणाचे आगमन चौघड्यांच्या इशारतीने कळे, तर कुणाचे शिंगाच्या आवाजाने.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दोन प्रहरी शिवाजी जिजाऊंच्या जवळ बसले होते. तुकाबाई पण तेथेच होत्या. एकदम शिवाजीने विचारले,

‘आई, आपल्याकडे माणसं येतात, तशी इथं का येत नाहीत?’

दोघींनी शिवाजीकडे पाहिले. जिजाऊ म्हणाल्या,

‘काय म्हणतोस तू? अरे, इथं किती तरी सरदार, उमराव येतात.’

‘ते नव्हे. आपल्याकडे कसे पाटील येतात. नानू वस्ताद येतो. मावळे येतात.’

तुकाबाई छद्मी हसून म्हणाल्या, ‘शिवाजीराजे, हे महाराजांचे ठिकाण आहे. इथं तसली माणसं कशी येतील? राजांच्या घरी राजेच यायचे.’

‘राजे कुणाचे?’

‘प्रजेचे!’

‘मग ज्या राजाच्या घरी प्रजा जायला भिते, तो राजा कसला? रामायणात राम वनवासात निघाले, तर सारे त्यांना पोहोचवायला शहराबाहेर गेले. गुहकाला रामांनी मिठी मारली. तो खरा राजा ना, आई?’

तुकाबाईंचा चेहरा गंभीर झाला. जिजाबाई म्हणाल्या,

‘जा, खेळ जा बाहेर! बघ, दादा, एकोजीराजे कुठं आहेत, ते!’

शिवबा बाहेर गेला; पण त्याची शंका तशीच राहिली.

बंगळूरला शिवाजी इतके दिवस राहिला; पण त्याचे मन तिथे रमेना. नव्या नव्या गोष्टी दिसत होत्या; पण त्या साऱ्यांचा कंटाळा वाटत होता. शिवाजीराजांना आठवत होते पुणे. नजरेसमोर येत होते शिवापूरवाड्यात येणारे मावळे. पण हे सांगायचे कुणाला?

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सकाळी स्नान करून शिवाजी वडिलांच्या दर्शनाला गेला. पण महाली शहाजीराजे नव्हते. चौकशी करता ते वाड्याच्या बाहेर आहेत, असे कळले. शिवाजीराजे बाहेर धावले. वाड्याच्या दारातच शिवाजीराजांचे पाय थबकले.

बाहेरच्या पटांगणात दोन घोडी उभी होती. महाराज दोन्ही घोडी पाहत होते. आजूबाजूला दादोजी, संभाजी वगैरे मंडळी उभी होती. शिवाजीला पाहताच महाराज म्हणाले,

'या, राजे!'

शिवबा गेले. शहाजीराजांच्या पाया पडले. पंतांच्याकडे पाहत शहाजीराजे म्हणाले,

'आता छोटे राजेच परीक्षा करू देत. शिवबा, यांतलं उजवं जनावर कोणतं, ते सांगा.'

दोन्ही घोडे सारखे, एका उंचीचे, पांढरे शुभ्र. शिवाजीराजे तज्ज्ञासारखे घोड्यांभोवती फिरत होते. सारे कौतुकाने राजांच्याकडे पाहत होते. त्यांची ऐट निरखीत होते.

उजव्या घोड्याजवळ ते गेले. त्याच्या ओठाळीला हात लावीत असता शहाजीराजे म्हणाले,

'हं, राजे, चावेल!'

'हा चावणार नाही. हा चांगला घोडा आहे.'

अश्वपरीक्षेसाठी आणलेला महंमद आश्चर्यचकित झाला. तो म्हणाला,

'अल हम दुलील्लाह! उमर लहान, पण जानकारी केवढी!'

'राजे, तो घोडा काय वाईट आहे?'

'पायांत बेडी आहे. कपाळावर उतरंड आहे. केव्हा बुजेल, याचा नेम कुणी द्यावा?' राजांनी सांगितले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पंत, राजांना हे ज्ञान कसं?’

‘नेहमी पागेतच असतात राजे! घोड्यांवर भारी प्रेम आहे राजांचं!’

‘तेच लक्षण मोठं. आता आमचे शंभूराजे आहेत. संस्कृत सुरेख जाणतात, संस्कृत काव्य करतात, काव्यचर्चेत भाग घेतात; पण ही लक्षणं त्यांच्याजवळ नाहीत. शास्त्र्यांच्यामुळं सारी वळणं ब्राह्मणी बनली आहेत.’

संभाजीराजे लाजले. शिवाजीराजांना जवळ घेत महाराज म्हणाले,

‘राजे, आम्ही तुमच्या अश्वपरीक्षेवर निहायत फिदा आहोत. हा घोडा पसंत आहे, तर तुम्ही घ्या. आम्ही पागेत जातो, तेव्हा एक श्लोक म्हणत असतो... तुम्हांला संस्कृत येतं ना?’

‘हो, थोडं थोडं.’

‘चालेल! आम्ही सांगतो, तो श्लोक लक्षात ठेवायचा :

यस्याश्वा तस्य राज्यं यस्याश्वा तस्य मेदिनी
यस्याश्वा तस्य सौख्यं यस्याश्वा तस्य साम्राज्यम्।

‘लक्षात राहील? नाही राहिला, तर पाठ करून घेऊ. राजे! ज्यांच्या घरी हे ऐश्वर्य आहे, त्यांचंच राज्य अभेद्य असतं, हे विसरू नका.’ आणि पंतांच्याकडे वळून ते म्हणाले, ‘पंत, आज संध्याकाळी आमच्या शिवाजीराजांची दृष्ट काढायला सांगा. आमचीच दृष्ट लागायची त्यांना.’

रात्री एकोजींनी घोड्याचा हट्ट तुकाबाईंच्याकडे धरला. एकोजीला जवळ घेत जिजाबाईंच्याकडे पाहत तुकाबाई म्हणाल्या,

‘राजे, तुम्हांला घोडा कसा मिळणार! शिवाजीराजे लाडके, आणि तुम्ही सगळ्यांत धाकटे. तुमच्या नशिबी घोडा नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ते शब्द काळीज कातरीत गेले; पण जिजाबाई काही बोलल्या नाहीत.

रात्री जेवणे झाली. जिजाबाई महालात आल्या. शिवाजी, संभाजी या दोघांची शय्या मोकळी होती. रात्र पुष्कळ झाली होती. अशा रात्री जेवून ही मुले कोठे गेली, हे त्यांना समजेना. जिजाऊंनी नोकरांना दोघांना हुडकण्यासाठी पाठविले. जेव्हा ते दोघे आले, तेव्हा शिवाजीराजांची नजर चोरटी बनली होती. जिजाऊंनी विचारले,

‘कुठं सापडले हे दोघे?’

‘नाचमहालात गाणं चाललंय् न्हवं! तिथं स्वाऱ्या होत्या.’

‘नाचमहालात?’ जिजाबाई उद्गारल्या.

‘आत न्हवं; बाहिरच! चोरून आत बघत व्हते.’

‘जा तू.’

नोकर गेला. जिजाबाईंनी दोघांवरून नजर फिरविली. त्यांचा स्वर करडा बनला.

‘राजे, हे खरं?’

शिवबा काही बोलला नाही.

‘कुणाला विचारून गेला होता, राजे? सांगितलं नव्हतं, रात्री बाहेरच्या चौकात जायचं नाही, म्हणून?’

शिवाजीचा चेहरा गोरामोरा झाला. रडकुंडीच्या आवाजात तो म्हणाला,

‘दादामहाराज म्हणाले, चल, गंमत बघू या.’

‘अन् तुम्ही नाचगाणं... तेही चोरून... पाहायला गेलात! शरम वाटली नाही?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चढता आवाज ऐकून तुकाबाई आत आल्या. शिवाजी रडत होता. त्याला जवळ घेत त्या म्हणाल्या,

‘राणीसाहेब नाचगाणं पाहिलं, म्हणून काय झालं? राजांच्या मुलांनी हे पाहायचं नाही, तर कुणी?’

‘बाई, लहान असलीस, तरी हात जोडते. तू यात पडू नको.’

- आणि त्यांनी शिवाजीराजांना धरून ओढले.

‘उगीच लहान सहान गोष्टींवर कसलं रागवायचं? हे चालायचंच!’

‘हे तुम्हांला चालेल! आम्हांला ते परवडायचं नाही. मुलाचं वळण टिकायचं नाही.’

तुकाबाईही संतापल्या. त्या म्हणाल्या, ‘कळतात बोलणी! राणीसाहेब, एवढी काळजी वाटते, तर पोरांना मारण्यापेक्षा स्वारींनाच का सांगत नाही?’

‘खरंच सांगायला हवं.’ जिजाबाई खंबीरपणे म्हणाल्या, ‘ज्या घरात मूल वाढतं, तिथं कसं वागावं, हे मोठ्यांना कळायला हवं.’

तुकाबाई आल्या, तशा रागाने निघून गेल्या. शिवाजीराजे हुंदके देत झोपी गेले; पण डोळे पुसायला जिजाबाई गेल्या नाहीत.

दुसऱ्या दिवशी सारा दिवस तुकाबाई संधी शोधीत होत्या. सायंकाळी ती मिळाली. शहाजीराजे महालात आले. जिजाबाई, तुकाबाई, संभाजी, शिवाजी, एकोजी सारे होते. बोलता-बोलता शहाजीराजांनी विचारले,

‘आम्ही विसरलोच! काल शिवबांची कुणी दृष्ट काढली का?’

‘खुद्द थोरल्या राणीसाहेबांनीच काढली.’

‘आम्ही समजलो नाही.’ शहाजीराजे हसून म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेबांना इथलं वळण आवडत नाही. शिवाजीराजे या वातावरणात बिघडतील, असं त्यांना वाटतं.’

‘असं कोण म्हणतं?’

‘खुद्द राणीसाहेबच म्हणतात. शिवाजीराजे इथं राहायचे झाले, तर इकडून आपल्या सवयी बदलल्या गेल्या पाहिजेत, असं म्हणतात.’

‘मतलब?’ गंभीर होत महाराज म्हणाले.

‘काल नाचीच्या महालात शिवाजीराजे गाणं ऐकत होते.’

‘मग?’

‘ते बंद झालं पाहिजे, असा राणीसाहेबांचा आग्रह आहे.’

‘खरं?’ जिजाऊंच्यावर नजर रोखीत शहाजीराजांनी विचारले.

जिजाबाई काही बोलल्या नाहीत. तुकाबाई विजयाने पाहत होत्या. शहाजीराजे एकदम आसनावरून उठले. बाहेर जात असता ते म्हणाले,

‘आमच्या सवयी बदलणं कठीण! ते वयही आता राहिलं नाही. राणीसाहेबांना आमच्या सहवासात शिवाजीराजे बिघडतील, असं वाटत असेल, तर त्यांनी खुशाल त्यांना घेऊन जावं!’

महाराज निघून गेले. जिजाबाईंनी डोळ्यांना पदर लावला. तुकाबाई म्हणाल्या,

‘बघा, बाई! तुम्हीच म्हणालात सांगा, म्हणून.’

जिजाबाईंनी पुष्कळ विचार केला. तुकाबाईंचा वाढता कडवटपणा दिसत होता. एखाद्या दिवशी काही मोठे प्रकरण होऊन जाण्यापेक्षा आताच तो निर्णय केलेला बरा, असे जिजाबाईंना वाटले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एके दिवशी मन घट्ट करून त्यांनी शहाजीराजांना निर्णय सांगून टाकला.

शिवाजीराजे पुण्याला जाणार, हे साऱ्या वाड्यात पसरले. वर्ष-दीड वर्षाच्या काळात शहाजीराजांना शिवाजीचा लळा लागला होता. ते शिवाजीला शक्य तेवढे जवळ बाळगीत असत. सकाळी शिवाजीराजे पाया पडण्यासाठी आले असता महाराज म्हणाले,

'राजे, आता तुम्ही पुण्याला जाणार! आमची आठवण येईल ना?'

'आबासाहेब!' म्हणत शिवाजीराजे महाराजांना बिलगले.

'हां हां! राजे! पुरुष कधी रडतात का?' कंठ दाटून आल्याने शहाजीराजांचा स्वर घोगरा झाला होता. शेजारी दादोजी हे पाहत उभे होते.

शहाजीराजे म्हणाले,

'दादोजी, आम्हीदेखील पुण्याला येऊ लवकरच.'

'खरंच याल?' शिवबांनी हसत विचारले.

'अगदी खरं! आता तुम्ही जहागिरदार! तुम्ही आज्ञा केलीत, की आम्ही आलोच!'

'आमची कुठं आहे जहागीर?' शिवबांनी विचारले.

'मग आहे, ती कुणाची?'

'आपली.'

'राजे!' दादोजींनी दटावले.

शिवाजीराजे कावरेबावरे झाले. काय चुकले, हे त्यांना कळेना.

राजांना जवळ घेत शहाजीराजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘दादोजी, राजांचं खरं आहे. आपलं म्हटल्याखेरीज प्रेम निर्माण होत नाही. पंत, आपण मुलांना खेळायला घोडा देतो, बंदूक देतो, तलवार देतो, कशाकरिता? ती तयार व्हावी, म्हणून ना? मग जहागिरदार तयार करायचा झाला, तर जहागीर नको? पंत, आमच्या जहागिरीतला छत्तीस गावांचा मोकासा राजांच्या नावे आम्ही पूर्वीच केला आहे. नाव मात्र दप्तरी न राहता त्याचा अंमल सुरू करा. राजांच्या नावाची मुद्रा कागदोपत्री होऊ दे. राजे, ही जहागीर राखलीत, तर पुणे जहागीर तुमची!’

पंत म्हणाले, ‘राजे, पाया पडा! नशीब थोर, म्हणून असा पिता मिळाला. आमचं भाग्य थोर, म्हणून हे पाहायला मिळालं.’

शिवबांनी शहाजीराजांच्या पायांवर मस्तक ठेवले. त्यांना हृदयाशी कवटाळीत शहाजीराजे पंतांना म्हणाले,

‘पंत, या पोरानं वेड लावलं. उद्या हा गेला, म्हणजे करमायचं नाही. राजांना चांगलं वाढवलंत तुम्ही. आमच्या म्हातारपणाची ददात मिटविलीत.’ पंतांचे डोळे ओले झाले. उपरण्याने त्यांनी डोळे पुसले.

दुसऱ्या दिवशी शहाजीराजांच्या जहागिरीचा सारा तपशील तयार झाला. खास आपल्या विश्वासातील माणसे महाराजांनी शिवाजीराजांना दिली. पेशवे म्हणून शामराव नीळकंठ, नारोपंत दीक्षितांचे चुलतभाऊ बाळकृष्णपंत अमात्य म्हणून पाठविण्याचे ठरले. त्याखेरीज जहागिरीचे मुतालिक म्हणून दादोजीपंतांची नेमणूक होती, ती निराळीच.

शिवाजीराजांची परतण्याची तयारी होत होती. धीर करून जिजाबाईंनी शहाजीराजांना विचारले,

‘संभाजीला थोडे दिवस नेऊ का?’

‘नको! राणीसाहेब, संभाजी आमच्या वातावरणात वाढले. ते इथं रमलेत. राहू दे त्यांना तिथंच!’

‘आपला राग जाणार नाही का? रागाच्या भरात बोलून...!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्ही रागानं म्हणत नाही. आम्हांलाही तुमचा विचार पटला. म्हणूनच आम्ही शिवाजीराजांना पाठवतोय्. त्यांना पाहून आम्हांला आनंद झाला. आम्ही शंभूराजांना मोठे करतो. तुम्ही शिवाजीराजांना करा.’ आणि हसत जिजाऊंच्याकडे पाहत ते म्हणाले, ‘पाहू, कोण सरस ठरतं, ते!’

जायचा दिवस आला. भरल्या डोळ्यांनी जिजाबाईंनी साऱ्यांचा निरोप घेतला. शिवाजीराजे शहाजीराजांच्या पाया पडताच शहाजीराजांनी शिवाजीराजांना कवटाळले. त्यांच्या कपाळाचे चुंबन घेतले. ते दादोजींना म्हणाले,

‘पंत! राजांना संभाळा. त्यांना मोठं करा. आमची अमानत तुमच्या विश्वासावर तुमच्या हवाली करीत आहो. जीवमोलानं तिचा संभाळ करा.’

गावाबाहेर पहिल्या मुक्कामापर्यंत संभाजीराजे जिजाऊंना पोहोचवायला आले होते. दुसऱ्या दिवशी पहाटे जिजाबाई काफिल्यासह पुण्याची वाटचाल करू लागल्या. संभाजी अश्वपथकासह बंगळुरी परत गेले.

□

१२

बंगळुराहून राजे पुण्याला आले. साऱ्या मावळात ती बातमी पसरली. जो तो शिवाजीराजांना भेटायला येत होता. पाटील, कुलकर्णी, देसाई, देशपांडे, देशमुख सारे येऊन भेटून जात होते. राजे तेच होते. थोडे मोठे झालेले. बदल पडला होता फक्त फडात. पूर्वी नुसते कारकून दिसत. आता फडाला भारदस्तपणा आला होता, आदब आली होती. कारण दप्तरी आता पेशवे, डबीर, अमात्य होते.

दीड वर्षाच्या कालावधीनंतर पुण्याला आल्यामुळे या कालखंडात घडलेल्या गोष्टी दादोजी नऱ्हेकरांच्याकडून समजावून घेत होते. दप्तरतपासणीत ते मग्न झाले होते. बाहेरच्या कारभाराबरोबर शिवाजीराजांना दादोजी फडातही सक्तीने गुंतवीत होते; पत्रव्यवहार, कारभार पाहायला लावीत होते.

राजे स्नान व देवाला नमस्कार करून आले. जिजाबाई वाट पाहत होत्या. मासाहेबांच्या
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाया पडून ते पाटावर बसले; आणि दुधाचा पेला त्यांनी ओठी लावला. दूध पिऊन होताच जिजाबाई म्हणाल्या,

'राजे, आता उठा! नाही तर दप्तरी उशीर केल्याबद्दल दादोजी दोष देतील.'

तोच नोकर आला. त्याने वर्दी दिली, 'मुधोजीराव निंबाळकर आले आहेत.'

शिवाजीराजे गडबडीने उठले. बाहेर जाऊ लागले. जिजाबाई म्हणाल्या,

'राजे, मुधोजीराव आपले सासरे. उघड्या डोक्यानं सामोरे जाऊ नका.'

महाली जाऊन, पागोटे घालून, शिवाजीराजे बाहेर गेले.

'या, राजे! काय म्हणतं बंगळूर?' मुधोजीरावांनी विचारले.

राजे हसले. जिजाबाई दाराशी येताच मुधोजीराव उठले. मुजरा केला. जिजाऊंनी विचारले,

'मामासाहेब, आपण आलात. आमची सून नाही आणलीत?'

'आणली तर! नाही तर राजे रागावतील ना!' मुधोजीराव म्हणाले, 'राणीसाहेब, तो पाहा, मेणा आलाच.'

वाड्याच्या दारासमोर मेणा थांबताच दासी धावल्या. दादोजी पगडी, उपरणे सावरून पायऱ्या उतरले. पायांवर पाणी घेऊन सईबाई वाड्यात आल्या. नेसलेल्या लुगड्याने सारा डौल बदलला होता. वय लहान असूनही त्या डौलात येत होत्या. साऱ्यांवरून नजर फिरत होती. झडणाऱ्या मुजऱ्यांचा त्या स्वीकार करीत होत्या. दादोजींनी केलेल्या मुजऱ्याचा स्वीकार त्याच हास्यवदनाने त्यांनी केला. वाड्याच्या प्रथम सदरेत त्या आल्या. दाराशी उभ्या असलेल्या जिजाऊंच्या त्या पाया पडल्या. जेथे दादोजी होते, तेथे जाऊन त्यांनी त्रिवार नमस्कार केला आणि त्या परत जिजाबाईंच्याकडे आल्या. जिजाबाई तिचा गालगुच्चा घेत म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘भारीच पोक्त झालीस, हो! आणि नवऱ्याच्या कुणी पाया पडायचं?’

आणलेला भाव कुठच्या कुठे गेला. सईबाई खुदकन हसल्या, आणि जिजाऊंना बिलगल्या. जिजाऊ तिला कुरवाळीत म्हणाल्या,

‘आता कशी शहाणी झालीस! पण भारी ऐट करू नको. राजांनी बंगळूरला दुसरी बायको केली.’

‘करू द्या.’

‘तुझ्यापेक्षा छान आहे. गोरी गोमटी आहे.’

‘असू दे! माझ्याबरोबर खेळायला येईल ती.’

सारे हसले. मुधोजीरावांना जिजाबाई म्हणाल्या,

‘खरंच, मोठी राणी शोभणार ही!’

दोन दिवसांनी मुधोजीराव सईबाईंना सोडून निघून गेले. सईबाई वाड्यात रमली. सईबाईंच्या भोवती पुण्यातल्या मुली गोळा होत होत्या. सईबाईंचा खेळ वाड्यात रंगत होता.

दुपार टळली होती. सईबाई मासाहेबांच्याकडे आल्या. मासाहेबांनी वर पाहताच त्या म्हणाल्या,

‘मामीसाहेब!’

‘थोबाड फोडून देईन, पुन्हा ‘मामीसाहेब’ म्हटलंस, तर.’

सईबाई हसल्या. त्या म्हणाल्या,

‘मासाहेब!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हसू लपवीत जिजाबाई म्हणाल्या, ‘काय पाहिजे आता? सई! अग, लौकर मोठी हो. तू आणि तुझ्या पोरी सारं घर डोक्यावर घेता. सासरी हे वागणं बरं नव्हे.’

सईबाई हिरमुसल्या होऊन वळल्या. जिजाबाई ओरडल्या,

‘ये! मागे फीर.’

सईबाई वळल्या. मासाहेबांनी विचारले,

‘का आली होतीस?’

‘आज शुक्रवार. जोगेश्वरीला जाऊन येऊ का, म्हणून...’

‘मग जा ना! पंतांना सांग जा...’

सईबाई धावत गेल्या. दादोजी काही तरी लिहीत होते. सईबाईंना पाहताच दादोजींनी विचारले,

‘राणीसाहेब! काय हुकूम?’

‘अशानं आम्ही बोलणार नाही.’ सईबाई म्हणाल्या.

‘खरंच, तुम्ही राणीसाहेब! आता त्या मासाहेब आणि तुम्ही राणीसाहेब.’

‘पंत, आम्ही देवाला जाऊ?’

‘जरूर! मी मेण्याची व्यवस्था करतो.’

संध्याकाळी सईबाई दासी-मैत्रिणींसह जोगेश्वरीला गेल्या.

नवरात्र जवळ आले. घट बसले. वाड्याच्या चौकात दरदरोज बकरे पडत होते. नवरात्राचे दिवस केवढे धामधुमीचे. राजांना सर्व देवदेवतांना जाऊन यावे लागे. दररोज

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सकाळी स्नान झाल्यावर राजे सजविलेल्या घोड्यावर स्वार होऊन गणपती, जोगेश्वरी, महादेव ही सारी मंदिरे फिरून येत. वाड्यात तर एकच गडबड उडालेली असे. नवरात्र जवळ आले, की सारी शस्त्रे धुऊन, पुसून, उजळून चकचकीत केली जात. मीठ आणि चिंचेचे बोळे घेऊन तलवारी, जंबिये, विटे साफ केले जात. घटस्थापनेच्या दिवशी खास सदरेवर सारी शस्त्रे पूजेला ओळीने लाविलेली असत. एका ठिकाणी गोळा झालेली ती नानाविध शस्त्रे पाहण्यात राजांना मौज वाटे. त्यांत नाना तऱ्हेच्या तलवारी, फिरंग, पट्टे, विटा, भाले, ढाली, जंबिये, बिचवे, कट्यारी असत. त्यांच्या जोडीला जमदाड, सांग, खांडा यांसारखी अनेक हत्यारे सदरेवर यायची. त्यांचे देखणेपण, त्यांचा बोज राजे समजावून घेत.

वाड्याच्या देव्हाऱ्यात सुवर्णसमया अखंड तेवत असत. त्यांच्या सौम्य प्रकाशात अष्टभुजेची मूर्ती उजळून निघत असे. देवीच्या समोर उजव्या बाजूला घटस्थापना केलेली असे. दररोज एक खाऊच्या पानांची माळ वर बांधली जात असे. उलटणाऱ्या दिवसांबरोबर घटाच्या कडेने कोंब उगवायला लागत. नवरात्र संपेपर्यंत ते चांगलेच वर येत.

नवरात्रात दररोज रात्री वाड्यात चौकामध्ये गोंधळ उभा राही. 'उदे, ग! अंबे, उदे!' च्या घोषाने वातावरण भरून जाई. दाटीवाटीने सारे गोंधळ ऐकायला जमत. गळ्यात कवड्यांची माळ घातलेले, तेल माखून घेतलेले भुत्ये आपले फेटे सावरीत हाती संबळ घेऊन उभे राहत. सुरुवातीला पोत खेळविला जाई. राजांना पोत भारी आवडत. पोत नाचायला सारे उतरले, की पोतांच्या हेलकाव्याबरोबर जी फरफर घुमे, ती ऐकण्यात राजे रंगून जात.

खंडेनवमीला सकाळी वाजत गाजत घोडा दाराशी येई. दाराच्या उंबऱ्यात बकऱ्याचा बळी पडे; आणि रक्त ओलांडून घोडा डौलाने वाड्यात प्रवेश करी. नऊ दिवस पूजेत राहिलेली आपली छोटी तलवार राजे मस्तकाला लावून बाहेर काढीत.

सायंकाळी चांगले कपडे करून राजे जिजाबाईंच्याकडे गेले. राजांच्या गालाला तीट लावीत जिजाबाई म्हणाल्या,

'राजे, आता फार दिवस हे सीमोल्लंघन चालायचं नाही.'

'मग काय करायचं?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘या दिवशी पराक्रमाला बाहेर पडायचं. शत्रूचा बीमोड करायचा. घर यशानं भरायचं. पाठीवर लक्ष्मी घेऊन यायचं.’

‘आम्ही तसंच करू.’

राजे सोने लुटायला बाहेर पडले. वाड्यासमोर राजांचा दागिन्यांनी सजविलेला घोडा उभा होता. राजांनी घोड्यावर मांड टाकली. राजांच्या बरोबर दादोजीही जात होते. मागे-पुढे घोडेस्वार चालत होते. सोन्याच्या माळावर येऊन घोडी थांबली. उपाध्याय आधीच हजर झाले होते. शमी वृक्षाची राजांनी पूजा केली; आपल्या तलवारीने सोने पाडले; आणि वाजत गाजत ते घरी आले. वाड्याच्या दरवाज्यात सईबाईंनी ओवाळले. राजे वाड्यात प्रवेश करते झाले.

राजे देवघरात गेले. उंबरठ्याजवळ जिजाबाईंनी राजांना उभे केले. राजांची पाठ उंबरठ्याकडे होती. उंबऱ्यावर शेला झाकला होता. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, आता मागे न पाहता उंबऱ्यावर तलवार चालवा.’

राजांनी तलवार उपसली. मागे न पाहता उंबऱ्यावर ओढली. राजांनी विचारले,

‘झालं?’

‘हो!’

राजे वळले. जिजाबाईंनी शेला उचलला. उंबऱ्यावर तांदूळ पसरले होते. त्यांतील सुवर्णाची अंगठी जिजाबाईंनी उचलली, आणि राजांच्या मस्तकी लावली. राजांनी विचारले,

‘मासाहेब, ही अंगठी का ठेवली?’

‘राजे, ही अंगठी नाही; ही लक्ष्मी आहे. तुम्ही सोनं लुटून आलात ना! तुमच्या मागून लक्ष्मी येते. पण तिला पाहायचं नसतं. तिला मागे न पाहता घरात घ्यायचं असतं. घरात आली, की तिचा पाय तोडायचा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'पाय तोडायचा?' राजे उद्गारले.

'हो! एकदा का तिला लंगडी केली, की घराबाहेर कशी जाईल?'

राजे हसले.

जिजाबाई म्हणाल्या, 'राजे, आता तुम्ही लहान नाही. नेहमी लक्षात ठेवा, लक्ष्मीमागे धावून लक्ष्मी कधी प्रसन्न होत नसते. ती कर्तृत्ववान माणसाच्या पाठीमागून आपोआप येत असते. लक्ष्मी नेहमी पाठीशी ठेवावी; आणि संकटे समोर बघावीत. हे विसरू नका.... दादोजी वाट पाहत असतील. सदरेत जा.'

राजांनी जिजाबाईंना वंदन केले; आणि राजे सदरेत गेले.

सदर खास शृंगारली होती. बैठकीच्या उजव्या बाजूला वस्त्राच्छादित तबके ठेवली होती. राजे बसताच प्रथम ब्राह्मण मंडळी आली. राजांनी उभे राहून त्यांचे सोने घेतले. दादोजी राजांच्या हातात नाणे देत होते. राजे ते वाटीत होते. फडातले दप्तरदार आले. पाटील, वतनदार आले. त्यानंतर पागेचे अधिकारी, नोकर आले. घराचे नोकर झाले. राजांनी उठून दादोजींच्या पायी मस्तक ठेवले. दादोजींनी राजांना कवटाळले.

जिजाबाई म्हणाल्या, 'राजे, दादोजींना मोहरा नाही दिल्या?'

दादोजी राजांना जवळ घेत म्हणाले,

'मासाहेब, ही मोहर माझीच आहे. यापरतं भाग्य नाही.'

□

१३

राजे दादोजींच्या बरोबर मावळ फिरत होते. वाड्यात दप्तर पाहत होते; पायरीवर आलेला न्याय जिजाबाईंनी गोतमुखाने सोडविलेला पाहत होते. वाड्यात कीर्तनकार येत होते; भजनी लोक येत होते. भजन-कीर्तनांत राजांचा जीव रमून जाई. एखाद्या शाहिराचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पोवाडा ऐकत असता अंगात वीरश्री संचरे. खरा कंटाळा येई, तो दादोजींच्या बरोबर मावळ फिरण्याचा. जहागिरीवर थोर माणसांच्या बरोबर फिरण्यात त्यांचे मन थकत असे.

सकाळी दादोजींनी राजांना सांगितले, 'राजे आज नाणेमावळात जायला हवं.'

'परत केव्हा येणार?' जिजाऊंनी विचारले.

'पाच-सहा दिवस तरी मोडतील. पुष्कळ हिशेब राहिला आहे.'

राजे नाराजीने दादोजींच्याकडे पाहत होते. दादोजींच्या ते लक्षात आले. ते म्हणाले,

'पाहा, राजे! जहागीर तुमची. मोठ्या राजांच्याकडून हौसेने ती घेतलीत. आधीच तंट्याबखेड्यांनी भरलेली. मालकाशिवाय रेटणार कशी? तुम्हांला कंटाळा येत असेल, तर तसं सांगा. मी महाराजसाहेबांना कळवून टाकतो.'

ती मात्रा बरोबर लागू पडत असे. शिवाजीराजे आपोआप घोड्यावर स्वार होत. मावळात फिरत असता राजांचे लक्ष मुलुखात उठलेल्या, आकाशाला टेकलेल्या गडांच्याकडे जायचे. ते पंतांना विचारायचे,

'पंत, हे गड कुणाचे?'

'आदिलशाहीचे.'

'जहागीर आमची, आणि गड त्यांचे कसे?'

'राजे, जहागीर म्हणजे मालकी नव्हे. फक्त वसुलाचा हक्क तुम्हांला. पण सत्ता आदिलशाहीचीच!'

मावळात शिवाजीराजांचा दरारा खूप होता. त्यांच्या नावाला फार मान होता. दादोजींच्या बरोबर आलेले शहाजीपुत्र पाहताच साऱ्यांच्या माना झुकत होत्या. देशमुख प्रेमाने वळत होते. प्रजेला राजा पाहायला मिळत होता. त्यांच्या सुखदुःखांना वाचा फुटत होती. सामोपचाराबरोबरच प्रसंगी दंडनीतीचादेखील दादोजी वापर करतात, हे राजे पाहत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गुंडगिरी, अरेरावी करणाऱ्या बांदल देशमुखांना जबर शिक्षा केल्यामुळे मुलुखाचा वाढलेला आदर राजांच्या ध्यानी येत होता.

वाड्याच्या पुढच्या चौकसदरेवर राजे एकटेच बसले होते. मागे मासाहेब उभ्या होत्या. त्या केव्हा आल्या, हे शिवबांना कळले नाही. जिजाबाईंनी विचारले,

‘राजे, एवढं टक लावून काय पाहता?’

नजर न काढता राजे म्हणाले,

‘मासाहेब, मुंग्या किडा पकडून नेताहेत, ते पाहतो आहे.’

‘मग त्यात काय एवढं पाहायचं?’

‘केवढा मोठा किडा आहे! मघापासून पाहतो आहे. किडा जिवंत आहे. सुटण्यासाठी धडपडतो आहे. पण छोट्या मुंग्यांपुढं काही चालत नाही. चारी बाजूंनी जेर केलंय् त्याला.’

जिजाबाईंचे उत्तर आले नाही. राजांनी मागे पाहिले. जिजाबाई आत गेल्या होत्या.

राजांची नजर दरवाज्याकडे गेली. एक इसम येत होता. सावळा, उंचापुरा. चेहरा तुकतुकीत होता. डोळ्यांत हसू होते. काढणी बांधली, तर श्वासाबरोबर तुटेल, अशी छाती होती. गुडघ्यापर्यंत धोतर होते. अंगात भरड्या वस्त्राची बंडी होती. बंडीचा डावा खांदा फाटून तिच्या चिंध्या झाल्या होत्या. खांदा जखमी होता. रक्ताचे ओघळ पंज्यापर्यंत येऊन हातावर वाळले होते; पण वेदनेचा लवलेश चेहऱ्यावर नव्हता. हातातली जाडजूड भरीव काठी पेलीत तो आत आला.

त्याने चौकात नजर टाकली. शिवाजीला पाहताच मुजरा करून तो म्हणाला,

‘राम राम! शिवाजीराजांचा हाच वाडा न्हवं?’

‘होय. का?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काम व्हतं.’

‘वरती ये!’ राजांनी फर्मावले.

‘आँ?’

शांतपणे राजे म्हणाले, ‘वरती ये.’

बिचकत तो इसम वर आला.

‘बैस.’

‘पन...’

‘बैस, म्हणतो ना!’

राजांची नजर पाहताच तो बसला. शिवाजीराजे उठले. त्यांनी काही न बोलता त्याचा हात पाहिला; आणि ते ओरडले,

‘कोण आहे तिकडे?’

चारी वाटांनी हुजरे धावले. प्रथम आलेल्याला राजे म्हणाले,

‘देवडीवरचे कुठं गेले? जा, वैद्यांना ताबडतोब बोलावून आण.’

नोकर गेला. राजांनी विचारले,

‘नाव काय तुझं?’

‘भीमा. लव्हार हाय मी.’ चूक सुधारीत भीमा म्हणाला, ‘....सरकार.’

एव्हाना दादोजीही उठून बाहेर आले. राजांनी भीमाला विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘का आला होतास?’

‘सांगू का? मी ह्या मुलुखाचा न्हवं. आमी तिकडचं.... साताऱ्याचं. दुस्काळ पडला, तवा मुलूख सोडून मोगलाईत गेलोतो. वाटंनं येत हुतो. रान हुतं. आन् आलं की अंगावर.’

‘कोण?’ राजांनी विचारले.

‘लांडगं, वंऽऽ... चुकलो, सरकार!’

‘मग?’

‘तीन हुते. आडरानात एकटा माणूस मी. हातात निस्ती काठी. करनार काय? घेतलं देवाचं नाव, आन् म्होरं आलंल्यावर हानली काठी. ते धूड मागं कोलमडलं. उरलेलं मागं ठिसकत सरकलं. पर जनावर भारी. तसंच उठलं, आन् घेतली उडी. डाव्या रट्ट्यानं रेटीपातूर बावळा काढला भडव्यानं! डोस्कंच फिरलं. मुस्काट बघून एकच काठी हानली. उठलंच न्हाई!’

‘आणि दुसरे लांडगे?’

‘म्होरक्या पडल्यावर कशाला ऱ्हात्यात?’

राजे कौतुकानं ऐकत होते. त्यांना गंमत वाटत होती.

‘पण तू इकडं कसा?’ राजांनी विचारले.

‘आयला.... ते ऱ्हायलंच की! तिथनं वाट सुदरली. वाटंनं येत हुतो, तर दोन मानसं भेटली. तुमांवानीच त्यांनी बी इचारलं, बावळ्याला काय झालं, म्हनून. म्या सांगितलं. तर ते म्हनले, ‘अरं, लांडग्याची शेपटी का आनली न्हाईस?’ म्या म्हनलं, ‘कशाला?’ तर ते म्हनले, ‘अरे, येड्या! लांडगा मारला, आन् शेपटी दावली, तर शिवाजीचा बामन बक्षीस देतो.’ ’

साऱ्यांची नजर दादोजींच्याकडे गेली. दादोजी हसत होते. भीमा सांगत होता,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘परमुलुखाचा म्या. मला काय ठावं? तसाच माघारी गेलो, आन् शेपटी आनली. ही घ्या.’ म्हणत कमरेला खोवलेली झुपकेदार शेपटी त्याने समोर टाकली.

लांडग्यांचा उपद्रव थांबविण्यासाठी दादोजींनी ही बक्षिसाची प्रथा ठेवली होती, हे साऱ्या मावळात प्रसिद्ध होते. वैद्य आले. त्यांनी भीमाच्या जखमेला औषधं लाविली. औषध लावीत असता त्याने विचारले,

‘शिवाजीराजं म्हंत्यात, ते तुमीच?’

‘हो, का?’

‘काय न्हाय. लई बोलवा ऐकली हुती. मला वाटलं, कुनी तरी जानता मानूस असंल.’

सारा वाडा हसला.

दादोजींनी सांगितले,

‘कुलकर्णी, याला दप्तरी घेऊन जा; आणि याचं बक्षीस द्या.’

‘थांबा.’ राजे म्हणाले. राजे उठून आत गेले. जेव्हा ते बाहेर आले, तेव्हा त्यांच्या हातात एक तलवार होती. भीमाला ती देत राजे म्हणाले,

‘भीमा, नशीब तुझं, म्हणून काठीवर भागलं. ही तलवार जवळ राहू दे.’

भीमाने तलवार हाती घेतली. पान बघत तो म्हणाला,

‘रामपुरी दिसते.’

‘तुला यातलं कळतं?’ राजांनी विचारले.

‘म्हंजे? धंदाच न्हवं माझा? हेच करत आलो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आता कुठं जाणार?’

‘पोट भरंल, तिकडं.’

‘इथं राहतोस?’

‘ऱ्हाईन की! काम सांगा.’

‘तुला लोहारशाळा देतो. करशील?’

भीमाने राजांचे पाय धरले. ‘लई उपकार हुतील, सरकार!’

‘सोनोपंत!’ राजे सोनोपंताच्याकडे वळून म्हणाले, ‘याला लोहारशाळा काढून द्या.’

सोनोपंतांनी दादोजींकडे पाहिले. दादोजी म्हणाले,

‘सोनोपंत, राजाज्ञा झाली. वाट कसली पाहता?’

‘आज्ञा!’ म्हणत सोनोपंत भीमाला घेऊन गेले.

सारे पांगले.

राजे एकटे असता दादोजी म्हणाले,

‘राजे, एवढ्या तडकाफडकी माणसं नेमायची नसतात. तो परका माणूस! कोण, कुठला, काय, सांगता येत नाही.’

‘पंत, संधी मिळाली, तर कळणार ना? हात बळकट आहेत. कष्टाळू आहेत. छाती निधडी आहे. पोलादाची जात सहज ओळखता येते. बस्स! आणखी काय हवं? संधी दिली आहे, मगदूर आपोआप कळेल.’

दादोजी कौतुकाने ऐकत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संध्याकाळी जिजाऊंच्या दर्शनाला गेले असता दादोजी जिजाऊंना म्हणाले,

‘मासाहेब, राजांची नजर तयार होत आहे. भीमाची पारख किती चटकन केली!’

‘मलाही कौतुक वाटतं. माणसं बरोबर हेरतो.’

‘हेही राजलक्षणच! पाहून येतं, तेवढं शिकून येत नाही, म्हणतात, ते काही खोटं नाही.’

ते ऐकून जिजाबाईंना आनंद वाटत होता. दादोजींच्याकडून अशी उघड स्तुती फार क्वचित ऐकायला मिळत असे. दादोजी म्हणाले,

‘मासाहेब, सोलापुराहून एक शाहीर आला आहे. आज्ञा असेल, तर वाड्यात कवन करावं, असं म्हणतो.’

‘जरूर! राजांना पोवाड्याची फार हौस आहे. रात्री आम्ही पोवाडा ऐकू.’

रात्री पलित्यांच्या उजेडात वाड्याचा प्रथम चौक उजळला होता. चौकात दाटीवाटीने माणसे बसली होती. सदरेत खास बैठक अंथरली होती. शाहीर वाड्याच्या धुमीजवळ आपले कडे तापवीत बसला होता. साथीदार तुणतुणे, डफ, टाळ जुळवीत होते. खाशा स्वाऱ्यांनी बैठक सजली. मुजरे झडले. बैठकीच्या उजव्या बाजूला दादोजी, अमात्य, डबीर ही मंडळी बसली होती. बैठकीवरच्या डाव्या हाताला दादोजींची मंडळी, ब्राह्मण स्त्रिया. त्यांच्या पलीकडे मराठा स्त्रिया बसल्या होत्या.

शाहीर चौकात आला. त्याने व त्याच्या साथीदारांनी मुजरा केला. डफावर थाप पडली. तुणतुण्याने लय धरली, टाळ खणखणू लागले. आणि होती, ती बारीक कुजबूजही थांबली. मुजरा करून शाहिराने नमनाला तोंड घातले:

आदि नमोनी गणरायाला देवि भवानीला
मुजरे करितो जिजाऊ माते, बाळ शिवाजीला।
मर्दांचे गाइले पवाडे आजवर कैकांनी
ऐका आता स्त्रीजातीच्या शौर्याची कहाणी।

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रजपुतरमणी राणि पद्मिनी अनुपरूपखाणी
चितोडगडचे नाव गाजवी थोर तिची करणी
लक्ष्मणसिंग राणा चितोडाचा
भीमसिंग त्याचा। चुलता नात्याचा
शोभली उमा शंकरा
जानकी रामा रघुवीरा
की रंभा शोभे सुरवरा
भिमसिंगाला तशी पद्मिनी चितोडची राणी
रजपुतवंशा धन्य करी ती, धन्य तिची करणी।।१।।

शाहीर नमन करून पोवाडा गात होता. विषय होता राणी पद्मिनीचा. चितोडची ही रूपसंपन्न राणी उपजतच स्वाभिमान घेऊन जन्मलेली. तिच्या राज्यात कोणी उपाशी नव्हता, दु:खी नव्हता. भीमसिंग-पद्मिनीची जोडी चितोडच्या राज्यात लक्ष्मीनारायणांसारखी शोभत होती.

शुक्राची चांदणी पद्मिनी स्वरूपाची मूर्ती
रूपगुणांची तिच्या पसरली जगावरी कीर्ती।
अल्लाउद्दिन खिलजि माजला होता शिरजोर
पद्मिनीची कीर्ती गेली त्याच्या कानांवर।
'खुबसुरती का अजब खजाना जरूर देखूँ तो'
मनात मांडे खात गडावर चाल करून ये तो।।

पद्मिनीच्या रूपाची कीर्ती अल्लाउद्दीन खिलजीच्या कानांवर गेली. ते अलौकिक सौंदर्य पाहण्यासाठी तो बेचैन झाला. पापी वासनेने पछाडलेल्या अल्लाउद्दिनाने चितोडवर हल्ला केला. सुखासमाधानांत वावरणारी चितोडची भूमी रक्ताने न्हाऊन निघाली. भीमसिंग चितोडचे रक्षण करण्यासाठी पराकाष्ठा करीत होता; पण दैवात यश लिहिले नव्हते. भीमसिंग अल्लाउद्दिनाच्या हाती सापडला. पद्मिनीचे कुंकू धोक्यात आले. अल्लाउद्दिनाने पद्मिनीला पाहण्याचा हट्ट धरला. कुंकू राखण्यासाठी पद्मिनी त्यालाही तयार झाली. अल्लाउद्दीन महालात आला. त्याचे पापी डोळे अधीर झाले होते; पडदा सरकवला गेला... आणि अल्लाउद्दिनाची नजर पडद्यामागे ठेवलेल्या आरशावर गेली. स्वप्न अवतरावे, तसे हळूहळू त्याला पद्मिनीचे दर्शन घडले. ते असामान्य लावण्य पाहून अल्लाउद्दीन पाघळला;

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वचन विसरला. भीमसिंग तर सुटलाच नाही; पण अल्लाउद्दिनाने सरळ पद्मिनीला मागणी घातली. मागणी कोण मान्य करणार? संतापाने बेभान झालेल्या अल्लाउद्दिनाने हल्ला केला. पण त्याला रजपुतांचा स्वाभिमान माहीत नव्हता.

भडकला खिलजी अनिवार
उलटे तलवार। चितोडगडावर
कत्तल केली त्याने सर्रास
बुरुजाबुरुजावर प्रेतांची रास
गड रुधिरानं न्हाला समयास।। जी।।
झाला विजय क्रूर म्लेंच्छाचा
दुष्ट खिलजीचा। अधम वासनेचा
पराजित पातिव्रत्य होई
पुण्याला पाप शह देई
सत्याचा बळी असत् होई।। जी ।।
पद्मिनीने वक्त जाणला
पराजय झाला। जरी समराला
रजपुत बाणा कोण जितणार?
खिलजीला नखहि नाही दिसणार
जाहली सिद्ध करण्या जोहार।। २।।

पोवाडा ऐकत असता राजांचे डोळे अश्रूंनी भरत होते; जीव गुदमरत होता. शाहीर सांगत होता...

सौंदर्याने सीमा गाठली अंतिम शौर्याची
धडधडत्या अग्नीत मिसळली ज्योत पद्मिनीची।
तिच्या संगती रजपुत नारी करिती जोहार
सद्धर्माचा विजय एका परि खिलजीची हार।
पद्मिनीवाणी अगणित आज भगिनी बळी जाती
म्लेंच्छ माजला, धाय मोकलुन रडे बघा धरती।।
पुरुषार्थ पार लोपला
गोरगरिबाला । आयाबहिणीला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कुणी आज वाली ना उरला
का, रे, देवा डोळा झाकला?
चितोडचा जोहार व्यर्थ का गेला?
गुलामगिरीचं जगणं नव्हे हे जितं कलेवर
पराक्रम पुरुषात दिसेना काय गाऊ म्होरं?।। ५ ।।

राजांना पुढचे ऐकणे अशक्य झाले. ते तसेच उठून आत गेले. पाठोपाठ जिजाबाई गेल्या. राजे पाठमोरे झाले. डोळे टिपीत होते. मागून आवाज आला,

'का, राजे, का आलात?'

राजे वळले. सारा चेहरा फुलला होता. डोळे भरून आले होते. मुठी वळल्या होत्या. राजे म्हणाले,

'मासाहेब, आम्हांला असले पोवाडे ऐकवत नाहीत. फत्तराच्या काळजाचा माणूसदेखील हे ऐकू शकणार नाही, सहन करू शकणार नाही!'

'सारं सहन करतो. खुद्द पद्मिनीनं सहन केलं नाही? माणसाइतकी निर्लज्ज जात या वालीद पृथ्वीतलावर दुसरी नसेल. चितोडच्या राणीचं असं झालं. दाहीरच्या राजकन्या खलिफाच्या जनानखान्यात कोंबल्या, तेव्हा कुणी अडवलं? पद्मिनीनं जोहार केला. सुटली बिचारी! पण अशा हजारो पद्मिनी आज नरकात कुजत पडल्या आहेत, देवाधर्माला मुकल्या आहेत. दुसऱ्यांचं कशाला? खुद्द माझी जाऊ गोदावरीस्नानाला गेली होती; तिला दिवसा ढवळ्या महाबतखानाने पळवून नेली. काय केलं आम्ही?'

'मग माणसं ओठावर मिशा बाळगतात कशाला?'

'बोलणं फार सोपं, राजे! ही माणसं, गावं, शहरं आहेत कुठं? एकदा उघड्या डोळ्यांनी पाहा.'

'हे थांबणार केव्हा?'

'थांबवणारा भेटेल, तेव्हा! आज थोर बलशाली आहेत, ते शाही कृपेवर तृप्त आहेत.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रजेला जुलुमाची सवय झाली आहे; ती पार हाडीमांसी खिळली आहे. नशीब तुमचं-आमचं, की एकाच वेळी एकच जेठाबाई ऐकायला मिळते. साऱ्या कथा एका वेळी कानांवर आल्या असत्या, तर....'

'मासाहेब, आम्ही ते बंद करू!'

'राजे, स्वप्नातले मनोरे भूतलावर दिसले असते, तर मग कशाला असं घडलं असतं? पुसा ते डोळे, आणि सदरेवर चला. मधून उठून जाणं बरं दिसत नाही. शाहिराचा हिरमोड होतो. पोवाडा संपेपर्यंत तुम्हांला बसायला हवं.'

राजे जिजाबाईंच्यासह परत बैठकीवर गेले.

□

१४

बरेच दिवस पद्मिनी राजांच्या मनात घोळत होती.

पदरी माणसे गोळा होत होती. मित्रपरिवार वाढत होता. त्यात गुंजवण्याचे येसाजी कंक होते; मोसे खोऱ्यातील बाजी पासलकर, नऱ्हेकरांचे बाळाजी चिमणाजी होते. कावजी कोंढाळकर, जिऊ महाला, वाघोजी तुपे, सूर्याजीराव काकडे यांसारखी लहान-थोर मंडळी होती. बाजी पासलकर तर साठीच्या घरातले उमराव; पण राजांशी त्यांची दाट मैत्री जमली होती. हे साथीदार घेऊन राजे आता स्वतंत्रपणे फेरफटक्याला जात होते. पूर्वी टापांचा आवाज ऐकताच 'मोगल आले' समजून रानाचा निवारा घेणारी माणसे आता टापांचा आवाज ऐकताच 'राजे आले' समजून धावत आडवी येत होती; बाळराजांना डोळे भरून पाहत होती.

राजे रांझ्यावरून असेच जात होते. थंडीचे दिवस होते. टापांचा आवाज डोंगरकपारींतून परतत होता. राजांच्या कानांवर अस्पष्ट हाक आली,

'राजेऽऽ'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घोड्यांचे लगाम खेचले गेले. परत तीच हाक आली. सारे चौफेर पाहत होते. येसाजी म्हणाला,

‘राजे! ते पाहा!’

शिवारातून एक इसम धावत येत होता. राजे पायउतार झाले. पळत येणाऱ्या त्या इसमाचा झोक जात होता. एकदा तर तो पडला; तसाच परत उठला, आणि राजांच्या रोखाने धावू लागला. तो इसम जवळ आला. माथ्यावर टक्कल. कडेने वाढलेले पांढरे केस. पांढरे कल्ले. चेहऱ्यावर सुरकुत्यांचे जाळे. धापा टाकीत तो इसम आला आणि उभ्या उभ्या राजांच्या पायांवर पडला. धाप, हुंदके यांनी त्याचे अंग हलत होते. येसाजीने त्याला उठविण्याचा प्रयत्न केला; पण मिठी सुटत नव्हती. राजांनी हाताने येसाजीला खुणावले. पायांची पकड हळू हळू ढिली होत होती. राजे म्हणाले,

‘उठा!’

तो सावकाश उठला.

‘काय झालं? न रडता सांगा.’

‘राजे, काय झालं नाही, म्हणून विचारा!’ परत त्याचे डोळे भरून आले. पुसून तो म्हणाला,

‘राजा, माझं वाटोळं झालं. माझी पोर नदीला पाणी भरायला गेली होती. तिला पळवली. बाटवली. माझ्या पोरीनं जीव दिला. राजा, पोरीविना पोरका झालो मी!’

‘हे कुणी केलं, माहीत आहे?’ राजांनी विचारले.

‘नसायला काय झालं? साऱ्या पाणवठ्यानं सारं पाहिलंय्. पन इचारनार कोन?’

‘कोण आहे तो?’

‘कुंपणानंच शेत खाल्लं, राजे! गावच्या पाटलानंच हे केलं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘थांबा इथंच... येसाजी, आम्ही इथं थांबतो. गावात जा, आणि पाटलांना इथं घेऊन या.’

येसाजीने घोड्यावर मांड टाकली. भरधाव वेगाने तो रांझ्याकडे दौडला. राजे त्या इसमाचे सांत्वन करीत होते, सारी माहिती काढून घेत होते. बऱ्याच वेळाने येसाजी आला, पण एकटा. त्याचा चेहरा गोरामोरा झाला होता.

‘काय झालं? पाटील भेटले नाहीत?’

‘भेटले.’

‘मग का आले नाहीत?’ राजांचा आवाज कठोर झाला.

येसाजीने ओठांवरून जीभ फिरविली. तो चाचरत म्हणाला,

‘पाटील मस्तवाल आहे. हुकूम सांगितला, तर तो म्हणाला... ‘जाऊन तुझ्या राजाला सांग, त्यो नावाचा राजा हाय, तसा मी नावाचा पाटील न्हाई, म्हनावं. गाव माझं. बटीक समजतो.’ ’

‘असं म्हणाले पाटील? व्वा!’ राजांच्या चेहऱ्यावर हास्य होते.

संतापाने भान हरपून बाजी म्हणाला,

‘येसाजी, आनी असला निरोप घेऊन आलास? कमरेची तलवार सोबेची हाय काय?’

‘बाजी, येसाजीनं केलं, तेच बरोबर! नाही तर मोगलाईत आणि आमच्यांत फरक काय?’

‘राजे!’ तो इसम हताश होऊन म्हणाला.

‘तुमचं नाव काय?’ राजांनी नजर वळवून विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘रामजी खोडे. याच गावचा मी.’

‘काळजी करू नका.... येसाजी, एक स्वार पायउतार करा. रामजींना संगती घ्या.’

रामजीसह सारे पुण्यात आले. वाड्यावर न जाता राजे सरळ पागेकडे गेले. राजांना अचानक आलेले पाहताच स्वार अदबीने गोळा झाले. राजे म्हणाले,

‘येसाजी, पन्नास स्वार घेऊन तुम्ही रांझ्याला जा. पाटलांच्या मुसक्या आवळून, त्यांना उद्या सकाळी आमच्या समोर हजर करा.’

येसाजीच्या चेहऱ्यावर हसू उमटले. येसाजी रामजीसह स्वारांचे पथक घेऊन रांझ्याकडे दौडू लागला.

सकाळी राजे नेहमीप्रमाणे उठले. स्नान झाले. राजे आपल्या महाली ठेवणीचे कपडे करीत होते. चुणीदार विजार घातली होती. अंगात कलाबुतीचा जामा होता. कमरपट्ट्यात बिचवा खोवला होता. कमरेला तलवार लटकाविली होती. दर्पणात पाहून त्यांनी आपला जिरेटोप मस्तकी घातला. कपाळी लावलेल्या गंधावर त्यांची नजर गेली; आणि ते हसले. महालात जिजाबाई उभ्या होत्या. राजांनी जाऊन त्यांचे पाय शिवले. आशीर्वाद देऊन त्यांनी विचारले,

‘काय गोंधळ घातलात, राजे? दादोजींनाही खबर नाही. सारा चौक भरून गेलाय्... आणि आज हे सणासुदीचे कपडे बरे?’

‘नावाचे का असेनात, पण राजाचे कपडे आहेत. ...चला, मासाहेब. आजचा गोंधळ फार मोठा आहे.’

खरेच चौक भरला होता. राजे जाताच मुजरे झाले. पंतांच्यासह सारी दप्तरीची माणसे गोळा झाली होती. राजांनी नजर फिरविली; आणि ते बैठकीवर वीरासन घालून बसले.

‘येसाजी, पाटलांना हजर करा!’

काढण्या लावून आणलेले पाटील चौकात पुढे ढकलले गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘रामजी, हेच ना पाटील?’

‘महाराज, हाच तो हरामखोर!’

‘राजेऽऽ’ पाटलाने भयभीत हाक मारली.

राजे हसले. ते म्हणाले, ‘पाटील. आम्ही नावाचे राजे असू. तुम्ही गावचे खरे पाटील असाल; पण आम्ही धरतीचे पुत्र आहोत. परस्त्रीला आम्ही आई, बहिणी म्हणून ओळखतो... प्रजेला बटीक समजत नाही!’ येसाजीकडे वळून त्यांनी विचारले, ‘घडला गुन्हा खरा?’

‘होय, महाराज!’

‘पाटील, प्रजा ही पोरासारखी! ती राखण्याकरिता पाटिलकी दिली... आणि प्रजेवर तुम्ही बलात्कार केलात? मुसलमानी सल्तनीचे रिवाज आमच्या मावळात पाळलेत? पाटील, जाब द्या!’

पाटील पुढे सरसावले. त्यांनी पंतांचे पाय धरले. म्हणाले,

‘पंत, मला न्याय द्या. गोतमुखानं मला न्याय हवा.’

‘राजेऽऽ’ पंत म्हणाले.

राजे पंतांच्याकडे नजर न वळविता म्हणाले, ‘पंत, तुम्ही यात लक्ष घालू नका.. ...पाटील, जरूर तुम्हांला गोतमुखानं न्याय मिळेल; पण अट आहे.’

‘कसली?’ आशेने पाटलाने विचारले.

‘कसली? रामजीच्या मुलीला उभी करा. तिलाही काही सांगायचं असेल.’

‘अन्याय आहे!’ पाटील ओरडला, ‘मेलेलं माणूस कधी उभं राहील का?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'बस्स!' राजे नजर रोखीत म्हणाले, 'पाटील, गोतमुखाचा न्याय किरकोळ सामान्यांकरिता असतो; तुमच्यासारख्या मातब्बर गुन्हेगारांकरिता नव्हे.'

'पंत, चुकलो! एक डाव माफी करा.'

'खामोश!' राजे संतापाने थरथरत उभे राहिले. 'ती पोर जेव्हा किंचाळली असेल, तेव्हा काय कान बहिरे झाले होते? येसाजी, या पाप्याचे हात आणि पाय तोडा. गाढवावर बसवून रांझण्यात नेऊन सोडा. गावचे पाटील आहेत ते! मानानं गावी गेले पाहिजेत. घेऊन जा... शिक्षेची अंमलबजावणी झाल्याचं ताबडतोब सांगायला या.'

आक्रोश करणाऱ्या पाटलांना नेले गेले. राजे महालात आले. पाठोपाठ जिजाबाई, दादोजी आले होते. जिजाऊंच्या अंगाला कापरा सुटला होता. पंत म्हणाले,

'राजे, एवढी कठोर शिक्षाऽऽ'

गर्रकन वळून राजे म्हणाले, 'पंत, मघा बोललो; क्षमा करा! बांदल देशमुख आम्हांला मानीत नव्हते, तर त्यांचे हात-पाय तुटले. शिक्षा कमी व्हायची होती, ती तिथं!'

'पण, शिवबा...!'

'मासाहेब, पद्मिनी आठवते? तुमच्या जाऊबाई आठवतात?... नाही, मासाहेब. हे आता थांबवलंच पाहिजे. आमचा नाइलाज आहे. हे होत नसेल, तर आम्हांला ही जहागीर नको, राजेपणा नको, काही नको! त्याची आम्हांला हौस नाही.'

शिवाजीराजे तसेच संतापाने निघून गेले. हतबुद्ध झालेल्या जिजाबाई म्हणाल्या,

'भलताच भडकतो!'

दादोजी डोळे टिपीत म्हणाले, 'मासाहेब, आज मी तृप्त आहे. हे पाहायला आज इथं थोरले महाराज हवे होते. आज शिवबा राजे शोभले. गजाननाला दंडवत घालून येतो.'

पाटलाचे हात-पाय तुटल्याची वार्ता साऱ्या मावळात पसरायला वेळ लागला नाही.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सारे राजांना धन्यवाद देत होते. पाटील-देशमुखांच्या तोंडचे पाणी पळाले होते.

-आता राजांच्या लहान वयाचा हिशेब कुणाच्या मनात राहिला नव्हता.

□

१५

‘मासाहेब!’ शिवाजीराजे महालात प्रवेश करीत म्हणाले, ‘आम्ही पहाटे रोहिडेश्वराच्या दर्शनाला जाणार आहो.’

संध्याकाळ होत आली होती. जिजाबाई म्हणाल्या, ‘राजे, संध्याकाळ होत आली. सकाळी तरी सांगायचं नाही? न्याहरी करायची केव्हा?’

‘दोन प्रहरीच ठरलं आमचं.’

‘दादोजी येताहेत?’

‘नाही.’

‘मग?’

‘बाजी, येसाजी, चिमणाजी, बाळाजी हे सारे आहेत.’

‘पंतांना सांगितलंत?’

‘हो. जा, म्हणाले.’

‘ठीक आहे. येणार केव्हा?’

‘परवा येऊ.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मुक्काम?’

‘नाचणीलाच करणार! बाजीचं घर आहे तिथं.’

‘त्यांच्या घरी राहणार?’

‘मग त्यात काय बिघडलं?’

‘त्यासाठी म्हणत नाही मी. पण, राजे, गरिबाचं घर. राजा घरी आला, तर पार धुऊन जातं. तुमचे लोक, अश्वपथक!’

‘मग नाचणीला स्वार सोडू! वर्दी देऊ!’

‘तोही गावाला भूर्दंडच ना?’

‘मग?’

‘काळजी करू नका, राजे! तुम्ही जरूर बाजीकडे उतरा; पण स्वारांचा शिधा आत्ताच रवाना करा. मी काढून द्यायला सांगते. स्वारांना रांधून घ्यायला सांगा.’

शिवबा आनंदाने बाहेर गेले.

आळंदी, जेजुरी यांसारखी ठिकाणे फिरायला राजांना फार आवडे. त्यांतच रोहिडेश्वराची भर पडली होती. डोंगराच्या उंच माथ्यावर दाट जंगलात हे शंकराचे मंदिर होते. निसर्गाने नटलेल्या त्या मुलुखाने शिवाजीच्या मनात ओढ निर्माण केली होती. रोहिडेश्वराच्या अनेक वेळच्या दर्शनांत दादाजी नरसप्रभू गुप्ते यांसारखी मंडळी जिव्हाळ्याची बनली होती.

भर दुपारची वेळ असूनही रोहिडेश्वर कसा शांत होता. गार वारा अंगात चैतन्य आणीत होता. समोर पसरलेला मावळ विलोभनीय वाटत होता. शंभूचे दर्शन घेऊन सारे देवासमोर बसले होते. राजे काही बोलत नव्हते. चिमणाजी नऱ्हेकर म्हणाले,

‘राजे, आज आपण बोलत नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय बोलू, चिमणाजी? नुसतं नावाचं राजेपण मिरवणाऱ्यांना काही बोलता येत नाही, चालता येत नाही.’

‘कोण नावाचे राजे?’

‘आम्ही! दुसरे कोण? पाहा, गुप्ते, सारा मुलूख कसा बेहोश पडल्यासारखा वाटतो. पूर्वी निजामशाही, आता आदिलशाही. पण मुलुखात काही बदल नाही. शाही फौजा आल्या, की त्यांनी मुलूख लुटायचे; आपला भरणा करायचा. किल्लेदारांनी त्याला हातभार लावायचा... आणि लोक तरी किती निर्लज्ज! हे सारं सहन करतात. बेचिराख झालेली गावं तिथंच उठवतात. बायका-पोरी पळवून नेल्या, तरी काही परिणाम नाही.’

‘राजे, ही कुनाला हौस आहे?’ येसाजी म्हणाला, ‘परजा म्हणजे मेंढरागत. धनगर नाही. अशीच रानोमाळी फिरायची.’

‘येसाजी, मावळी हाडाची ताकद मला माहीत आहे. साध्या काठीनं लांडगा झोपविणारे मावळे जर एक होतील, तर...’

‘तर काय, राजे...?’

‘तर... तर काय सांगू?’ राजांची छाती रुंदावली. ‘तर आमच्या दैवतांना असं डोंगरकपारी दडावं लागणार नाही. बायाबापड्यांना मोकळ्यावर वावरायला अशी भीती वाटायची नाही. लोक कोण, राज्य कुणाचं?’

‘पण हे जमणार कसं?’

‘न जमायला काय झालं? हे जहागिरदार, देशमुख, पाटील, कुलकर्णी एक झाले, तर केवढी प्रचंड ताकद वाढेल!’

‘विजापूरची ताकद कमी आहे होय?’ बाळाजीने शंका काढली.

‘आहे ना! आम्ही बघून आलोय् ती. उंटावरून शेळ्या हाकणारी जात बादशहाची. बाळाजी, रामाजवळ कोणाचं सैन्य होतं? रावण तपस्वी होता, योगसामर्थ्यवान सिद्ध होता;

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पण त्याचा पराभव झाला, तो कशानं? माकडांच्या मदतीनं राक्षसांचा पराभव! तो बळाच्या जोरावर नव्हता; निष्ठेवर होता, बाळाजी! आमच्या जवळ कमी आहे, ती निष्ठा. बळाला तोटा नाही.’

‘बोल, राजा!’ सुभान म्हणाला, ‘कानाला गोड वाटतंय्, बघा.’

‘हं!’ राजे हसले, ‘सुभाना, सारे कीर्तनकार देवाचा पत्ता, ठावठिकाणा सांगतात, म्हणून कुणाला देव सापडतो का, रे? अरे, कीर्तन ऐकून देव सापडत नाही.’

‘आमांस्नी सापडलाय्...’ सुभाना म्हणाला.

‘कुठं आहे?’

‘तूच आमचा देव!’ सुभाना म्हणाला.

‘खुळा आहेस, सुभाना. बोलून देव होत नसतात.’

‘मग काय करायचं, सांग. अरं, तू हाक दिलीस, तर सारा मावळ उठंल. तुझं नाव मावळातल्या बायाबापड्यांच्या तोंडांत बसलंय्. देसाई, देशमुख, देशपांडे तुज्या वाड्याचा उंबरठा झिजवत्यात, ते काय उगीच? तसं नसतं, तर रांझ्याच्या पाटलाचं हात-पाय तोडलंस, तवा गप बसली नसती सारी. अरं, रांझं तुज्या वाटेकडे डोळे लावून बसलंय्...’

राजे उठत म्हणाले, ‘चल, सुभाना. विचारांनी डोकं फिरायची पाळी आली. शंकराला दंडवत घालू. त्याला सांगू. त्याच्या मनात असेल, तर सारं होऊन जाईल. नाचणीला येसाजी वाट पाहत असेल.’

नाचणी चिमुकले, दीडदोनशे वस्तीचे गाव. डोंगराच्या कुशीत वसलेले. सारे गाव राजांची वाट पाहत होते. घोड्यांच्या टापांनी एवढेसे गाव भरून गेले. येसाजीची छाती अभिमानाने फुलून गेली. गावचे पाटील म्हणाले,

‘राजे, येसाजीच्या पुण्याईनं आपले पाय गावाला लागले. वाड्यात चलावं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘का? येसाजी आम्हांला घराबाहेर काढणार काय?’

‘तसं कसं होईल?’

‘पाटील, आम्ही या खेपेला येसाजीचे पाहुणे. पुढच्या खेपेला तुमच्याकडे येऊ.’

बसक्या घराच्या कट्ट्यावर घोंगड्या पसरल्या होत्या. राजांनी पाय धुतले. ते कट्ट्यावर बसले. येसाजीची आई, बायको बाहेर आली. राजे उठले. त्यांनी हात जोडले. येसाजीच्या आईने पाय धरताच ते वाकले. म्हातारीला उठवीत ते म्हणाले,

‘आई, येसाजी सुद्धा माझ्याहून मोठा. तुम्ही त्याच्या आई. जसा येसाजी, तसा मी! तुम्ही आशीर्वाद द्यायचे.’

राजे परत बसले.

सारा गाव गोळा झाला. पीकपाणी, अडीअडचणी... साऱ्या गोष्टी सांगितल्या जात होत्या. येसाजीचे सख्य पाहून लोकांची भीड चेपली होती. त्याच सलोख्याने राजांना ते भेटत होते. त्याच वेळी हवालदार येऊन मुजरा करून उभा राहिला. राजांनी विचारले,

‘सारी सोय लागली ना?’

‘जी!’

‘वैरणकाडी, दाणागोटा... कशाची तसदी गावाला लागू देऊ नका. तक्रार आली, तर मुलाहिजा राखला जाणार नाही.’

‘राजे, गाव तुमचं. शिधापानी आनलासा. गावाला तुमचा बोजा वाटला असता व्हय?’

‘तसं नाही, पाटील. आम्ही येसाजीचे पाहुणे आहोत, म्हणून आमच्या अश्वपथकाचा भार येसाजीवर टाकणं खरं नाही. मासाहेबांनी आम्हांला सांगितलं आहे... राजानं वाटेतल्या तुळशीचं पानदेखील तोडताना दक्षता घ्यावी. नाही तर राजानं पान तोडलं, मागच्या दळाच्या हातात तुळसही उरत नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बरं आठवलं, बगा!... अरं, कोन हाय? मनूला बोलवा बघू.’

राजे पाहत होते. एक बारा-तेरा वर्षांची रेखीव, कोकणी सौंदर्यानं नटलेली मुलगी राजांच्या पाया पडली.

‘कोण ही?’

‘हिचं नाव मनोहारी, महाराज!’

‘मनोहारी! नाव वेगळंच वाटतं.’

‘मनोहर मनसंतोष गडाची ही. गडाचंच नाव ठेवलंय् तिचं. ती काल आली.’

‘का?’

‘गडकरी मुसलमान. त्याची नजर पडली पोरीवर. पोरगी अनाथ. गडकऱ्यानं जनानखान्यात पाठविण्याचा हुकूम केला. रातोरात गावानं तिला इकडे पाठविली. म्या म्हटलं, राजा येणारच. त्याच्यावर ही जिम्मेदारी सोपवावी.’

राजे हसले. ते म्हणाले, ‘पाटील, याचा निर्णय आम्ही लावू शकत नाही. तुम्ही मासाहेबांच्याकडे हिला घेऊन या. मासाहेब सारं पाहतील. हिंदूची पोर अनाथ झाली, म्हणून ती जनानखान्यात जावी, असं आता व्हायचं नाही.’

‘तसं करतो.’ पाटील म्हणाले.

रात्री जेवण झाल्यावर सारे बाहेरच्या कट्ट्यावर बसले. रात्र अंधारी होती. गावच्या उजव्या हाताला अश्वपथकांनी शेकोट्या पेटविल्या होत्या. हवेतला गारवा जाणवत होता. रात्री बराच वेळ शिवाजीराजे अंथरुणावर जागे होते.

भल्या पहाटे शिवबांनी नाचणीचा निरोप घेतला. पुण्याकडे घोडदौड चालली होती. पक्ष्यांच्या थव्यांबरोबर शिवाजीचा जथा टापांचा आवाज करीत कूच करीत होता. पहाटेला रस्त्यावर चरायला बाहेर पडलेल्या रानकोंबड्या फडफडत होत्या. एखादे सांबर भरकन

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आडवे जात होते. कौतुकाने शिवाजीराजे हे सारे निसर्गसौंदर्य पाहत होते. सूर्य उगवला. उन्हे डोंगरावर आली. डोंगराच्या वळणावर रस्ता सोडून आत गाव वसले होते. झोपड्यांनी सजलेले सह्याद्रीच्या कुशीतले एक घरटे. गावाच्या वर डोंगरकडेला माणसे गोळा झाली होती. राजांनी हात उंचावला. अश्वपथक थांबले.

'बाजी, गावचे लोक सकाळच्या वेळी डोंगरकडेला का?'

बाजीने पाहिले. तो म्हणाला, 'कोणी तरी गेलं असेल.'

'तसं वाटत नाही मला. अनेक लोक बोडके आहेत. चला पाहू.'

टापांच्या आवाजाने आधीच सावध माणसे अश्वपथक येताना पाहून भयभीत झाली. काही पांगले. गावाला वळसा घालून घोडी जवळ गेली. राजे पायउतार झाले. लोक पाया पडत होते. वाट देत होते. लोकांच्या मध्ये गाय पडली होती. तिच्याभोवती सारे गोळा झाले होते. राजांनी विचारले,

'काय झालं?'

मेलेल्या गाईवरून हात फिरवीत बसलेल्या म्हाताऱ्याने नजर वर केली. अश्रू पुशीत तो म्हणाला,

'राजा! माझी गाय वाघानं मारली, रं! काल राती घरला आली न्हाई. आज हुडकून आनली.'

'अणि वाघ?'

'त्यो हाय रानातच. राजा त्यो! तेला बाहिर कोन काढणार? जलम फुकट आमचा. राजा, अरं, बादशाहीचं लोक येऊन पीक नेत्यात; आनी रानचं राजं येऊन जनावरं नेत्यात. मानसानं जगावं कसं? महिन्यात तिसरं जनावर हे.'

'वाघ कुठं आहे?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हाय की घळीत. समद्यांस्नी दिसतुया. सोकावलाय् त्यो. रान सोडून हलंल कशाला?’

‘बाजी, येसाजी!’

दोघे पुढे झाले.

‘हाका काढून शिकार करू या. आमची बंदूक आहे. कसं?’

‘करू या की!’

‘गोहत्या करणाऱ्या वाघाला सोडणं हा क्षत्रियधर्म नव्हे.’ बाळाजी नऱ्हेकर म्हणाले.

शिवाजीराजा शिकार करणार, म्हटल्याबरोबर त्या चिमण्या गावात एकच उत्साह संचारला. त्याखेरीज अश्वपथकाचे लोक होतेच. घोडी बांधून सारे एकत्र झाले. वाघाच्या ठिकाणाची माहिती काढली गेली. त्याच्या वळणाचा अंदाज घेतला. रानचे माहितगार हुडकून हाकेकऱ्यांच्या बरोबर दिले. वाघाची जागा होती, तेथपासून खालीपर्यंत एक मोठी उतरंडीची घळ होती. तिच्या खाली रान पातळ होते; मोठा माळ लागला होता. त्या रानाच्या जागेवरच शिकारी बसायचे ठरले. राजांनी साऱ्यांना सांगितले,

‘बार झाला, की हाकेकऱ्यांनी झाडांचा आश्रय घ्यावा. तुतारी होईपर्यंत कोणी उतरू नका.’

हाकेकरी जंगलात गेले. राजांनी आपला भाला, तलवार, कट्यार सर्व हत्यारे पाहून घेतली; आणि ते शिकारीच्या जागेकडे जाण्यासाठी वळले. बरोबर बाजी, येसाजी, बाळाजी, चिमणाजी वगैरे साथीदार होते. शिकारीची जागा आली. रानाचा अंदाज घेऊन एका मोठ्या जाळीचा आडोसा निवडण्यात आला. बंदूक ठासली जात होती. बंदूक तयार झाली. सारे हाक्याची वाट पाहत होते.

जंगलावर नि:स्तब्ध शांतता होती. कुठेच कसला आवाज येत नव्हता. ऊन्ह चढत होते आणि एकदम डोंगराच्या वर हाका सुरू झाला. भांड्यांचे आवाज, आरडाओरडा करीत हाका डोंगरावरून उतरत होता. सावधगिरीने पुढे सरकत होता. पक्ष्यांचे थवे आकाशात भिरभिरले. माकडांचा चीत्कार झाला. हाका सुरू होऊन थोडा वेळ झाला, तोच भेकरांचे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

टोळके वायुवेगाने खाली उतरले; राजांना डावी घालून दिसेनासे झाले. राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. बाजीची मूठ पल्लेदार भाल्यावर आवळली गेली होती. आपले भाले सरसावून सारे रानाकडे पाहत होते.

रानाच्या वर खसफस वाढली. बाजीने बोट दाखविले. जाळीतून राजांनी पाहिले. श्वास रोखले गेले; आणि समोरच्या रानातून डुकरांचा कळप बाहेर पडला. अंगावर ताठ केस फुललेले. परतलेल्या सुळ्यांनी भेसूर दिसणारी ती जनावरे हुंदडत जवळून गेली.

शिकार पचवून निर्धास्तपणे झोपी गेलेला वाघ अचानक उठलेल्या कोलाहलाने जागा झाला. दगड कोसळत होते; आवाज वाढत होता. संतापाने गुरगुरून त्याने शेपटी फुलविली; आणि चपळतेने तो गुहेबाहेर पडला. धीमी पावले टाकीत, आवाजाच्या बाजूला पाहत तो घळण उतरत होता.

हाकेकऱ्यांचा आवाज एकदम थांबला. दुसऱ्या क्षणी पूर्वीपेक्षाही ओरडा उठला. भांड्यांच्या आवाजांनी रान दणाणून गेले. माकडे डोंगराच्या माथ्यावरून झाडांचे शेंडे गाठीत, चीत्कार करीत जंगल उतरत होती. शेंड्यांवरून माकडे दिसताच राजे म्हणाले,

‘बाजी, वाघ येतोय्.’

नजर न हलविता राजे रान निरखीत होते. हाका जवळ येत होता... आणि राजांना वाघाचे दर्शन झाले. ते अजस्त्र धूड संतापाने शेपटी फडकावीत, पंजे रोवीत पुढे येत होते. उचलणाऱ्या पावलाबरोबर त्याच्या अंगाचे पट्टे झळाळत होते. वाघ अगदी समोरच येत होता. राजांनी गुडघ्यावर हात घेऊन बंदूक पेलली. जाळीतून नळीचे टोक पुढे सरकत होते. राजांनी नेम धरला. वाघ टप्प्यात येताच बार उडाला.

बारापाठोपाठ वाघाच्या गर्जनेने सारे रान दणाणून गेले. बाराच्या दारूच्या धुरांडीने जाळी भरून गेली. सारे चूपचाप बसून होते. बार होताच हाकेकऱ्यांनी झाडे गाठली. राजांनी पाहिले. वाघ डरकाळ्या फोडीत जमिनीवर लोळत होता. दमला, की धापत होता; चालण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्याचा कणोठाच मोडला होता. हलणे शक्य होत नाही, हे समजताच सारी ताकद लावून संतापाने उशी घेत होता. तोंडात आलेला दगड फोडीत होता. वाघाच्या थैमानात सारे रान थरथरत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बार लागला.’ बाजी म्हणाला.

‘शूऽऽऽ’ राजांनी दटावले.

वाघाची गुरगूर थांबली. काळ्या कडांनी सजलेले पांढरे पोट धापत होते. राजे हळूच जाळीबाहेर आले. पाठोपाठ सारे होते.

‘माझा भाला…’

‘पण, राजे…’ येसाजी कुजबुजला.

‘माझी फेक झाल्यावरच गरज पडली, तर फेक करा. चला.’

राजांनी भाला पेलला. जाळीबाहेर सारे आले. पडल्या जागेवरून वाघाने डोळे उघडले. अनर्थाला कारणीभूत झालेला शत्रू त्याच्याच रोखाने पुढे येत होता. वाघ गर्जत उठला; आणि त्याच क्षणी राजांचा फाळ त्याच्या छातीत भसकन घुसला. तोंडाशी आलेली काठी दातांनी फोडीत असतानाच त्याची मान लटकी पडली. बाजीने फाळ उचलला. राजांनी याला थांबविले. वाघ मेला होता. सारे नजीक गेले. ते प्रचंड धूड पाहत असताना येसाजी म्हणाला,

‘वाघीण हाय.’

-आणि आनंदाने बेहोश झालेल्या येसाजीने तुतारी उचलली. क्षणात तुतारीचा आवाज साऱ्या रानाला शिकारीची वार्ता देऊन मोकळा झाला.

आनंदाने बेभान झालेले गावकरी आरोळ्या ठोकीत धावत येत होते. कित्येकांनी भान विसरून शिवाजीराजांना मिठी मारली. त्यांना उचलले.

हाकेकरी गोळा होत होते. एका हाकेकऱ्याने वाघाचे दोन छावे आणले; राजांच्या समोर सोडले. राजांनी एका छाव्याला घेण्यासाठी हात पुढे केला. एका एवढ्याशा छाव्याने पंजा उगारला; ‘ठिस्’ करून दात दाखविले. बळजबरीने छाव्याला कुरवाळीत राजे म्हणाले, ‘या छाव्यांसाठीच एका जागी अडली होती… हवालदार, हे छावे बरोबर घ्या. आपल्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिकारखान्यात शोभतील.’

एका म्हाताऱ्याने भराभर वाघाच्या मिशा उपटल्या; आणि चकमक काढून जाळल्या. मिशी भारी विषारी, असा समज. म्हाताऱ्याचा ऊर भरून आला होता. पचकन वाघावर तो थुंकला; आणि म्हणाला,

‘शेराला सव्वा शेर एक ना एक दिवस भेटतोच.’

म्हाताऱ्याने राजाला हलू दिले नाही. थोड्याच वेळात गावातून करडी लेझीम आली. वाघाचे पाय वाशावर बांधले गेले. वाघ उचलायला दहाजण लागले. साऱ्यांनी उत्स्फूर्त आरोळी ठोकली,

‘शिवाजी महाराज की जय!’

पाठोपाठ राजांना उचलले गेले. माणसांच्या खांद्यावरून राजांची मिरवणूक निघाली. संकोचून राजे पाहत होते. बाजी, येसाजी, चिमणाजी राजांकडे पाहून हसत होते.

गावाचा निरोप घेत असता राजांनी विचारले,

‘गावाचं नाव काय?’

म्हातारा म्हणाला, ‘कुठलं गाव? वरीससुदीक झालं नाही गाव करून.’

‘मग ‘वाघमार’ नाव ठेवा.’

□

१६

राजांची दौड सुरू झाली.

राजांनी मारलेला वाघ बघायला वाड्यात पुणे लोटले होते. चौकात वाघ पडला होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सईबाई जिजाबाईंच्यासह वाघ बघून गेल्या होत्या. राजे आपल्या महालात गेले होते. संध्याकाळ होत आली होती. दादोजीपंत मासाहेबांच्या महालात आले.

‘केवढा मोठा वाघ! एकट्या शिवबानं मारला, म्हणे.’

‘हो!’

‘भारीच धाडशी पोर.’ जिजाबाई कौतुकाने म्हणाल्या.

‘तेच सांगण्यासाठी आलो होतो मी. वेळीच राजांना आवरणं आवश्यक आहे.’

‘आम्हांला वाटलं होतं की, तुम्हीही राजांचं कौतुक कराल.’

‘कौतुक जरूर वाटतं, मासाहेब! म्हणून जबाबदारी कशी विसरता येईल? मासाहेब, राजांच्या शिकारीचा छडा लावलाय् मी. राजे रोहिडेश्वरी देवदर्शनाला जातो, म्हणून सांगून गेले होते. त्यामुळं मी परवानगी दिली. बरोबर शिकार-हवालदार नसता मी शिकारीला परवानगी दिली नसती.’

‘गैरसमज होतोय्, पंत. आम्ही सुद्धा चौकशी केली. मारलेल्या गाईमुळं गाव कष्टी झालं होतं. ते पाहून राजांचं मन कळवळलं. वाघाची शिकार करून प्रजेला संकटमुक्त केलं, याचा आमच्याप्रमाणेच तुम्हांलाही अभिमान वाटायला हवा.’

‘का वाटणार नाही? राजांच्या शिकारीच्या धाडसाचा जरूर मला अभिमान आहे.’

‘काय म्हणायचं आहे तुम्हांला?’ न समजून जिजाबाईंनी विचारले.

‘मला एवढंच म्हणायचं आहे, मासाहेब! राजे असं धाडस वापरायला अजून मुखत्यार नाहीत.’

‘कारण?’

‘कारण विचारता, मासाहेब? राजांनी वाघावर गोळी चालवली. वाघ जखमी झाला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाला घेऊन ते पुढं सरसावले. मासाहेब, जरा डोळ्यांपुढे प्रसंग आणा... वाघ कच्चा जखमी असता... त्यानं झेप घेतली असती, राजांच्या छातीवर आपले पंजे रोवून...'

'पंत!' मासाहेब ओरडल्या. घामाने चेहरा भरून गेला होता.

'नाइलाजानं बोलावं लागतं, मासाहेब! कोवळं वय. वेडं धाडस. शिकारीची वार्ता ऐकताच सारं शरीर गलितगात्र झालं. उठायचं बळ पायांत राहिलं नाही. मासाहेब, जीवनात आलेला आनंद, दु:ख माणूस सहन करतोच. तुम्हीही सहन केलं असतं. पण आमची काय वाट? एका राजांच्या जिवावर, मासाहेब, आज हजारो घास खाताहेत. लाखांचा पोशिंदा असा वारेमोल सोडून कसा चालेल?'

दादोजींना बोलवेना. त्यांनी डोळे टिपले. ते म्हणाले,

'मासाहेब, हे तुम्हीच राजांना सांगू शकाल. वेळीच जरब बसली नाही, तर पुढं काही उपयोग होत नाही. यावर निर्णय आपला.'

पंत थकल्या पावली निघून गेले. मासाहेबांच्या समोर पंत एवढे कधी बोलले नव्हते. दादोजींनी सांगितले, त्यात काही खोटे नव्हते. मासाहेबांचा राग उफाळला. त्याच संतापाने त्या राजांच्या महाली गेल्या. मासाहेबांना आत आलेल्या पाहताच शिवाजीराजे उभे राहिले. मासाहेबांनी एकदम विचारले,

'राजे, कुणाला विचारून शिकारीला गेलात?'

'मासाहेब, आम्ही...'

'त्या भाकडकथा बाहेरच ऐकल्यात मी! त्या नका सांगू. बार चुकला असता, तर...'

'मासाहेब, आबासाहेबांनी आम्हांला विश्वासानं बंदूक दिली. आमचं निशाण चुकत नाही, हे तुम्हीही जाणता. आम्हांला माहीत आहे... ते पंत सांगणार, आणि तुम्ही...'

'शिवबा!' मासाहेबांचा आवाज करडा बनला, 'कुणाबद्दल हे बोलता? क्षमा मागा!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी आवंढा गिळला. ते म्हणाले, ‘पण आमचं...’

‘क्षमा मागितल्याखेरीज एक शब्दही बोलू नका!’

राजांच्या डोळ्यांत पाणी तरळले. ते कसेबसे म्हणाले,

‘आम्ही चुकलो. क्षमा करा!’

‘दादोजींची जाऊन क्षमा मागा. त्यांना हे वचन द्या.’

‘जशी आज्ञा!’

संतापाने फुललेले, डोळ्यांत पाणी घेऊन उभे असलेले ते शिवाजीराजांचे रूप पाहून मासाहेबांचे मन कळवळले. त्यांनी राजांना मिठीत घेतले; पण मिठीतून बाहेर पडून राजे जाऊ लागले.

‘कुठं निघाला?’

मागे न पाहता राजे म्हणाले, ‘पंतांच्याकडे!’

पंत आपल्या खोलीत बसले होते. राजांना पाहताच ते म्हणाले,

‘राजे!’

शिवाजीराजे काही न बोलता वाकले. त्यांनी पंतांचे पाय शिवले. पंत आशीर्वाद पुटपुटत म्हणाले,

‘हे काय?’

‘आम्ही पुन्हा असं वागणार नाही... क्षमा करा...’

‘क्षमा केव्हाच केली, राजे! चूक कुणाच्या हातून होत नाही? एकदा केलेली चूक

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ध्यानी आली, आणि ती परत केली नाही, की माणसाला सुधारायला फारसा वेळ लागत नाही.’

पंतांचे बोलणे संपताच राजे वळले, आणि आपल्या महालात गेले. थोपविलेले अश्रू ओघळत होते. रात्री दिवे लागले, तरी राजे महालीच पडून होते. पावलांचा आवाज येताच त्यांनी डोळे उघडले. सईबाई उभ्या होत्या.

‘काय पाहिजे?’

‘जेवायला बोलावलंय्!’

‘कुणी?’

‘मासाहेबांनी!’

‘आम्हांला जेवायचं नाही, म्हणून सांगा.’

‘असं काय...?’

‘सांगितलं ना? मग जा.’

गाल फुगवून सईबाई म्हणाल्या, ‘मग आम्हीही जेवणार नाही.’

‘नका जेवू. तुम्ही जेवला नाही, म्हणून जग उपाशी मरायचं नाही. जा!’

सईबाई धावत महालाबाहेर गेल्या. रात्र झाली, वाढली; पण राजांना परत बोलवायला कुणीच आलं नाही.

सकाळी राजांचे स्नान झाले. देवदर्शन झाले. महालीच दूध पिणे झाले. हे सारे मासाहेबांना चुकवीत झाले. पलंगावर वाघाचे छावे झोपले होते. सईबाई त्यांच्याकडे पाहत होती. बाहेर पावले वाजली, म्हणून राजांनी पाहिले. दारातून मासाहेब आत येत होत्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मासाहेबांना पाहताच राजे पाठ फिरवून उभे राहिले. सईबाई बच्चे न दिसतील, अशी खबरदारी घेऊन पलंगाशेजारी उभ्या राहिल्या. राजांच्या कानांवर शब्द आले,

'राजे, आईला पाहून केव्हापासून पाठ फिरवू लागलात? आम्हांला पाहून एवढे कष्ट होत असतील, तर आम्ही जातो. आपल्याला आजही भूक नसेल, तर तसं कळवा. आमचं जेवण आजही बंद ठेवू. तेच विचारायला आम्ही आलो होतो.'

मासाहेब जेवल्या नाहीत. त्यांना उपास घडला! राजांना असह्य झाले. ते वळले. आईला पाहताच त्यांचे डोळे भरून आले. एकदम ते मासाहेबांच्या मिठीत धावले. मासाहेब म्हणाल्या,

'राजे, पुसा ते डोळे! राजांनी डोळे ओले करायचे नसतात. बायकोसमोर तर मुळीच नाही. काल तुम्ही शिकार केलेली सांगितलीत; पण वाघाचे छावे आणलेले सांगितले नाहीत. ते आम्हांला पाहायचे आहेत. कुठं आहेत?'

राजांची नजर पलंगाकडे गेली. सईबाई गोंधळून उभ्या होत्या. पिलांना त्यांनी आडोसा धरला. या बाजूला झाल्या. मासाहेब पुढे झाल्या. गादीवर ते एकमेकांना बिलगून झोपले होते.

'छान आहेत.' सईबाईंच्याकडे वळून म्हणाल्या, 'यांची जोखीम सूनबाईंच्यावर दिसते. तूही या खेळात सामील झालीस का?... दूध पितात?'

'बोथडीनं पाजावं लागतं, मासाहेब! सकाळीच दूध पाजलं.'

'छान केलंस! पण तू काही खाल्लंस का?'

रागाने राजांच्याकडे पाहत सईबाई म्हणाल्या,

'एक दिवस जेवलं नाही, म्हणून जग उपाशी मरत नाही.'

रागाने सईबाई निघून गेल्या. शिवाजीराजांच्या ओठांवर हसू उमटले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

१७

उन्हाळा आला, तसा लाल महालाचा मुक्काम खेडबाऱ्याच्या वाड्यात हलला. राजे, जिजाबाई, दादोजी यांच्या खेडबाऱ्याच्या मुक्कामाबरोबर खेडबारे गजबजून गेले. वाड्याकडे वर्दळ सुरू झाली. दादोजींनी शिवापूरला लावलेल्या आंब्याच्या बागांनी रूप घेतले होते. राजे दादोजींच्या बरोबर अनेक वेळा बाग पाहायला जात.

फाल्गुन पुनव जवळ येत होती. घरी सणाची तयारी चालू होती. फाल्गुन पुनवेला सकाळी वाड्यासमोर होळीचौकात साफसफाई झाली होती. एरंडाचे भले थोरले झाड वाजत गाजत आणले गेले. ते सांगायला राजे धावत आत गेले. आतल्या सोप्यात सई उभी होती. राजांनी विचारले,

'मासाहेब कोठे आहेत?'

'आपल्या महालात रडताहेत.'

'काय झालं?'

'मी विचारलं. पण सांगेनात. खेळ जा, म्हणाल्या.'

राजे जिजाबाईंच्याकडे गेले. राजांना पाहताच जिजाबाईंनी गडबडीने डोळे पुसले. राजे जवळ गेले, बसले; आणि जिजाबाईंच्या गळ्यात पडत त्यांनी विचारले,

'मासाहेब, काय झालं?'

त्या एका वाक्यात आवरलेले अश्रू झरू लागले. शिवाजीराजांना कवटाळून त्या रडत होत्या. राजांनी कष्टाने मिठी सोडविली. मासाहेबांचे अश्रू पुशीत ते म्हणाले,

'मासाहेब, आमची शपथ आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हां, राजे! सुटली म्हणा!’

‘म्हणतो. पण का रडता, सांगा!’

‘सांगते. सुटली, म्हणा!’

‘सुटली!’

जिजाबाईंनी डोळे पुसले. राजांना जवळ घेत त्या म्हणाल्या,

‘राजे, तुमच्या दादामहाराजांची आठवण झाली.’

‘का?’

‘त्यांचा आज वाढदिवस. तुमचा वाढदिवस आम्ही करतो, पण यांचा कोण करीत असेल?’

‘मासाहेब, मग दादासाहेब महाराजांना बोलावून का घेत नाही?’

जिजाबाईंचे डोळे भरले. त्या अश्रू आवरीत म्हणाल्या,

‘तेवढं हातांत असतं, तर शंभू लांब का राहिला असता?’

गडबडीने उठत जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे! चला. आज होळीचा दिवस. काम फार आहे.’

होळीचा सण झाला; आणि उन्हाळा आपल्या रखरखीत पावलांनी अवतरला. मोहोरलेल्या आम्रवृक्षांनी आपल्या धरतीवर छाया धरली. वाढत्या दिवसांबरोबर आंब्याचे शेंडे फळभाराने धरणीकडे झुकत होते.

दादोजी दोन प्रहरच्या वेळी शहापूरच्या आंबराईतून फिरत होते. आंब्याच्या डेरेदार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झाडांनी बाग सजली होती. कुठे तरी आंब्यांना तुरळक आंबे लटकत होते. पाच-सहा वर्षांच्या परिश्रमाचे सार्थक झाल्यासारखे वाटत होते. नुकतीच आळी केलेली ती झाडे समाधानाने पाहत दादोजी जात होते. पाठीमागून कृष्णाजीपंत चालत होते. दादोजी म्हणाले,

'कृष्णाजी लवकर फळं धरली.'

'पंत, याचं श्रेय तुम्हांला. शिवापूरला, शहापूरला, जिजापूरला तुम्ही चांगल्या बागा वसवल्या; माळरानावर नंदनवन केलंत.'

'थोरल्या महाराजांना आंबे फार आवडतात. जेव्हा महाराज येतील, तेव्हा दुसऱ्या कशाला नसेल, तरी या बागांसाठी माझी पाठ थोपटतील.'

'पंत, ऊन्ह फार आहे. वेळही पुष्कळ झाला.'

'हो ना! परतू या.'

पंत वळले. आंबराईबाहेर घोडी उभी होती. जात असता अचानक पंतांचे पाऊल थबकले. एक राजस आंबा झाडावर हाताच्या उंचीवर डोलत होता. पिवळसर छटा आंब्यावर उमटली होती. न कळत पंतांचा हात उंचावला; आणि यांनी तो आंबा तोडला. आंब्याचा वास पंतांनी घेतला. आंबा पाहत असता यांचे हास्य मावळले. चेहरा गंभीर झाला. अंग कापू लागले.

'काय झालं, पंत?' कृष्णाजी म्हणाला.

रागाने आंबा भिरकावून देत पंत उद्गारले,

'केवढा मी असंयमी! केवढा पापी! धिक्कार असो...!'

पंत पुटपुटत तरातरा पावले टाकीत जात होते. कृष्णाजीपंतांना काही कळत नव्हते, समजत नव्हते. कृष्णाजीपंतांच्याकडे न पाहता दादोजींनी घोड्यावर मांड टाकली, टाच मारली. घोडे उधळले. वाड्यात जातानादेखील पंत कुणाशी बोलले नाहीत. वाड्याच्या मागे आपल्या निवासस्थानी ते निघून गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाई आपल्या महालात झोपल्या होत्या. शेजारी सईबाई बसल्या होत्या. पावलांच्या आवाजाने जिजाबाईंना जाग आली. घाबऱ्या झालेल्या गंगाबाई आत आल्या. जिजाबाईंना त्या म्हणाल्या,

‘राणीसाहेब! चला. हे कसंसंच करायला लागलेत.’

‘काय झालं?’ गडबडीने उठत जिजाबाई म्हणाल्या.

‘भ्रमिष्टासारखे करताहेत. शिवापूरला बागेत गेले होते. तिथून आले, ते तलवार उपसून हात तोडायला बसले. वेळीच आवरलं, म्हणून बरं. बरं-वाईट आपल्यालाच बोलून घेताहेत. कुणाशी काही बोलत नाहीत. रडणं पडणं चालू आहे.’

गंगाबाईंच्या बरोबर जिजाबाई धावल्या. मागोमाग सईबाई होत्या. तोवर शिवाजीराजे आले. सारे पंतांच्या निवासस्थानी गेले. खोली माणसांनी भरली होती. जिजाबाई-राजांना पाहताच सारे बाहेर आले. जिजाबाई आत गेल्या. आतले दृश्य निराळेच होते. पंतांच्या दंडाला दोघांनी धरले होते. कोपऱ्यात तलवार पडली होती. पंत धापा टाकीत होते. पंतांनी नजर वर केली; आणि मासाहेबांना पाहताच ते म्हणाले,

‘मासाहेब!’

पंतांना पुढे बोलवेना. ते रडू लागले.

मासाहेबांनी मागे वळून पाहिले. भीतीने गारठलेले राजे, सईबाई उभे होते. मासाहेब म्हणाल्या,

‘राजे, सई, तुम्ही वाड्यात जा. इथं कुणी राहू नका.’

क्षणात सारे पांगले. पंतांना धरलेल्यांना जिजाबाई म्हणाल्या,

‘पंतांना सोडा, आणि बाहेर जा.’

दोघे उठून गेले. गंगाबाई पंतांच्या शेजारी बसल्या. जिजाबाई जवळ जात म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पंत, काय झालं? कशासाठी हा त्रागा?’

‘काय झालं?’ हाताचे पंजे पुढे करीत पंत म्हणाले, ‘मासाहेब, ह्या हाताला विचारा!’ आणि पंतांनी उजवा हात ताड ताड कपाळी मारून घेतला.

‘पंत!’ जिजाबाई ओरडल्या.

‘मासाहेब, हा दादोजी चांडाळ आहे! आज त्यानं चोरी केली!’

‘चोरी?’

‘होय, मासाहेब. त्याचं ताडन ह्या हाताला झालंच पाहिजे. बुद्धी फिरली. खाल्ल्या अन्नावर उलटला!’ म्हणत दादोजी तलवारीकडे वळले.

‘दादोजी, थांबा! काय झालं, ते सांगितल्याखेरीज रेसभरही पुढं सरकू नका.’

‘काय सांगू, मासाहेब? कोणत्या तोंडानं सांगू? थोरल्या महाराजांच्या परवानगीविना या दादोजीनं राजांच्या बागेतला एक आंबा तोडला.’

‘मग त्यात काय झालं?’ जिजाबाईंनी विचारले.

‘काय झालं? मासाहेब, कोणत्या तोंडानं राजांना काही सांगायला जाऊ? लहान काय, आणि मोठी काय, चोरी, ती चोरीच! तिचं प्रायश्चित्त मला घेतलंच पाहिजे.’

दादोजींनी एकदम तलवारीला हात घातला. मासाहेब ओरडल्या,

‘हां, दादोजी, ज्यांची एवढ्या इमाने इतबारे सेवा करता, त्या तुमच्या थोरल्या महाराजांची, माझी, शिवबाची शपथ आहे. टाका ती तलवार!’

दादोजींच्या हातून तलवार पडली; आणि उपरण्यात तोंड लपवून ते रडू लागले. एवढ्या वयोवृद्ध, तपोवृद्ध माणसाला रडताना पाहून जिजाबाईंचा जीव गुदमरला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पंत, घडलं, ते नकळत! झालं, होऊन गेलं. तुमच्या आधारावर आम्हांला इथं पाठविलं गेलं. काही अविचार करून बसला असता, तर आम्ही काय करणार होतो? तुम्ही वयानं, मानानं मोठे. तुम्हांला काही सांगण्याचा अधिकार नाही. पण राहवत नाही, म्हणून सांगते... काही झालं, तरी आम्हांला विसरू नका.’

दुसऱ्या दिवशी दादोजी दप्तरी गेले, तेव्हा सारे त्यांच्याकडे पाहत राहिले. शामराव नीळकंठ उद्गारले,

‘दादोजी, हे काय?’

‘काय झालं?’

‘तुमच्या अंगरख्याला बाही नाही...’

‘काढून टाकलीय्.’ दादोजी बैठकीवर बसत, हसत म्हणाले, ‘काल थोरल्या राजांच्या बागेत गेलो होतो. आंबा दिसला. धन्याच्या परवानगीविना तोडला. चोरी केली. त्याची ही शिक्षा आहे.’

‘किती दिवस असा अंगरखा घालणार?’

‘किती दिवस? साऱ्यांना हा एक बाहीचा अंगरखा सरावाचा होईपर्यंत. गुन्हा करताना लाज वाटली नाही. निस्तरताना तरी का लाजावं?’

पंत हसले; पण कुणी हसू शकलं नाही.

□

१८

खेडबाऱ्याचा मुक्काम लौकरच पुण्याला हलला. शिवाजीराजांनी पुण्याला जायची घाईच घेतली. जिजाऊंना अलीकडे शिवाजीचे वर्तनच कळत नव्हते. रांझ्याच्या पाटलाचे प्रकरण झाल्यापासून राजे गंभीर बनले होते. घरी एकटे बसत; नाही तर बहुधा फिरतीवर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

असत. पुण्याला येताच राजे परत रोहिडेश्वरी गेले. त्या वेळी पंत कामासाठी जुन्नरला गेले होते. जुन्नरहून दादोजी परत आले. त्यांनी चौकशी केली. राजे रोहिडेश्वरी गेल्याचे कळले. पंत चिंताग्रस्त झाले. जिजाऊंना म्हणाले,

'मासाहेब, राजे मध्येच रोहिडेश्वरी बरे गेले? आठ दिवसांपूर्वीच खेडबाऱ्याहूनही गेले होते ना?'

'हो! त्यांना ते ठिकाण फार आवडतं. देवाधर्माचा भारी छंद आहे त्यांना.'

'ते काही वाईट नाही! पण मला दुसराच वास येतो.'

'कसला?'

'अलीकडे राजांच्या भोवती गोळा होणारी माणसं पाहिलीत? नेताजी, येसाजी, तानाजी, बाजी, बाळाजी, चिमणाजी... किती नावं घ्यावीत? प्रत्येक खेपेला कोणी तरी नवं दिसतं. तो दादाजी नरसप्रभू तर अलीकडे सावलीसारखा चिकटलाय्.'

'काय म्हणायचं आहे तुम्हांला?'

'मला काही कळत नाही, मासाहेब! राजांच्या वयाची माणसं असती, तर मी समजू शकलो असतो; पण राजांच्या बरोबर लहान-थोर सारे दिसतात. ब्राह्मण, मराठे, महार, रामोशी, प्रभू... अठरापगड जातीचे लोक आहेत. त्यांत देशमुख आहेत, देशपांडे आहेत. मावळे आहेत. राजांच्या मनीचे बेत कळत नाहीत.'

'विनाकारण कल्पनेचे डोंगर रचता, दादोजी! याचा अर्थ एवढाच की, राजांचा ओढा सर्वांनाच आहे. आणि ते का वाईट?'

दादोजी काही उत्तर देऊ शकले नाहीत. ते तसेच माघारी गेले.

दादोजींना जी शंका आली, तीत काही खोटे नव्हते. शिवापूरचा सारा वाडा पहाटेच मावळ्यांनी फुलून गेला होता. वाड्याची पागा तट्टांनी सजली होती. राजे बाहेर आले, तेव्हा त्यांच्याबरोबर दादाजी नरसप्रभू गुप्ते, येसाजी, तानाजी, बाळाजी, चिमणाजी ही मंडळी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होती. भीमा लोहार मुजरा करून उभा राहिला.

‘भीमा, कुठवर आलं?’

‘पन्नास तलवारी आणि शंभर-एक भाले तयार हाईत.’

‘शाब्बास! आणि इतरांचे?’

‘तेबी तेवढेच असतील.’

‘चला, निघू या.’

सारे रोहिडेश्वराकडे निघाले. भर दोन प्रहरी रोहिडेश्वरावर सारे पोहोचले. शिवाजीराजांच्या चेहऱ्यावर एक निराळेच तेज दिसत होते. झऱ्यावर हात-पाय धुऊन ते रोहिडेश्वराच्या मंदिरात आले. दादाजी नरसप्रभूंनी व पुजाऱ्याने पूजा केली. बेल आच्छादिलेल्या त्या शिवलिंगापुढे राजांनी साष्टांग दंडवत घातला. राजे म्हणाले,

‘दादाजी, पुन्हा विचार करा.’

‘विचार केव्हाच ठरला.’ दादाजी म्हणाले, ‘जगायचं असलं, तर वाघाचं जीवन जगू. शेळी म्हणून जगावंसं आता वाटत नाही.’

‘मग व्हा पुढं.’

राजांनी दादाजींचा हात हाती घेतला. पिंडीवर हात ठेवीत राजे म्हणाले,

‘शंभो, हर हर महादेव! आज तुझ्या प्रेरणेनं आम्ही हिंदवी स्वराज्याची शपथ घेणार आहोत. संकल्प तडीला न्यायला तू सिद्ध आहेस. जोवर स्वराज्याची उभारणी होत नाही, तोवर मैत्रीसाठी धरलेला हात आम्ही सोडणार नाही. दिल्या वचनाला अंतर देणार नाही.’

एवढे बोलून राजांनी पिंडीवरचा बेल उचलला, आणि मस्तकी लावला. दादाजींनीही राजांचे अनुकरण केले. नारळ फुटले. प्रसादाचे ताट घेऊन पुजारी बाहेर आला. मंदिराच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

समोर जमलेले शे-सव्वाशे साथीदार हर्षभरित नजरेने राजांच्याकडे पाहत होते.

राजे पायरीवर बसले. प्रसाद वाटला जात होता. येसाजी, बाजी, तानाजी हे सारे राजे आता काय सांगतात, इकडे लक्ष देऊन होते. राजे म्हणाले,

‘येसाजी, आज आम्ही शपथ घेऊन मोकळे झालो. हे शेंदरीलगतचं दैवत स्वयंभू आहे. यानं आम्हांला आजवर यश दिलं, तुमची जोड दिली. आता पुढचे मनोरथ हिंदवी स्वराज्याचे. तेही तो पुरे करील. त्यासाठी आपली जबाबदारी फार मोठी.’

नेताजी हे राजांचे आप्त. वयानेही फार मोठे. ते म्हणाले,

‘भीती कसली?’

‘भीती नाही. पहिलं पाऊल कोणतं टाकायचं, कुठून टाकायचं, याचा विचार करतो आहे.’

‘त्यात इचार कसला?’ तानाजी म्हणाला, ‘देवाम्होरं शपथ झाली, तेच पहिलं ठिकाण.’

‘म्हणजे?’

‘म्हणजे काय? रोहिडेश्वर घेऊन देवाची जागा कबज्यात आणू या. कसं?’

‘फार सुरेख! पण गडाची हालत?’

बाजी म्हणाला, ‘मी फिरून आलोय् गड. लई तर दोनशेपातूर शिबंदी असंल. गडाला मजबुती न्हाई. चारी बाजूंना खिंडारं हाईत.’

‘काय, दादाजी?’

‘ठरलं! रोहिडेश्वरावर प्रथम चाल करायची!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ठीक आहे.’ राजे म्हणाले, ‘उद्या रोहिडेश्वरावर स्वराज्याचा कौल घेऊ.’

‘हर हर महादेव’ची गर्जना उठली. राजांनी येसाजीला हाक मारली,

‘येसाजी, बाजी, तानाजी, तुम्हां सर्वांची माणसं तयार आहेत ना?’

‘हो.’

‘रोहिड्याच्या पायथ्याला रात्र असतानाच साऱ्यांनी गोळा व्हायचं. आम्ही तिथं पहाटे येऊ. आवाज, गोंधळ होऊ द्यायचा नाही. सारं कसं चूपचाप पार पडलं पाहिजे.’

सारे रोहिडेश्वराच्या डोंगरावरून परतले. राजे समोर दिसणारा किल्ला पाहत उतरत होते.

मध्यरात्र होईपर्यंत राजे वाड्यात जागे होते. लोहारांनी तयार करून आणलेल्या भाले-तलवारींचा ढीग पडला होता. चार लोहारांनी रात्रंदिवस राबून पंधरा दिवसांत एवढी तयारी केली होती. भीमा म्हणाला,

‘राजे, जरा आगूप कळवायला पाहिजे हुतं. बर्च्या तयार झाल्या असत्या.’

राजे हसले. म्हणाले, ‘भीमा, एवढं केलंत, हे काय थोडं झालं?’ हातातले सोन्याचे कडे त्यांनी भीमाला दिले. ते म्हणाले, ‘हे चौघांत वाटून घ्या.’

‘तुमच्या हाताचं कडं मोडणार काय आमी? पूजेला ऱ्हाईल हे!’

राजे वाड्यात आले. मागोमाग भीमा आला. राजे वळले. त्यांनी विचारले,

‘काय, भीमा?’

भीमाने राजांचे पाय धरले. तो म्हणाला,

‘एक मागनं हाय.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कसलं?’

‘देतो, म्हना?’

‘अरे, तुला नाही म्हणेन का? दिलं!’

‘उद्या जानार हाईसा, तितं मला संगं न्या.’

‘काय म्हणतोस, भीमा? अरे...’

‘राजे, मला तलवार चालवाया येते. भाला येतुया. उगीच धंदा करीत न्हाई म्या. तुमीच तलवार दिलीसा, ते काय लांडगं मारत बसू?’

राजांना गहिवरून आले. त्यांनी भीमाला उठविले. पाठ थोपटीत ते म्हणाले,

‘भीमा! तुझ्यासारखीच माणसं हुडकतोय् मी. जाऊ सकाळी.’

आनंदाने भीमा गेला. लोहारशाळेत भली रात्र होईपर्यंत भीमा एकटाच तलवारीला पाणी पाजीत बसला.

भल्या पहाटे राजे स्नान आटोपून बाहेर आले. चौकात भालदार हत्यारी उभे होते. राजांनी पूर्वेकडे तोंड करून उभ्या असलेल्या अश्वावर मांड टाकली. पाठीमागचे स्वार झाले. त्यांत भीमाही होता. राजांनी मनात देवाचे स्मरण करून घोड्याला टाच मारली. आकाशात नक्षत्रे लुकलुकत होती. पूर्वेला अजून पांढरी कड उमटली नव्हती. रात्रीतून पहाट होत असताना राजे रोहिडेश्वराच्या पायथ्याशी पोहोचले. वाटेवर सारे राजांची वाट पाहत होते.

राजांनी उतरताच विचारले, ‘तानाजी, किती गोळा झाले?’

‘हजारांवर पन्नास!’

‘ठीक आहे! ज्यांना हत्यारं नसतील, त्यांना हत्यारं द्या.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शस्त्रे वाटण्यात आली. पूर्वेला उजाडू लागले होते. साऱ्या रानात पक्ष्यांचा चिवचिवाट वाढला होता. राजांनी येसाजीला विचारले,

‘येसाजी!’

‘जी?’

‘भारे किती तयार आहेत?’

‘पन्नास आहेत.’

‘पुरे होतील?’

‘रग्गड! हत्यारी होते, तेवढे चारी बाजूंनी सोडलेत. इशारत झाली, की गडावर मिळतील.’

‘आणि तू?’

‘मी, तानाजी आपल्या बरोबर राहू. इशारत आली, की रानखिंडीनं वर जायचं. माणसं पेरून आलोय् मी.’

‘गड?’

‘शांत आहे. कालच सुभाना गडावर वस्तीला गेलाय्. त्याची मामी हाय गडावर.’

साऱ्यांच्या चेहऱ्यांवर स्मित झळकले. राजे दादाजींना म्हणाले,

‘दादाजी, तुम्ही इथंच राहा. गड फत्ते झाला, की वर या.’

‘ते नाही जमायचं!’ उमदे दादाजी म्हणाले, ‘रोहिडेश्वरावर अशी शपथ झाली नव्हती. गडावर तुम्ही, आणि गडाखाली मी?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'आज प्रभूला शोभलात खरे! तुमच्याखेरीज असलं प्रभुत्व कोण गाजवणार?' राजांनी दादाजींचे कौतुक केले.

पहाटेचा दरवाजा उघडल्याचा चौघडा वातावरणात घुमला. राजे स्वस्थ होते. एक भारेकरी उठला. राजांना मुजरा करून भारा डोक्यावर घेऊन तो चालू लागला. थोड्या वेळाने आणखी दोन भारेकरी निघाले. अधीर भीमाने विचारले,

'राजे, मी जाऊ?'

'जा! हुशारीनं. इशारत झाल्याखेरीज काही करायचं नाही.'

'तेची काळजी सोडा.'

थोडे भारे आणखी गेले; आणि भीमाने भारा उचलला. राजांनी विचारले,

'तलवार घेतलीस ना?'

भीमाने हसून भाऱ्याकडे बोट दाखविले.

सूर्य क्षितिजावर येईपर्यंत रानात फक्त राजे, दादाजी, येसाजी आणि पन्नास मावळे राहिले. रानावर उन्हे फाकत होती. नव्या पालवीचे नानाविध रंग रानावर दिसत होते. येसाजीने राजांना खूण केली. राजांनी तलवार उपसून मस्तकी लावली; आणि ते गडाच्या रोखाने चालू लागले. एक एक पाऊल सावधगिरीने टाकले जात होते.

गडाच्या दरवाज्यावर चौकी-पहारेकरी दरवाजाच्या देवडीवर चिलीम फुंकीत बसले होते. भारे आत जात होते. पावसाळा आता लौकरच येणार होता. गडावर झडी बांधायचे काम सुरू झाले होते. भारे घेऊन जाणारे सरळ गडात जात होते. पण जसे जास्त भारे जाऊ लागले, तसे एकाचे लक्ष त्याच्याकडे गेले.

'आयला! आजवर झोपले हुते काय भडवे? किती भारं चढत्यात गडावर?'

तोवर आणखीन एक भारा आला. पहारेकऱ्याने हटकले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कुठलं भारं?’

‘इथलंच जी!’ भारेवाला म्हणाला.

‘गाव?’

‘मावळ, जी!’

भारेवाला आत गेला. पाठोपाठ तिघे मुंडासे बांधलेले, ठेवणीतले कपडे केलेले, कमरेला तलवार, हाती भाला घेतलेले गडात घुसले; पहारेकऱ्याकडे न पाहता पुढे जाऊ लागले. पहारेकऱ्याने हाक मारली,

‘आवं पावनंऽऽ...’

‘काय म्हंतासा?’ एकाने वळून विचारले.

‘काय म्हणणार? अगदी घरागत आतच सुटलासा नी. कोन, कुठलं, सांगशिला, का न्हाई? कुटं निघालासा?’

‘कुटलंसा? लगीन ठरवाया निगालोय् आमी!’

‘आवो, पन कुनाचं?’

‘गडाचं!’

‘आँ!’

‘आवो, गडाचा पोरगा, म्हंजे गडाचंच की!’

पहारेकरी हसले. एक म्हणाला, ‘आमांस बोलवा लगनाला.’

‘तुमच्याबिगर लगीन पार पडंल व्हय?’ म्हणत तिघे मिशीवर ताव देत गडावर गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एका पहारेकऱ्याच्या डोक्यात कीड पडली होती. त्याला कुठे तरी खटकत होते. हे भारेकरी, लग्न ठरवायला गेलेले हत्यारबंद इसम. त्याला काही सुचेना. त्याच वेळी आणखीन एक भारा आत घुसला. पहारेकऱ्याने कट्ट्यावरून उडी घेतली. तो ओरडला,

'ए, थांब!'

भारेवाला थांबला.

'कुठं भारं घेऊन निघालास?'

'आत, जी!'

'ते दिसतंय् मला. कुणाच्या घरात?'

'वाड्यात, जी!'

'किल्लेदाराच्या?'

'व्हय, जी.'

'काल हवालदारानं वर्दी दिली व्हती, तेच भारं?'

'व्हय, जी!' भारेकरी म्हणाला.

'टाका भारा खाली.'

भारा खाली टाकला गेला. पहारेकरी ओरडला,

'सोड भारा.'

देवडीवरचे सारे हसत होते. एकजण म्हणाला,

'राम्या, कशाला गोतं करतोस त्याचं? जाऊ दे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तिकडे लक्ष न देता रामजी म्हणाला, ‘उघड भारा.’

भारेकऱ्याने पाहिले. सूर्य वर चढला होता. तो बेताने वाकला; आणि एकदम तोंडात बोट घालून त्याने शीळ घातली.

‘आयलाऽ! डोंबारी काय?’ पहारेकरी म्हणाला. तोच भाऱ्यातून तलवार उपसली गेली. उभ्या जागी पहारेकऱ्याचे डोळे ताठरले. क्षणात तो देवडीकडे धावू लागला. त्याने दोन पावले टाकली असतील, नसतील, तो त्याच्या पिंढरीवर घाव बसला. किंचाळत पहारेकरी कोसळला.

देवडीवाल्यांच्या हातून चिलीम केव्हाच सुटली होती. पायावर पडलेला इंगळ झटकत एक उभा राहिला. बाकीच्या दोघांनी त्याचे अनुकरण केले; आणि जेथे तलवारी, भाले ठेवले होते, तिकडे ते धावले.

शीळ घुमताच मागचा भारेकरी सावध झाला. भीमाने भारा खाली टाकला आणि तलवार काढून तो धावू लागला. एक पहारेकरी नगारखान्याजवळ जाऊन पोहोचला होता.खाली चकमक चालू झाली होती; आणि नगाऱ्याचा आवाज गडावर घुमू लागला. गडाच्या चारही बाजूंनी ‘हर हर महादेव’ च्या गर्जना उठत होत्या. हातघाईचे तुरळक सामने होत होते. पाहता-पाहता चारही बुरुजांच्या चौक्या काबीज झाल्या.

गडाच्या किल्लेदाराची झोप अजून उतरली नव्हती. तो धडपडत बाहेर आला. एकच गोंधळ गडावर माजला होता. ‘शिवाजी आला!’ आरोळी उठत होती. किल्लेदार तलवार घ्यायला वळला; पण त्याच वेळी चारही बाजूंनी शिवाजीचे लोक पुढे आले. किल्लेदार गिरफदार झाला.

शिवाजीराजे एका बुरुजावरून हे सारे पाहत होते. गडावर शांतता पसरली. राजे संथ पावले टाकीत पायऱ्या उतरले. साऱ्यांचे मुजरे झडले. अभिमानाने, कौतुकाने साऱ्यांचे चेहरे फुलले होते. भीमाच्या पाठीला जखम झाली होती. राजे म्हणाले,

‘भीमा, अंगावर जखम घेतल्याखेरीज बरं वाटत नाही?’

‘राजं, करणार काय? नामर्दाची जात ही. पाठीवर घाव घातला!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पळत सुटला असशील!’ तानाजी चिडविण्यासाठी म्हणाला.

‘तर! येशीत जाऊ बघ! दोन मुडदं पडल्यात.’

किल्लेदाराला समोर आणले गेले. किल्लेदार थरथरत होता. उसन्या अवसानाने तो म्हणाला,

‘हे बरं नव्हं! सांगून ठेवतो. लई दीस गमजा चालायच्या न्हाईत ह्या.’

‘येसाजी, गडावर तोफ आहे?’

‘जी, आहे.’

‘याला तोफेच्या तोंडी द्या.’ राजे म्हणाले.

किल्लेदार एकदम राजांच्या पायांवर पडला.

‘राजे, यात काय माझा गुन्हा न्हाई. गड तुमचा हाय! सांगशिला, ती चाकरी करीन.’

राजे हसले. दादाजींच्याकडे वळून म्हणाले,

‘दादाजी! पाहिलंत? ही आदिलशाहीची इमानी माणसं! किल्लेदारांना नजरकैदेत ठेवा. येसाजी, पुढची व्यवस्था होईपर्यंत तुम्ही गडावर राहा. बाळाजी, चिमणाजी, गडाची मालमत्ता, धान्य, शिबंदी यांचा हिशेब करा. आम्ही पुण्याला जाऊन ताबडतोब माघारी येऊ.’

गडाच्या बायाबापड्या येऊन राजांच्या पाया पडत होत्या. राजांनी साऱ्यांना धीर, आश्वासन दिले. गडाची शिबंदी राजांची बनली. जखमींना तातडीने डोलीने शिवापूरच्या वाड्यात हलविण्यात आले. गडाच्या प्रथम दरवाज्याशी येताच राजांचे लक्ष नगारखान्यावर फडकणाऱ्या हिरव्या ध्वजावर गेले. राजांनी विचारले,

‘दादाजी! आपला झेंडा आणलात ना?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी!’ म्हणत दादाजींनी झेंडा पुढे केला.

‘दादाजी, देवाच्या इच्छेनं स्वराज्याचं पहिलं पाऊल पडलं. त्याच देवाचा ध्वज आम्ही यापुढं वापरू; देवाचं राज्य उभं करू.’

नगारखान्यावर राजे गेले. आदिलशाही ध्वज उतरला गेला; आणि निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर भगवा ध्वज फडकू लागला.

□

१९

दादोजींना आज दप्तरी यायला बराच उशीर झाला होता. दादोजींनी दप्तरी प्रवेश करताच शामराव नीळकंठ, सोनोपंत डबीर, बल्लाळ सबनीस उठून उभे राहिले. दादोजी बैठकीवर बसत म्हणाले,

‘आज पूजेला जरा वेळ झाला. शामराव, आपले वैद्य कुठं आहेत? काल मात्रा मिळाली नाही.’

शामराव नीळकंठ म्हणाले, ‘वैद्यराज चार दिवसांपूर्वी शिवापूरला गेले आहेत.’

‘कारण?’

‘राजांनी पाठविलं होतं.’

‘शिवापूरला?’ दादोजी पुढे काही बोलले नाहीत.

वाड्याबाहेर चौकीदार सकाळच्या उन्हात गप्पा मारीत होते. टापांचा आवाज कानांवर आला. भाले सरसावून ते गडबडीने उभे राहिले. भरधाव वेगाने एक स्वार येत होता. वाड्याच्या दाराशी तो पायउतार झाला. घोडा चौकीदाराकडे देऊन अंगावरची धूळही न झटकता तो स्वार आत गेला. दप्तराच्या पायऱ्या चढून तो दप्तरी गेला. त्याने दादोजींना मुजरा केला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय आहे?’

स्वाराने सर्वांवरून नजर फिरविली. तो घुटमळला.

‘पंत, जरा बाहीर येतासा?’

त्रासिकपणे पंत म्हणाले, ‘अरे, सांग ना? इथं कोण परकं आहे?’

स्वार एकदम पुढे झाला. पंतांच्या कानाला लागला. पंत किंचाळले.

‘काय सांगतोस?’ आणि भानावर येत पंत म्हणाले, ‘काय नशा तरी करून आला नाहीस?’

‘नाही, पंत! देवाशपथ, वाड्यात जखमी...’

‘चल, चल. बाहेर चल. इथं नको...’ पंत उठले. भ्रमिष्टासारखे ते दप्तराच्या बाहेर जात होते. उपरणे पडल्याचे भान नव्हते.

मासाहेब मुदपाकखान्यात शिधा सांगत होत्या. पंतांचा निरोप येताच त्या महालात आल्या.

‘काय, पंत?’

‘तरी सांगत होतो, मासाहेब! गेल्या काही दिवसांतली राजांची लक्षणं ठीक दिसत नव्हती. त्यासाठी त्यांना शिवापूरचा तळ हलवायचा होता. वाडा मोकळा हवा होता ना?’

‘पंत, नीट काही सांगाल, की नाही?’

‘नीट घडलं, तर नीट सांगणार!’ पंत बोटांशी चाळा करीत म्हणाले, ‘मासाहेब, राजांचा पराक्रम ऐका-- राजांनी रोहिडेश्वर घेतला.’

‘रोहिडेश्वर?’ शंका येऊन मासाहेबांनी विचारले, ‘तब्येत ठीक आहे ना?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘होती, मासाहेब! आता राहील, की नाही, ते माहीत नाही. राजांच्या रोहिडेश्वराच्या खेपा, दादाजी नरसप्रभूची वाढती संगत, मावळ्यांची जमवणी... साऱ्यांचा अर्थ आता कळला.’

‘कुणी सांगितलं? खोटं असेल!’

‘खोटं? मासाहेब, शिवापूरचा वाडा जखमींनी भरला आहे.’

‘आणि राजे?’

‘देवाची कृपा! राजे सुखरूप आहेत.’

जिजाबाईंनी सुटकेचा नि:श्वास सोडला. त्या हसून म्हणाल्या,

‘पण हे घडलं कसं?’

‘मासाहेब, बाराशे स्वारांनिशी राजे रोहिडेश्वरावर चालून गेले. किल्लेदाराला कैद केलं. गडावर आज आदिलशाही निशाण नाही.’

‘शिवबा आला, की सारं कळेल!’

‘आता कळून तरी काय फायदा? जे घडायला नको होतं, ते घडून गेलं.’

‘राजे केव्हा येणार आहेत?’

‘शिवापूर सोडायच्या तयारीत होते, अशी वर्दी आहे. मासाहेब, उभं राहवत नाही. जरा बाहेर जाऊन बसतो.’

दादोजी बाहेर गेले. जिजाऊंना शिवबाच्या पराक्रमाचे कौतुक वाटत होते; पण त्याचबरोबर कसली तरी हुरहुर वाटत होती. जिजाबाई मुदपाकखान्यात गेल्या. सईबाई बदाम खात होत्या. मासाहेबांना पाहताच त्या उभ्या राहिल्या. मनोहारी शेजारी उभी होती. मासाहेब म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सई, लौकर चांगले कपडे कर. आरती तयार ठेव.’

‘कुणाला ओवाळायचं?’

‘मला ओवाळ आता! शहाणे, तुझा नवरा पराक्रम करून घरी येतोय्. त्याला ओवाळ. राजांनी रोहिडेश्वर काबीज केलाय्.’

सईबाई सणासुदीचे कपडे घालून तयार झाल्या. मनोहारी सईबाईंच्या अंगावर एक एक दागिना चढवीत होती. सईबाईंनी विचारले,

‘मनोहारी, तू ह्यांना पाहिलंस?’

‘आत्ता, ग, बया! अवो, राजांनी मला पाहिलं नसतं, तर हे पाय कशाला दिसलं असतं?’

‘नशीब तुझं. घरात असून आम्हांला दर्शन घडत नाही.’

‘आत्ता येतीलच की!’

‘इकडून यायचं, आणि तिकडे जायचं!’

‘आता राजे आले, की सोडूच नका. नवरा मुठीत ठेवावा, म्हंत्यात.’

सईबाई हसल्या. राजांना मुठीत ठेवण्याच्या कल्पनेने त्यांना हसू आले. त्या म्हणाल्या,

‘ठेवला असता, ग... पण...’

‘पन काय?’

‘मूठच लहान आहे, बघ!’ सईबाई खळखळून हसल्या.

‘खिदळत काय बसलाय्?’ जिजाबाईंचा आवाज आला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दोघी उठून उभ्या राहिल्या. सईबाई म्हणाल्या,

‘आमची तयारी झाली.’

‘हो! ते दिसतंच आहे. पण आरतीकडे कुणी पाहायचं?’

दोघी जीभ चावून बाहेर पळून गेल्या.

राजांचा रोहिडेश्वराचा पराक्रम साऱ्या वाड्यात पसरला होता. जिकडे तिकडे कुजबूज चालू होती. घोड्यांच्या टापांचा आवाज येऊ लागला; आणि जो तो हातांतली कामे टाकून धावू लागला. अश्वपथक वाड्यासमोर येऊन थांबले. घोड्यांच्या टापांनी राजवाड्याबाहेरचे मैदान भरून गेले. राजे पायउतार झाले. वाड्याच्या दाराशी सुवासिनींनी राजांच्या पायांवर पाणी घातले. दहीभात ओवाळून टाकला. राजांनी पाय उचलला, तोच पिवळे जरी वस्त्र नेसून येणाऱ्या सईबाई नजरेत आल्या. पुन्हा पाऊल मागे घेतले. सईबाई आल्या. त्यांनी राजांच्या मस्तकी टिळा लावण्यासाठी हात उंचावला. राजांनी मान वाकवली. घामाने भरलेले कपाळ, धारदार नाक, कानांत हेलकावे घेणारी ती कर्णकुंडले- क्षणात केवढे मोहक दर्शन घडले! सईबाई लाजल्या. राजांची नजर सईबाईंना निरखीत होती. सईबाईंनी गडबडीने विडा हाती दिला, आणि ओवाळले. विडा तबकात ठेवताना राजांच्या ओठांवर हसू होते. राजे आत आले. मासाहेबांच्या पायांना हात लावून ते पाया पडले. मासाहेब म्हणाल्या,

‘औक्षवंत व्हा! विजयी व्हा!’

राजांचे लक्ष मासाहेबांच्या शेजारी उभ्या असलेल्या मनोहारीकडे गेले. राजे थांबले. जिजाबाईंनी विचारले,

‘का थांबलात, राजे?’

मनोहारीकडे बोट दाखवीत राजे म्हणाले, ‘हिला कुठं तरी पाहिल्यासारखं वाटतं.’

जिजाबाई हसल्या. त्या म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, एवढ्यात विसरलात? नाचणीला पाटलांनी तुमच्या समोर...’

‘आठवलं! ही मनोहारी ना?’

‘हो. चांगली आहे मुलगी! तुम्ही भेटला नसता, तर काय झालं असतं मुलीचं, कुणास ठाऊक?’

राजे सदरेत आले. सदरेत तानाजी, दादाजी नरसप्रभू उभे होते. राजांनी पेशव्यांना विचारले,

‘दादोजी कुठं आहेत?’

‘दप्तरी!’

राजांनी दादाजींच्याकडे पाहिले. दादाजी राजांच्या मागून चालू लागले. ते दप्तरी जाताच दादोजी उठून उभे राहिले. दप्तरी दादोजी एकटेच होते. राजांनी दादोजींना नमस्कार केला. दादोजी राजांच्याकडे पाहत होते.

‘राजे, हे करायचं होतं, तर आधी का सांगितलं नाही?’

राजे काही बोलले नाहीत.

‘आम्ही विश्वासातले वाटलो नाही?’

‘गैरसमज होतोय्, दादोजी!’

‘चांगला समज झाला आहे. भावनेच्या भरात एक गोष्ट करून गेलात. परिणाम माहीत आहेत?’

‘ते आनंदानं सहन करू!’ राजे सहजपणे बोलून गेले.

‘हं! बोलणं फार सोपं. आज रोहिडेश्वर काबीज केलात-- आदिलशाहीचा गड घेतलात!

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बादशाहीत राहून बादशाहीशी वैर पत्करलंत.'

'कुठली बादशाही, दादोजी? कुणाची?' राजे उफाळले. 'जिथं धर्म सुरक्षित नाही, दैवत सुरक्षित नाही, नोकरीही स्थिर नाही.'

'कुठली नोकरी?'

'आपण सांगितलं नाही, म्हणून आम्हांला कळायचं राहिलं थोडंच? शहाजीराजांच्यावर, त्याबरोबर तुमच्यावरही, ठपका देऊन थोरल्या महाराजांची दरबारी चौकशी झाली, ती कशासाठी?'

'तो गैरसमजाचा प्रकार होता.'

'गैरसमज! शाही गैरसमजाचे परिणाम आम्ही जाणतो. मुरार जगदेव हाल हाल करून मारले गेले. अशाच गैरसमजातून आमच्या आजोबांचे, लखुजी जाधवरावांचे, मानाच्या सरदारांचे भर दरबारी तुकडे उडवले गेले. असले गैरसमज फार दिवस सहन व्हायचे नाहीत आम्हांला!'

'मग तुमच्या प्रकारानं थांबतील?'

'श्रींच्या मनात असेल, तर जरूर थांबतील!'

दादोजी दादाजी नरसप्रभूंकडे पाहत उफाळले, 'आणि तू! तुला तरी अक्कल हवी होती. अरे, जेध्यांचा कारभारी तू, शाही दरबाराचा वतनदार, रोहिडखोऱ्याचा देशपांडे! या पोरखेळात सामील झालास?'

राजे शांतपणे म्हणाले, 'पंत! हा पोरखेळ नाही.'

'राजे, तुमचं वय लहान आहे. फार पावसाळे या पिकल्या केसांनी पाहिलेत! निदान राजकारणात तरी मला शिकवू नका. थोरल्या महाराजांनी असाच बंडावा केला होता. सहाहजारी फौज होती. सारा मावळ महाराजांच्या मागे उभा होता. काय झालं त्या बंडाव्याचं? धुळीला मिळालं ते स्वप्न! जिथं त्यांची ही स्थिती...'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘एक अपयश हे कदाचित दुसऱ्या यशाची सुरुवात असते....’

‘राजे, मला फार बोलता येत नाही. पण मी सांगतो, ते ध्यानी ठेवा. पुढं हे शब्द आठवतील. तुम्ही जो डाव टाकीत आहा, तो कदाचित...’

राजे ओरडले, ‘थांबा, पंत! दैव कुणाला चुकलं नाही. आमच्या कार्याला आशीर्वाद देता येत नसेल, तर देऊ नका. पण आज देवांचं राज्य उभं करीत असता शाप तरी नका देऊ! येतो आम्ही...’

-आणि भावनाविवश झालेले राजे दप्तरातून निघून गेले.

साऱ्या मावळ्यांचे जेवणखाण होऊन हातावर पाणी पडायला संध्याकाळ झाली. जिजाऊंच्या महालात राजे बराच वेळ बसले होते, जिजाऊ म्हणाल्या,

‘दादोजींनी हे मनाला फार लावून घेतलं आहे. राजे, आता थोडे दिवस सबुरीनं घ्या.’

‘मासाहेब, तसं करता येईल, असं वाटत नाही.’

‘कारण?’

‘कारण एक गड घेतला काय, आणि अनेक गड घेतले काय, आता जाणून बुजून सापाच्या शेपटीवर पाय ठेवला आहे. दुसरे गड सावध व्हायच्या आत, सत्ता बळकट करायला हवी.’

‘आणि विजापूरकर चाल करून आले, तर?’

‘त्याचाही आम्ही विचार करून ठेवला आहे. मंद गती हे शाह्यांचं बिरूद आहे. कागदी घोडे नाचवून हवा तेवढा वेळ काढता येईल.’

जिजाबाई निःश्वास सोडून म्हणाल्या, ‘तुम्ही काय करावं, हे जाणता! लक्षात ठेवा एवढंच -आम्हांला दुसरा आधार नाही. जे काही कराल, ते पूर्ण विचारानं आणि श्रद्धेनं करा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे उठत म्हणाले, ‘मासाहेब, येतो आम्ही. पहाटे परत गडावर जायचं आहे. सारा बंदोबस्त पुरा व्हायचा आहे.’

‘थांबा.’ जिजाबाई म्हणाल्या. त्यांनी आपली संदूक उघडली. एक थैली राजांच्या हाती देत त्या म्हणाल्या,

‘हे हजार होन आहेत- माझे स्वत:चे. ठेवून तरी काय उगवतात? तुम्हांला हे उपयोगी पडतील.’

राजांना अश्रू आवरणे कठीण गेले. ते म्हणाले,

‘मासाहेब, हे हजार होन नाहीत. यांची किंमत होणार नाही. स्वराज्यावरचं कोणतंही संकट टाळायला ही दौलत समर्थ आहे.’

राजांनी मासाहेबांचे पाय शिवले. राजांच्या पाठीवरून मायेचा हात फिरला; आणि राजे आपल्या महाली गेले.

सकाळी राजे स्नान करून महाली आले. सईबाई उभ्या होत्या. पलंगावर कपडे काढून ठेवले होते. जिरेटोप, तलवार, बिचवादेखील व्यवस्थित ठेवला होता.

‘सुखाचे दिवस आले, म्हणायचे!’ राजे म्हणाले.

‘तर! जसे काही आत्तापर्यंत हालच होते.’

‘पुरुषांची दु:खं तुम्हांला कशी कळणार? केवढाही पराक्रमी पुरुष असो, त्याला हवे ते कपडे आणि हत्यार वेळेवर मिळणं कठीण! मग सेवकांवर रागवायचं; आरडाओरड व्हायची; आणि जेव्हा तयार व्हायचं, तेव्हा सारे रचलेले बेत त्या संतापानं विरघळून जायचे, हे ठरलेलं!’

राजांनी कपडे केले. सईबाईंनी एक एक हत्यार दिले; शेवटी टोप दिला. राजे म्हणाले,

‘आज शिरस्त्राण असतं, बरं झालं असतं...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आता कुठली लढाई?’

‘छे, आता कुठली लढाई? आता माघार! दादोजींना भेटण्यासाठी आम्ही निघालो आहोत ना?’

‘पंत काही रागावले नाहीत!’

‘कुणी सांगितलं?’

‘सांगायला कशाला हवं? आपण मासाहेबांच्या महालातून आलात; आणि दादोजी मासाहेबांच्या बरोबर बोलताना बाहेरून ऐकलं.’

‘काय म्हणत होते?’

‘दादोजी म्हणत होते- हे कुणी तरी करायलाच हवं. ती वेळच आली होती. राजे

करतात, याची भीती वाटते.’

न कळत सईबाई दादोजींची नक्कल करीत होत्या. राजे हसले. म्हणाले,

‘राणीसाहेब, आम्ही स्वराज्याची स्थापना केलीच आहे. आता आम्हांला जासूदही ठेवावे लागणारच. वाड्यातल्या बातम्या काढायला आपली नेमणूक करायला काहीच हरकत नाही. एवढ्या विश्वासाचा आणि काळजीचा जासूद मिळणार कुठं?’

सईबाई लाजल्या; आणि राजे दादोजींच्याकडे हसत गेले. त्यांची भीती थोडी कमी झाली होती.

राजे पंतांच्या पाया पडले. पंत काही बोलले नाहीत. राजे म्हणाले,

‘पंत, आम्ही रोहिडेश्वराला जाऊन येतो.’

‘ठीक!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बरोबर पेशवे, डबीर, अमात्य न्यावे, म्हणतो.’

‘राजे तुम्ही नेऊ शकता. आपल्याच जहागिरीसाठी महाराजांनी ते दिले आहेत.’

‘येतो आम्ही.’ म्हणत राजे वळले. तोच पंतांनी हाक मारली,

‘राजे!’

राजे थांबले. मागून शब्द आले.

‘राजे! गड नवखा. नुकताच घेतलेला. घातपात होण्याचा संभव असतो. सावधगिरीनं राहा.’

दुसऱ्या दिवशी सकाळी दोन स्वार तातडीने रवाना झाले. जिजाबाईंनी विचारले,

‘एवढ्या तातडीनं स्वार कुठं गेले?’

‘बंगळूरला?’

‘कारण?’

‘मासाहेब! इथं जे घडतं, ते थोपवू शकलो नसलो, तरी थोरल्या महाराजांना, जे घडलं, ते कळवणं माझं कर्तव्य आहे. ते मी केलं आहे.’

□

२०

राजांनी रोहिडेश्वराचे बांधकाम जारीने सुरू केले. तटबंदी भक्कम होत आली. पुण्याच्या वाड्यात दप्तरात स्वराज्याचे नवीन खाते उघडण्यात आले. बारा मावळांतले मावळे येत. मावळ्यांच्या नावनिशीवार याद्या होत. तीन हजारांपर्यंत मावळे वाढले होते. पंत हे सारे पाहत होते. जसा त्यांचा विरोध नव्हता, तसा त्यांचा पाठिंबाही नव्हता. जहागिरीच्या कामात

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लक्ष घालून ते सचिंत बसलेले असत.

एके दिवशी पंत राजांना म्हणाले,

‘राजे! हे तुमचे मावळे कशाच्या जोरावर लढणार आहेत?’

‘त्या कामी निष्ठा लागते. तेवढी त्यांच्याजवळ आहे.’

‘फार दिवस पुरायची नाही ती. राजे, सैन्य नुसत्या निष्ठेवर लढत नसतं. त्याला पोटही असतं.’

‘पंत, मला आपला रोख कळला. आपण चिंता करू नका. पैशासाठी आम्ही तुमच्याकडे येणार नाही.’

‘संतापू नका, राजे! त्याऐवजी थोडा विचार करा. गडाची बांधणी, मावळ्यांचे पगार हे सारं छत्तीस गावच्या पोटमोकाशावर चालेल कसं?’

‘ज्यानं बुद्धी दिली, तो चालवायला समर्थ आहे. पांगळा सुद्धा पायांविना चालविण्याची त्याची शक्ती आहे, हा विश्वास तुकाराम महाराजांच्या तोंडून आम्ही ऐकला आहे.’

राजांनी अवसानाने उत्तर दिले खरे; पण पंतांच्या सांगण्यातली सत्यता त्यांना जाणवत होती. पैशाशिवाय हे चालणार कसे? किती उपास सहन करीपर्यंत मावळे राजांच्या कामी गुंतणार? राजांना काही सुचत नव्हते. ते बेचैन झाले.

जिजाबाईंच्या लक्षात ही बेचैनी येत होती. त्यांनी राजाला विचारले,

‘राजे, रोहिडेश्वर बांधला जातो आहे. सारं काम होत आहे. मग तुम्ही उदास का? कसलं संकट आहे?’

‘छे! तसं नाही, मासाहेब! ही सारखी रपेट होत आहे ना, त्यामुळं तुम्हांला तसं वाटत असेल.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शिवबा! आईची नजर फसवता येत नाही. आई आणि गुरू यांच्यापासून काहीही लपवून ठेवता येत नाही-- ठेवूही नये.’

राजांनी नि:श्वास सोडला. पंतांचे बोलणे सांगितले. जिजाबाई म्हणाल्या,

‘सध्या तर चिंता नाही ना! मग कल्पनेच्या भीतीनं कशाला राहायचं? माणसं दोन स्वभावांची असतात. काही मागचा-पुढचा विचार करतात. सावधगिरी हा त्यांचा स्वभाव असतो. अपयशाची त्यांना सदैव भीती वाटत असते. त्या अपयशाच्या जागा हुडकण्यात त्यांचं मन व्यग्र असतं. अशा माणसांचं जीवन स्थिर राहतं; पण त्यांच्या हातून फारसं घडत नाही. दुसरी, मनाला पटेल ते करणारी माणसं असतात. परिणामाचा विचार त्यांना नसतो. स्वारीचंच बघा ना. झेपावणं हे त्यांच्या स्वभावात आहे. परिणाम ते जाणीत नाहीत. तो स्वभाव, ते धाडस तुमच्या अंगी आलं आहे.’

‘पण हे वेडं धाडस ठरलं, तर?’

‘कोण ठरवणार? स्वारींनी बंडावा केला. मोगलाई-आदिलशाहीला एकट्यांनी तोंड दिलं. बंडावा मोडला, म्हणून त्यांना पराजित समजायचं? ज्ञानेश्वरांनी गीता मराठीत आणली. लोकांनी वाळीत टाकलं त्यांना. ते पराजित होते? मग आळंदीचं मंदिर कसं उभं राहिलं? भीतीपोटी माणसाच्या हातून काहीही घडत नाही, हे लक्षात ठेवा.’

‘मासाहेब!’

‘राजे, देवाधर्मावर विश्वास ठेवून कार्य आरंभलंत. ते पार करण्याची ताकद त्याची आहे. त्याची शंका घेऊ नका. राजे, मनात आणाल, ते उभं करण्याची तुमची हिंमत आहे. तो तुमच्या कुंडलीचा योग आहे. देव्हाऱ्यात देव, तशी मनात निष्ठा, हिंमत शोभते. त्या मनात कल्पनेची भीती घालू नका.’

जिजाबाईंच्या बोलण्याने राजांचे थकलेले मन ताजेतवाने झाले. मनातली भीती झाडून टाकून ते मोकळे झाले.

राजांचे लक्ष वळले तोरण्यावर-- आकाशाला भिडलेला, चढायला कठीण, पण संपूर्ण दुर्लक्षित असलेला. किल्लेदार गाफील. राजांनी सरळ तोरण्यावर धडक दिली; आणि

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गाफील गड ताब्यात घेऊन त्यावर कब्जा केला. तोरण्यापाठोपाठ तोरण्याच्या आग्नेयेस दुरजादेवीचा डोंगर ताब्यात घेतला. दोन्ही गडांच्या तटबंदीचे काम झपाट्याने होणे फार अगत्याचे होते. हिंमत बांधून राजांनी गडाचे काम सुरू केले.

घरचे गुपित गावात पसरायला वेळ लागत नाही; मग सह्याद्रीच्या उघडपणे फडकणारी स्वराज्याची द्वाही कशी दडून राहील? राजांच्या क्रोधाला बळी पडलेल्या बांदल देशमुखांच्यासारख्या देशमुखांनी ह्या बंडाव्याची आगळीक शिरवळला जाऊन सुभानमंगळ किल्ल्याच्या ठाणेदार अमीनला दिली. अमीनाचे डोळे उघडले. त्याने तातडीने विजापूरला शिवाजीच्या बंडाव्याचे वृत्त कळविले. बाबाजी नरसप्रभू गुप्ते राजांना मिळाल्याबद्दलची तक्रार केली गेली.

सरकारी चक्रे जशी फिरत होती, तशी तोरणा गडावर चुनाघाणीची चक्रे मंद गतीने राबत होती. तटाचे काम चालले होते. हाती लागलेल्या गडाच्या तुटपुंज्या खजिन्यावर आणि धान्यसाठ्यावर एवढे मोठे काम होणार कसे? खजिना झर झर संपत होता. राजे विचारात पडले होते. काही मार्ग सुचत नव्हता. पुण्यात ते संचित बसून होते. मासाहेबांना ते म्हणाले,

'मासाहेब, गडाचं काम थांबवावं लागणार!'

मासाहेब काही बोलल्या नाहीत. राजे म्हणाले,

'काय करावं, सुचत नाही.'

'जे होईल, ते खरं. त्याला इलाज नाही.'

मासाहेब अस्वस्थ झाल्या. एवढ्या हौसेने मांडलेला डाव मध्येच बंद ठेवावा लागणार. हे त्यांना पाहवत नव्हते. न राहवून त्या म्हणाल्या,

'राजे, दागिने, भांडी काढली, तर?'

'जर जमत असतं, तर तेही करण्यात आम्ही कुचराई केली नसती. पण तोरण्यासारखा अव्वल गड बळकट करायला तेवढंच आर्थिक बळ हवं. देवीडोंगराच्या तर तीन माच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बांधायला हव्यात. तरच त्याला शोभा, बळकटी येईल. आम्ही उद्या काम बंद ठेवण्याची आज्ञा करू.'

जड पावलांनी राजे उठले आणि शयनगृहाकडे गेले. रात्रभर राजे तळमळत होते. पहाटेला त्यांना जागे करण्यात आले. तानाजी आल्याची वर्दी आली. एवढ्या भल्या पहाटे तानाजी!

राजे तसेच बाहेर गेले. तानाजीच्या चेहऱ्यावर रात्रीच्या प्रवासाचा थकवा मुळीच नव्हता. राजांनी अधीर होऊन विचारले,

'तानाजी, तातडीनं बरं?'

तानाजी राजांच्या कानाजवळ कुजबुजला. राजांचा चेहरा क्षणात उजळून निघाला. ते म्हणाले,

'देवाची कृपा! थांब, तानाजी. मासाहेबांना सांगून येतो आम्ही. त्या काळजीत असतील.'

मासाहेब उठल्या होत्या. एकनाथी भावार्थ रामायण वाचीत होत्या. राजे महालाच्या दाराशी थांबले. आतले दृश्य पाहून ते मुग्ध झाले. मासाहेबांच्या उजव्या हाती समई तेवत होती. समईची काजळी हळुवार हातांनी सईबाई झाडीत होत्या. जिजाबाईंची नजर हाती धरलेल्या पोथीच्या पानावरून फिरत होती. शब्द उमटत होते...

अवताराचें सामर्थ्यपण। प्रपंचपरमार्थीं सावधान।
उभयतां दिसों नेदि न्यून। तें चिन्ह अवधारीं।।
तोडी नवग्रहांची बेडी। सोडवी देवांची बांधवडी।
उभवी रामराज्याची गुढी। आज्ञा धडफुडी तिहीं लोकीं।।
सांडी समाधीची भ्रांति। धनुष्यबाण घेऊनि हातीं।
रामनामाची ख्याति। त्रिजगतीं उद्धरीं।।

अध्याय संपला. जिजाबाईंनी पोथी मस्तकी लावली; आणि त्या सईबाईंना म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कशाला एवढ्या भल्या पहाटे उठतेस?’

राजांनी हाक मारली, ‘मासाहेब!’

‘कोण, शिवबा?’ म्हणत उठत असताना त्या म्हणत होत्या, ‘शिवबा, रात्रभर झोप आली नाही, बघ.’

राजांच्या हसतमुख चेहऱ्यावर त्यांची नजर खिळली. आश्चर्यानं त्या म्हणाल्या,

‘नेहमी कसला हसत असतोस? मनात काय आहे, ते काही कळत नाही.’

राजे जिजाबाईंच्या जवळ गेले. सईबाईंच्याकडे पाहत म्हणाले,

‘तोंडात तीळ भिजेल का?’

सईबाई म्हणाल्या, ‘नाही भिजायचा! मी जाते!’ आणि एवढे बोलून त्या निघून गेल्या. मासाहेब म्हणाल्या,

‘उगीच चिडवतोस तिला.’

‘ते जाऊ द्या. मासाहेब, आनंदाची बातमी आहे.’

‘काय? आता मांडलेला पसारा आवरल्याखेरीज काही करू नको.’

‘तो चुटकीसरशी आवरला जाईल.’

‘ते कसं?’

‘मासाहेब! तुम्ही म्हणालात, तेच खरं. मनात हिंमत असली, तर देव्हाऱ्यात देव प्रकटायला वेळ लागत नाही.’ हलक्या आवाजात राजे म्हणाले, ‘तानाजी बातमी घेऊन आला आहे-- काल तटाचं काम चालू असताना धन सापडलं. विपुल साठा आहे धनाचा. मोहरांचे हंडे आहेत!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘लाज राखली देवानं!’

राजे तानाजीकडे गेले. तानाजीला सांगताच तानाजी म्हणाला,

‘नको, राजे! जोखमीचं काम. तुम्ही चला.’

‘तसं काही तुमच्या मनात असतं, तर खजिन्याची वार्ता सांगायला कशाला आला असता तुम्ही? शिबंदी घे; आणि खजिना घेऊन इकडे ये. माझी तिथं काही गरज नाही.’

राजे स्नान करून महालात आले; पण सईबाई कुठेच दिसत नव्हत्या. तेवढ्यात मनोहारी दूध घेऊन आली. राजांनी विचारले,

‘राणीसाहेब कुठं आहेत?’

‘मुदपाकखान्यात!’

‘त्यांना पाठवून दे!’

राजे पलंगावर बसून होते. सईबाई आत आल्या. त्यांच्या डोळ्यांच्या कडा तांबूस दिसत होत्या. त्यांनी विचारले,

‘काय?’

‘दिसला नाही, म्हणून हाक मारली.’

सईबाई म्हणाल्या, ‘जा म्हणवून घेण्यापेक्षा महालाबाहेरच राहिलेलं बरं.’

‘राग गेलेला दिसत नाही.’ म्हणत राजे उठले. राजे उठलेले पाहताच सईबाई पाठ फिरवून उभ्या राहिल्या. राजे आर्जवाने म्हणाले,

‘ऐकावं तरी...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘उगीच काही सांगू नका. तीळ भिजत नाही तोंडात!’

‘आता जे काही सांगणार आहोत, ते चारचौघांत सांगायला मुळीच हरकत नाही. आम्ही घेतलेले किल्ले-- तोरणा, दुरजादेवी आणि खुद्द रोहिडेश्वर आम्ही सोडणार आहो. आदिलशाहीपुढं आम्ही शरणागत जाणार आहो...’

‘काय?’ म्हणत सईबाई वळल्या. चेहरा भीतीने व्यग्र झालेला. डोळे भरलेले. उजवा हात हलवीत त्या थरथरत्या ओठांनी ‘नाही, नाही’ म्हणत होत्या; पण शब्द फुटत नव्हते. राजांना बोलल्याचा पश्चात्ताप झाला. त्यांनी झटकन सईबाईंना जवळ घेतले. त्यांचा चेहरा हातांत घेत ते म्हणाले,

‘खुळी! थट्टा केलेलीही कळत नाही? आम्ही कधी शरणागत जाऊ?’ राजांनी सईबाईंचे डोळे पुसले. खाली पाहत सईबाईंनी नाक ओढले; आणि त्या एकदम हसल्या.

‘सई, इकडे बघ.’

सईबाईंनी नजर वर केली. राजांच्या गालांवर कोवळी दाढी शोभत होती. पातळ ओठांवर तेच हास्य विलसत होते. नजरेला नरज देत राजे म्हणाले,

‘तोरण्यावर खजिना सापडला, सई! मोहरांचे हंडे सापडले. सई, गडाचं काम आता बघता-बघता पुरं होऊन जाईल!’

‘खरं?’

‘हो!’

‘मग मी मासाहेबांच्या जवळ राहिले असते, तर काय बिघडलं असतं?’

‘असली बातमी का मासाहेबांच्या समोर सांगायची? कालच आम्ही तुझी जासूद म्हणून नेमणूक करून दिली. असला अधीरेपणा जासुदाला काय कामाचा?’

राजांच्या विस्फारित नेत्रांकडे पाहताच सईबाई मोठ्याने हसल्या. राजांनी त्यांना एकदम

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जवळ घेतले. ते म्हणाले,

‘सई, हे तुझं खळखळून हसणं मला फार आवडतं.’

‘सोडा पाहू! कोणी आलं, तर?’

‘काय बिशाद आहे कुणाची? राजे-राणीसाहेब आपल्या महाली आहेत, हे मनोहारीला माहीत असता महाली कोण येतो?’

राजांच्यापासून दूर जात सईबाई म्हणाल्या, ‘मग का सोडलंत, तर?...’

राजांना सईबाई बोलल्याचा अर्थ कळेपर्यंत सईबाई महालाबाहेर गेल्याही होत्या.

□

२१

बंदोबस्तात खजिना वाड्यात आला. मोहरांची, सोनेनाण्यांची मोजदाद झाली. दादोजींना जेव्हा हे समजले, तेव्हा ते राजांना म्हणाले,

‘बरं झालं. अडचणीच्या वेळी तुमच्यावर लक्ष्मी प्रसन्न झाली. देवानं देणं दिलं आहे. तो खर्च करायला तुम्ही मुखत्यार आहात. पण सारे अंदाज बांधून कामं उभी करा.’

दादोजींच्या एवढ्या मान्यतेवरही राजे खूश होते. तिन्ही गडांची कामे सुरू झाली. राजांनी त्याच द्रव्यातून शस्त्रे खरीदली; बंदुका घेतल्या. देवीगडाच्या सुवेळामाचीचे काम रूप घेऊ लागले. राजांचे पाय आता पुण्यात टिकत नव्हते. या तिन्ही गडांवर त्यांच्या खेपा होत होत्या.

राजे शिवापूरच्या वाड्यात असताना त्यांना तातडीचे बोलावणे आले. दादाजी व त्यांचे वडील नरसीबाबा वाड्यात आले होते. सदरेवर बाबाजी, दादाजी व दादोजी अधोवदन बसले होते. राजे तिघांना आतल्या महालात आले. जिजाबाई म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बाबाजी घाबरून गेले आहेत. त्यांना काहीच सुचत नाही.’

‘एवढं घाबरण्यासारखं काय आहे? एक खलिता आला, म्हणून एवढं घाबरायचं?’ राजे म्हणाले.

दादोजींनी विजापूरकरांचे पत्र समोर टाकले. ते म्हणाले,

‘राजे, साऱ्याच गोष्टी लहान समजून चालत नाहीत. वाचा तो खलिता, म्हणजे आम्ही काळजीत का पडलो, ते समजेल.’

राजांनी खलिता उघडला. नजर फिरू लागली. दादोजी म्हणाले,

‘मोठ्यानं वाचा ना! मासाहेबांनाही मजकूर कळेल.’

‘ठीक आहे’ म्हणत राजे वाचू लागले-

> ‘वजारतमाब सिवाजीराजे फरजंद शहाजीराजे याणे शहासी बेमानगी करून तुझे खोरियात रोहिडेश्वराचे डोंगराचे आश्रयाने पुंडावेयाने मावळे वगैरे लोक जमाव केला आणि तेथून जाऊन पेशजी किल्ल्यावरील ठाणे उठवून आपण किल्ल्यात शिरला...
>
> हे न जालियास खुदावंत शहा तुजला विजापुरी नेऊन गरदन मारतील व जमेदारी हककानू चालणार नाही. हे मनी समजणे आणि याऊपरी दिवाणात रुजू राहणे...’

राजांनी पत्र वाचून संपविले; आणि ते बाबाजींना म्हणाले,

‘बाबाजी, एकंदरीत तुमची धडगत दिसत नाही. गर्दन मारली जाणार, असं दिसतं.’

बाबाजी म्हणाले, ‘राजे, शाही फर्मान म्हणजे काय थट्टा वाटते? उद्या घरादारांवरून गाढवाचे नांगर....’

‘बाबाजी! जसा दादाजी, तसा मी! गाढवाचे नांगर फिरतील, तर तेव्हा आम्ही असणार नाही. आम्हीही रोहिडेश्वरी शपथेत गुंतलो आहोत. त्यात आम्ही अंतर आणणार नाही.’

बाबाजी म्हणाले, ‘मी म्हातारा! आता माझे किती दिवस राहिले? पण तुमच्यासारखी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मुलं... काळजी वाटते, ती तुमची!'

'तुमचे आशीर्वाद असता काळजी कसली? हिंदवी स्वराज्याचे मनोरथ पुरवणारा तो समर्थ आहे. हे राज्य व्हावं, हे श्रींच्या मनात फार आहे. त्यावर आमची निष्ठा आहे.'

'राजे, तुमची निष्ठा काय कामाची? आदिलशाहीशी टक्कर ही काय सामान्य गोष्ट आहे? नुकतं मिसरूड फुटू लागलंय् तुम्हांला. हे केस राजकारणात पांढरे झाले.'

'आमचं वय! फार वेळा ऐकतोय् ते! बाबाजी, श्रीकृष्ण गोकुळातून मथुरेला गेले, तेव्हा कृष्णाचं वय काय होतं? राम यज्ञरक्षणासाठी गेले, तेव्हा त्यांचं वय काय होतं? ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली, तेव्हा त्यांचं वय काय होतं?'

'राजे ह्या देवादिकांच्या गोष्टी! त्या सामान्य माणसाला....'

'कोण सामान्य मानव? सामान्य समजणं हे चूक आहे. देवांचं राज्य उभं करायला आपण ठाकलो. त्या राज्यात देवांचंच अनुकरण केलं पाहिजे. दीन, दुबळे, हीन समजून राहणाऱ्यांच्या हातून हे कार्य कसं घडेल?'

बाबाजी म्हणाले, 'राजे, मी काय करू?'

राजे म्हणाले, 'मी कोण सांगणार? तुमच्यावर का सक्ती आहे? हे पटत नसेल, तर माफी मागून मोकळे व्हा!'

बाबाजी थरथरत म्हणाले, 'माफी? जिवासाठी?- राजे, हेही मावळचंच हाड आहे. तुमच्या बरोबर आमचं व्हायचं ते होऊ द्या!'

दादाजी अभिमानाने आपल्या वडिलांच्याकडे पाहत होते. दादोजींना निःश्वास सोडला. ते म्हणाले,

'हे असं होणार, हे माहीतच होतं. बाबाजी, मला वाटलं होतं, तू राजांना सांगशील. सारं शिकवलेलं वाया गेलं.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पंत, असं कसं म्हणता? राजांचं काय खोटं आहे? राजांच्या मागे देव उभा आहे. मीच म्हणतो, असं नाही; सारे म्हणतात! करतील, त्यात त्यांना यश आहे. खजिना सापडला, तो काय अवकाशातून पडला?’

‘बस्स कर, बाबा! एकटे राजे ऐकवतात, तेवढं पुष्कळ झालं. त्यात तुझी भर घालू नको.’ दादोजी म्हणाले.

‘दादोजी, तुम्ही चिंता करू नका. आम्ही आमच्या पेशव्यांच्या मार्फत विजापूर दरबारला थैली रवाना केली आहे.’

‘काय म्हणून केलीत?’ घाबरून दादोजींनी विचारले.

‘दादोजी, आपल्या संगतीत राहून तेवढंही कळत नाही होय?- ‘इथले गड गाफील आहेत. मुलुखात अंदाधुंदी आहे. बादशाहीनं जो मुलूख जहागिरीचा दिला आहे, त्याचा बंदोबस्त करणं कठीण आहे. त्यासाठी हे गड घेऊन मुलुखाचा बंदोबस्त केला आहे. शाही नोकरीत बेइमान होणार नाही...’ अशा मजकुराचं पत्र आम्ही पाठविलं आहे. तेवढ्यावर बादशहा समाधान मानून घेईल.’

‘कुठवर?’ दादोजींनी विचारले.

‘जमेल तिथवर!’ राजे म्हणाले.

‘आणि महाराजसाहेबांना कळलं, तरी?’

‘ते कळायचं राहिलंय् थोडंच? तुम्हीच ते कळवलंत ना! आबासाहेबांचं अजून उत्तर आलं नाही. एवढी महत्त्वाची बाब. आबासाहेबांच्या मनात विकल्प आला असता, तर त्यांनी पत्र पाठविलं असतं. पत्र नाही, याचा अर्थ अनुज्ञा, असाच आम्ही घेतो.’

‘तुम्ही हवा तो अर्थ घ्यायला मोकळे आहात; पण पत्र नाही, याचा अर्थ आम्ही निराळा करतो.’ दादोजी म्हणाले.

‘कसला अर्थ?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपल्या कारवाईमुळं, शाही फर्मानामुळं राजे संकटात तर पडले नसतील ना, अशी भीती आमच्या मनाला ग्रासते...’

‘ती भीती काढून टाका. आमचं पत्र गेलं, तेव्हाच तो विचार आम्ही केला होता. राजे बंगळुरी सुखरूप आहेत, विजापुरात ते नाहीत, ही बातमी आम्ही आणलेली आहे.’

आतापर्यंत शांत बसलेल्या दादोजींनी विचारले,

‘पण, राजे, बाबाजींनी राहायचं कुठं?’

‘का?’

‘आता अमीन थोडाच गप्प बसणार? केव्हा कैद होईल, ते सांगता येत नाही.’

‘बाबाजींना ही भीती वाटत असली, तर हे घर कुणाचं आहे? निर्धोकपणे बाबाजी इथं राहतील. तुमच्याइतकाच त्यांचाही आमच्यावर हक्क आहे. आशीर्वाद द्यायला आणखीन एक वडीलधारं माणूस मिळालं, याचा आम्हांला आनंद आहे.’

□

२२

राजे अचानक आल्याचे कळताच जिजाबाईंना आश्चर्य वाटले. रोहिडेश्वर घेतल्यापासून राजांचा मुक्काम सारखा शिवापूरला असायचा. मधून मधून ते यायचे, भेटायचे आणि परत जायचे. राजे आणखीन काही दिवस येणार नाहीत, असा मासाहेबांचा समज होता. मध्येच राजे आल्यामुळे त्यांचे मन चिंताचूर झाले. शिवाजीराजे येताच ते जिजाबाईंना घेऊन एकांती बसले. राजे चिंताग्रस्त होते. ते म्हणाले,

‘मासाहेब, परकीयांच्या आधी स्वकीयांनाच विरोध करावा लागणार, असं दिसतं.’

‘कोण स्वकीय?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आमचे खुद्द मामासाहेब!’

‘कोण, मुधोजीराव?’ जिजाबाई उद्गारल्या.

‘हो! आम्ही रोहिडेश्वरी केलेली स्वराज्यसंस्थापना त्यांना टोचली. आदिलशाहीचे इमानी सेवक ना? त्यांनी मावळात फिरून चिथावणी द्यायला सुरुवात केली आहे. आमच्या विरुद्ध तेच शत्रू म्हणून उभे राहताहेत.’

‘मग?’

‘आम्ही दुसरं काय करू शकतो? फलटणला स्वार पाठविले आहेत. आम्हीही तिकडे निघालो आहोत. भोसले काय असतात, हे त्यांनाही कळून येईल!’

जिजाबाई उभ्या राहिल्या. कापऱ्या आवाजात त्या म्हणाल्या, ‘शिवबा! हात जोडते; पण हे सामोपचारानं घे. डोक्यात राख घालून घेऊ नको. भोसले-जाधवांचं वैर पेटलं; दोन्ही घराणी वारेमोल झाली. नाती जोडली, ती आधारासाठी; वैरासाठी नव्हे.’

‘आम्ही कुठं वैर केलं? आगळीक त्यांनी केलेली आहे.’

‘ती सुधारता येत नाही, असं थोडंच आहे? वैर वाढवायला साऱ्यांनाच येतं; पण वैर टिकविण्याची ताकद फार थोड्यांना असते. त्यालाही असामान्य ताकद लागते.’

‘आम्ही घरी बसावं? होईल ते पाहावं?’ राजांनी विचारले.

‘मुळीच नाही. पण वैर मिटवायला जाता आहात, एवढं ध्यानी घ्यावं. ते यश घेऊन तुम्ही परत यावं. मुधोजीराव सईचे वडील आहेत, हे विसरू नये, एवढंच वाटतं.’

‘आपल्या आज्ञेबाहेर आम्ही नाही. आम्ही शिकस्त करू. येतो.’

राजांनी मासाहेबांचे पाय शिवले; आणि ते शिबंदीसह फलटणच्या मार्गाला लागले.

फलटणच्या वेशीत राजे पोहोचले. वेशीवर राजांचे स्वार होते. सारे गाव शांत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचे घोडदळ कुठेच दिसत नव्हते. राजांनी विचारले,

‘सगळे कुठं आहेत?’

‘गावाची नाकेबंदी केली आहे.’ स्वार मुजरा करीत म्हणाला, ‘वाड्याबाहेर चौक्या बसवल्या आहेत.’

‘आणि निंबाळकर?’

‘चाहूल लागताच ते पळून गेले. त्यांच्यापाठोपाठ घोडदळ गेलं आहे.’

‘ठीक आहे.’ राजांनी नजर वर टाकली. माळावर लिंबाची झाडे होती. तिकडे बोट दाखवीत राजे म्हणाले, ‘आम्ही इथं थांबतो. तू गावात जा. वाड्यावरच्या चौक्या उठव आणि त्यांना इकडे पाठव. एक सांगितलं, तर दुसरं करतात.’

स्वार गेला. थोड्या वेळाने सारे चौकीदार लिंबाच्या दिशेने येताना दिसले. हवेत उकाडा होता. उष्ण वारे वाहत होते. त्या उन्हाच्या तावात फलटण मुरून बसले होते. गावची कूस वेडीवाकडी वळणे घेत गावाभोवती फेर धरून उभी होती. गावाच्या दरवाज्यातून येणाऱ्या स्त्रिया दिसताच शिवाजीराजे सावरून उभे राहिले. दृष्टिटप्प्यात तो जथा आला आणि शिवाजीराजांनी त्यांना ओळखले.

पायांतली मोजडी काढून त्या तापल्या धुळीतून राजे सामोरे गेले. जवळ जाऊन त्यांनी मुजरा केला.

‘मुजरा, मामीसाहेब!’

निंबाळकर मामीसाहेबांचा डोळ्यांवर विश्वास बसेना. राजे हात बांधून उभे होते. ते म्हणाले,

‘सावलीत चलावं.’

सावलीत जाताच राजे म्हणाले, ‘आपण उगीच उन्हातून येण्याचा त्रास घेतलात. आज्ञा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

करायची होती; आम्ही आलो असतो.’

‘कुंकवालाच हात घातलात, राजे! आज्ञा कोण करणार?’

‘गैरसमज होतोय्, मामीसाहेब! जशा मासाहेब, तशा आपण. आमच्याकडून कुणाला धक्का लागणार नाही.’

‘खरं? मग चौक्या का बसल्या? इकडून का जाणं झालं?’

‘आपलं दुर्दैव! आम्ही मामासाहेबांची समजूत काढायला आलो; आणि मामासाहेब आम्ही चाल करून आलो, असं समजून पळून गेले. आम्ही त्यांचीच वाट पाहत आहोत.’

‘वाड्यात चलावं ना!’

‘जरूर येऊ! पण आता नाही. मालक नसता वाड्यात आलो, तर बळजबरीनं वाड्यात घुसलो, असा अर्थ होईल. आम्ही त्याचसाठी इथं थांबलो. मामासाहेब आले, की त्यांच्याबरोबर आम्ही येऊ.’

निंबाळकर मामीसाहेब समाधानाने परतल्या.

राजांना फार वेळ वाट पाहावी लागली नाही. उडणाऱ्या धुळीने घोडदळ येत असल्याचे सूचित केले. अश्वपथकाच्या समोरच दोन घोडी होती. एकावर मुधोजीराव होते. लगतच्या घोड्यावर येसाजी होता. थोड्या अंतरावर घोडी थांबली. मुधोजीराव सामोरे येत होते. नजीक येताच राजांनी मुजरा केला. मुधोजीराव संतप्त होते. येसाजीला राजांनी विचारले,

‘मामासाहेब कुठं मिळाले?’

‘तीन कोसांवर!’

‘हातघाई झाली?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी, नाही. चारी बाजूंनी घेरलं. आपसूक मिळाले.’

‘मामासाहेब, एवढ्या तातडीनं कुठं निघाला होता?’

‘विजापूरला. दुसरं कुठं जाणार?’

‘आमच्याविरुद्ध तक्रार करण्यासाठी विजापूरला जाण्यापेक्षा पुणं अधिक जवळ होतं.’

‘जवळ असेल! पण जवळची माणसं हवीत ना?’

‘मामासाहेब!’ राजांचा आवाज किंचित चढला. ‘भावनेच्या भरात माणसांचा उपमर्द करू नका. आमच्यापेक्षा विजापूर जवळ? विसरलात वाटतं, मामासाहेब?- त्याच विजापूरकरांच्या कृपेनं दहा वर्षं सातारच्या तुरुंगात पडला होता. महाराजसाहेबांच्यामुळं आपण सुटलात. गेलेली जहागीर पूर्ववत मिळाली. मासाहेब वाड्यात आहेत. खुद्द तुमच्या कन्या तिथं आहेत. ही सारी परकी?’

‘तुमच्या बंडाव्याची झळ आम्हांला लागल्याखेरीज राहील का? राजे, हाल सोसून थकलो आम्ही!’

‘आणि म्हणून हा मार्ग पत्करलात? मराठ्यांच्या नशिबी लिहिलेला हा शाप कधीच पुसून जाणार नाही का? जाधवांनी भोसल्यांशी वैर केलं. दोघे एक झाले असते, तर? मामासाहेब, तुम्ही आशीर्वाद द्यायचा. ते सोडून तुम्हीच आमच्यावर उठलात! केव्हाही, कुणाही निरपराध्याला दहा वर्षं तुरुंगात पिचत पडावं लागू नये, म्हणून, ही मोगलाई जावी, म्हणून, आम्ही कमरा कसल्या...’

‘राजे, आशीर्वादाची गरज होती ना? रोहिडेश्वर घेताना कुठं आठवण झाली नाही? एका शब्दानं विचारलं नाही. आम्ही कोण, असं वाटलं ना?’

‘हा मराठ्यांचा दुसरा गुण! ज्यानं अकारण हातबेडी ठोकली, त्याचे पाय चाटायला जायला केव्हाही लाज वाटत नाही; पण क्षुल्लक मानापमानावरून गैरसमज! आयुष्याचं वैर! मामासाहेब, रोहिडेश्वराचा मनसुबा जसा तुम्हांला ठाऊक नव्हता, तसाच तो मासाहेबांना, दादोजींना पण माहीत नव्हता. हाती यश घेतल्याखेरीज सांगणार काय?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मुधोजीरावांची नजर खाली वळली होती. राजे भरल्या कंठाने म्हणाले,

‘मामासाहेब! आम्ही तुम्हांला कैद केलेलं नाही. तुम्हांला शाही इतराजीचं भय वाटत असेल, तर तुम्ही आम्हांला येऊन मिळावं, असं आम्ही म्हणत नाही. तुम्ही वेगळे राहा; पण आमच्या कार्यात आड तरी येऊ नका! एवढीच विनंती करायला मी आलो आहे.’

मुधोजीराव शरमिंदे झाले होते. ‘राजे, आणखीन बोलून लाजवू नका. लहान वयात जो पोक्तपणा तुमच्या ठायी आहे, तो आमच्याजवळ नाही, याची आम्हांला खंत वाटते. मी वचन देतो... आपल्या कार्यात मी आड येणार नाही.’

राजे हसले. म्हणाले, ‘आम्ही हाच आशीर्वाद समजतो.’

मुधोजीराव राजांच्यासह वाड्यात गेले. बजाजी राजांना येऊन भेटला. राजे म्हणाले,

‘बजाजी, तुम्ही आमचे मेव्हणे. कान पिळायचा अधिकार तुमचा. तुम्ही तरी मामासाहेबांना सांगायचं होतंत की, राजांचे कान मी पिळून येतो, म्हणून!’

त्या वाक्याबरोबर वाड्याचा ताण एकदम कमी झाला.

शिवाजीराजे म्हणाले,

‘संध्याकाळ होत आली. आम्ही निघतो.’

‘छे! राजे, रात्री कुठं जाणार? सकाळी जा. नाही तर आम्ही असं समजू की, आपला राग गेला नाही.’

‘मामासाहेब! मासाहेब वाटेकडे डोळे लावून बसल्या असतील. त्यांच्या घशाखाली घास उतरला नसेल. उलट, आपण बरोबर आलात, तर फार बरं होईल. मासाहेबांना आपल्या...’ राजे चाचरले, ‘...आमच्या सांगण्याचा विश्वास बसायचा नाही.’

‘खरं आहे. मी येतो.’ मुधोजीराव म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निंबाळकर मामीसाहेब दाराशी येऊन म्हणाल्या,

‘राजे, त्यांना घेऊन जाणार?’

राजे हसले. ते म्हणाले, ‘मामीसाहेब, काळजी करू नका. दगाफटका व्हायचा असता, तर इथंच घडला असता. मामासाहेबांना नेतो आहे, ते आशीर्वादासाठी!’

मध्यरात्रीच्या सुमारास राजांनी पुण्यात प्रवेश केला. दादोजी सदरेत बसून होते. पलोते जवळ होते. राजांनी चौकात प्रवेश केला; आणि मासाहेब बाहेर आलेल्या दिसल्या. राजांच्याबरोबर मुधोजीराव दिसताच जिजाबाईंच्या चेहऱ्यावर हसू उमटले.

मुधोजीरावांना राजे म्हणाले,

‘मामासाहेब, सांगितलं, ते खरं ना! पाहिलंत? मासाहेब वाटेकडे डोळे लावून बसल्या होत्या.’

मुधोजीराव काही बोलले नाहीत. ते वर गेले; आणि त्यांनी मासाहेबांचे पाय शिवले. मासाहेब मागे सरत म्हणाल्या,

‘हे काय, मामासाहेब? आपण मोठेऽ’

‘फार लहान आहे मी, राणीसाहेब. त्याची तीव्रतेनं जाणीव झाली. राजे लहान, म्हणून त्यांचे पाय शिवले नाहीत. दुबळ्या मनावर मात झाली नाही.’

सईबाई धावत आल्या. बापाला पाहताच त्या धावल्या; आणि त्यांनी मुधोजीरावांना मिठी मारली. मासाहेब म्हणाल्या,

‘रडून गोंधळ केला पोरीनं. समजूत काढता काढता पुरे झालं. राजे, मामासाहेबांना आणलंत; बरं झालं. नाही तर पोरीला पटलं नसतं. आत चलावं.’

सारे आत गेले. दादोजी हे कौतुकाने पाहत होते. राजे सामोरे गेले; आणि त्यांनी दादोजींचे पाय शिवले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे! रोहिडेश्वराच्या पराक्रमापेक्षाही थोर पराक्रम आज केलात. समाधान दिलंत.’

पण हे समाधान फार काळ टिकणारे नव्हते. मुधोजीराव गेले; आणि थोड्याच दिवसांत विजापूरकरांची मुधोजीरावांवर इतराजी झाली. पुंडाव्याच्या आरोपाखाली आदिलशाही सरदार अंबरखान फलटणवर अचानक चालून आला. प्रतिकार करीत असता मुधोजीराव पडले. बजाजीला कैद करून विजापुरी नेले गेले. काही दिवस गेले; आणि हा धक्का सहन करीत असतानाच पुण्याला दुसरी बातमी येऊन थडकली- बजाजींना बळजबरीने मुसलमान केले. ज्याची बहीण शहाजीसारख्या सरदाराच्या मुलाला केली, तो सरदार बाटविल्याचा आनंद बादशहाला झाला. त्या आनंदात बादशहाने आपली मुलगी बजाजीला दिली.

राजे महालात गेले, तेव्हा सईबाई झोपल्या होत्या. मासाहेब शेजारी बसल्या होत्या. मासाहेब डोळे टिपीत महालाबाहेर गेल्या. राजे पलंगाजवळ गेले. सईबाई राजांच्याकडे पाहत होत्या. उठण्याचेही भान त्यांना नव्हते. चेहरा व्याकूळ झाला होता. ओठ थरथरत होते. बघता-बघता सईबाईंचे डोळे डबडबले; आणि सईबाईंनी मान वळविली. हुंदका फुटला. राजे पलंगावर बसले. सईबाईंच्या पाठीवरून ते हात फिरवीत होते. हुंदके वाढत होते. जरा वेळ गेला. राजांनी हळुवारपणे हाक मारली,

‘सई, जरा ऐकशील?’

कष्टाने सईबाईंनी डोळे टिपले. राजांनी सईबाईंचा चेहरा आपल्याकडे वळविला. राजांचा आवाज घोगरा बनला होता.

‘सई, तू मनाला लावून घेऊ नको. बजाजी मुसलमान झाले, म्हणून काय झालं? ते आमचे आहेत. त्यांना आम्ही पारखे होऊ देणार नाही.

‘ते आता कसं शक्य आहे?’ सईबाईंनी विचारले.

नि:श्वास सोडून राजे म्हणाले, ‘हिंदू असलेले मुसलमान होऊ शकतात; मग मुसलमान हिंदू का होणार नाहीत? आज आमचे डोळे उघडले. आपलं माणूस परधर्मात जाणं किती भयंकर असतं, याचं दु:ख आज कळलं. हजारोंनी या यातना

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भोगल्या असतील, हजारो भोगत असतील; पण आम्हांला त्याची जाणीव नव्हती.

आम्ही तुम्हांला वचन देतो... बजाजी आमच्यांत आल्याखेरीज आम्हांला चैन पडणार नाही. सुखाचा घास आम्ही गिळणार नाही.'

सईबाई राजांच्या निश्चयी मुद्रेकडे पाहत होत्या. कृतज्ञतेने सारे अंग कंप पावत होते. काही न बोलता त्यांनी राजांच्या हातावर हात ठेवला. बराच वेळ तो हात तसाच होता...

□

२३

बाबाजी नरसप्रभू कैदेच्या भीतीने पुण्याच्या लाल महालात आले. त्यांना आलेल्या फर्मानाने दादोजी मात्र भयंकर काळजीत पडले. आदिलशाहीशी आज ना उद्या राजांना टक्कर द्यावी लागणार, हे दादोजींना स्पष्ट दिसत होते. मनातून ते निराश होत होते, थकत होते. राजांच्या किल्ल्याचे बांधकाम पुरे होत आले होते. रोहिडेश्वर-तोरण्याची तटबंदी भक्कम झाली होती. किल्ल्यावरच्या तोफांनी बुरूज सजले होते. किल्ल्याच्या सोप्या वाटा तासून घेण्यात आल्या होत्या. राजांची शिबंदीही आता मोठा आकार घेत होती. रोहिडेश्वरावर जमा केलेली हजार-बाराशे मावळे फौज पाच-सहा हजारांवर गेली होती. व्याप वाढत होता; त्याबरोबर राजांच्या चिंताही वाढत होत्या.

राजांना सर्वांत मोठी चिंता वाटत होती, ती दादोजींची. दादोजींचे वय झाले होते. राजांच्या ह्या पुंडाईमुळे तर दादोजी फारच थकले. राजांना हे दिसत होते; पण उपाय नव्हता. राजे पुण्याला गेले, की दादोजींच्या बरोबर बोलत बसत. सारे वर्तमान त्यांच्या कानांवर घालीत. दादोजी नुसते ऐकून घेत. आता सल्लाही देणे त्यांनी बंद केले होते. होईल तेवढा जहागिरीचा बसल्या जागी बंदोबस्त पाहून बाकीचा वेळ ते ईश्वरचिंतनात खर्च करीत.

राजे तोरण्याहून आले होते. त्यांच्या हातात काठी होती. दादोजींना काठी देत ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'पंत, पांढरीची काठी आहे. सरळ मिळाली. बहुधा पांढरी सरळ मिळत नाही. आपल्याकरिता मुद्दाम आणली.'

पंतांनी काठी निरखली. 'राजे, काठी चांगली आहे; पण...'

'पण काय?'

'वृद्धापकाळी काठीपेक्षा मुलाचाच आधार जास्त वाटतो. आधार तुमचा हवा, राजे! काठीचा नव्हे.'

'पंत, असं का बोललात?' राजांनी विचारले.

पंतांनी सावरून घेतले. ते म्हणाले,

'काही नाही, राजे! काही तरी बोलून गेलो. आता मन स्थिर राहत नाही. वय झालं ना!'

'पंत, वैद्यराज आहेत. त्यांच्याकडून औषधं तरी...'

'राजे, काळजी करू नका. काही झालं नाही मला. आता हाती राहिलंय्, ते...' आकाशाकडे बोट दाखवीत पंत म्हणाले, '...त्या वैद्यराजाच्या हाती...'

पंतांचे असे बोलणे ऐकले, की राजे कष्टी बनत; पण घरच्या गोष्टींवर विचार करायला राजांना उसंत नव्हती. स्वराज्य उभारण्याचा ताण वाढत होता. त्याचा विचार एवढा एकच आता राजांच्या मनात होता.

थोड्याच दिवसांत दादाजी नरसप्रभूंच्या संमतीने रोहिडा किल्ला स्वराज्यात सामील करून घेतला. आणखीन एक भगवा झेंडा सह्याद्रीच्या शिखरावर शोभू लागला.

दादोजींना रोहिड्याची बातमी समजली. रोहिडेश्वर, तोरणा आणि आता रोहिडा. राजे फार झपाट्याने पुढे जात होते. जिजाबाईंचा त्यांना पाठिंबा होता. शहाजीराजांचे काही पत्र नव्हते. पंतांनी अनेक खलिते पाठविले होते. त्यांची उत्तरे आली होती. 'शिवाजीराजांना

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सांभाळून घ्यावे, लक्ष ठेवावे.' एवढेच त्या पत्रांतून होते. राजांनीही आपला मनसुबा शहाजी महाराजांना कळविला असावा, असा दाट संशय दादोजींना वाटत होता.

पूर्वी थोडी झोप लागे, तीही आताशा दादोजींना पारखी झाली होती. दिवस कसा तरी निघून जाई; पण रात्री त्यांना खायला उठत. रात्री असेच ते तळमळत होते. पाख्यातून गार वारा येत होता. गंगाबाई शांतपणे झोपी गेल्या होत्या. पंत मात्र डोळे सताड उघडे ठेवून विचार करीत होते. दादोजी पाटस परगण्याचे मलठाण गावचे हिशेबनीस. शहाजीराजांनी त्यांना आपल्या कारभारासाठी उचलले. महाराजसाहेबांचा विश्वास बसला. पुणे जहागिरीचा कारभार आपल्या नावे करण्याची त्यांनी दादोजींना आज्ञा केली.

शहाजीराजांच्या या विश्वासामुळेच आदिलशाहीच्या दरबारचा सुद्धा दादोजींच्यावर भरवसा होता. त्यांनीही दादोजींना अधिकार दिले होते.

दादोजींच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. थोरल्या महाराजसाहेबांचा केवढा विश्वास! जिजाबाई आणि शिवाजी यांची संपूर्ण जबाबदारी दादोजींच्या हाती सोपविणे हा थोडा का विश्वास? दादोजींनी तो त्याच निष्ठेने उचलला.

जिजाबाई-शिवाजींसह दादोजी पुण्याला आले, तेव्हा केवढे प्रश्न त्यांच्यासमोर उभे होते! ठावठिकाणा नसलेली पुण्याची वास्तू. वस्ती करायला माणसे शोधण्यापासून

सुरुवात. दुष्काळातून उठलेला आणि बंडाव्यात पोळलेला मुलूख कबज्यात आणायचा. वास्तू उभारण्यापासून सुरुवात करायची. कुणाच्या सोबतीने? आजूबाजूला सोबत होती दाट रानाची, डोंगरकपारींची; भेटलीच, तर चोराचिलटांची. पण गजाननाच्या कृपेने सारे होत राहिले. वाडे सजले. वस्त्या झाल्या. बागा झाल्या. शेतवाडी झाली. निवडुंगाचे भरघोस पिकात रूपांतर झाले. बेबनावाने धुंदावलेला बारा मावळ कबज्यात आला. जहागिरीचा अंमल स्थिर झाला. एवढ्या अपार कष्टाने मिळविलेल्या, उभ्या केलेल्या जहागिरीचे काय होणार? पुन्हा बंडाव्यात ही मोडली तर जाणार नाही ना? राजे...

दादोजींनी कूस बदलली; पण विचार बदलला नाही.

राजे... पुण्याला आले, तेव्हा पुरते सहा वर्षांचेही नव्हते. राजांना शिकवायला शास्त्री ठेवले. वाढत्या वयात चांगले वस्ताद ठेवून त्यांना शस्त्रपारंगत करून घेतले. कारभार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिकविला. मुलूख दाखविला. असे गुणी पोर हुडकून सापडायचे नाही. जे जे द्यावे, ते ते राजांनी उचलले. राजांनी हा विस्तवाशी खेळ मांडला नसता, तर आदर्श जहागिरदार म्हणून केवढे नाव झाले असते!- हंः! कारभाऱ्याला हा विचार ठीक; पण वीज हाती पकडणाऱ्या परशुरामाला आवरायचे कुणी? पुराणे वाचली. ते देवांचे अनुकरण करायला निघाले. शस्त्रविद्या शिकले, ते मृगयेत रमले नाहीत. हिंदवी स्वराज्याचे स्वप्न तरळू लागले. मुलूख दाखविला; पण जहागीर दिसली नाही. दिसले स्वतंत्र राज्य... फार उघड्या डोळ्यांनी राजांनी पाहिले...

याचा परिणाम?...

दुसरा काय होणार? शहाजीराजांच्या बंडाव्याचे काय झाले? हंपीच्या साम्राज्याचे, देवगिरीच्या साम्राज्याचे काय झाले? एवढी मोठी प्रबळ सत्ता जेथे मोगलांच्या धाडीला टिकू शकली नाही, तेथे कोवळे स्वप्न टिकेल कसे? आणि दुर्दैवाने तसे घडलेच, तर... थोरल्या महाराजांना काय सांगणार? त्यांचा विश्वासघात होईल. कुणी केला?- दादोजी, त्या अनर्थाला तुझ्याशिवाय दुसरे कोण जबाबदार?

'मी नाही ऽऽ, मी नाही ऽऽ' दादोजी मोठ्याने म्हणाले. त्यांचे सारे अंग घामाने भिजले होते. कासावीस झालेले दादोजी अंथरुणावर उठून बसले. गंगाबाई जाग्या झाल्या. घाबरून त्यांनी विचारले,

'काय झालं?'

'काही नाही. झोपा.' दादोजी म्हणाले. त्यांनी पंच्याने घाम पुसला. तांब्यातले पाणी ते प्याले. त्यांचे लक्ष देवघराकडे गेले. वात मंदावली होती. पंतांनी उठून समईची काजळी झाडली. वात फरफरत मोठी झाली. देव्हाऱ्यातील गजाननाची मूर्ती त्या सौम्य प्रकाशात उजळली. पंतांनी हात जोडले. परत ते अंथरुणावर येऊन झोपले. बराच वेळ पंतांना झोप लागली नाही....

पंत दचकून जागे झाले. गंगाबाई त्यांना हलवून जागे करीत होत्या. पंतांनी डोळे उघडताच गंगाबाईंनी विचारले,

'स्वप्न पडलं का?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घाम पुशीत पंत म्हणाले, ‘हो! एवढं वाईट स्वप्न मला पडलं नव्हतं.’

‘कसलं स्वप्न?’

‘राजे शिकारीला गेले होते. बरोबर कुणी नव्हतं. एक भलं मोठं अस्वल अचानक राजांच्या अंगावर आलं. राजांनी बार काढला. तरी ते हसत येतच होतं. दोन पायांवर उभं राहिलेलं ते अस्वल केवढं मोठं होतं! राजांना त्यानं गाठलं. अंगरख्यावर रक्त दिसलं...’

‘रक्त दिसलं ना? मग ते चांगलंच!’

विषय बदलीत पंत म्हणाले, ‘पहाट झाली?’

‘हो. नुकतीच झाली. उठले होते, तोच तुमचा आवाज ऐकला. जागं केलं.’

‘ठीक आहे. मीही उठतो.’

पंत सकाळी स्नान-संध्या आटोपून कसबा गणपतीला जाऊन आले; कपडे करून जिजाबाईंच्याकडे गेले. पंतांनी विचारले,

‘राजे कुठं गेलेत?’

‘शिवापूरला.’

‘केव्हा येणार आहेत?’

‘जेवणाला येणार, असा निरोप आहे का?’

‘काही नाही. सहज विचारलं. तुमचं भाग्य थोर, म्हणून राजांच्या सारखे चिरंजीव तुम्हांला लाभले.’

जिजाबाई आश्चर्याने दादोजींच्याकडे पाहत होत्या. किती तरी दिवसांनी दादोजींच्या चेहऱ्यावर पूर्वीचे हास्य होते. पंत म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘खरंच सांगतो. मासाहेब, राजे केवढे कष्ट घेतात! इतर जहागिरदारपुत्रांसारखे झाले असते, तर आपण काय करणार होतो?’

‘त्याचं श्रेय तुम्हांला आहे, दादोजी!’ जिजाबाई म्हणाल्या.

‘श्रेय कुठलं? आपली पुण्याई जबरदस्त, असंच समजायला हवं.’

दादोजी दप्तरी गेले. जिजाबाईंना समाधान वाटले. दादोजी आपल्या स्वतंत्र खोलीत काम करीत बसले होते. दप्तरीच्या अनेक वह्या मागवून हिशेब पाहत होते.

राजे भर उन्हातून अश्वपथकासह आले. मोतद्दाराने घोडा धरला. राजे पायउतार झाले. उन्हाची रपेट झाल्याने काळी घोडी घामाने निथळत होती. ओठाळी फेसाळली होती. राजे मोतद्दाराला म्हणाले,

‘पागेत नेऊन चांगली पुसून काढा. दम गेल्याखेरीज वैरण देऊ नका.’

‘जी.’ मोतद्दार म्हणाला.

महाराज प्रथम चौकात आले. बाळकृष्ण सामोरे आले. हात जोडून ते म्हणाले,

‘राजे, पंतांनी आपली आठवण केली आहे.’

‘आमची आठवण? आणि या वेळी! आणखीन् कोण आहे?’ राजांनी विचारले.

‘कोणी नाही. एकटेच आहेत.’

‘चला. आम्ही येतो.’

राजे पंतांच्या खोलीकडे जात होते. पंतांनी तातडीने का बोलावले, याचा अंदाज लागत नव्हता.

पंत खोलीत बैठकीवर बसले होते. काही तरी लिहीत होते. वर न पाहता पंत म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘या, राजे! आम्ही तुमचीच वाट पाहत होतो. बसा.’

पंतांचे सारेच वर्तन नवे होते. राजांना बसायचेही सुचले नाही. काही वेळ असाच गेला. पंतांनी लिहिलेल्या कागदावर वाळू टाकली. कागद झाडला. बोरू नीट ठेवून दिला. दौत मिटली. नजर वर करीत पंत म्हणाले,

‘राजे, उभे का? बसा ना! आत्ता आलात?’

‘हो. शिवापूरला गेलो होतो.’

‘तेही समजलं. उठविलेलं रान पाहिलंत?’

‘कुठलं रान?’

‘राजे, आपण आता लहान नाही. मागे दुष्काळी आलेल्या शंभर लोकांना तुम्हीच गाव वसविण्याचा कौल दिला होता. त्याचं विस्मरण झालेलं दिसतं...’

‘आम्ही समजलो नाही.’

पंत हसले. ‘अलीकडे कारभारातलं लक्ष उडालंय्. ध्यानी येणार कसं? राजे, शिवापूरचं रान तोडून, बागायत रान उठविण्याचा हुकूम दिला आहे. ते तयार झालं आहे, असं शामराव नीळकंठ सांगत होते.’

राजांच्या ध्यानी आले. त्यांची नजर खाली वळली. ते म्हणाले,

‘आमच्या लक्षात नव्हतं!’

पंत म्हणाले, ‘राजे, आमचा आग्रह नाही. पण स्वराज्याचं तोरण कच्च्या पायावर बांधता येत नाही. जिवाला जीव देणारी माणसं हुडकण्याच्या आधी त्यांची घरं-दारं सुरक्षित करावी लागतात. ते केलंत, की आपोआप माणसं गोळा होतात. तुम्ही रोहिडेश्वरी गेला होता ना?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिवापूरच्या मुक्कामात असताना राजे रोहिडेश्वरी गेले होते, हे दादोजींना कुणी सांगितलं, हे राजांना कळत नव्हते. मोजदाद करण्यासाठी राजांनी आपले मावळे एकत्र केले होते. दादोजींना तेही समजलं नसेल ना?

दादोजी स्मित करीत म्हणाले, 'राजे, तुमच्या हाकेला साद देऊन किती मावळे रोहिडेश्वरी गोळा झाले?'

राजांनी नि:श्वास सोडला. ते म्हणाले,

'सात हजार!'

'त्यांतले टिकणारे किती?'

राजांनी एकदम मान वर केली. डोळ्यांत संतापाची सूक्ष्म छटा तरळून गेली. ते म्हणाले,

'पंत, निष्ठेनं गोळा झालेल्यांची थट्टा केलेली आम्हांला खपत नाही.'

'मी थट्टा केली नाही.' दादोजी स्थिर आवाजात म्हणाले, 'मोठे शब्द वापरून मोठ्या गोष्टी ठरत नाहीत. राजे, रोहिडेश्वरी गोळा झाले, ते नुसत्या तुमच्या हाकेनं?'

'मग कुणाच्या?'

'थोरल्या महाराजांच्या!'

'पंत!'

'ऐका, राजे! मुलूख स्थिर झाला नाही, तोच पातशाहीविरुद्ध बंड करण्याइतपत मुलुखात ताकद आलेली नाही. एवढी मोठी शिबंदी पोसण्याचीही तुमची कुवत नाही. भरपूर संपत्तीखेरीज राज्य उभं राहत नाही.'

'मग जमले, ते कशासाठी? का?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तुमच्याभोवती जे जमा झाले, ते शहाजीराजांच्या मुलासाठी! शिवाजीसाठी नव्हे. ती ताकद यायला अजून अवकाश आहे.’

‘आम्ही वाट पाहू.’

‘आदिलशाही तोवर थांबेल? राजे, आता पुढचा बेत कोणता? सांगा ना. निदान ऐकू द्या तरी.’

राजे धीर करून म्हणाले, ‘किल्ले कोंढाणा.’

‘किल्ले कोंढाणा!’ दादोजींचे डोळे विस्फारले गेले. कोंढाणा म्हणजे आदिलशाहीचे मावळनाक!

‘कोंढाणा घेणं इतकं सोपं वाटतं?’

‘ताकदीनं नव्हे, सामोपचारानं गड हाती येईल, असं वाटतं.’

‘जमलं, तर तेच करा!’ पंत म्हणाले.

राजांचा कानावर विश्वास बसेना. त्यांचा चेहरा आनंदला. दादोजी सांगत होते.

‘राजे, तुम्ही जे कराल, ते पूर्ण विचारानं कराल, यावर आमचा विश्वास आहे. आम्ही तुम्हांला बोलावलं, ते एवढा कागद पाहण्यासाठी. हा एकदा नजरेखालून घाला.’

पंतांनी कागद हाती दिला.

‘काय हे?’ राजांनी विचारले.

‘आपला बारा मावळाचा वसूल. शिल्लक, त्याचा सविस्तर तपशील.’

राजांचा कागद धरलेला हात कापू लागला. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पंत, आम्ही तुमच्यावर केव्हाच अविश्वास दाखविला नव्हता. ते पातक...’

‘तसं मी म्हणत नाही. विपरीत अर्थ घेऊ नका. स्वराज्य उभं करीत आहात. ते उभं करायला लागणारा पैसा हाही महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी तुम्हांला एकदा हे तपशील समजणं आवश्यक आहे.’

‘दादोजी!’

‘राजे, शंका धरू नका. आयुष्यात मी खोटं बोललो नाही. आता कसं बोलेन? तुमच्यावर पुत्रवत प्रेम केलं. त्यापलीकडे मी काही करू शकलो नाही. त्या भावनेला धक्का देणारं वर्तनही तुमच्या हातून घडलं नाही.’

पंतांचा कंठ भरून आला. श्वास घेऊन ते म्हणाले,

‘राजे, आता आम्ही पिकली पानं. आमचा भरोसा काय? आज आहे. तर उद्या नाही. माणसाचा भरोसा देता येत नाही. त्यात वय झालं. आम्ही थकलो. घ्याल, ती माणसं पारखून घ्या. साऱ्यांचं ऐका; मनाला येईल, पटेल, तेच मात्र करा. तुमच्यासह पुण्यात आलो, तेव्हा तुम्ही लहान होता; सारा मुलूख बेशिस्त होता, होईल त्या मगदुरानं सारं आटोक्यात आणलं. तुम्हांला घेऊन सारा मुलूख फिरलो. गावन् गाव, बारा मावळ फिरलो. झाडाझुडपांचादेखील परिचय घडवला. त्याचं सार्थक घडत आहे. त्यात मला आनंद आहे. जगदंबा तुम्हांला उदंड यश देवो. याखेरीज या जीर्ण कुडीची कोणतीच इच्छा मागे राहिली नाही... दमला असाल. मासाहेब वाट पाहत असतील. जा तुम्ही!’

राजांनी दादोजींचे पाय शिवले. राजांचे मन भरून आले. दादोजी म्हणाले,

‘शतायुषी भव! विजयी भव!’

राजांचे मन भारावले होते. पाय उचलत नव्हते. दादोजी असे कधी वागले नव्हते, बोलले नव्हते. आपल्याच विचारात राजे महाली गेले. मंचकावर बसून राहिले. सईबाई मागे येऊन केव्हा उभ्या राहिल्या, हेही त्यांना कळले नाही.

‘कपडे उतरवावेत ना!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अं?’ म्हणत राजांनी मागे पाहिले. काही न बोलता सईबाईंच्या हाती राजांनी पागोटे दिले; तलवार उतरली. दुशेला सोडून ते बसून राहिले.

‘महाली यायला वेळ लागला. मासाहेबांच्याकडे...’

‘नाही, सई. दादोजींच्याकडे गेलो होतो. त्यांनी आठवण केली होती.’

सईबाई हसल्या.

‘का हसलात?’ राजांनी विचारले.

‘तरीच स्वारी एवढी गंभीर दिसते! काय घडलं?’

राजे हसले. म्हणाले, ‘हा मात्र तर्क चुकला. आज नेहमीप्रमाणे काही घडलं नाही. रोहिडेश्वरी सारे मावळे गोळा केल्याचं कळूनही दादोजी काही बोलले नाहीत.’

‘मग काय बोलले?’

‘तोच विचार करतोय् आम्ही!’

‘तो नंतर करा. मासाहेब जेवणासाठी वाट पाहत आहेत.’

राजे जेवून महाली आले. पलंगावर झोपले. अंग जडावले होते; पण झोप येत नव्हती. सईबाई आल्या. तेव्हा राजांनी विचारले,

‘जेवलात?’

‘हो.’

‘लौकर जेवणं झाली.’

‘लौकर कुठलं? आज फार जेवलो. भूकच संपेना.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सईबाई पायथ्याला बसल्या. राजे काही बोलणार, तोच हाक आली,

‘शिवबाऽऽ’

सईबाई उभ्या राहिल्या. राजे पण उठले. मासाहेब आत आल्या. चेहरा म्लान होता, घाबरलेला होता. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, दादोजी घाबरे झालेत! चल!...’

मासाहेब वळल्या. राजे महालाबाहेर धावले. पाठोपाठ मासाहेब, सईबाई धावल्या. दादोजींच्या निवासाबाहेर मनोहारी, अमात्य, डबीर गोळा झाले होते. राजे आत गेले.

दादोजी शय्येवर पडले होते. गंगाबाई शेजारी अश्रू टिपीत बसल्या होत्या. महाराज धावले. दादोजींच्या छातीवर हात ठेवीत ते म्हणाले,

‘पंत, काय झालं?’ आणि राजे ओरडले, ‘अरे, कुणी वैद्यांना बोलवा.’

हाताने इशारा करीत पंत म्हणाले, ‘नको. त्याचा आता उपयोग नाही.’

मासाहेबांचा हात तोंडावर गेला. त्या म्हणाल्या, ‘पंतांनी काही घेतलं तर नाही?’

एक वार चमकून राजांनी मासाहेबांकडे पाहिले. क्षणात राजांच्या अंगाला मुंग्या सुटल्या. पंतांच्याकडे वळून राजे ओरडले,

‘पंत, हे खरं?’

दादोजी शांतपणे म्हणाले, ‘खरं आहे. आता वैद्यराज काहीही करू शकणार नाहीत.’

स्त्रियांच्या तोंडून दु:खोद्गार निघाले. गंगाबाई बसल्या जागी मूर्च्छित झाल्या. त्यांना सावरले गेले. राजांना हुंदका फुटला.

‘दादोजी, काय केलंत हे? कोणत्या अपराधाची ही कठोर शिक्षा केलीत?’ म्हणत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी मान वर केली. दादोजींच्या नजरेला नजर देत राजे म्हणाले, ‘पंत, आमच्या स्वराज्याचा एवढा कंटाळा आला होता, तर तसं सांगायचं होतंत. माझ्या हातानं मी बांधलेलं स्वराज्याचं तोरण उतरलं असतं...’

रडत राजांनी दादोजींच्या छातीवर मस्तक ठेवले. पंतांचा थरथरता हात राजांच्या केसांवरून फिरवला गेला. पंत म्हणाले,

‘रडू नका, राजे! असं अशुभही बोलू नका. आता फार वेळ नाही. पुष्कळ सांगायचं आहे. ऐका!’

राजांची मान उचलली. पंत सांगत होते :

‘...तुमच्यावर माझा राग नाही. वैतागून मी जात नाही. पण, राजे, आम्ही पडलो जुनी माणसं. तुम्हां तरुणांची छाती आमच्या जवळ कुठली? डोंगरकपारीत जन्मलेला झरा, हाताशी येईल, त्या ओढ्यानाल्यांची संगत करीत, नदी बनून सागराला भेटायला जातो. या प्रवाहाला संथपणाची, खळखळाटाची, प्रपातांची भीती कुठली? पण आम्ही जुनी माणसं डबक्यासारखी. उन्हाच्या भीतीनं आटत जाणं एवढंच ठाऊक असतं. तुमची धाव आमच्याजवळ नाही, राजे...’

‘पंत!’

‘ऐका, राजे! तुम्ही जो खेळ मांडलात, तो सजला, तर पृथ्वीमोलाचं कौतुक होईल. पण दुर्दैवानं अपयश आलं, तर... राजे, यशाचं कौतुक सारेच करतात; पण अपयश आलं, तर बोल मोजक्यांनाच लागतो. स्वतंत्र संस्थापकाला लुटारू, बंडखोर बनायला फार वेळ लागत नाही. आयुष्यभर इमाने इतबारे थोरल्या राजांची सेवा केली. बोल लावून घेतला नाही. वृद्धापकाळी अपयशाच्या भीतीनं मन कचरतं. राजे, रंगीत कपड्यांना मळ सोसतो; पण श्वेत वस्त्र परिधान केलं, तर त्याला एवढाही डाग खपत नाही. तो चटकन साऱ्यांच्या नजरेत भरतो.’

राजांच्या अश्रूंना खळ नव्हता. ते म्हणाले,

‘पंत, कसली भीती बाळगलीत? अपयश आलं, तर आनंदानं सहन करावं, हे तुम्हीच

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सांगितलं ना!’

डावा हात हलवीत पंत म्हणाले, ‘नाही, राजे. त्या अपयशाला मी भीत नााही. बंगळूरहून थोरल्या महाराजासाहेबांनी माझ्या जबाबदारीवर तुम्हांला आणि मासाहेबांना पाठवलं, तेव्हा ते म्हणाले होते- ‘दादोजी, ही आमची अमानत तुमच्या हाती देतो. जीवमोलानं संभाळा. तुमच्यामुळं मी निश्चिंत आहे.’ भीती वाटत होती, त्यांच्या एका शब्दाची, बोलाची... राजे, पाणी...!’

राजांनी पाणी पाजले. दादोजींचा घाम टिपला. दादोजी म्हणाले,

‘मासाहेब, देव्हाऱ्यात गंगोदक आहे, तुळशीपत्र आहे... राजे, आम्हांला मांडी द्या.’

राजांनी डोळे टिपले; मांडी दिली. दादोजी जिजाबाईंना म्हणाले,

‘मासाहेब! माझं नशीब थोर, म्हणून तुमच्या राजांच्या डोळ्यांतले अश्रू पाहण्याचं

भाग्य मला अंतकाळी लाभतं आहे. देवांनीदेखील याचा हेवा करावा.’

पंतांनी गंगोदक घेतले. जिभेवर तुळशीपत्र ठेवले. हुंदक्यांचा आवाज चढत होता. राजे दादोजींचे मस्तक धरून होते. सारी ताकद एकवटून दादोजी जड आवाजात म्हणाले,

‘मासाहेब! राजांना संभाळा... ते आता मोठे झाले... कर्ते झाले... त्यांचं उदंड यश पाहा... आमच्यासारखे दुबळे बनू नका... राजेऽऽ’

राजे वाकले. अश्रू दादोजींच्या कपाळावर पडत होते. ओठ पुटपुटले. शब्द उमटले.

‘रडू नका... येतो आम्ही...’

राजांचे अश्रू पुसायला पंतांचा डावा हात उंचावला गेला. शेवटचे शब्द उमटले,

‘राजेऽऽ!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

--आणि उंचावलेला हात कोसळला.

□ □ □

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग दुसरा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

दादोजींच्या मृत्यूने राजांना फार दु:ख झाले. दादोजींची शिकवण, त्यांचे बोलणे, रागावणे, कौतुक करणे हे सारे आठवत होते. ज्या दादोजींच्या सहवासात राजांना कधी पितृच्छायेची आठवण झाली नाही, ते दादोजी गेल्यामुळे राजांच्या मनात मोठी पोकळी निर्माण झाली. लाल महालात आता दादोजी वावरणार नव्हते. सदरेवर संस्कृतचे पठन करीत बसलेली दादोजींची वयोवृद्ध छाया पुन्हा दिसणार नव्हती. आपल्या खोलीत, दप्तरात, बसक्या मेजासमोर बैठक घालून आपल्या दराऱ्याने फडाला बेचैन करणारी दादोजींची जागा आता रिकामी पडली. दादोजींचे नाव निघाले, तरी राजांच्या, मासाहेबांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहत. लाल महालाचा मुक्काम राजांना नको वाटे.

पण शिवाजीराजांना स्वत:च्या दु:खावर एवढा विचार करायला उसंत नव्हती. विजापूरकरांचे लक्ष वळायच्या आत राज्य स्थिर करणे आवश्यक होते. राजांनी आपल्या दु:खावर पांघरूण घातले. शहाजीराजांचा वसूल झालेला खजिना पंचवीस हजार होता. दादोजींच्या मृत्यूच्या बातमीबरोबरच राजांनी आपल्या वाढत्या खर्चासाठी तो खजिना वापरण्याची परवानगी शहाजीराजांच्याकडे मागितली. शहाजीराजांनी तातडीने ती संमती पाठवून दिली. शहाजीराजांच्या त्या संमतीने राजांना बळ चढले; आणि सामोपचाराने कोंढाणा कसा घेता येईल, याचा ते विचार करू लागले. खेडबाऱ्याचे बापूजी नऱ्हेकर- जे राजांच्या पुण्याचे हवालदार होते- आणि कोंढाण्याचा किल्लेदार सिद्दी अंबर यांचा स्नेह होता. त्या स्नेहाच्या जोरावर राजांनी सिद्दी अंबरला आपल्याकडे वळवून घेतले आणि एका सुमुहूर्तावर कोंढाणा स्वराज्यात सामील झाला. राजांचा किल्लेदार म्हणून सिद्दी अंबर कोंढाण्याची व्यवस्था पाहू लागला.

राजांनी विस्ताराचे आणखीन एक पाऊल उचलले. राजांनी पुण्याचा मुक्काम खेडबाऱ्याला नेला. शिवापूरहून राजांच्या खेपा रोहिडेश्वर, चाकण येथे होऊ लागल्या. त्या वेळी राजांचे लक्ष होते पुरंधरवर. बारामती, सुपे, इंदापूर हे राजांचे परगणे. त्यांचा बंदोबस्त

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

व्हायचा, तर पुरंधर हाती येणे आवश्यक होते. पुरंधरावर शहाजीमहाराजांचे व दादोजींचे स्नेही नीळकंठराव होते. त्यामुळे पुरंधरला राजांना हात घालता आला नाही. नीळकंठरावांचा मृत्यू झाला. त्यांचे तिघे मुलगे निळोजी, संक्राजी व पिलाजी. बापामागे निळोजी गडाचा मालक बनला. पण आपल्या दोघां भावांना वाटा देण्यास तो राजी नव्हता. राजे खेडबाऱ्याला आलेले कळताच पिलाजी आणि संक्राजी राजांच्याकडे खेपा घालू लागले. निळोजी राजांना मानीत होता. राजांच्या मध्यस्थीने उत्पन्न मिळावे, हा दोघां भावांचा हेतू होता. राजांनी दोघां भावांना आश्वासन दिले. राजे म्हणाले,

‘पिलाजी, आम्ही जरूर तुम्हांस मदत करू. पण आम्ही पडलो त्रयस्थ. काही निमित्तानं जर तुम्ही आम्हांस गडावर बोलवाल, तर निळोजीरावांना शब्द टाकता येईल.’

पिलाजी म्हणाला, ‘राजे, दिवाळी जवळ आली आहे. त्या निमित्तानं आम्ही तुम्हांस बोलवू.’

‘ठीक! आम्ही दिवाळीला गडाच्या पायथ्याच्या नारायण मंदिरात देवदर्शनाला येऊ. तसा निळोजींना निरोपही पाठवू. दिवाळीचे पाच दिवस आपल्याकडे काढता येतील.’

बेत पक्का झाला.

दिवाळीच्या आदल्या दिवशी राजे ठरल्याप्रमाणे नारायणदर्शनासाठी गेले. मंदिरासमोर तिघे भाऊ राजांची वाट पाहत होते. राजांच्या बरोबर शिबंदी होती. येसाजी, तानाजी, जिऊ महाला, संभाजी कावजी ही मंडळी होती. राजांनी देवदर्शन घेतले. देवळात घातलेल्या बैठकीवर राजे बसले. राजे म्हणाले,

‘निळोजी! आम्ही खेडबाऱ्यात आलो, पण आपली भेट नाही. नीळकंठराव असते, तर त्यांनी असं केलं नसतं.’

‘राजे, माफी असावी. दिवस धामधुमीचे. फंदफितुरीचे.’ दोघां भावांकडे पाहत निळोजी म्हणाले, ‘गड सोडून जायला धजावत नाही.’

‘मग आम्हांला बोलवायचं होतं. आम्ही आलो असतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘गडाखाली आपण येणार, म्हणून कळलं. त्यासाठीच आलो. दिवाळीचा सण आहे. हा गडावर घालवावा, ही आमची विनंती आहे.’

‘अलबत! का नाही? पण सणासुदीचे आम्ही एकटे कसे येणार? आमच्याबरोबर ही माणसं आहेत ना!’

‘गडाला आपली शिबंदी जड नाही. त्यात संकोच मानू नये...’ निळोजी म्हणाले.

राजांनी निमंत्रण स्वीकारले; आणि ते परत खेडबाऱ्याला आले. दिवाळीच्या पहिल्या दिवशी राजांनी अभ्यंगस्नान केले. फराळ केला. जेवण झाल्यावर मासाहेबांच्या पाया पडून, आशीर्वाद घेऊन राजे पुरंधरावर निघाले. सोबत दीडशे स्वार होते. विश्वासाची माणसे होती. निळोजी राजांच्या स्वागतासाठी पुढे आले. राजे गडावर गेले. गड चढताना राजांची नजर गड निरखीत होती. गड बुलंद, मजबूत होता. माची प्रशस्त होती. महादरवाज्यातून राजे गडात प्रवेश करते झाले. बालेकिल्ल्यात निळोजींचा प्रशस्त वाडा होता. तीन टेकड्यांनी सजलेला बालेकिल्ला पाहून राजे थक्क झाले. गड बंदोबस्तात होता. प्रत्येक बुरुजावर तोफा सज्ज होता. त्या मानाने शिबंदी फार थोडी होती. निळोजींच्याबरोबर राजांनी गड पाहिला.

रात्री मेजवानीच्या आधी निळोजींनी बिचकत राजांना विचारले,

‘राजे, थोडं मद्य... सणाचा दिवस आहे.’

‘निळोजी, तुम्ही संकोच करू नका. आम्हांला असल्या सवयी जमत नाहीत. आम्ही सरबत घेऊ.’

निळोजी मद्य घेत होते. पिलाजी-संक्राजी राजांकडे पाहत होते. निळोजी म्हणाले,

‘राजे, एवढे गड घेतलेत, पण पुरंधरसारखा गड पाहिलात काय?’

‘एवढा बुलंद गड आमच्याकडे कुठला? तसा प्रसंग आला, तर तुम्ही का परके? केव्हाही तुमच्या आश्रयाला येऊ.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नाही हं, राजे. आपली मैत्री आणि राजकारण भिन्न. आम्ही आदिलशाहीचे इमानी सेवक. त्यात अंतर पडणार नाही.’

राजे हसले. म्हणाले,

‘ठीक आहे. आमचा आग्रह नाही. पण, निळोजी, स्वकीयांना तरी आश्रय द्याल, का नाही?’

थोडा कैफ चढलेले निळोजी म्हणाले, ‘राजे, वाटणी कसली? आम्ही थोरले. गादीचे मालक आम्ही. हे आश्रित. हवं, तर राहावं. नाही, तर...’

‘पण जावं कुठं?’

‘वाट फुटेल, तिकडे! राजे, हे इतके साधे आहेत, असं समजू नका. वडील वारले, आणि मला माहीत नसताना विजापूरदरबाराशी यांनी बोलणी केली.’

‘मग आम्ही खावं काय?’

राजे म्हणाले, ‘थांबा! आज सण आहे, ही कटुता आवरा.’

राजांनी भांडण वाढू दिले नाही. रात्री मेजवानी झाली. राजे रात्री गडावरच राहिले. दुसऱ्या दिवशी गड पाहत असता राजांना पिलाजीने गाठले. तो निराश झाला होता. पिलाजीराव म्हणाला,

‘राजे, आता पुढं काय?’

‘तुम्ही पाहिलंतच! निळोजीराव काही करतील, असं वाटत नाही.’

‘राजे, तुम्हीच असं...’

‘पिलाजीराव, एकच उपाय आहे. साम, दाम, भेद, दंड. तयारी असेल, तर रात्री निळोजीरावांना कैद करा. माझी माणसं आहेतच. ती आपल्याला मदत करतील. विचार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

करा. मला काय ते सांगा.’

पिलाजीरावांनी तत्काळ त्याला मान्यता दिली.

रात्री भरपूर मद्य पिऊन झोकांड्या देत निळोजीराव झोपायला गेले. राजेही आपल्या शय्यास्थानी गेले. पिलाजी-संक्राजींनी राजांची माणसे महालात घेतली आणि निद्रित निळोजीरावांच्या मुसक्या आवळण्यात आल्या. राजांना जागे करण्यात आले. राजे आले, तेव्हा हात-पाय बांधलेले निळोजी खांबाला जखडलेले होते. डोळ्यांत अंगार होता. निळोजी उसळला.

‘राजे, हा विश्वासघात आहे! दगा केलात.’

‘नाही, निळोजी दगा मी केला नाही. आपण मानलं असतं, तर हा दोष आपल्या भावांच्या माथी आला नसता. पिलाजी, संक्राजी, निळोजींना बंदोबस्तात ठेवून घ्या. सण झाला, की सर्व गोष्टी ठरवू.’

पिलाजी, संक्राजी आनंदाने बेहोश झाले होते. स्वर्ग हाती लागल्याचे समाधान होते.

दुसऱ्या दिवशी राजे म्हणाले,

‘पिलाजी, संक्राजी!’

‘जी!’

‘आमची इच्छा आहे की, आज पाडवा, आपण दोघांनी आमच्याकडे आज पाहुणचाराला यावं. उद्या सकाळी परत येऊ.’

‘जशी आज्ञा!’

संध्याकाळी राजे पिलाजी-संक्राजीसह शिवापूरला वाड्यात आले. वर्दी आधीच गेली होती. जिजाबाईंनाही राजे आल्याचा आनंद होता. हसत, गप्पा मारीत जेवण आटोपले. पिलाजी, संक्राजी झोपायला गेले. राजे आपल्या महालात आले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सईबाई उभ्या होत्या. चांदीचा पाट ठेवला होता. आरती दिसत होती. राजे म्हणाले,

‘हे काय?’

‘घर कधी लक्षात राहतं का? आज पाडवा!’

‘मग?’

‘आज ओवाळून घ्यायचं.’

‘नशीबवान आहोत.’ म्हणत राजे पाटावर बसले.

सईबाईंनी राजांना ओवाळले. राजांनी विचारले,

‘तबकात काय घालू?’

‘हवं ते.’

राजांनी आपल्या बोटातली प्रवाळाची अंगठी काढली. सईबाईंनी तबक खाली पाटावर ठेवले. राजांनी आपल्या हातातली अंगठी सईबाईंच्या हाती घातली. राजे म्हणाले,

‘सई! ही अंगठी गुणाची आहे. रोहिडेश्वराच्या दिवशी ही बोटात घातली होती. आम्हांला गड मिळाला. तुम्हांला काय मिळतं, पाहा.’

सईबाई लाजल्या. विषय बदलीत त्या म्हणाल्या,

‘पिलाजीराव-संक्राजीरावांचं पाडव्याच्या मुहूर्तावर पुरंधरचं शेवटचं जेवण झालं, म्हणायचं.’

‘मतलब?’

‘तसं नसतं, तर ते इथं कशाला आले असते?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे मोकळेपणाने हसले.

‘सई! आम्ही खूश आहोत तुमच्यावर. काय हवं ते मागा.’

‘मागू? पाहा, माघार घ्याल!’

‘मुळीच नाही.’

‘आज पाडवा. फार दिवस बुद्धिबळं खेळल्याला झाले. आज खेळू या ना!’

‘बस्स? एवढंच ना? मांड पट.’

राजांनी कपडे बदलीपर्यंत सईबाईंनी गालिच्यावर पट मांडला. रौप्यसमया लावल्या गेल्या. दोन्ही बाजूंना दोन लोड ठेवले गेले. राजे बैठकीवर येऊन बसले. पट मांडला गेला. सईबाई म्हणाल्या,

‘मला काळा पट नको. हस्तिदंती पाहिजे.’

‘सुरुवातीपासून रडीला सुरुवात झाली ना?’

‘होऊ दे.’

डाव सुरू झाला. रात्र चढू लागली, तशा सईबाई कंटाळल्या. दीर्घ जांभई देऊन आळस देत त्या म्हणाल्या,

‘बस्स करू या डाव!’

‘संपायच्या आधीच?’

‘तुम्ही जिंकला काय, आणि मी जिंकला काय? दोन्ही सारखंच! उगीच जाग्रण तेवढं!’

‘हे छान! तुम्हीच म्हणालात, म्हणून खेळायला बसलो. पण, सई, ही सवय बरी नव्हे.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नेहमी असंच अर्ध्या डावावरून उठून जातेस.’

‘राणी आहे ना मी!’

राजांनी कौतुकाने पाहिले आणि सईबाईंच्या मोकळ्या हसण्याने महाल भरून गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मासाहेबांचा निरोप घेऊन राजे पिलाजी-संक्राजीसह पुरंधरकडे दौडले. हवेत दिवाळीची थंडी होती. पहाटेचे दव पडल्याने रस्ता तपकिरी झाला होता. विरळ धुक्यात पुरंधरचे अस्पष्ट दूरदर्शन होत होते. धुक्याचे पट्टे डोंगरकपारींना चिकटून राहिले होते. राजे पहिल्या माचीवर पायउतार झाले. पिलाजी-संक्राजींसह आनंदाने मनमोकळ्या गप्पा करीत राजे गड चढत होते. किल्ल्याचा मुख्य दरवाजा आला. दरवाज्याकडे लक्ष जाताच पिलाजी, संक्राजी आश्चर्यचकित झाले. दरवाज्याबाहेर आदिलशाही चांदतारा नव्हता. त्या जागी भगवा ध्वज फडकत होता. विचारग्रस्त होऊन दोघे बंधू दरवाज्यापाशी आले. राजांच्या आगमनाची वार्ता सांगणारा नगारा झडला. तानाजी, नेताजी सामोरे आले. राजांना मुजरे झाले. राजे म्हणाले,

‘सर्व ठीक ना?’

‘जी! आज्ञेप्रमाणे सारं घडलं.’ मुरारजी म्हणाले.

‘शाबास! आणि येसाजी कुठं आहेत?’

‘दारूकोठाराकडे चौकीवर आहेत.’

‘चला!’

‘राजे, हे पहारे कुणाचे?’ संक्राजी ओरडला.

शांतपणे राजे म्हणाले, ‘आमचे.’

‘याचा अर्थ?’ पिलाजीने विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘एवढे का अजाण आहात, पिलाजी? महाद्वारावर आमचं निशाण आहे. चौकीपहारे आमचे आहेत. गड आमचा आहे!’

‘विश्वासघात!’ पिलाजी उद्गारला.

‘नाही, पिलाजी! विश्वासघात निळोजींचा तुम्ही केलात. आम्ही फक्त राजकारण केलं. राजकारण आणि मैत्री यांत गल्लत करू नका.’

राजांनी टाळी वाजवली. पहारेकरी धावले. पिलाजी-संक्राजींकडे बोट दाखवून राजे म्हणाले, ‘यांना कैद करा.’

दोघे भाऊ पकडले गेले. आपल्या बुद्धिचातुर्यापुढे हरलेल्यांची राजांना नेहमीच कीव वाटे.

राजांनी गडाची बारकाईने पाहणी केली. गड सुरक्षित होता. भरपूर तोफा, बंदुका, हत्यारे होती. दारूखाना भरपूर होता. खजिना होता. पाडव्याच्या मुहूर्तावर चांगले यश पदरात पडले होते.

दोन प्रहरी राजांनी तिघां भावांना सामोरे आणवले. राजे निळोजींना म्हणाले,

‘निळोजी, आता तरी तिघे एकत्र, चांगल्या भावानं राहाल ना?’

‘ते आता केव्हाही शक्य नाही.’ निळोजी उफाळले.

राजे येसाजीकडे वळून म्हणाले, ‘येसाजी, या तिघांना एका खोलीत कोंडा. सायंकाळपर्यंत जर यांची भांडणं मिटली नाहीत, तर... गड गेलाच आहे... वतनं सुद्धा काढून घेऊन त्यांना शिक्षा करू.’

तासाच्या आतच बाळाजी आले. ते म्हणाले,

‘निळोजीचं भांडण मिटलं आहे. म्हणाल, तसे वर्तावयास ते सिद्ध आहेत.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

परत तिघां भावांना राजांच्या समोर आणले गेले. राजे म्हणाले,

‘निळोजी, घाबरू नका. गृहकलह केवढा विनाशकारी असतो, हे तुम्हांला कळलंच आहे. आमच्याऐवजी एखादा मुसलमान सरदार आला असता, तर त्यानं तुमची भांडणं लक्षात घेऊन केव्हाच तुम्हांला परागंदा केलं असतं. तुमची वतनं आम्ही तुम्हां तिघांना देऊ. त्यात तुम्ही संतुष्ट राहा. गड आमच्याकडे राहील. गडाखाली वतनावर तुम्ही राहा. आमच्याशी इमाने वर्ताल, तर आम्ही तुम्हांस अंतर देणार नाही...’

तिघां भावांनी शपथा घेतल्या. तिघांच्या उत्पन्नाची व्यवस्था करून, राजांनी मासाहेबांना आणण्यासाठी स्वार रवाना केले.

मासाहेब, सईबाई गडावर आल्या. राजांनी सारा गड मासाहेबांना फिरून दाखविला. सईबाईंनी पाहिलेला हा पहिलाच गड. त्यांना खूप कौतुक वाटत होते. बुरुजावरून तुटलेले कडे त्या पाहत होत्या. वाऱ्याने पदर टिकत नव्हता. कपाळावर खेळणारे केस, चेहऱ्यावर प्रसन्न भाव पाहत असता राजांना समाधान वाटत होते. मासाहेब नेताजी-तानाजींबरोबर बोलत फिरत होत्या. सईबाई बुरुजाकडे जात होत्या. त्या फार पुढे जातील, या भीतीने राजे पुढे गेले. सईबाईंना ते म्हणाले,

‘असं एकदम पुढं जाऊ नका.’

‘खूप आनंद झालाय् मला. वाटतं...’

‘काय?’

‘घोड्यावर बसून सारा गड पाहावा... तुमच्याबरोबर...’

‘छान! लोक काय म्हणतील?’

‘काय म्हणणार? देवाधर्मासमक्ष, एवढे लोक असता हात धरला. घोड्यावरून फिरलं, म्हणून काय झालं?’

‘ती गोष्ट निराळी.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ती कशी?’

‘तेव्हा आम्ही लहान होतो ना?’

सईबाई रुसल्या. राजे हसले. तोच मागून मासाहेब आल्या. बुरुजावरची तोफ पाहत असता राजे म्हणाले,

‘मासाहेब, गड चांगला आहे. अगदी सुसज्ज आहे.’

‘बरं झालं.’

अजून सूर्यास्ताला खूप वेळ होता. मासाहेब बुरुजावर बसत म्हणाल्या,

‘राजे, पाय थकले आता.’

‘मेणा मागवू?’

‘मेणा कशाला?... येसाजी, घोडीच मागवा ना! मलाही घोड्यावर बसून फार दिवस झाले.’

राजे गोरेमोरे झाले. सईबाई लाजल्या होत्या. बोलताना आपल्यावरून मासाहेबांच्याकडे वारा वाहतो, हे राजांच्या लक्षात आले नव्हते.

घोडी आली. खाशा स्वाऱ्या अश्वारूढ झाल्या. पाठोपाठ तानाजी, येसाजी, नेताजी ही मंडळी होती. सावकाश गड फिरत असता मासाहेब म्हणाल्या,

‘सई, टाच मार बघू.’

सईबाईंनी टाच मारताच घोडा उधळला. मासाहेब म्हणाल्या,

‘राजे, पाहा. पडतील राणीसाहेब!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लाजलेले राजे क्षणभर कुचंबले; पण माचीवरून धावणारे जनावर पाहताच त्यांनीही घोड्याला टाच दिली. सईबाईंना राजांनी गाठले. मागे एकदा पाहून राजे म्हणाले,

‘राणीसाहेब! पाहिलात आपल्या बोलण्याचा परिणाम?’

‘पाहा ना! मासाहेबांना जे सुचलं, ते तुमच्या ध्यानी आलं नाही.’

‘भारीच लाड चालवलेत मासाहेबांनी.’ राजे म्हणाले.

‘मग आहेच मी लाडकी!’

‘या लाडाला तसंच काही कारण नाही ना?’

‘चला, काही तरीच!’ सईबाई लाजल्या.

काही न बोलता दोघे जात होते. सईबाईंनी मान वळविली. त्या राजांना म्हणाल्या,

‘एक सांगू का?’

‘सांगा ना!’

‘पुण्यात, नाही तर शिवापूरला राहण्यापेक्षा गडावर आपण राहू या ना!’

‘आवडेल? पावसाळ्यात फार त्रास होईल.’

‘नाही व्हायचा.’

‘सई! कैक वेळा आपले दोघांचे विचार एकच असतात. आम्ही जेव्हा या गडावर आलो, तेव्हा आमच्याही मनात हेच विचार होते.’

सायंकाळी सारे वाड्यात आले. बैठकीवर बसलेल्या मासाहेबांच्या शेजारी जरा अंतरावर सईबाई अदबीने बसल्या होत्या. मासाहेबांच्या समोर राजे गेले. राजे येताच

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सईबाई उठून उभ्या राहिल्या. मासाहेबांना राजांनी विचारले,

‘मासाहेब, गड आवडला?’

‘सुरेख आहे गड! पण, राजे, जसं राजकारणात लक्ष घालता, तसंच जरा घरीही देत चला.’

राजे आश्चर्याने म्हणाले, ‘काय चुकलं आमचं?’

जिजाबाई हसल्या. त्या म्हणाल्या, ‘चुकलं, म्हटलं नाही. लक्ष घालीत चला, असं म्हटलं आम्ही.’

‘कुठं दुर्लक्ष झालं?’

जिजाबाईंनी सईबाईंच्याकडे पाहिले. त्या म्हणाल्या,

‘पोरीला दिवस गेलेत. तिची हौस कुणी पुरवायची?’

राजे आश्चर्याने सईबाईंच्याकडे पाहत होते. सईबाई लाजल्या आणि महालातून निघून गेल्या. जिजाबाईंच्या हसण्याने राजे भानावर आले. चेहरा लाजेने गोरामोरा झाला. विषय बदलीत ते म्हणाले,

‘जरा सदरेवर चलावं.’

हसू आवरत जिजाबाई उठल्या. महाराजांच्याबरोबर सदरेवर आल्या. सदर बैठकीवर बसताच राजांनी खूण केली. येसाजी तबक घेऊन आला. मासाहेबांच्या समोर तबक ठेवले होते. तबकात दुशेला, तलवार होती. मासाहेबांनी राजांना विचारले. राजे म्हणाले,

‘मासाहेब, पुरंधर हाती आला. आता चाकण आला, की खरा बारा मावळ हातात येईल. नेताजी, येसाजी, तानाजी यांसारखी माणसं आली नसती, तर हे स्वप्न कसं अवतरलं असतं?... नेताजीऽ’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नेताजी पुढे आला. मुजरा करून उभा राहिला.

'मासाहेब, आज आपल्या हातांनी आम्ही नेताजींना गडाचे सरनौबत करीत आहोत. नेताजींच्या नात्याचं, निष्ठेचं मोल फार आहे.'

मासाहेबांनी मानवस्त्रे, तलवार दिली. नेताजी भारावून गेले.

'नेताजी, राजांचा विश्वास संपादन करणं फार कठीण! तो जतन करा.' मासाहेब म्हणाल्या.

राजे म्हणाले, 'नेताजी, गड मजबूत करून घ्या. पुरंधरवर राहावं, असं आम्हांला वाटतं. बालेकिल्ल्याच्या राजगादी टेकडीवर वाडा बांधून घ्या.'

'राजे!' मासाहेब म्हणाल्या.

'मासाहेब, आता पसारा खूप वाढला. रोहिडेश्वर, तोरणा, कोंढाणा, पुरंधर यांसकट एवढा मुलूख आहे. आता जमिनीवर राहणं खरं नाही. केव्हा आदिलशाही चाल करील, याचा भरवसा नाही. एखादी सुरक्षित जागा निवडायला हवी.'

सगळ्यांनाच तो विचार पटला. चार दिवस राहून, गडाची व्यवस्था लावून राजे शिवापूरला आले; आणि तेथून त्यांनी लगेच पुणे गाठले.

आता डोळ्यांसमोर तरळत होता किल्ले चाकण!

□

२

राजे सदरमहालात बसले होते. बैठकीच्या खाली बाळाजी, चिमणाजी, तानाजी, येसाजी वगैरे मंडळी हात बांधून उभी होती. राजांनी विचारले,

'तानाजी, आपले स्वार तीन हजार झाले. पायदळही पाच हजारपावेतो उभं करता

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

येईल. पण गडाच्या आणि मुलुखाच्या मानानं ही शिबंदी उपयोगी नाही. आपले घोडेस्वार वाढले पाहिजेत.'

'हळूहळू वाढत्यातच की!' तानाजी म्हणाला.

'हळूहळू या शब्दाला काही किंमत नाही. ज्याचं घोडदळ कमी, त्याचं राज्य असुरक्षित...' एकदम विषय बदलीत राजे म्हणाले, 'तानाजी, आपण उद्या निघायचं. येसाजी, बाजी, चिमणाजी, बाळाजी, तुम्ही सुद्धा यायचं!'

'स्वार?' येसाजीने विचारले.

'दोन-तीनशे स्वार बरोबर राहू देत.'

'रोहिडेश्वरी जायचं?' चिमणाजीने विचारले.

राजे म्हणाले, 'पाहू! जगदंबा बुद्धी देईल, तिकडे जाऊ.'

दुसऱ्या दिवशी राजांनी वाट धरली चाकणची. येसाजी, तानाजी चकित झाले होते. राजांच्या मनात काय आहे, हे त्यांना कळत नव्हते. विचारायचे धाडस नव्हते. दौड करीत राजे चाकणला पोहोचले. इतक्या थोड्या शिबंदीने राजे दिवसा गढीवर येतील, ही कुणालाच कल्पना नव्हती. चाकणच्या चौकीदारांचा विश्वास बसत नव्हता. गडाच्या दरवाज्यात चौकीदारांची धावपळ उडाली. राजांना आत घ्यावे, की न घ्यावे, याचा विचार ठरत नव्हता. राजे दाराशी येताच गढीचा दरवाजा उघडला गेला. राजांना मुजरे झडले.

राजे गडाच्या आत गेले नाहीत. घोडी दरवाज्यातच थांबली. राजे पायउतार झाले. हवालदार अदबीने पुढे आला. राजे म्हणाले,

'फिरंगोजींना आम्ही आल्याची वर्दी द्या.'

'जी.' म्हणत हवालदार धावले. राजे गढी निरखीत तेथेच उभे राहिले. थोड्या वेळाने हवालदार आला. राजांना किल्लेदारांनी बोलाविले होते. राजे परत स्वार झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपल्या माडीवर फिरंगोजी नरसाळा अस्वस्थपणे येरझाऱ्या घालीत होते. शिवाजी अचानक गढीवर येतो, हे कल्पनेपेक्षाही वेगळे होते. कशासाठी राजे आले? आदिलशाहीला ही भेट कळली, तर?

टापांचा आवाज फिरंगोजीच्या कानांवर आला. फिरंगोजी खिडकीजवळ गेले. राजे समोरून येत होते. पांढरा शुभ्र घोडा डौलात पावले टाकीत होता. त्याच्या ओठाळीत तांबडी रेशमी काढणी शोभत होती. राजांच्या मस्तकावर जिरेटोप होता. मानेच्या हेलकाव्याबरोबर मोत्याची लडी हेलकावे घेत होती. राजे ताठ मानेने सावकाश येत होते. चेहऱ्याची कोवळी दाढी राजांच्या उमदेपणात भर घालीत होती. राजे किल्लेदारांच्या वाड्यासमोर पायउतार झाले. सेवकांनी घोडे धरले. फिरंगोजी आपली पगडी सावरीत गडबडीने सामोरे जाण्यासाठी जिना उतरले.

राजांना पाहताच फिरंगोजींनी हात जोडले. राजांनीही हात जोडून त्याला प्रत्युत्तर दिले. राजे हात, पाय धुऊन आत आले. राजांना घेऊन फिरंगोजी माडीवर आले. राजे आसनावर बसले. बाळाची, चिमणाजी, येसाजी, तानाजी पाठोपाठ आले. फिरंगोजींनी खिडकीतून पाहिले. स्वार घोडी धरून उभे होते. फिरंगोजींना काय बोलावे, हे सुचत नव्हते.

राजे म्हणाले, ‘बाळाजी, फिरंगोजींना आमची ही भेट आवडलेली दिसत नाही.’

फिरंगोजी म्हणाले, ‘न्हाई, राजे! तसं मुळीच न्हाई. पन इचार करतोय्.’

‘कसला?’

‘आळशाघरी ही गंगा का उतरली?’ फिरंगोजी नरसाळा राजांच्या नजरेला नजर देत विचारते झाले. ‘राजे, काय इचार हाय?’

राजे फिरंगोजींना निरखीत होते. फिरंगोजी मध्यम वयाचे, बलदंड शरीराचे होते. झुपकेदार गलमिशांची टोके डोळ्यांच्या दिशांना चढली होती. चेहरा करारी होता. त्यावरची रेषाही बदलत नव्हती. राजे पूर्वीच्याच मोकळेपणाने म्हणाले,

‘तुम्हांला भेटण्यासाठी आलो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘साफ खोटं! भेटायचं कारण काय? राजे, चाकणवर असलो, तरी कान आणि डोळे मावळात असत्यात. तोरणा, रोहिडा, पुरंधर कसा घेतलासा, ते काय माहीत नाही? राजे, इथं दगाफटका चालायचा न्हाई. आदीच सांगून ठेवतो.’

राजे येसाजी-तानाजींच्या कानाला लागले. दोघे उठून बाहेर गेले. बाळाजी, चिमणाजी बसून होते. बाहेर घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकताच फिरंगोजी खिडकीकडे धावले. घोडी गढीबाहेर जात होती. आश्चर्यचकित झालेले फिरंगोजी वळले. राजे याच स्मितवदनाने लोडाला टेकून सैल अंगाने बसले होते. फिरंगोजींनी विचारले,

‘घोडी गेली कुठं?’

‘तटाबाहेर. तुमच्या परवानगीनं ती वर आली होती. तुमच्या मनात शंका आहे, म्हणून तर पाठविली.’

‘धाड ऽ’ असा आवाज घुमला. फिरंगोजी परत खिडकीकडे धावला. गडाचा मोठा दरवाजा बंद केला जात होता. गडाबाहेर स्वार गेले होते. फिरंगोजी म्हणाले,

‘दरवाजा लावून घ्यायला कुणी सांगितलं?’

‘आम्ही सांगितलं. आता गडावर आम्ही तिघे आहोत. तुमच्या आज्ञेशिवाय आम्ही गडाबाहेर जाऊ शकत नाही.’

फिरंगोजी पुरे अस्वस्थ झाले होते. राजांनी जे सांगितले, ते सत्य होते. फिरंगोजींनी मनात आणले, तर दगाफटका करणे सहज शक्य होते. फिरंगोजी म्हणाले,

‘आता दगाफटका झाला, तर?’

‘करून पाहा ना!’ राजे म्हणाले.

फिरंगोजी दचकले. संशयाने त्यांनी विचारले, ‘कोण अडवणार?’

‘तुम्ही!’ राजे शांतपणे म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय?’ फिरंगोजी किंचाळले.

‘फिरंगोजी, तेवढा विश्वास नसता, तर आत येण्याइतपत आम्ही का दूधखुळे होतो? माणसाची पारख आम्हांला आहे. सज्जन माणसाला दगाफटका जमत नाही.’

‘तुम्ही केलात, तवा?’

‘तो दगाफटका नव्हता, फिरंगोजी! दगाफटका करण्यास सोकावलेल्यांना ते प्रायश्चित्त होतं.’

‘राजे, असं आडवाटचं बोलणं नगं. उगीच जीव टांगू नगासा. सरळ सांगा बगू.’

‘काय सांगू?’

‘हे तुमी चालवलंय् काय?’

‘स्वराज्य उभं करतो आहोत.’

‘कशासाठी?’

‘या मुलुखात आमचं राज्य व्हावं, म्हणून. श्रींची इच्छा आहे, म्हणून!’

‘गडावर लई धन सापडलं, म्हंत्यात, खरं?’

‘होय! खरं आहे. ते नसतं, तर एवढी ताकद आली नसती.’

‘पन हे बादशाहीम्होरं टिकंल?’

‘टिकवलं, तर टिकेल.’

‘कोन टिकवनार?’

‘तुमच्यासारखी माणसं!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्ही?’ फिरंगोजी चपापले.

‘फिरंगोजी, तुमची जात कोणती?’

अस्वस्थ झालेले फिरंगोजी म्हणाले, ‘हिंदू.’

‘तुमची देवळं जागेवर आहेत? देव सुरक्षित आहे?’

‘राजेऽ’

‘किल्लेदार, त्यापेक्षा तुम्ही मुसलमान का होत नाही? एखादी मुलगी शाही जनानखान्यात टाकली, तर सुभेदार व्हाल.’

‘खबरदार, राजे! शहाजीराजे काय मुसलमान झाले?’

‘नाही!’ राजे त्याच शांतपणाने म्हणाले, ‘म्हणूनच तीन शाह्या फिराव्या लागल्या त्यांना. त्यांच्याही नशिबात कैद येते. महाराजे मुरार जगदेवांचे हात-पाय तोडले जातात; मोगल सरदारांचे जात नाहीत. तुमच्याही विरुद्ध आदिलशाही दरबारात अमीन तक्रार करतो, ती कोणत्या हेतूनं? गुन्हा काय तुमचा? तुम्हांला माहीत नसेल, तर सांगतो. गुन्हा एकच! तुम्ही हिंदू आहात; राज्य मुसलमानी आहे.’

‘पन, राजे, सत्ता केवढी! ताकद केवढी!’

‘हं!’ राजे खिन्नपणे हसले. ‘फिरंगोजी, कुठून आले हे मोगल? निर्वासित म्हणून आलेला बाबर सम्राट झाला. कुणाच्या जोरावर? कुणी बनवला सम्राट? तुम्ही आम्हीच ना? परक्यांना ही किमया साधते, ती तुम्हांआम्हांला का साध्य होऊ नये?’

‘हो, पन तुमच्या ह्या खेळात महाराजांची विजापुरात काय तऱ्हा होईल?’

‘त्याची कल्पना त्यांनाही आहे. नाही तर त्यांनी आम्हांला पुढं जाऊ दिलं नसतं.’

फिरंगोजी गप्प बसले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘फिरंगोजी, जहागीर सांभाळून बसलो, तर काही कमी पडायचं नाही, हे आम्हांलाही दिसतं. पण असल्या मुर्दाडपणाचं अन्न नको वाटतं. इथं असं राज्य व्हावं, की जिथं साऱ्यांचे धर्म सुरक्षित राहतील. बायाबापड्यांना मोकळ्यानं फिरायला भीती वाटायची नाही. गोरगरिबाला अनाथ वाटायचं नाही. देवाधर्माचं राज्य व्हावं, ही परमेश्वराची इच्छा आहे. झालं, तर अशाच राज्यात जगू, नाही तर मरून जाऊ. त्यातही आम्हांला आनंद आहे. आपल्या घरादाराला चूड लावून यायची ज्याची हिंमत असेल, यानंच आमच्या मागून यावं.’

‘बस्स कर. ऊठ, बघू! चल.’

‘कुठं?’

‘उगीच डोक्यात कीड घालून बसायची सवय न्हाई मला. चल, पुन्याला जाऊ. तुज्या माउलीला भेटतो. तिनं कौल दिला, तर तू म्हनशील, ते करू या.’

राजांना आनंदाचे भरते आले. त्यांनी काही न बोलता फिरंगोजींना मिठी मारली.

राजे फिरंगोजींसह पुण्याला यायला निघाले. मोठ्या दरवाजाचा अडणा सरकवला गेला, दरवाजा उघडला. हवालदाराकडे बोट दाखवून फिरंगोजी म्हणाले,

‘हवालदाराच्या मुसक्या आवळा. मी आल्यावर चौकशी करीन.’

आज्ञा पाळली गेली. राजांनी विचारले,

‘ह्या गरिबावर का राग?’

‘राजे, गड माझ्या जोखमीवर. कुणाच्याही सांगेवारीनं गडाचे दरवाजे मिटाय-उघडायला लागले, तर गड जाग्यावर ऱ्हाईल काय?’

राजांच्या चेहऱ्यावर अस्पष्ट स्मित झळकले. त्यांनी काही उत्तर दिले नाही.

पुण्याला फिरंगोजींनी जिजाबाईंची भेट घेतली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाई म्हणाल्या, ‘आम्ही तुमची फार दिवस वाट पाहत होतो. तुमच्याशिवाय राजांचं राज्य अपुरं आहे.’

पहिल्याच बोलण्यात फिरंगोजी चकित झाले. त्यांनी विचारले,

‘राणीसाहेब, आपला ह्याला कौल आहे?’

‘आईविना कधी लेकरू वाढतं का?’

‘आता माझं कायबी म्हननं न्हाई. राजे, गड तुमचा. कुनाच्याबी ताब्यात द्या. जे तुमचं हुईल, ते माझं. आज मोकळा झालो.’

‘नाही हं, फिरंगोजी! आम्हांला गड नको. तुम्ही हवे होता, म्हणून आम्ही आलो होतो. बळकट माणसं मिळाली, तरच बळकट गडांना शोभा. जाताना निशाण, शिबंदी घेऊन चला. स्वराज्याचे पहिले किल्लेदार तुम्ही! गड तुमच्याच ताब्यात राहील.’

फिरंगोजींनी राजांचे, मासाहेबांचे पाय शिवले. मानाचे वस्त्र घेऊन फिरंगोजी चाकणला गेले. चाकणवर भगवा ध्वज फडकू लागला...

□

३

पहाटे राजांना जाग आली. चांगलेच उजाडले होते. महालात सुगंध दरवळत होता. पलंगानजीक उभ्या असलेल्या सईबाईंच्याकडे राजे पाहत होते. सईबाईंनी आपल्या ओट्यातून आणलेली मोगरीची फुले पलंगावर ठेवायला सुरुवात केली. राजे उठले. सईबाई म्हणाल्या,

‘झोपमोड झाली का?’

‘नाही! उलट, मागूनही मिळायची नाही, अशी जाग मिळाली- एवढी फुलं कुणी आणून दिली?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘देतो कोण? आपल्याच बागेतली.’

‘एवढी?’

‘केशव माळ्यानं केवढी चांगली बाग केलीय्. पण कधी पाहाल, तर खरं!’

‘आपण म्हणाल, तर जाऊ या!’

‘खरंच, चला ना!’

राजे उठत म्हणाले, ‘चला, जाऊ.’

सईबाई चकित झाल्या. त्यांचा विश्वास बसेना. त्या पाहत राहिल्या. राजांनी विचारले,

‘का?’

‘खरं नाही वाटत! कुणाला वाटावं, अगदी सांगेन, ते ऐकता.’

‘ऐकलंच पाहिजे! करणार काय?’

‘का?’

‘मासाहेबांची आज्ञा आहे की, तुमच्याकडे फार लक्ष दिलं पाहिजे, म्हणून!’

सईबाई लाजल्या.

राजांनी चूळ भरली आणि ते बागेकडे चालू लागले.

मोगरीचा ताटवा पाहून राजे आनंदित झाले. खुद्द राजे आलेले पाहताच वृद्ध केशव माळी लगबगीने आला. मुजरा करून उभा राहिला. राजे बगीचा पाहत होते. राजे न राहवून म्हणाले,

‘केशव, बाग सुंदर केलीस!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी!’

चाफ्याची झाडे निरखून राजांनी विचारले,

‘चाफ्याची झाडं कुठून आणलीस?’

‘कोकणातून आणली. पंतांनी मागवून घेतली होती.’

‘केशव! जी झाडं लागतील, ती मागवून घेत जा! मी कचेरीत सांगून ठेवीन. राहतोस कुठं?’

‘देवळाजवळच! वाड्याच्या मागं!’

‘राणीसाहेब, बगीचा दृष्ट लागण्यासारखा झाला खरं, पण...’

‘पण काय?’

‘तुमचा फुलांचा शौक पाहिला, की मासाहेबांना पूजेला फुलं कशी मिळणार, याची काळजी वाटते.’

सईबाई हसल्या. राजे म्हणाले, ‘चला, जाऊ. अजून स्नान आटोपायचं आहे. बरीच कामं आहेत.’

आंघोळ करून, मासाहेबांना भेटून, राजे फडात गेले. पुरंधरच्या तटांच्या कामाचा तपशील ते पाहत होते. बराच वेळ गेला, आणि शामराव नीळकंठांनी वर्दी दिली,

‘बाजी पासलकर आलेत.’

‘बाजी?’ म्हणत राजे उठले. बाजी एवढ्या तातडीने का आले, हे राजांना कळत नव्हते. त्याच विचारात राजे बाहेर आले. सदरेवर बाजी उभे होते.

‘बाजी, बसावं ना!’ राजे म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पण बाजी बसले नाहीत. त्यांचा चेहरा चिंतातुर दिसत होता. राजांना पाहताच होणारा आनंद चेहऱ्यावर नव्हता. बाजी म्हणाले,

‘राजे, मासाहेबांना आम्ही आल्याची वर्दी द्या.’

मासाहेबांच्याकडून बोलावणे येताच राजांच्यासह बाजी आत गेले. मासाहेबांनी विचारले,

‘बाजी, एवढ्या तातडीनं निरोप पाठविलात?’

‘तसदीबद्दल क्षमा असावी.’ बाजी म्हणाले, ‘तसंच जरुरीचं काम पडलं. राजांनी चाकण घेतला. शिरवळच्या अमिनानं तक्रार केली. आजवर स्वस्थ बसलेला बादशहा अस्वस्थ झाला. महाराजसाहेबही दक्षिणेत आहेत. दरबारच्या लहरीला आवरणार कोण? आदिलशाहीनं आपला बंदोबस्त करण्यासाठी फत्तेखान पाठविला आहे. त्यानं विजापूर सोडलं आहे. जशी बातमी आली, तसा तडक इकडे आलो.’

राजांनी नि:श्वास सोडला. हसून ते म्हणाले,

‘बाजी! केवढे भ्यालो होतो आम्ही! म्हटलं, काय वार्ता घेऊन आलात? आमची ही अपेक्षा होतीच. आमच्या अपेक्षेपेक्षा हे थोडं उशिराच घडतं आहे. आम्ही खानाला सामोरे यायला तयार आहोत.’

‘राजे, तुमच्या तरुण रक्ताला हे बोलणं ठीक आहे; पण हे केस पांढरे झाले. आम्हांला विचार करायला हवा.’

‘बाजी, आम्हांला पण तुमची काळजी आहे. मासाहेब, तुम्ही फक्त आशीर्वाद द्या. आम्हांला तेवढा पुरे!’ राजे डोळे मिचकावीत मासाहेबांच्याकडे पाहत म्हणाले.

बाजींचे कल्ले थरथरले. गलमिशांवरून पालथी मूठ फिरवीत ते म्हणाले,

‘राजे! मनगट शाबूत आहे. मागे राहून लढाई पाहायची सवय नाही मला.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मग उठा, बाजी! साऱ्यांना गोळा करा. पुरंधरवर पहिली लढाई खेळायची. त्याची जिम्मेदारी तुमची!’

बाजी मुजरा करून उठले; पुढच्या तयारीसाठी पुरंधरवर निघून गेले.

राजांना आता क्षणाची उसंत नव्हती. तानाजी, फिरंगोजी- साऱ्यांना तातडीने स्वार रवाना झाले. पुण्याचा खजिना तोरण्यावर हलविला गेला. मासाहेब म्हणाल्या,

‘राजे, आम्ही पण पुरंधरवर येतो.’

‘नको, मासाहेब. आपल्याजवळ फिरंगोजींना ठेवून जातो. कात्रज ओलांडून खान येणार नाही. पण आलाच, तर आम्ही वर्दी देऊ. तुम्ही चाकणवर जा. आमची काळजी नसावी. आम्ही यशस्वी होऊ, यात शंका नाही. उलट, ही पहिली चकमक कशी घडते, हे पाहायला आम्ही अधीर आहो.’

‘राजे, तुम्ही यशस्वी व्हाल! पण गर्दीत मिसळू नका.’

‘केव्हाही जीव धोक्यात टाकायला आम्ही मोकळे नाही. आमचं स्वप्न फार मोठं आहे. त्याची आम्हांला जाणीव आहे.’

चांगला दिवस पाहून राजांनी बाजी पासलकरांबरोबर पुणे सोडले आणि ते पुरंधरला आले. आज्ञेप्रमाणे गडावर सर्व हजर झाले होते. गडावर एकच उत्साह होता. दारूखाना भरपूर होता. अचूक जागा हेरून तोफांचे मोर्चे बांधले होते. तटाकडे गोफणदगडांपासून मोठ्या दगडांपर्यंत ढीग रचले होते. शेकडो रामोशी तटांच्या भिंतींवरून गस्त घालीत होते. ही सारी व्यवस्था कावजी मल्हारने पुढे होऊन अंगावर घेतली होती. नेताजींची त्याला साथ होती. गोदाजी जगताप, भिमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर, भैरोजी चोर, पोळ, घाटगे यांच्यासारखे अनेक वीर उत्साहाने वावरत होते. गडाची व्यवस्था पाहून राजे संतोष पावले. दोन दिवसांत खानाच्या बातम्या रामोशी आणू लागले.

खानाने खळत-बेलसरला तळ दिला; आणि आपला एक प्रमुख सरदार बाळाजी हैबतराव याला फौज देऊन पाठविले. शिरवळला आदिलशाही सरकारच्या अमिनाचे ठाणे होतेच. तिथवर बाळाजी हैबतराव आपल्या सैन्यासह आला. त्याने सुभानमंगळच्या गढीत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ठाणे दिले. राजांना ती बातमी समजली.

गोदाजी जगताप म्हणाला, ‘राजे, आता कवा बी बाळाजी हैबतराव येऊ दे.’

राजे म्हणाले, ‘नाही, जगताप! असं वाट पाहून कसं चालेल? खानाचा सरदार पुढं आला आहे. आपणही चार पावलं पुढं जायला हवं.’

कावजी मल्हार पुढे झाला. ‘राजे, अगदी बरोबर! शिरवळचा कोट मला ठावं हाय. मी जातो.’

‘शाबास, कावजी. स्वराज्याची पहिली कामगिरी मागितलीत. तो हक्क तुमचाच आहे. बाळाजी स्थिर व्हायच्या आत त्याला गाठा. आजच बाहेर पडा.’

बाजी पासलकर वयोवृद्ध. ते सर्वांत मोठे. ते म्हणाले,

‘राजे, आज अमावास्या. उद्या गेलं, तर बरं.’

राजे म्हणाले, ‘आज अमावास्या खरी. पण उद्या प्रतिपदा आहे. प्रतिपदेचा विजय वाढता असतो. तोच घरी येऊ दे. तो मिळवायला अमावास्येला बाहेर पडायला हवं.’

मुहूर्त नक्की झाला. गडावर रात्र उतरली. पलित्यांच्या तिकट्या साऱ्या गडावर दिसत होत्या. किर्र रात्री आकाशात नक्षत्रे चमकत असता कावजी मल्हार गडाखाली उतला. राजांनी निरोप देताना सांगितले,

‘कावजी, ही आपली पहिली मोहीम. मला विजय हवा. तसाच विजयाचा आनंदही हवा. विजयी होऊन सुखरूप घरी या. आम्ही वाट पाहतो.’

गडाखाली कावजी मल्हारची फौज गोळा झाली. पहाटेपर्यंत सारी फौज गोळा करून पहाटेला सहा कोसांवर असलेल्या सुभानमंगळ गढीकडे फौज निघाली. शिरवळची आदिलशाही फौजही, मराठे येताहेत, हे पाहताच सुभानमंगळच्या आश्रयाला धावली. शिरवळ मोकळे झाल्याचे पाहताच कावजीला स्फुरण चढले. आपल्या साथीदारांसह, सैन्यासह तो सुभानमंगळ कोटावर तुटून पडला. गढीवजा किल्ला, मातीचा तट,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ओढ्यासारखा खंदक. कावजी सैन्यासह तटाला भिडला. तट पाहून भिमाजी वाघ म्हणाला,

‘कावजी, तटाला शिड्या...’

‘अरे, वाघ तू! असल्या तटाला शिड्या कशाला? हा किल्ला म्हणजे थोडीच लंका लागली आहे? भिंती पाडा.’

गडावरून पाहणाऱ्या हशमांची मुंडकी बाणांच्या वर्षावांनी छेदली जात होती. सुभानमंगळचे तट लोखंडी सोप्याने, कुदळीने खणले जात होते. तटाच्या दरवाज्याला खुद्द कावजी धडका देत होता. गडावरून शिलाखंड अंगावर येत होते. इंगळांचा पाऊस पडत होता. भ्यालेले हशम गाडीची चाके, मुसळे, लाटणी सुद्धा फेकीत होते. बाळाजीबरोबरचे सरदार फाजलशहा, अशफशहा हे गर्भगळीत होऊन किल्ल्यात फिरत होते.

गडाचा दरवाजा पडला. खिंडारातून, शिड्यांवरून ‘हरहर महादेव’ची गर्जना उठली. किल्ल्यात एकच कापाकापी सुरू झाली. गडाची घरे आगीत सापडली. धुराचे लोट सुभानमंगळावर उठले. हलकल्लोळ माजला. भिमा वाघ, भिकाजी चोर, घाटगे यांच्यासारखे खंदे वीर त्वेषाने कत्तल चालवीत पुढे सरकत होते. प्रतिकार क्षणाक्षणाला कमी होत होता. अचानक कावजीला बाळाजी हैबतराव दिसला. कावजीला पाहताच बाळाजी पळू लागला. कावजीने भाला पेलला आणि तो त्याच्यामागे धावला. बाळाजी बुरूज गाठण्याच्या प्रयत्नात असतानाच भाला सुटला. बाळाजी पडला. त्या वार्तेने पळापळ सुरू झाली आणि थोड्याच वेळात किल्ला हाती आला. सायंकाळच्या सुमारास सुभानमंगळवर मराठी निशाण चढले. राजांना बातमी समजली.

सुभानमंगळच्या खणत्या, रात्र पडली, तरी जारी राहिल्या. पहाटे लूट गोळा करून कावजी पुरंधरकडे निघाला. लुटीत अनेक घोडे, हत्ती, मौल्यवान अलंकार, वस्त्रप्रावरणे, पालख्या, शस्त्रे होती. राजांच्या पुढे सारी लूट ठेवून वीर उभे होते. राजांच्या आनंदाला सीमा नव्हत्या. राजे म्हणाले,

‘शाब्बास, कावजी! स्वराज्याचं पहिलं रणक्षेत्र गाजवलंत. आता फत्तेखान बिळातून नाग बाहेर पडावा, तसा खळत-बेलसर सोडून पुरंधरवर चाल करून येईल. वजवलेले हात फत्तेखानावर उपयोगी येतील.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचा तर्क अगदी खरा होता. शिरवळची वार्ता ऐकताच फत्तेखान स्वारीसाठी खळत-बेलसरहून निघून पुरंधरच्या पायथ्याशी दाखल झाला. फत्तेखानाचे सैन्य गड चढू लागले. पिछाडीस स्वत: फत्तेखान होता. डाव्या बगलेला निंबाळकर होते. उजव्या बगलेला घाटगे होते. राजे बुरुजावरून सारे पाहत होते. बाजी पासलकर तटाच्या कडेने हिंडत होते. सारे मोर्चे पाहत होते. शत्रू बाणांच्या टप्प्यात येताच तोफ धडाडली. 'हरहर महादेव' म्हणत सैन्य गडाबाहेर पडले. तटावर चढू पाहणाऱ्या शत्रूवर बंदुकींच्या, गोफणींचा वर्षाव सुरू झाला. प्रचंड दगड गडावरून शत्रूवर कोसळू लागले.

फत्तेखानाच्या सैन्याची पांगापांग झाली. जे गडावरच्या तटापर्यंत पोहोचले, त्यांची कत्तल झाली. बाकीचे पळत सुटले. विजयाची चिन्हे दिसत होती. घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकून राजे वळले. तो बाजी घोड्यावर स्वार झाले होते.

'बाजी, स्वार का झालात?'

'राजे, सारी उमर लढाई पाहण्यात गेली. स्वराज्याच्या पहिल्या लढाईत बसून कसा राहू? पुरा विजय घेऊनच घरी येतो.'

राजे काही बोलायच्या आत बाजींनी टाच मारली. गडाबाहेर पडलेली बाजींची कुमक पाहताच मराठ्यांना चेव चढला. फत्तेखान आपले पळणारे सैन्य सावरून मोर्चे बांधण्याचा प्रयत्न करीत असता बाजी पासलकर आदिलशाही सैन्यावर तुटून पडले. सारे प्राणपणाने लढत होते. फत्तेखानाचा उजवा हात मुसेरखान वेषाने लढत होता. हे पाहताच गोदाजी जगताप मुसेरखानावर चालून गेला. गोदाजीने फेकलेला भाला मुसेरखानाच्या मांडीत घुसला. संतापाने बेभान झालेल्या मुसेरखानाने भाला उपसला आणि भाल्याचे दोन तुकडे करून फेकून दिले. तलवार घेऊन तो गोदाजीवर चालून आला. गोदाजीने चांगलीच लढत दिली. संधी साधून गोदाजीची तलवार खानाच्या खांद्यावर वेगाने उतरली. खान रक्ताच्या थारोळ्यात पडला. मुसेरखान पडलेला पाहताच फत्तेखानाचे उरलेसुरले अवसान नाहीसे झाले. खान पळू लागला.

बाजी पासलकर पळणारा शत्रू पाहून ओरडले, 'एक शत्रू सोडू नका. मावळात घुसलेला दुश्मन सुखरूप परत जात नाही, हे कळू द्या.'

विजयाने हर्षभरित झालेले मराठे खानामागे लागले. बेलसरच्या छावणीपर्यंत खानाचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाठलाग, कत्तल होत होती. मराठ्यांनी सरळ छावणीवर धडक दिली.

खानाचा पाठलाग करणारी फौज गडावरून दिसत होती. सैन्य दिसेनासे झाले. राजे आनंदाने माघारी आले. गडावर सर्वत्र आनंद दिसत होता. बाजी पासलकर, जगताप, काटे, इंगळे या वीरांच्या स्वागताची तयारी करण्यात राजे गुंतले होते.

दुसऱ्या दिवशी सूर्य वर आल्यावर खळत-बेलसरची लढाई मारून राजांचे सैन्य गडपायथ्याला आले. राजे बुरुजावरून येणारी पथके पाहत होते. राजे सामोरे गेले. प्रथम आला, तो गोदाजी जगताप.

‘गोदाजी! लढाई जिंकलीत ना?’

‘हो!’ गोदाजी म्हणाला.

कुणाच्याही चेहऱ्यावर आनंद दिसत नव्हता. राजांनी विचारले,

‘काय झालं?’

‘बाजी जखमी झाले!’

राजांचे लक्ष मागून येणाऱ्या पालखीकडे गेले. पालखी जमिनीवर ठेविली गेली. राजे पुढे धावले.

बाजींचे डोळे मिटले होते. सारा अंगरखा रक्तबंबाळ झाला होता. मस्तकीचे पांढरे केस विस्कटले होते. कपाळावर झालेल्या निसटत्या जखमेतून रक्त ओघळले होते. पांढऱ्या मिशांचे झुपके ओठांच्या हालचालींबरोबर थरथरत होते. राजांनी हाक मारली,

‘बाजी!’

बाजींनी डोळे उघडले. राजांना पाहताच त्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. राजांचा हात धरून ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, आपली फत्ते झाली!’

राजांनी बाजींचा हात हातात घेतला. ते म्हणाले,

‘बाजी, काय केलंत हे? आपली फत्ते झालीच होती. कुठं जात होता फत्तेखान? कशाला जीव धोक्यात घातलात?’

राजांना अश्रू आवरेनात. बाजी म्हणाले,

‘राजे! विजय मिळाला. वाईट काय झालं? मी म्हातारा. असलं मरण मागून मिळायचं नाही. हसा, राजे! तुमचं हसू पाहण्यासाठी जीव अडतोय् माझा! तेवढी एकच इच्छा राहिलीय्!’

राजे हसले. आणि ते हसू पाहून सुखावलेल्या बाजींची मान हसता-हसता कलंडली. राजांनी बाजींच्यावर शेला पांघरला. अश्रू टिपीत उठत असता राजे म्हणाले,

‘गोदाजी! प्रतिपदेचा विजय घरी आला; पण हरवलेली ही चंद्रकोर पुन्हा पाहायला मिळायची नाही. पौर्णिमेला सुद्धा ही उणीव वाटल्याखेरीज राहणार नाही.’

❑

४

पुरंधरहून आल्यापासून सारा दिवस गडबडीत पार पडला होता. सारा वाडा पुरंधरच्या वीरांनी भरला होता. आनंद, उत्साह मनात मावत नव्हता. सारे राजांच्याबरोबर बोलायला आतुर होते. मध्यरात्रीच्या सुमारास राजांना मोकळीक मिळाली. राजे आपल्या महाली आले. सईबाई महालात आल्या, तेव्हा राजे कपडे बदलून पलंगावर बसले होते. सईबाई म्हणाल्या,

‘केवढी गर्दी उसळली आज! मासाहेबांचा आनंद तर विचारायला नको.’

‘साहजिकच आहे. हा जिव्हाळा पाहून जीवनाचं सार्थक झाल्यासारखं वाटतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सईबाई एक एक दागिना उतरून मंचकावर ठेवीत होत्या. मंचकावर गोळा झालेले दागिने पाहून राजे म्हणाले,

‘खरंच, बायकांना दागिन्यांची केवढी हौस!’

‘तर! आपण गळ्यात कंठी, मनगटी पोहची, कानी चौकडा, बोटांत अंगठ्या घालता, ते पुरुषही तेवढीच हौस करतात.’

‘आम्ही माघार घेतली! मग तर झालं?’

‘अशी माघार घेऊन नाही चालायचं. आपण विजय मिळवून आलात. निदान आज तरी आरतीत काही टाकायचं होतं.’

राजे गंभीर होऊन म्हणाले, ‘विसरलं खरं.’

‘हीही माघार ना!’

‘हो! पण आमची नव्हे, तुमची!’ म्हणत राजे उठले. मंचकाचा कप्पा उघडून त्यांनी सोन्याचा कमरपट्टा काढला. सईबाईंच्याकडे पाहत ते म्हणाले,

‘आता तुम्हीच सांगा. हा कमरपट्टा आरतीत टाकता आला असता का? आणि तोही चारचौघांत?’

सईबाई आनंदाने कमरपट्टा निरखीत होत्या. राजांनी विचारले,

‘आवडला?’

‘हो!’

‘एवढंच नाही. आणखीन एक नजर आम्ही राणीसाहेबांच्या चरणांकरिता आणली आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय आणलंत?’

‘त्या तिथं, आमच्या टोपाखाली पाहा.’

सईबाईंनी जाऊन टोप उचलला. त्या टोपाखाली दोन सुरेख रौप्यसाखळ्या होत्या.

‘किती सुंदर!’ साखळ्या उचलीत सईबाई म्हणाल्या. साखळ्यांचा नाजूक आवाज झाला. राजे म्हणाले,

‘सई, सांगितलं, तर हसशील!’

‘काय झालं?’

‘काय झालं! सुभानमंगळच्या खजिन्यांची मोजदाद पुरंधरवर चालली होती. एक एक दागिना मोजून टाकला जात होता. अचानक ह्या साखळ्या पडल्या, आणि त्या पाहताच तुम्ही डोळ्यांसमोर उभ्या राहिलात. साऱ्यांची नजर टाळीत आम्ही बोलून गेलो... त्या साखळ्या आमच्या नावे खर्ची टाकून वेगळ्या राहू देत.’

सईबाई भारावून राजांचे बोलणे ऐकत होत्या. राजे म्हणाले,

‘एवढा आम्ही पराक्रम केला! आता स्वस्थ उभ्या राहू नका. तुमच्या पायांत त्या साखळ्या पाहायच्या आहेत आम्हांला.’

सईबाईंनी पायांत साखळ्या घातल्या. राजे म्हणाले,

‘तुमच्या पायांना साखळ्या शोभतात.’

चार पावले टाकून सईबाई थबकल्या. त्या म्हणाल्या,

‘मी नाही, बाई, ह्या साखळ्या घालणार.’

‘का?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘का काय? आवाज होतो ना! मासाहेब काय म्हणतील?’

‘काही म्हणणार नाहीत! उलट, आमचं कौतुक करतील.’

‘कशाबद्दल?’ सईबाईंनी विचारले.

सईबाईंच्या डोळ्याला डोळा देत राजे म्हणाले, ‘आपल्या लाडक्या सूनबाईंकडे आम्ही जागरूकतेनं पाहतो, याबद्दल.’

सईबाई नजीक आल्या. त्या म्हणाल्या,

‘केवढी मूर्ख मी! आधीच थकलात. रात्र उलटून चालली. झोपावं आता.’

राजे सईबाईंचा हात धरीत म्हणाले, ‘सई, काही दिवस असे आनंदाचे येतात, की तेव्हा दिवसरात्रीचा विचार राहत नाही. आजचा दिवस तसाच आहे.’

सईबाईंना हजारी समयांच्या ज्योती शांत करायला सुरुवात केली. समई तेवढी तेवत होती. हवेत गारठा होता. समईचा मंद प्रकाश महालात पसरत होता.

पुरंधरच्या लढाईत ज्यांनी शौर्य गाजविले, त्यांचा राजांनी यथोचित सत्कार केला. लढाईत जे कामी आले, त्यांच्या वारसांना द्रव्य दिले. खळत-बेलसरच्या पराक्रमाने सारा मावळ आनंदित झाला होता.

पण हा आनंद टिकणार नव्हता. बंगळूरहून तातडीचा खलिता आला. खलिता वाचून राजे संतप्त झाले. क्षणभर आपल्या पावलांखालची वाळू सरकते आहे, असा त्यांना भास झाला. राजे जिजाबाईंना म्हणाले,

‘मासाहेब, बंगळुराहून दादामहाराजांचा खलिता आला आहे.’

‘काय म्हणतो संभाजी?’

आदिलशाही दरबारात भोसल्यांच्या घराण्याविरुद्ध सत्रच उभं केलेलं दिसतं.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आमच्यावर जसा फत्तेखान, बाळाजी हैबती आला, तसाच फर्हादखान व तानाजी डुरे या आदिलशाही सरदारांना बंगळूर काबीज करण्यासाठी पाठविलं होतं. पण दादामहाराजांनी त्यांचा आमच्यासारखाच साफ बीमोड केला. फर्हादखान अपयश घेऊन मोकळा झाला.'

'देवाची कृपा! दोघेही संकटातून पार पडलात!'

राजे निःश्वास सोडून म्हणाले, 'नाही, मासाहेब! आदिलशाहीविरुद्ध झालेली चकमक बरीच महागात पडणार, अशी दिसते. जेव्हा आम्ही इकडे विजय मिळवीत होतो, तेव्हा तिकडे दक्षिणेत जंजीनजीक महाराजसाहेब आदिलशाही फासात फसत होते. मुस्ताफखानानं विश्वासघातानं कैद केलं.'

'शिवबा, काय सांगतोस?' मासाहेब म्हणाल्या.

'ऐका, मासाहेब, दुर्दैवाची कहाणी ऐका! आबासाहेब छावणीत झोपले असता, बेसावध असता, मुधोळच्या बाजी घोरपड्यानं छावणीत प्रवेश केला. घोरपड्यांची आणि महाराजसाहेबांची चकमक झडली. फर्जंद शहाजीराजे गिरफदार केले गेले. जे शहाजीराजे दरबारी जाताना हत्तीवरून जात, ज्यांचं ऐश्वर्य आदिलशाहीलाही लाजवी, ते फर्जंद शहाजीराजे पायी बेड्या ठोकलेले विजापुरात आले. अफजलखानानं नौरोजच्या सणाच्या दिवशी तशा स्थितीत महाराजसाहेबांना दरबारी हजर केलं.'

मासाहेबांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. त्यांनी कंपित आवाजात विचारले, 'आणिऽऽ'

'आणि काय? सध्या महाराजसाहेब आदिलशाहीच्या कैदेत आहेत. मासाहेब, एक ना एक दिवस त्या अफजलखानाला आणि बाजी घोरपड्याला पश्चात्ताप झाल्याखेरीज राहणार नाही. शिवाजीच्या बापाच्या हाती-पायी बेड्या ठोकणं इतकं सोपं नाही, हे त्यांना कळून येईल.'

'ते होईल, तेव्हा होईल. पण आता काय करणार?'

'तोच विचार करतो आहे. पण काही सुचत नाही. आदिलशाहीची आगळीक आम्ही केली आहे. फत्तेखान आणि बंगळुराहून आलेला, पराजित झालेला फर्हादखान शाही तख्तापुढं आमच्या नावानं छाती पिटून घेत असेल. संपूर्ण शरणागतीखेरीज

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

महाराजसाहेबांची सुटका होईल, असं वाटत नाही.’ राजे संतप्त होऊन मुठी आवळीत म्हणाले, ‘आदिलशाहीनं फार वाईट डाव टाकला. वाटतं की, दादामहाराजांना कळवावं आणि सरळ विजापुरावर चाल करून जावं.’

अमात्य म्हणाले, ‘राजे, तसं करणं म्हणजे जाणून बुजून जोहार करणं ठरेल.’

‘काय करावं, सुचत नाही.’

पेशवे म्हणाले, ‘राजे! जोवर विजापूरकरांच्याकडून काही येत नाही, तोवर हालचाल करणार कशी? थोडा वेळ जाऊ दे. आपोआप मार्ग सुचेल.’

‘तोवर आदिलशाही स्वस्थ बसेल?’ जिजाबाईंनी विचारले.

‘आदिलशाहीला इतक्या तडकाफडकी निर्णय घेता येणार नाही. शहाजीराजांच्या केसाला जरी धक्का लावला, तरी सारे हिंदू सरदार, आम्ही ते सहन करणार नाही, एवढं ज्ञान आदिलशाहीला खास आहे.’ राजे म्हणाले.

राजांनी जिजाबाईंना धीर दिला. पण आपल्या मनाला ते समजावू शकले नाहीत. उलटणारा प्रत्येक दिवस काळजीत जात होता. मासाहेबांच्या चिंतातुर, भयव्याकुल चेहऱ्याकडे पाहण्याचे धाडसही त्यांना होत नव्हते. राजांना आठवत होता मुरार जगदेव. मुरार जगदेव हाही ‘महाराज’च होता. ऐश्वर्यसंपन्न होता. पराक्रमी होता. पण आदिलशाहीत त्याची खांडोळी व्हायला वेळ लागला नाही. पुरंधर घेतल्यामुळे तर आदिलशाहीला आव्हानच दिल्यासारखे झाले होते.

राजे याच बेचैनीत आपल्या पलंगावर पडले होते. झोप येत नव्हती. सईबाई हलक्या पावलांनी महालात आल्या. राजांनी हाक मारली,

‘सई!’

‘झोपला नाहीत!’ सईबाईंनी आश्चर्यानं विचारले.

पलंगावर उठून बसत राजे म्हणाले, ‘झोपच येत नाही. डोळ्यांसमोर सारखे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

महाराजसाहेब उभे आहेत. मासाहेबांना काय वाटत असेल, याची कल्पनाही करवत नाही. वेणीफणी करीत असताना दररोज मासाहेबांचा हात कुंकवाच्या कोयरीत थबकत असेल. अशुभ कल्पनांनी त्यांचं मन ग्रासून गेलं असेल.'

'मासाहेबांनी अनुष्ठानाला ब्राह्मण बसविले आहेत. गणपतीवर अभिषेक चालू आहे. मीही नवस बोलले आहे.'

'प्रयत्नांती परमेश्वर असतो, सई! नुसत्या अनुष्ठानाला तो पावत नाही. कृतीची जोड त्याला लागते.'

'काय करायचं ठरवलं?'

'इथं स्वस्थ बसून काय करणार? शरणागती पत्करण्यापेक्षा विजापूरवर चालून जावं, असं मनात येतं.'

'त्यात यश मिळेल?'

'शक्यता फार थोडी. पण अपमानित जीवन जगावं लागणार नाही... तुम्हांला काय वाटतं?'

क्षणभर सईबाई विचारात पडल्या. त्या म्हणाल्या,

'राजकारणातलं बायकांना काय समजतं? पण वाटतं...'

'काय? सांग ना!'

'नको, बाई! हसाल.'

'नाही हसणार. सांगा.'

'राजकारणाचे खेळ आम्हांला जमत नाहीत. समजत नाहीत. समजतो, तो तुमच्या नादानं शिकलेला बुद्धिबळ. ज्यात यशाची खात्री नाही, तो डाव खेळू नये. हत्तीला शह

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

द्यायला वजीरच घातला पाहिजे, असं थोडंच आहे? संधी असेल, तर ते काम उंट, घोडाही करू शकेल.'

राजे चकित होऊन सईबाईंच्याकडे पाहत होते. ते उठून उभे राहिले. स्वगत बोलावे, तसे ते म्हणाले, 'हत्तीला शह द्यायला, उंट... घोडाही चालेल...'

'काय म्हटलंत?'

'थांबा! बोलू नका!' राजे काही क्षण निश्चल उभे होते. एकदम मोठ्याने हसले. वळले, तेव्हा त्यांचा सारा चेहरा आनंदला होता. राजे म्हणाले,

'सई, काही वेळेला मोठी संकटं सुद्धा किती सहजपणे सुटतात! राणीसाहेब, आम्ही तुमच्यावर खूश आहोत.'

'मला समजत नाही.'

'तुम्ही इतक्या सरळ आहात, म्हणून परमेश्वर तुमच्या मुखातून वदला.'

राजांनी सपाता पायी चढविल्या. सईबाईंना ते म्हणाले,

'सई, मासाहेबांना उठवा. आम्ही साऱ्यांना बोलावतो. शुभ वेळेला सुचलेली गोष्ट त्या वेळी करून मोकळं व्हावं.'

महालात समया प्रज्वलित केल्या गेल्या. डबीर, अमात्य, पेशवे आले. एवढ्या तातडीने बोलविल्यामुळे सारे विचारात पडले होते. मासाहेबांनी विचारले,

'राजे! एवढ्या तातडीनं साऱ्यांना का गोळा केलंत?'

सर्वांवर नजर फिरवून राजांनी विचारले, 'आम्ही विजापूरवर चालून जायचं ठरवलं, तर?'

'तो आत्मघात ठरेल!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तह करायचा मान्य केला, तर?’ राजांनी विचारलं.

‘आजवर केलेलं सर्व वाया जाईल. पुन्हा ही संधी यायची नाही.’ अमात्य म्हणाले.

निळोजीपंतांच्याकडे पाहत राजांनी विचारले, ‘शहाजादे मुराद सध्या कुठं आहेत?’

निळोजीपंत म्हणाले, ‘शहाजादे अहमदाबादेला आहेत.’

‘निळोजीपंत, शहाजाद्यांना खलिता पाठवा. त्यांची चाकरी करण्यात आम्ही धन्यता मानू, हे कळवा. आदिलशाहीनं अकारण आमच्या वडिलांना कैद केल्यामुळं आम्ही संकटात पडलो, नाही तर खुद्द जातीनं शहाजाद्यांच्या दर्शनाला आम्ही आलो असतो, असं लिहा. खातरजमेचं पत्र येताच आम्ही दर्शनार्थ येऊ, असं कळवा.’

‘व्वा, राजे! मुत्सद्दीपणाची कमाल झाली.’ अमात्य म्हणाले.

रातोरात खलिता लिहिला गेला; आणि तातडीने खलिता अहमदाबादेला पाठविला गेला.

□

५

राजे भल्या सकाळी महालात आलेले पाहताच जिजाबाईंना आश्चर्य वाटले.

‘राजे! आज लवकर आलात? एवढ्यात स्नान, पूजा आटोपली?’

‘जी!’

‘झोप आली नाही?’

‘मासाहेब! आम्ही रात्रभर बेचैन होतो. पहाटे कसलं स्वप्न पडलं, कुणास ठाऊक! आम्ही जागे झालो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काळजीइतका मोठा वैरी माणसाला नसेल, बघ.’ जिजाबाई नि:श्वास सोडून म्हणाल्या.

राजांना चिंता लपविता आली नाही.

‘मासाहेब! अहमदाबादेला खलिता पाठवून कैक दिवस झाले. पण अद्याप उत्तर नाही. प्रत्येक दिवस अखंड चिंतेचा बनला आहे. विजापूरची काळजी वाटते. तो अफजल आणि बाजी घोरपडे कोणता डाव खेळतील, याचा भरवसा वाटत नाही.’

राजांच्या बोलांनी जिजाबाईंची चिंता वाढली. त्यांच्या डोळ्यांत पाणी भरले.

‘शिवबा! दुसरा काही उपाय नाही का, रे?’

राजे गडबडीने म्हणाले,

‘मासाहेब! तुम्ही चिंता करू नका. महाराजसाहेबांच्या केसालाही धक्का लागणार नाही. ती आमची श्रद्धा आहे. आम्ही टाकलेला डाव यशस्वी झाल्याखेरीज राहणार नाही. महाराजसाहेबांची बाइज्जत सुटका होईल.’

‘तुझ्या तोंडात साखर पडो! काय सांगू? शिवबा, स्वार आला, म्हटलं, तरी जिवाचा थारा उडतो. कुणी मोठ्यानं हाक मारली, तरी कापरा भरतो. बातमी कळल्यापासून देवांना अभिषेक चालू आहेत. नवसांची खैरात केली. केव्हा त्याला दया येते, कोण जाणे!’

‘तेच आमच्याही मनात आलं आहे.’

‘काय?’

‘आज पहाटेपासून आळंदीला जावं, देवाचं दर्शन घ्यावं, असं मनात येत आहे. सकाळी जागे झालो, ते आळंदीच्या आठवणीत!’

‘जरूर जा! संकटकाळी त्याचाच आधार!’

जिजाबाईंच्या अनुमतीने राजांचा आळंदीचा बेत पक्का झाला. राजांची अश्वपथके तयार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झाली. येसाजी, तानाजी, नेताजी या मंडळींसह राजे आळंदीला निघाले.

उन्हाळ्याची सकाळ मोठी प्रसन्न होती. लहान-मोठ्या टेकड्या ओलांडीत राजांचे पथक भरधाव जात होते. राजे इंद्रायणीजवळ पोहोचले, तेव्हा सूर्य वर चढला होता. उन्हाळ्याच्या दिवसांमुळे इंद्रायणीचे पात्र क्षीण बनले होते. सारे खडक उघडे पडले दिसत होते. ज्ञानेश्वरांच्या कळसाचे दर्शन होताच राजांनी हात जोडले. नदी पार करून राजे गावात शिरले. टापांच्या आवाजाने भयभीत झालेले नागरिक राजांना पाहताच आनंदाने पुढे येत होते, मुजरे करीत होते. मंदिरासमोर राजे पायउतार झाले. मंदिराबाहेर राजांची अश्वदळाची शे, सव्वाशे घोडी उभी होती. राजे आपल्या निवडक सहकाऱ्यांसह मंदिराच्या पायऱ्या चढू लागले. महाद्वाराच्या उंबरठ्याला स्पर्श करून राजे आतल्या चौकात आले. चारी बाजूंनी प्रशस्त ओवऱ्यांनी सजलेला तो चौक होता. उजव्या हाती पिंपळपार उभा होता. समोर ज्ञानदेवांचे मंदिर होते.

राजांनी मंदिरात प्रवेश केला. पुजाऱ्याने पुढे केलेल्या तबकातील हार ज्ञानदेवांना अर्पण केला. अत्यंत नम्र भावाने राजांनी देवापुढे मस्तक ठेवले.

राजे समाधानाने म्हणाले, ‘आम्ही जेव्हा बेचैन बनतो, तेव्हा इथं येतो. इथं आलं, की समाधान वाटतं. मन शांत होतं. आम्हांला ही जागा फार आवडते.’

पुजाऱ्याने आणलेल्या तबकात राजांनी मोहरांची थैली रिकामी केली. देवदर्शन घेऊन राजे माघारी वळले. तोच महाद्वारातून येणारा माणसांचा लोंढा नजरेत आला. त्यातून येसाजी गडबडीत पुढे येत होता. येसाजी राजांच्या जवळ आला. मुजरा करून त्याने सांगितले,

‘तुकोबाराय येताहेत.’

‘आज खरोखरीच भाग्याचा दिवस!’ म्हणत राजे गाभाऱ्यासमोरून बाजूला सरले. एका बाजूला उभे राहून राजे अतृप्त नजरेने पाहत होते. टाळमृदंगाच्या साथीवर भजनाचा आवाज कानांवर येत होता-

‘जय जय राम कृष्ण हरी ऽ ऽ जय जय ऽ ऽ’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सागराच्या लाटा हेलकाव्यात, तशी मागे-पुढे सरकणारी दिंडी राजांच्या नजरेत आली. दिंडीसमोर चिपळ्या उंचावून तुकाराम महाराज नाचत होते. नेत्र मिटले होते. कपाळी बुक्क्याची निशाणी उमटली होती. अनवाणी पाय, गुडघ्यांपर्यंत धोतर, अंगात आखूड बाह्यांची खोळ, मस्तकी बसके मुंडासे हा त्यांचा वेश होता. कानांच्या पाळ्यांवर आणि कपाळावर उमटलेल्या चंदनमुद्रांमुळे चेहऱ्यावरचे भक्तिभाव खुलले होते बुक्का उधळीत दिंडी मंदिरासमोर आली. दिंडी दुतर्फा उभी राहिली. मध्यभागी तुका वाणी उभा होता. चिपळ्यांच्या नादावर तल्लीन होऊन नाचत होता. क्षणभर नाच थांबला. प्रेमाने व्याकूळ बनलेल्या तुकारामांनी देवावर दृष्टी लावली. टाळांचा आवाज नाजूक बनला. मृदंगाची थाप मंदावली. चिपळ्यांच्या छळकीवर रसपूर्ण, भावपूर्ण आवाजात महाराज गात होते :

जगीं ऐसा बाप व्हावा। ज्याचा वंश मुक्तीस जावा।
पोटा येतां हरलें पापा। ज्ञानदेव मायबापा।। ध्रु.।।
मुळीं बाप होता ज्ञानी। तरी आम्ही लागलों ध्यानीं।
तुका म्हणे मी पोटींचें बाळ। माझी पुरवा ब्रह्मींची आळ ।।

तुकाराम महाराजांनी देवाला दंडवत घातला. ते उभे राहिले. त्यांचे चरण शिवण्यासाठी गर्दी उसळली. राजे पुढे झाले. राजांना पाहताच सर्वांनी वाट दिली. राजांनी तुकाराम महाराजांचे पाय धरून पायांवर मस्तक टेकले. तुकाराम महाराजांनी गडबडीने राजांना उठविले.

'राजे! राजे! किती वेळ आम्ही सांगितलं की, असं करू नका, म्हणून. तुमच्यासारख्या राजांनी आमचे दरिद्र्याचे पाय कसले शिवायचे?'

'महाराज!'

'महाराज आम्ही नाही.' ज्ञानेश्वरांकडे बोट दाखवीत तुकाराम म्हणाले, 'ते महाराज!'

राजे संकोचले. तुकाराम महाराज राजांचा चेहरा आनंदून पाहत होते. त्यांचे मन उचंबळून आले.

'अहाहा! काय गोजिरं रूप! तुम्हांला पाहिलं, की ज्ञानदेवांना पाहिल्याचा भास होतो. असंच त्यांचा कोवळं रूप! त्यांनी ज्ञानाची कवाडं उघडली; चैतन्यानं तुम्ही ती साकार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

केलीत.’

राजांचा हात धरून तुकाराम महाराज वाट काढीत होते. राजांचे मन त्या बहुमानाने भरून आले होते. तुकारामांच्या संगती राजे ओवरीवर आले. कुणी तरी घोंगडे पसरले. महाराजांनी राजांना बळेच शेजारी बसवून घेतले. राजांना क्षेमकुशल विचारले. राजांनी विनंती केली,

‘महाराज, एक प्रार्थना आहे.’

‘एकदा आपले पाय आमच्या घरी लागावेत. आपण म्हणाल, तेव्हा पालखी, सरंजाम आम्ही पाठवू.’

तुकाराम महाराज मोठ्याने हसले. डोळ्यांतले पाणी डाव्या बोटांनी टिपीत राजांच्या पाठीवर प्रेमभराचा हात थोपटीत ते म्हणाले,

‘कशासाठी हा सायास?’

‘आपलं दर्शन घडावं. सहवास लाभावा.’

‘राजे, आमचं कसलं दर्शन? त्यात काय आनंद? पुरेशा वस्त्राअभावी ही मळकटलेली काया, उपवासानं रोडके झालेले हात-पाय... याचा कसला दर्शनसोहळा?’

त्या बोलांनी राजांचे मन उदास झाले. महाराजांच्या ते ध्यानी आले.

‘राजे! उदास होऊ नका. तुमच्यापाशी येऊन आम्ही काय मागणार? अन्न मागावं, तर आम्हांला मिळालेली भिक्षाच मोठी वाटते. अंगावरच्या या चिंध्यांचाच भार पुष्कळ आहे, तिथं वस्त्रं काय मागायची? भूमिशय्या, आणि आकाशाच्या पांघरुणात ऊब भोगणारे आम्ही. राजांच्याकडे मानासाठी जावं. पण मानात आमचं मन रमत नाही. तुमच्या घरी भाग्यवंताला मान. इतर सामान्यांना तिथं किंमत नाही.’

तुकारामांच्या शेवटच्या बोलांनी राजांचे मन कळवळले. त्यांचे डोळे बसल्या जागी भरून आले. ते पाहून तुकाराम कासावीस झाले. ते गुदमरल्या आवाजात म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे! डोळ्यांत पाणी का आणलंत? आम्ही तुम्हांला दुखविण्याकरिता बोललो नाही. आमचा अर्थ तुमच्या ध्यानी आला नाही.’

राजांनी वर पाहिले. राजांचा चेहरा व्यथित बनला होता. त्या भाबड्या जिवाच्या बोटांना कंप होता. राजांच्या खांद्यावर त्या बोटांचा स्पर्श करीत महाराज म्हणाले,

‘राजे, तुम्ही श्रीमंत! श्रीमान योगी. उपजतच ज्ञानी. ज्ञानदेवांसारखं हे तुमचं रूप. तुमच्या घरी सामान्य येईल कशाला? तिथं भाग्यवंतच यायचा. तुमचं रूप ध्यानी यावं, म्हणून बोललो. उगीच मनाला लावून घेतलंत.’

राजांनी एकदम महाराजांचे पाय शिवले.

‘राजे, हे काय?’

‘महाराज! अनुग्रह व्हावा!’

तुकाराम महाराजांनी राजांना प्रेमभराने उठवले. राजांच्या नजरेला नजर भिडवीत महाराजांनी विचारले,

‘आम्ही सांगू, त्यावर विश्वास धराल?’

‘जी!’

‘अनुग्रहाची चिंता करू नका. तुमचा अनुग्रह थोर आहे. तो योग त्या अधिकारी पुरुषाकडून योग्य वेळी होईल. त्यात तुमचं कल्याण आहे. राजे! मृदंगावर टाळ बडवून बोल निघत नाही. त्याला हाताचीच थाप लागते. टाळावर हात मारून आवाज निघेल का? त्यासाठी दुसरा टाळ हवा. गुरुशिष्यांची जोड अशीच आहे. तुमची जोड तुम्हांला मिळेल. त्यासाठी उतावीळ होऊ नका.’

त्या वैराग्यसंपन्न, ज्ञानी महापुरुषाच्या दर्शनाने राजे थक्क झाले. पण त्यांचे मन पराभव पत्करायला तयार नव्हते. त्यांनी इच्छा व्यक्त केली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज! आपल्यासाठी काही तरी करावं, असं वाटतं. तेवढी इच्छा पुरवावी.’

‘फार मोठ्या संकटात टाकलंत!’ महाराज विचारात पडले. ‘धन, ऐश्वर्य मागावं, तर आम्हांला त्याचा तिटकारा... हां, राजे, एक मागणं आहे.’

‘आज्ञा, महाराज!’

तुकाराम महाराजांनी ओवरीवरून देवळाकडे नजर टाकली. देवळावरची दृष्टी न हलविता ते म्हणाले,

‘राजे! थोडा वेळ देवळात जाऊन या. एवढं आमच्यासाठी करा.’

‘देवळात?’ राजे उद्गारले.

‘हो!’ महाराजांच्या चेहऱ्यावर खेळकर स्मित चमकले. ‘राजे! तुम्ही आमच्याजवळ बसल्यामुळं आमच्या भेटीसाठी आलेली मंडळी खोळंबलीत. तुम्ही राजे. तुमच्या देखत ते सलगी करणार कसे? तुम्ही देवळात गेला, तर ते आम्हांला भेटतील. त्यांना भेटीचा आनंद घेता येईल.’

राजांच्या चेहऱ्यावर स्मित प्रकटले. ते उठत म्हणाले,

‘जशी आज्ञा!’

राजे निघालेले पाहताच महाराजांनी हाक मारली,

‘राजे! प्रसाद इथंच करा.’

‘पण आमची शिबंदी...’ राजे चाचरले.

‘राजे! आमच्या राज्याची वहिवाट मोठी. इंद्रायणीसारखी जीवनदात्री आहे. ज्ञानदेवांसारखी माउली आमची पाठीराखी आहे. तुम्ही चिंता करू नका.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे उठले. देवळात गेले. देवळातून राजे पाहत होते. तुकाराम महाराजांच्या ओवरीभोवती गर्दी उसळली होती. काही वेळाने गर्दी कमी झाली. राजे तुकाराम महाराजांच्या प्रसादाला आहेत, हे वृत्त साऱ्या आळंदीत पसरले. एका ओवरीवर घराघरांतून आलेल्या भाजी-भाकरीच्या चवडी लागल्या होत्या. राजे ओवरीवर गेले. तेव्हा तुकाराम महाराज म्हणाले,

'राजे पाहा! शेकडो हातांनी जपणारी ही उदंड माउली!'

राजांच्या हातावर भाकरभाजी ठेवण्यात आली. सारे कौतुकाने पाहत होते. राजे अत्यंत चवीने सर्वांसह प्रसाद भक्षण करीत होते.

दोन प्रहर टळली, तेव्हा राजांनी महाराजांचा निरोप घेतला. राजांना प्रेमभराने उराशी कवटाळीत महाराजांनी आशीर्वाद दिला,

'राजे! भवानी सदैव तुमच्या पाठीशी आहे. कसली चिंता करू नका. सारं ठीक होईल. तुमचं कार्य तडीस नेण्यास ती माउली समर्थ आहे.'

सायंकाळच्या वेळी राजे मोठ्या समाधानाने पुण्याला येत होते.

□

६

आळंदीहून राजे पुण्यात आले. दिवेलागण झाली होती. लाल महालात प्रवेश करीत असता त्यांची नजर वाड्याच्या प्रथम चौकाच्या दारात उभ्या असलेल्या जिजाबाईंच्याकडे गेली. पायांवर पाणी घेऊन राजे सदरपायऱ्या चढून गेले. जिजाबाईंच्या पाया पडले. आशीर्वाद देऊन जिजाबाई म्हणाल्या,

'राजे! तुमच्या पुढंच अहमदाबादेचा खलिता आला.'

'खरंच?' राजे आनंदित होऊन उद्गारले, 'आशीर्वाद खोटा ठरायचा नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कुणाचा आशीर्वाद?’

‘मासाहेब! तुम्ही आळंदीला आला असता, तर फार बरं झालं असतं. आळंदीला तुकाराम महाराजांचं दर्शन घडलं.’

‘खरं?’ जिजाबाई हात जोडीत म्हणाल्या.

‘हो ना! त्यांच्या थोड्या सहवासात आम्ही खूप शिकलो. आमचा अहंकार नाहीसा

झाला. सम्राटानंदेखील त्यांच्यासमोर लाजावं, अशी त्यांची योग्यता.’

‘सकाळपासून उपाशी असाल. चला...’

‘नाही हं, मासाहेब! आमचं पोटं अगदी भरलं. आम्हांला तुकाराम महाराजांनी ठेवून घेतलं. घराघरांतून आलेला भाजीभाकरीचा प्रसाद सर्वांना मिळाला. इतकं रुचकर भोजन आम्ही आजवर केलं नाही.’

‘नशीबवान आहात!’

‘मासाहेब! आम्हांला महाराजांनी जवळ बसवून घेतलं. संकट दूर होईल, म्हणून आशीर्वाद दिला... आम्ही फडात जाऊन येतो. खलिता वाचायचा आहे.’

राजांनी दोन पावले टाकली. ते तसेच वळले. चेहरा शरमिंदा झाला होता. जिजाबाईंच्या जवळ जात राजे म्हणाले,

‘क्षमा, मासाहेब! आमच्या ध्यानी आलं नाही. आम्ही जेवलो नाही, असं वाटून तुम्हीही अद्याप उपाशीच असाल. प्रथम जेवू.’

जिजाबाई हसल्या.

‘शिवबा! तुम्ही फडात जाऊन या. रात्र झाली आहे. थोड्या वेळानं जेवलं, म्हणून बिघडणार नाही. खरंच जा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे फडात गेले. राजांच्या हाती शाही खलिता देण्यात आला. राजांनी अधीरपणे खलिता उघडला. राजे वाचीत होते. चेहऱ्यावर समाधान विलसत होते. मुरादने लिहिले होते....

> 'तुम्ही खातरजमेचे पत्र आल्यानंतर हुजूर येतो म्हणून लिहिले. ऐसियास वकील अगोदर पाठविणे. म्हणजे खातरजमेचे पत्र पंजासहित पाठविण्यात येईल.'

राजांचा आणि मुरादचा पत्रव्यवहार सुरू झाला. आदिलशाहीला ही वार्ता समजताच अर्धांगाने आजारी असलेला शहा काळजीत पडला. मोगलांचे वैर पत्करणे आदिलशाहीला शक्य नव्हते. त्यातच मुरादकडून शहाजीला पत्र गेले. पत्र दडपणे विजापूर-सुलतानाला शक्य नव्हते. कारण सम्राटाचे पत्र होते. मुरादने लिहिले होते :

> 'तुमचे पत्र शिवाजी यांणी अर्जदास्त हुजूर येण्याविषयी पाठविली ती पावली. पेशजीच्या गोष्टी मनात न आणिता तुमची मोकळीक करण्याविषयी लिहिले... तुम्हांकरिता पोशाख पाठविला आहे. हा घेऊन आपणांवर पूर्ण लोभ आहे, असे मनात आणावे...'

विजापूरकर सुलतान धास्तावला. शहाजीला मुरादने मानाचे वस्त्र पाठविले, याचा अर्थ आता तो दिल्लीदरबारचा मानकरी होता; आणि शहाजीच्या संरक्षणाची सारी जबाबदारी विजापूर-सरकारवर होती. आदिलशाही पेचात पडली. विजापूरसुलतानाने शहाजीराजांना खिलत पाठविली. मानाने दरबारी आणले. आपला आब राखण्यासाठी व दरबारी इज्जत राखण्यासाठी सुलतानाने एकच अट घातली : संभाजीने लढविलेले बंगळूर शहर, कंदर्पी हा किल्ला बादशहास द्यावा व शिवाजीने आदिलशाहीचा बळकावलेला कोंढाणा किल्ला परत करावा. शहाजीराजांनी फारसे ओढून न धरता त्या अटी मान्य केल्या व तशा मजकुराची पत्रे शिवाजीस व संभाजीस पाठविली. जंजीकैदेनंतर जवळ जवळ दहा महिन्यांनी शहाजीराजांची सुटका झाली. शहाजीराजांच्या अपमानाचे शल्य कमी करण्यासाठी आदिलशहाने शहाजीराजांच्या दारी हत्ती, घोडे बांधविले. 'फर्जंद' ही किताबत दिली. पण आलेल्या अनुभवाने शहाजीराजांचे चाकरीतील मन उदास बनले.

राजांना विजापूरचे पत्र आले. शहाजीराजांची मुक्तता झाल्याचे वाचून लाल महालात आनंदाला भरते आले. कोंढाणा द्यावा लागणार, याचे राजांना दुःख होते. कोंढाणा म्हणजे स्वराज्याचे अव्वल ठिकाण होते. पण टळलेले संकट त्यापेक्षा कैक पटींनी मोठे होते. जिजाबाई, सईबाई, अमात्य, डबीर, पेशवे यांच्यासह राजे गजाननाच्या दर्शनाला गेले. गजाननापुढे मस्तक टेकवून राजे उभे राहिले. म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘देवानं लाज राखली. त्यानंच संकटातून तारलं.’

‘राजे, निर्भेळ सुख कधी मिळतच नाही का?’ सोनोपंत म्हणाले.

राजे म्हणाले, ‘हे निर्भेळच आहे. कोंढाण्याचं दुःख कसलं? स्वराज्यासाठी अजून दोनशे गड घ्यायचे असतील, तर त्यांत आणखीन एक जड नाही. हा कोंढाणा परत घेता येईल. असले छप्पन कोंढाणे महाराजसाहेबांच्यावरून ओवाळून टाकावे लागले, तरी त्याची खंत आम्हांला वाटणार नाही.’

देवदर्शन आटोपून वाड्यात येत असता जिजाबाईंनी आज्ञा केली,

‘अमात्य, आज गजाननाच्या मंदिरावर दीपोत्सव करा. आम्ही नवस बोललो होतो.’

रात्र झाली, आणि गजाननाचे शिखर लक्ष दीपांत उजळून निघाले.

रात्री झोपण्याआधी राजे जिजाबाईंच्या दर्शनाला गेले. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, फार ताण पडला. साऱ्यांनाच मनस्ताप झाला. विश्रांती घ्या. ऐन वेळी तुम्हांला सुचलं, म्हणून बरं झालं.’

‘मासाहेब, हे श्रेय आमचं नाही.’ सईबाईंच्याकडे पाहत राजे म्हणाले, ‘कौतुक करायचंच, तर आपल्या सूनबाईंचं करा. त्यांनीच हे सुचविलं.’

‘आहेच ती हुशार!’ मासाहेब म्हणाल्या.

‘हो ना!’ राजे सईबाईंच्यावर नजर रोखीत म्हणाले, ‘पण शह देतात, तो राजाला; हत्तीला नव्हे, हे अजून कळायचं आहे.’

सईबाई गडबडीने निघून गेल्या. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे! तिला आता चिडवीत जाऊ नका. दिवसांतली पोर. सुखरूपपणे पार पडली, की काळजी मिटली. एवढे मोठे झालात, पण वयाची जाणीव नाही. असेच राहा!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सईबाई महाली गेल्या, तेव्हा राजे पाठ फिरवून झोपी गेले होते. गंभीर होऊन पलंगाजवळ जात सईबाई म्हणाल्या,

'माहीत आहे, जागे आहात ते. सोंग नका घेऊ.'

राजे वळले. राजांच्यावर नजर रोखून उभ्या असलेल्या सईबाईंना ते म्हणाले,

'ही चाल नाही... हा मात्र नक्की शह हं!'

त्या शब्दांनी सईबाईंचे अवसान कुठच्या कुठे निघून गेले. त्या एकदम हसल्या. राजांचे हास्य त्यात मिसळून गेले.

❑

७

शहाजीराजांच्या आज्ञेप्रमाणे शिवाजीराजांनी आदिलशाहीला कोंढाणा दिल्यामुळे आदिलशाही नजीकच्या काळात काही कारवाई करील, असे वाटत नव्हते. किती तरी दिवसांनी राजांना स्वस्थता मिळत होती. आजवर शत्रूंच्या भीतीने किल्ले, कोट, शस्त्रखरेदी यांत घातलेले लक्ष त्यांनी आता राज्याच्या बंदोबस्तात गुंतविले. दादोजी कोंडदेवांनी जमीनमहसुलाची बसविलेली पद्धत- त्या पद्धतीची अंमलबजावणी जारीने सुरू करण्यात आली. पुण्याला पाण्याची टंचाई पडू नये, म्हणून कोंढवे गावाला धरणाचे बांधकाम सुरू केले. शिवापूरच्या बागायतीसाठी दुसऱ्या धरणाची उठावणी केली. या कामात राजे जातीने लक्ष घालीत होते. दादोजींची उणीव जिजामाता भरून काढीत होत्या. वाड्याच्या दारात आलेल्या तंट्याचा निर्णय त्याच करीत असत.

राजे वेळ मिळेल, तेव्हा पुरंधरचे काम पाहत होते. खळत-बेलसरला मिळालेल्या राजांच्या विजयाने सारा मावळ सुरक्षित झाला होता. त्या मावळाला आता न्यायी राज्याचा पडताळा येत होता. पिकावर वसूल घेतला जात होता. शेती उठवायला नवीन जमीन मिळत होती. गुरे, अवजारे घेण्यासाठी गरीब शेतकऱ्यांना रकमा मिळत होत्या. कर्ज मिळत होते. कुणाही सरकारी अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार करायला प्रजा धजत होती. राजे अशा तक्रारीची दखल जातीने घेत. अन्याय करणाऱ्या अधिकाऱ्यांना कडक शासन केले जाई.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचे जसे प्रजापालनाचे नियम होते, तसे लष्कराचेही नियम होते. लष्कराची पाहणी नेहमी व्हायची. घोडा हे राज्याचे ऐश्वर्य असल्याने त्याची मालकी खासगी नव्हती. सारे घोडे सरकारी लष्करात. बायको, बटीक, कलावंतीण बाळगायला मनाई असे. जो बाळगील, त्याची गर्दन मारावी, असा हुकूम राजांनी काढला होता.

एके दिवशी राजे पुरंधरहून पुण्याला आले. सगळ्यांच्या चेहऱ्यांवर आनंद होता. वाड्यात एकच गडबड उडाली होती. मनोहारी गडबडीने सदरेवरून आत जात होती. राजांनी हाक मारली,

'मनोहारी! आज गडबड कसली?'

हातातील कलश सावरीत मनोहारी हसली, आणि उत्तर न देता आत निघून गेली. राजांना त्या वर्तनाचा अर्थ लागेना. ते मासाहेबांच्या महालात गेले. तेथे कोणी नव्हते. त्याच वेळी मासाहेब आल्या.

'मासाहेब, आज गडबड कसली?' राजांनी विचारले.

'राजे!' मासाहेब हसून म्हणाल्या, 'रात्रीपासून गडबड सुरू आहे. तरी तुम्हांला सांगत होते, चार दिवस कुठं जाऊ नका, म्हणून.'

'काय झालं?'

'काय झालं? तुम्ही 'आबासाहेब' बनलात, राजे! आज पहाटेच मुलगी झाली. बरं झालं, वेळेवर आलात. देवांना साखर ठेवून साखरथैली पाठवायला हवी. साखर वाटायला हवी.'

राजांच्या चेहऱ्यावर आनंद प्रकटला. राजे जेव्हा सईबाईंना भेटायला गेले, तेव्हा बाळ पाळण्यात झोपले होते. राजांनी निद्रित मुलाला पाहिले, आणि ते सईबाईंच्याकडे वळले. सईबाईंच्या चेहऱ्यावर क्षीण हास्य होते. राजे म्हणाले,

'कुणासारखी आहे मुलगी?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपल्याच वळणावर गेलीय्!’

राजे हसले. म्हणाले, ‘वाटलंच होतं. मुलाचं जिथं रूप दिसणं कठीण, तिथं तुम्ही बायका त्याचं वळणही सांगून मोकळ्या होता. कसं, देव जाणे!’

राजांच्या हताश मुद्रेकडे पाहताच सईबाईंना हसू आवरणे कठीण गेले. त्या मोठ्याने हसल्या. हसता-हसता मध्येच थांबल्या. उद्गार निघाला, ‘आईऽगऽ’

राजे धावले. ‘काय झालं?’

‘काही नाही. हसणंही सहन होत नाही.’

‘तुम्ही विश्रांती घ्या.’ राजे म्हणाले.

‘थांबावं ना!’

‘काय?’

‘खरं सांगाल?’

‘आम्ही तुमच्याशी कधी खोटं बोललो का?’

‘मुलगी झाली, म्हणून वाईट वाटलं नाही?’

‘बिलकुल नाही! मासाहेबही म्हणाल्या- पहिली बेटी, तूपरोटी! पण, राणीसाहेब, ह्या छोकरीला अगदी तुमच्यासारखी बनवा.’

‘म्हणजे कशी?’

क्षणभर राजांनी सईबाईंना निरखले; आणि ते म्हणाले,

‘आपलं दुःख गिळून दुसऱ्यांच्या सुखात विरघळणारी.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

-आणि एवढे बोलून राजे महालाबाहेर गेले. सईबाईंच्या मुखावर एक वेगळेच समाधान होते.

मुलीची साखर देवादिकांना, आप्तस्वकीयांना वाटली गेली. लाल महालात थाटाने बारसे झाले. मुलीचे नाव ‘सखुबाई’ ठेवण्यात आले.

सखुबाईचा जन्म चांगल्या पायगुणाचा ठरला. शहाजीराजांच्या सुटकेनंतर तिचा जन्म झाला. घरादाराला स्वस्थता असताना ती जन्माला आली. राजांना सखूला पाहण्यात मोठा आनंद वाटत होता. राज्यकारभाराबरोबरच सखूचे वाढते चाळे ते पाहत होते. सखू रांगू लागली; आणि बोबडे बोल उमटू लागले. घरादाराच्या अंगाखांद्यांवर सखू खेळू लागली.

एके दिवशी लाल महालात बातमी आली- कान्होजी जेधे पुण्यास येत होते. कान्होजी जेधे हे शहाजीराजांच्या खास विश्वासातले सरदार. शहाजीराजांना कैद झाली, तेव्हा कान्होजी कैद केले गेले. कनकगिरीला कान्होजी आदिलशाही कैदेत पडले. पुढे शहाजीराजांची सुटका झाल्यानंतर कान्होजींना सोडण्यात आले. आपल्यामुळे अकारण कान्होजींना बंदिवास भोगावा लागला, याचे शहाजीराजांना फार दुःख झाले. कान्होजींचेही मन बादशाही सेवेला विटले होते. कान्होजींसारख्या तडफेच्या नेकजात सरदाराने लहरी आदिलशाहीत राहावे, असे शहाजीराजांना वाटेना. त्यांनी कान्होजींना आपल्या वतनावर पाठविले. निरोप देताना सांगितले,

‘कान्होजी! आमचा तुमच्यावर विश्वास आहे. तिथं आमचे पुत्र शिवाजीराजे आहेत. त्यांची जिवाभावानं, इमानीपणानं सेवा करा. आमचे ठायी ते समजा. जीवमोलानं त्यांचं रक्षण करा. आदिलशाही फौज आली, तरी शिवाजी महाराजांच्या वतीनं फौजेला टक्कर द्यायला भिऊ नका.’

कान्होजींनी ती आज्ञा शिरसावंद्य मानली. शहाजीराजांच्या पुढे बेलरोटीची शपथ घेऊन कान्होजींनी विजापूर सोडले. बादशाहीला विटलेले कान्होजी शिवाजीराजांच्या भेटीसाठी पुण्याची वाटचाल करू लागले. कान्होजी येणार, या वार्तेने राजे आनंदित झाले होते.

रात्री राजे सखुबाईला जवळ घेऊन झोपले होते. सखूच्या डोळ्यांत झोप आली होती. राजे तिला थोपटीत होते. बोलता-बोलता सखू झोपी गेली. आपल्या कुशीत झोपलेल्या सखूकडे पाहून राजे समाधानाने डोळे मिटून पडले होते. सईबाई आत आल्या. त्यांनी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांकडे आणि झोपलेल्या सखूकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित विलसले. त्या समईकडे वळल्या, आणि हाक आली,

'सईऽ'

सईबाईंनी दचकून पाहिले. शिवाजीराजे पाहत होते.

'झोपला नाहीत? झोपमोड होऊ नये, म्हणून किती हळुवार पावलांनी आले!'

'आपल्या आगमनाची वर्दी तुम्ही येण्याआधीच मिळते.'

'ती कशी?' सईबाईंनी आश्चर्याने विचारले.

हळुवारपणे उठत राजे म्हणाले, 'ती सांगते.'

'ती कोण?'

'आहे अशीच बोलकी.'

'आपण तिच्याबरोबर बोलत बसावं. जाते मी.'

सईबाई जाण्यासाठी वळलेल्या पाहताच राजे गडबडीने म्हणाले,

'तुम्ही जा! पण नाव तर ऐकून जाल.'

सईबाई थांबल्या. त्यांच्या कानांवर शब्द आले,

'तुमची वर्दी तुमच्या पायीची साखळी देते.'

सईबाई राजांच्याकडे चकित होऊन पाहत होत्या. त्या कृत्रिम कोपाने म्हणाल्या,

'या साखळ्यांचा एवढा का आवाज येतो, की मुदपाकखान्यापासून इथवर ऐकू यावा?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नाही, सई. ते तुम्हांला कळायचं नाही. ते आम्हीच जाणे. आतुर पतीच्या तीक्ष्ण कानांना पत्नीच्या पायांतल्या साखळ्यांचा आवाज फार लौकर ऐकू येतो.’

सईबाई लाजल्या. काही न बोलता समईच्या नजीक जाऊन वात शांत करू लागल्या...

कान्होजी जेधे पुण्याला आले. त्यांच्याबरोबर एक खास मेणाही होता. विजापुराहून येताना शहाजीराजांनी सोयराबाईंनाही कान्होजींच्याबरोबर पाठविले होते. धाकट्या राणीसाहेबांनी मोठ्या सन्मानाने वाड्यात पाऊल टाकले. कान्होजींनी जिजाबाईंना मुजरा केला. राजांनी विजापूरचे क्षेमकुशल विचारले. जिजाबाईंनी महाराजसाहेबांची, संभाजीराजांची चौकशी केली. राजे कान्होजींना म्हणाले,

‘कान्होजी! तुम्ही आलात. आम्हांला आणखीन धीर आला. आमचं बळ वाढलं.’

‘राजे, तुमचं कर्तृत्व ऐकून महाराजसाहेबांना कौतुक वाटतं. नाही तर त्यांनी आपल्या सेवेसाठी मला पाठविलं नसतं.’

‘तुमची निष्ठा आम्हांस माहीत आहे.’ कान्होजींच्याबरोबर आलेल्या बाजी जेध्यांच्याकडे बोट दाखवीत राजे म्हणाले, ‘तुमच्या आधी तुमचे बाजी आमच्या बाजूनं फत्तेखानाविरुद्ध लढले. थोर पराक्रम केला. आम्ही सारे त्यांना ‘सवाई बाजी’ म्हणतो.’

‘योग्य धनी मिळाला, तरच पराक्रमाला वाव मिळतो. त्यासाठी राजे, माझे काही खास विश्वासातले वीर आणले आहेत. माणसं विश्वासाची, जिवाला जीव देणारी आहेत.’

तोच येसाजी आत आला. राजांची नजर येसाजीवर खिळली. येसाजीचे डोळे भरले होते. राजांनी गडबडीने विचारले,

‘काय झालं, येसाजी?’

‘महाराज! वाईट बातमी आली आहे.’

‘कसली बातमी?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तुकाराम महाराजांनी देह ठेवला!’

ते ऐकताच राजांना मोठा धक्का बसला. साऱ्या आठवणी उफाळून आल्या. उभ्या जागी डोळे भरले. गहिवरल्या आवाजात राजे म्हणाले,

‘अरेरे! एका महात्म्याच्या दर्शनाला आम्ही मुकलो. उपवासानं क्षीण बनलेली काया, चेहऱ्यावरचं भोळंभाबडं हसू, पाखरांशेजारून जातानादेखील पाखरे उडाली, म्हणून दुःख करणारा तो आत्मा! आमच्या नजरेसमोरून ते रूप हलत नाही. आमच्या भूमीवर या संतांचे भारी उपकार आहेत. आम्ही राजे सत्तेच्या जोरावर राज्य उभारतो. पण हे संत! काही सत्ता नसता त्यांनी मोगली राज्यात आपला धर्म टिकविला. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, नामदेव, जनाबाई, एकनाथ, चोखा, बंका- किती नावं घ्यावीत! स्वकीयांचा, परधर्मीयांचा अखंड विरोध सहन करीत यांनी धर्माची ज्योत तेवत ठेवली. धर्माची ओळख सामान्यांपर्यंत नेऊन भिडविली. कान्होजी! आमचं राज्य उभारीत असता अशा संतसज्जनांकडे आम्ही जास्त लक्ष पुरवायला हवं. यांची सेवा करीतच राज्याचा विस्तार करायला हवा. तरच आमच्या राज्याला काही अर्थ प्राप्त होईल.’ राजे बोलत होते.

ओघळणाऱ्या अश्रूंचेही त्यांना भान राहिलेले नव्हते.

थोड्याच दिवसांत कान्होजी राजांचा निरोप घेऊन रोहिडखोऱ्यात निघून गेले.

दिवसेंदिवस राजांची ताकद वाढत होती. स्वस्थतेचे दिवस असल्याने राजांना सर्व व्यवहारात लक्ष घालता येत होते. एके दिवशी मासाहेब राजांना म्हणाल्या,

‘राजे, आमची एक इच्छा राहून गेली आहे.’

‘कोणती मासाहेब?’

‘विजापुरी स्वारींना कैद झाली, तेव्हा आम्ही महाबळेश्वरला अनुष्ठानाचा संकल्प सोडला होता. सत्पुरुष गोपाळभटांचं दर्शन घ्यावं, असं फार दिवस आमच्या मनात होतं. पण मधल्या गडबडीमुळं बोलता आलं नाही!’

‘मासाहेब, आपण लौकरच महाबळेश्वरला जाऊ. त्यात आम्हांलाही आनंद आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी महाबळेश्वरची तयारी केली. मासाहेबांच्यासह राजे महाबळेश्वरला गेले. महाबळेश्वरच्या सत्पुरुष गोपाळभटांचे दोघांनी दर्शन घेतले. गुरुमंत्र घेऊन अनुष्ठान केले. देवस्थानाला व स्वामींना वर्षासन दिले.

राजांचा महाबळेश्वरी मुक्काम असता महाबळेश्वरानजीक असलेल्या जावळी खोरे, कोयना खोरे या मुलुखांतून राजांची नजर फिरत होती. महाबळेश्वर, मकरंदगड, मंगलगड यांनी बंदिस्त असलेली, पारघाटाच्या प्रचंड भिंतीस पाठ लावून बसलेली ती खोरी राजांच्या मनात भरली होती. जावळी खोऱ्याचा दरारा आदिलशाही दरबारालाही वाटत होता. डोंगरकपारींत दाट रानाने वेढलेला तो भाग जवळजवळ अजिंक्यच होता. ज्याच्या हाती जावळी, त्याचे राज्य सुरक्षित, असे ते ठिकाण होते. त्या प्रदेशावर राज्य होते मोऱ्यांचे. त्यांना 'चंद्रराव' ही पिढीजात किताबत होती. सध्याचा चंद्रराव यशवंत मोरे राजांच्याच कृपेने जावळीला आला होता; पण राजांना त्याचा विश्वास वाटत नव्हता.

राजे महाबळेश्वराहून परतले; पण जावळी त्यांच्या नजरेआड झाली नाही.

□

८

लाल महालात दिवेलागण झाली होती. राजे सज्जावर उभे होते. पाठीमागे महालात कोणी नव्हते. वाड्यासमोरचे चौकीपहारे, वाड्याच्या बाहेरचे मोकळे मैदान अस्पष्ट दिसत होते. उकाडा पुष्कळ वाढत होता. राजे वळले. हजारी समई कोणी तरी पेटवीत होते. राजांनी विचारले,

'कोण?'

'मी!'

'कोण? मनोहारी?'

'जी!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मनोहारीने महालातल्या समया प्रज्वलित केल्या. राजांच्या जवळ येऊन तिने त्रिवार नमस्कार केला. राजांनी दिव्याला नमस्कार केला. ते म्हणाले,

‘आज साऱ्यांनी आम्हांला वाळीत टाकलेलं दिसतं. आमच्या सखुबाई पण दिसल्या नाहीत.’

‘येसाजीराव यांना लग्नाला घेऊन गेले आहेत.’

‘आणि राणीसाहेब?’

‘खाली मासाहेबांच्याकडे आहेत. पाठवू?’

‘नको.’

वाद्यांचा आवाज येताच राजांची पावले सज्जाकडे वळली. मागोमाग मनोहारी होती. दिवट्यांच्या रांगा वाड्याच्या दिशेने पुढे येत होत्या. राजे म्हणाले,

‘वरात आली, वाटतं!’

‘जी!’

‘तू जा. मासाहेबांना वर्दी दे. तोवर आम्ही खाली आलोच.’

घोड्यावर नवरानवरी बसले होते. पुढे सनई, ताशा वाजत होता. सज्जावरून राजे मिरवणूक निरखीत होते. वरात वाड्याच्या पटांगणात आली. पलोत्यांनी कडे धरले. आणि मधल्या रिंगणात जिऊ महाला उतरला. करडीच्या तालावर जिऊ तलवारीचे हात करीत होता. चौक घेऊन तो गुडघ्यांवर बसला. जिवापासून नऊ हातांवर नारळ ठेवला गेला. जिऊने गुडघ्यांवरूनच बैठ्या चालीने नारळ मारला. पाहणारे ‘भले’ म्हणून ओरडले. असे चार नारळ जिवा महालाने मारले. मग दुसरा वीर रिंगणात येऊन पट्टा फिरवू लागला.

नवरानवरी घोड्यावरून उतरली. त्यांच्याबरोबर सारे महालात येताना दिसले. राजे काही वेळ तसेच उभे होते. नंतर महालात जाऊन त्यांनी पागोटे घातले; आणि जिना उतरून ते

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपल्या सदरेवर आले.

सदरसोप्यात नवरानवरी बसली होती. मासाहेब उजव्या बाजूला असलेल्या सईबाईंच्यासह उभ्या होत्या. बाकीची मंडळी अदबीने बाजूला उभी होती. राजे येताच साऱ्यांनी मुजरे केले. नवरानवरी राजांच्या पाया पडली. सखुबाईंना कडेवर घेऊन उभा असलेला येसाजी हणाला,

‘महाराज, हा रामूकाकाचा मुलगा भीमा, आणि ही आपल्या सर्जेरावांची मुलगी गंगा.’

‘अरे, व्वा! म्हणजे घरचंच लग्न, म्हणायचं.’ सर्जेरावांच्याकडे वळून राजे म्हणाले, ‘सर्जेराव, आम्ही रागावलोय् तुमच्यावर.’

पगडी सावरीत सर्जेराव पुढे झाले. त्यांनी विचारले, ‘ते का, महाराज?’

‘तुमच्या मुलीचं लग्न. नुसतं आमंत्रण दिलंत. आर्जव करून आम्हांला नेलं नाही.’

सर्जेराव म्हणाला, ‘महाराज, गरिबाचं लग्न! उंदराच्या घरात हत्ती कसा मावणार?’

येसाजीच्या कडेवर असलेल्या सखुबाईकडे बोट दाखवून राजे म्हणाले,

‘म्हणूनच छोटा उंदीर घेऊन गेलात, वाटतं?’

उसळलेल्या हसण्याने सदर भरून गेली. जिवाकडे वळून राजे म्हणाले,

‘जिवा, तुझी ही करामत आम्हांला माहीत नव्हती.’

येसाजी पुढे झाला, ‘महाराज! साऱ्यांस्नी ठावं हाय. कुणाचं बी लगीन पुण्यात असू दे, जिवाबिगार वरात सजत न्हाई. नऊ हातांवरचा नारळ बसल्या बैठकीत मारून माघारी यायला जिवाच जाणे.’

जिवा लाजला. तो बिचकत बोलला, ‘महाराज, एवढंच येतंय् मला.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हास्याचा कल्लोळ परत उसळला. सारे शांत होताच राजे म्हणाले,

‘जिवा, माणसाला थोडंच यावं; पण त्याला तोड नसावी.’

नवऱ्या मुलाकडे वळून राजे म्हणाले, ‘काय, भीमराव, आमच्या नव्या मोहिमेत येणार, की नाही? बाकी, नशीबवान तू! एवढा मोठा होऊन नवरी मिळाली!’

सर्जेराव म्हणाले, ‘तसं नाही, महाराज. सोयरीक ठरून लई वर्सं झाली.’

‘मग लग्न का लांबलं?’

सारे स्तब्ध झाले. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, तुम्हीच याला कारण!’

‘आम्ही?’ राजे उद्गारले.

सर्जेरावाने तोंड घातले, ‘तसं न्हाई. पण रामूकाकांची पुरंधरवर नेमणूक झाली. आम्ही ऱ्हायलो राजगडावर. आज, उद्या म्हणत दीस गेलं. आवंदा मासायेबांनीच मनावर घेतलं. लागंल, ती मदत केली. लगीन सजवलं.’

‘अस्सं! आम्हांला कल्पनाच नाही.’ भीमरावाकडे वळून राजे म्हणाले, ‘मग काय, भीमराव, काय ठरला बेत?... पण आता तुम्ही कसले येता मोहिमेवर?’

‘मी येनार, महाराज.’ भीमराव धीर करून म्हणाला,

‘तुम्ही याल, हो! पण आमच्या सूनबाई आम्हांला काय म्हणतील?’ राजे म्हणाले.

सर्जेराव मिशीवरून हात फिरवीत म्हणाला, ‘महाराज, ती काय म्हनायची न्हाई. या सर्जेरावाची लेक हाय ती. तिनं मानसाबरोबर लग्न केलं न्हाई; तलवारीसंगं केलंय्. ठावं हाय तिला. कपाळीचं...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हां, सर्जेराव, जबान रोखा!’ राजांनी दापले. ‘ही शिलेदाराची भाषा संसारात चालत नाही. मुली, औक्षवंत हो! तुझं सौभाग्य अखंड राहो! वज्रचुडेमंडित हो!’

नवरानवरीला राजांचा आहेर झाला. वरात जशी वाजत-गाजत आली, तशीच वाजत-गाजत ती परत गेली. राजे महाली जायला वळले आणि आवाज आला :

‘आबाऽ’

राजे वळले. मनोहारी सखूला घेऊन उभी होती. मनोहारी जवळ आली; आणि सखू राजांच्यावर झेपावली. राजांनी तिला घेतली आणि ते महालाकडे चालू लागले.

त्यानंतर थोड्याच दिवसांत राजे जिजाऊंना म्हणाले,

‘मासाहेब, आपलं कुलदैवत शिखरशिंगणापूरला आहे. जावं आणि दर्शन घ्यावं, असं फार दिवस मनात आहे.’

‘मग जाऊन या ना.’

‘तुम्हीही आमच्याबरोबर असावं, असं वाटतं.’

‘मग चार दिवसांत निघू आपण.’

‘बरं!’

राजांनी शिखरशिंगणापूरला जाण्याची तयारी चालविली. फलटणपासून थोड्या अंतरावर डोंगर-शिखरावर शंकराचे हे जागृत देवस्थान आहे. भोसल्यांचे कुलदैवत ते. राजांनी शिखरशिंगणापूरची मोठी तयारी सुरू केली होती. स्वार, सामान पुढे गेले होते. मेणे, पालख्या तयार होत होत्या. सगळीकडे हुकूम जारी झाले होते. सईबाईंनी विचारले,

‘मी येऊ?’

‘शिंगणापूरला?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो!’

‘सखू लहान. आम्ही दर्शन घेऊन चटकन परत येऊ.’

‘काही दिवस पुढं ढकललं असतंत, तर चाललं नसतं?’ सईबाई किंचित नाराजीने म्हणाल्या. राजे जवळ गेले. ते म्हणाले,

‘तसं चालण्यासारखं नव्हतं, म्हणूनच जातोय् आम्ही. तुम्हांला जरी नेलं नाही, तरी आम्ही येऊ, तेव्हा काही तरी अलौकिक भेट घेऊन येऊ.’

‘कसली?’

‘परमेश्वराच्या मनात असेल, तर आल्यावर कळेल.’

सुमुहूर्तावर राजांनी पुणे सोडले. मेणा वाटचाल करू लागला. शिबंदीचे स्वार मागे-पुढे जात होते. जिजाऊंच्या मेण्यामागे एक-दोन मेणे होते; त्यांत सरदार स्त्रिया होत्या. राजे अश्वपथकासह दौडत जात होते. बरोबर येसाजी, तानाजी, शिवा, बाळाजी, पुढे चिमणाजी हेही लोक होते.

राजांनी केलेली तयारी शिंगणापूरच्या पायथ्याशी दिसत होती. पायथ्याच्या माळाला छावणीचे स्वरूप आले होते. डेरे मारले होते. राहुट्या, पाली माळावर पसरल्या होत्या. चौकी, पहारेकरी उभे होते. ती छावणी पाहून जिजाबाई चकित झाल्या. राजांना त्यांनी विचारले,

‘राजे, एवढी तयारी?’

‘तयारी कसली?’ राजे म्हणाले, ‘आपल्याबरोबर साऱ्यांनाच दर्शन घडेल. चार दिवस मोकळेपणात जातील.’

जिजाबाईंना सामोरे आलेल्या माणसांत उपाध्याय होते. पुण्याचे वयोवृद्ध दशग्रंथी ब्राह्मण होते. राजांचे खास सरदार होते. जिजाबाईंच्या राजांच्या मनातले काही कळत नव्हते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दुसऱ्या दिवशी देवालयात अभिषेक झाला. देवाचा प्रसाद वाटला गेला आणि पुजाऱ्याने येऊन वर्दी दिली,

‘मासाहेबांच्या दर्शनासाठी बजाजी निंबाळकर आले आहेत.’

मासाहेबांनी विचारले, ‘कुठे आहेत?’

‘पायथ्याला आहेत.’

जिजाबाईंनी राजांच्याकडे पाहिले. त्या म्हणाल्या,

‘राजे, त्यांना थांबायला सांगा. दर्शन आटोपून आम्ही येत आहोत, म्हणून कळवा.’

बजाजी निंबाळकरांना जुलुमाने मुसलमान केल्यानंतर आजवर बजाजी विजापुरातच होते. बजाजींची मुसलमान बायको विजापुरी मृत्यू पावली. बादशाही मर्जी उतरली. धर्माला, शाही मर्जीला मुकलेले बजाजी परत फलटणला गेले. नवऱ्याच्या धर्मांतराच्या धक्क्याने पूर्वपत्नी सावित्रीबाई फलटणला वारली. तिच्या मुलाला- महादजीला- घेऊन राजांच्या निमंत्रणानुसार बजाजी शिखरशिंगणापूरला आले होते.

देवदर्शन आटोपून जिजाबाईंसह शिवाजीराजे मंदिराबाहेर आले. पालख्या उभ्या होत्या. दोघे पालख्यांत बसले. शिबंदीसह पालख्या डोंगर उतरू लागल्या. दोन प्रहरच्या उन्हात छावणी उठून दिसत होती.

छावणीच्या बाहेरच बजाजींचे अश्वपथक उभे होते. पालख्या थांबल्या. जिजाबाई पालखीतून बाहेर आल्या. जिजाबाईंनी पाहिले- बजाजी हात बांधून उभे होते. मुसलमानी पागोटे, हनुवटीवरची खुरटी दाढी, पायघोळ अंगरखा असा त्यांचा वेष होता. ते रूप पाहून जिजाबाईंच्या मनात कालवाकालव झाली. बळ एकवटून जिजाबाई म्हणाल्या,

‘बजाजी! आज आमची आठवण झाली?’

बजाजींनी एकदम जिजाबाईंचे पाय धरले. बजाजींच्या अश्रूंनी जिजाबाईंचे पाय भिजत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘उठा, बजाजी! झालं गेलं, होऊन गेलं. तुम्ही परत आलात, त्यातच समाधान आहे.’

बजाजींचा आवाज आला, ‘मासाहेब! भीक घाला, उठतो.’

‘हे काय, बजाजी? सारे पाहताहेत. उठा, काय ते सांगा.’

बजाजी उठले. अश्रू टिपीत ते म्हणाले,

‘मासाहेब! लाख माणसांत आपले पाय धरले, तर त्यात लाज कसली? आणि लाज राहिलीय् कुठं? मासाहेब, देहानं बाटलो, तरी मनानं नाही. मुसलमान म्हणून मला मरू देऊ नका. मी सईचा भाऊ आहे, मासाहेब!’ पाच वर्षांच्या महादजीला ओढीत बजाजी म्हणाले, ‘या निष्पाप, पोरक्या पोराचा बाप आहे. काय करू मी?’

बजाजी स्फुंदून स्फुंदून रडू लागले. जिजाबाईंचे नव्हे, तर राजांचे आणि पाहणाऱ्यांचेही डोळे भरून आले. जिजाबाई बजाजींच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाल्या,

‘बजाजी, शांत व्हा! तुम्ही आमचेच आहात. आमची माणसं आम्हांला जड नाहीत. आमच्या माणसांची प्रतिष्ठा आम्हांला राखता येत नसेल, तर आमच्या प्रतिष्ठेला काही अर्थ नाही. मुसलमान झालात, हा गुन्हा तुमचा नाही. राजांची परीक्षा पाहण्यासाठीच कदाचित हा प्रसंग आला असेल. चला, काळजी करू नका. यातून आम्ही मार्ग काढू.’

जिजाबाईंचे बोलणे ऐकून राजांचे मन भरून आले होते. भारल्यासारखे होऊन ते जिजाबाईंच्या बरोबर डेऱ्याकडे चालत होते.

एकान्त मिळताच जिजाबाई राजांना म्हणाल्या, ‘राजे, एवढ्यासाठीच हे तीर्थाटन घडवलंत, वाटतं? आम्हांला पत्ताही लागू दिला नाहीत.’

राजे नजर टाळीत म्हणाले, ‘मासाहेब, बजाजींना निरोप पाठविला होता. पण ते येतील, की नाही, याची शंका होती; म्हणून बोललो नाही.’

‘राजे, मी थट्टा केली. आमच्याही मनात हा सल खुपत होता.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

९

सायंकाळी राजांच्या डेऱ्यात सारे सरदार, ब्राह्मणमंडळी जमली होती. सारी सभा स्थिर झाल्यावर राजे म्हणाले,

‘आमचे मेहुणे बजाजी निंबाळकर बळजबरीनं मुसलमान केले गेलेले आहेत. त्यांना परत हिंदुधर्मात घ्यायची आमची इच्छा आहे. शास्त्रीपंडितांनी याचा शांतपणे निर्णय घ्यावा आणि उद्या सकाळी आम्हांला सांगावं.’

शास्त्रीपंडितांमध्ये कुजबूज झाली. सरदारमंडळी आश्चर्याने राजांच्याकडे पाहत होती. एकदा मुसलमान झालेला परत हिंदू करून घेतला गेलेला त्यांच्या ऐकिवात नव्हता.

दुसऱ्या दिवशी पहाटे राजे स्नान करून, जिजाबाईंच्यासह देवदर्शन आटोपून आले. सभेचा शामियाना सज्ज केला होता. राजे शामियान्यात प्रवेश करते झाले. साऱ्यांचे मुजरे घेऊन राजे उच्चासनावर जाऊन बसले. उजव्या हाताला शास्त्रीपंडित उभे होते. डाव्या हाताला सरदारमंडळी उभी होती. त्यांतच बजाजीही उभे हाते. सभेत चलबिचल झाली. राजांनी पाहिले- शामियान्याच्या मागच्या दारातून मासाहेब येत होत्या. राजे उठले. जिजाबाईंना ते आसनावर घेऊन आले. राजे, जिजाबाई आसनांवर बसताच सारी सभा स्थिर झाली. राजे म्हणाले,

‘काल आम्ही आमच्या मनीचा हेतू सांगितलाच आहे. आज आम्ही आपला निर्णय ऐकण्यास उतावीळ आहोत. सांगा.’

शास्त्रीपंडितांच्या सभेत कुजबूज झाली. प्रमुख शास्त्री पुढे झाले. ते म्हणाले,

‘महाराज! बजाजी हे मुसलमान झालेले आहेत. त्यांनी धर्म बदलला आहे. अशा माणसाला परत धर्मात घेणं अशक्य नसलं, तरी धर्मरिवाजाला सोडून आहे; आणि जे रिवाजाला सोडून आहे, ते करणं उचित नाही, असा आमचा एकमुखी निर्णय आहे.’

त्या निर्णयाने सारी सभा चकित झाली. जिजाबाई बेचैन झाल्या. राजे मात्र शांतपणे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बसून होते. त्यांच्या चेहऱ्यावर सदैव दिसणारे स्मित जराही ढळले नव्हते. राजे म्हणाले,

'आमची तुमच्याकडून हीच अपेक्षा होती.'

शास्त्रीपंडितांचे चेहरे खुलले. पण ते समाधान फार काळ टिकले नाही. राजे त्याच संथ आवाजात बोलत होते,

'धर्मनिर्णय आम्ही चुकीचा मानीत नाही. पण पंडितांनी आता आजवर आचरलेला धर्महीन भाव टाकून देण्याची वेळ आली आहे, एवढंच आम्हांला सांगायचं आहे.'

वयोवृद्ध शास्त्री उद्गारले, 'धर्महीन? आम्ही?'

'धर्महीन तुम्ही नाही; तुमच्या भावाबाद्दल आम्ही बोललो. धर्माच्या कार्यात ढवळाढवळ करण्याची आमची मुळीच इच्छा नाही. पण परिस्थितीप्रमाणे, माणसांच्या बदलाप्रमाणे धर्मही वाढीला लागला पाहिजे. आज यवनांच्या जुलुमानं हजारो लोक इच्छेविरुद्ध बाटविले जातात. पावरोटीचा तुकडा विहिरीत टाकून धर्म बदलतो. आमचा मुलूख बारदेस बनतो. पण आपला विशाल हिंदुधर्म- त्याची दारं जाणाऱ्यांना मोकळी, येणाऱ्यांना सदैव बंद. हे किती दिवस चालणार? असंच चालत राहिलं, तर हिंदू म्हणून कोणी उरेल काय?'

एक पंडित उठले, 'महाराज, आपण राज्याच्या कक्षा बदलू शकता. पण धर्म तेवढा सोपा नाही.'

'तो सोपा व्हायला हवा!' राजांचा आवाज तिखट बनला. 'मुळातच तो सोपा आहे. विशाल आहे. ज्ञानी माणसांना अज्ञानाची चीड आहे. खऱ्या धर्माची त्यांना चाड आहे. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी भागवतधर्माचं खरं स्वरूप दाखविण्याचा प्रयत्न केला.

दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो।
जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात।।

अशी प्रार्थना उमटली, ती त्याच माणुसकीच्या गहिवरातून. पण ती संन्याशाची पोरं ठरली. त्यांना धर्मात जागा मिळाली नाही. एकनाथांनी विश्वबंधुत्व जाणलं; त्यांना वाळीत टाकलं. आयुष्यभर त्यांचा छळ केला. ते गेले, आणि त्यांची देवळं बांधलीत. त्यांची तपश्चर्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कोंडून टाकलीत. माणसाचा दुरावा करणारा धर्म कसला?'

'राजे, हा धर्मसभेचा अपमान आहे. आम्ही धर्मनिर्णय दिला आहे. धर्माचं स्थान आपल्यापेक्षा उंचीवर आहे, हे ध्यानी घ्यावं. धर्माची अप्रतिष्ठा ऐकणं आम्ही पाप समजतो.'

राजे म्हणाले, 'शास्त्रीबुवा, नाइलाजानं बोलावं लागतं. धर्माची मिरास सांगणाऱ्यांना बुद्धीची धार आहे, पण विवेकाची त्याला जोड नाही, याची आम्हांला खंत वाटते. आजचा धर्म अंधळ्या हत्तीसारखा वावरतो आहे. धर्मानं विकास व्हायचा, तिथं त्याच्याच पायी आपलीच माणसं तुडविली जात आहेत. थोडा शांतपणे विचार करा. जेव्हा हिंदूंची देवालयं भ्रष्ट केली गेली, मूर्ती फोडल्या गेल्या, तेव्हा एक तरी धर्माभिमानी देवळाच्या दारात उभा ठाकला का? तेव्हा धर्माची ही मिरास कुठं गेली होती?'

'सत्तेपुढं शहाणपण चालत नाही, राजे!' शास्त्री म्हणाले.

'शास्त्रीबुवा, तुम्ही हे सांगता? यापरता धर्माचा दुसरा अपमान तो कोणता? शहेनशहा अकबराच्या मांडीला मांडी लावून काशीच्या पंडितांनी दीनेइलाहीचा जन्म घडविला, तेव्हा हिंदुधर्माची प्रतिष्ठा कुठं होती? म्लेंच्छांकडून मिळालेलं सुवर्णनाणं पाण्यानं धुऊन घेतलं, तर शुद्ध होतं. पण शतजन्माची पातकं एका स्नानानं धुणारी गंगा पश्चात्तापानं होरपळलेल्या जीवाला धर्मात आणू शकत नाही? हंः! शास्त्रीबुवा, यात निश्चितपणे काही तरी गफलत होते आहे.'

'आपण म्हणता, त्याप्रमाणे आम्ही अनुज्ञा दिली नाही, तर?'

'तर...? धर्माज्ञेनं याचा निर्णय होत नसेल, तर माणुसकीच्या राजाज्ञेनं या गोष्टी आम्हांला करून घ्याव्या लागतील.'

'सक्तीनं?'

'जरूर पडली, तर तसंही! जो धर्म सहिष्णुतेनं इतर धर्मांकडे पाहतो, तो धर्म आपल्या माणसांची उपेक्षा करतो, यावर आमचा विश्वास बसत नाही. माणुसकीला विसरणारा धर्म धर्मच होऊ शकणार नाही. आम्ही राजधर्माला बांधले गेलो आहो. प्रजेला टाकणं हे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आम्हांला जमायचं नाही.’

शास्त्रीपंडित एकमेकांच्याकडे पाहत होते. जिजाबाईंना काही सुचत नव्हते. एक

शास्त्री धीराने पुढे आला. म्हणाला,

‘राजे, बजाजी जर प्रायश्चित्त करायला तयार असतील, तर त्यांना धर्मात घेता येईल.’

‘जरूर प्रायश्चित्त घेतील. त्यांनी ते नाकारलं आहे केव्हा?’ राजे नि:श्वास सोडून म्हणाले, ‘आपण शास्त्रीपंडित आहा. आपला अधिकार मोठा. पण समाजाला पारखं झालेलं पांडित्य बाळगलं, तर ते नसल्यासारखंच असतं. धर्म हा वाहत्या पाण्यासारखा निर्मळ असायला हवा. समाजाचे डाग धुवायला तो समर्थ हवा. मानवतेच्या धर्माला ज्ञानाचे पायबंद घालून रोखू पाहाल, तर ते जमणार नाही, धर्म अधर्म बनायला वेळ लागणार नाही. इंद्राच्या झेंड्याला भगवज्झर्झर म्हणतात. तोच पवित्र ध्वज ज्ञानदेव-एकनाथांनी पुढं चालविला. तोच ध्वज आमच्या राज्यासाठी निवडला. मानवतेच्या धर्माची प्रतिज्ञा सांगणाऱ्या त्या ध्वजाची प्रतिष्ठा तुम्ही राखली पाहिजे. हे काळाचं आव्हान तुम्ही स्वीकारलं पाहिजे.’

सारी सभा राजांनी जिंकली होती. शास्त्रीपंडितांची कुजबूज जोरात सुरू होती. सरदारांच्या चेहऱ्यांवर हास्य विसलत होते. जिजाबाईंच्या डोळ्यांत आनंदाश्रू गोळा झाले होते. प्रमुख शास्त्री पुढे झाले. ते म्हणाले,

‘महाराज, बजाजींना धर्मात घ्यायला आमची तयारी आहे.’

सर्वांनी नि:श्वास सोडले. राजांना आनंद झाला. ते म्हणाले,

‘शास्त्रीबुवा, आमच्या कार्यात आज जी सोबत देत आहात, त्याचं विस्मरण आम्हांला होणार नाही. बजाजींच्यासारखे जे जे दुर्दैवी जीव तुमच्याकडे धावतील, त्यांना आपलं करून घ्या. श्रद्धेविना धर्म नाही, आणि धर्माविना माणूस नाही.’

राजांनी पंडितांना वंदन केले. मासाहेब उठल्या. पाठोपाठ राजे पण उठले. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर अलौकिक पराक्रमाचा आनंद दिसत होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बजाजींच्या शुद्धीकरणाची तयारी जोरात सुरू झाली. पंचक्रोशीतल्या समस्त ब्रह्मवृंदांना, शास्त्रीपंडितांना आमंत्रण दिले. बजाजींनी समाधानपूर्वक प्रायश्चित्त घेतले. ग्रहशांती झाली, होम झाले; आणि बजाजींचे समारंभपूर्वक थाटाने शुद्धीकरण झाले. 'लांडे' बजाजी पूर्ववत धर्मात आले.

मोठ्या आनंदाने आणि समाधानाने जिजाबाई, राजे पुण्याला आले. अश्वारूढ राजे सायंकाळच्या वेळी पुण्यात शिरले. सोबत बजाजी निंबाळकर होते. दोघांमागून अश्वपथक मंदगतीने येत होते. त्यांच्या मागे शाही मेणा होता.

राजांनी वाड्यात प्रवेश केला. दाराशी आलेल्या सखूला उचलून घेतली, आणि ते महालात आले. सईबाई महालात उभ्या होत्या. राजे म्हणाले,

'जाताना आम्ही सांगितलं होतं ना, तुमच्यासाठी अनमोल भेट आणू, म्हणून? ती आणलीय्... बजाजी, आत या.'

बजाजी आत आले. सईबाई धावल्या. त्यांनी भावाला मिठी मारली. दोघेही रडत होते. राजे म्हणाले,

'बजाजी, अशी मायेची माणसं सोडून रानोमाळ फिरू नका आता... आणि, राणीसाहेब, तेवढ्यानं आता बजाजींचं पोट भरायचं नाही. गेले चार दिवस त्यांची शुद्धी होत असता भरपूर हाल झालेत. चांगला मेजवानीचा बेत आखा.'

रात्री पंगतीला अपूर्व शोभा होती. रांगोळ्यांनी पाट सजले होते. धुपाचा वास दरवळत होता. राजे, बजाजी, महादजी, नेताजी अशा क्रमाने पंगत बसली होती. दुसऱ्या बाजूला बाळाजी, चिमणाजी ही ब्राह्मणमंडळींची पंगत बसली होती. दोन्ही बाजूंचा स्वयंपाक गोड असूनही अलग होता. पंगतीच्या दोन्ही ओळींमध्ये टेकवून चांदीचा पाट ठेवला होता. जिजाबाई आपल्या खास देखरेखीखाली सर्वांना आग्रह करीत होत्या. मोकळेपणी खाणे, बोलणे होत पंगत उठली.

रात्री राजे आपल्या महालात गेले. बरीच रात्र झाली होती. सईबाई गालिच्यावर बसून होत्या. राजे येताच त्या उठल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘झोपायचं होतंत.’

सईबाई काही बोलल्या नाहीत. त्या राजांच्या जवळ आल्या, आणि त्यांनी एकदम राजांच्या पायांवर मस्तक ठेवले. राजे मागे सरकले. सईबाईंना गडबडीने उठवीत ते म्हणाले,

‘हे काय?’

आपली अश्रुपूर्ण नजर राजांच्यावर रोखीत सईबाई म्हणाल्या, ‘एवढं मोठं देणं मला कोणी दिलं नव्हतं.’

पुढे त्यांना बोलवेना. राजांनी त्यांना एकदम मिठीत घेतलं. राजांच्या मिठीत सईबाई अश्रू आवरण्याचे आटोकाट प्रयत्न करीत होत्या. सईबाईंना पाठीवर थोपटून त्यांना सामोऱ्या उभ्या करीत राजे म्हणाले,

‘आम्हांला तुम्हां बायकांचं काही कळत नाही. दुःखातही रडता, आनंदातही रडता! अजब आहे.’

राजांच्या त्या आविर्भावाबरोबर सईबाईंना हसू आवरले नाही. राजे मात्र ते तृप्त रूप मनात साठविण्यात गुंतले होते....

❑

१०

थंडीचे दिवस होते. राजे नुकतेच पुरंधराहून पुण्यात आले होते. अचानक दादाजी नरसप्रभूंच्यासह कान्होजी आल्याची वर्दी वाड्यात आली.

कान्होजी आले. राजांना ते म्हणाले,

‘राजे, अफझलखानाचा हुकूम आला आहे की, आम्ही जावळीशी संधान बांधावं, नाही तर जावळी हस्तगत करावी.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कारण?’

‘कारण तुम्हीच आहात, राजे! पोरक्या झालेल्या जावळी जहागिरीवर यशवंतराव मोरे दत्तक घातलात. जी गोष्ट आदिलशाहीत अर्ज, विनंत्या करून पार पाडायची, ती तुमच्या अधिकारानं झाली, यात आदिलशाहीचा अपमान नाही?’

‘बरं, मग?’

‘त्याचसाठी अफझलखानाला ही मोहीम आदिलशाहीनं सांगितली. पण खान धूर्त आहे. हुशार आहे. तो जावळीच्या रानात शिरायला भितो. आम्ही, दप्तरी का होईना, पण पडलो आदिलशाहीचे चाकर. ही मोहीम आमच्यावर ढकलून अफझल मोकळा झाला.’

‘मग जावळीवर चालून जाणार?’

‘तोच विचार करतो आहे. खान दीर्घद्वेषी आहे, घातकी आहे.’

‘आम्हांला ते माहीत आहे. अफझलखानानं महाराजसाहेबांच्या हातांत बेड्या ठोकल्या होत्या, हे आम्ही विसरलो नाही, विसरणार नाही.’

‘राजे, मी खानाशी वाटाघाटी करून वेळ काढतो. पण खानाशी जावळीच्या चंद्ररावांचं जुगणं होण्याच्या आत जावळीचा गड्डा हलवणं आवश्यक आहे.’

‘जावळी आमच्या नजरेत आहे. पण जावळी बिकट आडरानात आहे. आदिलशाही फौजांनीदेखील तिथं मार खाल्ला आहे.’

आदिलशही परकी फौज. आपल्याला ते कठीण नाही. तुम्हीच वारस, म्हणून जावळीच्या गादीवर बसवलेला यशवंत मोरे आज चंद्रराव म्हणून बळजोर झाला आहे. तो कुणाला जुमानीत नाही.’

‘प्रथम सामोपचारानं घेऊ. जमलं नाही, तर नाइलाज आहे.’

कान्होजी राजांचा निरोप घेऊन गेले; आणि राजांचे रामोशी हेर जावळी खोऱ्यात फिरू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लागले. मोऱ्यांच्या जुलुमी राजवटीच्या बातम्या राजांच्या कानांवर येत होत्या. त्याचबरोबर राजांचे लक्ष पुरंधरवर होते. पुरंधरवरचे बांधकाम पुरे होत आले होते.

सकाळी राजे आपल्या महालात बसले होते. घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकताच राजे सज्जात गेले. बजाजी निंबाळकर आपल्या तुकडीनिशी आले होते. बजाजी वाड्यात आले. राजे बजाजींची वाट पाहत होते. बजाजींचे शुद्धीकरण झाल्यापासून बजाजी महादजींचे लग्न ठरविण्यात गुंतले होते. मुलगी पाहण्यासाठी बजाजी जुन्नरला गेले होते, एवढेच राजांना कळले होते. बराच वेळ गेल्यानंतर बजाजी राजांच्याकडे आले.

‘या, बजाजी! तुम्ही आल्याचं मघाच आम्ही पाहिलं.’

‘मासाहेबांच्या दर्शनाला गेलो होतो.’

‘तुम्ही मासाहेबांची खाशी माणसं. तुमच्यावर आम्हांला राग करता येत नाही.’

बजाजी त्या थट्टेनेही कळवळले. ते म्हणाले,

‘असू समजू नये, राजे. आम्हांला दोन्ही पाय एकच! तुमच्यामुळं माझा उद्धार झाला. पुन्हा माणसांत आलो.’

‘तुम्ही सोयरीक ठरवायला गेला होता ना?’ राजांनी विषय बदलला.

‘जी!’

‘मग? महादजीचं लग्न ठरलं?’

‘जी, नाही!’

‘का? मुलगी बरी नाही!’

‘तसं नाही, महाराज! मुलगी पसंत होती. पण त्यांनाच सोयरीक मान्य झाली नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे गंभीर झाले. त्यांनी विचारले, ‘का?’

बजाजी खाली मान घालून उभे होते. निखळलेली आसवे गालांवरून वाहत होती. राजे गडबडीने उठले. बजाजींच्या खांद्यावर हात ठेवीत ते म्हणाले,

‘बजाजी, हे काय? एक सोयरीक मोडली, म्हणून मुलाच्या बापाच्या डोळ्यांत अश्रू? पुसा ते डोळे, बजाजी! असल्या छप्पन नवऱ्या महादजीला मिळतील.’

बजाजी अश्रू टिपीत म्हणाले, ‘नाही, राजे! इतकं सोपं नाही ते. आपण मला धर्मात घेतलंत. पण माझ्याशी सोयरीक बांधायला कोणी धजत नाही.’

राजे विचारात पडले. त्यांना काही सुचत नव्हते. त्याच वेळी जिन्यावर पावले वाजली. बजाजी सावरून उभे राहिले. आणि दारातून सखूबाई ‘आबासाहेब’ म्हणत धावत आली. हिरवा परकर, हिरवी चोळी घातलेली सखू बजाजींना पाहून दारातच थबकली. राजे हसले. म्हणाले,

‘कोण? आमच्या सखुबाई? या, आत या! लाजू नका. निंबाळकर मामांच्या पाया पडलात, की नाही?’

सखू आत आली. ती बजाजींच्या पाया पडली, आणि झटकन राजांना बिलगत म्हणाली,

‘आबासाहेब!’

‘काय म्हणता? अक्कासाहेब?’ राजांनी तिला कुरवाळीत विचारले.

‘जावा! अशानं आम्ही बोलणार नाही.’

सखूची समजूत काढीत राजे म्हणाले, ‘तुम्ही बोलला नाही, तर आमच्या बरोबर बोलणार कोण? काय हवं होतं अक्कासाहेबांना?’

सखूने एकवार बजाजींच्याकडे पाहिले, आणि एकदम राजांच्यावर नजर वळवून ती

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

म्हणाली,

‘आमाला बाहुली पायजे.’

‘मुळीच मिळायची नाही.’ राजे म्हणाले.

सखूने राजांच्या कुशीत तोंड लपविले. तिचा चेहरा हाती धरून तिच्या नजरेला नजर देत राजे म्हणाले,

‘आता आणायचा, तो बाहुला. तीच चिंता आम्हांला लागलीय्. बजाजी, ही आमची सखू तुम्हांला सून म्हणून चालेल?’

बजाजी थक्क झाले. त्यांचे डोळे विस्फारले गेले. ते उद्गारले, ‘महाराज!’

‘आम्ही खरंच विचारतो. ही सून चालेल?’

बजाजींच्या सर्वांगाला कंप सुटला होता. त्यांना उमाळून हुंदका फुटला. एकदम पुढे होऊन ते राजांचे पाय धरीत असता, राजांनी त्यांना एकदम जवळ घेतले. मिठी मारीत राजे म्हणाले,

‘हे काय, बजाजी! आता तर तुम्ही आमचे व्याही.’

सखुबाईने ते ऐकले मात्र. एकदम लाजून ती तेथून पळाली. महाराजांच्या हास्यात बजाजी सामील झाले. अश्रू टिपून बजाजी म्हणाले,

‘राजे, तुमचं मन फार मोठं.’

‘थांबा, बजाजी! तुम्ही खाली सदरेवर जा. खाली जाताच आहा, तर तुमच्या बहिणीला वर पाठवून द्या.’

बजाजी समजले. ते खाली गेले. थोड्याच वेळात सईबाईंनी महाली येताच विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘एवढ्या तातडीनं बरं बोलावलंत?’

‘तसंच जरुरीचं काम होतं.’

‘आता कुठली मोहीम काढलीत?’ सईबाईंनी विचारले.

‘मुलीच्या बापाला मुलीच्या लग्नाइतकी अवघड मोहीम कुठली?’

‘कुणाचं लग्न?’

‘आपल्या सखूचं! हुडकूनही मिळणार नाही, असं सुरेख स्थळ आलं आहे.’

‘मग ठरवून टाकावं. मला काय विचारायचं?’

‘पाहा, नंतर तक्रार कराल!’

‘बिलकुल नाही!’

‘ठीक आहे. ठरवून टाकू?’

सईबाई पुढे येत म्हणाल्या, ‘पण स्थळ सांगा ना!’

‘पाहिलं? अडलात ना?’

‘मुळीच नाही!’ सईबाई निश्चयाने म्हणाल्या, ‘पण त्याचा अर्थ स्थळ समजू नये, असा थोडाच आहे?’

‘फार चांगलं स्थळ आहे. बजाजींच्या महादजीला सखू निश्चित केली आहे.’

सईबाई राजांच्याकडे पाहतच होत्या. त्यांना शब्दही फुटत नव्हता. राजांनी विचारले,

‘का? स्थळ पसंत नाही?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘एक विचारू का?’

‘विचारा ना!’

‘हे सारं माझ्यासाठी म्हणूनच करता का?’

‘सई, तुझ्यासाठी करीत नाही. तुझ्यामुळं करायला बळ येतं... मग ठरवू ना?’

‘आपण करता आहात. विचारानं कराल, याची मला खात्री आहे. तुमच्या करणीनं माझंही सोनं होऊन जाईल. सखूचं कल्याण होईल.’

‘सई, हीच माझी अपेक्षा होती.’

राजे जवळ येत असलेले पाहताच सईबाई म्हणाल्या, ‘जाते मी. मासाहेबांनी पुलाव्याची जबाबदारी आम्हां दोघींवर टाकली आहे. धाकट्या बाई एकट्याच आहेत.’

सईबाई निघून गेल्या. राजे समाधानाने मागे वळले.

बजाजींचा आनंद मनात मावत नव्हता. दिसेल त्या सरदारांना ते ती बातमी सांगत होते. साऱ्या महालात ही बातमी वावटळीप्रमाणे पसरली.

दोन प्रहरी जिजाबाई झोपल्या होत्या. पलंगाशेजारी धाकट्या राणीसाहेब सोयराबाई बसल्या होत्या. सोयराबाईंनी ही बातमी जिजाबाईंना सांगितली. जिजाबाईंचा विश्वास बसेना. त्या सोयराबाईंना म्हणाल्या,

‘पण, सूनबाई, कुणी सांगितलं तुला?’

‘साऱ्या महालात पसरलीय् ही बातमी!’

जिजाबाई उठत म्हणाल्या,

‘काय म्हणावं या शिवबाला! काही वेळा फारच करतो. छे! हे शक्य नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाई उठल्या. हुजऱ्याकडून त्यांनी आपण राजांच्या महाली येत असल्याची वर्दी पाठविली. जिजाबाई महाली गेल्या. राजे वाट पाहत होते. मागे सईबाई उभ्या होत्या. जिजाबाई आत येताच राजे म्हणाले,

'मासाहेब! आपण आज्ञा केली असतीत, तर आम्ही खाली आलो असतो.'

राजांच्यावर नजर रोखीत जिजाबाई म्हणाल्या, 'राजे! ह्या घरात घडणारी प्रत्येक गोष्ट आमच्या कानांवर घालून केली जाते, असा आमचा समज होता.'

'तो खराही आहे.' राजे म्हणाले.

'तसं असतं, तर आम्हांला न विचारता सखुबाईची सोयरीक जमवली नसती.'

'मासाहेब! आपल्याच आज्ञेनं आपले बजाजी परत आपल्यांत आले. आम्हांला वाटलं होतं, हे ऐकून आपल्याला आनंद वाटेल.'

जिजाबाईंना काही उत्तर सुचेना. त्या म्हणाल्या,

'महादजीचं लग्न ठरवायचं, तर आपल्या पदरी अनेक मानकरी होते. कुठंही त्यांची सोयरीक जमवली असती.'

'कुठंही जमू शकतं, तर आमच्या सखूशी का जमू शकत नाही? सांगा, मासाहेब!' राजांनी विचारले.

'पण जरा विचार...'

'कसला विचार?'

सईबाईंच्याकडे वळून जिजाबाईंनी विचारले, 'आणि तुला हे पसंत आहे?'

सईबाईंनी मान खाली घातली. जिजाबाई समजल्या. राजे जिजाबाईंच्याकडे पाहत होते. जिजाबाई काही बोलल्या नाहीत. जिजाबाईंच्या नजरेला नजर भिडताच आजवर ज्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांची नजर पायांकडे वळत असे, तेच राजे स्थिर नजरेने जिजाबाईंकडे पाहत होते. जिजाबाईंची नजर मात्र वळली होती. राजे म्हणाले,

'मासाहेब, सांगा ना. म्हणा, बजाजी बाटलेले आहेत. त्यांच्या घरात आपली मुलगी द्यायला ते काबील नाहीत.'

'आणि म्हणूनच सखूला दिलीत?' जिजाबाईंनी विचारले. 'तिची निवड का केलीत? कोणी विचारणारं नाही, म्हणून?'

'कोणी विचारणारं नाही, म्हणून नव्हे. ती आपली लाडकी आहे. सखुबाई आपल्या लाडक्या आहेत, म्हणून त्यांची या मोठ्या जागी निवड केली. असं मोठं घराणं हुडकूनही सापडणार नाही, म्हणून निवड केली.'

'शिवबा ऽ ऽ'

राजे भारल्यासारखे बोलत होते, 'मासाहेब, नुसती धर्मात घेऊन माणसं आपली होत नाहीत. त्यांना आपलं म्हणावं लागतं, आपलं करावं लागतं. त्यांना विश्वास द्यावा लागतो. बजाजी आपले आप्तस्वकीय. जुलुमानं परधर्मात गेले. त्याचं दुःख तुम्हांला झालं. त्यांना आपण धर्मात घेतलं. पण त्यानं काय झालं? एकाही जागी महादजीची सोयरीक जमेना. मुलाचा बाप असूनही सोयरीक मोडली. हे सांगत असता त्यांची काय स्थिती झाली, हे, मासाहेब, आपण पाहिलं नाही. त्या माणसाला धर्मात घेतलंत. आता त्याला वाऱ्यावर सोडता येणार नाही. माणुसकीला ते शोभणार नाही. मासाहेब, हे तुम्ही करायला हवं.'

जिजाबाईंनी श्वास घेतला. त्या हसून म्हणाल्या, 'राजे, क्षणभर गोंधळ झाला होता खरा! तुम्ही म्हणता, ते खरं आहे.'

'मासाहेब! आम्हांला ते माहीत होतं.' राजे आनंदाने म्हणाले, 'राजानं पाडलेल्या नव्या वाटा राजरस्ता बनायला वेळ लागत नाही. थोडी कुजबूज होईल, वाद होईल. पण आपोआप हा मार्ग रुळेल. महादजी चांगला आहे. आपल्या तोलामोलाचं, कुळाशीलाचं ते घराणं आहे. आम्हांला हे मनापासून पटतं.'

जिजाबाई म्हणाल्या, 'शिवबा, कैक वेळा तुझी दृष्ट काढून टाकावी, असं वाटतं.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मनाच्या साऱ्या शंका तुझ्या चार बोलांनी नाहीशा होतात.'

'मग चांगल्या कामाला उशीर का? मासाहेब, वधूपक्ष आपला आहे. मोठ्या थाटामाटात आपल्या सखुबाईचं लग्न व्हायला हवं, अशी तुमच्या राणीसाहेबांची इच्छा आहे....'

दुसऱ्या दिवसापासून सखुबाईच्या लग्नाची तयारी सुरू झाली. निमंत्रणे पाठविली गेली. राजांचे सारे सरदार, मावळे पुण्यात गोळा झाले आणि सखुबाईंचा विवाह मोठ्या ऐश्वर्यात पार पडला...

□

११

बजाजी निंबाळकर राजांचा निरोप घेऊन फलटणला गेले. सखुबाई लहान असल्याने ती पुण्यात राहिली. सकाळी राजे सखुबाईंसह पागेत आले होते. नवीन घेतलेली घोडी पागेच्या मधल्या चौकात उभी होती. पागेच्या धुमीवर शिक्के तापविले जात होते. एकेक घोडे पुढे आणले जात होते. काळजीपूर्वक मागच्या फऱ्यावर तापलेला शिक्का उठविला जात होता. घोड्याची धडपड, शिक्का अंगावर टेकताच त्यातून निघणारा धूर पाहून सखुबाईंचे डोळे विस्फारले जात होते. तिने आजवर हे पाहिले नव्हते. राजांचे बोट धरून हे पाहत असलेल्या सखूने विचारले,

'आबा! घोड्याला भाजतात का?'

'भाजत नाहीत!' राजे म्हणाले, 'अक्कासाहेब, ही आपली घोडी ना! मग ती कशी ओळखायची? त्यासाठी हा शिक्का मारायचा?'

राजांनी पागेतले एक घोडे आणावयास सांगितले. घोडे आणले जात होते. राजांनी सखुबाईला घोड्यावर मारलेला शिक्का दाखविला. सखुबाईचे समाधान झाले. मोतद्दार नवा शिक्का मारलेल्या घोड्याला चुचकारीत होता. फऱ्यावरच्या डागाने ते घोडे कावरेबावरे झाले होते. त्याने एकदम पाठीमागच्या पायाची लाथ झाडली. सखुबाई हसल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिक्के मारून नवी घोडी तबेल्यात नेली गेली. राजे, सखुबाई नवी घोडी निरखीत असता तानाजी पागेत आला. राजांना मुजरा करून तो म्हणाला,

‘कान्होजी जेधे वाड्यात आलेत.’

‘आम्ही येतो.’

राजे स्वार झाले. सखुबाई कट्ट्यावर उभ्या होत्या. तेथे तट्ट नेताच त्या स्वार झाल्या. रक्षक स्वारांनी मांड टाकली; आणि राजे सखुबाईंच्यासह वाड्याकडे जाऊ लागले.

कान्होजी जेधे, येसाजी कंक, बाजी जेधे, दादाजी नरसप्रभू, बजाजी, चिमणाजी ही सारी मंडळी सदरेवर उपस्थित होती. सर्वांना पाहताच राजे म्हणाले,

‘अरे, व्वा! आज तर खास बैठक होणार, असं दिसतं.’

साऱ्यांनी राजांना मुजरे केले. सर्वांसह राजे महालात गेले. जिजाबाईही आल्या. स्थिरस्थावर होताच जेधे म्हणाले,

‘राजे! नाइलाजानं यावं लागलं. चंद्ररावांनी आमची आगळीक करण्यापर्यंत मजल गाठली.’

‘काय केलं?’

‘शिरमळकर देशमुखांचा तर हक्क त्यानं डावललाच! आता आपल्या रोहिडखोऱ्यात चाल करून चिखलीच्या पाटलाला त्याच्या मुलासह ठार केलं. दिवसेंदिवस चंद्ररावाचा पुंडावा वाढतो आहे. तो कोणालाच जुमानीनासा झाला आहे. रंगो त्रिमळ वाकडा या कुलकर्ण्यानं विधवा स्त्रीवर अत्याचार केला. त्यासाठी तुम्ही त्याला हजर व्हायला सांगितलं. पण तो कुठं गेला, माहीत आहे?’

शांतपणे राजे म्हणाले, ‘तो जावळीला चंद्ररावाच्या आश्रयाला गेला.’

जेधे थक्क झाले, ‘हे माहीत होतं आपल्याला?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो! अनेक गोष्टी आम्हांला माहीत आहेत. बिरवडीच्या पाटलांचं उत्पन्न चंद्ररावांनी बळकावलेलं आम्ही जाणतो. एवढंच काय, पण आमचा घात करण्यासाठी विजापूरकरांनी पाठवलेला मारेकरी- तोही चंद्ररावांच्याच आश्रयाला आहे, हेही आम्हांला ठाऊक आहे.’

‘हे किती दिवस सहन करायचं?’

‘रागावू नका, कान्होजी! पण तुम्ही हे सहन का करता? तुम्ही जावळीवर चाल करून का गेला नाहीत? आम्ही तुम्हांला दोष दिला नसता.’

कान्होजींनी ओठांवरून जीभ फिरवली. ते म्हणाले,

‘राजे! आम्ही आतून तुमचे असलो, तरी आदिलशाहीचे चाकर आहोत.’

‘फार काळ राहता येईल, असं वाटत नाही. कान्होजी, आम्ही संधीची वाट पाहत आहो. वेळ येताच चंद्ररावाचा आम्ही बंदोबस्त करू.’

‘तोवर?’

‘तोवर हे असंच सहन केलं पाहिजे. भगवान कृष्णालादेखील वाट पाहावी लागली. अद्याप एकशे एक भरले नाहीत.’

जिजाबाई म्हणाल्या, ‘शिवबा कधी मनातलं सांगायचा नाही.’

राजे म्हणाले, ‘तसं नाही, मासाहेब! आम्ही काळाची वाट पाहत आहो. मोऱ्यांची वेळ भरली आहे, पण काळ अद्याप आला नाही, एवढाच अर्थ आहे- कान्होजी, अफझलखानाची वर्दी आम्हांला सदैव कळवीत चला. वाईच्या वार्तेकडे आमचं लक्ष सदैव असतं.’

कान्होजी हसले. ते म्हणाले, ‘राजे! ती चिंता नको. खान एवढ्यात आपल्यावर चालून येईल, असं वाटत नाही.’

‘ते काही त्याचे उपकार नाहीत.’ राजे म्हणाले, ‘विजापूर दरबारातला वाढता बेबनाव,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यामुळं महाराजसाहेबांचं दरबारातलं वाढतं वजन, हे आम्हांला माहीत आहे. त्या दरबारी महाराजसाहेब फर्जंद आहेत; त्यांच्या मुलाची आगळीक काढायला खान धजणार नाही, एवढा तो धूर्त आहे. धूर्तता कमी आपल्याच लोकांत... तुमच्यांत!'

'आमच्यांत!' कान्होजी उद्गारले.

'हो! चंद्ररावच बघा ना! विजापूरकरांनी त्यांना किताब, मोरचेल दिले. या वैभवामुळं त्यांचे डोळे फिरले. त्या धुंदीत ते स्वत:ला श्रेष्ठ मानतात; इतरांना कमी लेखतात. त्यांच्याप्रमाणेच कुठऱ्याचे शिर्के, शृंगारपूर पालवणीचे दळवी, कुंभारखाणीचे सुर्वे, वाडीचे सावंत, म्हसवडचे माने... किती नावं घ्यावीत! आणि यांचं कार्य काय? बादशाही वैभव टिकविणं. मुसलमानी राजसत्तेनं केवढेही जुलूम केले, तरी यांचे डोळे बंदच. चीड नाही, खंत नाही. मुसलमानांच्या अंगचा जोर हिंदूंच्या अंगी कधीच उत्पन्न झाला नाही. देवळं फोडली, बायका पळवून नेल्या, घरं-दारं लुटली ...फार काय, सरकारीची माणसं तोंडावर थुंकू लागली, 'आ' वासण्याची पाळी आली, तरी हिंदूंच्या अंगी चेव नाही. अशा परिस्थितीत उसनं बाळसं आणायचं किती?'

राजांच्या या बोलण्याने कान्होजी नाराज झाले.

दोन प्रहरी एकटे असता जिजाबाईंनी विचारले,

'राजे! कान्होजी तुमच्या बोलण्यानं उदास झाले. जावळीचे मोरे उन्मत्त बनायला फार वेळ लागणार नाही.'

राजे हसून म्हणाले, 'मासाहेब! चारचौघांत सांगता येत नाही. पुरंधरापासून दोन वर्षांच्या कालात आम्ही स्वस्थ बसलो आहो, ते काय हौस, म्हणून? विजापूरकरांनी अफझलखानाला वाईचा सुभेदार नेमला आहे. खान आपले मराठे लोक वळविण्याचा प्रयत्न करीत आहे. संधी मिळाली, तर आमच्यावर चाल करायचा त्याचा इरादा आहे. वाईत त्यांचा चांगला सुभेदार म्हणून लौकिक वाढतो आहे. आमच्याच मार्गानं तो आम्हांस शह देतो आहे. वतनदारांना तो गोंजारीत आहे. अन्याय झालेल्यांना तो सांभाळीत आहे. मोरे नाचू लागलेत; पण ते कळसूत्री बाहुलं आहे. त्याच्या दोऱ्या खानाच्या हाती आहेत. आम्ही जावळीवर चालून गेलो, तर तेवढं निमित्त करून जावळीजवळच्या वाई खोऱ्यात सत्ताधीश बनलेला खान चालून यायला कमी करायचा नाही. हा खानाचा शह उठेपर्यंत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तरी आम्हांला काही करता येणार नाही.'

'हे किती दिवस चालणार?' जिजाबाईंनी विचारले.

'फार काळ चालायचं नाही! विजापूरला बादशहा आजारी आहे, असं आम्हांला कळलं आहे. किंबहुना, कालच खानाची नेमणूक कनकगिरीला झाली आहे, असं कळलं आहे. खानानं वाई सोडली, की सारं मनासारखं होईल.'

दुसऱ्या दिवशी राजे जेध्यांच्या सह पुरंधरला गेले. गड पुरा होत आला होता. राजांनी पुरंधरवर हलण्याचे ठरविले. एका सुमुहूर्तावर राजे सर्वांसह पुरंधरावर गेले. सुरक्षित स्थळी राजांनी आपला कबिला हलविला. पुरंधरावर असतानाच बातमी आली- अफझलखान परत विजापूरला गेला होता. कनकगिरीला त्याची नेमणूक झाली होती. ज्या संधीची राजे वाट पाहत होते, ती संधी आली होती.

राजांनी चिटणिसांना बोलावले. चिटणीस राजांचे एक पत्र लिहून घेत होते. राजे मोऱ्यांच्या पत्राचा मजकूर सांगत होते...

> '...तुम्ही मुस्तफद राजे म्हणविता. राजे आम्ही, आम्हांस श्रीशंभूने राज्य दिधले आहे. तर तुम्ही राजे न म्हणावे. आमचे नोकर होऊन, मुलूख खाऊन हामरहा चाकरी करावी... जावळी खाली करून, राजे न म्हणून, मोरचेल दूर करून, हात रुमाले बांधून, भेटीस येऊन हुजुरांची काही चाकरी करणे. इतकियावर बदफैली केलिया मारले जाल...'

राजांचे पत्र तातडीने जावळीला रवाना झाले. मोरे काय उत्तर देतात, इकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले होते. मोऱ्यांचे उत्तर आले. सदरेवर सारे सरदार होते. राजांनी चिटणिसांना पत्र वाचण्याची आज्ञा केली. चिटणीस वाचू लागले...

> 'चंद्रराव ही आमची खिताब. आम्ही पिढीजात राजे. तुम्ही काल राजे झाला! तुम्हांस राज्य कोणे दिधले? मुस्तफद राजा आपले घरी म्हटलियावर कोण मानितो? येता जावली जाता गोवली...'

पंत थांबले. तानाजी-येसाजींच्या भुवया संतापाने वक्र झाल्या होत्या. मिशांवरून पालथ्या मुठी फिरत होत्या. राजे म्हणाले,

'पंत, थांबलात का? वाचा.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘...पुढे एक मनुष्य जिवंत राहणार नाही. तुमच्यामध्ये पुरुषार्थ असला, तर उदयिक याल, तर आजच यावे. दारूगोळी महसुद आहे. काही बेजबाबास घालून लिहिले. ते कासियास ल्याहाविले? थोर समर्थ असो...’

पत्र संपले. सारे संतप्त होते. राजे हसत होते.

‘ठीक आहे. मोऱ्यांनी सुरेख पत्र लिहिले आहे. त्यांच्या इच्छेप्रमाणे जायला हवे.’

राजांनी तातडीने खलिते रवाना केले. पुरंधरवर निवडक फौज गोळा होऊ लागली.

राजांच्या आज्ञेची वाट पाहत सारे बसून होते.

सदरेवर सिलीमकर, बांदल, कान्होजी जेधे, रघुनाथ बल्लाळ, संभाजी कावजी ही सारी मंडळी बोलत बसली होती. त्याच वेळी राजे सदरेकडे येताना दिसले. सारे उभे राहिले. मुजरे झाले. राजे मुजऱ्यांचा स्वीकार करून म्हणाले,

‘साऱ्या मावळचे भाऊबंद गोळा झाले. चंद्ररावाला आता कठीण जाईल.’

‘पण तोही फार भारी आहे, राजे!’ कान्होजी जेधे म्हणाले, ‘मातब्बर देशमुख आप्तसंबंधांचं बळ आणि स्वयंभू डोंगर या दोहोंचं त्याला पाठबळ आहे.’

‘आम्ही काय थोडे आहोत? कान्होजी, मावळचे बारभाई मिळाले, तर चंदराई बुडायला फारसा वेळ लागायचा नाही. ती वेळ आली आहे.’

जबाबदारीची माणसे घेऊन राजांनी पुरंधर सोडला.

□

१२

महाबळेश्वरला देवदर्शन घेऊन राजे सर्वांशी विचारविनिमय करीत होते. तानाजी, येसाजी यांसारखे वीर जावळीवर चालून जावे, या मताचे होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जावळी खोरे किर्रर रानाने वेढलेले. काटेरी जाळ्या, झाडे-झुडपे, कळकीची बेटे यांनी रात्रंदिवस करकरणाऱ्या त्या खोऱ्यात दिवसा ढवळ्या एकाकी माणूस शिरायला घाबरे. याच रानात पूर्वीच्या मोऱ्यांनी खिलजीच्या, बहामनी व आदिलशाहीच्या फौजा कापून काढल्या होत्या. जावळीवर सरळ चाल करणे अशक्य होते. अवघड जागेमुळे जावळीचा एक माणूस बाहेरच्या शंभर माणसांना भारी होता. महाबळेश्वरी राजांच्या बरोबर सिलीमकर, बांदल, कान्होजी जेधे यांसारखे मातब्बर होते. तसेच तानाजी, येसाजी, रघुनाथ बल्लाळ, सुरराव काकडे यांसारखी जिवाला जीव देणारी माणसेही होती. राजांनी मनाशी निर्णय केला, आणि त्यांनी रघुनाथ बल्लाळ कोरड्यांना बोलाविले. त्यांना राजे म्हणाले,

‘चंद्रराव मोरे यास मारल्याविरहित राज्य साधत नाही. ज्याच्या हाती जावळी, त्याची सत्ता वाई प्रांतावर. त्यात तुम्हांवाचून हे कर्म कोणास न होय! तुम्ही त्याजकडे हेजबीस जाणे!’

रघुनाथपंतांनी आज्ञा मान्य केली. चंद्ररावाच्या जावळीत बोलणी करण्याच्या निमित्ताने ते घुसण्यास तयार झाले. रघुनाथपंतांबरोबर राजांनी निवडक शे, सव्वाशे धारकरी माणूस दिले. निरोप घेताना रघुनाथपंत म्हणाले,

‘मी मोरेगढीत प्रवेश करतो. बातमी कळवीत जाईन. बेत ठरला, की जावळीवर चालून यावं!’

बेत पक्का करून रघुनाथपंत जावळी खोऱ्यात उतरले. बरोबर संभाजी कावजी कोंढाळकरासारखे निधडे वीर घेऊन, बाकीचे जावळीभोवती पेरून, रघुनाथपंतांनी जावळीत प्रवेश केला. जावळीत हनुमंतराव मोरे कारभारी होते; व खुद्द यशवंतराव मोरे चंद्रराव होते.

शिवाजीकडून रघुनाथपंत आल्याचे कळताच यशवंतराव शेफारून गेला. हात बांधून येण्याची आज्ञा करणारा शिवाजी, जमली तर, सोयरीक करण्यासाठी जावळीत येत होता. हनुमंतरावामार्फत यशवंतरावाने दुसऱ्या दिवशी रात्री भेटीची वेळ ठरविली. रघुनाथपंत जावळीत राहिले. रघुनाथपंतांचे लोक जावळी निरखीत होते. हेरांकरवी राजांना दुसऱ्या दिवशी रात्रीचे निमंत्रण गेले.

दुसऱ्या दिवशी रात्री रघुनाथपंत संभाजी कावजीसह चंद्ररावाच्या वाड्यात गेले. सदरेवर चंद्रराव बसला होता. पलोत्यांच्या उजेडात चौक प्रकाशमान झाला होता. चंद्रराव भरजरी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बैठकीवर मद्य पीत बसला होता. त्याच्या उजव्या हाताला उंचा पुरा, भारदस्त वीर उभा होता. मस्तकी पगडी, कपाळी गंध, मोठे पाणीदार डोळे, ओठावर झुपकेदार मिशा बाळगलेला तो वीर आपली उजवी मूठ तलवारीवर ठेवून चौकात येणाऱ्या रघुनाथपंतांकडे पाहत होता. आपली धुंदावलेली नजर वर करीत यशवंतरावाने विचारले,

‘बाजी! कोण येतंय्?’

‘शिवाजीचा वकील येतोय्, राजे!’

हनुमंतराव मोऱ्यांच्या मागोमाग रघुनाथपंत, संभाजी कावजी हे आपल्या रक्षकांसह चौकात आले. यशवंतराव मोऱ्यांना साऱ्यांनी मुजरे केले. हनुमंतराव सदरेच्या पायरीवरच होते.

मद्याचा पेला ओठी लावीत यशवंतराव नजर रोखीत म्हणाला,

‘कोण तू?’

हनुमंतराव अदबीने म्हणाले, ‘महाराज...’

‘चूप!’ यशवंतराव ओरडला. ‘त्याला बोलू दे.’

रघुनाथपंत खाकरले. म्हणाले, ‘मी रघुनाथ बल्लाळ कोरडे. शिवाजी राजांचा चिटणीस... राजांच्या...’

‘कोण राजे?’ यशवंतराव म्हणाला, ‘इथं राजे एकच! ते म्हणजे आम्ही...’

‘ते आपण म्हणू शकता; आम्ही नाही. शिवाजी महाराजांच्या कृपेमुळंच आपण मोऱ्यांच्या गादीवर दत्तक गेलात, चंद्रराव खिताब मिळाली, हे कृपा करून ध्यानी घ्यावं.’

यशवंतराव मोठ्याने हसला. हसू संपल्यावर तो म्हणाला,

‘मोठे उपकार आहेत शिवाजीचे! एवढी ताकद होती, तर तोच का नाही बसला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गादीवर?'

सारे हसले. संभाजी कावजीचा हात तलवारीकडे गेला. रघुनाथपंतांनी त्याला इशारत केली. रघुनाथपंत म्हणाले,

'झालं गेलं, होऊन गेलं. राजांच्या मनात सलूख करावा, असं आहे. त्यात राजांना आनंद आहे.'

'त्याला असेल, आम्हांला नाही. जाऊन तुमच्या राजाला सांगा- जावळीत पाय घातला, तर माघारी जाता यायचं नाही, म्हणावं- हनुमंतराव!'

'जी!' हनुमंतराव पुढे झाले.

चंद्रराव उठू लागला. रघुनाथपंत अस्वस्थ झाले. ते म्हणाले, 'सोयरिकीचं काय?'

यशवंतराव परत बैठकीवर बसला. त्याला परत हसू फुटले. तो म्हणाला,

'आमची सोयरीक त्या भोसल्याच्या पोराबरोबर? व्वा! खूब!' एकदम यशवंतरावाचा चेहरा कठोर बनला. तो ओरडला,

'सांग तुझ्या शिवाजीला! हे मोऱ्यांचं घराणं चंद्रगुप्ताचं घराणं आहे. पिढ्यान्‌पिढ्यांचे राजे आहोत आम्ही, म्हणावं!!'

परत चंद्रराव हसला. तो म्हणाला,

'थांबा, एक तोड आहे! एक स्थळ योग्यतेचं आहे. आमचे कारभारी यशवंतराव आहेत ना! त्यांची मुलगी आहे. विचार करता का? योग्य पायरीनंच सोयरीक घडेल ती!'

सारे स्तब्ध होते. त्याच वेळी घुबडाचा घूत्कार घुमला. पुन्हा तोच आवाज आला. यशवंतराव म्हणाला,

'बघा, जमतं का! घुबडानंही साथ दिलीय्!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘घुबड ओरडलं, की मृत्यू येतो, म्हणतात.’ रघुनाथपंत म्हणाले.

‘कदाचित तसंही असेल. तुम्ही मरणार नाही कशावरून?... हनुमंतराव, यांना गिरफदार करा. मस्तक उडवा!’

‘तितकं सोपं नाही ते!’ रघुनाथपंत कडाडले. सारे चपापले. त्वेषाने रघुनाथपंत बोलले, ‘फार ऐकलं. चंद्रराव, कान उघडे ठेवून ऐक! दिलेली संधीही तू गमावलीस. या क्षणी जावळीभोवती राजांचा गराडा आहे. घुबडाचा आवाज ऐकलास, तो तुझ्या मृत्यूचा कौल होता.’

हनुमंतराव मोरे तलवार उपसून रघुनाथपंतांवर धावला, आणि त्याच वेळी रघुनाथपंतांच्या मागे असलेल्या संभाजी कावजीने हनुमंतरावांवर वार केला. किंचाळत हनुमंतराव मागे कोसळला. संभाजी कावजी, रघुनाथपंत क्षणाचाही अवधी न सोडता कापाकापी करीत वाड्याबाहेर पडले. एक बार जावळीवर उठला; आणि जावळीच्या चारी बाजूंनी ‘हर हर महादेव’ची आरोळी उठली.

जावळीत लढाईला तोंड लागले. चंद्ररावाच्या वाड्याच्या दाराशी मोऱ्यांचा एक मर्द तलवार चालवीत होता. शर्थीने तो दरवाजा रोखून होता. त्याच्या पुढे साऱ्यांना हार खावी लागत होती. वाड्याच्या मागच्या दरवाज्यातून जेव्हा वाट मिळाली, तेव्हा मागे-पुढे घुसून त्या वीराला पकडण्यात आले. त्याचे नाव होते मुरारबाजी देशपांडे!

जावळी काबीज झाली; पण त्या गर्दीत यशवंतराव आपल्या बायकामुलांसह पळून गेला. त्याने थेट रायरी गाठली.

राजे जावळीत आले. मोऱ्यांची महशूर पागा, संपत्ती राजांना जावळीत मिळाली. मोऱ्यांच्या वाड्यात राजे आले, तेव्हा मुरारबाजी देशपांडे यांना हजर केले गेले. दोरखंडाने जखडलेल्या मुरारबाजींना पाहताच राजांनी त्यांना मोकळे करण्यास सांगितले. राजे म्हणाले,

‘मुरारबाजी! तुमचं शौर्य आम्ही पाहिलं. तुमच्यासारखी गुणी माणसं आम्हांला हवीत!’

राजांनी मुरारबाजींचे समाधान केले. मुरारबाजी राजांना मिळाले. जावळी खोऱ्यातले ते सर्वांत मोठे यश होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जावळी खोऱ्याचा पुरा ताबा घ्यायला राजांना पंधरा दिवस लागले. मोऱ्यांच्याकडील जे लोक राजांच्या सेवेला आले, त्यांना राजांना पदरी ठेवून घेतले. कृष्णाजी बाबाजी या माहितगार माणसाला जावळीचा सुभेदार नेमले. विरो राम यांस मुजुमदार नेमले. जुन्या हक्कदारांच्या याद्या तयार करून त्यांचे हक्क कायम केले.

राजांचे फार दिवसांचे स्वप्न साकार झाले होते. चांभारगड, सोनगड, चंद्रगड, मकरंदगड- तटबंदीने सुरक्षित असलेला जावळी मुलूख राजे पाहत होते. दाट रानाने त्या मुलुखाची सुरक्षितता वाढवली होती. पाठीशी महाबळेश्वर रक्षणासाठी उभा होता. त्या मुलुखात जावळीशेजारी उभ्या असलेल्या भोरप्या डोंगराकडे राजांचे लक्ष गेले. मोरोपंत पिंगळे यांना राजांनी बोलावले. ते म्हणाले,

'मोरोपंत! तुम्हांला गडाची माहिती चांगली आहे, असं आम्ही ऐकतो. या भोरप्या डोंगरावर तुम्ही मजबूत किल्ला बांधा. किल्ला असा बांधा, की कोणत्याही बाक्या प्रसंगी आम्हांला या गडाची आठवण व्हावी. ती जबाबदारी तुमची!'

मोरोपंतांनी अंगावर आलेली पहिली जबाबदारी त्याच निष्ठेने उचलली. ते म्हणाले,

'बेशक, महाराज! आपल्या आज्ञेप्रमाणे गड तामीर करू. महाराजांच्या दूरांदेशीची ही कमाल म्हटली पाहिजे.'

'कमाल कसली?'

'महाराज! कुणीही जावळी काबीज केली असती, तर ही शक्कल सुचली नसती. भोवताली मकरंद, चांभार, कांगोरी, सोनगड यांसारखे टेहळे व बंदिस्त गड असता हा नवीन गड बांधायचं काय कारण?'

'बोला, पंत!' राजे कौतुकाने म्हणाले.

'...असाच विचार कुणीही केला असता; पण आपण हा मुलूख पाहिलात, या भागाचं अजिंक्यत्व आपण जाणलंत, आणि म्हणूनच चारी बाजूंनी राखणीचे गड ठेवून, मधला भोरप्या आपण निवडलात. खजिन्याला, कोठल्याही मातब्बर शत्रूला तोंड द्यायला अशी सुरक्षित जागा हुडकून सापडायची नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे प्रसन्न झाले. ‘वा, पंत! तुम्ही आमच्या मनातले बेत बरोबर जाणलेत! हीच दृष्टी ठेवून गड पुरा करा. तुळजापूरला जाऊन भवानी मातेचं दर्शन घेणं आम्हांला जमत नाही. अनेक अडचणी येतात. या सुरक्षित जागी देवीची स्थापना करावी, असं आमच्या मनात आहे.’

जावळीची व्यवस्था लावून राजे यशवंतराव मोऱ्याचे पारिपत्य करायला निघाले. यशवंतराव मोरे आपल्या बायकामुलांसह रायरीच्या आश्रयाला दडला होता.

राजांनी जावळी सोडली. आपल्या सैन्यासह ते रायरीला आले. रायरी आकाशाला भिडलेला गड. रायरीला राजांच्या सैन्याचा वेढा पडला. यशवंतराव मोरे गडावरून अधूनमधून मारा करीत होता; दिवस ढकलीत होता. गड बळकट होता, उत्तुंग होता; पण बेशिस्त होता. दुर्लक्ष केलेल्या त्या गडावर मोरे अचानक गेले होते. गडात धान्य भरून घेण्याची उसंत मोऱ्यांना नव्हती. जेव्हा बुद्धी सुचली, तेव्हा राजांच्या सैन्याने वेढा घातला होता. तीन महिने सरत आले; पण वेढा उठण्याचे चिन्ह दिसेना. गडाखाली राजेही मनातून बेचैन होते. वैशाखाच्या उन्हात राजे वेढा देऊन होते. पाठीवर पावसाळा होता. पावसाळा आला, की धो धो पावसात त्या मुलुखात उघड्यावर टिकणे कठीण होते. राजांच्या सैन्यात सिलीमकर होते; ते मोऱ्यांचे आप्त होते. राजांनी त्यांना गडावर पाठविले.

जेरीला आलेला यशवंतराव संधी पाहतच होता. गडाची धान्यसामग्री संपत आली होती. जास्त दिवस गड लढविणे कठीण होते. यशवंतराव आपल्या बायकामुलांसह गडाखाली आला.

शिवाजीराजांनी यशवंतरावांचे स्वागत केले, यशवंतरावांचा बहुमान केला, घोडा व शिरपाव दिधला. यशवंतरावांनी त्या गौरवाचा भलताच अर्थ घेतला. मानाचा रुमाल त्याने नाकारला. शिवाजीराजांनीही यशवंतरावाचा मोरचेलाचा अधिकार काढून घेतला. गडाखाली यशवंतरावाला ठेवून राजे गड पाहायला गेले.

रायरी गडाची माहिती राजे आजवर ऐकत होते. अनेक वेळा गडाचे दूरदर्शन त्यांना घडले होते; पण प्रत्यक्ष गड पाहत असता राजे चकित होत होते. तसा पाहिला, तर रायरी हमरस्त्यावरच होता. रत्नागिरी अगर दक्खन- कोठेही जायला जागा सोयिस्कर. समुद्र जवळ. रायरीची सत्ता म्हणजे अनेक घाटांची आणि त्यांच्या वाहतुकीची सत्ता होती. रायरी अतिउंच व चढण्यास कठीण अशी जागा होती. राजांनी सारा गड निरखला. राजा खासा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जाऊन पाहता गड बहुत चखोट. चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणे दीड गाव उंच. पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे. दौलताबाद पृथ्वीवरील चांगला गड खरा; पण तो उंचीने कमी. दौलताबादेपेक्षा रायरी दशगुणी उंच. असे पाहून राजे संतुष्ट झाले; आणि नकळत बोलून गेले,

'तख्तास जागा हाच गड करावा!'

राजांनी रायरीचे नाव 'रायगड' ठेवले.

गडाखाली राजांची छावणी असताना राजे नेहमी गडावर जात. आबाजी महादेव, हिरोजी इंदलकर यासारखे बांधकामाचे तज्ज्ञ बरोबर असत. राजे त्यांना आपली कल्पना सांगत. राजांच्या मनात गडाचे रूप स्पष्ट होत होते.

राजे गडावरून छावणीत आले. कान्होजी जेधे राजांना मुजरा करून उभे राहिले.

'कान्होजी, काय खबर?'

'खबर तितकीशी चांगली नाही, महाराज! आपण यशवंतराव-प्रतापरावांना अभय दिलंत. आज ते पळून गेले.'

'कसे?'

'आपण गडावर गेलात, आणि मोऱ्यांना फितलेल्यांनी त्यांना घोडी दिली. पाठलाग केला. यशवंतराव सापडले. प्रतापराव पळून गेले.'

राजे संतप्त झाले. यशवंतरावांना आपल्याकडे वळवून घेऊन त्यांनाच जावळीत ठेवण्याचा राजांचा बेत होता. राजे म्हणाले,

'यशवंतरावांना हजर करा.'

जेरबंद केलेले यशवंतराव राजांच्या समोर आणले गेले. यशवंतरावांकडे तुच्छतेनं पाहत राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘यशवंतराव! कुठं पळून जायची तयारी केली होतीत?’

यशवंतराव हसला. तो म्हणाला,

‘जिथं तू नाहीस, अशा कोणत्याही ठिकाणी जायची तयारी आहे माझी!’

‘यशवंतराव! तुम्ही कैदी आहात, हे विसरू नका. अजूनही तुम्ही इमानानं राहायला तयार असाल...’

‘इमान? आणि तुझ्याशी? लढाईत हरलो, म्हणून जागा विसरलो नाही मी. सिंह भुकेला झाला, म्हणून गवत खाणार नाही. पिढीजाद ‘चंद्रराव’ खिताब मिरवणारे मोरे भिक्षेचं अन्न खात नसतात! तुझ्यासारख्या उपऱ्याकडून तर मुळीच नाही.’

राजांचे स्मित नाहीसे झाले. खोबणीत बसलेल्या नेत्रांना एक वेगळीच धार आली. आपली नजर यशवंतरावावर रोखीत राजे कडाडले,

‘नुसती चंद्रगुप्त मौर्यांची वंशावळी सांगून माणसं मोठी होत नसतात, मोरे! मद्याच्या कैफात सदैव धुंद राहणारा तू; त्या पराक्रमी मौर्यांची आठवण कशाला करतोस? प्रजेवर अव्याहत जुलूम, जबरदस्ती करणारे, निरपराध माणसं पोत्यात कोंडून त्यांच्याकडून हवं ते वदायला आणि करायला भाग पाडणारे समर्थ राजे तुम्ही! त्या थोर घराण्याचं नावही घेण्याची तुमची लायकी नाही. आम्ही संधी दिली होती; पण ती तुम्हांला उचलता आली नाही.’

जेध्यांच्याकडे वळून राजे म्हणाले,

‘हे सामोपचारानं वळतील, असं दिसत नाही. असा शत्रू आम्हांस परवडायचा नाही. जेधे! या उन्मत्त, अविचारी माणसाला न्या, आणि त्याची गर्दन मारा.’

-आणि दुसऱ्या दिवशी यशवंतरावाची गर्दन मारली गेली. यशवंतरावांच्या बायकामुलांना पुण्याला बंदोबस्तात पाठविण्यात आले. जावळी-रायरीची व्यवस्था लावून राजेही मागोमाग पुण्याला परतले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

१३

पुरंधरवर सर्वांचा मुक्काम असल्याने पुण्याचा लाल महाल मोकळाच होता. कैद केलेली मोऱ्यांची मुले कृष्णाजी आणि बाजी ही चंद्ररावांच्या बायकामंडळींसह लाल महालातच ठेवली.

पावसाळा आला, आणि राजे पुरंधरावर गेले. जिजाबाईंना जावळी काबीज झाल्याचे ऐकून फार आनंद झाला होता. जावळी खोरे हाती आल्यामुळे राजांचे हात आणखीन बळकट झाले होते.

पावसाची झड संपली. श्रावण आला. कोवळी उन्हे ढगांआडून प्रकाशित होऊ लागली. साऱ्या मुलूखभर हिरवीगार वनश्री थाटली आणि राजांना तातडीचे पुण्याचे बोलावणे आले.

राजे पुण्याला आले. चिटणीस अधोवदन उभे होते. राजांनी विचारले,

'काय झालं, पंत?'

'राजे, क्षमा असावी. बाजी मोरे पळून गेले.'

क्षणात राजे उफाळले, 'कसे गेले?'

पंत कावरेबावरे झाले होते. त्यांच्या सर्वांगाला कंप सुटला होता. ते म्हणाले,

'राजे! चौकी पहारे जारी होते. आपल्या आज्ञेनुसार मोऱ्यांना मानानं वागवलं जात होतं. केव्हा तरी गणपतीला दोन्ही मुलं जात होती; पण आपली माणसं फितवून कृष्णराव मोरे मुधोळकर घोरपड्यांच्या बरोबर संधान बांधीत आहेत, हे कुणाच्या ध्यानी आलं नाही.'

'मग? बोलाऽऽऽ'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘परवा सायंकाळी देवदर्शनाला गेले होते आणि एकदम दोघे नाहीसे झाले. ताबडतोब तपास करविला. कृष्णाजी मिळाला; पण बाजी पळून गेला. त्याचा पत्ता लागत नाही.’

कृष्णराव मोऱ्यांना राजांच्या समोर हजर केले गेले. सोळा-सतरा वर्षांच्या ऐन उमेदीतला तो तरुण निर्भीड नजरेने राजांना पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर हास्य होते. राजांनी विचारले,

‘कुठं आहे बाजी?’

कृष्णराव हसला. तो म्हणाला,

‘तो सुटला. आता सापडायचा नाही तो.’

‘कसा सुटला?’

‘ज्या वाटेनं आपण अनेकदा गेलात, त्याच वाटेनं तो गेला असेल!’

‘चांगले इमानी आहात!’ राजे संतापून म्हणाले, ‘खाल्ल्या अन्नाला तरी जागायचं होतंत.’

‘आमचंही अन्न तुम्ही खाल्लंतच की! पण त्याला कुठं जागलात? जावळीला खात होता, ते अन्न कुणाचं?’

‘खामोश! व्वा, कृष्णाजी! पोर म्हणून गय करायला गेलो, तर चांगलीच नखं दाखवायला सुरुवात केलीत! बाप कोणत्या वाटेनं गेला, ते ठाऊक नाही?’

‘आहे ना! ज्या वाटेनं वडील गेले, त्याच वाटेनं आम्हांला जायला लाज नाही; ना भीती! आम्ही वैर कधी विसरत नाही!’

‘पंत! या मगरूर मोऱ्याला घेऊन जा! निमगजावर नेऊन याचं मस्तक मारा. सापाची ही औलाद दूध पाजून वळणारी नव्हे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे!’ पंत म्हणाले.

रागाने पंतांच्याकडे वळून राजे म्हणाले, ‘पंत! आम्ही आज्ञा केली, तिचा अंमल करा. जे या कटात सामील झाले असतील, त्यांचे हात-पाय तोडा.’

कृष्णरावास नेले गेले. दोन प्रहरी राजे जागे झाले, ते रडण्याच्या आवाजाने. वाड्याच्या मागच्या सोप्यातून तो आक्रोश उठत होता. कृष्णरावाचा शिरच्छेद झाला होता.

कृष्णरावाचा शिरच्छेद झाल्यापासून राजांच्या अवस्थेला सीमा नव्हत्या. राजांच्या पुढे जायलादेखील माणसे घाबरत. एवढ्यातेवढ्यावरूनही राजे संतापत.

दोन प्रहरी राजे झोपले होते. सेवकाने येऊन त्यांना जागे केले.

‘काय आहे?’ राजांनी विचारले.

‘मासाहेब पुरंधराहून येत आहेत!’

‘मासाहेब?’ राजांनी आश्चर्याने विचारले, ‘कुठं आहेत?’

‘एवढ्यात वाड्याच्या दाराशी येतील!’

राजे गडबडीने उठले. कपडे करून ते तयार होईपर्यंत वाड्याच्या दरवाज्याशी वर्दळ वाढल्याची जाग ऐकू आली. राजे गडबडीने खाली गेले. वाड्याच्या दरवाज्याशी मेणा उभा होता. जिजाबाई मेण्याबाहेर येत होत्या. राजे पुढे गेले. जिजाबाईंच्या पायांना हात लावून ते पाया पडले; पण जिजाबाईंच्या चेहऱ्यावर स्मित झळकले नाही; ना मायेचा हात पाठीवरून फिरला. साऱ्यांचे मुजरे घेत जिजाबाई वाड्यात प्रवेश करत्या झाल्या. पाठोपाठ राजे येत होते. महालात येताच राजांनी विचारले,

‘मासाहेब! अचानक येणं झालं?’

‘यावं लागलं!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कारण?’

‘इथं सांगता येणार नाही. वर चला.’

राजे वरच्या महाली गेले. जिजाबाई हात-पाय धुऊन महालात गेल्या. एवढ्या तातडीने मासाहेब का याव्यात, हे राजांच्या ध्यानी येईना.

जिजाबाई महाली येताच राजांनी विचारले,

‘मासाहेब! एवढ्या तातडीनं का आलात, ते सांगून टाका. अनेक कल्पनांनी आम्हांस घेरलं आहे.’

‘राजे! आम्हांलादेखील गेले दोन दिवस चैन नाही. मोऱ्यांच्या मुलाला तुम्ही मारलंत, ते ऐकून आमच्या जिवाचा थारा उडाला.’

‘मासाहेब! आम्ही कृष्णाजीरावाची गर्दन मारली, एवढंच तुम्ही ऐकलंत; पण गर्दन का मारली, हे नाही ऐकलंत.’

‘ते ऐकण्यासाठी आम्ही आलो आहोत. सांगा!’

‘मासाहेब! आम्ही त्या मुलाला इथं आणलं. भावाप्रमाणे जपलं; पण त्यांनी इथं राहून घोरपड्यांशी सूत बांधलं. आमची माणसं फितूर केली. एवढंच नव्हे, तर बाजी मोरे पळूनही गेला.’

‘बस्स? एवढंच?’

‘एवढंच नाही! आम्ही कृष्णाजीला विचारायला गेलो, तर... खंत बाजूलाच राहिली... उलट, तोच मगरुरीची भाषा बोलू लागला. दुसरा कोणी असता, तर माफी मागितली असती, पाय धरून दया अपेक्षिली असती. तुम्ही आमच्या जागी असता, तरी, मासाहेब, हेच केलं असतं!’

मासाहेब खिन्नपणाने हसल्या. त्या म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, आम्ही असतो, तर हे केलं नसतं. आम्ही कृष्णरावाला सोडून दिलं असतं.’

‘मासाहेब!’ राजे उद्गारले.

‘राजे! तुम्हांला संताप आला. कृष्णरावानं तुमचे पाय धरायला हवे होते, दयेची याचना करायला हवी होती. कशासाठी? त्यांची जावळी काबीज केली, म्हणून? त्यांच्या वडिलांचा शिरच्छेद केलात, म्हणून? राजे! माणसाला पराजय पचविता येतो; यश पचविणं इतकं सोपं नाही. मिळालेल्या यशानं तुम्ही वाहवलात, याचं आम्हांला दु:ख आहे. यशापाठोपाठ येणाऱ्या मगरुरीची चाहूल तुम्हांला लागली नाही, याची खंत वाटते.’

मासाहेबांच्या संतापापेक्षाही त्यांची व्याकुळता विदीर्ण करणारी होती. राजांच्या घशाला कोरड पडली. त्यांना शब्द सुचेनात. जिजाबाईंच्या डोळ्याला डोळा देण्याचेही त्राण त्यांच्या ठायी राहिले नव्हते. नि:श्वास सोडून जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे! जावळीचे मोरे प्रेमानं वळेनात, जावळीखेरीज राज्य सुरक्षित नव्हतं, मोरे खानाला मिळायच्या आत जावळी घेणं अत्यावश्यक होतं, म्हणून तुम्ही जावळी घेतलीत... हे आम्ही जाणतो. पळून जाणाऱ्या यशवंतरावांची गर्दन तुम्ही मारलीत, तेही आम्ही जाणतो. यशवंतरावानं तुमचा उपमर्द केला होता, युद्धाचं आव्हान दिलं होतं, प्रजेवर जुलूम केले होते. त्या सर्वांचं फळ त्यांनी भोगलं. पण ही मुलं... त्यांनी काय केलं होतं? त्यांना वळवून घेतलं असतंत, तर...’

‘मासाहेब! ते अशक्य होतं. ती सापाची औलाद होती. केव्हा ना केव्हा उलटल्याखेरीज राहणार नव्हती.’

‘तुम्ही पराजिताला साप, कुत्रं- हवं ते म्हणू शकता. त्यांना सिंहाची जात म्हटलीत, तर तोच गुण अभिमानाचा, सत्त्वाचा, निधड्या छातीचा बनायला वेळ लागणार नाही. राजे, आठवतं? शिकारीला गेला होतात. वाघीण मारलीत. तिचे दोन छावे होते, ते घरी घेऊन आलात. त्या छाव्यांना दूध घातलं, गोंजारलं, तरी एक ना एक दिवस ते पंजा उगारणार, हे ठाऊक असूनही तुम्ही त्यांना जतन केलंत. राजे, जनावरांना प्रेम देता, ते माणसांना देता येऊ नये? सत्ता अशीच डोक्यात थैमान घालणार असेल, तर तुमच्या राज्याला काही अर्थ उरायचा नाही. देशातल्या अनेक सुलतानशाह्यांत आणखीन एका राजवटीची भर पडेल. राजे, आम्ही तुमच्याकडून तरी असलं वर्तन अपेक्षिलं नव्हतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाईंचा प्रत्येक शब्द आसुडासारखा भासत होता. राजांचा जीव त्या बोलांनी गुदमरून गेला. डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

जिजाबाई म्हणाल्या, ‘राजे! आता कोणत्या तोंडानं मोऱ्यांच्या त्या रंडक्या स्त्रियांच्या समोर जाऊन उभी राहू? त्यांनी विचारलं, तर काय उत्तर देऊ? राजे, एवढं केलंत, आता त्यांचीही कत्तल करून मोकळे व्हा! यातनांतून सोडवल्याचं पुण्य तरी पदरात घ्या.’

राजांना ऐकणे अशक्य झाले. ते ओरडले,

‘बस्स, मासाहेब! मेलेल्याला परत मारू नका.’

राजांनी एकदम मासाहेबांचे पाय धरले. राजे म्हणाले,

‘मासाहेब! आम्ही चुकलो. सत्तेची अमर्यादा केली. आम्हांला क्षमा करा. आपल्या पायांची शपथ घेऊन सांगतो, मासाहेब! आम्ही असलं वर्तन परत घडू देणार नाही.’

जिजाबाईंनी प्रेमभराने राजांना उठविले. त्यांना उराशी कवटाळले. दोघांच्याही नेत्रांतून अश्रू ओघळत होते.

□

१४

राजे जिजाबाईंच्यासह पुरंधरवर आले. जावळी प्रकरणात जवळ जवळ सहा महिने दगदगीचे गेले होते. गडावर येताच राजांनी अंतर्गत व्यवहारात लक्ष घातले. जावळी खोरे स्वराज्यात सामील झाल्यापासून राजांचा मुलूख दुपटीने वाढला होता; आणि त्याची हद्द समुद्राला भिडली होती. हे वाढते राज्य आतून, बाहेरून सुरक्षित करणे आवश्यक होते. नव्या पागांची मोजदाद सुरू होती. नवे अधिकारी नेमले जात होते. स्वत:च्या ‘प्रतिपच्चन्द्रलेखेव’ या मुद्रेबरोबर त्यांचा पेशवा सामराज यांची ‘शिवनरपति-हर्ष-निधान-सामराज-मतिमत्प्रधान’ अशी मुद्रा यापूर्वीच तयार केली होती. त्याशिवाय पेशवे, मुजुमदार, डबीर, सुरनीस, सरनोबत असे अष्टप्रधानांपैकी निदान पाचजण व पायदळाचे सरनोबत, पायदळाचे सबनीस, हेरदळाचे प्रमुख असे अधिकारी राजांनी नेमले होते. खर्च वाढत होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भोरप्या डोंगराचा गड आणि रायगड ही दोन्ही बांधकामे एकाच वेळी सुरू झाली होती. पुरंधरवर मुक्काम ठेवून राजे हे सर्व करीत होते. राजगडावर कचेरी हलविली होती.

एके दिवशी राजे पुरंधराखाली नारायणदर्शनाला सर्वांसह उतरले. जिजामाता व सईबाई एका मेण्यात होत्या. सईबाईंना दिवस गेल्याने त्यांची काळजी घेतली जात होती. दुसऱ्या मेण्यात सोयराबाई होत्या. देवदर्शन करून राजे मंदिराबाहेर आले. शामराव नीळकंठांनी राजांना विनंती केली,

'महाराज, सुप्याचे तिमाजी कुलकर्णी आले आहेत.'

'आमच्याकडे?'

'हो!'

तिमाजी कुलकर्णी सुप्याचा वतनदार. त्याचे वतन संभाजी मोहित्यांनी बळजबरीने काढून घेतले. विसाजीराव व रामजी पणदकर नावाच्या भावांनी संभाजी मोहित्यांना एक घोडा व एकशे सत्तावन्न रुपये लाच दिली; आणि त्यासाठी संभाजी मोहित्यांनी कुलकर्ण्याचा छळ करून, जबरीने वचनचिठ्ठी लिहून घेऊन कुलकर्ण्याचे वतन भावांना दिले. कुलकर्णी दाद मागायला बंगळूरला गेला. शहाजीराजांनी त्याला राजांच्याकडे पाठविला. अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी कुलकर्णी राजांच्याकडे आला होता.

संभाजी मोहिते म्हणजे शहाजीराजांचे मेव्हणे. राजांचे सावत्र मामा. सुपे परगणा शहाजीराजांचा होता. त्यांनी तो परगणा शहाजीराजांच्या धाकट्या राणीसाहेब तुकाबाई यांचे भाऊ संभाजी मोहिते यांना दिला होता. मोहिते सुप्याच्या गढीत राहून सुप्यावर बेलगाम अंमल करीत होते. त्यांच्याबद्दल अनेक तक्रारी आल्या होत्या; पण राजांना मोहिते मानीत नव्हते. मोहित्यांना दुखविले, तर विनाकारण घरात गैरसमज होईल, म्हणून राजे आजवर मोहित्यांकडे दुर्लक्ष करून होते. राजांनी कुलकर्ण्याला अभय दिले; आणि ते गडावर गेले.

दुसऱ्या दिवशी राजे सकाळच्या वेळी रघुनाथ बल्लाळ, अत्रे, सोनोपंत डबीर यांच्याबरोबर बोलत होते. बोलता-बोलता राजे स्तब्ध झाले. राजे उठले; खिडकीजवळ आले. खालच्या चौकात भगवी वस्त्रे धारण केलेला एक तरुण संन्यासी उच्च रवाने श्लोक म्हणत होता :

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे
जनीं जाणता भक्त होऊनि राहे।
गुणीं प्रीति राखे क्रमू साधनाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।
सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा
सदा रामनामें वदे नित्य वाचा।
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।

'वा!' राजे उद्गारले, 'काय प्रासादिक वाणी आहे! कोण आहे हा संन्यासी?' अत्रे, डबीर खिडकीपाशी आले. संन्यासी म्हणत होता-

मदें मत्सरें सांडिला स्वार्थबुद्धी
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी।
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।

अत्रे म्हणाले, 'हा तर रामदासी दिसतो. असे अनेक भिक्षेकरी येतात. संन्यासी, बैरागी, दरवेशी यांची अखंड रीघ लागलेली असते.'

'नाही, अत्रे, साधे भिक्षेकरी आणि रामदासी यांच्यांत खूपच फरक दिसतो. हे रामदासी नुसती भिक्षा मागत नाहीत, तर प्रत्येक भिक्षेबरोबर एक जाज्वल्य सद्विचार समाजात पेरीत असतात. समाजाला विचाराकडे प्रवृत्त करीत असतात. नाही तर आम्ही यांच्या सादेला आकृष्ट झालो नसतो.'

'हे रामदासी साऱ्या मुलुखात पसरले आहेत.'

'आम्हांला ते माहीत आहे. त्या सत्पुरुषाचा उपदेश ऐकून अनेकजण आम्हांला येऊन मिळाले आहेत. रामदासीला भेटण्याची आमची इच्छा आहे.'

'आज्ञा!' सोनोपंत म्हणाले, 'आत्ता बोलावून आणतो.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यांना थांबवीत राजे म्हणाले, ‘नको. श्रीसमर्थांच्या शिष्यालादेखील बोलावण्याचा अधिकार आमचा नाही. आम्हीच सामोरे जाऊ.’

राजांच्या पाठोपाठ अत्रे, सोनोपंत होते. राजांना महालाच्या बाहेर आलेले पाहताच रामदासी चकित झाला. भानावर येऊन त्याने हात जोडले. राजांनी वाकून नमस्कार केला. त्यांनी विचारले,

‘महाराज, आपण कोण?’

‘आम्ही रामदासी. सेवकाला ‘कल्याण’ म्हणतात. भिक्षेसाठी आलो.’

‘आपण कोणते अभंग म्हणत होता?’

‘राजा, हे अभंग नव्हेत; ते श्लोक आहेत. गुरुदेव सध्या शिवथर-घळीत बसून ग्रंथ लिहीत आहेत. ग्रंथ पुरा होईतो कुठंही न जाण्याचा संकल्प त्यांनी सोडला आहे. त्यांचे हे मनाचे श्लोक आहेत.’

‘आपल्या कृपेने त्यांतील आणखी काही ऐकायला मिळेल, तर आम्हांला आनंद वाटेल.’

संन्यासी म्हणाला, ‘राजा! ती तर गुर्वाज्ञा आहे-’

‘क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादें
न लिंपे कदा दंभवादें विवादें।
करी सूखसंवाद जो ऊगमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।
सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी।
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।’

राजे समाधानाने म्हणाले, ‘पाहिलंत, पंत! सारे थोर विचार एकाच प्रवाहात जातात;

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मग ते कोणीही सांगो. असाच विचार तुकाराम महाराजांनी सांगितला आहे-

‘नसावें ओशाळ। मन मानिती सकळ।
जाय तेथें पावे मान। चाले बोलिलें वचन॥’

‘पंत, असं ऐकलं, की वाटतं- धावत जावं; आणि ज्यांच्या मुखातून अशा अमृतधारा वर्षतात, त्यांचे चरण धरावे- रामदासी! समर्थ क्षेम आहेत ना?’

‘रामकृपेनं सारं क्षेम आहे. समर्थ नेहमी सांगतात-’

‘काय?’ राजांनी विचारले.

रामदासी कल्याण म्हणाला, ‘समर्थ सांगतात- आता मठाच्या योगक्षेमाची चिंता करू नका. मोगलाई सरली. स्वराज्याचा उदय झाला. शिवबाच्या राज्यात धर्म, न्याय, निष्ठा सुरक्षित आहे.’

ते ऐकून राजांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. राजे म्हणाले, ‘पंत! ऐका, केवढी मोठी जबाबदारी समर्थांनी आमच्यावर टाकली आहे- रामदासी, समर्थांना आमचा दंडवत सांगा. त्यांना सांगा, स्वराज्याचं स्वप्न अद्याप साकार झालं नाही. यासाठी आशीर्वाद हवेत. समर्थांच्या दर्शनासाठी आमचा जीव उतावीळ झाला आहे. आम्ही रायगडी येऊ, तेव्हा दर्शनासाठी जरूर येऊ. रामदासी, काही कमतरता भासली, तर आम्हांला कळविण्यास संकोच मानू नका. समर्थांची सेवा घडली, तर आम्ही ते भाग्य समजू.’

राजे शामरावपंतांच्याकडे वळले व म्हणाले, ‘पंत, समर्थ एका थोर कार्यात मग्न आहेत. चाफळच्या उत्सवाला दरसाल दोनशे होन देण्याचं फर्मान काढा. रामदासींची योग्य व्यवस्था करून मानानं, आदरानं त्यांना निरोप द्या.’

राजे वाड्यात आले. सदरेवर विचारे, गायकवाड उभे होते. मुजरे स्वीकारून, राजे आत गेले. राजे आपल्या महाली जात असता सईबाई सामोऱ्या आल्या. त्या म्हणाल्या,

‘आपल्यालाच हुडकीत होते.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘का?’

‘मासाहेबांनी आठवण केलीय्.’

‘का? विशेष काही?’

सईबाई हसू लपवीत म्हणाल्या, ‘मला काही ठाऊक नाही.’

सईबाईंच्या पाठोपाठ राजे जिजाबाईंच्याकडे गेले.

‘मासाहेब, काय आज्ञा?’ राजांनी विचारले.

‘अरे, आज्ञा कसली? तू संतापणार नसलास, तर सांगते.’

‘मासाहेब, आपल्यावर कधी आम्ही संतापलो आहो का? आपण सांगाल, ते आम्ही आनंदानं मान्य करू.’

‘पाहा हं, राजे! मग फिराल.’

‘आपल्या पायांची शपथ! मग तर झालं?’ राजे प्रसन्नतेने म्हणाले.

‘हे बघ. बाहेर आपले विचारे, गायकवाड आलेत. त्यांची इच्छा आहे, की त्यांच्या मुली इथं द्याव्यात. सोयरीक घडावी.’

‘इथं लग्नाचं कोण आहे?’ राजे आश्चर्याने म्हणाले.

‘तुमच्याकरिता म्हणतात ते.’

‘मासाहेब, तीन लग्नं झाली. पुरे झाली नाहीत का?’

‘राजे, हासुद्धा राजकारणाचा भाग समजा. एक सोयरीक घडते; दहा माणसं आधाराला मिळतात. शिवाय, राजांनी अधिक विवाह करणं हा रिवाजच आहे मुळी!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे खिन्नतेने हसले. म्हणाले, 'हं! मासाहेब, हे कारण मात्र खोटं. त्यामुळं आमच्या लौकिकाला काही बाध यायचा नाही. प्रभू रामचंद्रांना आपण आदर्श मानतो. मासाहेब, हे मोगल सलतनतीचे रिवाज. राजकर्त्यांबरोबरच ते आमच्या हाडीमासी खिळले. तेच रिवाज आपण पाळीत आहो.'

'राजे, आम्ही गायकवाडांना आणि विचाऱ्यांना शब्द दिला आहे. सोयरीक मान्य केली आहे.'

राजे हताशपणे म्हणाले, 'मग आम्ही काय बोलणार? ठरवून टाका.'

-आणि यानंतर तीन-चार महिन्यांतच गायकवाड, जाधव, इंगळे अशा तीन घराण्यांशी राजांच्या सोयरिकी झाल्या. सईबाई, सोयराबाई, पुतळाबाई यांच्या सोबतीला सकवारबाई, काशीबाई, गुणवंताबाई राजांच्या राणीवशात प्रवेश करत्या झाल्या.

दसरा झाला. दिवाळी जवळ येत होती. दिवाळी पंधरा दिवसांवर असता राजांनी घोडदळासह गड सोडला. राजांनी कऱ्हे पठार गाठले. सकाळची थंडी अद्याप ओसरली नसता, धुक्यातून राजे सुप्याला पोहोचले. धुक्यातून दिसणारी गढी स्वप्ननगरा सारखी भासत होती. राजे सरळ गढीच्या वेशीत गेले. शिवाजीराजांना पाहताच पहारेकऱ्यांच्या कमरा मुजऱ्यासाठी लवल्या. खुद्द शहाजीपुत्र, जहागिरीचा मालक गढीत येत होता. त्याला रोखणार कोण? शिवाजीराजांच्या मावळ्यांनी गढी वेढली. दरवाज्यावर व गढीच्या चारी बाजूंना चौक्या जारी झाल्या. राजे वाड्यासमोर गेले.

शिवाजीराजे आलेले कळताच संभाजी मोहिते मामाच्या तोऱ्यात सदरेवर आले. राजांनी मुजरा केला. मामांनी राजांना विचारले,

'राजे! आज अवचित आलात?'

'मामासाहेब! दिवाळी जवळ आली. सणासुदीला थोरामोठ्यांचे आशीर्वाद घ्यायला, सण मागायला आम्ही आलो आहोत.'

'उशिरा का होईना, थोरामोठ्यांची आठवण झाली, हे काय थोडं?' मामा छद्मीपणाने म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मामासाहेब, आम्ही आपली आठवण कशी विसरू?’

‘बंगळुराहून काही कानपिचक्या आल्या, वाटतं?’

संभाजी मोहिते आपल्याच तोऱ्यात बोलत होते. राजांना त्यांचे मनातून हसू येत होते. राजे हसून म्हणाले,

‘हो! आपण बरोबर ओळखलंत, मामा. पण ती आम्हांला नाही; आपणांला.’

‘राजे, आदब सांभाळून बोला. आम्हांला कानपिचकी यायचं काय कारण?’

‘तिमाजी कुलकर्ण्यांनी आपली तक्रार महाराजसाहेबांच्या चरणी रुजू केली आहे. आमच्याकडेही तक्रार आली आहे. आपण अन्यायानं घेतलेलं त्यांचं वतन परत करावं, ही विनंती आहे.’

‘त्या भटाची तरफदारी तुम्ही करता? सुप्यावर आम्हांला नेमलं आहे, ते महाराजसाहेबांनी! तुम्हांला कोण विचारतो? सुपे परगणा ही त्यांची जहागीर आहे.’

‘बरोबर आहे! आणि आम्ही महाराजसाहेबांचे चिरंजीव आहोत. महाराजसाहेबांच्या जहागिरीत अन्याय होत नाही, हे पाहणं आमचं कर्तव्य आहे. कटुता न वाढता हे घडावं, ही आमची इच्छा आहे.’

‘तुमची इच्छा? कोण तुम्ही? राजे, दिवाळीचा सण मागायला आलात, तो घ्या, आणि रस्ता धरा.’

‘मग, मामासाहेब, सण मागावाच लागेल.’

‘मागा ना! किती होन हवेत?’

‘सुपे, ठाणे परगणा आमच्या हवाली करा. तुम्हीही आम्हांला सामील व्हा.’

संभाजी मोहिते मोठ्याने हसले. गंभीर होत राजांच्या वर नजर रोखीत ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे! तुम्ही लहान, आमचे भाचे; म्हणून गय केली. दुसरा कोणी असता, तर गर्दन मारली असती.’

राजे संतप्त झाले. चेहरा रूक्ष, कठोर झाला. त्यांचा थंड, धारदार आवाज मन चिरीत गेला-

‘मामासाहेब, तुम्हांला ते जमणार नाही. पण आम्ही ते सहज करू, हे तुमच्या ध्यानी येत नाही.’

‘मतलब?’

‘मामासाहेब! आज ह्या क्षणी गढीभोवती माझे पहारे आहेत. ही गढी तुमच्यासह माझ्या ताब्यात आहे.’

‘राजे!’ मोहित्यांचे डोळे विस्फारले गेले. मोहिते भिंतीवर लटकावलेल्या तलवारीकडे धावले. तोच राजांच्या मावळ्यांनी त्यांना गिरफदार केले. मामांचा कैफ उतरला. उसन्या अवसानाने ते म्हणाले,

‘राजे, याचा परिणाम बरा होणार नाही. महाराजसाहेबांना-’

‘मामा, आपण जरूर सांगून पाहा. महाराजसाहेबांना आम्ही चांगले ओळखतो. आपली जुलमी राजवट त्यांच्या कानी केव्हाच गेली आहे. अजूनही आपण वर्तन सुधारावे व आमच्या पदरी...’

‘हं! भाच्याची सेवा? आणि मोहिते करणार?’

‘ठीक आहे. आपण बंगळूरला जाऊ शकता.’

‘माझी चीजवस्तू?’

‘ती आम्ही जप्त केली आहे. आप्त म्हणून गय करू लागलो, तर इतरांच्या गुन्ह्याला आम्ही कोणती शिक्षा करणार? जीव राखून परत जाता, हेच नशीब समजा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सुप्याची गढी हस्तगत झाली. त्याचबरोबर मोहित्यांच्या हातांखाली असलेला जहागिरीचा भाग राजांच्या ताब्यात आला. कऱ्हे पठार स्वराज्यात सामील झाले. मोहित्यांची तीनशेची पागा आणि गढीतली दौलत राजांना मिळाली. सुप्याचा बंदोबस्त करून राजे दिवाळीसाठी गडाकडे वळले.

सुप्याचा विजय पदरी बांधून राजे आनंदाने गडावर आले; पण गडावर दुःखाची सावली पडली होती. बंगळुराहून बातमी आली होती- शिवाजीराजांचे थोरले भाऊ, जिजाबाईंचे ज्येष्ठ पुत्र संभाजीराजे लढाईत ठार झाले. कर्नाटकात संभाजीराजे व अफझलखान कनकगिरीला वेढा देऊन बसले होते. अफझलने संभाजीराजांना गडावर चाल करण्यास सांगितली. संभाजी किल्ल्यावर चालून गेले. मागून अफझल येतो, हा विश्वास. अफझलने भोसल्यांच्या वैराचा दावा साधला. त्याने संभाजीराजांना कुमक केली नाही. संभाजीराजे एकटे पडले; आणि त्या गर्दीत लढत असता जंबूरियाचा गोळा लागून शांत झाले.

राजे जिजाबाईंच्या महालात गेले. आवरलेल्या अश्रूंचे बांध दाराशीच फुटले. आईला मिठीत घेऊन राजे आपल्या अश्रूंनी जिजाबाईंचे दुःख भिजवीत होते.

जिजाबाईंच्या नजरेवरून संभाजी हलत नव्हता. बंगळूर सोडताना महाराजसाहेब म्हणाले होते, 'तुम्ही शिवाजीराजांना तयार करा; आम्ही संभाजीराजांना तयार करतो. पाहू, कोण पुढं जातो, ते.'

संभाजी! लहानपणीची पाच-सहा वर्षे जो सहवास घडला, तेवढाच! जुन्नर सोडताना शहाजीराजांच्या मागून जाणाऱ्या लहान संभाजीची अस्पष्ट मूर्ती आजही जिजाबाईंना दिसत होती. बंगळूरला आपली वाट पाहत वेशीत थांबलेले शंभूबाळ जिजाबाईंच्या नजरेसमोर येत होते. बंगळुराहून परत येताना एका मुक्कामापर्यंत आणि निरोपाच्या वेळी डोळ्यांत पाणी घेऊन उभे असलेले संभाजीराजे... तेच रूप अखेरचे!

दोन वर्षांपूर्वीच संभाजीला मुलगा झाल्याचे कळले होते. नातवाचे मुख पाहण्याचे निमित्त करून जाणे झाले असते, तर संभाजी दिसला असता.

संभाजी एक स्वप्न होते. नेहमी नजरेसमोर येणारे, पण कधीच मिठीत न सापडणारे. संभाजी स्वप्नासारखाच राहिला. स्वप्नातच तो तीळ तीळ मोठा झाला; आणि स्पर्श

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होण्याआधीच जीवनाच्या भर पहाटे विरघळून गेला. राहिले संभाजी हे स्वप्न. शंभूबाळ अशा रीतीने पुढे जाऊन महाराजसाहेबांचे शब्द खरे करतील, अशी शंका स्वप्नातही कधी जिजाबाईंना वाटली नव्हती. पण ऊर चिरून जाणारा सत्याचा घाव आधी दिसला नाही, म्हणून चुकत नसतो.

संभाजीराजांच्या मृत्यूच्या बातमीने खचलेल्या जिजाबाईंच्यावर नजर ठेवून राजे गडावर वास्तव्य करून होते. उलटणाऱ्या दिवसांबरोबर दुःखाला बांध घातले जात होते. खोल गेलेल्या जखमेचे शल्य फक्त जिजाबाईंनाच जाणवत होते. जिजाबाईंनी मोठ्या धीराने ते दुःख सहन केल्याचे भासविले; आणि राजे पुन्हा राजकारणात गुंतले.

□

१५

राजे शंभू महादेवाचे दर्शन घेऊन गडावरच्या बालेकिल्ल्यानजीक आले. बालेकिल्ल्याचेही काम पुरे झाले होते. बालेकिल्ल्यामुळे पुरंधर आता शोभिवंत दिसत होता. बालेकिल्ल्याच्या दाराशी नेताजी पालकर आले. ते म्हणाले,

‘महाराज, तोफखान्याच्या इमारतीचं काम पुरं होत आलं आहे.’

‘चला पाहू. आपण किल्लेदार. काका, आपली आज्ञा कोण डावलणार?’

नेताजींसह येसाजी, तानाजी, शिवा, जिवा महाला ही मंडळी वळली. तोफखान्याची इमारत गडाच्या एका बाजूला होती. रसाच्या मोऱ्या, रसवणाच्या चुली- सारं काम मजबूत झालं होतं. राजांनी जावळी काबीज केल्यानंतर अंबाजी मोरे व त्याचे दोघे भाऊ तोफा ओतण्यात निष्णात, म्हणून त्यांना पदरी घेतले होते. त्यासाठी त्यांना तीन हजारांची मनसब दिली होती. तोफखाना पाहून राजे म्हणाले,

‘अंबाजीराव, इमारत पाहून आम्हांला काय कळणार? या तोफखान्यात तयार झालेल्या पल्ल्याच्या तोफा शत्रुतटांना जेव्हा खिंडारं पाडतील, तेव्हाच तुमचं कसब आमच्या ध्यानी येईल. येसाजी, अंबाजीरावांना जे लागेल, ते द्या. आम्ही तयार तोफा पाहण्यास उतावीळ आहोत.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तोफखाना पाहून राजे बालेकिल्ल्यात आले, तेव्हा सूर्य वर आला होता. राजे वाड्यात जात असता आतून फिरंगोजी बाहेर आले. राजांना त्यांनी मुजरा केला.

‘फिरंगोजी, आपण केव्हा आलात?’ राजांनी विचारले.

‘थोडा वेळ झाला, राजे! तातडीनं बोलावणं केलंत, म्हणून...’

‘फार दिवस झाले. तुमच्यासारखे दिसले नाहीत, की चुकल्यासारखं वाटतं. मासाहेबांना भेटलात?’

‘हो!’

‘चला. आत जाऊ.’

सारे खास सदरेवर आले. राजांच्या मनात काय आहे, याचा अंदाज कोणाला येत नव्हता. बैठकीत तानाजी, येसाजी, फिरंगोजी यांच्याबरोबरच रघुनाथ बल्लाळ, अत्रे, दादाजी रांझेकर, रामचंद्रपंत बहुतकर हीही मंडळी होती. त्याखेरीज सोनोपंत डबीर, शामराव नीळकंठ ही कारभारी मंडळीही होती. राजांनी सर्वांवरून नजर फिरविली. राजे म्हणाले,

‘आज मुद्दाम आपणां सर्वांना गोळा केलं आहे. कऱ्हे पठार आल्यानं आपल्या राज्याचा भाग सुरक्षित झाला आहे. जावळी खोऱ्यामुळं आपली हद्द आता पार समुद्राला मिळाली आहे. आदिलशाही पातशाहा मेल्यामुळं विजापूरकरांचा गोंधळ उडालेला आहे. शहाजादा औरंगजेब आपल्या वडिलांच्या आजारामुळं आज पुरा अस्वस्थ होऊन दक्षिणेत अडकून पडला आहे. आपल्या राज्याचे दोन्ही शत्रू गाफील असताना आपला कार्यभाग साधून घ्यायला हवा. ही संधी सोडली, तर...’

त्याच वेळी त्र्यंबकपंत डबीर आत आले. राजांनी नजर वळताच ते म्हणाले,

‘महाराज, बाहेर एक बैरागी आपल्या दर्शनासाठी थांबला आहे.’

‘नाव काय?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपलं नाव तो ‘निरंजन’ सांगतो.’

‘आलोच आम्ही.’

राजे उठले. तातडीने बाहेर गेले. दाराशी आलेल्या बैराग्याला घेऊन राजे आपल्या महालात गेले.

खास सदरेवरची मंडळी चकित झाली होती. तानाजी म्हणाला,

‘राजांचं साधुसंतांवर भारी लक्ष! कोणी साधू दाराशी आला, की सारी कामं सोडून राजे प्रथम त्यांना भेटतील.’

बराच वेळ झाला. राजे आले नाहीत. सोनोपंत डबिरांना बोलावणे आले. सोनोपंत राजांच्या महाली गेले. राजांनी सांगितले,

‘सोनोपंत, हे निरंजन बैरागी. ह्यांना पाचशे होन द्या.’

‘पाचशे!’

‘हो! ते तीर्थाटनाला जात आहेत. हे केव्हाही आले, आणि आम्ही झोपलो असलो, तरी आम्हांला उठवून यांचं दर्शन करवा!’

सोनोपंतांच्यासह बैरागी गेला. राजे आपल्या महालाच्या पायऱ्या उतरून खाली आले. सदरेकडे महाराज चालू लागणार, तोच मनोहारी आली. ती म्हणाली,

‘मासाहेबांनी आठवण केलीय्.’

‘आलोच आम्ही!’

राजे मनोहारीपाठोपाठ मासाहेबांच्या महाली गेले. महाली सईबाई, पुतळाबाई, सोयराबाई उभ्या होत्या. मासाहेब लोडाला टेकून बसल्या होत्या. त्यांच्या शेजारी सखुबाई उभ्या होत्या. मासाहेबांपासून थोड्या अंतरावर महादजी बसले होते. राजांनी जाऊन

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मासाहेबांचे पाय शिवले.

‘औक्षवंत व्हा! राजे, आज सखू जाणार, म्हणते.’

‘ती कुठली म्हणते! आमचे जावईबापू म्हणत असतील.’

‘हो! त्याचमुळं हाक मारली. सकाळपासून तुमचं दर्शन नाही. फिरंगोजी भेटून गेले. आज सारे गोळा केलेले दिसतात. राजे, असा प्रसंग आला, तर कळवावं. काहीतरी गोडधोड करून घालता येतं. ऐन वेळी सांगितलंत, तर...’

‘मासाहेब, आम्हांला सांगण्याची गरज वाटली नाही. आता एक सोडून एवढ्या सुना हातांखाली असता त्यांना अंदाज येत नाही? आम्ही घरी बसून राज्याच्या बातम्या काढतो, आणि घरच्या सुनांना सदरेवरच्या वार्ता कळू नयेत?’

सारे हसले. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, नेहमीच कसली थट्टा? आम्ही मघाच बोलावणार होतो. पण तुमच्याकडे कोणी बैरागी आला होता, म्हणे!’

‘जी! खरं आहे!’

सोयराबाई म्हणाल्या, ‘बैराग्याला सुद्धा वेळ मिळतो. पण सखुबाई, घरच्यांकडे लक्ष द्यायला...’

‘हां, सूनबाई...’ जिजाबाई म्हणाल्या.

सोयराबाई थांबल्या. राजे हसले. म्हणाले,

‘मासाहेब, आम्ही नुसते बैराग्याला भेटलो, एवढंच नव्हे, तर त्याला पाचशे होनदेखील दिले.’

जिजाबाईंच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. त्या म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सई, अग, हा भलतीच उधळपट्टी करू लागला.’

सईबाई म्हणाल्या, ‘उगीच कोणी पाचशे होन बैराग्याला देत नाही.’

‘ठीक आहे. आमच्या दातृत्वावरदेखील कुणाचा विश्वास नाही.’ राजे उठत म्हणाले, ‘मासाहेब, सदरेवर सारे खोळंबलेत! आम्ही येतो.’

‘हो! पण आज सखू जाऊ दे ना? मुहूर्त पाहिलाय्.’

‘जाऊ दे ना. महादजी!’

‘जी!’

‘आठवतं? तुमचं लग्न झाल्यानंतर तुम्हांला, सखूला घेऊन आम्ही जेजुरीला देवदर्शनाला जात होतो, तेव्हा वाटेवर वाल्हे गाव लागलं. ते तुमच्या मनात भरलं. आम्ही तो गाव आमच्या सखुबाईंच्या चोळीखणासाठी इनाम दिला आहे. तो गाव आता तुमचा आहे. येतो आम्ही.’

राजे सदरेत गेले. जणू काही घडलेच नाही, असे राजे सांगू लागले,

‘...या संधीचा फायदा घेण्यासाठी आता आम्हांला हालचाल करायला हवी. या मोहिमा आमच्या लोकांनी आपणहून उचलायला हव्यात.’

रघुनाथ बल्लाळ अत्रे म्हणाले, ‘राजे, आज्ञा करायची खोटी. आपल्या मनातील इच्छित सफल झालं नाही, तर विचारा.’

‘आम्ही तुमच्याकडून हीच अपेक्षा केली होती. अत्रे, आम्ही तुम्हांला दाभोळ मुलुखात पाठवलं होतं, आठवतं?’

‘होय, महाराज!’

‘मग तुम्ही मुस्तफाबाद बंदर आणि आजूबाजूचा मुलूख काबीज करून या. तुमच्यावर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आम्ही ती जबाबदारी टाकीत आहोत.’

अत्रे आनंदाने उठले. इतर उत्सुकतेने राजांच्याकडे पाहत होते. राजे फिरंगोजींना म्हणाले,

‘फिरंगोजी, तुम्ही आपली सर्व कुमक गोळा करून चाकणवर तयार राहा. कदाचित आम्ही त्याही बाजूला येऊ. येसाजी, तानाजी, तुम्ही सर्व आपापले मावळे, पागा जय्यत तयार ठेवा. हुकूम येईल, तेव्हा क्षणाचीही उसंत लावू नका.’

काही तरी घडणार, याची सर्वांना जाणीव होती. त्यासाठी त्यांचे बाहू स्फुरत होते. फिरंगोजी म्हणाले,

‘राजे, मग आज मला जाण्याची आज्ञा द्या.’

‘फिरंगोजी, तुम्ही तर घरचे. राहा ना चार दिवस.’

‘नको, राजे. अशा दिवसांत फार दिवस गडावरून दूर राहणं बरं नव्हे.’

‘मग एक काम करा. आज तुम्ही निघतोच, म्हणता. आम्हांलाही गडावरून हलता येईल, असं दिसत नाही. आज आमची सखुबाई सासरी जातेय्. आम्ही तिला पोहोचवायला जायला हवं. पण तुम्ही असला, तर सखुबाईला ती उणीव भासायची नाही.’

‘आज्ञा!’

जेवणे झाली. थोड्या वेळाने सखुबाई महादजींबरोबर जायला निघाल्या. सखुबाईंची ओटी भरण्यात आली. सखुबाई राजांच्या पाया पडल्या. सखुबाईंना जवळ घेत राजे म्हणाले,

‘सखू, सुखी राहा! जपून राहा, पोरी!’ राजांना पुढे बोलवेना.

राजे गडाच्या खालीपर्यंत सखुबाईला पोहोचवायला गेले. फिरंगोजींच्या अश्वपथकासह जाणारे महादजींचे अश्वपथक दिसेनासे होईपर्यंत राजे पाहत उभे होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या आज्ञेनुसार रघुनाथ अत्रे दाभोळ ऊर्फ मुस्तफाबाद बंदरावर चालून गेले. अत्र्यांनी विजय मिळविला. मुस्तफाबाद बंदरावर आणि आजूबाजूच्या किल्ल्यांवर भगवे झेंडे फडकू लागले. त्या विजयाची बातमी गडावर येताच राजकारणाचा पट मांडला. राजांनी डबीर, सोनोपंत यांना औरंगाबादेकडे रवाना केले. शहाजादा बिदरला होता. राजे विजापूरकरांचा जो मुलूख जिंकीत होते, त्याला मोगलांचा कौल घेऊन ठेवावा, शहाजीराजांच्या कैदेच्या वेळी मुरादकडे मागितलेली जुन्नर-अहमदनगरची देशमुखी मिळवावी, असे राजांना वाटले. पण सोनोपंतांना निश्चित फर्मान देताना फक्त जिंकलेल्या दाभोळपट्टीला मंजुरी दिली; पण जुन्नर-अहमदनगरच्या देशमुखीबद्दल एक अक्षरही औरंगजेबाने लिहिले नाही. राजांना याचा संताप आला. शहाजादे औरंगजेबाला अक्कल शिकविण्याचा धाडसी डाव राजांनी टाकला.

हेरांच्याकडून सारख्या बातम्या येत होत्या. बहिर्जी नाईक आणि त्यांचे चतुर रामोशी कल्याण-भिवंडीकडे नाना वेष धारण करून फिरत होते. जुन्नर-अहमदनगरला राजांचे फकीर, बैरागी, संन्यासी संचार करीत होते.

उन्हाळ्याचे दिवस होते. एके दिवशी राजांनी जिजाबाईंचा आशीर्वाद घेऊन पुरंधर सोडला. पुण्याला लाल महालात सारी कुमक आज्ञेप्रमाणे गोळा झाली होती. पुण्याहून पहाटे घोडदौड सुटली. चाकणला विसावा घेतला. फिरंगोजींनी तेथे जमा केलेल्या राजांच्या घोडदळासह राजे जुन्नरवर चाल करून गेले. जुन्नरची इत्थंभूत माहिती राजांना मिळालेली होती. जुन्नर अगदी बेसावध होते. जुन्नर म्हणजे मोगलांची दक्षिणेतील एक मातब्बर पेठ. तटाने मजबूत असलेली. जेथे विजापूरकरांना जुन्नरकडे वाकड्या नजरेने पाहायचे धारिष्ट झाले नाही, तेथे शिवाजी ते धाडस करील, असे कोणाला स्वप्नातही वाटले नाही. जुन्नर चारी बाजूंनी वेढले गेले. पहाऱ्याच्या जागा चुकवून शिड्या लावल्या गेल्या. जुन्नरचा दरवाजा थोड्या चकमकीत उघडला गेला; आणि मध्यरात्री राजे घोडदळासह जुन्नरमध्ये प्रवेश करते झाले. एकच कापाकापी सुरू झाली. जुन्नरची पागा महशूर होती. अस्सल जातिवंत शेकडो घोडी पागेत होती; ठाणबंद होती. ती पागा राजांना मिळाली. तीन लक्ष होनांची मत्ता राजांना मिळाली. त्याखेरीज मौल्यवान कापड, जिन्नस, जडजवाहीर हे वेगळेच. पाहता-पाहता जुन्नर लुटून, ती लूट घेऊन राजे चाकणला आले. ऐश्वर्याने संपन्न असलेली जुन्नर पेठ एका रात्रीत दरिद्री झाली. चाकणला सर्व संपदा सुरक्षित ठेवून राजे पुण्याला आले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जुन्नरच्या मोहिमेनंतर थोड्याच अवधीत राजांनी फिरून अहमदनगरवर चाल केली. अहमदनगर म्हणजे मोगलांचे अव्वल ठाणे. राजांनी त्यावरच धाड घातली. पण अहमदनगर बेसावध नव्हते. राजांनी अहमदनगरात प्रवेश केला. अहमदनगरात शिवाजी आल्याचे कळताच नगर किल्ल्यात असलेला मोगल सरदार नौसिरखान राजांच्यावर चालून आला. राजांनी त्याचा पराभव केला; आणि राजे माघारी आले. नौसिरखानबरोबर लढताना राजांचे अनेक लोक कामी आले होते. अहमदनगरला फारशी लूटही मिळाली नाही; पण मोगलांच्या ठाण्यांवर चालून जाण्याचा पराक्रम मात्र पदरात पडला.

बिदरला जेव्हा औरंगजेबाला समजले, तेव्हा तो संतप्त झाला. जुन्नर-अहमदनगरवर केलेला हा हल्ला म्हणजे दक्षिण मोगलशाहीला आव्हानच होते. औरंगजेबाने मुल्तफखान, नौसिरखान, मीर जुमला वगैरे सर्व सरदारांना शिवाजीचा बंदोबस्त करण्याबद्दल चिडून पत्रे लिहिली.

शिवाजीचा मुलूख बेचिराख करून, शिवाजीच्या माणसांची सर्रास कत्तल उडविण्याचा हुकूम औरंगजेबाने पाठविला होता. तोवर राजे पुण्यास येऊन पोहोचले होते.

औरंगजेबाचा संताप राजांना माहीत होता. औरंगजेबाने कार्तलबखान, होशदारखान, रायकरण सिंह, शास्ताखान यांसारख्या सरदारांना सरहद्दीवर रवाना केल्याचे समजताच राजांनी दुसरा पवित्रा टाकला. बऱ्हाणपुरास औरंगजेबाच्या भेटीसाठी राजांनी आपला वकील पाठवला. वकिलाने जुन्नर-अहमदनगर मारल्याबद्दल राजांना पश्चात्ताप होत असल्याचे सांगितले; झाल्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त केला; पण केलेली लूट परत करण्याबद्दलचे अवाक्षरही काढले नाही. औरंगजेबाने सर्व विसरल्याचे भासविले. त्याचे लक्ष व्यग्र होते. डोळे आग्र्याकडे लागले होते. पातशहा शहाजहान आजारी असल्याची पक्की बातमी होती. मूर्तिपूजकांचा मित्र दारा प्रत्यक्षात सारी सूत्रे हलवीत होता. फारा दिवसांपासून अल्लाने व त्याच्या रसूलने औरंगजेबावर महान जबाबदारी टाकली होती. ती खांद्यावर घेण्याची वेळ आली होती. राज्य हाती घेण्यासाठी बंड करणे भाग होते. आलमगिराच्या दैवी इच्छा आणि मानवी महत्त्वाकांक्षा फलद्रूप होण्याचीही वेळ होती. सारे विसरून क्षमा करण्याचे नाटक करणेच भाग होते.

☐

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१६

जुन्नर, अहमदनगर मारून राजे पुण्याला आले. पुण्याला येताच राजांना तातडीने पुरंधरास जावे लागले. पुरंधरावर आनंदीआनंद पसरला होता. गडावर तोफांचे आवाज होत होते. सईबाई प्रसूत होऊन राजांना पुत्ररत्न झाले होते. पहिला मुलगा. थोरला. गादीचा वारस जन्माला आला होता.

बारशाची निमंत्रणे पाठविली गेली. बारशाच्या दिवशी मुलाचे नाव काय ठेवायचे, हे विचारण्यासाठी सारे जिजाबाईंच्याकडे गेले. क्षणभर जिजाबाईंच्या डोळ्यांत पाणी तरळले. त्या म्हणाल्या,

‘जेव्हा ते तिकडे घडले, तेव्हाच हा राहिला. शिवबा, तुमच्या दादामहाराजांचं नाव ठेवा.’

मुलाचे नाव ‘संभाजी’ ठेवण्यात आले. जिजाबाईंनी संभाजीला उराशी कवटाळले. गमावलेला संभाजी परत आल्याचा भास झाला.

संभाजी चांगल्या पायगुणाचा ठरला. पावसाळा संपायच्या आत कोंढाणा स्वराज्यात सामील झाला. शहाजीराजांच्या सुटकेसाठी द्यावा लागलेला गड परत आल्यामुळे राजांच्या मनातले एक शल्य निघून गेले.

सईबाईंना अशक्तपणा फार आला होता. संभाजीला दूध पुरत नव्हते. म्हणून जिजाबाईंनी नसरापूरजवळच्या कापूरवहाळ गावच्या गाडे नावाच्या चांगल्या मराठा घराण्यातील धाराई नावाची स्त्री गडावर आणून घेतली. धाराई संभाजीराजांची दूधआई बनली.

संभाजीराजे पालथे होऊ लागले, पुढे सरकू लागले. त्या वेळी राजेही स्वराज्याचा होईल तो विस्तार करण्यात गुंतले होते. अनेक मोहिमा आखल्या जात होत्या. विजयाच्या वार्ता गडावर येत होत्या. अत्र्यांनी दंडराजपुरी काबीज करून जंजिऱ्याला मोर्चे लावले होते.

नव्या मोहिमांचा खर्च चालू होताा. त्याचबरोबर रायगड, प्रतापगड हे दोन गड उभारले

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जात होते. पाठवावा, तेवढा पैसा अपुरा पडत होता, एवढे ते प्रचंड काम होते. गडाचे काम थांबू नये, म्हणून राजे फार जागरूक होते. मोरोपंत पिंगळे सर्व खबर देण्यासाठी जातीने पुरंधरवर आले होते. त्यांनी राजांच्या कानांवर सर्व हकीगत घातली. राजे निःश्वास सोडून म्हणाले,

'मोरोपंत, आम्ही एवढी लूट आणतो; पण तुम्ही आमचा पाहता-पाहता दिमाख उतरवता.'

'महाराज! एवढी प्रचंड कामं उभी केलीत. त्याला खर्च व्हायचाच. आता कोट पुरा झाला आहे. वाडा, सदर सजली, की गड पुरा झाला.'

'पंत, तुमच्या कामात अडचण येऊ नये, असं फार वाटत होतं. पण काही दिवस काम बंद ठेवावं लागेल, असं दिसतं.'

'जशी आज्ञा!' मोरोपंत किंचित नाराजीने म्हणाले.

'मोरोपंत, कष्टी होऊ नका. आम्ही प्रतापगडाचं काम शेवटास नेऊ, आणि तेही तुमच्या हातून.'

राजांनी दिलासा दिला खरा, पण तेवढे बोलताना त्यांच्या मनाला पीळ पडला. ते तसेच उठून बाहेर आले. राजांचे पाय थबकले. वाड्याच्या चौकात संन्यासी उभा होता. राजे उद्गारले,

'कोण? रामशरण?'

'जी!' संन्यासी मुजरा करून म्हणाला.

राजांनी त्याला खुणावले. राजांच्या पाठोपाठ संन्यासी चालू लागला. राजे बराच वेळ संन्याशाबरोबर बोलत होते. राजे जेव्हा खाली सदरेवर आले, तेव्हा त्यांनी मोरोपंतांना हाक मारली. राजे आनंदाने म्हणाले,

'मोरोपंत, आम्ही मघा बोललो, ते विसरून जा! गडाच्या कामाला लागा. त्यासाठी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लागणारी संपत्ती आपोआप गडावर चालून येईल.’

आनंदित झालेले मोरोपंत नवा उत्साह घेऊन प्रतापगडावर गेले. गडावरून हुकूम सुटले. दुसऱ्या दिवशी पहाटे राजे मासाहेबांच्या दर्शनाला गेले. राजे म्हणाले,

‘मासाहेब, कल्याणहून शाही खजिना बाहेर पडल्याची वार्ता आली आहे. स्वराज्याच्या कामी तो आशीर्वादच ठरावा. शक्य झालं, तर तसंच कल्याण-भिवंडी मारूनच आम्ही परत येऊ.’

सईबाईंचा, शंभूबाळाचा निरोप घेऊन राजे गडाखाली उतरले.

दादाजी कृष्ण व सखो कृष्ण लोहोकरे हे राजांचे सरदार आबाजी महादेव यांच्या नेतृत्वाने फौजेसह पुढे गेले होते. राजे आपल्या घोडदळासह कल्याणची वाट कापीत होते.

कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद कल्याणमध्ये निश्चिंतपणे बसला होता. विजापूर दरबारचा गोळा केलेला खजिना भरभक्कम सशस्त्र अश्वदलाबरोबर विजापूरच्या वाटेवर रवाना करून सुभेदार निश्चिंत झाला होता. खजिन्याबरोबर खुद्द त्याचा मुलगा मुल्ला याहिआ आपल्या पत्नीसह जात होता.

दिवसा उजेडी घाटातून खजिना धीमेपणाने प्रवास करीत होता. गाड्यांच्या चाकांचा खडखडाट घाटात दूर ऐकू जात होता. खजिन्याच्या अग्रभागी उमद्या घोड्यावर स्वार झालेला तरुण मुल्ला वारंवार मागे वळून आपल्या पथकावर नजर टाकीत होता. समोर वळण आले, की हाती तळपते तेगे घेतलेली अश्वपथकाची तुकडी पुढे जाऊन रस्ता निर्धोक असल्याची खात्री करून घेत होती. मेण्यातून जाणारी तरुण सुभेदारसून मेण्याचे पडदे किंचित बाजूला करून घाटाचे निसर्गसौंदर्य पाहत होती. दोन्ही बाजूंच्या घनदाट रानांतून शेकडो डोळे आपल्यावर नजर ठेवीत आहेत, याची कुणाला कल्पना नव्हती.

घाटाची चढण लागली. अवजड बोज्याने लादलेल्या गाड्या कष्टाने ओढल्या जाऊ लागल्या. बैलांच्या पाठीवर चाबकांचे पट्टे फुटू लागले. बैलांना दिलेल्या आवाजांनी रान दणदणून गेले. पाय रोवीत, मार सहन करीत ती मुकी जनावरे कष्टाने पाऊल उचलीत होती. गाड्या हळू हळू पुढे सरकत होत्या. जेव्हा उभा चढ लागला, तेव्हा खजिन्याचा भारीच गोंधळ झाला. अश्वपथक पायउतार झाले. गाड्यांच्या चाकांना दोहो बाजूंनी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिपायांचे हात लागले. थंडीच्या दिवसांतही सारे घामाघूम झाले. लौकर घाट पार होण्याची धडपड प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होती.

तोच चारी बाजूंनी 'हर हर महादेव' ची रणगर्जना उसळली. गदारोळ उसळला. जे स्वार होते, त्यांनी शस्त्रे परजली. थोडी चकमक झाली; आणि थोड्याच अवधीत कल्याणखजिना सुरक्षितपणे हाती आला. गाड्यांचे मोहरे फिरले. खजिना परत कल्याणची वाट चालू लागला.

कल्याण नगरात दोन प्रहरच्या वेळी नीरव शांतता नांदत होती. बाजार रिकामा होता. मराठा घोडेस्वारांची एक तुकडी अशा निवांत वेळी कल्याण दरवाज्यापाशी आली. द्वाररक्षकांची एकच धावपळ उडाली. दरवाजा बंद करून घ्यायलाही उसंत मिळाली नाही. चारी बाजूंनी दबा धरलेले घोडदळ कल्याणचा दरवाजा हाती आलेला कळताच उधळले. कल्याण शहर काही क्षणांतच घोड्यांच्या टापांच्या आवाजाने भरून गेले. सुभेदार मुल्ला अहमद गिरफदार केला गेला. कल्याणच्या नगारखान्यावर भगवा ध्वज डौलाने फडकू लागला.

कल्याण काबीज झाले, त्याच वेळी भिवंडीही काबीज झाली. कल्याणच्या वाटेवर असलेल्या राजांना ही विजयाची वार्ता सांगण्यासाठी अश्वपथक दौडले.

दुसऱ्या दिवशी राजांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू झाली. आबाजी महादेवाने कल्याणबाहेरच्या माळावर एक सुशोभित शामियाना उभा केला होता. कल्याण-सुभेदाराचा तो खास शामियाना राजांची प्रतीक्षा करीत होता.

दुसऱ्या दिवशी सूर्य माथ्यावरून कलल्यावर राजे येत असल्याची बातमी घेऊन दोन स्वार कल्याणवर आले. आपली पागोटी सावरून आबाजी महादेव हे दादाजी कृष्ण व सखो कृष्ण लोहोकरे यांच्यासह शामियान्याच्या समोर उभे राहिले. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर विजयाचा अमाप आनंद ओसंडत होता. राजांचे अश्वपथक दिसू लागले.

अश्वपथक धीम्या पावलांनी येत होते. राजांचे लक्ष कल्याणवर फडकणाऱ्या भगव्या ध्वजाकडे गेले. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. घोडी नजीक येताच सर्वांनी राजांना मुजरे केले. तुताऱ्यांचा आवाज आला. कल्याणचा नगारा राजांच्या आगमनाची वार्ता जाहीर करून मोकळा झाला. आबाजी महादेवांनी पुढे होऊन राजांच्या घोड्याची ओठाळी धरली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे पायउतार झाले. आबाजींच्या पाठीवर हात ठेवीत राजे म्हणाले,

'आबाजी, आता तुम्ही घोडं धरणं योग्य नव्हे.'

'महाराज, का?'

'का? कल्याण सुभ्याचे सुभेदार असली कामं करतात का?'

'आपली कृपा, महाराज! असले दहा सुभे देऊ केलेत, तरी आपलं घोडं धरण्याची संधी मिळते, तेव्हा होणारा आनंद वेगळाच असतो.'

'आबाजी! तुम्ही आणि लोहोकरे बंधूंनी केलेला पराक्रम समजला. तो ऐकून आम्हांला समाधान वाटलं. फार कामी आले?'

'फक्त पंधरा!'

राजे खिन्नपणे हसले, 'आबाजी, एका सुद्धा जिवाचं आम्हांला फार मोल वाटतं. रक्ताच्या अभिषेकाखेरीज रणक्षेत्र प्रसन्न होतच नाही का? चला. आबाजी, जगदंबेची इच्छा!'

राजे शामियान्यात आले.

थोडी विश्रांती घेऊन राजांनी कल्याणमध्ये प्रवेश केला. भयचकित नजरेने कल्याणचे रहिवासी राजांना पाहत होते. राजांच्या मागे-पुढे दोन्ही बाजूंना हत्यारबंद स्वार जात होते. राजे ते ऐश्वर्यसंपन्न शहर निरखीत होते. गर्जणाऱ्या सागराच्या पार्श्वभूमीवर कल्याण शहर खुलून दिसत होते. उंच प्रासादांनी, भव्य मशिदींनी आकाशात आपले मनोरे चढविले होते. शहर मोठे सुबक आणि देखणे होते.

शहराचा फेरफटका आटोपून राजे शामियान्यात आले. शामियाना भव्य होता. उच्चासनावर सुशोभित बैठक मांडली होती. रंगीबेरंगी पडद्यांनी आणि आडपडद्यांनी शोभिवंत केलेला शामियाना राजे निरखीत होते. रुजाम्याच्या गालिच्यांनी जमीन आच्छादून गेली होती. धूपदाण्यांतून शामियान्यात सुगंध दरवळत होता. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आबाजी, आमचं स्वागतही शाही दिसतं. अशा शामियान्यात फार काळ राहिलं, तर शाही मिजास चढायला फारसा वेळ लागायचा नाही.’

राजे उच्चासनावर बसले. कल्याणखजिना राजांच्या समोर आणला गेला. सुवर्णरौप्यनाणी, अनेक अलंकार, रत्नांचे ढीग यांची राजांच्या देखत मोजदाद झाली. कल्याण-मोहिमेत जे जखमी झाले, त्यांच्या कुटुंबीयांना भरपूर द्रव्य दिले. ज्यांनी पराक्रम केला, त्यांचा बहुमान केला. आबाजी महादेवांना सुभेदारी दिली. दादाजी कृष्ण व सखो कृष्ण लोहोकरे यांना कल्याणचा व भिवंडीचा कारभार सांगितला. सरते शेवटी कल्याणचा कैद झालेला सुभेदार व त्याचा मुलगा यांना दरबारी हजर करण्यात आले. वंशाने अरब असलेल्या त्या पितापुत्रांची धिप्पाड जोडी पाहून राजे स्तिमित झाले. गोरेपान, उंचे पुरे, देखणे पुरुष. घायाळ, संतप्त नजरेने ते राजांच्याकडे पाहत होते. राजांनी त्यांना मोकळे करण्याचा हुकूम केला. बाइज्जत विजापूरला जाण्याची परवानगी दिली. जिवाची आशा सोडून मृत्यूला उभे ठाकलेले दोघे त्या आज्ञेने चकित झाले.

आबाजी महादेव पुढे झाले. त्यांनी राजांना मुजरा केला. राजांनी विचारले,

‘आबाजी! काय आहे?’

‘महाराज, आणखी एक कैदी हजर व्हायचा आहे!’

‘कोण आहे?’

‘कल्याणसुभेदाराची सून!’

राजे संतप्त झाले. ते म्हणाले, ‘आबाजी!’

आबाजी आवंढा गिळत म्हणाले, ‘महाराज, गैरसमज होतो. कल्याणखजिना लुटला, तेव्हा ही सून आपल्या नवऱ्याबरोबर विजापूरला जात होती. सारे गिरफदार केले गेले. त्यांत तीही सापडली. आपल्या आज्ञेखेरीज तिचा निर्णय कोण घेणार?’

राजांचा संताप निवळला. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आबाजी! मनात आणलं असतंत, तर ते तुम्हीही करू शकला असता. आम्ही त्याबद्दल दोष दिला नसता. पण ही सून वेगळी दिसते.’

‘होय, महाराज! पृथ्वीतलावर धुंडूनही दिसणार नाही, असं तिचं लावण्य आहे. फुलापेक्षाही नाजूक! दृष्टी टाकताच तिचं सौंदर्य अत्तरासारखं दरवळतंय्.’

‘व्वा, आबाजी! तुम्ही काव्यही करू लागलात. हे सामर्थ्य जिच्या ठायी आहे, ती सुभेदाराची स्नुषा आमच्यासमोर हजर करा.’

सारा दरबार तटस्थ झाला होता. आबाजी महादेवांनी टाळी वाजवताच शामियान्याच्या डाव्या बाजूचा चिकाचा पडदा उचलला गेला. दोन दासींच्यासह सुभेदारसुनेने शामियान्यात प्रवेश केला. मुसलमानी वेष परिधान केलेली ती युवती राजांच्यासमोर उभी केली गेली. तिच्या चेहऱ्यावर झिरझिरीत ओढणीचे अवगुंठन होते. मेहंदीच्या लाल रंगाने चित्रित झालेले तिचे नाजूक पंजे कंप पावत होते. सुकुमार गौर पावलांचे अंगठे रुजाम्याच्या गालिच्यात रुतत होते.

राजांनी एक दीर्घ श्वास घेतला. क्षणभर डोळे मिटले आणि क्षणात ते उघडले. त्या युवतीवरची नजर ढळू न देता राजे उठले. उच्चासनावरून उतरले. धीमी पावले टाकीत राजे त्या युवतीच्या नजीक गेले. तांबड्या रुजाम्याच्या गालिच्यावरून सामोरे येऊन ठाकलेले राजांचे पाय नतमस्तक युवतीला दिसत होते. राजांनी सुभेदाराकडे पाहिले. दोघांच्या नजरेत तीव्र संताप उमटला होता. राजांनी स्थिर हातांनी त्या युवतीचे अवगुंठन उचलले आणि ते मागे मस्तकावर टाकले. त्या अप्रतिम लावण्याच्या दर्शनाने साऱ्या दरबाराच्या श्वासाचा अवरोध झाला. राजे शांत नजरेने ते सौंदर्य दृष्टीत साठवीत होते. नतमस्तक असलेल्या तिच्या नेत्रांतून अश्रू निखळले. व्यथित होऊन राजे माघारी बैठकीवर आले.

राजांच्या कृतीने चकित झालेल्या त्या रूपवतीने नजर वर केली. राजे शांत नजरेने तिच्याकडे पाहत होते. तारुण्याच्या ऐन उमेदीतल्या राजांनी केशरी जिरेटोप परिधान केला होता. कपाळी शिवगंध रेखाटले होते. तेजस्वी डोळे तिच्या नेत्रांना भिडले होते. ती नजर पाहून युवती थक्क झाली. कुणाही पुरुषाला ज्या नजरेला नजर देण्याची हिंमत होत नसे, त्या नजरेकडे ती सून पाहत होती. ते शांत रूप पाहून नजर वळविण्याचे सामर्थ्य तिच्या ठायी राहिले नव्हते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आबाजींकडे नजर वळवीत राजे म्हणाले, ‘आबाजी! ही मुलगी खरंच सौंदर्याची खाण आहे. तुम्ही तिला हजर केली आहे. आम्ही काय करावं, असं तुम्हांला वाटतं?’

‘महाराज!’

‘सांगा, आबाजी! मोकळेपणानं सांगा!’

‘महाराज, रिवाज विचाराल, तर आपण हिला नाट्यशाळेत स्थान दिलंत, तरी हिचा सन्मानच होईल. शत्रूचा तो रिवाजच आहे. पद्मिनीवर कोणी दया दाखविली नाही. कमलकुमारीची आहुती अशीच पडली आहे. राणी दुर्गावतीच्या बहिणीला अकबरानं अशीच जनानखान्यात कोंडली होती. उलट, अशा युवतींनीच बादशहाचे मीनाबाजार भरले गेले. त्याच शत्रूंची ही कन्या आहे. त्याच शत्रूंची ही दुहिता आहे. क्रोधानं आपण हिला एखाद्या बारगिराची बटीक बनविलीत, तरी आपल्याला कोणी नावं ठेवणार नाही. लोकरिवाजाला ते सोडूनही होणार नाही.’

‘बस्स! आबाजी! पापाचं समर्थनं पापानं होत नाही. लोकरिवाजापेक्षा माणुसकीच्या धर्माला आम्ही ओळखतो... आमचा ध्वज भगवा आहे. पवित्रतेचं ते प्रतीक आहे. या मुलीचं लावण्य पाहून आम्ही चकित झालो. काही तरी अलौकिक पाहिल्याचं समाधान वाटलं.’ सुभेदार-सुनेकडे बोट दाखवून राजे म्हणाले, ‘यांना पाहताच वाटलं-’ राजे थांबले. त्यांचा गळा दाटून आला.

‘काय वाटलं, महाराज?’

‘काय वाटलं!... आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या, तर आम्हीही सुंदर निपजलो असतो! आबाजी, आमच्या माहेबांची आठवण करून देणाऱ्या या सुभेदार सुनेला मानाचे आहेर करा. मासाहेबांची रवानगी करताना ज्या इतमामानं वागवाल, तसंच या कन्येला तिच्या नवऱ्याबरोबर पाठविताना मानानं वागवा.’

राजांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान प्रकट झाले होते. सुभेदार पितापुत्रांच्या नजरा विस्फारल्या गेल्या होत्या. राजांची आज्ञा ऐकून भारावलेल्या सुनेच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले होते. भक्तिभावाने तिने कुर्निसात केला. राजांनी हात जोडले. ते उठले. साऱ्यांचे मुजरे झडले. त्यांत सुभेदार पितापुत्रही सामील झाले होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कल्याण-भिवंडीची व्यवस्था लावून राजे परत आले. पुरंधर दिसू लागला. आपल्या सहकाऱ्यांसह राजे गड चढत होते. माचीचे महाद्वार दिसू लागले. जवळ जाताच महाद्वारात उभ्या असलेल्या जिजाबाईंचे दर्शन राजांना झाले. जिजाबाईंना गडाच्या प्रथम दरवाज्यात पाहून राजांना आश्चर्य वाटले. राजे महाद्वारात गेले. सुवासिनींनी राजांच्या पायांवर पाणी ओतले. डोळ्यांना पाणी लावले. दहीभाताचे मुटके राजांच्या वरून ओवाळून टाकले. जिजाबाई आरती घेऊन सामोऱ्या आल्या. राजांचे उमदे रूप निरखून त्यांनी राजांना ओवाळले. जिजाबाई मासाहेबांचे पाय शिवत राजांनी विचारले,

'मासाहेब! आपल्याला गडाच्या प्रथम दरवाज्याशी पाहून आम्हांला...'

'आश्चर्य वाटलं ना? राजे, लोकरिवाजाला सोडून अलौकिक पराक्रम केलात. मग अशा वीराचं स्वागत जरा वेगळ्याच तऱ्हेनं नको का व्हायला? राजे, आजच्या तुमच्या पराक्रमानं आम्ही धन्य झालो. तुमच्या कर्तुकीनं साता पिढ्यांचा उद्धार झाला. आज खरे राजे शोभलात!'

जिजाबाईंना पुढे बोलवेना. त्यांनी राजांना मिठीत घेतले. सारे ते दृश्य भारावून पाहत होते.

रात्री राजे महालात आले. तेव्हा शंभूराजे झोपले होते. सईबाई थकल्या होत्या. राजे म्हणाले,

'बरं वाटत नाही, तर, सई, विश्रांती घ्यावी!'

'एवढा पराक्रम करून आलात. जेव्हा कल्याण-सुभेदाराच्या सुनेची बातमी कळली, तेव्हा काय वाटलं, ते कसं सांगू? वाटलं, पंख लावून जावं; आणि असतील तिथं स्वारींना गाठावं!'

'आणिऽ?'

सईबाई लाजल्या. त्या म्हणाल्या, 'सारीच थट्टा वाटते! आम्ही नाही बोलणार.'

राजे हसले. ते म्हणाले, 'छे! ते नाही चालायचं. जे ऐकण्यासाठी कान उतावीळ होते,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ते तसंच राहून गेलं.’

‘चला ऽ ऽ’

सईबाई लाजलेल्या पाहून राजे परत हसले. स्वत:ला सावरून सईबाईंनी विचारले,

‘एक विचारू? खरं सांगाल?’

‘सई, आम्ही कधी खोटं बोललो का?’

‘सुभेदाराची सून सुंदर होती?’

‘हो! होती!’

‘खूप?’

‘खूप!’ राजे म्हणाले.

‘मग?’

‘पण ती तुमच्याइतकी सुंदर नव्हती.’ राजे म्हणाले.

‘चला! परत थट्टा करू लागला! मी का सुंदर आहे?’

राजे उठले. सईबाईंच्या जवळ जाऊन त्यांचा चेहरा आपल्याकडे वळवीत राजे म्हणाले,

‘मी थट्टा नाही केली. आम्ही खरं तेच सांगतो. ते सौंदर्य पाहिलं, पण फार कमी भासलं. मोहविण्यासारखं त्यात काहीच नव्हतं. सई, सौंदर्य मनाच्या स्नेहातून प्रकट होतं. जिव्हाळ्यानं ते ज्ञात होतं. तशा रूपाला तोड नसते.’

राजांच्या त्या भावनाविवश नजरेला नजर देण्याची ताकद सईबाईंना राहिली नाही.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यांनी आपलं मस्तक राजांच्या खांद्यावर टेकले. राजांच्या करपाशात सईबाई केव्हा विसावल्या, हे त्यांचे त्यांनाही कळले नाही.

□

१७

कल्याण-भिवंडी काबीज करून राजे तातडीने पुरंधरला आले. मकरसंक्रांत उजाडली. कल्याण-भिवंडीचा आनंद साऱ्यांच्या मुखांवर दिसत होता. कल्याणच्या प्रवासाने राजे थकले होते. दोन प्रहरी जेवण करून राजे आपल्या महालात गेले. पलंगावर विचार करीत राजे कलंडले असता केव्हा झोप लागली, तेही राजांना कळले नाही.

राजे अचानक जागे झाले. पश्चिमेच्या खिडकीतून सूर्यकिरणे आत आली होती. कानांवर डफ-तुणतुण्याचा आवाज येत होता. पोवाड्याचे शब्द कानांवर पडत होते.

राजे ऐकत होते. पोवाडेवाला कल्याण-खजिन्याचा भाग ऐकवीत होता:

‘...राजांच्या पुढे अगणित दौलत ओतली होती. ती दौलत बघून सारे दिपले होते. आबाजी सोनदेवांनी राजांना सांगितले, ‘याहीपेक्षा नामी रत्न मिळाले आहे. आज्ञा असेल, तर हजर करतो.’ राजांनी मान डोलविली; आणि सुभेदाराची सून दरबारात आली. तिलोत्तमा, उर्वशी, रंभा या साऱ्यांनी लाजावे, असे तिचे सौंदर्य होते. राजा ते पाहून थक्क झाला. बसल्या जागी त्याचा कंठ दाटून आला. तो म्हणाला, ‘सोनदेव! हे काय केलंत? परस्त्री म्हणजे माता. तिची बेइज्जत का केलीत?’ राजांनी सांगितले, ‘आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या, तर आम्हीदेखील असेच सुंदर निपजलो असतो.’ राजांनी आई म्हणून तिचा सन्मान केला. राजाच्या पराक्रमाने पातशाहीला कापरा भरला. पातशाही थरारली...’

राजांना ते ऐकणे असह्य झाले. उठत त्यांनी हाक मारली, ‘कोण आहे?’

हुजऱ्या आत आला. संतप्त राजांनी विचारले,

‘काय चाललंय् खाली?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मासाहेब पोवाडा ऐकतात!’

मासाहेबांचे नाव ऐकताच राजांचा संताप निवळला.

भराभर जिना उतरून ते खाली गेले. चौकाच्या प्रवेशद्वारातच त्यांची पावले अडखळली.

उजव्या हाती तुणतुणे घेऊन, डावा हात कानांवर ठेवून शाहीर चौकात पोवाडा म्हणत होता. पाठीमागच्या इसमाने डफाची साथ धरली होती. चौकसोप्यावर चिकाच्या पडद्याआड जिजाबाई, सईबाई ऐकत बसल्या होत्या. राजांना पाहताच राजस्त्रिया पदर सावरून उभ्या राहिल्या. जिजाबाईंचे लक्ष मागे गेले. त्या उठल्या. लोड ओलांडून त्या राजांच्या जवळ आल्या. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, तुमचाच पोवाडा ऐकतोय् आम्ही.’

‘ते ऐकूनच आम्ही खाली आलो. मासाहेब, असले सवंग पोवाडे कसले ऐकता? साधी नावं सुद्धा बरोबर घेता येत नाहीत. आबाजी महादेवाचा चक्क आबाजी सोनदेव केला. असले पोवाडे ऐकण्यात कसला आनंद?’

‘तुम्ही आई झाला असतात, म्हणजे कळलं असतं.’

‘मासाहेब, शाहिराचं कवन ऐकून आमची मान शरमिंदी झाली.’

‘मला ते कळत नाही. राजे, आता पोथ्या-पुराणांचादेखील कंटाळा येऊ लागला आहे. तुझा लौकिक ऐकताच कान तृप्त होतात. तोच ऐकत राहावंसं वाटतं.’

‘पण, मासाहेब! जे ऐकता, ते खरं नाही.’

‘कुणास माहीत? त्याच्या वाणीत भविष्य बोलत असेल.’

राजे निरुत्तर झाले. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपल्याला आनंद असेल, तर आपण ऐका.’

‘तुम्ही ऐकत नाही?’ मासाहेबांनी विचारले.

राजे स्मितवदनाने म्हणाले, ‘नाही म्हटलं, तर, ऐकावं लागेल, असं दिसतं. शाहिराचा आवाज तेवढा भक्कम आहे. आम्ही नंतर येऊ.’

राजे परत आपल्या महाली गेले. शाहिराचा पोवाडा संपल्यावर राजे खाली आले. चौकात राजांना पाहताच शाहिराने मुजरा केला. राजे म्हणाले,

‘शाहीर, तुम्ही चांगलं कवन करता. परवा घडलेल्या प्रसंगावर आज कवन करूनही मोकळे झालात.’

शाहिराला अंदाज लागत नव्हता. राजांनी विचारले,

‘शाहीर, पातशाहीत कवनं केली असतील ना?’

‘जी! केलीत ना, महाराज! पन्नास होन बिदागी दिली. आपला लौकिक...’

‘समजलं.’ राजे त्याला बोलू न देता म्हणाले.

मागे उभ्या असलेल्या पंतांना राजे म्हणाले, ‘पंत, यांना पंचावन होन बिदागी द्या.’

राजे फिरले. मासाहेब व राजस्त्रिया आत जायच्या तयारीत होत्या. राजांच्या चेहऱ्यावर हसू होते. लक्षात येऊन जिजाबाईंनी विचारले,

‘का हसता?’

‘मासाहेब, इथं जशी आज पातशाही थरथरली, तशीच पातशाहीत शिवशाही थरथरली असणार.’

‘तुझं नेहमी असंच!’ जिजाबाई रागाने म्हणाल्या, ‘असू दे! पण आम्हांला पोवाडा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आवडला.'

'रागावू नका, मासाहेब! स्तुती कोणाला आवडत नाही? पण ती मनाला पटायला हवी! अधिकारवाणीनं यायला हवी!'

'नशिबात असेल, तर तेही ऐकू.'

'का नाही?' राजे आत्मविश्वासाने म्हणाले, 'मासाहेब, आम्ही वचन देतो. एक ना एक दिवस ती आम्ही जरूर तुम्हांला ऐकवू; आणि ती स्तुती ऐकत असता तुमच्या बरोबरच आमचेही कान तृप्त करून घेऊ.'

त्यानंतर चारच दिवसांत आबाजी महादेव गडावर आले. राजांना ते म्हणाले,

'राजे! आपल्या आज्ञेप्रमाणे गलबतं बांधण्यात हुशार असे कारागीर आले आहेत.'

'छान! कुठं आहेत?'

'खाली माचीवरच्या धर्मशाळेत उतरलेत!'

'किती आहेत?'

'चारशे!'

'ठीक! त्यांची व्यवस्था ठेवा. आम्ही सकाळी भेटू.'

साऱ्या गडावर तो कौतुकाचा विषय बनला. चारशे फिरंगी एका वेळी कधी पाहायला मिळाले नव्हते. सारा गड त्यांना पाहण्यास लोटला होता. जिजाबाईंनी विचारले,

'राजे! एवढे फिरंगी कशाला गोळा केलेत?'

'मासाहेब! आमची हद्द सागरापर्यंत पोहोचली. सागरकिनारा राखायचा, तर गलबतं उभी करायला नकोत? हे फिरंगी त्यात निष्णात आहेत. त्यांची नेमणूक आम्ही करणार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहोत.’

दुसऱ्या दिवशी चारशे फिरंगी राजवाड्यात आले. आपल्या भव्य टोप्या काढून त्यांनी कुर्निसात केला. त्यांचा प्रमुख पुढे आला. आबाजींनी ओळख करून दिली,

‘महाराज, हा लुई व्हर्तांव. जहाजं बांधण्यात निष्णात आहे.’

राजे लुई व्हर्तांवला पाहत होते. राजे प्रश्न विचारीत होते. दुभाष्या भाषांतर करीत होता. लुई व्हर्तांवच्या उत्तराने राजे प्रसन्न झाले. साऱ्या फिरंग्यांना भरपूर द्रव्य देऊन राजांनी त्यांना नोकरीत घेतले. कल्याणकडे जाण्याची आज्ञा दिली. फिरंगी गेले. राजे आबाजींना म्हणाले,

‘आबाजी, फिरंग्यांना जे लागेल, ते द्या. शक्य तो लौकर आमची संगमेश्वरी जहाजं तयार करून घ्या. त्यांच्या कामात खोटी पडू देऊ नका... आणि एक लक्षात ठेवा- त्यांच्या हातांखाली जी माणसं द्याल, ती हुशार, हरहुन्नरी निवडून द्या. एकही साधा माणूस त्यांच्या हातांखाली घालू नका.’

फिरंगी राजांचा निरोप घेऊन दुसऱ्या दिवशी कल्याणच्या वाटेला लागले.

कल्याणला गलबते बांधायला सुरुवात झाली. बातम्या येत होत्या आणि अशीच एक बातमी गडावर आली. राजे तातडीने कल्याणला गेले. आबाजी महादेव चिंताचूर होते. राजांनी विचारले,

‘आबाजी, काय झालं?’

‘महाराजा, फिरंग्यांना अगदी ऐश्वर्यात ठेवलं होतं. त्यांच्या सर्व मागण्या पुरवल्या होत्या. कामही ते निष्ठेनं करीत होते. पण एके दिवशी गोव्याहून एक फिरंगी आला. त्यानं काय कान भरवले, कुणास ठाऊक! रातोरात सारे फिरंगी आपलं सामान टाकून पळून गेले. मुंबईला ते गेले, अशी बातमी आहे.’

राजे शांत होते. त्यांनी विचारले, ‘मग गलबतांचं काम?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बंद आहे. त्याचमुळं आपणांस त्रास द्यावा लागला.’

‘चला, पाहू.’

राजे आबाजींसह खाडीवर आले. गलबतांच्या बांधणीसाठी प्रचंड आकाराची पायाड उभी केली होती. सारा किनारा भरला होता. लाकडाच्या फळ्यांचे ढीग लागले हाते. गलबतांच्या सामानाने केवढा तरी पसारा मांडला होता.

‘कामावर किती माणसं होती?’

‘दीड हजारांवर कामगार आहेत.’

‘सारे पारखलेले आहेत?’

‘जी!’

‘लुई व्हर्तांविच्या हातांखाली कोण होतं? त्यांना बोलवा.’

लुईंच्या हातांखाली काम करणाऱ्यांना राजांच्या समोर हजर केले.

‘आम्ही ही गलबतं पुरी करायला सांगितली, तर कराल?’

म्होरक्या म्हणाला, ‘राजे, संधी मिळाली, तर फिरंग्यांपेक्षा नामी गलबतं तयार करू.’

‘ठीक आहे. गलबतांचं काम सुरू करा. काम चांगलं झालं, तर आमच्या आरमाराचं काम तुम्हांला देऊ.’

आबाजी आश्चर्यचकित होऊन ऐकत होते. राजे म्हणाले,

‘आबाजी! त्यात आश्चर्य कसलं? जेव्हा फिरंगी आले, तेव्हाच असं काही तरी होईल, याची अटकळ आम्हांला होती. त्यासाठीच हरहुन्नरी माणसं नेमायला सांगितली होती.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पण फिरंगी गेले का?’

‘का? फिरंग्यांच्यांत आणि आमच्यांत फार फरक आहे, आबाजी! प्रत्येक फिरंगी आपल्या देशाशी इमान राखून आहे. म्हणूनच एवढ्या दूरवर येऊन ते राज्य करतात. त्यांना निरोप गेला असेल. आज ना उद्या आमच्याशी त्यांची लढत होणार, हे फिरंगी राज्यकर्ते ओळखून आहेत. उद्याच्या शत्रूला मदत करण्याइतके का ते मूर्ख आहेत? त्यांना नुसता निरोप आला, आणि भवितव्याची चिंता न करता, आपल्या राज्याशी इमानी असलेले फिरंगी आमची नोकरी सोडून गेले. त्याच्या उलट आमचं. आमची माणसं पातशाहीची नोकरी पत्करून, आमचेच शत्रू होऊन आम्हांवर चालून येतात. शत्रू म्हणून त्यांच्याशी आम्हांला लढावं लागतं- आबाजी! ही गलबतं पुरी झालीच पाहिजेत! त्या कामात आता व्यत्यय येऊ देऊ नका.’

बंद पडलेले गलबतांचे काम सुरू करून राजे परत आले.

राजे गडावर आल्यानंतर थोड्याच दिवसांनी त्यांनी माहुलीवर हल्ला करून माहुली काबीज केली. निजामशाहीशी टक्कर देताना शहाजीराजांनी तो शेवटचा किल्ला लढविलेला होता.

राजांच्या विजयाने मराठी राज्याच्या सीमा आता चौफेर वाढल्या होत्या. ते राज्य बंदिस्त व सुरक्षित करणे आवश्यक होते. शामराज नीळकंठाच्या जागी मोरोपंत पिंगळ्यांची पेशवे म्हणून नेमणूक केली होती. निळो सोनदेवांना मुजुमदार नेमले. नेताजी पालकर सरनोबत होते. आबाजी महादेवांना सुरनीस म्हणून नेमून घेतले.

राजांचे घोडदळ दहा हजारांचे झाले होते. तेवढेच पायदळ होते. त्यावर येसाजी कंक याची नेमणूक केली होती. गडांची संख्या चाळिसावर गेली होती. राजे सदैव मोहिमांत गुंतलेले. त्यामुळे कारभाराची देखरेख, न्यायनिवाडे खुद्द जिजाबाईंनाच पाहावे लागत. दप्तर आधीच राजगडावर गेले होते. जिजाबाईंचा मुक्काम राजगडावर हलला, त्या वेळी राजे कर्नाटकच्या दुसऱ्या मोहिमेत गुंतले होते.

राजे कर्नाटकातून जेव्हा आले, त्या वेळी राजांच्या या वाढत्या पराक्रमाने विजापूर दरबार आणि मोगलाई पुरी अस्वस्थ झाली होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

उत्तरेकडे जाण्यासाठी अधीर बनलेला औरंगजेब बऱ्हाणपूरला गेला होता. जुन्नर, नगर लुटल्याचा संताप त्याच्या मनात होता. राजांनी आपले वकील पाठवून त्याचा राग शांत करण्याचे धोरण चालू ठेवले होते.

महंमद आदिलशहा वारल्यानंतर विजापूरला पुष्कळ बदल झाले. विजापूरची सर्व सत्ता आदिलशहाची बेगम बडी साहेबीण हिच्या हाती आली. विजापूर दरबारच्या पूर्वीच्या राजवटीतील एकेक मुत्सद्दी तिने बळी घेतला. खान महंमदास तिने मारविले. नंतर बहलोलखान तिने मारविला. ज्या फत्तेखानाने पुरंधरला वेढा घातला होता, त्याला विजापुरास विष देण्यात आले. यामुळे विजापूरच्या दरबारचे वजन कमी झाले. या परिस्थितीचा फायदा घेऊनच शिवाजीराजांनी कर्नाटकच्या मोहिमा आखल्या. राजांच्या वाढत्या पुंडाईने त्रस्त होऊन विजापूर दरबारने शहाजीराजांना मुलाला आवरायला सांगितले; पण शहाजीराजांनी आपला मुलगा व पत्नी आपल्या कह्यात नाहीत, त्यांचे दरबार हवे ते करू शकतो, असे सांगून शिवाजीराजांच्या कृत्यांतून आपला हात काढून घेतला. उलट, शिवाजीच्या भागात चांगले सुभेदार नेमण्याची सूचना केली. त्यानुसार बड्या साहेबिणीने विजापूरचा बलवत्तर खान अफझल यास परत सुभेदार नेमले. कुडाळ सावंत कोकणात बलवत्तर होते. म्हणून त्यांचे पारिपत्य करण्यासाठी रणदुल्लाखानाचा मुलगा रुस्तुम जमा याची नेमणूक केली.

कुडाळकर लखम सावंत हा आदिलशाहीतील वतनदार देसाई; पण काहीसा स्वतंत्र बाण्याचा. शृंगारपूरचे सुर्वे, गोवलेकर, सावंत ही मंडळी अशीच स्वतंत्र बाण्याने राहणारी होती. रुस्तुम जमा आपल्यावर चालून येतो, हे कळताच कुडाळकर लखम सावंतांनी रुस्तुम जमाला तोंड देण्याची तयारी केली. रुस्तुम जमाने चढाई करून रांगणा किल्ला काबीज केला. कुडाळचे खेम सावंत व लखम सावंत यांनी धैर्याने लढाई चालू ठेवून शिवाजीराजांच्याकडे आपला वकील पितांबर शेणवी यास पाठवून राजांचे साहाय्य मागितले. राजांनी सावंतांना अभय दिले. राजांचे आणि लखम सावंतांचे सैन्य एक होऊन त्यांनी रुस्तुम जमाचे संकट परतविले. सावंतांचा गेलेला सर्व मुलूख परत मिळवून दिला. त्याबद्दल फोंडा किल्ला व त्याभोवतालचा तालुका राजांना देऊन सावंतांनी राजांचे मांडलिकत्व पत्करले. कुडाळ सावंत स्वराज्याचे पहिले मांडलीक बनले. जावळीइतकाच दुर्गम आणि आदिलशाहीला जवळचा असा हा महत्त्वाचा कुडाळ प्रांत शिवाजीराजांच्या लगामी आला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कुडाळ सावंतांना अभय देऊन राजांनी तळे घोसाळे जिंकले. परत येत असता गोवलेकर सावंत राजांच्या भेटीस आले. राजांनी त्यांचा बहुमान केला. त्यांना नावाजून आपल्या पदरी ठेवून घेतले. त्यांजपाशी एक नामांकित तलवार होती. गोवलेकर सावंतांनी ती धोप तलवार राजांना नजर केली. फिरंगी बनावटीचे ते अप्रतिम हत्यार पाहून राजे खूश झाले. ते म्हणाले,

‘सावंत, ही फिरंगी पाहून आम्ही प्रसन्न आहोत; पण शस्त्र हे जिंकायचं तरी असतं, किंवा खरीदायचं तरी असतं. हा मैत्रीचा गुंता पडला आहे. तो सोडवायचा कसा?’

राजांनी या तलवारीसाठी तीनशे होन व मानाचा पोशाख देऊन सावंतांना गौरविले. राजांनी फिरंगीचे नाव ‘भवानी तलवार’ असे ठेविले.

एकापाठोपाठ झालेल्या ह्या मोहिमांमुळे राजांच्यावर पुष्कळ ताण पडला. राजांना बरे वाटेना. वैद्यराजांनी विश्रांतीचा सल्ला दिला. राजांनी विश्रांतीसाठी हरिहरेश्वर निवडले. समुद्रकाठी तीर्थाच्या जागी राजे जाऊन राहिले. ज्वर गेला; पण अशक्तपणा वाढत होता. राजे पालखीतून राजगडावर आले. राजांच्या आजाराची बातमी समजताच पुरंधराहून राणीवसा गडावर हजर झाला. हळूहळू राजे हिंडू फिरू लागले. एके दिवशी शहाजादा औरंगजेबाचा वकील फर्मान घेऊन गडावर आला. औरंगजेब बापाच्या पारिपत्यासाठी दिल्लीला निघाला होता. त्याने राजांना लिहिले होते-

> ‘हा फरमाना पोहोचताच तुम्ही आम्हांस मिळावे. आपल्याला येणे शक्य नसेल, तर आपले दिवाण शामराज नीळकंठ यांना फौज देऊन आमच्या साहाय्यासाठी पाठवावे. आमच्या हाती दिल्लीचे राज्य आले, की तुमच्या बापास नव्हती, अशी दौलत, मानमरातब तुम्हांस देऊ.’

राजांच्या नजीकच्या लोकांना हा बहुमान वाटला. राजांनी औरंगजेबास मदत करावी, असाही अनेकांनी सल्ला दिला. राजे हसले. म्हणाले,

‘तुरकास साहाय्य करणं उचित नव्हे. आमच्याकडून औरंगजेबास कोणतंही साहाय्य मिळणार नाही. आम्ही दिलगीर आहो.’

राजांचा जबाब घेऊन औरंगजेबाचा वकील परत गेला. त्याने औरंगजेबाला निरोप पोहोचविला. औरंगजेब संतापला. पण शिवाजीने केलेल्या अपमानाचा बदला घ्यायला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्याला उसंत नव्हती. हा दावा मनात ठेवून औरंगजेब बापाचे पारिपत्य करण्यासाठी आग्र्याची वाटचाल करू लागला.

औरंगजेब उत्तरेला गेला, आणि तीन महिन्यांच्या अवधीत त्याने बापाला कैदेत टाकून, भावांचा बीमोड करून, राज्य बळकाविले. औरंगजेब दिल्लीपती झाल्याची बातमी कळताच राजांनी औरंगजेबाच्या मनात कटुता न राहावी, म्हणून नव्या बादशहाच्या सन्मानार्थ आपले वकील सोनोजीपंत यांना दिल्लीला पाठविले.

सोनोजीपंत उत्तरेकडे पाठविल्याचे कळताच जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, तुमचा एक शह हलला.’

‘हलला नाही, मासाहेब. सध्यापुरता सोडवून घेतला. आमच्या वकिलाला पाहून औरंगजेब कटुता विसरेल, असं वाटत नाही; पण तो थोर मुत्सद्दी आहे. तो तसं निश्चित भासवील. तेवढं केलं, तरी सध्या ते आम्हांस पुष्कळ आहे. आम्हांस सध्या तरी औरंगजेबाची भीती नाही. पण...’

‘आता कोणाची भीती?’

‘विजापूर दरबारात आमच्याविरुद्ध वादळ उठण्याचा रंग दिसतो. विजापूरचा काळा ढग केव्हा बारिश करील, हे सांगत येत नाही. विजापूरचा प्रबळ सेनापती, पूर्वीचा वाईचा सुभेदार आमच्यावर स्वारी करण्याची संधी हुडकतो आहे. त्याच्याकडे आमचं लक्ष आहे.’

राजांना अफझलपेक्षाही जास्त चिंता वाटत होती सईबाईंची. सईबाई सारख्या आजारी पडत होत्या. हवाफेरासाठी राजांनी त्यांना नव्या बांधलेल्या प्रतापगडावर हलविण्याचे ठरविले.

□

१८

विजापूरचा दरबार तटस्थ होता. बादशहा अली आदिलशहा तख्तावर बसला होता.
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्याची नजर उजव्या हाताच्या जाळीदार पडद्यांनी आच्छादिलेल्या सज्जावर स्थिर झाली होती. याची आई बडी साहेबीण संतप्त होऊन सज्जात उभी होती. ज्या शिवाजीने आदिलशाहीचे गड काबीज केले, मुलुख बळकाविला, बंदरे ताब्यात घेतली- एवढेच नव्हे, तर आदिलशाही मुलुखात दोनदा चढाया करून लूट केली, गावे बेचिराख केली, कल्याणखजिना लुटला, त्या शिवाजीची गय करायची किती? बड्या साहेबिणीचा संयम सुटला होता. दरबारात शिवाजीच्या पराभवासाठी पैजेचे विडे ठेविले होते. तख्तापुढे नक्षीदार चौरंगावर सुवर्णतबकात ठेविलेले विडे साऱ्या दरबाराला आव्हान देत होते.

दरबारात अंकुशखान, रुस्तुम जमा, मुसेखान, याकुतखान, सिद्दी हलाल यांच्यासारख्या प्रतिष्ठेच्या सरदारांबरोबरच विजापूरचे इमानी सेवक बाजी घोरपडे, मंबाजी भोसले, झुंजारराव घाटगे हेही हजर होते. सारे चूपचाप हात बांधून हजर होते. साऱ्यांच्या नजरा जमिनीला खिळल्या होत्या. विड्यांकडे पाहण्याचे धैर्य एकालाही नव्हते. उलटणाऱ्या क्षणाबरोबर बड्या बेगमेचा संताप वाढत होता. तिचा कणखर आवाज साऱ्या दरबारात उमटला होता-

‘उसने अजमते शाही को ललकारा है. राज्य आणि धर्म यांच्यासाठी त्याचा पराभव झालाच पाहिजे. हे आव्हान स्वीकारणाऱ्या वीरासाठी दरबारचे विडे हजर आहेत.’

बेगमेची नजर दरबारावरून फिरली. तिने पुन्हा पुकारले,

‘कौन है वह नाराये तकवीर बुलंद करनेवाला मुजाहिद?’

सारे चूपचाप होते. अधोवदन उभ्या असलेल्या सरदारांना नजरेखालच्या गालिच्यांवरून पावले रुतत जाताना दिसली. माना वर होऊ लागल्या. साऱ्या दरबारावर बेगुमान नजर फेकून खान अफझल तख्ताकडे जात होता. अफझलचा देह धिप्पाड होता, उंचापुरा होता. चेहऱ्यावर राकट मगरुरी होती. डोळ्यांत आत्मविश्वास होता. पाठीवरून जमिनीपर्यंत रुळणारी जरी खिलत उजव्या हाताने सावरीत, डावा हात तलवारीच्या मुठीवर ठेवीत खान तख्तासमोर उभा राहिला. बादशहाला मुजरा करून त्याने साऱ्या दरबारावरून एक तुच्छतेची नजर फिरविली; व तो गर्जला,

‘जिल्ले सुभानी, बंदा पायांशी हजर आहे. गर्दन मारण्याच्या हुकुमाची फक्त वाट पाहतो आहे. हुजुरांनी त्या मनहूसचं क्षुद्र नाव घोषित करावं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शीवा... गद्दारे दक्कन!’

खान हसला. तो म्हणाला,

‘बस्स? आणि एवढ्यासाठी आमच्या दरबारी एकही सरदार नाही? यह मजाल! बेगम हुजूर, आदिलशाही सलतनीत काट्याप्रमाणे सलत असलेल्या या क्षुद्र सीवाचा मी पूर्ण बीमोड करीन. सीवा, सीवा तो काय? चढे घोडियानिशी काबीज करून त्याला ह्या तख्तासमोर हजर करतो.’

...आणि पाहता-पाहता आपल्या पोलादी पंज्याने खानाने तबकातले विडे उचलले.

साऱ्या दरबारचा भार उतरला. ‘सुभानऽल्ला! सुभानऽल्ला!!’ असे उद्गार प्रकटू लागले. साऱ्या दरबारात रिवाज विसरून एकच जल्लोश झाला! बादशहाने खानास अनेक भारी वस्तू भेट म्हणून दिल्या. त्यांत एक रत्नजडित म्यानाची तेजस्वी कट्यार होती. ती खुद्द बादशहाची होती.

विजापूर दरबारने खानाला अनेक सरदार दिले. मुसेखान, हसनखान, सिद्दी हिलाल, अंकुशखान या सरदारांबरोबरच पांढरे नाईक, घोरपडे, मंबाजी भोसले, प्रतापराव मोरे यांच्यासारखे हिंदूही होते. खानाचा मुलगा फाजलखान आपल्या दोन भावांसह खानाबरोबर होता.

विजापुराबाहेर खानाची छावणी तयार होत होती. आपापली पथके घेऊन सरदार सामील होत होते. उंट, हत्ती, घोडी यांनी छावणी ठायीठायी सजली होती.

छावणीची तयारी होताच एके दिवशी छावणी उठली. तुताऱ्या, नगारे झडू लागले. चांदताऱ्याने सुशोभित झालेला आदिलशाही हिरवा ध्वज आघाडीच्या हत्तीवर फडकत होता. बिनीच्या हत्तीमागे लागलेल्या हत्तींच्या मालिकेतल्या एका हत्तीवर चांदीची अंबारी तळपत होती. खान तीत दिमाखाने बसला होता; हत्तीवरून आपल्या मागे-पुढे पसरलेल्या सैन्यावर नजर टाकीत होता. शंभर हत्तींच्या गळ्यांतल्या घाटांच्या आवाजात हजारो उंटांच्या साखळ्यांचा आवाज मिसळत होता. चित्रविचित्र रंगांनी सुशोभित केलेले खानाच्या जनानखान्याचे मेणे भोयांच्या हुंकारावर दौडत होते. अवजड तोफांचे गाडे हत्ती खेचत होते. छावणीचे सामान लादलेल्या गाड्यांची रांग दृष्टिपथातही येत नव्हती. सरत्या उन्हाळ्याची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तगमग होत असता खानाचे प्रचंड, सुसज्ज सैन्य शिवाजीच्या पारिपत्यासाठी धुळीचे लोट उडवीत जात होते.

विजापुरापासून अवघ्या दोन-अडीच कोसांवर खानाने प्रथम छावणी केली. रात्री खानाने आपल्या शामियान्यात साऱ्या सरदारांना एकत्र केले. खानाचा वकील कृष्णाजी भास्कर खानाशेजारी उभा होता. खानाने सर्वांवरून नजर फिरविली. तो म्हणाला,

'आम्ही शिवाजीवर नजीकच्या मार्गानं चालून जाणार नाही. तुळजापूर, पंढरपूर यांवरून वाईला जायचा आमचा मनशा आहे.'

'बेअदबीका कसूर माफ, आब्बाजान! लेकिन नजदिकी रास्ता छोड यह राहे दराजकी जरुरत क्या?'

अफझलखानाच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. आपल्या दाढीवरून हात फिरवीत कृष्णाजी भास्कराकडे पाहत खान म्हणाला,

'बारिश केव्हा सुरू होईल, हे सांगता येत नाही. आमचा कबिला, छावणी मोठी. वाटेत पाऊस आला, तर कठीण प्रसंग येईल. पंढरपूरचा मार्ग कोरडा आहे. वाईपर्यंत तरी पावसात सापडण्याची आमची इच्छा नाही.'

साऱ्यांनी माना डोलविल्या. खानाच्या मनातले बेत तसेच लपून राहिले. दुसऱ्या दिवशी खान आपल्या सैन्यासह तुळजापूरच्या वाटेला लागला.

तुळजापूर दिसू लागले, डोंगरकपारीत वसलेले. भवानीच्या मंदिराचा कळस नजरेत येत होता. तुळजापूर चिमुकले गाव. खान येतो, हे कळताच भयभीत झालेले तुळजापूरचे लोक सैरावैरा पळत सुटले. खान तुळजापूरला आला. हत्ती बसताच शिडी लावण्यात आली. खान उतरला. तुळजापूरवरून नजर फिरवीत खानाने विचारले,

'या जागेला हिंदू लोक फार मानतात ना?'

कृष्णाजी भास्कराला थोडी कल्पना आली होती. तो हात जोडून म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘खानसाहेब, आम्हां हिंदूंना या जागेइतकी दुसरी पवित्र जागा नाही. जशी आपल्याला मक्का...’

‘खामोश! आमच्या मक्केची तुलना काफिरांच्या तुलजेबरोबर करता? हाच तो शिवाजीचा देव ना?’

‘जी! खानसाहेब, या स्थानाला धक्का लागला, तर आपले हिंदू सरदार बिथरतील!’ कृष्णाजी भास्कराने दुसरा डाव टाकला.

खान गर्जला,

‘आमच्याविरुद्ध बिथरण्याची ताकद कुणाला आहे? गर्दन मारू! कृष्णाजी, आम्ही वाईचे सुभेदार होते. आम्ही एका देवळाला हात लावला नाही; बुतशिकनी केली नाही. नतीजा, शिवाजी शिरजोर झाला. काफिर माजले. नाही, कृष्णाजी! आता मुतलक लिहाज नाही. हा अफझल म्हणजे दिनदार कुफ्रशिकन! दिनदार बुतशिकन! कातिले मुतमर्तीदान!’

अफझलखानाचे खरे रूप प्रकट झाले होते. अफझल म्हणजे इस्लामचा बंदा. काफिरांचा कर्दनकाळ! बंडखोरांचे शिरकाण करणारा. खानाने तुळजापुराकडे बोट दाखविले व तो ओरडला,

‘बेचिराख करा! लुटा!’

एवढ्याशा गावावर ‘दीन! दीन!’ म्हणत खानाचे सैन्य तुटून पडले. एखाद्या सशावर दहा-बारा कुत्री एकदम तुटून पडावी, आणि पाहता-पाहता ससा दिसेनासा व्हावा, तसे तुळजापूर दिसेनासे झाले. खान धीमी पावले टाकीत पायऱ्या उतरून गेला. देवीच्या देवळातील भोपे खानाच्या पुढे आले; पण खानाने त्यांना हाकलून दिले. दिसेल ती मूर्ती फोडीत खानाने देवळात प्रवेश केला. तुळजापूरभवानी सामोरी उभी होती. अष्टभुजा. पायांशी तिने महिषासुर धरला होता. हातातले शस्त्र महिषासुराला छेदीत होते. शांत नजरेने देवी समोर ठाकलेल्या अफझलकडे पाहत होती.

देवीकडे पाहत खान मोठ्याने हसला. साऱ्या गाभाऱ्यात तो आवाज घुमला. खान ओरडला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ऐ बुते काफरान! बताव मुझे तेरी करामत! बताव तेरी अजमत!’

खानाचे हात उचलले गेले. मूर्तीवर घाव पडला. तुळजाभवानी कलली, भंगली, फुटली. प्रत्येक प्रहाराबरोबर खान हसत होता. देवीचे तुकडे, ठिकऱ्या उडत होत्या. देवीचे देऊळ लुटले गेले. खानाने देवीसमोर गाय मारली. खानाचा राग शांत झाला.

खानाला आता दिसत होते पंढरपूर!

□

१९

शिवाजी महाराजांचा मुक्काम राजगडाच्या पायथ्याशी राजांनीच बसविलेल्या शिवापट्टण गावाला होता. सईबाईंची दिवसेंदिवस खालावत जाणारी तबियत पाहून राजांनी हवाफेर म्हणून त्यांना जिजाबाईंच्यासह प्रतापगडावर पाठविले होते. तिथे काही बदल घडला नाही, म्हणून राजगडाच्या पायथ्याशी शिवापट्टणात बांधलेल्या वाड्यात सईबाईंना आणून ठेविले होते. संभाजीराजे पावले टाकीत होते; पळत होते आणि सईबाईसाहेब अंथरुणाला खिळल्या होत्या.

राजे सईबाईंच्या महाली होते. दोन दिवस आलेल्या ज्वराने सईबाई जास्तच अशक्त दिसत होत्या. सईबाईंच्या शेजारी बसलेल्या राजांनी विचारले,

‘सई, तुला कंटाळा आला असेल, तर बुद्धिबळं मांडू या का?’

सईबाई म्हणाल्या, ‘नको. आता फार वेळ बसवत नाही. डाव पुरा न करता उठलं, तर तुम्हांला आवडत नाही.’

राजे हसून म्हणाले, ‘हा आमच्या आवडीचा प्रश्न नाही. तुम्हांला बरं वाटण्याचा प्रश्न आहे.’

सईबाई खिन्नपणे हसल्या. त्या म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मला वाटत नाही, मी यातून उठेन, म्हणून!’

राजे त्या बोलांनी व्यथित झाले. ते म्हणाले,

‘सई, असं बोलू नको! वैद्यराजांनी सांगितलं आहे, लौकर बरं वाटेल.’

राजांचा व्यथित चेहरा पाहून सईबाई म्हणाल्या, ‘केव्हा तरी आजारपणाचा कंटाळा येतो, आणि असं बोलून जाते.’

राजांना काय बोलावे, सुचत नव्हते. त्या वेळी मनोहारी आत आली. राजे म्हणाले,

‘सई! आता आमचे कपडेलत्ते या मनोहारीलाच पाहावे लागतात.’

सईबाई हसल्या. त्या म्हणाल्या, ‘आपण तिला सांगता; पण बिचारीवर साऱ्यांचा रोष होतो. त्यापेक्षा धाकट्या राणीसाहेबांना सांगितलं, तर...’

‘सई! ही कामं सांगून वा ठरवून का होतात?’ राजे म्हणाले, ‘तुमच्याबरोबरच ही आली. हिला फारसं सांगावंही लागत नाही.’

मनोहारी स्तब्ध उभी होती. सईबाईंनी विचारले,

‘का आली होतीस, मनू?’

‘मासाहेब इकडे येताहेत!’

राजे गडबडीने उठत म्हणाले, ‘मग आल्याबरोबर सांगायचं नाही? शहाणीच आहेस!’

सईबाईंच्या चेहऱ्यावर हास्य विलसले. तोच जिजाबाई आत आल्या. त्यांच्या पाठोपाठ दोन दासी होत्या. सईबाईंच्या जवळ येऊन दासींनी सईबाईंची दृष्ट काढली. लिंबे उतरून घेतली. अंगारा लावला. जिजाबाई म्हणाल्या,

‘शिंगणापूरचा प्रसाद आला. हिच्यासाठी अभिषेक सांगितला होता. तो तरी नवसाला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पावतो का, पाहायचं!'

राजे काही बोलले नाहीत. जिजाबाईंनी विचारले,

'खानाची काही बातमी?'

'खानानं विजापूर सोडलं आहे.' राजे म्हणाले.

'फिरंगोजींना तुम्ही बोलावलंत?'

'हो... आलेत?'

'मघाशीच आले. तुम्ही इथं होता. आम्हांला भेटले.'

राजे गडबडीने बाहेर गेले. सदरेवरून हसणे उठत होते. राजे सदरेवर गेले. त्यांचे पाय जागच्या जागी खिळून राहिले. फिरंगोजी ओणवे झाले होते. त्यांच्या पाठीवर शंभूबाळ बसले होते. बाजूला उभे असलेले शामराजपंत, अण्णाजी, तानाजी राजांना पाहताच चपापून उभे राहिले. फिरंगोजींच्या लक्षात येऊनही त्यांना उठता येत नव्हते. पाठीवर शंभूराजे होते ना! राजांना हसू आवरणे कठीण झाले. पुढे होऊन त्यांनी शंभूराजांना उचलले. उठत असलेल्या फिरंगोजींच्याकडे पाहत राजे म्हणाले,

'शंभूबाळ! आजोबांचा घोडा करतात का?'

संभाजीराजे आनंदाने हसले आणि ते उभ्या असलेल्या फिरंगोजींच्याकडे झेपावले. फिरंगोजींनी त्यांना घेतले. राजे म्हणाले,

'फिरंगोजी, राजांना तुमचा भलताच लळा लागलेला दिसतो.'

'दोन वर्षांची उमर! पण माणसांची चांगली ओळख ठेवतात.' फिरंगोजी म्हणाले. फिरंगोजींच्या काखेतून शंभूबाळ खाली उतरले आणि दौडत आत गेले.

राजे खाशा सदरेत आले. फिरंगोजी, तानाजी, रघुनाथपंत ही मंडळी मागोमाग होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे बैठकीवर बसले. फिरंगोजींनी विचारले,

‘राजे, आठवण बरी केलीसा?’

‘फिरंगोजी, माणकोजी- ही मंडळी मोठी! आधाराची! संकटाच्या वेळी तुमची आठवण करायची नाही, तर कुणाची करायची?’

‘संकट काय, पाचवीलाच पुजलंय्!’ फिरंगोजी म्हणाले.

‘तसं नव्हे, नरसाळा!’ माणकोजी दहातोंडे म्हणाला, ‘विजापूरचा अफझलखान- वाईला सुभेदार व्हता त्यो- विजापुरास्नं निघालाय्!’

‘कशाला?’

‘तुला लगनाचं आवातनं द्यायला!’ माणकोजी चिडले. सारे हसले.

राजे म्हणाले,

‘माणकोजी, आमचे फिरंगोजी एकदम साधे. त्यांना असं आडवाटेचं बोलणं कळत नाही- फिरंगोजी, अफझलखान आमच्यावर स्वारी करण्यासाठी निघाला आहे. दहा हजार फौज आहे. तेवढंच घोडदळ आहे.’

‘आणि?’ फिरंगोजींनी टाळा वासला.

‘एवढंच नव्हे, तर विजापूर दरबारात आम्हांला चढे घोड्यानिशी पकडून आणतो, म्हणून पैजेचा विडा उचललाय् त्यानं.’

फिरंगोजीच्या मिशा थरथरल्या. पालथी मूठ गलमिशांवरून फिरवीत फिरंगोजी म्हणाले,

‘वाट बग, म्हनावं! शिवाजी सोडच; तेच्या घोड्याचा नाल गावनार न्हाई, म्हनावं!’

‘बसल्या जागी संतापून संकट निवारण होत नाही, फिरंगोजी!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मग काय करावं, सांगा!’

‘खानाची तयारी ऐकली, तर खान सामोपचारानं फिरेल, असं दिसत नाही. त्याचा तो इरादा नाही.’

विश्वासराव आल्याची वर्दी घेऊन नोकर आत आला. विश्वासराव म्हणजे राजांच्या नजरबाज खात्याचा बहिर्जीबरोबरचा हुद्देकरी. विश्वासराव जेव्हा आत आले, तेव्हा आतल्या दरवाज्याने जिजाबाईही आल्या. विश्वासरावांनी मुजरा केला. जिजाबाई म्हणाल्या,

‘विश्वासराव, काही चांगली बातमी आणलीत ना?’

विश्वासराव काही न बोलता उभे होते. राजांनी विश्वासरावांना विचारले,

‘सांगा, विश्वासराव, काय झालं?’

‘महाराज, बातमी चांगली नाही! खान वाकडी वाट करून तुळजापूरला गेला.’

‘तुळजापूरला?’ मासाहेब उद्गारल्या.

‘हो! तुळजापूरला. खानानं तुळजापूर लुटलं. गाव बेचिराख करून खान भवानीच्या देवळात गेला. तुळजापूरची भवानी खानानं फोडली.’

जिजाबाईंचे डोळे भरून आले. राजांच्या उभ्या शरीरावर काटा फुलला. डोळ्यांत संताप उसळला. आपल्या मुठी आवळीत ते म्हणाले,

‘विश्वासराव, खानानं आमचं कुलदैवत फोडलं! आणि आम्ही ते शांतपणे ऐकतो आहोत! खानाची मजल इथवर जाईल, असं वाटलं नव्हतं.’

विश्वासराव म्हणाले, ‘राजे! तुळजापूर मारून खान पंढरपूरकडे वळला आहे.’

‘पापाचे घडे पुरे भरूनच खान येणार, असं दिसतं.’ जिजाबाई म्हणाल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो! त्याच्या पापाची आणि आमच्या दुबळेपणाची परीक्षा एकाच वेळी होणार, असं वाटतं. मासाहेब, खानाचा हा सामना अटीतटीचा दिसतो.’

‘ज्यानं भवानीला हात घातला, त्याच्यासंगं बोलणी करण्यापरीस चार हात केलेलं बरं!’ फिरंगोजी म्हणाला.

‘शाब्बास! फिरंगोजी, असे शब्द ऐकले, की जिवात जीव येतो. आपण शांतपणे विचार करू. आई बुद्धी देईल, तसं वागू.’ विश्वासरावांच्याकडे वळून राजे म्हणाले,

‘विश्वासराव, तुम्ही जा. खान कुठं जरी फिरला, तरी छावणी वाईलाच करील. त्याच्याच सुभ्याचं ते ठिकाण! पंढरपूरपासून वाईपर्यंत आपले नजरबाज पेरा. फकीर, संन्यासी- नाना वेषांत ही माणसं हिंडू देत. खान माणूसबळही करीत असेल. त्यातही आपली माणसं घाला. खानाची शिंकदेखील आम्हांला कळायला हवी!’

विश्वासराव मुजरा करून गेले. चिंताचूर जिजाबाईंकडे पाहून राजे म्हणाले,

‘मासाहेब, खान अवेळी येतो आहे, याबद्दल परमेश्वराचे आभार मानायला हवेत. हाच खान आधी आला असता, तर बाका प्रसंग होता.’

राजे काय म्हणतात, याचे कोडे सर्वांना पडले होते. राजे म्हणाले,

‘एवढा निसर्ग आमचा पाठीराखा असता, भ्यायचं कारण काय? खान कितीही लौकर आला, तरी तो वाईला पावसातच येणार! पावसाळा संपेपर्यंत त्याला हालचाल करता येणार नाही. तेवढी उसंत आपल्याला पुष्कळ आहे. फिरंगोजी, तुम्ही चाकणला जाऊन गडाच्या बंदोबस्तापुरती शिबंदी ठेवा. गड सुरक्षित करून उरलेल्या शिबंदीनिशी इकडे या. सोनोपंत, अशाच आज्ञा साऱ्या गडांवर पाठवा.’

दुसऱ्या दिवशी राजांचा शिवापट्टणचा मुक्काम राजगडावर हलला. गडाच्या बंदोबस्तीचे काम जारीने सुरू झाले, राजगडाच्या तिन्ही माच्यांचा बंदोबस्त केला गेला. गडावर सारख्या खानाच्या बातम्या येत होत्या. त्यांतच नको ती बातमी येऊन थडकली-

खानाने पंढरपूरच्या देवस्थानाला उपद्रव केला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

२०

गडाचे वातावरण चिंताचूर होते. गडावर जशा खानाच्या बातम्या येत होत्या, तशाच चांगल्याही बातम्या येत होत्या. राजांचे एक एक सरदार आपल्या अश्वपथकासह गडाकडे येत होते. पावसाने झड धरली होती. पश्चिमेचा वारा घोंघावत, थैमान घालीत होता. उभ्या सरी कोसळत होत्या. पण याला दाद न देता सरदार भर पावसात गड जवळ करीत होते. वाढत्या शिबंदीबरोबरच राजांचे बळही वाढत होते.

दोन प्रहरच्या वेळी कान्होजी जेधे आपल्या पाचही पुत्रांसह गडावर आल्याची बातमी सेवकाने दिली. राजे त्यांची वाट पाहत होते, त्या सरदारांत कान्होजी नव्हते. मग कान्होजी एवढ्या तातडीने आणि तेही आपल्या पाचही पुत्रांसह का यावेत? जिजाबाई आणि राजे या दोघांनाही त्याचे आश्चर्य वाटले.

जेधे सदरेवर आल्याचे कळताच राजांनी त्यांना बोलाविले. जेधे आपल्या पाचही मुलांसह आत आले. सर्वांनी जिजाबाईंना, राजांना मुजरे केले. राजांनी विचारले,

‘जेधे, भिजलात, वाटतं?’

जेधे म्हणाले, ‘राजे! कपडे भिजले, तर बदलता येतील. पण मन भिजलं, तर कसं बदलायचं?’

‘मन भिजायला काय झालं?’ राजांनी विचारले.

जेध्यांनी बादशाही फर्मान राजांच्या समोर टाकले; व ते म्हणाले,

‘हे शाही फर्मान आलं, आणि टाकोटाक पोरांच्यासह इकडे आलो.’

राजांनी सचिवांना बोलावणे पाठविले. सचिव आले. राजांनी फर्मानाकडे बोट दाखवीत सांगितले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पंत! फर्मान वाचा!’

पंच वाचू लागले.

> ‘सुलतान मुहंमद पातशहानंतर, ईश्वराच्या कृपेने अली आदिलशाहा पातशाह यांनी चंद्रसूर्यांवर सहीशिक्का मोर्तब केला आहे.
>
> मशहुशल अनाम कान्होजी जेधे देशमुख यांस हा फर्मान सादर केला जातो जे. सुहर सन तिसा खससैन्य व अलफ.
>
> शिवाजीने अविचाराने व अज्ञानाने निजामशाही कोकणातील मुसलमानांना त्रास देऊन, लूट करून पातशही मुलुखातील कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत. यास्तव त्याच्या पारिपत्यासाठी अफझलखान महंमदशाही यांस तिकडील सुभेदारी देऊन नामजाद केले आहे. तरी तुम्ही खानमजकुराचे रजामंदीत व हुकुमात राहून शिवाजीचा पराभव करून निर्मूळ फडशा करावा. शिवाजीच्या पदरच्या लोकांस आश्रय न देता त्यांस ठार मारावे व या आदिलशाही दौलतीने कल्याण चिंतावे. अफझलखान यांची शिफारस होईल, त्याप्रमाणे तुमची सर्फराजी केली जाईल. त्यांचे हुकुमाप्रमाणे वागावे. तसे न केल्यास परिणाम चांगला होणार नाही. हे जाणोन या सरकारी हुकुमाप्रमाणे वागावे.’

फर्मान वाचून संपले. सारे खामोश होते. ती शांतता सर्वांनाच असह्य वाटत होती. राजांनी त्या शांततेचा भंग केला. राजे म्हणाले,

‘कान्होजी, फर्मान सुरेख आहे. सचिव, फर्मानाकडे लक्ष द्या. इतक्या सुंदर तर्जुम्याचं फर्मान पाहायला मिळणंही कठीण!’

‘राजे, जिवाला गाठ पडलीय्; आणि फर्मानाचं कसलं कौतुक करता?’ कान्होजी म्हणाले.

राजे जिजाबाईंच्याकडे पाहत म्हणाले,

‘यात भिण्याचं काय कारण? खानापुढं आमची धडगत लागणं कठीण, हे फर्मानावरून सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ दिसतं. ज्या नावेत पाणी शिरतं, त्या नावेत कोणी बसायला धजेल का?’

‘राजे!’ कान्होजी उद्गारले, ‘म्हणून आम्ही खानाला मिळायचं?’

‘काय बिघडलं? आम्ही तरी तुमच्यासारख्या आपल्या माणसांना ‘या खाईत उडी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घ्या,' असं सांगणार नाही. आम्ही प्रसंग जाणतो. जीव वाचवणं हा काही गुन्हा ठरत नाही.'

'राजे, काय बोलता?'

'जगावेगळं आम्ही काहीच बोलत नाही. तुमचे शेजारी खंडोजी खोपडे, देशमुख, उत्रवळीकर कुठं आहेत? मसूरचे सुलतानजी जगदाळे देशमुख कुठं आहेत?'

कान्होजी चकित झाले. राजे म्हणाले,

'तुम्हांला माहीत नसेल, तर आम्ही सांगतो. अशीच शाही फर्मानं त्यांना गेली. ते जिवाच्या भीतीनं खानाकडे गेले. आज आमचे दोन्ही देशमुख खानाच्या तळावर आहेत. आम्ही त्यांचं काही करू शकत नाही. ते मात्र आमचं काय करणार आहेत, हे फर्मानात अगदी स्पष्ट आहे.'

'राजे, त्यांनी शेण खाल्लं, म्हणून आम्ही तेच करावं? निदान देवाधर्माची तरी...'

'देवाधर्माची चाड कुणाला आहे, जेधे?' राजे व्यथित झाले. 'जेधे, आपल्या कुलदैवतावर, तुळजापूरच्या भवानीवर त्या मदांधानं प्रहार केले. आमच्या विठोबाला उपद्रव दिला. त्याचे हात शाबूत कुणी राखले? घोरपडे, नाईकजी पांढरे, कल्याणजी यादव, झुंजारराव घाटगे, काटे, देवकाते, प्रतापराव मोरे, जावळीकर आणि कळस म्हणून आमचे खुद्द चुलतकाका मंबाजीराजे भोसले! ही सारी आपलीच माणसं ना? धर्म कोणाला हवा, जेधे? माझं ऐका. आमच्या वेडेपणाची कास धरू नका. तुम्ही फर्मानाप्रमाणं खानाला मिळा. तुम्ही फर्मानाचा अवमान केलात, तर वतनाला धक्का बसेल. तुमच्या जिवावर हे संकट आलं आहे. तुम्ही जा.'

राजे बोलत होते; पण राजांचा प्रत्येक शब्द जेध्यांचे काळीज पोखरीत होता. कान्होजी जेधे थरथरत म्हणाले,

'राजे, ही जेध्यांची अवलाद आहे. ती कधी बेइमान होईल? थोरल्या महाराजांची सेवा केली, ती फुकट? थोरल्या महाराजांनी बंगळूर सोडताना सांगितलं- तुम्हांला अंतर देऊ नये, म्हणून बजावलं. राजे! बेलरोटीची शपथ घेतलीय् मी! निमकहरामी आम्हांला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जमायची नाही, राजे!’

‘जेधे, आम्ही पोरवयाचे. पण तुम्ही जाणते, बहुत पाहिलेले. आमच्या पोरखेळात सामील होऊन कुठं तरी खस्त होऊन जाल.’

‘मराठ्याला कवापासून जीव एवढा मोठा झाला? जवा फर्मान आलं, तवा पोरांस्नी म्हणालो, ‘चला, पोरांनो! राजा दील, ती कामगिरी घेऊन घराला येऊ या!’ तवाच जिवावर पाणी सोडलं!’

‘वतन जाईल, जेधे!’ राजांनी शेवटचे डिवचले.

जेध्यांनी एकवार जिजाबाईंच्याकडे आणि राजांच्याकडे पाहिले. ते उठले. मंचकावर ठेवलेल्या पाण्याच्या गडव्यातले पाणी पेल्यात घेऊन ते गर्जले,

‘राजे! ऐका. आमचं कुलदैवत नागेश्वरीची शपथ घेऊन, तुमचे दोघांचे पाय शिवून आज वतनावर पाणी सोडलं.’

कान्होजींनी उजव्या हाताने पाणी सोडले. राजे त्यांना थांबवायला उठले, तोवर जेध्यांनी पाणी सोडलेही होते. जेधे पाय शिवायला वाकले आणि कान्होजी जेध्यांना राजांनी मिठी मारली. त्यांचा गळा दाटून आला.

‘जेधे, धन्य तुमची, तुमच्या निष्ठेची! कान्होजी, तुमच्या पुढ्यात सांगण्यात लाज काय? खंडोजी खोपडे खानाला मिळाल्यापासून जिवाला चैन नव्हती. तुमची आठवण येत होती; पण बोलवायचा धीर नव्हता. आज तुमच्यामुळं धीर आला. बळ वाढलं.’

‘राजे, आता काय, सांगा!’

‘फार मोठी जोखीम टाकतो आहोत. तुम्ही जाऊन सारे देशमुख गोळा करा, त्यांचा विचार घ्या; समजूत काढा. पण खंडोजी खोपड्यांचे वर्तन कुणाला करू देऊ नका.’

‘ती जिम्मेदारी माझी! आजच आम्ही माघारी फिरतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘थांबा, जेधे! कधी नाही ते मुलांसह घरी आलात. राहून चला.’ मासाहेब म्हणाल्या.

‘मासाहेब, घर काय परकं आहे? पण आता जाऊ द्या. परवानगी द्या.’

‘ठीक आहे.’

‘कान्होजी!’ राजे म्हणाले, ‘तुमचा कारीचा कबिला ढमढेरे तळेगावला पाठवा.’

कान्होजी नजर देत विचारते झाले, ‘राजे, घरादारावर पाणी सोडलं, तरी विश्वास नाही?’

‘गैरसमज करून घेतलात, कान्होजी! तुम्ही तुमच्या वतनावर पाणी सोडलंत, आणि तुमच्या घरादाराचा बोजा आमच्यावर टाकलात. तुम्हांला काळजी नसली, तरी आम्हांला ती टाकून कशी चालेल? कारीला तुमच्या घरच्या लोकांनी आता राहणं सुरक्षित नाही. त्यांना तळेगावला पाठवा. ही आमची आज्ञा आहे!’

राजांच्या त्या प्रेमाज्ञेने कान्होजींना सार्थक झाल्यासारखं वाटलं. राजांची कामगिरी घेऊन कान्होजी माघारी गेले.

कान्होजींच्या वर्तनाने सुखावलेले राजे हेजिबाने आणलेल्या बातमीने बेचैन झाले. पंढरपुराहून येत असता खानाने वाटेवरच्या मलवडीला बजाजी निंबाळकरांना कैद केले. निंबाळकरांच्या चाकरीत काही कसूर झाला नव्हता. तरीही त्यांचे गुन्हे फार मोठे होते. मुसलमान झाले असता ते परत हिंदू झाले. बजाजी शिवाजीचे मेहुणे होते. बजाजींना महादजीसाठी सखुबाईचा स्वीकार करून शिवाजीचे नाते नवीन केले होते. खानाने बजाजीला दस्त करून हत्तीच्या पायातळी घालून मारण्याची धमकी दिली. बजाजी परत संकटात सापडले.

सईबाईंच वाढते आजारपण आणि त्यातच आलेली ही भावाची बातमी. ती ऐकून सईबाई पुऱ्या खचल्या. राजांनी जाऊन समजावले. सईबाई म्हणाल्या,

‘आपण त्यांच्यासाठी थोडं का केलंत? आपल्याला काही सांगायलादेखील जागा राहिली नाही!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सई! या गोष्टी का सांगाव्या लागतात? बजाजी तुमचे भाऊ, आणि आमचे कोणीच नव्हेत का? बजाजींना जरी विसरलो, तरी आमच्या लाडक्या सखुबाईंना कसे विसरू? आम्ही बजाजींना सोडवून घेऊ.’

‘खरं?’

‘हो! पण एका अटीवर!’

‘कोणत्या?’

‘पुन्हा डोळ्यांत पाणी आणायचं नाही! त्रास करून घ्यायचा नाही!’

सईबाई हसल्या. त्यांनी डोळे टिपले.

राजांनी सईबाईंना वचन दिले खरे; पण ते पार कसे पाडायचे?

राजांनी गुप्तहेरांमार्फत पांढरे नाइकांना पत्र पाठविले. त्यांना गळ घातली. पांढरे हे शहाजीराजांच्या खास मर्जीतले सरदार. त्यांनी ते मानले. पांढऱ्यांनी खानाला गळ घातली. खान साठ हजार होनांना राजी झाला. बजाजींनी साठ हजार होन कर्ज काढून भरले. बजाजी संकटातून सुटले.

राजांनी सईबाईंना दिलेला शब्द खरा केला.

□

२१

राजगडाची सदर दररोज येणाऱ्या सरदारांनी भरत होती. खलबतखान्यात खलबते शिजत होती. फडातून नवे हुकूम सुटत होते. राजांना क्षणाची उसंत नव्हती. राजगडाची भक्कम नाकेबंदी केली होती. तिन्ही माच्यांचे आणि बालेकिल्ल्यांचे बुरूज तोफांनी सजले होते. अखंड कोसळणाऱ्या पावसाचे भान कुणाला राहिले नव्हते. बाजीप्रभू देशपांडे गडावर हजर झाले. धिप्पाड शरीराचे बाजीप्रभू राजांच्या मुजऱ्याला उभे ठाकले. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बाजी, मोहनगड सज्ज झाला?’

हिरडस मावळातल्या ओस पडलेल्या गडाला राजांनी ‘मोहनगड’ असे नाव दिले होते. विजापुराहून खान निघणार, याची प्रथम बातमी आली होती, तेव्हाच राजांनी मोहनगड भक्कम करून घ्यायला बाजीप्रभूंना आज्ञा केली होती.

बाजीप्रभू म्हणाले, ‘राजे! गड पुरा बंदोबस्तात आहे. चिंता नसावी.’

‘बाजी! तुम्ही असल्यावर चिंता कसली? आपली शिबंदीही आणलीत ना? ’

‘हो! शिबंदी आपल्या आज्ञेप्रमाणे शिवापूरला आहे.’

‘ठीक आहे.’

पावसाने दिलेली उघडीप पाहून राजगडच्या संजीवनी माचीवर तोफा चढवायचे काम सुरू झाले. माची अरुंद. त्यामुळे तोफांचे गाडे कष्टाने पुढे सरकत होते. पावसाने ओल्या झालेल्या मातीत चाके रुतत होती. राजे जातीने हे काम पाहत होते. एक मध्यम तोफ अशीच रेलली जात असता गाड्याचे चाक सारणीत घसरले. तोफ कलली. अरुंद जागेवर जनावरे आणणे कठीण होते. माणूसबळाने तोफ वर घेण्याचे काम चालू होते. अडचणीच्या जागेमुळे आणि चिखलामुळे तोफगाडा रेसभरही सरकत नव्हता. राजांच्याबरोबर बाजीप्रभू, तानाजी, संभाजी कावजी, पानसंबळ ही माणसे ते दृश्य पाहत होती. थोडा वेळ गेला, आणि संभाजी अस्तनी आखडीत खाली उतरला. येसाजीने विचारले,

‘काय, संभाजी? काय बेत?’

‘आता दावतोच की!’ म्हणत संभाजी कावजी गाड्याजवळ गेला. साऱ्यांना त्याने बाजूला केले. सारणीत दाटीवाटीने संभाजी उतरला. गाड्याच्या मागच्या-पुढच्या माणसांना संभाजी म्हणाला,

‘चाक वर आलं, की गाडा वर ओढा.’

दोन्ही हातांवर थुंकून संभाजीने श्वास घेतला. छाती तटतटून फुगली. त्याने गाड्याला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हात लावला. हातांचे गोळे तटतटले. नरड्याची शीरन् शीर इंगळीसारखी उमटली. गाडा करकरला. डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. गाड्याचे चाक उचलले जात होते. चाक वर आले आणि 'हर हर महादेव' ची गर्जना होऊन गाडा खेचला गेला. रुतलेले चाक सारणीतून वर आले.

संभाजी राजांच्या जवळ आला. राजे कौतुकाने म्हणाले,

'संभाजी, आजवर आम्ही नुसता तुमचा धिप्पाड देह पाहत होतो. पण त्याची ताकद आज पाहिली.'

'महाराज, ह्याला जेवायला कोन बी बलवत नाही. अर्धं बकरं जागंला बसवतो. बळकट घोडं सहज उचलंल, अशी ताकद हाय त्याची.'

'तानाजी, कुठं तरी दृष्ट लागेल त्याला.'

'डोळ्यांत मावला, तर लागनार, न्हवं?'

तानाजीच्या बोलण्याने सारे हसले. तोफा जागेवर बसलेल्या पाहून राजे माघारी आले.

शिवापट्टण आणि राजगड सरदारांनी, मावळ्यांनी भरून गेला. राजगडाचा बंदोबस्त करून राजांनी राजगड फिरंगोजींच्या ताब्यात दिला आणि स्वत: जावळीला जाण्याचा निर्णय जाहीर केला. जिजाबाई म्हणाल्या,

'राजे, पाऊस मी म्हणतोय्. जावळीत जाण्याऐवजी इथंच राहिलं, तर काय बिघडेल?'

'मासाहेब! खान अजून वाईला आला नाही. वाईला खान आला, की आम्ही असू, त्या जागी त्याचं लक्ष जाईल. तुम्ही, शंभूराजे, सारे इथं राहा. आम्ही जावळीला जातो. त्यामुळं राजगड सुरक्षित राहील!'

'राजे, तुम्ही संकटात! आम्ही सुरक्षित राहून काय करायचं?'

'मासाहेब, जेवढी जबाबदारी आमची आहे, तेवढीच तुमचीही आहे. आमचे वारस शंभू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे सुरक्षित राखणं ही तुमची जबाबदारी आहे. केव्हाही हाक मारलीत, आज्ञा केलीत, तरी जावळीवरून आम्ही सेवेला हजर होऊ.’

जिजाबाईंचा निरोप घेणे सोपे होते. पण सईबाईंचा निरोप घेणे फार कठीण! सईबाई अंथरुणाला खिळल्या होत्या. संभाजीला कडेवर घेऊन राजे सईबाईंच्याकडे गेले. सईबाईंनी हसून स्वागत केले. राजे म्हणाले,

‘सई! पाहिलंस? आम्ही जावळीला जाणार म्हणताच, हा ‘येतो’ म्हणून पाठीस लागला आहे!’

‘असं आडून सांगण्याचं काही कारण नाही. इथं सारे आहेत. आपण काळजी न करता जावं.’

राजे चकित झाले. त्यांनी विचारलं,

‘सई, तुला कुणी सांगितलं?’

‘आपली मनोहारी आहे ना!’

‘एकूण तुमचं नजरबाज-खातं चालू आहे, तर? राणीसाहेब, आपण आजारी असता, पाऊल उचलणं कठीण जातं.’

‘ते मला माहीत आहे. माझी चिंता करू नये. आपण जावं. खानाचा पराभव करावा.’

‘इतकं सोपं आहे ते?’

‘आम्हांला तुमचा भरोसा आहे.’ सईबाई म्हणाल्या, ‘जेव्हा तुळजाभवानीला आणि विठोबाला हात घातला, तेव्हाच त्याचं बाशिंगबळ खचलं आहे.’

राजे गहिवरले, ‘सई! किती सहजपणे दुसऱ्याला आत्मविश्वास देऊन मोकळी होतेस?’

राजांनी सईबाईंचा निरोप घेतला. जिजाबाईंचे पाय शिवून राजे जावळीला भर पावसात

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निघाले. फिरंगोजी म्हणाले,

‘राजे, एक विनंती आहे’

‘सांगा, फिरंगोजी!’

‘मी आपल्याबरोबर येतो.’

‘फिरंगोजी, तुम्हांला आम्ही मुद्दाम इथं ठेवून जातो आहोत. इथं मासाहेब आहेत. शंभूराजे आहेत. राणीसाहेब आजारी आहेत. तुमच्या भरवशावर ही जिवाभावाची माणसं सोडून आम्ही निर्धास्त होऊन जावळीला जात आहो. ही जबाबदारी तेवढीच मोठी आहे.’

फिरंगोजींना मुजरा केला. चार पावले पुढे गेलेले राजे मागे वळले. फिरंगोजींना म्हणाले,

‘राणीसाहेब आजारी आहेत. त्यांचं क्षेमकुशल दररोज कळवीत चला.’

राजांनी राजगड सोडला. खान कृष्णाकाठाने वाई जवळ करीत होता.

राजे जावळीला आले. जावळी खोऱ्याला छावणीचे स्वरूप आले. खोऱ्यातल्या प्रत्येक खेड्यात राजांचे सैन्य पसरले होते. भर पावसात राजे जावळीला सैन्याची जुळवाजुळव करीत होते. मोरोपंत पिंगळ्यांनी प्रतापगड सुसज्ज करून ठेविला होता. कल्याणहून पाठविलेल्या लांब पल्ल्याच्या तोफांनी प्रतापगडाचे मोर्चे धरून ठेविले होते. श्रावणाचे कोवळे ऊन जावळी उजळू लागले. अखंड जलधारांनी चिंब झालेली सृष्टी त्या उन्हात अंग वाळवू लागली. पावसाळा संपला, पाउलवाटांचे शेवाळ नाहीसे झाले. रात्री, अपरात्री जावळी खोऱ्यात टापांचे आवाज उठू लागले. डोंगरकपारींतून मशाली फिरताना दिसू लागल्या.

राजांनी प्रतापगडावर ठाणे हलविले होते. खान कुठे जरी उतरला, तरी प्रतापगड सोडायचा नाही. हे राजांनी ठरविले. खान वाईला येणार, हे राजांना नक्की माहीत होते. प्रतापगडापासून कोसांच्या अंतराने वाई फार जवळ होती. पण वाईहून प्रतापगड गाठणे इतके सोपे नव्हते. घनदाट रानाने आणि चोहोबाजूंच्या डोंगरशाखांनी वेढलेल्या जावळी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खोऱ्यात राजांचा प्रतापगड अगदी सुरक्षित होता. खानासारख्या बलाढ्य शत्रूशी मुकाबला करायला याच्यासारखी आड जागा नव्हती. राजे खानाची पुढची हालचाल पाहत होते.

एके दिवशी राजगडाहून आनंदाची बातमी आली. औरंगजेबाने सिंहासनारोहणप्रसंगी राजांना खास पोशाख व खुशीचे पत्र पाठविले होते. राजांना ती घटना अपेक्षितच होती. कायम नजर ठेवणाऱ्या प्रमुख पात्राचा अभिनय निदान आज तरी मोहक होता.

पण ते समाधान फार काळ टिकले नाही. राजगडाहून सईबाईंची तब्येत बिघडल्याची वार्ता घेऊन स्वार आला. राजांना तातडीने बोलाविले होते. चिंताचूर मनाने राजांनी प्रतापगड सोडला.

□

२२

राजगडाच्या रोखाने राजांचे अश्वपथक वेगाने दौडत होते. दिवस कासराभर असताना राजे गडाच्या पायथ्याशी असलेल्या पालीला पोहोचले. घोड्यांची गती मंदावली होती. राजे सावकाश गड चढत होते. पद्मावती माचीच्या दुसऱ्या दरवाज्यात राजे आले, आणि दुसरी नौबत झडली. फिरंगोजी नरसाळा राजांच्या स्वागतासाठी सामोरे आले होते. राजे पायउतार झाले. फिरंगोजी नजीक येताच त्यांच्या कडेवरच्या शंभूबाळांनी राजांकडे झेप घेतली. राजांनी शंभूबाळांना घेतले. त्यांचा मुका घेतला.

‘फिरंगोजी, राणीसाहेबांची तबियत?’

‘आहे तशीच आहे.’

फिरंगोजींच्या चिंताचूर चेहऱ्याकडे पाहताच राजांनी ते जाणले होते. राजांनी दीर्घ निःश्वास सोडला. देवीचे दर्शन घेतले; आणि शंभूबाळांच्यासह ते स्वार झाले. राजे बालेकिल्ल्यात आले. तेव्हा दिवस मावळायला आला होता. वाड्याच्या देवडीवर मशाली पेटल्या होत्या. नेहमी राजे गडावर आले, की सारा गड चैतन्यमय बनायचा. आज मुजरे झडत होते; पण कुणाच्या चेहऱ्यावर आनंद नव्हता. राजे पाय धुऊन वाड्याचा चौक चढले. सदरेवर पेशवे, अमात्य, सचिव सारे हात बांधून उभे होते. राजे आत गेले.
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाईंच्या पाया पडताच जिजाबाईंनी डोळ्यांना पदर लावला.

जिजाबाईंना राजे जवळ घेत म्हणाले, ‘मासाहेब, देवावर विश्वास ठेवा!’

‘राजे, सारे प्रयत्न होताहेत. वैद्यांची औषधं आहेत, देवावरचे अभिषेक आहेत, अनुष्ठानं आहेत, अंगारे धुपारे- काही शिल्लक ठेवलं नाही. पण कशाचा गुण येत नाही. कालची पोर आज दिसत नाही. अरे, माझं आयुष्य मागितलं, तरी या पोरीसाठी देईन.’

‘मासाहेब! धीर धरा! त्यानं राणीसाहेब बऱ्या होत असत्या, तर आम्ही आमचंही आयुष्य दिलं असतं.’

राजे सईबाईंच्या महालात गेले. मंद उदाच्या वासाने सारा महाल भरला होता. समया प्रज्वलित झाल्या होत्या. राजे महालात जाताच पलंगाच्या शेजारी घातलेल्या बैठकीवर बसलेला राणीवसा उठून उभा राहिला. मनोहारी सईबाईंच्या पायांवरून हात फिरवीत बसली होती. राजे आत जाताच सारे बाहेर गेले. मनोहारी उठू लागली. राजांनी तिला बसायला खुणावले. राजे पलंगाजवळ गेले. राजांना पाहताच सईबाई क्षीणपणे हसल्या. त्या म्हणाल्या,

‘शेवटी यावं लागलंच ना! मी सांगितलं होतं, एवढं काळजीचं कारण नाही, म्हणून?’

राजे शेजारी बसले. त्यांनी सईबाईंच्या मस्तकी हात ठेवला. कपाळ गरम होते. राजे म्हणाले,

‘कुणी निरोप पाठवला, म्हणून आम्ही आलो नाही. आम्हांला चैन पडेना, म्हणून आम्ही आलो. आता बरं वाटतं ना?’

‘खूप बरं वाटतंय्!’ सईबाई म्हणाल्या. राजांनी पाहिले. गिर्दीवर अश्रू पडत होते. राजे कासावीस होऊन ओणवे झाले. त्यांनी अश्रू निपटले. राजे म्हणाले,

‘सई! काय हे? आम्ही आलो ना?’

स्वत:ला सावरीत सईबाई म्हणाल्या, ‘आपण आलात, फार बरं वाटलं. डोळ्यांत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाणी आलं. वाटलं नव्हतं, परत पाय दिसतील, म्हणून!'

'आता चिंता करू नका. तुम्हांला बरं वाटल्याखेरीज आम्ही कुठंही जाणार नाही. आम्ही कपडे बदलून येतो.'

राजे महालाबाहेर आले. वैद्यांना त्यांनी बोलाविणे पाठविले. राजे आपल्या महालात गेले. राजांचा महाल सजविला होता. खाली जमिनीवर गालिचे पसरले होते. सज्जातून येणारा वारा पडद्यांना हेलकावे देत होता. राजांनी कपडे बदलले. पावलांचा आवाज येताच त्यांनी वळून पाहिले. सोयराबाईसाहेब आत येत होत्या.

'आपण आलात, फार बरं झालं. राणीसाहेबांना बरं वाटेल!'

राजे काही बोलले नाहीत.

'नशीबवान आहेत राणीसाहेब! नाही तर एवढ्या तातडीनं कोण येतो?'

'प्राक्तनी लिहिलं असेल, तसं होतं.' राजे म्हणाले.

'परमेश्वरानं आम्हांला पाठविताना आमची कपाळं मोकळी ठेविली होती!'

राजे खिन्नपणे हसले. ते म्हणाले, 'चुकता आहात, राणीसाहेब! ती मोकळी असती, तर आम्ही कसे राहिलो असतो? राणीसाहेब, संताप प्रसंगानंच शोभून दिसतो.'

राजांच्या त्या शब्दांबरोबर सोयराबाई भानावर आल्या. चूक होऊन गेली होती. काय बोलावे, हे सुचत नव्हते. त्याच वेळी मनोहारी आत आली.

'मनोहारी, काय आहे?'

'वैद्यराज आले आहेत!'

सोयराबाईंच्याकडे पाहत राजे म्हणाले, 'पाठव त्यांना.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मनोहारीपाठोपाठ सोयराबाई गेल्या. वैद्यराज आले.

‘वैद्यराज, राणीसाहेबांची तबियत कशी आहे?’

‘राजे, माझ्याकडून मी कसलीही कमतरता ठेवली नाही. पण कशाचा गुण नाही. ज्वर हटत नाही. एकही औषध लागू पडत नाही. दिवसेंदिवस अशक्तपणा मात्र वाढत आहे.’

‘त्यावर उपाय?’

वैद्यराज काही बोलले नाहीत. खाली मान घालून ते उभे होते. राजांनी वैद्यांना परवानगी दिली. वैद्यराज गेले. राजे महालात एकटे उभे होते. ते एकटेपण राजांना सहन होईना. राजे जिजाबाईंच्या महाली वळले.

शास्त्री पंचांग उघडून बसले होते. राजे जाताच शास्त्रीबुवा उठू लागले. राजांनी त्यांना बसण्याची खूण केली. राजे म्हणाले,

‘मासाहेब, काय पाहता?’

सुस्कारा सोडून जिजाबाई म्हणाल्या, ‘दुसरं काय पाहणार? सईची कुंडली पाहायला सांगते आहे.’

शास्त्रीबुवा म्हणाले, ‘तसं काळजीचं कारण नाही, मासाहेब! हे दोन दिवस पार पडले, नवरात्राची घटस्थापना झाली, की काही भीती नाही.’

रात्री राजे सईबाईंच्या महाली गेले. सईबाईंना झोप लागली होती. राजांना थोडे समाधान वाटले. जिजाबाईंनी राजांना झोपायला सांगितले. राजे आपल्या महाली गेले. पण झोप लागत नव्हती. दचकून जागे व्हायला होत होते. पहाटेच्या नगाऱ्याने राजांना जाग आली. राजे उठले. सज्जात उभे राहिले. गडाचे दरवाजे उघडले जात होते. पूर्वेला उजाडू लागले होते.

राजे स्नान आटोपून महालात आले. तेव्हा सूर्य उगवला होता. जिजाबाई महालात आल्या. राजांनी पाय शिवले. जिजाबाई बसल्या. जागरणाचा थकवा दिसत होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कशी आहे तब्येत?’

‘तू आलास. बर झालं, बाबा! सईला चांगली झोप लागली होती. आता पुष्कळ बरं आहे.’

तोच पुतळाबाई संभाजीराजांना घेऊन आल्या. राजांना पाहताच संभाजी धावला; आणि तो पाया पडण्यासाठी वाकला. राजांनी शंभूबाळांना कौतुकाने उचलले. पुतळाबाईंच्याकडे पाहत राजे म्हणाले,

‘हे तुम्ही शिकवलंत, वाटतं?’

‘एक धाराई किंवा ही. ह्या दोघींच्याकडेच शंभूबाळ असतात. शंभू, आमच्या नाही पाया पडला?’

दोन वर्षांच्या शंभूबाळांनी तिरकी मान करून जिजाबाईंच्याकडे पाहिलं व नकारार्थी मान हलवीत एकदम जिजाबाईंच्या गळ्याला मिठी घालीत शंभूबाळांनी त्यांचा मुका घेतला.

राजे हसले. ते म्हणाले, ‘अरे व्वा! शंभूबाळांचं असलं पाया पडणं आम्हांलाही आवडेल.’

पुतळाबाईंनी आणलेले दूध पिऊन राजे उठले. शंभूबाळांचा हात धरून राजे सईबाईंच्या महाली आले. सईबाई पलंगावर टेकून बसल्या होत्या. मनोहारीने दर्पण हाती धरला होता. सईबाई कुंकू लावीत होत्या. राजांना पाहताच झटकन कुंकू लावून त्या मोकळ्या झाल्या. राजांनी संभाजीला उचलून पलंगावर ठेविले. त्याला जवळ घेत सईबाई म्हणाल्या,

‘हे कुठं गाठ पडले?’

‘आमच्या महाली आले होते.’ राजे म्हणाले.

‘फारच लाडावलेत हे! यांना कुणी एक शब्द बोलला, तर दहाजणांचे बोल ऐकावे लागतात. अगदी फिरंगोजीकाकांपर्यंत!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सईबाई अशक्त झाल्या होत्या, तरी त्यांच्या डोळ्यांत हसरेपणा तोच होता. तेच तेज होते. हसतमुख सईबाईंना पाहून राजांना बरे वाटले. त्यांनी विचारले,

‘ज्वर गेला?’

‘तो तर माझा दावेदार! देणं घेतल्याखेरीज हलणार थोडाच? मला आता त्याच्याकडे लक्ष द्यायलाही फुरसत नाही.’

राजांनी शंभूबाळांना खाली उतरविले. शंभूबाळांनी एकदा दोघांकडे पाहिले आणि ते धावत महालाबाहेर गेले.

राजे शेजारी बसले. सईबाई म्हणाल्या,

‘आज भाद्रपद चतुर्दशी ना?’

‘हो. का?’

‘परवा घट बसतील. दसरा आला. सणाचे दिवस आणि मी ही अशी आजारी!’

‘मग लौकर बरी हो ना!’ राजांनी सईबाईंचा हात हाती घेतला. रोडावलेला तो पंजा कुरवाळीत असता राजांचे लक्ष बोटांकडे गेले. राजांनी विचारले,

‘तुझी प्रवाळाची अंगठी काय झाली?’

सईबाई म्हणाल्या, ‘रुतू लागली, सैल पण झाली. तेव्हा काढून ठेवली.’

सईबाईंना बसवेना. राजांनी मागच्या गिर्द्या काढल्या; सईबाईंना अलगद झोपवले. सईबाईंनी विचारले,

‘खान आला?’

‘तो निघाला आहे, म्हणजे येईलच ना!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मला त्याची चिंता नाही वाटत.’

‘एवढ्या सैन्यानिशी खान येतो आहे आणि त्याची भीती वाटत नाही?’

‘खरंच वाटत नाही!’

‘का?’

‘भीती वाटत नाही, एवढं खरं. का, ते कसं सांगू?’

राजे हसले. ते म्हणाले,

‘हे उत्तर छान आहे. याला काही तोड नाही.’

सईबाईंच्या महालातून राजे मोकळ्या मनाने बाहेर आले. राजे सदरेवर गेले. सईबाईंना पडलेला आराम बघून राजांना समाधान वाटत होते. सूर्य वर चढत होता. राजे फिरंगोजींच्यासह देवीदर्शनाला माचीवर उतरले. देवीदर्शन आटोपून फिरंगोजींच्या बरोबर बोलत राजे बालेकिल्ल्याकडे येत असतानाच सेवक धावत आला.

‘राणीसाहेब घाबऱ्या झाल्या.’

पुढचे ऐकायला राजे थांबलेच नाहीत. राजांनी बघता-बघता बालेकिल्ला गाठला. राजे वाड्यात गेले. सदरेवर वैद्यांना पाहून राजे चकित झाले.

‘वैद्यराज!’

वैद्यराजांनी डोळ्यांना उपरणे लावले. राजांनी विचारले, ‘रडू नका! सांगाऽऽ’

‘काय सांगू? माझ्या हाती आता काही उरलं नाही.’

राजे सईबाईंच्या महाली जाताच सारे उठून बाहेर गेले. राजे सईबाईंच्याजवळ गेले. कपाळी घाम डवरला असता राजांनी तो पुसला. सईबाईंनी डोळे उघडले. राजांनी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सईबाईंचा हात हाती घेतला. हात थंड लागत होता. सईबाईंनी विचारले,

‘वैद्यराज काय म्हणाले?’

राजांनी आवंढा गिळला. ते म्हणाले, ‘चिंता करण्याचं कारण नाही, असं म्हणाले.’

सईबाईंच्या चेहऱ्यावर क्षीण हास्य उमटले. त्या म्हणाल्या,

‘बरोबर आहे त्यांचं! असणाऱ्यांची चिंता करायची; जाणाऱ्याची कसली चिंता?’

त्याबरोबर आवरलेले अश्रू राजांच्या नेत्रांतून ओघळले. ते उद्गारले,

‘सई!’

‘मला सारं माहीत आहे. नाही तर तुम्ही येताच सारे उठून गेले नसते. डोळ्यांत पाणी न आणता निरोप द्यावा.’

‘सई! काय बोलतेस! स्वराज्याचा डाव नुकताच कुठं रंगतो आहे, तोच अर्ध्या डावावरून उठून चाललीस?’

सईबाई म्हणाल्या, ‘अर्ध्या डावावरून उठून जाणं हा तर स्वभावच माझा. तुम्हीच सांगितलं होतंत ना! अगदी खरं ठरलं. पाहा ना- संसारातून उठून निघाले. मुलाची आई होऊनही त्याला दूध देऊ शकले नाही. निदान आईचा मायेचा हात- तो तरी पाठीवर टिकावा; त्यालाही शंभूबाळ पारखा. सारंच अर्धवट राहिलं.’

‘सई! असं बोलू नकोस!’ राजे व्यथित होऊन म्हणाले, ‘तू मांडलेले सारे डाव आम्ही पुरे करू.’

‘तेवढ्यासाठीच जीव घुटमळतोय्! संभाजी आईविना पोर. त्याला संभाळा. आता तुम्हीच त्याची आई... आणि तुम्हीच त्याचे पिते.’

‘शंभूबाळाबद्दल मला काहीच का वाटत नाही?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तसं म्हणत नाही मी. पण पुरुषांची माया स्त्रीपेक्षा वेगळी! आईच्या नजरेनं पाहायला हवं.’

राजांना अश्रू आवरत नव्हते. कष्टाने ते म्हणाले,

‘सई! मी वचन देतो. शंभूबाळाला मी तळहाताच्या फोडाप्रमाणे जपेन.’

राजांनी आपला चेहरा हातांत झाकून घेतला. श्वास घेणेही कठीण जात होते. त्यांच्या कानी आवाज आला,

‘जरा इकडे बघायचं ना!’

आवाज बदलला होता. राजांनी दचकून पाहिलं. सईबाई राजांच्याकडे पाहत होत्या. त्यांच्या ओठांवर स्मित झळकले आणि राजांचे रूप पाहत असतानाच सईबाईंची मान कलंडली.

राजांचे अश्रू थिजून गेले. राजांच्यावर खिळलेली नजर तशीच होती. तीतील चैतन्य केव्हाच निघून गेले होते. राजांनी हलक्या हातांनी ते डोळे मिटले. राजांच्या लाडक्या सईबाई शांतपणे झोपी गेल्या होत्या.

ते रूप पाहून राजे उठले. झोपेत चालावे, तशी पावले टाकीत महालाबाहेर आले. राजांना पाहताच जिजाबाई उठल्या. राजांचे भरलेले डोळे पाहून त्या थांबल्या. गालांवर ओघळणाऱ्या अश्रूंचे भान नसलेले राजे म्हणाले,

‘मासाहेब! राणीसाहेब आम्हांला सोडून गेल्या!’

सारे महालाकडे धावले.

महालात एकच आक्रोश उसळला!

❑

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

२३

रात्र चढत होती. महालात हजारी समई तेवत होती. झोप येत नव्हती. राजे बेचैन होऊन उठले आणि सज्जात गेले. गार वाऱ्याच्या स्पर्शाने त्यांना जरा बरे वाटले. सज्जाच्या सुरूदार नक्षीखांबावर उजवा हात ठेवून राजे उभे होते. अगणित नक्षत्रांनी आकाश नटले होते. राजांच्या मनात विचार आला :

'आकाशात करोडो नक्षत्रे असूनदेखील एका चंद्राची बरोबरी करू शकत नाहीत ना!...'

गार वाऱ्याची झुळूक राजांच्या अंगावरून गेली. समईच्या वाती थरथरल्या. राजे निश्चलपणे उभे राहून आकाश निरखीत होते. अचानक ते भानावर आले. राजांचे तीक्ष्ण कान ऐकत होते. मागे महालात पडद्यांची सळसळ झाली. रुजाम्याच्या गालिच्यावर पडणाऱ्या पावलांच्या सपळाबरोबर साखळ्यांचा नाजूक आवाज आला. परिचित आवाज. साऱ्या अंगावर थरारून काटा उभा रहिला. राजे एकदम वळले.

महालात कोणी नव्हते. महाल मोकळा होता. वाऱ्यावर पडदे हेलकावे खात होते. समईच्या वाती थरथरत होत्या. कुणाचा आवाज नव्हता.

भासच तो!

दीर्घ नि:श्वास सोडून राजे परत आकाश निरखू लागले. उजवा हात सज्जाच्या रेखीव खांबावर ठेविला होता. डावा हात केसांवरून फिरत होता. हात अचानक थांबला. कान परत तीक्ष्ण बनले. पुन्हा तोच आवाज. तीच पडद्यांची सळसळ. तोच पदन्यास. काही शंका नव्हती. राजांचा कंठ उभ्या जागी भरून आला. डोळे पाणावले.

मागे न पाहता राजे भरल्या कंठाने म्हणाले,

'सई! तुझा आमच्या शब्दांवर विश्वास बसत नाही ना? शंभूबाळांची चिंता वाटते? नको, सई! आम्ही तुम्हांला संसारात गुंतवू शकलो नाही. आशेत तरी कशाला गुंततेस? आम्ही वचनबद्ध आहोत. सई, निदान तू तरी आमच्यावर अविश्वास दाखवू नको.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वारा थांबला. पडद्यांची सळसळ थांबली. नूपुरांचा आवाज थांबला. एक भयाण शांतता पसरली आणि दुःखावेग न आवरून राजांनी खांबावर मस्तक टेकले. राजे उद्गारले,

‘सई! तू जाऊन शंभू पोरका झाला नाही! आम्ही पोरके झालो. सई! आम्ही!!’

□ □ □

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग तिसरा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

नवरात्राचे दिवस राणीसाहेबांच्या सुतकातच गेले. दसरा उजाडला. खान वाईला आला. त्याने तळ दिल्याची बातमी यापूर्वीच आली होती. कृष्णाकाठाला धरून खानाचा तळ पडला होता. राजांना स्वतःच्या दुःखाचा विचार करायला वेळ नव्हता. राजांनी आपले दुःख मनात खोल दडवून ठेविले, आणि राजे परत हिमतीने उठले.

सदैव सावध राहण्याची ताकीद साऱ्या गडांना दिलीच होती. गडाखालच्या मुलुखात खान आला, तर विरोध न करता सामील व्हावे, अशी सूचना दिली गेली.

सोनोपंत डबीर म्हणाले,

'राजे, हा हुकूम कशासाठी?'

'प्रजा राहिली, तर स्वराज्य ना! खान आला आहे. तो आता आमच्या मुलुखात हात पसरल्याखेरीज थोडाच राहणार? आमची सारी फौज प्रतापगडाशी आज गोळा होत आहे. प्रजेनं विरोध केला, तर खान आमचा प्रदेश बेचिराख करील. त्यापेक्षा खानापुढं मान तुकवली, तर प्रजेला अधिक तोशीस पडणार नाही.'

राजांनी केलेले भाकीत अगदी खरे ठरले. खानाने पाहता-पाहता शिवाजीचा प्रदेश बळकाविला. खानाचे सरदार राज्यात पसरले. जाधवाने सुपे प्रांत काबीज केला. पांढऱ्याने शिरवळला ठाणे दिले. खराट्याने सासवड घेतले. हिलालने पुण्यात तळ दिला आणि हबशी सैफखानाने तळकोकण व्यापिले. पण कुठेदेखील विरोध झाला नाही. चकमक झडली नाही. शिवाजीचा प्रदेश आपण जिंकतो आहो; तेव्हा शिवाजी कुठे ना कुठे मैदानात उतरेल, असे खानाला वाटत होते. पण शिवाजीचा कुठेच पत्ता नव्हता. खान चिंताचूर बनला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खानाचे व्याप राजांना कळत होते. त्यांच्या चिंता वाढत होत्या. खानाला कुठे विरोध जरी केला नाही, तरी खानाचे सैन्य मुलुखात लूट व विध्वंस करीतच होते. त्या बातम्यांनी राजांचे मन कष्टी बनत होते. सदरेवर सारी मंडळी हजर होती. माणकोजी दहातोंडे सारे ऐकत होते.

माणकोजी दहातोंडे म्हणजे राजांचा जुना माणूस. दादोजी कोंडदेवांच्या बरोबर शहाजीराजांनी जी विश्वासू माणसे पाठविली, त्यांत माणकोजी दहातोंडे होते. राजांच्या पहिल्या पागेचे तेच सरनोबत होते. लोहगड-विसापूरचा ताबा याच माणकोजी दहातोंड्यांनी घेतला होता. माणकोजींचे वय झाल्यामुळे राजांनी नेताजींना सरनोबत केले; आणि त्या दिवसापासून माणकोजी सदरेच्या सल्लागारांत आले. राजांच्या सदरेवर माणकोजींना भारी वजन होते. खानाचे पराक्रम ऐकून माणकोजी म्हणाला,

‘राजे, हे असलं ऐकण्यापरीस जागा बगून एक-दोन थपडा लावल्या, तर खान सबुरीनं वागंल!’

कोणी तरी हा विचार मांडायला हवा होता. फिरंगोजी, तानाजी, येसाजी, या साऱ्या मंडळींनी माणकोजींचे मत उचलून घेतले. राजांनी सर्वांना बोलू दिले. मग ते म्हणाले,

‘माणकोजी, हे का आम्हांला वाटत नाही? हे बघण्यात का आम्हांला सुख आहे? पण या प्रसंगात शत्रूशी कोठेही उघड्यावर लढाई द्यायची नाही, हे आम्ही पक्कं ठरविलं आहे. आम्ही बाहेर पडावं, म्हणून खानाचे हे उपद्‌व्याप चालू आहेत. खान त्याचीच वाट पाहतो आहे.’

‘मग आता?’ येसाजीने विचारले.

‘आता शक्य तो लौकर जावळी गाठायची! तिथं बसून राहायचं.’

‘कुठवर?’

‘खान जावळीत शिरेपर्यंत!’

राजे जावळीला जायला निघाले. जिजाबाईंचे मन पिळवटून निघाले होते. राजांचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सईबाईंच्या वरचा लोभ त्यांना माहीत होता. आपले दुःख दाबून ठेवून वावरणाऱ्या राजांना पाहून त्यांचे मन व्यथित होत होते. जिजाबाई म्हणाल्या,

'राजे, थोडे दिवस थांबता येणार नाही का?'

'नाही, मासाहेब! प्रत्येक दिवस मोलाचा आहे.'

'अरे, पण सई जाऊन पुरते...'

क्षणभर राजांचे अंग ताठरले. राजे म्हणाले,

'मासाहेब! त्याला सुद्धा नशीब लागतं. कोणत्याही गोष्टीचा फार आनंद मानायला किंवा दुःख करायला परमेश्वरानं आमच्या जीवनात उसंत ठेवलीच नाही.'

सायंकाळी सदर भरली. जिजाबाई बैठकीवर बसल्या. नेताजी पालकर, अत्रे, माणकोजी, पानसंबळ, कृष्णाजी नाईक, मोरोपंत पिंगळे ही खाशी माणसे हजर होती. राजांनी आपला बेत सांगितला.

खानाशी युद्ध म्हणजे राजांचा पराभव, हे साऱ्यांना स्पष्ट दिसत होते. खान पुऱ्या तयारीनिशी आला होता. सारे बेचैन होते. फिरंगोजी म्हणाला,

'खानाशी तह केला, तर?'

'तह?' राजे हसले. 'आम्हांला चढे घोड्यानिशी जिवंत पकडून नेण्याची खानाची प्रतिज्ञा विसरलात, वाटतं? दादामहाराजांना जसं त्यानं मारलं, तसं तो आम्हांला मारील. म्हणून सल्ला करणे नाही. युद्ध करोन मारिता-मारिता जे होईल, ते करू.'

माणकोजी म्हणाला, 'हे कठीण कर्म! सिद्धीस गेलं, म्हणजे बरं. नाही तर कसं होईल?'

राजे म्हणाले, 'माणकोजी, आता मात्र आपण म्हातारे झालात, हे पटलं. नाही तर हे उद्गार येते ना!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाई म्हणाल्या, ‘राजे, काळजीपोटीच असे शब्द येतात.’

‘ते आम्ही जाणतो! मासाहेब, महाभारताचा प्रसंग आठवा. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितलं : जिंकलंस, तर पृथ्वीचं राज्य भोगशील; मेलास, तर स्वर्गाचा मानकरी होशील. आम्ही सल्ला केला, तरी प्राणनाश स्पष्ट दिसतो. युद्ध केलियाने जय जाहलियास उत्तम. प्राण गेला, तरी निदान कीर्ती तरी राहील.’

जावळीत बसून खानाला तोंड द्यायचा विचार पक्का झाला; आणि सदरेची बैठक मोडली.

मासाहेबांना रात्रभर झोप लागली नाही. डुलकी लागली, तरी दचकून जागे व्हायला होत होते. खानासारख्या बलवत्तर सेनापतीपुढे राजांचा पाडाव लागेल का? याच खानाने फर्जंद शहाजीराजांना बेड्या ठोकून विजापूरभर त्यांची धिंड काढली होती. शंभूराजांना यानेच गिळले होते. तुळजापूरच्या भवानीवर घण घालणारा हा खान शिवाजीराजांना कचरेल का? जिजाबाईंनी आपले अश्रू टिपले. त्या उठल्या. मनोहारी आत आली. जिजाबाईंनी विचारले,

‘मनू, राजे उठले?’

‘जी! आंघोळ सुद्धा झाली!’

जिजाबाई उठल्या. तोंड धुऊन त्या राजांच्याकडे गेल्या. तेव्हा सामानाच्या संदुकी उचलल्या जात होत्या. राजांचा चेहरा प्रसन्न होता. राजे पाया पडत म्हणाले,

‘आम्ही आता आपल्या दर्शनाला येणारच होतो. मासाहेब, आज आम्हांला स्वप्न पडलं.’

‘कसलं?’

‘देवीनं आम्हांला दृष्टांत दिला. मातेनं आम्हांला अभय दिलं. सांगितलं, ‘आम्ही प्रसन्न आहो. सर्वस्वे साह्य तुला आहे. तुझे हाते अफझल मारवितो. तुजला यश देतो. तू चिंता करू नको.’ असं बोलून माता अदृश्य झाली. आम्ही जागे झालो. पहाट झाली होती.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाई म्हणाल्या, ‘बरं झालं. आता तिनंच आम्हांला राखायचं! शिवबा, आम्ही रात्री ठरवलंय्. आम्ही पण गडावर येणार!’

‘मासाहेब!’

‘राजे, जे व्हायचं असेल, ते होऊ दे. पण आता तुम्हांला नजरेआड करावं, असं वाटत नाही.’

‘मासाहेब, आम्हांला नजरेआड करू न देण्यात स्वराज्य नजरेआड करून कसं चालेल? तुमच्या भरवशावर तर आम्ही जातो आहोत.’

‘आमचा कसला भरवसा?’ जिजाबाई कळवळल्या.

‘बोलून चालून लढाई! आम्ही खानाला मारू, हा आमचा विश्वास आहे. पण दुर्दैवानं तसं झालं नाही..’

‘शिवबा ऽ ऽ’

राजांचा आवाज कठोर बनला, ‘मासाहेब, डोळ्यांत पाणी आणायची ही वेळ नव्हे. ऐका, मासाहेब! आमचं काही बरं-वाईट घडलंच, तर धीर खचू न देता शंभूबाळांना हाताशी धरून राज्य चालविण्याची जबाबदारी तुमची आहे. इथं आईच्या मायेला जागा नाही. त्याचकरिता शंभूबाळांना तुमच्यासह इथं ठेवून जात आहोत.’

मासाहेबांनी राजांना मिठीत घेतले. राजांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. राजे हसण्याचा प्रयत्न करीत म्हणाले,

‘मासाहेब! सावरून घ्या. नाही तर आपण अश्रू ढाळलेले पाहताच दाराशी उभे असलेले राणीमंडळ कोलमडून पडेल, आणि आम्हांला बाहेर पाऊल टाकणंही अशक्य होईल.’

मासाहेबांनी अश्रू टिपले. जिजाबाईंसह राजे देवघरात गेले. राजांनी देवापुढे मस्तक टेकले. सोयराबाईंनी पुढे होऊन राजांच्या हातावर दही घातले. राजांनी सर्वांवरून नजर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

फिरविली. नाक ओढल्याचे आवाज येत होते. राजांनी जिजाबाईंच्या पायांवर मस्तक ठेवले. जिजाबाईंनी राजांना उराशी कवटाळले. अश्रू ओघळले. राजांनाही काही बोलणे जमत नव्हते.

'शिवबा! सांभाळून! खान धोकेबाज आहे. तुमच्या दादामहाराजांना विसरू नका. त्याचं उसनं फेडून घ्या. विजयी होऊन घरी या!'

'येतो, मासाहेब! चिंता करू नका! तुमच्या आशीर्वादानं, भवानी मातेच्या कृपेनं आम्ही या संकटातून पार पडू, हा आमचा विश्वास आहे. अफझलखान मारून, गर्दीस मिळवून, आम्ही आपल्या दर्शनास येऊ.'

सदरेवर फिरंगोजी, शामराजपंत, सोनोपंत ही मंडळी होती. साऱ्यांचे मुजरे झाले. राजांनी विचारले,

'सामानाच्या गाड्या पुढं गेल्या?'

'हो!' पेशव्यांनी सांगितले.

'फिरंगोजी, संभाजीराजे, मासाहेब आता तुमच्या जबाबदारीवर. अफझलखान मारून जय जाहला, तरी माझा मीच आहे. एखादे समयी युद्धी प्राणनाश जाहला, तरी संभाजीराजे आहेत. त्यांस राज्य देऊन त्यांचे आज्ञेत तुम्ही राहणे. आम्ही उभे केलेले 'महाराष्ट्र राज्य'- ते अवघ्यांनी हिंमत धरून राखावे. येतो आम्ही.'

राजे वाड्याच्या दारात आले. त्यांनी वळून पाहिले. व्याकूळ जिजाबाई चौकटीवर आधार घेऊन उभ्या होत्या. राजांनी मान वळविली; व ते वाड्याबाहेर पडले.

मोतद्दार राजांचा आवडता घोडा धरून उभा होता. अश्वपथक सज्ज होते. राजे घोड्यावर स्वार झाले आणि हुजऱ्याच्या खांद्यावर असलेला संभाजी ओरडला,

'आबा ऽ ऽ! झ्या, झ्या!'

तशातही सर्वांच्या चेहऱ्यांवर हसू उमटले. राजांनी खुणावताच हुजऱ्या पुढे झाला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी शंभूबाळांना उचलून पुढे घेतले. घोड्याला टाच मारली. मैदानाचा एक फेरा पुरा करून राजे परत आले. राजांनी शंभूबाळांचा मुका घेऊन त्यांना फिरंगोजींच्या हाती दिले, आणि कूच करण्याची इशारत दिली. नौबत झडली. राजे अश्वपथकासह गड उतरू लागले.

□

२

जावळीची पागा आणि छावणी पाहून प्रतापगडावर जायला राजांना संध्याकाळ झाली. राजांच्या सामानाबरोबर गेलेले माणकोजी दहातोंडे मोरोपंत पिंगळ्यांच्यासह गडाच्या प्रथम दरवाज्यात स्वागतासाठी उभे होते. राजे गडाच्या दरवाज्यापाशीच पायउतार झाले.

राजे सर्वांसह पायऱ्या चढत होते. नजर गडावर जात होती. ठायी ठायी चौकी-पहारे बसले होते. मोक्याच्या जागी तोफांचे मारे होते. राजे गडावर आले. गडाच्या प्रथम माचीवर उभे राहून त्यांनी मुलुखावर नजर टाकली. सूर्याच्या मावळत्या किरणांत कोयना खोरे उजळून निघाले होते. समोर महाबळेश्वर उभा होता. राजांनी महाबळेश्वरला वंदन केले. राजे बालेकिल्ल्याकडे चालू लागले.

बालेकिल्ल्यात प्रवेश करताच समोर सदर दिसू लागली. सदरेसमोर केदारेश्वराचे सुबक मंदिर होते. राजे जेव्हा प्रथम डोंगरावर आले होते, तेव्हाच त्यांना हे शिवलिंग सापडले होते. तो शुभ शकुन समजून राजांनी देऊळ बांधण्याची आज्ञा केली. ‘केदारेश्वर’ हे नाव ठेवले. राजांनी केदारेश्वराचे दर्शन घेतले; आणि राजे वाड्याकडे वळले.

प्रतापगडाच्या अगदी उंच जागेवर मोरोपंतांनी वाडा बांधला होता. वाडा आकाराने लहान होता, पण सुबक होता. सुरूदार खांबांनी दर्शनी भाग सजला होता. पुढच्या चौकावर माडी होती. महिरपी खिडक्यांनी ती सुशोभित झाली होती.

राजे आपल्या महाली आले, तेव्हाच दारातच त्यांचे पाय खिळले. आलेले सामान मनोहारी नीट लावून घेत होती. दासींची धावपळ महालात चालू होती. राजांना पाहताच दासी अदबीने उभ्या राहिल्या. संदुकीतून काढलेला अंगरखा तसाच हाती घेऊन मनोहारी उभी राहिली. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कोण? मनोहारी? तू इथं कशी?’

मनोहारी म्हणाली, ‘मासाहेबांनी पाठविलं. त्या म्हणाल्या- कपड्यालत्त्यांची काळजी घेणारं तिथं कोणी नाही...’

राजे हसून म्हणाले, ‘मासाहेबांनी सांगितलं; मग आम्ही काय म्हणणार? ठीक आहे. लावून घे सामान. सर्व आलं का, ते नीट पाहा. आम्ही खाली जातो.’

राजे वळले. मागून आवाज आला,

‘जरा थांबावं!’

राजे थांबले. मनोहारी अंगरखा ठेवून पुढे आली. तिचा चेहरा व्यथित झाला होता. तिने राजांच्या समोर मूठ उघडली. मनोहारीच्या हातात सईबाईंची प्रवाळाची अंगठी होती. त्या अंगठीच्या दर्शनाने राजे घायाळ बनले. त्यांनी विचारले,

‘ही तुझ्याकडे कशी?’

मनोहारीचे डोळे भरून आले. ती म्हणाली,

‘राणीसाहेबांना जेव्हा जास्त झालं, तेव्हा आपण याल, न याल, म्हणून ही अंगठी त्यांनी माझ्याकडे दिली होती. सांगितलं होतं की, मी गेल्यावर ही त्यांना दे. राजगडावर वेळ मिळाला नाही; अंगठी देता आली नाही.’

मनोहारीने डोळे टिपले. राजे नि:श्वास सोडून म्हणाले,

‘आम्ही आमची आठवण म्हणून ही अंगठी राणीसाहेबांना दिली होती. त्यांनी विश्वासानं ती तुझ्या हाती दिली. राणीसाहेबांची आठवण म्हणून ती तुझ्या बोटात ठेव.’

एवढे बोलून राजे निघून गेले. मनोहारी चकित होऊन राजांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे गडावर आले आणि सारे जावळी खोरे चैतन्यमय झाले. महाराजांचे जिवाभावाचे सारे सरदार गडावर गोळा होत होते आणि एके दिवशी कान्होजी जेधे येत असल्याची वर्दी गडावर आली. राजांना ते ऐकून फार समाधान वाटले. कान्होजी गडावर आले. कान्होजींनी आपला शब्द खरा केला होता. कान्होजी एकटे आले नव्हते. कान्होजींच्या बरोबर शितोळे, खोपडे, गायकवाड, डोहार, मारणे, कोंडे, मरळ, शिळमकर वगैरे सारे देशमुख वतनदार आपल्या जमेनिशी आले होते. देशमुख आले, म्हणजे इतरही वतनदार आले. कान्होजींनी उत्साह आणला, प्रेम आणले, राजनिष्ठा आणली. त्याने राजांचा विश्वास दुणावला.

साऱ्या सरदारांनी, देशमुखांनी, वतनदारांनी बेलरोटीची शपथ घेऊन राजनिष्ठा व्यक्त केली. राजांनी सर्वांनाच एकाच पंक्तीला घेऊन भोजन केले.

राजांची पागा सात हजारांवर वाढली होती. पायदळही तीन हजारांवर जमा झाले होते. कान्होजींनी विचारले,

‘राजे, लढाईचा बेत मोठा दिसतो. खानाची कुमक भारी असणार!’

‘कान्होजी, जावळीखोऱ्यात येणाऱ्या शंभर शत्रूंना आमचा माणूस पुरेसा आहे. आमची कुमक नुसती माणसांची नाही. आमच्या मागे रक्षणार्थ सह्याद्रीची कूस उभी आहे! आशीर्वाद द्यायला महाबळेश्वर आहे. इतरांप्रमाणे शरणागती पत्करून कायमचे ताबेदार राहणार, की नव्यानं स्थापन झालेल्या आपल्या हिंदवी स्वराज्याच्या उपक्रमाची परिपूर्ती करून एकदाचे सर्व शृंखलांतून मुक्त होणार, याचा निकाल या मोहिमेत लावण्याचा आमचा निश्चय आहे.’

‘पण खान वाई सोडील का?’

‘त्याला सोडावीच लागेल. खानाबरोबर प्रतापराव मोऱ्यांसारखी माणसं आहेत. जावळीवर पुन्हा ताबा मिळवण्याचं त्यांचं स्वप्न आहे. त्यांच्यासारखी बरीचशी या भागाची माहितगार माणसं खानानं आणली आहेत. आपल्या सामर्थ्याच्या घमेंडीवर खान आपण जाऊ, तिकडे वळेल. तो नाही वळला, तर वळवावा लागेल.’

प्रतापगडावर बसून राजे जसा विचार करीत होते, अंदाज बांधीत होते, तसा खानही वाईत बसून राजांची हालचाल समजून घेत होता. खान त्रस्त झाला होता. शिवाजीचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एवढा मुलूख ताब्यात आणला, एवढी लूट केली, पण शिवाजी जावळी सोडून कसा बाहेर पडत नाही, याचे खानाला कोडे पडले होते. एवढी मोहीम चालवूनही सारे कसे शांत होते. ही शांतता खानाला बेचैन करीत होती. जावळीजवळ गोळा केलेल्या सैन्याची खबर खानाला मिळाली होती. शिवाजीला अधिक उसंत देणे म्हणजे नव्या संकटाला तोंड देणे हे खान ओळखून होता. खानाने शिवाजीचा अंदाज घ्यायचे ठरविले. त्याने शांततेला तोंड फोडले. खानाने आपला वकील कृष्णाजी भास्कर याला वकील म्हणून प्रतापगडावर पाठवायचे ठरविले.

बलाढ्य शत्रूचा वकील आपणहून राजांच्या दरबारी येत होता...

□

३

खानाचा वकील आपणहून भेटायला येतो, यावर कुणाचाच विश्वास बसेना. खानाचा वकील कृष्णाजी भास्कर आपल्या अश्वपथकासह गडाच्या पायथ्याशी आल्याची वर्दी आली. राजांनी जेधे, पानसंबळ, पंताजी गोपिनाथ, अण्णाजीपंत यांना वकिलाला सामोरे जाऊन मानाने गडावर घेऊन यायला पाठविले. साऱ्यांचे लक्ष आता वकिलाकडे लागले होते.

गडाच्या दरवाज्याशी पंताजी गोपिनाथ हे कृष्णाजी भास्करांना सामोरे आले. कृष्णाजी भास्कर छिलछिलीट अंगलटीचे, उंचेपुरे, देखणे होते. त्यांचे घारे डोळे मनाचा ठाव घेणारे होते. डोक्याला पगडी, अंगात रेशमी पिवळा अंगरखा आणि कमरेस तलम मलमली धोतर परिधान केलेले कृष्णाजी आपल्या नजरेने गड आणि परिसर निरखीत होते. पंताजी गोपिनाथांनी त्यांची ओळख करून दिली. पंताजी म्हणाले,

‘आपल्या भेटीसाठी राजे वाट पाहत आहेत.’

‘आम्ही येण्याआधीच आमच्या आगमनाची वार्ता आली असेल, नाही?’

पंताजी हसले. म्हणाले, ‘मोठ्या माणसांच्या हालचाली इतक्या लपून राहत नाहीत. चलावं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कृष्णाजी गड निरखीत चढत होते. गडाचा कडेकोट बंदोबस्त त्यांच्या नजरेतून सुटत नव्हता. गडाच्या सदरेवर येताच दुहेरी तटबंदीनं बंदिस्त असलेला गड कृष्णाजी भास्करांच्या नजरेत भरला. गडावरच्या चौक्या-पहारे, बुरुजांवरच्या पल्लेदार तोफा, तोफगोळ्यांचे ढीग-सारे पाहून कृष्णाजींच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. ते पंताजींना म्हणाले,

'पंत, इथं तर लढाईची जय्यत तयारी दिसते.'

'गैरसमज होतो. राजांच्या कोणत्याही गडावर हा नेहमीचाच बंदोबस्त असतो... देवदर्शन घ्यावं.'

केदारेश्वराचे दर्शन घेऊन कृष्णाजी भास्कर वाड्याकडे येऊ लागले. राजे कपडे करून आपल्या महालात तयार होते. कृष्णाजी भास्कर सदरेत आले. सदरेच्या सरदारांच्या ओळखी करून दिल्या गेल्या आणि राजांचे बोलावणे आले. पंत बैठकीच्या जागी कृष्णाजींना घेऊन गेले. राजे बैठकीवर बसले होते. कृष्णाजींची ओळख पंतांनी करून दिली. राजांनी मुजऱ्याचा स्वीकार केला; व ते म्हणाले,

'आम्ही आपलं भाग्य समजतो की, खानसाहेबांनी आमची आठवण ठेवली.'

कृष्णाजीपंत म्हणाले, 'राजे, खानसाहेब का परके आहेत? त्यांच्या मनात आपल्याबद्दल प्रेमभाव आहे. तसं नसतं, तर एवढ्या बलशाली खानांनी आपल्याकडे मला पाठवलं नसतं.'

'खानसाहेबांना आमचे धन्यवाद द्या. जसे महाराजसाहेब, तसे खान आपणांस वडील आहेत. त्यांची भेट झाली, तर जरूर घेऊ.'

कृष्णाजी भास्करांनी खानाचे पत्र पुढे केले. राजांनी पंताजी गोपिनाथांच्याकडे पाहिले. पंताजींनी पत्र घेतले. उघडले. पंताजी वाचू लागले,

> 'तुमचा उद्धटपणा शहाच्या मनास झोंबत आहे. निजामशाही बुडाल्यानंतर स्वत: हस्तगत केलेला मुलूख आदिलशहाने मोंगलांना तहात दिला होता. तो डोंगरी किल्ल्यांनी भरलेला मुलूख तुम्ही काबीज केल्यामुळे तेथील राजा जळफळत आहे. चंद्ररावांचे विस्तीर्ण राज्य तुम्ही हरण केले आहे. कल्याण-भिवंडी घेऊन तुम्ही अल्लाह परवरदिगाराच्या मशिदी जमीनदोस्त केल्या आहेत; काजी व मुल्ला यांना कैद केलेले आहे. त्यासाठी, राजा, माझ्या आज्ञेप्रमाणे तू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संधी कर आणि सर्व किल्ले व मुलूख देऊन टाक. सिंहगड, लोहगड, पुरंधर, चाकण, नीरा व भीमा यांतील प्रदेश सोडून दे.’

‘एकंदरीत आमची धडगत दिसत नाही.’ राजे म्हणाले.

कृष्णाजी भास्कर म्हणाला, ‘राजे, माझा सल्ला विचाराल, तर खान म्हणतात, त्याप्रमाणे सल्ला करावा.’

‘तसं झालं नाही, तर?’

‘तर खानाची भारी फौज आपणांवर तुटून पडेल. खानाची ताकद किती प्रचंड, याचा तपशील राजांना मिळालाच असेल!’

‘ते आम्ही जाणतो. पण खानसाहेब एक विसरतात... आम्ही शहाजीराजांचे पुत्र आहो. आमचे एक बंधू अपघाती मृत्यू पावले. विजापूरच्या फर्जंद शहाजीराजांना दुसरा मुलगा गेलेला परवडायचा नाही.’

कृष्णाजी भास्कर चकित झाले. हा अनोखा वार होता. आपला पवित्रा बदलीत कृष्णाजी म्हणाले,

‘पण एवढ्या दूरवर गोष्टी न्यायची जरुरीच काय? आपण वाईला आलात, खुल्लमखुल्ला गोष्टी झाल्या, तर सारे गैरसमज दूर होऊन जातील.’

‘कृष्णाजी, गैरसमज आमचे नाहीत! कल्याणला मशिदी पाडल्या, हे खरं, की खोटं, हे खानांनी मनात आणलं, तर कळायला फारसा वेळ लागणार नाही. स्वत:च्या आचरणावर खान अंदाज बांधतात, म्हणून अशी गफलत होते.’

‘बारीकसारीक गोष्टी मनात न आणल्या, तरच यातून काही तरी चांगलं निघेल.’

‘आमच्या मनात काही नाही. आम्ही मनमोकळेपणानं विचार करू. आपण राहावं, आमचं उत्तर घेऊन जावं, अशी आमची इच्छा आहे.’

‘जशी आज्ञा!’ कृष्णाजी भास्कर म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी कृष्णाजींना मानवस्त्र देऊन त्यांना निरोप दिला.

कृष्णाजी भास्करांची एका स्वतंत्र घरात व्यवस्था केली होती. तिकडे कृष्णाजीपंतांना पाठवून राजे आपल्या महाली गेले. सदरेवरची मंडळी पंतांच्या भोवती गोळा झाली. खानाच्या पत्रास राजे काय उत्तर देतात, याबद्दल प्रत्येकाच्या मनात विचार सुरू झाले.

दुसऱ्या दिवशी राजांनी आपले सर्व विश्वासू मातबर गोळा केले. त्यांना घेऊन एकांतात खलबत बसले. खानाच्या पत्राचा मसुदा सांगण्यात आला. राजांनी खानाकडून अभय देऊन, शपथ घेऊन वाईला भेटावे, असा अनेकांनी सल्ला दिला. राजे म्हणाले,

'खान इतका सोपा वाटतो? मित्राचा अंदाज चुकला, तरी चालतो. पण शत्रू? त्याचा अंदाज कमी करून चालत नाही. शत्रूचं पुरं वजन वाढवूनच शत्रूला पाहावं. हे आमंत्रण इतकं साधं नाही. ज्या खानाला विजापूर दरबारानं आम्हांस सफा करून, जिवे मारून टाकण्याची आज्ञा दिली आहे, तो इतक्या सरळपणानं भेटेल? या खानाची कर्तूक आठवा. शिऱ्याच्या कस्तुरी रंगाला भेटीला बोलावून यानंच ठार केलं. खान महंमदाचा खून यानंच केला. एवढंच काय, पण खुद्द आमचे दादामहाराज यांना याच दगलबाजानं विश्वासघातानं मारलं. खानाला भेटायचं झालं, तर त्यानं इथंच येऊन भेटलं पाहिजे!'

'खान तयार होईल?'

'पाहू! जगदंबेच्या मनात असेल, तसं होईल!'

त्यानंतर राजांनी पंताजी गोपिनाथांची एकांती भेट घेतली. पंताजी गोपिनाथ म्हणजे बुद्धीचे आगर. धूर्त. खास मुरब्बी आणि विश्वासाचा माणूस. एवढा घरोबा की, सारे पंतांना 'पंताजीकाका' म्हणून म्हणत. पंताजी येताच राजे म्हणाले,

'पंत, खानाचा वकील आला, म्हणजे रिवाजाला धरून आमचाही हेजीब खानाच्या गोटात जावयास हवा. आमचे हेजीब म्हणून तुमची निवड केली आहे. आम्ही कृष्णाजी भास्करांस आज निरोप देतो. तुम्ही नंतर अफझलकडे जावं.'

'जशी आज्ञा!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पंत! आमचा तुमच्या निष्ठेवर विश्वास आहे. खान होईल त्या मार्गानं वळवायलाच हवा. ते कसब तुमचं आहे.’

राजांनी कृष्णाजी भास्करला बोलाविले. कृष्णाजीपंत येताच राजे म्हणाले,

‘कृष्णाजी भास्कर, आम्ही खानांच्या पत्राचं उत्तर तयार केलं आहे. ते तुमच्याबरोबर

दिलं, तर योग्य होणार नाही; रिवाजाला सोडून होईल. त्यासाठी खानांच्याकडे आम्ही आमचे हेजीब पंताजी गोपिनाथ यांना पाठवीत आहो. तुम्ही त्यांची व खानांची भेट घडवून द्यावी.’

‘जशी आज्ञा!’ कृष्णाजी भास्कर म्हणाला.

खानाच्या वकिलाला वस्त्रे देऊन सन्मानाने पाठविले गेले.

दुसऱ्या दिवशी पंताजी गोपिनाथ खानाकडे जायला निघाले. राजांनी त्यांना एकांती घेतले. राजे म्हणाले,

‘तुम्ही खानाशी सर्व बोलणी करा. आमचा मनसुबा तुम्हांस माहीतच आहे. खानाकडून प्रत्येक गोष्टीला क्रियाशपथ घ्या. त्यांनी मागितली, तर बेलाशक द्या. अनमान करू नका. तुमच्याबरोबर माणसं देत आहो; ती सारी नजरबाज आहेत. खानाचा हेतू काय आहे, याची पुरी खात्री करून घ्या. जेवढं पाहता, ऐकता येईल व समजून घेता येईल, तेवढं करून माघारी या. खानाकडे जाताना पालखीतून, खाशा इतमामानं जा. भवानी तुम्हांस यश देवो!’

पंताजी गोपिनाथांनी राजांना निरोप घेतला.

कृष्णाजी भास्कर आल्याचे कळताच खानाने तातडीने बोलावणे पाठविले. शिवाजीचे उत्तर ऐकायला खान अधीर झाला होता. कृष्णाजी भास्कर आला. खान शाही बैठकीवर बसून हुक्का पीत होता. कृष्णाजीकडे पाहून तो गर्जला,

‘कहो, कृष्णाजी! कुछ हाले मुलाकात बयान करो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपलं पत्र शिवाजीला दिलं. पत्रामुळं शिवाजी पुष्कळ नाराज दिसला.’

खान खुशीने हसला.

‘आपली ताकद शिवाजीला पुरी माहीत आहे.’

‘मग यायला तयार झाला?’

‘नाही! शिवाजी इथं यायला भितो. मी सांगितलं की, खानसाहेबांचा राग भारी असतो. खानसाहेब चालून आले, तर ते परवडायचं नाही.’

‘फिर?’

‘शिवाजी म्हणाला की, खानांना सांगा... फर्जंद शहाजीराजांना पण दुसरा मुलगा गेल्याचं आवडणार नाही.’

अफझलखानच्या हातातील हुक्क्याची नळी सुटली. ती खानाने उचलली; आणि तो मोठ्याने हसला. म्हणाला,

‘दुश्मन, हुशियार, तेज मालूम होता है!’

कृष्णाजीने शिवाजीचा गड, मुलूख... सारी माहिती खानाला दिली. राजांचा वकील येत असल्याचे सांगितले. खान विचार करीत होता. शिवाजीचा अंदाज लागला नव्हता. कुठे तरी पाणी वाढत होते.

दुसऱ्या दिवशी पंताजी गोपिनाथ खानाच्या छावणीत आले. कृष्णाजीपंत त्यांना सामोरे गेले. गोपिनाथपंत खानाच्या गोटाकडे जात होते. मागे-पुढे स्वार जात होते. मध्ये पांढऱ्या कपड्यांच्या भोयांनी पंतांची पालखी तोलली होती. दांडीच्या गोंड्यांना धरून गोपिनाथपंत छावणीवर नजर टाकीत होते. पालखी सुशोभित होती. पुढच्या दांडीला लावलेले चांदीच्या व्याघ्रमुखाचे डोळे माणकांचे होते. भगव्या रेशमी वस्त्रांनी पालखीच्या रेशमी दांड्या झाकल्या होत्या. खान गोपिनाथांची वाटच पाहत होता. गोपिनाथांनी खानाला मुजरा केला. कृष्णाजीपंतांनी राजांच्या वकिलाची ओळख करून दिली. खासगी भेटीची विनंती केली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खानाने साऱ्यांना दूर केले. गोपिनाथपंत खानाला म्हणाले,

‘आपल्या पत्रानं राजांना धन्यता वाटली. राजांनी आपल्याला उत्तर पाठविलं आहे.’

‘वाचा.’

पंताजी गोपिनाथ वाचू लागले...

> ‘आपली आज्ञा शिरसा मान्य! आपण कृपावंत म्हणूनच माझ्या गुन्ह्यांना माफी करू धजलात! आपण मागता आहा, ते सारे किल्ले व जावळी मी द्यायला तयार आहे. ज्यांच्या पुढे नजर वर करून पाहणे कठीण, अशा आपणांसमोर मी केव्हाही कट्यार ठेवण्यास तयार आहे.’

खानाच्या खुशीला हद्द उरली नाही. वरून हर्ष न दर्शविता खान म्हणाला,

‘मग राजे केव्हा येतात?’

‘माफी असावी, हुजूर! पण राजे इथं यायला डर घेतात. आपल्या स्नेहाचं, सेवेचं प्रतीक म्हणून राजांनी भेट पाठविली आहे. आज्ञा होईल, तर...’

‘जरूर!’

पंताजी गोपिनाथांनी टाळी वाजविली. हुजरे आत आले, आणि तबक ठेवून माघारी गेले. पंताजी गोपिनाथांनी तबकावरचे आच्छादन काढले. सुवर्णतबकात रत्नजडित म्यानात बंदिस्त असलेली सुवर्णमुठीची नाजूक कट्यार होती; आणि मखमलीच्या निळ्या, छोट्या गिर्दीवर मोत्यांचा कंठा होता. भान विसरून खानाने दोन्ही वस्तू उचलल्या. गोपिनाथपंत म्हणाले,

‘गुस्ताखी माफ हो, हुजूर! पण विजापूरदरबाराच्या कट्यारीपेक्षा ही कट्यार नामी आहे.’

‘मतलब?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपल्यापाशी जवाहिरे आहेत; ते कट्यारीची कदाचित किंमत करू शकतील. पण कंठ्याची किंमत करणं अशक्य!’

खान कंठा पाहत होता. एक एक मोती बोराएवढा होता. खान पुटपुटला,

‘शिवाजीपाशी अशी दौलत आहे?’

‘हुजूर, आपल्या मेहेरबानीची थोरवी काय सांगावी? हा तर एक बूंद आहे.’

‘पण एवढा भारी तोहफा द्यायचं कारण?’

‘आपण फर्जंद शहाजीराजांचे दोस्त, म्हणजे वडिलांसमान. आपला आशीर्वाद राजांना लाभला, तर राजे आपल्यासारख्या बुजुर्ग माणसावरून दौलत निछावर करायला मागे पाहत नाहीत, याचं आपणांस प्रत्यंतर येईल.’

खानाचा डावा हात दाढीकडे गेला होता. डोळे हातातल्या कंठ्यावर खिळले होते.

पंताजी गोपिनाथ सांगत होते, ‘राजे कचदिल आहेत; वाईला यायला घाबरतात. आपण कौल द्यावा. राजे निर्भय होऊन जावळीस येतील. तुम्ही मागाल, ते देतील.’

खानाने पंताजी गोपिनाथांच्याकडे पाहिले. त्याची नजर परत कंठ्यावर गेली. खान म्हणाला,

‘शिवाजीराजा हरामजादा! काफर! जावळी कुबल जागा. तिथं बोलावून दगा करणार नाही ना?’

पंताजी गोपिनाथ हसले. खान संतापला.

‘का हसतोस?’

‘ऐकलं होतं, खानांची छाती पोलादी आहे. हुजूर! एकच गोष्ट सांगतो. आपण जावळीला या. आपल्या सर्व सैन्यानिशी या. राजे ते भाग्यच समजतील. राजांचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपल्यासमोर काय पाडाव? त्यांची ताकद केवढी? मुंगीनं हत्तीशी झुंजतो, म्हटलं, तर ते जमेल का? आपण राजांना आदिलशाही अवकृपेतून सोडवून घेतलंत, तर राजे तृप्त होतील. करोडो होनांची बरसात करतील!'

'करोडो होन!'

'राजांना लढणं कठीण! ते कठीण नाही. तुमच्या बाबतीत तर मुळीच नाही.'

साठ हजार होनांसाठी बजाजीला सोडणारा खान करोडो होनांच्या चक्रात पडला. त्याच्या मनाचा गोंधळ वाढत होता. तो ओरडला,

'लेकिन तुम बम्मन हो! गवाह बनकर यकीन दिला सकते हो? हम राजा की मुलाकात जरूर लेंगे!'

पंताजी गोपिनाथांनी शपथ घेतली. खानाला करोडो रुपयांची संपदा दिसत होती. खानाला विचार करायला उसंत हवी होती. त्याने पंताजी गोपिनाथांना मानाने ठेवून घेतले.

पंताजी गोपिनाथ खानाच्या छावणीत खानाचा पाहुणचार घेत होते. कृष्णाजीपंतांनी या शिवाजीच्या वकिलांची अनेक सरदारांशी ओळख करून दिली. राजांची माणसे बावळटपणाने सारे पाहत छावणीत भटकत होती.

खानाने खास मसलत भरविली, आणि शिवाजीची भेट घेण्याचा आपला बेत सांगितला. वजीर सरदारांनी 'जावळीला जाऊ नये, शिवाजी विश्वासघात करील,' असा सल्ला दिला. खानाने कृष्णाजी भास्कराला विचारले,

'शिवाजी जावळी सोडून बाहेर येईल?'

'हुजूर! मी अंदाज काढला आहे. काही झालं, तरी जावळी सोडून बाहेर यायचं नाही, असा विचार करून शिवाजी प्रतापगडावर बसला आहे.'

खान दाढी कुरवाळीत विचार करीत होता. त्याने निर्णय जाहीर केला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शिवाजी हरामजादा आहे. सरळ जंगामध्ये तो उतरणार नाही. जावळीला सैन्य घेऊन जाऊ. सरळ सापडला, तर सरळ आणू. नाही तर जावळी मुलूख सफा करून शिवाजीचा मुर्दा घेऊन येऊ.’

हा विचार साऱ्यांना पटला. खानाने सर्वांना रजा दिली. कृष्णाजी भास्कर तेवढा ठेवून घेतला. खानाने विचारले,

‘कृष्णाजी, शिवाजीपाशी एवढी दौलत आहे?’

‘हुजूर! शिवाजी म्हणजे जातीचा लुटारू. ज्यानं जावळी लुटली, कल्याणखजिन्यासकट कल्याण-भिवंडी लुटली, मोगलांचं जुन्नर लुटून घरात आणलं, त्याच्याजवळ काय नाही? खानसाहेब! आपली गोष्ट सोडाच, पण मी आपला वकील म्हणून गेलो होतो, तर परत येतानं त्यानं मला भरजरी वस्त्रं, मोत्यांचा चौकडा, सुवर्णाची कडी व पदकं, एक अरबी घोडा व पाच हजार होन दिले.’

खान आश्चर्याने पाहत होता.

‘हां, हुजूर!’

‘कृष्णाजी, शिवाजीची दौलत हाती घेऊ. मग शिवाजी घेऊ. शिवाजी जातो कुठं?’

खान हसला; आणि तो हसल्यामुळे कृष्णाजीला हसावेच लागले.

दुसऱ्या दिवशी सन्मानाने पंताजी गोपिनाथांना परत पाठविले.

□

४

पंताजी वकिली करून गडावर आले. सदरेवर सारे सरदार पंताजींनी आणलेली बातमी ऐकण्यास उतावीळ होते. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पंत, खानांनी काय निरोप दिला?’

‘राजे, खान आपल्या नजराण्यानं खूश झाले. आपल्या विनंतीनुसार ते जावळीला यायला तयार आहेत. पण येताना ते सडे येणार नाहीत. त्यांच्याबरोबर त्यांची फौज सर्व सरंजामासह येईल.’

‘त्यात आम्हांला आनंद आहे... पंत, तुम्ही थकला असाल. विश्रांती घ्या.’

पंत मुजरा करून गेले.

सायंकाळी राजे एकटेच पूर्वेच्या बुरुजावर उभे होते. जावळी खोऱ्यात थंडी उतरू लागली होती. राजांना गारवा जाणवत होता. मानेवरचे केस वाऱ्याने रुळत होते. राजे भान विसरून समोरचे विस्तीर्ण जावळी खोरे निरखीत होते. मनात विचारांचे काहूर माजले होते. गडावर रात्र उतरली. चौक्या-पहाऱ्यांच्या मशाली फरफरू लागल्या. पाठीमागच्या पावलांच्या आवाजाने राजे भानावर आले.

‘कोण?’

‘मी, माणकोजी!’

‘काका! काळोखात कशाला आलात?’

‘राजे, थंडी उतरते आहे. गार वारा सुटला आहे. अशा वेळी नुसत्या अंगरख्यानं वावरणं बरं नव्हे, म्हणून शाल आणली.’

‘शाल? कुणी दिली?’

‘सदरेवर होतो. मनोहारीनं बोलावलं.’

‘उगीच राणीसाहेबांनी तिची निवड केली नाही.’ राजांनी अंगावर शाल घेतली व ते म्हणाले, ‘चल! जाऊ आपण.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दोघे वाड्यावर आले.

रात्रीचे भोजन झाले. राजे आपल्या महालात गेले. एकटेच बैठकीच्या लोडाला टेकून बसले. खूप वेळ तसाच गेला; आणि महालात मनोहारीने प्रवेश केला.

‘मनू, का आलीस?’ राजांनी विचारलं.

समयांच्याकडे पाहत मनोहारी म्हणाली, ‘आपली झोपायची वेळ झाली, तेव्हा समया शांत करायला.’

‘नको! राहू देत... आणि हे बघ, सदरेवर कोणी असेल, तर पाठवून दे. तू झोप जा.’

राजांनी पंतांना बोलवायला सांगितले. पंत आले. राजांनी तानाजीला हाक मारून महालाबाहेर उभे केले. राजांनी महालाचे दार लावून घेतले, आणि ते पंताजींना म्हणाले,

‘पंत, बसा. संकोच करू नका. खूप बोलायचं आहे.’

पंत बसले नाहीत. राजे येरझाऱ्या घालीत होते. एकदम ते थांबले. पंताजींच्याकडे पाहत राजे म्हणाले,

‘पंत, तुम्ही विश्वासाची माणसं. जुनी. राजकारणात पोहलेली. म्हणूनच आम्ही ही जबाबदारी तुमच्यावर टाकली. सदरेवर सारे होते, म्हणून आम्ही फार विचारलं नाही. घडला, तो करीणा सांगा. आम्ही ऐकायला आतुर आहो.’

पंतांनी प्रतापगड सोडल्यापासून खानाच्या छावणीत प्रवेश केल्यापर्यंतचा सर्व वृत्तांत सांगितला. पंत म्हणाले,

‘राजे, खान धूर्त आहे. बुद्धिमान आहे. जसा शरीरानं बळकट आहे, तसाच तो मनानं खंबीर आहे. पण...’

‘पण काय?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपला तर्क बरोबर ठरला. आपली भेट उघडताच, ती पाहताच खान बैठकीवरून उतरला. त्या दोन्ही चिजा पाहून त्याचे डोळे विस्फारले.’

‘खानाचा लोभी स्वभाव ओळखणं फारसं कठीण नव्हतं. पुढं सांगा.’

‘खान जावळीत यायला राजी आहे.’

‘त्याचा हेतू?’

‘मी गेल्यानंतर खानानं बैठक भरविली. साऱ्यांनी ‘जावळीत जाऊ नये,’ असा सल्ला दिला. पण खानानं ते मानलं नाही.’

राजे एकटक पंताजींच्याकडे पाहत होते. राजे म्हणाले,

‘पंताजी, हा आमच्या जीवनमरणाचा प्रसंग आहे. तुम्हांला भवानीची शपथ आहे. खानाच्या मनात काय आहे, हे आम्हांला खरं सांगा. हे संकट पार पडलं, तर राज्याचा कारभार तुमच्यासारख्या विश्वासू माणसाला आम्ही देऊ.’

पंताजी गोपिनाथांनी शपथ घेतली. ते म्हणाले,

‘राजे, राजकारण अत्यंत सावधतेनं करावं, हे उचितच आहे. आपण विश्वास धरावा. आजवर इमाने इतबारे सेवा केली, ती लक्षात घ्यावी.’

‘ती लक्षात घेतली, म्हणूनच ही जोखीम तुमच्यावर टाकली. सांगा, पंत. खानाचा इरादा मैत्रीचा आहे, की...’

‘राजे, खानाच्या मनात दुष्ट बुद्धी आहे. सल्ला करून, तुम्हांस भेटीस आणून, कार्यभाग साधताच दगा करून, कैद करून, विजापुरास न्यावे, ऐसे आहे.’

‘मग तुमचा सल्ला काय आहे?’

‘खान लालचावला आहे. त्याचा फायदा घेऊन, खानास नाना प्रकारे जावळीस घेऊन

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

येतो. तुम्हांत हिंमत असली, तर खानास एकांती एकांगी करून मारावा. लश्कर लुटावं. राज्य आपलं करावं.’

राजांना तो विचार पटला. पंताजींना राजांनी प्रसन्न होऊन पाच हजार होन दिले. ते म्हणाले,

‘पंत, तुम्ही खानाकडे जा. त्याला सांगा- राजा भितो. भेटीस यावयास धीर पुरत नाही. तरी आपण जावळीस यावे. हाती धरून, धीर भरवसा घेऊन, पातशहाचे मुलाजमतीस घेऊन जाऊन, मला ऊर्जित करतील, तरी थोरपणा आहे.’

दुसऱ्या दिवशी राजांचा निरोप घेऊन पंताजी गोपिनाथ खानाकडे रवाना झाले.

खान जावळीत उतरणार, याबद्दल राजांना कसलीच शंका नव्हती. राजांनी भराभर पावले उचलली. नेताजी पालकरांना जावळी आणि वाई रोखण्याचे काम दिले. खान जावळीत उतरला, की त्यांनी घाटमाथा सांभाळावा, असे ठरले. साऱ्या सरदारांच्या जागा अशाच तऱ्हेने राजांनी निश्चित केल्या. गडावरून जावळीचा नकाशा समोर होता. राजे सर्वांना आपापली ठिकाणे दाखवीत होते. सरदारांना आता चेव चढला होता. लढाईसाठी ते आतुर झाले होते.

राजे कोयना खोऱ्यात फेरफटका मारून आले. खानाला उतरण्यासाठी कोयना खोरे सोयीचे होते. खानाच्या तळासाठी राजांनी प्रतापगडापासून दक्षिणेस कोसभर अंतरावर असलेल्या ‘पार’ गावाजवळ खानाच्या छावणीची जागा निवडली. रडतोंडीच्या घाटाने उतरताना खानाला त्रास होऊ नये, म्हणून वाटेवरची झाडे तोडून मार्ग मोकळा केला.

पंताजी गोपिनाथ या वेळी खानाशी वाटाघाटी करीत होते. पंताजी गोपिनाथांनी खानाला पुरा विश्वास दिला. तो म्हणेल, ते कबूल केले. पंताजींनी सांगितले,

‘राजा कचदिल आहे; म्हणूनच आपल्याला जावळीत येण्याचा त्रास. तिथं भेटीस येतील. दिलासा करून बरोबर घेऊन जाणे.’

खानाने ते मान्य केले. निरोप घेता-घेता गोपिनाथांनी खानास विनंती केली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ऐश्वर्यात उणेपणा पडणार नाही. पण अशा भेटीच्या प्रसंगी काही तरी खास खरेदी करून खानांना भेट द्यावी, अशी राजांची इच्छा आहे. आपल्या छावणीत असलेला बाजार, हिऱ्यामोत्यांचे व्यापारी जर आपल्याबरोबर येतील, तर तिथंच, खरेदी होऊन आपला व आपल्या सरदारांचा यथोचित सत्कार करता येईल.’

‘बेशक! बेशक! हमारे साथ मोतिये, जवाहिरे सभी तो आयेंगे!’

खानाने आपल्या खास विश्वासाचे सरदार जावळीची व्यवस्था पाहण्यासाठी पंताजींबरोबर पाठविले.

खानास पुरा विश्वास यावा, म्हणून राजांनी त्याच्या सर्व सोयी करावयाचे मनावर घेतले. कोयनाकाठच्या ‘पार’ गावाजवळ सैन्याला तळ द्यायला प्रशस्त जागा व्हावी, म्हणून झाडेझुडपे तोडून चांगले विस्तीर्ण मैदान केले. दाट जंगलाने व्यापलेल्या कोयना खोऱ्यात तेवढीच मोकळी जागा दिसत होती. खानाच्या तळापासून जागोजाग धारकऱ्यांच्या गुप्त व प्रकट चौक्या ठेवून त्यांवर कारकून नेमले.

खानाच्या भेटीसाठी राजांनी गडाखालच्या माचीसोंडेची जागा निवडली. ही जागा अशा ठिकाणी होती की, गडावरून तेथे संपूर्ण लक्ष ठेवता येत होते. अनाजी मलकऱ्यांना राजांनी या जागी उत्तम सदर उभारण्याची आज्ञा केली. राजे म्हणाले,

‘अनाजी, सदर अशी तयार करा, की असली देखणी, ऐश्वर्यसंपन्न सदर विजापूरच्या दरबारीही नसावी.’

पंताजी गोपिनाथांबरोबर जी खानाची माणसे आली होती, त्यांनी कोयनातळाची जागा पाहिली. त्यांना ते ठिकाण पसंत पडले. तेथून भेटीची जागा नजरेच्या टप्प्यात येत होती; व नदीकाठ असल्याने तो पाठीशी घालून, प्रसंग आलाच, तर किल्ल्याला चटकन शह देता येण्यासारखा होता. राजांनी खानाच्या माणसांना भरपूर द्रव्य देऊन, त्यांना संतुष्ट करून परत पाठविले.

खानाने वाईची छावणी दुभंगली; आपली माणसे निवडली; व तळ जावळीला हलविण्याची आज्ञा दिली. खानाचा निम्मा तळ जावळीकडे सरकू लागला. हत्ती तोफांचे गाडे ओढू लागले. खानाबरोबर निवडक दहा-बारा हजार स्वार, तोफखाना, पायदळ,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बुतरनाला, बाणांचे उंट व जेजाला होता. जंगली व डोंगराळ प्रदेशातून एवढा कबिला चढविताना व जावळी खोऱ्यात उतरताना खानाच्या लोकांच्या नाकी दम भरला.

खान आपल्या प्रचंड लश्करासहित कोयना खोऱ्यात आला. छावणीची जागा पाहताच खान खूश झाला; रडतोंडीच्या घाटाने उतरताना झालेले सैन्याचे हाल विसरून गेला. शाही डेरे उभारले गेले. हजारो घोड्यांची पागा उभी राहिली. हत्ती साखळदंडांनी ठाणबंद केले होते. उंटांच्या तांड्यांनी पूर्वेकडचा माळ व्यापला. तोफांचे अवजड गाडे, लहान-मोठ्या तोफा छावणीत विखुरल्या होत्या.

खानाच्या सैन्याला मदत करण्यासाठी राजांनी शेकडो बेगारी छावणीत पाठविले होते. खानाबरोबर आलेले बाजारबुणगे छावणीपाशी आपला बाजार भरविण्यात गर्क झाले होते. त्यात हर जिन्नस भरला होता. मोतिये, जवाहिरे खानाच्या भेटीकडे डोळे लावून बसले होते. भेट होताच मानकऱ्यांना आहेर करण्यासाठी शिवाजी मोठी खरेदी करणार, याबद्दल त्यांची खात्री होती.

गडावरून खानाची छावणी दिसत होती. खानाच्या तळावर असलेल्या प्रत्येक वस्तूचा तपशील राजांना मिळत होता. खान छावणीत स्थिर होताच राजांनी दूर ठेविलेले सैन्य जवळ आणण्यास सुरुवात केली. ढवळेघाटात चंद्रगडावर लोक ठेवले. नेताजी पालकर महाबळेश्वरची वाट अडवून बसले होते. सिलमकर बाचीघोलीचे घाटी नेमले होते. जावळी अंगाला बांदल होते. अफझलखानाचे सैन्य चांगलेच कोंडले होते. पण खान निराळाच विचार करीत होता. शिवाजीची भेट घ्यायची. जमलं, तर शिवाजीला गिरफदार करायचं. नाही तर भेटीच्या निमित्ताने एवढी मोठी फौज जावळीत घुसलीच आहे; शिवाजी गडावर गेला, तर नुसत्या तोफांच्या माऱ्याने गड जमीनदोस्त करता येईल. शिवाजी जातो कुठं?

भेटीच्या अटी ठरविण्यासाठी दोहों बाजूंचे वकील एकमेकांकडे खेपा घालीत होते. भेटीच्या अटी ठरल्या. भेटीसाठी दोघांनी सशस्त्र यावे. सदरेत कोणीही दोनांपेक्षा अधिक खासबदार (शरीररक्षक) आणू नयेत. प्रथम खानाने भेटीच्या जागी यावे व राजांची वाट पाहावी. दोघांच्याही रक्षणासाठी आणखीन दहा-दहा सैनिक येतील. त्यांनी भेटीच्या जागेपासून बाणांच्या टप्प्यावर उभे राहावे. दोघांच्या भेटी एकांतात व्हाव्या. या अटी दोघांनाही मान्य झाल्या. एक दिवस आड करून भेटीचा दिवस ठरला.

भेटीच्या आदल्या दिवशी राजे संध्याकाळी भेटीच्या जागेवर गेले. त्यांनी शामियाना
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निरखला. चारी बाजूंनी दाट रान होते. माथ्यावर गड होता. राजांचा जय, पराजय तेथेच निश्चित होणार होता. राजे सारे डोळ्यांत साठवून माघारी गेले. राजगडावर जिजाबाईंना कळविण्यासाठी विश्वासू हेर पाठविला होता. राजांच्या जवळ निवडक माणसे होती. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर उद्या काय होणार, याची चिंता होती; आपले काम दक्षतेने पार पडावे, ही खबरदारीची जाणीव होती.

रात्र झाली.

षष्ठीची धीट चंद्रकोर आकाशात दिसत होती. खानाच्या तळावरचे असंख्य पलोते खानाच्या छावणीचा विस्तार स्पष्ट करीत होते. राजांचा खास नजरबाज तातडीने गडावर आला होता. राजांच्या महालात तो उभा होता. राजे पाठीवर हात बांधून येरझाऱ्या घालीत होते. बहिर्जी सांगत होता,

‘...खान भारी आहे. दीड गज उंच आहे. दोन वावेचा घेर आहे. पहार सहज वाकवतो व परत सरळ करतो, असं त्याचं बळ आहे. पडलेली तोफेची गाडी एकट्यानं उचललेली मी पाहिली आहे.’

‘अस्सं! ठीक. सांग...’

‘विजापूरहून येताना तो साठ बेगमा मारून आला, असं छावणीत बोलतात. त्याच्या गुरूनं पाहताच मस्तक दिसलं नाही, असं म्हटल्याचं सांगतात. अंगचं बळ हेच त्याचं हत्यार आहे.’

‘खानाबरोबर रक्षक म्हणून कोण येतो?’

‘बंडा सय्यदखेरीज खानाचा कोणावरही विश्वास नाही. तोच येणार, अशी खास बातमी आहे.’

‘हा सय्यद बंडा कोण?’

‘खानाच्या उंचीचा, अंगलटीत कमी भासला, तरी पोलादी हाडाचा आहे. पट्टा फिरवण्यात महशूर आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मतलब?’

‘नऊ हातांवरचा माणूस गारद करून, तो दुसरा हात करण्याआधी आपली पहिली जागा घेतो, असं सांगतात.’

‘दुसरा?’

‘दुसरा कोणी नाही. खान गाफील आहे. आपल्या बळाचा त्याला विश्वास आहे. छावणीत तह होणार आहे, हा भरवसा आहे. खानाच्या तळावर आपल्या माणसांची नजर आहे.’

‘नऊ हातांवरचा माणूस गारद करतो!...’ राजे पुटपुटले.

‘जी!’ बहिर्जी उद्गारला.

‘काही नाही, बहिर्जी!’ राजांनी आपल्या हातातील पोहची उतरविली; आणि ती बहिर्जीला देत ते म्हणाले, ‘तुझ्या कामाला तोड नाही. भेटीपर्यंत काही महत्त्वाचं समजलं, तर कळविण्यात विलंब करू नको. जा!’

बहिर्जी मुजरा करून गेला.

राजे काही क्षण विचारात होते. दुसऱ्या क्षणी त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. राजे गडबडीने सदरेवर आले.

नेताजी, बांदल, जेधे हे तर केव्हाच आपल्या जागी गेले होते. उरलेले राजांची आज्ञा ऐकण्यास उतावीळ होते. अत्रे, माणकोजी दहातोंडे, रांझेकर, सुभानजी इंगळे, येसाजी कंक, तानाजी मालुसरे, संभाजी कावजी असे अनेक वीर राजांच्याकडे पाहत होते. राजे सदरेवर येऊन बैठकीवर बसले. राजांनी विचारले,

‘माणकोजी, काय म्हणतात आमचे वीर?’

तानाजी म्हणाला, ‘जागंला बसून कट्टाळा आला. आता कामगिरी सांगा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तुम्हांला मुद्दाम ठेवून घेतलं आहे. तुम्ही आणि तुमच्या मावळ्यांनी उद्या शामियाना राखायचा आहे. दिवस उगवायच्या आत साऱ्यांनी आपापल्या जागा घ्यायच्या. खानाच्या माणसांच्या नजरेत एक माणूस येता कामा नये. खानाचा फडशा पडला, की वर आलेला एक माणूस खाली जाता कामा नये. हिरोजी, तानाजी, येसाजी, तुम्ही शामियान्याच्या बाजूला झाडीत आपल्या माणसांसह राहा. या प्रसंगी आमचं लक्ष एका खानावर नाही... नुसता खान गारद होऊन राज्य साधणार नाही. खानानं आणलेली अपार संपत्ती, शामियाने, बाडबिछायत, शेकडो तोफा, हजारो घोडी, उंट,हत्ती... सारं आपणांला हवं. त्यानंच आमचं राज्य संपन्न होणार आहे. हातचं काही गमावू नका.’

राजांचा प्रत्येक शब्द मनात साठविला जात होता. राजांनी विचारले,

‘आम्ही खानाला कसं भेटायला जावं?’

कृष्णाजी बंककर म्हणाले, ‘राजे, अंगाला सील करा.’

‘भेटीच्या अटींनुसार दोनच हत्यारबंद नेता येतील. आमच्याबरोबर कोणी यावं?’

सारे उतावीळ नजरेने राजांच्याकडे पाहत होते. राजे म्हणाले,

‘तुम्हां प्रत्येकाला यावंसं वाटतं, हे आम्ही ओळखतो. पण आम्ही आमची माणसं निवडली आहेत.’

‘कोण?’ माणकोजींनी अधीर होऊन विचारले.

‘एक, संभाजी कावजी. खानाच्या ताकदीला तोंड देणारा तेवढाच आम्हांला दिसतो.’

संभाजीची छाती फुगली. राजे म्हणाले,

‘संभाजी! हुरळून जाऊ नका. ताकदीबरोबरच अकलेचंही काम आहे. जे सांगेन, ते ध्यानी धर.’

‘आणि दुसरा?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी सर्वांवरून नजर फिरविली. त्यांनी विचारले.

'आमचा जिवा कुठं दिसत नाही?'

'असंल खालच्या सदरेवर.' माणकोजी उत्तरला.

'त्याला बोलवा.'

जिवा महाला आला. राजांनी विचारले,

'जिवा, तू येशील आमच्याबरोबर उद्या?'

साऱ्यांच्या इतकेच जिवाला आश्चर्य वाटले. तो आनंदून म्हणाला,

'नशीब माझं थोर!'

'जिवा, तयारीनं राहा. सकाळी सर्व सांगेन!'

राजांनी सर्वांना निरोप दिला. राजे झोपायला गेले. समया शांत करायला मनोहारी गेली, तेव्हा राजे शांतपणे झोपी गेले होते.

□

५

राजांना जाग आली. महालात मंद प्रकाश होता. महालाच्या कोपऱ्यात समईच्या दोन ज्योती थरथरत होत्या. पहाटेचा गारवा महालात उतरत होता. राजांनी पांघरूण दूर केले. पलंगावर बसून त्यांनी नित्यस्मरण केले; हात जोडले; आणि ते पलंगाखाली उतरले. सज्जापाशी जाऊन त्यांनी दृष्टी टाकली. गडावर काळोख होता. पूर्वेला उजाडल्याची जाग अद्याप नव्हती. राजांनी आवाज देताच हुजरे धावले.

मुखमार्जन, स्नान आटोपून राजे महालात आले. नित्यपूजेच्या स्फटिकशिवलिंगाची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यांनी पूजा केली; आणि राजे सदरेत आले. आपल्या बरोबरचे दहा रक्षक निवडून बाकीच्यांना त्यांनी वेगवेगळ्या कामगिऱ्या सांगितल्या, गाफील न राहण्याबद्दल आज्ञा दिली. सारे भरल्या मनाने राजांचे रूप न्याहाळून, मुजरा करून पहाटेच्या अंधारात गड उतरले.

हळूहळू सारे जावळी खोरे जागे होऊ लागले. पक्ष्यांची किलबिल वाढली. पूर्वेला पांढरी कड धरली. दिवस उगवायचा समय जवळ येत होता. राजे खाशा माणसांच्या बरोबर केदारेश्वराकडे जात होते. राजांनी केदारेश्वराची पूजा केली. तीर्थप्रसाद घेऊन राजे सदरेजवळच्या बुरुजावर उभे राहिले. राजांच्या मस्तकी शिवगंध दिसत होते. कपाळावरून मागे परतविलेले केस मानेवर रुळत होते. कानात चौकडा शोभत होता. राजे मुलूख न्याहाळीत होते. खानाच्या तळावरून हत्तींचे ओरडणे ऐकू येत होते. कोयनेचे पात्र धवल धुक्याने आच्छादिले होते. डोंगरकपारीवर विरळ धुक्याचे पट्टे कमरबंदासारखे शोभून दिसत होते. उगवत्या सूर्यकिरणांत महाबळेश्वराचा माथा रूप घेत होता. राजांनी महाबळेश्वराला वंदन केले; उगवत्या सूर्यनारायणाचे दर्शन घेतले; आणि ते माघारी वळले.

गडाच्या सर्व चौक्या-पहाऱ्यांची त्यांनी जातीने पाहणी केली. आज्ञेप्रमाणे प्रत्येक तोफेचे दारूसामान दारूखान्यातून आणून तोफांजवळ ठेविले जात होते. तोफा ठासून तयार होत्या. गडाचा बंदोबस्त पाहून राजे वाड्यात आले. सदरेवर राजांच्या बरोबर जाणारी मंडळी हजर होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर तेज होते. आपापल्या परी आपल्या जोखमीची बजावणी प्रत्येकजण करीत होता. राजे सदरेवर आले. राजे म्हणाले,

‘आम्ही यशस्वी होऊ, यात शंका नाही. पण दुर्दैवानं तसं घडलं नाही, तर... आम्ही गेलो, म्हणून धीर सोडू नका. सगळ्यांना सांगितलं, तेच तुम्हीही ध्यानी ठेवा. आज ह्या घडीला प्रतापगडापासून सुप्यापर्यंत आमची फौज जंगलराईतून दबा धरून बसली आहे. खानासकट पुऱ्या फौजेचा निकाल लावा. खानाचा बीमोड करून राजगड गाठा. माणकोजी, तुमच्यासारख्या मंडळींनी धीर द्यावा. संभाजीबाळांना गादीवर बसवून आम्ही सुरू केलेलं कार्य तडीला न्या.’

साऱ्यांचे डोळे त्या बोलांनी भरून आले. येसाजी डोळे टिपीत म्हणाला,

‘राजे! तुमी हाय, तर राज्याला सोबा!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘येसाजी, हा विचार सोडा. आपण सारे राज्याशी इमानी! शिवाजी टिकतो, की नाही, हा प्रश्न नाही. राज्य टिकतं, की नाही, हा सवाल आहे. राज्य राखलंत, तर असे दहा शिवाजी येतील!’

मध्यान्हीचा समय जवळ येत होता. राजांनी पंताजी गोपिनाथांना खानाला आणण्यासाठी रवाना केले. पंत जात असता राजांनी सांगितले,

‘पंताजी, खान तहाच्या अटी पाळतो, हे पाहा. आम्ही भेटल्याखेरीज खानाला नजरेआड करू नका.’

‘राजे, आपण काळजी करू नये. खानाला एकटा आणून सामोरे उभा करतो. खान धोकेबाज आहे; विश्वासघात करण्यात पटाईत आहे. संधी एकदाच येते, हे न विसरता जे करायचं, ते करावं, एवढीच विनंती आहे. राजे, आता भेट होईल, ती खानाच्या बरोबर. संभाळून राहा, राजे!’

‘पंत, काळजी करू नका!’

राजांनी पंताजींना मिठी मारून निरोप दिला.

राजे जिवा महालाला आणि संभाजी कावजीला घेऊन आपल्या महाली गेले.

‘जिवा, तुझ्या पुढच्या कामगिरीआधी दुसरी छोटीशी कामगिरी आहे. तुझी कैची आहे ना?’

‘जी!’

‘घेऊन ये!’

जिवा कैची घेऊन आला. मंचकावर बसत राजांनी सहजपणे सांगितले,

‘जिवा, आमची दाढी उतर. सहजपणे हाती न यावी, एवढी बारीक कर.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिवाने राजांची दाढी उतरविली. गालाबरोबर राहिलेल्या दाढीवर हात फिरवीत राजे म्हणाले,

‘हे छान झालं. आता लक्षात घ्या.’ राजे म्हणाले, ‘संभाजी, जिवा, तुम्ही दोघे शामियान्याच्या आमच्या प्रवेशद्वाराजवळ उभे असणार. तसा काही प्रसंग घडलाच, तर जिवा, तू सय्यद बंडाकडे लक्ष ठेव. माझ्याकडे मुळीच लक्ष ठेवायचं नाही. समजलं?’

‘जी!’

‘आणि, संभाजी, तू खानाकडे लक्ष दे. माझ्या मागे मात्र सावलीसारखा राहा. मला डोळ्यांआड करू नको.’

‘जी!’

त्यानंतर राजांनी, अन्न नको म्हणू नये, म्हणून थोडेसे भोजन केले. मध्यान्हीचा दिवस आला होता. राजे कपडे करण्याच्या तयारीला लागले. महालात राजांनी सांगितलेले सर्व कपडे काढून ठेविले होते.

राजांनी प्रथम जरी बख्तर अंगात घातले. त्यावर श्वेत अंगरखा चढविला. डोईला बख्तर घालून त्यावर आपला जिरेटोप चढविला. पायांत चोळणा घालून कास कसली. कमरेला जरी दुशेला आवळला. उजव्या हाती बिचवा खोवून, राजांनी आपल्या कानांतला चौकडा उतरला. भवानी तलवार जिवाच्या हाती देत राजे म्हणाले,

‘प्रसंग पडला, तर हाती दे.’

पलंगावरचे शेवटचे शस्त्र राजांनी उचलले. तीक्ष्ण टोकांनी सजलेले चार नख्यांचे ते वाघनख राजांनी डाव्या हातात चढविले. वाघनखाच्या कड्या सुवर्णाच्या होत्या. दोन्हींवर तेजस्वी हिरे चमकत होते. मिटलेल्या मुठीवर फक्त अंगठ्या दिसत होत्या. मुठीत वाघनख अंग आवळून बसले होते.

तुताऱ्यांचा आवाज झाला. चौघडा झडला. खान भेटीच्या जागी यायला निघाला होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे महालातून बाहेर पडायला निघाले, तोच अचानक मनोहारी आली. काही न बोलता तिने राजांच्या पायांवर मस्तक ठेविले. तिच्या मस्तकावरून हात फिरवीत राजे म्हणाले,

‘वेडे! असं करू नको. आम्ही येऊ. खचित येऊ!’

एवढे बोलून राजे जायला निघाले. तोच मनोहारी म्हणाली,

‘महाराज! थोडं तसंच थांबावं.’

राजे तसेच उभे राहिले. मनोहारी चांदीचे पंचपात्र सामोरे घेऊन आली. राजांनी पाहिले, तो त्या पात्रात केशरी पाणी होते.

‘हे काय?’

‘पांढऱ्या शुभ्र कपड्यांनी बाहेर पडू नये, म्हणतात. केशरपाणी आहे. शिडकावा करून घ्यावा.’

‘मग तूच कर ना!’

मनोहारी आपल्या उजव्या हाताची पाचही बोटे पंचपात्रात बुडविली, आणि तिने राजांच्या अंगरख्यावर बोटांनी केशरपाणी उडविले. राजे हसले आणि चालू लागले.

राजे वाड्याबाहेर आले. चौकी-पहारेवाले राजांच्या आगमनाबरोबर मुजरे करीत होते. भर उन्हाच्या किरणांत राजे केदारेश्वराजवळ जाऊन पोहोचले. केदारेश्वराला वंदन करून राजे बुरुजावरून पाहत होते. खान छावणी सोडून निघाला होता.

खान खुशीत होता. साऱ्या छावणीत ती खुशी पसरली होती. आनंदाने छावणीची मेजवानी पार पडली होती. काहींचे जेवण अद्याप व्हावयाचे होते. खान शाही पालखीत येऊन बसला. पालखी उचलली गेली. खानाबरोबर तळपते तेगे घेतलेले पंधराशे स्वार चालू लागले. ते पाहताच पंताजी गोपिनाथ पुढे धावला. खानाला तो आर्जवाने म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘खानसाहेब, अटीप्रमाणे वागायला हवं. पंधराशे स्वार पाहताच गडाखाली उतरलेला राजा आपली धास्ती खाऊन माघारी जाईल; भेट होणं अशक्य होईल.’

खान हसला. शक्य झाले, तर त्याला स्वार न्यायचे होते. खान म्हणाला,

‘बिल्कुल दुरुस्त!’

कृष्णाजी भास्कराला स्वार माचीखालीच ठेवण्याची आज्ञा खानाने केली. खानाची पालखी माचीची टेकडी चढू लागली. खान माचीवर आला. शामियान्यासमोर पालखी ठेवली गेली. खान उतरला. एखादा पर्वत उभा ठाकावा, तसा ता अजस्त्रकाय खान कमरेवर हात ठेवून शामियाना निरखीत होता. शामियान्याचे सोन्याचे चंदराई कळस उन्हात तळपत होते. नाजूक नक्षीदार शिसवी खांबांनी शामियान्याला आधार दिला होता. रेशमी काढण्यांच्या तणावा लावल्या होत्या. भारी कापडाचे पडदे लाविले होते. खान थक्क होऊन ते ऐश्वर्य पाहत होता. पायांखाली जाड, भारी गालिच्यांची बैठक होती. फितवीला चौफेर कनातीच्या किनखापी व पडद्यांना मोत्यांच्या झालरी होत्या. भरजरी अस्मानगिरी केली होती. शामियान्यात बैठकीसाठी खास चौथरा उभारण्यात आला होता. हिरव्या कंच मखमलीने तो चौथरा आच्छादित होता. डोळे दिपवील, असे जरीचे सुबक काम असलेली आभरणे गिर्द्या-लोडांवर शोभत होती. सुवर्ण-धूपदाण्यांतून धूपाची वलये उठत होती. कस्तूरीचा सुगंध पसरला होता. मुरादाबादी पिकदाणीपासून ते बऱ्हाणपुरी नक्षीदार सुवर्णहुक्क्यापर्यंत सर्व इंतजाम त्या शामियान्यात होता.

पंताजी गोपिनाथांनी बैठकीवर बसण्याची विनंती केली. खान भानावर येऊन म्हणाला,

‘शिवाजी स्वत:ला कोण समजतो? पातशहापाशी अशी दौलत नाही. केवढे हे मोती! केवढा हा दिमाख!’

पंताजी म्हणाले, ‘मी सांगितलं होतं, ते हुजुरांना पटलं, तर! हा माल परका नाही. पातशाहीचा माल पातशाहीकडे जाईल.’

खान मनापासून हसला. बैठकीवर बसत तो म्हणाला, ‘तुमच्या राजियास लौकर आणा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पंताजींनी तातडीने हेजीब पाठविला. राजे गडावर तयारच होते. राजांनी माणकोजींच्याकडे पाहिले. माणकोजी खचला होता. राजांना त्याने ते सहा वर्षांचे असताना पाहिले होते. पोरासारखे राजांवर प्रेम केले होते. राजांची दृष्टी भिडताच म्हाताऱ्याची मान कापू लागली. डोळे भरून आले. राजांनी माणकोजींचे पाय शिवले. ते म्हणाले,

‘माणकोजी, तुम्हांला महाराजसाहेब मानीत. तुम्हीच आशीर्वाद द्या.’

‘शिवबा!’ म्हणत माणकोजींनी राजांना उठविले; आणि मिठी मारली. माणकोजी म्हणाले,

‘राजा! सोनं लुटून ये!’

राजांनी माणकोजींना सावरले. ते म्हणाले,

‘भवानी आम्हांस राखील. आमची चिंता करू नका. काही झालं, तरी राज्य विसरू नका.’

राजांनी तोफेकडे पाहिले. इशारतीची तोफ सज्ज होती. राजांनी जिवाकडून वाघनखे घेतली. मस्तकी लावून डाव्या हाती घालून मूठ मिटली. राजे पायऱ्या उतरू लागले. गडाच्या प्रथम दरवाज्यात राजांचा घोडा सजून उभा होता. राजांनी आपल्या जिवा-संभाजीच्या घोड्यांना शामियान्याजवळ आणून ठेवायला सांगितले. राजे दोन खास रक्षकांसह व दहा जोखीमदारांसह पायीच निघाले. शामियान्याचे अंतर कमी होत होते. शामियाना दिसू लागला. शामियान्याच्या दुसऱ्या बाजूस बाणाच्या टप्प्यावर खानाचे दहा रक्षक तळपते तेगे घेऊन उभे होते. खानाच्या मेण्याचे बत्तीस भोई एका बाजूला अदबीने खडे होते. राजांचे दहा रक्षक त्याच अंतरावर उभे राहिले. जिवा-संभाजींसह राजे शामियान्यात निघाले. कृष्णाजी भास्कर सामोरे आले. राजांनी मुजऱ्याचा स्वीकार केला. राजे पडद्याजवळ गेले. त्यांची नजर आत गेली. राजे तसेच दोन पावले माघारी गेले. पंताजी गोपिनाथ लगबगीने बाहेर आले. राजांनी विचारले,

‘पंत, आत खानाच्या शेजारी कोण आहे?’

‘बंडा सय्यद आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘त्याला ठरल्याप्रमाणे बाहेर जायला सांगा.’

खानही अस्वस्थ झाला होता. गोपिनाथांनी विनंती करताच खानाच्या चेहऱ्यावर छद्मी हास्य उमटले. त्याने सय्यद बंडाला बाहेर उभे राहण्याची आज्ञा केली. दाराशी जिवा-संभाजींना उभे करून राजे कृष्णाजीबरोबर आत प्रवेश करते झाले.

खानाचे रूप राजांनी क्षणात हेरले. मोगलाई पगडीवर पाचूंच्या जडावाचे हिरवे गर्द पिंपळपान चमकत होते. चेहऱ्यावर हास्य होते. डोळे राजांच्या वर रोखले होते. धुराचा लोट उठावा, तसा खान चौथऱ्यावर उभा राहिला.

राजांचा बांधा अमळ ठेंगणा व सडपातळ. खानाच्या तुलनेने ते फारच किरकोळ भासत होते. पंताजी गोपिनाथांनी ओळख करून दिली.

‘वीजारमताब हुजूर अफझल खान माहमदशाही!’

कृष्णाजी भास्करांनी सांगितले,

‘महाराज शिवाजीराजे भोसले.’

खानाच्या चेहऱ्यावर हास्य उमटले. तो राजांच्याकडे बोट दाखवून विचारता झाला,

‘शिवाजी शिवाजी म्हणतात, तो हाच काय?’

दोन्ही वकिलांनी माना हलविल्या.

राजांनी निर्भयपणे खानाकडे पाहिले, आणि राजांचा कणखर आवाज उमटला,

‘खान खान म्हणतात, तो हाच काय?’

दोन्ही वकिलांनी आश्चर्यचकित होऊन कळायच्या आत होकारार्थी मान डोलविल्या; आणि अदबीने ते मागे सरले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शामियान्याच्या खास चौकात फक्त दोघे उरले. खानाने आपले विशाल बाहू पसरले; आणि तो म्हणाला,

'आवो, राजे!'

राजे धीम्या पावलांनी चौथरा चढून गेले. त्यांनी जगदंबेचे स्मरण केले; आणि अफझलचे हात राजांच्या पाठीवर पडले. शिवाजीराजांनी खानाच्या उजव्या छातीवर मस्तक टेकले. खानाचे बळ वाढत होते. खान हसला; आणि त्याने राजांचे मस्तक डाव्या बाजूला घेतले. खान राजांचे मस्तक काखेकडे नेऊ पाहत होता. खानाच्या चेहऱ्यावर विजयाचे हसृ उमटले होते. तोच ते हास्य विरले. डोळे विस्फारले गेले. तीव्र वेदना मुखावर प्रकटली. खानाच्या वेदनेसह त्याचा संताप उसळला. त्याने जमदाड उपसली, आणि राजांच्या पाठीत खुपसली. पण ती जरी कुडत्यावरून अंगरखा फाडीत सरकली. राजांनी त्याच क्षणी बिचवा उपसून खानाच्या उजव्या बाजूत भोसकला. सर्व ताकदीने बिचवा आडवा ओढला. खान त्या वाराने मागे कलला. खानाच्या पकडीतून सुटका करून घेत राजांनी चौथऱ्याखाली उडी मारली. तोच संतापाने बेभान झालेल्या खानाचा दुसरा वार राजांच्या मस्तकावर झाला. जिरेटोप तुटून, आतले जरी बख्तर फुटून त्या वाराने राजांच्या टाळूवर निसटती जखम झाली. सुन्न झालेले राजे स्वत:ला सावरीत असतानाच खान ओरडला,

'दगा ऽ ऽ! दगा ऽ ऽ!'

शामियान्यात सर्व लक्ष केंद्रित करून दाराशी उभे असलेले संभाजी कावजी व जिवा आत घुसले. जिवाने पाहिले, तो बधिर झालेले राजे शामियान्यात उभे होते. दुसऱ्या दरवाज्याने बंडा सय्यद पट्टा चढवून पुढे सरकत होता. क्षणाचाही अवधी न घेता जिवा महालाने बैठक घेतली. शिवाजीवर लक्ष ठेवून येणाऱ्या सय्यदचे लक्ष पळभरच हाताखाली पोहोचलेल्या जिवाकडे नव्हते. राजांच्यापासून अगदी नजीक पट्टा आला असता जिवाने तो हात आपल्या तलवारीने कलम केला. सय्यदचा हात पट्ट्यासह तुटला. सय्यदची किंकाळी घुमली. आश्चर्यचकित झालेला सय्यद कुठून वार आला, हे पाहत असतानाच जिवाने दुसरा वार केला. सय्यद कोसळला.

संभाजी खानाकडे बघत होता. रक्तबंबाळ झालेला खान दुशेल्याने पोट बांधून दिसेल त्याचा आधार घेत, रक्त सांडीत शामियान्याच्या बाहेर जात होता. झोकांड्या देत त्याने पालखी गाठली. भोयांनी ती उचलीपर्यंत संभाजी धावला. कसलाही विचार न करता त्याने

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भोयांचे पाय तोडले. पालखी पडली, आणि संभाजीची तलवार खानाच्या छातीत घुसली.

झाडीत लपलेले सारे वीर एकदम तुटून पडले. एकच चकमक सुरू जाली. भानावर आलेले राजे त्वरित शामियान्याच्या बाहेर पडले. जिवाने भवानी तलवार राजांच्या हाती दिली. राजांनी घोडे गाठले. राजे स्वार झाले, तोच कृष्णाजी भास्कर तळपत्या तलवारीनिशी धावत आला. तो ओरडला,

'राजे, घात केलात!'

कृष्णाजीने केलेला वार राजांनी तलवारीवर झेलला. प्रत्येक क्षणाला किंमत होती. राजे ओरडले,

'पंत! तुम्ही जा!'

संतापाने बेभान झालेल्या कृष्णाजी भास्कराने दुसरा वार उचलला. राजांचा नाइलाज झाला. त्यांनी बसल्या घोड्यावरून कृष्णाजीवर वार केला. कृष्णाजी गतप्राण होऊन कोसळले.

सगळीकडे चकमक झडत होती. राजांनी पाहिले, जिवा राजांच्या पाठोपाठ स्वार झाला होता; पण संभाजी कावजीचा कोठे पत्ता नव्हता. तोच संभाजी कावजी दिसला. शामियान्याच्या उजव्या बाजूने संभाजी येत होता. उजव्या हातात खानाचे मस्तक होते. संभाजी स्वार होताच राजांनी टाच मारली. भरधाव वेगाने तिन्ही घोडी गडाकडे उधळली.

सारे डोळ्यांत प्राण आणून गडावरून पाहत होते. गडाच्या प्रथम दरवाज्यापाशी राजे पायउतार झाले, आणि पायऱ्यांवरून ते धावत सुटले. प्रथम दरवाज्यात येताच त्यांनी खुणेचा कर्णा वाजवायला सांगितला. सारे विस्फारित नेत्रांनी राजांच्याकडे पाहत होते. पांढरा शुभ्र अंगरखा पाठीवरून फाटून त्याच्या दशा वाऱ्यावर उडत होत्या. समोरची बाजू रक्ताने भरली होती. मस्तकावर केस विस्कळीत झाले होते.

राजे ओरडले, 'पाहता काय? इशारतीचा कर्णा वाजवा!'

क्षणात दरवाजा बंद झाला. कर्णा वाजला. राजे तडक पायऱ्या चढत होते. राजे आत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

येताच प्रत्येक दरवाजा बंद होत होता. राजे वरच्या दरवाज्याशी आले, तोच गडावर तोफ झाली. सारा आसमंत त्या आवाजाने हादरला.

राजे गडावर आले. जावळीतून ‘हर हर महादेव’ ची गर्जना उठली. राजे सदरेवरच्या दरवाज्यापाशी आले. माणकोजी थरथरत सामोरे आले. नाना अशुभ कल्पनांनी त्यांचे मन पेटले होते. रक्ताने माखलेले राजे त्यांनी गडावरून पाहिले होते. राजांना हात देण्यासाठी माणकोजी पुढे झाले. काळजीने भान हरपून निघालेले माणकोजी पाहताच राजे त्यांना मिठी मारीत म्हणाले,

‘माणकोजी, आम्हांला काही झालं नाही. आमची फत्ते झाली. खान मारला गेला!’

राजे तडक केदारेश्वराजवळ आले. त्यांनी मंदिरात प्रवेश केला. त्याच वेळी देवाजवळ धरणे धरून बसलेली मनोहारी तोफेच्या आवाजाने आनंदाने बाहेर यायला निघाली होती. तिचे लक्ष राजांच्याकडे गेले. रक्ताने माखलेले बोडके डोके पाहताच तिला धक्का बसला. दोन्ही हातांत तोंड झाकून ती फिरली. उभ्या जागी तिला हुंदका फुटला. त्याच वेळी राजांचा हाताचा स्पर्श तिच्या खांद्याला झाला. कानांवर शब्द आले,

‘मनू! हे रक्त आमचं नाही. शत्रूचं आहे. आम्ही सुरक्षित आहो.’

त्या शब्दांनी अचानक आनंदलेली मनोहारी वळली. डोळ्यांत पाणी होते. चेहऱ्यावर आनंद होता. ओठांवर हसू उमटत होते. राजे म्हणाले,

‘एकाच वेळी डोळ्यांत पाणी आणि ओठांवर हसू! असं रूप चुकूनही पाहायला सापडायचं नाही.’

केदारेश्वराला वंदन करून राजे तटावर आले. प्रतापगडाच्या तोफेबरोबर साऱ्या गडांच्या तोफा डागल्या जात होत्या. राजांच्या राज्यात इशारत पसरत होती.

राजे बेभान होऊन गडावरून कोयना खोरे पाहत होते. ते पाहत असताना मागे उभे राहिलेले माणकोजी म्हणाले,

‘राजे, आता चिंता कसली? मस्तकावर जखम झाली आहे. त्यावर उपचार झाल्याविना

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपण इथं उभे राहिलात, तर मासाहेबांचा दोष या पिकल्या पानावर पडेल. आता आपण सत्वर महाली जाऊन पोशाख बदलून घ्यावा.'

राजांनी माणकोजींच्याकडे पाहिले; आणि काहीही न बोलता ते वाड्याकडे चालू लागले.

माणकोजी उभ्या जागेवरून खानाचा तळ पाहत होते.

खानाचा तळ पुरा गाफील होता. खान भेटीसाठी रवाना झाला, तरी खानाची छावणी जेवली नव्हती. सकाळपासून थंडावलेली छावणी नुकती कुठे तापत होती. हत्ती ठाण्यावर झुलत होते. उंटमाळ उग्र वासाने दरवळत होती. खानाचे सरदार दोन प्रहरची विश्रांती घेण्याच्या विचारात होते. तोच गडावरून तोफ झाली. भेटीच्या सन्मानार्थ तोफ झाली, असे समजून छावणी निर्धास्त झाली. निःश्वास पार पडले. तोच छावणीभोवती नवी सृष्टी निर्माण झाली. आजूबाजूच्या रानावनांतून 'हर ऽ हर ऽ महादेव' ची गर्जना उठली.

थोड्या वेळापूर्वी पक्ष्यांच्या आवाजांनी किलबिलणारी, हिरव्या गार वनश्रीने नटलेली सृष्टी काळालाही न जुमानणाऱ्या शूर शिपायांनी गजबजून उठली. जिकडे पाहावे, तिकडून शिवाजीचे लोक उतरत होते. सर्रास कापाकापी सुरू झाली. बाजी-सर्जेरावांनी तर पराक्रमाची शर्थ केली. माचीखाली थांबलेले हत्यारबंद दीड हजार सैनिक केव्हाच कापले गेले होते. जेधे-बांदलांनी पार-घाटाचे लश्कर मोडले. मोरोपंतांनी त्यांना साथ दिली. सर्व रानभर एकच गोंधळ माजला. महाराजांच्या सेनेने व गाववाल्यांनी लोकांनी एक होऊन एकच किलकारी करून दिली.

साऱ्या वाटा झाडे तोडून अडविल्या गेल्या होत्या. शिवाजीराजांचे लोक अखंड उतरत होते. कोणी हत्यार घ्यावे, कोणी घोडे धरावे, कोणी भारी माल कबज्यात घ्यावा, अशी सुरुवात झाली. हत्यार धरील, त्याला जिवे मारले जात होते. अफझलखानाचा फर्जंद फाजलखान लश्करात होता. तो मोठ्या मुश्किलीने पळून गेला, म्हणून वाचला. अफझलचे दोघे पुत्र मात्र कैद झाले. काही प्रहरांपूर्वी ऐश्वर्यात तळपणारी छावणी आता प्रेतांच्या खचात आणि जखमींच्या आक्रोशात विखुरली गेली. भालाभर सूर्य असता खानाची पाराची छावणी पुरी गारद झाली; आणि विजयाची वार्ता देण्यासाठी स्वार गडाकडे दौडला.

राजे कपडे बदलून सदरेवरच्या बुरुजावर उभे होते. गडाच्या दरवाज्याशी स्वार येत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होता. खालच्या टप्प्यावर स्वार असताच अधीर झालेले राजे ओरडले,

‘अरे, सांग! काय झालं?’

आनंदाने स्वार मुजरा करून ओरडला, ‘आपली फत्ते झाली, महाराज!’

राजे आनंदाने माघारी वळले. गडावर आनंद मावत नव्हता. त्याच वेळी वाई, सुपे, शिरवळ, सासवड या सर्व ठिकाणी खानाच्या सैन्यावर मराठी सेना तुटून पडली होती.

राजे सदरेवर आले. खानाचे मस्तक सारे पाहत होते. राजे संभाजी कावजीला म्हणाले,

‘संभाजी, अरे, आम्ही तुला आधीच सांगितलं होतं की, बळापेक्षा बुद्धी वापर; मी सांगेन, तेवढंच कर. या जिवानं बघ, सांगितलं, तेवढं काम कसं चोख पार पाडलं. खानाच्या वारानं आमच्या मस्तकावर जखम झाली होती. आम्ही थोडे बेसावध होतो. पण जिवानं आमच्याकडे मुळीच लक्ष दिलं नाही. त्यानं लक्ष ठेवलं सय्यद बंडावर. जिवानं थोडी जरी कुचराई केली असती, तरी आज आम्ही विजय मिळवूनही इथं दिसलो नसतो. तू मात्र आमची पाठ सोडून खानामागे धावलास. आज्ञा नसता उत्साहाच्या भरात खानाचं मस्तक घेऊन आलास. संभाजी, अशा प्रसंगी क्षणाला फार महत्त्व असतं. अरे, खान कुठं पळत होता?’

सदरेवर आलेल्या गोपिनाथांच्याकडे लक्ष जाताच राजांच्या चेहऱ्यावर हास्य विलसले. पंतांनी राजांना मिठी मारली. राजा-प्रजेचे अंतर सरल्याचा तो क्षण होता. दोघे मुत्सद्दी एकमेकांच्या मिठीत असूनही काही बोलत नव्हते. राजे म्हणाले,

‘पंत, तुम्ही दिसला नाहीत. आमचं मन चिंताग्रस्त झालं.’

‘राजे, तुम्ही निघालात, पण पाऊल उचलेना. तुम्ही जाताच येसाजींनी जिवाच्या बाजीनं वाटा रोखल्या. कळसूत्री बाहुल्यांसारखे आमचे वीर चारही बाजूंनी प्रकटले. एकच कापाकापी सुरू झाली. वर आलेला एकही माणूस खाली उतरत नाही, हे सारे पाहत होतो. तोच तोफ झाली. त्याच क्षणी माची हातात आली होती. येसाजींसह आम्ही खाली उतरलो. राजे, गडाखाली कैदी आणले आहेत. आपण चलावं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे सर्वांच्या सह गड उतरले. अफझलखानाचे दोन्ही पुत्र भयभीत झाले होते. खानाच्या अटक झालेल्या सरदारांनी जिवाची आशा सोडली होती. येसाजींची पाठ थोपटीत राजे म्हणाले,

'येसाजी, युद्ध संपलं, वैर संपलं! अटक झालेल्या सर्वांना मानानं पाठवा. चला.'

मशाली पेटविल्या गेल्या. माचीपर्यंत राजे गेले. जखमींना पाहिले. लढाईत कामी आलेले वीर शेल्याखाली झाकून ठेविले होते. राजांचे पाय तेथे अडखळले. दीर्घ निःश्वास सोडून राजे गडावर परत आले.

गडावर खानाचा मुडदा आणला होता. तो पाहताच राजे म्हणाले,

'ज्या म्लेंच्छानं आमच्या कुलदैवतास उपद्रव केला, त्या या म्लेंच्छाचं मस्तक मासाहेबांना पाहण्यासाठी पाठवा. राजगडाच्या वेशीत त्या मस्तकाला जागा द्या. जिथं खान पडला, बंडा सय्यद पडला, त्या जागी या विजापूरच्या सेनापतीचं यथोचित दफन करा.'

झोप केव्हाच उडून गेली होती. पारावरचे मावळे विजय संपादन करून राजांचे कौतुक ऐकायला गडावर येत होते. नेहमी सूर्यास्ताबरोबर बंद होणारे दरवाजे सताड मोकळे होते. यात्रेच्या दिवशी दिसणाऱ्या भक्तांच्या वर्दळीप्रमाणे गड गजबजून गेला होता. डोक्यावर सप्तमीचे पिठूर चांदणे फाकले होते. पार तळापासून गडापर्यंत मशालींची रांग लागली होती. साऱ्या जावळी खोऱ्यात दीपोत्सव केल्याचा भास होत होता. मध्यरात्रीच्या आधीच वाई फत्ते झाल्याची बातमी गडावर आली. जिजाबाईंना दाखविण्यासाठी खानाचे मस्तक घेऊन जिवा महाला राजगडाच्या वाटेला लागला होता.

□

६

राजगडावर पळापळांनी घटका सरत होत्या. मंद गतीने प्रहर उलटत होते. साऱ्या राजगडचा परिसर नेहमीप्रमाणे वावरत असूनही विचित्र शांतता सर्वत्र पसरली होती. सारे व्यवहार कसे चूपचाप होत होते. गडावरच्या प्रत्येक देवळात अभिषेक चालू होते. फिरंगोजी उत्तरेच्या बुरुजावर मध्यान्हापासूनच बसून होते. साऱ्यांचे लक्ष प्रतापगडाच्या दिशेला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लागले होते.

बाहेर जी शांतता होती, तीच वाड्याच्या परिसरात नांदत होती. जिजामाता मात्र देवळातच होत्या. सकाळपासून त्यांनी पाण्याच्या थेंबालाही स्पर्श केला नव्हता. दोहों बाजूंच्या सुवर्णसमयांच्या प्रकाशात भवानीच्या मूर्तीकडे त्या टक लावून पाहत होत्या. देव्हाऱ्याच्या उजव्या बाजूला ठेवलेल्या तबकात मोहरांची रास होती. डाव्या हाताच्या तशाच तबकात एक अत्यंत तेजस्वी, रत्नखचित सुवर्णमुठीचा खंजीर तळपत होता.

जिजाबाईंचे ध्यान भवानीवर खिळले होते. ओठ थरथरत होते. भावनावेग न आवरला, की प्राजक्ताच्या फुलांप्रमाणे अश्रू ठिबकत होते.

तीस वर्षांचा शिवाजीचा काल त्यांच्या नजरेसमोरून सरकत होता. त्या पोराला हाताशी धरून केवढे मनसुबे रचले होते, केवढी स्वप्ने उभी केली होती! ते स्वप्न नुकते कुठे रूप धरत होते, तोच... कोणत्या क्षणी कसली वार्ता येईल, याचा भरवसा नव्हता.

बसल्या जागी डोळे भरून येत होते. केव्हा अकारण अंगारा कापरा सुटे. जिजाबाई देवीची करुणा भाकीत होत्या; साकडे घालीत होत्या; नवस बोलत होत्या. पण ती अष्टभुजा काही सांगत नव्हती. तेच शांत हास्य तिच्या मुखावर ओसंडत होते. पायाखालच्या महिषासुराचा वध करीत असता सुद्धा ते रूप बदलत नव्हते; त्या हास्यात बदल होत नव्हता.

मध्यान्ह झाली. सूर्य कलला. सायंकाळ व्हायला आली, तरी काहीच बातमी कशी येत नव्हती? काय घडलं? मग वेळ का लागतो?

पावलांचा आवाज झाला. दासी 'मासाहेब! मासाहेब!' म्हणत धावत आली. जिजाबाईंच्या सर्वांगाला कंप सुटला होता. कान अधीर झाले होते. मन दुबळे झाले होते. जिजाबाई देवीकडे पाहत मागचा आवाज ऐकत होत्या. पावले नजीक आली. दासी धापा टाकीत म्हणाली,

'मासाहेब! आनंदाची बातमी! राजे गडावर पोहोचले! तोफ झाली!'

त्याच वेळी गडावरच्या तोफेने ती बातमी जाहीर केली. साऱ्या गडावर आनंद

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

उसळला! जिजाबाईंनी देवीपुढे मस्तक टेकले; व त्या उठल्या. आनंदाची बातमी सांगायला आलेल्या दासीला त्या म्हणाल्या,

‘ये!’

दासी पुढे झाली. जिजाबाई म्हणाल्या,

‘ओटी कर!’

दासीने ओटी पसरली. जिजाबाईंनी कष्टाने मोहरांचे तबक उचलले. ते तबक दासीच्या ओट्यात रिते होऊ लागले. वाढत्या भाराने जेव्हा दासी वाकत होती, तेव्हा जिजाबाई सरळ होत होत्या. जिजाबाईंनी तबक रिते केले, आणि डाव्या हाताच्या तबकातील रत्नजडित कट्यार मस्तकी लावून देवीच्या पायाजवळ ठेवून दिली.

गडावर एकच आनंद उसळला होता. राजस्त्रिया आनंदाने बेभान होऊन संभाजीला उराशी कवटाळीत होत्या. मुक्यांच्या वर्षावांनी संभाजीचा जीव गुदमरत होता.

राजगडावर पहाट झाली. फिरंगोजींनी जिवा महाला आल्याची वर्दी पाठविली. जिजाबाई सदरेवर आल्या, आणि त्यांचे पाऊल थबकले. सदरेवर आनंदित मुद्रेने जिवा महाला उभा होता. सदरेवर आच्छादिलेली थाळी होती. मुजरा करून जिवा म्हणाला,

‘मासाहेब, राजे सुखरूप आहेत. खानाचा पुरा बीमोड झाला आहे. राजे मागोमाग येत आहेत. आपली खात्री पटावी, म्हणून हे राजांनी पाठविले आहे. गडाच्या वेशीतल्या कोनाड्यात हे ठेवायला सांगितले आहे.’

जिवाने आच्छादन उचलले. सर्वांचे श्वास अवरोधले गेले. जिजाबाई स्थिर नजरेने ते मस्तक निरखीत होत्या.

हाच तो अफझल... ज्याने... स्वारींच्या हातांत बेड्या चढविल्या होत्या. हाच तो अफझल... ज्याने... संभाजीचा बळी घेतला... राजांना नेस्तनाबूद करायला हाच आला होता. यानेच गेले कैक महिने साऱ्यांची निद्रा उडविली होती. हाच तो पापी, ज्याची मजल तुळजाभवानीवर घाव घालण्यापर्यंत पोहोचली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाईंनी आपला संताप आवरला. त्या म्हणाल्या,

‘फिरंगोजी, झालं गेलं, होऊन गेलं. राजांच्या आज्ञेप्रमाणे इज्जतीनं ह्या मस्तकाचं गडाच्या वेशीत दफन करा. आपला शत्रू असला, तरी तो सेनापती होता; निधड्या छातीचा होता. सत्तेच्या अहंकारानं आणि धर्माच्या कैफानं त्याचा बळी गेला. त्याच्याबरोबरच वैरही संपलं.’

खानाच्या मस्तकाची व्यवस्था लावून झाल्यावर राजांच्या स्वागताची तयारी सुरू झाली. गडाच्या प्रथम दरवाज्यावर तोरण चढविले. तेथून वरपर्यंत तोरणे लागली होती. गडावर ठायी ठायी गुढ्या उभ्या होत्या.

दोन प्रहरी राजे गडावर येत असल्याची वर्दी आली. सणासुदीचे कपडे करून सारे राजांची वाट पाहत होते. धुळीचा लोट उडताना दिसू लागला. गडाच्या पायथ्याशी राजे थांबले. फिरंगोजींनी धावत जाऊन राजांना मिठी मारली. राजे पायांवर पाणी घेऊन दीड-दोन हजार शिबंदीसह गड चढू लागले. नगाऱ्यावरच्या टिपरीने राजे गडी आल्याची वर्दी दिली. देवीचे दर्शन घेऊन राजे बालेकिल्ल्यात आले. वाड्याच्या दरवाज्याशी राजस्त्रिया आरत्या घेऊन उभ्या होत्या. त्यांचा स्वीकार करून राजे आत आले. जिजाबाईंना पाहताच राजे उभे राहिले.

जिजाबाईंच्या डोळ्यांत अश्रू गोळा झाले होते. चेहऱ्यावर कौतुक होते. त्यांनी राजांना मिठीत घेतले. अश्रू आवरेनात. राजे म्हणाले,

‘मासाहेब! आम्ही आलो! आपल्या आशीर्वादानं आणि भवानीकृपेनं सुखरूप आलो. डोळ्यांत पाणी आणायची ही वेळ नव्हे.’

जिजाबाईंनी डोळे टिपले. त्या म्हणाल्या,

‘अरे! दु:खाच्या वेळीच डोळ्यांत अश्रू येतात, हे कुणी सांगितलं? आनंदाच्या वेळीही येतात!’

‘ते अश्रू पाहण्याचं भाग्य लाभलंय् आम्हांला!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शंभूबाळ आले. राजांनी त्यांना कवटाळले.

राजांच्या आगमनाबरोबर सारा गड भरून गेला. राजांनी जखमदरबार भरविला. जे जखमी झाले, त्यांना दौलत वाटली. पराक्रम गाजविणाऱ्यांना मानसन्मान दिला. जे कामी आले, त्यांना नेमणुका दिल्या.

खानाच्या मोहिमेत राजांना पंचाहत्तर हत्ती, चार हजार घोडी, बाराशे उंट, त्याखेरीज शेकडो तोफा, उंची कापड, जडजवाहीर आणि अगणित संपत्ती मिळाली. खानाचे तीन हजार लोक कापले गेले होते. राजांचे शेकडो कामी आले होते. खानाने काबीज केलेला राजांचा मुलूख एका दिवसात मोकळा केला गेला. सगळीकडून नुसत्या विजयाच्या वार्ता व विजयी वीर गडावर येत होते.

जिजाबाई म्हणाल्या, 'राजे! तुम्ही दिसावं, म्हणून किती नवस बोलले होते, ते माझे मला आठवत नाहीत. जेवढे आठवतात, तेवढे नवस फेडल्याखेरीज आता कुठं जाऊ नका.'

राजे हसले. ते म्हणाले, 'मासाहेब, तसं करता आलं असतं, तर आनंदच झाला असता; पण ही सुवर्णसंधी कोण दवडील? विजापूरचा बलाढ्य सेनानी आपल्या सैन्यासह धुळीला मिळाल्याची वार्ता ऐकून विजापूर दरबारनं हाय खाल्ली असेल. याचा फायदा घेऊन आम्ही आजच मोहिमेवर निघणार आहोत. विजापूरकरांचे उरलेले गड ताब्यात घेण्याचा हाच मोका आहे.'

राजे क्षणभर थांबले. एक निराळाच विचार त्यांच्या मनात प्रकटला.

'मासाहेब, हा काही फारसा मोठा विजय नाही. हे चढाईच्या धोरणात जिंकलेलं एक प्यादं आहे. खऱ्या लढाईला अजून अवकाश आहे. अफझल म्हणजे गोमेचा पाय आहे. हा मोडल्यानं काशी सुरक्षित होत नाही. आमच्या विजयाचं नातं औरंगजेबाच्या पराजयात गुंतलं आहे.'

-आणि दुसऱ्या दिवशी राजे आपल्या फौजेनिशी मोहिमेला बाहेर पडले. राजांना दिसत होता किल्ले पन्हाळा!

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

७

जिजाबाईंचा निरोप घेऊन राजे वाईला आले. खानाच्या पारिपत्यासाठी मुलुखात पसरलेल्या सैन्याने वाईला जमण्याचे हुकूम आधीच सुटले होते. त्यानुसार राजांची विजयी फौज वाईला गोळा झाली होती. राजे वाईला पोहोचले, तेव्हा भक्कम दळाचे त्यांना दर्शन घडले. हजारो घोडे, हजारो पायदळ राजांची वाट पाहत होते. खानाच्या तळाचे जिंकलेले सामान वाईतच होते. सर्वत्र सामानाचे ढीग लागले होते. लहान पालींपासून ते शाही शामियाने-डेऱ्यांपर्यंतचे छावणीचे सर्व सामान हाती आले होते. हजारो उंट, शेकडो हत्ती, सामान-वाहतुकीचे बैल, गाडे, पालख्या, मेणे, अंबाऱ्या, हौदे असे नाना तऱ्हेचे सामान त्यात होते. हत्यारांची, बंदुकींची, लहानमोठ्या तोफांची मोजदाद करणेही कठीण जात होते. पुणे, सुपे भागांतील जिंकलेले सामान दास्तानासाठी वाईकडे अजून येतच होते. त्या सर्व सामानाचा बंदोबस्त करण्यासाठी राजांनी स्वतंत्र अधिकारी नेमले.

विजयी सेनापती नेताजी पालकर मुजऱ्याला आले. राजांनी त्यांना मानवस्त्रे देऊन सन्मान केला. राजे म्हणाले,

‘काका, तुमचा पराक्रम ऐकून आम्हांला आनंद वाटला. फाजलखान पळून गेला, याबद्दल दुःख नाही; पण फितूर खंडोजी खोपडा पळाल्याचं ऐकून वाईट वाटलं.’

‘जातो कुठं तो? एक ना एक दिवस येईलच परत. महाराज, एक अर्ज आहे.’

‘काय?’

‘खानाचे सरदार जाधवराव, पांढरे, खराटे व सिद्दी हिलाल शरण आले आहेत. आपल्या दर्शनाला ते येऊ इच्छितात.’

‘जरूर!’

पराजित झालेले खानाचे सरदार राजांच्या दर्शनाला आले. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आमचं तुम्हांला अभय आहे. परकीयांच्या सत्तेचा लोभ धरून स्वकीयांवर तुम्ही चालून आला. खानाचं वैर होतं, ते मिटलं. आमचा तुमच्यावर राग नाही. तुम्ही तुमच्या मनाला येईल, ते करायला मोकळे आहात!’

सरदारांचा कानांवर विश्वास बसत नव्हता. जाधव पुढे होऊन म्हणाले,

‘राजे, जोवर कोणी शास्ता नव्हता, तोवर पातशहाची चाकरी केली. आता स्वराज्यासाठी पराक्रम कारणी लागावा, असं आमच्या सर्वांच्या मनांत आहे. पायांजवळ चाकरी करण्याचं भाग्य...’

‘स्वराज्याला मिळेल, तेवढी मदत हवी आहे. तुम्ही आलात, तर आम्हांला आनंदच आहे. आमचं बळ आणखीन वाढलं, असं आम्ही समजू.’

जाधव, पांढरे, खराटे आनंदाने राजांच्या फौजेत सामील झाले. सिद्दी हिलाल मात्र कावराबावरा होऊन उभा होता. राजे हसले. सिद्दी हिलालजवळ जाऊन ते म्हणाले,

‘हिलाल, तुमची पोलादी झडप आम्हांला माहीत आहे. कोणत्याही धर्माशी आमचं वैर नाही. आमच्या पदरी जसे हिंदू आहेत, तसेच मुसलमानही आहेत. तुम्ही आम्हांला मिळाला, तर त्यापरता आनंद नाही.’

भारावलेल्या सिद्दी हिलालने राजनिष्ठेची तलवार राजांच्या पायी ठेवली. राजांनी ती उचलून आपल्या हातांनी सिद्दीच्या दुशेल्यात खोवली. राजे सरदारांना म्हणाले,

‘आज आम्ही कूच करणार. तुम्ही सर्व जिथं होता, तिथंच राहा. हा सर्व मुलूख सांभाळा. आम्ही मुलुखगिरीहून परत येईपर्यंत या मुलुखाची जबाबदारी तुमची. तुम्ही आम्हांस इमाने वर्ताल, तर आम्ही तुम्हांस अंतर देणार नाही. परत येऊ, तेव्हा तुमचं काम पाहून हुद्दा, मान देऊ.’

शरणागत आलेल्या खानाच्या सैन्याला राजांनी आपल्या सैन्यात सामील करून घेतले. राजांनी मोरोपंतांना आज्ञा केली,

‘पंत, पुणे, इंदापूर, चाकण, सुपे, बारामती या भागांतील हिंदू व मुसलमान यांना जी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

इनामं आहेत, अफझलखानाआधी चालत आली आहेत, त्यांना धक्का लावू नका. ती तशीच चालवा. आम्ही मुलुखगिरीहून आलो, की आम्हांला आठवण द्या. तसे हुकूम आम्ही जारी करू.' नेताजींकडे वळून राजे म्हणाले, 'नेताजीकाका, कूच करण्याचा डंका वाजवायची आज्ञा द्या.'

'महाराज, क्षमा असावी! पण बेत कळला नाही.'

'तुम्ही तर सेनापती. तुमच्यापासून बेत दडवून ठेवून कसं चालेल? खानानं आमच्या मुलुखाला जो उपद्रव केला, त्या मुलुखाची भरपाई आदिलशाही मुलुखातूनच झाली पाहिजे. त्यासाठी विजापूर मुलुखात खंडण्या वसूल करण्याचा आमचा इरादा आहे. होईल, तो मुलूख ताब्यात आणण्याची आमची इच्छा आहे. पन्हाळा हा आदिलशाहीचा किल्ला. तो स्वराज्यात मिळविण्याचं आमचं स्वप्न आहे. चंदन-वंदनपासून सुरुवात करून पन्हाळापावेतो विश्रांती नाही.'

नेताजीने हर्षभरित होऊन कुचाच्या नगाऱ्यांची इशारत दिली. सारी वाई नगाऱ्यांच्या आणि तुताऱ्यांच्या निनादात गर्जून उठली. राजांची प्रचंड फौज स्वारीला निघाली.

चंदन, वंदन किल्ल्यांची नाकेबंदी करून राजांच्या फौजेने वाई प्रांत व्यापला; दक्षिणेकडे खटाव, मायणी, वाळवे, कऱ्हाड या भागांत खंडणी वसूल केली. तेथून राजांनी सुपे गाठले. उरणकोळेपर्यंतचा सर्व भाग राजांनी घेतला.

अफझलखानाच्या मृत्यूची व भयंकर पराजयाची वार्ता कानी पोहोचते, न पोहोचते, तोच मागून 'शिवाजी आला' ही बातमी येऊन थडके. सारे बळ क्षणात सरून जाई, आणि राजांच्या पुढे शरणागती पत्करण्याची चुरस लागे.

राजांची फौज चारी वाटांनी विजापूरकरांच्या मुलुखात खंडण्या वसूल करीत होती. राजे एकामागोमाग एक विजय संपादन करीत कोल्हापुरात घुसले. कोल्हापुरापासून पन्हाळा अवघ्या चार कोसांवर. जे स्वप्न राजे उराशी धरून आले होते, ते आता अवघ्या चार कोसांवर होते. राजांची फौज पन्हाळ्याच्या दिशेने उधळली. राजांच्या फौजेने पन्हाळ्याला वेढा घातला. पन्हाळ्याचा किल्लेदार आपल्या तुटपुंज्या शिबंदीनिशी गडाचे दरवाजे बंद करून घेऊन बसला होता. धीर करून त्याने तोफांचे मोर्चे डागले. गडावरून गोळे सुटू लागले. विजयाने धुंद झालेली राजांची फौज तटाला भिडू लागली; बाणांनी, बंदुकांनी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गडावरची माणसे टिपू लागली. किल्लेदाराचे अवसान जात होते.

पन्हाळ्याच्या वेढ्याची दुसरी रात्र आली, आणि मराठी फौजेने तटाला शिड्या लावल्या. चारी बाजूंनी एकच किलकारी उठली. गडात उतरलेल्या फौजेने कापाकापी सुरू केली. गडाचे दरवाजे उघडले, आणि 'हर हर महादेवा'च्या गर्जनेत भर रात्री मराठी फौजेने पन्हाळा काबीज केला.

राजे आपल्या छावणीतल्या शामियान्यात फेऱ्या घालीत होते; बातमीची वाट पाहत होते. भर रात्रीच्या समयाला जिची राजे वाट पाहत होते, ती बातमी घेऊन स्वारपथक आले. पन्हाळा काबीज झाला होता. राजांनी बातमी आणणाऱ्या सैनिकांना बक्षिसे वाटली. येसाजी आनंदाने म्हणाला,

'राजे, आपण विश्रांती घ्यावी! आम्ही गडावर पुढं होतो.'

'येसाजी, गड पाहायला तुमच्याइतकेच आम्हीही उत्सुक आहो. आम्ही पण गड पाहायला येऊ.'

'पण, महाराज, रात्र आहे! आपल्याला विश्रांती...'

'येसाजी, या बातमीसारखी दुसरी विश्रांती कोणती? आमचा सारा थकवा गेला आहे. जीव उतावीळ आहे, तो गड पाहायला.'

राजे घोड्यावर स्वार झाले. थंडीचे गार वारे अंगाला झोंबत होते. पहाटेचे धुके अंग ओले करीत होते. मशाली फरफरत होत्या. राजे अश्वपथकासह गड चढत होते. येसाजी, तानाजी पाठोपाठ होते. गडाच्या चार दरवाजाशी राजे आले. एवढ्या रात्री राजे गडावर येतील, असे कुणाला वाटले नव्हते.

राजांना पाहून हर्षभरित झालेल्या गडाचे दरवाजे उघडले गेले. साऱ्या गडावर चौकी-पहारे जारी केले होते. राजांना बिलकुल थकवा वाटत नव्हता. राजे सारा गड पाहत होते. प्रत्येक चौकीवर जाऊन सर्वांचे कौतुक करीत होते. गड फिरून येईपर्यंत पहाट झाली. राजे पूर्वेच्या बुरुजावर उभे होते. पर्णाल पर्वताच्या माथ्यावर उभे राहून माळवद पाहण्याचे स्वप्न साकार होत होते. सज्जा कोठीवर, चार दरवाजांवर भगवे ध्वज फडकत होते. उगवत्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सूर्यकिरणांनी धुक्याचा पडदा सरकविला; सारा मुलूख राजांच्या समोर मोकळा झाला. राजांनी उगवत्या सूर्याला हात जोडले; आणि त्यांची दृष्टी गडावरून फिरू लागली.

गड विस्तृत होता. चार दरवाजा, तीन दरवाजा, वाघ दरवाजा आणि राजदिंडी अशा दरवाजांनी गडाची प्रवेशद्वारे रोखली होती. पंचवीस हजार खंडी धान्य मावेल, असा गंगा, यमुना व सिंधु कोठ्यांनी सजविलेला भव्य अंबारखाना होता. सज्जा कोठी, कलावंतिणीचा सज्जा यांसारख्या गडाच्या वैभवात भर घालणाऱ्या सुबक इमारती होत्या. अनेक मंदिरे गडावर होती. मुबलक निर्मळ पाणी पुरविणारी नागझरी, अंधारबाव होती. मजबूत तटबंदीने वेढलेल्या देखण्या बुरुजांनी डौल बाळगणारा बुलंद किल्ला स्वराज्यात आला होता.

विजापूरकरांचा कौस्तुभ राजांनी जिंकला होता.

❑

८

अफझलखानाच्या मृत्यूची आणि आदिलशाही फौजेच्या भयंकर पराभवाची वार्ता विजापुरात आली, तेव्हा 'चढे घोडियानिशी राजांना पकडून दरबारी हजर' केल्याचे स्वप्न पाहण्यात विजापूर दरबार दंग झाला होता. अफझलवधाची बातमी आली, आणि दरबार स्वप्नातून जागा झाला. वीज कोसळावी, तशी ती बातमी आली. बादशहा हतबल होऊन तख्तावरून उठून गेला. बड्या बेगमेच्या अश्रूंना खळ राहिला नाही. या बातमीच्या पाठोपाठच शिवाजीच्या फौजा आदिलशाहीत घुसल्याच्या बातम्या येऊ लागल्या. आदिलशाही त्या वार्तेने कासावीस झाली. विचार सुरू झाला, तोच आदिलशाहीचा एक प्रमुख किल्ला पन्हाळा शिवाजीने काबीज केल्याची वार्ता येऊन थडकली.

बातम्या यायलादेखील उसंत लागत होती; पण शिवाजीला उसंत नव्हती. अफझलवधानंतर अवघ्या अठरा दिवसांत आदिलशाही मुलूख काबीज करीत शिवाजी पन्हाळगडावर पोहोचला होता. आजवर शिवाजीचा बंदोबस्त करणारी आदिलशाही शिवाजीच्या आक्रमणापासून आपला कसा बचाव करावा, याचा विचार करू लागली.

औरंगजेबाने राज्यारोहणप्रसंगी शिवाजीराजांना खास पोशाख पाठविल्याचे आधीच जाहीर झाले होते. या साऱ्या बातम्यांनी भयभीत झालेल्या आदिलशाहीने मोगलाईकडे धाव
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घेतली; आणि मदतीची याचना करणारे शाही पत्र घेऊन विजापूरचे स्वार दिल्लीकडे रवाना झाले.

देश, कोकण आणि खुद्द विजापूर या मुलुखांत शिवाजीने उठविलेल्या या धुमाळीने आदिलशाही हादरून गेली. आदिलशाहीने गडबडीने शिवाजीवर दुसरी मोहीम पाठवली. वाईवरून पळून गेलेला अफझलखानाचा मुलगा फाजलखान सूड घेण्याच्या संधीची वाट पाहत होता. फाजलखान आणि रुस्तुम जमा यांच्या आधिपत्याखाली दुसरी मोहीम रचली गेली. आदिलशाहीचे सरदार सादतखान, फत्तेखान, संताजी घोरपडे, सर्जेराव घाटगे हेही त्या मोहिमेत सामील झाले होते.

राजांना ह्या नव्या संकटाची चाहूल लागताच त्यांनी आपले पुणे भागातले नवे सरदारही तातडीने बोलावून घेतले. राजांनी पन्हाळ्याचा बंदोबस्त पक्का केला.

नेताजी पालकरांना आपल्यावर चालून येणाऱ्या सैन्याला त्रस्त करून सोडण्याचे हुकूम सोडले. राजांच्या जवळ त्या वेळी हिरोजी इंगले, भिमाजी वाघ, सिदोजी पवार, गोधाजी जगताप व महाडीक हे सरदार होते. त्यांच्या मदतीला नुकतेच स्वराज्यात सामील झालेले जाधव, पांढरे, खराटे पितापुत्र व सिद्दी हिलाल हे होते.

येणाऱ्या शत्रूचा मागोवा घेत नेताजीही राजांना सामील झाला. आदिलशाही फौजेशी उघड्या मैदानावर टक्कर देण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. राजे सर्व तयारी करून आदिलशाही फौजेची कोल्हापूरनजीक वाट पाहत होते.

राजांनी सैन्याचे दोन भाग केले- एक रुस्तुम जमासाठी, दुसरा फाजलखानासाठी. फाजलखानावर नेताजींची निवड केली. राजे नेताजींना म्हणाले,

'काका, तुम्ही फाजलवर चालून जा. फाजलने आमचा पराक्रम पाहिला आहे. तो धास्तावलेला शत्रू आहे. पहिली धडक जोरानं, तडफेनं द्या. त्याचं उरलंसुरलं धैर्य नाहीसं होईल. तो पळून जाईल.'

'आणि, राजे, आपण?'

'आम्ही रुस्तुम जमावर चालून जाऊ. रुस्तुम जमाचा आणि आमचा स्नेह आहे. आम्ही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चालून येतो, हे समजताच तो धरसोडीचं धोरण ठेवील. फाजलचा पराभव झाला, की तो त्याच्या पाठोपाठ जाईल, असा आमचा अंदाज आहे. एवढा शत्रूचा पराभव केला, की विजापूरची ताकद पुरी नामोहरम होईल. या मोहिमेत विजय मिळवायलाच हवा. शत्रू आपणांस गाठीपर्यंत आपण थांबायचं नाही. टप्प्यात शत्रू आला, की आपण चालून जायचं.'

राजे वाट पाहत होते. फाजल व रुस्तुम जमा आपल्या फौजा घेऊन मार्ग आक्रमीत होते. कोल्हापूरनजीक फौजा येताच राजांनी आघाडी उघडली. राजांच्या आणि नेताजींच्या फौजा त्वेषाने आदिलशाही फौजेवर तुटून पडल्या. मराठ्यांचे सैन्य आपणहून चालून येईल, असे आदिलशाहीला वाटले नव्हते. राजे कुठल्या तरी किल्ल्याचा आश्रय घेतील, आपण वेढा घालू, मदत मागू, असा फाजलचा अंदाज होता. पण समोरून धुळीचा पर्वत उभा करीत येणारी मराठी फौज पाहताच फाजल गांगरून गेला. काय होतेय्, हे कळायच्या आत टापांचा आवाज घुमवीत, एखादा वळीव गर्जना करीत कोसळावा, तसा मराठी फौजेचा तडाखा फाजलवर कोसळला. एकच रणकंदन सुरू झाले. 'हर हर महादेव'च्या गर्जनेत 'दीन दीन'चे आवाज लुप्त झाले; आणि फाजलची आदिलशाही फौज वाट दिसेल, तिकडे धावत सुटली. थोडा पाठलाग करून राजांची फौज मागे कोल्हापूरला आली. या लढाईत राजांनी बारा हत्ती व दोन हजार घोडी यांचा पाडाव केला.

पन्हाळा घेतल्यापासून एका महिन्याच्या अवधीत ही लढाई झाली. एका महिन्याच्या अवधीत आदिलशाहीचा दुसरा पराभव झाला.

राजांनी पन्हाळगडाची मजबुती वाढविली, आणि आपले लक्ष मुलुखगिरीवर केंद्रित केले. आपल्या फौजेचे तीन भाग करून तीन स्वाऱ्यांचा बेत राजांनी रचला. आदिलशाहीची कचदिल मन:स्थिती, अंत:स्थ दुबळेपणा आणि नव्या पराक्रमाने आदिलशाहीला पडलेली दहशत राजांनी पुरी ओळखली. राजांनी नेताजींच्या आधिपत्याखाली आदिलशाहीचा गाभा दिला; खुद्द स्वत:कडे देश घेतला; आणि तिसरी मोहीम कोकणातील आखली.

नेताजी पालकरने आपल्या तीन हजार घोडदळासह विजापूरलगतचे तिकोटे, दक्षिणेकडील हुक्केरी, गोकाक येथपासून गदग लक्ष्मीश्वरापर्यंत जाऊन खंडण्या वसूल केल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांची कोकणातील मोहीम दारोजीच्या आधिपत्याने राजापूर बंदराकडे वळली. राजापूर रुस्तुम जमाच्या ताब्यात होते. राजांचा आणि रुस्तुम जमाचा अंत:स्थ स्नेह होता. तेव्हा बंदराला त्रास न देता बंदरात उभी असलेली अफझलची तीन जहाजे तेवढी ताब्यात घेण्याचा राजांच्या सेनापतींचा इरादा होता. पण राजापूरचे इंग्रज वखारवाले संधीचा फायदा घ्यायला उठले. देण्याघेण्याच्या मोबदल्यात त्यांनी त्यांतले एक गलबत लाटण्याचा डाव मांडला. मराठ्यांचा अधिकारी दारोजी याला त्याचा सुगावा लागताच राग येऊन त्याने गिफर्ड व एक इंग्रज दलाल यांना गिरफदार केले.

राजे तेव्हा आपल्या फौजेनिशी आजूबाजूचे किल्ले घेत होते. रायबागसारख्या व्यापारी पेठा, लोकांशी अनुसंधान लावून, राजांनी काबीज केल्या होत्या.

राजे मिरजेजवळ असता राजापूरला पकडलेले गिफर्ड, एक दलाल आणि जप्त केलेले गलबत यांबद्दल तक्रार घेऊन टोपीवाल्यांचा प्रतिनिधी दुभाष्या शेणवीसह मिरजेला येऊन थडकला. गंगाधरपंतांनी टोपीकराला राजांच्या पुढे हजर केले. राजांनी सर्व तक्रार ऐकली. इंग्रज धूर्त आहे, हे राजांनी ओळखले होते; पण इंग्रजांचा आणि रुस्तुम जमाचा स्नेह राजांना माहीत होता. रुस्तुम जमा फोंडा काबीज करून राजांच्या विरुद्ध उभ्या ठाकलेल्या कुडाळ सावंतांचा आदिलशाहीच्या वतीने समाचार घेत आहे, हे राजांना माहीत होते. राजांनी उदारपणे गिफर्डला व दलालाला सोडून दिले. पण हे करीत असता त्यांनी इंग्रजांकडून लेखी करार करून घेतला. इंग्रजांनी जंजिरा सिद्दीला मदत करू नये, व केव्हाही राजांच्या विरुद्ध उभ्या ठाकणाऱ्या शत्रूला मदत करू नये, अशी महत्त्वाची दोन कलमे त्यात होती. हा करार लिहून घेऊन कैद केलेले दोन्ही इंग्रज व त्यांचा जप्त केलेला माल राजांनी परत केला.

सर्व मुलूखभर चाललेली लुटालूट, गमावलेले किल्ले, फाजलचा झालेला पराजय यांनी आदिलशाही अक्षरश: गर्भगळीत झाली. या घालमेलीतच शिवाजीराजे आता विजापूरवर स्वारी करून आदिलशहाला विजापूरच्या गादीवरून काढून, त्या जागी दुसरा सुलतान नेमणार, अशी बातमी विजापूरला येऊन थडकली. विजापूर दरबारचे खलबत बसले. अली आदिलशहाने कुर्नूलचा पराक्रमी सरदार सिद्दी जौहर याच्याकडे धाव घेतली.

सिद्दी जौहर हा युद्धनिष्णात, राजकारण जाणणारा व तडफेने मोहीम चालवणारा सरदार होता. आदिलशहाने त्याचा मोठा सन्मान केला; 'सलाबतखान' हा उच्च किताब दिला; आणि वीस हजार घोडदळ, चाळीस हजार फौज देऊन सिद्दी जौहरला
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिवाजीराजांच्यावर पाठविले. सिद्दी जौहरला मदत करण्यासाठी आधीच्या लढाईत पराजित झालेले फाजलखान व रुस्तुम जमा हेही होते.

विजापूरहून सिद्दी जौहर जेव्हा निघाला, तेव्हा राजे मिरजेच्या वेढ्यावर होते. नेताजी विजापूर भागात होता. दारोजी राजापूर आटोपून रुस्तुम जमाचा मुलूख सोडून आचरे, वेंगुर्ले, कुडाळ या प्रदेशाकडे वळले होते. राजांच्या फौजेचे दोन हिस्से मुलुखगिरीवर असता सिद्दी जौहर विजापूरहून निघाल्याची बातमी राजांना मिळाली.

आदिलशाहीचा हा डाव अनोखा होता. राजे त्या बातमीने बेचैन होते. राजांनी गडबडीने मिरजेचा वेढा उठविला. नेताजी-दारोजींना सत्वर येण्याचे हुकूम पाठविले, व कोल्हापूरला महालक्ष्मीचे दर्शन घेऊन गुढीपाडव्याच्या दिवशी राजे पन्हाळगडावर गेले. गडावर गुढ्या उभारल्या होत्या. जिकडे तिकडे तोरणे, झेंडे उभारले होते. स्वराज्याची गुढी नुकती कुठे उंचावत होती, तोच त्या उंचावणाऱ्या गुढीचा नाश करण्यासाठी आदिलशाहीचा जौहर येत होता. याचवेळी शास्ताखान पंचाहत्तर हजारांची फौज घेऊन राजांवर चालून येत असल्याची बातमी आली.

आदिलशाहीने व मोगलांनी एकाच वेळी राजांचा पुरा बीमोड करण्याचा चंग उचलला. राजांनी किल्ल्याचा कडक बंदोबस्त करून घेतला. गंजीखान्यापासून ते अंबारखान्यापर्यंत. शास्ताखान अहमदनगरास व सिद्दी नजीक आल्याचे वर्तमान राजांना गडावर कळले. नेताजींचा, दारोजीचा अद्याप पत्ता नव्हता.

पन्हाळ्यास इशारतीच्या आरोळ्या सुरू झाल्या होत्या. मेटकऱ्यांचे खुणेचे कर्णे वाजत होते. गडाच्या तुपाच्या विहिरीत भरपूर तूप जमा झाले होते. सगळीकडे जय्यत तयारी झाली होती. तोफांचे धमधमे उभारले होते.

एके दिवशी त्र्यंबकराव भास्कर यांचा सबनीस धावत महाराजांच्याकडे आला.

‘राजे, गनिमांची फौज आल्याची वर्दी आलीय्.’

‘ठीक आहे, सबनीस. त्यात घाबरण्याचं काय कारण आहे? लक्ष्मी पाठीशी आणि संकटं सदैव समोर ठेवावीत, असं आम्हांला शिकवलं गेलं आहे. चला.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे घोड्यावर स्वार झाले. पुन्हा एकदा त्यांनी गडाची पाहणी केली; जरूर त्या सूचना केल्या; आणि राजे दक्षिण बुरुजावर आले. कोल्हापूरच्या दिशेने धुळीचे लोट दिसू लागले. बुरुजावरच्या तोफा ठासून सज्ज ठेवण्याची आज्ञा देण्यात आली.

सिद्दीची चाळीस हजारांची फौज पन्हाळ्याजवळ आली. गड गाठताच सिद्दीने वेढ्याचे काम सुरू केले. गडाच्या पूर्वेस सिद्दी जौहर, फाजल बडेखान व रुस्तुम जमा हे होते. पश्चिमेला सादतखान, मसूद, बाजी घोरपडे, भाईखान हे होते. दक्षिण-उत्तर जागा पाहून नाकेबंदी करण्यात आली होती. जास्त भर पूर्व-पश्चिमेकडे होता; कारण गडाच्या प्रमुख वाटा त्याच बाजूला होत्या. सिद्दी जौहरने वेढ्याचे काम पूर्ण केले.

गडावरून जिकडे पाहावे, तिकडे सैन्याच्या छावण्या दिसत होत्या. वेढ्याची मांडणी पुरी होताच फौज पुढे सरकू लागली. गडानजीक येणाऱ्या तोफांचे गाडे गडावरून दिसत होते. राजे पूर्वेच्या बाजूवरून शत्रूच्या हालचाली निरखीत होते. बुरुजावरची तोफ इशारतीसाठी वाट पाहत होती. शत्रू टप्प्यात येताच राजे बुरुजावरून उतरले. दृष्टीच्या टप्प्यात येणाऱ्या तोफांच्या मोर्च्यांवर त्यांनी नजर टाकली. राजांनी हात वर केला, तोच 'जय भवानी'च्या आरोळ्यांत तोफा धडाडू लागल्या.

जौहर तीन दिवसांत जेवढा पुढे आला होता, तेवढा मागे रेटला गेला. शत्रूचा एकच गोंधळ माजला. तोफांच्या टप्प्याबाहेर जाऊन शत्रूने दम घेतला. राजांच्या तोफांचा पल्ला ही लक्ष्मणरेषा ठरली. चिडलेल्या सिद्दीने वेढा अधिक बळकट करण्याकडे लक्ष दिले. त्याने वेढा अधिक जोरदार आवळून टाकला.

सह्याद्रीचा सिंह पुरा कोंडला गेला.

□

९

रायगडावर राजमाता जिजाबाई चिंतेत होत्या. शास्ताखानाच्या प्रचंड दलाची बातमी त्यांना आधीच समजली होती. फिरंगोजी नरसाळा तातडीने चाकणला रवाना झाले होते. येणाऱ्या शास्ताखानाच्या आक्रमणाला कसे तोंड द्यावे, याचा विचारविनिमय करीत असतानाच राजे पन्हाळगडावर सिद्दी जौहरच्या वेढ्यात सापडल्याची बातमी रायगडावर
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आली. संकट सर्व बाजूंनी कोसळू पाहत होते. जिजाबाईंनी प्रथम सर्व गडांना मजबूत राहण्याचे व कोणत्याही परिस्थितीत गड लढविण्याचे हुकूम सोडले.

नेताजी पालकर विजापूर भागात धुमाकूळ घालीत होते. सिद्दी जौहरचा वेढा पन्हाळ्यास पडल्याचे ऐकताच नेताजीने एक धाडसी बेत आखला. विजापूरजवळील शहापुरावर त्याने अचानक धाड घातली; आणि ते सुंदर शहर मनसोक्त लुटले.

आपल्या राजधानीलगतच्या शहरावर आलेला हल्ला पाहून अली आदिलशहा राजधानीच्या रक्षणार्थ सिद्दीस परत बोलावील, असा नेताजींचा अंदाज होता. अली आदिलशहाने घाबरून तो निर्णय घेतला होता. तोच हेरांनी बातमी आणली की,

नेताजीजवळ फार अपुरे सैन्य आहे. त्या बातमीने अली आदिलशहा सावध झाला. त्याने नेताजीचा कावा ओळखला. त्याने खवासखानाला पाच हजार सैन्यानिशी नेताजीवर पाठविला. खवासखानाच्या मदतीला गोवळकोंड्याची फौज येऊन मिळाली. एवढ्या मोठ्या फौजेसमोर तुटपुंज्या फौजेचा पाडाव लागला नाही. नेताजीचा बेत हुकला; आणि लढाईत पराजय पत्करून त्याला माघार घ्यावी लागली.

राजे गडावर अडकले असता सेनापतीचा पराभव ही धक्का देणारी घटना होती.

जिजाबाईंना सगळ्या बाजूंनी निराश करणाऱ्या बातम्या येत होत्या. शास्ताखान आपल्या अवाढव्य फौजेनिशी शिरवळला खुद्द राजांच्या राज्यात येऊन पोहोचला होता. शास्ताखानाबरोबर मराठे सरदार सुरजी गायकवाड, दिनकरराव काकडे, खंडागळे बंधू, रंभाजी पवार, सर्जेराव घाटगे, कमळाजी गाडे, जसवंतराव कोकाटे हे होते. त्यातच माहूरच्या उदाराम देशमुखांची विधवा पत्नी- जी शूर आणि पराक्रमी होती, जिला औरंगजेबाने ‘रायबागन’ म्हणजे ‘राजव्याघ्री’ हा किताब दिला होता- ती सुद्धा शास्ताखानाला सामील झाली होती. आणि सर्वांवर कळस म्हणून की काय, त्र्यंबकराव भोसले, बाबाजी भोसले, दत्ताजीराव जाधव व शिवाजीराजांचे मामा रुस्तुमराव जाधव हेही आपल्या भाच्याच्या विरुद्ध खानाला जाऊन मिळाले. स्वकीय परकीय बनले. खानाच्या सैन्याला सागराचे रूप आले. हे सारे ऐकून जिजाबाईंच्या जिवाची तगमग झाली.

दिवस उलटत होते. जिजाबाईंनी अनेक हेर राजांच्या खबरीसाठी पाठविले; पण एकही वेढा पार करून राजांच्यापर्यंत पोहोचू शकला नाही. जिजाबाई धैर्याने उभ्या राहिल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यांनी आपल्या होत्या त्या फौजांना गनिमी काव्याने खानाला बेजार करण्याचा हुकूम सोडला. मावळ्याच्या देशमुख-देशपांड्यांना तशीच आज्ञापत्रे पाठविली. मराठी सेना उभी राहिली. खानाशी ठिकठिकाणी चकमकी झडू लागल्या. खान शिवापूर सोडून सासवडला गेला. तेथून तो पुण्याला आला; आणि खुद्द शिवाजीराजांच्या लाल महालात मुक्काम ठोकून राहिला. मुळामुठेच्या काठी औरसचौरस दीड कोस खानाची छावणी पसरली.

सिद्दी जौहरच्या वेढ्यात राजे सापडून महिने लोटले, तरी राजांची काही बातमी नव्हती. हेरांनी आणलेल्या बातम्या जिजाबाईंना बेचैन करीत होत्या. उलटणारा दिवस अधिक संकटात घालणारा उगवत होता. जिजाबाईंनी निश्चय केला. त्यांनी हाताशी जेवढी फौज होती, तेवढी गोळा करायला सुरुवात केली. शिलेखान्यातून शस्त्रे काढण्याचा हुकूम दिला. शिवाजीराजांची सुटका करण्यासाठी जिजाबाई जातीनिशी जायला निघाल्या. मंत्रिमंडळ पेचात पडले. मोरोपंतांनी जिजाबाईंना शब्द टाकला. जिजाबाई म्हणाल्या,

'पंत, आम्हांला का हौस आहे? राजे अपुऱ्या फौजेनिशी पन्हाळ्यात वेढले गेलेत. खान इकडे बळावतो आहे. जर उद्या खान पन्हाळ्याकडे निघाला, तर राजांना कोण सोडवील?'

'मासाहेब, क्षमा असावी! पण एवढ्या अपुऱ्या फौजेनिशी वेढा फोडू धजणं अविचाराचं ठरेल!'

'वाईट काय होईल? जमलं, राजे सुखरूप येतील; नाही तर आम्ही खर्ची पडू, हेच ना? आज स्वराज्याला राजांची गरज आहे; मासाहेबांची नाही.'

मोरोपंत डोळ्यांत पाणी आणून म्हणाले, 'मासाहेब, हे राजांना विचारलं असतंत, तर त्यांनी उत्तर दिलं असतं! आम्ही देणं अमर्यादा होईल.'

नेताजी पालकर गडावर येत आहेत, ही बातमी आली; आणि जिजाबाईंना धीर आला. राजांचे सेनापती नेताजी पालकर आणि सरदार सिद्दी हिलाल जिजाबाईंच्याकडे मुजऱ्याला आले. जिजाबाईंनी विचारले,

'सेनापती, कुठं मुलुखगिरी करून आलात?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आदिलशाहीत!’

‘खंडणी वसूल केलीत?’

‘जारीनं! खंडणी आणि लूट गडावर येत आहे.’

‘चांगलं केलंत! आणि राजांची वार्ता?’

नेताजींची मान खाली गेली. तो नजर टाळीत म्हणाला,

‘सिद्दी जौहरनं पक्का वेढा घातल्याची बातमी आहे. काय करावं, समजत नाही.’

‘ते सोपं आहे.’ मासाहेब खिन्नपणे हसून म्हणाल्या, ‘जसे सुर्वे, सावंत शत्रूला मिळाले, तसे तुम्हीही मिळू शकता! आम्हांला हे माहीत होतं, म्हणूनच आम्ही जातीनिशी जौहरवर चालून जायचं ठरवलंय्.’

‘मासाहेब!’

‘नेताजी, तुम्ही नात्याची माणसं. राजांचा भरवसा म्हणून सेनापती झालात. आणि मराठी राज्याचे सेनापती जौहरच्या वेढ्याचं कौतुक करतात!’ जिजाबाई एवढ्या संतापलेल्या केव्हाच कुणी पाहिल्या नव्हत्या. ‘नेताजी, स्वराज्य टिकलं, तर सारं टिकेल; पण ते उभं करणं फक्त राजांनाच माहीत आहे. बलवत्तर शत्रूला निधड्या छातीनं धडक देण्याचं सामर्थ्य फक्त त्यांच्याच मनगटात दिसावं, हे आमचं दुर्दैव. त्याच राजांचे सेनापती नेताजी पालकर आणि विश्वासाचे सरदार सिद्दी हिलाल आमच्यापुढं नुसते मनगटं चोळीत उभे राहतात. नेताजी, कमरेच्या तलवारीची आणि पालकरांच्या कुळीची तरी आठवण ठेवा.’

जिजाबाईंचा प्रत्येक शब्द नेताजींच्या, सिद्दी हिलालच्या वर्मावर बसत होता. नेताजीने आपली तलवार उपसली. तो म्हणाला,

‘मासाहेब, ह्या तलवारीची शपथ घेऊन सांगतो- राजांना सोडवून घेऊन परत येऊ, तेव्हाच तोंड दाखवू. त्यासाठी मासाहेबांनी जायची गरज नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दोन दिवस गडावर राहून, फौजेला विश्रांती देऊन, नेताजी पालकर आणि सिद्दी हिलाल आपल्या फौजेनिशी पन्हाळ्याच्या वाटेला लागले.

□

१०

पन्हाळगडावर सूर्य आला, तेव्हा राजे सोमेश्वराचे दर्शन घेऊन बाहेर पडले. बरोबर बाजीप्रभू, गंगाधरपंत, त्र्यंबक भास्कर ही मंडळी होती. राजे अश्वपथकासह सज्जाकोठीकडे जात होते. सारे चूपचाप होते. कोणी काही बोलत नव्हते. राजे सज्जाकोठीजवळ पायउतार झाले. सर्वांसह ते तटावर आले. समोर नेहमीचेच दृश्य होते. पूर्वेचा मंद वारा वाहत होता. तुटलेल्या कड्याखाली गर्द रान पसरले होते. सिद्दीच्या छावण्या मोकळ्या जागेत दिसत होत्या. राजे निःश्वास सोडून म्हणाले,

'त्र्यंबकराव, सिद्दी जौहर चिकाटीचा दिसतो, नाही?'

'जी! इतके दिवस झाले; पण वेढा कुठंच सैल होत नाही. उलट, दिवसेंदिवस अधिकच आवळला जात आहे.'

'गडावर आज हजार माणूस आहे. अंबारकोठीची काय हालत आहे?'

'त्याची काळजी नाही. भरपूर वरी, नागली, भात आहे. म्हणू तितके दिवस गड लढविता येईल.'

'पण, राजे, नेताजींची अजून कशी खबर नाही?' बाजीप्रभूंनी चिंता व्यक्त केली.

'बाजी, नेताजी आपले सेनापती आहेत. आम्ही वेढलो गेलो आहोत, हे त्यांना माहीत आहे. पण तिकडे शास्ताखान उतरल्याची बातमी होती. नेताजी कोणत्या संकटात आहेत, काही समजत नाही. आता फक्त दोनच मदतींची आशा आहे.'

'कोणत्या?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘एक नेताजी, आणि दुसरा आपला सदैव पाठीराखा सह्याद्री!’

‘सह्याद्री!’ गंगाधरपंत उद्गारले.

‘हो! त्याच्यावर आमचा सर्व भरिभार आहे. पावसाला आता सुरुवात होईल. अखंड धारा वर्षतील. सिद्दी जौहरच्या फौजेला ते तेवढं मानवायचं नाही... त्र्यंबकराव, दारूगोळा भरपूर आहे ना?’ राजांनी एकदम विचारले.

‘जी! त्याची उणीव पडायची नाही.’

‘मग आम्हांलाही वेढ्याची चिंता नाही. आपल्या तोफा गडावर सज्ज आहेत, तोवर सिद्दी जौहरला अंतर ठेवूनच बसावं लागेल.’

त्याच विचारात राजे सज्जाकोठीत विश्रांतीसाठी गेले.

पण राजांचा तर्क साफ चुकला. सिद्दी जौहरने गडाला वेढा घालताच आपले चारशे पायदळ व एक लहानशी घोडदळाची तुकडी राजापूरच्या इंग्रजाकडे रवाना केली होती. सिद्दी जौहरने तोफा डागणाऱ्या कसबी माणसांची व लांब पल्ल्याच्या तोफांची मागणी केली होती.

सिद्दीचा दूत राजापूरला जाताच इंग्रजांनी त्याचे स्वागत केले. त्यांना जौहरच्या वेढ्याचे वृत्त समजलेच होते. तसेच, शास्ताखानाची प्रचंड फौज शिवाजीच्या बीमोडासाठी उतरलेली त्यांना ठाऊक होती. आता शिवाजी संपल्यासारखाच होता. उलट, व्यापाराची नवीन संधी प्राप्त होत होती. इंग्रजांच्या तोंडाला पाणी सुटले. त्यांनी सिद्दी जौहराची मागणी मान्य केली. मिरजेचा तह इंग्रज विसरले; आणि ज्या गिफर्डला राजांनी सोडले, तोच गिफर्ड वेलची, मिगहेम यांसारखे तोफखान्याचे दर्दी बरोबर घेऊन दोन तोफांसह पन्हाळ्याकडे निघाला. खुद्द रेव्हिंग्टन एक नामी तोफ घेऊन आपल्या साथीदारांसह अणुस्कुरामागे पन्हाळ्यास आला. राजांना याचा पत्ताही नव्हता.

एके दिवशी सकाळी राजे सदरमहालात असता बाहेर टापांचा आवाज आला. राजांच्या जवळ असलेल्या शिवा न्हाव्याने वर्दी दिली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘किल्लेदार आलेत.’

‘किल्लेदार तर मघाच आमचा निरोप घेऊन परकोटाकडे गेले होते!’

तोच त्र्यंबकराव आत आले. राजांनी विचारले,

‘काय झालं?’

‘राजे, टोपीकरांनी घात केला. ते सिद्दीला येऊन मिळाले.’

‘अशक्य!’ म्हणत राजे उभे राहिले.

‘नाही, महाराज, ते सत्य आहे. टोपीकर आपलं निशाण चढवून तोफा डागीत आहेत.’

‘चला, त्र्यंबकराव! काय प्रकार आहे, तो पाहू.’

राजे पराकोटावर गेले. त्र्यंबकरावाने बोट दाखविले. गंगाधरपंत म्हणाले,

‘टोपीवाले राजापूरकर दिसतात.’

त्यात संशय नव्हता. आपले निशाण फडकावीत सिद्दीच्या मदतीने टोपीकर तोफा पुढे आणीत होते. राजांचा सारा संताप उफाळून उठला. त्वेषाने मुठी वळल्या. क्षणात नेत्र आरक्त बनले. ते म्हणाले,

‘काय पाजी जात आहे! ज्या टोपीवाल्यांना दया दाखवून अवघे तीन मास लोटले नाहीत, ज्यांचा आम्ही जप्त केलेला माल आणि पकडलेला साहेब सोडून दिला, तेच हे वखारवाले आमच्याशी केलेला करार मोडून आज आमच्यावर चालून येतात!’

राजे भानावर आले. त्यांनी संताप आवरला. क्षणात ते इतके शांत झाले, की तो बदल पाहून जवळची माणसेदेखील थक्क झाली. राजे हसू म्हणाले,

‘बाजी, बोलून चालून व्यापारी ते. सौद्याची चांगली वेळ गाठली. नशिबात असलं, तर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपल्याला हा सौदा फार महागात पडला, हे त्यांच्या ध्यानी येईल. त्र्यंबकराव, तोफा सज्ज ठेवा. गडावरील प्रत्येक हत्यारी तटाला भिडवा. श्रींची इच्छा असेल, तर यातूनही आपण सहज पार पडू.'

त्याच वेळी टोपीकरांच्या तोफेने धूर ओकला. गोळा तटाजवळ येऊन पडला. परकोटावर फिरंगी बनावटीची 'काली तोफ' सज्ज होती. राजे त्वेषाने म्हणाले,

'त्र्यंबकराव, कालीचं कौशल्य बघू या. तिला बत्ती द्या.'

काली गर्जत उसळली. टोपीवाल्यांच्या तोफेला गडावरून प्रत्युत्तर गेले. गडावरच्या तोफा आग फेकू लागल्या. गड उंच असल्यामुळे गडाखालील गोळे तटापर्यंत येत नव्हते. त्यासाठी जी जागा हवी होती, ती जागा गडावरच्या तोफांच्या माऱ्यात होती.

टोपीवाले युद्धात उतरल्याने राजे काळजीत पडले. वेढ्यातून चौफेर फिरत टोपीवाले दुर्बिणीतून गडाची पाहणी करीत होते. गडावरून राजांना त्यांची हालचाल दिसत होती. निरनिराळ्या जागांवरून तोफा डागल्या जात होत्या. राजे आता नुसते पावसाची वाट पाहत होते.

पावसाचे वारे वाहू लागले. हवेत गारवा येऊ लागला. आकाशातून पूर्वेकडे ढग सरकू लागले. राजे आनंदले.

सिद्दी जौहर हाही तसाच मुरब्बी होता. त्याने पावसाळी छपऱ्या बांधायला सुरुवात केली.

-आणि एके दिवशी आपल्या सैन्यासह नेताजी येत असल्याची बातमी जौहरच्या हेरांनी आणली. शिवाजीचा सेनापती नेताजी चालून येत होता. सिद्दी जौहरने नेताजीचा डाव पुरा ओळखला- नेताजी वेढ्याला कुठे तरी खिंडार पाडील; व शिवाजीला त्यातून पळून जायला फावेल. ती संधी लाभू नये, म्हणून नेताजी वेढ्याला भिडण्याच्या आतच सिद्दीने आपली एक फौजेची तुकडी नेताजीवर पाठविली; आणि वेढ्याला डोळ्यांत तेल घालून राहण्याची आज्ञा दिली.

राजे गडावरून पाहत होते. नेताजी आला. बरोबर सिद्दी हिलाल व त्याचा मुलगा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वाहवाह हाही होता. नेताजीची व सिद्दी जौहरच्या सैन्याची गाठ पडली. नेताजीने शर्थ केली; पण त्याचे काही चालेना. त्या दंगलीत वाहवाह जखमी होऊन पडला. मुलाला सोडवायला गेलेला सिद्दी हिलाल शत्रूहाती सापडला. नेताजीला पराभूत होऊन पळावे लागले. नेताजीच्या रूपाने राजांची उरलीसुरली आशा दूर पळत होती.

सूर्य अस्ताला जात होता. खिन्न मनाने राजे उभे होते. एकटक नजरेने अस्ताला जाणारा सूर्य बघत होते. बघता-बघता सूर्य क्षितिजावर टेकला. राजांनी अस्ताला जाणाऱ्या सूर्याला हात जोडले. सूर्य झरझर क्षितिजाआड झाला. पश्चिमेकडील रंगांची उधळण हळूहळू विरत होती. क्षितिजाला एक छोटासा तांबडा ढग दिसत होता. स्थिर नजरेने त्या ढगाकडे राजे पाहत होते... तो नजरेत येणारा ढगही आता अंधारात मिसळून जाईल; आणि काही क्षणांतच पश्चिमेची धूसर कडही वाढत्या अंधारात लुप्त होईल...

एक दीर्घ नि:श्वास सोडून राजे वळले.

राजे उदास झाले. पावसाने आपली झोड उठविली; पण सिद्दीचा वेढा रेसभरही हलला नाही. पावसात शत्रूची छावणी भिजत होती. तंबू उडत होते. वादळी वारे वाहत होते. पण सिद्दी कशाला जुमानीत नव्हता. राजांना सुटकेची आशा दिसत नव्हती.

निसर्गाने राजांना कुमक केली; पण सिद्दी निसर्गावर मात करून उभा ठाकला होता. राजांना मनातून सिद्दीच्या चिकाटीचे कौतुक आणि आपल्या दैवाची कीव वाटत होती. राजांनी निर्णय केला. सिद्दी जौहरशी त्यांनी तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या. वेढ्याकडे थोडेही दुर्लक्ष न करता सिद्दी जौहर राजांनी पुढे केलेल्या तहाला ठोकरीत होता.

सिद्दी जौहर एकाच तहाला मान्यता देणे शक्य होते :

राजांनी सिद्दी जौहरच्या स्वाधीन होणे.

□

११

पावसाच्या अखंड धारा कोसळत होत्या. घोंघावणारा वारा रात्रंदिवस वाढत होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पानांची सळसळ, पावसाचा आवाज आणि वादळ यांत सारा निसर्ग हेलावून गेला होता. चांदण्याचे दिवस असूनही चांदणे दिसत नव्हते. टेहळणी बुरुजावरचे लोक कानाचे डोळे करून गड राखीत होते. जाग देणारे आवाज उठत होते. घोंघावणाऱ्या वाऱ्यात ते आवाज भयाण वाटत होते. सिदू हवालदार असाच पावसाचा मारा चुकवीत उत्तरेच्या तटावरून फिरत होता. अंगावरली इरली पावसात निथळत होती. काही न बोलता सिदू हवालदारामागून दोघे बारगीर जात होते. काही तरी ढासळल्याचा आवाज अचानक आला. तिघांची पावले थांबली. काही दिसत नव्हते. कान ऐकत होते. घोंघावणाऱ्या वाऱ्याचा आणि ओघळणाऱ्या पाण्याचा तेवढा आवाज येत होता. पावसात कपारीचा दगड निखळला असेल, असे समजून सिदू परत ताठ झाला. तोच आवाज पुन्हा आला.

'हुश्शारऽऽऽ'

आवाज गडावरून आला नव्हता. आवाज खालून आला होता. पावसाची पर्वा न करता सिदूने झटकन इरले फेकले. वाऱ्याच्या तडाख्यात ते तटाखाली उडाले. मागच्यांनी त्याचेच अनुकरण केले. सिदूने तलवार उपसली. डोळ्यांवर येणारे पाणी निपटून सिदू ऐकू लागला. परत तो अस्पष्ट आवाज कानांवर आला.

'हुश्शारऽऽ'

आता मात्र शंका नव्हती. सिदू तटावर वाकला. त्याने हाक दिली,

'कोन हाय?'

उत्तर आले नाही. परत त्याने जोराने आवाज दिला,

'अरं, कोन हाय?'

'दोर सोडा!' खालून आवाज आला.

सिदूच्या अंगावर भर पावसातही काटा फुलला. त्याने एका बारगिराला चौकीवरचे सैनिक गोळा करायला सांगितले. बघता बघता पाच-पन्नास हत्यारबंद गोळा झाले. सिदूने एका बारगिराला किल्लेदारांना आणायला पाठविले. बारगीर धावला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खालून परत आवाज आला. 'दोर टाका, दोर ऽऽ'

सिदूने कपाळावरचे पाणी निपटले. तटावरून वाकून तो ओरडला,

'टाकतो! उबा ऱ्हा, हो ऽ ऽ ऽ'

खालचा आवाज बंद झाला. उभ्या पावसात निथळत सारे तटाकडे उभे होते. कुणाला काही सुचत नव्हते. पावसाच्या आणि वाऱ्याच्या आवाजातून कल्पनेचे नवीन आवाज कानांवर पडत होते. तटभागावर सारखी वर्दळ चालू ठेविली होती. तोच किल्लेदार त्र्यंबकराव तिथे आले. सिदूने मुजरा करून सांगितले. त्र्यंबकराव म्हणाले,

'दोर सोडा!'

चौकीपहाऱ्यांतून दोर आणला गेला. दोराचे वेटोळे फेकले गेले. सिदू ओरडला,

'दोर आला, हो ऽ ऽ ऽ'

सारे दोराकडे पाहत होते. सिदूच्या हाती दोराचे टोक होते. दोराला हिसके बसताच सिदू म्हणाला,

'दोर पकडला!'

दोघे बारगीर पुढे झाले. त्यांनी आणि सिदूने हाताला तिढे देऊन, तटाला पाय देऊन दोर खेचून धरला. दोराला ओढ लागत होती. ओढ वाढत होती. काही वेळ गेला; आणि एक हात तटावर पडला. दोघांनी त्या माणसाला वर उचलून घेतले. त्र्यंबकरावांनी विचारले,

'आणखी कोण आहे?'

श्वास घेत तो इसम म्हणाला, 'कोन न्हाई.'

त्र्यंबकरावांनी दोर उचलून घ्यायला सांगितले. बुरुजाच्या चौकीवर सारे गेले. पलोते

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नजीक आले. एक संन्यासी चिंब भिंजलेला उभा होता. अनेक ठिकाणी त्याला खरचटले होते. त्र्यंबकरावांनी विचारले,

‘कोण तू?’

‘संन्यासी, महाराज!’ तो संन्यासी म्हणाला.

‘गडावर का आलास?’

‘भिक्षेसाठी, महाराज!’

‘आणि वेढ्यातून कुणी सोडलं?’

‘समर्थकृपा!’

‘नीट बोलतोस का?’ त्रिंबकराव चिडले.

‘रागावू नका! गरीब संन्यासी मी. साधू माणूस. मला राजांच्या समोर हजर करा.’

‘तर! मानकरीच तू! राजे सुखी झालेत.’

‘राजांना उठवा. नाही तर...’

‘नाही तर काय?’

‘राजे उद्या रागावतील आपल्यावर. मी फार थकलोय्. राजांच्याकडे मला घेऊन चला.’

संन्याशाच्या शांत उद्गारांनी त्र्यंबकरावांना काय करावे, ते सुचेना. ते म्हणाले,

‘ठीक आहे!’

संन्याशाचे हात मागे बांधले गेले. सारे वाड्याकडे चालू लागले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांना जागे करण्यात आले. एवढ्या अपरात्री जागे करण्यात आल्यामुळे राजे ताडकरून पलंगावरून उतरले. त्यांनी विचारले,

‘काय झालं?’

हुजऱ्या म्हणाला, ‘किल्लेदार आलेत.’

‘पाठव त्यांना.’

किल्लेदार आत आले. राजांना म्हणाले,

‘एक संन्यासी गडावर आला आहे.’

‘कसा आला?’ राजांनी करड्या आवाजात विचारले.

‘तटाखालून आवाज येत होता. पहारेकऱ्यांनी तो ऐकला. दोर फेकून वर घेतला. काही सांगत नाही.’

‘कुठं आहे?’

‘आणला आहे. आज्ञा होईल, तर...’

‘आमच्यासमोर हजर करा...’

संन्यासी आणला गेला. संन्याशाला पाहताच राजांची चर्या बदलली. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसू लागले. राजे म्हणाले,

‘त्याचे हात सोडा.’

‘पण, महाराज...’ त्र्यंबकराव म्हणाले.

‘हात सोडा! साधुसंतांना कोणी बांधतं का?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संन्याशाचे हात सोडले गेले. राजे म्हणाले,

‘त्र्यंबकराव, तुम्ही जा. कपडे बदलून घ्या. आम्ही पाहतो.’

त्र्यंबकराव मुजरा करून गेले. ओल्या अंगाने निथळत असलेल्या संन्याशाला मिठी मारीत राजे म्हणाले,

‘अरे महादेवा, अक्षरशः देवासारखा अवतरलास! थांब!’

राजांनी आत जाऊन आपली संदूक उघडली. तीतून आपले कपडे काढून महादेवापुढे करीत ते म्हणाले,

‘प्रथम कपडे बदल.’

‘नको, महाराज!’ तो म्हणाला.

‘अरे, तुझं खरचटलेलं अंग, भिजलेले कपडे... थंडीनं कुडकुडतोस. अरे, सरळ बोलता तरी यायला हवं ना! घाल ते कपडे. आमची आज्ञा आहे. तोवर आम्ही आलो.’

राजे बाहेर गेले. देवडीवरचे पहारेकरी गडबडीने उठून उभे राहिले. राजे म्हणाले,

‘देवडीवरच्या धुमीवर जाळ करा.’

राजे परत आपल्या महाली आले. महादेवाने कपडे घातले होते. तो संकोचला होता. राजे हसले. त्याचा हात धरून राजे म्हणाले,

‘चल.’

महादेवाला घेऊन राजे देवडीवर आले. नाईक अदबीने उभा होता. राजे म्हणाले,

‘नाईक, तुमचं घोंगडं धुमीजवळ टाका. आम्ही जरा शेकत बसतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नाईकाने आपले घोंगडे धुमीजवळ टाकले. राजे म्हणाले,

‘नाईक, पहारेकरी बाहेर उभे करा. आत कुणालाही सोडू नका.’

‘जी!’

नाईक जाताच राजे घोंगड्यावर बसले. धुमीतील बाभळीची गाठ जळत होती. नवी बारीक लाकडे तीवर रचली होती. धूर धुमसत होता. हाताला धरून राजांनी महादेवाला जवळ बसवून घेतले. छपरावर पावसाच्या सरी कोसळत होत्या. पागळीचे पाणी चौकात पडत होते.

‘काय, महादेवा? सांग आता.’ राजे म्हणाले.

‘महाराज, गडावर मासाहेब महाराज काळजीत आहेत. शास्ताखानानं पुण्यात आपल्या लाल महालात ठाणं दिलं आहे. खालचा मुलूख लुटला आहे.’

‘आणि किल्ले?’

‘किल्ले मजबूत आहेत. चाकणला त्यानं वेढा दिला आहे. फिरंगोजी गड लढवीत आहेत. आपण वेढ्यात गुंतलात; मासाहेबांना काही सुचेना. खुद्द मासाहेब महाराज फौज घेऊन निघाल्या!...

‘हो! नेताजी आले. त्यांनी मासाहेबांना रोखलं.’

धुमी पेटली होती. लहानलहान ज्वाळा उफाळत होत्या. राजे हात शेकीत होते. राजे म्हणाले,

‘घार आकाशात फिरते; पण तिचं लक्ष पिलाकडे असतं. इथं सगळंच उफराटं झालं. आम्ही भराऱ्या मारतो आहो; आणि मासाहेबांना ते गडावरून पाहावं लागतं आहे. काय वाटत असेल त्यांना!... सांग...’

‘नेताजी हरले...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ते आम्ही पाहिलं. त्यांचा नाइलाज झाला; पण तू कसा आलास?’

‘मासाहेबांनी अनेक नजरबाज पाठविले; पण कुणाचं काही चाललं नाही. सिद्दी जौहर, संन्यासी, बैरागी, फकीर- कुणालाच जागा देत नाही. वेढा मजबूत आहे. दिवसातून एक वेळ तरी भर पावसातून सुद्धा सबंध वेढा फिरतो.’

‘पण तू कसा आलास?’

‘मी येत असता कोकणातली सुर्व्यांची तुकडी वेढ्यात सामील व्हायला जात होती. साताऱ्याजवळ गाठ पडली. पन्नास होन देऊन त्यांना फितवलं. त्यांच्यांतलाच एक म्हणून मी तळावर आलो.’

‘शाब्बास!’

‘महिनाभर तळावर आहे. पण संधी मिळेना. नशिबानं एक जागा गावली. सगळीकडे बोलवा होती की, शिवाजीराजे सिद्दीला शरण जाणार! धीर निघेना. मग काल राती हिय्या केला आणि रातीचं निघालो.’

‘मग संन्यासी केव्हा झालास?’

‘येताना हेच कपडे करून आलो. साताऱ्याला बारगीर झालो. कफनी जवळ व्हती. विचार केला- गावलं, तर वाढाचार लागायचा. तवा परत राती कफनी चढविली, आणि आलो.’

‘धन्य तुझी, महादेव!- आलास, ती वाट कशी आहे?’

‘उत्तरेची घळण हाय, न्हवं? तिथं दोन मेट्या जरा पातळ हाईत.’

‘किती अंतरावर मेटी आहेत?’

‘दीडशे कदमांवर तरी असंल!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे हसले. म्हणाले, ‘तिला पातळ म्हणतोस?’

‘बाकीच्या मेटी पन्नास पावलांवर हाईत. हाताला हात लावून वेढा उभा आहे. तेवढी एकच जागा आहे. मेटकरी लई तर तीस असतील.’

‘ठीक आहे. उद्या विचार करू. थकलास. झोप आता.’

राजे उठले, तेव्हा शेकोटी पुरी पेटली होती. ज्वाळा जिभल्या चाटीत वर उफाळत होत्या.

□

१२

दुसऱ्या दिवशी पहाटेच्या नगाऱ्याने राजे जागे झाले. महालक्ष्मीच्या देवळातून घंटेचा आवाज येत होता. काकडआरती संपली नसावी. राजे स्नान, पूजा आटोपून सदरेवर आले. रात्री दोराच्या साहाय्याने कोणी तरी गडावर आले, एवढीच बातमी गडावर फैलावली होती.

राजे सदरेवर असता महादेव आला. राजांना मुजरा करून तो उभा राहिला. महादेवाकडे पाहून राजांना हसू आवरेना. महादेव शरीराने किरकोळ, पण उंचापुरा. राजांचे कपडे त्याला बेडौल दिसत होते. विजार पिंढरीपर्यंत चढली होती. अंगरखा गुडघ्यापर्यंत आला होता. छातीवर बंडी ढिली झाली होती. त्याच वेळी शिवा न्हावी सदरेवर आला. राजांनी विचारले,

‘शिवा, आमचा पोशाख कसा वाटतो?’

शिवा महादेवाकडे पाहतच होता. हसू आवरणे त्याला कठीण गेले. शिवा आपल्या दाढीवरून हात फिरवीत म्हणाला,

‘बोलूनचालून राजांचं कपडं. ते आमाला कसं शोभतील?’

‘न शोभायला काय झालं? अरे शिवा, तू आमचे कपडे केलेस, तर कुणी परका ओळखणार सुद्धा नाही! याच्या आणि आमच्या अंगलटीत फरक, म्हणून हे दिसतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बाजीप्रभू, त्र्यंबकराव, गंगाधरपंत ही सारी मंडळी आली. येसाजी सुद्धा आला. राजे म्हणाले,

‘त्र्यंबकराव, आमच्या महादेवाला आधी जमणारे कपडे द्या. आमच्या कपड्यांमुळं त्याची पंचाईत झाली आहे.’

त्र्यंबकरावांनी हवालदाराला सांगिलते. महादेव त्याच्याबरोबर गेला.

राजे सर्वांसह आपल्या महालात गेले.

सज्जाकोठीत खलबत बसले. राजे म्हणाले,

‘बोला, त्र्यंबकराव. आता या वेढ्यातून मार्ग कसा काढायचा?’

‘राजे, काही सुचत नाही, कळत नाही. सिद्दी जौहर संपूर्ण शरणागतीखेरीज काही मानील, असं दिसत नाही.’

‘मग काय? त्याखेरीज इलाज नाही!’ राजे निःश्वास सोडून म्हणाले.

‘राजे!’ बाजीप्रभूंना बोलवेना.

‘काय झालं, बाजी?’

‘राजे, आम्ही दुबळे ठरलो. राखता आलं नाही आपल्याला.’

बाजीप्रभूंसारख्या धिप्पाड, बलदंड माणसाने अश्रू ढाळताना पाहून राजांच्या मनाला पीळ पडला. राजे म्हणाले,

‘बाजी, नशीब खडतर आहे. पण प्रसंग कितीही खडतर असला, तरी शोधला, तर मार्ग मिळू शकतो.’

बाजीने डोळे टिपले. आशेने तो म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बोला, महाराज! थांबू नका.’

‘काल महादेव आला. उत्तरेतून दोन मेटी पातळ आहेत, असा त्यानं सुगावा आणला आहे. रात्रीचा फायदा घेऊन निसटून जायला तोच मार्ग आहे.’

त्र्यंबकराव म्हणाले, ‘मग वाट कसली बघायची? गडाची चिंता करू नका. जिवात जीव असेतो...’

‘ते मला माहीत आहे. पण मार्ग धोक्याचा. शत्रू सावध झाला, तर...’

‘तर मेटकरी जागेला कापून काढू.’ बाजी उसळले.

‘तेही जमेल. पण नंतर विशाळगडाखेरीज थांबता यायचं नाही. जवळ जवळ पंधरा कोसांचं अंतर. शत्रूनं गाठायच्या आत ते कापता येईल का?’

‘राजे!’ बाजी म्हणाले. ‘वेढ्यातून बाहेर पडा. विशाळगडावर सुखरूप न्यायची जबाबदारी आमची.’

‘ठीक आहे. पाहू, श्रींची काय इच्छा आहे, ती.’

रात्री एक माणूस महादेवाबरोबर दिंडीदरवाजातून बाहेर पडला. पहाटेला वादळी वाऱ्यात भिजलेली माणसे गडावर परत आली. ती वेढ्याबाहेर जाऊन परत आली होती. राजांना समाधान वाटले. दुसऱ्या दिवशी गंगाधरपंत सिद्दी जौहरकडे तहाची याचना करून आले. सिद्दी जौहर तर सावधपणे गंगाधरपंतांशी बोलत होता. बोलणी करून गंगाधरपंत गडावर आले.

त्या रात्री राजे शांत झोपी गेले. पहाटे राजे जागे झाले, सकाळी सज्जाकोठीत खास माणसे गोळा झाली. पौर्णिमेच्या रातीत पाऊस पडत होता. आषाढाच्या वादळी पावसाने थैमान मांडले होते. वादळी हवेत राजे बेत आखीत होते. राजांनी सांगितले,

‘त्र्यंबकराव, दोन पालख्या सज्ज ठेवा... बाजी, तुमची निवडक माणसं घ्या... गंगाधरपंत, पत्र पुरं झालं?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गंगाधरांनी पत्र तयार केले होते. राजांनी ते वाचले; शिक्कामोर्तब करून ते पत्र गंगाधरपंतांना दिले. सिद्दी व फाजल यांच्याशी शरणागतीबद्दल वाटाघाटी करण्यासाठी गंगाधरपंतांची नियुक्ती झाली. पत्रात राजांनी लिहिले होते :

> ‘सलाबतखानाने मध्यस्थी करून अली शहाकडे रदबदली करावी, म्हणजे आपण आपले सर्वस्व त्यांच्या चरणी अर्पण करू.’

गंगाधरपंत व आणखी चौघे मिळून गडाच्या प्रसिद्ध चार दरवाजापाशी आले. त्र्यंबक भास्करांनी हा गडाचा प्रमुख दरवाजा सव्वाशे दिवसांनंतर उघडला. गंगाधरपंत शरणागतीचे पांढरे निशाण घेऊन गड उतरू लागले. वेढा देऊन बसलेल्या हशमांनी ते निशाण पाहिले. सिद्दीकडे वर्दी गेली. फाजल ऐटीने शामियान्याबाहेर आला. आपल्या यशाचे कौतुक पाहू लागला.

गंगाधरपंतांनी अत्यंत लीनतेने राजांची थैली जौहरच्या हाती दिली. सिद्दीने थैली वाचली. शिवाजी शरणागती पत्करण्यास तयार होता. शिवाजी पुरा जेरीला आला होता. सिद्दीने विचारले,

‘राजासाब यहाँ हाजिर होंगे?’

‘आपण राजांच्या सुरक्षिततेची हमी दिलीत, तर राजे उद्या हजर होतील.’

‘आम्ही जरूर ती हमी देऊ.’ सिद्दी म्हणाला.

‘यात शिवाजीचा डाव दिसतो.’ फाजल म्हणाला. ‘अब्बाजानच्या वेळी अशीच बोलणी झाली होती.’

सिद्दी जौहर हसला. म्हणाला, ‘फाजल, अफझलखानाच्या वेळी बोलणी अशीच झाली; पण वेढा असा नव्हता. त्या वेळी तुझे अब्बाजान शिवाजीला भेटायला गेले. उद्या शिवाजी इथं येतो आहे. त्याला यावंच लागेल.’

राजांच्या सुरक्षिततेची हमी घेऊन ‘राजे उद्या सिद्दी जौहरच्या शामियान्यात हजर होतील,’ असे सांगून गंगाधरपंत गडावर परतले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

साऱ्या छावणीत ही बातमी पसरली. अखंड पावसाच्या माऱ्यात सापडून बेजार झालेली छावणी त्या बातमीने आनंदित झाली. वेढ्याचा ताण एकदम कमी झाला. फाजलखान उद्याचे स्वप्न पाहत होता. सिद्दी जौहर आपले विजापुरातील प्रचंड स्वागत नजरेपुढून घालीत होता.

बाहेर अखंड पाऊस कोसळत होता.

□

१३

सिद्दी जौहरच्या छावणीतून गंगाधरपंत गडावर परत आले. सज्जाकोठीत येताच राजांना सर्व वृत्त त्यांनी सादर केले. राजांच्या चेहऱ्यावर तेच स्मित होते.

'पंत, इथवर तर सर्व ठीक झालं. आता खुद्द गडावर 'आम्ही उद्या सिद्दी जौहरला भेटायला जाणार,' ही वदंता पसरू द्या.' हसत राजे म्हणाले, 'सर्व पार पडलं, तर ठीक. नाही तर आम्हांला सिद्दीला भेटायचा योग येणारच!'

दोन प्रहर संपत आली. बाजींनी आपली माणसे निवडली होती. राजे सज्जाकोठीत येरझाऱ्या घालीत होते. गंगाधरपंत, त्र्यंबकराव हे राजांच्या संगे जाणारे दळ, सामान यांची व्यवस्था करीत होते.

दोन प्रहरी कमी झालेला पाऊस परत वाढला. राजांनी शिवा न्हाव्याला बोलाविले. हसतमुख शिवा राजांच्या समोर आला. राजे म्हणाले,

'शिवा, आम्ही गडाबाहेर पडताना आणखी एक पालखी राजरस्त्यानं सोडणार आहोत. तीत आणखी एक शिवाजी हवा.'

'महाराज, समजलं नाही!' शिवा म्हणाला.

कसे सांगावे, हे राजांना समजेना. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'शिवा, आम्ही गेलो, की दुसरी पालखी निघेल. ही पालखी राजरस्त्यानं जाणार असल्यानं नक्कीच जौहरच्या हाती मिळेल. जरी आमचा सुगावा लागला, तरी दुसरी पालखी सापडल्यामुळं 'शिवाजी सापडला,' अशी समजूत होईल.'

'मग अडलंय् कुठं?' शिवाने विचारले.

'दुसरा शिवाजी पाहिजे! आमच्या अंगलटीचा, चेहऱ्यामोहऱ्याशी जुळणारा.'

शिवाच्या एकदम लक्षात आले. तो आनंदाने म्हणाला,

'अशी कामगिरी कोन सोडंल व्हय?'

शिवा न्हावी राजांच्या उंचीचा, तसाच होता. अनेक वेळा त्याच्याशी आपले साधर्म्य राजांनी बोलून दाखविले होते. आणि शिवानेदेखील हौसेने तशीच दाढी राखली होती. तो आला, की त्याचे मित्र सुद्धा त्याला 'या, राजे!' असे थट्टेने म्हणत असत. शिवाच्या निर्णयाची खात्री राजांना होती. राजे संयमित आवाजाने म्हणाले,

'शिवा, शिवाजी होणं इतकं सोपं नाही. तुझ्यामुळं आम्ही सुटून जाऊ. पण तू? तू सुटणं कठीण. म्हणूनच आम्ही विचार करतो आहो.'

शिवाने राजांचे पाय धरले. तो म्हणाला,

'महाराज, भवानीची शपथ आहे तुम्हांला! आता विचार बदलू नका. तुम्ही वाचाल, तर लाख शिवा न्हावी जन्माला येतील. शिवाच्या जिवाचं सोनं होईल.'

'चल, तर! बघू, शिवाजी कसा दिसतो, ते!'

राजांनी आपले खास कपडे शिवाला दिले. कपडे मस्तकी लावून त्याने जरीबुंदी अंगरखा चढविला. पायांत चोळणा कसला. राजांनी संदूक उघडून टोप दिला. टोप चढवून शिवा उभा होता. राजांनी दुशेला आपल्या हातांनी बांधला. कमरेला रत्नजडित तलवार लाविली. दुशेल्यात कट्यार खोवली. अंगावर चढणाऱ्या एक एक वस्तूबरोबर शिवा कासावीस होत होता. त्याचे हृदय धडकत होते. राजांनी मोत्यांचा तुरा शिवाच्या टोपात

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खोचला; आणि जरी चढाव दाखवीत राजे म्हणाले,

‘शिवा, चढाव घाल!’

त्या शब्दांनी शिवा एक पाऊल मागे सरला. दुसऱ्याच क्षणी जोडे उराशी कवटाळीत तो म्हणाला,

‘महाराज, फार झालं! आजवर हे ओझं कसं सोसलंसा, तुमालाच माहीत! या जोड्यांच्या जवळ उभं राह्यची माझी लायकी नाही; आणि हे जोडं पायांत घालू?’

राजे कठोर बनले. ‘शिवा, जोडे घाल! असला रडवा शिवाजी? अरे, आमची अब्रू पणाला लागेल अशानं!’

त्या शब्दांबरेबर शिवाची छाती रुंदावली. डोळे हसरे बनले. त्याने चढाव पायी चढविले. तलवारीवर हात ठेवीत तो म्हणाला,

‘कोण म्हणतो आम्ही रडवे, म्हणून?’

राजे हसले. राजांनी गळ्यातला कंठा काढला; तो शिवाच्या गळ्यात घातला. संदुकीतून कवड्यांची माळ उचलली. कपाळी लावून ते म्हणाले,

‘शिवा, हे भोसल्यांचं खरं लेणं! भवानीचा प्रसाद! देवीच्या भक्ताची खूण! हिला कमीपणा आणू नको. कशावर फसला नाही, तरी ही माळ पाहून सिद्दी फसेल.’

राजांनी कवड्यांची माळ शिवाच्या गळ्यात घातली. राजे मागे सरून शिवाचे रूप पाहत होते, तोच हुजऱ्या आला. तो म्हणाला,

‘गंगाधरपंत आलेत.’

‘पाठव त्यांना आत!’

राजे म्हणाले, ‘जरा पाठमोरा उभा राहा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एवढे बोलून राजे पलीकडच्या दालनात गेले. गंगाधरपंत, बाजीप्रभू आत आले. गंगाधरपंतांनी मुजरा केला. ते म्हणाले,

‘राजे, सारी तयारी झाली.’

शिवा गर्कन वळला. म्हणाला,

‘ठीक आहे. पंत, आम्हीही तयार आहो...’

बाजीप्रभू उद्गारले, ‘तुम्ही ऽ ऽ - तू ऽ’

शिवा हसला. राजेही बाहेर पडले. राजांनी विचारले,

‘बाजी, कसा वाटतो प्रतिशिवाजी?’

‘महाराज, क्षणभर विश्वास बसला नाही. ज्यानं आपणांला जवळून पाहिलं नाही, तो खास फसेल... पण, शिवा, राजे असं ढिल्या अंगानं कधी उभे राहत नाहीत.’

शिवा एकदम ताठ झाला. परत हसणे उसळले!

राजे म्हणाले, ‘शिवा, एक राहिलं!’

राजांनी आपल्या कानांतला चौकडा काढला. शिवाच्या एका कानात चौकडा घातला. दुसरा चौकडा घालण्यासाठी राजे वळले. राजांचे राखलेले अवसान एकदम नाहीसे झाले. त्यांचे नेत्र अश्रूंनी भरले. हुंदका फुटला. गडबडीने त्यांनी शिवाच्या हाती चौकडा दिला. शिवा उद्गारला,

‘महाराज!’

राजांनी शिवाला एकदम मिठीत घेतले. राजांना काही बोलायला सुचत नव्हते. डोळ्यांतले अश्रू शिवाचा खांदा भिजवीत होते. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शिवा, या राजेपणाचा याचसाठी तिटकारा वाटतो. तुमच्यासारखे हर घडीला, हर प्रसंगाला खर्ची घालायचे. कशासाठी? का? अरे, माझ्यासाठी मरण पत्करणारा तू! आणि तुझ्या कानात मी चौकडा घालतो! केवढी क्रूर थट्टा आहे ही!’

शिवाने राजांच्या मिठीतून सोडवणूक करून घेतली. शिवा म्हणाला,

‘राजे, मानसं मेल्यानंतर रडणारे पुष्कळ आहेत; पन जितेपनी रडणारे फार थोडे. महाराज! माझ्यासारख्या मानसासाठी तुमच्या डोळ्यांत पानी आलं. आणखीन काय पाहिजे या जिवाला? पडलेल्या एका टिपासाठी एक एक मरन पत्करीन मी! माझ्यासाठी वाईट वाटून घेऊ नका.’

राजांनी स्वत:ला सावरले. डोळे टिपले. त्यांनी विचारले,

‘गंगाधरपंत, नजरबाज रवाना झाले?’

‘हो! अंधार पडताच नजरबाज रस्ता दाखवायला गडाखाली उतरले आहेत. पण राजे, बाहेर पाऊस आणि वादळ फार आहे.’

‘निसर्गाइतकी आमची जपणूक कोणीच केली नाही. आज पौर्णिमा. पण पौर्णिमेचं चांदणं असताही आमच्या रक्षणार्थ निसर्गानं हे रूप धारण केलं आहे. आपण निसर्गाचे आभार मानायला हवेत.’

जेवणे आटोपली. सर्व तयार होते. रात्र वाढत होती. राजे वाड्याबाहेर आले. प्रहर रात्र उलटली होती. घोंघावणारा वारा आणि पावसाच्या धारा यांनी वातावरण भरून गेले होते. राजे सर्वांसह वाड्याबाहेर काढले. राजदिंडीजवल पालखी तयार होती. राजांनी शिवाला मिठी मारली; आणि ते त्र्यंबकरावांना म्हणाले,

‘आम्ही जाताच दरवाजे बंद करून घ्या. शिवाची दुसऱ्या वाटेनं रवानगी करा. जेवढा लढविता येईल, तितके दिवस गड लढवा.’

पंतांनी उत्तर दिले, ‘राजे, त्याची चिंता करू नका. सुखरूपपणानं जा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे म्हणाले, ‘बाजी असता काळजी कसली? पंत, आम्ही येतो.’

राजे पालखीत बसले. पालखी राजदिंडीने बाहेर पडली.

पाठोपाठ निवडक सहाशे पायदळ आणि पंधरा उमदी घोडी अंधारातून मार्ग उतरू लागली. राजदिंडी बंद झाली.

राजांच्या पाठोपाठच शिवा दुसऱ्या पालखीतून गडाखाली पाठविला गेला.

❑

१४

पावसाच्या माऱ्यात राजांची पालखी पुढे धावत होती. पालखीबरोबर बाजी व इतर बांदल बारगीर धावत होते. पायांतल्या वहाणांचा आवाज येऊ नये, म्हणून पालखीजवळ कुणाच्याच पायांत वहाणा नव्हत्या. घातल्या जरी असल्या, तरी आडवाटेने रानातून कोसळणाऱ्या पावसात चिखल तुडविताना त्या टिकल्याही नसत्या. प्रत्येक क्षण मोलाचा होता, जीव घेणारा होता. जमिनीवर पाय ठरत नव्हते.

शत्रूच्या वेढ्याच्या चौक्या नजीक येत होत्या. प्रत्येक पन्नास कदमांवर पुढे पाठविलेले हेर राजांची पुढची वाट दाखवीत होते. शत्रुचौकी नजरेत येताच पालखीची गती किंचित मंदावली. आवाज न करता सर्वांच्या तलवारी म्यानाबाहेर पडल्या. प्रत्येकाची छाती पुढच्या क्षणासाठी धडधडत होती. शक्य तो आवाज न करता पावले उचलली जात होती. पण पाण्यात पडणारा पाय उचलताच जो आवाज येई, तो पावसापेक्षाही जास्त भासे. चौकी-पहारा ओलांडला, तोच कानांवर आवाज पडला,

‘हुश्शार ऽ ऽ’

बाजी दमदार आवाजात म्हणाले, ‘चला ऽ ऽ!’

पळभर मंदावलेली गती दुप्पट झाली. मागून परत साद आली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हुश्शार ऽ ऽ’

राजांच्या पालखीने वेढा ओलांडला होता. आता जिद्द आली होती. परीक्षा होती धावेची! पालखी पळविली जात होती. एकच पळापळ सुरू झाली. शब्द कानी येऊ लागले,

‘ठेहरो!’

पण ‘ठेहरो’ शब्दापेक्षा ‘चला’ हा बाजीचा शब्द बळकट होता. शत्रूची खात्री झाली. एकच किलकारी मागे उठली :

‘दुश्मन भाग गया!’

□

१५

‘कैसा भाग गया?’

आलीशान बैठकीवर मद्याने धुंद झालेला सिद्दी जौहर नुकताच कोठे निद्राधीन व्हायचा विचार करीत होता. तोच शिवाजी पळाल्याची बातमी त्याच्या कानांवर आली. डोंगरकपारीत शांतपणे तिरप्या उन्हात निद्रित झालेल्या काळ्या नागावर अचानक कुणी तरी दगड फेकताच जसा नाग उंचावतो, तसा सिद्दी उभा राहिला. डोळे अंगार फेकू लागले. बातमी घेऊन येणाऱ्या सैनिकावर तो थपडांचा वर्षाव करीत होता. तोवर फाजल, मसूदखान धावत आले.

फाजल म्हणाला, ‘तरी मी सांगत होतो...’

‘खामोश!’ संतापाने बेभान झालेला जौहर ओरडला. त्याची संतप्त नजर वळताच फाजलचे शब्द आटले. मसूदकडे नजर वळवून सिद्दी जौहर म्हणाला,

‘मसूद! शिवाजीका पीछा करो! जाओ! शिवाजीखेरीज आमच्या समोर येऊ नको.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मसूदने विलंब न करता हजार घोडेस्वार, हजार पायदळ जमा केले. भरधाव वेगाने भर पावसातून राजांना पकडायला तो धावला. बरेच अंतर मसूदने काटले; पण शिवाजी नजरेत येत नव्हता, कुठे पत्ता लागत नव्हता. अचानक एक स्वार बेंबीच्या देठापासून किंचाळला,

'दुश्मन ऽ! दुश्मन ऽऽ!'

मसूदला अवसान चढले. मंदावलेला घोड्याचा वेग वाढला. पालखीला वेढा घातला गेला. मसूदने पालखीतल्या राजांना पाहिले. पालखी पळविली गेली. मसूदच्या आनंदाला सीमा नव्हत्या. मराठ्याचा राजा शिवाजी अलगद मसूदच्या हाती सापडला होता!

कडेकोट बंदोबस्तात पालखी घेऊन मसूद छावणीवर आला. हे कळताच साऱ्यांचे चेहरे उजळले. सेवकाने सिद्दीला धावत जाऊन सांगितले,

'शिवाजी सापडला, हुजूर! मसूद शिवाजीला कैद करून घेऊन आला!'

सिद्दीची पावले थांबली. त्याने मान वर केली; सेवकावर नजर स्थिर झाली. चिंताक्रांत सिद्दीचे आरक्त बनलेले डोळे हसू लागले. सिद्दी प्रसन्नपणे हसला. त्याचे पांढरे शुभ्र दात मोत्यांसारखे चमकले. सिद्दीने बैठकीवर ठेवलेल्या आपल्या टोपातील रत्नजडित पान उपसले, आणि सेवकाच्या अंगावर भिरकावले. फाजलखान सिद्दीकडे पाहत होता. त्याच्याकडे पाहत सिद्दी म्हणाला,

'फाजल, कुर्नूलच्या ह्या सिंहानं जिथं पंजा टाकला, त्यातून आजवर कुणी सुटलं नाही. आणि हा ऽ ऽ'

तोच डेऱ्याच्या दाराशी आवाज आले. सिद्दीचे, फाजलचे डोळे तिकडे वळले. मसूद आत येत होता. त्याच्या मागून शिवाजीराजे काही घडलेच नाही, असे दाखवीत आत येत होते. राजांनी सर्वांवरून नजर फिरविली, आणि सिद्दीवर स्थिर केली. सिद्दी त्या धैर्याकडे पाहतच राहिला. त्याच्या चेहऱ्यावर हास्य उमटले. तो म्हणाला,

'राजे! पळून जात होता?'

'जमलं, तर पाहावं, हा इरादा होता ऽ ऽ'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तो फिर क्या हुआ?’

‘जमलं नाही!’

सिद्दी हसला. तो म्हणाला,

‘राजे, बहादूर आहात. बसा!’

शिवाजीला पाहताच फाजलचा त्वेष उफाळला होता. हाच तो शिवाजी, ज्याने अब्बाजानची कत्तल केली होती... आणि त्याला सिद्दी मानाने वागवतो!

‘जौहर!’ फाजल ओरडला. ‘सलतनीच्या ह्या शत्रूचं कौतुक कसलं करतोस? तलवारीनं मस्तक...’

‘हां! फाजल, जबान आवर! शिवाजी तुझ्या-माझ्यासारखे सरदार नाहीत. ते राजे आहेत. त्यांचा निर्णय पादशहासलामत घेतील. राजे माझे मेहमान आहेत... राजे, बसावं!’

‘शुक्रिया!’ म्हणत राजे आसनावर बसले.

‘राजासाब! शराब पिओगे?’ राजांच्या भिजलेल्या कपड्याकडे पाहून सिद्दीने विचारले.

सिद्दीने पेला हाती दिला. तांबडे मद्य राजांच्या पेल्यात ओतले गेले. राजांनी पेला ओठी लाविला नाही. स्थिर नजरेने त्यांनी विचारले,

‘आप नहीं पिएंगे?’

सिद्दी हसला. त्याची शंका दूर झाली. त्याने पेला उचलला. त्याच सुरईतले मद्य ओतून घेतले आणि ओठी लावले. राजांनी हसून पेला ओठी लावला.

सिद्दी जौहर राजांना निरखीत होता. राजांची ती धिटाई पाहून सिद्दीला कौतुक वाटत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजासाब, अगर भाग जाते, तो कहाँ जाते?’

‘विशालशैल! आम्ही एकदा ते गाठलं असतं, तर तुम्हांला काही करता आलं नसतं!’

‘बिलकुल सच! राजासाब, आपकी किस्मत की कोताही पर हमें अफसोस है!’

‘हमारी किस्मत हमेशाही कोताह नहीं होती!’

‘लेकिन आज तो वैसाही समझना होगा! हकीकत भी क्या दर्दनाक है!’

राजे हसून म्हणाले, ‘मालिक पूरा जानकार है.’

सिद्दीने विचारले, ‘अगर जंग में आप कत्ल कर दिये होते, तो?’

राजे मोकळेपणाने हसले. डावी मूठ कमरेवर ठेवीत सिद्दीच्या नजरेला नजर देत राजांनी विचारले,

‘सिद्दीसाब! फर्जंद शहाजी राजाको क्या आप भूल गये?’

सिद्दी हसला. राजेही त्या हास्यात सामील झाले. त्याच वेळी डेऱ्यात हेजीब आला. सिद्दीने विचारले,

‘काय आहे?’

हेजीब पुढे झाला, आणि सिद्दीच्या कानाला लागला. सिद्दी चकित झाला. क्षणात त्याची जागा संतापाने घेतली. त्याने आपली तलवार उपसली. तो राजांच्याकडे पाहून ओरडला,

‘तू कोण आहेस?’

‘शिवाजी!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘खोटं! शिवाजी पळून गेला. खरा शिवाजी पळून गेला ऽ ऽ!’

‘तेही खरं आहे.’

‘मतलब?’

‘शिवाजीराजे तुझ्या हाती सापडण्याइतके का खुळे आहेत? सिद्दी, अरे, एव्हाना राजे खूप दूर गेले असतील.’

‘तू कोण? बोल!’

सिद्दीच्या नजरेला नजर देत शिवा म्हणाला, ‘या जीवाला शिवा न्हावी म्हणतात!’

‘दगा ऽ ऽ’ उद्गारत फाजल पुढे आला. संतापाने थरथरत असलेला सिद्दी आपली तलवार शिवाच्या छातीला टेकवीत ओरडला,

‘याचा परिणाम माहीत आहे?’

थंडपणाने ती तलवार बाजूला सरकवीत शिवा म्हणाला, ‘ते माहीत नसतं, तर कशाला इथं आलो असतो? एवढी जिवाची भीती असती, तर पालखीतदेखील हीच कट्यार कमरेला होती.’

‘हरामखोर!’ फाजल ओरडला.

शिवा हसला. म्हणाला,

‘फाजल, आता संतापून काय उपयोग? राजे केव्हाच गेले. प्रहरभर का होईना, पण राजांचे कपडे अंगावर चढले. सोंगातला का होईना, पण शिवाजी बनलो. बस्स! जिवाचं सोनं झालं!’

‘खामोश! कंबख्त!’ सिद्दी ओरडला; आणि त्याने आपली तलवार सरळ शिवाच्या छाताडात भोसकली. तरवारीचे पाते रक्ताने न्हाले. शिवाच्या चेहऱ्यावर तीव्र वेदना उमटून

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गेली. तलवार निघालेल्या जागी त्याने डावा पंजा दाबला. उजव्या हाताने डेऱ्याचा खांब पकडला. तोल सावरीत हसण्याचा प्रयत्न करीत शिवा म्हणाला,

‘सोंगातला शिवाजी झाला, म्हणून काय तो पालथा पडेल? राजे ऽऽ, मुजरा ऽऽ’ असे म्हणत शिवा उभ्या दांडीच्या आधाराने खाली घरंगळला.

❑

१६

राजे पळून गेल्याची खात्री होताच खानाच्या छावणीत पुन्हा गोंधळ उडाला. स्वत:चे कौतुक करून घेत बसलेला मसूद, आपण आणलेला शिवाजी खोटा शिवाजी आहे, हे कळताच हताश झाला. संतापाने त्याने पुन्हा फौज गोळा केली; आणि मध्यरात्रीनंतर तो विशाळगडाच्या वाटेला लागला. सिद्दी जौहरला नक्की काही उमजत नव्हते. कदाचित खरा शिवाजी अजून गडावरच असेल, अशी शंका येऊन या गोंधळात विस्कळीत झालेला वेढा परत आवळून तो स्वत: गडाजवळच राहिला.

विशाळगडाच्या वाटेवर कुठे तरी पहाट होत होती. राजांची पालखी दौडीनं पळविली जात होती. पालखीच्या पुढे-मागे पळणारे वीर सारखी मागे-पुढे नजर टाकीत होते. वादळ कमी झाले होते; पण पाऊस होताच. राजे पालखीच्या गोंड्याला धरून पालखीत बसले होते. ऊर फुटेपर्यंत माणसे सारखी पळत होती. पालखीची माणसे पळता-पळता बदलत होती. खालच्या चिखलातून पावलांचा अखंड नाद उमटत होता. आपल्यासाठी घेतले जाणारे कष्ट पाहून राजांचे डोळे बसल्या जागी भरून येत होते. विशाळगड अजून फार दूर होता.

दिवस दीड प्रहर वर आला; आणि मागून येत असलेल्या मसूदची बातमी घेऊन हेर धावत आला. रात्रभर पळून थकलेल्या त्या जिवांचा थकवा ती बातमी ऐकताच कुठच्या कुठे गेला. जीव पणाला लावून विशाळगडाचे अंतर कमी करण्यासाठी सारे धावू लागले. विशाळगड अजूनही फार लांब होता. सर्वस्व पणाला लावून पालखीने गजापूरची खिंड गाठली.

खिंडीपासून गडाचे अंतर अजून तीन कोसांचे होते. शत्रू तर मागून येत असलेला
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दृष्टिपथात आला होता. दीड हजारांचे दळ घेऊन मसूद त्वेषाने चालून येत होता. गजापूरच्या घोडखिंडीजवळ राजे आले; आणि त्यांना बातमी लागली- विशाळगडाला सुर्वे आणि जसवंतसिंग वेढा देऊन बसले आहेत. गडावर पोहोचायचेच झाले, तर सुर्व्यांचा वेढा फोडूनच वर जायला हवे होते. मागून मसूद येत होता. वेढा फोडायचा कुणी?

राजांच्या बरोबर सहाशेच्या आसपास पायदळ. भोई वगैरेंची संख्या धरली, तरी आठशेच्या आतच माणूसबळ- रात्रभर चिखलाराडीतून पंधरा कोस धावलेले; छाती फुटेपर्यंत पळालेले. ही माणसे आता ताज्या दमाच्या सुर्व्यांची फळी फोडणार होती; संतापाने बेभान झालेल्या मसूदला टक्कर देणार होती...

कधीही बधिर न होणारी राजांची विचारशक्ती सुन्न झाली. बाजीप्रभूंनी पालखी खाली ठेवण्याची आज्ञा केली. गजापूर खिंडीत पालखी खाली ठेविली गेली. राजे बाहेर आले. बाजी म्हणाले,

'महाराज, आता वेळ करू नका. निम्मी शिबंदी घेऊन तुम्ही पुढं व्हा! सुर्व्यांची फळी फोडून तुम्ही गड गाठा.'

'आणि, बाजी, तुम्ही?'

'मी? इथं उभा राहतो! केवढाही वेळ लागो, एका शत्रूला खिंड ओलांडू देत नाही!'

'नाही, बाजी! जिवाची बाजी लावून आम्हांला इथवर आणलंत. आता जे होईल, ते मिळून करू.'

'राजे!' बाजी म्हणाले, 'प्रत्येक क्षण मोलाचा आहे. कृपा करून तुम्ही पुढं जा. जिवाची बाजी लावून तुम्हांला इथं आणलं, ते यासाठी नव्हे! या कष्टांचं चीज करा. गनीम येतो आहे. दावा साधील. सारं क्षणात व्यर्थ होईल.'

बाजींना राजांनी मिठी मारली. बाजी मुजरा करीत म्हणाले,

'राजे, तुम्ही या. आम्ही साहेबकामावर मरतो. मुलांलेकरांना अन्न द्यायला तुम्ही समर्थ असता मला काळजी कसली? पण, राजे...'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय, बाजी?’ राजे अश्रू आवरीत विचारते झाले.

‘राजे, गडावर जाताच इशारतीची तोफ द्या. बस्स! या, राजे ऽऽ’

राजांनी बाजींना मिठी मारली. क्षणभर बाजीही त्या मिठीत विसावले. दुसऱ्याच क्षणी मिठी सोडवीत बाजी बाजूला झाले. राजे आपल्या शिबंदीसह गडाकडे जाऊ लागले. राजे दिसेनासे होताच बाजी त्वेषाने फिरले. सारे बांदल बाजींकडे पाहत होते.

‘पाहता काय? राजे गडावर जाईपर्यंत एक गनीम या खिंडीतून जाता कामा नये. राजांना गडावर पोहोचवयाची जबाबदारी आपली आहे. बोला, हर ऽ हर ऽ महा ऽ देव ऽ ऽ.’

‘हर हर महादेव’ ची एकच गर्जना उसळली. पायांत त्राण आले. तलवारी उपसल्या गेल्या. बाजीप्रभू घोडखिंडीत उभे ठाकले.

‘दीन, दीन!’ म्हणत मसूद चालून येत होता.

गजापूरच्या घाटीवर असलेली घोडखिंड आपले नाव सार्थ करणारी होती. दोन्ही बाजूंना उंच दरड होती. मध्ये अरुंद खिंड वाटत होती. खिंड जवळ जवळ दीडशे कदम लांब होती.

मसूदचे सैन्य खिंडीपाशी आले; आणि बाजीप्रभूंचे बांदल मावळे त्वेषाने तुटून पडले. एकच कापाकापी सुरू झाली. मसूदचे सैन्य हटले. बाजीप्रभूंचे आघाडीचे मावळे मागे हटले. पाठीमागचे पुढे सरकले. थोड्या थोड्या अवधीने मसूदचे सैन्य हल्ला करीत होते. बाजीचे सैन्य प्रतिकार करीत होते. यात प्रहर उलटला.

राजे आपल्या तीनशे मावळ्यांसह गडाकडे धावत होते. गड नजरेत आला होता. तोच सुर्व्यांच्या वेढ्याला खबर मिळाली- खुद्द शिवाजीराजे चालून येतात.

सूर्यराव राजांवर चाल करून आला. राजांच्या लोकांनी पराक्रमाची शर्थ केली. राजांच्या सकट सारे लढत होते. हळूहळू सुर्व्यांचा विरोध कमी होऊ लागला. त्यांचे सैन्य हटू लागले. हीच संधी घेऊन ‘हर हर महादेव’ ची गर्जना गडापर्यंत पोहोचली. सूर्यरावाचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वेढा कापून राजे आपल्या जखमी मावळ्यांसह विशालशैलाकडे धावू लागले.

गडावरचा भगवा झेंडा फडकत होता. क्षणाक्षणाला किल्ला जवळ होत होता. प्रत्येक मावळ्याला आयुष्याचे सार्थक झाल्यासारखे वाटत होते.

राजे सुटले होते; पण बाजी पुरे अडकले होते. बाजींची तीनशेंची फौज आता निम्मीही राहिली नव्हती. ज्याला जखम नाही, असा मावळा दिसत नव्हता. रंगपंचमीत सुद्धा रंगाची अशी उधळण झाली नसेल.

बाजी रक्तबंबाळ झाले होते. पागोटे केव्हाच पडले होते. बलदंड शरीराचे बाजी शत्रूवर त्वेषाने फिरंग चालवीत होते. डोईच्या संजाबातून मानेवर शेंडीचा झुबका रुळत होता. बाजींना रणचंडिका प्रसन्न झाल्याचा भास होत होता. तीन प्रहर होत आले, तरी खिंड काबीज होत नव्हती. दरड चढण्याचा प्रयत्न केला, तरी त्यात यश येत नव्हते. मसूद संतापला होता; पण त्याचे काही चालत नव्हते. लढाईचे असे रूप त्याने आजवर पाहिले नव्हते. आत्तापर्यंत खिंडीवर तुटून पडणारे लोक खिंड जवळ येताच बचावाचे धोरण धरीत दबत पुढे सरकत होते. बाजींनी आता विटा हाती घेतला होता. खिंडीपासून काही अंतरावर विटा गनिमाचा वेध अचूक घेत होता. खिंडीच्या दारात अजिंक्य आत्म्यांचे कडे उभे ठाकल्याचा भास होत होता.

मसूदने बंदूक आणायला फर्मावले. बंदूक आणली गेली. नेमबाजाने नेम धरला; आणि बार झाला.

गोळी छाताडाला लागली. बाजी त्या धक्क्याने मागे सरकले. बाजींना मागे आणले गेले. मावळे पुढे सरकले. खिंड परत अजिंक्यच राहिली.

बाजी शुद्धीवर आले. वर धुरकट आकाश दिसत होते. त्यांनी विचारले,

‘तोफ झाली?’

नकारार्थी माना हलल्या. बाजी उठू लागले. जखमांनी भरलेल्या, वर्मी झालेल्या घावाने घायाळ बननेल्या बाजींना कुणी तरी म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'बाजी! तुम्ही उठू नका. आम्ही खिंड राखतो.'

'तोफ झाली नाही ऽ ऽ?' म्हणत सारे बळ एकवटून बाजी उठले. त्यांनी माणसांना बाजूला सारले. धडपडत, हातातल्या विट्यावर तोल सावरीत बाजी झोंकाड्या देत गर्जले,

'गोळी लागली, म्हणून काय झालं? राजे गडावर पोहोचले नाहीत. आणि बाजी मरतो..?'

बाजी वाट काढीत खिंडीच्या प्रवेशद्वारापाशी गेले. बाजींनी विटा हाती पेलला. रक्तबंबाळ बाजी समोर दिसताच पुढे येणारे गनीम मागे हटले. तोच गडावरून तोफेचा आवाज आसमंतात कडाडला.

बाजींच्या चेहऱ्यावर हसू उमटले. बाजी पुटपुटले,

'राजे गडावर पोहोचले. आपली फत्ते झाली.'

बाजी कोसळले. मसूदचे सैन्य तुटून पडले. गेले सात प्रहर मृत्यूशी झुंज देणारी बांदलसेना कृतार्थ झाली. तिचे बळ सरले.

घोडखिंडीत सर्रास कापाकापी झाली. सारे मावळे निर्दयपणे कापले गेले. पण कुणाला खेद नव्हता, खंत नव्हती.

□

१७

राजे सायंकाळी विशाळगडाच्या दरवाजाशी पोहोचले. दरवाजा उघडला गेला. राजांच्या स्वागताची नौबत झडली. दरवाजा लावून घेतला गेला. राजांना आलेले पाहून गडावर एकच उत्साह संचारला. राजांच्या आज्ञेने तोफ डागली होती. राजे सुखरूपपणे गडावर आले, याचा एकच आनंद उसळला होता. राजांच्या बरोबर गडावर आलेले मावळे पुरे थकले होते. ज्याच्या अंगावर वार नाही, असा एकही मावळा दिसत नव्हता. गेल्या सात प्रहरांच्या श्रमांचे सार्थक साऱ्यांच्या तोंडांवर उमटले होते. राजांनी किल्लेदारांना विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘किल्लेदार, गडाची काय हालत आहे?’

‘महाराज, गड मजबूत आहे. शिबंदीही भरपूर आहे.’

‘तुपाच्या विहिरी आहेत ना?’

‘जी! भरपूर आहेत!’

‘आमचे सांगाती जखमी झालेत; ओले आहेत. त्यांच्या जखमांना तूप लावा. कुणी नाकारलं, तर सांगा- आम्ही येऊन ते काम करू. गेले सात प्रहर कुणाच्या तोंडात घास नाही. साऱ्यांना जेवण देऊन विश्रांती द्या.’

प्राणपणाने लढणाऱ्या मावळ्यांना जखमांच्या वेदनांची फिकीर वाटत नव्हती. पण औषधोपचार नकोसा वाटत होता. जुने कुजलेले तूप हा एकच त्या वेळी जखमेवर जालीम उपचार होता. तुपाने जखमा कोरड्या राहत. पू धरत नसे. बघता-बघता जखम भरून येई. पण ते तूप लावले, की होणारी आग मात्र भयंकर असे. मीठ किंवा भगवती सुद्धा कमी दाहक. तूप लावून घ्यायला सारे कचरत. त्यामुळे ती आज्ञा राजांनी दिली होती.

राजांनी विश्रांती घेतली नाही. मावळत्या धूसर प्रकाशात ते पाहत होते. गजापूरची खिंड शांत होती. त्या बाजूने गडावर येणाऱ्या कुणाची जाग नव्हती. राजे चिंताचूर झाले होते. विशाळगडावर वेढा देऊन बसलेल्या सुर्व्यांचा संताप मनात उफाळत होता. राजांनी आपले लोक म्हणून सुर्व्यांची गय केली होती. तेच सुर्वे खानाचे सरदार बनून आज राजांच्यावर शस्त्र उगारायला धजले होते.

राजे विशाळगडाच्या वाड्यात आले. किल्लेदारांनी सर्व सोय लाविली होती. राजांचे सामान आणि खजिना महादेवाने व्यवस्थित लावून घेतला होता. राजे महालात बैठकीवर बसले होते. सारे वातावरण चिंताचूर झाले होते. गजापूर खिंडीत काय घडले, हे सर्वांना कळत होते; पण बोलून दाखवायची हिंमत एकालाही नव्हती.

किल्लेदार आले. त्यांच्या पाठोपाठ एक जखमी बांदल सेवकांच्या आधाराने आणला जात होता. राजे उठले. त्यांनी त्या रक्तबंबाळ सेवकाला सावरून आपल्या बैठकीवर बसविले. त्या जखमीला ग्लानी येत होती. थंड पाण्याचा शिडकावा त्याच्या मुखावर केला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गेला. मशाली जवळ आणल्या. त्या जखमीने डोळे उघडले. राजांना पाहताच तो उठू लागला. राजांनी त्याला सावरले. राजे म्हणाले,

‘सांग ऽ ऽ’

‘राजे! बाजी लढले! तोफ ऐकायला जीव घोटाळत होता. नव्या जखमेला अंगावर जागा नव्हती. मसूदनं बंदूकवाला पुढं केला. बाजींना गोळी घातली...’

जखमीने श्वास घेतला. राजे भरल्या आवाजाने विचारते झाले,

‘काय झालं?’

‘बाजी पडले! आम्ही त्यांना मागे नेलं. खिंड लढतच होती. गोळी छाताडाला वर्मी लागली होती. बाजी शुद्धीवर आले. त्यांनी विचारले, ‘तोफ झाली?’ आणि अद्याप तोफ झाली नसल्याचं त्यांना समजलं. बाजी म्हणाले, ‘राजे अजून कसे गडावर जात नाहीत?’ बाजी तसेच उठले. कुणाला आवरेनात! विटा घेऊन खिंडीच्या तोंडाला ते जात होते. बाजी म्हणत होते, ‘राजे गडावर गेले नाहीत. गोळी लागली, म्हणून काय झालं? राजे गडावर गेले नाहीत, तर बाजी मरतो कसा?’ ’

राजांची टिपे गळत होती. ऊर कोंडला होता. साऱ्यांची तीच स्थिती झाली होती. जखमी सांगत होता.

‘तोच तोफ झाली. ती ऐकताच बाजी ओरडले, ‘राजे गडावर गेले! आपली फत्ते झाली! राजे, मुजरा ऽ ऽ’ आणि बाजी कोसळले. साऱ्यांचंच अवसान सरलं होतं. मसूद चालून आला. सारे कापले गेले. मी खिंडीत होतो. तसाच आलो. राजे, आपली फत्ते ऽ ऽ ऽ’

जखमीने मान टाकली. हुंदके देत राजांनी जखमीची मान बैठकीवर ठेवली. राजे उभे राहिले. आपला दुशेला सोडून त्यांनी जखमीवर पांघरला. राजे म्हणाले,

‘बाजी! तुम्ही गेलात! घोडखिंड पावन केलीत! किल्लेदार, घोडखिंडीचं नाव ‘पावनखिंड’ ठेवा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दुसऱ्या दिवशी राजे तटावरून पाहत होते. मसूद आणि सुर्वे मोर्चे उभारण्याच्या तयारीत गुंतलेले होते. गडाला वेढा देण्याची तयारी राजांनी ओळखली. किल्लेदारासह ते वाड्यात आले. राजांनी आज्ञा दिल्या. त्या रात्री गडाच्या दोन्ही बाजूंनी सैन्य चूपचाप उतरले. सुर्वे अथवा मसूद यांना राजे खाली येऊन हल्ला करतील, असे वाटले नव्हते. चांदण्या रात्री वादळवाऱ्यात काकडत असलेल्या मसूद आणि सुर्वे यांच्या सैन्यावर मराठे तुटून पडले. एकच गोंधळ, एकच कापाकापी झाली. बेसावध छावणीची त्रेधातिरपीट उडून गेली. तेवढ्यात दोन्ही बाजूंना गोंधळ माजला होता. किती शत्रू आहे, याचा अंदाज लागत नव्हता. मसूद, सुर्वे भयभीत झाले होते. राजांचे सैन्य जसे चूपचाप उतरले, तसेच कामगिरी फत्ते करून ते परत गडावर गेले.

सकाळ झाली, तेव्हा मसूद, सुर्वे यांची छावणी भयभीत नजरेने गडाकडे पाहत होती. विशाळगडावर मोर्चे बांधून इतके दिवस झाले होते; पण आजवर गड शांत होता. राजांनी विचारले,

‘किल्लेदार, गडावरून तोफा डागल्यात कधी?’

‘नाही, महाराज! आपण तिकडे वेढ्यात होता. इकडे धामधूम माजवून उपयोग होणार नाही, असं वाटलं.’

‘चांगलं केलंत! आता वेळ न करता बुरुजांच्या तोफा डागायला सांगा.’

किल्लेदाराच्या सर्व लक्षात आले. तो तातडीने बाहेर गेला.

गडावरच्या बुरुजावरच्या तोफांची जागा राजांनी पाहिली. ज्या ठिकाणी मोर्चे तोफांच्या पल्ल्यात होते, अशा अनेक जागा होत्या. राजांनी त्या जागांच्या तोफांना बत्ती द्यायचा हुकूम दिला. एकाच वेळी चार बाजूंच्या तोफा धडाडल्या. वेढा, मोर्चे कुठच्या कुठे विस्कटले गेले. रात्रीच्या प्रकारानंतरचा हा प्रकार म्हणजे कळस होता. मसूद, सुर्वे आपापल्या सैन्याची धावपळ बघत होते. राजे हसत होते.

मसूदने तो अवघड किल्ला पाहिला होता. सुर्व्यांना सोडून तो परत सिद्दी जौहरकडे जायला निघाला. सुर्वे एकटे वेढा द्यायला तयार नव्हते. दोघांनीही वेढ्याचा नाद सोडला; आणि थोड्याच दिवसांत वेढा उठवून ते सिद्दी जौहरकडे गेले. राजांची वाट मोकळी झाली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांना आता काळजी होती शास्ताखानाची. राजे राजगडाकडे निघाले.

□

१८

राजे राजगडाच्या पायथ्याशी आल्याची बातमी जिजाबाईंना मिळाली. कैक महिन्यांनी राजे राजगडावर येत होते. अनेक मोहिमा पार पाडून, संकटांना तोंड देऊन राजे येत होते. राजगडावर एकच आनंद ओसंडत होता. अफझलवधाच्या आधीचा काळ धरला, तर जवळ जवळ वर्षभर जिजाबाई राजांच्या काळजीत होत्या. निवांतपणे असे राजे आताच भेटणार होते.

गडाच्या प्रथम दरवाजाचा नगारा वाजला. पुतळाबाई राणीसाहेबांनी संभाजीराजांना कपडे करून त्यांना मासाहेबांच्या महालात आणून सोडले. जिजाबाई संभाजीला म्हणाल्या,

‘शंभूराजे, तुमचे आबासाहेब येताहेत. त्यांना सामोरे जा!’

संभाजीराजे हुजऱ्याबरोबर बाहेर आले. मोरोपंत पिंगळे, सोनोपंत- सारे तयार होते. सर्वांसह शंभूराजे वडिलांचे स्वागत करायला वाड्याबाहेर आले. बालेकिल्ल्याच्या दरवाजात राजे आले; आणि त्यांची नजर शंभूराजांवर गेली. राजांनी शंभूराजांना कवटाळले. त्यांना उचलून घेऊन राजे बालेकिल्ल्यात आले.

जिजाबाईंना पाहताच राजे थांबले. शंभूबाळांना त्यांनी खाली उतरविले. राजांनी जिजाबाईंचे पाय शिवले. जिजाबाईंनी राजांना मिठीत घेतले. जिजाबाई उद्गारल्या,

‘शिवबा!’

‘मासाहेब, तुमच्या आशीर्वादानं आम्ही सुखरूप परत आलो.’

‘राजे, आमची प्रत्येक रात्र इकडे वैऱ्याची गेली.’

‘खरं सांगू, मासाहेब? आम्हांला स्वराज्याची आता काळजी वाटत नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कारण?’

‘दप्तरावर तर आपलं लक्ष आहेच. प्रसंग पडला, तर आपण मोहिमेला सुद्धा सज्ज होता, हे आम्हांला नवीन समजलं.’

जिजाबाई लाजल्या. त्या म्हणाल्या,

‘आई झाला असता, म्हणजे कळलं असतं. पन्हाळ्याला अडकून पडलात. काही सुचेना.’

‘म्हणून स्वत: निघालात! तेवढंच नव्हे, तर आम्ही वेढ्यात असता शास्ताखानावर फौज पाठविलीत. ते ऐकून तर आम्ही धन्य झालो!’

‘चला, राजे! पुष्कळ बोलायचं आहे, विचारायचं आहे.’

जिजाबाईंच्यासह राजे वाड्यात आले.

सायंकाळी जिजाबाई आणि शिवाजीराजे बोलत बसले होते. शेजारी महादेव उभा होता. राजे म्हणाले,

‘मासाहेब, हा तुमचा नजरबाज वेळीच गडावर आला नसता, तर मात्र प्रसंग बाका होता.’

जिजाबाई म्हणाल्या, ‘राजे, एवढे नजरबाज सोडले, पण कोणीच आत जाऊ शकलं नाही. सारे परत आले.’

महादेवला राजे म्हणाले, ‘महादेव! आम्ही कुठंही असलो, तरी तू आमचा पत्ता लावू शकशील, यात आम्हांला संशय नाही. तेव्हा आजपासून आम्ही तुझं नाव नजरबाजांच्या यादीतून कमी करीत आहो.’

जिजाबाई राजांकडे पाहत होत्या. महादेव घाबरला होता. तो म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज!’

‘महादेव!’ राजे हसले. ‘आता आमची जबाबदारी वाढते आहे. आमच्याजवळ तुझ्यासारखी हरहुन्नरी माणसं असायला हवीत. कोणता प्रसंग केव्हा येईल, हे सांगता येत नाही. तेव्हा यापुढं तुझी नेमणूक आमच्या खास रक्षकदलावर करीत आहो.’

इतक्यात नेताजी पालकर आणि कान्होजी जेधे आल्याची वर्दी आली.

नेताजी राजांच्या सामोरे जायला भीत होते. पन्हाळगडाचा वेढा नेताजी फोडू न शकल्यामुळे राजांच्या समोर यायला नेताजी कचरत होते. त्याचमुळे कान्होजींना घेऊन नेताजी गडावर आले होते. कान्होजींच्यासह नेताजी महालात आले. मुजरा करून दोघे उभे राहिले. नेताजी राजांची नजर टाळीत होते.

‘मासाहेब!’ राजे म्हणाले, ‘आमचे सेनापती आमच्यासमोर यायला संकोच करतात! म्हणूनच कान्होजींचं पाठबळ घेऊन नेताजीकाका हजर झाले आहेत.’

कान्होजी गडबडीने म्हणाले, ‘आपण येणार, म्हणून बातमी आली. गडावर यायला निघालो होतो. वाटेत नेताजी भेटले. मिळून आलो.’

‘कान्होजी, इतक्या सहजासहजी का सांगाती सापडतात?... नेताजी, आम्ही जेव्हा हुकूम पाठवला, तेव्हाच पन्हाळा गाठला असता, तर वेढ्यात दोन महिने आम्हांला खिचपत पडावं लागलं नसतं. तुमच्याही फौजेची झालेली हानी, झालेला पराभव आम्हांला पाहावा लागला नसता. लढाईत क्षणाला महत्त्व असतं. क्षणाचा अवधी सुद्धा जय, पराजय ठरवू शकतो. तिथं असं गाफील राहून चालत नाही. कसूर नसेल, तर जयपराजयाचं आम्हांला काही वाटत नाही. तुम्ही शहापूरचा केलेला पराक्रम आम्ही ऐकला आहे. त्या धाडसाबद्दल तुमचं कौतुक करावं तेवढं थोडं आहे.’

त्या बोलांनी नेताजींना धीर आला. त्यांच्या चेहऱ्यावर परत हास्य विलसले. राजे म्हणाले,

‘त्याहीपेक्षा एक कामगिरी अशी बजावलीत, की ज्यासाठी शंभर गुन्हे माफ व्हावेत. खुद्द मासाहेब आमची सुटका करण्यासाठी निघाल्या होत्या; त्यांना तुम्ही परावृत्त केलंत.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आमचं छत्र राखलंत... कान्होजी, मासाहेबांच्या देखत तुम्हांला एक विनंती करायची आहे.’

‘आज्ञा करावी, महाराज!’

‘कान्होजी, अफझलवधानंतर आम्ही तुम्हांला आमच्या दरबाराचं मानाचं पहिलं पान दिलं होतं. आठवतं?’

‘जी!’

‘पन्हाळगडावर आम्ही वेढ्यात सापडलो होतो. सुटकेचा मार्ग काही दिसत नव्हता आणि हा महादेव गडावर अचानक अवरतरला. गड सोडण्याचा बेत पक्का झाला. बाजीप्रभू देशपांडे...! आज आठवण आली, तरी मन कालवतं. त्यांनी आमची जोखीम उचलली, आणि गडावर तुफान असता, आम्ही गड सोडला. पन्हाळगडापासून खेळण्यापर्यंत चौदा कोसांचं अंतर दिवसरात्रीची, उपासातापासाची, चिखलापाण्याची- कशाची पर्वा न करता आमची पालखी अखंड पळविली जात होती. घोडखिंडीजवळ मागून आलेल्या गनिमांनी आम्हांला गाठलं. प्रसंग बाका. खेळण्याला सुर्वे वेढा देऊन बसलेत, याची कल्पना नाही. मागं-पुढं प्रबळ शत्रू उभा होता. अखंड सात प्रहर धावलेली उपाशी बांदलसेना घेऊन बाजी खिंड लढायला सज्ज झाले. आम्हांला म्हणाले, ‘राजे, तुम्ही गडावर जा. तुम्ही पोहोचल्याची तोफ ऐकू येईपर्यंत एकाही गनिमाला पुढं सोडणार नाही. साहेबकामी आम्ही मरतो.’ निम्म्या शिबंदीनं आम्ही गड गाठला; पण बाजी निम्म्या शिबंदीसह खर्ची पडले. कोणी वाचलं नाही.’

राजांच्या बरोबरच ते ऐकणाऱ्यांचे डोळे पाण्याने भरले होते. स्वत:ला सावरून राजे म्हणाले,

‘कान्होजी, बाजी तर गेले. पण त्यांचा पराक्रम... त्याचं सार्थक कसं व्हायचं? आमच्या दरबाराचं पहिल्या मानाचं पान बाजींच्या घराण्याला मिळावं, अशी आमची इच्छा आहे- अर्थात, तुमची इच्छा असेल, तर...’

कान्होजी हसले, ‘मग, राजे, त्यात एवढा विचार कसला करता? बाजींच्या पराक्रमामुळं तुमचे पाय आम्हांला दिसले. आम्ही आनंदानं पहिल्या पानाचा मान सोडतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे उठले. कान्होजींना अत्यंत आदराने मिठी मारीत राजे म्हणाले,

‘खोट्या मानासाठी हवी ती लाचारी पत्करायला मागं-पुढं न पाहणारे आपण मराठे! कान्होजी, तुमच्या ह्या कृत्यानं तो कलंक आज धुऊन निघाला.’

नेताजी म्हणाले, ‘महाराज, चाकणला संग्रामदुर्गावर शास्ताखानानं वेढा घातला आहे. फिरंगोजी आज दीड महिना गड लढवीत आहेत. त्यांना तातडीनं काही तरी मदत करायला हवी.’

‘आमच्या लक्षात आहे. आपण त्याचा उद्या निर्णय करू! निदान आजचा दिवस तरी आम्हांला मासाहेबांच्या संगतीत काढू द्या.’

सोयराबाई आत आल्या. त्या म्हणाल्या,

‘ताटं करू देत ना?’

‘जरूर! आज आनंदाचा दिवस आहे. नेताजी, कान्होजी हेही आमच्या बरोबर पंक्तीला बसतील.’

रात्री पंगत बसली होती. पंक्तीवर नजर ठेवण्यासाठी समोर पाटावर जिजाबाई बसल्या होत्या. जेवता-जेवता राजे एकेक आठवण सांगत होते. सारी पंगत भान हरपून राजांचा बोल मनात साठवीत होती.

□

१९

‘आबासाहेब, उठा ना, आबासाहेब!’

त्या बोलांनी राज जागे झाले. त्यांनी पाहिले, तो छोटे संभाजीराजे पलंगापाशी उभे होते. दोन प्रहरी जेवून राजे पलंगावर विचार करीत पडले होते, तोच त्यांना झोप लागली होती. राजांनी शंभूबाळांना अलगद उचलून घेतले. आपल्या पोटावर शंभूबाळांना बसवीत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यांनी विचारले,

‘बाळराजे, कुणी उठवायला सांगितलं तुम्हांला?’

‘आईसाहेबांनी.’

‘कुठं आहेत?’

‘बाहेर. दाराजवळ.’ बोट दाखवीत शंभूराजे म्हणाले.

‘कोण आहे बाहेर?’ राजांनी विचारले.

पुतळाबाई राणीसाहेब पदर सावरून आत आल्या. राजे म्हणाले,

‘राणीसाहेब!’

‘एक प्रार्थना आहे.’ पुतळाबाई म्हणाल्या.

‘कसली?’

‘आपण मला ‘राणीसाहेब’ म्हणू नये. ती जागा माझी नाही.’

‘नाही कशी? फार तर ‘धाकट्या राणीसाहेब’ म्हणू!’

‘बरं-वाईट काहीही बोलायला आपला अधिकार आहे. वाटलं, ते सांगितलं.’

राजे उठून बसले. संभाजीला कुरवाळीत ते म्हणाले,

‘बाळराजे तुम्हांला ‘आईसाहेब’ म्हणतात. तुमच्यावर प्रेम करतात. लहान मुलं माणसं पटकन ओळखतात.’

‘ती काय, मायेनं घेतली, तर कुणाकडेही जातात.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ठीक, ठीक! म्हणाल, ते खरं. आता आम्ही उठलोच आहो, तर आम्हांला का जागं करण्यात आलं, ते नाही सांगितलं?’

‘खाली फिरंगोजी आलेत. मासाहेबांनी आपण झोपल्याचं सांगितलं. वाटलं, ते आपल्या कानांवर जावं.’

राजांनी संभाजीला बाजूला बसविले. ते उठत म्हणाले, ‘फिरंगोजी इथं आलेत?’

फिरंगोजी चाकणला गड लढवीत होते. राजे जेव्हा गडावर आले, त्याच दिवशी नेताजींना फौज गोळा करायला त्यांनी आज्ञा दिली होती. फिरंगोजींच्या मदतीला फौज पाठविण्याचा राजांचा विचार होता. राजे उठले. म्हणाले,

‘बरं केलंत, उठवलंत, ते! आम्ही खाली येतो.’

पुतळाबाई जाण्यासाठी वळल्या. राजांनी हाक मारली, ‘पुतळा!’

उभ्या जागी पुतळाबाईंचे अंग मोहोरले. त्या वळल्या. पुतळाबाई तशाच उंच्या पुऱ्या, सडपातळ होत्या. सईबाई सावळ्या होत्या; पुतळाबाई नावाप्रमाणे उजळ होत्या. सईबाईंचे डोळे नेहमी हसरे असत; तर पुतळाबाईंच्या डोळ्यांत सदैव कारुण्य दिसे. पुतळाबाई हसल्या. त्या म्हणाल्या,

‘जी!’

‘शंभूबाळांना घेऊन जाता ना? आम्ही कपडे बदलून खाली जातो.’

संभाजी पुतळाबाईंच्याकडे धावला. त्यांचा हात धरून तो महालाबाहेर गेला.

राजांनी कपडे बदलले; आणि ते खाली आले. फिरंगोजी जिजाबाईंच्या महालात असल्याचे कळले. राजे महालाजवळ गेले, तोच त्यांच्या कानांवर शब्द आले,

‘मासाहेब, राजांना तोंड दाखवायला जागा नाही. तसा गड शास्ताखानाला दिला नसता. पण त्यानं घात केला. भुयार काढून गडापर्यंत तो आला; आणि भुयारातून दारू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पेरून त्यानं उडविली. तटाला खिंडार पडलं. तरी गनीम आत घेतला नाही. शिबंदी थोडी; पन्नास दिवसांत थकली, आणि गड सोडून आलो. राजांच्या समोर जाण्यापेक्षा जीव द्यावा, असं वाटत होतं. पण वाटलं, पाप केलं, ते निस्तरायला का भ्यायचं? म्हणून आलो....'

'फार चांगलं केलंत!' म्हणत राजे आत आले.

महालात जिजाबाई बसल्या होत्या. फिरंगोजी, मोरोपंत उभे होते. राजांना पाहताच फिरंगोजी पुढे झाले. ते पाय शिवत असता राजांनी त्यांना उभे केले.

'फिरंगोजी, तुमच्या डोळ्यांत अश्रू शोभत नाहीत. पुसा ते डोळे.'

'राजे!'

'शरमिंदे आम्ही आहोत! फिरंगोजी, अपराध असेल, तर तो आमचा आहे. तुम्ही एकाकी गड लढवीत असता तुम्हांला मदत पाठविणं आम्हांला शक्य झालं नाही; आणि तुम्ही कुणाची मदत नसता खानाच्या एवढ्या मोठ्या फौजेला लढत दिलीत! पन्नास दिवस संग्रामदुर्ग लढवलात! तुमचं कौतुक करायला शब्द अपुरे आहेत. मासाहेब, फिरंगोजींचा सन्मान करायला हवा.'

'गड सोडला, म्हणून!' फिरंगोजी खेदाने म्हणाले. त्यांचे कल्ले परत थरथरले.

'फिरंगोजी, जय-पराजय आम्ही मानीत नाही. आम्ही मानतो पराक्रम, जिद्द!'

मोरोपंत म्हणाले, 'महाराज, फिरंगोजींचं शौर्य पाहून खुद्द खानानं फिरंगोजींना आपल्याकडे बोलावलं.'

'त्यात आश्चर्य काय? खान बोलावील; पण फिरंगोजी जायला हवेत ना! गेल्या जन्मीचे हे आमचे देणेदार. देणं फिटल्याखेरीज जातील कसे? पंत, फिरंगोजींचा आम्हांला सत्कार करायचा आहे.'

मोरोपंत गेले. काही वेळातच ते मानाचे तबक घेऊन आले. मासाहेबांच्या समोर ते तबक ठेवण्यात आले. मासाहेबांनी आच्छादन काढले. तबकात भरजरी दुशेला, तलवार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होती.

जिजाबाई म्हणाल्या, 'फिरंगोजी, या.'

तो दुशेला आणि तलवार स्वीकारताना फिरंगोजींचे हात थरथरत होते. राजांचे शब्द कानांवर आले:

'फिरंगोजी, हा नुसता मान नाही. ही भूपाळगडची किल्लेदारी आहे.'

'भूपाळगड!' फिरंगोजी आश्चर्यचकित होऊन म्हणाले.

'भूपाळगड आमचा एक अव्वल गड. आदिलशाहीच्या सरहद्दीवर असलेला हा आमचा किल्ला. आम्ही तो मुद्दाम बांधवून भक्कम केला आहे. अशा मोक्याच्या जागेवर तुमच्यासारखेच जिद्दीने लढत देणारे किल्लेदार हवेत. भूपाळगडासारख्या जबाबदारीच्या गडासाठी आम्ही त्याच तोलामोलाच्या माणसाच्या शोधात होतो. खानानं आम्हांस भूपाळगडाचा किल्लेदार मिळवून दिला.'

संभाजीराजे महालात आले. जिजाबाईंना बिलगले. जिजाबाई म्हणाल्या,

'बाळराजे, फिरंगोजी आजोबांना मुजरा नाही केलात?'

तीन वर्षांची उमर ओलांडलेल्या बालराजांनी फिरंगोजींच्याकडे पाहिले. त्यांचा चेहरा परिचित होता. माणूस नवखा वाटत नव्हता. राजे म्हणाले,

'बाळराजे, फिरंगोजींचा घोडा करीत होता, ते विसरला?'

जिजाबाई म्हणाल्या, 'उठा, बाळराजे!'

संभाजीराजे उठले. त्यांनी फिरंगोजींना मुजरा केला. फिरंगोजींनी पटकन राजांना उचलले. संभाजीराजे हसले.

☐

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

२०

राजगडावर राजांच्या भेटीसाठी सारे गोळा झाले होते. येसाजी, तानाजी, कान्होजी, फिरंगोजी, नेताजी असे राजांचे सरदार राजांच्या भोवती जमा झाले होते. शास्ताखानाने चाकणचा संग्रामदुर्ग काबीज केला होता. पावसाळा संपत आला होता. शास्ताखान पावसाळा संपताच हालचाल करणार, यात शंका नव्हती. त्याच वेळी आदिलशहा स्वत: शिवाजीचा पराभव करण्यासाठी विजापुराहून निघाल्याची बातमी होती. दोन्ही प्रबळ शत्रू एकाच वेळी राजांवर चालून येत होते. त्यावर राजे विचार करीत होते. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, जर आदिलशाही आणि मोगलाई एक झाली, तर...’

‘मासाहेब, ती शक्यता फार कमी दिसते. जर आदिलशाहीला औरंगजेबानं मदत करायची ठरविली असती, तर शास्ताखान नुसता आमचा मुलूख जाळीत, लुटीत बसला नसता. आम्ही पन्हाळगडावर सापडल्याचं ऐकताच तोही आपल्या सैन्यानिशी तिथं धावत आला असता.’

‘पण अली आदिलशाही आणि शास्ताखान स्वस्थ बसतील?’

‘त्यासाठी का ते बाहेर पडलेत?’ राजे हसून म्हणाले, ‘पण आमचा तर्क आहे... जर सामोपचाराच्या गोष्टी बोलल्या, तर आदिलशहा तेवढ्यावर तृप्त होईल.’

‘तो कसा?’

‘विजापूरची हालत तितकी चांगली नाही. अफझलवध, त्यानंतर फाजल, रुस्तुम जमा यांचा पराभव, त्यांच्या मुलुखात आम्ही वसूल केलेल्या खंडण्या, अंतर्गत दुही या सर्वांमुळं आदिलशहा त्रस्त आहे. आम्ही पळून गेल्यामुळं त्याची सिद्दी जौहरवर इतराजी झाली आहे. रुस्तुम जमा आता सेनापती बनला आहे. त्याच्या-आमच्या स्नेहाचा फायदा घेऊन तहाच्या वाटाघाटी सहज जमतील. आमच्या त्र्यंबक भास्करांनी पन्हाळा जारीनं लढवीत ठेवला आहे. तोच पन्हाळा देऊन आदिलशाहीला खूश करण्याचा आमचा इरादा आहे.’

‘पन्हाळा सोडणार?’ जिजाबाईंनी विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मासाहेब, पन्हाळा परत घेता येईल; पण आदिलशहा खुद्द मिरजेला आले आहेत. आदिलशाहीचा प्रमुख किल्ला दिला, तर ते खूश होतील. विशाळगड आमच्याकडे राहील.’

जिजाबाईंच्यासह सर्व विचारविनिमय करून राजांनी रुस्तुम जमाकडे वाटाघाटीसाठी आपला वकील पाठविला.

अफझलखानाच्या स्वारीपासून आजवर तुंबलेली सर्व कामे राजांनी पाहायला सुरुवात केली. मध्यंतरी ते कल्याणला जाऊन आले. खाडीवर डोलणारी संगमेश्वरी गलबते पाहून त्यांचे मन प्रसन्न झाले. राजे भारावून आपली जहाजे पाहत होते. आबाजी महादेव शेजारी उभे होते. राजे म्हणाले,

‘आबाजी, आता हे आमचं सामर्थ्य वाढायला हवं. अनेक बंदरांवर आमची शेकडो लढाऊ गलबतं सज्ज दिसायला हवीत. फिरंग्यांच्यासारखी आमची गलबतं साता समुद्राकडे फिरायला जायला हवीत. तेवढ्या तातडीनं तुम्ही गलबतं पुरी करून घेतलीत, याबद्दल आमचं कौतुक करावं तेवढं थोडं.’

‘आमचं कौतुक कसलं, महाराज? एवढा अफझलखान आला. आपण पन्हाळ्यावर अडकून पडलात; पण गलबतांच्या कामात कधी दिरंगाई होऊ दिली नाहीत. काम बंद पडलं नाही. पैसा कमी पडला नाही. त्याचमुळं आजचा दिवस दिसतो.’

‘भवानीची कृपा! कल्याणखजिना आणि दुर्गाडीची दौलत मिळाली. त्याचंच हे फळ!’

वर्षभरात झालेल्या मोहिमा, आरमाराचा खर्च, रायगडाच्या कामासाठी अखंड खर्चला जाणारा पैसा यामुळे राजांना पैशाची फार चणचण निर्माण झाली होती. दोन्ही बाजूंना प्रबळ शत्रू आल्यामुळे राजांना हालचाल करणेही कठीण जात होते.

-आणि एके दिवशी त्र्यंबक भास्कर गडावर आल्याची बातमी आली.

राजांनी खास सदरेवर त्र्यंबक भास्करांचे स्वागत केले. पन्हाळगड खाली करून द्यावा लागला, म्हणून त्र्यंबकराव नाराज होते. त्र्यंबकराव म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, तुमचा हुकूम आला, म्हणूनच गड सोडला. नाही तर अजून कैक महिने सिद्दी जौहरला वाळवत ठेवला असता.’

‘आम्ही ते जाणतो. पण त्र्यंबकराव, एवढ्या मोठ्या दोन शत्रूंच्या बरोबर एकाच वेळी लढत देणं इतकं सोपं नाही. राजकारणामध्ये चढाईपेक्षा माघारीला फार महत्त्व असतं, हे तुम्ही जाणता. पन्हाळा सोडावा लागल्याचं तुमच्याइतकं आम्हांलाही दुःख आहे. पन्हाळा जातो कुठं? परत तो आपण घेऊ. पण त्याला अवधी आहे. गड सोडताना तुम्हांला त्रास झाला नाही ना?’

‘नाही. सिद्दी जौहर दिलदार स्वभावाचा आहे. काही त्रास न देता त्यानं सर्व सैन्याला गड खाली करू दिला. या तहामुळं जौहर, रुस्तुम जमा आणि खुद्द अली आदिलशहा खूश झाले आहेत.’

‘ती खुशी फार दिवस टिकणार नाही, याचं आम्हांला दुःख आहे.’

आदिलशहाबरोबर झालेल्या तहामुळे राजांच्या मनावरचा निम्मा ताण उतरला. राजे आता शास्ताखानाकडे बारकाईने पाहत होते. गडावर दररोज नजरबाजांची वर्दळ चालू झाली होती.

एके दिवशी राजे मोरोपंतांना म्हणाले, ‘पंत, ज्या प्रतापगडावर भवानीनं आमच्या हातून अफझलवध करवून आम्हांस आशीर्वाद दिला, त्या गडावर आमच्या कुलदैवताची स्थापना करावी, असं आमच्या मनात फार आहे.’

‘मग अडचण कसली?’

‘देवीची सुंदर मूर्ती हवी!’

‘जशी आज्ञा!’

मोरोपंतांनी मूर्तीसाठी चांगली शिला आणायला मंबाजी नाइकांना नेपाळला पाठविले. नेपाळच्या गंडकी पाषाणाचा लौकिक फार मोठा होता. मोरोपंतांनी प्रतापगडावर देवीच्या देवळाचे काम सुरू केले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

२१

पावसाळा संपला आणि राजांच्या तर्काप्रमाणे शास्ताखान तळ उठवून पुण्याला आला. खुद्द राजांच्या मुलुखात शास्ताखानाने तळ दिला. खुद्द शिवाजीराजांच्या लाल महालात स्वत: शास्ताखान राहिला. राजांना ते कळले. राजे संतापले होते; पण तसेच मनातून हसतही होते.

शास्ताखान आलेला कळताच राजांनी सोनो विश्वनाथ डबिरांना नरमाईचे पत्र देऊन खानाकडे पाठविले. राजांनी कान्होजी जेध्यांना बोलावून घेतले. एकांती बसून राजे कान्होजींना म्हणाले,

‘कान्होजी, शास्ताखान पुण्यात येऊन अगदी आमच्या लाल महालात तळ देऊन बसला आहे. पावसाळा असताही त्याच्या सैन्याने आमचा मुलूख बेचिराख केला; तो आता स्वस्थ कसा बसेल? एवढ्या मोठ्या फौजेनिशी तो चालून आला, तरी ते सहन करणं कठीण!’

‘खरं आहे, महाराज!’

‘तेव्हा, कान्होजी, आम्ही आमचे वकील खानाकडे पाठविलेच आहेत. नुसत्या रिकाम्या गोड बोलण्यानं तो वश होणार नाही. त्याचा अंदाज लागणं कठीण आहे. आमची इच्छा अशी आहे की, तुम्ही, तुमचे देशमुख यांनी खानाचा बेत काढता आला, तर पाहावं. आपल्या भागातले देशमुख जवळ येताहेत, हे पाहिलं, तर खान त्यांना विश्वासानं जवळ करील. सध्या वतनदारांना असलेलं भयही कमी होईल.’

जेधे राजांचा निरोप घेऊन गेले.

त्यानंतर वारंवार जेधे गडावर येत होते. राजांच्या बरोबर खास बैठका होत होत्या.

एकदा जेधे गडावर असेच आले असता सर्व बोलणी झाली; पण जेधे उठेनात. कान्होजी अस्वस्थ दिसत होते. राजांना त्यांच्या बेचैनीचे कारण समजत नव्हते. शेवटी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनीच विचारले,

‘कान्होजी, आज मनात काही तरी दिसतं.’

कान्होजी कावरेबावरे झाले. ते म्हणाले,

‘काही नाही, महाराज!’

‘कान्होजी, आम्ही एवढे का परके, की आमच्या समोर दिलखुलास बोलायला जड जावं?’

कान्होजींनी श्वास घेतला. ते म्हणाले,

‘राजे, सांगतोच तर! एका पेचात मी सापडलोय्. तुम्ही सोडवायला पाहिजे.’

राजे गंभीर झाले. ते म्हणाले, ‘कान्होजी, तुम्ही आमची माणसं. तुमच्यापेक्षा आम्हांला आमचा जीवही जास्त वाटत नाही... कसला पेच पडला?’

‘राजे, सारं विसरता येतं; पण नातं विसरता येत नाही. आपले एकनिष्ठ सरदार हैबतराव शिळमकर यांचे सासरे खंडोजी खोपडे खानाच्या वधापासून आज वर्षभर आपल्या भीतीनं दऱ्याखोऱ्यांत दडून राहिले आहेत. जिवाच्या भीतीमुळं बाहेर पडायला जागा नाही. त्यांनी आपल्या जावयाकडे, हैबतरावांकडे धरणं धरलं आहे. ते माझ्याकडे आले...’

‘मग?’ राजांनी विचारलं.

‘राजे, झालं, एवढं पुष्कळ झालं. खंडोजीरावानं खूप सोसलं. आता त्याला क्षमा करून पायांपाशी जागा द्यावी.’

खंडोजी खोपडे- ज्याच्यावर राजांनी एवढे उपकार केले होते, तोच खंडोजी खानाला मिळाला. राजांच्या विरुद्ध शस्त्र हाती धरले. फाजलखानाला वाट दाखविणारा खंडोजी!

राजे उफाळले, ‘कान्होजी, त्या विश्वासघातक्याची बाजू घेता? तो हरामखोर खंडोजी-

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ज्याच्या वतनाचा ठिकाणा नव्हता. आम्ही वतन दिलं, आम्ही अन्नाला लावलं- तोच खंडोजी आमच्यावर उलटला. आमच्या विरुद्ध शस्त्र हाती धरलं. ज्याची चार धडं चार मार्गांवर फेकावीत, अशी लायकी, त्याची भीड घेऊन तुम्ही आला?'

'राजे, आम्ही हैबतरावांना शब्द दिला आहे. खंडोजीचा गुन्हा आम्हांस द्यावा; आणि त्याचं वतन चालवावं, जीव वाचवावा.'

राजे गहिवरले. ते म्हणाले,

'कान्होजी, खंडोजीचा गुन्हा पदरात घेऊ नका. स्वराज्यासाठी वतनावर, घरादारावर पाणी सोडणारे तुम्ही कुठं, आणि कुठं तो खंडोजी! तुमच्या भिडेखातर आम्ही त्याला जीवदान देतो. खंडोजीला तुम्ही घेऊन या!'

कान्होजी आनंदाने गडाखाली गेले.

दोन-तीन दिवसांत ते खंडोजी खोपड्यांना राजांच्या मुजऱ्यासाठी घेऊन आले. राजे काही बोलले नाहीत; पण खंडोजी महाचिवट. तो नेहमी गडावर येऊ लागला; अकारण राजांशी बोलू लागला. कान्होजींना दिलेल्या वचनामुळे राजे ते सारे वर्तन सहन करीत होते; आणि त्याचा भलताच अर्थ खंडोजी घेत होता.

राजे आपल्या महालात एकटेच होते. अचानक खंडोजीला पाहताच राजे अस्वस्थ झाले. खंडोजी नीट महालात कसे आले, याचे राजांना कोडे पडले. खंडोजी मुजरा करून उभा राहिला. राजे म्हणाले,

'खोपडे, एकदम वर कसे आलात?'

खंडोजी लाचारीचे हास्य करीत म्हणाला,

'राजे, जरा खासगी आणि महत्त्वाची बाब होती. पंतांना सांगितलं. त्यांनी महालात पाठविलं.'

राजांना काही कळेना. त्यांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय सांगायचं आहे तुम्हांला?’

खंडोजी हसत म्हणाला, ‘नाही, राजे! आम्ही अफझलखानाला मिळालो; आमच्यावर आपली गैरमर्जी झाली. कृपावंत होऊन परत पायांजवळ केलंत!’

‘मग?’

‘हो! पण अजून आमच्यावर राग आहेच! ते आम्ही जाणतो; पण गुन्हा आमच्याच हातून घडतो, असं नाही. माणसं चुकायचीच!’

‘कुणाबद्दल बोलता तुम्ही?’

‘दुसऱ्या कुणाबद्दल? खुद्द आपले खास विश्वासाचे कान्होजी जेधे!’

राजे बैठकीवरून उठले. आपली नजर खंडोजीवर रोखीत ते म्हणाले,

‘खंडोजी! काय बोलता? नीट सांगा.’

‘तसं काही विशेष नाही; पण कान्होजी दिसतात, तेवढे साधे नाहीत. महाराजांनी जरा जपून असावं, एवढीच विनंती!’

‘खंडोजी, आम्हांला सर्व स्पष्टपणे सांगा. असं अर्धवट बोलू नका.’

‘राजे, कान्होजी सध्या कुठं जातात, त्यांची माणसं कुठं असतात, याची चौकशी केलीत?’

राजांचा संयम सुटत होता. ते म्हणाले,

‘खंडोजी!’

‘मी सांगतो. शास्ताखानाशी संगनमत करतात. मी अफझलखानाला मिळालो; पण असा नाही. सरळ उभा होतो. आणि आपले कान्होजी... दिवसा तुमच्या सदरेवर; रात्री

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लाल महालाच्या वाटेवर!’

‘खंडोजी!’ राजे ओरडले.

‘राग येतो? विचारा. कान्होजीला मी रुजवात घालून देतो.’

‘खंडोजी, खाली जा! आणि सदरेत जेवढे हत्यारबंद असतील, त्यांना तातडीनं इथं बोलावून घ्या.’

खंडोजी धावला.

राजे संतापाने थरथरत होते. त्यांना काही सुचत नव्हते. काही वेळातच चार हत्यारबंदांसह खंडोजी महालात आला. राजांनी खंडोजीकडे बोट दाखविले,

‘बघता काय? या हरामखोराला पकडा!’

खंडोजी खोपडा गिरफदार केला गेला. भयचकित खंडोजी म्हणाला,

‘राजे!’

‘चूप! आम्ही वतन दिलं; आमचा घात करायला उठला. ज्या कान्होजींनी भीड घालून तुला वाचवून घेतलं, त्याच कान्होजींच्या बद्दल गरळ ओकतोस?’

शिपायांच्याकडे वळून राजे ओरडले, ‘बघता काय? या पातक्याचा उजवा हात आणि डावा पाय इथल्या इथं तोडा.’

क्षणात खंडोजी पाडला गेला. बघता-बघता खंडोजीचा उजवा हात आणि डाव पाय कलम झाला. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. खंडोजीच्या किंकाळीने महाल घुमला; पण राजे शांत नजरेते ते पाहत होते. खंडोजीसाठी त्यांचे मन द्रवत नव्हते. राजे म्हणाले,

‘घेऊन जा त्याला. वैद्यांचं औषध करा. मरता उपयोगी नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खंडोजीला महालातून नेले गेले.

कान्होजींना जेव्हा खंडोजीची बातमी कळली, तेव्हा त्यांचा आपल्या कानांवर विश्वास बसेना. संतप्त होऊन ते तातडीने गडावर आले. राजांच्या समोर तडक ते आले. राजे त्यांच्याकडे शांत नजरेने पाहत होते. कान्होजी गर्जले,

'राजे, खंडोजीला अभय देऊन हे वर्तन केलंत? आमच्या शब्दांची काय किंमत राहिली? राजे, तुम्ही असा विश्वासघात कराल, असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. मनातला दावा विसरायचा नव्हता, तर अभय द्यायचं नव्हतं!'

'कान्होजी, आमच्या मनातला दावा जेव्हा शब्द दिला होता, तेव्हाच विसरला गेला.'

'मग खंडोजीचे हात-पाय का तुटले?'

'हिंमत असेल, तर तुम्ही जाऊन विचारा! कान्होजी, शब्द दिला होता, म्हणूनच त्याचा जीव राहिला, नाही तर गर्दन मारली असती.'

राजांचे ते रूप पाहून कान्होजी चपापले. ते म्हणाले,

'पण, राजे...'

'कान्होजी, आमच्या पदरी जसे आपल्यासारखे जीवमोलाचे इमानी असतात, तसेच स्वार्थासाठी हवं ते करणारे संधिसाधूही असतात. आम्हांला कारणपरत्वे दोघांनाही जवळ बाळगावं लागतं. पण खंडोजीसारखी विश्वासघातकी जात- ती जवळ करणंही अशक्य. खंडोजीरावांचा गुन्हा तुम्ही पदरात घेतलात आणि त्याला मुजऱ्याला आणलंत. तोच खंडोजी तुम्ही शास्ताखानाला सामील असल्याचं सांगत होता, विष कालवू पाहत होता. माणूस भावनेला जवळचा. आम्हांला माहीत होतं, म्हणून गैरसमज झाला नाही. उद्या दुसऱ्या कसल्या प्रसंगात काही कळलं, तर कान भरायला किती वेळ लागणार? आमचा नाइलाज आहे, कान्होजी! असली माणसं जपणं आम्हांला शक्य नाही.'

कान्होजी भानावर आले. त्यांचा सारा संताप निवळला. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, दुर्दैव खंडोजीचं, दुसरं काय? आमचीच चूक झाली.’

‘चूक नाही, कान्होजी! तुम्ही संधी दिलीत. खंडोजीला स्वत: सुधारून ती वापरता आली नाही.’

काही वेळ कोणी काही बोलले नाही. राजांनी भरल्या आवाजात विचारले,

‘कान्होजी, रागावला नाही ना?’

कान्होजी हसले. ते म्हणाले,

‘राजे, आमच्या प्रतिष्ठेसाठी एवढे जपणारे तुम्ही. तुमच्यावर रागावेन तरी कसा?’

राजांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. राजांचा सारा भार उतरला. दोघे हसत सदरेवर जायला निघाले.

□

२२

सायंकाळच्या वेळी राजे सरळ कोठीत आल्याचे पाहून साऱ्यांना आश्चर्य वाटले. जिजाबाई कोठीत पाटावर बसल्या होत्या. दासी शिधा काढीत होत्या. राजे येताच पुतळाबाई, सोयराबाई पदर सावरून उभ्या राहिल्या. दासीपरिवार अंग चोरून कोपऱ्यापाशी भिडला. राजे सुद्धा क्षणभर घोटाळले. जिजाबाईंनी विचारले,

‘राजे, कोठीपर्यंत सरळ मातकड काय बेत धरली?’

राजे म्हणाले, ‘मासाहेब, आपण जरा आत याल, तर सर्व सांगता येईल.’

‘तुम्ही चला. आम्ही एवढ्यात येतो.’

राजे वळले. जिजाबाईंच्या महाली राजे येरझाऱ्या घालीत होते. प्रत्येक क्षण त्यांना

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मोठा वाटत होता. वारंवार ते दरवाजाकडे पाहत होते. जिजाबाई आत येताच राजांनी त्यांचे दोन्ही खांदे पकडले. जिजाबाई पाहत होत्या. राजांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडत होता. जिजाबाई म्हणाल्या,

'शिवबा, अरे, झालंय् काय तुला?'

'मासाहेब! केवढा आनंद! केवढं समाधान वाटतंय् आज! आज महाराजसाहेबांचं विजापुराहून पत्र आलंय्.'

'खरं?'

'हो, मासाहेब! आनंदाची बातमी आणली, तर खुशाली मिळते. द्याल, ती खुशाली कमी पडावी, अशी बातमी आम्ही सांगणार आहोत.'

'सांग ना ती!'

'मग मागेन, ते द्यायला हवं!'

'राजा, अरे, जीव सुद्धा माझा राहिला नाही. तुला मी काय देणार?'

'मासाहेब! महाराजसाहेब आम्हांला भेटायला येणार आहेत. हे सांगितलं, तर खरं वाटेल तुम्हांला?'

'चल, उगीच भलती थट्टा कसली करतोस?'

'थट्टा नाही, मासाहेब! अगदी खरं आहे. आम्ही आदिलशाहीशी केलेला करार आणि आमची वाढती सत्ता लक्षात घेऊन आदिलशाहीत महाराजसाहेबांना तीर्थयात्रेची, आमच्या भेटीची परवानगी दिली आहे. एवढेच नव्हे, तर महाराजसाहेब तुळजापूरला देवीदर्शनाला येऊन थडकलेतही.'

'देवीदर्शन? पण खानानं...'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे परत हसले. एक वेगळा अभिमान त्यांच्या मुखावर उमटला.

‘मासाहेब, आमचे तुळजापूरचे भोपे इतर कशात हुशार नसले, तरी देवीरक्षणात तरबेज आहेत. त्यांनी आपल्या कृतीनं कदमांच्या घराण्याचं नाव वाढवलं.’

‘काय केलं त्यांनी?’ जिजाबाईंनी उत्सुकतेने विचारले.

‘काय केलं नाही, ते विचारा! त्यांनी आमची इज्जत, प्रतिष्ठा, आमचं कुलदैवत राखलं, जपलं. मासाहेब, तुकाईची मूर्ती चल आहे. जेव्हा खान तुळजापूरला आला, तेव्हा कदमांनी मूर्ती लपविली, आणि त्या जागी दुसरीच मूर्ती ठेविली.’

जिजाबाई ते ऐकून आनंदल्या.

‘राजे, अशा माणसांचं कौतुक व्हायला हवं.’

‘जरूर होईल, मासाहेब! संधी मिळताच आम्ही त्यांचं कौतुक जरूर करू.’

जिजाबाईंनी उत्सुकतेने विचारले, ‘पण, राजे, स्वारी केव्हा येणार?’

‘पंढरपूर करून जेजुरीवरून महाराजसाहेब येतील, असं वाटतं.’

‘पण शास्ताखान... तो पुण्यात तळ देऊन आहे ना!’

‘त्याची चिंता करू नका. महाराजसाहेब भेट घेऊन परत जाईतो शास्ताखानाला आम्ही झुलवीत ठेवू. त्यासाठी हवं ते कबूल करू. आणि जरी शास्ताखानाला महाराजसाहेबांची वर्दी लागली, तरी तो काही करणार नाही. शहाजहानच्या कारकीर्दीत महाराजा शहाजीराजांनी गाजविलेले पराक्रम, दक्षिणेतील त्यांची वाढती सत्ता, हे सर्व तो जाणून आहे.’

‘तू करशील, बाबा! तुला सारं जमतं.’ जिजाबाई म्हणाल्या.

फारच क्वचित जिजाबाई एकेरी नावाने राजांच्या बरोबर बोलत असत. अत्यानंद

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झाल्याखेरीज ते शब्द उमटत नसत.

राजांनी भराभर हुकूम सोडायला सुरुवात केली. राजगडची सदर रंगवायला सुरुवात झाली. सर्व वाडा, सारे चौक, पागा, बुरुजांच्या तोफा, ढालाइतांचे कपडे बारीकसारीक साऱ्या गोष्टी राजांच्या नजरेत येत होत्या. पेशवे, डबीर, अमात्य सर्वांना नाना हुकूम सुटत होते. जिजाबाई सामानांच्या याद्या फडात पाठवीत होत्या. सर्वांची नजर शहाजीराजांच्या आगमनाकडे लागली होती.

जिजाबाईंचा आनंद मनात सामावला जात नव्हता. आज जवळजवळ वीस वर्षांनंतर स्वारींचे पाय दिसणार होते. नशिबाने घडत असणाऱ्या या भेटीत काही न्यून राहू नये, म्हणून त्यांनी शास्त्र्यांना बोलावून घेतले. शास्त्रनिर्णय असा निघाला की, इतक्या वर्षांनी घडणारी भेट सरळ होऊ नये. ती देवस्थानाच्या जागी व्हावी. प्रथम दर्शन तुपाच्या प्रतिबिंबाने घडावे. राजांना ते समजताच राजांनी जेजुरीच्या देवळात भेट घेण्याचे निश्चित केले.

सखुबाई, महादजी, बजाजी या साऱ्या मंडळींना अगत्याने गडावर येण्यासाठी बोलावणी पाठविली. कान्होजी जेध्यांचा आनंद तर मनात मावत नव्हता. शहाजीराजांचे ते खास सरदार. बातमी समजताच ते गडावर हजर झाले. राजांनी खास अश्वपथक निवडले. कान्होजी, येसाजी, तानाजी ही खास निवडक माणसे घेऊन पेशवे मोरोपंत खास अश्वपथकासह शहाजीराजांना गाठण्यासाठी पंढरपूरला निघाले.

शास्ताखानाबरोबर वाटाघाटी करण्यासाठी डबीर वारंवार पुण्याला जात होते. राजे नरमाईची, नम्रतेची पत्रे पाठवीत होते. प्रत्येक भेटीबरोबर खानासाठी भारी वस्त्रे, अलंकार पाठविले जात होते. आपल्या अवाढव्य फौजेने शिवाजी नमला आहे, असा अर्थ खानाने करून घेतला होता. ज्या पद्धतीने शिवाजी आदिलशाहीशी वागत होता, तसा आजवर मोगलांशी वागलेला नव्हता. भारताच्या सम्राटांशी वागणे थोडे निराळेच असणार, अशी आलमगीरपासून सर्वांची समजूत होती. राजांनी तेच धोरण चालू ठेवले होते.

राजे जेजुरीला गेले. मंदिरापासून पायथ्यापर्यंत राजांची नजर फिरली. राजांनी पायथ्यावरच्या माळावर जागा निवडली. भव्य शामियाना उभा करण्याची आज्ञा दिली.

शहाजीराजांनी पंढरपूर सोडल्याची बातमी गडावर येऊन पोहोचली. राजांचे शेकडो

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नजरबाज पुण्यापासून जेजुरीपर्यंत पेरले गेले होते. नेताजी पालकरांना आज्ञा दिल्या गेल्या होत्या. जेजुरीच्या आसपासच्या मुलुखात भेटीच्या आदल्या दिवशी आपले आठ हजारांचे घोडदळ घेऊन हजर राहण्याचा राजांनी हुकूम सोडला होता.

रात्री राजे महालात गेले. पलंगावर पडून ते विचार करीत होते. त्यांना बंगळूरच्या किल्ल्यात वाड्याच्या दरवाजाशी उभे असलेले शहाजीराजे अस्पष्ट आठवत होते. अनेक धूसर आठवणींची गल्लत होत होती.

सोयराबाई महालात आल्या, तरी त्यांची चाहूल राजांना लागली नाही. सोयराबाई म्हणाल्या,

‘कसला विचार चाललाय् एवढा?’

राजांनी सोयराबाईंच्याकडे पाहिले. हसत राजे म्हणाले,

‘वीस वर्षांपूर्वीचा काळ आठवत होतो आम्ही.’

‘त्या वेळी काय घडलं?’

‘खुद्द आमच्याच आठवणी दुधी बनल्यात; तिथं तुम्हांला आठवणार कसं?’

‘कसल्या आठवणी?’

‘कसल्या? आम्हांला पहिलं पितृदर्शन घडलं, ते तिथं. तिथंच त्यांच्या हौसेसाठी आपला विवाह झाला.’

‘तरी मी नशीबवान!’

‘का?’

‘लहानपणीच घरदार सुटलं; माहेर पारखं झालं. आठवणींचा आम्हांला त्रास नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘साऱ्याच आठवणी त्रासदायक असतात, असं थोडंच? काही सुखाच्याही असतात.’

‘आमच्या नशिबी तसल्या आठवणी नाहीत.’

‘राणीसाहेब, असं म्हणत जाऊ नका. ‘नाही’ म्हटलं, की नाहीच होत. नेहमी माणसानं ‘आहे’ म्हणावं.’

‘पण असलं, तर ना?’

‘नसलं, तरी आपोआप येईल!’

‘बरं, बाई, आहे!’ सोयराबाई हसून म्हणाल्या.

इतका मनाचा हळवेपणा राजांच्या ठिकाणी फारच क्वचित दिसून येई.

चांगला मुहूर्त पाहून राजगडाहून मेणे हलले. राजे आपल्या अश्वपथकासह बाहेर पडले. जेजुरीची वाट फार दूरची वाटत होती, एवढी साऱ्यांची मने उतावीळ झाली होती.

जेजुरीचे सारे रूप पालटत होते. खुरट्या हिरव्या गवताने जेजुरीचा कातळ शोभिवंत दिसत होता. मंदिराच्या तटापर्यंत चढलेल्या काळ्याभोर पायऱ्या एकदम डोळ्यांत भरत होत्या. गडाच्या पायथ्याशी शेकडो पाली, डेरे-शामियाने उभे केले होते. छावणीच्या मध्यभागी असलेला सुवर्णकळसाचा डेरा खास होता. भगवा ध्वज त्यावर डौलाने फडफडत होता.

राजांनी खंडोबाची यथासांग पूजा केली. दानधर्म केला.

शहाजीराजांच्या आगमनाची वार्ता येताच सारे मंदिरात आले.

शहाजीराजे आपल्या हजार घोडदळासह, राजांनी पाठविलेल्या अश्वपथकासह जेजुरीकडे येत होते. जेजुरीच्या पायथ्याशी राजे पायउतार झाले. शहाजीराजांच्या बरोबर मोरोपंत, कान्होजी ही मंडळी होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शहाजीराजांच्या स्वागतासाठी माणकोजी दहातोंडे, अमात्य, डबीर व इतर सरदारमंडळी पायथ्याशी उभी होती. अदबीने सारे पुढे झाले. माणकोजीने शहाजीराजांचे पाय धरले. शहाजीराजांनी माणकोजींना उठवून मिठी मारली. भरल्या आवाजात शहाजीराजे म्हणाले,

'माणकोजी! भेट झाली, बरं वाटलं.'

माणकोजी म्हणाले, 'चलावं, महाराज.'

क्षणभर शहाजीराजे बेचैन झाले. म्हणाले,

'तुम्ही सर्व आलात; पण राजे सामोरे आले नाहीत.'

'क्षमा करावी, महाराज! पण द्वादशीनंतर ही भेट घडत आहे. एकदम सामोरे येऊ नये, असा धर्मसंकेत. त्यामुळं...'

'अस्सं!' शहाजीराजे म्हणाले. 'चला, आम्ही राजांना भेटायला उतावीळ आहोत.'

शहाजीराजे सर्वांसह मंदिराच्या पायऱ्या चढत होते. शहाजीराजांनी मंदिराच्या बाहेर पाय धुतले; आणि ते मंदिरात प्रवेश करते झाले.

देवदर्शन आटोपून शहाजीराजे चौकगाभाऱ्यात आले. त्या चौकात एक भली मोठी रौप्यपरात ठेविली होती. तिच्या बाजूने पणत्यांची माळ तेवत होती. शहाजीराजे परातीवर वाकले. तूप निश्चल होते. शहाजीराजे पाहत होते.

परातीतील तुपात चार चेहरे दिसत होते. तो उमदा पुरुष कोण? आपलीच दोन प्रतिबिंबं तर पाहत नाही ना, असे शहाजीराजांना वाटले. लक्ष वेधले मधल्या प्रतिमेकडे. तेच धारदार नाक, तेच रुंद कपाळ, आणि तेच बोलके डोळे! आणि कडेवर कोण आहे? छोटे युवराज? आणि ही आमची, सूनबाई, वाटतं? सारेच चेहरे हसरे बनले होते. घंटांचा आवाज उमटत होता. माणकोजी-कान्होजींचे डोळे समाधानाने भरून आले होते.

शहाजीराजे उभे राहिले. शहाजीराजांनी साठीची उमर ओलांडली होती. वार्धक्याची छटा पिकल्या केसांत व्यक्त होत होती. पण रुबाब तोच होता. तोच देखणेपणा होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शहाजीराजांनी मान वर केली. समोर शिवाजीराजे उभे होते.

डोक्याला जिरेटोप होता. कानांत चौकडा डुलत होता. हनुवटीवरची भरदार, काळीभोर दाढी चेहऱ्याच्या रुबाबात भर घालीत होती. शहाजीराजांना आपली तरुणपणीची प्रतिमा आठवली. त्यांचे श्वास ते रूप पाहताच कोंडले गेले.

शिवाजीराजे धीमी पावले टाकीत समोरे गेले. नजीक जाऊन ते गुडघ्यांवर वाकले. आपले दोन्ही हात शहाजीराजांच्या पायांच्या दोन्ही बाजूंना टेकून ते शिवाजीराजांनी आपले मस्तक महाराजसाहेबांच्या पायांवर ठेवले.

थरथरत्या हातांनी शहाजीराजांनी शिवबांना उठविले; मिठीत घेतले. राजांच्या पाठीवर ते मायेचे हात फिरत होते. पण शहाजीराजांच्या तोंडून शब्द उमटत नव्हता. मिठी सैल होत नव्हती.

स्वत:ला सावरून घेत आनंदाश्रू पाझरत असता शहाजीराजे म्हणाले,

‘राजे, मोठे झालात; कर्तृत्ववान झालात. पण लहानपणीची सवय सुटत नाही.’

साऱ्यांच्या भेटी झाल्या. सारे आनंदाने मंदिर उतरू लागले.

शहाजीराजे डेऱ्यात येऊन बसले. जिजाबाई, सोयराबाई, पुतळाबाई वगैरे राणीवसा अदबीने उभा होता. शिवाजीराजे समोर उभे होते. शंभूबाळ आपल्या आजोबांच्या मांडीवर बसून साऱ्यांच्याकडे धिटाईने पाहत होता. शहाजीराजांनी विचारले,

‘सूनबाई, ओळख आहे का?’

सोयराबाई लाजल्या. शहाजीराजे म्हणाले,

‘एवढं लाजायला नको. लग्नात रडू लागलीस, तर कडेवर घेऊन समजूत काढीपर्यंत पुरेवाट झाली.’

सारे हसले. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपण थोडा वेळ विश्रांती घ्यावी. आज्ञा झाली, की हजर होऊ.’

राजांनी सोयराबाईंच्याकडे पाहिले, आणि शंभूबाळाला घेतले. राजांच्या पाठोपाठ राणीवसा बाहेर पडला. डेऱ्यात फक्त शहाजीराजे आणि जिजाबाई होत्या. शहाजीराजे म्हणाले,

‘राणीसाहेब!’

‘जी!’

शहाजीराजे उठले. येरझाऱ्या घालू लागले. दोन्ही हात पाठीशी बांधले होते. मानेवर केस रुळत होते. काय बोलावे, कसे बोलावे, हे त्यांना कळत नव्हते. कोणत्याही बिकट प्रसंगात न गोंधळणारे फर्जंद शहाजीराजे पुरे बेचैन झाले होते. चालता-चालता ते एकदम थांबले. गर्कन वळत ते म्हणाले,

‘राणीसाहेब!’

‘जी!’

‘आज आपल्या समोर आम्ही शरमिंदे आहोत. तुमच्यासमोर उभे राहायला आम्हांला हिंमत पुरत नाही.’

जिजाबाईंनी आपली नजर वर केली. शहाजीराजे व्यथित झाले होते.

शहाजीराजे म्हणाले,

‘आठवतं? जेव्हा बंगळुराहून यायला निघालात, तेव्हा तुम्ही ‘थोरल्या संभाजीराजांना चार दिवस घेऊन जातो,’ म्हणालात. तेव्हा मारे ऐटीने आम्ही म्हणालो... ‘आम्ही संभाजीराजांना वाढवितो; तुम्ही शिवाजीराजांना तयार करा. पाहू, कोण तयार होतं, ते...’ ’

शहाजीराजे अडखळले. त्यांनी आवंढा गिळला. कष्टाने अश्रू आवरीत ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेब, एकाकी असताही स्त्रीत्वाच्या दुबळ्या हातांनी तुम्ही शिवाजीराजांना पोलादी पुरुष बनवलंत. थोर पराक्रम करून दाखवलात. पण आमच्या पोलादी छत्राखाली आम्ही शंभूबाळांचं रक्षण करू शकलो नाही. त्याची खंत मनाला जाळते आहे.’

‘मी काय करणार होते? जे झालं, ते दैवानं झालं. आपले आशीर्वाद होते, म्हणूनच राजे एवढं करू शकले.’

‘असं समजता, हा तुमचा मोठेपणा! राजांना आम्ही कसली मदत केली? त्यांनी मात्र आम्हांला कठीण प्रसंगातून सोडवून घेतलं. आणि तोहमत येते, असं वाटताच आदिलशाही इतराजीला घाबरून राजांची जबाबदारी सफे उडवून टाकली. उलटणाऱ्या दिवसाबरोबर ते शल्य मनाला जाळत होते. म्हणूनच आम्ही येण्याची उतावीळ केली.’

रात्री देवळाच्या पायथ्यापासून मंदिरापर्यंत पायऱ्यांवर आणि दोहों बाजूंच्या दीपमाळांवर दीप पाजळले होते. लक्ष ज्योतींची शांत उतरंड वाऱ्यावर थरथरत होती.

दोन दिवस जेजुरीला राहून शिवाजीराजांनी मुक्काम हलविला. शहाजीराजांच्यासह ते राजगडावर आले. राजगडाच्या पायथ्याशी शृंगारलेली पालखी होती. पालखीच्या दोन्ही मुखांना सुवर्णाचे रत्नजडित हत्तींचे मुखवटे बसविले होते. पालखी किनखापी बैठकीने आणि जरी गोंड्यांनी सजली होती. राजांनी शहाजीराजांना पालखीत बसण्याची विनंती केली. शहाजीराजे पालखीत बसले. शहाजीराजांनी काढलेले जोडे घेऊन अनवाणी पायांनी राजे पालखीमागून जात होते. पालखी प्रवेश करिताच गडाच्या दरवाज्यावर नगारा झडत होता. पालखीमागून सारे जात होते.

शहाजीराजांना सन्मानाने घेऊन येऊन राजांनी त्यांना सुशोभित सदरेवर बसविले. राजांच्या काखेतले जोडे पाहताच शहाजीराजे म्हणाले,

‘राजे! आमचे जोडे आपल्या पायांत शोभतील, अशी कीर्ती मिळविलीत. ते जोडे खाली ठेवा!’

शिवाजीराजांनी साऱ्या मंत्रिमंडळाशी शहाजीराजांचा परिचय करून दिला.

रात्री भोजनाची पंगत सजली. सुवर्णताटांभोवती सुंदर रांगोळ्या काढण्यात आल्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होत्या. नातवाला घेऊन शहाजीराजे सुवर्णफुल्यांनी सजलेल्या चांदीच्या पाटावर बसले. राजे अदबीने पुढे झाले. त्यांनी अदबीने शहाजीराजांच्या मनगटावर मोगरीचा गजरा बांधला, आणि तो बांधीत असतांच राजांचे अश्रू शहाजीराजांच्या मनगटावर पडले. शहाजीराजे उद्गारले,

'राजे! तुमच्या डोळ्यांत अश्रू?'

राजे म्हणाले, 'आमच्या पुंडाईमुळं आपणांस बंदिवास घडला. या बलशाली हातांत बेड्या पडल्या.'

'राजे, असं बोलू नका. जे आम्हांला जमलं नाही, ते आपण करून दाखवलंत. मोगलाई आणि अदिलशाही यांशी झुंज देऊन थोर पराक्रम केलात. तुमच्या पराक्रमानं आम्ही धन्य झालो. हातीच्या बेड्या सुद्धा आम्हांला या फुलांइतक्याच हलक्या वाटल्या. त्यासाठी इतके कष्टी होऊ नका!'

संभाजीराजांनी ताटात हात घातलेला पाहून ते म्हणाले,

'पाहिलंत! आमचे शंभूबाळदेखील उतावीळ झाले आहेत, बसा तुम्ही!'

पंगत बसली. समाधानाने जेवणाऱ्या शहाजीराजांना पाहून जिजाबाई तृप्त झाल्या. सोयराबाई, पुतळाबाई हा राणीवसा वाढायला सिद्ध झाला होता. नवे नवे पदार्थ मुदपाकखान्यातून येत होते. शेवटी शहाजीराजे म्हणाले,

'राजे, या सुनांच्यामुळं भारी संकटात पडलोय् आम्ही.'

'काय झालं?'

'काय झालं?' शहाजीराजे हसत म्हणाले, 'येणारी आमची प्रत्येक सूनबाई आतून नवीन चीज घेऊन येते. नाही म्हणता येत नाही. आता सत्तरीच्या घरात उमर आली. एवढं पचायचं कसं? तेव्हा तुम्हीच आम्हांला या हसीन आफतीमधून मोकळं करा.'

शहाजीराजांचे ते बोल ऐकताच सारी पंगत हसली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे शहाजीराजांना आपला गड, दप्तराची व्यवस्था, सारे दाखवीत होते. माणकोजी, कान्होजी राजांचे पराक्रम ऐकवीत होते. सर्व पाहून शहाजीराजे तृप्त झाले. शहाजीराजांच्यासाठी राजांनी सर्वत्र शिकार-भालदार सोडले होते. नित्य नवी शिकार गडावर येत होती.

एकदा जेवत असता शहाजीराजांनी विचारले,

‘राजे, केव्हा शिकारीला जाता, की नाही?’

राजे शरमले. ते म्हणाले,

‘इच्छा आहे, पण उसंतच मिळत नाही.’

‘खरं आहे!’ शहाजीराजे म्हणाले, ‘पण आम्हांला मृगयेची भारी हौस. आता सारी हौस फिटली आहे. पण अजूनही वाटतं...’

‘काय महाराज?’

‘एखादी भल्या जंगी डुकराची वर्दी यावी. घोड्यावरून भाल्यानं शिकार करावी. त्या शिकारीला मात्र आमच्या जवळ कंटाळा नाही, थकवा नाही. वयाचा हिशेब तिथं आठवतच नाही.’

□

२३

शहाजीराजांनी आपल्या सुनांसाठी, नातवासाठी अनेक बहुमोल दागिने आणि भारी कर्नाटकी वस्त्रे आणली होती. सर्वांना बोलावून त्यांनी ती वाटली. शेवटी राजांकडे वळून ते म्हणाले,

‘राजे, तुमच्यासाठी आम्ही नामी वस्तू आणली आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सेवकाने तबक पुढे आणले. तबकात एक रत्नजडित मुठीची नामी तलवार होती. शिवाजीराजे शहाजीराजांच्या समोर गुडघे टेकून बसले. शहाजीराजांनी तलवार म्यानाबाहेर काढून दोन्ही हातांनी राजांच्या हाती दिली. राजांनी तलवार मस्तकी लवून तिचा स्वीकार केला. शहाजीराजे म्हणाले,

'आपल्या भवानी तलवारीची ख्याती आम्ही ऐकली आहे. ती तुम्हांला लाभली आहे. ही वस्तू पण तुमच्या संग्रही राहू द्या. हिचं नाव 'तुळजा' ठेवा.'

राजे म्हणाले, 'आपला आशीर्वाद समजून आम्ही हिची भवानीबरोबरच नित्य पूजा करू.'

राजांचे कौतुक करण्यात शहाजीराजांचे दिवस उलटत होते.

एके दिवशी अगदी सकाळी राजे म्हणाले,

'आज गडाखाली जाऊन यावं, अशी विनंती आहे.'

'राजे, तुमचा कोणताही हट्ट डावलायचा नाही, असं आम्ही ठरवून आलो आहे. चला.'

गडाखाली खोगीर चढविलेली खास घोडी उभी होती. शहाजीराजे स्वार झाले. पाठोपाठ राजांनी आपल्या विश्वास घोड्यावर मांड टाकली. दोन्ही घोड्यांच्या मागून अश्वपथक दौडू लागले.

शहाजीराजांना काही बेत कळत नव्हता. डोंगरपठारीचे रान समोर दिसत होते. कोवळ्या उन्हात सर्व वनराई उठून दिसत होती. नाना पक्ष्यांच्या बोलांनी रान गजबजले होते. पाण्याला उतरलेला एखादा मोरांचा कळप टापांच्या आवाजांनी भयभीत होऊन फडफडत उडत होता. डोंगरकपारींच्या आसऱ्याने वसलेल्या एका चिमुकल्या गावाजवळ राजांचे पथक थांबले. गावाबाहेरच्या मोकळ्या जागेत डेरे मारले गेले होते. राजांच्या स्वागताला तानाजी, येसाजी, माणकोजी पुढे आले. त्यांना पाहताच शहाजीराजे म्हणाले,

'माणकोजी, राजांनी कसला बेत आखला आहे?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कौतुक करणारे असल्यावर बेतांना काय तोटा आहे?’

शहाजीराजे डेऱ्यात प्रवेश करते झाले. राजांच्या स्वागताला सारे गाव आले होते. राजे पाटलांना म्हणाले,

‘काय, पाटील, ठीक आहे ना?’

‘राजे, तुमचं पाय लागलं; गावाचं सोनं झालं. ही डुकरं पीक टिकू दिनात. सारी त्यांच्या नावानं बोटं मोडत्यात. पन आज त्यांच्याचमुळं राजांचं पाय गावाला लागलं.’

पाटलांना कसं रोखावं, हे राजांना कळत नव्हतं. राजे शरमले. शहाजी मोठ्याने हसले. म्हणाले,

‘राजे, तुमचा बेत कळला. आमची बारीकशी इच्छाही अपुरी ठेवायची नाही, असा बेत दिसतो.’

थोडी विश्रांती घेऊन सारे शिकारमाळाकडे निघाले. रानाला लागून मशागतीसाठी बरेच मोठे रान तोडले होते. तेथून नदीपर्यंत तुरळक झाडांनी व्यापलेली मोकळी जमीन होती. शिकाररानावर सारे पोहोचले. शहाजीराजांच्या ढालाइताने भाले पुढे केले. शहाजीराजांनी एक वजनदार भाला निवडला. ते राजांना म्हणाले,

‘राजे, बघा आमचे भाले. एखादा जमतो का, पाहा.’

शहाजीराजांच्या भाल्यांपैकी एक भाला राजांनी निवडला. शहाजीराजांनी कान्होजींनाही भाला निवडायला सांगितला. कान्होजी म्हणाले,

‘महाराजसाहेब, आता भालाईत शिकार जमत नाही. आम्ही, माणकोजी नुसतं पाहतो.’

निवडक लोकांचे अश्वपथक पुढे झाले. प्रत्येकाच्या हातात तळपते भाले होते. त्या अश्वदळाची पाच-दहा पथके तयार करण्यात आली. राजांनी सर्वांना सूचना दिल्या. खुद्द राजे शहाजीराजांच्याजवळ राहिले; झाडांच्या आडोशाने घोडी उभी राहिली; आणि राजांनी इशारत देताच कर्णा वाजविला गेला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

साऱ्या रानात एकच आवाज सुरू झाला. त्या आवाजाने रान गजबजून उठले. पक्ष्यांचे थवे आकाशात उधळले. रानावर हाका सुरू झाला. हाका सुरू होताच चितळ, सांबर, भेकर आपल्या कळपांसह भरधाव वेगाने उड्या टाकीत माळावर उतरली, आणि वाट फुटेल तिकडे धावत सुटली. शहाजीराजे ते रानाचे ऐश्वर्य समाधानाने पाहत होते. ऊन चढत होते. हाका अर्धे रान उतरून आला होता. रानातून कर्ण्यांचा गंभीर नाद उठला. डुकरे उठल्याची ती खूण होती. साऱ्यांनी आपले भाले सरसावले. साऱ्यांचे लक्ष आता रानाच्या सीमेकडे लागले होते.

एकदम एक डुकरांचा कळप बाहेर पडला. कोळीण आपल्या पिलांसह वसवसत बाहेर पडली होती. पिलांच्या रक्षणार्थ ती चारी बाजूंना पाहत होती. संतापाने तिचे केस उभे राहिले होते. शहाजीराजे हसले. त्यांनी राजांना खूण केली. राजांनी त्या कोळिणीला सोडून देण्याची इशारत दिली. डुरकत ती डुकरीण आपल्या पिलांना घेऊन इतर डुकरांबरोबर नदीवर दिसेनाशी झाली. हाका उतरत होता. परत शिंग वाजले; आणि भला जंगी एक्कुलगा रान सोडून बाहेर धावला. मोकळ्यावर येताच त्याने आपली मुसंडी उचलली. ते भेसूर रूप पाहून साऱ्यांचे डोळे ताठरले. भले मोठे दोन सुळे सोंडेवर परतले होते. अंगावर दाभणासारखे ताठ केस उभे होते. पाठीमागच्या हाक्याकडे पाहून एक्कुलग्याने एक हुंकार केला आणि तो धावला. आडव्या जात असलेल्या त्या डुकराकडे शहाजीराजे पाहत होते. त्यांच्या चेहऱ्याचा स्नायून् स्नायू ताठरत होता. चेहऱ्यावर त्वेष प्रकटला होता. त्यांनी काही न बोलता डुकराकडे बोट दाखविले, आणि भाला सरसावून टाच मारली. पाठोपाठ राजांनी टाच मारली. पाठीमागून शत्रूची चाहूल लागताच संतापाने हुंकारून त्या एक्कुलग्याने वेग वाढवला. भरधाव वेगाने राजे खड्डेवळणांची पर्वा न करता शहाजीराजांच्या मागोमाग जात होते. क्षणाक्षणाला अंतर कमी होत होते.

भरधाव वेगाने पळणाऱ्या त्या श्वापदाने एकदम आपला मोहरा वळविला; आणि संतापाने ते फिरले. धावत येणाऱ्या शत्रूकडे पाहताच तो एक्कुलगा सरळ चाल करून गेला. फिरलेला डुक्कर आणि त्याने केलेली चाल लक्षात येईपर्यंत शहाजीराजांचे घोडे बिथरून खिंकाळले, आणि दोन पायांवर उभे राहिले. घोड्याच्या पायांजवळून एक्कुलगा तसाच पुढे धावला. मागून भरधाव वेगाने खूर खडखडत येत असलेल्या राजांनी शहाजीराजांचे उभे घोडे पाहिले. काळजीने त्यांचे मन कंपित झाले; आणि दुसऱ्याच क्षणी समोरून येत असलेल्या डुकरावर त्यांनी मोहरा केला. उजव्या बाजूला डुक्कर घेऊन त्यांनी भाला लावला. भाल्याचे फाळ घुसले. काडकन काठी मोडल्याचा आवाज झाला. डुकराचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चीत्कार उठला. धडपडत ते अजस्त्र जनावर उठले, आणि अंगात भाला घेऊन पळू लागले.

डुक्कर गेल्याच्या संतापाने बेभान झालेले शहाजीराजे जवळ आले होते. त्वेषाने त्यांनी टाच मारली. बघता-बघता त्यांनी डुक्कर गाठला, आणि मोठ्या कुशलतेने डुकरावर भाला लावला. भाला सोडला. भाल्याचे फाळ छाताड पोखरीत आत घुसले. चीत्कार करीत त्या रानडुकराने अंग टाकले. वेदनेने किंचाळत, गडगडत ते शांत झाले. सारी घोडी गोळा झाली. शहाजीराजे घामेजलेल्या चेहऱ्याने शिकार पाहत होते. त्यांच्या मुखावर समाधान होते. ते म्हणाले,

‘राजे, तुम्ही बहादूर खरे; पण तुमचा पिंड शिकाऱ्याचा नव्हे. आमच्या संकटात तुम्ही धावलात आणि डुकराला सामोरा फाळ लावलात. असा फाळ लावणं फार धोक्याचं, कठीण काम. पण हे शिकारीत शक्यतो टाळावं. बरोबरीनं डुकराला फाळ लावावा.’

त्यानंतर परत आणखीन एक रान उठवले गेले. भरपूर शिकार करून राजे रात्री परत गडावर आले. तेव्हा ते जिजाबाईंना भेटले, तेव्हा म्हणाले,

‘मासाहेब, महाराजसाहेबांची शिकारीची उमेद दांडगी. शिकार पाहिली, की सारं भान हरपतात. बेभान होऊन कशाचाही विचार न करता सरळ तुटून पडतात. ते महाराजसाहेब वेगळेच भासतात.’

□

२४

सकाळच्या वेळी शहाजीराजे देवीदर्शनासाठी गडाच्या माचीवर आले होते. शहाजीराजांच्या बरोबर सारे दर्शन करून माघारी फिरले. शहाजीराजांनी विचारले,

‘मोरोपंत, राजांचे गड किती आहेत?’

‘साठ गड सध्या मजबुतीचे आहेत!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अस्सं! आणि पागा?’

‘पंधरा हजार खडी पागा आहे.’ नेताजी म्हणाले.

‘राजे, तुम्ही गलबतंही बांधलीत, असं ऐकलं?’

‘जी!’ राजे म्हणाले.

‘चांगली गोष्ट आहे. राजे, पागा वाढवून घ्या. आम्ही सांगितला होता, तो श्लोक ध्यानी आहे ना?’

‘तो कसा विसरेल?’

‘मग सांगा ना!’

‘यस्याश्वा तस्य राज्यं यस्याश्वा तस्य मेदिनी।
यस्याश्वा तस्य सौख्यं यस्याश्वा तस्य साम्राज्यम्।।’

मोरोपंत म्हणाले, ‘बेअदबीची माफी असावी. पण जेव्हा राजे पागेत जातात, तेव्हा न चुकता हा श्लोक त्यांच्या तोंडून आम्हांला ऐकायला मिळतो.’

‘मोरोपंत, ज्याला ह्या श्लोकाचं महत्त्व कळलं, त्याचं साम्राज्य वाढायला फारसा वेळ लागणार नाही. राजे, इथं आम्ही आलो, राहिलो. तुम्ही समाधान दिलंत. तुमचं राज्य पाहून डोळे तृप्त झाले. आम्ही जेजुरीला खंडोबाला काय बोललो, माहीत आहे?’

‘जी?’

‘आम्ही तुमच्याबरोबर दर्शन करीत असता बोलून गेलो. आम्ही सांगितलं- आमच्या राजांचं राज्य उभं राहू दे; आम्ही देवाच्या सुवर्णमूर्ती घडवू. तो नवस फेडायला हवा. इथल्या मुक्कामात तुमचं राज्य उभं राहिल्याची खात्री झालीय् आम्हांला.’

‘क्षमा असावी.’ राजे म्हणाले, ‘अजून राज्य सुरक्षित नाही. शास्ताखान आमच्या बंदोबस्तासाठी उतरला आहे. तिकडे आदिलशाही संतप्त आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, जेव्हा राज्य उभं राहतं, तेव्हाच ही परचक्रं येतात. नाही तर आदिलशाहीला, मोगलाईला तुमची दखल घ्यायचं कारण काय? ती थोर राजकारणी, मुत्सद्दी माणसं असतात. त्यांची सदैव दूरदृष्टी असते. औरंगजेब त्यांतलाच एक आहे. जेव्हा कुणाचं लक्ष तुमच्याकडे नव्हतं, तेव्हा औरंगाबादेला दक्षिणेचा सुभेदार म्हणून असताना त्यानं तुमच्यावर नजर ठेवली होती. एवढंच नव्हे, तर आदिलशाहीला तुमच्यापासून सावध राहण्याचा सल्ला दिला होता. शास्ताखान आला, तरी घाबरू नका. तुम्ही या संकटातून पार पडाल, हा भरवसा आहे. आम्ही इथं भेटत असता, दोन मातब्बर शत्रू आपापल्या जागी जे खिळवून ठेवलेत, ते पाहून आम्ही थक्क झालो.’

राजसदरेवर शहाजीराजे बसले. जिजाबाई दाराशी येऊन उभ्या राहिल्या. संभाजीने मांडीवरची जागा घेतली. सारे अदबीने उभे होते. शहाजीराजे माणकोजींना म्हणाले,

‘माणकोजी, आता तुमची, आमची उमर झाली. राजांनी हे मिळविलेलं पाहून डोळे निवले. हे पाहायला दादोजी हवे होते. राजे जेव्हा दादोजींनी लावलेल्या बागेतली फळं पाठवितात, तेव्हा ती पाहून आमचं मन व्यथित होतं. राजे, अशी इमानी माणसं हुडकून जवळ करा. एक एक दुर्गाबरोबरीची ही माणसं. आणि, राजे, आता पसारा वाढला. पुणं नावारूपाला आणलंत; पण पुणं सुरक्षित नव्हे. रायगड बांधता आहात ना?’

‘जी!’

‘मग तीच जागा राजधानीची करा. तशी अव्वल जागा शोधून सापडणार नाही. तीच जागा निश्चित करा. कर्नाटकात आम्ही, होईल, त्या मगदुरानं जिंजीपावेतो मुलूख ताब्यात आणला आहे. आम्ही राहिलो, न राहिलो, तरी एकोजीराजे तो मुलूख सांभाळतील. त्यांना समज कमी.’ शहाजीराजे हसले. दरवाजाकडे पाहत म्हणाले, ‘आमच्याच वळणाखाली वाढले ना! तुम्ही आता थोरले. एकोजीराजांना संभाळा. दोघे एक झालात, तर तंजावरपासून नर्मदेपर्यंत मुलूख तुमचा बनायला फारसा वेळ लागायचा नाही. आमचं स्वप्न परमेश्वरानं तुमच्याकरवी साकार केलं. राजे, आम्हांला फार दिवस राहता येणार नाही; त्याचं दुःख आहे.’

‘का? एवढ्यात कंटाळलात?’ राजे खेदाने म्हणाले.

‘नको, राजा! असं बोलू नको. तुझा कंटाळा कोणाला येईल? अरे, तुझं यश बघून,
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कीर्ती पाहून, दहा वर्षांचं आयुष्य वाढवून मी जातो आहे. आम्ही जास्त काळ राहिलो, तर आदिलशाहीत संशय येईल. अफझलचा वध केलात, आणि तुम्ही आदिलशाहीत उतरलात. त्याच वेळी आम्ही कर्नाटकातून विजापुरात येत होतो. आणि विजापूर दरबारात हलकल्लोळ माजला!'

'कारण?' माणकोजींनी विचारले.

'अशी बोलवा उठली की, एका बाजूनं आम्ही आणि दुसऱ्या बाजूनं शिवाजी विजापूरवर स्वारी करणार. कशात काही नाही, तर ही बोलवा उठते. आणि आता तर आम्ही राजरोसपणे भेटतो आहो.'

'पण आदिलशाहीनं परवानगी दिली आहे ना?' राजांनी विचारले.

'उगीच नाही! आदिलशहांनी आम्हांला तुमची समजूत काढायला सांगितलं. तुम्हांला मानानं दरबारी आणायला सांगितलं. दहाहजारी ते द्यायला तयार आहेत... घाबरू नका. आम्ही ते कदापिही सांगणार नाही. नेमकी आम्ही संधी उचलली. मोगलांच्या विरुद्ध दक्खन शाह्यांनी एकजुटीनं राहावं, हे आजवर आम्ही म्हणत आलो. आम्ही ज्या तत्त्वाचा पाठपुरावा केला, त्याचं महत्त्व आदिलशाहीला हळूहळू पटू लागलं आहे. आदिलशाहीत ते तत्त्व बिंबविण्याचा आम्ही अधिक प्रयत्न करू. ते जमलं, तर तुमचं एक संकट तरी दूर होईल.'

राजे चित्त लावून ते बोल ऐकत होते. एक थोर राजकारणी, मुत्सद्दी आपले मनोगत बोलत होता. ते अखंड ऐकत राहावे, असे राजांना वाटत होते.

रात्री जेवण झाल्यावर सारे महालात बसले होते. उच्चासनावर शहाजीराजे बसले होते. खालच्या बैठकीवर एका बाजूला राणीपरिवार आणि दुसऱ्या बाजूला राजे जिजाबाईंसह बसले होते. परके कोणी नव्हते. शहाजीराजे म्हणाले,

'राजे, तुमच्या मासाहेबांनी तुम्हांला छान तयार केलं.'

जिजाबाई लाजल्या. त्या म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपल्याच वळणावर गेलेत राजे!’

शहाजीराजे हसले. ते म्हणाले,

‘मुळीच नाही. आमच्यांत आणि राजांमध्ये फारच फरक. आम्ही राजभोगी, तर ते राजयोगी! पाहा ना... आम्ही पराक्रम करतो; पण त्याचबरोबर आम्ही स्वत:ला विसरू शकत नाही. उपभोगाची वासना सुटत नाही. मोहिमेतून मोकळं होताच आम्ही विलासांकडे झुकतो. पण राजे पाहा! पराक्रमाबरोबरच ते सदैव राज्यकारभाराशी निगडित आहेत. त्यांच्यांत आदर्श राजांचे गुण पुरेपूर उतरलेत. म्हणूनच जयश्री त्यांना सदैव माळ घालते. अफझलखानासारख्या संकटातून सुटून जाणं हे काही सामान्य नव्हे!’

शहाजीराजांनी नि:श्वास सोडला. ते व्यथित झाले. ते म्हणाले,

‘राजे, अफझल मारलात, आणि आमच्या मनातलं एक शल्य हललं. त्यानंच आमच्या हातांत बेड्या ठोकल्या होत्या. शंभूराजांच्या मृत्यूला तोच कारणीभूत झाला होता. त्याचा वध केलात, आणि आम्हांला समाधान दिलंत. पण एक शल्य अजून खोल रुतून आहे.’

‘कोणतं?’ राजांनी अधीर होऊन विचारले.

‘बाजी घोरपडे!’ नि:श्वास सोडून शहाजीराजे म्हणाले, ‘दगाबाज! हरामी! आम्हांला गाफील ठेवून त्यानं कैद केलं. अफसोस, सद् अफसोस! आम्ही गाफील राहिलो. आम्ही आदिलशाहीचे चाकर. तोही आदिलशाहीच्या मर्जीतला. त्याचमुळं आम्हांस शक्य असूनही आम्ही खामोश राहिलो.’

गंभीर मुद्रेनं ठाम स्वरात राजे म्हणाले,

‘महाराजसाहेब, आज आपल्या पायांशी आम्ही इमान करतो. चढ्या मापानं आम्ही बदला घेऊ. दगाबाजीचं पुरं प्रायश्चित्त आम्ही त्याला देऊ.’

राजांचे ते बोल ऐकून शहाजीराजे समाधान पावले. ते म्हणाले,

‘आम्हांस तुमचा यकीन आहे. आम्ही निश्चिंत झालो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दोन दिवसांत शहाजीराजांनी सर्वांचा निरोप घेतला. शहाजीराजांच्या बरोबर आलेल्या सर्व सरदारांना शिवाजीराजांनी मौल्यवान भेटी दिल्या. दळाला मोहरा वाटल्या. जिजाबाईंचा निरोप घेत असता शहाजीराजे म्हणाले,

‘राणीसाहेब, आम्ही येतो.’

‘एक मागणं आहे!’

‘बोला!’

‘पुन्हा हे पाय दिसावेत!’

‘आम्ही जरूर येऊ! संधी मिळताच येऊ. शक्य झालं, परिस्थिती निवळली, तर राजांना कर्नाटकात नेण्याचा आमचा बेत आहे. राजांना जपा. त्यांच्यासाठी स्वत:ला जपणं आवश्यक आहे, हे ध्यानी ठेवा.’

शहाजीराजे बाहेर आले. सर्व राणीपरिवाराने शहाजीराजांना वंदन केले. आशीर्वाद देऊन, संभाजीला घेऊन शहाजीराजे सदरेवर आले. राजांना अश्रू आवरत नव्हते. त्यांनी शहाजीराजांच्या पायांवर डोके ठेवले. राजे म्हणाले,

‘जे आजवर मिळविलं, ते आणि मस्तक आपल्या पायांशी सदैव रुजू...’

शहाजीराजांना उभ्या जागी हुंदका आला. कासावीस होऊन त्यांनी राजांना कवटाळलं. त्यांच्या कपाळाचं चुंबन घेतलं. आपले अश्रू पुशीत आपल्या गळ्यातला अत्यंत तेजस्वी असा मोत्यांचा कंठा त्यांनी काढला. स्वत:च्या हातांनी राजांच्या गळ्यात तो कंठा घालून त्यांनी राजांना परत मिठीत घेतलं.

पालखीबरोबर राजे गडाच्या पायथ्यापर्यंत अनवाणी गेले. शहाजीराजे अश्वारूढ झाले. राजांनी त्रिवार मुजरा केला. किंचित ओणवे होऊन शहाजीराजांनी शिवाजीराजांची पाठ थोपटली, आणि घोड्याला टाच दिली. घोडदळ सुटले.

धुळीचा लोट दिसेनासा होईपर्यंत राजे तेथेच उभे होते,- भरल्या डोळ्यांनी...

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□ □ □

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग चवथा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

शहाजीराजे गेले; आणि गड मोकळा भासू लागला. पंधरा दिवस वडील आले; पण त्यांच्या आगमनाने, बोलांनी राजांना केवढा तरी हुरूप प्राप्त झाला. बोलून दाखविले नाही, तरी कुठे तरी आपल्याला पितृच्छायेचे सुख नाही, ही जाणीव राजांना बेचैन करीत असे. ते शल्य आता दूर झाले होते.

शास्ताखान पुण्याला तळ देऊन बसला होता. दक्खनला येऊन त्याला जवळ जवळ वर्ष होत आले होते. शहाजीराजांचा पुणे भागाचा मुलूख त्याने व्यापला होता. पण सगळे गड राजांच्या ताब्यात होते. चाकण सोडला, तर एकही गड तो जिंकू शकला नव्हता. नाही म्हणायला परिंडा किल्ला त्याने वाटाघाटीने मिळविला होता. एवढी मोठी फौज घेऊन शास्ताखान आला होता, पण त्या मानाने यश काहीच नव्हते. पावसाळा पुरा संपला होता. खानाने हालचाल करायची ठरविली. त्याची दृष्टी कल्याण-भिवंडीकडे वळली. राजांनी काबीज केलेली बंदरे घेण्याचा त्याने बेत केला. कल्याणला शिवाजी गलबते बांधतो आहे, हे त्याला आधीच कळले होते. शिवाजीचा मुलूख त्याच्या ताब्यात आला होता. आता कोकणचा मुलूख घेऊन शिवाजीचा आश्रय साफ तोडण्याची खानाची इच्छा होती.

परिंडा घेण्यात यशस्वी झालेला आपला विश्वासू सरदार कहारतलबखान खानाने बोलावून घेतला; आणि त्याला ही महत्त्वाची मोहीम दिली. अनेक सरदार मदतीला दिले. त्यांत चव्हाण, गाडे, कोकाटे, जाधव हे मराठे सरदारही होते. शूर रायबागन महिला ही आपल्या सैन्यानिशी मदतीला होती. कहारतलबखानाने आपल्या फौजेची जुळणी करायला सुरुवात केली.

दसरा आला. राजे गडावर सीमोल्लंघन करून वाड्याच्या दाराशी आले. दाराशी सातही राण्या ओवाळायला आल्या. ओवाळणे पार पडले. राजे आत आले. जिजाबाईंच्या पाया पडले. जिजाबाईंना राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मासाहेब, हे सीमोल्लंघन खरं नाही. हा शिळा दसरा. दिवाळी अशीच जाणार, असं दिसतं.’

‘जे मिळविलं, ते राखणं हासुद्धा पराक्रमच असतो, राजे!’

‘त्याच चिंतेत आम्ही आहो.’

दसरा जसा गेला, तसाच दिवाळीचा सणही पार पडला. दिवाळीनंतर राजे रायगडाला जाऊन आले. गडाचे काम पाहून त्यांना समाधान वाटले.

राजे रायगडाहून आल्यानंतर एक दिवस संध्याकाळी जिजाबाईंच्यासह गडावर फेरफटक्याला गेले होते. बरोबर राणीपरिवारही होता. गडावरून फिरत राजे वाड्यात आले. खास बातमी घेऊन नजरबाज आला होता.

राजे एकांतात त्याच्या बरोबर बोलत बसले होते. ते बाहेर आले, तेव्हा त्यांचा चेहरा चिंताक्रांत दिसत होता. राजांनी तातडीने आपले सरदार गोळा केले.

जिजाबाईंनी राजांना विचारले. राजे म्हणाले,

‘मासाहेब, विश्रांतीचे दिवस संपले. शास्ताखानाचा प्रबळ सरदार कहारतलबखान फौज गोळा करून आमच्यावर चालून येत आहे.’

‘राजगडावर?’

‘छे! चाकणच्या किल्ल्यापासून आमचे गड काय असतात, हे त्याला कळले आहे. तोही राजकारणातला मुरब्बी आहे. बसल्या बैठकीचं राजकारण शास्ताखान फार चांगलं करतो. त्याची नजर आता कोकणातल्या आमच्या मुलुखाकडे वळला आहे.’

जिजाबाईंनी निःश्वास सोडला. राजे हसून म्हणाले,

‘मासाहेब, इतकी सोपी मोहीम नाही ही. खानाच्या फौजेनं जर तळकोकण गाठला, आणि आमचे चौल, कल्याण, भिवंडी, पनवेल, नागोठणे काबीज केले, तर आम्ही पुरे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गारद होऊ. वरती देश आणि खाली कोकण आम्ही गमावलं, तर नुसतं गडावर राहून किती दिवस चालणार?'

'मग? काय बेत आखलात?'

'ही खानाची मोहीम तर थांबवायलाच हवी. खानाचा निश्चित मार्ग कळला, की पुढं काही तरी मार्ग निघेल.'

राजांनी ही समस्या जेव्हा मंत्रिमंडळाच्या व सेनापतींच्या पुढे टाकली, तेव्हा 'कल्याण-भिवंडी लढवावी, खानाला तळकोकणातच गाठावा', असे बहुतेकांचे मत पडले. राजे नुसते हसले. ते म्हणाले,

'पाहू, भवानी काय बुद्धी देते, ती!'

राजांनी फौज एकत्र करण्याच्या आज्ञा दिल्या. दररोज पथके घेऊन दाखल होऊ लागली. सरदार मुजऱ्याला येऊ लागले. राजगडाच्या परिसरात राजांची फौज जमा झाली.

....आणि एके दिवशी गडावर बहिर्जी आला. राजे गडबडीने त्याला महाली घेऊन गेले.

बहिर्जी सांगू लागला, 'कहारतलबखान उद्या कूच करणार आहे. खानाच्या सैन्यात अनेक मराठे सरदार, खुद्द रायबागन सामील आहे. निवडक फौज नेण्याची आज्ञा शास्ताखानानं दिल्यामुळं भक्कम फौज बांधूनच कहारतलबखान बाहेर पडतो आहे.'

राजे उठले. येरझाऱ्या घालू लागले. त्यांनी विचारले,

'खान कोणत्या वाटेनं जाणार, समजलं?'

'जी! खान लोहगडमार्गानं उंबरखिंडीतून कोकणात उतरणार आहे.'

'उंबरखिंड?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'जी!'

'बहिर्जी!' राजे आनंदाने उद्गारले, 'श्रींनी खानाला कर्मोचित बुद्धी दिली.'

त्या रात्री राजे समाधानाने झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी राजे जिजाबाईंना म्हणाले, 'मासाहेब, आम्ही उद्या सीमोल्लंघनाला बाहेर पडणार. जरा उशीर होत आहे; पण इलाज नाही.'

जिजाबाई म्हणाल्या, 'पण, राजे, जपून!'

राजे म्हणाले, 'मासाहेब, आजवरच्या मोहिमांत ही मोहीम सोपी. या मोहिमेचं यश या क्षणाला आमच्या हाती आहे. हे यश आम्ही पदरात पाडून घेतलं, की खानाला थप्पड बसेल. आमचा मुलूख लुटणं, जाळणं यांत समाधान मानणारा खान जरा शुद्धीवर येईल. पुढची मोहीम आखताना दहा वेळा विचार करील.'

कूच करण्याचा नगारा झडला. टापांच्या खडखडाटाने गडाचा कोपरान् कोपरा भरून गेला. राजे गडाखाली आले. नेताजी आपल्या तुकडीसह उभा होता. राजांनी विचारले,

'नेताजी, तोफा रवाना झाल्या?'

'जी! चाळीस लहान तोफा पाठवल्यात.'

'पुष्कळ झाल्या. चला.'

राजांचे सैन्य वेगाने दौड करीत होते. राजे उंबरखिंडीत आले. गगनाला पोहोचलेल्या उंच पर्वतराईतून, उंबरखिंडीतून वाट होती. एका बाजूला उंच कडा, दुसऱ्या बाजूला अनेक ठिकाणी खोल तुटलेले कडे. दाट रानाने दोन्ही बाजू पुऱ्या माखलेल्या... आणि त्यांतून उंबरखिंडीची अरुंद निमुळती वाट.

उंबरखिंडीतील ते निसर्गवैभव पाहून राजे तृप्त झाले. राजांच्या सैन्याने उंबरखिंडीच्या मोक्याच्या जागा गाठल्या होत्या. उंच वृक्षांच्या गर्द पालवीत टेहळेकरी बसले होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जंगलातून जिथून वाट दिसेल, अशा ठिकाणी तोफांचे मोर्चे रचले होते. रणवेष केलेल्या राजांनी नेताजींच्यासह साऱ्या मुलुखाची पाहणी केली. राजे आता कहारतलबखानाच्या सैन्याची आतुरतेने वाट पाहत होते.

□

२

राजांना खान घाटावर आल्याची वर्दी आली. रात्रीचे वास्तव्य खानाने घाटमाथ्यावरच केले. दुसऱ्या दिवशी सूर्योदयाबरोबर खानाची फौज हलली. खान घाट उतरू लागला. रस्ता पाहण्यासाठी पुढे पाठविलेले अश्वपथक टापांचा आवाज घुमवीत उंबरखिंडीत उतरले. सगळे रान शांत होते. वाट मोकळी होती. अश्वपथक खालीपर्यंत जाऊन वाट सुरक्षित असल्याचे पाहून माघारी आले. खानाचे घोडदळ, तोफांचे गाडे, सामानांच्या गाड्या, पायदळ यांची रांग जपून पावले टाकीत होती. वाट निमुळती होती. घाटाची वळणे धोक्याची होती. सावकाश धीमे धीमे खानाचा सरंजाम खिंडीची वाट चालत होता.

खान काळ्या घोड्यावर बसला होता. खानाबरोबर एका बाजूला अमरसिंह आणि दुसऱ्या बाजूला रायबागन उमद्या घोड्यांवर बसून जात होते. पाठीमागे कहारतलबचे रक्षक पथक तळपत्या शस्त्रांनिशी येत होते. खानाच्या फौजेचा शेवटचा उंट खिंडीत उतरला.

सगळे वातावरण कसे शांत होते. वाऱ्याचा कुठे मागमूसही नव्हता. सूर्य डोक्याकडे चढत होता. त्याच्या किरणांत सारी खिंड उजळून निघाली. कहारतलब रायबागनला म्हणाला,

‘केवढा देखणा आणि सुंदर मुलूख आहे!’

रायबागन म्हणाली, ‘देखणा खरा! पण, खानसाहेब, ही खामोशी, हा सन्नाटा कसा तरीच वाटतो.’

त्याच वेळी कुठे तरी नगारा दुडदुडला. साऱ्या खिंडीवरच्या रानावर त्याचे तरंग उठले. तोच दुसऱ्या बाजूने तसाच नगारा वाजला. साऱ्या रानात नगाऱ्यांचे आवाज उठू लागले. कहारतलब, रायबागन, अमरसिंह भयभीत होऊन आवाज ऐकत होते. जिकडे पाहावे,
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तिकडून आवाज ऐकू येत होते. कहारतलब स्वगत बोलल्यासारखा चारी बाजूंना पाहत म्हणाला,

'हा आवाज कसला? कोण नौबत वाजवतो?'

रायबागन म्हणाली, 'खानसाहेब, खामोशीचं रहस्य सुटत आहे. शिवाजीनं आपल्याला घेरलं.'

रायबागनने आपली तलवार उपसली. अमरसिंहाकडे पाहून ती म्हणाली,

'तुम्ही खानाच्या जवळ राहा. मी पुढं जाऊन पाहून येते.'

रायबागनने घोड्याला टाच दिली. तोच तोफेचा आवाज साऱ्या दऱ्याखोऱ्यांत घुमला. फौजेच्या अग्रभागी एकच गोंधळ उडाला. तोफांच्या माऱ्यात सैन्य अचूक टिपले जात होते. तोफांच्या जोडीलाच आता कर्णे घुमू लागले. तुताऱ्या शहारे उठवू लागल्या. कोणी दिसत नव्हते. आवाज तेवढे येत होते. खानाच्या फौजेची दाणादाण उडाली. जीव वाचवायला रानाचा आश्रय घेणारा सैनिक अचूक बाणांनी टिपला जात होता. उंबरखिंडीच्या वाटेवर खानाच्या देखत मुडदे पडत होते. खान दोन तोफांच्या गाड्यांमध्ये भोवताली अश्वपथक घेऊन संहार पाहत होता.

पुढे गेलेली रायबागन खानाजवळ आली. ती म्हणाली,

'खानसाहेब, खिंडीच्या दोन्ही वाटा बंद झाल्या आहेत.'

संतापाने खान ओरडला, 'शत्रूची कत्तल करा!'

'कुठं आहे शत्रू?' रायबागनने विचारले, 'कत्तल होते आहे आपल्या माणसांची. शत्रू एक दिसत नाही.'

'जंगलात पाठलाग करा!'

'गेलेला एक माणूस परत येत नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सारी उंबरखिंड एकाच वेळी किंकाळ्यांनी, बिथरलेल्या घोड्यांच्या टापांनी भरून गेली. सामानाच्या गाड्या तोफांनी उडविल्या जात होत्या. साऱ्या वाटेवर सामान फेकले जात होते. खानाच्या खजिन्याचा एक पेटारा असाच फुटून रस्त्यावर विखुरला होता. मोहरांचा सडा पडला होता; पण त्याच्याकडे पाहण्याचा कुणाला धीर होत नव्हता. प्रत्येक सैनिक केव्हा, कोणत्या क्षणी, कुठून बाण येणार आहे व आपण प्राण घेणार आहे, एवढीच प्रतीक्षा करीत होता. काही वेळापूर्वी निश्चल, शांत, निर्मनुष्य असलेली खिंड माणसांच्या मुडद्यांनी, घोडे-बैल यांच्या कलेवरांनी, आणि रक्ताच्या शिडकाव्याने भरून गेली. भीती, संताप, उद्वेग यांनी खान थरथरत होता.

रायबागन म्हणाली,

‘खान, या शिवाजीच्या अवघड मुलुखात शिरण्याचं धाडस केलंस, त्याचा हा परिणाम आहे.’

‘रायबागन! यातून वाट काढ.’

‘मगरीच्या जबड्यात शिरल्यावर परतीची वाट कुठली? सोन्यासारखी शाही फौज सिंहाच्या जबड्यात सरळ आणून सोडलीस. आजवर मिळविलेलं सारं यश फुकट गमावलंस.’

‘रायबागन! हिंमतसे काम लो!’

‘हिंमत? खानसाहेब, निदान तुम्ही तरी मला हिंमत शिकवू नका. आलमगीर पादशहांनी औरंगाबादेत जगजीवनपुरा बांधला, तो माझ्याच मुलाच्या नावानं. औरंगजेबानं ह्या उदारामपत्नीला ‘रायबागन’ किताबत दिली, ती हिंमत पाहूनच. खानसाहेब, फलनिष्पत्ती होत असेल, तरच पुरुषाच्या उद्योगाला अर्थ प्राप्त होतो. नाही तर असलं वेडं साहस उपहासाचा विषय बनतं.’

‘रायबागन, तुझा सल्ला काय?’

‘सल्ला! अपयश तर निश्चित आहे. शिवाजीनं मनात आणलं, तर आता फौजेतला एकही माणूस सुखरूप राहणार नाही. तुझे पटाईत तीरंदाज चित्रासारखे स्थिर आहेत. त्यांना

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काही दिसत नाही. अदृश्य शत्रूच्या मर्जीवर तुझं सैन्य जीव धरून आहे.'

कहारतलबखान ते ऐकत होता. क्षणाक्षणाला किंकाळ्या वाढत होत्या. खानाच्या पायांतले त्राण नाहीसे झाले. तो ओरडला,

'कुछ भी करो; पहले हमें बचाओ! ये शिवाजी नहीं, शैतान है!'

रायबागन हसली. ती म्हणाली,

'खानसाहेब, ताबडतोब तुमचा वकील सुलहसाठी पाठवा.'

'शिवाजी मान्य करील?' खानाने विचारले.

जो शत्रू पुरा सापडला आहे, त्याच्यावर दया दाखवणे हा मुसलमानी रिवाज नव्हता. उलट, त्वेषनिवारणार्थ, फौजेच्या करमणुकीसाठी कत्तलींना इजाजत दिली जात असे. खानाच्या फौजेची तीच अवस्था होती.

रायबागन म्हणाली,

'शिवाजी थोर राजा आहे; दिलदार आहे. शरणागत शत्रूवर तो केव्हाही चाल करीत नाही, असा त्याचा लौकिक आहे.'

'मग वकील पाठव. तह करायला मी तयार आहे.'

रायबागनने सत्वर वकील निवडला. पांढरे कपडे घातलेले नि:शस्त्र लोक सोबतीस घेऊन खानाचा वकील निघाला. रानात प्रवेश करताना 'तह, तह' असे ओरडत ते रान तुडवीत होते. थोडे अंतर जाताच शिवाजीच्या लोकांनी त्यांना गराडा घातला. त्या गराड्यातून खानाचे लोक शिवाजीकडे निघाले. खिंडीच्या वाटेवर लढाई चालूच होती.

दोन प्रहर टळत आली होती. डोंगराच्या एका माथ्यावर किंचित विरळ असणाऱ्या जागेवर खानाचा वकील पोहोचला. राजे घोड्यावर स्वार झाले होते. आपल्या रक्षक दळात संपूर्ण रणवेष करून अश्वारूढ झालेले शिवाजीराजे नजरेत भरत होते. खानाचे वकील

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आल्याची वर्दी राजांच्याकडे गेली. राजांनी वकिलास सामोरा येऊ दिला. जमिनीपर्यंत लवून वकिलाने तीन वेळा कुर्निसात केला. आपले हात हिरव्या रुमालाने बांधून तो म्हणाला,

‘खाने आझम कहारतलबखानांच्या व रायबागनसाहेबांच्या आज्ञेवरून त्यांचा वकील म्हणून मी राजांच्या पायांशी आलो आहे.’

‘पराक्रमी कहारतलबखान आणि रायबागन यांचा निरोप आम्हांला सांगा.’

‘खानसाहेबांना आपल्या चुकीचा पश्चात्ताप होत आहे. आपलं स्नेहाचं नातं असता, शास्ताखानाच्या आज्ञेवरून अकारण आपल्या मुलुखात त्यांना यावं लागलं, याचं तीव्र दुःख त्यांना वाटतं.’

‘आमचा स्नेह?’

‘महाराज, कहारतलबखान फर्जंद शहाजीराजांचे जुने दोस्त. ते नातं ध्यानी घ्यावं, आणि खानांना जीवदान द्यावं, एवढीच प्रार्थना आहे.’

राजे हसले. ते म्हणाले,

‘किती लौकर नाती आठवतात तुम्हांला! तुम्ही जाऊन खानसाहेबांना आणि रायबागनना आमचा नमस्कार सांगा. त्यांना सांगा, शरणागत शत्रूला आम्ही धक्का लावीत नाही. खानसाहेबांच्यामुळं अकारण आम्हांला आणि आमच्या फौजेला त्रास पडला. खानसाहेबांनी त्यासाठी भरपूर खंडणी द्यावी. आम्ही त्यांना फौजेसह माघारी जायला वाट देऊ. जोवर हे मान्य होणार नाही, तोवर लढाई जारी राहील. आम्ही इथंच थांबतो आहो. उत्तराची वाट पाहतो आहो.’

वकिलाने परत लवून मुजरा केला. मुजरा करीत, मागे हटत, तो काही कदम गेला आणि फिरला. खानाने शिवाजीच्या अटी ताबडतोब मान्य केल्या. मोहीमखर्चासाठी घेतलेल्या खजिन्याच्या पेट्या उतरून ते ओझे माणसांच्यावर लादले गेले. वकील परत राजांच्याकडे चालू लागला. खानाच्या वकिलाबरोबर एक तरुण चालला होता. तरुण देखणा होता. मस्तकावर डौलदार पिवळे पागोटे होते. त्यावर रत्नजडित चांद बसविला होता. अंगात भरजरी अंगरखा होता. पायांत चोळणा आणि जरी चढाव होते. कमरेला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रत्नजडित मुठीची तलवार लाविली होती. वकिलाबरोबर तो तरुण चालला होता. माथ्यावर येताच त्या तरुणाला शिवाजीराजांचे दर्शन घडले. भोवती हत्यारबंद रक्षकांच्या मध्ये शिवाजीराजे पांढऱ्या शुभ्र घोड्यावर स्वार झाले होते.

मस्तकी सूर्यकिरणांत झळाळणारे शिरस्त्राण होते. भरदार अंगलटीवर जाळीदार चिलखत शोभत होते. पाठीचे बाणांचे दोन भाते पंखांप्रमाणे दिसत होते. उजव्या खांद्यावर धनुष्य अडकविले होते. आपल्या अत्यंत तेजस्वी, हिऱ्यांप्रमाणे चमकणाऱ्या चपळ नजरेने ते आसमंत हेरीत होते. कपाळीच्या शिवगंधाने यांच्या रूपाच्या रौद्रतेत शांतपणाची छटा मिसळली होती.

खानाच्या वकिलाने मुजरा केला. मागच्या सेवकांना इशारत केली. सेवकांनी संदुका खाली ठेवल्या. वकिलाने संदुका उघडल्या. एक रौपनाण्यांनी भरली होती; दुसरीत सुवर्णनाणी होती आणि तिसऱ्या लहान संदुकीत जडजवाहीर दिसत होते. राजांनी हात वर केला; आणि नेताजीकडे पाहिले. नेताजीने इशारत करताच एका स्वाराने कर्णा वाजविला. अनेक कर्ण्यांनी त्याला साथ दिली. खिंडीतला कोलाहल थांबता-थांबता पूर्णपणे थांबला. साऱ्या खिंडीत पूर्ववत शांतता पसरली. राजे म्हणाले,

'आमच्या मुलुखातून सत्वर माघारी जायला खानसाहेबांना सांगा. पुन्हा अशी आगळीक करण्याचं धाडस करू नका, म्हणून बजावा. आमच्या राज्यात नागमण्यासारखा हा भाग शोभतो. तो मणी हिरावून घेण्याचं सामर्थ्य कोणाच्याही अंगात नाही. आमच्या कठीण प्रदेशात नुसता कल्पनेचा सुद्धा घोडा नाचविणं कठीण; मग प्रदेश काबीज करण्याची बात कशाला? तो अट्टहास करण्याचं धाडस कुणी करू नये, हे तुम्हांला समजलं असेल.'

वकिलामागे उभा असलेला तरुण एकटक नजरेने राजांच्याकडे पाहत होता. तलवारीवर हात ठेवून तो पुढे सरसावला. नेताजीने तलवारीवर हात ठेवला. राजांनी नेताजीला खुणावले. राजे जवळ येणाऱ्या तरुणाकडे पाहत होते. तो तरुण जवळ आला. त्याने मुजरा केला. राजे तरुणाकडे शांत नजरेने पाहत होते. तरुणाने आपल्या शेल्यात खोवलेली कमरेची तलवार म्यानासह काढून राजांच्या समोर धरली. राजे म्हणाले,

'हे काय?'

'आपला दिलदार स्वभाव पाहून धन्यता वाटली. नाचीजची भेट म्हणून या फिरंगीचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

स्वीकार व्हावा.’

राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. तलवार धरलेले हात ते पाहत होते. त्या तरुणाच्या नजरेला नजर देत राजे म्हणाले,

‘तुझ्यासारख्या थोर सेनापतीची तलवार घेणं आम्ही उचित समजत नाही. या क्षणी सत्कार करायला आमच्याजवळ वस्त्रं नाहीत; नाही तर तोही आम्ही केला असता. तुमच्या धाडसाचं कौतुक करतो. औरंगजेबानं ‘रायबागन’ किताब सार्थपणे तुम्हांला दिला आहे.’

रायबागनचे हात थरथरले. ती म्हणाली,

‘महाराज, आपण कसं ओळखलंत?’

‘ते कठीण नव्हतं!’ राजे म्हणाले, ‘गोंदलेलं कपाळ आणि आपले हात पाहून आपण कोण, हे सांगणं कठीण नव्हतं. किंबहुना, तुम्ही जेव्हा आलात, तेव्हाच आम्ही ओळखलं होतं. हे धाडस तुमच्याखेरीज दुसरं कोण करणार?’

रायबागनला शब्द सुचत नव्हते. राजे म्हणाले,

‘तुम्ही जा! खानाला दिलासा द्या. तुमच्यासारख्या वीरस्त्रीचं दर्शन घडलं; आणि पवित्र झालो. तुमचा पराक्रम, तुमच्या धैर्याच्या गोष्टी ऐकल्या, की आम्हांला भवानी आठवते. जेव्हा संधी मिळेल, तेव्हा आम्ही आपला यथोचित सत्कार करू. आज ते जमत नसल्यानं आम्ही शरमिंदे आहो.’

वकिलासह रायबागन गेली. जे रूप, जो स्वभाव पाहिला, त्याने ती चकित झाली होती; भारली गेली होती.

खानाने आपली उरलीसुरली फौज गोळा केली; आणि तो माघारी वळला.

दुसऱ्या दिवशी खिंड मोकळी झाली. राजे खिंडीतून जात असता खानाचे पडलेले सैनिक, जनावरे दिसत होती. कामी आलेल्या आपल्या सैनिकांबरोबरच राजांनी खानाच्याही सैनिकांना मूठमाती द्यायला आज्ञा केली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे पुढचा विचार करीत होते. उंबरखिंडीची हकीकत कळल्यावर शास्ताखान अधिक संतापेल, हे राजांना माहीत होते. शास्ताखानाने संतापून परत कोकणची मोहीम काढली, तर ऐन वेळी धावाधाव होऊ नये, म्हणून त्यांनी नेताजी पालकरांना आपल्या फौजेसह बोरघाटात जागरुकीने राहायला सांगितले; आणि राजे राजगडाकडे वळले.

□

३

कहारतलबखानाचा पराभव करून राजे टाकोटाक राजगडावर आले. गडावर येताच त्यांनी आपली उरलेली फौज गोळा करायला सुरुवात केली. प्रत्येक दिवस त्यांना मोलाचा वाटत होता. नजरबाजांना आज्ञा देऊन पुढे पाठविले होते. राजांनी आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एक भाग राजांच्याकडे होता.

राजांची ही गडबड पाहून जिजाबाईंनी विचारले,

‘राजे, एक मोहीम पुरी केलीत. आता थोडी विश्रांती तरी...’

‘मासाहेब, विश्रांतीला आता अवसर नाही. शास्ताखानाची सुस्त आमच्या उंबरखिंडीच्या युद्धानं साफ उडाली असेल. नेताजी कोकणात आहेतच. रायगड-महाडपर्यंत ते खानाची हालचाल होऊ देणार नाहीत. आता शास्ताखानाला उसंत, सवड देता उपयोगी नाही. आमचा दरारा खानाला समजायला हवा.’

‘मग खानावर चालून जाणार?’

‘छे! खानावर आत्ताच चालून जायचं काय कारण? वेळ आली, तर तेही करू. पालवणचा राजा जसवंतसिंह आमची आगळीक काढतो आहे. पन्हाळ्यावर आम्ही अडकलो असता ज्या सुर्व्यांनी आमच्या विरुद्ध शस्त्र धरलं, त्यांना जाब विचारायचा आहे. ज्या टोपीकरांनी आमच्या विरुद्ध तोफा डागल्या, त्यांची असली घातकी सवय नष्ट करायची आहे. टोपीकरांचा बंदोबस्त आम्ही केला, की खानाला आमच्या ताकदीची खरी जाणीव होईल.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शंभूबाळ धावत आत आले. राजांनी विचारले,

‘काय, छोटे राजे! एवढे धावत आलात?’

‘आम्ही तुमच्या बरोबर येऊ?’

‘मोहिमेला?’

‘हो! मासाहेबांनी आम्हांला ही दिली. ही बघा.’ शंभूबाळांनी छोटी तलवार दाखविली.

राजांच्या, जिजाबाईंच्या चेहऱ्यांवर हसू होते. राजांनी शंभूबाळाला कौतुकाने उचलले. ते म्हणाले,

‘अजून ‘तलवार’ म्हणता येत नाही; आणि निघाले मोहिमेला! राजे, खेळायचे दिवस फार थोडे आहेत. खेळून घ्या. पुढं, आम्ही करतो, तोच उद्योग तुम्हांला करावा लागणार आहे.’

शंभूराजांचा हट्ट घालवीपर्यंत राजांची तारांबळ उडाली. ते काही केल्या ऐकेनात. शंभूराजे रडू लागले, तसे राजे अस्वस्थ झाले. जिजाबाई गोंधळलेल्या राजांच्याकडे पाहत होत्या. हसत त्या म्हणाल्या,

‘राजे, एवढ्या मोहिमा काढता, बेत आखता; पण साधी मुलाची समजूत काढता येत नाही?’

राजांनी गडबडीने शंभूराजांना जिजाबाईंकडे दिले. संभाजी लाथा झाडीत होता, किंचाळत होता. जिजाबाई मोठ्याने म्हणाल्या,

‘बाळराजे, तुम्ही मोहिमेवर जा!’

संभाजी एकदम रडायचा थांबला. डोळे पुशीत, नाक ओढीत तो रागाने राजांच्याकडे पाहून गाल फुगवून म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आबासाहेब वाईट्ट आहेत!’

जिजाबाई म्हणाल्या, ‘असं बोलू नये, बाळराजे!’

राजे म्हणाले, ‘मासाहेब, रागीट स्वभाव दिसतो बाळराजांचा... आम्ही वाईट, तर नेणारच नाही तुम्हांला.’

संभाजी परत रडण्याच्या बेतात आला. त्याला कवटाळीत जिजाबाई म्हणाल्या,

‘गप ना, बाबा!... बाळराजे, तुम्ही जाणार ना?’

संभाजीने होकारार्थी मान हलविली. संभाजीला समोर उभे करीत जिजाबाईंनी विचारले,

‘पण तुमची ढाल कुठं आहे?’

‘डाल?’ संभाजी विचारात पडला.

‘हो! ढाल नाही, तर तुम्ही लढणार कसे?’

संभाजीला उत्तर सुचेना. त्याला जवळ घेत जिजाबाई म्हणाल्या,

‘बाळराजे, तुमची ढाल करायला टाकली ना? ती आली, की मग तुम्ही मोहिमेवर जा.’

‘मग न्याल?’ संभाजीने राजांना विचारले.

राजांनी संभाजीचा मुका घेतला. ते म्हणाले,

‘हो. जरूर नेऊ.’

संभाजी आनंदाने पळत गेला. जिजाबाई म्हणाल्या,

‘संतापतो. नाही, असं नाही. पण समजावून सांगितलं, तर सारं ऐकतो. असं भोळं,
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रेमळ पोर मिळायचं नाही. अगदी आईच्याच वळणावर गेलंय्.'

सईबाईंची आठवण येताच राजांचं अंग जागच्या जागी ताठरलं. चूपचाप ते महालाबाहेर गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजे मोहिमेसाठी गडाखाली उतरले. वाटेत फौज येऊन मिळत होती. मुक्कामाबरोबर राजांचे बळ वाढत होते. राजांच्या बरोबर तानाजी मालुसरे, पिलाजी नीळकंठराव हे सरदार होते. राजांनी आपली फौज दक्षिण कोकणाकडे वळविली. उंबरखिंडीतील विजय सर्वत्र पसरला होता. राजे येतात, हे ऐकताच कोकणातील पेठा, धनाढ्य शहरे सहज ताब्यात येत होती. जिंकलेल्या मुलुखावर नवे अधिकारी नेमून राजे पुढे जात होते. राजांना विरोध झाला, तो निजामपूरला. निजामपूर लुटून राजे सरळ दापोलीच्या उत्तरेस असलेल्या पालवणवर चालून गेले.

शिवाजी चालून येतो, हे कळताच पालवणचा राजा जसवंतराव भयभीत झाला. पहाळ्याच्या वेढ्यात तो सिद्दी जौहरच्या मदतीला धावला होता. पालवणच्या जसवंतरावाने सरळ पळ काढला; आणि तो शृंगारपूरकर सुर्व्यांच्या आश्रयाला गेला. राजांनी पालवण काबीज करून दळव्यांचे दाभोळ हे बंदर ताब्यात घेतले. राजांनी चिपळूणला तळ दिला.

चिपळूण परशुराम-देवस्थानाबद्दल प्रसिद्ध. डोंगराच्या माथ्यावर असलेल्या परशुराममंदिरात राजे गेले. त्यांनी यथासांग पूजा केली; ब्राह्मणांना भरपूर दान वाटले; आणि परशुरामाचा प्रसाद घेऊन राजे देवरुखला आले.

शृंगारपूरचे सुर्वे, कुडाळचे सावंत आणि पालवणचे दळवी ही तिन्ही जहागीरवजा राज्ये आपल्याच माणसांची होती. राजांना त्यांच्याशी मैत्री करण्याची इच्छा नव्हती. उलट, ते मिळाले, तर हवे होते. पन्हाळगडच्या वेढ्यात सुर्वे आपल्या विरुद्ध लढले, हा त्यांचा अपराध विसरून राजांनी सुर्व्यांच्याकडे आपला वकील पाठविला; आणि निरोप धाडला :

'आम्ही स्वारीवर जात आहोत. या मुलुखाच्या रक्षणासाठी संगमेश्वरला थोडी फौज ठेविली आहे. आम्ही मोहीम आटोपून परत येईपर्यंत तुम्ही फौजेकडे लक्ष ठेवावे. काही संकट आले, तर मदत करावी.'

शिवाजीराजांच्या आगमनाने भ्यालेला सुर्वे तो निरोप ऐकून निर्धास्त झाला. त्याने

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आनंदाने राजांची कामगिरी स्वीकारली. त्याने निरोप पाठविला:

'मी आपला गुलाम आहे. सेवाचाकरीची संधी मिळते, हे माझं भाग्य समजतो. अपराध क्षमा करून मला संभाळून घ्यावे.'

सुर्व्यांचा निरोप ऐकून राजांना समाधान झाले.

मोहिमेवरून परत येते वेळी सुर्वे यांची समजूत काढून, त्यांना मानाने वळवून घ्यायचे राजांनी ठरविले.

संगमेश्वरच्या फौजेवर तानाजीला नेमले होते. पाठोपाठ पिलाजी नीळकंठही हुकुमाप्रमाणे तानाजीला येऊन मिळाले. त्या दोघांना थोड्या फौजेसह संगमेश्वरला ठेवून राजे राजापूरच्या रोखाने निघाले.

शिवाजीराजे आपले हजार घोडदळ व तीन हजार पायदळ घेऊन राजापुरावर थडकले. राजापुराबाहेर राजांनी तळ दिला. राजापूरची चारी बाजूंनी नाकेबंदी करून रिवाजाप्रमाणे राजांनी आपला वकील राजापुरात पाठविला. जाताना राजांच्या वकिलाने विचारले,

'टोपीकरांना बोलवायचे?'

'छे, छे! त्यांना बोलावू नका. ते बिचारे व्यापार-उदीम करून पोट भरतात. आम्ही नंतर त्यांच्या भेटीला जाऊ.'

राजांच्या निमंत्रणानुसार राजापूरचे सधन व्यापारी, सावकार राजांना भेटायला आले. राजांनी खंडणीची मागणी केली; पण काहींनी टाळाटाळ चालविली. राजांनी सर्वांना जाऊ दिले. जे शब्दाला जागणारे होते, अशा व्यापाऱ्यांनी राजांना खंडणी भरली. ते गेले, आणि राजांना वर्दी आली :

'टोपीकर येत आहेत.'

'आमच्या भेटीला? आम्ही न बोलावता?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे निश्चल नजरेने शामियान्याच्या दरवाजाकडे पाहत होते. चार-पाच साहेब ऐटीने आत आले. त्यांनी राजांना अदबीने आपल्या पसरट टोप्या काढून अभिवादन केले. राजे पाहत होते. रेव्हिंग्टनबरोबर आलेले रँडॉल्फ टेलर, रिचर्ड टेलर, गिफर्ड, फेरांड, रिचर्ड नेपिअर, सॅम्युएल बर्नार्ड हे इंग्रज राजांना निरखीत उभे होते.

त्या इंग्रजांच्या चेहऱ्यांवर स्मित होते. केसांची झुलपे मस्तकावर खेळत होती. उंच्या पुऱ्या इंग्रजांनी मांड्यांपर्यंत आलेले पांढरे शुभ्र डगले घातले होते. त्यांच्या खांद्यांवर तांबड्या फितव्या लावल्या होत्या. पायांत अरुंद विजारी आणि पायमोजे होते. टोपीवाल्यांनी आणलेल्या दुभाष्याकडे पाहिले. दुभाष्या मुजरा करून म्हणाला,

'राजे, आपण बंदराबाहेर आला आहात, हे समजताच आपल्या भेटीसाठी हे इंग्रज व्यापारी आले आहेत.'

एक एक टोपीवाल्याची ओळख दुभाष्या करून देत होता. 'हे गिफर्ड. हे हेन्री रेव्हिंग्टन.'

राजांनी मानेने त्यांच्या अभिवादनाचा परत स्वीकार केला. राजे हसून म्हणाले,

'आम्ही न बोलावता आपणहून साहेबमजकूर आले. आम्हांला आनंद वाटला.'

रेव्हिंग्टन म्हणाले, 'आपली मैत्री आम्हांला व कंपनीला मोलाची वाटते.'

दुभाष्या भाषांतर करीत होता.

राजे म्हणाले, 'अस्सं! तसा आपला-आमचा परिचय आहेच!'

साहेब बिथरले.

राजे हसून म्हणाले,

'मिरजेचा तह झाला. आपला जप्त केलेला माल आणि पकडलेले लोक आम्ही बाइज्जत सोडले. कैद केलेले गिफर्ड हेच ना?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रेव्हिंग्टन हसला. तो म्हणाला, ‘हे उपकार आम्ही कसे विसरू?’

राजे संतापले. ‘काय कोडगी जात आहे ही! बेशरम! एवढी जाणीव होती, तर मिरजेच्या तहाची शाई कागदावर वाळायच्या आत तोफा घेऊन पन्हाळ्यावर का गेलात? एवढी शब्दाची चाड होती, तर रणांगणावर तुमचं निशाण फडकविताना लाज वाटली नाही?’

विजेचा लोळ उतरावा, तसा भास झाला. रेव्हिंग्टन रुमालाने तोंड पुशीत म्हणाला,

‘गैरसमज होतोय्, राजे!’

‘चूप! आम्ही सांगतो, तुम्ही पन्हाळ्याला का आलात, ते. सिद्दी जौहरचा बळकट वेढा तुम्हांला माहीत होता. शास्ताखान आमच्या मुलुखात उतरला आहे, हे तुम्हांला माहीत होतं. शिवाजी संपला, असं तुम्हांला वाटलं; आणि तुम्ही तोफा घेऊन उरलेलं कार्य करायला धावलात.’

राजांची संतप्त नजर हेन्री रेव्हिंग्टनकडे वळली. ‘रेव्हिंग्टन, तुम्हांला फार दूरचं दिसतं, होय ना? तुमच्याजवळ दूर अंतराची वस्तू अगदी जवळ दिसणारं साधन आहे, म्हणे! तेच घेऊन पन्हाळ्याला आला होता ना?’

मध्येच दुभाष्याकडे वळून राजे म्हणाले, ‘दुभाषे, आमचा प्रत्येक शब्द टोपीवाल्यांना जसाच्या तसा सांगा.’

पूर्ववत रेव्हिंग्टनवर नजर वळवीत राजे म्हणाले, ‘हं! साहेब, तुम्हांला फार दूरचं दिसतं, यावर आमचा विश्वास नाही. तसं असतं, तर असे वागला नसता; ही पाळी तुमच्यावर आली नसती.’

राजे क्षणभर खिन्न झाले. दुसऱ्याच क्षणी तिरस्काराने म्हणाले,

‘हाच तुमचा व्यापार-उदीम आहे? याचसाठी तुमचा मुलूख सोडून आलात? कसला व्यापार करता? मालाचा, की देशाचा? तुमचा हा व्यापार असेल, तर तो आम्हांला परवडायचा नाही. तो आम्हांला एक दिवस पश्चात्ताप करायला लावील.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रेव्हिंग्टनकडे पाहत राजे उठले. ते म्हणाले,

‘नाही. तुम्हांस क्षमा होणे नाही.’

‘राजे, आपण म्हणाल, ती खंडणी...’ रेव्हिंग्टन चाचरला.

‘खंडणी! काय, उपकार करता काय?’ राजे त्वेषाने आसनावरून उठले आणि ओरडले, ‘ह्या हरामखोरांना गिरफदार करा. आपला बावटा फडकावून आमच्यावर गोळे उडविल्याचं प्रायश्चित्त त्यांना आणि त्यांच्या कंपनीला मिळायला हवं.’

राजे शामियान्याबाहेर पडले. त्यांनी आपल्या फौजेसह राजापुरात प्रवेश केला. ज्या व्यापाऱ्यांनी खंडणी दिली होती, तेवढे वगळून बाकी सर्व सावकार आणि व्यापारी यांना संपूर्ण लुटण्याची आज्ञा राजांनी दिली. राजांचे लक्ष इंग्रजांच्या वखारीकडे गेले. तटबंदीने बंदिस्त असलेल्या वखारीकडे बोट दाखवून राजांनी आज्ञा दिली,

‘टोपीवाल्यांची ही वखार पुरी लुटा! कुदळी लावून, खणती करून लूट करा. जेवढे टोपीवाले सापडतील, तेवढे गिरफदार करा. कुणी शस्त्र उगारलं, तर त्याची गय न करता सरळ कत्तल करा.’

संतापलेल्या राजांचा आवाज एकदम नरम बनला. ते आपल्या शेजारच्या हवालदाराला म्हणाले,

‘बाळाजी आवजी नामक माणसाचा जारीनं तपास करा. त्याचा शोध करून त्याला आमच्यासमोर हजर करा.’

राजापूरची लूट सुरू झाल्याचे पाहून राजे परत शामियान्यात आले.

सायंकाळपर्यंत लूट चालली होती. लुटीचा माल राजांच्या समोर येऊन पडत होता. शामियान्याबाहेर लुटीच्या इतर सामानांचे ढीग लागले होते.

पितळ, शिसे, तांबे, लोखंड, कथील, काच, सुवर्ण, चंदन, कस्तूरी, केशर, नाना प्रकारची औषधे, गेंड्यांची शिंगे, राळ, शिलाजित, मेण, मसाल्याचे नाना जिन्नस लुटीमध्ये

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होते.

राजापुरातील वखारींच्या गाड्या, घोडे, बैल जप्त करून लुटलेला माल आणि अगणित संपत्ती बंदोबस्तात राजांनी गडावर पाठवून दिली. वखारीचे सर्व इंग्रज कैद केले गेले होते. रेव्हिंग्टनला व त्याच्या साथीदारांना सोनगडाला कैदेत ठेवण्याचा हुकूम दिला. इतर इंग्रजांना दुसऱ्या गडावर कैदेत टाकले. शिवाजीच्या क्रोधाचे पहिले प्रत्यंतर इंग्रजांना आले.

राजे वाट पाहत होते. हवालदार आत आला; आणि त्याने वर्दी दिली,

'हुकुमाप्रमाणे बाळाजी आवजीला आणले आहे.'

राजे अधीर होऊन म्हणाले, 'त्याला आमच्या समोर घेऊन या. आम्ही त्याचीच वाट पाहत होतो.'

बाळाजी आवजीला आणले गेले. राजे त्या तरुणाकडे पाहत होते. बिचारा घाबरून थरथर कापत होता. राजांच्या कानांवर स्त्रीचे रडणे पडले. त्यांनी विचारले,

'कोण रडतंय्?'

'बाळाजीची आई आहे, महाराज!'

'त्यांना आत पाठवा.'

एका वृद्धा धावतच आत आली. तिच्या बरोबर तिघे होते. त्या बाईने एकदम राजांचे पाय धरले. ती म्हणाली,

'राजे! आम्ही गरीब! आमच्याजवळ काही नाही, हो!'

राजांनी त्या वृद्धेला उठविले. ते म्हणाले,

'आई! काळजी करू नका. आम्ही तुमच्या बाळाजीला कामासाठी बोलावलं आहे;

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गुन्हा केला, म्हणून नव्हे.'

त्या बाईला धीर आला, ती म्हणाली,

'राजे, काय सांगू माझी कर्मदशा? माझे मालक सिद्दीकडे दिवाण होते. सिद्दीची मर्जी फिरली. त्यांनी माझ्या मालकांना, दिरांना मारलं; आणि मला, माझ्या तीन मुलांना गुलाम म्हणून विकायला पाठविलं. राजे, खलाश्यांना माझी दया आली. त्यांनी आम्हांला मस्कतला न नेता राजापूरला आणलं. इथं माझा भाऊ व्यापार करतो. त्याचं नाव विसाजी शंकर. त्यानं ओळख न दाखविता आम्हांला विकत घेतलं. त्याच्याच आश्रयानं आम्ही पोरं जगवितो.'

'ती पाळी आता येणार नाही.' राजांनी आश्वासन दिले; व मागे उभ्या असलेल्या प्रौढ गृहस्थाकडे वळून राजांनी विचारले, 'तुम्ही यांचे भाऊ विसाजी शंकर ना?'

'जी!'

'व्यापार करता?'

'होय, महाराज!'

राजे खेळकरपणे म्हणाले, 'मग तुमचीही लूट झाली असेल, नाही?'

'नाही, महाराज!'

'का झाली नाही?'

'मी आधीच खंडणी भरली, महाराज!'

'अस्सं!' राजे चिटणिसांना म्हणाले, 'चिटणीस, यांची खंडणी परत करा. ही आपली माणसं आहेत. यांना कौल देऊन, कसली तकलीफ होत नाही, हे पाहा.'

बाळाजीकडे वळून राजे म्हणाले, 'बाळाजी, इथले जुलूम, अत्याचार यांचं जे पत्र

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तुम्हीच आमच्याकडे रवाना केलंत, त्याची खात्री तुमच्या मातोश्रींच्या कथा ऐकून झाली. ते पत्र तुम्हीच लिहिलंत ना?'

'जी!'

'तुमचं हस्ताक्षर आम्हांला आवडलं. आम्ही नुसत्या धनासाठीच मोहिमा करतो, असं नाही. आमच्या राज्याकरिता तुमच्यासारख्या गुणी माणसांचीही जरूर भासते. तुम्ही आमच्या पदरी यावं, अशी आमची इच्छा आहे.'

'ते माझं भाग्य समजेन, महाराज!'

बाळाजींनी पाय शिवले. राजे म्हणाले,

'उठा! तुम्ही, तुमचे बंधू आणि तुमच्या आई, सर्व मिळून राजगडावर चला... चिटणीस, यांना खर्चाची रक्कम द्या. राजगडावर तुमचं काम सांगू.'

राजांना बाळाजी आवजी दप्तरी आल्याचे समाधान वाटत होते.

□

४

राजापूरची व्यवस्था लावून राजे तळ उठविण्याचा विचार करीत होते. हातासरशी पुढचा मुलूख काबीज करण्याचा त्यांचा इरादा होता. तोच संगमेश्वरहून विठोजी आल्याची वर्दी आली. विठोजी सांगत होता, त्यावर राजांचा विश्वास बसत नव्हता. विठोजी सांगत होता :

'संगमेश्वरला आपल्या हुकुमाप्रमाणे तानाजीची व पिलाजीरावांची फौज तळ देऊन होती. आणि फौज बेसावध असताना रात्री अचानक पालवणचे राजे जसवंतराव यांनी व शृंगारपूरच्या सुर्व्यांनी छावणीवर हल्ला केला. तीन तास लढाई चालली. तानाजीनं शर्थीनं लढत दिली. पहाट होत असता सुर्वे पळून गेले.'

याच सुर्व्यांना राजांनी अभय देऊन, संगमेश्वरच्या छावणीवर लक्ष ठेवायला सांगितले

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होते. सुर्व्यांनी फार चांगले लक्ष ठेवले. ती बातमी समजताच राजांनी राजापूरचा तळ उठविला आणि ते माघारी वळले.

राजांनी संगमेश्वर गाठले. राजे तळावर येत आहेत, हे कळताच तानाजी पुढे आले. सर्वांच्या चेहऱ्यांवर आनंद दिसत होता. राजे साऱ्यांचे कौतुक करीत होते. सुर्व्यांच्या हल्ल्याला ज्या धैर्याने लढत दिली, तिचा अभिमान राजांनाही होता. राजांनी विचारले,

'तानाजी, तुम्ही भेटलात; पण आमचे दुसरे सेनापती पिलाजीराव कुठं आहेत?'

तानाजी हसला. साऱ्यांच्याच चेहऱ्यांवर ते हसू होते. तानाजी म्हणाला,

'राजे, ते तुमच्या म्होरं यायला लाजत्यात.'

'का?'

'त्यांस्नी मी दगडाला बांधलं, म्हनून!'

'दगडाला बांधलं?' राजांनी आश्चर्याने विचारले, 'पण का?'

'राजे, रातीचं गनीम अचानक उतरलं! सारी छावणी बेसावध. काय व्हतंय्, कोन आलं, कळीपातूर जरा गोंधळ झाला. आन् काय! पिलाजी नीलकंठाला सांगाया म्हनून गेलो, तं गडी पसार!'

'पसार! म्हणजे?'

'बामन लागला की पळाया! मग काय करनार? तस्सा गेलो, आनी पळणाऱ्या पिलाजीला गाठलं. म्या म्हनालो, 'अरं! इथं सारी आपली मानसं रगत सांडत्यात, आन् पळतोस कुठं?' पर ऐकंच ना! मग घेतलं वालं, आनी बांधला दगडाला. म्या म्हनालो, 'बग, कशी लडाई असतीया, ती!' '

सारे हसले. पण राजे गंभीर होते. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पिलाजीरावांना बोलवा.’

थोड्या वेळाने शरमिंदा झालेला पिलाजी समोरून येताना दिसला. पिलाजी म्हणजे पुरंधरच्या नीळकंठरावांचे वंशज. राजांनी पुरंधर घेतल्यानंतर ते घराणे राजांच्या पदरी होते. जवळ येऊन पिलाजीरावांनी मुजरा केला. राजे त्यांना जवळ घेऊन पाठीवर थोपटीत म्हणाले,

‘पिलाजीराव, शरमायला नको! पहिल्या लढाईत हे असंच होतं. आम्ही अफझलवध केला. यश घेऊन गडावर आलो, तरी आमच्या अंगचा कापरा गेला नव्हता. तानाजी, पुढं प्रसंग येऊ दे. बघा, आमचे पिलाजी केवढी तडफ दाखवितात, ते! ताज्या दमाची मुलं! छाती भरवून घ्यायला लागते.’

राजे शृंगारपूरच्या सूर्यराव सुर्व्यांवर फार संतापले होते. ते तानाजीला म्हणाले,

‘तानाजी, सुर्वे कुठं आहेत? काही खबर?’

‘राजे, तो शृंगारपूरलाच गेला. फौज घेऊन तिथंच हाय.’

‘बेत काय?’ राजांनी विचारले.

‘बेत?’ तानाजी त्वेषाने म्हणाला, ‘राजे, हुकूम नव्हता, म्हणून गप्प बसलो. न्हाई तर एक डाव मला शृंगारपूर बघायचं होतं.’

‘ते नंतरही बघायला मिळेल. तानाजी, हे सुर्वे, सावंत आपली माणसं. चुकली, तरी सुधारतात का, ते पाहायला हवं. त्यांना संधी मिळायला हवी.’

‘मग ती दिलीसाच की! पन्हाळ्याला हे दोघंबी तलवार घेऊन उठले. ते मनात ठेवलं न्हाईसा. उलट, त्यांस्नीच छावनीवर नजर ठेवायला सांगितलासा. चांगलं पांग फेडलं त्यानं.’

‘सबुरीनं घे, तानाजी! जे जसवंतरावाचं झालं, ते सुर्व्यांचं करायला अवघड जायचं नाही. पण अजून संधी देऊ.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी आपला वकील सुर्व्यांकडे पाठविला. राजांचा निरोप होता :

> 'सूर्यराव, कारण नसता तुम्ही विश्वासघाताने आमच्या छावणीवर हल्ला केलात, याचे आम्हांला दु:ख आहे. हे वर्तन अक्षम्य आहे. असे असूनही आम्ही ते मनावर घेत नाही. आमच्याशी बेइमानी करणाऱ्या जसवंतरावाला तुम्ही आश्रय दिला आहे. त्या जसवंतरावाचा मुलूख काबीज करण्यासाठी आम्ही सिद्ध झालो आहो. आमचा निरोप पोहोचताच तुम्ही आम्हांस पालीस येऊन मिळावे. आमच्या मनात काही राहणार नाही.'

राजांनी उदार मनाने हा निरोप पाठविला. सूर्यरावाने वकिलाला 'तुम्ही पुढं जा, आम्ही मागोमाग येतो,' म्हणून निरोप पाठविला.

राजांनी आपले सर्व सैन्य पालीकडे वळविले. पालीचा जसवंतराव तर केव्हाच सूर्यराव सुर्व्यांच्या आश्रयाला गेला होता. पाली काबीज झाली. तिथला चित्रदुर्ग ताब्यात घेऊन राजांनी त्याला 'मंडणगड' हे नाव दिले. नव्या नेमलेल्या गडकऱ्याला त्याची तटबंदी करून घ्यायला सांगून राजे पुढे निघाले.

पालीचा मुलूख ताब्यात घेतला, तरी सूर्यराव आला नाही. राजांचा सारा संयम सुटला. ते म्हणाले,

'सुर्व्यांची ही घमेंड! तानाजी म्हणाला, तेच खरं. यांना माणसासारखं वागवून चालत नाही. त्यांना गुरांसारखंच वागविलं पाहिजे! तीच त्यांची लायकी आहे.'

'आन् जसवंतरावाचं काय?' तानाजीने विचारले.

राजे हसले. म्हणाले, 'जसवंतराव! सुर्व्यांचाच ठिकाणा राहणार नाही, तर त्यांच्या आश्रयाला गेलेले जसवंतराव काय सुटतात? तानाजी, पुराणात एक कथा आहे- इन्द्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा! जनमेजय राजानं सर्पयज्ञ केला. सारे होमात आले. पण तक्षक- तो इंद्रामागे दडला. जनमेजयाला जेव्हा ते कळलं, तेव्हा त्यानं आज्ञा केली- 'इंद्रासह तक्षकाला बोलवा.' पालवणकर आणि त्यांचे इंद्र सुर्वे- दोघांचीही गत आता तीच होणार आहे.'

उन्हाळ्याचे दिवस. कोकण भाग. पुष्कळ उकाडा होता. राजे पालखीतून जात होते. फौज प्रभावळीकडे चाल करीत होती. राजे प्रभावळीजवळ पोहोचले, तरी कुठे प्रतिकार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झाला नाही. राजे पालीकडे गेले, हे कळताच सुर्वे बेसावध झाले. त्यांनी गोळा केलेली फौज सोडून दिली. आणि त्यानंतर 'शिवाजी येतो,' ही बातमी सुर्व्यांना मिळाली. जसवंतरावाचे आणि सूर्यरावांचे बळ सरले. बातमी येताच आपली चीजवस्तू, घरची माणसे घेऊन दोघे शृंगारपूर सोडून जीव घेऊन पळून गेले.

राजांना ही बातमी समजली. ते उद्गारले,

'भ्याड! नामर्द!'

राजांनी शृंगारपुरात प्रवेश केला. त्या ओसाड गावातून राजे सुर्व्यांच्या वाड्यात गेले. वाड्याचा फौजेने कबजा घेतला; आणि राजे वाड्यात शिरले. समोर सुर्व्यांचे उच्चासन-मसनद होती; पण तिचा मालक केव्हाच पळून गेला होता. राजांनी त्वेषाने ती गादी लाथेने उडविली. राजे म्हणाले,

'आता सुर्व्यांना परत या गादीची जरुरी पडणार नाही.'

राजांनी शृंगारपूर आणि प्रभावळ ही सुर्व्यांची दोन्ही ठाणी काबीज केली. प्रभावळीचा सुभा त्र्यंबक भास्करांना सांगून राजे राजगडाच्या वाटेला लागले.

□

५

कोकणची मोहीम आटोपून राजे राजगडाकडे येत होते. राजांनी येताना महाडात दोन दिवस मुक्काम केला; देवदर्शन घेतले; आणि विश्रांती घेऊन ते राजगडावर आले.

उन्हाळा संपला. मृग आला. गडावरील झडी बांधून घेतल्या गेल्या. पावसाळ्याचे सर्व सामान, लाकूडफाटा गडावर भरला जात होता. पूर्वेकडचे वारे थांबले होते. पश्चिमेकडची झड सुरू झाली. काळ्या ढगांची छपरी पूर्वेकडे सरकू लागली... आणि एके रात्री पाऊस पडू लागला. पागळ्या झडू लागल्या. पावसाने जम बसविला. उसंत न देता पावसाच्या सरी कोसळू लागल्या. गडाचे वातावरण कुंदावले. राजे या उसंतीत झालेल्या मोहिमांचे तपशील, खर्च, जामदारखान्याचे हिशेब समजावून घेत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एके दिवशी मोरोपंतांनी येऊन सांगितले,

'राजे, आपल्या आज्ञेप्रमाणे श्रीभवानीची मूर्ती तयार झाली आहे. आपली आज्ञा होईल, तर गडावर आणण्याची व्यवस्था होईल.'

राजे आनंदले. ते म्हणाले,

'ज्याचा ध्यास लागतो, अशी कोणतीही गोष्ट तुम्हांस सांगावी... मग ती तटाची तटबंदी असो, आमच्या निवासाचा वाडा असो, राजकारणाचा गुंता असो, किंवा आमच्या श्रद्धेची बाब असो. तुम्हांला सांगितलं, की आमची इच्छा पुरी झालीच, असं आम्ही समजतो.'

मोरोपंत म्हणाले, 'असं आपल्याला वाटतं. यापरता आनंद नाही.'

राजांनी सांगितले, 'पंत, चांगला दिवस पाहा. श्रीभवानीची मूर्ती वाजत-गाजत गडावर येऊ दे. आमच्या बरोबरच साऱ्यांना दर्शन घडेल.'

'जशी आज्ञा!'

'आणि हे पाहा! तो बाळाजी आवजी आला आहे ना? कसा आहे?'

'तल्लख बुद्धी आहे. हस्ताक्षर नामी आहे. थोड्याच दिवसांत कारभार पाहून तयार होईल.'

'आमची तीच अपेक्षा आहे. त्याला आणि त्याच्या घरादाराला काही उणे पडू देऊ नका.'

'जशी आज्ञा!'

सकाळपासून वाड्यात गडबड सुरू होती. मुदपाकखान्यात पाच-पंचवीस बाया पुरणाच्या पोळ्या लाटीत बसल्या होत्या. सगळ्या वाड्याची स्नाने सूर्योदयाबरोबरच झाली होती. वाड्याच्या सदरेत साफसफाई चालली होती. बाहेर उघडीप होती. वाड्यात सारखी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वर्दळ होत होती.

राजे संभाजीराजांच्यासह बाहेर पडले. मोरोपंत वगैरे माणसे गडाखाली गेली होती. राजे आपल्या माणसांसह गड उतरत होते. सूर्योदयानंतर थोड्या वेळाने राजे गडाखाली पोहोचले. मोरोपंतांनी गडाखाली मोठा थाट मांडला होता. भव्य सुशोभित पालखीभोवती अब्दागीर, चवऱ्या घेऊन लोक उभे होते. एका पांढऱ्या शुभ्र घोड्याला सजविले होते. पायांत चांदीचे तोडे, गळ्यात रौप्यकोयरीच्या माळा घातलेले ते उमदे जनावर मोतद्दाराच्या हातात उभ्या जागी पाय नाचवीत होते. भजनी दिंड्या, कर्णे, शिंगे, वाजंत्री यांचा थाट पालखीबरोबर होता.

राजे पालखीजवळ गेले पालखीत देवी भवानीची मूर्ती ठेविली होती- काळ्याभोर दगडाची, अष्टभुजा, शांत नजरेची. राजांची नजर मूर्तीवर खिळून राहिली. राजे उद्गारले,

‘सुरेख!’

पालखी उचलली गेली. गुलाल उधळला गेला.

‘उदे, ग, अंबे, उदे ऽ ऽ’

सारे वातावरण भरून गेले. टाळ-मृदंग खणखणू लागले. भजनाचे सूर उठू लागले.

सर्वांपुढे घोडा होता. त्याच्या मागे वाजंत्री वाजत होती. पाठीमागे भजनी दिंड्या उभ्या होत्या. पालखीला सुरुवातीला पाच पावले राजांनी खांदा दिला. पालखीमागून सारे सरदार, मावळे राजांच्या बरोबर अनवाणी चालत होते. पालखी संजीवनी माचीवरील देवळासमोर आली. राजांनी देवीला नारळ ठेविला. तेथून पालखी चालू लागली, आणि जोरदार पावसाची सर आली. राजांच्यावर अब्दागीर धरायला हशम धावला. राजे म्हणाले,

‘अरे, नको! मोहिमांत भिजतो; एकदा देवीच्या आशीर्वादात भिजू दे. निसर्ग सुद्धा देवीभक्तच आहे. अशा प्रसंगी तो चार फुलं उधळल्याखेरीज कसा राहील?’

पालखी गडावर आली. बालेकिल्ल्यात ती आली, आणि पालखीचा नूर बदलला. पालखीसमोर वीर उतरू लागले. करड्यांच्या तालावर दांडपट्टा, विटा, तलवार फिरू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लागली. पालखीची गती पावलापावलाला मंद होऊ लागली. पावसाच्या सरीत भिजलेल्या कपड्यांवर गुलाल फाकू लागला.

पालखी प्रथम चौकात आली. मूर्ती सदरेवर आणली गेली. जिजाबाईंनी व राणीपरिवाराने पालखीची खणानारळांनी ओटी भरली. रात्री देवीच्या गजरात देवीची गाणी वाड्यात घुमली. संबळ-तुणतुण्यांच्या आवाजात आणि पलोत्यांच्या प्रकाशात पहाट झाली.

राजांनी मोरोपंतांना देवीची स्थापना करण्याची आज्ञा दिली. मोरोपंत म्हणाले,

‘महाराज, पावसाचे दिवस. आपल्याला उसंत नाही. उसंत मिळाली, की स्थापना करू. तोवर पावसाळाही संपेल.’

‘मोरोपंत, आम्ही संकटात भिजत असता, देवीनं विलंब न करता, आमचं रक्षण केलं; आणि आम्ही देवीच्या स्थापनेला खोळंबून ठेवायचं? जशी आजवरची संकटं तिच्या आशीर्वादानं टळली, तशीच पुढचीही टळतील. या कामात दिरंगाई नको. देवीस्थापनेचा सोहळा पाहायची आमची फार इच्छा आहे. त्यासाठी मन आतुर आहे.’

प्रतापगडावर मंदिर पुरे होत आले होते. पालखी सन्मानाने प्रतापगडाकडे रवाना झाली. बरोबर मोरोपंत गेले. देवीस्थापनेचा दिवस आला. भर पावसातही राजगडावरून प्रतापगडाकडे मेणे निघाले. राजे सहकुटुंब, सहपरिवार प्रतापगडावर गेले. मोठा उत्सव करून राजांनी देवीची स्थापना केली. देवीचा प्रसाद आणि भोसल्यांचे भूषण म्हणून राजांनी कवड्यांची माळ धारण केली. राजे स्वत: देवीचे भोपे बनले.

देवीस्थापना करून राजे राजगडावर परत आले.

□

६

सकाळच्या वेळी सोयराबाई महालात आल्याचे पाहून राजांना आश्चर्य वाटले.

‘राणीसाहेब, आजचा दिवस भाग्याचा दिसतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘का बरं?’ सोयराबाईंनी हसत विचारले.

‘आज सकाळीच आपलं दर्शन घडलं.’

‘का? सकाळी येऊ नये?’

‘असं कुठं आम्ही म्हटलं? नेहमी आपली स्नानपूजा व्हायला पुष्कळ वेळ लागतो. त्यामुळं आम्ही विचारलं.’

सोयराबाई हसल्या. त्या म्हणाल्या,

‘आज भल्या पहाटेच जाग आली. नंतर झोप आलीच नाही.’

सोयराबाईंच्यावर नजर खिळवीत राजांनी विचारले,

‘स्वप्न तर पडलं नाही ना?’

‘हो ना! तेच सांगणार होते. आज स्वप्नामध्ये थोरले मामासाहेब महाराज आले होते.’

‘कोण? महाराजसाहेब?’

‘हो!’

‘फार चांगलं स्वप्न आहे. आम्हांलाही अलीकडे त्यांची फार आठवण होते. शंभूबाळ कुठं आहेत?’

सोयराबाईंचे हसणे विरले.

‘असतील मासाहेबांच्याकडे, नाही तर धाकट्या महाली. त्यांचा ओढा आमच्याकडे कमीच.’

‘मुलाची जात. माया लावावी, तशी लागते.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सोयराबाईंनी गडबडीने विषय बदलला.

‘मी विसरलेच सांगायला. मासाहेब म्हणाल्या- तुमची तयारी झाली का, पाहून ये. बहुतेक मासाहेब इकडे येणार असतील.’

‘मासाहेबांनी कशाला यायला हवं? चला, आपणच तिकडे जाऊ.’

राजे मासाहेबांच्या महाली आले, तेव्हा मासाहेब सचिंत बसल्या होत्या. राजे जाताच त्या म्हणाल्या,

‘राजे, माणकोजींची तबियत बिघडली आहे. जास्त झालंय्, म्हणून कळतं.’

‘केव्हा?’

‘मघाच मोरोपंत सांगत होते. त्यासाठी तुमची चौकशी केली.’

‘माणकोजींना परवाच आम्ही भेटून आलो. फार थकलेत.’

‘वय झाले. त्यात ही पावसाळी हवा.’

‘आम्ही गडाखाली जाऊन येतो.’

राजे गडाखालच्या शिवापूरला गेले. बरोबर मोरोपंतही होते. माणकोजींची तब्येत जास्त खालावली होती. राजांचा हात धरून माणकोजी कष्टाने म्हणाले,

‘राजे, खानाचा जुलूम लई वाडलाय्. त्याला आवराय् पायजे.’

एवढी प्रकृती ढासळलेली असूनही राज्याची काळजी घेणारे माणकोजी पाहून राजे गहिवरले. ते म्हणाले,

‘माणकोजी, तुम्ही बरे व्हा. आम्ही सर्व करू.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे! आता बरी व्हनारी आमी माणसं न्हवं. आता वय झालं.’

‘माणकोजी, असं बोलू नका. तुमच्यासारख्या वडीलधाऱ्या माणसांचे आशीर्वाद नसले, तर हाती घेतलेलं काम तडीस जाणार कसं?’

‘महाराज, याची काळजी आमाला न्हाई. तुमी सारं करशिला. आमचा भरोसा कसला? तुमी भेटला; बरं झालं. मासाहेबांना मुजरा सांगा.’

राजांनी माणकोजींचा निरोप घेतला. वैद्यांना माणकोजींच्याकडे लक्ष ठेवायला सांगून राजे खिन्न मनाने गडावर येत होते.

कान्होजी गेले. माणकोजीही टिकतील, असे वाटत नव्हते. दादोजी, कान्होजी, माणकोजी हे तीन आधार तुटले, तर कसं व्हायचं?

त्याच विचारात राजे पद्मावती माचीवर आले. देवीदर्शन घेऊन ते बाहेर आले, तेव्हा देवळाच्या समोरच्या अंगणात मोरोपंत उभे होते. त्यांच्या शेजारी कानात भिकबाळी घातलेला, रुमाल बांधलेला, गोऱ्या रंगाचा, तिशीच्या वयाचा एक गृहस्थ उभा होता. त्याने राजांना लवून नमस्कार केला. राजांनी मोरोपंतांना विचारले,

‘मोरोपंत, हे कोण?’

मोरोपंतांनी अदबीने सांगितले, ‘हे मोसा खोऱ्याचे कुलकर्णी. आपली भेट व्हावी, म्हणून आले आहेत.’

राजांनी कुलकर्ण्यांना विचारले, ‘कशासाठी आमची भेट व्हावी?’

तो कुलकर्णी हात जोडून म्हणाला, ‘महाराज, घरची परिस्थिती अत्यंत कठीण आहे. आम्ही तीन भाऊ. मी धाकटा. पण दारिद्र्यामुळं एकाचंही लग्न होऊ शकलं नाही. आम्ही ब्राह्मण. भिक्षा मागणं उचित नाही. फडामध्ये जागा मिळेल, तर योगक्षेम चालेल. एका गरिबाला वाचविल्याचं पुण्य पदरी पडेल.’

राजे त्या तरुणावरची दृष्टी न हलविता ते बोलणे ऐकत होते. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तुम्ही कुलकर्णी ना? मग तुमच्या वतनाचं काय झालं?’

त्या प्रश्नाबरोबर त्या तरुणाच्या चेहऱ्यावर भीती तरळली. भयभीत होऊन तो म्हणाला,

‘महाराज, माझी कुणाविरुद्ध तक्रार नाही. जे नशिबी होतं, ते होऊन गेलं. पायांशी चाकरी मिळावी.’

राजांनी परत विचारले, ‘तुमच्या वतनाचं काय झालं? न भिता आम्हांला सर्व सांगा.’

कुलकर्ण्यांनी आवंढा गिळला. ‘महाराज, आम्ही कुलकर्णी, हे खरं! घरात कुलकर्णीपण असून, जोशीपण असूनही वडिलार्जित कर्जामुळं निर्वाह होणं कठीण झालं. कर्ज काढावं लागलं. त्या कर्जाचं व्याज चार-पाच वर्षांत एवढं वाढलं, की कर्जापायी जोशीपण आणि कुलकर्णीपण सावकारांना लिहून द्यावं लागलं. आज सारं घर रस्त्यावर आलं.’

राजे हसले. त्या तरुणावरची नजर न काढता त्यांनी विचारले,

‘सावकारांची हुशारी आणि वतनदारांचा अजागळपणा यांचा सुरेख संगम तुमच्या कहाणीत दिसतो. एवढा धूर्त सावकार कोण भेटला तुम्हांला?’

ज्या प्रश्नाला कुलकर्णी भीत होता, ते संकट टाळल्याने टळत नव्हते. कुलकर्णी म्हणाले,

‘महाराज, माझी कुणाविरुद्ध तक्रार नाही.’

राजे किंचित कठोरपणे बोलले, ‘आम्हांला सावकाराचं नाव हवं आहे.’

हताशपणे कुलकर्ण्यांने सांगितले,

‘आपले पेशवे, शामराज नीळकंठ. तेच आमच्या वतनाचे मालक झाले आहेत.’

ते ऐकून राजे चकित झाले. त्यांनी एक वेळ मोरोपंतांच्याकडे पाहिले. मोरोपंतांची मान

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खाली झुकली होती. राजांनी मोरोपंतांना सांगितले,

‘पंत, यांना फडामध्ये गुंतवून घ्या; आणि आम्हांला नंतर येऊन भेटा.’

सायंकाळी राजांच्या खास महालात मोरोपंत आले. राजांनी त्यांना सांगितले,

‘मोरोपंत, अंत:स्थपणे शामराज नीळकंठ यांची चौकशी करा. ह्या वतनांच्या काय गफलती आहेत, हे आम्हांला सांगा. त्याची वाच्यता कुठंही होऊ देऊ नका.’

त्यानंतरचे चार-पाच दिवस राजे पुरे बेचैन होते. जिजाबाईंच्या ध्यानी ते यायला वेळ लागला नाही. त्यांनी राजांना कारण विचारले. महालात दुसरे कोणी नव्हते. राजांनी सांगितले,

‘मासाहेब, तसं काही संकट नाही. आपण चिंता करू नये.’

‘राजे, आम्हांला फसवता?’ जिजाबाईंनी विचारले.

राजांनी पाहिले. जिजाबाईंच्या चेहऱ्यावर हसू होते. ते हास्य पाहून राजे गडबडीने म्हणाले,

‘मासाहेब, गैरसमज होतो. चिंता आहे खरी; पण ती परचक्राची नाही, एवढंच मला सांगायचं होतं.’

‘मग दुसरी कसली चिंता?’

‘मासाहेब, वतनदारीबद्दल आम्हांला केवढा तिटकारा आहे, हे आपण जाणता. ही वतनं नाहीशी करावीत, प्रजा सुखी व्हावी, म्हणून आम्ही धडपडतो; आणि खुद्द आमचीच माणसं सावकारी करून वतनं मिळवू लागली, तर काय करायचं?’

‘राजे, आपल्याला कुणी तरी खोटं सांगितलं असेल.’

‘आम्हांला सुद्धा तीच आशा आहे. असं ठरलं, तर त्यात आम्ही आनंद मानू. पण खरं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ठरलं, तर?'

'अशी माणसं फडात बाळगून चालणार नाही.' जिजाबाई शांतपणे म्हणाल्या.

राजांनी एकदम जिजाबाईंच्याकडे पाहिले. राजांच्या चेहऱ्यावर स्मित प्रकटले.

'मासाहेब, तुमचे बोल आम्हांला सदैव धीर देतात.'

त्यानंतर दोन दिवसांनी मोरोपंतांनी राजांना सर्व खबर दिली. राजांनी सदर भरविण्याचा हुकूम दिला. सायंकाळी राजे सदरेवर आले. सदरेत पेशवे, अमात्य, डबीर यांखेरीज नेताजी, येसाजी कंक ही खासे मंडळी उपस्थित होती. पेशवे शामराज नीळकंठ अस्वस्थ होते.

राजांची बेचैनी त्यांच्या ध्यानी आली होती. शामराज नीळकंठ जंजिऱ्याच्या मोहिमेवरून परत आले होते. जंजिऱ्याच्या मोहिमेत आलेले अपयश त्यांच्या मनाला डाचत होते. सिद्दी खैर्यतच्या डावाला फसून त्यांनी नामुश्की पदरी घेतली होती. राजांनी एवढ्या तातडीने सदर का भरवावी, हा प्रश्न साऱ्यांच्या चेहऱ्यांवर उमटला होता.

राजे सदरेवर आले. राजांची चर्या गंभीर होती. राजांच्या पाठोपाठ जिजाबाई सदरेवर आल्या. राजांनी त्यांना उत्थापन दिले. आपल्या हातांनी त्यांना बैठकीवर बसवून राजे शेजारी बसले.

जिजाबाईंनी राजांना विचारले,

'राजे, आज सदर भरवलीत? माणकोजींची तब्येत जरा...'

'त्यांची काळजी करण्यासारखं काही राहिलं नाही. ते तृप्त आहेत. असलीच, तर राज्याची काळजी त्यांना आहे. अशी निष्ठावंत माणसं मिळणं कठीण!'

'मग आजची सदर...'

'खास आमचे पेशवे शामराजपंत यांच्याकरिता भरविली आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

साऱ्यांच्या नजरा शामराजपंतांच्याकडे वळल्या. आपले उपरणे सावरीत शामराजपंतांनी विचारले,

'महाराज, माझ्यासाठी...'

'हो! तुम्ही दौलतीची अनुभवी, मुरब्बी माणसं. जेव्हा आमच्या मनात शंका येते, तेव्हा तुमच्याखेरीज कुणाला सल्ला विचारणार?'

'जी!' शामराज म्हणाले.

'आम्हांला वतनदारीचा तिटकारा आहे, हे तुम्ही जाणता. त्यासाठी मिरासदारांचा रोष पत्करून आम्ही रयतेला सुखी केलं. जमीनदारांना नगद गल्ला व नक्त गाव बांधून दिले. देशमुख, देशकुलकर्णी, पाटील यांस हक्क बांधून दिले, हेही तुम्ही जाणता.'

'जी!'

'हे कशासाठी केलं?... हे रयतेला नागवतात. पदरी फौज बाळगून, वाडेहुडे बांधून राहतात. सांगावयास गेलं, तर शत्रूला मिळतात. प्रजा आणि राजा दोन्ही त्रस्त होतात. याचसाठी आम्ही नामांकित वाडे आमच्या हाती घेऊन इतर मिरासदार वाडे पाडले ना?'

'जी!'

'जी काय म्हणता?' राजांचा आवाज करडा बनला. शामराजपंतांवर नजर रोखीत ते बोलू लागले, 'एका बाजूला ही वतनदारी नष्ट करण्याचे आम्ही प्रयत्न करीत असता, तुम्ही पेशवे असून, वतनाची हाव धरू लागलात?'

शामराजपंतांचे डोळे खाडकन उघडले. राजांचे बोल त्यांच्या कानी पडत होते :

'कशासाठी हे केलंत?'

'महाराज, गैरसमज होत आहे. कुणी तरी खोटी अदावत आमच्यावर घेतली आहे.' शामराजपंत धीर करून म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शामराजपंत, एक खोटेपणा केलात; आता दुसरा करू नका. मोसे खोऱ्यातील कुलकर्णी वतनावर तुम्ही नजर ठेवलीत. पेशवाईच्या सत्तेवर कुलकर्णीपण बळकावलंत. हे खोटं?’

शामराजपंतांनी आवंढा गिळला. ते म्हणाले,

‘महाराज, हा अन्याय...’

‘अन्याय? तुमच्यावर? शामराजपंत, तुमच्या कृत्यानं आमची मान शरमेनं खाली झुकली आहे. पेशव्यांच्या आरोपाची चौकशी करण्यासाठी कुलकर्ण्यांना सदरेवर साक्षीसाठी बोलवावं, ही तुमची इच्छा असेल, तर आम्ही तेही करू.’ राजांची नजर मोरोपंतांच्याकडे वळली. ‘मोरोपंत, त्या कुलकर्ण्यांना सदरेवर बोलवा.’

मोरोपंत सदरेबाहेर जायला निघालेले पाहताच शामराजपंत घाबरून गडबडीने म्हणाले,

‘महाराज, क्षमा असावी!’

राजांनी मोरोपंतांना थांबण्याची इशारत दिली. त्या प्रकाराने जिजाबाई मात्र गोंधळून गेल्या होत्या. त्यांच्या ध्यानी काही येत नव्हते. त्यांनी विचारले,

‘शिवबा, हा काय प्रकार आहे?’

राजे उदासपणे हसले. म्हणाले,

‘मासाहेब, सांगताना सुद्धा शरम वाटते. हे आमचे पेशवे; पण राज्याच्या प्रधानपदावर राहूनही यांचं मन तृप्त नाही. ह्यांना वतनाची हौस वाटली. बळजबरीनं यांनी कुलकर्णी वतनं सावकारीच्या बळावर बळकाविली. आज आमचे पेशवे वतनदार बनले आहेत. ज्या घरात कुलकर्णीपण, जोशीपण चालत होतं, ते घर अन्नाला मोताद होऊन आमच्या आश्रयाला येतं. ब्राह्मण असूनही भिक्षा मागायची पाळी त्यांच्यावर आली आणि हे सारं आमच्या पेशव्यांच्या कृपेमुळं झालं.’

‘एक वेळ गुन्ह्याची माफी असावी. आपली आज्ञा म्हणून मी वतनं परत करतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हा निर्णय ठीक. तसं तुम्हांला करावंच लागेल. शामराजपंत, जंजिऱ्याच्या लढाईत पराभव घेऊन आलात. आम्ही दोष दिला नाही. सिद्दी खैर्यत याच्या दगलबाजीला फसलात, आणि कैदेत सापडलात; जंजिऱ्यावर कधीही परत येणार नाही, असं सांगून आपली सुटका करून घेतलीत. पण तोही दोष आम्ही मानला नाही. राजकारणात असे प्रसंग येतात; पण हा गुन्हा अक्षम्य. त्याला क्षमा करता येईल, असं वाटत नाही.’

‘महाराज!’ शामराजपंत उद्गारले.

राजांची नजर गर्भगळीत झालेल्या शामराजपंतांवर खिळली होती. ते शांतपणे म्हणाले,

‘शामराजपंत, तुम्ही आमचे पेशवे. आम्ही म्हणजे काही इंद्र नव्हे. तो हजार डोळ्यांनी पाहणार. आम्ही तुमच्यासारख्या अधिकाऱ्यांच्या डोळ्यांनी पाहणार, प्रजा राखणार. पेशवेपदावर असूनही तुमची नजर एवढ्या खाली पोहोचत असेल, तर तुम्ही या जागेस योग्य नव्हे. तुमच्या हाती प्रजा सुरक्षित राहील, असं आम्हांस वाटत नाही. तेव्हा आजपासून तुमचं पेशवेपद आम्ही काढून घेत आहोत.’

राजांच्या त्या निर्णयाने सारे चकित झाले. शामराजपंतांनी आपली नजर उंचावली. उद्वेगाने ते म्हणाले,

‘महाराज, मग फडाच्याही जबाबदारीतून मोकळं करावं.’

शामराजपंतांच्या बोलांनी राजांच्या मनावर काही परिणाम झाला नाही.

‘शामराजपंत, या दबावाचा आमच्या मनावर काही परिणाम होणार नाही. फडाची जबाबदारी घेणं शक्य नसेल, तर तसं तुम्ही करू शकता. गुन्हा तुमचा. आगळीक तुम्ही केलीत. आणि आमच्यावर संतापता? पंत, परत विचार करा. आमच्या राज्यात गमावलेली जागा आणि हरवलेली संधी पुन्हा मिळत नसते.’

शामराजपंत भानावर आले. ‘चूक झाली, महाराज! माझे शब्द मी परत घेतो. क्षमा असावी.’

‘ठीक आहे. आजपासून शामराजपंतांच्या जागी नरहरी आनंदराव यांची पेशवे म्हणून

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आम्ही नेमणूक करीत आहो; आणि त्यांची जागा अनाजी दत्तो यांना आम्ही देत आहो. शामराजपंत, तुम्ही आमचे प्रथमपासूनचे पेशवे. त्या पेशवेपदाला डाग लागू नये, ही आमची इच्छा आहे. आज नरहरी पेशवे बनत असले, तरी राज्याची बेदिली चारचौघांत जाऊ नये, म्हणून तुम्ही असेपावेतो शिक्का तुमच्याच नावाचा चालेल.'

राजांनी नरहरी आनंदराव आणि अनाजी दत्तो यांना पेशवाईची आणि वाकनिशीची वस्त्रे जिजाबाईंच्या हस्ते दिली. दोघांनाही पालखीचा मान देण्यात आला.

□

७

माणकोजी दहातोंडे वारल्याचे वृत्त ऐकून राजांना दुःख झाले. लहानपणापासून आपल्याला पाहत आलेला हा जिव्हाळ्याचा माणूस. स्वराज्याचा सेनापती. राजांनी मोठ्या मानाने त्यांची उत्तरक्रिया करायला लावली.

पावसाळ्यात जरी शास्ताखान स्वस्थ होता, तरी राजे स्वस्थ बसले नाहीत. कोकणात ठेवलेला नेताजी मोगलांच्यावर हल्ले करीतच होता. त्याच वेळी राजांचे दोन हजार मावळे जुन्नर परगण्यात खंडणी वसूल करीत होते. चारी बाजूंनी किरकोळ चावे घेणाऱ्या ह्या शिवाजीच्या फौजेमुळे शास्ताखान त्रस्त झाला. कहारतलबचा पराभव याला डाचत होता. शास्ताखानाने आपला नामजाद सरदार नामदारखान हा कल्याण-भिवंडीवर सोडला.

राजांना ही खबर लागताच राजे कृष्णाजी बाबाजी सुभेदार व वाघोजी तुपे यांना घेऊन नामदारखानावर चालून गेले. पेणजवळच्या मिऱ्या डोंगरावर राजांनी खानाला गाठले. अकस्मात आलेल्या धडाक्याने नामदारखानाच्या फौजेची फाटाफूट झाली; पण या लढाईत राजांचे सरदार कृष्णाजी ठार झाले; तुपे जखमी झाले. राजे माघारी आले. या मोहिमेत यश जरी पदरात पडले नाही, तर नामदारखान धास्तावला. तेवढे यश राजांना पुष्कळ होते.

नामदारखानाची मोहीम आटोपून राजे गडावर आले. नेताजी आणि इतर सरदार आपल्या जमावानिशी शास्ताखानाच्या बाहेर पडलेल्या सैन्यावर हल्ले करीत होतेच; पण शास्ताखानाची ताकद फार मोठी होती. खानाचे सैन्य मात्र या प्रकाराने चिडून आता मुलूख लुटू लागले होते. गावे बेचिराख होत होती. गुरेढोरे डोळ्यांदेखत पळविली जात होती. उभी
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पिके कापली जात होती. पुणे मुलूख तर पाहता-पाहता उजाड झाला होता. जिवाच्या भीतीने लोक गावे सोडून कोकणच्या आश्रयाला जाऊ लागली.

त्यातच राजापूरला पकडलेल्या व किल्ल्यात खिचपत पडलेल्या इंग्रजांना सोडावे, अशी विनंती कंपनीकडून सारखी होत होती. राजांनी आजारी म्हणून रेव्हिंग्टनला पूर्वीच सोडले होते; पण तो फार दिवस जगला नाही. कैदेत तीन इंग्रज मेले. झाली ती शिक्षा पुरे झाली, असे समजून राजांनी अखेरीस इंग्रजांना सोडण्याचा हुकूम दिला.

राजांनी तातडीने आपल्या देशमुखांना बोलावून घेतले. प्रजेचे रक्षण कसे करावे, याचा विचार सर्वांनाच पडला होता. राजे सर्जेराव देशमुखांना म्हणाले,

'सर्जेराव, लोक गाव सोडू लागलेत, हे खरं?'

'राजे, लोकांनी खानाची दोन वर्षं कशी काढली, ते त्यांचं त्यांना माहीत! आता लोकांचा धीर सुटला. अडवायला गेलं, तरी कुणी राहत नाही.'

राजे खिन्नपणे म्हणाले, 'त्यांचा काय दोष? आम्ही 'राजे' म्हणवितो. डोळ्यांसमोर प्रजा नाडली जाते, लुबाडली जाते, नागवली जाते, तरी आम्ही काही करीत नाही.'

'असं कोणी म्हणत नाही. उलट, सारे म्हणतात, की राजे म्हणूनच टिकले!'

'हं! हे म्हणतात, हे त्यांचे उपकार. देशमुख, आपण प्रजेची घरंदारं राखली नाहीत, निदान त्यांचे जीव तरी वाचवू या. ज्या गावांना खानाचा उपद्रव पोहोचतो, त्या गावांना रात्रीचा दिवस करून घाटाखाली सुखरूपपणे जागा द्या. गनीम दिसताच रानाचा आश्रय घ्यायला सांगा. प्रजा राहिली, तर आमचं राज्य राहणार. ज्यांच्यासाठी हे करायचं, तेच नाहीसे झाले, तर त्याला अर्थ तो काय?'

राजांच्या हुकुमाने वस्त्या घाटाखाली सरकू लागल्या. ते पाहून राजांना अनंत यातना होत होत्या. राजांना काही सुचत नव्हते. खानाचा शह कसा हलवायचा, याची विवंचना लागून राहिली होती.

महिने उलटत होते. उन्हाळा आला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सायंकाळी राजे मोरोपंतांसह गडाचा फेरफटका करीत होते. तोच जासूद बातमी घेऊन आला,

‘राजे, नेताजी पालकर जखमी झालेत!’

‘कुठं?’

‘सुप्याजवळ नामदारखानाची आणि नेताजींची चकमक झाली. नेताजींनी पराक्रमाची शर्थ केली; पण उपयोग झाला नाही. नेताजींनी माघार घेतली. सरफराजखान व नामदारखान या दोघांनी नेताजींचा पाठलाग करून तीनशे घोडी जायबंदी केली.’

‘आणि नेताजी कुठं आहेत?’

‘गडाखाली आले असतील. डोली करून त्यांना आणीत आहेत.’

राजे म्हणाले, ‘काय म्हणावं नेताजींना! अंदाज लागला, की वेळीच माघार घ्यायची सवय नाही. वेडं धाडस करतात.’

राजे वाड्यात आले. नेताजी जखमी झाल्याचे कळताच जिजाबाईही अस्वस्थ झाल्या. नेताजींच्या मांडीवरची जखम मोठी होती. राजांनी वैद्यांना प्रथम औषधोपचार करायला सांगितले. नेताजी ग्लानीत होते; रक्तस्त्रावाने पांढरे पडले होते. वैद्यांनी पट्ट्या बांधल्या. वैद्य म्हणाले,

‘काळजीचं कारण नाही. रक्तस्त्रावामुळं अशक्तपणा आला आहे. नेताजी हाती पायी सुरक्षित आहेत.’

ते ऐकून राजांना समाधान वाटले.

दुसऱ्या दिवशी राजे नेताजींना भेटायला गेले. नेताजी शुद्धीवर आले होते. राजांना पाहताच नेताजी उठू लागले. राजे पुढे धावले. नेताजींना झोपवीत ते म्हणाले,

‘आता अशी हालचाल करायची नाही. केलीत, तेवढी पुष्कळ झाली.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पडल्या जागी नेताजींच्या डोळ्यांतून अश्रू झरले. राजे ते अश्रू टिपीत म्हणाले,

‘काका! आमचे सेनापती तुम्ही! आणि हे डोळ्यांत पाणी? हे मात्र मुळीच शोभत नाही. आम्ही नामदारखानाला डिवचलं; आणि त्यानं तुम्हांला उघड्यात गाठून राग काढला. माघार घ्यावी लागली, घोडी जायबंदी झाली, म्हणून एवढं जिवाला लावून घ्यायचं कारण काय? आम्ही नेहमीच सांगतो... आम्हांला जय-पराजयाचं दुःख नसतं. आम्हांला सदैव कौतुक असतं जिद्दीचं. ती जिद्द दाखविलीत. खानाशी दोन हात केलेत. बस्स! आम्हांला सारं मिळालं.’

राजांनी नेताजींना धीर दिला खरा; पण हा पराजय राजांच्या मनाला लागला. प्रजा बेघर होत होती. फौजेवर सारखा ताण पडत होता. खानाचे उद्योग राजांना कुठेच रोखता येत नव्हते. कोंढाण्यावर फितुरी माजते आहे, अशी बातमी हेरांनी आणली होती. गेल्या दोन-तीन वर्षांत मोगलांविरुद्ध राजांना कुठेच भरघोस यश मिळाले नव्हते.

राजांचा तेहतिसावा वाढदिवस याच काळजीत गेला.

पाडवा आला. गडावर गुढ्या उभ्या केल्या होत्या. रंगीबेरंगी वस्त्रांनी सजलेल्या, आकाशात चढलेल्या गुढ्या राजे पाहत होते. जिजाबाईंनी गुढीपूजेसाठी राजांना बोलावले. राजे गेले. त्यांनी पूजा केली. गुढीवर अक्षता टाकताना त्यांचा हात डोळ्यांकडे गेला. जिजाबाईंनी विचारले,

‘काय झालं, राजे?’

‘काही नाही. आठवण झाली!’

‘कुणाची?’

‘दुसऱ्या कुणाची? आमच्या कमजोरीमुळं घरादाराला मुकलेली जी प्रजा आज रानावनाचा आश्रय घेऊन आहे, तिची! तिचा पाडवा आज कसा साजरा होत असेल?’

राजे उठले आणि कुणाकडेही न पाहता तडक आपल्या महाली गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

८

‘जरा इकडे यावं!’

बैठकीवर बसलेल्या राजांनी वर पाहिले. सज्जाजवळ उभ्या असलेल्या सोयराबाईसाहेब हाक मारीत होत्या.

राजांची प्रार्थना झालीच होती. ते उठले आणि सोयराबाईंच्या मागे उभे राहिले. सोयराबाईंनी जिकडे बोट केले होते, त्या दिशेकडे राजांनी पाहिले. सकाळच्या कोवळ्या उन्हात वाड्याबाहेरच्या पटांगणात एक तट्टू फिरत होते. तांबडे खोगीर घातलेल्या त्या अबलख घोड्यावर संभाजीराजे बसले होते. मोतद्दार घोड्याचा लगाम धरून मागून धावत होता. राजे कौतुकाने उद्गारले,

‘अरे, व्वा! एवढ्या लहान वयात बाळराजे छान उशी घेतात.’

‘पण आजच्या घोड्यावर बसण्यासाठी चार दिवस घरदार राबत होतं.’

‘ते बरं?’

‘आपल्या घोड्याचं खोगीर बाळराजांनी पाहिलं; आणि मासाहेबांच्याकडे हट्ट धरला. बाळराजांचा हट्ट मासाहेबांनी पुरवला नाही, असं कधी झालंय्? मासाहेबांचे हुकूम सुटले. साऱ्या राण्या कामाला लागल्या. मासाहेबांची नजर कामावर... ‘ही फीत नको. ती लाव. इथं टाका घाल.’ शेवटी काल खोगीर तयार झालं; आणि आज राजे बसले.’

‘मोठे भाग्यवान आहेत बाळराजे!’

‘एवढे लहान आहेत; पण फार हुशार. काल मी दोन प्रहरी बसले होते. साऱ्याजणी खोगीर करीत होत्या. अचानक बाळराजे आले आणि मला विचारतात कसे, ‘तुमच्या आईसाहेब कुठं आहेत?’ मी सांगितलं, ‘बंगळूरला!’. ’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मग बाळराजे काय म्हणाले?’

सोयराबाईंना हसू आवरेना. त्या म्हणाल्या,

‘...तर बाळराजांनी विचारलं, ‘खूप आहेत?’ ’

‘मग?’

‘...मला कळलं नाही. मी म्हणाले, ‘खूप कशा असतील? एकच आईसाहेब असतात.’ तर चटकन गाल फुगवून बाळराजे म्हणाले, ‘खोटं सांगता! आमाला बघा किती आईसाहेब आहेत, त्या!’ साऱ्यांच्याकडे बोट दाखवून बाळराजे म्हणाले. सगळ्याजणींना हसता-हसता पुरेवाट झाली. धाकटी पुतळाबाई तर रडूच लागली.’

राजांनी स्वत:ला सावरले. ते म्हणाले,

‘चला. दिवस फार वर आला. सदरेवर लोक वाट पाहत असतील. मासाहेबांचं अजून दर्शन झालं नाही.’

‘मासाहेब तर बोलत बसल्यात!’

‘कुणाबरोबर?’

‘कोण ज्ञानू माळी म्हणून आला आहे.’

‘ज्ञानू माळी?’ राजे पुटपुटले. ‘हे पहिल्यांदाच तुम्ही सांगायला हवं होतं.’ एवढे बोलून राजे वळले. सोयराबाई राजांच्याकडे वळेपर्यंत राजे महालाबाहेर गेलेही होते.

राजे आत येताच ज्ञानू माळी उठून उभा राहिला. पुढे येऊन त्याने राजांचे पाय शिवले. राजे म्हणाले,

‘ज्ञानू, आज आठवण झाली, होय?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तसं न्हाई, महाराज! कैदेतली मानसं आमी. सुटका व्हईल, तवा यायचं!’

‘कैद?’

‘आता पुन्याच्या वाड्यावरचा मी माळी. हलायला जागा हाय, व्हय? कवा आला, कवा गेला... दिसातनं धा डाव इचार चालतुया.’

‘मग आता कसा सुटलास?’

‘गावाला पोरगं आजारी हाय, म्हून सांगितलं, आन् वाट धरली. म्हटलं, राजं गरिबाला इसरलं, म्हून काय झालं? आपुन आठवण द्यावी!’

‘बरं झालं, आलास ते. बैस!’

राजे मासाहेबांच्या शेजारी बसले. ज्ञानूचे वय साठीच्या घरात गेले होते; पण ज्ञानू वयाच्या मानाने ताठ होता. राजांनी विचारले,

‘ज्ञानू, तुझी बाग काय म्हणते?’

‘बरी हाय, जी!’

‘आता मोगरीची फुलं पुष्कळ येत असतील, नाही?’

‘ऐका, मासाहेब, राजांचं बोलनं. ती फुलं घेऊन काय जाळायची?’

‘का, रे?’

‘राजं! त्या खानानं सोन्यासारखा वाडा पार बाटवला. जितं द्येवघर व्हतं, द्येवाची पूजा चालायची, त्या जागंला खान हवं ते खात बसतो. तुमच्या महालाचा जनानखाना केला यानं. फुलं द्येवावर पडायची, आपल्या मानसांच्या हातांत जायची, ती फुलं त्या बेगमांच्या आन् नाचनारींच्या अंगावर जात्यात. तिथं पोथी वाचायची, तिथं चाळघुंगरांचा आवाज रातदीस उठतोया. राजे, पार शोबा गेली महालाची, पुन्याची!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे बेचैन झाले. म्हणाले,

‘अरे, बाबा, वेळ आहे त्याची. मजा करून घेतोय्!’

‘कसली वेळ? राजं, सारं पुनं वोसाड झालं. बगावं, तिकडं खानाची छावनी पसरलीय्. आपली मानसं डोळ्यांला दिसंनात. आज गनपतीसमोरनं गाईचं मांस वाड्यात जातंय्, आन् काय सांगतासा? सोसवंना, म्हून आलो! बोलतो, म्हून राग करू नकासा!’

‘नाही, रे, ज्ञानू! तू बोलतोस, ते अगदी खरं. काही तरी तोड निघेल.’

‘असली कामं वाट बगून होत न्हाईत, धनी! तावानं उठा. शास्ताखान म्हंजे काय हत्ती हाय? सुस्तावलेला रेडा हाय त्यो! गाठा त्याला. म्येला, तरी कोन बघायचं न्हाई.’

राजे विस्फारलेल्या डोळ्यांनी ज्ञानूकडे पाहत होते. ते उठले. म्हणाले,

‘चल! ऊठ, ज्ञानू. वरती महालात चल.’

ज्ञानूला घेऊन राजे महालात गेले. दारे लावलेली होती.

मध्यान्हीचा सूर्य मस्तकावर आला. राजे ज्ञानूसह खाली आले. राजांच्या नजरेत एक वेगळीच चमक दिसत होती.

राजांनी त्याच दिवशी ज्ञानू माळ्याची पुण्याकडे रवानगी केली.

□

९

नेताजी पालकर हिंडू फिरू लागले होते. राजे, नेताजी, मोरोपंत, सर्जेराव जेधे, तानाजी ही सारी मंडळी आता खलबत करण्यात गुंतली होती. गडावर नेहमी फकीर येत होते. राजांना भेटून गडाबाहेर जात होते. खास विश्वासाची माणसे राजे निवडीत होते. नाना वेषांनी, नाना कारणांनी त्यांची पुण्यास रवानगी होत होती. निवडलेल्या फौजेत राजांनी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपल्या फौजेतले काही पठाणही निवडले होते. पठाण फौजेचा अधिकारी इब्राहीमखान आता सदैव राजांच्या बरोबर दिसत होता.

थोड्याच दिवसांत राजांच्या हाती सारे तपशील आले. पुण्यात कुठे पहारे-चौक्या आहेत, पहारे केव्हा बदलतात, खानाच्या साठ सरदारांचे तळ, त्यांच्या जागा, निरनिराळे शामियाने, डेरे या साऱ्या नोंदी राजांच्या मनात होत होत्या. चौकी-पहारे, त्यांच्या अचूक जागा, पहारे बदलण्याच्या वेळा, टेहळणीसाठी बाहेर पडणाऱ्या तुकड्या, त्यांचे मार्ग, परतण्याच्या वेळा हे सारे बारकावे राजे ध्यानी घेत होते.

राजे सदैव विचारमग्न दिसत होते. काही तरी मोठा बेत शिजतो आहे, हे साऱ्यांना जाणवत होते. वाढत्या उन्हाळ्याबरोबर गडाची तगमग वाढत होती. बाळाजी, चिमणाजी हे नऱ्हेकर बंधू, नेताजी पालकर, तानाजी मालुसरे यांच्यासह राजे सदैव वावरत होते.

राजे विचार करीत महालात बसले असता मनोहारी आत आली. तिने सांगितले,

'फिरंगोजी आलेत.'

'कुठं आहेत?'

'मासाहेबांच्या बरोबर बोलत बसलेत. आपली मासाहेबांनी आठवण केलीय्.'

निरोप सांगून मनोहारी वळली. राजांनी हाक मारताच ती थांबली. राजे म्हणाले,

'फिरंगोजींना आणि मासाहेबांना आम्हीच बोलावलंय्, म्हणून सांग.'

'जी!'

जिजाबाई आणि फिरंगोजी यांची चाहूल लागताच राजे उभे राहिले. जिजाबाई आत आल्या; बैठकीवर बसल्या. फिरंगोजी बैठकीच्या खाली अदबीने बसले. दोघेही राजांकडे पाहत होते. राजांनी विचारले,

'फिरंगोजी, तुम्ही काय बातमी आणलीय्?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अष्टमीचा मुहूर्त आहे. आपला झुणके होता ना? पुण्याचा हवालदार?...’

‘बरं!’

‘त्याची मुलगी भोरच्या रावतांच्या मुलाला ठरवली.’

‘छान!’

‘शिवबा! अरे, चाललंय् काय? कसलं लग्न?’ मासाहेबांनी विचारले.

राजे नुसते हसले. जिजाबाई फिरंगोजींना म्हणाल्या,

‘फिरंगोजी, आताशा राजे तुटकच वागतात. काही बोलायचं झालं, तर आपली माणसं घेऊन गडाच्या बुरुजावर फिरत बोलतात. नजरबाज तर हर घडीला एक येतो. पण आम्हांला मात्र राजे काही सांगत नाहीत. आता राजांचा विश्वास...’

‘हां, मासाहेब! पुष्कळ झालं!’ राजे हसून म्हणाले, ‘या तक्रारीवर कुणाचा विश्वास बसायचा नाही. आमचा बेत पक्का झाला, की आम्ही तुम्हांला सांगणारच होतो.’

‘कसला बेत?’

‘मासाहेब, आम्ही लाल महालावर चालून जायचं ठरवलंय्.’

‘लाल महालावर?’ जिजाबाई आश्चर्यचकित झाल्या.

‘हो!’

‘पण, राजे, खानाची फौज लाखावर! सारं पुणं व्यापलंय् त्याच्या फौजेनं... ज्ञानू सांगत होता ना?’

‘खरं आहे!’ राजे म्हणाले, ‘आम्ही फौजेवर तुटून पडणार नाही. आम्ही खानावर चालून जाणार!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पण ते कसं शक्य आहे?’

‘आपल्या आशीर्वादानं आणि भवानीकृपेनं सारं होईल. मासाहेब, आम्ही आजवर वाट पाहिली; पण खान पक्का आहे. त्याचे सरदार बाहेर पडतात; पण तो पुणं सोडून हलत नाही. आम्ही महाबतखानाचा पराभव केला; पण खान संतापून बाहेर पडला नाही. आमचा मुलूख त्यानं बळकाविला आहे. प्रजा घरं-दारं सोडून वनवासी झाली आहे. दिवसेंदिवस आमचं बळ कमी होत आहे. संभाजी कावजीसारखी माणसंही मोहाला बळी पडून खानाच्या आश्रयाला जाऊ लागली आहेत.’

‘म्हणून हा आततायी मार्ग...’

‘त्याखेरीज इलाज नाही. खान सुखलोलुप, आरामी असला, तरी त्याला बादशहाची दुसरी प्रतिमा समजतात, असा त्याचा लौकिक आहे. आमच्या हातून जेवढं होईल, तेवढं आजवर केलं. खानाच्या फौजेवर हल्ले केले. कहारतलबाचा, नामदारखानाचा पराभव केला. मोगलाईत खंडण्या वसूल केल्या. पण त्याचा खानावर काहीच परिणाम होत नाही. उलट, दिवसेंदिवस त्याची ताकद वाढते आहे. आमचे खुद्द सेनापती जखमी झाले. तीनशे घोडी जखमी झाली. नवीन येणारा दर दिवस आमची ताकद कमी करतो आहे. शास्ताखानानं आमचा मुलूख गिळलाच आहे. अशीच उसंत दिली, तर कोकणही हातचं जायला विलंब लागणार नाही.’

‘म्हणून हा बेत आखलात?’

‘हो! आम्ही लाल महालात येऊ, हे खानाच्या स्वप्नीही नसेल. ते घडलं, आणि खान मेला, की फौज राहणार नाही. सारा मुलूख मोकळा होईल.’

जिजाबाई चिंताचूर झाल्या. काही न बोलता त्या बसून होत्या.

शिवाजीराजे गहिवरून म्हणाले,

‘मासाहेब, तुम्हांला हे मान्य नाही का?’

‘राजे, तसं म्हणत नाही आम्ही. पण खानाच्या एवढ्या पसाऱ्यात तुम्ही एकाकी शिरणं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हे बरं वाटत नाही.’

‘एकाकी का? आमच्या बरोबर तानाजी, येसाजी, फिरंगोजी, सर्जेराव, आमचं रक्षकदल- सारे असणार!’

जिजाबाई हसल्या. म्हणाल्या,

‘राजे, उगीच कसला धीर देता? कुठं दीड लाखाची छावणी! चारी बाजूंनी सागरासारखी छावणी पसरलेली; आणि त्या लाल महालात तुम्ही एवढे जाणार?’

फिरंगोजी म्हणाले, ‘मासाहेब, आम्ही राजांना तेच सांगतो आहो. आम्ही फत्ते करून येतो, म्हटलं, तर राजे ऐकत नाहीत.’

जिजाबाई म्हणाल्या, ‘राजांनी मनावर घेतलं, की संपलं. मग त्यात बदल खुद्द त्यांच्या मासाहेब सुद्धा करू शकत नाहीत.’

‘मासाहेब, आपण आज्ञा करा; आम्ही हा बेत मागे घेतो.’

‘तसं कधी आम्ही म्हटलं?’

‘मग, मासाहेब, एवढी जोखमीची बाब! जरा चूक झाली, तर हसं व्हायला, जीवमोलाची माणसं गमवायला वेळ लागायचा नाही. लाल महाल आमचं घर. पायांखालचा सराव. जेवढ्या सफाईनं आम्ही ही कामगिरी पार पाडू, तेवढं दुसरं कोण आहे? मासाहेब, आम्हांला देवीनं दृष्टांत दिला आहे. स्वप्नी येऊन आम्हांला अभय दिलं. आम्ही ही मोहीम यशस्वी करू, यात आम्हांला शंका नाही.’

जिजाबाईंनी श्वास घेतला. त्या म्हणाल्या,

‘राजे, तुम्ही मनात आणाल, ते पार पाडाल, याची आम्हांला खात्री आहे; पण आईचं मन भितं. आम्ही आड येत नाही. मागे आम्ही आहोत, आम्हांला दुसरा आधार नाही, हे ध्यानी घेऊन जे करायचं, ते करा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे भारावून म्हणाले, ‘मासाहेब, आपण चिंता करीत आहा, याची आम्हांला जाणीव आहे. आपली तळमळ आम्ही जाणतो. संकटाची चाहूल लागताच मुलाला माता अनेक; पण कर्तव्यासाठी मुलाला संकटात जाऊ देणाऱ्या आपल्यासारख्या मातांचं दर्शन दुर्लभ. तुमच्या पोटी जन्म घेतल्याचं आम्हांला समाधान वाटतं, अभिमान वाटतो.’

राजे काही क्षण थांबले. त्यांनी निर्णय जाहीर केला :

‘आम्ही पंचमीला येथून बाहेर पडू. कोंढाण्याला तळ करून अष्टमीला आम्ही पुण्यात प्रवेश करू.’

‘पण रामनवमी?’

‘आम्ही विजयाच्या आनंदात कोंढाण्यावर रामनवमी साजरी करू. मासाहेब, रमजानचे उपवास सुरू होतील. अष्टमीला सहावा दिवस असेल. उपासानं थकलेले जीव रात्री जेवण करून गाढ झोपतात. निद्रा आवरत नाही. त्यांचे उपवास आमच्या पथ्यावर पडल्याखेरीज राहणार नाहीत.’

फिरंगोजी थक्क होऊन म्हणाले, ‘राजे, हे ध्यानी आलं नव्हतं.’

‘फिरंगोजी,’ राजे म्हणाले, ‘शत्रूवर चाल करताना नुसती फौज लक्षात घेऊन चालत नाही. त्याचे सणवार, रीतिरिवाज, उपवास हे सारं ध्यानी घ्यावं लागतं. दसऱ्याच्या दिवशी मराठ्यावर कोणी चालून आलं, तर प्रतिकार दसपट होणारच. साऱ्यांचीच शस्त्रं परजलेली, हाती असलेली!’

राजे सर्व बेत ठरवीत होते. आजवर भीती वाटत होती, ती जिजाबाईंच्या अनुज्ञेची! ती पदरात पडताच राजांचा उत्साह दुणावला. ते तडफेने कार्याला लागले.

□

१०

पंचमी उजाडली, आणि राजांनी जिजाबाईंचा निरोप घेऊन राजगड सोडला. आपल्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घोडदळासह राजे कोंढाण्याच्या वाटेला लागले. उन्हाच्या तावाने सारे वातावरण गदगदत होते. वाऱ्याचा कुठे पत्ता नव्हता. उकाड्याने आणि केलेल्या दौडीमुळे घोडी फेसाळली होती. राजांच्या बरोबर नेताजी, फिरंगोजी, बाळाजी, चिमणाजी आणि मोरोपंत होते. राजे कोंढाण्याला पोहोचले. आज्ञेप्रमाणे सारे गोळा झाले होते. काही तरी खास महत्त्वाची आणि जबाबदारीची मोहीम राजांनी काढली आहे, एवढेच साऱ्यांना कळले होते. राजांनी अत्यंत दक्षतेने चखोट धारकरी निवडलेले होते. निवडलेला प्रत्येक माणूस बारकाईने न्याहाळला होता. गडावर तानाजी, येसाजी हे आपल्या पथकांसह राजांची वाट पाहत होते.

कोंढाण्यावर जाताच राजांनी एकेकाला एकेक कामगिरी निवडून दिली.

कोंढाण्याच्या खलबतखान्यात राजे बसले होते. नेताजी, फिरंगोजी, तानाजी, येसाजी, बाळाजी, चिमणाजी, मोरोपंत, सर्जेराव जेधे एवढी खास विश्वासाची माणसे गोळा झाली होती. त्याखेरीज बहिर्जी, विश्वासराव, महादेव हे तिघे होते. खानावर चालून जायचा बेत प्रथमच राजांनी सांगितला. फिरंगोजींनाच तेवढा तो आधी माहीत होता. राजांचा बेत ऐकून साऱ्यांचे बाहू स्फुरण पावले. तानाजी म्हणाला,

'महाराज! एकदम नामी बेत! या शिळ्या कढीला ऊत आणून लई कंटाळा आला व्हता, बघा.'

राजे म्हणाले, 'तानाजी, आजवरची दिरंगाई हौसेनं केली नाही; ना आत्ताच्या मोहिमेचं आम्हांला कौतुक आहे. पण याखेरीज दुसरा मार्गच नाही.'

'खानाच्या स्वप्नात सुद्धा हे यायचं नाही.' बाळाजी म्हणाले.

'ते खरं! पण, बाळाजी, हा बेत सोपा नाही. एक जरी माणसानं थोडा घोटाळा केला, सांगितल्यात कच खाल्ली, तरी साऱ्यांच्याच कत्तली उडायला फारसा वेळ लागायचा नाही... तानाजी!'

'जी!'

'तू उद्या नीघ. कात्रज घाटाखाली लग्नाचं वऱ्हाड तयार ठेव. तुला परवानगी मिळेल. दोन प्रहर झाली, की तुम्ही वाजतगाजत पुण्यात जायचं. महादेव तुझ्याबरोबर असेल.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

समजलं?'

'जी!'

'आणि, येसाजी, तू संध्याकाळी दिवस मावळायच्या आत गवताच्या गाड्या घेऊन पुण्यात शिरायचं. पाच-पंचवीस लोक काढण्या लावून संगती न्यायचे. विचारलं, तर गंजीखान्यासाठी गवत धरून आणलं आहे, म्हणून सांगायचं... विठोजी!'

'जी!'

'घाटाखालच्या रानात दीडदोनशे बैल शिंगांना पलोते बांधून तयार ठेवा. मध्यरात्रीनंतर कर्णा वाजला, की पलोते पेटवून तुम्ही सरळ गडाकडे निघून जा. येताना वाटेत पेरलेली सारी माणसं खबरदारीनं संगती घेऊन गड गाठा.'

'महाराज, तुम्ही...' फिरंगोजींनी विचारले.

'मोरोपंत आणि नेताजी आपापल्या तुकडीनिशी आम्ही सांगू, तेथे थांबतील. सर्जेराव जेधे, बाळाजी, चिमणाजी हे आमच्याबरोबर राहतील.'

बाळाजी, चिमणाजी आनंदले. राजे म्हणाले,

'बाळाजी, चिमणाजी, बाळपणापासूनचे तुम्ही आमचे दोस्त! वाड्यात एकत्र खेळलो, वावरलो. तुम्हां दोघांइतका वाडा कुणाच्याच परिचयाचा नाही... आणि, फिरंगोजी, तुम्ही मात्र गडावरच राहायचं!'

फिरंगोजी नाराज होऊन म्हणाले, 'महाराज!'

'एवढं नाराज व्हायचं कारण नाही. आम्ही परत इथं येऊ, तेव्हा आमचा पाठलाग करीत कदाचित खानाचं सैन्य येईल. तुम्ही गड मजबूत ठेवा. तोफांचे मोर्चे बांधून घ्या. गडाचा बंदोबस्त पक्का आहे, इकडे लक्ष द्या. हेही काम फार महत्त्वाचं आहे.'

दुसऱ्या दिवशी एक एक जण राजांचा निरोप घेऊन गड उतरू लागला. निरनिराळ्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वाटांनी राजांनी पुण्यात तुकड्या पाठविल्या होत्या. पुण्यात एका बाजूने पुण्याच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या सरदाराचे नाव सांगायचे, हा रिवाज ठरला होता. प्रत्येक तुकडी कोठून शिरणार, कुठे थांबणार, त्यांनी कुणाचं नाव सांगायचं, केव्हा काय करायचं, ते राजे अत्यंत दक्षतेने, जातीने सांगत होते. मोहिमेत भाग घेणाऱ्या प्रत्येकाशी बोलत होते. जणू आपल्यामुळेच ही मोहीम फत्ते होणार आहे, असे प्रत्येकाला वाटत होते; आणि त्यात काही खोटेही नव्हते.

अष्टमीच्या दिवशी भर दिवसा एक वऱ्हाड कात्रजच्या चौकी-पहाऱ्याशी आले. नवरदेव घोड्यावर बसला होता. शे-पन्नास माणसे सणासुदीचे कपडे करून, कमरेला तलवारी लावून मारे ऐटीने नवरदेवाबरोबर जात होती. परवान्याबरहुकूम माणसे आहेत, याची मोजदाद करून वरात चौकी-पहाऱ्यातून सुटली; आणि पुण्याच्या वाटेला लागली.

त्याच वेळी पुण्याच्या नदीच्या बाजूने एक अश्वपथक पुण्यात प्रवेश करीत होते. पहाऱ्यावर त्याला अडवले,

‘कौन?’

‘जाधवांची फौज. फेरफटका करून परत येत आहे.’

जाधवांचा तळ पर्वतीच्या पूर्वेला होता. चौकी-पहाऱ्यातून ते अश्वपथक पुण्यात प्रवेश करते झाले.

दोन प्रहर टळत असता कात्रज घाटावर चौकी-पहाऱ्यासमोर पाच-सहा गवताचे गाडे आले. पाच-पंचवीस काढण्या लावलेल्या माणसांना फटकारे मारीत घोडेस्वार बरोबर जात होते. पहारेकऱ्यांनी चौकशी केली. हवालदार म्हणाला,

‘भडवे! गवत घेऊन जात होते. उद्या डोकी मारली जातील, तेव्हा कळेल.’

पहारेकऱ्यांना ते दृश्य परिचयाचे होते. पहारेकऱ्यांना काही संशय आला नाही. गाड्यांनी कात्रज ओलांडले.

जे दृश्य कात्रजच्या पहारेकऱ्यांनी पाहिले, तेच कोटाच्या दरवाज्याशी असलेले

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पहारेकरी पाहत होते. कुणाला कसला संशय न येता सारे पुण्यात प्रवेश करते झाले.

कात्रजच्या घाटात रानात वसलेल्या एका चिमुकल्या वस्तीत राजे एका छपरीखाली बसले होते. सभोवार पसरलेल्या रानावरून त्यांची नजर फिरत होती. कधी नाही ते गावात गोळा झालेल्या घोड्यांकडे सारे कौतुकाने पाहत होते. राजांबरोबर असलेली पठाणांची उंचीपुरी धिप्पाड तुकडी पाहून साऱ्यांना तिचा दरारा वाटत होता.

सारे रान उन्हात कसे गपचीप उभे होते. नेहमी पक्ष्यांच्या आवाजांनी भरून राहणारी वनश्री नि:स्तब्ध वाटत होती. दूर कुठे तरी एकाकी भारद्वाजाचा आवाज ती शांतता मोडीत होता. राजांच्या जवळ उभा असलेला बाळाजी म्हणाला,

‘राजे, पाऊस येणार, असं वाटतं.’

‘आला, तर बरंच होईल. पण अजून वर्दी कशी आली नाही?’

‘काही समजत नाही.’

हळूहळू पूर्वेला ढग जमू लागले. वारा सुटला. वाऱ्याचा वेग वाढत होता. साऱ्या रानावर वाऱ्याचा आवाज घुमत होता. तृषार्त मोरांचा आरव रानावर उठत होता.

वादळात सापडलेले ढग उलथे पालथे होत होते. घोड्यांची खोगिरे काढून छपरीत आणली गेली. पूर्वेच्या दाट ढगांची काळीभोर फळी डोंगरमाथ्यावर उठली. नगाऱ्यावर टिपरी घुमावी, तसा ढग घुमला. वारा एकदम बंद झाला.

राजे म्हणाले, ‘वळीव आला.’

गार वाऱ्याची नाजूक झुळूक अंगाला चाटून गेली; आणि लक्कन वीज चमकली. सारा आसमंत कडाडून निघाला. लक्ष घोडदळ टापांचा आवाज करीत यावे, तसा आवाज उठवीत पाऊस येत होता. विजा कडाडत होत्या; आकाश छेदून धरतीवर उतरत होत्या. पावसाच्या मोठ्या सरीतून गारा फुटत होत्या. सारी वनश्री त्या माऱ्यात झोडपून निघाली होती. छपरीवरून पागोळ्या ओतत होत्या. राजे निसर्गाचे थैमान पाहत होते. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हा वळीव युद्धभूमीची आठवण करून देतो. कोल्हापूरला रुस्तुम जमाशी आमचं युद्ध जेव्हा झालं, तेव्हाचं रूप असंच काही तरी होतं. तोफांचे आवाज, तलवारींचा खणखणाट, बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव, बाणांचा सडा आणि घोड्याच्या टापांचा अखंड नाद. या रौद्र सौंदर्यात देखील केवढं विलोभन साठवलं आहे!’

हळूहळू पाऊस थांबला. ढग गुरगुरत होते. विजा चमकत होत्या. मातीचा सुगंध साऱ्या वातावरणात भरला होता. भिजलेली घोडी अंग शहारून आपले पाणी झटकत होती. सायंकाळची तिरपी किरणे साऱ्या रानावर फाकली होती. रानात पक्ष्यांचे आवाज उठत होते. आणि याच वेळी टापांचा आवाज कानांवर आला. राजे छपरीबाहेर आले. काही क्षणांतच महादेव येताना दिसू लागला. महादेव आला. त्याने मुजरा केला.

‘महादेव, काय वार्ता?’

‘ठरल्यासारखं सारं पार पडलं. कुणालाही अडवलं नाही. सारे पुण्यात सुखरूप पोहोचले.’

‘छान! विठोजी कुठं आहेत?’

महादेव हसला. ‘तो आणि त्याचे लोक बैल घेऊन आहेत. पलोते बांधतोय्. झाडांना सुद्धा अधूनमधून पलोते बांधलेत.’

‘ठीक.’ राजे म्हणाले.

हळूहळू सूर्य मावळला. अंधार पसरत-पसरत पुरा दाट बनला. पूर्वेला मात्र वीज होत होती. आकाशात नक्षत्रे उजळत होती. राजांनी अंगात जाळीदार चिलखत चढवून वरून अंगरखा घातला. डोक्याला शिरस्त्राण घालून वरून मंदील बांधला. कमरेच्या दुशेल्यात भवानी शोभत होती. उजव्या बाजूला कट्यार, बिचवा खोवला होता.

राजांचा पठाण सरदार इब्राहीमखान याचा रुबाब तर और होता. इब्राहीमच्या मस्तकी तांबडे जर्द पागोटे शोभत होते. त्यावर हिऱ्याचे पान चमकत होते. अंगात जरीबुंदी जामा त्याने घातला होता. पायांत भारी चोळणा आणि चढाव होता. हिरव्या दुशेल्यात तलवार, कट्यार होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी इब्राहीमकडे पाहिले. इब्राहीम लाजला. राजे म्हणाले,

‘बाळाजी, अफझलखानाची लूट आपल्याला मानवली. आता याच्या खांद्यावर जरी चिलखत जाऊ दे.’

इब्राहीमखानाच्या खांद्यावर जरी चिलखत अडकवले गेले. बाहेर इब्राहीमच्या काळ्या घोड्यावर किनखापी खोगीर, रेशमी ओढाळी, लगाम अडकवली जात होती. बाकीच्या पठाणांचे असेच वेष केले होते. सारे तयार झाले. राजे म्हणाले,

‘इब्राहीम, आता तू आमचा सरदार; आम्ही तुझे सेवक! समजलं?’

‘जी, हुजूर!’

‘चला!’

राजांनी भवानी मातेचे स्मरण केले. अंधारातून अश्वपथक चालू लागले. वाटेवर येताच राजांनी मशाली पेटविण्याची आज्ञा दिली. मशाली पेटविल्या गेल्या. पितळेच्या नक्षीदार तुंब्यांनी सजलेल्या मशाली वाऱ्यावर फरफरू लागल्या. अग्रभागी दोन मशालजी होते. त्यांच्या मध्ये इब्राहीमखान होता. इब्राहीमच्या डाव्या हाताला राजे होते; उजव्या बाजूला बाळाजी, चिमणाजी होते. सर्जेराव जेधे, महादेव राजांच्या मागे होते. पाठीमागून पठाणांचे व इतर स्वारांचे पथक होते. राजांनी इशारत करताच दौड सुरू झाली. टापा घुमवीत पथक भरधाव वेगाने घाट चढत होते. घाटाचे चौकी-पहारे जवळ आले. टापांचा आवाज ऐकून चौकीवाले भाले-तलवारी सावरून रस्त्यावर आले. चौकीजवळ येताच इब्राहीमने हात उंचावून थांबण्याची इशारत केली. पाच-पंचवीस मशालींत सारे अश्वपथक उजळून निघाले होते. डावा हात कमरेवर ठेवून इब्राहीमने समोर आलेल्या पहारेकऱ्यांवर नजर टाकली. पहारेकरी काही बोलायच्या आतच इब्राहीमने विचारले,

‘कितने आदमी है यहाँ?’

‘करीब पचीस होंगे, हुजूर!’ चौकीदार म्हणाला.

‘गाफील मत रहना! समझें?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी, हुजूर!’

इब्राहीमने टाच दिली. अश्वपथक टापांचा आवाज करीत पुढे सरकले. अंधारात नाहीसे होणारे मशालदिवे पाहत पहारेकरी सुटकेचा नि:श्वास सोडून चौकीकडे वळले.

पुणे गाठीपर्यंत रात्र खूप झाली होती. अष्टमीच्या चंद्राचे कोवळे चांदणे धरित्रीवर फाकले होते. घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकून पहारेकरी बंदुका सरसावून पुढे आले. इब्राहीमखानाचे पथक थांबले. पहारेकऱ्यांनी दरडावून विचारले,

‘कौन है?’

एका पठाणाने घोडा पुढे घातला. मशालीच्या उजेडात इब्राहीमखानाला पाहताच पहारेकरी चपापला होता. तोच शेजारी आलेल्या पठाणाने घोड्यावरून वाकून पहारेकऱ्याच्या खाडकन मुस्काडात दिली; आणि तो ओरडला,

‘बदतमीज! खानसाहबको पहचानता नहीं?’

पहाऱ्याच्या बाकीच्या ढालाइतांनी गडबडीने मुजरे केले. वाट मोकळी झाली. इब्राहीम काही झालेच नाही, अशा आविर्भावात आपल्या पथकासह आत गेला. सारे पथक मंद गतीने जात होते. सर्वत्र केव्हाच सामसूम झाली होती. गस्तकऱ्यांच्या आरोळ्या उठत होत्या. टेहळणीची अश्वपथके वाटेत गाठ पडत होती. सारी मोगल सेना दिवसभराच्या रमजानच्या उपवासाने थकून, जेवून गाढ झोपी गेली होती.

इब्राहीमचे अश्वपथक सरळ लाल महालापाशी आले. पथक लाल महालाकडे येताना भेटणारी व्यक्ती पथक पाहताच ‘परवरदिगार!’ हा शब्द म्हणत होती. राजांना परवलीचा शब्द ऐकून धीर येत होता. लाल महालाशेजारी असलेल्या कसब्याजवळ येऊन अश्वपथक थांबले. लाल महालाभोवती पहारेकरी उभे होते. इब्राहीमखानाने आपला एक एक स्वार पहाऱ्याला उभा करण्यास सुरुवात केली. मूळच्या पहारेकऱ्यांना चांगला पहारा करण्याबद्दल दम भरला. पहारेकरी पेरीत वाड्याच्या मागेपर्यंत पथक गेले. राजे ज्ञानूच्या घराजवळ पायउतार होऊन त्यांनी दारावर टिचक्या मारल्या. ज्ञानूने दार उघडले.

राजांनी आपले धारकरी एक वेळ पाहून घेतले. वाड्याच्या दिंडीजवळ राजे आले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ज्ञानूने दिंडी उघडली. दिंडीदरवाजाजवळ सर्जेराव घोड्यासह उभे होते.

महालाच्या आवारात नीरव शांतता नांदत होती. पिछाडीच्या पहारेकऱ्याने विचारले,

‘कोण?’

‘मी, ज्ञानू माळी.’ ज्ञानूने सांगितले.

निर्धास्त होऊन पहारेकरी सामोरा येत होता. राजांच्या मागे उभ्या असलेल्या महादूने खंजीर काढला. सपकन आवाज झाला. माळ्याने पुढे होऊन पहारेकऱ्यांचे तोंड आवळले. आवाज न करता पहारेकरी झोपला.

वाड्याच्या मुदपाकखान्यातून भांड्यांचे आवाज येत होते. खानाचे भटारी पहाटेचा स्वयंपाक करण्यात गुंतले होते. राजांनी खुणावताच पाचजण चोरपावलांनी आत घुसले. स्वयंपाकात मग्न असलेले भटारी केव्हा हल्ला झाला, हेही समजू शकले नाहीत. एक भटारी अस्पष्ट ओरडला; पण क्षणात तो आवाज बंद झाला.

ज्ञानू राजांजवळ आला. त्याच्या हातात शिडी होती. त्याने वरच्या खिडकीकडे बोट दाखविले. खिडकी बंद होती. ज्ञानू म्हणाला,

‘कुसवं ढिली केलीत. अलगद हाती घ्या.’

राजांनी महादूकडे पाहिले. महादूने शिडी लावली. खिडकीच्या बाकणाला हात घालून महादेव नेट लावीत होता. खिडकी करकरत उघडली. सारे काही क्षण तसेच दबून होते. महादेव खाली आला. राजांनी बाळाजी-चिमणाजींना खूण केली. बाळाजी-चिमणाजींच्या पाठोपाठ राजे खिडकीतून प्रवेश करते झाले. पाठोपाठ एक एक जण आत येत होता.

राजांच्या कल्पनेप्रमाणे ती महालाची जागा होती. राजे नेहमी तेथे झोपत असत. पण तो महाल आता पडद्यांच्या बाडांनी झाकला गेला. खानाच्या अनेक बेगमांसाठी त्या महालात पडदे, आडपडदे लावून अनेक दालने बनविली होती. राजांनी एका बाडात कट्यार खुपसली. पडदा फाडीत कट्यार उतरली. राजांनी आत प्रवेश केला. आतले दृश्य पाहून राजे जागच्या जागी खिळले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खानाच्या काही बेगमा, दासी त्या आखणात झोपल्या होत्या. समयांचा उजेड दालनात फाकला होता. जाग्या झालेल्या स्त्रियांनी डोळे उघडले. तलवार हाती घेतलेले लोक पाहताच त्यांचे डोळे विस्फारले गेले. अंगावरच्या चोळ्यांचे अथवा पायांतल्या विजारींचे भान नसलेल्या त्या नग्न स्त्रिया पाहताच राजांचे लोक थबकले. त्याच वेळी एका स्त्रीने किंकाळी फोडली. नीरव शांततेत ती किंकाळी घुमली, तोच तलवारीने तिचा आवाज बंद करण्यात आला. एका दासीने गडबडीने समई विझविली. काळोख झाला. बेगमांचा एकच आक्रोश उठला. राजांचे सहकारी आवाज थांबविण्याचा प्रयत्न करीत होते.

भटारखान्यातील सैनिक वाड्यात घुसले होते. अर्धवट पेंगत असलेल्या सैनिकांना ‘असे पहारे करता होय?’ म्हणत कत्तल करीत होते. त्यांनी वाड्याचे पहारे कबजात आणले होते. राजे क्षणाची उसंत न घेता येणारा आडवा पडदा चिरीत खानाचा शोध घेत जात होते.

खान पलंगावर झोपला होता. उठलेल्या आक्रोशाने खान जागा होऊन त्याने बाजूला भरून ठेवलेली बंदूक उचलली. पडदा फाडून आत शिरलेल्या मावळ्यावर बार काढला गेला. मावळा ढासळला. पाठोपाठ राजे आत घुसले. भेदरलेला खान खिडकीतून सज्जात उडी मारण्याच्या तयारीत होता. त्याच वेळी बेगमेने दिवा विझविला. राजांनी त्वरेने अंदाजाने वार केला. खानाची किंकाळी उमटली. बेगमांचा आक्रोश वाढला.

साऱ्या महालात एकच धावपळ उडाली. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात राहिला नाही. अंधारात सर्रास कापाकापी चालू झाली होती. किंकाळ्या उठत होत्या. खानाचा मुलगा अब्दुल फत्ते बापाच्या रक्षणार्थ धावला; पण त्याची क्षणात कत्तल झाली. या गोंधळात काही मावळे वाड्यातल्या पाण्याच्या हौदात पडले.

राजांनी इशारत केली. वाड्याच्या प्रथम दरवाजात असलेले वाजंत्रीवाले उठले होते. मावळ्यांनी त्यांना चौघडे बडवायला सांगितले. जेव्हा राजांचे लोक वाड्याच्या मागच्या दिंडीदरवाजाजवळ गोळा झाले हाते, तेव्हा नगारखान्यावर नगारा वाजत होता.

वाड्यात किलकारी उठताच इब्राहीमच्या पठाणांनी वाड्याभोवतीचे पहारे कापले होते. राजे दिंडीदरवाजाने बाहेर आले. सर्जेराव घोड्यावर स्वार होऊन दुसरा घोडा हाती धरून उभे होते. राजे स्वार झाले. साऱ्यांनी आपली जनावरे पकडली. इब्राहीमखानाचे पथक आले, तसे दौडत निघाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वाड्यातून उठलेल्या किंकाळ्या, पाठोपाठ झडणारा चौघडा ऐकून पहाऱ्याचे स्वार वाड्यासमोर गोळा झाले. तोच इब्राहीम ओरडला,

‘खान मारे गये! गनीम भाग गया! पीछा करो! पकडो!’

इब्राहीमने बोट दाखविलेल्या दिशेकडे अश्वपथक उधळले. पाठोपाठ इब्राहीम आपल्या पथकासह ‘पकडो! गनीम भाग गया!’ ओरडत धावत होता. खानाच्या छावणीत एकच गोंधळ उडाला होता. पुढच्या अश्वपथकाच्या पाठोपाठ भरधाव वेगाने राजांचे अश्वपथक धावत होते. ‘पकडो, मारो!’ म्हणत नेताजी, तानाजी, मोरोपंत आपल्या पथकांसह राजांना येऊन मिळत होते. राजांच्या स्वाराने पुण्याबाहेर येताच कर्णा वाजविला. त्याचे आवाज उठत होते. कात्रजजवळ रानातून तसाच आवाज उठला.

पुढे गेलेले अश्वपथक घाटावर पोहोचले. पथकाने विचारले,

‘गनीम यहाँसे भाग गया?’

‘नहीं, हुजूर!’

पथकाचा सरदार गोंधळला. तोच त्याच्या स्वाराने बोट दाखवीत सांगितले,

‘हुजूर! ते पाहा!’

सरदार पाहत होता. खालच्या दरीतून मशाली पळत होत्या. सरदाराचा संताप भडकला. समोर आलेल्या पहारेकऱ्यावर तलवार चालवीत तो ओरडला,

‘दगाबाज!’

क्षणात पहारेकऱ्याला शासन मिळाले; आणि खानाचा सरदार कात्रजच्या घाटाच्या रोखाने उतरू लागला. पाठोपाठ राजांचे पथक घाटावर आले. खानाचे पथक मशालींच्या दिशेला वळलेले पाहताच राजांचे घोडदळ कोंढाण्याच्या दिशेला लागले. खानाच्या पथकाला मागून टापांचा आवाज ऐकू येत होता. पण त्यांना आपलीच कुमक आहे, असे वाटून ते त्वेषाने मशालींचा पाठलाग करण्यासाठी रानातून घुसले होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मशाली नजीक आल्या. सरदाराचे डोळे विस्फारले गेले. साऱ्या रानात बैल धावत होते. शिंगांचे पलोते फरफरत होते. अनेक झाडांच्या फांद्यांवर तशाच मशाली बांधल्या होत्या. ते बघून खानाचा सरदार जागच्या जागी खिळून राहिला. त्याच्या नजरेसमोर काजवे चमकू लागले.

नवमीच्या पहाटे राजे कोंढाण्यावर पोहोचले. रामजन्माच्या दिवशी सूर्योदयाला राजे कोंढाण्यावरून सूर्यदर्शन घेत होते.

□

११

शाही मिजाशीने दरवळणाऱ्या, मोगली ऐश्वर्याने झगमगणाऱ्या लाल महालावर अवकळा पसरली होती. अब्दुल फत्तेच्या प्रेताभोवती बेगमांचा आक्रोश उसळला होता. रात्रीच्या अंधारात मारल्या गेलेल्या बेगमा, दासी, खोजे यांची वस्त्राच्छादित प्रेते दफनाची वाट पाहत होती. खुद्द शास्ताखानाच्या उजव्या हाताची तीन बोटे तुटली होती. हकिमाने मलमपट्टी केलेल्या हाताकडे खान हताशपणे पाहत होता. अजून खानाच्या अंगाचा कापरा गेला नव्हता.

साऱ्या छावणीत एकच गडबड उडाली होती. शिवाजीने रात्री लाल महालावर हल्ला केला, यावर कुणाचाच विश्वास बसत नव्हता. सारे सरदार लाल महालासमोर गोळा झाले होते. सरदारांना पाहताच खानाचा क्रोध उफाळला. सरदारांच्या गाफिलपणामुळे हा प्रकार झाला, असा खानाचा पक्का समज झाला होता. शास्ताखान खुद्द औरंगजेबाचा रिश्तेदार. आता थोट्या हाताने औरंगजेबासमोर कोणत्या तोंडाने जायचे, याचा शास्ताखानाला विचार पडला होता.

आपल्या मुलाचे, बेगमांचे दफन करून शास्ताखान लाल महालात आला. रात्र पडू लागली. तसा त्याचा धीर सुटू लागला. सारी रात्र त्याने आणि लाल महालाने जागून काढली.

खानाची फौज कोंढाण्याजवळ येताना दिसताच राजांनी इशारत दिली. फौज फारशी नव्हती. राजांनी गडाचे दरवाजे उघडेच ठेवायला सांगितले. तटावर कोणी माणूस दिसत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नव्हता. गडावर भगवे निशाण फडकत नव्हते. मोकळे दरवाजे आणि निर्मनुष्य तट पाहून खानाचे सैन्य पुढे झेपावले. शिवाजी गड सोडून पळून गेला, असाच त्यांचा समज झाला. क्षणाक्षणाला खानाचे सैन्य पुढे सरकत होते. आघाडीच्या हत्तीवर मोगली ध्वज फडकत होता.

खानाचे सैन्य गडापाशी येऊन भिडले. वाट भरून सैन्य वर येत होते आणि अचानक 'हर हर महादेव' च्या गर्जनेने कोंढाणा भरून गेला. खानाच्या सैन्याने वर पाहिले. त्यांचा डोळ्यांवर विश्वास बसेना. गडावर भगवा ध्वज फडकत होता. तोफांचे आवाज, धुराचे ढग उठू लागले. आघाडीचा हत्ती तोफेच्या गोळ्यात सापडला. तोफा सारख्या धडाडत होत्या. बिथरलेल्या घोड्यांच्या टापांखाली मोगल सैन्य सापडत होते. खानाच्या सैन्याची दुर्दशा उडून गेली. माघार घेईपर्यंत निम्मी फौज हकनाक बळी पडली. खानाच्या सैन्याने कशीबशी माघार घेतली, तोच गडाच्या दरवाजातून घोडदळ बाहेर पडताना नजरेत आले. खानाच्या सैन्याचा उरलासुरला धीर सुटला आणि फौज जीव घेऊन पळत सुटली. राजे हा विजय समाधानाने गडावरून पाहत होते.

शिवाजीराजांपाठोपाठ गेलेल्या सैन्याची दाणादाण झाल्याची वार्ता पुण्यात आली. शास्ताखान ते ऐकून पुरा धास्तावला. आता त्याचा कुणावरही विश्वास राहिला नव्हता. तो म्हणाला,

'गनीम खाशा डेऱ्यापर्यंत येईतो कुणी वजीर हुशार नाहीत; कोणी खबरदार नाहीत. अवघे फितव्यात मिळाले. आज त्या शिवाजीनं बोटं तोडली; उद्या मागती येऊन शिर कापून नेईल. दगेखोर आणखीन दगा देईल. लष्कराचा इतबार राहिला नाही. या लोकांबरोबर राहणं जमणार नाही.'

खानाने आवराआवर केली; आणि तिसऱ्याच दिवशी त्याने पुण्याचा आपला मुक्काम हलविला. जसवंतसिंगाला काही फौजेनिशी पुण्यात शिवाजीचा पराभव करायला ठेवून खान औरंगाबादेच्या वाटेला लागला. त्याला आता पुण्यात ठेवून घेण्याचे सामर्थ्य कुणात उरले नव्हते.

खानाच्या छाप्यात जे जखमी झाले होते, त्यांना कोंढाण्याला ठेवून राजे राजगडावर आले. गडावर एकच आनंद उसळला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खानाची बोटे तुटली, व तो पुण्याहून गेला, ही बातमी दोन दिवसांत गडावर आली. राजे ती बातमी ऐकून नाराज झाले. त्यांचा असा समज होता की, अंधारात केलेला वार कारीगर झाला असेल.

राजे म्हणाले, ‘श्रीजगदंबाकृपेनं फत्ते होऊन आलो. शास्ता म्हणजे शिक्षा. पातशाहानं नाव ठेविलं; पण नावाप्रमाणे खानानं करामत केली नाही. आम्ही शास्ताखानास शास्त केली. जे पातशहास जमलं नाही, ते आम्ही शास्त करून नाव रुजू केलं.’

शास्ताखानाच्या पराभवाच्या आनंदार्थ जिजाबाईंनी साखर वाटली; आणि गडावरून तोफांच्या फैरी झाडल्या गेल्या.

सायंकाळी राजे एकटेच महाली होते. पुतळाबाई महालात आल्याचे पाहून राजांना आश्चर्य वाटले. पुतळाबाई आल्या. महाली येऊन उभ्या राहिल्या. राजे नुसते पाहत होते. पुतळाबाई राजांची नजर टाळीत होत्या. वाढत्या क्षणाबरोबर त्यांच्या मनाचा गोंधळ वाढत होता. तो असह्य होऊन पुतळाबाई एकदम म्हणाल्या,

‘जाते मी!’

पुतळाबाई दारापर्यंत गेल्या, आणि एकदम हाक आली.

‘पुतळा!’

पुतळाबाई वळल्या. राजांनी विचारले,

‘काय मनात होतं?’

‘काही नाही!’

राजे उठले. पुतळाबाईंच्या जवळ जात ते म्हणाले,

‘शत्रूंच्या हालचाली, त्यांचे मनसुबे आम्ही जाणतो. पण आम्हांला आमच्या माणसांचं मन जाणता येत नाही. सांग ना, का आली होतीस?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुतळाबाई म्हणाल्या, ‘आपण मोहीम जिंकलीत, आणि मी मात्र अडचणीत सापडले.’

‘कसली अडचण?’

‘मला काही समजत नाही! आपण गडावरून गेलात. मनाला चैन पडेना. नाही नाही ते मनात येऊ लागलं. तेव्हा तशीच खाली देवीच्या देवळात गेले. नवस बोलून मोकळी झाले.’

राजे हसले. पुतळाबाईंचा चेहरा उंचावत ते म्हणाले,

‘मग त्यात एवढं संकोचायचं काय कारण? नवस फेडून टाका.’

पुतळाबाई रडकुंडीला येऊन म्हणाल्या, ‘तीच तर खरी अडचण आलीय् ना! मला नवस फेडता येत असता, तर केव्हाच फेडला असता.’

‘म्हणजे? काय बोललीस तू?’

‘अक्कलच कमी! गेले हवं ते बोलून. मी बोलले... यात यश मिळू दे. आम्ही दोघे तुझी खणानारळांनी ओटी भरू.’

राजे गंभीरपणाचा आव आणीत म्हणाले, ‘हे मात्र खरंच कठीण दिसतं, हं! त्यात थोरल्या राणीसाहेबांना कळलं, तर पाहायलाच नको.’

‘मला भीती वाटते, ती त्यांच्याच रागाची!’

राजे हसून म्हणाले, ‘पुतळा, काळजी करू नकोस. आम्ही काही तरी वाट जरूर काढू.’

‘खरं?’

‘अगदी खरं!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाबड्या पुतळाबाई नकळत हसून गेल्या. ते समाधान पाहून राजे मोहरले. पुतळाबाई म्हणाल्या,

‘जाते मी. नाही तर चौकशी होईल.’

‘एवढं भ्यायचं काय कारण? जरा बैस ना! तुमच्या बरोबर बोलायला आम्हांला फारसा वेळ मिळत नाही.’

‘नको. जाते मी.’

पुतळाबाई निश्चयाने वळल्या. त्याच वेळी त्यांचा हात पकडला गेला. पुतळाबाईंचे सारे अंग शहारून उठले. हाताला कंप सुटला. कानांवर शब्द आले,

‘पुतळा, ही आमची आज्ञा आहे!’

दुसऱ्या दिवशी सकाळी राजे स्नान, पूजा आटोपून खाली आले. जिजाबाई आपल्या महाली बसल्या होत्या. शंभूबाळ मांडीवर होता. बैठकीजवळ सोयराबाई, पुतळाबाई, सगुणाबाई, काशीबाई उभ्या होत्या. राजांनी जिजाबाईंचे पाय शिवले. शंभूबाळांनी उठून राजांना नमस्कार केला. शंभूबाळांना जवळ घेत राजांनी विचारले,

‘मासाहेब, इथं तर सारेच जमलेत! काय बेत?’

‘अरे, बेत कसला? तू आलास, तशाच मुली पाया पडायला आल्या होत्या.’

‘मग काही हरकत नाही.’ राजे म्हणाले.

‘आबासाहेब, शास्ताखानाची बोटं तुटली?’ शंभूबाळांनी विचारले.

‘हो!’

‘तुमी तोडली?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो!’

‘मग त्याला मारलंच का नाही?’

सारे हसले. राजे म्हणाले,

‘आम्हांला जमलं, तेवढं केलं. तुम्ही मोठे झालात, की उरलेलं काम करा. मासाहेब. आम्ही मोहीम फत्ते केली, पण एक काम राहून गेलं.’

‘कसलं?’

‘खानावर चालून जाताना, गड सोडताना आम्ही देवीला नवस केला, की काम फत्ते झालं, तर खणानारळांनी जोडीनं ओटी भरू!’

‘मग, बाबा, उगीच दिरंगाई नको. आज शुक्रवार आहे खरा. संध्याकाळीच जाऊन ओटी भरून या!’

पुतळाबाई उभ्या जागी लाजल्या होत्या. त्या राजांची नजर टाळीत होत्या.

दोन प्रहरी राजे सोयराबाईंना म्हणाले,

‘संध्याकाळी पद्मावतीमाचीवर जायचं ना?’

‘खरं सांगू?’ सोयराबाई म्हणाल्या, ‘गड चढणं-उतरणं नको वाटतं. धाप लागते.’

‘तसं काही खास कारण नाही ना?’

‘चला! काही तरीच तुमचं?’

राजे म्हणाले, ‘ठीक आहे! आम्ही धाकट्या राणीसाहेबांना घेऊन जाऊ.’

संध्याकाळी राजे पुतळाबाईंसह गडाखाली माचीवर उतरले. पूजासाहित्य घेऊन मनोहारी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मागे उभी होती. राजांनी आणि पुतळाबाईंनी देवीची ओटी भरली. पुतळाबाईंचा आनंद मनात सामावत नव्हता.

धाकट्या राणीसाहेबांना एवढे आनंदी कुणी पाहिले नव्हते. कुणाला त्या आनंदाचे कारण कळत नव्हते.

□

१२

शास्ताखानाच्या छाप्यानंतर आठच दिवसांत राजांनी कोकणची मोहीम काढली. राजापूर, कुडाळ, वेंगुर्ला हे मुलूख जिंकून नवे कौल, आश्वासनपत्रे देऊन राजांची स्वारी थेट बांद्यापर्यंत गेली. पावसाळा सुरू झाला. मोगली फौज महाडपर्यंत आल्याची बातमी आली; आणि राजे माघारी वळले. या मोहिमेत आर्थिक लाभ झाला नसला, तरी कुडाळ सावंतांच्या मुलुखाचा बंदोबस्त व कोकण प्रांतातले राजांचे वर्चस्व वाढले. एवढे यश पदरात घेऊन राजे भर पावसाळ्यात राजगडाला आले.

शास्ताखानाने तीन वर्षांत शिवाजीराजांचा पुणे मुलूख जवळ जवळ उद्ध्वस्त केला होता. गावे परागंदा होऊन कोकणच्या आश्रयाला गेली होती. शास्ताखान गेला, तरी पुण्यात जसवंतसिंग आपल्या सैन्यासह तळ देऊन होता. त्यामुळे तो मुलूख सुरक्षित नव्हता. कोकण अस्थिर असल्याने कोकणचाही म्हणावा तसा वसूल येत नव्हता. मोगली फौजेने प्रजेची केलेली ससेहोलपट, राज्यावर बसलेल्या लढाईचा अखंड ताण, पागा आणि शिलेदार यांचा वाढता ताण यांमध्ये राजांची परिस्थिती मोठी बिकट झाली होती. हा खर्च भरून काढण्यासाठी कुठे तरी मोहीम आखणे जरूर होते. प्रधानांनी सल्ला दिला,

‘कर्नाटकात गेल्यास फायदा होईल.’

राजांनी नकारार्थी मान हलविली. ते म्हणाले,

‘आदिलशाही आमच्याबाबत निर्धास्त बनली आहे. हा सलोखा राखणं आवश्यक आहे. आज ना उद्या शास्ताखानाच्या पराभवाचा सूड उगविण्याकरिता मोगल चालून येतीलच. त्या वेळी आदिलशाहीचं वैर आम्हांस झेपणार नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मग यातून उपाय?’ जिजाबाईंनी विचारले.

‘त्याची काळजी आताच कशाला?’ राजे म्हणाले, ‘जगदंबा आमच्या पाठीशी आहे. तिच्यावर आमचा विश्वास आहे. ती आम्हांला निश्चित मार्ग दाखवील.’

बहिर्जी नाईक आल्याची वर्दी आली. राजे म्हणाले,

‘चला! आता आणखीन काय बातमी आलीय्, ती ऐकू.’

बहिर्जीने येऊन मुजरा केला. राजांनी विचारले,

‘काय, बहिर्जी, जसवंतसिंग काय म्हणतात?’

बहिर्जी म्हणतात, ‘जसवंतसिंग तळ उठवील, असं वाटत नाही. उलट, जसवंतसिंग फौजफाटा गोळा करीत आहे.’

राजांनी नि:श्वास सोडला, ‘आणि?’

‘आनी काय न्हाई! राजं, भेटलं त्यो मानूस इचारतोय्, ह्यो फौजफाटा कवा हलणार? लोक लई कटाळल्यात.’

‘खरं आहे. बहिर्जी, तू थांब. तुला कामगिरी सांगायची आहे.’ राजांनी सर्वांकडे नजर टाकली; आणि ते म्हणाले, ‘ज्या मोगल सैन्यानं आम्हांस त्रास दिला, त्याचा खर्च आम्हांला मोगलांकडूनच भरून काढला पाहिजे. पाहू, काही तरी मार्ग सुचेल.’

दुसऱ्या दिवशी सकाळी राजे बराच वेळ बहिर्जीशी बोलत होते. दोन प्रहरी बहिर्जी गडाखाली उतरताना दिसला.

पावसाळा सरला. थंडी पडू लागली. गड पहाटेच्या धुक्यात भिजू लागला. राजे संभाजीराजांच्या सहवासात, कुटुंबपरिवारात दिवस काढीत होते.

एके दिवशी सायंकाळी राजे संभाजीबाळांसह गडावर फेरफटका करीत असता महंमद

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सईस तेथे आला. महंमद सईस राजांच्या खास अश्वशाळेवरचा प्रमुख. राजांनी विचारले,

‘महमंद, का आलास?’

‘हुजूर, विश्वासची तबियत नासाज आहे.’

‘काय होतं?’

‘बुखार आहे.’

‘केव्हापासून?’

‘कालपासून. वैद्यांनी दवा दिला; पण गुण नाही. आज बिमारी जास्तच वाढली आहे.’

‘गवत खातो?’

‘जी, नाही.’

‘पाणी?’

‘प्याला.’

‘चलबिचल आहे? धापतो?’

‘पडून आहे, सरकार!’

‘आम्ही पागेत येतो. तू चल पुढं.’

विश्वास म्हणजे राजांचा आवडता घोडा. सदैव मोहिमेत विश्वास असायचा. तोच विश्वास बिमार असल्याचे ऐकून राजे चिंताचूर झाले. दिवस मावळायला आला होता. संभाजीराजांना वाड्याकडे पाठवून राजे सरळ पागेकडे आले.

गडाच्या मोहनबुरुजापाशी अश्वशाळेची इमारत होती. अश्वशाळेची इमारत चौसोपी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

असून, मध्ये एक प्रशस्त चौक होता. चारी बाजूंनी तबेले होते. राजांच्या खास घोड्यांसाठी ती इमारत बांधली होती. मधल्याच चौकात चंदी, रातब, डंका, निशाण वगैरे ठेवण्यासाठी एक टुमदार इमारत होती. प्रत्येक घोड्याच्या ठाणामध्ये कमरेपेक्षा उंच भिंत होती. पागेच्या दरवाजाजवळ आतल्या बाजूला एक सुबक विहीर होती. पागेच्या प्रथम देवडीत खांबाला बांधलेले माकड कट्ट्यावरून पागेची हालचाल पाहत होते. शेजारी बांधलेला एडका देवडीच्या कट्ट्याला अंग घाशीत होता.

राजे पागेत आले, तेव्हा मशाली पेटल्या होत्या. पागेतले सारे चाकर अदबीने मुजरे करते झाले. राजांच्या बरोबर महादेव, तानाजी होते. राजांचा आवाज ऐकताच राजांची आवडती घोडी तुरंगी, इंद्रायणी, गजरा, रणभीर, कृष्णी उभ्या जागी खूर आपटू लागली; ठाणाच्या बाहेर तोंड काढून फुरफुरू लागली. राजे पागेत आले की, सर्वांवरून हात फिरवीत फिरत असत. पण राजांनी आज कुणाकडेही पाहिले नाही. सरळ विश्वासच्या तबेल्याकडे गेले. तबेल्याजवळ अश्ववैद्य, महंमद उभे होते. राजांनी विश्वासकडे पाहिले. विश्वास तबेल्यात पडून होता. आजूबाजूला माणसांची वर्दळ असूनही ते उमदे जनावर गवतावर झोपून होते. विश्वास एवढा आजारी असेल, असे राजांना वाटले नव्हते. ते तबेल्याचा कट्टा झटकन चढून गेले. त्यांनी हाक मारली,

‘विश्वास ऽ ऽ’

विश्वासचे कान हलले. तो जागच्या जागी फुरफुरला; आणि त्याने पडल्या जागेवरून राजांकडे पाहिले. राजांनी वैद्यांना विचारले,

‘काय झाल्‌ंय विश्वासला?’

‘ताप आहे, महाराज!’

‘बरा होईल ना?’

‘औषधं दिलीत, राजे!’

‘बरा होईल ना?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज, जनावरांच्या आजाराचं काही सांगता येत नाही. सकाळपर्यंत उभा होता. काळजी वाटली नाही. दोन प्रहरी झोपला. उभ्या जनावरांच्या रोगाची काळजी वाटत नाही. पण जनावर पडलं, की काळजी वाटते. हा विश्वास उभा व्हायला हवा.’

राजे ऐकत होते; पण डोळे विश्वासवर खिळले होते. राजे विश्वासजवळ गेले. बसले. त्यांचा हात विश्वासच्या चेहऱ्यावरून फिरत होता. राजांच्या डोळ्यांत पाणी होते.

‘राजे!’ तानाजी म्हणाला, ‘रात्र झाली. तुमी जावा. आमी बसतो.’

राजांनी वर पाहिले. ते म्हणाले,

‘तानाजी, जाऊनही चैन पडायचं नाही. असं उमदं जनावर मिळायचं नाही. रात्र असो, दिवस असो, गती मंद असो, दौड असो, वाट सरळ असो, आडवाट असो... विश्वासवर मांड टाकली, की मन निश्चिंत असायचं.’

‘महाराज, हजार घोड्यांत विश्वास उठून दिसायचा!’ महादेव म्हणाला.

कुणी तरी पुढे होऊन राजांच्या जवळ घोंगडे पसरले. राजे घोंगड्यावर बसले. विश्वासच्या आठवणी निघाल्या. त्या मुक्या जनावरावरून हात फिरवीत राजे बोलत होते. विश्वासच्या नाकपुडीतून उष्ण श्वास बाहेर पडत होते.

बराच वेळ गेला. रात्र वाढली; आणि पागेत मशाली शिरल्या. तानाजीने वर्दी दिली.

‘मासाहेब, महाराज!’

राजे उभे राहिले. मासाहेब आल्या. त्यांनी तबेल्यावरून नजर फिरवली. त्या म्हणाल्या,

‘फार आजारी आहे?’

‘होय, मासाहेब! दोन प्रहरापासून उठला नाही. ताप आहे.’

जिजाबाईंनी विश्वासवरून हात फिरविला. त्या म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ताटाला तुम्ही आला नाहीत. सारी खोळंबलीत.’

‘मासाहेब, भूक नाही. मनही स्वस्थ नाही. आम्ही आज जेवणार नाही.’

‘इथंच बसून राहणार?’

‘दुसरं काय करणार? जेवढं करणं शक्य आहे, तेवढं वैद्यराजांनी केलं आहे. निदान हा डोळ्यांसमोर तरी राहील!’

जिजाबाईंनी मागे पाहिले. दासी पुढे झाल्या. त्यांनी विश्वासची दृष्ट काढली. थोडा वेळ थांबून जिजाबाई वाड्याकडे गेल्या.

राजे गुडघ्यांत मान घालून बसले होते. वाढत्या रात्रीबरोबर साऱ्यांच्या नजरेत झोप चढत होती. सर्वत्र नीरव शांतता होती. अचानक घोडे फुरफुरले. राजांनी मान वर केली. विश्वास उठायचा प्रयत्न करीत होता. राजे धडधडत्या अंत:करणाने पाहत होते. विश्वास अर्धवट उठला; आणि परत पडला. पुन्हा त्याने सारे बळ लावून धडपड केली; आणि विश्वास उभा राहिला. राजे त्याच्याकडे पाहत होते. विश्वास तोंड पुढे करून राजांची मान चाटीत होता. राजांना गुदगुल्या झाल्या. ते हसले. राजे उभे राहिले. त्यांनी हाक मारली,

‘तानाजी, महंमद, महादेव...’

बाजूला कट्ट्यावर पेंगणारे सारे धडपडून उठले, तबेल्याकडे धावले. विश्वास उभा होता. राजे त्याला कुरवाळीत होते. वैद्य आनंदाने म्हणाले,

‘महाराज, आपण निश्चिंत होऊन विश्रांती या. विश्वासला आता कसलाही धोका नाही.’

सारे समाधानाने वाड्यात आले. उत्तररात्रीला सुरुवात झाली होती. राजे थकलेले होते. ते सरळ आपल्या महाली जात असता मागून आवाज आला,

‘राजे!’

राजे वळले. मासाहेब दारात उभ्या होत्या. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मासाहेब, झोपला नाही?’

‘झोप येईना. कसा आहे विश्वास?’

‘उभा राहिला.’

‘बरं झालं. देवानं गाऱ्हाणं ऐकलं. विश्रांती घ्या.’

राजे महालात आले. समई तेवत होती. राजे पलंगावर झोपी गेले. काही वेळ गेला. राजांच्या डोळ्यांत झोप उतरत होती. तोच त्यांना जाग आली. त्यांनी पाहिले, कुणी तरी समईच्या ज्योती शांत करीत होते.

‘कोण?’

‘मी, मनोहारी.’

‘आणि राणीसाहेब कुठं आहेत?’

‘झोपल्यात.’

मनोहारीने समया शांत केल्या. एक ज्योत मंदपणे जळत होती. राजे म्हणाले,

‘दार ओढून घे; आणि तू जा.’

पावलांचा आवाज उठला. दार ओढून घेतल्याचा आवाज झाला; आणि महालात शांतता पसरली.

सकाळी जेव्हा राजे स्नान, पूजा आटोपून महालात आले, तेव्हा सोयराबाई राणीसाहेब महालात उभ्या होत्या. राजांनी विचारले,

‘राणीसाहेब, शंभूबाळ कुठं आहेत?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ते आपल्याच वळणावर गेलेत. सकाळी उठले; आणि समजताच पागेत गेलेत. दूध प्यायलाही अजून आले नाहीत.’

‘बाळराजांनाही आता कळू लागलं, म्हणायचं!’

‘हो पण आपल्या ह्या छंदापायी काल साऱ्यांना उपवास घडला. आमचं सोडा; पण मासाहेबांकडे तरी पाहायचं होतंत!’

राजे हसले. म्हणाले,

‘पण आम्हीही उपाशीच होतो ना!’

‘त्याऐवजी येऊन जेवून गेला असतात, तर काय बिघडलं असतं? वैद्य होते, सारे होते.’

‘तेही खरंच!’

‘मला, बाई, झोप आली. झोपून गेले मी.’

‘छान केलंत! मासाहेबांची पूजा झाली का, पाहा. आम्ही खाली येतोय्, म्हणून सांगा.’

सोयराबाई निघून गेल्या. राजांनी आपला दुशेला कमरेला आवळला; आणि ते वळणार, तोच महालाच्या दाराशी पुतळाबाई आल्या. त्यांच्या मागे मनोहारी होती. मनोहारीने तबक बैठकीवर ठेविले. राजांनी विचारले,

‘काय आहे?’

‘काल रात्री उपाशी राहिलात. थोडं फराळाचं आणलंय्.’

‘तुम्ही आमच्यावर रागावला नाहीत?’ राजांनी विचारले.

‘राग? आणि आपल्यावर? तो कशासाठी, बाई?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘व्वा! काल आम्ही जेवलो नाही. त्यामुळं मासाहेबांबरोबरच साऱ्या राणीवशाला उपवास घडला. केवढा अनर्थ घडला!’

राजे बैठकीवर बसले. मनोहारी, पुतळाबाई उभ्या होत्या. राजे फराळ करीत होते. पुतळाबाई म्हणाल्या,

‘काल आपण आलात, तेव्हा महाली आले. झोप लागली होती.’ थोडा वेळ थांबून त्या म्हणाल्या, ‘आता काळजीचं कारण नाही. विश्वासची तब्येत आता बरी आहे.’

‘तुम्हांला कसं कळलं?’

‘सकाळी मी आणि ही पागेकडे गेलो होतो. आता गवत खातो. खुद्द बाळराजे त्याला चारताहेत. बोलावलं, तरी येईनात. तिथंच आहेत ते.’

‘फारच थोड्यांना कळतं हे.’

राजे गडबडीने दूध प्याले, आणि उठले. फराळाचे बरेचसे तसेच राहिलेले पाहून पुतळाबाई उद्गारल्या,

‘हे काय? काहीच घेतलं नाहीत?’

राजांनी पुतळाबाईंकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित होते. ते म्हणाले,

‘नुसत्या अन्नानंच पोट भरतं, असं कुणी सांगितलं?... मासाहेब वाट पाहत असतील.’ म्हणत राजे उठले, आणि मासाहेबांच्या महालाकडे चालू लागले.

□

१३

दोन प्रहरच्या वेळी येसाजी, तानाजी, नेताजी राजगड चढत होते. पायांतल्या वहाणा करकरत होत्या. देवीच्या देवळात जाऊन तिघांनी देवीला वंदन केले; आणि तिघे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

देवळाबाहेर आले. नेताजी म्हणाला,

‘तानाजी, राजांनी काही तरी मोठा बेत आखलेला दिसतो.’

तानाजी म्हणाला, ‘मलाबी तसंच वाटतंया. राजांनी सारी फौज गोळा केलीया. साऱ्यांस्नी वर्द्या सुटल्यात. कालच राजांच्या बरोबर आमी खालच्या तळावर जाऊन आलो. राजांनी जातीनं सारी छावनी बघितली.’

‘होय. पण कुठला बेत काढलाय्, ते समजलं का?’ नेताजींनी विचारले.

येसाजी हसला. तो म्हणाला, ‘आता तुमीच इचारा की राजांस्नी!’

‘मी?’ नेताजी दचकून म्हणाले.

‘व्हय. तुमी सेनापती, राजांचे सोयरे. तुमांस्नी हे धाडस व्हत न्हाई, तर आमी काय इचारनार? बाकी, गेल्या दहा दिवसांत जसा बहिर्जी आला, तसं चारी वाटंनं नजरबाज गडावर दिसत्यात.’ तानाजी म्हणाला.

येसाजी म्हणाला, ‘कुटं का मोहीम असंना, पन आनी एक महिन्यानं ठेवाया पायजे व्हती.’

‘ते, रं, का?’ तानाजीने विचारले.

‘आवंदा पिकं झोकबाज आलीती. मळण्या आटोपून गेलं असतं, तर बेस झालं असतं.’

‘तुज्या मळण्या, आनी आमच्या न्हाईत? आमी पीकपानी सोडून आलो, ते?’

‘फुकट सोडशिला!’ नेताजी थांबले. दोघे त्यांच्याकडे पाहत होते. ‘मी राजांना कवा तरी सांगनार आहे.’

‘काय सांगणार?’ येसाजीने विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अरे, घरात तोटा पडला, तर कवाबी अंबारखान्यातनं दानं मिळत्यात. साऱ्या फौजेला हे माहीत आहे. आता पावसाळ्यात शेतावर पूर्वीसारखी राबणूक करीत नाहीत हे लोक.’

‘हे मातुर खरं!’ तानाजीने आपले थोराड मुंडासे डोलवले.

गडाच्या दरवाजाशी चौकी-पहारेकऱ्यांचे मुजरे स्वीकारून सारे वाड्यात आले. राजे सदरेवरच होते. शेजारी प्रतापराव सरनोबत, आनंदराव, मोरोपंत, निळोपंत, अण्णाजीपंत ही सारी मंडळी होती. नेताजी येत असलेले पाहून राजे म्हणाले,

‘चला. नेताजीकाका शिल्लक राहिले होते, तेही आले.’ तानाजी-येसाजींकडे पाहून राजांनी विचारले, ‘कुठं सापडले आमचे सेनापती?’

येसाजी हसून मुजरा करीत म्हणाला, ‘मोहिमेचं नाव काढलं; आणि दडून बसले की घरात! मग नाइलाज झाला. घरातनं ओढून काढून आणलं सदरेवर.’

सारे हसले. सदरेवर नेताजी येताच राजांनी निर्णय सांगितला,

‘नेताजी, उद्या बाहेर पडायचं.’

‘मोहिमेला जायचं?’ नेताजींनी विचारलं.

‘फिरायचे दिवस अजून यायचे आहेत.’ राजे म्हणाले. ‘तुमचा रोख आम्ही ओळखला. तुमच्यापासून लपवून ठेवण्यात काय अर्थ? अहमदाबादेचा मोगली खलिता आला आहे. महाबतखानानं पट्टणचं बंड मोडण्यासाठी आम्हांला तातडीनं बोलावलं आहे. ही संधी घेतली, तर आम्ही केलेल्या मदतीमुळं औरंगजेबाचा राग शांत होईल. जरा स्वस्थता लाभेल.’

ज्यासाठी सारे आतुर होते, तो मोहिमेचा बेत कळला. तो ऐकून सारे निराश झाले. राजांनी बादशहाच्या मदतीला एवढ्या तातडीने का जावे, हे कुणालाच कळत नव्हते. राजे सदरेवरून उठले, आणि आत गेले.

संध्याकाळी राजे जिजाबाईंच्या भेटीला गेले असता जिजाबाईंनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, उद्याची मोहीम महाबतखानाच्या मदतीसाठी आखलीत?’

‘कुणी सांगितलं?’

‘मोरोपंत म्हणत होते.’

‘केवढ्या लौकर आमचे बेत जगजाहीर होतात, मासाहेब! चला, मासाहेब, थोडं बोलायचं आहे. आमच्या महाली जाऊ.’

राजे जिजाबाईंसह महालात आले. राजांनी महादेवला महालाबाहेर उभे केले. राजे म्हणाले,

‘मासाहेब, हा खर्चाचा ताण आता सहन करणं अशक्य आहे. शास्ताखानानं जी प्रजा बेघरदार केली, त्या प्रजेला दिलासा देऊन ती माणसं जमवायला हवीत. याला प्रचंड पैसा लागणार.’

पण आणणार कोठून?’

‘ती विहीर आम्ही हुडकली आहे. अगणित संपत्तीनं ती काठोकाठ भरलेली आहे. तो गाळ उपसण्याकरिताच आम्ही जात आहो.’

‘काय सांगता? नीट बोला ना!’

‘मासाहेब, सुरतेवर स्वारी करणार आहो.’

‘सुरत?’

‘हो. सुरत म्हणजे मोगलांची दुभती गाय. लक्षावधी रुपये नुसते कररूपानं मोगलांना मिळतात. मक्केच्या हाजची तीच वाट. ती सुरत लुटून आम्ही आमची नुकसानभरपाई करायचं ठरवलं आहे.’

‘पण, राजे, पुरा मोगली मुलूख. केवढा लांब पल्ला!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'गेले चार महिने आमचे शेकडो नजरबाज इथून सुरतेपर्यंत पसरले आहेत. मोगलांच्या भर मुलुखात वसलेली सुरत निर्भयपणे माळावर वसली आहे. तिला तट नाहीत, शिबंदी नाही. मोगली राज्याच्या वेढ्यात सुरक्षित असलेली सुरत खास उद्यानात वावरणाऱ्या निर्भय राजपुत्रीसारखी नांदते आहे. शत्रूचं भय तिच्या स्वप्नातही नाही.'

'पण कुणी आडवं आलं, तर?'

'कोणी येणार नाही. शहाजादा मुअज्जम औरंगाबादेला आमच्या स्वारीला तोंड देण्याची तयारी करतो आहे. तशी आम्ही हूल उठविली आहे. गोव्यावरच्या आमच्या स्वारीच्या बातमीनं पोर्तुगीज भ्याले आहेत. आदिलशाही आपला मुलूख सांभाळण्यासाठी जागरूक होऊन बसली आहे. आणि खुद्द मोगलांच्या मदतीला आम्ही इमानी सरदार जातो आहो, हे कळल्यावर कोण आडवं येणार?'

'धन्य आहे तुमची! खुद्द घरच्यांना सुद्धा कसला पत्ता लागू देत नाही. बिचारे तुमचे सेनापती! त्यांच्यावर देखील अविश्वास?'

'गैरसमज होतोय्. मासाहेब! अविश्वास नव्हे; ही सुरक्षितता. आमच्या नजरबाजांना आमचे हेतू कळतात. आज खुद्द सुरतेत आमचे नजरबाज हिंडत आहेत; आमची वाट पाहत आहेत. आमची संगमेश्वरी जहाजं आज सुरतेच्या आसपास जाण्याची तयारी करीत आहेत. मोहिमेचा अंदाज चुकला, तर यश कसं मिळणार? उलट, एकट्यानचं आपल्या सर्व जबाबदारीवर मोहीम आखताना त्याच्या मनावर किती ताण पडतो, हे आम्हीच जाणतो. जिवाला जीव देणारी हजारो माणसं आमच्या शब्दावर प्रेमानं बाहेर पडतात. त्यांच्या जबाबदारीनं जीव वारेमोल बनतो.'

जिजाबाई उठल्या. राजांना म्हणाल्या,

'जिवाला संभाळा! मोहीम फत्ते करून, माघारी सुखरूप या.'

'मासाहेब, आम्ही हे यश असं मिळवू की, याला तोड राहणार नाही. मोगली फौजांच्या चार मोहिमांचा खर्च या एका मोहिमेत मिळवू. जेव्हा आम्ही परत येऊ, तेव्हा आणलेल्या अगणित संपत्तीनं साऱ्यांचे डोळे दिपून जातील. आमची ताकद शतपटीनं वाढेल. मासाहेब, आमचं स्वागत करताना तुमच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आजही आम्ही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाहतो आहो.’

जिजाबाईंनी शिवबाच्या पाठीवर हात ठेवला. दोघे महालाबाहेर आले. महादेव

उभा होता. जिजाबाईंनी विचारले,

‘महादेव घेणार ना बरोबर?’

‘तो म्हणजे आमची सावलीच बनलाय्. त्याला सोडून कसं चालेल?’

दुसऱ्या दिवशी पहाटे कुचाचा नगारा दुमदुमला. तुताऱ्यांचे आवाज, शिंगांचे आवाज होऊ लागले. राजांनी जिजाबाईंचा निरोप घेतला. भल्या थंड वेळी राजे सर्वांसह गड उतरले. राजांची आठ हजार फौज दौडू लागली. राजांनी आपल्या फौजेनिशी सरळ त्र्यंबकेश्वर गाठले. तेथे देवदर्शन करून राजे पुढे निघाले. ठायी ठायी वाटाडे आडवे येत होते, पुढची वाट दाखवीत होते. जव्हारमार्गे राजे सुरतकडे कूच करीत होते. दिवसा रानात विश्रांती व रात्रीचा प्रवास, यामुळे राजांच्या मजलीची कुणाला नोंदही झाली नाही.

□

१४

तापी नदीच्या दक्षिण तीरावर सुरतेचा टुमदार किल्ला वसला होता. किल्ला आकाराने लहान असला, तरी त्याची तटबंदी भक्कम होती. किल्ल्याला लागून पसरलेले सुरत शहर मात्र अगदी मोकळ्या मैदानावर वसले होते. दोन कोस लांब रुंद पसरलेल्या त्या शहराला तटबंदी नव्हती, खंदक नव्हते. शहराच्या चार सुरेख वेशी होत्या; पण त्यांचा उपयोग रक्षणापेक्षा शोभेकरिताच होता. कधी काळी मारलेल्या खंदकाची काही ठिकाणी खळग्यांच्या रूपाने निशाणी दिसे; पण तेही खळगे कोरडे पडले होते. पाठीशी समुद्र आणि सामोरा शेकडो मैल पसरलेला मोगली मुलूख असता मोगलांच्या व्यापारपेठेला संरक्षणाची गरज काय?

सुरत त्या वेळी वैभवाच्या कळसाला पोहोचले होते. औरंगजेबाला सुरतेच्या नुसत्या कराचे दहा लाख रुपये वर्षाला मिळत. साऱ्या देशाचे व्यापारकेंद्र म्हणून सुरतेचा लौकिक

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होता. इंग्रज, वलंदेज, हबसाण, तुर्क लोक याच बंदरातून व्यापार करीत असत. नाना देशीच्या, नाना वेषांच्या लोकांनी या शहराला शोभा आणली होती.

मोगलांचा सरदार इनायतखान निर्धोकपणे शहरावर सत्ता गाजवीत होता. इंग्रज साहेब ऑग्झेंडन आपली वखार राखीत होता; नदीपलीकडे असलेल्या स्वाली गोदीवर बसून सुरतेवर लक्ष ठेवीत होता. सुरतेपासून समुद्र थोडा दूर होता. छोटी गलबते स्वालीच्या गोदीपर्यंत येऊ शकत होती. तेथून सुरतेत नाना देशींचा माल आणला जाई; आणि हिंदोस्थानचा माल बाहेर जाई. शहराला लागून असलेल्या नदीकाठावर सुरतेच्या धनाढ्य व्यापाऱ्यांचे वाडे उभे होते. गावचे रस्ते वेडीवाकडी वळणे घेत जाणारे आणि अरुंद होते. श्रीमंतांचे महाल सोडले, तर सारे शहर साध्या घरांनीच सजले होते. वलंदेजांच्या आणि इंग्रजांच्या दोन वखारी आपल्या वेगळ्या धाटणीने शहरात नजरेत भरत होत्या.

सुरतेच्या बऱ्हाणपूरच्या वेशीचे चौकीदार सकाळच्या थंडीत कोवळ्या उन्हावर पाठी शेकत होते. रात्रीचा गारवा अजून अंगातून गेला नव्हता. शहरातील जकातघर शांत होते. नेहमी तेथे गडबड दिसायची. पण गोदीत जहाज न आल्याने तेथे फारशी धावपळ दिसत नव्हती. जकातघरापुढे नेहमी जागरूकता असे. सुरतेत येणारा वा बाहेर जाणारा माल मोगली अधिकाऱ्यांकडून कसून तपासला जाई. जकातनाक्यासमोर उभा असलेला मोमीन वाकडा चेहरा करून उभा होता. एक पहारेकरी म्हणाला,

‘क्यों, मोमीन, खडा क्यूँ?’

मोमीन म्हणाला, ‘आज काम मिळेल, असं दिसत न्हाई.’

‘अरे, दररोज काम कुठलं? आज सगळा थंडा कारभार आहे. गोदीवर जा.’

‘कालच जाऊन आलो. पण गोदीत एक गलबत नाही. पोट भरायसाठी मुलूख सोडून आलो; पण नशिबात उपवास! काम मिळणार कसं?’

पहारेकरी हसले; आणि मोमीन सावकाश वळला.

सुरतेतल्या इंग्रजांच्या वखारीजवळ असलेल्या छपरीबाहेर बाबूल घोड्याला नाल मारीत होता. बाबूल तसाच पोटापाण्याचा धंदा शोधीत सुरतेत पाच महिन्यांपूर्वी आला होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

साहेबांनी त्याच्या कामावर खूश होऊन त्याला वखारीजवळ छपरी घालून दिली होती. बाबूल जनावराला नाल ठोकीत होता. मोतद्दार आणि दोघे शेजारी उभे होते. त्याच वेळी रस्त्यांवर चाकांचा खडखडाट ऐकू आला. बाबूलने वळून पाहिले. वखारीतून घोड्यांचा चौकडा बाहेर पडीत होता. ऑग्झेंडनसाहेब चौकड्यात बसला होता. चौकड्यामागे तांबडा गणवेष केलेले दोन सेवक उभे होते. गाडीवरच्या खिळ्यावर चांदीचे पत्रे मढविले होते. साहेब येताना पाहून बाबूल हातचे काम टाकून उभा राहिला. गाडी सामोरी येताच त्याने सलाम केला. साहेब हसला; आणि गाडी पुढे गेली. मोतद्दार म्हणाला,

‘अरे, बाबूल, लौकर आटोप ना! जनावर अवघडलं.’

‘झालंच की! एकच नाल राहिला.’ म्हणत बाबूल कामाला लागला.

मोतद्दाराने विचारले, ‘अरे बाबूल, इथं एक भिकारी होता, तो कुठं गेला?’

बाबूलने चमकून वर पाहिले; आणि विचारले,

‘कोणता?’

‘अरे, तो इथं तुझ्या छपरीसमोर भीक मागत बसायचा. तो फाटके, गलिच्छ कपडे घातलेला, नि हातात एक वेळूची काठी आणि कटोरा घेतलेला?’

आठवल्यासारखं करून बाबूल म्हणाला, ‘दिला हाकलून! गरीब म्हणून जागा दिली, तर, साला, माझेच नाल चोरू लागला.’

मोतद्दार हसला. तो भिकारी चार महिन्यांत साऱ्यांच्या परिचयाचा झाला होता. साऱ्या शहरभर दिसायचा. अलीकडे कुठे त्याचे दर्शन झाले नव्हते.

शेवटचा नाल ठोकून बाबूलने मान वर केली. त्या उमद्या उंच्यापुऱ्या अबलख घोड्याकडे पाहत बाबूल म्हणाला,

‘भारी उमदं जनावर! सुरतेत जनावर पाळावं, तर सुभेदारसाहेबांनीच!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मोतद्दार म्हणाला, ‘मालिकांचा खरा शौक एवढा एकच. अस्सल अरबी जात आहे. अशी जातिवंत साठ घोडी मालिकांच्या तबेल्यात आहेत.’

‘खरं?’

‘तर काय खोटं सांगतो?’

‘आज गलबत आलं नाही, वाटतं?’ बाबूलने विषय बदलला.

‘का? तुला का चौकशी?’ मोतद्दाराने विचारले.

‘तुम्हांला काय? राजे तुम्ही. माझं पोट त्यावर आहे, बाबा! गलबत आलं, की माल उतरायला आणि न्यायला गडबड सुरू होते ना! मगच घोड्याच्या नालांची चौकशी होते.’

मोतद्दार हसला. ‘बाबूल, खरं आहे तुझं. पण, राजा, आज एकही गलबत नाही; दोन दिवसांत येणारही नाही. मी पहाटेच गोदीवर जाऊन आलो. जातो मी.’

‘आणि पैसे?’

मोतद्दाराने एकदम रूप बदलले. संतापून तो म्हणाला,

‘भिकारड्या! भीक मागत होतास, ते अन्नाला लागलास; आणि सुभेदारांच्या खास घोड्याचे पैसे मागण्यापर्यंत मजल गेली? सुभेदारांच्या कानांवर घालू?’

बाबूलने चटकन कान पकडले. ‘चूक झाली, मालक! परत नाही विचारणार!’

मोतद्दार आणि हुजरे घोड्यासह निघून गेले.

बाबूल चार दिवसांची आपली दाढी खाजवीत कट्ट्यावर बसून राहिला. नाना तऱ्हेचे कपडे केलेले नाना देशींचे लोक रस्त्याने जात होते. कुणी पालखीतून, तर कुणी घोड्यावरून जात होते. त्यांत फिरंगी, वलंदेज, गुजराती, सिद्दी, अरब असे अनेक लोक होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अंगावर पडलेल्या सावलीमुळे बाबूलने मान वर केली. डोकीला चपटे पागोटे बांधलेला, थकलेला रामशरण उभा होता.

‘काय, रामशरण?’

‘बाबूल, तुझं ठीक. पण तेल्याघरची नोकरी करून जीव नकोसा झालाय्.’

‘का, रे?’

‘अरे बाबा, फिरणारा बैल बघूनदेखील डोकं फिरतं. झोपेत सुद्धा मी फिरतो.’ रामशरणने इकडे तिकडे पाहिले; आणि तो म्हणाला, ‘वीरजी होराचा गलबताचा माल तयार झाला आहे. दोन-तीन दिवसांत गलबत येईल, असं म्हणत होते. बाबूल, जातो. नाही तर मालक परत शिव्या द्यायचा.’

रामशरण गेला. बाबूल इंग्रजांच्या वखारीतून चक्कर मारून आला.

दोन प्रहरच्या वेळी सुरतेच्या शांत रस्त्यावरून दोन स्वार भरधाव वेगाने सुभेदाराच्या हवेलीकडे जाताना दिसले.

सुभेदार इनायतखान गोड झोपेच्या अधीन झाला होता. त्याला जागे करण्यात आले. झोपमोड झाल्यामुळे त्रस्त झालेला इनायतखान महालात गेला. दोघां जासुदांनी मुजरे केले. लोडाला टेकून बसत जांभई देत इनायतखानाने विचारले,

‘काय झालं?’

‘हुजूर! शिवाजी गणदेवीत आला आहे. भारी फौज बरोबर आहे.’

इनायतखानाची झोप उडाली. शिवाजी? गणदेवीत? अवघ्या सोळा कोसांवर? नामुमकीन! इनायत हसला. म्हणाला,

‘बेवकूब! शिवाजी मोगली मुलुखात इथवर येईल कसा? तुमने खुद देखा है?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नाही, हुजूर! पण गणदेवीत एकच पळापळ सुरू झाली, ती पाहिली; आणि वर्दी द्यायला पुढं आलो.’

‘बिलकुल गवार! शिवाजी एवढ्या फौजेनिशी आला असता, तर मोगली मुलुखातनं कुणी सोडला असता त्याला? फिर ऐसी हवाई खबरें लानेकी हिंमत न करना!’

जासूद बाहेर गेले; आणि शिवाजीची कुणकुण लोकांत पसरू लागली. सायंकाळी दुसरी बातमी येऊन थडकली- शिवाजी सुरतेपासून अवघ्या अडीच कोसांवरच्या उधन्याला आला. इनायतखान विचारात पडला. पाठोपाठ आणखीन एक स्वार सुरतेत येऊन दाखल झाला. त्याने इनायतखानाला बातमी दिली,

‘हुजूर, कोणी तरी मोठा सरदार मोगली फौजांना कुमक करण्यासाठी अहमदाबादेला जात आहे.’

इनायतखान त्या बातमीने खूश झाला; पण शहरात चिंतेचे वातावरण पसरले होते. शहरात तिकटीतिकटीवर लोक जमून कुजबुजत होते. खुद्द इंग्रज व वलंदेज प्रतिनिधी इनायतखानाकडे आले. त्यांनी शहर सोडून स्वालीच्या गोदीवर जाण्याची आज्ञा मागितली.

इनायतखान म्हणाला, ‘एरवी व्यापार करायला तळ देता, आणि संकट आलं, की पळून जायचा विचार करता? तुम्ही मूर्खपणानं शहर सोडलंत, तर शहराची काय हालत होईल? तुम्हांला माझ्याप्रमाणेच शहर सोडता येणार नाही.’

‘पण ऽ ऽ’

‘हम कुछ उजर सुनना नहीं चाहते!’ इनायतखान हसला. ‘शिवाजी आलेला नाही. आमच्याकडे खास बातमी आली आहे. मोगल फौजेचा मराठा सरदार आपली फौज घेऊन अहमदाबादेला जात आहे. फिकर की कोई जरुरत नहीं.’

इनायतखानाने आपला जासूद उधन्याकडे पिटाळला. त्याने आलेल्या मराठा सरदाराला निरोप पाठविला :

‘आपको सुरत दाखल होनेकी जरुरत नही! तुमच्या आगमनामुळं प्रजा घाबरली आहे.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तरी तुम्ही परस्पर अहमदाबादेला जावं.'

सुभेदाराकडून बाहेर पडलेल्या इंग्रज प्रेसिडेंटाने व वलंदेजप्रमुखांनी विचारविनिमय केला; आपले दोन जासूद उधन्याला खरी परिस्थिती पाहण्यासाठी पाठविले, आणि सुरक्षितता म्हणून इंग्रज व वलंदेज वखारींतील बायका-मुले स्वालीच्या गोदीवर पाठवून दिली.

रात्री वलंदेजांचे पाठविलेले हेर परत आले. इनायतखानाने पाठविलेला जासूद गिरफदार केला गेला होता; पण चौकशी करून त्यालाही सोडून देण्यात आले. आलेला सरदार दुसरा कोणी नसून, खुद्द शिवाजी आहे, ही हेरांची खात्री होती; कारण राजापूरच्या हल्ल्याच्या वेळी दोघांनीही शिवाजीला पाहिले होते. आता कोणालाच शंका राहिली नव्हती. इंग्रज व वलंदेज सुभेदाराकडे धावले. सुभेदार संतापला,

'कोण आणतं असल्या खुळचट बातम्या?'

ऑग्झेंडन म्हणाला, 'सुभेदार, जरा होशमध्ये या. तुमचा जासूद शिवाजीने गिरफदार केला आहे. शिवाजीच आलेला आहे, याची आम्हांला खात्री आहे. आमच्या वखारींचं व शहराचं रक्षण करणं हे तुमचं कर्तव्य आहे. वेळ फार थोडा आहे.'

इंग्रजांचं ते थंडपणाचं भाषण ऐकून इनायतखानाचा दाढीवरचा हात सुटला.

खरंच शिवाजी आला?

तिघे विचार करीत असताच घोड्याच्या टापांचा आवाज आला. घोडा सुभेदाराच्या महालासमोर थांबला. सेवक धावत आला.

'हुजूर! शिवाजीचा वकील आला आहे!'

तिघेही भयचकित होऊन उभे राहिले. वकील आत आला. त्याने अदबीने शिवाजी राजांचे पत्र पुढे केले. खानाने पत्र उघडले. त्याचे हात थरथरत होते. पत्रात लिहिले होते...

'...उद्या दुपारी सूर्य मस्तकावर येण्याच्या आधी शिवाजीराजे सुरतेत पोहोचत आहेत. तेव्हा तुम्ही स्वत: आणि शहराचे धनाढ्य व्यापारी बहरजी बोहरा, हाजी कासम आणि हाजी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सय्यद बेग यांनी राजांना भेटून खंडणी निश्चित करून घ्यावी; नाही तर शहरावर आग आणि तलवार चालवू.'

इंग्रजांनी व वलंदेजांनी एक वेळ तिरस्काराने इनायतखानाकडे पाहिले; आणि ते आपल्या वखारींकडे निघून गेले.

भल्या पहाटे इनायतखान आपल्या बायकामुलांसह आणि जडजवाहीर घेऊन किल्ल्याच्या आश्रयाला गेला. सुभेदार आपल्या रक्षकांसह पळाल्याचे कळताच श्रीमंत व्यापारी जीव वाचविण्यासाठी किल्ल्याकडे धावत सुटले. मोठमोठ्या रकमांची लाच घेऊन इनायतखानाने त्यांना किल्ल्यात घेतले. सुभेदार पळाला; व्यापारी पळून गेले. शहरात एकच हाहाकार उडाला.

जायचं झालं, तरी जायचं कुठं?

पाठीशी नदी आणि समुद्र होता. तोंडासमोर आठ हजारांची छावणी पसरली होती. राजांचा तळ बसताच सर्व बाजूंनी चौकी-पहारे बसले होते. सुरतेतून बाहेर पडणे अशक्य बनले होते.

इंग्रजांनी आपल्या वखारींचा बंदोबस्त वाढविला; आणि येईल त्या प्रसंगी वखारींचे संरक्षण करण्याच्या तयारीने ते उभे ठाकले. वखारींच्या तटांवर चारही बाजूंना तोफा तयार दिसू लागल्या.

सुरतेतले गोरगरीब बोचकी पाठीला लावून पळत होते आणि त्याच वेळी इंग्रजांच्या तुतारीच्या आवाजाने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. खुद्द ऑग्झेंडन आपल्या दोनशे गोऱ्या शिपायांनिशी शहरातून दौड करीत होता. ते धारिष्ट पाहून साऱ्यांना अचंबा वाटला. काहींना परत धीर आला. शहरभर रूट मार्च करून इंग्रज परत वखारीत गेले. वखारींचे दरवाजे बंद झाले.

शहराच्या वेशीतले चौकीदार भयचकित नजरेने वेशीबाहेर पडणाऱ्या लोकांना पाहत होते. त्यांत बाबूल, मोमीन, रामशरण ही तिक्कल पाहताच एका पहारेकऱ्याने विचारले,

'बाबूल, तूही पळत सुटलास?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मग काय करू? शिवाजी ऽ ऽ’

‘अरे, पण शिवाजी आला, तर तुला काय करणार तो? एवढे मोठे लोक राहिले, आणि तू जातोस?’

‘सबसे बडी जान प्यारी, बाबा! शिर सलामत तो... आमचं सोडा, पण शिवाजी आला, तर पहिले मरणार तुम्ही...’

‘काय बोलतोस?’

‘खरं तेच सांगतो! सुभेदार इनायतखान बसला किल्ल्यात! आणि तुम्ही वेशीत! तोंडावर! उगीच शहर पळतंय्?’

‘जा, जा!’ घाबरून पहारेकरी म्हणाला.

तिघे वाटेला लागले; आणि थोड्याच वेळात वेशीचे पहारेकरी पण दिसेनासे झाले...

□

१५

सूर्य आकाशात चढत होता. मध्यान्हीचा समय जवळ आला असता टापांचा आवाज कानांवर येऊ लागला. एखादा मोठा वळीव पाऊस आवाज करीत यावा, तसा टापांचा अखंड नाद ऐकू येत होता. गावाबाहेरचे लोक विस्फारित नेत्रांनी समोर पाहत होते. झाडी ओलांडून येणारे घोडदळ नजरेत आले; आणि वेशीवर उभे असलेले लोक ओरडत गावातून पळू लागले.

आठ हजार स्वारांनिशी शिवाजीराजे सुरतेच्या बऱ्हाणपूर वेशीजवळ आले. वेशीलगतच्या स्मशानभूमीपासून शहाबेगमेच्या बागेपर्यंत कोसाची छावणी पसरली होती. एका डेरेदार आम्रवृक्षाखाली एक पाल ठोकण्यात आली. बाकी सारी छावणी अगदी उघड्यावर पथारे थाटून उभी होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे सुरतेकडे पाहत होते. अनेक बागांनी, उद्यानांनी सजलेल्या त्या सुरतेच्या मशिदींचे सफेद घुमट नजरेत येत होते. राजांच्या दिशेने बहिर्जी नाईक येत होता. त्याच्या पाठोपाठ सुरतेत बाबूल, रामशरण, मोमीन म्हणून वावरलेले विठोजी माणके, अप्पा रामोशी, अब्दुल कादर ही मंडळी येत होती. सर्वांनी राजांना जवळ येऊन मुजरे केले. राजांनी विचारले,

'विठोजी, काय म्हणते सुरत?'

'महाराज, आपली वाट बघते आहे.'

'काही विरोध व्हायचा नाही?'

'कोण करणार? सुभेदार सकाळीच पळून गेला. इंग्रज आणि वलंदेज तेवढे वखारी सांभाळून आहेत.'

'किती आहेत लोक?'

'फार तर दोनशेच्या आत-बाहेर होतील!'

'मोगली फौज?'

'काही नाही! सुरतेत पहारेकरीही नाहीत!'

'आम्ही निरोप पाठवलाय्!' राजे म्हणाले. 'त्याची वाट पाहू. जर बऱ्या बोलानं व्यापारी खंडणी द्यायला राजी झाले, तर सुरतेत लूट करायची आमची इच्छा नाही.'

संध्याकाळ झाली, तरी सुरतेतून कोणी आलं नाही. बहिर्जी म्हणाला,

'ठीक आहे. नशीब त्यांचं! नेताजी...'

नेताजी पुढे झाले. राजे म्हणाले,

'नेताजी, तुम्ही पाचशे स्वार घेऊन शहरात जा. शहरफटका करून या. येताना दहशत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बसावी, अशी थोडी लूट करून या. त्यानं कदाचित शहाणपण शिकतात का, पाहा! मोरोपंत...’

‘जी!’ मोरोपंत पुढे झाले.

‘तुम्ही साहेबांच्यासाठी पत्र पाठवा. तीन लक्ष रुपयांची खंडणी मागा. त्यांना सांगा की, आम्ही फक्त मोगलांच्या वैरानं येथे आलो आहो. आम्हांस इंग्रजांना अथवा वलंदेजांना धक्का लावण्याची इच्छा नाही. असा मसुदा तयार करून कुडतोजी गुजरांच्याकडे द्या. ते साहेबाचा अंदाज घेऊन येतील.’

थोड्याच वेळात कुडतोजी गुजरांची तुकडी राजांचे पत्र घेऊन सुरतेत शिरली. बरोबर बहिर्जी नाईक होता. कुडतोजीबरोबर आलेला बहिर्जी पाहताच ऑग्झेंडनचे डोळे विस्फारले गेले. बाबूलच्या छपरीभोवती बसणारा भिकारी त्याने आपल्या चाणाक्ष नजरेने चटकन ओळखला. ऑग्झेंडनने पत्र वाचले. त्याने निरोप दिला :

‘शिवाजीराजांना सांगा की, आम्ही व्यापारी; आमच्या जवळ नगद रुपये नाहीत; पण मसाल्याच्या अथवा कापडाच्या रूपानं खंडणी घेण्यास राजा तयार असेल, तर आम्ही जरूर देऊ. जोवर आमच्या मालाला अथवा वखारींना धक्का लागत नाही, तोवर तुमचा राजा काय करतो, याकडे आम्ही लक्ष देणार नाही. पण जर त्यांना आमच्याशी लढायचंच असेल, तर उद्या येणार असाल, तर आजच या, म्हणून निरोप सांगा. आम्ही वाट पाहतो.’

इंग्रजांचा निरोप घेऊन कुडतोजी छावणीत आले. तो निरोप ऐकून राजांच्या चेहऱ्यावर स्मित उमटले.

‘साहेब बिलंदर खरा. त्याला माहीत आहे की, आम्ही मसाल्याचं सामान, कपड्यांच्या गाठी, यासारखं अवजड ओझं नेऊ शकणार नाही.’

संतापलेले कुडतोजी गुजर म्हणाले, ‘राजे, आज्ञा करा. फार तर दोनशे टोपडी आणि चार तोफा! वखारी होत्या की नव्हत्या, असं करून माघारी येतो.’

‘हां, कुडतोजी! दमानं घ्या. सुरतेत आम्हांला लढाई नको आहे. मोगलांच्या मुलुखात आपण आहो. साहेबालाही ते माहीत आहे. म्हणूनच हा निरोप आहे. इंग्रजांना आणि

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वलंदेजांना जराही धक्का लावू नका. किल्ल्यात लपलेल्या सुभेदाराला भिवविण्यासाठी आमचे स्वार किल्ल्यापर्यंत जाऊ देत. त्याला बाहेर पडू देऊ नका. उद्या पहाटेपर्यंत वाट पाहून लुटीस सुरुवात करा. मोरोपंत, गलबतांचं काय झालं?'

'गलबतं गोदीवर आली आहेत.'

'छान!'

'राजे, पाहा.' राजांच्या मागे तळपती तलवार घेऊन उभ्या असलेल्या महादेवने सुरतेकडे बोट दाखविले. सूर्यास्ताच्या वेळी सुरतेवर धुराचे दोन स्तंभ उठले होते. राजे म्हणाले,

'नेताजींनी कामगिरी सुरू केली, असं दिसतं.'

सुरतेवर उठणाऱ्या धुराकडे सारे पाहत होते.

रात्र पडू लागली, तसे बैलगाड्यांतून भरलेले सामान छावणीकडे येऊ लागले. एवढ्या मोठ्या लष्कराच्या पोटापाण्याची सोय करण्यासाठी नाना तऱ्हेची भांडी, पिठांची गठडी बैलगाड्यांतून जात होती. गवतांचे गाडेही त्यांच्या मागून दिसू लागले. बैलगाड्यांच्या मागून एक बकऱ्यांचा कळपही वाटचाल करीत होता.

मराठ्यांच्या तळावर रात्र थंडी घेऊन उतरली. सर्वत्र शेकोट्या पेटू लागल्या. राजे आपल्या छोट्या तंबूबाहेर आसनावर बसले होते. समोर शेकोटी धगधगत होती. तंबूभोवती कडेकोट बंदोबस्त होता. पलोते, मशाली उजळल्या होत्या. तळावर अनेक ठिकाणी दगडांच्या चुलींवर स्वयंपाकाची तयारी चालली होती. नेताजी शहरातून आले. सोन्यारुप्याच्या नाण्यांनी व मोतीरत्नांनी भरलेल्या पिशव्या प्रत्येक स्वाराबरोबर होत्या. राजांच्या समोर ती लूट ठेवण्यात आली. ती लूट पाहून राजांनी विचारले,

'नेताजी, सारी सुरत एकाच दिवशी लुटली काय?'

'नाही, महाराज. सुरतेचा हा धुरळादेखील नाही. नुसते जकातनाके आणि अदमासे चार घरे यांची ही लूट आहे. आपल्या आज्ञेप्रमाणे फक्त दोनच घरांना आगी लावल्या.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तो पराक्रम आम्हांला इथूनही दिसला. नेताजी, उद्या सूर्योदयापर्यंत आपण वाट पाहू. इंग्रजांची काही हालचाल?’

‘काही नाही. वखारीचे दरवाजे बंद करून ते स्वस्थ आहेत.’

‘नेताजी, तळाची व्यवस्था पाहा. उद्या प्रत्येक स्वाराबरोबर एक रिकामं घोडं ठेवा. प्रत्येक अश्वपथकाचे दोन भाग करा. एकानं लूट करावी, दुसऱ्यानं ती तळावर आणावी. आमचे नजरबाज सारं शहर दाखवितील.’

रात्र चढली. थंडी वाढू लागली. तळाचे जेवणखाण आटोपल्यावर राजे सर्व तळावरून फिरून आले, आणि आपल्या तंबूत गेले. तंबूबाहेर धारकरी खडे झाले.

समोर सुरत काळोखात बुडाली होती. इंग्रज-वलंदेजांच्या वखारींवर पेटलेल्या मशाली सोडल्या, तर सर्वत्र काळोख होता. त्या काळोखात त्या मशाली अधिकच भयाण वाटत होता. मराठ्यांच्या तळावर लक्ष नक्षत्रे दिसावीत, तशा दिवट्यांच्या, मशालींच्या खुणा दिसत होत्या. शेकोट्या प्रज्वलित झाल्या होत्या. उशाशी घोडे ठाणबंद करून स्वार शेकोट्यांभोवती झोपी गेले होते. उघड्यावर पडलेल्या त्या तळावर एक चिमुकली पांढरी राहुटी उठून दिसत होती.

पहाटे तळ जागा झाला. राजे आपल्या तंबूबाहेर उभे होते. अंगावर पांढरी शाल होती. राजांच्या समोरची शेकोटी प्रज्वलित करण्याचा प्रयत्न महादेव करीत होता.

चांगले उजाडले. विरळ धुके उतरत होते. पूर्वेकडे तांबडी कड दिसत होती. नेताजी, कुडतोजी, येसाजी, तानाजी आपापल्या अश्वपथकांना सूचना देत होते. घोड्यांवर खोगीर चढविले गेले. आज्ञा घेण्यासाठी सारे राजांकडे आले. राजांचा चेहरा व्यथित दिसत होता.

सूर्योदयाची वेळ झाली. बालकिरणे सुरतेवर पसरली. राजांच्या आज्ञेची सारे वाट पाहत होते. त्याच वेळी काळा पायघोळ झगा घातलेले पाच इसम तळाकडे येताना दिसले. अग्रभागी चालणारा इसम गोरा होता. राजांच्या समोर त्यांना हजर करण्यात आले. दुभाष्यामार्फत बोलणी झाली.

आलेल्या इसमाचे नाव रेव्हरंड अँब्रोज होते. तो धर्मोपदेशक होता. अभय मागण्यासाठी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तो आला होता. राजांनी त्याला अभय दिले. राजे म्हणाले,

‘हे किरिस्ताँव चांगले सज्जन लोक आहेत. त्यांना अथवा त्यांच्या लोकांना कसलाही त्रास आम्ही देणार नाही.’

फादर अँब्रोजने सुरतेतल्या आणखी एका सज्जन व्यापाऱ्याची शिफारस केली. तो व्यापारी मेला होता, तरी त्याच्या दातृत्वाची कीर्ती सुरतेत राहिली होती. त्या व्यापाऱ्याने पुष्कळ दानधर्म केला होता. ते ऐकून राजांनी त्या व्यापाऱ्याची पेढी व घर सुरक्षित राखण्याची जबाबदारी खुद्द कुडतोजीरावांना सांगितली. फादर अँब्रोज आनंदाने माघारी गेला. राजांनी नेताजींच्याकडे पाहिले. नेताजींसह सर्वांनी मुजरे केले. राजे रूक्षपणे बोलले,

‘नेताजी, बायका-मुलं, गोरगरीब, मशिदी-प्रार्थनेच्या जागा, देवळे- मग ती कोणत्याही धर्माची असोत, त्यांना तोशीस लागता कामा नये.’

‘जी!’

राजे उभे राहिले. आपला डावा हात सुरतेकडे दाखवीत ते म्हणाले,

‘मोगली मिजास सांगणाऱ्या ह्या सुरतेची बेसुरत करा! हिचं सारं वैभव आमच्या स्वराज्यासाठी एक करा. जा!’

-आणि स्वार सुरतेच्या रोखाने दौडले.

सकाळची वेळ असूनही सारे रस्ते भयाण मोकळे होते. सर्व दरवाजे बंद होते. अश्वपथकांच्या अग्रभागी नजरबाज दौडत होते. वेचक श्रीमंतांची हेरून ठेवलेली घरे ते दाखवीत होते. क्षणात घराचे दरवाजे उन्मळून पडत होते. आतल्या बायकापोरांचा हलकल्लोळ उडत होता. मिळालेला नगद ऐवज आणलेल्या लांब पिशव्यांतून भरला जात होता. लपवून ठेवलेल्या द्रव्यासाठी व्यापाऱ्यांच्या, श्रीमंतांच्या पाठी चाबकांखाली फुटत होत्या. द्रव्यलोभाने संपत्तीला चिकटून राहिलेले व्यापारी, श्रीमंत बघता-बघता प्राणाला चिकटून राहून लपवून ठेवलेले सोने-नाणे हवाली करीत होते. कैद केलेले व्यापारी तळाकडे पाठविल्या जाणाऱ्या लुटीबरोबर जात होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मध्यान्हीचा सूर्य येईपर्यंत सुरतेत लुटीचे सत्र चालू होते. तेल्याच्या घरचे तेल आणून लुटलेल्या घरावर टाकून आगी लावल्या जात होत्या. सुरतेवर उठलेल्या धुराने आकाश भरून गेले होते. भर दिवसा सूर्य झाकळला होता.

तळाकडे अखंड रीघ लागली होती. लुटीबरोबरच कैदी पण तळावर येत होते. तंबूशेजारच्या आंब्याच्या फांदीला ऊन झाकण्यासाठी एक चादर बांधली होती. राजे आसनावर बसले होते. चारही बाजूंना धारकरी उभे होते. समोर येणाऱ्या लुटीचा ढीग पडला होता. उभे असलेले कारकून चांदी, सोने, रत्ने अशी लुटीची ठोकळ मोजदाद करीत होते.

दोन प्रहरी एक गोरा कैदी राजांच्या समोर उभा केला गेला. त्याचे नाव होते अँथनी स्मिथ. हा साहेब इंग्रज कंपनीचा नौकर होता. स्वालीच्या वलंदेजांच्या वखारीतून तो येत असता मराठा सैनिकांना तो वाटेत सापडला. इतर कैद्यांप्रमाणे तो राजांच्या समोर आला. काही कैद्यांचे तुटलेले हात त्याने पाहिले. तो भयचकित झाला होता. राजांनी अँथनी स्मिथकडे अफाट खंडणी मागितली; पण अँथनी स्मिथने आपण गरीब असल्याचे सांगितले. राजांचा विश्वास बसला नाही. राजांनी त्याचे हात तोडण्याचे फर्मावले. स्मिथने आपली नजर राजांकडे वळविली. तो हिंदोस्थानीमध्ये म्हणाला,

'हुजूर! मेरे हाथ क्यूँ तोडते हो? गर्दन मारी जाय, तो हमपर रहम होगी.'

राजांना त्या धाडसाचे कौतुक वाटले. त्यांनी शेजारच्या सेवकाला आज्ञा केली,

'त्याची टोपी काढून घ्या, आणि गर्दन मारा.'

स्मिथच्या डोक्यावरची टोपी काढून घेतली गेली. स्मिथ गुडघ्यांवर बसला. त्याने डोळे मिटले. त्याचे ओठ पुटपुटत होते. शांतपणे तो प्रार्थना करीत होता. तलवार उचलली गेली. राजांनी हात वर केला. स्मिथने डोळे उघडले. तो आश्चर्यचकित झाला होता. राजांच्या चेहऱ्यावर हसू होते. राजे म्हणाले,

'त्याला सोडा. पण तळाबाहेर जाता कामा नये. आमचा कैदी म्हणून राहील.'

स्मिथ राजांच्या जवळ कैदी म्हणून राहिला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संध्याकाळपर्यंत जवळ जवळ निम्मे शहर लुटले होते. आगीचे लोट शहरावर उसळत होते. श्रीमंत व्यापाऱ्यांचे वाडे लुटून फस्त केले होते. व्यापारी पळून केव्हाच किल्ल्याच्या आश्रयाला गेले होते. एका व्यापाऱ्याच्या घरात इतर संपत्तीखेरीज नुसते मोती अठ्ठावीस शेर सापडले. मराठी फौजेचा उत्साह वाढला होता. काही विरोध न होता मनसोक्तपणे लूट चालली होती. काही तुकड्या सरळ किल्ल्याला भिडल्या होत्या.

सुभेदार इनायतखानाने घाबरून तोफा डागण्याची आज्ञा केली. तोफांचे आवाज उठू लागले. किल्ल्यापासून पसरलेल्या सुरतेवर गोळे पडू लागले. खुद्द सुरतेवरच सुरतेचा सुभेदार गोळे डागीत होता. आणखीन आगी पेटत होत्या.

रात्र पडली, तसे सुरतेचे भयाण रूप जाणवू लागले. प्रचंड अग्नीमुळे दिवसाचा भास होत होता. आगीच्या भक्ष्यस्थानी पडणारी लाकडे आवाज करीत फुटत होती. वाडे कोसळत होते. साऱ्या सुरतेवर रक्तिमा पसरला होता. दिवसा धुरामुळे रात्र भासली; आता आगीच्या उजेडात दिवस भासत होता.

सुरतेने दिवसा रात्र आणि रात्री दिवस पाहिला.

□

१६

दुसऱ्या दिवशी सकाळपासून लूट जारी होती. इंग्रजांच्या वखारीत बातमी आली की, बंदरात शिवाजीची जहाजे आली आहेत. त्याने इंग्रज भिऊन गेले. स्वालीच्या गोदीची काळजी इंग्रजांना लागली. मागोमाग बातमी आली की, जहाजे शिवाजीचीच असली, तरी गोदीला काहीही धक्का न लावण्याची त्यांना सक्त ताकीद दिली गेली होती.

इंग्रज निश्चिंत झाले; पण किल्ल्यात बसलेल्या सुभेदाराला पुढचे मरण दिसू लागले. आकाशात उठणाऱ्या लोटांकडे तो भकासपणे पाहत होता. सुरत तर शिवाजीने पुरी लुटली. तो आता निघून जाईल; पण उद्या दिल्लीचा बादशहा आपणांस काय म्हणेल? इनायतखान बेचैन झाला. त्याने शक्कल लढविली; आणि शिवाजीशी तह करण्यासाठी त्याने आपला वकील पाठविला. वकील चार स्वारांनिशी किल्ल्याबाहेर पडला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे छावणीवर लुटीची चाललेली मोजदाद पाहत होते. लुटीच्या मालाची मोजणी होऊन गोणी भरल्या जात होत्या; शिवून मोहोरा केल्या जात होत्या. आणि त्याच वेळी तानाजी आपल्या अश्वपथकांसह तेथे आला. मुजरा करून तो म्हणाला,

'महाराज, दोन व्यापारी नदीपलीकडे पिपं हलवीत होते.'

'मग?'

'हिंदूच होते. त्यांना गिरफदार करून आणलंय्.'

'कसली पिपं होती?'

'त्यो सांगत व्हता, तेलाची पिपं हाईत, म्हून. मी बघत व्हतो, चांगले बैल असूनबी गाडीतनं एकच पीप नेत व्हते. मला पटेना. पीप फोडलं. सोनं व्हतं. ताबडतोब जाऊन नदीवर सारी पिपं पकडली. तीस पिपं मिळाली.'

'शाब्बास! कुठं आहेत पिपं?'

'नदीवरच आहेत. पहारे बसवून इकडे आलो. ती आणायची कशी?'

'इकडे आणू नका. आपली जहाजं आलीत, त्यांवर चढवा.'

तानाजीने व्यापाऱ्यांना पुढे केले. गरीब व्यापारी म्हणून राजांनी ज्यांना पहिल्याच दिवशी सोडले होते, त्यांचाच हा उद्योग होता. व्यापारी गयावया करू लागले:

'हुजूर, एक वेळ माफ करा! म्हणाल, ती खंडणी देतो.'

'आम्ही जरूर खंडणी घेऊ; पण ती आम्हांला सोन्याच्या रूपानं नको... तानाजी, ह्या लुच्च्यांना घेऊन जा, आणि ताबडतोब खंडणीसाठी त्यांची मस्तकं मारा.'

आक्रोश करणाऱ्या व्यापाऱ्यांना नेले गेले. राजांच्या आज्ञेची बजावणी त्याच क्षणी झाली. स्मिथ हे सारे पाहत होता. राजे आसनावर बसले असता बातमी आली :

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सुभेदाराचे वकील येत आहेत!’

राजे म्हणाले, ‘लौकर जागे झाले! घेऊन या.’

सुभेदाराचा वकील राजांच्या समोर आला. राजांच्या पुढे पडलेल्या अपार संपत्तीच्या ढिगाकडे तो आश्चर्याने पाहत होता. त्या ढिगात सारखी भर पडत होती. वकिलाने राजांकडे पाहिले. राजे सुशोभित आसनावर लोडाला टेकून बसले होते. मागे बिनकनातीचा छोटा तंबू उभा होता. राजांच्या दोन्ही बाजूंना तळपत्या तलवारी घेतलेले रक्षक उभे होते. वकिलाने मुजरा केला.

‘बोला!’ राजे म्हणाले.

‘राजे शिवाजी! सुरतेचे सुभेदार, मोगल सम्राटांचे प्रतिनिधी इनायतखान यांनी मला आपणांकडे पाठविलं आहे. सुभेदारसाहेबांचा निरोप आहे...’

‘काय? बोला.’

‘सुभेदारसाहेबांनी सांगितलं आहे की, तुम्ही सुरतेत घुसून जी लुटालूट केलीत, त्याबद्दल सम्राट तुम्हांला कधी माफी करणार नाहीत. तथापि, अजूनही तुमच्या फौजा सुरतेबाहेर घेतल्या, तर झाला प्रकार विसरून सुभेदार तुमच्याबद्दल शिफारस करतील.’

‘आणि?’

‘या अटी तुम्ही पाळल्यात, तर सुभेदारसाहेब योग्य ती खंडणी द्यावयास तयार आहेत. पण त्यासाठी तुम्हांला केलेली लूट परत करावी लागेल.’

‘झालं?’ राजांनी विचारले.

‘हो!’

राजे उभे राहिले. त्यांचे रूप पालटले. चेहऱ्यावरचे स्मित विरून गेले. ते कडाडले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘केवढी बेशरम माणसं आहात तुम्ही! इनायत शहराचा सुभेदार. संकट येताच रक्षणकर्ता बायकांसारखा किल्ल्यात जाऊन दडला! प्रजेला बेवारस करून मोकळा झाला. आणि तो आम्हांला अटी घालतो! कशाच्या जोरावर? सुरत आज आमच्या हाती आहे. ह्या अटी मान्य करायला आम्ही इनायतसारखे जनानी नाही.’

क्षणभर त्या वकिलाचे नेत्र वेगळ्याच रीतीने चमकले.

‘आम्ही पण जनानी नाही. हा घे पुरावा!’ असे उलट बोलून तो तरुण शिवाजीराजांच्या अंगावर खंजीर उगारता झाला. राजांच्या मागे उभ्या असलेल्या महादेवने त्या वकिलाचा खंजिराचा हात त्याच चपळतेने वरच्या वर छाटला.

आवेशाने धावलेला वकील आपला तोल सावरू शकला नाही. तो राजांच्या अंगावर पडला. राजांचा तोल गेला, आणि तेही कोलमडले. वकिलाच्या थोट्या हाताच्या रक्ताच्या लोंढ्याने शिवाजीराजे माखले गेले होते. दुसऱ्या रक्षकाने राजांच्या अंगावरून वकिलाला बाजूला केले; आणि क्षणात वकिलाचे डोके फोडले गेले. राजांच्या अंगावर रक्त पाहून साऱ्या छावणीत राजांच्या खुनाची वार्ता वावटळीसारखी पसरली; आणि त्या हाकाटीमुळे तळावर गिरफदार केलेल्या कैद्यांची मस्तके सूडभावनेने उडविली जाऊ लागली. साऱ्या तळावर एकच कत्तल माजली होती.

राजे धडपडत उठले. त्यांच्या लक्षात तो सारा प्रकार आला. ते छावणीकडे धावले.

राजे छावणीवरून धावत होते. आपण सुरक्षित असल्याचे दाखवून देत होते. कत्तल थांबविण्याचा हुकूम सोडीत होते. साऱ्या छावणीला राजे सुरक्षित असल्याचे समजेपर्यंत अनेकांची निर्दयपणे कत्तल झाली होती. थकले-भागलेले राजे आपल्या तंबूपाशी आले. इनायतखानाच्या वकिलाचा हा उद्दामपणा पाहून मात्र राजांना संताप आला होता. त्याच संतापात त्रस्त झालेल्या छावणीला शांत करण्यासाठी राजांनी बावीस कैद्यांचे हात तोडण्याची शिक्षा दिली. सहाजणांचा शिरच्छेद झाला. अँथनी स्मिथ हे सारे पाहत होता.

राजांनी सेनापतींना हुकूम सोडला : ‘ह्या सुरतेची पुरी लूट जारी ठेवा. कुणाचीही गय करू नका. सोनं, नाणं, चांदी यांखेरीज कशालाही किंमत देऊ नका.’

राजांची लूट जारी असतानाच हबसाणचा वकील सापडला. दिल्लीला निघालेला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वकील- त्याच्याबरोबर औरंगजेबाला नजर करण्यासाठी आणलेला मोठा नजराणा होता. सराईत सापडलेल्या त्या वकिलाने तो नजराणा राजांना नजर केला. राजांनी त्याला सोडून दिले.

प्रत्येक घडणारी गोष्ट कुतूहलाने पाहणाऱ्या अँथनी स्मिथबद्दल राजांना कुतूहल होते. स्मिथकडून राजांनी तीनशे रुपयांची खंडणी मान्य करून घेऊन त्याला सोडून दिले. त्याला सोडून देताना वजन ठेवण्यासाठी इंग्रजांकडे खंडणीची मागणी केली.

तिसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत सुरतेची लूट जवळजवळ पुरी झाली होती. श्रीमंत व्यापाऱ्यांचा मोहल्ला पुरा लुटला गेला होता.

चौथ्या दिवसापासून लुटीच्या गोण्या नदीतीरावरच्या गलबतांवर हलविल्या जात होत्या. सायंकाळपर्यंत ते काम चालू होते. निव्वळ सोने, चांदी आणि रत्ने यांच्या रूपात गोळा केलेली करोडो होनांची संपत्ती गलबतांवर चढविली होती. खजिन्याच्या रक्षणार्थ खास रक्षक दल गलबतांवर ठेवून गलबते हाकारली गेली.

राजे तळावर आले; आणि त्यांना बातमी आली की, बादशहाचा सरदार महाबतखान मोठ्या फौजेनिशी सुरतेवर येत आहे. तळ उठविण्याची तयारी सुरू झाली. राजांच्या फौजेबरोबर अश्वदळही वाढले होते. त्यांतल्या त्यांत जातिवंत साठ अरबी घोडी साऱ्यांचे लक्ष वेधून घेत होती. जे व्यापारी जिवंत राहिले होते, त्यांना सोडताना राजांनी सांगितले,

‘तुमच्या बादशहाला आणि सुभेदाराला आमचा निरोप सांगा... ‘तुमची सुरत होती, ती आम्ही बेसुरत केली. ही भूमी पुरातन हिंदूंची आहे. तुमचे दक्षिणेत काही नाही. जिथं तुम्ही राज्य करता, ती दिल्लीही तुमची नव्हे; तीही पुरातन हिंदूंचीच आहे. एक ना एक दिवस तेही आम्ही सिद्ध करून दाखवू.’ आमचा निरोप जरूर तुमच्या सुभेदारांना आणि बादशहांना कळवा.’

राजांनी कुचाची आज्ञा दिली. तुताऱ्या वाजल्या, आणि आठ हजार घोडेस्वारांची मांड आपल्या मुलुखाची वाटचाल करू लागली.

चारच दिवसांपूर्वी मोगल साम्राज्याची ऐश्वर्यसंपन्न व्यापारपेठ म्हणून गाजलेली सुरत कोळशाची वखार बनली होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

१७

सुरतेचा असामान्य विजय संपादून राजे राजगडाकडे येत होते. मकरसंक्रांत वाटेतच झाली होती. राजांना राजगडाचे वेध लागले होते. खुद्द मोगलांच्या मुलुखात आतवर शिरून फौजेची फारशी हानी होऊ न देता करोडो रुपयांची संपदा राजे घरी आणीत होते. हा विजय अलौकिक होता. त्याचे कौतुक करणारी एकच व्यक्ती होती. ती म्हणजे जिजाबाई.

आपल्या पराक्रमाने हर्षभरित झालेल्या मासाहेब वाड्याच्या प्रवेशद्वाराशी आरतीचे तबक हाती धरून उभ्या असलेल्या राजांना दिसत होत्या. आनंदाने भारावलेल्या आईच्या कुशीत शिरायला राजांचे मन उतावीळ झाले होते. राजगड दिसू लागला; आणि राजांनी घोड्याला टाच दिली. घोडदळ वेगाने राजगड जवळ करीत होते.

रात्रभरच्या दौडीने थकलेल्या राजांचा थकवा गड दिसू लागताच कुठच्या कुठे गेला. राजे गडापायथ्याच्या वाडीतून दौडत जात होते. लोक मुजरा करीत होते. राजे गडाच्या पायथ्याशी आले. नेहमी राजांच्या आगमनाची वार्ता देणारा नगारा झडला नाही. शिंगे वाजली नाहीत. राजांनी दरवाजाजवळच्या भगव्या झेंड्याकडे पाहिले. वारा नसल्याने झेंडा मलूलपणे उभा होता. चौकी-पहारे खालच्या मानेने मुजरे करीत होते. राजे दुसऱ्या दरवाजात आले; आणि त्यांना फिरंगोजी दिसले. फिरंगोजींना पाहताच राजे विचारात पडले. गड सोडून फिरंगोजी का आले? राजे पायउतार झाले. फिरंगोजींनी चार पावले टाकली; आणि ते थांबले. त्यांना पाऊल उचलवत नव्हते. राजे सामोरे गेले.

फिरंगोजी बोडके होते. मस्तकावरचे पांढरे केस विस्कटलेले होते. गलमिशा थरथरत होत्या. सारे अंग कापत होते. डोळ्यांतून अश्रू वाहत होते. राजांच्या जिवाचे पाणी झाले. राजे धावले. फिरंगोजींचे खांदे धरीत राजे ओरडले,

‘फिरंगोजी, काय झालं? सांगा ऽ ऽ’

‘घात झाला, राजे! थोरले महाराजसाहेब ऽ ऽ’

‘बोला ऽ ऽ’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘थोरले महाराजसाहेब आपल्याला सोडून गेले!’

थोरले महाराजसाहेब सोडून गेले? मुलाची त्यांनी कधीच संगत केली नाही. राजांचा फार थोडा सहवास त्यांना लाभला होता; पण ती आयुष्याची आठवण बनली होती. मन पुलकित झालं होतं. मुलाच्या शब्दासरशी छत्तीस गावचा पोटमोकासा देणारे महाराजसाहेब! पायी डोकं ठेवलं, तर ‘राजे, मोठे झालात, पण सवय गेली नाही’ म्हणणारे महाराजसाहेब! राजांचं राज्य उभं राहिलं, तर एक लक्ष रुपयांच्या सुवर्णमूर्ती वाहण्याचा नवस बोलणारे महाराजसाहेब न भेटता, न सांगता निघून गेले! हे कसं घडलं?

राजांचे डोळे भरून आले. स्वत:ला सावरून राजांनी वर पाहिले.

‘फिरंगोजी, काय झालं?’

‘महाराजसाहेब रणदुल्लाखान आणि सर्जाखान यांच्यासह बिदनूर प्रांती मोहिमेला गेले होते. पाळेगारांचा बंदोबस्त करण्यासाठी शिमोगाजवळच्या होडीकेरी गावी मुक्काम होता. महाराजसाहेबांना शिकारीची लहर आली. ते शिकारीला बाहेर पडले. रानात श्वापद उठले. महाराजसाहेब हाती भाला सरसावून घोड्यावरून श्वापदाच्या मागे भरधाव जात होते, आणि ऽ ऽ’

‘बोला ऽ ऽ’ राजांचा आवाज कंपित झाला. ओठ थरथरले.

‘दैव फिरलं, राजे! एवढा पटाईत स्वार. घळणात घोड्याचा पाय फसला. घोडा

मुरकंडून पडला. फूल फेकलं जावं, तसे महाराजसाहेब फेकले गेले. पडल्या जागीच महाराजसाहेब शांत झाले!’

फिरंगोजींनी राजांना मिठी मारली. राजांचे अश्रू सांडू लागले. राजांच्या डोळ्यांसमोर डुकराच्या शिकारीच्या वेळी भान विसरून भरधाव वेगाने दौडणारे महाराजसाहेब दिसत होते. राजे कष्टाने फिरंगोजींच्या मिठीतून मोकळे झाले.

‘मासाहेब कुठं आहेत?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

फिरंगोजींनी अश्रू टिपले. ते म्हणाले,

‘राजे, काय सांगू? मासाहेब सती जाणार आहेत. गडावर सारी तयारी झाली आहे. आपण येईपर्यंत तरी थांबावं, असं साऱ्यांनी सांगून पाहिलं. आणा-शपथा घातल्या. पण मासाहेब कुणाचंच ऐकायला तयार नाहीत.’

‘आम्हांला न भेटता मासाहेब सती जाणार होत्या?’ राजे उद्गारले. राजांनी पावले उचलली. ते भराभर चालत होते. मागून कोणी येते, की नाही, याचेही त्यांना भान राहिले नव्हते.

वाड्याच्या दरवाजातून राजे चौकात गेले. शामराजपंतांसारखी वयस्क माणसे सदरेवर कपाळाला हात लावून बसली होती. साऱ्यांच्या नजरा झुकल्या होत्या. कोणी काही बोलत नव्हते. एक भयाण शांतता वाड्यावर पसरली होती. एवढ्या माणसांचा राबता असूनही वाडा भयाण वाटत होता. राजांनी कसेबसे पायांवर पाणी घेतले; आणि ते सरळ मासाहेबांच्या महालाकडे गेले.

महालाच्या दाराशी राजांचे पाय अडखळले. जिजाबाई जमिनीवर बसल्या होत्या. त्या हिरवे वस्त्र नेसल्या होत्या. हाती हिरवा चुडा होता. महालात बाजूला सूपवाणे ओळीने लावून ठेविली होती. जिजाबाईंच्या जवळपास साऱ्या राण्या खाली मान घालून बसल्या होत्या. जिजाबाईंनी नजर वर केली. मळवट भरलेल्या कपाळाचे दर्शन होताच राजांच्या मनाचे बांध फुटले.

‘शिवबा ऽ ऽ’ एवढा एकच उद्गार जिजाबाईंच्या मुखातून निघाला; आणि दुसऱ्याच क्षणी त्यांनी राजांना मिठी मारली. महालात एकच आक्रोश उठला. आईच्या कुशीत राजे मुक्त कंठाने अश्रू ढाळीत होते. काही वेळ गेला. राजांनी नजर वर केली.

‘मासाहेब, आम्हांला न भेटता जाणार होता?’

राजांना कुरवाळीत जिजाबाई म्हणाल्या, ‘राजे, तुम्ही आता लहान नाही. ते गेले; त्यांच्या मागे आता मला जायला हवं. माझं काम संपलं. आता राहणे नाही.’

निश्चयपूर्वक जिजाबाई बोलत होत्या. राजांचे मन थरकापून उठले. जिजाबाई म्हणजे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांची सावली. राजे म्हणाले,

‘मासाहेब! जन्म-मृत्यू दैवाधीन, असं तुम्हीच आम्हांला सांगितलंत! महाराजसाहेब गेले. तुम्ही गेलात, तर आम्ही जगावं कसं? नाही, मासाहेब! त्यापेक्षा आम्हांस मृत्यू चांगला वाटेल.’

‘राजे, असं बोलू नका. आता माझा काय उपयोग?’

‘महाराजसाहेब आमचा पराक्रम पाहायला उरले नाहीत. मासाहेब, तुम्ही गेलात, तर मग आमचा पराक्रम दाखवायचा कुणाला? मासाहेब, आजवर एकही गोष्ट आम्ही तुमच्या सल्ल्याबाहेर केली नाही. कोणत्याही मोहिमेला बाहेर जाताना तुमचे आशीर्वाद आम्हांला अभय द्यायचे. मासाहेब, तुम्ही गेलात, तर साधं पाऊल उचलतानाही आम्ही अडखळू. मासाहेब, आमच्यासाठी नको. पण उद्याच्या हिंदवी स्वराज्यासाठी तुम्ही राहणं आवश्यक आहे. तो पुरुषार्थ पाहायला तुमच्याखेरीज आम्हांला दुसरं कोणी नाही.’

राजांना अश्रू आवरेनात. शब्द फुटेना. जिजाबाईंनी पदराने राजांचे अश्रू पुसले. त्या उद्गारल्या,

‘राजे, कसलं कोडं घालता?’

राजांच्या मनात आशा पालवली.

‘नाही, मासाहेब, हे कोडं नाही! आम्ही सत्य तेच सांगतो.’ राजांनी जिजाबाईंचे पाय शिवले. ‘मासाहेब, आम्ही तुमचे पाय शिवून सांगतो... आम्ही हिंदवी स्वराज्याचं साकारलेलं स्वप्न तुम्हांस दाखविण्यास बद्ध आहो. ते उभं करीपर्यंत आम्ही क्षणाचीही उसंत घेणार नाही. महाराजसाहेबांचा खंडोबाच्या मूर्तीचा नवस आपण फेडू. मासाहेब, एवढी भीक मला घाला!

जिजाबाईंनी राजांना मिठीत घेतले. राजांचे संकट टळले. सतीच्या वाणांची मांडलेली सुपे बाहेर नेली गेली. दु:खातही सुखाचा वारा स्पर्शून गेला.

कैक वर्षांपूर्वी रंगपंचमीच्या दरबारी उधळल्या गेलेल्या हळदी-कुंकवाची शेवटची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निशाणी मासाहेबांच्या कपाळावरून कायमची पुसली गेली.

□

१८

शहाजीराजांचे दिवस आणि श्राद्धकर्म राजगडावरच पार पडले. राजांनी आपला दानधर्म केला. जिजाबाईंची चिंता त्यांना वाटत होती. राजांनी आपल्या दु:खाला आवर घातला; आणि जिजाबाईंच्या शेजारी ते बसून राहिले. जिजाबाईंचे दु:ख हलके करण्याचा ते प्रयत्न करू लागले. सर्व राण्या संभाजीला सारखे जिजाबाईंकडे सोडीत होत्या. संभाजी आज्जींना बिलगत होता, त्यांना बोलके करीत होता.

राजांचा मुक्काम राजगडावरच होता. मोगल सरदार जसवंतसिंग कोंढाण्याला वेढा देऊन बसला होता. कोंढाणा पक्का बंदिस्त होता. त्याची काळजी महाराजांना वाटत नव्हती; उलट, जसवंतसिंगाचे त्यांना हसू येते होते. जसवंतसिंगाने कोंढाण्याला वेढा घातला, त्यानंतर थोड्याच थोड्याच दिवसांनंतर राजे कोंढाण्याजवळूनच सुरतेच्या स्वारीला गेले. मोगलांची सुरत लुटून, जाळून राजे त्याच वाटेने माघारी आले. तरी जसवंतसिंग वेढा देऊनच बसला होता.

थंडी संपली, उन्हाळा आला, तरी कोंढाणा हाती येईना, हे पाहून जसवंतसिंग संतापला. पावसाने गाठले, की किल्ला सर होणे अशक्य होते. जसवंतसिंगाने निकराच्या लढ्याची सिद्धता केली; आणि कोंढाण्याला धडक दिली. पण जसवंतसिंगाच्या नशिबाचे फासे उलटे पडले होते. जसवंतसिंग कोंढाण्याला भिडला; आणि किल्ल्यातून तेवढाच जोराचा प्रतिकार झाला. सारे मोर्चे मोडून काढले गेले. आणि त्याच वेळी जसवंतसिंगाच्या दारूखान्याला आग लागली. भडका उडाला. अनेक माणसे गगनात फेकली गेली. या दोन्ही घटनांनी जसवंतसिंग पुरा निराश झाला; आणि कोंढाण्याचा वेढा उठवून त्याने पुण्याचा रस्ता धरला. पाच महिन्यांच्या वेढ्यानंतर अपयश घेऊन जसवंतसिंग आणि त्याचा मेहुणा माघारी गेले.

राजांना ही बातमी कळली. त्यांना समाधान वाटले. मोगल फौजेला टक्कर देणाऱ्या वीरांचे कौतुक करण्यासाठी राजे वेढा उठल्यानंतर दुसऱ्याच दिवशी कोंढाण्यावर गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

किल्लेदारांची तारीफ करून राजे गड पाहत असता नेताजींना म्हणाले,

‘नेताजी, आठवतं? रोहिडेश्वराची शपथ घेत असताही आम्हांला कोंढाण्याची ओढ वाटत होती. सुरुवातीपासूनच हा आमच्या मनात घर करून आहे. पण याची आणि आमची कुंडली जमत नाही.’

‘असं का म्हणता, महाराज?’

‘आम्ही कोंढाणा मिळविला. महाराजसाहेबांच्या कैदप्रसंगी त्यांची सुटका करण्यासाठी आम्हांला हा सोडावा लागला. परत आम्ही हा घेतला. शास्ताखानाच्या हल्ल्यानंतर आम्ही गडावर आलो. का, कुणास ठाऊक, आम्हांला गडाचा पुरा बंदोबस्त करावासा वाटला. मोगली वेढ्यातून सुटला खरा; पण अकारण वाटतं की, हा गड आमच्या अनेक संकटांची आठवण बनणार आहे. जे असेल, ते असो.’

किल्लेदारांना व इतर अधिकाऱ्यांना सूचना देऊन राजे परत राजगडावर आले. राजांनी नव्या मोहिमांचे बेत आखले. सुरतेच्या लुटीने आणि कोंढाण्याच्या प्रतिकाराने राजांची दहशत वाढली होती. राजांनी शास्ताखानाच्या लुटीचा पुरा वचपा काढण्याचे ठरविले. नेताजींना आपल्या फौजेनिशी मोगली मुलूख मारण्याचे काम सोपविले. खुद्द राजे स्वत: अहमदनगर प्रांतात घुसले. जुन्नरहल्ल्याच्या वेळी अहमदनगरचा हल्ला अपुराच राहिला होता. ते अपयश राजांनी या वेळी धुऊन काढले. अहमदनगर लुटून औरंगाबादेपर्यंत जाऊन त्यांनी मोगली मुलूख झोडपून काढला. राजांवर चालून येणाऱ्या मोगल अधिकाऱ्यांची चाहूल राजांना लागली. त्यांनी आपले फारसनवीस नीलप्रभू यांना बोलावले. राजांच्या संग्रही अनेक भाषा जाणणारे लोक होते. फारसी जाणणाऱ्यांत नीलप्रभूंचा लौकिक होता. नीलप्रभूंना राजांनी मोगली सरदारासाठी पत्रमजूकर सांगायला सुरुवात केली-

> ‘...आज तीन वर्षे बादशहाचे मोठमोठे सल्लागार व योद्धे आमचा प्रदेश काबीज करण्यासाठी चालून येत आहेत, हे तुम्हां सर्वांस माहीत आहेच. बादशहा दिल्लीत बैसोन हुकूम फर्मावतात- ‘शिवाजीचे किल्ले व मुलूख काबीज करा.’ तुम्ही जबाब पाठविता- ‘आम्ही लौकरच काबीज करतो.’ आमच्या ह्या कठीण मुलुखात नुसत्या कल्पनांचा घोडा सुद्धा नाचवणे कठीण आहे; मग तो प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला? भलत्याच खोट्या बातम्या बादशहाकडे लिहून पाठविण्यास तुम्हांस लाज कशी वाटत नाही? कल्याणीचे व बेदरचे किल्ले उघड्या मैदानात होते, ते तुम्ही काबीज केले. आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहे. नदीनाले उतरून जाण्यास वाट नाही. अत्यंत मजबूत असे साठ किल्ले आज आमचे तयार आहेत. पैकी काही समुद्रकिनाऱ्यालगत आहेत. बिचारा अफझलखान जावळीवर फौज घेऊन आला; आणि नाहक मृत्युमुखी पडला. हा सर्व प्रकार बादशहास का कळवीत नाही? अमीर-उल-उमराव शास्ताखान आमच्या या गगनचुंबी डोंगरांत व पाताळात पोहोचणाऱ्या खोऱ्यांतून तीन वर्षे सारखा खपत होता. शिवाजीचा पाडाव करून लौकरच त्याचा प्रदेश काबीज करतो, असे बादशहाकडे लिहून लिहून थकला. ह्या खोडसाळ वर्तनाचा परिणाम त्याला भोवला. तो परिणाम सूर्यासारखा स्वच्छ सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे. आपल्या भूमीचे रक्षण करणे हे माझे कर्तव्य आहे. तुम्ही बादशहाकडे कितीही खोट्या बातम्या लिहून पाठविल्या, तरी मी आपले कर्तव्य बजावण्यास कधी चुकणार नाही...'

राजांनी पत्र पाठविले. शत्रूकडून आलेले ते पत्र वाचून मोगल सरदार चकित झाला.

राजे मोगलांच्या प्रदेशात धुमाकूळ घालीत असताना एके दिवशी राजगडाहून तातडीचा खलिता आला. जिजाबाईंनी राजांना पत्र पाठविले होते. राजांनी ते पत्र उलगडले :

'...सांप्रत पुन्हा दुर्बुद्धी धरून खवासखान विजापुराहून तुमच्यावर रवाना झाला आहे. त्याच्या बरोबर बाजी घोरपडे व खेमसावंत हे आहेत. ते तिकडे येत आहेत. तुम्हांस श्रीसांब व अंबा यश देणार पूर्ण आहे. बाजी घोरपडे याचा विसर पडू देऊ नये. ये समयी त्यांचे वेढे घ्यावे. आणि आमचे मनोदय शेवटास नेणारे तुम्ही सुपुत्र निर्माण आहा. म्हणोन आज्ञा केली...'

राजांनी पत्र मस्तकी लावले. राजे येसाजीला म्हणाले,

'आदिलशहाने तह मोडून आमच्यावर स्वारी आणली आहे. खवासखान चाल करून येतो आहे.'

'राजे, नेताजींना बोलावून घेऊ?'

'नको.' राजे म्हणाले, 'खवासखान येत आहे. त्याच्या बरोबर सावंतही येत आहेत. आपली फौज भरपूर आहे. खवासखान कोकण चढून यायच्या आत त्याला गाठू.'

खवासखानाला गाठण्यासाठी राजे दक्षिण कोकणाकडे वळले. राजे वाटेवर असतानाच त्यांना बातमी मिळाली. त्या बातमीने राजे व्यथित बनले. खवासखानाबरोबर आदिलशाही सरदार म्हणून खुद्द राजांचे भाऊ एकोजीराजे भोसले येत होते. त्या बातमीबरोबरच दुसरी महत्त्वाची बातमी हेरांनी आणली : बाजी घोरपड्यांना जरी खवासखानाला मिळण्याचे हुकूम

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गेले असले, तरी बाजी घोरपडे अद्यापि फौजेत सामील झालेले नाहीत. बाजी घोरपडे मुधोळात विश्रांती घेत आहेत.

राजांना जिजाबाईंचे पत्र आठवले. बाजी घोरपड्यांचे कृत्य त्यांना आठवले. सारा त्वेष उफाळून उठला. राजे येसाजीला म्हणाले,

‘येसाजी, आमच्या मराठ्यांचं कौतुक करावं, तेवढं थोडं आहे. खुद्द आमचे बंधू आमच्या विरुद्ध लढायला येतात. कुडाळ सावंत, बाजी घोरपडे आणि आम्ही एका वंशाचे. पण तिघांच्या तीन तऱ्हा. सावंतांना आम्ही आपले म्हणून जवळ केले; पण ते आमचाच विश्वासघात करण्यात सदैव मग्न. याच बाजी घोरपड्यानं महाराजसाहेबांना विश्वासघातानं पकडलं; त्यांना जेरबंद केलं. यात आम्हांला आनंद नाही; पण आम्हांला ते करावंच लागणार. घोरपड्यांची आाणि सावंतांची आता गय करणे नाही. या क्षणी आमच्या स्वारीसाठी घोरपडे मुधोळात विश्रांती घेत आहेत. त्याला कायमची विश्रांती देण्याचं आम्ही ठरवलं आहे. उसंत न घेता मुधोळ गाठायला हवं.’

राजे आपल्या फौजेनिशी वेगाने दौडत होते. राजांनी उसंत न घेता मुधोळ गाठले. दिवस मावळायला राजे मुधोळच्या परिसरात पोहोचले. सपाट भूमीवर वसलेल्या मुधोळवर राजांची नजर स्थिरावली. वेशीच्या दिवट्या, बाजी घोरपडे यांच्या वाड्यावरचे चौकी-पहारे राजे पाहत होते. हजारो स्वार काळोखात उभे होते. घोडी फुरफुरत होती; उभ्या जागी पाय नाचवीत होती. राजांनी सूचना दिल्या. मुधोळ वेढले गेले. मुधोळ शांत होते. चारी बाजूंनी आवळले जाणारे पाश लोकांना जाणवत नव्हते.

राजांनी आपल्या पथकाला इशारत दिली. पथक सरळ वेशीतून घुसले. बघता-बघता वेस गारद झाली; आणि राजे सरळ बाजी घोरपड्यांच्या वाड्याशी आले. दरवाजा ठोठावला गेला. दिंडीदरवाजा उघडून सेवक बाहेर डोकावला; आणि ती डोकावणारी मान परत आत गेली नाही. वाड्याचा कबजा मिळाला. माडीवर चढलेल्या सैनिकांनी बाजी घोरपड्यांना अंथरुणाशी खिळवून ठेवले होते. राजे माडीवर गेले. बाजी घोरपडे विस्फारित नेत्रांनी राजांकडे पाहत होता.

‘कोण तुम्ही?’

‘ओळखलं नाहीस? मला ‘शिवाजी’ म्हणतात.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शिवाजी!’

‘हो! फर्जंद शहाजीराजांचा मुलगा!’

बाजीला मृत्यूची जाणीव झाली. तो उठण्याचा प्रयत्न करीत असताच त्याच्या छातीला तलवार भिडली. उसन्या धैर्याने बाजी म्हणाला,

‘झोपलेल्यावर वार करणं शोभत नाही. मला संधी दे. मीही सशस्त्र होऊन येतो.’

‘हरामी! दगाबाज! आता रणनीती सुचू लागली. फर्जंद शहाजीराजांना कैद करताना हे आठवलं नाही! विश्वासघातक्या! जेव्हा महाराजसाहेब झोपले होते, तेव्हाच त्यांना कैद केलंस ना? त्या धडपडीत आबासाहेब जखमी होऊन बेशुद्ध पडले असता, त्यांना बेड्या चढविणारे तुम्ही वीर आज आम्हांला रणनीती सांगता?’

राजे मागे सरले. मृत्यूच्या भीतीने गर्भगळीत होऊन पडलेल्या त्या बाजीकडे त्यांनी तिरस्काराने पाहिले; आणि ते म्हणाले,

‘बाजी! खाली आम्ही चौकात वाट पाहतो. तलवार घेऊन सत्वर खाली ये. सारं मुधोळ वेढलं आहे. पळून जाण्याचा प्रयत्न केलास, तर जमणार नाही.’

काही स्वार बाजीबरोबर ठेवून राजे खाली आले. बाजीच्या वाड्यातून आक्रोश उठला होता. साऱ्या मुधोळमध्ये गलका वाढला होता.

टापांच्या आवाजाने मुधोळ गजबजून उठले. राजे चौकात उभे होते. एखादा नाग बिळाबाहेर पडावा, तसा बाजी नागव्या तलवारीनिशी सदरेवर आला. शत्रू असला, तरी बाजी उत्कृष्ट तलवारबाज होता; शूर होता. राजांनी धोका पत्करला होता. डाव्या हातात ढाल सावरीत बाजी चौकात उतरला. राजांनी आपल्या भवानीकडे पाहिले; आणि राजांनी मोहरा केला. वार होत होते. वार ढालीवर झेलले जात होते. राजांनी फार वेळ घेतला नाही. एक वार सरळ भवानीवर झेलला. तलवारी खणखणल्या. मोठ्या मुश्किलीने बाजीने तलवार सोडवून घेतली, आणि वारासाठी उगारली. राजे याच संधीची वाट पाहत होते. बाजीचा हात खाली यायच्या आत राजांची भवानी बाजीच्या छाताडात घुसली. बाजीच्या हातची तलवार निखळली. बाजी ढासळला. राजांनी बाजीकडे पाहिले. वार वर्मी झाला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होता. डोळे उघडे ठेवून बाजीने राम म्हटला.

राजांनी सारा वाडा लुटण्याची आज्ञा दिली. राजे म्हणाले,

'पुरे मुधोळ गारद करा! या विश्वासघातक्याचा वंशही मागे उरता कामा नये.'

मुधोळात एकच कत्तल सुरू झाली. घोरपड्यांचे कुणीही जिवंत उरले नाही.

राजे मुधोळबाहेर उभे होते. मुधोळातून एकच आक्रोश उठला होता.

हळूहळू रात्र उजळू लागली. मुधोळवर आगीचे लोळ उठले. मुधोळ लुटून, जाळून राजे माघारी वळले. सुदैवाने बाजीची राणी आपल्या मालोजी आणि शंकराजी या दोन्ही मुलांसह आपल्या माहेरी दहीरगावी होती. मुधोळात तीन हजारांची कत्तल झाली. आपल्या वडिलांच्या अपमानाचा सूड उगवून राजे माघारी वळले. जिजाबाईंची इच्छा पुरी केल्याने बहुत खुशवख्त जाले.

□

१९

घोरपड्यांचे पारिपत्य करून राजे आपल्या फौजेनिशी कुडाळवर आले. खवासखान घोरपड्यांची वाट पाहत होता. घोरपड्यांवरचा हल्ला, त्यांचा मृत्यू याची त्याला खबरही नव्हती. राजे एका रात्री कोकणात उतरले. अवघड जागी तळ देऊन राहिलेल्या खवासखानाच्या सैन्याला राजांची चारी बाजूंनी वेढा दिला. भर रात्रीचा आलेला हल्ला पाहून खवासखानाला काही सुचेना. शिवाजी सैतान आहे, असे तो ऐकत होता. त्याचे प्रत्यंतर तो बघत होता. त्याने आपल्या फौजेची जमवाजमव केली; आणि तो प्रतिकार करू लागला. राजांच्या हल्ल्याला खानाने तारिफेचे तोंड दिले; पण आडरानात सापडलेल्या खानाला मुकाबला करायला मैदान सापडत नव्हते. खवासखानाचे दोन सरदार ठार झाले. या अचानक आलेल्या संकटातून फौजेसह कसे वाचायचे, एवढाच विचार खवासखानाच्या डोळ्यांसमोर होता. तोच बातमी आली : 'शिवाजीने मुधोळ मारले; राजे बाजी घोरपडे मारले गेले.' त्या बातमीने धास्त खाऊन खवासखान माघार घेत घाटावर पळून गेला. माघार घेत असताही राजांना पाठलाग करता आला नाही, असे खवासखानाचे मोर्चे होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांना त्याच्या युद्धनैपुण्याचे कौतुक वाटले.

खवासखानाचा पराभव झालेला पाहताच लखम सावंताचे धाबे दणाणले. त्याला आपले भवितव्य दिसू लागले. आपली चीजवस्तू, बायका-मुले घेऊन लखम सावंताने कुडाळ सोडून फिरंगाणाचा रस्ता धरला. पण फिरंगी सावंताला जवळ करीनात. सावंताच्या निमित्ताने वैर पदरात घ्यायला फिरंगी तयार नव्हते. सावंताचा थारा उडाला. उभे राहायला भूमी पारखी झाली. राजे कुडाळ काबीज करून मोकळे झाले होते; आणि फिरंगी जागा द्यायला राजी नव्हते. सावंत फिरंग्यांच्या आश्रयाला गेला, हे कळताच राजांनी आपली नजर गोव्याकडे वळविली. गोवेकर फिरंगी भ्याले. त्यांनी राजांना नजराणे पाठवून सल्ला केला... आणि शेवटी सावंत राजांना शरण आले. आपला वकील पितांबर शेणवी याला पाठवून सावंतांनी कौल मागितला. सावंतांनी राजांना कुळीची आठवण दिली. विनविले,

'आपण सावंत, म्हणजे भोसले यांना गोत्रज. आपले तुम्ही चालविणे उचित आहे. आपले पुत्र आहो.'

त्या शब्दांनी राजांचा राग निवळला. स्वराज्याच्या सुरुवातीला हेच सावंत असेच शरण आले होते. राजांनी त्यांना आपलेसे करून घेतले; स्वराज्याचे पहिले मांडलीक बनविले. पण सावंत ते सारे विसरले. त्यांच्या धोरणाने राजांना खूप त्रास झाला. पण ती आपल्याच माणसांची चूक होती, हे राजे विसरले नाहीत. त्यांनी सावंतांना कौल दिला. सावंतांकडे राजांनी निम्मा प्रांत दिला; फौज-चाकरीचा करार करून घेतला; आणि सावंतप्रकरण असे मिटले.

या मोहिमेत शक्य तेवढा कोकण ताब्यात घेऊनच माघारी वळायचे, असे राजांनी ठरविले होते. राजांचा मनोदय पुरा झाला होता. कोकण निर्धास्त झाले होते. सारी प्रजा आनंदली होती.

कोकण मोहिमेत राजांना फार दगदग झाली. कोकण संभाळायचे झाले, तर समुद्रपट्टी सुरक्षित करणे आवश्यक होते. त्यासाठी आपले आरमार वाढविणे आवश्यक आहे, याची राजांना जाणीव होती. राजांनी मालवणला जायचे ठरविले. तेथे आरमार पाहावे, विश्रांती घ्यावी, हा राजांनी बेत आखला; आणि ते मालवणला आले.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

२०

राजे समुद्रतीरावर उभे होते. सागर गर्जत किनाऱ्यावर झेपावत होता. राजांच्या बरोबर तानाजी, मानाजी उभे होते. राजे भारावून सागराचे विशाल रूप पाहत होते. सूर्याच्या मावळत्या किरणांत सागराच्या खडकावर फुटणाऱ्या लाटा मोत्यांचा चुरा उधळीत होत्या. राजे भानावर आले. सूर्यवंदन करून राजे म्हणाले,

'मानाजी, या समुद्रासारखा गुरू नाही. इथं आलं, की मन विशाल होतं. अनेक विचारांच्या लाटा मनाच्या खडकावर फुटू लागतात. माणसानं समुद्रासारखं असावं. समुद्राला पृथ्वी पादाक्रांत होणार नाही, हा अनादिकालाचा अनुभव आहे. तसं असूनही पराजयाची भीती त्याला माहीत नाही. नेहमी त्याचे हात किनाऱ्याकडे धावत असतात. त्या ईर्ष्येत जय-पराजयाचं, भरती-ओहोटीचं सुद्धा त्याला भान राहत नाही... चला.'

राजे माघारी वळले.

रात्री राजांना झोप आली नाही. राजांच्या डोळ्यांसमोर समुद्र दिसत होता. गर्जणाऱ्या लाटांचा आवाज कानांवर येत होता. राजांच्या राज्याच्या सीमा वाढल्या होत्या. कोकणपट्टी त्यांच्या आधिपत्याखाली आली होती. समुद्रपट्टी गाजविण्याइतपत राजांची गलबते तयार झाली होती. असे असूनही समुद्रपट्टीवर खरी हुकमत होती, ती जंजिऱ्याच्या सिद्दीची. दंडराजपुरी आणि जंजिरा या दोन भक्कम ठिकाणांमुळे त्याच्या जहाजांचे वर्चस्व सबंध किनारपट्टीवर होते. समुद्रातून नाकेबंदी झाली, तर तो जमीनमार्गाने रसदपुरवठा करून घेई. जमिनीची रसद तोडली, तर जलमार्ग त्याला मोकळा राही. राजांच्या समुद्रवर्चस्वाला अशा ठिकाणांची उणीव होती. असे बुलंद ठाणे मिळेल, तर सागरी वर्चस्वाचे स्वप्न साकार व्हायला केवढा अवकाश!

राजांना पहाटे जाग आली. राजांनी हाक मारताच सेवक धावले. राजांनी आज्ञा दिली,

'आमची घोडी तयार ठेव. तानाजी, गंगाजी, मानाजी यांना आम्ही रपेटीला जात असल्याची वर्दी द्या.'

राजांनी कपडे केले. थंडीचे दिवस असल्याने पहाटेच्या दवाने जमीन ओली झाली

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होती. विरळ धुक्याचे ढग पसरत होते. राजे आपल्या अश्वपथकासह बाहेर पडले.

राजे समुद्रकिनाऱ्यावरून जात होते. समुद्राचा अखंड घोष कानांवर पडत होता. राजे काही बोलत नव्हते. पाठीमागून तानाजी, मानाजी, गंगाजी जात होते. सूर्योदय झाला. सूर्याच्या बालकिरणांत लाटांवर चमकी फाकली. जाता-जाता राजांनी अचानक लगाम खेचली. समुद्रात काही अंतरावर एक काळा ठिपका दिसत होता. राजांनी तिकडे बोट दाखवीत विचारले,

‘ते काय?’

सारे त्या काळ्या ठिपक्याकडे बघत होते. कुणाला माहिती नव्हती. तेवढ्यात समुद्रकाठाने जाणारा एक कोळी नजरेत आला. तानाजीने घोड्याला टाच दिली. राजांचे अश्वपथक बघून तो कोळी घाबरत होता. त्यात स्वार बघताच तर त्याची बोबडी वळली. त्याला तानाजीने राजांच्या जवळ आणले. शिवाजीराजांना पाहताच तो आनंदला. जमिनीवर डोके ठेवून त्याने नमस्कार केला.

‘नाव काय तुझं?’

‘सावजी कोळी.’ कोळी म्हणाला.

राजांनी खडकाकडे बोट दाखवून विचारले,

‘ते काय आहे?’

कोळ्याने नजर टाकली. तो म्हणाला,

‘सरकार, ते कुरटं बेट!’

‘मोठं आहे?’

‘व्हय, महाराज!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बेटावर तरांडी जातात?’

‘जात्यात की.’

‘सावजी, माझं एक काम करशील?’ राजांनी विचारले.

सावजी आनंदला. त्याची भीड चेपली होती. तो म्हणाला,

‘सांगा, महाराज!’

‘गावात जाऊन, बेटावर जायला दोन तरांडी बघ. आणि ती मिळाली, की तळावर येऊन वर्दी दे.’

राजे तळावर आले; आणि थोड्याच वेळात सावजी कोळी धावत तळावर आला. तरांडी तयार होती. राजांनी तानाजी, गंगाजी, मानाजी यांना बोलावून घेतले.

‘तानाजी!’

‘जी!’

‘तुम्ही कुरटे बेटावर जाऊन या. सारं बेट पाहून या. समजलं?’

तानाजी हसला. तो म्हणाला,

‘जी!’

राजे तळावर अस्वस्थ होते. भर समुद्रात दिसणारा तो खडक राजांच्या डोळ्यांसमोरून हलत नव्हता.

दोन प्रहरच्या वेळी तानाजी आल्याची वर्दी आली. तानाजी, मानाजी, गंगाजी-तिघांच्या चेहऱ्यांवर आनंद दिसत होता. राजे अधीर होऊन म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तानाजी, बोला.’

‘महाराज, बेट नामी आहे. चौफेर काळाभोर मजबूत खडक आहे. घेर कोस-सव्वा कोसाचा आहे.’

राजे आनंदले. मानाजी म्हणाला,

‘महाराज, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे खडकावर गोडं पाणी आहे.’

राजांची मान वर झाली. डोळे हसरे झाले.

‘खरं?’

‘जी! सावजी सांगत होता... तरांडी खडाकडे गेली, तर पाण्याची गरज लागत नाही. बारमास भरपूर गोड पाणी असतं. आम्ही पण पाणी पिऊन आलो. चांगलं पाणी आहे.’

‘परमेश्वराची कृपा!’ राजे आनंदाने म्हणाले. तानाजी, मानाजी, गंगाजी, सावजी राजांच्या हर्षभरित मुद्रेकडे पाहत होते. राजे म्हणाले,

‘तुम्ही आज काय करून आलात, याची तुम्हांला कल्पना नाही. आम्ही आज बेटावर जाणार. सावजी, मालवणातले हुशार कोळी गोळा कर. जेवढी शक्य असतील, तेवढी तरांडी तयार ठेव. आम्ही बेटावर जाणार आहोत.’

भर दुपारचे ऊन चमकत होते. सागराच्या लाटा गर्जत किनाऱ्यावर धावत होत्या. राजांचे पडाव किनाऱ्याच्या वाळूवर करकरत होते. राजांच्या मागे पाच-पंचवीस कोळी अभिमानाने चालत होते. तानाजी, गंगाजी, मानाजी आणि रक्षक दल मागून जात होते. सावजी कोळी राजांच्या बरोबर चालत होता. राजे सावजीला अनेक प्रश्न विचारीत होते- ‘पाणी किती खोल आहे?’, ‘तुफान झालं, तर खडक बुडतो काय?’, ‘भरती किती वर चढते?’, ‘मालवणच्या किनारपट्टीवर कुठं खोलीची जागा आहे का?’

किनाऱ्यावर पाच-पन्नास तरांडी उभी होती. एक-दोन शिडाच्या नावा होत्या. राजे नावेत चढले. डोलकाठी धरून ते पाहत होते. सारी तरांडी भरली. सागरलाटांवर हेलावू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लागली. लाटेबरोबर नाव वर चढत होती; पण लाटेवरून घसरत होती. होडीवर फुटणाऱ्या लाटांचे तुषार राजांच्या चेहऱ्यावर उडत होते. भर उन्हाचा जर समुद्रावर चमचमत होता. शेवाळ्यांचे पुंजके नावेच्या धावेबरोबर पांगत होते. नजीक येणाऱ्या खडकाकडे राजे अतृप्त नजरेने पाहत होते. खडकाला नावा लागल्या. राजांनी हसत हात जोडले; आणि खडकावर पाऊल ठेवले.

खडकाचे विशाल, भक्कम रूप पाहून राजांचा ऊर भरून आला. चौफेर पसरलेला समुद्र राजांच्या मनात कल्लोळ उठवीत होता. राजांचे एक अधुरे स्वप्न साकार होत होते. जमावाबरोबर राजे खडक फिरून आले. खडकावरचे निर्मळ पाणी पिऊन तृप्त झाले. राजे म्हणाले,

'तानाजी, आमच्या मनातलं एक शल्य आज दूर झालं. आम्ही आरमार उभं करण्याचा घाट घातला; पण त्या आरमाराला भक्कम जंजिरा नव्हता. महाडापासून गोकर्णापर्यंत आमची सुरक्षित समुद्रपट्टी असूनही, सिद्दीच्या गलबताची भीती, फिरंग्यांची मिरास आम्हांला बेचैन करीत होती. भक्कम जंजिऱ्यावाचून आरमार म्हणजे दोरीवाचून धनुष्य आणि मुठीवाचून तलवार. आमच्या आरमाराच्या पोलादी पात्याला कुरटे बेटाची मूठ शोभून दिसेल. तानाजी, आम्ही इथं जंजिरा बांधणार.'

साऱ्यांना प्रकाश पडला. ती कल्पना ऐकून सारे थक्क झाले. तानाजी म्हणाला,

'महाराज, कुरटे बेटाचं सोनं होणार, तर!'

'नाही! ही दैवी देणगी आहे.' राजे सांगत होते. 'हे कुरटे बेट नाही; या बेटाच्या रूपानं शिवधनुष्य हाती आलं आहे. निसर्गाच्या ह्या पवित्र देणगीनं आमचं सोनं होणार आहे.'

चौफेर नजर फिरवीत राजे उद्गारले,

'चौऱ्यांशी बंदरी ऐसी जागा नाही. या बेटाच्या रूपानं सिद्दीची मिजास उतरेल. आम्हांला फिरंग्यांना कर द्यावे लागणार नाहीत. आमची गलबतं इथं सुरक्षित राहतील. समुद्राची अनिर्बंध सत्ता स्वराज्याला लाभेल. तानाजी, तो दिवस आता फार दूर नाही.'

राजांच्या अंगात दैवी संचार झाल्याचा भास होत होता, इतके त्यांचे रूप बदलले होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भान हरपले होते. राजे बेट निरखीत होते. ती दृष्टी स्थापत्यविशारदाची नव्हती, तर स्वराज्यनिर्मात्याची होती, महाराष्ट्राचा मनोदय घडविणाऱ्या शिल्पकाराची होती.

राजे खडकावरून परत आले; पण मनातून जंजिरा हलला नाही. त्याखेरीज राजांना काही सुचेना. राजांनी सारे कोळी जमा केले. राजे दररोज कुरटे बेटावर जात होते. राजांच्या आज्ञेने कोळी तळठाव पाहत होते. कोळ्यांचे मत अनुकूल पडताच राजांचा हुरूप वाढला. मनातला जंजिरा साकार झालाच होता; आता त्याची प्रतिकृती उठवायची बाकी राहिली होती.

राजांनी कुरटे बेटाचा शोध लावणारे पहिले मानकरी तानाजी, गंगाजी, मानाजी आणि सावजी कोळी यांना सोन्याचे तोडे देऊन गौरविले. राजांनी आपला मालवणचा मुक्काम वाढविला.

गावातील उपाध्या जानभट अभ्यंकर याने शुभ मुहूर्त काढून दिला; आणि एके दिवशी राजे भूमिपूजनाची सर्व सिद्धता करून आपले सरदार, रक्षक व निवडक लोक गोळा करून शेकडो कोळ्यांच्यासह कुरटे-बेटाकडे निघाले. समुद्रात तरांड्याच्या रुद्राक्षमाळा तरंगू लागल्या. राजांनी बेटावर गणपतिपूजन केले. समुद्रपूजन करताना वस्त्र, मंदील, होन, इत्यादी राजोपचार त्याला समर्पिले. सोन्याचा नारळ सोडला; आणि समुद्राने आपल्या लाटांच्या शुभ्र उत्तरीय वस्त्रात लगेच तो गुंडाळून घेतला. सागर तृप्त झाला. त्याने आशीर्वादाचे हात उभारले. सागरवंदन करून राजे भूमिपूजनाच्या जागी आले. राजांनी संकल्प सोडला; आणि मंत्रांच्या आवाजात जलदुर्गाच्या पायाचा प्रथम चिरा राजांनी स्वहस्ते बसवला. शिंगे वाजविली. नगाऱ्यावर टिपरी पडली. कुरटे-बेटावर एकच आनंद उसळला.

मालवणात येऊन राजांनी कुशल माणसे गोळा करायला सुरुवात केली. साऱ्या मुलूखातून राजे निष्णात गोळा करीत होते. पाचशे पाथरवट, दोनशे लोहार, शिवाय कामाठी, कोळी वगैरे तीन हजार हुन्नरी लोक त्यांनी बेटावर आणून ठेवले. बेटावर छपऱ्या उठल्या. कामात खोळंबा होऊ नये, म्हणून भरपूर रसद बेटावर साठविली गेली. हे सारे पाहणारा तानाजी एक दिवस धीर करून म्हणाला,

‘महाराज, ही फार खर्चाची बाब होणार.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'खर्च? तानाजी, आपल्याला काय कमी आहे? सुरतेने दिलेली करोडो होनांची संपत्ती- ती कशासाठी? स्वराज्याची संपत्ती ते करोडो होन नाहीत, तानाजी! असले भक्कम दुर्ग हीच खरी संपदा! राज्य चारही बाजूंनी सुरक्षित झालं, की संपदेला काय तोटा?'

कोकणमोहिमेच्या वेळी फिरंग्यांनी राजांना नजराणा पाठवून मैत्रीची अपेक्षा केली होती. राजांनी ती मैत्री कसाला लाविण्याचे ठरविले. त्यांनी गोवेकर फिरंग्यांकडे कुशल कारागीर मागितले; आणि गोवेकरांनी तत्परतेने शंभर फिरंगी कारागीर पाठविले. जंजिऱ्याच्या बांधकामावर राजांनी सुभेदार गोविंद विश्वनाथ प्रभूची नेमणूक केली.

कुरटे बेटावर दुर्गाचे काम जोरात सुरू झाले. पाथरवट चिरे फोडीत होते. लोहारशाळेत मुशी तयार झाल्या. नावांतून आणलेल्या शिशाचे ढीग बेटावर पडले. शिसे ओतविले जात होते. शिशाचा रस दुर्गाच्या पायात ओतून त्यात पायाचे दगड बसविले जात होते. पाच खंडी शिशाच्या रसात जंजिऱ्याचा पाया भक्कम केला गेला.

दुर्गरक्षणार्थ पाचशे मावळ्यांचा खडा पहारा उभा होता. राजांची गलबते, तोफा, दारूगोळा मालवणाभोवती सज्ज झाला. शिवाजी जलदुर्ग बांधतो, याची खरी भीती होती सिद्दीला. त्याने बांधकामात व्यत्यय आणू नये, म्हणून राजांनी सारी खबरदारी घेतली होती. स्वत: जातीने उभे राहून, जलदुर्गाचे काम चालीस लावून राजांनी मालवणचा महिनाभराचा मुक्काम उठविला; आणि ते आनंदाने राजगडला परतले.

□

२१

राजे गडावर आले, तरी जलदुर्गाची बांधणी त्यांच्या मनातून जात नव्हती. त्याखेरीज बोलायला दुसरा विषय नव्हता. जलदुर्ग तयार होईपर्यंत आरमार तयार व्हावयास हवे होते. राजांनी गलबतांचे काम जारीने सुरू ठेवण्याचे हुकूम दिले. तयार झालेली राजांची गलबते समुद्रावर फेरफटका मारू लागली. फिरंगी आणि इंग्रज राजांच्या वाढत्या आरमाराकडे जागृततेने पाहू लागले. शास्ताखानाच्या वेळी मोगलांच्या ताब्यात गेलेला पुणे, सुपे भाग सोडला, तर राजांचा बाकीचा मुलूख स्थिरस्थावर झाला होता. कोकणपट्टीचा पुरा बंदोबस्त

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झाला होता. सुरत, अहमदनगर लुटल्यापासून राजांचा दरारा वाढला होता. शास्ताखान-जसवंतसिंगांच्या पराभवाने मोगलाई डगमगली होती. बाजी घोरपड्यांची कत्तल आणि खवासखानाचा पराभव यांनी आदिलशाहीला चपराक बसली होती. राजांचे सामर्थ्य आणि सत्ता वाढत होती. जिजाबाईंना राजांच्या पराक्रमाचे कौतुक वाटत होते.

राजे सायंकाळी जिजाबाईंच्याकडे नेहमीप्रमाणे गेले. जिजाबाई बैठकीवर बसल्या होत्या. शास्त्री पाटावर पंचांग उघडून बसले होते. राजांनी विचारले,

'मासाहेब, कसला मुहूर्त पाहता?'

'राजे, या! आम्ही तुमचीच वाट पाहत होतो. सूर्यग्रहण आलं, त्यामुळं आम्ही चौकशी करीत होतो.'

'केव्हा आहे सूर्यग्रहण?' राजांनी विचारले.

'पौष वद्य अमावास्या. एक मास अजून अवधी आहे.' शास्त्री म्हणाले.

'मग?' राजांनी विचारले.

'राजे!' मासाहेब सांगू लागल्या. 'असं ग्रहण येतं, तेव्हा अनिष्टनिवारणार्थ दानधर्म करतात.'

शास्त्री म्हणाले,

'राजे, ग्रहण तितकंसं चांगलं नाही. क्रोधी संवत्सर आहे. ग्रहणाला उग्रता आहे. असं ग्रहण असलं की, दानधर्म करून ग्रहशांती होते. अशा प्रसंगी तुलादानही करतात.'

'ग्रहण अनिष्ट तर खरं!' राजे हसून म्हणाले, 'आमच्या पराक्रमानं अस्वस्थ झालेल्या शहेनशहा औरंगजेबानं आमच्यावर स्वारी करण्याचा बेत आखला आहे, आणि तो खुद्द दक्षिणेत उतरणार आहे, अशी बातमी आमच्या कानांवर आली आहे.'

जिजाबाईंच्या चेहऱ्यावर काळजी प्रकटली. त्या म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मग तुम्ही काय ठरवलंत?’

‘आम्ही काय ठरवणार? मासाहेब, तुमचे आशीर्वाद असता काळजी कसली?’

‘राजे, ग्रहण जवळ आलं. संकटं सामोरी दिसताहेत. माझ्या मनात...’

‘बोला, मासाहेब!’

‘राजे, या ग्रहणप्रसंगी खूप दानधर्म करावा, असं वाटतं.’

‘मग त्यासारखी आनंदाची गोष्ट कोणती? मासाहेब, तुमची इच्छा आम्ही जरूर पाळू. जगदंबाकृपेनं तेवढं आमचं बळ आहे.’

‘दान करायचं, तर केवढं? त्याला काही मर्यादा?’

राजांनी शास्त्र्यांना विचारले,

‘शास्त्रीबुवा, मघा तुम्ही तुलादान म्हणालात ना?’

‘हो!’ शास्त्री म्हणाले, ‘अशा प्रसंगी तुलादान सुद्धा करतात.’

राजे हर्षभरित झाले. ते म्हणाले,

‘ठीक आहे. सूर्यग्रहणप्रसंगी आम्ही मासाहेबांची सुवर्णतुला करू. स्वराज्याची पुण्याई जोखता येते का, पाहू!’

‘राजे!’ मासाहेब उद्गारल्या.

‘मासाहेब, अशी पुण्याईची संधी कोण दवडील? आम्ही हे निश्चित केलं आहे. आता आमचा बेत बदलणार नाही.’

राजांनी सुवर्णतुलेसाठी क्षेत्र महाबळेश्वर निवडले. महाबळेश्वराच्या मुक्कामाचे हुकूम

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सुटले. डेरे, तंबू, शामियाने गाड्यांतून महाबळेश्वरी रवाना झाले. जिजाबाईंच्या सुवर्णतुलेची जय्यत तयारी सुरू झाली. राजांनी तुला करण्यासाठी रुप्याचा तराजू करण्याची आज्ञा दिली. सुवर्णतुलेसाठी खजिन्यातून भरपूर सोने काढून, खास बंदोबस्तात ते महाबळेश्वरी रवाना केले. खाशा स्वाऱ्यांसाठी पालखी, मेणे सजविले जात होते. चांगला दिवस पाहून राजांनी प्रस्थान काढले. खाशा मेण्यांतून जिजाबाई, राणीपरिवार जात होता. त्या शाही मेण्यांच्या मागून एक पालखी वाटचाल करीत होती. वयोवृद्ध डबीर पालखीतून महाबळेश्वरी जात होते.

सोनोपंत पुरे थकले होते. दादोजी कोंडदेव, सोनोपंत डबीर, माणकोजी दहातोंडे आणि कान्होजी जेधे ही कै. महाराजसाहेबांची खास विश्वासाची माणसे. त्यांपैकी राहिले होते सोनोपंत डबीर. अत्यंत महत्त्वाचे काम असले, की ते सोनोपंतांच्याकडे जाई. सोनोपंत राजांचे वकील म्हणून दिल्लीदरबारला गेले होते. शास्ताखानाशी तह करायला राजांनी सोनोपंतांनाच पाठविले होते. आज सोनोपंतांचे वय झाले होते. स्वराज्यसेवेत गात्रे थकून गेली होती. सोनोपंतांचा भरवसा नव्हता. सोनोपंत 'नको' म्हणत असताही राजांनी त्यांना बरोबर घेतले होते.

महाबळेश्वरचे रूप पालटत होते. मंदिराच्या भोवतालच्या मैदानात खासे डेरे, शामियाने उभे केले होते. मंदिर कळीच्या चुन्याने रंगविले होते. कळस उजळला होता. मंदिराच्या तटापासून सर्व जागा स्वच्छ करण्यात आली होती. लतापल्लवांच्या माळा टांगल्या होत्या. उपाध्याय, शास्त्री मंडळी, पूजेत कमतरता राहू नये, म्हणून बारीकसारीक गोष्टींचे तपशील तपासून पाहत होते. राजे महाबळेश्वरला आले. सर्व राण्यांसह, जिजाबाईंच्यासह राजांनी महाबळेश्वराचे दर्शन घेतले. राजे मंत्रमुग्ध होऊन त्या स्वयंभू लिंगाकडे पाहत होते.

केवढे पवित्र ठिकाण! भूमी समृद्ध करणाऱ्या जीवनदात्री कृष्णा, कोयना, वेण्णा, गायत्री, सावित्री या पंच नद्यांचे जन्मस्थान. एवढी पवित्र जागा महाराष्ट्रात दुसरी नसेल.

राजांनी सारी व्यवस्था पाहून समाधान व्यक्त केले. तानाजी, येसाजी, मानाजी, महादेव ही सारी विश्वासाची माणसे राजांच्या जवळ गोळा झाली होती. शंभूबाळाच्या बोलांनी, बालपावलांनी उत्साह वाढत होता. राजे स्नान, देवदर्शन आटोपून डेऱ्यात आले. मासाहेब शंभूबाळांचे कपडे करीत होत्या. राजांनी जिजाबाईंचे पाय शिवले. शंभूबाळ म्हणाले,

'आबासाहेब! आम्ही सकाळी गंमत बघितली.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कसली?’ राजांनी कौतुकाने विचारले.

शंभूराजांचे गाल फुगले. हात पसरीत ते म्हणाले,

‘देवळात, की नाई, एवढी मोठी तागडी लावलीय्.’

शंभूबाळांनी पसरलेल्या हातांकडे बघत राजे म्हणाले,

‘पण, बाळराजे, खरी गंमत कुठं तुम्हांला माहीत आहे?’

‘कसली?’

‘तुमच्या मासाहेबांना आम्ही तिच्या एका पारड्यात घालणार आहो. अगदी मारून मुटकून!’

बाळराजे भ्याले. त्यांची नजर कावरीबावरी झाली. जिजाबाईंना बिलगत ते म्हणाले,

‘मासाहेब! खरं?’

‘कोण ऐकतो, बाबा, माझं?’ जिजाबाई म्हणाल्या. ‘तुमचे आबासाहेब करतील, ते खरं!’

बाळराजे रडकुंडीला आले. ते आळीपाळीने दोघांकडे पाहत होते. राजांनी बाळराजांना जवळ घेतले.

‘बाळराजे, आपल्या मासाहेबांची सोन्यानं तुला करायची. खूप जम्मत येईल. बघा तर खरं!’

बाळराजांना धीर आला. बाळराजांसह राजे आपल्या डेऱ्यात गेले.

तुलेची सर्व सिद्धता झाली. भव्य रौप्यतराजू आपल्या रुपेरी झाकीने तळपत होता. सारे मानकरी खास कपडे करून मंदिरासमोर गोळा झाले. ते अलौकिक दृश्य पाहण्यासाठी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यांची मने उतावीळ झाली होती. तराजूजवळ शोभिवंत बैठका अंथरल्या होत्या. जिजामातांना आणण्यासाठी सर्व सिद्धता झालेली पाहून राजे बाहेर पडले.

राजमाता जिजाबाईंनी पांढरे वस्त्र परिधान केले होते. जिजाबाई सडपातळ अंगलटीच्या, उंच्या पुऱ्या होत्या. नजरेत विलक्षण धार होती. कुंकमतिलकाच्या अभावी कपाळ जास्तच रुंद भासत होते. जिजामातांनी समोर आलेल्या राजांच्याकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. जिजाबाईंनी विचारले,

'शिवबा! अरे, हे केलंच पाहिजे का?'

'मासाहेब, आम्हांला हे यश लाभावं, आमची स्वप्नं साकार व्हावीत, असं आपल्याला वाटतं ना?'

'राजे, त्याखेरीज आता कोणतीच इच्छा राहिली नाही.'

'मग त्यासाठी गाठीला जबरदस्त पुण्याई लागते. मासाहेब, ती पुण्याई संपादन करण्यासाठीच हा सोपा मार्ग काढला आहे.'

'सोपा मार्ग?'

'सोपा नाही तर काय? तुमची तुला सोन्यानं करणं आणि तुला झाली, असं म्हणणं, याइतका मूर्खपणा जगात दुसरा असेल का? तुमची तुला कशानं होऊ शकेल? मासाहेब, ही तुला लाक्षणिक आहे, ती खरी नाही, याची आम्हांला पुरेपूर जाणीव आहे.'

'पुष्कळ झालं! चला.' म्हणत जिजाबाई उठल्या. त्यांचं पाऊल थांबलं.

'राजे, आणि आज हे काय घातलंत?'

मासाहेबांची नजर राजांच्यावर स्थिरावली. जिरेटोपावर सुवर्णपानांचा तुरा होता. गळ्यात सुवर्णसाखळीचे सर होते. मनगटावरची पोहची, हातातल्या अंगठ्या- सारे सुवर्णाचे होते.

राजांच्या लक्षात आले. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मासाहेब, आज सुवर्णतुला ना? या प्रसंगी आपणही सुवर्णाचे दागिने घालावेत, असं वाटलं. मासाहेब, आपल्या तुलेबरोबर आणखीन एक तुला करण्याचं आम्ही ठरविलं आहे.’

‘कुणाची?’

‘आपल्या सोनोपंतांची! मासाहेब, आज दादोजी हवे होते. दादोजी असते, तर त्यांची तुला केली असती. सोनोपंत थकले. नंतर अशा माणसांविषयी वाटून काही उपयोग नसतो.’

‘फार चांगली कल्पना!’ जिजाबाई म्हणाल्या, ‘सोनोपंतांना त्यांना होत नसताही महाबळेश्वरी का आणलंत, हे आज कळलं. राजे, तुमच्यासारख्या...’

‘चलावं, मासाहेब, वेळ होतो.’ राजे मध्येच म्हणाले.

‘चला.’

जिजाबाईंच्यासह राजे मंदिरात आले. मुजरे झाले. मासाहेबांना बैठकीवर बसविले. सोनोपंत आधार घेऊन येत होते. राजांनी जाऊन त्यांचा हात धरला आणि त्यांना बैठकीवर बसविले.

वेदमंत्रांचा आवाज उठत होता. शिवलिंगावर अभिषेकाची धार पडत होती. राजांनी तुलेची पूजा केली, आणि सोयराबाईंच्याकडे पाहिले. सोयराबाई पदर सावरून उठल्या. राजांनी जिजाबाईंना विनविले. जिजाबाई उठल्या. त्यांच्या साऱ्या शरीराला कंप सुटला होता. राजांचीही तीच अवस्था झाली होती. जिजाबाईंना तराजूच्या एका पारड्यात बसविण्यात आले. राजे दुसऱ्या बाजूला उभे राहिले. मासाहेबांच्या पारड्याजवळ सोयराबाई उभ्या होत्या. पुतळाबाई, सगुणाबाई, काशीबाई, गुणवंताबाई वगैरे भारावलेल्या नजरेने पाहत होत्या. सुवर्णतुलेचा सुवर्णक्षण नजीक येऊन ठेपला. साऱ्यांची नजर राजांच्या वर खिळली होती.

राजे भारावून पारड्यात बसलेल्या आपल्या आईकडे पाहत होते. राजांनी आपल्या कानांतली कडी काढली, आणि ती पारड्यात टाकली. शांतपणे त्यांनी शिरपेच उतरला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आणि पारड्यात ठेवला.

राजांच्या त्या कृतीने मात्र जिजाबाईंच्या आवरलेल्या अश्रूंना संधी मिळाली. त्यांच्या गालांवरून अश्रू ओघळू लागले. भरल्या नजरेत तृप्तता सामावली. असा मुलगा लाभणं केवढं भाग्य! जिजाबाईंची कूस धन्य झाली!

राजांनी सारे दागिने उतरले होते. कपाळावरचे शिवगंध राजांच्या चेहऱ्यावर खुलून दिसत होते. क्षणभर जिजाबाईंना राजांनी दागिने उतरल्याचा आनंद झाला. ह्या अलौकिक मुलाला, ह्याच्या अलौकिक रूपाला दागिन्यांची मुळी गरजच काय?

राजांनी ओळीने ठेविलेल्या तबकांतल्या पुतळ्या पशाने उचलल्या. सुवर्णाच्या ओंजळी भरून राजे पारड्यात टाकीत होते. पुतळ्या-मोहरांची तबके रिती होत होती. साऱ्यांची नजर पारड्याकडे लागली होती. पारडे किंचित हलले. उंचावले गेले. राजांच्या डोळ्यांत आनंदाश्रू गोळा झाले. पाहणारेही गहिवरले. राजांनी ओंजळ रिती केली. तुला भरली. नगाऱ्याच्या गंभीर नादाने सारे वातावरण दुमदुमले. शिंगांचा आवाज गगनाला भिडला.

राजांनी जिजाबाईंना बैठकीवर आणले; आणि आपले मस्तक त्यांच्या पायी ठेवले. जिजाबाईंचे ओठ पुटपुटले. जिरेटोपावरून थरथरणारा हात फिरला. राजे उठले; आणि जिजाबाईंनी राजांना घट्ट मिठी मारली. दोघांच्याही डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळत होते. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, आज कूस धन्य केलीत!’

राजांना शब्द आठवत नव्हते. आपला डावा हात हलवीत श्वास अवरोधून राजे कष्टाने बोलले,

‘मासाहेब, आम्ही दरिद्री. आम्ही कूस काय उजवतो? हिऱ्याची तुला सोन्यानं केली, याची आमच्या जिवाला खंत वाटते. आमचं कौतुक कसलं?’

जिजाबाईंची तुला झाली. जिजाबाईंची तुला पाहत बसलेल्या सोनोपंत डबिरांचे डोळे भरून आले होते. आता राजांची पावले सोनोपंतांच्याकडे वळली. राजे सोनोपंतांना म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘उठा, पंत!’

पंत आश्चर्यचकित झाले. त्यांनी विचारले,

‘कुठं?’

‘शुभकार्याच्या वेळी ‘कुठं’ म्हणून विचारू नये.’ एवढे बोलून राजांनी सोनोपंतांचा हात धरला. सोनोपंत राजांच्या आश्रयाने तराजूपाशी आले. तराजू मोकळा झाला होता.

‘पंत, बसावं.’

वार्धक्याने आधीच विकल झालेले शरीर भावनावेगाने कापू लागले. पंत म्हणाले,

‘राजे, गरिबाची कसली तुला करणार?’

‘सोनोपंत, राज्याच्या सेवेसाठी भरभक्कम शरीर वारेमोल करून घेतलं, तर त्याची सुवर्णतुला करतो, यात मोठेपण कसलं? बसावं!’

सोनोपंतांची तुला झाली. राजनिष्ठेचे सोने झाले.

-आणि त्यानंतर राजे जिजाबाईंच्यासह दानाला उभे राहिले.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग पाचवा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

शास्ताखानाच्या पराभवाने, सुरत-अहमदनगरलुटीने, जसवंतसिंगाच्या पराभवाने औरंगजेबाचा संताप वाढत होता. औरंगजेब वरून शांत दिसत होता, तरी त्याच्या मनात चिंता, चीड वसत होती. सत्तर हजारांची फौज घेऊन शास्ताखान गेला व लक्षावधी होनांचा अकारण खर्च होऊनही काही पदरात पाडून न घेता, बोटे गमावून माघारी आला. दिल्लीसम्राटांची व्यापारपेठ सुरत बघता-बघता लुटली गेली. औरंगजेब मुत्सद्दी. सुरतेची बातमी कळताच भर दरबारी तो म्हणाला,

‘इनायतखानासारखे नादान सुभेदार आमच्या पदरी आहेत, म्हणूनच शिवाजीसारखा चलाख, शूर शत्रू आमच्या डोळ्यांदेखत आमची सुरत लुटून मोकळा होतो. आमच्या दरबारी अनेकजण शिवाजीबद्दल आत्मीयता बाळगून आहेत, हे आम्हांला माहीत आहे. त्याच्यासारखा कर्तबगार माणूस आमच्या दरबारला मिळाला, तर त्यात आम्हांला आनंदच आहे. आम्ही मागचे सर्व विसरायला तयार आहो.’

शिवाजीचे वाढते उपद्व्याप आणि मोगली मुलुखात त्याने घातलेला धुमाकूळ औरंगजेबाच्या कानांवर पडला. शिवाजीचा असाच उद्योग चालू ठेवू दिला, तर दक्षिणेतली मोगलाई संपुष्टात आल्याखेरीज राहणार नाही, हे चाणाक्ष औरंगजेबाने पुरेपूर ओळखले. शिवाजीचे पारिपत्य करण्यासाठी त्याने आपल्या दरबारचा सर्वश्रेष्ठ सरदार निवडला- मिर्झाराजे जयसिंग. मिर्झाराजांना प्रचंड फौजा देऊन औरंगजेब म्हणाला,

‘राजासाब, एक आम्ही किंवा तुम्ही तरी जावे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे; आणि म्हणूनच तुम्हांस आम्ही ही मोहीम देत आहो. शिवाजीचा पुरा बीमोड करूनच तुम्ही माघारी या, ही आमची आज्ञा आहे. तुमच्या मदतीला आम्ही दिलेरखान देत आहो.’

मिर्झाराजांनी मोहिमेचे नेतृत्व स्वीकारले. औरंगजेबाने दिलेरखान का दिला, हे मिर्झाराजे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ओळखून होते... मिर्झाराजे मोठे झाले, तरी हिंदू होते. मिर्झाराजांनी सर्व तयारी सुरू केली. अफजलखान, शास्ताखान यांसारखी मिर्झाराजांनी गर्वोक्ती केली नाही. मिर्झाराजांचे वय साठीच्या घरातले. सारे आयुष्य राजकारणी प्यादी हलविण्यात गेलेले. त्यांनी शिवाजीचे बळ ओळखले होते. राजांच्या फौजेत कुतुबुद्दीनखान, उग्रसेन कछवाह, गाझी बेग यांसारखे अनेक युद्धकुशल सरदार होते. तोफखान्यावर रूम देशाचा निकोलाओ मनुची हा गोरा तज्ज्ञ होता.

मिर्झाराजांनी जय्यत तयारी केली. शक्तीने लढणाऱ्यांची भीती मिर्झाराजे कधीच बाळगीत नसत; पण शिवाजी बुद्धिमान होता. शक्तीपेक्षा युक्तीवर त्याचा विश्वास अधिक होता. याचमुळे मिर्झाराजांचे मन चिंताचूर बनले होते. मिर्झाराजांनी यश मिळावे, म्हणून चारशे ब्राह्मण अनुष्ठानास बसवून कोटी चंडीहोम, एकादश कोटी लिंगार्चन, बगलामुखीचे जप व अनुष्ठान करविले. अपरंपार खर्च करून, अनुष्ठानाची पूर्णाहुती करून, मग त्यांनी आपल्या फौजेनिशी दिल्ली सोडली; आणि ते फौजेसह बऱ्हाणपूरला येऊन दाखल झाले.

राजांच्या राज्यावरील संकटे टळावीत, म्हणून महाबळेश्वरी उदंड दानधर्म करून जिजाबाई राजांच्यासह राजगडावर आल्या; आणि मुलुखात फिरणाऱ्या नजरबाजांनी बातमी दिली की-

‘जयसिंग मिर्झाराजा ऐंशी हजार स्वार, बरोबरी दिलेरखान, पाच हजार पठाण ऐशी फौजा घेऊन येत आहे. मुक्काम औरंगाबादेस आहे.’

ती बातमी ऐकून राजांचे मुत्सद्दी हतबल झाले. पंत म्हणाले,

‘राजे, अफझल, शास्ताखान हे बेसावध मुसलमान होते; पण हा रजपूत येतो आहे. तो दगा करून घेणार नाही. सैन्यबलही भक्कम आहे. याच्याशी सल्ला करावा.’

‘बस्स? नुसता मिर्झाराजा येतो, हे कळताच आमचे मुत्सद्दी डगमगतात? सल्ला करण्यास तयार होतात? पंत, निदान शत्रू पाहू तरी. सल्ला जातो कुठं?’

‘राजे, मिर्झाराजांना तोंड देणार?’ जिजाबाईंनी विचारले.

‘ती आम्हांला हौस नाही. ऐंशी हजारांसह मिर्झाराजे येताहेत. पुणे-सुप्यात पसरलेली

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

फौज मिळताच त्यांचं बळ लाखावर वाढेल, हेही आम्ही जाणतो. मिर्झाराजे मातब्बर आहेत, राजकारणपटू आहेत; शब्दांचे सच्चे आणि निष्ठेचे कडवे आहेत; पण त्यांच्याबरोबर येणारा दिलेरखान तो काळ्या तेंडव्यासारखा आहे. त्याचा भरवसा देणं कठीण. तो काय करील, हे कळणं कठीण!'

'त्यासाठीच...' पंत म्हणाले.

राजांनी एकदम नजर वळविली. ते म्हणाले,

'शत्रुबलाची माहिती असावी, ती स्वत: नामोहरम होण्यासाठी नव्हे. मिर्झाराजा पुण्यात यायला अद्याप खूप अवकाश आहे. त्याची चाल काय पडेल, ते पाहून मगच आपलं पाऊल उचलू. श्रींचं राज्य! आमचा भार उचलण्यास श्री समर्थ आहेत...'

राजांनी साऱ्या गडांना ताकीदपत्रे लिहिली. किल्ल्याचा धान्यसाठा, दारूगोळा भक्कम भरून घेण्याचे हुकूम दिले. मिर्झाराजांची खबर आणण्यासाठी शेकडो नजरबाजांची नेमणूक केली. आपली गलबते, तरांडी मालवणला गोळा करण्याची राजांची आज्ञा सुटली.

जिजाबाईंनी विचारले, 'राजे, गलबते मालवणास बरी?'

'मासाहेब, मिर्झाराजे आता येतील; आमच्या मुलुखाच्या किल्ल्यांवर हल्ले करतील. मिर्झाराजे मोठे राजकारणी, धोरणी. त्यांच्याशी आम्हांला पुष्कळ काळ झुंजावं लागेल. अपार खर्च येईल. सुरत-अहमदनगरच्या लुटीवर राज्याची कामं आणि शत्रूशी मुकाबला हे जमायचं नाही. मालवणचा जंजिरा, रायगड यांसारखी कामं थांबवूनही चालणार नाही. एवढ्या ईर्ष्येनं आम्ही आरमार उभं केलं; त्याची ताकद आम्हांला आजमावून बघायची आहे. आदिलशहा आणि बेदनूरचा राजा यांचं वैमनस्य मिटल्यामुळं त्या भागात कोठेच फौजेचा राबता नाही. बेदनूरराजाचं बंदर बसनूर आहे. मोठं ऐश्वर्यसंपन्न आहे, असं ऐकतो.'

राजांनी आपली चार हजारांची फौज गोकर्णाकडे पाठविली; व राजे मालवणला जाण्यासाठी बाहेर पडले. राजे मालवणला आले, तेव्हा जंजिऱ्याच्या पायाचे काम वर चढले होते. कोटाचा आकार दिसत होता. मालवणच्या समुद्रात राजांची गलबते उभी होती. तीन मोठी गलबते आणि पंच्याऐंशी लहान गलबतांचा ताफा सागरलाटांवर हेलावत होता. सुमुहूर्तावर राजांनी गलबतावर पाय ठेवला. डोलकाठ्या अस्मानाला भिडल्याचा भास

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झाला. गलबतावर तोफा सज्ज होत्या. साऱ्या जहाजांवर राजांची फौज चढली. राजांनी आज्ञा दिली. नांगर उचलले गेले. शिडे फरारू लागली. गलबतांवरचे भगवे झेंडे डौलाने फडकू लागले. मराठ्यांचे आरमार पहिल्या स्वारीला राजांच्यासह बाहेर पडत होते. राजांचे मन त्या यशाने हेलकावे घेत होते. ते मोरोपंतांना म्हणाले,

'पंत, या सागरात आमची शेकडो गलबतं हिंडायला हवीत. परकीयांपासून आमच्या भूमीचं संरक्षण करण्यासाठी ती ताकद वाढविली पाहिजे.'

राजांचे आरमार किनारपट्टीने जात होते. गोव्याहून आरमार जात असता फिरंगी भयचकित नजरेने ते पाहत होते. राजांच्या आरमाराला कुणीच विरोध केला नाही.

बसनूर निद्रेतून जागे झाले. पहाट झाली; आणि बसनूरच्या किनारपट्टीवरच्या लोकांच्या नजरेत भगवी निशाणे लावलेल्या गलबतांनी व्यापलेला सागर आला. तरांडी किनाऱ्याकडे झेपावत होती; आणि बसनुरात हाकाटी उठली, 'शिवाजी आला!'

बसनूर पुरे बेसावध असता मराठे बसनुरात घुसले. अगदी सावकाश लूट गोळा केली. अगणित संपत्ती बसनुरात मिळाली. सारी संपत्ती गलबतांवर चढवून राजे गोकर्ण-महाबळेश्वरला गेले. महाबळेश्वरला दर्शन करून, तीर्थयात्रा संपादन करून, राजे अंकोल्याला गेले. राजांनी तेथून आरमार स्वदेशी पाठवून दिले; आणि राजे फौज घेऊन किनाऱ्याने चालले. आडव्या आलेल्या नद्या पार करण्यासाठी फक्त बारा तरांडी त्यांनी ठेवून घेतली होती. राजे कारवारला जात होते.

होळी नजीक आली होती. राजांचा पस्तिसावा वाढदिवस. तारुण्य आणि स्वप्ने, हुरूप आणि साहस यांच्या सीमा ओलांडून राजे प्रौढतेत पाऊल टाकीत होते. हा उंबरठा आपल्या प्रौढ मुत्सद्देगिरीला साजेल, अशा शिकारीने साधण्याचा त्यांचा हेतू होता. कारवार बंदरात इंग्रजांची गलबते उभी होती. ती लुटण्याचा राजांचा डाव होता. राजांनी जहाजे लुटायची ठरविले.

त्याच वेळी आदिलशाही सरदार कारवारला आला होता. शेरखानाच्या कानांवर शिवाजी येत असल्याची बातमी आली. शेरखानाजवळ फौजफाटा नव्हता. शिवाजीला कसे तोंड द्यावे, याचे त्याला कोडे पडले. शेरखान बुद्धिमान होता. तो या प्रसंगाने डगमगला नाही. त्याने साऱ्या व्यापाऱ्यांना एकत्र गोळा केले; त्यांच्याकडून खंडणी वसूल केली;

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आणि शिवाजीराजांना भारी नजराणा पाठवून दिला. राजांना त्याच्या चातुर्याचे कौतुक वाटले.

कारवार बंदरात इंग्रजांची गलबते उभी होती. राजाचे लक्ष तिकडे वळले. होळीची शिकार साधण्याचा राजांनी डाव टाकला. राजांनी शेरखानास निरोप पाठविला,

‘शहर वाचवून घेतलेत. आता निदान इंग्रजांची गलबतं तरी आमच्या स्वाधीन करावीत.’

शेरखानाने तो निरोप इंग्रजांना कळविला. इंग्रज घाबरून गेले. शेरखानाने त्यांच्याकडूनही नजराणा गोळा करून तो राजांच्याकडे पाठवून दिला. नजराणा पाहून राजांचा नाइलाज झाला. कारवारबाहेरच दोन दिवस राहून राजांनी आपला तळ उठविला. तळ उठविताना राजे म्हणाले,

‘आमची होळीची शिकार शेरखानानं घालवली.’

□

२

अंगावर माशीसुद्धा बसू न देणारी दोन उमदी अबलख घोडी वाड्याबाहेरच्या मैदानात उभी होती. मोतद्दार त्यांना स्थिर करण्याचा प्रयत्न करीत होते. दृष्ट लागावी, अशी ती दोन जनावरे होती. अश्वपरीक्षा चालली होती. तानाजी, येसाजी, नेताजी, मोरोपंत हे राजांच्यासह जनावरे पाहत होते. राजांच्या मनात दोन्ही घोडी भरली होती. घोडी घेऊन आलेला कच्छी आशेने महाराजांच्याकडे पाहत होता. महाराज म्हणाले,

‘जनावरं उमदी आहेत. आम्ही पूजा आटोपून येतो. किमतीत जमलं, तर आम्ही जनावरं खरेदी करू. पंत, तुम्ही सारे घोडी पारखून घ्या. कुठं खोट आहे का, पाहा. तोवर आम्ही येतो.’

‘जी!’ नेताजी म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तानाजी, मांड टाकून पाहणार का?’ राजांनी विचारले.

‘जी! त्यात काय?’

‘अजून घोडी वजवली नसतील.’ पंत म्हणाले.

कच्छी अदबीने म्हणाला, ‘वजवलीत, महाराज. कोणत्याही एका चालीनं जायची सवय आहे. नवीन जागा. जरा बिथरलीत.’

‘येतो आम्ही. मग पाहू.’

राजे वाड्यात गेले. तानाजी म्हणाला,

‘घोडं बघितलं, की राजांचं भान हरपतं.’

‘अगदी खरं.’ येसाजी म्हणाला, ‘हौसेनं जनावर बाळगावं, तर म्हाराजांनीच! पागेत गेलं, आणि जरा आबाळ दिसली, की सोपलाच कारभार. पोटाला कमी पडंल, पण जनावरांना दाणागोटा भक्कम!’

ते बोलणे ऐकत असलेले नेताजी एकदम मुजऱ्यासाठी वाकले. साऱ्यांचे लक्ष वळले. वाड्यातून संभाजीबाळ धावत येत होते. नजीक येताच त्यांची नजर घोड्यांवर खिळली. त्यांनी नेताजींना विचारले,

‘काका, कुणी आणली घोडी?’

‘बाळराजे, हा कच्छी घेऊन आला आहे.’

‘आबासाहेबांनी घेतली?’

‘हो.’ येसाजी हसत म्हणाला, ‘पण ही तुमच्यासाठी नाहीत हं!’

‘का?’ शंभूबाळांनी विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘म्हाराजांनी स्वत:साठी घेतलीत. त्यांनी सांगितलंय् की, दुसऱ्या कुणाला द्यायची नाहीत.’

‘तर तर!’ शंभूराजे एकदम म्हणाले, ‘आबासाहेब असं कधी म्हणायचे नाहीत.’

सारे घोड्यांची परीक्षा करीत होते. संभाजीराजे कौतुकाने पाहत होते. कच्छी म्हणाल,

‘हुजूर, बसणार काय?’

‘हो. येसाजी, आमचं खोगीर आणायला सांगा.’

‘पण, राजे...’ पंत म्हणाले.

‘आम्हांला बसता येतं!’

येसाजीने सांगताच मोतद्दार पागेकडे धावला. सामान आणले गेले. घोड्यावर खोगीर चढविले गेले. ओठाळी, लगाम लावला गेला.

खोगीर घातलेल्या घोड्याजवळ जाऊन येसाजीने खाली हात धरला. बाळराजांनी डावा पाय हातावर ठेविला आणि त्यांनी उशी घेतली. लगाम हाती धरून बाळराजे सावरून बसले. घोडे फुरफुरत होते. मोतद्दाराने ओठाळी धरली होती. मोतद्दाराच्या हातातला वेत बाळराजांनी घेतला. नेताजी मोतद्दाराला म्हणाले,

‘संभाळून जा. घोड्यावरचा हात काढू नका...’

मोतद्दार घोड्याबरोबर पळत होता. बाळराजे ऐटीने उशी घेत मैदानावरून जात होते. त्यांच्याकडे पाहत मोरोपंत म्हणाले,

‘सात वर्षांची उमर; पण मांड कशी जाणत्याची आहे!’

सारे कौतुकाने बाळराजांच्याकडे पाहत होते. त्याच वेळी राजे पूजा आटोपून महालात आले. महालात सोयराबाई उभ्या होत्या. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नवीन घोडी पाहिलीत?’

‘नाही, बाई! आणि घोड्यातलं आम्हां बायकांना काय कळतं?’

राजे हसले. ते म्हणाले, ‘हो. तेही खरंच. आमच्या ध्यानी ते आलं नाही.’

तोच गलका वाढलेला कानांवर आला. घोड्याचे खिंकाळणे साऱ्या महालात घुमले. महाराज धावले. खालचे दृश्य पाहताच ते क्षणात काष्ठवत बनले. मैदानात घोडे दोन पायांवर उभे होते. बाळराजे स्वार झालेले ते घोडे थयथयत होते. बाळराजे घोड्याला आवरायचा प्रयत्न करीत होते. एकदम घोडे उधळले, आणि धावत सुटले. येईल तो अडथळा उडी घेऊन पार करीत बाणासारखे ते घोडे धावत होते. हे पाहणाऱ्या राजांच्या कानांवर आर्त हाक आली,

‘शंभू ऽ ऽ’

राजांनी पाहिले, तो वाड्याच्या दुसऱ्या सज्जात जिजाबाई उभ्या होत्या. जिजाबाईंच्या त्या आर्त हाकेने राजे भानावर आले. राजांनी खालच्या माणसाकडे पाहिले. नेताजी दुसऱ्या घोड्यावर खोगीर, लगाम नसता स्वार होऊन घोड्याला टाच देत होते. राजे ओरडले,

‘घोडं आवरा ऽ ऽ’

राजे वळले आणि धावत सुटले. जिने उतरून महाल पार करीत राजे वाड्याबाहेर आले. मोरोपंतांच्याकडे पाहत राजे म्हणाले,

‘पंत, बाळराजांना कसं स्वार होऊ दिलंत?’

पंतांना शब्द फुटत नव्हता. कसेबसे ते म्हणाले, ‘आपण गेलात; आणि बाळराजांनी हट्ट धरला. मोतद्दारानं घोडं धरलं होतं; पण अचानक बाळराजांनी टाच दिली. मोतद्दार ऐकेना, म्हणून त्याच्या हातावर वेत ओढले.’

‘आमचं घोडं कुठं आहे?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचे सारे अंग थरथरत होते. पंत म्हणाले,

‘महाराज, बाळराजे येताहेत!’

राजांनी नजर वर केली. तानाजी आणि नेताजी बाळराजांना मध्ये घेऊन येत होते. तिन्ही घोडी सावकाश येत होती. महाराज पुढे धावले. तिन्ही स्वार पायउतार झाले. तानाजी-नेताजींकडे पाहून राजांनी आपल्या हातांतल्या सलकड्या काढल्या, आणि दोघांना दिल्या. राजांची नजर बाळराजांच्याकडे वळली. बाळराजे हसत पुढे येत होते. नजर बेगुमान होती. बाळराजे जवळ आले; आणि काय होते, हे लक्षात यायच्या आत राजांच्या उजव्या हाताची पाचही बोटे बाळराजांच्या चिमुकल्या गालावर उठली. सुन्न झालेल्या बाळराजांचा हात हुळहुळणाऱ्या गालावर गेला. आजूबाजूच्या माणसांवरून कोवळी नजर फिरली. चिमुकले हसरे डोळे क्षणात अश्रूंनी डबडबले; आणि गालांवरून अश्रू पाझरले. ज्या हाताने थप्पड मारली, त्या हाताची बोटे मुठीत वळवळत होती.

कष्टी बाळराजे आबासाहेबांच्याकडे पाहत होते. राजांना ती बाळराजांची घायाळ नजर असह्य झाली. राजांनी एकदम शंभूराजांना मिठीत घेतले. ते म्हणाले,

‘बाळराजे! असं काय वागता? थप्पड बसली, म्हणून डोळ्यांत पाणी येतं; पण तुमच्या करणीनं आमच्या जिवाचा थारा उडतो. महाराजसाहेबांची आठवण अजून ताजी असता तुम्हांला जेव्हा नवख्या घोड्यावर स्वार झालेलं पाहिलं, तेव्हा आम्हांला काय वाटलं, हे परमेश्वरदेखील सांगू शकेल, की नाही, याची शंका आहे. आमचं सोडा; पण जरा मागे वळून पाहा...’

दोघे वळले. जिजाबाई वाडा सोडून मैदानात आल्या होत्या. श्वेतवस्त्र परिधान केलेल्या जिजाबाईंना पाहून राजांचे डोळे भरून आले. राजे गहिवरून म्हणाले,

‘बघा, राजे! तुमच्या मासाहेब! महाराजसाहेब गेल्यानंतर ज्यांनी आपला महाल सुद्धा ओलांडला नाही, त्या तुमच्या मासाहेब तुमचा पराक्रम पाहून, भान हरपून, भर चौकात धावत आल्या. राजे, असं अविचारी धाडस करीत जाऊ नका. जीव धोक्यात घालायला तुम्ही मोकळे नाही, राजे! जा, मासाहेबांना भेटा...’

राजांनी बाळराजांच्या गालाचे चुंबन घेतले; आणि बाळराजे जिजाबाईंच्याकडे धावत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सुटले. दुसऱ्या क्षणी बाळराजे जिजाबाईंच्या मिठीत सामावलेले दिसले. ते पाहून राजांच्या ओठांवर स्मित झळकले. जिजाबाईंच्यासह बाळराजे महालात दिसेनासे झाल्यावर राजे वळले. राजांच्या चेहऱ्यावरचे प्रसन्न हास्य पाहून साऱ्यांचे चेहरे हसरे बनले. ते म्हणाले,

'पंत, तुम्ही घोडी घेऊन टाका. मागेल ती किंमत द्या. घोडी मोठी सुलक्षणी आहेत.'

त्याच वेळी राजांचे लक्ष समोर गेले. कुडतोजी गुजर आणि रघुनाथपंत सामोरे येत होते.

कुडतोजी गुजर आणि रघुनाथपंत यांच्यासह राजे महालात जाऊन बसले. आसनावर बसताच राजांनी विचारले,

'मिर्झाराजे भेटले?'

'जी!'

'कसे आहेत मिर्झाराजे?'

'माणूस मोठा उमदा, पिकल्या केसांचा, पिकल्या बुद्धीचा आहे.'

'आमचं पत्र दिलंत?'

'जी!'

'मग ते वाचून संतापले असतील?'

रघुनाथपंतांनी नकारार्थी मान हलविली. ते म्हणाले,

'नाही, महाराज. उलट, पत्र वाचून त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकलं. ते म्हणाले, 'तुमच्या राजांना सांगा की, केवढाही बलाढ्य शत्रू नामोहरम करण्याचं बळ मोगली सैन्यात आहे. पुढचा विनाश टाळण्यासाठी जितक्या लवकर तुमचे राजे शरण येतील, तितकं त्यांच्या हिताचं आहे.' '

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे विचारात पडले. राजांनी नजर वर केली.

‘मिर्झाराजे सामोपचाराला तयार होतील?’

‘जी! तसं वाटत नाही.’ रघुनाथपंत म्हणाले.

राजे हसले. ‘पंत, आज जरी मिर्झाराजे तयार झाले नाहीत, तरी थोड्याच दिवसांत निश्चितपणे तयार होतील. शास्ताखान अशीच एक प्रचंड फौज घेऊन आला होता; पण एक चाकण घेता-घेता त्याचे नाकी नऊ आले. मिर्झाराजांनाही तो अनुभव येईल... जयसिंगाची छावणी काय म्हणते?’

‘छावणी अफाट आहे.’ कुडतोजी गुजर म्हणाले, ‘दोन गाव लांब आणि एक गाव रुंद सहज भरेल. तोफखाना मोठा आहे; त्यात काही प्रचंड तोफा आहेत. एक तोफ ओढायला ऐंशी बैल लाविलेले मी पाहिले. तोफखान्यावर मनुची नावाचा फिरंगी सरदार आहे.’

‘सांगा.’

‘मिर्झाराजांना पुण्याचा कब्जा देऊन जसवंतसिंग दिल्लीला परत गेला आहे. मिर्झाराजांच्या बरोबर त्यांचा मुलगा किरतसिंग आहे. मदतीला अनेक मोठमोठे सरदार राजे आहेत. दिलेरखान, दाऊदखान, राजा जयसिंग, सिसोदिया, इतिमतखान, राजा सुभानसिंग बुंदेला, तिरुमल, झाबरदस्तखान, बकरंदाझखान, कुबतखान, मित्रसेन, इंद्रायण बुंदेला असे अनेक सरदार असून, त्यांपैकी अनेक नौबत-नगाऱ्याचे मानकरी आहेत.’

‘अस्सं! एकंदर जंगी तयारी करून मिर्झाराजे उतरलेत, तर! ठीक आहे. साऱ्या गडांना पूर्ण तयारीनिशी राहण्याचे हुकूम द्या. प्रत्येक गड प्राणशर्थीने लढला पाहिजे. आम्ही उद्या पुरंधरावर जाऊ. तो गड नजीक आहे. बहुधा, पहिला वेढा त्याच गडाला पडेल. कुडतोजी, कोंढाण्याची हालत काय आहे?’

‘महाराज, कोंढाण्याची काळजी नसावी. दारूगोळ्यासहित गड भक्कम आहे.’

राजांना आता उसंत नव्हती. राजगडावरून साऱ्या गडकऱ्यांना हुकूम सुटले; आणि राजे स्वत: पुरंधरावर गेले. राजांना पाहताच साऱ्या गडावर उत्साह संचारला. पुरंधरावर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मुरारबाजी देशपांडे आपली फौज गोळा करून हजर झाले होते. राजांच्या खास विश्वासाची जी माणसे होती, त्यांपैकी मुरारबाजी होते.

ओठांवरच्या गलमिशा, उन्हाने करपटलेल्या उग्र चेहऱ्यावर चमकणारे तेजस्वी डोळे, कमावलेल्या पोलादी शरीराचे मुरारबाजी राजांची आज्ञा ऐकण्यास उतावीळ झाले होते. राजांनी किल्लेदारांना व मुरारबाजींना आज्ञा केली,

'मुरारबाजी, मिर्झाराजे आमच्या पारिपत्यासाठी रणांगणात उतरलेत; बहुतेक या रणांगणाचा पहिला मान पुरंधरलाच मिळेल, असा आमचा कयास आहे. हल्ला करायला कोंढाण्यापेक्षा पुरंधर सोपा, असा दर्शनी भास होतो. मिर्झाराजांचे सैन्य, ताकद अफाट आहे... आणि त्याच्याविरुद्ध गड लढविण्याची जोखीम तुमची आहे.'

'महाराज, जोवर गडावर मुरारबाजी उभा आहे, तोवर गडावर शत्रू येणार नाही, याची खात्री बाळगावी.'

'ते आम्हांला माहीत आहे; पण गड हुशारीनं अनेक महिने झुंजायला हवा. मिर्झाराजांना पुरंधरनं अक्कल शिकवायला हवी. शिवाजीच्या राज्यात घुसणं इतकं सोपं नाही, हे त्यांना कळायला हवं.'

'जशी आज्ञा!'

'गडात काही कमतरता आहे?'

'नाही, महाराज!' गडकरी म्हणाले, 'पण जास्त दिवस गड लढवावा लागला, तर दारूगोळा कमी पडेल, अशी भीती...'

'ती भीती बाळगू नका. अगदी राजगडावर पोहोचताच भरपूर दारूगोळा आणि जादा कुमक पाठवू.'

'महाराज, मग कसलीच काळजी नाही. कोठ्या धान्यानं भरल्या आहेत. गड मजबूत आहे. मिर्झाराजांना गडाचा चिराही निखळवू देणार नाही.' मुरारबाजी आवेशाने म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी मुरारबाजींना मिठीत घेतले. मुरारबाजींचे बळ शतपटीने वाढले. राजे तातडीने राजगडावर आले.

□

३

पुण्याच्या पूर्वेच्या माळावर सायंकाळच्या तिरप्या सोनेरी किरणांत मिर्झाराजे जयसिंगांचा केशरी डेरा उजळला होता. कडेकोट बंदोबस्तात शाही डेरा उभा होता. डेऱ्याच्या चारी बाजूंना तळपते तेगे घेऊन उभे असलेले सिद्दी पहारा देत होते. डेऱ्याच्या मधल्या आखणात आलीशान बैठकीवर मिर्झाराजे बसले होते. मेहंदीने तांबूस बनलेले केस मानेवर रुळत होते. ओठावरच्या गलमिशा चेहऱ्याच्या भव्यतेत भर घालीत होत्या. साठीच्या घरात येऊनही मिर्झाराजांचे देखणे व्यक्तिमत्त्व लपत नव्हते. गौरवर्णीय गोल चेहऱ्यावर धारदार नाक, पातळ गुलाबी ओठ, सदैव पाणावलेली भावपूर्ण नजर, खोल जिवणी रजपूत रूपलक्षण दर्शवीत होती. दासी वारा ढाळीत होत्या. शेजारी किरतसिंग हात बांधून उभा होता. मिर्झाराजे आपल्याच विचारात मग्न होते. नौबतीच्या आवाजाने त्यांचा समाधिभंग झाला. त्यांनी किरतसिंगाकडे पाहिले. किरतसिंग डेऱ्याबाहेर गेला, आणि काही क्षणांतच माघारी वळला. किरतसिंग अदबीने म्हणाला,

‘दिलेरखान येताहेत!’

डेऱ्याच्या कोपऱ्यात उभ्या असलेल्या नक्षीदार तिवईवर मिर्झाराजांची नजर गेली. तिवईवर भरजरी पागोटे ठेवले होते. किरतसिंगाने ते हजर केले. मिर्झाराजांनी पागोटे मस्तकी घातले; आणि ते उठले.

मिर्झाराजे डेऱ्याबाहेर येताच खोजे ताठ उभे राहिले. किरतसिंगासह मिर्झाराजे चार पावले बाहेर गेले; आणि त्यांच्या नजरेत अश्वपथकासह दौडत येणारा दिलेरखान आला.

मिर्झाराजे जयसिंगांना पाहताच दिलेरखान पायउतार झाला. दिलेरखानाच्या अंगावर भरजरी जामा होता. पायांत पठाणी विजार व चढाव होते. मस्तकावर पठाणी जरी टोप होता. उंचापुरा, धिप्पाड अंगलटीचा तो पठाण सरदार ऐटीने पावले टाकीत होता. गालांवरच्या कुरळ्या खुरट्या दाढीने त्याचा रुबाब वाढविला होता. दिलेरखानाच्या
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अभिवादनाचा स्वीकार करून मिर्झाराजे म्हणाले,

‘आइये, दिलेरखान! हमें आपही का इंतजार था!’

दिलेरखान दिल्ली दरबारचा मोठा मानकरी, औरंगजेबाचा खास विश्वासाचा माणूस. मोहिमेची सारी सत्ता जरी मिर्झाराजांच्या हाती होती, तरी आपल्यावर नजर ठेवण्यासाठी दिलेरखान दिला आहे, हे मिर्झाराजे ओळखून होते. दिलेरखान आपल्या पाच हजार पठाणी फौजेनिशी मिर्झाराजांच्या तळावर दाखल झाला होता.

बैठकीवर बसताच मिर्झाराजांनी दिलेरखानाला मद्य दिले. मद्याचा आस्वाद घेत दोघे बोलत होते. किरतसिंग व इतर सरदार अदबीने उभे होते. काही वेळाने दिलेरखानाने विषयाला हात घातला.

‘राजासाब, आपका इरादा क्या है?’

‘इसीलिये आपका इंतजार था!’ मिर्झाराजे म्हणाले, ‘आपका क्या मशवरा है?’

‘शिवाजीची सारी हालचाल मी ध्यानी घेतली आहे. त्याची ताकद गडांत सामावली आहे. माझा मशवरा असा की, शिवाजीचे सारे गड प्रथम घेऊन टाकावेत!’

‘क्या यह इतना आसान होगा?’ मिर्झाराजांनी विचारले.

दिलेरखानाने एकदम वर पाहिले. मिर्झाराजांची शांत नजर दिलेरखानावर खिळली होती. त्या नजरेने दिलेरखानाचे पठाणी रक्त उसळले.

‘शाही फौजोंको यह दुश्मन कुछ अजीम नहीं होते.’

‘ते मीही जाणतो. पण जी चूक मागच्यांनी केली, ती आपण करून चालणार नाही.’

‘मिर्झासाब, मी स्पष्ट बोलणारा माणूस आहे. राग मानू नये.’

‘बोला, दिलेरखान. आमची इजाजत आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मागची मोहीम कमकुवत दिलानं झाली होती. त्यामुळं तसं घडलं.’

‘ते खरं नाही.’ मिर्झाराजे शांतपणे म्हणाले, ‘शास्ताखान आमच्याएवढीच फौज घेऊन आले होते. चाकणचा साधा भुईकोट किल्ला. तो पदरात घ्यायला शाही फौजेला अफाट खर्च करावा लागला. तिनं हात पोळून घेतले. जसवंतसिंग मोठी फौज घेऊन कोंढाण्याला वेढा देऊन बसला; पण त्यालाही मराठी सत्तेपुढं माघार घ्यावी लागली. तीन वर्षं शाही फौज इथं राहिली. दरबारचे करोडो होन खर्ची पडले. आणि यश केवढं?’

‘राजासाब, पुराण्या गोष्टी सोडून द्या. मी गड हेरला आहे- पुरंधर. पुरंधरची शान चुटकीसरशी उतरवीन. एक गड ढासळला, की आपोआप बाकीचे हाती येतील.’

मिर्झाराजांनी मान हलविली. ते म्हणाले,

‘दिलेरखान, तुमच्या तडफेचे आम्ही कदरदान आहो; पण राजकारणात नुसती तडफ चालत नाही. हा डाव बुद्धीनं खेळायला हवा. गड आले, तर बरे. नाही तर नाव जाईल. तुम्ही गडांच्या पाठीमागे लागू नका.’

‘मग आपला हुकूम काय आहे?’ किंचित उपरोधाने दिलेरखानाने विचारले.

शब्दाची खोच लक्षात आली नाही, असे भासवीत मिर्झाराजे म्हणाले,

‘शिवाजीचं बळ गडांत सामावलेलं आहे. गड घेऊ पाहाल, तर अपार नुकसान सोसावं लागेल. उंदराची बिळं पन्नास असतात. एक उकरलंत, तर दुसरं सुरक्षित असतं.’

‘हो, पण साऱ्या बिळांतून पाणी घुसलं, तर उंदीर बाहेर पडायचा नाही?’

‘बेशक बाहेर पडेल; पण हा उंदीर बिळात राहत नाही, गडांवर राहतो. त्याच्या शेकडो बिळांत पाणी भरायची ताकद ना तुमच्यांत, ना माझ्यात. त्यापेक्षा तो उंदीर सापळ्यात कसा अडकेल, इकडे लक्ष द्यायला हवं.’

‘मतलब?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘साफ आहे! शिवाजीचं बळ गडांत असलं, तरी तो राजा आहे. त्याची रियाया उघड्यावर आहे. शिवाजीच्या गडांकडे दुर्लक्ष करा. त्याचा मुलूख काबीज करा. गावं लुटा. माणसं पकडा. मुलूख बेचिराख करा. गडांची रसद संपूर्णपणे तोडून टाका. म्हणजे गडांसह राजा आपोआप हाती लागेल.’

‘किती दिवस हे करीत बसणार?’

मिर्झाराजांच्या चेहऱ्यावरचे हास्य लुप्त झाले. चेहरा कठोर बनला. त्यांच्या शब्दांना धार आली.

‘दिलेरखान, तुमच्यापेक्षा जास्त पावसाळे मी पाहिलेत. कोणतीही मोहीम वर्षानुवर्षं करण्याची मला आदत नाही. शिवाजीचा मुलूख तो काय! आठ दिवसांच्या आत मुलूख बेचिराख करता येईल. एका जागी असलेली आपली फौज शिवाजीच्या राज्यात पसरू दे. कसलीही दया-माया दाखवू नका. याची अंमलबजावणी आजपासून सुरू झाली, असं समजा!’

‘पण माझा सल्ला?’

‘ठीक आहे! मोका पाहून त्याचाही अंमल करू. आणि तशी वेळ येईल, तेव्हा आम्हीही पुरंधरच्या पायथ्याशीच असू.’

दिलेरखान काहीशा नाराजीनेच मिर्झाराजांचा निरोप घेऊन गेला. सुपे, जुन्नर, लोणी, पुणे, शिरवळ वगैरे ठिकाणी मिर्झाराजांनी आपले सरदार पाच-दहा हजार सैन्यानिशी पाठविले. शिवाजीचा मुलूख बेचिराख करण्याचे, प्रजा त्रस्त करण्याचे हुकूम दिले. शिवाजी कुठेही गडाखाली उतरला, तरी त्याच्याशी दोन हात करून त्याला परत गडावर पिटाळून देण्याचा सल्ला सरदारांना दिला.

-आणि दुसऱ्या दिवसापासून साऱ्या बारा मावळांत हाकाटी उठली. घोड्यांच्या टापांनी प्रदेश हादरून गेला. गावाच्या शेकोट्या बनल्या. पळविल्या जाणाऱ्या बायकांच्या किंकाळ्यांनी मने कातरून निघत होती. जनावरे लुटली जात होती. वेठबिगार करण्यासाठी माणसांचे तांडे दावणीला बांधले गेले. पाहता-पाहता सारे कऱ्हेपठार उजाड झाले. सगळीकडे हाहाकार उडाला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मिर्झाराजांनी म्हटल्याप्रमाणे आठ दिवसांत शिवाजीच्या मुलुखावर शाही वरवंटा फिरविला. राजांच्या फौजा तुरळकपणे अचानक मोगली सैन्यावर तुटून पडत. दाणागोटा लुटीत. मोगली तुकडीला भुलावणी देऊन आडमार्गी नेऊन झोडपून काढीत; आणि जादा कुमक येते, असे दिसताच मनुष्यहानी टाळण्यासाठी निघून जात. राजांची तशी सक्त ताकीद होती.

उलटणाऱ्या दिवसाबरोबर दिलेरखानाची अस्वस्थता वाढत होती. तो पुरंधरकडे जाण्यास अधीर झाला होता. मिर्झाराजांची चाल त्याला पटत नव्हती. मिर्झाराजांनी त्याचा वाढता संताप ओळखला; आणि दिलेरखानाला त्यांनी पुरंधरला जाण्यास परवानगी दिली.

दिलेरखान आपल्या फौजेनिशी कूच करीत पंधरा दिवसांत आपल्या अवाढव्य फौजेनिशी पुरंधरच्या पायथ्याशी पोहोचला. मागोमाग मिर्झाराजे आपल्या सर्व सैन्यबलानिशी पुरंधरची वाटचाल करू लागले. जबाबदार सरदार निरनिराळ्या मुलुखांवर बंदोबस्तासाठी ठेवीत, मागचा-पुढचा मार्ग सुरक्षित करीत, सासवडजवळील नारायणपेठेजवळ येऊन मिर्झाराजांनी आपल्या मुक्कामाचा शामियाना उभारला. पुरंधरच्या मोगली वेढ्यापर्यंत मिर्झाराजांची छावणी पसरली.

दिलेरखान गडाच्या पायथ्याशी पोहोचला; आणि गडावरच्या तोफांच्या माऱ्याला त्याला तोंड द्यावे लागले. तोफांच्या टप्प्याबाहेर राहून दिलेरखान मोर्चे बांधीत होता; गड जवळ करण्याचा प्रयत्न करीत होता. आणि त्याच वेळी खुद्द मिर्झाराजांची कुमक दिलेरखानाला मिळाली. तोफांचा भडिमार सुरू झाला. खंदक खणून त्याचा आश्रय घेत दिलेरखानाची फौज पुढे सरकत होती. दिलेरखानाच्या रणनैपुण्यावर खूश होऊन मिर्झाराजे दिलेरखानाची वाढती प्रगती पाहत होते. पुरंधरचा वेढा आणि शिवाजीच्या मुलुखाची लुटालूट एकाच वेळी मिर्झाराजांनी सुरू केली होती.

दिलेरखान थकला-भागला होऊन एक दिवस मिर्झाराजांच्या शामियान्यात आला. गडाला वेढा देऊन आठ दिवस लोटले, तरी फारशी प्रगती होत नव्हती. तोफांच्या भडिमारात दारूसामान खर्ची पडत होते; पण धुराचे ढग उठविण्यापलीकडे त्यातून काहीच निष्पन्न होत नव्हते. मिर्झाराजांनी विचारले,

'दिलेरखान, वेढा काय म्हणतो?' मिर्झाराजे हसले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जमके और मुस्तैदीसे जारी है!’

‘हं! दिलेरखान, जर वेढा इतका चोख असेल, तर शिवाजीच्या सैन्याची एक तुकडी बिनविरोध गडावर गेली कशी?’

दिलेरखान उफाळला, ‘वह दाऊदखानकी बेइमानी है।’

‘ठीक!’ मिर्झाराजे म्हणाले, ‘दिलेरखान, गड घेणं, तेही शिवाजीचे, इतकं सोपं नाही. तुम्ही सुरुंग माचलेत, तर शत्रू येऊन सुरुंगावर पाणी टाकून ते निकामी करतो. खुद्द तुमच्या रसूल बेगवर हल्ला करून, तुमच्या खंदकांतील तीन मोगली तोफा शत्रूंनी रंजुकीच्या भोकांत खिळे ठोकून निरुपयोगी करून टाकल्या. अशा धाडसी शत्रूशी नुसत्या घमेंडीवर मुकाबला करणं कठीण आहे.’

दिलेरखान म्हणाला, ‘मिर्झाराजे, पुरंधरची गळचेपी मी पुरी अमलात आणली आहे. आता हे प्रकार घडणार नाहीत.’

‘ते ठीक! पण एवढासा गड घ्यायला किती वेळ खर्ची पडणार?’

दिलेर चपापला. तो धुमसत म्हणाला,

‘मिर्झासाब, तुम्ही पाहता. आम्ही शिकस्त करतो आहो. लेकिन मरहट्टे बेहद जिद्दी हैं.’

‘तो अब यकीन हुआ? मी तेच सांगत होतो. पण तुम्ही अधीर बनला होता. पावसाळा तोंडावर आला. गडावरचे मराठे त्याचीच वाट पाहत आहेत. एकदा का पाऊस सुरू झाला, की एवढ्या मोठ्या फौजेला चिखलात रुतवल्याची गुन्हागारी आपल्या माथी येईल. नामुश्की पदरात पडेल. आलीजाह ठपका देतील, तो वेगळाच.’

दिलेरखानाची संतप्त नजर मिर्झाराजांच्याकडे वळली. तो ओरडला,

‘नामुमकीन! हम किले पुरंधरको खाक व गुब्बार बना देंगे.’

‘केव्हा?’ मिर्झाराजांनी शांतपणे विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजासाब, या दिलेरखानावर बेऐतमादी दाखवता?’ दिलेरने सवाल टाकला.

‘खामोश!’ मिर्झाराजे मुठी वळत म्हणाले, ‘जबान इस्तमाल अदबसे करना सीखो. वहममें न रहना. आप मिर्झाराजा जयसिंगसे बात कर रहे हैं. तो विकार सम्हालो...’

मिर्झाराजे क्षणात शांत झाले. ‘दिलेरखान, शत्रूचा नुसता द्वेष करून शत्रूची शिकस्त होत नसते. त्याला कृतीची जोड लागते.’

दिलेरखान उठला. आपला भरजरी टोप उतरून हाती घेत तो म्हणाला,

‘मिर्झासाहब, एकदा या पठाणाची जबान ऐका. जोवर पुरंधर हाती येत नाही, तोवर हा किमॉष ह्या शिरावर दिसणार नाही. इजाजत.’

दिलेरखान शामियान्याबाहेर पडला; आणि मिर्झाराजांच्या चेहऱ्यावर समाधानाचे स्मित पसरले.

मिर्झाराजांना पुरंधरची काळजी आता वाटत नव्हती.

❑

४

राजगडचे वातावरण तंग होते. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर काळजी उमटली होती. राजांच्या बेचैनीला तर पारावार राहिला नव्हता. घडीघडीला गडावर बातम्या येत होत्या. मोगल सैन्याच्या तावडीतून सुटून आलेले मराठे सरदार राजांना भेटत होते. प्रत्येक बातमीने राजांची काळजी वाढत होती. राजे आपल्या खास माणसांसह मसलतीला बसले होते. मोरोपंत, रघुनाथपंत, अण्णाजी दत्तो, तानाजी, येसाजी, कुडतोजी गुजर, आनंदराव आणि खुद्द जिजाबाई महाली हजर होत्या. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर काळजीची काजळी धरली होती.

राजांनी सर्वांवरून नजर फिरविली, आणि बोलायला सुरुवात केली...

‘प्रसंग बाका आहे. मिर्झाराजे हुशार खरे. एकाच वेळी पुरंधरला वेढा आणि आमच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मुलुखात लुटालूट सुरू केलीय् त्यांनी.’

तानाजी आवेशाने म्हणाला, ‘गावं जाळत बायाबापड्यांस्नी नागवत फिरणारा ह्यो मिर्झाराजा! त्याचं कसलं कौतुक? ही मर्दाची कामं नव्हत.’

राजे हसले, ‘तानाजी, मिर्झाराजांनी तसं केलं नसतं, तरच आम्हांला काही वाटलं असतं. मिर्झाराजे हुशार आहेत. आमचे गड काबीज करणं इतकं सोपं नाही, हे ते जाणतात. आज आमच्या राज्यातील घरं बेचिराख होत आहेत. वस्त्या उठत आहेत. आमच्या आयाबहिणी पळवून नेल्या जात आहेत. निष्पाप माणसं वेठबिगारीसाठी आसुडाखाली फोडली जात आहेत. आणि आम्ही त्यांचे राजे! आम्ही गडावर सुरक्षित राहून प्रजेची वाताहत थंड नजरेनं बघतो आहोत.’

‘पण यातून मिर्झाराजे काय साधणार?’ अण्णाजींनी विचारले.

‘काय साधणार?’ राजे अण्णाजींच्याकडे वळत म्हणाले, ‘काय साधणार नाही, हे विचारा. राजांचं राजेपण प्रजेच्या निष्ठेवर टिकतं. प्रजेत असंतोष माजला, की राज्य उलथून पडायला कितीसा वेळ लागणार? राजे गडावर सुरक्षित आहेत, आणि आपलं तेवढं वाटोळं होत आहे, हे जेव्हा प्रजेला जाणवेल, तेव्हा त्यांची निष्ठा टिकणार नाही. आणि तसं घडलं, तरी आम्ही प्रजेला दोष देणार नाही.’

‘सारी फौज एकत्र करून मुकाबला केला, तर?’ कुडतोजींनी सुचविले.

‘त्याचा विचार आम्ही केला. पण तसं करणं आत्मघात ठरेल. मिर्झाराजांनी आपली फौज आमच्या मुलूखभर पसरून ठेवली आहे. आम्ही शिरलो, तर चारी बाजूंनी मोगली फौज गोळा व्हायला फारसा वेळ लागणार नाही.’

रघुनाथपंत म्हणाले, ‘महाराज, स्पष्ट बोलतो; माफी असावी. अफझल मारला, आणि शास्ताखानास दगा केला. पण ते दोघे गैरहुशार मुसलमान होते. हुन्नरही नवाच केला. हे सर्व रजपुतांस जाहीर आहे. ते दगा करू देणार नाहीत. मिर्झाराजांशी सल्ला करावा.’

‘आम्ही कुठं नाही म्हणतो? त्याचकरिता तुम्हांला मिर्झाराजांकडे खेपा घालाव्या लागल्या. पण मिर्झाराजे आमची शरणागती मागतात ना! त्यांनी चारी बाजूंनी तणावा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आवळीत आणल्या आहेत. आज्ञा आहे, ती पुरंधरावर!’

‘पुरंधर सहज वर्षभर भांडेल.’ येसाजीने निर्वाळा दिला.

‘तेवढा वेळ मिळाला, तरी विचार करायला भरपूर सवड मिळेल. श्रींचे राज्य. श्रींवर आमचा भार. ते काय करतील, ते खरं! पण आज ह्या क्षणी आमची पुण्याई कमी पडते आहे, असा भास होतो.’

जिजाबाई शांतपणे ऐकत होत्या. त्या नि:श्वास सोडून म्हणाल्या,

‘पुण्याई कमी पडायला काय झालं? एवढा दानधर्म होतो आहे. इडापिडा टळाव्यात, संकटं जावीत, म्हणूनच ग्रहणाच्या वेळी सुवर्णदान केलंत ना? ते सारंच का वाया?’

राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले.

‘मासाहेब, आम्ही फक्त सुवर्णदान केलं. पण मिर्झाराजे कोटीचंडी करून, करोडो अशर्फ्या खर्च करून बाहेर पडलेत. त्यांचं पुण्य केवढं?’

‘मिर्झाराजांचं मन वळवता यायचं नाही का?’ जिजाबाईंनी विचारले.

‘कठीण आहे. मिर्झाराजे रजपूत आहेत; खाल्ल्या अन्नाला इमानी आहेत. मिर्झाराजे नुसते गड काबीज करीत सुटले असते, तर त्याची आम्ही खंत बाळगली नसती. आमचे सारे गड घ्यायला त्यांना आयुष्य पुरलं नसतं. पण ते पडले पक्के राजकारणधुरंधर. सिंहाच्या तडाख्यातून सुटता येईल; पण मिर्झाराजांच्या विळख्यातून सुटणं महाकठीण!’

‘राजे, असली कचदिल भाषा तुमच्या तोंडी शोभत नाही.’ जिजाबाई म्हणाल्या.

राजे स्थिर आवाजात म्हणाले, ‘मासाहेब, आम्ही हे निराशेनं बोलत नाही. खोट्या अहंकारापेक्षा सत्य पारखून घेणं श्रेयस्कर असतं. मिर्झाराजे आपल्या लाख फौजेच्या बळानं शेफारले नाहीत. औरंगजेबानं आपल्या अंगावरचा काबा उतरून मिर्झाराजांच्या खांद्यांवर चढवला, हिऱ्याचं पदक त्यांच्या शिरपेचात खोवलं, म्हणून ते दिपले नाहीत. मिर्झाराजे कोटीचंडीचं अनुष्ठान करून बाहेर पडलेत. ज्याच्या पाठीशी श्रद्धा आणि अफाट बुद्धिबळ

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहे, तो जिथं हात घालील, तिथं त्याला यशच मिळेल.'

'मग तुम्ही ठरवलंत तरी काय?' जिजाबाईंनी विचारले.

'आम्ही काही ठरवलं नाही. चारी बाजूंना उठवलं जाणारं रान आम्ही पाहत आहो. अद्याप शत्रूचा निश्चित मोहरा आमच्या ध्यानी येत नाही. आजवर जिनं संकटातून पार केलं, त्या जगदंबेवर आमचा भरवसा आहे. संकटाच्या वेळी श्रद्धा अस्थिर होणं योग्य नव्हे.'

राजमहालातली बैठक उठली. सारे चूपचाप निघून गेले. राजे एकटेच महालात बसून होते. जीव झुरत होता. काही सुचत नव्हते. पावलांचा आवाज आला. राजांनी नजर वर केली. कुडतोजी गुजर महालात येत होते. राजांनी विचारले,

'कुडतोजी, परत का आलात?'

'महाराज, मिर्झाराजे आपली माणसं फितविण्याचा प्रयत्न करीत आहेत. जावळीच्या छावणीत गडबड उडाल्याची बातमी आल्यानं नेताजी तिकडे तातडीनं गेले.'

'आम्हांला न भेटता?'

'जी! पुरंधरचे आत्माजी व कहार कोळी हे दोघे बंधू त्यांच्या तीन हजार स्वारांसह मिर्झाराजांनी फोडून आपल्या नोकरीत घेतल्याची बातमी आहे.'

त्या बातमीने राजे सुन्न झाले. दीर्घ निःश्वास सोडून ते म्हणाले,

'मिर्झाराजांची कमाल आहे! पुण्याला येण्याआधीच आदिलशाही सरदार कुल्बशहा, रामनगर, पेठ व चोथीया हे राजे त्यांनी फितवले. शिवाप्पा नायक व बसवपट्टणचा नायक यांना आमच्या विरुद्ध उभे केले. वलंदेज, फिरंगी यांना आमच्या गलबतांविरुद्ध मोहीम काढण्याचा सल्ला दिला. जावळीच्या चंद्ररावांचे वंशज हुडकून त्यांना त्यांच्या राज्याचं आमिष दाखविलं. अफझलखानाच्या मुलाला बापाचा सूड घेण्यासाठी तयार केलं. आणि आता खुद्द आमची माणसं उठवायला सुरुवात झाली!'

'मिर्झाराजे स्वस्थ बसले, तर?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘स्वप्नदेखील त्यापेक्षा देखणं असतं! तसं झालं तर, तर... कुणी सांगावं, राजकारणाचा रंग बदलेल!’

कुडतोजींनी पुढे होऊन एकदम राजांचे पाय शिवले. राजांनी पाहिले. कुडतोजींचे डोळे भरून आले होते.

‘हे काय करता, कुडतोजी? उठा. तुम्ही आमचे दुय्यम सेनापती. सेनापतींच्या डोळ्यांत अश्रू शोभत नाहीत.’

‘महाराज, जगलो-वाचलो, तर परत मला पाय दिसतील. नाही तर हाच शेवटचा मुजरा समजावा! मिर्झाराजांची चिंता करू नका.’

राजांचे अंग बसल्या जागी ताठरले. ते म्हणाले,

‘कुडतोजी, काय विचार आहे?’

‘थांबा, महाराज!’ कुडतोजी निश्चयाने म्हणाले, ‘आजवर कधी असं वागलो नाही. मात्र क्षमा करा. यापुढं शब्द जरी मला सांगाल, तरी आपल्याला आपल्या कुलदैवताची-भवानीची शपथ आहे!’

‘काय केलंत, हे कुडतोजी?’ आणि राजांनी बसल्या जागी डोळे मिटले. जेव्हा राजांनी डोळे उघडले, तेव्हा महालात कुडतोजी दिसत नव्हते.

राजांचा सारा दिवस चिंतेत गेला. रात्री थकलेभागलेले राजे आपल्या महालात आले. राजे महालातल्या चांदीच्या देव्हाऱ्याजवळ गेले. देव्हाऱ्यात स्फटिकाचे शिवलिंग समयांच्या ज्योतीत उजळले होते. त्यामागे जगदंबेची सुवर्णमूर्ती नजरेत भरत होती. राजांनी गुडघे टेकले. बराच वेळ ते तसेच नतमस्तक होते. राजे सावकाश उठले, आणि पलंगाकडे चालू लागले.

बराच वेळ राजे जागे होते. अनेक वादळे मनात उठत होती. कूस बदलूनही मनातले वादळ शांत होत नव्हते. केव्हा निद्रा लागली, हे राजांना कळले नाही.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अचानक राजांना जाग आली. त्यांचे सारे अंग घामाने डवरले होते. सज्जातून वारा आत येत होता. खिडक्यांच्या फळ्या वाऱ्याने हेलकावे घेत होत्या. विजांचा प्रकाश महाल उजळीत होता. त्या क्षीण प्रकाशात रौप्यदेव्हारा उजळून निघत होता. समयांच्या वाती थरथरत होत्या. जगदंबेची सुवर्णमूर्ती दृश्य-अदृश्याचा खेळ खेळत होती. राजे पलंगावर उठून बसले. मेघगर्जनेने ते भानावर आले. राजे सज्जात गेले. बाहेर वादळाने थैमान मांडले होते. हवेत उकाडा होता. निसर्गात वादळ होते; पण पावसाचा मागमूसही नव्हता. राजांनी वळून जगदंबेकडे पाहिले; आणि देव्हाऱ्याजवळ जाऊन त्यांनी देवीपुढे मस्तक टेकले. ढगांचा गडगडाट महालात घुसला...

...राजे महालाबाहेर पडले. ते सरळ जिजाबाईंच्या महालाकडे गेले. महाल जवळ येत होता. अर्धग्लानीत असल्यासारखे राजे झोकांड्या देत जात होते. महाल नजरेत येताच राजांनी हाक मारली,

'मासाहेब ऽ ऽ, मासाहेब ऽ ऽ!'

मनोहारी बाहेर आली. राजांना पाहताच ती बाजूला झाली. राजे सरळ महालात गेले. जिजाबाई पलंगाजवळ उभ्या होत्या. मनोहारीने समया उजळायला सुरुवात केली होती. भर रात्री राजांच्या हाका ऐकून जिजाबाईंच्या अंगाला कापरा सुटला होता. राजांचे रूप पाहून तर त्यांचे अवसान गेले. राजांची नजर ताठरलेली होती. कपाळावर घाम डवरला होता. केस विस्कळीत झाले होते...

'राजे, काय झालं?'

'पाणी ऽ ऽ'

मनोहारीने सुरईतले पाणी त्वरेने आणले. राजांनी पेला ओठी लावला. घटाघटा ते पाणी पीत होते. पाणी पिऊन होताच राजांनी नि:श्वास सोडला.

'बसा, राजे!' जिजाबाई म्हणाल्या.

'मासाहेब ऽ ऽ!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शिवबा, स्वप्न पडलं का?’

‘स्वप्न कसलं, मासाहेब!’ राजे प्रयत्न करीत होते. ‘आम्ही उशिराच झोपी गेलो. अचानक जाग आली. सारा महाल उजळला होता. झोपेत आहे, की जागा आहे, तेही कळत नव्हतं. महालात साक्षात जगदंबा उभी होती. खोल दरीतून आवाज यावा, तसा आवाज आम्ही ऐकत होतो. शब्दन् शब्द स्पष्ट आठवतो....’

‘काय ऐकलंत, राजे?’ जिजाबाई अधीर होऊन म्हणाल्या.

‘आई सांगत होती....’ राजांचे डोळे परत ताठरले. मुठी वळल्या गेल्या. ‘लेकरा, प्रसंग कठीण आहे. जयसिंगास मारवत नाही. कठीण प्रसंग आला, तरी काळजी करू नको. सोबत मी आहे. तुला संकटातून तारून नेईन. यशस्वी करीन. चिंता करू नको. भार माझा आहे. तुला एका पिढीचं राज्य मी दिलं नाही. सत्तावीस पिढ्यांचं राज्य तुझं आहे. ती चिंता मला आहे. लेकराची वेडीवाकडी वर्तणूक मला सावरावी लागते. कोणाविशी चिंता न करणे.’ ’

राजांनी निःश्वास सोडला. ‘बस्स! एवढंच आम्ही ऐकलं. आणि महालात कोणी नव्हतं. फक्त वादळविजांचा कडकडाट होता...’

‘विजा, वादळ ऽ ऽ? राजे ऽ ऽ’

राजांनी जिजाबाईंच्याकडे पाहिले.

‘सगळीकडे सामसूम होतं. ढगांचा आवाज नव्हता. महालाचे पडदे अगदी स्थिर होते.’ राजे उद्गारले, ‘मग आम्हांला झाला, तो भास?’

जिजाबाईंच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता. त्या गहिवरून म्हणाल्या,

‘राजे, भाग्यवान म्हणून तुम्हांला दृष्टांत झाला. ती पाठीराखी असता काळजी कसली करता? आईचा आशीर्वाद मिळाला. शांत चित्तानं झोपा.’

राजे भारावलेल्या मनाने आपल्या महाली आले. सर्वत्र शांतता होती. वाऱ्याचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लवलेशही नव्हता. राजे पलंगावर झोपले. मन हलके झाले होते. डोळ्यांत शांत नीज उतरत होती.

□

५

सायंकाळच्या वेळी मिर्झाराजे मनुचीबरोबर बुद्धिबळ खेळत होते. अंधार पडायला सुरुवात झाली होती. एखादी गार वाऱ्याची झुळूक डेऱ्यात प्रवेश करीत होती. मिर्झाराजांनी चाल केली होती. मनुचीसाहेब विचार करीत होता. तोंडावर पंजा धरून पटाकडे पाहत होता. थोडा वेळ गेला. मनुचीचे खांदे उडविले; आणि तो म्हणाला,

'राजासाब, आपकी जीत! हम हार गये!'

मिर्झाराजे मोठ्याने हसले. मनुची उठला. आपली पसरट टोपी घालून त्याने मिर्झाराजांना वाकून अभिवादन केले; आणि मनुची गेला. मिर्झाराजे उठले. डेऱ्याबाहेर येऊन ते उभे राहिले. तळावर पलोते पेटत होते. मिर्झाराजांनी शामियान्यात जाण्यासाठी पायांत जरी चढाव चढविला आणि ते शामियान्याकडे चालू लागले. तळपते तेगे घेतलेले दोन सिद्दी मागोमाग चालत होते. मिर्झाराजे आपल्याच विचारात जात होते. शामियान्याच्या प्रवेशद्वाराचे पलोते दिसू लागले. मिर्झाराजे शामियान्याच्या जवळ पोहोचले, तोच एक इसम अंधारातून धावला. खोजाच्या लक्षात येताच तो धिप्पाड खोजा पुढे झाला; आणि त्याने आपला तेगा चालवला. तेग्याचा वार त्या इसमाने आपल्या खंजिरावर झेलला. तेगा पुढे पुढे सरकत होता. खंजिराचा हात मागे हटत होता. दुसरा खोजा धावला. भानावर आलेले मिर्झाराजे ओरडले,

'जिंदा पकडना ऽ ऽ'

क्षणात तो अनोखा इसम गिरफदार केला गेला. मिर्झाराजे म्हणाले,

'त्याला डेऱ्यात घेऊन जा. डेऱ्यात कोणी असता कामा नये. बोलता होतो का, पाहा. याची वार्ता कुणाला समजता उपयोगी नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्या इसमाला नेण्यात आले. काळोखामुळे त्याचा चेहराही पाहता आला नाही. मिर्झाराजे अस्वस्थ झाले होते. पण तसे न भासविता ते शामियान्यात गेले. मिर्झाराजांचा मुलगा किरतसिंग याने राजांचे स्वागत केले. पण मिर्झाराजे बैठकीवर गेले नाहीत. ते म्हणाले,

‘किरत!’

‘जी!’

‘मला जेवायला थोडा वेळ होईल. माझी तयारी झाली, की मी येईन. मला बोलावणं पाठवू नको. जरुरीचं काम आहे.’

किरत त्या बोलण्यानं आश्चर्यचकित झाला. मिर्झाराजे आपल्या ठरल्या कार्यक्रमात कधीही बदल करीत नसत. शामियान्याबाहेर जाणाऱ्या मिर्झाराजांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे थक्क होऊन किरत बघत होता.

मिर्झाराजे डेऱ्यात आले. डेरा मोकळा होता. दोघे सिद्दी गिरफदार केलेल्या खुन्याला धरून उभे होते. खुन्याच्या मुसक्या आवळल्या गेल्या. मिर्झाराजे बैठकीवर बसले. आपल्या हाताने तिवईवरील सुरईतील मद्य सुवर्णप्याल्यात ओतून घेऊन ते त्या खुन्याकडे पाहत होते. मिर्झाराजांनी त्याच्या मुसक्या सोडण्यास सांगितले. त्याचा चेहरा मोकळा होताच मिर्झाराजे आश्चर्यचकित झाले. मिर्झाराजे म्हणाले,

‘कोण तू? शिवाजीच्या वकिलाबरोबर तूच आला होतास ना?’

कुडतोजी काही बोलले नाहीत. मिर्झाराजांनी रक्षकांना बाहेर जाण्याची आज्ञा केली. कुडतोजी त्या वर्तनाने अस्वस्थ झाले. मिर्झाराजे म्हणाले,

‘भिऊ नको. तुला काही होणार नाही. माझी हत्या करून काय साधणार होतं?’

कुडतोजींनी ओठांवरून जीभ फिरविली. त्यांना धीर आला होता. ते म्हणाले,

‘साहेब, चाकरी समजून आलो होतो; पण आपलं दैव बलवत्तर. ईश्वर तुमच्या पाठीशी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहे, म्हणूनच वाचलात.’

मिर्झाराजे हसले. ‘ते आम्हांलाही माहीत आहे. तो आशीर्वाद आमच्या पाठीशी नसता, तर आम्ही शिवाजीराजांच्या वर विजय मिळविला नसता.’

‘विजय अजून फार दूर आहे.’

‘चुकीचं आहे. विजय आमच्या मुठीत आहे. नाही तर राजांच्या पदरची, त्यांच्यावर वेडं प्रेम करणारी तुमच्यासारखी माणसं असं वागली नसती.’

‘मिर्झाराजाला खरंच चेटूक प्रसन्न आहे का?’ असा विचार कुडतोजींच्या मनाला स्पर्श करून गेला. विस्फारित नेत्रांनी ते मिर्झाराजांच्याकडे पाहत होते.

मिर्झाराजे दिलखुलास हसले. ‘आम्ही हे कसं जाणलं, याचं आश्चर्य वाटतं? शिवाजीजवळ राहून अजून त्याला ओळखलं नाही? शिवाजीनं टाकलेली झेप कधी चुकत नाही. आमची हत्याच करायची असती, तर असा कच्चा डाव शिवाजीनं टाकला नसता. अफझल, शास्ताखान आठव! पण आम्ही तुझ्यावर खूश आहो. आमची इच्छा आहे की, तू आमच्या पदरी यावं. मागशील, तो मान तुला मी देईन.’

कुडतोजी भानावर आले. त्यांनी आवंढा गिळला. ते म्हणाले,

‘यापेक्षा माझं डोकं उडवलं, तरी चालेल.’

‘तू हे म्हणणार, तेही मला माहीत होतं. आम्ही तुला सोडायचं ठरविलं आहे. तुझं घोडं आहे?’

‘नाही!’

‘ठीक!’ मिर्झाराजांनी टाळी वाजविली. सेवक आत आला. मिर्झाराजांनी शिरपाव आणवून तो कुडतोजींना दिला. कुडतोजींसाठी घोडा तयार ठेवण्याची आज्ञा दिली. मिर्झाराजांनी खांद्यावर हात ठेवला. त्यांच्या नजरेला नजर भिडवीत मिर्झाराजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘घाबरू नको. दगा होणार नाही. चावडीबाहेर जाईपर्यंत माझं पथक तुला सोबत करील. घोडा तुला बक्षीस दिला आहे. शिवाजीराजांना सांग- शत्रूच्या मुलखात असताना आम्ही क्षणभरही बेसावध नसतो. यापेक्षा खुद्द तुमचे राजे लौकर येऊन भेटतील, तर बादशहाकडून मनसबदारी देणं सोपं पडेल. फार कटुता वाढण्याच्या आतच राजांना भेटा, म्हणावं. त्यात त्यांचं कल्याण आहे.’

मिर्झाराजांच्या व्यक्तिमत्त्वाने, त्यांच्या औदार्याने कुडतोजी दिपले होते. त्यांनी लवून मुजरा केला; आणि मिर्झाराजांचा निरोप घेतला.

मद्याचा आस्वाद घेत मिर्झाराजे समाधानाने जरी बैठकीवर रेलून बसले होते. तोच किरतसिंग आत आला. अधीरपणे त्याने विचारले,

‘आपल्यावर हल्ला झाला?’

‘कोण म्हणतं?’

‘माझ्या शामियान्याजवळचा सेवक सांगत होता.’

‘खोटं! माझ्यावर हल्ला कोण करणार?’

‘मग कोण आलं होतं?’

‘हा प्रश्न विचारण्याचा अधिकार तुला नव्हता. पण तुला म्हणून सांगतो. शिवाजीचा दुय्यम सेनापती गुजर भेटायला आला होता. लौकरच आपल्या मनाजोगा तह होईल. आम्ही एवढ्यात जेवायला येऊ.’

‘आपल्यालाही खूश खबर द्यायची आहे. दिलेरखानांनी वज्रगड घेतला आहे. इजाजत...’

मिर्झाराजे समाधानाने लोडावर कलंडले. किरत निघून गेला; आणि थोड्याच वेळाने मिर्झाराजे डेऱ्याबाहेर पडून शामियान्याकडे जाऊ लागले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

६

कुडतोजी गुजर राजांच्या समोर उभे होते. सारी हकीकत ऐकूनही राजांचा विश्वास बसत नव्हता. कुडतोजी सांगत होते...

‘मिर्झाराजांनी मला चांगलं वागवलं; एवढंच नव्हे, तर शिरपाव आणि घोडा दिला. माणूस मोठा उमदा. राजा शोभतो.’

राजे प्रसन्नपणे हसले. म्हणाले, ‘कुडतोजी, मिर्झाराजांनी तुम्हांला सोडून जे मिळवायचं, ते यश मिळविलं. तुम्ही गेलात; पण तुमच्या काळजीनं आमचा जीव झुरत होता. तुम्ही आला, ही बातमी कळली, तेव्हा केवढा आनंद झाला, ते कसं सांगू? तुम्ही सुखरूप आलात, यातच आम्हांला सर्व मिळालं. पण, कुडतोजी, तुमचा हा अविवेकी स्वभाव आम्हांला एक ना एक दिवस पश्चात्ताप करायला लावील. आपल्या स्वभावाला मुरड घालायला शिका.... मिर्झाराजांची छावणी काय म्हणते?’

‘यश मिळण्याची मिर्झाराजांना खात्री आहे. काल दोन प्रहरपर्यंत तोफांचे आवाज कानांवर येत होते. एल्गार जारी आहे.’

‘हं!’

राजांनी निःश्वास सोडला.

कुडतोजींनी मुजरा केला. ते वळणार, तोच राजे म्हणाले,

‘थांबा, कुडतोजी. आमचे शत्रू आमच्या माणसाचं कौतुक करतात, तिथं आम्ही स्वस्थ कसे बसू?’

राजांनी शिरपाव मागवला. शिरपाव घेऊन मोरोपंत आत आले. तबकात शिरपाव, तलवार आणि मानवस्त्र होते. राजे मोरोपंतांना म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मोरोपंत, कुडतोजी मोठा पराक्रम करून आलेत. खास शत्रुगोटाची बातमी काढून आलेत!’

राजांनी कुडतोजींना शिरपाव दिला. तलवार आणि मानवस्त्र हाती देत ते म्हणाले,

‘कुडतोजी, आम्ही तुमचं नाव बदललं आहे. ‘प्रतापराव’ ही किताबत आम्ही तुम्हांला बहाल करीत आहो. तुमच्या पराक्रमाला ते नाव सार्थ आहे.’

प्रतापरावांनी मुजरा केला. कुडतोजी गुजरांचे ‘प्रतापराव गुजर’ झाले. मानाचा स्वीकार करून प्रतापराव वळले. त्याच वेळी महालात येत असलेल्या तानाजीवर साऱ्यांची नजर वळली. तानाजी मुजरा करून म्हणाला,

‘महाराज! घात झाला! वज्रगड पडला!’

वज्रगड पडला! राजे सुन्न झाले. वज्रगड पुरंधरचा जुळा भाऊ. वज्रगड पडला, की आकाशाला भिडलेला पुरंधर नजरेच्या टप्प्यात, तोफांच्या माऱ्यात आला. तो गड वर्षभर भांडेल, असे वाटत होते, त्याचा रक्षणकर्ता अवघ्या तेरा दिवसांत पडला.

राजे म्हणाले, ‘ज्याची भीती वाटत होती, तेच घडलं.’

राजे आपल्याच विचारात रात्री आपल्या महाली बसले होते. जिजाबाईंना आत आलेल्या पाहताच राजे उठले. राजे म्हणाले,

‘आम्हांला बोलवायचं होतं. आम्ही खाली...’

‘दिवेलागण होऊन बराच वेळ झाला. सोयराला विचारलं, तर एकटेच महाली आहात, असं कळलं....’

‘केव्हा वेळ गेला, हे आमच्या लक्षात आलं नाही.’

‘वज्रगड पडला, हे खरं?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'हो! आता फार काळ पुरंधर टिकाव धरील, असं वाटत नाही. मासाहेब, आम्ही तह करायचं ठरविलं आहे.'

'पण मिर्झाराजे संपूर्ण शरणागती मागतात ना?'

'शक्यतो ती पाळी येऊ नये, यासाठीच आम्ही खटपट करू. पण जमेल, असं दिसत नाही. पुरंधर हातचा जायच्या आतच तह झाला, तर मानाचा तह होण्याची शक्यता आहे. पुरंधर गेला, की मग मिर्झाराजांच्या दयेचा प्रश्न राहील.'

'शिवबा! कसलं, रे, हे संकट!'

'मासाहेब, डोळ्यांत पाणी आणू नका. आम्हांला जगदंबेनं दृष्टांत दिला आहे. जेव्हा काळजीची पराकोटी होते, तेव्हाच त्यातून सुटण्याचा मार्ग सापडतो, हा आमचा अनुभव आहे. वज्रगड पडला, तरी पुरंधर घेणं इतकं सोपं जाणार नाही. मुरारबाजी शर्थीनं गड राखतील!'

'मग तहासाठी कुणाला पाठवणार?'

'आता सावधगिरीनं पावलं टाकायला हवीत. उद्या आम्ही आणखीन एक पवित्रा टाकणार आहो. पाहू, जमतं का!'

दुसऱ्या दिवशी राजांनी मिर्झाराजांच्याकडे करमाजी नावाच्या विश्वासू जासुदाच्या मार्फत थैली रवाना केली. मिर्झाराजांच्या पत्रात राजांनी लिहिले होते...

> '....सम्राटांचा माझ्यापासून खूप फायदा होईल. मी बादशहांचा नौकरच आहे. या कोकणपट्टीच्या दुर्गम अशा खडकाळ व डोंगराळ भागात लढाई करीत राहून श्रमी होण्यापेक्षा आपण आदिलशाही स्वारीचा विचार करीत असाल, तर जरूर मी मदत करायला तयार आहे.'

आपल्यावरची संक्रांत विजापुरावर सरकावण्याचा राजांचा डाव होता.

राजे उत्तराची वाट पाहत होते. पत्राचे उत्तर घेऊन जासूद आला. राजांनी रघुनाथपंतांना ते पत्र वाचावयास सांगितले. रघुनाथपंत वाचू लागले....

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

> '...बादशाही सेना, जी आकाशातील अगणित ताऱ्यांप्रमाणे विपुल आहे, तिला दख्खनमध्ये तुझ्या विरुद्ध पाठविलेली आहे. तुझ्या दुर्गम डोंगरी व खडकाळ प्रदेशावर विसंबून राहू नकोस. ईश्वराची इच्छा असेल, तर हा प्रदेश घोडदळाच्या व पायदळाच्या टाचांनी पार सपाट होऊन जाईल. तुला तुझ्या जिवाची पर्वा असेल, तर साम्राज्याच्या नौकरीची धुरा गळ्यात अडकवून घे. असे करशील, तर तुझ्या नवीन धन्यालाही मोठेपणा व बरे वाटेल. तेव्हा तू या डोंगरगडांवरून तुझे चित्त दूर ठेव. नाही तर जो परिणाम भोगावा लागेल, तो तुझ्याच कर्माची फळे म्हणून भोगणे प्राप्त होईल...'

त्या उत्तराने राजे सुन्न झाले. राजांच्याकडून अनेक पत्रे जात होती. उत्तरे येत होती. पण मिर्झाराजे वळत नव्हते. पुरंधरवर तानाजीने तीनशे सैनिक गडावर चढविल्याने राजे पुरंधरविषयी निश्चिंत होते. राजांचा एकच आधार उरला होता - निसर्गाचा. पावसाळा आला, की काही तरी हालचाल करता येणे शक्य होते.

राजे तह करण्यासाठी मिर्झाराजांना अनेक पत्र लिहीत होते. पण मिर्झाराजे संपूर्ण शरणागतीखेरीज काहीच बोलत नव्हते. राज्यातल्या मुलुखात बेसुमार लुटालूट जारी होती. पुरंधरवरचा हल्ला एकही दिवस थांबत नव्हता. तो थांबविण्याकरिता राजांनी आपले सेनापती व युवराज यांना तह करण्यासाठी पाठविण्याची तयारी दर्शविली. पण मिर्झाराजे शिवाजीराजांच्या खेरीज कुणाशीही बोलणी करण्यात तयार नव्हते. त्यांनी रघुनाथपंतांना स्पष्ट बजावले,

'तह करण्याचा मला हक्क नाही. पण शिवाजी बिनहत्यार, गुन्हेगारासारखा समक्ष येऊन केल्या गुन्ह्याची माफी मागेल, तर कदाचित कृपाळू होऊन क्षमा करतील. मी तशी शिफारस जरूर करीन...'

राजांनी जीविताची हमी मागितली. राजे येणार, हे कळताच मिर्झाराजे आनंदले. त्यांनी राजांच्या जीविताची हमी दिली. राजांचे वकील रघुनाथपंत यांना शपथ करून बेलतुळशी दिल्या.

भेटीच्या दिवसाची तारीख निश्चित करण्यासाठी बोलणी सुरू झाली. मिर्झाराजांनी तातडीने दिलेरखानाला बोलावून घेतले. दिलेरखान आला. मिर्झाराजांनी सर्व परिस्थिती सांगितली. आपल्या परोक्ष ही बोलणी ठरावीत, याचा दिलेरखानाला राग आला. जेव्हा मिर्झाराजांनी पुरंधरवरचा वेढा सौम्य करण्याचा आदेश दिला, तेव्हा तर दिलेरखानाच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. तो भानावर येऊन उसळला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मिर्झासाब, एवढे कष्ट घेऊन रुद्रमाळ घेतला, पुरंधर बेजार केला, ते ऐन वेळी कच खाण्यासाठी? चार दिवसांत पुरंधर ताब्यात येईल.’

‘हे मी कैक दिवस ऐकतो आहे. जरी ते शक्य असलं, तरी मला ते नको आहे.’

‘का?’

‘शिवाजीराजांना पुरंधर जाण्याच्या आत तह हवा. त्यांचं स्वप्न पुरंधरवर अवलंबून आहे. पुरंधर पडला, तर शिवाजी कदाचित तहाला होणार नाही. निराश होऊन तो बेफाम बनेल. आलेलं यश दूर जाईल.’

‘हां, राजासाब! एवढे तुम्ही...’

‘खामोश! दिलेरखान, एवढा गड घ्यायला इतके दिवस लागले. दारूगोळा खर्ची पडला. पाऊस केव्हा सुरू होईल, कुणी सांगावं! माणसाशी टक्कर देता येते; पण निसर्गाशी टक्कर... कठीण आहे! मला तो धोका पत्करण्याची इच्छा नाही. झाला तह, तर ठीकच आहे. नाही झाला, तर तुमचे मार्ग मोकळे आहेत. तेव्हा शिवाजीची भेट होईपर्यंत पुरंधरचा लढा सौम्य करा. न जाणवेल, अशा तऱ्हेनं...’

दिलेरखान जळफळत उठला. पण बोलून दाखविण्याचे अथवा विरोध करण्याचे सामर्थ्य त्याला नव्हते. मिर्झाराजांची आज्ञा मान्य करून तो आपल्या तळाकडे निघून गेला.

मिर्झाराजे शिवाजीराजांना भेटण्यास उतावीळ झाले होते.

❑

७

भेटीचा दिवस निश्चित ठरला. मृग नक्षत्र लागले, तरी पावसाचा पत्ता नव्हता; ना पश्चिमेचा गार वारा सुरू झाला. पश्चिमेकडून ढग अखंडपणे येत होते. काळ्या ढगांनी सारे वातावरण कुंदावले होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे राजगडाला होते. महिनाभर वाटाघाटी करून भेटीचा दिवस आषाढ शुद्ध नवमी ठरला. भेट निश्चित झाली, तशी राजांची तगमग वाढली. यातून काय निष्पन्न होणार, याचा अंदाज लागत नव्हता. राजांनी सुरक्षिततेसाठी जिजाबाईंना आणि सोयराबाईंना कोंढाण्यावर हलविण्याचे ठरविले. जिजाबाईंनी विचारले,

'आम्ही कोंढाण्यावर जायचे कारण?'

'मासाहेब, तहाला बसण्याची वेळ आली, तर कोंढाण्यासाठी जरूर हट्ट धरला जाईल. आपण तिथं असला, तर निमित्त करता येईल. शंभूबाळ राजगडावर राहतील. तुम्ही कोंढाण्यावर असावं. कसलाही प्रसंग आला, तरी सारं घर एका जागी राहणं बरं नाही.'

'राजे, तुम्ही मिर्झाराजांच्याकडे जात आहात खरे; पण मला भीती वाटते!'

'कसली?'

'मिर्झाराजे घातपात तर करणार नाहीत ना?'

राजे जिजाबाईंच्या नजरेस नजर देत म्हणाले, 'नाही, मासाहेब ती चिंता सोडा. मिर्झाराजे राजपूत आहेत; शब्दाला जागणारे आहेत. दिलेरखानानं वज्रगड घेतला, तेव्हा वज्रगडाचे लोक पकडून मिर्झाराजांच्याकडे पाठविले. अशा प्रसंगात शत्रूच्या माणसांची कत्तल हा रिवाजच आहे. पण मिर्झाराजांनी आमची सारी माणसं सोडून दिली. बाइज्जत!'

'मोठ्या उदार मनाचा माणूस दिसतो.'

'ती राजकारणी चाल होती.'

'चाल?' जिजाबाईंनी विचारले.

'हो!' राजे म्हणाले, 'मिर्झाराजांचा उदार स्वभाव कळावा, हा जसा हेतू, तसाच पुरंधर लढवीत असलेल्या आमच्या फौजेनं दिपावं, हाही डाव होता. पण काही झालं, तरी मिर्झाराजे आम्हांला जपतील, प्राणमोलानं जपतील; परंतु तो दिलेरखान मोठा हरामजादा, बेइमान आहे. तोच काय करील, हे कळत नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दुसऱ्या दिवशी राजांनी जिजाबाईंना, सोयराबाईंना कोंढाण्याकडे पाठविले. राजांनी, सर्व गडांना, प्रसंग आला, तर गड भांडविण्याची आज्ञापत्रके पाठविली. मोरोपंत, अनाजी दत्तो, प्रतापराव गुजर, येसाजी, मानाजी या सर्वांना प्रसंग बाका आला, तर काय करायचे, याच्या योजना सांगितल्या. गडाची मजबुती जातीने पाहिली. राजांनी आनंदराव, निराजीपंत, नागोजी फर्जंद, बहिर्जी फर्जंद, कृष्णा जोशी व विश्वासराव यांना सोबती म्हणून निवडले; महादेव रक्षक म्हणून बरोबर घेतला; आणि सुमुहूर्तावर राजांनी गड सोडला.

□

८

शिवाजीराजांच्या भेटीसाठी खास उभारलेल्या शामियान्यात मिर्झाराजे बसले होते. दोन जरी बैठका नजरेत भरत होत्या. दोन्ही बैठकांच्या शेजारी नक्षीकाम केलेले उंची हुक्के ठेविले होते. सुवर्णधूपदाण्यांतून कनोजी धूपाची वलये उठत होती. किनखापी कनाती लावलेल्या व गालिचे अंथरलेल्या आपल्या शेंदरी रंगाच्या शाही शामियान्यात मिर्झाराजे शिवाजीराजांची वाट बघत होते. शामियान्याचा थाटमाट ऐश्वर्यसंपन्न होता. मिर्झाराजांनी स्वत: जागा निवडून शामियाना उभा केला होता. मिर्झाराजांच्या भोवती जुन्या सरंजामी परंपरेतील काही निवडक रजपूत वीर रक्षक म्हणून उभे होते, त्यांच्या मस्तकांवर रुबाबदार साफे बांधलेले होते. लांबलचक दाढ्या मधोमध विभागून छातीवरील चिलखतावर दोन्ही बाजूंस रुळत्या केल्या होत्या. प्रत्येकाच्या हातात नागवी समशेर होती. शिवाजीच्या भेटीच्या वेळी सुरक्षिततेची सारी जोखीम उग्रसेन कछवाहवर सोपविली होती. शामियान्याच्या चारी बाजूंना तळपते तेगे घेतलेल्या सिद्दींचा जागता पहारा होता. भेटीचा दिवस निश्चित झाल्यापासून तळावर येणाऱ्या प्रत्येक नवख्या माणसाची कसून चौकशी होत होती.

मिर्झाराजे विचारात गढले होते. त्यांच्या मस्तकावर केशरी साफा शोभत होता. त्यावर पाचूचे पिंपळपान उठून दिसत होते. अंगावर जरी काडीची किनार असलेला अस्मानी अंगरखा व पायांत चुणीदार विजार होती. गळ्यात नवरत्नांचा कंठा रुळत होता. साठीच्या घरात असलेले वय फक्त पांढऱ्या केसांनी दिसत होते. तरततरीत सरळ असलेले नाक, पातळ ओठ, गहिरी पाणावलेली नजर मिर्झाराजांच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव आणीत होती. रुंद कपाळावर केशरी टिळा शोभत होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तोफांच्या आवाजाने मिर्झाराजे भानावर आले. उग्रसेन कछवाहकडे नजर वळवून मिर्झाराजे म्हणाले,

‘दिलेरखानांनी हल्ला सुरू केला, वाटतं?’

‘आपणच हुकूम दिला होता ना?’

‘हो. शिवाजीराजांच्या स्वागताला तोफांची सलामी नको?’

उग्रसेन हसला. मिर्झाराजांच्या चेहऱ्यावर समाधान होते. तोफांचे आवाज अखंड उठत होते. दिलेरखानाने रुद्रमाळेवरून पुरंधरवर तोफांचा मारा जारी ठेविला होता. सूर्य आकाशात चढत होता. बराच वेळ गेला; आणि हेजिबाने बातमी आणली,

‘हुजूर, पुरंधरच्या बुरुजाजवळ तटाला खिंडार पडलं.’

‘छान! हल्ला असाच जारी ठेवा.’ मिर्झाराजे समाधानाने म्हणाले.

हेजीब गेला.

मिर्झाराजे हुक्का पीत होते.

विचारात गढलेल्या मिर्झाराजांच्यावर नजर ठेवून थोड्या अंतरावर उदयराज मुनशी व उग्रसेन कछवाह उभे होते.

जानी बेग बक्षी डेऱ्यात आले. त्यांनी वर्दी दिली,

‘शिवाजीराजे छावणीपासून दृष्टिटप्प्यात आले आहेत.’

‘बरोबर कोण आहे?’

‘फार असामी नाहीत. शिवाजीराजे पालखीतून येत आहेत. बरोबर पाच-सहा रक्षक व पालखीचे कहार भोई आहेत.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मिर्झाराजांनी उग्रसेन कछवाह आणि उदयराज मुनशी यांना राजांना सामोरे जायला सांगितले; व आज्ञा दिली,

‘शिवाजीराजे नि:शस्त्र, संपूर्ण शरणागतीच्या तयारीनं मला भेटायला येत असतील, तरच या, म्हणावं. नाही तर त्यांना आल्या पावली परत जाण्यास मोकळीक आहे, हे कळवा. हे मान्य असेल, तरच राजांना येथे घेऊन या.’

उग्रसेन कछवाह आणि उदयराज मुनशी मिर्झाराजांना मुजरे करून कामावर निघून गेले. मिर्झाराजे अस्वस्थपणे येरझाऱ्या घालीत होते. थोड्या वेळातच कछवाह आत आला. त्याने वर्दी दिली,

‘शिवाजीराजे येत आहेत.’

‘कुठं आहेत?’

‘एव्हाना डेऱ्याजवळ येऊन पोहोचले असतील.’

मिर्झाराजे गडबडीने बाहेर गेले. डेऱ्याच्या दारी येताच समोरून येणाऱ्या शिवाजीराजांचे त्यांना दर्शन घडले. शिवाजीराजांच्या वर मिर्झाराजांची आतुर नजर जाताच ती घायाळ बनली.

शिवाजीराजे समोरून येत होते; पण त्यांचे दोन्ही हात पुढे जोडले होते. त्यांवर पांढरा शेला गुंडाळला होता.

मिर्झाराजे एकदम पुढे गेले. मिर्झाराजांना आपल्या जयाचा, रिवाजाचा विसर पडला. तशा स्थितीतही स्मितवदनाने येणारे राजे पाहून मिर्झाराजे अचंबले. शिवाजीराजांच्या हातांवर बांधलेला शेला दूर करीत मिर्झाराजे बोलले,

‘राजासाब, ये क्या?’

शिवाजीराजे म्हणाले, ‘मिर्झाराजे, संपूर्ण शरणागतीची आपण आज्ञा पाठवलीत. शरणागतीचा रिवाज आम्ही पाळला. आपल्यासारख्या पितृतुल्य राजपुतासमोर हात बांधूनच

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काय, पण गुडघे टेकून सुद्धा यायला आम्हांला खंत वाटणार नाही.'

मिर्झाराजांनी शिवाजीराजांना पुढे बोलू दिले नाही. मिर्झाराजांच्या मिठीत शिवाजीराजे बद्ध झाले. शिवाजीराजे जेव्हा त्या प्रेममिठीतून मुक्त झाले, तेव्हा त्यांचा हात धरीत मिर्झाराजे म्हणाले,

'राजे, आजवर तुम्ही दिल्लीतख्ताविरुद्ध चांगलीच शर्थ दिलीत. आता त्याच निष्ठेनं आपण सम्राटांची सेवा करायला हवी. चलावं, राजे.'

शिवाजीराजांच्यासह मिर्झाराजे डेऱ्यात आले. डेऱ्याच्या प्रवेशद्वाराशी आनंदराव राजांचे जोडे घेऊन उभे राहिले. राजांच्यासाठी मांडलेल्या खास बैठकीवर राजांना बसवून मिर्झाराजे समोरील बैठकीवर बसले. मिर्झाराजे एकटक नजरेने वीरासन घालून बसलेल्या राजांच्याकडे पाहत होते.

राजांच्या पांढऱ्या जिरेटोपांवर मोत्यांचा तुरा शोभत होता. कानांतील टपोऱ्या मोत्यांचे चौकडे मानेच्या किंचित हेलकाव्याबरोबर आपली निळी झाक नजरेत भरवीत होते. डौलदार दाढी. तेजस्वी डोळे, रेखीव भुवयांवर लावलेले पवित्र शिवगंध राजांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वात भर घालीत होते. राजांची उमर पस्तिशीची असूनही वयाचे कोवळेपण जाणवत होते. राजांनी अंगात जरी बुंदीचा पांढरा शुभ्र अंगरखा

पेहेनला होता. कमरेला केशरी शेला आवळला होता. राजे नि:शस्त्र होते. पायांत तंग विजार होती. शिवाजीराजांना निरखीत असता मिर्झाराजांच्या मनात अनेक विचार उठत होते....

'हाच तो शिवाजी! अफझलचा वध यानंच केला. शास्ताखानाच्या छावणीत शिरून त्याच्यावर हल्ला करण्याचं धाडसं याचं. ज्या सम्राटांच्या ताकदीपुढं निजामशाही नष्ट झाली, आदिलशाहीनं मान तुकविली, त्या महान शक्तीला आव्हान देणारा हाच शिवाजी. दिल्लीपतीला अस्वस्थ करून सोडण्याचं याचं सामर्थ्य!'

विजयाने बेहोश बनलेली माणसे मिर्झाराजांनी अनेक पाहिली होती. पण पराजय स्वीकारतानाही आपल्या बेगुमान गहिऱ्या नजरेने आव्हान देणारा तरुण मिर्झाराजे प्रथमच पाहत होते. मिर्झाराजांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजासाब, आम्ही तुमचीच वाट पाहत होतो. तुम्ही आलात, फार चांगलं झालं. आपले गुजर कुठं दिसत नाहीत? मोठा धाडसाचा माणूस!’

‘धाडस कारणी आलं, तरच कौतुक!’ राजे म्हणाले.

‘दुर्दैवानं फसलं, असंच ना?’

राजांच्या चेहऱ्यावर स्मित कायम होते. ‘राजकारणात सारं माफ असतं. आमचा फसलेला डाव आमच्याच अंगावर उलटणार नाही, हे कुणी सांगावं?’

मिर्झाराजे आपल्या मांडीवर थाप मारीत म्हणाले, ‘ते या मिर्झाराजाच्या तळावर घडणार नाही. आमचा प्रत्येक मेहमान प्राणमोलानं जपला जातो.’

‘आम्हीही राजपूतच आहोत. आम्हांला ते माहीत आहे. ती खात्री नसती, तर इथं येण्याचं धाडस आम्ही केलं नसतं.’

शिवाजीराजांच्या स्पष्टोक्तीवर मिर्झाराजे खूश होते. त्यांना ती तडफ आवडली होती. त्यांनी आणखी अंदाज घ्यायचा ठरवला.

‘पण, राजे, आपली भवानी तलवार कुठं आहे? अद्याप ती म्यानाबाहेर पडलेली दिसत नाही!’

राजांनी नजर मिर्झाराजांच्या नजरेला भिडली. क्षणभर नजरेत अंगार उसळल्याचा भास झाला. आपली नजर न हलविता राजे म्हणाले,

‘काही वेळा प्रसंगानुसार यशस्वी शस्त्रंही शमीवृक्षावर ठेवावी लागतात!’

‘व्वा ऽ ऽ! तुमच्या जवाबाला तोड नाही.’ मिर्झाराजे उद्गारले. ‘पण, राजे, अद्याप आपण कमसिन आहात. माझी सारी उमर याच खेळात गेली. शहाजादा औरंगजेब बनला, तो मिर्झाराजांच्याच बळावर, हे विसरू नका.’

‘त्याचा विसर कसा पडेल? उलट, त्याचंच दुर्दैव वाटतं.’ राजे बोलून गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मिर्झाराजांच्या भुवया वक्र बनल्या. त्यांनी विचारले, 'मतलब?'

शिवाजीराज म्हणाले, 'साफ आहे! दिल्लीतख्ताचं राज्य औरंगजेबाला देण्याऐवजी त्या तख्तावर आपण बसला असता, तर ते अधिक शोभलं असतं. ती आपली योग्यताही होती. हिंदूंमध्ये कोणी बलशाली माणूस राहू नये, असं औरंगजेबाला वाटतं. इस्लामखेरीज तो काही जाणीत नाही. हिंदूंच्या भूमीवर मूठभर मुसलमानांची सत्ता स्थापण्यापेक्षा जर तुम्हीच सम्राट बनला असता, तर आज आपल्याला दक्षिणेत उतरायची गरज पडली नसती. मी माझ्या पावलांनी दिल्ली जवळ केली असती; आणि माझ्या हातांनी माझं छोटं राज्य तुमच्यावरून ओवाळून टाकलं असतं! जन्मोजन्मीचा तुमचा गुलाम झालो असतो!'

शिवाजीराजांच्या आवेशयुक्त बोलांनी थक्क झालेले मिर्झाराजे भानावर आले. त्यांचा जीव घाबरा झाला. आजूबाजूला पाहत मिर्झाराजे ओरडले,

'पाबंदी रक्खो! राजे, जबानकी पाबंदी रक्खो. या मिर्झाराजांवर सत्ता बादशहांची आहे. मिर्झाराजे त्यांचा बंदा आहे. दिल्लीतख्ताचा उपमर्द येथे ऐकला जात नाही.'

शिवाजीराजांनी नि:श्वास सोडला. ते म्हणाले,

'राहिलं! गुलामगिरीत मनातले भाव मोकळेपणानं बोलता येत नाहीत, हे आम्ही विसरलो. हम माफीके तलबगार हैं.'

मिर्झाराजांनी टाळी वाजविली. सेवक फळांची तबके घेऊन येत होते. राजांच्या समोर तबक धरण्यात आले. राजांनी एक सफरचंद उचलले. मिर्झाराजे बैठकीवर उठले. त्यांनी तबकातला चाकू उचलला. राजांच्या हातातले फळ घेऊन त्यांनी ते छेदले; आणि राजांच्या पुढे हात धरला.

'घ्या, राजे. कोणतंही उचला.'

राजांनी दोन्ही तुकडे उचलले. मिर्झाराजे चकित झाले.

राजांच्या चेहऱ्यावर स्मित होते. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मिर्झाराजे, आपण मनात काहीही आणू नका. आमच्या मनात संशय नाही. माणूस परमेश्वरी इच्छेनं जगतो आणि मरतो, यावर आमची श्रद्धा आहे.’

राजांच्या दिलदारीवर मिर्झाराजे एकदम खूश झाले. राजे मद्य घेत नाहीत, हे ध्यानी येताच त्यांनी सरबत मागविले. मिर्झाराजांच्या बरोबर राजांचा फलाहार सुरू झाला. तोफांचे आवाज कानांवर येत होते. पण राजे आपली अस्वस्थता न दाखविता फलाहार करीत होते. पुरंधर तोफांच्या माऱ्यात सापडला आहे, मुरारबाजी शर्थीनं ह्या लढ्याला तोंड देत आहेत, हे राजांना दिसत होते.

राजांना तोफांचे आवाज असह्य झाले. ते मिर्झाराजांना म्हणाले,

‘मिर्झाराजे, हे आवाज कसले?’

‘तुमच्या पुरंधरवरच्या हल्ल्याचे ते आवाज आहेत.’

‘पण आम्ही शरणागती पत्करली आहे ना?’ राजांनी विचारले.

‘त्याची अंमलबजावणी होईपर्यंत हे असंच चालायचं!’

राजे बैठकीवर उठू लागलेले पाहताच मिर्झाराजे पुढे म्हणाले,

‘थांबा, राजे! उठण्याची गरज नाही.’

मिर्झाराजांनी आज्ञा दिली, आणि ते राजांच्या जवळ येऊन बसले. सेवकांनी डेऱ्याची कनात उचलली. राजांचे डोळे विस्फारले गेले. राजांना बसल्या जागेवरून पुरंधर दिसत होता. आगीच्या भडिमारात होरपळणारा पुरंधर पाहून राजांचे मन करपले. मिर्झाराजे शिवाजीराजांची अस्वस्थता समाधानाने पाहत होते. राजांच्या कानांवर शब्द आले,

‘शिवाजीराजे, तुमच्या दक्खनदौलतीचे बुरुज कसे ढासळतात, ते पाहा! ते पाहण्यासाठीच इथली बैठक सजविली आहे.’

राजे पाहत होते; आणि मिर्झाराजांच्या सांगण्याचे प्रत्यंतर राजांना येत होते. पुरंधरचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सफेद बुरुज तोफांच्या माऱ्यात ढासळत होता. आगीने आणि धुराने गड वेढला होता. राजे स्वप्नातल्यासारखे उठले. झोकांड्या देत ते सामोरे गेले. डेऱ्याच्या खांबाचा आधार घेत ते पाहत होते. राजे उभ्या जागी एकदम वळले. मिर्झाराजे बैठकीवर बसूनच होते. त्यांच्या चेहऱ्यावर विजयाचे स्मित होते. राजे म्हणाले,

'मिर्झाराजे, मी तुम्हांला पुरंधर देतो.' पुरंधरकडे बोट दाखवीत राजे म्हणाले, 'पण हा मारा थांबवा!'

'पुरंधर देता!' मिर्झाराजे हसले. 'राजे, पुरंधर आम्ही घेतला आहे. आणखीन काही क्षणांतच पुरंधरवर आमचं निशाण दिसेल. जे बोलायचं असेल, ते तुमच्या गडांबद्दल बोला.'

'ठीक आहे!' नि:श्वास सोडून राजे कळवळले. 'निदान हा मारा तरी थांबवा!'

नजरेला नजर भिडवीत मिर्झाराजे म्हणाले,

'विनंती केलीत, तर जरूर थांबवू!'

त्या शब्दांबरोबर राजांचे नेत्र आरक्त झाले. आपला संताप आवरीत ते कष्टाने म्हणाले,

'मिर्झाराजे, आम्ही विनंती करतो आहो. आम्ही भीक मागतो; पण माझी माणसं वाचवा!'

मिर्झाराजांनी किरतसिंगाला हल्ला थांबविण्यास सांगितले.

किरतसिंग मिर्झाराजांचा निरोप घेऊन तातडीने दिलेरखानाकडे गेला.

मिर्झाराजांच्याबरोबर राजांचे भोजन झाले. पण राजांचा प्रत्येक घास विषासारखा वाटत होता. त्यांचे लक्ष पुरंधरकडे लागले होते.

भोजन होताच राजे मिर्झाराजांच्यासह डेऱ्यात आले. तोफांचा आवाज थांबला होता. मिर्झाराजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, कसला विचार करता?’

राजे हसले. म्हणाले, ‘काही नाही. विचार कसला करणार?’

काही वेळ गेला; आणि राजांना भेटण्यासाठी कोरडे आल्याची बातमी आली. राजांनी कोरड्यांना येण्याची आज्ञा दिली. मल्हार कोरडे डेऱ्यात आले. त्यांनी राजांना मुजरा केला. राजांनी विचारले,

‘कोरडे गड खाली झाला?’

‘नाही, महाराज?’

‘का?’

‘आपली आज्ञा झाल्याखेरीज लढाई थांबवायला हवालदार नाईक तयार नाहीत.’

राजांनी अभिमानाने मिर्झाराजांच्याकडे पाहिले. राजे कोरड्यांना म्हणाले,

‘असेच माघारी जा! लढाई थांबवून गड खाली करण्याची आज्ञा हवालदारांना कळवा; आणि मुरारबाजींना आम्हांला भेटायला सांगा.’

‘महाराज!’ कोरडे उद्गारले.

‘काय?’

‘महाराज, मुरारबाजी लढाईत कामी आले!’

कोरड्यांनी सांगितलेल्या बातमीने राजे सुन्न झाले. कोरडे मुजरा करून बाहेर गेले. मिर्झाराजे शिवाजीराजांकडे पाहत होते. राजांचे डोळे उभ्या जागी भरून आले होते. मुठी वळल्या होत्या. राजांचे भान हरपले होते. गालांवरून निखळलेली आसवे खालच्या गालिच्यावर ठिपकत होती. मिर्झाराजे पुढे झाले. राजांच्या खांद्यावर स्नेहभराने हात ठेवीत मिर्झाराजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘एक माणूस हरवला, म्हणून डोळ्यांत पाणी? राजासाब, लढाईत हे चालायचंच!’

राजांनी मिर्झाराजांच्याकडे पाहिले; आणि ते ओरडले,

‘आनंदराव!’

आनंदराव आत आले. राजांनी आज्ञा केली, ‘आनंदराव! कोरड्यांना बोलवा.’

राजांनी डोळे टिपले. मिर्झाराजे राजांच्याकडे पाहत होते. कोरडे आत आले. कोरड्यांना पाहताच राजे म्हणाले,

‘कोरडे! आमचे मुरारबाजी कसे पडले, हे मिर्झाराजांना ऐकायचं आहे. तेवढं सांगा.’

‘महाराज, मी मुरारबाजींच्या बरोबरच होतो. शत्रूनं सुलतानढवा केला. बाजी तटावरून ते पाहत होते. लढाई जारी होती. बालेकिल्ला धोक्यात येतो, हे दिसताच मुरारबाजींनी हिंमत उचलली. त्यांनी बालेकिल्ल्याचं दार उघडण्याचा हुकूम दिला. साऱ्यांना चेव चढला. मुरारबाजी पंधराशे मावळ्यांसह बालेकिल्ल्याच्या बाहेर पडले. अचानक हल्ल्यानं शत्रू बिचकला. त्याची पीछेहाट सुरू झाली. मुरारबाजी पुढे सरकत होते. गनीम कापला जात होता. मुरारबाजींची चाल पाहून दिलेरखानानं माघार घेतली. दिलेरखान आपल्या छावणीत गेला. मुरारबाजी निकरानं लढत सरळ पठाणी छावणीवर चालून गेले. महाराज! असा बहाद्दर आम्ही पाहिला नाही. खुद्द दिलेरखान थक्क होऊन सामोरा आला. त्यानं ओरडून क्षणभर लढाई थांबविली. तो म्हणाला-

‘ ‘अरे! खरा मर्दाना तू! फुकट जीव वाया घालवू नको. अरे, कौल घे! मी तुला कौल देतो. सरदारकी देतो!’

‘क्षणभरची विश्रांती सरली. त्या बोलांनी मुरारबाजी संतापले. पचकन थुंकून ते ओरडले,

‘ ‘अरे, जा! तुझा कौल म्हणजे काय? तू कोण? मी शिवाजीराजांचा शिपाई! तुझा कौल घेतो, की काय?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आणि मुरारबाजी खानावर चालून गेले. एकच कापाकापी सुरू झाली. खानावर मुरारबाजी चालून जातो, हे पाहताच एका नेमबाजाने बाण सोडला. बाणाने निशाण अचूक गाठले. मुरारबाजींच्या मानेतून बाण आरपार गेला. मुरारबाजी पडले. मुरारबाजींना घेऊन परत आम्ही बालेकिल्ला गाठला.’

कोरडे थांबले. राजांनी त्यांना जायची इशारत दिली. कोरडे गेले. राजांनी आपली नजर वर केली. अनेक भावनांच्या छटा त्या डोळ्यांत सामावल्या होत्या. आपले डोळे पुशीत राजे म्हणाले,

‘ऐकलंत? जेव्हा मुरारबाजी पडले, हे कळलं, तेव्हाच आमच्या ध्यानी आलं होतं. सहजासहजी पडणारी माझी माणसं नाहीत, मिर्झाराजे! एकाच स्वप्नानं वेडी झालेली माणसं. आमच्या जवळ पोटासाठी चाकरी करणारे नाहीत. माझा प्रत्येक माणूस माझ्या तोलामोलाचाच आहे. तो खर्ची पडला, याचं आम्हांला दु:ख आहे!’

मिर्झाराजांना राजांच्या नजरेला नजर देण्याची हिंमत झाली नाही. त्यांची नजर आपोआप खाली वळली.

काही क्षण तसेच गेले.

मिर्झाराजांचा शब्द कानांवर आला,

‘राजे, आपण थकलात. थोडी विश्रांती घ्या. रात्री तहाची बोलणी सुरू होतील.’

शिवाजीराजे जड पावलांनी शामियान्याबाहेर पडले.

उग्रसेन कछवाह वाट दाखवीत होता. शिवाजीराजांच्यासाठी उभारलेल्या खास डेऱ्यात राजे गेले. शरीर आणि मन पुरे थकले होते. राहून-राहून डोळे भरून येत होते. डेऱ्यातल्या शय्येवर त्यांनी अंग झोकून दिले.

□

९

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिवाजीराजे सायंकाळी आपल्या सहकाऱ्यांबरोबर पाय मोकळे करून मिर्झाराजांच्या डेऱ्यात आले. राजांना पाहताच मिर्झाराजांनी राजांना हाताशी धरून आत आणले. डेऱ्यात उदयराज, उग्रसेन, त्याचबरोबर बैठकीवर बसलेले उमदे फिरंगी यांकडे राजांचे लक्ष गेले. मिर्झाराजांनी मनुचीची ओळख करून दिली. मनुचीच्या अभिवादनाचा स्वीकार करून राजे म्हणाले,

'आपल्या तोफखान्याचे हेच प्रमुख ना?'

मिर्झाराजे आश्चर्याने उद्गारले, 'आपल्याला तेही माहीत आहे?'

राजे नुसते हसले. मिर्झाराजांनी सांगितले,

'आमचे मनुची नुसते तोफखान्यात हुशार नाहीत, ते बुद्धिबळही चांगले जाणतात.'

राजांनी हसून मनुचीकडे पाहिले. राजे म्हणाले,

'मग आमचं आणि यांचं जमेल. आम्हांलाही बुद्धिबळाचा विश्वास आहे.'

'व्वा ऽ ऽ! आम्हांला हे माहीत नव्हतं.' मिर्झाराजे म्हणाले, 'तुमची ना नसेल, तर एक डाव मांडू या?'

'काही हरकत नाही. पण तहाच्या...'

राजांना पुढे बोलू न देता मिर्झाराजे म्हणाले, 'ते होऊन जाईल.'

बुद्धिबळाचा डाव मांडला गेला. दोन भरजरी लोडांना टेकून दोघे बसले होते. मध्ये चौरगांवर बुद्धिबळाचा हस्तिदंती पट मांडला होता. मनुची डाव पाहत शेजारी बसला होता. डाव सुरू होऊन बराच वेळ झाला. मिर्झाराजे वारंवार हुक्का पीत होते. साऱ्या डेऱ्यात शांतता पसरली होती. समया प्रज्वलित झाल्या होत्या. राजांची सरशी स्पष्ट दिसू लागली. मिर्झाराजे अस्वस्थ बनले. आणि राजांनी मिर्झाराजांना शह दिला.

मनुची हसला. मिर्झाराजांनी मनुचीकडे पाहिले; मनुचीने खांदे उडविले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मिर्झाराजे विचार करीत होते. शह सुटण्याची शक्यता दिसत नव्हती. मिर्झाराजांनी हुक्क्याची नळी फेकली. ते म्हणाले,

‘राजे, आपकी जीत! हम हार गये! सारी उम्र डाव खेळण्यात गेली. पण आज तुमच्याकडून हार खावी लागली.’

राजांच्या चेहऱ्यावरचे स्मित त्या बोलाने विरले. राजे खिन्नपणाने म्हणाले,

‘राजाजी, या डावाला कसली किंमत? हाच खेळातला डाव प्रत्यक्षात उतरला असता, तर...’

मिर्झाराजांनी राजांच्या नजरेला नजर दिली. मिर्झाराजे शांतपणे म्हणाले,

‘ती शंका जरी असती, तरी आम्ही डावात उतरलो नसतो.’

क्षणात दोघे मनमोकळेपणाने हसले. सेवकाने ताटे तयार असल्याची वर्दी दिली. मिर्झाराजे म्हणाले,

‘राजे, चला!’

‘माफी असावी! मी एकच वेळ भोजन करतो.’

‘फलाहार तरी कराल ना?’

मिर्झाराजांच्यासह शिवाजीराजे उठले. पाठोपाठ मनुची, उग्रसेन, उदयराज जात होते.

फलाहार करून राजे डेऱ्यात आले. डेरा अनेक समयांच्या उजेडात प्रज्वलित झाला होता. राजे बैठकीवर बसले होते. हिरोजी, आनंदराव शेजारी उभे होते. घाटाघाटींसाठी बोलावण्याची राजे वाट पाहत होते. आणि पंतांनी वर्दी आणली :

‘उदयराज मुनशी आणि सुरतसिंग कछवाह येत आहेत.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दोघे आत आले. मुजरे झाले. राजांनी विचारले, ‘चलायचं?’

‘कुठं?’ उदयराजांनी विचारले.

‘वाटाघाटीला.’

‘त्याचसाठी आम्ही आलो. मिर्झाराजांनी तहाचा मसुदा तयार करायला आम्हांला पाठविलं आहे.’

‘आणि मिर्झाराजे?’

‘ते हजर राहणार नाहीत!’

राजे विचारात पडले. त्यांनी निर्णय केला,

‘ठीक आहे. आपण बोलू.’

तहाची बोलणी सुरू झाली. उदयराजांनी आपली मागणी मांडली. राजे ती ऐकून चकित झाले. राजांनी खूप विनवणी केली. राजांच्या विनंतीनुसार कछवाह मिर्झाराजांच्या डेऱ्यात खेपा घालीत होतो. पण मिर्झाराजे मागणीतला एक किल्ला अथवा एक सुरती रुपयासुद्धा कमी करायला तयार नव्हते. राजे पुरे सापडले होते.

अखेर राजांनी तह मान्य केला. राजांनी आपले तेवीस किल्ले व त्याबरोबरचा चार लक्ष होनांचा मुलूख बादशहाच्या पदरात टाकला. राजांच्या ताब्यात अवघे बारा किल्ले आणि लाख होनांचा मुलूख राहिला. ज्याचा वसूल नाही, असा तळकोकणचा मुलूख राजांच्या ताब्यात राहिला. राजांच्याकडे राहिलेल्या मुलुखातून राज्याचा खर्चही भागणे कठीण होते. राज्यविस्तारासाठी राजांनी आदिलशाहीचा बालाघाटाखालील नऊ लाख होनांचा मुलूख जिंकण्याची तयारी दाखविली. ती अट मान्य झाली. पण त्यासाठी मिर्झाराजांनी चाळीस लाखांची खंडणी राजांवर लादली. वार्षिक तीन लाखांचे हप्ते ठरले.

उदयराजांनी मुद्द्याला हात घातला. त्यांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, आपल्या चाकरीचं काय?’

ज्या प्रश्नाला राजे भीत होते, तोच प्रश्न उपस्थित झाला होता. एका स्वतंत्र राज्याचे स्वप्न पाहणाऱ्या राजाने बादशहाची नोकरी करायची? गरुडाने कावळ्याशी मैत्री करण्यासारखे ते होते.

राजे म्हणाले,

‘उदयराज, मी सारं मान्य केलं. पण एवढी अट तुम्ही घालू नका.’

‘बादशहांची चाकरी करणं तुम्ही अमान्य करता, असं का आम्ही समजायचं?’

‘गैरसमज होतो.’ राजे गडबडीने म्हणाले. ‘आजवर मी बादशहाशी हवा तसा वागलो. लायकी नसताना त्यांना विरोध केला. मी एक राजपूत आहे. कोणत्या तोंडानं मी शहेन्शहांच्या तोंडासमोर जाऊ? त्यांनी गुन्ह्याची माफी केली, हा त्यांचा मोठेपणा. मी पापी आहे. माझ्यापेक्षा माझ्या मुलाला बादशहांनी पंचहजारी द्यावी. माझा मुलगा बादशहांच्या सेवेत अधिक शोभेल. यापुढं मी बेइमानी करणार नाही. बादशहांच्यासाठी, ते सांगतील, ती कामगिरी मी करीन, त्यातच मला धन्यता वाटेल. माझ्यासारख्या गुन्हेगाराला मनसब नको; चाकरीही नको.’

उदयराजांनी ते मान्य केले. न कळत राजांनी निःश्वास सोडला.

उत्तररात्री वाटाघाटी संपल्या.

सूर्योदयाला राजे जागे झाले. स्नान आटोपून ते मिर्झाराजांना भेटायला गेले. मिर्झाराजांनी त्यांचे आनंदाने स्वागत केले. मिर्झाराजे म्हणाले,

‘राजे, समजुतदारपणे तुम्ही तह मान्य केलात. हमारी मुबारकबादी कबूल फरमाना!’

‘राजाजी, तह फार कडक झाला.’

‘गुन्ह्याच्या मानानं कमीच!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ते मी जाणतो.’

‘राजे, तह कागदावर होऊन चालत नाही. त्याची अंमलबजावणी व्हावी लागते.’

‘मला मंजूर आहे.’

तह झाला, तरी मिर्झाराजे एका चिंतेत होते. ‘तह आपल्याला न विचारता झाला,’ असे वाटून दिलेरखान नाराज होणे स्वाभाविक होते. मिर्झाराजांना ते नको होते. मिर्झाराजांनी राजांना दिलेरखानाला भेटण्याची आज्ञा केली. शिवाजीराजे म्हणाले,

‘राजासाब, तह आपल्याशी झाला. दिलेरखानांना भेटायची मला जरुरी?’

‘राजे, तुम्ही शरणागती स्वीकारता आहात. जरा सबुरीनं घ्या. दिलेरखान फामिंदा आहे; बादशहाच्या मेहेरबानीचा आहे. भीती बाळगू नका.’

राजे हसले, म्हणाले,

‘भीती? आणि दिलेरखानाची? राजाजी, मीही शिवाजी आहे. तुमची आज्ञा, म्हणून जातो, भेटतो. पण मला सन्मानानं पाठवा.’

‘मतलब?’

‘आपण मला जरी खिलत द्यावी. तुम्ही सन्मानानं मला वागवलंत, तर दिलेरखान माझा उपमर्द करू धजणार नाही.’

‘शरणागताला जरी खिलत नसते, राजे!’

त्या बोलांनी राजे कळवळले. त्यांचा त्वेष उफाळला.

‘मग दुसरी जबाबदारी माझ्यावर टाकू नका.’

‘कसली जबाबदारी?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजाजी, तुम्ही वडील आहात; राजपूत आहात. तुमचे बोल मी ऐकू शकतो. पण तो दिलेरखान काही वाकडा वागेल, तर त्याची इज्जत ठेवणं मला कठीण जाईल. तसं घडून तुम्हांला कमीपणा येऊ नये, म्हणून जरी खिलत मागितली. ज्या शिवाजीनं आजवर अनेकांच्या खिलती छिनावून घेतल्या, तो शिवाजी खिलत मागेल कशाला!’

मिर्झाराजे एकदम पुढे झाले. त्यांनी राजांचे दोन्ही खांदे धरले. गहिवरून ते म्हणाले,

‘राजासाब! कसल्या दुर्दैवी परिस्थितीत आपण भेटतो आहो! तुमच्या प्रत्येक बोलानं आमचं मन उचंबळून येतं. कितीही कठोर व्हायचं ठरवलं, तरी तुमच्या शब्दांनी आमचं मन विरघळून जातं.’

मिर्झाराजांनी राजांना खिलत दिली. राजा रायसिंहाबरोबर दोन प्रहरी शिवाजीराजे चांदीच्या हौद्यात बसून हत्तीवरून दिलेरखानाला भेटायला पुरंधरवर गेले. शिवाजीराजा भेटायला येतो, याचा दिलेरखानाला अभिमान वाटला. त्याने राजांचे स्वागत केले; तहाचे कौतुक केले; भारी तलवार राजांना नजर केली.

राजे दिलेरखानाला भेटून माघारी आले.

रात्री मिर्झाराजांचा डेरा विशेष सजविला होता. रुजाम्याच्या गालिच्यांची बैठक अंथरली होती.

मिर्झाराजांनी राजांचे स्वागत केले. दोघे बैठकीवर बसले. राजांची माणसे, रायसिंग, कछवाह, मुनशी, दाऊदखान ही मंडळी आपापल्या आसनांवर बसली होती. मिर्झाराजांनी सांगितले,

‘राजे, तहाच्या यशाप्रीत्यर्थ आज आम्ही आपल्याला राजपूत गाणं ऐकवणार आहोत.’

‘पण आम्हांला गाण्यातलं काही कळत नाही.’

‘थट्टा सोडा, राजे! तुमच्यासारख्या कदरदान शूराला गाणं अप्रिय व्हायचं नाही.’

मिर्झाराजांनी टाळी वाजविली. साफा बांधलेला एक उमदा राजपूत आत आला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्याच्या हातात खंजिरी होती. मुजरा करून तो मधल्या बैठकीवर बसला. मागे साथीदार ढोलकं घेऊन बसला होता. मिर्झाराजांनी ओळख करून दिली.

‘राजे, हा आमचा हिरासिंग. आवाज पहाडी आणि भावपूर्ण आहे.... हिरासिंग, राजेसाहेबांचा दिल खूश होईल, असं गीत गा.’

बसल्या जागेवरून हिरासिंगाने मान तुकविली. खंजिरीचा नाद उठला; आणि हिरासिंग गाऊ लागला....

केसरिया बालम आवो जी पधारो म्हारा देस ।। ध्रु.।।
साजन साजन मैं करूँ। और साजन जीव जडी ।
साजन फुल गुलाबरा। और सुंघू घडी घडी ।।१।।
साजन जाता कह गया। और कर ग्या कोल अनेक ।
गिनता गिनता गिस गयी। म्हारी आंगलियोरी रेख ।।२।।
साजन आया ये सखी। और कई मनुहार करूँ।
पहले पातल प्रेमरी। फिर दोनों नैन धरो ।।३।।

हिरासिंगाचे गाणे संपले. मिर्झाराजांनी विचारले,

‘राजासाहेब, गाणं आवडलं?’

‘कानांना गोड वाटलं.’ राजे म्हणाले.

‘राजे, गाणं फार नाजूक आहे. केशरी साफा बांधलेला प्रियकरानं युद्धावर जाताना आपल्या महबुबाला वापसीचा दिवस निश्चितपणे सांगितला होता. बिचारी त्याची वाट पाहत होती. दिवस आपल्या बोटांच्या पेरांवर मोजीत होती. तिचं पेरं स्मरणातून चुकलं. सुन्न होऊन ती दिवस कंठीत होती. अचानक तिचा प्रियकर आला, आणि तिनं प्रेमभरानं त्याच्या नजरेला नजर भिडविली.’

‘व्वा! केवढा नाजूक भाव आहे!’ राजे उद्गारले.

‘ही गीतं राजपुतांची दौलत आहे, राजे!’

‘खरं आहे.’ राजे बोलले. ‘राजाजी, हे गीत ऐकून आम्हांलाही घरची ओढ लागली
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहे. उद्या आम्ही जावं, म्हणतो.'

मिर्झाराजे प्रसन्नतेने हसले. मिर्झाराजांचा निरोप घेऊन राजे उठले.

उसने अवसान सरले होते. आता गरज होती एकांताची.

□

१०

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळी तहाचा मसुदा पक्का झाला. मिर्झाराजांनी विचारले,

'राजे, तह झाला. पण त्याची अंमलबजावणी?'

'आपण म्हणाल, तेव्हा. आम्ही शब्दाचे पक्के आहो.'

'त्याची आम्हांला खात्री आहे. आजपासूनच तहाची अंमलबजावणी सुरू व्हावी.'

'जशी आज्ञा!' राजे म्हणाले.

राजांनी आपली माणसे निवडली. गड खाली करून देण्याचे हुकूम लिहिले. रोहिडा, लोहगड, इसागड, टोक व तिकोणा ताब्यात घेण्यासाठी मिर्झाराजांनी आपले सरदार पाठविले. मिर्झाराजे समाधानाने म्हणाले,

'राजे, तुम्ही राजगडाला जाताना कोंढाणा आमच्या ताब्यात देऊन चला. त्यासाठी किरतसिंग आपल्या बरोबर येईल. त्याला घेऊन राजगडावर जा. त्याच्याबरोबर युवराज संभाजींना पाठवा. ते आमच्याकडे ओलीस म्हणून राहतील.'

राजे कासावीस झाले. मिर्झाराजे म्हणाले,

'राजे, चिंता करू नका. तुमच्याइतकंच मायेच्या नजरेनं मी युवराजांना सांभाळीन. पण ते होणं आवश्यक आहे. मी कोणताही ठपका घ्यायला तयार नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी नि:श्वास टाकला. ते म्हणाले,

‘आम्ही जाणतो. आम्ही युवराजांना पाठवू.’

राजांनी राजगडी जाण्याची सर्व तयारी झाली. मिर्झाराजांनी राजांना सन्मानाने निरोप दिला. दागिन्यांनी मढविलेले दोन घोडे व एक हत्ती भेट म्हणून देण्यात आले. मिर्झाराजे राजांच्या जवळ आले. राजे आपली नजर चुकवीत होते. मिर्झाराजे म्हणाले,

‘राजासाब, माझ्यावर भरोसा ठेवा! सर्व ठीक होऊन जाईल. बादशहांच्या नौकरीतच तुमचे-माझे कल्याण आहे.’

‘मला इजाजत द्या.’ राजे स्वत:ला सावरीत म्हणाले.

मिर्झाराजांनी राजांना एकदम मिठीत घेतले. आवरून धरलेले अश्रू दोघांच्याही डोळ्यांतून निखळले. मिठीतून दूर होताच मिर्झाराजे गहिवरून म्हणाले,

‘राजे! पुसा ते डोळे! मनाला फार लावून घेऊ नका. मी खलिते पाठविले आहेत. बादशहांची मेहेरनजर होईल. संभाळून राहा. दाऊदखानांच्या डेऱ्यात आपल्याला निरोपाचे विडे देण्यात येतील. त्यांचा स्वीकार करून तुम्ही चला.’

विडे देण्याचा समारंभ दाऊदखानाच्या डेऱ्यात पार पडला. राजे पालखीत बसले. पालखी उचलली गेली. राजांच्या अश्वदळाबरोबर उग्रसेन कछवाह व किरतसिंग आपल्या दळासह जात होते. आकाश ढगांनी भरून आले होते. भर दोन प्रहरी गारवा भासत होता. पावसाला अद्याप सुरुवात झाली नव्हती.

राजांची पालखी भरभर जात होती. दोन प्रहर टळण्याच्या सुमारास कोंढाणा नजीक आला. पालखीतून राजांना कोंढाण्याचे दर्शन घडत होते. राजे स्थिर नजरेने कोंढाणा पाहत होते; कोंढाण्यावरचे भगवे निशाण नजरेत सामावून घेण्याचा प्रयत्न करीत होते.

कोंढाणा म्हणजे कोकणचा दरवाजा. मोक्याची जागा. याच कोंढाण्याने महाराजसाहेबांची सुटका केली होती. यानेच जसवंतसिंगाला मावळी सामर्थ्याची दहशत घातली होती. राजांचा आवडता कोंढाणा आपल्या हातांनी राजे मोगलांच्या हवाली करणार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होते.

राजे त्या विचाराने बेचैन बनले. राजांना कोंढाण्याकडे पाहवेना. त्यांनी डोळे मिटून घेतले.

नगाऱ्याच्या आवाजाने राजे भानावर आले. राजांच्या आगमनाची वार्ता सांगण्यासाठी प्रथम दरवाज्यावरील नगारा दुमदुमत होता. प्रत्येक दरवाज्यावरील नौबतीचा स्वीकार करीत पालखी गडावर पोहोचली. राजे पालखीतून बाहेर आले. नेताजी, मोरोपंत वगैरे मंडळी राजांना सामोरी आली. मुजऱ्याचा स्वीकार करून, काही न बोलता, राजे वाड्यात गेले. कोंढाण्याकडे मंडळी राजांच्या बरोबर आलेल्या हिरोजी, निराजी, आनंदराव, नागोजी फर्जंद या मंडळींच्या भोवती गोळा होऊन कुजबुजत होती.

राजे आतल्या चौकात आले. दाराशी सोयराबाई उभ्या होत्या. राजे दरवाज्याजवळ गेले. त्यांनी सोयराबाईंना विचारले,

'मासाहेब कुठं आहेत?'

'महालात आपली वाट पाहत आहेत.' सोयराबाईंनी सांगितले.

राजे आत पाऊल टाकणार, तोच सोयराबाईंच्या मागे उभी असलेली मनोहारी म्हणाली,

'पाय धुतले नाहीत.'

राजे थबकले. मनोहारीकडे पाहत ते म्हणाले,

'ध्यानी आलं नाही. तू म्हणतेस, म्हणून पाय धुतो. पण पाय धुऊन आता स्वच्छ व्हायचे नाहीत!'

राजे माघारी वळले, आणि पाय धुऊन वर आले. मनोहारीने गडबडीने रुमालाने पाय टिपले. मनोहारी पाय पुशीत असता राजांनी सोयराबाईंना विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मासाहेबांची तब्येत?’

‘बरी आहे. पण सकाळपासून आपल्या वाटेकडे डोळे लावून बसल्यात.’

‘आम्ही तिकडेच जातो. तुम्ही सर्व आवरा. आज आपण राजगडाला जाणार आहो.’

‘आजच्या आज?’

‘हो!’

राजे थांबले नाहीत. ते चालू लागले.

राजांनी मासाहेबांचे पाय शिवले. आशीर्वादासाठी जिजाबाईंचे ओठ थरथरले. जिजाबाईंनी विचारले,

‘तह ठरला?’

‘हो!’

‘काय ठरलं?’

राजांनी श्वास घेतला. चेहरा कठोर बनला. राजे म्हणाले,

‘ठरायचं काय? शरणागताच्या हातांत असतं काय? मिर्झाराजांनी काही बाकी ठेवलं नाही. आमच्या राज्याचे तेवीस गड चार लक्ष होनांच्या मुलुखासह मोगलांना द्यावे लागले. त्यांत हा कोंढाणादेखील आहे. आमच्या जवळ राजगड, रायरी धरून अवघे बारा गड आणि एक लाखाचा मुलूख राहिला.’ राजे खिन्नपणाने हसले. ‘आदिलशाहीचा मुलूख काबीज करण्याची विनंती केली, तर उद्या काबीज करायच्या मुलुखासाठी चाळीस लाखांची खंडणी आमच्यावर लादली गेली.’

‘आपल्या बाजूनं काहीच का झालं नाही?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘झालं तर! आम्ही स्वत: बादशहाच्या नोकरीतून सुटलो. आमचे युवराज बादशहांचे नोकर झाले. त्यांना पंचहजारी मनसब येईल. हा काय थोडा मान झाला?’

‘शिवबा!’

‘ऐका, मासाहेब! तह पुरा पाळला जाईपर्यंत संभाजीराजे मिर्झाराजांच्याकडे ओलीस म्हणून राहतील.’

‘राजे!’

‘त्याला इलाज नव्हता. मिर्झाराजे जयसिंगांसारखा मुरब्बी राजकारणी आम्ही पाहिला नाही. त्यांची ही पद्धतच आहे. रामनगर, पेठ व चोथीया यांच्या राजांची मुलं अशीच ओलीस ठेवून घेतलेली आम्ही पाहिली आहेत.’

‘राजे! काय झालं हे? काय राहिलं?’ जिजाबाई कळवळल्या.

‘राहिलाय् फक्त संयम!’

जिजाबाईंचे डोळे डबडबलेले पाहताच राजे गडबडीने म्हणाले,

‘मासाहेब! कृपा करून रडू नका! आम्ही फार थकलो. तुमच्या डोळ्यांतले अश्रू पाहण्याचं सामर्थ्य आमच्या अंगी उरलेलं नाही. गड ताबडतोब खाली करून द्यायला हवा. राजगड गाठायला हवा.’

राजांनी पाठ वळविली; आणि ते महालाबाहेर पडले. वाड्याबाहेर पालख्या, मेणे तयार केले जात होते. साऱ्या गडावर धावपळ दिसत होती; पण आवाज उठत नव्हता.

सायंकाळ व्हायच्या आतच सारी तयारी झाली. राजांनी जिजाबाई मेण्यात बसलेल्या पाहिल्या. तीन मेणे गडाखाली उतरू लागले. राजे पालखीकडे चालू लागले. किरतसिंग बरोबर येत होता. पालखीत बसण्यासाठी राजे वळणार, तोच किरतसिंगाने मुजरा केला. राजांनी मुजऱ्याचा स्वीकार मुजरा करूनच केला. किरतसिंगांना ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘किरतसिंग, यापुढं आपली अनेकदा भेट होईल. तुम्ही आम्हांला मुजरा करण्याची गरज नाही. मिर्झाराजांना गड ताब्यात दिल्याचं कळवा.’

राजे पालखीत बसले. भोई पालखी घेऊन चालू लागले. किरतसिंग पालखीबरोबर चालत येत होता. पालखी नगारखान्याजवळ आली. राजांचे लक्ष नगारखान्यावरील भगव्या झेंड्याकडे गेले. किरतसिंगाने विचारले,

‘राजे, अद्याप आपला झेंडा गडावर आहे. तो उतरवून घेऊ देत ना?’

राजांनी पालखी थांबविण्याची आज्ञा दिली. पालखी जमिनीवर ठेविली गेली. राजे बाहेर आले. त्यांचा चेहरा व्यथित दिसत होता. ते म्हणाले,

‘किरतसिंग, बरी आठवण केलीत! आम्ही निशाण उतरवून घेऊ!’

राजे नगारखान्याच्या पायऱ्या चढून गेले. झेंडा वाऱ्यावर फडकत होता. अश्रुपूर्ण नजरेने राजांनी झेंड्याला मुजरा केला, आणि काढणी सोडली. झेंडा सरसरत खाली आला. राजांनी झेंडा सोडला. त्याची नीट घडी करून आपल्या अंगरख्यात खोवली.

राजे वळले. किरतसिंग खाली मान घालून उभा होता. राजांनी पटकन अश्रू पुसले; आणि झरझर पायऱ्या उतरून ते खाली गेले. पालखीत बसताच पालखी चालू लागली. राजे पालखीच्या गोंड्याला धरून बसले होते. नजर खाली वळली होती.

□

११

थोडी रात्र झाली; आणि राजे राजगडावर पोहोचले. मेणे पुढे पोहोचले होते. राजे राजवाड्यातल्या दाराशी पायउतार झाले. पायांवर पाणी घेऊन राजे आत गेले. आतल्या चौकातल्या दरवाज्यापाशी राजांचे पाय थबकले. दाराशी पुतळाबाई ओवाळण्याचे साहित्य घेऊन उभ्या होत्या. पुतळाबाईंच्या हातांतल्या तबकाकडे पाहून राजांनी विचारले,

‘मासाहेब भेटल्या नाहीत?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नाही!’ पुतळाबाई चकित होऊन म्हणाल्या, ‘तुमच्या पुढंच त्या आल्या. तब्येत बरी नाही, म्हणून महाली गेल्या.’

पुतळाबाई तबक घेऊन पाऊलभर पुढे सरकल्या. ते पाहताच राजे म्हणाले,

‘थांबावं, राणीसाहेब!’

पुतळाबाईंची नजर वर गेली. राजांची अशी नजर त्यांनी कधी पाहिली नव्हती. पुतळाबाईंच्या हातीचे तबक कापू लागले. राजे एकदम बोलून गेले,

‘राणीसाहेब, पराजित पतीला ओवाळण्याइतकं त्याला अपमानाचं दुसरं काही नसतं. ते धाडस करू नका!’

काय होते, हे कळायच्या आत राजांनी हातांनी तबक सरकवले; आणि पुतळाबाईंना बगल देऊन ते आपल्या महाली गेले. महालाचे दरवाजे बंद झाल्याचा आवाज घुमला; पाठोपाठ अडणा सरकवल्याचा आवाज आला; आणि साऱ्या वाड्यात शांतता पसरली.

पुढच्या सदरेत बिचारे मोरोपंत, आलेला उग्रसेन कछवाह आणि त्याच्या बरोबरीची माणसं ऊठबस पाहत होती. तेवढी जागा सोडली, तर सारा महाल शांत होता.

सकाळ झाली. जिजाबाईंना केव्हाच जाग आली होती. पण अंथरुणावरून उठावेसे वाटत नव्हते. मस्तक ठणकत होते. त्या तशाच पडून होत्या. वाड्यातले सर्व व्यवहार तसेच चालू होते. कपाळावर पडलेल्या हातांनी त्यांनी डोळे उघडले. संभाजी शेजारी उभे होते. जिजाबाईंनी होळे उघडताच त्यांनी विचारले,

‘मासाहेब, तुम्हांला बरं नाही?’

शंभूबाळांना पाहताच जिजाबाई गहिवरल्या. त्यांनी शंभूबाळांना मिठीत घेतले. त्या परत रडू लागल्या. आठ-नऊ वर्षांचे संभाजी राजे घाबरले. त्यांनी विचारले,

‘मासाहेब, काय झालं? का रडता?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाईंनी डोळे टिपले. त्या म्हणाल्या,

‘काही नाही, बाळराजे! चार दिवस भेटला नव्हता ना! जा, खेळा जा. मी उठते.’

जिजाबाई तोंड धुऊन महालात आल्या; आणि मोरोपंत पिंगळे आत आले.

‘काय आहे, पंत?’

‘महाराजांच्या बरोबर उग्रसेन कछवाह आणि इतर मंडळी आली आहेत. राजांचं दर्शन नाही.’

‘समजलं, मोरोपंत, त्यांना काही उणं भासू देऊ नका. तुम्हीच पुढं होऊन सर्व करून घ्या.’

‘जी!’

दिवस वाढत होता. मध्यान्हीचा समय टळला. पुतळाबाईंच्या पाठोपाठ मनोहारी जिजाबाईंचे ताट घेऊन महालात आली. पाहताच जिजाबाई म्हणाल्या,

‘मुली, मला भूक नाही! तब्येतही बरी नाही.’

पुतळाबाईंनी एकदम डोळ्यांना पदर लावला. जिजाबाई एकदम घाबरून म्हणाल्या,

‘काय झालं, पुतळा? खरंच...’

‘मासाहेब, आम्ही काय करावं?’ पुतळाबाई म्हणाल्या, ‘अद्याप महालाचे दरवाजे उघडले नाहीत. कुणाच्या घशात घास उतरत नाही. कुणी काही बोलत नाही, सांगत नाही.’

‘कालपासून अद्याप महालाचे दरवाजे उघडले नाहीत?’

न कळत दोघींनी नकारार्थी मान हलविली. त्याच वेळी महालात सोयराबाई आल्या. जिजाबाईंनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सोयरा, महालाचे दरवाजे उघडले नाहीत, हे खरं?’

‘हो!’

‘मग स्वस्थ कशा बसलात?’

सोयराबाई एकदम बोलून गेल्या, ‘आम्ही काय करणार? हाका मारल्या; पण ओसुद्धा कुणी देत नाही!’

त्याच संतापात सोयराबाई निघून गेल्या.

जिजाबाई कष्टाने उठल्या. त्या म्हणाल्या,

‘काय करावं तुम्हां पोरींना! निदान मला तरी सांगायचं.’

जिजाबाई राजांच्या महालासमोर येऊन उभ्या राहिल्या. पण हाक मारायला शब्द उमटत नव्हता. सारी ताकद एकवटून त्यांनी हाक मारली,

‘शिवबा! दार उघड. शिवबा, मी आलेय्! दार उघड.’

काही क्षण तसेच गेले. पावलांचा आवाज आला. अडणा सरकल्याचा आवाज घुमला; पण दार मात्र उघडले नाही. जिजाबाईंनी पुढे होऊन दार उघडले; आणि त्यांची पावले तेथेच अडखळली.

दारासमोरच महालात राजे पाठमोरे उभे होते. मानेवर विस्कटलेले केस रुळत होते. पाठीवर हात बांधलेले होते. मुठी वळल्या जात होत्या. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे ऽ ऽ’

जिजाबाईंच्या कानांवर घोगरे शब्द पडत होते,

‘मासाहेब! कृपा करून जा. इथं तुमचा शिवबा नाही! इथं राजे नाहीत! ते दोन्ही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कालच मिर्झाराजांच्या तळावर संपले!'

'शिवबा ऽ ऽ'

'मासाहेब! कृपा करून जा! आमचा भरोसा धरू नका. जगावं, की मरावं, याचा विचार आम्ही करतो आहो. मृत्यू आम्हांला गोड वाटतो आहे!'

त्या बोलांनी जिजाबाईंचे हृदय फाटून गेले. डोळ्यांतले अश्रू जिथल्या तिथे थिजले. जिजाबाईंचा आवाज धारदार बनला. त्या म्हणाल्या,

'राजे, मृत्यूचं विलोभन एवढं वाटणार होतं, तर अकारण आम्हांला कशाला आशेत गुंतवलंत?'

त्या वाक्याने राजांचे पाठीवर बांधलेले हात सुटले. राजे सावकाश वळले.

राजांचे ते रूप बघून जिजाबाईंना धक्का बसला. डोळे आरक्त बनले होते. चेहऱ्यावरचे तेज कुठच्या कुठे गेले होते. राजांनी नजर उचलली; आणि ते म्हणाले,

'मासाहेब, आम्ही कधी गुंतवलं?'

'तुम्ही विसरलात, राजे! पण आम्ही विसरलो नाही. स्वारी गेली, तेव्हा आम्ही सती जात होतो. पण तुम्ही आडवे आलात. पाय शिवलेत. म्हणालात, 'मासाहेब, तुम्ही जाऊ नका! आमचा पराक्रम पाहायला कोणी उरलं नाही. स्वराज्याची स्थापना आम्ही करीत नाही, तोवर आम्ही प्रतिज्ञेला बद्ध आहोत.' विसरलात ते, राजे? शब्दांना मोल नसेल, तर ते उच्चारू नयेत. हाच तो पराक्रम दाखविण्याकरिता आम्हांला गुंतवलंत?'

'नाही, मासाहेब!' राजांचे ओठ थरथरले. 'उराशी फार स्वप्नं होती. या भूमीत आमचं राज्य व्हावं, ही इच्छा हाती. ते स्वप्न साकार व्हावं, त्याला तुमचे आशीर्वाद मिळावेत, हा भाव धरला, तो काय गुन्हा? हिंदवी स्वराज्याचं स्वप्न पाहणारे आम्ही आज मोगलांचे गुलाम बनलो. जिवाची बाजी लावून जिंकलेले गड, निढळ्या घामानं बांधलेले किल्ले मोगलांच्या स्वाधीन केले. ओसाड मुलूख स्वराज्याच्या स्वप्नानं कष्टानं वसतीला आणला; तोच मुलूख गमावून बसलो. पोटच्या पोराला, स्वराज्याच्या भावी युवराजाला शत्रूघरचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पंचहजारी मनसबदार केला. मासाहेब! स्वप्नं विरून गेली. अस्तित्वही उरलं नाही. मग जगायचं तरी कशाला?’

जिजाबाईंचा चेहरा कठोर बनला. राजांची दुबळी मुद्रा त्यांना असह्य झाली. राजांच्या नजरेला नजर भिडवीत त्या म्हणाल्या,

‘राजे! दुःखाचे आणि संकटाचे पोवाडे माझ्यासमोर गाता? साता मासांची गर्भार असता स्वारी टाकून गेली. परमुलुखात, परघरी तुमचा जन्म झाला. पतीबरोबरच थोरला गेलेला. मी एकटी बाईमाणूस. कुणाचा आधार नाही. मी कशी जगले?...

‘तुम्ही सहा वर्षांचे होता. पुण्याच्या उजाड वास्तूवर तुमचं बोट धरून मी राहिले. ओसाडगावची जहागिरदारीण मी! पण माझ्या मनाला भीती शिवली नाही. राजे, पांडवांना वनवास भोगावा लागला. प्रभू रामचंद्रांनाही तो टळला नाही. जे देवांना टाळता आलं नाही, ते दैव तुम्ही कसं टाळणार? कष्टांना आणि संकटांना भिणारी माणसं कधी देवांचं राज्य उभं करू शकत नाहीत, राजे!’

‘मासाहेब ऽ ऽ’

‘गप्प बसा! ऐका... तुम्हांला मृत्यू जवळचा वाटतो ना? जगू नये, असं वाटतं ना? तसं वाटत असेल, तर हाताशी असेल ती शिबंदी घ्या, आणि सरळ मिर्झाराजांच्या गोटावर चालून जा. माझ्या शब्दावर विश्वास ठेवा. त्या रणांगणात तुमची खांडोळी उडाली, तरी मी ते सहन करीन. पण, राजे...’

जिजाबाईंचा शब्द अडला. मूर्तिमंत तिरस्कार नजरेत प्रकटला. त्या त्वेषाने म्हणाल्या,

‘...पण, राजे, या मातेच्या कुशीनं एका भ्याड, नादान, आत्महत्या करणाऱ्या पोराला जन्म दिला, हा ठपका माझ्या नशिबी लावू नका! मी जाते, राजे! तुमचं तोंडही पाहणं नको वाटतं. राजे, तुम्हांला हवं, ते करू शकता.’

जिजामाता वळल्या. थकल्या पावलांनी त्या जात होत्या.

राजे धावले. त्यांनी समोर जाऊन मासाहेबांचे पाय धरले. पायांना मिठी घालीत राजे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

म्हणाले,

'नका, मासाहेब! जगानं पाठ फिरविली; तुम्ही तरी पाठ फिरवू नका! आम्ही चुकलो. बोलू नये, ते बोललो. ह्या गुन्ह्याला एवढी कठोर शिक्षा करू नका. शक्य झालं, तर जे बोललो, ते विसरून जा. आम्ही वचन देतो. आमची प्रतिज्ञा विसरणार नाही. आम्ही...'

राजांना बोलवेना.

जिजाबाई थरथरत वाकल्या. अश्रू झरत होते. गहिवरून राजांना उठवीत त्या म्हणाल्या,

'शिवबा ऽ ऽ! बाळ ऽ ऽ!'

-आणि दोघे मिठीत बद्ध झाले. दोघेही अश्रू ढाळीत होते...

सायंकाळी राजे सदरेत आले. त्यांनी उग्रसेन कछवाहांची विचारपूस केली. राजांना हसतमुख पाहून साऱ्यांना धीर आला. रात्री राजे जिजाबाईंचा निरोप घेण्यासाठी महालात गेले. राजे म्हणाले,

'मासाहेब, आम्ही झोपतो.'

'शंभूबाळ उद्या जाणार, खरं?'

'हो! त्याची चिंता करू नका. मिर्झाराजांनी आम्हांला शब्द दिला आहे.'

'बरोबर कोण जाणार?'

'नेताजींना पाठवतो आहे!'

राजांनी जिजाबाईंचा निरोप घेतला; आणि ते आपल्या महाली झोपायला गेले.

दुसऱ्या दिवशी राजे सकाळी एकटेच आपल्या महाली बसले होते. त्यांनी शंभूबाळांना बोलावणे पाठवले. शंभूबाळ महालात आले. राजांना बिलगत ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय, आबासाहेब?’

‘बाळराजे, आम्ही तुम्हांला मुद्दाम बोलावलं. आता तुम्ही लहान नाही. राज्याची जबाबदारी आता तुम्हीही उचलायला हवी. आम्ही ते काम तुमच्यावर टाकलं, तर कराल?’

‘हो!’ बाळराजांनी मान डोलविली.

राजे हसले. म्हणाले, ‘पाहा, बेत बदलाल!’

‘मुळीच नाही. सांगाल, ते आम्ही करू.’

राजांनी पटकन संभाजीराजांचा मुका घेतला. बाळराजांना मोकळे करीत ते म्हणाले,

‘बाळराजे, मिर्झाराजांचा आणि आमचा तह झाला आहे. तह पूर्णपणे पाळला जाईपर्यंत आमचे युवराज म्हणून तुम्ही मिर्झाराजांच्याकडे जायला हवं.’

संभाजीराजांची नजर कावरीबावरी झाली. त्यांनी विचारले,

‘एकटा?’

राजे क्षणभर थांबले. नजर वळवून ते म्हणाले,

‘राजे, राजांच्या नशिबी एकटेपणच असतं. त्याची आत्तापासूनच तुम्हांला सवय करायला हवी... मग, जाल?’

‘हो!’

‘आणि हे पाहा, बाळराजे, तुम्ही जायला निघाल, तुमच्या मासाहेबांचा, तुमच्या आईसाहेबांचा निरोप घ्याल, तेव्हा त्यांनी जरी डोळ्यांत पाणी आणलं, तरी तुम्ही रडायचं नाही. युवराज कधी रडत नसतात. समजलं?’

बाळराजे ताठ उभे राहिले. छाती फुगवून ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आबासाहेब, आम्ही मुळीच रडणार नाही.’

‘शाब्बास! मिर्झाराजांच्या इथं मानानं राहा. तुम्ही पंचहजारी मनसबदार बनणार आहा. काही हट्ट करू नका; काही मागू नका. मिर्झाराजांना ‘आजोबा’ म्हणत चला. तुमच्या बरोबर नेताजी काका येत आहेत. ते सांगतील, तसं वागा. जा तुम्ही.’

बाळराजे गेले.

डोळे मिटूनही राजांच्या डोळ्यांसमोरचे संभाजी हलत नव्हते.

‘सात-आठ वर्षांचं, निर्व्याज मनाचं कोवळं पोर! आज आम्ही त्याला ओलीस म्हणून शत्रुघरी पाठवीत आहो. ते मोठे म्हणून जन्माला आले, युवराज बनले, हाच त्यांचा गुन्हा! नाही तर मिर्झाराजांनी त्यांची मागणी का केली असती? राजकारणाच्या खेळात अजाण बालकाचं नाव का गोवलं असतं?

‘युवराज!- एवढाच का अर्थ?

‘तळहाताच्या फोडासारखे जपू, म्हणून एका जीवाला वचन दिलं होतं. संभाजीला पोरकेपणा वाटू देणार नाही, म्हणून हमी दिली होती. त्याच पोराला आम्ही एकटेपणा सोसण्याचे धडे दिले!

‘हेच का जपणं?

‘ही सईची चालती-बोलती आठवण! सई आमच्या संसारात रमली. अत्तराची कुपी उघडताच सुगंध दरवळावा, तसं आमचं जीवन दरवळून गेलं. पण दैवाला ते मान्य नव्हतं. सई संसारातून उठून गेली!

‘त्याच सईची चालती-बोलती आठवण... ती तरी टिकेल ना?...’

राजांच्या मिटल्या डोळ्यांतून अश्रू ओघळले.

‘मिर्झाराजांनी न कळत केवढा घाव घातला! पुरंधरच्या तहातलं सर्वांत कठीण असं हे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कलम. स्वत:च्या पोराच्या जिवाशी खेळ खेळणारे राजकारणाचे डावपेच पाहण्यापेक्षा परमेश्वरानं आम्हांला साधे संसारीच का बनविलं नाही?'

'दुर्दैवानं हा तह मोडला, तर हे अजाण पोर पुन्हा नजरेला तरी पडेल का?...'

राजांना तो विचार करणे कठीण झाले. त्यांनी डोळे उघडले.

बाळराजांची जायची तयारी झाली, तरी राजे आपल्या महालातच बसून होते. राजांचा निरोप घ्यायला बाळराजे वरच्या महालात गेले. दाराशी बाळराजांना पाहताच राजांचा श्वास कोंडला. 'नऊ वर्षांचं कोवळं पोर! दुर्दैवानं तह मोडला, तर हे पोर परत दिसेल का?'

मस्तकी जिरेटोप, अंगात अंगरखा, विजार घातलेली, कमरेला तलवार, पाठीला ढाल आणि शेल्यात कट्यार खोवलेली बाळराजांची देखणी मूर्ती राजांच्या समोर येऊन उभी ठाकली. त्यांनी गुडघे वाकविले, आणि राजांच्या पायांवर मस्तक टेकविले. राजांचा कंपित हात पाठीवरून फिरला. त्या चिमुकल्या जीवाला हृदयाशी कवटाळावे, असे राजांना वाटत होते. पण कष्टाने आवरलेले मन जाणो फुटले, तर? तो धोका न स्वीकारता राजे म्हणाले,

'आम्ही सांगितलेलं ध्यानी धरा.'

बाळराजांनी मान डोलविली आणि ते बाहेर गेले. राजांनी आपली मान लोडावर टेकली. डोळे मिटले. कडांवर गोळा झालेले अश्रू गालांवर ओघळले.

बाहेर वाढलेल्या आवाजाने राजे सावध झाले. महालाच्या सज्जात खिडकीपाशी ते गेले.

वाड्याबाहेरच्या मैदानात पालखी ठेवली होती. नेताजी वगैरे मंडळी पालखीभोवती उभी होती. राजांनी बाळराजे पालखीत बसलेले पाहिले. साऱ्यांनी मुजरे केले. पालखी जाऊ लागली. पालखीबरोबर अश्वपथक जात होते. पालखीच्या दोन्ही बाजूंना नेताजी पालकर, उग्रसेन कछवाह मार्ग आक्रमीत होते. पालखी दिसेनाशी झाली.

राजांचा जीव उभ्या जागी घोटाळला; हुंदका उमाळून उठला; आणि खिडकीची कड हाती धरून, त्यावर मस्तक टेकून राजे मुक्तपणे अश्रू ढाळू लागले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

१२

आकाश ढगांनी भरले होते. पश्चिमेचा गार वारा अंगाला झोंबत होता. पाऊस कोणत्याही क्षणी सुरू होण्याची चिन्हे दिसत होती. मिर्झाराजांनी आपला मुक्काम गडावर हलविला होता. तळ हलविण्याची गडबड चालू होती. गडावर मिर्झाराजे महालात बसले होते. शेजारी दिलेरखान, उदयराज मुनशी गोळा झाले होते. दोन प्रहर टळत आली होती. मिर्झाराजे खुशीत होते. विचारग्रस्त दिलेरखानाला मिर्झाराजे म्हणाले,

‘दिलेरखान, तुमच्या बहादुरीमुळंच शिवाजी शरण आला.’

‘असं दिसतं खरं!’ दिलेरखान म्हणाला.

दिलेरखानाला हा तह पसंत पडला नाही, हे मिर्झाराजांना माहीत होते. दिलेरखानाचा शिवाजीवर मुळीच विश्वास बसत नव्हता. मिर्झाराजे म्हणाले,

‘खानसाहेब, आमच्या शब्दावर विश्वास ठेवा. शिवाजीराजे आम्हांला मिळाले, तर दिल्ली तख्ताची इभ्रत वाढल्याखेरीज राहणार नाही. तहामध्ये शिवाजीराजांना आम्ही काही शिल्लक ठेवलं नाही. अव्वल गड आम्ही आमच्या ताब्यात घेतले आहेत. मुलूख आमचा आहे. एवढंच नव्हे, तर खुद्द शिवाजीचा मुलगा संभाजी आमच्याकडे ओलीस म्हणून राहणार आहे.’

‘तसं घडलं, तर...’ दिलेरखान म्हणाला.

‘न घडायला काय झालं? तसंच ठरलं आहे.’

‘ठरणं आणि घडणं यांत जमीनअस्मानाचं अंतर आहे, राजासाब! शिवाजीवर माझा मुळीच विश्वास नाही.’

मिर्झाराजे त्या बोलांनी अस्वस्थ झाले. त्याच वेळी सेवक आत आला. त्याने वर्दी दिली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘गडाखाली किरतसिंग, कछवाह आले आहेत.’

‘आणि संभाजीराजे?’ मिर्झाराजांनी विचारले.

‘त्यांची बातमी नाही.’

दिलेरखानाच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. दिलेरखानाने विचारले,

‘राजाजी, कुमार किरतसिंग कोंढाणा ताब्यात घेण्यासाठी गेले होते ना?’

मिर्झाराजांनी मान डोलविली. दिलेरखानाने विचारले,

‘मग एका दिवसात गडाचा ताबा घेतला? आणि गडाचा ताबा मिळाला, तर किरतसिंग का आले?’

मिर्झाराजे गोंधळले. त्यांना उत्तर सुचेना. त्यांची संतप्त नजर पाहताच दिलेरखानाचे हास्य मावळले. मिर्झाराजे म्हणाले,

‘दिलेरखान, तुमच्या प्रश्नांची उत्तरं आमच्याजवळ नाहीत. किरत येईल, तेव्हा सर्व कळेल. पण हेही लक्षात घ्या की, शिवाजी जरा जरी बदलतो, असं दिसलं, तरी आम्ही त्याचा पुरा पराभव करू. तेवढी ताकद माझी आहे.’

मिर्झाराजे विचारांत गढून हुक्का पीत होते. दिलेरखान बसल्या जागी चाळवाचाळव करीत होता.

संध्याकाळ होत आली, आणि किरतसिंग येत असल्याची वर्दी आली. साऱ्यांचे लक्ष प्रवेशद्वाराकडे लागले होते. किरतसिंग आत आला. त्यांच्या मागोमाग उग्रसेन कछवाह आत आला. उग्रसेनाबरोबर आलेल्या कुमारावर मिर्झाराजांची नजर स्थिरावली.

संभाजी महाल निरखीत होता. संभाजीराजांची नजर मिर्झाराजांच्याकडे गेली. त्यांनी एकवार उग्रसेनाकडे पाहिले. त्याने मान डोलविली; आणि संभाजीराजे सामोरे गेले. मिर्झाराजांपासून दोन कदम अंतरावर उभे राहून संभाजीराजांनी मुजरा केला. मिर्झाराजे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रसन्नतेने हसले.

‘या, संभाजीराजे! आम्ही तुमचीच वाट पाहत होतो. या, आमच्या जवळ या.’

संभाजीराजे पुढे गेले. मिर्झाराजांनी संभाजीराजांना प्रेमाने जवळ बसवून घेतले.

मिर्झाराजांनी किरतसिंगाला विचारले,

‘अजून कोंढाणा खाली झाला नाही?’

‘जी! झाला. आम्ही गडावर पोहोचताच राजांनी गड खाली करून दिला, आणि ते कुटुंबीयांसह राजगडी रवाना झाले. गडाचा सर्व बंदोबस्त करून मी आलो आहे. आज गडावर मोगली निशाण आहे. शहीदखानाच्या हाती गड सोपविला आहे. संभाजीराजे उग्रसेन कछवाहासह गडावर येताच आम्ही इकडे आलो.’

मिर्झाराजांनी दिलेरखानाकडे पाहिले. दिलेरखान नजर चुकवीत होता. मिर्झाराजांनी संभाजीराजांना विचारले,

‘राजे, तुम्ही आमच्या जवळ राहाल?’

‘आम्ही राहू, आजोबा!’ संभाजीराजे म्हणाले.

मिर्झाराजांनी चकित होऊन विचारले, ‘आम्हांला ‘आजोबा’ म्हणायला कुणी शिकवलं?’

‘आबासाहेबांनी!’

‘उग्रसेन,’ मिर्झाराजांनी उग्रसेनवर नजर वळविली, ‘शिवाजी राजांच्या युवराजांची डेऱ्यात व्यवस्था ठेवा. ते आमच्याबरोबर राहतील.’

नेताजी पालकर आत आले. त्यांनी मिर्झाराजांना मुजरा केला. नेताजींच्या उमद्या व्यक्तिमत्त्वावर मिर्झाराजांची नजर खिळली. किरतसिंगाने ओळख करून दिली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'हा नेताजी पालकर. युवराजांच्या बरोबर आला आहे.'

मिर्झाराजे हसले. ते म्हणाले,

'किरत, शिवाजीची माणसं हरहुन्नरी असतात. त्यांच्या कामावर फसून चालत नाही. हा युवराजांचा रक्षक नाही. हा नेताजी शिवाजीचा सेनापती आहे. दुसरा शिवाजी, असा याचा लौकिक आहे. सामान्य माणूस युवराजांच्या बरोबर पाठविला जाईल कसा?- काय, नेताजी, आम्ही म्हणतो, ते खरं ना?'

नेताजी नुसते हसले.

पावसाला सुरुवात झाली होती.

दिलेरखान म्हणाला,

'बारिश सुरू झाली.'

'आमच्या यशाचा निम्मा वाटा त्यालाच आहे.' एवढे बोलून मिर्झाराजांची हुक्क्याची नळी हातात घेतली.

मिर्झाराजे समाधानाने हुक्का पीत होते. संभाजीराजे सर्वांच्यावरून नजर फिरवीत होते. समया प्रज्वलित केल्या जात होत्या. समई प्रज्वलित होताच संभाजीराजांनी समईला हात जोडले. ते उठले; आणि मिर्झाराजांचे पाय शिवत म्हणाले,

'आजोबा, आम्ही पाया पडतो.'

मिर्झाराजांनी कौतुकाने बालराजांच्या पाठीवरून हात फिरविला; आणि प्रेमभराने त्यांनी संभाजीराजांना जवळ बसवून घेतले.

□

१३

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पावसाने झड धरली होती. राजगडाचा आसमंत धुक्याने आणि पावसाने भरून गेला होता. नजर टाकावी, तिकडे कड्यावरून कोसळणारे प्रपात नजरेत येत होते. वेगाने खळखळत उतरणाऱ्या ओढ्यांचे आवाज घुमत होते.

राजे सदरबैठकीत बसले होते. मोरोपंत, अनाजी या मंडळींच्या बरोबर आनंदराव, येसाजी, तानाजी हीही मंडळी सदरेवर हजर होती. पुरंधरचा तह झाल्यापासून दोन महिन्यांच्या अवधीत तहाप्रमाणे सर्व किल्ले मिर्झाराजांनी ताब्यात घेतले होते. मोकळ्या केलेल्या गडांवरचे गडकरी शिबंदीसह राजांच्याकडे येत होते. राज्य गेले होते, फौज राहिली होती. आपल्या विश्वासाने गोळा झालेल्या या फौजेचे आता काय करायचे, हा विचार राजांना बेचैन करीत होता. अनाजी दत्तोंनी सुचविले,

‘महाराज! दिवस कठीण दिसतात. अवघे बारा किल्ले आणि एक लाखाचा मुलूख यांवर हा डोलारा तोलणं कठीण. हा भार कमी करायला हवा.’

‘तुम्ही काय सुचवता?’ राजांनी विचारले.

‘थोडा फौजफाटा कमी करावा. लोक आपलेच आहेत. पुन्हा हाकेला हजर होतील.’

राजे हसून म्हणाले, ‘केवढी महत्त्वाची गोष्ट सांगितलीत, अनाजी! आणि तीही किती सहजपणे! शास्ताखान आमच्या मुलुखात आल्यापासून आजतागायत आमचा बारा मावळ होरपळला गेला. वस्त्या उठल्या. लोक बेघर झाले; पण आमच्या शब्दावर विश्वास ठेवणाऱ्यांचा विश्वास उडाला नाही. त्यांनी आमची सोबत सोडली नाही. ते निष्ठेनं जवळ राहिले. आज आम्ही त्यांना चाकरीतून कमी केलं, तर गरज लागताच धावत येतील, एवढी विश्वासू माणसं. ती जर हातची सोडली, तर मग आमची पारख काय होईल?- नाही, अनाजी, आम्ही हे करणार नाही.’

‘पण, राजे, एवढी शिबंदी मुरवायची कुठं?’ आनंदरावांनी विचारले.

‘आनंदराव, त्यात अडचण कसली? आमचे अद्याप बारा गड आहेत. त्यांखालचा मुलूख आहे. ही सवड मिळते, तोवर सारे गड मजबूत करून घ्या. सारी शिबंदी गडांवर जाऊ दे. तिचा भार आम्हांला व्हायचा नाही. श्रींच्या कृपेनं जे संपादन केलं, ते त्यांचंच आहे. आनंदराव, तानाजी, येसाजी आणि प्रतापराव, तुम्ही चौघे आमच्या फौजेची व्यवस्था

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लावा. राजगडावर आपली खास फौज ठेवून घ्या. पावसाळी फौजेचे हाल होऊ न देता त्यांना लवकर किल्ले गाठण्याचा हुकूम द्या.’

राजे सदरेवरून उठले व आपल्या महालाकडे जाण्यासाठी वळणार, तोच कानांवर शब्द आले,

‘मासाहेब बोलावतात.’

राजांनी वळून पाहिले. पुतळाबाई दारात उभ्या होत्या. राजांनी सुस्कारा सोडला आणि ते वळले. जी व्यथा राजे भोगीत होते, तीच व्यथा जिजाबाईही सोशीत होत्या. जिजाबाईंचा चिंताचूर चेहरा पाहून राजांचा जीव कळवळून जाई. संभाजीराजे ओलीस म्हणून गेले, ते जिजाबाईंनी मनाला फार लावून घेतले.

राजे महालात गेले. जिजाबाई राजांची वाट पाहत होत्या. राजांना पाहताच त्यांनी विचारले,

‘बाळराजांची काही बातमी?’

उसन्या अवसानाने राजे म्हणाले, ‘काही नाही. पण काळजीचं काय कारण? बाळराजे सुरक्षित आहेत.’

‘तुम्ही सांगायचं, आणि आम्ही ऐकायचं.’ जिजाबाई म्हणाल्या, ‘राजे, ओलीस म्हणून राहिलेलं पोर; ते का सुरक्षित समजायचं?’

‘मासाहेब, आम्ही अनेकवेळा सांगितलं; आजही सांगतो- बाळराजे इथं जेवढे सुरक्षित नाहीत, तेवढे तिथं सुखरूप आहेत. तो विश्वास नसता, तर आम्ही बाळराजांना पाठविलं नसतं; तेवढं कठोर मन आम्ही केलं नसतं.’

‘ठीक आहे. जे कराल, ते खरं.’ जिजाबाई म्हणाल्या.

‘मासाहेब, आमची याद बरी केली होती?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सदरेवर सारे आले होते, असं कळलं.’

‘हो, मासाहेब! खाली केलेल्या गडांची शिबंदी, गडकरी येत आहेत.’

‘मग त्यांना काय सांगितलंत?’

‘अनाजी दत्तोंनी आम्हांस सल्ला दिला...’ राजे म्हणाले.

‘कसला सल्ला?’

‘गड गेले; मुलूख गेला. आता एवढी फौज ठेवणं परवडायचं नाही. तेव्हा फौज कमी करावी, असा सल्ला दिला.’

‘मग फौज कमी केलीत?’

‘फौज कमी करून बिचारे जाणार कुठं? मिर्झाराजांनी साऱ्यांना ठेवून घ्यायची तयारी दाखविली होती; पण बिचारे सरळ आमच्याकडे आले. त्यांना कसं सोडणार? आम्ही सर्वांना ठेवून घेतलं आहे. एक लाखाच्या मुलुखावर भागणार नाही. त्यासाठी एकदा आमचा कोकणचा मुलूख पाहून यायचं ठरवलं आहे. काहीही करून ही माणसं राखायला हवीत.’

‘काही नसता त्यांनी एवढा पसारा मांडला. त्यांना कुठं वाऱ्यावर सोडणार? आज बारा गड आहेत. या बारा गडांचे बाराशे करायचे झाले, तर हीच माणसं करतील.’

त्या बोलांनी राजांना समाधान वाटले. राजे उठत म्हणाले,

‘आम्ही येतो.’

‘शिवबा ऽ ऽ’

राजे परत थांबले. जिजाबाई म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्हांला बाळराजांना पाहावंसं वाटतं. गेले दोन दिवस आमचा डोळा फुरफुरतो आहे. जिवाला चैन नाही.’

‘पण ते कसं शक्य आहे, मासाहेब?’

‘आम्ही भेटायला गेलो, तर?’

‘ते बरं दिसणार नाही.’

‘शिवबा, काय केलंत हे? हवं ते करायचं होतंत; पण अजाण पोरावर टांगती तलवार का धरलीत?’

‘मासाहेब, आमच्यावर विश्वास ठेवा. मिर्झाराजे शब्दाचे सच्चे आहेत. ते बाळराजांना जिवापाड सांभाळतील. त्यांच्या केसालाही धक्का लागणार नाही.’

‘हं! शत्रूचा भरोसा किती द्यावा, त्यालाही मर्यादा आहेत. ज्यानं तुमच्या मुसक्या आवळल्या, त्या शत्रूचे गोडवे गाता?’

‘गैरसमज होतो, मासाहेब! शत्रू झाला, तरी त्याला समजून घ्यायला हवा. मिर्झाराजे औरंगजेबाला इमानी आहेत. त्यांच्या निष्ठा सेवेत गुंतल्या आहेत. काहीही झालं, तरी त्यांच्या निष्ठेत बदल होणार नाही; पण तेवढी जागा सोडली, तर मिर्झाराजांसारखा स्नेही नाही. दिलाचा मोठा. कदरदान माणूस आहे. त्याची परीक्षा बघायची असेल, तर केव्हाही बघावी.’

‘आम्हांला बाळराजांना पाहायचं आहे.’ जिजाबाई म्हणाल्या.

राजांनी जिजाबाईंच्याकडे रोखून पाहिले. राजे म्हणाले,

‘ठीक आहे. आज आम्ही मिर्झाराजांना पत्र पाठवतो. मिर्झाराजे बाळराजांना जरूर पाठवतील. पण असं पत्र पाठविणं ठीक नाही. त्यात आमची कमजोरी दिसते.’

‘आम्हांला बाळराजांना पाहायचं आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तसं होईल. जशी आज्ञा.’

राजे महालाबाहेर पडले. सदरेवर जाऊन मिर्झाराजांना पत्र लिहिले गेले. भर पावसात पत्र घेऊन स्वार गडाखाली उतरला.

दोन दिवस गेले; पण जयसिंगांच्याकडून काहीच उत्तर आले नाही. पाऊस थांबला होता.

दोन प्रहरी महालात राजे विश्रांती घेत होते. झालेल्या आवाजाने राजांनी डोळे उघडले. दाराशी मनोहारी उभी होती. चेहऱ्यावरून आनंद ओसंडत होता. राजांनी डोळे उघडलेले पाहताच ती म्हणाली,

‘बाळराजे आले!’

‘केव्हा?’ राजांनी उठत विचारले.

‘आत्ता हेच!’

‘कुठं आहेत?’

‘मासाहेबांच्या महाली.’

‘ठीक आहे. आम्ही आलो. तू पुढं हो.’

राजे जिजाबाईंच्या महाली गेले. बाळराजांना मांडीवर घेऊन जिजाबाई बसल्या होत्या. सोयराबाई, पुतळाबाई, सगुणाबाई महालात हजर होत्या. नेताजी पालकर अदबीने उभे होते. राजांना महालात येताना पाहून नेताजींनी पुढे होऊन मुजरा केला. बाळराजे उठून सामोरे आले आणि त्यांनी राजांच्या पायांवर मस्तक ठेवले. प्रेमभराने त्यांना जवळ घेत राजे म्हणाले,

‘बाळराजे, तुम्ही लवकरच मोगलाईचे मनसबदार बनणार आणि अजून मासाहेबांच्या मांडीवर बसता?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्ही बसणार!’

‘मग मनसब मिळणार नाही.’

‘मग आम्हांला ती मनसबही नको!’

साऱ्यांच्या हसण्याने महाल भरला. राजांनी नेताजींना विचारले,

‘नेताजी, पत्र पाठवलं. मग दोन दिवस का लागले?’

‘आपलं पत्र मिळताच मिर्झाराजांनी बाळराजांना पाठवायचं ठरविलं; पण पाऊस होता. राजाजींना बाळराजांचा खूप लळा लागला होता. बाळराजे भिजतील, आजारी पडतील, म्हणून पाऊस थांबण्याची वाट पाहण्याची आज्ञा झाली. पाऊस थांबला आणि निघालो.’

बाळराजे एकदम पुढे झाले. गळ्यातला कंठा पुढे करीत बाळराजे म्हणाले,

‘आबासाहेब, आम्ही येत होतो, तर आजोबांनी आपल्या गळ्यातला कंठा काढून आमच्या गळ्यात घातला. हा बघा.’

‘छान आहे.’ राजांनी नेताजींना विचारले, ‘बरोबर कोण आहे?’

‘कोणी नाही.’ नेताजींनी सांगितले. ‘राजाजी म्हणाले- बाळराजांना घेऊन जा. जितके दिवस ठेवून घ्यायचं, तितके दिवस ठेवून घ्या. सावकाश आले, तरी चालेल.’

राजांनी जिजाबाईंच्याकडे पाहिले. जिजाबाईंनी नजर चुकविली. राजे म्हणाले,

‘आमची माणसांची पारख तशी चुकत नाही.’

राजे समाधानाने बाहेर पडले.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१४

पावसाळा संपताच मिर्झाराजे कोंढाण्याला गेले. ज्या गडापुढे जसवंतसिंगाने सुलतानढवा करूनही माघार घेतली, तो गड मिर्झाराजांना बघायचा होता. गडाचे ताशीव काळेभोर कडे, गडाचा बंदिस्त परिसर पाहून मिर्झाराजांचे समाधान झाले. एक रात्र गडावर वस्ती करून जयसिंग परत आपल्या तळावर आले आणि संभाजीराजांच्यासाठी दिल्लीहून आलेल्या फर्मानाची बातमी मिर्झाराजांना मिळाली. संभाजीराजांना फर्मानाचा स्वीकार करण्यासाठी तातडीने पाठविण्यासाठी मिर्झाराजांनी राजगडला पत्र पाठविले. दुसऱ्या दिवशी सकाळी संभाजीराजे छावणीत आले. त्यांनी समारंभपूर्वक फर्मानाचा स्वीकार केला. संभाजीराजांना सहा हजारांची मनसब, दोन लक्ष रुपये आणि निशाणी नौबत घेण्याची परवानगी बादशहाकडून मिळाली. संभाजीराजे बादशहांचे सहाहजारी मनसबदार बनले.

मिर्झाराजांचे एक स्वप्न पुरे झाले. ते दुसऱ्यासाठी आतुर झाले होते. शिवाजीराजांची अस्वस्थता त्यांच्या नजरेत आली होती. ती चलबिचल लौकर थांबावी, शिवाजीराजांचा पुरा विश्वास संपादन करावा, या हेतूने मिर्झाराजांनी अनेक पत्रे औरंगजेबाला लिहिली होती. ज्या घटनेची मिर्झाराजे अत्यंत आतुरतेने वाट पाहत होते, ते शाही फर्मान येत असल्याची बातमी थोड्याच दिवसांत मिर्झाराजांना आली. शिवाजीराजे त्या वेळी तळकोकणात होते. मिर्झाराजांचे स्वार तातडीने रवाना झाले.

मिर्झाराजांचे पत्र वाचताच शिवाजीराजे मिर्झाराजांच्या छावणीवर दाखल झाले. मिर्झाराजांनी आनंदाने राजांचे स्वागत केले. मिर्झाराजे म्हणाले,

‘राजे, तुम्ही मोठे भाग्यवान आहात. आमच्या रदबदलीचं चीज झालं.’

‘होय, राजाजी! ऐकून आम्हीही कृतार्थ झालो. संभाजीराजे मनसबदार बनले, यात आम्हांलाही आनंद झाला.’

मिर्झाराजे राजांच्या जवळ येत म्हणाले,

‘राजे, आम्ही तुमच्या नावे दिल्लीला पत्र पाठविलं होतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आमच्या नावे?’

‘हो! त्याखेरीज इलाज नव्हता.’ मिर्झाराजे म्हणाले, ‘तुमचं दिलगिरीचं पत्र आणि आमची शिफारस पाहून बादशहा खूश झाले. त्यांनी तुमच्यासाठी तातडीनं फर्मान पाठविलं.’

‘पण मी कुठं नोकरीत आहे?’ राजांनी विचारले.

‘त्याचसाठी मी तुम्हांला भाग्यवान म्हटलं. फर्मान निघाल्याचं कळताच तुम्हांला तातडीनं बोलावून घेतलं.’

राजांना काय बोलावे, हे कळेना. आवंढा गिळून ते म्हणाले,

‘बादशहा थोर मनाचे, म्हणून त्यांची मेहेरनजर माझ्यावर झुकली; पण, राजाजी, मी त्यांच्या फर्मानाला पात्र नाही. संभाजीराजे नोकरीत दाखल झाले, म्हणून ते फर्मानाचे धनी झाले. पण मी... मी कसा फर्मानाचा स्वीकार करणार?’

मिर्झाराजे चकित झाले. त्यांचा आवाज कठोर बनला. त्यांनी विचारले,

‘शाही फर्मान डावलण्याचा तुमचा बेत आहे?’

राजांनी चटकन सावरून घेतले. ‘गैरसमज होतो.’ राजे म्हणाले, ‘लायकी नसताना हा बहुमान येतो. त्यानं माझे डोळे दिपले. खिलत चढवून घेणं सोपं; पण तिची इज्जत टिकवणं फार कठीण!’

मिर्झाराजांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले. पुढे होऊन त्यांनी राजांचे खांदे पकडले व ते म्हणाले,

‘राजासाब! माझ्यावर विश्वास ठेवा, बादशहांची सेवा करण्यातच तुमचं-माझं कल्याण आहे. तुमच्यावरचा रोष जावा, तुमच्यावर कृपा व्हावी, ह्याच इच्छेनं मी धडपडत होतो. फर्मान हे त्याचंच फळ आहे. आता लौकरच शाही फर्मान येऊन दाखल होईल. त्याचं रिवाजाप्रमाणे स्वागत व्हायला पाहिजे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'पण, राजाजी!...'

'मी सारं जाणतो. फर्मानाच्या स्वागताचा मी पुरा बंदोबस्त करीन. राजे, दिलेरखान बादशहांच्या खास मर्जीतला. पण त्यालाही रिवाज सोडून असं फर्मान आलं नाही. साऱ्यांना ह्या तुमच्या मानमरातबाचं कौतुक वाटणं स्वाभाविक आहे. या समारंभात काही उणं पडलं, तर चटकन तुम्हांला दोष लावला जाईल. तेव्हा सर्व काळजीपूर्वक, रिवाजाला धरून करा. त्यानं तुमची, त्याचबरोबर माझीही इभ्रत वाढेल.'

मान डोलविण्याखेरीज राजांच्या हाती दुसरे काही नव्हते.

राजे बेचैन बनले. ज्यांनी आपली हयात मोगली सत्तेला विरोध करण्यात खर्च केली, ज्यांच्या सामर्थ्यापुढे आदिलशाहीला नमावे लागले, शास्ताखानाला पळून जावे लागले, त्याच शिवाजीराजांना फर्मान येत होते. बादशहांच्या कृपेची निशाणी. बादशहांचा आशीर्वाद. पृथ्वीतलावरचा अलौकिक मान. त्या खास फर्मानात बादशहाची मेहेरनजर लिहिली असेल. त्यावर मेंदीने रंगविलेल्या खुद्द बादशहांच्या हाताचा छाप असेल. त्याचा स्वीकार राजे करणार होते. फर्मानाला पायी सामोरे जाऊन, गुडघे टेकवून ते स्वीकारायला हवे.

राजांचा संताप उसळत होता. मुठी वळत होत्या; पण कष्टाने राजे आपला संताप आवरीत होते. मिर्झाराजांचे सारे सरदार राजांच्या ह्या भाग्याचा हेवा करीत होते. राजांचे अभिनंदन करीत होते. उसन्या अवसानाने राजे आनंद दर्शवीत होते.

मिर्झाराजांनी फर्मानाचे स्वागत करण्यासाठी छावणीपासून तीन कोसांवर फर्मान यायच्या वाटेवर चांगली जागा पाहून फर्मानबाडी उभारली. भव्य शामियाना तेथे उभा केला. त्या जागी शिवाजीराजे फर्मानाचे स्वागत करणार होते.

दिल्लीवरून येणाऱ्या फर्मानाचे टप्पे दररोज छावणीत कळत होते. फर्मानभेटीचा दिवस ठरला. राजे पहाटे स्नान करून सरदारांसह फर्मानबाडीकडे चालू लागले. शाही फर्मानाला पायी सामोरे जायचे, हा रिवाजच होता. राजांच्या बरोबर मिर्झाराजांचा मुलगा किरतसिंग व बक्षी जानी बेग होते. सारे शामियान्यात फर्मानाची वाट पाहत होते.

ऊन तळपत होते. चारी बाजूंच्या हिरव्यागर्द मुलुखात मोकळ्या असलेल्या माळावर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

फर्मानबाडी उभारण्यात आली होती. शामियाना भव्य होता. शामियान्याच्या चारी बाजूंना सोन्याचे कळस सूर्यकिरणांत तळपत होते. मोगलाई हिरवा झेंडा शामियान्यावर फडकत होता. शामियान्याच्या दोन्ही बाजूंना अश्वदळ उभे होते. अत्यानंदामुळे राजे अस्वस्थ बनले आहेत, असे समजून बेग राजांना फर्मान स्वीकारण्याचे रिवाज समजावून देत होता. राजे ते ऐकत होते; ते ऐकत असता डोळ्यांत गोळा होणारे अश्रू कष्टाने आवरीत होते. चालत आल्याने पायांतल्या चढावांवर गोळा झालेल्या धुळीकडे राजे पाहत होते.

त्याच वेळी नौबतीचा गंभीर नाद निनादला. किरतसिंग म्हणाला,

'फर्मान आले.'

राजांनी चढाव काढला, आणि ते शामियान्याच्या बाहेर गेले. मागोमाग किरतसिंग, बेग हे होतेच. राजे रस्त्यावर आले. त्यांनी नजर टाकली. दूरवरून अश्वपथक येताना दिसले. अश्वपथक नजरेत आले. अश्वपथकामागे फर्मानाचा उंट होता. मोगल निशाण फर्मानाची जागा दाखवीत होते.

'राजासाब, फर्मान करीब आ रहा है. आया.'

राजांनी आवंढा गिळला. त्यांची मान झुकली. गुडघे टेकले गेले. तप्त धुळीत अश्रू ठिबकत होते. तांबड्या मातीत पडणारे ते थेंब घर करीत होते; क्षणात सुकत होते. फर्मानाच्या स्वागतासाठी शामियान्याबाहेरील वाद्यांचा गजर चालू होता.

अश्वपथक पुढे गेले. फर्मानाचा उंट सामोरा आला. उंट बसला. किरतसिंग, बक्षी जानी बेग सामोरे गेले. फर्मान उतरले गेले. अत्यंत अदबीने ते फर्मान राजांच्या पसरलेल्या हाती ठेविले गेले. राजांनी फर्मान मस्तकी लावले. बंदुकीच्या सलामी झडल्या. नौबती दुमदुमल्या. फर्मान घेऊन राजे उभे राहिले. राजांच्या डोळ्यांकडे पाहताच किरतसिंग उद्गारला,

'राजासाब! ये क्या? आपकी आँखों में आँसू!'

राजांनी हसून बोटांनी अश्रू निपटले आणि ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘किरतसिंग, कुणी सांगितलं की, अश्रू दुःखाच्याच वेळी येतात, म्हणून? आनंदाच्या वेळीही ते येतात!’

□

१५

वाद्यांच्या गजरात, बंदुकींच्या आवाजात शाही फर्मान घेऊन राजे तळावर आले. मिर्झाराजांनी एखाद्या वीराचे स्वागत करावे, तसे राजांचे स्वागत केले. राजांच्या स्वागतासाठी सज्ज केलेल्या शामियान्यात दिलेरखानासह सर्व सरदार उपस्थित होते. राजे आता त्यांच्यापैकी एक बनले होते. राजांना आलेला पोशाख, शाही खिलत पाहून साऱ्यांना राजांच्या यशाचे कौतुक वाटत होते. तख्ताचा कालचा शत्रू तह होताच खिलतीचा मानकरी होतो, आणि बादशहांसाठी अहोरात्र खपत असलेले मोगली सरदार बाजूला राहतात, याचा अनेकांना खेद वाटत होता; पण बोलून दाखविण्याचे धाडस कुणात नव्हते. शामियान्यात चाललेले शिवाजीचे कौतुक सारे पाहत होते, आनंद दर्शवीत होते. औरंगजेबाने शिवाजीला ‘राजा’ हा किताब बहाल केला होता. मिर्झाराजांनी शिवाजीमहाराजांना प्रेमभराने आपल्या बैठकीवर बसवून घेतले. शिवाजीराजांच्या कमरेला कुठलेच हत्यार नाही, हे ध्यानी येताच मिर्झाराजांनी विचारले,

‘राजासाब! आपली तलवार कुठं आहे? शस्त्राविना आपला पोशाख विजोड दिसतो.’

राजे स्मितवदनाने म्हणाले, ‘राजाजी, मी शरणागत. निःशस्त्र भेटीला यावं, अशी आपलीच आज्ञा. त्याचमुळं आम्ही शस्त्र बाळगिलं नाही. शस्त्र नसलं, तर उणीव भासते खरी; पण जर चुकून शस्त्र उतरवून ठेवायला सांगितलं, तर मरणप्राय दुःख होतं.’

‘राजासाब! परमेश्वरशपथ सांगतो, आमच्या ध्यानी आलं नाही. जेव्हा आम्ही मैत्रीचा हात पुढं करतो, तेव्हा त्यात एवढाही खोटेपणा ठेवीत नाही. आमच्या लक्षात आलं नाही. आम्ही चुकलो!’

‘राजाजी!’

‘थांबा...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मिर्झाराजांनी किरतसिंगाला हाक मारली. त्याच्या कानात काहीतरी सांगितले. किरतसिंग त्वरेने बाहेर नेला. शामियान्यात मद्याचे प्याले आणले गेले. सारे मद्याचे घोट घेत होते. राजे सरबत घेत होते.

किरतसिंग आत आला. त्याच्या मागून येणाऱ्या सेवकाच्या हाती रेशमी आच्छादन घातलेले तबक होते. मिर्झाराजांनी आच्छादन उघडले. तबकात रत्नजडित मुठीची तलवार आणि तशीच कट्यार होती. मिर्झाराजांनी तलवार राजांच्या दुशेल्यात खोवली; कट्यार शेल्यात नीट बसविली.

रुबाबदार साफ्याखाली दिसणाऱ्या भव्य कपाळावर उठून दिसणारा मिर्झाराजांचा केशरी टिळा, पांढऱ्या रेखीव भुवयांखाली मनाचा ठाव घेणारे पाणीदार डोळे, भावनाविवशतेने राजपुती नाकाच्या रुंदावलेल्या नाकपुड्या, ओठांच्या कंपाबरोबर कंप पावणाऱ्या पांढऱ्या रुबाबदार गलमिशा- ते रूप पाहून, का, कोण जाणे, राजांना महाराजसाहेबांची आठवण झाली. ते एकदम झेपावले; आणि लक्षात यायच्या आत त्यांनी मिर्झाराजांचे पाय शिवले. शिवाजीराजांना गडबडीने उठवीत मिर्झाराजे म्हणाले,

'राजासाब, ये क्या?'

राजे मिर्झाराजांच्या नजरेला नजर देत म्हणाले,

'आशीर्वाद मागतो.'

'कसला?'

'गमावलेलं शस्त्र परत कमरेत खोवलंत, राजाजी! आता आशीर्वाद असा द्या, की परत हे शस्त्र शेल्यातून सुटू नये; उतरावं लागू नये.'

मिर्झाराजे गहिवरले. राजांच्या पाठीवर हात थोपटीत ते म्हणाले,

'राजासाब, वैसाही होगा! वैसाही होगा!! संकटकाळी आम्ही एक शेर सदैव आठवतो-

खुदी को कर बुलंद इतना के हर तहरीरसे पहले
खुदा बन्देसे खुद पूछे : बता, तेरी रजा क्या है?

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

माणसानं स्वत:लाच एवढं सामर्थ्यशाली बनवावं, की दरवेळी ललाटलेख लिहिण्यापूर्वी परमेश्वरानं विचारावं, ‘बाबा, रे, सांग तुझी काय इच्छा आहे!’

सायंकाळी मिर्झाराजे व शिवाजीराजे बोलत होते. मिर्झाराजांच्या मनात अनेक विचारांचे काहूर उठले होते. मिर्झाराजे म्हणाले,

‘राजासाब! आता बारिश संपली. आदिलशाही काबीज करण्याचा आमचा बेत आहे. तशी आलमगीरची आज्ञा आहे.’

मिर्झाराजांचा बेत ऐकून राजे थक्क झाले. आदिलशाही आणि कुतुबशाही दोन्ही मुसलमान शाह्या. त्यांच्या विरुद्ध मोगल उठतील, असे राजांना वाटले नव्हते. मिर्झाराजांनी राजांचे विचार जाणले. ते म्हणाले,

‘आमचा बेत ऐकून आश्चर्य वाटलं ना? आम्ही उत्तरेत परतण्याआधी या आदिलशाहीला नमविता आलं, तर सम्राटांचं राज्य आख्ख्या हिंदोस्थानभर बेरोकटोक महफूज होईल. ते साधलं, तर आलमगीर प्रसन्न होईल.’

राजांनी मान डोलविली. राजांनी विचारले,

‘केव्हा मोहीम काढणार?’

‘लौकरच काढू. आमच्या मनात, तुम्ही मदत करावी, असं आहे.’

‘मी कसली मदत करणार?’ राजे म्हणाले, ‘मी नुसता नावाचा राजा. ना राज्य, ना फौज.’

‘ती कालची गोष्ट होती. राजे, तुम्ही आता राजे बनला आहात. संभाजीराजांना मनसब आहे. ती फौज तुमच्या हाती राहणार. तुम्ही या भागातले. तुम्ही फौज घेऊन आलात, तर तुम्ही मनसबदारीत गुंतल्याचा यकीन येईल. आदिलशाहीचा जो मुलूख फत्ते करू, तो तुम्हांला मिळावा, म्हणून मला शिफारस करता येईल.’

‘तत्काळ फौज उभी करता येणं शक्य नाही. खर्चाची बाब. मुदत लागेल.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजासाब, खर्चाची फिकर करू नका. मी तुम्हांला उद्या दोन लक्ष रुपये देतो. शक न करो. ही रहम नाही. तुमच्या जहागिरीतून ते पैसे आम्ही वसूल करून घेऊ. तुम्ही उद्या जा. शक्यतो लवकर फौज गोळा करून छावणीत दाखल व्हा. तुम्ही आला, की आम्ही स्वारीवर निघू.’

राजांनी मान डोलविली. दुसऱ्या दिवशी राजांनी मिर्झाराजांचा निरोप घेतला; आणि तातडीने ते राजगडावर आले.

राजगडावर येताच राजांनी सर्व फौजेला गोळा होण्यासाठी हुकूम पाठविले. आजवर मोहिमांचे हुकूम सुटले, की कसा उत्साह संचारे. पण हा हुकूम सुटताच कुणाच्या चेहऱ्यावर आनंद प्रकटला नाही.

राजे गडावरील आपल्या महालात विचार करीत बसले होते. नुकतेच बाळाजी आवजीला पत्र सांगून राजे मोकळे झाले होते. राजांनी मिर्झाराजांना फौज गोळा होत असल्याचे लिहिले होते. बाळाजी आवजीने मुजरा केलेला पाहताच राजांची नजर दाराकडे गेली. जिजाबाई आत येत होत्या. त्यांच्या बरोबर संभाजीही होते. जिजाबाईंना पाहताच राजे उठून उभे राहिले. बाळाजी आवजी अदबीने महालाबाहेर गेले. राजे बाळराजांना जवळ घेत म्हणाले,

‘मासाहेब, आम्हांला बोलवायचं होतंत. आम्ही खाली आलो असतो.’

जिजाबाई म्हणाल्या, ‘आता बोलवून तरी काय उपयोग? तुम्ही काही बोलत नाही, सांगत नाही. तुटक उत्तरं ऐकून काही कळत नाही.’

‘मासाहेब, जेव्हा सांगण्यासारखं होतं, तेव्हा खूप सांगितलं. आता जेवढं कानी घालायचं, तेवढं घालून मोकळं व्हायचं. यापेक्षा आमच्या हाती काही राहिलं नाही.’

‘राजे, दुःखं धैर्यानं सोसली पाहिजेत.’

‘मासाहेब, किती धैर्य आणायचं?’ राजे अस्वस्थपणे येरझाऱ्या घालीत होते. एकदम ते थांबले. जिजाबाईंच्या नजरेला नजर देत म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मासाहेब, आम्हांला फर्मान आलं. एका कागदी भेंडोळ्याचा काय थाट! त्याच्या स्वागताला पायी जायचं. फर्मानबाडीपाशी तिष्ठत उभं राहायचं. फर्मानाचा उंट दिसला, की रस्त्यावर अनवाणी जाऊन गुडघे टेकून बसायचं. उंट जवळ आला, तरी मान वर करायची नाही... फर्मान बादशहांची साक्षात प्रतिमा ना!’

‘राजे ऽ ऽ!’

‘ऐका, मासाहेब! उंट बसला, की फर्मानाचा खालच्या मानेनं स्वीकार करायचा. फर्मान मस्तकी लावायचं आणि ते डोक्यावर घेऊन फर्मानबाडीपासून छावणीपर्यंत

यायचं. शिमग्यातील मिरवणूकदेखील एवढी उपहासाची नसेल! आम्ही मोहिमेला जाणार, तर आम्हांला परवडायचं नाही, म्हणून मिर्झाराजांनी आमच्या हाती दोन लाख रुपये ठेविले!’

‘मग ते घेतलेत?’

‘दुबळ्याला सूड उगवायला तेवढीच जागा होती!’ राजे भेसूर हसले.

जिजाबाईंच्या डोळ्यांतले अश्रू पाहताच राजे उफाळले.

‘मासाहेब! तुमच्या डोळ्यांत पाणी? तुम्हांला आत्महत्या करणारा भेकड मुलगा नको होता ना? एक निर्लज्ज, कोडगा हवा होता. तोच बनण्याचा प्रयत्न करीत असता डोळ्यांत पाणी कशाला आणता?’

राजांच्या त्या बोलांनी जिजाबाईंच्या डोळ्यांतील पाणी मागे सरले. एक वेगळीच चमक त्या डोळ्यांत प्रकटली.

‘शिवबा, स्वत:च्या पराजयाचं थोडं कौतुक करा. जरा आठवा- महाधनुर्धर अर्जुनानं बृहन्नडा होऊन पायांत चाळ बांधले असतील, तेव्हा त्या पौरुषाला कोण यातना झाल्या असतील! सर्वशक्तिशाली भीमानं हाती पाटा-वरवंटा घेतला असेल, तेव्हा त्याला कोण कष्ट पडले असतील! साक्षात धर्म म्हणवून घेणाऱ्या युधिष्ठिरानं कीचकाचा पडलेला जोडा स्वत:च्या हातांनी समोर ठेवला असेल, तेव्हा त्याच्या धर्मभावनेचं काय झालं असेल?

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे, जे संकट सहन करतात, त्यांचाच भविष्यकाल उज्ज्वल असतो. ह्या जगात माणसाचं मोठेपण कर्तृत्वापेक्षा सोसण्यावर आहे. ज्यांनी हे सोसलं, त्यांनाच भवानीचा आशीर्वाद लाभला. भवानीच्या आशीर्वादावर विश्वास ठेवा, राजे!'

'त्यावरच आम्हीही जगतो आहो, मासाहेब!' राजांची नजर एकदम संभाजीवर खिळली. ते पोर बावरले होते. राजांनी एकदम रोख बदलला. संभाजीकडे पाहत राजे म्हणाले,

'मासाहेब, आता आमचे संभाजीराजे सहाहजारी मनसबदार बनले आहेत. त्यांची फौज घेऊन आम्ही मिर्झाराजांच्या बरोबर आदिलशाही मोहिमेवर जाणार आहो. बाळराजे, तुमची फौज द्याल ना?'

अर्थ न समजून बाळराजे म्हणाले, 'आम्ही जाऊ लढायला?'

राजांनी संभाजीबाळांना मिठीत घेतले. राजे म्हणाले,

'बाळराजे, अशा मोहिमांत जाण्याची पाळी तुमच्यावर चुकूनही येऊ नये. ते दुःख तुम्हांला सोसायचं नाही.'

राजांचे अश्रू आपल्या बालहातांनी पुशीत संभाजीराजांनी विचारले,

'आबासाहेब, तुम्ही रडता?'

'हां, राजे! तेवढं एकच भाग्य अजून टिकून आहे. रडायला का होईना, पण मासाहेबांची जागा आम्हांला नशिबानं ठेवली आहे. जा, बाळराजे, खेळा जा!' जिजाबाईंच्याकडे वळून राजे म्हणाले, 'मासाहेब, आम्ही थकलो. जरा विश्रांती घेतो. आमच्याकडे आता कोणालाही पाठवू नका.'

संभाजीराजांच्यासह जिजाबाई बाहेर गेल्या.

राजांची थकली पावले पलंगाकडे वळली.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१६

मिर्झाराजांच्या छावणीला लष्करी तळाचे स्वरूप येत होते. साऱ्या मुलुखात पसरलेल्या फौजा छावणीवर गोळा होत होत्या. शिवाजीराजेही आपल्या बरोबर संभाजीराजांचे सहा हजार व आपले सात हजार निवडक सैन्य घेऊन मिर्झाराजांच्या गोटात दाखल झाले होते.

राजांच्यासाठी उभारलेल्या खास डेऱ्यात राजे मनुचीबरोबर बुद्धिबळ खेळत होते. मनुचीचा स्वभाव राजांना आवडला होता. मनुचीही राजांच्याकडे वारंवार येई. राजांना त्याच्याकडून खूप आश्चर्यकारक बातम्या समजत. समुद्रावरून इतक्या दूर येऊन परक्या देशात सत्ता प्रस्थापित करणाऱ्या फिरंग्यांचे राजांना सदैव कौतुक वाटे. मनुची गोरा, देखणा होता. त्याचे घारे डोळे अतिबोलके होते. त्याला निरखण्यात राजांना गंमत वाटे. एखादी चांगली चाल असो, किंवा एखादी फसलेली कृती असो, मनुचीचे डोळे प्रथम बोलत. राजांनी आपला डाव केला होता. मनुची आपल्या लांब केसांत पंजे खुपसून एकाग्रतेने डावाकडे पाहत होते. डेऱ्यात पडलेली सावली पाहून राजांनी मान वर केली. मिर्झाराजे आत येत होते. राजे उठले. मिर्झाराजे म्हणाले,

‘बसा, राजासाब! चालू दे तुमचा डाव.’

काही तातडीचे काम असल्याखेरीज मिर्झाराजे येणार नाहीत, हे राजांनी ओळखले. ते म्हणाले,

‘कंटाळा आला. मी बंद करणारच होतो.’

‘व्वा ऽ, राजासाब! डाव निम्म्यावर टाकून कधी उठतात का? डाव पुरा करूनच उठा.’ मिर्झाराजांनी सांगितले.

नकळत राजे बोलून गेले, ‘राजाजी! निम्म्या डावावरून उठण्यातदेखील गंमत असते.’

‘मतलब?’

राजांनी चटकन सावरून घेतले, ‘काही नाही. सहज बोलून गेलो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मनुचीने डाव गोळा केला. दोघांना अभिवादन करून तो डेऱ्याबाहेर गेला. मनुची जाताच मिर्झाराजांनी सांगितले,

‘उद्या मुहूर्त चांगला आहे. उद्या निघावं, म्हणतो.’

‘ठीक!’ राजे म्हणाले.

‘राजे, आपण या मुलुखाचे माहितगार. आपल्याला आघाडीवर ठेवावं, असं आमच्या मनात आहे.’

‘जशी आज्ञा!’

‘तुमच्याकडून याच उत्तराची अपेक्षा होती. बऱ्याच गोष्टी अजून पाहायच्या आहेत. आम्ही चलतो.’

मिर्झाराजे जाताच राजांनी नेताजींना बोलावून घेतले. स्वारीच्या सर्व सूचना दिल्या.

पहाटेच्या नगाऱ्याच्या आवाजाने छावणी जागी झाली. हत्तींचे ओरडणे, घोड्यांचे खिंकाळणे, उंटांचे आवाज त्यांनी छावणी भरून गेली. दिवस उगवायला राजे मिर्झाराजांच्या डेऱ्यासमोर गेले. पाठोपाठ नेताजी, प्रतापराव, आनंदराव, येसाजी ही मंडळी चालत होती. मिर्झाराजे डेऱ्यासमोर उभे होते. त्यांच्या शेजारी किरतसिंग, उग्रसेन, दाऊदखान, दिलेरखान उभे होते. शिवाजीराजे समोर येताच मिर्झाराजे म्हणाले,

‘या, राजे. आम्ही तुमचीच वाट पाहत होतो. मोहिमेची सुरुवात कोठून करावी, याचा आम्ही विचार करीत होतो.’

राजांना प्रश्नाचा रोख समजला नाही. दिलेरखान म्हणाला,

‘राजासाब, मोहिमेची सलामी आपलीच होऊ दे.’

‘ते आम्हांला मान्य आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपले स्मित लपवीत दिलेरखान म्हणाला, 'मग फलटणपासूनच सुरुवात होऊ दे.'

'फलटण?' राजांनी विचारले.

'हां! तो आदिलशाहीचा मुलूख आहे ना? ताथवड आणि फलटण घेतलं, की विजापूरचा रास्ता खुल्ला होईल.'

चेहऱ्यावर काही भाव न दाखविता राजांनी ते मान्य केले. दिलेरखानाचा पहिला आकस राजांना दिसून आला. खुद्द राजांची लाडकी सखुबाई फलटणच्या महादजीला दिलेली. जावयावर चालून जायची कामगिरी सासऱ्यावर आली होती. राजांनी नेताजीला फौजेसह कूच करण्याचा हुकूम दिला. कुचाची नौबत झडली; आणि मराठ्यांची फौज तळावरून पुढे सरकली.

चांदीसोन्याच्या दागिन्यांनी सजविलेला मिर्झाराजांचा हत्ती डेऱ्यासमोर आला. हत्तीच्या गळ्यातल्या चांदीच्या घाटेचा आवाज उठत होता. नक्षीदार रौप्यहौदा हत्तीच्या मखमली झुलीवर शोभत होता. हत्ती येऊन बसला. शिडी लावली गेली. मिर्झाराजे म्हणाले,

'राजासाब, चला.'

'मी पालखीतून येईन ना!'

'छे! तुम्ही आमच्या बरोबरीनं असावं, असं आम्हांला वाटतं.'

मिर्झाराजांच्या पाठोपाठ राजे हौद्यात बसले. ऊन लागू नये, म्हणून दोघांवर अब्दागिरी धरण्यात आली होती. हत्तीबरोबर भालदार व मिर्झाराजांचे रक्षक चालत होते. मिर्झाराजांनी शिवाजीराजांचे एवढे कौतुक करावे, हे दिलेरखानासारख्या सरदारांना रुचले नाही.

मिर्झाराजांची फौज आदिलशाहीच्या रोखाने जात होती. नीरा नदीपाशी फौज आली. मिर्झाराजांनी शिवाजीराजांना आघाडी दिली. राजांनी तेथे गोळा झालेल्या आपल्या सैन्याला हुकूम सोडले. मराठी सैन्य फलटणवर तुटून पडले. पुराचा लोंढा यावा, तसे मराठी सैन्य पुढे घुसत होते. फलटण पडले. पाठोपाठ ताथवडचा किल्ला सर झाला, विजापूरकरांचे खटाव सर झाले आणि नेताजीने मंगळवेढ्याचा किल्ला कबज्यात आणला. राजांच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नेतृत्वाने मिळालेले यश मिर्झाराजांना कौतुकास्पद वाटले. त्यांनी राजांची तारीफ दिल्लीदरबारला कळविली.

आदिलशाहीचा मुलूख काबीज करीत, विजय संपादन करीत फौजा तळकोकणात शिरल्या. इलासखानाला राजांच्या सैन्याने कोकणातून हुसकावून लावले. मोगल सैन्य चालून येते, हे पाहताच आदिलशाहीने लढाईची सिद्धता केली. विजापूरच्या आसपासचा मुलूख उद्ध्वस्त करून सर्व पाण्याची ठिकाणे विष टाकून निकामी केली. आदिलशाही निकराच्या लढ्याच्या तयारीने मोगली फौजेची वाट पाहत होती. विजयाने भान हरपलेली मोगल फौज आपल्या दिमाखात विजापूरपासून सहा कोसांवर येऊन थडकली आणि अचानक आकाशात लोळ उतरावा, तशी आदिलशाही फौज मोगल सैन्यावर तुटून पडली. मोगलांना आपला तोल सावरता आला नाही. मोगल सेनेने माघार घेतली. मोगलांचे चौदा हजार लोक आणि अनेक सरदार या लढाईत कामी आले.

आलेल्या अपयशाने मिर्झाराजांची झोप उडाली. या पराभवाचे कारण काय, हेही त्यांना कळत नव्हते. छावणीत मिर्झाराजे सचिंतपणे बसले असता संतप्त दिलेरखानाने डेऱ्यात प्रवेश केला. मिर्झाराजांनी मान वर करताच दिलेरखान उसळला,

‘राजाजी! आम्ही सांगत होतो, ते पटलं?’

‘काय?’

‘हा पराभव कुणामुळं झाला?- हा त्या शिवाजीचा डाव आहे, मिर्झाराजे! रजपूत म्हणून गय करायला गेलात, त्यानं बरोबर तोंडघशी पाडलं.’

‘दिलेरखान!’

‘खोटं वाटतं? शिवाजीला आघाडी दिलीत. त्यानं सरळ मोगली फौज आदिलशाहीच्या तोंडात दिली. राजे, ज्याचा भाऊ शत्रुपक्षाकडून लढतो आहे, त्याचं इमान काय तोलावं?’

‘कुणाचा भाऊ?’ मिर्झाराजांनी विचारले.

‘तुमच्या शिवाजीचा भाऊ! एकोजीराजे आदिलशाहीची फौज चालवितो आहे. मिर्झाजी,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हा बनलेला मामला आहे. उद्या चाल करून जा, म्हटलंत, तरी फौज आमचा विश्वास धरायची नाही.'

मिर्झाराजे सुन्न झाले. त्यांना काही सुचेना. दिलेरखान म्हणाला,

'राजाजी! एक सांगतो. ऐकाल?'

'सांगा, दिलेरखान!' मिर्झाराजे म्हणाले.

दिलेरखानाने आजूबाजूला कोणी नसल्याची खात्री करून घेतली. सेवकांना बाहेर घालविले आणि दिलेरखान म्हणाला,

'ही संधी चांगली आहे. शिवाजीचा काटा इथंच काढून टाका. गर्दीत हे काम सहज होऊन जाईल.'

मिर्झाराजे ताडकन उठले. ते उद्गारले,

'काय सांगता, दिलेरखान?...'

'गौर करो, मिर्झाजी! ही कामगिरी माझ्यावर सोपवा. आपल्यावर एवढाही शक व शुबा मी येऊ देणार नाही.'

'लानत है इस अंदाजे खयालपर. नामुमकिन!' मिर्झाराजे मुठी वळत म्हणाले.

'मिर्झाजी, होशवर या!' तेवढ्यात शांतपणे दिलेरखान म्हणाला. त्याच्या डोळ्यांत वेगळीच चमक उठत होती. तो सांगत होता, 'हा शिवाजी साधा नाही. त्याच्याजवळ शेरे बबरचा हौसला आहे. रेड्याची निर्भयता आहे. हा सलतनीचा काटा बादशहाला कधीच स्वस्थता लाभू देणार नाही. हा काटा काढलात, तर बादशहांना आनंद होईल.'

'खामोश!' मिर्झाराजे किंचाळले. त्यांचे सारे अंग थरथरत होते. मिर्झाराजे दोन पावले तसेच मागे हटले. दिलेरखानाकडे बोट करीत ते घोगऱ्या आवाजात म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘दिलेरखान! हम राजपूत हैं. शिवाजीराजाको हमने बैयत दी है. त्यांनी लढाईत बेइमानी केली नाही, याची मला खात्री आहे. जर राजांच्या जिवाला धोका झाला, तर... दिलेरखान, यह कभी न भूलना- राजाकी जानको अगर कुछ खतरा हुवा, तो हम तख्त और सलतनतका लिहाज न कर सकेंगें. कुछ इसपर भी गौर व फिकर करो.’

‘मिर्झाजी...’ ओठांवर जीभ फिरवीत दिलेरखान म्हणाला.

‘काही बोलू नका. फौज माझ्या हाती आहे. शहेनशहांचा विश्वास माझ्यावर आहे. दिलेरखान, परत असला विचार करू नका. ही आमची आज्ञा आहे. जा!’

दिलेरखान निघून गेला. मिर्झाजी थकून बैठकीवर बसले. एक विचार जन्माला आला होता. तो आता थांबणे कठीण होते. शिवाजीराजे मोगल फौजेत असुरक्षित होते. मिर्झाराजांना चैन पडेना. ते तसेच उठले आणि शिवाजीराजांच्या डेऱ्यात गेले. मिर्झाराजांना आलेले पाहताच सारे उठून बाहेर गेले. झालेल्या पराभवाने शिवाजीराजेही सचिंत बसले होते. मिर्झाराजे बसत म्हणाले,

‘राजासाब, दिसला नाहीत, म्हणून आम्ही आलो.’

‘राजाजी, आपल्याला तोंड दाखवायला जागा राहिली नाही, म्हणून मी आलो नाही.’ शिवाजीराजे म्हणाले.

‘लढाईत जय-पराभव हे चालायचेच. एखादी लढाई हरली, म्हणून पराभव होत नाही. राजे! तुम्ही निष्ठेनं लढला, हे मी पाहिलं आहे. त्याचं मोल मला अधिक आहे.’

‘मिर्झाजी! एक विनंती आहे.’

‘कसली?’

‘सेनेचं नेतृत्व दुसऱ्या कुणाकडे तरी द्या. मी त्यांच्या हाताखाली लढेन. मी केलेलं नेतृत्व साऱ्यांना रुचेल, असं वाटत नाही. मनातून बिथरलेली सेना त्वेषानं लढत नसते, राजाजी!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मिर्झाराजांना शिवाजीराजांचे कौतुक वाटले. न बोलताही त्यांना सारे कळत होते. मिर्झाराजे म्हणाले,

‘आता बदल करून चालणार नाही. बदल केला, तर आलेल्या अपयशाचं धनीपण सरळ तुमच्यावर येईल.’

दोघे विचारात पडले. राजे एकदम म्हणाले,

‘मिर्झाजी, एक सुचवू?’

‘सांगा ना!’

‘आपण मला स्वतंत्र मोहीम द्या. पन्हाळा भागाची मला माहिती आहे. तिकडे मला पाठविल्यास मी माझ्या फौजेच्या मदतीनं पन्हाळा काबीज करीन. त्या प्रांतात एवढा धुमाकूळ घालीन, की माझ्या बंदोबस्तासाठी आदिलशाहीला मोठं सैन्य पाठवावं लागेल.’

मिर्झाराजांना तो विचार पटला. त्यांनी एकदम मान्यता दिली. शिवाजीराजांच्या जीविताची जी काळजी वाटत होती, ती दूर झाली.

दोन-चार दिवसांत राजांनी आपली फौज गोळा केली. त्यांनी मिर्झाराजांचा निरोप घेतला.

राजे फौजेनिशी पन्हाळगडाकडे दौडले.

□

१७

पन्हाळ्याकडे जाताना शिवाजीराजांनी आपल्या फौजेच्या दोन तुकड्या केल्या. एका तुकडीचे नेतृत्व आपल्याकडे घेतले, आणि दुसरी तुकडी नेताजींच्या स्वाधीन केली. राजांनी नेताजींना सांगितले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नेताजी, आदिलशाही मुलूख मारीत तुम्ही आम्हांला पन्हाळ्याला येऊन मिळा. आजपासून पाचव्या दिवशी पन्हाळ्याच्या पायथ्याशी तुम्ही हजर व्हा. तुम्ही येताच पन्हाळ्यावर हल्ला करू.’

ठरल्याप्रमाणे राजे विजापूरकरांचा मुलूख बेचिराख करीत पाचव्या दिवशी रात्री पन्हाळ्याला पोहोचले. पुढे पाठविलेले हेर राजांना भेटले; पण नेताजींचा कुठे पत्ता नव्हता. राजांच्या जवळ अवघी दोन हजारांची फौज होती. कडाक्याची थंडी पडली होती. अंधूक चांदणे खोऱ्यात पसरले होते. सकाळ झाली आणि शत्रूला सुगावा लागला, तर? राजांनी हल्ला करायचे ठरविले. तानाजी-येसाजींनी त्या बोलाला साथ दिली आणि राजांनी चढाई सुरू केली. बिनबोभाट राजांचे सैन्य गडावर चढत होते.

अचानक गडावरचे पहारेकरी सावध झाले. गडावर एकच हाकाटी उडाली. सारे पहारे सावध झाले. गडावरचे सैन्य राजांच्या सैन्यावर तुटून पडले. कापाकापी सुरू झाली. अकस्मात झालेल्या हल्ल्याने बिथरलेल्या मराठ्यांनी माघार घेतली. जेवढे वाचले, तेवढे सैन्य गोळा करून राजे विशाळगडाच्या आश्रयाला धावले. या चकमकीत राजांचे एक हजार माणूस कामी आले. राजांना हा मोठा धक्का बसला.

पराजयाने संतप्त झालेले राजे विशाळगडावर विचार करीत होते. पुढे काय करावे, हे त्यांना सुचत नव्हते.

दुसऱ्या दिवशीची दुपार टळली आणि येसाजीने नेताजी येत असल्याची वर्दी आणली. त्या बातमीने राजांच्या नेत्री अंगार फुलले.

राजे नेताजींची वाट पाहत होते. नेताजी राजांचे सेनापती; खास विश्वासातले. घरचे, पण विश्वासाचे म्हणणे कठीण. अफझलवधाच्या वेळीही त्यांनी अशीच कसूर केली होती. माणसे सावरून घ्यायलादेखील मर्यादा असते. अकारण हजार माणसे गमावली. नेताजी वेळेवर आले असते, तर...

नेताजी सामारे आले. राजांनी विचारले,

‘नेताजी, ही दिरंगाई का झाली?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नेताजींना राजांचा संताप माहीत होता. आजवर हाक मारायची झाली, तर राजे नेताजींना 'नेताजी काका' म्हणून संबोधीत. नेताजींना धडगत दिसत नव्हती. ते म्हणाले,

'राजे, फक्त आठ प्रहरांचा उशीर झाला.'

'आठ प्रहर! नेताजी, निदान तुम्हांला तरी हे कळायला हवं होतं- युद्धात क्षणाचा विलंबही विनाशकारी ठरतो. आम्ही वेळेवर गडाखाली आलो; पण तुमचा पत्ता नव्हता. रात्र सरत होती. आम्ही गडावर चढाई केली. गड सावध झाला. तुमच्या निष्काळजीपणामुळं आमची हजार माणसं कामी आली. आम्हांला अपयश आलं. ह्याला जबाबदार तुम्ही!'

'मी?' नेताजींनी विचारले.

'नाही तर कोण?' राजे संतप्त झाले.

त्या नजरेने नेताजींचा थरकाप उडाला. ते म्हणाले,

'मी एकटा यायचा असतो, तर आलो असतो. पण फौज बरोबर होती. ती चालायला तर हवी!'

'बस्स करा, नेताजी! आमच्या सेनापतींना हे शब्द शोभत नाहीत.'

'कोण सेनापती?' नेताजी बोलून गेले.

राजांचे अंग जागच्या जागी ताठरले. ते ओरडले,

'काय म्हणालास?'

'राजे, राजे होता, तोवर फौज लढली; जीवमोलानं लढली. तुम्ही राजेपण गमावलंत. बादशहांचे सरदार तुम्ही. सेनापती मिर्झाराजे. सरदारांचा सेनापती असतो का?'

राजे थरथरत म्हणाले, 'नेताजी, शब्द मागे घ्या!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नेताजींना आवरण्यासाठी तानाजी धावला; पण नेताजींनी तानाजीला सरकावला. नेताजी म्हणाले,

'तुमच्यासारखे शब्द बदलायची सवय नाही मला. मराठ्याचा शब्द आहे.'

त्या शब्दांनी राजे बेभान झाले. दोन पावलांत त्यांनी नेताजींना गाठले. नेताजींची तलवार खसकन ओढून घेतली. ती जमिनीवर फेकीत राजे ओरडले,

'नेताजी! चालता हो! तुझ्यासारख्या घराबरोबर फिरणाऱ्या वाशांची मला गरज नाही. मी मस्तक मारायच्या आत चालता हो! जा ऽ ऽ'

सारा गड त्या गर्जनेने हादरला. राजांनी नेताजींकडे पाठ फिरविली. राजांचा एक जिव्हाळा हरवला.

❑

१८

पन्हाळगडाचा पराभव राजांच्या जिव्हारी झोंबला. राजांनी आपली फौज फोंड्याकडे वळविली. आदिलशाही किल्ला फोंडा हा जिंकूनच माघारी जायचे, असे राजांनी ठरविले. मराठी फौजांनी फोंड्याला वेढा घातला.

मिर्झाराजे विजापूरच्या लढाईत मार खाऊन परिंड्याला आले होते. विजापूरचे पाणी प्याल्याखेरीज मागे जायचे नाही, या प्रतिज्ञेने दिलेरखान सैन्याची आखणी करीत होता. चकमकी झडत होत्या. आदिलशाहीला मिळालेला नेताजी दिलेरखानाच्या सैन्यावर हल्ले करीत होता.

या पराभवातून कसे सावरावे, याचा मिर्झाराजे विचार करीत असतानाच एक अस्वस्थ करणारी बातमी तळावर आली- कुतुबशहा आदिलशहाला मिळाला होता. आदिलशहाचा जर पराभव झाला, तर मिर्झाराजे कुतुबशहावर धाड घालणार, हे कुतुबशहाने ओळखले; आणि त्याने आदिलशाहीचा पराभव वाचविण्यासाठी आपली पन्नास हजारांची फौज पाठवून दिली. त्या बातमीने मिर्झाराजे काळजीत पडले. त्यांनी तातडीने दिलेरखानाला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बोलावणे पाठविले. मोगलाई सरदारांच्या बरोबर मिर्झाराजे खलबत करीत होते. दिलेरखानाने सांगितले,

‘राजाजी, अजून अजीम आफतीची चाहूल आपल्याला लागलेली दिसत नाही.’

‘कसली आफत?’

‘शिवाजीचा उजवा हात नेताजी आदिलशाहीला मिळाला आहे.’

‘सुना है, नेताजी और राजामें कुछ गहरा फिसाद हुवा.’ मिर्झाराजे म्हणाले.

‘और आपने उसपर एतमाद किया.’ दिलेरखान हसून म्हणाला.

‘तुम्हांला काय म्हणायचं आहे? साफ साफ सांग ना!’

‘आम्ही कोण सांगणार?’ दिलेरखान छद्मी हास्य करीत म्हणाला. ‘आमचं ऐकतो कोण? राजाजी, ही शिवाजीची चाल आहे. विजापूरला आघाडी दिलीत; त्यानं शाही फौज नाहक खर्ची घातली. त्याला पन्हाळ्यावर पाठवलंत; तिथं त्यानं मार खाल्ला. आता, म्हणे, फोंड्याला वेढा घालून बसलाय्. राजाजी, शत्रूवर किती विश्वास ठेवावा, त्यालाही मर्यादा आहेत.’

‘दिलेरखान, काय सांगता?’

‘मै हकीकत बयान कर रहा हूँ. ज्या शिवाजीनं मूठभर माणसं हाती नसता गड काबीज केले, तो शिवाजी एवढी फौज असता शिकस्त घेतो? राजाजी, माझ्या शब्दावर विश्वास ठेवा. नेताजी आदिलशाहीला मिळाला; आणि पाठोपाठ एक दिवस शिवाजी पण आदिलशहाला मिळाल्याचं तुम्हांला ऐकू येईल.’

‘तसं घडलं, तर शिवाजीची गय केली जाणार नाही.’ मिर्झाराजे त्वेषाने म्हणाले.

दिलेरखान मोठ्याने हसत होता. सारे सरदार चकित होऊन दिलेरखानाकडे पाहत होते. मिर्झाराजे ओरडले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘दिलेरखान! हसायला काय झालं?’

दिलेरखान हसता-हसता थांबला. राजाजींच्या नजरेला नजर भिडवीत तो म्हणाला,

‘राजाजी! हसू नको, तर काय करू? बेअदबीची माफी असावी. शिवाजी आदिलशाहीला मिळाला, तर तुमच्या हाती काय राहील? कुतुबशाही, आदिलशाही आणि शिवाजी एक झाले, तर या मुलुखातून आपला एक शिपाईदेखील सुटायचा नाही. मग बदला कुणाचा घेणार?’

भर थंडीतही मिर्झाराजांचा जीव कासावीस झाला. दिलेरखान म्हणाला, ते अगदी खरे होते. मिर्झाराजांनी साऱ्यांना निरोप दिले. त्यांनी तातडीने दिल्लीला खलिता पाठविला-

> ‘...आता आदिलशहा कुतुबशहा एक झाले आहेत. तेव्हा कसेही करून शिवाजीचे मन आपल्याकडे वळवून घेतले पाहिजे. बादशहांची भेट घेण्याकरिता म्हणून त्याला उत्तरेकडे पाठवून देणे जरूर आहे...’

मिर्झाराजे दिल्लीच्या उत्तराची वाट पाहत होते. त्याच वेळी दिल्लीला शहाजहान बादशहा मृत्यू पावला. औरंगजेब खऱ्या अर्थाने बादशहा झाला.

फोंड्याच्या रुस्तुम जमाशी बोलणी करून फोंडा ताब्यात घेण्याची शिवाजीराजांची आशा होती; पण आदिलशाहीने पाठविलेल्या फौजेमुळे अचानक फोंड्याला कुमक मिळाली. फोंड्यालाही पराभव स्वीकारून राजांना माघार घ्यावी लागली. त्याच वेळी राजांना मिर्झाराजांचे तातडीने बोलावणे आले. राजे मिर्झाराजांना भेटले. मिर्झाराजे म्हणाले,

‘राजे, पराजयाचं वाईट वाटून घेऊ नका. तुम्ही तुमच्याकडून शर्थ केलीत, हे मला माहीत आहे.’

‘राजाजी, तुम्ही हे म्हणावं, यात तुमचा मोठेपणा आहे.’

‘मुळीच नाही.’ मिर्झाराजे म्हणाले, ‘राजे, आता साठीचं वय आलं. अनेक रणांगणांचा अनुभव घेऊन हे केस पांढरे झाले. लढाईतलं यशापयश दैवाधीन असतं, हे मला समजून चुकलं आहे. मी तुम्हांला बोलावलं, ते एक विनंती करण्यासाठी.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कसली विनंती?’

‘मान्य कराल?’ मिर्झाराजांनी विचारले.

‘मिर्झाजी, मला लाजवू नका. तुम्ही सांगाल, ते मी मान्य करीन.’

‘हे शपथपूर्वक सांगाल?’ मिर्झाराजांनी विचारले.

राजे क्षणभर अस्वस्थ झाले. दुसऱ्या क्षणी राजे त्याच निश्चयाने म्हणाले,

‘राजाजी! मीही राजपूत आहे. आमचा शब्द शपथेइतकाच मोलाचा असतो.’

‘राजाजी, आम्ही तुमच्या पराक्रमाची तारीफ दिल्लीला कळविली होती. त्यातच शहाजहान स्वर्गवासी झाले. औरंगजेब आता पातशहा झाले आहेत. आग्र्याला त्यांचा वाढदिवस मोठ्या थाटानं साजरा होत आहे. तुम्ही आणि युवराजांनी त्यांना भेटावं, अशी आज्ञा आली आहे.’

‘मी आणि संभाजीराजे?’

‘होय. बादशहांची मेहेरनजर आहे, तोवर तुम्ही त्यांना भेटावं, असं मला वाटतं. माझी खात्री आहे, बादशहा तुमचं प्रेमानं स्वागत करतील. तुम्ही दोघेही फर्मानाचे धनी झाला आहात. बादशहांची भेट घेऊन निष्ठा व्यक्त करणं हा रिवाजच आहे. तो तुम्ही पाळायला हवा.’

राजे विचारात पडले. औरंगजेबाच्या दरबारी जायचे! काही दगा झाला, तर? राजे म्हणाले,

‘राजाजी, हा सन्मान खरा; पण काही धोका झाला, तर...’

मिर्झाराजे राजांच्या जवळ आले. ते म्हणाले,

‘राजाजी, तुमची काळजी मला अधिक. मी सारा विचार केला आहे. तुम्ही मनात शंका

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आणू नका. तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही, हे मी वचन देतो. मी तुळशी हाती घेऊन तुमच्या जिवाची एकदा हमी घेतली आहे. त्याला मी बद्ध आहे. माझ्यावर विश्वास ठेवा.'

राजे म्हणाले, 'ठीक आहे. आम्ही जाऊ. तुम्ही सांगता, म्हणून जाऊ. आमचा आमच्यापेक्षा तुमच्यावर अधिक विश्वास आहे; पण मी हे का करावं, ते मला कळत नाही.'

मिर्झाराजे म्हणाले, 'राजासाब, जेवढं मला करता येणं शक्य होतं, तेवढं मी केलं. यापेक्षा मी काही करू शकत नाही; ते खुद्द बादशहाच करू शकतील. कुणास माहीत, कदाचित ते खूश होऊन तुम्हांला दक्षिणची सुभेदारी बहाल करतील. सुदैवानं तसं घडावं. तसं झालं, तर तुमचे मनोरथ आपोआप सिद्धीस जातील. यापेक्षा मला जास्त बोलता येत नाही.'

'ठीक आहे. नशिबाची परीक्षा पाहायला मी तयार आहे.'

मिर्झाराजांना आनंद झाला. राजांना त्यांनी दिलासा दिला, 'खुद्द बादशहांचा प्रतिनिधी म्हणून जानी बेग तुमच्याबरोबर येईल. मी रामसिंगाला स्वतंत्र पत्र लिहीत आहे. तो तुमची सारी व्यवस्था करील. वाटेत माझा विश्वासाचा माणूस तेजसिंह कछवाह थेट आग्र्यापर्यंत तुम्हांला सोबत करील. आम्ही सांगायचं विसरलोच- बादशहांनी तुम्हांस वाटखर्चासाठी एक लक्ष रुपये देऊ केले आहेत. तुम्ही जायची तयारी करा.'

राजे उठले. निरोप घेतेवेळी राजे म्हणाले,

'राजाजी, एक विनंती करावीशी वाटते- मी तुमच्या विश्वासावर हे धाडस करीत आहे; पण मी परमुलुखात असता माझ्या राहिलेल्या राज्याला धक्का पोहोचू नये.'

मिर्झाराजांनी एकदम शिवाजीराजांना हातांच्या मिठीत सामावून घेतले. राजांच्या पाठीवर थोपटीत मिर्झाराजे म्हणाले,

'राजे, तुम्ही निश्चिंत असा. तुमच्या मुलुखाला मी जराही धक्का लागू देणार नाही. तुम्ही सुरक्षितपणे परत येईपर्यंत मी दक्षिणेत तुमची वाट पाहत आहे. तुमच्या येण्याकडे माझी नजर लागून राहील.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी तातडीने मिर्झाराजांचा निरोप घेतला आणि राजे राजगडावर आले.

□

१९

'राजे! तुम्ही आग्र्याला जाणार?' जिजाबाई उद्गारल्या.

तो धक्का साऱ्यांनाच बसला होता. महालात मोरोपंत पिंगळे, सोनोपंत डबीर, जिजाबाई आणि राजे हे बसले असता राजांनी ती बातमी अगदी सहजपणे सांगून टाकली.

राजे स्मितवदनाने म्हणाले,

'मासाहेब? त्यात एवढं दचकायला काय झालं? औरंगजेब आता खरेखुरे शहेनशहा झाले आहेत. संभाजीराजे सहाहजारी मनसबदार बनले आहेत. आम्हीही फर्मानाच्या कृपेला पात्र झालो आहो. बादशहांनी प्रसन्न होऊन आम्हांला बोलावलं, त्यात आनंद मानायला नको का?'

'नाही त्या वेळी तुम्हांला थट्टा सुचते.' जिजाबाईंनी दटावले.

राजे या बोलांनी गंभीर बनले. राजांनी मन उघडे केले,

'मासाहेब, हिंदवी स्वराज्याचं स्वप्न आम्ही विसरलो नाही. त्याचमुळं हा निर्णय आम्ही घेतला. आज आहो, या परिस्थितीत आम्ही कितीही दिवस राहिलो, तरी ते स्वप्न हाताशी यायचं नाही. उलट, या संधीचा आम्ही फायदा घ्यायचं ठरविलं आहे.'

'कसला फायदा?' मोरोपंतांनी विचारले.

'फायदा आहे तर! जर खरोखरीच बादशहा प्रसन्न झाले, तर आम्हांला ते दख्खनची सुभेदारी बहाल करतील. दिल्लीदरबाराची मनसब घेऊन आम्ही मुलुखात आलो की, आपोआप मिर्झाराजांना शह सुटेल. बादशहा दिल्लीत सुखरूप बसतील आणि त्यांच्या नावाखाली इथलं राज्य पुरं उभं करता येईल. हा काय थोडा फायदा आहे?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सारे निरुत्तर झाले. जिजाबाईंचा जीव काळजीने पोखरून गेला. राजांचे सांगणे पटत होते; कळत होते. पण मातेच्या मनाची काळजी त्याने दूर होत नव्हती. त्या म्हणाल्या,

'राजे, पण धोका केवढा...'

'धोका मुळीच नाही. मिर्झाराजांनी शब्द दिला आहे. ते शब्दाचे सच्चे आहेत; त्यासाठी ते हवं ते करतील. त्याची आम्हांला खात्री आहे. मिर्झाराजांच्या शब्दाखातर तरी औरंगजेब आम्हांला जीवमोलानं जपेल. त्याला जपावंच लागेल. मिर्झाराजांना डावलणं औरंगजेबालाही पेलणार नाही. ती खात्री नसती, तर आम्ही होकार दिलाच नसता.'

सारे निरुत्तर झाले.

राजांना फार दिवसांची उसंत नव्हती. दुसऱ्या दिवशी राजे गडाबाहेर पडले. राजे आपल्या गडांना अचानक भेट देत होते. गडांची पाहणी करीत होते. किल्लेदारांना सांगत होते...

'हुशारीनं राहा. रात्रंदिवस जागता पहारा ठेवा. अकस्मात हल्ला आला, तरी न डरता हल्ल्याला तोंड द्या. मासाहेबांची आज्ञा होईल. ती काटेकोरपणे पाळा. आजवर जसे वागत आला, तसेच आम्ही आहो, असं समजून वागा. गड राखलात, तर तुमच्या गुणाचं चीज होईल. हेळसांड झाली, तर गय केली जाणार नाही.'

आपल्या मुलुखाचा कारभार नीट लावून राजे मोरोपंतांसह राजगडावर आले. राजांनी आपली सारी विश्वासातली माणसे गोळा केली. त्यांत येसाजी, तानाजी, प्रतापराव गुजर, फिरंगोजी नरसाळा, हिरोजी फर्जंद, निराजी रावजी, त्र्यंबक सोनदेव अशा साऱ्यांना बोलावून राजांनी राज्याची निरवानिरव केली. राज्याचा कारभार, मुखत्यारी जिजाबाईंच्या हाती सोपविली. मोरोपंत पिंगळे पेशवे, निळो सोनदेव मुजुमदार आणि नेताजींनंतर सेनापती बनलेले प्रतापराव गुजर यांना राज्यकारभार सांगितला. आरमाराचा सुभा दर्यासारंग दौलतखान आणि मायनाक भंडारी यांच्यावर सोपविला.

राजांची निरवानिरव पाहून अनेकांच्या डोळ्यांत पाणी आले. राजे युवराजांसह जाणार, या कल्पनेनेच जिजाबाई घायाळ बनल्या होत्या. वार्धक्याची सावली जिजाबाईंच्यावर पडली होती. जिजाबाई म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'राजा! अरे, तू नाहीस, संभाजी नाही, तर या कारभाराला काय करायचं?'

'हां, मासाहेब! असं म्हणू नका. आम्ही माघारी येऊ; सुखरूपपणे येऊ. पण आमच्यापेक्षा राज्य मोलाचं. ते टिकवायला हवं. जेव्हा आम्हांला कळत नव्हतं, तेव्हा सदरेवर बसून कारभार चालविणाऱ्या मासाहेबांची आज गरज आहे. ती उणीव तुम्ही भरून काढायला हवी.'

मोरोपंतांनी विचारले, 'राजे, आपल्याबरोबर...'

'ते सांगायचं राहिलंच. आमच्याबरोबर रघुनाथ कोरडे, त्र्यंबक सोनदेव डबीर, मदारी मेहतर, बाजी जेधे, निराजी रावजी, सबनीस ही मंडळी येतील. कवी परमानंदांनाही आम्ही बोलावलं.'

ज्यांची नावे घेतली, ते धन्य झाले. पण येसाजी, तानाजी, फिरंगोजी यांच्यासारखी मंडळी नाराज झाली. राजे म्हणाले,

'फिरंगोजी, इथं राज्य आहे. ते राखायला हवं. ते काम तुमचं. तानाजी, येसाजी, प्रतापराव, तुम्ही ही जबाबदारी पेलली पाहिजे. मासाहेबांना जपलं पाहिजे. गरुडाच्या नजरेनं मुलुखावर नजर ठेवा. सावधगिरीनं राहा.'

राजांनी साडेतीनशे माणसांची निवड केली होती. एकूण एक माणूस पारखून घेतला होता. त्यांत अनेक नजरबाज सामील करून घेतले होते. पालख्यांचे भोई आणि सामानाची वाहतूक करणारे यांतही माणसांची पारख झाली होती.

राजांना सोबत करण्यासाठी म्हणून नेमणूक झालेले जानी बेग आणि तेजसिंग कछवाह गडावर हजर झाले. प्रयाणाचा दिवस जवळ येत होता. जिजाबाईंनी शास्त्र्यांना विचारून मुहूर्त काढला होता. फाल्गुन शुद्ध नवमीला राजे निघणार होते. गडावरच्या सर्व दैवतांना अभिषेक झाले. राजवाड्यात सामानाची बांधाबांध चालू होती. संदुका, पेट्या भरल्या जात होत्या. संभाजीराजे प्रवासाच्या कल्पनेने आनंदले होते. मोठ्या उत्साहाने सारी गडबड ते पाहत होते.

राजांच्या महाली मनोहारी राजांचे कपडे संदुकीत भरत होती. सोयराबाई नजर ठेवीत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होत्या. सोयराबाई एक पेटी हाती देत म्हणाल्या,

'मनोहारी, टोपाच्या खणात ही पेटी ठेव. शिरपेच आहेत; पण स्वारींना सारं सापडेल का? आत्ताच कुठं काय ठेवलं, हे माझ्या लक्षात नाही.'

'महादेव आहे ना संगती.' मनोहारी म्हणाली, 'त्याला सारं समजावून सांगेन. खरं सांगू का, राणीसाहेब? त्यांना ह्या कपड्यांतलं काही कळत नाही. कपडे काढून द्यावेत, तेव्हा कळतं.'

'कपड्यांतलंच काय, पण संसारातलंही कळत नाही.' सोयराबाई निःश्वास सोडून म्हणाल्या.

त्याच वेळी कानांवर आवाज आला :

'छान बोलणी चाललीत तुमची!'

दोघी झटकन ताठ झाल्या. गडबडीने पदर घेतले गेले. राजे हसत आत आले.

'आडून ऐकलं, की निंदाच कानी पडते, याचं प्रत्यंतर आज आलं.'

दोघी लाजून हसल्या. दोघींच्याकडे पाहत राजे बोलले,

'आम्ही एवढा राज्याचा खटाटोप करतो; आणि आम्हांला साधं कपड्यांतलं कळत नाही?'

सोयराबाईंनी मान वर केली. त्या म्हणाल्या,

'मग सांगा पाहू, जाम्याचे आणि अंगरख्याचे किती जोड घालायचे? त्यांत जरीबुंदी किती, रंगीत किती, साधे किती, बंदाचे किती, आणि गोफाचे...'

'बस, बस, बस ऽ ऽ' राजे एकदम म्हणाले, 'आम्ही हरलो. जर आमचा महादेव एवढी उसाभर करीत असेल, तर आम्ही परत येताच त्याला मुजुमदार करून टाकू. असल्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

किचकट कामांत थकत असेल, तर सोपं काम देऊ.'

मनोहारी तोंडाला पदर लावून बाहेर गेली. महालात फक्त राजे आणि सोयराबाई राहिल्या. राजे सोयराबाईंच्या नजीक गेले. सोयराबाई राजांच्याकडे पाहत होत्या. त्यांचा गौर वर्ण, धिटाईची नजर, प्रभावी व्यक्तिमत्त्व पाहत राजे म्हणाले,

'राणीसाहेब, आम्ही जाणार, म्हणून वाईट वाटत नाही?'

'वाईट? ते कशासाठी? जाणं भाग आहे, म्हणून जाता.'

'हे साऱ्यांनाच कळत नाही.' राजे बोलून गेले.

'मला खोटं वागायला येत नाही.' सोयराबाई हसून म्हणाल्या, 'तसं पाहिलं, तर एरवीदेखील कुठं एका जागी राहणं होतं? आम्हां बायकांना त्याची सवयच असते.'

'तेही खरंच!' राजांनी होकार दिला.

'साऱ्यांनाच काळजी वाटते बाळराजांची. आपल्यापेक्षा का बाळराजे जास्त? भलतीच सोंगं करतात.'

सोयराबाई उत्साहाने बोलत होत्या. पण राजे कुठेतरी व्यथित होत होते. का, ते त्यांना कळत नव्हते. राजे सावरून हणाले,

'राणीसाहेब, आपण थोरल्या. आता मासाहेब थकल्या. तुम्ही आता दप्तरी लक्ष देत जा. मासाहेबांच्या बरोबर कारभाराला मदत करीत चला.'

'मासाहेबांना आवडलं, तर करीन की!'

'मी सांगेन.' राजांनी आश्वासन दिले.

'मी जाते.' म्हणून सोयराबाई थांबल्या. राजे नजीक गेले. त्यांनी सोयराबाईंच्या खांद्यावर हात ठेवले. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेब! काही हवं का?’

‘कसं सांगावं, तेच कळत नाही. उत्तरेला अत्तरं चांगली मिळतात, म्हणे. सवड झाली, तर आणावीत.’

राजे हसले. त्या हसण्याने दचकून सोयराबाईंनी विचारले,

‘माझं काही चुकलं का?’

‘छे! मुळीच नाही.’ राजे गडबडीने म्हणाले, ‘आपलं काम करण्यात आम्हांला आनंद वाटेल.’

‘पाहा हं! विसराल!’

‘आम्ही मुळीच विसरणार नाही. आमच्या साऱ्या प्रवासात एवढं एकच सुगंधी काम आहे. ते कसं विसरणार?’

सोयराबाई लाजल्या आणि क्षणात महालाबाहेर गेल्या.

राजांचे उसने हास्य जागच्या जागी विरून गेले.

दप्तरीची निरवानिरव करून झोपायला जाण्यास खूप उशीर झाला. दिवसाच्या श्रमांनी थकलेले राजे आपल्या महाली आले. समया तेवत होत्या. काही वाती विझल्या होत्या. राजांच्या डोळ्यांवर झोप तिष्ठत होती. राजे पलंगाकडे जात होते. राजांच्या पलंगाजवळ कोणीतरी बसले होते. राजांनी जवळ जाताच ओळखले,

‘कोण?’ राजांनी विचारले, ‘पुतळा?’

पुतळाबाई उभ्या राहिल्या. राजे जवळ गेले. पुतळाबाईंचा चेहरा आपल्याकडे वळवीत ते म्हणाले,

‘पुतळा, काय झालं?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुतळाबाईंना हुंदका फुटला. त्यांचे सारे अंग गदगदत होते. राजांनी पुतळाबाईंना जवळ घेतले. राजांचा हात पाठीवरून फिरत होता. राजे म्हणाले,

‘वेडी का तू? पूस डोळे. आम्ही परत येऊ. काळजी करू नको.’

पुतळाबाईंनी डोळे पुसले. राजे म्हणाले,

‘पुतळा, मी उद्या निघणार. तू भेटलीस, बरं झालं. मला विचारायचं होतं.’

‘काय?’

‘तुझ्यासाठी काय आणू?’

‘आणाल?’ पुतळाबाईंनी विचारले.

‘हो! सांग ना.’

‘माझी शपथ?’

‘तुझी शपथ! आता तर झालं?’ राजे पुतळाबाईंच्याकडे पाहत होते.

पुतळाबाईंची नजर उंचावली.

राजे म्हणाले,

‘सांगा ना.’

‘आपण सुखरूप यावं.’ एवढं बोलून पुतळाबाईंनी हुंदका दिला.

राजे सुन्न झाले. म्हणाले,

‘फार कठीण काम सांगितलंस, पुतळा! ठीक आहे. आम्ही जरूर ते पार पाडू; पण त्यालाही अट आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुतळाबाईंनी चमकून वर पाहिले. राजे हसत म्हणाले,

‘रडायचं नाही. उपवास तर मुळीच करायचे नाहीत.’

‘काहीतरीच!’

‘व्वा! काहीतरीच कसं? आम्ही शब्द पाळण्यासाठी यायचं, तेव्हा आपलं माणूस तरी दिसायला हवं ना!’

‘काही धाड होत नाही मला!’ पुतळाबाई म्हणाल्या, ‘जाते मी. रात्र फार झाली. दर्शन घेण्यासाठी थांबले होते.’

पुतळाबाई वळल्या. राजांनी हाक मारली,

‘पुतळा!’

‘जी!’ पुतळाबाई वळल्या.

‘एक काम करशील?’

‘आज्ञा!’

राजांचा आवाज घोगरा बनला. ते म्हणाले,

‘मासाहेबांचं वय झालं. थकल्यात त्या. त्यांना संभाळायला, धीर द्यायला कुणी तरी हवं. तू त्यांना जप. तुझ्यामुळं मी निश्चिंत राहीन. करशील?’

‘एवढा विश्वास टाकलात; सोनं झालं माझं!’ पुतळाबाईंना पुढे बोलवेना. त्यांनी क्षणभर राजांच्याकडे पाहिले; आणि त्या झरकन निघून गेल्या.

समईच्या उजेडात दिसलेल्या त्या नेत्रांच्या दर्शनाने राजांना केवढा धीर आला. तेच आठवीत राजे झोपी गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

२०

पहाटे स्नान आटोपून, पूजा करून, राजे महालात आले. मनोहारी तेथे उभी होती. राजांनी सांगितले,

‘मनोहारी, देवाच्या पेटीत माझं पूजेचं स्फटिकलिंग ठेव.’

‘जी!’

मनोहारीने देव्हाऱ्यातले स्फटिकलिंग उचलले, आणि राजांच्या पूजेच्या पेटीत ठेवले. राजे कुठेही गेले, तरी त्यांच्या बरोबर ते लिंग सदैव असे. मनोहारीने पेटी बंद केली. राजांनी विचारले,

‘मनोहारी, सामान गेलं?’

‘जी! सगळं सामान पहाटेच गडाखाली गेलं. मी जाऊ?’

‘हो!’

मनोहारी पुढे आली. चटकन तिने राजांचे पाय शिवले. नकळत राजांचा हात क्षणभर तिच्या मस्तकावर विसावला. मनोहारी उभी राहिली. तिचे अश्रूंनी भरलेले डोळे पाहताच राजे म्हणाले,

‘काळजी करू नको, मनू! आम्ही सुखरूपपणे परत येऊ. तुझ्यासारख्या अश्राप जिवाची आशा वाया जायची नाही. मासाहेबांना जपा.’

राजे महालातून खाली आले. संभाजीराजे जिजाबाईंच्या महाली हजर होते, दागिन्यांनी सजलेले. राजे बोलले,

‘शाही दरबारचा थाट दिसतो खरा!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बाळराजांचा हात धरून राजे देव्हाऱ्याजवळ गेले. जमिनीला मस्तक टेकून दोघे पाया पडले. राजे मासाहेबांच्या जवळ आले. परत त्यांचे मन भारावले. जिजाबाई घायाळ नजरेने पाहत होत्या. काही न बोलता राजांनी मासाहेबांच्या पायांवर मस्तक टेकविले. उठत असतानाच ते जिजाबाईंच्या कुशीत ओढले गेले.

'शिवबा ऽ ऽ' जिजाबाई उद्गारल्या.

राजे कष्टाने मिठीतून मोकळे झाले.

'मासाहेब, चिंता करू नका. आम्ही परत येऊ. बोलून चालून शत्रुघरात आम्ही जातो आहो. अनेक बातम्या उठतील. पण त्यांनी घाबरे होऊ नका. धीर घालवू नका. संभाळा.'

'पोराला जप.'

'काळजी करू नका, मासाहेब!' राजांनी सर्वांवरून नजर फिरविली, आणि राजे म्हणाले,

'येतो आम्ही.'

राजे वळणार, तोच जिजाबाई म्हणाल्या,

'राजे, थांबा!'

जिजाबाईंनी शाल आणली आणि राजांच्या हाती दिली.

'हे काय? शाल कशाला?'

'राजे! बाळराजे माझ्या जवळ झोपतात ना? त्यांची ही शाल!'

'पण उकाडा असणार!'

'या शालीखेरीज बाळराजांना चांगली झोप येत नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी शाल घेतली; आणि बाळराजांच्यासह ते महालाबाहेर पडले.

□

२१

राजे आपल्या सरंजामासह वाटचाल करीत होते. उन्हाळ्याची सुरुवात झाली होती. बाळराजे बरोबर असल्याने राजांचा प्रवास जरा धीमेपणाने चालला होता. राजांना वाटेतच औरंगजेबाचे फर्मान मिळाले :

> '...इकडील लोभ तुम्हांवर पूर्ण आहे. खातरजमेने यावे. म्हणजे भेटीअंती बहुत सत्कार पावून माघारे जाण्याविषयी निरोप दिला जाईल.'

सदर फर्मानाबरोबर राजांना खास पोशाख पाठविला होता. राजांना ते पत्र व पोशाख पाहून खूप समाधान वाटले. वाटेवर जेथे राजांचा मुक्काम पडत होता, तेथे मोगल अधिकारी सामोरे येत होते; राजांच्या कबिल्याला दाणा-पाणी पुरवीत होते. औरंगजेबाने आपले कुलफौजदार व महालमोकासे यांना तशी ताकीदपत्रे आधीच लिहिली होती. 'खुद्द शहाजादे यांच्याप्रमाणे अदब चालवावी,' असा औरंगजेबाचा सर्वांना हुकूम होता. त्यामुळे कष्ट न होता राजांचा प्रवास होत होता. राजे दरमजल करीत औरंगाबादेच्या नजीक आले.

शिवाजीराजा येतो आहे, हे कळताच साऱ्या औरंगाबादेचे कुतूहल जागृत झाले. राजे यायच्या दिवशी शिवाजीराजांना पाहायला रस्त्यावर हजारोंची गर्दी जमली. साऱ्यांचे लक्ष वेशीकडे लागले होते. तोवर हाकाटी उठली,

'आला... आला...'

औरंगाबादेच्या सुभेदाराचे स्वार दौडत नगरात प्रवेश करते झाले. 'हटो... हटो...' म्हणत ते दौडत रस्त्यावरून पुढे गेले आणि वेशीतून आघाडीचा हत्ती प्रवेश करता झाला. चांदीच्या दागिन्यांनी सजलेल्या त्या हत्तीच्या पाठीवर चांदीचा हौदा होता. त्या हौद्यावर शिवाजीचे भगवे निशाण फडकत होते. भगव्या निशाणावर जरीच्या कशिद्याने काढलेले सूर्यचंद्र नजरेत भरत होते. आघाडीच्या निशाणापाठोपाठ रक्षक स्वार येत होते. स्वारांच्या देखण्या घोड्यांची खोगिरेसुद्धा सुवर्णचांदीच्या जराने मढविली होती. स्वारांच्या मागे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रुबाबदार कपडे केलेले पायदळ येत होते. त्याच्या मागून खास पालखी येत होती.

राजे पालखीत बसले होते. सर्व पालखी नक्षीदार चांदीच्या पत्र्याने मढविली होती. पालखीचे खूर व कळस सुवर्णाचे होते. बाळराजांची तसलीच पालखी पाठीमागून येत होती. पालखीचे सर्व भोई एकाच वेशाचे होते. त्यांची तुर्की पागोटी लक्ष वेधून घेत होती. आपल्या दुडक्या चालीने पालखी तोलीत ते जात होते. दोन्ही पालख्यांबरोबर स्वार आणि सशस्त्र दल तळपत्या तलवारी, लांब नळ्यांच्या बंदुका घेऊन चालत होते. ऊन लागू नये, म्हणून झालरीची अब्दागीर धरलेले दोन सेवक पालखीमागून जात होते. त्या दोन पालख्यांच्या मागे राजांच्या खास माणसांच्या अनेक पालख्या, चांदीचे हौदे असलेल्या दोन हत्तिणी चालत होत्या. सामानांचे उंट, बैल येत होते, ते वेगळेच.

औरंगाबादेचे नागरिक राजांना निरखीत होते. गव्हाळ वर्णाचे देखणे स्वरूप पाहून नागरिक तृप्त होत होते. पाठीमागच्या पालखीतील बाळराजांनी आपल्या अप्रतिम देखणेपणाने साऱ्यांची मने काबीज केली. बाळराजांना पाहून अनेक हिंदू स्त्रियांनी उभ्या जागी कानशिलांवर बोटे मोडली.

औरंगाबादेचा सुभेदार सफशिकनखान मोठा मगरूर होता. शिवाजीराजांच्याबद्दल आलेले फर्मान त्यालाही पोहोचले होते. पण तिकडे दुर्लक्ष करून आपण स्वत: राजांच्या स्वागताला न जाता त्याने आपल्या पुतण्याला राजांच्या स्वागताला पाठविले. त्याच्या मते एका जमिनदार मराठ्याला एवढा मान पुष्कळ होता. खानाच्या पुतण्याने राजांचे वेशीत स्वागत केले, आणि सांगितले,

‘सुभेदार सफशिकनखानांच्या वतीनं मी आपलं स्वागत करतो. सुभेदारसाहेबांनी आपल्याला सुभेदारमहाली भेटण्याची विनंती केली आहे.’

राजे ऐकत होते. त्यांनी विचारले,

‘सुभेदार बीमार तर नाहीत?’

‘अल्लाच्या कृपेनं त्यांची तबियत ठीक आहे.’

‘तुम्ही आमच्या मुक्कामाची वाट दाखवा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपण सुभेदारांच्या घरी येत नाही?’ खानाच्या पुतण्याने विचारले.

‘नाही. आम्ही आमच्या मुक्कामावर जाणार आहोत.’

पालखी चालू लागली; सुभेदाराचा पुतण्या मार्ग दाखविण्यासाठी आपल्या स्वारांनिशी पुढे धावला. राजांच्यासाठी मोकळ्या केलेल्या शाही बागेतल्या महालात राजे पोहोचले. महालाभोवती राजांच्या इतर मंडळींकरिता तंबू, डेरे उभारले होते.

राजांना मुक्कामावर सोडून सुभेदाराचा पुतण्या सुभेदारांकडे धावला. सुभेदार आपले अधिकारी गोळा करून राजांची वाट पाहत होता. पुतण्याने घडलेला प्रसंग सांगितला. सुभेदार ते ऐकून थक्क झाला. ‘खुद्द शहाजादा येतो आहे, असे समजून राजांची बडदास्त ठेवावी,’ असे औरंगजेबाने फर्मान का काढले, ते सुभेदाराला समजले. चूक झाली होती. शिवाजीने वर कळविले, तर कदाचित इतराजी होण्याचा संभव होता. सफशिकनखानाची सारी घमेंड उतरली. सारे अधिकारी घेऊन तो शाही बागेकडे धावला. अत्यंत अदबीने त्याने राजांची भेट घेतली. नजराणे लावले. त्यांबद्दल राजांनी समाधान व्यक्त केले; एवढेच नव्हे, तर दुसऱ्या दिवशी सुभेदाराच्या घरी पाहुणचाराला येण्याचे राजांनी आनंदाने मान्य केले.

ठरल्याप्रमाणे राजे दुसऱ्या दिवशी सुभेदाराकडे गेले. राजांच्या विनयशील स्वभावाने साऱ्यांच्यावर राजांची छाप पडली. राजे काही दिवस औरंगाबादेस राहिले. राजांनी विश्रांती घेतली; आणि पुढचा प्रवास सुरू केला. सुभेदार शहराबाहेरपर्यंत राजांना पोहोचवायला आला होता.

हवा प्रसन्न होती. राजे आपल्या नजरेने सारा मुलूख न्याहाळीत होते. पालखी एका चालीने जात होती. बालराजे त्यांच्या पालखीबरोबर जाणाऱ्या हिरोजी फर्जंदला अनेक प्रश्न विचारून भंडावीत होते.

राजांच्या नजरेत दौलताबादेचा किल्ला दिसू लागला. नजीक येणाऱ्या किल्ल्यांवर राजांची नजर स्थिर झाली होती. सपाट मुलुखामध्ये तो किल्ला आपल्या ऐश्वर्याने उंचावला होता. खंदकांनी वेढलेला, ताशीव कड्यांनी सजलेला तो भव्य किल्ला राजांच्या नेत्रांचे पारणे फेडीत होता. हिंदूंची दुसरी शाही येथेच नांदली होती; कथाकीर्तनांत दंग झाली होती. एकावर एक टप्पे घेत चढलेल्या या किल्ल्याच्या शिखरावर फडकणारे हिरवे निशाण पाहून

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचे मन व्यथित झाले. विजयनगरच्या साम्राज्याची धूळधाण झाली. दौलताबादेच्या साम्राज्यावरून मोगली वरवंटा फिरला. केवढी वैभवसंपन्न साम्राज्ये नाश पावली! कुणामुळे का? राजांच्या मनात विचार आला... 'आपल्याही स्वप्नाची ही गत व्हायची नाही ना?' त्या विचाराबरोबर राजांचे अंग थरकापून उठले. एक नि:श्वास बाहेर पडला. दौलताबादेसमोर किल्लेदार राजांच्या स्वागतासाठी उभा होता. पण राजांनी तेथे मुक्काम केला नाही.

व्यथित राजांच्या कानांवर धक्का देणारी बातमी आली. नेताजी आदिलशाही सोडून मिर्झाराजांना मिळाले होते. औरंगजेबाने त्यांना पाचहजारी मनसब देऊ केली होती. त्या बातमीने राजे दु:खी बनले होते. बराच वेळ काही न बोलता विचार करीत होते.

भल्या पहाटे राजांनी मुक्काम हलविला. राजे निराजीपंतांना म्हणाले,

'पंत, वाटेत घृष्णेश्वर दैवत लागतं- आम्हां भोसल्यांचं कुलदैवत. तिथं एक मुक्काम करावा, असं वाटतं.'

'चांगली इच्छा आहे, राजे!' निराजीपंतांनी मान डोलविली.

काही शिबंदीचे स्वार घृष्णेश्वराकडे दौडले.

घृष्णेश्वरमंदिर जसे जवळ येऊ लागले, तसे राजे अधीर बनले. पालखी थांबविली गेली. राजे पायउतार झाले. बाळराजांना ते म्हणाले,

'बाळराजे, इथून घोड्यावरून जावं, असं आमच्या मनात आहे. तुम्ही येणार?'

'येऊ ना, आबासाहेब!'

घोडी आणली गेली. गर्द राईने सुशोभित झालेले डोंगर, गार वारा यांमुळे साऱ्यांची मने प्रसन्न होती. तेजसिंह कछवाह राजांच्या जवळ आला. तो म्हणाला,

'राजासाब, बादशहांची ही आवडती जागा. औरंगाबादेला जेव्हा शहेनशहा सुभेदार होते, तेव्हा नेहमी इथं छावणी करीत. ही जागा फार आवडली, असं म्हणत.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी सभोवार नजर फिरविली, आणि ते म्हणाले,

‘खरोखरीच चांगली जागा आहे. पण, तेजसिंहजी, जागा उगीच आवडत नाही. त्या जागेचं काही तरी नातं असावं लागतं. तेव्हाच अशी ओढ असते.’

‘आम्ही समजलो नाही.’ तेजसिंह म्हणाला.

‘आम्हांला तरी कुठं माहीत आहे? या जागेशी बादशहांचा काही तरी ऋणानुबंध असावा, असं उगीच आम्हांला वाटलं. चल...’

डोंगरपायथ्याला वसलेल्या घृष्णेश्वराचा कळस दिसू लागला. हीच ती भोसल्यांची पुण्यभूमी; भोसल्यांचे कुलदैवत. राजांनी बालराजांच्यासह देवदर्शन घेतले. घृष्णेश्वराला अभिषेक केला. दान केले. घृष्णेश्वराच्या परिसरात राजांचे मन तल्लीन झाले. पूजा आटोपून जेवणे व्हायला दोन प्रहर झाली. राजे बालराजांच्यासह देवळाच्या फरशीवर बसले होते.

निराजीपंत सोवळे बदलून आत आले. राजे निराजीपंतांना म्हणाले,

‘पंत, खूप बरं वाटलं, नाही?’

‘जागाच तशी आहे. स्वयंभू स्थान आहे ना!’ निराजीपंत सांगत होते. ‘राजे, येथून जवळच डोंगरात फार देखण्या गुहा आहेत, म्हणे!’

‘जवळ असतील, तर पाहू या ना!’ राजे म्हणाले.

‘पण तेथे वन्य श्वापदांची वस्ती असते, असं म्हणतात.’

‘मग काय ती खातात, की काय?’ हिरोजी फर्जंद म्हणाला. ‘चार पलोते संगं घेतले, की झालं.’

‘चला, बाळराजे!’ म्हणत राजे उठले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गर्द राईने माखलेल्या जंगलाकडे सारे चालत होते. घृष्णेश्वराचा वाटाड्या वाट दाखवीत होता. रानातली नाना रंगांची पाखरे बाळराजांचे लक्ष वेधून घेत होती. डोंगराची चढण लागली. वाट गर्द सावलीतून येत होती. सूर्य माथ्यावर असूनही सूर्याचे किरण जमिनीवर पडत नव्हते आणि एकदम झाडी संपली. न कळत साऱ्यांची पावले थांबली. समोरचे दृश्य अवाक करणारे होते. चारी बाजूंनी जंगल तुटले होते; आणि कड्यांतून कोरलेल्या गुहा नजरेत येत होत्या. लक्ष खिळत होते मोठ्या गुहेवर. गुहेच्या द्वारी अजस्र कोरीव हत्ती उभे होते. वाटाड्या म्हणाला,

'ते कैलासमंदिर! तेवढंच मोकळं आहे. बाकीच्या गुहांच्या वाटा खराब झाल्यात. पण सर्व गुहांत हेच बघण्यासारखं आहे.'

जसजसे राजे नजीक जात होते, तसतशी कैलासाची भव्यता नजरेत भरत होती. कैलासाच्या दरवाज्यावरील द्वारपालदैवते पाहत राजे मंदिरप्रवेश करते झाले. जिकडे पाहावे, तिकडे भव्य शिल्पे उभी होती. समोरच्या शिल्पाकडे राजे पाहत राहिले. कैलासावर पार्वती श्रीशंकराच्या मांडीवर बसलेली. बाजूला सर्वजण उभे आणि कैलास हलविण्याच्या प्रयत्नात गढलेला रावण. न कळत राजांचे हात जोडले गेले. राजे उद्गारले,

'धन्य तो तपस्वी रावण! आईच्या पूजेसाठी खुद्द कैलासाला हात घालण्याचं त्याचं धारिष्ट. हे कोण कलावंत, की ज्यांचे हात एवढी कुशल कारागिरी करण्यात समर्थ होते?'

'फार पूर्वी श्रमण, यती, मुनी, यक्ष, गंधर्व आणि हिंदू साधू यांनी विश्वकर्म्याच्या मदतीनं ही शिल्पं कोरली, असं म्हणतात.' वाटाड्याने सांगितले.

'साधुत्वाखेरीज हे भाव उमटतील कसे?' राजे बोलून गेले. 'व्वा! निराजीपंत, इथं आम्हांला आणून जीवनाचं सार्थक केलंत. आज आम्ही धन्य झालो!'

भारावलेल्या मनाने राजांनी सर्व मंदिर पाहिले. केव्हा वेळ गेला, तेही कळले नाही. सूर्यास्त झाल्याची जाणीव राजांना देण्यात आली. राजे मंदिरातून बाहेर पडले. घृष्णेश्वराजवळ राजे आले, तेव्हा चांदणे फाकले होते. हवेत गोड गारवा होता. भोजन करून सारे उघड्यावर झोपले. राजांच्या शेजारी बाळराजांची गादी होती. बाळराजे केव्हाच झोपी गेले होते. देवळाच्या अंगणात शेकोटी पेटली होती. चारी बाजूंना पहारे होते. देवळाच्या पूर्वेला कछवाह, बेग आपल्या माणसांसहित विश्रांती घेत होते. राजे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आकाशातल्या चंद्राकडे पाहत होते. चाहूल लागताच त्यांनी विचारले,

‘कोण?’

‘जी! मी मदारी.’

‘ये. झोपला नाहीस?’

पंधरा-सोळा वर्षांचा मदारी राजांच्या जवळ आला. काही न बोलता तो पायांशी बसला. राजांचे पाय चेपण्यात मदारी गर्क झाला. राजांच्या डोळ्यांसमोरून मात्र कैलास हलत नव्हता.

□

२२

प्रवासाच्या दिवसांबरोबर उष्मा वाढत होता. माणसांचा वेष, भाषा बदलत होती. मोगली भाषा सर्वत्र ऐकू येत होती. राजे लक्ष देऊन ती भाषा ऐकत होते. राजांना मुसलमानी बोली येत होती. पण राजे आता त्या भाषेच्या सफाईकडे लक्ष देत होते. वाढत्या उन्हामुळे भल्या पहाटे प्रवास सुरू करावा लागे. दोन प्रहरी विश्रांती घेऊन उन्हे कलल्यावर परत प्रवास सुरू होई, तो सूर्यास्तापर्यंत. तरीही प्रखर उन्हाने अंगाची लाही होत होती. माकणीचे उंट बरोबर असूनही पाणी पुरत नसे, इतका घशाला शोष पडे.

राजे अशीरगडला पोहोचले. अशीरगडचा किल्लेदार राजांना सामोरा आला. त्याने प्रेमभराने स्वागत केले. त्याने राजांचा मोठा सत्कार केला. राजे अशीरगडाकडे पाहत होते. हाच तो अशीरगड, की जो ताब्यात आल्यानंतर आनंदाने बेहोश झालेला अकबर म्हणाला होता,

‘अशीरगड जिंकून आज मी दक्षिणेचा दरवाजा उघडला आहे!’

निरोप देताना अशीरगडचा किल्लेदार म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'राजासाब! तुम्हांला भेटायला जीव आतुरला होता. तुमच्या भेटीनं एक मुराद पुरी झाली. यापुढं आपण बादशहांची सेवा करू की, औलाद व अफलाद.'

अपमान राजांची पाठ सोडीत नव्हता. शाही दरबारात बादशहांच्या भेटीला जाताना इतमामास साजणारा सरंजाम पेलणार नाही, म्हणून बादशहांनी एक लाख रुपये देऊ केले होते आणि आता अशीरगडचा किल्लेदार त्या तख्ताची वंशपरंपरेने सेवा करण्याचे आवाहन करीत होता. कष्टी मनाने राजांनी अशीरगड सोडला.

ग्वाल्हेरचा राजा मानसिंग याचा किल्ला राजांच्या मनात घर करून राहिला. डौलदार भव्य बुरुजांची रांग भक्कमपणाबरोबरच किल्ल्याच्या सौंदर्यातही भर घालीत होती. ते मनोरे पाहून राजांना उगीचच असे मनोरे आपल्या किल्ल्यांवर असावेत, असे वाटले.

आग्रा नजीक येत होता. दैवी काय लिहिले आहे, याची राजांना चिंता वाटत होती. उन्हाळा निखारा ओतीत होता.

नर्मदा, चंबळ पार करून राजे आग्र्यानजीक आले. राजांच्या आगमनाची वार्ता कळवायला जानी बेगचे स्वार पुढे गेले होते. राजे आपल्या सरंजामासह दोन प्रहरी आग्र्यापासून एका मजलेवर दाखल झाले. शाही दरबारचा कुणीतरी मोठा सरदार, वजीर आपल्या स्वागतास येईल, अशी राजांची अपेक्षा होती. समोरून येणाऱ्या पथकाकडे लक्ष गेले. एक राजपूत स्वार व त्यांच्या मागून येणारे चार घोडेस्वार राजांना सामोरे आले. काही अंतरावर आघाडीचा राजपूत पायउतार झाला. त्याने अदबीने मुजरा केला.

'राजासाब, कुमार रामसिंगांनी आपल्या स्वागतासाठी पाठविलं आहे.'

'आपली तारीफ?' राजांनी विचारले.

'नाचीजला मुनशी गिरधरलाल म्हणतात.'

राजांना हसावे, की रडावे, हे समजेना. आपल्या स्वागतासाठी एक सामान्य कारकून येतो!

राजांची नाराजी गिरधरलालने चटकन ओळखली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजासाब, गैरसमज न व्हावा. खुद्द रामसिंगच येणार होते; पण आजच ते शाही पहाऱ्याच्या कामावर गुंतले आहेत. त्यांचा नाइलाज झाला. आपण इतराजी न होता कृपावंत होऊन मुक्कामी चलावं. रामसिंगांना मोकळीक मिळताच रिवाजाप्रमाणे ते आपल्याला सामोरे येतील.’

‘बादशहांचा दरबार उद्याच ना?’

‘जी!’

राजांनी गिरधरलालची विनंती मान्य केली.

आग्रा शहरात गिरधरलालसह राजांनी प्रवेश केला. सायंकाळ होत होती. मनस्वी उकाड्याने राजे थकले होते. राजांची उतरण्याची सोय मुलुकचंदाच्या सराईत केली होती. त्या सराईत राजे रात्र घालविणार होते. सकाळी रामसिंगांबरोबर राजे त्यांच्या खास मुक्कामावर जाणार होते. सराई चांगली होती. सर्व व्यवस्था चोख होती; पण आग्राप्रवेशातच आपल्या सामोरे कोणी मातबर येऊ नये, हे चिन्ह राजांना बरे वाटले नाही. हे त्यांच्या मनाला लागले.

भल्या पहाटे स्नान आटोपून, पूजा करून, राजे सूर्योदयाला बाळराजांच्यासह तयार होऊन रामसिंगांची वाट पाहत बसले. अनेक अश्वपथके आग्र्यात प्रवेश करीत होती. बाळराजे सराईतून त्या मिरवणुका पाहत होते. वाढत्या क्षणाबरोबर राजांची अस्वस्थता वाढत होती.

□

२३

आग्रा शहराला यक्षनगरीचे स्वरूप प्राप्त झाले होते. शहराबाहेर जिकडे पाहावे, तिकडे खास समारंभासाठी आलेल्या सरदारांच्या छावण्या पसरल्या होत्या. औरंगजेब साध्या राहणीचा होता, तरी या समारंभाच्या ऐश्वर्यात यत्किंचितही उणीव पडू नये, यासाठी तो खबरदारी घेत होता. आजवर झाला नाही, असा भव्य समारंभ करण्याचे त्याने ठरविले. या हेतूमागे मोठे राजकारण होते. शहाजहान नुकताच मेला होता. कायदेशीरपणे आता

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

औरंगजेब सिंहासनावर बसणार होता. हे राज्य मिळविण्यासाठी जो खटाटोप करावा लागला, त्यात औरंगजेबाला पुष्कळ दुष्कीर्ती सहन करावी लागली. बापाला कैदेत टाकल्याने जुने सरदार नाखूश बनले होते. भावांची बंडे मोडून, त्यांना देहांत शासन देऊन, औरंगजेब तख्तावर आला होता. ज्यांनी त्या बंडखोर भावांना साथ दिली, त्यांनाही औरंगजेबाने शासन केले होते. राज्यावर बसण्यासाठी उतावीळ असलेल्या औरंगजेबाला कैदेतल्या बापाच्या मृत्यूची वाट पाहत बसणे असह्य होऊन, त्याने विषप्रयोगाने बापाचा अंत केला होता. या सर्व गोष्टींची वदंता दरबारात पसरली होती. ही दुष्कीर्ती पुसून जावी, या पन्नासाव्या वाढदिवसाच्या, सिंहासनारोहणाच्या प्रसंगी सर्व सरदारांना खूश करावे, या हेतूने हा भव्य दरबार औरंगजेबाने योजिला होता. त्यासाठी दिल्लीचे जगद्विख्यात तख्ते ताऊस म्हणजेच मयूरसिंहासन त्याने आग्र्याला आणवून घेतले होते. याच दिवाण-इ-आम-च्या दरबारात शिवाजीची भेट घेण्याचे त्याने ठरविले होते. त्यामुळे आपोआप शिवाजीला बादशहाचे सामर्थ्य कळणार होते, आपली स्वत:ची लायकी समजणार होती.

शिवाजीराजांना सामोरे जाण्यासाठी औरंगजेबाने कुमार रामसिंग आणि मुखलिसखान यांची नेमणूक केली होती. ज्या दिवशी राजे आग्र्याजवळ येऊन पोहोचले, त्याच दिवशी रामसिंगाचा हफ्तचौकीचा दिवस आला. आठवड्यातून एक दिवस खुद्द बादशहांच्या निवासस्थानावर पहारा करण्याचा तो दिवस. त्यामुळे रामसिंग अडकून पडला. नाइलाजाने त्याने गिरधरलालला राजांच्या स्वागतास सामोरे पाठविले. दरबारच्या गडबडीत गुंतलेल्या औरंगजेबाच्याही ते ध्यानी आले नाही. गिरधरलालने राजे सराईवर आल्याची वर्दी दिली; पण रामसिंगाला हलता येत नव्हते. दुसऱ्या दिवशी दरबार होणार होता. रामसिंगाने गिरधरलालला राजांची समजूत काढून सकाळी दरबाराकडे आणायला सांगितले. शाही पहाऱ्याच्या कामातून सुटका होताच आपण राजांना सामोरे येत असल्याचे कळविले. गिरधरलाल राजांना आणण्यासाठी सराईवर गेला.

सकाळी गिरधरलाल राजांना आणण्यासाठी गेला. नुसत्या गिरधरलालला पाहून राजांना संताप आला. गिरधरलालने सर्व परिस्थिती सांगितली. विनवणी केली,

'राजासाब, दरबाराची धामधूम चालू आहे. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही. कुमार रामसिंग कामात गुंतलेत. दरबार सुरू होण्याची वेळ आली आहे. मनात विकल्प न आणता आपण चलावं. कुमार कदाचित आपणांस वाटेतच भेटतील.'

राजांनी संताप आवरला. दक्षिणेतून आपण इथवर आलो. एवढ्याशा गोष्टीने सारे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बिघडविण्यात अर्थ नाही, हे त्यांनी जाणले.

सूर्य चांगलाच वर आला होता. उष्मा जाणवू लागला होता. राजांनी नजराण्याचे साहित्य बरोबर घेतले. संभाजीला बरोबर घेऊन राजे आपल्या इतमामासह घोड्यावरून निघाले. गिरधरलाल मार्ग दाखवीत होता. आपल्या ऐश्वर्यासह जाणाऱ्या ह्या मराठा राजाकडे सारे कौतुकाने पाहत होते.

दैव वेगळे असले, की केलेल्या साध्या गोष्टींनादेखील वेगळा अर्थ प्राप्त होतो. धरलेले मार्गही चुकतात. शिवाजीराजांना आणण्यासाठी गिरधरलालला पाठविताना त्यांनी कोणत्या रस्त्याने यायचे, हे सांगायला रामसिंग विसरला. पहाऱ्यावरून सुटका होताच रामसिंग व मुखलिसखान फिरोझा बागेवरून राजांच्याकडे येत होते, आणि त्याच वेळी गिरधरलाल मुनशी दहारआरा बागेवरून राजांना घेऊन जात होता. जेव्हा कुमार रामसिंगाला कळले की, शिवाजी दहारआरा बागेवरून जात आहे, तेव्हा त्याने आपले सेवक डुंगरमल चौधरी व रामदास रजपूत यांना राजांना फिरोझा बागेच्या रस्त्यावरून आणण्यास पिटाळले. त्या दोघांनी पुढे जाऊन राजांची वाट बदलली. राजांना बाजारपेठेतून कुंवरच्या तळाकडे आणले; आणि नूरगंजबेगापाशी त्यांची गाठ पडली.

राजांच्या शेजारी कुंवरसिंग होता. त्याने रामसिंगाची ओळख करून दिली. रामसिंगालाही शिवाजीचा परिचय करून दिला. आकाशात ऊन तळपत होते आणि आग्र्याच्या भर बाजारात या दोघांची भेट होत होती. दोघेही घोड्यावर स्वार होते. रामसिंगाने आपला घोडा नजीक आणला आणि घोड्यावरूनच त्यांनी एकमेकांना आलिंगन दिले.

राजे तसेच मुखलिसखानाला भेटले. राजांच्या बरोबरचा लवाजमा पाहून रामसिंग म्हणाला,

‘राजासाब! पुढे भीड फार आहे. माझ्या तळाशेजारीच आपला तळ उभा आहे. हत्ती तळावर जाऊ देत. दरबारची वेळ झाली आहे. उशीर करून चालायचं नाही.’

राजांनी मान्यता दिली. कुमार रामसिंग, मुखलिसखान यांच्यासह राजे जात होते.

तांबड्या फत्तरांनी, नक्षीदार चबुत्र्यांनी सजलेली लाल किल्ल्याची इमारत मोगली ऐश्वर्याची साक्ष देत होती. रामसिंगासह शिवाजीराजांनी किल्ल्यात प्रवेश केला. खास कपडे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

केलेले शस्त्रधारी पहारेकरी आपल्या जागरूक नजरेने प्रत्येक येणाऱ्या इसमावर लक्ष ठेवीत होते. प्रवेशद्वाराच्या अधिकाऱ्याने रामसिंगाची खातरजमा करून घेताच राजे लाल किल्ल्यात प्रवेश करते झाले. राजे पायऱ्या चढून वर गेले. आजूबाजूला नजर टाकण्याची उसंत राजांना नव्हती. राजे जात असता नगाऱ्याचा आवाज घुमला आणि रामसिंगाने भरभर चालण्याची विनंती राजांना केली. दिवाण-इ-आम-च्या समोरील उद्यानात नानाविध तऱ्हेच्या वेषांत उभे राहिलेले सरदारांचे घोळके पाहताच रामसिंगाने दिवाण-इ-आम-चा खास दरबार संपल्याचे ओळखले. ज्या दरबारी हजर राहण्यासाठी मिर्झाराजांनी राजांना पाठविले होते, एवढ्या लांबचा प्रवास घडविला होता, तो दरबार संपला होता. दिवाण-इ-आम-चा दरबार संपवून औरंगजेब आपल्या सल्लागृहात म्हणजेच दिवाण-इ-खास-मध्ये गेला होता. रामसिंगाने शिवाजीराजे आल्याची वर्दी वजीर जाफरखानला कळविली. शिवाजी आल्याचे कळताच औरंगजेबाने असदखान बक्षीला राजांना भेटीसाठी पुढे घेऊन येण्यास सांगितले.

राजे संभाजीराजांच्यासह बादशहाच्या बोलावण्याची वाट पाहत उभे होते. असदखानाने रामसिंगाला बादशहांची आज्ञा सांगितली आणि रामसिंग राजांच्या सह दिवाण-इ-खास-मध्ये गेला. प्रखर उन्हातून गेल्यामुळे दिवाण-इ-खास-मध्ये प्रवेश करताच तिथल्या मंद प्रकाशामुळे क्षणभर राजे दाराशीच थांबले. आतले दृश्य नजरेत आले.

दिवाण-इ-खास-च्या प्रशस्त महालात औरंगजेब भरजरी बैठकीवर बसला होता. बाहेरचा उष्मा भासू नये, म्हणून दिवाण-इ-खास-च्या चारी बाजूंच्या कमानींवर वाळ्याचे पडदे सोडले होते. त्यांवर सतत बाहेरून गार पाण्याचा शिडकावा होत असल्याने महालात वाळ्याचा सुखविणारा सुगंध दरवळत होता. औरंगजेबामागे सशस्त्र रक्षक उभे होते. दोन दासी वारा ढाळीत होत्या. बसल्या जागेवरून औरंगजेब नजर फिरवीत होता. दरबारात अगदी निवडक - बादशहांच्या खास मर्जीतले लोक हजर होते. वजीर जाफरखान जसा त्यांत होता, तसाच औरंगजेबाचा नातलग म्हणून जसवंतसिंगही हात बांधून, नजर जमिनीवर खिळवून उभा होता. औरंगजेबाच्या अंगावर अत्यंत भारी, हिरवी फुले व जरीचे बुंदके काढलेला मलमली अंगरखा होता. कमरेच्या श्वेत कमरबंदावर रेशमी जरीकाम केलेले होते. मस्तकावरचा किमॉष सोनेरी जरामुळे झगमगत होता. किमॉषच्या मस्तकपट्टीवर अत्यंत तेजस्वी असे मोठे हिरे लखलखत होते. गळ्यात टपोऱ्या मोत्यांचे सर रुळत होते. ज्याच्या साधेपणाची ख्याती राजांनी ऐकली होती, ते साधेपण निरखीत राजे उभे असता जाफरखान सामोरा आला. राजे त्याच्या पाठोपाठ पुढे सरकले. औरंगजेब शिवाजीराजांना निरखीत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होता.

किंचित ठेंगणी, पण आपल्या पुरुषी सौंदर्याने भारून टाकणारी राजांची मूर्ती जवळ येत असताना औरंगजेब पाहत होता. राजे औरंगजेबासमोर उभे राहिले. मागून आलेल्या सेवकाने नजर पुढे केली. राजांनी एक हजार मोहरा, दोन हजार रुपये नजर व पाच हजार रुपये निसार दिली. राजे थोडे मागे सरले. संभाजीराजे पुढे सरले. त्यांनी पाचशे मोहरा व हजार रुपये नजर दिले; दोन हजार रुपये निसार दिली. दोघांनी शाही रिवाजाचे मुजरे केले.

राजे उभे होते; पण औरंगजेब काही बोलला नाही. दिवाण-इ-आम-च्या दरबाराने थकलेला औरंगजेब गिर्दीवर रेलून राजांकडे पाहत होता. राजांना अवघडल्यासारखे झाले. वजिराने राजांना खुणावले आणि जसवंतसिंगाच्या पाठीमागे राजांना उभे केले. शेजारी संभाजी, रामसिंग उभे राहिले. राजांचा संताप वाढत होता. त्याला पायबंद घालण्याचा राजे प्रयत्न करीत होते. सर्वांना विडे दिले. राजांना विडा मिळाला; पण खिलत मात्र पातशहाजादे, जाफरखान व जसवंतसिंग यांनाच मिळाली.

मिर्झाराजांच्या भेटीपासून राजांचे अपमान होत होते. त्या सर्व अपमानांचा हा कळस होता. सुभेदारी राहिली बाजूला; पण साधी खिलतही मिळू नये? दरबारी बोलावले, ते याच अपमानासाठी? जसवंतसिंगाला खिलत मिळते... त्याचा सन्मान होतो! कशाबद्दल?

राजे दिलगीर झाले. उभ्या जागी त्यांच्या अंगाला कापरा सुटला. डोळे लाल होऊन अश्रूंनी भरले. राजांनी विचारले,

‘रामसिंग, माझ्यासमोर कोण उभा आहे?’

केवढा मोठा आवाज! बादशहा असता उभं राहायचं, ते नजर दर कदम जमिनीला खिळवून; बोलायचंच झालं, तर बादशहांच्या अनुज्ञेनं; आणि तेही नजर वर न करता, तोंडाला रुमाल लावून! आणि हे मोकळे शब्द आले कोठून?

रामसिंग कुजबुजला,

‘राजा जसवंतसिंग!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नाव ऐकताच वीज कडाडली, 'हं:! हा जसवंतसिंग... ज्यानं माझ्या सैन्याकडून मार खाल्ला, माझ्या सैन्यानं ज्याची पाठच पाहिली! त्याच्या मागे मी उभा!'

रामसिंग घाबरला. हाताने तो राजांना शांत राहण्यास खुणावीत होता. ज्याने राजांचा राग आणखीन भडकला.

'हम बरदाश्त नहीं कर सकते!'

रामसिंगने राजांचा हात धरला. तो झिडकारीत राजे ओरडले,

'कभी नहीं!'

राजांनी सरळ औरंगजेबाकडे पाठ फिरविली आणि राजे तडक दिवाण-इ-खास-च्या बाहेर गेले. पाठोपाठ संभाजीराजे धावले. सारा दरबार स्तिमित झाला. रामसिंग बादशहाला मुजरा करून, पाठ न दाखविता बाहेर गेला. राजांना बाहेरच्या फरशीवर उभे राहणे अशक्य होऊन बसले होते. त्यांनी आपले मस्तक दोन्ही हातांत धरले होते. डोळ्यांत अंगार पेटला होता. रामसिंग धावला. तो म्हणाला,

'राजासाब!'

राजे डावा हात उंचावत ओरडले, 'काही सांगू नको, कुंवर! याचसाठी मला बोलावून घेतलं? मला माहीत आहे. हवं, तर माझं शिर उडवा; पण मी परत बादशहांच्या समोर जाणार नाही.'

सारे शब्द औरंगजेब ऐकत होता. औरंगजेबाने मुलतफीतखान, आकिलखान, मुखलिसखान यांना आज्ञा केली,

'शिवाजीला शांत करा. त्याला खिलत देऊन घेऊन या.'

तिघे गडबडीने बाहेर गेले. राजांना त्यांनी समजावण्याचा प्रयत्न केला. त्याने राजे जास्तच भडकले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘खिलत? कोण पर्वा करतो त्या खिलतीची? जसवंतसिंगामागे मला उभं केलं जातं? का? मी काय केलं होतं, म्हणून माझा हा अपमान? माझा मुलगा बादशहाचा नोकर होता; सहाहजारी होता. त्याला कुठंही उभा करायचा होता. मी तुमच्या बादशहांचा नोकर नाही-नव्हतो!’

‘राजासाब!’ मुखलिसखान बोलण्याचा प्रयत्न करीत होता.

‘तुमचा बादशहा माझा खून करू शकतो! मी त्याची चाकरी कदापिही करणार नाही. अशक्य!’

नाइलाजाने सारे माघारी फिरले. त्यांनी बादशहाला सर्व सांगितले. रामसिंग म्हणाला,

‘आलीजाह! ही आग्र्याची हवा राजांना मानवली नाही. त्यांना माफी असावी!’

‘हम राजाका दर्दे दिल जान सकते हैं!’ औरंगजेब म्हणाला, ‘रामसिंग, तू शिवाजीला घेऊन जा. माझं खास गुलाबपाणी त्याच्यासाठी वापर. त्याला शांत कर. तो शांत झाला, की मग बोलू. जा तू.’

रामसिंग राजांसह आपल्या मुक्कामावर आला. रामसिंगाच्या डेऱ्यात राजांना बैठकीवर बसविले गेले. राजांच्या अंगाचा कापरा अद्याप कमी झाला नव्हता. रामसिंगही बेचैन होता. मिर्झाराजांनी राजांची सारी जबाबदारी रामसिंगावर सोपविली होती. राजांच्या वर्तनाचे काय परिणाम होणार, हेही रामसिंगाला कळत नव्हते. तो घाबरून गेला होता. तो म्हणाला,

‘राजासाब, तुम्ही असं वागायला नको होतं.’

राजांची जळजळीत नजर रामसिंगावर खिळली. राजे म्हणाले,

‘माझ्यापेक्षा बादशहांना का सांगत नाही? माणसानं किती सोसावं, यालाही मर्यादा असतात. माझी लायकी सांगायला मोगल दरबारी अनेक हजर आहेत. कुणी खिलती हरवल्या आहेत. कुणी बोटं...’

‘पण, राजासाब, याचा नतीजा...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘परिणामाची काळजी राजपूत केव्हापासून करू लागले?’

‘गैरसमज होतोय् हा!’ रामसिंग म्हणाला.

‘गैरसमज?’ राजे उद्गारले.

‘हां, हां! गैरसमज.’

‘साधे रिवाज दरबारला पाळता येत नाहीत. आम्ही येणार, हे माहीत असून सामोरा कोण येतो?- तुमचा कारकून! जाणूनबुजून आम्हांला पंचहजारीत उभं केलं जातं. आमच्या देखत खिलत वाटली जाते; आणि आम्ही वगळले जातो. हे सारं दिसतं आणि वर आमचाच गैरसमज?’

रामसिंग निश्चल आवाजात म्हणाला,

‘हां, हां! गैरसमज! मी अगदी खरं सांगतो, राजासाब! चूक असलीच, तर ती आपल्या दैवाची आहे. बादशहांनी तुमच्या स्वागताची सारी जबाबदारी माझ्यावर सोपविली होती; पण मी पहाऱ्यावर अडकलो. दरबारच्या गर्दीत बादशहांच्या ते ध्यानी आलं नाही आणि मीही त्यांना भेटू शकलो नाही. सकाळी निघालो, तो आपली चुकामूक झाली. आपल्याला गाठण्यात वेळ गेला. कुणास माहीत, दिवाण-इ-आम-च्या दरबारात आपली भेट झाली असती, तर बादशहांची काय कृपा झाली असती? बादशहा दरबारी तुमची इंतजारी करीत होते. तुम्ही हजर राहिला नाही. त्याचा गैरसमज बादशहांनी का करून घेऊ नये? पण त्यांनी गैरसमज करून घेतला नाही. तुम्ही आल्याचं कळताच बादशहांनी तुम्हांला भेटीला बोलाविलं. तुमची नजर, निसार स्वीकारली.’

‘आणि त्याबद्दल असा अपमान केला?’

‘कसला अपमान?’ रामसिंग कडवटपणे म्हणाला, ‘माहीत आहे? खुद्द मिर्झाराजे दरबारी त्याच जागी उभे राहतात. तिथंच तुम्ही होता.’

‘रामसिंग, एक विसरता.’ राजे बोलले, ‘तुमचे वालिदे औरंगजेबाचे नौकर आहेत. मी तह झालेला, तरी स्वतंत्र राजा आहे. औरंगजेबाने ‘राजा’ किताब देऊन मी राजा झालो

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नाही. त्याआधीच राजेपण मला चिकटलं आहे.’

राजे उठले. रामसिंगाच्या खांद्यावर हात ठेवीत ते म्हणाले, ‘रामसिंग, ते तुम्हांला कळायचं नाही. तुम्ही काळजी करू नका. जे घडेल, त्याला मी आनंदानं तयार आहे. मी पण विचार करीन.’

रामसिंगाच्या तळानजीकच राजांच्यासाठी उभारलेल्या तळावर राजे आले. निरोप घेऊन रामसिंग परत गेला. राजे आपल्या डेऱ्यात गेले. निराजीपंत, सोनदेव, फर्जंद ही सारी मंडळी ते वर्तमान ऐकून चिंतेत पडली होती.

बाहेर काळोख पसरत होता.

□

२४

एवढ्या मोठ्या उत्साहाने, संपूर्णपणे विचार करून भरविलेल्या पन्नासाव्या वाढदिवसाचे सिंहासनारोहण यथासांग पार पडले होते. औरंगजेबाला जे हवे होते, ते सारे मिळाले होते; पण दिवाण-इ-खास-च्या बैठकीतील एका शिवाजीच्या प्रसंगाने साऱ्याला गालबोट लावले होते. साऱ्या दरबारात ती बातमी पसरली होती. एक हिंदू राजा येतो, आणि बादशहाचा अपमान त्याच्या तोंडावर करून निघून जातो, यावर कुणाचा विश्वास बसत नव्हता. आग्र्यात गोळा झालेल्या सरदारांत त्याबद्दल कुजबूज चालू होती.

रात्री जेवण करून औरंगजेब आपल्या शयनगृहात बसला होता. अंगात एक मलमली कुडता आणि विजार त्याने घातली होती. पांढऱ्या शुभ्र आवरणाने सजलेल्या साध्या बैठकीवर तो बसला होता. उजव्या हातात त्याची जपाची माळ होती. शयनगृहात खास गोटातील बेगमसाहेबा, जहाँआरा, जाफरखान, राजा जसवंतसिंग उभे होते. औरंगजेबाच्या चेहऱ्यावर शांत स्मित होते. ओठांच्या कडांवरून खाली झुकलेल्या आपल्या मिशांवरून डाव्या हाताची बोटे तो फिरवीत होता. जपाच्या माळेतला एक एक मणी पुढे सरकत होता.

जाफरखान म्हणाला, ‘आलीजाह! दरबारी साधी जुबाँ उघडली, तरी कडाई सजा होते. आणि हा काफर दरबारी सरळ सरळ बेइज्जत करतो! पाठ फिरवितो! त्याला क्षमा? असं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चालू दिलं, तर दरबारचा बोज राहायचा नाही. पुष्कळ भूमिये असे येतील, आणि सरळ सरळ बेमुर्वतपणे वागून जातील. साऱ्या मानकऱ्यांत हेच बोललं जातंय्. काफरांचं बेवर्तन असं सहन केलं, तर इस्लाम टिकणार नाही. सारे तसेच वागतील. मग राज्य चालायचं कसं?'

'अन्नदाता! वजीर म्हणतात, ते एकदम दुरुस्त आहे.' जसवंतसिंगाने पाठिंबा दिला. 'अर्थात, याचा निर्णय सर्वस्वी आलीजाहांच्या हाती आहे. त्यांनी कुणाला क्षमा करावी, आणि कुणाला शिक्षा करावी, हे कोण सांगणार? पण यानं आलीजाहांचं नमक खाल्लं आहे, त्याला हे सहन करणं कठीण आहे.'

औरंगजेब हसला. त्याने विचारले,

'मग, जसवंतसिंग, तुझा काय सल्ला आहे?'

'अन्नदाता! शिवाजीला शिक्षा झाली पाहिजे!'

'हां, हां! हम समझते हैं.' औरंगजेबाने मान डोलविली. त्याची नजर जहाँआरावर खिळली. हास्य कायम होते. आपली दाढी कुरवाळीत औरंगजेबाने विचारले,

'आणि, बेगमसाहेब, तुमचं मत नाही सांगितलंत?'

'ते काय सांगायला हवं? खुदावंत सारं जाणतात. ज्यानं आपली सुरत लुटली, शास्ताखानाची बोटं तोडली, एवढंच नव्हे, तर खुद्द भर दरबारी आपली मुरवत ठेवली नाही, त्याची गय कसली?'

शांतपणे जपाची माळ ओढीत काही क्षण औरंगजेब बसला. सर्व भारताचे राजकारण धूर्तपणे पाहणाऱ्या आलमगीरला वैयक्तिक अहंता फार नव्हत्या. तो आपल्या दैवी जबाबदारीचा वारस होता. खुळ्या रागचिडीला तो मनातून हसत होता. त्याच्या नजरेसमोर होता मिर्झाराजा जयसिंग. काबूलपासून आसामपर्यंत व काश्मीरपासून दक्षिणेपर्यंत त्याच्यासाठी फिरणारा इमानी मिर्झाराजा! त्याचाच विचार औरंगजेब करीत होता. सारे नि:स्तब्ध, विचारमग्न आलमगीरकडे पाहत होते. भानावर येऊन औरंगजेबाने नजर उंचावली. तो म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सारं होऊन जाईल! मानमरातबाबरोबरच अल्लानं आणखीन एक छोटीशी गोष्ट माणसाला दिलीय्. त्यामुळं सारी दुनिया जगते. माहीत आहे?’

जहाँआराने नकारार्थी मान हलविली.

‘त्या नाजूक देणगीचं नाव आहे नींद! ती आमच्या डोळ्यांसमोर तरसते आहे. तुम्हां सर्वांची ना नसेल, तर आम्ही झोपावं, म्हणतो.’

शहेनशहांनी एक सूक्ष्म जांभई दिली. त्यांचे ओठ चिंतन करीत होते...

‘बिस्मिल् लह इर्ररहमानिर् रहीम
ला इलह इल्ललह मुहंमदुर्रसूलल्लह
परवरदिगार रहम
रहम... रहम... आमेन...’

□

२५

दोन दिवसांनी दोन प्रहरी अचानक कुंवर रामसिंग राजांच्याकडे आला. निराजीपंत, त्र्यंबकजी बोलत बसले होते. दोन दिवसांत राजांचा राग बराचसा निवळला होता. आपण बादशहांच्या मुलुखात आहो, बादशहाला फार दुखविणे इष्ट नाही, हे त्यांच्या ध्यानी आले होते. रामसिंगाच्या सल्ल्याने त्यांनी औरंगजेबाला पत्र लिहिले होते. औरंगजेब कोणती पावले टाकील, यावर राजे विचार करीत होते. तोच रामसिंग आल्याची वर्दी आली. राजांनी रामसिंगाचे प्रेमाने स्वागत केले. राजांची प्रसन्न मुद्रा पाहून रामसिंगाला बरे वाटले. राजांनी विचारले,

‘काय म्हणतो तुमचा दरबार?’

‘वातावरण अजून तापलेलं आहे. राजाजींच्या विरोधी गटाची मंडळी तुमच्या विरुद्ध बादशहांचे कान भरवीत आहेत. त्यांना भर म्हणून शास्ताखानाची बेगमही त्यांना सामील झाली आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘त्याचा परिणाम?’

‘आलमपन्हा शांतीचे सागर आहेत. दर्याच्या जिगरमधील जलजले कळण्यासाठी दैवी सामर्थ्य पाहिजे; पण मी त्यांच्या कानांवर घातलं आहे. वजीर जाफरखानांनाही मी बोललो आहे. त्यांची एकदा भेट घ्यायला हवी.’

‘आम्ही?’ राजे दचकले.

‘राजासाब, जाणून बुजून तुम्ही पहाडाखाली हात घातलात. तो सुटेपर्यंत गौरफिकरची जरूरत आहे. आता काही दिवस मानापमान संपूर्णपणे विसरून जावं, हा माझा अर्ज आहे. आपल्या जीविताची सारी जबाबदारी माझ्यावर आहे. तीतून मला पार पडायचं आहे.’

राजे हसले. ते म्हणाले, ‘कुंवरजी, घाबरू नका. आम्ही वचन देतो- तुम्ही सांगाल, तसे आम्ही वागू. फक्त दरबारात आम्हांला जायला लावू नका.’

‘बहुतेक ती पाळी यायची नाही. राजासाब, आज मी मुद्दाम लौकर आलो आहे. एक विनंती आहे.’

‘कसली?’

‘आज थोडं फिरायला जाऊ.’

‘आनंदानं! निराजी ऽ ऽ’

निराजी जवळ आले. ‘निराजी, बाळराजे हिरोजीबरोबर इथंच कुठंतरी जवळपास असतील. त्यांना बोलवा. तयार व्हा.’

राजे कपडे करून आले. तोवर संभाजीराजेही आत आले. सारे अश्वारूढ झाले. रामसिंगाबरोबर राजे होते. पाठोपाठ हिरोजी, संभाजी, निराजी ही मंडळी होती. मागून रक्षक दल येत होते. ताजमहालासमोर सारे पायउतार झाले. सूर्याच्या तिरप्या किरणांत आपल्या अलौकिक सौंदर्याने तळपणारे ते शिल्प राजे पाहत होते. त्या इमारतीची ख्याती राजांनी खूप ऐकली होती. राजे मंत्रमुग्ध होऊन उद्गारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘वा! सुरेख!’

‘आपल्याला ही इमारत आवडेल, अशी खात्री होती. म्हणून काल वजीर जाफरखानांच्याकडून खास परवाना काढला.’

‘अंधळ्याखेरीज कुणाही माणसाला ही इमारत आवडेल.’ राजांनी विचारले, ‘पण परवाना का काढलात?’

‘त्याखेरीज गाभाऱ्यात जाता येत नाही. बड्या शहेनशहांनी आपला सारा जवाहरखाना इथं रिता केला आहे.’

‘अस्सं!’

‘अशी इमारत दुनियेत नाही. शहाजहान बादशहांनी अर्जुमंदबानूंच्या आठवणीखातर ही यादगार तामीर केली. हिच्यासाठी सारी दौलत खर्ची घातली. पंधरा वर्षं वीस हजार मजूर या कामावर राबत होते. रावळ मक्रानाहून संगमरवर आणला जात होता. शहेनशहांच्या मृत्यूनंतर त्यांचंही दफन याच जागी झालं.’

‘अलौकिक!’ सारे म्हणाले, ‘शब्द अपुरे आहेत. नेत्रांचं सार्थक व्हावं, अशी सुंदर इमारत आहे.’

‘आबासाहेब, आपणही अशी इमारत बांधू या ना!’ राजांच्या शेजारी उभे असलेले संभाजीराजे म्हणाले. सारे हसले. राजांनी बाळराजांच्याकडे पाहिले. ते मोकळेपणे हसले. बाळराजांच्या पाठीवर हात ठेवीत राजे म्हणाले,

‘बाळराजे, अजून तुम्ही लहान आहात. लक्षात ठेवता आलं, तर ठेवा- गादीवर येणारा प्रत्येक सम्राट आपलं भव्य थडगं उभारण्यात आपली निम्मी हयात खर्ची घालीत असतो. आपल्या मागे आपलं नाव राहावं, हीच त्यामागे उत्कट इच्छा असते. बाळराजे, माणसानं जगात येऊन असं कार्य करावं, की त्याला आपलं नाव राहण्यासाठी थडगं बांधण्याची पाळी येऊ नये. जीवन असं जगावं, की उज्ज्वल कीर्तीचा दरवळ सदैव मागे राहावा.’

‘नसीहत नेक है!’ रामसिंग म्हणाला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मग असल्या इमारती असल्यापेक्षा नसलेल्या बऱ्या.’ हिरोजी बोलून गेला.

ते ऐकताच राजे वळले. हिरोजीकडे पाहत म्हणाले,

‘नाही, हिरोजी! एकदम अशी नफरत व्यक्त करू नकोस. त्या हेतूनं मी बोललो नाही. ज्या नजरेनं पाहावं, तसं दृश्य दिसतं. आम्ही बोललो, ते फक्त स्मारकाच्या कल्पनेबद्दल; ताजच्या खुबसुरतीबद्दल नव्हे.’

सारे स्तब्ध झाले. राजे परत ताजमहाल पाहू लागले. आकाशात उंच चढलेले मनोरे, मधला भव्य घुमट, नक्षीदार चबुत्रे- राजे ते दृश्य मनात साठवीत होते. निराजीपंत म्हणाले,

‘या मोगली इमारतींना एक वेगळीच शान आहे; पण मंदिरांचा गोडवा यात नाही.’

‘आम्ही सांगितलं ना? ज्या दृष्टीनं पाहावं, तसं दिसतं. निराजीपंत, काम-क्रोध-मद-मत्सरांच्या चार मनोऱ्यांत गुंतलेल्या जीवाचं हे प्रतीक आहे, असं आम्ही सांगितलं, तर हाच ताज केवढा वेगळा वाटेल, नाही?’

निराजीपंत स्तब्ध झाले. राजांनी रामसिंगाला एकदम विचारले,

‘कुंवरजी, या संगमरवरी स्वप्नासाठी पायाचे दगडही संगमरवरीच वापरलेत का?’

‘नाही, राजासाब. पायाचे दगड साध्या फत्तरांचेच आहेत.’

राजे हसले व पुढे चालू लागले. रामसिंग अदबीने म्हणाला,

‘गुस्ताखी माफ हो! आज्ञा झाली, तर...’

‘हां, कुंवरजी! ते शाही रिवाज इथं पाळू नका. आपल्या वडिलांनी- मिर्झाराजांनी- आम्हांला पुत्रवत लेखलं आहे. तसं पाहिलं, तर आपलं नातं भावाभावाचं आहे... काय विचारणार होता?’

‘राजासाब, अनेकांच्या सोबतीनं मी हा ताज पाहिला; पण हा प्रश्न कोणी केला नव्हता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मी सांगताच आपण का हसला, तेही समजलं नाही!'

राजे एकदम गंभीर झाले. एक दीर्घ नि:श्वास त्यांच्या मुखातून बाहेर पडला. ताजवर नजर खिळवून ते सांगू लागले,

'कुंवरजी, हजारो काळे फत्तर जेव्हा स्वत:ला पायात गाडून घेतात, तेव्हाच त्यांवर असं संगमरवरी स्वप्न उभं राहतं, आपल्या सौंदर्यात झगमगतं. जोवर ही इमारत आहे, तोवर आमच्यासारखे अनेक मुसाफीर इथं येतील, याचं सौंदर्य पाहून थक्क होतील, तृप्त होतील; पण या शिल्पाच्या उभारणीसाठी याच्या पायात खर्ची पडलेल्या हजारो फत्तरांचा हिशेब कुणाच्या ध्यानीमनीही येणार नाही. आम्हीही एक स्वप्न उभं करीत आहोत. जगदंबेच्या कृपेनं ते आज ना उद्या साकार होईलही. ते जेव्हा घडेल, तेव्हा त्याचं कर्तृत्व आमच्या माथी मारलं जाईल; पण ज्यांच्या शहादतीवर स्वराज्य उभं राहिलं, आमच्या शब्दाखातर ज्यांनी स्वराज्याच्या पायी कुर्बानी केली, त्या सर्वांची नावनिशाणी कोण सांगणार? आज ताज पाहत असताना आम्हांला आमच्या मोहिमांत कामी आलेल्यांची तीव्रतेनं आठवण होत आहे.' राजे भानावर आले. '...चला, कुंवरजी! ताज पाहू.'

पाय धुऊन साऱ्यांनी ताजच्या गाभाऱ्यात प्रवेश केला. धूपाचा आणि उदबत्त्यांचा मंद सुगंध साऱ्या वातावरणात भरून राहिला होता. अप्रतिम जाळीच्या संगमरवरी कठड्यांनी कबरींभोवती वेढा दिला होता. एक फकीर कबरीवर मोरपंख्याने वारा ढाळीत होता. अनेक मौल्यवान रत्नांनी जडविलेल्या दोन कबरींवर दृष्टीही ठरत नव्हती. राजांनी नम्रतेने त्या कबरींना हात जोडले. बाळराजांनी त्यांचे अनुकरण केले. ते पाहून रामसिंगाला आश्चर्य वाटले. काल भर दरबारी संतापाने लालेलाल झालेला हाच तो शिवाजी की काय, असा संभ्रम निर्माण झाला. राजांनी ते भाव जाणले. त्यांनी सांगितलं,

'कुंवरजी! ह्या जीवाला हुस्नची जानकार नजर होती. त्याला प्रेमाचा अर्थ कळला होता. त्या जीवासमोर नतमस्तक होण्यात संकोच कसला?'

गाभाऱ्यातून वर जाण्यासाठी राजे चालू लागले. पाठोपाठ हिरोजी, निराजी येत होते. हिरोजीने निराजींना विचारले,

'केवढी रत्नं खर्ची पडलीत, नाही?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गाभाऱ्यात ते कुजबुजणे घुमले. राजांनी मागे पाहिले आणि ते म्हणाले,

‘हिरोजी, युद्ध आणि प्रेम यांत खर्चाचा हिशेब नसतो.’

रामसिंगासह राजे ताजमहालाच्या चौथऱ्यावर आले; आणि रामसिंगाने सांगितले;

‘पण, राजे, शहेन्शहा शहाजहानला ही एकच बेगम नव्हती. अनेक बेगमा त्यांना होत्या.’

त्या शब्दांबरोबर राजे व्यथित बनले. उचललेले पाऊल अडखळले. नजर घायाळ बनली. शेजारी असलेल्या संभाजीला नजीक ओढीत ताजकडे पाहत राजे बोलले,

‘कुंवरजी, अशी गल्लत करू नका. जीवनात एखादा मनसुबा असा जमून जातो, की त्याची सोबत आयुष्यभर सुटत नाही. बेगमांच्या यादीवर प्रेमांचा हिशेब मांडला जात नाही, रामसिंग! तशी गल्लत करू नका. शंकेचं ठिकाण हे नव्हे.’

‘माफी असावी! गैरसमजानं बोललो.’

‘असले गैरसमज जपायला हवेत. तुमच्या मताप्रमाणे आम्हीही खूप गैरसमज करून घेतलेत ना!’

‘तेही विसरून जावे.’

‘आमच्या मनात काही नाही. तुम्ही आमच्या भल्याकरताच सांगता. पण आम्हांला आता औरंगजेबाचा एतबार येत नाही. त्याच्या हेतूबद्दल आमचा संशय फिटलेला नाही.’

‘नाही, राजाजी. अद्याप तसा संशय धरण्याचं काही कारण नाही. शहेन्शहांच्या मनात काही नाही. सारं ठीक होईल. माझ्या वडिलांनी शहेन्शहांना स्पष्ट कळविलं आहे- तुमच्या केसाला जरी धक्का लागला, तरी राणाजींचं दिल्लीतख्ताचं इमान संपून जी जागा वैर घेईल.’

‘आम्हांला ती खात्री आहे. त्याच भरवशावर आम्ही औरंगजेबाला भेटण्याचं धाडस

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

केलं. नाही तर आम्ही आलो असतो कशाला? ह्याच आलमगीरनं तख्तासाठी भावांच्या कत्तली केल्या; जन्मदात्याला- या ताजच्या निर्मात्याला- कैद केलं; त्याच्या मृत्यूची अहोरात्र वाट पाहून इच्छित साध्य करण्यासाठी बापाच्या मालिशाच्या तेलात विष मिसळलं; आणि त्याचा परिणाम म्हणून अंगाला भेगा पडून अत्यंत दर्दनाक मौत शहाजहानला स्वीकारावी लागली. मेल्यावर माणसं वैर विसरतात; पण आलमगीर तिथंही मुस्तसना झाला. पुन्हा आठवणींना उजाळा मिळू नये, म्हणून एका बेवारशाप्रमाणे शहाजहानला रातोरात किल्ल्यातून हलवून, इथं आणून, त्यानं त्याचं दफन केलं. साधा दरबारचा दफनविधीही त्या जीवाला मिळाला नाही.'

'आपल्याला हे कसं समजलं?''

'साऱ्या राजधानीला हे माहीत आहे. जाऊ दे. आम्हांला त्याच्याशी कर्तव्य नाही. सांगायचा हेतू एवढाच होता की, प्रत्यक्ष रक्ताशी बेइमानी करणारे आपले कृपाळू शहेन्शहा उद्या आमच्याकडे कोणत्या कृपादृष्टीनं पाहतात, याची आमच्या मनात शंका आहे. त्याचा भरवसा कुणी द्यावा?'

रामसिंगाला उत्तर सुचले नाही. राजांच्यासह तो छावणीवर आला. रामसिंगाला बोलाविण्यासाठी आलेला वजीर जाफरखानाचा हेजीब रामसिंगाच्या तळावर वाट पाहत होता.

□

२६

रामसिंग अमीनखानाकडे गेला, तेव्हा अमीनखान एकटाच बसला होता. वजीर जाफरखान व अमीनखान मिर्झाराजांच्या बाजूचे होते. रामसिंगाने त्यांना आपल्या बाजूला वळवून घेतले होते. अमीनखान सचिंत दिसत होता. रामसिंगाने सामोरे जाताच विचारले,

'खानसाहेब, तातडीनं बोलावलंत?'

आसनाकडे बोट दाखवीत अमीनखान म्हणाला, 'बसा, कुंवरजी! दरबारी मामला ठीक दिसत नाही. दरबारी गुंतागुंत सारखी वाढते आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पण जाफरखान तर सांगत होते की, चार-आठ दिवसांत सारं निवळेल; आणि बादशहा राजांना भेटीला बोलावतील.’

‘उन्हाळी पावसाचा अंदाज सांगता येईल, पण दरबारचा अंदाज सांगणं कठीण. मला आज खास बातमी लागली आहे... बादशहांनी शिवाजीला मारण्याचा बेत ठरविला आहे. तो बेत पार पाडीपर्यंत फिदाईखानाच्या घरी राजांना ठेवण्याचा हुकूम फुलादखानाला मिळाला आहे.’

‘खानसाहेब! हा दगा आहे!’ रामसिंग म्हणाला. खरोखरच बादशहाने शिवाजीला मारले, तर रामसिंग जबाबदार धरला जाणार होता. मिर्झाराजांनी सारी जबाबदारी रामसिंगावर टाकली होती.

‘दगा कसला?’ अमीन म्हणाला. ‘जेवढं करता येणं शक्य होतं, तेवढं आपण केलं. शिवाजीनंच हे प्रकरण चिघळविलं, त्याला आपण काय करणार?’

‘काही तरी करायला हवं! हे थांबायला हवं!’ रामसिंग उठत म्हणाला, ‘नाही, खानसाहेब, हे होता उपयोगी नाही.’

काही वेळ दोघेही बोलत नव्हते. शेवटी रामसिंगाने निर्णय केला. तो म्हणाला,

‘अमीनसाब! तुम्ही एक करा. माझा निरोप बादशहांना कळवा.’

‘कसला?’

‘बादशहांना सांगा... त्यानं शिवाजीला मारण्याचा निर्णय केला असेल, तर तो चुकीचा होईल. शिवाजीनं आपल्या सुरक्षितपणाबद्दल माझ्या पिताजींचा कौल घेतला आहे. शिवाजीची जबाबदारी माझ्यावरही टाकलेली आहे. बादशहा कसेही वागण्यास मोकळे आहेत. ते हेच करणार असतील, तर त्याआधी त्यांनी मला ठार करावं; नंतर माझ्या मुलाला मारून मगच शिवाजीचा निर्णय करावा.’

‘असं सांगू?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘एक शब्दही न वगळता माझा निरोप सांगा. नाही तर शिवाजी वाचू शकणार नाही.’

अमीनखानाने दुसऱ्या दिवशी सकाळी बादशहाची भेट घेऊन रामसिंगाचा निरोप सांगितला. औरंगजेब तो निरोप ऐकून विचारात पडला. हे राजपूत एककल्ली. न जाणो, शिवाजीचा वध होताच दक्षिणेत जयसिंग आणि इकडे रामसिंग बादशहाविरुद्ध उभे राहिले, तर? जयसिंगाशी वैर बादशहाला परवडणारे नव्हते. तो अमीनखानाला म्हणाला,

‘अमीन, रामसिंगाला विचार... तो शिवाजीला जामीन राहण्यास तयार आहे का? तो पळाला, किंवा त्यानं काही कपट केलं, तर जबाबदार तो राहील. जामीनकतबा लिहून दिला, तर तो मी विचार करीन.’

कुंवरला ते सांगताच कुंवरने शिवाजीला जामीन राहण्याचे कबूल केले. तो तसाच धावत शिवाजीराजांच्याकडे आला. शिवाजीराजांनी सर्व हकीकत ऐकली. राजांनी आपल्या पूजेच्या शिवलिंगावरील बेल उचलून रामसिंगाला वचन दिले; आणि रामसिंगाने सहीनिशी जामीनकतबा तयार केला. शिवाजीराजांच्यासाठी रामसिंगाने स्वत:चा प्राण गुंतविला.

दिवाण-इ-खासच्या संध्याकाळच्या बैठकीत तो जामीननामा रामसिंगाने अमीनखानाच्या हाती दिला. याचा स्वीकार करून औरंगजेब म्हणाला,

‘कुंवरला सांगा की, मी त्याची नेमणूक काबूलवर केली आहे. आपली फौज घेऊन शिवाजीसह त्यानं काबूलला जावं. निघण्याचा मुहूर्त बघावा.’

‘एका संकटातून बाहेर पडतात, न पडतात, तोच राजे दुसऱ्या संकटात सापडले. राजांनी जाफरखानाची भेट घेतली; त्याला भरपूर नजराणा दिला; आणि वजीर जाफरखान मध्यस्थी करायला तयार झाला. आपले सैन्य आणू दिले, तर राजांनी काबूलला जाण्याची तयारी दाखविली. औररंगजेब विचारात पडला. खुद्द दिल्लीमध्ये शिवाजीचे सैन्य येऊ द्यायला तो खुळा नव्हता. काबूलचा बेत त्याने रद्द केला. शिवाजीला निश्चित कोणती वचने देऊन मिर्झाराजांनी पाठविले आहे, याची विचारणा करणारे तातडीचे पत्र औरंगजेबाने मिर्झाराजांना पाठविले.

दिवस उलटत होते. राजे दरबारच्या मोठमोठ्या सरदारांना भेटत होते; नजराणे देत होते. राजांची माणसे, महादेव यांसारखे नजरबाज आग्रा शहरात फेरफटका मारीत होते; ओळखी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वाढवीत होते. दरबारचे वातावरण निवळावे, म्हणून रामसिंग संभाजीराजांना घेऊन दरबारी जात होता. संभाजीराजांना औरंगजेबाने मानाची कट्यार व पोशाख देऊन गौरविले होते. औरंगजेब मिर्झाराजांच्या उत्तराची वाट पाहत होता. राजांच्यावर रामसिंगाचा पहारा होता. आपल्यावरील टांगत्या तलवारीचा राजांना वीट आला होता. त्यांनी सोक्षमोक्ष लावून घेण्याच्या हेतूने एक अर्ज पाठविला :

> '...जर बादशहांनी सरकारात दिलेले सर्व किल्ले परत केले, तर मी दोन कोटी रुपये खंडणी देईन. मला परत जाण्यास परवानगी मिळावी. माझा मुलगा येथे चाकरीत ठेवण्यास मी तयार आहे. बादशहा जी शपथ घ्यावयास सांगतील, ती मी घेईन. मी बादशहांच्या शब्दांवर विसंबून आलो. माझी निष्ठा मोठी आहे. ज्या वेळी स्वारीचा बेत कराल, त्या वेळी बोलावताच मी येईन. बादशहा विजापूरस्वारीत गुंतले आहेत. मला तेथे जाऊ द्या. मी बादशहांसाठी लढा देईन, किंवा मरून जाईन.'

राजांच्या सारख्या जाणाऱ्या अर्जांनी आणि शिवाजीच्या वाढत्या भेटींनी औरंगजेबाचा संशय वाढला तो म्हणाला,

'मी शिवाजीशी सौम्यपणे वागतो, यानं त्याचं डोकं फिरलं आहे. घरी जायला मी त्याला परवानगी देईन कशी? त्याला सांगा की, त्यानं यापुढं कोणासही भेटू नये. रामसिंगाकडेही जाऊ नये. सक्त ताकीद द्या.'

राजांना रामसिंगाचे पहारे कडक झाल्याचे जाणवले. औरंगजेबाने रामसिंगाकडून, शिवाजीने त्याच्याकडे राहिलेले किल्ले द्यावेत, म्हणून मागणी केली. रामसिंगाने तो निरोप राजांना सांगताच राजे भडकले.

'कुंवरजी! तुम्ही मला काय सांगता? इथं बोलावून आणून मला तुमच्या पहाऱ्यात टाकलं. मिर्झाराजांच्या सांगण्यावरून तेवीस गड मी बादशहाला दिले; आणि मिर्झाराजांनी टोक परगणा बक्षीस मिळविला. आता राहिलेले गड बादशहांना द्यायला सांगून तुम्ही कोणता परगणा मिळविणार आहात, ते तरी सांगा!'

राजांच्या या रोकड्या सवालाने रामसिंग थंड झाला. त्याने बादशहाला राजांचा नकार कळविला. बादशहा ते ऐकून सावध झाला. त्याने आपली नखे बाहेर काढली. फुलादखानाला पाच हजार फौजेनिशी शिवाजीवर पहारा बसविण्याला पाठविले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे मंचकावर बसले होते. सायंकाळचा समय होता. आपल्या सहकाऱ्यांबरोबर विचारविनिमय करण्यात राजे गुंतले असता संभाजीराजे धावत आले,

‘आबासाहेब! सैन्य येतंय्!’

त्या घाबरलेल्या बाळजीवाला जवळ घेत राजे म्हणाले,

‘बाळराजे! ही औरंगजेबाची राजधानी आहे. दरबारासाठी आलेला एखादा सरदार शाही मेहेरनजरेतून सुटका होऊन माघारी जात असेल. बाळराजे, असं अश्वदळ पाहून घाबरलात, तर कसं होणार?’

साऱ्यांच्या चेहऱ्यांवर स्मित उमटणार, तोच राजांच्या छावणीभोवती चारी बाजूंनी टापांचा खडखडाट उठला. हिरोजी बाहेर धावला; आणि बाहेर उभा असलेला महादेव आत आला. महादेव ओरडला,

‘राजे, घात झाला! छावणीभोवती चारी बाजूंनी सैन्याचा गराडा पडला आहे.’

साऱ्यांच्या तलवारी उपसल्या गेल्या.

राजे डेऱ्याच्या दाराशी गेले. तोफांचे गाडे छावणीभोवती लावले जात होते. हजारो घोड्यांचे खूर खडखडत होते. राजांचा डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. राजांचे लक्ष डेऱ्याच्या रोखाने येणाऱ्या एका स्वाराकडे गेले. हिरवी जरी कलाबुतीची झगमगणारी फतू, मस्तकी किमॉष, अंगात अंगरखा, चोळणा घातलेला स्वार उजव्या हाती लगाम व डाव्या हाताची मूठ आपल्या कमरेवर ठेवून मारे ऐटीत डेऱ्याकडे येत होता.

राजे माघारी वळले; आणि क्षणांत तो सरदार डेऱ्यात प्रवेश करता झाला. राजांच्या भोवतीच्या माणसांच्या हातांतील तलवारी पाहून त्याच्या चेहऱ्यावर हसू उमटले. तिकडे दुर्लक्ष करून किंचित मान झुकवून तो म्हणाला,

‘शिवाजीराजे! बादशहांच्या बंद्याला फुलादखान म्हणतात. अफसोसकी बात है, ...आपल्यावर पहारा करण्यासाठी मला आणि माझ्या पाच हजार स्वारांना आज्ञा झाली आहे. आजपासून आपण माझ्या पहाऱ्यात आहात, याची आठवण ठेवावी. ही दरखास्त

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहे.’

राजे सुन्न होऊन ते ऐकत होते. हाच तो फुलादखान, की ज्याचं वर्णन ‘काळीज नसलेला माणूस’ म्हणून करतात! राजांनी त्या धिप्पाड देहाकडे निरखून पाहिलं; व ते म्हणाले,

‘खानसाहेब, तुम्ही तुमचं काम करा. आमच्याकडून तुम्हांला त्रास व्हायचा नाही. आपण दोघे बादशहांचे बंदे. तुम्ही पहारा करा. आम्ही कैदेत राहू.’

राजांचा तो शांतपणा पाहून फुलादखान चकित झाला. अभिवादन करून तो बाहेर गेला. राजे कसेबसे मंचकावर जाऊन बसले. बाल संभाजी राजांच्याकडे धावले. ते म्हणाले,

‘आबासाहेब, हे स्वार का आलेत?’

त्या चिमकुल्या जीवाच्या बोलांनी राजांचे धैर्य ढासळले. एकदम बाळराजांना मिठीत घेऊन राजे म्हणाले,

‘घात झाला! आम्ही फसलो!’

-आणि राजांच्या डोळ्यांना अश्रुधारा लागल्या. त्यांच्या शोकाला सीमा राहिल्या नाहीत...

□

२७

फुलादखानाचा कडेकोट पहारा राजांच्या भोवती जारी झाला. बाहेरचा पहारा फुलादखानाचा होता; तर आतला पहारा रामसिंगाचा होता. राजांच्याकडे जाणाऱ्यांवर कडाई नजर ठेविली जात होती. राजांच्या तळाच्या तोंडाशी खुद्द फुलादखानाचा डेरा उभारण्यात आला होता. एका माणसाच्या बंदोबस्तासाठी औरंगजेबाने अनेक तोफा आणि हजारो माणसे गुंतविली होती. तशा परिस्थितीही राजांना औरंगजेबाने घेतलेल्या धास्तीचे कौतुक

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वाटत होते. सरळ मार्गाने सुटका आता अशक्य आहे, हे राजांना उघड दिसत होते. राजांच्या भोवती सारे गर्भगळीत होऊन बसले होते. राजांनी आपले मन सावरले. यातून मार्ग शोधण्यात त्यांचे मन गुंतले.

रामसिंगाला राजांचे पहारे जारी झाल्याचे समजताच तो राजांना भेटायला आला. त्याची मान शरमेने लवली होती. रामसिंगाला पाहताच राजे उफाळले,

'रामसिंग, पटली ना खात्री? हाच सलोखा औरंगजेबाला करायचा होता ना?'

'राजासाब, मी सक्त दिलगीर आहे.' रामसिंग डोळ्यांत पाणी आणून म्हणाला, 'मी पिताजींना सर्व कळविलं आहे. पण माझी शक्ती मर्यादित आहे.'

रामसिंगाचा काही दोष नाही, हे राजे जाणीत होते. त्यांनी रामसिंगाला जवळ बसवून घेतले. ते म्हणाले,

'तुमचा दोष नाही, रामसिंग! दोष आमचा आहे. आमचे मनसुबे फसले. औरंगजेबाचे सफल झाले. आता माझं ऐका... फुलादखानाचा पहारा बसलाच आहे. माझ्यासाठी तुम्ही जामीन राहिला आहात. आजपर्यंत तुम्ही माझ्यासाठी खूप तरफदारी केलीत. पण तुमच्या शब्दाला दरबारी किंमत नाही. तुमचं कोणी ऐकत नाही. अशा परिस्थितीत तुम्ही माझी जबाबदारी स्वीकारू नये.'

'राजासाब!'

'ऐका, कुंवरजी! मी सांगतो, ते अगदी खरं आहे. तुम्ही बादशहाला सांगा... शिवाजीवर आता फुलादचे पहारे आहेत. त्याची जबाबदारी तुमची. त्याला तुम्ही ठार मारू शकता. पण आता माझ्यावर शिवाजीची जबाबदारी नको.'

रामसिंग कावराबावरा होऊन उभा राहिला. बोलून-चालून अस्सल रजपूत तो. याला ते ऐकणेही कठीण गेले. त्याचे डोळे अश्रूंनी भरले. तो म्हणाला,

'राजासाब! तुम्ही असं म्हणावं, हा तुमचा मोठेपणा. पण तुम्हीच मला भाऊ मानलंत. संकटकाळी भावाला सोडणं हा राजपुतांचा धर्म नाही... राजे! मी तुम्हांला वाऱ्यावर सोडू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शकणार नाही. जे व्हायचं, ते आपणां दोघांचं होईल.’

रामसिंग सरळ मनाचा होता. त्याला कसं समजावून सांगायचं, हेच राजांना कळेना. रामसिंग म्हणाला,

‘राजाजी! पहारे बसले, म्हणून तुम्ही काळजी करू नका. माझी विश्वासाची माणसं तेजसिंग, अर्जुनजी, सुखसिंग, नाथावाट हे तुमच्या पहाऱ्यावर आहेत. डोळ्यांत तेल घालून ते तुम्हांला जपतील.’

राजांनी नि:श्वास सोडला. रामसिंग राजांचा निरोप घेऊन गेला. राजांनी आपली सारी माणसे गोळा केली. आता यापुढे प्रत्येक दिवस मोलाचा आहे, हे राजांनी जाणले. राजे आपले बेत सांगत होते. राजांच्या साथीदारांच्या चेहऱ्यांवर ते ऐकून बाळसे चढत होते.

दुसऱ्या दिवशी रामसिंग डेऱ्यात आला. त्याने राजांची उग्र संतापी प्रकृती पाहिली. राजे संतापले होते. हिरोजी, निराजी ही मंडळी हात बांधून अपराधी चेहऱ्यांनी सामोरी उभी होती. राजे ओरडले,

‘चालते व्हा! मला कुणाची जरुरी नाही. माझ्याजवळ कोणी राहण्याची गरज नाही.’

खालच्या मानेने सारे बाहेर गेले. रामसिंग थक्क होऊन म्हणाला,

‘राजासाब! काय चालवलंय् हे? आपल्या विश्वासाच्या माणसांची जेव्हा अत्यंत गरज, तेव्हा त्यांना घालवून देता?’

‘कसली गरज? इथं परमेश्वराखेरीज कोणाचं काय चालणार? परमुलखात परस्वाधीन बनलो मी! जे व्हायचं, ते होऊ दे. बिचारे ते आणखी गुंततील.’

रामसिंगाने राजांना शांत केले. तो तंबूबाहेर आला, तेव्हा राजांच्या लोकांनी तंबू पाडले होते. त्यांनी रामसिंगाला सांगितले,

‘आम्ही जातो!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रामसिंग निराजीपंतांना म्हणाला, ‘पंत, राजे माझंही ऐकत नाहीत. तुम्ही या लोकांना जाऊ देऊ नका. माझं ऐका. या लोकांना इथले मुक्काम हलवून माझ्या तळामागे बागेत राहायला सांगा.’

निराजी सुन्न झाले. राजे एक रचीत होते; आणि रामसिंग प्रेमापोटी त्यातच नेमका खो घालीत होता. निराजीपंतांनी राजांच्या माणसांना बागेत उतरण्यास सांगितले. राजांना हसावं, की रडावं, ते कळेना. ते म्हणाले,

‘पंत, या राजपुतांना डोकं फार कमी. भावनाविवश होणं एवढंच यांना माहीत. असं नसतं, तर कशाला बिचारे पिढ्यान् पिढ्या बादशहांची सेवा करीत बसले असते?’

सकाळी राजांनी फुलादखानाला बोलावून घेतले. फुलादखान येताच राजांनी त्याला मोठ्या मानाने बसवून घेतले. फुलादखान राजांच्या वर्तनाने चकित झाला. राजे हसत म्हणाले,

‘फुलादखान, आमच्या मनात तुमच्याविषयी काही नाही; तुम्ही हुकमाचे बंदे. तुम्ही आपलं कर्तव्य करता.’

‘राजासाब, तुम्ही समजुतदार म्हणून...’

‘असू दे.’ राजे म्हणाले. ‘आज आम्ही एका कामासाठी तुम्हांस त्रास दिला.’

फुलादखान सावध झाला. त्याने विचारले,

‘कसलं काम?’

‘मी तर आता कैदेत पडलो. एवढ्या दूर मी आलेला. माझ्या एवढ्या माणसांचा खर्च मला निभत नाही. तुम्ही माझी विनंती बादशहांना कळवा... आवश्यक तेवढी दहा-बारा माणसं ठेवून, बाकीचे मी माझ्या मुलुखात त्यांच्या घरी पाठवावे, म्हणतो.’

सिद्दी फुलादखानाचे डोळे आनंदाने चमकले. त्याने औरंगजेबाला राजांची विनंती सांगितली. राजांची माणसे जाणार, हे कळताच औरंगजेबाला आनंद झाला. त्याने राजांच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शेकडो माणसांना आग्र्याबाहेर जाण्याचे परवाने पाठवून दिले. शिवाजीने ही चाल का करावी, याचा विचार औरंगजेब करीत होता. शिवाजीच्या प्रत्येक गोष्टीवर त्याचे बारीक लक्ष होते. मागे शिवाजीने हत्ती खरीदल्याचे कळताच त्याने कसून चौकशी केली होती. आपली आहेत ती माणसे पाठवून शिवाजी मूठभर लोकांनिशी राहू इच्छितो, हे औरंगजेबाच्या बुद्धीला पटेना. त्याने तातडीने साऱ्या परगण्यांना हुकूम पाठविले...

'जर आग्र्याहून शिवाजी पळाला, तर त्याला दिसेल तिथं अडकवून ठेवण्याची खबरदारी घ्या.'

बादशहाकडूनच हुकूम आल्याने रामसिंगाचा नाइलाज झाला. साऱ्यांनी राजांचा जड अंत:करणाने निरोप घेतला. त्यात महादेवही होता. अनेक नजरबाज होते.

फार दिवसांनी एक गोष्ट मनासारखी झाली होती.

औरंगजेब जयसिंगाच्या उत्तराची वाट पाहत होता. जयसिंगाचे पत्र आले; पण त्यात त्याने शिवाजीच्या जिवाला जपण्याचा सल्ला दिला होता. औरंगजेब विचार करीत असता एके दिवशी शिवाजीचा निरोप आला.

शिवाजीराजांना बैरागी व्हायचे होते. त्यांचे मन विटले होते. काशीला जाऊन संन्यास घ्यायची परवानगी त्यांनी मागितली होती. ते ऐकून औरंगजेब हसला. त्याने निरोपाचे उत्तर दिले:

'राजांना जर बैरागी व्हायचे असेल, तर त्याला माझी काही हरकत नाही. संन्याशाला कुठंही राहिलं, तरी सारखंच. त्यांनी इलाहबादला जाऊन माझ्या किल्ल्यात राहावं. तिथं माझा सुभेदार बहादुरखान आहे. तो राजांच्यावर चांगली नजर ठेवील. राजांनी तिथं सुखानं ईश्वरचिंतन करावं.'

राजांचा संन्यास घेण्याचा मार्ग ढासळला. दोन मास होत आले, तरी काही घडत नव्हते.

एके दिवशी कवींद्र परमानंद अलाहाबादेच्या एका विद्वान ब्राह्मण कवीला घेऊन आले. त्याचे नाव होते कब कलश. राजांनी कब कलशला ठेवून घेतले. खूप रात्र होईपर्यंत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बोलणी झाली. दोन दिवसांनी कवी परमानंदांची त्यांनी रवानगी केली. त्यांना आपले हत्ती बक्षीस दिले. कब कलशलाही सन्मानाची बिदागी मिळाली. औरंगजेबाला ते कळले. राजे आता खरोखरच विरक्त बनत आहेत, असे त्याला भासले.

आग्र्यात पावसाच्या तुरळक सरी पडत होत्या. उष्मा शतपटींनी वाढला होता. राजांना आकाशातले ढग पाहून आठवत होता आपला मुलूख. ती गर्द राई. हिरव्या मखमलीने आच्छादिलेले पर्वत. आता मुसळधार पावसात गड नहात असतील. कड्यांवरून कोसळणाऱ्या प्रपातांचा श्वेत प्रवाह नजरेचे पारणे फेडीत असेल. धुक्याच्या विरळ वस्त्राने गडांच्या माथ्यांवर मायेचा पदर धरला असेल.

‘...मायेचा पदर!

‘मासाहेब! कशी दिवस कंठीत असेल ती माउली?’

राजांनी डोळ्यांच्या कडा पुसल्या. त्यांनी पाहिले. संभाजीराजे बिछान्यावर झोपले होते. त्यांच्या अंगावर काही पांघरूण नव्हते. हिरोजीला राजे म्हणाले,

‘हिरोजी, बाळराजांची शाल कुठं आहे?’

‘उकडतं, म्हणून घातली नाही अंगावर!’

‘पण तिच्याशिवाय बाळराजांना चांगली झोप येत नाही.’ राजांनी उठून शाल घेतली. क्षणभर हातात ती ती शाल घोळवीत राहिले; आणि त्यांनी ती शाल बाळराजांच्या अंगावर टाकली. बाळराजांची चाळवाचाळव झाली; आणि परत ते शांतपणे झोपी गेले.

पहारेकऱ्यांचे आवाज उठत होते. राजे बाळराजांच्या शेजारी झोपले. डोळे मिटत नव्हते. डेऱ्याच्या दाराशी तलवार उशाला घेऊन हिरोजी आडवा झाला होता. मदारीने विचारले,

‘पाय रगडू?’

‘नको, मदारी! झोप तू. आम्ही पण झोपतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

२८

मदारी समया शांत करीत होता. जळत राहिलेल्या समईच्या एक-दोन वातींचा उजेड अंधाराची भयाणता वाढवीत होता. राजे पडल्या जागेवरूनच त्या वातींकडे पाहत होते. राजांचे मन बेचैन झाले होते. अनेक विचारांचे काहूर मनात उठले होते...

'माणूस स्वत:ला जाणता समजतो. केवढा अहंकार!

'दक्षिणच्या सुभेदारीचं स्वप्न घेऊन आपण आग्र्यात आलो. आलमगीरची मर्जी संपादन करून सुभेदारी घ्यावी, आणि मिर्झाराजे, दिलेरखान यांचा शह उठताच परत स्वराज्याच्या खटपटीस लागावं, हा आमचा मनसुबा. मनसुबा दूरच राहिला; आणि आम्ही बादशहाच्या कपटनीतीला मात्र बळी पडलो!'

राजांना आपल्या विचारांचे हसू आले.

'नीती, अनीती ठरवायची कुणी? ज्याच्या साम्राज्याविरुद्ध आम्ही लढत देण्यासाठी उभे राहिलो, त्या औरंगजेबानं आमची गय का करावी? आणि दक्षिणेची सुभेदारी तो देईल तरी कसा? खुद्द आपल्याच भावांना कठोर शासन करणारा हा औरंगजेब! आपल्या पित्याला विष घालताना ज्याचे हात थरथरले नाहीत, तो आलमगीर आमच्या बाबतीत रहेमदिल होईल कसा? आजवर औरंगजेबानं आम्हांला जिवंत का ठेवलं?

'खास, काही तरी मोठी गल्लत होते आहे.

'दैवानंच आलमगिराच्या मनात काही तरी गोंधळ निर्माण केलेला दिसतो. नाही तर 'तो' निर्णय करायला त्याला एवढा वेळ लागला नसता. औरंगजेब पक्का राजकारणी! राजकारणात वेळेला फार महत्त्व असतं. कैक निर्णय वेळच्या वेळीच अमलात आणले नाहीत, तर आयुष्यभर पश्चात्ताप करण्याची पाळी येते. हे माहीत असताना औरंगजेब आमच्या बाबतीत स्वस्थ कसा? आमचंच दैव बलत्तर, म्हणूनच हे घडत असावं...'

'तसं असेल, तर आई मार्ग का दाखवीत नाही?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे सावकाश पलंगावरून उठले. त्यांची नजर शांतपणे झोपी गेलेल्या संभाजीराजांच्याकडे गेली.

‘किती निर्धास्तपणे झोपलाय् हा! ह्या अजाण मनाला पहाऱ्याची जाणीव नाही; कैदेची फिकीर नाही; मृत्यूच्या टांगत्या तलवारीची भीती नाही. पालकाच्या भरवशावर किती शांतपणे युवराज झोपू शकतात! मग आम्हांलाच पालकाचा विश्वास का नसावा!

‘मासाहेब!

‘आधीच वार्धक्यानं थकलेल्या! त्यांच्या चिंतेला पारावार नसेल. देवाच्या पायांशी धरणं धरून ती माउली अश्रू ढाळीत, नवस बोलत झुरत असेल. दुर्दैवानं आमचं इथंच काही बरं-वाईट झालं, तर...’

राजांना तो विचार सहन होईना. जिजाबाईंच्या आठवणीने त्यांचे मन कातर बनले. त्याच बेचैनीत ते फेऱ्या घालीत होते.

‘मुलुखापासून केवढे दूर आम्ही शत्रूच्या गोटात येऊन सापडलो. या वेळेला गडावर केवढी चिंता वाढली असेल! अनाजी, मोरोपंत, प्रतापराव, तानाजी ही सारी माणसं काय करीत असतील? दररोज नवीन अफवा उठत असतील. मनाच्या तराजूतलं आमचं जीवनमरणाचं पारडं दररोज हेलावत असेल!

‘कदाचित आमचे नजरबाज आग्र्यापर्यंत येऊन पोहोचलेही असतील.

‘आम्ही शत्रुहाती सापडलो, हे जाणून आमच्या माघारी बंडावा तर झाला नसेल?’

त्या विचाराबरोबर राजांची पावले थांबली. क्षणात चेहऱ्यावर स्मित उजळले.

‘बंडावा?

‘कोण करणार?

‘कोणाविरुद्ध?

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अनाजी, मोरोपंत, प्रतापराव, तानाजी... नावं घ्यावीत तेवढी थोडी.

‘ही माणसं बंडावा करणार? अशक्य!!

‘उलट, पुरंधरच्या तहानं कमजोर झालेलं राज्य सावरता-सावरता बिचारे थकत असतील. खोट्या धीराच्या शब्दांनी मासाहेबांना आणि फौजेला धीर देत बिचारे दिवस कंठीत असतील.’

राजांनी परत पावले उचलली.

‘येताना मारे ऐटीने आमच्या बरोबर आम्ही खास विश्वासाची हजार असामी आणली. त्यांना या संकटातून बाहेर काढण्यात यश मिळालं, ही देवाची कृपा. बिचाऱ्या रामसिंगाच्या ध्यानी आलं नाही; पण ही हजार माणसं आमच्या हजार वाटांवर अहोरात्र नजर ठेवून आमच्यासाठी तिष्ठत असतील.’

राजांची मुद्रा करारी बनली.

‘या संकटातून आम्हांला सुटायला हवं!

‘पण कसं?

‘कसं?’

राजे विचारात गुंतले. मनात शब्द उतरत होते...

‘केल्यानें होत आहे, रे! तें आधीं केलेंचि पाहिजे.’

समर्थांच्या आठवणीने राजांना धीर आला. साऱ्या विचारांचे रूपच पालटले.

‘फर्मानाचा स्वीकार करून आम्ही मासाहेबांच्या सामोरे गेलो होतो. भोगल्या अपमानानं संतापलेल्या आम्हांला मासाहेबांनी सांगितलं होतं...

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ ‘राजे! स्वत:च्या पराजयाचं जरा कौतुक करा. तेही परमेश्वरी वरदानच असतं. त्यानं पाठविलेली संकटं जे धीरानं सहन करतात, सोसतात, त्यांनाच भविष्यकाळ उज्ज्वल असतो, असं पोथ्या-पुराणं सांगतात. श्रद्धेनं आणि डोळसपणानं या संकटांकडे पाहिलं, तर साऱ्या वाटा दिसू लागतात...’ ’

त्या आठवणीनं राजांना धीर आला. त्यांच्या विचारांना एक वेगळीच दिशा गवसली.

‘लाक्षागृहातून जर पांडव सुटतात, तर मग आम्हांला तोच मार्ग का सुचू नये?

‘कंसाच्या बंदिशाळेत श्रीकृष्णाचा जन्म झाला. एवढा पहारा असताही वसुदेवांनी साध्या टोपलीच्या आधारानं श्रीकृष्णांना बंदिशाळेतून बाहेर काढलंच ना! त्यांच्याच कृपेनं पहारेकऱ्यांना निद्रा लागली; कुलुपाचे बंध सुटले; भरल्या नदीनं वाट दिली.

‘आलमगीर विचारांच्या आहारी जाऊन आम्हांला आजवर जिवंत ठेवतो, ही त्याचीच कृपा असली पाहिजे. आम्ही फक्त आधीच मोकळा असलेला मार्ग शोधायला हवा.’

राजांनी समईकडे पाहिले. एक वात मंदावत होती. राजे पुढे झाले. त्यांनी दोन्ही वाती पुढे सरकविल्या. वाती फरफरत मोठ्या झाल्या.

त्या वाढत्या प्रकाशात राजांच्या मुखावरचे समाधान उजळले होते.

□

२९

सकाळच्या वेळी राजे सर्वांशी प्रसन्नपणे बोलत होते. निराजीपंत, हिरोजी फर्जंद यांच्यासारख्या जाणत्यांना तो बदललेला भाव पाहून खूप बरे वाटले. निराश मनात आशेची पालवी उमटली.

राजे सर्वांसह मोकळेपणाने बोलत बसले असता रामसिंग आल्याची वर्दी आली. राजांनी रामसिंगाचे स्वागत केले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘रामसिंग, दरबारची काय खबर?’

‘सर्व ठीक आहे.’

‘आलमगिरांच्या कृपेनं आम्हीही इथं निर्धास्त बनलो आहो.’

‘जी!’ रामसिंग चकित झाला.

राजे हसले.

‘रामसिंग. एवढं आश्चर्य वाटायला काय झालं? आम्ही आयुष्यात कधी निर्धास्त नव्हतो, एवढे इथं आहो. एवढा कडेकोट पहारा असताना माणसाला काळजी कसली? कैदेसारखं सुख नसतं, रामसिंग!’ राजांनी एकदम विचारले, ‘आमच्या जबाबदारीतून सुटका करून घेतलीत, की नाही?’

‘जी! अजून नाही.’

‘रामसिंग, तुम्ही आम्हांला लहान भावासारखे. तुम्ही आमच्यासाठी हा धोका पत्करू नका. बोलून चालून ते बादशहा. त्यांची केव्हा लहर फिरेल, कोणत्या कारणानं इतराजी होईल, ते सांगता येणं कठीण.’

रामसिंग थोडा विचारात पडला. त्याचा तो भाव पाहून राजांना बरे वाटले. विषय बदलीत त्यांनी गोपीनाथपंतांना विचारले,

‘पंत, युवराज कुठं आहेत?’

गोपिनाथपंतांनी हसून उत्तर दिले,

‘मघा ते फुलादखानाबरोबर पहारा पाहत होते.’

त्या उत्तराने राजे खळखळून हसले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सुरेख! आम्ही कैदेत; आणि युवराज मात्र मोकळे! उलट, तेच आमचे पहारे पाहतात. भाग्यवान आहेत.’

रामसिंग हसण्यात सामील झाला.

‘खरं आहे, राजे! युवराज खरेच भाग्यवान आहेत. आलमगिरांना त्यांचा खूप लळा आहे. आजही त्यांना घेऊन येण्याची आज्ञा झाली आहे. आणि, राजे, युवराजांनी माझं घर तर आपलंसं केलं आहे.’

‘छान! आलमगीर कृपाळू आहेत. मनाचे मोठे आहेत. नाही तर शत्रूच्या मुलाला एवढ्या मायेनं कुणी वागविलं असतं?’

राजांचा आनंद पाहून रामसिंग म्हणाला,

‘राजासाब, एक विनंती आहे.’

‘असं परक्यासारखं बोलायचं नाही, रामसिंग. एकदा तसं ठरलं ना?... सांगा.’

‘आपल्याला दक्षिणेत मनुची भेटले होते?’

‘मनुची?’

‘जी! पिताजींच्या तोफखान्यावर ते अधिकारी होते. परदेशी आहेत. त्यांची आणि आपली पुरंधरला ओळख झाली होती.’

राजांना एकदम आठवले.

‘व्वाऽ! लाख माणूस! आम्ही जरूर त्यांना ओळखतो... नव्हे, आमची दोस्ती आहे. चिंतेच्या दिवसांत त्यांचा सहवास आम्हांला सुखावह वाटला. कुठं आहेत ते? इथं आलेत?’

‘जी, नाही! पण त्यांनी ओळखपत्र देऊन एक कलावंत पाठविला आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कलावंत?’

‘जी! चितारी आहे. दरबारी अनेकजणांची त्यानं चित्रं काढली आहेत. आलमगिरांनी त्यांना आपल्याला भेटायची इजाजत दिली आहे.’

‘बादशहा कृपाळू आहेत. त्या कलावंतांचं नाव काय?’

‘मीर हसन.’

‘आलेत?’

‘जी!’

‘बोलवा.’

थोड्याच वेळात मीर हसन राजांच्या सामोरा आला. रामसिंगाला, राजांना मीर हसनने मुजरे केले. मीर हसनने राजांना मनुचीचे पत्र सादर केले. त्यात मनुचीने मीर हसनला राजांची छबी काढण्याची विनंती केली होती. पत्राचा मजकूर जाणून घेताच राजांनी मीर हसनकडे पाहिले.

सडपातळ देहाचा, हसऱ्या नजरेचा मीर हसन राजांच्या मान्यतेची वाट पाहत होता. राजांची नजर रामसिंगाकडे वळली.

‘रामसिंग, काय योग असतात. पाहा. जेव्हा आम्ही पुरंधरचा तह करून शरणागती स्वीकारली, तेव्हा तिथं आम्हांला उत्तरेचे पंडित शिवराम भेटले. त्यांनी आग्रह करून आमची कुंडली घेतली. दीड वर्षानंतर आमचे मनोरथ सिद्धीला जातील, असं भविष्य वर्तविलं. संकटात सापडलेल्या जीवांना अशा गोष्टींचा मोठा आधार वाटतो. मनोरथ दूरच राहिले; उलट, आम्ही जिवंत सुटणं कठीण होऊन बसलं! आणि इथं कैदेत असता मनुचीचं पत्र घेऊन हे चितारी येतात. कैक वेळा दैवदेखील भारी क्रूर थट्टा करीत असतं.’

पण राजांची ती गंभीर मुद्रा फार काळ टिकली नाही. ते एकदम हसले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कदाचित या दैवयोगाला निराळंच कारण असावं. आम्ही इथं राहिलो नाही, तरी आमची छबी निश्चित मागे राहील.’

राजे हसले. पण रामसिंग हसला नाही. राजांच्या बोलण्याने तो बेचैन झाला होता. राजे सावध झाले. त्याच सहजतेने ते म्हणाले,

‘रामसिंग! चिंता कसली? एक ना एक दिवस मृत्यू गाठणारच! इथंच आमचा शेवट झाला, तरी हे चित्र मागे राहील. नाही का?’

रामसिंगाच्या मनावरचे ओझे उतरले.

‘राजासाहेबांनी असं बोलू नये. कदाचित जहाँपन्हांची...’

‘हां, हां! रामसिंग, नशिबात असेल, ते सारं होऊन जाईल. या कलावंतांना केव्हाही यायला सांगा. त्यांना आमचं चित्र काढू देत, तेवढाच वेळ आमचा चांगला जाईल.’

दुसऱ्या दिवसापासून मीर हसन राजांच्याकडे येऊ लागला; चित्र काढू लागला. सारे कौतुकाने ते पाहत होते. राजे मोकळ्या मनाने मीर हसनबरोबर बोलत होते. उलटणाऱ्या दिवसाबरोबर राजांचा प्रसन्न भाव वाढत होता; पण रामसिंगाला संकटांचे डोंगर दिसत होते.

मिर्झाराजांनी कोठून ह्या शिवाजीची जोखीम पत्करली आणि आग्र्याची जोखीम आपल्यावर टाकली, असे त्याला झाले होते. मध्यंतरी बादशहाच्या मनात खुद्द आपण दक्षिणेत विजापूरमोहिमेवर जावे, असे आले होते. रामसिंगावर शिवाजीची जबाबदारी टाकून दक्षिणेत उतरावे, असा त्याचा इरादा होता. पण रामसिंगाला मिर्झाराजांनी शिवाजीची जबाबदारी न स्वीकारता बादशहाबरोबर दक्षिणेत उतरण्याचा सल्ला दिला होता. शिवाजीराजांचा उपदेश त्यांच्या ध्यानी येत होता. जामिनकीतून मुक्तता करून घ्यावी, हा राजांचा वारंवारचा सल्ला त्याला आता पटू लागला होता. औरंगजेबाने प्रथम रामसिंगाच्या विनंतीकडे लक्ष दिले नाही; पण नंतर त्याने ते मान्य केले, आणि रामसिंगाला शिवाजीच्या जामिनकीतून मोकळे केले. रामसिंगाला मोठा भार उतरल्याचे समाधान झाले. राजांना ती बातमी रामसिंगाने सांगताच खूप हलके वाटले.

राजांना आता आपले मार्ग संपूर्णपणे मोकळे होते. रामसिंगाच्या शपथेतून आता ते

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मोकळे झाले होते.

एके दिवशी मीर हसन पुरे झालेले चित्र राजांना दाखविण्यासाठी घेऊन आला. राजे ते चित्र मोठ्या कौतुकाने पाहत होते. चित्रात राजे आपल्या खास पोशाखात अश्वारूढ झालेले दिसत होते. संगे अनेक भालाईत दाखविले होते. त्यांत अनेक मुसलमानही दिसत होते.

'मीर हसन, तुमच्या कलेचं कौतुक करावं, तेवढं थोडं आहे. आमचं रूप हुबेहूब टिपलंत. पण एवढे मोगल सरदार आमच्या बरोबर आले कोठून?'

'हुजूर, आपण रामसिंगांच्यासह शाही दरबारी जाताना मी पाहिलं होतं. ते सारं तसंच मनात होतं.'

'वा! सुरेख! निराजीपंत....'

निराजीपंतांनी मानवस्त्रे आणली. राजांनी मीर हसनला मानवस्त्रे आणि विपुल द्रव्य देऊन गौरविले. मीर हसनने राजांचे चित्र राजांना नजर केले.

'मीर हसन! ही कलाकृती तुमच्याच जवळ राहू देत. हवं, तर हे चित्र मनुचींना द्या. आमची आठवण म्हणून ते जतन करतील.'

राजांनी मोठ्या सन्मानाने मीर हसनला निरोप दिला,

त्यानंतर थोड्याच दिवसांत...

□

३०

त्यानंतर थोड्याच दिवसांत राजे आजारी पडल्याची बातमी पसरली. रामसिंग राजांची विचारपूस करी. औरंगजेबाला आजाराची बातमी कळली. त्याने हकीम पाठविण्याची तयारी दाखविली; पण जीवनाला विटलेले राजे कसलीच औषधे घ्यायला तयार नव्हते. नाही म्हणायला गावातील एका वैद्याचे औषध तेवढे ते स्वीकारीत. राजांच्या जवळ हिरोजी फर्जंद

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

व मदारी मेहतर एवढेच लोक राहिले होते. रामसिंगाचे पहारेकरी राजांच्या विश्वासाचे बनले होते. राजांचा आजार बळावत होता. कष्टाने फिरणारे राजे अंथरुणाला खिळले. फुलादखान वारंवार राजांच्या चौकशीला येई. प्रकृतीला आराम वाटावा, म्हणून धार्मिक संप्रदायांप्रमाणे साधुसंत, देवस्थाने, बादशहांचे वजीर यांना मिठाई पाठविण्याचे राजांच्या मनात आले.

दररोज मिठाई पाठविली जात होती. डेऱ्याबाहेरच्या पहाऱ्यावर तेजसिंग, अर्जुनजी, सुखसिंग नाथावट ही माणसे होती. तसेच, डेऱ्यालगत रामसिंगाचे रामकिशन ब्राह्मण, जिवा जोशी, श्रीकिशन उपाध्याय आणि बलराम पुरोहित हे लोक होते. रामसिंगाची ही सारी माणसे राजांनी वश करून घेतली होती. यांखेरीज फुलादखानाचे अनेक अधिकारी येत; त्यांनाही राजांनी भरपूर द्रव्य दिले होते. फुलादखानाला मात्र याची गंधवार्ताही नव्हती.

औरंगजेब शिवाजीबद्दल आता निर्धास्त बनला होता. शास्ताखानाच्या बेगमेने, अनेक जासुदांनी उगीचच शिवाजीबद्दल हव्या त्या कंड्या पिकविल्या होत्या... 'शिवाजी सैतान आहे. तो भिंतीतून आलेला शास्ताखानाने पाहिला. चौदा हात उडी तो मारू शकतो. तो अदृश्य होऊ शकतो...'

'हे त्याला करता येतं, तर पहाऱ्यात खितपत का पडला असता?' औरंगजेब अखेरच्या डावाची वाट पाहत होता. राजा विठ्ठलदासाची हवेली पुरी होत आली होती. शिवाजीला त्या हवेलीत हलवून, तिथेच त्याचा वध करून पुरण्याचे औरंगजेबाने निश्चित केले होते. ही कुणकूण रामसिंगालाही लागली होती.

राजांची प्रकृती पाहायला रामसिंग आला होता. राजे कण्हत होते. ताप नव्हता; पण सारे अंग कळांनी भरले होते, असे राजे सांगत होते. रामसिंग बेचैन दिसत होता. तो म्हणाला,

'राजासाब, फार वाईट वेळेला हे दुखणं आलं.'

'का?' राजांनी कष्टाने विचारले.

'मला बातमी लागली आहे. विठ्ठलदासाच्या हवेलीत नेऊन तुम्हांला मारण्याचा कट घाटत आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘रामसिंग?’

‘औरंगजेब काहीही करू शकतो. माझा नाइलाज आहे, राजे! मी काहीही करू शकत नाही.’ रामसिंग रडू लागला.

राजे कष्टाने उठले. त्यांनी रामसिंगाला जवळ घेतले. राजे म्हणाले,

‘रडू नका. जे व्हायचं, ते होईल. रामसिंग, करता आली, तर एक गोष्ट करा.’

‘काय करू, राजासाब?’

‘विठ्ठलदासाच्या हवेलीत आम्हांला केव्हा हलविलं जाणार, ते आम्हांला कळायला हवं.’

‘ते जमेल. पण त्याचा काय उपयोग?’

‘निदान घरच्या माणसांना निरोप तरी सांगता येतील. रामसिंग, संभाजीवर लक्ष ठेवा!’

‘त्यांची काळजी करू नका, राजे! आता ते माझ्या सवयीचे झाले आहेत. दरबारचे रिवाजदेखील त्यांच्या अंगवळणी पडले आहेत. राजासाब, जेव्हा तुम्हांला हलवायचं ठरेल, तेव्हा मीही आपल्याला भेटू शकणार नाही. मी असं करीन...’

रामसिंगाने थोडा विचार केला; आणि तो म्हणाला, ‘मी त्या दिवशी फुलादखानाकडून निरोप पाठवीन की, ‘तुम्ही माझ्याकडे येऊ नका. पातशहांनी बंदी केली आहे.’ ज्या दिवशी असा निरोप येईल, त्याच्या दुसऱ्या दिवशी तुम्हांला हलविलं जाणार, हे निश्चित समजा. यापेक्षा मला जास्त सांगता येत नाही.’

रामसिंग राजांचा निरोप घेऊन गेला. राजे स्वस्थ पडून राहिले. मदारी, हिरोजी, रामकिशन, जिवा जोशी मिठाईचे पेटारे भरण्यासाठी आत आले. राजांनी हिरोजीला निरोप सांगितला. हिरोजी गडबडीने बाहेर गेला. मिठाईच्या टोपल्या भरीत असलेला मदारी म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज, अशी मिठाई आपल्याकडे होत नाही.’

‘खरं आहे, मदारी. ही मिठाई राजगडला पोहोचायला हवी.’

‘तितके दिवस टिकेल?’

रामकिशन म्हणाला, ‘महिनाभर ठेवली, तरी बिघडत नाही.’

‘ऐकलंस, मदारी? मिठाई हवे तितके दिवस टिकते. फक्त पाठविता आली पाहिजे.’

पंधरा-सोळा वर्षांचा पोर मदारी. पण हुशार खरा. त्याला आपलं हसू लपविता आलं नाही. टोपल्या तयार झाल्या. रंगीत दांड्यांना अडकवून एकएक टोपली दोघां सेवकांच्या खांद्यावरून डेऱ्याबाहेर गेली.

फुलादखानाच्या पहाऱ्यावर टोपल्यांची कसून झडती झाली; आणि टोपल्या बाहेर गेल्या. त्यांतली एक टोपली खुद्द फुलादखानालाच पाठविली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी कब कलश राजांच्या भेटीला आल्याची वर्दी आली. राजांनी कब कलशची भेट घेतली. डोक्याला भगवा रुमाल, कपाळी गंध, गोरी पान, उंची पुरी अशी कब कलशची मूर्ती त्याच्या बुद्धिमत्तेचे तेज दाखवीत होती. राजे बराच वेळ कलशबरोबर बोलत होते. राजांचे लक्ष दाराशी गेले. डेऱ्याच्या आतल्या द्वारी फुलादखान उभा होता.

राजांनी पलंगावरूनच हाक दिली.

‘या, फुलादखान!’

फुलादखान आत येत म्हणाला, ‘राजासाब! आपल्या मिठाईबद्दल शुक्रिया आदा करण्यासाठी मी आलो होतो.’

‘बसा ना! त्यात आभार कसले? हे कब कलश. काशीचे दशग्रंथी ब्राह्मण. कुंडली चांगली जाणतात. आमच्या प्रकृतीला आराम केव्हा पडेल, हे आम्ही विचारीत होतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

फुलादखान हसून म्हणाला, 'राजासाब, त्यापेक्षा आपली सुटका केव्हा होईल, हे का विचारीत नाही?'

राजांनी आपल्या तीक्ष्ण नजरेने फुलादखानाला न्याहाळले. दुसऱ्या क्षणी हसत ते म्हणाले,

'फुलादखान, त्या प्रश्नाला काय अर्थ आहे? मेहेरबान बादशहांच्या आज्ञेनं तुमच्या पोलादी पंज्यात आम्ही सापडलेले. आमची सुटका कठीणच! सापडलेला पक्षी कधी औरंगजेबानं सोडला नाही; आणि तुमच्या पकडीतून आजवर कुणी निसटू शकलेलं नाही.'

सिद्दी फुलादखानाचा काळा चेहरा तकाकला. डोळे चमकले. पांढरे शुभ्र मोठे दात दाखवीत तो म्हणाला,

'राजासाब! ही तारीफ नाही. ही हकीकत आहे.'

'आम्ही तारीफ केली नाही. हकीकतच सांगितली.'

त्याच वेळी संभाजीराजे आत आले. शिवाजीराजांच्याकडे जात ते म्हणाले,

'आबासाहेब!'

'बाळराजे, सकाळपासून होता कुठं?'

'आम्ही रामसिंग काकांच्याकडं गेलो होतो. त्यांच्याबरोबर आम्ही आलीजांच्याकडं गेलो होतो. आलीजांनी मला जवळ घेतलं, आपली कट्यार मला दिली. ही बघा.'

बाळराजांनी कट्यार काढली. कट्यारीचं पातं चकाकलं. राजे म्हणाले,

'बरीच धारदार आहे. बाळराजे, सांभाळून. ह्या शाही कट्यारी मोठ्या विषारी असतात.'

'आबासाहेब, आम्ही तुमच्यासाठीही एक कट्यार मागितली. तर आलीजाह म्हणाले...' आणि एकदम बाळराजांनी विचारले, '...'अनजान' म्हणजे काय हो, आबासाहेब?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘का?’

‘आम्ही कट्यार मागितली, तर आलीजाह म्हणाले, ‘पोरगा निहायत मासूम व अनजान आहे.’ ’

सारे हसले. राजे म्हणाले,

‘बाळराजे! बादशहांनी तुमचं कौतुक केलं.’

‘आलीजांनी आम्हांला संध्याकाळी पण बोलावलंय्.’

‘असं? भाग्यवान आहात. आमची ती तकदीर नाही.’

फुलादखान इतके दिवस राजांच्यावर पहारा करीत होता; पण राजांची सौजन्यशील वागणूक, सर्वांशी प्रेमळ बोलणे पाहून त्याला राजांच्या कैदेचे कोडे उलगडत नव्हते. न राहवून तो म्हणाला,

‘राजासाब, दुर्दैवाची गोष्ट आहे की, आपण कैदेत पडलात, आणि मी पहारा करतो. संभाजीराजांच्यासारखीच बादशहांची कृपा आपल्यावर असती, तर आज आपण शाही दरबारचे सच्चे दोस्त बनलो असतो.’

‘आजही आपलं नातं तेच आहे. तुम्ही पहारा करता, म्हणून तुम्हांला दोष देण्याइतके आम्ही अज्ञानी नाही.’

फुलादखानाने रजा घेतली. फुलादखान बाहेर जाताच राजांनी बाळराजांना जवळ बोलावलं. ते म्हणाले,

‘बाळराजे, यांना ओळखता ना?’

‘हो!’ बाळराजांनी मान डोलाविली.

‘मग यांची ओळख पक्की ठेवा! ह्यांनी केव्हा जरी काही सांगितलं, तरी ऐकायचं.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

समजलं?’

‘जी, आबासाहेब!’

कब कलशने बाळराजांच्या पाठीवरून हात फिरवला. बाळराजे बाजूला जाताच कब कलश म्हणाला,

‘राजे, फार मोठी जबाबदारी टाकता आहात.’

‘तुम्ही ती पार पाडाल, याची खात्री आहे. तुम्ही आता परत येण्याची गरज नाही. हिरोजी तुम्हांला गाठील.’

कब कलश गेला. राजांनी परत बिछान्यावर अंग टाकले.

□

३१

दिवसेंदिवस शिवाजीराजांची प्रकृती बिघडतच होती. औषधांचा काही गुण येत नव्हता. दोन प्रहरी अचानक फुलादखान आला. राजे जागेच आहेत, असे कळताच तो आत गेला. फुलादखान राजांच्या जवळ जात म्हणाला,

‘राजासाब, आपकी तबियत...’

‘ती आता एकदमच बरी व्हायची!’ राजे म्हणाले.

‘उम्मीद सोडून कसं चालेल? अल्ला रहमदिल आहे... राजासाब, आपण कुंवर रामसिंगाच्या भेटीस जाणार होतात?’

राजांनी आश्चर्य दाखविले नाही. ते म्हणाले,

‘या रोगाचा कंटाळा आला. तुमच्या सोबतीनं जावं, म्हणत होतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अफसोसकी बात है, राजासाब! कुंवरजींचा निरोप आहे.’

‘काय म्हणतात?’

‘त्यांनी ‘भेटायला येऊ नका,’ म्हणून निरोप पाठविला आहे. बादशहांनी त्याला मना केलं आहे. अशा हालतीत तुम्ही जाणंही बरं वाटत नाही.’

‘श्रींची इच्छा!’ राजे म्हणाले, ‘एक बोलाय-चालायला जागा होती... तीही बंद झाली. आम्ही झोपतो.’

फुलादखान निघून गेला. राजांनी मदारी, फर्जंद, जोशी- साऱ्यांना भराभर हुकूम सोडले. संभाजीला जोश्यांबरोबर रामसिंगाकडे पाठवून दिले. संभाजीराजांना राजांनी सांगितले,

‘बाळराजे, तुम्ही रामसिंग काकांच्याकडे जा. तिथं खेळा. काका दरबारी गेले, तरी तुम्ही जाऊ नका. मी, कलश काका, हिरोजी यांपैकी जो जे सांगेल, तसं वागा. जपून राहा.’

संभाजी जोश्यांबरोबर रामसिंगाकडे गेला. राजांनी अर्जुनसिंगाला विचारले,

‘टोपल्या तयार आहेत?’

‘जी!’

‘सारी माणसं विश्वासाची आहेत ना?’

‘जी!’

‘ठीक! अर्जुनसिंग, तुम्ही गावापर्यंत आम्हांला सोबत करायची. पुढचं आमचं आम्ही पाहून घेऊ. कारागिराला आत बोलवा.’

अर्जुनसिंगाने मान डोलविली. अर्जुनसिंग एका माणसाला घेऊन आत आला. तो पेटारे नेणाऱ्यांपैकीच एक कहार होता. अर्जुनसिंग म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'हा बहिरा आणि मुका आहे.'

राजे आसनावर बसले. राजांची दाढी होत असता हिरोजी राजांचे कपडे चढवीत होता. राजांची दाढी झाली. राजे उठले. हिरोजी राजांच्या कपड्यांत उभा होता. दुरून पाहिले, तर कुणाला संशय येणे शक्य नव्हते. राजांनी आपल्या हातातले कडे आणि कानांतले चौकडे उतरून त्याच्या हाती दिले. हिरोजी राजांच्या बिछान्यावर झोपला. राजांनी भरभर भोयाचा वेष केला. कानांत कडी अडकवली. डोक्याला गोल पागोटे चढविले. राजांच्या रूपात आमूलाग्र बदल झाला. राजांनी हिरोजीला सूचना दिल्या होत्या. मदारीच्या पाठीवरून हात फिरविला. मदारी हिरोजीचे पाय चेपू लागला. हिरोजी कुजबुजला,

'राजे, जपा!'

राजांनी हिरोजीचा हात दाबला. तेजसिंगाला संभाजीला आणण्यास पाठविले; आणि राजे मिठाईच्या टोपल्या नेण्यासाठी गोळा झालेल्या भोयांच्या जागी बसले.

सूर्य मावळला. पहारे बदलण्याची गडबड सुरू झाली. अर्जुनसिंगाने राजांना खुणावले. पुढे दोन पेटारे सोडून तिसऱ्या पेटाऱ्याला मागच्या बाजूला राजांनी खांदा दिला. पाठीमागे मिठाईचे दोन पेटारे होते. एकेक पेटारा बाहेर पडत होता. राजे मागोमाग बाहेर पडले. पहाऱ्यावर पेटारे अडविले गेले. मिठाईच्या टोपल्यांची झाकणे उघडून बघितली जात होती. सर्व टोपल्या तपासून झाल्यावर पेटारे बाहेर पडले. झपझप पावले टाकीत पेटारे जात होते. अग्रभागी अर्जुनसिंग चालत होता. काळोख पडू लागला होता. पेटारे बाजारपेठेनजीक एका अरुंद रस्त्यावर आले आणि कानांवर आवाज आला,

सूरतसे कीरत बडी बिना पंख उड जाय।
सूरत तो जाती रही कीरत कबहु न जाय।
रहम, बंदा परवर, रहम करो।।

राजांनी पाहिले. एक फकीर रस्त्यावर बसला होता. त्याच्याजवळ एक भोई उभा होता. राजांनी डाव्या हाती धरलेला रुपया कटोऱ्यावर भिरकावला. पेटारे पुढे गेले. तोच मागून भोई आला. राजांच्या बरोबर चालू लागला. त्यानेही नकळत राजांच्या मागे उभे राहून दांडीला खांदा दिला. राजे अलगद बाजूला झाले. राजे पेटारे दिसेनासे होईपर्यंत रस्त्यावर उभे होते. मागून आवाज आला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘लौकर चला...’

फकिराच्या पाठोपाठ राजे गल्लीत शिरले. नागमोडी गल्ल्या ओलांडीत राजे एका घरात घुसले. दार लावले गेले. घर कुंभाराचे होते. कब कलशला पाहताच राजे उद्गारले,

‘बाळराजे?’

‘सुरक्षित आहेत. एव्हाना ते आग्र्याबाहेर गेले असतील.’ कलश म्हणाला. ‘आपण पळाल्याचं कळताच कसून झडत्या होतील. युवराज तसे दडायचे नाहीत. शोध होईल, तेव्हा तुम्ही बाळराजांच्यासह असणार, असं समजून लहान मुलाबरोबर फिरणाऱ्या प्रत्येकाची झडती होईल. बाळराजांच्या बरोबर महादेवदेखील आहे. ते मथुरेच्या वाटेला लागले आहेत.’

‘पण कुणी ओळखलं, तर?’

‘संजाब राखलेले बाळराजे आता तुम्हीही ओळखू शकणार नाही. गरीब ब्राह्मणाकडे कोण लक्ष देतो?’

-आणि पुढचा विचार सुरू झाला.

□

३२

हिरोजी फर्जंद पडद्याकडे तोंड करून पांघरूण घेऊन झोपला होता. मदारी पाय चेपत होता. समया तेवत होत्या. अर्जुनसिंग नित्याप्रमाणे पहाऱ्यावर हजर झाला. जोशीही आला. फुलादखानाचे पहारेकरी डेऱ्यात डोकावून गेले. राजे झोपले होते. मदारी पाय चेपीत होता. उशाच्या मंचकावर जिरेटोप, तलवार दिसत होती. रात्र चढत होती. राजांनी जेवणही नाकारले होते. कण्हण्याचा आवाज ऐकू येत होता. मदारी पाय चेपता-चेपता कुजबुजला,

‘हिरोजी! पुरे म्हण की! हात दुखले.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘रगड! संशय येईल.’ हिरोजी म्हणाला.

मदारी पाय परत चेपू लागला. मध्यरात्रीचे पहारे बदलले. मदारी पाय रगडता-रगडता तेथेच झोपी गेला होता. भल्या पहाटे हिरोजीने मदारीला जागे केले. मदारीने डोळे उघडले. हिरोजी म्हणाला,

‘ऊठ!’

हिरोजी चटकन पलंगाखाली आला. त्याने राजांचे कपडे बदलले. आपला चोळणा, मुंडासे घालून तो तयार झाला. पलंगावर लोड घालून, त्यावर पांघरूण घालून, त्याने सारखे केले. कुणालाही वाटावे की, डोक्यावर पांघरूण घेऊन राजे झोपलेत. पलंगाशेजारी मदारी, हिरोजी गुडघ्यांत मान घालून बसले.

पहाटेचा अधिकारी आत डोकावला. तो काही बोलणार, तोच हिरोजीने ओठांवर बोट ठेवले; झोप लागल्याची खूण केली.

थोड्या वेळाने दोघे उठले, आणि डेऱ्याबाहेर पडले. बाहेरच्या पहारेकऱ्याला हिरोजी म्हणाला,

‘राजांना रात्रभर झोप नाही. पहाटे नुकताच डोळा लागला आहे. शिर दुखतं आहे. राजे उठायच्या आत औषध घेऊन येतो. राजांना त्रास देऊ नका.’

दोघे छावणीबाहेर पडले.

दिवस उगवला; पण डेऱ्यात पुरी सामसूम. राजांच्या वागणुकीने सारेच राजांच्या काळजीचे बनले होते. कोणीही आले, तरी ‘राजांना रात्रभर झोप नाही, राजे नुकतेच झोपलेत,’ असे सांगितले जाई. राजे झोपल्याचे पाहून अधिकारी निघून जाई.

सूर्य चढू लागला. राजे उठत नव्हते. कण्हत नव्हते. पहारेकरी अस्वस्थ होऊ लागले. त्यांना काही कळेना. औषध आणायला गेलेले राजांचे नोकर- त्यांचाही कुठे पत्ता नव्हता. सूर्य डोक्यावर आला, तसा पहारेकऱ्यांचा धीर सुटला. त्यांनी फुलादखानाला ही वर्दी दिली. फुलादखानाचा विश्वास बसेना. तो तसाच डेऱ्यात आला. राजे झोपले होते. उशाला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचा जिरेटोप, तलवार तशीच होती. त्याला हायसे वाटले. सावकाश तो बिछान्याजवळ आला. त्याने हलक्या आवाजात हाक दिली,

‘राजासाब!’

काही उत्तर नाही.

‘राजासाब!’

सारे शांत!

फुलाद नजीक गेला आणि त्याने खसकन पांघरूण ओढले.

आकाश कोसळले होते. ताठरलेल्या डोळ्यांनी फुलाद बिछान्यावरच्या लोड, दुलई, गिर्द्या पाहत होता. फुलादचे दात करकर वाजले. एकदम तो ओरडला,

‘या अल्ला! शैतान भाग गया ऽ ऽ!’

संतापलेला फुलाद पहारेकऱ्यांवर गिर्द्या फेकीत होता; लाथा मारीत होता. फुलाद भानावर येताच रामसिंगाकडे गेला. रामसिंगाला आश्चर्याचा धक्का बसला. दोघांच्याही माना पुऱ्या सापडल्या होत्या. रामसिंग तडक दरबारी गेला.

बादशहा औरंगजेब दिवाण-इ-खासच्या मजलसीत बसला होता. शेजारी वजीर होते. दरबारचे मौलवी हजर होते. रामसिंगाला पाहताच बादशहा खूश झाला. त्याला शिवाजी आठवला. आजचा दिवस शिवाजीचा शेवटचा होता. आज सायंकाळी तो हलविला जाणार होता आणि विठ्ठलदासाच्या हवेलीत प्रवेश करताच त्याला समाधी मिळणार होती. औरंगजेब म्हणाला,

‘ये, रामसिंग!’

रामसिंग खाली मान घालून उभा होता. सदैव हसतमुख दिसणारा रामसिंग आज गंभीर का, याचे औरंगजेबाला कोडे पडले. त्याने विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘रामसिंग, कसलं संकट कोसळलं तुझ्यावर?’

रामसिंगाने मान वर केली. त्याचे डोळे भरले आणि त्यांतून अश्रू ठिबकले. रामसिंगाने सांगितले,

‘अन्नदाता! बातमी वाईट आहे. शिवाजी नाहीसा झाला!’

औरंगजेबाला त्या वाक्याचा अर्थ कळायला काही अवधी लागला. दाढीवरून त्याचा हात सुटला. जपाच्या माळेचे मणी भरभर सरकू लागले. संतापाने उठत औरंगजेब ओरडला,

‘कसा गेला शिवाजी?’

‘पहारे सक्त होते! पण आज सकाळी तो नाहीसा झाला आहे! त्याच्या डेऱ्यात कोणी नाही!’

औरंगजेबाच्या त्राग्याला सीमा राहिल्या नाहीत. त्याने फुलादखानाला बोलाविले. फुलादने कुराणाची शपथ घेऊन सांगितले की, शिवाजी अदृश्य झाला. फुलादखानाइतका इमानी सेवक नव्हता. औरंगजेब ओरडला,

‘रामसिंग, हे तुझंच कृत्य! तूच त्याला पळवलंस.’

‘अन्नदाते! क्षमा असावी. माझा पहारा आत होता; पण बाहेरचा पहारा खुद्द फुलादखानाचा होता, हे आलीजांनी ध्यानी घ्यावं.’

औरंगजेबाने चारही वाटा शिवाजीचा शोध करण्याची आज्ञा दिली. सारे सरदार शोधासाठी निघाले. त्यांत रामसिंगही होता. आग्रा शहरातील घरन् घर तपासायची आज्ञा झाली. संभाजीसह जाणारा शिवाजी कुठे ना कुठे सापडेल, ही औरंगजेबाला आशा होती. तसा तपास होत होता. आग्र्यातील कुंभाराचे घरही तपासले गेले; पण कोणी सापडले नाही. हवेलीच्या तळघरात लपून राहिलेले राजे तेथेच राहिले.

रामसिंगाचे पहारेकरी पकडले गेले. त्यांना मारबडव झाली; पण तीतून काही निष्पन्न

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झाले नाही. आग्र्याच्या झडतीत त्र्यंबकपंत आणि रघुनाथपंत मात्र सापडले. फुलादखानाने सारा राग त्यांच्यावर काढला. त्या दोघांचा पुष्कळ छळ झाला; पण काहीच माहिती मिळू शकली नाही. राजांनी दिलेला हत्ती बरोबर घेऊन जात असलेले कवी परमानंदही ह्या धरपकडीत सापडले.

औरंगजेबाची अवस्था वेड्यासारखी झाली होती. त्या घटनेवर त्याचा विश्वास बसत नव्हता. फुलादखानाच्या सांगण्याप्रमाणे शिवाजी खरोखरच गुप्त झाला नसेल ना? शास्ताखानाच्या वेळी तो भिंतीतून प्रकट झाला, तसा तर तो येणार नाही ना? स्वत:च्या जिवाला सांभाळणारा औरंगजेब तो धोका घेऊ इच्छीत नव्हता. त्याने आपल्या भोवती कडेकोट पहारा बसविला. शेजारी मौलवी ठेविले.

रामसिंगाची मनसब काढून घेतली. नेताजीला कैद करून पाठविण्याचा हुकूम मिर्झाराजांना पाठविला.

□

३३

आग्र्यातील वातावरण बरेचसे निवळले होते. राजांचे हेजीब राजांना बातम्या आणीत होते. एके दिवशी राजांनी बैराग्याचा वेष धारण केला. साऱ्यांनी राजांचे अनुकरण केले. साऱ्यांची मने राजांना बैराग्याच्या वेषात पाहून कळवळली. राजे म्हणाले,

‘निराजीपंत, फार दिवसांची आमची इच्छा या सोंगानं पुरी होत आहे. वाईट एवढंच वाटतं की, योग्यता नसता हा बैरागीवेष धारण करीत आहो. ती योग्यता येईल, तेव्हा जीवनाचं सार्थक होईल.’

राजे निराजीपंतांना सांगत होते, ‘निराजीपंत, तुम्हांला बैराग्यांची भाषा येते ना?’

‘जी!’

‘तुमची निवड त्याचसाठी केली होती. आता तुम्ही आमचे महंत. तुमचं नाव ‘कल्याण’; माझं ‘आनंद’. आम्ही सारे तुमचे शिष्य.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी सर्वांना नावे दिली. हळूहळू एक-दोघे मिळून आग्र्याबाहेर पडत होते. राजांनी तीन गट केले- बैरागी, उदासी, गोसावी. तिन्ही गटांचे वेष निराळे. दोन-तीन दिवसांत सारे आग्र्याबाहेर पडले. दक्षिणेत तपास जारी असणार, हे ओळखून सारे उत्तरेकडे निघाले होते.

रात्री सर्वांचा मुक्काम धर्मशाळेत होता. धुमी पेटवून बैरागी बसले होते. धर्मशाळेत एक इसम कोपऱ्यात बसून होता. त्याच्या मस्तकी रुमाल होता. अंगात रेशमी अंगरखा व विजार होती. त्याच्याजवळ एक पेटी होती. बैरागी धर्मशाळेत आल्यापासून तो त्यांना निरखीत होता.

पहाट झाली. सारे बैरागी तयार झाले आणि तो इसम आला. म्हणाला,

'महाराज, जरा कृपा करावी!'

निराजीपंतांनी त्याला बारीक नजरेने न्याहाळले, 'काय हवं?'

'मी अत्तरिया आहे. भारी कनोजी अत्तर माझ्याजवळ आहे.' अत्तरांची पेटी उघडून तो म्हणाला.

सारे हसले. निराजीपंत म्हणाले, 'बाबा रे, आम्ही बैरागी. राखेचं सुद्धा आम्हांला ओझं. तुझं अत्तर कोण घेणार?'

'असं म्हणू नका. नामी अत्तर आहे. माझा केवडा अगदी अस्सल आहे. असा केवडा मिळायचा नाही.'

ते ऐकत असलेल्या राजांचे कान तीक्ष्ण बनले. ते पुढे आले. त्यांनी सांगितले,

'आम्हांला केवडा हवा होता. त्याच्याच शोधात आम्ही होतो.'

सारे थक्क झाले.

अत्तरियाने विचारले, 'केवडा हवा?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हां! हां! केवडा!’ अत्तरियाच्या नजरेला नजर देत राजे म्हणाले, ‘कलश!’

‘जी!’ अत्तरिया म्हणाला.

‘मथुरेच्या आसपास आमची वाट पाहा. आम्ही येऊ.’

अत्तरिया निघाला. राजांनी आपल्या झोळीतून काही रत्ने काढून त्याच्या हाती ठेविली. सारे गोंधळात पडले होते. राजे म्हणाले,

‘हा कब कलशचा माणूस. ‘केवडा’ हा सांकेतिक शब्द.’

बैरागी परत वाटेला लागले.

सारे मथुरेत पोहोचले. मोरोपंत पिंगळ्यांचे मेहुणे मथुरेत होते. निराजीपंतांचे कब कलशबरोबर आधीच पत्र गेले होते. मोरोपंतांचे मेहुणे कृष्णाजीपंत व यांचे भाऊ काशिराऊ व विसाजीपंत यांनी संभाजीराजांची जोखीम स्वीकारली. राजे कृष्णाजीपंतांना भेटले. ब्राह्मण वेषातील संभाजीराजे बैराग्यांना पाहून चकित झाले. राजांची ओळख पटली. राजांनी संभाजीराजांना मथुरेत ठेवले. आपण मुलुखात गेलो, की दूत पाठवू. मग संभाजीराजांच्या सह कृष्णाजींनी यावे, असे ठरवून राजांनी मथुरा सोडली. राजे काशीच्या वाटेला लागले.

काशीला जाऊनही राजांच्या जिवाला समाधान नव्हते. कब कलशने राजांना सर्वतोपरी मदत केली होती; पण राजांचे मन काशीत रमत नव्हते. राजांना आपली काशी आठवत होती- राजगड! तिथे डोळ्यांत प्राण आणून वाट पाहणारी जन्मदात्री!

□

३४

राजगडच्या पद्मावतीमाचीवरील राजवाड्यात शांतता होती. सदरेवर कोणी नव्हते. मोरोपंत, बाळाजी वगैरे मंडळी फडात कामात गुंतली होती. जिजाबाई अद्याप देवघरातच होत्या. राजे आग्र्याला गेल्यापासून यांचा बराचसा वेळ देवपूजेत, उपासतापासातच जाई. दिवसेंदिवस त्या थकत चालल्या होत्या. त्यांच्या घायाळ मूर्तीकडे पाहिले, तरी साऱ्यांचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जीव कळवळून येई. जिजाबाईंना धीराचे शब्द सांगणाऱ्यांचे शब्दही आता संपत आले होते. अनेक वदंता उठत होत्या; पण जिजाबाईंच्या कानी काही जाऊ नये, याची काळजी सर्वजण घेत होते.

मोरोपंत दप्तरी बसले होते. मध्यान्हकाळ टळत आला होता आणि मोरोपंतांना भेटण्यासाठी एक स्वार आल्याची बातमी घेऊन जासूद आला. मोरोपंत उठले. स्वाराला घेऊन येण्याची परवानगी दिली. मोरोपंत सदरेवर वाट पाहत होते. स्वार जेव्हा दाराशी आला, तेव्हा मोरोपंतांचा विश्वास बसेना. मोरोपंत धावले. त्यांनी महादेवला कडकडून मिठी मारली. त्याला हाताशी धरून मोरोपंत दप्तरखोलीत गेले. अधीर झालेल्या मोरोपंतांनी विचारले,

'राजे कसे आहेत?'

'राजे सुखरूप आहेत!' महादेव म्हणाला.

'कुठं आहेत?'

'ते माहीत नाही.' महादेव म्हणाला.

'त्याचा अर्थ...'

महादेवने आग्र्याची हकीगत सांगितली. आपण आग्र्याच्या बाहेर पडेपर्यंत घडलेला सर्व वृत्तांत कथन केला व तो म्हणाला,

'राजांच्या आज्ञेप्रमाणे नरवरघाटी ओलांडून आम्ही राजांची वाट पाहत होतो. एके दिवशी राजे पळाल्याची धामधूम झाली आणि तपास जारी झाला. राजांच्या आज्ञेप्रमाणे मी इकडे आलो.'

'राजांनी काय आज्ञा केली?'

महादेव सांगत होता, 'राजांनी मला निरोप देताना सांगितलं... महादेव, जेव्हा आम्ही सुटल्याचं समजेल, तेव्हा तू राजगड जवळ कर. आम्ही पळालो, हे कळताच साऱ्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मुलूखभर आमचा शोध जारी होईल. फार धोके पत्करून आमचा मार्ग आम्हांला आक्रमावा लागेल. तू गडावर जाताच मोरोपंतांना भेट आणि त्यांना सांग, 'राजे सुटले. गडावर सुखरूपपणे आले, म्हणून गडावर तोफांचे आवाज करा.' एवढा निरोप सांगितला, की ते सर्व समजतील.'

मोरोपंतांच्या नेत्रांतून अश्रुधारा लागल्या होत्या. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर समाधान प्रकटले होते. ते गहिवरून म्हणाले,

'अशा राजाची सेवा करायला मिळते, केवढं भाग्य! मला सारं समजलं. अरे, राजांचा नजरबाज तू! तुला एवढं कळलं नाही? अरे वेड्या, इथं गडावर तोफा झाल्या, राजे आल्याची बातमी पसरली, की आपोआप ती औरंगजेबाच्या कानांवर जाईल. राजांचा चाललेला शोध थांबेल. राजांचा मार्ग निर्धोक होईल... तू इथंच थांब. मी मासाहेबांना भेटतो. मग तू भेट.'

मोरोपंत बाहेर पडले. तोच मनोहारी धावत आली. तिने विचारले,

'पंत, महादेव आला?'

'छे!'

मनोहारी निराश झाली. ती म्हणाली,

'मघा कुणीतरी त्याच्यासारखं पाहिलं- तसं वाटलं.'

'भास झाला असेल... मासाहेबांची पूजा झाली?'

'हो! नुकत्याच महाली आल्यात.'

मोरोपंत आत आले. जिजाबाई बैठकीवर बसल्या होत्या. शेजारी पुतळाबाई उभ्या होत्या. मोरोपंतांना पाहताच जिजाबाई म्हणाल्या,

'ये, बाबा! का आलास? 'पूजा झाली का? मी जेवले का?' हेच विचारायला ना?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नाही, मासाहेब! एक छोटी बातमी आणलीय्.’

‘कसली बातमी? काही कटकटी सांगू नको. काही असलं, तर सोयराला सांग. ती ठरवील.’

मोरोपंत नेहमीची आदब सोडून जिजाबाईंच्या जवळ बसले. सहजपणे म्हणाले,

‘मासाहेब, राजांनी औरंगजेबाच्या हातावर तुरी दिल्या!’

‘कुणी सांगितलं?’ जिजाबाईंनी विचारले.

‘खरं आहे. राजे कडेकोट पहाऱ्यातून सुटून गेले. राजे राजगडाच्या वाटेवर आहेत. चिंता करण्याचं काही कारण नाही.’

‘अरे, पण कुणी सांगितलं? स्वप्न पडलं का?’

‘नाही, मासाहेब. महादेव आला आहे.’

‘कुठं आहे?’

‘उठू नका, मासाहेब. मी बोलावतो.’

दाराजवळ सारे ऐकत उभी असलेली मनोहारी फडाकडे धावली. एकच आनंद उसळला. बिचारा महादेव उत्तरे देता-देता दमून गेला. जिजाबाईंनी देव्हाऱ्यापुढे जाऊन मस्तक टेकले. मोरोपंतांनी राजांचा निरोप जिजाबाईंना सांगितला.

‘मग तोफांची आज्ञा व्हावी!’

‘अरे, पेशवा ना तू! कसं विसरतोस? रात्र होऊ दे. गडाखाली मेणा जाऊ दे. पथकासहित गडावर परत येऊ देत. गडाचे पहारे जारी करा. सकाळी तोफांचे आवाज करा. राजे गडावर आल्याचं जाहीर करा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रात्री मोरोपंत शाही पालखी घेऊन गडाखाली उतरले. मध्यरात्रीच्या सुमारास शाही पालखी गडावर आली. पालखीचे पडदे सोडले होते. सकाळी गडावर बातमी पसरली...

'राजे आले!'

गडावरून तोफांचे आवाज होत होते. राजे आजारी होते; पण गडावर पोहोचले होते!

दक्षिणेतल्या मिर्झाराजांना ती बातमी कळली. त्यांनी औरंगजेबाला कळविले.

राजगडाचे पहारे सक्त झाले. येणारा प्रत्येक माणूस खात्री करून आत घेतला जात होता. मोरोपंतांच्या हुकुमाखेरीज कुणाला गड उतरता येत नव्हता.

□

३५

शिवाजीराजे बैराग्याच्या वेषात मार्ग आक्रमीत होते. चांदा, इंदूर या परगण्यांतून राजे भागानगर मुलुखात आले. सृष्टीचे बदलणारे परिचित रूप पाहून राजांना हुरूप येत होता. चालण्याच्या कष्टांचा विसर पडला. संध्याकाळ होत आली होती. एक चिमुकले गाव झाडीच्या कुशीत वसले होते. गावावर धूर उठत होता. निराजीपंत म्हणाले,

'राजे, त्या गावात आश्रय घेऊ.'

'ठीक आहे.'

चारही बैरागी त्या दिशेने चालू लागले. गावाजवळ येताच गावकरी कुतूहलाने त्या बैराग्यांकडे पाहत होते. निराजी चौकशी करीत होते. गावात धर्मशाळा नव्हती. एका कुळवाड्याने त्यांचे स्वागत केले. घराच्या कट्ट्यावर जागा दिली. हातपाय धुऊन राजांनी आपली घोंगडी पसरली. निराजीने आसन घातले. निराजी बसताच बाकीचे सारे बसले. निराजीपंतांना बाकीचे म्हणाले,

'महाराज, लोक केवढे भाविक आहेत, नाही?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निराजीपंत म्हणाले, ‘आनंद! दारी आलेल्या अतिथींचे स्वागत हा तर हिंदूंचा आचार. अशी भोळी निरागस माणसं समाजात आहेत, म्हणून तर आपल्यासारख्या बैराग्यांचे दिवस जातात.’

त्या कुळवाड्याची पत्नी बाहेर आली. वाळल्या शेंगा बैराग्यांच्या मध्ये ठेवून, साऱ्यांना नमस्कार करून ती आत गेली. कुळवाडी बाहेर आला. शेंगांकडे बोट दाखवीत तो म्हणाला,

‘घ्या, महाराज!’

सर्वांनी विचारले, ‘तुमचं नाव काय?’

‘रावजी पाटील म्हंत्यात मला.’

‘तुम्ही पाटील आहात?’ निराजींनी विचारले.

रावजी हसला. म्हणाला, ‘महाराज, घराण्याची पाटिलकी होती. मोगलाईत गेली. नाव राहिलं. नाव पाटील; पण पोट भरायची पंचाईत!’

‘ती पाळी जास्त दिवस राहायची नाही.’ राजे म्हणाले.

‘आँ!’

निराजी म्हणाले, ‘पाटील, आमचा आनंद भविष्य चांगलं जाणतो. त्याचे बोल खोटे व्हायचे नाहीत.’

पाटील उठला. राजांचे पाय धरीत तो म्हणाला,

‘आनंदजी, गरिबाचं कल्याण होईल. तुमच्या तोंडात साखर पडो!’

रात्री पाटलाच्या पत्नीने साऱ्यांच्या हातावर भाजीभाकर ठेविली. गरम भाजीभाकर पाहून राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'आई, तुमचं कल्याण होवो!'

त्या बाईने राजांच्याकडे पाहिले. तिचा संताप उफाळला. ती म्हणाली,

'बाबांनो! हाती घास आला, तो गप खावा. राखलं असतं, तर दोन गोड घास घातलं असतं; पण त्यो शिवाजी हाय न्हवं? त्यो गोड घास कसा गिळू देनार?'

सारे चपापले. आश्चर्य न दाखविता राजे म्हणाले,

'काय केलं शिवाजीनं?'

'आता मोगलाईत आमी सापडलो, तो काय आमचा गुना हाय व्हय? शिवाजीराजाचं सरदार- त्ये प्रतापराव, आनंदराव, तेलंगराव! आक्ख्या मोगलाईत धुमाकूळ घातलाय्. गावं लुटली. बादशहानं पकडलं व्हतं, म्हनं. तिथंच म्येला असता, तर बरं झालं असतं!'

'शिवाजी सुटला?'

'म्हंजे? तुमांस ठावं न्हाई?' पाटलाने विचारले.

'आम्ही बैरागी! शिवाजीची चौकशी कशाला करतो?' निराजींनी सांगितले.

'अवं, शिवाजीराजा सुटला, एवढंच नव्हं, तर गडावर पोचलाबी! साऱ्या गडांवरनं तोफा झाल्या!'

'अस्सं!' राजे म्हणाले, 'पण आई म्हणते, ते खरं?'

पाटील म्हणाला, 'अवो, तिचं काय ऐकता! परड्यातलं लाकूड गेलं, तरी सा महिने कलकलनारी ही बायकांची जात! ह्या मुसलमानांचा लई माजोर झाला व्हता. जशा राजांच्या फौजा आल्या, तशी नांगी टाकून बसल्यात! आता वाळल्याबरोबर वलं जरा जळायचंच!'

राजांनी भाकर खाल्ली. घोंगडी पसरून राजे झोपी गेले. पहाटेला पाटलाचा निरोप घेऊन बैरागी मार्गस्थ झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

थोड्याच दिवसांनी राजे आपल्या भागात आले. त्या आमराया, डोंगरदऱ्या, नजरेत येणारे दूरचे गड. निराजीपंत म्हणाले,

‘राजे, आपण आपल्या मुलुखात आलो. आता प्रकट व्हायला काही हरकत नाही.’

‘नाही! निराजीपंत, गडावर गेल्याखेरीज हे मुळीच करायचं नाही.’

निराजीपंत काही बोलले नाहीत.

भर उन्हाचे राजे रस्त्यावरून जात होते. निराजीपंतांनी राजांना थांबण्याची खूण केली. घोड्यांच्या टापांचा आवाज कानांवर येत होता. आवाज मोठे होत होते. रस्त्यावरून उधळत येणारे अश्वपथक नजरेत आले. भरधाव वेगाने अश्वदळ येत होते. चारी बैरागी रस्त्याच्या बाजूला झाले. अश्वदळ नजीक आले. घोड्यांचे लगाम खेचले गेले. अग्रभागीचा सरदार पायउतार झाला. राजांनी प्रतापराव गुजरांना चटकन ओळखले. प्रतापराव सरळ बैराग्यांच्या जवळ आले. निराजीपंत अग्रभागी होते. प्रतापरावांनी आदराने वंदन केले. निराजीपंतांनी आशीर्वादासाठी हात उंचावला. प्रतापराव म्हणाले,

‘बैरागी, आपण कोण देशीचे?’

‘आम्ही काशीचे बैरागी!’

‘मग दक्षिणेत बरे उतरला?’

निराजी कुबडीशी चाळा करीत म्हणाले, ‘बेटा, बोलून चालून आम्ही बैरागी. परमेश्वराच्या धरतीवर फिरायला बंदी कसली? जिकडे पुढा, तिकडे मुलूख थोडा!’

प्रतापराव क्षणभर त्या बैराग्याला निरखीत उभे राहिले. ते हात जोडून म्हणाले,

‘महाराज, एक संकट आहे. ते टळेल का, आपण सांगू शकाल?’

निराजीपंत म्हणाले, ‘बेटा, तो योग मला नाही; पण माझा हा शिष्य आनंद आहे ना, त्याला हा योग आहे. तो भूतभविष्य जाणतो. तू त्याला विचार.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे थक्क झाले. राजे सावरून उभे राहिले. प्रतापराव नजीक आले. ते म्हणाले,

'महाराज, कृपा व्हावी!'

प्रतापराव त्या बैराग्याकडे पाहत होता. भगवी कफनी, डोक्याचा रुद्राक्षमंडित जटाभार कपाळावर, गालांवर केलेले भस्मलेपन, गळ्यातल्या माळा यांनी त्या बैराग्याचे तेज आणखीन वाढले होते. बैराग्याने डोळे मिटले. तो म्हणाला,

'बेटा, काय संकट आहे?'

प्रतापरावांनी पाहिले- स्वार बरेच लांब होते. प्रतापरावांनी शंकेने विचारले,

'महाराज, खरोखरच आपण भूत-भविष्य जाणता ना?'

बैरागी संतापला. उग्र मुद्रा धारण करीत तो म्हणाला,

'संशयात्मा! बेटा, आमची परीक्षा करतोस? अरे, मी तुला पुरा जाणतो! तू कुडतोजी ना? 'प्रतापराव' ही राजानं लावलेली उपाधी! आज तुझ्या हातांखाली हजार स्वार मला दिसतात. तू सेनापती आहेस... आणि ऐक! तुझा राजा अद्यापि गडावर आलेला नाही. तो गडावर पोहोचला, हे साफ खोटं आहे. तुझा राजा केव्हा भेटेल, हे तुला विचारायचं होतं ना?'

'धन्य, महाराज!' म्हणत प्रतापरावांनी बैराग्याचे पाय शिवले. 'महाराज, चूक झाली; क्षमा व्हावी. आमचे राजे अद्याप गडावर आले नाहीत. त्याच चिंतेत आम्ही आहोत.'

बैराग्याने आनंदाने डोळे मिटले. दीर्घ श्वास घेतला. आपले नेत्र प्रतापरावांवर स्थिर करीत तो म्हणाला,

'बेटा, चिंता करू नको! तुझा राजा सुखरूप आहे.'

'पण भेटतील केव्हा?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अगदी नजीकच्या काळात. या सप्ताहात तू राजांचे पाय शिवत असलेला मला दिसतो आहेस!’

प्रतापराव आनंदित झाले. त्यांनी हात जोडले.

‘महाराज, तसं झालं, तर माझे हात स्वर्गाला लागतील!’ आपल्या हातातल्या सोन्याच्या कड्याकडे पाहत प्रतापराव म्हणाले, ‘महाराज, आपलं भविष्य खरं ठरलं, तर खुद्द राजांनी आपल्या हातांनी या हातात घातलेलं कडं मी तुमच्या हाती घालीन.’

‘त्यात आम्हांलाही आनंद आहे!’

प्रतापरावांनी एकदम विचारले,

‘पण, महाराज, आपला मुक्काम कुठं?’

आनंद हात उंचावत म्हणाला, ‘बेटा, चिंता करू नकोस. तुझा राजा जेव्हा येईल, तेव्हा मीहून तुझी गाठ घेईन. मी तिथंच असेन.’

बैराग्यांना वंदन करून प्रतापराव आपल्या अश्वदळासह दौडले. दाबून ठेवलेले निराजीपंतांचे हसू उफाळले. राजे गंभीर झाले. म्हणाले,

‘निराजीपंत! पण मासाहेब आम्हांला ओळखतील ना?’

निराजीपंत गहिवरले. ते म्हणाले,

‘राजे! आईची नजर फसायची नाही. पायांशी सदैव निगडित असलेली नजर एक वेळ फसेल; पण सदैव डोळ्यांत गुंतलेली नजर चुकेल कशी?’

राजांनी दीर्घ नि:श्वास सोडला आणि ते भरभर चालू लागले.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

३६

राजांना राजगडाचे दर्शन झाले आणि राजांची पावले अडखळली. सूर्य माथ्यावर चढत होता. साऱ्यांचीच ती अवस्था झाली होती. निराजीपंत म्हणाले,

‘राजे! केवळ दैव बलवत्तर, म्हणूनच हा दिवस दिसत आहे!’

‘हां, निराजीपंत! भवानीची कृपा! त्या गडात एक जीव आहे; त्याचे आशीर्वाद!... चला, पंत. आता एक क्षणही वाया घालवू नका. ते पाय पाहीपर्यंत आता जिवाला चैन पडायचं नाही.’

राजे राजगडाच्या प्रथम द्वारी आले. चार बैरागी येताना पाहून पहारेकरी पुढे झाले. हवालदाराने विचारले,

‘कुठं निघाला, महाराज?’

निराजीपंत म्हणाले,

‘बेटा! तुझं कल्याण असो! आम्ही भिक्षेसाठी गडावर जात आहो.’

हवालदार म्हणाला,

‘महाराज! पेशव्यांच्या हुकुमाखेरीज आपल्याला गडावर जाता यायचं नाही.’

‘बैराग्यांनाही मज्जाव?’

‘माझा नाइलाज आहे.’ हवालदार म्हणाला.

चौघे बैरागी एकमेकांकडे पाहत होते. राजांनाही काय बोलावं, सुचेना. तेवढ्यात हवालदार म्हणाला,

‘बाजूला व्हा! सेनापती येताहेत.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चौघे बैरागी बाजूला झाले. प्रतापराव, आनंदराव आणि तेलंगराव पायी गड चढत होते. मागे रक्षक चालत होते. प्रतापराव दरवाज्यापाशी आले. त्यांचे लक्ष बैराग्यांच्याकडे गेले. प्रतापराव धावले. ते पाया पडले. प्रतापरावांनी विचारले,

'महाराज! आपण इथं का उभे?'

'आम्ही भिक्षेसाठी आलो होतो; पण आम्हांला मज्जाव करण्यात आला. शिवाजीराजांची आई विपुल धर्म करते, असं ऐकून आम्ही आलो होतो.'

'महाराज! मी आपल्याला ओळखतो. आपण गडावर जाऊ शकता. गडावर आपण भेटूच.'

प्रतापरावांनी चौकीदारांना सांगितले आणि प्रतापराव आपल्या अनुयायांसह गड चढू लागले. मागून बैरागी जात होते.

जिजाबाई देवघरात होत्या. देव्हाऱ्यात जगदंबेची मूर्ती उभी होती. जिजाबाई आपल्या पूजेच्या शिवलिंगावर बिल्वदळ टाकीत होत्या. तोंडाने 'शिवा ऽऽ, शिवा ऽऽ' म्हणत होत्या. उजव्या हाताला बेलाची तबके भरून ठेविली होती. आपली हलणारी मान सावरीत जिजाबाई थरथरत्या हाताने एक एक बेलपान देवावर सोडीत होत्या. जिजाबाईंचा हा नित्याचा कार्यक्रम झाला होता.

मोरोपंत देवघरात आले. ते दृश्य पाहून मोरोपंत अडखळले. अकारण मोरोपंत खाकरले. जिजाबाईंनी वळून विचारले,

'कोण, मोरोपंत? का आलास, बाबा?'

'मासाहेब! दारी चार बैरागी आलेत. आपलं दर्शन मागतात.'

जिजाबाईंनी परत बेल उचलला. त्या म्हणाल्या,

'जा, बाबा! त्यांची समजूत घाल. त्यांना हवी ती भिक्षा घाल. सारं करून थकले मी. अभिषेक झाले. अनुष्ठानं झाली. दानधर्म झाला; पण माझा शिवबा मला दिसत नाही.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्याशिवाय डोळे मिटत नाहीत!... चांगलेपणानं पाठव त्यांना.’

मोरोपंत बाहेर गेले. जिजाबाई परत पूजेत गर्क झाल्या. काही वेळाने मोरोपंत पुन्हा आत आले. ते जिजाबाईंना म्हणाले,

‘मासाहेब, आपलं दर्शन झाल्याखेरीज बैरागी जागचे हलत नाहीत. त्याशिवाय काही स्वीकारायला पण तयार नाहीत.’

जिजाबाईंनी बेलपत्र सोडले. देवाला नमस्कार केला. त्या म्हणाल्या,

‘बैरागी सुद्धा हट्टी बनलेत ना! येते, बाबा! आता कुणाचे शाप नकोत मला.’

जिजाबाई गुडघ्यांवर हात ठेवून उठत होत्या. मोरोपंत धावले. त्यांनी हातांनी जिजाबाईंना सावरले. जिजाबाई म्हणाल्या,

‘आताशा तोल जातो, बघ.’

‘मासाहेब! वय झालं. उपास सोसत नाहीत.’

‘मग मरण का, रे, येत नाही?’ जिजाबाई एकदम म्हणाल्या. आपल्याशीच बोलल्यासारखे त्या बोलत होत्या. ‘कुठं भटकत असेल पोर? शिवबा मोठा आहे; सारं सोशील तो. पण जीव तुटतो, तो त्या कोवळ्या पोरासाठी!’

मोरोपंतांनी अश्रू टिपले. जिजाबाईंच्या ते ध्यानी आले नाही. मोरोपंत म्हणाले,

‘मासाहेब, बैराग्यांना भेटून थोडा वेळ पुढच्या महालात यावं.’

‘का, रे?’

‘सारे गोळा झालेत. काहीतरी ठरवायला हवं.’

‘बरं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाई बाहेर निघाल्या, तोच पुतळाबाई धावत आल्या. म्हणाल्या,

‘मासाहेब! बाहेर निघालात?’

‘खुळी का? बाहेर कुठं जाऊ? बाहेर बैरागी आलेत, म्हणे. त्यांना भेटायला हवं. हवं तर तू पण चल.’

पुतळाबाईंच्या हाताचा आधार जिजाबाईंनी घेतला. दुसऱ्या बाजूला मोरोपंत चालत होते. जिजाबाई सदरेवर आल्या.

जिजाबाईंच्या वर नजर जाताच राजे उभे राहिले. आईला ते पाहत होते. श्वेत वस्त्र परिधान केलेली आई! केस संपूर्ण पांढरे पडलेले. आपल्या हलणाऱ्या मानेने, पाणावलेल्या डोळ्यांनी जिजाबाई सदरेवर उभ्या होत्या. त्या थकल्या भागल्या जीवाला पाहताच राजांचे डोळे पाणावले. राजे भारावल्यासारखे पावले टाकीत जिजाबाईंच्या जवळ गेले. चौकाच्या पायऱ्या चढून सदरेवर येताच त्यांनी एकदम जिजाबाईंच्या पायांवर डोके ठेविले. पुतळाबाई, मोरोपंत मागे सरले. गडबडीने मागे सरण्याचा प्रयत्न करीत जिजाबाई म्हणाल्या,

‘अरे! आजवर थोडे का अपशकुन झाले! बैरागी कधी पाया पडतो का?’

त्याच वेळी कानांवर आवाज आला,

‘मासाहेब! तुम्ही आम्हांस ओळखलं नाही!’

जिजाबाईंच्या अंगातून शेकडो झिणझिण्या उठत होत्या. आवाज परिचयाचा होता. तो ऐकण्यासाठी जीव आतुरला होता. बैरागी उठत होता. मोरोपंत, पुतळाबाई भान हरपून बैराग्याकडे पाहत होते. जिजाबाई निरखीत होत्या. राजांच्या खोबणीत बसविलेल्या तेजस्वी नेत्रांवर जिजाबाईंची नजर खिळली आणि ते डोळे झुकले. तेच भव्य कपाळ. तो ओठाकडे किंचित झुकलेला धारदार नाकाचा शेंडा! मासाहेब उद्गारल्या,

‘शिवबा ऽ ऽ ऽ!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

-आणि दुसऱ्याच क्षणी राजांनी जिजाबाईंनी मिठीत सावरले. एकच आनंदकल्लोळ उसळला. निराजीपंत धावले. पुतळाबाई आत पळत गेल्या. दारात येणाऱ्या मनोहारीशी त्यांची टक्कर झाली!

‘काय झालं, राणीसाहेब? धावलात का?’

पुतळाबाईंनी मनोहारीला मिठीत घेतले. पटकन तिचा मुका घेतला! त्या लाजून म्हणाल्या,

‘स्वारीचं येणं झालं.’

जिजाबाईंना राजांनी महालात आणले. त्यांना बैठकीवर बसविले. राजे म्हणाले,

‘मासाहेब! बसावं. जरा शांत व्हा. मग खूप बोलू.’

डोळ्यांतले अश्रू पुशीत जिजाबाई म्हणाल्या,

‘शिवबा! शंकराची उपासना करीत होते ना, अगदी त्या रूपात प्रकटलास!’

सारा महाल भरून गेला. दास, दासी, सर्व राण्या- सारे गोळा झाले. कुणाला मर्यादा राहिली नाही. राजे उठले. जिजाबाईंची परवानगी घेऊन ते महालाबाहेर आले. दप्तरीच्या खोलीत निराजीपंतांभोवती सारे गोळा झाले होते. दारात राजांना पाहताच साऱ्यांच्या माना मुजऱ्यासाठी लवल्या. मान वर केली, तेव्हा बैराग्याच्या वेषात उभे असलेले राजे रडत होते. प्रतापरावांचा अजूनही विश्वास बसत नव्हता. ते उद्गारले,

‘महाराज! आपण...’

‘हां! मीच तो. आम्ही सांगितलं होतं ना? जेव्हा तुमचे राजे प्रकट होतील, तेव्हा आम्ही तुमच्याजवळ असू... पण, प्रतापराव, तुम्ही आमचे सेनापती. निदान तुम्ही तरी आम्हांला ओळखायला हवं होतं.’

राजांची भरलेली नजर प्रतापराव, आनंदराव, तेलंगराव, अनाजी, बाळाजी, मोरोपंत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

यांवरून फिरली. राजांचा कंठ परत भरून आला! समोर असलेल्या प्रतापरावांच्या खांद्यावर हात ठेवून राजे म्हणाले,

‘तुमचे अनंत उपकार आमच्या राज्यावर आहेत. आम्ही शत्रुघरी सापडलो; कैद झालो. अनेक मास लोटले. तरी राज्याची घडी एवढीही बिघडू दिली नाहीत. एवढंच नव्हे, तर आम्ही नसता आमचं कार्य चालू ठेवलंत. हे तुमचे उपकार कधी फिटायचे नाहीत. मोरोपंत, अनाजी, ही ताकद तुमची असली, तरी राज्यउभारणीला माझीही गरज लागणार नाही.’

राजांना पुढे बोलवेना. त्यांनी आपले अश्रू पुसले. श्वास घेतला. साऱ्यांची अंगे राजांच्या बोलांनी रोमांचित झाली होती. अनाजी दत्तो म्हणाले,

‘महाराज, बाळराजे कुठं आहेत?’

राजांनी निराजीपंतांकडे पाहिले. राजांच्या मुठी वळल्या गेल्या. ते म्हणाले,

‘नको तो प्रश्न विचारलात!’ राजांनी डोळे मिटले. ते म्हणाले, ‘बाळराजांचा काळ झाला! बाळराजे आम्हांस सोडून गेले!’

राजांनी डोळे उघडले, तेव्हा सारे भयभीत झाले होते. सर्वांचे डोळे दरवाज्याकडे वळले होते. राजांनी गरकन वळून पाहिले- दाराशी जिजामाता उभ्या होत्या. जो प्रश्न विचारायला आल्या होत्या, त्याचे उत्तर मिळाले होते! राजे उद्गारले,

‘मासाहेब!’

जिजाबाई रडत माघारी वळल्या. तरतर पावले टाकीत त्या जात होत्या. राजांना काही सुचेना. राजे माघारी वळले. जिजाबाईंच्या पाठोपाठ राजे महालात आले. जिजाबाई बैठकीवर अंग टाकून रडत होत्या. त्यांनी टाहो फोडला.

‘बाळराजे! मला टाकून कसे गेला? कुणी परवानगी दिली?’

आनंदाने वेडावलेल्या महालावर दुःखाची वीज कोसळली. तो धक्का मोठा होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एकच आकांत महालात उसळला होता. राणीवशाच्या आक्रोशाला सीमा राहिल्या नाहीत. राजे जिजाबाईंच्याकडे धावले. जिजाबाईंना उठवीत ते मोठ्याने म्हणाले,

'मासाहेब! आमचं जरा ऐका!'

जिजाबाईंनी राजांचा हात झिडकारला. तोंडात आपली बोटे चावीत, मागे सरकत जिजाबाई म्हणाल्या,

'काय ऐका, राजे? नको ते ऐकलं! आणखीन काय ऐकू? थोरामोठ्यांच्या राजकारणात हकनाक माझं पोर हरवलंत! राजे! निदान त्या सईला दिलेल्या वचनाची तरी आठवण ठेवायची होतीत...'

महालात कुणाचा धरबंध राहिला नव्हता. राजे जिजाबाईंना म्हणाले,

'मासाहेब! आमची शपथ आहे. जरा देवघरात चला.'

'देवघरात? आता कोण आहे तिथं, ते देवघरात जाऊ? अरे, माझा बाळकृष्ण गेला! त्या रित्या गाभाऱ्यासमोर कशाला जाऊ मी?'

राजांनाही अश्रू आवरणे कठीण गेले. राजांनी जिजाबाईंचे दंड धरले, बळेच त्यांना उभे केले. हातांनी सावरीत ते जिजाबाईंना घेऊन देवघरात गेले. देवघराचे दार पुढे ढकलले. राजे जिजाबाईंना म्हणाले,

'मासाहेब, जरा ऐका!'

त्या कठोर आवाजाने जिजाबाईंचे रडणे थांबले. त्या राजांच्याकडे पाहत होत्या. देव्हाऱ्याच्या समईच्या प्रकाशात भवानी व बेलांनी आच्छादित शिवलिंग दिसत होते. राजे म्हणाले,

'मासाहेब, आम्ही तुम्हांला नंतर सांगणार होतो. नाइलाजानं आता सांगावं लागतं. तुमचे बाळराजे सुखरूप आहेत!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शिवबाऽऽऽ!’

‘ह्या जगदंबेशपथ! मार्ग धोक्याचा, म्हणून त्यांना मथुरेत ठेवलं आहे. पण जी बातमी आता उठली, तीच कायम टिकली पाहिजे. बाळराजे शत्रुमुलुखातून घरी येईपर्यंत तुम्ही सुद्धा तीत सामील झालं पाहिजे!’

‘राजे!’

‘ऐका, मासाहेब! जोवर तुमचे बाळराजे तुम्हांला भेटत नाहीत, तोवर आम्ही शपथेला बद्ध आहोत; आमच्या जिवाला स्वस्थता लाभणार नाही. बाळराजांच्या मृत्यूची बातमी आपोआप दिल्लीला जाईल. शोध थांबेल. आणि... बाळराजे सुरक्षित घरी येतील.’

‘शिवबा, तुझ्या असल्या राजकारणात साध्या माणसांची आतडी तुटतात, रे!’

‘चला, मासाहेब! तुम्हांलाही ह्या खेळात भाग घ्यायला हवा. हे चुकूनही कुणाला कळता कामा नये. बाळराजांची सुरक्षितता त्यावर अवलंबून आहे!’

राजे जिजाबाईंना घेऊन देवघरातून बाहेर आले. महालात जिजाबाईंना बैठकीवर बसविले; आणि जिजाबाईंनी लोडावर मान टाकली. आपले डोळे पुशीत राजे उठले, आणि सरळ आपल्या महालात गेले.

खालच्या महालात उठणारा आक्रोश तेथेही ऐकू येत होता.

□ □ □

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग सहावा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

राजे राजगडावर येऊन महिना लोटला, तरी राजांच्या प्रकृतीला आराम वाटला नाही. उत्तरेचा उन्हाळा, प्रवासाचा शीण, काळजीची पोखरणी यांनी राजे आजारी पडले. थोडा-फार ज्वरही अधूनमधून येत होता. वैद्यांचे औषधपाणी चालू होते. हळू हळू राजांची प्रकृती सुधारत होती. राजांच्या महालात मोरोपंत, अनाजी, बाळाजी, प्रतापराव ही मंडळी राजांच्या परोक्ष घडलेल्या सर्व गोष्टी राजांच्या कानांवर घालीत होती. राजांच्या आगमनाने आनंदित झालेले गडकरी, मुलुखाचे अधिकारी हे राजांना भेटत होते. प्रजेचे प्रेम पाहून राजांना आनंद वाटत होता. आग्र्याला राजांच्या बरोबर गेलेली माणसेही हळू हळू परतत होती. आग्र्याची बातमी कळत होती.

राजे पळून गेल्याचे समजताच औरंगजेबाने रामसिंगाची मनसब रद्द केली, जहागीर काढून घेतली; एवढेच नव्हे, तर दरबारी सामोरे येण्यासही रामसिंगास बंदी घातली. ते ऐकून राजांना वाईट वाटले. मिर्झाराजांना ते ऐकून केवढे दु:ख होईल, याची राजांना कल्पना होती.

दोन प्रहरी राजे जागे झाले. त्यांची नजर महालावरून फिरत बैठकीवर स्थिरावली. तेथे सोयराबाई कशिदा भरीत बसल्या होत्या. एकाग्र चित्ताने कशिदा भरणाऱ्या त्या सौंदर्यसंपन्न सोयराबाईंकडे पाहत राजे काही क्षण तसेच पडून राहिले. मध्येच सोयराबाईंनी नजर वर केली. त्यांची नजर राजांच्या नजरेला भिडली.

‘केव्हा आलात, राणीसाहेब?’

‘थोडा वेळ झाला. आपला डोळा लागला होता.’

‘अस्सं!’ राजे पलंगावर उठून बसले. ‘मासाहेब कुठं आहेत?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मी आले, त्या वेळी मासाहेब कोठीत होत्या. बरोबर धाकट्या राणीसाहेब होत्या.’

‘कोण पुतळा?’

‘नाही; सगुणाबाईसाहेब. मासाहेबांना बोलावू का?’

‘काही नको. तुम्ही बसा ना! मी सहज विचारलं.’

सोयराबाईंनी राजांच्याकडे पाहिले. त्या एकदम हसल्या. राजांनी प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. सोयराबाई म्हणाल्या,

‘आज स्वारी प्रसन्न दिसते!’

‘राणीसाहेब, प्रसन्नता सांसर्गिक असते. एक माणूस प्रसन्न असलं, की आपोआप आजूबाजूची माणसं प्रसन्न होतात. तुम्ही आनंदी दिसला; आम्ही तसे बनलो.’

‘त्यामुळं तर इथं आले. खाली गेले, की साऱ्यांचे चेहरे सुतकी! मासाहेबांनी ते दुःख आवरलं; पण बाकीच्यांनी काही नाही. काहीही बोलायचं झालं, तर ‘बाळराजे’. नको ते होऊन गेलं. आठवण करून का माणूस परत येतं?’

राजे हसले. ते म्हणाले, ‘राणीसाहेब, साऱ्यांनाच कुठं जमतं? विचार असला, म्हणजे आपोआप भावना आवरता येतात.’

‘तेच म्हणते मी. पण ऐकतं कोण?’

‘राणीसाहेब...!’

सोयराबाईंनी मान वर केली. राजे गंभीर बनले होते. सोयराबाईंनी विचारले,

‘का?’

‘आमची कधी आठवण येत होती?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सोयराबाई लाजल्या. त्या म्हणाल्या, 'हे काय विचारणं झालं?'

राजे एकदम हसले. म्हणाले, 'आम्हांला पण तुमची आठवण येत होती. आग्र्याचं ते शाही वैभव पाहताना, का, कुणास ठाऊक, तुम्ही सदैव डोळ्यांसमोर उभ्या असायच्या.'

'हो!' सोयराबाई एकदम म्हणाल्या, 'एवढी आठवण येत होती, तर सांगितलेलं विसरला नसता.'

'काय?'

'पाहिलंत ना? मी अत्तर आणायला सांगितलं होतं, ते विसरला ना?'

'विसरलो नाही; पण आणायला जमलंच नाही.'

'मनात असलं, की सारं जमतं!'

'तसं नाही हं, राणीसाहेब. तो सुद्धा योग असतो.'

'योग?'

'नाही तर काय? आम्ही सुरतेला गेलो होतो. एवढी लुटीची धामधूम; पण रेशीम दिसताच तुम्ही न सांगताही आम्ही तुमच्याकरिता रेशीम आणलंच ना? या खेपेला एवढी सोपी गोष्ट सांगितलीत; पण ती जमली नाही. आणि धाकट्या राणीसाहेबांनी मोठी अवघड गोष्ट आणायला सांगितली, ती पटकन जमून गेली!'

'एवढी कसली अवघड गोष्ट आणायला सांगितली होती?'

'ते मला कसं सांगता येईल?'

'असू दे! मला काय करायचं?' सोयराबाई उठल्या.

त्याच वेळी पुतळाबाई महालाच्या दाराशी आल्या. थोरल्या राणीसाहेबांना पाहताच त्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

थबकल्या.

‘या! तुमच्यावरूनच भांडणाचा योग आला.’ राजे म्हणाले.

‘भांडण कसलं, बाई? ज्याचं त्याचं नशीब!’ सोयराबाई म्हणाल्या.

पुतळाबाईंना काही समजेना. चांदीचा पेला तसाच हाती धरून त्या उभ्या होत्या. राजे हसून म्हणाले,

‘एवढं घाबरायला काय झालं? राणीसाहेबांनी सांगितलेलं अत्तर आणायला आम्ही विसरलो; पण तुम्ही सांगितलेली गोष्ट मात्र आठवणीनं आणली, असं आम्ही म्हणालो.’

पुतळाबाई हसल्या. त्या म्हणाल्या,

‘थट्टेनं सुद्धा भांडणं वाढतात, राणीसाहेब. खरंच मी काही आणायला सांगितलं नव्हतं. स्वारीनं सुखरूप घरी यावं, एवढंच मी म्हणाले होते.’

राजे मोठ्याने हसले. ‘तेच आम्ही सांगितलं.’

सोयराबाईंच्या नाकाचा शेंडा तांबडा झाला. कानांच्या पाळ्याही तप्त झाल्या. कशिद्याचं सामान उचलीत त्या म्हणाल्या,

‘कुणी तरी काळजी केली, की झालं. जाते मी.’

सोयराबाई निघून गेल्या. राजे पुतळाबाईंच्याकडे पाहत होते. पुतळाबाई म्हणाल्या,

‘आधीच माझ्यावर रागात असतात. विनाकारण आज भर पडली.’

‘तो आमचा दोष! आम्ही थट्टा करायला गेलो; झालं भलतंच. जाऊ दे. आमच्यासाठी सहन करा... काय आणलंस?’

‘मासाहेबांनी कांजी दिलीय्.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी पेला ओठी लावला. कांजी घेऊन राजे म्हणाले,

‘ह्या वैद्यांना चवीचं काहीच कळत नाही. काही तरी सांगून बसतात.’

पुतळाबाई हसल्या. राजांनी तस्तात चूळ भरली. महालाच्या देव्हाऱ्याजवळ ते गेले. समईची ज्योत त्यांनी मोठी केली; आणि पुतळाबाईंना ते म्हणाले,

‘पुतळा, एक गोष्ट हरवली! मनाला लागून राहिली.’

‘काय राहिलं?’

‘माझं पूजेचं शिवलिंग! ते घ्यायला उसंतच मिळाली नाही. विसरलं!’

त्याच वेळी खालून हाक आली.

‘आबाऽऽ’

राजांच्या चेहऱ्यावर एकदम आनंद प्रकटला. ते म्हणाले,

‘सखू आली, वाटतं!’

राजे दाराशी धावले. त्याच वेळी सखुबाई दारात आल्या. राजांच्या पाया पडल्या. राजांनी त्यांना प्रेमभराने जवळ घेतले. सखुबाई पुतळाबाईंच्या पाया पडल्या. एकदम सखुबाईंना हुंदका फुटला.

‘सखू, उगीच रडायचं नाही. मासाहेब रडून थकल्या. त्यांना आपण त्रास द्यायचा नाही. तू आता समजदार आहेस. समजुतीनं घे.’

सखुबाईंनी डोळे पुसले. राजांनी विचारले,

‘एकटीच आलीस?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सखुबाईंनी नकारार्थी मान हलविली.

‘मग जावई पण आलेत?’

सखुबाईंनी मानेने होकार दिला. त्या म्हणाल्या,

‘मामासाहेब पण आलेत.’

‘मग खाली काय करतात? बजाजी परके का आहेत? त्यांना वर पाठव.’

सखुबाई पुतळाबाईंच्यासह खाली गेल्या. सखुबाई आल्याचे पाहून राजांना समाधान वाटले. त्याचबरोबर सईबाईंची आठवण झाली. सखुबाई अगदी सईबाईंच्या वळणावर गेली होती.

बजाजीच्या मागोमाग महादजी आत आले. पितापुत्रांनी राजांना मुजरे केले. राजे बजाजीच्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाले,

‘बजाजी, आम्ही शरमिंदे आहोत!’

‘कशाबद्दल?’

‘मिर्झाराजांच्या फौजेबरोबर आम्हांला आदिलशाही लढाईत फलटणवर चालून यावं लागलं. आमचे हात बांधले होते. आमचा नाइलाज झाला होता.’

‘महाराजांनी ते विसरून जावं.’ बजाजी म्हणाला. ‘तुमच्यामुळं आम्ही परत माणसांत आलो. आम्हांला तेवढं कळत नाही?’

‘हा तुमचा मोठेपणा!’ राजे म्हणाले, ‘पण, बजाजी, आता आमचे फार मोठे मनसुबे आहेत. आता तुमच्यासारखी पराक्रमी माणसं शत्रुघरात राहून उपयोगी नाहीत.’

‘राजे, जहागीर आदिलशाही असली, तरी या जीवावर सत्ता तुमची आहे. मध्यान रातीला हाक मारा; आम्ही आनंदानं चाकरीला येऊ. राजे, तुम्ही आल्याचं कळलं; आनंद

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गगनात मावेना. पाठोपाठ ती बातमी. एका डोळ्यात आनंद आणि दुसऱ्या...'

'दैवगतीपुढं इलाज नाही!' राजे म्हणाले.

□

२

आप्तस्वकीयांनी वाडा भरून गेला होता. राजे अंथरूण सोडून सदरेत येऊ लागले होते. बजाजी सखुबाईंना ठेवून महादजीबरोबर फलटणला गेले.

सदरेतून लौकरच राजे महालात परतले होते. राजे महालात बसतात, न बसतात, तोच पिलाजीराव शिर्के आल्याची वर्दी घेऊन मोरोपंत महालात आले. पिलाजीराव म्हणजे राजांचे व्याही, येसूबाईंचे वडील. राजांनी त्यांना महाली घेऊन यायला सांगितले.

पिलाजीराव राजांच्याच वयाचे. शृंगारपूरला संभीजीराजांच्या लग्नात भेट झाली. त्यानंतर आजच पिलाजीराव भेटत होते. जिन्यावर पाय वाजताच राजे उठून उभे राहिले. पिलाजीराव आत आले. राजे जवळ गेले. पिलाजी म्हणजे अस्सल पोलादी कांब. मराठी पीळ त्यांच्या मिशांना शोभायचा. चेहऱ्यावर करारीपण सदैव दिसायचे. पिलाजीराव थकले भागले होऊन राजांच्या समोर उभे होते. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहवत नव्हते. राजांनी पिलाजीरावांच्या खांद्यावर हात ठेवला आणि पिलाजीरावांचे अवसान संपले. राजांना मिठी मारून ते रडू लागले. राजे त्यांना बैठकीवर घेऊन आले. पिलाजीरावांना बसवीत राजे म्हणाले,

'पिलाजीराव, धीर धरा!'

'कसला धीर धरू, राजे? तुम्ही पोहोचल्याची बातमी आली. खूप बरं वाटलं. वाटलं, संभाजीराजेही आले असतील आणि पाठोपाठ ती बातमी आली. लग्नात पोर अजाण होती. आता तिला सारं कळतं. त्या पोरीच्या कुंकवाला, मंगळसूत्राला कसा हात घालणार मी?'

'पिलाजीरावऽऽ'

'राजे, ते धाडस झालं नाही. कुणाला काही बोललो नाही. सरळ आपल्याकडे आलो.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मुलीची पाठवणी करण्यासाठी येणारा मी आज संभाजीराजांचे जोडे घेऊन जायला आलो.'

'जोडे?' राजे उद्गारले.

'राजे! शिर्क्यांची कुळीची ती लेक आहे. सती गेल्याखेरीज राहायची नाही!'

राजांच्या अंगावरून सरारून काटा गेला; घशाला शोष पडला. पिलाजीराव आपले रडणे आवरून म्हणाले,

'राजे, काय माझ्या नशिबी लिहिलं हे? वाड्याबाहेर पडत असता पोर चौकात खेळत होती. मला तिनं विचारलं, 'कुठं निघाला?' मी कसंबसं सांगितलं. तर म्हणाली, 'मला काही तरी घेऊन या.' पिलाजीरावांना हुंदका फुटला. 'राजे, आता जोडे घेऊन जाईन, तेव्हा काय वाटेल तिला? अजाण, अश्राप पोर...'

'बोलू नका! असं बोलू नका, पिलाजीराव!' राजे कानांवर हात ठेवीत उठले. त्यांनी महालाचे दरवाजे गडबडीने बंद केले. राजांचा सारा चेहरा घामाने डवरला होता. पिलाजीराव आश्चर्यचकित होऊन राजांच्याकडे पाहत होते. राजे जवळ येऊन बसत म्हणाले,

'अजून घरी सांगितलं नाही ना?'

'नाही, राजे! तो धीर झाला नाही. तसाच निघालो.'

'पिलाजीराव, असेच जा आणि सूनबाईला भरल्या कपाळानं घेऊन या.'

'आँ!'

राजांनी पिलाजीरावांना शपथ घालून सर्व सांगितले. ते ऐकत असता पिलाजीराव आनंदाने बेहोश होत होते. राजांनी सांगून संपविताच थरथरत पिलाजीराव उभे राहिले. त्यांनी दुशेल्यातली तलवार काढली; आणि राजांच्या समोर धरीत ते म्हणाले,

'राजे! हिचा स्वीकार करा.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हे काय?’

‘इकडे येताना वेशीत आमच्या कुलदैवताचं, भावेश्वरीचं देऊळ लागलं. त्या कुलदैवताला स्मरून मी पण केला होता : ‘ही वार्ता खोटी आहे, असं सांगेल, त्याला आमचं इमान अर्पण करणार आहे.’

राजांनी पिलाजीरावांना मिठी मारली; आणि आपल्या हातांनी पिलाजीरावांची तलवार त्यांच्या दुशेल्यात खोवली.

रात्री राजे जिजाबाईंचा निरोप घेऊन महालात आले. पाठोपाठ जिजाबाई राजांच्या महालात आल्या. त्यांना पाहून राजांना आश्चर्य वाटले. त्यांनी विचारले,

‘मासाहेब, का आलात?’

‘राजे, पिलाजीराव आले ना? त्यांच्याकडे पाहवत नव्हतं. सखू बिचारी डोळ्यांत पाणी न खळता बसली आहे. आता मला हे सहन होत नाही. साऱ्या घरावर अवकळा पसरली.’

‘ते आम्हांलाही कळतं. जरा धीर धरावा. आम्ही आमची विश्वासू माणसं बाळराजांना आणायला पाठवलीत.’

‘खरं?’

‘आपल्या पायांशी का खोटं बोलेन?’

‘पण बाळराजे केव्हा येतील? कधी पाहीन, असं झालं आहे!’

‘असल्या कामात उतावीळपणा चालत नाही, मासाहेब फार जबाबदारीनं ह्या गोष्टी कराव्या लागतात.’

‘नेताजींची काही खबर?’

‘औरंगजेबाच्या हुकुमानुसार नेताजी कबिल्यासहित कैद करून दिल्लीला रवाना केले

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गेले, एवढंच कळलं आहे.'

'पोरीची कीव वाटते! सगुणानं ते मनाला लागून घेतलं.'

'दोष नेताजींचा; राणीसाहेबांचा नव्हे.'

'हो! पण तिला वाटणारच ना? किती केलं, तरी नेताजी तिचे काका.' जिजाबाईंनी विषय बदलला. त्या म्हणाल्या, 'बाळराजांना आणायचं बघावं!'

'आम्हांला का तसं वाटत नाही? बाळराजे जसे गुंतलेत, तसेच मदारी, हिरोजी, रघुनाथपंत, त्र्यंबकपंत हीही मंडळी अजून आली नाहीत. बाळराजांच्याबद्दल आम्ही निश्चिंत आहोत. पण ही जीवमोलाची माणसं. त्यांचा विचार जरी आला, तरी मनाचा थारा उडतो.'

राजांच्या त्या काळजीने भरलेल्या चेहऱ्याकडे पाहून जिजाबाईंना काही बोलता आले नाही. त्या मंद पावलांनी महालाबाहेर गेल्या.

□

३

रात्री जेवण झाल्यावर राजे जिजाबाईंच्या महालात बसले होते. महालात जिजाबाई, सखुबाई बसल्या होत्या. पुतळाबाई, सोयराबाई, सगुणाबाई, काशीबाई उभ्या होत्या. राजे उत्तरेतल्या अनेक कथा सांगत होते, त्या ऐकत असता गहिवरून जात होत्या. राजे म्हणाले,

'मासाहेब, बैरागी होणं केवढं कर्मकठीण! दारासमोर उभं राहून 'भिक्षा वाढा,' हे शब्द गळ्याशी आणणं हीच एक मोठी तपश्चर्या आहे.'

'नको, बाबा! ते सांगूही नकोस; आणि आम्हांला ते ऐकायलाही नको.'

राजे हसले. त्याच वेळी दरवाज्यावर राजांनी नजर खिळली. दारातून आत येत मदारी आणि हिरोजी राजांना मुजरे करीत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मदारीऽ, हिरोजीऽऽ,’ राजे गडबडीने उठले. पुढे होऊन त्यांनी दोघांना जवळ घेतले. मदारीने पाठीचे ओझे खाली ठेवले. मदारी आणि हिरोजी आत आल्यामुळे साऱ्या राण्या आणि सखुबाई जाण्यासाठी उठल्या. राजे म्हणाले,

‘काही कोणी जाण्याची गरज नाही. हा मदारी आणि हिरोजी जर नसते, तर आज आम्ही जिवंत दिसलो नसतो. जिवंत मरण स्वीकारून यांनी आम्हांला वाचवलं.’

सारे थांबले. राजे बैठकीवर बसले. राजे मदारीने ठेवलेल्या पेटीकडे पाहत म्हणाले,

‘मदारी! आग्ऱ्याहून लूट आणलीस काय?’

‘व्हय, महाराज! बघितलं, तर जीव हरकून जाईल तुमचा!’

‘अरे, मग दाखव ना!’ राजे उतावीळपणे म्हणाले.

मदारीने पेटी राजांच्या समोर ठेवली, आणि उघडली. आतली वस्तू पाहताच राजांच्या अंगावर रोमांच उठले. थरथरत्या हाताने त्यांनी पेटीतले स्फटिक-शिवलिंग काढले, आणि गालिचावर ठेवले. नकळत सर्वांचे हात जोडले गेले. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे! हे तुमच्या पूजेचं...’

‘हो! आम्ही येताना आणू शकलो नाही. मदारी, तुला कसं...’

‘महाराज, एवढंच आणायला गावलं!’

‘सारं आणल्यापेक्षा जास्त आनंद झाला... हिरोजी, काय बातमी?’

‘बातमी चांगली नाही, महाराज...’

‘सांग, बाबा...’ राजे म्हणाले.

‘रघुनाथपंत आणि त्र्यंबकपंत आग्र्यात सापडले!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कसे?’ राजांनी विचारले.

‘झडतीत गावले! आपण आला, त्याच दिवशी गावले. पंडित कलश आणि परमानंद कवी पण सापडले, असं म्हणतात.’

‘अरेरे! मदारी, शिवलिंग आलं, पण त्रिदळ मात्र गुंतून राहिलं. बिचारे काय हाल भोगीत असतील! ...आणि?’

‘औरंगाबादेहून मिर्झाराजांनी तळ उचलला. ते दिल्लीला निघाले, म्हणे. दुसरा सुभेदार औरंगाबादेस येणार, म्हणतात.’

‘बिचारे मिर्झाराजे! मासाहेब, चांगला दिवस पाहून या दोन वीरांचा यथोचित सत्कार करायला हवा. यांच्या पराक्रमाला मोल नाही. काहीही दिलं, तरी कमी भासेल... मदारी, हिरोजी, विश्रांती घ्या. उद्या बोलू.’

दोघे मुजरे करून निघून गेले; आणि राजे मदारी-हिरोजींची कथा सांगू लागले.

□

४

एके दिवशी तातडीने राजे राजगडाहून गेले. जाताना बरोबर तानाजी, सूर्याजी, येसाजी आणि प्रतापरावांचे अश्वदळ होते. राजे अचानक का गेले, हे कुणालाच माहीत नव्हते. दोन दिवसांनी सायंकाळच्या सुमारास राजे राजगडाच्या पायथ्याशी आले. सारे आश्चर्यचकित होऊन राजांच्याकडे पाहत होते. शेजारच्या घोड्यावर संभाजीराजे बसले होते. मागून अनेक मंडळी येत होती. दोन मेणेही संगती होते. संभाजीराजांच्या आगमनाची बातमी गडावर पोहोचली होती. आश्चर्य आणि आनंद यांनी सारे वेडावून गेले. जो तो संभाजीराजांना पाहायला धावत होता. पाहूनही डोळ्यांवर विश्वास बसत नहता.

वाड्यात जेव्हा बातमी कळली, तेव्हा मनोहारी वेड्यासारखी वाड्यावर भिरभिरली. पुतळाबाईंना आनंदाश्रू आवरेनासे झाले. सोयराबाई सुन्न झाल्या. भानावर राहिल्या होत्या, त्या फक्त जिजाबाई. बाळराजांना ओवाळण्याची तयारी करायला त्या सांगत होत्या. त्यांनी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मोरोपंतांना सांगितले,

‘मोरोपंत! बाळराजांच्यावरून सोन्याच्या मोहरा ओवाळून टाका. राजे सोन्याच्या पावलांनी घरात येऊ देत!’

नगाऱ्याचे आवाज घुमत होते. शिंगे वाजत होती. राजे बाळराजांच्यासह वाड्याच्या दरवाज्याशी आले; पायउतार झाले. बाळराजांच्यावरून दहीभात ओवाळून टाकला गेला. सुवासिनींनी पायांवर पाणी टाकले. सर्व आया आरती घेऊन उभ्या होत्या; बाळराजांना निरखीत होत्या. मोरोपंत पुढे झाले. सेवकाने आणलेल्या तबकातील मोहरा त्यांनी बाळराजांच्यावरून ओवाळून टाकल्या. ओवाळून घेऊन बाळराजांनी सोन्याच्या पावलांनी वाड्यात प्रवेश केला. साऱ्यांचे मुजरे झाले.

आतल्या दरवाज्यात जिजाबाई उभ्या होत्या. बाळराजे पाया पडताच त्यांनी बाळराजांना उराशी कवटाळले. बाळराजांच्या जिरेटोपावर अश्रू पडू लागले. बाळराजांना घेऊन जिजाबाई बैठकीवर बसल्या. राजे आत आले. जिजाबाईंच्या मांडीवर बसलेले बाळराजे पाहताच राजे म्हणाले,

‘आता मांडीवर बसायला बाळराजे लहान नाहीत.’

सारे हसले. बाळराजे सरकू लागले. त्यांना हाताचा विळखा घालीत जिजाबाई म्हणाल्या,

‘गप, रे! तो लहानच आहे.’

राजे पुढे गेले; आणि त्यांनी बाळराजांच्या टोपाला हात घातला. बाळराजांनी टोप गच्च पकडला. राजे मोठ्याने हसले. जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, काय झालं?’

‘विचारा ना बाळराजांना!’

जिजाबाईंनी टोप काढला. संजाब राखलेले संभाजीचे मस्तक पाहून सारे हसले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजांनी लाजून आजीच्या कुशीत तोंड लपविले. राजे म्हणाले,

‘मासाहेब, तुम्ही बाळराजांचं ते रूप, तो अवतार पाहिला नाही. गुडघ्यापर्यंत पंचा, अंगावर छोटं उपरणं, आणि डोक्यावर हे...’

‘गप बसा, राजे! तुम्ही सुद्धा बैरागी बनूनच दारी आलात. दोन्ही रूपं मला देवाचीच वाटतात... एक शिवाचं, दुसरं वामनाचं!’

जिजाबाईंनी बाळराजांच्या मस्तकाचे चुंबन घेतले. राजे बाहेर गेले; आणि राजांच्या पाठोपाठ मोरोपंत, कृष्णाजीपंत, केसो त्रिमळ आत आले. त्यांच्या पाठोपाठ कृष्णाजीपंतांच्या पत्नी पार्वतीबाई आणि काशिपंतांच्या पत्नी लक्ष्मीबाई पण होत्या.

राजांनी त्या सर्वांची जिजाबाईंना ओळख करून दिली व सांगितले,

‘मासाहेब, या सर्वांचे उपकार या जन्मी फिटणार नाहीत! आपल्या मोरोपंतांचे मेहुणे कृष्णाजीपंत. हे मथुरेलाच असतात. त्यांचे भाऊ हे काशिपंत. या सर्वांनी संभाजीराजांचा आपल्या घरी संभाळ केला; बाळराजांना जीवमोलानं जपलं. हे कृष्णाजीपंत आम्हांला वाराणशीपर्यंत सोबतीला आले आणि ह्या केसो त्रिमळांनी बाळराजांना इथवर आणलं. ज्यांनी बाळराजांना आम्ही बरोबर नसतानाही मथुरेत पोहोचवलं, ते कवी कलश मात्र आज औरंगजेबाच्या हातीच आहेत.’

‘ते कसे सापडले?’ मोरोपंतांनी विचारले.

‘सांगितल्याप्रमाणे त्यांनी बाळराजांना मथुरेत सोडलं आणि ते कुणी संशय न घ्यावा, म्हणून परत आग्र्याला आले. नेमके बादशहांच्या हाती लागले.’

‘राजे, त्यांना सोडविण्याची खटपट केली पाहिजे. तुम्ही भलतंच सांगून बसलात आणि साऱ्यांनी दीड महिना झुरून काढला. कुणाकडे पाहवतही नव्हतं.’

‘ती का आम्हांला हौस होती?’ राजे म्हणाले, ‘उलट, या बातमीनं बाळराजांचं आयुष्यच वाढलं. ही बातमी आम्ही उठविली नसती, तर औरंगजेबाचा शोध निष्काळजी बनला नसता. बाळराजे दोन महिन्यांच्या आत गडावर आले नसते.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तुम्ही केलंत, म्हणून हे झालं. पोर सुखरूप घरी आलं!’

राजे जिजाबाईंना एकदम म्हणाले,

‘नाही हं, मासाहेब! हे आम्ही मुळीच ऐकून घेणार नाही. आम्ही तुम्हांला जीव तोडून बाळराजे सुरक्षित असल्याचं सांगितलं; पण तुमचा त्यावर विश्वास बसला नाही.’

‘माझा विश्वास बसला नाही? आणि तुमच्यावर? राजे!’ जिजाबाई आश्चर्याने उद्गारल्या.

‘हो! ते अगदी सत्य आहे. नाही तर आजवर तुम्ही उपवास करीत बसला नसता. बाळराजांच्यापेक्षाही तुमच्या उपवासांनी आम्ही घाबरे बनलो.’

जिजाबाईंना काही उत्तर देता आले नाही.

राजांनी मोरोपंतांच्या सर्व मंडळींना गडावर ठेवून घेतले. अपार द्रव्य त्यांना दिले. राजांनी मोरोपंतांना सांगितले,

‘मोरोपंत, अद्याप रघुनाथपंत आणि त्र्यंबकपंत बादशहाच्या हाती आहेत. ते सुखरूप आहेत, असं त्यांच्या घरी कळवा. त्यांना परत आणण्याची आम्ही खटपट करू. तसं आश्वासन त्यांना द्या. बिचारे काळजीत असतील.’

बाळराजे घरी आल्यापासून वाड्यात नवीन उत्साह संचारला होता. जिजाबाईंचा सर्व थकवा कुठच्या कुठे गेला. सात आयांच्या लाडात आणि आजीच्या कौतुकात बाळराजे गुदमरून गेले.

राजे मात्र कामात गढले. साऱ्यांना बोलावून राजे नवी फौज उभारीत होते. येसाजी, तानाजी, प्रतापराव, मोरोपंत, अनाजी, सूर्याजी, फिरंगोजी नव्या उत्साहाने कामाला लागले होते. नवी शस्त्रे, घोडी खरीदली जात होती. गडावर सारखी वर्दळ सुरू झाली.

एके दिवशी मोरोपंत सदरेवर आले. त्यांनी बातमी सांगितली,

‘महाराज, कृष्णराव नाईक दर्शनाला आले आहेत.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कोण?’

‘नेताजींचे नाईक. नेताजींच्या बरोबरच ते गेले होते. मिर्झाराजांचा तळ उठला. नेताजींना अटक झाली.’

राजे संतप्त आले. ते म्हणाले,

‘मोरोपंत, त्यांना निरोप द्या! अशा लोकांनी आम्हांला फौज वाढवायची नाही. जे राज्याशी इमानी असतील, तेच आम्हांला हवेत.’

नेताजींच्या आठवणीने अस्वस्थ झालेले राजे सदरेवर आपल्या महाली निघून गेले.

□

५

सकाळच्या वेळी सोयराबाईंना महालात आलेल्या पाहून राजांना आश्चर्य वाटले. पाठोपाठ करीम चाचा आलेला पाहून तर आश्चर्य दुणावले. करीम चाचा हा पुण्याचा शिंपी. राजांचे कपडे लहानपणापासून तोच शिवीत असे. करीम आता पुष्कळ म्हातारा झाला होता. करीमने मुजरा करताच राजांनी विचारले,

‘राणीसाहेब, हा कुठं सापडला?’

‘सापडतो कुठला? अनाजींना सांगितलं होतं. घोडं पाठवून बोलावून घेतला.’

‘बरं केलंत. ही जुनी प्रेम करणारी माणसं भेटली, म्हणजे बरं वाटतं... काय, चाचा, बरं आहे ना?’

‘अल्लाच्या कृपेनं सारी बरकत आहे, हुजूर!’

‘पण, राणीसाहेब, याला बरं बोलावून घेतलंत?’ राजांनी विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘छान! आपण आग्र्याला जाताना सारे चांगले कपडे घेऊन गेलात. येताना कफनी बांधून आलात. महादेव, मनोहारी हेच म्हणाली. तेव्हा याला बोलावून घेतला.’

राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. ‘खरं सांगू, राणीसाहेब? ती कफनी होती ना, तीच फार बरी वाटली. अकारण साधुत्वाच्या कल्पनेनं अंग पुलकित होई.’

‘नसते डोहाळे बोलू नका.’ सोयराबाई भिऊन बोलल्या.

राजे मोठ्याने हसले; उभे राहिले. त्यांनी विचारले,

‘शिंपी बोलावलात, पण कापडाचे काय?’

‘त्याची नको काळजी. कोठारात कापडाचे ढीग लागलेत.’

‘तुम्ही कोठारं सुद्धा पाहिलीत वाटतं?’

‘मासाहेबांनी तेच काम लावून दिलंय्. रेशमी, भरजरी ठाव उन्हाला घालायचं काम मलाच करावं लागतं.’

‘म्हणजे आता दप्तरी सुद्धा हस्तक्षेप झाला, तर!’

सोयराबाई लाजल्या. म्हणाल्या,

‘करीम! माप घे, बाबा.’

‘पण, राणीसाहेब, एवढ्या तातडीनं कपडे शिवण्याची आवश्यकता आहे का?’

‘साधे कपडे भरपूर आहेत; पण भरजरी...’

‘समजलो.’ राजे क्षणभर उभे राहिले; गंभीर झाले. ‘राणीसाहेब, आता यापुढं कुणाच्या दरबारी आम्हांला उभं राहावं लागेल, असं वाटत नाही... आणि जे आमच्या दरबारी येतील, त्यांचं आमच्या कपड्यांकडे लक्षही जायचं नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘करीम...’ सोयराबाई म्हणाल्या.

‘घे, बाबा! आमचं इथं काही चालत नाही.’

करीम मापे घेत होता. राजे मुकाट्याने उभे होते. मापे घेऊन झाली. राजे म्हणाले,

‘बाळराजांचीही...’

‘त्यांची काळजी नको. त्यांची मापं घेऊनच वर आलो.’

‘ठीक!’

करीम मुजरा करून निघून गेला. सोयराबाई जाण्यासाठी वळल्या, तोच राजे म्हणाले,

‘चांगला दिवस आहे. मोरोपंतांना आणि बाळाजींना आमच्याकडे पाठवून द्या.’

‘जी!’

सोयराबाईंनी बाळाजी आवजींना आणि मोरोपंतांना पाठविले. अनाजीही आले. राजे अनाजींना म्हणाले,

‘अनाजी, तुम्ही पण आलात, बरं झालं. आम्ही आज एक महत्त्वाचं पत्र लिहायचं ठरवलं आहे.’

‘कसलं, महाराज?’

‘मोरोपंत, अनाजी, आम्ही सुटल्यामुळं औरंगजेबाचा आता काय तर्क असेल?’

‘आपण परत उठाव कराल, असंच कोणालाही वाटेल.’

‘अगदी बरोबर.’ राजे मांडीवर थाप मारीत म्हणाले, ‘पुरंधरच्या तहाबरोबर आमचं राज्य अपुरं बनलं. मोगलाईचे सरदार थोड्या-फार शिबंदीनिशी अजून आपल्या मुलुखात आहेत.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मिर्झाराजे तर परत निघाले. याच वेळी आम्ही उठाव केला, तर संतप्त औरंगजेब पुन्हा दक्षिणेत उतरणं कठीण नाही. एकाच वेळी मोगलाई, आदिलशाही आणि कुतुबशाही यांचं वैर आपणांला सोसवणार नाही. आपलं राज्य नवं; दोन-तीन चपेटे खाऊन हलाखीला आलेलं. अशा परिस्थितीत शत्रू मित्र करून घ्यावा, ती उसंत घेऊन बळ वाढवावं, हा एकच उपाय आम्हांस दिसतो.'

'ते कसं शक्य आहे?' अनाजी म्हणाले.

'आम्ही आज औरंगजेबाला पत्र पाठविणार आहो. आमच्या इमानीपणाची खात्री देणार आहोत.'

'पण औरंगजेब मान्य करील?'

'निश्चित करेल. मिर्झाराजांच्या मोहिमेत पुष्कळ खर्च झाला; यश लाभलं नाही. पुन्हा तो दक्षिणेतल्या कटकटींना आनंदानं तोंड देणार नाही. त्याला आमचं पत्र पाहून आश्चर्य वाटेल; पण तो सर्व मान्य करील.'

'...आणि आपण मोगलांच्या निष्ठेत राहायचं?' मोरोपंतांनी विचारले.

'कुणी सांगितलं? सध्या आपण स्वस्थ बसू, याचा अर्थ निष्क्रिय नव्हे. आपल्यालाही उसंत हवी. फौज उभी राहायला हवी. ताकद वाढायला हवी. गेले कैक दिवस आमच्या शिलकीचा अंदाज आम्ही घेतला, तो याचसाठी. एवढ्या अवधीत आपल्याला पुष्कळ गोष्टी करता येतील... बाळाजी, लिहायचं साहित्य आणलंत ना?'

'जी!'

'बसा.'

बाळाजी बसले. राजे मजकूर सांगत होते. बाळाजी लिहून घेत होते. मजकूर तयार होताच राजे म्हणाले,

'बाळाजी, पत्र सायंकाळी तयार करून आणा. मग शिक्कामोर्तब करून पत्र पाठवून

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

देऊ.’

‘जी!’

बाळाजी उठले आणि बाळराजे महालात आले. राजांच्या जवळ जाऊन ते पाया पडले. राजांनी त्यांच्या केसांवरून हात फिरविला. बाळराजांना जवळ घेत राजांनी विचारले,

‘बाळराजे, आज लौकर मुजऱ्याला आलात?’

राजांचा हात बाळराजांच्या केसांवरून फिरत होता. केसांचा गार स्पर्श जाणवताच राजे म्हणाले,

‘बाळराजे, मासाहेबांना तुम्ही भेटलेले दिसत नाही.’

‘मासाहेब पूजेत होत्या.’ एकदम वळून बाळराजांनी विचारले, ‘पण, आबासाहेब, तुम्ही कसं ओळखलंत?’

राजे हसले. म्हणाले, ‘अगदी सोपं होतं. तुम्ही मासाहेबांना भेटला असता, तर तुमचे हे ओले केस कोरडे केल्याविना त्यांनी मुळीच सोडलं नसतं.’

‘शेवटी आम्हीच दोषी ना?’

साऱ्यांच्या नजरा त्या शब्दांबरोबर महालाच्या द्वारी वळल्या. जिजामाता आत येत होत्या. राजे चटकन उभे राहिले. बाळराजांसह पुढे होऊन राजांनी जिजाबाईंचे पाय शिवले.

‘औक्षवंत व्हा!’ जिजाबाई म्हणाल्या.

बाळराजे जिजाबाईंना बिलगले. त्यांना जवळ घेत जिजाबाई म्हणाल्या,

‘शिवबा, आज बाळराजे एवढ्या सकाळी स्नान आटोपून तुमच्या दर्शनाला का आले, ते त्यांनी सांगितलं नाही, वाटतं?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बाळराजे म्हणाले, ‘मासाहेब!’

राजे म्हणाले, ‘छे! आम्हांला काही सांगितलं नाही. कशासाठी आले होते बाळराजे?’

‘बाळराजांना मोती हवा.’ जिजाबाईंनी सांगून टाकले.

राजे मोठ्याने हसले. त्या मोकळ्या हसण्याने महाल भरून गेला. राजे मोरोपंतांना म्हणाले,

‘मोरोपंत, हे बरं नाही. पुरंधरचा तह झाला, म्हणून एवढी का परिस्थिती बिघडली? एवढी संपदा आम्ही घरी आणून बाळराजांना मोती मिळू नये? बाळराजांना आज रत्नघरात घेऊन जा. त्यांना हवे तेवढे मोती द्या. बस्स?’

बाळराजांचे गाल फुगले,

‘आबासाहेब, आम्हांला ते मोती नकोत.’

‘मग?’

‘तुम्ही आणलेला मोती हवा.’

राजांना काही समजेना. ‘आम्ही आणलेला? आम्ही समजलो नाही.’

जिजाबाई हसल्या. म्हणाल्या,

‘बाळराजे तुमच्याकडे घोडा मागताहेत. ‘मोती’ नावाचा तुमचा पांढरा घोडा आहे, म्हणे. परवाच खरीदलात...’

राजांना सारे समजले. ते बाळराजांकडे पाहत होते. बाळराजे नजर चुकवीत होते. राजांच्या चेहऱ्यावर मिस्किल स्मित झळकले. ते म्हणाले,

‘मासाहेब, बाळराजे आल्यापासून भारीच लाड चालवलेत. मोती आमचा आवडता

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहे. तो आम्ही देणार नाही.’

‘मासाहेब!’ बाळराजे जिजाबाईंना म्हणाले.

‘राजे, या पोरापुढं माझं काही चालत नाही. उगीच त्याला चिडवू नका.’

पुढे होऊन बाळराजांना जवळ घेत राजे म्हणाले,

‘बाळराजे! आम्ही थट्टा केली. भारीच जबरदस्त काम घेऊन आलात. म्हणूनच वशिल्यासाठी मासाहेबही आल्या. या गडबडीत तुमचे केस ओले राहिले, त्यात नवल काय?’

‘मग आम्हांला घोडा देणार?’

‘न देऊन चालेल कसं? एवढा मोठा वशिला आणलात; नाही म्हणायची काय बिशाद आहे? चला, पागेकडे जाऊ. मासाहेब, बाळराजांना आम्ही मोती देऊन येतो.’

बाळराजे आनंदले. त्यांनी जिजाबाईंच्याकडे पाहिले. राजांचा हात धरून बाळराजे जात होते. अनाजी, मोरोपंत, बाळाजी यांच्याकडे पाहून राजे म्हणाले,

‘चला, बाळराजांचा हट्ट पुरवू.’

सारे वाड्याबाहेर आले. थंडीचे दिवस असल्याने सूर्य डोक्यावर येऊनही डोंगराच्या कडेने धुक्याचे पट्टे रेंगाळत होते. ते ऊन सुखावह वाटत होते. चौकीपहाऱ्यांचे मुजरे घेत राजे पागेकडे जात होते. बाळराजे उत्साहाने राजांच्या बरोबर चालत होते.

राजे पागेसमोर आले आणि उभे राहिले. त्यांनी रिशालदाराला मोती मोकळा करण्याची आज्ञा दिली. बाळराजे म्हणाले,

‘चला ना! पागेत जाऊ.’

‘पागेत कशाला? आपण इथंच उभे राहू.’ राजे म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

थोड्याच वेळात मोतीचे खिंकाळणे कानांवर आले. पागेच्या इमारतीकडे साऱ्यांची नजर वळली. पागेच्या प्रवेशद्वारात पांढरा शुभ्र, सुलक्षणी मोती उभा होता. क्षणात तो उधळला आणि राजांच्या दिशेने येऊ लागला. त्याची आयाळ मानेवर उडत होती. मोती डौलात जेथे राजे होते, तेथे आला; महाराजांचे हात चाटू लागला. महाराज मोतीला थोपटीत होते. सारे कौतुकाने पाहत होते. राजांनी मोतीचे कपाळ खाजविले. मोतीची मान हुंदाडत होती. त्याच्या कपाळावरचे केस उशी घेत होते. राजे कौतुकाने त्या उमद्या जनावराकडे पाहत होते. राजांनी त्याच्या मानेवरून हात फिरविला. राजांनी मानेवर मारलेल्या पोकळ थापेचा आवाज उठला. राजे म्हणाले,

'बाळराजे, आपलं खरं ऐश्वर्य हे!... बाळाजी, तो श्लोक कोणता? हां! आठवला...

'यस्याश्वा तस्य राज्यं यस्याश्वा तस्य मेदिनी।
यस्वाश्वा तस्य सौख्यं यस्याश्वा तस्य साम्राज्यम्।।'

राजांनी बाळराजांना विचारले, 'अर्थ समजला?'

'हो!'

'काय?'

बाळराजे पुढे झाले. मोतीला गोंजारीत ते म्हणाले,

'ज्याच्या पदरी घोडा, त्याचं सर्व जग!'

राजे थक्क झाले. त्यांनी विचारले,

'तुम्हांला संस्कृत येतं?'

बाळराजांनी मान खाली घातली. ते म्हणाले,

'मासाहेबांनी सांगितलं.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तरीच! मग एवढे शरमिंदे व्हायला काय झालं?... मोरोपंत, जवळजवळ वर्ष फुकट गेलं. राजांना आता शिकवायला हवं.’

‘जी! मी शास्त्रींना सांगतो.’

‘बाळराजे, तुमच्याच नावाचे आमचे दादा होते. ते तुमच्या वयाचे होते, तेव्हा संस्कृत काव्य करीत असत... जाऊ दे. बाळराजे, आजपासून हा मोती तुमचा. फार समजुतदार जनावर आहे. किती लवकर यानं आम्हांला माया लावली! पागेत जनावर बांधून आपलं काम होत नाही. त्याला तसंच प्रेम द्यावं लागतं. पाहिलंत ना, आम्हांला पाहताच कसा दौडत आला तो? आम्ही जेव्हा एकटे स्वार असतो, तेव्हा आम्ही घोड्याबरोबर बोलतो.’

सारे हसले. बाळराजे चकित होऊन म्हणाले,

‘घोड्याबरोबर बोलता?’

‘हो! त्यात हसण्यासारखं काय आहे? आम्ही खरं तेच सांगतो. मुकं जनावर असलं, तरी ते सारं समजू शकतं. शब्द कळले नाहीत, तरी त्याला भाव कळतो. मोतीला आम्ही सांभाळलं, तसंच तुम्ही सांभाळा. सकाळ-संध्याकाळ पागेत चक्कर टाका. त्याला खाऊ घाला. त्याच्याशी बोला. त्याला माया लावा. जनावराचं प्रेम मिळविण्यातही अलौकिक आनंद असतो. त्याचं प्रत्यंतर घ्या.’

नजीक उभ्या असलेल्या रिशालदाराला राजे म्हणाले,

‘हणमंत, जनावराला काढणी लावा. घेऊन जा.’

रिशालदाराने मोतीला काढणी लावली. त्याने घोड्याला वळविले. राजे म्हणाले,

‘बाळराजे, मोती आता तुमचा झाला. त्याला ते कळायला हवं. तुम्ही त्याला ठाणबंद करून या.’

रिशालदाराने बाळराजांच्या हाती काढणी दिली. बाळराजे पागेकडे मोतीला घेऊन जात होते. ते दृश्य पाहून राजांना समाधान वाटत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

६

देवपूजा आटोपून राजे नेहमीप्रमाणे जिजाबाईंच्या महाली गेले. मासाहेबांच्या जवळ बसलेले संभाजीराजे राजांना पाहताच उठले. राजे हसत जवळ आले. त्यांनी मासाहेबांचे पाय शिवले. जिजाबाईंनी राजांना विचारले,

‘राजे, आज गडबड दिसते?’

‘आम्हीच आज सर्वांना बोलावून घेतलं आहे.’

‘काय बेत ठरवलात?’

‘बेत मोठा आहे, मासाहेब! विस्कटलेली घडी नीट बसवायला हवी. आपणही चलावं.’

‘मी?’ जिजाबाई म्हणाल्या. ‘आता ह्या राजकारणात यायला हवंच का? मी थकले. आता होत नाही.’

‘मासाहेब, असं सारखं म्हणत जाऊ नका.’ राजे कळवळले.

‘यापुढं नाही म्हणणार. झालं? चला.’

जिजाबाई उठल्या. त्यांनी संभाजीराजांना हाताशी धरले.

‘चला, शंभूबाळ. आपण बसू.’

राजांच्या पाठोपाठ जिजाबाई शंभूराजांना घेऊन जात होत्या.

सदरेवर प्रतापराव, अनाजी, मोरोपंत ह्या मंडळींबरोबरच दर्यासारंग, इब्राहीमखान, दौलतखान, मायनाक ही आरमाराची प्रमुख मंडळीही दिसत होती. राजांनी एवढ्या तातडीने का बोलवावे, हे कुणालाच कळत नव्हते. सारे कुजबुजत होते. राजांना पाहताच साऱ्यांची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कुजबूज एकदम थांबली. बैठक उठली. मुजरे झडले. मासाहेबांच्यासह राजे बैठकीवर बसले. संभाजीराजे मासाहेबांच्या नजीक बसले. सारे बसताच मोरोपंत म्हणाले,

'राजे, आता स्वस्थ बसून किती दिवस चालायचं? काहीतरी चाल करायला हवी. मिर्झाराजांनी परत प्यादी हलवायला सुरुवात केली आहे. मोगलांच्या बंडखोरांना मदत करू नका, असा इशारा त्यांनी दिला आहे. पुणे, सुपे, इंदापूर या राजांच्या खास मुलुखात काही गडबड करू नये, म्हणून जयसिंगाने पक्का बंदोबस्त केला आहे. जयसिंगाची ही चाल साधी असली, तरी तिच्याकडे काणाडोळा करून उपयोगी नाही.'

राजे म्हणाले, 'मोरोपंत, मिर्झाराजांनी जरी आता हालचाल सुरू केली असली, तरी आता ते फार काळ दक्षिणेत राहू शकतील, असं आम्हांला वाटत नाही. त्यांच्याकडून आम्हांला त्रास पोहोचणार नाही, हा आमचा तर्क आहे.'

'महाराज!' प्रतापराव म्हणाले, 'ही संधी नामी आहे. आम्ही आज्ञेचीच वाट पाहत आहो. फार झालं आता कौतुक.'

'प्रतापराव, स्वस्थ बसायची का आम्हांला हौस आहे? पण पाठीमागे भक्कम आधार असल्याशिवाय साधं प्यादंही पुढं सरकवायला मन कचरतं. तो भक्कम आधार निर्माण करायला हवा. ती ताकद आधी निर्माण करायला हवी.'

'महाराज, तुम्ही हाक मारायचा अवकाश, बघता-बघता माणसं गोळा होतील. तुमच्या हाकेचीच ती वाट पाहत आहेत.' मोरोपंत म्हणाले.

'तो आम्हांला विश्वास आहे.' राजे म्हणाले, 'मोरोपंत, ती हाक मारण्याची पाळी येणार नाही, हेही आम्ही जाणतो.' राजे क्षणभर थांबले आणि म्हणाले, 'येताना प्रवासात घडलेली एक गोष्ट आम्हांस आठवते... बैराग्याच्या वेषात आम्ही आमच्या प्रदेशात आलो. सायंकाळची वेळ. एका छोट्या गावात कुळवाड्याच्या घरी आमची वस्ती पडली. कुळवाड्याची म्हातारी मनानं थोर होती. म्हातारीनं आम्हांला गरम गरम भात वाढला. पत्रावळीवर वाढलेल्या भातात कालवण वाढलं आणि वाढलेलं कालवण बघता-बघता जमिनीवर पसरलं. पानात काही उरलं नाही. आम्ही बघत राहिलो. काही सुचत नव्हतं. म्हातारी आमच्याकडे एकटक नजरेनं बघत होती. हसत ती म्हणाली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अगदी शिवाजीराजाच दिसतोस तू!’

आश्चर्य न दाखवता आम्ही विचारलं,

‘काय झालं, आई? शिवाजीनं काय केलं?’

‘अरं बाबा, मुलूख बांधून घेतला न्हाई. चारी वाटा मोकळ्या. राज्य ऱ्हाईल व्हय?’ आणि हसून म्हातारी म्हणाली, ‘आळं कर, बाबा. त्याविना कालवण ऱ्हाईल कसं?’

‘आम्ही आळं केलं!’ हसून राजे म्हणाले, ‘त्या प्रसंगाची याद आम्ही ठेवली आहे. साध्या प्रसंगातूनदेखील श्री मार्ग दाखवितात. स्वराज्य राखायला हवं. त्यासाठी भक्कम तटबंदी करायला हवी. कुठंही कसूर राहून उपयोगी नाही.’ राजे मोरोपंतांच्याकडे वळून म्हणाले, ‘...बरी आठवण झाली! मोरोपंत, आमच्या सरदारांनी मोगली मुलुखात धुमाकूळ घातला, मुलूख लुटला. एका पाटलाच्या घरी ते ऐकायला मिळालं. त्याचं घरदार लुटलं. निराजीपंतांना त्यांचा ठिकाणा माहीत आहे. त्यांना विचारून घ्या. आम्ही त्यांना शब्द दिला आहे. त्यांची भरपाई तुरंत पाठवून द्या.’

‘जी!’ मोरोपंत म्हणाले.

‘आमच्या कैदेनं अनेक कामं विस्कळीत बनली आहेत. मालवणचा जंजिरा, रायगड यांची कामं तशीच राहिली असतील. ती कामं...’

‘नाही, महाराज. ती कामं चालू आहेत. त्यांत खंड पडला नाही.’

‘खर्चाची तरतूद?’

‘महाराज, ह्या दोन्ही कामांची रक्कम आधीच बाजूला काढून ठेविली होती. त्या रकमेला हात लावू दिला नाही मासाहेबांनी.’

‘व्वा, मोरोपंत! आमच्या कठीण प्रसंगातदेखील या कामात खंड पडू दिला नाहीत. धन्य! अहो, श्रींचं राज्य. श्री करवितात, हे आम्हांला वाटतं, ते याचमुळं!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे थांबले. सर्वांवरून नजर टाकून त्यांनी बोलायला सुरुवात केली. आपल्या फौजेच्या व्यवस्थेची कल्पना राजे सांगत होते; पायदळ, घोडदळ आणि आरमार यांची व्यवस्था समजावीत होते, त्यांचं महत्त्व सांगत होते. ते ऐकत असलेल्या मासाहेब म्हणाल्या,

‘राजे, हे याच्या आधीच व्हायला हवं होतं. राज्यउभारणीबरोबरच राज्यरक्षणाचा विचार करायला हवा- नव्हे, तो प्रथम व्हायला हवा.’

‘तोच विचार आम्ही केला आहे. भक्कम तटबंदी असलेला गड माऱ्याला दाद देत नाही. राज्याचंही तसंच आहे. मिर्झाराजांनी मनुचीसारखा माणूस तोफखान्यावर का ठेवला, हे आम्ही तिथंच शिकलो.’

राजांची नवी योजना ऐकून साऱ्यांना हुरूप आला. सदरेवरील बैठक उठली आणि उसंत न घेता मोरोपंत, बाळाजी आवजी फडाच्या मंडळींसह फडात खपू लागले. कच्चे मसुदे तयार होत होते. राजे त्यांवर विचार करीत होते. पायदळ, घोडदळ आणि आरमार अशी फौजेची विभागणी केली होती.

पायदळाच्या दहा लोकांवर एक नाईक, पाच नाइकांवर हवालदार, तीन हवालदारांवर एक जुमलेदार आणि दहा जुमलेदारांवर एक हजारी नेमण्यात आला. पायदळाच्या सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्यास ‘सरनौबत’ हुद्दा ठरविण्यात आला.

घोडदळाचे दोन भाग केले- बारगीर आणि शिलेदार. पंचवीस स्वारांवर एक हवालदार, पाच हवालदारांवर एक जुमला, दहा जुमल्यांवर सुभा आणि दहा सुभ्यांवर पंचहजारी. घोडदळाच्या मुख्य सेनापतीस ‘सरनौबत’ हुद्दा दिला गेला.

पायदळ, घोडदळ याचप्रमाणे राजांनी आरमाराची आणि किल्ल्यांची व्यवस्था लावली. फौजेच्या व्यवस्थेबरोबरच राजांनी फौजेचे नियम ठरवून दिले...

‘दसरा होताच फौजेने कूच करावे. आठ महिने परमुलुखात पोट भरावे. खंडण्या घ्याव्यात. पावसाच्या सुरुवातीस फौजेने आपला मुलूख जवळ करावा. लष्करात असता कोणीही बायको, बटीक अथवा कलावंतीण जवळ बाळगू नये. जो बाळगील, त्याची गर्दन मारली जाईल. लुटीचा माल लपवील, त्यास कडक शिक्षा केली जाईल.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लष्कराच्या आणि आरमाराच्या व्यवस्थेत कसर राहू नये, याची दक्षता राजे घेत होते. राजांची कल्पना साकारली जात होती. साऱ्या गडांना ते भेटी देत होते. फौजेच्या निरनिराळ्या तुकड्यांची पाहणी ते करीत होते. बळ वाढत होते. नवी ताकद येत होती.

राजे मालवणचा जलदुर्ग पाहून आले. समुद्रातून मान वर काढणारा तट त्यांनी डोळे भरून पाहिला. अपार कष्ट करणाऱ्या, पण त्या कष्टांची फिकीर न बाळगणाऱ्या लोकांचे त्यांनी कौतुक केले. समुद्रावर तरांडी, गलबते, मचवे, दुबारे, संगमिऱ्या अशा अनेक जातींच्या नौका तरंगत होत्या. लाटांवर हेलकावणाऱ्या त्या नौका पाहून राजांचे मन भरून आले.

भरल्या मनाने राजे राजगडावर आले होते; मनाशी अनेक बेत ठरवीत होते. औरंगजेबाच्या बातम्या त्यांच्या कानांवर येत होत्या. मिर्झाराजांच्या दक्षिणेतल्या पराभवाने अस्वस्थ झालेला औरंगजेब उत्तरेला अफगाणांच्या बंडाव्याने दिवसेंदिवस त्रस्त होत होता. राजांना ती गोष्ट अनुकूल वाटत होती. औरंगजेब आपला तह मान्य करील, याचा विश्वास दुणावत होता.

संध्याकाळी राजे मोरोपंतांच्यासह गडावर फेरफटका मारून आले होते. राजे महालात जाण्यासाठी वळणार, तोच सेवक धावत आला. त्याने बातमी दिली,

'महाराज! रघुनाथपंत आणि त्र्यंबकपंत आले!'

सायंकाळच्या सोनेरी किरणांत राजांचा चेहरा उजळला. त्यांनी पाहिले- त्र्यंबकपंत आणि रघुनाथपंत येत होते. राजांनी क्षणात त्यांना डोळे भरून पाहिले. त्यांच्या रूपात कितीतरी बदल पडला होता. न सांगताही औरंगजेबाने केलेला छळ त्यांचा चेहरा सांगत होता. क्षणात राजांचे डोळे भरून आले. पुढे झेपावणारी द्वयी राजे भरल्या डोळ्यांत साठवीत होते. दोघांनी मुजरे केले. राजांना शब्द फुटत नव्हता. डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंचे त्यांना भान नव्हते. स्वत:ला सावरीत राजे मोरोपंतांना म्हणाले,

'पंत! उरलेले आमचे दोन मोहरे काळाच्या दाढेतून सुटलेले पाहण्याचं भाग्य लाभत आहे. आम्ही दिलेल्या वचनातून श्रींनी आम्हांस मुक्त केलं. रघुनाथपंत! आपण थकला आहात. विश्रांती घ्या. खूप विचारायचं आहे. नंतर बोलू.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज!’ रघुनाथपंत म्हणाले, ‘एक आनंदाची बातमी- औरंगजेबानं आपला तह मान्य केला!’

‘पंत! तुम्हांला आम्ही पाहिलं, तेव्हाच आम्ही ते जाणलं. आमच्या मनासारखी गोष्ट घडली. त्यात आम्हांला आनंद आहे. तुम्ही विश्रांती घ्या, पंत!’ राजे डोळ्यांच्या कडा पुशीत म्हणाले, ‘आम्ही नंतर खाली येऊ.’

रात्री जिजाबाईंच्या महालात सारी मंडळी बसली होती. रघुनाथपंत आणि त्र्यंबकपंत आपली हकीगत सांगत होते. सारे ऐकत होते. औरंगजेबाने पकडून ठेवल्यापासूनची हकीगत रघुनाथपंत ऐकवीत होते. औरंगजेबाने केलेल्या छळांच्या गोष्टी ऐकून साऱ्यांच्या मनाचा थरकाप उडत होता. धर्मांतरासाठी औरंगजेबाने दोघांवर टाकलेले पाश ऐकून साऱ्यांना चीड आली होती. स्वधर्मासाठी प्रत्यक्ष मृत्यूच्या उंबरठ्यातून जायला सिद्ध झालेली द्वयी. साऱ्यांनाच त्यांचा अभिमान वाटला. रघुनाथपंत म्हणाले,

‘महाराज, आपण मूळचंदाकडे दिलेली सारी रत्नं औरंगजेबाकडे गेली.’

‘रत्नं?’ मासाहेबांनी विचारले.

‘मासाहेब, आम्ही आपल्या सुटकेचा विचार करीत असता आमच्या जवळची मौलिक रत्नं राजगडावर पोहोचविण्यासाठी मूळचंदाकडे दिली होती, सुरक्षित येतील, म्हणून.’

‘मग?’ मासाहेबांनी विचारले.

‘मासाहेब, आम्ही असं ऐकलं- मूळचंदानं ती सारी रत्नं दक्षिणेत मुनिमाकरवी रवाना केली होती; पण राजे पळाल्याचं समजताच गोंधळात पडलेल्या मुनिमानं ती रत्नं परत मूळचंदाकडे पोहोचविली. मूळचंदानं घाबरून ती रत्नं औरंगजेबाकडे दिली. काफिराचा पैसा नको, म्हणून औरंगजेबानं सारी रत्नं विकली; आणि आलेला पैसा फकिरांना वाटला.’

‘पंत!’ राजे सद्गदित आवाजात म्हणाले, ‘औरंगजेबानं दोन रत्नं आपणहून आम्हांकडे पाठविली; त्यांत सर्व आलं. ते जवाहीर गेलं, म्हणून आम्हांस दुःख वाटत नाही- आणि ती रत्नं जातात कुठं?’ राजांच्या मुठी वळल्या. ते आवेशाने म्हणाले, ‘औरंगजेबानं आमची रत्नं दान करून मिळविलेलं पुण्य त्याला पचनी पडणार नाही; आम्ही ते पडू देणार नाही.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एक ना एक दिवस ते आम्ही दामदुपटीनं वसूल करू.’

बराच वेळ कुणी काही बोलले नाही. सारे राजांच्याकडे पाहत होते. अचानक मोरोपंतांनी विचारले,

‘रघुनाथपंत, नेताजींना कैद झाल्याची बातमी होती.’

साऱ्यांच्या नजरा मोरोपंतांच्याकडे वळल्या. क्षणात राजांची आवेशयुक्त नजर तिरस्काराने भरली. रघुनाथपंतांनी राजांच्याकडे एकवार पाहिले; आणि खाली मान घालून ते म्हणाले,

‘नेताजी मुसलमान झाले!’

नेताजी? मुसलमान? सर्वांनाच तो धक्का अनपेक्षित होता. रघुनाथपंत म्हणाले,

‘झालेल्या छळाला नेताजी डगमगले. औरंगजेबाने छळ करून त्यांना मारण्याचा घाट घातला होता. नेताजींना जीव मोलाचा वाटला. त्यांनी जीव वाचविला, धर्म सोडला.’

मासाहेबांच्या जवळ बसलेले बाळराजे एकदम बोलून गेले,

‘त्यापेक्षा मरायचं होतं!’

साऱ्यांच्या नजरा बाळराजांच्याकडे वळल्या. बाळराजांची नजर स्थिर होती. कुणीच काही बोलत नव्हतं. दीर्घ नि:श्वास सोडून राजे म्हणाले,

‘जीवनातली अपुरी निष्ठा माणसाला अशीच वाहवत नेते. आमचा पडता काळ पाहताच अडीच हजार मनसबीसाठी आमचे सेनापती आदिलशाहीला मिळाले. मिर्झाराजांनी पंचहजारी देऊ करताच त्यांनी आदिलशाही सोडली; मोगलाई जोडली. जीवनरक्षणार्थ आता ते मुसलमान झाले. नशीब यांचं!’

नेताजींच्या धर्मांतराने राजे खिन्न बनले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दुसऱ्या दिवशी राजे जिजाबाईंच्या महालात गेले. तेव्हा दाराशीच त्यांची पावले अडखळली. जिजाबाईंच्या शेजारी सगुणाबाई बसल्या होत्या. त्यांच्या पाठीवर जिजाबाईंचा हात होता. सगुणाबाई गुडघ्यांत मान घालून बसल्या होत्या. राजांच्याकडे नजर जाताच जिजाबाई म्हणाल्या,

'या, राजे. पूजा झाली?'

'जी!'

सगुणाबाई डोळे टिपीत उठल्या. राजे जिजाबाईंच्या पाया पडले. सगुणाबाईंच्याकडे पाहत राजे उद्गारले,

'काय झालं?'

'बिचारी पोर!' जिजाबाई म्हणाल्या, 'काल नेताजींच्या धर्मांतराची बातमी कळल्यापासून तिच्या डोळ्यांचं पाणी खळेना.'

'नेताजी मुसलमान झाले, त्यात राणीसाहेबांचा काय दोष?' राजे म्हणाले.

'तेच सांगते मी! पण किती केलं, तरी रक्ताचं नातं. काका मुसलमान झाले, त्याचं वाईट वाटणारच.'

'इलाज नाही. नको ते झालं, होऊन गेलं. ते मनाला लावून घेऊ नये.'

सगुणाबाई निघून गेल्या. राजे सदरेत जाण्यासाठी वळणार, तोच जिजाबाईंनी हाक मारली,

'राजे!'

'जी!'

'नुसतं राज्याकडेच लक्ष देऊन चालत नाही. घराकडेही जरा लक्ष देत जा.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्ही समजलो नाही.’

जिजाबाई हसल्या. ‘राजे, हेच काल सगुणाला बोलावून सांगितलं असतंत, तर तिला बरं वाटलं असतं. पतीच्या शब्दासाठी बायकांचा जीव उतावीळ असतो, राजे! सोयराला दप्तरी लक्ष द्यायला तुम्ही प्रोत्साहन दिलंत. आज ती सारं पाहते. फडाचे कारकून दबून राहतात.’

‘तुमच्या हातांखाली तयार होतात ना! मग त्यात काय आश्चर्य?’

‘विषय बदलून जमणार नाही. तुम्ही कौतुक केलंत, म्हणूनच सोयरा मनापासून कोठीदप्तर पाहू लागली. सगुणा, पुतळा, काशी सारा वाडा पाहतात; आलं-गेलं, हवं-नको बघतात. त्यांचं कौतुक कुणी करायचं?’

राजे शरमिंदे झाले. म्हणाले,

‘आम्ही चुकलो. यापुढं तेही करू.’

जिजाबाईंच्या चेहऱ्यावरचे स्मित पाहायला राजे महाली थांबले नाहीत.

□

७

औरंगजेबाशी तह झाल्याने राजांना खूप बरे वाटले. राजांच्या मनावरचा एक मोठा ताण उतरला. या तहामुळे राजांना उसंत मिळणार होती. पुरंधरच्या तहामुळे हाती राहिलेल्या मुलुखाचा, बेशिस्त कोकणचा कारभार सुरळीत लावण्याचे राजांनी ठरविले. राजांनी आपल्या फौजेला नव्या शिस्तीचे स्वरूप दिले होते, तसेच मुलुखाची बटाई करून महसुलाची व्यवस्थाही त्यांना आवाक्यात आणायची होती. औरंगजेबाच्या तहामुळे संभाजीराजांना मिळणाऱ्या मनसबीतून फौजेचा वाढता खर्च निभावता येणे शक्य होते. राजांनी आपल्या मागण्या औरंगजेबाला कळविल्या होत्या. आदिलशाही मुलूख वारंवार होणाऱ्या युद्धामुळे उत्पन्नाच्या दृष्टीने निर्वेध नव्हता. त्यासाठी पुरंधरच्या तहाव्यतिरिक्त राजांनी बादशहाकडे दिलेल्या मुलुखातून आणखी एक लाख होनांचे उत्पन्न मिळावे, अशी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मागणी औरंगजेबाकडे केली होती. औरंगजेबाने ते मान्य केले आणि देशमुखी वसूल करण्याची परवानगी राजांना दिली.

औरंगजेबाच्या तहामुळे निश्चिंत होऊन राजांनी कोकण भागाकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. सैन्याची सर्व व्यवस्था पुरी करून राजे कोकणात जायचा विचार करीत होते आणि त्याच वेळी कोकणातील रांगणा किल्ल्याला आदिलशाही फौजेने वेढा घातल्याची बातमी आली.

एकच वर्षापूर्वी रांगणा राजांच्या हाती आला होता. सुभेदार रावजी पंडितांची रांगण्यावर नेमणूक केली होती. राजे मोगलाईच्या कचाट्यात सापडले आहेत, असे पाहून आदिलशाहीने गमावलेला किल्ला परत मिळविण्यासाठी आपली फौज पाठविली होती. रांगण्याच्या वेढ्याने संतप्त झालेल्या राजांनी मोरोपंतांना आज्ञा दिली,

‘पंत, आमच्या फौजेच्या अधिकाऱ्यांना आपल्या फौजेनिशी गोळा होण्याचे हुकूम द्या.’

गडावरून हुकूम सुटले. रांगण्याच्या बातम्या घेऊन नजरबाज येत होते. त्याचबरोबर गडावर फौज गोळा होत होती. राजांचे फौजी अधिकारी दररोज येत होते. प्रतापराव, तानाजी, येसाजी, सूर्याजी, फिरंगोजी, तेलंगराव गडावर हजर झाले होते. रांगण्याच्या वेढ्याची बातमी ऐकून सारे बेचैन बनले होते.

दोन प्रहरी सदरेवर सारे राजांची वाट पाहत होते. राजे जिजाबाईंच्यासह सदरेवर आले. जिजाबाई तानाजीला म्हणाल्या,

‘अरे तानाजी, आता म्हातारीला जरा स्वस्थ बसू द्याल, की नाही?’

सारे हसले. तानाजी म्हणाला, ‘मासाब, तुमीच असं म्हटलासा, तर पोरांना कसा धीर यायचा?’

‘अरे, कसला धीर देणार मी?’

मोरोपंत हसले. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पंत, का हसला?’

‘राजे, आपण आग्र्याला होतात. सारी चिंता. अहोरात्र मासाहेबांना लागलेली. देवापुढं धरणं धरून बसलेल्या मासाहेब; पण सदरेवर आल्या, की कापरा उडायचा!’

‘काहीतरीच सांगतो.’ जिजाबाई म्हणाल्या.

‘खोटं सांगत नाही मी! कुलकर्ण्यांची आगळीक दिसली, तर मासाहेबांनी स्पष्ट बजावलं, ‘नशते कथले केलियास चिरंजीव मुल्हाजा करणार नाहीत.’ जसं फडात लक्ष, तसंच फौजेवर. प्रतापरावांना, तेलंगरावांना विचारा; एक दिवस स्वस्थ बसवून ठेवलं नाही. बजाजी, झुंजारराव आणि कानोजी पतंगराव यांचा भाऊबंदकीचा तंटा याच सदरेवर बसून मासाहेबांनी गोतमुखानं सोडविला.’

‘जाऊ दे, रे! गेल्या गोष्टी कसल्या सांगतोस?’ जिजाबाई म्हणाल्या, ‘आता समोर काय ठेवलंय्, बघा. राजे सांगत होते, रांगण्याला वेढा पडला आहे.’

‘जी, मासाहेब!’ प्रतापरावांनी दुजोरा दिला. ‘रांगण्याची गय केली, तर विजापूरकर बळावल्याखेरीज राहणार नाहीत.’

‘मग गय कुणी करायला सांगितली?’ राजांनी विचारले.

‘आम्ही आज्ञेची वाट पाहतो.’ तेलंगराव म्हणाले, ‘पण असा शत्रू उभा राहिला, तर...’

‘चेचा!’ राजे उद्गारले.

सारे राजांच्या उद्गारांनी चकित झाले. राजे कधी असे बोलत नसत. राजांनी ते जाणले.

‘आश्चर्य वाटतं ना? पुरंधरच्या तहानं आम्ही खूप शहाणे झालो. आमचं राज्य राखावं, एवढीच आमची आजवरची धडपड होती. प्रसंगी माघार घेणं, शत्रू आला, की निघून जाणं, संधी मिळताच पुन्हा स्वारी करणं, हा खेळ आता बस्स झाला. राज्यकर्त्यानं नुसतं बचावाचं धोरण ठेवून जमत नाही, हे आम्ही पुरेपूर शिकलो. केव्हा तरी आपल्या सामर्थ्याची जाणीव व्हावी लागते. अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्यासाठी जिद्दीनं जावं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लागतं. जेव्हा त्या सामर्थ्याची जाणीव होते, तेव्हाच राज्य सुरक्षित राहतं. आम्ही बलशाली आहो, हे शत्रूला कळतं, तेव्हाच तो स्वस्थ बसतो; आम्हांला बसू देतो. ती सामर्थ्याची जाणीव कुठं ना कुठं दाखवायलाच हवी. ही अक्कल आम्हांला औरंगजेबानं शिकवली. अनुभवानं माणूस शिकतो, म्हणतात, ते काही खोटं नाही.'

'मग रांगण्यावर चालून जाणार?' जिजाबाईंनी विचारले.

'त्याखेरीज गत्यंतर नाही. रांगण्यावर चालून जात असता मनाला मात्र एक शल्य टोचतं.'

'कसलं शल्य?' जिजाबाईंनी विचारले.

'आमच्या गडाला वेढा घालायला आदिलशाही फौज घेऊन बहिलोलखान आणि खुद्द आमचे सावत्र भाऊ एकोजीराजे आले आहेत.'

'राज्यापुढं नात्याचा विचार केव्हापासून करू लागलात, राजे?' जिजाबाईंनी विचारले.

राजे समाधानाने हसले. 'मासाहेब, आमची आपल्याकडून हीच अपेक्षा होती. आपला कौल मिळाला. आम्ही मोहिमेवर जातो.'

राजांनी मोहिमेचा बेत जाहीर केला. साऱ्यांना ते ऐकून उत्साह चढला. राजांच्या सूचना ऐकून सारे उठणार, तोच घोड्यांच्या टापांचा आवाज आला. साऱ्यांच्या नजरा दरवाज्याकडे वळल्या. थोड्याच वेळात बाळराजे आत येताना दिसले. पाठोपाठ हवालदार, इब्राहीमखान येत होते. बाळराजे सदरेवर आले. राजांचे, जिजाबाईंचे पाय त्यांना शिवले. राजांनी विचारले,

'काय, बाळराजे! शिकार झाली?'

'हो!'

'कसली शिकार केलीत?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आबासाहेब, डांगळ मिळाला!’

‘इकडे या.’ राजे म्हणाले.

बाळराजे राजांच्या जवळ आले. राजांनी त्यांच्या उजव्या खांद्याला हात लावताच बाळराजे कळवळले. इब्राहीमखान म्हणाला,

‘हुजूर, भारी जनावर होतं, त्यामुळं बंदूक दिली.’

‘आम्ही ते ओळखलं! बार कुठं लागला?’

‘राजांनी वर्मी बार घातला. छाती धरून बसला.’ इब्राहीमखान अभिमानाने म्हणाला.

‘बाळराजे, आज खांदा चांगला चोळून घ्या. पोकळ बंदूक धरलीत, तर जास्त धक्का बसतो. रात्री आम्हांला तुमची शिकार सांगा.’ साऱ्यांवरून नजर फिरवून राजे म्हणाले, ‘बरं झालं, आज शिकार आणली, ती!’

बाळराजांना हुरूप चढला. ते म्हणाले,

‘आबासाहेब, शिवाईच्या रानात फार डुकरं उठतात, म्हणे!’

‘बाळराजांना अलीकडे शिकारीखेरीज काही सुचेनासं झालंय्, असं दिसतं... मोरोपंत, बाळराजांच्या अभ्यासाचं काय?’

‘पहाटे शास्त्र्यांच्याकडे बसतात.’

बाळराजे जिजाबाईंच्यासह वाड्यात गेले. राजे इब्राहीमखानाला म्हणाले,

‘इब्राहीम, बाळराजांना तयार करताना सावधगिरीनं राहत जा. तुझं नाव काढलं पाहिजे त्यांनी.’

‘काही शिकवावं लागत नाही, हुजूर! तलवार, भाला, बंदूक- अगदी सहज हात

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

करतात.’

राजांनी इब्राहीमला शिकारीचे बक्षीस द्यायला पंतांना आज्ञा केली आणि राजे प्रतापरावांना घेऊन आपल्या महाली गेले.

सुमुहूर्तावर राजे रांगण्याच्या बचावासाठी आपल्या फौजेनिशी गडाबाहेर पडले. आज्ञा केल्याप्रमाणे वाटेत राजांच्या फौजा मिळत होत्या.

रांगण्याला एकोजीराजे व बहिलोलखान आपला वेढा बळकट करीत होते. गडकरी रावजी पंडित सर्व सामर्थ्यानिशी गड राखण्याचा प्रयत्न करीत होता, राजांच्या मदतीची वाट पाहत होता.

उन्हाळ्याचे दिवस. दोन प्रहरी आकाश भरून आले होते. उकाडा मनस्वी वाढला होता. विजा कडाडू लागल्या. पावसाचे थेंब उतरू लागले. अखंड धारा ओतू लागल्या. त्या पावसाखाली आदिलशाही फौज भिजत होती, आश्रय शोधीत होती. सायंकाळच्या सुमारास पाऊस थांबला. पावसात विस्कळीत झालेला वेढा आजूबाजूला पाहत असतानाच मराठी सेनेची ‘हर हर महादेव’ची गर्जना सैन्याला ऐकू आली. चारी बाजूंच्या डोंगरमुलुखातून राजांचे सैन्य आदिलशाही सैन्यावर तुटून पडले. बहिलोलखान आणि एकोजीराजे आपले सैन्य गोळा करून शत्रूला तोंड देण्याचा प्रयत्न करीत होते. रात्र पडली; आणि लढाई थांबली. भीतीने व्याकूळ झालेले आदिलशाही सैन्य रात्रभर शत्रुभीतीने तिष्ठत राहिले.

दुसऱ्या दिवशी राजांचे सैन्य परत शत्रूवर तुटून पडले. राजांच्या सैन्याच्या वाढत्या धडाडीने बहिलोल आणि एकोजीराजे घाबरले. जेवढे वाचविता येईल, तेवढे सैन्य वाचवून आदिलशाही फौज मागे हटली. पदरात पराजय घेऊन आदिलशाहीचे सरदार मागे पळून गेले. राजांनी गड राखला. गडाचा बंदोबस्त वाढवून राजे राजगडाकडे माघारी वळले.

राजांच्या विजयाची वार्ता आधीच राजगडावर पोहोचली होती. सारे उत्सुकतेने राजांची वाट पाहत होते. राजे आल्याची नौबत झडली. राजे माचीवर आले. मुजरे स्वीकारीत राजे सायंकाळच्या वेळी वाड्याच्या दाराशी आले. राजांनी पायांवर पाणी घेतले. राजे दाराशी आले आणि त्यांचे लक्ष दाराशी आलेल्या पुतळाबाईंच्याकडे गेले. त्यांच्या हाती आरती होती. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘...आणि थोरल्या राणीसाहेब कुठं आहेत? एवढं यश घेऊन आम्ही घरी आलो. त्यांनाही बोलवा ना!’

सदरेवर उभ्या असलेल्या सोयराबाई पुढं आल्या. राजांच्या चेहऱ्यावरचे हसू पाहून त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. त्यांनी राजांच्या कपाळी कुंकुमतिलक लावला, मस्तकावर अक्षता टाकल्या; राजांना ओवाळले. सोयराबाईंच्या नंतर चौघींचे ओवाळणे घेऊन राजे वाड्यात प्रवेश करते झाले.

रात्री सोयराबाई राजांच्या महाली आल्या, तेव्हा राजे त्यांची वाट पाहत होते. राजे बैठकीवर बसले होते. सोयराबाईंनी विचारले,

‘झोपला नाहीत?’

‘आम्ही तुमची वाट पाहत होतो. करणार काय? मोहिमेइतकं का ते सोपं आहे?’

‘काय?’

‘मनात येईल, तेव्हा तुम्हांला महाली आणणं!’

‘चला, काहीतरीच!’ सोयराबाई लाजून म्हणाल्या, ‘ओवाळायच्या वेळीदेखीच असंच बोललात. चारचौघांत लाजल्यासारखं झालं.’

‘मग काय करणार? आम्ही घरी आलो; आणि राणीसाहेबांचा पत्ता नाही.’

‘तर तर! कुणाला तरी खरंच वाटेल! आपण विसरला असाल; पण आम्ही विसरलो नाही.’

‘काय?’

‘तह करून वाड्यात आलात. धाकट्या राणीसाहेब रिवाजाप्रमाणे ओवाळायला आल्या. सरळ आरतीचं तबक बाजूला सारून गेलात. केवढं रागावणं झालं होतं!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अपमान त्यांचा झाला असेल; राग मात्र तुम्हांला आला. आज त्याचंच समाधान वाटत आहे. पण...’

‘वाटलंच आम्हांला.’

राजे हसत उठले. सोयराबाईंच्या जवळ येत ते म्हणाले, ‘राणीसाहेब, तो दोष आमचा नव्हता; परिस्थितीचा होता. आम्हांलाही त्याची जाणीव होती. म्हणूनच आज आम्ही तुम्हांला बोलावलं.’

‘खरं?’

‘अगदी खरं! आता गेला ना राग?’

सोयराबाई मोकळेपणी हसल्या.

राजे पलंगावर बसले होते. सोयराबाई समयांच्या ज्योती शांत करीत होत्या. एकेका ज्योतीच्या विझण्याबरोबर चेहऱ्यावर पडणाऱ्या उजेडातला बदल राजे निरखीत होते.

□

८

राजे रांगण्याचा वेढा मारून राजगडावर आले. त्या पराक्रमाने राजांच्या फौजेची गमावलेली अस्मिता परत जागृत झाली. राजे नव्या उत्साहाने वावरू लागले. राज्याची सर्व अंगे सुरक्षित करून घेण्याचा त्यांनी निश्चय केला.

राजे रायगडावर जाऊन रायगडचे काम पाहून आले. राजगडावर नवीन शस्त्रे तयार होऊ लागली. फौजेत नवी भरती केली जात होती. पागेतल्या घोड्यांची संख्या वाढत होती.

बाहेरच्या पावसाची तमा न करता राजे अंतर्गत व्यवस्थेचा कारभार करीत होते. मनातल्या विचारांना आकार येत होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाऊस कमी होऊ लागला. श्रावण आला. वाड्यातली धार्मिक कार्ये पार पाडण्यासाठी वाड्यात गडबड सुरू झाली. पूजा-अभिषेक होऊ लागले. राजे हे सारे समाधानाने पाहत होते.

सायंकाळच्या वेळी राजे गडावरून फेरफटका मारून वाड्यात परत आले. सदरेवर निराजी, मोरोपंत, अनाजी हजर होते. राजे मोरोपंतांना म्हणाले,

'मोरोपंत, आता बहुतेक पाऊस संपलाच आहे. शक्य तो लौकर कोकणात फेरफटका मारून यावं, असं वाटतं.'

राजांच्या बरोबर असलेले प्रतापराव, तेलंगराव, तानाजी, सूर्याजी ह्या चौकडीने कान टवकारले. राजे सांगत होते,

'आपला कोकण अद्याप निर्धास्त झालेला नाही. पिलाजीरावांचं परवा पत्र आलं होतं. कोकणच्या देसायांचा जोवर आपण मोड करीत नाही, तोवर ते आपल्याला स्वस्थ बसू देणार नाहीत. प्रतापराव, तुमचा विचार काय?'

'कुडाळसावंताचा मोड करायला आपण जायची गरज नाही. उद्या आज्ञा झाली, तरी मी जाईन.'

'प्रतापराव, इतके उतावीळ होऊ नका. यापुढं मोहिमा हाती घेताना एकच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून परवडायचं नाही. सर्व बाजूंनी विचार करायला हवा. औरंगाबादेला औरंगजेब पुत्र मुअज्जम सुभेदार म्हणून आला आहे. मिर्झाराजे जरी परत गेले, तरी त्यांच्या जागी राजा जसवंतसिंग इतर सरदारांबरोबर दक्षिणेत आला आहे. अद्याप मोगलांशी आमचा तह पक्का झाला नाही. तो होईपर्यंत आम्ही पुढची हालचाल करू धजत नाही.'

अचानक जिजाबाई सदरेवर आल्या. राजे उठून उभे राहिले. जिजाबाई बैठकीवर बसल्या.

'माझं काही काम नव्हतं.' जिजाबाई म्हणाल्या. 'पण या मोरोपंतांना सांगायला आले होते.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी, मासाहेब?’ मोरोपंत म्हणाले.

‘अरे, ‘जी’ म्हणून कामं होतात का? राजे, तुम्ही पागा वाढवता आहात; पण जनावरांना जागा नको का? पावसाचे दिवस. पागेत गर्दी झालीय्, म्हणून सोयरा सांगत होती.’

‘राणीसाहेबांनी आज्ञा दिली, त्याप्रमाणे कामाची तरतूद केली आहे. पाऊस कमी झाला, की पागेचा पाया मारून काम सुरू होईल.’ अनाजी दत्तो म्हणाले.

राजे ऐकत होते. समाधानाने ते म्हणाले,

‘अनाजी, आता अरुंद पागा बांधू नका. ऐसपैस जागा बांधा. आम्ही उत्तरेत देखण्या पागा पाहिल्या. निराजीपंतांना आम्ही सांगितलं होतं; त्यांनी मापही घेतलं होतं. मध्ये ऐसपैस चौक धरून चारी बाजूंनी पागा ठेवा. चौकात चांगले चुनेगच्ची हौद असावेत.’

‘जी!’ अनाजी म्हणाले.

‘राजे, तुमचं भारीच कौतुक वाटतं.’ जिजाबाई म्हणाल्या, ‘आग्र्याला गेलात, ते राजकारणासाठी, की पागा पाहण्यासाठी? आग्र्याहून आल्यापासून जेव्हातेव्हा तुमचं उत्तरेतलं सुरू असतं.’

सारे हसले. राजे पण त्यात सामील झाले.

‘मासाहेब!’ राजे म्हणाले, ‘तुम्ही म्हणता, ते खरं आहे. डोळे उघडून पाहिलं, की सारं दिसतं. मिर्झाराजांनी आम्हांला खूप शिकवलं. उद्या आमची स्वप्नं साकार झाली, तर त्याचं बरंचसं श्रेय मिर्झाराजांना आहे.’

मोरोपंत मध्येच म्हणाले, ‘महाराज, क्षमा असावी.’

‘काय झालं?’ राजांनी विचारले.

‘एक वाईट बातमी आली आहे. थोड्या वेळानं सांगावी, म्हणून थांबलो होतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कसली बातमी?’

‘मिर्झाराजांच्या मृत्यूची! बऱ्हाणपूर मुक्कामी मिर्झाराजांचा अंत झाला, अशी बातमी आली आहे.’

राजे सुन्न झाले. मिर्झाराजे गेले! क्षणात साऱ्या आठवणी राजांच्या डोळ्यांसमोर तरळल्या. राजांच्या नेत्री अश्रू साकळले. मोरोपंत म्हणाले,

‘महाराज, मिर्झाराजांचा मृत्यू नैसर्गिक झाला नाही.’

‘मग?’ राजांनी चमकून विचारले.

‘मिर्झाराजे अखेरच्या दिवसांत दुःखी बनले होते. औरंगजेबाची रामसिंगावरची इतराजी आणि मुअज्जमची सुभेदारीवरील नेमणूक यांनी मिर्झाराजे खचले होते. बऱ्हाणपूरला त्यांची तबियत ढासळली होती. त्यातच औरंगजेबानं आपल्या हस्तकांकरवी मिर्झाराजांच्यावर विषप्रयोग केला, असं म्हणतात. अमावास्येच्या दिवशी मिर्झाराजांचा बऱ्हाणपूरला अंत झाला.’

राजे ऐकत होते. राजांची अवस्था बघून काय बोलावे, हे कुणाला सुचत नव्हते. जिजाबाई म्हणाल्या,

‘औरंगजेबाने फार वाईट केलं.’

राजांनी आपली अश्रुपूर्ण नजर जिजाबाईंच्यावर वळविली. भरल्या आवाजात राजे म्हणाले,

‘नाही, मासाहेब! ही औरंगजेबाची चूक नाही. त्याला दोष देऊ नका. हे जर खरं असेल, तर आलमगिरानं केलं, तेच योग्य, असं म्हणावं लागेल.’

राजांच्या बोलांनी सारे अचंबले. आपले अश्रू टिपून राजे म्हणाले,

‘आलमगीर पक्का राजकारणी; भावनेपेक्षा उद्दिष्टावर नजर ठेवणारा. त्याच्या उलट

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मिर्झाराजे. ते पडले भावनाविवश, कर्तव्यकठोर, राजनिष्ठ सेवक. यापलीकडे त्यांना दुसरा विचार नव्हता. शुजाविरुद्ध लढताना अनेक वेळा जयसिंगांनी औरंगजेबाचं रक्षण केलं. मिर्झाराजांनी दिल्लीचा बचाव केला. दाराचा मुलगा सुलेमान शिकोहला मिर्झाराजांनीच पकडलं. मिर्झाराजे नसते, तर औरंगजेब गादीवर बसलाच नसता.'

'आणि या उपकाराची फेड औरंगजेबानं अशी केली?' जिजाबाई संतापाने म्हणाल्या.

'औरंगजेब धूर्त आहे. आपल्या भावाला, बापाला मारून तो गादीवर आला, हे मिर्झाराजांनी ओळखायला हवं होतं. दक्षिणेतलं अपयश, आमची सुटका, हे पाहताच औरंगजेबाच्या मनावरचा शह सुटला. त्यानं वेळीच मिर्झाराजांचा काटा काढला.'

'कारण?' मोरोपंतांनी विचारले.

'कारण मिर्झाराजे सत्ताधीश होते, पराक्रमी होते. अभिमानी होते, भावनाविवश होते. त्यांच्या राजनिष्ठेला तडा जायला फारसा वेळ लागला नसता. मिर्झाराजांचं शत्रुत्व औरंगजेबाला सोसवणारं नव्हतं. योग्य वेळी त्यानं आपला मार्ग मोकळा करून घेतला. राजकारणाच्या पटावरील हा सरळमार्गी हत्ती उंटाच्या तिरक्या चालीत सापडला. बिचारे मिर्झाराजे राजनिष्ठेपायी त्या राजकारणाचे बळी ठरले. असा पुरुष आम्ही पाहिला नाही; परत दिसेल, असंही वाटत नाही.'

राजांनी दीर्घ नि:श्वास सोडला; आणि कुणाचाही निरोप न घेता ते सरळ आपल्या महाली गेले.

□

९

मिर्झाराजांच्या मृत्यूची बातमी समजताच औरंगजेबाने समाधान व्यक्त केले; पण दक्षिणेची सुभेदारी दिलेले मुअज्जम आणि त्याचा सेनापती जसवंतसिंग मात्र अस्वस्थ झाले. दक्षिणेत परत शिवाजीने उचल खाल्ली, तर त्याचा पराभव करण्याचे सामर्थ्य त्या दोघांतही नव्हते. सुभेदार मुअज्जमने औरंगजेबाकडे तातडीने शिवाजीची शिफारस केली. औरंगजेबाने सारा विचार करून ते मान्य केले. त्याने आपले फर्मान तातडीने औरंगाबादेला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाठविले. शहाजादा मुअज्जमने ती आनंदाची बातमी कळविण्यासाठी टाकोटाक आपला खलिता राजगडी रवाना केला.

राजांनी खलित्याचे स्वागत केले. संभाजीराजांना आलेली मनसब स्वीकारण्यासाठी पाठविण्याचे निश्चित केले. संभाजीराजांच्या जाण्याची सर्व तयारी गडावर सुरू झाली. राजांच्या बरोबर जाणाऱ्या सरदारांची निवड सुरू झाली.

रात्री राजे जिजाबाईंच्या महाली बसले होते. जिजाबाईंच्या जवळ बाळराजे होते. पुतळाबाई, सोयराबाई, काशीबाई उभ्या होत्या. राजे म्हणाले,

'मासाहेब, आता बाळराजे खरेखुरे मनसबदार बनणार!'

'आबासाहेब, तुम्ही आमच्या बरोबर येणार नाही?' बाळराजांनी विचारले.

'मनसब तुम्हांला आली. आमचं काय काम?'

बाळराजे विचारात पडले. जिजाबाईंच्याकडे सरकत त्यांनी विचारले,

'आणि आम्हांला एकटंच ठेवून घेतलं, तर?'

राजांच्या हसण्याने सारा महाल भरून गेला. जिजाबाईंच्या डोळ्यांत पाणी आले. त्या म्हणाल्या,

'राजे! हसता; पण पोर एकटं मथुरेत राहिलं, त्याची भीती घेतलीय् त्यानं.'

राजे म्हणाले, 'मासाहेब, तोही अनुभव नाही काही वाईट नाही- पण, बाळराजे, आता काळजी करू नका. तुम्ही एकटे नाही. तुमच्या बरोबर खुद्द आमचे सेनापती प्रतापराव गुजर येतात. त्याखेरीज फौजही आहे. तसा प्रसंग आलाच, तर औरंगाबाद फस्त करून या.'

बाळराजे हसले. राजांच्या शब्दांनी त्यांना धीर आला. जिजाबाईंनी विचारले,

'खरंच प्रतापराव जाणार?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'मासाहेब, आमचे युवराज जात आहेत. ते सडे कसे जातील? शहाजादा मुअज्जम आमच्या मैत्रीची अपेक्षा करतो, असं त्याच्या पत्रावरून वाटतं. त्याचाही अंदाज लागेल. औरंगाबादेची वार्ता घेण्यासाठी बाळराजांच्या बरोबर प्रतापराव सरनौबत आपल्या पाच हजार फौजेनिशी जातील. निराजीपंत कारकून, मोरोपंत पेशवे, मुजुमदार, सुरनीस हे सारे आहेत. आमचं वैभव बादशहांच्या पंचहजारीत सामावलेलं नाही, हेही शहाजाद्यांच्या लक्षात येईल.'

राजांच्या बोलांनी जिजाबाईंची शंका दूर झाली.

नवरात्राचा जागर मोठ्या धामधुमीत पार पडला. राजांनी बाळराजांच्यासह सोने लुटले. दिवस उलटत होते. दिवाळीच्या भाऊबीजेचा दिवस प्रस्थानासाठी निवडला. भाऊबीजेच्या दिवशी जिजाबाईंचे आणि राजांचे आशीर्वाद घेऊन बाळराजे मनसब स्वीकारण्याकरिता औरंगाबादेला रवाना झाले.

संभाजीराजे रवाना होताच राजांनी आपले जासूद कोकणात व गोव्यात रवाना केले. येणारी वार्ता राजे ऐकत होते. रांगण्याच्या पराभवाने धास्ती खाल्लेल्या आदिलशाहीने राजांशी मित्रत्वाच्या तहाची बोलणी सुरू केली. राजांनी आदिलशाहीशी अंत:स्थ तह करून टाकला. आदिलशाहीने अनेक अटींबरोबर तीन लक्ष रुपयांची वार्षिक खंडणीही मान्य केली.

मनसब स्वीकारायला गेलेले संभाजीराजे मनसब स्वीकारून मोठ्या मानाने राजगडावर परत आले. संभाजीराजे आता मोगली दरबारचे पंचहजारी मनसबदार झाले होते. शहाजादा मुअज्जमने संभाजीराजांचे चांगले स्वागत केले होते. प्रतापराव सांगत होते,

'शहाजाद्यांनी बहुत सन्मानाने राजांची भेट घेतली. संचतर जागा दाखवून पुरा वसविला. हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रे सर्वांस दिली.'

'अस्सं!' राजांनी समाधान व्यक्त केले.

निराजीपंत म्हणाले, 'बाळराजांच्या जहागिरीचा सर्व तपशील सविस्तर घेऊन आम्ही आलो. वऱ्हाड देशाचा पंधरा लक्ष होनांचा मुलूख जहागीर म्हणून दिला आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे सारे ऐकत होते. सारे तपशील ऐकून झाल्यावर राजांनी मत व्यक्त केले.

‘निराजीपंत, फार मोठी कामगिरी पार पाडलीत. आम्ही आता निर्धास्त झालो. मोगलाई आणि आदिलशाही दोन्हींशी तह झाल्यामुळं आता उसंत मिळेल. फौजेचा खर्च भागेल. आम्हांला आमचे मनसुबे पार पाडता येतील.’

राजांनी त्यानंतर थोड्याच दिवसांत आपले मनसुबे सांगितले. कोकणचे देसाई राजांना सदैव उपद्रव करीत. त्यांच्या लखम सावंत, केशव नाईक, केशव प्रभू यांसारखे प्रमुख असत. राजांची पाठ फिरताच राजांच्या मुलुखात ते दांडगाई करीत. राजांचे सैन्य येते, असे दिसताच आपला मुलूख सोडून गोव्याच्या आश्रयाला जायचे, हा त्यांचा रिवाजच होता. मोगलाई आणि आदिलशही यांच्याशी तह झाल्याने राजांनी हा देसायांचा प्रश्न कायमचा निकालात काढण्याचे ठरविले. प्रतापरावांनी विचारले,

‘आणि सावंत गोव्यात आश्रयाला गेले, तर...?’

राजे हसले. ‘गोव्यात गेले, तर? तीच तर आमची इच्छा आहे. फिरंगी मस्तवाल झालेत. आमच्या मुलुखात येऊन आमच्या लोकांवर जुलूम करतात. नुकताच फिरंगी विजरईनं ‘हिंदूंनी बारदेशातून दोन महिन्यांत निघून जावे,’ असा हुकूम काढला आहे. सात हजार हिंदूंना जुलुमानं बाटविण्यात आलं. ह्या फिरंग्यांचे असेच लाड चालू ठेवले, तर उद्या हिंदुधर्म उरायचा नाही. सुदैवानं आम्हांला भिऊन देसाई बारदेशात घुसले, तर तीच संधी घेऊन बारदेश बेचिराख करू.’

कोकणच्या स्वारीवर राजे फौजेसह बाहेर पडले. राजांच्या अपेक्षेप्रमाणे, राजे येताहेत, हे पाहताच कोकणच्या देसायांनी बारदेशात आश्रय घेतला. राजांना हेच हवे होते. राजे त्वेषाने बारदेशात घुसले. आडव्या आलेल्या धर्मोपदेशकांचीही राजांनी गय केली नाही. चार पाद्र्यांना कंठस्नान घालून, फौज जाळपोळ करीत पुढे सरकत होती. राजांनी तीन दिवसांत अनेक खेडी बेचिराख केली; आणि पोर्तुगीज सैन्य व त्यांचे आरमार यांची क्षिती न बाळगता सुमारे तेराशे लोकांना कैद केले. तेव्हा कुठे बारदेशकरांचे डोळे उघडले.

राजे डिचोलीला थांबले होते. तेथे पाद्री गोंसालू व रामोजी कोठारी शेणवी तहाची बोलणी करावयास आले. राजांना जास्त काळ बारदेशात गुंतून राहणे शक्य नव्हते. त्यांनी तहाला मान्यता दिली. तह पक्का करण्यास राजगडला येण्यास सांगून राजे आपल्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सैन्यासह माघारी आले. त्या तहामुळे कोकणदेसायांचा आश्रय तुटला. राजांचा हेतू सफल झाला. राजांनी पकडलेले कैदी बाइज्जत मुक्त केले. बारदेशकरांच्या वाढत्या धर्मांतराला पायबंद बसला.

राजे राजगडावर आले. बारदेशस्वारीने पोर्तुगीजांबरोबरच इंग्रजही घाबरले. आदिलशाही आणि मोगलाई यांच्याशी सख्य करून बसलेल्या शिवाजीची इतराजी होईल, असे त्यांना वाटू लागले. इंग्रजांचे आणि पोर्तुगीजांचे वकील राजांच्या स्नेहासाठी गडावर वारंवार येऊ लागले. दोघांनाही न दुखविता राजे आपला वचक कायम ठेवून बोलणी करीत होते.

राजे दोन प्रहरी विश्रांती घेत होते. त्यांचा नुकताच डोळा लागला होता. त्यांच्या कानांवर हाक आली,

'महाराज!'

राजांनी डोळे उघडले. मनोहारी राजांच्याकडे पाहत होती. राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. त्यांनी विचारले,

'काय, मनू?'

'पंतांनी...'

'जागं करायला सांगितलं, असंच ना?' राजे म्हणाले, 'तू जा. आम्ही सदरेत येत आहोत.'

मनोहारी गेली. थोड्याच वेळात राजे सदरेत आले. बाहेरच्या सदरेवर मोगली सैनिक दिसत होते. त्यांनी राजांना मुजरे केले. मोरोपंत म्हणाले,

'महाराज, शाही फर्मान दोन दिवसांत गडावर येत असल्याची वर्दी घेऊन हे औरंगाबादेहून आले आहेत.'

'बाळराजांच्यासाठी आणखी फर्मान आले?' राजांनी विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘फर्मान आपल्या नावे आहे.’ मोरोपंतांनी सांगितले.

राजे क्षणभर विचारात पडले. ‘ठीक आहे. वर्दी घेऊन आलेल्यांना चांगला सत्कार करून पाठवा. शहाजादे मुअज्जम यांना आम्ही पत्र देणार आहो.’

राजांचे पत्र घेऊन वर्दीस्वार परत औरंगाबादेला गेले.

फर्मानाच्या स्वागतासाठी तयारी करण्याचे हुकूम राजांनी दिले. गडाखाली थोड्या अंतरावर फर्मानबाडी उभारण्यात आली. राजे बाळराजांना म्हणाले,

‘बाळराजे, आमच्या फर्मानाचं स्वागत तुम्ही करा.’

‘हो!’ बाळराजे म्हणाले.

राजे आपले हसू लपवीत म्हणाले,

‘तुम्ही मोगली मनसबदार! तुम्हांला ते करताही येईल. पण, बाळराजे, पाहा हं! शाही रिवाजात कसूर होता उपयोगी नाही.’

‘आम्ही कसूर करणार नाही.’ अजाणतेपणाने बाळराजे बोलून गेले.

‘तेच म्हणतो आम्ही! फर्मानाचा उंट दिसू लागला, की अनवाणी पुढं जाऊन, गुडघे टेकून जमिनीवर बसायचं. उंट आला, की खालच्या मानेनं फर्मानाचा स्वीकार करायचा. फर्मान मस्तकी लावायचं. मग ते मस्तकावर धरून वाजत-गाजत गडावर आणायचं.’

बाळराजांचा चेहरा गोरामोरा झाला. ते म्हणाले,

‘आम्हांला नाही जमायचं.’

सारे हसले. पण राजे गंभीर होते. बाळराजांना जवळ घेऊन ते म्हणाले,

‘बाळराजे, तुम्ही आमचे ना!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो!’

‘आम्ही एकदा हे सारं केलं आहे. राजकारणात सारं करावं लागतं. मानापमान गुंडाळून ठेवावा लागतो. तुम्ही आमच्यासाठी हे करायला हवं. नाही तर हे आम्हांला करावं लागेल.’

बाळराजांनी राजांच्या व्यथित चेहऱ्याकडे पाहिले आणि ते राजांच्या पायांना बिलगत म्हणाले,

‘आम्ही करू. आबासाहेब! तुमच्यासाठी हवं ते करू.’

राजांनी बाळराजांना उचलले, आणि एकदम उराशी कवटाळले.

फर्मान यायच्या दिवशी गडावर एकच धामधूम उडाली होती. वाड्याच्या दारात गुढ्या-तोरणे उभारली होती. वाड्याच्या दाराला आंबवती लटकावल्या होत्या. सुरेख रांगोळ्यांनी चौक सजविले होते. राजसदर तर ऐश्वर्याने झगमगत होती. बारीकसारीक गोष्टींकडे राजे लक्ष देत होते. जिजाबाईंना ते असह्य झाले. त्या राजांना म्हणाल्या,

‘राजे, फर्मानाचं एवढं कौतुक?’

राजांनी निःश्वास सोडला. ते म्हणाले,

‘मासाहेब, हा थाट फर्मानाच्या कौतुकाचा नाही. हा राजकारणाचा डाव आहे. आम्ही केलेलं हे फर्मानाचं स्वागत बादशहाच्या कानांवर जाईल. त्यानं तो संतुष्ट होईल. आमच्या मनात काही नाही, याचा विश्वास त्याला पटेल. आम्हांला खूप गोष्टी करावयाच्या आहेत. त्यासाठी उसंत हवी आम्हांला.’

फर्मानस्वागतासाठी संभाजीराजांची रवानगी झाली. संभाजीराजांच्या बरोबर खासे सरदार, सेनापती सर्व इतमामाने पाठविले होते. राजे गडावर फर्मानाची वाट पाहत होते.

फर्मान गडाच्या पायथ्याशी आल्याची वर्दी आली. राजे कपडे करून तयार होते. निराजीपंत, मोरोपंत, अनाजी, तानाजी, येसाजी यांसह राजे अनवाणी पायांनी फर्मानाला सामोरे गेले. गडाच्या दरवाज्याशी राजे फर्मानाची वाट पाहत होते. वाद्यांचा आवाज

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कानांवर येत होता. शिंगाचा नाद गडाच्या वातावरणात घुमत होता. फर्मान येताना दिसू लागले. सोन्याचांदीच्या दागिन्यांनी सजविलेले घोडे अग्रभागी चालत होते. मागे वाद्ये वाजत होती. बाळराजे फर्मान घेऊन येत होते. राजांनी नत मस्तकाने फर्मानाचे स्वागत केले. नगारे झडले. तोफांच्या आवाजांत गड धुंदावून गेला.

राजसदरेवर जरी वस्त्राने आच्छादित अशा चौरंगावर फर्मान ठेवले गेले. राजांनी मोरोपंतांना फर्मान वाचण्याची आज्ञा केली. मोरोपंत फर्मान वाचू लागले. शाही दरबाराच्या सर्वोच्च मानांची पखरण त्यात केली होती. फारसी फर्मानाचा अर्थ राजांना कळत होता...

> 'आज तुम्हांवर बहुत लोभ आहे. याजकरता तुम्हांस 'राजा' हा किताब बहाल केला आहे. पेशजीपेक्षा अधिक काम करून दाखवावे. म्हणजे तुमचे सर्व मनोरथ आम्ही पूर्ण करू... खातरजमा ठेवावी. जुलूस ११ शव्वाल ५ हिजरी १०७८.'

फर्मानाबरोबर आलेल्या मोगल सरदारांनी राजांना मिठी मारून बधाई दिली. राजांनी शहाजादा मुअज्जमचे पत्र वाचण्याची आज्ञा केली. मुअज्जमने लिहिले होते...

'...शिवाजीराजे! तुमच्याबद्दल आमच्या मनात सहानुभूती आहे. त्याप्रमाणे आम्ही बादशहांना तुमच्या निष्ठेची खात्री दिली. बादशहांनी कृपाळू होऊन तुम्हांस 'राजा' ही खिताब बहाल केली. तुमचे मस्तक उंचावले, यात आम्हांला आनंद आहे...'

राजांनी दोन्ही पत्रांबद्दल आनंद व्यक्त केला. मुअज्जमला तसेच मानाचे पत्र लिहिले. मोगल सरदारांचा अनेक नजराणे देऊन सत्कार केला.

रात्री जिजाबाईंच्या महाली राजे गेले. प्रतापराव, निराजीपंत, तानाजी ही सारी खास माणसे तेथे होती. जिजाबाईंच्या समोर औरंगजेबाकडून आलेले शाही फर्मान, रत्नजडित मुठीची तलवार, पोशाख ठेविला होता. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर मिस्किल हास्य होते. राजे महाली येताच सारे बाजूला झाले.

'मासाहेब, आज बादशहांनी आम्हांला 'राजे' केलं.'

निराजीपंत हसले. म्हणाले,

'महाराज, बोलतो, क्षमा करा. ज्यानं आपल्याला मारण्याचा कट घातला, त्याच्याकडून

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आलेल्या या फर्मानाला आणि पोशाखाला कसली किंमत?'

'निराजीपंत, तुमच्यासारख्या जबाबदार माणसानं तरी असं बोलू नये. उलट, गेले दोन दिवस आम्ही औरंगजेबाच्या बुद्धिमत्तेचं कौतुकच करीत आहो. आम्ही त्याच्या हातून सुटलो, हे पाहताच त्यानं आपला मोहरा बदलला. एवढा सम्राट असूनही स्वत:चा मान विसरून, आमची मर्जी राखण्याची संधी त्यानं डावलली नाही. औरंगजेबाच्या बुद्धिमत्तेचं कौतुक करावं, तेवढं थोडं आहे. यात आपल्याला खूप शिकण्यासारखं आहे.'

'ते खरं; पण आपण सुटलात, म्हणून हे घडतं. नाही तर...' मोरोपंत म्हणाले.

राजे खिन्नपणे हसले.

'मोरोपंत, राजकारणात 'जर तर' याला फारसा अर्थ नसतो. प्रत्येक घडीचा निर्णय त्या क्षणाच्या परिस्थितीवर अवलंबून असतो. हे जे ओळखतात, तेच राजकारणात यशस्वी होतात. आम्ही सुखरूपपणे आमच्या गोटात परत आल्यानंतर सलोखा साधण्याखेरीज औरंगजेबाच्या हाती दुसरं काय आहे? मोरोपंत, राजकारणात विचाराला वेळ नसतो. कैक वेळी गमावलेल्या क्षणासाठी आयुष्याचा पश्चात्ताप सहन करीत राहावं लागतं. आम्ही जेव्हा औरंगजेबाच्या हाती सापडलो होतो, तेव्हाच त्यानं आमची कत्तल केली असती, तर आजच्या अपमानाचा प्रसंग त्याच्यावर आला नसता. ही चूक औरंगजेबाला फार महागात पडणार आहे. त्यासाठी आयुष्यभर पश्चात्ताप करावा लागणार आहे.'

राजांच्या बोलांनी आलेल्या फर्मानाला वेगळाच अर्थ प्राप्त झाला होता. सारे कौतुकाने त्या नजराण्याकडे पाहत होते.

□

१०

संभाजीराजांना मिळालेल्या मनसबीच्या व्यवस्थेसाठी राजांनी प्रतापराव आणि निराजीपंत यांची मुतालिक म्हणून नेमणूक केली. प्रतापराव आपल्या पाच हजार फौजेनिशी निराजीपंतांसह औरंगाबादेला रवाना झाले. थोड्याच दिवसांत राजांना औरंगाबादेच्या बातम्या आल्या. मुअज्जमने राजांच्या मागण्या मान्य केल्या. राजांकडून औरंगजेबाकडे जावयाच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खंडणीच्या सहामाही हप्त्यातून चौथाई म्हणजे प्रतिवर्षी सुमारे पाच हजार फौजेचा खर्च निघाला होता. मनसबीचा वसूल येणार होता. या तहामुळे राजांना थोडे आर्थिक साहाय्य लाभले.

राजांनी फौजेची व्यवस्था, नियम घालून दिले होते. राजांचे लक्ष आता प्रजेकडे वळले. राजांनी आपला बेत फडामध्ये व्यक्त केला. तो ऐकून सारे स्तिमित झाले. अनाजी म्हणाले,

'राजे, पिढ्यान् पिढ्यांची चालत आलेली वतनदारी कमी केली, तर लोक नाराज होतील.'

'लोक नव्हे, वतनदार!' राजांनी दुरुस्ती केली.

'पण त्यामुळं दप्तरावर मोठा ताण पडेल.'

'तेही आम्ही जाणतो!' राजे प्रत्येक वाक्य निश्चयाने बोलत होते. 'आळशी राज्यकर्ते प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करून वतनदारीचा स्वीकार करतात. रोख वसुलीवर ते तृप्त होतात. पण त्यासाठी वतनदारांकडून कुलरयत छळली जाते, हे त्यांच्या ध्यानी येत नाही. राज्याला कीड बनून राहिलेली ही वतनदारी नष्ट झालीच पाहिजे.'

'राजे, हळू-हळू हे सर्व करता येतील. पण सध्याच्या...'

'अनाजी, 'हळू-हळू' ह्या शब्दाला काही अर्थ? तशी कधीच सुधारणा होत नसते. हे पाटील, खोत, कुलकर्णी, देसाई, देशमुख, देशपांडे, मिरासदार, जहागिरदार हे वतनाचे धनी. त्यांच्या तावडीत गरीब रयत. तिला मात्र कुणीच वाली नाही. आम्ही राजे कुणाचे? वतनदारांचे, की रयतेचे? नाही, अनाजी. आमचं राज्य श्रींचं राज्य आहे. त्या राज्यात हे चालायचं नाही!'

'पण वतनदारांचा असा कोणता गुन्हा घडला?...' अनाजी समर्थन करीत होते. पण राजांनी मध्येच त्यांना थांबविले.

'कोणता अन्याय केला नाही, ते विचारा. लहानपणापासून आम्ही हे पाहत आलो. रांझ्याच्या पाटलांनी केलेला अन्याय अजूनही आमच्या स्मरणात आहे. त्याचं शल्य

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आजवर तसंच आमच्या मनात आहे. यापुढं कुलरयत वतनदारांच्या ताब्यात नाही; वतनदारांनी साहेबी रयतेला नागवीन म्हटलियाने जमणार नाही. जुलूम करीत वतनदार माजले. वाडे, हुडे, कोट बांधून, प्यादी-बंदुकी बाळगून राहू लागले. सांगावयास गेले, तर भांडावयास उभे राहतात; प्रसंगी शत्रूला मिळतात. हे सारं बंद व्हायला हवं. अनाजी, आजवर जे मिरासदार इनाम घेत होते, ते सर्व अमानत करून जमिनदारांना, पाटील, कुलकर्णी यांना नक्त हक्क बांधून द्या. या वतनदारांचे वाडेहुडे पाडून टाका; आणि यापुढं जमिनदारांनी बुरुजांचा वाडा बांधू नये, घर बांधून राहावे, असा हुकूम जारी करा.'

'पण देवस्थानवतनं असतील, ती?'

'कायदा सर्वांना सारखाच! त्याला देवस्थानही अपवाद नाही. देवस्थानचा दिवा-बत्ती, नैवेद्य, अभिषेक यांचा खर्च सरकारातून दिला जावा. मुसलमानांचे पीर, मशिदी यांचेही खर्च सरकारातून व्हावेत. ब्राह्मण, विद्यावंत, वेदशास्त्रसंपन्न, ज्योतिषी, अनुष्ठानी, तपस्वी, गावोगावचे सत्पुरुष हे पाहून, त्यांचे कुटुंब पाहून, अन्न-वस्त्र ज्याला लागेल, त्याप्रमाणे, धान्य, द्रव्य गावचे गावी महाली नेमून देऊन, साल-दरसाल त्यांना कारकुनांनी पोहोचवावं. ब्राह्मणांनी ते अन्न भक्षून स्नानसंध्या करून राजियासी कल्याण चिंतून सुखरूप असावे.'

अनाजी राजांच्याकडे आश्चर्याने पाहत होते. राजांनी एवढा विचार केला असेल, यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. केवळ जिज्ञासेने त्यांनी राजांना विचारले,

'आणि रयत?'

'आमची परीक्षा पाहता?' राजांनी विचारले.

अनाजी घाबरे झाले. राजे हसून म्हणाले,

'अनाजी, आम्ही दादोजींच्या हातांखाली तयार झालो. त्यांनी ही दृष्टी आम्हांला दिली. त्यासाठी सारा मुलूख फिरवला. ज्यानं रयतेचं दु:ख उघड्या डोळ्यांनी पाहिलं आहे, त्याला रयतेचे नियम घालून देणं कठीण नाही. अनाजी, रयतेला प्रथम काय हवं? पोटभर अन्न, निवाऱ्याची जागा, शेतीसाठी लागणारी अवजारं, जनावरं आणि लज्जानिवारणार्थ अंगभर कपडा. एवढं दिलं, की ती तृप्त आहे; पण आपण त्यापेक्षा जास्त विचार करायला हवा. पिकवतात ते; पण अन्नाला तेच महाग. निवाऱ्यासाठी, प्रपंचासाठी, कष्टाला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लागणाऱ्या जनावरांसाठी बिचारे कर्जबाजारी होतात आणि आयुष्यातून उठतात. राजसदरेवर आलेले कज्जे जे बालपणापासून ऐकले, ते सारे मनात राहिले आहेत. रयतेला विश्वास द्या. ते पिकवतील, त्याचे पाच हिस्से करा. दोन हिस्से सरकारी, तीन त्यांचे. जमिनीचं मोजमाप करा. जमीन मोजून, आकारून गावची गावास द्या. नवीन रयत आली, तर यांना लागणारी अवजारं, गुरं-ढोरं सरकारातून द्या. बियांसाठी चांगलं धान्य द्या. रयतेला धान्य कमी पडलं, तर ते द्या. हवं तर त्यांच्या कुवतीप्रमाणे दोन-चार वर्षांत तो ऐवज उगवून घ्या. रयत आहे, म्हणून आम्ही राजे. तेच उठले, तर आम्ही कुठले? वर्षाच्या वर्षाला पीक पाहून वसूल करा. एवढं केलंत, तर बिचारे तुम्हांला दुवा देतील, सुखी होतील.'

त्यानंतर राजांना उसंत राहिली नाही. फडामध्ये राजे सारखे दिसू लागले. जमीनमहसुलांचे बारीकसारीक कायदे राजे नजरेखालून घालीत होते. ते काम पूर्ण होताच त्याची अंमलबजावणी सुरू झाली. साऱ्या मुलुखात वावटळ पसरली. कोणत्याही शाहीत आजवर जे घडले नव्हते, ते शिवशाहीत घडत होते. सारे वतनदार संतप्त झाले; पण प्रजा मात्र तृप्त झाली. तृप्त प्रजेचे रूप पाहून संतप्त वतनदारांचे राजांना काही वाटले नाही. राजे स्वत: गावोगाव फिरत होते, हुकुमाची अंमलबजावणी पाहत होते. राजांचे एक स्वप्न आकार घेत होते.

चिंचवड-देवस्थान हे मोठे देवस्थान. ते वतनही मोठे. राजांच्या हुकुमाने चिंचवडचे देव संतापले. त्यांनी राजांना पत्र पाठविले; वतन काढून घेणे हे देवस्थानावर अतिक्रमण असल्याचे सांगितले. राजांनी देवांना देवस्थान-खर्चासाठी लागेल तेवढी रक्कम दरसाल देण्याचे अभिवचन दिले; पण देवांना ते मान्य झाले नाही. त्यांना वतनच हवे होते. वतनावरील आपला हक्क गमावू देण्यास ते राजी होईनात. राजांनी त्यांना सरळ सांगितले,

'आपण गोसावी. गोसाव्याला वतनाचा लोभ हवा कशाला? तुम्हांला तुमची बिरुदे चालविता येत नसतील, तर ती आम्हांला द्या. आमची बिरुदे तुम्ही घ्या. तुमची आम्ही चालवू.'

त्या उत्तराने गोसावी निरुत्तर झाले. राजांनी आव्हानच दिले होते. चिंचवडचे देवस्थानवतन स्वराज्यात बिनबोभाट सामील झाले.

एके दिवशी राजांचा आनंद दुणावला. राजांना पिलाजीराव शिर्के आल्याची वर्दी आली. राजे पिलाजीरावांना भेटण्यासाठी जिजाबाईंच्या महाली गेले. पिलाजीराव एकटेच

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नव्हते. जिजाबाईंच्या शेजारी तरतरीत चेहऱ्याची, कपाळी कुंकवाची चंद्रकोर रेखलेली आठ-नऊ वर्षांची एक मुलगी बसली होती. तिचे विशाल डोळे राजांच्यावर खिळले होते. राजे आत जाताच पिलाजीरावांनी मुजरा केला. ती मुलगी पुढे झाली. तिने राजांना त्रिवार नमस्कार केला. राजांनी तिला जवळ घेतले.

'सूनबाई, तुझ्या येण्याचीच आम्ही वाट बघत होतो. तुझ्या पायांनी आज आमचं घर भरलं; पण आमचे बाळराजे कुठं आहेत?'

जिजाबाई हसल्या. म्हणाल्या,

'बाळराजांची सारी धिटाई सदरेबाहेरच! बायकोला पाहताच पळून गेले.'

राजे हसले. म्हणाले, 'पण, मासाहेब, पिलाजीराव आपणहून येसूबाईला घेऊन आले नाहीत. आम्ही बारदेशच्या स्वारीवर गेलो होतो, तेव्हा आडवी वाट करून घरी गेलो, आर्जवं केली, तेव्हा कुठं येसूला घेऊन आले.'

'होय, पिलाजीराव?' जिजाबाईंनी विचारले.

'मासाहेब, ही राजांची थट्टा आहे. लग्न झालेली पोर बापाघरी ठेवून घेणं फार मोठी जोखीम. थोरामोठ्यांच्या घरी न बोलावता पाठवायची कशी, याची चिंता.'

'पिलाजीराव, हे घर का परकं?'

'देवघरात जावं लागलं, तर हातपाय धुऊन जावं लागतं, मासाहेब! राजे आमचे मालक. आम्ही त्यांचे चाकर. एक वेळ चाकरीत कुचराई होऊ; पण पायरी सोडून वागृ कसे?'

'पिलाजीराव! या बोलण्यानं मात्र तुम्ही शोभलात!'

दोन दिवसांत येसूबाई घरात रुळलेली पाहून पिलाजीराव परत जायला निघाले. राजांनी सांगितले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पिलाजीराव, आम्ही थोड्याच दिवसांत परत कोकणात उतरू. तिथल्या देसायांच्या, फिरंग्यांच्या, इंग्रजांच्या हालचाली आम्हांस समजणं आवश्यक आहे. तुम्ही सर्वत्र नजर ठेवा. काही विशेष हालचाल दिसली, तर आम्हांस टाकोटाक कळवा.’

पिलाजीराव मुजरा करून जायला निघाले. राजे गडाच्या दरवाज्यापर्यंत पिलाजीरावांना पोहोचवायला निघाले. दरवाज्याशी पिलाजीरावांच्या खांद्यावर राजांनी हात ठेविला. ते म्हणाले,

‘पिलाजी, येसूची काळजी करू नका. माझी सून नव्हे, मुलगी समजेन मी.’

पिलाजीराव भारावले. ते म्हणाले,

‘राजे, त्याची मला चिंता नाही; पण पोर लाडांत वाढली. अजून पोच कमी. तेव्हा...’

‘सांगू नका. येसू आता तुमची नाही, आमची आहे.’

पिलाजीराव समाधानाने गडाबाहेर पडले.

□

११

येसूबाई वाड्यात येऊन महिना झाला नाही, तोच त्या सर्वांच्या लाडक्या सूनबाई बनल्या. जिजाबाईंना तर नातसुनेचे भारी कौतुक. त्यांनी येसूबाईंना नवीन दागिने घडविले होते. संभाजीराजांच्या बरोबर येसूबाईही शास्त्र्यांच्याकडे शिकत होत्या. राजे सायंकाळी फिरायला निघाले, तर येसूबाईंनाही बरोबर नेत. सर्व राण्यांच्या मायेखाली येसू घरची बनली होती.

सकाळच्या वेळी संभाजीराजे जिजाबाईंच्या दर्शनाला आले. शेजारी येसूबाई उभ्या होत्या. जिजाबाईंच्या पाया पडून संभाजीराजे म्हणाले,

‘मासाहेब, आम्ही येतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कुठं जाणार?’ येसूबाईंनी विचारले.

‘विचारलं, कुठं जाणार?’

जिजाबाई हसल्या आणि त्या हसण्याने येसूबाई शरमिंद्या झाल्या. जिजाबाई म्हणाल्या,

‘येसू, बाहेर जाताना ‘कुठं’ म्हणून विचारू नये. अग, बाळराजे रपेटीला निघालेत!’

‘मी येऊ?’ येसूबाईंनी एकदम विचारले.

संभाजीराजे गोंधळले. ते म्हणाले,

‘आबासाहेब रागावतील.’

‘काही रागावणार नाहीत.’ येसूबाई म्हणाल्या.

‘तुला घोड्यावर बसता येतं?’ जिजाबाईंनी विचारले.

‘हो! माझी चार घोडी आहेत.’

‘गाढवं असतील.’ संभाजीराजे म्हणाले.

‘तर तर! तुमचीच असतील, बघा!’ येसूबाई बोलून गेल्या.

‘हां, येसू! नवऱ्याला असं उत्तर देतात का? क्षमा माग.’ जिजाबाईंनी दटावले.

येसूबाई पटकन हसल्या. त्या म्हणाल्या,

‘चुकलं आमचं! परत नाही म्हणणार!’ आणि जिजाबाईंना बिलगत त्यांनी विचारले, ‘मग जाऊ?’

जिजाबाईंनी येसूबाईंना जवळ घेतले. त्या स्वत:शीच म्हणाल्या, ‘काही कळत नाही पोरीला. असंच राहा!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जाऊ का?’

‘मी कोण सांगणार? तुझ्या सासऱ्यांनी परवानगी दिली, तर जा बापडी!’

‘गेलात, की रागावतीलच आबासाहेब!’ संभाजीराजे म्हणाले.

येसूबाईंनी क्षणभर विचार केला आणि त्या म्हणाल्या,

‘एवढ्यात येते विचारून!’

समजायच्या आत येसूबाई महालाबाहेर गेल्या. जिजाबाईंनी मारलेली हाकदेखील त्यांना ऐकू आली नाही. ‘काय करावं पोरीला?...’ म्हणत जिजाबाई उठल्या. संभाजीराजे बोलले,

‘मासाहेब, आम्ही येतो.’

‘थांब, थांब! ही तुझ्या बायकोची घाई निस्तरते. मग जा.’

येसूबाई राजांच्या महाली गेल्या, तेव्हा राजे सोयराबाईंच्या बरोबर बोलत होते. येसूबाई दाराशीच थबकल्या. राजांनी विचारले,

‘कोण? सूनबाई? या, आत या.’

येसूबाईंनी पदर घेतला. त्या आत आल्या. राजे नवलाईने येसूबाईंकडे पाहत होते. राजांनी गंभीरपणे विचारले,

‘का आला होता?’

‘आम्ही रपेटीला जाऊ?’

राजांना हसू आवरणे कठीण जात होते. हसू दाबून त्यांनी विचारले,

‘कोण जातंय्?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘स्वारी!’ येसूबाई बोलून गेल्या.

राजांचे हसू एकदम फुटले. सोयराबाई पण हसत होत्या. त्या हसण्याने येसूबाई आणखीन लाजल्या. राजे म्हणाले,

‘जरूर जा! पण एका अटीवर...’

येसूबाईंनी आपली नजर उंचावली. राजे दोन्ही हात पुढे करून म्हणाले,

‘एकदा आमच्या जवळ या.’

येसूबाई एकदम धावल्या. राजांनी त्यांना जवळ घेतले. त्याच वेळी जिजाबाई आत आल्या. राजे उठण्याचा प्रयत्न करीत असता जिजाबाईंचे शब्द कानांवर आले,

‘बोलण्याचा अवकाश; उठलीच! भीड म्हणून नाही. तुमच्या असल्या वागण्यानं शेफारून गेली, तर नवल काय? तुमची काही भीती राहिली नाही पोरीला.’

‘परमेश्वरानं ऐकलं!’ राजे म्हणाले.

‘काय?’ जिजाबाई उद्गारल्या.

‘मासाहेब, सहजासहजी माणसं घरात रुळत नाहीत. पिलाजीरावांना आम्ही शब्द दिला होता. येसूला मुलीसारखं वागवू, म्हणून वचनबद्ध होतो. पोरीला माया लागली, ही देवाचीच कृपा; दुसरं काय? हिला पाहिलं, की सखूची आठवण होते. ती सुद्धा अशीच हक्क गाजवायची!’

जिजाबाई येसूबाईवर ओरडल्या, ‘जा, ग! बाळराजे खोळंबलेत. आणि हे बघ, उगीच घोडी पळवू नका. पडाल.’

येसूबाई हसत महालाबाहेर पळाल्या. पाठोपाठ जिजाबाई पण गेल्या. राजांनी समाधानाचा नि:श्वास सोडला. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेब, खरंच, बाळपण केवढं निरागस असतं, नाही?’

‘हो ना! म्हणूनच शिस्त लावायची, ती ह्याच वयात.’

‘का? काय झालं?’

‘काय झालं? भारीच लाडावलंय् हे प्रकरण...’

राजे नुसते हसले. सोयराबाई आणखीन संतापल्या. त्या म्हणाल्या,

‘ऐकून ठेवा! आज सून सून म्हणून कौतुक करताय्; पण उद्या हीच फुणफूण करू लागली, की मग आठवेल स्वारींना!’

‘राणीसाहेब, येसूबाईंना नावं ठेवताना स्वतःचा विसर पडतोय्. तुम्ही पण मासाहेबांच्या सूनबाईच ना? तुमची फुणफूण कुठं सुरू झाली नाही, ती!’

सोयराबाई एकदम लाजल्या; हसल्या. ते पाहून राजे प्रसन्न झाले. ते म्हणाले,

‘किती सुरेख हसता! आम्हांला तुमचं हसणं भारी आवडतं!’

राजांनी नकळत सोयराबाईंचा हात धरला. हात सोडवून घेण्याचा प्रयत्न करीत सोयराबाई म्हणाल्या,

‘हे काय? कुणी येईल ना!’

‘कोणी यायचं नाही.’ राजे म्हणाले, ‘तुम्ही महाली आहा, हे आता साऱ्यांना ठाऊक झालं आहे.’

‘शपथ आहे माझी! सोडा ना!’

दीर्घ निःश्वास सोडून राजांनी हात सोडला व ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेब, हे मात्र चुकलं. सुटली, म्हणा!’

‘सुटली; पण काय चुकलं?’ सोयराबाईंनी दरवाज्याकडे जात विचारले.

‘भलत्या वेळी शपथ घातलीत!’

सोयराबाई पुऱ्या लाजल्या. कपाळीचा घाम टिपीत त्या महालाबाहेर पडत असता त्यांचे पाय उंबऱ्यावर थबकले. त्यांनी वळून पाहिले. राजांची नजर त्यांच्यावर खिळली होती. राजे हसले.

‘पटलं ना?’

त्या शब्दाबरोबर सोयराबाई उभ्या जागी मोहरून गेल्या. जिन्याच्या पायऱ्या उतरत असताही त्यांची पावले अडखळत होती.

□

१२

सायंकाळी राजे गडाच्या माचीवर उभे होते. खाली पसरलेला मुलूख राजे निरखीत होते. झाडीच्या मधून उठणारी धुराची वलये गावांची निशाणी दाखवीत होती. राजांच्या मागे तानाजी, येसाजी उभे होते. राजे म्हणाले,

‘येसाजी, आता या गावांना नवं वळण लागेल. जमिनीचा मगदूर सुधारेल. बिचाऱ्यांचे आयुष्याचे कष्ट सार्थकी लागतील.’

‘होय, महाराज! सारे दुवा देत्यात. आनंदानं गावं भरून गेल्यात.’

सायंकाळच्या वाऱ्याबरोबर वाढणारी थंडी जाणवू लागली होती. राजांनी शाल लपेटून घेतली. राजे वळणार, तोच तानाजी म्हणाला,

‘बहिर्जी येतोय्, वाटतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी पाहिले. बहिर्जी येत होता. बहिर्जींची नेमणूक राजांनी गोव्यात केली होती. अनेक नजरबाज गोव्यात पाठविले होते. बहिर्जीने मुजरा केला. राजे म्हणाले,

'बहिर्जी, बरं आहे ना?'

'जी!'

'काय बातमी आणलीस? अरे, सांग. कोणी परकं नाही.'

बहिर्जी म्हणाला, 'महाराज! कंटाळा आला. गोव्यात सगळी सामसूम हाय. साऱ्यांस्नी तुम्ही परत येनार, वाटतंय्. बस्स, एवडंच!'

'बस्स?' राजांनी विचारले.

'काय दम न्हाई गोव्यात. न्हाई म्हणायला त्यो विजरई म्येला, तेवडाच! मोठा माणूस म्हणून पोचवायला गर्दी झाली व्हती. पाद्री तेवढं चुकचुकत व्हते. पण बाकी सारी परजा आनंदी व्हती. त्यानं लई मानसं बाटवली.'

राजे काही बोलले नाहीत. ते सरळ वाड्यावर आले, आणि बहिर्जीला घेऊन महाली गेले.

गोव्याचा विजरई कोंदी द सांव्हिसेंत मृत्यू पावल्याच्या बातमीने राजांच्या मनाने उचल खाल्ली. राजांनी सारा गोवा एकदम घेण्याचा बेत केला. दुसऱ्या दिवशी राजांनी आपले मनोगत खास माणसांना सांगितले. माणसांची निवड सुरू झाली आणि आठ दिवसांत चार-पाचशे विश्वासू माणूस गोव्यात प्रवेश करण्यासाठी पाठवून दिले. त्याआधी राजांचे अनेक हेर गोव्यात पसरले होतेच. हरतऱ्हेच्या निमित्ताने गोव्यात घुसलेल्या माणसांनी ठरल्या दिवशी उठाव करावा, गोव्याच्या सीमेवर आलेल्या राजांनी गोव्यात प्रवेश करून गोवा कबज्यात आणावा, हा मोठा बेत राजांनी आखला. राजे आपल्या सैन्यानिशी गोव्याकडे कूच करते झाले.

राजे गोवा हद्दीवरील भतग्राम महालातील पंचगंगा नदीच्या तीरावर वसलेल्या नार्वे गावी मुक्काम करून राहिले होते. गोव्यातल्या बातमीची राजे वाट पाहत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पहाटे राजे स्नान करून आपल्या छावणीतून बाहेर आले. मोरोपंतांना राजांनी विचारले,

‘मोरोपंत, आमचे शिवलिंग गडबडीत विसरलं. इथं जवळपास कुठं शिवालय आहे का?’

मोरोपंतांनी चौकशी केली. छावणीपासून थोड्याच अंतरावर शिवालय आहे, हे कळताच राजे देवळाकडे गेले. तेथील शिवलिंग पाहून राजांचे मन आनंदले; पण देवालयावर छप्पर नव्हते. राजांनी पूजा आटोपली. नेत्र उघडले. वाऱ्याने एक बेलपत्र राजांच्या समोर सरकत आले होते. राजांनी देवळाचा इतिहास विचारला. पुजारी म्हणाला,

‘राजे, हे सप्तकोटेश्वराचे देवस्थान. ‘शिवक्षेत्र’ म्हणून प्रसिद्ध आहे. हे कदंबांचं कुलदैवत. मुसलमानस्वारीत देऊळ उखडलं गेलं. शिवलिंग शेतात फेकलं गेलं. पुढं बुक्करायानं पुन्हा शिवलिंगाची स्थापना केली. मोगल गेले आणि परत पोर्तुगीजांची धाड आली. त्यांचा परत या देवस्थानावर हल्ला झाला. इथलं शिवलिंग उखडून विहिरीच्या काठावर बसविलं गेलं. भतग्रामच्या देसायांनी ते चोरलं व इथं स्थापन केलं. ना राज्यकर्त्यांचं लक्ष, ना कोणी भक्त. देऊळ पडलं.’

राजे मोरोपंतांना आज्ञा करते झाले, ‘मोरोपंत, आमच्या मनात सप्तकोटेश्वराचा जीर्णोद्धार करण्याचं आहे. आपण मुक्काम हलविण्याच्या आत कामाची सुरुवात व्हावी.’

मोरोपंत कामाला लागले. देवळाच्या प्राथमिक कामाची जुळवाजुळव झाली. त्याच वेळी गोव्यातून बहिर्जी राजांच्या भेटीस आला. राजांनी मोठ्या उत्सुकतेने विचारले,

‘बहिर्जी, सर्व तयारी झाली?’

बहिर्जीने मान खाली घातली. राजांनी अधीरतेने विचारले,

‘सांग, बहिर्जी, काय झालं?’

बहिर्जीने ओठांवरून जीभ फिरविली व तो म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, घात झाला! कट कसा फुटला, ते माहीत नाही. आपले सर्व लोक पकडले गेले. गोव्यातल्या आपल्या वकिलाला पकडून नव्या विजरईने मुस्कडात दिल्या आणि वकिलासकट सर्वांना गोव्यातून हद्दपार केलं.’

राजांचे तणावलेले अंग सैल पडले. आपल्या निराशेवर मात करीत राजे म्हणाले,

‘जशी श्रींची इच्छा! आपले लोक सुखरूप आले, याचा आनंद वाटतो. आमचा एक डाव फसला!’

गोव्याचा कट फसूनही राजांनी आपला नार्वेचा मुक्काम हलविला नाही. नार्वेच्या पलीकडे उभे असलेले गोवे राजांना दिसत होते. ‘सातां समुद्रांपलीकडून इथं परके लोक येतात. मूठभर लोक आमच्याच लोकांचं इमान विकत घेतात, आपलं राज्य या भूमीत स्थिर करतात. हजारो लोक बाटविले जातात आणि आमची दैवतं उखडलेली आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहतो. धन्य आहे आमच्या धर्मनिष्ठेची!’

राजांनी सप्तकोटेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे ठरविले. एका सुमुहूर्तावर राजांनी मंदिराचे काम स्वहस्ते सुरू केले; आणि मंदिराचे काम सुरळीतपणे पार पाडण्याची आज्ञा देऊन राजे माघारी वळले.

राजे स्वार झाले होते. मागे अश्वदळ उभे होते. राजांची नजर समोर दिसणाऱ्या गोव्यावर परत खिळली. राजे तानाजीला म्हणाले,

‘तानाजी, आज आपल्या थोडक्या शिबंदीमुळं आम्ही गोव्याकडे पाहण्याखेरीज काही करू शकत नाही, याची आम्हांला खंत आहे. आम्ही परत आमची फौज घेऊन येऊ, आणि या फिरंग्यांना आमच्या सामर्थ्याची जाणीव करून देऊ.’

राजांनी घोड्याला टाच दिली. सायंकाळच्या सुमारास राजे कुडाळला आले. राजांनी कुडाळला मुक्काम केला.

सकाळी राजे आपल्या पालात बाहेर पडण्याच्या तयारीत होते, तोच मोरोपंत आले. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज, आज भल्या पहाटे सिंधुदुर्गाचा जासूद आला होता. पत्र घेऊन तो राजगडला जात होता. इथं आपला मुक्काम आहे, हे समजताच तो इथं आला.’

‘कारण?’

‘महाराज, सिंधुदुर्ग पुरा झाला आहे.’

राजांच्या चेहऱ्यावर एकदम समाधान पसरले. गोव्याचे शल्य क्षणात ते विसरून गेले. ते उद्गारले,

‘केवढा भाग्याचा दिवस!’

‘आजचा दिवस खरंच चांगला आहे. या सुमुहूर्तावर सिंधुदुर्गात प्रवेश करायला काही हरकत नाही.’

‘मोरोपंत, तुम्हांला माहीत नाही, या दिवसासाठी आम्ही केवढे उतावीळ झालो होतो, ते. चला, मोरोपंत, सिंधुदुर्ग डोळे भरून पाहू!’

थोड्याच वेळात छावणी उठली. मालवणच्या रोखाने घोडी भरधाव सुटली. सूर्य वर आला असता राजे मालवणच्या किनाऱ्यावर आले. सूर्यकिरणांत सागराच्या रुपेरी लाटा किनाऱ्याकडे झेपावत होत्या. जणू राजांच्याकरिता पायघड्या अंथरल्या जात होत्या. समुद्रात उभ्या असलेल्या सिंधुदुर्गाची भव्य वास्तू राजे भान हरपून पाहत होते. उन्हासाठी म्हणून समुद्रपृष्ठावर आलेल्या प्रचंड कासवासारख्या दिसणाऱ्या कुरटे बेटावर केवढी वास्तू उभी राहिली होती! कूर्मावताराचे ते सार्थ प्रतीकच होते.

राजांनी नावेत पाय ठेविला. अनेक नावा समुद्रात तरंगू लागल्या; लाटांवर हेलकावे घेत सिंधुदुर्गावर जात होत्या. राजे येताहेत, हे कळताच गडाच्या ईशान्य महाद्वारासमोर लोकांची गर्दी उसळली होती. राजांनी सिंधुदुर्गावर पाय ठेवला. सिंधुदुर्गाच्या कामावर नेमलेले गोविंद विश्वनाथ प्रभू सामोरे आले. त्यांनी राजांना लवून मुजरा केला. हर्षभरित राजांनी आपल्या गळ्यातील कंठ्याला हात घातला. काही न बोलता कंठा उतरून तो त्यांनी प्रभूंच्या हाती दिला. प्रभूंनी एकदम राजांचे पाय शिवले. राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘प्रभू, स्वराज्याच्या कंठ्यात हा अमोल मोती जडवलात! आम्ही धन्य झालो! चला, आम्हांला दुर्ग दाखवा.’

राजे चालू लागले. गडाच्या प्रवेशद्वाराच्या खिंडीतून आत जाऊन राजे प्रवेशद्वारी उभे राहिले. नगारा झडला. शिंगांचा आवाज आकाशाला भिडला. राजांनी उंबऱ्याला हात लावून मुजरा केला; आणि राजांनी सिंधुदुर्गात प्रवेश केला. राजांच्या बरोबर प्रभू, मोरोपंत, अनाजीपंत, बाळाजी आवजी, कोंडाजी फर्जंद, रामचंद्रपंत नाईक, जिवा महाला चालत होते. मागून तानाजी, येसाजी, गडावरचे लोक आणि राजांची शिबंदी जात होती. किल्ल्याच्या आवारात बांधलेली घरटी, दारूकोठार पाहत राजे किल्ल्यातील विहिरीपाशी आले. निर्मळ पाण्याने भरलेली ती विहीर पाहून राजांनी हात जोडले.

‘मोरोपंत, देवाची करणी केवढी अगाध! या जागी गोड पाण्याचा झरा!... गोविंदराव, हे पाणी पुरतं का?’

‘जी, महाराज! तीन वर्षांमध्ये एकदाही पाणी कमी पडलं नाही. मालवणच्या पाण्यापेक्षा हे पाणी चवीला चांगलं आहे.’

‘या जगात द्यायचं झालं, तर ते परमेश्वरानंच द्यावं!’ राजे बोलून गेले.

राजे तटावरून जात होते. सूर्य माथ्यावर आला होता. राजांची नजर क्षितिजाला टेकलेल्या समुद्रावरून फिरत होती. दर्याबुरुजावरून राजे पाहत होते. समोर मालवणचा किनारा दिसत होता. राजे अनाजीपंतांना म्हणाले,

‘अनाजीपंत, या सिंधुदुर्गाच्या उभारणीनं मस्तवाल झालेला हबशी नरमेल. त्याचा उपद्रव कमी होईल. टोपीकर फिरंग्यांना आमच्या सागरी सत्तेची जाणीव होईल. वाडीच्या सावंतांना चाचेगिरी करण्याचं धारिष्ट राहणार नाही. साऱ्या कोकणपट्टीवर या सिंधुदुर्गाची सत्ता राहील, एवढं आरमार आपण उभं करू.’

राजांनी मोठ्या थाटात सिंधुदुर्गाची वास्तुशांत केली. एक कोटी होन खर्चून बांधलेल्या त्या सिंधुदुर्गाचे भूदेव संतुष्ट केले. कामगारांना कडी, मंदील वाटले. अनेक नजराणे दिले. साऱ्यांच्या कष्टांचे चीज केले. गडाच्या बुरुजांवरच्या तोफांची पाहणी केली आणि स्वराज्याच्या त्या जलदुर्गावर रायाजी भोसले याला किल्लेदार नेमले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचा मुक्काम हलणार होता. सायंकाळच्या वेळी राजे दर्याबुरुजावर उभे होते. तिरप्या सूर्यकिरणांत समुद्राच्या लाटा फेसाळत होत्या, गंभीर नाद करीत तटावर आदळत होत्या. आकाशात शतरंग उधळले होते. अर्धवर्तुळाकार बुरुजावर तोफेच्या पाठीवर हात ठेवून राजे आसमंत निरखीत होते. अंगातला जामा वाऱ्याने हेलकावे घेत होता. राजे आपल्याच विचारात मग्न होते. त्यांच्या मागे हात बांधून मोरोपंत, अनाजी, तानाजी उभे होते. एक दीर्घ निःश्वास राजांच्या मुखातून बाहेर पडला. एकदम त्यांची नजर मोरोपंतांच्या वर खिळली. साऱ्या सिंधुदुर्गावरून नजर फिरवीत ते म्हणाले,

'मोरोपंत, हा सिंधुदुर्ग म्हणजे आम्हांला आमचं प्रतीक वाटतो. किनाऱ्यापासून दूर भर दर्यात उभा राहिलेला, चारी बाजूंनी खाऱ्या पाण्यानं वेढलेला. भरतीच्या मस्तवाल लाटा याच्या तटावर अखंड टक्कर देत असतात, आपल्या धडकांनी याला जमीनदोस्त करू पाहतात, तर ओहोटीच्या लाटा याचे पाय ओढायला धजत असतात. या सागरावर उठणारा प्रथम मेघ इथंच वर्षतो. सागराचे वादळी वारे इथंच घोंघावतात. हे सारं सहन करीत एकट्यानं उभं राहायचं; तेही अंतरीच्या एका गोड पाण्याच्या झऱ्याच्या आधारावर!'

राजांनी निःश्वास सोडला. क्षणभर ते बेचैन बनले; आणि दुसऱ्या क्षणी ते तटाच्या पायऱ्या उतरू लागले. तटापलीकडील लाटांचा गंभीर आवाज कानांवर पडत होता...

□

१३

मोठ्या समाधानाने राजे सिंधुदुर्गावरून राजगडावर आले. उन्हाळ्याचे दिवस होते. तप्त धरणीबरोबरच राजांचे मन तापत होते. मुलुखाची बटाई पुरी होत आली होती. राजांचे लक्ष जंजिऱ्याच्या सिद्दीकडे वळले. मोगलाई, आदिलशाही, टोपीकर इंग्रज हे प्रबळ शत्रू स्वस्थ असतानाच सिद्दीमोहीम हाती घ्यावी, असे राजांनी ठरविले. फौजेला हुकूम सुटले. आरमार जंजिऱ्याच्या दिशेने सरकू लागले. जमिनीवरून आणि समुद्रातून एकाच वेळी जंजिरा वेढण्याचा बेत राजांनी केला. महाडच्या उत्तरेकडून फौजेसह राजे सिद्दीच्या मुलुखात घुसले.

दंडराजपुरीचा भाग लुटीत, सिद्दीचे किल्ले काबीज करीत राजे पुढे सरकत होते. राजांच्या स्वारीने घाबरलेला सिद्दी जंजिऱ्याच्या आश्रयाला गेला. राजांनी दंडराजपुरी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काबीज केली. राजांचा मुक्काम पेणला होता. आपल्या फौजेच्या विजयाची वार्ता राजे ऐकत होते. चारी बाजूंनी जंजिऱ्यावर तोफांचा भडिमार होत होता. सिद्दी फत्तेखान पुरा संकटात सापडला होता. राजांनी जंजिरा खाली करून देण्याचे बोलणे लावले. फत्तेखान याला तयारही झाला; पण ऐनवेळी फत्तेखानाच्या तीन सहकाऱ्यांनी शरणागती पत्करायला तयार झालेल्या आपल्या नेत्याला कैद केले; आणि ते वीर जंजिऱ्याच्या रक्षणार्थ नव्या धडाडीने उभे ठाकले. त्यांच्या शौर्याने जंजिरा पडणे कठीण दिसू लागले. पावसाळा आला होता. राजांनी माघार घेतली. जिंकलेल्या मुलुखाची व्यवस्था लावली. खुद्द दंडराजपुरीत सिद्दीवर वचक ठेवण्यासाठी आपली काही लढाऊ गलबते ठेवून राजे माघारी राजगडला आले.

अवघ्या सहा महिन्यांत राजांच्या दोन मोहिमा अयशस्वी झाल्या. गोव्याचे बंड फसले. ऐन वेळी जंजिऱ्याने ताकद उचलली; पण राजांना त्याची खंत वाटली नाही. दोन्ही पराजय दैवाधीन होते. त्यांत थोडे समाधानही होते. सप्तकोटेश्वराचा जीर्णोद्धार आणि दंडराजपुरीची सत्ता ह्या दोन्ही गोष्टी तेवढ्याच महत्त्वाच्या होत्या. त्या साध्य झाल्याचा आनंद राजांना होता.

राजे गडावर आले, तेव्हा पावसाळा सुरू झालेला होता. गडावरचे वातावरण कुंदावले होते. सत्तरीच्या घरात गेलेल्या जिजाबाई महालाबाहेर क्वचित येत असत.

राजे जेवत होते. शेजारी संभाजीराजे बसले होते. समोर पाटावर जिजाबाई दोघांवर लक्ष ठेवून बसल्या होत्या. पंक्तीला तानाजी, फिरंगोजी हजर होते. गप्पा मारीत जेवण चालले होते.

‘राजे, पावसाचा जोर आता कमी झाला.’

‘ते आमच्या ध्यानी आलंय्! पावसाळ्यात गडावर बसून राहणं नको वाटतं, नाही?’

‘तर काय?’ तानाजीने पुष्टी दिली.

‘फिरंगोजी, दोन पराभव घेतले. वेळ बरी दिसत नाही.’

‘कायतरीच! लढाईतली हारजीत खरी असतीया व्हय?’ फिरंगोजी म्हणाले, ‘म्हातारा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झालो; पण ढाल-तलवार अंगावर असली की, बाळसं चढतंय्.’

‘जेवा, फिरंगोजी!’ मासाहेब म्हणाल्या, ‘जेव्हा बघावं, तेव्हा स्वारी... लढाई...’

सारे चपापले. बाळराजे खुदकन हसले; आणि हसणे उसळले.

काळी चंद्रकळा नेसलेल्या सोयराबाई वाढीत होत्या. राजांची नजर राहून-राहून त्यांच्याकडे वळत होती. राजांचे जेवण झाले. राजे चौकात गेले. चौकाच्या कट्ट्यावरील रुप्याच्या तपेल्याजवळचा तांब्या राजे उचलणार, तोच नाजूक हातांनी तांब्या उचलला गेला. सोयराबाई स्मितवदनाने उभ्या होत्या. राजांनी हात पुढे केले. पाण्याची धार हातावर पडत होती. राजे हात धूत होते. हात धुता-धुता राजे पुटपुटले,

‘आमच्या महाली या.’

सोयराबाई गोऱ्यामोऱ्या झाल्या. राजांनी हसत हात धुतले.

राजे जेव्हा आपल्या महाली आले, तेव्हा सोयराबाई तेथे उभ्या होत्या. राजांना पाहताच त्या म्हणाल्या,

‘कुणी ऐकलं, तर...’

‘काय होईल?’

सोयराबाईंना काही सुचले नाही. राजे जवळ येत म्हणाले,

‘जेवताना तुम्ही वाढायला आलात. तुम्ही नेसलेल्या चंद्रकळेनं तुम्ही आमच्या डोळ्यांत भरलात. काळा रंग चांगला नाही, असं म्हणणाऱ्यांनी तुम्हांला पाहावं.’

‘हे मासाहेबांना सांगा! त्यांना काळा रंग मुळीच आवडत नाही.’

‘त्याबद्दल आम्हांला काही बोलता येत नाही; पण आमच्या नजरेला आज तुम्ही सुरेख दिसता, हे मात्र खरं. तुमच्या गौरवर्णाला हा रंग खुलून दिसतो. तुम्हांला पाहून आमचं मन

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रसन्न झालं.’

‘मग काही बक्षीस?’ सोयराबाईंनी धिटाईने विचारले.

‘त्यासाठीच तुम्हांला बोलावलं.’ राजे जवळ सरकत म्हणाले.

सोयराबाई भयभीत झाल्या. गडबडीने त्या म्हणाल्या,

‘मी जाते.’

‘घाबरू नका. थांबा.’ म्हणत राजे आपल्या संदुकीपाशी गेले. त्यांनी पेटी उघडली. एक सुवर्णी कमरपट्टा काढला. मोगली कलाकुसरीचा तो पट्टा नजर ठरू देत नव्हता. सोयराबाईंच्या हाती तो देत राजांनी सांगितले,

‘दंडराजपुरीला हा मिळाला. लूट जारी असताही सुवर्णकाराला मोल देऊन आम्ही हा खरीदला.’

‘मग अजून बरा ठेवला होता?’

‘प्रसंग पाहून भेट नजर करायची असते.’

‘तेच म्हणते मी!’

‘का? काय झालं?’

‘नको त्या वेळी नाही ती वस्तू देता.’

‘आम्ही समजलो नाही.’

सोयराबाई लाजल्या. त्या म्हणाल्या,

‘आता मला पट्टा वापरता यायचा नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या एकदम लक्षात आले. त्यांनी सोयराबाईंना जवळ घेतले; आणि ते म्हणाले,

‘सोयरा, आमची भेट काही दिवस ठेवावी लागणार, याचा आम्हांला आनंदच वाटतो. या तिसऱ्या पराजयानं मात्र आम्ही संपूर्ण समाधान पावलो!’

‘मी जाऊ ना? मासाहेब वाट पाहत असतील.’

‘थोडं चुकलं! ‘आम्ही जाऊ ना?’ असं म्हणत चला.’

सोयराबाई लाजेने चूर झाल्या, आणि हसत महालाबाहेर निघून गेल्या.

□

१४

पावसाळा संपत आला. श्रावणातले कोरडे ऊन दिसू लागले; आणि राजे रायगडचे बांधकाम पाहण्यासाठी रायगडी गेले. राजांचा रायगडी मुक्काम झाला. रायगडाची पाहणी करून राजे परत राजगडी आले, तेव्हा राजगडाचे वातावरण गंभीर बनले होते. राजे सदरेत आले. अनाजी दत्तोंसारखी राजकारणधुरंधर माणसे सदरेत नतमस्तक उभी होती. राजांनी विचारले,

‘अनाजी, काय झालं?’

अनाजींनी ती कटू बातमी सांगितली-

‘राजे गडावर वाईट बातमी आली आहे. औरंगजेबानं काशीविश्वेश्वराचं देऊळ उखडल्याची बातमी आली आहे.’

विजेचा लोळ उतरावा, तशी ती बातमी राजांच्यावर कोसळली. राजांना काही बोलवेना. अनाजी सांगत होते,

‘एवढंच नव्हे, पण मथुरेतील श्रीकेशवदेवाचं मंदिरही उद्ध्वस्त झालं. औरंगजेबानं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हिंदूंवर जिझिया कर पुन्हा बसविला आहे. ही बातमी कळल्यापासून मासाहेबांनी हाय घेतली आहे. गेले दोन दिवस त्यांनी पाण्यालाही स्पर्श केला नाही!'

राजे धावले. महालात लोडाला टेकून जिजाबाई बसल्या होत्या. घरचे सारे भोवती बसले होते. राजांनी हाक मारली,

'मासाहेब!'

जिजाबाईंची घायाळ नजर सावकाश उंचावली. त्या थरथरत उठल्या. राजे पुढे धावले. जिजाबाईंना सावरीत असता जिजाबाई कळवळून बोलल्या,

'राजे! औरंगजेबानं दावा साधला; आपलं काशीचं देऊळ पाडलं. तिथं त्याच दगडांनी मशीद बांधली, म्हणे. राजे, आपला धर्म बुडाला! आम्ही पोरके झालो!'

सत्तरीच्या जिजाबाई! उभ्या आयुष्यात कधी एवढ्या व्याकूळ बनल्या नव्हत्या, हताश झाल्या नव्हत्या. त्या बोलांनी राजांचे हृदय फाटून गेले. जिजाबाईंना समजावायला आलेले राजे त्यांनाच मिठी मारून रडू लागले. डोळ्यांतून टपोरे मोती ओघळू लागले. दाराशी आलेले अनाजी, मोरोपंत, बाळाजी ही मंडळी आतले दृश्य पाहून जागच्या जागी खिळून राहिली. सारा महाल हुंदक्यांनी भरला. राजांनी कष्टाने स्वतःला सावरले. जिजाबाईंना बैठकीवर बसविले. राजे म्हणाले,

'मासाहेब! रडू नका. शोक आवरा.'

'हिंदू म्हणवून घेता; आणि रडू नका, म्हणून सांगता? तुम्हां पुरुषांची जात कोडगी बनल्यावर बायकांनी रडण्यापेक्षा काय करायचं?' जिजाबाई उफाळल्या.

राजे म्हणाले, 'शांत व्हा, मासाहेब! अजून आमचा स्वाभिमान गहाण पडलेला नाही. उत्तरेतल्या हिंदूंना कदाचित धर्माची चाड नसेल, राजपूत म्हणवून घेणारे धर्म विसरले असतील; पण आम्ही तेवढे नादान बनलो नाही.'

'तुम्ही काय करणार?' जिजाबाई उद्गारल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय करणार नाही, ते विचारा! औरंगजेबाला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप करावाच लागेल. काशीविश्वेश्वराची शपथ घेऊन आज आम्ही प्रतिज्ञा करतो- औरंगजेबाला आम्ही क्षमा करणार नाही. आज ह्या घडीला आम्ही ते वैर पत्करतो आहोत. जोवर आम्ही आमच्या कुलदैवताचं मंदिर परत उभारणार नाही, तोवर आमच्या मनाला शांतता लाभणार नाही!’

‘राजे, भावनेच्या भरात...’

‘नाही, मासाहेब! ही भावनेच्या भरात केलेली वल्गना नाही. आम्हांला आमच्या ताकदीचा पुरा विश्वास आहे. आज मिर्झाराजे हवे होते. आम्ही बोललो, त्याची सत्यता त्यांना पटली असती. औरंगजेब मोकाट सुटला आहे. धर्माची नशा त्याच्या नजरेत उतरली आहे. जिझिया कर आता हिंदूंच्यावर लादला गेला आहे. त्याला पायबंद बसायला हवा.’

अनाजी म्हणाले, ‘जिझिया कर सोसता येईल; पण...’

तशा स्थितीतही राजे हसले.

‘अनाजी, हा जिझिया म्हणजे काय, माहीत आहे?’

अनाजी चाचरत म्हणाले, ‘बिगरमुसलमानांच्यावर लादलेला कर.’

‘बस्स? एवढा सोपा वाटतो जिझिया? औरंगजेब एवढा खुळा नाही. उखडलेली मंदिरं पुन्हा उभी करता येतील; पण दुबळी मनं पुन्हा कशी उभी करणार? विश्वेश्वराला हात घालून औरंगजेबानं श्रद्धेला तडा दिला; पण त्या जखमी मनाला संपूर्ण दुबळं बनविणारा हा जिझिया! मोरोपंत, तुम्हांला जिझियाची कलमं आठवतात?’

मोरोपंतांनी होकारार्थी मान हलविली. राजांनी आज्ञा केली,

‘सांगा, मोरोपंत, आमच्या अनाजींना एकदा जिझिया कर समजू दे.’

मोरोपंतांनी क्षणाची उसंत घेतली; आणि ते बोलू लागले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'महाराज! जिझिया कराची वीस कलमं आहेत. त्या कलमान्वये हिंदूंना नवी देवळं बांधता येणार नाहीत; पाडलेल्या देवळांना उभारता येणार नाही. हिंदूंच्या पूजागृह, देवळांच्या जागी मुसलमानांना उतरण्याचा हक्क राहील; एवढंच नव्हे, तर कोणाही हिंदूच्या घरात मुसलमान शाही पाहुणा म्हणून राहण्याचा हक्क या जिझिया करान्वये दिला आहे. हिंदू अपत्यांना मुसलमानी नावे ठेवण्याचा अधिकार नाही. त्यांना शस्त्रं अथवा मोहोर खड्याच्या अंगठ्या बाळगता येणार नाहीत...'

मोरोपंत थांबले. राजांची नजर एकदम त्यांच्यावर वळली.

'का, थांबलात का?... अनाजी, एवढ्यावर हा जिझिया थांबत नाही. कोणाही हिंदूला मुसलमानाच्या घराजवळ घर बांधता येणार नाही. हिंदूंच्या घरात कोणी वारलं, तर यांना मोठ्यानं शोक करता येणार नाही. हिंदूंनी मुसलमानांविषयी आदर दाखविला पाहिजे... सांगा, अनाजी, हा रिवाज पाळला गेला, तर या देशात आम्हां हिंदूंना कोणतं मानाचं स्थान राहील? आत्ताच पायबंद घातला नाही, तर सारा हिंदोस्तान मुसलमान झाल्याखेरीज राहणार नाही!'

'पण आपल्या हाती काय आहे?'

'पुष्कळ आहे, मासाहेब! एक ठिणगीदेखील वणवा पेटवू शकते. मासाहेब, यापुढं आम्ही एवढं रान उठवू, की दक्षिणेतील मोगलाई हादरून जावी. औरंगजेबाला दक्षिणेत उतरावंच लागेल. आजवर कोणी शिकवला नसेल, असा धडा आम्ही औरंगजेबाला शिकवू!'

राजांच्या बोलण्याने सारे आनंदले. अनाजी त्वेषाने म्हणाले,

'राजे, आज्ञा व्हावी; मुलुखात एकही मशीद उभी दिसणार नाही!'

राजांनी अनाजींवर नजर खिळविली. ते खिन्नपणे हसत म्हणाले,

'व्वा, अनाजी! संतापाच्या भरात विवेक विसरलात. अविवेकाचं उत्तर अविवेकानंच का द्यायचं असतं? हे उत्तर नव्हे. तो विचारही मनात आणू नका... बाळाजी...'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी!’

‘आम्हांला दिल्लीला तातडीनं खलिता पाठवायचा आहे. लेखनसाहित्य घेऊन या.’

बाळाजी गेले; फडातून सर्व साहित्य घेऊन आले. राजे येरझाऱ्या घालीत होते. एकदम ते बाळाजींना म्हणाले,

‘वर औरंगजेबाचा मायना लिहा.’

‘जी!’

राजे मजकूर सांगत होते...

> ‘...आम्हां हिंदूंचे परम पवित्र देवस्थान, काशीचे श्रीशिवशंकराचे पवित्र मंदिर तुम्ही धर्मांध बनून पाडले. त्यावर मशीद उभी केली. पराक्रम थोर केला, ऐशा घमेंडीत आपण असाल. हा अभिमान लटका आहे, हे थोड्याच दिवसांत आपल्या निदर्शनास येईल. आपण उत्तरेत सत्ताधीश असाल; पण दक्षिणेतील आमची सत्ता आहे, हे विसरता. मनात आणले, तर दक्षिणेतील प्रत्येक मशिदीचे मंदिर करायला वेळ किती? इस्लाम धर्म आम्ही तुमच्यापेक्षा जास्त जाणतो. माणुसकी जाणीत नाही, तो धर्म कसला? हिंदूंना जुलुमाने बाटविणे, जिझिया कराची आकारणी करणे हे इस्लामच्या बंद्याला न शोभणारे वर्तन. ते तुम्ही करीत आहा... केले. आम्ही ते कदापिही सहन करणार नाही. इथे तर तुमचे राज्य नाहीच; पण जेथे आहात, तीही पवित्र भूमी तुमची नाही. एक ना एक दिवस तुमचे दिल्लीतख्त उखडून तुम्ही पाडलेल्या मंदिराची उभारणी आम्ही करू, तेव्हाच आम्ही स्वस्थ बसू. आमचे वैर निभावण्यास परमेश्वर तुम्हांस सामर्थ्य देवो...’

राजांनी उसंत घेतली. पुतळाबाईंच्याकडे वळून ते म्हणाले,

‘मासाहेबांचे ताट घेऊन या.’

‘शिवबा ऽ ऽ’

‘मासाहेब, असं दुबळं बनून चालणार नाही. अधर्माविरुद्ध भांडायला उभं राहायचं बळ सत्प्रवृत्त माणसांच्या अंगी असायला हवं. मिर्झाराजांच्यासारखी माणसं दुबळी ठरली, त्यांनी बगल दिली, म्हणून औरंगजेब पुढं धजला. गुंडांच्या धक्काधक्कीला चांगली माणसं भितात, ती मागे सरतात, तेव्हाच गुंडांची मालिका आघाडीवर दिसते. त्या वेळी हताश

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होऊन चालणार नाही.'

शेजारी बसून राजांनी जिजाबाईंना जेवू घातले.

दुसऱ्या दिवसापासून राजांनी आल्या फौजेला गोळा होण्याचे हुकूम सोडले. राजांनी मिळेल तेवढा दारूगोळा, हत्यारे, बंदुका खरेदी करण्याची आज्ञा फडाला दिली. राजे पुरे बेचैन बनले होते.

सायंकाळी राजे माचीकडे गेले असता प्रतापराव गुजर आणि रावजी सोमनाथ परत आल्याचे कळले. संभाजीराजांच्या जहागिरीची तजवीज पाहायला गेलेले सेनापती आणि रावजी सोमनाथ वर्दी न देताच परत येतात, याचे राजांना आश्चर्य वाटले. राजे तसेच वाड्याकडे परतले.

प्रतापराव गुजर आणि रावजी राजांची वाट पाहत होते. सदरेवर येताच राजांनी विचारले,

'प्रतापराव, काय झालं?'

प्रतापरावांच्या चेहऱ्यावर हास्य होते. ते म्हणाले,

'महाराज, चिंता करण्याचं कारण नाही. औरंगजेबानं हिंदूंवर आग पाडायला सुरुवात केली आहे. मोगलाईत त्यामुळं प्रजा त्रस्त झाली आहे. आम्ही औरंगाबादेला असता औरंगजेबानं आम्हांला अटक करण्याचा हुकूम शहाजादा मुअज्जमला पाठविला. त्याची बातमी आधीच शहाजाद्यांना लागली. शहाजादे औरंगजेबाच्या बाजूचे नव्हते. त्यांनी आम्हांला सूचना दिली. रातोरात फौजेसह मी औरंगाबाद सोडलं. तसाच रावजींना वऱ्हाडात निरोप पाठविला. आम्ही सर्व सुखरूपपणे परत आलो.'

राजांनी समाधानाचा निःश्वास सोडला. प्रतापरावांनी सांगितले,

'महाराज, वऱ्हाडातून रावजी तसेच आले नाहीत. माझा निरोप पोहोचताच मोगलाई ठाण्यांची लुटालूट करीत लाखो रुपयांची लूट घेऊन रावजी परत आले.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘रावजी, हे खरं?’ राजांनी विचारले.

रावजी म्हणाले, ‘नाइलाज झाला, महाराज! आपण आग्र्याला जाताना वाटखर्चाला दिलेले एक लाख रुपये औरंगजेबानं कापून घेतले, ते आम्ही विसरलो नाही. त्यावर कळस म्हणून हा कट रचला. तह मोडलाच होता; मग हात हलवीत आपल्या समोर येणं बरं वाटलं नाही. म्हणून येताना औशापर्यंत सर्व वऱ्हाड प्रांत लुटीत आलो. वीस लाखांची लूट मिळाली.’

‘व्वा, रावजी! शाब्बास तुमची!’ राजे पुढे होऊन रावजींची पाठ थोपटीत म्हणाले, ‘अशी समयसूचक माणसं आम्हांला हवीत. औरंगजेबाबरोबर वैर उगवण्याचा पहिला मान तुम्ही मिळवलात. आम्ही समाधान पावलो. रावजी, दोन वर्षं लष्कराचं पोट भरलं, शहाजादा मित्र जोडला, ही गोष्ट बरी झाली. शिवाय, मोगलाई वऱ्हाडाची ओळख झाली. थोर पराक्रम केलात. आता मोगलाई मुलूख मारून खावयास वाव झाला.’

प्रतापरावांच्या आगमनाने राजांचे बळ वाढले.

□

१५

राजांच्या मावळ मुलुखात नवे चैतन्य पसरले. चार वर्षे जवळजवळ संथ राहिलेला प्रवाह उसळू लागला. गावोगावी घोडी दौडू लागली. गावची तरणीताठी पोरे राजांच्या फौजेत गोळा होत होती. खुंटीवरच्या लटकलेल्या तलवारींना धार चढत होती. मुलुखाची बटाई झाल्यापासून राजांच्यावरचे प्रेम उदंड झाले होते.

राजगडावर दररोज नव्या बातम्या येत. हिंदू लोकांच्यावरील अत्याचारांना ऊत आला. मोगली मुलुखात जुलुमाला कंटाळलेले लोक बाहेर पडत होते. गडाच्या सदरेवर मुलुखाचे सुभेदार, शिलेदार हजर झाले. आपापल्या शिबंदीचा तपशील ते राजांना देत होते.

सदर बैठकीत राजांनी आपला विचार मांडला :

‘प्रथम आपले गमावलेले गड हाती यायला हवेत. मिर्झाराजांनी जे तंत्र वापरलं, तेच

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपण वापरू. गड घेत असता आपल्या फौजा साऱ्या मोगलाईत पसरू देत. वऱ्हाड, उत्तर गंगथडी, औसा या भागांत फौजा जाऊ देत.'

'एकाच वेळी गडांची आणि मुलुखाची मोहीम?' अनाजी उद्गारले.

'अनाजी, त्यात अवघड काय? आम्ही मिर्झाराजांना गड दिले; पण सत्तावीस गड मजबूत ठेवणं सोपं नाही. त्यासाठी मिर्झाराजांनी गडांचे तट पाडून कमजोर केले. तोटक्या शिबंदीनिशी शत्रूहाती असलेले गड आपल्याला लौकर घेता येतील. ते बळकट होण्याआधीच आपल्या हाती आले पाहिजेत. मोरोपंत पेशवे, निळोपंत मुजुमदार, आणि, अनाजी, तुम्ही राजकारण, यत्न करून किल्ले घ्यावेत; आणि आमचे मावळे गड घेतील.'

प्रतापराव सरनौबतांनी तर पुष्कळ मोठे काम केले. मोगलाईत पसरलेले मराठे त्यांनी राजांना आणून भिडविले. राजांनी मुहूर्त पाहून पहिली फौज मोगलाईत पाठवून दिली.

राजांनी आपल्या देखरेखीने दोन हजार माणसांची निवड केली. त्यांत अचूक नेमबाज, तीरंदाज, निष्णात पटेकरी, भालाईत, तलवारबहादूर यांचा समावेश होता. डोक्याला मंदील, अंगात सखलादी अंगरखे असा त्यांचा वेष होता. त्यांच्यापैकी काही सोनकड्यांचे, रौप्यकड्यांचे मानकरी होते.

जिजाबाईंनी विचारले, 'राजे, ही दोन हजार फौज कसली?'

राजे म्हणाले, 'मासाहेब, हे आमचे शरीररक्षक सदैव आमच्या सान्निध्यात राहतील.'

'जिवाला जपू लागलात, तर!' जिजाबाई हसल्या.

'नाही, मासाहेब! यापुढं आम्हांला गाफील राहून चालायचं नाही. वारेमोल जीव टाकायला आम्ही मोकळे नाही. श्रींचं राज्य ह्या भूमीवर अवतरेपर्यंत गाफील राहणं आम्हांला परवडायचं नाही.'

सूर्यास्त होण्याआधीच सायंकाळी तानाजी, येसाजी, सूर्याजी यांच्याबरोबर राजे गडावरून फिरून आले. वाड्याच्या प्रथम दरवाज्यात जिजाबाई उभ्या होत्या. बाळाजी शेजारी उभे होते. जिजाबाई थकल्या होत्या. मान हलत होती, तरी त्या ताठ उभ्या होत्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वाड्याच्या दरवाज्याशी जिजाबाईंना पाहून राजांना आश्चर्य वाटले. जिजाबाईंनी ते जाणले.

‘राजे, या बाळाजीला वाड्यासमोर देवडी बांधून घ्यायला सांगत होते. आलेल्या माणसाला एकदम सदरेवर यावं लागतं. तुमच्या समोर अवघडतात बिचारी.’

‘आमच्या ते ध्यानी आलं नाही.’

येसाजी, तानाजी यांच्याकडे पाहत जिजाबाईंनी विचारले,

‘गुप्त बोलणी झाली?’

गडबडीने राजे म्हणाले, ‘गुप्त बोलणी कसली? आता सारा उघडा मामला. कोणत्या किल्ल्यापासून सुरुवात करावी, याचा आम्ही विचार करीत होतो.’

जिजाबाई राजांच्याजवळ आल्या. त्या म्हणाल्या, ‘चला.’

जिजाबाईंच्या पाठोपाठ सारे जात होते. जिजाबाई वाड्याच्या दक्षिणेला उभ्या होत्या. समोर पाहत हात करीत त्या म्हणाल्या,

‘तो पाहा.’

साऱ्यांची नजर वळली. कोंढाणा दिसत होता. जिजाबाईंचे शब्द कानांवर आले,

‘रोज सकाळी तो कोंढाणा आमच्या डोळ्यांत सलतो. आमच्या नजीकचा एवढा महत्त्वाचा गड शत्रूहाती असलेला पाहून वाईट वाटतं.’

‘महाराज, मासाहेबांच्या तोंडानं जगदंबा बोलली! कौल मिळाला!’ तानाजी म्हणाला.

राजे विचारात पडले. मोगलाईने अत्यंत जागरूकतेने राखलेले दोनच गड- एक पुरंधर आणि दुसरा कोंढाणा. कोंढाण्यावर उदयभानु होता. जातीचा रजपूत. कडवा किल्लेदार. दोन हजार राजपुतांच्या कडव्या पहाऱ्यात कोंढाणा जपला जात होता. गडही तसा सोपा नव्हता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कसला विचार करता, राजे?’ जिजाबाईंनी विचारले.

‘मासाहेब, कोंढाणा भारी मजबूत गड. तो घेणं इतकं सोपं नाही. कदाचित...’

‘मग त्याचा विचार करू नका.’ जिजाबाईंनी सांगितले. ‘हा पुढं घेता येईल.’

‘नाही, मासाहेब! अशा गडांना भिऊन बादशहाला थप्पड मारणं जमायचं न्हाई.’ तानाजी बोलून गेला. ‘आमच्या आधी कोंडाणा निपजला असंल, म्हणून आमाला तो भारी न्हाई. ठरली गोष्ट ठरून गेली!’

‘पण जबाबदारी फार मोठी! अपयश आम्हांला चालणार नाही.’ राजे बोलले.

तानाजी, येसाजी राजांच्याकडे पाहत होते. तानाजी एकदम पुढे झाला आणि त्याने राजांचे पाय शिवले. राजे दचकून म्हणाले,

‘तानाजी, हे काय?’

‘महाराज! लहानपणापासून हे पाय जोडले! आजवर मी काय बी मागितलं न्हाई. आज एक मागणं हाय!’ तानाजी म्हणाला.

राजांनी तानाजीला जवळ घेतले. सद्गदित आवाजात ते म्हणाले,

‘तानाजी! माग, राजा! ह्या शिवाजीजवळ तुझ्यापेक्षा मोलाची चीज कोणती नाही.’

‘राजे! हा कोंढाणा मला द्या!’

‘तानाजी!’ राजे ओरडले.

‘वचनाला बट्टा लावू नका, राजे! कोंढाणा घ्यायचं काम माझं. अपयश आलं, तर तोंड दाखवणार नाही.’

‘तानाजी...’ राजांना बोलवेना.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे तानाजीसह वाड्यात आले.

दुसऱ्या दिवशी राजांनी तानाजीला विडा दिला, वस्त्रे दिली.

तानाजी सूर्याजीसह कामगिरीवर निघाला. त्याने जिजाबाईंचे पाय शिवले. जिजाबाई म्हणाल्या,

'तानाजी, संभाळून...'

'काळजी करू नका, मासाहेब!... राजे, नवमीच्या रात्री झोपू नका. गडावर नजर ठेवा. नवमीला खुणेची गंजी पेटलेली दिसेल तुम्हांला...'

त्या विश्वासाने राजांची छाती रुंदावली. तानाजीच्या पाठीवर हात ठेवीत राजे म्हणाले,

'तानाजी! मी जागा राहीन. जाळ दिसताच आम्ही जातीनिशी कोंढाण्यावर तुझ्या भेटीला येऊ.'

'राजे, गडाच्या दाराजवळ मी तुमची वाट पाहतो.'

तानाजीने मुजरा केला. रुंदाड छातीचा, पिळदार अंगलटीचा तानाजी राजांच्या समोर उभा होता. त्याची मराठेशाही पगडी, ओठावरच्या गलमिशा, चेहऱ्यावरचे राकट हास्य राजे निरखीत होते. क्षणभर दोघांची नजर एकमेकांना भिडली; आणि तानाजी वळला. दरवाज्याबाहेर जाईपर्यंत राजे त्याच्याकडे पाहत होते.

चार दिवस उलटले. तानाजीने रोहिडखोऱ्यातील मावळे गोळा केल्याची बातमी आली. कोंढाणा तानाजीला परिचित होता. तरीही राजांच्या नजरेसमोरून कोंढाणा हलत नव्हता. ते काळे कभिन्न ताशीव कडे, राजांनीच बनविलेली भक्कम तटबंदी, उदयभानूसारख्या कडव्या राजपुताचा जागता पहारा. राजांना काही सुचत नव्हते. त्यांचे मन पुरे बेचैन बनले होते. सज्जात उभे राहून ते कोंढाणा पाहत होते. देवघरातील पूजा वाढत होती.

नवमीचा दिवस उजाडला. फडात राजांनी सर्व आज्ञा दिल्या. मुंगीच्या पावलांनी दिवस सरत होता. सूर्यास्ताला राजे सूर्यवंदन करून आले. रात्र वाढत होती. राजे आपल्या महाली

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बसले होते. राहून-राहून ते सज्जात जात होते. आकाशात नक्षत्रे चमकत होती. पण ज्या ताऱ्याची राजे वाट पाहत होते, त्याची दिशा मोकळीच होती.

रात्रीच्या वेळी मासाहेब महालात आल्याचे पाहून राजांना आश्चर्य वाटले. त्यांच्या बरोबर मनोहारी, पुतळाबाई होत्या. मनोहारीने काही न बोलता समयांच्या वाती प्रज्वलित केल्या. राजांनी विचारले,

'मासाहेब, झोपला नाही?'

'झोपच येईना.'

पुतळाबाईंच्याकडे वळून राजांनी विचारले,

'आणि थोरल्या राणीसाहेब?'

'अवघडलीय् ती. मीच 'झोप' म्हणून सांगितलं.' जिजाबाईंनी उत्तर दिले.

जिजाबाई बैठकीवर बसल्या. बाजूला पुतळाबाई, मनोहारी बैठकीखाली बसल्या. राजे मात्र येरझाऱ्या घालीत होते. कोणी काही बोलत नव्हते. गडावरच्या पहाऱ्यांची जाग मात्र अधूनमधून ऐकू येत होती. प्रहराचे तास वाजत होते. मध्यरात्र टळली, तसे राजे म्हणाले,

'मासाहेब, आपण झोपा. बातमी आली, म्हणजे उठवीन. तानाजी कोंढाण्याशी परिचित आहे. तो अपयश घेणार नाही.'

'अरे, सोन्यासारखी माणसं जीव गुंतवून राहिलीत. झोप येईल कशी?'

राजे परत सज्जात जाऊन उभे राहिले. बराच वेळ राजे उभे होते. कंटाळून राजे वळणार, तोच त्यांची दृष्टी अंधारावर खिळली. एक तारा मोठा होत होता. राजांची खात्री पटली. ते ओरडले,

'मासाहेब, गड घेतला! फत्ते झाली!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या खांद्यावर जिजाबाईंची बोटे विसावली. मागे मनोहारी, पुतळाबाई उभ्या होत्या. राजे बोटाने दिशा दाखवीत होते. जिन्यावर पावले वाजली. मोरोपंत आत आले. आनंदाने म्हणाले,

'महाराज, कोंढाणा सर झाला!'

'तेच आम्ही मासाहेबांना दाखवीत होतो. इतकं सुरेख नक्षत्र आकाशात कधी उगवलं नसेल, उगवणार नाही. मोरोपंत, तानाजीनं शब्द पाळला. आता आम्ही आपला शब्द पाळू. घोडी तयार ठेवा.'

'ती आज्ञा करूनच इकडे आलो.'

'आम्ही आलोच!' राजे वळले.

'आत्ता जाणार?' जिजाबाईंनी विचारले.

'हो, मासाहेब! तानाजीला भेटण्यासाठी आमचा जीव उतावीळ झाला आहे. गडाच्या दाराशी तो आमची वाट पाहत असेल.'

राजे वाड्याबाहेर आले, तेव्हा पेटलेल्या मशालींच्या उजेडात घोडी उभी होती. गडाखाली अश्वदळ सज्ज होते. राजे गड उतरून स्वार झाले. राजांच्या पाठोपाठ अश्वदळ जात होते. समोर मशाली फरफरत होत्या. घोड्यांच्या टापांचा आवाज घुमत होता.

सूर्योदयाच्या सुमारास राजे गडावर पोहोचले. गडाच्या मेट्यावर मावळ्यांचे पहारे होते. राजांना पाहताच मुजरे झडत; पण सारे खालच्या मानेने. राजे पुणे दरवाज्यातून वर गेले. कुणाच्याच चेहऱ्यावर आनंद दिसत नव्हता. उलट, सारे चेहरे काळवंडून गेले होते. सगळीकडे कशी भयाण शांतता पसरली होती.

राजे गडावर आले. कुणाला काही विचारायचे धाडस होत नव्हते. गडावर एके ठिकाणी गर्दी जमली होती. राजांची पावले तिकडे वळली. राजांना पाहताच प्रत्येकाच्या डोळ्यांतून अश्रू ठिबकले. राजांच्या मनाचा थारा उडाला. राजांना वाट दिली गेली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांची पावले जागच्या-जागी खिळली. मोकळ्या जागेत सूर्याजी अश्रू ढाळीत बसला होता. त्याच्या समोर निळा शेला पसरला होता. राजांनी तो शेला त्याच क्षणी ओळखला. तानाजीला विडा देताना तो शेला राजांनी दिला होता. राजांचा डावा हात छातीवर गेला. उभ्या जागी त्यांचा कंठ दाटून आला. राजे उद्गारले,

‘आई भवानीऽऽ’

बधिर पावलांनी राजे चालत होते. थरथरत्या हातांनी राजांनी शेला सरकावला. तानाजी शांतपणे झोपला होता. नेत्र मिटले होते. गालावरच्या जखमेचे ओहळ कानावर ओघळले होते. कुठेही व्यथेचा लवलेश दिसत नव्हता. कुणाच्याही दुःखाचे भान तानाजीला राहिले नव्हते. राजे पाहत होते...

राजांचा तानाजी! स्वराज्याच्या स्थापनेपासूनचा सोबती! अफझलच्या प्रसंगातला पराक्रमी... किती आठवायचं! क्षणभर राजांनी आपल्या डोळ्यांसमोर हात धरला. दीर्घ निःश्वास सोडला. परत राजांना हुंदका फुटला. राजे म्हणाले,

‘तानाजी! काय केलंस हे? आजवर कधी खोटं बोलला नाहीस. ते धाडस आजच का केलंस? अरे, तू वचन दिलं होतंस ना? आमच्या स्वागताला गडाच्या दरवाज्याशी उभा राहणार होतास ना?’

राजांनी मोठ्या कष्टाने अश्रू आवरले. त्यांचं लक्ष सूर्याजीकडे वळले. राजांनी विचारले,

‘काय झालं?’

जोत्याजी गहिवरल्या आवाजात बोलत होता. शब्द अडखळत होते...

‘...महाराज! रात चढल्यावर सुभेदारांनी गडाला माळा लावल्या. गडावर तीनशे माणूस गेलं असेल, नसेल, तोच दैवानं दावा साधला. गडाला जाग आली. गनीम सावध झाला. हिलाल, चंद्रज्योती लावून हजार-बाराशे माणूस चालून गेलं. सुभेदारांनी ‘हर हर ऽ महादेव’ची गर्जना केली; आणि मावळ्यांसह ते चालून गेले. एकच कापाकापी सुरू झाली. तानाजीरावांनी उदयभानूला गाठलं. दोघंबी बळकट. वार करीत चालले. पण सुभेदारांच्या नशिबाचं बळ तुटलं होतं. उदयभानूच्या तडाख्यानं त्यांची ढाल तुटली. डाव्या हातावर वार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झेलीत तानाजी उदयभानूला भिडले; आणि काय होतंय्, हे कळायच्या आत दोघेही जमिनीवर कोसळले!’

‘आणि?’ गद्गदलेल्या स्वरात राजांनी विचारले.

‘सुभेदार पडले, तशी साऱ्यांची हिंमत तुटली. सारे कड्याकडे धावू लागले.’ सूर्याजीकडे बोट दाखवून जोत्याजी म्हणाला, ‘पळणारे मावळे पाहून सूर्याजीरावांनी हिंमत बांधली. फिरंग हाती घेऊन ते धावत गेले. गडाचे दोर कचाकच कापले; आणि ते ओरडले,

‘ ‘तिथं तुमचा बाप पडला, आणि पळता कुठं?’

‘पळणारे मावळे वळले. लढाईचा रंग पालटला. राजपूत पळू लागले. अनेकांनी कड्यावरून उड्या घेतल्या. गड काबीज झाला!’

राजांची नजर सूर्याजीकडे वळली. त्याच्या अश्रूंना खळ नव्हता. राजांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. त्या स्पर्शाने सूर्याजीचे मन फुटले!

‘महाराज! काय झालं हेऽऽ’

आपले अश्रू कष्टाने आवरीत राजे म्हणाले, ‘रडू नको, सूर्याजी! ही घडी रडण्याची नाही. आज खऱ्या अर्थानं तानाजीनं सिंहगडचं नाव भूषविलं. यापुढं तेच नाव कायम राहील. ऊठ, सूर्याजीऽऽ’

राजांनी त्याच्या दंडाला हात घातला. त्याला बळेच उठवीत राजे म्हणाले,

‘सूर्याजी, तानाजीच्या मरणाचा हेवा करावा, असं मरण त्यानं गाठलं. एक काम बाकी आहे. त्याखेरीज त्याला शांती लाभायची नाही.’

रडणाऱ्या सूर्याजीला घेऊन राजे भरभर जात होते. नगारखान्याजवळ ते आले. सूर्याजीसह भरभर पायऱ्या चढून ते गेले. गडावर अद्याप हिरवे निशाण फडकत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बघतोस काय? सूर्याजी, भावाचं स्मरण करून उतरव ते निशाण!’

सूर्याजीने डोळे टिपले, निशाण उतरविले. राजांनी आपल्या अंगरख्यात खोवलेला भगवा ध्वज बाहेर काढला.

‘सूर्याजी, मिर्झाराजांना गड खाली करून देताना आमचा हा पवित्र ध्वज आम्ही आमच्या हातांनी उतरविला होता. जीवमोलानं आम्ही हा जतन करून ठेवला होता. राजगडावरून जेव्हा जाळ दिसला, तेव्हाच आम्ही ठरवलं होतं... तानाजीच्या हातानं हा ध्वज आम्ही चढवणार होतो. ते काम तू कर. तो मान तुझाच आहे.’

उगवत्या सूर्यकिरणांत भगवा ध्वज फडकू लागला. क्षणभर राजांची छाती रुंदावली. मागून आलेल्या येसाजीला राजे म्हणाले,

‘येसाजी, राजगडला निरोप पाठवा. मासाहेबांना कळवा- आम्ही एक गड घेतला, पण एक बुलंद गड गमावला!’

❑

१६

सिंहगडाची व्यवस्था लावून राजे परत आले. सिंहगडचा कबजा म्हणजे मोगलाईची काढलेली प्रत्यक्ष कळ. राजांनी नागाच्या शेपटीवर पाय दिला होता. आता राजांना थांबणे शक्य नव्हते. तानाजीचे दुःख गिळून त्यांनी पुढचे बेत आखले. वऱ्हाडात शिरलेल्या फौजांचा विक्रम राजांना कळत होता.

जिजाबाईंना तानाजीचे दुःख अपार झाले. राजांच्या बरोबरच तानाजी डोळ्यांसमोर वाढलेला. पण त्यांनाही शोक करायला उसंत नव्हती. सोयराबाईंचे दिवस भरत आले होते. त्यांची तब्येत नाजूक बनली होती. वाड्यावर थोडी काळजी पसरली होती.

राजे एकटेच महालात बसले होते. रात्र सरली, तरी काही बातमी येत नव्हती. राजे बेचैन बनले होते. जिन्यावर पावले वाजली. राजांचे लक्ष तिकडे वळले. पावले सावकाश वाजत होती. राजे अधीर झाले. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कोण आहे?’

त्याच वेळी दाराशी पुतळाबाई आलेल्या दिसल्या. पुतळाबाई थकल्या होत्या. त्या चेहऱ्यावरचा घाम टिपीत होत्या. पण त्यांच्या चेहऱ्यावरून समाधान ओसंडत होते. त्या हसून म्हणाल्या,

‘मुलगा झाला!’

राजांना बरं वाटलं. मनावरचं ओझं उतरलं. पुतळाबाई सांगत होत्या.

‘फार त्रास झाला; पण राणीसाहेबांची सुखरूपपणे सुटका झाली.’

‘आमची निराशा केलीत.’ राजे म्हणाले.

पुतळाबाईंना काही समजेना. राजे हसून बैठकीवरच्या थैलीकडे बोट दाखवीत म्हणाले,

‘पाहा ना! ही आनंदाची बातमी घेऊन येईल, त्याला आम्ही ही मोहरांची थैली देणार होतो...’

‘मग मला द्या ना!’ पुतळाबाई थैलीकडे सरकत म्हणाल्या.

राजांनी थैली उचलली. ते म्हणाले,

‘राणीसाहेब, मोहरांची थैली देण्याइतक्या सामान्य तुम्ही नाही. तुमची खुशाली फार मोठी आहे.’

‘कसली?’ पुतळाबाईंनी विचारले.

‘आम्ही स्वत:!’ राजे हसून म्हणाले.

पुतळाबाई एकदम गंभीर झाल्या. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘खरं नाही वाटत?’

‘तुमचा शब्द खोटा नसतो, हे मला ठाऊक आहे. पण एवढं मोठं देणं सोसायचं नाही.’

राजे एकदम भारावले. आपली नजर खाली वळवीत ते म्हणाले,

‘असं म्हणू नको, पुतळा! तुझ्याशिवाय असं स्वीकारणारं दुसरं कोणी आम्हांस दिसत नाही.’

उभ्या जागी पुतळाबाईंचे अंग मोहरून गेले. त्याच वेळी मनोहारीने आत प्रवेश केला. पुतळाबाईंना पाहताच ती थबकली. राजांनी हाक मारली,

‘कोण, मनू? बातमी सांगायला आली होतीस ना? पण आम्हांला ती आधीच कळली.’

मनोहारीला आपले भाव लपविता आले नाहीत. पुतळाबाई मनोहारीकडे पाहत हसल्या, म्हणाल्या,

‘मनू, नशीबवान आहेस तू! ज्याचं देणं त्यालाच मिळायचं.’

राजांनी मनोहारीला बोलविले; आणि तिला थैली दिली. मनोहारीने दोघांना नमस्कार केला. पुतळाबाईंना नमस्कार करीत असता पुतळाबाई म्हणाल्या,

‘ज्यानं बातमी सांगितली, त्याला काहीच मिळालं नाही, बघ.’

‘हे खोटं हं, मनू!’ राजे बोलून गेले.

पुतळाबाई एकदम लाजल्या. मनोहारी काही न समजता महालाबाहेर गेली. पुतळाबाई रागाने म्हणाल्या,

‘काय समजेल ती?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे मोठ्याने हसले.

सायंकाळी राजे सोयराबाईंच्या महाली गेले. जिजाबाई बाळाला घेऊन बसल्या होत्या. राजांनी मुलाला पाहिले; सतका केला. राजे सोयराबाईंना भेटले. बसलेल्या जिजाबाईंना राजांनी विचारले,

‘बाहेर शास्त्री का बसलेत?’

मुलाकडे बोट दाखवीत जिजाबाई म्हणाल्या,

‘राजे, हा पालथा जन्माला आला!’

‘मग त्यात चिंता कसली?’ राजे हसून म्हणाले, ‘हा दिल्लीची पातशाही पालथी घालील. पालथं राज्यही सावरील. पालथं झाल्याखेरीज काही वेचता येत नाही, मासाहेब!’

राजांच्या बोलांनी साऱ्यांची मने आनंदित झाली. राजे बाहेर आले. शास्त्र्यांना राजे म्हणाले,

‘शास्त्रीबुवा, वेळ चांगली आहे ना?’

‘चिंता नसावी, महाराज! आपल्यापेक्षाही उदंड कीर्ती संपादन करतील.’

राजे आनंदाने सदरेवर आले. त्यानंतर दोन-चार दिवसांतच राजांनी निळोपंत मुजुमदारांना पुरंधर घेण्यासाठी पाठविले.

राजगडावर मोठ्या थाटात बारसे साजरे झाले. अनेक दाने झाली. मुलाचे नाव ‘राजाराम’ ठेवण्यात आले. वाद्यांचा गजर झाला.

बारशाच्या दुसऱ्याच दिवशी गडावर पुरंधर घेतल्याची बातमी आली. विजयाची नौबत झडली. निळोपंतांनी पुरंधर काबीज केला व मोगली किल्लेदार शेख रझिउद्दीनला अटक करून राजगडावर पाठविला. बारशाच्या आनंदप्रसंगी विजयाच्या वार्तेबरोबर आलेल्या कैदी किल्लेदाराला राजांनी मानाने सोडून दिले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मृत्यूच्या तयारीने आलेला रझिउद्दीन राजांच्या औदार्याची तारीफ करीत गडाखाली उतरला.

□

१७

सकाळच्या वेळी सोयराबाईंच्या महालात सारे गोळा झाले होते. बाल राजारामाची आंघोळ झाली होती. नुकत्याच शेकलेल्या केसांमुळे उदाचा वास खोलीत रेंगाळत होता. दिवसाचा खोलीत उजेड कमी असल्याने खोलीच्या चारी कोपऱ्यांत समया अखंडपणे तेवत होत्या. जिजाबाईंच्या शेजारी बसलेल्या येसूबाईंच्या मांडीवर रामराजे होते. नुकतीच आंघोळ झाल्याने बाळराजांचे डोळे झोपेच्या गुंगीत होते; मुठी वळत होत्या.

खोलीत असलेल्या संभाजीराजांनी सर्वांवरून नजर फिरविली. जिजाबाई म्हणाल्या,

‘बाळराजे, शास्त्रीबुवांनी लौकर सोडलं, वाटतं?’

‘लौकर कुठले सोडतात? खूप वेळ झाला.’ येसूबाईंच्याकडे बोट दाखवीत संभाजीराजे म्हणाले, ‘आणि ह्यांनी तर आज फाटाच दिला!’

सारे हसले. जिजाबाई म्हणाल्या,

‘अरे, ती पोरीची जात. जरा कमी शिकली, म्हणून बिघडत नाही.’

संभाजीराजे जिजाबाईंच्याजवळ बसले. काशीबाईंनी येसूबाईंच्या मांडीवर झोपलेल्या राजारामांना काजळाची तीट लावली; आपल्या भांगात ते बोट पुसले. हे पाहणाऱ्या बाळराजांनी विचारले,

‘मासाहेब, छोटे राजे एवढे सुरेख असताना काजळ का लावतात, हो?’

‘तुम्हांला नाही का तीट लावीत? नजर लागू नये, दृष्ट लागू नये, म्हणून तीट लावतात.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बाळराजे एकदम जिजाबाईंच्या कानाशी लागले. जिजाबाई हसत म्हणाल्या,

‘घ्या ना! तुम्ही दादाच आहात- पुतळा! राजारामला जरा ह्यांच्या मांडीवर दे.’

पुतळाबाई हसत पुढे आल्या. बाळराजे मांडी घालून बसले होते. त्यांनी मांडीवरचा अंगरखा नीट केला. पुतळाबाईंनी अलगद राजारामांना उचलले, आणि बाळराजांच्या मांडीवर ठेवले. पुतळाबाई म्हणाल्या,

‘बाळराजे! जरा मांडी उचला... हां! नाही तर बाळाची मान अवघडेल.’

बाळराजे राजारामाकडे पाहत होते. किलकिल्या नजरेने राजाराम पाहत होते, मिटक्या मारीत होते. आपल्या मांडीवरून बाळाला उचलून घेतल्यामुळे येसूबाई रागावल्या होत्या; पण राग न दाखवता त्या बाळाकडे पाहत होत्या. जिजाबाईंनी बाळराजांना विचारले,

‘राजे सदरेवर आले?’

‘केव्हाच! ते आले, म्हणून तर शास्त्रीबुवांच्याकडून आमची सुटका झाली.’

पुतळाबाई हसल्या. म्हणाल्या,

‘शिकार म्हटली, की कसे कान टवकारतात! आणि शिकायचं झालं, की झाली रड सुरू!’

‘बघा, मासाहेब! आम्ही कधी असं केलंय् का?’ बाळराजे कुरकुरले.

‘गप बसा, ग!’ जिजाबाई संभाजीच्या पाठीवरून हात फिरवीत पुतळाबाई म्हणाल्या, ‘तुमचेच लाड आहेत हे. परवा खोटंच बाळराजांचं डोकं दुखतं, म्हणून सांगितलं, आणि...

‘आईसाहेब, उचला...’ बाळराजे ओरडले.

बाळराजांचे हात उंचावले होते, चेहरा रडवा झाला होता. पुतळाबाईंच्याकडे ते पाहत होते. सगळ्यांच्या हसण्याने खोली भरून गेली होती. पलंगावर झोपलेल्या सोयराबाईंनाही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हसू आवरणं कठीण जात होतं. बाळराजे ओरडले,

‘उचला ना!’

पुतळाबाई पुढे आल्या. त्यांनी अलगद राजारामाला उचलले. त्याचा मुका घेत त्या म्हणाल्या,

‘दादामहाराजांना भिजवलंत ना?’

बाळराजे उठले हाते. भिजलेला अंगरखा बघत होते. जिजाबाई म्हणाल्या,

‘एवढं वाकडं तोंड करायला काय झालं? लहानपणी तुम्ही हेच करीत होता.’

तिकडे लक्ष न देता बाळराजे मनोहारीला म्हणाले,

‘आम्हांला दुसरा अंगरखा द्या.’

‘बदलायला कशाला हवा?’ पुतळाबाईंनी सांगितले. ‘वाळेल आपोआप. वास येत नाही त्याला.’

परत हसणे उसळले. बाळराजे परत ओरडले.

‘मनू, दे, बाई, त्याला अंगरखा!’

बाळराजे अंगरखा झटकीत बाहेर जायला वळले, तोच नौबतीचा गंभीर नाद कानांवर आला.

‘नौबत कसली वाजली?’ बाळराजांनी विचारले.

‘अरे, कुठल्या तरी विजयाची बातमी आली असेल.’ जिजाबाई म्हणाल्या.

बाळराजे मनोहारीबरोबर बाहेर गेले. बाळराजांना अंगरखा देऊन मनोहारी परत आली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तेव्हा खोलीच्या दाराशी राजांची गाठ पडली. मनोहारी खोलीत आली. ती मासाहेबांना म्हणाली,

‘बाहेर महाराज... ‘येऊ का’ विचारतात.’

‘या, म्हणावं.’

राजे आत आले. जिजाबाईंना म्हणाले,

‘मासाहेब, आमच्या फौजेनं वऱ्हाडात थोर पराक्रम केला.’

‘नौबत झडली, तेव्हाच विजय कळला. फक्त नाव कळायचं होतं.’

झोपलेल्या राजारामाकडे पाहून राजे हसले. म्हणाले,

‘मासाहेब, हा पालथा जन्मला, म्हणून काळजी वाटत होती ना? पाहिलात याचा पायगुण? हे आले, आणि आम्हांला विजय मिळू लागले. यापुढं नौबतीला उसंत मिळणार नाही.’

□

१८

राजांच्या अनेक तुकड्या मोगलाईत धुमाकूळ घालीत होत्या. अनेक सरदारांवर किल्ले काबीज करण्याची जबाबदारी पडली होती. खुद्द राजे आपली फौज घेऊन गडाबाहेर पडले. माहुलीगडावर त्यांनी नजर वळविली. पुरंधरच्या तहात तो राजांना मोगलांना द्यावा लागला होता. माहुलीवर मनोहरदास गौर नावाचा राजपूत किल्लेदार होता. किल्लेदार मोठा जागरूक आणि कडवा होता. राजांनी भर रात्री हल्ला केला. पण जागरूक किल्लेदाराने तेवढ्याच निष्ठेने मराठी सैन्यावर हल्ला केला. अकस्मात झालेल्या हल्ल्याने राजांच्या फौजेला सावरता आले नाही. राजांना माघार घ्यावी लागली. पराजयापेक्षाही हजार माणूस हकनाक हरवले, याचे राजांना फार दु:ख झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

माहुलीच्या पराजयाचे खचून न जाता राजांनी कल्याण-भिवंडीवर चाल केली. शास्ताखानापासून मोगलांच्या कबज्यात गेलेली कल्याण-भिवंडी राजांच्या झडपेने जागी झाली. मोगली अधिकारी आपल्या फौजेनिशी प्रतिकाराला उभे ठाकले. पण राजांच्या फौजेपुढे त्यांचे काही चालले नाही. मराठ्यांनी थोर पराक्रम केला. उझबेगखान ठार झाला. लोधीखान पळून गेला. कल्याण-भिवंडी काबीज झाली.

राजांची फौज चांदवडकडे वळली. चांदवड साफ लुटले गेले. कल्याण-चांदवडची बातमी ऐकून नांदेडचा फौजदार फत्तेजंगखान पळून गेला. मोगलाईत रणचंडी अवतरली होती. नगर-जुन्नरपासून परिंड्यापर्यंत राजांच्या फौजा बेलगाम उधळत होत्या. कर्नाळा हस्तगत झाला होता.

मोगली पराभवाच्या वार्ता मोगल सरदार दाऊदखान कुरेशीच्या कानांवर गेल्या. दाऊदखान राजनिष्ठ होता. खुद्द शहाजादा मुअज्जम आणि दिलेरखान यांसारखे मोगली सलतनीचे पाठीराखे मोगलाईची वाताहत उघड्या डोळ्यांनी पाहत होते; पण दाऊदखानाला हे पाहवेना. खानदेशातून फौज घेऊन तो जुन्नर भागात यायला निघाला. दाऊदखान येत आहे, हे कळताच मराठी फौजा पारनेर, जुन्नर, माहुली या भागांतून हटल्या; आणि जेथून दाऊदखान आला, त्या नगर भागात घुसल्या. उन्हाळ्याच्या सुरुवातीला राजांच्या फौजेने अहमदनगर, जुन्नर, परिंडा या प्रांतांतील एक्कावन गावे लुटली.

माहुलीच्या किल्लेदाराने राजांचा पराभव करताच आज ना उद्या मराठ्यांची धाड येईल, हे ओळखून बादशहाकडे जादा मदत मागितली; पण त्याच्या मागणीकडे कोणी लक्ष दिले. तेव्हा राजांच्या हल्ल्याच्या भीतीने तो किल्ला सोडून निघून गेला. त्याच्या जागी अलावर्दी बेग किल्लेदार बनला. गड पहिल्या हल्ल्यात कमकुवत बनलेला; किल्लेदाराचा बदल झालेला. राजांना हे समजताच राजांनी माहुलीवर चाल केली. पहिल्या पराजयाने चिडलेली फौज माहुलीवर तुटून पडली. मोठ्या शर्थीने राजांनी माहुलीगड जिंकला. किल्लेदार अलावर्दी बेग व त्याचे दोनशे साथीदार राजांनी कापून काढले. माहुलीवर भगवा ध्वज फडकू लागला.

राजे गडावर समाधानाने परतले होते. माहुली, कर्नाळा यांसारखे गड भर पावसाळ्यात, शत्रूच्या डोळ्यांदेखत राजांनी काबीज केले होते. महिन्याच्या अवधीत राजांनी कोंढाणा, पुरंधर, कल्याण, लोहगड, हिंदोळा, माहुली, अर्नाळा, रोहिडा यांसारखे गड आपल्या कबज्यात आणले होते. वऱ्हाड-खानदेशाची लक्षावधी होनांची संपदा घरी आली होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे गडावर आले. अमाप संपत्ती घरी येत होती. नवीन मुलूख जोडला जात होता. राज्य भराभर वाढीला लागले होते. नवे मिळणे हे जितके महत्त्वाचे, तितकेच मिळालेले राखणे हेही महत्त्वाचे आहे, हे राजांनी ओळखले होते. जिंकलेल्या किल्ल्यांवर ठेवायला राजांनी आपली निवडक माणसे शोधली. प्रत्येक गड दारूगोळा भरून सुरक्षित केला. अफझलखानाचा पराभव केल्यानंतर राजांनी पन्हाळ्यापर्यंतचा मुलूख बघता-बघता काबीज केला होता; पण आदिलशाहीची आणि मोगलाईची आच लागताच तोच मुलूख राजांना गमवावा लागला. हा अनुभव राजे विसरले नाहीत. सर्व मुलूख त्यांनी जागता ठेवला.

पावसाच्या धारा गडावर ओतत होत्या. धुक्याने गड वेढला जात होता. पण त्याचीही राजांनी पर्वा बाळगली नाही. कोकण, मावळ राजांच्या हाती आले होते. राजांनी मोरोपंतांना जुन्नर-शिवनेरींवर रवाना केले. अनाजीपंत, प्रतापराव, आनंदराव यांनाही मोगलाईवर रवाना केले.

कारभार वाढत होता. फडाची जबाबदारी गुंतागुंतीची होत होती. तो कारभार पाहण्यास कोणी तरी आवश्यक होते. राजांनी नजर निळोपंतांच्यावर खिळली. निळोपंतांचे वय झाले असले, तरी म्हातारा खारकेसारखा होता. त्यांनीच पुरंधर परत स्वराज्याच्या माळेत जोडला होता. निळोपंतांना लढाई व राजकारण दोन्ही कळत होते. असाच माणूस मुजुमदारीला हवा होता. राजे निळोपंतांना म्हणाले,

‘निळोपंत, तुम्ही माहोलीपासून भीमगडपावेतो व इंदापूर, चाकण कदीम या वतनीचा कारभार करावा.’

निळोपंत म्हातारे झाले होते, तरी तलवारीच्या मुठीची त्यांची पकड ढिली झाली नव्हती. राजांची आज्ञा ऐकून ते नाराज झाले. निळोजीपंतांनी राजांना विनंती केली.

‘राजे, हे काम दुसऱ्या कुणाला तरी सांगावं. आपणांबरोबर येऊन दहा लोकांबरोबर काम करावं, आज्ञा केलीत, तर गड घ्यावे, असं अजून वाटतं.’

राजे पंतांचे हात धरून म्हणाले, ‘पंत, तुम्हांला काय म्हणायचं आहे, ते आम्ही जाणतो. या कामाचं वाईट वाटून घेऊ नका. स्वराज्यात सारेच शिलेदार झाले, तर कारभार कुणी पाहावा? तुम्ही वतनावर राहून कारभार पाहा. हेही काम मोठं आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचा कल पाहून पंतांनी ते मान्य केले. ते म्हणाले,

‘आपल्याला हे काम थोर वाटतं, तर ते करीन. एकानं सिद्धसंरक्षण करावं, एकानं साध्य करावं. दोन्ही कामं साहेब बराबरी मानितात.’

‘अलबत!’

‘मग एक अर्ज आहे. मुजुमदारी करीत असता वसुलाची टक्केवारी मला नको. मोरोपंत पेशवे आहेत. त्यांना पंचवीस मिळाले, तर मला वीस मिळावेत.’

राजांनी निळोपंतांचे शल्य जाणले. त्यांनी त्यांची विनंती आनंदाने मान्य केली.

रात्री राजे जिजाबाईंना म्हणाले, ‘मासाहेब, आम्ही थोडे दिवस रायगडला जाऊन येतो.’

‘राजे, अद्याप पाऊस संपला नाही. सारं करीत असता तब्येतीकडे पण जरा लक्ष द्या आणि एवढ्या तातडीनं रायगडला बरं?’

‘मासाहेब, मागे एकदा आम्ही बोललो होतो... आता राज्याचा पसारा वाढतो आहे. तो आता कमी व्हायचा नाही. राजधानीसाठी सुरक्षित जागा आम्हांला हवी.’

‘राजगड काय वाईट आहे?’

‘मासाहेब, आज ना उद्या मोगली सत्तेला आम्हांला टक्कर द्यावी लागेल. पुण्यानजीक असलेला हा राजगड तेवढा सुरक्षित नाही. सह्याद्रीच्या कपारींनी कोट करून राखलेला महाड आमच्या नजरेत आला. महाडमुळं आमची सत्ता पश्चिम समुद्राच्या किनाऱ्याला भिडली. महाड जसं व्यापारी केंद्र आहे, तसंच सुरेख बंदरही आहे. पण आम्ही विचार केला सिद्दीचा. ती राजधानी केली, तर सिद्दीला उपद्रव देणं सोपं जाईल. त्याचसाठी आम्ही रायगड किल्ला निवडला आहे. रायगड अस्मानाला भिडला आहे. सर्व सोयींनी सज्ज झाला, की कैलास भासेल, अशी ती जागा आहे. पाहाल, तेव्हा थक्क व्हाल.’

जिजाबाई हसल्या; म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बाबा रे! मी म्हातारी. आताशा राजगडची ही हवा मानवत नाही. त्या तुझ्या कैलासानं कसा टिकावं लागेल माझा?’

राजे म्हणाले, ‘त्याची चिंता करू नका. रायगडच्या पायथ्याशी पाचाडात मुद्दाम आपल्याकरिता वाडा बांधला आहे. आपल्याला कुठंही राहता येईल.’

जिजाबाई भारावल्या. ‘आता तुम्हांला सोडून कुठं राहावं, असं वाटत नाही.’

जिजाबाईंची अनुज्ञा घेऊन राजे रायगडी रवाना झाले.

□

१९

आपल्या रक्षकांसह राजे पाचाडला आले. बरोबर सर्जेराव, बहिर्जी, महादेव ही मंडळी होती. राजांनी पाचाडचा दोन चौकी वाडा प्रथम पाहिला. भक्कम तटबंदीत वसलेला तो वाडा पाहून राजांनी समाधान व्यक्त केले. राजे आल्याचे कळताच गडावरचे आबाजी सोनदेव, रामराव प्रभू, गडावरच्या इमारतखात्याचे प्रमुख हिरोजी इटलकर हे राजांना सामोरे आले. साऱ्यांनी राजांना मेणा करण्याची विनंती केली. पण राजे म्हणाले,

‘पुढं आम्ही पालखीनंच चढण चढू; पण आज गड पायी चढण्याची इच्छा आहे. हिरोजी, तुमचं बांधकाम अधिक बारीक नजरेनं पाहता येईल. चालेल ना?’

‘महाराज, बारीक नजरेनं पाहूनही चूक दिसायची नाही. मी आज आहे, तर उद्या नाही; पण गड पिढ्यान् पिढ्यांची अमानत.’

‘शाब्बास, हिरोजी! माणसाला धमक असावी, तर अशी! ज्यांच्या ठायी विश्वास असतो, त्यांना काय अशक्य?’

राजे सकाळच्या थंड वेळी गड चढत होते. पश्चिमेच्या बाजूने गडाची वाट असल्याने ती वेळ सावलीची होती. आकाशाला भिडलेला गड पाचाडहून दिसत होता. गडाला किंचित वळसा देऊन राजे खिंडीतून वाडीवर उतरले. लहान दरवाज्यातून राजे गड चढत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होते. नाना दरवाज्यातून राजे वर आले, आणि त्यांच्या सूक्ष्म नासिकेला सुवास जाणवला. राजांनी पाहिले, तर लहान दरवाज्याच्या खाली एक चाफ्याचा हिरडा बहरला होता. राजे तसेच पुढे सरकले. काही ठिकाणी वाट सरळ खोदली होती; तर काही ठिकाणी पायऱ्या खोदल्या होत्या. कड्याच्या गर्भात लपलेल्या धान्यकोठाराची पाहणी करून राजे वाटचाल करू लागले.

दृष्टीला भोवळ यावी, असे एका बाजूला ताशीव तुटलेले कडे आणि दुसऱ्या बाजूला नीट आकाशात चढलेली दरड आणि त्यांमधून जाणारी चिंचोळी वाट राजांच्या मनाला सुखवीत होती. तोरण्याखेरीज एवढी चिंचोळी वाट राजांनी अनुभविली नव्हती.

महादरवाज्याच्या खाली राजे येऊन विसावले. सकाळच्या वेळीही त्यांचा चेहरा घामजेला होता. अंगरख्याच्या बाहीत खोवलेल्या रुमालानं घाम टिपीत राजांनी दरवाज्याची खूण दाखविणाऱ्या अर्धगोलाकार तटबंदीवर नजर टाकली. श्वास घेऊन राजांनी पायऱ्या चढायला सुरुवात केली. गडाच्या प्रथम दरवाज्यापर्यंत येईतो राजांचा ऊर भरून आला. दरवाज्याच्या खिंडीत विसावत राजे म्हणाले,

‘हिरोजी, सुरेख जागा निवडलीत. आमच्या गडाचे दरवाजे सूर्यास्ताला बंद करून घेण्याची काहीच गरज नाही. ते उघडे राहिले, तरी काही बिघडणार नाही.’

आबाजी सोनदेवांनी विचारले, ‘महाराज, कारण समजेल?’

राजे हसून म्हणाले, ‘त्यात अवघड काय? गडाच्या दरवाज्याची चढण इतकी खडी आहे, की केवढाही मातब्बर गनीम चाल करून आला, तरी गडाच्या दरवाज्याशी येईपर्यंत त्याला हातातल्या फिरंगीचा वार करण्याचं सामर्थ्यही राहणार नाही. अशी ही अवघड जागा आहे.’

हिरोजी अदबीने म्हणाले, ‘महाराज, गडावर यायला एवढी एकच वाट आहे.’

‘आम्हांला असाच गड हवा होता.’

राजे गडावर आले. उन्हाची वेळ चढती असूनही हवेत कमालीचा गारवा होता. गडाच्या माथ्याला वर्षा ऋतूचे सरते मेघ स्पर्शून जात होते. त्यामुळे गडाला स्वप्ननगरीचे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

स्वरूप प्राप्त झाले होते. हत्तीटाळ्याला बगल देऊन राजे जात असता राजांची नजर फिरत होती. शेकडो मजूर राबत असलेले दिसत होते. राजांनी विचारले,

‘हे टाकं इथं बरं बांधलंत?’

हिरोजी म्हणाले, ‘राजे, हे हत्तीटाकं. मागे पंत आले, तेव्हा म्हणाले की, इथं हत्ती वावरणार; त्यांना डुंबायला जागा हवी.’

‘काही वेळा आमच्या मोरोपंतांना फार दूरचं दिसतं.’

राजे गंगासागरावर उभे होते. निर्मळ पाण्याने भरलेला तो गंगासागर बालेकिल्ल्याचे प्रतिबिंब उरात साठवून पसरला होता. गंगासागरावरून राजांची नजर बालेकिल्ल्याच्या तटाला लागून गंगासागराच्या काठावर उभ्या असलेल्या द्वादशकोणी दोन उंच मनोऱ्यांवर खिळली. अनेक रेखीव दगडी खिडक्यांनी सजलेले ते पाचमजली मनोरे नजर खिळवून ठेवीत होते. राजांनी ते निरखले.

‘हिरोजी, तुम्ही मनकवडे तर नाही? आम्ही जेव्हा उत्तरेत गेलो होतो, तेव्हा वाटेवरल्या मानसिंग किल्ल्यानं असंच आमचं लक्ष वेधून घेतलं होतं. त्या किल्ल्यावरचे सुबक मनोरे पाहून आम्हांला असं वाटलं होतं की, आपणही असेच मनोरे बांधावेत. न सांगताही ती इच्छा तुम्ही पुरी केलीत!’

राजांनी तो बालेकिल्ला नजरेखालून घातला. सात राण्यांचे महाल पाहून क्षणभर राजे उदास झाले. ते हिरोजीला म्हणाले,

‘हिरोजी, हे आठ महाल असते, तर फार बरं झालं असतं.’

राजे बालेकिल्ला पाहत होते. अंधारकोठड्यांपासून टांकसाळीपर्यंत सर्व व्यवस्था पाहून राजांनी विचारले,

‘एवढे बारीक तपशील कुणी दिले?’

‘मोरोपंतांनी!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘भारी हुशार आणि दूरदर्शी माणूस. असा अष्टावधानी आम्ही पाहिला नाही. राजकारणात आणि युद्धकारणात पारंगत. प्रतापगड त्यांनीच रेखला. पण हे भव्य काम मोठं. हिरोजी, आबाजी आणि मोरोपंत, तुम्हां तिघांना याचं श्रेय!’

सोनारशाळा, दप्तरखाना पाहत राजे पुढे जात होते. प्रधानांची जागा पाहून राजे परत मेणदरवाज्यापाशी आले. उत्तरेचा मेणदरवाजा त्यांनी ओलांडला. सूर्य माथ्यावर आला होता. मेणदरवाज्याबाहेर प्रशस्त, मोकळे पठार होते. पठाराच्या टोकाला तुटलेले कडे होते. जागा बंदिस्त होती. दूरवर पसरलेली सह्याद्रीची शिखरे आणि मुलूख नजरेत भरत होता. आबाजी म्हणाले,

‘राणीवशातील लोकांना फिरायला म्हणून ह्या जागेची आखणी केली.’

‘फार सुरेख जागा! ध्यानालाही हे ठिकाण चांगलं आहे.’

बालेकिल्ला पाहत राजे मनोऱ्यावर आले. एका मनोऱ्याच्या कमानींना सुबक महिरप कोरली होती. दुसरा मनोरा साधा होता. नक्षीदार मनोऱ्याकडे बोट दाखवीत हिरोजी म्हणाले,

‘तो राणीवशाकरिता!’

‘व्वा, हिरोजी! तुमच्या रसिकपणाचं आम्ही कौतुक करतो.’

राजे बालेकिल्ल्यातील मध्यभागाच्या राजसदरेवर आले. राजसदरेवरच्या भव्य इमारतीसमोर आकाशात उंच चढलेला नगारखाना दिसत होता. राजसदरेच्या आणि नगारखान्याच्या मध्ये विस्तृत चौक दिसत होता. राजे उद्गारले,

‘केवढी भव्य सदर आखलीत! सम्राटाला शोभेल, अशी राजसदर आहे.’

चार दिवस राजांचा मुक्काम गडावर होता. राजांनी आपला वाडा पाहिला, प्रधानांचे निवास पाहिले. भव्य बाजारपेठ, पिलखाना, दारूकोठार, जगदीश्वरप्रासाद, पागा... साऱ्या वास्तू पाहून राजे प्रसन्न झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सायंकाळच्या वेळी टकमक टोकावर राजे उभे होते. प्रचंड दरी समोर पसरली होती. निजामपूरची वस्ती घरट्याएवढी दिसत होती. दूरवर पर्वतशाखा पसरल्या होत्या. समोर कोकणदिवा दिसत होता. त्या डोंगराकडे बोट दाखवून राजे म्हणाले,

‘या कोकणदिव्यासारख्या किती तरी गडांनी रायगडाचं संरक्षण केलं आहे. ईशान्येला लिंगाणा, पूर्वेला तोरणा, दक्षिणेला कांगोरा, चांभारगड, सोनगड, वायव्येला तळेगड, उत्तरेला घोसाळगड या गडांच्या माळेत रायगड सुरक्षित आहे... हिरोजी, हे टकमक टोक मात्र मोकळं कसं सोडलंत?’

‘महाराज, ही कडेलोटाची जागा म्हणून राखली आहे.’

राजांचे भाव एकदम बदलले. ते स्वत:शीच बोलावं, तसे बोलले,

‘याही जागेची गरज असतेच ना! बिचारे कोण दुर्दैवी जीव या जागेचे मानकरी ठरणार आहेत! कसलं दु:ख आमच्या जिवाला लावून जाणार आहेत!... चला, हिरोजी. परत जाऊ.’

राजे बाजारपेठेत आले. ते हिरोजींना म्हणाले,

‘हिरोजी, नुसत्या बालेकिल्ल्यानं, गंगासागरानं आणि कारभाऱ्यांच्या निवासस्थानांनी राजधानी पुरी होत नाही. चांगल्या जागा पाहून सरदारांसाठी, हुजुरातीसाठी, ब्राह्मणवर्गासाठी घरटी उभी करा. पाण्याच्या साठ्यासाठी अनेक जागा शोधा. विपुल वस्ती असल्याखेरीज गड शोभायचा नाही.’

‘गडावर आधीच खर्च अमाप झाला आहे. मोरोपंतांनी हात राखून खर्च करण्याची आज्ञा केली आहे. जेवढं आवश्यक, तेवढंच केलं. अजून पुष्कळ करायचं...’

राजांच्या चेहऱ्यावर हास्य उसळले. हिरोजींच्या खांद्यावर हात ठेवीत ते म्हणाले,

‘सारं करा! खर्चाची काळजी करू नका. आपल्याला आता काय कमी आहे? बादशहाची व्यापारी पेठ सुरत एवढी हाताशी असता कमतरता कशाची? गडाचा प्रत्येक दगड रत्नांनी जडवतो, असं म्हटलंत, तरी ते आता अशक्य नाही. पण आता जास्त वेळ

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लावू नका. शक्य तो लौकर गडावर राजधानी हलावी, अशी आमची इच्छा आहे.'

हिरोजी उत्साहाने म्हणाले, 'महाराज, तीन हजार माणूस राबत आहे, तिथं पाच हजार करतो. आता केव्हाही आपले पाय गडाला लागू देत.'

दुसऱ्या दिवशी समाधानाने राजे गड उतरले.

□

२०

कल्याणला राजांची छावणी पसरली. आज्ञापत्रानुसार राजांच्या फौजा छावणीवर दाखल होत होत्या. घोड्यांच्या टापांचा आवाज वातावरण भरून टाकीत होता. आनंदराव आपल्या फौजेसह येऊन मिळाले. पाठोपाठ सेनापती सरनौबत प्रतापराव, व्यंकोजीपंत आले. राजांची वीस हजारांची फौज मोहिमेच्या आज्ञेची वाट पाहत होती. दिवाळीचे दिवस नजीक येत होते. राजांनी सुरतेत दिवाळी साजरी करण्याचे ठरविले. सुमुहूर्तावर कुचाचे नगारे झडले. फौज सुरतेची वाटचाल करू लागली.

सुरतेपासून अवघ्या दहा कोसांवर शिवाजीराजे पोहोचले, तरी सुरत झोपेतच होती. कल्याणच्या इंग्रज जासुदांनी राजांची फौज कल्याणमध्ये गोळा होताना पाहताच सुरतेला धोक्याची सूचना दिली होती, त्याप्रमाणे इंग्रजांनी सावधगिरी बाळगली. आपला सर्व माल स्वालीच्या गोदीवर त्यांनी सुरक्षित ठेवला. कल्याणच्या सुभेदारालाही ती बातमी समजली होती; पण सुभेदाराने तितके लक्ष दिले नाही. अशा अफवा सुरतेत नेहमीच उठत असत. सुभेदाराच्या हातांखाली सुरतरक्षणाकरता अवघे तीनशे सैनिक होते. शिवाजीराजांच्या पहिल्या लुटीनंतर सुरतेत फक्त एकच बदल घडला होता; तो म्हणजे सुरतेचा तट. सुरतेभोवती भक्कम तटबंदी उभारली होती. ऐश्वर्यसंपन्न व्यापारी पेठेच्या लौकिकाला शोभतील, अशा देखण्या वेशी उभारल्या होत्या.

दहा कोसांवर येऊन जेव्हा राजांच्या फौजेने मुक्काम केला, तेव्हा सुभेदाराचे डोळे खाडकन् उघडले. 'शिवाजी आया'ची सुरतेत हाकाटी उठली. सुरतेचे लोक चीजवस्तू टाकून मिळेल, तिकडे धावत सुटले. सुरतेचा सुभेदार गियासउद्दीन तीनशे सैनिकांसह सुरतेच्या बंदोबस्ताला उभा राहिला. औरंगजेबाने सुरतेला तटबंदी केली होती, पण वेशीला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दरवाजे करण्याचे तेवढे तो विसरला होता.

मशिदीतल्या क्षीण बांगेने सुरत जागी झाली; किंबहुना जे जागे होते, त्यांना रात्र सरल्याचे जाणवले. थंडीतल्या ओल्या धुक्याचा पडदा सूर्योदयाबरोबर उचलला गेला. सुरतेत भयाण शांतता पसरली होती. दिवाळीच्या लक्ष्मीपूजनाचा दिवस. वास्तविक पाहता या दिवशी सुरतेत केवढी गडबड असायची! पहाटेलाच हिंदू व्यापाऱ्यांच्या घरांसमोर मंगल वाद्ये वाजायची. रस्त्यावर घोड्यांचे चौकडे खडखडायचे. हळू हळू नाना भाषांच्या आवाजांनी रस्ता कुजबुजायचा. त्याच सुरतेत भर दिवसा भयाण शांतता नांदत होती. एखादे कावरेबावरे झालेले कुत्रे रस्त्यातून जाताना दिसत होते.

सूर्य आकाशात चढत होता. वेशीजवळ गियासउद्दीन भर थंडीतही आपला घाम पुशीत उभा होता. त्याच्या सैनिकांची भित्री नजर वारंवार सुरतेबाहेरच्या माळावरून फिरत होती. सगळीकडे कसे शांत होते. ती शांतता माणसाला पागल बनवायला समर्थ होती. गियासउद्दीन आपल्या जरी कलाबुतीच्या जाकिटाची बटने सैल करीत हसून म्हणाला,

'शिवाजी कभी नहीं आयेगा. ये सब झूठ है!'

पण कोणी त्याला साथ दिली नाही. सारे तटाबाहेर पाहत होते. एक सैनिक दबल्या आवाजात म्हणाला,

'सुभेदारसाब ऽ ऽ'

'क्या है?' सुभेदाराने घाबरून विचारले.

'देखो ऽ ऽ'

सैनिकाने दाखविलेल्या दिशेकडे सारे पाहू लागले. काही दिसत नव्हते. फक्त दूरवरच्या टेकडीच्या माथ्यावर तांबूस पट्टा दिसत होता. गियासउद्दीन रागाने म्हणाला,

'क्या बकता है?'

'सुनो ऽ ऽ' तो सैनिक ओरडला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

साऱ्यांचे श्वास थांबले, कान तीक्ष्ण बनले. मधाचे मोहोळ उठावे, तसा आवाज येत होता. गियासउद्दीन टाळा वासून बघत होता. त्याच्या कपाळावरून घाम निथळत होता. ज्यासाठी जीव उतावीळ होता, ते शेवटी दिसले. सुरतेच्या समोर दूरवर या टोकापासून त्या टोकापर्यंत काळी रेघ उमटली. गारांचा पाऊस पडताना आवाज यावा, तसा घोड्यांच्या टापांचा आवाज येत होता. कोणी तरी ओरडले,

'शिवाजी आया ऽ ऽ ऽ'

ताठरलेल्या डोळ्यांनी सारे ते दृश्य पाहत होते. टापांचा अखंड नाद कानांवर येत होता. अचानक तो आवाज थांबला. शिवाजीचे घोडदळ थांबले होते. सुरतेच्या समोर उभा ठाकलेला तो सेनासागर पाहून गियासउद्दिनाने निर्णय केला. सेनाप्रमुखाला अखेरपर्यंत वेस लढविण्याचा आदेश देऊन गियासउद्दीन सुरतेच्या किल्ल्याच्या आश्रयाला गेला.

उमद्या श्वेत घोड्यावर राजे बसले होते. उजव्या बाजूला प्रतापराव होते. डाव्या बाजूला आनंदराव व्यंकोजीपंत होते. राजे सुरतेकडे पाहत होते. सूर्यप्रकाशात सुरत नवरत्नांच्या अंगठीसारखी दिसत होती. राजे म्हणाले,

'प्रतापराव, तुम्ही शहराचा कबजा घ्या. आनंदराव आणि व्यंकोजीपंत,तुम्ही शहराची नाकेबंदी करा. आम्ही आमच्या फौजेनिशी छावणी करतो. लूट जारी ठेवा. टोपीवाले, वलंदेज वगैरे परक्या लोकांच्या वखारींची कळ काढू नका. लढाई टाकून लुटीवर लक्ष ठेवा. जय भवानी!'

राजांनी आपली तलवार उपसली. त्या तलवारीचे टोक त्यांनी आवेशाने सुरतेकडे दाखविले. गगनाला भिडणारी 'हर हर महादेव'ची एकच गर्जना उठली. बघता-बघता अश्वदळ भरधाव वेगाने उधळले. पाहता-पाहता राजांना सुरत वेढलेली दिसली. वेशीसमोर क्षणभर गर्दी दिसली; आणि काही वेळातच वेशीतून प्रवेश करणारे घोडेस्वार राजांच्या नजरेत आले. राजांच्या चेहऱ्यावर समाधान पसरले.

मराठी फौजा सुरतेत पसरल्या. सुरतेची अनिर्बंध सत्ता मराठ्यांच्या हाती होती. वाड्यांचे दरवाजे, पेढ्या लुटल्या जात होत्या. कोठारावरील संपत्ती राजांच्या समोर रचली गेली. राजांच्या समोर द्रव्यांच्या राशी पडल्या होत्या. इंग्रजांच्या वखारींवर मात्र जागता पहारा होता. राजांच्या सैनिकांनी त्यांना दम देताच वखारींवरून गोळीबार झाला. या चकमकीत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचे अनेक शिपाई ठार झाले. वखारींत अवघे पन्नास गोरे स्ट्रिमशॅम मास्टरच्या नेतृत्वाने वखारींचे निष्ठेने रक्षण करीत होते. त्याच वेळी इंग्रज वखारींचा गव्हर्नर जिराल्ड ॲंग्नर स्वालीच्या गोदीत इंग्रज मालाचे रक्षण करीत होता. मास्टरचा कडवा विरोध पाहून राजांच्या आज्ञेमुळे मराठ्यांनी वखारींवर चाल केली नाही.

राजांनी डचांना तटस्थ राहण्याचा सल्ला दिला होता, त्याप्रमाणे ते तटस्थ होते. ते सुरक्षित राहिले. फ्रेंचांनी सुद्धा आधीच तह केल्यामुळे तेही सुरक्षित होते; पण फ्रेंचांच्या वखारींसमोर असलेल्या जुन्या सराईत नुकताच सुरतेत आलेला काशगरचा राजा मराठ्यांच्या वेढ्यात सापडला. पहिल्या दिवशी त्याच्या रक्षकांनी मराठ्यांना रोखले; पण रात्र पडताच त्यांनी राजाला सुरक्षितपणे सुरतेच्या किल्ल्याच्या आश्रयाला पाठविले. राजाचा सर्व माल मराठ्यांच्या हाती सापडला. त्या मालात सोने, रुपे, मौल्यवान पदके, सोन्याचा पलंग व खूप जवाहीर सापडले.

रात्र पडली, तशी सुरतेवर तांबूस किनार उठली. आकाश प्रकाशमान झाले. मोगलांची व्यापारपेठ सुरत आपल्या प्रकाशाने आकाश उजळीत होती.

राजांनी तीन दिवस सुरतेची लूट केली. शेवटी इंग्रजांकडूनही तलवारी, सुऱ्या, भारी वस्तू यांचा नजराणा आला. कोट्यवधी होनांची संपत्ती राजांच्या हाती गोळा झाली होती. राजे त्या लुटीवर तृप्त होते. सुरतेत मिळालेल्या घोड्यांवर लूट लादून राजे माघारी वळले.

सुरतेची राजांनी परत बेसुरत केली. शिवाजी परत गेला, यावर कुणाचा विश्वास बसत नव्हता. आगीमध्ये धुमसणाऱ्या सुरतेत सर्रास लूट सुरू होती. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता. या संधीचा फायदा घेऊन खुद्द स्ट्रिनशॅम मास्टर आपल्या खलाशी सहकाऱ्यांसह नंतरच्या लुटीत आपले हात धुऊन घेत होता.

सुरतेने बारा लक्ष रुपयांची वार्षिक खंडणी कबूल केली नाही, तर पुढच्या वर्षी परत येऊन सुरत बेचिराख करण्याची तंबी देऊन राजांनी सुरत सोडली.

त्या वेळी सुरत धुराचे नि:श्वास सोडीत होती.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

२१

घोड्यांची पथके सावकाश वाटचाल करीत होती. त्यांच्या मागे लूट लादलेली शेकडो घोडी, खेचरे चालत होती. लुटीच्या ऐवजाच्या मागे-पुढे हत्यारबंद स्वारांचे संरक्षण होते. त्यांच्या मागे राजे आपल्या सेनापतीसह जात होते. मागे फौज होती. राजे सुरतेहून बागलाणात उतरले होते; आणि जासुदाने मोगल सरदार दाऊदखान चालून येत असल्याची बातमी आणली. राजे गडबडीने आपल्या लुटीसह कांचना-मंचना खिंडीतून चांदवड डोंगराची रांग ओलांडून गेले. डोंगरपायथ्याला आल्यानंतर राजे थांबले. रात्र पडली होती. प्रतापराव म्हणाले,

‘महाराज, दाऊदखान येतो आहे. विसावा न घेता जर कूच केली, तर आपणांला गडाच्या आश्रयाला जाता येईल.’

‘नाही, प्रतापराव. त्याची काही गरज नाही. पायदळ आणि दोन हजार घोडेस्वार देऊन त्यांना लुटीसह पुढं पाठवा. लूट राजगडावर घेऊन जायला सांगा.’

प्रतापरावांना वाटले, लूट पुढे पाठवून राजे नाशिककडे वळतील. त्या समजाने प्रतापरावांनी भीती व्यक्त केली,

‘पण दाऊदखानानं लूट पकडली, तर?’

‘ते त्याला जमायचं नाही. पाहता काय, प्रतापराव? दाऊदखान येतो, असं समजताच आम्ही पळून जाऊ, असा समज शत्रूचा असणार. यापुढं पळणं बंद! पाहू, दाऊदखान कसा लढतो, ते.’

प्रतापराव त्या भाषणाने उत्साहित झाले. त्यांनी लूट सुरक्षितपणे पाठवून दिली.

दाऊदखान बऱ्हाणपुराहून बागलाणकडे झेपावत होता. मध्यरात्री दाऊदखानाला बातमी मिळाली की, शिवाजी कांचना-मंचना खिंडीतून नाशिककडे निम्मी फौज घेऊन गेला असून, निम्मी फौज त्याने खिंडीपाशी ठेवली आहे. ही बातमी समजताच दाऊदखान ताबडतोब निघाला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या जासुदांनी दाऊदखानाचे सैन्य येत असल्याची बातमी आणली. राजांनी विचारले,

'सैन्य किती आहे?'

'फार तर चार हजार भरेल; पण खानाजवळ दारूगोळा आहे, हत्ती आहेत.'

'फार चांगली गोष्ट आहे. फौजेला तयार राहण्याचे हुकूम द्या.'

काही क्षणांतच तळावरच्या शेकोट्या विझल्या. राजांची फौज चूपचापपणे तयार होत होती. पहाटेचा गारवा उतरत होता. साऱ्या फौजेचे बाहू स्फुरण पावत होते. पहाट झाली. राजांनी पंधरा हजारांची फौज जय्यत तयारी होऊन सपाट माळावर पसरली होती. खुद्द राजे आपल्या पांढऱ्या घोड्यावर स्वार झाले होते. अंगात जरी बख्तर होते. माथ्यावर शिरस्त्राण शोभत होते. सुवर्णाचे काम केलेले दस्तबख्त राजांच्या पोलादी मनगटावर विसावले होते. नाजूक कमलदलासारखी याची टोके कोपरापर्यंत गेली होती. राजांनी दोन्ही हातांत पट्टे चढविले होते. राजे आपल्या खाशा संरक्षणदळात फौजेच्या मागे उंचवट्यावर उभे होते. जवळ प्रतापराव होते. व्यंकोजीपंत व आनंदराव फौजेतून फिरत होते.

दाऊदखानाच्या आघाडीवर इखलासखान मियाना हा कडवा सरदार होता. इखलासखान मोठ्या आवेशाने खिंड ओलांडून आला. नेहमीप्रमाणे शिवाजी हा, शत्रू येताना पाहून पळत असेल, अशा कल्पनेने इखलासखान आलेला; पण खालच्या पठारावर युद्धाच्या तयारीने उभी ठाकलेली फौज पाहून त्याला धक्का बसला. जिकडे पाहावे, तिकडे शिवाजीची फौज पसरलेली त्याला दिसत होती. अनेक तुकड्या सगळीकडे पसरल्या होत्या.

मोगली फौज दिसताच राजांनी हुकूम सोडला. आवेशाने मराठी फौज थोडी पुढे सरकली. पुढे जाणारी फौज आपल्या ढालींवर तलवारींच्या मुठींचा आवाज करीत होती. त्या खटखट्यांचा गंभीर नाद आसमंतात घुमत होता. दाऊदखानाला चुकीची बातमी मिळाली होती. सर्व सैन्यानिशी शिवाजी लढायला उभा ठाकला होता.

समोरच्या दृश्याने इखलासखान चवताळला. तो ढालींचा आवाज त्याला बेचैन करीत होता. शत्रू तोंडाशी अचानक उभा ठाकलेला पाहून मोगली सैन्याची धावपळ उडाली. जो

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तो उंटावर लादलेली आपली चिलखते शोधण्यात व ती अंगावर चढविण्यात गुंतला होता. संतापाने बेभान झालेला इखलासखान आपल्या थोड्या फौजेसह सैन्यावर तुटून पडला.

डोंगरमाथ्यावरून उतरणारी फौज पाहताच राजांनी प्रतापरावांना इशारत दिली. प्रतापरावांनी घोड्याला टाच दिली. प्रतापरावांच्या हातात तलवार तळपत होती. आवेशाने प्रतापरावांनी गर्जना केली : ‘हर हर महादेव ऽ ऽ’

दहा हजार मुखांतून ते शब्द झेलले गेले. ती गर्जना आकाशात पोहोचली. आनंदरावांची फौज सामोरी गेली. दोन्ही फौजा एकमेकींना भिडल्या. इखलासखानाची कुमक थोडी. पाहता-पाहता इखलासखान वेढला गेला. एकच गिल्ला उडाला. इखलासखानापाठोपाठ मोगल तोफखान्याचा सरदार मीर अब्दुल मबूद आपल्या दोन मुलांसह बाजूने उतरला होता. व्यंकोजीपंतांची फौज त्यांचा समाचार घेण्यात गुंतली होती. व्यंकोजीपंतांनी त्याला शाही फौजेपासून तोडले होते. बघता-बघता मीर अब्दुलचा पराभव झाला. त्या लढाईत खुद्द मीर अब्दुल मबूद व त्याचा एक मुलगा जखमी झाला. मबूदचा दुसरा मुलगा आणि त्याचे अनेक सैनिक रणांगणावर पडले. पंतांच्या फौजेने मोगली तोफखान्याचे निशाण व मबूदचे घोडे काबीज करून राजांच्या जवळ आणले.

सूर्य वर चढत होता. जिकडे पाहावे, तिकडे रणकंदन माजले होते. तोफा धूर ओकीत होत्या. त्यांच्या आवाजाने रणक्षेत्र हुंकारत होते. नगाऱ्यांचे, तुताऱ्यांचे आवाज बाहूंना अवसान देत होते. राजे सारी मोहीम बघत होते. पाठीशी उभे असलेले राजे फौजेला देवाचे बळ देत होते.

इखलासखान तरफेची लढाई करीत होता. नेटाने पुढे सरकत होता. ते पाहताच प्रतापराव त्वेषाने पुढे झाले. एकच भीड उडाली. प्रतापरावांनी इखलासखानाला गाठले. इखलासखान प्रतापरावांच्या वेढ्यात सापडला; आणि अचानक इखलासखान जखमी होऊन घोड्यावरून खाली आला. स्वार गमावलेला आणि गर्दीत सापडलेला इखलासखानाचा घोडा क्षणभर दोन पायांवर उभा राहिलेला दिसला. त्याच्या खिंकाळण्याने इखलासखान पडल्याचे साऱ्यांना कळले. दाऊदखान रणांगणावर हजर झाला होता. मोगली फौज हटते आहे, असे दिसताच त्याने संग्राम घोरी आणि राय मकरंद या सरदारांना मराठ्यांवर सोडले; आणि बाकीच्या सैन्याला हत्ती, निशाणी, नगारा यांसह टेकडीमाथ्यावरील उजाड गावात आश्रय घेण्यास पाठविले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

इखलासखानाचा पराभव करून, एक हत्ती हौद्यासह काबीज करून, प्रतापराव आनंदरावांना गुंतवून, माघारी राजांच्या जवळ आले. प्रतापरावांच्या हाती इखलासखानाचे जिंकलेले निशाण फडकत होते.

भर दुपारी लढाई थोडी मंदावली. दाऊदखानाचे बुंदेले बर्कंदाज पुढे सरकत होते. त्या बुंदेल्या फौजांचा मारा मोठा होता. बंदुका, उखळी तोफा, तीरंदाज मराठ्यांवर आग पाखडीत होते. खुद्द दाऊदखान आपल्या फौजेनिशी रणांगणावर उतरला. पराक्रमाची कमाल करून त्याने जखमी इखलासखानाला माघारी नेले.

दोन प्रहरी परत मोगली हल्ले होत होते; पण राजांच्या तीरंदाजांनी ते हल्ले परतविले. सायंकाळपर्यंत लढाई जवळ जवळ थांबली. दिंडोरीच्या या लढाईत राजांच्या फौजेने भारी पराक्रम केला होता. तीन हजारांवर मोगल फौज कापली होती. अनेक ध्वज जिंकले होते. रात्र पडली होती. संध्यासमयाच्या काळोखात दाऊदखानाचे लोक मुडदे हलविताना दिसत होते.

टेकडीवर शेकोट्या पेटल्या होत्या. राजे आपल्या तळावर विसावले होते. प्रतापराव, व्यंकोजीपंत जवळ उभे होते. राजांनी विचारले,

‘आपले किती कामी आले?’

‘जास्त नाहीत; तीनशेच्या आतबाहेर. पण जखमी मात्र फार आहेत.’

प्रतापरावांच्या दंडावरच्या जखमेकडे पाहून राजांनी तीवरून हळुवार हात फिरविला. ते म्हणाले,

‘सेनापती! जखम बांधून घ्या.’

‘मोठी जखम नाही.’ प्रतापराव म्हणाले.

‘तुम्हांला जखम कधीच मोठी होत नसते. प्रतापराव, तुम्ही सेनापती! असे वेड्यासारखे एकदम आघाडीवर धावता, जखमी होता, हे बरे नाही. सेनापती गमावून आम्हांला परवडायचं नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तेवढ्यात तेथे जासूद आला. राजांना मुजरा करून तो म्हणाला,

‘महाराज, दाऊदखान त्या टेकडीवर आहे. टेकडी गाफील आहे. मेलेल्यांना पुरण्यात आणि घायाळांना औषधपाणी करण्यात सारे गुंतले आहेत.’

‘राजे, माझी फौज घेऊन जाऊ?’ आनंदरावांनी विचारले.

‘हां, आनंदराव! मोगलांत आम्हांत फरक आहे. युद्धभूमीची हारजीत संपली. ही वेळ वैराची नव्हे. दाऊदखानानं अपुरं सैन्य असताही तरफेची लढाई केली. त्याचे दोन वजीर पकडलेत ना?’

‘जी!’

‘त्यांना मानानं पाठवून द्या. आपल्या जखमींना कुंजरगडावर हलवा. आम्ही पण तिकडेच जाणार आहो... प्रतापराव, छावणी बिनबोभाट उठवा.’

दिंडोरीच्या युद्धात मिळालेले यश घेऊन पाडाव केलेल्या हत्तीघोड्यांसह राजांची फौज वाटचाल करू लागली.

□

२२

दिंडोरीचे रणक्षेत्र गाजवून राजे कुंजरगडावर आले. राजांनी आपल्या फौजेला विसावा दिला, जखमींची शुश्रूषा केली. प्रतापराव, आनंदराव, व्यंकोजीपंत यांच्यासह राजे पुढचे बेत ठरवीत असता एक आनंदाची बातमी राजांना कळली. मोरोपंतांना शिवनेरी घेण्यात जरी अपयश आले होते, तरी जाता-जाता त्यांनी त्र्यंबकगडावर भगवे निशाण चढविले होते. दाऊदखानाचा मुलगा अहमदखान व जसवंतसिंग यांच्यांतील वैर विकोपाला गेले होते. मुअज्जम आणि दिलेरखान यांच्या भांडणामुळे ते दोघेही गाफील होते. राजांनी या संधीचा फायदा घ्यायचे ठरविले. पंधरा-वीस दिवस कुंजरगडावर मुक्काम करून राजे ताज्या दमाने मोहिमेसाठी बाहेर पडले. त्यांचे लक्ष खिळले होते कारंजावर.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वऱ्हाडची राजधानी शोभावी, असे कारंजे शहर होते. अफाट संपत्तीने भरलेले हे व्यापारी केंद्र. राजे आपल्या वीस हजार फौजेसह बऱ्हाणपुराकडे गेले. बऱ्हाणपुरात खुद्द जसवंतसिंग होता. बऱ्हाणपूर टाळून राजांनी नजीकचे बहादुरपूर लुटले. मोरोपंतही त्या वेळी खानदेशात धुमाकूळ घालीत होते. राजांच्या फौजा वेगाने कारंजाकडे जात होत्या. राजे बेसावध कारंजाजवळ पोहोचले. राजांनी कारंजे वेढले. चारी वेशींनी मराठे आत घुसले. एकजात धनिक व्यापारी कैद केले गेले. वाड्यांना खणत्या लागल्या. पेठांची संपत्ती रस्त्यावर आली. राजांना अपरंपार धन मिळाले. सर्वांत जो मोठा धनिक होता, तो मात्र राजांच्या हातून निसटला. स्त्रीचा वेष घेऊन तो पळून गेला. तीन दिवस राजांचा मुक्काम कारंजात होता. त्यांनी कारंजाच्या व्यापाऱ्यांकडून वार्षिक खंडणी कबूल करून घेतली. कारंजात एवढी संपत्ती राजांना मिळाली होती, की ती वाहून नेण्यासाठी चार हजार बैल व गाढवे लागली.

राजे खानदेशाकडे वळले. लूट मिळवीत, नंदुरबारनजीकच्या मुलुखातून चौथाईची खंडणी देण्याबद्दलचे करार करून घेत राजे पुढे सरकत होते. त्यातच त्यांना मोरोपंतही येऊन मिळाले. वाढलेल्या मदतीच्या जोरावर विशेष परिश्रम न करता अहिवंत, खळा जावडा, मार्कंडा हे किल्ले राजांनी पदरात पाडून घेतले.

राजांचा रोख साल्हेरकडे वळल्याचे दिवसात दाऊदखान साल्हेर वाचविण्याला धावला; पण वाटेतच त्याला शिवाजीने साल्हेर जिंकल्याचे समजले. साल्हेरचा किल्लेदार साल्हेरवेढ्यात ठार झाला; आणि त्याच्या मेहुण्याने साल्हेरचा किल्ला राजांच्या स्वाधीन केला.

कारंजाची करोडो होनांची लूट घेऊन राजे राजगडाला आले.

□

२३

राजे राजगडाला आले. राजांचा पराक्रम ऐकून जिजाबाईंना खूप समाधान वाटले. राजे येण्याच्या आधीच सुरतेची लूट, दिंडोरीची, कारंजाची लूट या साऱ्या बातम्या जिजाबाईंना कळल्या होत्या. जिजाबाईंनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, या मोहिमेत पुष्कळ थकला असाल, नाही?’

‘नाही, मासाहेब! उलट, पुष्कळ ताकद कमावून आम्ही आलो. आज आम्हांला पंख असते, तर केवढं बरं झालं असतं!’

‘पंख कशाला हवे होते?’

राजे जिजाबाईंच्या वर नजर खिळवून म्हणाले,

‘मासाहेब, मनात येतं... पंख असते, तर आपल्याला पाठीवर घेऊन आम्ही सारा मुलूख हिंडवून आणला असता; गडागडावर फडकणारे भगवे झेंडे तुम्हांला दाखविले असते.’

जिजाबाईंना राहवले नाही. त्यांनी राजांना जवळ ओढले. राजे क्षणभर जिजाबाईंच्या कुशीत विसावले. राजांच्या मस्तकावरून हात फिरवीत जिजाबाई म्हणाल्या,

‘ते मला दिसतं! त्यासाठी पंखांची गरज नाही.’

‘मासाहेब!’

‘खरंच सांगते मी. अरे, दृष्टी अधू झाली, की सारं दिसायला लागतं. माणूस त्रिकालज्ञानी बनतो.’

दाराशी आलेले संभाजी आतील दृश्य पाहून थबकले. त्यांच्या चेहऱ्यावर हसू पसरले. राजांची नजर तिकडे गेली. राजे बाजूला होत म्हणाले,

‘हे तुमचे लाडके बाळराजे! आमची सवतच बनलेत!’

‘का?’

‘आम्ही तुमच्या जवळ आलो, तर पाहा ना, कसे हसतात, ते!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजे जिजाबाईंच्या जवळ आले. त्यांना जवळ घेत जिजाबाई म्हणाल्या,

‘अरे! तुम्ही केवढे जरी मोठे झालात, तरी मला लहानच!’

संभाजीराजांनी एकदम राजांना विचारले,

‘आबासाहेब, तुम्ही दाऊदखानाचा हत्ती पकडून आणलात, खरं?’

‘कोण सांगतं?’

‘महादेव सांगत होता.’

‘साफ खोटं! आम्ही काय हत्ती पकडतो? सुरत लुटून आम्ही येत होतो. खूप मोठं रान लागलं. दाऊदखानाचा हत्ती बिचारा चरत होता, गरीब होता.’ डोळे मिचकावीत राजे म्हणाले, ‘आणला पकडून चूपचाप!’

‘खोटं!’ संभाजीराजे म्हणाले.

‘राजे, थट्टेतही मुलांना कधी खोटं सांगू नये.’ जिजाबाईंनी दटावले.

‘बाळराजे, तुम्ही ऐकलं, ते खरं; पण लढाईच्या गोष्टी ऐकून लढाई समजत नाही; ती प्रत्यक्ष पाहावी लागते.’

‘आम्हांला नेलं असतं, तर आम्ही पाहिली असती.’

‘ती वेळ आता फार दूर नाही.’ राजे म्हणाले, ‘मासाहेब, बाळराजे आता तेरा वर्षांचे झाले. जरा खोगीर, लगाम चढवायला हवा.’

‘काय म्हणता?’ जिजाबाईंनी विचारले.

‘बाळराजांना आता राज्यकारभारात गुंतवावं, असं वाटतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘गुंतवा ना! मी कुठं नको म्हणते? जेवढ्या लहानपणी गोष्टी कळतील, तेवढ्या बऱ्या.’ जिजाबाईंनी अनुज्ञा दिली.

‘रायगडला जाताच आम्ही ती व्यवस्था करू.’

‘केव्हा जायचं?’ जिजाबाईंनी विचारले.

‘मुहूर्त पाहायला सांगितलं आहे. चांगला मुहूर्त पाहून गड सोडू.’

राजगडावरून प्रथम दप्तर हलले. त्यानंतर थोड्याच दिवसांत शेकडो बैल, बैलगाड्या रायगडाच्या वाटेला लागल्या. पाठोपाठ जिजाबाई आपल्या सुनामुलांसह गडाखाली उतरल्या. राजाराम लहान, त्यामुळे प्रवास धीमे धीमे करण्याचा बेत ठरला. अनेक मेण्यापालख्यांतून सारे रायगडला निघाले. राजे संभाजीराजांना म्हणाले,

‘बाळराजे, ही तुमची पहिली कामगिरी. आम्ही तुमच्या पाठोपाठ येतच आहो. तुम्ही मासाहेबांना घेऊन सुखरूपपणे पाचाडला वाड्यावर जा. तुमच्या बरोबर फौज आहे. तिच्यावर वजन ठेवून वागा.’

राजे गडावर मागे राहिले होते. सर्व गड खाली झाला. गडावर राहणाऱ्या शिबंदीची आणि वस्तीची राजांनी व्यवस्था लावली. सुभानरावांच्याकडे गडाची किल्लेदारी होती. राजांनी देवदर्शन घेतले. राजांना पोहोचवायला सुभानराव किल्ल्याच्या पहिल्या दरवाज्यापर्यंत आले होते. राजे काही बोलत नव्हते. राजांचा जीव कासावीस झाला होता. राजांचे सरदार काही न बोलता बरोबर चालत होते. राजे दरवाज्यापाशी थांबले. राजांचा कंठ दाटून आला होता. राजे गहिवरल्या सुरात म्हणाले,

‘सुभानराव, आम्ही असता गड संभाळलात, तसा संभाळा. आम्ही आहो, असं समजून दक्षतेनं राहा. या गडानं जिवाची भारी गुंतवण केली आहे. अफझलभेटीला येथूनच आम्ही बाहेर पडलो. याच जागेवरून आम्ही शास्ताखानाची शास्त केली. आमच्या अनेक मोहिमा इथूनच निघाल्या. प्रतापगडभवानीचं दर्शन आम्हांला इथंच घडलं. मिर्झाराजांच्या भेटीला इथूनच आम्ही पाऊल टाकलं; आणि मासाहेबांचं पुण्यदर्शन आम्हांला इथंच फिरून घडलं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या नेत्री अश्रू गोळा झाले. सुभानरावांचीही तीच अवस्था झाली होती. त्यांच्या खांद्यावर हात ठेवीत राजे बोलून गेले,

‘याहीपेक्षा आमच्या काही आठवणी आम्ही या जागेवर हरवल्या आहेत. कायमच्या...’

सुभानरावांच्या खांद्यावरचा राजांचा हात सुटला. अश्रू टिपीत राजे स्वार झाले; आणि मागे न पाहता त्यांनी घोड्याला टाच दिली.

□

२४

दोन प्रहरच्या वेळी राजे रायगडाच्या आपल्या महालात बसले होते. बाळ राजारामाला घेऊन सोयराबाई जवळच बसल्या होत्या. दाराशी येसूबाई येऊन थांबल्या. राजांनी हाक मारली,

‘ये, येसू!... राणीसाहेब, आमच्या सूनबाई आल्या.’

येसूबाई आत आल्या. राजांनी विचारले,

‘आज काय काम काढलंत?’

‘आबासाहेब, आम्ही जगदीश्वराला जाऊ?’

‘नित्यनियमानं जात चला. संभाजीराजे आले?’

‘येसूबाईंनी नकारार्थी मान हलवली. राजांनी विचारले,

‘कुठं गेलेत?’

येसूबाई नजर टाळीत म्हणाल्या, ‘पाचाडच्या वाड्यात गेलेत.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पाचाडच्या वाड्यात पहाटे गेले, आणि अजून परत आले नाहीत?’ राजे हसले व म्हणाले, ‘शेवटी तूही शहाणपण शिकलीस ना? आम्हांला खोटं सांगतेस?’

येसूबाई गडबडीने म्हणाल्या, ‘चहाड्या करू नयेत, म्हणून मासाहेबांनी सांगितलंय्.’

राजे मोठ्याने हसले. सोयराबाईंना राजे म्हणाले,

‘चला! मासाहेबांच्या आज्ञेनं आमचा हा हेर आज फितवला गेला. येसू, मासाहेबांना सांगा की, आम्ही पण जगदीश्वराकडे येणार आहो.’

येसूबाई आनंदाने पळाल्या. राजे म्हणाले,

‘केवढी निष्पाप पोर आहे!’

‘पण युवराज कोठे गेले, ते कळलं का?’ सोयराबाईंनी विचारले.

‘न कळायला काय झालं? पहाटेच ते शिकारीला उतरले. आम्हांला सांगूनच गेले.’

‘केव्हा सांगितलं?’

‘राणीसाहेब, आम्ही कधी खोटं बोलत नाही. भल्या पहाटे आम्हांला संभाजीराजांनी जागं केलं; मासाहेबांची सुद्धा परवानगी घेतली.’

‘तुम्ही परवानगी दिलीत?’

‘न द्यायला काय झालं? युवराजांना शिकार आवडते. यातूनच मुलुखाची ओळख होते. घोड्याची मांड तयार होते. नेमबाज बनता येतं.’

‘पण अलीकडे शिकारी फार वाढल्यात.’

‘तेही आमच्या ध्यानी आलं आहे. हेच वय आहे. पुढं युवराजांवर फार मोठी जबाबदारी आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मांडीवरच्या राजारामाकडे पाहून सोयराबाई म्हणाल्या,

‘बघा, कसा हसतो गुलाम!... तुला म्हणत नाहीत ते. युवराजांच्याबद्दल बोलतात.’

राजे उठत म्हणाले, ‘तुम्ही जगदीश्वराला येणार?’

‘नाही, बाई. याला वारा सोसत नाही.’

राजे काही बोलले नाहीत.

जिजाबाईंच्यासह राजे नगारखान्याजवळ आले. राजांच्या मागे पुतळाबाई, काशीबाई, सगुणाबाई हा राणीपरिवार चालत होता. मनोहारी आणि इतर दासी मागे होत्या. राजे नगारखाना ओलांडून जात असता जिजाबाई म्हणाल्या,

‘केवढं मोठं काम उभं केलंत! वाड्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकाला जाईपर्यंत पाय दुखतात.’

‘मासाहेब, पालखी आणवू काय? जगदीश्वरही लांबच आहे.’

‘नाही, रे. तशी थकत नाही मी. जिने चढायचे झाले, तर थकल्यासारखं वाटतं.’

नगारखान्याच्या डाव्या चौकात राजे आले; आणि त्यांचं लक्ष समोरून येणाऱ्या संभाजीराजांच्याकडे गेले. संभाजीराजे घोड्यावर स्वार झाले होते. राजांना पाहताच ते पायउतार झाले. मागून येणाऱ्या मोतद्दाराला घोडे देऊन ते सामारे आले.

‘झाली शिकार?’

‘जी!’ संभाजीराजे हसत म्हणाले.

‘पण, संभाजीराजे, तुम्ही गडावर घोड्यावरून आलात?’

संभाजीराजांनी नजर टाळली. राजे किंचित कठोर आवाजात म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तुम्हांला आम्ही ताकीद दिली होती. अजून गडाची वाट पक्की झालेली नसता, पायऱ्या खोदल्या जात असता, कच्च्या वाटेवरून आलात? कुठं जनावर बुजलं, पाय घसरला, तर?... चला, आम्ही जगदीश्वराला जातो आहो.’

संभाजीराजे हसले. ते मासाहेबांच्या बरोबर चालू लागले. दुतर्फा गडाच्या बाजाराकरिता बांधलेली चिरेबंदी बाजारपेठ लागली. जिजाबाई तिकडे पाहत होत्या.

‘राजे, केवढी उंच जोती बांधलीत?’

‘ती आपल्या हिरोजींची अक्कल! म्हणे, घोड्यावरून बाजारहाट करता आला पाहिजे. पेठ वसली, की छान दृश्य दिसेल!’

सारे परत हसले. सर्व बाजूंना गडाची कामे सुरू होती. काम करणारी माणसे राजांना पाहताच मुजरे करीत होती. राजे बाजारपेठेच्या शेवटाला गेले. जगदीश्वराच्या मंदिराकडे राजे वळणार, तोच राजांचे लक्ष उभ्या असलेल्या बहिर्जींकडे गेले. बहिर्जीमागे एक गृहस्थ उभा होता; त्याने मुजरा केला. बहिर्जी पुढे झाला. त्याने राजांचे, जिजाबाईंचे पाय शिवले.

‘काय आहे, बहिर्जी? आणि हे कोण?’

‘हे नागाप्पा शेंट्टी! व्यापारी आहेत, महाराज. गड पाहायला आले होते.’

‘अस्सं!’

‘गडावर पेठेत जागा मिळावी, अशी इच्छा आहे.’

‘बहिर्जी, गडावरचे पेठकरी अद्याप निवडले नाहीत. मोरोपंत आले, की त्यांना भेटायला सांग. गडावरचा माणूस जोखमीनं पतकरायला हवा.’

‘महाराज, त्याची काळजी नसावी. नागाप्पा जुन्नरचे. आजवर यांनी आम्हांला खूप मदत केली आहे.’

‘कसली?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हे नेहमी सुरतेला जातात. पहिल्या स्वारीच्या वेळी यांनी सुरतेची चोख बातमी दिली. सुरक्षित वाटा दाखविल्या. नगर भागाचीही माहिती यांनीच पुरविली. सुरतेत, नगर भागात माणसं गेली, ती यांच्याच मदतीनं.’

‘बस्स, बर्हिजी. तुझ्या खात्रीचे हे आहेत ना? तू आमचा नजरबाज. तुझी पारख झाली, की काम झालं... नागाप्पा...’

‘जी!’

‘पावसाळा संपला, की तुम्ही आम्हांला भेटा. ही पेठ वसवायचं काम आम्ही तुम्हांलाच सांगू.’

नागाप्पा आनंदला. राजे सर्वांसह जगदीश्वराच्या मंदिराकडे गेले. त्यांनी देवदर्शन घेतलं. जगदीश्वराच्या चारी बाजूंना प्रशस्त आवार होते. मंदिराबाहेर येऊन राजांनी जिजाबाईंना सांगितले,

‘मासाहेब, आम्ही आता युवराजांना कारभार सांगणार आहोत.’

‘तेच बरं! त्याशिवाय वठणीवर यायचे नाहीत ते.’ जिजाबाईंनी साथ दिली.

संभाजीराजे म्हणाले, ‘आम्ही जरूर बघू.’

राजांनी संभाजीराजांना जवळ घेतले. ते म्हणाले,

‘राजे, हाच विश्वास राज्यकारभाराला उपयोगी पडतो.’

सुमुहूर्तावर जगदीश्वराला अभिषेक करण्यात आला; आणि राजांनी संभाजीराजांना राज्यकारभारात गुंतविले.

□

२५

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या देखरेखीखाली रायगडचे उरलेले काम पुरे होत होते. बालेकिल्ल्याचे सर्व महाल पुरे होत आले होते. रायगडाच्या परिसरात अनेक घरटी उठत होती. सुरू केलेली कामे पाऊस सुरू होण्यापूर्वी पुरी करून घ्यायची होती. टकमक बुरुजाजवळची आणि भवानीटेकाकडील दारूकोठारे पुरी झाली होती. अनेक तलावांची कामे पूर्ण झाली. काही घरे पुरी केली होती.

थंड वारा रायगडावर वाहू लागला; ढगांच्या छपऱ्या आकाशातून सरकू लागल्या, तशा गडांच्या झडपा बांधण्याची कामे सुरू झाली.

जिजाबाईंना पावसाळा मानवणार नाही, असे वाटून राजांनी जिजाबाईंना गडाखाली पाचाडच्या वाड्यात पोहोचविले. जिजाबाईंच्या बरोबर गुणवंताबाई, काशीबाई होत्या. खानदेशाकडील फौजा मोगलाईत कामगिरीवरच गुंतल्या होत्या. कोकणातल्या फौजा गडांच्या आश्रयाने छावण्या करून विसावल्या होत्या. भर पावसातही पाचाडला संभाजीराजांच्या खेपा होत होत्या. बाळाजी आवजींसारखी माणसे हाताशी घेऊन राजे दप्तर, खजिना या गोष्टी तपाशीत होते. संभाजीराजे कारभार समजावून घेत होते.

श्रावणानंतर राजे जवळपासच्या छोट्या मोठ्या गडांना भेटी देऊन आले. गडाच्या इमारतकामाची त्यांनी पाहणी केली. पावसाळा संपला. राजांनी रायगडाची उरलेली कामे परत सुरू केली. महाडच्या कोटाचेही काम सुरू झाले होते. पूर्वीचा कोट डागडुजी करून भक्कम केला जात होता.

महाडला असताना राजांना एक धक्का देणारी बातमी समजली- दिलेरखान, बहादुरखान व महातबखान यांनी पुण्यावर हल्ला केला. पुण्याची जाळपोळ करून दिलेरखान थांबला नाही; तर नऊ वर्षांवरील सर्व बायकापुरुषांची त्याने निर्दयपणे कत्तल उडविली होती! ती बातमी ऐकून राजांच्या अंगाची काहिली उडाली. ते टाकोटाक पाचाडला आले.

जिजाबाईंना ती बातमी ऐकून धक्का बसला. त्या म्हणाल्या,

‘राजे, ही फौज अचानक कशी आपल्या मुलुखात शिरली?’

‘अचानक नाही, मासाहेब! आम्हांला आधी हे माहीत होतं. पण दिलेरखान असा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाशवी अत्याचार करील, असं आम्हांला वाटलं नव्हतं.'

'बोलून चालून शत्रू! त्यानं कसं वागावं, याचा भरवसा कोण देणार?'

'मासाहेब, आम्ही सुरत लुटली, कारंजं लुटलं; मोगलाईचे धडे घेतले. मोगलाईत कधी नव्हता एवढा धुमाकूळ घातला. त्याचे परिणाम आम्हांला माहीत होते. एक ना एक दिवस मोगली फौज सर्व सामर्थ्यानिशी दक्षिणेत उतरेल, हे आम्ही जाणलं होतं. त्याचसाठी एवढ्या तातडीनं आम्ही रायगडची सुरक्षित जागा निवडली. औरंगजेबानं अनेक मातब्बर सरदार आमच्यावर पाठविले आहेत. काही किरकोळ गडही त्यांनी काबीज केले. खुद्द साल्हेरला आज त्यांचा वेढा पडला आहे. आपल्याला काळजी वाटू नये, म्हणून आपल्या कानांवर हे घातलं नव्हतं.'

'राजे, याचा परिणाम?'

'आता काळजी करायची नाही. आमचे सारे गड भक्कम उभे आहेत; एवढंच नव्हे, तर आमच्या फौजा दिलेरखानाला तोंड द्यायला समर्थ आहेत. आम्ही सांगतो, याचं प्रत्यंतर थोड्याच दिवसांत आपल्याला दिसून येईल.'

राजे तातडीने जिजाबाईंच्यासह रायगडावर आले. दोन प्रहरी त्यांनी बाळाजी आवजींना बोलाविले. राजे म्हणाले,

'बाळाजी, सरनौबत प्रतापरावांना तातडीचा खलिता पाठवायचा आहे. प्रतापरावांना लिहा : 'तुम्ही लष्कर घेऊन सिताफीने वरघाटे साल्हेरीला जाऊन साल्हेरीला पडलेला वेढा मोडून काढणे. बेहलोलखानावरही छाप घालून बेहलोलखान मारून चालविणे आणि कोकणातून मोरोपंत पेशवे यांस कुल फौजेसह तुम्हांस मिळण्यास पाठवू. ते इकडून येतील आणि तुम्ही वर घाटी येणे. असे दुतर्फा चालून घेऊन गनिमास मारून गर्दीस मेळविणे.' समजलं?'

'जी!'

बाळाजी आवजी दप्तरी गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुण्याच्या हल्ल्याने राजे पुरे बेचैन होते. एखाद्या संतप्त वाघाने येरझाऱ्या घालाव्या, तसे राजे महालात येरझाऱ्या घालीत होते. राजे जगदीश्वराचे दर्शन घेऊन आले. रात्र पडू लागली. वाड्यात समया पेटल्या. राजांनी सूर्यराव काकड्यांना बोलावले. काकडे येताच राजांनी विचारले,

‘येसाजी आले?’

‘जी! एवढ्यात येतील.’

‘अजून आले नाहीत? केव्हा माणूस पाठवलात?’

‘आपली आज्ञा झाली, तेव्हाच महाडहून माणूस पाठवला होता.’

‘काकडे! तुम्ही जा, आणि बाळाजी आवजींना पत्र घेऊन यायला सांगा. येसाजी येताच मला कळवायला विसरू नका.’

राजांचा संतप्त भाव पाहून काकडे वळले. थोड्याच वेळात बाळाजी आले. राजे महालात फेऱ्या घालीत होते. महादेव भिंतीलगत उभा होता. बाळाजींना पाहताच राजांनी विचारले,

‘पत्र लिहिलं?’

‘जी!’

‘वाचा!’

बाळाजींनी राजांच्याकडे पाहिले. राजांचा आवाज करडा बनला होता. त्यांनी आज्ञा दिली,

‘वाचा!’

बाळाजींनी रुमाल सोडला. पत्र हाती घेतले. महादेवाकडे पाहताच महादेव दिवटी घेऊन

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नजीक गेला. महादेवाने धरलेल्या उजेडात बाळाजी वाचीत होते :

> ‘तुम्ही लष्कर घेऊन सिताबीने वरघाट साल्हेरीस जाऊन साल्हेरीस पडलेला वेढा मोडून काढणे... असे दुतर्फा चालून घेऊन गनिमास मारून गर्दीस मेळविणे...’

बाळाजींनी पत्र वाचून संपविले, आणि धीर करून राजांकडे पाहिले.

‘सुरेख!’ राजे उद्गारले. ‘आमचा शब्दन् शब्द पुरा टिपलात. बाळाजी, परत वाचा पाहू.’

बाळाजींनी आवंढा गिळला. शेजारी उभ्या असलेल्या महादेवला चेहऱ्यावरचे हास्य लपविणे कठीण गेले. राजांचे लक्ष महादेवाकडे गेले. राजांनी विचारले,

‘का, महादेव? काय झालं?’

महादेवाचे हसू लोपले. बाळाजींचे पाय उभ्या जागी कापू लागले. हातातला कागद थरथरू लागला. राजांनी विचारले,

‘काय झालं, बाळाजी?’

बाळाजींनी एकदम राजांचे पाय धरले. राजे मागे सरत म्हणाले,

‘उठा, बाळाजी. काय चालवलंय्?’

बाळाजी सारे अवसान एकवटून म्हणाले,

‘क्षमा, महाराज!’

‘कशाबद्दल?’

‘आपण दोन प्रहरी तर्जुमा सांगितलात. सकाळी पत्र पाठवायचं असल्यामुळं रात्री लिहून ठेवता येईल, असं वाटलं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बोला.’

बाळाजींनी श्वास घेतला. ‘अचानक आपली आज्ञा झाली.’

‘मग वाचलंत, ते काय? पाहू!’

बाळाजींनी हातांतला कागद राजांच्या हाती दिला. राजांनी पाहिले, तो कागद कोरा होता. आश्चर्याने बाळाजींच्याकडे पाहिले. बाळाजी घाबरून म्हणाले,

‘आपली इतराजी होईल, ह्या भीतीनं मला आठवला तो मजकूर बोलण्याचं धाडस केलं.’

‘बाळाजी, आम्ही रागावलो नाही. उलट, आम्ही प्रसन्न झालो. आत्ता सांगितलेला शब्द दुसऱ्या क्षणी विसरून जाणारे आमच्या दप्तरी अनेक आहेत. पण आमचा प्रत्येक शब्द मनात कोरून ठेवणारे तुमच्यासारखे विरळ. आजपासून दप्तराची चिटणिशी तुम्ही पाहा. सकाळी पत्र घेऊन या.’

बाळाजी आवजी राजांच्या थोर मनाने भारावले. ते जाण्यासाठी वळले, तोच राजांची हाक आली.

‘बाळाजी!’

‘जी?’ बाळाजी वळले.

‘परत असले कोरे कागद वाचू नका!’

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग सातवा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

संकट जितके मोठे, तितका राजांचा हुरूप दांडगा. मोगलांनी आक्रमणाचा पवित्रा टाकलेला पाहताच त्याला तोंड देण्यासाठी राजे उभे ठाकले. दुसऱ्या दिवशी खलिते घेऊन जासूद गडावरून रवाना होऊ लागले. मोरोपंत पेशवे कुडाळ भागात होते. त्यांना पायदळ घेऊन महाडात येण्याची राजांनी आज्ञा केली. कुडाळ वगैरे सर्व लांबलांबच्या ठिकाणांहून सैन्य काढून आणून ते महाडात जमविण्याचा राजांचा इरादा होता. राजांच्या पत्रानुसार पांगलेली मराठी सेना महाडला गोळा झाली.

सूर्यराव काकडे आपल्या फौजेनिशी राजांच्या जवळच होते. राजांच्यासह ते महाडला गेले. राजांच्या सैन्याने महाड शहर गजबजून गेले. महाडमध्ये मोरोपंत पिंगळे दाखल झाले. त्याचबरोबर रूपाजी भोसले, खंडोजी जगताप, मोरो नागनाथ असे अनेक वजीर-उमराव राजांच्या आज्ञेची वाट पाहत होते. पुण्याची बातमी साऱ्यांना कळली होती. साऱ्यांच्या मनात दिलेरखानाचा सूड उगवायचा होता. मोरोपंत म्हणाले,

'महाराज, आज्ञा होईल, तर आम्ही दिलेरखानावर चालून जातो.'

क्षणभर राजांचा हात दाढीवर विसावला. त्यांनी सांगितले,

'मोरोपंत, मोगली फौजांचा पराभव करणं इतकं अवघड नाही, हे आम्हांला माहीत आहे. पुण्याचा शह उठविण्याचा आम्ही दुसरा मार्ग शोधला आहे. प्रतापरावांना आणि आनंदरावांना वरघाटावरून साल्हेरीचा वेढा उठविण्यासाठी चालून जाण्यास आम्ही कळविलं आहे. तुम्ही फौज घेऊन कोकणात जा. दोन्ही बाजूंनी एकाच वेळी हल्ला चढविताना मोगल फौजेचा पाडाव व्हायला आणि साल्हेरी मोकळी व्हायला अवकाश लागणार नाही. हे यश मिळवलंत, तर पुण्याचा शह चटकन सुटेल, असा आमचा कयास आहे. यात भवानी तुम्हांस यश देवो!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी सर्वांना विडे दिले; आणि महाडची फौज मोठ्या उत्साहाने साल्हेरीकडे कूच करू लागली.

राजांची आज्ञा प्रतापरावांनाही पोहाचली होती; आणि आनंदराव आपल्या घोडदळानिशी साल्हेरीकडे निघाले. प्रतापरावांना मदत करण्यासाठी कोकणातून निघालेली फौज अंतर कमी करीत होती. दोन्ही सैन्यांचे जासूद एकमेकांना आपले टप्पे कळवीत होते. दोन्ही फौजा एकत्र आल्या; आणि एल्गाराचा दिवस ठरला.

साल्हेरीच्या गडाला पन्नास हजारांची मोगल फौज वेढा देऊन बसली होती. गडाच्या सर्व बाजूंनी वेढा जारी होता. मोगल सरदारांचे डेरे, शामियाने, छावण्यांच्या राहुट्या ठिकठिकाणी दिसत होत्या. ऐशआरामी थाटात इखलासखान वेढ्यावर नजर ठेवून होता. त्याच्या बरोबर मुहकमसिंग चंदावत, अमरसिंह चंदावत यांसारखे अनेक मोठमोठे सरदार होते. शाही थाटात, ऐशआरामात हा वेढा चालू होता. औरंगजेबाने अफाट दौलत आणि अगणित फौज दिल्यामुळे कुणालाच वेळकाळाचे भान नव्हते.

राजांचे हेर वेढा अजमावून परतले. दबा धरलेल्या सर्व मराठी फौजांना प्रतापरावांनी हुकूम दिले.

रात्र सरली. सूर्य उगवला. साल्हेरचा मराठी किल्लेदार गडावरून नजर फिरवीत होता. दृश्य नेहमीचेच होते. आता थोड्या वेळाने वेढ्यातून तोफा डागल्या जाणार होत्या. एखादी तुकडी गडाला भिडणार होती; गडावरून तोफा डागल्या, की परत वेढ्यात परतणार होती. दिवसातून दोन-तीन वेळा हे होणार होते. सूर्य मावळणार होता; काळजीची रात्र परतणार होती. किल्लेदाराला हे नित्याचे झाले होते. ठरल्याप्रमाणे तो तटावरून फिरत होता; पहारे बदलीत होता. हे किती दिवस चालणार, हे त्याला माहीत नव्हते. जिवाची खंत नव्हती, तर तो विचार तरी कशाला करील?

मोगल छावणी सकाळच्या उन्हात आळस झाडीत होती. घोड्यांच्या खिंकाळण्याने, हत्तींच्या चीत्काराने छावणी पुरी जागी झाली. इखलासखान वेढ्याचा बेत ठरविण्यात मग्न झाला होता आणि अचानक शिंगाचा आवाज उठला. इखलासखान कान टवकारून ऐकू लागला. छावणीत दुसऱ्याच क्षणी गडबड उडाली. इखलासखानच्या डेऱ्यात जासूद घुसला. कुर्निसात करून तो म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘खानसाब! मरगट्ठे आ गये!’

खानाचा कानांवर विश्वास बसेना!

...मराठे आले!

खानाने भराभर हुकूम दिले. साऱ्या छावणीत एकच गडबड उडाली. एका छावणीतून दुसऱ्या छावणीत स्वार धावू लागले. हत्तीवर हौदे चढले. घोड्यांवर खोगिरे चढविली गेली. इखलासखान चिलखत घालून हत्तीवर बसला. सारी फौज तयार होत असता त्यांना मराठे दिसले.

इखलासखानाने आवेशाने हुकूम दिला. मोगल फौज मराठ्यांना भिडली. त्याच वेळी वेढ्याच्या दुसऱ्या बाजूने मराठे उतरले. घनघोर युद्धाला सुरुवात झाली. ‘हर हर महादेव’च्या गर्जनेने साल्हेरचा परिसर घुमला. टापांचा आवाज, शस्त्रांचा खणखणाट, घोड्यांचे-हत्तींचे ओरडणे, वर्मी घाव लागताच उठणारी अंतकाळची आर्त किंकाळी अशा अनेक आवाजांनी भूमी कंपित होत होती. दोन्ही बाजूंची हजारो माणसे पडली. रक्ताचे पूर वाहिले. मोगल सेनेला जीव वाचवता पुरेवाट झाली. मोरोपंत, आनंदराव, प्रतापराव वगैरे उमरावांनी शिकस्त केली.

या विजयात मराठ्यांना सहा हजार घोडे, शंभरावर हत्ती आणि हजारो उंट मिळाले. लक्षावधी रुपयांचे जडजवाहीर, मालमत्ता, खजिना हाती आला. खासे इखलासखान पाडाव जाले. मोगलाईचे बावीस नामांकित वजीर धरले.

या युद्धात मराठ्यांचे अनेक वीर पडले; पण त्यांत ज्याच्या शौर्याने रणास शोभा आणली, आणि मृत्यूने विजयाचा आनंद लाभू दिला नाही, असा एक नामांकित सरदार होता. त्याचे नाव ‘सूर्यराव काकडे.’

□

२

सायंकाळच्या वेळी नगारखान्याच्या डाव्या तटालगत असलेल्या कातळावर राजे उभे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होते. शेजारी बाळाजी आवजी होते. खालच्या चौकात संभाजीराजे स्वार झाले होते. त्यांच्या पुढ्यात छोटे राजाराम बसले होते. आपल्या डाव्या हाताने संभाजीराजांनी राजारामांना सावरले होते. प्रत्येक उशीबरोबर राजारामांच्या चेहऱ्यावर हसू उमटत होते. पाच-सहा फेरे झाल्यानंतर संभाजीराजे कातळानजीक आले. राजे पुढे झाले; आणि त्यांनी राजारामाला घेण्यासाठी हात पुढे केले. दोन वर्षांच्या राजारामांनी एकदम ते हात झिडकारले. संभाजीराजांच्याकडे पाहत ते म्हणाले,

'दादाऽऽ, इ्या इ्या ऽऽ'

सारे हसले. संभाजीराजे म्हणाले,

'बाळराजे, आता कौतुकानं उतरा. नाही तर तुमच्यासकट आम्हांला पण आबासाहेबांचा प्रसाद मिळेल.'

राजारामांचा चेहरा रडवा झाला. राजे म्हणाले,

'संभाजीराजे, फारच लाडावून ठेवलंत त्यांना. आणखीन दोन फेरे मारा, नाही तर रडतील बाळराजे.'

संभाजीराजांनी परत घोड्याला टाच दिली. राजे त्या रपेटीकडे पाहत होते आणि त्याच वेळी गडावर आलेला जासूद नजरेत आला. बाळाजी कातळाखाली उतरले. जासुदाने दिलेली थैली त्यांनी घेतली. जासुदासह राजांच्या जवळ येत ते म्हणाले,

'पेशव्यांची थैली आली आहे.'

क्षणभर राजांच्या चेहऱ्यावर चिंता व्यक्त झाली. अधीरपणे ते म्हणाले,

'वाचा.'

बाळाजींनी थैली उघडली. पत्र वाचीत असता ते आनंदाने म्हणाले,

'महाराज! आनंदाची बातमी! पंतांनी आणि सेनापतींनी साल्हेरचा वेढा मोडून शत्रूचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पराजय केला. इतकेच नव्हे, तर मुल्हेरही काबीज झाले आहे.'

राजे म्हणाले, 'बाळाजी! या वार्तेसाठी आमचे कान उतावीळ होते.'

बाळाजी सांगत होते....

'महाराज! शत्रूचे सहा हजार घोडे, शंभरावर हत्ती आणि हजारो उंट मिळाले. इखलासखानाचा पुरा पाडाव झाला. मोगलांचे बावीस सरदार धरले. लक्षावधी होनांची मालमत्ता, जडजवाहीर, खजिना हाती आला.'

'व्वा! सांगा, बाळाजी!'

'शत्रूचे हजारो पडले. तसेच आपलेही हजारो कामी आले.'

राजांच्या चेहऱ्यावर विषण्णता पसरली.

'आणि?'

'साल्हेरच्या रणांगणात सूर्यराव काकडे कामी आले.'

'अरेरे!' राजे कळवळले. क्षणात राजांच्या डोळ्यांसमोर सूर्यराव काकडे उभे राहिले. राजांचा जीव भरून आला. राजे दु:खाने उद्गारले,

'अशा चंदनाची आहुती घेतल्याखेरीज रणभूमी प्रसन्न होतच नाही का?'

राजांनी स्वत:ला सावरले. जासुदाकडे पाहत राजे म्हणाले,

'बाळाजी, आम्ही आलोच. तुम्ही पुढं व्हा. सदरेवर सोन्याचं कडं घेऊन या.'

राजांनी संभाजीराजांना इशारत केली. संभाजीराजे जवळ आले. राजांनी राजारामांना घेतले; आणि ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शंभूराजे, घोडं मोतद्दाराकडं द्या आणि सदरेवर या.’

राजे जिजाबाईंच्या सह राजसदरेवर आले. तेव्हा संभाजीराजे, बाळाजी, थैली घेऊन आलेला जासूद तेथे हजर होते. जिजाबाईंनी विचारले,

‘राजे, काय प्रकार आहे?’

‘मासाहेब, आमच्या सेनापतींनी, पेशव्यांनी थोर पराक्रम केला. साल्हेरचा वेढा मारून शत्रूचा पुरा पराभव केला. दिलेरखानाला आमचं बळ आता समजेल. आमचे युवराज आता राज्यकारभार पाहतात. या यशाची वार्ता घेऊन आलेल्या जासुदाच्या हाती सोन्याचं कडं चढविण्याचा मान आज त्यांना मिळणार आहे.’

बाळाजी आवजींनी तबक पुढे धरले. संभाजीराजांनी तबकातले कडे उचलून जासुदाच्या हाती चढविले. जासुदाने गहिवरून राजांचे, जिजाबाईंचे पाय शिवले. राजे आनंदाने उद्गारले,

‘युवराज! पाहता काय? या आनंदासाठी गडावर साखर वाटा; तोफा उडवा!... बाळाजी, तुम्ही युवराजांच्या बरोबर जा.’

बाळाजी, संभाजीराजे गेले. राजांनी दीर्घ नि:श्वास सोडला. जिजाबाईंना हाताचा आधार देऊन राजे चालत होते. जिजाबाईंनी विचारले,

‘शिवबा, आता खरं सांग. काय झालं?’

‘काही नाही, मासाहेब.’ राजे बोलले.

जिजाबाई हसल्या. म्हणाल्या,

‘अरे, म्हातारी झाले, तरी बुद्धी अजून शाबूद आहे. ढोंग पुरे झालं. सांग ना!’

उभ्या जागी राजांचे डोळे भरले. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मासाहेब! साल्हेरच्या रणांगणात आमचे सूर्याजीराव काकडे पडले; हजारो कामी आले!’

जिजाबाई थांबल्या. राजांच्याकडे पाहत म्हणाल्या,

‘आणखीन एक मोहरा हरवला!... पण, राजे, लढाई म्हटली, की याला तयार असायलाच हवं.’

‘ते आम्ही जाणतो. पण वाढत्या जबाबदारीनं आमचं मन बेचैन होऊन उठतं.’

‘कसली जबाबदारी?’

‘मासाहेब, अमाच्या शब्दाखातर, एका स्वप्नासाठी ही हजारो माणसं आनंदानं बलिदान करतात. त्या स्वराज्यापायी खर्ची पडलेल्या जिवांचं बलिदान वाया जाऊ नये, एवढंच वाटतं. गेलेले आपलं काम करून मोकळे झाले. पण मागे राहिलेले आम्ही... आमची जबाबदारी वाढते.’

‘चिंता करू नका, राजे! सर्व मनोरथ सिद्धीस नेणारी ती आदिमाया सारं करील.’

साल्हेर-मुल्हेरच्या विजयाने राजांच्या तर्काप्रमाणे दिलेरखानाचा शह उठला. भयभीत झालेला दिलेरखान माघारी वळला. औरंगजेबाला जेव्हा ही बातमी समजली, तेव्हा त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. त्याने सुभेदाराला लिहिले,

> ‘आमचा मुलूख शत्रूने जिंकला, तुमच्यासारख्या मातब्बर सरदारांना नामोहरम केले, हे आम्हांला कळविण्याऐवजी तुम्ही मेला का नाही? जगलात कशाला? आदिल-कुत्ब, फिरंगी, हबशी वगैरे सत्ताधारी त्या शिवाजीस नजराणा पाठवून खूश करतात. त्याऐवजी तुम्ही सर्व मिळून त्याच्यावर चाल कराल, तर पराभव करायला किती वेळ लागेल?’

बादशहाने लिहिलेल्या पत्राला बहादुरखानाने उत्तर पाठविले :

> ‘आपले पत्र पावले. आपण शिवाजीचा बंदोबस्त आम्ही करावा, असे इच्छिता; आमच्या पराभवांना ठपका देता. पण हुजुरांच्या लक्षात येत नाही की, खुद्द शिवाजी आग्रा येथे कैदखान्यात सापडला असता आपल्या अत्यंत जबर कैदेतून तो पक्ष्यासारखा पुत्रासह पळून गेला. ही गोष्ट खाविंदांनी नजरेसमोर ठेवली, तर येथे आम्हांला पराभव का स्वीकारावा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

> लागतो, हे खाविंदांच्या ध्यानी येईल, आणि आमची कसूर झाली, असे खाविंदांना वाटणार नाही. हल्ली शिवाजीने दूरवर विचार करून आपला मुसलमान वकील काजी हैदर आमच्याकडे पाठविला आहे. आपली आज्ञा झाली, तर मामुली सल्ला करून शिवाजीशी चांगले संबंध राखता येतील.'

या पत्रामुळे औरंगजेबाचा संताप आणखीन उसळला. त्याने शिवाजीच्या वकिलाला गिरफदार करण्याची आज्ञा बहादुरखानास दिली. जेव्हा ही आज्ञा दिल्लीस लिहिली जात होती, तेव्हा रायगडावर मोरोपंत, प्रतापराव वगैरे आपल्या वीरांची राजे आतुरतेने वाट पाहत होते. दररोज त्यांच्या मुक्कामांच्या बातम्या गडावर येत होत्या. एके दिवशी गडाच्या पायथ्याला सारे आल्याचे समजले. राजांनी गडावर गुढ्या, तोरणे उभी केली.

राजे राजसदरेवर उभे होते. मागे बैठकीवर जिजाबाई, संभाजीराजे बसले होते. राजांचे लक्ष समोरच्या नगारखान्याकडे खिळले होते. नगारखान्याच्या भव्य प्रवेशद्वारी आलेले प्रतापराव, मोरोपंत राजांना दिसले. त्यांच्या पाठोपाठ आनंदराव, व्यंकोजीपंत चालत होते. त्यांच्या मागून अनेक सरदार येत होते.

उतावीळ झालेले राजे न कळत राजसदरेच्या पायऱ्या उतरले. सर्वांनी मुजरे केले. प्रेमाने पुढे होऊन राजांनी चौघां वीरांना उरी कवटाळले. राजांना शब्द अपुरे होते.

चौघांसह राजे सदरेवर आले. राजांनी चौघांवरून द्रव्याची खैरात केली; सर्व सरदारांना, पराक्रम गाजविणाऱ्या वीरांना मुक्त हस्ताने बक्षिसे दिली. राजे मोरोपंतांना म्हणाले,

'आज आमच्या आनंदाला सीमा नाहीत. आमचे पेशवे आणि आमचे सेनापती या दोघांनी केलेला पराक्रम अलौकिक आहे. आज सूर्यराव काकडे यांच्यासारख्या जिवलगांचा सत्कार आम्हांला करता येत नाही, याची खंत वाटते. मोरोपंत, आम्ही सूर्यरावांच्या घरी स्वत: जाऊ.'

'महाराज, आणखी एका घरी जाणं आवश्यक आहे.' प्रतापराव म्हणाले.

'कुणाच्या?'

'रामजी पांगेऱ्यांच्या.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'रामजी पांगेरे? आमचे कणेरागडाचे किल्लेदार?'

'जी!'

'सांगा, प्रतापराव! काय झालं?'

'महाराज, आम्ही जेव्हा साल्हेरीचा बेत आखीत होतो, तेव्हा दिलेरखानाची नजर चांदवडजवळील कणेरागडाकडे वळली. दिलेरखान सहा हजार फौजेनिशी गडावर चालून येतो, हे पाहताच रामजीनं आपले लोक गोळा केले. रामजीनं आव्हान दिलं, 'निदान करायचं. आपले सोबती असतील, त्यांनी पुढं यावं.' रामजीच्या हाकेला सातशे मावळे तयार झाले. रामजी सातशेंसह गडाखाली उतरला, आणि दिलेरखानाला सामोरा गेला. अवघा सातशेंचा जमाव भांडायला येतो, हे पाहताच दिलेरखानाची फौज पायउतार झाली; आणि चौफेर मावळे वेढले गेले. रामजी आपल्या संख्येची पर्वा न करता शर्थीनं लढत होता. एक प्रहर, शिमग्याची टिपरी जैसी दणाणते, तैसे मावळे एक प्रहर भांडिले. मग सातशे माणूस रामजी पांगेरा सर्वही उघडेबोडके होऊन एकएकास वीस-तीस जखमा होऊन सारे त्या रणांगणात कामी आले. खुद्द दिलेरखानानं तोंडात आंगोळी घालून आश्चर्य केलं. त्या पराक्रमानं थक्क झालेला दिलेरखान कणेऱ्याकडं न पाहता माघारी वळला. दिलेरखानानं बाराशे पठाण रणास आणिले.'

राजे थकून सदरेवर बसले. त्यांचा आवाज कापरा बनला. ते म्हणाले,

'प्रतापराव, बरं झालं, हा पांगेरा गेला. त्याच्यावरून राज्य ओवाळून टाकलं असतं, तरीही दारिद्र्यच दिसलं असतं. अफझलखानप्रसंगी पराक्रम गाजविणारा पांगेरा कणेऱ्याचं रक्षण करता कामी आला... मोरोपंत, पांगेऱ्यासह लढणाऱ्या प्रत्येक मावळ्याची चौकशी करा. पांगेऱ्याच्या घरी जाऊन नतमस्तक होणं हे आमचं कर्तव्यच आहे. ते आम्ही बजावू.'

'पण, महाराज!' मोरोपंत म्हणाले. 'आपल्या ह्या वाढत्या यशानं संतापलेल्या औरंगजेबानं बहादुरखानाला सुभेदारी दिली आहे. असं आम्ही ऐकतो.'

'त्याची कसली भीती बाळगता, मोरोपंत?' राजे एकदम प्रसन्न मुद्रेने म्हणाले, 'बहादुरखान पेंडीचं गुरू आहे; समोर तुकडा पडला, की तृप्त होईल. त्याचा गुमान कसला? आमच्या मुलुखात पोहोचतो, म्हटलं, तरी त्याला सहज दोन वर्षं लागतील.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रतापरावांनी विचारले, ‘महाराज, साल्हेरीच्या युद्धात पाडाव झालेले मोगल सरदार आहेत, त्यांचं काय करायचं?’

‘युद्धात शरण आलेल्या शत्रूंना आम्ही विनाकारण कधी बळी दिलंय् का? प्रतापराव, त्या सरदारांना बाइज्जत सन्मानानं मुक्त करा. त्यांना वस्त्रं, भूषणं देऊन परत पाठवा.’

राजांची सदर उठली. राजे आपल्या महालाकडे जात होते; पण त्यांच्या डोळ्यांसमोरून रामजी पांगेरा बाजूला सरकत नव्हता.

❑

३

सायंकाळची वेळ होती. उन्हाळ्याचे दिवस असूनही गडमाथ्यावर गारवा होता. राजांच्या महाली मोरोपंत, बाळाजी, अनाजी हजर होते. संभाजीराजे महालात आले. ते राजांना म्हणाले,

‘आबासाहेब, पागेची इमारत पुरी झाली. आपण जरा नजर टाकावी, अशी हिरोजींची इच्छा आहे.’

‘आणि तुमची?’ राजांनी विचारले.

‘आपण याल, म्हणून मी शब्द दिला आहे.’ संभाजीराजे म्हणाले.

‘पण, युवराज, आम्ही मोहिमेबद्दल बोलतो आहो. पागा उद्या पाहिली, तर नाही का चालणार?’ अनाजींनी विचारले.

अनाजींचा प्रश्न अनपेक्षित होता. साऱ्यांची नजर त्यांच्याकडे वळली. संभाजीराजांच्या चेहऱ्यावर क्षणभर संताप उमटला. संयम राखीत ते म्हणाले,

‘ते आबासाहेबांनी ठरवायचं!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे हसले; म्हणाले, 'अनाजी, युवराजांनी शब्द दिला आहे, तो पाळायला हवा. आणि मोहिमेबद्दल आपल्याला जाता-जाताही बोलता येईल.' संभाजीराजांच्याकडे वळून राजे म्हणाले, 'बाळराजे येतात का, पाहा. त्यांना फिरायला यायला आवडतं.'

युवराज गेले. राजे अनाजींना म्हणाले,

'अनाजी, आम्ही राज्यकारभार युवराजांना सांगत आहो. त्यांच्या शिलेदारांच्या यादीत रूपाजी भोसल्यांसारखी जबाबदार माणसं घातली आहेत. तरुण वयाच्या हुरुपात ते आहेत. तो हुरूप टिकविला पाहिजे. त्यांच्या शब्दाला वजन प्राप्त करून देण्याचं हेच वय.'

'शिकार आणि राज्यकारभार सारखाच मानतात युवराज!' अनाजी बोलून गेले.

'ती गल्लत आमच्याही जीवनात घडली होती; पण दादोजींनी आमचं लक्ष इकडं वळवलं. आमच्या ध्यानी युवराजांचा शिकारीचा शौक आला, म्हणूनच राज्यकारभाराची जबाबदारी त्यांच्यावर टाकली. रुळवून घेतलं, तर रुळतील ते.'

अनाजी काही बोलले नाहीत. त्याच वेळी संभाजीराजे महालात आले. त्यांना एकटेच आलेले पाहून राजांनी विचारले,

'बाळराजे आले नाहीत?'

'आईसाहेब म्हणाल्या... त्यांना फिरायला नेऊ नका.'

'आईसाहेबांना सांगा की, आम्ही बाळराजांना फिरायला नेतो आहो. त्यांना घेऊन या.'

युवराज गेले. राजे उठत म्हणाले,

'चला, अनाजी. पाहू, पागा कशी सजलीय्, ती. जगदीश्वराचंही दर्शन घडेल.'

राजे महालाबाहेर आले; आणि संभाजीराजाची गाठ पडली. युवराज एकटेच आले होते. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बाळराजे कुठं आहेत?’

युवराजांनी मान खाली घातली. ते म्हणाले,

‘आईसाहेब म्हणाल्या... बाहेर हवा गार आहे. तेव्हा बाळराजांना...’

‘तुम्ही थांबा. आम्ही घेऊन येतो बाळराजांना...’

राजे भरभर पावले टाकीत जात होते. कचेरीसोप्यातून राजे सोयराबाईंच्या महाली गेले. राजांना पाहताच राजारामांच्या चेहऱ्यावर हास्य विलसले. अडखळत्या पावलांनी बाळराजे झेपावले. राजांच्या पायांना मिठी घालीत मान उंचावीत ते म्हणाले,

‘आबा ऽ ऽ, भूर्र!’

‘हो, हो, जाऊ या!’ राजांची नजर सोयराबाईंच्याकडे गेली. त्या राजांच्याकडे पाहत होत्या. राजे म्हणाले,

‘आम्ही फिरायला जातो आहो. बाळराजांना घेऊन जातो.’

‘नको!’

‘कारण?’

‘परवाच सरदी झाली. गार हवेत फिरणं सोसत नाही त्यांना.’ सोयराबाई म्हणाल्या.

राजे हसण्याचा प्रयत्न करीत म्हणाले,

‘मराठ्यांची पोरं अशीच घट्ट व्हायची. हे चालायचंच!’

‘नेऊ नये बाळराजांना!’ सोयराबाई बोलल्या.

राजांचे हास्य विरले. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेब, आम्हांलाही मुलांची काळजी आहे. एवढं जपायला नको त्यांना.’

सोयराबाई किंचित हसल्याचा भास झाला. त्यांचे शब्द उमटले,

‘बरोबर आहे! आपल्याला दोन मुलं आहेत. मला मात्र एकच आहे.’

एखादा आसूड फुटावा, तशी तीव्र वेदना क्षणभर राजांच्या चेहऱ्यावर उमटून गेली. डाव्या हाताने बाळराजांची मिठी सोडवीत ते बोलले.

‘राणीसाहेब! हे बोलला नसता, तर फार बरं झालं असतं!’

राजे वळले. राजारामांचे रडणे, मागून येणारी त्यांची पावले राजांना कळत होती. राजांनी आपली पावले भरभर उचलली; आणि ते महालाबाहेर पडले.

□

४

मध्यान्हीचा सूर्य गडावर तळपत होता. राजे हिरोजी इटलकरांसह हत्तीखान्याचे काम पाहत होते. हत्तीखान्याचे दगड चढत होते. अनेक मजूर कामात गर्क झाले होते. राजे हिरोजींना म्हणाले,

‘हिरोजी, काम सुरेख होत आहे, यात शंका नाही. पण खरं सांगायचं झालं, तर या पिलखान्याची गडावर गरज नव्हती. ऐरावताचं ऐश्वर्य बाळगण्याची आम्हांला हौस नाही. मोगली विजयात आम्हांस हत्ती मिळतात, त्यांचं काय करायचं, याचं आम्हांस कोडं पडतं. आमचा भरवसा घोडदळावरचा. उघड्यावरची छावणी.’

‘पण, महाराज, हत्तीशिवाय गडाला शोभा नाही, सैन्याला बळकटी नाही.’

राजे हसले. ‘हिरोजी, पहिलं बरोबर; दुसरं चूक. मोगली पराजयाची अनेक कारणं... त्यांतलं एक कारण हत्तीची अंबारी. अचूक टिपायला हत्तींच्या अंबारीइतकी सोपी गोष्ट नाही. सेनापती पडला, की सेनेची वाताहत व्हायला केवढा वेळ?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्याच वेळी राजांच्या कानांवर आवाज आला,

‘जय जय रघुवीर समर्थ!’

राजांनी पाहिले, तो एक भगवी कफनी धारण केलेला गोसावी राजांच्या रोखाने येत होता. राजांच्या जवळ येऊन त्याने वंदन केले. राजांनी तेवढ्याच नम्र भावाने नमस्कार केला. राजे म्हणाले,

‘गोसावी, आपलं नाव?’

‘या जीवाला ‘दिवाकर गोसावी’ म्हणतात.’

‘चाफळला असता?’

‘होय!’

‘समर्थांकडील सर्व क्षेम आहे ना?’

‘रामकृपा!’

‘दिवाकर गोसावी, चलावं.’ राजे म्हणाले.

‘राजे, समर्थांनी आपणांस पत्र दिलं आहे. त्याचा आधी स्वीकार व्हावा.’

‘पत्र? आम्हांला?’

दिवाकराने काखेतल्या झोळीतून पत्र काढले, आणि ते राजांच्या हाती दिले. राजांनी ते मस्तकी लावले. पत्र वाचण्यास राजे अधीर झाले होते. दिवाकर गोसाव्यांच्यासह ते सदरेवर गेले. दिवाकरांना आसन देऊन राजांनी पत्र मोरोपंतांच्या हाती दिले. राजे म्हणाले,

‘वाचा.’ पण क्षणात राजे उद्गारले, ‘थांबा! मासाहेबांनीही ते ऐकू द्या. गोसावी, तुमची आज्ञा असेल, तर आम्ही आत जाऊन येतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दिवाकराने मान डोलावली. राजे मोरोपंतांसह जिजाबाईंच्या महाली गेले. महालात जाताच म्हणाले,

‘मासाहेब! आमचं भाग्य उजाडलं! आम्हांस आज पत्र आलं आहे.’

‘कुणाचं?’ जिजाबाईंनी बसल्या जागेवरून विचारले.

‘समर्थांचं!’ म्हणत राजे जिजाबाईंच्या नजीक बसले. जिजाबाईंनी विचारले,

‘काय पत्र आलं आहे?’

‘आम्ही अद्याप वाचलं नाही. ते पत्र घेऊन आम्ही तडक इकडे आलो.’ शेजारी उभ्या असलेल्या येसूबाईंना राजे म्हणाले, ‘येसू! दाराशी मोरोपंत उभे असतील. त्यांना बोलाव.’

मोरोपंत आत आले. राजांनी आज्ञा केली.

‘मोरोपंत, वाचा!’

मोरोपंतांनी पत्र वाचावयास सुरुवात केली :

‘निश्चयाचा महामेरू। बहुत जनांस आधारू।
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।१।।
परोपकाराचिया राशी। उदंड घडती जयाशीं।
जयाचे गुणमहत्त्वाशीं। तुळणा कैशी।।२।।
नरपति हयपति। गजपति गडपति।
पुरंधर आणि शक्ती। पृष्ठभागीं।।३।।
यशवंत कीर्तिवंत। सामर्थ्यवंत वरदवंत।
पुण्यवंत आणि जयवंत। जाणता राजा।।४।।
आचारशील विचारशील। दानशील धर्मशील।
सर्वज्ञपणें सुशील। सर्वां ठायीं।।५।।
धीर उदार सुंदर। शूरक्रीयेसी तत्पर।
सावधपणेंसी नृपवर। तुच्छ केले।।६।।
तीर्थक्षेत्रें तीं मोडिलीं। ब्राह्मणस्थानें बिघडलीं।
सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला।।७।।
देवधर्म गोब्राह्मण। करावयासि रक्षण।
हृदयस्थ झाला नारायण। प्रेरणा केली।।८।।

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

उदंड पंडित पुराणिक। कवीश्वर याज्ञिक वैदिक।
धूर्त तार्किक सभानायक। तुमचे ठायीं।।९।।
या भूमंडळाचे ठायीं। धर्म रक्षी ऐसा नाहीं।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हां करितां।।१०।।
आणखी कांहीं धर्म चालती। श्रीमंत होऊनि कित्येक असती।
धन्य धन्य तुमची कीर्ति। विस्तारली।।११।।
कित्येत दुष्ट संहारिले। कित्येकांस धाक सुटले।
कित्येकांसी आश्रय झाले। शिवकल्याण राजा।।१२।।
तुमचे देशीं वास्तव्य केलें। परंतू वर्तमान नाहीं घेतलें।
ऋणानुबंधें विस्मरण जाहलें। बा काय नेणूं।।१३।।'

'थांबा, मोरोपंत! तो श्लोक परत वाचा.' राजे मध्येच म्हणाले. मोरोपंत वाचू लागले :

'तुमचे देशीं वास्तव्य केलें। परंतू वर्तमान नाही घेतलें।
ऋणानुबंधें विस्मरण जाहलें। बा काय नेणूं।।१३।।
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति। सांगणें काय तुम्हां प्रती।।
धर्मस्थापनेची कीर्ति। सांभाळली पाहिजे।।१४।।
उदंड राजकारण तटलें। तेथें चित्त विभागलें।
प्रसंग नसतां लिहिलें। क्षमा केली पाहिजे।।१५।।

पत्र वाचून संपले. महालात शांतता पसरली. राजांनी जिजाबाईंच्याकडे पाहिले. त्यांचे हात जोडले होते; डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. खुद्द राजांचीही तीच अवस्था झाली होती. जिजाबाई म्हणाल्या,

'राजे! समर्थांनी तुमची स्तुती करावी, आणि ती आम्हांला ऐकायला मिळावी! केवढं भाग्य!'

'नाही, मासाहेब! ही स्तुती नाही. हे समर्थांनी आमच्यावर टाकलेलं ओझं आहे! आमच्या कर्तव्याची परत करून दिलेली जाणीव आहे! आमच्या अपराधांना क्षमा करून केलेला तो प्रेमवर्षाव आहे!'

'अपराध कसले?'

'आहेत तर! समर्थांच्यासारखा श्रेष्ठ पुरुष आमच्या राज्यात वावरतो. मुलुखात पसरलेले त्यांचे शिष्य हरघडी आम्हांला मदत करतात. खेडोपाडी जाऊन आमच्या कार्याला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मिळण्याचा आदेश देतात. त्या समर्थांची आणि आमची भेट होत नाही. उलट, त्याबद्दल समर्थ क्षमा मागतात. आम्ही क्षमा करणार! आणि तीही समर्थांना!! अनेक वर्षं या महात्म्याला भेटायला जीव उतावीळ होता... नाही, मासाहेब! आता दिरंगाई होणार नाही. जेथे समर्थ असतील, तेथे आम्ही जाणार! ते पाय दिसतील, तेव्हाच आमच्या मनाला समाधान लाभेल.'

'राजे!' जिजाबाई म्हणाल्या, 'आता प्रवासाची दगदग सोसवत नाही. नाही तर मी सुद्धा आले असते. समर्थ भेटतील, तेव्हा त्यांना आमचा दंडवत सांगा. डोळे मिटण्याआधी त्यांचं दर्शन घडावं, अशी फार इच्छा होती.'

राजांनी गोसावींचा यथोचित सत्कार केला, समर्थांच्या पत्राला उत्तर दिले; आपण चाफळला येत असल्याचा निरोप दिवाकरांच्या बरोबर दिला. राजांचा निरोप घेऊन दिवाकर गड उतरले.

दुसऱ्या दिवशी राजांचे अनेक नजरबाज चाफळ मुलुखाकडे जाऊ लागले.

□

५

राजे चाफळच्या परिसरात आले होते. युवराजांच्या हाती गड देऊन राजे तीन दिवस मजल मारीत होते. ठायी ठायी पेरलेले गुप्तहेर वाटा दाखवीत होते. राजमार्ग सोडून राजे चाफळ जवळ करीत होते. राजे चाफळला आले; आणि तेथे रामदास स्वामींचे वास्तव्य तेथून नजीकच असलेल्या शिंगणवाडीला असल्याचे कळले. राजांनी शिंगणवाडीकडे मोर्चा वळविला.

वाटेवर अनेक गोसावी ठायी ठायी भेटत होते. राजे पुढे गेले, की शंखनाद वातावरणात घुमत होता. त्या नादाला तसेच अनेक नाद येऊन मिळत होते. राजे ते कौतुकाने पाहत होते. राजे शिंगणवाडीच्या परिसरात आले.

डेरेदार आम्रवृक्षांच्या राईत वसलेले ते चिमुकले गाव होते. चारी बाजूंनी दाट झाडीने गाव वेढले होते. सह्याद्रीच्या कुशीत वसलेले तारळी-कोयनेच्या खोऱ्यातले ते गाव

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपल्या निसर्गसौंदर्याने मन प्रसन्न करीत होते. गाव नजीक येताच राजे पायउतार झाले. दिवाकर गोसावी राजांच्या स्वागताला सामोरे आले.

गावाबाहेर एका विशाल आंबराईत समर्थांचा मठ वसला होता. मठाचे वातावरण स्वच्छ, निर्मळ होते. अनेक गोसावी तेथे वावरत होते. बसक्या झोपड्यांच्या समोरची सारवलेली अंगणे लक्ष वेधून घेत होती. ते पाहत असताना राजांना रामायणातील आश्रमांची वर्णने आठवत होती. एके ठिकाणी राजांचे पाऊल क्षणभर अडखळले. राजांच्या समोर थोड्या अंतरावर एक भव्य पिंपळ वृक्ष होता. त्याच्या नजीकच मठाची टुमदार पर्णकुटी नजरेस भरत होती. पर्णकुटीसमोर लहान, पण लक्षवेधी फुलांचे उद्यान होते. राजांचे लक्ष पिंपळ वृक्षाच्या विस्तीर्ण पारावर उभ्या असलेल्या भव्य पुरुषावर खिळले. ते रूप मनात साठवीत राजे पाऊल उचलीत होते.

त्या व्यक्तीच्या मस्तकावर जटाभार शोभत होता. अर्ध्या छातीपर्यंत उतरलेली दाढी, अत्यंत तेजस्वी, पण सावळा देहवर्ण, तीक्ष्ण, पण शांत नजर, चेहऱ्यावर उमटलेले मंद स्मित, भव्य कपाळ, त्यावर एक ठळक आवाळू. एका हातात जपाची माळ आणि दुसऱ्या हाती कुबडी घेऊन उभ्या ठाकलेल्या त्या महापुरुषाला पाहताच राजांचे मन शांत झाले. राजांच्या साऱ्या अंगावर रोमांच उभे राहिले होते. राजे नजीक आले. राजांच्या कानांवर एखाद्या खोल विहिरीतून आवाज उमटावा, तसे शब्द आले,

‘राजे, आम्ही तुमचीच वाट पाहत होतो.’

राजे पार चढून गेले. त्यांनी गुडघे टेकले, आणि अत्यंत लीनतेने समर्थांच्या पायांवर मस्तक टेकले. राजांच्या दोन्ही हातांना स्पर्श झाला. राजांना हातांची पकड जाणवली. त्यांची नजर त्या हातांकडे वळली. राजांना उठवणाऱ्या त्या हातांच्या दंडांत बांधलेल्या रुद्राक्षमाळा बळकट स्नायूंच्या आकुंचनाने तुटतील काय, अशी भीती राजांना वाटली. राजे उठले, आणि दुसऱ्याच क्षणी समर्थांच्या मिठीत बद्ध झाले. समर्थ बोलत होते,

‘राजे! तुमच्या दर्शनानं आज आम्हांला प्रभू रामचंद्राच्या दर्शनाचा लाभ झाला! आम्ही धन्य झालो!’

राजांना ते असह्य झाले. राजांचे शब्द स्वामीजी बोलून गेले होते. राजांच्या नेत्री फक्त अश्रू उरले होते. राजे बळ एकवटून म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘समर्थांनी अपराधाची क्षमा करावी!’

‘शिवबा! इकडे बघा!’

राजांनी नजर उचलली. केवढी प्रसन्न मुद्रा त्यांच्या सामोरी होती! राजांच्या पाठीवर हात ठेवीत स्वामी म्हणाले,

‘शिवबा! तुम्हांला स्व-रूपाची ओळख नसली, तरी आम्ही तुम्हांला ओळखतो. तुम्ही राजयोगी! श्रीमान योगी! तुमची योग्यता आम्ही काय वर्णावी? पण, राजे, तुमच्या योगसाधनात आमच्यासारख्यांची तारांबळ उडते. असं का वागता?’

राजे विस्मयाने समर्थांच्याकडे पाहत होते. समर्थ हसले; म्हणाले,

‘राजे! हा आदिलशाहीचा मुलूख. आमच्या भेटीसाठी असा जीव धोक्यात का टाकता? तुमचे पराक्रम ऐकून आम्हांला आनंद झाला. त्या भरात आम्ही तुम्हांला पत्र लिहिलं. एवढं उतावीळ वर्तन तुम्ही कराल, असं आम्हांला स्वप्नातही वाटलं नाही.’

‘एवढा जीव मोलाचा नाही आमचा!’

स्वामीजींनी एकदम राजांचे मनगट धरले. ते म्हणाले,

‘सबूर, राजे! असं चुकूनही म्हणत जाऊ नका. तुमचं कार्य फार मोलाचं, मोठं आहे. आम्ही प्रभू रामचंद्राचे दास. विचार पेरीत जाणं एवढाच आमचा धर्म. ते विचार संपन्न भूमीत पडले, तर उदंड पीक दिसतं; पण फत्तरावर पडलं, तर ते वाऱ्यावर उडून जातात. फुकाच्या बोलांना काय अर्थ? राजे! तुमच्या कष्टांना यश आलं, या भूमीत खऱ्या अर्थानं आनंदवनभुवन अवतरलं, तरच आमच्या विचारांना, जगण्याला अर्थ! तुमच्याविना आमचं जीवन अपुरं आहे. तुम्ही ते कार्य पुरं करेपर्यंत सुरक्षित राहण्यात आमचं जीवनसाफल्य सामावलं आहे. राजे! तुम्ही येणार, हे कळताच तुम्हांला निरोप पाठविणार होतो; तोच तुम्ही निघाल्याचीही वार्ता आली.’

समर्थांनी राजांना आपल्या जवळ बसवून घेतले. राजांनी आपल्या बरोबर आलेले मोरोपंत पेशवे आणि प्रतापराव गुजर यांची ओळख करून दिली. समर्थ दोघांना म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘साल्हेरीचा पराक्रम ऐकून आमचे कान तृप्त झाले. असाच पराक्रम करीत राहा. यापुढं मोगलाईतल्या तुमच्या कामगिऱ्या फार महत्त्वाच्या आहेत!’

‘समर्थांना बरीच जानकारी दिसते!’ राजे भारावून म्हणाले.

‘नाही, राजे. हे अंतर्ज्ञान नाही. तुमच्या बहिर्जींसारख्या, महादेवसारख्या नजरबाजांनी आमचे शेकडो गोसावी अडकवलेत. परमार्थापेक्षा राजकारणातच ते अधिक गुंतलेत. त्यामुळं सारं समजतं.’

समर्थांच्या पुढे राजे प्रथमच हसले. समर्थ राजांना म्हणाले,

‘राजे, आता आदिलशाहीशी फारा दिवसांचं सख्य राहील, असं वाटत नाही!’

‘समर्थांना अंदेशा वाटण्याचं कारण?’ राजांनी विचारले, ‘आदिलशाही वकील, आमचे बाबाजी नाईक पुंडे विजापुरातच आहेत.’

‘ते ठीक. आम्हांला संशय नाही; पण खात्री आहे. कुडाळयुद्धात ज्या खवासखानाचं वैर तुम्ही पत्करलंत, त्या खवासखानाचं प्राबल्य विजापूरदरबारी वाढतं आहे. एक ना एक दिवशी ते तुम्हांला कळेल. तेव्हा योग्य तो निर्णयही तुम्ही घ्याल.’

राजांनी मोरोपंतांच्याकडे पाहिले. मोरोपंतांच्या मागे उभ्या असलेल्या मावळ्यांच्या हातांतील तबके मोरोपंत समर्थांच्या पुढे ठेवीत होते. तबकांची आच्छादने काढली गेली. सुवर्ण-रौप्य नाण्यांनी ती तबके ओतप्रोत भरली होती. त्यांकडे पाहून समर्थ म्हणाले,

‘राजे, हे कशाला आणलंत? याची काय गरज होती? आम्ही संन्यासी! असलेल्या लंगोटीचा आम्हांला भार. आम्हांला गरज आहे; नाही, असं नाही; पण ती याची नव्हे. गरज आहे प्रेमाची! तुमच्या वचनाची!’

‘वचन?’

‘हां, राजे! काही माणसं अवतारकार्य करायला या पृथ्वीवर अवतरतात. ती परमेश्वरस्वरूपच असतात. त्यांची वचनं मिळविणं यातच आमचं कल्याण नसतं का?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘समर्थांनी आम्हांला संकोचवू नये!’

‘राजे, खोटा विनय बाळगू नये. आज तुमचा पराक्रम पाहून आमच्यासारखी संन्यासी माणसंही तुमच्या गुणांवर लुब्ध होतात. ही तुमची योग्यता. ती जाणून घ्या. ती वाया जाऊ देऊ नका.’

‘मी काय करू?’ राजांनी विचारले.

समर्थ हसले. म्हणाले, ‘राजे, मेघांचं जे नातं धरित्रीशी असतं, तेच नातं राजाचं प्रजेशी असतं.मेघ आपल्या उरातल्या ओलाव्यानं धरित्री तृप्त करीत असतो. त्याची नजर सदैव धरित्रीवर खिळलेली असते. तेच तुमचं कर्तव्य!’

समर्थांनी कल्याणला हाक मारली, ‘कल्याण!’

कल्याणस्वामी आले. राजांनी त्यांना वंदन केले. समर्थ म्हणाले,

‘कल्याण! अरे, राजे आमच्या घरी पाहुणे आले. सरळ आमच्या शेजारी त्यांनी पाटावर बैठक टाकली. राजांनीच उघड्यावर बैठक टाकलेली पाहून बिचारे राजांचे सोबती पेचात पडले असतील. आता त्यांना उघड्या जमिनीवरही बसायला संकोच वाटत असेल. जनावरांचं चारापाणी, शिबंदीचं जेवणखाण- सर्वांकडे तू लक्ष दे.’

‘क्षमा असावी, समर्थ!’ राजे म्हणाले, ‘आपण त्याची चिंता करू नये. आमची शिबंदी सदैव सर्व साहित्य बाळगून असते.’

‘राजे, ते आम्हांला माहीत आहे. आपल्या मुलुखात कुठंही तुमची फौज असली, तरी त्या फौजेचा उपद्रव गावांना होत नाही, हे आम्ही जाणतो. त्याचा आम्हांला अभिमान वाटतो.’

समर्थांनी स्थापन केलेल्या मारुतीचे राजांनी दर्शन घेतले; आणि समर्थांच्यासह ते मठात गेले.

त्यानंतर दोन दिवस गेले. राजे समर्थांच्या तोंडून उपदेश ऐकत होते. आत्मदर्शन,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सिद्धलक्षण, सारविवेक, राजकारण, चातुर्यलक्षण, विषयत्याग अशा अनेक विषयांवर समर्थ बोलत होते. त्या वेगळ्या वातावरणाची, वेगळ्या विचारांची मोहिनी राजांवर पडत होती. मन तृप्त झाले होते. दुसऱ्या दिवशी राजांनी गुरूपदेश घेण्याची इच्छा व्यक्त केली. समर्थांनी ते आनंदाने मान्य केले.

शुभ दिवस पाहून समर्थांनी अनुग्रह दिला. समर्थांचा वरद हस्त लाभला. राजे सनाथ झाले.

दोन प्रहरी राजे आणि समर्थ झोपडीत बसले होते. बोलता-बोलता राजांनी विचारले,

'स्वामीजी! परमेश्वर आपल्याला दिसला का?'

समर्थांनी एकदम वर पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्न हास्य विलसले. ते राजांच्यावर नजर रोखीत म्हणाले,

'शिवबा! हा प्रश्न काल विचारायचा होता; गुरूपदेश घेण्याआधी आमची पारख करीत होता, तेव्हा विचारायचा होता. आता तो अधिकार राहिला नाही.'

राजे संकोचले. त्यांच्या कानांवर शब्द पडत होते :

'राजे, परमेश्वरदर्शन हे जीवनाचं ध्येय नव्हे. अध्यात्मालाही ते मान्य नाही. परमेश्वर चराचर स्वरूपामध्ये भरून राहिला आहे. तो आपल्यातही आहे. स्व-रूपाची ओळख हेच आपलं ध्येय असायला हवं. आम्हांला परमेश्वर सापडला असता, तर आम्ही कशाला तुम्हांला गुरूपदेश करीत बसलो असतो?'

'मग सद्गुरूला जीवनात काहीच का अर्थ नाही?' राजांनी विचारले.

'राजे, तुम्ही अनेक वेळा अनोख्या मुलुखातून गेला असाल, वाट चुकला असाल. वाटेवर कोणीतरी पांथस्थ भेटतो. त्याला तुम्ही मार्ग विचारता. तो सांगतो, त्या वाटेनं तुम्ही जाता. तुमच्या मनात असा संशय कधी येतो का, की त्या माणसानं आपल्याला खोटी वाट दाखविली असेल, म्हणून? त्या पांथस्थाची जीवनात जी जागा, तीच गुरूची, वाट तुम्हीच चालायची असते. मुक्कामही तुम्हीच गाठायचा असतो. तसं पाहिलं, तर आता

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपण दोघंही एका मार्गाचे प्रवासी. ज्याला आधी सापडेल, त्यानं दुसऱ्याला सांगावं, एवढ्याचपुरते आपण बद्ध.'

'पण, स्वामीजी! आपण आम्हांला काहीच जपतप सांगितलं नाही.' राजांनी दुसरी शंका व्यक्त केली.

'कशासाठी? परमेश्वरानं तुमचं कार्य तुम्हांला दिलं आहे. त्यात तुम्ही मग्न आहा. या धरतीवर श्रींचं राज्य प्रस्थापित व्हावं, हे तुमचं ध्येय. ते काम श्रद्धेनं, प्रेमानं करणं हीच ईश्वरसेवा नाही का? राजे, सर्वांभूती प्रेम बाळगा. प्रजेवर उदंड प्रेम करा. धर्माची लाज राखा. महाराष्ट्रधर्म वाढवा. हीच तुमची तपश्चर्या. तिनंच तुम्हांला ईश्वर पावेल.'

मठात पंगत बसली होती. राजांची सारी शिबंदी भेदाभेद विसरून समर्थांच्या मठाचा प्रसाद सेवन करीत होती. त्या प्रेममय वातावरणात राजे सारी काळजी विसरले होते. आनंदाचे भरते मनात साठत होते.

चार दिवस झाले, तरी राजे जाण्याची गोष्ट काढीनात. समर्थांनी ते जाणले. ते राजांना म्हणाले,

'शिवबा! उद्या दिवस चांगला आहे. त्या दिवसावर प्रस्थान ठेवा. तुम्ही इथं गुंतलात, तर सारा महाराष्ट्र आम्हांला दोष देईल. गडावर आईसाहेब आपली वाट पाहत असतील.'

राजे भारावले. ते म्हणाले,

'मासाहेबांची दर्शनाची फार इच्छा होती. पण आता त्या थकल्यात. प्रवास झेपत नाही. आम्ही येताना म्हणाल्या... समर्थांना दंडवत सांगा. त्यांना सांगा, 'डोळे मिटायच्या आधी दर्शन घडावं, असं फार वाटतं...' '

समर्थांनी डोळे मिटले. त्यांनी डोळे उघडले, तेव्हा त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते. ते म्हणाले,

'राजे, आपल्या मासाहेब म्हणजे थोर आत्मा. त्यांचं दर्शन घ्यायला हवं. त्यांना सांगा... निरोप पोहोचला. इच्छा तृप्त करणारा प्रभू रामचंद्र समर्थ आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जायचा दिवस उजाडला. राजांचे मन व्याकूळ बनले होते. समर्थ सुद्धा अस्वस्थ होते. राजांनी समर्थांचे पाय धरले. राजांच्या डोळ्यांतले अश्रू पाहून समर्थदेखील भारावले. ते म्हणाले,

‘शिवबा! तुमच्या डोळ्यांत पाणी शोभत नाही.’

‘स्वामीजी, आपला सहवास लाभला. जीवनाचं सार्थक झालं. वाटतं, हे पाय सोडून हलूच नये. स्वामीजी, पुन्हा केव्हा दर्शन?’ राजांनी कळवळून विचारले.

समर्थांनी राजांच्या नजरेला नजर भिडविली. राजांच्या पाठीवर हात ठेवून ते म्हणाले,

‘राजे, तुम्ही आमचा उपदेश घेतलात. कुठं जरी असला, तरी आमचं स्मरण करताच आम्ही तुमच्या सन्निध असायला हवं. आता दुरावा नाही; तो नव्हताही. तसं वाटलं, तर मग या गुरुशिष्यभावनेला अर्थही राहायचा नाही. यासाठी चित्त गुंतवू नका. कार्य फार मोठं आहे. फार सोसायचं आहे. तिकडे लक्ष द्या.’

‘गुरुदेव!’

‘हां, शिवबा! आवरा! सारं ठीक होईल. कधी तसं भासलं, तर जरूर या. तुमच्या दर्शनात आम्हांलाही आनंद आहे.’

समर्थांचे डोळे अश्रूंनी भरले. त्यांनी राजांना कवटाळले. ते म्हणाले,

‘राजे! आम्ही संन्यासी! जीवनापासून निवृत्त झालेले. पण तुम्ही आम्हांला गुंतवलंत. ...थांबा, राजे!’

समर्थ आपल्या मठात गेले. खडावांच्या आवाजासरशी राजांचे नेत्र मठाच्या दारी खिळले. समर्थ हाती भगव्या रुमालात गुंडाळलेले बासन घेऊन बाहेर येत होते. राजांच्या जवळ येऊन समर्थ म्हणाले,

‘राजे! आम्ही संन्यासी. आम्ही काय देणार? शिवथर घळीत बसून नऊ वर्षांनी आम्ही ‘दासबोध’ पुरा केला. हा कल्याण तो उतरून घेत होता. प्रभू रामचंद्रांच्या आशीवार्दानं ते

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कार्य तडीला गेलं. त्यानंतर आम्ही आमच्या हस्ताक्षरात एक प्रत तयार केली. ती तुमच्याकरिता आम्ही जतन केली होती. आमच्या जीवनाचं सारं तत्त्वज्ञान आम्ही त्यात मांडलं आहे. हे धन जतन करून ठेवा. जेव्हा मन उदास होईल, जिवाला कोडं पडेल, तेव्हा हा ग्रंथ उघडा. रामचंद्रांच्या कृपेनं तुम्हांला तुमची वाट दिसेल. आज ह्या दासबोधाच्या रूपानं मी तुम्हांला सर्वस्व देत आहे.'

राजांनी दासबोध मस्तकी लावला. समर्थांचे पाय पुन्हा अश्रूंनी भिजले; आणि राजांनी समर्थांना निरोप घेतला.

□

६

उन्हाळ्याचे दिवस असल्याने भल्या पहाटे राजांनी छावणी उठवली. समर्थांची भेट होऊन दोन दिवस झाले होते. पण राजांच्या नजरेसमोर समर्थांची मूर्ती होती; त्यांचे शब्द कानांत घुमत होते.

वाढत्या उन्हाबरोबर उकाडा वाढत होता. उन्हाची पर्वा न करता राजे प्रतापरावांच्यासह दौड करीत होते. मागे-पुढे स्वार दौडत होते. मध्यान्हीच्या सुमाराला राजे एका आम्रवृक्षाखाली थांबले; घोडदळाला इशारत दिली. नदीचे पात्र क्षीण बनले होते. सारे घोडदळ नदीकाठावर पसरले. न्याहऱ्या सोडल्या गेल्या. प्रतापराव राजांच्याकडे पाहत होते. आजूबाजूला त्यांचे लक्ष फिरत होते. राजांनी विचारले,

'प्रतापराव, काय पाहता?'

'वर फनसवड्याची पानं दिसतात. एवढ्यात घेऊन येतो. पत्रावळी लावता येतील.'

राजे हसले; म्हणाले,

'प्रतापराव, मराठमोळी माणसं आपण. अनेकदा उभ्या छावणीत हातावर भाकर घेऊन खायचा सराव झालाय् आम्हांला. आमची भाकर हातावर द्या.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रतापरावांच्या शिलेदाराने न्याहरीचे फडके सोडले. हिरव्या मिरच्यांचा खरडा, पांढरे कांदे आणि भाकरी हा बेत पाहून राजे खूश झाले. राजांनी कांदा सोलून बुक्कीने दगडावर फोडला. खरडा घातलेली भाकरी हातावर घेतली. राजांच्या आग्रहाने प्रतापरावांनीही भाकरी घेतली. साऱ्यांच्या न्याहऱ्या संपल्यावर ते नदीच्या पात्रात उतरले, पाणी प्याले. थोडी विश्रांती घेऊन राजे घोड्यावर स्वार व्हायच्या बेतात असता प्रतापराव म्हणाले,

'महाराज, इथून थोड्या अंतरावर डोंगराच्या त्रिकोणात कोरजाई गाव आहे.'

राजांना त्यांच्या बोलण्याचा रोख समजला नाही. प्रतापरावांनी म्हटले,

'रामजी पांगेऱ्याचं तेच गाव!'

'इथला रामजी पांगेरा कणेरागडावर नेमलात?'

'तेवढ्या लांब जायला तसा विश्वासू माणूस नजरेत येत नव्हता. त्याच मुलुखातली माणसं किल्लेदार म्हणून नेमू नयेत, अशी आज्ञा असल्यामुळं पांगेऱ्याला तिकडे टाकलं.'

'प्रतापराव, जाता-जाता आपण वाडीवर थोडा वेळ थांबून जाऊ.'

डोंगराच्या कुशीत वसलेली कोरजाई अगदी नजीक गेल्याखेरीज राजांच्या नजरेत आली नाही. पाच-पंचवीस झोपड्यांची, दहा-पाच बसक्या घरांची ती वस्ती. डोंगरउतरणीला असलेल्या शिवाराच्या वर कोरजाई वसली होती. घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकून गाव भयभीत होऊन गेले होते. राजांचे स्वार गावात पोहोचले होते. राजे प्रतापरावांच्या बरोबर सावकाश चालत होते. प्रत्येक घराचे दार बायकापोरांनी, बाप्यांनी सजले होते. गाव राजांचा न्याहाळीत होते. पाया पडायचेही कुणाला सुचत नव्हते. सारे कौतुकाने राजांच्याकडे पाहत होते. पुढे जाणारे प्रतापराव गुजर पायउतार झाले.

रामजी पांगेऱ्याचे वडील मारुती पांगेरा एक वयस्क माणूस. जेव्हा स्वारांनी त्यांना राजे येत असल्याचे सांगितले, तेव्हा त्याचे भान हरपले. आपल्या घराचा कट्टा त्याने खराट्याने झटकन साफ केला; त्यावर घोंगडी अंथरली. म्हाताऱ्याची नुसती धावपळ उडाली होती. आपल्या दुसऱ्या मुलाला- रूपाजीला- त्याने बोलावणे पाठविले. तोच राजे घरासमोर आल्याची वर्दी आली. खराटा कोपऱ्यात फेकून मारुती मुंडासे सावरीत पुढे धावला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्याच्या मनात आनंद मावत नव्हता.

मारुतीच्या घरासमोर महाराज पायउतार झाले. राजांची नजर मारुतीवर खिळली. म्हातारा ताठ उभा होता. डोळे राजांच्या वर स्थिर झाले होते. राजांनी पाऊल उचलले; आणि तो म्हातारा धावला. त्याने एकदम राजांचे पाय धरले. राजे मारुती पांगेऱ्याला उठवीत म्हणाले,

‘बाबा! तुम्ही आशीर्वाद द्यायचे; पाया पडायचं नाही.’

म्हाताऱ्याला आनंदाने शब्द फुटत नव्हता. राजांना तो कट्ट्यावर घेऊन गेला. राजे कट्ट्यावर बसले. मारुतीला काही बोलणे सुचत नव्हते. तो एकदम घरात गेला. बाहेर आला, तेव्हा त्याच्या पाठोपाठ एक म्हातारी, रामजी पांगेऱ्याची विधवा पत्नी आणि रामजीचा बारा वर्षांचा मुलगा हे बाहेर आले. सारे राजांच्या पाया पडले. मारुती संकोचाने प्रथमच बोलला,

‘धाकला शिवारात गेलाय्!’

राजे त्या घराचा आनंद पाहून कुचंबले होते. ज्या घराचा कर्ता मुलगा हरवला होता, तेथे शोकाऐवजी दिसणारा आनंद पाहून राजांना काही सुचत नव्हते. राजे कसेबसे म्हणाले,

‘असू दे! बाबा, बसा तुम्ही.’

राजांनी बळेच मारुतीला जवळ बसून घेतले; रामजीच्या उघड्या पोराला जवळ घेतले. ते पोर बुजून चटकन दूर पळाले. तो जिव्हाळा पाहून राजे गहिवरले. मारुती म्हणाला,

‘आमचं नशीब थोर, म्हणून तुझं पाय गरिबाच्या घराला लागलं.’

‘नाही, बाबा! हे गरिबाचं घर नाही. छातीचा कोट करून दिलेरखानाला थोपविणाऱ्या रामजीचं हे घर...’

रामजीच्या नावाने म्हातारा भानावर आला. त्याच्या डोळ्यांत क्षणभर पाणी तरळले. राजांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. आपल्या डोळ्यांतलं पाणी आवरीत राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बाबा! रडू नका!’

‘नाही रडत, राजा!’ मारुती डोळे पुशीत म्हणाला, ‘पोरानं कुळी धन्य केली. नाही तर गरिबाच्या घराला, तुझं पाय कशाला लागलं असतं? तू आलास, घोंगड्यावर बसलास. राजा, माझं घर उद्धरून गेलं!’

राजे खिन्नपणे हसले; म्हणाले,

‘बाबा! आमचं कसलं कौतुक? रामजीसारख्यांच्या जिवावर राज्य करीत मागे राहणारे आम्ही!’

मारुती त्या बोलांनी कळवळला.

‘नको, राजा! असं बोलू नकोस. अरं, तू मागं ऱ्हातोस, म्हनून पोरं लढत्यात. कधी न्हाई तो मुलुखात सण साजरा झाला. गोरगरिबांच्या तोंडात राख पडायची, ते चार घास पडले. तू पुढं जाऊन गरिबांनी काय करायचं होतं?’

राजांना मारुतीचा रोख कळेना. त्यांनी विचारले,

‘आम्ही काय केलं, बाबा?’

‘काय केलं न्हाईस, ते इचार! हे पाटील, कुलकर्णी, देसाई, जागिरदार... मुलुखाच्या जळवा ह्या! ईल ते पीक घेऊन जानार! आन् आमी रानच्या मेरुल्या हुडकत पोटं भरायची! उमेदीत व्हतो, तवाची कानी हाय. येठीसाठी एक डाव गाव बोलावलं व्हतं. म्या गेलोच न्हाई. तर तीन दीस वाड्याच्या देवडीवर दोघंजन माझं आंग चाबकानं फोडत व्हते. अजूनबी मळाभ आलं, तर अंग दुखतंया.’

‘आणि आता?’

‘आता? ते सांगाय पायजे व्हय?’ समोरच्या दावणीला दोन बैल बांधले होते, तिकडे बोट दाखवीत मारुती म्हणाला, ‘ती बैलं कुठली?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कुठली?’

‘तुज्या सरकारतनं मिळाली ती! राजं, शेतकऱ्याला जनावरं मिळाली, देनं नसलं, तर पिकाला काय तोटा? दोन हिस्सं घेतोस. मागितलंस, तर तीन हिस्संबी आनंदानं देतील तुला.’

‘बाबा, मला खूप मिळालं. जिवाला जीव देणारी माणसं भेटली. आणखी काय मिळवायचं?’

तोच मारुतीचा दुसरा मुलगा रूपाजी आला. बलंदड शरीराचा, बापासारखाच ताठ असलेला रूपाजी राजांच्या पाया पडला. म्हातारा म्हणाला,

‘हा रूपाजी; रामजीच्या पाठीवरचा.’

राजे उठत म्हणाले, ‘बाबा, येतो आम्ही.’

राजांनी प्रतापरावांकडे पाहिले. त्यांनी राजांच्या पुढे थैली केली. थैली घेऊन राजांनी ती मारुतीसमोर धरली.

‘बाबा, हे राहू दे; अडीअडचणीला उपयोगी होईल.’

मारुतीने एकदम हात मागे घेतला. म्हातारा म्हणाला,

‘राजा, पोर गेलं, म्हणून हे देयाची कायबी गरज न्हाई. शिवारात शेत हाय. घर हाय. तू पाठीशी असल्यावर पैसं घेऊन करायचं काय?’

राजांना उत्तर सुचेना. राजे अडखळले.

‘मग मी तुमच्यासाठी काय करू?’

‘असं म्हंतासा?’ मारुतीने राजांच्या डोळ्यांला नजर भिडविली. तो एकदम हसला; म्हणाला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘एक काम करशिला?’

‘सांगा. आम्ही जरूर करू.’

मारुतीने रूपाजीला समोर ओढले. त्याला राजांच्या समोर आणीत मारुती म्हणाला,

‘राजा, जसं रामजीला जवळ केलंसा, तसंच यालाबी जवळ करा. पांगेऱ्याची कूस अजून उजाड झाली न्हाई. रामजीची जागा ह्यो घील.’

राजांच्या डोळ्यांत अश्रू चमकले. मारुतीचा हात प्रेमाने दाबीत राजे म्हणाले,

‘तुमच्या आशीर्वादानं सारं होईल. पण घरात शेतीभाती पाहायला हा राहू देत. तेदेखील स्वराज्याचंच काम आहे.’

मारुती म्हणाला, ‘हां, राजा! अरं, वय झालं, म्हनून म्हातारा झालो काय मी? अशा धा पोरांचं काम करायला बळ हाय अंगात अजून. रूपाला पायांजवळ जागा दे, राजा!’

राजांना बोलवेना. राजांनी रूपाला जवळ घेतले. राजे म्हणाले,

‘बाबा, रूपाजीची काळजी करू नका. रूपाजी माझा आहे.’

घराभोवती माणसं जमली होती. राजांनी मोहोरांची थैली रूपाजीच्या हाती दिली. राजे म्हणाले,

‘शिलेदार रूपाजी! ही रक्कम घरासाठी कारणी लावून घरची व्यवस्था नीट लावा; आणि तुम्ही रायगडावर या. तिथं आम्ही पुढची कामगिरी सांगू.’

रूपाजीने राजांचे पाय शिवले. गावच्या उतरणीपर्यंत सारे गाव राजांना पोहोचवायला आले होते. उन्हे कलली होती. मारुतीचा निरोप घेऊन राजे स्वार झाले. थोडे अंतर गेल्यानंतर राजे प्रतापरावांना म्हणाले,

‘प्रतापराव, आज तुम्ही आम्हांला सोन्याचा दिवस दाखवलात!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

७

राजे पाचाडला आले. पाचाडच्या वाड्यात अनाजी दत्तोंना पाहून राजांना आश्चर्य वाटले. पावसाळा तोंडावर आला होता. गडाची पावसाळी हवा जिजाबाईंना मानवत नसल्यामुळे जिजाबाई पाचाडला येऊन राहत. जिजाबाईंची पाचाडची व्यवस्था पुरी करण्यासाठी अनाजी दत्तो गडाखाली आले असतील, या कल्पनेने राजांनी विचारले,

'अनाजी, मासाहेबांची व्यवस्था पाहायला गडाखाली उतरलात?'

'जी! तेही एक होतंच. पण महाडला जावं लागलं. महाडच्या दिवाकर वैद्यांना गडावर पाठवलं, तोच आपण येत असल्याची वर्दी आली.'

'वैद्य? कशासाठी?' राजांनी घाबरून विचारले.

'युवराज शिकारीत जखमी झालेत.'

राजांच्या जिवाचा ठाव उडाला. राजे बोलून गेले,

'केव्हा?'

'कालच युवराज शिकारीला गेले होते. वाघोत्र्याचं रान उठवलं होतं. तेंडवा उठला. युवराजांनी कुणाचंही न ऐकता तलवारीनं वाघ मारायचा ठरवला. जनावर भारी होतं. युवराजांनी सरळ वाघाला अंगावर घेतलं. वाघ मेला; पण त्यात राजे जखमी झाले.'

'फार जखमी झालेत!'

'आपल्या वैद्यराजांनी दिवाकर वैद्यांना आणायला सांगितलं, ते निघालोच.'

'गड राखण्यासाठी युवराजांना ठेवलं?... बरं, जाऊ तरी कसं दिलंत? बरोबर कोण होतं?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘इब्राहीम होता, येसाजी होता. सोबत रूपाजी भोसलेही होते. आणि...’

‘मला नावं नकोत!’

राजे तसेच वाड्याबाहेर पडले, आणि स्वार झाले. मागून शिबंदी येते, की नाही, याचा विचार न करता राजे स्वार झाले. पाठोपाठ प्रतापराव धावले.

महादरवाजाच्या नौबतीने राजे गडावर येत असल्याचे जाहीर केले. राजे गडमाथ्यावर आले. हत्तीटाक्याला वळसा घालून रस्त्याने न जाता राजांनी आपले घोडे गंगासागराकडे वळविले. पालखीदरवाजाशी जाऊन राजे घामेजलेल्या घोड्यावरून पायउतार झाले.

पहारेकऱ्यांचे मुजरे घेत राजे पालखीदरवाजाच्या पायऱ्या चढून गेले. अवचित मागच्या दरवाजाने राजे आलेले पाहून सारे चकित होत होते. जामदारखान्याच्या चौकातून राजे सरळ जात होते. राजे संभाजीराजांच्या महाली गेले. संभाजीराजे पलंगावर झोपले होते. शेजारी वैद्य उभे होते.

येसाजी, रूपाजी भोसले तेथे हजर होते. जिजाबाई युवराजांच्या उशाला उभ्या होत्या. राजे महालात जाताच वैद्य मागे सरले. राजांनी वैद्यांना विचारले,

‘वैद्यराज, युवराज कसे आहेत?’

‘काळजीचं कारण नाही. एक खांद्यावरची जखम जरा खोल आहे. आठ दिवसांत युवराज हिंडू-फिरू लागतील.’

राजांनी घाम टिपला. त्यांची नजर संभाजीवर गेली. संभाजीराजांच्या चेहऱ्यावर हास्य होते. ते हास्य पाहून राजांचा संताप उफाळला. ते गर्जले,

‘कुणाला विचारून तुम्ही शिकारीला गेला होता? वय काय तुमचं? आणि तुम्ही वाघावर चालून गेलात?’ राजांची नजर येसाजीकडे वळली. ‘येसाजी, तुम्ही, इब्राहीमखान असताना राजांना पुढं जाऊ दिलंत? ...संभाजीराजे! आमच्या प्रश्नांची उत्तरं हवीत आम्हांला.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजांचा चेहरा घाबरा बनला. त्यांनी मासाहेबांच्याकडे पाहिले. जिजाबाई राजांना म्हणाल्या,

‘राजे, तुम्ही आपल्या महालात जा!’

त्या अनपेक्षित उद्गारांनी राजांनी एकदम जिजाबाईंच्याकडे पाहिले. राजे म्हणाले,

‘पण, मासाहेब...’

‘काही न बोलता, राजे, तुम्ही आपल्या महाली जा.’

राजे त्या शब्दांनी सुन्न झाले. राजांनी सर्वांवरून नजर फिरविली; आणि त्याच संतापात राजे महालाबाहेर गेले.

राजे आपल्या महाली गेले. जिरेटोप पलंगावर ठेवून राजे खिडकीपाशी उभे होते. राजांना गंगासागराचे मनोरे दिसत होते. मनोऱ्यात सोयराबाई राजारामांना घेऊन उभ्या होत्या. ते पाहून राजांचे मन प्रसन्न झाले नाही. पावलांच्या आवाजाने राजांनी मागे वळून पाहिले. जिजाबाई महालात येत होत्या. जिजाबाई जवळ आल्या. त्या म्हणाल्या,

‘राजे, रागावलात?’

‘नाही, मासाहेब!’

‘राजे, शंभूबाळ जखमी. अशा वेळी त्यांना बोलणं बरं नव्हतं.’

‘ती का आम्हांला हौस होती? मासाहेब, काही वेळा आम्ही तुम्हांला समजूच शकत नाही.’

‘का? मी काय केलं?’

‘मासाहेब, आठवतं? एकदा आम्ही थोरल्या महाराजसाहेबांनी दिलेल्या बंदुकीनं वाघाची शिकार केली होती. खाली बसून शिकार केली, एवढाच गुन्हा! पण त्यासाठी तुम्ही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आम्हांला बोल लावलात. आम्ही जेवलो नाही, तरी त्याची कदर केली नाहीत. ज्या कडक शिस्तीत आम्हांला वाढवलंत, ती शिस्त शंभूबाळांना मात्र नाही. उलट, त्यांचे लाड भरपूर. लाडांना सोकावलेल्या बाळराजांना भावी जीवन फार कठीण जाईल. मासाहेब, त्याची भीती वाटते. असं का वागता, तेच कळत नाही.'

जिजाबाईंची नजर एकदम व्यथित झाली. त्या म्हणाल्या, 'शिवबा, तुमची चूक होते आहे. हा प्रश्न आम्ही सईला विचारला असता. तुम्हांला आई आहे, त्यांना नाही.'

□

८

संभाजीराजे आठ दिवसांत हिंडू फिरू लागले. राजे केव्हातरी संभाजीराजांच्या महाली जात. चौकशी करत; पण त्यात तुटकपणा असे. संभाजीराजांना ते जाणवे. संभाजीराजांच्या आजारामुळे जिजाबाईंचेही वास्तव्य गडावरच होते. राजे रायगडाच्या इमारतीवर देखरेख करीत होते. निरनिराळ्या गडांच्या डागडुजी करून घेण्याच्या आज्ञा रायगडावरून सुटत होत्या. ते सारे करीत असता राजांच्या मनात अनेक बेत उभे राहत होते.

राजे सकाळच्या वेळी आपल्या महालात बसले होते. शेजारी पुतळाबाई उभ्या होत्या. सोयराबाईही बाळ राजारामांसहित महाली आल्या. त्यांना पाहून राजे म्हणाले,

'आजचा दिवस फार चांगला दिसतो.'

राजांनी राजारामाला उचलून मांडीवर घेतले, आणि सोयराबाईंना विचारले,

'मासाहेब कुठं आहेत?'

'पूजा करताहेत.'

राजांनी एक निःश्वास सोडला. ते म्हणाले,

'आम्ही आग्र्याहून सुटलो; पण मासाहेब गुंतल्या, त्या गुंतल्याच. त्यांची सुटका

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होईल, असं दिसत नाही.'

दोघी राण्या राजांच्या बोलांनी आश्चर्यचकित होऊन राजांच्याकडे पाहत होत्या. राजे हसले.

'आम्ही औरंगजेबाकडे गेलो. मासाहेबांनी अनेक व्रतं, उपवास सुरू केले. आम्ही आलो; पण धरलेलं सुटलं नाही. आठवड्यातून तीन दिवस तरी निर्जळी उपवास असतो. वाढलेली पूजाअर्चा हीत मासाहेब पुऱ्या गुंतल्या गेल्या.'

राजांची नजर दाराकडे गेली. दारात संभाजीराजे उभे होते. पंधरा वर्षांचे संभाजीराजे. मानेवर पडलेले, मागे परतविलेले काळेभोर केस, विशाल तेजस्वी नेत्र, कर्पूरगौर रंग, भरदार तणावलेली छाती... राजे युवराजांचे रूप न्याहाळीत होते. राजे म्हणाले,

'हे मासाहेबांचं नवं आराध्यदैवत. यांना कोणी काही बोलू धजत नाही.'

संभाजीराजे त्या वाक्याने बिचकले. ते राजांच्या जवळ आले. त्यांनी गुडघे टेकून राजांच्या पायांवर मस्तक ठेवले. राजारामाला बाजूला ठेवून राजांनी संभाजीराजांना उठवले. संभाजीच्या ओल्या केसांना राजांच्या हाताचा स्पर्श झाला. राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले.

'वैद्यांनी आंघोळीला परवानगी दिली, वाटतं?'

'जी!'

पुतळाबाईंच्याकडे पाहत राजे म्हणाले,

'फार दिवसांमागची गोष्ट आहे... बाळराजे लहान होते. राजगडावर असेच ओले केस घेऊन संभाजीराजे आले होते मोती मागायला.' संभाजीराजांच्याकडे पाहत राजांनी विचारले, 'तुमचा मोती कुठं आहे?'

'पाचाडच्या पागेत.' संभाजीराजे उत्तरले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजाराम एकदम म्हणाले, ‘आबासाहेब ऽ ऽ, आमांला पण मोती पायजे ऽ ऽ’

राजांनी मान वळवून राजारामांकडे पाहिले. गाल फुगवून राजाराम बसले होते. ते रूप पाहून साऱ्यांना हसू फुटले. बाळराजांच्या नाकावर बोट ठेवून राजे म्हणाले,

‘मोती आमच्या जवळ आहे कुठं? आणि आता तुम्हांला मोती मागायचाच झाला, तर तुमच्या दादा महाराजांकडेच मागायचा.’

बाळराजांनी संभाजीराजांच्याकडे पाहिले. संभाजीराजांनी राजारामाला उचलून घेतले. राजाराम संभाजीराजांच्या मानेला बिलगले. राजांनी संभाजीराजांना विचारले,

‘राजे, जखम बरी झाली. आता पुन्हा शिकारीचा बेत केव्हा?’

संभाजीराजांनी राजारामांना खाली ठेवले, आणि राजांचे पाय शिवले. ते म्हणाले,

‘आबासाहेब, आम्ही पुन्हा असं वागणार नाही.’

राजांनी संभाजीराजांना जवळ घेतले. ते म्हणाले,

‘राजे, आम्ही रागावलो, म्हणून वाईट वाटतं? ती का आम्हांला हौस आहे? राज्याचा हा वाढता पसारा. आमच्या मनात अनेक मनसुबे. ती जबाबदारी तुमची. आमचं स्वप्न तुम्ही साकार करायचं. तुम्हीच असं अविवेकी धाडस करू लागलात, साध्या खेळात जीव गुंतवू लागलात, तर कसं होणार?’

राजे एकदम गंभीर झाले. संभाजीवर नजर रोखीत ते म्हणाले,

‘राजे, शिकार करू नका, असं आम्ही म्हणत नाही; पण सांगतो, ते ऐकाल?’

संभाजीराजांची नजर राजांच्या नजरेला भिडली. क्षणभर त्या नजरेनं तेज मंदावल्याचा भास संभाजीराजांना झाला. राजे म्हणाले,

‘अशी शिकार करायचं मनात आलं, तर आम्हांला घेतल्याखेरीज जाऊ नका. कोणतंही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आमचं काम आम्ही बाजूला ठेवून तुमच्याबरोबर...’

‘आबासाहेब!’

राजांनी संभाजीराजांना मिठीत घेतले. महालात सोयराबाई, पुतळाबाई आहेत, याचेही भान राजांना राहिले नाही. डोळे मिटून ते संभाजीराजांच्या पाठीवरून हात फिरवीत होते, पुटपुटत होते,

‘आम्ही शब्दांत गुंतलोय्, राजे! तो शब्द मोडला, तर आम्ही जगणार नाही.’

राजे भानावर आले. त्यांची नजर दोघी राण्यांवर गेली. गडबडीने आपले अश्रू पुसून ते म्हणाले,

‘राजे, फडात अनाजी असतील, त्यांना सांगा... आम्ही फडात येत आहो. आणि हे पाहा, मासाहेब आज पाचाडला जाण्यासाठी गडाखाली उतरणार आहेत. तुम्ही त्यांच्याबरोबर जा.’

‘जी!’ म्हणून संभाजीराजांनी पटकन बाळराजांना उचलले; आणि ते महालाबाहेर गेले.

राजे म्हणाले,

‘भारी प्रेमळ पोर आहे. राम-लक्ष्मणांची ही जोडी आमचे सारे मनोरथ सिद्धीला नेईल!’

□

९

राजांच्या नव्या पराक्रमाने राजांची सत्ता वाढत गेली. ताब्यात आलेले गड राजे बंदिस्त करून घेत होते. राज्याच्या वाढीबरोबर वाढलेले राज्य स्थिरस्थावर करण्याकडे राजे लक्ष देत होते. गड-कोट म्हणजे राज्याचे मूळ, हे राजांनी जाणल्याने प्रत्येक किल्ला मजबूत होतो आहे, इकडे राजे जातीने लक्ष देत होते. त्यापायी चालू झालेल्या बांधकामात राजांचे लक्षावधी होन खर्ची पडले. या सर्वांचा ताण खजिन्यावर पडत होता. खजिन्याला तूट येऊ

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नये, म्हणून राजांनी महालोमहालांतून रकमा आणवून दर साल सव्वा लक्ष होन गंगाजळीत टाकण्याचे ठरविले.

मोरोपंत कोकणात मुलुखगिरी करीत होते, तर प्रतापराव गुजर वऱ्हाड-खानदेशात धुमाकूळ घालीत होते. शिवाजीराजांच्या वाढत्या सत्तेची जाणीव इंग्रजांनाही झाली होती. सेनापती प्रतापराव गुजरांनी सुरतेकडे खंडणी मागितली होती; खंडणी दिली नाही, तर सुरत पुन्हा लुटण्याची धमकी दिली होती. प्रतापरावांच्या पत्रामुळे सुरत पुन्हा त्रस्त बनली. शिवाजीराजांच्याकडून लिहिलेल्या पत्रात म्हटले होते...

> 'सरकार जमाबंदीची चौथाई सुमारे चार लक्ष रुपये मला द्या. नाही तर मी स्वत: येऊन वसूल केल्याखेरीज राहणार नाही. तुमच्या बादशहाने माझा देश आणि माझी प्रजा यांवर चढाई केली. त्याच्याशी लढाई करण्यासाठी मला सैन्य ठेवावे लागले. तरी त्या सैन्याचा पगार मला तुमच्याकडून वसूल करण्याखेरीज गत्यंतर नाही...'

राजांचे सैन्य सुरतेवर चालून गेले नाही; पण पत्राचा व्हायचा तो परिणाम झाला. सुरतेत चिंताग्रस्त वातावरण निर्माण झाले. दक्षिणची सुभेदारी पेलणारे महाबतखान आणि शहाजादा मुअज्जम या दोघांनाही औरंगजेबाने दिल्लीला बोलावून घेतल्याने दक्षिणेत फक्त दिलेरखान आणि बहादुरखान उरले होते. साल्हेर-मुल्हेरच्या लढाईत पराजित झालेल्या या सरदारांनी सुरतेच्या पत्राची दहशत घेतली. साल्हेर-मुल्हेरच्या पराजयाने संतापलेल्या औरंगजेबाला शांत कसे करावे, याचीच चिंता या दोघां सरदारांना पडली होती. त्यातच आपल्या पत्राप्रमाणे शिवाजीने सुरत लुटली, तर त्यांना धडगत दिसत नव्हती. त्यांनी वाटाघाटीसाठी शिवाजीकडे एक ब्राह्मण वकील पाठविला. राजांनी वकिलाचे स्वागत करून तहाची तयारी दाखविली व आपला वकील म्हणून आपल्या फडातील एक विश्वासू चिटणीस काझी हैदर याला बहादुरखानाकडे पाठवून दिले. राजांना तह झाला, तर हवा होता.

याच सुमारास औरंगजेबाने एक खरमरीत पत्र आपल्या सरदारांना पाठविले. यात त्याने लिहिले होते :

> 'शिवाजीचे सर्व शत्रू आदिल, कुतुब, फिरंगी, हबशी व तुम्ही एक होऊन शिवाजीचा मुलूख काबीज करा. म्हणजे तो असा किल्ल्यात दडून किती दिवस राहील? आपोआप जेरीस येईल.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बहादूरखानाने ताबडतोब उत्तर पाठविले :

> ‘याचा काही उपयोग व्हायचा नाही; कारण त्याच्या ताब्यात एकाहून एक प्रबळ असे अनेक किल्ले आहेत. एवढेच नव्हे, तर त्याच्या स्वत:च्या दुर्गम मुलुखात शेकडो खंडी धान्य पिकते. त्यामुळे आम्ही शंभर वर्षे अशी खटपट केली, तरीदेखील त्याला केवळ वेढा घालीत बसून जेरीस आणणे शक्य नाही. त्याच्याशी तह करण्याशिवाय आम्हांला गत्यंतर दिसले नाही. म्हणून तर आम्ही शिवाजीकडे एक ब्राह्मण वकील आधीच पाठविला आहे; आणि त्याचा स्वीकार करून त्याने काझी हैदर नावाचा मुसलमान वकील बोलणे करण्यासाठी आमच्याकडे पाठविला आहे. तरी तहाची आज्ञा व्हावी.’

तहाची सूचना ऐकताच औरंगजेबाचा संताप परत उफाळला. त्याने कानउघाडणीचे पत्र उलट पाठवून दिले. हे पाहताच दिलेरखान आणि बहादुरखान यांची तारांबळ उडाली. तहाची बोलणी थांबवून, औरंगजेबाची समजूत काढण्यासाठी बहादुरखानाने व दिलेरखानाने राजांचा वकील काझी हैदर याला नावापुरता बंदिवान करून परिंड्याच्या किल्ल्यावर ठेवले.

काझी हैदरला परिंड्याच्या किल्ल्यावर ठेवल्याची बातमी राजांना मिळाली. राजे हसले. ते म्हणाले,

‘हतभागी आलमगीर! असे सरदार मिळाल्यावर आमचा पराभव कसला होणार? या सरदारांना आम्ही ‘पेंडीचं गुरू’ म्हणतो, ते उगीच नाही.’

मोगलांशी तह झाला असता, तर तो हवा होता. राजांना उसंतीची गरज होती. बहादुरखानाकडून अथवा दिलेरखानाकडून फारशी तकलीफ होईल, असे वाटत नव्हते. दक्षिणेतील मोगलाईचे वजन ढासळत होते; आणि ती जाणीव होऊन मोगलाईचे खुद्द राजांचे मामेभाऊ जाधवराव, सिद्दी हिलाल यांसारखे मोगली सरदार राजांना येऊन मिळत होते. राजांचे सैन्य नव्या जोमाने मोगलाईत लुटालूट करीत होते.

राजांचे लक्ष मोगलाईकडे लागलेले असतानाच गोवळकोंड्याचा सुलतान अब्दुल कुतुबशहा मृत्यू पावला; आणि त्याचा जावई अबुल हसन तानाशाह गादीवर आला. राजांना ही वार्ता समजताच राजांनी आपला हेजीब म्हणून निराजीपंतांना गोवळकोंड्यास पाठविले. पूर्वीपासून चालत आलेला सलोखा नव्या कारकीर्दीत बदलू नये, अशी त्यामागे इच्छा होती. राजांच्या अपेक्षेप्रमाणे निराजीपंत यश घेऊन माघारी आले. तानाशाहाने पूर्वीचा सलोखा मान्य केला. ठरलेल्या एक लक्ष होनांच्या खंडणीपैकी सहासष्ट हजार होन घेऊनच

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निराजीपंत गडावर आले.

राजांच्या फौजा वऱ्हाड-तेलंगणात लूट करून माघारी येत होत्या. राजगडचा खजिना संपन्न होत होता. बहादुरखान आणि दिलेरखान यांना मराठी सैन्याचा पाठलाग करता-करता पुरेवाट झाली होती.

याच वेळी विजापूरचा अली आदिलशहा मरण पावला. त्याचा पाच वर्षांचा अल्पवयी मुलगा सिकंदरजहाँ आदिलशाही तख्तावर बसला व हबशी सरदार खवासखान याच्या हाती राज्याची सारी सूत्रे गेली. या बातमीने राजे बेचैन बनले. खवासखान हा राजांचा पक्का द्वेष्टा. तो आज ना उद्या शत्रुत्व पत्करणार, याची राजांना खात्री होती. कोणत्या क्षणी आदिलशाही औरंगजेबाला मिळेल, याचा नेम नव्हता. राजांनी निर्णय केला. आदिलशाही दरबारातील राजांचा वकील बाबाजी नाईक पुंडे याला राजांनी बोलावून घेतले. आदिलशाहीच्या आक्रमणाच्या आधीच आदिलशाहीवर स्वारी करण्याचा राजांचा इरादा होता. राजांचे सेनापती प्रतापराव व आनंदराव वऱ्हाडात, तेलंगणात होते. राजांनी आपल्या फौजांना गोळा होण्याचे हुकूम सोडले. राजे प्रतापरावांची वाट पाहत होते.

आदिलशाही स्वारीचा बेत पक्का झाला होता. गडाचे नाव होते किल्ले पन्हाळा.

□

१०

राजांचे शेकडो नजरबाज आदिलशाही मुलुखात फिरत होते. सेनापती प्रतापराव गुजर गडावर दाखल झाले होते. पन्हाळगडाच्या बातम्या राजांना मिळत होत्या. किल्ला बळकट होता, हुशार होता. खुद्द राजांनी पन्हाळगडावर एकदा पराजय सोसला होता. त्या दिव्यात राजांची हजार फौज गारद झाली होती. आता राजांना अपयश नको होते. या कामासाठी नुसते धाडस चालणार नव्हते. कुशल बुद्धीचा हरकामी माणूस राजांना हवा होता. राजे विचारमग्न बनले होते.

सायंकाळी राजे जगदीश्वरप्रासादाकडे जात होते. मागून अनाजी दत्तो, गणाजी, प्रतापराव ही मंडळी चालत होती. देवदर्शन करून राजे जगदीश्वरप्रासादाबाहेर आले. समोर भवानीटोक नजरेत येत होते. हवेतला गारवा राजांना जाणवत होता. अनाजी म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज, थंडी उतरू लागली. आता परतू या.’

‘हं! थंडी. अनाजी, या थंडीचं भय आम्हांस वाटत नाही. भय वाटतं मनातल्या गारठ्याचं.’

‘कसला गारठा?’

समोर बोट दाखवीत राजे म्हणाले, ‘तो पाहिलात तोरणा? तो दिसतो, पण त्याच्या मागे असलेला राजगड मात्र या दिवसांत दिसत नाही. हवा स्वच्छ असली, की खूप दूरचं दिसतं. आता उतरणाऱ्या धुक्यात सारं कसं अस्पष्ट झालं आहे.’

‘क्षमा असावी, महाराज. पण आम्ही असता चिंता कसली?’ अनाजी दत्तो म्हणाले.

राजांनी दीर्घ नि:श्वास सोडला. अनाजींच्या खांद्यावर हात ठेवीत ते म्हणाले,

‘इथं कोणी परकं नाही; बोलायला हरकत नाही. आदिलशाहीची सत्ता खवासखानाच्या हाती आलेली आहे. आमचं मित्रत्व जगजाहीर आहे. मोगलांशी हातमिळवणी करून तो आमच्यावर चालून येईल, यात आम्हांला शंका नाही. हे आम्हांला दिसलं, म्हणूनच बाबाजी पुंड्यांना आम्ही माघारी बोलावून घेतलं. आदिलशाहीनं कळ काढण्याआधी आम्ही पावलं उचलायला हवी.’

‘आज्ञा व्हावी! आदिलशाही मुलूख बेचिराख करू.’ प्रतापराव तलवारीवर हात ठेवीत म्हणाले.

‘हां, हां! जरा सबुरीनं घ्या.’ राजे हसून म्हणाले, ‘प्रतापराव, नुसता मुलूख बेचिराख करून जमायचं नाही. आदिलशाही धसका घेईल, असं कृत्य करायला हवं.’

‘म्हणजे पन्हाळा...’ अनाजी दत्तो म्हणाले.

‘बरोबर! आमचं मनोगतच बोललात.’

‘आज्ञा, महाराज!’ प्रतापराव, गणाजी एकाच वेळी पुढे सरसावले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘प्रतापराव, आम्ही जाणतो; पण नुसत्या वेड्या धाडसानं गड फत्ते व्हायचा नाही. त्या गडापायी हजार जीव गमावून आम्ही पश्चात्ताप पावलो आहो. विचार करायला हवा. चला.’

सारे परतले. राजांच्या महालापर्यंत अनाजी आले. महालात आलेल्या अनाजींना पाहून राजांना आश्चर्य वाटले. त्यांनी विचारले,

‘अनाजी, काय आहे?’

‘महाराज, आज्ञा होईल, तर पन्हाळ्यावर मी जाईन.’

‘तुम्ही?’

‘जी! नजरबाजांच्याकरवी गडाचा पुरता छडा लावता येईल. प्रयत्न करून कदाचित भेदही जमेल. निश्चित आखणी झाली, की योग्य त्या प्रकारानं गड साधता येईल. अपयश येऊ देणार नाही.’

क्षणभर राजे विचारात पडले. त्यांनी नजर उंचावली.

‘आम्ही विचार करू.’

अनाजी मुजरा करून महालाबाहेर गेले.

सकाळची सूर्यकिरणे गडावर फाकली. राजांच्या हुकुमाने सारे सरदार राजसदरेवर हजर झाले. अनाजी, प्रतापराव, खळेकर ही माणसेही त्यांत होती. राजांनी सर्वांसमक्ष अनाजींना विडा दिला.

‘अनाजी, आम्ही तुम्हांला पन्हाळ्याची मोहीम देतो आहो. जी कुमक लागेल, ती प्रतापरावांच्याकडून मागून घ्या. वेळ लागला, तरी चालेल; पण या मोहिमेत यश घेऊन या.’

अनाजींना आनंदाचे भरते आले. इतरांची मने थोडी नाराज झाली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चांगला मुहूर्त पाहून अनाजी आपल्या फौजेसह गडाखाली उतरले.

□

११

अनाजी दत्तो फौजेसह राजापूरला दाखल झाले. राजापूरला टाकलेल्या छावणीत नजरबाजांची वर्दळ वाढू लागली. पन्हाळगडची बित्तंबातमी अनाजींना मिळत होती. येणारी बातमी उमेद वाढविणारी नव्हती. गडावर दोन-अडीच हजारांची शिबंदी होती. गड उंच, बळकट होता. किल्लेदार जागरूक होता. तट मजबूत होते. गडाचे दरवाजे गडाइतकेच बुलंद होते. अनाजी विचारात पडले. राजांना शब्द दिला होता. सरळ चाल करून जाण्यासारखी परिस्थिती नव्हती आणि नवा मार्ग सुचत नव्हता.

अनाजी मोहिमेवर जाऊन महिना झाला, तरी अनाजींची काही हालचाल झाली नव्हती. राजांना पन्हाळगडाची चिंता लागली होती.

सकाळच्या सुमारास राजे बालेकिल्ल्याच्या कातळावर उभे होते. समोरचा होळी चौक मोकळा होता. बाजारपेठ नजरेत येत होती. गडापलीकडच्या पर्वतांच्या मालिकेत कोकणदिवा नजरेत भरत होता. राजांच्या मागे बाळाजी आवजी उभे होते. राजांचे लक्ष गडावर येणाऱ्या संभाजीराजांच्याकडे गेले. पाठोपाठ कोंडाजी फर्जंद नजरेत आले. राजे गडबडीने कातळ उतरले. संभाजीराजांनी राजांना मुजरा केला.

‘संभाजीराजे, आज अचानक आलात? मासाहेब क्षेम आहेत ना?’

‘जी! आबासाहेब, आम्ही शिकारीला गेलो होतो.’

‘मग शिकार मिळाली?’

‘हो! भला जंगी डुक्कर मिळाला.’ संभाजीराजे राजांच्या बरोबर चालत होते; सांगत होते, ‘देवकाईच्या तळ्यावर जनावरं उतरतात, अशी वर्दी होती. भल्या पहाटे आम्ही रान जवळ केलं. सांबर दिसलाच नाही; पण डुक्कर उठला.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘किती ओझ्याचा आहे?’ राजांनी विचारले.

‘सोळा.’ कोंडाजीने सांगितले.

‘बंदुकीनं मारलात?’

‘नाही, आबासाहेब! भाल्यानं मारला.’

राजांच्या कपाळावर सूक्ष्म आठी पडली. ते थांबले.

‘सोळ्या ओझ्यांचं जनावर भाल्यानं मारलं?’ राजांचा आवाज करडा बनला. ‘तुम्ही भाला लावलात?’

संभाजीराजांचा संताप उफाळला. ते म्हणाले,

‘आम्ही नाही फाळ लावला. फाळ कोंडाजीनं लावला, आबासाहेब! आम्ही घोड्यावरून तळ्याची दरड उतरत होतो. दरड उतरलो आणि तळ्याच्या चिखलात बसलेला डुक्कर उठला. आम्ही मुळीच भ्यालो नाही. भाला पेलून आम्ही टाच दिली, तोच मागून येणारे कोंडाजी आम्हांला बगल देऊन पुढं घुसले. विचारा की, खरं, की खोटं, ते!’

राजांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. त्यांनी कोंडाजींना विचारले,

‘कोंडाजी, बाळराजांची तक्रार दिसते.’

कोंडाजी अदबीने हसू लपवीत म्हणाला,

‘नाइलाज झाला. जनावर भारी होतं. युवराजांना पेलणार नाही, असं वाटलं. म्हणूनच घोडं पुढं काढलं.’

‘चांगलं केलंत. बाळराजांचा उतावीळ स्वभाव आम्ही जाणतो. त्याचसाठी त्यांच्या मावळ्यांवर तुमची नेमणूक केली. तुम्ही होता, म्हणून बरं. हे शहाणे सरळ चालून गेले असते... राजे, आम्ही तुम्हांला बजावलं होतं. तुम्ही तसं वचनही दिलं होतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पण, आबासाहेब, आम्ही वाघावर चालून गेलो नाही; डुक्कर मारला आम्ही!’ संभाजीराजांनी सांगून टाकलं.

राजे थक्क होऊन त्या भाबड्या मुखाकडे पाहत होते. ते रूप पाहून कसे रागवावे, हेही राजांना कळेना. संभाजीराजांना जवळ घेत राजे म्हणाले,

‘बाळराजे, कसं सांगावं तुम्हांला? आम्ही तुमच्या वेड्या धाडसाबद्दल सांगितलं होतं; वाघाच्या शिकारीबाबत नव्हे! चला.’ आणि राजांनी एकदम विचारले, ‘...आणि शिकार नाही आणलीत, वाटतं?’

‘आणली, तर! मासाहेबांनीच शिकार घेऊन जायला सांगितलं. मासाहेबांनी चरबी काढून ठेवायला सांगितलं आहे.’

‘का?’

‘मासाहेबांचे गुडघे दुखतात ना! डुकराची चरबी लावली, की कळ थांबते.’

राजांना हसू आवरणे कठीण गेले. ते म्हणाले,

‘बाळराजे, तुम्ही मासाहेबांची काळजी घेता, हे आता मात्र आम्हांला पटलं! तुमची शिकारीची हौस भागली; आणि मासाहेबांना औषध मिळालं. एवढ्याचसाठी मासाहेबांच्या सोबतीचं निमित्त करून पाचाडला राहता, वाटतं?’

संभाजीराजांनी राजांची नजर टाळली. वाड्यात जाताच ते सरळ थोरल्या राणीसाहेबांच्या महालाकडे धावले. राजारामांच्या भेटीसाठी उतावीळपणे जाणाऱ्या संभाजीराजांना राजांनी हाक मारली. संभाजीराजे वळले. राजांनी विचारले,

‘एवढी गडबड बरी?’

संभाजी हसले. ‘राजारामांना शिकार दाखवायची आहे, आणि चरबी पण काढून...’

राजे हसू लपवीत म्हणाले, ‘समजलं. जा तुम्ही!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजे दिसेनासे झाल्यावर राजे आपल्या महालाकडे वळले.

□

१२

रात्री राजांना शांत झोप लागली नाही. सकाळ होताच ते आपली स्नानपूजा आटोपून आपल्या महाली आले; आणि कोंडाजी फर्जंदांना त्यांनी बोलावणे पाठविले. कोंडाजी राजांच्या महाली हजर झाला. कालचा शिकारीचा प्रसंग, त्यानंतर राजांचे आलेले बोलावणे यांमुळे कोंडाजी मनातून चरकला होता. कोंडाजीच्या मुजऱ्याचा स्वीकार करून राजे म्हणाले,

‘कोंडाजी, आम्ही चिंतेत आहो.’

‘आज्ञा, महाराज!’ कोंडाजी म्हणाला.

‘पन्हाळा काबीज करण्याचा मानस आहे. त्यासाठी आम्ही अनाजींना फौजपागा देऊन पाठवलं. आता महिना होऊन गेला; पण अद्याप अनाजी राजापूरलाच आहेत. पन्हाळा काबीज केल्याखेरीज आमच्या चित्ताला समाधान लाभणार नाही.’

‘धन्याच्या जिवाला शांती नाही, तर आम्ही कशाला जगायचं?’ कोंडाजीने सवाल केला.

‘कोंडाजी, का, कुणास ठाऊक, रात्रभर तू आमच्या नजरेसमोर होतास. तुला पाठवावं, असं आम्हांला वाटतं.’

‘महाराज, नशीब उजाडलं माझं! लई कंटाळा आला व्हता.’

‘ठीक आहे. निघायची तयारी कर.’

कोंडाजी आनंदाने माघारी वळला. राजांनी बाळाजी आवजींना बोलावून घेतले. राजसदरेवर हजर राहण्याचे हुकूम सुटले. सूर्य माथ्यावर आला असता राजांची राजसदर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सरदारांनी सजली होती. त्यात कोंडाजी फर्जंद, गणाजी व मोत्याजी खळेकर ही मंडळीही हजर होती.

राजे आसनावर येऊन बसले. सर्वांवरून नजर फिरवून राजे म्हणाले,

‘आजचा दिवस भाग्याचा. अनेक दिवसांची चिंता आज दूर झाली. पन्हाळा काबीज करण्याचा आमचा बेत तडीस जाणार, असं दिसतं. आमचे अनाजीपंत पुढं गेलेलेच आहेत. त्यांची छावणी राजापूरला आहे. कोंडाजी, तू फौज जमवून त्यांच्या मदतीला जा. तुझ्याबरोबर गणाजी व मोत्याजी मामा खळेकरही येतील.’

कोंडाजीची छाती तणावली. धीमी पावले टाकीत तो राजांच्या जवळ आला आणि त्याने मुजरा केला. राजांनी बाळाजींकडे पाहिले. बाळाजी पुढे झाले; आणि त्यांनी आसनावर ठेवलेल्या रौप्यतबकातील रुमाल उचलले. तबकात मानवस्त्रे व सोन्याची कडी शोभत होती.

राजे उभे राहिले; आणि त्यांनी आपल्या हातांनी कोंडाजीच्या हातांत सोन्याची कडी चढविली. मानवस्त्र दिले. कोंडाजीचे भान हरपले. त्याने पटकन राजांचे पाय शिवले. राजांनी कोंडाजीला उठविले. कोंडाजीचे डोळे पाणावले होते, श्वास जड बनला होता.

‘महाराज ऽ ऽ’ कोंडाजीला पुढे बोलवेना.

‘काही बोलायची गरज नाही, कोंडाजी! सारं समजलं. तुम्ही आजपासून सोन्याच्या कड्याचे मानकरी. पालखीचा मान तुम्हांला.’

ते दृश्य पाहून सारे अचंबले होते. येसाजीच्या चेहऱ्यावरील स्मित पाहून राजांनी विचारले,

‘येसाजी, आम्ही करतो, त्यात हसण्यासारखं काय आहे?’

येसाजीचे स्मित जागच्या जागी आटले. तो अदबीने म्हणाला,

‘महाराज, कामगिरी पार पाडल्यावर कौतुक केलेलं मी लई वेळा बघितलं; पण

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कामगिरी फत्ते व्हायच्या आधीच सोन्याच्या तोड्याचा मानकरी झालेला पहिलाच दिसला.'

सारे त्या बोलण्याने हसले. साऱ्यांच्या मनांतील शंका येसाजीने बोलून दाखविली होती. राजे मात्र गंभीर होते. येसाजीकडे नजर वळवीत असता त्यांनी आपला डावा हात कोंडाजीच्या खांद्यावर ठेवला.

'येसाजी, कोंडाजीला जेव्हा कामगिरी सांगितली, तेव्हाच गड फत्ते झाला, हे आम्ही जाणतो. गडाची काळजी मिटली; पण ही जिवाच्या बाजीनं लढणारी माणसं परत दिसतील, की नाही, हे कुणी सांगावं? आता तानाजीचा गौरव करायचा म्हटला, तरी तो कुठं सापडणार?'

राजांनी दीर्घ नि:श्वास सोडला. क्षणभर ते स्तब्ध राहिले. दुसऱ्याच क्षणी ते म्हणाले,

'कोंडाजी, पन्हाळा घ्या; पण तो घेतला, हे सांगायला तुम्ही परत या. पुढचे मनसुबे फार मोठे आहेत. त्याला तुमच्यासारख्यांची जोड हवी.'

कोंडाजी राजापूरला आपल्या साथीदारांसह रवाना झाला; आणि राजांची काळजी वाढली. मोरोपंतांनी नाशिक-त्र्यंबकच्या काबीज केलेल्या मुलुखातून मिळविलेली लूट गडावर पाठविली होती; पण राजांना कशातच समाधान वाटत नव्हते. राजांचे लक्ष पन्हाळ्याच्या वार्तेकडे लागले होते. पंधरा दिवस होऊन गेले, तरी पन्हाळ्याची काही बातमी आली नाही.

राजे पहाटे स्नान करून आपल्या महाली आले. राजांच्या देव्हाऱ्याजवळ पुतळाबाई, मनोहारी या उभ्या होत्या. पुतळाबाई तबकातील कमळे नीट ठेवण्यात गुंतल्या होत्या. राजांनी विचारले,

'कमळं कुठून आली?'

'आपल्या कुशावर्तात फुललीत.'

'तुम्ही पाहिलीत?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नाही. काल ही मनू सांगत होती. तेव्हा आपल्या पूजेसाठी आणायला सांगितली.’

‘छान! आम्ही गडावर असूनही आम्हांला याचा पत्ता लागला नाही. आमचं जाणं जगदीश्वराकडे, नाही तर पागेकडे. कुशावर्त बाजूला पडतो ना!’

राजांनी पूजा आटोपली. दासबोध वाचला. राजे देव्हाऱ्यातून महालात आले. दूध घेत असता राजे पुतळाबाईंना म्हणाले,

‘राणीसाहेब, आज संध्याकाळी आपण कुशावर्त पाहायला जाऊ. थोरल्या राणीसाहेबांनाही सांगा. शंभूबाळांची काही खबर?’

‘बाळराजे पाचाडलाच आहेत.’

‘चैन आहे त्यांची. सारे लाड पुरवणाऱ्या मासाहेब आहेत. मग आमच्या करड्या नजरेखाली येतील कशाला? शंभूबाळांच्यामुळं अलीकडे मासाहेबांनाही आमची आठवण येईनाशी झाली आहे.’

‘तसं नाही हं!’ पुतळाबाई म्हणाल्या, ‘दररोज आपल्या तब्येतीचे निरोप गडाखाली जातात. माझ्याकडे एकतरी माणूस दररोज येऊन जातो.’

‘तुम्ही पण भाग्यवान आहात. मासाहेबांचा तुमच्यावर विश्वास आहे; पण आम्ही काळजीत असलो, की मासाहेबांची आठवण उत्कटतेनं होते. सारखं चुकल्यासारखं वाटतं.’

‘मग मासाहेबांना बोलावून घ्यावं.’

‘नको! त्यांचं वय झालं. आता दगदग सोसवत नाही. आम्हीच एक-दोन दिवसांत त्यांना भेटायला जाऊ.’

सायंकाळी राजे वाड्याच्या चौकात उभे होते. बाळाजी, उधोजी, महादेव ही मंडळी शेजारी होती. तोच आतून येणाऱ्या पुतळाबाई, काशीबाई, सगुणाबाई दासीपरिवारासह नजरेत आल्या. सोयराबाई मात्र दिसत नव्हत्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी पुतळाबाईंना विचारले,

‘...आणि थोरल्या राणीसाहेब?’

‘त्यांची तब्येत बरी नाही. बाळराजांना घेऊन जा, असं त्या म्हणाल्या. बाळराजांना आणू?’

‘नको. त्यांना वारा सोसायचा नाही. जरा कुठं सर्दी झाली, तर दोष आमच्यावर यायचा. चला, जाऊ.’

राजे कुशावर्ताकडे चालू लागले. कुशावर्त वरून सहजासहजी दिसणारा नव्हता. बालेकिल्ल्यासमोरच्या घळीत कुशावर्त तलाव बांधला होता. चारी बाजूंच्या झाडीत ते स्थान लपले होते. राजे सावकाश उतरत होते. जेव्हा कुशावर्त नजरेत आला, तेव्हा राजांचे पाय आपसूक थांबले. कुशावर्ताच्या निळ्याशार पाण्यावर असंख्य तांबडी, मधूनमधून पांढरी आणि जर्द कमळे फुलली होती. पाण्यावर कमळाच्या हिरव्या पानांनी साज चढविला होता. कुशावर्ताच्या भोवतालची झाडी, कमळांनी सुशोभित झालेला तलाव, काठावरचे टुमदार शिवालय यांमुळे त्या जागेला एक वेगळेच रूप प्राप्त झाले होते. राजे उद्गारले,

‘व्वा! सुरेख! हिरोजींनी नुसता कुशावर्त बांधला नाही. हिरोजी एवढे रसिक असतील, असं वाटलं नाही.’

‘महाराज...’ महादेव म्हणाला.

‘बोल.’

‘बाळराजांनी कमळांचे गड्डे आणले.’

‘शंभूबाळांनी?’

‘जी! गेल्या वर्षी महाडच्या तलावातून बाळमहाराजांनी गड्डे आणवून घेतले. त्यांनीच ते तलावात सोडले. शिकारीला देवीतळ्याला जात्यात. तिथनंबी गड्डे आणल्यात.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे प्रसन्न झाले. समाधानाने म्हणाले,

‘शिकारीचा नाद असा उपयोगी पडेल, असं वाटलं नव्हतं. त्यांच्या ठिकाणची सौंदर्यदृष्टी पाहून बरं वाटलं.’

राजे कुशावर्तमंदिरात गेले; देवदर्शन घेऊन बाहेर आले. तलावाच्या काठी बांधलेल्या कट्ट्यावर ते विसावले. राजांचा कुटुंबपरिवार देवदर्शन करीत होता. राजे बाळाजींना म्हणाले,

‘बाळाजी, केवढं रम्य ठिकाण झालं, नाही? आमच्या गंगासागरापेक्षाही हे स्थान अधिक रमणीय बनलं आहे.’

‘जी!’

‘बाळाजी, कुशावर्ताची निगा अशीच राखा. हे तुमचं काम समजा. कुशावर्ताच्या आजूबाजूची झाडी मुळीच तोडू नका. आमच्या नियमांना हा भाग अपवाद समजा. ही जागा सुरक्षित आहे.’

देवदर्शन करून तिघी राण्या बाहेर आल्या. राजे उठले. बाळाजी, महादेव ही मंडळी अदबीने मागे सरली. सामोऱ्या आलेल्या पुतळाबाईंना राजे म्हणाले,

‘राणीसाहेब, तुमच्यामुळं हा योग आला. आम्हांला हे ठिकाण पाहून फार बरं वाटलं.’

पुतळाबाई पदर सावरून म्हणाल्या,

‘इथं आम्ही आलो; आणि उगीचच मनात आलं...’

‘काय?’

‘या फुलांचा जगदीश्वराला अभिषेक करावा.’

‘मग करा ना! उद्या सोमवार आहे. तुम्हांला फुलं देण्याची व्यवस्था करू. मग झालं?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नको!’

‘का?’

‘ते जमायचं नाही.’

‘कारण?’

‘देवाला वाहायचं फूल स्वत:च्या हातांनी तोडावं लागतं. नाही तर पुण्य पदरात पडत नाही, म्हणतात.’

‘आम्हांला ते माहीत आहे. मया हस्तेन पूजार्थं पुष्पाणि प्रतिगृह्यताम्। दुसऱ्याच्या हातांनी तोडलेल्या फुलांपेक्षा स्वहस्ते तोडलेली, संकल्पानुसार वाहिलेली फुलं देवाला अधिक प्रिय असतात, असंच ना? पण हे कसं जमायचं?’

‘त्यासाठीच नको म्हटलं.’ पुतळाबाई म्हणाल्या, ‘पुण्य पदरात पडायचं नाही. बिचारी फुलं मात्र अकारण खर्ची पडायची. इथल्या शोभेला गालबोट लागून राहील.’

राजे क्षणभर विचारात पडले. ‘आलो’ म्हणून त्यांनी दूर उभ्या असलेल्या महादेवाला हाक मारली. महादेवाशी ते दोन क्षण बोलले, आणि परत आले. राजांच्या चेहऱ्यावर पूर्वीचीच प्रसन्नता दिसत होती.

‘राणीसाहेब, तुमचा संकल्प पुरा होणार.’

‘तो कसा?’ आश्चर्याने पुतळाबाईंनी विचारले.

‘एवढे राज्याचे प्रश्न आम्ही सोडवितो, आणि घरचं कोडं सोडविता येत नाही? उद्या पहाटे कुशावर्तात छोटी नाव घातली जाईल. तुम्ही तिघीजणी मिळून हवी तेवढी फुलं तोडा; संकल्प पुरा करा.’

पुतळाबाई काहीतरी बोलणार, तोच राजे म्हणाले, ‘थांबा, ऐका!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सारे स्तब्ध झाले. नगाऱ्याचा आवाज कानी पडत होता. राजे म्हणाले,

‘ही नौबत कसली? एवढं मानाचं कोण आलं?’

त्या नौबतीच्या आवाजाने सारे चकित झाले होते. तोच समोरच्या झाडीतून हिरोजी इटलकर धावत येत असलेला दिसला. राजे पुढे धावले. हिरोजी नजीक आला.

‘हिरोजी, कोण आलं? नौबत कुणी वाजविली?’

‘मीच वाजवायला सांगितली. राजे, पन्हाळा काबीज झाला! ती बातमी घेऊन स्वार गडावर आला आहे.’

‘जगदंबे!’ राजांचा आनंद उफाळला. ‘हिरोजी, आम्ही तुमच्यावर खूश आहो! ह्या बातमीचं आगमन आमच्या आगमनापेक्षाही श्रेष्ठ आहे. नौबतीचा मान दिलात; आमचा मनोरथ सिद्धीला नेलात.’

राजे पुतळाबाईंच्याकडे वळले. ‘राणीसाहेब, पन्हाळा फत्ते झाला! अपुरी इच्छा आज पुरी झाली. पाहिलंत ना, चांगल्या संकल्पांना सिद्धी किती लौकर प्राप्त होते, ती! उद्याच्या उद्या संकल्प पुरा करा. आम्ही पुढं जातो... चला, हिरोजी.’

राजे भरभर जात होते. मागून हिरोजी, बाळाजी जात होते.

□

१३

राजे नगारखान्यातून बालेकिल्ल्याच्या आतल्या चौकात आले. आपल्या महालाला वळसा घालून राजे जात होते. जामदारखाना ओलांडून ते सातमहालाच्या सदरेवर आले. मुजरा करणाऱ्या सेवकांचे राजांना भान नव्हते. ते सरळ सोयराबाईंच्या महाली गेले.

सोयराबाई महालाच्या सोप्यात बसल्या होत्या. शेजारी राजाराम खेळत होता. राजे आकस्मिक आलेले पाहून साऱ्या दासी गडबडीने पदर सावरून उभ्या राहिल्या. सोयराबाई

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पण उठल्या. राजाराम ‘आबासाहेब’ म्हणत राजांच्याकडे धावले.

राजारामांना उचलून घेत राजांनी विचारले,

‘आपली तबियत बरी नव्हती ना?’

‘जरा डोकं दुखतं.’

‘हं! ठीक आहे. पन्हाळा फत्ते झाला, ते सांगायला आम्ही आलो होतो.’

सोयराबाईंनी मान वर केली. सोयराबाईंचा नूर निराळा दिसत होता. त्या एकदम बोलून गेल्या,

‘तेवढा राहिला होता, वाटतं.’

‘मतलब?’

‘नाही; मला माहीत नव्हतं.’

‘उद्या जगदीश्वरप्रासादाकडे जायचंय्.’

‘साऱ्यांनीच यायला हवं?’

‘राणीसाहेब, आज खरंच आपली तबियत बरी दिसत नाही. आपण विश्रांती घ्या!’ हातांतल्या राजारामाला राजे म्हणाले, ‘चला, बाळराजे, आपण तोफा उडवू!’

‘फिरायला न्याल, म्हणून बाळराजे कपडे करून बसले होते. केवढे रडले!’

‘आमच्या पण मनात होतं; पण पुन्हा वाटलं, कुठं तरी हवा बाधायची!... येतो आम्ही.’

राजे महालाबाहेर पडले. काही पावले टाकेपर्यंत ते विचारात गढल्यासारखे भासले;

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पण नंतर त्यांचा नूर पालटला. सदरेवर उभ्या असलेल्या बाळाजींना राजांनी विचारले,

‘बाळाजी, जासूद कुठं आहे?’

‘जी, बोलावतो.’

राजे सदरेवर बसले. सारे उभे होते. प्रत्येकाच्या मुखावर विजयाचा आनंद दिसत होता. राजांनी बाळाजींना आज्ञा केली. बाळाजी गडबडीने राजसदरेवरून निघून गेले.

पन्हाळ्यावरून आलेला जासूद सदरेवर आला. मुजरा करून त्याने राजांना थैली दिली. राजांनी पत्र वाचले. राजांचे नेत्र सुखावले. राजांनी उभे राहून हाक मारली,

‘बाळाजी!’

बाळाजी गडबडीने आत येत होते. मागून दोन कारकून हातांत तबके घेऊन चालत होते. राजांनी तबकांवरील रुमाल उचलले. एका तबकात मोहरा आणि दुसऱ्या तबकात साखर होती. राजांनी हातात साखर घेतली. ते जासुदाजवळ गेले. जासूद संकोचला होता. राजे म्हणाले,

‘तोंड उघड!’

‘महाराज...’

‘तोंड उघड!’

जासुदाने तोंड उघडले. राजांनी आपल्या हातांनी त्याच्या मुखात साखर घातली. साऱ्यांच्या बरोबर हसत राजांनी सांगितले,

‘ही आनंदाची बातमी सांगितल्याबद्दल या जासुदाला शंभर सुवर्णहोन खुशाली द्या. गडावरून फत्ते मुबारकीच्या तोफा वाजू द्या. आजच्या आमच्या आनंदाला सीमा नाहीत.’

राजांच्या आज्ञेची तामिली करण्यासाठी बाळाजींनी सेवक पाठविले. राजांचे लक्ष

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जासुदावर स्थिरावले,

‘तुझं नाव?’

‘माणकू.’

‘माणकोजी, कोंडाजींनी पन्हाळा काबीज केला, तेव्हा तू तिथं होतास?’

‘असना तर, महाराज! कोंडाजींच्या संगं मीच व्हतो.’

‘माणकू, आम्हांला आमच्या कोंडाजी फर्जंदचा पराक्रम ऐकू दे.’

माणकू सांगू लागला, ‘राजापूरला सारा बेत ठरला. पंतांना मागनं यायला सांगून कोंडाजींच्या बरोबर आम्ही पुढं गेलो. कोंडाजींची माणसं आधीच गडावर फिरून आली होती. शिबंदीचे लोक फितवले होते. ठरलेल्या दिवशी पंतबी आम्हांला येऊन मिळाले. नंतर कोंडाजींनी गड पारखून घेतला. नाइकांनी लई मोठा बेत आखला होता. पंतांस्नी सगळ्यांसंगं गडाबाहीर ठेवलं होतं. मावळतीकडनं साठजणांनी गड गाठायचं ठरलं होतं.’

‘अवघे साठ?’

‘व्हय! जागा हेरून घेतल्याली होती.’

‘सांगा पुढं!’ राजे उत्सुकतेने विचारते झाले.

‘...आणि काय? रात जवा चढली, तवा गडाचा तळ गाठला. आमच्यात शिडीवाले, मेखवाले, वाघनखवाले, शिंगवालेबी व्हते. गणामामा, मोत्याजीमामा संगं हुते. नाव बदलून भवानीचं नाव घेतलं; आणि कोंडाजी कड्याला भिडले. एकमेकांला हात देत कडा पार केला, आन् गड गाठला. दोऱ्या सोडून बाकीच्यांस्नी वर घेतलं. आधी रात उलटून गेली व्हती. डोळ्यात बोट घातलं, तरी दिसत नव्हतं. एक मशालजी गस्त घालीत आला. आवाज करायच्या अगोदर त्याला बानानं टिपला. वाट मोकळी झाली. ठरल्यापरमानं आमची मानसं तलवारी काढून गडावर पांगली; आणि कोंडाजीनं इशारत दिली. आमचे शिंगवाले शिंगं फुंकू लागले. चारी बाजूंनी येकच आवाज उठला. सारा गड जागा झाला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

येकच धावपळ उडाली. 'कुठून आवाज येतो, कोन शिंग फुंकतो', असा आरोड उठला. भुतं असतील, असं भ्या वाटून, कोन पुढंबी येई ना. त्यातच खुणेची शीळ घुमली. 'हर हर महादेव ऽ'चा बुक्का उधळला. कापाकापी सुरू झाली. रानात दडून बसलेले पंत शिबंदीसकट पुढे आले. तवर आमच्या लोकांनी दरवाजा गाठला होता. गडाचा किल्लेदार जागा होऊन घराबाहेर आला, तवर कोंडाजीनं त्याला गाठला. दोन हातांत किल्लेदाराचं डोकं उडालं. त्याच येळंला पुढच्या दरवाजानं पंत आत शिरले. किल्लेदार पडला, तशी लढाईच सोपली. नागोजी पंडित म्हणून एक नाईक होता, त्यो पळून गेला.'

'शाबास, कोंडाजी!' राजे उद्गारले, 'जीव ओवाळून टाकावीत, अशी ही माणसं. खुद्द आम्ही हजर असताना ज्या गडावर आम्हांला पराभव पाहावा लागला, तोच आदिलशाही मातबर गड अवघ्या साठ भुतांनी घेतला!'

त्याच वेळी तोफेचा आवाज उठला. राजे आसनावरून उठले.

'बाळाजी, उद्या अभिषेक आटोपून आम्ही गडाखाली उतरू. मासाहेबांना भेटून आम्ही पन्हाळ्यावर जाणार. कोंडाजी-अनाजींना भेटल्याखेरीज आम्हांला चैन पडणार नाही... प्रतापराव!'

'जी!'

'तुम्ही उद्या आमच्यासह चला. आपली फौज पन्हाळा भागात गोळा करा. आदिलशाही आता जागा होईल. त्या तयारीनं आपल्याला जायला हवं!'

'जी!' प्रतापरावांनी मुजरा केला.

राजे समाधानाने महालाकडे पावले टाकू लागले.

□

१४

राजे झोपण्याच्या तयारीत होते. त्याच वेळी मनोहारी आत आली. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मनोहारी, काय आहे?’

‘बाळमहाराज आले आहेत.’

‘या वेळी का आले?’

राजे चिंताचूर होऊन उठले. महालाच्या दरवाजापाशी ते गेले, तोच समोरून येणारे संभाजीराजे त्यांच्या नजरेत आले. संभाजीराजांनी जवळ येऊन राजांचे पाय शिवले.

‘बाळराजे, रात्रीचे आलात? मासाहेबांची तबियत...’

‘आबासाहेब, मासाहेब क्षेम आहेत. गडावरून तोफांचे आवाज आले. मासाहेब म्हणाल्या : ‘नवी बातमी गडावर आली, वाटतं.’ मासाहेबांना चैन पडेना. त्यांनी पाठवलं, म्हणून आलो.’

सारे ऐकत होते. त्या शब्दांनी राजांचे मन भारावले. राजे म्हणाले,

‘बाळराजे, एवढे मोठे होऊनही आम्ही आईचं मन जाणलं नाही. उद्या आम्ही गडाखाली उतरणार होतो. मासाहेबांना भेटूनच पुढं जाणार होतो. पण आईच्या प्रेमळ मनाला तेवढा विलंब कसा रुचणार? बाळराजे, गडाखाली आमच्या आज्ञेनं जासूद पाठवा. पन्हाळा फत्ते झाल्याची बातमी मासाहेबांना कळवा. आमच्याकडून दिरंगाई झाल्याबद्दल आमच्या वतीनं क्षमा मागा.’

संभाजीराजे वळले. राजांनी हाक मारली,

‘बाळराजे!’

संभाजीराजे वळले. प्रेमभराने पुढे झाले.

‘राजे, आम्ही आज कुशावर्त पाहिला. तुम्ही लावलेली कमळं आम्ही पाहिली. फार आनंद वाटला. उद्या सकाळी जगदीश्वरावर अभिषेक आहे. योग्य वेळी तुम्ही गडावर आलात. सांगितलेलं नीट पार पाडा, आणि विश्रांती घ्या.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजे निघून गेले. राजे आपल्या महाली जाऊन झोपले. बऱ्याच दिवसांनी राजांना शांत निद्रा प्रसन्न झाली.

राजे पहाटे प्रतापरावांच्यासह गड फिरत होते. पहाटेचे धुके गडावर उतरले होते. भवानीटोकावरून राजे जगदीश्वरावर आले. देवदर्शन करून राजे टकमकशेजारी पायउतार झाले. राजे आणि प्रतापराव टकमककडे चालत होते. सूर्योदय व्हायची वेळ जवळ आली होती. धुके विरळ होत होते टकमकवर उभे राहून राजे खालची दरी न्याहाळीत होते.

‘प्रतापराव, पन्हाळा फत्ते झाला. केवढं समाधान वाटलं! एक तपानंतर पन्हाळा पुन्हा स्वराज्यात सामील झाला. माणसाचं मन तरी किती अहंकारी असतं. आम्ही सोसलेला पराभव आजवर सलत होता, खुपत होता. ते शल्य निघताच केवढं हलकं वाटलं!’

‘पण आता आदिलशाही खवळून उठेल.’

‘तेच आम्हांला हवं. कुतुबशाही आमच्याशी मैत्री राखू इच्छिते. भीती आहे फक्त आदिलशाहीची. तिला आमची सत्ता जाणवली, की दक्षिणेत आपल्याला शत्रू राहणार नाही. उत्तरेचा आपला मार्ग मोकळा होईल.’

सूर्योदय झाला. राजांनी उगवत्या सूर्याला वंदन केले. बालसूर्याच्या सोनेरी किरणांत रायगडच्या भोवती उभ्या ठाकलेल्या पर्वतांची शिखरे उजळून निघाली. कोकणदिव्याच्या दरीतून वाहणाऱ्या नदीच्या पात्राचे रुपेरी पट्टे दिसू लागले. धुक्याची वलये डोंगराच्या पायथ्याला बिलगली. सृष्टीचे ते जागे होणारे रूप राजे पाहत असता घोड्याच्या टापांचा आवाज त्यांच्या कानांवर आला. राजांनी वळून पाहिले. संभाजीराजे बेगुमानपणे घोड्यावरून टकमकटोकावर येत होते. नजीक येऊन संभाजीराजे पायउतार झाले.

‘शंभूबाळ, टकमकटोक गडाची अवघड जागा. दुतर्फा कडे तुटलेले. आम्ही सोडलेली घोडी पाहूनही इथवर घोड्यावरून का आलात? कुठं जनावराचा पाय घसरला, तर?... एवढ्या तातडीनं बरे आलात?’

संभाजीराजे हसले. म्हणाले,

‘आबासाहेब, आईसाहेब आपली वाट पाहत आहेत.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सांगायचं विसरूनच गेलो. चला, जाऊ आपण.’

राजांच्या महालासमोर सर्व राण्या राजांची वाट पाहत उभ्या होत्या. पुतळाबाई पुढे झाल्या. राजे म्हणाले,

‘तुम्ही कुशावर्तावर गेला नाहीत? सकाळीच महादेव कुशावर्तावर गेला. सर्व तयारी झाल्याचं त्यांनी आम्हांला कळविलं.’

‘आपण याल, असं वाटलं.’

‘आम्ही सांगायचं विसरलो. आम्ही येत नाही. आम्ही आलो, तर तुमच्या नौकाविहारात संकोच निर्माण होईल. शिवाय बाळराजे तुमच्याबरोबर आहेतच.’

राजांची नजर सर्वांवरून फिरली; आणि त्यांनी विचारले, ‘थोरल्या राणीसाहेब...’

‘त्या ‘येत नाही,’ म्हणाल्या.’

‘ठीक! तुम्ही जा. अभिषेकाला उशीर नको.’

अभिषेक करून, दोन प्रहरी उन्हे कलल्यावर, राजे संभाजीसह गडाखाली उतरले.

पाचाडच्या वाड्यात जिजाबाई राजांची वाट पाहत होत्या. राजे जिजाबाईंच्या समोर गेले, पाय शिवून म्हणाले,

‘मासाहेब, आम्ही शरमिंदे आहो. वास्तविक पाहता कालच आम्ही गड उतरणार होतो; पण दिरंगाई झाली.’

‘असल्या लहानसहान गोष्टी कसल्या मनाला लावून घेता? आमचं वय झालं. गोवऱ्या पुढं गेल्या. या वयात देवाधर्मात मन गुंतवून गप बसावं, की नाही? तिथंही मन लागत नाही. गडावर जरा खुट्ट झालं, तरी मन गडावर धावतं.’

राजे जिजाबाईंच्याकडे पाहत होतं. डोक्यावर घेतलेल्या पदरातून डोकावणारे पांढरे केस

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चेहऱ्यावर उमटू लागलेल्या सुरकुत्या, कंप पावणारी मान, सदैव पाणावलेले डोळे... राजांनी जिजाबाईंचा हात धरला. त्यांना बैठकीवर बसवीत ते म्हणाले,

‘मग, मासाहेब, आपण गडावर का येत नाही?’

‘शिवबा, आता सत्तरी ओलांडली. अजूनही संसारातच रमू, म्हणतोस? आता घरात पोरी आल्या. त्यांना सारं पाहू दे, करू दे. मी का जन्माला पुरणार? पिकलं पान; आज ना उद्या गळून पडायचंच.’

‘मासाहेब!’

‘राहिलं! पण सत्याकडे डोळेझाक करून चालत नाही, राजे.’

संभाजी महालात आले. जिजाबाईंना बिलगून बसले. त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत जिजाबाईंनी विचारले,

‘बाळराजे, कुठं होता?’

‘पागेकडे गेलो होतो...’

‘राजे, बाळराजांना पागा, शिकार आणि...’

‘...औषध...’ राजे म्हणाले.

‘औषध कसलं?’ जिजाबाईंनी विचारले.

‘तुम्हांला माहीत नाही, वाटतं?’ संभाजीकडे पाहत राजे म्हणाले, ‘शंभूराजे शिकार हौसेसाठी करीत नाहीत; आपल्या औषधासाठी म्हणून करतात! परवा त्यांनी डुक्कर मारला, तो आपल्याला चरबी हवी, म्हणून.’

‘राजे!’ जिजाबाई संभाजीला जवळ घेत म्हणाल्या, ‘तुमच्या नशिबात बालपण नव्हतं. याच्या वयाचे असतानाच रोहिडेश्वराची शपथ तुमच्या गळ्यात पडली. निदान यांना तरी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बालपण भोगू द्या.’

‘आम्ही कुठं नको म्हणतो?’

‘भारी प्रेमळ पोर आहे. जरा जरी बरं नसलं, तरी जवळून हलत नाही. पूजेपासून झोपेपर्यंत साऱ्यावर याचं लक्ष असतं. गडावर तोफा वाजल्या, राहवेना; तर हा जायला तयार झाला. याला गडावर पाठविलं, आणि मग मलाच काळजी वाटू लागली.’

‘असल्या कामात तरबेज आहेत ते. आजचीच गोष्ट घ्या ना. आम्ही टकमकवर उभे होतो. घोडी दारूकोठाराजवळ सोडून आम्ही पायी टकमकवर गेलो होतो; आणि हे आमचे युवराज सरळ घोडा उधळीत त्या चिंचोळ्या टोकावर आले.’

संभाजीराजांच्या चेहऱ्यावर हसू होते. कृत्रिम रागाने जिजाबाई त्यांना चापटी मारीत म्हणाल्या,

‘होय, रे?’

राजे हसले. ‘पुरे, मासाहेब! फार मोठी शिक्षा झाली.’

जिजाबाई हसता-हसता एकदम थांबल्या.

‘राजे, आता तुम्हांला पोराची काळजी काय असते, ते समजू लागलं. राजे, पण त्यातही मोठं सुख असतं. आपण वाढविलेलं, जपलेलं रोपटं मोठं झालेलं पाहण्यात फार मोठं समाधान असतं. ते समाधान मी भोगते आहे. तुम्हांलाही ते पाहण्याचं भाग्य मिळेल, तेव्हा, मी काय म्हणते, ते कळेल.’

जिजाबाईंनी एकदम विषय बदलला. त्यांनी विचारले,

‘तुम्ही आता पन्हाळ्याला जाणार, म्हणे?’

‘जी! मासाहेब, आता आदिलशाहीची कळ काढलीय् खरी. त्यांचं लक्ष वळायच्या आत गड मजबूत करून घ्यायला हवा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सरळ पन्हाळ्यालाच जाणार?’

‘नाही, मासाहेब. वाटेत पोलादपूर आहे. कवींद्र परमानंद तिथंच आहेत. त्यांचं दर्शन घेऊन प्रतापगडला एक दिवस राहू. देवीची पूजा करूनच आम्ही पुढं जावं, म्हणतो.’

‘तसंच करा. संकटाच्या वेळी देवाला हाक मारण्यापेक्षा, जेव्हा असे सुलक्षणी योग येतात, तेव्हा त्याला आठवावं. त्यानं तो प्रसन्न होतो.’

‘आम्ही लौकरच येऊ. प्रतापराव आमच्या बरोबर आहेत. चिंता नसावी. तब्येतीला जपून राहावं.’

‘आमची काळजी कसली? हे बाळराजे आमच्यावर डोळ्यांत तेल घालून आहेत.’

‘तेवढं केलं, तरी आम्ही बाळराजांच्यावर खूश आहोत... चला, बाळराजे! तुमचा मोती आम्हांला पाहायचा आहे.’

जिजाबाईंच्या अनुज्ञेने राजे शंभूराजांच्यासह पागेकडे गेले.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे राजांनी आपल्या दलासह पन्हाळ्याकडे कूच केले.

□

१५

पाचाड, महाड, पोलादपूर, प्रतापगड या ठिकाणी मुक्काम करीत, देवदर्शन करीत राजे पन्हाळ्यानजीक आले. राजे येत आहेत, हे कळताच पन्हाळ्यावर एकच चैतन्य पसरले. घराघरांवर राजांच्या स्वागतासाठी गुढ्या-तोरणे चढली. गडावर बातमी आली. राजे गडाच्या पायथ्यापर्यंत आले. अनाजींनी कोंडाजींना आपल्या अश्वपथकासह राजांच्या स्वागताला पाठवले. अनाजी गडाच्या दरवाजापाशी उभे राहिले.

राजांचे अश्वदळ गड चढत होते. अग्रभागी राजे सुलक्षणी काळ्या घोड्यावर स्वार झाले होते. शेजारी जरद्या घोड्यावर स्वार झालेले सेनापती दौडत होते. टापांचा आवाज

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आसमंतात उठत होता. अचानक राजांनी कायदा ओढला. प्रतापरावांनी इशारत दिली. साऱ्या दळाचा वेग मंदावला. राजे ऐकत होते. घोड्यांचा टापांचा आवाज कानांवर येत होता. समोरच्या वळणावर राजांची नजर खिळली. क्षणात कोंडाजी नजरेत आले. महाराज आनंदाने प्रतापरावांना म्हणाले,

'प्रतापराव, पाहिलंत? तो पाहा, गड घेऊन सिंह येतो आहे!'

राजे पायउतार झाले. कोंडाजी फर्जंददेखील थोड्या अंतरावर येऊन पायउतार झाला. मोठ्या अदबीने कोंडाजी येत होता. डोक्यावर भगवे पागोटे होते. रुंदाड छातीवर अंगरखा तणावला होता. गुडघ्याच्या खाली चोळणा बळकट पिंढरीवर सुरकुतला होता. पायांतल्या वहाणा करकरत होत्या. डाव्या हाताच्या मुठीने तलवार सावरीत संकोचलेला कोंडाजी राजांच्याकडे येत होता. अभिमान आणि संकोच यांचा सुंदर मिलाफ त्याच्या चेहऱ्यावर झाला होता. चार पावले पुढे येऊन कोंडाजीने पायीच्या वहाणा काढल्या. अनवाणी पायांनी तो राजांच्या जवळ येत असता राजे धावले. दुसऱ्या क्षणी कोंडाजी राजांच्या मिठीत बद्ध झाला. राजे काही न बोलता कोंडाजीची पाठ थोपटीत होते. कोंडाजीला स्वर्ग हाती आल्याचा अनुभव येत होता. मिठी सुटली. राजांनी विचारले,

'आणि आमचे अनाजी कुठं आहेत?'

'गडाच्या दाराशी आपली वाट बघत आहेत!'

'मग लौकर जायला हवं. पंतांना तिष्ठत ठेवणं बरं होणार नाही. चला!'

सारे स्वार झाले. कोंडाजीच्या पथकाला बगल देऊन राजे पुढे झाले. राजांच्या दोन्ही बाजूंना कोंडाजी, प्रतापराव दौडत होते. दरवाजा नजीक आला. दरवाजावर भगवे निशाण फडफडत होते. राजांचा उजवा हात छातीकडे गेला.

राजे दरवाजाजवळ पोहोचले. दरवाजाशी अनाजी उभे होते. राजांचे मावळे राजांचे स्वागत करायला दाटीवाटीने दरवाजाच्या दोन्ही बाजूंना उभे होते. नगारखान्याची नौबत झडली. शिंगाची ललकार आकाशाला भिडली. अनाजींनी पुढे होऊन राजांच्यावर सुवर्णफुलांची उधळण केली. त्या प्रेमभावनेने राजांचे नेत्र पाणावले. राजांनी अनाजींच्या खांद्यावर हात ठेवला. अनाजी म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज! चलावं.’

राजांनी महाद्वाराकडे नजर टाकली. ते अनाजी-कोंडाजींना म्हणाले,

‘तुम्ही पुढं व्हा. तुम्ही जिंकलेला गड. त्यात प्रवेश करण्याचा प्रथम मान तुमचा. सुभेदार कोंडाजी, पुढं व्हा.’

अनाजी-कोंडाजींची पावले अडखळली. राजे स्मितवदनाने म्हणाले,

‘अनाजी, कोंडाजी, जेव्हा आपण यश मिळवतो, तेव्हा संकोचू नये. ते व्यक्त करण्यात लाजू नये. चला पुढं. आम्ही आहोच मागे.’

अनाजी-कोंडाजींसह राजांनी गडप्रवेश केला. पुन्हा नौबत झडली. तुताऱ्यांचे आवाज उठले. राजांचे गडावरचे आगमन गडावरच्या तोफेने जाहीर केले.

राजे सर्वांसह सज्जाकोठीवर गेले. कोंडाजीने इशारत करताच राजांच्या समोर धनाच्या राशी ओतल्या गेल्या. अनाजी म्हणाले,

‘गड अलगद हाती आला. गंगा, जमना अंबारखाने भरले आहेत. दारूगोळा, तोफखाना अलगद हाती आला.’

‘त्यात आम्हांला अचंबा वाटत नाही. अपरात्री गडावर जर साठ भुतं गोळा झाली, तर काय होणार नाही? चूपचाप गड काबीज केलेले आम्ही अनेक पाहिले; पण अवघ्या साठजणांनी गड गाठून, शिंग वाजवून, जाग आणून घेतलेला गड हाच! तुमचं धाडस अफाट. तुमच्या युक्तीला तोड नाही.’

समोरच्या धनाच्या राशीकडे बोट दाखवीत राजांनी आज्ञा दिली,

‘या धनापेक्षा आम्हांला आमची साठ भुतं दाखवा. ते धन पाहायला आम्ही आतुर आहो.’

राजांनी सर्वांना भरपूर धन देऊन सर्वांचा गौरव केला, कैद झालेल्यांना अभय दिले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गडाच्या पहाऱ्यांची जातीने तपासणी केली. आता राजांना पन्हाळा हातचा जाऊ द्यायचा नव्हता.

□

१६

पन्हाळा काबीज झाल्यापासून राजांना नवचैतन्य प्राप्त झाले होते. राजे आपली फौज गोळा करण्याचा प्रतापरावांना हुकूम देत होते. राजांचे नजरबाज साऱ्या मुलुखात पसरले होते. न राहवून प्रतापरावांनी विचारले,

'महाराज, एवढ्या तातडीचं कारण?'

'प्रतापराव, तुम्ही आमचे सरलष्कर. निदान तुम्ही तरी हा प्रश्न विचारायला नको होता. विजापूरला जेव्हा ही बातमी पोहोचेल, तेव्हा खवासखान खवळून उठेल. आमच्या पराभवासाठी आपलं सारं बळ खर्ची घालील. आदिलशाहीची उठायची तयारी होण्याआधीच तिला आमची दहशत बसायला हवी. त्यासाठी आम्ही पन्हाळ्यावरच वास्तव्य करणार आहोत.'

राजांच्या बेताचे प्रत्यंतर लौकरच प्रतापरावांना आले.

गोळा झालेल्या फौजांना राजांनी आदिलशाही मुलुखात पाठविले. राजांच्या फौजांनी दोन महिन्यांच्या अवधीत परळी, सातारा हे आदिलशाही किल्ले घेतले. या मध्यवर्ती आणि महत्त्वाच्या किल्ल्यांवरून अमर्याद लूट शेकडो बैलांवर लादून रायगडी पाठविण्यात आली. परळी-सातारा किल्ल्यांवर राजांनी आपली शिबंदी वाढवली, विश्वासू किल्लेदार नेमले.

विजापूरच्या अल्पवयी सिकंदरजहाँच्या कारकीर्दीत सत्ताधीश बनलेला खवासखान शिवाजीचा बीमोड कसा करावा, याचा विचार करीत असतानाच पन्हाळा गेल्याची बातमी त्याला मिळाली. विजापुरात एकच धांदल उडाली. खवासखानाने विखुरलेल्या फौजांना एकत्र करायला सुरुवात केली, तोच परळी, सातारा हे शिवाजीने घेतल्याच्या बातम्या विजापूरला थडकल्या. संतप्त खवासखानाने राजांच्या पराभवासाठी विजापूरचा बडा सरदार अब्दुल करीम बेहलोलखान निवडला, मोठी फौज देऊन त्याला शिवाजीवर रवाना केले.
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खान बारा हजारांची फौज घेऊन विजापुरापासून बारा कोसांवर असलेल्या उंबराणीला आला. बेहलोलखानाला जादा मदत मिळावी, म्हणून खवासखानाने रांगणा, अदवानी, कर्नोल यांच्या सुभेदारांना सैन्यासह येऊन बेहलोलखानाला मिळण्याची फर्माने काढली.

खान उंबराणीला आल्याची बातमी राजांना टाकोटाक कळली. राजांनी सेनापती प्रतापराव, आनंदराव, अनाजी, विठोजी शिंदे, विठ्ठल पिलदेव यांच्यासारखी विश्वासू माणसे गोळा केली.

'प्रतापराव, आदिलशाही सरदार बेहलोलखान पठाण उंबराणीपावेतो आल्याची वर्दी आली आहे.'

'फौज?'

'दहा-बारा हजार असेल फार तर.'

प्रतापराव हसले. ते म्हणाले, 'महाराज, मग विचार कसला करायचा? बेहलोलची जबाबदारी माझी. पुढं येऊ दे. मी एकटा पाहून घेईन.'

राजे खिन्नपणे हसले. 'प्रतापराव, आपल्या मराठ्यांना हा शापच आहे. विचारापेक्षा भावनाच बलवत्तर. आपल्या ताकदीचा आम्हांला का अंदाज नाही? बेहलोल उंबराणीला उगीच बसला नाही. तो फौजेची वाट पाहतो आहे. मोगल सरदार दिलेरखानाकडेही खवासखानानं फौज मागितली आहे. आज उंबराणीला साचलेल्या तळ्याचं सागरात रूपांतर व्हायला आता फारसा अवधी नाही. आमच्या फौजा रानोमाळ पसरलेल्या.'

'आत्ताच हल्ला केला, तर?' प्रतापराव बोलून गेले.

'उशिरा का होईना, पण तुमच्या लक्षात आलं. आमचा बेत असा आहे की, बेहलोलची ताकद वाढण्याआधीच त्याला उंबराणीला गाठावा.'

'मग त्यासाठी महाराजांनी कशाला तकलीफ घ्यायला हवी? अजून प्रतापरावांचं मनगट शाबूत आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्ही ते जाणतो. प्रतापराव, तुम्ही फौज घेऊन जा. तुमच्याबरोबर विठोबा शिंदे, विठ्ठल पिलदेव, कृष्णाजी भास्कर, विसो बल्लाळ आणि सिद्दी हिलाल हे आमचे नामांकित आणि कल्पक सरदार तुमचे साथीदार म्हणून येतील. या मोहिमेत आम्हांला अपयश नको. आणखी बळ लागलं, तर कळवा; आम्ही जातीनिशी येऊ.’

‘आज्ञा!’

राजे उठले. कमरेची रत्नजडित कट्यार काढून प्रतापरावांच्या हाती देत राजे म्हणाले,

‘आता आज्ञा एकच... हा बेहलोल वळवळ बहुत करीत आहे. त्यास मारून फत्ते करणे.’

प्रतापरावांनी मुजरा केला.

भर दुपारी सारा गड घोड्यांच्या टापांनी, तुताऱ्यांच्या इशारतीने कल्लोळला. राजांना मुजरा करून प्रतापराव साथीदारांसह गडाबाहेर पडले.

धुळीचे लोट उडवीत जाणारी आपली फौज राजे गडावरून माळवदातून निरखीत होते.

□

१७

प्रतापराव आपल्या फौजपागेसह उंबराणी जवळ करीत होते. मिरजमार्गे त्यांनी फारशी उसंत न घेता उंबराणी गाठली. बेहलोलखानाच्या छावणीची सर्व माहिती प्रतापरावांना मिळत होती. बेहलोलखानाचा तळ उंबराणीनजीक पडला होता. खानाच्या छावणीपासून थोड्या अंतरावर एक तलाव होता. तेच पाणी छावणीसाठी घेतले जाई. खान जादा फौजेची वाट पाहत तळ देऊन बसला होता.

प्रतापरावांनी अत्यंत सावधपणे खानाच्या छावणीची नाकेबंदी केली. रात्रीच्या वेळी छावणी पुरी वेढली. तलावाचा कबजा घेतला. पहाटेच्या वेळी पाण्यासाठी जेव्हा खानाचे लोक तलावावर आले, तेव्हा त्यांना शत्रू उभा ठाकलेला दिसला. खानाच्या छावणीत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एकच धावपळ उडाली. वाट शोधावी, तिकडे शत्रू दिसत होता. ऊन वाढत होते. मरू घातलेल्या जनावरावर नजर ठेवून वृक्षाच्या शेंड्यावर गिधाडे बसावीत, तसा चारी बाजूंना शत्रू शांतपणे बसून होता. संतप्त खानाला काही सुचत नव्हते. भर उन्हाळ्यात वाढत्या उन्हाने तो तगमगत होता. पाण्याविना छावणी कासावीस बनली होती. खानाने वेढा फोडायचा ठरवला. हत्तीवर बसून तो आपल्या दळासह छावणीबाहेर पडला. 'दीन, दीनऽ' म्हणत आवेशाने पठाण पुढे सरकत होते. रणवेश केलेला संतप्त बेहलोलखान तलवार पुढे करून हौद्यात डुलत होता, आपल्या शब्दांनी आपल्या सैन्याचा जोश वाढवीत होता. अचानक साऱ्या सैन्यावर स्तब्धता पसरली; गर्जना लुप्त झाल्या. बुद्धिबळाची प्यादी मांडावीत, तशा समोरच्या टेकडीवर काळ्या आकृती दिसत होत्या. नजर फिरवावी, तिकडे तीच रेषा पसरली होती. खानाने आवंढा गिळला. तोच आकाश भेदून 'हर हर महादेवऽ' ची गर्जना उठली.

गारांचा पाऊस कोसळावा, तसा टापांचा खडखडाट उठला; आणि पहिली मराठ्यांची लाट खानाच्या सैन्यावर येऊन आदळली. खानानेही तरफेची लढाई सुरू केली. पण मराठ्यांच्या वाढत्या बळापुढे त्याचे काही चालेना. चारी बाजूंनी वाटा रोखून सर्रास कत्तल करीत पुढे सरसावणाऱ्या मराठ्यांना पाहून खान अचंबला. त्यातच खानाच बर्की नावाचा सरदार दीपाजी राऊतने ठार केला. खानाच्या डोळ्यांदेखत खानाचा हत्ती शत्रूने हाकलून आपल्याकडे घेतला. खानाचे सैन्य चारी बाजूंनी उतरणाऱ्या शत्रूला तोंड देत होते. पळून जायला वाट नव्हती. प्यायला पाणी नव्हते. प्रखर उन्हात खानाची फौज कोरड्या घशाने शत्रूशी मुकाबला करण्याचा प्रयत्न करीत होती.

सूर्य मावळला. खानाच्या सैन्याला थोडा विसावा मिळाला. खानाचे अनेक चांगले सरदार कामी आले होते. अर्धी छावणी शत्रूच्या हल्ल्यात होरपळली होती. या संकटातून सुटण्याचा मार्गही दिसत नव्हता. खानाला आपला मृत्यू दिसू लागला.

खानाने आपला वकील प्रतापरावांच्याकडे पाठविला. खान शरण आला होता. खानाने आर्जव केले होते. अंत:स्थपणे कळविले-

> 'आपण तुम्हांवरी येत नाही. पातशहाचे हुकुमाने आलो. याऊपरी आपण तुमचा आहे. हरएक वक्ती आपण राजियांचा दावा न करी.'

प्रतापरावांचे मन त्या आर्जवांनी विरघळले. त्यांनी उदार मनाने खानाला क्षमा केली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हाती सापडलेल्या बेहलोलखानाला प्रतापरावांनी जाऊ दिले.

राजे पन्हाळ्यावर होते. राजांना ही बातमी समजली. आपल्या फौजेच्या पराक्रमावर ते खूश झाले; पण हाती आलेला बेभरवशाचा बेहलोलखान प्रतापरावांनी सोडून दिला, हे कळताच राजांना फार दुःख झाले. या कृत्याचा जाब विचारणारी थैली त्यांनी प्रतापरावांना पाठवून दिली. राजांनी प्रतापरावांना विचारले होते,

> '....बेहलोलखानास मारून फत्ते करणे अशी आज्ञा आम्ही केली असता त्यास सोडून का दिले? सला काय निमित्य केला?....'

□

१८

पावसाच्या सुरुवातीचे दिवस. आकाश काळ्या ढगांनी आच्छादिले होते. गडावर अखंड गार वारा वाहत होता. पावसाची झड केव्हा बसेल, याचा नेम नव्हता. गडावर पावसाळी तजवीज पुरी झाली होती. घरांना झडपा लागल्या होत्या. पावसाच्या भीतीने अपुरी राहिलेली घरे केव्हाच पुरी करण्यात आली होती. पाचाडला मासाहेबांची व्यवस्था लावून संभाजीराजेही गडावर आले. शिवाजीराजे पन्हाळ्याहून येऊन हरिहरेश्वराला गेल्याची बातमी गडावर आली होती. राजे लौकरच गडावर येणार, अशी वर्दी आल्याने सारा गड जागरूक बनला होता. दप्तरातून गडबड उडाली होती.

दोन प्रहरच्या वेळी संभाजीराजे आपल्या महालात पलंगावर बसले होते. वारंवार त्यांची नजर दाराकडे वळत होती. ज्यांना पाहण्यासाठी संभाजीराजांची नजर उतावीळ झाली होती, त्या येसूबाईंना पाहताच संभाजीराजांनी दुसरीकडे नजर वळविली. दारी थांबलेल्या येसूबाईंच्या चेहऱ्यावर हसू उमटले. मागे पाहत त्यांनी हाक मारली,

'बाळराजे, लौकर या.'

त्या हाकेबरोबर संभाजीराजांनी दरवाजाकडे पाहिले. येसूबाईंच्या पाठोपाठ राजाराम धावत येत होता. उंबरा ओलांडून आत येताना राजाराम अडखळले. येसूबाईंनी राजारामांचा हात धरला. संभाजीराजांच्याकडे बोट दाखवीत त्या म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बाळराजे, बघा, तुमचे दादा महाराज आमच्यावर रागावलेत.’

त्या शब्दांबरोबर राजारामांची नजर भीतियुक्त बनली. येसूबाईंचा हात गच्च धरीत स्थिर नजरेने ते संभाजीराजांच्याकडे पाहत होते. राजारामाच्या चेहऱ्याकडे पाहताच संभाजीराजे हसले. राजाराम धावला. राजारामाला संभाजीराजे पलंगावर उचलून घेत असता राजारामांनी विचारले,

‘दादा महालाजऽ, खलंच तुम्ही लागावला?’

राजारामाला जवळ घेत संभाजीराजे म्हणाले,

‘नाही, बाळराजे! आम्ही तुमच्यावर मुळीच रागावलो नाही. तुमची वहिनी वाइट्ट आहे.’

राजारामांनी येसूबाईंकडे हसून पाहिले; आणि डोळे बारीक करीत ते म्हणाले,

‘वहिनी वाइट्ट!’

‘भाऊ शोभलात खरे!’ येसूबाई हसू लपवीत म्हणाल्या, ‘एवढ्या शिताफीनं थोरल्या आईसाहेबांच्या महालातून सोडवून आणलं; आणि वर मी वाईट! ठीक आहे. आम्ही आता बोलणारच नाही.’

राजारामांचा चेहरा रडवा बनला. ते पाहून पलंगावर ओणवे होत येसूबाईंनी राजारामांना विचारले,

‘मग खरं सांगा, तुम्हांला कोण आवडतं... मी का हे?’

राजारामांनी एकवार दोघांकडे पाहिले; आणि हसत वहिनींकडे बोट दाखवीत झेपावत ते म्हणाले,

‘तुमीऽऽ’

येसूबाई मोठ्याने हसल्या. त्यांनी झेपावणाऱ्या राजारामांना जवळ ओढले; पण

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजांनी राजारामांना सोडले नव्हते. येसूबाईंचा चेहरा संभाजीराजांच्या नजीक आला होता. येसूबाईंनी नजर वर केली. संभाजीराजांचे भावनाविवश डोळे त्यांच्यावर खिळले होते. उष्ण श्वास गालाला जाणवत होता. त्या नजरेने घायाळ झालेल्या येसूबाई कुजबुजल्या,

‘सोडा ना ऽ ऽ’

संभाजीराजांनी राजारामांना सोडले आणि निःश्वास टाकला. राजारामांना मिठीत घेऊन उभ्या राहत येसूबाई राजारामांना म्हणाल्या,

‘तुमचे दादामहाराज अगदी वाईट आहेत, हो ना?’

‘दादामहालाज वाईट आहेत!’ राजारामांनी निर्वाळा दिला.

राजारामांना उराशी कवटाळीत येसूबाईंनी त्यांचे चुंबन घेतले.

त्या दोघांकडे पाहत संभाजीराजांनी विचारले, ‘बाळराजांची तब्येत आता बरी दिसते. पाचाडात आम्ही ऐकलं की, बाळराजे आजारी आहेत, म्हणून.’

‘बरी नव्हतीच तब्येत. सारखा ताप यायचा. सर्दी, खोकला तर आहेच. पण गोसावी बाबांनी सारं ठीक केलं.’

‘कुणी?’

‘आपले निश्चलपुरी गोसावी आहेत ना, त्यांनी ताईत मंत्रून बांधला. त्या दिवसापासून ताप हटला.’

‘खरं आहे. फार मोठे सत्पुरुष आहेत ते. आपले कवी कलश सुद्धा; मोठी गंमत करतात. शिकारीच्या आधी त्यांनी सांगितलं, की हटकून शिकार घडते.’

‘ते हरिहरेश्वराला गेलेत, म्हणे. गोसावी सांगत होते.’ येसूबाईंनी विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो! आबासाहेबांनी त्यांना मुद्दाम बोलावून घेतलं होतं. ते कवी आहेत, तसेच महान मांत्रिकही आहेत.’

येसूबाई काही बोलणार, तोच त्यांचे लक्ष दाराकडे गेले. दारात सोयराबाई उभ्या होत्या. येसूबाईंचा पदर ढळला होता. राजारामांना खाली सोडून पदर सावरून येसूबाई उभ्या राहिल्या. संभाजी राजेही उभे राहिले. राजाराम सोयराबाईंच्याकडे धावले. येसूबाईंच्याकडे पाहत सोयराबाई म्हणाल्या,

‘बाईऽऽ! नुकतीच कुठं बाळराजांची तब्येत ठीक होते आहे. कशाला वाऱ्यातून त्यांना आणलंस?’

येसूबाईंनी मान खाली घातली. राजाराम आईकडे पाहत म्हणाले,

‘दादामहालाज वाइट्ट आहेत!’

सोयराबाई हसल्या. त्या म्हणाल्या,

‘एवढं कळतं, तर सारखं सारखं कशाला येता इथं?... याला काही खायला दिलं नाहीस ना, ग?’

‘जी, नाही.’ येसूबाई म्हणाल्या.

‘जरा जास्त खाल्लं, तरी सोसत नाही याला.’ सोयराबाईंची नजर शंभूराजांच्याकडे वळली.

‘शंभूराजे, तुम्ही अजून महालात बरे?’

संभाजीराजांना रोख कळला नाही. सोयराबाई हसून म्हणाल्या,

‘इकडून आम्हांला राज्यकारभारात गुंतवणं झालं खरं; पण महाल तुम्हांला सोडवत नाही. अनाजी सांगत होते की, इंग्रज वकील आलेत, म्हणे. पण तुम्ही महालातच. सदैव महालात बसण्यापेक्षा जरा सदरेवर नजर ठेवलीत, तर बरं दिसेल.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सोयराबाई राजारामांचा हात धरून निघून गेल्या. येसूबाई गोऱ्यामोऱ्या झाल्या होत्या. संभाजीराजांच्या चेहऱ्यावर क्षणात हास्य विलसले. ते नजीक आले. नजर उंचावीत येसूबाई म्हणाल्या,

‘आईसाहेब सारखं असं तोडून का बोलतात?’

‘त्या आपल्या आहेत, म्हणून.’ संभाजीराजे म्हणाले, ‘परकी माणसं कधी रागावत नसतात... ठीक आहे. आता आज्ञा झालीच आहे. आम्ही सदरेवर जाऊन येतो.’

संभाजीराजे महालाबाहेर पडून राजसदरेकडे पावले टाकीत होते. मस्तकावरून मागे परतविलेले केस, गौरवर्ण, मजबूत पिळदार अंगलट असे संभाजीराजे राजसदरेवर पोहोचले. राजसदरेवर अनाजी काही तरी वाचीत होते. शेजारी बाळाजी उभे होते. संभाजीराजांना येताना पाहताच बाळाजी मागे सरले. त्यांनी मुजरा केला. अनाजी गडबडीने उठले. त्यांनी बाळाजींचे अनुकरण केले. संभाजीराजांची उमर अवघी सोळा वर्षांची. गालावर नुकतीच कुठे कोवळ्या दाढीची सावली तरळू लागलेली. पण नजरेतील जरब विलक्षण प्रभावी. तिला नजर देणे कठीण. ती नजर पाहताच राजांच्या नजरेची आठवण व्हायची. संभाजीराजांच्या चेहऱ्यावर स्मित विलसत होते. मुजऱ्याचा स्वीकार करीत राजसदरेच्या खाशा बैठकीवर बसत संभाजीराजांनी विचारले,

‘अनाजी, काय वाचीत होता?’

हातातले पत्र बाळाजींकडे परत देऊन अनाजी म्हणाले,

‘पन्हाळ्यावरून थैली आली होती.’

‘का? काही गडबड?’

‘नाही. क्षेमसमाचाराची.’ अनाजी थंडपणे म्हणाले.

‘आबासाहेबांची काही बातमी?’

‘राजे एक-दोन दिवसांत गडावर यावेत.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पत्र आलं?’

‘नाही. आम्ही मिळूनच पन्हाळ्याहून आलो होतो ना? राजे तीर्थस्नानाला गेले. आम्ही गडावर आलो, त्याच वेळी सांगितलं होतं.’

‘तुम्ही आबासाहेबांच्या विश्वासातली माणसं. तुमचं भाग्य मोठं!’

‘युवराजांनी मनात आणलं, तर तो विश्वास युवराजांनाही संपादन करता येईल.’

‘पाहू, जमलं, तर!... इंग्रज वकील गडावर आलेत, असं आम्ही ऐकलं.’

‘गडावर नव्हे, गडाखाली आलेत.’

‘मग त्यांना बोलावून घ्या. आम्ही त्यांची भेट घेऊ.’

‘गैरसमज न व्हावा. पण त्यांना राजांनी न भेटणं हेच उत्तम.’

‘कारण?’ नजर वळवीत संभाजीराजांनी विचारले.

‘कारण आलेला वकील मुत्सद्दी आहे. तो साध्या हेतूनं आलेला नाही. अशा माणसाला भेटणं....’

‘आम्हांला माहीत आहे. यापूर्वी अशा अनेक व्यापाऱ्यांना आम्ही भेटलो आहो...’

‘ते व्यापारी होते. हा वकील आहे. तिथं उतावीळपणा...’

‘अनाजी!’ संभाजीराजे उद्गारले. ‘आम्ही युवराज आहो. आबासाहेबांनी आम्हांला राज्यकारभार सांगितला आहे. आमचं वय म्हणाल, तर रोहिडेश्वराच्या वेळी आबासाहेब आमच्यापेक्षाही लहान होते.’

‘राजांची गोष्ट...’ मोरोपंत चाचरले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘का? ते का आकाशातून पडले?’

‘राजे!’ अनाजी उद्गारले.

भानावर येत संभाजीराजे म्हणाले, ‘ठीक आहे. आम्ही थोडे जास्तच बोललो असू. अनाजी, इंग्रज वकिलाला उद्या गडावर बोलावून घ्या. आम्ही त्यांना भेटू. आमच्या हातून काही गफलत झाली, तर ती सावरून घ्यायला आबासाहेब समर्थ आहेत. त्याची चिंता करू नका.’

‘युवराजांनी निर्णय केल्यानंतर आम्ही काय करणार? तथापि, राहवत नाही, म्हणून सांगावंसं वाटतं...’

‘बोला, अनाजीऽ ऽ’

‘इंग्रज वकील राजापूरची नुकसानभरपाई मागण्यासाठीच येत नाही. प्रतापरावांनी हुबळीची वखार लुटली आहे. त्यामुळं इंग्रज मनातून नाराज झाले आहेत. हा वकील तो मुद्दा काढल्याशिवाय राहणार नाही.’

‘ठीक! आम्ही विचार करू.’ एकदम संभाजीराजांनी विचारले, ‘आमचे कोंडाजी फर्जंद आले नाहीत?’

‘जी, नाही. त्यांना पन्हाळ्यावरच ठेवलं आहे.’

‘आमचे कोंडाजी खरे बहाद्दर! अवघ्या साठांनिशी त्यांनी गड काबीज केला. त्यांनी दरवाजे उघडल्यानंतरच तुम्ही गडात प्रवेश केलात ना?’

अनाजींच्या कपाळी सूक्ष्म आठी पडली. ते शांतपणे म्हणाले,

‘किल्ल्यात जाण्याइतकंच त्याची वाट शोधणं हेही महत्त्वाचं असतं, राजे!’

संभाजीराजे हसत अनाजींवर नजर रोखीत म्हणाले, ‘अनाजी, पण मृत्यूला सामोरं जावं लागतं, ते गडावर जाणाऱ्यांनाच. कवी कलशांच्याकडे शिकण्याजोगं भरपूर आहे. आम्ही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तिकडं जातो.'

संभाजी सदर उतरले. सदरेची तणावलेली अंगे क्षणभर सैल झाली. तोच संभाजीराजे वळले,

'अनाजी, उद्या इंग्रज वकिलाला जरूर बोलावून घ्या.'

संभाजीराजे दिसेनासे होईपर्यंत सारे त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत होते. ते दिसेनासे होताच मोरोपंत नि:श्वास सोडून म्हणाले,

'राजांची भीती वाटत नाही; पण युवराजांची भीती फार वाटते. अचूक हेरतात, अचानक वर्मी घाव घालतात... अगदी शांतपणे...'

'शिकारी आहेत ना!' अनाजी म्हणाले, 'पण उद्याची वकिलाची भेट वाटते तेवढी सोपी नाही. बाळाजी, तुम्ही आज गडाखाली जा, आणि त्या वकिलाला गडावर घेऊन या.'

दुसऱ्या दिवशी सकाळी इंग्रज वकील टॉमस निकल्स आपला दुभाष्या शामजी यासह गडावर आला. चिटणिसांनी निकल्सचे स्वागत केले, त्यांना सदरेवर बसविले; संभाजीराजांना वर्दी पाठविली. निकल्सच्या पायांत मोजे होते, पायांत तंग विजार होती; कमरेपर्यंत आलेला चुणीदार, घोळदार, पूर्ण बाह्यांचा गरम अंगरखा होता; गळेबंदावर सुरकुती रेशमी कपड्याचे वलय शोभत होते. निकल्स रापलेला तांबूस गोरा, उंच, सडपातळ अंगलटीचा होता. त्याचे घारे, हसरे डोळे राजसदर निरखीत होते. मांडीवर घेतलेल्या टोपीशी हाताने चाळा करीत तो सर्वत्र पाहत होता.

चिटणिसांनी विचारले, 'वकीलसाहेबांचा मुक्काम किती?'

'राजांची भेट झाली, की निकल्ससाहेब माघारी जातील.' शामजीने सांगितले.

'आपला मुलूख?' चिटणिसांनी विचारले.

'इंग्लंड.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मुलूख मोठा आहे?’

प्रश्न समजताच निकल्स हसला.

‘आपल्याइतका मोठा नाही.’

‘मग आपल्याजवळ केवढं दळ आहे?’

समोरच्या झाडाकडे बोट दाखवीत निकल्सने विचारले,

‘त्या झाडाला पानं किती आहेत, सांगता येईल?’

त्या उत्तराने चिटणीस वरमले. ते विषय बदलणार, तोच निकल्सने सांगितले,

‘मलाही त्या प्रश्नाचं उत्तर माहीत नाही.’

चिटणीस अदबीने उभे राहिले. पुटपुटले,

‘युवराज ऽ ऽ’

निकल्स उठून उभा राहिला. संभाजीराजे सदरेवर आले. निकल्सच्या अभिवादनाचा स्वीकार करून राजांनी निकल्सला बैठक दाखविली. दोघे बसले. युवराजांच्या शेजारी चिटणीस, दुभाष्या उभे होते. निकल्सच्या शेजारी त्यांचा दुभाष्या होता. संभाजीराजे म्हणाले,

‘साहेब, तुम्ही महाराजांच्या भेटीसाठी आलात; पण महाराज इथं नसल्यानं आपल्याला थांबावं लागलं. आपली हरकत होते, याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. आपल्या कामाबाबत आम्हांला काही मदत करता आली, तर आम्हांला आनंद वाटेल.’

निकल्स आशेने पुढे आला. राजापूरच्या लुटीची नुकसानभरपाई मिळण्याची त्याने विनंती केली. तसेच हुबळीच्या लुटीबद्दलची कंपनी सरकारची इतराजी त्याने सांगितली. बिगरजकात लाकूड, सर्पण नेण्याची त्याने परवानगी मागितली. संभाजीराजे सर्व बोलणे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शांतपणे ऐकून घेत होते. चेहऱ्यावर काही भाव दिसत नव्हता. वकिलाचे सर्व बोलणे झाल्यावर संभाजीराजे म्हणाले,

'आपल्या मागण्यांचा मी विचार करीन. या क्षणी उत्तर देणं कठीण आहे. एक-दोन दिवसांत महाराज गडावर येतील, असा अंदाज आहे. ते आले, की मी त्यांच्या कानांवर सर्व घालीन, आणि आपली भेट करवून देईन. महाराजांना गडावर यायला विलंब लागला, तर आपल्या कामाबाबत मीच योग्य तो निर्णय करीन. आपल्या प्रकृतीला ही उंचावरची पावसाळी हवा मानवणार नाही. तेव्हा बोलावीपर्यंत तुम्ही गडाखाली राहा. तुमची सर्व व्यवस्था केली जाते ना?'

'हो. त्याबद्दल आम्ही ऋणी आहो.'

'काही कमतरता भासली, तर आम्हांला कळवा. आम्ही ती दूर करू.'

संभाजीराजांनी बाळाजींकडे पाहिले. बाळाजींनी निकल्सला व दुभाष्याला विडे, वस्त्रे दिली. निकल्सचा निरोप घेऊन संभाजीराजे सदरेबाहेर गेले.

तिसऱ्या दिवशी सकाळी महाराज पाचाडला आल्याची व अनाजी त्यांना गडाखाली सामोरे गेल्याची बातमी संभाजीराजांना कळली. राजे गडावर येणार, या बातमीने गडावर एकच उत्साह संचारला. राजांचा महाल ठाकठीक करण्यात पुतळाबाईंची, मनोहारीची धावपळ चालू झाली. भर दुपारी महादरवाजावरची नौबत झडली. राजे आपल्या महाली आल्याची संभाजीराजांना वर्दी आली.

राजांच्या महालात संभाजीराजे प्रवेश करते झाले. राजांच्या शेजारी येसूबाई उभ्या होत्या. राजाराम त्यांच्या कडेवर होता. संभाजीराजांना पाहताच राजांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता आली.

'या! आम्ही तुमचीच वाट पाहत होतो.'

संभाजीराजांनी राजांचे पाय शिवले. संभाजीराजे म्हणाले,

'आम्ही पण आपल्या सामोरे आलो असतो.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

येसूबाई महालाबाहेर गेल्या; आणि महालात अनाजी, बाळाजी, मोरोपंत आले. त्यांच्याकडे पाहत अंगरख्याचे बंद सोडीत राजे म्हणाले,

‘तुम्ही आला नाहीत, म्हणून काही बिघडलं नाही.’

‘मासाहेबांची तब्येत...’

‘छान आहे. तुमची फार आठवण करीत होत्या. तुम्ही भेटायला जाऊन या.’

‘जी!’

राजे पलंगावर बसले. त्यांना खोकल्याची उबळ आली. संभाजीराजांनी सुरईतले पाणी घेऊन पेला पुढे केला. राजे पाणी प्याले. पेला हाती देत असता संभाजींनी विचारले,

‘आबासाहेब, बरं नाही!’

‘चालायचंच! पण, शंभूबाळ, आम्हांला तुमची हरिहरेश्वरला फार आठवण झाली. आम्ही समुद्रस्नानाला उतरलो होतो. तेवढीच एक हौस शिल्लक राहिलीय्. तुम्ही असता, तर फार बरं झालं असतं, असं वाटलं... काही खबर?’

‘आबासाहेब, इंग्रज वकील टॉमस निकल्स आपल्या भेटीसाठी आला आहे.’

‘ते समजलं.’ राजे म्हणाले, ‘तुम्ही त्याला भेटलात; आपला हेतू न सांगता त्याचा सर्व बेत जाणून घेतलात. तुमच्या मुलाखतीवर आम्ही खूश आहो.’

संभाजीराजांनी अनाजींकडे पाहिले.

राजे हसले.

‘शंभूबाळ, त्यांनीच आम्हांला सांगितलं. न सांगता समजायला आम्ही आकाशातून थोडेच का पडलो?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजे चपापले, भयभीत झाले. गडबडीने ते म्हणाले,

‘क्षमा!’

‘त्याची काही गरज नाही. तुम्ही म्हणालात, ते अगदी खरं आहे. आम्ही पाहूनच, अनुभवानं शिकलो. नुसतं दोन डोळ्यांनी पाहून सारं पाहता येत नाही, प्रसंगी दुसऱ्यांच्या डोळ्यांचाही उपयोग करावा लागतो, हेही आमच्या ध्यानी आलं. दुसऱ्यांच्या अनुभवांचा फायदा घेतला, तर फार फायदा होतो, राजे! असो... अनाजी, आज वकिलांना गडावर बोलावून घ्या. आम्ही भेटू. ...शंभूबाळ, वकिलांचा बेत काय आहे?’

‘राजापूरची नुकसानभरपाई ते मागतात. प्रतापरावांनी हुबळी लुटली, त्याबद्दल ते संतप्त आहेत.’

‘अस्सं! कर्नाटकात प्रतापरावांनी चांगलीच धडक मारली. आणि... जाऊ दे. नंतर पाहू. ...चला, शंभूराजे. राणीवशात चक्कर मारून येऊ. थोरल्या राणीसाहेबांची तब्येत बरी नाही, म्हणे. तुम्ही गेला होता?’

‘जी, नाही.’ नजर चुकवीत संभाजीराजे उत्तरले.

‘हेही चुकलंच तुमचं. चला...’

राजांच्या मागोमाग संभाजीराजे चालू लागले.

सकाळी टॉमस निकल्स आपल्या दुभाष्यासह राजसदरेवर आला. राजसदर सर्वतोपरी शृंगारली होती. सदरेच्या मध्यभागी जरी बैठक मांडली होती. त्या बैठकीच्या डाव्या बाजूला दुसरी बैठक लाविली होती. सदरेबाहेर सशस्त्र रक्षक चौफेर नजर ठेवून उभे होते. टॉमस निकल्सचे स्वागत अनाजींनी केले. थोड्याच वेळात राजे येत असल्याची बातमी आली. निकल्स उभा राहिला. राजे सदरेच्या पायऱ्या चढून येत आहेत, असे दिसताच निकल्स पुढे आला. दरवाजातच दोघांची गाठ पडली. राजांनी स्मितवदनाने निकल्सच्या अभिवादनाचा स्वीकार केला आणि प्रेमभराने त्याचा हात धरून आपल्या डाव्या अंगाला लोडापासून जवळच बसवले. अनाजींनी दोघांचीही एकमेकांना ओळख करून दिली. लोडावर किंचित कलते होऊन राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय काम आहे, बोला.’

निकल्सने क्षणभर विचार केला. आपल्या हातोप्यात खोवलेल्या रुमालाने चेहरा पुशीत तो म्हणाला,

‘एका बाजूला आम्ही तहाचं बोलणं करीत असतानाच ध्यानीमनी नसता तुमच्या सैनिकांनी आमच्या हुबळीच्या वखारीवर हल्ला केला, खणत्या लावून लूट केली. त्यामुळं आपल्या मुलुखात वखार घालावी, की नाही, याचा प्रेसिडेंटला विचार पडला आहे.’

राजे काही बोलले नाहीत. सदैव चेहऱ्यावर दिसणारे ते स्मित तसेच होते. निकल्सने उतावीळपणे विचारले,

‘हुबळीची लूट तुमच्याच संमतीनं झाली काय?’

‘तुम्हांला माहीत आहे... इंग्रजांचा स्नेह राहावा, अशी आमची इच्छा आहे.’

‘मग हा हल्ला का झाला?’

‘आमच्याच लोकांनी हल्ला केला कशावरून?’

त्या प्रश्नाने निकल्स थक्क झाला. निश्चयी स्वरात तो म्हणाला,

‘आपल्याच सैन्यानं वखार लुटली, हे सिद्ध करून दिलं, तर?’

‘साहेब, आम्ही आमच्या शत्रुमुलुखात युद्ध करीत असता त्यामध्ये न जाणता कदाचित लूट झाली असेलही. हे सारं युद्धामध्ये क्षम्यच ठरतं.’

‘राजापूरची नुकसानभरपाई द्यायचं तुम्ही कबूल केलं आहे.’

‘आम्ही कुठं नाकारतो? आम्ही जरूर नुकसानभरपाई देऊ.’

‘तसाच विचार हुबळीचाही करावा, ही कंपनी सरकारची...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अशक्य!’

‘कारण समजेल?’

‘साहेब, राजापूरची नुकसानभरपाई, आम्ही वचन दिलं, म्हणून देतो. पण आठवा... आम्ही राजापूरची लूट का केली, ती! आमच्या विरुद्ध तोफा घेऊन आमच्या शत्रूला मिळालात. व्यापारासाठी आलेले तुम्ही राजकारणात पडता कशाला?’

निकल्सचा घसा कोरडा पडला. राजे निकल्सच्या नजरेला नजर देत विचारते झाले,

‘साहेब, सुरत लुटायला आम्ही आलो, तेव्हा तुमच्या वखारीत आम्हांला उर्मट उत्तरं मिळाली. पाच दिवस आम्ही सुरत जाळीत होतो. तीस माणसांची तुमची वखार आम्हांला भारी नव्हती. आम्ही स्नेह जाणतो. प्रसंगी तुम्ही तो नेमका विसरता.’

‘मैत्री आपल्या उभयतांत हवी. आपली गलबतं मक्केहून येणार आहेत, अशी बातमी आहे. ती आमच्या गलबतांनी पकडली, तर?’

राजे शांतपणे म्हणाले, ‘जरूर पकडावी. मी आपल्याला वचन देतो... आम्ही यापुढं याच संधीची वाट पाहत राहू. आपल्या हातून असं घडलंच, तर हिंदोस्तानच्या किनारपट्टीवर आपलं एकही गलबत तरंगताना दिसणार नाही. सिद्दी संबूळला मुंबई बंदरात तुम्ही आश्रय दिलात, हेही आम्ही जाणतो. तुमच्या व्यापाराकडे आम्ही लक्षपूर्वक पाहतो.’

राजांच्या या शांत, पण अत्यंत निर्णायक उत्तराने निकल्स अस्वस्थ झाला. तो गडबडीने म्हणाला,

‘महाराज, आपला गैरसमज होतो आहे. संबूळ आमच्याकडे आला, त्यानं आश्रय मागितला; पण आम्ही तो दिला नाही.’

राजे त्यावर काही बोलले नाहीत. राजांनी निकल्सच्या मागण्यांचा विचार करू, असे आश्वासन देऊन निकल्सला निरोपाची विडावस्त्रे दिली.

पावसाळा आला, तरी राजांनी फौजेला उसंत दिली नाही. राजांच्या फौजेने सातारा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काबीज केला. साताऱ्याला विजयाने राजांना समाधान मिळाले.

राजे पावसाळा संपण्याची वाट पाहत होते.

□

१९

पावसाळा संपला. गडावरून सर्व छावण्यांना हुकूम सुटू लागले. फौजा गोळा होऊ लागल्या. नवरात्राचे घट बसले. गडावरच्या देवीसमोर दररोज बकरे पडत होते. निश्चलपुरी, कवी कलश हे राजांच्या यशासाठी नवग्रहशांती करण्यात मग्न झाले होते. शस्त्रपूजेचा दिवस उजाडला. राजसदरेवर शस्त्रपूजा झाली. सारी सदर नानाविध शस्त्रांनी सुशोभित झाली होती. राजारामांचा हात धरून संभाजीराजे त्यांना शस्त्रे दाखवीत होते, त्यांचे वैशिष्ट्य राजारामांना समजावून सांगत होते. राजसदरेवर पूजेला लावलेल्या हत्यारांत अनेक नामांकित शस्त्रेही होती. त्यांत बाकदार फिरंग, सैफ, जमदाड, गुप्ती, पट्टा, कट्यारी, भाले, बरच्या, वाघनख अशी नानाविध शस्त्रे होती. अनेक तलवारींच्या मुठी आपल्या देखणेपणाने लक्ष वेधून घेत होत्या. राजारामांना सर्व दाखवीत संभाजीराजे खास बैठकीजवळ आले. लोडगिर्द्यांच्या बैठकीवर राजांची खास शस्त्रास्त्रे ठेवली होती. त्यांत राजारामांची, संभाजीराजांची ढाल-तलवारही होती. संभाजीराजे छोट्या तलवारीकडे बोट दाखवीत म्हणाले,

'बाळराजे, ती पाहा तुमची तलवार!'

पण राजारामांचे लक्ष रत्नजडित मुठीच्या तलवारीकडे खिळले होते. त्या तलवारीचे पाते तळपत होते. शेजारीच तांबड्या मखमलीचे रत्नजडित म्यान उभे होते. संभाजीराजे हसले; म्हणाले,

'बाळराजे, ती तलवार मिर्झाराजांनी आबासाहेबांना दिली. आणि ते वाघनख बघा. आबासाहेबांनी तेच वाघनख अफझलवर चालवलं.'

राजारामाचे लक्ष संभाजीच्या तलवारीकडे वळले. संभाजीराजांच्या तलवारीशेजारीच राजारामांची छोटी, साधी तलवार उभी होती. राजारामांचे गाल फुगले. ते संभाजीराजांना

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बिलगत म्हणाले,

‘दादामहालाज, आमाला ही तलवार नको; मोठी हवी. तुमची आमाला द्याल?’

संभाजीराजे काही बोलण्याआधीच मागून आवाज आला,

‘तलवारी मागून मिळत नसतात. त्या जिंकून घ्याव्या लागतात.’

दोघांनी एकदम मागे वळून पाहिले. सोयराबाई सर्व राण्यांसह सदरेवर येत होत्या. सोयराबाईंच्या चेहऱ्यावर एक वेगळेच हास्य विलसत होते. संभाजीराजे पुढे झाले. त्यांनी मुजरा केला; आणि ते म्हणाले,

‘तलवारी जिंकायच्या, त्या शत्रूंच्या; भावांच्या नव्हेत!’

त्या उत्तराने सोयराबाई चकित झाल्या. पुतळाबाई कौतुकाने संभाजीराजांच्याकडे पाहत होत्या. स्वत:ला सावरून घेत सोयराबाई म्हणाल्या,

‘आणि भावानं तलवार दिली नाही, तर...?’

संभाजीराजांच्या देखण्या चेहऱ्यावर हास्य उमटले. त्यांनी राजारामांना उचलले; आणि ते म्हणाले,

‘तसं झालं, तर ‘भाऊ’ म्हणायला तो अपात्र ठरेल.’

संभाजीराजे राजारामांसह जाऊ लागलेले पाहताच सोयराबाईंनी विचारले,

‘राजारामांना कुठं नेता?’

मागे वळून संभाजीराजे म्हणाले,

‘निश्चलपुरींच्या होमाची समाप्ती आहे. प्रसाद घ्यायला त्यांनी बोलावलं आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बाळराजे दिसेनासे होताच न राहवून पुतळाबाई बोलून गेल्या,

‘दृष्ट लागावी, अशी जोडी आहे. एकमेकांवर भारी जीव!’

सोयराबाईंची तिखट नजर पुतळाबाईंच्या वर खिळली; आणि पुतळाबाईंचे शब्द जिथल्या तिथे विरले. सोयराबाई म्हणाल्या,

‘जाणत्यांची हुशारी आणि नेणत्यांचा भाबडेपणा यांची गल्लत अशीच होते.’

पुतळाबाई पुढं झाल्या. त्यांनी दासींना खूण केली. पूजेचे तबक बैठकीवर ठेवले गेले. शस्त्रांवर हळदीकुंकू पडू लागले.

गडावर गडबड उडाली होती. हत्तीटाक्याच्या मैदानात, होळीमैदानात राजांची अश्वपथके उभी होती. राजे कपडे करून देवघरात गेले. देव्हाऱ्यात कमरेएवढ्या उंचीच्या सुवर्णसमया प्रज्वलित झाल्या होत्या. रत्नजडित देव्हाऱ्यात भवानीची मूर्ती उभी होती. नवरात्राच्या घटावर फुलांच्या माळा सोडल्या होत्या. घटाच्या ओल्या मातीतून पिवळेधमक कोंब वर आले होते. उपाध्यांनी दिलेले तीर्थ राजांनी घेतले. हाती दिलेले कोंब टोपावर खोवले. पाठीमागे उभ्या असलेल्या संभाजींनी, राजारामांनी राजांचे अनुकरण केले. राजे देवघराबाहेर आले. महालात सोयराबाई, सगुणाबाई, काशीबाई, पुतळाबाई उभ्या होत्या. सर्व राण्यांनी राजांना ओवाळले. राजे सोयराबाईंना म्हणाले,

‘राणीसाहेब, आमच्या दोन्ही छाव्यांना आम्ही गडाखाली घेऊन जातो. उद्या मासाहेब गडावर येतील. त्यांच्या बरोबरच दोघे परततील.’

काही न बोलता सोयराबाईंनी राजांच्या पुढे तलवार केली. राजांनी ती मस्तकी लावून आपल्या दुशेल्यात खोवली. तबकातील आपली कट्यार उचलली. ती डाव्या बाजूला खोवली. राजांचे लक्ष पुतळाबाईंच्याकडे गेले. राजारामांच्या आणि संभाजीराजांच्या तलवारी घेऊन त्या उभ्या होत्या. संभाजीराजांची तलवार त्यांनी उघडली. संभाजीराजे पुढे झाले. तेवढ्यात राजे म्हणाले,

‘थांबा, राणीसाहेब. शंभूराजांची तलवार बाळराजांच्या दुशेल्यात घाला. पाहू, कशी दिसते. आम्हांला पाहायची आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजांनी आपली तलवार उचलली आणि राजारामांच्या दुशेल्यात अडकविली. तलवारीचे टोक जमिनीला भिडले होते. गोंधळलेले राजाराम सर्वांच्याकडे पाहत होते. पुतळाबाईंच्याकडे जाण्यासाठी त्यांनी पाऊल उचलले. तलवार जमिनीला घासत होती. वजनदार तलवार डाव्या हाताने तोलत नव्हती. साऱ्या महालात हसण्याचा आवाज उठला. पुतळाबाईंनी राजारामांना जवळ घेतले. संतापलेले राजाराम म्हणाले,

'आईसाहेब! आम्हांला ही तलवार नको!'

पुन्हा सारे हसले. राजारामांच्या दुशेल्यातील तलवार काढीत पुतळाबाई म्हणाल्या,

'आम्ही मोठे झाल्यावर घालू, म्हणावं.'

राजे हसले. 'हो, पण तेव्हा शंभूराजे पण मोठे झाले असणारच ना?'

संतप्त सोयराबाई जागच्या जागी ताठरल्या नजरेने सारे पाहत होत्या. संभाजी, राजाराम शस्त्रसिद्ध झाले. राजे सोयराबाईंना म्हणाले,

'राणीसाहेब, आम्ही मोहिमेला जाऊन येतो. मासाहेब गडावर येतील, त्यांची काळजी घ्या.'

राजे सदरेवर आले. सर्वांचे मुजरे घेऊन राजे होळीचौकातल्या पालखीत बसले. पालखी उचलली गेली. नौबत झडली. राजे गडाखाली उतरू लागले.

पाचाडला जिजाबाईंना भेटून आपल्या फौजेसह राजे दक्षिणेकडे निघाले. राजे सरळ साताऱ्याला आले. साताऱ्याच्या मुक्कामात राजांना पहिली आनंदाची बातमी कळली- राजांच्या फौजांनी पांडवगड काबीज केला होता. राजांच्या फौजा साताऱ्याला येऊन मिळत होत्या. साताऱ्याच्या मुक्कामात राजांनी बाळाजी चिटणिसांना पालखी बहाल करून त्यांच्या सेवेचा गौरव केला; आणि ते कारवार प्रांतावर फौजेसह चालून गेले. बेहलोलखान आजारपणामुळे मिरजेला तळ देऊन होता. त्यामुळे त्याची भीती राजांना नव्हती. राजांचे एक सैन्य महाडकडे मोगल व सिद्दी यांजवर जरब बसवीत होते. दुसरे साताऱ्याला होते. तिसरी फौज बंकापूर भागात दौडत होती आणि खुद्द राजे कारवारपासून दीड दिवसाच्या मुक्कामावर असलेल्या कुदरा गावी होते. राजांची बरीचशी फौज खुद्द हुबळीकडे गुंतली

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होती. फौजेच्या हालचालींच्या बातम्या राजांना कळत होत्या. राजांचे सरदार विठोजी शिंदे सर्जाखानाशी लढताना चंदगडरणांगणी पडल्याची बातमी राजांनी कुदरामुक्कामी असताना ऐकली. त्याच कुदरामुक्कामात माहिमाजी शिंदे याने सर्जाखानाला गाठून, त्याला मारून, विठोजी शिंद्यांच्या मरणाचा बदला घेतल्याचीही बातमी राजांनी ऐकली. जवळ जवळ तीन महिने विजापूरकरांच्या मुलुखात काढून, पुरेपूर लूट मिळवून शिवाजीराजे रायगडावर परतले.

□

२०

मध्यरात्रीच्या सुमारास राजे गडावर आले. राजे गडावर येत असल्याची वर्दी आधी दीड प्रहर आली होती. गडावर भरपूर थंडी उतरली होती. गार वारे वाहत होते. अंगावर शाल लपेटून पुतळाबाई गंगासागराच्या मनोऱ्यात उभ्या होत्या. हत्तीटाक्याकडे वारंवार त्यांचे लक्ष जात होते. शेजारी मनोहारी उभी होती. पालखीदरवाजाजवळचे पलोते वाऱ्यावर फरफरत होते. पहारेकरी जागरूकतेने उभा पहारा देत होते. गडावर सर्वत्र शांतता दिसत होती. बाजारपेठ, होळीचौक, बालेकिल्ल्याच्या तटानजीक असलेले चौकीपहारे यांच्या जळत्या मशालींची जागा सोडली, तर गड कसा अगदी शांत होता. ते गूढ रम्य वातावरण पाहत असता मनोहारी म्हणाली,

‘राणीसाहेब!’

पुतळाबाईंनी नजर फिरविली. गडावरच्या रस्त्यावर पलोते दिसू लागले. पाच-पन्नास पलोते होळीचौकाकडे चालत होते. पुतळाबाई वळत म्हणाल्या,

‘मनू, तू पुढं हो. थोरल्या राणीसाहेबांना वर्दी देऊन खाशा महालात चल. तोवर मी आलेच.’

पुतळाबाई मनोहारीसह सातमहालात आल्या. पुतळाबाई आपल्या महालाकडे वळल्या; आणि मनोहारी सोयराबाईंना वर्दी देण्यासाठी धावली.

राजे आपल्या महालापाशी आले. बरोबर अनाजी, मोरोपंत, बाळाजी ही मंडळी होती.
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बाहेर थंडी असूनही राजांचा चेहरा घामाने डवरला होता. श्वास जड भासत होता. महालाच्या दरवाजाशी सर्वांना निरोप देत राजे म्हणाले,

‘आता आम्ही विश्रांती घेतो. सकाळी भेटू.’

साऱ्यांनी मुजरे केले. राजे महालात आले. महालात कोणी नसेल, या समजुतीने राजे उद्गारले,

‘जगदंब ऽ ऽ’

-आणि त्याच वेळी मनोहारी पुढे झाली. राजांनी आपला जिरेटोप मनोहारीच्या हाती दिला.

‘मनू, थोरल्या राणीसाहेब?’

‘त्यांची तब्येत बरी नाही.’

‘काय होतंय्?’

‘डोकं दुखतं.’

‘आणि मासाहेब?’

पुतळाबाई महालात प्रवेश करीत म्हणाल्या,

‘त्यांना झोप लागली होती. उठवलं नाही.’

‘बरं केलंत.’ म्हणत राजे मंचकावर बसले.

पुतळाबाई पुढे झाल्या. अधीरपणे त्यांनी विचारले,

‘बरं नाही का?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हां! थोडा ज्वर असावासं वाटतं. होईल कमी.’

‘मग अपरात्री चालत कशाला यायचं? पालखीतून...’

‘राणीसाहेब, पाचाडला राहावंसं वाटेना. आम्ही तसेच आलो. आग्र्याहून आल्यापासून जरा दगदग वाढली, की शरीर असं थकतं.’

‘कपडे उतरावेत.’

राजे उभे राहिले. तलवार, दुशेला उतरवला गेला. राजांनी आपले कपडे बदलले आणि ते पलंगावर पडले.

‘वैद्यांना बोलावू दे ना?’ पुतळाबाईंनी विचारले.

‘नको. मध्यरात्र उलटून गेली. आता सकाळी पाहू.’

मनोहारी महालातल्या समया शांत करीत होती. पुतळाबाई राजांच्या पायांवरून हात फिरवीत बसल्या होत्या.

‘राणीसाहेब, तुम्ही आता जा. विश्रांती घ्या.’

‘डोळा लागला, की जाईन मी.’

राजे खिन्नपणे हसले. म्हणाले,

‘नुसतं शरीर थकून झोप येत नाही. मनही थकावं लागतं, पुतळा! हे मन आहे ना, ते बेटं मुळीच थकत नाही. उगीच विचारांच्या पाठीमागे आम्हांला फरफटत नेतं...’

राजे बोलत होते. बोलता-बोलता ते हळू हळू झोपी गेले. पुतळाबाई हलक्या पावलांनी उठल्या. महालाबाहेर मनोहारी गुडघ्यांत मान घालून बसली होती, तिला पुतळाबाईंनी जागे केले. राजांच्या द्वाररक्षकाकडे नजर टाकून दोघी सातमहालाकडे वळल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चार दिवसांत राजांच्या प्रकृतीला आराम वाटला. राजे हिंडू-फिरू लागले. या विश्रांतीच्या काळात राजे कारवार प्रांतातून आणि इतर भागांतून आलेल्या लुटीचा तपशील पाहत होते.

सायंकाळच्या वेळी राजे जगदीश्वरदर्शनासाठी जायला निघाले असताना मोरोपंत महालात आले.

‘महाराज, नाशकाहून थैली आली आहे.’

‘कुणाची?’

‘आपले उपाध्याय अनंतभट्ट कावळे यांची.’

राजांनी हात जोडले. ते म्हणाले,

‘क्षेम आहे ना?’

‘जी! काशीचे विद्वान पंडित गागाभट्ट आपल्या भेटीसाठी गडाची वाटचाल करीत आहेत, असं त्यांनी कळविलं आहे. गागाभट्ट म्हणजे साक्षात वेदोनारायण, असा त्यांचा लौकिक आहे.’

‘आमचं भाग्य मोठं, म्हणून या माणसाचं दर्शन घडतं. मोरोपंत, गागाभट्टांच्या स्वागतासाठी आमचे राजपुरोहित लवाजम्यानिशी नाशकाला रवाना करा. त्यांना उचित सन्मानानं गडावर घेऊन यायची व्यवस्था करा.’

गागाभट्टांच्यासाठी पालखी, लवाजमा नाशकाला रवाना झाला. गागाभट्टांच्या स्वागतात उणीव राहू नये, म्हणून राजे जातीने लक्ष देत होते. जगदीश्वरप्रासादाच्या वाटेवर उठणाऱ्या नवीन घरांपैकी एक सुबक घर राजांनी गागाभट्टांच्या वास्तव्याकरिता नियोजित केले.

गागाभट्टांच्या आगमनाच्या वार्तेने निश्चलपुरींना सुरुवातीला काही वाटले नाही. पंडितांचा, साधुसंतांचा राजांच्याकडून सदैव गौरव होतो, हे सर्वांना माहीत होते. पण गागाभट्टांच्या स्वागताची वाढती तयारी पाहून निश्चलपुरी थोडे अस्वस्थ झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एके दिवशी गागाभट्ट महाडशेजारी आल्याची बातमी गडावर आली. दुसऱ्या दिवशी राजे गडाखाली संभाजीराजांच्यासह उतरले. गडाच्या खाली रायगडवाडीनजीक वसविलेल्या नव्या पेठेला लागून राजांनी शाही शामियाना उभारला होता. गागाभट्ट नजीक आलेले कळताच राजे आपल्या मंत्र्यांसह सामोरे गेले. राजांना येताना पाहून गागाभट्ट पालखीतून उतरले.

किंचित स्थूल देहाचे, गौर वर्णाचे गागाभट्ट राजांच्याकडे पाहत होते. त्यांनी मस्तकी जरी कशिदा काढलेला पिवळा रुमाल बांधलेला होता. पांढरे शुभ्र लाल रेशीमकाठी धोतर ते नेसले होते. पायांत खडावा. अंगावर लाल जरीकाम असलेली शाल त्यांनी लपेटली होती. रुंद कपाळावर शिवगंध रेखाटले होते. त्यांच्या विशाल काळ्या नेत्रांत अधिकाराची निशाणी जाणवत होती. गळा व हात यांवर भस्माचे पट्टे, मनगटावर विभूती, रुद्राक्षमाळा आणि शाल सावरण्यासाठी खांद्यावर विसावलेल्या हाताच्या लांबसडक बोटात बृहस्पतीची खूण सांगणारी पुष्कराजाची अंगठी व दुसऱ्या बोटात सुवर्णपवित्रक लक्ष वेधून घेत होते. खडावांच्या पावलांनी चार पावले ते चालले; आणि त्यांचा उजवा हात नतमस्तक राजांच्यावर थबकला. ओठ आशीर्वाद बोलत होते.

राजांनी वेदमूर्ती गागाभट्टांना अत्यंत आदराने, सन्मानाने गडावर आणले. ऐश्वर्यसंपन्न दुर्गेश्वर रायगड पाहून गागाभट्ट प्रसन्न झाले. राजांचे ते रूप, राजांचे ऐश्वर्य, राजांची सत्ता निरखीत होते. रोहिडेश्वराची शपथ घेऊन स्वराज्याचा मंत्र उच्चारणारा, अफझलखानाचा वध करून राजसत्ता बळकट करणारा, प्रतापगडावर भवानीची स्थापना करून सप्तकोटेश्वराचा जीर्णोद्धार करणारा, आग्र्याहून औरंगजेबाच्या पंजातून निसटणारा, आणि जवळ जवळ लयाला गेलेले राज्य पुन्हा त्याच तडफेने उभा करणारा युगपुरुष गागाभट्ट डोळे भरून पाहत होते. त्यांच्या आनंदाला सीमा राहिल्या नव्हत्या.

राजांच्यासह सर्व राण्यांनी गागाभट्टांची पाद्यपूजा करून आशीर्वाद घेतले. राजांच्या विनयाने, राजघरातील आतिथ्याने गागाभट्ट प्रसन्न झाले. त्यांच्या साऱ्या अपेक्षा पुऱ्या झाल्या होत्या. त्यांनी आनंदाने गडावरचे वास्तव्य मान्य केले.

एके दिवशी गागाभट्ट राजांना म्हणाले,

'राजे! आम्ही काही विशिष्ट हेतू मनाशी बाळगून तुमच्याकडे आलो. उद्या सूर्योदयानंतर एक प्रहरानं मुहूर्त चांगला आहे. तरी उद्या आम्ही तुम्हां सर्वांना आमचा मनोदय सांगावा,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

असं आम्हांला वाटतं.’

राजांनी मान्यता दिली.

दुसऱ्या दिवशी सकाळी लौकर स्नान-पूजा आटोपून राजे जिजाबाईंच्या महाली गेले. राजांनी जिजाबाईंना वंदन केले. महालात सर्व राण्या, संभाजी, राजाराम, येसूबाई ही मंडळी हजर होती. छोटे राजाराम महालात धावत होते, राण्यांच्या मागे लपत होते. संभाजीराजे त्यांना पकडण्यासाठी मागून धावत होते. सारे कौतुकाने तो खेळ पाहत होते. राजाराम अचानक येसूबाईंच्या मागे लपले. संभाजीराजांचे पुढे टाकलेले पाऊल तसेच अडखळले. राजाराम टाळ्या पिटीत होते. महालात एकच हसणे उसळले. राजेही त्यात सामील झाले. संभाजीराजे मात्र जागच्या-जागी संकोचून उभे होते. राजांच्या ते ध्यानी आले. ते म्हणाले,

‘मासाहेब, सर्व तयारी झाली ना?’

‘हो, बाबा! एवढा थोर पुरुष; आपणहून गडावर आला. त्याच्या मनात काय आहे, कोण सांगणार? पण ते ऐकायला जीव उतावीळ झाला आहे, बघ.’

पुतळाबाईंनी जिजाबाईंना हात दिला. राजे संभाजी-राजारामांसह पुढे झाले. सारी मंडळी राजसदरेत आली. अनाजींनी प्रसंगाला उचित अशी राजसदर सजविली होती. मोरोपंत, बाळाजी ही मंडळी अदबीने उभी होती. गागाभट्टांच्यासाठी उच्चासन मांडले होते. त्या आसनाच्या डाव्या बाजूला अशा बैठकीवर जिजाबाईंच्या शेजारी राजे बसले. लगतच्या बैठकीवर संभाजीराजे राजारामांसह बसले. मागे सर्व राणीवसा राजस्नुषांसह स्थानापन्न झाला. उच्चासनाच्या डाव्या बाजूला थोडी मोकळी जागा सोडून सर्व मंत्री व खासे सरदार उभे होते. सर्वांचे लक्ष गागाभट्टांच्या आगमनाकडे लागले होते. राजे जिजाबाईंच्यासह बोलत असता अचानक बाळाजी पुढे आले.

‘आचार्य आले ऽ ऽ’

राजे चटकन उठले. राजसदरेच्या पायऱ्या उतरून ते खाली गेले, तोच आपल्या शिष्यपरिवारासह येत असलेले गागाभट्ट त्यांच्या नजरेत आले. राजांनी अत्यंत आदराने गागाभट्टांना राजसदरेवर आणले. सर्वांनी त्यांना उत्थापन दिले. सर्वांचे हात जोडले गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आशीर्वाद पुटपुटत गागाभट्ट आपल्या उच्चासनावर विराजमान झाले. राजसदर स्थिर झाली. गागाभट्टांनी आपल्या मस्तकीचा रुमाल उतरला. पांढऱ्या शुभ्र संजाबावरून मानेवर शेंडी ओघळली. आपल्या संजाबावरून हात फिरवीत त्यांनी सर्वांवरून नजर फिरविली. काही क्षण डोळे मिटले. दीर्घ श्वास घेतला. त्यांच्या ओठांची हालचाल झाली; आणि नंतर ते बोलू लागले.

'राजे, आम्ही तुमच्या मुलुखात आलो; तुमची भेट घेतली. पंडितांनी राजांच्या गृही जावं, त्यांचं आदरातिथ्य भोगावं, दक्षिणा मिळवावी, हा प्रघातच आहे. पण आज आम्ही तेवढाच हेतू मनाशी धरून आलो नाही. काही विशिष्ट हेतू मनात धरूनच ही पायपीट आम्ही केली.'

राजे उठले. हात जोडून ते म्हणाले,

'आपल्या दर्शनानं आम्हांला समाधान लाभलं. आपली आज्ञा आम्हांला शिरसावंद्य आहे.'

प्रसन्न मुद्रेनं गागाभट्टांनी राजांना बसण्याची खूण केली. राजे बसले. गागाभट्ट काय सांगतात, इकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते.

'राजे! आम्ही काशीचे. तुमच्या कीर्तीचा परिमल तिथवर येऊन पोहोचला. त्या सुगंधानं आम्ही मुग्ध झालो. या भारतवर्षात चंद्रगुप्त मौर्य सम्राट होऊन गेला. त्यानंतर किती हिंदू राज्यं उभी ठाकली! विजयनगरचं साम्राज्य, देवगिरीचं राज्य ही दोन्ही राज्यं कीर्तीच्या शिखरावर असतानाच परकीयांच्या साध्या धक्क्यानं पार कोलमडून गेली, नामशेष झाली. हिंदूंचा कैवार घेणारं राज्य भारतवर्षात दिसेनासं झालं. या निराशेच्या अंधकारात चाचपडत असता आम्हांला दक्षिणेकडे आशेचा दीप प्रज्वलित होताना दिसू लागला. तुमच्या वाढत्या पराक्रमानं आमची आशा पल्लवित होत होती. आग्र्याच्या काळदाढेतून तुम्ही सुटलात, याचा परमहर्ष आम्हांला झाला. यशाच्या, कीर्तीच्या शिखरावर स्थिर झालेली हिंदू राज्यं आम्ही कोसळलेली पाहिली. त्यांचं पुनरुत्थान झालं नाही. पण पुरंधरच्या तहानं जमीनदोस्त झालेलं राज्य पुन्हा तुम्ही उभं केलंत! पूर्वीपेक्षाही अधिक बळकट, सामर्थ्यवान. तुमच्या या यशानं आमचं मन धुंदावलं; आणि ज्ञानाचा, अहंकाराचा, आमच्या अधिकाराचा विसर पडून आम्ही येथवर धावत आलो. आशीर्वाद देण्यासाठी नव्हे; राजा! आज आम्ही तुझ्यापुढं याचक म्हणून उभे आहो. तुझ्या दातेपणाची कसोटी आज आम्ही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अजमावणार आहो.’

राजे संकोचले. त्यांची नजर खाली वळली. गागाभट्ट बोलत होते :

‘राजे! लोक आम्हांला ‘वेदोनारायण’ म्हणतात. आम्ही कधी खोटी स्तुती करीत नाही, मिथ्या भाषणही करीत नाही. आमच्या पूर्वजांनी काशीविश्वेश्वराची स्थापना केली. आमचे पूर्वज नारायणभट्ट हे भट्ट वंशातील अत्यंत प्रसिद्ध असे पुरुष होऊन गेले. त्यांनी आपल्या गाढ विद्वत्तेनं, पवित्र आचरणानं आणि गीर्वाणग्रंथांसाठी केलेल्या सततोद्योगानं आमच्या कुळाला भूषविलं. त्यांच्या वेळी सनातनधर्मविद्वेष आणि अतिरेकी धर्माभिमान यांच्या भरात मुसलमानांनी काशी येथील विश्वेश्वराच्या मंदिराचा विध्वंस केला. त्यामुळं भयंकर दुष्काळ पडला. तेव्हा मुसलमान बादशहाच्या विनंतीवरून नारायणभट्टांनी विश्वेश्वराची आराधना करून पाऊस पाडला, असं सांगतात. नारायणभट्टांनी विश्वेश्वराचं मंदिर पुन्हा उभारलं.’

गागाभट्टांचा आवाज किंचित नरम झाला.

‘आम्ही त्याच नारायणभट्टांचे वंशज. थोर मीमांसक, प्रकांडपंडित, वेदांतसूर्य असा आमचा लौकिक.’

गागाभट्ट खिन्नपणे हसले.

‘पण आम्ही आमच्या डोळ्यांनी विश्वेश्वराच्या मंदिराचा विध्वंस पाहिला. त्या पुरातन पवित्र मंदिराच्या शिलाखंडांनी औरंगजेबानं उभारलेली मशीद पाहिली. आमची तपश्चर्या, आमचं ज्ञान ते थांबवू शकलं नाही; ना आमच्या वेदांना विहिरीच्या तळाशी गेलेल्या विश्वेश्वराला पृष्ठभागी आणण्याचं सामर्थ्य लाभलं. ज्ञानाचा पराभव झाला, तेव्हा श्रद्धेकडे आमचं लक्ष वेधलं. राजे! आमचं स्वप्न साकार करण्याचं सामर्थ्य फक्त तुमच्याच ठायी दिसतं. तीच याचना करण्यासाठी मी तुमच्या दारी आशेनं आलो आहे.’

जिजाबाईंची नजर गागाभट्टांच्यावर खिळली. मातेच्या नजरेतील भीती गागाभट्टांनी जाणली.

‘आईसाहेब! हा क्षत्रियकुलाचार आहे. होमहवनात राक्षसांकडून होणारी विघ्नं टाळण्यासाठी विश्वामित्र दशरथाच्या दारी आले, त्यांनी राम-लक्ष्मणांना मागितलं, हे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आठवा. माझाही राजांच्यावर हक्क आहे. कावळे म्हणजे भोसल्यांचे राजोपाध्ये. आम्ही त्याच घराण्याचे. त्यामुळं तर आम्ही राजांच्या सामोरे जायचं धाडस केलं... शिवबा, आता तुम्ही राजे आहात, सत्ताधीश आहात. तुमचा राज्यविस्तार आणि लौकिक विशाल आहे. तुंगभद्रेपासून नर्मदेपर्यंत तुमचं राज्य विस्तारलं आहे. त्यावर शिक्कामोर्तब व्हायला हवा. तुम्ही मूर्धाभिषिक्त राजे बनायला हवं. तुमच्या मस्तकी छत्रचामरं ढळायला हवीत. यादवांच्या पराजयाबरोबरच हिंदुधर्म लयाला गेला, हा समज नाहीसा व्हायला हवा. हिंदूंचा धार्मिक छळ यापुढं मुसलमानांना करता यायचा नाही; त्यांचा त्राता, रक्षक असा एक छत्रपती आहे; हे आश्वासन आमच्या भयग्रस्त हिंदूंना मिळायला हवं. राजे, हे तुमच्या एका राज्याभिषेकानं होईल. याचक म्हणून तेवढीच विनंती करायला मी आलो आहे.'

बसल्या जागी जिजाबाईंची नजर आनंदाश्रूंनी भरून आली. सर्वांच्या अंगांवर रोमांच उठले. वीरासन घालून बसलेले राजे संकोचले. जिजाबाईंनी आपला थरथरता हात राजांच्या पाठीवरून फिरविला. राजांनी जिजाबाईंच्याकडे पाहिले. आपले अश्रू टिपीत जिजाबाईंनी होकारार्थी मान हलविली. राजांनी मंत्र्यांच्याकडे पाहिले. अनाजी म्हणाले,

'वेदोनारायण आमचंच मनोगत बोलून गेले.'

आनंदित झालेले गागाभट्ट राजांना म्हणाले,

'बोला, राजे! तुमचा होकार ऐकण्यास जीव उतावीळ आहे.'

राजे उभे राहिले.

'आजवर आम्ही धर्माज्ञा कधीही ओलांडली नाही. आपली इच्छा आम्ही धर्माज्ञा मानतो.'

'राजे, तुमच्या वचनानं आम्ही तृप्त झालो.'

'एक विनंती आहे.'

'बोला, राजे!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हे कार्य आपल्या शुभ हस्तांनी, शुभ आशीर्वादांनी...’

आशीर्वादाचा हात उंचावीत आनंदभरित झालेले गागाभट्ट म्हणाले,

‘राजे, हे तर परमपवित्र कर्तव्य. ते करण्यात आम्हांलाही धन्यता वाटेल.’

‘मोरोपंत!’ राजे मोरोपंतांच्याकडे वळले. ‘समर्थांना ही हकीकत कळवा. त्यांचे आशीर्वाद मागा. तसंच तातडीनं नाशकाला आमचे कुलगुरू अनंतभट्ट यांना पालखी पाठवून बोलावून घ्या. वेदोनारायण व कुलगुरू अनंतदेव मिळून याबाबत सर्वतोपरी विचार करतील.’

आशीर्वाद देऊन गागाभट्ट आपल्या निवासस्थानी गेले.

एक अद्भुत चैतन्य गडावर अवतरले.

□

२१

राज्याभिषेकाच्या कल्पनेने साऱ्या गडाचा रंग बदलला होता. गडाच्या प्रत्येक घरट्यात त्याची चर्चा चालू होती. काहींना याचा आनंद वाटत होता; तर निश्चलपुरींसारख्या मांत्रिकांना शुभापेक्षा अशुभाचाच वास त्यात अधिक येत होता. राजपुरोहित बाळंभट्ट कावळे अनंतभट्टांना आणण्यासाठी नाशकाला रवाना झाले होते. साऱ्यांचे लक्ष अनंतभट्टांच्या आगमनाकडे लागून राहिले होते. गागाभट्ट शांतपणे राज्याभिषेकाचा विचार करण्यात मग्न झाले होते.

अनंतभट्ट रायगडी दाखल झाले होते. त्यांच्याबरोबर अनेक विद्वान ब्राह्मण आले होते. त्यांनी गागाभट्टांची भेट घेतली. राजसदरेला धर्मसभेचे स्वरूप प्राप्त झाले. गागाभट्टांनी राज्याभिषेकाचा प्रस्ताव समोर ठेवला. अनंतदेवभट्ट गागाभट्टांचे गुरुबंधू, सोयरे. राज्याभिषेकाची कल्पना, त्याची आवश्यकता अनंतभट्टांनाही पटली. ते म्हणाले,

‘आपण म्हणता, तसा राज्याभिषेक झाला, तर ते आम्हांला इष्टच वाटतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गागाभट्ट हसून म्हणाले, ‘बोला. संकोच न करता, आमच्या जागेचा, अधिकाराचा अथवा ज्ञानाचा गंड न बाळगता मोकळेपणानं बोला.’

त्या आश्वासनाने निर्भय झालेले अनंतभट्ट म्हणाले,

‘राजांचा राज्याभिषेक होतो, याचा आम्हांला आनंद आहे. पण राजांचा हा मूर्धाभिषेक सर्वतोपरी निर्दोष असावा, असं आम्हांला वाटतं.’

‘दोष कसला?’

साऱ्यांचे लक्ष अनंतभट्टांकडे लागले होते. राजसभेत हजर असलेले खुद्द राजे शांतपणे ऐकत होते.

‘आपल्याला ज्ञातच आहे की, कलियुगात फक्त ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण. आणि क्षत्रियाखेरीज राज्याभिषेकाचा अधिकार अन्य कोणास नाही.’

गागाभट्टांच्या चेहऱ्यावर प्रसन्न हास्य विलसले.

‘अनंतदेव, आपलं भट्टघराणं नेहमीच धर्मशास्त्रात श्रुतिसंमत अशा युगानुकूल निर्णयाची स्थापना करीत आलं आहे. लग्न झालेला दत्तक चालतो, हा निर्णय भट्ट घराण्याचा. तसाच बहिणीचा गोत्रज म्हणून वारसा, हाही निर्णय आपल्याच घराण्याचा. तुमची शंका योग्य आहे. पण सर्व रजपूत क्षत्रिय. राष्ट्रकूट, यादव यांच्या राजवटी या कलियुगाच्या, आणि क्षत्रिय. म्हणून कलियुगात क्षत्रिय आहेत, असं आमचं मत आहे आणि राजे शिसोदियाकुलोत्पन्न. मुळात क्षत्रिय असूनही, मागाहून ब्राह्मण झालेल्या महान सूक्तद्रष्ट्या विश्वामित्राच्या कौशिक गोत्राचे ते आहेत.’

‘पण संस्कारलोपाचं काय?’

‘संस्कारलोप झाला असला, तरी तो देशकालविप्लवामुळं आहे. त्यासाठी प्रायश्चित्त घेऊन संस्कारारंभ करता येतात.’

अनंतभट्ट त्या उत्तराने समाधान पावले. शिवाजीमहाराजांचा व्रतबंध झाला नव्हता. हा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मुख्य संस्कार झाला नसल्याने कुल क्षत्रिय असले, तरी ते संस्काराभावाने शूद्र झाले होते. राज्याभिषेकापूर्वी मौंजीबंधन केल्यास देशकालविप्लवाने जडलेला दोष नाहीसा होईल, हा गागाभट्टांचा विचार अनंतदेवांना पटला. एकच शंका शिल्लक राहिली होती. ती अनंतदेवांनी बोलून दाखविली-

'राजांनी आजवर अनेक युद्धं केली. त्यांमध्ये कदाचित राजांच्या हातून ब्रह्महत्याही घडली असेल आणि त्याला तर धर्मात शुद्धी नाही.'

'असं कोण म्हणतं?' गागाभट्ट निश्चयपूर्वक म्हणाले. ' 'मात्स्या'च्या आधारानं आम्ही सांगतो. तुलदानाव्यतिरिक्त तुलापुरुषदानानं हा दोष नाहीसा होतो, हे खुद्द आमचे आजोबा विख्यात नारायणभट्ट यांनी सशास्त्र सिद्ध केलं आहे.'

गागाभट्टांनी सर्वांच्या शंका दूर केल्या. राज्याभिषेक निर्दोष बनतो, याची अनंतभट्टांना खात्री पटली. राज्याभिषेक निश्चित झाला. अवधी थोडा होता. तेवढ्यात अनेक गोष्टी व्हायच्या होत्या. शेकडो वर्षांच्या कालांतराने या भूमीत घडणाऱ्या राज्याभिषेकासाठी होमहवनादी धर्मविधींची परत मांडणी करायला हवी होती. त्यासाठी गागाभट्टांनी व अनंतदेवांनी अथर्ववेद, गोपथब्राह्मण, विष्णुधर्मोत्तर, वसिष्ठसंहिता, इत्यादी ग्रंथांच्या आधारे राज्याभिषेकप्रयोगाची स्वतंत्र पोथी तयार करायला सुरुवात केली.

राज्याभिषेकाची तयारी सुरू झाली. नद्यांची व सागरांची जले जमविण्यासाठी राजांनी आपले लोक चारी दिशांना पाठविले. सिंहासन घडविण्यास वेळ लागेल, म्हणून ते काम आधी चालू केले. गागाभट्टांच्या व अनंतभट्टांच्या सल्ल्याने राज्यातील व दूरवरच्या ब्राह्मणांना निमंत्रणे देऊन निरनिराळ्या वेदांचे व शास्त्रांचे निष्णात पढीक ब्राह्मण मिळविण्याची खटपट सुरू झाली.

राज्याभिषेकाची गडबड गडावर सुरू असता राजांचे मन मात्र पन्हाळ्याच्या आसपास रेंगाळत होते. बेहलोलखानाने परत उचल घेतली होती. उंबराणीचा तह विसरून तो राजांच्या मुलुखात शिरला होता. उसंत मिळताच पन्हाळ्याला जाण्याचे राजांनी ठरविले होते.

□ □ □

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग आठवा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

सकाळच्या कोवळ्या किरणांत राजे शिरकाईच्या समोरील होळीचौकात उभे होते. राजारामांनी त्यांचे बोट धरले होते. राजांच्या जवळ निराजीपंत, अनाजी, मोरोपंत ही मंडळी उभी होती. राजे राज्यारोहणाच्या तयारीचे बेत त्यांच्या तोंडून ऐकत होते.

'मोरोपंत, राज्याभिषेकासाठी हा गड निवडला खरा. पण एवढा राबता होणार; गडाची जागा पुरेल?'

'त्याची चिंता नसावी, महाराज.' मोरोपंत म्हणाले. 'यासारखा सुलक्षणी गड नाही, असं आचार्य गागाभट्ट म्हणतात. तख्तास हीच जागा योग्य आहे. या भूमीवर कधी रक्त सांडलं नाही. कैलासाप्रमाणे ही जागा सदैव पवित्र राहिली आहे.'

'ते आम्हांलाही मान्य आहे; पण या गडावर किती लोक मावणार?'

'त्याचाही विचार झाला आहे. गडावर एवढे महाल, घरटी उठली आहेत. गडाचा विस्तार खूप आहे. राज्याचे सारे नामांकित डेरे, तंबू, शामियाने इथं उभे केले जातील. त्याखेरीज गडाखालची रायगडवाडी, पाचाडचा वाडा, पाचाडची छावणी हे सर्व मिळून लाखावर अधिक माणूस सामावलं जाईल. त्याची चिंता नसावी.'

'तुम्ही असता आम्हांला चिंता कसली?'

त्याच वेळी गडावर आलेल्या जासुदाकडे सर्वांचे लक्ष वेधले. राजांना मुजरा करून जासुदाने थैली हातात दिली. थैली पन्हाळ्याहून प्रतापराव गुजरांनी पाठविली होती. राजे तातडीने सर्वांसह महालात आले. राजांनी थैली उघडली. पत्रावरून नजर फिरत असता राजांचे भाव बदलत होते. पत्र वाचून राजांनी ते पत्र अनाजींच्या हाती दिले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अनाजींनी पत्रावरून नजर फिरविली. प्रतापराव गुजरांनी बेहलोल बेळगावमार्गे चालून येत असल्याची खबर पाठविली होती. अनाजींची नजर वर होताच राजांचे शब्द त्यांच्या कानांवर पडले,

‘आमचे सरसेनापती प्रतापराव गुजर आम्हांला काय लिहितात, ते पाहिलंत? उंबराणीच्या लढाईत बेहलोल हाती सापडला असताही यांनी स्वत:चा शहाणपणा लढवून त्याला तह करून सोडून दिलं. तोच बेहलोल तह मोडून, परत चाल करून येतो, असं आम्हांला आमचे सेनापती कळवितात; काय करावं, म्हणून सल्ला मागतात. पायघड्या घालून त्यांना मानानं बोलावून घ्यायला सांगा! अनायासे राज्याभिषेक होणारच आहे. त्या प्रसंगी राज्याचं दान करता येईल!’

संतप्त राजे पाहून कोणी काही बोलायला धजत नव्हते. राजांनी आपला संताप आवरला. ते अनाजींना म्हणाले,

‘अनाजी प्रतापरावांना खरमरीत पत्र पाठवा. आम्ही राज्याभिषेकात गुंतलो असता शत्रूनी उचल घेतलेली आम्हांला परवडणार नाही, म्हणून त्यांना कळवा. बेहलोलला जिथल्या तिथं तातडीनं पायबंद घालून, गडावर येण्याची आमची आज्ञा त्यांना कळवा.’

प्रतापरावांना पत्र पाठविले गेले. राजांनी वरून जरी संताप दाखविला, तरी ते बेहलोलबद्दल निश्चिंत होते. आनंदराव, हंसाजी मोहिते आपल्या दळानिशी त्याच भागात असल्याने राजांना काळजी वाटत नव्हती. राजांनी आपले लक्ष राज्यकारभाराकडे वळविले.

काही दिवस उलटले; आणि एके दिवशी रात्री राजांना उठविण्यात आले. राजे राजसदरेवर गेले. अनाजी, बाळाजी तेथे आले होते. अनाजी म्हणाले,

‘प्रतापरावांचा निरोप घेऊन आले आहेत.’

नजर रोखीत राजे म्हणाले, ‘बोला.’

‘महाराज, आपलं पत्र मिळताच आपल्या आज्ञेप्रमाणे प्रतापरावांनी पन्हाळ्याहून कूच केलं. खानाचा तळ गडहिंग्लज मुलुखातील नेसरीच्या खिंडीत पडला होता. प्रतापरावांनी खानाच्या सैन्याला वेढा दिला आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मग प्रतापराव कशाची वाट पाहत आहेत?’

‘खानाचं सैन्य मोठं आहे. उंबराणीच्या वेढ्यात सापडलेला बेहलोल परत नेसरीच्या खिंडीत सापडल्यामुळं धास्तावला आहे. शत्रूला आमच्या अपुऱ्या सैन्याची कल्पना नाही. तेव्हा प्रतापरावांनी जादा कुमक तातडीनं मिळावी, म्हणून अर्ज केला आहे. आणखीन थोडी कुमक मिळेल, तर खानाचा पराभव...’

‘बस्स करा!’ राजे बाळाजींच्याकडे वळले. ‘बाळाजी, आम्ही सांगतो, तो शब्दन् शब्द ध्यानी धरून प्रतापरावांना पत्र लिहा.’

राजे पत्राचा मजकूर सांगत होते...

> ‘तुम्ही आपल्या बेकैद वर्तनाने आम्हांस नाखूश केले आहे. तुम्ही ज्या खानास तह करून सोडले, तो पुन्हा फौज घेऊन आमच्या मुलुखात उतरतो. अशा माणसांचा इतबार तुम्ही कोणत्या आधारे धरिला होता? त्याचा त्याच वेळी नाश केला असता, तर त्याच्यापासून आज आम्हांस व तुम्हांस तकलीफ न होती. आम्ही इकडे केवढ्या फौजेनिशी शत्रूच्या मातब्बर फौजांना सामना देतो, हे तुम्ही जाणता. असे असता तुम्ही फेरकुमक मागावी, हे शोभले नाही. जिवास राखून मुलुखगिरी करणे वीरास योग्य नव्हे. म्हणून आम्ही तुम्हांस दोष लाविला आहे. आता विजापूरकरांची फौज सफाई बुडविल्याखेरीज आमच्या समोर कदापि येऊ नका...’

राजांचे पत्र घेऊन रातोरात स्वार गडाखाली उतरला. राजांना मात्र झोप आली नाही. त्यांच्या मनात विचारांचे मोहोळ उठले होते. सकाळी पूजा आटोपताच ते सदरेवर आले. मोरोपंत-अनाजींना बोलावून घेण्यात आले.

‘अनाजी, चिपळूण-छावणीला पत्र पाठवा. जी कुमक असेल, ती प्रतापरावांच्या मदतीला पाठविण्याचं पत्र लिहा.’

‘जी!’

‘काल प्रतापरावांचा निरोप आल्यापासून आमचं मन बेचैन आहे. बेहलोल जरा पुढं सरकतो आहे, असं दिसलं, तर शिवरात्र आटोपून आम्ही स्वत: पन्हाळा भागात उतरू.’

शिवरात्रीचा दिवस उजाडला. थंडीचे दिवस असूनही आकाश अभ्राच्छादित झाले होते. राजे जिजाबाईंच्यासह जगदीश्वरमंदिराकडे गेले. अभिषेक झाला. राजे जिजाबाईंच्यासह

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मंदिराकडे येत असता जिजाबाई म्हणाल्या,

‘आज काय झालं, कुणास ठाऊक? पण देवावर अभिषेक टिकेना, सारखी माळ तुटायची. निश्चलपुरींना विचारून पाहा.’

‘जी!’ राजे म्हणाले.

राजे बेचैन बनले होते. त्यांनी निश्चलपुरींना निरोप पाठवला. निश्चलपुरी मंत्रतंत्रात गढले.

शिवरात्रीनंतर दिवस उलटत होते. राजे प्रतापरावांची बातमी ऐकण्यास उत्सुक होते. वारंवार ते चौकशी करीत होते.

-आणि एके दिवशी प्रतापरावांचे दुय्यम सेनापती आनंदराव गडावर येत असल्याची बातमी राजांना मिळाली. राजे सदरेवर आनंदरावांची वाट पाहत होते. राजांचे सारे मंत्री त्याच अधीरतेने तेथे गोळा झाले होते. आनंदराव आले. राजे उभे राहिले. अधीरतेने त्यांनी विचारले,

‘बेहलोलचा पराभव झाला?’

‘जी, नाही.’

‘नाही? बोला, आनंदराव!’

अस्वस्थ झालेले राजे पाठीमागे हात घेऊन सदरेवर येरझाऱ्या घालीत होते. आनंदराव नतमस्तक उभे होते. राजे थांबले. त्यांनी पुन्हा आवाज दिला,

‘सांगा, आनंदराव?’

‘महाराज, आम्ही बेहलोलखानावर चाल केली; पण यश आलं नाही. प्रतापरावांनी पराक्रमाची शर्थ केली.’

‘आणि हे सांगायला त्यांनी तुम्हांला पाठविलं? हं:! कुठं आहेत आमचे सेनापती? हे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सांगायला ते का आले नाहीत?’

आनंदरावांचं अवसान ढळलं. डोळ्यांत साकळलेले अश्रू खळकन निखळले. कसेबसे ते बोलून गेले,

‘सेनापती आणि त्यांचे सहा सरदार बेहलोलयुद्धात खर्ची पडले.’

अधीऱ्या भूमीवर पावसाऐवजी वीज कोसळावी, तशी ती बातमी साऱ्यांच्या कानांवर आदळली. राजांचे उभे अंग जागच्या जागी भिजले. कापऱ्या आवाजात राजे बोलून गेले,

‘काय झालं?’

‘आम्ही खानाला वेढलं होतं. सेनापती मदतीची वाट पाहत होते. आपलं पत्र आलं. मला आणि हंसाजींना सेनापतींनी सैन्य घेऊन जायला सांगितलं. एवढ्या छोट्या फौजेचा पाडाव खानापुढं लागणार नाही, असं ते म्हणाले...’

‘रडू नका, आनंदराव! सांगा ऽ ऽ’

‘शिवरात्रीचा दिवस होता. भर दुपारी प्रतापराव आणि त्यांचे सहा सरदार स्वार झाले. ते म्हणाले, ‘महाराजांना जाऊन सांगा की, त्यांच्या आज्ञेप्रमाणे आम्ही लढलो.’ ’

राजांचे ओठ थरथरू लागले. मुठी आवळल्या गेल्या. आनंदराव कष्टाने सांगत होते.

‘आम्ही सांगायचा प्रयत्न केला; पण त्यांनी ऐकलं नाही. प्रतापराव आणि सहा सरदार यांनी टाच दिली. दहा हजारांच्या छावणीवर अवघे सातजण तुटून पडले. ‘हर हर महादेव’ चा गजर उठला. थोडी गडबड उडाली; आणि सातही रिकामी घोडी छावणी सोडून जंगलात शिरताना दिसली. तेव्हा कुणालाच आवरता येईना. चारही बाजूंनी आपले लोक खानावर तुटून पडले. एकच कापाकापी सुरू झाली. खानापुढं आमचं काही चाललं नाही. माघार घ्यावी लागली. प्रतापराव गेले; आणि ते सांगायला मी जिवंत राहिलो....’

आनंदराव दुशेल्यात तोंड लपवून रडत होते. राजे कपाळी हात लावून मटकन खाली बसले. मिर्झाराजांच्यावर चालून जाणारे प्रतापराव त्यांना दिसत होते. सांडणाऱ्या अश्रूंचे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भान विसरून राजे आपल्या महालाकडे जात होते. त्यांना काही सुचत नव्हते.

राजे मंचकावर बसले होते. राहून-राहून त्यांचे डोळे भरून येत होते. पश्चात्तापाने त्यांचे मन होरपळून निघाले होते.

'शिवबा ऽ ऽ'

राजांची नजर उंचावली. महालात जिजाबाई उभ्या होत्या. त्यांना पाहताच राजांचे मन उचंबळले.

'मासाहेब, आमचे प्रतापराव गेले! त्यांच्या मृत्यूला आम्ही कारणीभूत झालो!'

'सारं समजलं. प्रतापराव असं करतील, हे तरी कुणाला माहीत...?'

'नाही, मासाहेब! साऱ्यांना अतर्क्य असलं, तरी आम्हांला ते कळायला हवं होतं. प्रतापरावांचा उतावीळ स्वभाव आम्हांला माहीत होता. एवढ्या निधड्या छातीची, जिवाला जीव देणारी माणसं फुकट शब्दांनी खर्ची पडली! त्याचं दुःख आम्हांला फार आहे.'

राजे अश्रू ढाळीत होते. जिजाबाई त्यांचे सांत्वन करीत होत्या.

सकाळी राजे स्नान करून सदरेत आले, तेव्हा त्यांचे नेत्र आरक्त बनले होते. मुद्रा करारी होती. राजे आनंदरावांना म्हणाले,

'आनंदराव, बेहलोलच्या पारिपत्यासाठी आम्ही जायचं ठरवलं आहे.'

'क्षमा, महाराज!' निराजीपंत म्हणाले, 'पण राज्याभिषेक नजीक आला असता...'

'हां, निराजीपंत! आमच्या शब्दाखातर प्रतापराव आपल्या जिवाची उधळण करून गेले. त्यांचा मारेकरी आमच्या मुलुखात उघड माथ्यानं वावरत असता आम्ही राज्याभिषेक करून घेऊ, असं वाटतं? त्या राज्याभिषेकाला काय अर्थ राहील?'

महाराज जातीने मोहीम हाती घेणार, हे ऐकताच साऱ्यांच्या मुद्रा चिंताक्रांत झाल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जनार्दनपंतांनी एकवार आनंदरावांच्याकडे पाहिले. आनंदराव पुढे झाले. त्यांनी राजांचे पाय शिवले. त्यांना उठवीत राजे म्हणाले,

'आनंदराव! हे काय?'

'महाराज, ही संधी मला द्या... मी आणि हंसाजी मोहिते. प्रतापरावांनी आम्हांला खूप जपलं. खानाचा बीमोड करण्याची संधी आम्हांला द्या. कामगिरी फत्ते करून आलो नाही, तर तोंड दाखविणार नाही.'

राजांनी भावनावेगाने आनंदरावांना जवळ घेतले. गहिवरून राजे म्हणाले,

'आनंदराव, आता तो शब्द काढू नका. हवी तेवढी कुमक घ्या. खानाला गाठा; धूळधाण उडवा. पण सुखरूपपणे परत या. आम्ही तुमची वाट पाहतो.'

राजांनी आनंदरावांना निरोपाचे विडे दिले. आनंदराव हर्षभरित होऊन नव्या कामगिरीला बाहेर पडले.

राजे अनाजींना म्हणाले,

'अनाजी! नौबतीचा मानकरी गेला! आमचे सरनौबत हरवले! गडाची नौबत बंद ठेवा. प्रतापरावांचं सुतक आम्हांलाही आहे.'

थकल्या पावलांनी राजे महालाकडे जात होते.

□

२

गडाचे अठरा कारखाने राज्याभिषेकाच्या तयारीला लागले. आपल्याकडून काही उणीव राहू नये, ही धडपड प्रत्येकात दिसत होती. सुवर्णसिंहासनाचे काम पुरे होत आले होते. खुद्द जिजाबाईंनाही आपल्या वयाचा विचार करायला उसंत नव्हती. सर्व राण्यांचे दागदागिने, कपडे पाहण्यात त्या गुंतल्या होत्या. कुशल सुवर्णकार सोनारसोप्यात दागिने

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घडवीत होते.

राजांच्या शेजारी अनाजी, मोरोपंत, बाळाजी उभे होते. जामदारखान्यात राज्याभिषेकासाठी लागणाऱ्या सर्व खर्चाचा तपशील राजे ऐकत होते. लक्षावधी होनांच्या खर्चाचा अंदाज पाहून राजे म्हणाले,

‘मोरोपंत, एवढ्या खर्चात एक राज्य उभं करणं सहज शक्य आहे.’

‘जी! मासाहेबांनी सर्व तपशिलांना मान्यता दिली आहे.’ मोरोपंत म्हणाले.

‘मग आमच्या नजरेची गरज काय?’

‘मासाहेब म्हणाल्या- राजांच्या राज्याभिषेकात काही कमतरता पडू देऊ नका.’

‘पण हे सारं जमेल का?’

मोरोपंतांची छाती किंचित तणावली. चेहऱ्यावर अभिमान प्रकटला. ते म्हणाले,

‘असले दहा राज्याभिषेक करण्याचं सामर्थ्य राजांच्या जामदारखान्यात आहे.’

राजांनी प्रेमभराने मोरोपंतांच्या खांद्यावर हात ठेवला.

‘जगदंबेची कृपा! मोरोपंत, आम्हांला सदैव तुमच्याबद्दल कौतुक वाटतं. तुमच्यासारखी अष्टावधानी माणसं हाती असता आम्ही कसली काळजी करणार? पण आज सकाळपासून संभाजीराजे दिसले नाहीत!’

अनाजी म्हणाले, ‘युवराज गडावर नाहीत.’

‘मग?’

अनाजींनी ओठांवरून जीभ फिरविली. ते शांतपणे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मध्यरात्रीला युवराज गडाखाली गेले, असं विश्वसनीयरीत्या कळलं आहे.’

राजे विचारमग्न झाले. चिंता प्रकटली. त्यांनी विचारले,

‘कशासाठी युवराज गडाखाली उतरले?’

अनाजी नम्रपणे म्हणाले, ‘ते आम्हांस कसं कळावं? पण युवराज असे अनेक वेळा गड उतरून जातात.’

बोलता-बोलता अनाजी एकदम थांबले, चपापले. मागे सरत ते मुजऱ्यासाठी वाकले. मोरोपंतांनी आणि बाळाजींनीही त्यांचे अनुकरण केले. राजांनी मागे वळून पाहिले. खुद्द युवराज संभाजीराजे जामदारखान्यात प्रवेश करीत होते. संभाजीराजांनी राजांना मुजरा केला. राजांनी विचारले,

‘शंभूराजे, तुम्ही गडाखाली गेला होता?’

‘जी!’ राजांच्या प्रश्नाने युवराजांच्या चेहऱ्यावरचे स्मित अधिकच फाकले.

‘आबासाहेब, बेहलोलचा पराभव करून आनंदराव गडावर येत असल्याची बातमी नजरबाजानं आणली आहे.’

अनाजी ते ऐकून अस्वस्थ झाले. न राहवून ते बोलून गेले.

‘नजरबाजानं बातमी आणली असती, तर ती आम्हांला कळली असती.’

संभाजीराजांचे हास्य क्षणात विरले. अनाजींवर नजर रोखीत ते म्हणाले,

‘अनाजी, नजरबाज आमचा. बातमी प्रथम आम्हांला कळणार!’

राजे प्रसन्नपणे हसले. अनाजींना ते म्हणाले,

‘अनाजी, युवराज राजकारणात गुंतले. आता हे होणं उचित आहे.’ एकदम विषय

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बदलून राजे संभाजीराजांना म्हणाले, 'सांगा, शंभूराजे! पुढची बातमी ऐकण्यास आम्ही उतावीळ आहो.'

'बेहलोलचा पराभव करण्यासाठी आनंदराव येथून गेले, तेव्हा पुढचं संकट ओळखून बेहलोलनं मोगलांच्या दिलेरखानाशी हातमिळवणी केली. आदिलशाही, मोगलाई एक झाली. एवढ्या मोठ्या फौजेशी मुकाबला करणं आनंदरावांना कठीण होतं.'

'मग?'

'पण आनंदरावांनी आणि हंसाजीमामांनी नामी तोड काढली. मुलुखात घुसलेल्या शत्रूला तोंड न देता शत्रुसैन्याला बगल देऊन आनंदराव सरळ कानडी मुलुखात घुसले. बेहलोलखानाची जहागीर, संपगावचा बाजार आणि आदिलशाही मुलूख यांची होळी करून हजारो बैलांवरून अपार लूट घेऊन आनंदराव परतले.'

'पण बेहलोल स्वस्थ कसा बसला?'

'छे! स्वस्थ कसा बसेल? ही बातमी कळताच तो जळफळत उठला. बेहलोलनं आनंदरावांना बंकापुरापाशी गाठलं. प्रतापरावांच्या सूडानं पेटलेली मराठी फौज सरळ बेहलोलला भिडली. बेहलोलची फौज पळत सुटली. बेहलोलबरोबर आलेल्या खिजरचा भाऊ रणांगणात मारला गेला; आणि बेहलोलच्या डोळ्यांदेखत त्याची अपार संपत्ती आपण जिंकली. जिंकलेली पाचशे घोडी आणि दोन हत्ती घेऊन आनंदराव आपल्या दर्शनाला येत आहेत.'

'बोला.' आनंदित झालेल्या राजांनी आज्ञा केली.

'आबासाहेब, आम्हांला ही बातमी रात्री मिळाली. आपण झोपला होता. पण आताशा आपली तबियत चांगली नसते, हे आम्हांला माहीत आहे. त्यामुळंच आपल्याला आम्ही उठविलं नाही. या अपराधाबद्दल क्षमा असावी.'

'बोला, राजे! मग काय केलंत?'

'आपण केलं असतं, तेच आम्ही केलं.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्ही समजलो नाही.’

‘आनंदरावांच्या स्वागतासाठी आम्ही रातोरात गड उतरलो, आणि त्यांना घेऊन गडावर आलो.’

‘शाबास! युवराजाला उचित असेच वागलात... अनाजी, चला. विजयी वीरांचं आपण स्वागत करू या.’

राजे राजसदरेत आले. राजांची मुद्रा प्रसन्न बनली होती. डोळ्यांत कौतुक साठले होते. मुजऱ्यासाठी वाकलेल्या आनंदरावांना राजांनी हर्षभराने मिठी मारली.

‘आनंदराव, तुमच्या विजयानं आम्ही समाधान पावलो. मनातल्या प्रतापरावांच्या दु:खाला विरंगुळा मिळाला.’

राजांनी स्वत:च्या हातांनी आनंदरावांच्या पगडीवर शिरपेच चढविला. बेहलोलचा पराभव करून परतलेले विजयी वीर रायगडाच्या राज्याभिषेकाच्या तयारीत सामील झाले.

या आनंदात भर घालणारी आणखी एक बातमी रायगडावर येऊन थडकली- राजांच्या आरमाराने नवा विजय संपादन केला. जंजिऱ्याच्या सिद्दीला सातवळीच्या खाडीत गाठून राजांच्या दौलतखानाने लढाई केली. खुद्द सिद्दी संबूळ जखमी होऊन पळून गेला. या आरमारी युद्धात सिद्दीचे शंभराच्या वर लोक ठार झाले.

या दोन विजयवार्तांनी राजांचे मन सुखावले.

□

३

गडावर रंगरंगोटी सुरू झाली. राजसदर चितारण्यासाठी कोकणातील निष्णात रंगारी गडावर गोळा झाले. रामायण-महाभारतांतील प्रसंग सुबकपणे राजसदरेवर चितारले जात होते. खारीच्या मऊ केसांचे निरनिराळ्या आकारांचे कुंचले नानाविध रंगच्छटांनी सजले होते. गडावरच्या अपुऱ्या इमारती, माड्या, घरटी तत्परतेने पुरी केली जात होती. त्यासाठी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मोरोपंत, इटलकर ही मंडळी सदैव झटत होती.

दौलतीचे नामांकित डेरे, शामियाने गडावर आणले जात होते. गडाच्या उतरणीवर ते वाळवून, स्वच्छ करून, आबादान केले जात होते. राज्याभिषेकाच्या वेळी पन्नास हजारांचा राबता गडावर होईल, असा जाणत्यांचा तर्क होता. त्या अंदाजाने गडाचे, पाचाडचे अंबारखाने भरले जात होते. बालेकिल्ल्यातून येणारी प्रत्येक यादी पुरविण्यात नागाप्पा वाणी मग्न झाला होता. जिजाबाईंच्या आज्ञेनुसार सोयराबाई, पुतळाबाई सर्वत्र लक्ष ठेवीत होत्या; पण काशीबाई राणीसाहेब मात्र या धावपळीत कुठेच दिसत नव्हत्या. त्या अंथरुणाला खिळून होत्या. वैद्यांच्या सल्ल्यावरून काशीबाईंना पाचाडच्या वाड्यात हलविण्यात आले. त्यांच्या बरोबर पुतळाबाईंना, सगुणाबाईंना पाठविण्यात आले. वैद्यांच्या औषधांनी वा मांत्रिकांच्या उपचारांनी त्यांना गुण पडत नव्हता. दिवसेंदिवस त्यांची तब्येत ढासळत होती. जिजाबाईंच्या मनात ती काळजी रेंगाळत होती. सवड मिळेल, तेव्हा राजे पाचाडला काशीबाईंच्या महाली जात होते, विचारपूस करीत होते.

याखेरीज आणखीन एक काळजी राजांच्या मनात रेंगाळत होती- प्रतापराव गेल्यामुळे सेनापतिपद मोकळे पडले होते. ते फार काळ मोकळे राहणे इष्ट नव्हते. राज्याभिषेकप्रसंगी आदिलशाही व मोगलाई अपशकुन करण्यास सरसावण्याची शक्यता होती.

रात्रीच्या वेळी राजे आपल्या खासे महालात बसले होते. समयांच्या प्रकाशात महाल प्रकाशित झाला होता. खास विश्वासाची माणसे तेथे हजर होती. अनाजी, मोरोपंत, येसाजी, युवराज संभाजी ही मंडळी राजांचा विचार जाणून घेण्यास उत्सुक होती. राजांनी आपले शल्य बोलून दाखविले,

‘प्रतापराव गेले! त्यांची जागा घेईल, असा माणूस आम्हांला दिसत नाही.’

अनाजी अदबीने म्हणाले, ‘महाराज, आनंदराव विजय संपादून गडावर आले आहेत. त्यांनी आपली योग्यता सिद्ध केली आहे.’

राजांच्या चेहऱ्यावर मंदस्मित झळकले.

‘अनाजी, विजयावरच सेनापतिपद द्यायचं असेल, तर विजय संपादन करणारे असे अनेक वीर आमच्या जवळ आहेत. पन्हाळा काबीज करणारे तुम्ही, कोंडाजी आहात;

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

साल्हेरमुल्हेरचा दिपविणारा विजय मिळविणारे मोरोपंत आहेत; हंसाजी, येसाजी आहेत. पंत, आता जोखीम वाढती आहे. नुसते धाडस, यश यांचा विचार करून भागणार नाही. सरनौबताच्या अंगी अनेक गुण असावे लागतात. मुलूख जाणणारा, प्रसंगावधानी, फौजेचा विश्वासू, दूरदृष्टीचा आणि त्याचबरोबर राज्याविषयी अविचलित इमान बाळगणारा असा सरनौबत असावा लागतो. आमचे सेनापती दोन. त्यांची कथा पाहा ना- नेताजींच्या जवळ धाडस, सैन्याचा विश्वास, आमच्या नात्याची जाण- सारे गुण होते; पण राज्याचं इमान नव्हतं. त्यामुळं ते वाया गेले आणि प्रतापरावांना अजोड धाडस, अविचलित इमान हे असूनही प्रसंगाच्या अवधानापायी ते खर्ची पडले, आमच्या जिवाला ओढ लावून गेले.'

'आबासाहेब, आम्ही बोलू?' संभाजीराजांनी विचारले.

'बोला!'

'आम्हांला हंसाजी मामा दिसतात. ते शांत आहेत, त्यांच्या जवळ अनुभव आहे; आणि राज्याशी ते इमानीही आहेत.'

संभाजीराजांवर नजर स्थिरावीत राजांनी विचारले,

'शेवटचा अंदाज कसा केलात?'

स्थिर आवाजात युवराज म्हणाले, 'त्यात अवघड काय? त्यांनी एवढ्या मोहिमा केल्या, पराक्रम गाजविले. खुद्द रक्ताचं नातं असूनही कधी सरनौबतीची हाव धरली नाही. बेहलोलचा पराभव करण्यात त्यांचीही आनंदरावांना साथ होतीच; पण ते आनंदरावांच्यासह गडावर आले नाहीत. आनंदरावांना गडावर पाठवून ते चिपळूणच्या छावणीवर तातडीनं गेले.'

राजांचा चेहरा गंभीर बनला. पण क्षणात उठत ते म्हणाले,

'ठीक आहे. पाहू... अनाजी, आज तुम्ही पाचाडला जाऊन तिथल्या अंबारखान्याची व्यवस्था पाहा. तसंच, गडाखाली पेठ भरली आहे, असं नागाप्पा सांगत होता. माल गडावर चढायला दिरंगाई का होते, हे पाहून तुम्ही गडावर या. बाळाजी, हंसाजी मोहिते यांना आम्ही शक्य तो लौकर चिपळूणला येत असल्याचं कळवा.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पण राज्याभिषेक...’ मोरोपंत बोलले.

राजे हसत म्हणाले, ‘काळजी करू नका. त्याला हजर राहावंच लागेल आम्हांला. पण त्यापेक्षा या चिपळूण-छावणीनं आमच्या मनात अधिक गुंता वाढविला आहे... रात्र झाली. आम्ही विश्रांती घेतो.’

सारे राजांना मुजरे करून निघून गेले. संभाजीराजे पाय शिवण्यासाठी नजीक येताच राजांनी सांगितले,

‘शंभूराजे, आनंदरावांना सकाळी भेटायला सांगा. याची वार्ता कुणाला कळता कामा नये. ते आले, की तुम्हीच आम्हांला वर्दी द्या.’

संभाजीराजे महालाबाहेर गेले. राजांची नजर पलंगाकडे गेली; पण डोळ्यांवर झोप नव्हती. तसेच बैठकीवर बसून राहिले.

□

४

सकाळी देवदर्शन आटोपून राजे जिजाबाईंच्या महाली आले; पण महालात जिजाबाई नव्हत्या. त्या सातमहालाकडे गेल्याचे राजांना कळले. राजे सातमहालाकडे वळले, तोच मोरोपंत तेथे आले. त्यांनी वर्दी दिली.

‘फिरंगोजी दर्शनासाठी आले आहेत.’

राजे सदरेकडे वळले. सदरमहालात फिरंगोजी उभे होते. त्यांनी मुजरा केला. मुजऱ्याचा स्वीकार करून राजे म्हणाले,

‘फिरंगोजी, परक्यासारखे राजसदरेवरच थांबलात?’

‘तसं नाही, महाराज! आपण जगदीश्वराकडे गेला होता, तेव्हाच मासाहेबांचं दर्शन घेतलं. टाकोटाक गडावर परतायचं होतं, म्हणून...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘एवढ्या तातडीनं बरे आलात?’

‘राज्याभिषेकाची बातमी कळली. जिवाला चैन पडेना. एकदा पाहावंसं वाटलं. म्हणून तजवीज करून टाकोटाक गडावर...’

राजे पुढे झाले. फिरंगोजींना आपल्या हातांनी बैठकीवर बसवीत राजे म्हणाले,

‘फिरंगोजी, आम्ही जाणतो. हे घडतं, ते आपल्यासारख्यांच्या आशीर्वादानं...’

राजे फिरंगोजींना गडाची हालहवाल विचारीत होते, सर्व जाणून घेत होते. बोलणे संपले, तरी फिरंगोजी उठेनात. राजांच्या ध्यानी ते आले.

‘फिरंगोजी, काही सांगायचं आहे का?’

फिरंगोजींच्या सुरकुत्यांचे जाळे थरथरले. आपले पागोटे सावरीत फिरंगोजी भरल्या कंठाने म्हणाले,

‘राजे! या पायांच्या सेवेत काळ्याचे पांढरे झाले. गडावर येवढा थाट होनार. आपन छत्रपती होनार. आन् ते बघायला मी मातुर इथं असनार न्हाई.’

‘का?’

‘मलाच इचारता? साऱ्या गडांस्नी हुकूम सोडलासा- ‘डोळ्यांत तेल घालून गड राखाया होवा. जागा सोडून जाऊ नये. गाफील राहिल्यास मुलाहिजा राखला जानार न्हाई...’ ’

राजे हसत होते.

‘हसता काय, राजे? थोरांची थट्टा होते, तर जीव जातो गरिबाचा. आजवर मी कायबी मागितलं नाही. येवढं एकच मागनं हाय.’

‘फिरंगोजी, आज्ञा साऱ्या गडांना गेल्या, त्यातच भूपाळगडालाही. पण आम्ही तुम्हांला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

विसरलो नव्हतो. तुमच्याशिवाय आमचा राज्याभिषेक होणार कसा? भूपाळगडाची तात्पुरती व्यवस्था लावून आम्ही तुम्हांला राज्याभिषेकाच्या आधी बोलावून घेऊ. तुमच्याखेरीज आमचा राज्याभिषेक होणार नाही.'

फिरंगोजी एकदम उठले. राजांनी नजर वर केली. संभाजीराजे सदरेवर येत होते. फिरंगोजींनी मुजरा केला. संभाजीराजे फिरंगोजींकडे धावले; वाकून त्यांच्या पाया पडले. भारावलेले फिरंगोजी राजांना उठवीत म्हणाले,

'शंभूबाळ, हे काय?'

राजे दोघांकडे आनंदाने पाहत होते.

'फिरंगोजी, युवराजांनी केलं, तेच बरोबर. नाही तर तुमच्या तोंडून 'शंभूबाळ' हे शब्द उमटले नसते. त्यांना अंगाखांद्यावर खेळवलंत. त्यांनी पाया पडणं हे उचित.'

'आबासाहेब, जरा बाहेर येता?' संभाजीराजांनी विचारले.

राजे दारापर्यंत गेले. दोघांची कुजबूज झाली. राजे माघारी आले. त्यांनी मागून आलेल्या संभाजीराजांना सांगितले,

'फिरंगोजींना सारा गड दाखवा, नव्या इमारती दाखवा. राज्याभिषेकाची सर्व तयारी दाखवून त्यांना विडे-वस्त्र देऊन पाठवा. गडाची व्यवस्था लावून रायगडी लौकर यायला सांगा... फिरंगोजी, आम्ही जातो. जरा महत्त्वाचं काम आहे.'

फिरंगोजींनी मुजरा केला आणि राजे सदरेबाहेर गेले.

राजे संभाजीराजांच्या महालानजीक आले. महालाबाहेर दरूबंकी उभे होते. महालात कुणाला न सोडण्याची आज्ञा करून राजे महालात गेले. महालात आनंदराव उभे होते.

राजे बैठकीवर बसले. राजांच्या गंभीर मुद्रेकडे पाहून आनंदरावांना काही अंदाज येत नव्हता. राजांनी खाशा महालात, एकांतात का भेट घ्यावी, हे त्यांना कळत नव्हतं.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आनंदराव, आम्ही तुम्हांला मुद्दाम बोलावलं.’

‘जी!’

‘बेहलोलचा पराभव करून तुम्ही गडावर आलात; पण हंसाजी मोहिते का आले नाहीत?’

‘चिपळूणच्या छावणीची गडबड ऐकून ते तातडीनं चिपळूणला गेले.’

‘कसली गडबड? आम्हांला सारं ऐकायचं आहे. मोकळेपणानं सांगा.’

आनंदरावांचा घसा कोरडा पडला.

‘महाराज! प्रतापराव आणि सहा सरदार नेसरीच्या युद्धात कामी आले. सेनापतींच्या मृत्यूची बातमी ऐकून छावणीत अस्वस्थता वाढली. चिपळूण-छावणीच्या सरदारांत थोडी चलबिचल झाल्याची वार्ता हंसाजीरावांना कळली. तेव्हा ते म्हणाले, की तुम्ही असेच गडावर जा. मी चिपळूणला जातो. गडावर जाताच राजांना छावणीकडे पाठवून द्या.’

‘मग आम्हांला का निरोप सांगितला नाही?’ राजांनी अस्वस्थ होऊन विचारले.

‘आपण इथं गडबडीत होता आणि हंसाजीराव छावणीवर गेले, म्हणजे काळजीचं कारण नाही, असं वाटलं.’

‘वाटलं?... छान! आनंदराव, इतकी सोपी गोष्ट वाटली?’

त्याच वेळी महालात सेवक आला. राजांची नजर त्याच्याकडे वळली.

‘राणीसरकार महालात वाट पाहत आहेत.’

राजे तुटकपणे म्हणाले, ‘इथलं काम संपताच आम्ही येत आहो, म्हणून सांग, जा.’

सेवक गेला. राजांची नजर आनंदरावांकडे वळली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आनंदराव, फौज म्हणजे अठरा जातींची; हजारो मनांची बांधलेली मोट. बांधणीचा एक दुवा जरी कच्चा झाला, तरी त्या गवताच्या काड्या वाऱ्यावर सुटायला कितीसा वेळ लागणार? बांध फुटला, तर हजार वाटांनी धावणारं पाणी कशानं आवरणार?’

सेवकाने परत प्रवेश केलेला पाहताच राजे संतप्त झाले. बिचारा सेवक गर्भगळीत झाला होता.

‘काय?’

‘तातडीनं बोलावलंय्!’

‘आमचा निरोप सांगितला नाही?’

‘जी!’ खाली मान घालून सेवक म्हणाला.

त्रस्त होऊन राजे उठले. सेवकाच्या मागोमाग राजे चालत होते. राजमहालात जाताच त्यांची नजर उभ्या असलेल्या पुतळाबाईंच्याकडे गेली. सोयराबाई असतील, या कल्पनेने गेलेले राजे पुतळाबाईंना पाहताच चकित झाले; पण मनात दबलेला संताप व्यक्त झाला.

‘राणीसाहेब! दागदागिने, शालू, जरी वस्त्रं यापेक्षा आम्हांला अधिक महत्त्वाची कामं असतात.’

‘हो, पण ती ध्यानी यायला हवीत ना!’ पुतळाबाईंचा संताप उफाळला.

असे बोलणे पुतळाबाईंच्या तोंडून राजांनी कधी ऐकले नव्हते. पुतळाबाईंचा सारा चेहरा फुलला होता. डोळ्यांत पाणी तरळत होते. राजांनी विचारले,

‘काय झालं?’

‘आयुष्यभर तिनं काही मागितलं नाही. जाताना दर्शन घडावं, असं मनात आणलं, तर काय गुन्हा?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कुणाबद्दल बोलता? काशी...’

‘आठवण झाली, हे तिचं नशीब!’

‘आम्हांला कुणीच सांगितलं नाही.’

‘केव्हा सांगणार? वेळ हवा ना? घटकाभर इथं थांबले; पण आपण कामात गुंतलेले. नाइलाजानं निरोप पाठवला.’

राजांना काही सुचेनासे झाले. एकदम ते म्हणाले, ‘तुम्ही आपल्या मेण्यातून मासाहेबांना घेऊन या. आम्ही पुढं चलतो.’

राजे महालाबाहेर येत असताना मोरोपंत सामोरे आले. राजांनी त्यांना सांगितले. मोरोपंत धावले. राजे नगारखान्याजवळ आले, तेव्हा नगारखान्याबाहेर सेवक उभे होते. मोरोपंतांनी विचारले,

‘पालखी?’

‘वेळ होईल. आपण पुढं होऊ. मागून सारं येईल.’

राजे गड उतरत होते. महादरवाजाचे मुजरे झडले. पण राजांचे तिकडे लक्ष नव्हते. राजे आपल्याच तंद्रीत चालत होते. नाणेदरवाजानजीक राजांनी थोडी उसंत घेतली. राजे अस्वस्थपणे घोड्यांची वाट पाहत होते. मेणे पुढे गेले. उलटणारा क्षण मोलाचा वाटत होता. आपल्या थकव्याचा विचार न करता राजे म्हणाले,

‘चला.’

राजे चालू लागले. राजे खिंडीचा चढ चढत असताना अश्वपथकाने राजांना गाठले.

अश्वारूढ राजांनी घोड्याला टाच दिली. अश्वपथक दौडू लागले.

फेसाळलेली घोडी जेव्हा पाचाडच्या दरवाजापाशी थांबली, तेव्हा मेणे वाड्यात प्रवेश

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

करीत होते.

राजे पायउतार होऊन गडबडीने वाड्यात शिरले. जिजाबाईंना आणि पुतळाबाईंना मागे टाकून राजे राणीवशाच्या महालाकडे जात होते.

राजे महालाच्या सोप्यात आले. महालाबाहेर गोळा झालेल्या दासी अदबीने मागे सरल्या. राजांनी काशीबाईंच्या महालाच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवले मात्र, आणि ते तेथेच खिळले.

महालातून उठलेला आकांत त्यांचे सारे अंग बधिर करीत होता.

मागून येणाऱ्या पुतळाबाई राजांना बाजूला सारून आत धावल्या. त्या धक्क्याने राजे भानावर आले. ते तसेच माघारी वळले. थकली पावले वाट चालत होती. सदैव ताठ असलेली मान खाली झुकली होती. कानांवर आक्रोश पडत होता. त्या आवाजाने हातांतली कामे तशीच टाकून धावणारी माणसे राजांना पाहताच थबकत होती. पण राजांना कशाचेच भान नव्हते. महाल गाठणे एवढेच त्यांच्या ध्यानी होते.

राजे महालात आले. सारा महाल मोकळा होता. राजांनी आपला घाम टिपला. सुन्नपणे ते त्या मोकळ्या महालात उभे होते. डोळ्यांसमोर तरळत होती काशी..

‘काशी...! हळदीच्या पावलांनी घरात आली आणि वाड्याच्या चार भिंतींतच हरवली. या मोगलाई रिवाजापायी मासाहेबांनी अनेक जिवांची अकारण गुंतवण केली. सई गेली, तेव्हा अश्रूंनी भरलेली नजर घेऊन काशी काही न बोलता सामोरी उभी होती. प्रतापगडी जाताना दाराशी कोरड्या नजरेनं ती पाहत होती. एकदा पहाटे जाग आली, तेव्हा काशी पायांवर हात ठेवून तशीच झोपी गेलेली होती...

‘काशी काही बोलली का?

‘मनात जखडून ठेवावा, असा एकही शब्द कसा आठवत नाही? काशी जीवनात आली केव्हा आणि गेली केव्हा, हे कधीच कसं जाणवलं नाही? सारं आयुष्य उंबरठ्यातून निरखण्यात गेलं आणि जेव्हा आम्ही उंबरठ्यावर पाऊल ठेवलं, नेमकं त्याच वेळी ते माणूस तसंच निघून गेलं. काही न सांगता! काही न मागता!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांना अश्रू आवरणे कठीण गेले. त्यांच्या अश्रूंना खळ राहिला नाही.

उत्साहाने भारावलेल्या गडावर दुःखाची छाया पसरली. पाचाडच्या माळावर चंदनाची चिता रचली होती. सारा उतार माणसांनी व्यापला होता. सायंकाळचे गार वारे वाहत होते. चितेला अग्नी दिला. कापूरखोबऱ्याने पेट घेतला. चंदनाचा सुगंध दरवळला. ज्वाळा उफाळू लागल्या.

राजे ती पेट घेणारी चिता निश्चल नजरेने पाहत होते. एका सोबतीची अंधूक आठवण नाहीशी होत होती. चितेने पुरा पेट घेतला. ज्वालेखेरीज काही दिसेनासे झाले.

फिरंगोजी पुढे झाले. राजांच्या जवळ येऊन ते म्हणाले,

‘झळ लागते. जरा मागं सरावं...’

क्षणभर राजांची भरली नजर फिरंगोजींवर खिळली. उभ्या जागी कंठ दाटला. राजे बोलून गेले,

‘आता ही झळ आमच्या आयुष्याला पुरली! मागे सरून ती कमी व्हायची नाही.’

□

५

राजे रायगडच्या आपल्या महालात बसले होते. काशीबाईंचे दिवस झाले होते. हळूहळू सर्व कारभार पूर्ववत सुरू झाला होता. पण राजांच्या मनावर जो आघात झाला होता, तो राजे विसरू शकत नव्हते.

पावलांच्या आवाजाने राजांची नजर उंचावली. महालात पुतळाबाई प्रवेश करीत होत्या. पुतळाबाई नजीक आल्या, तरी राजे काही बोलले नाहीत. पुतळाबाई गोऱ्यामोऱ्या झाल्या. न कळत त्यांच्या मुखातून हुंदका उमटला. राजे चपापले. गडबडीने उठत ते पुतळाबाईंच्या नजीक गेले. त्यांच्या खांद्यावर हात ठेवीत राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पुतळा, काय झालं?’

नाक ओढीत पुतळाबाई म्हणाल्या,

‘मी चुकले. पण त्याबद्दल क्षमा होणार नाही का?’

‘काय चूक घडली? कसली क्षमा?’

‘काशी आजारी होती. आपल्याला बोलवायला आले. आपण कामात होता. इकडे माझा जीव तिच्यासाठी तडफडत होता. आपण संतापलात. मलाही भान राहिलं नाही. त्या भरात उलट बोलले.’

राजांच्या ध्यानी सर्व प्रकार आला. पुतळाबाईंना जवळ घेत राजे म्हणाले,

‘पुतळा! आमच्या मनात काही नव्हतं.’

‘मग असं का वागता?’

राजे खिन्नपणे हसले. पुतळाबाईंची हनुवटी उंचावीत त्यांच्या नजरेला नजर भिडवीत राजे म्हणाले,

‘पुतळा! काशी गेली. पण तिनं खूप शिकवलं. आम्ही राजे केवढे जरी श्रेष्ठ असलो, तरी पती म्हणून आम्ही कमी पडलो, याचं दुःख आम्हांला फार आहे. तू आम्हांला सावरायची खटपट केलीस. पण ते दैवी नव्हतं. जाताना बिचारीनं मनात काय आणलं असेल, कोण जाणे!’

‘तसं नाही हं!’ पुतळाबाई डोळे टिपीत म्हणाल्या, ‘मी होते ना शेजारी. तिला शेवट दिसत होता. सारं तिला कळत होतं. तिनं सारं बोलून दाखविलं.’

‘काय म्हणाली ती?’

‘ती म्हणाली, ‘नशीब थोर, म्हणून मी हे सारं पाहायला जगले. राज्याभिषेक पाहता

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आला असता, तर फार बरं झालं असतं! नवरा आणि मूल मोठं झालेलं पाहिलं, की सारं मिळवलं. दोन्ही पाहायला मिळालं मला.'

'मी हसले. तशी माझा हात दाबीत काशी म्हणाली, 'खोटं वाटतं? स्वारींचं मोठेपण मी कशाला सांगायला हवं? आणि स्वारींनी निर्माण केलेलं राज्य हे माझं मूलच नाही का? दोन्ही केवढी मोठी झाली! एकच वाटतं, बघ...'

' 'काय?' मी विचारलं.'

पुतळाबाईंच्या नेत्रांत अश्रू गोळा झाले. शब्द फुटेनासा झाला. राजे म्हणाले,

'सांग, पुतळा. काय म्हणाली ती?'

पुतळाबाईंनी आवंढा गिळला. श्वास घेऊन त्या म्हणाल्या,

'ती म्हणाली, 'जाताना एकदा दर्शन घडावंसं वाटतं.' मी म्हणाले, 'आत्ता घेऊन येते.' तर ती म्हणाली, 'नको. त्यांच्या मागं पुष्कळ कामं... सवड असली, तर बघ.' '

राजांच्या डोळ्यांतून अश्रू निखळले. आपले अश्रू पुशीत ते म्हणाले,

'पुतळा, दु:ख वाटतं, ते याचंच. आम्ही राज्यं उभं केलं. प्रजा आम्हांला देव मानते. संत आम्हांला आशीर्वाद देतात. पण आमच्या जिवाशी जखडलेला तो जीव... आम्हांला पाहत प्राण सोडावा, ही त्याची साधी इच्छा. पण ती सुद्धा पुरी करू शकलो नाही! बिचारा अश्राप जीव तसाच निघून गेला. केवढ्या यातना त्या जीवानं भोगल्या असतील! अनेकांचे मनोरथ सिद्धीला नेणारे आम्ही खुद्द आमच्या घरात अपयशी ठरलो.'

'त्यात आपला काय दोष?'

'दोष कुणाचाच नाही. असलाच, तर आम्हांला एकत्र जखडणाऱ्या दैवाचा. पुतळा, साऱ्या आयुष्यात आम्ही एकच शिकलो- हे सारं जीवन परावलंबी आहे. करतो, म्हणून काही साधत नाही. सोसणं, आणि तेही एकट्यानं, एवढा एकच अर्थ या जीवनाला आहे. आलेली सुखदु:खं माणूस किती चांगल्या तऱ्हेनं सोसतो, यावरच त्याचं कर्तेपण अवलंबून

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहे.’

पुतळाबाईंनी तो विषय एकदम बदलला. त्यांनी विचारले,

‘मी इकडे येताना मनोऱ्याकडून आले. तेव्हा होळीचौकात खूप गर्दी दिसत होती.’

‘सारे आले, वाटतं?’ राजे म्हणाले, ‘पुतळा, आज आम्ही चिपळूणला निघालो.’

‘केव्हा येणार?’

‘बहुतेक लौकर येऊ. तोवर मासाहेबांच्यावर लक्ष ठेवा. त्या भारी दगदग करून घेतात. त्यांना जपा.’

दोन प्रहरी जिजाबाईंचे आशीर्वाद घेऊन राजे रायगड उतरले. नौबतीचा गंभीर नाद गडावर उठला. पाचाडला गोळा झालेले राजांचे दळ राजांच्या इशारतीबरोबर उधळले.

राजे चिपळूणच्या रोखाने दौडत होते.

□

६

उन्हाळ्याचे दिवस असूनही भर उन्हात चिपळूणची छावणी राबत होती. खुद्द राजे येणार, या वार्तेने साऱ्या छावणीत एकच आनंद, उत्साह संचारला होता. प्रत्येक बारगीर आपले घोडे सजविण्यात मग्न होता. दळवटणे झाडून लोटून लख्ख केले होते. राजांच्या स्वागतासाठी हंसाजी मोहित्यांनी एक शाही डेरा दळवट्यावर उभारलेला होता. पायदळाने, अश्वदळाने आपली कडपे स्वच्छ केली होती. प्रत्येकाने आपले हत्यार तळपते ठेविले होते. राजे केव्हा येतील, याचा नेम नव्हता.

हंसाजी मोहित्यांनी छावणीचे सारे अधिकारी बोलावून घेऊन त्यांना सर्व सूचना दिल्या होत्या. राजांच्या छावणीचे पूर्ण ऐश्वर्य त्यांच्या नजरेला यावे, यासाठी सर्व परिश्रम घेतले जात होते. राजांच्या आगमनाकडे साऱ्यांचे लक्ष लागले होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

-आणि दोन प्रहर टळत असता एक स्वार छावणीत प्रवेश करता झाला. हंसाजींच्या तंबूनजीक तो पायउतार झाला. आजूबाजूचे बारगीर धावले. त्या स्वाराच्या चेहऱ्यावर हास्य होते. प्रत्येकजण विचारीत होता,

‘महाराज आले?’

मानेने होकार देत तो तंबूकडे चालत होता. साऱ्या छावणीत ती बातमी पसरली. हंसाजी मोहिते आपल्या अश्वपथकासह राजांना सामोरे जाण्यासाठी छावणीतून बाहेर पडले.

सायंकाळच्या वेळी राजे येत असल्याची वार्ता बिनीच्या स्वारांनी आणली. एकच धावपळ उडाली. काही क्षणांत साऱ्या छावणीवर शांतता पसरली. नौबतीचा नाद दुमदुमला. तुताऱ्यांचा आवाज आकाशाला भिडला आणि आपले अश्वपथक राजांच्या नजरेत आले. मंदगतीने घोडी येत होती. राजांच्या उजव्या बाजूला हंसाजी होते. राजांची नजर सर्वत्र फिरत होती. मुजऱ्यासाठी सर्वांच्या माना लवल्या होत्या.

राजे शामियान्यानजीक पायउतार झाले. हंसाजींनी घोड्याची ओठाळी पकडली होती. राजांच्यासह हंसाजी डेऱ्यात प्रवेशले. छावणीचे सर्व लहान-थोर अधिकारी उभे होते. त्यांत नाईक, हवालदार, जुमलेदार, हजारी सरदार होते.

राजे बैठकीवर विराजमान झाले. ते हंसाजींना म्हणाले,

‘हंसाजी! तुमचा पराक्रम आम्हांला कळला. आम्हांला आनंद वाटला.’

‘यातच सारं मिळालं.’ हंसाजी बोलून गेले.

राजांनी त्या रात्री विश्रांती घेतली. नंतरच्या दोन दिवसांत ते छावणीमागून फिरत होते. त्यांच्या बरोबर हंसाजी मोहिते, छावणीचे अधिकारी असत. राजांना छावणी पाहून समाधान वाटले.

तिसऱ्या दिवशी राजांनी घोडदळाची पाहणी केली. एका तळावर तीन हजारांवर घोडी उभी होती. रहवाल, इराखी, अरब्बी, कच्छी, टाकण, तुर्की अशी अनेक देशांची जातिवंत जनावरे एकत्र पाहून राजांना अभिमान वाटला. प्रत्येक स्वार हाताशी घोडे धरून उभा होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

स्वारांच्या पायांत तंग तुमानी, अंगात रूदार अंगरखे, कमरेला शेले आणि डोक्याला पागोटी होती. प्रत्येकाच्या कमरेला दुशेल्यात अडकवलेली तलवार व पाठीला ढाल शोभत होती. अश्वारूढ झालेले राजे प्रत्येकाचा मुजरा स्वीकारीत होते. जनावर निरखीत पुढे जात होते. ऊन वाढत होते. पण राजांना उन्हाचे भान नव्हते. अचानक राजांनी आपल्या घोड्याचा कायदा ओढला. मुजऱ्यासाठी झुकलेल्या तरुण स्वाराने मान वर केली. राजांची नजर त्याच्यावर खिळली होती. राजे त्याच्याकडे बोट दाखवीत पुटपुटले,

‘हं! याचं नाव...’

हंसाजी पुढे झाले. पण ते बोलणार, तोच राजांनी त्यांना इशारत केली; आणि एकदम हंसाजींकडे वळून म्हणाले,

‘हा रामजी पांगेऱ्याचा भाऊ ना?’

हंसाजी स्मितवदनाने म्हणाले, ‘जी! महाराज, आपली आठवण अचूक आहे.’

‘नाही, हंसाजी! फार ढोबळ आहे.’ राजे अभिमानाने पांगेऱ्याकडे पाहत बोलले.

‘हंसाजी, रामजींचा पराक्रम कोण विसरेल? दिलेरखानाशी ज्या तडफेनं युद्ध करीत त्यांनी रणांगणी देह ठेवला, त्याला तोड नाही. ती आठवण आम्ही कशी विसरू?...’

‘हाही तसाच पराक्रमी आहे, महाराज! बेहलोलयुद्धात आघाडीच्या वीरांत हाही होता.’

‘मग अजून हा बारगिरांत का ठेवलात?... पांगेरे, आजपासून तुम्ही आमचे शिलेदार झालात.’

आनंदित पांगेऱ्याने राजांना मुजरा केला. राजे पुढे सरकले.

घोडदळाची पाहणी करून राजे डेऱ्यात विश्रांती घेत होते. शेजारी हंसाजी उभे होते. राजे हंसाजींना म्हणाले,

‘हंसाजी, आम्ही इकडे येताना कोण काळजी होती! पण छावणी पाहून आम्ही निर्धास्त

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झालो. काय गडबड झाली होती?'

'तसं काही नव्हतं. हेरांचे अंदाज चुकले. सेनापती गेल्यामुळं थोडी कुजबूज होणं स्वाभाविक होतं.'

'बरी आठवण केलीत! हंसाजी, आता आमचा राज्याभिषेक होणार. राज्याची जबाबदारी वाढते आहे. दळही वाढत आहे. तेव्हा सरनौबतांची रिकामी पडलेली जागा सत्वर भरायला हवी. ती जागा मोकळी राहून चालणार नाही.'

'जी! मी पण तेच सुचविणार होतो.'

'तुमच्या पुढं कोण दिसतं?'

'तसा माणूस शोधणं कठीण! पण आनंदरावांच्या सारखा धाडसी, विश्वासू माणूस मिळणं कठीण.'

'आनंदराव का? तुम्ही नाही?'

'नाही, महाराज. सरनौबताची जबाबदारी मोठी. नुसतं दळाचं प्रेम बाळगून चालत नाही. मुलुखाचा माहितगार, लढाईचा नूर जाणणारा आणि प्रसंगी माघार घेण्यातही निष्णात असलेला हरहुन्नरी माणूस त्या जागी हवा.'

'आणि आम्ही आपलीच निवड केली, तर...?'

'आपली आज्ञा डावलणं होणार नाही. पण आहे त्या ठिकाणी मला समाधान आहे.'

'बघू.' राजे म्हणाले.

राजांनी दोन दिवसांत पायदळाची पाहणी केली. राजांच्या आगमनामुळे दररोज निरनिराळ्या शिकारी तळावर येत होत्या. राजांना काही कमतरता भासू नये, म्हणून सर्व खटपट करीत होते. राजांना विश्रांतीचे दिवस लाभल्यासारखे वाटत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एके दिवशी दळाचे सारे प्रमुख राजांच्या भेटीसाठी आले. बराच वेळ झाला, तरी त्यांच्या आगमनाचा हेतू राजांच्या ध्यानी येईना. शेवटी राजे हंसाजींना म्हणाले,

'हंसाजी, या मंडळींच्या मनातला हेतू सांगून टाका ना!'

'महाराज, ही सारी मंडळी माझ्या मागे लागलीत... आपला राज्याभिषेक होणार, तो पाहायला साऱ्यांना गडावर येण्याची आज्ञा व्हावी, असं सर्वांना वाटतं.'

त्या अनपेक्षित उत्तराने राजे चपापले. त्यामागच्या प्रेमाने त्यांना भरते आले.

'तुम्हांला हे वाटणं स्वाभाविक आहे; पण राज्याभिषेकाला सर्वांनीच यायचं ठरवलं, तर आम्ही नको म्हणणार कुणाला? सारे गडकरी, सारे स्वार गडावर गोळा झाले, तर सारं राज्य असुरक्षित राहील. उलट, आमच्या राज्याभिषेकाच्या वेळी मोगल आणि आदिलशाही काही तरी विघ्न आणतील, की काय, अशी भीती आम्हांला वाटते. त्यासाठी आम्ही छावणी पाहायला आलो. तुम्ही जागरूकतेनं राहिलात, तर आमचा राज्याभिषेक निर्विघ्नपणे पार पडेल. ती जबाबदारी उलट तुम्ही उचलायला हवी.'

क्षणभर शांतता पसरली. राजे सर्वांच्याकडे पाहत होते. नियकर पुढे झाले. मुजरा करून म्हणाले,

'महाराजांनी बेघोर राहावं.'

राजांनी नियकरांना जवळ केले. त्यांच्या खांद्यावर हात ठेवून ते म्हणाले,

'आमची हीच अपेक्षा होती. आम्ही तुमच्या जिवावर निश्चिंत आहो. जमेल तेवढे लोक आम्ही गडावर बोलावून घेऊ. आम्ही आता लौकर परतावं, असं म्हणतो.'

'थोडा मुक्काम वाढला, तर पाहावं, असा अर्ज आहे.' हंसाजी म्हणाले.

'कारण?'

'आपण राज्याभिषेकाला जाणार. जाताना यश घेऊन जावं.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मतलब?’

‘गड हेरून ठेवला आहे. आज्ञा होईल, तर तो आपल्यांत सामील करूनच महाराजांनी जावं, असं सर्वांना वाटतं.’

‘कोणता गड?’

‘केळंजा. हेरांनी गड निरखला आहे. अपयश येणार नाही.’

‘हंसाजी, तुम्ही असता अपयश कसं शक्य आहे? या देण्यापरतं थोर देणं आम्ही पाहिलं नाही. पण हा पराक्रम पाहायला आम्ही जातीनिशी येणार.’

मोहिमेचा तपशील ठरला; आणि राजे दळासह केळंज्याकडे निघाले.

राजे पाठीशी असल्याने साऱ्या फौजेत एकच आत्मविश्वास नांदत होता. राजांच्या फौजेने केळंज्याला वेढा दिला. मोठ्या तडफेने हंसाजींनी आपल्या फौजेसह गडावर सुलतानढवा केला. तरफेची लढाई झाली. किल्लेदार गंगाजी तीत मारला गेला; आणि केळंज्यावर भगवे निशाण चढले. गडाची व्यवस्था लावून, राजे माघारी चिपळूणच्या दळवटण्यास आले.

मोहिमेत भाग घेतलेल्या फौजेची राजे पाहणी करीत होते. काहींना किरकोळ जखमा झाल्या होत्या; पण प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विजयाचा आनंद ओसंडत होता. अचानक राजांचे पाऊल थांबले. राजांच्या समोर एक उमदा तरुण उभा होता. त्याची उंचीपुरी अंगलट नजरेत भरत होती. पण त्याहीपेक्षा त्याच्या जखमेने राजांचे लक्ष खिळून राहिले. कपाळापासून हनुवटीपर्यंत उतरलेला वार दिसत होता. जखमेवर गोठलेल्या रक्ताचा वण दिसत होता. पण त्या वीराच्या चेहऱ्यावर हास्य होते. राजासमोर बोडके जाऊ नये, म्हणून डोक्यावर मराठेशाही पागोटे त्याने घातले होते. राजांनी विचारले,

‘याचं नाव?’

‘मल्हारी तांडेल. चिपळूणचाच आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'हुद्दा?'

'पायदळात दाहिजा आहे. केळंज्याच्या सुलतानढव्यात हा होता. भारी शौर्यानं लढला.'

'ते सांगण्याची गरज नाही. पण अशा जखमींना त्रास कशाला दिलात?'

'त्याला छावणीत ठेवलं होतं; पण आपल्या दर्शनाच्या ओढीनं आपणहून हट्टानं आला.'

'खरं?' म्हणत राजे त्या वीरानजीक गेले. डोक्याच्या पागोट्याने त्रास होत असेल, म्हणून राजांनी आपल्या हातांनी पागोटे हळुवारपणे उचलले. जखम न्याहाळीत राजे म्हणाले,

'असा वार करणारा वीर धन्य! आणि त्याच तडफेनं तो वार झेलून उभा राहणारा शतधन्य!'

मुजरा करून मल्हारी म्हणाला, 'महाराज, वार करणारा उभा राहिला नाही.'

'शाब्बास, मल्हारी!' राजे त्याच्या पाठीवर हात ठेवीत म्हणाले, 'हंसाजी, हा वीर दाहिजा नाही; हजारांत एक आहे. आजपासून याला हजारी करा. पालखी मागवा. हा पालखीतून छावणीत विश्रांतीला जाईल. आजपासून याला पालखीचा मान.'

मल्हारी त्या बोलण्याने विरघळला. त्याने राजांचे पाय शिवले. मागविलेल्या पालखीतून मल्हारी छावणीवर गेला.

रात्री राजे हंसाजीरावांच्या बरोबर बोलत असता राजांनी विचारले,

'हंसाजी, छावणीची तजवीज पुरेशी आहे ना?'

'पावसाळी छावणी हलवावी लागेल, असं वाटतं.'

'कारण?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘वैरण, दाणापाणी कमी आहे.’

‘पण का?’

‘स्पष्ट बोलतो, क्षमा असावी. एवढी मोठी छावणी, पण जुमलेदार, कारकून द्यावं तसं लक्ष देत नाहीत. खानगीबाबत आम्हांला काही बोलता येत नाही.’

‘हंसाजी, तुम्ही चिंता करू नका. आम्ही गडावर जाताच याची चौकशी करू. आता गडावर जायला हवं.’

‘आणखीन एक अर्ज आहे.’

‘बोला.’

‘साऱ्या छावणीची सतका करण्याची इच्छा आहे. राज्याभिषेकाला आपण निघालात. तेव्हा हे वाटणं उचितच आहे.’

‘जगदंबेची इच्छा!’

दुसऱ्या दिवशी राजांनी सर्व जुमलेदार, हवालदार, कारकून यांना बोलावून घेतले. छावणीच्या काटकसरीचा जाब विचारला. जुमलेदार पुढे होऊन सांगते झाले,

‘अचानक छावणी वाढली. अंदाज चुकला. त्यामुळं हा निर्णय करावा लागला.’

‘गडावर ही हकीकत गेली?’

‘जी! त्या आज्ञेनंच हा निर्णय केला.’

‘ठीक आहे. आम्ही पाहू.’

राजे हंसाजींसह डेऱ्याबाहेर आले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

छावणीच्या पूर्वेला एक सुंदर शामियाना उभारला होता. राजांच्यासाठी मांडलेल्या उच्चासनावर राजे विराजमान झाले. राजांच्या आज्ञेने राजांच्या उजव्या हाताला मोहोरांची ताटे ठेवलेली होती. सतक्याला सुरुवात झाली. मानाप्रमाणे एक-एक सामोरा येत होता. कुवतीप्रमाणे राजांच्यावरून सतका करीत होता. राजे प्रत्येकाच्या हातात एक होन ठेवीत होते.

सायंकाळी सतका संपला.

राजांनी हंसाजींना सामोरे बोलाविले.

'हंसाजी, आम्ही तुमची छावणी पाहिली. फौजेचं तुमच्यावरचं प्रेम पाहिलं. तुमचं शौर्य आम्हांस माहीत होतं. पण केळंज्याची मोहीम प्रत्यक्ष पाहता आली. आम्ही तुमच्यावर प्रसन्न आहो. प्रतापरावांची मोकळी जागा आज आम्ही तुम्हांस देत आहो. तुम्ही आमचे सरनौबत आहा. 'हंबीरराव' ही किताबत आम्ही तुम्हांला बहाल करीत आहो.'

राजांनी सेनापतीची वस्त्रे, तलवार, शिरपेच हंसाजींना बहाल केला. हंसाजी मोहिते 'हंबीरराव मोहिते सरनौबत' बनले.

निर्धास्त मनाने राजांनी छावणी सोडली.

राजे गडावर येताच राजांनी अनाजी, मोरोपंत, निराजीपंत यांना बोलावून घेतले. राजे अनाजींना म्हणाले,

'अनाजी, आम्ही चिपळूणची छावणी पाहून आलो. एवढ्या इमाने-इतबारे राज्य राखणारे जीव; पण आजच छावणीचा दाणागोटा कमी भासतो आहे. पावसाळ्यात छावणी कशी टिकवावी, याची चिंता सर्वांना पडली आहे.'

'छावणीचा दरसालाप्रमाणे खर्च मंजूर झाला आहे.' अनाजी सांगते झाले. 'पण अचानक तळ वाढल्यानं जरा तूट आली आहे, हे खरं!'

'मग?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'जरा काटकसरीनं घेतलं, तर सर्व होऊन जाईल.'

'काय होऊन जाईल, अनाजी?' राजे संतप्त झाले, की कैक वेळा असे शांतपणे बोलत असत. तो किंचित घोगरा आवाज ऐकताच अनाजी चपापले.

'अनाजी, तुम्ही मंडळी जाणती. तुम्ही असं म्हणता! समजून घ्यायचं, म्हणजे तळानं अर्धपोटी राहायचं, जनावरांनी अंग सोडायचं. कशासाठी?'

'तसं नाही. पण आजूबाजूच्या मुलुखातून...'

'अनाजी, काय सांगता? त्याचा परिणाम माहीत आहे? आमची प्रजा आम्हीच लुटल्यासारखं होईल. आमच्यापेक्षा मोगलाई परवडली, असं आमचे लोक म्हणतील. छावणीनं सोडून गावास उपद्रव देऊ नये, म्हणून आमची सक्त ताकीद असते, ती याचसाठी. खर्चाचा विचार न करता तातडीनं छावणीला मदत पाठवा. पावसाळी दिवस यायच्या आत छावणी निर्धास्त करा.'

'जी, आजच पत्र लिहितो.'

'पत्र आम्ही लिहू. पुरेपूर रक्कम पाठविण्याची व्यवस्था आजच्या आज करा.'

राजांनी बाळाजींना बोलावणे पाठविले. बाळाजी लेखनसाहित्य घेऊन आले. अनाजी, हिराजी, मोरोपंत महालात होते. अस्वस्थपणे फेऱ्या मारीत राजे बाळाजींना मजकूर सांगत असलेले ते पाहत होते. प्रत्येक शब्द मनात शिरत होता. राजे सांगत होते :

> 'मशरूल अनाम जुमलेदारांनी व हवालदारांनी व कारकुनांनीं दिमत पायगो मुक्काम मौजे दलवटणें ताा चिपळूण मामले दाभोळ प्रति राजश्री शिवाजी राजे. सुाा अबी सबैन व अलफ. कसबे चिपळूणीं साहेबी लष्कराचीं विले केलीं आणि याउपरी घाटावरी कटक जावें ऐसा मान नाहीं. म्हणून एव्हां छावणीस रवाना केलें. ऐसियास चिपळूणीं कटकाचा मुक्काम होता. याकरितां दाभोळच्या सुबेयांत पावसाळ्याकारणें पागेस सामा व दाणा व वरकड केला होता तो कितेक खर्च होऊन गेला व चिपळूणा आसपास विलातीत लष्कराची तसवीस व गवताची व वरकड हरएक बाब लागली. त्याकरिता हाल कांहीं उरला नाही. ऐसें असतां वैशाखाचे दिवस, उनाळा, हेही पागेस अधिक. बैठी पडली. परंतु जरूर जालें. त्याकरितां कारकुनांकडून व गडोगडीं गल्ला असेल तो देववून जैसी तैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास तुम्हीं मनास माने ऐसा दाणा, रातीब, गवत मागाल, असेल तोवरी धुंदी करून चाराल, नाहीसें जालें

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

म्हणजे मग कांहीं पडत्या पावसांत मिळणार नाहीं. उपास पडतील. घोडीं मरायास लागतील. म्हणजे घोडीं तुम्हींच मारिलीं ऐसें होईल, व विलातीस तसवीस देऊं लागाल. ऐशास, लोक जातील. कोण्ही कुणब्याचेंथील दाणे आणील. कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटे, कोण्ही भाजी, कोण्ही पाले. ऐसें करूं लागलेत म्हणजे जीं कुणबी घर धरून जीव मात्र घेऊन राहिले आहेत, तेही जाऊं लागतील. कित्येक उपाशी मराया लागतील. म्हणजे त्याला ऐसें होईल की, मोगल मुलकांत आले, त्याहूनही अधिक तुम्हीं, ऐसा तळतळाट होईल! तेव्हां रयतीची व घोडियांची सारी बदनामी तुम्हांवरी येईल. हें तुम्हीं बरें जाणून, सिपाही हो अगर पावखलक हो, बहुत यादी धरून वर्तणूक करणें. कोण्ही पागेस अगर मुलकांत गांवोगांव राहिले असाल, त्यांणी रयतेस काडीचा अजार द्यायची गरज नाहीं. आपल्या राहिला जगाहून बाहीर पाया घालाया गरज नाहीं. साहेबी खजानांतून वाटणिया पदरीं घातलिया आहेती. ज्याला जें पाहिजे, दाणा हो अगर गुरेंढोरें वागवीत असाल त्यास गवत हो, अगर फाटे, भाजीपाले व वरकड विकावया येईल, तें रास घ्यावें. बाजारांत जावें, रास विकत आणावें. कोण्हावरी जुलूम अगर ज्याजती अगर कोण्हासी कलागती करावयाची गरज नाहीं व पागेस सामा केला आहे, तो पावसाळा पुरला पाहिजे. ऐसें तजवीजीनें दाणा रातीब कारकून देत जातील. तेणेंप्रमाणेंच घेत जाणें. कीं, उपास न पडतां रोजबरोज खायाला सापडे आणि होत होत घोडी तवाना होत ऐसें करणें. नसतीच कारकुनासी धरपस कराया, अगर अमकेंच द्या, तमकेंच द्या, ऐसें म्हणाया, धुंदी करून खासदार कोठींत, कोठारांत शिरून लुटाया गरज नाहीं व हालीं उन्हाळ्यात आहे तइसें खलक पागेचें आहेत. खण धरून राहिले असतील व राहतील. कोणी अगट्या करितील. कोण्ही भलतेच जागा चुली, रंधनाळा करतील. कोण्ही तंबाखूला आगी घेतील, गवत पडिलें आहे ऐसें अगर वारें लागिलें आहे ऐसें मनास न आणितां म्हणजे अविस्नाच एखादा दगा होईल. एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळोन जातील. गवताच्या लव्हाळ्या आहेत तितक्या एकेएक जाळों जातील. तेव्हां मग कांही कुणबीयांच्या गर्दना मारल्या अगर कारकुनास ताकीद करावी तैसी केली,
तऱ्ही कांहीं खण कराया एक लाकूड मिळणार नाहीं, एक खण होणार नाहीं. हें तो अवघियाला कळतें. या कारणें बरी ताकीद करून खासे खासे असाल, ते हमेशा फिरत जाऊन रंधनें करितां, आगट्या जाळितां, अगर रात्रीस दिवा घरांत असेल, अविस्नाच उंदीर वात नेईल, ते गोष्टी न हो. आगीचा दगा न हो. खण, गवत, वाचेल तें करणें. म्हणजे पावसाळा घोडीं वांचली नाहीं तर मग घोडीं बांधावीं न लगेत, खायास घालावें न लगे, पागाच बुडाली! तुम्हीं निसूर जालेत! ऐसें होईल. या कारणें तपशिलें तुम्हांस लिहिलें असे. जितके खासे खासे जुमलेदार, हवालदार कारकून आहां, तितके हा रोखा तपशिलें ऐकणें. आण हुशार राहणें. वरचेवरी रोज खबर घेऊन, ताकीद करून येणेंप्रमाणें वर्तणूक करतां ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल, त्यास मराठियाची तो इज्जत वाचणार नाही, मग रोजगार कैसा? खळक समजों. जास्ती केल्या वेगळ सोडणार नाहीं, हें बरें म्हणून वर्तणूक करणें...

राजांनी पत्र संपविले. बाळाजींनी ते परत वाचून दाखविले. राजांनी पत्रास मान्यता दिली. राजांची नजर मोरोपंतांच्याकडे गेली. मोरोपंतांच्या चेहऱ्यावर स्मित होते. ते आवरणे त्यांना कठीण जात होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मोरोपंत, हसलात का?’

‘क्षमा, महाराज! आपण राजे. ऐश्वर्यसंपन्न जीवनाचा आपला परिचय. आमच्या-देखील ध्यानी येणार नाहीत, असे बारकावे आपल्या नजरेत कसे भरले, याचा अचंबा वाटतो.’

‘कसले बारकावे?’ राजांनी विचारले.

‘फौजेने गवतकाडी विकत घ्यावी. तीही राशींनी. अवचित उंदीर वात पळवून नेई, आणि तो गंजीकडे धावेल. गंजी आगीच्या भक्ष्यस्थानी पडेल. जनावरांची चंदी नाहीशी होईल…’

राजे हसले; म्हणाले,

‘मोरोपंत, यात अवघड ते काय? बालपणात आम्ही पुण्यात आलो, तेव्हा नावाचे जहागिरदार होतो. दादोजींच्या बरोबर आम्ही गावं वसताना पाहिली. मासाहेबांच्या बरोबर वाड्याच्या कट्ट्यावर सुटणारे खटले ऐकत आम्ही लहानाचे मोठे झालो. आमच्यामध्ये आणि मावळ्यांत तसं अंतर नव्हतं. नाही तर तानाजी, बाजी, जिवा, शिवा यांसारखे सौंगडी आम्हांला लाभलेच नसते. दादोजींच्या बरोबर आम्ही पुष्कळ शिकलो. दारिद्र्यसुद्धा उपभोगायला मिळालं.’

‘दारिद्र्य?’ अनाजी उद्गारले.

‘त्यात आश्चर्य कसलं? या निराजीपंतांना विचारा ना! आग्र्याहून आम्ही बैराग्याच्या वेषात निघालो. संशय येऊ नये, म्हणून रांधायचं नाही; भिक्षा मागत रस्तोरस्ती फिरायचं. कुणी वाढायचं; कुणी पुढचा रस्ता दाखवायचं. त्या वेळी मानवतेचं जे विराट रूप पाहायला मिळालं, त्यात आम्ही सारं शिकलो. त्या अनुभवानं आम्ही शहाणे झालो… बाळाजी, हे पत्र सत्वर पाठविण्याची व्यवस्था करा… अनाजी, आमच्या हुकुमात कुचराई होऊ देऊ नका.’

अनाजी आणि निराजीपंत बाळाजींसह महालाबाहेर पडले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या एका नव्या रूपाची त्यांना ओळख घडली होती.

□

७

चिपळूणच्या छावणीची पाहणी करून राजे रायगडावर आल्याचे समजताच गागाभट्ट राजांना भेटावयास आले. गागाभट्टांनी सांगितले,

‘राजे, राज्याभिषेकप्रयोगाची पोथी तयार झाली आहे.’

‘आपल्याला फार कष्ट झाले.’

‘मुळीच नाही, राजे. राज्याभिषेकाची सर्व तयारी जवळ जवळ पुरी होत आली आहे. आपल्या माणसांचं कौतुक करावं तेवढं थोडं आहे. जे सांगावं, ते तत्काळ पुरं करण्याची पराकाष्ठा दिसून येते.’

‘काही अडचण...?’

‘काही नाही, राजे. निमंत्रित ब्राह्मणांची उतरण्याची सर्व सिद्धता मोरोपंतांनी केलेली आहे. धार्मिक विधींच्यासाठी लागणाऱ्या सर्व साहित्यासाठी स्वतंत्र कोठी आहे. या कामी मदत करण्यासाठी अनंतभट्ट आहेत, तसेच आपले खास कुलगुरू बाळंभट्टही आहेत.’

मोरोपंत महालात आले.

‘मोरोपंत, कोणतं काम आणलंत?’

‘महाराज, लक्ष्मीगृहात सिंहासन तयार झालं आहे. एकदा आपली नजर त्यावर पडावी, असं सर्वांना वाटतं.’

‘आम्ही जरूर येतो... देव, आपणही चलावं.’ राजे थांबले. ते गागाभट्टांना म्हणाले, ‘थोडं थांबावं. आम्ही मासाहेबांना घेऊन येतो... मोरोपंत, तुम्ही देवांच्यासह पुढं व्हा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे जिजाबाईंच्या महाली गेले; पण तेथे जिजाबाई वस्त्रगृहात असल्याचे कळताच त्यांची पावले तिकडे वळली. राजे वस्त्रगृहात पोहोचले. वस्त्रगृहात जिजाबाई सर्व राण्यांसह वावरत होत्या. येसूबाईही तेथे हजर होत्या. राजांना आत आलेले पाहताच येसूबाईंनी पुढे होऊन नमस्कार केला. येसूबाईंना जवळ घेत राजे म्हणाले,

‘येसू, अलीकडे तू आबासाहेबांच्यावर रुसलीस, वाटतं?’

‘जी, नाही.’

‘आणि आमचे युवराज कोठे आहेत?’

जिजाबाई म्हणाल्या, ‘तो शिकारीला गेला आहे. या धामधुमीत जरा कंटाळला होता. मीच पाठवला. तुम्ही चिपळूणला गेला होता.’

राजे काही बोलले नाहीत. त्यांची नजर वस्त्रगृहात फिरत होती. सर्वत्र रंगीबेरंगी, जरी, नानाविध तऱ्हेची वस्त्रे मांडली होती. ती निरखून राजे उद्गारले,

‘मासाहेब, इथं तर पेठ अवतरलेली दिसते!’

जिजाबाई हसल्या; म्हणाल्या,

‘राजे, साऱ्यांचे कपडे झाले; दागदागिने घडविले. पण खुद्द स्वतःच्या कपड्यांचा विचार केलात का? राज्याभिषेक तुमचा; आमचा नव्हे.’

‘खरंच की! आमच्या ध्यानी आलंच नाही!’

‘कसं येणार, बाबा? सारं बघायला जमतं, पण घर बघायला जमत नाही.’

‘तुम्ही असता आम्ही कशाला बघावं?’

जिजाबाईंची थरथरती मान उंचावली; आवाज किंचित कापरा बनला. त्या म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मी का आयुष्याला पुरले? आता बघायला शिकायला हवं. आलात, तसे तुमचे कपडे बघूनच जा.’

जिजाबाईंची नजर स्थिर झाली, तिकडे राजांची नजर गेली. राजे तिकडे वळले. एका मोठ्या उंचावलेल्या गालिच्यावर वस्त्रे मांडली होती. पाच-सहा जिरेटोप ठेवले होते. काही पांढरे, काही केशरी होते. प्रत्येकावर जरी कुसर होती. मोत्याचा तुरा प्रत्येकावर डुलत होता. बैठकीवर अनेक अंगरखे, तुमानी, धोतरे, जरी वस्त्रे मांडली होती.

‘मासाहेब, हे सारे कपडे आमचे?’

‘शिवबा, अरे, अनेक होम, शास्त्रविधी, अनेक स्नानं होणार. किमान एवढे कपडे तरी लागणारच...’

मोरोपंत आत येत म्हणाले,

‘आचार्य गागाभट्ट वाट पाहत आहेत...’

‘आम्ही विसरलोच!’ राजे जिजाबाईंच्याकडे वळले. ‘मासाहेब, लक्ष्मीघरात सिंहासन तयार झालं आहे. आमच्याबरोबर तुम्ही यावं, असं वाटतं.’

‘चला ना!’

येसूबाई पुढे झाल्या. ‘आबासाहेब, आम्ही येऊ?’

‘तुम्ही नंतर जा! तिथं गागाभट्ट आहेत.’

राजांच्या आधाराने जिजाबाई लक्ष्मीघराच्या समोर आल्या. गागाभट्ट तेथे उभे होते. राजांचे लक्ष लक्ष्मीघराच्या प्रवेशद्वारी ठेवलेल्या लाकडी कुरूप बाहुलीकडे गेले. ते म्हणाले,

‘ही बाहुली कसली?’

‘दृष्ट लागू नये, म्हणून निश्चलपुरी गोसावींनी ही ठेवली आहे.’ मोरोपंत प्रवेशद्वारीचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पडदा बाजूला करीत म्हणाले.

गागाभट्ट पुटपुटले, 'अज्ञानी जीवाची श्रद्धा!'

राजांनी जिजाबाईंच्यासह लक्ष्मीगृहात पाऊल टाकले. नाव शोभेल, अशीच ती जागा होती. महालाच्या तक्तपोशीला अडकविलेला, सुबक कलाकुसरीने सजलेला भव्य रौप्यतराजू प्रथम नजरेत आला. कुणाच्या तोंडून उद्गार निघत नव्हते. नजर नुसती तृप्त होत होती. तराजूच्या डाव्या बाजूला अनेक सुवर्ण-रौप्य कुंभ ओळीने लावून ठेवले होते. सुवर्णाची गंगाळे, चांदीचे चौरंग, सुवर्णाची पळीपंचपात्रे, हर तऱ्हेची सुवर्णपात्रे तेथे ओळीने लावून ठेविली होती. ती पाहत राजे पुढे सरकत होते. रत्नजडित सुवर्णअंबारीवर राजांचे लक्ष खिळले.

'हीही इथंच तयार केलीत?'

'जी, नाही.' मोरोपंत म्हणाले. 'सुरतेला ही मिळाली. इथं फक्त उजाळा दिला, काही रत्नं जडविली.'

राजे जिजाबाईंच्यासह राजसिंहासनाजवळ आले. सिंहासनावरचे आच्छादन दूर केले गेले. नामांकित रत्नांनी संपूर्ण मढविलेले ते भव्य सुवर्णसिंहासन अष्टकोनी होते. आठ कोनांवर सुवर्णसिंह बसविले होते. सिंहांचे डोळे माणकांचे जडविले होते. प्रत्येक सिंहावर एक एक सुवर्णस्तंभ उभारला होता. त्या आठ सुवर्णस्तंभांवर सिंहासनाची मेघडंबरी सावरली होती. सिंहासनाच्या पायांवर चारी बाजूंनी वृषभ, मार्जार, तरस, सिंह, व्याघ्र यांची चित्रे कोरली होती. सुवर्णस्तंभांवर वृक्ष, फळे, वेली, पक्षी व मत्स्यकूर्मादी जलचर दाखविले होते. मोरोपंत सांगत होते,

'महाराज, हे सिंहासन सशास्त्र सिद्ध केलं आहे. या सिंहासनाची बैठक प्रथम क्षीर, वट व औदुंबर या पवित्र वृक्षांच्या लाकडांनी सज्ज केली. ती वेदी सुवर्णाच्या लगटांनी मढवून रत्नखचित केली आहे. या सिंहासनासाठी बत्तीस मण सुवर्ण लागलं. नव रत्नं अमोलिक जितकी कोषात होती, त्यांमध्ये शोध करून मोठी मोलाची रत्नं मावली, तेवढी तक्तास जडविली.'

'पुष्कळ रत्नं खर्ची पडली.' गागाभट्ट म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचे भाव क्षणात पालटले. एक सूक्ष्म व्यथा त्यांच्या चेहऱ्यावर तरळून गेली.

‘आचार्य, फार कमी रत्नं सिंहासनाला जडविली गेली. आम्ही हे सिंहासन पाहतो, तेव्हा ते आमच्या ऐश्वर्याचं द्योतक म्हणून पाहत नाही. या सिंहासनाला जडविलेल्या प्रत्येक रत्नाबरोबर आम्हांला एक एक आठवण होते. स्वराज्याच्या कामासाठी केवढ्या अमोल जीवांची आम्हांला उधळण करावी लागली! आम्हांला आठवतो आमचा तानाजी, सूर्याजी; आठवतात बाजी, मुरारजी, प्रतापराव, पांगेरे. किती नावं घ्यावीत? खर्ची पडलेल्या रत्नांच्या मानानं इथं जडविलेली रत्नं काहीच नाहीत.’

जिजाबाईंचे लक्ष सिंहासनाच्या प्रथम पायरीच्या खोबणीत लटकविलेल्या रत्नजडित मुठीच्या तलवारीकडे गेले.

‘शिवबा, ही तलवार कसली?’

राजाचा कंठ दाटला.

‘एका आशीर्वादाची ती निशाणी आहे, मासाहेब! ही तलवार मिर्झाराजे जयसिंग यांनी आपल्या हातांनी आमच्या दुशेल्यात खोवली होती. पुन्हा कमरेची तलवार उतरण्याची पाळी येणार नाही, असा आशीर्वाद त्यांनी दिला होता. ते म्हणाले, होते :

खुदी को कर बुलंद इतना के
हर तहरीरसे पहले
खुदा बंदेसे खुद पूछे-
बता तेरी रज़ा क्या है?

तो आशीर्वाद खरा ठरला. फार मोठा माणूस! ही तलवार त्यांचीच आठवण आहे.’

मोरोपंतांनी राजांना सिंहासनालगत ठेवलेल्या तीन मणांच्या सुवर्णच्छत्राकडे नेले. बैठकीवर ठेवलेल्या त्या छत्रालगत अनेक दागिने, किरीट ठेवले होते. राजांनी विचारले,

‘हे काय?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘प्रतापगडाच्या भवानीमातेसाठी सिद्ध केलेले हे छत्र!’

‘आणि हे दागिने?’

मोरोपंतांनी जिजाबाईंच्याकडे पाहिले, आणि सांगितले,

‘मासाहेबांच्या आज्ञेवरून तुळजाभवानी, कसबा गणपती यांच्यासाठी घडविलेले दागिने...’

‘कसबा गणपती? पुण्याचा?’ राजांनी विचारले.

‘जी.’ मोरोपंतांनी मान डोलविली.

जिजाबाई पुढे झाल्या. त्यांनी सांगितले,

‘राजे, मीच ते करायला सांगितले. अरे, तुला घेऊन पुण्यात आले, तेव्हा प्रथम तो हाती लागला. त्याची स्थापना केली. त्याच्या सोबतीने लाल महाल बांधला. त्या मंगलमूर्तीचा आशीर्वाद ढळला नाही, त्याची सोबत कधी सुटली नाही.’

‘खरं आहे, मासाहेब. आम्ही काय करणार? तो चिंतामणी, विघ्नहर्ता, सुखकर्ता! त्यानंच आम्हांला तारलं, वाढवलं, प्रत्येक संकटात धीर दिला.’

जिजाबाईंनी एकदम हाक मारली,

‘राजे!’

‘काय, मासाहेब?’

जिजाबाई बोलण्याचा प्रयत्न करीत होत्या; पण शब्द सुचत नव्हते. राजांनी परत विचारले,

‘काय म्हणत होता, मासाहेब?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काही नाही, रे! एक नवस बोलले होते. तो आठवला.’

‘कसला?’

‘काय सांगू तुला? तू आग्र्याला गेलास, तिथंच अडकलास. काही सुचेना, तेव्हा तुळजाभवानीला मागून घेतलं होतं.’

‘काय?’

‘तुम्ही सुखरूपपणे आलात, तर देवीची जमीन रुप्यानं मढवीन, असं बोलले, बघ!’

जिजाबाई सांगतानासुद्धा संकोचत होत्या. राजांनी ते जाणलं. ते मोठ्याने हसले,

‘मासाहेब, मग त्यात अवघड काय? आमच्या राज्याभिषेकाच्या प्रसंगी आम्ही सोन्याचांदीची नाणी तयार करणारच आहोत. त्यांतली काही पवित्र कार्यासाठी खर्च झाली, तर आम्हांला आनंदच आहे!’

राजांची नजर मोरोपंतांकडे वळली.

‘मोरोपंत, आमच्या नावचे लाख चांदीचे शिक्के देवीच्या देवळात ठोकण्याची व्यवस्था करा. मासाहेबांचा नवस अपुरा ठेवला, तर आम्ही सुपुत्र ठरणार नाही. या छोट्या आईला मानलं नाही, तर ती मोठी आई आम्हांला जवळ करणार नाही.’

जिजाबाईंची प्रेमाने ओथंबलेली नजर राजांच्यावर स्थिरावली. त्या नजरेची जाणीव होताच राजे विषय बदलून मोरोपंतांना म्हणाले,

‘सुरेख, मोरोपंत, सुरेख दागिने घडवलेत! ज्याच्या कुशल नजरेखाली हे घडले, त्या कारागिराला आम्हांला पाहायचं आहे.’

मोरोपंत बाहेर गेले. गागाभट्ट म्हणाले,

‘मी पण तेच म्हणणार होतो. जयपूर-उदयपूर कारागिरी प्रसिद्ध खरी, पण त्याहीपेक्षा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ही कारागिरी थक्क करणारी आहे.’

राजे म्हणाले, ‘माणसं हुडकली, की सापडतात. या भूमीत कलाकारांची उणीव नाही. उणीव असलीच, तर ती दृष्टीची आहे. या भूमीत आपली माणसं आपल्यालाच दिसत नाहीत.’

मोरोपंत आले. मागून एक इसम आत आला. गोरापान, रेखीव बांधणीचा, कपाळी वैष्णव गंध रेखाटलेला. नजर तीक्ष्ण होती. नाक रेखीव होते. ओठ पातळ होते. जिवणी किंचित आत गेली होती. पायांत धोतर, अंगात साधा अंगरखा व मस्तकी पगडी होती. मोरोपंत म्हणाले,

‘महाराज, हा रामजी दत्तो. सिंहासनाचं, छत्रचामरांचं काम यानंच कारागिरांकडून पुरं करून घेतलं.’

राजांनी हातातली सलकडी उतरली. ती जिजाबाईंच्या हाती दिली. रामजीने येऊन दोघांना मुजरे केले. कडे रामजीच्या हाती देत जिजाबाई म्हणाल्या,

‘थोर कसब आहे तुझं! डोळे त्यावरून काढवत नाहीत.’

□

८

राज्याभिषेकाचे दिवस जवळ येत होते. राज्यातील प्रतिष्ठित व विद्वान ब्राह्मण, मांडलिक, इतर राजे, स्वराज्यातील मातबर लोक या सर्वांना निमंत्रणे गेली होती. निमंत्रितांची गडावर रीघ लागली होती. भोजनाच्या पंक्ती बसविण्यासाठी, लोकांच्या वास्तव्यासाठी गडावर ठिकठिकाणी विस्तीर्ण मंडप उभारले होते. खासे शामियाने, डेरे, वाबगा, राहुटी, चांदणी यांची एकच गर्दी गडावर झाली होती. प्रत्येक वास्तव्याच्या ठिकाणी सेवक व त्यांवरील अधिकारी यांच्या नेमणुका झाल्या होत्या. पाचाड व रायगडवाडी यांच्या नजीकही अशीच उभारणी केली होती. किल्ल्याखालच्या माचीवर अनेक सायवान डेरे उभारले होते. प्रत्येक कामावर स्वतंत्र अधिकारी होते. धुरळा उडू नये, म्हणून गडावरच्या राजरस्त्यावर छागल, पखाल-मशकधारी पाणी शिंपीत होते. एवढी सारी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सिद्धता होऊन अधिकाऱ्यांना वेळ अपुरा वाटत होता; कामाचा उरक होईल, की नाही, याची भीती वाटत होती.

संभाजीराजांच्या महाली संभाजीराजे कपडे करीत होते. येसूबाईंनी त्यांना तलवार दिली. तलवार दुशेल्यात खोवून संभाजीराजे तयार झाले. संभाजीराजे येसूबाईंच्यावर नजर खिळवून म्हणाले,

‘आमच्या मस्तकी तुम्ही असलात, तरी चारचौघांत ते झाकण्यासाठी शिरोभूषण हवं ना!’

येसूबाईंनी जीभ चावली. मंचकावरचा जिरेटोप राजांच्या हाती दिला. टोप घेण्यासाठी पुढे केलेले हात येसूबाईंच्या हातावर विसावले. येसूबाई लाजल्या. दरवाजाकडे पाहत त्या म्हणाल्या,

‘लौकर कपडे करावे. पुन्हा कोणी तरी वर्दी द्यायला येईल.’

संभाजीराजे मोकळेपणाने हसले. त्यांनी मस्तकी टोप चढविला. येसूबाईंच्या हनुवटीखाली मूठ देऊन त्यांनी चेहरा उंचावला; व ते बोलले,

‘पाहू!’

‘हे काय?’ डोळे मोठे करीत येसूबाईंनी विचारले.

‘आम्ही तुमच्या डोळ्यांत पाहत होतो. आरशात पाहिलं नाही, तर टोप नीट बसला, की नाही, कसं कळणार?’

‘कवी कलशांच्याकडे हेच शिकला, वाटतं?’

‘का? तुम्हांला आवडलं नाही?’

‘आता महालाबाहेर जाणार, का मी जाऊ?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तुम्ही गेलात, तर आमचं इथं काय काम? आम्ही येतो.’

संभाजीराजांच्या पाठोपाठ येसूबाई जिजाबाईंच्याकडे महालाकडे गेल्या. महालात जिजाबाई राजारामांना मांडीवर घेऊन बसल्या होत्या. शेजारी राजे उभे होते. संभाजीराजांना पाहताच राजाराम त्यांच्याकडे धावले. सर्वांचे लक्ष संभाजीराजांच्या वर खिळले. पाठीमागून येणाऱ्या येसूबाईंना पाहून राजे म्हणाले,

‘मासाहेब, आता आम्हांला सुद्धा आजोबा व्हावं, असं वाटू लागलंय्.’

सारे हसले. येसूबाई लाजल्या.

‘राजे,’ जिजाबाई म्हणाल्या, ‘ऊन वाढत आहे. लौकर बाहेर पडा. सोसवत असतं, तर मी पण देवीला आले असते. समर्थांना माझा दंडवत सांगा.’

राजे उठले. मुजरा करून ते संभाजीराजांना म्हणाले,

‘जायचं ना?’

संभाजीराजांनी जिजाबाईंना मुजरा केला. राजांच्यासह संभाजीराजे चालू लागले.

राजे पालखीतून प्रवास करीत होते. भोयांची पावले झप झप उचलत होती. राजांचे संरक्षक दल पुढे जात होते. राजांच्या आगमनाच्या इशारती रानांतून घुमत होत्या. सारे रान चैत्रपालवीने नटले होते. फणसवड्याच्या तांबड्या फुलांनी रानाची शोभा वाढली होती. रस्त्याकडेची बहरलेली चिंच पोपटी शेला पांघरून उभी होती. राजे घाट चढून प्रतापगडाच्या पायथ्याशी आले. पालखीतून पायउतार होऊन राजे गड चढत होते. गडाच्या माथ्यावर आल्यावर राजांनी किंचित विश्रांती घेतली. त्यांची नजर गडाच्या माचीकडे गेली. संभाजीराजांनी विचारले,

‘आबासाहेब, पालखी मागवू?’

‘नाही, राजे. आम्ही दमलो नाही. ही माची नजरेत आली, आणि अफझलप्रसंगाची आठवण झाली.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे माचीकडे पाहत होते. ती मोकळी माची तिन्ही बाजूंनी दाट झाडीने आच्छादिली होती. राजे एकटक नजरेने पाहत होते. संभाजीराजे म्हणाले,

'त्या वेळी काय झालं असेल, नाही?'

'शंभूबाळ! प्रत्येक क्षण मोलाचा होता. एवढी खबरदारी घेऊनही गड उतरताना हजारो विचारांचं मोहोळ मनात घोंघावत होतं.'

'खानाचा वध! केवढी जबाबदारी!'

'शंभूबाळ, खानाचा वध फार सोपा होता. त्याची चिंता आम्हांला नव्हती. आमचं लक्ष होतं खानाच्या तळावर.'

'तळावर?'

'हो! आमचं राज्य कोवळं; ताकद कमी. अफाट संपत्ती, बळकट सामग्री घेऊन खान अवतरलेला. सुपे, इंदापूर, वाई इथले आणि आमच्या विनंतीनुसार कोयनाखोऱ्यात पसरलेले ते तळ अचूक उचलायचे होते. तिथंच आमचं लक्ष केंद्रित झालं होतं. ठरल्याप्रमाणे सारं पार पडलं, ही जगदंबेची कृपा! त्या रात्रीत आमचे हात बळकट झाले. शेकडो तोफा, हजारो घोडी, उंट, हत्ती, शामियाने, डेरे आणि करोडो रुपयांची होनांची संपत्ती यांनी आम्ही बलशाली बनलो. ही सारी आईची कृपा! चला...'

राजे गडावर पोहोचले. त्यांनी भवानीचे दर्शन घेतले. राजांनी गडाची पाहणी केली. दुसऱ्या दिवशी राजांनी यथासांग छत्र वाहिले. छत्रधारी देवीचे रूप पाहून राजांचे भान हरपले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू निखळले. बराच वेळ ते देवीचे ध्यान मनात साठवीत होते. शेजारी हात जोडून बसलेल्या संभाजीराजांना ते म्हणाले,

'शंभूराजे! या आईच्या आशीर्वादानं सर्व मनोरथ सिद्धीस जातात. आमचं यश हे तिचं कर्तृत्व आहे. तुळजापूरला दर्शनास जाणं कठीण पडतं, हे जाणून तिनं आम्हांस दृष्टांत दिला. ज्या माचीवरून आम्ही संकट न्याहाळलं, त्या जागी या यशदायिनीची आम्ही स्थापना केली. आम्ही कुठंही असलो, तरी हे रूप आमच्या चित्तातून हलत नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी ब्राह्मणभोजन घातले; साऱ्या गडकऱ्यांना तृप्त केले. रात्री देवीचे दीपमाळशिखर लक्षावधी तेलवातींनी उजळले गेले. देवीच्या चौकात गोंधळ्यांची तयारी सुरू झाली. गोंधळी चौक मांडण्यात गढले होते. राजे संभाजीराजांच्या सह ओवरीच्या आसनावर बसले होते. मंदिराचे आवार माणसांनी फुलले होते. राजांचे लक्ष गोंधळ्यांच्याकडे गेले. कुणाच्या पायांत पायघोळ धोतर होते, तर कुणी गुडघ्यांएवढे नेसले होते; कुणी बंडी, तर कुणी कडता चढविला होता. राजांनी नाइकाला बोलावले.

'गोंधळी! बैरागी, संन्यासी, फकीर... साऱ्या उपासकांना पोशाख असतो आणि तुम्ही तर आमच्या देवीचे भक्त. तुम्हांला पोशाख का नाही?'

नाइकाला उत्तरे सुचेना. तो काही तरी बोलायचे, म्हणून बोलला,

'आमांस्नी पोशाख न्हाई, जी!'

'नसायला काय झालं? आम्ही देतो. यापुढं तुम्ही गोंधळी, भुत्ये आमचा वेष करीत चला.'

'आपलं कापड आमी घालायचं?'

'त्यात काय बिघडलं?' सुवर्णाच्या नाजूक तातीत गुंतलेल्या, गळ्यातील कवड्यांच्या माळेशी बोटांचा चाळा करीत राजे म्हणाले, 'आम्ही देवीचे भोपे, देवीचे भक्तच ना?'

राजांनी आज्ञा केली. राजांच्या कपड्यांतील तुमानी, अंगरखे आणले गेले. राजांनी ते कपडे घालण्याची आज्ञा केली. राजवेषात देवीचे भोपे सजले. डोक्यावर कंगणीदार पगड्या शोभू लागल्या. गळ्यांत टपोऱ्या कवड्यांच्या माळा घातलेले डवरी संबळ-तुणतुण्यांसह चौकात उतरले.

चौक मांडला होता. चौकाभोवती शाळूचे मखर उभे केले होते. मखरात स्थापन केलेल्या घटाची पूजा करून राजांनी दिवटी पेटविली. दिवटी नाचविण्याचा मान यजमानांचा. गोंधळी म्हणाला,

'पाच वेळा दिवटी उंचावून नंतर ती आमच्या हातात द्यावी. मग आम्ही दिवटी नाचवू.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आमच्या देवीची दिवटी नाचविण्यात आम्हांला कसली लाज? पेटवा दिवट्या.’

प्रत्येकाच्या हातात पेटता पोत दिसू लागला. हात तालावर नाचू लागले. वाऱ्यावर पोत फरफरत होते. राजांनी एक रिंगण पुरे केले आणि दिवटी संभाजीराजांच्या हाती दिली. संभाजीराजे आपल्या साथीदारांसह खेळात उतरले.

संभाजीराजे बेभान होऊन दिवट्या नाचवीत होते. ‘उदे, ग, अंबे, उदे ऽ ऽ’ चा गजर उठत होता. संबळाची लय वाढत होती. राजांच्या मागे बसलेले गडकरी म्हणाले,

‘युवराज सुरेख खेळतात!’

राजे काही बोलले नाहीत. ते एकटक युवराजांना निरखीत होते.

दिवटी नाचविणे संपले. संभाजीराजे माघारी आले. कपाळी घाम डवरला होता. चेहऱ्यावर हास्य विलसत होते. मस्तकीच्या गुलालाने ते रूप वेगळेच वाटत होते. राजे म्हणाले,

‘शंभूराजे, सुरेख खेळलात. तुम्हांला पृथ्वीतलावरचे सारेच खेळ अवगत आहेत. ते सारे तुम्हांला जमतात. आम्हांला कसलेच खेळ जमले नाहीत. एक राज्याचा खेळ मासाहेबांनी जोडून दिला, पण तोही निस्तरता नाकी दम आला!’

राजांच्या नजीक संभाजीराजे बसले. संबळ-तुणतुणे वाजू लागले. साऱ्यांचे लक्ष चौकात स्थिरावले. गोंधळ्याने गण सुरू केला :

मोरया गणपती, रे, गणराजा!
किती विनवूं, जी, तुला, महाराजा!...

गण संपला. जगदंबास्तवन आणि देवदेवतांना पाचारण केल्यावर गोंधळाला सुरुवात झाली :

सुदिन सुवेळ तुझा गोंधळ मांडिला, वो
ज्ञानवैराग्याचा वरतीं फुलवारा बांधिला, वो
चंद्र सूर्य दोन्ही यांचा पोत पाजळिला, वो

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घालूनी सिंहासन वरुतें घट स्थापियेला, वो
उदो बोला, उदो सद्गुरू माउलीचा, वो ।। ध्रु. ।।
प्रवृत्तिनिवृत्तीचें घालुनि शुद्धासन, वो
ध्येय आतां ध्यान प्रक्षाळिले चरण, वो
कायावाचामनें एकविध केलें अर्चन, वो
द्वैत-अद्वैतभावें दिलें आचमन, वो
भक्तिवैराग्यज्ञान यांहीं पुजियेली अंबा, वो
सद्रूप चिद्रूप पाहूनी प्रसन्न जगदंबा, वो
एका जनार्दनीं शरण मुळकदंबा, वो
त्राहि त्राहि, अंबे, तुझा दास उभा वो...

रात्र चढत होती. गोंधळ्याची कथा चालू होती. राजांचे अस्तित्व विसरून सारे कथा ऐकत होते. तीतल्या विनोदाला खळखळून हसत होते. नाइकाच्या दिवटीवर तेल ओतले जात होते. गोंधळाची रंगत वाऱ्यावर फरफरणाऱ्या पोताबरोबर वाढत होती.

पहाट झाली; तांबडे फुटले आणि गोंधळ संपत आला. राजे चौकासमोर हात जोडून बसले. कळसावर घातलेली कवड्यांची माळ गळ्यात घातली गेली. कपाळी गुलाल चिकटला; आणि पंचारती घेऊन राजे उभे राहिले. आरती संपल्यावर राजांच्या मस्तकावरून कलश पाच वेळा उतरला. जगदंबेचा गजर झाला. गोंधळ संपला.

सारी रात्र गोंधळात घालूनही राजांना थकवा भासत नव्हता. अत्यंत समाधानाने ते बालेकिल्ल्याकडे चालत होते.

पूर्वेला उजाडू लागले होते.

□

९

राजे शिवथरघळीच्या परिसरात आले. दोन पर्वतांच्या दरीतून वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहालगतच्या पर्वतखोबणीत ही घळ होती. राजांचे दळ जसे शिवथरच्या परिसरात आले, तसे राजांच्या सामोरे संन्यासी येऊ लागले. घनदाट अरण्याने सर्वत्र सावली धरली होती. भर उन्हाळ्याचे दिवस असूनही सारा परिसर कसा शांत आणि रमणीय होता. राजांच्या दळाच्या आगमनाने वन्य श्वापदे पळताना दिसत होती. राजांच्या आगमनाची वार्ता देणारे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शंखनाद रानात उठत होते. त्या वातावरणाने राजांचे मन प्रसन्न झाले. पूर्वी हा चंद्रराव मोऱ्यांचा मुलूख. याच शिवधरघळीत चंद्ररावांचा वाडा होता. शिवथरघळीत जेव्हा दासबोध लिहिला जात होता, तेव्हा त्याच डोंगरमाथ्यावर राजांच्या वैराचा कट शिजत होता.

राजे शिवथरची नदी ओलांडून पुढे झाले; आणि शिष्यपरिवारासह सामोरे येणारे समर्थ राजांच्या दृष्टिपथात आले. राजे त्वरेने पायउतार झाले. संभाजीराजांनी राजांचे अनुकरण केले. अत्यंत नम्र भावाने राजांनी समर्थांचे आशीर्वाद घेतले. राजे समर्थांच्या बरोबर शिवथरघळीकडे जात होते. उन्हाळ्यामुळे किंचित क्षीण झालेला प्रवाह घळीच्या एका बाजूने पर्वत उतरत होता. त्याचा मंद, पण अखंड नाद वातावरणाची उदात्तता वाढवीत होता. घळीत व्याघ्रासनावर समर्थ विराजमान झाले. समर्थांच्या मागे भिंतीवर धनुष्य व बाणांचा भाता अडकविला होता. संभाजीराजांचे लक्ष त्यांवर खिळले होते. ते पाहताच समर्थ हसले.

'शंभूराजे! आश्चर्य करण्याचं काहीच कारण नाही. वन्य श्वापदांइतकंच मोगल अत्याचारांचं भय आम्हांला बाळगावं लागतं. ही पाहा ना आमची कुबडी!' म्हणत समर्थांनी आपल्या उजव्या बगलेत घेतलेली कुबडी हातात घेतली. एका क्षणात कुबडीचा माथा अलग झाला; आणि समर्थांच्या हातात दीड हाताचे तीक्ष्ण पाते चमकू लागले.

'दुबळ्यांच्या दयेला आणि दीनांच्या अहिंसेला फारसा अर्थ राहत नाही. हे दोन्ही गुण सिद्ध व्हायला सामर्थ्यवान बनावं लागतं. आता या शस्त्राची गरज भासेल, असं वाटत नाही. आता शिवबा छत्रपती होणार. अनाथ भूमी सनाथ होणार!- शिवबा, तुमच्या राज्याभिषेकाच्या कल्पनेनं आम्ही तृप्त झालो! तृप्त झालो!'

राजांनी सर्व वृत्तांत समर्थांच्या कानी घातला. राज्याभिषेकाच्या सर्व योजना तपशीलवार सांगितल्या. राजे उठून हात जोडून म्हणाले,

'आपल्या आशीर्वादानं हे सारं घडत आहे. या निमित्तानं आपले पाय गडावर लागावेत, अशी आमची सर्वांची इच्छा आहे.'

'आणि म्हणून खास जातीनिशी निमंत्रण द्यायला आलात, असंच ना? राजे, आम्ही कुठंही असलो, तरी आमचे आशीर्वाद सदैव तुमच्या पाठीशी आहेत!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'गुरुदेव! आपण येणार नाही?' राजांच्या नजरेत भीती तरळली.

'येण्याचं काहीच प्रयोजन नाही, राजे! गागाभट्ट मोठे विद्वान पंडित आहेत. ते शास्त्र जाणतात. तो त्यांचा अधिकार आहे. त्यांच्या नजरेखाली आपला अभिषेक होत असता, आमच्यासारख्या अनधिकाऱ्यांचं माजलेलं स्तोम त्यांना आवडणार नाही. त्यांचा अहंकार दुखावेल आणि म्हणूनच आम्ही त्या प्रसंगी हजर नसणं इष्ट आहे.'

'असं असेल, तर आम्हांला त्या राज्याभिषेकाची गरज नाही!' राजे बोलून गेले.

समर्थ भावनाविवश होऊन उठले. राजांच्या जवळ येऊन त्यांनी राजांच्या खांद्यावर हात ठेवला. राजांच्या दृष्टीला दृष्टी भिडवीत ते म्हणाले,

'राजे! कसलं हे अज्ञानीपण! राज्याभिषेकाची हौस ना तुम्हांला, ना आम्हांला. पण होणं आवश्यक आहे, म्हणूनच ते व्हायला हवं. हवी तर ती आमची आज्ञा समजा. आम्ही गडावर नाही, याचा खेद बाळगू नका. जेव्हा तुम्हांला आमची अत्यंत गरज भासेल, तेव्हा आम्ही आपणहून, न बोलावता तुमच्याकडे येऊ, यात संशय बाळगू नका. श्रद्धायुक्त मनानं, प्रभू रामचंद्राला शरण जाऊन, राज्याभिषेक करून घ्या. आमची स्वप्नं साकार करा!'

राजांनी समर्थांचे चरण धरले. समर्थांनी राजांना मिठीत घेतले. दोघांच्याही नेत्रांतून अश्रू झरत होते. काही न बोलता दोघांचे मनोगत एकमेकांना कळत होते.

□

१०

समर्थांची भेट घेऊन राजे रायगडी येत होते. निजामपुरापासून पाली, डेरे, शामियाने यांनी सुसज्ज असे तळ दृष्टिक्षेपात येऊ लागले. रायगडाच्या नव्या पेठेला तर गावाचे रूप प्राप्त झाले होते. ओझी लादलेली घोडी, बैलगाड्या दाटीवाटीने उभ्या होत्या. कोकणी, कर्नाटकी, मारवाडी, गुजराती व्यापारी नाना वेषभूषांत आपापल्या माणसांसह वावरत होते. राजे सर्वांचे अभिवादन स्वीकारीत नाणे दरवाजानजीक पोहोचले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गढ चढायला सुखकर जावा, म्हणून गडाच्या वाटेवर पायऱ्या तासून जागोजागी पाणपोयांची उभारणी केली होती. राजे महादरवाजानजीक आले; आणि राजांच्या आगमनाची नौबत निनादली.

राजे गडावर आले. पाच-सात दिवसांत गडाचे रूप पालटले होते. गडावर सर्वत्र वर्दळ दिसत होती. गंगासागराच्या पाचमजली मनोऱ्यावर ध्वजपताका फडकू लागल्या होत्या. हत्तीटाक्याला वळसा देऊन राजे होळीचौकात आले. राजांनी शिरकाईचे दर्शन घेतले. राजांना पाहून प्रत्येकजण हर्षभरित होत होता. राजे संभाजीराजांच्यासह चौकात आले. स्वागताला सामोरे आलेले मोरोपंत, अनाजी मागे होते. अचानक राजांची पावले थांबली.

एक प्रचंड हत्ती झप झप पावले टाकीत बाजारपेठेच्या रस्त्यावरून चौकात आला. त्याच्या पाठीवर सुवर्णअंबारी लखलखत होती. हत्ती उंचापुरा होता. त्याच्या गळ्यातली घाट घणघणत होती. त्या हत्तीपाठोपाठ दुसरा रौप्यहौदा चढविलेला हत्ती सामोरा आला. राजांनी विचारले,

'मोरोपंत, या हत्तीवर अंबारी बरी चढवली?'

'राज्याभिषेकानंतर देवदर्शनाला अंबारीतून जावं लागेल. त्यासाठी हत्ती वजवताहेत.'

'किती हत्ती गडावर आणले?'

'चार. अंबारीचा ऐरावत आणि हौद्याचा पुरंधर. दोन्ही हत्ती मोठे सुलक्षणी आणि जातिवंत आहेत.'

'गजशाळा बांधलीत. हत्ती आहे. आता हे इथंच राहणार, वाटतं?'

'जी! हत्तीसाठी तलाव आहे. भरपूर चंदीवैरणीची सोय आहे. लक्ष्मीच्या वास्तव्यठिकाणी तिचं वाहन ऐरावत हवंच.'

'कराल, ते थोडं.'

राजे नगारखान्याजवळ आले. मोरोपंत म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जरा कातळावर चलावं.’

राजे कातळ चढले. समोर एका रेषेत उभी असलेली समांतर धावणारी बाजारपेठ उभी होती. फिरत्या स्वारालाही पायउतार न होता खरेदी करता यावी, अशी उंच समान जोत्यांची ती बाजारपेठ नजरेत भरत होती. काळ्या फत्तरांनी जडविलेल्या नक्षीदार कमानी तिचे ऐश्वर्य व्यक्त करीत होत्या.

बाजारपेठेतून भवानीटोकापर्यंत कुठेही मोकळी जागा दिसत नव्हती. घरटी, माड्या, मनोरे यांच्याखेरीज सापडलेले प्रत्येक मोकळे आवार उपयोगात आणले होते. त्या जागांतून उभारलेले शामियान्यांचे, डेऱ्यांचे कळस उन्हात चमकत होते.

‘मोरोपंत! तुम्ही तर अलकानगरी उभारलीत! जरा मोकळीक दिली, की तुमची कल्पनाशक्ती गरुडाची झेप घेते. लोक म्हणतात, आम्ही स्वप्नवेडे होतो. कुणाला स्वप्नवेड नव्हतं? बाजी-तानाजींपासून शिवा न्हाव्यापर्यंत सगळे स्वप्नावरच जगले, स्वप्नावर कुर्बान होऊन गेले! त्यांच्यांतले सर्वांत मोठे स्वप्नद्रष्टे तुम्ही आणि अनाजी आहा!’

राजे नगारखाने ओलांडून बालेकिल्ल्यात प्रवेश करते झाले. सिंहासनसदरेपासून नगारखान्यापर्यंतचा विस्तृत चौक आलीशान शामियान्यांनी आच्छादिला होता. राजसदरेपासून नगारखान्याच्या भव्य प्रवेशद्वारापर्यंत सुरूदार खांब उभारले होते. समोर राजसदर आणि सिंहासनाचा चौथरा नजरेत भरत होता. राजसदरेची इमारत भारी पडद्या-आडपडद्यांनी सुशोभित झाली होती. चौकशामियान्यांच्या कलाकुसरीत गुंतलेली शेकडो माणसे त्या जागेत वावरत होती.

राजे महाली आले. कपडे बदलून राजे जिजाबाईंच्याकडे जायला लागले. तोच राजस्नुषा येसूबाई आत आल्या. राजांची नजर त्यांच्यावर स्थिरावली. येसूबाई निळा बुंदेली शालू नेसल्या होत्या. कमरेला सुवर्णकमरबंध चमकत होता. गळ्यात हिऱ्यामोत्यांचे दागिने शोभत होते. पण राजांचे लक्ष वेधले होते त्यांच्या कपाळावर. येसूबाईंच्या कपाळी सुवर्णरौप्यमुकेशाने मळवट भरला होता. पुरे कपाळ सुबक मळवटाने चित्रित झाले होते. येसूबाई लाजल्या. त्यांनी राजांना नमस्कार केला. आशीर्वाद पुटपुटत येसूबाईंच्या मस्तकावरून हात फिरवीत राजे म्हणाले,

‘राज्याभिषेक सुरू झाला, वाटतं?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

येसूबाईंनी खाली मान घातली.

'मी नको म्हणत होते, तर सासूबाईंनी हट्टच धरला. त्यांना हे सगळं करून पाहायचं होतं.'

'मग त्यात काय बिघडलं? पण खरं सांगू, येसू? तुझ्या साऱ्या सासवा मोठ्या लबाड! त्यांनी सुरेख रूपाची गरीब सून निवडली; आणि मनाजोगे कपडे, दागिने चढवून केसांपासून नखापर्यंतचा सारा अंदाज घेतला. त्यांच्या डावाला नेमकी तू फसलीस.'

'तर! मोठी गरीबच, की नाही?' आत येत पुतळाबाई म्हणाल्या, 'दहा शालू टाकले, तरी हिची निवड होईना. हा सकाळपासूनचा तिसरा शालू!'

येसूबाईला जवळ घेत राजे म्हणाले, 'राणीसाहेब, ही येसू नाही; घरची लक्ष्मी आहे. शिर्क्यांची भावेश्वरी! भोसल्यांच्या घरात हिच्या पायांनी लक्ष्मी आली... पिलाजीराव अजून आले नाहीत?'

येसूबाईंनी नकारार्थी मान हलविली.

महालात बाल राजाराम आले. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर हसू प्रकटले. पायांत तुमान, अंगात अंगरखा, कमरेला शेला, शेल्यात खोवलेली कट्यार आणि तलवार, मस्तकावर पगडी असा बालराजांचा थाट होता. तलवारीच्या मुठीवर हात ठेवून त्यांनी वाकून मुजरा केला. राजांना हसू आवरणे कठीण गेले.

'एकूण सारी सोंगं तयार झाली, म्हणायची?'

बाल राजारामांचे गाल फुगले. ते वळत म्हणाले,

'आम्ही आईसाहेबांना सांगतो.'

राजे धावले. राजारामांना उचलून घेत ते म्हणाले,

'एवढं मात्र करू नका, राजे! हवा तर तुमचा राज्याभिषेक करतो. पण ही तक्रार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तुमच्या आईसाहेबांना सांगू नका.’

रामराजे हसले. त्यांना कवटाळीत राजे म्हणाले,

‘आता सखू पण येईल.’

‘सकाळीच त्या आल्या.’ पुतळाबाईंनी सांगितले.

‘सखू आली?’ राजे आनंदित झाले.

‘हो! मासाहेबांच्या जवळ आहेत.’

‘चला.’

राजे मासाहेबांच्या महालात गेले; आणि सखुबाईंनी पुढे येऊन नमस्कार केला. राजांचा कंठ उगाच भरून आला. सखूला जवळ घेत राजे जिजाबाईंना म्हणाले,

‘चांगलीच पोक्त दिसू लागली, नाही?’

‘अगदी सईच्या वळणावर गेली.’

राजांनी विषय बदलला.

‘एकटीच आलीस?’

‘हो!’

‘महादजींनी परवानगी दिली ना?’

‘हो!’

‘त्यांचे उपकार आहेत. आदिलशही नौकरीत असताही त्यांनी तुला येऊ दिलं, ही त्यांची कृपा. असो. जगदंबेची इच्छा!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दोन प्रहरी राजे कवी कलशांकडे गेले. कुशावर्ताच्या शिवमंदिरात दोघे होमात गर्क झाल्याचे राजांना कळले.

‘होम पुरा झाल्यावर आम्ही त्यांना येऊन गेल्याचं सांगा. आम्ही जगदीश्वराकडे गेलो, म्हणून सांगा.’

राजे सर्वांसह पेठेजवळ गेले. दोन्ही बाजूंनी दुकाने नानाविध वस्तूंची सजली होती. भारतातील सर्व पेठांची नामांकित वस्त्रे, दागिने तेथे गोळा झाले होते. नानाविध नवलाईच्या वस्तू प्रत्येक दुकानात नजरेसमोर ठेवल्या होत्या. सर्व व्यापारी राजांना पाहताच दुकानाच्या पायऱ्या उतरून सामोरे येत होते. नागाप्पा शेट्टी आपला स्थूल देह सावरीत राजांच्या सामोरा आला.

‘नागाप्पा, तुम्ही आमची पेठ सजविली खरी!’

तेवढ्या बोलण्याने नागाप्पाला साऱ्या श्रमाचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

ब्राह्मणवाडा ओलांडून राजे जगदीश्वराचा गढ चढू लागले. मंदिराच्या मागच्या प्रवेशद्वारातून राजांनी आत प्रवेश केला. देवळाच्या साऱ्या ओवऱ्या भरल्या होत्या. अनेक देशींचे लोक तेथे दिसत होते. अनेक स्त्रियाही तेथे होत्या.

‘मोरोपंत, हे कोण लोक?’

‘ही सारी कलावंत मंडळी आहेत. गवय्ये, कलावंतिणी, वादक, नर्तक या मंडळींना ही जागा दिली आहे. यांखेरीज अनेक तांबोळी, फुलारी, जुवारी, बाजेगरी पण गडावर आले आहेत.’

राजांनी मोजडी काढली. मंदिरातून मृदंगाच्या तालावर उठणारे नृत्याचे आवाज कानांवर पडत होते. राजांनी मंदिरात प्रवेश केला. एक कलावंतीण देवापुढे नृत्य करीत होती. राजे जाताच नृत्य थांबले. राजे म्हणाले,

‘आमच्यामुळं तुमच्या सेवेत खंड पाडू नका.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी दर्शन घेतले; आणि ते बाहेर गेले. मोरोपंतांना ते म्हणाले,

‘काही खरेच गुणी कलावंत असतील, तर पारखून त्यांना आपल्या पदरी ठेवून घ्या. देवाच्या सेवेसाठी त्यांची नेमणूक करा. उत्तरेत आम्ही गेलो असता मथुरेच्या द्वारकाधीशाच्या मंदिरात असेच कलावंत आम्ही पाहिले. त्यामुळं कलावंतांना आश्रय मिळतो; सर्वसामान्य माणसाला चांगलं ऐकायला, पाहायला मिळतं.’

राजे एकटेच मंदिराबाहेर पडले. निराजीपंत, मोरोपंत मागे राहिले असता राजे मंदिराच्या प्रवेशद्वाराशी आले. मंदिराच्या ओवरीवर बसलेल्या एका व्यक्तीने त्यांची नजर खिळवून ठेवली. तो रूपसंपन्न गृहस्थ होता. केस मानेवर रुळत होते. खांबाला टेकून, पाय कट्ट्यावर सोडून तो एकटा कसला तरी विचार करीत होता. त्याचे लक्ष राजांच्याकडे गेले. समारंभासाठी आलेला कुणी तरी सरदार असावा, असे समजून त्याने राजांना खुणावले. राजे जवळ गेले. राजांनी विचारले,

‘आपलं नाव?’

‘मी कवी भूषण! कानपूरच्या त्रिपाठी घराण्याचा मी!’

‘इथं येण्याचं प्रयोजन?’

‘शिवाजीराजांची कीर्ती ऐकली. दर्शन घेण्याची उत्कट इच्छा झाली... आपला परिचय?’ राजे घोटाळले. चटकन म्हणाले,

‘मला भोसले म्हणतात.’

‘उद्योग?’

‘राज्याची सेवा!’

‘शिवाजीराजे मला भेटतील?’

‘आल्या अतिथीचं स्वागत करणं हा तो धर्म समजतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘रूप कसं आहे?’

‘माणसाच्या रूपापेक्षा त्याचे गुण पारखावेत, असा त्यांचा स्वभाव आहे.’

‘त्यांना माझं काव्य ऐकवावं, असं फार मनात आहे. त्यांना आवडेल?’

‘न आवडायला काय झालं? तोही माणसूच आहे.’

कवी भूषण एकदम उठून उभा राहिला. मोरोपंत नजीक आले.

‘महाराज, कवी कलश येत आहेत.’

‘अरेरे! त्यांना विनाकारण त्रास झाला.’

तोच कवी कलश तेथे आले. त्यांनी नमस्कार केला. राजांनी विचारले,

‘कवी कलश, आमच्यामुळं होमात व्यत्यय आला नाही ना?’

‘जी, नाही. होम संपला; आणि इकडे आलो.’

बिचारा कवी भूषण राजांच्याकडे पाहत होता. त्याने कट्ट्यावरून उडी घेतली, आणि राजांना लवून प्रणाम केला.

‘क्षमा, महाराज! मी आपल्याला ओळखलं नाही.’

‘असू दे!... कवी कलश, हे कवी भूषण कानपूरचे... भूषण, आपलं काव्य ऐकायला आम्ही आतुर आहो.’

‘आज्ञा झाली, तर एखादं कवन आत्ताही ऐकवीन.’

‘जरूर!’ राजांनी आज्ञा केली.

कविराज भूषणने एकवार राजांच्याकडे पाहिले. त्याची वाणी स्रवू लागली...

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘औरनके जॉचे कहा, नहिं ज्यॉच्यो सिवराज?
औरन के जॉचे कहा, जो जॉच्यो सिवराज?’

‘वाहव्वा! व्वा!’ कवी कलश उद्गारले. ‘अगदी खरं आहे. शिवाजीराजांच्याकडे याचना न करिता इतरांजवळ याचना केली, तर काय उपयोग? आणि शिवाजीपाशी याचना केली, तर मग इतरांकडे याचना करण्याचं प्रयोजनच काय?’

राजे प्रसन्न झाले. ते भूषणला म्हणाले,

‘कवी कलशसारख्या श्रेष्ठ कवींची मान्यता मिळविलीत. आता काय बोलणार?- मोरोपंत, अशा गुणी माणसांना आमच्यापासून एवढे दूर ठेवू नका. त्यांची व्यवस्था आमच्या राजमहाली करा. त्यामुळं आम्हांला चार सुखाचे क्षण अधिक लाभतील.’

कवी भूषणने मनात धरलेले राजांचे रूप त्या बोलांनी साकार झाले. जीवनाचे सार्थक झाल्याचा भास त्याला झाला.

□

११

सकाळी संभाजीराजे महालात आले.

‘आबासाहेब, फिरंगोजी आले.’

फिरंगोजी आत आले. फिरंगोजींनी मुजरा केला. राजे म्हणाले,

‘शंभूराजे, निराजीपंतांना बोलवा.’

संभाजीराजे निराजीपंतांना बोलवायला गेले. फिरंगोजी म्हणाले,

‘राजे, डोळ्यांचं पारणं फिटावं, असा गड सजलाय्. लई बोलवा झालीया.’

‘त्याचीच आम्हांला चिंता वाटते. नेमका हाच मुहूर्त साधून मोगलाई किंवा आदिलशाही
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

उचल घ्यायची.’

‘काय बिशाद हाय त्यांची? मागचे दीस सरले आता.’

निराजीपंत महालात आले.

‘पंत, आमचे फिरंगोजी आलेत. त्यांना जबरदस्त काम द्या.’

‘त्यांचं काम निवडून ठेवलं आहे. अगदी मोक्याचं.’

‘कसलं काम निवडलंत?’

‘राज्याभिषेकाच्या वेळी खास सदरेवर फिरंगोजींनी उभं राहायचं आहे.’

राजांचे सारे खासे सरदार गडावर आले. हंबीरराव मोहिते, आनंदराव, येसाजी गडाच्या उत्साहात सामील झाले. राजांना एकच खंत मनात खुपत होती. ती त्यांनी हंबीररावांच्या जवळ बोलून दाखविली.

‘हंबीरराव, सगळे आले; पण एकोजीराजे आले नाहीत, महादजी आले नाहीत. आमच्या गोताला, सोयऱ्यांना आम्ही वाळ झालो आहो.’

दिवस झर झर झरत होते. गागाभट्टांनी राजांच्या मुंजीचा मुहूर्त काढला. अनेक विधी, अनेक तुला होणार होत्या. त्या सर्व धार्मिक विधींना आवश्यक ते साहित्य गोळा झाले होते. अनेक नद्यांची, सागरांची उदके अभिषेकासाठी आणविली गेली होती.

शुद्ध चतुर्थी उजाडली. आतल्या सदरचौकात शामियाना उभा केला होता. होमाची सिद्धता झाली. सुवर्णगंगाळातील मुहूर्ताचे घटिकापात्र पाण्यात तरंगत होते. तो सोहळा पाहण्यासाठी सर्व राण्या, युवराज, राजस्नुषा जिजाबाईंच्यासह बसल्या होत्या. चौकात राजांचा मौंजीबंधन विधी होत होता. गागाभट्ट व राजपुरोहित बाळंभट्ट पौरोहित्य करीत होते. राजांची मुंज झाली. त्यांनी यज्ञोपवीत धारण केले. वाद्यांच्या गजरात मौंजीबंधन विधी झाल्याचे जाहीर झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दुसऱ्या दिवशी राजांचा विवाह सोयराबाईंच्यासह झाला. सोयराबाई शास्त्रार्थाने थोरल्या राणीसाहेब बनल्या. त्यानंतर राजांचा इतर राण्यांसह विवाह झाला.

आता राजांच्या अभिषेकविधींना सुरुवात झाली होती. दररोज अनेक होम होत होते. गडावरचे वातावरण उत्साहाने भरले होते. सनईचौघडा झडत होता. गडावर आलेले कलावंत असलेल्या पाहुण्यांचे मनोरंजन करीत होते. जादुगारांच्या प्रयोगाने चमत्कार घडत होते. सकाळ, संध्याकाळ गडावर मिष्टान्नांच्या पंक्ती झडत होत्या. वाढत्या चंद्राबरोबर सुखाला भरती येत होती.

धार्मिक विधीने व उपवासाने थकलेले राजे रात्री गंगासागराच्या मनोऱ्यात उभे होते. चांदण्यात गंगासागराच्या लाटा चमकत होत्या. गडावर सर्वत्र पसरलेल्या मशाली तारांगणाची आठवण देत होत्या. जगदीश्वराच्या मंदिराकडून उठणारी लकेर वातावरणात तरंगत होती. कुठून तरी डफाचा आवाज कानांवर पडत होता. गडाची झोप उडाली होती.

थकलेले राजे शय्यागृहाकडे जात होते.

□

१२

राज्याभिषेकाच्या अनेक विधींपैकी आणि दानधर्मांपैकी महत्त्वाच्या तुलादान विधीला सुरुवात झाली. चांदीचा तराजू टांगला होता. तो विधी पाहण्यासाठी सारे सरदार शामियान्यात गोळा झाले होते. तुलादानासाठी लागणारे सर्व साहित्य तेथे आणून ठेवले होते.

राजे तुलादान विधीसाठी तयार होऊन जिजाबाईंच्या महाली गेले. जिजाबाईंचा चरणस्पर्श करताच जिजाबाईंनी राजांचा चेहरा हाती घेतला. जिजाबाई राजांना पारखीत होत्या. आईची पाणावलेली नजर पाहून राजे बेचैन झाले. चेहरा निरखीत असता जिजाबाई मागे उभ्या असलेल्या पुतळाबाईंना म्हणाल्या,

‘पुतळा, काजळाची डबी आण, पाहू.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काजळ कशाला, मासाहेब?’ राजांनी विचारले.

‘अरे, दृष्ट लागेल, म्हणून तीट लावते.’

साऱ्यांच्या चेहऱ्यांवर स्मित झळकले. राजे हसले; म्हणाले,

‘मासाहेब, आम्हांला कधी दृष्ट लागणार नाही.’

‘का?’

‘दृष्ट लागू नये. म्हणून तर आम्ही दाढी राखली.’

सारे हसले. जिजाबाई कृत्रिम कोपाने म्हणाल्या,

‘नेहमी तुम्हांला थट्टा सुचते.’ म्हणत जिजाबाईंनी काजळाच्या डबीत बोट बुडविले. हळुवार बोटाने त्यांनी राजांच्या गालावर काजळाची तीट लावली आणि काजळाचे बोट आपल्या भांगातून फिरविले.

राजे उठले, आणि तुलेच्या ठिकाणी आले. जिजाबाई सर्व राण्यांसह बैठकीवर विराजमान झाल्या.

गागाभट्टांनी निर्देश करताच राजे भूमीवर टेकलेल्या पारड्यात जाऊन बसले. अनेक ब्राह्मणहस्तांनी सावरलेल्या दुसऱ्या पारड्यात सुवर्णहोन टाकले जात होते. तबके रिकामी होत होती. सोळा हजार होन पारड्यात पडले; आणि राजांची तुला झाली. त्या आनंदाप्रीत्यर्थ चौघडे झडले. शिंगे फुंकली गेली. राजांची तुला झाल्यानंतर राजांनी ते सुवर्ण ब्राह्मणांना दान केले.

त्यानंतर दररोज तुला होतच राहिल्या.

राज्याभिषेकाच्या दिवसापर्यंत सर्वक्लेशनिवारणार्थ पितळ, तांबे, चांदी यांच्याबरोबर नाना तऱ्हांचे व्यवहारापयोगी आणि खाद्यपदार्थ यांनीदेखील राजांची तुला झाली. ते सर्व राजांनी स्वहस्ते दान केले. सर्व विधी बाळंभट्ट करीत होते. गागाभट्ट त्यांना मार्गदर्शन करीत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होते. दानासाठी भोजनार्थ सहस्त्र ब्राह्मण आले होते. बाकीचे पाचाडात ठेवले होते.

या सात दिवसांत अपरिमित दाने देऊन राजांनी सर्व ब्राह्मणांना संतुष्ट केले. राज्याभिषेकपूर्व सर्व प्रायश्चित्तविधी पुरे झाले होते. प्रायश्चित्तविधी व राज्याभिषेकमहोत्सव सलग होऊ नये, म्हणून गागाभट्टांनी त्यांत एका रात्रीचा खंड राखून दोषपरिमार्जन केले होते.

सारे प्रायश्चित्तविधी पुरे झाले. सात दिवस अखंड चाललेले होम, ब्राह्मणांचा उठणारा मंत्रघोष, सदैव दिसणारी धावपळ काही काळ थंडावली.

राज्याभिषेक पाहण्यास आता साऱ्यांचे जीव आतुर झाले होते.

□

१३

ज्येष्ठ शुद्ध द्वादशीचा दिवस हाती मंगल कलश घेऊन सूर्य क्षितिजावर आला. पूर्वेकडे तोरणा आणि राजगड नजरेत येत होते. राजे सूर्यदर्शन घेत होते. त्यांची नजर त्या दोन्ही गडांवर खिळली. आज रायगडावर राजांचा राज्याभिषेक होणार होता. पण स्वराज्याचा मुहूर्त, स्वराज्याचा विस्तार राजगडावर झाला. सूर्याबरोबरच राजांनी राजगडालाही वंदन केले.

सकाळी 'ऐंद्री शांती' उरकल्यानंतर राजांनी थोडी विश्रांती घेतली; कारण सायंकाळी सुरू होणारा राज्याभिषेक, सिंहासनारोहण व राजदर्शन हे समारंभ सकाळपर्यंत चालणार होते.

सायंकाळी राज्याभिषेकविधीस प्रारंभ झाला.

प्रथम गणेशपूजन, स्वस्तिवाचन, मातृकापूजन, वसोद्धारपूजन झाल्यावर राजांनी नांदीश्राद्ध, नारायणपूजन व आज्यहोम केला.

सोयराबाईंसह राजांनी मंडपपूजा केली. महावेदीसमोर प्रत्येक दिशेस चार चार कुंभ

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

स्थापन केले. पूर्वेस सुवर्णकुंभ, दक्षिणेस रजतकुंभ, पश्चिमेस ताम्रकुंभ व उत्तरेस मृत्तिकाकुंभ ठेवून त्यांत दूध, तूप, दधी व जल भरले. पूर्वेच्या कुंभात फक्त मध व इतर कुंभांत पवित्र जल भरले. कुंभ पल्लवपुष्पांनी व वस्त्रवेष्टनांनी सुशोभित झाले. अभिषेकासाठी औदुंबरशाखांची रौप्यमंडित आसंदी केली होती, ती स्थापिली. अनेक सागरांच्या व नद्यांच्या उदकांनी भरलेले कुंभ व रत्न, गंध, पुष्प, फल, इत्यादींनी आणि औषधींनी पूर्ण असे जलांचे कुंभ वेदीजवळ ओळीने लावून ठेवले होते. महावेदीवर अग्नीची व ग्रहांची प्रतिष्ठापना केली. अनेक मृत्तिकांची व कुंभांची विधिपूर्वक प्रतिष्ठापना करून सर्वप्रधान होम केला. होमाच्या वेळी सर्ववेदीय व सर्वशाखीय ब्राह्मणांनी केलेल्या वेदमंत्रघोषांनी सारे वातावरण धुंदावून गेले.

राजे समंत्रक स्नान करून परत वेदीवर आले. शुक्ल नेसलेल्या राजांना मंत्रघोषात मृत्तिका लावल्या. पंचामृतस्नान झाले. वेदमंत्रांच्या घोषात राजे मंडपात आले. तेथे प्रतिष्ठित केलेल्या आसंदीवर गुडघे लवून त्यांनी आरोहण केले.

पाठोपाठ सोयराबाई व युवराज संभाजी राजांच्या नजीक बसले. गागाभट्टांच्या सूचनेनुसार राजांच्या अष्टप्रधानांनी आपापल्या जागा घेतल्या. पूर्वेला मोरोपंत प्रधान तुपाचा सुवर्णकलश घेऊन उभे होते. दक्षिणेला हंबीरराव मोहित्यांनी दुधाचा कलश सावरला होता. अशा तऱ्हेने अष्ट दिशांना त्र्यंबकपंत, रामचंद्रपंत, दत्ताजीपंत, रघुनाथपंत व न्यायाधीश निराजीपंत दही, मध, पंखा, मोर्चेले सावरून उभे ठाकले.

गागाभट्टांनी बाळंभट्टांच्या हस्ते अभिषेकाला सुरुवात केली. महापंडित मंत्रघोष करू लागले. अभिषेकाला सुरुवात झाली. भारतातील महानद्यांची उदके राजांचे अंग पवित्र करू लागली. अभिषेकाच्या वेळी चाललेला तो गंभीर मंत्रघोष अंगावर रोमांच उभा करीत होता. आधीच वार्धक्याने क्षीण बनलेल्या जिजाबाईंच्या दृष्टीला डोळ्यांत साकळलेल्या आसवांमुळे समोरचे दृश्य धूसर दिसत होते. क्षणाक्षणाला डोळे टिपून त्या ते दृश्य मनात साठवीत होत्या.

मध्यरात्रीनंतर राजांचा अभिषेक संपला. राजा, राणी आणि युवराज यांना सुवासिनींनी ओवाळले. तुपाने भरलेल्या काशाच्या पात्रात राजांनी आपले मुखावलोकन केले. त्यानंतर राजांनी शुभ्र वस्त्रे व अमोल अलंकार धारण केले. शस्त्रपूजा करून राजांनी ढाल-तलवार, धनुष्यबाण यांचा स्वीकार केला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सिंहासनारोहणाचा समय जवळ येत होता. राणी सोयराबाई, युवराज संभाजीसह राजांनी कुलदेवतेला नमस्कार केला; बाळंभट्ट, गागाभट्ट, अनंतभट्ट यांना वंदन केले; आणि ते जिजाबाईंच्या समोर आले. तिघांनी जिजाबाईंना वंदन केले. जिजाबाईंच्या तोंडून शब्द उमटत नव्हता. त्यांनी राजांच्या मुखावरून आपली बोटे उतरली आणि ती कानशिलांवर मोडली.

राजे सिंहासनारोहणासाठी राजसभेकडे पावले टाकू लागले.

राजांच्या सरदारांनी, मानकऱ्यांनी व विद्वान ब्राह्मणांनी राजसभा सजली होती. राजसदरेसमोरच्या विस्तीर्ण चौकात गालिचे अंथरले होते. बाहेर नगारखान्याच्या द्वाराशी दोन हत्ती, दोन पांढरे शुभ्र घोडे उभे होते. चौकात मांडवावर भारी वस्त्रांच्या कनाती नाना रंगांत उठून दिसत होत्या. राजसदरेवर मध्यभागी उंच चौथरा उभारला होता. भरजरी गालिच्यांनी तो चौथरा झाकला होता; आणि त्यांवर ते नामांकित सुवर्णसिंहासन ठेविले होते. राजसदरेची व्यवस्था अशी होती, की कुठल्याही कोपऱ्यातून ते सिंहासन दृष्टीला यावे. नगारखान्यापासून सिंहासनाचे अंतर एवढे असूनही बोललेला साधा शब्दही दोन्ही टोकांना स्पष्टपणे टिपला जात असे. सिंहासनाच्या डाव्या बाजूला राजस्त्रियांना बसण्याची व्यवस्था केली होती. उजवी बाजू मंत्री आणि आप्तपुरुष या मंडळींना बसण्याकरिता राखली होती. दोन्ही बैठकी ऐश्वर्यसंपन्न होत्या. डाव्या बाजूला सोडलेल्या जाळीदार पडद्यांमुळे तो जनानी भाग आहे, हे न सांगताही ओळखू येत होते.

पहाटेचा समय जवळ येत असता राजे अष्टप्रधानांसह राजसभेत आले. पुरुष उंचीचे सुवर्णगुर्झब घेतलेले गुर्झबदार सामोरे चालत होते. राजे मखमली पायघड्या घातलेल्या पायऱ्या चढून राजसदरेच्या प्रथम टप्प्यावर आले. नंतर उजव्या बाजूच्या पायऱ्या चढून ते पहिल्या चौकात आले. राजे साऱ्यांच्या नजरेत आले. सिंहासनामागे अनेक भालकरी उभे होते. त्यांनी सुवर्णभाले सावरले होते. त्या सुवर्णांकित भाल्यांच्या टोकांवर अनेक अधिकारदर्शक व राजसत्तानिदर्शक चिन्हे दिसत होती. उजव्या हाताला भाल्यांच्या टोकांवर दोन मोठ्या दातांच्या मत्स्यांची सुवर्णाची शिरे होती; तर सिंहासनाच्या डाव्या बाजूला अनेक अश्वपुच्छे भाल्याच्या टोकांवर लटकाविली होती. एका मूल्यवान भाल्याच्या टोकावर सम पातळीत लोंबकळणारी सोन्याच्या तराजूची पारडी न्यायचिन्ह म्हणून तळपत होती.

राजांचे लक्ष डाव्या सदरेवर जरी बैठकीवर श्वेत वस्त्रे परिधान करून बसलेल्या जिजाबाईंच्याकडे गेले; आणि त्याच क्षणी गागाभट्टांनी वेदमंत्र म्हणायला प्रारंभ केला.
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

साऱ्या पंडितांनी तो वेदघोष उचलला.

संथ पावले टाकीत राजे सिंहासनाचा चौथरा चढले. राजे काही क्षण तेथेच उभे होते. अवर्थवेदातील मंत्रघोषाचा गंभीर नाद राजसभेवर उठत होता. सिंहाचा मुखवटा असलेला सुवर्णराजदंड गागाभट्टांनी राजांच्या हाती दिला. तो राजदंड मस्तकी लावून राजांनी सिंहासनाकडे पाहिले, आणि अत्यंत नम्र भावाने, सिंहासनाला पदस्पर्श होऊ न देता सिंहासनारोहण केले.

राजे वीरासन घालून बसले होते. उजव्या हाताजवळ तलवार ठेवली होती. राजांनी केशरी जिरेटोप परिधान केला होता. कानांत अत्यंत तेजस्वी मोत्यांचे चौकडे शोभत होते. मानेच्या लहानशा हेलकाव्याबरोबर त्या मोत्यांवर तारांगण उठत होते. मस्तकी धारण केलेले शिवगंध, राजसभेवरून फिरणारी तीक्ष्ण नजर, टोकाशी किंचित बाकदार झालेले सरळ नाक, निमुळत्या दाढीला आलेला डौल राजांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व जाणवून देत होते. साऱ्यांची नजर राजांच्यावर स्थिरावली होती. पूर्वेला सूर्योदयाची पूर्वचिन्हे उमटली होती.

मंत्रघोष करीत असतानाच गागाभट्टांनी मौल्यवान जडावाचे, मोतीलग झालरीचे छत्र उचलले. ते राजांच्या मस्तकावर धरले. मंत्रघोष संपला. क्षणभराची, पण श्वास दडपून टाकणारी शांतता राजसभेवर पसरली. अधीर जीवांच्या कानांवर गागाभट्टांची घोषणा पडत होती :

‘क्षत्रियकुलावतंस सिंहासनाधीश्वर गोब्राह्मणप्रतिपालक
हिंदुपतऽपातशहाऽ श्रीमंत श्री छत्रपती
शिवाजी महाराज की... जयऽ ऽ ऽ’

तो सोहळा पाहणाऱ्या हजारो मुखांतून तो जयध्वनी पडसादाप्रमाणे अनेक वेळ उठला.

मृदुंगावर थाप पडली. नर्तकींचे पदन्यास बोलू लागले. गवयांचे गायन सुरू झाले. चौकातल्या धृपदाचे शब्द कानांवर पडत होते :

‘अत प्रताप तेरो जगमें हो रावराजे बहादूर
नाम सुनत गुनि आवत धाय धाय पावत
मन इछा फलतिनको अधार...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वाद्यांच्या मेळांनी आपल्या सप्त सुरांनी वातावरण उजळून सोडले. गडाच्या चारी दिशांना तोफांचे आवाज उठू लागले. राष्ट्रभूमीला छत्रपती लाभल्याची वार्ता आसमंतात पसरली.

डोळ्यांतून झरणारे आनंदाश्रू न पुसता जिजाबाई थरथरत उठल्या. सारे अंग कापत होते. पुतळाबाई अश्रू टिपून धावल्या. जिजाबाईंना हात देत त्यांनी विचारले,

'काय हवं, मासाहेब!'

जिजाबाईंनी पुतळाबाईंच्याकडे पाहिले. दुसऱ्या क्षणी त्यांच्या कुशीत तोंड लपवीत त्या म्हणाल्या,

'घेऊन चला मला! कुठं तरी माझं पोर माझ्याच नजरेनं दृष्टावेल!'

जिजाबाईंना हुंदके फुटत होते. पुतळाबाई पाठीवरून हात फिरवीत होत्या.

सिंहासनावर राजांना जेव्हा सुवर्णस्नान घातले जात होते, तेव्हा पूर्वेला सूर्योदय होत होता.

-आणि त्या बालसूर्याच्या सहस्त्र किरणांनी पृथ्वीवरचा अंधकार नाहीसा झाला.

□

१४

पंतप्रधान मोरोपंतांनी राजांना आठ हजार होनांचे स्नान घातल्यानंतर राजसिंहानाच्या खाली असलेल्या जोत्यावर गागाभट्ट, संभाजीराजे व प्रधान मोरोपंत बसले. सारा दरबार खडा होता. मानाप्रमाणे सारे सरदार राजांना नजराणे अर्पण करीत होते. राजे नजराण्यांचा स्वीकार करीत होते. अचानक त्यांची नजर एका उंचावलेल्या हाताकडे गेली. इंग्रज वकील ऑग्झिंडेन हात उंचावून राजांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्याबरोबर दुभाष्या नारायण शेणवीही आला होता. राजांनी त्या दोघांना सामोरे आणण्याची आज्ञा केली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ऑग्झिंडेन सामोरा आला. त्याने अनेक गोष्टी राजांना नजर केल्या. त्यांत एक विलायती खुर्चीही होती. तीखेरीज हिरेजडित शिरपेच, दोन हिरेजडित सलकडी, तीन तेजस्वी मोती व एक हिऱ्याची अंगठी होती. ऑग्झिंडेनला मानाचा पोशाख देऊन राजांनी नजराण्यांचा स्वीकार केला.

राजे आता देवदर्शनाला जाणार होते. होळीचौकात सारा लवाजमा सिद्ध झाला. राजांचा ऐरावत पाठीवर सुवर्णअंबारी घेऊन झुलत उभा होता. सोन्यारुप्याच्या अलंकारांनी आणि भरजरी खोळीने तो सजला होता. राजे अंबारीत बसले होते. सरसेनापती हंबीरराव मोहिते सुवर्णांकुश घेऊन माहुताच्या जागी होते. मागे खवाशीत मोरोपंत प्रधान सोन्याच्या मुठीचे मोर्चेले राजांवर ढाळीत होते. राजांची मिरवणूक निघाली. असंख्य तुताऱ्यांचा नाद उठला.

राजांच्या जयघोषात मिरवणूक सरकू लागली. सारे सरदार राजांच्या मागून चालत होते. पुढे अश्वदळ चालत होते. मोर्चेले, अबदागीर राजांच्यावर धरली गेली होती. मिरवणूक पेठेत आली. आनंदाने बेहोश होऊन नागाप्पा शेट्टी राजांवरून मोहोरांची उधळण करीत होता. गुलाल उधळीत तो मिरवणुकीत सामील झाला.

दुतर्फा घरांच्या माड्या बायाबापड्यांनी भरल्या होत्या. राजांना पाहून हात जोडले जात होते. वाद्यगजरात राजे जगदीश्वरदर्शन घेऊन माघारी आले. वाड्याच्या दरवाजाशी लिंबलोण उतरले गेले. राजांनी वाड्यात प्रवेश केला.

अल्काबांचे पुकार पुकारले जात होते.

जिजाबाई आपल्या महालात बसल्या होत्या. मनोहारी धावत आली. तिने सांगितले,

'राजे वाड्यात आले!'

काही क्षणांत दुसरी दासी धावत आली.

'राजे राजसदर ओलांडून येत आहेत!'

नव्या दासीने वार्ता आणली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे अष्टकोनी महालाजवळ आले!’

राजे नजीक येत असल्याची बातमी कळत असता अल्काबांचे पुकार कानांवर आले :

‘बा अदब, बा मुलाहिजा..
आस्ते कदम महाराज ऽ ऽ आस्ते कदम ऽ ऽ ऽ’

जिजाबाई बेचैन झाल्या. गडबडीने उठत त्यांनी विचारले,

‘पुतळा, बसायचं, की उठायचं? छत्रपती झालाय् ना तो!’

तोच राजे राजमहालाच्या दारी प्रकटले. शांत पावले टाकीत राजे जिजाबाईंच्याजवळ गेले; आणि अत्यंत नम्र भावाने त्यांनी आईच्या पावलांवर मस्तक टेकले.

‘शिवबा! राजे ऽ ऽ ऽ!’

राजे उठले. जिजाबाईंना त्यांनी बळेच बैठकीवर बसविले. मोरोपंतांच्याकडे पाहताच मोरोपंत पुढे झाले. त्यांच्या हातांत आच्छादित तबक होते. आच्छादन दूर करताच या तबकात असलेली अत्यंत तलम मलमली जरी वस्त्रे नजरेत आली. राजे सद्गदित झाले. त्यांनी हात जोडले.

‘मासाहेब, आम्ही आपल्या पदराखाली लहानाचे मोठे झालो. आपल्या आशीर्वादानं आजचा दिवस दिसला. हाती सत्ता असती आणि पृथ्वीचं दान केलं असतं, तरी ते अपुरं पडावं, ही आपली योग्यता! एक धर्मविधी म्हणूनच ही वस्त्रं आपल्या चरणी आम्ही वाहतो. त्यांना हात लावा.’

मोरोपंतांनी तबक पुढे केले. जिजाबाईंनी तबकाला हात लावला. ओठ थरथरत होते. डोळे बावरे बनले होते. तबक सरकावून त्यांनी राजांना जवळ ओढले. राजांची मिठी जिजाबाईंच्या भोवती पडली. डोळ्यांतून अश्रू झरत असताही राजे म्हणत होते,

‘मासाहेब, शांत व्हा! शांत व्हा!’

काही क्षणांत जिजाबाई स्थिरावल्या. डोळे पुशीत त्या म्हणाल्या,
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शिवबा, काय वाटतं, ते कसं सांगू? कधी वाटलं नव्हतं, हा दिवस बघायला मिळेल, म्हणून. तुला माहीत नाही... तुझा जन्म शिवनेरीवर झाला, तेव्हा भविष्य वर्तवायला शास्त्री आले. त्यांना मी काय म्हणाले, माहीत आहे?’

राजांनी नकारार्थी मान हलविली.

जिजाबाई हसल्या.

‘मी म्हणाले, ‘शास्त्रीबुवा! हा पोटात असता ही संकटं आली. आता या पोराच्या पायगुणानं काय धिंडवडे निघणार आहेत, ते सांगा.’ तर शास्त्री म्हणाले, ‘मासाहेब, साक्षात सूर्य पोटी जन्माला आला! हा जन्मजन्मांतरीचे पांग फेडील!’ त्या शास्त्र्याचं भविष्य खरं ठरलं, बघ. जगल्याचं सार्थक झालं! मरायला मोकळीक झाली.’

‘मासाहेब, असं बोलू नका!’

‘भिऊ नको! अशी मी मरायची नाही. तुझी सावली बनूनच आलेय् ना! हजारो मरणं भोगून अगदी घट्ट झालेय्, बघ.’

‘मासाहेब!’

‘खोटं नाही! आजवर तुला कधी सांगितलं नाही. तू स्वराज्याचा डाव मांडलास. हरघडी संकटात उडी घ्यायचास. मी आशीर्वाद द्यायची. अफझल, शास्ताखान, आग्रा- अनेक मोहिमा. तू गेलास, की एकटं गडावर बसून राहायचं, देवापुढं धरणं धरायचं. सुखरूप असल्याचं कळेपर्यंत जिवात जीव नसायचा. नित्याचं मरण भोगताना जीव थकून जायचा. वाटायचं, हे सोसण्यापेक्षा जगू नये, मरून जावं...’

‘मासाहेब!’ राजांनी जिजाबाईंनी मिठी घातली. त्यांचे डोळे भरून आले. ‘मासाहेब! असं बोलू नका. आता काही सोसावं लागणार नाही. तसं झालं, तर आमच्या छत्रपतिपदाला अर्थ राहायचा नाही...’

सिंहासनारोहणापेक्षाही आईच्या मिठीने अधिक भारावून राजे महालाबाहेर आले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजसदरेच्या मंडपातून गाण्याचे सूर उठत होते.

□

१५

राज्याभिषेकाचा उत्सव गडावर सुरू झाला. नृत्य, गायन, पोवाडे यांच्या नादात गड धुंदावला. आलेल्या जुवारींनी ठिकठिकाणी पट मांडले. नशिबाचे फासे अजमावण्यासाठी मावळ्यांचे कडे त्यांच्या भोवती जमू लागले. बंगाली जादुगारांनी मांडलेले जादूचे खेळ पाहून बायाबापड्या भीत होत्या, पुरुष थक्क होत होते. नाना पक्वान्नांची अन्नछत्रे गडावर ठिकठिकाणी उघडली होती. राजारामांना घेऊन संभाजीराजे साऱ्या गडावर फिरत होते. शहाजादा अकबराच्या छावणीची आठवण त्यांच्या मनात जागी होत होती.

राजे आपल्या महालात एकटेच बसले होते. राज्याभिषेकाने वाढलेल्या जबाबदारीची त्यांना जाणीव होती. राज्याची व्यवस्था लावायची होती. नवे स्वरूप प्राप्त करून घ्यायचे होते. मनात खूप मनसुबे तरळत होते. तोच खाकरण्याचा आवाज झाला; आणि राजांचा समाधिभंग झाला. राजांनी मागे पाहिले. पाठीमागे सोयराबाई उभ्या होत्या. राजे त्यांच्या रूपाकडे पाहतच राहिले.

‘असं काय पाहायचं?’

‘खरं सांगू? खरोखरच अगदी काल लग्न झाल्यासारखं वाटतं. नव्या नवरीसारख्या भासता.’

सोयराबाई लाजल्या. ‘तर, तर! सगळं खोटं! महालात आले, येऊन मागे उभी राहिले, तरी स्वारींना पत्ता लागत नाही. मोठ्या हौसेनं आम्ही आलो होतो.’

‘ते बरं?’ राजांनी कुतूहलाने विचारले.

सोयराबाईंनी पाय पुढे केला. वस्त्र किंचित उचलले. राजांची नजर त्यांच्या पायांतल्या सोन्याच्या जोडव्यांवर व पायीच्या सुवर्णसाखळ्यांवर गेली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘गागाभट्टांनी सांगितलं की, अभिषिक्त राणीला सुवर्णसाखळ्या आणि सुवर्णजोडवी घालण्याचा मान असतो, म्हणून.’

राजांची नजर त्या साखळ्यांवर स्थिरावली; आणि न कळत ते बोलून गेले,

‘राणीसाहेब! खरं सांगू? सोनं बोलत नाही. चांदी बोलते.’

‘म्हणजे?’

राजे चटकन भानावर आले. सावरून घेत ते म्हणाले,

‘पाहा ना! चांदीच्या साखळ्या असत्या, तर त्यांच्या आवाजामुळं आम्हांला तुमच्या आगमनाची वर्दी चटकन लागली असती.’

‘आवाज नसला, म्हणून काय झालं? सोन्याच्या आहेत ना! अभिषेक झाल्यापासून बायाबापड्यांची गर्दी उडाली पाया पडायला. जीव नको झाला. आणि पाया पडतात, तेही पायांवर डोकं ठेवून.’

‘राज्ञीपद आहे ना! कंटाळा करून कसं चालेल?’

‘ते का मला कळत नाही? म्हणूनच सारं सोसते. अनाजीदेखील हेच म्हणाले. जाते मी. महालात बायका थांबल्या असतील.’

‘थोडं थांबा.’ म्हणत राजे उठले. त्यांनी संदूक उघडली. संदुकीतून एक सुबक नक्षीकाम केलेली हस्तीदंती पेटी काढून ती सोयराबाईंच्या हाती दिली.

‘काय हे?’

‘कर्नाटकातून बुक्केफरोज आला होता. त्याच्याकडून ही गंधाली विकत घेतली... तुमच्याकरिता. उघडून पाहा ना!’

सोयराबाईंनी पेटी उघडली. त्या छोट्या पेटीत उंची अत्तराच्या बुधल्या होत्या. राजे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

म्हणाले,

‘आठवतं? आग्र्याला जाताना तुम्ही अत्तर आणायला सांगितलं होतं. पण आम्ही आणू शकलो नाही.’

‘किती लक्षात राहतं स्वारींच्या!’

‘दिलं वचन विसरलं, तर छत्रपती कोण म्हणेल आम्हांला?’

सोयराबाईंचे लक्ष राजांच्या हातातल्या अंगठीवर गेले. हिऱ्याची अंगठी चमकत होती. त्यांनी विचारले,

‘नवी केली?’

‘नाही. काल इंग्रज वकिलानं भेट दिली.’

‘हे हिरे चमकतात; मग आमचे हिरे का चमकत नाहीत?’

‘ह्या हिऱ्यांना पैलू पाडलेत, राणीसाहेब! नाही तर साधा हिऱ्याचा खडा गारगोटीसारखाच दिसतो. हिऱ्याचं कशाला? मनाचंही तेच आहे. मन हेदेखील हिऱ्यासारखंच निर्मळ, निष्पाप असतं. त्याला ज्ञानाचे, व्यवहाराचे पैलू पडले, तरच ते प्रकाशित होतं.’

‘असू दे! आमचं मन निर्मळ नसेल.’ सोयराबाई एकदम संतापल्या.

राजे थक्क झाले. ते म्हणाले,

‘राणीसाहेब, आता असा संताप आवरायला हवा. नेमका कुतर्क उचलण्याची वृत्ती बदलायला हवी. तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. तुम्ही आता महाराणी आहात.’

सोयराबाई एकदम हसल्या. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजाराम कुठं आहेत?’

‘त्यांचा घरात पत्ता कुठं आहे? आपल्या दादा महाराजांच्याबरोबर गाण्याबजावण्यांत गर्क आहेत ते.’

‘सिंहासनारोहणप्रसंगी कुठं दिसले नाहीत, म्हणून विचारलं. झोपले होते, वाटतं?’

बिथरलेल्या सोयराबाई म्हणाल्या, ‘हो, हो! किती वेळ जागणार?’

‘शंभर वर्षं आयुष्य आहे!!’

सोयराबाईंनी महालात प्रवेश करणाऱ्या राजाराम-संभाजींकडे पाहिले. दोघांनी राजांना, सोयराबाईंना मुजरा केला.

राजांनी राजारामांना कडेवर घेतले. त्यांना कवटाळीत राजे म्हणाले,

‘बाळराजे, आम्ही तुमचीच आठवण काढली होती. आम्ही सिंहासनारोहण केलं, आणि नेमके तुम्ही झोपी गेलात हं!’

‘साफ खोटं! आम्ही मुळीच झोपलो नव्हतो.’

‘बाळराजे!’ घाबऱ्या होऊन सोयराबाई ओरडल्या.

‘मग कुठं होता, राजे?’ राजांनी विचारले.

‘आईसाहेबांनी आम्हांला मना केली; आम्हांला सातमहालीच ठेवलं.’ राजारामांनी सांगून टाकले.

राजे आश्चर्यचकित होऊन सोयराबाईंच्याकडे पाहत होते. सोयराबाई बावरल्या होत्या. या चटकन संतापल्या, आणि त्या भरात बोलून गेल्या,

‘युवराज म्हणून संभाजीराजे अभिषेकाला बसणार. युवराज म्हणून ते सिंहासनाच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पायरीवर बसणार आणि राजाराम बारगीर म्हणून उभे राहून काय पाहणार होते? त्या अपमानापेक्षा...’

‘राणीसाहेब, जबान आवरा!...’ राजे बोलले.

सोयराबाईंनी हातची गंधाली टाकली. अत्तराचे बुधले चौफेर उधळले आणि राणीसाहेब महालाबाहेर निघून गेल्या.

□

१६

शिवाजीराजांनी रात्रीचा दरबार भरविला होता. राजसदरेच्या बैठकीवर अनेक लोडतक्क्यांच्या भारी बैठकी लावल्या होत्या. सहस्र ज्योतींनी नटलेल्या वृक्षदीपांनी सारी सदर झगमगत होती. मशालधारी सावधतेने उभे होते. समयांच्या उजेडात रत्नखचित सिंहासन चमकत होते. चिकाच्या पडद्याआड राणीवसा हजर झाला होता. सारे सरदार, मानकरी आपापल्या जागी मानाप्रमाणे बसले होते. सिंहासनाच्या डाव्या बाजूला राजसदरेच्या लगत असलेल्या खास बैठकीवर बसलेला इंग्रज वकील ऑग्झिंडेन आपल्या लोकवेगळ्या पोशाखाने साऱ्यांचे लक्ष वेधून घेत होता. बिछायतीने आच्छादिलेल्या राजसदरेच्या बैठकीवर संभाजीराजे व राजाराम बसले होते.

दरबारी येण्यासाठी महाराज महालाबाहेर पडण्याच्या तयारीत असता त्यांनी शेजारी उभ्या असलेल्या हंबीररावांना विचारले,

‘मासाहेब दरबारी गेल्या?’

‘जी, नाही.’

‘का?’ राजांनी वर पाहत विचारले.

‘राज्याभिषेकाची रात्रभर दगदग झाली. त्यामुळं साऱ्यांनी त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अस्सं! चला, आपण मासाहेबांना भेटूनच दरबारी जाऊ!’

राजे महालाबाहेर पडले. आपल्या महाली जिजाबाई बैठकीवर बसल्या होत्या. शेजारी मनोहारी उभी होती. राजांनी पाय शिवले.

‘औक्षवंत व्हा! अरे, किती वेळा पाया पडतोस?’

‘तीच आमची तपश्चर्या आहे!... तब्येत बरी नाही, म्हणून कळलं.’

जिजाबाई हसल्या. म्हणाल्या,

‘छे, रे! छान आहे तब्येत. तुझा राज्याभिषेक पाहिल्यापासून झोप तर कुठच्या कुठं उडून गेलीय्. झोप येत नाही, स्वस्थ एका जागेला बसवत नाही, असं काही तरी झालंय्, बघ.’

‘मोठ्या हौसेनं आम्ही आजचा दरबार भरवला... तुमच्यासाठी; आणि तुम्हीच येत नाही, हे समजल्यावर मन खट्टू झालं.’

‘माझ्यासाठी?’

‘ते दरबारी आलं, म्हणजे कळेल.’

‘येते ना! डोळे मिटायच्या आधी सारं पाहून घेऊ दे मला.’

राजांच्या चेहऱ्यावरचे हसू विरलेले पाहताच गडबडीने जिजाबाई म्हणाल्या,

‘ऱ्हायलं! पुन्हा नाही म्हणणार. तू पुढं हो. मी आलेच.’

राजे क्षणभर उभे राहिले. म्हणाले,

‘अंहं! आमच्याबरोबरच चला.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाईंना हसू आले.

‘बरं, बाबा! तुझ्याबरोबरच येते. आजवर बालहट्ट पुरवला; आता राजहट्ट!’

सारे हसले. जिजाबाई गुडघ्यांचा आधार घेत उठल्या. राजांनी त्यांना हात दिला. जरीकाडीचे श्वेत वस्त्र परिधान केलेल्या जिजाबाई राजांच्या डाव्या हाताचा आधार घेऊन महालाबाहेर पडल्या. गुर्झबदार अल्काब पुकारत होते...

‘क्षत्रियकुलावतंस गोब्राह्मणप्रतिपालक...’

राजसदरेजवळ येताच जिजाबाई मनोहारीच्या आधाराने राणीवशाकडे वळल्या. राजे राजसदरेकडे जाऊ लागले.

अल्काबांच्या पुकाराने सावध झालेली सभा उभी होती. राजांनी प्रवेश करताच मुजरे झडले.

राजे सिंहासनाच्या पायऱ्या चढत होते. अल्काब पुकारले जात होते...

‘निग्गाह रक्खो! खडी ताजीम... आस्ते कदम महाराज, आस्ते कदम ऽ ऽ’

राजे सिंहासनावर बसले. गुर्झबदाराने सुवर्णदंडाचा दोनदा आवाज दिला. झुकलेल्या नजरा वर आल्या. राजांनी सर्वांना बसण्याची इशारत दिली. सारा दरबार स्थानापन्न झाला. राजे दरबारावरून आपली नजर फिरवीत होते. राजाराम, संभाजी यांना पाहताच त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. राजांनी समोर नजर टाकली. राजसभेच्या मधोमध घातलेल्या सुशोभित बैठकीवर कविराज भूषण उभे होते. तेजस्वी मुद्रा. श्वेत अंगरख्यावर रुळणारा केशरी शेला. कानांत चमकणारी सुवर्णकुंडले. कवी भूषणही राजांचे रूप डोळ्यांत साठवीत होते. राजांनी भूषणावर आपली नजर स्थिरावली. भूषणाचे हात जोडले होते.

‘कवी!’ महाराज बोलते झाले. ‘अत्यंत शुभ घडीला तुमचे पाय आमच्या गडाला लागले. श्रीजगदंबेनं आमच्या हातून आजवर जे घडवलं, तिच्या इच्छेवरून जे स्वप्न साकार झालं, त्याचं रूप तुमच्या अधिकारवाणीनं ऐकावं, असं आम्हांला वाटतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भूषणाने आपला शेला सावरला. हात उंचावत तो म्हणाला,

‘ऐक, राजा! तुझ्या देवतुल्य पराक्रमाचं अमर काव्य गाण्याचं भाग्य म्हणजे जीवनाचं सार्थक, असं माझ्यासारख्या कवीला वाटतं. ऐक, राजा! शांत चित्तानं, प्रेमभरानं तुझ्या दिग्विजयाचं काव्य ऐक.’

राजसभा स्थिरावली. कवी कलशासारख्या रसज्ञ विद्वानाची नजर भूषणावर स्थिरावली.

-आणि स्तब्ध राजमहालात अति लावण्यमयी नर्तकीचे एकसुराचे बोल पदन्यासाने बोलते व्हावेत, तसा कवी भूषणाचा एक एक शब्द राजसभेत भरू लागला.

‘साजि चतुरंग बीररंगमें तुरंग चढि,
सरजा सिवाजी जंग जीतन चलत है।
भूषन भनत नाद बिहद नगारन के,
नदी नद मद गैबरनके रलत है।।’

‘शूर शिवाजी चतुरंग सैन्य घेऊन, वीरोचित उत्साहाने घोड्यावर बसून युद्ध जिंकण्यासाठी निघाला आहे. नगाऱ्याचा भयंकर ध्वनी उठतो आहे; आणि उन्मत्त हत्तींच्या गंडस्थळांतून निघणारा मद नदीनाल्यांच्या प्रवाहांत मिसळत आहे...’

महाराज साऱ्या दरबाराबरोबरच मंत्रमुग्ध होऊन ते काव्य ऐकत होते. प्रत्येक कडव्याबरोबर भूषणाच्या आवाजाला धार चढत होती. घोड्यांच्या टापांनी उठणारा धुळीचा लोट नजरेसमोर येत होता. एक एक मोहीम राजांच्या नजरेसमोरून सरकत होती. अफझलवध झाला. शास्ताखान आला. भूषण सांगत होता...

‘तनियाँ न तिलक सुथनियाँ पगनिया न,
घामैं घुमराती छोडि सोजियाँ सुखन की।।’

‘मोगल स्त्रियांचे हाल तर विचारू नका. त्यांना आपल्या अंगांतील चोळ्यांचे व सदऱ्यांचे, तसेच, पायांतील विजारींचे व जोड्यांचे भान राहिले नाही.’

शास्ताखानाच्या महालात भर रात्री प्रवेश केला, तेव्हाचे दृश्य असेच काहीतरी होते. त्या आठवणीबरोबर राजांच्या चेहऱ्यावर हास्य विलसले. भूषण एकापाठोपाठ एक एक

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

प्रसंग डोळ्यांसमोर उभा करीत होता. राजे तल्लीन होऊन, वेळकाळाचे बंधन विसरून ते काव्य ऐकत होते. भूषण आग्र्याचा प्रसंग आपल्या प्रभावी काव्यवाणीने सांगत होता. त्या आठवणीने बसल्या जागी राजांच्या मुठी वळल्या गेल्या...

शिवाजी सिंहासारखी झडप घालील, की काय, ह्या भीतीने औरंगजेबाने घुसलखान्यात शिवाजीची भेट घेतली. सर्वांच्या वर उभे राहण्याची ज्याची योग्यता, त्याला हलक्या जागी उभे करण्यात आले. शिवाजीराजांचा संताप उफाळला...

'भूषन भनत महावीर बलकन लागो,
सारी पातसाही के उडाय गये जियरे।
तमक ते लाल मुख सिबा को निरखी भये,
स्याह मुख नौरँग सिपाह मुख पियरे।।'

'भूषण म्हणतो : महावीर शिवाजी संतप्त होऊन बडबडू लागला, तेव्हा दरबारातील सर्व लोकांचे जीव उडून गेले. संतापाने लाल झालेले शिवाजीचे मुख पाहून औरंगजेबाचे तोंड काळे ठिक्कर पडले...'

कवी भूषण मोगलाईचे अत्याचार वर्णन करीत होते. साऱ्या सभेत त्वेष संचारला होता.

'भूषन भनत भाग्यो कासीपति विश्वनाथ,
और कौन गिनतीमें भूली गति भब की।
चारों वर्ण धर्म छोडि कलमा निवाज पढि,
सिवाजी न होतो तो सुनति होत सब की।।'

'औरंगजेबाने मथुरेची कत्तल केली, आणि 'रब'ची द्वाही फिरविली; देवदेवतांच्या खणत्या केल्या. लाखो हिंदू मुसलमान झाले. एवढेच काय, प्रत्यक्ष काशीविश्वनाथ भयभीत होऊन पळाले. महादेवाचीच अशी त्रेधा उडाली. चारही वर्णांना आपले धर्म सोडून नमाज पढावी लागली असती; शिवाजी न होता, तर सर्वांची सुंता झाली असती!'

ते काव्य ऐकत असलेले गागाभट्ट राजसभेचा रिवाज विसरून, बेभान होऊन, आपल्या उच्चासनावरून उठले. हात उंचावत ते भूषणजवळ आले.

'धन्य हो, भूषण! धन्य!' म्हणत त्यांनी भूषणला मिठी मारली. त्यांना काही सुचेना. आपल्या गळ्यातील प्रवाळांची माला त्यांनी भूषणच्या गळ्यात घातली. दोन श्रेष्ठ

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गुणिजनांची भेट सारी सभा पाहत होती.

कवी भूषण राजांना वंदन करून परत आपले काव्य सांगू लागले. श्लोक संपला, की राजे 'आणखी' म्हणत. काव्य स्त्रवत होते; रात्र पुढे सरकत होती. मध्यरात्रीनंतर भूषण थांबले. राजांनी विचारले,

'भूषण, थांबलात का? आमचे कान अतृप्तच आहेत!'

'राजा, मध्यरात्र होऊन गेली. आता आज्ञा व्हावी. परत जेव्हा आज्ञा होईल, तेव्हा हा दास आपल्या सेवेला हजर आहे.'

'कवी भूषण! आज राज्याभिषेक-उत्सव प्रसंग. आम्ही मनाशी असं ठरवलं होतं की, आपल्या प्रत्येक श्लोकाला लक्ष रुपये बिदागी द्यायची. म्हटले असते, तेवढे सारे श्लोक ऐकायला आम्ही तयार होतो.'

सारा दरबार त्या बोलांनी थक्क झाला. कवी भूषणाच्या चेहऱ्यावर प्रसन्न स्मित झळकले. तो शांतपणे म्हणाला,

'राजा, तसं झालं असतं, तर करोडो रुपयांची तुझी संपदादेखील संपून गेली असती! तुझी स्तुती करीत असता जिव्हेला वीट येईल कसा? तुझी प्रजा तुला देव मानते. तुझ्या कार्यासाठी जीव वेचायला अगणित माणसं आतुरतेनं वाट पाहत असतात. ही तुझी संपदा वर्णायला कंटाळा येईल कसा? राजा! हे तर परम भाग्य! प्रत्येक कवनाला लाख रुपयांपेक्षा तू प्रेमभरानं एखादं बिल्वदळ जरी माझ्या पदरी टाकलंस, तरी मी जन्माचा गुलाम होऊन जाईन, ही तुझी योग्यता! राजा, विजयश्री तुला सदैव माळ घालो!'

भूषणाने हात जोडले. राजे सिंहासनावरून उठले. भूषणाच्या समोर येऊन त्यांनी आपल्या गळ्यातला कंठा भूषणाच्या गळ्यात घातला.

'कविराज भूषण! आमच्या दरबारी अष्टप्रधान आहेत, राजपंडित आहेत; पण राजकवीची जागा मोकळी होती. तुमच्यामुळं त्या जागेला शोभा आली.'

राजकवी भूषणाने नम्र भावाने व हर्षित मनाने त्या मानाचा स्वीकार केला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे पायऱ्या चढून येथे जिजाबाई बसल्या होत्या, तेथे गेले. जिजाबाई लोडाला टेकून बसल्या होत्या. गालांवर अश्रू सुकले होते. राजे जवळ बसले.

'मासाहेब, आठवतं? मागे एकदा आपण शाहिराचं काव्य ऐकत होता. तेव्हा आम्ही म्हणालो होतो...'

जिजाबाईंनी राजांना पुढे बोलू दिले नाही. त्यांच्या गालांवरून हात फिरवीत त्या कापऱ्या आवाजात म्हणाल्या,

'शिवबा, सारं आठवतं. तुझं राज्यारोहण पाहून डोळे तृप्त झाले होते; कान मात्र अतृप्तच होते. आज तेही तृप्त केलेस. मातृऋणातून मोकळा झालास...'

□

१७

राजांचा राज्याभिषेक झाला; आणि गडावर उत्सव सुरू झाला. राज्याभिषेकासाठी गडावर आलेले मुख्य किल्लेदार, राजांचे अधिकारी राजांचा निरोप घेऊन परतू लागले. राजांनी सर्वांना मानवस्त्रे देऊन निरोप दिला. फिरंगोजीही भूपाळगडाला निघून गेले.

गडावर उत्सव चालू असता राजे मात्र त्यात लक्ष न घालता राज्यकारभारात गुंतले होते, नव्या अष्टप्रधानांची कामगिरी ठरवीत होते. या शुभ प्रसंगाच्या निमित्ताने राजांच्या शिक्क्याची तांब्याची शिवराई व सोन्याची शिवराई दोन टांकसाळींत पाडण्यास सुरुवात झाली. अष्टप्रधानांत बाळाजींनी यावे, असे राजांना वाटत होते. पण बाळाजींनी प्रधानपदाऐवजी चिटणीसपद वंशपरंपरेने मागितले. राजांनी मोठ्या आनंदाने रुप्याचे कलमदान, घोडा, चवरी, चौकडा व भूषणे यांसह चिटणीसपदाची वस्त्रे बाळाजी आवजींना खास दरबार भरवून दिली.

दरबारात मोरोपंत, अनाजी, हंबीरराव, त्र्यंबकराव, रामचंद्रपंत, दत्ताजीपंत, रघुनाथपंत, निराजीपंत ही अष्टप्रधान मंडळी हजर होती. राजांनी केलेला बाळाजींचा सन्मान पाहून साऱ्यांनाच समाधान वाटत होते. अष्टप्रधानांबरोबरच दरबारात गागाभट्ट, भूषण, अनंतभट्ट हीही मंडळी होती. राजांची नजर मोरोपंतांच्याकडे वळली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मोरोपंत, आमच्या बाळाजींना आम्ही प्रधानपद देऊ केलं होतं. पण त्यांनी चिटणीसपदाचीच निवड केली.’

‘कदाचित त्यांचा विनय असेल, महाराज!’ मोरोपंत म्हणाले.

‘मुळीच नाही. उलट चिटणिशी मागण्यात त्यांनी हुशारीच दाखविली, असा आमचा समज आहे. तलवारीइतकंच कलमदानाला महत्त्व आहे, हे त्यांनी जाणलं, याचा आम्हांला आनंद आहे.’

राजे क्षणभर थांबले; आणि अचानक त्यांनी आज्ञा केली,

‘आमच्या मदारी मेहतराला बोलवा.’

त्या आज्ञेने साऱ्यांना आश्चर्य वाटले. मदारी मेहतराची आठवण राजांनी का केली, याचे कोडे कुणाला उलगडले नाही. राजांच्या चेहऱ्यावर हसू उमटले.

‘मोरोपंत, आम्ही मदारीची आठवण का केली, याचं आश्चर्य वाटलं ना? या प्रसंगी त्याची आठवण व्हायची नाही, तर कुणाची? आग्र्याच्या पिंजऱ्यातून आम्ही सुटण्याचा विचार करीत होतो. एकामागून एक सारे या ना त्या कारणानं बाहेर पाठवले गेले. शेवटी राहिले फक्त हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहतर. एक जाणता, दुसरा नेणता. पण दोघेही निष्ठावंत. हिरोजीनं आमची जागा घेतली; आणि मदारी आमचा भास टिकविण्यासाठी पाय रगडण्यात मग्न झाला. ते दोघे सुटण्याची शक्यता फार कमी होती. जाणूनबुजून मृत्यूचं स्वागत करणारे दोघे. हिरोजीला आम्ही नावाजलं; पण मदारी तसाच राहिला.’

मदारी दरबारात आला. राजांनी त्याला प्रेमाने जवळ बोलावून घेतले. विशीच्या वयाचा मदारी दरबारच्या आमंत्रणाने बिचकला होता.

‘मदारी, तुम्ही राखलंत, म्हणून आम्ही आज छत्रपती झालो. तुझ्या निष्ठेमुळं आमचं बत्तीस मणांचं सुवर्णसिंहासन सजलं. आजपासून आमच्या सिंहासनाची व्यवस्था आम्ही तुझ्यावर सोपवीत आहो.’

राजांनी मदारीला मानवस्त्रे देऊन त्याची नेमणूक सिंहासन-व्यवस्थेवर केली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गागाभट्ट आसनावरून उठले. ते म्हणाले,

'राजन्! राज्याभिषेकानंतर ज्या व्हावयास हव्या, त्या साऱ्या गोष्टी झाल्या. पण अद्याप एक गोष्ट राहिली आहे.'

'कोणती?' राजांनी विचारले.

'आमची इच्छा आहे की, राज्याभिषेकापासून नव्या राज्याभिषेकशकाची सुरुवात व्हावी.'

दरबारी असलेल्या कृष्णाजी ज्योतिष्यांनी ती सूचना उचलून धरली. राजांनी मान्यता दिली. ते कृष्णाजींना म्हणाले,

'कृष्णाजी, आपण आमच्या दरबारचे राजज्योतिषी. आपलं पंचांग शुद्ध व्हावं. यासाठी तुम्ही विचार करा. अभ्यासपूर्वक करणग्रंथ तयार करावा.'

कृष्णाजीपंतांनी ती जबाबदारी आनंदाने उचलली आणि त्याचबरोबर राजांनी रघुनाथपंडितांना राज्यव्यवहारकोष तयार करण्याची आज्ञा केली.

'महाराज, आपला हेतू समजला नाही.' पंडितांनी अदबीने सांगितले.

राजांच्या चेहऱ्यावर स्मित उजळले. ते म्हणाले,

'आपण पंडित! आपल्या ध्यानी हे यायला हवं होतं. राज्यव्यवहारातल्या चार कागदपत्रांवरून आपण नजर टाकलीत, तर आपल्या ध्यानी आमचा हेतू येईल. आपल्या भाषेचे व्यवहारातले जुने शब्द जाऊन, त्या जागी फारसी शब्दांचा भरणा वाढला आहे. भाषासुधारणा व्हायला हवी. ह्यासाठी नुसता राज्यव्यवहारकोष करून भागणार नाही. ते शब्द आवर्जून वापरात येतात, या बाबतीत आमचे अष्टप्रधान, राजपंडित या सर्वांनी जातीनं दक्ष राहायला हवं.'

राजांच्या त्या बोलण्याने गागाभट्ट आनंदित झाले. त्यांना राहवले नाही.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, आपण छत्रपती बनलात, हे आमचं भाग्य. पण त्याचबरोबर आपल्याला वाढत्या जबाबदारीची जाणीव होते आहे, हे पाहून आम्ही धन्य झालो!’

‘तसं नाही, आचार्य!’ राजे हसून म्हणाले, ‘उलट, जबाबदारी कमी झाल्यानं आम्हांला पंचांग, राज्यव्यवहारकोष हे सुचायला लागले.’

साऱ्यांच्या चेहऱ्यांवर स्मित उमटले. राजांचा चेहरा मात्र गंभीर झाला. ते संथपणे म्हणाले,

‘आम्ही थट्टेनं म्हणालो नाही. आजवरच्या राजेपणात आम्ही एकाकी निर्णय केले; प्रसंगी सल्ला घेतला. तेव्हा जबाबदारी फार मोठी होती. पण आज आमचं पारखून-सुलाखून तयार झालेलं अष्टप्रधानमंडळ आम्ही उभं केलं. राज्याच्या कक्षा वाढल्या, वाढतील. ती जबाबदारी एकाला पेलणं कठीण आहे. हे आमचं राज्य नव्हे; हे श्रीचं राज्य. ते त्याच जोखमीनं तोलायला हवं. संभाळायला हवं. यापुढचे निर्णय आमच्या बरोबरच आमचं प्रधानमंत्रिमंडळही घेईल. आम्ही छत्रपती झालो खरे! छत्राचा सुवर्णकळस कितीही चमकत असला, तरी छत्राचा भार आणि डौल छत्रतणावाच सावरीत असतात.’

राजे दरबारातून उठले. दरबार संपला. राजांचे लक्ष दरबारात गुंतले नव्हते. राज्याभिषेकापासून त्यांचे लक्ष जिजाबाईंच्याकडे लागून राहिले होते. राज्याभिषेकापासून त्या थकल्या होत्या. त्यांनी अंथरूण धरले होते. वैद्य औषध देत होते. कलशांनी ताईत मंत्रून दिले होते.

दोन प्रहरच्या वेळी राजे जिजाबाईंच्या महालातून बाहेर पडले, तोच त्यांच्या नजरेत कवी कलश आले. कवी कलश राजांच्या जवळ येऊन उभे राहिले. त्यांचा चेहरा चिंताग्रस्त दिसत होता.

‘राजे, निश्चलपुरी गोसावी निरोप घेण्यासाठी आलेत.’

‘कुठं निघाले?’

‘त्यांना गडाचं वास्तव्य मान्य नाही. ते गडाखाली उतरताहेत. आपला निरोप घेण्यासाठी सदरेत उभे आहेत.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गागाभट्टांच्याबद्दल निश्चलपुरींच्या मनात द्वेष आहे, हे राजांना जाणवले होते. एक होता प्रकांडपंडित, तर दुसरा होता तापसी गोसावी. दोघांनाही राजांनी संभाळून घेतले होते. राजे सदरेत आले. उपवासांनी व उग्र अनुष्ठानांनी कृश झालेले, व्याघ्रांबर नेसलेले, मस्तकी जटाभार असलेले, अंगावर भस्म चित्रित केलेले निश्चलपुरी सदरेत उभे होते.

‘गोसावी, आपण जाणार, असं कवी म्हणत होते.’

‘काही कालापुरतं जावं लागेल, असं वाटतं.’

‘कारण कळेल?’

निश्चलपुरींनी संतप्त नि:श्वास सोडला. त्यांची आग उफाळली.

‘राजन्, गागाभट्टांनी राज्याभिषेकाकरिता निवडलेला मुहूर्त मला मान्य नव्हता, हे तुम्ही जाणताच. ज्या प्रसंगी आधी सेनापती जातो, भार्या कालवश होते, तो महूर्त कसला? राज्याभिषेकाच्या आधल्या दिवशी उल्कापात झाला. हे उत्पात गागाभट्टांनी जाणावयास हवे होते. दोष मोठा आहे. राज्याभिषेकापासून तेरा, बावीस, पंचावन्न व पासष्ट या दिवशी असेच उत्पात घडतील...’

राजे नम्रपणे म्हणाले,

‘आपण ज्ञानी आहात. या अनिष्टनिवारणार्थ जे कराल, ते मान्य आहे.’

निश्चलपुरी हसले. ते म्हणाले,

‘राजा, मी जातो. तुला अनुभव आला, की मला निरोप पाठव. मी येईन; तांत्रिक अभिषेक करून भावी अनर्थ टाळीन.’

राजांनी निश्चलपुरींना सन्मानपूर्वक निरोप दिला.

निश्चलपुरींच्या भविष्यवाणीने राजांचे मन चिंताग्रस्त झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

१८

राजे जिजाबाईंच्या जवळ बसले होते. महालात समया पेटल्या होत्या. मासाहेब क्षीण भासत होत्या. महालात संभाजीराजे, सोयराबाई, पुतळाबाई, राजाराम हजर होते. राजाराम पलंगावर जिजाबाईंच्या जवळ बसले होते. जिजाबाई त्यांच्या केसांवरून हात फिरवीत होत्या. बसून कंटाळलेले राजाराम जिजाबाईंच्या जवळ कलंडले. सोयराबाई पुढे झाल्या. राजारामांचा हात धरीत त्या म्हणाल्या,

'उठा, बाळराजे, झोपायला जा. मासाहेब आजारी आहेत. एवढंही कळत नाही?'

जिजाबाई म्हणाल्या, 'राहू दे... शिवबा, हे पोर भारी प्रेमळ आहे, बघ. सांगाल, ते ऐकतं. फार शांत आहे. मला बरं नाही, तर ही दोघं सारखी आत-बाहेर करीत असतात.'

'सारे लाड पुरवले जातात ना!' राजे म्हणाले.

'नाही, रे! जातीनंच प्रेमळ आहेत. तुझ्या पोटी दोन नक्षत्रंच आली आहेत. एक आहे सूर्य, आणि दुसरा चंद्र. एक अत्यंत स्वाभिमानी, नाकावर माशी बसवून घेत नाही. तर दुसरा एकदम शांत.'

राजे काही बोलले नाहीत. जिजाबाईंच्या ते ध्यानी आले. त्या म्हणाल्या,

'काळजी कसली करता, राजे? थोडी दगदग झाली ना, त्यामुळं हा थकवा आला. जाईल सावकाश आणि नाही गेला, म्हणून काही बिघडणार नाही... राजे, आमचं ऐकाल?'

'सांगा, मासाहेब!' राजे म्हणाले.

'आम्हांला आता पाचाडला हलवा.'

'जरा बरं वाटलं, की...'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नको, रे! मेण्यातून मी जाईन. पावसाळा आला. झड बसली, की काही जमायचं नाही... आणि गडावरची पावसाळी हवा मला मानवायची नाही.’

राजांनाही डोळ्यांसमोर पावसाळा दिसत होता. जिजाबाईंना गडावरची पावसाळी हवा मानवत नाही, हे त्यांना माहीत होतं. वैद्यांनीही तो सल्ला दिला होता.

‘ठीक आहे, मासाहेब. आपण उद्या पाचाडला जाऊ.’

‘तुम्ही कशाला येता? इथं सारा पसारा असाच पडला आहे. संभाजीला घेऊन जाते. पुतळा पण येईल... येशील ना, ग?’

‘जी!’ पुतळाबाई म्हणाल्या.

‘तुम्ही इथली सावरासावर झाली, की मग या.’

दुसऱ्या दिवशी मेणे तयार झाले. पुतळाबाई व संभाजी यांसह मासाहेब गडाखाली उतरल्या. महादरवाजापर्यंत राजे पोहोचवावयास गेले.

राजे परत राज्यकारभारात गुंतले. राजांनी आपले अष्टप्रधान, पंडित यांना बोलाविले. राजे सर्वांना आपला मनोदय बोलून दाखवीत होते. राजे म्हणाले,

‘आता या राज्याभिषेकामुळं जबाबदारी वाढली. एका माणसाच्या बुद्धीनं हा गाडा निर्दोषपणे चालविता येणार नाही. यापुढं राज्यकारभाराचे सारे निर्णय आपण सर्वांनी मिळून करायला हवेत.’

‘आम्ही सल्ला देण्यात कधीही...’ अनाजी म्हणाले.

‘आम्हांला सल्ला नको. यापुढं आम्हांला निर्णय लागतील; आणि ते अष्टप्रधानांनी आपल्या जबाबदारीवर पार पाडायला हवेत. यापुढं प्रधानमंडळानं केलेले निर्णय आम्ही अमलात आणू, याबद्दल आम्ही खात्री देतो.’

राजांचा तो निर्णय ऐकून मंत्रिमंडळ चकित झाले. वाढत्या जबाबदारीने त्यांची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अस्वस्थता वाढली. राजांनी निराजीपंतांना विचारले,

‘पंत, आमच्या राज्याभिषेकाचा खर्च किती आला?’

‘कोटी होनांच्या घरात खर्चाचा आकडा पडेल, असं वाटतं.’

‘तो भरून काढायला मिरासपट्टी आकारावी, असं आम्हांला वाटतं.’

‘प्रजा आनंदानं पट्टी भरील!’ मोरोपंत म्हणाले.

‘प्रजेला बळ लागण्याचं काहीच कारण नाही. पण आमच्या राज्याभिषेकाची शंका बाळगणाऱ्या देशमुख, देशकुलकर्णी, पाटील व गावकुलकर्णी यांसारख्या वतनी हक्क वसूल करणाऱ्यांवर ही पट्टी बसवा. पण याला अपवाद पुणे प्रांत करा. मोगलांनी या प्रांतावर फार जुलूम केलेत. तो प्रांत या पट्टीतून वगळा.’

दोन प्रहरी राजे भोजन करून नुकतेच शय्यागृहात गेले होते. राजांना निद्रा लागली.

अचानक राजांना जाग आली. डोळ्यांसमोर संभाजीराजे होते. त्यांचा चेहरा तांबडाबुंद बनला होता. त्यांना पाहताच राजे उठून बसले.

‘का आलात, शंभूबाळ?’ राजांनी धीर करून विचारले.

त्या प्रश्नाबरोबर त्यांच्या डोळ्यांत साकळलेले अश्रू झरले. राजांनी विचारले,

‘काय झालं, राजे?’

‘मासाहेबांची तब्येत जास्त...’

राजांनी त्वरेने कपडे केले. सोयराबाई महालात आल्या.

‘राणीसाहेब, मासाहेबांची तब्येत बरी नाही, म्हणे. आम्ही पुढं जातो. तुम्ही मागून या.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे वाड्याबाहेर पडले. मोरोपंत धावत आले; म्हणाले,

‘महाराज, पालखी सांगितलीय्.’

‘नको. आम्ही चालत जातो. तुम्ही गडावर लक्ष ठेवा.’

राजे चालत होते. सेवक पुढे धावत होते. राजांच्या बरोबर संभाजीराजे चालत असूनही राजे काही बोलत नव्हते. स्वप्नात असल्यासारखे ते गड उतरत होते.

राजे पाचाडच्या वाड्यात आले. सर्वत्र चिंतेचे वातावरण दिसत होते. राजे तडक जिजाबाईंच्या महालात गेले. जिजाबाई पलंगावर झोपल्या होत्या. महालात पुतळाबाई, येसूबाई उभ्या होत्या. राजांना पाहताच जिजाबाईंच्या चेहऱ्यावर हसू उमटले. राजे नजीक गेले.

‘राजे, आलात? बरं झालं. राजाराम कुठं आहे?’

‘मागून येत आहेत. तब्येत कशी आहे?’

‘चांगली आहे, रे! पण आता पिकलं पान. केव्हा तरी गळून पडायचंच.’

राजांची नजर पुतळाबाईंच्याकडे वळली. राजांनी विचारले,

‘मासाहेबांना औषध?’

‘मात्रा दिलीय्!’

‘मग वैद्यराज कोठे आहेत?’

‘गंगावैद्यांना आणण्यासाठी महाडला गेलेत.’

गंगावैद्य म्हणजे साक्षात धन्वंतरी, असा लौकिक. राजांना गंगाशास्त्री येणार, हे ऐकून बरे वाटले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रात्र पडण्याच्या आधी पाचाडचा वाडा भरून गेला. सोयराबाई, राजाराम, सगुणाबाई, सारे गडाखाली उतरले. अनाजी, मोरोपंत न राहवून गडाखाली आले.

दुसऱ्या दिवशी सकाळी गंगावैद्य पाचाडला आले. त्यांनी जिजाबाईंना पाहिले. वैद्यराज जेव्हा महालाच्या बाहेर आले, तेव्हा त्यांची मुद्रा गंभीर होती. राजांनी आशेने विचारले,

'वैद्यराज!'

वैद्यांनी अकारण घसा साफ केला, आपली पगडी सावरली. राजांच्या नजरेला नजर भिडवीत ते म्हणाले,

'महाराज, आम्ही वैद्य; व्यथा जाणणारे, व्यथेवर औषध देणारे. जेथे व्यथा नाही, आजार नाही, तेथे आम्ही औषध काय देणार?'

'आम्ही समजलो नाही.' राजांच्या मागे उभे असलेले निराजीपंत म्हणाले.

'पंत, आम्ही खरं तेच सांगितलं. समजुतीखातर मात्रा देईन, भस्म देईन. पण त्यांनी यश येईल, असं वाटत नाही. जगायचं, की नाही, ते आता रुग्णानंच ठरवायचं. ते त्यांच्याच हाती आहे.'

आपले गोळा झालेले अश्रू सांडायच्या आत राजे काही न बोलता जड पावलांनी उठले. ते जिजाबाईंच्या महाली गेले. जिजाबाईंच्या शेजारी राजाराम, संभाजी बसले होते. राजांना पाहताच जिजाबाई संभाजीराजांना म्हणाल्या,

'राजारामाला घेऊन बाहेर जा.'

दोघे बाहेर गेले. राजे जिजाबाईंच्या जवळ बसले. जिजाबाईंनी आपला हात राजांच्या पाठीवर ठेवला; आणि राजांचे अवसान ढळले. हातांत तोंड लपवून ते रडू लागले. काही क्षणांनी जिजाबाईंनी हाक मारली.

'राजे!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी आपले डोळे पुसले. त्यांची नजर जिजाबाईंच्याकडे वळली. जिजाबाई म्हणाल्या,

‘शिवबा! तुम्ही आता लहान नाही. हा शोक तुम्हांला शोभत नाही. आता वैद्यांना त्रास देऊ नका. स्वारी गेली, तेव्हा सती जात होते. तुम्ही आम्हांला सांगितलंत, ‘आमचा पुरुषार्थ बघायला कोणी राहिलं नाही. मासाहेब, तुम्ही जाऊ नका!’ तुमचं आम्ही ऐकलं. आम्ही राहिलो. त्याचा आम्हांला आनंद झाला. खरोखरच तुमचा पुरुषार्थ आम्हांला पाहायला मिळाला. तुम्ही छत्रपती झालात, ते पाहायला मिळालं. राहिल्याचं सार्थक झालं!’

‘मासाहेब!’

‘शिवबा! आम्ही का जन्माला पुरलो? मुलाचं कर्तेपण पाहत ज्येष्ठांनी जावं, यातच जीवनाचं यश नाही का? आणि मी गेले, तरी कुठं जाणार? देहानं गेले, तरी मनानं इथंच आहे मी. आमच्या आठवणीनं कधी डोळ्यांत पाणी आणू नका. ते पाहून आमच्या मनाला दुःख होईल. राजे, तुमच्यांत जीव पुरा जखडून गेला आहे. मागे पाहिलंत, तरी तुमची सावली बनून आम्ही राहिलो आहे, हे तुमच्या ध्यानी येईल.’

जिजाबाईंनी थोडी उसंत घेतली. राजांच्या पाठीवरून हात फिरवीत त्या म्हणाल्या,

‘राजाराम, संभाजी... दोघेही लहान आहेत. संभाजीला अजून समज यायची आहे. त्याला खूप जपायला हवं. मी होते, तोवर सारं केलं. आता, राजे, तुम्ही घरात लक्ष घालायला हवं.’

तेवढ्या बोलण्यानेही जिजाबाईंना थकवा आला. त्या डोळे मिटून पडून राहिल्या. राजे हळुवार पावलांनी बाहेर गेले.

मृत्यूच्या चाहुलीने सारा वाडा चूपचाप झाला. कवी कलशही जिजाबाईंना बरे वाटावे, म्हणून होमात गुंतले होते. निराजीपंतांनी जिजाबाईंच्या महालाबाहेर अनुष्ठानाला ब्राह्मण बसविले होते. त्या मंद आवाजाने वाड्याची गंभीरता वाढली होती. राजे आणि संभाजी जिजाबाईंच्या उशाशी सदैव बसून होते. राजांना भावी पोरकेपण जाणवत होते. राहून-राहून त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे जिजाबाईंच्या शेजारी बसले होते. दुसऱ्या बाजूला संभाजी जिजाबाईंच्या हातावरून हात फिरवीत होते. पुतळाबाई पायांशी बसल्या होत्या. सोयराबाई, सगुणाबाई महालात वावरत होत्या. दोन प्रहर टळत आली होती. राजे एकटक नजरेने डोळे मिटून पडलेल्या जिजाबाईंच्याकडे पाहत होते.

जिजाबाईंनी डोळे उघडले. राजांच्या हातावर त्यांचा हात पडला. त्या म्हणाल्या,

'शिवबा, विश्रांती घ्या.'

'मासाहेब, कसं वाटतं?'

'आता काय वाटायचं?... हां, शिवबा, असं डोळ्यांत पाणी आणू नका! हरघडी असं डोळ्यांत पाणी येणं बरं नव्हे. साऱ्या इच्छा पुऱ्या झाल्या. सगळं बघितलं. पुष्कळ जगले. आता कुडीचा मोह सोडलेला बरा.'

'मासाहेब!'

'शिवबा!'

संभाजीची हातावर स्थिरावलेली बोटे जिजाबाईंना जाणवली. त्यांची नजर संभाजीकडे वळली. उंचावलेल्या हाताने किंचित स्पर्श करताच संभाजींनी आपले मस्तक जिजाबाईंच्या छातीवर टेकले. संभाजी हुंदके देत होते. जिजाबाई त्यांच्या केसांतून हात फिरवीत होत्या.

'गप्प, शंभू. रडू नको!' जिजाबाईंनी आपली नजर राजांच्या वर वळविली. 'शिवबा, काळजी वाटते, ती या पोराची. याला जपा. लहान आहे. अजून यावी तेवढी समज नाही. चुकलंमाकलं, तर सुधारून घ्या. आता तुमच्याखेरीज याला मायेनं कोण बघणार? सई असती, तर काळजी नव्हती.'

त्याच वेळी अनाजी आत आले. राजांची नजर त्यांच्याकडे गेली.

'महाराज! समर्थ आलेत!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कोण?’

‘श्री समर्थ रामदास स्वामी!’

राजे गडबडीने उठले. जिजाबाईंनी विचारले,

‘महाराज आले?’

‘हो! अनाजी सांगतात.’

‘नशीब माझं! शेवटी दर्शन घडलं!’

राजे त्वरेने महालाबाहेर गेले. राजसदरेवर राजे आले. निराजीपंत तेथे उभे होते. राजांनी विचारले,

‘समर्थ कोठे आहेत?’

निराजीपंतांनी बोट दाखविले. वाड्याच्या प्रवेशद्वारातून येत असलेली समर्थांची मूर्ती राजांच्या नजरेत आली. चढाव काढून राजे त्यांना समोरे गेले.

राजांना पाहून समर्थांच्या चेहऱ्यावर हास्य विलसले. राजे नजीक गेले आणि अत्यंत नम्र भावाने त्यांनी खडावांवर विसावलेल्या, धुळीने माखलेल्या पावलांना स्पर्श केला. समर्थांनी राजांना उभे केले. आशीर्वादासाठी ओठ पुटपुटले. समर्थांचा गंभीर आवाज उमटला,

‘आईसाहेबांची प्रकृती कशी आहे?’

राजांचे डोळे उभ्या जागी भरून आले. घशातून शब्द उमटेना. समर्थांचीही तीच अवस्था झाली. राजांच्या उजव्या खांद्यावर समर्थांचा हात विसावला. समर्थ उद्गारले,

‘प्रभू रामचंद्रांची इच्छा! बोला, राजे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘वैद्य हरले. सारे उपाय थकले. आम्हांला काही सुचत नाही. आम्ही...’

राजांचे कंप पावणारे अंग, निखळलेले अश्रू पाहून समर्थांनी राजांना जवळ घेतले.

‘हां, राजे! विवेक करा, भावनेला बंध घाला... चला.’

समर्थ पायांवर पाणी घेऊन राजसदरेवर आले. राजांनी विचारले,

‘गुरुदेव, एकटेच आलात?’

‘छे, राजे! संन्यासी एकटा कसा येईल? आमचा प्रपंच आहे ना बरोबर. आमचा जीव उतावीळ बनला. ते बिचारे मागून येताहेत.’

अनाजींनी मांडलेल्या व्याघ्रासनाकडे बोट दाखवीत राजे म्हणाले,

‘बसावं.’

‘आईसाहेबांना भेटू या.’

‘आपण आल्याचं ऐकून मासाहेबांना फार बरं वाटलं.’

समर्थांसह राजे जिजाबाईंच्या महाली आले. संभाजीराजांनी समर्थांच्या पायांवर मस्तक ठेवले. पाठोपाठ सर्व राण्यांनी वंदन केले. जिजाबाई कष्टाने उठण्याचा प्रयत्न करीत होत्या. ते ध्यानी येताच समर्थ पुढे झाले.

‘आईसाहेब, उठण्याचे कष्ट घेऊ नका!’

‘महाराज, आपण आलात... दर्शन घडलं.’

‘आम्ही वचनबद्ध होतो, आई! आम्ही तपस्वी. तप:साधन हे आमचं कार्य. हा पुण्यसंचयाचा योग प्रभू रामचंद्रानं दाखविला. आम्ही कृतार्थ झालो!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाई त्या बोलण्यानं संकोचल्या. त्यांचे हात जोडलेले होते. समर्थांचे रूप त्या आपल्या नजरेत साठवीत होत्या.

‘महाराज, आता माझा भरवसा नाही.’

‘या जगात शाश्वत असं काहीच नाही.’

‘आपलं दर्शन घडलं. आता कोणतीच इच्छा राहिली नाही.’

‘तो समर्थ आहे.’

‘महाराज, जगदंबेनं सारं यश दिलं. वाटतं...’

‘आज्ञा, आई!’

‘असं बोलून आम्हांला...’

‘आई, आम्ही खोटं बोलत नसतो. आपली योग्यता थोर. म्हणूनच ते शब्द आमच्या मुखातून आले.’

जिजाबाईंच्या चेहऱ्यावर समाधान विलसत होते. आपल्या शुष्क ओठांवरून जीभ फिरवीत त्या म्हणाल्या,

‘महाराज, काळजी वाटते शिवबाची. आम्ही निघालो. आता त्याला मायेचं कोणी राहिलं नाही. ती जबाबदारी आपली. आम्ही त्याला तुमच्या ओट्यात टाकतो. त्याला संभाळा!’

समर्थ नुसते हसले.

‘एवढी जबाबदारी आपण स्वीकारावी.’

समर्थांचा चेहरा गंभीर बनला. डोळ्यांत एक वेगळीच व्यथा तरळून गेली. आवाज

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घोगरा बनला.

'आई! ही जबाबदारी पेलण्याचं सामर्थ्य आमचं नाही. प्रत्यक्ष सूर्य जर आमच्या हाती दिलात, तर तो पेलणार कोण? ती योग्यता तुमची होती. तुम्ही ती पार पाडलीत. आम्ही शिवाजीराजांना नुसते राजे म्हणून पाहत नाही. आमच्यासारखे असंख्य तपस्वी, संन्यासी, योगी यांनी केलेल्या प्रार्थनेचं हे फळ. पृथ्वीतलावर साकार झालेलं हे परमेश्वरस्वरूप आम्ही मानतो. ती आमची श्रद्धा आहे. आमचं आनंदवनभुवन साकार करण्यासाठी अवतरलेला हा प्रभू रामचंद्रांचा अवतार आहे, अशी आमची धारणा आहे. याची जबाबदारी आम्ही कोण घेणार? त्याची चिंता करू नका. दैवयोगानं आलेला मातृवियोग पेलण्याचं सामर्थ्य त्यांना आहे. त्यांच्या हाती देव, धर्म आणि देश सुरक्षित आहे. तीच प्रभू रामचंद्राची इच्छा आहे.'

जिजाबाईंच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

'आई, आपण शांतचित्त होऊन प्रभू रामचंद्राचं स्मरण करा. आता तिकडे लक्ष स्थिर करा. आम्ही येतो.'

जिजाबाईंनी हात जोडले. राजे समर्थांसह राजसदरेवर आले.

सूर्य मावळला. पाचाडावर रात्र उतरली. वाड्याच्या मशाली वाऱ्यावर फरफरत होत्या. जिजाबाईंना श्वास लागला होता. महालात धावपळ सुरू झाली होती. रात्र वाढत होती.

समर्थ व्याघ्रासनावर ध्यानस्थ बसले होते. समोरच्या धुमीतला अंगार वाऱ्याबरोबर तेवत होता.

मध्यरात्रीच्या सुमारास वाड्यात आकांत उसळला.

ध्यानस्थ बसलेल्या समर्थांच्या मिटल्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते.

□

१९

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जिजाबाईंना पहाटे अग्नी देऊन सारी मंडळी वाड्यात आली. वाड्यातल्या बारगिरापासून मंत्रिमंडळातल्या मंत्र्यांपर्यंत साऱ्यांनाच जिजाबाईंचा मृत्यू जाणवला. राज्यकारभारावर त्या बाईंची अखंड नजर फिरत आली होती. एक मोठा आधार नाहीसा झाला होता. ती जागा आता कशानेही भरून निघणार नव्हती.

राजांच्या शोकाला तर पारावर राहिला नव्हता. त्यांच्या मनाचे सारे बांध फुटले होते. संभाजीराजांची तीच अवस्था झाली होती. सईबाईसाहेब गेल्या, त्या वेळी ते फार लहान होते. सारे आयुष्य जिजाबाईंच्या मायेखाली गेलेले. आई नाही, हे कधी त्यांना जाणवले नाही. त्यांचे हे दुसरे पोरकेपण त्यांना होरपळून काढीत होते. जिजाबाई गेल्याने ते उघड्यावर पडले होते. सारे राज्य दु:खात बुडाले होते, तेथे कोण कुणाचे डोळे पुसणार?

समर्थ साऱ्यांचे सांत्वन करीत होते; पण राजांच्या महालात जाण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी उरले नव्हते.

दोन दिवस गेले, तरी राजांचा शोक कमी होईना. मोरोपंत समर्थांच्या जवळ आले.

‘मोरोपंत, काय आहे?’

‘समर्थ सर्व जाणतात. पण मासाहेब गेल्यापासून राजे शोकात बुडाले आहेत. त्यांना आवरण्याचं सामर्थ्य आपल्याखेरीज कुणाला नाही.’

समर्थांनी दीर्घ नि:श्वास सोडला. त्यांची नजर व्याकूळ बनली. ते म्हणाले,

‘पंत, आम्ही संन्यासी असलो, तरी माणूसच आहो. आम्हांला हे का कळत नाही? साऱ्यांचं सांत्वन करायला आम्ही धजलो; पण राजांच्या समोर जायला मन धजत नाही. मासाहेबांचा आधार काय होता, हे आम्ही जाणतो. मासाहेब गेल्या, आणि राजांचं सर्वस्व हरवलं. मातृवियोग सर्वांनाच भोगावा लागतो. पण असं नातं फार दुर्मीळ. त्या राजांच्या माता, श्रेष्ठ सल्लागार, राजांचा धीर होता. राजांना त्यांनी घडवलं, जडवलं, गुणसंपन्न केलं. त्यांच्या वियोगाचं दु:ख कोण हलकं करणार? शब्दांना ते बळ कसं लाभणार? ही दु:खं अशी असतात, की ज्यांची त्यांनीच सोसायची असतात. त्यांत वाटेकरी होतो म्हटलं, तरी होता येत नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मोरोपंतांचे अश्रू वाहू लागले. पंचाने डोळे पुशीत ते म्हणाले,

‘मासाहेब गेल्या; आणि आम्हांला पोरकेपण आलं. चार वर्षांमागेपर्यंत मासाहेब निवाडा करीत होत्या. राजे कुठं जरी असले, तरी कारभारात कधी त्यांची उणीव भासायची नाही. आम्हांला राजे गडावर असल्यासारखेच वाटायचे. त्यांनी आम्हांला खूप शिकवलं. राजांचं दु:ख आम्ही जाणतो; पण त्याचबरोबर त्या शोकाला वेळीच बंध पडायला हवेत, हेही विसरता येत नाही. तेव्हा...’

‘समजलो! ठीक आहे. आम्ही येतो.’

समर्थ मोरोपंतांसह राजांच्या महालात गेले. राजे पलंगावर झोपले होते. समर्थांना पाहताच राजे उठले. कष्टाने त्यांनी पाय शिवले. समर्थांनी राजांच्या खांद्यांना धरून उभे केले. राजांच्या मुखातून हुंदका उमटला. सारे अंग कापू लागले. समर्थांचाही जीव गुदमरला. त्यांनी राजांना मिठीत घेतले. ते राजांच्या पाठीवरून हात फिरवीत होते. राजांच्या अश्रूंनी त्यांची छाती भिजत होती.

‘राजे, शांत व्हा! विवेक करा ऽ ऽ’

नकारार्थी मान हलवीत राजे म्हणाले,

‘आम्हांला काही सुचत नाही. मासाहेब गेल्या; आणि आमची सावली हरवली!’

‘राजे, राजे! आम्हांला सारं कळतं; पण मनाला आवरायला हवं. अजाण माणसांनी शोक केला, तर आम्ही तो समजू शकतो. पण ज्ञान्यांचा शोक आम्हांला व्यथित करतो. जन्माला येणाऱ्या जीवाबरोबरच मृत्यू हाही अटळ असतो. आईसाहेबांचा मृत्यू केवढा मोठा भाग्यशाली! तुमचा राज्याभिषेक पाहून तृप्त मनानं तो जीव गेला. आयुष्याचं सार्थक झालं. पृथ्वीतलावर असं भाग्य कितीजणांना लाभतं? मुलाचा पुरुषार्थ पाहून, तृप्त होऊन, आयुष्याची अखेर समाधानानं गाठणाऱ्या किती माता आहेत? ही तृप्तता पाहण्याचं भाग्य किती मुलांना लाभतं? धन्यता मानावी, असा हा क्षण! ज्ञानी माणसांनी आनंदोत्सव करावा, असा शुभ दिवस! मासाहेबांच्या आत्म्याला तुमचा शोक पाहून केवढे क्लेश होत असतील?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सारं कळतं, पण वळत नाही.’

‘ते वळवायला हवं, राजे!’

‘आम्हांला ते जमेल, असं वाटत नाही. मासाहेबांच्या शिवाय आम्हांला जगता यायचं नाही. आम्हांला ती सवय नाही.’

समर्थांचा चेहरा कठोर बनला.

‘राजे! मासाहेबांच्या शिवाय जीवन एवढं अधुरं राहणार होतं, तर मग तुम्हीच त्यांच्या मृत्यूला कारणीभूत का झाला?’

राजांची अश्रुपूर्ण नजर वर झाली. समर्थांच्याकडे पाहत राजे उद्गारले,

‘आम्ही मासाहेबांच्या मृत्यूला कारणीभूत झालो?’

‘हो, राजे! राज्याभिषेक करून घेतलात कशाला? तो आणखीन पाच-पंचवीस वर्षं पुढं ढकलायचा होतात. मासाहेब तेवढी वर्षं जगल्या असत्या. वृद्धत्वाशी झगडत, व्याधींशी लढत, खुरडत का होईना, त्यांना जगावंच लागलं असतं. तुमचा राज्याभिषेक पाहिला, आणि त्यांचं सारं जीवन सफल झालं. मोक्ष हाती आला. आशेची समाप्ती झाली. मग तो जीव राहील कशाला?’

राजांनी अश्रू टिपले.

‘राजे, आता आम्ही जातो. हे अजाणपण सोडून द्या. फार मोठी जबाबदारी तुमच्यावर आहे. लाखांचे तुम्ही पोशिंदे. स्वत:चा विचार करायला तुम्हांला मोकळीक नाही.’

राजांचा निरोप घेऊन जड अंत:करणाने समर्थ निघून गेले.

राजे एकटे...अगदी एकटे राहिले!

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

२०

जिजाबाईंचे दिवस झाले. हजारो गोरगरिबांना अन्न घातले गेले. राजांनी खूप दानधर्म केला. पण राजांच्या मनाची उदासीनता कमी झाली नाही. ते सदैव महालात बसून राहत.

जिजाबाईंच्या मृत्यूच्या बातमीने राज्याचे गडकरी, मातब्बर सरदार राजांना भेटायला येत होते. मासाहेबांच्या आठवणीने परत राजांचे दुःख वाढत होते.

रात्री अचानक राजांना जाग आली. सारे अंग घामेजले होते. पलंगाशेजारी पुतळाबाई उभ्या होत्या. दचकून जागे झाल्यामुळे विस्फारलेल्या डोळ्यांनी राजे पाहत होते.

'काय झालं?'

'आपण झोपेत ओरडत होता, म्हणून जागं केलं.'

'काय म्हणत होतो आम्ही?'

' 'मासाहेब, मासाहेब,' म्हणून हाका मारीत होता.'

राजे स्वप्न आठवीत होते. काही तरी अस्पष्ट आठवत होते. पांढरे पातळ नेसून मासाहेब उभ्या होत्या. त्यांनी राजांना खुणेने बोलाविले. राजे जवळ जात होते. मासाहेबांनी पाठ फिरविली. त्या चालू लागल्या. राजांनी त्यांना हाक मारीत गाठले आणि...आणि राजे जागे झाले.

राजांचे डोळे भरून आले. ओठ थरथरले. आवाज कापरा बनला.

'राणीसाहेब, सारा दिवस मासाहेबांना शोधण्यात जातो. त्यांचं कुठं दर्शन घडत नाही, अस्तित्व जाणवत नाही. मासाहेबांनी सावली बनून राहायचं वचन दिलं होतं; पण कुठंच, कुठंच त्या दिसत नाहीत. जीव थकून जातो आणि रात्री स्वप्नात नुकत्या कुठं मासाहेब आमच्या समोर अवतरू लागतात, तोच आम्हांला कशाला जागं करता?.... का?'

पुतळाबाईंना राजांचे ते घायाळ रूप, ते शब्द ऐकणे कठीण गेले. पदराचा बोळा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तोंडाशी धरून त्या धावत महालाबाहेर निघून गेल्या.

सकाळ झाली. सारे आकाश कुंदावले होते. सूर्योदयाला झिर झिर पावसाची सुरुवात झाली. पश्चिमेचा गार वारा जाणवू लागला. राजे बाहेरचे कुंदावलेले वातावरण पाहत असता महालात अनाजी आले. राजे म्हणाले,

‘अनाजी, आता पाऊस बरसणार, असं वाटतं.’

‘जी!’

‘काही महत्त्वाचं काम होतं का?’

‘गडावर जायची सर्व सिद्धता झाली आहे.’

‘अं?’ आश्चर्यचकित होऊन राजे म्हणाले.

‘मेणे, पालख्या सर्व तयार आहेत.’

‘कुणी सांगितलं, आम्ही गडावर जाणार, म्हणून?’ राजांनी विचारले.

‘धाकट्या राणीसाहेबांनी पहाटेच हुकूम दिले.’

राजांचा संताप वाढला होता. त्यांनी अनाजींना आज्ञा केली; पुतळाबाईंना बोलावणे पाठविले. पुतळाबाई महालात आल्या. राजे त्यांच्याकडे पाहत होते. पुतळाबाईंची नजर पायांकडे वळली होती.

‘आम्ही गडावर जाणार, म्हणून कळवलंत?’

‘जी?’

‘कारण?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुतळाबाई काही बोलल्या नाहीत. राजांचा संताप उफाळला.

‘सांगा, राणीसाहेब! कुणाला विचारून हा निर्णय घेतलात?’

पुतळाबाईंची नजर वर झाली. डोळ्यांत भीती सामावली होती. पण आवाज स्थिर होता.

‘या घरात आल्यापासून कधीच कसला निर्णय आम्ही केला नाही. नाइलाजानं हा करावा लागला.’

‘कारण?’

‘आपला राज्याभिषेक झाला. सारा पसारा तसाच गडावर आहे. कुणाची बोलायची हिंमत नाही.’

राजे खिन्नपणे हसले. उपहास उफाळला.

‘म्हणून मासाहेबांची जागा घेता, वाटतं?’

एक असह्य वेदना पुतळाबाईंच्या चेहऱ्यावर उमटली. दुसऱ्याच क्षणी तिचे रूपांतर क्रोधात झाले.

‘त्यांची जागा कोणी घेणार नाही. मासाहेब गेल्या. त्या आता पृथ्वीतलावर वावरणार नाहीत.’

‘राणीसाहेब!’

‘खरं तेच सांगते. पण तुमच्या ते ध्यानी येत नाही. इथं कितीही दिवस राहिलं, तरी मासाहेब का दिसणार आहेत? एका संसाराचे धनी असता, तर काही बोलले नसते. पण लाखांचं धनीपण आपल्या माथी. आपल्या आई गेल्या, म्हणून...’

‘बस्स करा, राणीसाहेब!’ राजे म्हणाले. ते पुरे थकले. डोळ्यांत अश्रू गोळा झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आमच्या मासाहेब गेल्या. त्या आम्हांला आता दिसणार नाहीत. आम्ही पोरके झालो, एकटे पडलो. हे आम्ही समजून घ्यायला हवं. अनाजींना सांगा... आम्ही येतो.’

पुतळाबाई महालाबाहेर गेल्या.

राजे बाहेर आले, तेव्हा मेणे पुढे गेले होते. पावसाचा जोर थोडा वाढला होता. अनाजी म्हणाले,

‘पाऊस जरा कमी झाला, की मग...’

राजे हसले. ते अनाजींच्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाले,

‘अनाजी, पावसाची भीती कसली? खूप भिजायचं आहे. चला, आम्हांला लौकर गडावर पोहोचायचं आहे.’

राजे पालखीत बसले. भोई झप झप चालू लागले.

समोरचा रायगड पावसात धुरकट दिसत होता.

□

२१

रायगडावर राज्याभिषेकाचा उत्सव कैक दिवस चालला असता, पण जिजाबाईंच्या मृत्यूने त्यावर विरजण पडले. उत्साहाने भरलेला गड शोकामध्ये बुडून गेला. सारे राजांना भेटत होते. जड मनाने राजांचा निरोप घेत होते. गडावर उभारलेले डेरे, कनाती, चांदण्या पावसाच्या भीतीने उतरल्या गेल्या होत्या. त्यामुळे गडाचे वातावरण जास्तच भकास वाटत होते.

राजांनी आपल्या दुःखाला आवर घालून कारभारात लक्ष घातले; पण त्यांचे मन त्यात रमत नव्हते. चेहऱ्यावरची दुःखाची छाया कमी होत नव्हती. राजे पुष्कळ अबोल बनले होते. थकलेले दिसत होते. नेहमी ते आपल्या महाली बसून राहिलेले दिसत. मनात आले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तर जगदीश्वरप्रासादाकडे फिरायला जात.

दोन प्रहरी राजांना झोप येईना. आकाश ढगांनी भरले होते; तरी पाऊस नव्हता. राजांनी तोंडावर गार पाण्याचा शिडकावा मारून घेतला.

‘कोण आहे तिकडे?’

मनोहारी आत आली.

‘मनू, थोरल्या राणीसाहेब कुठं आहेत?’

‘सातमहालात आहेत.’

‘झोपल्यात?’

‘जी, नाही. बाळराजांना बरं नाही. त्यामुळं...’

‘काय होतंय् बाळराजांना?’

‘थोडा ताप आलाय्.’

‘आम्ही तिकडे येतो, म्हणून वर्दी दे.’

‘जी.’

राजे महालाबाहेर आले. समोरचा चौक नजरेत आला.

राजांची तुला तेथेच झाली होती. तुलेला जाताना जिजाबाईंनी राजांना तीट

लाविली होती.

राजांनी तो विचार झटकला. चौकाकडे न पाहता ते सातमहालाकडे वळले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गंगासागराच्या मनोऱ्याजवळ येताच त्यांचे पाय थबकले. न कळत ते गंगासागराच्या मनोऱ्यात शिरले. गार वारा वाहत होता. गंगासागराच्या निळ्याभोर पाण्यावर तरंग उठत होते. समोर टकमकटोक नजरेत येत होते. दोन प्रहरची एक निराळीच शांतता गडावर पसरली होती. पावसाळी हवेने धुरकट बनलेले सृष्टीचे रूप राजे न्याहाळीत होते. त्यांची नजर फिरता-फिरता शेजारच्या दुसऱ्या मनोऱ्यावर स्थिर झाली. मनोऱ्याच्या तिसऱ्या मजल्यावर पुतळाबाई बसल्या होत्या. एकाग्र चित्ताने त्या गंगासागराकडे पाहत होत्या. ढळलेल्या पदराचेही त्यांना भान नव्हते. शेजारच्या मनोऱ्यावर राजे उभे आहेत, ते पाहत आहेत, याचेही त्यांना भान नव्हते. पुतळाबाईंना हाक मारावी, असे राजांना वाटले. पण दुसऱ्याच्या क्षणी त्यांनी तो बेत बदलला. हाक न मारता राजे तसेच माघारी वळले.

सोयराबाई आपल्या महाली बसल्या होत्या. जवळ बाल राजाराम होते. मनोहारी उभी होती. राजांना पाहून राजारामांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. राजारामांजवळ बसत राजांनी विचारले,

'बाळराजे, तब्येत कशी आहे?'

'चांगली आहे, आबासाहेब.' नाक ओढीत रामराजे म्हणाले, 'पण आईसाहेब आम्हांला अंथरुणाखाली उतरू देत नाहीत.'

'तर, तर! अंगात ताप आहे, सर्दी झाली आहे; आणि निघाले फिरायला!'

'पावसाळा सुरू झाला ना! हवा बदलली. त्यामुळं थोडा त्रास...'

'वैद्यराज म्हणाले की, पावसात भिजल्यामुळं बाळराजे आजारी पडले.'

'केव्हा भिजले?'

'पाचाडहून गडावर आलो, तेव्हा.'

दीर्घ नि:श्वास सोडून राजे म्हणाले, 'तेव्हा पाऊस होता खरा.'

राजारामांनी राजांना विचारले, 'दादा महाराज का आले नाहीत?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘खरंच! आमच्याही मुजऱ्याला आले नाहीत.’

‘गडावर असते, तर आले असते.’ सोयराबाई म्हणाल्या.

‘मग कुठं गेले संभाजीराजे?’

‘काल रात्री पाचाडला गेले, असं ऐकलं आम्ही.’

‘ते बरं?’

‘कदाचित आपल्यासारखीच त्यांनाही मासाहेबांची आठवण...’

‘राणीसाहेब, जे सांगायचं, ते स्पष्ट सांगा. त्यासाठी नसत्या आठवणी कशाला काढता? संभाजीराजे कदाचित गडाखाली शिकारीला उतरले असतील. शिकारीचा त्यांना नाद आहे.’

‘हो! आणि तो आता वाढलाही आहे. जनावरांच्या शिकारीपेक्षा माणसांच्या शिकारीचा नाद सुरू झाला आहे.’

‘काय सांगता?’

‘स्वारींनी चौकशी करावी. राज्याभिषेकाच्या वेळी गडावर आलेल्या काही कलावंतिणींना युवराजांनी पाचाडला ठेवून घेतलं आहे. गाणबजावणं करण्यासाठी ते गड उतरतात.’

‘हे माहीत असून स्वस्थ का बसलात?’

‘मी कोण सांगणार? ते का आता लहान आहेत?’

राजे खिन्नपणे हसले.

‘युवराजांना गाण्याचा शोक आहे. तरुण वय आहे. गेले असतील गाणं ऐकायला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यांना जबाबदारी कळते. आपण जशा राज्याच्या महाराणी आहात, तसेच तेही युवराज आहेत.’

त्या बोलांनी सोयराबाई थक्क झाल्या. राजांच्याकडून त्यांनी या बोलण्याची अपेक्षा केली नव्हती. त्यांचा संताप भडकला.

‘याचसाठी काही सांगू नये, असं वाटतं.’

‘राणीसाहेब, सांगण्यापेक्षा माणसानं करावं. तो आपला अधिकार आहे.’

‘हो! माहीत आहे; पण तो माझा नाही.’

‘मग कुणाचा?’

‘ज्यांच्या सांगण्यावरून आपलं उठणं-बसणं होतं, त्या धाकट्या राणीसाहेबांचा.’

‘पुतळाबाईंबद्दल का बोलता? त्यांचं नाव उगा कशाला घेता?’

‘खोटी अदावत घ्यायची सवय नाही मला. तेवढी सत्ता नसती, तर भर पावसात गड चढायला लावायची त्यांची हिंमत झाली नसती, आणि बाळराजे भिजले नसते.’ सोयराबाईंनी मनातली मळमळ ओकून टाकली.

सारा प्रकार राजांच्या ध्यानी आला. भीतीने गर्भगळीत झालेले राजाराम तसेच पडून होते. राजांनी त्यांच्या केसांवरून हात फिरविला. राजे उठत म्हणाले,

‘आम्हांला समजून घेणारं कोणी भेटेल, असं वाटत नाही.’

राजे सावकाश महालाबाहेर गेले. पालखीदरवाजापासून मेणदरवाजापर्यंतचा सोपा मोकळा होता. राजांची पावले न कळत मेणदरवाजाकडे वळली. मेणदरवाजाच्या पायऱ्या उतरून राजे डाव्या बाजूच्या पठारावर आले. गार वारा अंगाला झोंबत होता. राजे त्या पठारावरून चालत होते. राजांना ती जागा फार आवडे. राणीवसा मोकळ्यावर यावा, वावरायला सुरक्षित जागा असावी, म्हणून सातमहालाला लागूनच हे पठार राखले होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खोल तुटलेल्या कड्याखालचा मुलूख राजे निरखीत होते. त्यांची नजर पाचाडच्या वाड्यावर स्थिरावली. साऱ्या आठवणी उफाळून वर आल्या. एकटक नजरेने राजे तो वाडा पाहत होते.

राजांनी एकदम वळून मागे पाहिले. पुतळाबाई राजांच्या दिशेने येत होत्या. त्यांना पाहताच राजांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले. पुतळाबाई नजीक आल्या.

‘किती गार वारा सुटलाय्! पाऊसही येईल.’

‘कुणी सांगितलं आम्ही येथे आहो, म्हणून!’

‘आम्हांला कळतं.’

‘हे मात्र खोटं.’ राजे हसून म्हणाले, ‘गंगासागराच्या मनोऱ्यावर तुम्ही बसला होतात. अगदी विचारात गढला होतात.’

‘कुणी सांगितलं?’ पुतळाबाईंनी विचारले.

‘आम्ही शेजारच्या बुरुजावर होतो; पण आपलं लक्ष गेलं नाही.’

‘मग हाक का नाही मारलीत?’

‘विनाकारण समाधिभंग झाला असता.’

गार, प्रबळ वाऱ्यामुळे वस्त्र आवरणे कठीण जात होते. केसांच्या बटा वाऱ्यावर हेलकावे घेत होत्या. पदर आणि वस्त्र सावरण्यात पुतळाबाई गुंतल्या होत्या. राजे त्यांच्याकडे पाहून हसत होते. राजांचे ते हसणे आणि वाऱ्याने विस्कटलेले केस पाहून पुतळाबाईंनाही हसू आले. राजे म्हणाले,

‘पुतळा, एवढा कसला विचार करीत बसली होतीस?’

‘कसला नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे जवळ गेले. पुतळाबाईंची नजर उंचावली.

‘पुतळा, आमचा राज्याभिषेक झाला. वैभवाची मध्यान्ह आम्ही गाठली. अशा वेळी कसली चिंता तुम्हांला वाटत होती?’

‘काही नाही. सहज बसले होते.’

‘पुतळा, आम्हांला फसवतेस? दुर्दैवानं तेवढे अजाण आम्ही राहिलो नाही. सांगण्यासारखं नसेल, तर सांगू नको. आमचा आग्रह नाही.’

त्या बोलांनी पुतळाबाई कळवळल्या. दुसऱ्याच क्षणी त्या बोलून गेल्या,

‘सांगितलं, तर इकडून हसं होईल. आम्हां बायकांची जात शुभापेक्षा अशुभाच्याच भीतीनं अधिक मरते.’

‘कसली भीती?’

‘आपला राज्याभिषेक पाहिला. डोळे निवले. पण...’

‘काय?’

‘उगीच मनात आलं... सूर्य डोक्यावर आला. आता पुढं काय? उगीच मनाला हुरहूर लागली.’

‘ती हुरहूर काढून टाका. ऋणानुबंध असला, की असं होतं. हाच विचार आमच्याही मनात येऊन गेला. सृष्टीला जो नियम, तोच मानवालाही. माणूस का तीवेगळा आहे? मध्यान्ह काळ झाल्यावर अस्तकालाची वाटचाल करावी लागते, हे का सूर्याला माहीत नाही? भरतीनंतर सागराला ओहोटी येते, हे का सागराला कळत नाही? पौर्णिमेच्या चंद्राला का भावी क्षयाची जाणीव नसते? म्हणून सूर्य उगवायचा थांबत नाही, सागराच्या भरतीचा वेग मंदावत नाही, ना चंद्राला पौर्णिमेच्या रूपाची भीती वाटते. जीवनाचा ओघ खंडित होत नाही, याचाच हा पुरावा आहे. हे जीवनचक्र असंच चालायचं. जो नियम सृष्टी पाळते, त्याची जीवानं चिंता कशाला करावी?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो... पावसाची तरी करावी ना?’

राजांनी मागे पाहिले. पाऊस पुढे सरकत होता. राजांनी पावले उचलली; पण पावसाने गाठलेच. दोघे भिजत बालेकिल्ल्याकडे येत होते. पावसाच्या थेंबांनी सारे अंग मोहरत होते आणि त्याच वेळी राजांचे लक्ष मेणदरवाजातून छत्र घेऊन धावत येणाऱ्या सेवकांच्याकडे गेले. राजे म्हणाले,

‘पाहिलंत? छत्रपती झालो ना! पावसात भिजायला सुद्धा आम्हांला मोकळीक नाही.’

□

२२

पावसात भिजल्यामुळे राजांना किंचित ठसका सुरू झाला होता. रात्री राजे शयनगृहात आले; पण झोप येईल, असे त्यांना वाटत नव्हते. पुतळाबाई महालात हजर होत्या. राजांनी विचारले,

‘पुतळा, बाळराजांची तब्येत कशी आहे?’

‘आज बरी आहे.’

‘थोरल्या राणीसाहेबांची मर्जी आहे ना?’

‘नसायला काय झालं?’ पुतळाबाई म्हणाल्या. ‘जरा मोकळ्या स्वभावाच्या आहेत. मनात काही ठेवीत नाहीत. चटकन बोलून जातात.’

‘दोषांकडेदेखील किती चांगल्या तऱ्हेनं पाहता येतं, नाही?... तुम्ही जा. आम्हांला झोप येईल.’

‘डोळा लागला, की मग जाईन.’

राजांना निद्रा लागली. काही वेळ गेला. अचानक ठसका उफाळला. राजे उठले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चौपाईवरील भांडे त्यांनी उचलले; आणि पुतळाबाई समोर आल्या.

'अजून तुम्ही का गेला नाही?'

'जाणार होते, तोच आपल्याला जाग आली.'

राजे चूळ भरण्याकरिता तस्ताकडे गेले. चूळ भरून राजे उभे राहिले. खिडकीतून अंधारात लकाकणारा दिवा दिसत होता. तिकडे पाहत राजांनी विचारले,

'तो संभाजीचा महाल ना?'

'हो.'

'मग अजून दिवा बरा?'

'रात्री सूनबाईला पोथी असते.'

'काय वाचते?'

'एकनाथी भागवत.'

राजांनी पुतळाबाईंना जायला सांगितले. पुतळाबाई गेल्या; पण राजे बराच वेळ त्या दिव्याकडे पाहत होते. त्याच विचारात ते झोपी गेले.

पहाटे राजे देवदर्शनासाठी जायला सिद्ध झाले. राजसदरेवर राजांचा एकच सजलेला घोडा पाहताच राजांनी दुसरा घोडा आणण्याची आज्ञा केली. येसूबाईंना राजांनी बोलावणे पाठविले. येसूबाई आल्या. तेव्हा घोडा सज्ज झाला होता. येसूबाईंनी राजांना नमस्कार केला. राजे म्हणाले,

'येसू, तुम्ही आमच्या सूनबाई. युवराज तर कधी आमच्या बरोबर नसतातच. निदान तुम्ही तरी आम्हांला सोबत द्यावी, का नाही? तुम्ही दोघे असे वागू लागलात, तर उतारवयात आम्हांला पाहणार कोण?... चला. देवदर्शन करू. तशीच गडाचीही पाहणी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

करू.’

येसूबाई घोड्यावर स्वार झाल्या. राजांनी आपल्या घोड्यावर मांड घेतली. दोन्ही घोडी नगारखान्यातून बाहेर पडली. मागून अश्वदळ जात होते. देवदर्शन करून भवानीटोकापर्यंत जाऊन राजे माघारी आले. पायउतार होऊन येसूबाईंशी बोलत राजे महाली आले. येसूबाई आपल्या महाली जाण्यासाठी वळणार, तोच राजांनी हाक मारली. येसूबाईंनी राजांकडे पाहिले. राजे म्हणाले,

‘येसू, आता तू लहान नाहीस. मासाहेब गेल्या. त्यांची जागा एकानं भरून काढणं कठीण. आता सगळ्यांनीच लक्ष द्यायला हवं. तुझी जबाबदारी मोठी आहे. राज्याचा वारस तुला संभाळायचा आहे. तुला ती जाणीव राहावी, म्हणून आजपासून जेव्हा आम्ही गडावर नसू, तेव्हा आमचा शिक्काकट्यार तुमच्या ताब्यात राहील.’

येसूबाई चकित झाल्या. त्या उद्गारल्या,

‘आबासाहेब! ही जबाबदारी...’

राजे हसले.

‘आम्ही समजलो. त्याची चिंता करू नको. शंभूराजे आले, की आम्ही त्यांना सांगू. एक वेळ शंभूराजे आमच्या हातून सुटतील; पण ते तुझ्या हातून सुटणार नाहीत, हे आम्हांस माहीत आहे.’

येसूबाई लाजल्या. त्यांची नजर खाली वळली. राजे अत्यंत प्रेमभराने पुढे झाले. येसूबाईंच्या मस्तकावरून हात फिरवीत ते म्हणाले,

‘घरात सून म्हणून आलीस; पण वाढलीस मुलीसारखी. तूही त्यात कधी अंतर दिलं नाहीस. सखूपेक्षाही जास्त जिव्हाळा लावलास. आमच्या शंभूबाळांना जखडण्याचं सामर्थ्य तुला लाभलं, यात मला आनंदच आहे. हे तुझं सुख अक्षय टिको!’

येसूबाईंनी राजांचे पाय झटकन शिवले; आणि त्या महालाबाहेर निघून गेल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दोन प्रहरी संभाजीराजे गडावर आल्याचे राजांना कळले. पण ते राजांच्या समोर आले नाहीत.

सायंकाळी अनाजींसह राजे जगदीश्वराकडे गेले. एकांतामध्ये असताना राजांनी विचारले,

‘अनाजी, युवराज गडाखाली गेले, हे तुम्हांला माहीत आहे?’

‘जी.’

‘ते का जातात, माहीत आहे?’

‘जी.’

‘युवराज कलावंतिणीचं गाणं ऐकतात?’

‘जी.’

‘अनाजी, हे तुम्हांला माहीत होतं, तर आम्हांला का नाही सांगितलं?’

‘क्षमा, महाराज.’ अनाजी निर्धाराने म्हणाले. ‘युवराज संतापी आहेत. आधीच त्यांचा गैरसमज आहे. आम्ही बोलल्यानं तो वाढला असता. आपल्यालाही त्रास झाला असता. शेवटी राहवलं नाही, म्हणून राणीसाहेबांच्या...’

‘त्यांच्याऐवजी आम्हांला सांगितलं असतं, तर फार बरं झालं असतं. युवराज उद्याचे राज्याचे धनी. त्यांच्यावर लक्ष ठेवायला हवं. वेडंवाकडं वळण दिसलं, तर वेळीच त्यांना सावरायला हवं.’

‘जी.’

राजे देवदर्शन आटोपून माघारी आले. महाली महादेव उभा होता. त्याच्यासह राजे महाली गेले. बराच वेळ राजे महादेवबरोबर महाली एकांतात बोलत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दुसऱ्या दिवशी सकाळी राजे स्नानपूजा आटोपून एकटेच महाली बसले होते. मनोहारी आत आली.

‘युवराज भेटीला येताहेत.’

‘येऊ देत ना.’ राजे म्हणाले.

मनोहारी बाहेर गेली; आणि संभाजीराजे महालात आले. राजांची प्रसन्न मुद्रा पाहून त्यांना धीर आला. राजे युवराजांना निरखीत होते.

भरदार छातीमुळे अंगातील रेशमी जामा छातीवर तणावलेला होता. पायांत विजार होती. मस्तकी पांढरा जिरेटोप होता. नजरेत बेदरकार भाव होता. चेहऱ्यावर तारुण्याची मिजास उमटली होती. संभाजीराजे धीमी पावले टाकीत राजांच्या जवळ आले; आणि त्यांनी पाय शिवले. राजे पाठीवरून हात फिरवीत म्हणाले,

‘युवराजांना केव्हापासून आमच्या भेटीची परवानगी लागू लागली?’

संभाजीराजे हात बांधून उभे होते. नजर खाली झुकली होती.

‘पाचाडला गेला होता?’

युवराज काही बोलले नाहीत.

‘शिकारीचा बेत काढलात?’

युवराज काही बोलले नाहीत.

‘काल तुम्ही गडावर आलात, पण आमच्या भेटीला आला नाहीत. असा कोणता गुन्हा आम्ही केला?’

‘गुन्हा आम्ही केला!’ संभाजीराजे राजांचे पाय शिवत म्हणाले, ‘क्षमा मागण्यासाठी आम्ही आलो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी दीर्घ नि:श्वास सोडला.

‘शंभूबाळ, तुमचं वर्तन ऐकून आम्हांला फार यातना झाल्या. कलावंतिणींचं गाणं ऐकण्यासाठी तुम्ही गडाखाली गेलात. तुम्हांला या शौकाची फार आवड आहे, हे आम्हांला माहीत आहे. त्याबद्दल आम्ही कधी बोललो नाही. पण मासाहेब जाऊन महिना झाला नाही, तोच तुम्ही त्याच पाचाडच्या परिसरात गाणं ऐकण्यात गुंतलात! मासाहेबांना एवढ्यात विसरलात?’

संभाजीराजांना उभ्या जागी हुंदका फुटला. राजे जवळ गेले.

‘एकदा आम्हांला सांगून टाका! का असं वागता?... बोला!’

मान हलवीत संभाजीराजे बोलून गेले,

‘आबासाहेब! मासाहेब गेल्या, आम्हांला काही सुचत नाही. जिवाला चैन पडत नाही...’

राजांनी संभाजीराजांना जवळ ओढले. ते सद्गदित झाले.

‘शंभूबाळ, आणि म्हणून कलावंतिणीचं गाणं ऐकायला गेलात? त्यानं का ते दु:ख विसरलं जाणार होतं? एवढी का ती आठवण विसरणं सोपं आहे? मासाहेब गेल्या; पण त्यांचा आत्मा कुठं तरी तुमच्या-आमच्या भोवतीच घोटाळत असेल, नाही? तुमच्यावर त्यांचा भारी जीव. रात्री गड उतरलात. कदाचित तो आत्माही तुमच्या काळजीनं उतरला असेल. त्याचा तरी विचार करायचा होता!... इकडे पाहा.’

संभाजीराजांनी नजर वर केली. राजांचे डोळे पाणावले होते. संभाजीराजांच्या खांद्यावर राजांनी आपला थरथरता हात ठेवला.

‘शंभूबाळ, मासाहेब गेल्या. तुम्हांला दु:ख झालं; आणि आम्हांला काय आनंद झाला? आम्ही पोरके झालो. आमच्या जिवाचा थारा उडाला. पण आम्ही आमचं कर्तव्य, भान विसरलो नाही. मासाहेब गेल्या, असं समजू नका, राजे! पाचाडात मासाहेब होत्या, तरी गडावर त्यांचा धाक असायचा ना! आता तेही अंतर राहिलं नाही. मासाहेब आता दूर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नाहीत. त्यांनी तुमच्या-आमच्या मनांत आता जागा घेतली आहे. आता फार भिऊन वागायला हवं, राजे!’

‘आम्ही चुकलो! पुन्हा हे वर्तन घडणार नाही.’

‘आमची दुसरी कसलीच अपेक्षा नाही. चुका होत नाहीत कुणाच्या हातून? पण तीच चूक पुन्हा होऊ न देणं यातच माणसाची उन्नती साठवलेली असते. एवढं पथ्य पाळलं, तरी माणूस सहज मोठा होऊन जातो. तुम्ही तर भावी राज्याचे धनी. तुम्हांला फार जपायला हवं. राजा म्हणजे प्रजापालक, लोकनायक. चारित्र्य हा तर त्याचा पाया. आपल्या जीवनाशी हवा तसा खेळ खेळायला तुमची-आमची आयुष्यं मोकळी नाहीत, राजे! त्यांची गुंतवण केव्हाच झालेली आहे.’

राजांचे एक वेगळे रूप संभाजीराजांना प्रथमच दिसत होते. त्या बोलांनी त्यांचे मन उचंबळत होते. राजे त्यांना जवळ घेत म्हणाले,

‘पुसा ते डोळे!’

संभाजीराजांनी हसून डोळे पुसले.

‘राजारामांना ताप येत होता. ते तुमची आठवण काढीत होते.’

‘आम्ही जाऊन येतो.’

त्याच वेळी राजांची नजर महालाच्या दाराशी खिळली. महालात येणाऱ्या येसूबाईंना पाहताच राजे म्हणाले,

‘येसू, काळजी करू नको. आपले पतिराज सुखरूप आहेत.’

येसूबाईंनी हसून संभाजीराजांच्याकडे पाहिले. दुसऱ्याच क्षणी राजांच्या पाया पडत त्या म्हणाल्या,

‘आम्ही नेहमीप्रमाणे पाया पडायला आलो होतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे मोठ्याने हसले. संभाजीराजांना सांगते झाले,

‘युवराज, काल आम्ही आमच्या लाडक्या सूनबाईंना घेऊन फेरफटक्याला गेलो होतो. तुम्ही वेळी-अवेळी शिकारीत गुंतलेले असता. आम्ही मोहिमांत. मग गडावरचा राज्यकारभार चालणार कसा? जेव्हा आपण दोघेही गडावर नसू, तेव्हा यापुढं आमचा शिक्का येसूच्या हाती सुपूर्द करायचा आम्ही निर्णय केला आहे. तुमची त्याला ना नाही ना?’

संभाजीराजे लाजले. मुजरा करून ते गडबडीने बाहेर गेले. येसूबाई जागच्या जागी संकोचून उभ्या होत्या. राजांच्या हसण्याने महाल भरून गेला होता.

जिजाबाई गेल्यानंतर प्रथमच राजे मोकळेपणी हसले होते.

□

२३

गडावर महाराजांचा खास नजरबाज महादेव येऊन गेल्यापासून गडावर सारखे नजरबाज दिसू लागले होते. राजांनी सेनापती हंबीरराव, मोरोपंत, आनंदराव यांना फौजा गोळा करण्याचे हुकूम दिले होते. भर पावसाळ्यात राजांनी कुठली मोहीम काढली आहे, याचे सर्वांना कोडे पडले होते. रायगडावर पाऊस अखंड धार धरून उभा होता.

राजांच्या समोर मोरोपंत, हंबीरराव, आनंदराव, अनाजी, बाकीचे सर्व प्रधान आणि खुद्द युवराज उभे होते. राजांनी मोरोपंतांना विचारले,

‘मोरोपंत, मोगलछावणीची काय हालत आहे?’

‘औरंगजेबानं दिलेरखानाला माघारी बोलावून बहादुरखानाला सारी फौज दिलेली आहे.’

‘...आणि बहादुरखानानं पेडगावास बळकट कोट करून त्या गडाला ‘बहादुरगड’ असं नाव दिलं आहे, असंच ना?’ राजांनी विचारले.

‘जी!’ मोरोपंत म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आमचा राज्याभिषेक झाल्यामुळं आम्ही गाफील बनलो आहो, असा आमच्या शत्रूचा समज झाला आहे. त्याला थोडा धक्का देण्याचं आमच्या मनात आहे.’

‘पण, महाराज, भर पावसाळा... त्यात आपली मन:स्थिती...’

‘मोरोपंत, आमच्या सुखाचा वा दु:खाचा विचार करण्याचं आमच्या नशिबी राहिलेलं नाही. त्याचा विचार करू नका... आमच्या राज्याभिषेकाचा खर्च किती झाला?’

‘एक कोटी होन!’

‘तो आम्ही भरून काढायचं ठरवलं आहे.’

साऱ्यांची नजर राजांच्या वर खिळली.

‘बहादुरखानानं सरकारी भरणा करावयाचे एक कोटी रुपये गोळा केले आहेत. त्याखेरीज बादशहांना नजर करण्यासाठी नामांकित दोनशे घोडी आहेत, ती निराळी. हे सारं दिल्लीला रवाना होण्याआधी मिळवायचं आमच्या मनात आहे. ही एक मोहीम झाली. याखेरीज मोरोपंतांनी कल्याण-भिवंडीला जाऊन तळ करावा, वसईकरांकडून चौथाईची मागणी करावी. याच वेळी अनाजींनी फोंडा काबीज करावा. आम्ही खुद्द बहादुरखानाची मोहीम हाती घेऊ.’

संभाजीराजे ते ऐकत असता उभे राहिले.

‘आबासाहेब, आम्ही?’

राजे खूश झाले.

‘युवराज, आम्ही तुमच्याकडून याच उत्तराची अपेक्षा केली होती. बेचैन मन हवं तिथं शांत होत नाही. बेचैन मनाला गुंतवायला मोहिमेसारखा विचार नाही. तुम्हांला तो अनुभव येईलच. आनंदरावांनी युवराजांची साथ करावी. युवराज भागानगर मुलुखात जातील. पण, युवराज, लक्षात ठेवा... आम्हांला भागानगर जिंकायचं नाही. नुसती दहशत निर्माण करायची आहे. आम्ही गाफील नाही, एवढं शत्रूंना दाखवायचं आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे किंचित थांबले. ते सर्वांकडे पाहत होते.

‘आमचा मनोदय सांगितला. आता तुमचं म्हणणं सांगा.’

‘आपली आज्ञा शिरसामान्य आहे.’ हंबीरराव म्हणाले.

‘यापुढं राज्याचे निर्णय अष्टप्रधानांनी करावेत, अशी आमची इच्छा आहे. आमच्या बेतात काही गफलत दिसली, तर आम्ही ती आनंदानं मान्य करू.’

मोहीम निश्चित झाली. सारे त्या आनंदात निघून गेले. मागे मोरोपंत राहिले होते. राजांनी विचारले,

‘मोरोपंत, काय?’

मोरोपंतांनी क्षणभर विचार केला. ते म्हणाले,

‘युवराजांनी कलावंतिणींना बिदागी देऊन रवाना केलं.’

राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले.

‘ते आम्हांला माहीत आहे.’

आश्चर्य करण्याची पाळी मोरोपंतांच्यावर आली होती.

‘त्यात आश्चर्य कसलं? खुद्द युवराजांनी तुम्हांला ती कामगिरी सांगितली, तुम्ही तातडीनं गडाखाली गेलात, बिदागी देऊन कलावंतिणींना निरोप देऊन आलात. एवढंच नव्हे, तर राज्याभिषेकाच्या खर्चात ती रक्कम मुरविण्याचं तुम्ही ठरवलंत असंच ना?’

‘महाराज सर्व जाणतात!’

‘नाही, मोरोपंत. आम्ही अंतर्ज्ञानी नाही. तुम्ही संभाजीराजांच्याकडे युवराज म्हणून पाहता; आमची नजर बापाची आहे. एवढाच फरक.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एके दिवशी राजांनी मोरोपंतांना विडे दिले. त्यानंतर अनाजी गड उतरले. मोहिमेवर जाताना संभाजीराजे राजांच्या दर्शनाला आले. युवराजांना निरोप देताना राजे म्हणाले,

'युवराज, संभाळून राहा. तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. वारेमोल जीव समजून वेडं धाडस पदरात घेऊ नका. तुमच्या येण्याकडे आमचे डोळे लागले आहेत.'

संभाजीराज गडाखाली उतरले. राजे हंबीररावांना म्हणाले,

'हंबीरराव, आम्ही मोहिमेला बाहेर पडताना मासाहेबांना काय वाटत असेल, याची आता थोडी कल्पना येते... आता आपली मोहीम. पाहू, बहादुरखान कोकलताश काय म्हणतात, ते.'

'सरळ छावणीवर चालून यायचं?'

'मुळीच नाही. ही मोहीम तर फार सोपी. तुम्ही दोन हजारांची कुमक घेऊन, सांगून सवरून खानावर जा. तुम्ही येता, हे पाहताच खान आपल्या गढीबाहेर पडेल. त्याला झुलवीत खूप दूर न्या. आम्ही पाठीमागे आठ हजारांनिशी तयार असू. तुम्ही दूर गेलात, की आम्ही छावणी फस्त करून माघारी येऊ.'

'आणि हातघाईचा प्रसंग आला, तर?' हंबीररावांनी विचारले.

राजांच्या चेहऱ्यावरचे स्मित त्या शंकेने ढळले नाही.

'नाही, हंबीरराव. हातघाईचा सवाल येताच कामा नये. या मोहिमेत एकही माणूस गारद होऊ द्यायचा नाही. आमच्या राज्याभिषेकप्रसंगी टोपीवाल्यांनी आम्हांला आहेर केला; पण दिल्लीदरबारकडून येणारा आहेर तसाच राहून गेला. एक करोड होन आणि दोनशे नामांकित घोडी हा आहेर दिल्लीतख्ताला शोभण्यासारखा आहे, नाही? राज्याभिषेकासारख्या मंगल प्रसंगी शाही तख्ताचा आहेर स्वीकारीत असता रक्तपात होऊन कसा चालेल?'

हंबीरराव हसले. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'औरंगजेबाला ही चपराक भारी जाणवेल.'

'हंबीरराव, सेनापतींच्या तोंडी हे शब्द शोभत नाहीत. दिल्लीतख्ताचे बादशाहा असल्या लुटीची पर्वा करणारे नाहीत. ते भारी हुशार आणि दूरदृष्टीचे आहेत. त्या दृष्टीला काय दिसतं, हे कोण सांगणार?'

हंबीरराव राजांचा निरोप घेऊन गेले, तरी राजे आपल्याच विचारात उभे होते. त्यांच्या डोळ्यांसमोर आलमगीरची मूर्ती तरळत होती.

□

२४

दिल्लीच्या उकाड्याने परिसीमा गाठली होती. पावसाळी ढग आकाशात फिरत होते; पण अद्याप उत्तरेतील पावसाळ्याला सुरुवात झाली नव्हती. दोन प्रहर टळली, तरीही वाढत्या उष्णतेने जीव कासावीस होत होता. दिल्लीतल्या दिवाण-इ-खासच्या उद्यानांतून असंख्य कारंजी फवारे सोडीत होती. खुद्द दिवाण-इ-खासच्या कमानी वाळ्याच्या पडद्यांनी सजल्या होत्या. त्यांवर पाणी अखंड शिंपडले जात होते. गुलाबपाण्याचा आणि वाळ्याचा सुगंध दरवळत होता. दिवाण-इ-खासच्या मध्यभागीच्या संगमरवरी आसनावरच्या जरी बिछायतीवर बसून औरंगजेब दरबारी कामकाज पाहत होता.

पांढरा तलम कुडता आणि विजार एवढाच औरंगजेबाचा वेष होता. मस्तकावरच्या सफेद किमॉशवर एक तेजस्वी पाचूचे पिंपळपान राजचिन्ह म्हणून विराजले होते. औरंगजेबाच्या मागे उभे असलेले दोन खोजे मयूरपंखांनी वारा ढाळीत होते. औरंगजेबापासून थोड्या अंतरावर जाफरखान आणि चार-पाच सरदार रिवाजाप्रमाणे हात बांधून खालच्या नजरेने उभे होते. बादशहाची नजर सर्वांवर फिरत होती. हातातल्या जपाच्या माळेचे मणी ओढले जात होते. औरंगजेबाच्या चेहऱ्यावर प्रसन्नता होती. जाफरखानाकडे पाहत त्याने सांगितले,

'जाफरखान, इराणच्या वार्तेनं आमचं मन सुखावलं.'

'आलीजाह, आपण त्याबाबत बिलकुल बेफिकीर असावं. हे विजय असेच वाढत
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जातील, आणि इराणच्या बंडाचा मोडावा होईल, हा यकीन ठेवावा.’

‘परवरदिगार मोठा रहमदिल आहे! सल्तनतीची काळजी आम्ही कोण करणार?’

हे बोलत असता औरंगजेबाच्या मनात एक सूक्ष्म शंका निर्माण झाली. आपली गहिरी नजर जाफरखानावर खिळवीत त्याने विचारले,

‘जाफरखान, दक्षिणेची वार्ता काय आहे?’

जाफरखानाने त्याच अभिमानाने सांगितले,

‘जहाँपनाह, आदिलशाहीची मग्रुरी चेपली आहे. हुक्म झाला, तर आदिलशाहीचा निशा सुद्धा करता येईल.’

औरंगजेबाच्या चेहऱ्यावर एक वेगळाच भाव तरळून गेला. नकारार्थी मान हलवीत तो म्हणाला,

‘नाही, जाफर, आदिलशाही नष्ट करण्याची आमची केव्हाच इच्छा नव्हती; नाही. तिची सत्ता मर्यादेबाहेर वाढत नाही, एवढं पाहिलं, की झालं. आम्ही दक्षिणेची वार्ता विचारली, ती आदिलशाहीची नव्हे.’

‘कसूर माफ, आलमपनाह! हुजूरचा खोल मनशा सेवकाच्या नाचीज बुद्धीत कसा मावणार?’

औरंगजेब बोलून गेला,

‘जाफरखान, अरे, तो मक्कार दक्षिणेत आहे ना? त्या शिवाजीविषयी नेहमी तुम्ही गाफील राहता.’

‘जहाँपनाह,’ जाफरखानाने विश्वास दिला, ‘त्याची मुळीच चिंता करू नये. बहादुरखान कोकलताश आपल्या फौजेनिशी शिवाजीचा बंदोबस्त करण्यासाठी शिवाजीच्या मुलुखात तळ देऊन बसला आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आणि तो शिवाजी?’

जाफरखानाच्या चेहऱ्यावर हसू उमटले.

‘आलीजाह, तो शिवाजी काय करणार? त्याच्या मूर्खपणाच्या एक एक गोष्टी ऐकून हसावं, की रडावं, तेच कळत नाही.’

‘काय केलं त्यानं?’

‘जहाँपनाह,’ जाफरखान आलेले हसू आवरीत सांगत होता, ‘नुकतीच बातमी आली आहे की, त्या शिवाजीनं काशीच्या पंडिताकडून रायगडावर आपणांला राज्याभिषेक करून घेतला. असे राज्याभिषेक करून राजे बनले असते, तर मग कशाला?’

जाफरखानाचे लक्ष औरंगजेबाकडे नव्हते. तो आपल्याच नादात बोलत होता. त्याच्या बोलण्याने दरबारच्या इतर सरदारांच्या चेहऱ्यांवर छद्मी हास्य उमटले होते.

जाफरखानाचे लक्ष सहज आलमगिराकडे वळले, आणि त्याचे शब्द जिथल्या तिथेच विरले. औरंगजेबाच्या डोळ्यांची उघडझाप थांबली होती. पाण्याखाली तांबूस दिसणारा सागरकिनारा ओहोटीची लाट मागे सरकताच फिका पडावा, तसा औरंगजेबाचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता. त्या भकास नजरेत पाहता-पाहता संतापाचा अंगार फुलला. हातातून सुटलेली जपाची माळ त्याने कष्टाने उचलली. संतापाने थरथरत तो आसनावरून उठला. डोळ्यांत जमा होणारे अश्रू निखळायच्या आत तो दरबार सोडून जाऊ लागला. मुजऱ्यासाठी वाकलेले सरदार उभे राहिले, तेव्हा दिवाण-इ-खासमध्ये औरंगजेब नव्हता. बादशहाच्या पाठोपाठ जाफरखान दोन सरदारांसह धावला. दिवाण-इ-खासलगतच्या महालात जाफरखान शिरला; आणि त्याचे पाऊल दाराशीच थांबले. आतले दृश्य पाहून तो दिङ्मूढ झाला.

महालातल्या गालिच्यावर औरंगजेब पालथा पडला होता. दोन्ही हात गालिच्यांवरून फिरत होते. औरंगजेबाचा शोकमग्न आवाज महालात उठत होता:

‘परवरदिगार! मी असा कोणता गुन्हा केला होता, म्हणून तू मला हा दिवस दाखवलास? नवीन बदरची लढाई केली, तेव्हापासून मोमिनांना इतका वाईट दिवस कधी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आला नव्हता. माझी बंदगी आणि नमाज यांमध्ये कोठे कसूर तर घडला नाही? हे परवरदिगार, आज मोगल सल्तनतीला जो तडा जातो आहे, तो सांधण्याचं बळ तरी मला लाभेल का? ते बळ मी कोठून आणू? कोठून आणू?...'

जाफरखान धावला. औरंगजेबावर ओणवे होऊन त्याने हाक मारली,

'जहाँपनाह!'

त्या हाकेने मानावर येत आपली मान फिरवीत औरंगजेबाने विचारले,

'कौन?'

पडल्या जागेवरून औरंगजेबाच्या संतप्त नजरेत जाफरखान आणि त्यामागे उभे असलेले तीन सरदार आले. जाफरखानाने पुढे केलेला हात झिडकारीत औरंगजेब उभा राहिला. काही न बोलता त्याने आपले अश्रू टिपले. जाफरखानाने उभ्या आयुष्यात कधीही औरंगजेबाचे एवढे विकल, घायाळ रूप पाहिले नव्हते. जाफरखान धीर करून म्हणाला,

'जहाँपनाह, शिवाजीनं राज्याभिषेक करून घेतला, म्हणन बिघडलं काय? खुद्द सुजानं राज्याभिषेक करून घेतला नव्हता काय? स्वत:विषयी गैरसमज करून घेऊन आजवर अनेकांनी राज्याभिषेक करून घेतले; पण अशा नामधारी राजांचं त्यांच्या राज्यांसकट अस्तित्व नाहीसं करण्याचं सामर्थ्य मोगल सल्तनतीनं दाखवलं.'

औरंगजेबाला ते ऐकणे असह्य झाले.

'बस्स कर, जाफर! आणखीन नादानपणे बोलून माझ्या संतापात भर घालू नको. अरे, सुजानंच नव्हे, तर सलीमनं सुद्धा बाप गादीवर असताना राज्याभिषेक करून घेतला होता. नशिबानं ते बादशहा बनले असते, तरी ते मोगल सल्तनतीचेच वारस होते. पण त्यांची आणि शिवाजीची तख्तनशीनी यांत खूप फरक आहे. काशीच्या काफिर पंडितांनी राजाला दिलेली मान्यता ही गोष्ट सामान्य समजू नको. अरे, ते इस्लामला दिलेलं आव्हान आहे, हे कसं तुझ्या ध्यानी येत नाही?'

'आलीजाह, बेअदबीची माफी असावी. पण शिवाजीची मोगल तख्तापुढं किंमत ती

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काय? शिवाजी समझोत्यानं आहारी आला नाही, तर त्याचा पराभव...’

सहसा प्रकट न होणाऱ्या औरंगजेबाच्या विकट हास्याने सारा महाल भरून गेला. औरंगजेब त्वेषाने म्हणत होता,

‘गद्दार, अहलीयाने मशरीकऽ’

जाफरखानाने त्याला साथ दिली,

‘खरं आहे, जहाँपनाह. तो शिवाजी गद्दार आहे. मूर्तिपूजकांचा साथीदार आहे.’

औरंगजेबाने जाफरखानावर दृष्टी रोखली. त्याचे डोळे संकोचले. त्याच्याकडे बोट दाखवीत औरंगजेब म्हणाला,

‘जाफरखान, मी ‘गद्दार, अहलीयाने मशरीक’ म्हणालो, ते शिवाजीला नाही. ते तुम्हांला मी म्हणतो आहे. त्या काफिरानं तख्तनशीनी करून घेतली; आणि तुम्ही समझोत्याच्या गोष्टी करता? त्याच्या पराजयाचं स्वप्न पाहता? मूर्खांनो, तो शिवाजी आपल्या मरणानं मरेल; पण त्यानं उभं केलेलं काफिर तख्त... ते आव्हान... ते कसं संपणार?’

औरंगजेबाचा आवाज परत घायाळ बनला. आपल्या दोन्ही हातांचे पंजे प्रार्थनेसाठी उभारीत तो म्हणाला,

‘हे परवरदिगार, तू आपल्या बंद्यांना तुझ्यावर आणि तुझ्या नबीवर विश्वास ठेवल्याबद्दल शासन का करतो आहेस?’

औरंगजेबाची नजर परत जाफरखानावर आणि इतर सरदारांवर खिळली. त्याचा सारा संताप परत उफाळला.

‘चालते व्हा! निदान माझा संताप कमी होईपर्यंत तरी माझ्यासमोर येऊ नका! तो शिवाजी आग्र्याहून सुटला, हे तुमच्याच बेइमानीचं फळ आहे. तुझ्यासारख्या नादान, कमजोर, बेइमान माणसांचं धनीपण आम्ही चालवतो, हीच शिक्षा आम्हांला खूप आहे.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जा! तुमच्या कत्तलीचे हुकूम माझ्या तोंडून बाहेर पडण्याच्या आत चालते व्हा. निकल जाओ यहाँ से!’

भयभीत झालेले सरदार आणि जाफरखान यांनी गडबडीने मुजरे केले. महालात एकटा औरंगजेब उभा होता. त्याला काही सुचत नव्हतं. त्याची नजर मोकळ्या महालावरून फिरत होती.

□

२५

एके दिवशी भर पावसात राजांनी रायगड सोडला. आपल्या फौजेनिशी ते पेडगावच्या दिशेने जात होते. पावसाची झड कमी झाली होती. पण चार दिवसांत सूर्यदर्शन घडले नव्हते. गार वारा वाहत होता. जिकडे पाहावे, तिकडे पाणथळ जमीन नजरेत येत होती. सकाळी थोड्या सरी येत.

पाऊस थांबला होता. पुण्याच्या पूर्वेला काही कोसांवर वाहणाऱ्या भीमेच्या पाण्याला उधाण आले होते. तांबडेभोर पाणी फेसाळत धावत होते. त्या भीमेच्या काठाला वसलेल्या पेडगावच्या किल्ल्यात बहादुरखानाची छावणी सुस्तावली होती, जिकिरीने पावसाळ्याचे दिवस कंठीत होती.

बहादुरगडाच्या प्रवेशद्वारावर पहारेकरी पहारा देत होते. गडाचे दरवाजे उघडे होते. शेकोटी करून काही चौकीदार अंग शेकीत बसले होते. पाऊस गेल्याने तटावर पहारेकरी फेरा घालीत होते. गडाच्या दरवाजातील शिपायांचे लक्ष टापांच्या आवाजाकडे गेले. दोन घोडेस्वार भरधाव वेगाने गडाकडे येत होते. ते स्वार नजरेच्या टप्प्यात आले. पठाणी वेष असलेले ते स्वार गडाच्या दरवाजात आले. दरवाजाशी पायउतार होताच ते म्हणाले,

‘क्या देखते हो? दरवाजा बंद करो! मरगट्ठे आ गये ऽ ऽ’

स्वारांचे कोंडाळे त्या दोघांभोवती गोळा झाले. गडाचा किल्लेदार धावत आला. दोघां पठाणांनी आपली ओळख करून दिली. औरंगाबादेच्या सुभेदाराची ओळखपत्रे घेऊन चाकरीसाठी बहादुरखानाकडे येत असता दोघांना मराठ्यांचा तळ दिसला. जीव घेऊन दोघे
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गडाच्या आश्रयाला पोहोचले होते.

किल्लेदाराने दोघांना बहादुरखानाच्या समोर हजर केले. बहादुरखान विचारात पडला असतानाच टेहळणीच्या सांडणीस्वारांनी मराठे येत असल्याची बातमी आणली. एकापाठोपाठ बातम्या येत होत्या. अवघ्या दोन हजार फौजेनिशी मराठे चाल करून येत आहेत, हे ऐकून बहादुरखान चकित झाला.

‘बस्स? दोन हजार फक्त?’

‘मराठ्यांची ही रीतच आहे, हुजूर!’ सरदाराने साथ दिली.

बहादुर हसला. आपल्या दाढीवरून हात फिरवीत त्याने आज्ञा दिली,

‘इशारतीची नौबत द्या.’

पेडगावची छावणी गडबडून उठली. घोड्यांच्या टापांच्या आवाजाने छावणी भरून गेली. बहादुरखान सज्ज झाला.

खानाने आज्ञा दिली,

‘खोलो दरवाजा!’

दरवाजा उघडला गेला. नौबत निनादू लागली. बहादुर मराठ्यांना सामोरा जाण्यासाठी फौजेनिशी बाहेर पडला. मूठभर शिबंदीच्या हाती बहादुरगड हवाली करून बहादुरखान लढाईसाठी दौडू लागला. पेडगावपासून थोड्या अंतरावर जाताच मराठे त्याच्या नजरेत आले. बहादुरखानाची आठ-दहा हजार फौज पाहताच मराठ्यांनी तोंड फिरवून पाठ दाखविली. मराठी सैन्य पळू लागले.

बहादुरखानाने आजवर मराठ्यांच्या अनेक कथा ऐकल्या होत्या. अनेकदा त्याची भीतीने गाळण उडाली होती. पण पाठ दाखवून पळणारा शत्रू तो प्रथम पाहत होता. त्याने त्वेषाने घोड्याला टाच दिली. मराठी फौजेचा पाठलाग सुरू झाला. घोड्यांच्या खुरांबरोबर चिखलाच्या चिकांद्या उडू लागल्या. खान जोरात पाठलाग करीत होता. मराठी फौज

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हुलकावण्या दाखवीत धावत होती. पेडगावापासून खान दहा-बारा कोसांवर आला, तरी शत्रूशी गाठ पडेना. वीस कोस खान धावला, तरी मराठी फौज गाठता येईना. चिखलराडीतून धावून खानाची फौज दमली. खानाने पेडगावकडे वळायचे ठरविले.

‘भाग गये! डरपोक कहींके...’

मराठे गाठ पडले असते, तर त्यांचा खिमा कसा उडाला असता, याचे स्वप्न रंगवीत खान बहादुरगडाकडे जात होता. आकाश ढगांनी भरले होते. कुणाचे तरी प्रथम लक्ष गेले. त्या कुंदावलेल्या वातावरणावर सर्वांच्या नजरा खिळल्या. बहादुरगडच्या

दिशेने आकाशात धुराची काळी वेटोळी उठत होती, उन्हाळ्याच्या चक्री वादळासारखी. त्याचा अर्थ कुणालाच कळत नव्हता.

खान बहादुरगडाकडे धावू लागला. गड नजीक आला, तशी घोड्यांची गती मंदावली. खानाचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. साऱ्या बहादुरगडावर धुराचे लोट उठत होते. गडाचा दरवाजा सताड मोकळा होता. गडाची तटबंदी जशीच्या तशी शाबूद होती, पण तटावर एकही पहारेकरी दिसत नव्हता. कुठे कसली जाग लागत नव्हती.

बहादुरचे तोंड वासले होते. तो अघटित पाहत होता.

बहादुरखान गडानजीक आला. पुढचे स्वार वेशीतून आत गेलेले दिसले. दुसऱ्याच क्षणी ते माघारी आले. पाठोपाठ बहादुरगडाचे रहिवासी छाती पिटीत सामोरे आले. एकच आक्रोश उठला होता.

‘हम लुट गये, मालिक! शिवाजीने हमको लूटा!...’

‘शिवाजी ऽ! या अल्ला! सैतानका बच्चा! कहाँ गया? क्या हुआ?’

बहादुर पायउतार झाला. वेड्यासारखा तो चालत होता. वेशीच्या आतले वातावरण आक्रोशांनी भरून गेले. सर्व तंबू जळून खाक झाले होते. मराठ्यांच्या पळण्याचा अर्थ आता त्याला कळत होता. मराठ्यांची लूट काय असते, हे तो उभ्या पावसात बघत होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

-आणि याच वेळी राजे रायगडाची वाट कापीत होते. फौजेच्या आघाडीला राजांच्या बरोबर हंबीरराव दौडत होते. फौजेबरोबर नेली जाणारी दोनशे देखणी घोडी नजरेत भरत होती. एक कोटी रुपयांची नगद लूट सावरून राजांची फौज रायगड जवळ करीत होती.

□

२६

बहादुरखानाची लूट घेऊन राजे गडावर आले. गडावर आणि छावणीत बहादुरखानाची छावणी कशी लुटली, याचीच बोलवा चालू होती. मोरोपंतांनी कल्याण-भिवंडीला फौज गोळा करून दहशत निर्माण केली होती. त्या हालचालीमुळे इंग्रज व पोर्तुगीज घाबरून गेले. बहादुरगडाची लूट झाल्यानंतर राजांची एक फौज जुन्नर मुलुखाकडे रवाना झाली होती. अनाजी फोंडा मुलुखात होते. जिकडे तिकडे राजांच्या नावाचा गवगवा झाला होता. पण राजे वाट पाहत होते. संभाजीराजांची. ते अद्याप गडावर आले नव्हते.

एके दिवशी सायंकाळच्या सुमारास गडाची नौबत झडली. युवराज संभाजीराजे गडावर येत असल्याची वार्ता राजांना मिळाली. राजे उतावीळ बनून राजसदरेत गेले. प्रवेशद्वारातून आनंदराव येताना दिसले. पण संभाजीराजे कुठे दृष्टीत आले नाहीत. आनंदरावांनी नजीक येऊन मुजरा केला.

‘आनंदराव, आमचे युवराज कोठे आहेत?’

‘ते पालखीदरवाजानं आत गेले.’

‘कारण?’

आनंदराव हसले.

‘भागानगरच्या मुलुखात आम्ही घुसलो. फौज पुढं सरकत होती. तोच कुतुबशाही फौज येत असल्याचं कळलं. मी युवराजांना माघार घ्यायला सांगितलं. त्यांना ते आवडलं नाही. जबाबदारी माझी होती. युवराजांना मी पुढं जाऊ दिलं नाही. संतापानं युवराज माघारी वळले. त्यामुळं...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आमच्या समोर यायची त्यांना लाज वाटली, असंच ना?’ राजांनी विचारले. ‘ठीक आहे. तुम्ही केलंत, तेच बरोबर. आम्ही युवराजांची समजूत काढू.’

राजे युवराजांच्या महालाकडे वळले. महालात युवराज पलंगावर बसले होते. येसूबाई उभ्या होत्या. राजे जाताच संभाजीराजांनी मुजरा केला; आणि ते पाठमोरे उभे राहिले. राजांची नजर चौपाईवर ठेवलेल्या निरांजनतबकाकडे गेली. आलेले हसू लपवीत राजे येसूबाईंना म्हणाले,

‘येसू, युवराजांना ओवाळलं, की नाही?’

त्या शब्दाबरोबर संभाजीराजे वळले.

‘आबासाहेब, विजयी वीराला ओवाळतात; पळून आलेल्याला नव्हे...’

राजे संतप्त युवराजांच्या जवळ गेले.

‘कुणी सांगितलं तुम्हांला? यशस्वी माघार घेणं, फौज सुखरूप माघारी आणणं, हा सुद्धा एक थोर पराक्रमच आहे... विजयापेक्षाही अवघड.’

‘आमची फौज होती. सहज विजय मिळाला असता. पण तुमच्या आनंदरावांनी आम्हांला रोखलं, आमच्यावर बळजोरी केली...’

‘राजे, आम्ही तुमची तडफ जाणतो. तुमचा संतापही आम्हांला कळतो. पण त्यासाठी आनंदरावांना दोष देणं अन्यायाचं ठरेल. तुम्ही अजून लहान आहात. उसळतं रक्त नेहमीच बरोबर निर्णय करतं, असं नाही. तुम्ही आमची आज्ञा विसरलात; पण आनंदराव आपली जबाबदारी कशी विसरतील?’

‘कसली आज्ञा?’

राजे हसले. ‘युवराज, भागानगर जिंकण्यासाठी तुम्हांला पाठवलं नव्हतं; नुसती दहशत निर्माण करण्यासाठी पाठविलं होतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मराठी फौज पळालेली पाहून चांगलीच दहशत बसली असेल!’

‘युवराज, हा पळून येण्याचा सवाल नाही. तुम्ही आणलेली लूट काय कमी आहे? तिनं दरारा वाढला नसेल? पळणारी का होईना, पण मराठी फौज त्यांच्या मुलुखात घुसते, धुमाकूळ घालते, हे का थोडं झालं?’

राजांनी युवराजांच्या खांद्यावर हात ठेवला. संभाजीराजांची नजर राजांच्या नजरेला नजर भिडली.

‘आणि, युवराज, पराजयाचं दु:ख कसलं? आमची निम्मी हयात पळापळीतच गेली. आम्ही यापेक्षाही थोर पराजय घेतले आहेत. पन्हाळ्यावर तर आम्हांला पळता भुई थोडी झाली. पण त्या पराजयानंदेखील आम्हांला खूप शिकवलं.’

संभाजीराजांच्या चेहऱ्यावर हास्य उमलले. राजे येसूबाईंना म्हणाले,

‘येसू, युवराजांना ओवाळ. ते पराक्रम करून घरी आले आहेत.’

येसूबाईंनी तबकातली निरांजनं प्रज्वलित केली. त्यांनी युवराजांना ओवाळले. मस्तकी तिलक लावलेले संभाजीराजे राजांच्या पाया पडले. राजांनी संभाजीराजांच्या मस्तकावरून हात फिरवला.

‘युवराज, लक्षात ठेवा. ज्यांना पराजयाची भीती नसते, तेच विजयश्री संपादन करू शकतात... येतो आम्ही.’

राजांनी पाऊल उचलले. राजे महालात आले, ते उभेच राहिले, हे ध्यानी येताच येसूबाई म्हणाल्या,

‘आबासाहेब, बसावं ना!’

राजांनी येसूबाईंच्याकडे पाहिले.

‘येसू, नाइलाजानं आम्हांला इथं यावं लागलं. मोहिमेवर गेलेला पती फारा दिवसांनी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आला असता, तिथं अन्य कोणी जाणं गैर आहे, हे का आम्हांला कळत नाही?'

लाजलेल्या येसूबाईंच्याकडे न पाहता राजे महालाबाहेर गेले.

राजे जाताच संभाजीराजे येसूबाईंच्याकडे सरकले. येसूबाईंनी गडबडीने तबक उचलले. संभाजीराजांच्या हाताची पकड येसूबाईंच्या मनगटावर बसली. येसूबाई गडबडीने म्हणाल्या,

'तबक ठेवून येते ना!'

'त्याची आत्ताच गडबड का? नंतर ठेवा.'

येसूबाईंनी तबक खाली ठेवले. संभाजीराजांनी येसूबाईंच्या हाताला स्पर्श केला.

'इकडे बघा ना!'

'हे काय? कोणी येईल ना!' येसूबाई दरवाजाकडे पाहत म्हणाल्या.

'कोणी येणार नाही. खुद्द आबासाहेबांनीच सांगितलं नाही?'

'चला! काही तरीच बोलणं. लोक काय म्हणतील?'

'आम्ही एवढा पराक्रम करून आलो...'

'माहीत आहे पराक्रम...' येसूबाई हसून म्हणाल्या.

'अस्सं!' संभाजीराजांनी एक वेळ येसूबाईंच्याकडे रोखून पाहिले. दुसऱ्याच क्षणी दरवाजाकडे जात संभाजीराजे म्हणाले,

'रणांगणात पराजय घेतला, म्हणून आमच्या महालातही आम्ही तो घेऊ, की काय?'

येसूबाईंनी हसून वर पाहिले, तेव्हा खरोखरच महालाचे दरवाजे बंद होत होते...

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

२७

पावसाळा संपला. वनराईने गर्द हिरवा रंग धारण केला. रानकोंबड्यांचे आवाज रानावर उठू लागले. शिवारात भात, नागली, सावा सळसळू लागला होता. गडावरच्या झडपा निघाल्या. वाटेलगतच्या गवताची साफसफाई करण्यात येऊ लागली. हत्तीटाके, कुशावर्त, बामणटाकी, गंगासागर यांसारखे पाण्याचे तलाव पाण्याने तुडुंब भरले होते. लहरींनी त्यांची अंगे शहारत होती. राजांनी पाचाडला नव्या पागेचे काम उभारले. पागा पुरी झाली. हुजुरातीच्या निवडक पाचशे घोड्यांची पागा उभी राहिली. राजे पागा पाहून गडावर आले.

सायंकाळच्या वेळी राजे विवेकसभेत बसले होते. कवी कलश, निराजीपंत सभेत हजर होते. राजांच्या शेजारी खुद्द युवराज संभाजीराजे वीरासन घालून बसले होते. संभाजीराजांची संस्कृत काव्यामधील प्रगती कवी कलशांच्या तोंडून ऐकून राजे खूश झाले.

अंधार पडू लागला, तसे राजे विवेकसभेतून उठले. एकदम आठवण होऊन त्यांनी विचारले,

‘अलीकडे निश्चलपुरींची काही वार्ता नाही. त्यांचं क्षेम आहे ना?’

‘जी!’ कवी कलश म्हणाले. कवी कलश याच संधीची वाट पाहत होते. ते म्हणाले, ‘महाराज, निश्चलपुरींचा शब्द खोटा ठरला नाही.’

राजे थांबले.

‘कवी कलश! तुम्ही आमच्या नजीकचे. बोला.’

‘स्पष्ट बोलतो. पण निश्चलपुरींनी सांगितलेले सारे अपशकुन घडले. राज्याभिषेकाआधी सेनापती आणि आपल्या पत्नी निवर्तल्या. राज्याभिषेकाच्या तेराव्या दिवशी मासाहेब गेल्या. या अपशकुनांनी साऱ्यांची मने शंकित झाली आहेत.’

‘तुमचीही!’

‘क्षमा, महाराज!’ कवी कलश म्हणाले, ‘आम्हीही श्रद्धावान माणसं आहोत. जे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

डोळ्यांनी दिसतं, ते नाकारायचं कसं?'

'जे पाहावं, ते माणसाला दिसतं. प्रतापराव गेले; पण राज्याचं धैर्य दाखवून गेले. धन्याच्या एका शब्दाखातर दहा हजारांच्या छावणीवर चालून जाणारे आमचे सात सरदार मृत्यूचा पराभव करून गेले. त्यांच्या शौर्याला तोड कसली? राणीसाहेबांचा मृत्यू म्हणाल, तर त्या मृत्यूचा अर्थ आमच्या इतका कुणाला कळणार? मासाहेब गेल्या, आम्हांला दुःखाच्या खाईत टाकून गेल्या खऱ्या, पण अखेरच्या वेळची त्यांची तृप्तता आम्हीच पाहिली. ज्ञानदेव समाधिस्थ झाले, तो क्षण का अमंगल? तुम्ही म्हणाल, हा कल्पनेचा खेळ आहे. पण राज्याभिषेकाच्या आधीच आनंदरावांनी बेहलोलचा पराभव केला. राज्याभिषेकानंतर बहादुरखानाची लूट आमच्या पदरी पडली. हे विजय का सामान्य?'

कवी कलश त्याने निरुत्तर झाले.

'महाराज, आपला हा विचार असेल, तर माझी काही तक्रार नाही. पण खुद्द राज्याभिषेकाच्या वेळी गागाभट्टांनी पर्वतराजास बलिदान देवविलं नाही; खुद्द गडाची स्वामिनी शिर्काई... तिची पूजा केली नाही; ना देशस्वामी भार्गवाचं अर्चन करून घेतलं. या गोष्टी आमच्यासारख्यांना खटकतात. त्याचमुळं राज्याभिषेकाच्या वेळी गागाभट्टांच्या नाकावर काष्ठाचा तडाखा बसला, पौरोहित्य करणाऱ्या बाळंभट्टांच्या टाळूवर छताचं लाकडी कमळ पडलं, आणि अशुभाची जाणीव दिली गेली, असं आम्हांला वाटतं.'

राजे खिन्नपणे हसले.

'कवी कलश! आम्ही तुमच्या भावना जाणतो. पण या प्रसंगी एकच गोष्ट आठवते, जी तुम्हांला आणि निश्चलपुरींनाही पटावी. त्रिकालज्ञानी वसिष्ठांनी प्रभू रामचंद्रांच्या राज्याभिषेकाचा मुहूर्त काढला होता. त्यासाठी अनिष्टनिवारणार्थ होमही झाले होते. पण नेमक्या त्या सुलक्षणी मुहूर्तावरच प्रभू रामचंद्र चौदा वर्षं वनवासाला गेले.'

कवी कलश त्यावर काही बोलू शकले नाहीत.

'कवी, आम्ही तुमची भावना जाणतो. राज्याभिषेकाची आम्हांला हौस नव्हती; ती आवश्यकता होती. तो राज्याभिषेक सर्वतोपरी निर्दोष असावा, असं आम्हांलाही वाटतं. तुम्ही निश्चलपुरींना बोलावून घ्या. आम्ही त्यांच्या सांगण्याप्रमाणे तांत्रिक अभिषेक करून

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घेऊ.’

कवी कलश यांनी निश्चलपुरींना तातडीने निरोप पाठविला.

एके दिवशी निश्चलपुरी गडावर येऊन दाखल झाले. निश्चलपुरी मोठ्या उत्साहाने अभिषेकाच्या तयारीला लागले. निश्चलपुरींनी ललितापंचमीचा दिवस निश्चित केला.

सुरुवातीला निश्चलपुरींनी कुलदेवता, ग्रामदेवता, स्थानदेवता, इत्यादींचे पूजादी विधी केले. नंतर कलशस्थापना करून तंत्रानुसारे पूजाविधी उरकला. मेरुयंत्र नाना वर्णांनी चित्रित केले. मंडपात, तसेच सिंहासनाजवळ भूमिसंशोधन केले. सुवर्णसिंहासनासाठी दुसरी औदुंबरशाखांची आसंदी केली होती. तीत मंत्राने सिंहगात्रांची प्राणप्रतिष्ठा केली. राजे हाती खड्ग घेऊन राजसभेत आले. नंतर त्यांच्याकरवी द्वारपालदेवतांना बलिदान दिले. सिंहासनाच्या अष्ट सिंहांस बली दिले. नंतर इतर देवतांना बली देऊन संतुष्ट करण्यात आले. बलिदानविधी झाल्यावर शिवशक्तिरूपी कुंभांतील उदकांनी राजांनी राजमंडपात अभिषेचन केले. रायरी पर्वताला अन्नदान करून संतुष्ट केले. राजे राजसभेत येऊन मंत्रमय जयघोषात सिंहासनावर आरोहण करते झाले. प्रजाजनांना त्यांनी दर्शन दिले. राजांनी वाहिलेल्या दक्षिणेने निश्चलपुरी तृप्त झाले. त्यांनी आशीर्वाद दिला,

‘राजा! तुझ्यामुळं जगात सद्गुणांचा उत्कर्ष होईल. छत्रपतींच्या घराण्यात तीनशे वर्षं राजसत्ता चालेल. या अवधीत यवनांचा सतत नाश होत राहील.’

राजे सिंहासनावरून उतरले. न कळत त्यांची पावले उजव्या बाजूला वळली. राजे दोन पावले चालून थांबले. चटकन त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

ज्यांच्या पायांवर मस्तक टेकावं, आणि शुभाशीर्वाद घ्यावा, असं आता कोणी त्या बाजूला उरलं नव्हतं.

-मासाहेब केव्हाच निघून गेल्या होत्या!

□ □ □

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग नववा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

थंडीचे दिवस नजीक येत होते. पहाटेला धुक्याची वलये पर्वतराईला वेढू लागली. पाचाडच्या छावणीत राजांची पथके येऊन सामील होत होती. गडावर नजरबाजांची, जासुदांची वर्दळ वाढत होती. संभाजीराजे हे सेनापती हंबीरराव आणि आनंदराव यांच्यासह गडावर आले. नवी मोहीम कोणती, याचा विचार सर्वांना पडला होता.

राजांनी खानदेशाची मोहीम मनात धरली होती. जासुदांनी त्या भागातली अचूक बातमी गडावर आणली होती. आनंदरावांच्या नेतृत्वाने राजांनी एक फौज सुरतेला दहशत बसविण्याकरिता पाठविली होती; आणि दुसरी खुद्द आपल्या नेतृत्वाने घेऊन राजे खानदेशाकडे वळले.

जवळ जवळ तीन महिने राजे खानदेशात दौड करीत होते. आनंदरावांची फौज सुरतेकडे जात असता रामनगरच्या चार हजार भिल्लांनी फौजेला अडविले. एक लाख रुपये कबूल करूनही भिल्लांनी वाट दिली नाही. अकारण युद्धाचा प्रसंग उभा ठाकणार, हे पाहताच आनंदरावांनी वाट बदलली; आणि ते महाराजांना मिळण्याकरिता औरंगाबादेकडे वळले. रामनगरच्या भिल्लांमुळे सुरत वाचली.

एरंडोलजवळ राजे थांबले. त्यांनी इंग्रजांच्या वखारींवर फौज पाठविली. राजांच्या फौजेने चालविलेला धुमाकूळ पाहून मोगल फौजदार खेशगी आपल्या ताकदीनिशी मराठ्यांवर चाल करून आला; पण मराठ्यांच्या पुढे त्याचे काही चालले नाही. त्याची शेकडो माणसे मराठ्यांनी कापून काढली. खेशगी औरंगाबादेला पळून गेला. मराठ्यांनी धरणगावची वखार लुटली. खेशगी पळून गेल्यामुळे मराठ्यांना विरोध राहिला नव्हता. राजे बऱ्हाणपूरपर्यंत जाऊन, लूट घेऊन व मोगली मुलुखात दहशत निर्माण करून माघारी रायगडावर आले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांची फौज साऱ्या मुलूखभर पसरली होती. धरणगाव लुटल्यामुळे इंग्रज घाबरून गेले. धरणगावच्या वखारीची नुकसानभरपाई मिळविण्यासाठी त्यांनी आपला वकील राजांच्याकडे पाठविण्याचे ठरविले. अनाजी कोल्हापूर भागात वावरत होते. मोरोपंत कल्याण-भिवंडीला होते. खानदेशाची मोहीम आटोपून राजे गडावर आले. आता राजांना उसंत नव्हती.

राज्यविस्तार प्रतिदिनी वाढत होता. अनेक मोहिमांचे मनसुबे राजांच्या मनात उठत होते. मोगल आणि विजापूरकर यांबरोबरच राजांचा तिसरा प्रबळ शत्रू सिद्दी राजांच्या विरुद्ध केव्हा उठेल, याचा नेम नव्हता. सिद्दीच्या जंजिऱ्यामुळे सागरावरची त्याची हुकमत अबाधित होती. राजांच्या गलबतांना त्याची भीती नेहमीच वाटत होती. जंजिऱ्यावर जरब ठेवण्यासाठी राजांनी राजपुरीच्या समोर असलेल्या 'कासा' नावाच्या बेटावर किल्ला बांधण्याचे ठरविले. तातडीने काम पुरे करून घेण्याची राजांची इच्छा होती. त्या किल्ल्याच्या बांधकामात सिद्दीकडून उपद्रव होणार, हे जाणून राजांनी आपल्या दर्यासारंग दौलतखानांना आरमारासह कासा बेटावर उठणाऱ्या पद्मदुर्गाच्या रक्षणार्थ पाठविले. पद्मदुर्गाच्या उभारणीसाठी लागणारा पैसा व धान्य यांत कमतरता भासू नये, म्हणून प्रभावळीच्या सुभेदारांना ताकीद दिली गेली होती.

खानदेशाच्या स्वारीवरून राजे रायगडी आले. सर्व मुलुखाच्या बातम्या ते ऐकत होते. थैल्या गडावर येत होत्या. त्यांत एक महत्त्वाची थैली गडावर आली. पद्मदुर्गाच्या रक्षणार्थ पाठविलेल्या दर्यासारंगाने राजांना पत्र पाठविले होते. पद्मदुर्गाच्या कामात दिरंगाई होत होती. एका बाजूला सिद्दीला तोंड देत पद्मदुर्गाचे काम करीत असता जिवाजीपंतांकडून हवी ती कुमक तातडीने मिळत नाही, धान्य व पैसा अपुरा पडत असल्याने आरमार आणता येत नाही, अशी तक्रार दर्यासारंगाने केली होती.

दर्यासारंगांचे ते पत्र वाचून राजांचा संताप वाढला. एका बाजूला सर्व अडचणी दूर सारून पद्मदुर्ग पुरा करून घेण्याची आज्ञा राजे करीत असता जिवाजीपंत नुसती दिरंगाई करीत होते. म्हणून राजांनी प्रभावळीच्या सुभेदार जिवाजीपंतांना असे पत्र पाठविले, की त्यांची झोप उडावी. राजांनी लिहिले होते...

> '...दौलतखान व दर्यासारंग यांसी ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत यांणी वराता सुबे मजकुरावरी दिधल्या त्यांस तुम्हीं कांहीं पावलें नाही, म्हणोन कळों आलें. यावरून अजब वाटलें कीं, ऐसे नादान थोडे असतील. तुम्हांस समजलें असेल कीं, याला ऐवज कोठे तरी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ऐवज खजाना रसद पाठविलीया मजरा होईल म्हणत असाल. तरी पद्मदुर्ग बसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली आहे. त्याची मदत व्हावी. पाणी, फाटी आदिकरून सामान पावावें, या कामास आरमार वेगीनें पावावें, तें नाहीं. पद्मदुर्ग हबशी फौजा चौफेर जेर करीत असतील, आणि तुम्हीं ऐवज न पाठवून, आरमार खोंळबून पाडाल! येवढी हरामखोरी तुम्हीं कराल आणि रसद पाठवून मजरा करूं म्हणाल, त्यावरी साहेबी रिझतील कीं काय? ही गोष्ट घडायची तऱ्ही होय; न कळे कीं, हबशियांनीं कांहीं देऊन आपलें चाकर तुम्हांस केले असतील? त्याकरिता ऐसी बुद्धी केली असेल! तरि ऐशा चाकरास ठीकेठीक केले पाहिजेत! ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करूं पाहतो? याउपरी तऱ्ही त्यांला ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत देविला असें देवितील. तो खजाना रसद पावलियाहून अधिक जाणून तेणेंप्रमाणे आदा करणें कीं ते तुमची फिर्याद न करीत व त्यांचे पोटास पावोन आरमार घेऊन पद्मदुर्गाचें मदतीस रहात ते करणें. याउपरि बोभाट आलियाउपरी मुलाहिजा करणार नाहीं. गनिमाचे चाकर, गनिम जालेस, ऐसें जाणून बरा नतिजा तुम्हांस पावेल, ताकीद असे. रवाना...’

त्या पत्राने सारी खोळंबलेली सूत्रे हलू लागली. पद्मदुर्गाचे काम झपाट्याने पुरे करून घेण्याची घाई उडाली. जिवाजीपंत राजाज्ञेची वाट न पाहता पद्मदुर्गाच्या प्रत्येक मागणीला साद देऊ लागला. जेव्हा पद्मदुर्ग पुरा झाला, तेव्हा राजांनी सुभानजी मोहिते यांस किल्लेदारी दिली.

राजांचा बेत आदिलशाहीवर चालून जाण्याचा होता. त्यासाठी राजांनी दत्ताजीपंतांनी फौज देऊन कोल्हापूर भागात रवाना केले, आणि पन्हाळा भागात असलेल्या अनाजींना फौज देऊन फोंड्यावर चालून जाण्याची आज्ञा केली. गमावलेली दंडराजपुरी परत घेण्यासाठी राजांची एक फौज दंडराजपुरीवर गेली होती. पावसाळ्यापूर्वी दंडराजपुरी घेण्याचा राजांचा विचार होता.

राजे या मोहिमेचा विचार करीत असतानाच राजांनी गडावर संभाजीराजांची मुंज मोठ्या धामधुमीत केली. वास्तविक पाहता राज्याभिषेकानंतर युवराजांची मुंज होणार होती; पण जिजाबाईंच्या मृत्यूमुळे ती पुढे ढकलली गेली होती.

संभाजीराजांची मुंज आटोपताच राजे मोहिमेवर निघणार होते; पण याच वेळी मोगलांनी कल्याण-भिवंडीवर हल्ला केल्याची बातमी गडावर आली. बऱ्याच दिवसांनी मोगलांनी ही उचल घेतली होती. कल्याण-भिवंडीतील घरे मोगलांच्या धाडीत आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. त्या वार्तेने राजे काळजीत पडले. पाठोपाठ दुसरी बातमी गडावर येऊन धडकली. मोरोपंतांना कल्याण-भिवंडीची बातमी कळताच त्यांनी मराठी फौज पाठविली. मराठी फौजेने मोगलांना हुसकावून दिले आणि कल्याण-भिवंडीचा ताबा घेतला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कल्याण-भिवंडी स्वराज्यात राहिल्याचा आनंद राजांना झाला खरा; पण मोगलांनी घेतलेली उचल पाहून राजे चिंताग्रस्त झाले.

□

२

राजे दोन प्रहरच्या वेळी संभाजीराजांसह बुद्धिबळ खेळत होते. महालात राजाराम, सोयराबाई, पुतळाबाई ही मंडळी तो खेळ पाहत होती. राजाराम खेळाला कंटाळून महालात इकडे तिकडे फिरत होते. सोयराबाई, पुतळाबाई उत्सुकतेने खेळ पाहत होत्या. राजांची हार दिसू लागली होती. संभाजीराजांच्या चेहऱ्यावर विजयाचे स्मित दिसत होते. राजे मात्र पटाकडे एकाग्र चित्ताने पाहत होते. राजांनी आपले प्यादे एक घर पुढे सरकविले. संभाजीराजांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच स्मित झळकले. ते म्हणाले,

‘आबासाहेब, एका प्याद्याच्या मोहात आम्ही कसे पडू? आमची चाल उंटाची. ना अडीच घरं जाऊ, ना सरळ!’

संभाजीराजांनी आपला उंट चालविला आणि वजिराची कोंडी केली.

राजे हसले. वजीर वाचवायला जावे, तर सरळ राजाला शह बसत होता. डाव संपत होता. वजीर वाचवूनही डाव हाती येत नव्हता. राजे विचारात असतानाच त्यांचे लक्ष दरवाजाकडे गेले. दारातून येसूबाई आत येत होत्या. त्यांना पाहताच राजे मोठ्याने हसले.

‘शंभूबाळ, तुमचा डाव! आम्ही मान्य करतो. खुद्द भावेश्वरी महालात आली. तिच्या पावलांनी तुम्हांला यश मिळणारच.’

‘व्वा! खासा न्याय!’ संभाजीराजे म्हणाले. ‘आम्ही विचार करून डाव जिंकला; आणि श्रेय कुणाला?’

संभाजीराजांच्या बोलण्याने सारा महाल राजांच्या खळखळून हसण्यात सामील झाला. बाल राजाराम धावले. डाव संपल्याचा आनंद त्यांना झाला होता. त्यांनी राजांना विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आबासाहेब, डाव संपला?’

‘हो.’

‘कोण हरलं?’

‘आम्ही.’

‘तुम्ही?’

‘त्यात आश्चर्य काय? आम्ही कधी हरलो, तर तुमच्या प्रेमापोटीच हरू! आम्हांला पराजित करण्याची शक्ती दुसऱ्या कोणात नाही.’

‘आबासाहेब, बुद्धिबळाचा डाव भान हरपायला लावतो, नाही?’ संभाजीराजे म्हणाले.

‘हां, राजे! भान हरपावं, असे तीनच डाव आम्ही आजवर खेळलो. एक मिर्झाराजे जयसिंगाबरोबर. तो डाव जिंकला. दुसरा आजचा. तो तुम्ही जिंकलात.’

‘आणि तिसरा?’ न कळत संभाजीराजे विचारून गेले.

राजांनी एकदम संभाजीराजांच्याकडे पाहिले. त्यांचे भाव बदलले.

‘तो डाव तसाच अर्धा राहिला!’

‘कुणाबरोबर खेळलात, ते सांगावं तरी!’ सोयराबाईंनी विचारले.

त्या प्रश्नाने व्याकुळलेले राजे सावध झाले. सईची एक मिस्किल हास्यलहर कानांवर कुठून तरी निनादली. पण राजांनी क्षणात स्वत:ला सावरले.

‘दुसरा कुठला डाव असणार? हा स्वराज्याचा खेळतो आहे ना! जोडीदाराचं नाव आहे दैव!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सोयराबाईंच्या चेहऱ्यावर समाधान प्रकटले.

‘मग तो अर्धा राहिला, कशाला म्हणावं?’

‘डाव फार मोठा! त्याच्याशी झुंज देता-देता आम्ही थकलो. पण डाव नजरेत येत नाही. हा डाव तडीस न्यायचा, तो या दोघांनी.’

राजांची नजर संभाजीराजांच्यावर खिळली होती. संभाजींच्या पाठीवर राजाराम ओणवे झाले होते. राजांनी विषय बदलला.

‘शंभूबाळ, आम्हांला जरा उसंत मिळाली, की एकदा शिकारीला जाऊ. तुम्ही धावत्या जनावराला फाळ चांगला लावता, असं आम्ही ऐकलंय्.’

महालात मनोहारी आली. तिने वर्दी दिली,

‘बहिर्जी आलेत.’

राजे म्हणाले, ‘आता आम्हांला एकांत हवा.’

सर्व उठले. आतल्या दरवाजाने आत गेले. बहिर्जी आत आला, तेव्हा महालात राजे एकटे होते. बहिर्जीबरोबर राजे बोलत बसले होते. सायंकाळच्या सुमारास राजे बहिर्जीबरोबर सदरेवर आले.

सदरेवर संभाजीराजे होते. बहिर्जीने त्यांना मुजरा केला. बाळाजी आवजीही तेथे हजर होते. राजांनी विचारले,

‘काय, बाळाजी? काय म्हणतात आमचे युवराज?’

‘पुरंधर इथं एक वाद माजला आहे. बहुतेक युवराजांना निवाडा करण्यासाठी जावं लागेल, असं दिसतं.’

‘जरूर पाठवा. त्यांना आता ह्या गोष्टी कळायला हव्यात.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजे बहिर्जीकडे पाहत होते. बहिर्जी मध्यम अंगलटीचा होता. गुडघ्यांपर्यंत धोतर होते. रंगीत बंदाने छातीशी बंडी आवळली होती. डोक्यावर तांबडे बसकट पागोटे होते. संभाजीराजांनी सांगितले,

‘बहिर्जी, हा वेष तुला शोभून दिसतो.’

राजे म्हणाले, ‘शंभूबाळ, बहिर्जी आमचा नजरबाज. सामान्य मावळ्याच्या वेषातच त्याला फिरावं लागतं. बहिर्जी नजरबाज आहे, तसाच उत्तम शिकारीही आहे. तुमच्याबरोबर त्याला केव्हा तरी शिकारीला न्या.’

‘ते जमायचं नाही.’ संभाजीराजे एकदम बोलले.

‘का?’

‘आपला महादेव, हे बहिर्जी नजरबाज. आम्ही जाणूनबुजून ही माणसं आमच्या बरोबर कशी बाळगू?’

राजे हसले.

‘शंभूबाळ, ही माणसं बाळगली नाहीत, तरी आम्हांला कळायच्या गोष्टी कळतातच. आत्ताच पाहा ना! तुम्ही पाचाडला जाण्याच्या विचारात आहात. नवीन घोडं वजवलं जात आहे; ते तुम्हांला बघायचं आहे. परवा घोडं वजवताना पडलात. नव्या घोड्यावर मांड टाकू नका, म्हणून सांगितलं, तरी तुम्ही ऐकत नाही.’

सारे हसू दाबण्याचा प्रयत्न करीत होते. संभाजीराजांच्या चेहऱ्यावर भीती तरळली.

‘घाबरू नका. पण आज पाचाडला जाऊ नका. आम्हांला रात्री बरंच बोलायचं आहे. बाळाजी, तुम्ही, निराजीपंत रात्री महालात या. चला, शंभूबाळ. आम्ही गडाची पागा पाहणार आहो. तुम्ही आमच्या संगती चला.’

राजे जगदीश्वराचे दर्शन घेऊन पागा पाहून उतरले. राजे कुणाशी फारसे बोलत नव्हते. कसला तरी विचार त्यांच्या मनात उफाळत होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रात्री राजांच्या महालात रघुनाथपंत पंडितराव, त्र्यंबकराव, निराजीपंत, बाळाजी आवजी ही मंडळी हजर झाली. संभाजीराजेही महालात आले.

'आज आम्ही थोडे बेचैन झालो. त्याचमुळं तुम्हां सर्वांना बोलवावं लागलं. आम्हांला बातमी आली आहे. बहादुरगड लुटल्यामुळं बहादुरखान संतप्त होणं स्वाभाविक आहे. पण बहादुरखान दिलेरखानासारखा तडफदार नव्हे. तो सुस्त प्रकृतीचा सरदार होता. तो उठाव घेईल, असं वाटलं नव्हतं. आमची खानदेशाची स्वारी थोडी महाग पडणार, असं दिसतं. आमच्यावर स्वारी करण्यासाठी बहादुरखान मोठी तयारी करतो आहे, असं आम्हांला कळलं आहे; एवढंच नव्हे, तर भिवंडीच्या हल्ल्यानं ते सिद्धही झालं आहे.'

'क्षमा, महाराज!' रघुनाथपंत म्हणाले, 'बहादुरखानाची एवढी भीती बाळगण्याचं कारण नाही. आमची फौज सहज त्याचं पारिपत्य करील.'

'आमच्या दरबारचे तुम्ही पंडितराव! अमात्य! जयसिंगाबरोबर शरणागतीची बोलणी करण्यासाठी तुम्हीच गेला होतात ना?'

'त्या वेळची परिस्थिती निराळी होती.'

'पण मोगल साम्राज्य तसंच आहे. त्याची ताकद कमी झालेली नाही. आम्हांला बहादुरखानाशी वैर पत्करून चालायचं नाही.'

'पण, आबासाहेब, आपली फौज ऽ ऽ'

'कोठे आहे फौज? दत्ताजीपंत, अनाजी हे फौज घेऊन फोंडा, कोल्हापूर भागात आहेत. मोरोपंत कोकणात उतरले आहेत. हंबीरराव भागानगरकडे आहेत. फोंडा, कारवार भाग हस्तगत करण्यासाठी आम्ही मोहीम आखली आणि याच वेळी बहादुर उभा ठाकला.'

'फौज बोलावून घेता येईल.' संभाजीराजे म्हणाले.

'आणि आखलेल्या मोहिमेचं काय करायचं?' राजांनी विचारले.

'पण या दोन गोष्टी साधणार कशा?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शंभूबाळ, यालाच राजकारण म्हणतात. आम्ही मोगलांशी तह करण्याचं ठरवलं आहे.’

‘आबासाहेब!’

‘हो! पंडितराव, बहादुरखानाशी तहाची बोलणी सुरू करा. त्याला सांगा की, आम्ही बादशहांना शरण आहो. बादशहाच्या चरणी मी सतरा किल्ले वाहायला तयार आहे. एवढंच नव्हे; तर माझ्या मुलाला मनसब मिळेल, तर त्यालाही बादशहाच्या चाकरीला पाठवीन. त्याला सहाहजारी मनसब मिळावी; आणि भीमा नदीच्या दक्षिणेचा मुलूख माझ्याकडे राहावा.’

‘आम्ही मुळीच बादशहाच्या सेवेला जाणार नाही.’ संभाजीराजे संतप्त होऊन म्हणाले.

‘जावं लागेल! आठ वर्षांचे होता, तेव्हा जिथं ओलीस म्हणून राहिला होता, तिथं मनसबदार म्हणून गेलेलं काय वाईट?’

‘पण कशासाठी?’

‘राज्यरक्षणासाठी!’

‘अशा तऱ्हेनं राज्य राखण्यापेक्षा लढलेलं काय वाईट?’

‘पंडितराव, पाहिलंत? आमचे युवराज तरुण रक्ताचे आहेत; पण अनुभवानं अजून फार कच्चे आहेत.’

हसू आवरणे सर्वांना कठीण जात होते. संभाजीराजे त्या हास्याने चकित झाले होते. राजे उठले; संभाजीराजांच्या जवळ जाऊन म्हणाले,

‘शंभूराजे, राजकारणात वारेमाप उधळणाऱ्या शब्दांना किंमत नसते. आम्ही आखलेली कारवारची मोहीम पार पडायला सहज दोन-तीन महिन्यांचा अवधी लागेल. तोवर बहादुरखान तहाची वाटाघाट करीत बसेल. या बोलण्यात त्याला खूप आनंद वाटेल. बहादुरखानानं दिल्लीहून तुमच्यासाठी मागविलेलं फर्मान यायला खूप अवधी लागेल. या काळात त्याला काही करता यायचं नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजांच्या मनावरचे ओझे उतरले. खांद्यावरच्या राजांच्या हातातील ताकद त्यांना प्रथमच जाणवत होती.

□

३

राजांचा तर्क खरा ठरला. बहादुरखान मोगलाईतील राजांच्या धुमाकुळाने आधीच त्रस्त झाला होता. त्या वार्ता ऐकून औरंगजेब बहादुरखानावर संतापत होता. कल्याण-भिवंडीतून मोगलांना मराठ्यांनी हुसकावून दिले होते आणि राजांच्या बऱ्हाणपूरपर्यंतच्या लुटीत सारा मुलूख हवालदिल बनला होता. राजांच्या वाढत्या कारवाईला पायबंद घालण्याची ताकद बहादुरखानात नव्हती. राजांच्याकडून तहाची वाटाघाट येताच तो एका क्षणात सारे विसरला. तह होणार, या कल्पनेने तो आनंदला. त्याने तातडीने ही खबर पंजाबात असलेल्या औरंगजेबाला पाठविली. संभाजीराजांच्या नावाचे फर्मान पाठविण्याची विनंती केली.

बहादुरखान तहाच्या वाटाघाटीत गुंतलेला पाहताच राजांनी आपली नवीन मोहीम उघडली. संभाजीराजांना रायगडावर ठेवून राजे फोंड्याच्या लढाईला निघाले.

राजे राजापूरच्या रोखाने निघाले होते. राजांना फौजा येऊन मिळत होत्या. राजे राजापूरला आले; आणि त्यांनी आपली चाळीस गलबते वेंगुर्ल्याकडे रवाना केली. या चाळीस गलबतांतून फोंड्याच्या स्वारीत भाग घेण्यासाठी शेकडो मजूर राजांनी वेंगुर्ल्याकडे पाठविले. खुद्द राजे जयसिंगाच्या वेळी फोंडा काबीज करण्यात फसले होते. अनाजींचा लढादेखील अयशस्वी ठरला होता. या खेपेला राजांना फोंडा हवा होता. त्यात अपयश नको होते. त्यासाठी राजांनी पंधरा हजारांचे घोडदळ, चौदा हजारांचे पायदळ घेतले होते. राजापूर, कुडाळ करीत फोंड्याला आले; आणि त्यांनी दोन हजार घोडेस्वार व पाच हजार स्वार यांचा फोंड्याला वेढा घातला.

भर उन्हाळ्याचे दिवस होते. गर्द राईने झाकलेला मुलूख असूनही दिवसरात्र अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या. तशात उन्हाळ्याच्या दिवसांत फोंडा-किल्ल्याचा वेढा जारी राखला होता. दररोज मराठी फौजा किल्ल्याला भिडत होत्या. महंमद इखलासखान हा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

फोंड्याचा आदिलशाही किल्लेदार होता. चार महिने पुरेल, इतकी रसद असताही तो निष्ठेने राजांच्या विरुद्ध लढत होता. महंमदखानावर राजांचा खास राग होता. शिवाजीराजांच्या हद्दीतल्या मसुरा गावातील एका श्रीमंत व्यापाऱ्याला महंमदखानाने पकडून नेले होते. फोंडा काबीज केल्याखेरीज मागे जायचे नाही, असा राजांनी निर्धार केला होता.

शिवाजीराजांनी फोंड्याला वेढा घातलेला पाहताच गोव्याच्या पोर्तुगीजांना मोठी भीती निर्माण झाली. त्यांनी शिवाजीला तटस्थ राहण्याचे वचन दिले होते; तरी फोंडा काबीज झाला, तर गोवा सुरक्षित नाही, हे त्यांना कळत होते. त्यांनी राजांच्या कुरापती काढण्यास सुरुवात केली, सरहद्दीच्या देसायांना राजांविरुद्ध उठविले. हा प्रकार होणार, हे राजांनी गृहीत धरलेलेच होते. देसायांनी छावणीवर हल्ला केला मात्र, आणि राजांच्या सैनिकांनी देसायांची पाठ धरली. देसाई पोर्तुगीजांच्या मुलुखात पळाला. पण मराठी सैनिकांनी त्याची पाठ सोडली नाही. ते सरळ पोर्तुगीजांच्या चांदरगावात घुसले, तेथील घरे त्यांनी लुटली. किरिस्ताँव देवळाचा नोकर त्यात बळी पडला. याच वेळी साष्टीतील कुंक्कळी गावावर दोनशे घोडेस्वारांनी हल्ला केला. हे स्वार रणमुस्तखान नावाच्या विजापुरी सरदाराच्या मागे लागले होते.

या दोन्ही हल्ल्यांनी पोर्तुगीज विजरई घाबरला. त्याने शिवाजीराजांच्या वकिलाला अटक केली. राजांचा संताप आणखीन वाढला. पोर्तुगीजांच्या हालचालींवर त्यांचे बारकाईने लक्ष होते आणि एके दिवशी पोर्तुगीजांनी फोंड्याला मदत म्हणून पाठविलेली धान्याने भरलेली दहा शिबाडे व काही माणसे राजांच्या हाती लागली. राजांनी त्याबद्दल विजरईला जाब विचारला. पण हे प्रकरण अंगाशी येणार, हे पाहून पोर्तुगीजांनी कानांवर हात ठेवले. राजांनी दहा शिबाडे जप्त केली.

पोर्तुगीजांचा बंदोबस्त झाला होता. राजे जातीनिशी फोंड्याचा वेढा पाहत होते. मराठे दररोज हल्ले करीत होते, पण निकराने ते परतविले जात होते. जखमींची संख्या वाढत होती. मराठी फौजेने किल्ल्यापासून दहा-बारा हातांवर दरड उभी केली होती. तिच्या आश्रयाने किल्ल्यावर सतत हल्ला जारी ठेवला होता. तटावर दिसणारा माणूस अचूक टिपला जात होता. चार वेळा तटाला सुरुंग लावण्याचे प्रयत्न झाले, पण तटाला भगदाड पडले नाही.

रात्री राजे छावणीतून फिरत होते. जखमींची विचारपूस करून राजे आपल्या पालीकडे येत असता मशालींच्या उजेडात येणाऱ्या अनाजींच्याकडे त्यांचे लक्ष गेले. अनाजींच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मागे इब्राहिमखान उभा होता. दोघांनी मुजरे केले.

‘अनाजी, काय खबर?’

‘खबर चांगली नाही!’ अनाजी म्हणाले, ‘फोंड्याच्या मदतीसाठी बेहलोलखान येतो आहे, अशी बातमी आली आहे.’

राजे विचारात पडले. क्षणभरात ते म्हणाले,

‘त्याची भीती बाळगू नका. आदिलशाही वजिरीवर खवासखान आहे. त्या जागेसाठी खवासखानाची आणि बेहलोलची चुरस आहे. बेहलोल असा यायचा नाही. तुम्ही बेहलोलकडे आपली माणसं रवाना करा. लाचेवर तो तृप्त होईल. याखेरीज झाडं तोडून फोंड्याच्या साऱ्या वाटा बंद करा. चौक्या, पहारे जारी ठेवा.’

इब्राहिमखानाला राजांनी विचारले,

‘इब्राहिम, सुरुंगाचं काय झालं?’

‘कोशिश करता हूँ, हुजूर!’

‘कोशिश नको! आम्हांला आमचं निशाण फोंड्यावर चढलेलं पाहायचं आहे.’

दोघे मुजरा करून निघून गेले.

फोंड्याला वेढा घालून पंधरा-वीस दिवस होत आले, तरी किल्ला हाती येत नव्हता. राजांनी नवा बेत आखला. त्यांनी सुलतानढवा करण्याचे ठरविले. राजांच्या आज्ञेने पाचशे शिड्या आणि अर्धा शेर वजनाची पाचशे कडी तयार केली.

इब्राहीमखान नवे सुरुंग ठेवण्याच्या प्रयत्नात गुंतला होता.

राजांनी सुलतानढव्याचा दिवस मुक्रर केला. तटाला शिडी लावून आत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक वीराला सोन्याचे कडे देण्याचे राजांनी जाहीर केले होते. एक नवा उत्साह

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संचारला होता.

दिवस उगवला. छावणीवर शांतता पसरली होती. किल्ल्यावर एकही हल्ला होत नव्हता. किल्ल्याच्या तटावरून किल्ल्यातील सैनिक पाहत होते. अचानक थांबलेल्या लढाईचा अर्थ त्यांना कळत नव्हता. शत्रू तटाभोवती वावरत होता; पण त्यात नेहमीची गडबड दिसत नव्हती. वाढत्या वेळेबरोबर तटावरचे सैनिकांचे आकडे वाढत होते. सूर्य आकाशात चढत होता.

राजे किल्ल्यावर लक्ष ठेवून होते. मध्यान्हीचा सूर्य माथ्यावर आला; आणि इशारत दिली गेली. शिंगांचा आवाज शांततेचा भंग करून उठला. त्या इशारतीबरोबर सुरुंगाच्या वाती फरफरू लागल्या. तटावरचे पहारेकरी आश्चर्यचकित होऊन पाहत असतानाच कानठळ्या बसवणारा आवाज साऱ्या परिसरात घुमला. तटावरच्या पहारेकऱ्यांसकट तट आकाशात फेकला गेला! एकापाठोपाठ तीन सुरुंग पेटले. आकाशात उडालेल्या अत्तरांच्या अक्षता साऱ्या किल्ल्यावर पसरल्या. एकच धावपळ उडाली. तटाला खिंडार पडलेले पाहताच दबा धरून बसलेल्या मराठी सैनिकांनी ‘हर हर महादेव’ चा गजर केला. शिड्या घेतलेले मराठे वीर तटाला भिडले.

मराठी फौज किल्ल्यात प्रवेश करीत होती. एकच कापाकापी सुरू झाली. या धामधुमीतच राजांचा सरदार इब्राहिमखान हाती निशाण घेऊन पुढे घुसत होता. फोंडा सर झाला. किल्लेदार महंमदखानाला बेड्या ठोकल्या होत्या. राजांचे भगवे निशाण गडावर फडकू लागले. नौबत निनादली. तो विजय पाहून राजांचे अंग मोहरून गेले.

राजांनी जखमदरबार भरवला होता. साऱ्या वीरांचे राजांनी यथोचित सत्कार केले. सोन्याची कडी वाटली गेली. त्यांपैकी एका कड्याचा मानकरी इब्राहिमखान राजांच्या समोर आला. उजव्या दंडावर झालेल्या जखमेने त्याला मुजरा करता येत नव्हता. नतमस्तक होऊन त्याने राजांना अभिवादन केले. राजे हर्षभरित होऊन इब्राहिमखानाजवळ आले.

‘इब्राहिम, आम्ही तुझ्या पराक्रमावर प्रसन्न आहोत!’ राजांनी आपल्या हातांनी इब्राहिमच्या हाती कडे घातले. ‘ज्या तडफेनं काम झालं, ज्या तडफेनं तू आमची यशोपताका किल्ल्यावर चढवलीस, त्या शौर्याला तोड नाही. इब्राहिमखान, तुझ्या हातून लावलेल्या ध्वजाची इभ्रत कायम राखण्याची जबाबदारी आम्ही तुझ्यावरच सोपवीत आहो. यापुढं फोंडा किल्ल्याचा किल्लेदार तू आहेस. तुझ्या हाती हा किल्ला आम्ही सुपूर्त करीत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहो.’

राजांचे बऱ्याच वर्षांचे स्वप्न साकार झाले होते. फोंडा किल्ला घेतल्याने मराठ्यांच्या अमलाखाली अंत्रूज, अष्टागर, हेमाडबार्से, बाळी, चंद्रवाडी व काकोडे म्हणजे फोंडे, सांगे, केंपे व काणकोण हे महाल आले होते. पावसाळा यायच्या आत राजांना कारवार जिंकायचे होते.

राजांनी फोंड्याची सर्व व्यवस्था लावली, किल्ल्याची डागडुजी केली, किल्ल्याच्या मुख्य दरवाजावर काळ्या पाषाणाची एक सुंदर कोरीव गणेशपट्टी बसविली. त्र्यंबक पंडिताला फोंड्याची सुभेदारी सांगून राजे आपल्या फौजेनिशी कारवारकडे वळले.

□

४

संभाजीराजे मराईच्या रानात दोन दिवस शिकार खेळत होते. शिकार भरपूर झाली होती; त्यामुळे संभाजीराजे खुशीत होते. दोन दिवसांनंतर संभाजीराजांनी तळ हलविला.

भर उन्हाचे दिवस. सावित्री नदीचे पात्र कोरडे पडले होते. उन्हाचा ताप वाढत होता. त्या उन्हात सारे सृष्टीचे रूप कोमेजले होते. आकाशाला भिडलेले चारही बाजूंचे पर्वत उघडे-बोडके, भयाण वाटत होते. अशा भर दुपारी राजे रायगड जवळ करीत होते. उन्हात दौड केल्याने घामेजलेले घोडे फुरफुरत होते. संभाजीराजे आपल्या अश्वपथकासह पाचाडजवळ आले. संभाजीराजांच्या नजरेत पाचाडचा वाडा आला. चौफेर बुरुजांनी सजलेली वाड्याची कूस; त्या कुशीवर डोकावणारे आतले इमले. पाचाडचा वाडा नजरेत येताच संभाजीराजे व्याकूळ बनले; घोड्याची गती मंदावली. संभाजीराजांनी शिलेदाराला हाक मारली.

‘शिदोजी!’

मागून येणारा शिदोजी संभाजीराजांच्या नजीक आला. संभाजीराजे म्हणाले,

‘तुम्ही नाणेदरवाजाजवळ थांबा. आम्ही मासाहेबांचे दर्शन घेऊन तिकडे येऊ.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे एकटेच वळले. पांढऱ्या शुभ्र मोतीवर बसलेले संभाजीराजे आपल्या डाव्या हाताच्या वाड्याकडे पाहत होते. ती वास्तू केवढी मोकळी, भकास वाटत होती! पाचाड वाड्याच्या पहारेकऱ्यांनी राजांना मुजरे केले. मानेनेच त्या मुजऱ्यांचा स्वीकार करून राजे वाड्याला बगल देऊन सरळ जात होते. बामणवाड्यातील मंडळी राजांच्याकडे पाहत होती. भर तळपत्या उन्हातून एकटे जाणारे संभाजीराजे ते पाहत होते. उन्हाळ्यातल्या मोकळ्या झालेल्या धुळीच्या रस्त्यावरून संभाजीराजे संथ गतीने जात होते.

संभाजीराजे रायगडच्या दक्षिणेकडे वळले. डोंगराला वळसा घेऊन पाचाडपासून थोड्या अंतरावर असलेल्या जिजाबाईंच्या समाधीपाशी ते आले. घोड्यावरून पायउतार होऊन शिवाजीराजांनी बांधलेल्या स्मारकापाशी संभाजीराजे गेले. त्या निर्जीव स्मारकावरून आपली बोटे फिरवीत होते. मासाहेबांच्या आठवणी मनात उफाळत होत्या. जिजाबाईंचा आधार गेला; आणि राजे पोरके झाले. युवराज असूनही राजांना कोणी आपले भासत नव्हते. तळपत्या उन्हात समाधीवरील तुळशीचे रोपटे वाऱ्यावर डोलत होते. त्या वृंदावनाभोवती संभाजीराजे अनेक वेळा फिरले. शुष्क नजरेने ते माघारी वळले. मोतीवर स्वार होऊन संभाजीराजांनी त्याला टाच दिली. घोडे उधळले. आपल्या खुरांनी धुळीचा लोट उडवीत घोडे धावत होते. टापांचा आवाज उठत होता. संभाजीराजांच्या मुखावर घाम डवरला होता.

पाचाडवाडा मागे टाकून संभाजीराजे जात होते. त्यांची नजर चौफेर फिरत होती. न कळत घोड्याचा लगाम खेचला गेला. बसलेल्या ओढीने त्या जनावराची मान उंचावली, गती मंदावली. युवराजांची नजर रस्त्यापासून जरा बाजूला असलेल्या विहिरीवर खिळली होती. विहिरीच्या काठावर एक युवती उभी होती. टापांच्या आवाजाने कुतूहलाने ती घोडेस्वाराकडे पाहत होती. संभाजीराजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. घोड्याची पावले वळली, स्वार आपल्याकडे वळलेला पाहताच ती तरुणी घाबरली. गडबडीने तिने आपली घागर विहिरीत सोडली.

संभाजीराजे सावकाश विहिरीकडे जात होते. त्यांची नजर त्या तरुणीवर खिळली होती. घागर खेचणाऱ्या त्या तरुणीचे सौष्ठव ते नजरेत भरून घेत होते. त्या तरुणीने घागर ओढून घेतली; आणि तिने मागे पाहिले. संभाजीराजे अगदी नजीक आले होते. तरुणीच्या डोळ्यांत भीती तरळली. संभाजीराजे खाकरले. त्या तरुणीने परत वर पाहिले. संभाजीराजांच्या कपाळी घाम डवरला होता. संभाजीराजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जनावराला पाणी मिळेल?’

त्या तरुणीने काही न बोलता घागर दगडी खोगराळात रिती केली. संभाजीराजांनी हलकी टाच दिली. घोडे पुढे सरकले. घोडे पाणी पीत होते. त्याच्या मानेवर थोपटीत संभाजीराजे त्या तरुणीचे लावण्य निरखीत होते. ती तरुणी गौर वर्णाची, रेखीव बांध्याची होती. नेत्र विशाल आणि काळे होते. संभाजीराजांच्या नजरेला भिडलेली नजर काढणे तिला अशक्य झाले होते. ज्या नजरेने ती तरुणी पाहत होती, त्या नजरेतल्या धिटाईने राजे मोहित झाले होते. ती तरुणीही रूपसंपन्न युवराजांना न्याहाळीत होती. घोडे पाणी प्याले. युवराज पायउतार झाले. संथ पावले टाकीत ते तरुणीजवळ गेले.

‘जनावराची तहान भागवलीत; पण आम्ही मात्र तहानलेलेच राहिलो.’

त्या तरुणीने एक वेळ रागाने युवराजांकडे पाहिले. संभाजीराजांच्या चेहऱ्याकडे पाहताच तिच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. आजूबाजूला पाहत ती गडबडीने म्हणाली,

‘जावं ना! कोणी तरी पाहील.’

संभाजीराजांनी एक वेळ त्या तरुणीकडे पाहिले. ते माघारी वळले.

‘जनावराला पाणी मिळालं. पण आम्हांला...’ घोड्याच्या पाठीवर हात ठेवीत संभाजीराजे म्हणाले, ‘मोती, नशीबवान आहेस, बेटा! चल.’

ती तरुणी संभाजीराजांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत होती. तिच्या चेहऱ्यावर हसू होते. संभाजीराजे घोड्यावर स्वार होणार, असे वाटून ती गडबडीने म्हणाली,

‘पाणी घेऊन जावं!’

युवराज वळले. घागर विहिरीत सोडली गेली. त्या तरुणीच्या हातचा दोर सरसरला. पाण्यावर पोहोचलेल्या घागरीचा मंद नाद उठला. दोराला हेलकावे देऊन तिने घागर भरल्याची खात्री करून घेतली. घागर खेचली जात होती. घागर वर येताच तिने कासरा काढला. पाणी कशातून द्यावे, हे तिला कळेना. संभाजीराजांनी ते ओळखले. आपल्या हातांची ओंजळ तोंडाजवळ लावून ते वाकले. त्या तरुणीने आजूबाजूला पाहिले. कोणी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दिसत नव्हते. तिने घागर उचलली. काळजीपूर्वक राजांच्या हातावर धार धरली. राजे पाणी पीत होते. त्यांची नजर तिच्या उभार छातीवर खिळली होती. पाणी पिऊन राजे उभे राहिले.

‘किती गोड पाणी आहे! आम्ही इतक्या वेळा इथं येतो; पण या विहिरीवर कधी पाणी प्यालो नाही.’ आपल्या बाहीत खोवलेल्या रुमालाने तोंड पुशीत संभाजीराजे म्हणाले, ‘पाणी दिलंत; उपकार झाले!’

‘मालकांनी असं म्हणू नये.’

‘एकूण तुम्ही आम्हांला ओळखलंत, तर?’

‘युवराजांना कोण ओळखत नाही?’

‘युवराजांना सारे ओळखतात; पण आम्हांला कोणी ओळखत नाही... तुझं नाव?’

‘गोदावरी.’

‘बामणवाड्यात राहतेस?’

तिने होकारार्थी मान हलवली.

‘दररोज या वेळी पाणी भरायला येतेस?’

गोदावरी काही बोलली नाही. संभाजीराजे तिच्या नजरेला नजर देत म्हणाले,

‘उद्या या वेळी येशील, तर आम्ही सुद्धा पाणी प्यायला येऊ.’

‘नको ऽ,नको!’ ती बोलून गेली.

‘मग आम्ही घरी येऊ?’

‘नको ऽ ऽ.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ठीक आहे. मग उद्या आम्ही इथंच येऊ!’

संभाजीराजे वळले. त्यांनी घोड्यावर मांड टाकली. टाच देताच घोडे उधळले. गोदावरी त्या पाठमोऱ्या युवराजांकडे पाहत होती. स्वप्नवत घडलेला प्रसंग तिच्या मनात काहूर उठवीत होता.

दुसऱ्या दिवशी गोदावरी विहिरीवर गेली. धुणे मोकळेपणाने आटोपता यावे, म्हणून, जेव्हा वर्दळ नसते, अशा वेळी गोदावरी विहिरीवर जात असे.

गोदावरीने आजूबाजूला पाहिले. कोणी नजरेत येत नव्हते. रात्रभर ती बेचैन होती. ‘खरंच संभाजीराजे येतील काय,’ अशी तिला भीती वाटत होती. निश्चिंत मनाने गोदावरीने धुणे धुतले, घागर घासून भरून घेतली; आणि तिला पावलांचा आवाज ऐकू आला. चमकून तिने मागे पाहिले. संभाजीराजे अगदी नजीक उभे होते. न कळत गोदावरी विचारून गेली,

‘आणि घोडा कुठं आहे?’

‘त्याच्या तहानेचं कौतुक होतं. त्याला प्रथम पाणी मिळतं. आणि आम्हांला मिनतवारी करावी लागते. म्हणून आम्ही त्याला चितदरवाजाजवळच सोडून आलो.’

‘जा, ना! कोणी तरी पाहिलं, तर?’

‘तुम्हां बायकांना याखेरीज काहीच का बोलता येत नाही ? आम्ही पाणी पिण्यासाठी गड उतरलो, आणि....’

गोदावरीला संताप दाखविणे कठीण गेले. तिने तांब्याचे पंचपात्र भरले, आणि ते युवराजांच्या जवळ धरले. नकारार्थी मान हलवीत संभाजीराजे म्हणाले,

‘पंचपात्राने तहान भागणार नाही.’

संभाजीराजे ओणवे झाले. त्यांनी ओंजळ धरली. गोदावरी खुदकन हसली. तिने घागर उचलली. पाणी पिऊन झाल्यावर संभाजीराजांनी आपले हात झाडले. त्यांचा हात

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हातोप्याकडे गेला. रुमाल तेथे नव्हता. संभाजीराजे आपल्या ओल्या हातांकडे पाहत होते. गोदावरीने आजूबाजूला कोणी नसल्याची खात्री करून घेतली. तिच्या अंगावर कंप उभा राहिला होता. कसलेला पदर तिने सोडला. तिने पदर पुढे केला.

संभाजीराजांनी हर्षाने पदराला हात पुसला. तो पदर हाती धरून ते म्हणाले,

'गोदावरी, रात्रभर झोप आली नाही.'

गोदावरीने पदर सोडवून घेतला. संभाजीराजे भानावर आले.

'याचकानं दात्याला सतावू नये, हेच खरं!' म्हणत संभाजीराजांनी आपल्या गळ्यातला कंठा काढला. तो पुढे करीत संभाजीराजे म्हणाले,

'आमची तहान भागवलीत. आमची आठवण म्हणून हा कंठा जतन कर.'

गोदावरी घाबरून मागे सरली.

'माहेरवाशीण मी. मला हे खपायचं नाही.'

संभाजीराजांनी कंठा परत गळ्यात घातला.

'गोदावरी, तुझ्यासाठी काही तरी करावं, असं मनात आहे... ज्याची आठवण तुला आयुष्यभर राहावी. सांग, तुला मी काय देऊ ? बोल ना!'

'काही नको. पण वाटतं....'

'काय?'

'महाराजांचं दर्शन एकदा घडावं. त्यांना जवळून पाहायला मिळावं.'

संभाजीराजे क्षणभर विचारात पडले. ते बोलून गेले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘गोदावरी, आम्ही तुझी इच्छा जरूर पुरी करू. पुन्हा भेटेन.’

संभाजीराजे वळले. त्यांची पावले चितदरवाजाच्या दिशेने पडत होती. राजांचे विश्वासू सेवक दरवाजापाशी उभे होते. पहारेकऱ्यांनी केलेले मुजरे घेऊन राजे गड चढू लागले. उन्हाचा त्रास त्यांना जाणवत नव्हता. राजे गडावर पोहोचले. राजे सदरेजवळून आपल्या महालाकडे जात असता रामचंद्रपंत सामोरे आले.

‘आत्ता हीच थैली आली. आत वर्दी पाठविली.’

संभाजीराजांनी थैली उघडली. थैली फोंड्याहून आली होती. पत्र वाचीत असता संभाजीराजांचा हर्ष वाढत होता. पत्र वाचून ते रामचंद्रपंतांच्या हाती देत संभाजीराजे म्हणाले,

‘पंत, तोफांचे आवाज करा! आबासाहेबांनी सुरुंग लावून फोंडा जिंकला. फोंडा जिंकून आबासाहेबांनी कारवार प्रांतात मोहीम उघडली आहे.’

ती विजयाची वार्ता घेऊन संभाजीराजे आपल्या महाली आले. येसूबाईंच्या हाती आपला टोप देत राजे म्हणाले,

‘आबासाहेबांनी फोंडा काबीज केला.’

संभाजीराजांनी आपली तलवार, शेला उतरला. ते पलंगावर जाऊन कलते झाले.

‘गडाखाली गेला होता!’

‘हो!’

‘अशा उन्हाचं!’

‘अशी मधलीअधली चक्कर फायदेशीर असते. तिन्ही दरवाजे नजरेखालून घातले.’

‘आणि?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘चितदरवाजा सुद्धा पाहिला.’

‘आणि?’

‘ठीक आहे.’ संभाजीराजे उठत म्हणाले. ‘नव्या शिकारीचा बेत आखला.’

‘कसली शिकार?’

‘वाघ आलाय्, म्हणे. अजून जनावर मोडलं नाही; पण पहाटेला गडाखाली भेटतो, म्हणे.’

‘रात्री शिकारीला जाणार?’

येसूबाईंवर नजर रोखीत राजे म्हणाले,

‘तुम्ही गुपित राखलंत, तर!’

येसूबाई मनमोकळेपणाने हसल्या. संभाजीराजांची नजर तबकात ठेवलेल्या चाफ्याच्या वेणीकडे गेली.

‘ अरे, व्वा! चाफा!’

‘नव्या पेठेजवळ चाफा फुललाय्, म्हणे.’

युवराजांनी वेणी हाती घेतली. त्या सोनरंगाकडे पाहताच त्यांना एका चाफेकळीची आठवण झाली. वेणीचा एक दीर्घ वास घेत युवराज बोलले, ‘चाफ्याचा वास भारी धुंदावणारा असतो, नाही?’

- आणि त्याच वेळी विजयवार्ता सांगणाऱ्या तोफेचा आवाज गडावर घुमला.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

५

राजांच्या नव्या नव्या विजयाच्या वार्ता गडावर येऊन पोहोचत होत्या. अकोला, शिवेश्वर, काद्रा आणि खुद्द कारवार राजांनी जिंकला. कारवार प्रांत मराठी राज्यात सामील झाला.

कारवारला गुलामांचा व्यापार चालत असे. कारवार मराठी राज्यात सामील होताच राजांनी प्रतापरावांना आज्ञा केली,

‘प्रतापराव! माणसानं माणसांचा व्यापार करावा, याइतकी लांछनास्पद गोष्ट नाही. हा गुलामांचा व्यापार थांबलाच पाहिजे.’

प्रतापराव म्हणाले,

‘महाराज, क्षमा असावी. हे व्हायला हवं; पण जरा सबुरीनं घ्यायला हवं. कारण कारवार हे एकच गुलामविक्रीचं केंद्र नाही. विजापूर, हुबळी, कारवार या तीन ठिकाणी हा व्यापार अनेक वर्षं चालत आलेला आहे. त्यात टोपीवाले, आदिलशाही, एवढंच नव्हे, तर दिल्ली दरबारचेही हात गुंतले आहेत.’

राजे विचारात पडले. प्रतापरावांना काय सांगायचे आहे, हे त्यांनी जाणले. राजांनी उत्सुकतेने विचारले,

‘प्रतापराव, आम्ही आदिलशाही-मोगलाईची गुलामांची हौस जाणतो. पण या टोपीवाल्यांना....’

‘महाराज, टोपीवाल्यांच्या दरबारी इथल्या बुटक्यांना भारी मागणी आहे.’

‘अस्सं! बुटक्या माणसांचं प्रदर्शन करण्याची ही खुजी मनोवृत्ती अजब म्हणायची! प्रतापराव, हे आमच्या राज्यात चालणार नाही. नाही तर श्रींच्या राज्याला अर्थ राहणार नाही. या गुलामांच्या व्यापारावर जबरदस्त कर बसवा. एवढे कर बसवा, की हा व्यापारच थांबेल. शक्य तो लौकर या गुलामांच्या व्यापाराचं समूळ उच्चाटन होतं, हे पाहा. आम्ही रायगडी गेलो, की जरूर याबाबत योग्य तो निर्णय घेऊ.’
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कारवारमध्ये राजांनी काही दिवस मुक्काम केला. कारवारस्वारीने बहुतेक कोकणकिनारा राजांच्या हाती आला होता. पोर्तुगीज, इंग्रज आणि सिद्दी यांच्या हालचालींना त्यामुळे पायबंद बसला होता. पावसाळा नजीक आला असता राजे रायगडाकडे यायला निघाल्याची बातमी गडावर आली.

संभाजीराजे अलीकडे नेहमी गडाखाली उतरत होते. त्यांच्या शिकारी वाढल्या होत्या. अनेक वेळा रात्री-अपरात्रीदेखील युवराज गड उतरतात, हा गडावरच्या राजकारणी मंडळात चिंतेचा विषय झाला होता.

संभाजीराजे आपल्या महालात दोन प्रहराच्या वेळी कपडे करून तयार झाले होते. येसूबाईंनी विचारले,

'परत केव्हा येणार?'

'बहुधा उद्या येऊ; नाही तर परवा निश्चित.'

'सासूबाईंना सांगितलंत?'

'आम्ही गेल्यावर तुम्ही सांगा.'

'पण काय सांगू?'

संभाजीराजांनी येसूबाईंच्याकडे वळून पाहिले. क्षणात त्यांचा संताप उफाळला.

'सांगा, आम्ही चैन करायला जातो, म्हणून!'

'यात माझा काय दोष?'

त्या प्रश्नाने संभाजीराजे शांत झाले; नजीक जाऊन ते म्हणाले,

'तुमचा काही दोष नाही. खरंच, दोष आमचाच आहे! येतो आम्ही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

युवराज महालाच्या दाराशी आले; आणि त्याची पावले थांबली. दारात सोयराबाई उभ्या होत्या. संभाजीराजांनी मुजरा केला.

'कुठं निघालात?' सोयराबाईंनी विचारले.

संभाजीराजांनी वर पाहिले. सोयराबाईंच्या चेहऱ्यावर छद्मी हास्य प्रकटले. त्या गडबडीने पुढे म्हणाल्या,

'आमचं चुकलंच, नाही? महत्त्वाच्या कामाला निघाला असाल. 'कुठं?' म्हणून विचारलं. आता योजलेलं काम व्हायचं नाही!'

संभाजीराजे हसले.

'आईसाहेब, दैव बलवत्तर असेल, तर योजलेल्या कामात अडथळा येणार नाही.'

'कसलं दैवजात काम काढलंत, ते तरी सांगा.'

'आबासाहेब विजयी होऊन येत आहेत. उद्या किंवा परवा ते गडावर यावेत. त्यांना आम्ही सामोरे जातो आहो.'

हे उत्तर अनपेक्षित होते. सोयराबाईंनी विचारले,

'मग हे आम्हांला का नाही सांगितलं?'

'स्वारी गडावर येईपर्यंत कुठलीही बातमी बाहेर पडू नये, असा रिवाज आहे.'

'अस्सं!'

रागाने सोयराबाई माघारी वळल्या. त्या जाताच येसूबाई म्हणाल्या,

'त्यांच्याशी नेहमी असं का बोलता? अकारण माणसं दुखावली जातात.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तसं नाही, येसू. आईसाहेब दुखविण्यासाठी येतात, आणि त्यांच्याच बोलांनी त्या दुखावल्या जातात. आम्ही प्रथम जन्माला आलो! हाच आमचा मोठा गुन्हा आहे. त्याला कधी क्षमा व्हायची नाही... येतो आम्ही.’

त्या बोलण्याने भारावलेल्या येसूबाई काही बोलणार, तोच संभाजीराजे महालाबाहेर गेले होते.

□

६

राजे पाचाडला येत असल्याची वर्दी आली. संभाजीराजे आपल्या अश्वपथकासह राजांना सामोरे गेले. मृग नक्षत्र निघाले होते; पण अद्याप पाऊस उतरला नव्हता. पश्चिमेकडून अखंड ढग येत होते. हवेत अद्याप गारवा नव्हता.

राजे येताना दिसू लागताच संभाजीराजे पायउतार झाले. संभाजीराजांना पाहून राजांना भरते आले. राजे पायउतार झाले. त्यांनी प्रेमाने संभाजीराजांना मिठीत घेतले. दोन्ही खांदे धरून त्यांनी युवराजांना निरखले.

‘युवराज, सर्व क्षेम आहे ना?’

‘जी.’

शेजारी उभ्या असलेल्या हंबीररावांना राजे म्हणाले,

‘हंबीरराव, हा जीवनातला एक वेगळा आनंद. आम्ही पण अपेक्षाविरहित नाही, याचा हा पुरावा आहे. युवराज जरी गडावर भेटले असते, तरी फारसं बिघडलं नसतं. पण कुठं तरी वाटत होतं, कोणी तरी सामोरं यावं, आम्हांला पाहून आनंदित व्हावं. शेवटी सारं जीवन हा लोभाचाच व्यवहार आहे. ज्याच्या नशिबी असा लोभ नसेल, त्याचं जीवन रूक्षच; किंबहुना, ते जीवनच नव्हे.’

‘साऱ्यांनाच असा लोभ थोडाच मिळतो?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘त्याखेरीज माणूस जिवंत राहणारच नाही. छावणी वर्षभर लढते; पण पावसाळा येताच घरी परतण्याला केवढी उतावीळ असते! पिता, पुत्र, माता, पत्नी, बंधू, भगिनी ही सर्व नाती याच लोभाची. साधुसंतांचीदेखील यांतून सुटका नाही. परमेश्वर निर्गुण आहे, हे माहीत असूनही त्यांनी त्याला सगुण रूप दिलंच ना! त्यांना मोक्षाचा ध्यास नसतो. त्यांना ध्यास असतो भत्त‡ा‡चा. जीवनातला हा सामान्य लोभ थोडा उंचावला, की तो सहज भक्तीत मिसळून जातो... चला, युवराज! गड चढू.’

राजांच्या पाठोपाठ संभाजीराजे स्वार झाले. राजे अश्वदळासह पाचाडला आले. राजांच्या आज्ञेने अश्वदळ पागेकडे वळले. संभाजीराजांनी विचारले,

‘आबासाहेब, पाचाडला विसावा घेणार? अजून ऊन फार आहे.’

‘नको, आता पाचाडला थांबावं, असं वाटत नाही. प्रहरात आपण गड चढू. चला.’

राजांच्या बरोबर हंबीरराव, युवराज जात होते. मागून अश्वपथक येत होते. पाचाड मागे पडले. घोडी रायगडाकडे वळली; आणि संभाजीराजांची नजर विहिरीकडे गेली. त्यांनी गोदावरीला चटकन ओळखले.

‘आबासाहेब!’

‘काय?’

‘ती विहीर आहे ना, तिचं पाणी भारी गोड आहे!’

‘तहान लागलेली दिसते. आम्ही पाणी पिऊ... चला, हंबीरराव.’

तिन्ही घोडी विहिरीकडे निघाली. खुद्द राजे येताना पाहताच गोदावरीची धांदल उडाली. विहिरीला कठडा नव्हता. पाणी खेचण्यासाठी एक घडघडा उभारला होता. धुण्याचा दगड आणि पाण्याचा दगड एवढाच पसारा भोवती होता. तिघेजण पायउतार झाले. राजांच्या मागून दोघे चालत होते. राजे विहिरीनजीक गेले.

‘मुली, पाणी प्यायला मिळेल?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गोदावरीने राजांना वाकून नमस्कार केला. भरलेल्या घागरीकडे ती पाहत होती. तिला काही सुचत नव्हते. युवराज म्हणाले,

‘पाण्याचं भांडं दिसत नाही.’

‘त्याची गरजही नाही... मुली, उचल घागर.’

राजांनी ओंजळ पुढे केली. गोदावरीने घागर उचलली. राजे पाणी पीत होते. पाणी पिऊन होताच राजे म्हणाले,

‘खरंच! चवदार पाणी आहे.’

संभाजीराजे, हंबीरराव पाणी प्याले. गोदावरी राजांचे रूप पाहत होती. एवढ्या जवळून दर्शन घडले, याची तिला धन्यता वाटत होती. चोरून युवराजांच्याकडे तिची नजर वळत होती. त्या नजरेत मिस्किल भाव आढळत होता. औदुंबराच्या छायेत राजे उभे होते.

‘हंबीरराव, आम्ही अनेक वेळा असं पाणी प्यालोय्. बारा मावळ फिरताना तर नेहमी अनुभव येई. नदीचा पाणवठा असो, वा गावची विहीर असो, याच जागी खरी दुःखं कळतात... नदीला आता पाणी नाही, वाटतं?’

‘हो. तिथंही झरा काढला आहे. पण ब्राह्मण लोक इथूनच पाणी नेतात.’

‘युवराज, विहिरीला कठडा बांधून घ्यायला सांगा.’

‘त्याची गरज नाही, आबासाहेब. विहीर फार खोल नाही.’

‘ते तुम्हांला. पण बायकांचा जीव नाजूक. कुठं पाय घसरून पडलं, तर एवढं पाणीही अनर्थाला पुरेसं होईल.’

‘गडावर जाताच विहिरीचं बांधकाम सुरू करतो.’

‘आपण आलात. विहिरीचं भाग्य उजाडलं.’ हंबीरराव म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ते श्रेय युवराजांना. त्यांनी सांगितलं नसतं, तर आम्ही आलोच नसतो.’

गोदावरीने युवराजांच्याकडे पाहिले. युवराज हसत होते. राजांनी गोदावरीला विचारले,

‘मुली, तुझं नाव?’

‘गोदावरी.’ गोदावरीने धैर्याने सांगितले.

‘पाणी दिलंस; नाव सार्थ केलंस. तू कुणाची? कोण?’

हंबीरराव पुढे झाले. ‘महाराज, ही दिनकरपंतांची मुलगी, आपल्या अनाजींच्या आप्तांपैकीच.’

‘अस्सं! हंबीरराव, ही जेव्हा सासरी जायला निघेल, तेव्हा खासगीतून खणानारळानं हिची ओटी भरून हिला पाठवा. हिला पाहिली; आणि आज आम्हांला सखूची आठवण झाली....चला.’

गडाच्या दिशेने जाणाऱ्या घोड्यांकडे गोदावरी किती तरी वेळ पाहत होती. राहून राहून तिचे अंग मोहरत होते.

□

७

मुसळधार पावसात रायगड भिजत होता. सकाळ, संध्याकाळ चारही दिशा धुक्याने वेढल्या जात होत्या. सावित्री, काळ, गांधारी या नद्यांना उधाण आले होते. खळखळत, फेसाळत त्या धावत होत्या. जवळ जवळ वर्षभर विश्रांती न घेता सदैव मोहिमेत गुंतलेल्या फौजा आपापल्या घरी परतल्या होत्या. राजांचे सारे सरदार गडावर येत होते. मोरोपंत अद्याप आले नव्हते. राजांनी त्यांना तातडीने माघारी बोलाविले. पावसाळा संपताच जंजिरामोहीम हाती घेण्याचे राजांनी ठरविले. राजांचे नजरबाज त्या भागात फिरत होते.

-आणि एके दिवशी बहादुरखानाचे वकील आपल्या सर्व सरंजामासह गडावर येत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

असल्याची बातमी आली. बाहेरच्या पावसाने मरगळलेली मने ताजीतवानी झाली. सर्वजण आतुरतेने वाट पाहत होते. राजांनी वकिलाला सन्मानाने गडावर आणण्याची आज्ञा केली.

वकील गडावर आला. त्याला निवासस्थान देण्यात आले. पावसाची उघडीप पाहून राजांनी भेटीचा दिवस ठरविला. राजसदरेसमोर शामियाना उभारण्यात आला. हजर असलेल्या सर्व प्रधानांना आणि सरदारांना दरबारची आज्ञा गेली. दरबारी वेष करून सर्व दरबारी हजर झाले. वकिलाला बोलावण्यासाठी खुद्द निराजीपंत गेले.

वकील दरबारी आला. त्याच्या मस्तकी मोगली पगडी होती. अंगात रेशमी अंगरखा व पायांत विजार होती. आपल्या खुरट्या दाढीवरून हात फिरवीत तो दरबार पाहत होता. त्याच्या मागे तबके घेतलेले सेवक अदबीने उभे होते. शिवाजीराजांचा तो वैभवसंपन्न दरबार पाहून वकील चकित झाला होता. त्याची नजर वारंवार रत्नखचित सिंहासन, जरी बैठका, नरमियाच्या बिछायती यांवर फिरत होती. निराजीपंतांना तो अनेक प्रश्न विचारीत होता. सिंहासनाकडे बोट दाखवून त्याने निराजीपंतांना विचारले,

'एवढं सुरेख सिंहासन कुठं मिळालं?'

'मिळालं नाही; हे इथं घडवलं. यासाठी बत्तीस मण सोनं आणि लक्षावधी रुपयांचं जडजवाहीर खर्ची पडलं.'

'शिवाजीजवळ एवढी संपत्ती आहे?'

'खोटी ऐट करण्याची सवय आमच्या राजांना नाही.'

वकील विचारात पडला होता. एवढं ऐश्वर्यसंपन्न राज्य असता शिवाजी मोगलांची ताबेदारी स्वीकारील, आपले गड देईल, हे त्याला खरे वाटत नव्हते. आणि त्याच वेळी गुर्झबदारांचा पुकार कानांवर आला :

> 'क्षत्रियकुलावतंस, सिंहासनाधीश्वर गोब्राह्मणप्रतिपालक
> हिंदुपतपातशहा राजा शिवछत्रपती महाराज ऽ ऽ ऽ'

सारा दरबार उभा राहिला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'निग्गाह रक्खो! खडी ताजीम!
बा आदब, बा मुलाहिजा ऽ ऽ ऽ'

सुवर्णगुर्झब घेतलेले गुर्झबदार आदब पुकारीत सिंहासनाजवळ आले; आणि त्यांपाठोपाठ येणाऱ्या शिवाजी महाराजांचे दर्शन साऱ्यांना झाले. मुजऱ्यासाठी माना लवल्या. सिंहासनाला वंदन करून राजे सिंहासनावर बसले. उजव्या बाजूला संभाजीराजे स्वतंत्र बैठकीवर बसले. राजांची नजर दरबारावरून फिरली. रामचंद्रपंतांनी वकिलाची उपस्थिती जाहीर केली.

'दक्षिणेतील मोगली सुभेदार खानजहान बहादुर कोकलताश जाफरजंग यांच्याकडून दरबारी वकील आमच्या दरबारी हजर झाले आहेत.'

राजांनी सस्मित वदनाने वकिलाकडे पाहिले. त्याने लवून त्रिवार कुर्निसात केला.

'आमच्या दरबारी बहादुरखानांचे वकील आले आहेत, याचा आम्हांला परम हर्ष झाला आहे. वकिलांचं आम्ही स्वागत करतो.'

वकील पुढे झाला. त्याने हलकी टाळी वाजवताच मागचे सेवक पुढे झाले. तबकांची आच्छादने काढली गेली. सुवर्णहोनांनी आणि मौल्यवान वस्तूंनी तबके झगमगत होती. तबके राजांच्या पुढे करण्यात आली. राजांनी तबकांना हात लावून नजराण्यांचा स्वीकार केला. वकील म्हणाला,

'हुजुरांच्या मेहेरनजरेनं बंदा गुलाम झाला आहे.' वकील म्हणाला.

'बहादुरखानांनी एवढ्या तातडीनं आपले वकील का पाठविले? कसली विनंती त्यांनी केली आहे? हे जाणण्यास आम्ही उत्सुक आहो. त्यांच्या विनंतीचा आम्ही जरूर विचार करू.'

राजसभेतील प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य प्रकटले होते. राजांच्या त्या शब्दांनी वकील आश्चर्यचकित झाला होता. कसे सांगावे, हे त्याला समजत नव्हते. शेवटी त्याला कंठ फुटला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हुजूर, आमचे मालिक बहादुरखान यांनी हुजुरांच्यासाठी जहाँपनाह औरंगजेब बादशहा यांच्याकडे अर्ज पेश केला होता. बादशहा कृपाळू होऊन त्यांनी आपला अर्ज मंजूर केला. आपल्या सर्व अपराधांची बादशहांनी क्षमा केली आहे. आपल्या अर्जमंजुरीचं शाही फर्मान आलं आहे. ठरल्याप्रमाणे आपले गड आमच्या स्वाधीन करून, आपले शहाजादे संभाजीराजे यांना फर्मानाचा व बादशाही नौकरीचा स्वीकार करण्यासाठी पाठवावे, असा बहादुरखानांनी निरोप पाठविला आहे.’

राजे हसले; म्हणाले,

‘वकीलसाहेब, निरोप नसेल; आज्ञा असेल.’

वकिलाने आवंढा गिळला. भयभीत होऊन तो म्हणाला,

‘जी, हुजूर.’

क्षणात राजांचे हास्य विरले. संतप्त होऊन राजे उभे राहिले. त्यांची जळजळीत नजर वकिलावर खिळली होती. कोंदणात बसवलेल्या हिऱ्यांप्रमाणे चमकणारे ते भेदक डोळे पाहण्याचे धैर्य वकिलाला राहिले नाही. त्याच्या कानांवर शब्द पडत होते....

‘आज्ञा? कोणाला? आम्हांला? तुमचे बहादूरखान स्वत:ला कोण समजतात? आम्ही लुटलेला बहादुरगड एवढ्यात विसरला गेला? असा कोणता पराक्रम तुमच्या बादशहानं अथवा बहादुरखानानं केला, की ज्याच्या दबावावर आम्ही आमचे गड तुमच्या ताब्यात द्यावेत? आमच्या युवराजांनी तुमची चाकरी पत्करावी?’

‘पण, हुजूर ऽ ऽ’

‘खामोश! असा अपमान आमच्या दरबारी सहन केला जात नाही, जाणार नाही. आमचा संताप वाढण्याच्या आधी दरबारातून चालते व्हा! नाही तर बेमुर्वत वर्तनाबद्दल तुमची गय केली जाणार नाही.’

त्याच संतापाच्या भरात राजे राजसदरेवर उभे होते. मुजरे झडले. माना वर झाल्या, तेव्हा राजे गेले होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वकिलावर वीज कोसळली होती. त्याच्या डोळ्यांसमोर संतप्त बहादुरखान दिसत होता. बादशहाने पाठविलेले फर्मान, तह होणार, या बातमीने आनंदून जाऊन औरंगजेबाने वाढविलेली बहादुरखानाची मनसब, खूश होऊन भेट म्हणून पाठविलेला हत्ती, या सर्वांचे काय करायचे? बहादुरगडाच्या लुटीपेक्षाही ही थप्पड मोठी होती. ती सहन करण्याचे बळ बहादुरला मिळावे, म्हणून वकील मनातल्या मनात अल्लाची प्रार्थना करीत होता, भर पावसात गड उतरत होता.....

□

८

मोरोपंत गडावर आले.

पावसाळ्यानंतर उघडल्या जाणाऱ्या जंजिऱ्याच्या मोहिमेबद्दल राजे मंत्रिमंडळाबरोबर बोलत होते; आपल्या फौजेचा, मुलुखाचा अंदाज घेत होते. जंजिऱ्याची सर्व माहिती नजरबाजांकडून उपलब्ध होत होती. एवढी महत्त्वाची मोहीम राज्याचे सव्यसाची वीर, मुत्सद्दी मोरोपंत यांनाच द्यायची राजांनी ठरविली होती. त्या मोहिमेत लक्ष घालण्याची राजांनी मोरोपंतांना आज्ञा केली.

याच वेळी धरणगावच्या लुटीची नुकसानभरपाई मागण्यासाठी इंग्रज वकील ऑस्टिन गडावर आला.राजांनी वकिलाची दरबारी गाठ घेतली. दरबारात युवराज संभाजीराजेही हजर होते. राजांनी इंग्रज वकिलाची नुकसानभरपाईची मागणी धुडकावून लावली. ऑस्टिन निराश होऊन गडाखाली उतरला.

गडाची विवेकसभा, खलबतखाना दररोज रंगत होता. राजांनी अनेक बेत मनाशी धरले होते. अनाजीपंत पाचाडला आल्याचे राजांना कळले होते. मोहिमेनंतर बऱ्याच दिवसांनी अनाजी परतल्यामुळे राजांनी त्यांना गडावर बोलावले नव्हते. अनाजी येण्याची वाट पाहून एके दिवशी राजांनी अनाजींना भेटीला येण्याचा निरोप पाठवला; पण दुसऱ्या दिवशी अनाजी गडावर आले नाहीत.

राजे आपल्या महालात बसले होते. दोन प्रहरची वेळ असूनही गारवा कमी नव्हता. शेजारी सोयराबाई बसल्या होत्या. राजे आपल्या विचारात मग्न होते. सोयराबाई उठल्या.
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांचे लक्ष सोयराबाईंच्याकडे गेले.

‘का? उठलात का?’

‘शेजारी बसलेलं माणूसदेखील लक्षात येत नाही. मग बसून तरी काय करायचं?’

‘राणीसाहेब, आम्ही पुढच्या मोहिमेचा विचार करीत होतो.’

‘त्याखेरीज काहीच का सुचत नाही?’

‘खूप सुचतं. पण....हे पाहा, जरा मोरोपंतांना बोलावणं पाठवा.’

‘हो.’

सोयराबाई महालाबाहेर पडत असता राजांनी परत हाक मारली,

‘आणि हे पाहा, निरोप पाठवून परत या. नाही तर जाल तशाच रागात.’

सोयराबाई हसल्या. निरोप सांगून माघारी महालात आल्या. राजे सोयराबाईंच्या जवळ गेले.

‘राणीसाहेब, मघा रागावलात ना? पण असा गैरसमज करून घेऊ नका. राज्य श्रींचं. पण तुम्ही, शंभूराजे, रामराजे हेच आमचे. तुम्ही घरच्यांनीच आम्हांला समजून घ्यायला हवं.’

सोयराबाई पदराशी चाळा करीत म्हणाल्या,

‘खरं सांगू?’

‘सांगा ना!’

‘पण रागावणार नाही?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘छे! मुळीच नाही.’

‘आपण कोणाचेच नाही, असं साऱ्यांना वाटतं.’

राजे त्या वाक्याने दुखावले. सोयराबाईंचा हात हाती घेत ते म्हणाले,

‘राणीसाहेब, आम्ही पण माणूसच आहोत. दैवानं हे कर्तव्य आमच्या नशिबी आलं. ते पार पाडण्यात जीव थकून जातो. मोहिमांतून फिरताना रात्री, अपरात्री जाग येते. दाराशी पहारा असतो. गस्तकऱ्यांची जाग असते. दिवट्यांचा उजेड असतो. आम्ही मात्र एकटे असतो, बंदिवान जीवासारखे. आम्हांला तुम्हां सर्वांची आठवण येत असते. आता शंभूराजे मोठे झाले, कर्ते झाले. यापुढं आम्ही भरपूर उसंत घ्यायची ठरविली आहे.’

संभाजीराजांच्या नावाबरोबर सोयराबाईंनी हात सोडवून घेतला.

‘का?’ राजांनी विचारले.

तोच मनोहारी आत आली. मोरोपंत येत असल्याची तिने वर्दी दिली.

मोरोपंत आले. त्यांनी दोघांना मुजरा केला. राजांनी विचारले,

‘पंत, कोकणातील नावा आणि गुराबा तयार व्हायला किती अवधी लागेल?’

‘आणखीन दोन-तीन महिन्यांचा तरी अवधी लागेल, असं वाटतं.’

‘शक्य तेवढ्या लौकर ते काम पुरं करण्याची कोशीस करा.’

‘जी.’

‘अनाजी अजून आले नाहीत?’

‘जी, नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘का? त्यांची तब्येत बरी नाही?’

‘जी, बरी आहे.’

‘मग अनाजी का आले नाहीत?’

‘जी, आले नाहीत.’

‘पण का?’ राजांचा आवाज चढला.

‘कारण त्यांना लाज आहे! अब्रूची चाड आहे!’ सोयराबाई बोलल्या.

राजांनी वळून पाहिले. त्यांची नजर परत मोरोपंतांच्यावर खिळली. मोरोपंत खाली मान घालून उभे होते.

‘असा अनाजींचा काय गुन्हा घडला, की त्यांनी आमच्या समोर यायला लाजावं?’

‘अनाजींनी काही केलं नाही.’

‘राणीसाहेब!’ मोरोपंत म्हणाले. पण सोयराबाईंनी तिकडे लक्ष दिले नाही.

‘केलं युवराजांनी. अनाजी फक्त निस्तरताहेत.’

राजांना काही अर्थबोध होत नव्हता. ते उतावीळ होऊन विचारते झाले,

‘काय केलं युवराजांनी?’

‘आपल्या युवराजांनी त्यांच्या नात्यातल्या ब्राह्मण मुलीला पळवून लिंगाण्यावर जबरदस्तीनं ठेवली आहे.’

‘राणीसाहेब!’ राजे ओरडले.

‘खरं तेच सांगितलं. सगळीकडे कुजबूज चालू आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मोरोपंत, हे खरं?’ राजांनी विचारले.

‘असं ऐकतो खरं! अनाजी सेवेतून निवृत्त होण्याच्या गोष्टी बोलताहेत, म्हणे.’

राजे सुन्न झाले. काय बोलावं, हे त्यांना कळेना.

‘युवराज कोठे आहेत?’

‘सध्या गडावरच आहेत.’ सोयराबाई म्हणाल्या. ‘हवं तर त्यांना बोलावून विचारा.’

‘नको!’ राजे म्हणाले. ‘मोरोपंत, तुम्ही असेच गड उतरा. हे खरं असेल, तर अनाजींना फार मोठा धक्का बसला असेल. याची वाच्यता कोठे होऊ देऊ नका.’

दुसऱ्या दिवशी सकाळी अनाजी मोरोपंतासह राजांच्या समोर आले. अनाजी आल्याचे कळताच सोयराबाईही महाली आल्या. एका रात्रीत राजे थकले होते. राजे अनाजींना म्हणाले,

‘अनाजी, आम्ही एवढे का परके, की आमच्यावर रुसून गडाखाली राहावं?’

अनाजींनी शेला डोळ्यांना लावला. राजे पुढे झाले. त्यांचा कंठ भरून आला.

‘सांगा, अनाजी! आम्ही ऐकलं, ते खरं?’

अनाजींनी होकारार्थी मान हलविली.

‘महाराज, किती केलं, तरी आम्ही चाकर. ते पडले युवराज, उद्याच्या राज्याचे स्वामी! आज त्यांच्याविरुद्ध तक्रार केली, आपली नाराजी होईल त्यांच्यावर. पण एक ना एक दिवस आपण एक व्हाल. आणि तेव्हा... झालेली गोष्ट आता भरून येणार नाही. पोर मेली, असं समजून आम्ही गप्प बसलो.’

‘फार मोठी चूक केलीत, अनाजी! संभाजीराजे आमचे चिरंजीव असतील; पण तसेच ते राज्याचे युवराजही आहेत. राज्याची जबाबदारी पेलणारे तुम्ही! ही तुमचीही जबाबदारी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होती.’

राजांचा चेहरा करारी बनला. त्यांच्या मुठी वळल्या गेल्या. राजे घोगऱ्या आवाजात म्हणाले,

‘अनाजी, संभाजीराजांचा निवाडा उद्या भर दरबारी केला जाईल.’

‘हे करू नये.’ सोयराबाई म्हणाल्या.

‘कारण?’

‘त्यातून काही निष्पन्न होणार नाही. उगीच गवगवा तेवढा वाढेल.’

‘राणीसाहेब! गुन्हा शाबीत झाला, तर... तर युवराज म्हणून मुलाहिजा राखला जाणार नाही.’

‘हं!’ सोयराबाई हुंकारल्या. ‘ताकीद देऊन सोडणं होईल, एवढंच ना?’

राजांनी क्षणभर नेत्र मिटले.

‘अशा गुन्ह्यांना आजवर आम्ही जी शिक्षा देत आलो, तीच शिक्षा युवराजांना दिली जाईल. युवराज असले, तरी तोफेच्या तोंडी दिलं जाईल!’

‘महाराज!’ अनाजी उद्गारले.

‘तुम्ही आता जा! आम्हांला आता काही ऐकवत नाही.’

राजे पाठमोरे होऊन उभे राहिले. दाराशी आलेल्या पुतळाबाईंनी राजांचे शेवटचे शब्द ऐकले होते. तोंडाला पदर लावून त्या धावत सुटल्या.

पावसाची झड घेऊन अंगाला झोंबणारा वारा गडावर थैमान घालीत होता.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

९

सातमहालातील आपल्या महालात सोयराबाई हाती विणकाम घेऊन बसल्या होत्या. दासी वारा ढाळीत होत्या. बाल राजाराम धावत महालात आले.

‘आईसाहेब, दादामहाराजांच्याकडे जाऊ?’

‘काही नको जायला! बाहेर खेळा.’

हिरमुसले होऊन राजाराम बाहेर गेले.

‘असली पोरं पोटाला असल्यापेक्षा नसलेली बरी.’

‘साऱ्या वाड्याभर बोलवा गेलीया.’ दासी म्हणाल्या. ‘आमांस्नी समजलं, तवापासनं घशाखाली घास उतरंना.’

‘तरी मला संशय होताच! दिवसा, दुपारी, रात्री बेरात्री युवराज गड उतरू लागले, तेव्हाच मला संशय आला. पण सांगणार कोणाला? आणि ऐकणार कोण?’

अचानक सोयराबाईंचे बोलणे थांबले. महालात पुतळाबाई येत होत्या. त्यांना पाहून सोयराबाईंच्या चेहऱ्यावर विजयाचे हसू प्रकटले.

‘कोण? धाकट्या राणीसाहेब! बऱ्याच दिवसांनी वाट चुकला?’

पुतळाबाई नजीक गेल्या.

‘थोरल्या बाई! माझं ऐका. फार पेटलं नाही, तोवर हे विझवायला हवं.’

‘पेटायचं राहिलंय् काय?’

‘तुम्ही सांगितलंत, तर....’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कोण? मी? मी, बाई, काय सांगणार? तुमच्या आज्ञेत जेवढे आहेत, तेवढे आमच्या आज्ञेत नाहीत. ’

पुतळाबाईंनी दासींच्याकडे पाहिले. त्या चटकन निघून गेल्या. डोळ्यांत अश्रू आणून पुतळाबाई म्हणाल्या,

‘युवराजांची चूक झाली खरी; पण ती सावरून नको का घ्यायला?’

‘घ्या ना!’

‘मोठ्या बाई! मी तुमच्या पाया पडते. पोटच्या लेकराची तुम्हांला आण....’

‘शपथ मागे घ्या! लाज नाही वाटत? त्या उंडग्या पोरासाठी मला शपथ घालता? माझ्या लेकराची?’

पुतळाबाईंचा संताप उफाळला.

‘उंडग्या पोरासाठी नव्हे; तुमच्या-माझ्या कपाळीच्या कुंकवासाठी शपथ घालतेय्, बाई! त्यांना ते सहन व्हायचं नाही.’

‘भारीच कळवळा दिसतोय्. तरी बरं, पोटाला पोर नाही.’

‘बाई!’

‘गप्प बसा! उगीच नसती लुडबूड करू नका.’

‘जाते मी!’

‘मी बोलावलं नव्हतं.’

पुतळाबाई संतापातच महालाबाहेर पडल्या. दाराशी अंग चोरून उभ्या असलेल्या दासी आत आल्या. सोयराबाई म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘भारीच पुळका आला होता ऽ ऽ’

-आणि तिघीजणी तोंडाला पदर लावून हसू लागल्या.

पुतळाबाईंना काही सुचत नव्हते. त्यांच्या बेचैनीला काही सीमा राहिल्या नव्हत्या.

गडावर रात्र उतरली. महालात समया पेटल्या. त्या समयांच्या उजेडाने पुतळाबाई भानावर आल्या. मनोहारी समई पेटवीत होती. पुतळाबाईंनी आपले अश्रू पुसले.

‘मनू, युवराज महालात आहेत?’

‘जी.’

‘आणि येसू?’

‘त्या पण!’

मनाचा निर्धार करून पुतळाबाई उठल्या.

संभाजीराजांच्या महालात संभाजीराजे पलंगाच्या एका कोपऱ्यात बसले होते. खाली बैठकीवर येसूबाई गुडघ्यांत मान घालून बसल्या होत्या.

पुतळाबाई महालात गेल्या. संभाजीराजे उठून उभे राहिले. त्यांचे नेत्र आरक्त झाले होते. चेहरा व्याकूळ बनला होता. येसूबाईंच्या तोंडून हुंदका बाहेर पडला.

‘युवराज, मी सांगितलं, तर ऐकाल?’

‘जी.’

‘अगदी काही न बोलता?’

‘जी.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘असेच उठा! महालात जा; त्यांचे पाय धरा!’

‘पण, आबासाहेब....’

‘सांगितलं ना, काही बोलायचं नाही, म्हणून?.....’

‘आईसाहेब! आम्हांला कोणी नाही. आई नाही! वडील नाहीत! फक्त वैरी आम्हांला आहेत. ते लुच्चे अनाजी सांगणार.... ’

‘हां, शंभूबाळ! चूक तुम्ही करता; आणि बोल दुसऱ्याला का लावता?’

पुतळाबाई जवळ गेल्या. त्यांनी संभाजीराजांना जवळ घेतले. संभाजीराजे त्या मायेच्या स्पर्शाने रडू लागले. काही वेळाने पुतळाबाई म्हणाल्या,

‘जाणार ना महालात?’

‘आपण यावं ऽ ऽ’ संभाजीराजे म्हणाले.

‘चला. मी येते.’

संभाजीराजांनी डोळे पुसले. पुतळाबाईंच्या मागून ते चालत होते. चौकात पाऊस पडत होता. महालाचा दरवाजा बंद होता. क्षणभर त्या बंद दरवाजाकडे पाहत पुतळाबाई उभ्या राहिल्या.

महादेव अदबीने म्हणाला,

‘महालात कोणाला सोडू नये, असा हुकूम झाला आहे.’

पाठीमागे उभ्या असलेल्या संभाजीराजांच्याकडे एकवार पुतळाबाईंनी पाहिले. श्वास घेऊन त्यांनी दारावर थाप मारली, पुन्हा थाप मारली; पण दरवाजा उघडला नाही. काहीच हालचाल ऐकू आली नाही.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुतळाबाईंनी मागे पाहिले, तेव्हा संभाजीराजे तिथे नव्हते. त्यांचे डोळे विस्फारले गेले. चौकातून भिजत जाणाऱ्या संभाजींची पाठमोरी आकृती अंधूकपणे नजरेत आली. संभाजीराजे दिसेनासे झाले.

□

१०

दिवस उजाडला; पण सूर्यदर्शन घडले नाही. पावसाची झिमझिम चालू होती. वाड्यात एवढी वर्दळ असूनही वाडा कसा शांत भासत होता. राजे नित्याप्रमाणे उठले होते. स्नानपूजा आटोपून ते आपल्या महालीच बसले होते. महालाकडे जायची कोणाची छाती होत नव्हती.

दिवस वाढत होता. दप्तरखान्यात अनाजी, निराजी, मोरोपंत आणि इतर मंत्रिमंडळ हजर झाले होते. आदल्या रात्री अष्टप्रधान-महालातील अनाजींच्या महाली बराच वेळ सर्वजण जमले होते; पण आलेल्या प्रसंगातून वाट दिसत नव्हती. मोरोपंत म्हणाले,

‘अनाजी, होऊ नये, ती गोष्ट झाली. त्याला आता इलाज नाही. महाराजांच्याकडे आपण सर्वांनी पाहायला हवं.’

अनाजी नि:श्वास सोडून म्हणाले,

‘मी कुठं नाही म्हणतो? माझी काही तक्रार नव्हती. माझ्या दैवाला दोष देऊन मी गप्प बसलो.’

‘स्वस्थ बसून हे होणार नाही.’

‘मी काय करावं, म्हणता?’

‘आता थोड्याच वेळात दरबार भरेल. तो तुम्ही-आम्ही थांबवू शकत नाही. पण दरबारी तुम्हीच राजांना सांगितलं, तर ते ऐकतील.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय सांगू? ‘झाली गोष्ट चांगली झाली. मुलीला मी युवराजांच्या पदी वाहिली आहे.’?’

अनाजींचे अश्रुपूर्ण डोळे पाहून मोरोपंत गहिवरले. कष्टाने ते म्हणाले,

‘अनाजी, तुमच्या यातना का आम्हांला कळत नाहीत? पण राजांच्या यातना आठवा. युवराजांच्यावर त्यांचं केवढं प्रेम! ज्या राजांनी आजवर परस्त्रीकडे नजर वर करून पाहिलं नाही, किंबहुना, ज्यांनी हा गुन्हा केला, त्यांना कडेलोटाखेरीज दुसरी शिक्षा दिली नाही, त्याच राजांचा मुलगा आज गुन्हेगार म्हणून राजांच्या समोर येतो आहे. युवराजांना राजे तोफेच्या तोंडी देणार, असं बोललं जातं. तुम्हीही ते ऐकलंत. राजांच्याकरिता युवराजांना वाचवायला हवं.’

‘मला का ते कळत नाही? मी जरूर सांगेन! पण राजे ऐकतील, असं वाटत नाही.’

राजे आपल्या महाली कपडे करीत होते. राजांनी आपला टोप मस्तकी चढविला. दुशेला आवळला. तलवार, कट्यार दुशेल्यात खोवली. आपल्या देव्हाऱ्यासमोर राजे गेले. त्यांनी मस्तक टेकले. डोळे पुसून राजे उभे राहिले. महालात महादेव आला.

‘रंगमहाली सर्व आले?’

‘जी.’

‘तू जा. आम्ही येत असल्याचं कळव.’

महादेव गेला. राजांनी पावले उचलली. अचानक दरवाजातून येसूबाई आल्या. राजांचे पाय घट्ट धरून त्या रडू लागल्या. राजे डोळे मिटून उभे होते. चेहऱ्यावर व्यथा उमटलेली होती. राजांचा मंद आवाज उमटला,

‘येसू! ऊठ. तुमच्यापेक्षा आमचं दुर्दैव फार मोठं आहे. आजवर कधी खर्ची पडलं नाही, एवढं बळ क्षणाक्षणाला खर्ची पडत आहे. युवराजांनी फार मोठा गुन्हा केला आहे. त्यांना वाचवणं आता आमच्या हाती नाही. त्यासाठी आमच्याप्रमाणेच तूही जगदंबेची करुणा भाक! आई तुझ्या हाकेला साद देईल... येसू, पाय सोड.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आशीर्वाद द्यावा ऽ ऽ’

राजांच्या बोटांची पिळवणूक झाली. कष्टाने अश्रू आवरीत ते म्हणाले,

‘येणारं संकट सोसण्याचं बळ तुला जगदंबा देवो!... पाय सोड.’

राजे वाकले. त्यांनी येसूबाईंची मिठी सोडविली. मागे न पाहता ते रंगमहालाकडे चालू लागले.

रंगमहाल चूपचाप होता. नगारखान्याचे पहारे जारी करण्यात आले होते. राजे महालात आले. राजांची मुद्रा गंभीर आणि करारी दिसत होती. राजे आसनावर बसले. साऱ्या मंत्रिमंडळावरून त्यांची नजर फिरली. रंगमहालाच्या मागच्या बाजूस चिकाच्या पडद्याआड पुतळाबाई, सोयराबाई येऊन उभ्या होत्या.

राजांनी आज्ञा दिली.

‘युवराजांना घेऊन या.’

हंबीरराव मोहित्यांच्यासह युवराज महालात आले. संभाजीराजांनी पांढरा टोप घातला होता. अंगात पांढरा अंगरखा आणि विजार होती. कमरेला गुलाबी शेला होता. शेल्यात तलवार खोवली होती. गळ्यात कवड्यांच्या माळेखेरीज काहीही दागिना नव्हता, ना हातावर पोहोची. चेहरा म्लान होता. मान खाली झुकली होती.

‘अनाजी, युवराजांच्या गुन्ह्याचा आमच्या वतीनं उच्चार करा.’

अनाजी पुढे झाले.

‘क्षमा, महाराज! पण एवढ्या तातडीनं....’

‘अनाजी, आम्ही पुन्हा आमच्या आज्ञेचा उच्चार करतो... युवराजांच्या गुन्ह्याचा आमच्या वतीनं उच्चार करा. आमची आज्ञा डावलण्याचं धाडस करू नका.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अनाजी घोटाळले. त्यांची नजर भयभीत बनली. ते युवराजांकडे पाहत होते.

'बोला, अनाजी! इथं कुणाच्याही जागेचा अथवा नात्याचा मुलाहिजा न बाळगता स्पष्टपणे सांगा.'

'महाराज, युवराजांनी एका ब्राह्मण स्त्रीस बळजबरीनं पळवून नेली, असा त्यांच्यावर आरोप आहे. सदर दुर्दैवी स्त्रीला युवराजांनी लिंगाण्यावर कैदेत ठेवली आहे, अशी खात्रीलायक बातमी आहे.'

संभाजीराजांची जळजळीत नजर अनाजींच्यावर गेली; पण क्षणात ती खाली वळली.

'संभाजीराजे, तुम्हांला गुन्हा मान्य आहे?'

संभाजीराजांनी वर पाहिले.

'बोला! तुम्ही स्त्रीला पळवली?'

'होय.'

'लिंगाण्यावर तिला कैदेत ठेवलीत?'

'होय.'

सारा दरबार हताश झाला. राजे कष्टाने म्हणाले,

'असल्या बेकैद वर्तनाला आमच्या राज्यात काय शिक्षा आहे, हे तुम्ही जाणता?'

'होय.'

'कोणती शिक्षा आहे?'

'कडेलोट अथवा तोफेच्या तोंडी.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आणि हे माहीत असता, तुम्ही हे कर्म करू धजलात?’

संभाजीराजांची नजर उंचावली गेली. डोळे कोरडे होते; पण त्यांत व्याकूळ भाव सामावला होता.

‘महाराज, या आपल्या दरबारात आम्ही नुसते गुन्हेगार म्हणूनच जर उभे असू, तर आम्हांलाही काही सांगावंसं वाटतं.’

‘खामोश!’ राजे ओरडले. ‘पापाचं समर्थन ऐकण्याचा रिवाज आमच्या कानांना नाही!’

हंबीरराव मोहिते मुजरा करून पुढे झाले.

‘क्षमा, महाराज! युवराज सामान्य गुन्हेगार म्हणून आपल्या समोर आले आहेत. त्यांना आपल्या सफाईबद्दल बोलण्याची परवानगी मिळावी, ही प्रार्थना आहे.’

हंबीररावांच्या धारिष्टाने सारा दरबार थक्क झाला. राजे खिन्नपणे हसले; म्हणाले,

‘हंबीरराव, आम्ही तुमची विनंती मान्य करतो. युवराज बोलू शकतात.’

संभाजीराजांनी आपली नजर परत उंचावली. ते म्हणाले,

‘आम्ही ब्राह्मण विवाहित स्त्रीला लिंगाण्यावर ठेवली, हे खरं. पण आम्ही तिला पळवून नेलं नाही. आम्ही बळजोरीनं आजवर कुणाला पळवलं नाही, ना कुणावर बलात्कार केला. आम्हांला हे आरोप मान्य नाहीत.’

‘याला पुरावा?’ हंबीररावांनी विचारले.

‘तुम्ही त्या दुर्दैवी स्त्रीला विचारू शकता.’

‘हंबीरराव! युवराजांच्या धाडसाला हसावं, की रडावं, हे आम्हांला कळत नाही. पापाच्या ठायी एवढी धिटाई येते कशी, हे आम्हांला कळत नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज! अन्याय कुणाच्याही बाबतीत होऊ नये. चौकशी व्हायची, तर पूर्ण व्हावी. युवराज आपले चिरंजीव आहेत, म्हणून त्यांच्यावर अन्याय होऊ नये.’

साऱ्यांनी हंबीररावांच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

‘ठीक आहे... अनाजी, उद्या तुम्ही लिंगाणा गाठा. त्या मुलीला समजावून घेऊन या. आमच्या समोर तिला हजर करा. मग आम्ही युवराजांच्या बाबतीत अंतिम निर्णय करू.’

दरबारचे सुटकेचे नि:श्वास बाहेर पडले; पण राजांची नजर संभाजीराजांवर स्थिरच होती.

‘काही असलं, तरी युवराजांनी एका विवाहित स्त्रीस नेऊन लिंगाण्यावर ठेवलं, हा आरोप त्यांनाही मान्य आहे. प्रजा कन्यावत, असं असता युवराजांनी हे कर्म केलं, हा गुन्हाच. या गुन्ह्यासाठी जगदंबेची सेवा सांगणारी भोसले कुळाची कवड्यांची माळ युवराजांनी उतरावी. तसंच दीनांचं, अबलांचं रक्षण करण्यासाठी, क्षत्रियत्वाशी इमानी राहण्यासाठी कमरेला बाळगलेली तलवार युवराजांनी उतरावी. ही शिक्षा आम्ही युवराजांना देत आहो. अनाजी, युवराजांची तलवार आणि माळ उतरून घ्या.’

अनाजी न कळत पुढे झाले; आणि संतप्त संभाजीराजांनी तलवारीच्या मुठीवर हात ठेविला. डावा हात गळ्याशी खिळला होता. संभाजीराजांचा तलवारीवर पडलेला हात बघताच राजे आसनावरून उठले. राजे उठलेले पाहताच संभाजीराजांचे भान हरपले, डोळे भरून आले, तलवारीवरची मूठ ढिली पडली, हातचे बळ सरले.

राजे शांत पावले टाकीत युवराजांच्या जवळ गेले. क्षणात दरबारात कवड्या विखुरल्या गेल्या. फेकल्या गेलेल्या तलवारीचा आवाज झाला. आसनाकडे जावयास गेलेल्या राजांची आज्ञा साऱ्यांच्या कानांवर पडली :

‘याचा निर्णय लागेपर्यंत युवराजांना गडाचे दरवाजे बंद राहतील.’

त्या मनस्तापात राजे आपल्या महालात गेले. पाठोपाठ पुतळाबाई महालात आल्या. त्या आलेल्याची जाणीव राजांना होती; पण त्यांनी मागे वळून पाहिले नाही. संतप्त पुतळाबाईंनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘झालं समाधान? त्या पोराला कोणी विचारणारं नाही... त्यांची आई नाही, मासाहेब नाहीत. कुणाचा आधार नाही. ’

‘राणीसाहेब!’ राजे कळवळले. ‘युवराजांचा गुन्हा तुम्ही विसरता.’

‘चूक कोणाची होत नाही?’

‘ही चूक अक्षम्य आहे.’

‘चूक त्यांचीच नाही; आपलीही आहे.’

‘आमची?’

निर्धाराने पुतळाबाई म्हणाल्या,

‘मासाहेब होत्या, तोवर कधी त्यांच्या हातून आगळीक घडली? मासाहेब गेल्या, आणि त्यांच्यावर कुणाचंच लक्ष राहिलं नाही. युवराज कुठं हिंडतात, कुणाबरोबर फिरतात, याची काळजी कुणाला होती? रानोमाळ फिरणारं तरुण पोर ते. त्याची गत हीच व्हायची.’

‘राणीसाहेब!’

‘खुद्द वडिलांनी टाकलं. आता त्या पोरानं काय करावं? युवराजांचा गुन्हा घडला; मी ‘नाही’ म्हणत नाही. त्याची चौकशी करायची होती, तर आप्तस्वकीय काय थोडे होते? पण युवराजांना दरबारात उभं केलंत. उद्याच्या राज्याचे मालक ते. त्यांची काय इज्जत राहिली?’

राजे व्याकूळ होऊन म्हणाले,

‘बोला! थांबलात का?’

‘मी कशाला बोलू?’ पुतळाबाईंचे डोळे भरून आले. ‘मी त्यांची सख्खी आई थोडीच आहे? थोरल्या राणीसाहेब असत्या, मासाहेब असत्या, तर त्यांनी हे होऊ दिलं नसतं.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपण नुसते राजे आहात! तिथं पोराला जागा नाही, रक्ताला किंमत नाही.’

‘बस्स करा, राणीसाहेब!’

पुतळाबाईंनी पाहिले. राजांची आरक्त नजर त्यांच्या नजरेला भिडली होती; पण तीत दाह नव्हता.

‘ कशाला आम्हांला दोष देता? हाच गुन्हा दुसऱ्या कोणी केला असता, तर त्याची चौकशी न करता आम्ही त्याला तोफेच्या तोंडी दिलं असतं; आणि चिकाच्या पडद्याआडून तुम्ही मान्यतेची मानही डोलविली असती. पण सामोरे होते शंभूबाळ! ते रूप विसरता येत नव्हतं. आज न्यायाशी आम्ही बेइमान झालो, रक्ताशी इमानी राहिलो, याचंच दुःख आम्हांला आहे. नुसतं रक्ताचंच नातं नाही, राणीसाहेब! एका जात्या जिवाला आम्ही वचनबद्ध आहो. आता तळहातावरच्या या फोडावर फुंकर मारीत बसण्याखेरीज आमच्या हाती काही राहिलं नाही. खोटा बोल आम्हांला लावू नका. ’

राजे थकले. ते बैठकीवर बसले. राजांचे ते घायाळ रूप पाहून, पुतळाबाईंना काय बोलावे, हे कळेना. त्यांचा संताप कुठच्या कुठे गेला. राजांनी नजर वर केली.

‘काल तुम्ही युवराजांना घेऊन महाली आलात; पण महालाचे दरवाजे बंद होते. उभ्या आयुष्यात आम्ही दोनदाच दरवाजे बंद करून घेतले... जेव्हा जगू नये, असं वाटत होतं, तेव्हाच. काल आम्हांला तसंच वाटत होतं.’

पुतळाबाई राजांच्या जवळ बसल्या, रडू लागल्या. राजांनी आपला हात पुतळाबाईंच्या पाठीवर ठेवला.

‘रडून संकट टळत नाही, पुतळा! गप्प! जेवढं माझ्या हातून करता येईल, तेवढं मी करीन. पण, पुतळा, नुसतं ‘ प्रेम करा ’, म्हणून कोणी प्रेम करीत नाही. प्रेम दिल्याखेरीज मिळत नाही. आमच्या युवराजांना तेवढंच जमत नाही. येसूबाई बघा. बिचारी पोर यात होरपळून गेली असेल!’

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

११

दोन प्रहरची वेळ होती. पावसाने जोर धरला होता. राजे महालात डोळे मिटून पडले होते. महालात राजाराम धावत आले. पलंगाशेजारी जाऊन ते उभे राहिले. राजे झोपले आहेत, असे समजून ते चूपचाप उभे होते. राजांनी डोळे उघडले. राजाराम हसले. पलंगाजवळ जाऊन ते राजांना बिलगले.

‘आबासाहेब, झोप झाली?’

‘हो! तुम्ही दादामहाराजांच्याकडे गेला होता?’

‘ते पण झोपूनच आहेत.’

‘झोपून असायला काय झालं? सकाळीच जगदीश्वराकडे गेले होते.’ महालात येत सोयराबाई म्हणाल्या,

राजे पलंगावरून उठले. सोयराबाईंच्याकडे पाहत ते म्हणाले,

‘युवराजांना जायला तेवढी एकच जागा राहिली आहे.’

राजाराम राजांच्याकडे धावले. भीतियुक्त नजरेने त्यांनी विचारले,

‘दादामहाराजांना तोफेच्या तोंडी देणार?’

राजे दचकले. त्यांनी विचारले,

‘कोण सांगत होतं?’

राजारामांनी सोयराबाईंच्याकडे पाहिले. सोयराबाईंनी नजर वळविली. राजे म्हणाले,

‘हो!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

उभ्या जागी राजारामांचा चेहरा रडवा बनला. राजांनी त्यांना घेण्यासाठी हात पुढे केला. ते हात झिडकारीत राजाराम वळले.

‘बाळराजे!’

रडणारे राजाराम वळले. ते ओरडले,

‘गट्टी फू! तुम्ही सगळे वाईट्ट आहात!’

मोठ्याने रडत राजाराम महालाबाहेर गेले. राजे उद्गारले,

‘बाळराजांनी खरं तेच सांगितलं.’

सोयराबाई पदर सावरत उभ्या राहिल्या. महालात अनाजी, हंबीरराव आले. अनाजींची नजर झुकली होती. अधीरपणे राजांनी विचारले,

‘मुलगी आली?’

‘जी, नाही.’ हंबीरराव म्हणाले.

‘काय झालं?’

‘अनर्थ झाला, महाराज!’ हंबीरराव म्हणाले. ‘आम्ही लिंगाण्यावर गेलो. आम्ही येतो, हे कळताच त्या मुलीनं गैरसमज करून घेतला. आम्ही वर पोचण्याआधीच तिनं कड्यावरून उडी घेतली!’

‘हर हर!’ राजे उद्गारले.

राजांचे सारे बळ सरले. ते मटकन खाली बसले. भरल्या डोळ्यांनी ते बोलले,

‘हंबीरराव, फार वाईट गोष्ट झाली. आमच्या युवराजांचं निर्दोषत्व सिद्ध करू शकणारा एकुलता एक पुरावा नाहीसा झाला. हंबीरराव, युवराजांनी गड उतरू नये, आमच्यासमोर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यांनी येऊ नये, ही आमची आज्ञा त्यांना कळवा... अनाजी, झाल्या प्रकारानं आमची मान खाली झुकली आहे. आम्ही शरमिंदे आहो!'

गडावर अखंड धारा ओतत होत्या. गडाच्या चारी बाजूंनी पाण्याचे लोट अखंड सांडत होते.

□

१२

पावसाळा संपला; पण गडाचे कुंदावलेले वातावरण निवळले नाही. युवराजांच्या आणि राजांच्या महालांची झालेली फारकत तशीच होती. संभाजीराजे गडावर एकाकी फिरताना दिसत; पण राजे महालात बसल्या-बसल्या थकत होते. पावसाळा संपताच मोहिमांची तयारी सुरू झाली. राजांच्या फौजा साताऱ्याकडे दौडल्या.

राजे एकटेच महालात असता मोरोपंत येत असल्याची वर्दी आली. राजांनी त्यांची भेट महालीच घेतली. मोरोपंतांच्या बरोबर हंबीररावही होते. दोघांनी मुजरे केले. राजांनी विचारले,

'मोरोपंत, काय खबर?'

'सोंध्याच्या दरबारातून पत्र आलं आहे. दिल्या वचनाप्रमाणे सोंध्याच्या राणीनं आपल्या दरबारी आमच्या वकिलांना ठेवून घेतलं आहे.'

'सोंधे दौलतीस मिळाले; पण बेदनूरकर मात्र दूरच राहिले.'

'आपलं आरमार जंजिऱ्याला गोळा होत आहे.'

'ठीक.'

'या मुदतीत कल्याणकडे एकदा जाऊन यावं, असा विचार आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'या ना! तुम्ही निर्णय केलात, की तो पारखायचं काय कारण?'

'बरोबर मदत म्हणून ऽ ऽ'

'कोण हवे असतील, त्यांना घेऊन चला. हंबीररावांना घेऊन जाणार का?'

'जी, नाही.'

'कुणाला न्यायचं मनात आहे?'

मोरोपंतांनी राजांची नजर चुकवीत सांगून टाकले,

'युवराजांना.'

राजांच्या चेहऱ्यावरचे सर्व भाव एकदम बदलले. डोळ्यांत वेगळीच छटा अवतरली. राजांची ती नजर मोरोपंतांवरून हंबीररावांच्याकडे वळली. दोघेही खाली पाहत होते. राजांच्या तोंडून निःश्वास बाहेर पडला. बैठकीवरची गिर्दी मांडीवर घेत ते म्हणाले,

'मोरोपंत, तुम्ही आम्हांला कोण समजता?'

दोघांची नजर राजांच्याकडे वळली.

'आम्हांलाही भावना आहेत. आम्हीही माणूसच आहोत. शिक्षा युवराजांना झाली नसून, ती आम्हांला झाली आहे. युवराजांना पाहण्यासाठी आमचा जीव तडफडतो. परवा आम्ही जगदीश्वराकडे गेलो होतो. देवालयानजीक आम्ही गेलो, आणि भवानीटोकाकडे जात असलेले युवराज आम्हांला दिसले. आम्ही येतो, हे कळताच ते भवानीटोकाकडे गेले. पाठमोऱ्या युवराजांच्याकडे पाहून केवढं दुःख झालं! ते कसं सांगू? देवालयाजवळ जाऊन आम्ही दर्शन न घेता तसेच माघारी आलो. सारेच आम्हांला पारखे झाले! येसू पूर्वी 'आबासाहेब' म्हणून धावत यायची, हट्ट करायची, खुद्द संभाजीराजांचा अधिकार ती गाजवायची. पण हे प्रकरण झालं; आणि ती पोर एकदम मुकी झाली. येते, पाया पडते, जाते. बोलायला गेलं, तर तुटक उत्तरं मिळतात. गुन्हा केला युवराजांनी, आणि शिक्षा भोगतो आम्ही....! '

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘म्हणूनच युवराजांना एक वेळ माफी व्हावी.’

राजांचा जीव कासावीस झाला.

‘माफी? कशाबद्दल? आमच्यावर ही राज्याची जबाबदारी नसती, तर आम्ही हे कदाचित सहनही केलं असतं. संभाजीराजे आमचे चिरंजीव आहेत, तसेच ते भावी राज्याचे धनी पण आहेत. त्या कल्पनेनंच आमचा जीव कातर झाला आहे.’

मोरोपंत ऐकत होते.

राजे उठले. मोरोपंतांच्या जवळ आले. मोरोपंतांच्या खांद्यावर हात ठेवीत ते म्हणाले,

‘मोरोपंत, आता राज्याचे निर्णय तुम्हां लोकांच्याच हाती. त्याला आम्ही आड येणार नाही. आम्ही तुमच्या भावना जाणतो, हेतूही जाणतो. त्यासाठी संभाजीराजांना मोहिमेवर घेऊन जाण्याचं काही कारण नाही. आजपासून त्यांना गडाचे दरवाजे मोकळे आहेत. आमचं कोणतंच बंधन त्यांच्यावर नाही. शक्यतो लौकर आम्ही साताऱ्याला जायचा विचार करीत आहो.’

अनाजी महालात आले. त्यांची चिंताक्रांत मुद्रा पाहून राजांनी विचारले,

‘अनाजी, काय बातमी?’

‘बातमी चांगली नाही.’ अनाजी म्हणाले. ‘प्रतापगडाच्या देवालयावर काल वीज पडली.’

ती बातमी ऐकून राजांना धक्का बसला. ते उद्गारले,

‘मूर्तीला धक्का ऽ ऽ ऽ?’

‘जी नाही. मूर्ती सुरक्षित आहे. पण शेजारच्या अश्वशाळेला आग लागली; त्या आगीत अनेक घोडी आणि देवीच्या छबीन्याचा हत्ती....’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अरेरे!’

राजे सुन्न होऊन बैठकीवर बसले. अनाजी सांगत होते,

‘कलशांना विचारलं. त्यांनी ‘काळजीचं कारण नाही,’ म्हणून सांगितलं....’

राजे खिन्नपणे हसले.

‘अनाजी, दैवी काय लिहिलं, ते कुणी सांगावं? मूर्ती वाचली, यातच समाधान मानून घ्यायचं. देवालयाची पडझड झाली असेल, तर सत्वर बांधकाम करून घ्या. तसंच, पागा त्याच ठिकाणी बांधून घ्या.’

एकदम अंग झाडून राजे उठले. मोरोपंत, अनाजी आश्चर्याने पाहत राहिले. पूर्वीचा थकवा कुठल्या कुठे गेला होता.

‘अनाजी, आता आपण म्हातारे झालो, हेच खरं. भर अमावास्येला आपण पहिली लढाई केली. तेव्हा शकुन, अपशकुन आठवले नाहीत; आठवले, तरी पर्वा केली नाही. पण आज देवालयाच्या नुसत्या वार्तेनं, क्षणभर का होईना, आपण हतबल झालो. साताऱ्याचा विजय संपादन केलेला आपण विसरलो. या साऱ्या वयाच्याच खुणा.’

सर्वांच्या चेहऱ्यांवर हसू प्रकटले.

‘चला, अनाजी. सदरेवर जाऊ. खूप गोष्टींचा आज निर्णय करायचा आहे. आम्ही साताऱ्याला जाण्याआधी सर्व निश्चित करायला हवं.’

‘आपल्याला साताऱ्याला जायची काय गरज?’ अनाजींनी विचारले.

‘अनाजी, आता तुम्ही तिघेजण मोहिमेवर जाणार. हाती आलेला कोल्हापूर, पन्हाळा, सातारा, परळी या जागा सुरक्षित करून घ्यायला हव्यात. आदिलशाहीत मोठा बेबनाव सुरू आहे. ती पावलं कशी पडतात, ते पाहून हालचाल करायला हवी. त्याखेरीज जंजिरामोहीम आहे. या सर्वांवर नजर ठेवायला सातारा हेच ठिकाण आम्ही निवडलं आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे महालाबाहेर पडले. पाठोपाठ हंबीरराव, अनाजी राजसदरेकडे चालत होते.

नव्या मोहिमांच्या वाटा त्यांना दिसत होत्या.

□

१३

राजे मोहिमेला जाण्याच्या तयारीत महालात उभे होते. गेले चार दिवस राजांचे सामान गडाखाली उतरत होते. महालात सोयराबाई, पुतळाबाई, राजाराम हजर होते. सोयराबाईंनी विचारले,

‘परत येणं केव्हा होणार?’

‘उन्हाळ्याच्या मध्यावर आम्ही येऊ.’

राजाराम पुढे झाले. राजांच्या अंगरख्याला बिलगत त्यांनी विचारले,

‘आबासाहेब, आम्ही तुमच्या बरोबर येऊ?’

राजांनी त्यांना उचलले. त्यांचा मुका घेत राजे म्हणाले,

‘तुम्ही आलात, तर तुमचे दादामहाराज एकटे राहतील ना!’ राजांची नजर सोयराबाईंच्याकडे वळली. ‘राणीसाहेब, आम्ही निघालो. हातावर दहीसाखर घालणार ना?’

‘मी आणू?’ पुतळाबाईंनी विचारले.

‘नको. मी आणते.’ म्हणत सोयराबाई महालाबाहेर गेल्या.

महाली फक्त राजाराम व पुतळाबाई होत्या. पुतळाबाई म्हणाल्या,

‘तब्येतीची काळजी घ्यावी. अलीकडे दगदग सोसवत नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो. तुम्ही पण काळजी घ्या. युवराजांवर नजर ठेवा. त्यांची आम्हांला काळजी वाटते.’

‘दादामहाराजांनी तुम्हांला पण सांगायला सांगितलंय्.’ राजाराम म्हणाले.

राजांची, पुतळाबाईंची दृष्टी राजारामांवर खिळली. राजांनी विचारले,

‘काय सांगितलं?’

राजारामांनी दरवाजाकडे पाहिले. गडबडीने ते म्हणाले,

‘दंडवत!’

‘खोटं!’

‘नाही, आबासाहेब! अगदी खरं!’ राजाराम सांगत होते. ‘आम्ही इकडे येत होतो. दादामहाराजांना म्हणालो, ‘चला.’ तर ते म्हणाले,‘आबासाहेब रागावतील.’ आम्ही एकटेच यायला निघालो. तर ते म्हणाले, ‘तुम्ही जाता आहातच, तर आमचा दंडवत सांगा.’ आबासाहेब, दंडवत म्हणजे काय, हो?’

राजांनी राजारामांना एकदम उराशी कवटाळले. क्षणभर ते काहीच बोलले नाहीत.

‘बाळराजे! दंडवत म्हणजे पाया पडणं. जी माणसं वयानं मोठी असतात, पण मनानं नसतात; ज्यांना मोठेपण हवं असतं, पण क्षमा करण्याची ताकद नसते, त्यांच्या वाट्याला जे पाया पडणं येतं, त्याला ‘दंडवत’ म्हणतात.’

बिचाऱ्या राजारामांना काही समजले नाही. ते काही तरी विचारणार, तोच सोयराबाई आत आल्या.

‘चला. आमच्या निघण्याची वेळ झाली.’

राजांनी हातावर दही घेतले आणि ते राजारामांबरोबर चालू लागले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे सदरेवर आले. त्यांनी सर्वांचा निरोप घेतला. अनाजी आधीच पुढे गेले होते. राजांच्याबरोबर महादरवाजापर्यंत मोरोपंत, बाळाजी वगैरे मंडळी गेली. राजांनी सर्वांना निरोप दिला. महादरवाजाची नौबत झडली.

राजे गडाखाली उतरल्याचे सर्वांना कळले.

❑

१४

संभाजीराजांनी राजांच्या महालात प्रवेश केला. युवराजांची नजर त्या महालावरून फिरत होती. मनोहारी पलंगावर आच्छादन घालीत होती. पावलांच्या आवाजाबरोबर मनोहारीने मागे वळून पाहिले. युवराजांना पाहून मनोहारीच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. युवराज पलंगाजवळ आले. पलंगाखाली ठेवलेली तस्ते पाहून त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी विचारले,

‘ही तस्तं बरी इथं?’

‘आताशा रात्री खोकला येतो.’

‘आबासाहेबांना आता कष्ट सहन होत नाहीत.’

‘साताऱ्याला गेले, तेव्हा रात्रभर डोळा लागला नव्हता.’

युवराज वळले. राजांच्या देव्हाऱ्याकडे त्यांची पावले वळली.

‘आबासाहेबांना साऱ्यांना शिस्त लावता येते, पण स्वत:ला मात्र....’

मनोहारीने दचकून युवराजांच्याकडे पाहिले. युवराज तिच्याकडे पाहत होते.

‘रागावू नको, मनोहारी. आबासाहेबांचा उपमर्द करण्यासाठी आम्ही बोललो नाही. ते आमच्या मनातही नव्हतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मनोहारी हसली.

'मी कधी रागावले?'

'तुला सांगायला हरकत नाही; पण अलीकडे आमचा जीव सारखा घाबरतो. आम्ही काही केलं, बोललो, तरी त्याचा अर्थ उलट घेतला जातो.'

मनोहारी गालिचाची गुंडाळी करीत होती. ती काही बोलली नाही. युवराज राजांच्या देव्हाऱ्यासमोर उभे होते. नेहमी दिसणारी जगदंबेची मूर्ती, स्फटिकाचे शिवलिंग, दासबोधाची पोथी यांपैकी काहीच तेथे नव्हते. आपले देव राजांनी संगती नेल्यामुळे देव्हारा रिकामा होता.

'रिकामा देव्हारा बघायला बरा वाटत नाही.'

'हो.'

'आबासाहेब गडावर नसले, की गड सुद्धा असाच मोकळा वाटतो.'

पुतळाबाई महालात आल्या. संभाजीराजांनी त्यांना मुजरा केला. पुतळाबाई मनोहारीला म्हणाल्या,

'मनू, तुझं आटोपलं, की नाही?'

'जी, झालंच.'

'लौकर आटोप आणि मुदपाकखान्याकडे जा. आज वातावरण गरम दिसतंय्.'

'काय झालं?' युवराजांनी विचारले.

'काही व्हावंच लागतं, असं काही नाही.' पुतळाबाई हसून म्हणाल्या. 'आणि आज तुमचीही चौकशी चालली होती.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बाप, रे!’ संभाजीराजे उद्गारले. ‘कुणी काही बोलायच्या आधी राजसदर गाठलेली बरी.’

‘मी तेच सांगणार होते.’

संभाजीराजांनी पुतळाबाईंच्याकडे पाहिले. नि:श्वास सोडून ते जायला वळले.

‘कुणाशी चार शब्द बोलावे, म्हटलं, तरी आम्हांला जागा राहिली नाही. साऱ्यांनाच आम्ही नको वाटतो.’

‘शंभूराजे, मागे वळा! शपथ आहे, पाऊल पुढं टाकाल, तर!’

संभाजीराजांनी मागे वळून पाहिले. पुतळाबाई निश्चल नजरेने त्यांच्याकडे पाहत होत्या. त्यांच्या चेहऱ्यावरचे स्मित कायम होते; पण नाकपुड्या रुंदावल्या होत्या, डोळे पाणावले होते.

‘एकदा बोललात; मी असेपर्यंत पुन्हा असं बोलू नका!’

उभ्या जागी संभाजीराजे गहिवरले. ते बोलण्याचा प्रयत्न करीत असतानाच त्यांच्या कानांवर शब्द आले,

‘जा!’

संभाजीराजे सदरेवर गेले, तेव्हा सदर उभी होती. मोरोपंत, आनंदराव, बाळाजी, रघुनाथपंत ही मंडळी हजर होती. खुद्द सोयराबाई सदरेवर होत्या. त्यांना पाहून संभाजीराजांना आश्चर्य वाटले. त्यांनी मुजरा केला. साऱ्यांनी संभाजीराजांना मुजरे केले. सोयराबाईंच्या चेहऱ्यावर वेगळेच हसू प्रकटले.

‘या, युवराज! आम्ही तुमचीच वाट पाहत होतो. आम्ही सदरेवर आलो, याचं आश्चर्य वाटलं ना?’

‘तसं नाही, आईसाहेब.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्हांला का सदरेवर यायची हौस आहे? पण करणार काय? युवराज आपला महाल सोडायला तयार नाहीत. मोहिमा तशाच अडून पडलेल्या.’

‘आज्ञा झाली, तर आम्ही मोहिमेवर जाऊ.’

‘कोण सांगणार, जा, म्हणून? धरलं, तर चावतं; सोडलं, तर पळतं; असं झालंय्.’

आपला संताप आवरून संभाजीराजांनी विचारले,

‘आम्ही समजलो नाही.’

‘त्यात न समजण्यासारखं काय आहे? तुम्हांला मोहिमेवर पाठवलं, आणि काही प्रताप गाजवलेत, तर त्याला जबाबदार कोण राहणार?’

‘त्याचसाठी आम्ही गडावर राहिलो.’

‘नुसतं राहून काय उपयोग? त्यानं स्वभाव कसा बदलेल?’

‘आईसाहेब?’

‘डोळे कशाला काढता? आम्हांला का तुमची थेरं कळत नाहीत? जगदीश्वराच्या सेवेसाठी नेमलेल्या कलावंतिणी नोकरी सोडून का गेल्या? एकदा गळ्यातली कवड्यांची माळ उतरली; मोकळे झालात!’

संभाजीराजांना ते सारे असह्य होत होते. सारे खाली मान घालून उभे होते. भर सदरेत सोयराबाईंनी असे बोलावे, हे कोणालाच रुचले नाही. संभाजीराजांची संतप्त नजर सोयराबाईंवर खिळली. संभाजीराजांना आलेला संताप पाहून सोयराबाईंना आनंद झाला होता. पण तो क्षणभरच टिकला.

‘आईसाहेब, फार गैरसमज होतोय् आपला. कलावंतिणी पळाल्या, त्या आमच्या वर्तनामुळं नव्हे; तुम्हांला सल्ला देणाऱ्या अनाजींच्यामुळं पळाल्या.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘युवराज ऽ ऽ’ सोयराबाई म्हणाल्या.

‘ऐका! फार ऐकलं. आता थोडं ऐकून घ्यावं. कलावंतिणींची बिदागी त्यांना पोहोचली नाही. कलावंतिणींना राहायला गडावर घरटं दिलं नाही. त्या जाचाला कंटाळून कलावंतिणी नोकरी सोडून गेल्या. हवं तर, मोरोपंतांना अथवा खुद्द अनाजींना विचारा.’

‘या विषयात आपल्याला सर्व माहिती दिसते.’

शांतपणे संभाजीराजे म्हणाले,

‘आईसाहेब, आपल्या ध्यानी येत नसेल, म्हणून मी सांगतो... ही सदर आहे. आम्ही युवराज आहोत. आबासाहेबांनी आम्हांला राजकारणात गुंतवलं आहे. इथं बेइज्जत झालेली आम्हांला खपणार नाही!’

‘युवराज!’ मोरोपंत उद्गारले.

‘खामोश!... आणि गेलेल्या कलावंतिणींबद्दल म्हणाल, तर त्यांना आणण्यासाठी खुद्द मोरोपंतांनी पत्रं पाठविली आहेत. थोड्याच दिवसांत कलावंतिणी गडावर सेवेला हजर होतील. कलावंतिणी नेमल्या, त्या आम्ही नव्हे, आबासाहेबांनी! त्यांना या विषयात कितपत ज्ञान आहे, ते आम्हांला माहीत नाही.’

‘युवराज ऽ ऽ’ संतप्त सोयराबाई उसळल्या.

‘हां, आईसाहेब! आता काही न बोलता आपण इथून जावं, ही आमची नम्र विनंती आहे. सदरेवर घडलेला प्रकार जर आबासाहेबांच्या कानांवर गेला, तर त्यांना आनंद वाटेल, असं आम्हांला वाटत नाही.’

शेवटच्या वाक्याने सोयराबाई भानावर आल्या. सर्वांवरून नजर फिरवून त्या महालाबाहेर गेल्या.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१५

मोरोपंत अकोला-सोंधेमोहिमेवर रवाना झाले. संभाजीराजे मात्र गडावरच राहिले. पाचाडला सुद्धा ते कधी उतरले नाहीत. कवी कलश यांच्याबरोबर किंवा आपल्या महालात ते नेहमी असत. सोयराबाईंच्या महाली मात्र मंत्र्यांची वर्दळ वाढली होती. न कळत राजकारणाची सूत्रे तेथून फिरू लागली होती.

सकाळी स्नान आटोपून संभाजीराजे महालात आले. येसूबाईंनी दुधाचा पेला समोर ठेवला. तो पेला उचलत संभाजीराजांनी सांगितले,

‘आम्ही देवाला जाऊन येतो.’

‘लौकर यावं.’

‘का?’

‘आज सासूबाई जाणार आहेत.’

‘कुठं?’

‘साताऱ्याला.’

‘ते बरं?’

‘आपल्याला माहीत नाही?’

‘काय?’

‘आबासाहेबांची तब्येत बरी नाही, म्हणून कालच बातमी आली. तब्येत जास्त बरी नाही, म्हणे.’

संभाजीराजे क्षणभर विचारात राहिले. दुसऱ्याच क्षणी दूध संपवून ते महालाबाहेर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पडले.

सदरेवर बाळाजी काही तरी लिहीत होते. संभाजीराजांना पाहून ते गडबडीने उठले.

‘बाळाजी, काल साताऱ्याहून खलिता आला?’

‘जी.’

‘मग तो आम्हांला का दाखविला गेला नाही?’

‘तो राणीसाहेबांनी घेतला.’

‘कुणाच्या नावाचा खलिता होता?’

‘रामचंद्रपंतांच्या.’

‘अस्सं! आबासाहेबांची तब्येत बरी नाही?’

‘जी.’

‘काय होतं?’

‘इथून गेल्यापासून तब्येत बिघडली आहे. मस्तकशूळ आहे. दिवसेंदिवस प्रकृती बिघडत आहे.’

‘बाळाजी, युवराज म्हणून नको, पण त्यांचे चिरंजीव म्हणून तरी हे आम्हांला सांगायचं होतंत! घर फिरतं आहे; वासे पण फिरायचेच. पण असलं वर्तन एक ना एक दिवस सर्वांनाच त्रासदायक होईल.’

संभाजीराजे तसेच वळले. ते सरळ सोयराबाईंच्या महाली गेले. बाहेरच्या सोप्यात सामानाच्या संदुका तयार होत होत्या. आतून आलेले रामराजे ओरडले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘दादामहाराज आले!’

संभाजीराजांना बिलगत ते म्हणाले, ‘आमी साताऱ्याला जाणार.’

‘ठीक!’

राजारामांच्यासह संभाजीराजे बैठकीच्या खोलीत आले. सोयराबाई येताच मुजरा झडला. सोयराबाईंनी विचारले

‘सदरेचे युवराज महाली बरे आले?’

त्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत संभाजीराजांनी विचारले,

‘आबासाहेबांची तब्येत बरी नाही?’

‘हो.’

‘आपण साताऱ्याला जाणार?’

‘हो. का?’

‘आम्ही येऊ?’

‘फक्त आम्हांलाच बोलावलं आहे.’

‘अस्सं!’

‘आणखीन काही विचारायचं होतं?’

संभाजीराजांनी सोयराबाईंच्याकडे पाहिले, मुजरा केला; आणि ते निघून गेले.

दोन प्रहरी सोयराबाई आणि राजाराम दासीपरिवारासह गडाखाली उतरले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजांच्या मनाची तगमग झाली होती. ते कवी कलशांच्याकडे गेले. कवी कलशांच्या बैठकीवर संभाजीराजे बसले. कलश आपल्या संजाबावरून हात फिरवीत त्रस्त युवराजांच्याकडे पाहत होते.

'युवराज! जिवावरचं दुखणं आहे; पण महाराज यातून बरे होतील. मी कुंडली पाहिली आहे. काळजी करू नका.'

संभाजीराजांचे डोळे भरून आले.

'आबासाहेब आजारी आहेत; आणि त्यांना आम्ही भेटू शकत नाही. आम्ही फक्त नावाचे युवराज राहिलो!'

'शांत व्हा, युवराज! हीच परिस्थिती कायम राहणार नाही. वारे बदलू लागतील. महाराजांचं मन वळेल, पण....'

'पण काय?'

'भविष्यकाळ कठीण आहे. आपल्या विरुद्ध अनेक शत्रू उभे राहतील, असं दिसतं. यापुढची पावलं सावधगिरीनं टाकायला हवीत. महाराजांनीही....'

'काय सांगता?'

'युवराज,राजकारणात मायाममतेला स्थान नसतं... महाराजांसाठी एक होम करावा, असं वाटतं.'

'विलंब न लावता करा. मी पंतांना पाठवितो. सर्व साहित्य मागून घ्या.'

युवराज उठले. कवी कलश म्हणाले,

'थोडं थांबावं.'

कलश आत गेले; येताना तबकातून पेला घेऊन आले. राजांच्या हाती त्यांनी पेला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दिला.

‘आज सोमवार ना? देवाचा प्रसाद.’

संभाजीराजांनी हसून भांगेचा पेला हाती घेतला. त्या पेल्याचा स्वाद घेत संभाजीराजे म्हणाले,

‘इथल्यासारखी भांग कुठंच होत नाही.’

‘तेही शास्त्र आहे, युवराज!’

युवराजांनी भांग घेतली. त्या भांगेने त्यांना थोडे बरे वाटले. कलशांनी दिलेला विडा घेऊन ते वाड्याकडे चालू लागले.

थंडीतला गार वारा अंगाला सुखावीत होता. कुशावर्ताचा तलाव कमळांच्या पानांनी आच्छादला होता. नव्या पालवीने सजलेल्या रानांतून अनेक पक्ष्यांचे आवाज कानांवर येत होते.

पायवाटेने युवराज चढण चढत होते.

सायंकाळच्या तिरप्या किरणांत बाजारपेठ उभी होती. युवराजांना मुजरे झडत होते. युवराज मुजऱ्यांचा स्वीकार करीत होळीचौकात आले. कातळाला वळसा घालून, ते नगारखान्याकडे पोहोचले. नगारखान्यावरचा भगवा ध्वज नजरेत येताच संभाजीराजांना महाराजांची आठवण झाली. क्षणात संताप उफाळला.

पुतळाबाई महालात कशिदा विणीत बसल्या होत्या. दाराशी युवराज आलेले पाहताच त्यांनी हातांतले काम बाजूला ठेवले.

‘कुठं, फिरायला गेला होता?’

‘नाही. कवी कलशांच्याकडे गेलो होतो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय सांगितलं?’ पुतळाबाईंनी काळजीने विचारले.

‘कुंडलीवरून काळजीचं कारण नाही, असं ते म्हणाले.’ संभाजीराजांचा संताप उफाळला. ‘आम्ही आबासाहेबांच्या पोटी जन्म घेतला; आणि त्यांची चौकशी कुंडलीवरून करतो आहोत! कुणाला आमच्या हयातीची जाणीव नाही. आम्हांला काय वाटतं, याचा विचार कुणालाच सुचत नाही. घरच्या नोकरांची किंमत सुद्धा आम्हांला राहिली नाही!’

‘कलशांच्याकडे पेय जास्त झालं, वाटतं?’

संभाजीराजांनी घाबरून पुतळाबाईंच्याकडे पाहिले. त्यांनी आपला घाम टिपला. ते चाचरत म्हणाले,

‘आमचं चुकलं का?’

‘चुकलं नाही; पण तुमच्या लक्षात येत नाही की, आम्हीसुद्धा गडावरच आहो. आम्हांला काही वाटत नसेल....?’

बोलता-बोलता पुतळाबाईंचा आवाज भरून आला. त्यांनी डोळ्यांना पदर लावला. संभाजीराजे गडबडीने पुढे झाले. पुतळाबाईंच्या जवळ बसत म्हणाले,

‘आम्ही आमचाच विचार केला. आम्ही चुकलो! आईसाहेब, रडू नका! आमच्याजवळ आमची पुण्याई नसेल; पण आबासाहेब लाखाचे पोशिंदे आहेत, ती पुण्याई वाया जायची नाही. आबासाहेब बरे होतील, ही आमची खात्री आहे.’

पुतळाबाई आपल्या दु:खाला वाट देत होत्या. फार दिवसांनी ऐकलेल्या मायेच्या शब्दांनी त्यांचे मन हलके होत होते.

❑

१६

साताऱ्याचा किल्ला पहाटेच्या विरळ धुक्याने आच्छादला होता. किल्ल्याच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पायथ्याशी चिमुकले सातारा गाव अंग दुमडून बसले होते. सूर्योदय झाला; आणि धरित्रीचे रूप पालटले. शिवारातले धुके डोंगराच्या कडेला गोळा होऊ लागले. सकाळच्या वाऱ्यावर शाळूचे पीक डोलू लागले. बाभळीवर अंग चोरून रात्रभर बसलेले कवडे शिवारात चरावयास उतरले. गडावरचे नगारखान्यावरचे पहारेकरी उगवत्या सूर्याला वंदन करून, नव्या पहारेकऱ्यांकडे भालाकाठी देऊन मोकळे झाले. चुकून राहिलेल्या दिवट्या विझवल्या गेल्या. गडावरची जाग सुरू झाली; पण तीत गडबड नव्हती. मोठा आवाज नव्हता. साऱ्यांचे लक्ष राजांच्या महालाकडे लागले होते.

वाड्याच्या सदरेत पानसंबळ, अनाजी, येसाजी हजर होते. सदरेच्या पायऱ्या चढून येत असलेले हंबीरराव पाहताच येसाजी पुढे झाला. हंबीरराव सदरेवर आले. त्यांनी अनाजींना विचारले,

'कशी आहे तब्येत?'

'रात्रभर झोप आली नाही. रात्री शिवराम वैद्य आले. आता आत गेलेत.'

'आज आठ दिवस झाले; पोटात काही टिकत नाही, मस्तकशूळ कमी होत नाही.ताप गेला, पण हे नवीनच सुरू झालं.' पानसंबळ म्हणाले.

'तुमी काय बी म्हना,पन हे काय साधं आजारपन न्हवं. साताऱ्याला महाराजांनी पाऊल ठेवलं, आन् अंथरूण गाठलं. एक दीसबी उतार नाही.'

'येसाजीराव, काय म्हणायचं आहे तुम्हांला?' हंबीररावांनी विचारले.

आपली पगडी सावरीत येसाजी म्हणाला,

'देवस्कीची बाब हाय. जानत्याला विचारून उतार व्हायला पायजे.'

'सगळे उपचार चाललेत. येसाजीराव, तुमच्या माहितीतील कोणी असेल, तर विचारून बघा.'

त्याच वेळी साऱ्यांची नजर दरवाजाकडे गेली. वयोवृद्ध शिवराम वैद्य सदरेवर येत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सारे त्यांच्या भोवती गोळा झाले. आपल्या पांढऱ्या भुवयांवरून हात फिरवीत वैद्यांनी सर्वांच्याकडे पाहिले. नि:श्वास सोडून ते म्हणाले,

'रात्रीच्या मात्रेनं थोडा गुण दिसतो; पण दोन दिवस गेल्याखेरीज नक्की सांगता येणार नाही.'

'तब्येतीला आराम वाटेल ना?' अनाजींनी विचारले.

'अनाजी, मी काल आलो. महाराज महिनाभर आजारी होते, असं म्हणता. अंगात अशक्तपणा आहे. निदान ठरवायचं आहे. मी काय सांगणार?'

शिवरामशास्त्र्यांच्या बोलांनी साऱ्यांची मने थरकली.

दोन प्रहरी अनाजी राजांच्या महाली गेले. राजे पलंगावर पडून होते. शेजारी सोयराबाई उभ्या होत्या. साऱ्या महालात शांतता होती. राजांनी डोळे उघडले. क्षीण आवाजात विचारले,

'कोण आहे?'

'अनाजी आलेत.' सोयराबाई म्हणाल्या.

राजांनी हाताने खुणावले. अनाजी नजीक गेले. राजांनी श्वास घेतला. राजे कष्टाने म्हणाले,

'अनाजी!'

'जी, महाराज.'

'युवराजांना बोलावून घ्या, तातडीनं.'

'जी.' अनाजींनी सोयराबाईंच्याकडे पाहिले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बरं वाटल्यावर बोलावून घ्यावं. एवढी कसली गडबड?’

राजे खिन्नपणे हसले; हात उंचावत म्हणाले,

‘बोलावून घ्या.’ राजांनी श्वास घेतला. ‘त्यांना पाहावंसं वाटतं. साऱ्यांनी टाकलं ऽ ऽ. आम्हांला तसं करता यायचं नाही. समजलं?’

‘जी.’ अनाजींनी सांगितले.

रायगडाकडे तातडीने थैली रवाना झाली.

गडावर रात्र उतरली. गडाचे दरवाजे बंद झाले. गारवा जाणवू लागला. किल्ल्यावर ठायी ठायी पलोते पेटले. त्यांचे टेंबे वाऱ्यावर फरफरत होते. पहारेकरी जाग देत होते.

महालात राजांना थोडी निद्रा लागली होती. अचानक त्यांना जाग आली. त्यांनी हाक मारली,

‘कोण आहे?’

पानसंबळ पुढे झाले.

‘जी?’

‘दाराशी समर्थ आलेत. आम्हांला ते हाका मारताहेत.’

राजांच्या बोलण्याचा अर्थ पानसंबळांना समजेना. ते घाबरले. धीर करून ते म्हणाले,

‘वैद्यांना बोलावतो.’

‘नको.’ हात हलवीत राजे म्हणाले. ‘माझी तब्येत बरी आहे. किल्ल्याच्या दाराशी जा. समर्थ आले आहेत, त्यांना घेऊन या.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी!’ म्हणून पानसंबळ गेले. सदरेत अनाजी, येसाजी, हंबीरराव बसले होते. पानसंबळांनी राजाचे बोलणे सांगितले. अनाजी चिंतेत पडले. येसाजी उठून गेला. अनाजी म्हणाले,

‘हा नवा प्रकार दिसतो. गडाच्या दरवाजाशी कोणी आलं असतं, तर कळलं नसतं का?’

‘चौकशीला कुणाला तरी पाठवा.’ हंबीरराव म्हणाले.

चौकशीसाठी सेवक पाठविला गेला. सारे चिंताचूर होऊन बसून राहिले. वेळ क्षणाक्षणांनी सरत होती.

येसाजी सदरेवर आला, तेव्हा त्याचा चेहरा आनंदित दिसत होता. तो म्हणाला,

‘पंत! स्वामीजी आले!’

अनाजींनी आश्चर्याने मान वर केली. समर्थशिष्य कल्याणस्वामी येसाजीपाठोपाठ येत होते. न कळत सारे उभे राहिले. सर्वांनी कल्याणस्वामींना वंदन केले. येसाजी सांगत होता,

‘मला संशय आला, म्हणून दरवाजाकडे गेलो. बघितलं, तर खरंच स्वामीजी बाहेर उभे! देवडीवरील दरवाजा उघडंनात. स्वामीजी हाका मारीत व्हते.’

‘आश्चर्य आहे!’

‘त्यात आश्चर्य कसलं?’ कल्याण म्हणाले. ‘राजांची तब्येत बिघडल्याचं जर समर्थांना शिवथरी कळतं, तर त्यांच्या शिष्यांना आम्ही दरवाजाशी आलेलं का कळणार नाही? ...आता विलंब न करता आम्हांला राजांच्या जवळ घेऊन चला.’

अनाजींच्या मागून कल्याणस्वामी राजांच्या महालात आले. समया प्रज्वलित करण्यात आल्या. पडल्या जागेवरून राजांनी हात जोडले. आशीर्वादाचा हात उंचावीत कल्याणस्वामी म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘श्रीसमर्थांनी प्रसाद देऊन आम्हांला पाठविलं.’

‘सद्‌गुरूसारखा असता पाठीराखा। इतरांचा कोण करी लेखा?’

राजांचे अश्रू उशीवर ओघळत होते. कल्याणस्वामींनी राजांच्या कपाळी अंगारा लावला, केसांवरून हात फिरवला .

‘स्वामी, आमच्यामुळं समर्थांना कष्ट पडले. शिष्यानं गुरूची सेवा करायची, हा रिवाज... असो, जगदंबेची इच्छा!.. अनाजी, आता आमची चिंता करू नका. आमचं संकट टळलं.’

राजांच्या बोलांनी सर्वांना धीर आला . कल्याणस्वामींनी राजांना प्रसाद दिला. ते अनाजींना म्हणाले,

‘थोडी लापशी आणा.’

‘काही घेतलं, की उलट्या होतात.’ अनाजी म्हणाले

‘आता व्हायच्या नाहीत.’ शांतपणे कल्याणस्वामी म्हणाले.

लापशी आणली गेली. कल्याणस्वामींनी स्वत:च्या हातांनी राजांना पाजली. सारे महालात बसून होते. राजांना काही अवधीने निद्रा लागली. सारे समाधानाने महालाबाहेर गेले.

□

१७

-आणि खरोखरच राजांना दुसऱ्या दिवसापासून आराम पडू लागला, पोटात अन्न जाऊ लागले. गडाचे चिंतेचे वातावरण निवळू लागले.

दिवस उलटत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एके दिवशी गडावर संभाजीराजे आले. सतत प्रवासाने ते श्रमी दिसत होते. राजांच्या महालाबाहेर क्षणभर त्यांची पावले अडखळली. महालात सोयराबाई, अनाजी होते. राजे पलंगावर गिर्दीला टेकून बसले होते. शाल छातीपर्यंत ओढली होती.

राजांचे रूप पाहून संभाजीराजांचे मन चरकले. डोळे खोल गेले होते. नाक अधिक उठून दिसत होते. मानेवर रुळणाऱ्या केसांवर पांढरी छटा उमटली होती. संभाजीराजांनी मुजरा केला. राजे संभाजीराजांना निरखीत होते. क्षीणपणे हसत राजे म्हणाले,

‘आलात? बरं झालं! केव्हा गड सोडलात?’

‘पत्र मिळालं; आणि गड सोडला.’

‘अखंड रपेट केली असेल ना? वाटलंच. स्नान करा, विश्रांती घ्या. संध्याकाळी बोलू.’

संभाजीराजांनी परत मुजरा केला; आणि ते बाहेर गेले. राजांच्या चेहऱ्यावर समाधान प्रकटले होते. ते म्हणाले,

‘अनाजी, युवराज उतावीळ आहेत; पण प्रेमळ आहेत. चुकतात; पण समजावलं, तर चटकन भानावरही येतात.’

‘तीर सुटल्यावर भानावर येऊन काय उपयोग?’ सोयराबाई म्हणाल्या.

‘राणीसाहेब, चुका साऱ्यांच्याच हातून होतात. सावरून घ्यायचं मनात आणलं, तर तसंही होतं. एखादा माणूस उतावीळ आहे, आणि त्याच्या हाती तीरकमान आहे, हे कळलं, तर त्याच्या पुढं जाणं ही सुद्धा चूकच ठरते, नाही?’

‘पण मी म्हणते....’

‘ते नंतर सांगा. आता आम्हांला बसवत नाही. आम्ही झोपावं, म्हणतो.’

पलंगामागे उभे असलेले पानसंबळ पुढे झाले. राजांच्या मानेखाली हात देऊन त्यांनी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गिर्द्या काढून घेतल्या. राजे पलंगावर आडवे झाले. त्यांनी डोळे मिटून घेतले.

उलटणारा दिवस राजांच्या प्रकृतीला आराम घडवीत होता. राजांचा थकवा कमी होत होता. संभाजीराजे, राजाराम यांच्यासह राजे मनमोकळेपणाने बोलू लागले. महालात प्रसन्न वातावरण अवतरले.

दोन प्रहरी राजांना जाग आली. महालात कोणी नव्हते. एक दीर्घ जांभई देऊन ते कुशीवर होणार, तोच त्यांची नजर पायथ्याशी गेली. पायांशी कोणी तरी उभे होते. उन्हाचा त्रास होऊ नये, म्हणून खिडक्यांवर सोडलेल्या पडद्यांमुळे व्यक्ती अस्पष्ट दिसत होती.

'कोण आहे?' राजांनी विचारले. नजर स्थिरावली. पडल्या जागेवरून ते उद्गारले,

'कोण? शंभू?'

संभाजीराजे काही न बोलता उभे होते. त्यांनी एकदम महाराजांचे शालीबाहेर आलेले पाय पकडले. जमिनीवर गुडघ्यांवर बसून राजांचे दोन्ही पाय हातांच्या पकडीत धरून त्यांवर मस्तक टेकवून ते बसले होते. सारे अंग हलत होते. संभाजीराजाच्या आसवांनी राजांचे पाय भिजत होते.

'अरे शंभू! हे काय? काय झालं?' म्हणत राजे कष्टाने उठले. त्यांनी संभाजीराजांच्या काळ्याभोर केसांवरून हात फिरविला.

'ऊठ, राजा! असा घाबरू नको. आमच्या आजाराची इतकी काळजी वाटते? खुळा आहेस. इतक्या सहजासहजी मरण्यासाठी आम्ही जन्माला आलो नाही. समर्थांचा प्रसाद आला; आता बरं वाटत आहे. काळजी करू नको. ऊठ!... ऊठ, म्हणतो ना!'

संभाजीराजांनी पाय सोडले नाहीत. ते म्हणाले,

'मी एवढा का पापी?'

'कसलं पाप? काय बोलता?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'लोक हवं ते बोलतात. आम्हांला ते ऐकवत नाही.'

'काय बोलतात? सांगा.'

संभाजीराजांची अश्रुपूर्ण नजर राजांच्याकडे वळली. ते भरकन बोलून गेले,

'म्हणतात... म्हणतात, आम्ही आपल्यावर विषप्रयोग केला!'

राजे त्या बोलांनी सावध झाले. त्यांनी संभाजीराजांना जवळ बोलावले. संभाजीराजे जवळ येऊन बसले. राजांचा आवाज न कळत करडा बनला.

'कोण म्हणतं असं?'

'साऱ्या महालात कुजबूज चालू आहे. नजर वर करून पाहायचं धैर्य आम्हांला उरलं नाही. महालात कोणी नसता एकटं जाऊ नये, अशी सूचना आम्हांला केली आहे.'

'कुणी?'

संभाजीराजांनी उत्तर दिले नाही. राजांनी संभाजीच्या पाठीवर हात ठेवला.

'राजे, काय सांगता? घरात भावनांची गल्लत झाली, तर चालते. भांडण वाढलं, तरी चिंता नसते. पण नांदत्या घरात बुद्धिबळाचे डाव सुरू झाले, तर मात्र फार जागरूक राहायला हवं. तुम्ही युवराज आहात. पुढची जबाबदारी फार मोठी आहे!'

'आबासाहेब! आमची शपथ आहे! खरं सांगा... तुमच्या मनात काही नाही ना? तसं असेल, तर तुम्ही आज्ञा करा; कोणत्याही कड्यावरून मी स्वत:ला लोटून घेईन!'

राजांनी एकदम संभाजीराजांना जवळ ओढले. ते गहिवरले. संभाजीराजांच्या केसांवरून हात फिरवीत ते म्हणाले,

'शंभू! कधी कळणार, रे, तुला? भावनेच्या भरात कड्यावरून स्वत:ला झोकून देण्याखेरीज काहीच का तुम्हांला कळत नाही? तुमच्यामागे मी राहीन कसा? संभाजी!

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तुझ्या हातचं विष सुद्धा पिण्यात मला आनंद वाटेल! ...सुटली, म्हण. असल्या गोष्टींवर विश्वास ठेवीत जाऊ नका. पूस ते डोळे. राजांच्या डोळ्यांत अश्रू शोभत नाहीत. सारं मुकाटपणे सहन करायला शिकायला हवं. तुम्ही जा. मी सारी चौकशी करीन.'

संभाजीराजे उठले.

'शंभूबाळ!'

'जी!'

'या आजाराचेदेखील उपकार मानावेत, असं वाटतं.'

'उपकार?'

'नाही तर काय? निदान त्यामुळं तुम्ही जवळ आलात, आपणहून आम्हांला बिलगलात. फार दिवसांत हे सुख भोगलं नव्हतं.'

'आबासाहेब!'

'शंभूबाळ, आमची संदूक उघडा. वरच्या उजव्या खणात एक चांदीची डबी आहे, तेवढी आणा.'

संभाजीराजांनी राजांच्या आज्ञेनुसार डबी आणली. आत सुवर्णाच्या साखळीत गुंफलेली कवड्यांची माळ होती. राजांचा हात क्षणभर थरथरला. त्यांनी ती कवड्यांची माळ उचलली, मस्तकी लावली. ते कसेबसे म्हणाले,

'वाका.'

राजांनी कवड्यांची माळ संभाजीराजांच्या गळ्यात घातली. फासा बसविला.

'युवराज! जे झालं, त्यात फार वेदना आम्हांला भोगाव्या लागल्या. आता हे देवीचं लेणं जपा. तिची इज्जत राखा! शंभूबाळ, आम्ही खूप जगावं, असं वाटत असेल, तर ते

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तुमच्याच हाती आहे. आजपासून तलवारही बाळगा.’

-आणि संभाजीराजांनी राजांच्या पायांवर मस्तक ठेवले.

□

१८

दुसऱ्या दिवशी दोन प्रहरी राजे एकटे असता संभाजीराजे बराच वेळ राजांच्या महाली होते. राजांचा निरोप घेऊन संभाजीराजे उठले. संभाजीराजे दाराशी आले; आणि त्यांचे पाऊल अडखळले. त्याच वेळी सोयराबाई आत येत होत्या. संभाजीराजांनी मुजरा केला, आणि वाट दिली. सोयराबाई महाली आल्या; आणि संभाजीराजे बाहेर गेले. सोयराबाई राजांच्या जवळ जात म्हणाल्या,

‘युवराज? आणि या वेळी?’

‘का? आम्हांला भेटायला का वेळ पाहावी लागते?’

‘तसं नाही. पण कालसुद्धा आले होते ना?’

‘कुणी सांगितलं?’

सोयराबाई या प्रश्नाने चापापल्या. सावरून घेत त्या म्हणाल्या,

‘कोणी तरी म्हणालं, बाई! मला काय करायचं आहे? आपली झोपायची वेळ. आजवर अवेळी ते कधी आले नव्हते.’

‘प्रसंग सारं काही घडवतो, करायला लावतो.’

‘कसला प्रसंग?’

‘आमच्या आजाराचा!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सोयराबाईंनी निःश्वास सोडला. विषय बदलीत त्या म्हणाल्या,

‘कसं वाटतं आता?’

‘अगदी बरं वाटतं! दाह थांबला. मस्तकशूळ गेला. भूक लागते.’

‘मी नवस केला होता. पावला म्हणायचा.’

‘आम्ही आजारी पडलो, आणि राज्यात अफवांना केवढं पीक आलं! पंत सकाळी आले होते. ते सांगत होते... लोक म्हणतात, आम्हांला विषप्रयोग झाला होता, म्हणून!...’

सोयराबाई बेचैन झाल्या. महाराज त्यांच्यावर नजर खिळवीत पुढे म्हणाले,

‘एवढंच नव्हे, तर आमच्या कानांवर आलं की, खुद्द...’

‘खुद्द काय?’

‘काही नाही.’

‘सांगावं ना! माझी शपथ....’

‘पण कुणाला बोलू नका.’

‘बिलकूल बोलणार नाही.’

राजांनी एक वेळ दरवाजाकडे पाहिले. सोयराबाई नजीक गेल्या. हळू आवाजात राजे म्हणाले,

‘सुटली, म्हणा! ...खुद्द संभाजीराजांचा हात यात आहे, असं म्हणतात.’

सोयराबाईंची निराशा झाली. त्या मान उडवीत म्हणाल्या,

‘हे आम्हांला नवीन नाही. हेच आम्ही सांगितलं असतं, तर पटलं नसतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आताही ते पटत नाही.’ राजांचा आवाज कठोर बनत होता. नजर सोयराबाईंच्यावर खिळली होती.

‘राणीसाहेब, आम्हांला विषप्रयोग झाला असेल, तर नाव युवराजांचं कशाला घ्यायचं? तुम्ही पण जवळ आहात!’

‘काय बोलणं हे?’

‘ऐका! फार वटवट करू नका. संभाजीराजे तुमचे सावत्र चिरंजीव असले, तरी ते थोरले आहेत. बिचारी सई राहिली नाही, म्हणून त्यांची उपेक्षा करण्यात काहीच अर्थ नाही. ती गेली, म्हणून तुम्ही राणी बनलात. ते उपकार स्मरून तरी युवराजांचा द्वेष करू नका!’

सोयराबाईंना नजरेला नजर देता येत नव्हती. त्यांच्या अंगाला कापरा सुटला होता.

‘कुणी तरी अफवा उठवणार, आणि....’

‘बस्स करा! या अफवा कुठून उठतात, ते आम्ही जाणतो. अफवा वाऱ्यावर पिकत नसतात. त्यांचं जन्मस्थान आप्तस्वकीयांत असतं. राणीसाहेब! आमच्या आजाराचा फायदा घेऊन अशा विषवार्ता पसरवणाऱ्यांच्या जिभा छाटून टाकाव्या, असं आम्हांला वाटतं!....’

‘पण माझा यात काय दोष?’

‘दोष तुमचा नाही; आमच्या नशिबाचा आहे. शत्रुगोटातली बित्तंबातमी जिथं आम्ही मिळवतो, तिथं असल्या गोष्टींचा छडा लावणं आम्हांला फारसं अवघड नाही. आता अधिक सहन करण्याची ताकद आमची राहिली नाही. संभाजीराजांना हवं तर जवळ करू नका. पण ते युवराज आहेत, त्यांचा मान मोठा आहे, हे विसरू नका. यापुढं असले खेळ महालात चालू राहिले, तर आम्हांला आपल्या राणीपदाचीही ओळख राहणार नाही.’

‘आमचा एवढा संशय होता, तर मग इथं राहावं तरी कशाला?’ डोळ्याला पदर लावीत सोयराबाई म्हणाल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हे रडणं थांबवा! आम्ही तेच सांगणार होतो. उद्या रायगडी जाण्याची तयारी करा. इथं तुमची मुळीच गरज नाही. जा!’

महालाबाहेर येऊनही बराच वेळ सोयराबाईंच्या अंगाचा कापरा कमी होत नव्हता.

□

१९

राजांच्या प्रकृतीला चांगले बरे वाटू लागले. राजे गडावर हिंडू फिरू लागले. राजांच्या आजारात अनाजी, मोरोपंत, निराजीपंत, दत्ताजीपंत, हरजीराजे महाडीक, हंबीरराव, येसाजी ही जवळची माणसे साताऱ्याला गोळा झाली होती. साऱ्या मोहिमा काही काळ थंडावल्या होत्या. राज्यात राजांच्या आजाराच्या अनेक अफवा पसरत होत्या. राजांनी सर्व गडांना आणि अधिकाऱ्यांना आपल्या खुशालीचे खलिते पाठविले. नव्या मोहिमांचे विचार सुरू झाले. अर्धवट पडलेल्या जंजिऱ्याची मोहीम हाती घेण्याची आज्ञा राजांनी केली. फौजा निरनिराळ्या मोहिमांवर पाठविल्या जाऊ लागल्या. नजरबाजांची वर्दळ गडावर वाढू लागली. राजांना राज्यातल्या वार्ता कळू लागल्या.

एके दिवशी एक स्वार तातडीने गडावर आला. त्याने आणलेली थैली वाचून राजांना आनंद झाला.

सकाळच्या थंडीचा प्रभाव कमी झाला होता. आकाशात सूर्य चढत होता. राजे सदरेत बसले. राजांनी अंगावर शाल पांघरली होती. शेजारी निराजीपंत, मोरोपंत, हंबीरराव, येसाजी ही मंडळी अदबीने उभी होती. राजे संभाजीराजांची वाट पाहत होते. संभाजीराजे आले. त्यांनी राजांचे पाय शिवले. एवढ्या सकाळी सदर का भरावी, आपल्याला का बोलावावे, हे संभाजीराजांच्या ध्यानी येत नव्हते. राजांच्या चेहऱ्यावरील प्रसन्न भाव पाहून संभाजीराजांना धीर आला. न राहवून त्यांनी विचारले,

‘आबासाहेब, आज्ञा बरी झाली?’

‘आज्ञा नव्हे, शंभूराजे, इच्छा! प्रबळ इच्छा! तुम्हांला पाहावंसं वाटलं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजांचे मन आनंदले. राजे युवराजांच्याकडे पाहत होते. त्यांच्याही चेहऱ्यावर स्मित झळकले होते.

‘युवराज, आता तुम्हांला आम्ही एक कामगिरी सांगणार आहो.’

‘जी, आज्ञा!’

‘रघुनाथपंत हणमंते आमच्या भेटीसाठी येत आहेत. ते आज साताऱ्याला येतील. त्यांना सामोरे जाऊन मानानं गडावर घेऊन या.’

हणमंते यांचे नाव ऐकून संभाजीराजे गोंधळात पडले. खुद्द युवराजांनी सामोरे जाऊन स्वागत करावे, अशी ही कोण व्यक्ती? राजांनी युवराजांच्या मनातले भाव ओळखले. ते म्हणाले,

‘युवराज, हे रघुनाथपंत हणमंते तशीच अफलातून असामी आहे. थोरल्या महाराजांच्याकडे नारो त्रिमल हणमंते मुख्य कारभारी होते. त्यांच्या पश्चात त्यांचे पुत्र रघुनाथपंत यांनी कारभारीपद चालविले. थोरल्या महाराजांचा काळ झाल्यानंतर रघुनाथपंत आमचे बंधू एकोजीराजे यांच्याकडेच राहिले. ते आमच्या भेटीसाठी गडावर येत आहेत.’

‘काकामहाराजांनी काही निरोप पाठवलाय्?’

‘तुमचे काकामहाराज आमच्याबद्दल तेवढे प्रेम बाळगून नाहीत, युवराज!’

‘मग?’

‘युवराज, नव्या रक्ताच्या माणसांना जुने सल्लागार नको वाटतात, त्यांची अडचण वाटू लागते. रघुनाथपंतांना एकोजीराजांची नोकरी सोडावी लागली. ते भागानगरला नोकरीसाठी गेले. प्रल्हादपंतांकडून ते आम्हांला कळलं. आपली माणसं अशी परदारी जावीत, हे मनाला रुचेना. तेव्हा आम्ही त्यांना आमच्याकडे बोलावून घेतलं आहे. अशी अनुभवी माणसं वाऱ्यावर सोडून कसं चालेल?’

संभाजीराजे आपल्या स्वारांनिशी गडाखाली उतरले. राजे रघुनाथपंतांना पाहण्यासाठी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

उतावीळ झाले होते. आजवर त्यांची अनेक पत्रे राजांना आली होती. त्या व्यवहारात राजांना रघुनाथपंतांचे जे दर्शन घडले, त्याने राजे आकर्षित झाले होते. आता सर्वांनाच रघुनाथपंतांना पाहण्याची उत्सुकता लागली होती.

सायंकाळी युवराजांच्यासह रघुनाथपंत गडावर येत असल्याची बातमी राजांना आली. राजांनी अंगात दरबारी कपडे चढविले होते. सदरमहालात भेटीची जागा ठरली होती. त्यासाठी सदरमहाल खास शृंगारला होता. सदरमहालात रघुनाथपंत पोहोचल्याची बातमी येताच राजे आपल्या महालातून निघाले. अल्काबांचे पुकार उठू लागले. हाती सुवर्णगुर्झब घेतलेले भालदार आदब बजावीत पुढे चालत होते. राजे संथ पावले टाकीत पुढे जात होते.

राजे सदरेत आले. मुजऱ्यासाठी माना लवल्या. त्या मुजऱ्यांचा सुहास्य वदनाने स्वीकार करून राजे आपल्या खास बैठकीवर विराजमान झाले.

सदरमहालात उभ्या असलेल्या रघुनाथपंतांना राजे पाहत होते.

रघुनाथपंत उतारवयाकडे झुकले होते. तरीही त्यांच्या शरीरावर तेज होते. डोक्यावर गुलबशी रंगाची पगडी, पगडीला मोत्यांच्या झिरमिळ्या, अंगात रेशमी अंगरखा, पायांत दक्षिणी रुंद काठाचे धोतर आणि उजव्या खांद्यावर जरीपल्लवाचे उपरणे हा रघुनाथपंतांचा थाट होता. रघुनाथपंत रंगाने उजळ होते. घाऱ्या डोळ्यांत हास्य सामावले होते, तर रुंद कपाळ व धारधार, सरळ नाक बुद्धिमत्तेचे लक्षण सांगत होते. राजांच्या कल्पनेनुसार रघुनाथपंतांचे चित्र उमटले, याचे राजांना समाधान होते.

रघुनाथपंतांचीही तीक्ष्ण घारी नजर राजांना निरखीत होती. राजांची शोधक नजर रघुनाथपंतांवर खिळली. रघुनाथपंतांना नजरेला नजर देणे कठीण गेले. त्यांची नजर आपोआप खाली वळली.

राजांच्या चेहऱ्यावर स्मित उजळले.

‘रघुनाथपंत, आम्ही तुमची भेट घेण्यास उतावीळ होतो.’

‘हे आमचं भाग्य. सेवकावर सदैव कृपादृष्टी असावी, हीच प्रार्थना.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रघुनाथपंतांनी राजांची कीर्ती ऐकली होती. त्यांच्या राज्याभिषेकाच्या वार्तेने पसरलेली दहशत रघुनाथपंतांनी पाहिली होती. राजांना प्रत्यक्ष पाहून त्यांच्या मनात भरते आले. राजांनी क्षेमकुशल विचारले. रघुनाथपंतांनी नजराणा म्हणून दक्षिणेतल्या अनेक वस्तू, जडजवाहीर राजांच्या पुढे ठेवले. ती निष्ठा पाहून राजे बहुत संतोष पावले. ते म्हणाले,

'रघुनाथपंत, या मौल्यवान गोष्टी आहेत खऱ्या; पण आम्हांला आणखीन एका वस्तूची आवश्यकता आहे.'

'आज्ञा, महाराज!' रघुनाथपंत म्हणाले.

'तुम्ही आमच्या दरबारी कायम असावे, अशी आमची इच्छा आहे.'

'त्यापरतं सुख नाही, आमचा परंपरागत मुजमूचा व्यवसाय. तोच मिळेल, तर....'

'आमच्या मनातलीच गोष्ट तुम्ही सांगितलीत. आमचे मुजुमदार निळो सोनदेव वारल्यामुळं त्यांची जागा तशीच रिकामी आहे. आम्ही आजपासून तुम्हांला मुजुमदार हुद्दा देत आहो.'

राजांनी रघुनाथपंतांना मानवस्त्रे देऊन मुजुमदारी सांगितली. रघुनाथपंडित राजांच्या सेवेत रुजू झाले.

रघुनाथपंडित आले, तशी दक्षिणेची सारी वार्ता राजांना कळू लागली. एकोजीराजे सामान्य लोक जवळ करून त्यांच्या तंत्राने वागू लागले होते. जुन्या अनुभवी सल्ल्याची त्यांना आता गरज उरली नव्हती. शहाजीराजांनी मिळविलेली जहागीर अनागोंदी कारभारात विस्कळीत होत आली होती. रघुनाथपंतांनी हे एकोजीराजांच्या ध्यानी आणून देण्याचा प्रयत्न केला. शिवाजीराजांनी कसा पराक्रम करून राज्य संपादन केले, हे त्यांना सांगितले. पण एकोजीराजांना ते पटले नाही. आपण पातशाही दौलत खातो, त्यावरच कमरबंदी करून पातशाही बुडवावी, हे उचित नाही, असे त्यांना वाटे. रघुनाथपंतांचे सांगणे एकोजीराजांना रुचेना. तेढ वाढू लागली. भर दरबारी रघुनाथपंतांचे अपमान होऊ लागले. त्रस्त होऊन रघुनाथपंतांनी एकोजींची नौकरी सोडण्याचा निर्णय केला.

राजांना ती हकीकत एकून फार वाईट वाटले. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘एकोजीराजांनी असं वागायला नको होतं.’

‘महाराज, मी पुष्कळ सांगून पाहिलं; पण त्याचा परिणाम उलटाच झाला. माझ्यावर इतराजी होण्यापर्यंत मजल गेली. एकोजीराजांच्या पदरी आमची शोभा जतन होणं शक्य दिसेना, तेव्हा ती जागा नाइलाजानं सोडावी लागली.’

‘आणि त्यांनी तुम्हांला स्वखुशीनं जाऊ दिलं?’ राजे उद्गारले.

‘काय सांगावं, महाराज?’ रघुनाथपंतांचा आवाज कठोर बनला. ‘निरोप घ्यायला गेलो, तर आम्हांला एकोजीराजे म्हणाले, ‘इथं केला, असला कारभार कुठं करू नका. तो सहन करून घेणारी माणसं भेटणार नाहीत.’ ’

‘पंत!’

‘महाराज, आयुष्यभर केलेल्या सेवेचं हे फळ! मलाही भान राहिलं नाही. मी एकोजीराजांना सांगून टाकलं, ‘आम्ही सेवक उगेच नाही. दुसरे स्थळी गेलो, तरी अर्धासनी तुम्हांला बसवू; अगर मनात आणलं, तर आम्ही तुमच्या अर्धासनी येऊन बसू.’ ’

राजे खिन्नपणे हसले. ते म्हणाले,

‘रघुनाथपंत, स्वाभिमान जरूर असावा; पण तो स्वकीयांच्या नाशाला केव्हाही कारणीभूत न व्हावा. स्वकीयांच्या बाबतीत क्षमा हीच सदैव आठवावी.’

‘संतापाच्या भरात बोलून गेलो, तरी ज्या अन्नावर आम्ही पोसलो, ते कसं विसरू?’

‘आमची तुमच्याकडून हीच अपेक्षा आहे. एकोजीराजांना आम्ही पत्रं लिहिली; पण ते आम्हांला परके मानतात. त्यांना एकदा भेटावं, त्यांच्याशी बोलावं, असं वाटतं. त्यांनी मानलं नाही, तरी आम्ही मोठे; आम्हांला कर्तव्य विसरून कसं चालेल?’

‘मग अडचण कसली ?’

‘अडचण नाही. संधी यायला हवी.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ती आपणहून आली आहे. प्रल्हाद निराजींसारखी आपली चतुर माणसं कुतुबशाहीत आहेत. मादण्णा-आक्कण्णा हे कुतुबशाहीचे खरे प्रधान आहेत. त्यांच्या मनात आपल्याविषयी आदर आहे. खुद्द कुतुबशहा आपल्याविषयी भीती बाळगून आहे. मादण्णा, आक्कण्णा यांनी कुतुबशहाच्या मनात आपल्याविषयीचा स्नेह निर्माण केला आहे. आपण मनात आणाल, तर हा स्नेह पक्का करण्यास अडचण येणार नाही.’

‘तुमच्याही मनात ही गोष्ट आहे, असं दिसतं.’

रघुनाथपंतांचे डोळे पाणावले, आवाज घायाळ बनला. आपले डोळे टिपीत ते म्हणाले,

‘महाराज, इथं आल्यापासून माझा जीव गुदमरतो आहे. जे राज्य आपण संपादन केलंत, त्याला तोड नाही! आज थोरले महाराज असते, तर त्यांना धन्य वाटलं असतं. थोरल्या महाराज-साहेबांचं स्वप्न तुम्ही साकार केलंत! पण एक स्वप्न तसंच अधुरं राहिलंय्.’

‘कोणतं?’

‘जोवर उत्तरेत मोगल आहे, तोवर ही राज्यं सुरक्षित नाहीत. त्यासाठी दक्षिणेतल्या राज्यांची एकजूट होणं आवश्यक आहे. हे थोरल्या महाराजांच्या मनात सदैव होतं. आदिलशाहीला ते आता जाणवतंय्. कुतुबशाही याचा आनंदानं स्वीकार करील. एकोजीराजे तर आपले लहान बंधू. ही एकजूट झाली, तर आपलंही स्वप्न साकार होऊन जायला फारसा वेळ लागणार नाही.’

‘ कसलं स्वप्न?’

‘ एक ना एक दिवस दिल्लीतख्ताची भीती नाहीशी करण्याचं, आमच्या परमपवित्र काशी-विश्वेश्वराची स्थापना करण्याचं.’

‘कुणी सांगितलं तुम्हांला?’

‘महाराज, आम्ही दक्षिणेत होतो, तरी आमचं सर्व लक्ष इकडे लागून होतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे क्षणभर भावनाविवश झाले. ते बोलून गेले,

‘जगदंबेची इच्छा! तिच्या आशीर्वादानं सारे मनोरथ सिद्धीस जातील.’

राजांनी पंतांचा आणि त्यांच्या बरोबर आलेले त्यांचे बंधू जनार्दन नारायण व इतर कुटुंबीय यांचा परामर्श घेतला. त्या सर्वांची व्यवस्था लावून दिली.

रघुनाथपंतांच्या बोलांनी राजसदर रंगत होती. राजांच्या डोळ्यांसमोर स्वप्न तरळत होतं......

□

२०

सकाळी राजे सदरेत आले, तेव्हा सदरेवर रघुनाथपंत, अनाजी, येसाजी, हंबीरराव ही मंडळी हजर होती. राजे आसनावर बसले. राजांनी रघुनाथपंतांना विचारले,

‘पंत, आपली सर्व सोय लागली ना?’

‘जी, महाराज.’

‘काही अडचण?’

पंत क्षणभर विचारात पडले. कसे सांगावे, हे त्यांना कळेना. शेवटी धीर करून ते म्हणाले,

‘महाराज, बोलतो, त्याची क्षमा असावी. पण माझी स्वत:ची पंचवीस घोड्यांची पागा सरकारी पागेत जमा करण्याची आपण आज्ञा दिलीत?’

‘जमा झाली?’

‘जी.’ काहीसे रुष्ट होऊन रघुनाथपंत म्हणाले. ‘एवढंच नव्हे, तर जनावरांना सरकारी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पागेचे डागही देण्यात आले.

‘पंत, तुम्हांला माहीत नाही; पण एक कायदा आम्ही अत्यंत कडकपणे आमच्या राज्यात पाळतो. आमच्या राज्यात कुणाच्याही मालकीची स्वतंत्र पागा नाही. पागा सोडाच, पण कुणाच्या मालकीचं जनावर नाही. सारी घोडी सरकारी पागेची. खुद्द आमच्या सेनापतींनाही स्वत:चं घोडं नाही.’

‘कारण कळेल?’ रघुनाथपंतांनी विचारले.

‘का नाही? तुम्ही येताना आपल्या सरंजामाबरोबर जशी तुमची पागा आणलीत, तसेच दोन हत्तीही आणलेत. तुमची पागा सरकारात जमा झाली; पण तुमचे हत्ती जमा झाले नाहीत. याचं कारण घोडा ही राज्याची शक्ती, असं आम्ही मानतो. पंत, लहानपणापासून आम्ही एक श्लोक सदैव म्हणत आलो-

‘यस्याश्वा तस्य राज्यं यस्याश्वा तस्य मेदिनी ।
यस्याश्वा तस्य सौख्यं यस्याश्वा तस्य साम्राज्यम् ।।’

‘याचमुळं पागेचा नियम आम्ही अत्यंत कडकपणे पाळतो. पंत, तुम्ही चिंतातूर होऊ नका, किंवा मनात शंका बाळगू नका ! सरकारात जमा केलेल्या घोड्यांची, तुम्हांस मान्य होईल, ती किंमत आम्ही चुकती करू. तुमच्या पागेची माणसं आमच्या घोडदळात सामील होतील.’

राजांचे बोलणे ऐकून रघुनाथपंतांचे समाधान झाले. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. प्रसन्नपणे त्यांनी कबूल केले,

‘हा दूरदर्शीपणा मला कुठंच दिसला नाही.’

‘मागं पाहिलं, की पुढचं दिसतं. राजांच्या पदरचे सरदार पागा बाळगतात, मातब्बर होतात; सांगावयास गेलं, की प्रसंगी भांडावयास उठतात, प्रसंगी शत्रूसही मिळतात. हा आजवरचा अनुभव जमेला धरून आम्ही हे पाऊल टाकलं. आम्ही....’

राजे बोलता-बोलता थांबले. त्यांचे लक्ष दरवाजाकडे गेले. दत्ताजीपंत सदरेत येत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मुजऱ्याचा स्वीकार करून राजांनी विचारले,

‘दत्ताजीपंत, कुठं होता?’

‘एक तंटा उपस्थित झाला आहे, महाराज.’

‘कसला तंटा?’

‘पालीचं पाटिलकीचं वतन काळभोर चालवीत आहेत. त्या वतनावर हक्क सांगण्यासाठी खराडे पुढं आले आहेत. दोन्ही माणसं आपलीच.’

‘मग तंटा मिटला?’

‘जी, नाही. हा तंटा आपल्या पायांशीच सोडवला जावा, अशी दोघांचीही इच्छा आहे. त्यासाठी मुजऱ्याला पालीचे काळभोर आणि खराडे आले आहेत.’

राजांनी दोघांना सदरेवर बोलावून घेतले. दोघेही आपल्या वतनी हक्काला पक्के होते. राजांनीच तो तंटा मिटवावा, असा दोघांचाही आग्रह होता. राजांनी दोघांचेही म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. नंतर ते म्हणाले,

‘काळभोर, खराडे, तुम्ही दोघे आमचेच. आम्ही जरूर पालीला येऊ. गोतसभा बोलावून गोतमुखानं न्याय करू. ते तुम्हांला चालेल का ?’

दोघांनीही राजांच्या निर्णयाला मान्यता दिली.

‘ठीक आहे. दत्ताजीपंत, चांगला दिवस पाहून पालीला गोतसभा बोलवा. आम्ही जातीनिशी त्या सभेला हजर राहू, या तंट्याचा निर्णय करू.’

काळभोर, खराडे मुजरे करून निघून गेले. रघुनाथपंतांनी विचारले,

‘महाराज, आपण खुद्द निवाड्याला हजर राहणार, तर गोतसभा कशाला बोलावली?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'पंत, वतन गावच्या लोकांच्या सहकार्यानं चालतं. ते नुसतं आमच्या निर्णयावर चालत नाही. गोतसभा म्हटली, की तीत गावचे पाटील,कुलकर्णी यांसारखे वतनदार येतात; त्याखेरीज गावचे बारा बलुतेदार येतात; महाजन म्हणजे व्यापारी, जमिनदार यांसारखे प्रतिष्ठित असतात. त्यांनी केलेला निर्णय बंधनकारक असतो. तो निर्णय पाळला जातो, की नाही, हे गोताला पाहावं लागतं. साऱ्याच गोष्टी राजाज्ञेनं होत नसतात, पंत!'

काळभोर-खराडे निवाड्यासाठी राजे पालीला गेले. गोतमुखाच्या न्यायाने खराडे खोटे ठरले. खराडे हट्टाला पेटून त्यांनी दिव्य करण्याची परवानगी मागितली. राजांनी त्यालाही मान्यता दिली. खराड्यांनी देवालयात दिव्य केले; पण त्यातही त्यांना अपयश आले. काळभोर खरे ठरले.

□

२१

पालीचा मजहर संपवून राजे साताऱ्याच्या किल्ल्यावर आले. राजांच्या आजारामुळे बऱ्याच फौजा अद्याप छावणीवरच होत्या. राजांनी नव्या मोहिमा उघडल्या. संभाजीराजांना दत्ताजीपंतांसह विजापूर मुलुखात पाठवले. मोरोपंतांनी रामनगरच्या बाजूला पारनेर, पिंडवोल अशा डोंगरांवर नवे किल्ले बांधण्याचे काम चालू केले होते. त्या किल्ल्यांमुळे सुरतेला कायमचा शह बसणार होता. किल्ले पुरे झाल्याची बातमी कळताच राजांनी मोरोपंतांना रामनगर भागात पाठविले.

राजांच्या कानांवर विजापूरच्या बातम्या येत होत्या. विजापूरचा नवा वजीर बेहलोलखान याचा पठाणपक्ष व जुना वजीर खवासखान याचा दक्षिणपक्ष यांमध्ये जोरात लाथाळी सुरू झाली होती. राजे जागरूकतेने विजापूरच्या घटना पाहत होते. प्रसंगी हालचाल करण्यास सोपे जावे, म्हणून राजांनी पन्हाळ्यास मुक्काम हलविला.

सकाळच्या वेळी स्नान करून सोमेश्वरदर्शन घेऊन राजे वाड्यात चालत होते. संगती येसाजी, चिटणीस, हंबीरराव ही मंडळी होती. वाड्याच्या दरवाजाशी दोन संन्यासी भिक्षेकरिता उभे होते. राजांनी त्यांना वंदन केले. त्यांची विचारपूस करून राजांनी वाड्यात प्रवेश केला. राजांना समर्थांची आठवण झाली. त्यांनी चिटणीसांना विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘समर्थांच काही क्षेम कळलं?’

‘सध्या समर्थ शिवथरघळीतच आहेत. परवाच दिवाकर गोसाव्यांचं पत्र आलं होतं.’

‘चाफळ देवस्थानची देणगी रवाना झालीय् ना?’

‘जी. पण....’

‘पण काय?’

‘समर्थांनी निरोप पाठविला आहे.’

‘आणखीन काही हवं असेल, तर आमच्या आज्ञेची वाट न पाहता तातडीनं सामग्री पाठवीत चला. समर्थांची आज्ञा ही आमचीच आज्ञा, असं समजत चला.’

‘समर्थांनी काही मागितलं नाही. उलट, त्यांनी याउपर द्रव्य अथवा धान्य न पाठविण्याविषयी लिहिलं आहे.’

राजे विचारात पडले. समर्थांनी असा निरोप का पाठविला? आपल्याकडून काही कसूर झाली का? राजांनी चिटणिसांना आज्ञा केली,

‘चाफळहून दिवाकर गोसाव्यांना बोलावून घ्या. आम्हांला त्यांना भेटायचं आहे.’

दुसऱ्या दिवशी चाफळच्या दिशेने स्वार रवाना झाला.

त्यानंतर आठ दिवसांत दिवाकर गोसावी गडावर आल्याची बातमी राजांना आली. राजांनी वाड्याच्या दरवाजाशी जाऊन दिवाकर गोसाव्यांचे स्वागत केले. मोठ्या आदराने राजांनी दिवाकर गोसाव्यांना आपल्या महाली नेले. दिवाकर मृगाजिनावर बसले होते. राजांनी समर्थांचे क्षेमकुशल विचारले; आणि नंतर समर्थांनी चाफळदेणगीबाबत असा निरोप का पाठविला, याचे कारण पुसले. दिवाकर म्हणाले,

‘राजे, समर्थांनी तो निरोप पाठवला, म्हणून मनात कुशंका आणू नका. त्यांचे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपणांवर उदंड प्रेम आहे. खरे पाहता, श्रींची निस्पृःह वृत्ती आहे. आपल्या भक्तीस्तव वैभव घेतात.’

ते ऐकून राजांचे मन उचंबळून आले. ते दिवाकरांना म्हणाले,

‘समर्थ आमची काळजी घेतात, आमचे रक्षण करतात, आम्ही आजारी पडलो, ता आमच्यासाठी मध्यरात्री प्रसाद पाठवतात.पण आम्ही मात्र त्यांच्यासाठी काहीच करीत नाही, काही करण्याची आमची पात्रताही नाही. आमच्या सत्तेला, आमच्या राज्याला काही अर्थ नाही.’

‘राजे, असे म्हणू नका. आम्ही समर्थांच्या सहवासात असतो. आपली आठवण झाली नाही,असा दिवस जात नाही.’

‘तेही आमचे भाग्यच! दिवाकर, एक विनंती समर्थचरणी रुजू करा. आम्ही मोकळे असतो, तर स्वत: येऊन सांगितलं असतं. समर्थांनी आता शिवथरघळीत राहावं, असं वाटत नाही. आता या वयात ती हवा त्यांना सोसवत नाही. त्यांनी महिपतगड किंवा परळी इथं वास्तव्य करावं, असं आम्हांला वाटतं.’

दिवाकर हसले.

‘राजे, आमच्यादेखील मनात तोच विचार येतो. आम्ही अनेक वेळा सांगितलं; पण त्यांनी ते मानलं नाही. स्वत:च्या प्रकृतीच्या कारणास्तव समर्थ मानतील, असं वाटत नाही.’

राजे आनंदून म्हणाले,

‘दिवाकर, आमची विनंती म्हणून समर्थांना सांगा. त्यांना सांगा... हा मुलूख आम्ही जिंकला; पण इथली मनं अद्याप आम्हांला पारखी आहेत. राज्यप्रस्थापनेचं उद्दिष्ट लोकांपर्यंत जायला हवं. समर्थ जर इकडे वास्तव्य करतील, तर ते सहज शक्य होईल. समर्थांचं दर्शन घेणंही आम्हांला सोयीचं होईल.’

दिवाकर म्हणाले,‘राजे, समर्थांना ही विनंती मान्य करावी लागेल.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्ही आजच महिपतगड आणि परळी येथील किल्लेदारांना हुकूम पाठवितो. समर्थांना जे स्थान आवडेल, तिथं ते राहतील.’

दिवाकर गोसावी गेले, आणि राजांचे अस्वस्थ मन शांत झाले. राजांनी नव्या हुरुपाने पन्हाळ्याच्या मजबुतीकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. गडाचे तट, पहारे यांची देखरेख राजे स्वत: जातीने करीत होते. गडाचे गंगा, यमुना, सरस्वती अंबारखाने भात, वरी, नागली वगैरे धान्यांनी भरले होते. राजे गडावर येऊन महिना झाला नाही, तोच राजांच्या कानांवर एक विजयवार्ता पडली. राजांच्या फौजेने अथणीची मातब्बर पेठ लुटली होती. तीत लक्षावधी होनांची लूट राजांना मिळाली . त्या लुटीतून इंग्रजही वाचले नाहीत. हजारो होन किमतीचे इंग्रजांचे कापड मराठ्यांनी लुटले.सातारच्या आजारात शिवाजी मेला, या बातमीवर विश्वास ठेवणाऱ्या इंग्रजांना शिवाजीराजांच्या हयातीची चोख पावती मिळाली!

राजे उन्हाळ्याअखेरपर्यंत पन्हाळ्यावरच मुक्काम ठेवून होते. पन्हाळ्याच्या हवेने राजांची प्रकृती पूर्ववत सुधारली. रामनगर भागात गेलेले मोरोपंत पिंडवोल, पावना हा भाग काबीज करून, बंदोबस्त करून लुटीसह रायगडला गेल्याची बातमी राजांना आली. विजापूर मुलुखात दत्ताजीपंत युवराजांच्यासह रायगडच्या वाटेला लागले होते. राजांनीही आपला तळ हलविण्याचे ठरविले.

विजापूरच्या दरबारात चाललेल्या यादवीकडे जसे राजांचे लक्ष होते,तसेच मोगलांचेही. मोगल सरदार बहादुरखानाने या संधीचा फायदा घेण्याचे ठरविले. अंतर्गत यादवीने दुबळी बनलेली आदिलशाही काबीज करून औरंगजेबाला खूश करण्याचे ठरविले; आणि सैन्य घेऊन तो विजापुरावर चालून गेला. बहादुरखान आपल्यावर चालून येतो आहे, हे कळताच खवासखान पक्षाकडून झालेल्या पराभवाने आधीच असहाय बनलेल्या बेहलोलखानाने राजांच्याकडे मदतीची याचना केली. दुहीमुळे एक दक्षिणी राज्य पराभूत होणार, आणि उत्तरेची मोगलाई दक्षिणेत पाय रोवणार, हे राजांच्या ध्यानी आले. त्यांनी आपली फौज तातडीने बेहलोलखानाच्या मदतीला पाठविली. हलगी येथे राजांच्या मदतीने बेहलोलखानाने बहादुरखानाचा पराभव केला. विजापूरचे एक गंडांतर टळले. युद्धाचा रंग अशा विलक्षण तऱ्हेने पालटलेला पाहून, राजांना समाधान वाटले; आणि निश्चिंत होऊन राजांनी रायगडी जाण्याचे ठरविले.

पन्हाळामुक्काम हलविण्यास सुरुवात झाली. नजरबाजांची, अश्वदळाची पथके पुढे सरली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गड सोडण्याच्या दिवशी राजांनी सोमेश्वराला अभिषेक करविला. अभिषेक आटोपून राजे सज्जाकोठीवर आले. तेथे रघुनाथपंत, बाळाजी आवजी, येसाजी, हंबीरराव सचिंत उभे होते. राजांनी विचारले,

‘हंबीरराव, काय बातमी?’

‘बातमी चांगली नाही, महाराज!’

‘काय झालं?’

‘आपली फौज अथणीहून येत असता फौजेनं बेळगावच्या किल्ल्यास वेढा घातला. किल्लेदार अनुखान नावाचा विजापुरी सरदार होता. त्या सरदारानं तहाची वाटाघाट सुरू केली. चाळीस हजार होन घेऊन किल्ला देण्याचं त्यानं वचन दिलं. कबूल केलेली अर्धी रक्कम त्याला दिली. आपल्यावर विजापूरचा ठपका येऊ नये, म्हणून त्यानं युद्धाचा देखावा करण्याचं ठरविलं. त्याच्या सूचनेनुसार ठरल्या वेळी किल्याचे दार उघडले गेले. विश्वासानं आपली फौज किल्ल्यात घुसली. आणि....’

‘आणि काय झालं?’

‘अनुखान वचनाला जागला नाही. आपल्या बेसावध फौजेवर त्यानं चौफेर हल्ला केला. आपली पाचशे माणसं त्यात गमावली, बेळगावचा वेढा उठविणं भाग पडलं.’

क्षणभर राजे स्तब्ध होते. दुसऱ्याच क्षणी राजे मोठ्याने हसू लागले. राजे असे फार क्वचित हसत. सारे राजांच्याकडे पाहत होते. राजे म्हणाले,

‘सेनापती! बघता काय? केव्हा तरी शेराला सव्वा शेर भेटतोच! अनुखानाच्या रूपानं तो भेटला, एवढंच. युद्धातल्या तहात गाफील राहून चालत नाही, हा धडा शिकायला मिळाला.’

राजा परत एकदम स्तब्ध झाले. एक व्यथा चेहऱ्यावर चमकून गेली. आसनाकडे जात असता ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पाचशे गमावले! फार महागात ही अक्कल पडली. जगदंबे!’

□

२२

महादरवाजावरची नौबत झडली; आणि राजे रायगडी आल्याचे साऱ्या गडाला समजले. राजांची पालखी होळीचौकात आली. राजे पायउतार झाले. मोरोपंत, अनाजी राजांच्या स्वागताला हजर होते. राजांची नजर सर्वांवरून फिरली; पण युवराज संभाजी अथवा राजाराम त्यांच्या नजरेत आले नाहीत.

‘अनाजी, युवराज कोठे आहेत? गडावर आहेत ना?’

‘जी. आपल्या महाली असतील.’

राजांनी शिरकाईचे दर्शन घेतले, आणि सर्वांसह बोलत ते नगारखान्यापाशी आले. नगारखान्यावर भगवा ध्वज फडफडत होता. राजांनी त्याला वंदन केले. नगारखान्याच्या भव्य कमानीत पाऊल ठेवताच नगारखान्याची नौबत निनादली. राजांच्या बरोबर रघुनाथपंत चालत होते. गडाचे वैभव पाहून ते थक्क झाले. सर्व मंडळींना सदरेवर सोडून, राजे आपल्या महाली आले. राजांच्या महालात धुपाचा वास दरवळत होता.

राजे महालात आले, तेव्हा पुतळाबाई महालात वाट पाहत होत्या. राजांनी आपला टोप पुतळाबाईंच्या हाती दिला. राजांनी दुशेला, तलवार उतरली. तीही पुतळाबाईंच्या हाती दिली. राजे बैठकीवर बसले.

‘तब्येत कशी आहे?’

‘छान आहे. दैवयोगानं आम्ही बचावलो.’

‘शंभूबाळांनी सांगितलं, तेव्हा कळलं.’

‘का? त्याआधी आमचं कुशल आम्ही गडावर कळविलं होतं. तुम्हांला सांगितलं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नाही?'

पुतळाबाईंनी नकारार्थी मान हलविली. राजांनी विचारले,

'आणि थोरल्या राणीसाहेब कुठं आहेत?'

'महाली असतील.'

'आणि राजाराम?'

'तेही तिथंच असतील.'

'युवराज?'

'ते आपल्या महाली असावेत.'

'असावेत?' राजांच्याकडे पाहण्याचा धीर पुतळाबाईंना झाला नाही.

राजांनी परत विचारले,

'थोरल्या राणीसाहेबांची प्रकृती ठीक आहे ना?'

'असावी; पण मला माहीत नाही.'

'पुतळा! असावी, असतील, ही भाषा कुठली? एका स्थळी राहून तुम्हांला युवराजांचा पत्ता नाही, राणीसाहेबांची बातमी नाही!'

'त्या बोलत नाहीत.'

'छान! सहा-सात महिन्यांनी आम्ही गडावर येतो. आमच्या सामोरे युवराज नाहीत. साऱ्यांचा बहिष्कार दिसतो.'

पुतळाबाई काही बोलल्या नाहीत. राजांची नजर दरवाजाशी गेली. येसूबाई तेथे उभ्या
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होत्या. राजांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता आली. ते आनंदाने म्हणाले,

‘येसू, आत ये ना! का तूही आमच्यावर रागावलीस?’

येसूबाई आत आल्या. त्यांनी राजांना त्रिवार नमस्कार केला. येसूबाई उठल्या. त्यांनी डोळ्यांना पदर लावताच राजे घाबरे झाले. येसूच्या पाठीवर हात ठेवीत त्यांनी विचारले,

‘येसू, काय झालं, बाळ?’

येसूबाईंनी मान वर केली. त्या म्हणाल्या,

‘आबासाहेब, आपल्याला पाहिलं, आणि रडू आलं.’

राजे हसत म्हणाले, ‘छान! आम्हांला पाहून लोक भितात, क्वचित आनंदित होतात. पण आम्हांला पाहताच रडू येणारी तूच आहेस! ...राणीसाहेब, आम्ही आजारी होतो ना, तेव्हा अनेक वेळा ही पोर स्वप्नात यायची.’

‘हो!’ येसूबाई म्हणाल्या. ‘एवढे आजारी पडलात, पण आम्हांला बोलावलं नाहीत!’

‘आम्ही आजारी! आम्ही कसं बोलावणार? तुम्ही यायचं होतंत!’ राजे बोलून गेले.

पुतळाबाईंनी चमकून राजांच्याकडे पहिलं. पुतळाबाईंच्या चेहऱ्यावरील वेदना पाहताच राजे गडबडीने म्हणाले,

‘आम्ही थट्टा केली. आता मात्र वाटतं की, आजारात तुम्हां सर्वांना बोलवून घेतलं असतं, तर फार बरं झालं असतं!... चला. आजचा एकंदर दिवस भारी कठीण दिसतो. आम्ही सातमहालाकडे जाणार आहो. तुम्ही येणार?’

दोघींनीही माना खाली केल्या. राजांनी नि:श्वास टाकला. ते महालाबाहेर गेले.

राजे सातमहालात आले. राजांनी सोयराबाईंच्या महाली प्रवेश केला. महालाच्या प्रथम द्वारीच राजाराम उभे होते. राजाराम पुढे झाले. त्यांनी राजांचे पाय शिवले. राजारामांना

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जवळ घेत राजांनी विचारले,

‘बाळराजे, आम्ही गडावर आलो, आणि तुम्ही सामोरे आला नाही?’

राजाराम क्षणभर बिचकले. त्यांनी एकदा मागे वळून महालात पाहिले. खालच्या मानेने ते म्हणाले,

‘आबासाहेब, आपण आल्याचं आम्हांला कळलं नाही.’

राजांनी राजारामांना उचलून घेतले. हसत ते म्हणाले,

‘हे मात्र खोटं! आम्ही गडावर चूपचाप यायला का तुमचे दादामहाराज आहोत? आम्ही यायचे झालो, तर चार नौबती झडतात, साऱ्या गडाला कळतं... बाळराजे, इकडे पाहा!’

राजारामांनी राजांच्या नजरेला नजर दिली.

‘बाळराजे, खोटं कधी बोलत जाऊ नका; मग कोणीही सांगो. खोटेपणा जीवनात कधीही उपयोगी पडत नाही, हे लक्षात ठेवा.’

राजारामांसह राजे आत गेले. महालात सोयराबाई उभ्या होत्या. राजारामांना खाली सोडीत राजे म्हणाले,

‘आम्ही आलो, पण तुमचं दर्शन घडलं नाही. त्यामुळं आम्हांला इकडं यावं लागलं.’

‘आमचं नशीब मोठं!’

‘निदान बाळराजांना तरी पाठवायचं होतंत.’

‘त्यांच्या दर्शनानं आणखीन कोणते शकुन घडले असते, कोण सांगणार?’

‘काय बोलता हे?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘त्याखेरीज का त्यांना दरवाजे बंद झाले?’

‘कुणाचे?’

‘शंभूराजांनी बाळराजांना महालात यायला मनाई केली आहे.’

‘होय, बाळराजे?’

राजाराम म्हणाले,‘होय, आबासाहेब! दादामहाराजांनी आम्हांला ‘महालात येऊ नका’ म्हणून सांगितलं.’

राजे व्यथित झाले. स्वत:ला सावरीत ते राजारामांना म्हणाले,

‘बाळराजे, आजारातून उठल्यापासून शोष पडतो. जरा पाणी आणता?’

राजाराम आत धावले. राजे महाली उभे होते. पण सोयराबाईंनी त्यांना ‘बसा’ म्हटले नाही, की त्या काही बोलल्या नाहीत. राजांनाही काय बोलावे, हे सुचत नव्हते. राजाराम महालात आले. पाठोपाठ दासी चांदीचा तांब्या, पेला घेऊन आली. तिने पाणी ओतून दिले. राजारामांनी तो पेला हाती घेतला. राजाराम राजांच्याकडे जात होते. राजांनी पेला हाती घेतला; आणि सोयराबाई एकदम म्हणाल्या,

‘पाणी न घ्यावं!’

‘कारण?’ राजांचा हात एकदम थबकला.

‘कुणास माहीत, पाणी कसलं असेल, ते?’

राजांची मुद्रा क्षणात बदलली. आपला क्रोध आवरीत राजे म्हणाले,

‘राणीसाहेब! जबान अदबीनं वापरीत चला. याउप्पर आम्ही तुमच्या महाली येणार नाही. त्याला जगदंब साक्ष आहे. आम्ही येतो!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या हातचा पेला गळून पडला. आपल्या बोलण्याचा एवढा भयंकर परिणाम होईल, याची कल्पना नसलेल्या सोयराबाई जागच्या जागी खिळून राहिल्या. राजे निघून गेले. घाबरलेले राजाराम सोयराबाईंना बिलगले. त्यांनी हाक मारली,

'आईसाहेब!'

त्या हाकेने सोयराबाई भानावर आल्या. राजारामांना उराशी कवटाळून त्या रडू लागल्या.

□

२३

राजे महाली आले, तेव्हा संभाजीराजे महालात उभे होते. त्यांनी पुढे होऊन राजांचे पाय शिवले. राजांनी विचारले,

'युवराज, कुठं होता?'

'महाली.'

'आम्ही आल्याची खबर मिळाली नाही?'

'जी.'

'मग?'

'सर्व भेटल्यावर यावं, म्हणून....'

'अस्सं! मोहीम कशी झाली?'

'चांगली झाली. मिळालेल्या लुटीची जमा झालेली आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ते आम्ही विचारलं नाही. सदरेवर जाता, की नाही?’

‘जी, अलीकडे गेलो नाही.’

‘कारण?’

‘तिथं कोणी आम्हांला विचारीत नाही. आमचं मन तिथं रमत नाही.’

‘युवराज! मन रमविण्यासाठी राज्यकारभार करायचा नसतो. एवढ्या कष्टानं जे राज्य उभं केलं, ते मन रमविण्यासाठी नव्हे... राजारामांना तुम्ही महाली येण्याची बंदी घातलीत?’

संभाजीराजांनी राजांच्याकडे पाहिले. ते शांतपणे म्हणाले,

‘जी.’

‘काय गुन्हा घडला बाळराजांच्या हातून?’

‘आबासाहेब, खरं सांगायचं झालं, तर.....’

‘आम्हांला खरंच ऐकायचं आहे.’

‘बाळराजे आमच्या महाली आले, तर त्यांना शिक्षा भोगावी लागते. ते आमच्या ध्यानी आलं, तेव्हाच आम्ही त्यांना मनाई केली.’

राजांनी संभाजीराजांच्याकडे पाहिले. संभाजीराजांच्या डोळ्यांत पाणी गोळा झाले होते. त्यांच्या पाठीवर हात ठेवीत राजे म्हणाले,

‘शंभूबाळ, राजकारण भावनेवर चालत नसतं; त्याला बुद्धीचं बळ असावं लागतं. ...चला. सदरेत सारी खोळंबली असतील.’

संभाजीराजांच्यासह राजे सदरेत आले. हवेत खूप उष्मा होता. सदरेवर अनाजी,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मोरोपंत, निराजी, हंबीरराव, आनंदराव, रघुनाथपंत हजर होते. राजांनी अनाजींना क्षेमकुशल विचारले, रामनगरच्या विजयाबद्दल मोरोपंतांचे कौतुक केले. बघता-बघता राजे पूर्ववत मोकळेपणी बोलू लागले.

'मोरोपंत, पावसाळा संपल्यानंतर आमचे खूप बेत आहेत. ते पार पाडायचे झाले, तर त्याआधी इथली व्यवस्था पुरी व्हायला हवी. भागानगरमार्फत आम्ही विजापूरकरांशी सलोखा करण्याचा प्रयत्न करीत आहो. मोगलांशी तसाच तह करण्याची आमची इच्छा आहे.'

'तह करण्याचं कारण काय?' अनाजींनी विचारले.

'आम्ही सांगितलं ना? पावसाळ्यानंतर काही काल आमच्या राज्यात स्वस्थता हवी आहे... निराजीपंत, तुम्ही मोगलांच्या बहादूरखानाकडे जा. विजापूरला आम्ही मदत केल्यामुळं तो थोडा संतापला असेल. पण तो लाचखाऊ आहे. पैशानं त्याला वश करा, खंडणी आणि मोगलाईची चाकरी मान्य करा. औरंगजेब काबूल-कंदाहारच्या बंडाव्यात गुंतला आहे. तो येऊन आमचा तह मान्य करीपर्यंत पुष्कळ वेळ मिळेल. ...मोरोपंत, उरलेलं काम तुम्ही पार पाडा. आमचा तिसरा शत्रू सिद्दी. तो मात्र स्वस्थ बसत नाही. आम्ही आजारी असता त्यानं आमच्या मुलुखाला त्रास दिला, वेंगुर्ल्यासारखी बंदरं जाळली. त्याची गय करून चालणार नाही. हवी तेवढी कुमक घेऊन तुम्ही सिद्दीचा पराभव करा.'

'जी.' मोरोपंत म्हणाले.

राजांनी मोरोपंतांना मोहिमेचे विडे दिले. सर्व वाटाघाटी ठरल्या. अष्टप्रधानांनी मान्यता दिली. साहेबसदर राजे म्हणाले,

'रघुनाथपंत, घरी काय किंवा बाहेर काय, आम्हांला सदैव रणांगणाचाच विचार करावा लागतो! ...आम्ही जगदीश्वराच्या दर्शनाला जाणार आहो. येणार?'

'जी.'

'पावसाची चिन्हं दिसतात, तेव्हा...' अनाजी म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अनाजी, वादळवारा तर आमच्या पाचवीला पुजला! पाहा ना, आम्ही गडावर आलो, पण क्षणाची उसंत नाही. चला. ...शंभूराजे, तुम्ही येणार?’

‘जी. मी...’

‘समजलं. ...रघुनाथपंत, अनाजी, चला.’

राजे नगारखान्याबाहेर आले. पूर्वेला भवानीटोकाकडे काळ्याभोर ढगांनी फळी धरली होती. जोराचा वारा वाहत होता. राजे पेठेतून जात होते. व्यापारी मुजरे करीत होते. राजांनी बामणवाडा ओलांडला. जगदीश्वराच्या टेकडीवर राजे आले. समोर काळ्या दगडांत बांधलेले मंदिर दिसत होते. देवालयाचा सुवर्णकळस उठून दिसत होता. मंदिरात जाऊन राजांनी देवदर्शन घेतले. दर्शन आटोपून राजे पूर्वेच्या दरवाजात आले. समोर दूरवर पागेची इमारत दिसत होती. भवानीटोक नजरेस येत होते. रघुनाथपंत म्हणाले,

‘गड मोठा विशाल आहे.’

‘देवाचं देणं विशालच असतं, पंत!’

समोर गोळा होणाऱ्या पावसाकडे राजे पाहत होते. एक काळाभोर मेघ आकाशातून पुढे सरकत होता. हवेत खूप उकाडा होता. वारा थांबला होता. क्षणभर सारे आसमंत स्थिर झाल्याचा भास झाला. वीज लक्खन चमकली; आणि पाठोपाठ ढगांची नौबत झडली.

‘पाऊस आला!’ अनाजी म्हणाले.

‘बरं झालं, देवळात आल्यावर पाऊस आला.’ रघुनाथपंत म्हणाले.

पाऊस कोसळत होता. विजा कडाडत होत्या. सेवकांनी ओवरीवर बैठक घातली. राजे सर्वांसह बैठकीवर बसले. देवालयाच्या चारी बाजूंच्या ओवऱ्यांचे पाणी आतल्या चौकाच्या फरशीवर पडत होते. त्याचा अखंड नाद उठत होता. आकाशात बदललेल्या वाऱ्यांवर ढगांची उलथापालथ होत होती. पावसाचा वेग वाढत होता.

हळू हळू पाऊस कमी झाला. सायंकाळचे सूर्यकिरण गडावर फाकले. वाड्याकडे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जाण्यासाठी राजे उठले.

राजे देवालयाच्या बाहेर आले. आकाश नितळले होते. मातीचा वास दरवळत होता. एक भला मोठा पांढरा ढग माथ्यावर आला होता. राजांची नजर त्याच्यावर स्थिरावली. त्या मेघाकडे बोट दाखवीत राजे म्हणाले,

'रघुनाथपंत, तो मेघ पाहिलात? काही काळापूर्वी जलानं संपन्न असलेला मेघ आता कसा फिका वाटतो, नाही?'

'आपली संपत्ती रिती करून मोकळा झालाय् ना तो!' रघुनाथपंत म्हणाले.

राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. ते म्हणाले,

'खरंच! वाऱ्यावर फिरणारा, आकाशातून मुक्तपणे भ्रमण करणारा हा बैरागी मेघ. तपश्चर्येनं त्याचं जीवन कसं समृद्ध बनलेलं. पण त्या बैरागी मेघालादेखील पृथ्वीचं व्याकूळ, तृषार्त रूप मोहवितं आणि पाहता-पाहता आपलं सर्वस्व पृथ्वीला अर्पण करून तो मोकळा होतो. दानानं जीवन समृद्ध होतं, असं म्हणतात; पण हे दान एवढं विलक्षण, की दानानं निष्प्रभ झालेल्या मेघाहाती वाऱ्यावर विरून जाण्याखेरीज काहीच उरत नाही.'

रात्री राजे आपला नित्याचा फलाहार आटोपून झोपण्याकरिता महाली आले. समया तेवत होत्या. महालाच्या दाराशी पावले अडखळली. महालात सोयराबाई उभ्या होत्या. राजांना पाहताच त्यांनी डोळ्यांना पदर लावला; राजे संथपणे जवळ गेले.

'राणीसाहेब, काय झालं?'

सोयराबाईंनी नजर वर केली. त्या म्हणाल्या,

'चुकून बोलून गेले, तर....'

'असं बोललं जातं, ते चुकूनच; संयम राहिला नाही, म्हणजे. म्हणून काही घाव बसायचा टळत नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘चुकलं, म्हणते ना!’

‘क्षमा मागायची काही गरज नाही. आमच्या मनात काही नाही.’

‘खरं?’

‘आम्ही खोटं बोलत नसतो.’

‘मग महाली....’

‘ते अशक्य! पण त्यानं काही बिघडलं नाही. तुम्ही आमच्या महाली येताच ना?’

‘माझ्या मनाला....’

‘राणीसाहेब, आम्ही आज फार थकलो. म्हणावं, तसं आम्हांला अजून बरं वाटत नाही. आम्ही झोपतो.’

राजे पलंगाजवळ गेले. पलंगावर हात जोडून चिंतनात मग्न झालेली मूर्ती सोयराबाईंनी काही क्षण न्याहाळली; आणि हलक्या पावलांनी त्या महालाबाहेर पडल्या.

समया शांत करण्यासाठी महादेव जेव्हा महाली आला, तेव्हा राजांना निद्रा लागली होती.

□

२४

पावसाळ्याची गडबड गडावर चालू झाली: साऱ्या घरांना झडी लावून घेण्यात आल्या. गडावरच्या पागेच्या गंजी बांधून घेण्यात आल्या. पाचाडहून अंबारखान्यात धान्य भरले जात होते. पश्चिमेकडचे वारे सुटले. सागरावरून येणाऱ्या ढगांनी आकाशात छपरी धरली. गार वाऱ्यांनी पावसाची नांदी दिली. मृगाचे शिडकावे पडू लागले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पावसाळा आला, की फौजेला उसंत मिळे. पण राजांनी सर्व फौजेला उसंत दिली नाही, मोरोपंतांच्यासह काही फौज जंजिऱ्यात गुंतली होती. राजांचे नजरबाज भागानगरपर्यंत पोहोचले होते. निराजीपंत औरंगाबादेला बहादुरखानाकडे गेले होते. राजे सर्व बातम्या ऐकत होते. गडाच्या विवेकसभेला रंग भरत होता.

सकाळी स्नान आटोपून राजे महालात आले. मनोहारी राजांच्या देव्हाऱ्यासमोर बेलपत्रे ठेवीत होती. दोन दिवसांत राजांना मनोहारी दिसली नव्हती.

‘मनू, तुझा पत्ता कुठं आहे?’

‘पाचाडला गेले होते.’

‘पाचाडला? ते बरं?’

पण त्याचे उत्तर मनोहारीला द्यावे लागले नाही. महालात येणाऱ्या सोयराबाईंनीच त्याचे उत्तर दिले.

‘चार दिवसांनी मासाहेबांचं श्राद्ध. तेव्हा व्यवस्थेसाठी तिला पाठविली होती.’

मासाहेबांच्या आठवणीबरोबर राजांचा जीव भारावला. एक दीर्घ नि:श्वास सोडून ते म्हणाले,

‘पाहता-पाहता दोन वर्षं निघून गेली; पण मासाहेबांची आठवण एक दिवसही मनातून हलत नाही. एक माणूस जातं, पण केवढं रितेपण निर्माण करून!’

राजांनी क्षणात तो विचार मागे सारला. त्यांनी सोयराबाईंना विचारले,

‘मग सर्व तयारी झाली?’

‘हो. अनाजींना पण गडाखाली पाठवलंय्. कसलीच कमतरता ठेवू नका, म्हणून मी बजावलंय्.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे खिन्नपणे हसले.

‘राणीसाहेब, माणूस असेपर्यंत आपण जे करू, तेच खरं. त्याच्या पश्चात या गोष्टी केल्या काय आणि न केल्या काय, सारख्याच!’

‘श्राद्धाला काहीच का महत्त्व नाही?’

‘तसं मी म्हटलं नाही. त्या व्यक्तीच्या श्रद्धेचं ते प्रतीक. त्या थोर आत्म्याची जाण वर्षातून एक दिवस तर मनात प्रकटावी, म्हणून हा दिवस पाळायचा; एका गमावलेल्या आठवणीला उजाळा द्यायचा, आलेला एकाकीपणा त्या आठवणीत विसरण्याचा प्रयत्न करायचा. राणीसाहेब, सर्व गोष्टी चांगल्या तऱ्हेनं, चांगल्या मनानं करा. मासाहेबांची आठवण जतन करण्यात आपणां सर्वांचं हित आहे.’

महादेव महाली आला. त्याने वर्दी दिली.

‘बाळाजी आले आहेत.’

‘एवढ्या सकाळी? ठीक आहे, त्यांना बोलाव.’

सोयराबाई, मनोहारी आतल्या दरवाजाने निघून गेल्या. बाळाजी महाली आले.

‘बाळाजी, या. काय खबर आणलीत?’

‘मोगलाईतील एक सरदार महंमद कुलीखान आपल्या दर्शनासाठी आलेत.’

‘महंमद कुलीखान?’ राजे विचारात पडले. क्षणभर राजे ते नाव आठवण्याचा प्रयत्न करीत होते. क्षणात त्याच्या चेहऱ्यावर हास्य विलसले. ते म्हणाले,

‘आम्ही महंमद कुलीखानांना ओळखीत असू, असं वाटतं. सायंकाळी सर्वांना सदरेवर यायची आज्ञा करा. आम्ही कुलीखानांची भेट तिथंच घेऊ.’

‘जी.’ म्हणून बाळाजी वळले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बाळाजी!’

‘जी.’

‘कुलीखान आमच्या भेटीला येतील, तेव्हा ते नि:शस्त्र आहेत, याची खात्री करून घ्या.’

‘जी.’

‘तोवर त्यांची गडावर चोख व्यवस्था ठेवा. त्यांच्याबरोबर कोण आहे?’

‘त्यांचं अश्वपथक पाचाडला आहे. संगती दोन-चार हशम आहेत.’

‘ठीक. जा तुम्ही.’

बाळाजी गेले. राजांनी मनोहारीला बोलावणे पाठविले. मनोहारी आली,तेव्हा राजे बैठकीवर बसून आराम करीत होते.

‘मनोहारी, धाकट्या राणीसाहेबांना, आम्ही बोलावलंय्, म्हणून सांग.’

थोड्या वेळाने पुतळाबाई महालात आल्या. राजांनी आज्ञा केली,

‘राणीसाहेब, आज बुद्धिबळं खेळावी, असं मनात आहे. आमचा पट काढा.’

‘आत्ता?’

‘हो. आमच्या अस्वस्थ मनाला तेवढाच विरंगुळा वाटेल.’

पुतळाबाई हसल्या. त्यांनी बुद्धिबळाचा डाव मांडला. राजे म्हणाले,

‘तुम्ही सुरुवात करा.’

पुतळाबाईंनी राजासमोरचे प्यादे उचलले, एक घर पुढे सारले. राजांनी सांगितले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पुतळा, राजासमोरचं प्यादं प्रथम चालवू नये. बहुधा ते प्यादं खर्ची पडतं.’

‘पण राजा सुखरूप राहतो ना!’

‘ते प्याद्याच्या ध्यानी येत नाही.’

‘काय म्हटलंत?’

‘काही नाही! ...बरं आठवलं. आज एक मोगल सरदार आपल्या भेटीला आले आहेत. सायंकाळी सदरेत आलात, तर तुम्हांलाही गंमत बघायला मिळेल.’

‘येईन ना!’

राजांनी उंटासमोरचे प्यादे पुढे ढकलले.

सायंकाळी खासे सदरेत सारे गोळा झाल्याची वर्दी राजांना आली. राजे सदरेकडे निघाले. सदरेत संभाजीराजे आधीच गेले होते. साऱ्यांचे मुजरे घेऊन राजे आपल्या उच्चासनावर स्थिर झाले. रघुनाथपंत, येसाजी, हंबीरराव, आनंदराव, बाळाजी ही मंडळी हजर होती. राजांनी महंमद कुलीखानांना दरबारी आणण्याची आज्ञा केली. साऱ्यांची नजर दरवाजाकडे होती. राजांनी उजव्या बाजूच्या खिडकीकडे पाहिले. जाळीच्या पडद्याआडची हालचाल नजरेत आली. राजांच्या चेहऱ्यावर नित्याचे स्मित प्रकटले. सारी सदर मोगलाईचे कोणते राजकारण शिजते, हे पाहण्यास आतुर बनली होती.

महंमद कुलीखानाने सदरेत प्रवेश केला. त्याने राजांना कुर्निसात केला. त्याचा स्वीकार न करता राजे बोलले.

‘महंमद कुलीखान!’

‘महाराज!’ महंमद धीर करून बोलला.

‘मुजरासुद्धा विसरलात?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्या शब्दांबरोबर महंमद कुलीखानाचे शिर झुकले. डोक्यावरची मोगलाई किमॉष. अंगातला मोगलाई अंगरखा, पायांतली विजार या वेषाचा महंमदाला विसर पडला. उभ्या जागी तो रडू लागला. सारी सदर आश्चर्यचकित झाली. राजे संथपणे म्हणाले,

‘महंमद कुलीखान! औरंगजेब बादशहाचे पंचहजारी निष्ठावंत सरदार...’

‘महाराज, क्षमा!’

‘क्षमा? आणि तुम्हांला? तुम्हांला पाहून आमच्या मनाला केवढ्या वेदना होतात, याची कल्पना यायची नाही. नेताजी! तुम्ही आमचे आप्त, एके काळचे आमचे सेनापती. आठवा तुमचा पराक्रम! खुद्द आमची प्रतिमा, असा तुमचा लौकिक होता. तुम्हांला लोक प्रतिशिवाजी असं समजत होते. तेच नेताजी आमच्यासमोर महंमद कुलीखान म्हणून येतात....’

‘महाराज! मी चुकलो.’ नेताजी कळवळले.

सारी सदर चकित होऊन पाहत होती. नेताजी पालकरांची ओळख अजून पटत नव्हती.

‘नेताजी, काय केलंत हे? आमचा पडता काळ पाहताच अवघ्या तीनहजारीसाठी आदिलशाही जवळ केलीत! मिर्झाराजांनी पाचहजारी देऊ करताच आदिलशाही सोडून मोगलाईला मिळालात! तुम्हांला पाहून औरंगजेबाला कोण आनंद झाला असेल! त्यानं तुम्हांला आणखी कोणती मनसब देऊ केली, की जिच्यासाठी तुम्हांला तुमच्या धर्माचाही विसर पडला?’

राजांचा एक एक शब्द चाबकाप्रमाणे नेताजींच्या अंगावर फुटत होता. नेताजींनी आपली घायाळ नजर वर केली.

‘महाराज, मी हौसेनं मुसलमान झालो नाही. माझ्यावर सक्ती करण्यात आली. मला मानावंच लागलं. तीन वेळा पळून जायचा प्रयत्न केला; पण यश आलं नाही. संधी मिळताच मी आलो.’

‘कुणाला सांगता हे, नेताजी? मला? धाकुटपणापासून आम्ही या देशात आहो. खरं-

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खोटं आम्ही जाणतो. माणसाचं माणूस ओळखतो. नऊ वर्षांमध्ये आज पळून जायला सवड मिळाली? तुम्ही मुसलमान झालात, आणि आपल्या बायकामुलांनाही मुसलमानी धर्म स्वीकारण्याचा सल्ला दिलात, हे खोटं?'

नेताजींची मान खाली झुकली. राजांचा संताप वाढला होता. त्यांचा आवाज मंदावला होता.

'खरंच! औरंगजेबानं तुमच्यावर मोठी कृपा केली! हिंदुधर्माला कलंक असलेले तुम्ही, त्यानं तुम्हांला आपल्या धर्मात जागा दिली!'

नेताजी धावला. राजांच्या समोर आसनाजवळ त्याने मस्तक टेकले.

'राजे, मला वाचवा! तुम्ही आप्त म्हणून नको. पण छत्रपती म्हणून पायांजवळ जागा द्या. मला माणसांत घ्या, राजे!'

राजे म्हणाले, ' नेताजी उठा, या अश्रूंना काय अर्थ आहे? परमेश्वरानं आम्हांला छत्र दिलं, ते जिवाच्या पायघड्या घालून श्रींचं राज्य उभं करणाऱ्याच्या रक्षणासाठी. ज्या माणसाला राज्याशी इमान नाही, दिल्या वचनाची चाड नाही, एवढंच नव्हे, तर स्वधर्माबद्दल निष्ठा नाही, त्याच्याबद्दल आम्ही काय करणार? असे आमच्या समोर येण्यापेक्षा रणांगणात गाठ पडली असती, तर फार बरं झालं असतं! ...नाही, नेताजी, देशद्रोह्याला आमच्या राज्यात छत्र नाही!'

नेताजींच्याकडे एकदाही न पाहता राजे सदरेतून निघून गेले. संभाजीराजे नेताजींच्याकडे धावले. सारे गोळा झाले. नेताजींच्या शोकाला सीमा राहिल्या नव्हत्या. केलेले सांत्वन त्यांच्या कानांपर्यंत पोहोचत नव्हते.

महादेव सदरेत आला. त्याने संभाजीराजांना सांगितले. संभाजीराजे महादेवाच्या पाठोपाठ आत गेले. आत पुतळाबाई, सगुणाबाई उभ्या होत्या. पुतळाबाईंनी डोळे टिपले. पुतळाबाई म्हणाल्या,

'नेताजीकाकांना तुमच्या महाली घेऊन चला.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी.’ संभाजीराजे म्हणाले.

संभाजीराजांच्या महाली नेताजी बराच उशीर होते. दिवेलागण झाल्यावर ते वाड्याबाहेर गेले.

रात्री राजांच्या महाली पुतळाबाई आल्या. राजांच्या शेजारी त्या उभ्या होत्या. पुतळाबाईंच्या म्लान चेहऱ्याकडे पाहून राजे गंभीर झाले. त्यांनी विचारले,

‘पुतळा! काय झालं?’

‘एक मागणं मागितलं, तर द्याल?’

‘मुळीच नाही!’ राजे म्हणाले. ‘तुम्ही नेताजींच्याबद्दल रदबदली करायला आलात ना?’

‘खरं आहे! किती केलं, तरी ते बाईंचे काका! त्यांच्याकडे पाहवत नाही. त्यांना परत....’

‘नाही, राणीसाहेब! नेताजींचा गुन्हा फार मोठा आहे. आम्हांला उगा भीड घालू नका!’

पुतळाबाई काही बोलल्या नाहीत. काही क्षण त्या तशाच उभ्या होत्या; आणि नंतर महालाबाहेर जाऊ लागल्या.

‘निघालात?’

‘जी. जाते ना.’

‘रागावलात?’

‘छे! मुळीच नाही.’ पुतळाबाई हसण्याचा प्रयत्न करीत म्हणाल्या. ‘मला माहीत आहे, आमची तेवढी योग्यता नाही.’

‘कुणाबद्दल बोलता?’ राजांनी आश्चर्याने विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘थोरल्या राणीसाहेब! दुसरं कोण? बजाजी असेच मुसलमान झाले होते; पण त्यांना पायांजवळ जागा मिळाली. त्यांनीही हाच गुन्हा केला होता... माझी तक्रार नाही. मी रागावलेही नाही. शब्द टाकण्याआधी मला कळायला हवं होतं.’

‘पुतळा!’ राजे उद्गारले. ‘थांब, जाऊ नको. निदान तू तरी आम्हांला समजून घे. बजाजी आदिलशाही सरदार होते; आदिलशाहीशीच एकनिष्ठ राहिले. पण नेताजी आपले होते. आमचे सेनापती होते. त्यांचं इमान आमच्याकडे रुजू झालं होतं. आमच्या मनात त्यांच्याबद्दल जिव्हाळा होता. ही सारी नाती त्यांनीहून तोडली. नेताजी आम्हांला सोडून गेले; मनाला फार वाईट वाटलं. पण जेव्हा धर्म बदललेला समजलं, तेव्हा कैक दिवस आमच्या मनाला चैन पडलं नाही. त्यांच्यासाठी आम्ही फार यातना भोगल्यात, राणीसाहेब!’

‘माझं काही म्हणणं नाही. मी जाते.’

राजे उठले. ‘थांब,’ म्हणत ते त्यांच्या जवळ गेले. त्यांनी त्यांच्या खांद्यावर हात ठेविला.

‘इकडे बघ.’

पुतळाबाईंची नजर वळली. राजांच्या चेहऱ्यावर स्मित होते.

‘पुतळा, काळजी करू नको. आम्ही नेताजींना परत आमच्यांत घेऊ.’

‘खरं?’

‘अगदी खरं! क्षणभर आम्हीही विसरलोच होतो. नेताजी, किती केलं, तरी आपले. आपल्या माणसांना शिक्षेएवजी क्षमा करणं हेच योग्य.’

‘माझ्यासाठी का म्हणता हे?’

‘तुमच्यासाठी म्हटलं, तरी कुठं बिघडलं? तुमचा तो हक्कच आहे. पण, पुतळा, पुन्हा कधी याविषयी शंका धरू नको. आमच्या मनाची पारख करण्यात निदान तू तरी चुकू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नको.’

‘सगुणेला.... धाकट्या बाईंना तसं सांगू?’

‘जरूर सांगा. नेताजी जरूर आमच्यांत येतील, म्हणावं.’

पुतळाबाई आनंदाने वळल्या. जीवनातल्या परमोच्च आनंदाचा क्षण उपभोगीत असल्याची जाणीव पुतळाबाईंना होत होती. त्या आनंदात त्यांचे भान हरपत होते.

□

२५

जिजाबाईंचे श्राद्ध आटोपून राजे गडावर आले. आषाढ वद्य चतुर्थीला राजांनी प्रायश्चित्तपूर्वक, विधिपूर्वक नेताजींना हिंदू करून घेतले. सर्वांनाच त्या घटनेचा आनंद झाला. नेताजींना हिंदू करून घेतल्यानंतर दोन प्रहरी खास मेजवानी झाली. तीत नेताजींना शेजारी घेऊन राजे पंक्तीस बसले. नेताजींना पुनर्जन्म झाल्याचा आनंद वाटत होता. पंगत सुरू होण्याआधी नेताजी उठले. त्यांनी राजांच्या पायांवर डोके ठेवले. राजांचे पाय नेताजींच्या अश्रूंनी भिजत होते.

‘नेताजी, हे काय? उठा. झालं गेलं, होऊन गेलं. आता त्यावर विचार करू नका. मागचं काही आठवू नका.’

‘राजे, तेच माझं मागणं आहे. धर्मात घेतलंत; माणसांत आणलंत. पूर्वी होतो, तसंच सेवेला रुजू करून घ्यावं....’

नेताजींच्या नजरेला राजांची नजर भिडली. नेताजींची नजर झुकली. सारी पंगत जिवाचे कान करून राजांचे उत्तर ऐकण्यास आतुर होती.

‘नेताजी, ते होणे नाही. त्याचा हट्ट धरू नका. आपणहून पायरी सोडलीत; ती पुन्हा मिळणे कठीण. आहे, यात सुख माना. राज्याची सेवा करा. केलेलं विसरून जाण्याइतपत थोर पराक्रम केलात, तर त्या पराक्रमाला साजेशी जागाही आपोआप तुमच्याकडे चालत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

येईल. रक्तापेक्षा आम्ही कर्तृत्व ओळखतो. कर्तृत्ववान माणसाला इथं नेहमीच किंमत दिली जाते.'

नेताजींना काही बोलायचा धीर झाला नाही.

पावसाळ्याने जसा जोर धरला, तसा रायगडच्या राजकारणालाही रंग भरला. गोवळकोंड्याच्या मादण्णांच्या मध्यस्थीने आदिलशाहीशी राजांचा तह झाला. कृष्णा नदी ही दोन राज्यांच्या मधील सरहद्द ठरविण्यात आली. त्यामुळे आदिलशाहीचा बालाघाटी मुलूख राजांच्या ताब्यात आला. राजांनी तीन लक्षांचा नजराणा व एक लाखाची खंडणी आदिलशाहीला द्यावी, असा तह झाला. त्या तहाने राजांना खूप समाधान वाटले. अनाजी मात्र साशंक होते. त्यांनी विचारले,

'हा तह टिकेल?'

राजे सहज बोलून गेले,

'अनाजी, हा तह टिकणार नाही, हे समजायला ज्योतिषी लागत नाही. काही काल मात्र टिकेल. तेवढाच अवधी आम्हांला हवा. कर्नाटकची मोहीम आटोपून येईपर्यंत हा तह टिकला, तरी खूप झालं.'

राजांनी तसाच तह करण्यासाठी निराजीपंतांना औरंगाबादेकडे पाठविले होते. निराजीपंत भीमातीरी असलेल्या पेडगावच्या बहादूरखानाच्या छावणीत तहाच्या वाटाघाटी करण्यात गुंतले होते. हवी ती खंडणी, बादशहाची चाकरी, संभाजीराजांना मनसबदारी यांची, आणि हवे होते, ते कबूल करण्याची मुभा निराजीपंतांना दिली होती. त्यामुळे त्याबाबत राजे निश्चिंत होते.

भागानगरच्या दरबारी प्रल्हाद निराजी राजांचे वकील म्हणून होते.

रघुनाथपंतांनी प्रल्हाद निराजींना राजांची भागानगरच्या भेटीची इच्छा कळविली होती. गोवळकोंड्याच्या उत्तराची राजे वाट पाहत होते.

एके दिवशी संतप्त झालेले राजे सदरेत आले. जेजुरीचे घडशी आणि गुरव यांच्यामध्ये

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हक्कासंबंधी वाद निर्माण झाला होता. चिंचवडचे देव जेजुरीला गेले असता त्यांच्या कानांवर ही बातमी गेली.त्यांनी न्याय करण्याचे अभय देऊन घडशी व गुरव यांना चिंचवडला बोलविले. देव न्यायाला बसले. त्यांच्या मतानुसार त्यांनी घडश्यांना दोषी ठरवून, घडश्यांचे हक्क गुरवांना देऊन टाकले. त्या अन्यायाने घडशी संतापले. देवांनी त्यांच्यावर न्याय मान्य करण्याची सक्ती सुरू केली. घडशी घाबरले. ते पळून जाऊ लागलेले पाहताच देवांनी त्यांना पकडून आणले, त्यांना बेदम चोपले, घडश्यांना सिंहगडावर पाठवून त्यांना खोड्यात टाकण्याची आज्ञा किल्लेदारांना दिली. चिंचवड संस्थानाच्या देवांचा दबदबा मोठा. खुद्द राजे त्यांना मानीत असत. सिंहगडाच्या किल्लेदाराने देवांची आज्ञा मानली, आणि घडश्यांना खोड्यांत टाकले. घडश्यांची बायका-पोरे राजांच्याकडे तक्रार घेऊन आली. तो सारा प्रकार ऐकून राजे संतप्त झाले. सदरेत येताच त्यांनी अनाजींना बोलावून घेतले.

‘अनाजी, देवांचा काय प्रकार आहे?’

‘मलाही तो आत्ताच कळला.’

‘देवांना आम्ही गुरूसमान मानतो, याचा देवांनी भलताच अर्थ घेतलेला दिसतो. राज्यकारभारातही ते भलतीच लुडबूड करू लागले. अनाजी, त्यांना स्पष्ट कळवा की, ‘धर्मकारण करता, तो आपला अधिकार आहे; पण राजकारणात आपण असला हस्तक्षेप करणे आम्हांला पटणार नाही.’ ’

अनाजी घाबरले. ‘पण देवांचा अधिकार....’

‘तो धर्मकारणात! त्याचा राजकारणाशी काही संबंध नाही. देवांच्या ताकिदीचं पत्र तयार करून ठेवा. आम्ही ते नजरेखालून घालू.’

‘जी.’

‘आणि आमच्या सिंहगडाच्या शहाण्या किल्लेदारांना डांबून ठेवलेल्या घडश्यांना सत्वर सोडून देण्याची आज्ञा पाठवा. देव सांगतात; आणि किल्लेदार ऐकतात! ते चाकर आमचे, की देवांचे? त्यांना ताकीद द्या... याउपर असला प्रकार घडला, तर आमच्याकडून क्षमा होणार नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांची पत्रे तातडीने गडावरून रवाना झाली. घडशी सुटले. देवांना आपल्या अधिकाराची चांगलीच जाणीव झाली.

देवप्रकरणात राजे जसे अस्वस्थ झाले, तसेच दुसऱ्या एका बातमीने राजे आनंदले.

एके दिवशी अनाजींनी राजांना खबर दिली,

‘महाराज, समर्थ रामदास स्वामी परळीवर राहायला गेले.’

‘कुणी बातमी पाठविली?’

‘परळीचे किल्लेदार जिजोजी काटकर यांनी कळविलं आहे. आपल्या आज्ञेनुसार सर्व व्यवस्था गडावर केली आहे.... परळीचं भाग्य उजळलं. आता ते संतसज्जनांचं माहेरघर बनलं!’ अनाजी म्हणाले.

‘खरंच सुंदर नाव आहे! यापुढं ‘परळी’ म्हणू नका. समर्थांच्या वास्तव्यानं पवित्र बनलेला तो ‘सज्जनगड’ बनला आहे.’

- आणि त्या दिवसापासून परळीचा ‘सज्जनगड’ बनला.

□

२६

गोवळकोंड्याच्या कुतुबशहाकडून राजांना भेटीस येण्याचे फर्मान आले. राजांनी तशाच सन्मानाने त्या आमंत्रणाचा स्वीकार केला. त्या दिवसापासून राजांचा फड गजबजून गेला. गोवळकोंड्याला मादण्णांना पत्रे जाऊ लागली. शेकडो नजरबाज भागानगरच्या मार्गी गुंतले. सेनापती हंबीरराव, येसाजी वगैरे मंडळींना निवडक, तगडे, नाणावलेले तरुण धाडसी घोडेस्वार निवडण्याची आज्ञा केली. पागेतल्या उमद्या घोड्यांच्या व फौजेतल्या कर्तबगार तरुणांच्या याद्या तयार होऊ लागल्या. वाटा निश्चित करण्यासाठी नजरबाज आधीच पाठविले होते. आडवाटेने जाताना अडचणी येऊ नयेत, म्हणून रान तोडणे, दगड फोडणे, सुरुंग लावणे या कामांसाठी नेकजात बेलदार, कामाठी गोळा करण्याचे काम सुरू झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

या मोहिमेचा थाट मोठा होता. नेहमीप्रमाणे ही खडी मोहीम होणार नव्हती. राजांनी छत्रपतिपदाला साजेसा डौल आखला होता. राजांची छावणी डेरे,शामियाने, राहुट्या यांनी सजणार होती. फौज पोशाख, अलंकार, निशाणे यांनी समृद्ध होणार होती. अश्वदळाच्या रुबाबात कमतरता राहणार नव्हती. याखेरीज जरीपटका, नगार-नौबती यांसाठी उंचेपुरे, सुलक्षणी, मोजके हत्ती निवडले होते. राजांच्या अठरा कारखान्यांना उसंत राहिली नव्हती. शस्त्रागारातील नामांकित शस्त्रांना, चिलखतांना उजाळा दिला. फौजेचा पोशाख, अलंकार, निशाणे ही निश्चित झाली.

ही सारी तयारी गडावर चालू असता मोरोपंत मात्र जंजिऱ्याच्या सिद्दीशी झुंज देत होते. दंडा-राजपुरी जिंकल्याखेरीज माघारी यायचे नाही, असा मोरोपंतांनी निश्चय केला होता. पण प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना यश येत नव्हते. राजांचे लक्ष भागानगरकडे वळले होते. त्यांनी मोरोपंतांना तातडीने माघारी बोलावून घेतले. नाइलाजाने मोरोपंतांना रायगडी परतावे लागले.

रायगडावर मोरोपंत राजांच्या समोर उभे होते. मोरोपंतांच्या बरोबर जंजिरामोहिमेत पराक्रमाची शर्थ करणारे पद्मदुर्गाचे सुभानजी मोहिते, सुभानजी खराडे आणि पाटील राजांच्या मुजऱ्याला आले होते. राजे सर्व हकीकत ऐकत होते.

मोरोपंतांनी जंजिऱ्याच्या किनाऱ्यावर जाताच किनाऱ्याची झाडी तोडून मोर्चे बांधले. मचव्यांवर तोफा चढविल्या. जंजिऱ्याच्या भोवती मराठी मचव्यांनी रिंगण धरले. जंजिऱ्यावर तोफा-बंदुकांचा भडिमार होऊ लागला. पण जंजिरा काबीज होण्याचे चिन्ह दिसेना. मोरोपंत इरेला पडले. शिड्या लावून जंजिऱ्यात जाण्याचा बेत त्यांनी आखला. त्यासाठी निधड्या छातीचा, समुद्राची पर्वा न बाळगणारा, मुलुखाचा माहितगार इसम पंतांना हवा होता. कोळीवाड्याच्या लायपाटलाने हिंमत बांधली. जंजिऱ्याला शिड्या लावण्याची कामगिरी त्याने पत्करली. दिवस ठरला, बेत पक्का झाला. भर रात्री तटाला शिड्या लावून देण्याचे पाटलांनी कबूल केले. पाटलांनी शिड्या लावायच्या; आणि पंतांनी जंजिऱ्यात घुसण्यासाठी धारकरी पाठवायचे.

‘शिड्या लावल्या नाहीत?’ राजांनी विचारले.

‘जी, शिड्या लावल्या.’ मोरोपंत म्हणाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘भर समुद्रात जाऊन तुम्ही शिड्या लावल्यात?’राजांनी विचारले.

‘जी!’ पाटील अभिमानाने म्हणाले. ‘आम्ही शिड्या लावून यांची वाट पाहत बसलो. पहाट झाली, दिसू लागलं, तसे माघारी वळलो.’

हे ऐकून राजे थक्क झाले. त्यांनी पंतांना विचारले,

‘हे खरं?’

‘जी, महाराज.’

‘धारकरी का गेले नाहीत?’

‘महाराज, क्षमा असावी. चूक माझी आहे. रात्री समुद्राला उधाण होतं. मचवेवाल्यांनी अशा उधाणात तटाला शिड्या लागणार नाहीत, असा अंदाज बांधला.’

‘नावाड्यांनी अंदाज बांधला, आणि तुम्ही त्यावर विश्वास ठेवलात? त्यापायी एक अमोल संधी गमावलीत.’

मोरोपंतांनी मान खाली घातली. राजे म्हणाले,

‘पंत, ठीक आहे. झालं, ते झालं. अंदाज चुकला, हा गुन्हा नाही. आपण परत प्रयत्न करू. पण, पंत, अशी संधी केव्हा तरी एकदाच येते. तो क्षण गमावला, की त्याची पुनरावृत्ती होत नसते. निसर्गाला ते मान्य नाही.’

राजांनी मोहिते, खराडे यांना वस्त्रे, पालखी देऊन त्यांचा गौरव केला. राजांची नजर लायपाटलांच्याकडे वळली. आसनावरून उठून ते लायपाटलांच्या जवळ आले. त्यांची पाठ थोपटून राजे म्हणाले,

‘तुमच्या बहादुरीला तोड नाही. आम्ही तुम्हांला पण पालखीचा मान देत आहो.’

लायपाटील भारावले. ते बोलले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपण बोलला... सेवेचं चीज झालं. पण मी कोळी. पालखी घेऊन कुठं फिरणार?’

राजे म्हणाले, ‘पाटील, असं का म्हणता? आता तुम्हांला आमच्या नजरेतून सुटता येणार नाही. जेव्हा आमच्या भेटीला याल, तेव्हा पालखीतून या.’

पाटलांचे नेत्र आनंदाने भरले. ते उदार राजांना म्हणाले,

‘महाराज, दर्शनाला अनवाणी पायांनी आलं, तरी पायांच्या कातड्याची लाज वाटते. तुमच्या भेटीला पालखीतनं येणारं आम्ही न्हवं!’

‘तुम्हांला पाटिलकी कुणी दिली?’ राजांनी विचारले.

‘बादशहांनी.’

‘पाटील, आजपासून आम्ही तुम्हांला ‘सरपाटील’ हा किताब देत आहो. पालखीचा मान तुमच्याकडे राहीलच; मग तो वापरा किंवा नका वापरू.’ राजांची नजर पंतांच्याकडे गेली. राजांनी आज्ञा केली, ‘पंत, लायपाटलांना एक शानदार गलबत बांधून द्या. त्या गलबताचं नाव द्या ‘पालखी’! पाटील, आता तरी पालखीचे मानकरी झालात ना?’

रात्रीच्या वेळी समुद्राला उधाण असता, जागत्या पहाऱ्यात भर समुद्रात उभ्या असलेल्या जंजिऱ्याला शिडी लावणारे लायपाटील उभ्या जागी भारले गेले. निधडी छाती पार उचंबळून आली. डोळ्यांतून निखळणाऱ्या अश्रूंचेही भान त्यांना राहिले नाही...

□

२७

पावसाळा संपला; आणि गडाच्या हालचालींना उधाण आले. अश्वपथके गडाखाली येत, मोहिमेचे काम स्वीकारून रवाना होत. नजरबाजांनी आखलेल्या रस्त्याचा विचार होत होता. अष्टप्रधानांच्यासमवेत राजे मोहिमेचा बेत पक्का करीत होते. कवी कलश राजज्योतिष्यांना पाचारण करून त्यांच्या बरोबर प्रयाणाचा मुहूर्त निश्चित करण्यात गुंतले होते. सर्वानुमते विजयादशमीचा मुहूर्त नक्की झाला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कर्नाटकमोहिमेची व्यवस्था चालू असता अंत:स्थ राजकारणाला सुद्धा भर आला होता. राजे कैक महिने राज्यापासून दूर राहणार होते. या कालावधीत राज्याची सत्ता कुणाकडे राहणार, याचा विचार प्रत्येकाच्या मनात घोळत होता. अनेक वेळा सदरेवर राजांच्या अनुपस्थितीत सोयराबाई येत होत्या.

सकाळची उन्हे चढली; आणि राजे राजसदरेवर आले. राजांच्या आज्ञेनुसार प्रधान मंडळी सदरेवर आली होती. संभाजीराजेही त्या सभेत उपस्थित होते. सारे मोहिमेचा सर्वतोपरी विचार करीत होते. मोरोपंतांनी शंका व्यक्त केली,

'आदिलशाही तह पाळील, अशी लक्षणं दिसत नाहीत. किंबहुना तह मोडलेलाच आहे.'

राजे हसले; म्हणाले,

'आम्हांलाही तेच हवं होतं. निराजीपंत बहादुरखानाशी तह करण्यात गुंतले आहेत. त्यामुळं मोगलांची भीती वाटत नाही. आणि अंतर्गत दुहीनं पोखरलेली आदिलशाही कुठल्याही आक्रमणाला उठेल, असं वाटत नाही. त्यामुळं तह मोडल्याचा आम्हांला आनंदच आहे.'

'पण तह टिकला असता, तर तेवढेच निर्धास्त झालो असतो.' अमात्य म्हणाले.

'अमात्य, मनात मुळीच शंका धरू नका. इथं मोरोपंत आहेत. आम्ही सारीच फौज घेऊन जात नाही. संकट आलं, तरी मोरोपंत निवारतील. आणि कर्नाटकाच्या मोहिमेत आम्हांला आमचा खर्च करण्याची इच्छा नाही. मोगलमुलखात लूट करून आपल्याला जमणार नाही. त्याऐवजी आदिलशाही मुलूख जवळचा आणि सोपा आहे. मोगलांच्या तहामुळं हा मुलूख निर्धास्त समजा. कोकणपट्टीबद्दलही आम्ही विचार केला आहे. आम्ही समुद्रकिनाऱ्याचे मुलूख जिंकण्यासाठी होनावरकडे जाणार आहो, अशी अफवा आधीच उठविली आहे. त्यामुळं इंग्रज आणि सिद्दी समुद्रपट्टी संभाळण्यात गुंततील. हंबीरराव फौज घेऊन आदिलशाहीत लूट करीत आम्हांस भागानगर मुलुखात मिळतील.'

'आपल्यासंगती कोण येणार?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आमच्या बरोबर हंबीरराव, आनंदराव, जेधे, सूर्याजी मालुसरे ही मंडळी राहतील.’

‘आणि इथं?’

‘इथं तुम्ही आहात, मोरोपंत आहेत; आणि खुद्द युवराज गडावर राहतील. आता ते लहान नाहीत. ...काय, युवराज?’

संभाजीराजे म्हणाले, ‘आपल्या आज्ञेचं आम्ही पालन करू. आपण येईपर्यंत आम्ही राज्यकारभार पाहू.’

अनाजी, मोरोपंत, अमात्य, पंडितराव ही मंडळी एकमेकांकडे पाहत होती. त्यांच्या नजरेतील चलबिचल पाहून संभाजीराजांच्या चेहऱ्यावर स्मित उजळले. प्रधानमंत्रिमंडळाच्या नजरेतील चलबिचल राजांच्या ध्यानी आली. काहीसे अस्वस्थ होऊन त्यांनी विचारले,

‘अनाजी, हे तुम्हांला मान्य आहे?’

‘स्पष्ट बोललं, तर....’

‘प्रधानमंडळाचा निर्णय सदैव स्पष्टच असावा.’

‘आपल्या परोक्ष युवराजांच्या हाती सत्ता राहणार असेल, तर आपण येईपर्यंत आम्हांला घरी राहण्याची आज्ञा व्हावी.’

राजे बेचैन झाले. संभाजीराजे संतप्त बनत होते. एक हंबीरराव सोडले,तर सारे खाली मान घालून उभे होते. हंबीरराव आवेशाने म्हणाले,

‘अनाजी, हा युवराजांचा अपमान आहे.’

कवी कलश शांतपणे म्हणाले, ‘अनाजी, राज्यव्यवहारधर्मानुसार युवराजांच्या हाती सत्ता असणं हेच योग्य आहे. तुमची भाषा राजनिष्ठेला शोभत नाही.’

‘आम्ही पायांचे चाकर! ते कधी विसरलो नाही. चाकरीत बेइमानी होऊ नये, म्हणूनच

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आम्ही हा निर्णय केला.’

अकस्मात उठलेल्या वादळाने राजे अस्वस्थ झाले. त्यांनी अनाजींना सांगितले,

‘अनाजी, युवराज मोठे झाले. ते आता जाणते आहेत. पुढची जबाबदारी याहून मोठी. त्यांना अनुभव मिळणं आवश्यक आहे.’

‘पण तोच बेत निश्चित करायला हवा. मंत्रिमंडळाच्या निर्णयामध्ये युवराज हस्तक्षेप करणार नसतील, तर आमची काही हरकत नाही.’

संतप्त संभाजीराजे उठून उभे राहिले. त्यांची क्रोधयुक्त नजर अनाजींवर स्थिरावली होती. राजे सदरेत आहेत, याचाही त्यांना विसर पडला. ते धारदार आवाजात म्हणाले,

‘हं:! मोठीच कृपा! अनाजी, आम्ही सारं ओळखतो. तुम्हांला आपल्या फडामध्ये आणखीन कारकून किंवा हुजरे हवे असतील, तर ते घ्यायला आमची हरकत नाही. त्यासाठी खुद्द आमची भर करू नका.’

‘युवराज!’ राजे उद्गारले.

‘आबासाहेब!’ संभाजीराजे निर्धाराने बोलत होते. ‘ह्यांना एवढी घमेंड असेल, तर हाकलून द्या. आम्ही एकटे राज्यकारभार पाहू! पण हेच राहणार असतील, तर आमची गडावर राहण्याची इच्छा नाही. आम्ही कुठंही जाऊ. कोणीही आम्हांला आश्रय देईल!’

‘संभाजीराजे, काय बोलता हे?’ राजे कळवळले. ‘राज्याचे युवराज तुम्ही, आणि दुसऱ्याच्या आश्रयाची भाषा कशाला काढता? सबुरीनं घ्या. युवराज आणि मंत्रिमंडळ एक विचारानं राहण्यात राज्याचं हित आहे; राज्य तुमचं आहे. अनाजींचं नव्हे.’

‘आबासाहेब, हे अनाजींना सांगा!’

‘युवराज!’ अनाजी नम्रपणे म्हणाले, ‘जरा पोक्त विचार करा. संताप आवरा. आम्ही जे म्हणतो, त्याला तशीच कारणं असतात. जरा समजून घेण्याचा प्रयत्न केलात, तर....’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बस करा, अनाजी! आम्हांला काही ऐकायचं नाही. तुम्ही बुद्धिमान! आत्ता निरुपद्रवी म्हणून पुढं सरकवलेलं प्यादं दहा चालींनंतर राजाला भिडतं, शह देऊन मोकळं होतं, आम्हांला बुद्धिबळ जमत नाही. तेवढी दूरदृष्टी आमची नाही. आमचा निर्णय आम्ही सांगितला. आम्ही जातो.’

संभाजीराजांनी गडबडीने राजांना मुजरा केला; आणि ते सदरेबाहेर गेले. सारी सभा अवाक होऊन उभी होती. राजेही झाल्या प्रकाराने स्तंभित झाले होते. क्षणात राजे शांत झाले. त्याची नजर अनाजींवर स्थिरावली.

‘अनाजी, राज्याभिषेकापासून आम्ही राज्याचे सारे निर्णय तुम्हां मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानं करतो, हे तुम्ही जाणता. पण हा निर्णय तुमचा एकट्याचा आहे, की मंत्रिमंडळाचा, हे आम्हांला जाणून घ्यायचं आहे.’

अनाजी त्याच निर्धाराने म्हणाले, ‘महाराज, हा निर्णय आम्हां सर्वांचा आहे. हवं तर आपण विचारू शकता.’

राजांनी सर्वांवरून नजर फिरविली. साऱ्यांची नजर झुकली होती. हंबीरराव म्हणाले,

‘सेनापती म्हणून मीही मंत्रिमंडळातच आहे. मला हे पटत नाही.’

अनाजींनी हंबीररावांच्याकडे पाहिले. ते म्हणाले,

‘हंबीरराव, तुमची निष्ठा आम्हांला कळते. अंतर्गत राज्यकारभार मुलुखगिरीपेक्षा निराळा आणि गुंतागुंतीचा असतो. तुमची ही इच्छा असेल, तर महाराजांच्या संगती मोरोपंत जातील. तुम्ही सर्व अधिकार हाती घ्या. युवराजांच्या हातांखाली आपण दोघे राहू.’

राजांनी विचारले, ‘पण, अनाजी, एवढ्या निकराचा निर्णय करण्याची काय गरज? युवराजांशी एवढा बेबनाव का?’

‘गैरसमज होतो, महाराज! हा बेबनाव नाही; हा जबाबदारीचा प्रश्न आहे. राज्य एवढं विस्तारलेलं. अर्धी-अधिक फौज बाहेर असणार. एका बाजूला सिद्दी आहे. दुसऱ्या बाजूला आदिलशाही, मोगलाई यांसारखे शत्रू आहेत. काही संकट उद्भवलं, तर तडकाफडकी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निर्णय करावे लागतील. ते कुणाच्या आधारावर करायचे?’

‘का? युवराज आता लहान आहेत?’ हंबीररावांनी विचारले.

‘ते लहान नाहीत, तसेच मोठेही नाहीत. लहान म्हणावेत, तर ते पोक्तपणाचा सल्ला मानतील, असा भरवसा नाही. मोठे म्हणावे, तर भावनेच्या भरात हट्टापायी केलेला चुकीचा निर्णय तडीस नेण्याची त्यांची ताकद आहे. राज्यकारभारात हा जुगार परवडत नाही. आत्ता आम्ही बोललो नाही, आणि महाराजांच्या गैरहजेरीत काही अपयश आलं, तर त्याची जबाबदारी कोण पेलणार?’

‘ठीक आहे. अनाजी, आम्ही तुमच्या निर्णयाचा जरूर विचार करू.’

राजे सदरेतून उठले. सारा दिवस ते बेचैन होते, मनाशी विचार करीत होते.

सायंकाळी संभाजीराजे कवी कलशांकडे गेले. संभाजीराजे संतप्त होते. पण कवी कलश मात्र शांत होते. संभाजीराजांनी विचारले,

‘आम्ही सदरेतून गेल्यावर काय झालं?’

‘काय होणार? युवराज, माझा अंदाज हाच होता. मंत्रिमंडळाला तुमचं आधिपत्य मानवणार नाही. त्यांचा राजांच्यावर जेवढा विश्वास आहे, तेवढाच तुमच्याबद्दल अविश्वास!’

‘पण आम्ही मंत्रिमंडळाचं काय केलं?’

‘ठिणगी पडली, तर गवत भरकन जळून जातं; पण त्याच ठिणगीनं कोळसा इंगळाचं रूप घेतो. पूर्व प्रकरणात दुखावलेली मनं. ती तुम्ही सावरून घेतली नाहीत. उलट, त्यांच्या तोंडावर त्यांची चेष्टा आरंभलीत.’

‘कसली चेष्टा?’

‘का? अनाजींसारख्या सचिवांना तुम्ही भर सदरेत ‘हे राजांचे लुच्चे सचिव’ असा उल्लेख करू लागलात, तो कसा सहन व्हावा? राजे, सुज्ञांना शब्दांचे वार फार खोलवर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जातात.’

‘आम्हांला त्याची किंमत नाही. पुढं काय करायचं, सांगा.’

‘पुढं आपल्या हातांत काय आहे? महाराजांनी मंत्रिमंडळाचा निर्णय मान्य केल्यासारखाच आहे. ते आपल्याला आज्ञा करतील. आपण मान तुकवाल.’

‘तेवढे दुबळे आम्ही राहिलेलो नाही. आबासाहेबांना आम्ही सांगितलंच आहे. परत सांगू.’

‘युवराज!’ कलश आपल्या संजाबावरून हात फिरवीत म्हणाले. ‘न कळत तुम्ही बोलून गेलात, ते अगदी खरं आहे. ही बुद्धिबळ खेळणारी माणसं; डावात मुरब्बी! एखादी चाल अशी टाकतील, की तिचा आयुष्यभर पश्चात्ताप करावा लागेल. खुद्द थोरल्या राणीसाहेब आपल्या विरुद्ध आहेत, ते विसरू नका.’

‘मग तुमचा सल्ला तरी काय आहे?’

‘तुम्ही इथं राहणं उचित नाही.’

‘मग आम्ही जावं कुठं?’

‘युवराज, ते तुम्ही ठरवायचं आहे. यापुढची दोन वर्षं आपल्याला भारी मनस्तापाला कारणीभूत होतील, असं दिसतं.’

‘मनस्ताप तर आम्ही जन्मापासून भोगतो आहोत... ठीक आहे. आम्ही जातो.’

‘पेय घेणार?’

‘नको.’ युवराज म्हणाले. ‘कदाचित आबासाहेबांच्या समोर एखादी हजेरी असेल.’

संभाजीराजे निघालेले पाहताच कलशांनी सावधगिरीचा इशारा दिला,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘युवराज, जरा संयमपूर्वक राहा. भावनेच्या भरात बोललेले शब्दही अनर्थाला कारणीभूत होतात. महाराजांनी सारी मोहीम उभी केली आहे. मुहूर्त ठरला आहे. त्यात विरजण पडू देऊ नका.’

संभाजीराजांच्या अंदाजाप्रमाणेच घडले. महाली येताच त्यांना राजांच्या कडून बोलावणे आले. युवराज राजांच्या महाली गेले.

‘या, शंभूबाळ. आम्ही तुमचीच वाट बघत होतो.’

संभाजीराजे काही बोलले नाहीत. राजे युवराजांना न्याहळीत होते.

‘शंभूबाळ, आम्ही एक गोष्ट सांगितली, तर ऐकाल?’

‘आपली आज्ञा केव्हाच डावलली नाही.’

‘जरा शांतपणे विचार करा. आम्ही मोहिमेवर जाताना निश्चिंत मनानं जावं, असं आम्हांला वाटतं.’

‘त्यासाठी माजोरी मंत्रिमंडळाची ताबेदारी पतकरावी, अशी आपली आज्ञा आहे काय?’

‘युवराज!’ क्षणभर राजांचा आवाज वाढला. दुसऱ्याच क्षणी ते नेहमीच्याच आवाजात म्हणाले, ‘असे भडकत जाऊ नका!’

‘आम्ही संतापलो नाही.’

राजे हसले; म्हणाले, ‘हाही संतापाचाच भाग! तुम्हांला तो शोभतोही... शंभूबाळ, तुमच्यांत आणि आमच्यांत खूप फरक आहे. आम्ही तुमच्यासारखे जन्मजात युवराज नव्हतो. मासाहेबांचं बोट धरून जेव्हा आम्ही पुण्यात प्रवेश केला, तेव्हा आमची जहागीर उजाड होती. रांझ्याचा साधा पाटील सुद्धा आम्हांला ‘नावाचे राजे’ म्हणत होता. दादोजींच्या आणि मासाहेबांच्या शिकवणीखाली आम्ही मोठे झालो. महार, मांग, कोळी-दिसेल तो माणूस आमचा स्वकीय बनला. दादोजीही कारभारीच होते-राज्याचे नव्हे, जहागिरीचे. पण त्यांचा दरारा थोरल्या महाराजांच्याइतकाच वाटायचा. जगदंबेच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आशीर्वादानं आणि आमच्या कर्तृत्वानं आम्ही राजे बनलो. माणसं हाताशी धरली. विश्वास दिला, घेतला. एकमेकांच्या चुका संभाळल्या. अनाजी, मोरोपंत यांसारख्या माणसांनी केवढे कष्ट घेतले! राज्यउभारणीत या माणसांचा फार मोठा वाटा आहे, युवराज! जन्मजात हक्कानं तुम्ही युवराजपद गाजवू पाहता; मग राज्यउभारणीसाठी ज्यांनी जीव गहाण टाकले,त्यांना आपल्या अधिकाराची जाणीव का होऊ नये? तोही त्यांचा हक्क नाही का?'

'मग राज्यात आम्हांला काहीच स्थान नाही?'

'असं कोण म्हणतं? पण राजा हा एकटाच स्वामी नसतो. प्रजा, अधिकारी, फौज, सेनापती यांच्या कर्तृत्वावरच त्यांचं राजेपण टिकतं ना! स्वामित्व गाजविलं जातं, ते अधिकाराच्या जोरावर नव्हे; ते कर्तृत्वानं सिद्ध व्हावं लागतं.'

'संधी मिळाली, तर आम्हीही ते सिद्ध करून दाखवू.'

'तेच आम्ही ठरवलं आहे.'

'जी?'

'आम्ही तुम्हांला प्रभावळीचा सुभा देऊ. आम्ही येईपर्यंत तुम्ही तो चालवून दाखवा.'

'जरूर चालवून दाखवू. पण मंत्रिमंडळाचा त्यात हात नसावा.'

'त्याची चिंता करू नका. तुम्हांला हवी ती माणसं तुम्ही निवडा. स्वतंत्र फौज घ्या. खर्चाची तजवीज करून घ्या. आम्ही येईपर्यंत तुमच्या कर्तृत्वावर प्रभावळीचं राज्य चालवून दाखवा. असं राज्य करा, की प्रधानमंत्रिमंडळाला तुमचं कर्तृत्व पाहून अचंबा वाटावा, आम्हांला जगल्याचं सार्थक वाटावं.'

युवराज समाधानाने आपल्या महाली गेले. राजांच्या बेचैनीला थोडा आराम मिळाला.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

२८

विजयादशमीचा दिवस जवळ येत होता. संभाजीराजांची माणसे आणि पथके पुढील व्यवस्थेसाठी शृंगारपूरला रवाना झाली होती. हंबीरराव राजांच्या बरोबर जाणार होते. आनंदराव फौजेबरोबर जात होते. फौजेच्या छावण्यांवर अनेक सरदार रवाना झाले होते. मोहिमेच्या यशासाठी गडावरील साऱ्या देवतांना अभिषेक झाला होता. कवी कलश संभाजीराजांच्या आज्ञेने शृंगारपूरला गेले. खांडेनवमी झाली. दसरा उजाडला. मनोहारी आणि महादेव राजांच्या कपड्यांच्या, देवांच्या संदुकी महालाबाहेर पाठवीत होते. राजांच्या महालात येसूबाई आल्या. त्यांनी राजांना वंदन केले.

‘झाली तयारी?’ राजांनी विचारले.

‘जी.’

‘आम्हीही पाठोपाठ निघतोच.’

राजांचा निरोप घेऊन येसूबाई मेण्यातून गड उतरल्या. राजांची तयारी झाली. संभाजीराजेही महालात आले. संभाजीराजांसह राजे वाड्यातल्या देव्हाऱ्यात गेले. चांदीच्या देव्हाऱ्यात भवानीची सूवर्णमूर्ती उभी होती. नवरात्राच्या माळांनी, कोवळ्या कोंबांनी देव्हाऱ्यासमोरचा कुंभ सजला होता. हजारी समईचे पुरुष उंचीचे झाड प्रज्वलित झाले होते. देवघरात सोयराबाई, पुतळाबाई, सकवारबाई, लक्ष्मीबाई, गुणवंताबाई उभ्या होत्या. राजांनी देव्हाऱ्यासमोर गुडघे टेकले, हात जोडले. संभाजीराजांनी राजांचे अनुकरण केले. राजे प्रार्थना करून उठले. सोयराबाई आरती घेऊन पुढे झाल्या. त्यांनी राजांना ओवाळले. सोयराबाई संभाजीराजांना ओवाळीत असता राजे म्हणाले,

‘युवराजही आमच्यासारख्या मोठ्या पराक्रमाला बाहेर पडत आहेत. हे ओवाळणंही मोठं मोलाचं आहे.’

मागून आलेल्या राजारामांनी विचारले,

‘दादामहाराजांनी काय केलं?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘केलं नाही; पण करणार आहेत. त्यांना आम्ही प्रभावळीचा सुभा दिला आहे. स्वतंत्र सुभेदारी करणं एवढं सोपं नाही.’

‘आमांला पण द्या ना!’

राजे हसले. सोयराबाई म्हणाल्या,

‘बाळराजे, स्वारी मुलुखगिरीवर जाते, ती तुमच्यासाठी नवीन राज्य मिळवायला.’

राजांनी सोयराबाईंच्याकडे पाहिले. पुतळाबाई गडबडीने पुढे झाल्या. त्यांनी राजांच्या व युवराजांच्या हातांवर दही घातले. पुतळाबाईंच्यावर नजर जाताच राजांचा चेहरा प्रसन्न झाला. क्षणभर राजांची नजर पुतळाबाईंच्या नजरेला भिडली; आणि राजे देवघराबाहेर पडले.

राजे नगारखान्याबाहेर पडल्याची नौबत झडली. राजे,युवराज चालत होते. बरोबर अनाजी, मोरोपंत, दत्ताजी, राहुजी सोमनाथ वगैरे मंडळी राजांना निरोप देण्यासाठी चालत होती. त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी टाकली होती. रायगडाच्या उत्तरेचा प्रदेश मोरोपंतांनी संभाळायचा होता. दक्षिणेची जबाबदारी अनाजींची होती. पन्हाळ्यापासून देश व कर्नाटक यांतील सर्व प्रदेश दत्ताजी त्र्यंबकांकडे सोपविण्यात आला होता. आणि खुद्द राजधानी रायगड राहुजी सोमनाथांवर सोपविली होती.

महादरवाजाशी राजांची पालखी उभी होती. राजांनी सर्वांचा निरोप घेतला. ते पालखीत बसले. दरवाजाबाहेर पालखी जाताच नौबतीचा आवाज घुमला.

राजे युवराजांसहित पाचाडला आले. राजे जिजाबाईंच्या समाधीजवळ आले. तुळशीवृंदावनावरील तुळशीचे रोप वाऱ्यावर डुलत होते. समाधीला वंदन करून दोघांनी जिजाबाईंचे आशीर्वाद घेतले. समाधीजवळून परतताना राजे युवराजांना म्हणाले,

‘शंभू, मासाहेबांची आठवण कधी विसरू नका. ती आठवण सदैव पुढंच नेईल.’

खाशी अश्वपथके दोघांची वाट पाहत होती. राजांचा पांढरा शुभ्र विजय उभ्या जागी खूर नाचवीत उभा होता. हंबीररावांनी त्याची ओठाळी धरली होती. राजांनी विजयच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खोगिरावर हात ठेवला. क्षणभर नेत्र मिटले. राजे स्वार झाले. पाठोपाठ युवराज आणि सारी पथके स्वार झाली.

शिंगांचा आवाज घुमला. राजांनी आवाज दिला :

‘जय भवानी!’

साऱ्या पथकाने तो आवाज उचलला.

राजांनी घोड्याला टाच दिली. विजय दौडू लागला. राजांच्या बरोबर युवराज दौडत होते. मागे-पुढे पथके धावत होती.

गडाच्या पालखीदरवाजाच्या मैदानात कड्याच्या टोकावर पुतळाबाई आणि मनोहारी पाचाडहून उधळलेली घोडी पाहत होत्या. बघता-बघता घोडी दिसेनाशी झाली. दिसत होती, ती धुळीने रेखलेली वेडी वाकडी रेघ- राजांच्या मार्गाची निशाणी.

□ □ □

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग दहावा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

युवराजांच्यासह राजे चिपळूणला गेले; तेथे श्रीभार्गवाचे दर्शन घेऊन शृंगारपूरला आले. रम्य वनश्रीने भरलेला तो मुलूख. राजांच्या स्वागताला कवी कलश उभे होते. राजांनी, युवराजांनी त्यांना वंदन केले. आशीर्वाद घेतल्यावर वाड्यात प्रवेश झाले. शृंगारपूरचा वाडा झाडला-लोटलेला, रंगरंगोटी केलेला, सज्ज होता.

'युवराज, ही जागा तुम्हांला निश्चित आवडेल.'

'आम्ही समजलो नाही, आबासाहेब!'

'रम्य वनश्रीनं, डोंगरदऱ्यांनी नटलेला हा मुलूख; कवी कलश, उमाजी पंडित यांच्यासारख्या विद्वानांचा सहवास; आणि प्रभावळीसारखा संपन्न सुभा. आम्हांला तुमचा हेवा वाटतो, युवराज!'

सारे हसले.

'युवराज, मृगयेची तुमची हौससुद्धा इथं पुरी होईल.'

राजे क्षणभर थांबले; म्हणाले,

'पण, युवराज, लक्षात ठेवा. शिकारीसाठी सावजामागे धावताना आपली मर्यादा विसरू नका!'

संभाजीराजांनी चपापून राजांच्याकडे पाहिले. राजांच्या चेहऱ्यावर स्मित तसेच होते. संभाजीराजे, कलश, उमाजी या सर्वांवरून नजर फिरवीत राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जीवनात ह्या मर्यादांना फार मोठा अर्थ आहे, नाही? थोडी मर्यादा चुकली, तर केवढा अनर्थ होतो! सीतेच्या ध्यानी हे आलं नाही. भिक्षा घालण्याचं पुण्यकर्म करण्यासाठी सीतेनं मर्यादा ओलांडली; आणि रावणानं तिचं हरण केलं.’

सदरेवर सर्वांना सोडून राजे युवराजांसह महाली आले. त्यानंतर राजांनी काही दिवसांत संभाजीराजांची सर्व व्यवस्था लावून दिली. वाड्याचा फड दप्तरकारकुनांनी भरला. सदरेवर प्रभावळीचे अधिकारी आले.

एके दिवशी सायंकाळी राजांनी येसूबाईंना आपला मोहिमेवर जाण्याचा बेत सांगितला.

‘येसू, आम्ही आता मोहिमेवर निघतो. प्रभावळीचा सुभा युवराज संभाळतील; पण तुझी जबाबदारी फार मोठी आहे. प्रभावळीचा सुभेदार आम्ही तुझ्या हाती सोपवितो. युवराजांवर नजर असू दे. तुझ्यामुळं आम्ही निर्धास्त आहो.’

‘मी बाईमाणूस काय करणार?’

‘येसू, पतीला रिझविण्यातच स्त्रीचं कर्तृत्व असतं. संसार त्यावरच अवलंबून असतो. आमचे युवराज आमचं सांगणं मोडतील; पण ते तुझ्या शब्दाबाहेर जाणार नाहीत, हे आम्हांला माहीत आहे. त्यामुळं आम्ही निर्धास्त आहो. हंबीरराव पुढं गेले आहेत. ते आमची वाट पाहत असतील.’

‘उद्याच निघणार?’

‘हो. खरं पाहिलं, तर आम्ही एवढंही थांबणार नव्हतो. आम्ही वाट पाहत होतो.’

‘कुणाची?’

‘दुसऱ्या कुणाची? आम्ही युवराजांच्या सुभेदारीसाठी प्रभावळीचा सुभा निवडला, तेव्हा नुसते युवराज आमच्या डोळ्यांसमोर नव्हते; तू पण होतीस. शृंगारपूर तुझं माहेर. जाण्यापूर्वी पिलाजीरावांची गाठ पडली असती, तर बरं झालं असतं.’

त्याच वेळी सेवकाने वर्दी आणली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सदरेवर शिर्के सरकार आले आहेत.’

राजे आनंदित झाले. म्हणाले,

‘शंभर वर्षं आयुष्य आहे! पिलाजीरावांना इकडेच घेऊन ये.’

युवराजांच्यासह पिलाजीराव महालात आले. येसूबाईंनी त्यांना वंदन केले. पिलाजीराव राजांच्या मुजऱ्यासाठी वाकले. राजांनी पुढे होऊन पिलाजीरावांचे हात धरले. ते म्हणाले,

‘पिलाजीराव आपण व्याही! मुजरा करून का लाजवता?’

‘तेवढंच नातं असतं, तर मुजरा केला नसता.’ पिलाजीराव आपल्या गलमिशांवरून पालथी मूठ फिरवीत म्हणाले. ‘पण आपण छत्रपती! कुणबी मराठ्याची मान वाकल्याबिगार राहील होय?’

‘ते सदरेत! इथं नव्हे. हा येसूचा महाल आहे.’

‘तसं मानलं, तरी मुजऱ्यातून सुटका होत नाही, महाराज!’

‘ते कसं?’

‘आठवतं? आग्र्याहून एकटेच आलात... आम्ही भेटायला...’

‘नको, पिलाजीराव. ती आठवण काढू नका! पुष्कळ यातना आपण दोघांनी भोगल्या.’

राजे एकदम विषय बदलीत म्हणाले. ‘आता हे तुमचे जावई प्रभावळीचे सुभेदार आहेत. आम्ही मोहिमेला जातो. आता या दोघांची जबाबदारी तुमच्यावर.’

‘महाराजांनी निर्धास्त असावं!’ पिलाजीराव म्हणाले. ‘महाराज, आमचे जावई प्रभावळीचे सुभेदार झाले; पण आमचं काय?’

राजांच्या चेहऱ्यावर शंका उमटली. त्यांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्ही समजलो नाही.’

‘मुलीच्या लग्नाच्या वेळी आम्ही आपल्याकडे वतन मागितलं होतं.’

राजे हसले; म्हणाले,

‘पिलाजीराव, आम्ही आमच्या वचनाला पक्के आहो. आम्ही वतनं देत नाही, हे खरं; पण त्यात तुम्ही अपवाद समजू. पण ते वतन तुम्हांला मिळणं वा न मिळणं हे तुमच्या येसूच्याच हाती आहे.’

पिलाजीरावांनी येसूबाईंकडे पाहिले.

‘पिलाजीराव, आम्ही तुम्हांला वचन दिलं होतं... आम्हांला नातू झाला, की आम्ही तुम्हांला वतन देऊ. आता तुम्हांला लौकरात लौकर वतन मिळावं, असं वाटू लागलं खरं! आम्ही थकलो. नातू पाहावा, असं फार वाटतं.’

येसूबाई लाजून महालाबाहेर पळल्या. संभाजीराजे संकोचून उभे होते. पिलाजीरावांच्या आणि राजांच्या हसण्याने महाल भरून गेला.

□

२

संभाजीराजे आणि येसूबाई यांना शृंगारपुरी ठेवून राजे निघाले. संभाजीराजांच्या जवळ जशी राजांच्या विश्वासाची माणसे होती, तशीच त्यांच्या न कळत महाराजांच्या विश्वासाचीही माणसे पेरलेली होती. युवराजांच्या तैनातीत असलेल्यांत राजांचे काही नजरबाजही होते.

राजे आपल्या फौजेसह आंबाघाटातून देशावर आले. त्यांनी पन्हाळ्याला मुक्काम केला. पन्हाळ्याला राजांची आणखीन फौज वाट पाहत होती. त्या फौजेला सामील करून राजे पाटगावला गेले. तेथे त्यानी सत्पुरुष मौनी बुवांचा आशीर्वाद घेतला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मौनी बुवांचा आशीर्वाद घेऊन आल्यानंतर राजांनी आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एक फौज हंबीररावांच्या नेतृत्वाने विजापूर मुलुखात पाठविली. हंबीररावांच्या बरोबर धनाजी जाधव, सर्जेराव जेधे, नागोजी जेधे हेही होते. हंबीरराव फौजेसह विजापूर भागात घुसले; आणि राजे आपल्या फौजेनिशी साताऱ्याजवळील निमसोड- मायणी गावांवरून भागानगरकडे निघाले. आदिलशाहीत दरारा उत्पन्न करीत, लूट मिळवीत हंबीरराव जात होते. त्यामुळे हंबीररावांच्या फौजेकडे आदिलशाहीचे लक्ष लागले होते. राजे निर्धास्तपणे आदिलशाही मुलुखातून भागानगरची वाटचाल करीत होते. विजापूर मुलुखातच त्यांनी आपल्या स्वारीची नालबंदी साधून घेतली.

आजवर राजे मोहिमेला जात, तेव्हा त्यांची स्वारी खडी असे. नुसत्या घोडदळावर त्यांचा भरवसा असे. आयुष्यात प्रथमच शिवाजीराजांनी अशी ऐश्वर्यसंपन्न मोहीम काढली होती. काबाडीचे शेकडो बैल सामान वाहून पुढे नेत होते. डेरे, शामियाने यांनी सजलेली छावणी उभारली जात असे. राजांच्या फौजेत घोडदळाबरोबर हत्ती, उंटही होते. छत्रचामरे मिरवीत राजे कर्नाटकातून जात होते.

विजापूर मुलुखात राजांची छावणी पडली होती. छावणीच्या चारही दिशांनी टेहळणीची अश्वपथके फिरत होती. दोन प्रहरची वेळ असूनही गारवा कमी झालेला नव्हता. राजांच्या डेऱ्याभोवती कडेकोट पहारे उभे होते. राजे आपल्या छावणीची पाहणी करून डेऱ्यात परतले होते राजांच्या जवळ बाळाजी आवजी, येसाजी कंक, रघुनाथपंत ही मंडळी बसली होती. राजे मनाने बेचैन होते. तुंगभद्रेच्या उत्तर तीराजवळचा दक्षिणेचे द्वार समजला जाणारा कोप्पलचा किल्ला अत्यंत प्राचीन होता. त्या किल्ल्यावर हुसेनखान व अब्दुल रहीम मियाना हे दोन पठाण बंधू अधिकारी होते. त्यांच्या जुलुमाच्या वार्ता राजांनी ऐकल्या होत्या. त्या पठाणांचा पाडाव करण्याची आज्ञा राजांनी हंबीररावांना केली होती. हंबीररावांनी कोप्पलकडे धाव घेतल्याचे राजांना कळले होते; पण त्या स्वारीचे काय झाले, हे राजांना कळले नव्हते. त्यामुळे राजे बेचैन होते.

सायंकाळच्या वेळी एक स्वार मराठा छावणीत दाखल झाला. राजे छावणीतल्या घोडदळाची पाहणी करीत होते. तेथे बाळाजी आले.

‘महाराज, हंबीररावांकडून स्वार आला आहे.’

‘काय बातमी?’ राजांनी उत्सुकतेने विचारले

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हंबीररावांनी विजय संपादन केला. हंबीरराव चालून येतात, हे कळताच हुसेनखान मियाना लढाईच्या तयारीनं बाहेर पडला. गदग प्रांतातील येलबुर्गा गावी दोघांची गाठ पडली. मोठ्या तरफेचं युद्ध झालं. हुसेनखानाचा पाडाव झाला. या युद्धात दोन हजार घोडी, बारा हत्ती, अनेक उंट, बिछाईत, खजिना आणि महीन कापड सापडलं. सर्व संपदा घेऊन हंबीरराव आपल्या फौजेनिशी इकडे येत आहेत.’

ती बातमी ऐकून राजांना फार आनंद झाला. राजांच्या शेजारी उभे असलेले सूर्याजी, येसाजी यांच्या चेहऱ्यांवर विजयाचे हास्य विलसले. राजांची नजर बाळाजींच्याकडे गेली; पण बाळाजींच्या चेहऱ्यावर तो आनंद दिसत नव्हता. राजांचे मन चरकले. ते म्हणाले,

‘बाळाजी, एवढा विजय संपादन केला; पण तुम्ही स्तब्ध का?’

‘महाराज, हुसेनखानाशी झालेल्या युद्धात पराक्रमाची शर्थ करून नागोजी जेधे कामी आले!’

राजांना धक्का बसला. सर्जेराव जेध्यांच्या बरोबर नागोजी आणि धनाजी जाधव ही दोन तरुण पोरे गेली होती. नागोजी जेधे गेले, यावर राजांचा विश्वास बसत नव्हता. बाळाजी सांगत होते,

‘हुसेनखान मियानाचा जेव्हा मोड झाला, तेव्हा मियानाचा हत्ती बगल काढून पळू लागला. ते पाहताच नागोजीनं हातातला भाला पेलीत आपला घोडा सरळ हत्तीला भिडविला. नागोजीचा भाला सुटला; आणि त्यानं बरोबर हत्तीच्या गंडस्थळाचा वेध घेतला. पळून जाणारा हत्ती माघारी वळला. हौद्यात बसलेल्या हुसेनखानानं त्वेषानं नागोजीवर बाण सोडला. दुर्दैवानं बाण वर्मी लागला. मस्तक भेदून बाण हनुवटीजवळ बाहेर पडला. सर्जेराव जवळच होते. बाण काढताच नागोजीराव निघून गेले!’

‘अरेरे!’ राजे कळवळले.

‘नागोजी पडलेला पाहताच धनाजी जाधवरावांनी मियानाचा हत्ती वेढला. मियानाला हौद्यातून खाली खेचला. हुसेनखान मियाना गारद झाला. धनाजींनी पठाणांची एकच लांडगेतोड केली.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बाळाजी थांबले. तो पराक्रम ऐकून राजे भारावले. ते उद्गारले,

‘निर्भेळ विजय मिळतच नाही का? सदैव त्याला दुःखाची झालर लावावीच लागते का?’

राजांचे मन कशातच लागणे शक्य नव्हते. पागेची पाहणी रद्द करून ते आपल्या डेऱ्याकडे गेले. दुसऱ्या दिवशी सकाळपासून हंबीररावांची फौज छावणीवर येऊ लागली. लुटलेली संपत्ती तळावर आली. दोन हजार घोडी, हत्ती, लुटीचे सामान पाहण्यासाठी साऱ्या छावणीने गर्दी केली.

राजे आपल्या डेऱ्यात बसले होते. येसाजी कंकाने हंबीरराव येत असल्याची वर्दी आणली. हंबीरराव आले. त्यांनी राजांना मुजरा केला.

‘हंबीरराव, आम्ही तुमचा पराक्रम ऐकला; समाधान वाटलं. पण नागोजींच्या बातमीनं आम्ही कष्टी झालो.’

हंबीरराव अदबीने म्हणाले, ‘युद्ध तरफेचं झालं. नागोजींनी पराक्रम थोर केला! सर्जेराव आणि धनाजी आपल्या दर्शनासाठी आलेत.’

राजे दचकले. ते उठून उभे राहत म्हणाले,

‘सर्जेराव गावी गेले नाहीत?’

‘जी. नाही. नागोजी पडले; त्यांचं दहन झालं. नागोजींच्या पत्नी गोदूबाई नागोजी पडल्याचे ऐकताच कारीगावात सती गेल्या. ती बातमी समजताच मी सर्जेरावांना कारीला जाण्याबद्दल सांगितलं; पण त्यांनी ते मानलं नाही. ‘जेधे घराण्यातला कोणीही पुरुष मोहिमेतून माघारी फिरला नाही’; असं ते म्हणाले.’

‘जेध्यांना बोलवा!’

हंबीरराव डेऱ्याबाहेर गेले. काही क्षणांत राजांची पावले डेऱ्याच्या प्रवेशद्वाराकडे वळली. राजे उभे होते. त्यांची नजर समोरून येणाऱ्या जेध्यांवर खिळली. ताठ मानेने

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सर्जेराव येत होते. डोक्यावर मावळी कंगणीदार पगडी, अंगात गुडघ्यांपर्यंत आलेला अंगरखा, पायांत चोळणी असा त्यांचा वेष होता. पाठीला ढाल आणि कमरेला शेल्यात खोवलेली तलवार, कट्यार होती. आपल्या गलमिशांवरून पालथी मूठ फिरवीत ते येत होते. राजांच्याकडे लक्ष जाताच सर्जेरावांचा उसना आवेश निघून गेला. त्यांचा मिशांवरचा हात खाली आला, ताठ मान झुकली.

राजे भरभर पावले टाकीत सर्जेरावांच्याकडे निघाले. सर्जेराव मुजऱ्यासाठी वाकले, आणि राजांनी काही न बोलता एकदम सर्जेरावांना मिठीत घेतले. सर्जेरावांच्या मागून येणारे धनाजी, हंबीरराव ते दृश्य पाहत होते. राजांच्या आजानुबाहू हातांची पकड सर्जेरावांच्या पाठीवर होती. कंप पावणारी ती बोटे सर्जेरावांच्या पाठीवरून फिरत होती. मिठी सैल पडली, तेव्हा दोघांच्याही डोळ्यांत अश्रू गोळा झाले होते. राजांनी सर्जेरावांचा हात धरला; आणि ते डेऱ्याकडे जाऊ लागले.

राजांनी त्यांना आपल्या शेजारी बसविले. सर्जेराव संकोचले.

'सर्जेराव, संकोच करू नका. लढाईत नागोजी कामी आले; सून सती गेली. पण मोहीम न सोडता तुम्ही आलात. तुमच्या निष्ठेपुढं आमची गर्दन हमेशा झुकलेली असेल!'

'राजे, काय बोलता? दौलतीच्या चाकरीत पराक्रम करून पोर निघून गेला. त्याचं सार्थक झालं! बापाच्या अगोदर पोरानं संधी मिळवली: आणि स्वारी सोडून मी कसा जाऊ?'

'सर्जेराव, तुमच्या धीराचं मोल कसं करावं? बाळाजी, सोन्याच्या मोलाची ही माणसं! त्यांचं मोल सोन्याच्या तोड्यानं होणार नाही. रायगडी जाताच या प्रसंगाची आठवण म्हणून दर वर्षी एक शेर सोनं द्यायची मोईन करा. आम्ही परत जाऊ, तेव्हा स्वत: कारीस जाऊन मातु:श्रींचं समाधान करू.'

धनाजी जाधवांच्या पराक्रमाचे कौतुक करून राजांनी सर्फराजी केली.

□

३

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हंबीरराव येऊन मिळाल्यामुळे छावणी वाढली होती. राजांच्या फौजेत तीस हजारांच्या आसपास घोडदळ व वीस हजारांचे पायदळ होते. राजे मजल, दरमजल करीत भागानगराच्या विलायतेत आले. भागानगराचा मुलूख लागताच राजांनी आपल्या सैन्यास सख्त ताकीद केली की, येथे प्रत्येक गोष्ट पदरच्या पैशाने विकत घ्यायची; वाटेतील लोकांस काडीचाही उपद्रव लागता कामा नये. सुरुवातीलाच या हुकुमाविरुद्ध जे वागले, त्यांना राजांनी क्षमा केली नाही. गुन्हेगारांच्या गर्दना मारून जाबता बसविला; आणि दर मजलीस खूशखरेदी सर्व पदार्थ घेत राजे भागानगराकडे जाऊ लागले. शिवाजी भागानगरास येत आहेत, या बातमीमुळे भागानगरच्या नागरिकांची उत्सुकता वाढली होती. कुतुबशहाच्या मनात मात्र राजांच्याबद्दल भीती वाटत होती. त्याच्या दरबारचे राजांचे वकील प्रल्हाद निराजी व खुद्द कुतुबशहाचे वजीर मादण्णा यांनी शपथक्रिया करूनही कुतुबशहाचे समाधान झाले नव्हते. पण राजे आपल्या मुलुखात येऊनही लुटालूट करीत नाहीत, ही बातमी जेव्हा ऐकली, तेव्हा कुतुबशहाला धीर आला. रिवाजाप्रमाणे शिवाजीराजांना चार गावे सामोरा जाण्यास तो तयार झाला. राजांचे स्वार खलिते घेऊन भागानगरकडे दौडत होते. छावणीवर दररोज खलिते येत होते. राजांना खुद्द तानाशहा सामोरा येणार, हे कळताच राजांनी आण घालून पातशहास कळिवले की,

‘ तुम्ही न येणे. आपण वडील भाऊ. आपण पुढे न यावे.’

राजांच्या त्या निरोपाने पातशहा संतुष्ट झाला. आपण स्वागताला जाण्याचे राजांच्या इच्छेनुसार रद्द करून कुतुबशाहीचे वजीर मादण्णापंत व आक्कण्णापंत यांना सामोरे पाठविण्याचे त्याने ठरविले.

राजे भागानगराकडे जात होते. भागानगर दोन गाव राहिले असता मादण्णापंत सामोरे येत असल्याची वर्दी आली. उन्हाची वेळ असूनही हवेत गारवा होता. राजांच्या पुढे, पाठीमागे अश्वदळ चालत होते. जरीपटक्याच्या आघाडीचा हत्ती फार दूरवर नजरेस येत होता. राजांच्या बरोबर हंबीरराव, येसाजी कंक, मानाजी मोरे रघुनाथपंत ही मंडळी जात होती. फौजेला बगल देऊन एक स्वार दौडत राजांच्यापाशी आला. कुतुबशाही पथके नजरेत येत असल्याची त्याने वर्दी दिली. राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. ते हंबीरराव मोहिते आणि सोमाजी नाईक यांना म्हणाले,

‘तुम्ही दोघे सामोरे जाऊन पातशहाच्या वजिरांना आमच्या सामोरे घेऊन या.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हंबीरराव सोमाजी नाईकांच्यासह आपली तुकडी घेऊन पुढे दौडले. राजांच्या फौजेची चाल आता मंदावली होती. राजे शांतपणे मार्ग आक्रमीत होते. बराच वेळ गेला. शेजारचे आनंदराव म्हणाले,

'महाराज!'

राजांनी सामोरे पाहिले. सपाट भूमीच्या त्या प्रदेशातून अश्वपथके दौडत होती. तळपत्या उन्हात त्या पथकांची शस्त्रे तळपत होती पथकाच्या अग्रभागी कुतुबशाहीचा हिरवा झेंडा फडकत होता. अंदाजे हजार-पाचशे स्वारांचे पथक नजरेत आले होते. अग्रभागी राजांच्या पथकाचे लोक दौडत होते. त्यामागे कुतुबशाही स्वार होते. त्यांच्या मागे हंबीरराव व इतर नजरेत भरणाऱ्या व्यक्ती दिसत होत्या. राजांची फौज केव्हा थांबली, हेही कोणाच्या ध्यानी आले नाही. राजांच्या मागून काही अंतरावर ती पथके थांबली. हंबीरराव, सोमाजी नाईक पायउतार झाले. त्यांच्या मागून येणाऱ्या प्रल्हाद निराजींनाही राजांनी ओळखले. राजे पायउतार झाले. घातलेल्या पायघड्यांवरून ते चार पावले गेले असतील, नसतील, तोच समोरची मंडळी नजदीक आली. प्रल्हाद निराजींनी मुजरा केला. त्यांच्या मागून येणाऱ्या दोघां असामींवर नजर खिळली. त्यांना पाहताच ते मादण्णापंत आणि आक्कण्णापंत आहेत, हे राजांनी ओळखले. प्रल्हाद निराजींनी ओळख करून दिली,

'महाराज, कुतुबशाहीचे वजीर मादण्णापंत आणि त्यांचे बंधू आक्कण्णापंत आपल्या स्वागतासाठी आले आहेत.'

राजांची नजर मादण्णापंतांवर खिळली. मस्तकी दक्षिणी पगडी, रेशमी अंगरखा व धोतर परिधान केलेले मादण्णा, आक्कण्णा राजांच्याकडे पाहत होते. मादण्णांच्या रुंद कपाळावर गंध रेखाटले होते. चेहरा सतेज आणि डोळे पाणीदार होते. उजवा हात छातीवर ठेवून मादण्णापंत नतमस्तक झाले.

'छत्रपतींचा विजय असो! छत्रपतींची पावलं भागानगरला लागताहेत, याचा आलमपनाहांना परम हर्ष आहे. खुद्द जिल्लेसुभानी आपल्या स्वागतासाठी येणार होते; पण आपल्याच विनंतीनुसार त्यांना आपल्या मनाला आवरावं लागलं. पातशहांच्या वतीनं मी या भूमीत आपला इस्तकबाल करतो. ही भूमी आपल्या शत्रूचं पारिपत्य करण्यात जशी महशूर आहे, तशीच आल्या मेहमानांच्या पुढे जिवाच्या पायघड्या घालण्यातही महशूर आहे. अजाणतेपणी काही कसूर घडली असल्यास माफी असावी.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मादण्णांची नजर वर झाली. राजे पुढे झाले. त्यांनी मादण्णांचे हात प्रेमाने हाती घेतले. राजे म्हणाले,

‘मादण्णापंत, पत्ररूपानं भेटी झाल्याच आहेत. तुम्हांला भेटायला जीव उतावीळ होता.’

राजांनी बोलता-बोलता आपल्या मनगटावरची रत्नखचित पोहोची काढली. ती मादण्णांच्या मनगटावर घालीत राजे म्हणाले,

‘आमची यादगार म्हणून ही जतन करा. परमेश्वर दयाळू आहे. वर आकाश आणि खाली विशाल धरित्री. या भूमीवर आमची छत्रचामरं आणि पातशहांची कुतुबशाही किती लहान! आकाशाच्या छत्राखाली होणारी ही स्नेहभराची भेट तशीच विशाल बनू दे! अक्षय टिकू दे!’

मादण्णांनी राजांचे गुण ऐकले होते; पण ते रूप आणि बोलणे ऐकून मादण्णा भारावून गेले. राजांच्या भेटीसाठी घेतलेल्या कष्टाचे चीज झाले, असे त्यांना वाटले. मादण्णांनी आपल्या बंधूंचा आणि स्वागतासाठी आलेल्या शाही दरबारातील मातब्बर सरदारांचा परिचय करून दिला. शाही दरबारचे लोक राजांच्या बरोबर भागानगरची वाट आक्रमृ लागले.

भागानगर नजीक येत होते. डोंगर आणि प्रचंड शिलाखंडांनी नानाविध आकार घेतलेल्या टेकड्या यांतून गेलेल्या रस्त्याने फौज पुढे सरकत होती.

सायंकाळच्या सुमारास राजे भागानगरजवळ आले. तिरप्या सूर्यकिरणांत उभ्या असलेल्या त्या वैभवसंपन्न नगरीचे दूरदर्शन राजांना घडले. भागानगरालगतच विस्तीर्ण माळावर राजांच्यासाठी छावणी उभारलेली होती. छावणीत मध्यभागी उभारलेल्या डेऱ्यावर सुवर्णकळस चकाकत होता. राजांच्या वास्तव्याचे ठिकाण दर्शविणाऱ्या त्या डेऱ्यावर भगवा ध्वज फडकत होता. छावणी दायरेकार पद्धतीची होती. छावणीचे रस्ते सुबकपणे एका रेषेत आखले होते. पुढे गेलेल्यांनी छावणीची व्यवस्था हाती घेतली होती. पहारे उभे राहिले होते. राजांनी छावणीत प्रवेश केला. मध्यभागीच्या डेऱ्याभोवती वर्तुळाकार छोटे डेरे उभारले होते. त्यांच्या लगतच मोठ्या तंबूंचे वलय होते. त्यानंतर राहुट्यांची वलये ठेवली होती. छावणीच्या चारही बाजूंना सायवान डेरे उभारलेले होते. त्यांखेरीज पिलखाना व कामकरी लोकांच्या जागा निराळ्या होत्या. भागानगराशेजारी एवढी ऐश्वर्यसंपन्न छावणी आजवर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पडली नव्हती.

राजांचा डेरा ऐश्वर्यसंपन्न होता. भारी बिछायतींनी, गालिच्यांनी त्याचे ऐश्वर्य वाढलेले होते. कनोजी धुपाचा मंद सुगंध सर्वत्र दरवळत होता. राजांनी मादण्णांसह डेऱ्यात प्रवेश केला, आणि तोफेचा आवाज उठला. राजे सुरक्षितपणे छावणीवर आल्याचे साऱ्या भागानगरला कळून चुकले. राजांनी मादण्णापंत, आक्कण्णापंत, शाही दरबारचे मनसबदार या सर्वांचा यथोचित सन्मान केला, निरोपाचे विडे दिले.

सूर्यास्ताच्या आधी राजांची छावणी स्थिर झाली. रात्र हळू हळू छावणीवर उतरू लागली.

गोवळकोंड्यात आपल्या महालाच्या सज्जावरून तानाशहा राजांची पन्नास हजारांची छावणी पाहत होता. छावणीवर हजारो टेंभे जळत होते. असंख्य काजवे चमकावेत, तसे ते भासत होते. भागानगराइतकीच विस्तीर्ण छावणी पसरल्याचा भास होत होता. मादण्णांनी ग्वाही देऊनही तानाशहाची भीती कमी झाली नव्हती. अस्वस्थ मनाने तो ती लुकलुकणारी छावणी पाहत होता.

□

४

पहाटेच्या थंडीत राजांची छावणी जागी झाली. पहारे बदलले. पहाटेच्या गार वाऱ्याने कनाती फडकू लागल्या. छावणीत ठायी ठायी शेकोट्या पेटल्या. सूर्योदयाला राजांनी डेऱ्याबाहेर येऊन सूर्यवंदन केले. राजांची स्नानपूजा आटोपली होती. उन्हे चढू लागली, तसे राजांचे एक एक सरदार मुजऱ्यासाठी सामोरे येऊ लागले. राजे प्रल्हादपंत, हंबीरराव, मानाजी, येसाजी या मंडळीबरोबर बोलत होते, छावणीची हालहवाल समजून घेत होते. कुतुबशाहीने ठेवलेल्या बडदास्तीने सारे खूश होते. कुतुबशहांनी कशाचीच कमतरता ठेवली नव्हती.

दिवस वर आला, तसे कुतुबशाहीचे मानकरी राजांच्या गोटाकडे येऊ लागले. मादण्णापंत आले. प्रल्हाद निराजी आले. पातशहांच्या भेटीचे स्थळ, काळ निश्चित करण्याबद्दल वाटाघाटी सुरू झाल्या. राजांनी सांगितले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मादण्णा, आम्ही पातशहांच्या भेटीसाठीच एवढ्या दूरवर आलो. पातशहांनी आमच्या स्वागतासाठी येण्याची गरज नाही. आम्ही किल्ल्यात जाऊन त्यांची भेट घेऊ.’

मादण्णापंतांच्या मनावरचे ओझे उतरले. पातशहा किल्लाबाहेर पडण्यास भीत होते, हे त्यांना माहीत होते. मादण्णांनी सांगितले,

‘महाराज, जशी आपली आज्ञा! भेटीबाबत आपली आणखी काही खास इच्छा असली, तर ती मी पातशहांच्या कानांवर घालीन.’

‘मादण्णा, पातशहांना आमचे धन्यवाद द्या. त्यांनी आमची बडदास्त पातशहांच्या कीर्तीला साजेशीच ठेवली आहे. मुहूर्त निश्चित झाला, की आम्ही भेटीसाठी ठरेल त्या ठिकाणी येऊ. पण आमच्या वतीनं पातशहांना विनंती करा की, जसे ते पातशहा आहेत, तसेच आम्ही पण छत्रचामरं बाळगीत आहो. दरबारी रिवाजाप्रमाणे पातशहांच्या पुढं शिरमोई धरणं व तसलीम करणं आम्हांला रुचणार नाही. भेट व्हावी, ती बरोबरीच्या नात्यानं व्हावी.’

मादण्णांनी पातशहांना राजांचा निरोप कळविला. पातशहांनी ती भेट मान्य केली. उभयपक्षी चांगला दिवस पाहून भेट निश्चित करण्यात आली. भेट तानाशहांच्या महालात मध्यान्ही होणार होती.

भागानगरचे लक्ष या भेटीच्या दिवसावर खिळून राहिले होते.

□

५

भेटीचा दिवस उजाडला. राजांच्या आज्ञेनुसार हंबीरराव पागेकडे लक्ष देत होते. त्यांच्या नजरेखाली निवडक पागा तयार होती. मानाजी मोरे मिरवणुकीत येणाऱ्या सैन्याची देखभाल करीत होते. आपल्या उंची पोशाखाने आणि तळपत्या शस्त्रांनी घोडदळ, पायदळ सज्ज झाले. जरीपटक्याचा हत्ती नखशिखान्त सोन्याचांदीच्या दागिन्यांनी मढविला होता. त्याच्या पाठीवर घातलेल्या भरजरी झुलीवर सुवर्णहौदा उन्हात तळपत होता. राजांबरोबर पातशहांच्या भेटीस जाणाऱ्या सरदारांनी उंची पोशाख केले होते. सोन्याचांदीचे अलंकार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यांच्या अंगांवर शोभत होते. मस्तकी मराठमोळी पगड्यांवर तुरे खोवले होते. मादण्णापंत प्रल्हादपंतांसह छावणीत आले. त्यांनी राजांची भेट घेतली. राजे पातशहांच्या भेटीला निघाले.

कुतुबशाहीचे रक्षणकर्ते म्हणून समजल्या जाणाऱ्या राजांच्या स्वागतासाठी भागानगरवासी आतुर झाले होते. ज्या रस्त्यावरून राजे जाणार होते, ते रस्ते कुंकुमकेशराच्या सड्यांनी, रंगमाळांनी शृंगारिले होते. रस्त्याच्या दुतर्फा गुढ्या, तोरणे, पताका उभारल्या होत्या. रस्त्याकडे उंच हवेल्यांच्या गच्च्या-खिडक्यांतून स्त्रिया गर्दी करून उभ्या होत्या. हजारो नागरिक राजांच्या दर्शनाला आतुर बनले होते. मध्यान्हीची वेळ नजीक येत होती. सूर्य आकाशात चढत होता. आणि त्याच वेळी राजांची भव्य मिरवणूक नगरप्रवेश करती झाली.

मिरवणुकीच्या अग्रभागी जरीपटक्याचा हत्ती चालत होता. नगाऱ्यांचा आवाज राजांच्या आगमनाची वर्दी देत होता. शिंगांचा आवाज गगनाला भिडला होता. डोळ्यांसमोरून सरकणाऱ्या राजांच्या फौजेकडे नागरिक कौतुकाने पाहत होते. मोगली सत्तेला आव्हान देणारे, आदिलशाहीचा थरकाप उडविणारे ते सैन्य निरखीत होते. मोगलाई, आदिलशाही आणि खुद्द कुतुबशाही यांच्या मुलुखापर्यंत चौफेर दरारा उत्पन्न करीद दौडणारे मराठी घोडदळ टापांचा आवाज करीत समोरून जात होते. मावळ्यांचे पायदळ आपल्या पायतणांचा आवाज करीत पुढे सरकत होते. त्या पावलांची करामत फार दूरवर पसरली होती. मी मी म्हणणाऱ्या किल्ल्यांना त्या पावलांच्या करामतीपुढे हार खावी लागली होती. घोडदळाच्या आणि पायदळाच्या हातांतील शस्त्रे उन्हात तळपत होती. प्रत्येक पथकाबरोबर पथकाचा नेता जात होता. त्याने त्यांच्या नावांची दहशत घराघरांतून पसरली होती.

ज्यांच्या दर्शनाला सारे आतुर झाले होते; ती राजांची स्वारी शहरात प्रवेश करती झाली. राजांच्या नावाचा जयघोष उठला. अगणित मंगलारत्या उजळून उठल्या. राजे पांढऱ्या शुभ्र घोड्यावर स्वार झाले होते. मस्तकी छत्रचामरे धरली होती. राजांनी मस्तकी केशरी रंगाचा जिरेटोप घातला होता. मोत्यांच्या तुरा मानेवर रुळत होता. अंगात नाजूक जरीकाम केलेला तलम रेशमी जामा शोभत होता. अंगरख्याच्या आत घातलेली जरी फतृ अंगरख्यातून दिसत होती. कमरेला भगवा शेला आवळला होता. त्यात भवानी तलवार, कट्यार खोवली होती. पायांत तंग विजार आणि जरी चढाव घातले होते. राजांच्या कपाळावर शिवगंध रेखाटले होते. कानांतील मोत्यांचे चौकडे घोड्यांच्या पावलांबरोबर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हेलकावे घेत होते. डाव्या हाताची मूठ कमरेवर ठेवून, उजव्या हाताने घोड्याचा रेशमी कायदा संभाळीत नागरिकांना दर्शन देत राजे पुढे जात होते. त्या गुणसंपन्न राजाच्या दर्शनाने नागरिक तृप्त झाले. राजे जसे पुढे जात होते, तशी दोन्ही बाजूंच्या इमारतींवरून राजांच्या वर अखंड सुवर्णफुलांची बरसात होत होती.

राजांच्या बरोबरच्या हुजुराती पथकाचे कपडे एकजात सारखे होते. त्यांचे कपडे भारी होते. अंगांवर कंठे, तोडे, चौकडे, तुरे शोभत होते. राजांच्या बरोबर जाणाऱ्या खाशा मंडळींत मादण्णापंत, प्रल्हादपंत, रघुनाथपंत ही राजकारणी माणसे होती, तसेच सेनापती हंबीरराव, दुय्यम सेनापती आनंदराव, मानाजी मोरे हेही होते. त्या खेरीज सूर्याजी मालुसरे, येसाजी कंक, सोमाजी नाईक, बाबाजी ढमढेरे हीही मंडळी राजांना सोबत करीत होती. राजांच्यावर उधळल्या जाणाऱ्या सुवर्णफुलांचा सडा रस्त्यावर पडत होता. स्त्रिया त्यांच्यावरून पंचारती ओवाळीत होत्या. राजांच्या आज्ञेनुसार राजांचे सहायक दुतर्फा रौप्यसुवर्णनाणी उधळीत आपले समाधान व्यक्त करीत जात होते. पंचवीस हजारांची फौज मागे-पुढे निरखीत राजे गोवळकोंड्याच्या किल्ल्यापाशी आले.

भागानगरच्या पश्चिमेला दीड कोसावर खडकावर बसलेल्या गोवळकोंड्याचे दर्शन राजे घेत होते. किल्ला अनेक तटांनी मजबूत केला होता. आठ दरवाजे आणि सत्त्याऐंशी बुरूज यांनी तो तट सजला होता. किल्ल्याच्या आत खडकावर बसलेल्या बालेकिल्ल्याच्या भव्य इमारती दुरून नजरेत येत होत्या. भुईकोट किल्ला आणि गड यांचे मिश्रण किल्ल्याला लाभले होते. किल्ल्याच्या प्रवेशद्वारी मादण्णा राजांच्या स्वागतासाठी उभे होते. राजांनी किल्ल्यात प्रवेश केला.

किल्ल्याचा आतला विस्तार कैक कोसांचा होता. भागानगरची खरी राजधानी गोवळकोंडाच होती. किल्ल्यात दुसरे शहर वसविल्याचा भास होत होता. किल्ल्याच्या आवारात अनेक तळी, उद्याने, शेते नजरेला येत होती. किल्ल्याला शत्रूचा वेढा पडला, तर किल्ल्याला लागणारे धान्य व पाणी येथे उपलब्ध होत असे.

राजांची नजर समोर दिसणाऱ्या बालेकिल्ल्यावर खिळली. त्याची तटबंदी निसर्गदत्त खडकांच्या चढउतारांबरोबर किल्ल्याला लपेटली होती. ठायी ठायी पहारे दिसत होते. खडकांच्या प्रचंड शिलाखंडांत उभी राहिलेली माथ्याची मशीद व तिच्यालगत असलेली मीनारांनी सजलेली इमारत लक्ष वेधून घेत होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांची भेट दादमहाली ठरलेली होती. दादमहालाच्या समोर मिरवणूक आली. राजे पायउतार झाले. खंदकापलीकडे बालेकिल्ल्याच्या तटात खिळेबंद दरवाजा दिसत होता. राजांनी हंबीररावांना नजीक बोलाविले.

‘हंबीरराव, आम्ही पातशहांच्या भेटीसाठी जातो. तुम्ही फौजेसह इथंच थांबा. आमची चिंता करू नका.’

हंबीरराव आश्चर्यचकित झाले. मादण्णांच्या इशारतीबरोबर खंदकावरची फळी करकरत उतरली. मखमलीच्या पायघड्या अंथरल्या गेल्या. राजांनी आपल्याबरोबर प्रल्हादपंत, जनार्दन नारायण आणि अंगरक्षक म्हणून सोमाजी नाईक व बाळाजी ढमढेरे एवढ्यांनाच घेतले. राजांचा निर्णय ऐकून मादण्णाही चकित झाले होते. ते म्हणाले,

‘महाराज, आपल्याला आणखीन संगती घ्यायचे....’

‘मादण्णापंत, मैत्रीमध्ये आमच्या मनात दुश्मनी येत नाही. एवढी माणसं काय करायची? रिवाज म्हणून ही संगती घेतली; नाही तर आम्ही सडेच पातशहांच्या सामोरे गेलो असतो. चला!’

‘खुद्द पातशहा आपल्या स्वागताला येणार आहेत, तेव्हा....’

‘नको, मादण्णा! पातशहांना निरोप पाठवा; महालीच राहा, म्हणून सांगा. त्यांनी खाली यायची गरज नाही. आम्हीहून त्यांच्या महाली जाऊ.’

मादण्णांनी पातशहांना निरोप पाठवला आणि राजांनी विश्वासाने खंदकाच्या फळीवर पाऊल ठेवले. मादण्णा व गोवळकोंड्याचे मनसबदार यांसह राजे फळीवरून तटाच्या दरवाजाशी गेले.

अंगूरमहालाच्या खिडकीतून राजांच्या फौजांकडे पाहणाऱ्या कुतुबशहाला राजांचा निरोप पोहोचला. तो आश्चर्यचकित होऊन राजांच्या कृतीकडे पाहत होता. अवघ्या चार माणसांनिशी शिवाजी बालेकिल्ल्यात येतो, हे पाहताना त्याची नजर विस्फारली गेली. खंदकाची फळी उंचावलेली दिसत असूनही त्याच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. शिवाजीराजाने आपल्यावर टाकलेल्या विश्वासाने त्याचे मन उंचबळून आले. त्याच वेळी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

टाळीचा आवाज महाली घुमला. शिवाजीराजे किल्ल्यात आल्याची इशारत मिळाली. राजांच्या भेटीसाठी तयार झालेला अबुल हसन तानाशहा गडबडीने राजांच्या सामोरा जाण्यासाठी अंगूरमहालाबाहेर पडला.

राजे जेव्हा दादमहालात आले, तेव्हा महालाच्या मध्यभागी उभ्या असलेल्या कुतुबशहावर त्यांची नजर गेली. कुतुबशहा पुढे आला. प्रल्हाद निराजी राजांना म्हणाले,

'अली आला हजरत आलमपनाह अबुल हसन कुत्बशाह!'

कुतुबशहांना मादण्णाने ओळख करून दिली,

'गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपतपातशाहा छत्रपती शिवाजी महाराज!'

कुतुबशहा प्रसन्न मुद्रेने सामोरे आले. त्यांनी राजांना स्नेहालिंगन दिले. राजांचा हात हाती घेऊन राजांच्यासह ते बैठकीवर गेले. दोघे एकाच बिछायतीवर लोडाला टेकून शेजारी बसले. राजे कुतुबशहांच्याकडे पाहत होते. कुतुबशहा मोठा देखणा होता. राजांना त्याचे डोळे भारी आवडले. आकाशासारखे किंचित निळसर असे ते डोळे बोलके आणि सुंदर होते. राजांचे भव्य व्यक्तिमत्त्व पाहून कुतुबशहाही प्रसन्न झाला. त्याची सारी भीती नाहीशी झाली. जडावात बसवलेल्या हिऱ्यांसारखे नेत्र तो पाहत होता. त्यांतले भाव जाणून घेण्याचा प्रयत्न करीत राजांच्या रेखीव आकृतीत आणि त्यांच्या सदा विजयी स्मितात लपलेले अंतरंग शोधण्याचाही तो प्रयत्न करीत होता.

दादमहालाचा आकार मोठा होता. नक्षीदार कोरीव छत, अत्यंत सुबक कमानी आणि पडदे, आडपडदे यांनी महालाच्या भव्यतेत भर घातली होती. महालाच्या चारी बाजूंच्या जाळीदार खिडक्यांतून आपल्यावर रोखलेल्या अनेक नजरांची राजांना जाणीव होत होती. राजांचा रुबाब पाहून तानाशहाच्या बेगमा थक्क झाल्या होत्या. आतुरलेल्या डोळ्यांनी त्या झरोक्यांतून ती भेट त्या पाहत होत्या. राजांचे चार सांगाती आणि शाही दरबारचे मानकरी अदबीने उभे होते. पातशहांनी दिलेल्या विशेष मानानुसार मादण्णा सामोरे बसले होते. सुवासिक पदार्थांनी भरलेली व मुरादाबादी सुवर्णपिकदाण्या ठेवलेली तबके हाती घेऊन सेवक उभे होते. खळ लावलेले मखमलीचे कशिदेदार अंगरखे व त्यांवर सोन्याचे कमरपट्टे घातलेले हुजरे दोघांवर मयूरपंखांनी वारा घालीत होते. राजे तानाशहांच्या बरोबर मोकळेपणाने बोलत होते. तानशहांनी राजांना क्षेमकुशल विचारले, त्यांच्या बडदास्तीची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चौकशी केली. एक प्रहर केव्हा सरला, हेही दोघांना कळले नाही. शेवटी राजे म्हणाले,

‘पुष्कळ वेळ झाला. आता आम्हांला जायची परवानगी मिळावी.’

तानाशहांनी राजांचा हात प्रेमभराने हाती घेतला.

‘आमच्या सहवासाचा एवढ्यात कंटाळा आला? आमची तमन्ना होती की, आपण एक-दोन दिवस तरी आमच्या महाली राहावं. खुले दिल गुफ्तगूँ करें. कुछ तफरीह करें.’

राजे हसले. ते चटकन म्हणाले,

‘ते आमचं आलीशान मुकद्दर समजू. आम्ही खोटं कधी बोलत नाही. आपल्याला आम्ही वडील बंधू मानतो. आपली इच्छा आम्ही कशी मोडू? आम्ही राहतो. आपल्या सहवासात आम्हांलाही आनंद आहे.’

तानाशहांच्या आश्चर्याला सीमा राहिल्या नाहीत. अवघ्या चार माणसांनिशी बालेकिल्ल्यात आलेला हा राजा किल्ल्यात राहायचेही मान्य करतो! राजांच्या या कृतीने तानाशहा राजांचा स्नेही बनला.

□

६

रात्री राजांना बारादरीत मेजवानी झाली. वातावरणात संपूर्ण दिलखुलासपणा आला होता. राजांच्या मनात नसतानाही राजांना अफझलवध, आग्र्याहून सुटका, सुरतेची लूट ही सांगावी लागत होती. बाहेर चांदणे पडले होते. जेव्हा शांतता पसरे, तेव्हा ठुमरीचे मधुर सूर कानांवर पडत. राजांचे लक्ष त्या सुरांकडे वेधत होते. ते लक्षात घेऊन तानाशहांच्या चेहऱ्यावर स्मित विलसत होते. मेजवानी झाली. तानाशहा राजांना म्हणाले,

‘हे गाणं कोण गातं, कुठं गातं, याचं कुतूहल आहे ना?’

राजे नि:संकोचपणे म्हणाले, ‘हो. जवळपास कुठं गाणं चालू असतं, तर आम्हांला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कळलं असतं. पण स्वप्नामध्ये हलक्या पावलांनी सूर अवतरावेत, असा हा भास होतो.'

'चला!'

तानाशहांच्या बरोबर राजे सज्जावर गेले. आकाशात दहावा चंद्र दिसत होता. तानाशहा आपल्या अंगावरची शाल बळजबरीने राजांच्या खांद्यावर टाकीत म्हणाले,

'आपण मेहमान आहात, धाकटे आहात. आपली काळजी आम्हांला घ्यायला हवी.'

राजांनी मान तुकवून त्या प्रेमाचा स्वीकार केला. दोघे सज्जाच्या कडेला आले. तानाशहा म्हणाले,

'ऐका!'

राजे स्तब्ध झाले. त्या शांत, नीरव वातावरणात गाण्याचे सूर ऐकू येत होते. काही क्षण गेल्यावर राजे उद्गारले,

'सुंदर!'

तानाशहांनी पश्चिमेकडे बोट केले. ते म्हणाले,

'राजे, किल्ल्याला लागून तलाव आहे ना, त्याच्या मागे पाहा. बारीक नजरेनं पाहिलं, तर दोन टेकड्यांवर उभ्या असलेल्या इमारती दिसतील. आपलं मन रिझवण्याकरिता दरबारचे कलावंत तिथं गात आहेत.'

राजांचा डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. तानाशहांनी दाखविलेले अंतर सहज कोस-सव्वा कोसाचे होते. तेथल्या इमारतीत गायिलेले सूर पश्चिमेच्या वाऱ्याने बारादरीपर्यंत येत होते. तानाशहा सांगत होते,

'जिथून हे सूर येतात, त्या दोन महालांची नावं 'प्रेमावती' आणि 'तारामती' आहेत. या दोघी कुतुबशाहीच्या राजगायिका. आमच्या वडिलांच्या पदरी त्या होत्या. इथं आला हजरत चांदण्या रात्री आराम करीत, आणि गाणं ऐकत असत. त्या गायिका गेल्या; पण ते महाल

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तसेच आहेत. आज आमच्या दरबारच्या कलावंतांचं गाणं ऐकण्यासाठी आपल्यासारखे थोर मेहमान आलेत, ही अल्लाची कृपा आहे.'

राजांची नजर मादण्णांच्याकडे वळली. राजे म्हणाले,

'मादण्णा, उद्या त्या कलावंतांची आणि आमची भेट घडवा. आम्ही त्यांच्या गाण्यावर प्रसन्न आहो.'

'राजे, त्या कलावंतांना भेटण्याची गरज नाही. आपली मेहरनजर म्हणून त्यांना भरपूर दिलं जाईल.' मादण्णा म्हणाले.

'नको. किती केलं, तरी ते कलावंत आहेत; ईश्वरी देणगीनं ते समृद्ध आहेत. त्यांना मुलाकात देणं हेच वाजवी होईल.'

रात्री राजे महालात झोपले असतानाही त्यांना ते मंजूळ सूर ऐकू येत होते. महालाच्या दरवाजाशी सोमाजी नाईक डोळ्याचे पाते लवू न देता तळपत्या तलवारीनिशी पहारा करीत होता. राजे निश्चिंत मनाने, पूर्ण समाधानाने झोपी गेले.

□

७

तानाशहांनी राजांचा सारा बालेकिल्ला फिरून दाखविला. खिलवतमहाल, राणीमहाल, तारामतीमहाल, दिवाण-इ-आम अशा अनेक नामांकित इमारती किल्ल्याच्या दक्षिणेला होत्या. इमारतींच्या तिसऱ्या मजल्यावरही पाणी खेळविले होते. राजवाड्यात सर्वत्र कारंजांतील जलतुषारांनी शोभा वाढविली होती. प्रत्येक दिवाणखान्यात वाहते पाणी खेळविले होते. राजांना बरोबर घेऊन तानाशहाने राजधानीतील मशिदी, प्रासाद आणि आपल्या पूर्वजांच्या कबरी दाखविल्या. प्रत्येक कबरीत भारी गालिचे, रेशमी चादरी व जमिनीपर्यंत लोळणाऱ्या फुलांच्या जाळ्यांचे आच्छादन असे. दीपांच्या प्रकाशात आणि सुगंधाच्या दरवळात वातावरण धुंदावलेले असे.

किल्ल्याच्या उत्तरेला प्रसिद्ध नवीन बाग नानाविध फुलांच्या ताटव्यांनी बहरलेली होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

विस्तृत व खोल विहिरींच्या पाण्याचा उपसा चार मोटा अखंड करीत होत्या. फुलबागेला लागूनच फळांच्या, पोफळींच्या बागा होत्या. ताडपोफळींची गर्द छाया थंडी वाढवीत होती.

राजमहालात रंगणाऱ्या राजकारणाच्या बैठकी, किल्ल्याच्या सहली आणि मेजवान्या यांत तीन दिवस केव्हा सरले, हेही कुणाच्या ध्यानी आले नाही. बालेकिल्ल्याबाहेर राजांची वाट पाहत बसलेली फौज तिच्यासाठी उभारलेल्या स्वतंत्र छावणीत आरामात होती, हे खरे; पण उलटणाऱ्या दिवसाबरोबर फौजेची मने बेचैन होत होती. राजांचे निरोप येत होते. राजांच्या वस्तू किल्ल्यात जात होत्या. पण राजांचे दर्शन घडत नव्हते. अनेक विकल्प फौजेच्या मनात येत होते.

दुसऱ्या दिवशी राजे तानाशहांच्या भेटीला गेले, तेव्हा तानाशहा चिंतामग्न आहेत, हे राजांच्या ध्यानी आले. राजांनी काळजीने विचारले,

‘आपली तबियत....’

‘अल्लाच्या कृपेनं एकदम दुरुस्त आहे. राजे शरीराची बिमारी आली, तर हकिमाचं औषध घेऊन बरी करता येते. पण मनाची बिमारी भारी खराब. ती फार बेचैन करते..’

‘आम्ही समजलो नाही.’

मादण्णांनी आवंढा गिळला. ते म्हणाले,

‘राजे, कसं सांगावं, हेच कळत नाही. आपल्या फौजेत चलबिचल झाली आहे. आपली फौज भागानगर लुटणार, अशी अफवा उठली आहे. ती पातशहांच्या कानांवर आली आहे.’

क्षणभर राजे विचारमग्न झाले. दुसऱ्याच क्षणी राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. ते मोठ्याने हसू लागले. तानाशहा, मादण्णा राजांच्याकडे पाहत होते. राजे तानाशहांना म्हणाले,

‘आणि आपण विश्वास ठेवलात?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्हांला खात्रीलायक बातमी आहे.’ तानाशहा म्हणाले. ‘तुम्हांला खोटं वाटतं?’

‘मुळीच नाही. पण याला कारणीभूत आपणच आहात!’

तानाशहा आणि मादण्णा चकित झाले. मादण्णा उद्गारले,

‘आम्ही?’

‘हो! हा तुमच्या आग्रहाचा परिणाम आहे. तुम्ही आम्हांला प्रेमभरानं ठेवून घेतलंत; आम्हांला कुठं जाऊ दिलं नाहीत. आमच्या फौजेला आम्ही दिसलो नाही. आमची फौज शाही स्वागतावर तृप्त होणं कठीण. अनेक शंका आल्या असतील, म्हणून थोडी चलबिचल झाली असेल. मादण्णा, आमचे सेनापती हंबीरराव यांना बोलावून घ्या.’

हंबीररावांना बोलावणे पाठविले गेले. तानाशहांना थोडा धीर आला. राजे त्यांना म्हणाले,

‘आपण आमच्या मैत्रीबद्दल शंका न धरावी. आम्ही लुटीला जातो, तेव्हा मैत्रीचा बहाणा करीत नाही.’

तानशहांनी राजांचा हात प्रेमभराने हाती घेतला. काही वेळातच तंग वातावरण निवळले. खूप वेळ गेला. राजे बोलत असता अचानक टाळीचा आवाज महालात घुमला. राजांनी दचकून छताकडे पाहिले.

‘आपले सेनापती किल्ल्यात आले.’

‘हा टाळीचा आवाज कुठून आला?’

‘बालेकिल्ल्यात प्रथम दरवाजात इशारतीची जागा आहे. तिथं टाळी वाजविली असता इथं आवाज येतो, वर्दी मिळते.’

‘आश्चर्य आहे!’ राजे उद्गारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आश्चर्य कसलं? ही करामत आहे.’ तानाशहा म्हणाले. ‘आमच्या शाही बडदास्तीत आपली फौज रमत नाही, तुमच्या दर्शनासाठी ती व्याकूळ बनते, याचं आश्चर्य करावं.’

थोड्याच वेळात हंबीरराव आले. त्यांच्या बरोबर मानाजी मोरे, येसाजी कंक, आनंदराव हेही होते. चौघांनी मुजरे केले. राजांनी चौघांची ओळख करून दिली. राजांनी हंबीररावांना विचारले,

‘हंबीरराव, फौजेची काय खबर?’

‘सर्व ठीक आहे, महाराज.’

‘काही कमतरता?’

‘जी, नाही. उलट, सर्व काळजी घेतली जाते. कशाची कमतरता नाही.’

‘फौजेत चलबिचल आहे, म्हणून आम्ही ऐकलं.’

हंबीररावांनी एक वेळ मादण्णांच्या वर नजर टाकली.

‘स्पष्ट बोलायला काही हरकत नाही. ही सर्व आपलीच मंडळी आहेत.’

‘महाराज, आपलं दर्शन न घडल्यानं फौजेत अफवा उठत आहेत. आम्ही त्याबद्दल खबरदारी घेत आहोत. पण...’

‘सांगा... आम्ही काय करावं?’

‘एक वेळ फौजेला दर्शन घडेल, तर सारं ठीक होईल.’

‘हंबीरराव, आम्ही आणि पातशहा दोघेही फौजेची पाहणी करू. एक प्रहरानं सारी फौज आमच्या महालाखालून जाऊ दे.’

‘जी.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तानाशहांनी चौघांना मौल्यवान वस्त्रे, रत्ने देऊन गौरविले.

दोन प्रहरी राजे आणि तानाशहा अंगूरमहालाच्या सज्जावर उभे राहिले.

राजांची फौज अंगूरमहालाखालून जात होती. राजे आणि पातशहा फौजेचे मुजरे स्वीकारीत होते. राजांचे दर्शन घडताच आनंदाने बेभान झालेली फौज राजांचा आणि पातशहांचा जयजयकार करीत होती. फौजेला दर्शन देऊन दोघे महालात आले. तानाशहांची काळजी दूर झाली.

'राजे, आपली फौज किती आहे?'

'पायदळ, घोडदळ मिळून चाळीस हजारांवर जाईल. त्याखेरीज दहा हजारांची असामी संगती आहे.'

'सर्वच फौज संगती आणलेली दिसते.'

'ते शक्य झालं नसतं. मुलुखाचा बंदोबस्त राखण्यासाठी एवढीच फौज माघारी ठेवून यावं लागलं.'

'आजवर आपल्या फौजेची तारीफ आम्ही खूप ऐकली. आता ती पाहायला मिळाली.'

'दुरून फौज पाहून तिचे गुण दिसणार नाहीत. आपली मर्जी असेल, तर उद्या आमच्या माणसांचं कसब आपल्याला पाहता येईल.'

'आम्हांला आनंद वाटेल.' तानाशहा म्हणाले.

राजांनी ढमढेऱ्यांच्या बरोबर हंबीररावांना निरोप पाठविला.

राजे राजकारणाच्या मसलतीत गढून गेले.

❑

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

८

आकाशात दोन प्रहराचा सूर्य कलला होता. गोवळकोंड्याच्या उत्तरेला असलेल्या मैदानावर खास शामियाना उभारला होता. जवळ जवळ पाचशे गज रुंदीचे वर्तुळाकार मैदान मोकळे होते. मैदानाच्या सभोवती दीड-दोन पुरुष उंचीचा भक्कम तट होता. तटाच्या वर शाही शामियाना थोड्या अंतरावर उभारला होता. तटाच्या कडेने किल्ल्यातील नागरिकांची व मराठी फौजेची गर्दी झाली होती. शाही शामियान्यात कुतुबशाहीचे श्रेष्ठ मानकरी, सरदार हजर झाले होते. राजघराण्यातील मंडळींनी शामियान्यात येऊन आपली जागा घेतली होती.

नौबत झडली. अल्काबांचे पुकार उठले. सारे उठून उभे राहिले. शामियान्यात कुतुबशहा राजांच्यासह आले. मुजऱ्यांचा स्वीकार करून दोघे उच्चासनांवर बसले. राजांच्या मागे हंबीरराव, येसाजी, मानाजी, रघुनाथपंत, प्रल्हादपंत, आनंदराव, धनाजी ही मंडळी उभी होती. कुतुबशहांच्या शेजारी मादण्णा, आक्कण्णा आणि कुतुबशाहीचे सेनापती मुहम्मद अमीन हे उभे होते. राजांनी कुतुबशहांना परवानगी विचारली. कुतुबशहांनी मान्यतेची मान झुकविली. राजांनी हंबीररावांना खेळ सुरू करण्याची आज्ञा केली. शिंग फुंकले गेले.

राजांचे लक्ष आता मैदानावर खिळले होते. मैदानात पंधरा-वीस मावळ्यांनी प्रवेश केला. प्रत्येकाच्या हातात ढाल-तलवार होती. डोक्याला मराठमोळी तांबड्या पगड्या, अंगात आखूड अंगरखे, चोळणे आणि पायांत मराठशाही पायताणे घातलेले ते मावळे रिंगणात आले. त्यांनी मुजरा केला. रणहलगीच्या नादावर तलवारीचे हात सुरू झाले. तलवारीचे खेळ झाल्यावर मैदानात पटाईत उतरले. पातशहा कौतुकाने पटाइतांचे खेळ पाहत होते. पटाईत मागे सरले; आणि एक पटाईत मैदानात आला. पटाईत वेगाने हात चालवीत होता. अनेक मोहरे घेऊन त्याने खेळ दाखविला, पट्ट्याने लिंबू उडवून दाखविले; आणि त्याने वेगाने पट्टा फिरवायला सुरुवात केली. हंबीररावांनी राजांच्या समोर लिंबू धरले. राजांनी दोन लिंबे तानाशहांच्या हाती दिली. तानाशहा उठून उभे राहिले, आणि ती लिंबे पाठोपाठ पट्ट्यावर फेकली. दोन्ही लिंबे छेदिली जाऊन आकाशात उडाली. चौफेर एकच जल्लोश उठला. नंतर दांडपट्टा, विटा, मग तीरंदाजांनी आपली कमाल दाखविली.

घोडेस्वारांनी मैदानात प्रवेश केला. टापांच्या आवाजांनी मैदान भरून गेले. भरधाव

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वेगाने घोडी रिंगणात पळत होती. भालाईत स्वार मैदानात उतरले. भरधाव वेगाने घोडदौड करीत येऊन जमिनीवरचे लिंबू त्यांनी टिपले. राजांनी फेकलेले लिंबू जमिनीवर उतरताच भाल्याच्या टोकावर टिपले गेले. मैदानाच्या उत्तरेला तटावर बसलेल्या माणसांतून एक मोकळी वाट सोडली होती. हंबीररावांनी तिकडे बोट करताच राजांची व तानाशहांची नजर त्या दिशेला वळली. एक स्वार चौखूर उधळत येताना नजरेत आला. स्वार दौडत मैदानाच्या दिशेने येत होता. स्वार मैदानात उडी घेणार, असे वाटत होते. साऱ्यांचे श्वास रोखले गेले; आणि मैदानाच्या कडेवर आलेला घोडा एकदम आवरला गेला. घोडा थांबला, तेव्हा त्याचे पुढचे पाय मैदानाच्या तटावर थांबले होते. तानाशहांची निराशा झाली. त्यांनी विचारले,

‘राजे, घोडा शेवटी थांबलाच!’

‘तेही एक कसब आहे. हव्या त्या क्षणी, हव्या त्याच ठिकाणी जनावर थांबवणं हेही स्वाराचं मोठं कसब असतं.’

तो स्वार परत फिरला होता. राजांनी तानाशहांचे लक्ष वेधले. तानाशहा पाहू लागले. तो स्वार परत दौडत येत होता. परत तेच पाहावे लागणार, याचा तानाशहांना कंटाळा आला होता. स्वार दौडत आला; आणि मैदानाच्या तटावरून त्याने सरळ झेप घेतली. साऱ्यांचे श्वास अवरोधले गेले. तोवर घोडे अलगद मैदानात उतरले होते. पातशहांचे अस्तित्व विसरून, शाही रिवाज विसरून शामियान्यात प्रशंसा ऐकू आली. मैदानात जल्लोश उडाला.

मर्दानी खेळ संपले होते. त्यांत भाग घेणारे वीर आपापल्या पथकानिशी मुजऱ्याला मैदानात परत आले. तानाशहा समोऱ्या आलेल्या पथकांना मोहरांच्या थैल्या फेकीत होते.

वीरांचा सन्मान करीत असता तानाशहांनी राजांना विचारले,

‘महाराज, आम्ही हे खेळ पाहिले; आम्हांला आवडले.’

‘आपल्या खुशीत भर पडावी, म्हणूनच हे खेळ आम्ही योजले. पण पातशहांची पूर्ण तशफ्फी झालेली दिसत नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी तानाशहांचे मन बरोबर ओळखले होते. या मर्दानी खेळांत खरोखरच त्यांना फारसे स्वारस्य वाटले नव्हते. तानाशहा म्हणाले,

‘आम्ही आपल्या फौजेचे, पायदळाचे, घोडदळाचे खेळ पाहिले. पण आपले हत्ती कुठं मैदानात उतरले नाहीत?’

‘आम्ही फारसे हत्ती बाळगीत नाही.’

तानाशहा अभिमानाने म्हणाले, ‘आमच्या पिलखान्यात हजार हत्ती आहेत. हत्ती जोवर रणांगणात उतरले नाहीत, तोवर हे मर्दानी खेळ ठीक आहेत. पण रणांगणात हत्तींशी सामोरं जाण्याचा प्रसंग आला, तर आपल्या फौजेची काय दुर्दशा होईल?’

राजांच्या चेहऱ्यावर मंद स्मित विलसले.

‘तो शक आमच्या मनात कदापिही येत नाही. माझा प्रत्येक माणूस हत्तीच्या तोलामोलाचा आहे.’

‘सुभान अल्ला! राजासाब, हम आपकी दाद देते हैं. पातशहा खूश होऊन म्हणाले. ‘लेकिन हा शायरीचा अंदाज झाला.’

‘आम्ही शायरीची भाषा बोललो नाही. आम्ही वस्तुस्थिती सांगितली.’

‘काय सांगता? आपला माणूस हत्तीशी लढेल?’ आश्चर्याने तानाशहांनी विचारले.

‘अलबत!’

‘ऐसा बहादुर कौन है?’

राजांनी मागे नजर टाकली. राजांच्या मागचे नऊजण मुजरा करून उभे राहिले. तानाशहांची नजर त्यांच्यावर खिळली. त्यांनी विचारले,

‘आमचा हत्ती सोडला, तर यांतला कोणी पुढं जाईल?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो!’

‘आम्हांला पाहायचं आहे.’

राजे अस्वस्थ झाले. ते कष्टाने म्हणाले,

‘आपली मनशा पुरविण्यात आम्हांला आनंद आहे.’

कुतुबशहांनी आज्ञा केली. साऱ्या मैदानात कुजबूज वाढली. काही तरी नवीन घडणार, याची सर्वांना जाणीव झाली.

तानाशहा राजांना म्हणाले, ‘आपला वीर कोणता?’

मागे न पाहता राजांनी उत्तर दिले, ‘सारेच वीर आहेत! आपण निवड करावी.’

तानाशहांची नजर राजांच्या मागे उभ्या असलेल्या नऊजणांवर खिळली. त्यांत हंबीरराव मोहिते, मानाजी मोरे, येसाजी कंक, धनाजी जाधव, बाबाजी ढमढेरे, अनाजी मलकरे, सूर्याजी मालुसरे, सोमाजी नाईक ही मंडळी दिसत होती. तानाशहांची नजर येसाजीवर स्थिरावली. किंचित बुटकी ठेवण आणि सडसडीत अंगयष्टी पाहून, तानाशहांनी येसाजीची निवड केली, व विचारले,

‘क्या तुम हाथी से लोहा लोगे?’

‘त्यात अवघड काय?’ येसाजी बोलून गेला.

साखळदंडांचा आवाज येताच साऱ्यांची भयभीत नजर मैदानाकडे वळली. तटात असलेला दरवाजा उघडला गेला. जिवाचा थरकाप उडविणारा आवाज करीत हत्तीने मैदानात प्रवेश केला. तटाच्या कडेला दाटीवाटीने बसलेले लोक, सुरक्षित जागा आहे, हे माहीत असूनही नकळत मागे सरले. हत्तीच्या गंडस्थळावरून मदाच्या धारा वाहत होत्या. मस्तकी शेंदूर थापल्यामुळे त्याचे रूप जास्तच भयावह वाटत होते. उंचापुरा, धिप्पाड, तपकिरी रंगाचा बेभान हत्ती आपली नजर फिरवीत, कान फडकावीत रिंगणातून फिरत होता. प्रत्येक पावलाबरोबर पायांना अडकवलेल्या साखळदंडांचा आवाज येत होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

साखळदंडांची दिक्कत त्याच्या चालण्यात वाटत नव्हती. साखळदंड फरफटत तो बेगुमानपणे मैदानात फिरत होता.

‘या हत्तीशी तुमचा माणूस झुंजेल?’ तानाशहांनी विचारले.

‘तुमच्या हत्तीपेक्षा हा वरचढ असल्याचं आपल्याला आढळेल.’

राजे उभे राहिले. येसाजी नजीक आला. त्याने राजांचे पाय शिवले. येसाजीच्या पाठीवर हात ठेवीत राजे कुजबुजले,

‘जपून!’

येसाजीने पातशहांना मुजरा केला. राजे परत आसनावर बसले. येसाजीने मैदानाकडे नजर टाकली. हत्ती मैदानाच्या दुसऱ्या टोकाला गेला होता. येसाजी ओरडला,

‘जय भवानी!’

-आणि त्याने तलवार हातात धरून मैदानात उडी घेतली. साऱ्या मैदानावर एक विचित्र शांतता पसरली. मैदानात काही तरी उतरल्याचे पाठमोऱ्या हत्तीच्या तीक्ष्ण कानांना जाणवले. संतप्त होऊन तो माघारी वळला. त्याची नजर मैदानावरून फिरत होती. उभ्या जागी तो डुलत होता. सोंड हेलकावे घेत होती. हत्तीची नजर येसाजीवर खिळली. येसाजीला पाहताच सोंड आवळून घेऊन त्याने मस्तक खाली केले. पांढऱ्या शुभ्र, लांबलचक दातांत आवळून घेतलेल्या सोंडेनिशी हत्तीने चाल केली. हत्तीच्या चीत्काराने सारे मैदान थरारले. पावलांचा सप सप आवाज करीत हत्ती धावून येत होता. क्षणाक्षणाला दोघांतले अंतर कमी होत होते. अंगावर धावून येणारे धूड येसाजी हाती तलवार घेऊन निश्चल नजरेने पाहत होता. हत्ती अधिक नजीक आलेला पाहताच राजांनी नजर खाली वळविली. एकच कल्लोळ मैदानावर माजला. राजांनी भीतियुक्त नजर वर केली; येसाजीने हत्तीला बगल दिली होती. पुढे गेलेला हत्ती आपली चाल चुकली, हे ध्यानी येऊन अधिक संतप्त होऊन माघारी वळला. राजांना ते दृश्य पाहणे असह्य होत होते. त्यांच्या साऱ्या अंगाला कंप सुटला होता. तानाशहा विस्फारलेल्या नेत्रांनी ती झुंज पाहत होता.

हत्तीने परत चाल करताच येसाजी एकेक पाऊल मागे हटू लागला. हत्ती जवळ येताच

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्याने परत बगल दिली. आल्या वेगाने हत्ती पुढे सरकला. सारे लोक हर्षाने ओरडले. हत्तीचा संताप वाढत होता. त्याचे ओरडणे अधिक तीव्र बनत होते. वाढत्या संतापाबरोबर त्याचा तोलही जात होता. येसाजीने अशा पाच-सहा हुलकावण्या दिल्या. शेवटी तो हत्तीच्या पाठीलगत उभा राहिला. हत्ती वळेल, तसा तोही वळत होता. हत्ती रिंगण घेत होता. येसाजी हत्तीबरोबर गोल फिरत होता. 'लाहोल विला!', 'सुभान अल्ला!' असे उद्गार तानाशहा काढीत होता व मुग्ध होऊन पाहत होता.

हत्तीने आपली आखडलेली सोंड आता सैल सोडली होती. सोंडेने शोध घेत तो वळत होता. तीच संधी येसाजीला हवी होती. येसाजीने संधी पाहून बगल दिली; आणि एकदम तो हत्तीच्या सामोरा गेला. अचानक शत्रू सामोरा आल्याचे पाहताच हत्ती क्षणभर स्तब्ध झाला. आणि त्याच क्षणी येसाजीने तलवार उगारली. पाते क्षणभर उन्हात तळपले. दुसऱ्याच क्षणी सोंडेवर वार करून येसाजी बाजूला झाला. एका वारात हत्तीची सोंड उतरली गेली. रक्ताचा लोंढा वाहू लागला. आर्त चीत्कार करीत वेदनेने बेभान झालेला हत्ती वाट फुटेल तिकडे धावू लागला. मैदानावर एकच आनंद उसळला. शेल्यांची बरसात होऊ लागली. रक्ताचा लोंढा सोडीत मैदानाच्या दुसऱ्या टोकापर्यंत गेलेल्या हत्तीने गुडघे टेकले; आणि तो कोसळला.

येसाजी शांतपणे मैदानातून वर आला. शामियान्यात येऊन त्याने मुजरा केला. घामाने डवरलेल्या राजांनी येसाजीला मिठी मारली; आपल्या हातांतील रत्नखचित सलकडी येसाजीच्या हाती घातली. काही न बोलता राजे परत बसले. तानाशहांनी येसाजीवर देणग्यांची खैरात केली. येसाजी कुतुबशाहीच्या दरबारी राहील, तर पंचहजारांची मनसब द्यायला कुतुबशहा तयार झाले. येसाजी मुजरा करून म्हणाला,

'मी महाराजांचं अन्न आतो. ते आपलंच आहे. त्यापेक्षा जहागीर का जास्त आहे?'

त्या उत्तराने तानाशहा आणखीन प्रसन्न झाले. ते राजांना म्हणाले,

'महाराज, हा तुमचा माणूस आम्हांला द्या.'

राजांचा हात गळ्यातल्या नवरत्नांच्या कंठ्याशी गेला. राजांनी हसून विचारले,

'या कंठ्यातलं एखादं रत्न निखळलं, तर काय होईल?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कंठ्याची शोभा जाईल!’

‘हजरत! आम्ही कंठा वापरतो, तो हौसेकरिता नाही; ना ऐश्वर्याच्या प्रदर्शनासाठी. हा कंठा या माणसांची आठवण आहे. यांतला प्रत्येक माणूस आमच्याच तोलामोलाचा आहे. आमचं राज्य हत्तीच्या बळावर नव्हे, यांच्या आधारावर सुरक्षित आहे. एक एक माणूस मिळवून माळेस मणी जोडले आहेत. ते मणी कसे काढता येतील?’

तानाशहा निरुत्तर झाले. त्यांना काही तरी एकदम आठवले. ते राजांच्याकडे वळून विचारते झाले,

‘एक विचारू?’

‘संकोच कसला?’

‘जेव्हा तुमचा माणूस हत्तीशी झुंजत होता, तेव्हा आपली नजर खाली का वळली होती? आपल्या कपाळी घाम का आला होता? असल्या झुंजीची आपल्याला भीती वाटते?’

‘आपका कहना दुरुस्त है.’ राजे म्हणाले. ‘ही जिवाला जीव देणारी माणसं. वेळ का सांगून येते? घात, अपघात होतात. चुकून पाऊल फसतं. करमणुकीपायी असे मोहरे खर्ची टाकण्याची सवय आम्हांला नाही. आपल्या इच्छेखातर आम्ही येसाजीला पाठवला; पण तो माघारी येईपर्यंत आमच्या जिवात जीव नव्हता.’

त्या बोलांनी तानाशहांना राजांचे एक नवे दर्शन घडले.

राजे तानाशहांच्या बरोबर महालात आले. राजांनी छावणीवर जायचा निरोप मागितला. तानाशहांनी विचारले,

‘परत भेट?’

‘आम्ही इथं आहो, तोवर याद फर्मावली जाईल, तेव्हा आम्ही हजर होऊ.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निरोप देताना पातशहांनी अनेक वस्त्रे, नामांकित रत्ने, हत्ती, घोडे राजांना नजर केले. शाही रिवाज सोडून तानाशहांनी खुद्द आपल्या हातांनी राजांच्या अंगाला अत्तर लावले व निरोपाचे विडे दिले.

□

९

राजांच्या मनमोकळ्या स्वभावाने व भेटीने तानाशहांच्या मनातली भीती नष्ट झाली होती. या भेटीने संशयाचे वातावरण संपूर्णपणे निवळून पुढील स्वारीच्या योजनेचा राजांनी ठरविलेला आराखडा गोवळकोंड्याच्या दरबारातून एकदम मंजूर होण्याची शक्यता निर्माण झाली.

मुख्य राजकारणी बोलणी चालू असताना शिवाजीराजांच्या कीर्तीचा, तानाशहांच्या भेटीचा बोलबाला भागानगरात पसरला होता. कुतुबशाहीचे वजीर मादण्णापंत यांनी राजांना स्वत:च्या घरी मेजवानीला बोलाविले. मेजवानीचा स्वयंपाक नोकरावर न सोपविता स्वत:च्या मातु:श्रींच्या हाती पाक सिद्ध करवून, दोघे बंधू जवळ बसून त्यांनी राजांना भोजन घातले. बरोबर समुदायही होता. भोजन झाल्यावर अलंकार, वस्त्रे, घोडी देऊन राजांची त्यांनी पाठवणी केली. शिवाजीराजांचे दरबारी वाढते वजन पाहून शहरातील सरदार, शेठ-सावकार यांच्यामध्ये राजांचा सत्कार करण्याची चढाओढ लागली. त्यांच्याकडेही राजांना मेजवान्या आल्या. राजांच्या ह्या मनमोकळेपणामुळे सारे भागानगर राजांच्याकडे आकृष्ट झाले, पातशहा तर राजांच्या मोकळ्या प्रामाणिकपणावर इतका खूश झाला, की त्याने राजे मागतील, ते देऊन त्यांना संतुष्ट ठेवण्याची मादण्णापंतांस आज्ञा केली.

राजे भागानगरच्या आलेल्या प्रतिष्ठित नागरिकांना आपुलकीने भेटत होते. पण एका भेटीची इच्छा अद्याप राहिली होती. भागानगरात केशवस्वामी नावाचे एक सत्पुरुष वास्तव्य करीत होते. त्यांचे दर्शन घेण्यास राजे उत्सुक होते.

एके दिवशी मादण्णांच्या पुढे राजांनी आपली इच्छा व्यक्त केली :

‘आमच्या मनाला स्वामीजींचे दर्शन घेण्याची भारी ओढ लागली आहे. त्यांना आमची इच्छा कळवा. त्यांची आज्ञा झाली, तर आम्ही त्यांच्या दर्शनाला जाऊ.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

केशवस्वामी मादण्णापंतांचे साक्षात गुरू. राजांची इच्छा ऐकून त्यांना भारी आनंद झाला. त्यांनी राजांची इच्छा केशवस्वामींना कळविली. केशवस्वामींनी भेटीला मान्यता दिली.

निवडक लोक संगती घेऊन राजे स्वामींच्या दर्शनाला गेले. गावाबाहेर मुसा नदीच्या काठी स्वामीजींचा आश्रम होता. आश्रमाचे वातावरण मोठे प्रसन्न करणारे होते. नाना जातींच्या वृक्षांनी आश्रमाचे आवार सुशोभित झाले होते. त्यांच्या सावलीतून आश्रमवासीयांच्या पर्णकुट्या उभारल्या होत्या. आश्रमाचे चिंचोळे रस्ते स्वच्छ होते. सर्वत्र नीरव शांतता पसरली होती. राजे सायंकाळच्या वेळी आश्रमाच्या नजीक आले. आश्रमाबाहेर राजे पायउतार झाले. राजांच्या संगती मादण्णा, आक्कण्णा, हंबीरराव, येसाजी, प्रल्हाद निराजी, रघुनाथपंत, बाळाजी ही मंडळी होती. आश्रमाच्या दारात भगवी वस्त्रे परिधान केलेले शिष्य राजांच्या स्वागताला उभे होते. राजे सर्वांसह बोलत आश्रमाकडे चालत होते. आश्रमाच्या आवारात फिरणारे मोर, हरिणेही नजरेत येत होती. राजे मुख्य आश्रमापाशी पोहोचले.

केशवस्वामी राजांची वाट पाहत होते. राजांची नजर केशवस्वामींच्यावर गेली. भगवी वस्त्रे धारण केलेली, सावळ्या, सतेज कांतीची, कपाळी वैष्णव गंध धारण केलेली केशवस्वामींची मूर्ती पाहून राजांचे मन उचंबळून आले. ती शांत नजर, ओठांवर विलसणारे प्रसन्न स्मित, मानेवर रुळणारे केस हे त्यांचा अधिकार सांगत होते. अत्यंत नम्र भावाने राजे पुढे झाले, आणि त्यांनी केशवस्वामींच्या चरणी मस्तक ठेवले. केशवस्वामी डोळे मिटून आशीर्वाद देत होते. राजांच्या खांद्यांना त्या हातांचा स्पर्श झाला. राजे उभे राहिले आणि क्षणात केशवस्वामींनी राजांना गाढ आलिंगन दिले. दोघांच्याही नेत्रांत आनंदाश्रू उभे राहिले होते. केशवस्वामींनी असा लोभ दुसऱ्या कुणावर दाखविलेला मादण्णांनी पाहिला नव्हता. न राहवून मादण्णा म्हणाले,

‘महाराज, आपण भाग्यवंत आहात! स्वामींनी असा लोभ कुणावर दाखविल्याचं आम्ही पाहिलं नाही. ते भाग्य आपल्याला लाभलं.’

राजांना बळेच आपल्या जवळ बसवीत केशवस्वामी म्हणाले,

‘मादण्णा, आम्ही ही भेट ईश्वरकृपा मानतो! राजांचा जन्म जबरदस्त पूर्वपुण्याईवरोन लाभतो. ते भाग्य लाभलेले जीव बहुतेक पूर्वपुण्याईचा विसर पडून ती पुण्याई

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खर्चण्यासाठीच जीवन घालवतात. पण हे राजे त्याला अपवाद आहेत. हा राजयोगी पुरुष आहे. आपल्या पराक्रमानं याचं पुण्य उदंड वाढत आहे. जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो, अनाचार माजतो, तेव्हा धर्मरक्षणासाठी परमेश्वराकडून अवतार धारण केला जातो. मादण्णा, हा अवतारी पुरुष आहे. याची ओळख फार थोड्यांना आहे. याच्या दर्शनानं कुणाला आनंद होणार नाही?'

त्या बोलण्याने राजे संकोचले. केशवस्वामी राजांचे विनयशील रूप मनात साठवीत होते. स्वामीजींनी राजांना बोध केला. त्या अधिकारवाणीने राजांच्या मनाला समाधान लाभले. बाहेर अंधार पडू लागला. राजांनी आज्ञा मागितली. केशवस्वामी म्हणाले,

'आपल्याला वेळ असेल, तर आज इथंच वस्ती करावी. ईश्वरभक्तीची तुम्हांला आवड आहे. त्या आनंदात काही प्रहर घालविता येतील.'

राजांनी तत्काल मान्यता दिली. राजे मादण्णापंतांना म्हणाले,

'पंत, हा योग कोण सोडील? छावणीवर निरोप पाठवा. आम्ही इथं वस्ती करू.'

हंबीरराव गडबडीने उठले. राजांनी त्यांचा बेत ओळखला. ते म्हणाले,

'हां, हंबीरराव! कसली दगदग करू नका. आमच्या गाद्या, गिर्द्या इथं आणवून, या वैभवापुढं दारिद्र्याचं प्रदर्शन करू नका. संतांचा सहवास, निर्मळ भूमीची शय्या आम्हांला राजवैभवापेक्षा प्रिय आहे. हा योग आम्हांला साधू द्या!'

राजांनी सर्वांसह फलाहार, दुग्धपान केले. रात्री समया प्रज्वलित करण्यात आल्या. स्वामीजींच्या शिष्यांनी टाळमृदंग हाती घेतला. हाती चिपळ्या घेऊन केशवस्वामी उभे राहिले. रामनामाचा गजर उठला. चिपळ्यांच्या तालावर केशवस्वामींचा भावपूर्ण आवाज स्त्रवू लागला :

लागी हो गोविंदासे पिरती
हृदयकमलमें जब जब देखूँ
परम सुंदर परी श्याम की मूरती
धन सुत संतति कछु नहीं आवत,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निशिदिन सुखरूप हरिगुण गावत,
आदिपुरुष हरि नंदका सुत,
निरखत नयरो डरे जमदुत
आनंदघन, मनमोहन श्याम,
रहत केशव मोकुं मिलाया राम ॥

केशवस्वामींच्या रसाळ वाणीने राजे तृप्त झाले. साऱ्या काळजीचा विसर पडून तल्लीन होऊन राजे भक्तिरसात हरवले होते. केशवस्वामींचीही तीच अवस्था झाली होती. प्रेमभराने ते कीर्तन करीत होते. प्रहर उलटत होते. केशवस्वामी गात होते :

श्रवणाचें चाडें हें धरिलें
गुरुमुखें निजबीज पेरिलें ॥ ध्रु० ॥
निजधैर्य नांगर धरुनी
भेदखुंट काढिले खणुनी
भक्ति ज्ञान वैराग्य तिफणी
अति शुद्ध केलेली मेदिनी ॥ १ ॥
स्वानंदाचा वर्षला निजघन
परिपूर्ण पिकलें चैतन्य
तेथें सत्त्व सोकारा राखण
कर्मपक्षी हांकितो आपण ॥ २ ॥
निजबोधें पिकलें शेत, वो
स्वानंदाच्या घुमऱ्या येत, वो
कैवल्याची राशी हे हेत, हो
गुरुकृपें केशव घेत, हो ॥ ३ ॥

पहाटेच्या सुमारास कीर्तन संपले; पण कीर्तनाचा रंग राजांच्या मनातून उतरला नाही. श्रद्धायुक्त अंत:करणाने केशवस्वामींना विपुल धन, वस्त्रे अर्पण करून, राजे तृप्त मनाने छावणीत निघून आले.

❑

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१०

भागानगरचा राजांचा मुक्काम जवळ जवळ महिनाभर झाला होता. राजांच्या कर्नाटकमोहिमेला कुतुबशहांनी सर्व साहाय्य करण्याचे आश्वासन दिले होते. जिंजीपर्यंतचा सर्व मुलूख जिंकण्याच्या कामात कुतुबशहांनी स्वत:चे सैन्य व मुख्यतः परदेशी गोलंदाजांच्या अमलाखालील त्यांचा तोफखाना दारूगोळ्यासह राजांच्या बरोबर द्यावा, व स्वारीचा खर्च म्हणून रोजी तीन हजार होन पुरवावे, असा उभयतांत तह झाला होता.

तानाशहा स्वभावाने सुखलोलुप होता. तो रसिक पातशहा गाणे, बजावणे, नाचरंग आणि इतर चैनी यांत मग्न होता. त्याला लढाई, मोहिमा यांची दगदग सोसवणार नव्हती. आदिलशाहीची दंडेली नेहमी कुतुबशाहीला सहन करावी लागे. याची स्पष्ट कल्पना कुतुबशहांना आली होती. शिवाजीसारखा पराक्रमी राजाच कुतुबशाहीला वाचविण्यास समर्थ होता, हे पातशहाने जाणले होते. त्यामुळे दक्षिणेकडील तीन पातशाहींची एकजूट मोगलांविरुद्ध करण्याचे राजांचे धोरण कुतुबशहाने मान्य केले. मादण्णांच्या मनात वेलूर व जुनी हिंदू सिंहासने यांभोवती हिंदूंचाच अधिकार राहावा, असे होते. गोवळकोंड्याच्या नावाने तो प्रदेश राजांनी जिंकल्यास आपोआप तो हिंदूंच्या कक्षेत राहणार होता. याच कारणासाठी राजांना सर्वतोपरी साहाय्य करण्याचे कुतुबशहाने ठरविले होते.

कुतुबशहांचा व त्यांच्या वजिरांचा निरोप घेऊन राजांनी तेथून पुढे स्वारीवर जाण्याचा संकल्प केला व बादशहांचा निरोप मागितला. निरोपसमारंभासाठी पातशहांनी खास दरबार भरवला. तानाशहांनी राजांच्या बरोबर आलेल्या सरदार-मानकऱ्यांचे मुजरे नावनिशीवार घेतले. प्रत्येकाच्या दर्जानुसार अलंकार, वस्त्रे, हत्ती, घोडे दिले. निरोप घेताना दोघांचीही मने गहिवरली होती. तानाशहा राजांचे हात हाती घेत म्हणाले,

‘ज्या निष्ठेनं आपल्या वडिलांनी निजामशाही राखली, त्याच प्रेमानं तुमचं आम्हांला सर्व प्रसंगी साहाय्य असावं.’

राजांनी पातशहाला आश्वासन दिले.

‘आमची मैत्री अभंग राहील. आम्ही स्वत:ला जसे छत्रपती समजतो, तसेच, निजामशाहीचे प्रतिनिधी पण मानतो. आपली पातशाही वाढवावी, पठाणांना नेस्तनाबूद

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

करावं, दक्षिणची पातशाही दक्षिणींच्या हातांत राहील, ते करावे, हेच आमचं ध्येय आहे.'

पातशहांनी राजांना अत्तर लावले. आपल्या हातांनी तयार केलेला विडा राजांच्या हाती दिला. राजांनी प्रेमभराने पातशहांचे हात दाबले. ते म्हणाले,

'हजरत, आपण निर्धास्त असा, प्रेमभरानं आपण विडा दिलात, म्हणून नाकारीत नाही. पण या विड्याला आज किंमत नाही. आदिलशाही, कुतुबशाही आणि आम्ही मिळून जेव्हा मोगलांचा पराभव करू, तेव्हाच या विड्याचा स्वीकार करण्यात आम्हांला आनंद वाटेल. ईश्वराची कृपा असेल, तर तो दिवस फार लांब नाही.'

पातशहांनी तहाखेरीज पाच लक्ष होन राजांना दिले; प्रल्हादपंतांकडेच दोन्ही दरबारची वकिली सुपूर्द करून राजांवरचा विश्वास जाहीर केला.

तानाशहांचा निरोप घेऊन येणाऱ्या राजांना पाहण्यासाठी गर्दी लोटली होती. सुवर्णनाणी उधळीत राजे छावणीत परतले.

छावणी उठवली जात होती. अंधारी रात्र थंडी घेऊन उतरत होती. राजे आपल्या डेऱ्यात पुढील स्वारीचा बेत ऐकवीत होते. अचानक राजांना आठवण झाली. ते रघुनाथपंतांना म्हणाले,

'बाळाजींना बोलवा. आम्हांला एक तातडीचं आणि महत्त्वाचं पत्र लिहावयाचं आहे.'

थोड्याच वेळात बाळाजी डेऱ्यात आले. राजे रघुनाथपंतांना म्हणाले,

'पंत कुतुबशाहीचा आणि आमचा संबंध जडला. आदिलशाहीत पठाणी वर्चस्व आहे, तोवर तिथं शहाणपण सुचायचं नाही; पण त्या दरबारी मराठी माणसं आहेत. ती आपल्याला मिळाली, तर दुहेरी कार्य साधेल.'

'जी.'

'आमचे पिढीजाद शत्रू बाजी घोरपड्यांचे चिरंजीव मालोजी घोरपडे आदिलशाहीत आहेत. जुना दावा विसरून, त्यांना पत्र पाठविण्याचं आम्ही ठरविलं आहे. अशीच पत्रं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आम्ही इतरांना पाठविणार आहो.

बाळाजी लेखनसाहित्य घेऊन बसले. राजे विचार करीत डेऱ्यात येरझाऱ्या घालीत होते. राजे पत्र सांगू लागले :

'......... पूर्वी निजामशाहींतून आमचे बाप कैलासवासी महाराज इभराईम आदिलशाहा पातशहाचें कारकीर्दीस इकडे आले. त्यांस, इभराईम आदिलशाहानें पादशाही कारबाराचा मदार महाराजांचें शिरीं टाकला. तेव्हां महाराजानें हा विचार केला कीं, पातशाही मदार आपले हातास आला असतां आधीं तो आपलें जातीचें लोक मराठे याला हातीं धरून सरदारकी करून पोटें भरितात. ते पातशाही वजीर करावें. पादशाही कामें याजकडून करवून नामोश होय.इज्जती थोर पात्रेत ते करावे म्हणुन तुमचे बाजी घोरपडे सरदारकी करून होते, ते आणून पातशहास भेटवून पादशाही वजीर केले. पातशहांनी तुमचें चालविलें. ऐंशा तीन पिढ्या पादशहाच्या, दोनी पिढ्या तुमच्या जाहल्या. ऐशियास, महाराजानें तुमच्या बापास इतकें बरें केलें हे स्मरण न धरून जेव्हां कांही मुस्ताफाखानें महाराजांस दस्त करविलें तेव्हां तुमचें बाप बाजी घोरपडे हमी होऊन महाराजांस दस्त करून मुस्ताफाखाचें हातीं दिले. त्या दिवसापासून तुमच्या घराणियाचा दावा वाढत चालिला. तो कित्येक झगडियांत तुम्ही आमचें लोक मारिले. आदिकरून तुमचें बाप बाजी घोरपडे याला आमचें लोकीं झगडियांत मारिले. ऐसा दावा परस्पर चालिला होता. ऐशियास सांप्रती राजकारणवर्तमान तरी. दक्षिणेचें पादशाह तीन. निजामशाह, आदिलशाह, कुतुबशाह. त्यामध्यें निजामशाही पादशाही बुडाली ते समई, निजामशाही उमदे वजीर होते त्याणीं आदिलशाही दरगाहासी रुजुवाती करून आपणांस रोजगारास जागा केला. हाली आदिलशाही बेहलोलखान पठाणी घेतली, पादशाह लहान लेकरू नांव मात्र ते आपलें कैदेत ठेविले आहेत, आणि तख्त व छत्र व विजापूरचा कोट पठाणानें कबज केला आहे, कांहीं गुबारून मिळाला नाही. ऐशियास दक्षणचें पादशाहीस पठाण जाला, हे गोष्ट बरी नव्हे! पठाण बळावला म्हणजे एका उपरि एक कुलि दक्षिणीयांची घरें बुडविल, कोण्हास तगो देणार नाही. ऐशें आम्हीं समजोन हजरत कुतुबशहा पादशहा यांसी पहिलेपासून रुजूवात राखली होती....

.... जे कांहीं आपले जातीचे मराठे लोक आहेती ते आपल्या कटांत घेऊन कुतुबशाहासि त्यांची रुजूवात करावी, दौलत देखावी. त्यांचें हातें पादशाही काम घेऊन पादशाहाची पादशाही दराज करवी. आणि तुम्हां लोकांच्या दौलताहि चालेत, घरें राहते ते करावे. आपल्या जातीच्या मराठिया लोकांचें बरें करावें हें आपणांस उचित आहे, ऐसें मनावरी आणून, तुमचा आमचा वडिलांपासून दावा वाढत आला तो आम्हीं मनांतून टाकून, नि:कपट होऊन, तुम्ही मराठे लोक, कामाचें, तुमचें बरें करावें ऐसें मनी धरून, हजरत कुतुबशहाच्या कौलाचा फर्मान घेऊन पाठविला आहे. तरी, तुम्हीं कुलीन, आमचा भरोसा मानून, देखत पत्र हरएक उपायें पठाणापासून निघोन मजल दरमजल भागानगरास आम्हांपाशीं येणें....ऐशियास तुम्हीं, कदाचित ऐसा विचार कराल कीं आदिलशाहीचें आपण दे पिढीचें वजीर आणि आतां विजापूराकडून कुतुबशाहींत राजेयांचें बोले कैसें जावें?.... विजापूर पठाणांचें हातास गेले! आतां आदिलशाही कैची!! जरी पठाणांची चाकरी करोन राहो म्हणाल तरी पठाण कांहीं तुम्हांस थोर दौलत देणार नाही. तुम्हीं मराठे लोक, आपलें आहां; तुमचे गोमटे व्हावें, म्हणून

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

स्पष्टच तुम्हांस लिहिलें असे. ऐविसीं, आम्हांपासून अंतर पडें तरी, व मागिल दावियाचा किंतू मनांतून आम्हीं टाकिला ऐविसीं, आम्हांस श्री देवाची आण असें.तुम्हीं नि:संदेह होऊन येणें..... आम्ही सर्व प्रकारें तुमचें गोमटें करावयासी अंतर पडो नेदऊन. बहुत काय लिहिणें....'

दुसऱ्या दिवशी मालोजीरावांच्या पत्रावर सही शिक्का होऊन पत्र रवाना झाले. मग सर्व द्रव्य, वस्तभाव बरोबर घेऊन राजे स्वारीस निघाले. मराठी फौजेबरोबर गोवळकोंड्याचा सेनापती मिर्झा महंमद अमीन हा चार हजार पायदळ, एक हजार घोडेस्वार व तोफखाना संगती घेऊन राजांच्या फौजेत सामील झाला.

उगवत्या सूर्याच्या किरणप्रकाशात राजांनी भागानगरचा निरोप घेतला.

❑

११

राजांची फौज कर्नाटकाकडे जात होती. राजे मजल मारीत कर्नूलनजीक आले. कर्नूलपासून दहा-बारा कोसांवर तुंगभद्रेचा व कृष्णेचा संगम आहे. निवृत्तिसंगम या नावाने हे तीर्थ ओळखले जाते. राजांनी त्या संगमावर जाऊन स्नान केले, दानधर्म केला. राजांचे लक्ष आणखीन एका अशाच पवित्र स्थळावर लागून राहिले होते. श्रीशैलाच्या दर्शनाची ओढ त्यांच्या मनाला लागली होती. श्रीशैल म्हणजे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक तीर्थ. निवृत्तिसंगमावर स्नान करून राजे कर्नूलला आले. कर्नूलजवळ कृष्णापार होऊन राजे फौजेसह आत्मकूरला आले.राजांचा तळ आत्मकूरला पडला.

तेथूनच श्रीशैलाची वाट होती. नील पर्वताच्या रांगांमध्ये वसलेले ते दैवत होते. वाट डोंगर-दऱ्यांतून, निबिड वनातून जात होती. राजांच्या तळावर पुढे पाठविलेल्या नजरबाजांनी सर्व खबर आणली होती. अशा अवघड वाटेने सर्व फौज घेऊन जाणे कठीण होते. वाटेचा बंदोबस्त करण्यासाठी राजांनी नजरबाज, कामकरी माणसे पुढे रवाना केली. काही फौज पुढे कर्नाटकात पाठवून बाकीची फौज आत्मकूरला ठेवण्याचा राजांनी निर्णय केला.

आपल्याबरोबर निवडक माणसे व अश्वपथके घेऊन राजे श्रीशैलाच्या दर्शनाला निघाले. सरत्या थंडीच्या दिवसांत राजे आपल्या अश्वपथकानिशी दौडत होते. चौफेर सुपीक, सपाट

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भूमी आणि काळ्याभोर जमिनीच्या बांधाने सजलेली शेतवाडीची शिवारे दिसत होती. त्या विस्तीर्ण मुलुखावर कुठे तरी तुरळक उभी ठाकलेली बाभळीची बने, आंबाचिंचेची झाडे डोळ्यांना सुखवीत होती. माळरानावर वसलेले एखादे गाव धुराचे वलय माथ्यावर घेऊन झाडीच्या कुशीत विसावलेले दिसे. कैक वेळा दौडणाऱ्या अश्वपथकाकडे कान टवकारून पाहणारे हरिणांचे कळप उभे ठाकलेले दिसत. दुसऱ्याच क्षणी उंच उंच उशी घेत ती हरिणे नाहीशी होत.

दोन प्रहरचा विसावा घेतल्यावर भर उन्हातून दौड सुरू झाली. बरेच अंतर गेल्यावर अचानक बाळाजींनी राजांचे लक्ष वेधले. क्षितिजाच्या कडेला निळसर रेषा दिसत होती. रघुनाथपंत म्हणाले,

‘महाराज, नीलमलई पर्वताच्या रांगा!’

राजांनी हात जोडले. त्यांनी परत घोड्याला टाच दिली. हळू हळू सृष्टीचेही रूप बदलू लागले. तुरळक वनश्री दाट बनू लागली. पर्वताचे रूप स्पष्ट होऊ लागले.

झाडीने व्यापलेला तो आडवा पसरलेला पर्वत पाहून राजांचे मन प्रसन्न झाले. आपल्या मुलुखाची त्यांना आठवण झाली. कर्नाटकात उतरल्यापासून गेल्या कित्येक महिन्यांत राजे नुसती सपाट भूमी पाहून कंटाळले होते. नीलमलई पर्वताच्या दर्शनाने राजांना आपला बारा मावळचा मुलूख आठवला; चारी बाजूंनी आकाशाला भिडलेला, सह्याद्रीच्या कुशीत निर्धास्त बनलेला रायगड आठवला.

नीलमलई पर्वताला सुरुवात झाली. राजांनी सर्वांना त्या पवित्र भूमीत शिकार न करण्याची आज्ञा केली. मार्ग आक्रमावा, तशी विरळ झाडी दाट बनत होती. साग, सावर, शिसवा यांचे उंच गेलेले शेंडे, मधून मधून दिसणारी चंदनाची झाडे, नाना रंगांच्या फुलांनी बहरलेल्या जाळ्या वसंताचे आमगन सूचित करीत होत्या. नव्या पालवीने नटलेले ते रान अनेक पक्ष्यांच्या आवाजांनी भरून गेले होते. राजांच्या पथकांना टेहळेकरी भेटत होते. ते मार्ग दाखवीत होते. राजे सायंकाळच्या वेळी पर्वतमाथ्यावर आले. समोरचे दृश्य अलौकिक होते. मावळत्या सूर्यकिरणांत समोर नीलमलई पर्वताच्या रांगा दिसत होत्या. पठारावर मोकळ्या जागेत दोन-तीन तंबू उभारले होते. राजांचा मुक्काम तेथे होणार होता.

रात्र पडली. शेकोट्या पेटल्या. तंबूच्या भोवती अश्वपथके विसावली. जागते पहारे सुरू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झाले. साऱ्या रानावर चांदणे पसरले होते. राजे आपल्या तंबूत विसावले होते. झालेल्या घोडदौडीने त्यांना खूप थकवा आला होता. वन्य श्वापदे, रात्रपक्ष्यांचे रानावर उठणारे आवाज ऐकत राजे निद्राधीन झाले.

पहाटेला पक्ष्यांच्या आवाजांनी सारे रान जागे झाले. सूर्योदयाला राजांनी मार्ग आक्रमायला सुरुवात केली. वृक्षराईतून वळणे घेत गेलेल्या रस्त्यावरून राजे जात होते.

दऱ्या, घाट ओलांडून राजे कृष्णेच्या प्रवाहाजवळ आले. दोन उत्तुंग पर्वतांच्या खोल दरीतून कृष्णा वाहत होती. दरीतून वाहणारा तो निळाभोर प्रवाह, दोन्ही बाजूंना आकाशापर्यंत चढलेली गर्द वनराईने भरलेली दरड - ते दृश्य मोठे विलोभनीय होते. राजे भान हरपून ते पाहत होते. कृष्णेकडे जात असता ठायी ठायी ढासळलेले बुरूज, तट यांच्या खुणा नजरेत येत होत्या. कृष्णेच्या उतारावर राजांची माणसे वाट पाहत होती. उतारावर राजे कृष्णापार झाले. समोरच्या डोंगरमाथ्यावर श्रीशैल होते. रघुनाथपंत राजांना म्हणाले,

'महाराज, या ठिकाणाला 'नीलगंगा' म्हणतात. या ठिकाणापासून पाताळगंगेपर्यंत कृष्णा उत्तरवाहिनी झाली आहे. हे तीर्थाचे ठिकाण आहे.'

राजे निश्चल नजरेने प्रचंड शिलाखंडांतून खळखळत जाणारे निळेभोर पात्र निरखीत होते.

'पंत, ज्यांनी ह्या जागेला 'नीलगंगा' नाव दिले असेल, ते केवढे रसिक! आमचे संस्कृत कवी खरोखरच थोर. माणसाच्या देण्यापेक्षा देवाचं देणं त्यांनी खूप पाहिलं. त्यांनी नक्षत्रांची वर्णनं केली, मृगाच्या धारा सांगितल्या. एका नदीचं वाहणारं पात्र; पण त्याचे बदलते रंगदेखील टिपले. पंत, या जागी आपण स्नान करू. मगच देवदर्शनाला जाऊ.'

राजे स्नानाच्या तयारीनिशी नीलगंगेत उतरले. त्या प्रवाहात त्यांनी स्वत:ला झोकून दिले. राजे मनसोक्त पोहत होते. राजांना इतके सुंदर पोहता येते, हे रघुनाथपंत प्रथमच पाहत होते. सर्वांची स्नाने झाली. पंतांनी सांगितले,

'महाराज, आपण सुरेख पोहता!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पंत, त्यासाठीच आमचा जन्म आहे... प्रवाहाविरुद्ध पोहत राहायचं.’ भानावर येत राजे म्हणाले, ‘थट्टा केली, पंत! आम्हांला खरंच पोहणं आवडतं. संधी मिळेल, तेव्हा आम्ही बाणकोटला पोहायला जात होतो. समुद्रस्नानासारखं सुख नाही... पण स्वत:ची हौस पुरवीत बसण्याइतकी आम्हांला उसंतच मिळली नाही.’

राजे कपडे करून तयार झाले. सूर्य मध्यान्हाकडे चढत होता. राजांचे लक्ष समोरच्या भव्य दृश्यावरून फिरत होते. राजांनी विचारले,

‘पंत, ते काय?’

‘महाराज, ते जुन्या किल्ल्यांचे अवशेष आहेत. असाच दुसरा किल्ला इथं आहे.’

‘कुणी बांधले हे किल्ले?’

‘महाराज, इथून नजीकच असलेल्या पाताळगंगेच्या वरच्या अंगाला कृष्णेच्या दोन्ही काठांमध्ये सम्राट चंद्रगुप्ताचा प्रदेश होता. त्या साम्राज्याचे अवशेष आजही दिसतात.’

‘हं!’ राजे खिन्न झाले. ‘पंत, एवढं मोठं साम्राज्य! काय झालं त्याचं? हे पडके अवशेष, हे ढासळलेले बुरूज, हेच ना त्याचं रूप?’

‘कालाय तस्मै नम:!’

राजांचे सारे भाव क्षणात पालटले. एक कसली तर सूक्ष्म वेदना त्यांच्या चेहऱ्यावर तरळू लागली. स्नानामुळे ओले झालेले, मागे परतविलेले मानेवर रुळणारे केस, कपाळी शिवगंध, अंगात पांढरा शुभ्र अंगरखा आणि पायांत तंग विजार परिधान केलेले राजे वेगळेच भासत होते. स्वत:शीच बोलल्यासारखे राजे सांगत होते,

‘या पृथ्वीवर जे जे जड आहे, ते ते नाशवंत आहे. हा सृष्टीचा नियम. त्याला अपवाद नाही. पिढ्यान् पिढ्यांचा अनुभव घेऊनही याचा परिणाम आपल्यावर नाही! आमचंच पाहा ना... केवढे अफाट परिश्रम! आकाशाला भिडलेल्या उघड्या बोडक्या पर्वतमाथ्यांवर आम्ही गडांचे जिरेटोप चढविले. तटांचे कमरबंद बांधले. स्वराज्याच्या कक्षा सुरक्षित राखण्यासाठी चौफेर हे बुलंद सुभेदार उभे केले. अनेक वर्षांची खडतर तपश्चर्या फळाला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आली. हे कशासाठी! या भूमीत आपलं राज्य असावं, इथं आमचे देव, धर्म सुरक्षित राहावे, इथला प्रत्येक माणूस तृप्त व्हावा, आमच्या आयाबहिणींची अब्रू सुरक्षित असावी, 'ही माझी भूमी आहे, इथं माझा अधिकार आहे,' असं म्हणण्याचं सामर्थ्य प्रत्येकाला यावं, म्हणून.'

राजे क्षणभर थांबले. त्यांनी श्वास घेतला.

'पण यासाठी केवढी प्राणहानी! केवढी उलाढाल! किती संकटांना सामोरं जावं लागलं! केवढी आक्रमणं सहन केली, करायला लावली.... पंत, या स्वप्नापायी एक पिढी खर्ची पडली. कशासाठी एवढी धडपड केली? अपार कष्टांनी आज उभं केलेलं हे स्वप्न पुढची पिढी जतन करील का?'

त्या विचाराबरोबर राजे कावरेबावरे झाले.

'पंत, त्याचा भरोसा कोण देणार? जीव जन्माला यायचा झाला, तर त्याचा नऊ महिन्यांचा गर्भवास तरी कळतो. पण मृत्यू? एका क्षणाचा कारभार. साऱ्या यातायातींची समाप्ती. आणि एवढ्या महत्त्वाचा जो क्षण, तो केव्हा, हे मात्र कुणालाच माहीत नाही. मग ही उठाठेव कशासाठी? पूर्वजांनी बाधलेले अवशेष थोडे का होते, म्हणून भावी कालासाठी आम्ही त्यांत भर घातली? कशासाठी हे सारं केलं? खरंच, माणसाला स्वप्नं नसती, तर किती बरं झालं असतं!'

राजांची ती अवस्था, ते बोलणे ऐकून रघुनाथपंत चकित झाले. डाव्या हातावर मस्तक ठेवून बसलेल्या राजांना पंतांनी हाक मारली,

'महाराज!'

राजांनी वर पाहिले. पंत, येसाजी वगैरे मंडळींच्या चेहऱ्यांवरची भीती राजांनी जाणली. ते उठत म्हणाले,

'ठीक आहे, पंत. चला! आता आम्हांला परमेश्वरदर्शनाची ओढ लागली आहे.'

'महाराज, इथून आता फक्त कोस-सव्वा-कोसाचं अंतर आहे. चढण फार आहे. घोडी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दुसऱ्या वाटेनं येतील. पालखी मागवली आहे.'

'पालखी कशाला? वाट चांगली नाही?'

'पाताळगंगेपासून घाट आहे, पण चढण फार आहे.'

'आम्ही चालत जाऊ. चला.'

राजे चालू लागले. नीलगंगेपासून पाताळगंगेपर्यंत नदीकाठानेच रस्ता होता. पाताळगंगेला देवस्थानाकडे जाणारा घाट नजरेत आला. शेकडो पायऱ्यांचा तो घाट आकाशात चढल्याचा भास होत होता. राजांनी पायऱ्या चढायला सुरुवात केली. राजे दमाने पायऱ्या चढत होते. मागे-पुढे लोक चालत होते. राजे अर्धा-अधिक घाट चढून गेले. राजांना दम लागला. थोडी विश्रांती घेऊन राजे पुन्हा घाट चढू लागले. काही अंतर चढल्यावर पुन्हा त्यांना धाप लागली. पायऱ्या चढणे कठीण झाले. पंतांनी काळजीच्या सुरात विचारले,

'पालखी मागवू?'

हाताने 'नको' म्हणून खुणावीत राजे विश्रांतीसाठी थांबले. त्यांचा सारा चेहरा घामाने डवरला होता. काही अंतर गेल्यावर राजे रघुनाथपंतांना म्हणाले,

'पंत! सारं आयुष्य गड चढण्यात-उतरण्यात घालवलं; पण आता ती ताकद राहिली नाही. शरीर थकलं आता!'

'क्षमा, महाराज!' रघुनाथपंत म्हणाले. 'अजून पन्नाशी आली नाही; आणि असं का बोलावं?'

'वयाच्या हिशेबावर शरीराचा मगदूर थोडाच टिकतो? आम्ही आठ वर्षांचे होतो. दादोजी तेव्हा आम्हांला सांगत, 'राजे, आता तुम्ही लहान नाही.' तेव्हापासून घोड्यावर मांड आणि शिरावर जबाबदारी आली. बाल्य केव्हा उलटलं, तारुण्य केव्हा आलं, प्रौढत्वानं जीवनात केव्हा प्रवेश केला, काही कळलं नाही. एका स्वप्नासाठी धावता-धावता सारं विसरून गेलं. जीवनाचा उपभोग घ्यायला सुद्धा उसंत मिळावी लागते. पंत!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी वरती पाहिले. आता घाटाचा थोडा टप्पा राहिला होता. पंतांनी राजांची नजर हेरली. ते म्हणाले,

‘आता थोडं अंतर राहिलं.’

राजांनी पंतांच्याकडे पाहिले. ते हसले.

‘खरं आहे, पंत! आता थोडं अंतर राहिलं. देवदर्शनाला आमचं मन उतावीळ झालं आहे. चला.’

न कळत राजांचा हात पंतांच्या खांद्यावर विसावला. त्या खांद्याचा आधार घेत राजे एक एक पायरी चढत होते. घाटाचा माथा नजरेत येत होता.....

□

१२

राजे आतुरलेल्या मनाने घाट चढून आले. पर्वतमाथ्यावरच्या डोंगरपठारावर उभे असलेले भव्य मंदिर राजांच्या डोळ्यांत भरले. सायंकाळच्या तिरप्या किरणांत रम्य वनश्रीने वेढलेला मंदिराचा प्राकार मनावर ठसत होता. मंदिराचे गोपुर भव्य व उत्तुंग होते.

राजांच्या पुढे गेलेले बाळाजी, जनार्दनपंत, सोमाजी नाईक ही मंडळी सामोरी आली. मंदिरापासून थोड्या अंतरावर राजांसाठी खास डेरा उभारला होता. चार-पाच तंबू आजूबाजूला विखुरले होते. मोकळ्या जागेवर पागा सजली होती. महादेव सामोरा आला. त्याने मुजरा केला.

‘महादेव, केव्हा आलास?’

‘दोन दिवस झाले.’

‘सर्व व्यवस्था लागलेली दिसते.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'जी!'

'बाळाजी, देवदर्शन आटोपूनच आपण डेऱ्याकडे जाऊ.'

राजे सर्वांसह देवळाकडे जात होते. देवळाच्या गोपुरावर शिल्प दिसत होते. मंदिराचा तट दीड पुरुष उंचीचा ताशीव दगडांचा होता. रामायण-महाभारतांतील प्रसंगांच्या शिल्पांनी तो तट भरून गेला होता. राजांच्या स्वागतासाठी मंदिराचे पुजारी समोर आले. राजांनी त्यांना अत्यंत नम्र भावाने वंदन केले. राजांनी आवारात पाऊल टाकले; आणि ते तेथेच थबकले. समोरचे दृश्य मनावर दडपण आणीत होते. जवळ जवळ तीनशे गज रुंद आणि पाचशे गज लांब, असे त्या मंदिराचे आवार होते. चारही बाजूंनी प्रशस्त ओवऱ्या होत्या या ओवऱ्या उत्कृष्ट शिल्पांच्या कमानीखांबांनी नटल्या होत्या. जिकडे दृष्टी फेकावी, तिकडे सुबक शिल्प नजरेत भरत होते. त्या भव्य आवारात श्रीशैल-मल्लिकार्जुनाचे प्रचंड देवालय उभे ठाकले होते. मंदिराच्या समोरच्या चौकात दीड पुरुष उंचीचा अखंड दगडातून कोरलेला नंदी दिसत होता. भूलोकीच्या कैलासातच आपण उतरलो आहो, असा भास राजांना झाला. राजांनी मंदिरात प्रवेश केला. त्यांची नजर गाभाऱ्यावर स्थिरावली होती. गाभाऱ्यात नंदादीपाच्या शांत प्रकाशात ते दिव्य शिवलिंग उजळून निघाले होते. सुवर्णनागाच्या पाच फणांनी लिंगावर छत्र धरले होते. अभिषेककलशातून थेंबाथेंबाने शिवलिंगावर पाणी पडत होते. त्या सुबक पिंडीवरील शिवगंधाने त्याच्या सौंदर्यात गांभीर्य ओतले होते. त्या दर्शनाने राजांचे मन उचंबळून आले. त्यांनी देवापुढे साष्टांग दंडवत घातला. राजे उठून उभे राहिले, तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. आजूबाजूचे लोक पाहत आहेत, याचेही त्यांना भान राहिले नव्हते. देवदर्शन करून राजे मंदिराच्या बाहेर आले. पुजारी सांगत होते...

'हे स्थान पुरातनकालापासून प्रसिद्ध आहे. शैलदानं तपश्चर्या करून श्रीशंकरांना प्रसन्न करून घेतलं. त्याच्या वरानं शैलदाला तीन मुलं झाली. ती तिन्ही मुलं शिवभक्त होती. ज्येष्ठ पुत्र नंदीनं आपल्या तपश्चर्येनं शंकराला प्रसन्न करून घेतलं, आणि तो शिवाचं वाहन नंदिकेश्वर बनला. दुसरा पर्वत. त्यानं देवांना प्रसन्न करून घेऊन देवांनी आपल्या मस्तकी वास्तव्य करावं, अशी इच्छा व्यक्त केली. पर्वत पर्वत बनला; आणि दिल्या वचनाप्रमाणे शंकरांनी तिथं वास्तव्य केलं.'

मंदिराच्या मागे असलेल्या दुसऱ्या देवालयापाशी राजे आले. राजे कुलस्वामींचे दर्शन घेऊन तृप्त झाले होते. आता दर्शन घडणार होते भवानी मातेचे. तिचे नाव होते 'भ्रमरांबा'.
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुजारी सांगत होता :

‘महाराज, या देवालयाचा जीर्णोद्धार विजयनगरचे सम्राट कृष्णदेवराय यांनी केला. या देवीला ‘भ्रमरांबा’ म्हणतात. त्यालाही तसंच कारण आहे. महिषासुराचा वध करीत असता देवीच्या गळ्यात कमळांचा हार होता. त्या सुगंधानं मोहित झालेले भ्रमर त्या हाराभोवती गुंजारव करीत होते. त्यामुळं देवीच्या रूपाला ‘भ्रामरी’ हे नाव पडलं...’

राजांनी अत्यंत श्रद्धायुक्त अंत:करणाने देवीचे दर्शन घेतले. राजे मंदिराच्या बाहेर आले. सूर्य मावळला होता. चांदण्याच्या उजेडात मंदिर उजळत होते. मंदिरातून फिरत राजे ओवऱ्यांच्या जवळ आले. धीर करून रघुनाथपंत राजांना म्हणाले,

‘आता डेऱ्याकडे चलावं. रात्र झाली.’

‘नको, पंत! आम्हांला इथंच राहावंसं वाटतं. आयुष्यभर ज्या स्थळाचा आम्ही शोध करीत होतो, ते स्थळ सापडल्यासारखं वाटतं. आम्ही इथं ओवरीवरच राहू.’

‘पण, महाराज, दोन दिवसांनी चैत्री पौर्णिमा आली. इथं यात्रा भरते. गर्दी होईल.’

‘मग त्यात काय बिघडलं? देवीच्या दारी येणारे सारेच भक्त. ही काय कुतुबशहांची भेट आहे, की इथं मानपान लक्षात घ्यावा? आमची व्यवस्था इथंच करा. इथून आता नजर हलवावी, असं वाटत नाही.’

साऱ्यांचा नाइलाज झाला. धावपळ सुरू झाली. ओवऱ्या झाडून, स्वच्छ करून, राजांची बिछायत अंथरण्यात आली. सारी गडबड चालू असता राजे मात्र एका खांबाला टेकून डोळे मिटून बसले होते. येसाजी, बाळाजी, मानाजी राजांचा फलाहार घेऊन आले. रघुनाथपंत म्हणाले,

‘महाराज, दूध, फळं आणली आहेत.’

‘अं?’ म्हणत राजांनी डोळे उघडले. रघुनाथपंतांच्यावर राजांची नजर स्थिर झाली. ‘पंत, आम्हांला भूक नाही. तुम्ही जेवून घ्या.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

साऱ्यांनाच काही कळत नव्हते. राजांचे रूप, वागणे अगदी निराळे बनले होते. कोणी जेवायला गेले नाहीत, याचे भान राजांना नव्हते. ते नुसते बसून होते. मध्येच त्यांनी डोळे उघडले, सर्वांवरून नजर फिरविली.

'बाळाजी, पंत, येसाजी, तुम्ही आजवरच्या साऱ्या आज्ञा पाळल्यात. आता एक आज्ञा केली, तर ऐकाल?आमची इच्छा पुरवाल?'

'महाराज, शंका का आली?' येसाजी म्हणाला, 'बोला, महाराज, तुम्ही सांगावं, आम्ही ऐकावं.'

'शब्द बोलता येतात; ते पाळणं फार कठीण असतं. तानाजी असंच बोलून गेला. शब्द पाळला, पण परत तो दिसला नाही!'

'जीव गेला, म्हणून काय झालं? शब्द पडू दिला का?' येसाजीने विचारले.

राजे हसले. 'पंत, इथं आल्यापासून खूप समाधान मिळालं. आम्ही खूप विचार केला... आयुष्यभर निष्ठेनं वागलो. अपार श्रम केले. त्या श्रमांचं सार्थक झालं. श्रीजगदंबेनं सर्व मनोरथ पूर्ण केले. तुम्ही सर्व लोक जबाबदार आहात. तुमच्या हाती राज्य सुरक्षित आहे. तुम्ही परत जा! संभाजी, राजाराम यांपैकी तुमच्या मनात येईल, त्याला गादीवर बसवा; राज्याची धुरा संभाळा.'

साऱ्यांची मने त्या बोलांनी चरकून गेली. येसाजी उद्गारला,

'महाराज!'

देवाच्या मंदिराकडे बोट दाखवीत राजा म्हणाले,

'महाराज तो! आम्ही कुठले? आता आमचे राजेपण संपलं. आता उरलेलं आयुष्य आम्ही इथंच घालविणार. ईश्वरचरणी उरलेलं आयुष्य घालवावं, असं वाटतं. ही इच्छा आता तुम्ही पुरवा.'

साऱ्यांचे डोळे भरून आले. येसाजीने राजांचे पाय धरले. रघुनाथपंत आपले अश्रू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

टिपीत बोलले,

'महाराज, तुम्हांला सोडून आम्ही कुठं जायचं? हाच निर्णय महाराजांनी करायचा ठरविला असेल, तर आम्हीही इथं राहतो... आपल्याबरोबर आमच्याही जिवाचं सार्थक होऊन जाईल.'

येसाजीला उठवीत राजे म्हणाले, 'येसाजी, पाहिलंस, बोलणं किती सोपं असतं, ते? मोहाचं रूप असंच असतं. नाही तर लाकूड पोखरणारा भुंगा कमळात कशाला अडकून पडला असता? ...ठीक आहे. झोपा तुम्ही. आम्हीही झोपतो.'

राजे झोपलेले पाहून साऱ्यांना जरा बरे वाटले. राजांच्यापासून थोड्या अंतरावर येसाजी, मानाजी, रघुनाथपंत, बाळाजी ही मंडळी झोपली. ओवरीखाली महादेव हाती तळपती तलवार घेऊन उभा होता. मंदिराच्या आवारात चांदणे उजळून निघाले होते. रात्र चढत होती. राजांनी हाक मारली,

'महादेव!'

'जी.'

'पहारा करतोस?'

'जी.'

'महादेव, झोप जा. श्रीशैलमल्लिकार्जुनासारखा पाठीराखा सामोरा असता पहारा कसला करतोस, बाबा? इथं येऊन तरी त्याचा अपमान करू नको. जा, झोप जा.'

महादेव बाजूला झाला. नीरव शांतता त्या मंदिराच्या आवारात नांदत होती. मध्यरात्रीचा सुमार जवळ आला होता. झोपलेले राजे उठून बसले. त्यांनी आजूबाजूला पाहिले. सर्वत्र शांतता होती. कोणीही जागे नव्हते. राजे शांतपणे उठले. त्यांनी उशाची तलवार उचलली. निद्राधीन झालेले रघुनाथपंत, बाळाजी, येसाजी, मोरे यांवर नजर टाकून राजा अलगद पोळीवरून उतरले. पिठूर चांदण्यात देवाचे आवार न्हाऊन निघाले होते. राजे मंदिराकडे चालत होते. ओवरीच्या खांबाआड उभा असलेला महादेव विस्फारित नेत्रांनी राजांच्याकडे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाहत होता. त्याने गडबडीने रघुनाथपंतांना डिवचले. रघुनाथपंतांनी पाहिले. तोंडावर बोट ठेवून महादेव उभा होता. काही न बोलता रघुनाथपंत उठले. महादेवाने बोटाने दिशा दाखविली. देवळात जाणारे पाठमोरे राजे रघुनाथपंतांना दिसले. रघुनाथपंतांनी पाहता-पाहता येसाजी, मानाजी, बाळाजी यांना जागे केले. क्षणात साऱ्यांनी पोळीवरून उड्या घेतल्या. राजे मंदिरात गेले होते. स्थिर पावलांनी राजे मंदिरासमोरच्या चौकात आले. चांदीच्या पत्र्यांनी मढवलेला मंदिराचा दरवाजा बंद होता. त्या दरवाजासमोर जाऊन राजांनी गुडघे टेकले. निश्चल नजरेने ते दरवाजाकडे पाहत होते. राजांच्या नजरेसमोर गाभाऱ्यातील शिवलिंग तरळत होते. राजांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच निर्धार प्रकटला होते. राजांनी शांतपणे तलवार उपसली. राजे नतमस्तक झाले. तलवारीचा उजवा हात उंचावला गेला. ते तळपते पाते राजांच्या मानेवर उतरणार, तोच राजांचे मनगट पकडले गेले. कानांवर गुदमरलेला आवाज आला,

‘महाराज, काय हे?’

राजांनी दचकून वर पाहिले. रघुनाथपंतांनी राजांचे मनगट धरले होते. चारी बाजूंना सारे गोळा झाले होते. राजे ओरडले,

‘सोडा हात! इथं राहू देत नाही. निदान हे शिरकमल देवाच्या चरणी रुजू तरी करू दे!’

रघुनाथपंतांच्या अंगाला कंप सुटला होता. कसेबसे ते म्हणाले,

‘महाराज, आत्महत्या पाप आहे!’

राजांची संतप्त नजर रघुनाथपंतांवर खिळली. बाहेरच्या चांदण्यांच्या अंधूक प्रकाशात राजांची नजर चमकली.

‘पंत, आत्महत्या पाप आहे; आत्मसमर्पण पुण्य आहे!’

‘मान्य आहे. त्याचाच निर्णय मनाशी करावा.’ रघुनाथपंत निर्धाराने बोलले.

‘काय म्हटलंत?’ राजे पुटपुटले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्यांची नजर बंद द्वाराशी खिळली. रघुनाथपंतांनी धरलेल्या मनगटातील तलवार खणखणत फरशीवर पडली. येसाजीने तलवारीचा ताबा घेतला. रघुनाथपंतांच्या हाताची पकड सुटली.

राजे तसेच बसून होते. सर्वांगाला कापरा सुटलेली, घडलेल्या प्रसंगाने सुन्न झालेली मंडळी मंदिराच्या चौकाच्या चारही बाजूंना राजांवर नजर ठेवून उभी होती. राजे निश्चल नजरेने देवाचा बंद दरवाजा पाहत होते.

❑

१३

‘हे बंद दरवाजे उघडणार केव्हा?

‘एक दरवाजा उघडावा, तर दुसरा बंद दरवाजा आत दिसतो. हे दरवाजे उघडण्याचे संपणार केव्हा? तेव्हा अंतिम दरवाजा उघडला जाईल, तेव्हा धीट मनानं गाभाऱ्यात प्रवेश करता येईल का?

‘मग हातची तलवार गळून का पडली?

‘खरं कोणतं आणि खोटं कोणतं? मनाची तगमग का उडून राहिली आहे? कुतुबशाहीच्या ऐश्वर्यसंपन्न सुखोपभोगात असताही मन उदास का होतं? कसली हुरहूर ह्या आत्म्याला लागली आहे? ज्या निष्ठेनं जीव जगत होता, त्या निष्ठेत तरी गफलत झाली नाही ना?

‘श्रींची इच्छा, या श्रद्धेनं उभं केलेलं राज्य! श्रद्धेनं जपणूक केलेलं एक स्वप्न. त्या राज्याच्या भवितव्याची चिंता तरी मनाला छळत नसेल? या राज्याची धुरा कोण संभाळील? हे वाढीला लागेल का? अक्षय टिकेल का? अक्षय टिकेल का?

‘स्वत:ला फसविण्यातदेखील केवढा आनंद असतो! स्वत:च्या लोभाला केवढं सुंदर आवरण!

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अतिलोभाचंच नाव तर निष्ठा नसेल?

‘ज्ञानदेवांनी ज्ञानदेवी अवघ्या पंधराव्या वर्षी लिहिली. माणसाला त्याचा धर्म कळावा, सहज समजावा, म्हणून गीता मराठीत आणली. ती शिकवण माणसांना दिली. तिचं पुढं काय झालं, याची चिंता त्यांनी कुठं केली? आपलं कार्य झालं, हे ध्यानी येताच जीवनाचा मोह सोडून त्यांनी समाधी घेतली.

‘ही देवांची उदाहरणं; सामान्यांना कशी लागू पडणार?

‘का नाही? मासाहेबांनी आम्हांला वाढवलं. सारं जीवन खडतरपणे काढलं. पुत्रवियोगाचा, पतिवियोगाचा आघात सहन केला. आमच्या चिंतेत ती माउली अहोरात्र जळत राहिली, नंदादीपासारखी. आमच्या भूमीत आमचं राज्य उभं राहावं, एवढी एकच इच्छा त्या जिवाला. ही इच्छा जगण्याचं सामर्थ्य देत होती. आमचं राज्य उभं राहिलं. तपश्चर्या फळाला आली. आम्ही छत्रपती झालो, हे पाहायला मिळालं. पण हाती आलेल्या यशाचा सुखोपभोग घेण्यात मासाहेब गुंतल्या नाहीत. कुडीचा मोह सोडून, आमच्याकडे न राहता त्या निघून गेल्या. पण आम्ही? आम्हांला मात्र मोह सोडवत नाही.

‘मोह! हाती काय राहिलं, की ज्याच्या मोहात गुंतावं? पर्वताप्रमाणे बाप असून, त्याची छाया कधी लाभली नाही. उदंड मायेची माय असून कधी तिच्याजवळ हट्ट करता आला नाही. आम्ही राजे असूनही उपभोग हा शब्द कधी जीवनात आला नाही. संसाराच्या पटावर एक-दोन दानं टाकून, अर्धा डाव सोडून सई निघून गेली. ती गेली; पण मनाची ओढ तशीच राहून गेली. ती जागा कधी भरून निघाली नाही.

‘राज्याभिषेक झाला. वाटलं... आता जरा उसंत मिळेल. मासाहेबांनी घेतलेल्या दगदगीला विश्रांती लाभेल. उरलेलं मायेचं माणूस... त्या थकल्या जीवाची सेवा करीत, सुख देत-घेत दिवस काढता येतील. पण तेवढाही स्वार्थ ईश्वरदरबारी मान्य नव्हता. मासाहेब निघून गेल्या. आम्ही कायमचेच पोरके झालो!

‘मोह! त्यालादेखील आधार लागतो. आमच्या शब्दाखातर जीव वेचायला तयार होणारे हजारो आम्ही तयार केले. पण आमच्या जिवाच्या जपणुकीसाठी तळमळणारा जीव आम्हांला तयार करता आला नाही. कदाचित तो विश्वास आम्हांला देता आला नसेल.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘विश्वास द्यायचा, म्हणजे आणखीन काय करायचं?

‘वाढत्या वयाबरोबर शंभूबाळ दुरावत चालले. जवळ येतात, ते आणखी दूर जाण्यासाठी!.... आणि घरात.... आमच्यावर विषप्रयोग केला जातो.... अमृताचा वर्षाव करण्यासाठी जवळ केलेली माणसं.... तीच विष पेरायला लागली, तर काय करायचं? कुणाला सांगायचं? राजा झाला, म्हणून काय झालं? तो सुद्धा माणूसच आहे ना?

‘हीही जगण्याची धडपड!

‘जगणं! याला का जगणं म्हणतात?... ती घोड्यांची खिंकाळणी, तोफांचा भडिमार, टापांचा आवाज, तलवारींचा खणखणाट, अखेरच्या वेदनेनं उठणाऱ्या आर्त किंकाळ्या!.... दिसेल तो मुलूख जिंकण्याची हाव धरून चालत राहायचं; आडवा येईल, त्याला चिरडून टाकायचं; शेल्याखाली झाकलेल्या आपल्या माणसांवर अश्रू ढाळायचे; परत पुढचा मुलूख पाहायचा! घराच्या भीतीमुळं एवढं करावं लागतं? राजा असो, नाही तर रंक असो; त्याला घर हे हवंच. ते नसेल, तर अशीच वणवण दोघांच्याही माथी. दिवस-रात्र हेच युद्ध चालायचं!

‘दिवस आणि रात्र, पौर्णिमा, अमावास्या- नेहमी येतात, जातात. महिने उलटतात. वर्षं कालाच्या उदरात गडप होतात. काल अनंत आहे. पण जीवन?...

‘जीवन! केवढा थोडा पल्ला! फार तर साठी-शंभरीची गाठ. गेला क्षण माघारी न येणारा. मग दिवस आणि रात्र कुठली? एवढं अमोल जीवन पाहता-पाहता निघून गेलं. बाल्यातला लडिवाळपणा उपभोगला नाही. तारुण्याची हौस रेंगाळली नाही. समृद्ध जीवनाच्या उपभोगानं मन धुंदावलं नाही. ते जीवन आलं, आणि तसंच हरवलं. परत कधीही न मिळणारं... हरवलं! ही जाणीव केवढी भयानक! वृद्धत्वाच्या उंबरठ्यावर जेव्हा ही जाणीव होते, तेव्हा जिवाची त्रेधा उडते!

‘परत जीवन मिळालं, तर आपण असंच वागू का?

‘आसक्ती म्हणतात, ती हीच नसेल ना? हरवल्याचं दुःख एवढं होतं? उपभोग घेऊ नको, म्हणून कुणी सांगितलं होतं? बारा मावळची जहागीर आणि आदिलशाहीची नोकरी चालविली असती, तर आम्हीसुद्धा फर्जंद शिवाजीराजे बनलो नसतो? उपभोग म्हणजे घेणं;

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्याग म्हणजे देणं. देवाचं रूप देण्यात आहे, घेण्यात नाही. उपभोग घेता येत नाही, म्हणून का संत संन्यस्त जीवन कंठतात? वयाच्या एकविसाव्या वर्षी ऐन तारुण्यात समाधी घेतात? समर्थ शिवथरघळीत स्वत:ला कोंडून घेतात? मनाची तगमग झाली असती, तर दासबोध सुचला नसता, ज्ञानदेवी स्त्रवली नसती.

'यशाचा परमोच्च बिंदू हाती असतानाच जीवन संपावं, हा तरी अट्टहास का धरावा? तोही स्वार्थच! ज्यानं मला जन्माला घातलं, त्याच्या हाती माझा शेवट. जन्म आणि मृत्यू या दोन्ही गोष्टी त्याच्या अधीन. त्या स्वत:च्या हाती घेण्याचा मला काय अधिकार? तसं करू पाहणं हा दैवी इच्छेचा उपमर्दच नाही का? तसं पाहिलं, तर आपल्या हातांत काय आहे? तो सुखदु:खं देतो, आपण ती भोगतो. काही हातांशी नसता त्यानं छत्रपती बनविलं, हातून उदंड करविलं, घडविलं. त्याचा शेवट त्याला ठरवू दे. तो जे जे देईल, त्यात आनंद मानायला हवा. सारं चांगलेपणानं सहन करायला हवं.... सोसायला हवं. ते बळ तो निश्चित देईल....'

राजे भानावर आले. पहाटेचा समय झाला होता. समोरचा दरवाजा उघडा होता. प्रसन्न शिवलिंगाच्या दर्शनाने राजांचे मन समाधान पावले. काकडआरतीचा आवाज उठत होता. नगाऱ्याचा गंभीर नाद त्यात मिसळत होता.

राजांनी अश्रू पुसले. भारावलेल्या अवस्थेत ते उभे राहिले. राजांचे लक्ष माथ्यावरच्या घाटेकडे गेले. न कळत त्यांचा हात उंचावला गेला.

देवाची आरती चालली होती. राजे घाट वाजवीत होते.

□

१४

भाविक यात्रेकरूंची गर्दी श्रीशैलावर होत होती. पौर्णिमेची यात्रा एक दिवसावर आली होती. राजांनी त्या पवित्र स्थळी अनेक धर्मकृत्ये पार पाडली. कृष्णेला घाट बांधण्याचे व देवळाच्या उत्तरेकडच्या गोपुराचा जीर्णोद्धार करण्याचे राजांनी ठरवले. राजे त्या वातावरणात रमले. देवाची पूजा, ध्यान यांत त्यांचा दिवस जाऊ लागला. राजे भानावर येऊन धर्मकृत्यांत मग्न झाल्याचे पाहून साऱ्यांचा जीव थाऱ्यावर आला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पौर्णिमेचा दिवस उजाडला. साऱ्या यात्रेकरूंनी ते स्थान गजबजून गेले. त्या वातावरणात, देवळाच्या आवारात राजे फिरत होते, आलेल्या प्रवाशांकडून मुलुखाची माहिती घेत होते. मंदिरातून उठणाऱ्या शंखाच्या गंभीर नादाने व नगारे, चौघडे, मंगल वाद्ये यांनी तो मंदिराचा भाग धुंदावून निघे. राजांनी खास अभिषेक केला. यात्रेकरूंना अन्नदान केले. रघुनाथपंत राजांना म्हणाले,

'महाराज, आज दीपोत्सव करायचं ठरलं आहे. आजचा दीपोत्सव आपला आहे.'

'ते बरं?'

'नवस बोललो होतो.'

'नवस बोललात? केव्हा? तो पावला केव्हा? असलं कसलं साकडं देवाला घातलं होतं?'

रघुनाथपंत हसले. 'महाराज, साकडं आम्ही घातलं नव्हतं; आपण घातलंत. परमेश्वरानं सोडवलं.'

राजे गंभीर झाले. 'पंत, आम्ही इथं राहिलो असतो, तर काय बिघडलं असतं?'

'आपलं काही बिघडलं नसतं, महाराज! आपण सुखानं राहिलाही असता! पण सत्यनाश आमचा झाला असता!' पंत गहिवरले. 'महाराज, साऱ्यांच्या जिवाचा थारा उडाला! मुलुखापासून एवढ्या दूर. काही घडलं असतं, तर आपल्या माथी आत्मसमर्पणाचं पुण्य पडलं असतं; आणि आत्महत्या करून नरकाचे धनी झालो असतो आम्ही! त्याशिवाय आम्हांला वाट नव्हती. परीस कुठं पडला, तरी त्याला त्याचं काय? काळजी करायची लोखंडानं!'

'आमच्या स्पर्शानं सोनं झालं असतं, तर ही चिंता कशाला केली असती, पंत?'

'सोनं व्हायचं आणखीन काय राहिलं? आज पन्नास हजार फौज आपल्या मागे धावते आहे. लक्षावधी जीव आपल्या आज्ञेची वाट पाहताहेत. देवाधर्माचं राज्य अवतरलं. आणखीन काय हवं?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जगदंबेची कृपा! आम्हांलाही खूप बरं वाटतं. दीपोत्सव शिरावर घेतलात, बरं केलंत. आकाशातल्या चंद्राभोवती लाख चांदण्या चमकतात, तशा या भूतलीच्या परमेश्वरावर लाख पणत्या उजळू. दीपोत्सव साजरा करू. पण एवढं तेल, पणत्या इथं मिळतील?’

‘ती सारी व्यवस्था झाली आहे. देवस्थानच्या पणत्या, तेल आलं आहे. आपण त्याचा खर्च दिला, की झालं!’

सायंकाळी राजांच्या माणसांनी दीपोत्सव करायला सुरुवात केली. शेकडो माणसे देवाच्या आवारात पणत्या पेटवीत होती. पाहता-पाहता देवळाच्या चौफेर तटावर, मंदिराच्या कळसापर्यंत, दीपमाळांच्या शाखांवर हजारो पणत्या तेवू लागल्या. आकाशात निरभ्र चांदणे होते. देवाचे आवार लक्षावधी ज्योतींनी उजळून निघाले होते. साऱ्या यात्रेकरूंचे लक्ष देवाबरोबरच राजांवर लागले होते.

त्यानंतर श्रीशैलाला पाच-सहा दिवस राजांचा मुक्काम होता. त्या मुक्कामात राजांनी घाट, गोपुर, धर्मशाळा या कामांची सुरुवात केली. त्यांवर देखरेखीसाठी माणसे नेमली. कामाच्या अंदाजापेक्षा भरपूर द्रव्य त्यांच्या हाती देऊन राजांनी श्रीशैलाचा निरोप घेतला. ज्या वाटेने राजे श्रीशैलाला आले होते, तो घाट राजे परत उतरले. नीलगंगेच्या खाली कृष्णेच्या उतारावर राजांची अश्वपथके उभी राहिली होती. राजे कृष्णेचा प्रवाह पाहत होते. त्यांची नजर सर्व दरीवरून फिरत होती. सूर्य आकाशात चढला होता. त्या तळपत्या उन्हात कृष्णेच्या लाटा चमकत होत्या. नीलगंगेच्या निळ्याभोर डोहाला गर्द छटा प्राप्त झाली होती. दोन्ही बाजूंच्या हिरव्या गर्द वनराईतून वाहत जाणारा नीलगंगेचा भाग दृष्टीला सुखवीत होता. राजे ते दृश्य साठवून ठेवीत होते. थकलेल्या राजांना पंतांनी आठवण दिली,

‘महाराज, जायचं ना?’

त्या शब्दांनी राजे भानावर आले. ते पंतांना म्हणाले,

‘हो. जायलाच हवं. सुखाची सोबत तरी कुठं अखंड मिळते? पंत, ही कृष्णा माउली. हिचं जन्मस्थळ महाबळेश्वर. ती जागा आम्ही अनेक वेळा पाहिली आहे. तिथं थेंबाथेंबानं ठिबकणाऱ्या जलबिंदूंचं केवढं हे विशाल रूप! महाबळेश्वरापासून इथवरच्या प्रवासात हा प्रवाह डोंगरदऱ्यांतून अवखळपणे बागडला असेल. सागराच्या प्रमत्त ओढीनं त्यानं स्वत:ला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कड्यांवरून झोकून दिलं असेल. शांत डोहांत याचं मन विसावलं असेल. शेकडो नद्यानाल्यांचे प्रवाह याच्यात मिसळले असतील. याच्या प्रवाहावर जीवमात्रांनी आपली मलिन अंगं धुतली असतील. मानवांनी आपल्या लक्तरांचा मल यात मिसळला असेल. याच्या काठावर जीवन जगणाऱ्या गावांची घाण यातच सामावली असेल. पण तरीही हा प्रवाह केवढा निर्मळ राहिला! पंत, या शुद्धतेचं कारण माहीत आहे?'

पंतांनी नकारार्थी मान हलविली. राजांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान विलसत होते. राजे विश्वासाने म्हणाले,

'कारण फार सोपं आहे. हा प्रवाह वाहता आहे. सागराच्या ओढीनं हा अखंड धावतो आहे. त्यामुळं त्याचं जीवन शुद्ध आहे. पंत, माणसाचं जीवनदेखील असंच आहे. ते ओघवान असेल, त्याच्या प्रवाहावर दुसऱ्यांचं जीवन समृद्ध बनत असेल, तर ते जीवन शुद्धच राहील. ज्याच्या मनात श्रद्धेचा थेंब अखंड ठिबकतो आहे, ते जीवन मलिन राहील कसं? काही वेळा त्या प्रवाहात नाना भावनांची गल्लत उडाली, बळावलेल्या वासनांचा कल्लोळ उसळला, तरी ते जीवन शेवटी निर्मळच राहील. सागराच्या विशाल रूपात त्याचा शेवट झाल्याखेरीज राहणार नाही. त्याच्या नशिबी लिहिलेलं जीवनतृप्तीचं श्रेय कोणी हिरावून घेणार नाही. समृद्ध, सफळ जीवनाची खूण सांगणारी ही कृष्णा... तिला आमचे शतशः प्रणाम!'

राजांनी कृष्णेला हात जोडले; आणि ते आपल्या घोड्यावर स्वार झाले. राजे कृष्णापार होत होते. त्या टापांच्या पावलांखाली पाण्याचे तुषार उडत होते.

क्षणभर कृष्णेचा प्रवाह खंडित झाल्याचा भास होत होता.

□

१५

आत्मकूरला येऊन राजांनी आपली फौज संगती घेतली आणि ते दक्षिणेकडे निघाले. राजांच्या नजरबाजांकडून आणि पुढे गेलेल्या फौजेकडून राजांना सर्व बातम्या मिळत होत्या. नंदियाळ, कडाप्पा या मार्गाने राजे तिरुपतीला गेले. तेथे श्रीव्यंकटेशाचे दर्शन घेऊन राजे कांचीवरमला आले. कांचीवरमला शिवविष्णूचे दर्शन राजांनी घेतले; आणि समुद्रकाठच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मद्रास गावापासून तीन कोसांवर असलेल्या पेड्डापोलमला राजांनी छावणी केली.

राजांच्या कर्नाटकमोहिमेला इथून सुरुवात होणार होती. एके काळी विजयनगर साम्राज्याचा जो मुलूख, तोच आता विजापूरकरांचा बनला होता. राजांच्या मनात तो प्रदेश सोडवून आपल्या आधिपत्याखाली आणायचा होता. राजांचे लक्ष वेधले, ते त्या मुलुखातील दोन मोठ्या किल्ल्यांवर. जिंजी हा विजापूरकरांचा अव्वल गड. हा डोंगरी किल्ला अत्यंत बळकट होता. लढून गड काबीज करणे अशक्य होते. पण राजांना जिंजी ठाणे सहज मिळेल, असे वाटत होते.

जिंजीला नसीर मुहम्मद हा विजापुरी किल्लेदार होता. हा किल्लेदार विजापूरच्या वजिराचा, खवासखानाचा भाऊ. विजापूरचे राजकारण बदलले. खवासखानाचा खून झाला आणि विजापुरात पठाणपक्ष सत्तेवर आला. विजापुराचा दक्षिणेतला सुभेदार शेरखान हाही पठाणच. त्यामुळे त्याचे वर्चस्व वाढले. त्याचे लक्ष जिंजीवर होतेच. त्याने जिंजीचा किल्ला ताब्यात आणण्याचा प्रयत्न केला; पण दक्षिणेत शिवाजीराजे उतरल्याचे कळताच तो मागे सरकला होता. राजांनी याच संधीचा फायदा घेण्याचे ठरविले होते. आपले हजार स्वार त्यांनी जिंजीवर पाठविले. मराठ्यांच्या अधिकाऱ्याने नसीर मुहम्मदची भेट घेतली. शिवाजीराजे पाठीमागून येत असल्याची बातमी त्याने सांगितली. नसीर घाबरला. 'एक ना एक दिवस शेरखानाच्या हाती किल्ला जाणार, तर तो शिवाजीच्या हाती देऊन स्वार्थ का न साधावा?' असा विचार करून नसीर तहाला तयार झाला. त्यासाठी पन्नास हजारांची जहागीर नसीर मुहम्मदला देण्याचे ठरले. राजांना ही बातमी कळताच निम्मे सैन्य व कुतुबशाही तोफखाना वेलोरच्या किल्ल्यावर रवाना करून उरलेल्या फौजेनिशी राजे जिंजीला आले. जिंजीचा किल्ला राजांना मिळाला. जिंजीवर मराठ्यांचे निशाण फडकू लागले.

जिंजीचा किल्ला भव्य होता. खालून पाहता तटावर तट चढल्याचा भास होत होता. किल्ल्याचा प्रथम तट तीन हात रुंदीचा होता. किल्ल्याचा खंदक वीस हात रुंद व खोल होता. त्या विस्तीर्ण तटाच्या मधे उंच चढलेल्या डोंगरशिखरावर राजगिरी बालेकिल्ला दिसत होता. त्या विस्तीर्ण पसरलेल्या डोंगरमाथ्यावर कृष्णागिरी, चंद्रायणदुर्ग हे नजरेत येत होते. राजगिरीवर रंगनाथमंदिर होते, पाण्याच्या टाक्या होत्या. दोन निर्मळ पाण्याच्या झऱ्यांनी गडाचे जीवन समृद्ध झाले होते. गडावर कल्याणमहालासारखे भव्य महाल होते. राजांनी सर्व किल्ला पाहिला. विजयनगरच्या एके काळच्या वैभवाची साक्ष देणारा तो

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

किल्ला पाहत असता राजांचे मन भारावून गेले. त्यांनी त्या किल्ल्याची डागडुजी करून किल्ला बळकट करण्याची आज्ञा दिली. जिंजीची किल्लेदारी रायाजी नळगे यांच्या स्वाधीन केली.

राजे आठ दिवस जिंजीला होते. जिंजीकिल्ल्याची सर्व व्यवस्था लावीत असतानाच राजांना वेलोरहून बातमी आली- कुतुबशहांचा मिर्झा महंमद अमीन आपल्या तोफखान्यासह गोवळकोंड्याला निघून गेला. राजांनी जिंजी जिंकल्यानंतर त्या किल्ल्यावर राजे कुतुबशाही निशाण फडकावतील व तो मुलूख कुतुबशाहीत सामावला जाईल, असे कुतुबशाहीच्या सेनापतीला वाटले होते. जिंजीचा मुलूख एकोजीराजांच्या मुलुखाला लागून असलेला. तो किल्ला कुतुबशाहीला जोडणे राजांना शक्य नव्हते. महंमद अमीन वेलोरचा वेढा निम्म्यावरच सोडून गेला, हे कळताच यापुढे राजांच्या छावणीत मंजूर झालेला प्रतिदिवशी तीन हजार होनांचा खर्च आता मिळणार नाही, हेही राजांनी ओळखले.

राजे तातडीने वेलोरला गेले. मिर्झा अमीन गेल्यामुळे विस्कळीत झालेला वेलोरचा वेढा त्यांनी पक्का केला. वेलोरचा किल्ला भुईकोट. किल्ला मुळापासूनच प्रबळ व अवघड होता. ती विजयनगर-साम्राज्याची अखेरची राजधानी होती. एकाभोवती एक भक्कम तटबंदीच्या अनेक रांगा त्याभोवती होत्या. मध्ये अनेक खंदक होते. ते पाण्याने तुडुंब भरलेले होते; व त्यांत सुसरींचा सुळसुळाट होता. राजांनी तो गड हेरला. तो किल्ला साम्राज्यात सामील होणे हे आवश्यक आहे, हे राजांच्या ध्यानी आले. पण अनुभवी राजांना सहजासहजी हा गड पडणार नाही, याचीही खात्री पटली.

किल्ल्यात अब्दुलखान नावाचा किल्लेदार होता. नसीरने मध्यस्थी करून राजांना गड देण्याविषयी अब्दुलशी बोलणी करण्याचा प्रयत्न केला; पण असला भ्याडपणा आपण करणार नाही, असे त्याने स्पष्ट सांगितले. अब्दुलखानाने किल्ला लढविण्याचे ठरविले; तसेच राजांनी किल्ला घेईपर्यंत वेढा जारी ठेवण्याचा निर्णय केला. राजांनी वेढ्याचे अधिकारी नेमले. तेथील फौज निश्चित केली; आणि ते परत जिंजीकडे जाण्यास निघाले.

जिंजी मराठ्यांनी काबीज केल्याचे ऐकताच आदिलशाही सरदारांची, राजांच्या पराभवाच्या स्वप्नात मग्न झालेल्या फिरंगी, वलंदेज व इंग्रज व्यापाऱ्यांची पाचांवर धारण बसली. त्यांनी राजांशी सामोपचाराची बोलणी सुरू केली.

इंग्रजांकडे राजांनी पुष्टिकारक रत्ने व विषावरचे उतारे मागितले होते, त्यांची किंमत
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

द्यायची तयारी दाखविली होती. पण इंग्रजांनी काही किंमत न घेता राजांना हव्या असलेल्या वस्तू पाठवून दिल्या.

राजांचा मुक्काम जिंजीच्या मुलुखात होता. भर उन्हाळ्याचे दिवस. घामाच्या अखंड धारा वाहत. राजांच्या छावणीचा थाट अगदी साधा होता. दोन जाडेभरडे तंबू; एक राजांसाठी, दुसरा सरदारांसाठी. बाकी सर्व छावणी उघड्यावर असे. राजे जिंकलेल्या प्रदेशाचा पूर्ण कबजा करीत, त्यावर अधिकारी नेमीत पुढे जात होते.

आता राजांचे लक्ष दक्षिणेतील आदिलशाही सुभेदार शेरखान याच्यावर वेधले होते.

□

१६

शेरखान लोदीचे मुख्य ठाणे त्रिचनापल्लीच्या बाजूला कावेरीच्या उत्तर तीरी वालिगंडापुरमला होते. तेथे राहून तो तंजावर व मदुरा या ठिकाणच्या नायकांवर नजर ठेवून असे. आपल्यावर शिवाजी चाल करून येणार, हे कळताच शेरखान चार-पाच हजार पठाणी फौजेनिशी कडलूर बंदराच्या पश्चिमेस तेरा मैलांवर असलेल्या तिरुवाडीला मुक्काम करून राहिला.

पावसाळ्याला सुरुवात झाली होती. आकाश ढगांनी भरले होते. पश्चिमेचा वारा सुरू झाला होता. पावसाची झड बसण्याआधी शेरखानाचा पराभव करण्याचे राजांनी ठरविले. शेरखान तिरुवाडीला आहे, हे कळताच राजे त्या रोखाने निघाले.

राजांचा तळ तिरुवाडीपासून जवळच पडला. तिरुवाडीचा तळ राजांच्या छावणीवरून दिसत होता. राजे केव्हा हल्ला करतात, याची शेरखान वाट पाहत होता; पण राजांनी काहीच हालचाल केली नाही. मराठी फौज चढाई करण्यासाठी उतावीळ बनत होती. शेरखानाचे नजरबाज फकीर, नालबंद यांच्या वेषात मराठ्यांच्या तळावर घिरट्या घालीत होते. राजांच्या नजरबाजांनी ती बातमी राजांच्या कानावर घातली; पण राजांनी त्या नजरबाजांच्याकडे दुर्लक्ष करण्याची आज्ञा आपल्या नजरबाजांना केली. दिवस उलटले, तरी राजांची काही हालचाल नाही. राजे काही हालचाल का करीत नाहीत, याचे शेरखानाला कोडे पडले. समोर शांतपणे उभा ठाकलेला शत्रू पाहून शेरखानाच्या सैन्याचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

धीर खचत होता. भीतीने त्रस्त झालेल्या शेरखानाने आपल्या फौजेला माघार घ्यायची आज्ञा केली. शेरखानाची फौज मागे हटू लागली.

राजे आपल्या तंबूत बसले होते. राजांच्या धोरणाने मनातून कंटाळलेले फौजेचे अधिकारी राजांच्या नजीक उभे होते. राजांच्या मनात काय आहे, हे त्यांना कळत नव्हते. त्याच वेळी राजांचा नजरबाज तंबूत आला. साऱ्यांची नजर त्याच्यावर खिळली.

'महाराज, शेरखानाची फौज मागे हटत आहे.'

'खरं?' राजे उठले. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते. त्यांनी सर्वांवरून नजर फिरविली.

'याच घडीची आम्ही वाट पाहत होतो. फौजेला स्वार होण्याची आज्ञा द्या. आम्ही आलोच.'

साऱ्यांच्या अंगांत उत्साह संचारला. छावणीवर एकच गडबड उडाली. राजांनी अंगावर चिलखत चढविले. राजे तंबूबाहेर आले, तेव्हा घोड्यांच्या टापांनी, उत्साही स्वारांनी छावणी गजबजली होती. राजे स्वार झाले. बरोबर सेनापती हंबीरराव व येसाजी होते. सेनापतींच्या इशारतीबरोबर अश्वदळे हलू लागली. राजे संथपणे तिरुवाडीकडे जात होते. त्या कुंदावलेल्या वातावरणात शेरखानाची मागे हटणारी फौज नजरेत आली.

मराठी फौज मागून येत आहे, हे लक्षात येताच पठाणांचे उरलेसुरले धैर्य नाहीसे झाले; आणि ते पळू लागले. राजांनी आपल्या फौजेला आज्ञा केली. शिंगांचा गगनभेदी आवाज उठला; आणि राजांच्या फौजेने जनावरांना टाच दिली. राजांच्या दोन्ही बाजूंनी घोडी धावत होती. तळपत्या तलवारी हाती घेतलेले, भाला सावरलेले स्वार वायुवेगाने दौडत होते. गारांचा पाऊस पडावा, तसा टापांचा आवाज येत होता. 'हर हर महादेव' च्या गर्जनेने रणभूमी निनादली. राजे पाहत होते. मराठी फौज पठाणी फौजेला भिडली. एकच कापाकापी सुरू झाली. पळणारी फौज केव्हाच गारद झाली होती; पण पाचशे वीर पठाण मराठी फौजेशी मुकाबला करीत होते. प्रहरात त्यांचेही बळ सरले. पराभव झालेला पाहून शेरखान व त्याचा मुलगा इब्राहिमखान आपल्या मोजक्या स्वारांनिशी पळत सुटले. रणांगणातून आलेल्या स्वाराने ही खबर राजांना दिली. राजांनी शेरखानाचा पाठलाग करण्याचे ठरविले. आपल्या फौजेसह राजे शेरखानाच्या पाठलागावर सुटले. शेरखानाचे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाचशे घोडे, दोन हत्ती, उंट बैल व लढाऊ सामान राजांना मिळाले.

पळत सुटलेल्या शेरखानाने भुवनगिरीच्या किल्ल्यात आश्रय घेतला. राजांनी शेरखानाचा सोक्षमोक्ष लावण्याचे ठरविले होते. त्या घटनेवरच दक्षिणविजय अवलंबून आहे, हे राजांनी ओळखले होते.

राजांची फौज वालदोरेमध्ये व देवनापट्टणात घुसली. खुद्द राजे भुवनागिरिपट्टणास येऊन दाखल झाले. शेरखानाच्या पराभवाची वार्ता वावटळासारखी पसरली. पाठोपाठ मराठे आले, ही बातमी येई. त्या बातमीने भयभीत झालेले मुसलमान पळू लागत. वालदोरे, देवनापट्टण यांतील मुसलमान शिबंदीने तेच केले. अशा अनेक गढ्या राजांना सहज काबीज करता आल्या.

भुवनगिरीत कोंडलेला शेरखान हवालदिल झाला. त्याने तहाचे बोलणे सुरू केले. राजांनी त्याच्यावर वीस हजार होनांची खंडणी लादली, त्याचा सर्व मुलूख ताब्यात घेतला. वीस हजार खंडणी भरणे शेरखानाला जमले नाही. त्यासाठी आपला मुलगा इब्राहिमखान राजांच्याकडे ओलीस म्हणून ठेवून तो निघून गेला.

शेरखानच्या पराभवाने दक्षिणेतल्या आदिलशाहीचा विरोध जवळ जवळ नाहीसा झाला. राजे जातील, तेथे त्यांच्या पुढे भूमी नमत होती. राजे जिंजीच्या भागात आले. राजे आता निर्धास्त होते. त्यांनी आपली फौज गोळा केली. राजांना आपले सावत्र भाऊ एकोजीराजे यांना भेटण्याची इच्छा होती. जिंजीची व्यवस्था पूर्ण झाल्याचे पाहून राजे परत दक्षिणेकडे निघाले.

□

१७

राजांची छावणी तिरुवन्नमलईला पडली होती. पावसाळ्यासाठी तिरुवाडीला छावणी हलविण्याचे राजांनी ठरविले. त्या बेताप्रमाणे पुढील व्यवस्थेला काही फौज पाठविली होती. जिंकलेल्या मुलुखातून सावकारांच्याकडून खंडण्या वसूल केल्या जात होत्या.

सकाळची वेळ होती. राजे हंबीरराव, जनार्दनपंत यांच्यासह छावणीची पाहणी करीत
"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होते. शेरखानाच्या लढाईत जखमी झालेल्यांची विचारपूस करून, राजे छावणीच्या एका टोकाला आले. तेथून तिरुवन्नमलई गाव नजरेत येत होते. राजे म्हणाले,

‘गाव किती सुरेख आहे!’

‘एके काळी हे गाव हिंदूंचं तीर्थक्षेत्र होतं.’ जनार्दनपंतांनी सांगितले.

‘एके काळी?’

‘हो. इथं श्रीशिव आणि समोत्तिपेरुमल दैवतांची सुरेख मंदिरं होती.’

‘मग त्यांचं काय झालं?’

‘विजयनगर साम्राज्याच्या विध्वंसाबरोबर ती मंदिरं मुसलमानी आक्रमणाखाली पाडली गेली.’

‘अरेरे! आता त्या ठिकाणी काही नाही?’ राजांनी विचारले.

‘त्या पुरातन मंदिरांच्या जागेवर मुसलमानांनी मशिदी बांधलेल्या आहेत.’

‘पंत, आम्हांला ते पाहायचं आहे.’

राजांचे अश्वपथक गावाकडे वळले.

राजे पायउतार झाले. समोर चुन्याने माखलेल्या पांढऱ्या शुभ्र मशिदींचे घुमट दिसत होते. समोर समोत्तिपेरुमलच्या एके काळच्या भव्य मंदिराचे भग्न अवशेष विखुरले होते. राजे जात असता त्यांची पावले अडखळत होती. आजूबाजूच्या गावांतून भंगलेल्या मूर्ती विखुरल्या होत्या. निष्णात हातांनी शिल्पिलेल्या त्या एके काळच्या अत्यंत सुबक मूर्तींची उद्ध्वस्त अवस्था पाहून मनाला पीळ पडत होता. राजांची पावले थांबली. एका खड्ड्यात काळाभोर नंदी उखळून विरूपावस्थेत पडला होता. त्याच्यापासून थोड्याच अंतरावर सुंदर पाषाणांत कोरलेले भ्रष्ट शिवलिंग आजूबाजूच्या हिरवळीतून डोकावत होते. ते उजाड, विषण्ण अवशेष पाहून राजांचे मन उद्विग्न झाले. ते उद्गारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘माणसं जगतात तरी कशी?’

‘सत्ताधाऱ्यांच्या आक्रमणापुढं नेहमीच मान तुकविली जाते.’

‘पंत, वतनाच्या हक्कासाठी पिढ्यान् पिढ्या झगडणारी माणसं. ही आमची वतनं भंगली, तरी उघड्या डोळ्यांनी पाहतो. आमची दैवतं भग्न होतात, आणि ती आम्ही पाहतो.’

राजे समोत्तिपेरुमलच्या मंदिराचे मशिदीत झालेले रूपांतर पाहत होते. राजे ते पाहून सुन्न झाले.

‘धर्माच्या नावाखाली केवढं अधर्मी कृत्य हे! ज्या मंदिरांच्या उभारणीसाठी शेकडो कलावंतांनी, शिल्पकारांनी अहोरात्र मेहनत घेतली असेल, ती माणसांच्या दृष्टीला सुखावणारी, थक्क करणारी, परमेश्वराचा साक्षात्कार घडविणारी ही आमची मंदिरं परक्या धर्मप्रसारासाठी नेस्तनाबूद केली जातात; एवढंच नव्हे, तर पवित्र वास्तूंवर मशिदी बांधल्या जातात. पंत, ही हिंमत आली कोठून?’

‘महाराज!’ रघुनाथपंतांचा आवाज विषण्ण झाला होता.

‘त्याचं एकच कारण आहे! मुसलमानांना त्यांच्या धर्माचा अभिमान आहे. त्या धर्मनिष्ठेपायी त्यांची सर्वस्वाचं बलिदान करण्याची ताकद आहे. हे फिरंगी आपल्या धर्मासाठी सात समुद्र ओलांडतात, परमुलुखात आपला धर्मप्रसार करतात. केवढी त्यांची निष्ठा! तीच निष्ठा त्यांना विजयी बनविते. आणि आम्ही हिंदू म्हणवून घेतो; पण उघड्या डोळ्यांनी आपल्या धर्माचा ऱ्हास पाहतो. ज्यांना स्वधर्मनिष्ठा नाही, त्यांचा भाग्योदय कसा होणार?’

‘पण, महाराज, झाल्या गोष्टींपुढं इलाज काय? आपण काय करू शकतो?’

राजांची संतप्त नजर हंबीररावांच्यावर खिळली.

‘हंबीरराव, हे तुम्ही बोलता? आमचे सेनापती हे बोलतात? मग छत्रपती कशासाठी झालो? लूट करणं, मुलूख जाळणं, स्वराज्याचा विस्तार करणं यासाठीच का आमचं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राज्य?'

राजांचा चेहरा करारी बनला. एक वेगळेच तेज त्यांच्या चेहऱ्यावर प्रकटले होते. राजांनी निश्चयपूर्वक आज्ञा दिली :

'पंत, या मशिदी पाडून टाका! इथं आमच्या दैवतांची पुन्हा स्थापना करा! समोत्तिपेरुमलच्या मंदिराच्या पडलेल्या या विटांतून नायक राजांनी बांधलेल्या या हजारखांबी मांडवासमोर सुरेख गोपुर बांधा. या दैवतांची पुन्हा प्रतिष्ठापना झाल्याखेरीज आमच्या मनाला शांती लाभणार नाही.'

त्या आज्ञेने जनार्दनपंत, हंबीरराव चकित झाले. जनार्दनपंत म्हणाले,

'पण, महाराज, या मशिदी पाडल्या, तर मुसलमानांची मनं दुखावतील.'

'जेव्हा आमची मंदिरं पाडली आणि मशिदी उभ्या केल्या, तेव्हा आमच्या भावना दुखावतील, याचा कुणी विचार केला होता? किंबहुना, आमचा धर्म नष्ट करण्यासाठीच ही कृत्यं केली ना?'

'एका धर्मवेड्या पिढीनं हे केलं, म्हणून आजच्या पिढीवर हा अन्याय....'

'पंत, परधर्मसहिष्णुता म्हणजे स्वधर्माबद्दल अनास्था नव्हे. याच विचारामुळं परकीय आक्रमण सहन करण्याची सवय आम्हांला लागली आहे; मनं कोडगी बनलीत. देवळं फोडली, तरी आम्ही स्वस्थ! विजयनगरचं साम्राज्य कोलमडलं, तरी खंत नाही! आमच्या आयाबहिणींची अब्रू लुटली गेली, तरी आनंद! माणूस म्हणून जगायचं तरी कशाला? कशासाठी? हीच सवय नडली आम्हांला. नाही तर आम्हां करोडो हिंदूंना अत्यंत पवित्र वाटणारं काशीविश्वेश्वराचं मंदिर पाडू धजला नसता. पंत, धर्म हा एका पिढीचा खेळ नाही. तो पिढ्यान् पिढ्यांचा वारसा आहे. तो टिकविणं हे आमचं कर्तव्य आहे. आम्हांला परधर्माचा द्वेष नाही. आमच्याही फौजेत मुसलमान आहेत. त्यांच्या मशिदी उभारण्याला विशाल भूमी मोकळी आहे. त्या आमच्याच पवित्र जागेवर बांधल्या गेल्या पाहिजेत, असं कोणी म्हणेल, तर ते आमच्या राज्यात होणार नाही. आमच्या हुकुमाची अंमलबजावणी ताबडतोब सुरू करा!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या आज्ञेने मशिदी पाडण्यात आल्या. मंदिरांचे काम सुरू झाले. राजांनी पावसाळ्यासाठी आपला तळ कावेरीकाठी तिरुवाडीला हलविला. तेथून जवळच तंजावरला राजांचे सावत्र भाऊ एकोजीराजे होते. राजांनी त्यांना मानाचे भेटीचे निमंत्रण पाठविले.

□

१८

राजांनी एकोजीराजांना निमंत्रण पाठविले; पण राजांच्या वाढत्या पराक्रमाने एकोजीराजांना भय वाटे. एकोजीराजे येत नाहीत, हे पाहून राजांनी त्यांच्या पदरचे मातब्बर लोक पाठविण्यास सांगितले. एकोजीराजांनी आपल्या पदरी असलेले गोविंदभट गोसावी, काकाजीपंत, निळोबा नाईक वगैरे मंडळी राजांच्याकडे पाठविली. राजांनी त्या मंडळींना आपल्या सद्भावाबद्दल खात्री पटविली. एकोजीराजांनी कटुता वाढण्याआधी भेटणे इष्ट कसे आहे, हे त्या मंडळींना समजाविले. राजांनी त्या सर्वांचा सत्कार करून त्यांना परत पाठविले. त्यांच्याबरोबर बाळंभट्ट, कृष्ण ज्योतिषी व कृष्णाजी सखोजी ही मंडळी एकोजीराजांच्याकडे पत्र देऊन पाठविली.

एकोजीराजे राजांच्या भेटीला येत असल्याची बातमी आली. राजांनी एकोजीरीजांच्या स्वागताची तयारी केली. प्रथम भेटीची जागा राजांच्या तळापासून तीन कोसांवर असलेल्या तिरुपतोटा गावी शिवमंदिरात निश्चित झाली. ठरल्या दिवशी राजे आपल्या लवाजम्यानिशी एकोजीराजांना सामोरे गेले. राजे शिवमंदिरात एकोजीराजांची वाट पाहत होते.

एकोजीराजांचे अश्वपथक दिसू लागले. देवळासमोर एकोजीराजे पायउतार झाले. राजे मंदिराच्या पायरीवर उभे होते. एकोजीराजांच्या बरोबर काकाजीपंत, जगन्नाथपंत, कान्हेरपंत ही मंडळी होती. त्यांखेरीज भिवजीराजे, प्रतापजीराजे हे शहाजीराजांचे अनौरस पुत्रही होते.

एकोजीराजे मध्यम उंचीचे, किंचित स्थूल देहाचे होते. शहाजीराजांच्या रूपाच्या अनेक खुणा चेहऱ्यावर दिसत होत्या. कपाळी शिवगंध होते. मस्तकावर मोगली किमॉष होता; त्यावर रत्नखचित पिंपळपान चमकत होते. गळ्यातील कंठे, हातीच्या अंगठ्या आणि चेहऱ्यावर आरामी भाव ऐश्वर्याची खूण सांगत होता. एकोजीराजे चार पावले सामोरे आले. त्यांनी राजांना मुजरा केला. राजे प्रेमभराने पुढे गेले आणि त्यांनी एकोजीराजांना आलिंगन

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दिले. राजांनी भिवजीराजे, प्रतापजीराजे यांची भेट घेतली. सर्वांसह देवदर्शन घेऊन राजे तिरुवाडीच्या तळावर आले.

राजांनी एकोजीराजांची व त्यांच्या बरोबर आलेल्यांची उत्तम बडदास्त राखली होती. राजांनी पहिल्या भेटीत सर्व क्षेमकुशल विचारून घेतले. त्यानंतर राजांच्या आणि एकोजीराजांच्या भेटी होऊ लागल्या. दोन्ही बाजूंची राजकारणी मंडळी राजकारणात गुंतली.

एके दिवशी राजांनी एकोजीराजांना आपल्या भावना बोलून दाखविल्या. ते म्हणाले,

'राजे, तुम्ही लहान. आपण दोघे एकाच वडिलांचे सुपुत्र. असं असता आम्ही रिवाज मोडून तुम्हांला निमंत्रण दिलं, चार पावलं तुमच्या सामोरे आलो, ते वडीलकीच्या प्रेमानं.'

'आम्ही नातं विसरलो नाही.' एकोजीराजे म्हणाले.

'तेही खरंच!' राजे म्हणाले. 'आम्ही तुमच्या मुलुखात आलो. आमच्यावर शेरखानासारखा शत्रू चालून आला. तुम्ही आमचे बंधू; पण तुम्ही धावून आला नाहीत. इथवर येऊन भेटीची इच्छा केली, तरी तुम्ही मनात शंका धरलीत.'

एकोजीराजे काही बोलले नाहीत.

'वास्तविक पाहता आम्ही मोठे. थोरल्या महाराजसाहेबांनी जी जहागीर मिळवली, तिचा निम्मा हिस्सा आम्हांला यायला पाहिजे होता. पण आजवर तुम्हांला ते सुचलं नाही. नशिबी मोठेपणा आल्यानं आम्ही विचारलं नाही.'

'जहागीर आमची नव्हे; ती आदिलशाहीची. थोरल्या महाराजसाहेबांच्या पश्चात आम्ही चाकरी चालविली, म्हणून जहागीर टिकली, हे दाजी स्वामींनी लक्षात घ्यावं.'

राजांनी एकोजीराजांच्याकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर विजयाचे स्मित झळकत होते. राजे शांतपणे म्हणाले,

'राजे, थोडा विचार करा! त्याचसाठी आम्ही तुम्हांला बोलावलं. मुरार जगदेवनं जाळलेल्या पुण्याच्या सुभेदारीवर आम्ही वाढलो. स्वपराक्रमानं आम्ही छत्रपती झालो. आज

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आदिलशाही, कुतुबशाही आम्हांला भिते. एवढंच काय, पण आम्ही मोगलांशीदेखील झुंज दिली. असा पराक्रम तुम्हीदेखील इथं करावा, असं आम्हांला वाटतं.'

राजांच्या सामोपचाराचा अर्थ एकोजींनी निराळाच घेतला. ते धिटाईनं म्हणाले,

'आपल्या माणसांच्या पाठबळावर आपण राज्य मिळवलंत, यात कौतुक कसलं? उलट, परमुलुखात आम्ही जहागीर सावरली, याचं कौतुक व्हावं.'

'तुमचा पराक्रम आम्हांला माहीत आहे.' राजे हसले. 'मदुरेच्या नायकाचा पराभव करणं तुम्हांला जमलं नाही. वलिगंडपुरमला बसलेल्या शेरखानाच्या नजरेत तुमची जहागीर हलायची. थोरच पराक्रम केलात!'

'आमच्या शब्दापेक्षा रघुनाथपंतांचा शब्द आपण खरा मानता?'

'मुळीच नाही. ती सवय आम्हांला नाही. तुम्हांला माहीत नाही, पण गेले कैक महिने आमचे नजरबाज तुमच्या राज्यात फिरतात. एकोजीराजे, आम्ही देतो, तो सल्ला आपण ऐकावा. त्यात तुमचं हित आहे.'

'कसला सल्ला?'

'तुम्ही आदिलशाहीची नोकरी सोडा; आणि तुम्ही आमच्या राज्यात सामील व्हा.'

एकोजीराजे अस्वस्थ झाले. ते जाणून राजे बोलले,

'मांडलीक म्हणून नव्हे; आमचे बंधू म्हणून. आम्ही तुम्हांला उदंड मुलूख व सत्ता देऊ. त्याआधी थोरल्या महाराजांनी संपादन केलेल्या जहागिरीचे तपशील आम्हांला दाखवा. ते पाहून तुम्ही-आम्ही समजून चालू. तुम्हांस जड पडेल, तर मदत देऊ. कुतुबशहासारखे राजे आमचं मानतात. तुम्ही आमचे बंधू. तुम्ही हे मानलंत, तर आम्हांला आनंद होईल.'

'आणि हे आम्ही मानलं नाही, तर?'

राजांचा आवाज कठोर बनला. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राजे, आम्ही मोठे. जरा सबुरीनं जबान वापरा! तुम्ही आमचे बंधू, म्हणून आम्ही हा सामोपचार केला. तुम्ही आम्हांला मिळाला नाही, तर आदिलशहाचे नोकर म्हणून आम्हांला तुमचा मुलाहिजा राखता येणार नाही. गृहकलह वाढीला लागला, तर काय होतं, हे महाभारतानं शिकविलं आहे. त्या आत्मनाशाची वाट तुम्ही धरू नका. शांतपणे विचार करून आम्हांला तुमचा मनसुबा सांगा. त्याप्रमाणे आम्ही चालू.’

एकोजीराजे मनातून भ्याले होते. राजे त्यांना नाना तऱ्हांनी समजावण्याचा प्रयत्न करीत होते; पण एकोजीराजांच्या मनात काही शिरत नव्हते.

एके दिवशी राजांनी एकोजीराजांच्या जवळ इच्छा व्यक्त केली,

‘आम्ही पुण्याच्या जहागिरीवर एवढं राज्य उभं केलं. आम्ही छत्रपती बनलो. आज तुंगभद्रेपासून नर्मदेपर्यंत आमचं राज्य पसरलं आहे; पण एवढ्या राज्यात फार मोठी उणीव आहे. ती तुम्हीच दूर करू शकाल.’

‘आम्ही?’एकोजींनी विचारले.

‘होय, राजे! तुम्हीच दूर करू शकाल. आम्ही छत्रचामरं मस्तकी धरली. आम्ही ऐश्वर्यसंपन्न सत्ताधीश झालो. पण आमच्या जवळ थोरल्या महाराजसाहेबांची आठवण धरणारं काही नाही. त्यांच्या पोटी जन्म घेऊनही त्यांची आठवण म्हणून काही जतन करता आलं नाही. आम्ही असं ऐकतो की, थोरल्या महाराजसाहेबांनी आपल्या पराक्रमाची निशाणी म्हणून बारा बिरुदं जतन केली, ती आपल्याकडे आहेत. ती बिरुदं आम्हांला द्या. आम्ही ती मानानं, प्राणमोलानं जतन करू. आम्ही पुष्कळ झेंडे उभारले, जरीपटके केले; पण वडिलांच्या हातची असावीत, म्हणून मागितली.’

नुसती बिरुदे देऊन सामोपचार घडत असलेला पाहून एकोजीराजांना बरे वाटले. ते आपल्या डेऱ्यात आले. एकोजीराजांनी राजांचा नवा प्रस्ताव काकाजीपंतांना सांगितला. काकाजीपंत विचारात पडले. ते पाहून एकोजीराजे परत घाबरले. त्यांनी विचारले,

‘काकाजीपंत, विचार कसला करता?’

‘राजे, ही शिवाजीराजांची चाल आहे. दिवाळीला पाहुणा म्हणून येऊन त्यांनी पुरंधर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घेतला. अफझलची भेट तर प्रख्यात आहे. एवढंच कशाला? ज्या नसीरखानानं राजांना विश्वासानं जिंजी दिली, त्याला तरी कुठं कबूल केलेली पन्नास हजारांची जहागीर दिली?'

'आपण जहागीर थोडीच देतो? आपण बिरुदं देतो.'

'पण शहाजीराजांच्या झेंड्याचं प्रेम एकदम का उचंबळलं?' काकाजीपंतांनी विचारले.

'आज त्यांची बिरुदं मागतात; उद्या त्या बिरुदांवर संपादन केलेली जहागीर मागतील.'

'तुमचा सल्ला तरी काय?'

'आम्ही काय सांगावं? किती केलं, तरी आपण सावत्र. शिवाजी राजे आज विजयी दिसतात. त्यांनी कदाचित आदिलशाहीला, कुतुबशाहीला शह दिला असेल. पण मोगलाईचं काय? ती सत्ता केवढी? एक ना एक दिवस शिवाजीराजांचं राज्य पाण्यावरचा बुडबुडाच ठरणार! त्या वेळी त्यांना साथ देणाऱ्यांची काय अवस्था होईल? आपली जहागीर सुरक्षित आहे. आदिलशाही मोगलाईपासून दूर आहे. राजकारणात जास्त वाटाघाटी करू नयेत. माणूस फसतो.'

त्या सल्ल्याने एकोजीराव पुरे घाबरले. ते निराशेने म्हणाले,

'आम्हांला काही समजेनासं झाले आहे. त्यापेक्षा आपण सरळ तंजावरला जाऊ. तिथं विचार ठरवू.'

'ती संधी मिळेल, असं वाटत नाही.' काकाजीपंत शांतपणे म्हणाले.

'का?'

'का? शिवाजीराजे एवढे दूधखुळे नाहीत. आता सहजपणे तुम्हांला ते जाऊ देतील, असं वाटत नाही.'

'आम्ही कैदी आहोत?' संतापाने एकोजीराजे उद्गारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तसं समजायला हरकत नाही.’

एकोजीराजे पुरे घाबरले; आणि रात्री एक स्वार संगती घेऊन ते तंजावरला पळून गेले.

सकाळी राजे एकोजीराजांची वाट पाहत होते. जेव्हा राजांना एकोजीराजे पळून गेल्याचे कळले, तेव्हा त्यांचा विश्वास बसेना. एकोजीराजांच्या बरोबर आलेले काकाजीपंत, जगन्नाथपंत, प्रतापजीराजे, भिवजीराजे यांना राजांनी बोलविले. राजांची संतप्त नजर सर्वांवरून फिरत होती. राजांनी काकाजीपंतांना विचारले,

‘राजे पळून गेले? बोला, पंत! हे खरं?’

‘जी.’ पंत निर्धाराने म्हणाले.

‘का? का पळून गेले?’ राजे क्रोधाने म्हणाले. ‘काय निमित्य पळाले? आम्ही त्यांना धरीत होतो, की काय? आम्हांस बिरुदं काय करायची? आमची बिरुदं अष्टदिशांस लागली आहेत. समुद्रवलयांकित भूमंडळी कीर्त आपली झाली आहे. तिथं बिरुदं काय करायची? वडिलांची वस्तू असावी, म्हणून मागितली होती. पळायचं नव्हतं. द्यायची नव्हती, तर न देणे. उगेच उठून पळून गेले!’

राजांचे मन त्या प्रकाराने उद्विग्न होऊन उठले. हताश होऊन, नि:श्वास सोडीत राजे बोलले,

‘धाकटे ते धाकटे; बुद्धीही धाकटी केली!’

राजांची नजर काकाजीपंतांवर स्थिरावली.

‘पंत, तुम्ही राजकारणी माणसं. काय सल्ला दिलात हा?’

‘पण, महाराज....’

‘काही सांगू नका! रातोरात पळून जायचं मन एकोजीराजांचं नव्हे. पंत, मनात आणलं, तर बसल्या जागेवरून तंजावरचं राज्य आम्ही घेऊ. सल्ला देताना तो तरी विचार करायचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होतात!... जा तुम्ही.’

राजांनी एकोजीराजांच्या सर्व माणसांचा वस्त्रे, दागिने देऊन सत्कार केला, आणि त्यांना तंजावरला पाठवून दिले.

□

१९

एकोजीराजे पळून गेले. त्यांच्या वर्तनाने राजांना खूप संताप आला. एकोजींच्या हातांखालचा मुलूख राजांच्या मागे राहील, हे स्वप्न विरघळून गेले. शहाजीराजांची जहागीर ताब्यात घेण्याचे राजांनी ठरविले. तसे हुकूम राजांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिले.

तिरुवाडीवरून राजे तुंदुमगुर्तीला आले. श्रावण महिना सुरू झाला होता. राजांची फौज मुलूख काबीज करण्यात गुंतली होती. रघुनाथपंत मदुरानायकाशी वाटाघाटी करीत होते. नरहरी रुद्र वेलोरचा वेढा लढवीत होता. शेरखानाच्या पराभवामुळे राजांचा लौकिक वाढला होता. राजांचे नाव ऐकताच शत्रू पळत होता. राजांची फौज जाईल, तेथे विजय मिळवीत होती. राजे श्रावणात वृद्धाचलमला गेले. वृद्धाचलम हा शहाजीराजांच्या जहागिरीचाच भाग. शामजी नाईक पुंडे, विठ्ठल पिलदेव अत्रे वगैरे थोर लोक बरोबर घेऊन राजांनी शिवाचे दर्शन घेतले. शिवदर्शन घेऊन राजे माघारी छावणीवर आले.

छावणीवर राजगडावरून आलेला खलिता राजांची वाट पाहत होता. मदुरेच्या नायकाकडून खंडणी कबूल करून घेऊन रघुनाथपंत आले होते. राजांचा चिंताचूर चेहरा पाहून रघुनाथपंतांनी विचारले,

‘महाराज, काय खबर?’

राजे हसून म्हणाले, ‘पंत, खबर तितकी चांगली नाही. आदिलशाहीत अंत:स्थ बखेडा वाढला आहे; पठाणी सत्ता प्रबळ बनते आहे. औरंगजेबानं बहादुरखानाला माघारी बोलावण्याचं ठरविलं आहे. त्या जागी दिलेरखान नेमला जाईल, असा अंदाज आहे.’

‘अजून दिलेरखान आला नाही ना?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आला नाही; पण येईल. आता दक्षिणेत फार काळ आम्हांला राहता येईल, असं वाटत नाही. शक्य तो लौकर मोहीम आटोपती घ्यायला हवी. अशा वेळी आम्ही स्वराज्यात असणं योग्य आहे.’

राजे, रघुनाथपंत, हंबीरराव, हरजीराजे महाडीक ही मंडळी विचारविनिमय करण्यात गुंतली होती. आणि एके दिवशी संताजीराजे भोसले राजांच्या भेटीला येत असल्याची बातमी आली. संताजी भोसले हे शहाजीराजांचे अनौरस पुत्र. रघुनाथपंडितांनी सामोरे जाऊन संताजीराजांना छावणीवर आणले. सख्ख्या भावाच्या जिव्हाळ्याने राजे संताजीराजांना भेटले. त्यांनी त्यांना छावणीवर ठेवून घेतले.

संताजीराजे राजांच्यासह बोलत असता संताजींनी आपणहून बोलणे काढले,

‘एकोजीराजांनी आपलं ऐकलं नाही?’

‘त्यांना आमचं सांगणं मानवलं नाही.’

‘कान फुंकणारे फुंकून जातात; पण आलेली संधी परत मिळत नाही.’

‘तो दोष कान फुंकणाऱ्यांचा नसतो, संताजीराजे! ऐकणाऱ्यांचा असतो.’

‘महाराज, त्याचमुळं आम्ही एकोजीराजांकडून तुमच्याकडं आलो.’

राजांनी आश्चर्याने विचारले,‘काय सांगता?’

‘होय, महाराज! आपण कर्नाटकात आल्यापासून आपल्याला बघण्यासाठी मन झुरत होतं.’

‘असं आम्ही काय केलं?’

‘काय केलं नाही? एवढं उदंड राज्य उभं केलं! आज थोरले महाराज असते, तर त्यांनी आनंदानं आपली जहागीर तुमच्या हाती सोपविली असती.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शहाजीराजांच्या आठवणीने राजे स्तब्ध झाले. संताजीराजे सांगत होते,

‘जेव्हा आपण कर्नाटकात आलात, तेव्हाच मी एकोजीराजांना आपल्याला सामोरे जायला सांगितलं; पण त्यांनी ते ऐकलं नाही. ते आपल्या भेटीला आले, तेव्हा काय होणार, हे मला माहीत होतं. म्हणून मी भिवजी-प्रतापजींबरोबर आलो नाही.’

‘त्यांनी मानलं नाही, हा दोष तुमचा नाही. तुम्ही का कष्टी होता?’

‘आपल्या माणसांची ओळख आपल्याच माणसांना झाली नाही, तर पीळ पडतो आतड्यांना! महाराज, यापुढं आम्हांला तुमच्या सेवेत घ्या!’

राजांची नजर संताजीराजांच्यावर खिळली. तो करारी, धिप्पाड देह निरखीत राजे बोलले,

‘संताजी, आमची सोबत म्हणजे हरघडी संकटांशी मुकाबला! सुखासुखी शांतपणे जगता यायचं नाही.’

‘त्याचाच कंटाळा आला. मर्द म्हणवून घेतो, आणि माश्या मारीत बसू?’

‘पण आमच्याकडे जहागीर मिळत नसते!’ राजे हसले.

संताजीराजांची रोख नजर राजांना भिडली. मिशीवरून पालथी मूठ फिरवीत संताजीराजे गर्जले, ‘जहागीर मागितलीय् कुणी? शिलेदारी तरी मिळेल, का नाही? मीही शहाजीराजांचं नाव सांगणारी औलाद आहे, राजे!’

राजे चटकन उठले. त्यांनी संताजीराजांनी मिठी मारली. राजांचे मन भरून आले. ते म्हणाले,

‘संताजीराजे, आम्हांला कुणाची जोड नाही, असं वाटत होतं. धीर दिलात, संताजी! आम्ही असता शिलेदारी का करता? पराक्रमाला डावलण्याचं सामर्थ्य आमचं नाही. संताजीराजे, आजपासून आम्ही तुम्हांला हजार स्वारांची मनसब बहाल करीत आहोत!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी सर्वदेखत संताजीराजांना मनसबीची वस्त्रे व तलवार बहाल केली.

संताजीराजे राजांचे मनसबदार बनले.

□

२०

मराठी फौजेने एलवनसूरवर कब्जा केला. शहाजीराजांच्या जहागिरीचा कोलार, होसकोटे, बालापूर, शिरे हा मुलूख राजांनी आपल्या अमलाखाली आणला. त्याच काळात राजे तिरुवन्नमलईला परत गेले. त्यांनी तेथे शिवलिंगाची प्रतिष्ठापना केली. तिथे चैत्रपुनवेच्या दीपोत्सवाची आज्ञा देऊन राजे माघारी आले.

राजांच्या फौजेने आदिलशाहीचा पाईनघाटाचा मुलूख व शहाजीराजांची एकोजीकडे चालत आलेली कावेरीच्या उत्तरेकडील सर्व जहागीर जिंकली. वीस लाख होनांहून जास्त महसूल असलेला मुलूख राजांच्या स्वराज्यात सामील झाला. जिंकलेले राज्य सुरक्षित राखण्यासाठी राजांनी ताबडतोब त्यावर अधिकारी नेमले. उटकूर, वालिंगडापुरम या ठिकाणी नागोजी भोसले, केदारजी जाधव व यशवंतराऊ कदम यांची नेमणूक केली. त्यांच्या हातांखाली किल्ल्याचे तटसरनोबत व बारगीर नेमून दिले. उटकूर-कोटाचा हवालदार यांस सालिना सव्वाशे होन तैनात मंजूर केली. मुजुमदार तेळगू लक्ष्माजी मादरस यास सालिना छत्तीस होनांची तैनात लावून दिली. नव्या जिंकलेल्या मुलुखात तलाव, देवालये वगैरे कामे जारी ठेवण्याची आज्ञा करून राजे परत यायला निघाले.

रघुनाथपंत, सेनापती हंबीरराव मोहिते, संताजीराजे भोसले, विठ्ठल पिलदेव अत्रे, हरजीराजे महाडीक वगैरे राजकारणातील मुरब्बी माणसांना मागे ठेवण्याचा राजांनी निर्णय केला. राजांनी त्यांच्या ताब्यात फौज दिली. निरोप घेताना राजांनी सांगितले,

‘तुम्ही सर्व सावधगिरीनं राहा. मुलुखाचा पुरा जाबता बसवून माघारी या. एकोजीराजे शहाणपण मानतील, असं वाटत नाही. त्यांनी काही बखेडा केला, तर ते आमचे बंधू आहेत, हे ध्यानी न धरता त्यांचा बंदोबस्त करा. इथल्या मुलुखात बखेडा सहन केला जाणार नाही. हे सर्वांना दाखवून द्या.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे आनंदरावांच्यासह आपली फौज घेऊन माघारी यायला निघाले. राजे पूर्व घाट चढून बालेघाटावर आले. राजांना जयदेवगड आपसूख मिळाला. शिवाजी येतो, हे कळताच शत्रू पळत होते.

शहाजीराजांच्या जहागिरीतील होसकोटे, बालापूर शिरे हा मुलूख राजांनी आपल्या ताब्यात आणला. कोप्पळच्या किल्ल्याला वेढा देऊन राजांचे दत्ताजी त्र्यंबक बसले होते. विजय संपादन करीत, सावकारांकडून खंडण्या वसूल करीत राजे तोरगल प्रांतात दाखल झाले. राजे तोरगल प्रांती असतानाच एकोजीराजांच्या कारवाईची बातमी राजांना मिळाली.

शहाजीराजांची जहागीर राजांनी जिंकल्यामुळे एकोजीराजे संतापले. त्यांनी आणि त्यांच्या मुसलमान सल्लागारांनी याचा सूड घेण्याचे ठरविले. एकोजीराजे फौजेसह चालून गेले. संताजीराजे भोसले सहा हजार स्वारांचे व सहा हजार पायदळाचे नेतृत्व करीत होते. एकोजीराजे चालून येत आहेत, हे कळताच संताजीराजे फौजेसह सामोरे गेले. दोन्ही फौजांची गाठ आंबोरियानजीक पडली. दिवसभर तुंबळ रण माजले. शेवटी संताजीराजांना माघार घ्यावी लागली. तंजावरची फौजही मिळविलेल्या विजयाने बेहोश होऊन आपल्या छावणीवर परतली.

माघार घ्यावी लागली, याचे संताजीराजांना फार दु:ख झाले. राजांनी नुकतीच हजारी मनसब दिली, विश्वास टाकला; आणि पहिल्याच चकमकीत आपण हरलो! संताजीराजे त्वेषाने उठले. जखमी सैनिकांना मागे ठेवून, भर रात्री ते तंजावरच्या छावणीवर तुटून पडले. बेसावध शत्रूला पळता भुई थोडी झाली. या लढाईत संताजीराजांनी हजार घोडे, प्रतापजीराजे, भिवजीराजे व शिवाजी दबीर असे तिघे सरदार आणि तंबू व इतर लष्करी सामान, बाडबिछायत हस्तगत केली. या पराजयाने एकोजीराजांचे डोळे साफ उघडले.

एकोजीराजांची हकीकत वाचून राजांना फार वाईट वाटले. राजांनी हंबीररावांना कळविले-

‘किती केले, तरी एकोजीराजे आमचे धाकटे बंधू आहेत. मूलबुद्धी करून वागले. तोही भाऊच आहे. त्यांचे राज्य बुडवू नका.’

राजांच्या आज्ञेनुसार रघुनाथपंतांनी एकोजीराजांच्या बरोबर वाटाघाटी केल्या. एकोजीराजांनी कोलारचा कोट राजांना देऊ करून तात्पुरते सख्य पदरात पाडून घेतले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी एकोजीराजांना कानउघाडणीचे खरमरीत पत्र पाठविले. राजांनी सुरुवातीला भेटीची आठवण देऊन पुढे लिहिले होते :

> ....येसीयास आम्हांस रायेगड प्रांते बहुत कांही कार्य होते. या निमित्ये तोरगल प्रांतास आलो, तेथें ऐंसी खबर ऐकली कीं, तुम्हीं तुरक लोकांच्या बुद्धीस लागोन आमच्या लोकांसी झगडा करावा, यैसे मनीं धरून आपली सारी जमेंत एकवट करून आमच्या लोकांवरी पाठवून दिल्हेत. तुमचें लोक चालोन आल्यावरी तुमच्या आमच्या लोकांत थोर झगडा जाला. तुमचें लोक पराजय पावले. किती येक लोक पलोन दाणादाण होऊन गेले. ऐसा समाचार आईकिला. हे ऐकोन बहुत नवल ऐसें वाटले कीं, कैलासवासि महाराज यांचें तुम्ही पुत्र बहुत थोर लोक ऐसे असोन कांहीं विचार करीत नाही. यैसे असतां कस्टी व्हाल याचे नवल काये.
>
> दुसरा विचार करावा कीं, श्रीशिवाची व श्रीची कृपा त्यावरि पुर्ण जाली आहे. दुस्ट तुरकाला ते मारितात. आपल्या सैन्यातही तुरुक लोकच असतां जये कैसा होतो आणि तुरुक लोक कैसे वाचो पहातात हा विचार करावा होता. आणि युद्धाचा प्रसंग पडावा नव्हता. परंतु दुर्योधनासारखी बुद्धी धरून युद्ध केले. आणि लोक मारविले. ते जालें ते जालें. पुढे तरी तुम्ही हट न करणें. तेरा वर्षे तुम्हीं सारें राज्य खादले ते खादले. याउपरि कितेक आमचें आमी घेतले असे. जे मागे तुमचें हातीं उरले आहेती ते आमचे लोकांचें हातीं देणें आणि नकद पैके व जडाव व हाती व घोडे यांचा अरधा वाटा देणे. ऐसा विचार करून आम्हांसी संधी करणे. तुम्हीं यैसा संधी निर्मलपणें केलिया आम्ही आपणापासून तुम्हांला तुंगभद्रै अलाड पनाले प्रांतें तीनी लक्ष होनांची दौलत देऊन अथवा आम्हां जवळील दौलत तुम्हांला मानेना तरी कुतुबशहास अर्ज करून त्यापासून तुम्हांला तीन लक्षांची दौलत देववूनु. यैसे दोनी विचार तुमास लिहले आहेत. या दोन्हीमधील एक मनीं धरून मान्य करणें. हटाचें हाती न देणे. आपल्यांत आपण गृहकलह करावा आणि कस्टी व्हावें याचें कांहीं प्रयोजन नाही. याऊपरि तऱ्ही आमचा आपला संधि व्हावा ऐसे बहुत मनी धरून वांटीयाचा वेव्हार निर्गमून टाकणे. आणि सुखी असणें. गृहकलह बरा नव्हे. आम्हीं तरी वडिल पणें आजीवरी तुम्हांला सांगितले. आताहि सांगतो. ऐकाल तरी बरें. तुम्हींच सुख पावाल. नाईकाल तर तुम्हींच कस्टी व्हाल.'

□

२१

राजांची छावणी गदग प्रांतातील संपगावाजवळ विसावली होती. थंडीचे दिवस असल्याने वातावरण प्रसन्न होते. राजे आपल्या तंबूच्या बाहेर आनंदरावांच्यासह उभे असता राजांचे सरदार सखुजी गायकवाड मुजऱ्याला आले. राजांनी विचारले,

'काय, सखुजीराव! छावणीची हालहवाल काय म्हणते?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सर्व ठीक आहे, महाराज, फक्त एकच कागाळी कानांवर आतली आहे.’

‘कसली कागाळी?’

‘काल आपले काबाडीचे बैल पुढच्या मुक्कामी जात असता बेलवडीच्या गढीच्या पाटलांनी ते अडविले, आणि सामानासहित पळवून नेले.’

राजे क्षणभर विचारात पडले. ते म्हणाले,

‘सखुजीराव, काही तरी गफलत झाली असेल. बेलवडी म्हणजे एवढी छोटी गढी. तिची ही हिंमत व्हायची नाही. पाटलांना समज देऊन बैल सोडण्याची आज्ञा करा.’

राजांची आज्ञा घेऊन सखुजीराव गेले. बेलवडी सपाट भूमीवर वसलेली, मातीच्या चौफेर कुशीने सजलेली छोटी गढी. त्या सपाट भूमीवर वसलेली ती गढी पावसाळी उगवलेल्या एकाकी अळंबीसारखी दिसत होती. पण त्या गढीचा पाटील मोठा हिंमतवान होता. सखुजीराव गायकवाडांचा निरोप जेव्हा त्याला कळला, तेव्हा त्याने एकच उत्तर दिले,

‘हिंमत असेल, तर बैल सोडवून न्या!’

राजांना पाटलांचा निरोप कळला. राजांनी सखुजीरावांना हुकूम दिला,

‘पाटील आपल्याच तोऱ्यात आहेत, असं दिसतं. सामोपचार त्यांना मानवेल, असं दिसत नाही. ठीक आहे. सखुजीराव, तुम्ही आपली कुमक घ्या, आणि बेलवडी काबीज करून बैल ताब्यात घ्या. तोवर आमचा तळ येथेच राहील.’

सखुजीरावांनी आपल्या स्वारांनिशी बेलवडीची नाकेबंदी केली. चौफेर चौक्या जारी केल्या. क्वचित चकमकी झडू लागल्या. पण बेलवडीला मराठी फौज भिडेना. भिडण्याचा प्रयत्न केला, तर हिरिरीने प्रतिकार केला जाई. कर्नाटकी प्यादे पायीच्या लढाईत मजबूत. त्याचे प्रत्यंतर सखुजीरावांना येत होते. दिवस उलटले; पण गढी काबीज होण्याची चिन्हे दिसेनात. राजांच्या छावणीतून गढी दिसत होती. सारी फौज गढीकडे डोळे लावून बसली होती. राजांचा मन:क्षोभ वाढत होता. राजे विचारमग्न बसले असता सखुजीराव आल्याची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वर्दी आली. सखुजीराव सामोरे येताच राजांनी विचारले,

‘बोला, सखुजीराव गढी काबीज झाली?’

सखुजीरावांची मान खाली झुकली. ते हताशपणे म्हणाले,

‘महाराज, गढीचा बंदोबस्त कडेकोट केला आहे. पण फार दिवस गढी टिकाव धरील, असं वाटत नाही.’

राजे हसले.

‘वा! सुरेख! सखुजीराव, कोणी ज्योतिषी भेटला का?’

‘त्यांनीही तेच सांगितलं.’ सखुजीराव म्हणाले.

राजांची नजर शेजारी उभ्या असलेल्या आनंदरावांच्याकडे गेली. आनंदराव म्हणजे फौजेचे दुय्यम सेनापती.

‘आनंदराव, आमच्या सखुजीरावांची तारीफ करावी, तेवढी थोडी! ज्योतिष्याला विचारण्यापर्यंत यांच्या शौर्याची मजल गेली! एवढा दक्षिणदिग्विजय करून आम्ही आलो; पण बेलवडीची ही चिमुकली गढी आम्हांला काबीज करता येत नाही. बेलवडीच्या पाटलानं ही आगळीक केली नसती, तर आमचं त्या गढीकडे लक्षही गेलं नसतं....सखुजीराव, आम्हांला असल्या खेळात फार दिवस घालवता येणार नाहीत.’

‘महाराज, आपला उंटावरचा तोफखाना वापरण्याची आज्ञा द्यावी. एका दिवसात गढी नेस्तनाबूद करू.’

‘केवढा लौकिक पदरात घ्याल! एक मामुली गढी, आणि तीसाठी तोफखाना! मग आमची फौज काय कमी आहे? चालत गेली, तर गढी राहणार नाही. तुमच्या हातून ही कामगिरी होत नसेल, तर सांगा, आम्ही दुसऱ्या कुणाची तरी नेमणूक करू!’

राजांचा निरोप घेऊन सखुजीराव बाहेर पडले. आपल्या माणसांसहित ते गढीला भिडू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लागले. चकमकी उडू लागल्या. आणि एके दिवशी गढीच्या द्वाराशी चाललेल्या चकमकीत पराभव होतो आहे, हे ध्यानी येताच गढीचा पाटील त्वेषाने बाहेर पडला. शर्थीची लढाई सुरू झाली. त्या लढाईत पाटील पडले. पाटलांना घेऊन पाटलाचे लोक गढीत गेले.

पाटील पडल्याचे ऐकताच सखुजीरावांना आनंद झाला. आता गढी ताब्यात येईल, असे वाटून ते दुसऱ्या दिवशी गढीवर चालून गेले. तेशील दृश्य पाहून सखुजीराव आश्चर्याने थक्क झाले. पाटलाच्या पश्चात पतीचे कार्य हाती घेऊन सावित्रीबाई गढीवर उभी होती. शौर्याने गढी लढवीत होती. नुसत्या पायदळाने गढी काबीज होण्याचे दिसेना. दिवस मात्र उलटत होते. गढीला वेढा घालून एकवीस दिवस झाले होते. सावित्रीबाई गढी लढविते आहे, हे राजांना कळले, तेव्हा राजे उद्गारले,

'धन्य आहे त्या शूर स्त्रीची! पतिनिधनानंतर आपलं दुःख विसरून ती आपली गढी लढविते आहे. तिच्या धैर्याला तोड नाही. आम्ही आणखीन एक दिवसाची वाट पाहू. नाही तर जातीनिशी या मोहिमेत भाग घेऊ. त्याखेरीज आम्हांला गत्यंतर नाही.'

राजांचा निर्धार सखुजीरावांना कळला. त्यांनी त्वेषाने ओठ चावले.

दुसऱ्या दिवशी पहाटे छावणीवर दाट धुके उतरले. रात्रभर जळत राहिलेले पलोते विझवले जात होते. सूर्योदयाबरोबर पूजा आटोपून राजे तंबूबाहेर आले. त्यांची नजर बेलवडीच्या गढीला गेली. राजांनी आनंदरावांना विचारले.

'आनंदराव, सखुजी आले नाहीत?'

'महाराज, आज पहाटेच सखुजीराव आपली कुमक घेऊन गढीवर चाल करून गेले.'

'कालचे आमचे बोल त्यांनी जिवाला लावून घेतलेले दिसतात.'

'सखुजीराव कामात कुचराई करणारे नव्हेत.' आनंदरावांनी ग्वाही दिली.

'आम्ही कुठं तसं म्हणतो? पण हा पेचच वेगळा पडला. एवढी फौज हाताशी असूनही गढीवर चालून जाता येत नाही, तोफखाना वापरता येत नाही. एका लहान गढीवर आम्ही फौज, तोफखाना वापरला, तर अपकीर्ती मात्र पदरात पडेल. धरलं, तर चावतं; सोडलं,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तर पळतं, अशी अवस्था झाली आहे. यात सखुजीरावांचा दोष नाही. सखुजीरावांच्या जवळ धाडस आहे. शौर्य आहे; पण....’

‘पण काय, महाराज?’ आनंदरावांनी विचारले.

‘युक्ती नाही. त्याऐवजी संताप आहे. संतापाने बुद्धीवरचा ताबा नष्ट होतो. चाल कळत नाही. नाही तर ही गढी घ्यायला इतका उशीर लागला नसता.’

अचानक तुताऱ्यांचा आवाज साऱ्या मुलुखात उठला. सारे आवाजाच्या दिशेने पाहत होते. गढीच्या रोखाने आवाज येत होता. महाराजांच्या चेहऱ्यावर हास्य उमलले. महाराज हात जोडून उद्गारले,

‘जगदंबेची कृपा! आनंदराव, सखुजीराव विजयी झाले. चला, आनंदराव विजयी वीरांच्या स्वागताला चार पावलं पुढं जाऊ.’

थोडी धावपळ उडाली. मोतद्दारांनी घोडी आणली. जाधवराव, निंबाळकर, आनंदराव ही मंडळी त्वरित डेऱ्यासमोर आपापल्या घोड्यानिशी सज्ज झाली. महाराज डेऱ्यातून बाहेर आले. त्यांनी सर्वांवरून नजर फिरविली. खास अश्वपथक तयार होते. राजांनी घोड्यावर मांड टाकली. टाच दिली. त्या काळ्या उमद्या जनावराने ऐटीने पावले उचलली. पाठोपाठ सरदार मंडळी जात होती. मागून अश्वपथकांचे स्वार जात होते.

महाराज गढीजवळ पोहोचले. मुख्य दरवाजाचा नगारा धडधडू लागला. महाराज पायउतार झाले. अनेक जखमी वीर तेथे होते. कामी आलेल्या वीरांवर शेले झाकले होते. महाराज गंभीर झाले. स्वागतासाठी श्रीपतराव नाईक आलेले पाहताच राजांचे पाय थबकले. श्रीपतरावांच्या मुजऱ्याचा स्वीकार करून राजांनी विचारले,

‘श्रीपतराव, सखुजीराव कुठं आहेत?’

महाराजांची चिंता ओळखून श्रीपतराव म्हणाले,

‘महाराज, गढी मोठ्या शर्थीनं सर झाली; पण या अनर्थाला कारणीभूत झालेली सावित्रीबाई मात्र धुक्याचा फायदा घेऊन हातून सुटली. तिला गिरफदार करण्यासाठी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सखुजीराव जातीनिशी गेले आहेत.’

राजांनी नि:श्वास सोडला. आनंदरावांना ते म्हणाले,

‘काय, आनंदराव? आम्ही बोललो, ते खरं आहे ना? गढी सर होऊनही सखुजीराव थांबू शकले नाहीत. त्यांचा संताप एवढ्यावरच तृप्त झाला, तर नवल! आम्ही त्यांच्या स्वागताला येथवर आलो, पण त्यांचाच पत्ता नाही! श्रीपतराव, फार हानी झाली?’

‘पाच-सहा कामी आले. जखमींची संख्या फार आहे.’ श्रीपतराव अदबीने म्हणाले.

नि:श्वास सोडून राजे म्हणाले, ‘श्रीपतराव, जे कामी आले, त्यांना वीरोचित सन्मान द्या. जखमींची नीट काळजी घ्या. आम्ही येतो.’

‘महाराज, आपण गढीत यावं...’

‘जरूर येऊ. पण श्रीपतराव, ज्यांनी ही गढी मोठ्या शर्थीनं जिंकली, ते सखुजीराव गढीत नसताना आम्ही गढीत प्रवेश कसा करणार? ते शोभणार नाही. सखुजीराव आले, की त्यांना सांगा... आम्ही त्यांच्या भेटीसाठी इथवर आलो होतो. त्यांच्या भेटीस्तव आमचा जीव उतावीळ आहे.’

त्यानंतर दोन दिवस गेले, तरी सखुजींचा पत्ता नव्हता. महाराज चिंतेत होते. छावणी उठविण्याची गडबड सुरू झाली. राजे सखुजीरावांची वाट पाहत होते. त्यांचा शोध घेण्यासाठी दोन पथकेही पाठविण्यात आली होती.

महाराज शामियान्यात बैठकीवर बसले होते. सारे सरदार, चिटणीस शामियान्यात हजर होते. राजे पुढचा मनसुबा सांगत होते. तोच जासूद आत आला. मुजरा करून तो म्हणाला,

‘महाराज, सखुजीराव आले.’

‘सखुजीराव आले?’ म्हणत राजे बैठकीवरून उठले. त्याच वेळी शामियान्याच्या प्रवेशद्वारातून सखुजीराव प्रवेश करते झाले. राजे पुढे झाले. सखुजी मुजऱ्याकरिता वाकले असतानाच राजांनी त्यांना मिठीत घेतले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सखुजीराव, धन्य आहे तुमची! आम्ही इकडे तुमच्या स्वागतासाठी आतुरलो असता तुमचा पत्ता नाही.’ राजांनी आपला डावा हात सखुजीरावांच्या डाव्या खांद्यावर ठेवीत हसत विचारले, ‘मग गनीम सापडला?’

‘तो सापडला नसता, तर सामोरा आलो नसतो.’ सखुजीराव म्हणाले.

‘शाब्बास!’

‘महाराज गनीम आपल्यासमोर हजर करण्याची आज्ञा व्हावी.’

राजांना मानेने होकार दिला. सखुजीराव शामियान्याच्या बाहेर गेले. राजे आसनस्थ झाले. साऱ्यांच्या नजरा शामियान्याच्या प्रवेशद्वारावर खिळल्या. सखुजीराव आत आले. त्यांच्या पाठोपाठ जेरबंद केलेल्या सावित्रीबाई पाहताच राजांचे हास्य कुठच्या कुठे गेले. त्यांनी सखुजीरावांच्याकडे पाहिले. सखुजीराव म्हणाले,

‘महाराज, ह्याच त्या सावित्रीबाई!’

‘पण स्त्रियांना जेरबंद करण्याची आवश्यकता केव्हापासून भासू लागली?’ राजांचा आवाज किंचित कठोर बनला.

‘महाराज, क्षमा असावी! ज्या शर्थीनं गढी लढवली, आणि जिनं तीन दिवस अन्नपाण्याविना आम्हांला रानोमाळ हिंडवलं, ते यांचं रूप इतकं सोज्ज्वळ नाही. यांचा शेवटचा माणूस गारद होईपर्यंत ह्या आमच्या हाती लागल्या नाहीत. गढीसाठी जेवढे बळी द्यावे लागले नाहीत, तेवढे यांना पकडताना द्यावे लागले.’

‘बाई, धन्य आहे तुमची, तुमच्या पराक्रमाची!’ राजे उद्‌गारले. ‘सखुजीराव, बाईंच्या हाती बांधलेल्या काढण्या सोडा.’

‘पण, महाराज!....’

‘सखुजी, अबलांना जेरबंद करणं हे वीरांना शोभत नाही. त्या आम्हांला मातेसमान आहेत. प्रथम त्यांना मोकळं करा!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काढण्या सोडल्या गेल्या. सावित्रीबाई अधोवदन निश्चल उभी होती. राजे गंभीर वाणीने बोलू लागले,

‘सावित्रीबाई, तुम्हांस त्रास द्यावा, हा आमचा हेतू नव्हता; आजही नाही. तुमच्या पतींनी अकारण आमची आगळीक काढली, आमचे काबाडीचे बैल लुटले. दिलेली समज त्यांनी मानली नाही. लढायला ते सिद्ध झाले. पण अविवेकी धाडसाला अर्थ नसतो. स्वराज्यस्थापनेसाठी, धर्मसंस्थापनेसाठी प्रयत्न करीत असता आपल्यासारख्या शौर्यशालिनीचा विरोध आम्हांला व्हावा, याचं दुःख होतं. स्वधर्म आणि स्वराज्य यांसाठी आम्हांला तुमच्या आशीर्वादाची गरज असता तुमचा विरोध का यावा?’

सावित्रीबाईंनी प्रथमच आपली नजर दरबारात वर केली. एखादी वीज चमकून जावी, तशी सावित्रीबाईंची नजर दरबारावरून फिरली. स्फुलिंगाची धगधगती नजर त्या फेकीत होत्या. राजे सस्मित वदनाने विचारते झाले,

‘बोला, बाई! हा पराजयाचा अपमान तर....’

‘हंः!’ सावित्रीबाई हुंकारली. ‘राजे, जय-पराजय ह्या नशिबाच्या गोष्टी. त्यांची खंत कसली?’

‘खरं आहे! राजे म्हणाले. ‘धर्मानं, न्यायानं आणि नीतीनं जाणाऱ्याला यशापयशाचा वारा शिवत नाही. आमच्या स्वराज्याला....’

‘तुझ्या आसुरी राज्याला स्वराज्याचा टिळा कशाला लावतोस, बाबा? दुर्दैव, आज माझा पराभव झाला! मंगल कार्यात देवानं हात दिला नाही.’

‘खामोश!’ आनंदराव ओरडले. राजांची नजर वळताच ते शरमले.

‘बोला, बाई! आम्ही सारं ऐकून घेऊ. तुमच्यावर अन्याय झाला, असं का तुम्हांला वाटतं?’

‘अन्याय? राजा, तुला न्यायाची चाड आहे?’ फरसबंदीवर नगदी रुपये खणखणत उतरावेत, तसा तो प्रश्न उमटला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे स्थिर नजरेने आणि स्थिर मनाने बोलले,

'आई, ह्या शिवाजीबद्दल अनेक प्रवाद असतील; पण त्याच्या स्वराज्याच्या हेतूबद्दल कोणीही आजवर शंका घेतली नाही. तुमची काही तक्रार दिसते. आमचं अभय आहे. तुम्ही मोकळ्या मनानं सांगा. तुमच्यावर अन्याय झाला असेल, तर जरूर न्याय मिळेल. पण त्याचबरोबर स्त्री म्हणून शत्रूचे अकारण लाड पुरविले जातील, असंही समजू नका.'

सावित्रीबाई स्तब्ध उभी होती. शांतता असह्य होत होती.

'बोला, बाई!' राजे म्हणाले.

खालच्या मानेनेच सावित्रीबाई म्हणाली.

'भर दरबारी मी काय सांगू?'

राजांनी आज्ञा केली. चकित झालेले सारे बाहेर गेले.

'सांगा...' राजे म्हणाले,

नागिणीसारखी संतप्त झालेली सावित्रीबाई त्या शब्दाबरोबर ढासळली. उभ्या जागी ती कापू लागली; आणि एकदम तिने आपला चेहरा हातांत दडविला. हुंदक्यांचा आवाज आला. राजे उभे राहिले.

'आई! कायं झालं, सांगा. मुलाचा संकोच बाळगू नका.'

सावित्रीबाईंनी डोळे टिपले. राजांच्या नजरेला नजर देत ती म्हणाली,

'तुमचे सखुजीराव गढी जिंकूनच थांबले नाहीत....' आणि नजर खाली वळवीत ती म्हणाली, 'त्यांनी माझी अब्रूही घेण्याचा प्रयत्न केला!'

'अशक्य!' राजे अस्वस्थ होऊन एकदम उद्गारले. 'बाई, तोहमत खोटी ठरली, तर ह्या गुन्ह्याला शिरच्छेदाखेरीज शिक्षा नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या नजरेला नजर भिजवीत सावित्रीबाई म्हणाली,

‘राजे, मी पाटलीण, गावची वतनदार, कोणती खानदानी स्त्री असं खोटं सांगेल? आपण सखुजीरावांना विचारा...’

राजांच्या कपाळी घर्मबिंदू गोळा झाले. मुठी वळल्या गेल्या. आज्ञेबरोबर सारे शामियान्यात आले. मूक अश्रू गाळीत उभ्या असलेल्या सावित्रीबाईंकडे सारे आश्चर्याने पाहत होते; आपली तीक्ष्ण नजर सखुजींवर स्थिर करीत राजांनी विचारले,

‘सखुजी, ह्या काय म्हणतात?’

‘साफ खोटं! महाराज, हे कुभांड आहे!’ सखुजी ओरडले.

‘साफ खोटं? कसलं कुभांड?’ राजे आसनावरून उठले. ‘ सखुजीराव, आम्ही काही न विचारता तुम्ही उत्तरं देता?’

सखुजीराव चपापले.

‘सखुजी. तुम्ही ह्यांच्याशी गैरवर्तन केलंत?’

‘महाराज!’ सखुजी उभ्या जागी घामेजला. ‘क्षमा, महाराज! क्षमा...’ म्हणत सखुजी महाराजांच्या पायांवर कोसळला.

महाराजांच्या मुठी आवळल्या गेल्या. उभ्या जागी त्यांचे डोळे भरून आले. सखुजीरावांच्या मिठीतून आपले पाय सोडवून घेत राजे मागे सरले. संतापाने राजे थरथरत होते. चेहरा उग्र बनत होता. एखाद्या खोल विहिरीतून आवाज यावा, तसे राजे बोलू लागले,

‘सखुजी, काय केलंत? मोगली जुलमी सत्तेतून प्रजा मोकळी व्हावी, धर्म आणि अब्रू यांचं रक्षण व्हावं, म्हणून आम्ही स्वराज्याचं तोरण उभं केलं, आणि तुम्ही... तुम्ही आईवर हात टाकण्याचा प्रयत्न केलात?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘क्षमा, महाराज!...’ म्हणत सखुजी पुढे सरले.

‘पुढं येऊ नका, सखुजी! त्या अमंगल हातांचा स्पर्श करू नका. ह्या गुन्ह्याला क्षमा होणे नाही. एक वेळ आम्ही पराभव सोसला असता... नाही, सखुजी, आम्ही क्षमा करू शकत नाही...’

राजे आसनावर बसले. ‘सखुजी! तुम्ही जे कृत्य केलंत, त्यानं स्वराज्याला कलंक लावलात. ह्या गुन्ह्याबद्दल...’

जाधवराव धीर करून पुढे सरकले. ‘राजे...’

‘खामोश!’ राजे उभे राहिले. साऱ्या दरबारची छाती धडधडत होती. श्वास अवरोधले होते. शांतपणे सखुजींकडे बोट दाखवीत राजे म्हणाले,

‘ह्या सखुजींचे पापी डोळे तप्त सांडसानं उखडून काढा! ज्या पापी हातांनी परस्त्रीला स्पर्श केला, ते हात तोडा! ह्या शिक्षेची अंमलबजावणी आमच्या देखत झाली पाहिजे.’

सखुजी पुरा ढासळला.

सावित्रीबाई थक्क होऊन पाहत होती. थोड्याच वेळात सांडस घेतलेले पलोतेधारी आत आले. सखुजीला पकडण्यात आले. पलित्यांवर अणकुचीदार सांडस तापविण्यात आले; आणि किंकाळीपाठोपाठ सखुजीचे डोळे उखडले गेले. ते दृश्य असह्य होऊन सावित्रीबाईंनी देखील डोळ्यांवर हात घेतले.

आपली संतप्त नजर सखुजींवरून न काढता राजे म्हणाले,

‘ह्या पाप्याला पन्हाळ्याच्या अंधारकोठीत टाकून द्या.’

सखुजीला दरबारातून नेण्यात आले. राजांची नजर सावित्रीबाईंच्याकडे वळली. सारा राग क्षणात ओसरला. नजरेत असहायता भरली. राजे म्हणाले,

‘बाई, ह्या शिक्षेनं गुन्ह्याची भरपाई होत नाही, हे आम्ही जाणतो. आमचं दुःख फार

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मोठं आहे. आम्ही तुम्हांला बाइज्जत मुक्त करीत आहोत. बेलवडी तुमची आहे. तीखेरीज दोन गावं आंदण म्हणून आम्ही तुम्हांला देऊ करीत आहोत.'

सावित्रीबाईंनी अश्रू टिपले. राजांच्या पाया पडण्यासाठी त्या पुढे आल्या. राजे हात जोडून उभे राहिले. सद्गदित आवाजात ते म्हणाले,

'आई, आम्हांला आणखीन लाजवू नका! देता आला, तर एकच आशीर्वाद द्या.'

सावित्रीबाईंनी वर पाहिले. राजांचे डोळे भरून आले होते. नजर घायाळ बनली होती. शब्द फुटत नव्हता राजे म्हणाले,

'आई, एकच आशीर्वाद द्या... आमच्या स्वराज्याला आपला शाप न लागावा. शक्य झालं, तर आमच्या सुराज्याला आशीर्वाद मिळावा. असा आशीर्वाद मिळावा, की असा दुर्दैवी कलंक आमच्या राज्याला पुन्हा कधीही न लागावा. एवढं दिलंत, तरी आम्ही कृतार्थ होऊ!'

सावित्रीबाईंनी पाहिले, तो राजांच्या नेत्रांतून आसवे ओघळत होती. आणि त्या अश्रूंच्या दर्शनाने सावित्रीबाईंना पावन झाल्याचा भास होत होता...

□

२२

सावित्रीबाईंच्या हाती बेलवडी सुपूर्द करून राजांनी संपगावचा तळ उठविला. संपगावच्या तळावरच राजांना विजापूरकडची बातमी कळली. बेहलोलखान मेल्यामुळे आदिलशाहीची वजिरी सिद्दी मसूदकडे आली होती. दिलेरखानदेखील विजापूरस्वारीवर येणार, अशा वदंता उठल्या होत्या. राजांनी पन्हाळा गाठण्याचे ठरविले; आणि आपल्या फौजेनिशी राजे मजल, दरमजल करीत पन्हाळ्याला आले. पाटगावला जाऊन मौनी बुवांचा त्यांनी आशीर्वाद घेतला. कारीला जाऊन नागोजी जेध्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली; आणि राजे पन्हाळ्याला परत आले. राजांचे लक्ष विजापूर व मोगल यांच्या राजकारणाकडे लागून राहिले होते. राजे पन्हाळ्याला आलेले कळताच मोरोपंत पन्हाळ्याला आले. त्यांनी राजांना राज्याचा सर्व वृत्तांत सांगितला. दक्षिणेतून हंबीरराव राजांना येऊन मिळाले. राजे मोरोपंतांना

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

म्हणाले,

‘पंत, दीड वर्षाच्या कालावधीत जगदंबेनं उदंड यश दिलं! एक वेलोरचा किल्ला सोडला, तर गेलो, तिथं आपसूख विजय पदरी पडला. आमच्या राज्याच्या कक्षा तुंगभद्रेला मिळाल्या. मोरोपंत, यापुढची जबाबदारी खूप मोठी आहे.’

‘आता चिंता कसली? स्वराज्याचा बंदोबस्त राखायला उदंड फौज, हरहुन्नरी माणसं आहेत. विपुल संपत्ती राज्याच्या जामदारखान्यात आहे. महाराजांनी कसलीही चिंता मनात आणू नये.’

राजे हसले. त्यांची नजर हंबीररावांच्याकडे गेली.

‘हंबीरराव, तुम्ही आमचे सेनापती. तुम्ही बोलत नाही.’

‘महाराज, पंत म्हणतात, ते खरं. आता आपल्याला दगदग करावी लागणार नाही.’

‘आमचे सेनापती, आमच्या राज्याचे पेशवे एवढी ग्वाही देत असता आम्हांला काळजी कसली?’ राजे क्षणभर थांबले. ‘पंत, एवढं गाफील राहून चालणार नाही. अजून सुखाचे दिवस फार लांब आहेत. सिद्दी अजून प्रबळ आहे; आणि दक्षिणेत दिलेरखानसारखा कपटी, मुत्सद्दी शत्रू उतरला आहे. पुरंधरचा तह विसरून चालायचा नाही. आयुष्यात दोन मातब्बर शत्रू आम्हांला भेटले... एक मिर्झाराजे जयसिंग आणि दुसरा दिलेर. मिर्झाराजे गेले. पण हा दिलेर- तो काय करील, याचा भरवसा नाही. त्यामुळं तर आम्ही दक्षिणेची स्वारी सोडून माघारी वळलो. नाही तर आमच्या राज्याची कक्षा सहज कन्याकुमारीला भिडविली असती.’

‘दिलेर रणांगणात उतरला, तर त्याचा पराभव करणं कठीण नाही आता. त्याच संधीची आम्ही वाट पाहतो आहोत.’ हंबीरराव म्हणाले.

‘दिलेरचा पराभव कराल. ते आम्ही जाणतो. पण तिथं आपली लढाई संपत नाही. आणखीन एक लढाई आहे.’

मोरोपंत, हंबीरराव राजांकडे पाहत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कोणती?’ मोरोपंतांनी विचारले.

‘औरंगजेब! एक दिवस खुद्द बादशहा दक्षिणेत उतरेल. त्याच्याशी आमचे दोन हात होतील. ती निर्णायक लढाई ठरेल. त्यानंतर जे राहील, ते राज्य. एक ना एक दिवस आम्ही औरंगजेबाचा पराभव करून दिल्ली गाठू; काशीविश्वेश्वराची स्थापना करू. तो दिवस जेव्हा दिसेल, तेव्हा खरी तृप्तता लाभेल. मोरोपंत, पल्ला फार दूरचा आहे. विसावा घ्यायला अवधी नाही... आणखीन काय खबर?’

‘एक खबर चांगली आहे.’ मोरोपंत म्हणाले, ‘नुकतीच नाशिक भागात दौड करून लूट गडावर आणली आहे.’

‘तुम्ही?’

‘जी.’

‘आणि?’

‘दुसरी खबर चांगली नाही.’

‘सांगा, मोरोपंत!’

‘त्र्यंबक डबीर आपल्याला सोडून गेले!’

राजांचा जीव व्याकूळ बनला. त्र्यंबकपंत अष्टप्रधानांपैकी एक, राज्याचे सुमंत. राजांनी विचारले,

‘केव्हा?’

‘गत वर्षी याच दिवसांत. शिवापूरला त्र्यंबकपंत वारले.’

‘अरेरे! जेव्हा अत्यंत गरज होती, तेव्हाच पंत गेले. जगदंबेची इच्छा! ...शृंगारपूरची बातमी?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सर्व ठीक आहे!’ मोरोपंत म्हणाले.

‘ठीक आहे?’ राजांना पुढे विचारायचा धीर झाला नाही.

राजे सदरेतून उठत असता हंबीररावांनी विचारले,

‘महाराज, आपल्या फौजेतला गुणवंता यादव आहे, तो फार मोठा कसबी आहे. आवाज चांगला आहे. दक्षिणेतील आपल्या पराक्रमावर त्यानं चार चौक रचले आहेत. आपण ऐकावे, आशी त्याची इच्छा आहे.’

‘तुम्ही पोवाडा ऐकलात?’

‘जी. फार चांगला आहे!’

‘तसं नसतं, तर तुम्ही ही तारीफ केलीच नसती. उद्या रात्री पोवाडा ठेवा. आम्ही स्वस्थ मनानं ऐकू.’

सायंकाळी राजे मोरोपंतांसह सोमेश्वरदर्शनाला गेले. देवदर्शन आटोपून राजे मोरोपंतांसह परकोटाच्या बाजूला गेले. राजांनी मोरोपंताखेरीज कुणालाच बरोबर घेतले नव्हते. तटाचे पहारे पाहत, मुजरे घेत राजे दौलतीबुरुजापर्यंत आले. राजांनी विचारले,

‘मोरोपंत, आम्ही या बुरुजाचं नाव ‘दौलती’-बुरूज का ठेवलं असेल?’

मोरोपंत स्मित लपवीत म्हणाले,

‘इतक्या दिवसांच्या सहवासात एवढं ध्यानी आलं नाही, तर सारंच वाया गेलं, म्हणावं लागेल. या जांभ्या दगडांनी बांधलेल्या या दौलतीवरून नजर टाकली, तरी आपल्या प्रश्नाचं उत्तर मिळतं. समोर खोरं आणि आंबाघाटाचा मुलूख पसरला आहे. या दौलतीवरून ती दौलत राखता येते. महाराजांच्या या दूरदृष्टीचं कौतुक वाटतं.’

राजे अभिमानाने म्हणाले, ‘पंत! या दौलतीबुरुजापेक्षा तुमच्यासारखे दौलतीचे राखणदार आम्ही उभे केले, याचं आम्हांला समाधान वाटतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘दौलतीचे धनी, राखणदार आपणच, महाराज! ती जागा दुसरा कोण घेईल?’

राजे गंभीर झाले.

‘पंत. आम्ही नावाचे धनी! स्वराज्याच्या कक्षा संभाळणारी फौज, आमच्यावर विश्वास ठेवणारी कुलरयत, आमच्या आज्ञा निष्ठेनं पाळणारी तुमच्यासारखी माणसं, हेच खरे दौलतीचे धनी. पाहा ना... बेहलोलखानाचं दफन झालं नाही, तोच आदिलशाही सिद्दी मसूदच्या हाती गेली; आणि आम्ही जवळ जवळ दीड वर्ष फौज घेऊन मुलूख सोडून जातो, आणि आमच्या राज्याचा कारभार एवढासुद्धा हलत नाही, आमच्याविना काही नडत नाही.’

‘महाराज!’

‘त्यात वाईट काय? हेच हवं होतं. आम्हांला खूप समाधान वाटलं! आज इथवर तुमच्याबरोबर फिरत आलो, याचं कारण मात्र निराळं. आम्हांला शृंगारपूरची हकीकत ऐकायची आहे.’

‘तसं काही विशेष नाही.’

‘जे असेल, ते ऐकायचं आहे.’ राजे निग्रहाने म्हणाले.

मोरोपंत विचारात पडले. अकारण आपले उपरणे सारखे करीत ते म्हणाले,

‘युवराजांचा लौकिक शृंगारपूरला पसरला आहे. युवराज आदर्श सुभेदार म्हणून प्रजा त्यांना ओळखते.’

‘आणि... सांगा, पंत! फसवणं तुम्हांला जमत नाही.’

‘महाराज, युवराजांनी रयतेला सूट दिली. त्यामुळं रयतेचा दुवा मिळाला; पण सुभ्याचा वसूल बुडाला आहे. रायगडाच्या खजिन्यातून मागतील ती रक्कम आपल्या आज्ञेनुसार पोहोचवली आहे. अनाजींनी निर्णय केले, की ते मुद्दाम फिरविले जातात; युवराजांचं अभय मिळतं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आणि?’

‘आणि....’

‘बोला.’

‘युवराजांनी कवी कलशांकडून कलशाभिषेक घेतल्याची बातमी आहे.’

‘खरं?’

‘बातमी विश्वसनीय आहे.’

‘छान! मोरोपंत, माणूस निष्क्रिय असला, की असं काही तरी घडतंच.’

‘युवराजांच्या भोवती शाक्तपंथीय माणसांचा सहवास आहे, त्यांचं वर्चस्व वाढतं आहे.’

‘ठीक!’

‘तशीच एक आनंदाची बातमी आहे.’

‘कोणती?’

‘आपण आजोबा होणार, अशी लक्षणं आहेत, म्हणे!’

त्या शेवटच्या बातमीने राजांचा चेहरा आनंदित झाला. ते मोरोपंतांना म्हणाले,

‘पंत, आपण उद्या राजापूरला जाऊ. पद्मदुर्गाचं काम आणि तेथील व्यवस्था पाहून, शृंगारपूर करून आपण रायगड गाठू.’

दुसऱ्या दिवशी राजे पन्हाळा सोडणार, ही बातमी पसरली. हंबीरराव राजांना म्हणाले,

‘महाराज, आपण पोवाडा ऐकणार होता!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मनात होतं खरं!’ राजे उद्गारले. ‘पण आता इथं मन रमणार नाही. मन बेचैन आहे. आता घरी परतावं, असं वाटतं.’

‘का? काय झालं, महाराज?’ हंबीररावांनी काळजीने विचारले.

‘ते कोण सांगणार? बिचारा आत्मा काही तरी सांगत असतो, सुचवीत असतो; पण मन सदैव आपल्याच रंगात गुंग झालेलं. आत्म्याचा आवाज कळणार कसा?’

‘आम्ही समजलो नाही.’ पंत म्हणाले.

‘आम्हांला कुठं कळतं, म्हणून ते तुम्हांला सांगणार?’ राजे आपल्या मोकळ्या केसांवरून हात फिरवीत म्हणाले.

‘हंबीरराव, तुम्ही चिंता करू नका. आनंदरावांना पन्हाळ्याला फौज गोळा करायला सांगा. आपण रायगडी जाऊन परत पन्हाळ्याला येऊ, तेव्हा आम्ही जरूर पोवाडा ऐकू.’

राजे अश्वारूढ झाले. राजांच्या शेजारी हंबीरराव, मोरोपंत स्वार झाले होते. मागे अश्वपथके तयारीत उभी होती. राजे हंबीररावांना म्हणाले,

‘हंबीरराव, तुमचा गुणवंता कुठं आहे?’

थोड्याच वेळात गुणवंता नजीक आला. त्याने राजांना मुजरा केला. राजांनी स्वत:बरोबर घेतलेली शंभर मोहरांची थैली गुणवंताच्या हाती फेकली. राजे म्हणाले,

‘गुणवंता, आम्ही जरूर तुमचा पोवाडा ऐकू. कवन चांगलं केलं, असं ध्यानी आलं, तर शिलेदारीतून तुझी नेमणूक शाहिरीवर करू.’

गुणवंता घाबरला. त्याचा चेहरा म्लान झाला. तो म्हणाला,

‘महाराज, माफी करा! परत कवन नाही करणार. पण शिलेदारीतनं....’

राजे मोकळेपणी हसले. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘गुणवंता, तू कवन कर. आम्ही शिलेदारीतून तुला काढणार नाही. तलवार गाजवून कवन करणारे तुझ्यासारखे वीर आम्हांला मिळणार तरी कुठं?’

राजांनी हंबीररावांच्याकडे पाहिले हंबीररावांनी इशारतीचा हात वर केला. राजे आपल्या पथकांसह दौडू लागले.

चार दरवाजाच्या नगाऱ्याचा नाद गडावर घुमत होता.

□

२३

हंबीरराव, मोरोपंत यांसह राजे राजापूरला आले. राजांनी पद्मदुर्गाची पाहणी केली. राजे आलेले समजताच इंग्रज वकील राजांना भेटायला आले. राजे इंग्रज वकिलांना भेटले.

दोन प्रहरी दौलतखान राजांच्या सामोरे आले. राजांनी त्यांना तातडीने बोलावून घेतले होते. दौलतखानाच्या मुजऱ्याचा स्वीकार करून राजे बोलले,

‘दौलतखान, तुम्ही आमचे दर्यासारंग. आमच्या राज्याची ही सागरी दौलत तुम्ही संभाळता. पण आज सिद्दी आम्हांला डोईजड होतो आहे. अनेक वेळा प्रयत्न करूनही दुर्दैवानं आम्ही त्याचा पराभव करू शकलो नाही. पण आता आम्हांला अधिक वाट पाहता येणार नाही. आमच्या राज्यात तो शिरतो, ब्राह्मणांना पकडून नेतो. त्यांना गुलाम म्हणून वागवतो. आणि आम्ही हे सारं उघड्या डोळ्यांनी पाहतो....’

‘महाराज...’ दौलतखानाने बोलण्याचा प्रयत्न केला.

‘नाही, दौलतखान. आता आम्हांला संधीची वाट पाहणं जमणार नाही. ती चालून येईल, यावर आमचा विश्वास नाही. तुम्ही हवी तेवढी कुमक घ्या. निकरानं झुंज द्या. आपण सागराचे राजे आहोत, म्हणणारा सिद्दी काही आकाशातून पडला नाही. त्याच्या पराभवासाठी आम्ही हवं ते मोल देऊ. दुर्दैवानं काही सोसावं लागलं, तरी आम्ही सोसू; पण सिद्दीचा पराभव आम्हांला हवा आहे. ते आमचं मोठं शल्य आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज, आपण चिंता न करावी.’

राजांच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. ते उठले. दौलतखानाच्या खांद्यावर हात ठेवीत ते बोलले,

‘दौलतखान, तुम्ही बोललात; आता सिद्दीची चिंता आम्हांस वाटत नाही. जी गरज भासेल, ती कळवा. ती तातडीनं तुम्हांस पोहोचेल.’

दौलतखान मुजरा करून नव्या जिद्दीने निघून गेला.

आठ दिवसांत राजांनी राजापूर सोडले. राजे शृंगारपूरला जात होते.

उन्हाळ्याचे दिवस. त्यात कोकणातला मुलूख. उकाड्याने जीव घाबरा होत होता. राजे त्या उन्हातून शृंगारपूर जवळ करीत होते. राजे येत असल्याची वर्दी आधीच शृंगारपूरला गेली होती. शृंगारपुरापासून दोन कोस अंतरावर खुद्द संभाजीराजे राजांच्या स्वागतासाठी आले. राजे युवराजांना भेटले. दोघे मिळून शृंगारपूरला आले.

शृंगारपूरच्या वाड्याच्या दारात उमाजी पंडित वगैरे मंडळी स्वागताला उभी होती. सर्वांचे मुजरे घेत वाड्यात जात असता राजांनी शेजारी चालत असलेल्या युवराजांना खालच्या आवाजात विचारले,

‘आम्ही आजोबा होणार, हे खरं?’

संभाजीराजांची पावले थांबली. त्यांनी चमकून राजांच्याकडे पाहिले. राजांची नजर संभाजीराजांवर खिळली होती. संभाजीराजे एकदम लाजले. राजे मोठ्याने हसले. त्यांनी प्रेमभराने संभाजीराजांच्या खांद्यावर हात ठेवला.

राजे आतल्या चौकात आले. आतल्या चौकात पिलाजीराव शिर्के उभे होते. त्यांनी राजांना मुजरा केला. मुजऱ्याचा स्वीकार करून राजे बोलले,

‘पिलाजीराव, आज आम्हांला खूप आनंद झाला आहे... खरं, की नाही, युवराज?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे परत मोठ्याने हसले. कुणाला त्या आनंदाच्या हसण्याचा अर्थ कळत नव्हता. राजे मात्र खूप आनंदी दिसत होते. राजांचे ते रूप संभाजीराजांना अनपेक्षित होते. राजांचा प्रसन्न भाव पाहून संभाजीराजांना धीर आला. पायांवर पाणी घेऊन राजे सदरेवर आले. सर्व कारकुनांनी राजांना मुजरे केले. राजे वाड्यात प्रवेश करते झाले. आतल्या महालात येसूबाई उभ्या होत्या. कष्टाने त्यांनी वाकून नमस्कार केला. राजे कौतुकाने येसूबाईंच्याकडे पाहत होते. आधीच रूपसंपन्न, त्यात निकोप प्रकृतीच्या येसूबाईंच्या चेहऱ्यावर गर्भारपणाचे तेज उमटले होते. येसूबाई मात्र संकोचाने उभ्या होत्या. राजे जवळ गेले. प्रेमभराने मायेचा हात पाठीवर फिरवीत राजे बोलले,

'पोरी, बरी आहेस ना?'

'जी.'

'पन्हाळा सोडल्यापासून तुला पाहायची फार ओढ लागली होती. अनेक वेळा तुझी आठवण आम्हांला व्हायची. आम्ही दक्षिणेत थोर पराक्रम केला; पण आमची उरलेली इच्छा आता पुरी होणार. नातवाचं मुख पाहायला मिळणार, याचा आनंद वेगळाच!'

'नातवाचं नाही, नातीचं....' मागून पिलाजीरावांचा आवाज आला.

राजांनी वळून पाहिले. पिलाजीरावांना, आपण उगीच बोललो, असे वाटले. ते गडबडीने म्हणाले,

'...असं मी म्हणत नाही; कवी कलशांनी भविष्य वर्तवलंय्.'

राजेही सावरले. ते चटकन म्हणाले,

'त्यांची असली भविष्यं कधी खोटी ठरत नाहीत. मुलगी झाली, तरी आम्हांला आनंद आहे. आपल्या घरी भवानी आली, असं समजू.'

रात्री पंक्तीला खूप रंग आला. हसण्याला उधाण आले. जेवता-जेवता राजे संभाजीराजांना म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘युवराज, आम्ही कर्नाटकात होतो; पण आमची नजर इथंच रेंगाळत होती. आम्हांला सर्व कळायचं.’

संभाजाराजे, कवी कलश, उमाजी पंडित या मंडळींचा हात थबकला. राजे हसून म्हणाले,

‘लहानपणी केशव पंडितांनी तुम्हांला संस्कृताची गोडी लावली. इथं कवी कलश, उमाजीपंत यांसारख्या रसिक विद्वानांचा सहवास. अशा संगतीत तुम्ही संस्कृत काव्य रचलंत, यात नवल काय? ते ऐकून आम्हांला समाधान वाटलं.’

साऱ्यांचे निःश्वास सुटले. पुन्हा खेळीमेळीने पंगत रंगली.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजे पुढच्या महालात आले, तेव्हा कवी कलश, हंबीरराव, मोरोपंत, उमाजी पंडित राजांच्या मुजऱ्यासाठी खोळंबले होते. राजांनी मुजऱ्यांचा स्वीकार केला. राजे बसले. राजांनी कलशांना विचारले,

‘कवी, आमचे ग्रह कसे आहेत?’

‘आता योग चांगले आहेत, महाराज. आपण कर्नाटकात विजयी होणार, हे मी आधीच सांगितलं होतं.’

उमाजीपंतांनी मान डोलावली.

‘तुम्हां पंडितांना ग्रहदशा कळते. आमचा अभ्यास नाही. कित्येक वेळेला वाटतं, हे राज्य पाहण्याऐवजी कुंडलीचा अभ्यास केला असता, तर फार बरं झालं असतं.’

हंबीरराव न कळत हसले. कवी कलशांनी किंचित रोषाने विचारले,

‘महाराज, आपला कुंडलीवर विश्वास नाही?’

‘आहे तर! कुंडली, ग्रहदशा, भाग्योदय या सर्वांवर आमचा विश्वास आहे. देवाधर्माइतका आनंद आम्हांला दुसऱ्या कशात नाही. नाही तर विजयासाठी जात असता

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आम्ही इतकी तीर्थं फिरलो नसतो.'

ते ऐकून कलशांना समाधान वाटले. त्याच वेळी संभाजीराजे महालात आले. राजे बैठकीवरून उठले. संभाजीराजे पाय शिवण्याकरिता वाकले असता राजांनी त्यांना बळेच उठविले, आपल्या शेजारी बसविले. संभाजीराजे त्या वर्तनाने चकित झाले होते. राजे म्हणाले,

'संभाजीराजे, तुम्हांला मानानंच वागवायला हवं. आता तुम्ही ना आमचे चिरंजीव, ना युवराज!'

'आबासाहेब!'

राजांचे भाव पालटत होते. कलशांच्याकडे पाहत राजे बोलत होते,

'आम्ही हयात असता तुम्ही कलशाभिषेक करून घेतलात, राजे झालात. अभिषिक्त राजांचा मान निदान राजांनी तरी ठेवायला हवा.'

ज्या संकटाला सारे भीत होते, ते संकट उभे ठाकले होते. राजांची नजर कवी कलश, उमाजी पंडित यांच्यावरून फिरत होती. संभाजीराजांची संतप्त नजर मोरोपंतांच्याकडे गेली. राजांच्या लक्षात आले.

'हां, राजे! ही मोरोपंतांची कसूर नाही. त्यांच्याकडे पाहू नका. अभिषेक करून घेतला जातो, तो असा चोरून नव्हे. राजरोसपणे छत्रचामरं बाळगून अभिषेक केला जातो... आणि, कवी...' राजांची नजर कलशांवर स्थिरावली. 'आम्ही हयात असता कलशाभिषेकाचा सल्ला युवराजांना तुम्ही दिलात? तुमच्या ज्ञानाची एवढीच मर्यादा?'

आपल्या शुष्क पडलेल्या ओठांवरून जीभ फिरवीत कलश म्हणाले,

'क्षमा, महाराज! युवराजांच्या हट्टापुढं काही बोलता येईना.'

युवराजांनी कलशांच्याकडे पाहिले. राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आणि या अभिषेकामुळं काय झालं? आमचं राज्य युवराजांच्या हाती गेलं, की युवराजांना स्वतंत्र राज्य मिळालं?’

‘महाराज, हा गैरसमज होतो. आपली चाकरी करीत असता आपल्या अन्नावर उठू कसे? युवराज आपल्या इतराजीला घाबरत होते. कोणताही गुन्हा घडला, तरी देहदंडाची शिक्षा होऊ नये, म्हणून.....’

‘म्हणून हा अभिषेक सुचविलात?’ राजांनी आश्चर्याने विचारले.

‘या अभिषेकामुळं युवराज राजे बनले; आणि राजाला कडेलोट करण्याचा, तोफेच्या तोंडी देण्याचा अधिकार कुणाला नसतो.’

ते ऐकून राजे थक्क झाले. हसावे, की रडावे, हे त्यांना समजेना. राजे उद्वेगाने बोलले,

‘कवी! भांगेची तार एवढी चढते, याची आम्हांला कल्पना नव्हती. युवराजांना आमच्या इतराजीतून वाचविण्याची काय तरकीब काढलीत! वा!’

राजांनी शेजारी चुळबुळत बसलेल्या युवराजांच्या पाठीवर हात ठेवला. राजे भावनाविवश झाले. क्षणभर त्यांच्या नेत्रांत अश्रू उभे राहिल्याचा भास झाला.

‘कवी, तुम्ही शंभूराजांना युवराज म्हणून पाहिलंत, भावी राज्याचे धनी म्हणून पाहिलंत. पण एक नातं विसरून गेलात. युवराज आमचे चिरंजीव आहेत, थोरले आहेत. हे रक्तानं जोडलेलं नातं... त्याचा विसर पडला! प्रत्येक गुन्ह्याचा फैसला न्यायानंच करायचा झाला असता, तर... तर एव्हाना युवराज कलशाभिषेकाला हजरही राहिले नसते.’

राजांचा हात संभाजीराजांच्या पाठीवर स्थिरावला होता. काळजीच्या सुरात त्यांनी विचारले,

‘शंभूबाळ! असा कोणता खेळ तुमच्या मनात खेळतो आहे, की ज्यासाठी आमच्याकडून मृत्युदंडाची भीती तुम्हांला वाटते?’

युवराजांनी राजांचे पाय धरले. राजांनी त्यांना उठविले. युवराजांना जवळ घेत राजे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

म्हणाले,

'शंभू, तुमच्यावर आमची भारी मदार आहे. तुम्ही आमचे चिरंजीव आहात. तुम्हांला चिरंजीव पाहण्यात आमचे डोळे मिटावेत, हे एकचं मागणं आम्ही आईकडे मागतो. हे कलश पंडित आहेत, विद्वान आहेत; पण त्यांच्या बुद्धीची मर्यादा होमहवन, बळी यांपलीकडे नाही. नुसती शक्तिपूजा करून राजांना विजय मिळत नसतात, राजे!'

'आबासाहेब, आम्ही चुकलो!'

राजांनी संभाजीराजांना जवळ घेतले, 'शंभूबाळ, चुकलात, म्हणून बिघडलं कुठं? आम्ही आहोत ना चुका निस्तरायला! निदान एक तरी वचन द्या.'

'जी...'

'आम्हांला सावरून घेता येतील, अशाच चुका निदान करा. तुम्ही कुलरयतेचे आवडते सुभेदार. रयतेच्या प्रेमानं तुम्ही वसूल माफ केला. रयतेनं तुम्हांला नावाजलं. रायगडाच्या खजिन्यातून रक्कम आणलीत, म्हणून बिघडलं नाही; पण राज्याला वसूल नाही, ते राज्य कसलं? अशानं ना राज्य साधतं, ना प्रजाहित. सुभा तुमचा, मुखत्यारी तुमची. तीत आम्हांला ढवळाढवळ करायची नाही; पण वाटलं, ते सांगितलं. आता फार दिवस सांगावं लागणार नाही. लौकरच तुम्ही बाप बनाल. मग आम्ही काय म्हणतो, हे ध्यानी येईल.'

राजांच्या शेवटच्या वाक्याने साऱ्यांना धीर आला. राजांनी बघता-बघता बोलणे फिरवले. कर्नाटकाच्या मोहिमेचे प्रसंग सांगण्यात राजे गुंतले.

दोन दिवसांनी राजांनी मुक्काम हलविण्याचे ठरविले. पिलाजीरावांनी येसूबाईंचे पहिले बाळंतपण माहेरीच व्हावे, ही इच्छा व्यक्त केली. राजांनी त्याला मान्यता दिली, रायगडाहून सुइणी पाठविण्याचे ठरविले. येसूबाईंना तब्येतीची काळजी घ्यायला सांगून राजांनी शृंगारपुराचा निरोप घेतला.

□

२४

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शृंगारपुराहून येताना राजांनी भार्गवाचे दर्शन घेतले. सत्पुरुष याकूत बाबांचा आशीर्वाद घेऊन राजे रायगडाला आले. मोरोपंत, हंबीरराव राजांच्या संगती होते. राजे गडावर येणार, याची वर्दी आधीच पुढे गेली होती. राजे पालखीतून महादरवाजापुढे आले; आणि पालखी थांबली.राजाराम पालखीनजीक आले. त्यांनी मुजरा केला. दीड वर्षांत राजाराम केवढे तरी बदलले होते. आठ वर्षांची उमर. राजे खूप उंच आणि बाळसेदार झाले होते. डोक्याला टोप, अंगात अंगरखा, पायांत तंग विजार,कमरेला लटकलेली छोटी तलवार. राजांना ते रूप पाहून आनंदाचे भरते आले. पालखी खाली ठेवली गेली. राजे पायउतार झाले. त्यांनी प्रेमाने राजारामांना जवळ ओढले.

‘बाळराजे, किती उंच झालात!’ हंबीररावांच्याकडे पाहत राजे म्हणाले, ‘हंबीरराव, बाळराजे खूप बदलले, नाही?’

‘जी.’

‘आबासाहेब, तुम्ही पालखीतून बरे आलात? तब्येत बरी नाही?’

‘आमची तब्येत ठीक आहे, बाळराजे! पण आता वय झालं. आता चढउतार जमत नाही. थोडं घोड्यावरून, थोडं पालखीतून, थोडं आधारानं अशी चालढकल चालली आहे. चला, आता आपण चालत जाऊ.’

राजारामांबरोबर राजांनी महादरवाजात प्रवेश केला. राजे गडावर आल्याने नौबतीने जाहीर केले. महादरवाजा चढून राजे वर आले; आणि अनाजीपंत सामोरे आले. राजाराम व अनाजी यांच्या बरोबर आलेल्यांवरून राजांची नजर फिरत होती. राजांना पाहून साऱ्यांच्या चेहऱ्यांवरून आनंद ओसंडत होता. आलेल्यांत मदारी मेहतर, जिऊ महाला, बहिर्जी ही मंडळी दिसत होती. राजांच्या बरोबर आलेल्या येसाजींची, मानाजींची सर्वांबरोबर नेत्रपल्लवी होत होती. राजांनी अनाजींना विचारले,

‘अनाजी, सर्व क्षेम आहे ना?’

‘जी. महाराज, पालखी का सोडलीत?’

‘आमचे बाळराजे भेटले. त्यांना आमच्या तब्येतीची काळजी वाटली, तेव्हा म्हटलं,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चालून दाखवून त्यांची खात्री करावी.’

सारे हसले. राजे राजारामांच्यासह चालू लागले; आणि याच वेळी गडबडीने पायऱ्या उतरून येणारे राहुजी सोमनाथ नजरेत आले. राजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. राहुजींच्या मुजऱ्याचा स्वीकार करीत राजे म्हणाले,

‘राहुजी, तुम्हांला पाहायला आमची नजर फिरत होती.’

‘क्षमा, महाराज! आपण आलात, म्हणून जगदीश्वरावर अभिषेक ठेवला होता. अंदाज चुकला. थोडा वेळ झाला.’

‘आम्ही थट्टा केली, राहुजी!’

सर्वांसह बोलत राजे गडावर आले. राजांची नजर न कळत गंगासागराच्या मनोऱ्यावर गेली. तेथे कोणी दिसत नव्हते. राजांच्या कपाळी सूक्ष्म आठी पडली. दुसऱ्याच क्षणी मनोऱ्याच्या चौथ्या सज्जावर श्वेत वस्त्र परिधान केलेली आकृती नजरेत आली.

राज्यांच्या चेहऱ्यावर स्मित पसरले.

राजांनी शिरकाईचे दर्शन घेतले. वाड्याच्या नगारखान्याजवळ सुवासिनींनी राजांना ओवाळले, दहीभात, लिंबू ओवाळून टाकला.

वाड्याच्या नगारखान्यातून आत प्रवेश करताच नौबत झडली. राजे न कळत बोलले,

‘दीड वर्षाचा काल, पण केवढ्या धामधुमीत गेला! केवढा मुलूख पाहिला! धरित्रीचं विशाल रूप! अनेक भाषा, अनेक रिवाज. मुलूख ओलांडावा, तसा थाट वेगळा. जमिनीचा रंग निराळा, पिकं निराळी, हवा निराळी. ह्या भूमीला माझी भूमी म्हणण्याची ताकद केवढी! अभिमानाने ऊर भरून येतो. अनाजी, आग्ऱ्यापासून तुंगभद्रेपर्यंत आम्ही फिरलो. या दर्शनानं थक्क झालो.माणूस नुसता फिरला, उघड्या डोळ्यांनी नुसतं त्यानं पाहिलं, तरी त्याला काही शिकावं लागणार नाही. सारं ज्ञान त्याला प्राप्त होईल.’

सर्वांचा निरोप घेऊन राजे राजारामांसह आपल्या महाली आले. महालात उदाचा वास

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दरवळत होता. श्वेत वस्त्र परिधान केलेली मनोहारी महालात उभी होती. तिच्या हाती टोप देत राजांनी विचारले,

‘मनू, राणीसाहेब कुठं आहेत?’

मनोहारीचे लक्ष दरवाजाकडे गेले. सोयराबाई महालात आल्या होत्या. राजांची नजर त्यांच्यावर गेली. हिरवागार शालू त्या नेसल्या होत्या. कमरेला सुवर्णपट्टा शोभत होता. नाकात मोत्यांची नथ होती. पायांत सोन्याच्या साखळ्या, जोडवी घातली होती. रूपसंपन्न सोयराबाईंच्या त्या पेहरावाकडे राजे पाहत राहिले. सोयराबाई लाजल्या.

‘असं काय पाहायचं?’

‘आज कोणता सण ?’

‘सण कुठला?’

‘मग आज हा शृंगार बरा?

‘स्वारी दीड वर्षानं घरी येते, हे विसरणं झालं वाटतं. आपली पावलं गडाला लागली, तोच सण नाही का?’

‘तेही खरंच!’ राजे मंचकावर बसते झाले. म्हणाले, ‘आम्ही कर्नाटकातून येताना खूप वस्तू आणल्या आहेत.’

‘खरं?’

‘हो! महादेव आला की त्या कुठं आहेत, हे समजेल. रात्री दाखवू. ते जिन्नस पाहून आश्चर्यानं थक्क व्हाल.’

सायंकाळी राजे राजसदरेत जाण्याच्या तयारीत होते. महालात सोयराबाई, राजाराम उभे होते. बाळाजी आवजींनी सदरेवर सर्वजण आल्याची बातमी दिली. राजांनी खास पोशाख केला होता. गळ्यातल्या कंठ्यावर राजांचा हात स्थिरावला. राजे महादेवाला म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महादेव, आणखीन दोन कंठे दे.’

महादेवाने दिलेले माणकांचे, पाचूंचे कंठे राजांनी परिधान केले. न राहवून सोयराबाईंनी विचारले,

‘आज एवढे कंठे बरे?’

‘तुमच्या सणाचा दिवस आहे, तसाच आमच्याही! सदरेवर चला ना, आज खऱ्या वैभव-संपन्न सदरेचं दर्शन तुम्हांला घडेल. सदरेवर कोणी परके नाहीत.’

राजांनी सांगितले, त्यात काही खोटे नव्हते. राजसदर खाशा सरदारांनी, मानकऱ्यांनी सजली होती. अनाजी, मोरोपंत, हंबीरराव, बाळाजी, येसाजी, राहुजी सोमनाथ, आनंदराव वगैरे मंडळी राजांची वाट पाहत होती. सदर का भरविली, याचा अंदाज कुणालाच येत नव्हता. अल्काबांच्या पुकारात राजे सदरेवर आले. साऱ्यांनी मुजरे केले. राजे स्थानापन्न झाले; आणि सर्वांची नजर वर झाली. राजे हंबीररावांना म्हणाले,

‘हंबीरराव, तुम्ही आमचे सेनापती. आजची सदर का भरविली, हे तुम्ही सांगाल?’

त्या प्रश्नाने हंबीरराव चकित झाले. ते म्हणाले,

‘क्षमा, महाराज!’

‘त्यात कठीण काय?...मोरोपंत!’

राजे उठून उभे राहिले. मोरोपंत सामोरे आले. राजांनी आपला मोत्याचा कंठा उतरला, आणि तो मोरोपंतांच्या गळ्यात घातला. त्यानंतर राजांच्या आज्ञेने अनाजी सामोरे आले. राजांनी त्यांना माणकांचा कंठा घातला. राहुजी सोमनाथांना राजांनी पाचूंचा कंठा बहाल केला. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर आश्चर्य प्रकटले होते. राजांच्या गळ्यात फक्त कवड्यांची माळ शिल्लक राहिली होती. मोरोपंत धीर करून विचारते झाले,

‘महाराज, आज गळ्यातले कंठे उतरून...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मोरोपंत, आज आमच्या समाधानाला, आनंदाला सीमा नाहीत. तुम्ही सोन्याच्या तोड्याचे मानकरी नाहीत. तो अपमान कसा करावा? तुम्हां तिघांवर राज्याची धुरा सोपवून आम्ही कर्नाटकात गेलो. एक-दोन दिवस नव्हे, दीड वर्ष आम्ही स्वराज्यापासून दूर. पण या कालावधीत तुम्ही राज्य जबाबदारीनं पेललंत. आम्ही असतो, तर ज्या मोहिमा काढल्या असत्या, त्या जारी राखल्यात. मोरोपंत, तुम्ही नाशिकची लूट आणलीत, ती कशाच्या जोरावर? आम्ही नसलो, तरी राज्य सुरक्षित आहे, ते पेलण्याचं सामर्थ्य आमच्या पंतप्रधानांत आहे, याच्याइतकी आनंदाची गोष्ट कोणती? तुमचा सन्मान कंठ्यानंच होणं योग्य. वाईट एवढंच वाटतं की, हा सन्मान घ्यायला त्र्यंबक सोनदेव आमच्यांत राहिले नाहीत!’

मंत्र्यांच्या सन्मानाबरोबरच राजांनी आपल्या बरोबर दक्षिणेत आलेल्या हंबीरराव, येसाजी, आनंदराव वगैरेंचाही सन्मान केला.

सदरेत समारंभ संपला; आणि राजांनी राजारामांना विचारले,

‘बाळराजे, समारंभ कसा वाटला?’

‘आबासाहेब, साऱ्यांना दिलंत, पण आम्हांला....’

सारी सदर हसली. राजे रोखून राजारामांच्याकडे पाहत होते. अनाजी एक पाऊल पुढे येऊन म्हणाले,

‘बाळराजे म्हणतात, ते अगदी खरं आहे, महाराज! आपण गेल्यापासून बाळराजे जातीनं गडाकडे लक्ष देतात. सकाळ-संध्याकाळ कधी फेरी चुकली नाही.’

राजांनी कौतुकाने राजारामांना जवळ ओढले.

‘बाळराजे, तुम्हांला द्यायला आमच्याजवळ आहे काय?’ मांडीकडे बोट दाखवीत राजे म्हणाले,

‘द्यायला एवढी एकच जागा आमच्याजवळ आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी बाळराजांना उचलण्यासाठी त्यांच्या काखेत हात घातले, तोच त्यांच्या कानांवर सोयराबाईंचे शब्द आले,

‘पाहा हं, बाळराजे! मांडीवर बसायला जाल, आणि बाळराजांचा ध्रुवबाळ होईल!’

सारी सदर त्या वाक्याने चपापली. राजांनी सोयराबाईंच्याकडे पाहिले. सोयराबाईंनाही आपण भलतेच बोलून गेल्याचे जाणवले. राजे चटकन म्हणाले,

‘तसं घडायला सुद्धा नशीब लागतं. ध्रुव बाळाला गृहकलहामुळं उत्तानपाद राजांच्या मांडीवर स्थान मिळालं नाही, म्हणूनच ध्रुवाला अढळपद मिळालं. आमचे युवराज दूर टाकले गेले, तरी असंच अढळपद मिळवितील!’

अत्तरगुलाब होऊन सदर उठली. राजे आपल्या महालाकडे येत होते. महालसोप्यात महादेव बासने उलगडीत होता. अनेक बासने, संदुका तेथे गोळा झाल्या होत्या. राजांनी बासने उलगडायला लावली. त्यांत नाना तऱ्हेची वस्त्रे होती- जरी किनखापाची ठाणे होती; भरजरी शालू होते; तलम जरीकाठी धोतरे, रुंद जरी पल्लवाची कर्नाटकी धोतरे, पंचे होते. शालूंचे बासन राजांनी सोयराबाईंना दाखविले.

‘तुम्हांला हवे ते शालू घ्या.’

राजांनी नवे आणलेले दागिने दाखविले. एका संदुकीकडे बोट दाखवून राजांनी महादेवला सांगितले,

‘तीतले सामान जपून महालात ठेव.’

महादेवने संदूक उघडली. तीतले जिन्नस तो काढू लागला. महादेवने हिरवट दिसणारा उंच ठावकीच्या आकाराचा एक दगडी जिन्नस बाहेर काढला. त्याकडे पाहून सोयराबाईंनी विचारले,

‘ते काय?’

‘तो विषदीप!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘विषदीप?’

‘हो! त्यानं अन्नाची परीक्षा करता येते.’

सोयराबाई उद्गारल्या,

‘एवढं आणलंत, त्यात हे कशाला अभद्र दर्शन?’

‘राणीसाहेब, आम्ही राजे आहोत ना? ते बाळगायलाच हवं.’

सातमहाली जाण्याकरिता जरी वस्त्रे, दागिने सोयराबाईंच्या हवाली करीत असताना न राहवून राजांनी विचारले,

‘आणि धाकट्या राणीसाहेब कुठं दिसल्या नाहीत?’

‘पुतळाबाई?’

‘हो!’

‘म्हणजे आपल्याला माहीत नाही?’ सोयराबाई आश्चर्य दाखवीत म्हणाल्या. ‘आपण कर्नाटकात गेलात, आणि राणीसाहेब गडाखाली रायगडवाडीला राहायला गेल्या.’

‘ते बरं?’

‘त्यांना इथली हवा मानवेना.’

‘आणि त्यांची व्यवस्था?’

‘सारी केलीय्. अनाजी जातीनं गेले होते. मीच पाठविलं होतं. वाडा आहे, शिबंदी आहे, दास-दासी आहेत, खर्चाची तरतूद आहे.’

‘वा!’ राजे खिन्नपणे हसून म्हणाले. ‘आणखीन काय लागतं माणसाला? पण आश्चर्य

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आहे!’

‘कसलं?’

‘या गडाची हवी इतकी खराब आहे? मासाहेबांना ती मानवली नाही. धाकट्या राणीसाहेबांनाही ती मानवेना. मग आम्हांला कशी मानवते? कदाचित आमची सुदृढ प्रकृती त्याला कारणीभूत असेल.’

राजांच्या बोलण्याने चकित झालेल्या सोयराबाई राजांच्याकडे पाहत होत्या. पण सोयराबाईंच्याकडे न पाहता राजे महालातून निघून गेले.

□

२५

महाराज गडावर आल्याची बातमी सर्वत्र पसरली होती. राजांना भेटायला अनेकजण येत होते. पावसाळा नजीक आला होता. जिजाबाईंचे वर्षश्राद्ध जवळ आले. श्राद्ध गडावरच उरकण्याचे ठरले. राजांनी श्राद्धकर्म आटोपले. राजे दोन प्रहरच्या वेळी हंबीरराव,मोरोपंत यांसह गडाखाली जायला निघाले. पालखी नाणेदरवाजात आली. नाणेदरवाजासमोर घोडी उभी होती. राजे स्वार झाले. राजांची पथके नव्या पेठेवरून पाचाडला दौडू लागली. रायगडवाडी उजव्या बाजूला टाकून अश्वपथक पाचाडला वळले. खूबलढा-बुरुजाजवळची दरड सावकाश चढून राजे खूबलढ्याच्या खिंडीत आले. समोर पाचाडपर्यंतचा झाडीने वेढलेला उतार होता. समोर पाचाडचा वाडा नजरेत भरत होता. राजांचे पथक पाचाडला आले. चौकीपहाऱ्यांचे मुजरे घेत राजे जात होते. पाचाडचा वाडा डाव्या हाती टाकून राजे जिजाबाईंच्या समाधीकडे निघाले. राजांनी समाधीचे दर्शन घेतले. राजे मोरोपंतांना म्हणाले,

‘मोरोपंत, या जागेला नुसत्या समाधीनं केवढं पावित्र्य आलं! या जागेत देखणी बाग उठवा. आयुष्यभर ज्या माउलीनं आम्हांला मायेची सावली दिली. तिच्या विश्रांतिस्थानात अखंड सावली राहू द्या.’

समाधीचे दर्शन घेऊन राजे जड मनाने परतले. पाचाडला न जाता राजांनी गडाकडे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जाण्याचा निर्णय केला. खूबलढ्याच्या खिंडीजवळ येताच राजे क्षणभर थांबले. त्यांची नजर समोरच्या दृश्यावर खिळली. समोर काळनदीचे खोरे पसरले होते. उजव्या हाती उंच चढलेला राजगड टकमकटोकापर्यंत नजरेत येत होता. काळनदीचे खोरे चारही बाजूंनी पर्वतांनी वेढल्याचा भास होत होता. आकाशात ढगांनी धरलेल्या छपरीतून अचानक सायंकाळची किरणे त्या दरीवर पसरली. दूर उभे ठाकलेले पर्वतकडे त्या किरणांत उजळून निघाले होते. हिरवाकंच गालिचा पसरावा, तसा काळनदीपर्यंतचा मुलूख दाट झाडीने व्यापला होता. त्यानंतर दिसत होती, ती आकाशाला भिडलेली पर्वतांची शिखरे. राजांनी ते दृश्य न्याहाळले; आणि ते खिंड उतरून आले. चांगली वाट सुरू झाली. पुढचे अश्वपथक दौडू लागले. राजे मोरोपंत, हंबीरराव यांच्यासह दौडत होते. वाडीचा रस्ता डाव्या हाती टाकून उजव्या बाजूला रायगडाची वाट जात होती. पुढचे अश्वपथक रायगडाकडे वळले; पण राजांनी अचानक रस्ता बदलला. राजे रायगडवाडीकडे जाऊ लागले. क्षणभर विचारात पडलेल्या हंबीररावांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. त्यांनी मोरोपंतांच्याकडे पाहिले. दोघांनी राजांना गाठले.

पाठीमागच्या स्वारांनी वेळीच भानावर येऊन लगाम खेचले होते. पुढचे स्वार मागे वळले.

रायगडवाडीच्या वाड्यासमोर राजे पायउतार झाले. वाड्यात एकच गडबड उडाली. महाराज दरवाजात पोहोचले. पहारेकरी गोंधळले होते. वाड्यात उडालेल्या धावपळीची राजांना जाणीव होत होती. दासींनी येऊन राजांच्या वरून भाताचे मुटके ओवाळून टाकले. आतल्या चौकात पायांवर पाणी घेऊन राजे वाड्याच्या सदरेवर आले. राजांनी महालात पाऊल टाकले. दासी पदर सावरून उभी होती. राजांनी विचारले,

‘राणीसाहेब कुठं आहेत?’

दासीला उत्तर द्यावे लागले नाही. राजांची नजर आतल्या दरवाजाने प्रवेश करणाऱ्या पुतळाबाईंच्यावर खिळली होती. अस्मानी रंगाचे पातळ नेसलेल्या पुतळाबाई दारात थबकल्या. क्षणभर राजांची आणि त्यांची दृष्टादृष्ट झाली. पदर सावरीत पुतळाबाई म्हणाल्या,

‘बसावं ना!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे बैठकीवर गेले; पण बसले नाहीत. पुतळाबाई म्हणाल्या,

‘आधी कळवायचं तरी होतंत. काही तयारी तरी करता आली असती.’

‘आम्ही तुम्हांला पाहायला आलो. आज मासाहेबांचं श्राद्ध ना? पाचाडला दर्शनाला गेलो होतो. परतत असता राहवलं नाही, अचानक आम्ही धीर करून वाट बदलली.’

पुतळाबाईंच्या चेहऱ्यावर स्मित प्रकटले. त्या म्हणाल्या,

‘कोणी तरी खरंच म्हणेल. इकडे यायला धीर करावा लागतो?’

राजे एकदम बदलले. पुतळाबाईंची नजर चुकवीत ते म्हणाले,

‘तुम्ही गड सोडून सुखासुखी आलात, असं वाटत नाही. त्याचं कारण आम्ही विचारीत नाही. जे घडलं असेल, त्याबद्दल आम्ही शरमिंदे....’

‘असं बोलू नये. इथं मला काही कमी नाही. आपल्या पायांची जोड असता काळजी कसली?’

‘आम्ही नशीबवान, म्हणून हे ऐकण्याचं भाग्य लाभलं. थोरल्या राणीसाहेब गेल्यानंतर आम्हांला कोणी समजून घेईल, असं वाटलं नव्हतं.’

‘बसावं. कपडे उतरावे ना!’

‘आम्ही विसरलोच! आम्ही गडावर जाणार आहो.’

‘संध्याकाळ होत आली. गडावर जायला रात्र होईल. त्यापेक्षा इथं राहून सकाळी...’

‘असं म्हणता...?’ राजांनी पुतळाबाईंच्याकडे पाहिले. आपला जिरेटोप त्यांच्या हाती देत राजे म्हणाले, ‘ठीक आहे. आम्ही राहू. आम्ही सदरेवर जाऊन येतो.’

राजे सदरेवर गेले. राजांच्या मुक्कामाची वर्दी गडावर पोहोचवायला सांगून थोड्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वेळाने राजे महाली आले. दिवेलागण झाली होती. राजे बैठकीवर बसले. आतून आलेल्या पुतळाबाईंनी राजांच्या हाती पेला दिला. राजांनी विचारले,

‘काय हे?’

‘कोकणातून ताजी आमसुलं आली होती. सरबत आहे.’

‘व्वा! किती दिवसांनी हे सरबत मिळालं! मासाहेब होत्या, तोवर हे सरबत उन्हाळ्यात हमखास मिळायचं. त्या गेल्या, आणि आमच्या आवडीही कुणाच्या ध्यानी राहिल्या नाहीत.’ राजे मोठ्याने हसले. ‘पुतळा, आम्ही सुद्धा विसरलो!’

राजांचे हसणे थांबले. पुतळाबाईंनी प्रकृतीची चौकशी केली. राजे पूर्ण समाधानाने बोलत होते. पुतळाबाईंनी मध्येच विचारले,

‘शृंगारपूरला जाणं झालं होतं?’

‘हो ना! सांगायचं राहिलंच. आता तुम्ही लौकर आजी व्हाल!’

‘येसूची तब्येत कशी आहे?’

‘छान आहे. एकदा आमच्या मनात आलं की, तिला रायगडी आणावं. तोच पिलाजीरावांनी ती जबाबदारी घेतली. आम्ही राजे झालो, म्हणून सारीच जबाबदारी पेलता येत नाही.’

‘आणि शंभूबाळ कसे आहेत?’

‘छान! शिकारी करतात, संस्कृत काव्य रचतात, ऐशआराम करतात. प्रजा दुवा देते. एवढंच काय, पण कलशांकडून कलशाभिषेक करून घेऊन ते मोकळे झाले.’

‘हा कसला अभिषेक?’

‘ते राजे बनले.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘खरं?’

‘अगदी खरं. त्यांना आमची भीती वाटली, म्हणून हे केलं, म्हणे! राणीसाहेब, पुढचे दिवस आम्हांला ठीक दिसत नाहीत.’ राजे उठत म्हणाले, ‘तुम्ही काळजी करू नका. आम्ही बाहेर सदरेवर जातो.’

राजे सदरेवर आले. रायगडवाडीचे पेठकरी राजांच्या दर्शनाला आले. राजांनी सर्वांची विचारपूस केली.

रात्री मोठी मेजवानी झाली. रायगडवाडीच्या त्या निवांत वातावरणात राजांना खूप बरे वाटले.

सकाळी राजे रायगडावर जाण्याच्या तयारीत उभे होते. राजांनी पुतळाबाईंना सांगितले,

‘काही लागलं सवरलं, तर आम्ही नसलो, तर मोरोपंतांना निरोप पाठवा.’

पुतळाबाईंनी मान डोलाविली. त्यांनी खालच्या मानेने विचारले,

‘परत कधी दर्शन?’

‘राणीसाहेब, आमची इच्छा तुम्ही जाणता. उसंत मिळेल, तेव्हा आम्ही इथं आल्याखेरीज राहणार नाही. आमचं एकाकीपण असह्य होईल, तेव्हा आम्हांला या जागेखेरीज दुसरं ठिकाण नाही.’

पुतळाबाईंना अश्रू आवरणे कठीण गेले. राजे त्यांच्या नजीक गेले. पुतळाबाईंच्या पाठीवर हात ठेवीत ते म्हणाले,

‘पुतळा, डोळ्यांतील अश्रूंनी माणसांची दुःखं कधीच धुऊन निघत नाहीत. ह्या अश्रूंनी आम्हांला लाजवू नका. आम्ही तुम्हांला गडावर घेऊन गेलो असतो; पण आमच्या हौसेखातर तू दुःख भोगावंस, असं आम्हांला वाटत नाही. आम्ही येतो.’

पुतळाबाईंनी गडबडीने डोळे पुसले. त्या म्हणाल्या,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘क्षणभर थांबावं.’

पुतळाबाई लगबगीने आत गेल्या. परत आल्या, तेव्हा त्यांच्या हाती भरजरी सपाता होत्या. कुंकुममिश्रित गंधाचे ठिपके त्यांवर होते. त्या त्यांनी महाराजांच्या पायांशी ठेवल्या. त्या जोड्यांकडे पाहत राजे उद्गारले,

‘कुठले हे जोडे?’

‘आपलेच आहेत. आपला राज्याभिषेक झाला, तेव्हा मासाहेबांच्याकडून मी मागून घेतलेले होते.’

‘आणि त्यांनी ते दिले?’ राजांनी आश्चर्याने विचारले.

‘हो. त्या म्हणाल्या... ‘मुली, ह्या जोड्यांची सोबत तुला आयुष्यभर पुरेल.’ ’

राजे आपला व्याकूळ भाव लपवू शकले नाहीत. त्यांचा जीव उभ्या जागी भरून आला.

‘मासाहेब!! त्यांच्याइतकं आम्हांला कोणी ओळखू शकलं नाही. त्या गेल्या, आणि आम्ही पोरके झालो! दुसऱ्यांनाही पोरकं करून बसलो!’

‘माझी शपथ आहे!’

‘ठीक आहे. काय आज्ञा?’

‘आज्ञा कसली?.... प्रार्थना आहे. एकवार हे जोडे घालून दारापर्यंत जावं. नशिबानं आपलं पाऊल दिसलं. पुन्हा केव्हा वाकडी वाट होते, कोण जाणे?’

राजे खिन्नपणाने हसले. ‘पुतळा, वाकड्या वाटेनं आम्हांस नेहमीच जावं लागतं. सरळ वाट दिसत असूनही ती आचरता येत नाही, याचंच आम्हांला दुःख आहे.’

राजे पुढे काही बोलले नाहीत. काही न बोलता राजांनी आपल्या पायांतले चढाव

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काढले, आणि समोर ठेवलेल्या जरी चढावांत पाय घातले.

राजांनी काढलेले जोडे पुतळाबाईंनी हाती घेतले. महाराजांच्या मागोमाग त्या दरवाजापर्यंत आल्या. दरवाजाशी राजांची पावले थांबली. पुतळाबाईंनी आपल्या हातांतील जोडे पदराने पुसून राजांच्या सामोरे ठेवले. जड पावलांनी राजांनी जोडे उतरले. आपल्या नेहमीच्या चढावांत पाय रुतवून राजांनी पुतळाबाईंच्याकडे एकवार पाहिले; आणि एकदम ते बाहेर पडले. राजे बाहेर पडताच उभ्या जागी पुतळाबाईंचे अवसान सरले. त्या मटकन गुडघ्यांवर बसल्या.

राजांनी काढलेल्या जरी चढावांवर अश्रू ठिबकत होते. त्या मोजड्यांवरचे कुंकुममिश्रित गंध त्या अश्रूंनी भिजत होते.

बाहेर उठलेला टापांचा आवाज कानांवर येत होता....

□

२६

पावसाचे दिवस असूनही राजांचे सैन्य विसावले नव्हते. सिद्दीचा पराभव करण्यात दौलतखान गुंतले होते. सर्जाखानाने राजांची अथणी, रायबाग ही ठाणी उठविल्याची बातमी गडावर आली होती. गडाच्या राजकारणाला रंग चढत होता. सदरेवर अनाजी, मोरोपंत, हंबीरराव, आनंदराव, मानाजी मोरे ही मंडळी राजांची वाट पाहत होती.

राजे आपल्या महाली सदरेवर जाण्याच्या तयारीत होते. राजे दरवाजापर्यंत आले, आणि सामोऱ्या सोयराबाई आल्या. राजांच्या चेहऱ्यावर स्मित पसरले.

'आम्ही तुमचीच वाट पाहून सदरेवर जायला निघालो होतो.'

'आठवण झाली, हे नशीब!'

'आठवण झाली होती, पण आपण दिसला नाहीत. रायगडवाडीहून आम्ही सकाळीच आलो. दोन प्रहरचं जेवण- तेही मनोहारीच्या हातून मिळालं.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मग बोलावणं बरं पाठवलं नाहीत?’

‘राणीसाहेब, ह्या गोष्टी बोलावण्यानं व्हायच्या नसतात. तो तुमच्या कर्तव्याचा भाग आहे, हे विसरता.’

राजांच्या करड्या बोलांनी सोयराबाई घाबरल्या. पण क्षणात त्यांचा राग उफाळला.

‘धाकट्या बाईंनी हा रिवाज नजरेत आणून दिला, वाटतं?’

‘तिथं रिवाज नाही. राणीसाहेब, तिथं फक्त जबाबदारीची जाणीव आहे.’

‘धाकट्या बाईंनी आमच्या विरुद्ध तक्रार केली, वाटतं?’

राजांची नजर सोयराबाईंच्यावर स्थिरावली. राजे म्हणाले,

‘बिलकुल नाही. असं तुम्ही काय केलंत, की त्यासाठी त्यांनी तक्रार करावी?’

स्वत:ला सावरून घेत सोयराबाई गडबडीने म्हणाल्या,

‘नाही. उगाच विचारलं.’

‘आम्ही सदरेकडे जातो.’ राजे दरवाजाकडे जाता-जाता एकदम थांबले. माघारी पाहत त्यांनी विचारले,

‘राणीसाहेब, तुम्ही कधी आमसुलांचं सरबत प्यालात?’

‘नाही, बाई! मला ते मुळीच आवडत नाही.’

‘वाटलंच आम्हांला!’

राजे हसले, आणि महालाबाहेर गेले. त्या हसण्याचा अर्थ सोयराबाईंना समजला नाही.

राजे सदरेवर आले. राजे मोठे प्रसन्न दिसत होते. राजांनी अनाजी, मोरोपंत यांना नवीन

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

खबरा विचारल्या. मोरोपंतांनी, सर्जाखानाने रायबाग, अथणी येथील ठाणी उठविल्याचे सांगितले.

‘ठीक आहे. त्याला उत्तर देता येईल. शत्रूची जी चाल आहे, त्याच चालीनं त्याला उत्तर दिलं, की त्याला लवकर अक्कल येते... हंबीरराव, आमच्या फौजा विजापूर मुलुखात पाठवा. लक्ष्मेश्वर, गदग या पेठा लुटून फस्त करा. मोरोपंत, अनाजी, आता स्वस्थ बसण्याचे दिवस संपले. दिलेरखान आला आहे. तो विजापूर संपविण्याच्या हेतूनंच उतरला आहे; पण हे आदिलशाहीला समजत नाही. पण ते समजून येईपर्यंत आपल्याला स्वस्थ बसता येणार नाही. दिलेरचं लक्ष आमच्याकडे वळलं,तर सावध असावं, म्हणून आम्ही पन्हाळ्याला फौज गोळा केली आहे... आनंदराव, पन्हाळ्याला चला... मोरोपंत, तुमच्या फौजा मोगलाईत जाऊ द्या. आमच्या राज्याच्या चारही कक्षांवर आमच्या राज्याची दहशत निर्माण करा. तिची जाणीव दिलेरखानाला व्हायला हवी.’

रायगडहून भराभर हुकूम सुटले. जेधे, आनंदराव, मानाजी मोरे वगैरे सरदार कामगिऱ्या घेऊन बाहेर पडले. पावसाळा कमी होताच राजांनी पन्हाळ्याला जाऊन लढावयाचे ठरविले.

गडावर पावसाने झड धरली; तसेच, मराठी फौजेने विजापूर भागात थैमान घातले. मराठी फौजेने मलगुंड, लक्ष्मेश्वर, गदग या पेठा लुटल्या. आदिलशाहीची लूट गडावर येऊन थडकली. पावसाळा संपत आला. श्रावणाच्या अखेरीला गडावर एक बातमी आली. आदिलशाही जमशीरखान, सर्जाखान आणि खुद्द सिद्दी मसूदचा मुलगा राजांच्या विरुद्ध मोहीम उघडणार, अशी बातमी होती. राजांना ती बातमी कळताच राजे हसले.

‘सापानं बेडूक धरला असता, बेडकानं माशी पकडण्याचा प्रयत्न करण्यासारखं हे कृत्य! दिलेरखान पातशाही बुडवायला टपला असता आदिलशाही फौज आमच्या समाचाराचा विचार करते! ‘विनाशकाले विपरीतबुद्धिः’ म्हणतात, ते यालाच!’

मोरोपंत म्हणाले, ‘महाराज, पण ही बातमी विश्वसनीय आहे.’

‘आम्ही कुठं अविश्वास धरतो? आता लौकरच आम्ही पन्हाळगड गाठू. आदिलशाही, मोगलाई यांची चाल आम्ही तिथूनच पाहू.’

राजांचा तळ पन्हाळगडी हलणार, असे दिसू लागले; पण तो बेत पार पडला नाही.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अचानक राजांना ज्वर येऊ लागला. राजे अंथरुणाला खिळले. राजांचे पन्हाळ्याला जाणे लांबणीवर पडले.

पावसाळ्याच्या अखेरीस राजांना आराम वाटू लागला. राजे महालात हिंडू-फिरू लागले. राजांच्या आरामाने गडावर परत चैतन्य आले.

☐

२७

गडावर दोन प्रहरची शांतता पसरली होती. उन्हाच्या उबेत गड अंग चोरून बसला होता. निळ्याभोर आकाशातून पांढरे ढग वाहत होते. अष्टप्रधानमहालातून मंत्री विसावले होते.

सदरफडात, जामदारखान्यात तेवढी कारकुनांची जाग ऐकू येत होती. त्या वेळी एक जासूद गडावर थैली घेऊन आला. वाड्याच्या दक्षिणेला खालच्या टप्प्यावर असलेल्या मोरोपंतांच्या महाली त्या जासुदाला नेण्यात आले. थोड्याच वेळात मोरोपंत महालाबाहेर पडताना दिसले.

मोरोपंतांच्या निरोपानुसार अनाजी, हंबीरराव तातडीने राजसदरेत आले. मोरोपंतांच्या चिंताग्रस्त चेहऱ्याकडे पाहून अनाजींना काही समजेना. सदरेवर तिघेच होते. अनाजींनी विचारले,

'काय झालं, मोरोपंत?'

'अजून झालं नाही; पण काही तरी होणार, असं वाटतं. आत्ताच ही थैली गडावर आली. वाचा.'

अनाजींनी थैली घेतली. ते पत्र वाचू लागले. पत्रातील मजकुराबरोबर नजर मोठी होत होती. काही ओळी परत वाचल्या जात होत्या. पत्र वाचून संपले; आणि अनाजींनी निःश्वास सोडला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अनाजी, काय आहे?’

‘आपलं कर्म आहे, हंबीरराव! आपले युवराज दिलेरखानाशी बोलणी करताहेत.’

‘कसली?’

अनाजी खिन्नपणे हसले.

‘सेनापती, ते कसं कळणार? कदाचित ते कलशांना ठाऊक असेल. ते कुंडली पाहतात. होम करतात. जारणमारणात ते जाणते आहेत.’

‘पण ही बातमी खरी कशावरून?’ हंबीररावांनी विचारले.

‘कशावरून? हंबीरराव, असल्या बातम्या खोट्या ठरत नाहीत. आपला खास नजरबाज बाजी नाईक यानं ही थैली पाठविली आहे. दिलेरखानाच्या छावणीवर खुद्द जनार्दनपंतांना त्यानं पाहिलं आहे.’

‘बाप, रे!’ ते उद्गारले.

‘काही तरी मोठं राजकारण शिजत आहे. नुकतेच महाराज आजारातून उठले. अजून पुरते बरे झाले नाहीत, तोच ही बातमी! महाराजांना फार काळजी वाटेल!’ मोरोपंत म्हणाले.

‘पण त्याखेरीज इलाज काय? महाराजांची चौकशी करा.’

महादेवला बोलावण्यात आले. अनाजींनी विचारले,

‘महाराज काय करताहेत?’

‘सुख करताहेत.’ महादेवने सांगितले.

‘महाराज दोन प्रहरी बरे झोपले?’ हंबीररावांनी काळजीच्या सुरात विचारले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ ‘सकाळपासून कसर आल्यासारखी वाटते,’म्हणाले. वैद्य येऊन गेले. नुकताच डोळा लागला.’

‘आणि राणीसाहेब?’ अनाजींनी विचारले.

‘महाली आहेत. बोलावू?’

‘हां!’ अनाजींनी संमती दिली.

सोयराबाई सदरमहाली आल्या, तेव्हा तिघांची कुजबूज चालली होती.

‘अनाजी, बोलावणं बरं पाठविलंत?’

‘महाराज झोपले, असं कळलं. तेव्हा....’

‘हो. आज तब्येत परत नरम झाली. काय काम होतं?’

‘तसं जरुरीचंच काम आहे, राणीसाहेब!’ अनाजींनी सांगितले. ‘युवराज दिलेरखानाशी बोलणी करण्यात गुंतले आहेत, असं कळतं.’

क्षणभर सोयराबाई विचारात उभ्या राहिल्या. न कळत एक वेगळेच समाधान त्यांच्या चेहऱ्यावर उमटले. त्या म्हणाल्या,

‘मी उठवते. थोड्या वेळानं तुम्ही या.’

राजांना चांगली झोप लागली होती. सोयराबाईंनी त्यांना उठविले. दचकून जागे होत राजांनी विचारले,

‘काय झालं? का उठवलं?’

‘मोरोपंत- अनाजींनी जागं करायला सांगितलं. तातडीचं काम आहे, म्हणे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी आपला घाम टिपला. ते उठले. थंड पाण्याने त्यांनी तोंड धुतले. त्या गार स्पर्शाने त्यांना बरे वाटले. राजे शयनगृहातून महाली आले. अनाजी, मोरोपंत, हंबीरराव आले होते. मुजऱ्यांचा स्वीकार करून राजांनी विचारले,

'काय आहे, अनाजी?'

अनाजींनी मोरोपंतांच्याकडे पाहिले. मोरोपंत म्हणाले,

'बातमी तितकीशी चांगली नाही. दिलेरखानाच्या गोटातून बातमी आली आहे... युवराजांची आणि दिलेरखानाची अंत:स्थ बोलणी चालू आहेत.'

'काय सांगता?' राजे आश्चर्याने उद्गारले.

'हो. एवढंच नव्हे, तर खुद्द जनार्दनपंतांना दिलेरखानाच्या तळावर पाहिल्याचं लिहिलं आहे.'

राजांची झोप कोठच्या कोठे उडाली. सोयराबाई म्हणाल्या,

'युवराजांना अटकच करायला हवी!'

सर्वांची नजर सोयराबाईंच्याकडे वळली. राजे शांतपणे म्हणाले,

'राणीसाहेब, तुम्ही आत जा. राजकारण सवतीमत्सराइतकं सोपं नाही.'

सोयराबाई संतापाने निघून गेल्या. राजांच्या कपाळी घर्मबिंदू गोळा होत होते. राजांनी विचारले,

'बातमी खरी?'

'तीत संशयाला जागा नाही. युवराज आणि दिलेरखान यांच्यांत कोणतं राजकारण शिजतं, कळत नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अचानक राजांच्या चेहऱ्यावर आशा प्रकटली.

‘अनाजी, युवराजांना आम्ही ओळखतो. ते व्यसनी असतील, थोडा वयाचा वाह्यातपणाही असेल; पण ते युवराजच आहेत. स्वत:च्या आयुष्याशी खेळ खेळतील; पण राज्याशी द्रोह करणार नाहीत. ‘एक ना एक दिवस अशी करामत आम्ही करून दाखवू, की आबासाहेब, तुम्हीदेखील चकित व्हाल!’ असं ते म्हणाले होते. शहाजादा मुअज्जमचा आणि युवराजांचा स्नेह जाहीर आहे; तसंच दिलेर आणि शहाजादा यांचं वैरही. इकडे दिलेरशी बोलणी करीत एक दिवस खुद्द शहाजादे युवराजांनी आमच्या आश्रयाला आणले, तरी आम्हांला त्याचं नवल वाटणार नाही.’

कोणी काही बोलले नाही. आपल्या आशावादाची राजांना शंका आली. त्यांच्या मनात शंका उभी ठाकली.

‘पण काही झालं, तरी धोका पत्करता येणार नाही... अनाजी, तुमचा सल्ला काय आहे?’

‘महाराज, याची शहानिशा लागेपर्यंत युवराजांना स्थानबद्ध करावं, जनार्दनपंतांना अटक करावी.’

‘अनाजी!’

‘याखेरीज दुसरा उपाय मला दिसत नाही. महाराज, माझ्या हेतूबद्दल शंका न धरावी.’

‘नाही, अनाजी. तुम्हांला काय म्हणायचं आहे, ते आम्हांला कळतं. आमची प्रकृती बरी असती, तर आम्ही असेच शृंगारपूरला गेलो असतो.’

राजे विचारात मग्न होते. अनेक विचार मनात उठत होते. राजे एकदम उभे राहिले.

‘मोरोपंत, शृंगारपुराभोवती आपल्या नजरबाजांचं जाळं टाका. येसाजीला खास कुमक देऊन शृंगारपूरला राहायला सांगा. आम्ही आजच परळीला येण्याची युवराजांना आज्ञा करू. युवराज परळीला आले, तर आम्ही पन्हाळ्याला जाताना त्यांना भेटू. समर्थांचा सहवास घडेल; मन स्वच्छ होईल. युवराजांच्यासह आम्ही पन्हाळ्याला जाऊ. नाजूक

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हातांनीच हे पेच सोडवायला हवेत.’

राजांचे पत्र घेऊन स्वार शृंगारपूरला रवाना झाला. सूर्यास्ताची वेळ झाली होती. राजांच्या मनात चिंतेचे मोहोळ उठले होते.

राजांच्या अंगात थंडी भरत होती. सारे अंग तीमुळे शहारत होते.

□

२८

गडाचा प्रत्येक दिवस अखंड चिंतेचा बनला होता. शृंगारपुराकडे असंख्य हेर गुंतले होते. येसाजीचे पथक केव्हाच रवाना झाले होते. आपल्या प्रकृतीचा विचार न करता राजे फिरत होते. गडावर येणाऱ्या प्रत्येक बातमीची राजे जातीने चौकशी करीत होते. गडावरच्या सर्व देवांना अभिषेक सुरू केले होते.

शुक्रवारचा दिवस होता. सायंकाळच्या वेळी राजे शिरकाईच्या दर्शनासाठी आले होते. संगती मोरोपंत, हंबीरराव होते. राजांनी देवदर्शन घेतले. राजे होळीचौकात उभे होते. मधून मधून पिलखान्यातून गजेंद्राचे ओरडणे ऐकू येत होते. राजांनी विचारले,

‘हंबीरराव, गजेंद्र का ओरडतो?’

‘माजाला आला आहे, त्यामुळं दोन दिवस बेचैन आहे. आज सकाळीच हत्तीखान्यात पोहताना त्याला पाहिला.’

‘माज उतरेपर्यंत त्याच्यावर लक्ष ठेवायला सांगा. गडाची जागा बंदिस्त. कुठं मोकळा सुटला, तर आवरायचा नाही.’

‘जी.’

त्याच वेळी राजाराम येताना दिसले. राजाराम नजीक आले. त्यांच्या चेहऱ्यावर रुसवा दिसत होता. त्यांनी तक्रार केली,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आबासाहेब, तुम्ही बाहेर आलात; मग आम्हांला का हाक मारली नाही?’

‘विसरलो खरं.’ राजे त्यांना जवळ घेत म्हणाले. ‘आम्ही सदरेवरून तसेच इकडे आलो.’

राजे हंबीररावांना म्हणाले,

‘हंबीरराव, कुठं मन रमत नाही. काही सुचेनासं झालं आहे!’

राजांनी राजारामांकडे पाहिले. आपली दोन्ही बोटे राजारामांच्या समोर धरीत राजे म्हणाले,

‘बाळराजे, बोट धरा!’

राजारामांनी बोट धरले. राजांनी त्यांना एकदम जवळ ओढले. ते राजारामांना म्हणाले,

‘बाळराजे, छान कौल दिलात! तसं घडलं, तर आम्ही तुम्हांला बक्षीस देऊ.’

‘काय बक्षीस देणार, आबासाहेब?’

‘मागाल, ते.’ राजांची नजर हंबीररावांच्याकडे गेली. क्षणभर त्यांचा राजांना विसर पडला होता. राजे किंचित वरमले. ‘हंबीरराव, मन कातर झालं, की माणूस साध्या कौलातदेखील दिलासा शोधतो, नाही?’

‘आबासाहेब, बघा!’ राजाराम म्हणाले.

राजांनी पाहिले, अनाजी धावत येत होते. पळताना पायातंले धोतर वाऱ्यावर उठत होते, पायांना अडत होते. ते सावरीत अनाजी धावत येत होते. राजे ताठरल्या अंगाने अनाजींकडे पाहत होता. राजाराम अनाजींचे रूप पाहून हसत होते. अनाजी नजीक आले. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता.

‘महाराज, चांगली खबर आलीय् ऽ’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सांगा, अनाजी!’ राजे उतावीळ झाले.

अनाजींना धाप लागली होती. ते म्हणाले,

‘शृंगारपुरहून खबर आली आहे... युवराज परवा... आज्ञेप्रमाणे गेले ऽ ऽ.’

‘कुठं?’

‘परळीला.’

‘काय सांगता? युवराज आमच्या आज्ञेनुसार परळीला दाखल झाले?’ राजे उद्गारले.

काय बोलावे, हे राजांना सुचत नव्हते. त्यांनी राजारामांना एकदम उचलले; आणि त्यांचा मुका घेतला. बाळराजे लाजले. त्या बातमीने सारेच आनंदित झाले होते. राजे तसेच वळले . शिरकाईसमोर उभे राहिले. त्या अष्टभुजेपुढे त्यांनी मस्तक टेकविले.

राजे उठले. त्यांचे समाधान मनात मावत नव्हते. राजे म्हणाले,

‘अनाजी, उभ्या आयुष्यात आम्ही एवढी आनंदाची बातमी ऐकली नाही. गेले चार दिवस अहोरात्र आम्ही काळजीत जळत होतो. क्षणभर मनाला शांतता लाभली नाही, काही सुचलं नाही. मन तर केवढं पापी! वैरी सुद्धा चिंतणार नाही, अशा कल्पना मनात उठत होत्या जिवाचा थरकाप होत होता.’

‘युवराजांनी खरोखरच लाज राखली!’ मोरोपंत म्हणाले.

‘आम्ही युवराजांना ओळखतो. शंभू हवं ते करील, पण आमचा शब्द कधीही डावलणार नाही. आमचा सारा भरोसा त्याच्यावर आहे, हे तो जाणतो. शंभूबाळ कितीही पुढं गेले, तरी आमच्या हाकेला परतल्यावाचून राहणार नाहीत, याची आम्हांला खात्री आहे. जगदंबेनं यश दिलं; सारं मिळालं... अनाजी, येत्या पुनवेला गडाच्या सर्व मंदिरांवर दीपोत्सव करा. साऱ्या देवदेवतांना अभिषेक करा.’

राजांच्या त्या प्रसन्न, आनंदित रूपाने साऱ्यांना समाधान वाटत होते. राजांची मान ताठ

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

झाली होती, अनाजींच्या खांद्यावर हात टाकीत राजे म्हणाले,

‘अनाजी, चला. परळीला पत्र पाठवायला हवं. युवराजांचं कौतुक करायला हवं.’

साऱ्यांनी पावले उचलली. राजारामांनी विचारले,

‘आबासाहेब, मागू, ते देईन, म्हणाला होता.....’

राजे वळले. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर हसू उमटले. राजांनी विचारले,

‘मागा! वरं ब्रूहि.’

‘मागू?’

‘हो, हो. मागा ना!’

‘आम्ही सातमहालात राहतो. सारे चिडवतात. आम्ही आता लहान नाही. आम्हांला स्वतंत्र महाल हवा.’

‘हात्तिच्या! मग हवा तो महाल घ्या.’

‘आम्ही दादामहाराजांच्या महालात राहू?’

‘आणि दादामहाराज आले, तर?’

‘आम्ही त्यांच्याबरोबर राहू.’

‘मग तुम्ही जरूर दादामहाराजांच्या महालात राहा. चला.’

राजाराम ती बातमी सोयराबाईंना सांगण्यासाठी पुढे धावत होते. हसणाऱ्या राजांच्या पाठोपाठ सारे वाड्याकडे जात होते.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

२९

सकाळच्या वेळी स्नानपूजा आटोपून राजे आपल्या महाली बसले होते. बाळराजे राजाराम राजांच्या दर्शनाला आले. पायांना हात लावून ते पाया पडले. राजांनी विचारले,

'बाळराजे, आज लौकर स्नान आटोपलंत?'

'आबासाहेब, आम्ही लवकर उठून घोड्यावरून तटाची रपेट करून आलो.'

'अरे, वा! मग महादरवाजाजवळ पहारे कुणाचे आहेत?'

'सोमनाथ काकांचे!'

'बिलकुल नाही. बाळराजे, तुम्ही महादरवाजाजवळ उतरला नव्हता ना?'

राजांनी राजारामांच्याकडे पाहिले. राजाराम पाहत म्हणाले,

'आम्ही महादरवाजावर गेलो नाही.'

'परत चढावं लागतं ना!' राजारामांना जवळ घेत राजे म्हणाले. 'बाळराजे, आमच्या गडाला तो एकच दरवाजा. तो पहारा महत्त्वाचा. आज पहाऱ्यावर भवानजी आहेत.'

'तुम्ही गेला होता?' आश्चर्याने राजारामांनी विचारले.

'जायला कशाला हवं? आम्हांला वर्दी मिळते ना!'

काही क्षण उलटले. राजांनी राजारामांना सांगितले,

'बाळराजे, जरा सदरेवर जाऊन या. अनाजी,मोरोपंत आलेत का, पाहा.'

'असतील, तर बोलावून आणू?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘नको. नुसते पाहून ऽ ऽ’ राजांना खोकला आला.

‘आबासाहेब, खोकला झाला?’

‘ते चालायचंच. तुम्ही जाऊन या.’

राजाराम सदरेकडे गेले. काही वेळाने ते परत आले. त्यांनी अनाजी, मोरोपंत सदरेवर असल्याचे सांगितले.

‘चला, बाळराजे. आपण सदरेवर जाऊन येऊ.’

सदरेवर मोरोपंत, अनाजी होते. राजांचा चेहरा आनंदित दिसत होता. मधून मधून येणारा ठसका सोडला, तर राजांची तब्येत ठीक दिसत होती. राजे अनाजींना म्हणाले,

‘अनाजी, आम्ही आज एका वेळानं जाणार!’

‘जी.’

‘आम्हांला रात्रभर झोप नाही. कधी शंभूबाळांना पाहू, असं वाटतंय्. आम्ही परळीला जातो. समर्थांचा सहवासही घडेल, युवराज भेटतील. तिथं चार-आठ दिवस काढून आम्ही युवराजांच्यासह पन्हाळ्याला जाऊ. आत्ताच्या आत्ता परळीला स्वार पाठवा. आम्ही मागून येत असल्याचं कळवा.’

हंबीरराव सदरेवर आले. राजे म्हणाले,

‘हंबीरराव, आम्ही तुम्हांलाच बोलावणार होतो. आज एक वेळानं आम्ही परळीला जाणार आहो. तुम्ही संगती चला. परळीहून तसेच पन्हाळ्याला जाऊ.’

‘महाराज, अजून आपली तब्येत...’ हंबीररावांनी बोलण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना मध्येच थांबवीत राजे म्हणाले,

‘आमची तब्येत ठीक आहे. कालच्या बातमीनं तर आम्ही एकदम दुरुस्त झालो.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आमची चिंता करू नका.’

राजांनी अचानक केलेल्या निर्णयाने गडावर धावपळ सुरू झाली. राजांच्या पालखीचे हुकूम सुटले. घोडी पागेबाहेर पडली. घोड्यांची खोगिरे वगैरे सामान बाहेर काढले गेले. मुदपाकखान्यात शिलेदारांच्या भाकऱ्या थापल्या जात होत्या. तासाच्या आतच गडाखालून पहिले अश्वपथक भरधाव वेगाने परळीकडे धावत सुटले. वाटेतल्या टेहळणी-चौक्यांना राजांच्या आगमनाच्या इशारती देत पथक दौडत होते.

राजे महालात आले, तेव्हा राजांच्या खास संदुकी बाहेर काढल्या होत्या. महादेव आणि मनोहारी राजांचे कपडे भरीत होते. सोयराबाई त्यावर देखरेख करीत होत्या.

सोयराबाई पदर सावरून उभ्या राहिल्या. राजांनी विचारले,

‘तयारी झाली?’

‘हो. कपडे भरले, की संदुका उठवल्या जातील. जिवाला केवढा घोर लागला होता! देव-दयेनं सारं टळलं.’

‘परमेश्वर दयाळू आहे, राणीसाहेब! आग्र्याला कैदेत असताना सुद्धा एवढा जीव झुरला नव्हता.’

‘महादेव, ते रेशमी अंगरखे बाजूला ठेव.’ सोयराबाईंनी महादेवाला सांगितले.

राजे त्या पसाऱ्याकडे पाहत होते.

‘राणीसाहेब, जेवढं जरूर आहे, तेवढंच सामान आता भरा. बाकीचं मागुती येईल.’

राजा महादेवला म्हणाले,

‘महादेव, अरे, आमचे देव विसरतील, बाबा! ते प्रथम घे.’

सोयराबाई हसल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेब, आमच्या आयुष्यात खरी सोबत ह्या देवांनी केली. आम्ही सारखे मोहिमांवर बाहेर. पण आमचा देव्हारा संगती असायचा. त्या देवांकडे पाहिलं, की घरात असल्यासारखं वाटायचं.’

‘आपल्याला देव तरी आहेत. गडावर असलात, की दिवस पुरत नाही. आणि जाणं झालं, की दिवस उलटत नाही.’

‘आता दगदगीचे दिवस सरले. आता येसू, संभाजी गडावर येतील. वाड्यात नातू खेळेल. राणीसाहेब, तुम्ही काही म्हणा. पण आम्हांला वृद्धापकाळ मोहवितो. त्याचं रूप फार मोठं देखणं आहे. आम्ही त्याचंच स्वप्न पाहतो.’

‘काही तरीच बोलायचं.’

‘काही तरीच नाही. बघा ना- कर्ती सवरती मुलं झालेली; वासनेचा लोप झालेला. घरात नातवंडांशी खेळत, ईश्वरचिंतन करीत समाधानानं दिवस कंठायचे. व्याधी आली, तरीदेखील सुखाचीच. आयुष्यभर जोडलेल्या, जतन केलेल्या मायेची जाण तेव्हाच व्हायची. अखंड सोबत मिळायचे ते दिवस. वृद्धापकाळाचा एवढा तिरस्कार का करतात, कोण जाणे!’

बाहेर पावलांचा आवाज आला. राजांनी वळून पाहिले; आणि ते तसेच उभे राहिले. महालात अनाजी, मोरोपंत, हंबीरराव आले होते. राणीसाहेब महालात आहेत, याचेही कुणाला भान नव्हते. अनाजींचे सारे अंग थरथरत होते.

‘अनाजी ऽ ऽ’

‘घात झाला, महाराज! घात झाला ऽ ऽ’

-आणि अनाजी उभ्या जागी रडू लागले.

‘बोला, अनाजी ऽ ऽ’ राजे उद्गारले, ‘मोरोपंत!...’

मोरोपंतांची पाणावलेली नजर अधीऱ्या, व्याकूळ राजांच्यावर स्थिरावली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज, परळीहून स्वार आला. युवराज परळीहून पळाले, माहुलीला मोगलांना मिळाले!’

राजांचा कानांवर विश्वास बसत नव्हता. बोललेले त्यांना कळत नव्हते. शंभूबाळ मोगलांना मिळाले! राज्याचा युवराज शत्रूच्या आश्रयाला गेला! छत्रपतीच्या मुलाला बापाचं छत्र अपुरं पडलं!....

राजे एकेक पाऊल मागे सरत होते. हंबीरराव धावले. त्यांनी राजांचा हात धरला. राजांची बोटे हंबीररावांचा हात आवळीत होती. त्या पकडीत आपला हात चिंबेल, की कायं, असं हंबीररावांना वाटत होते. राजे कलते झाले. हळू हळू ते जमिनीवर हात टेकून बसले. मान खाली झुकली.

‘महाराज!’ हंबीररावांनी हाक मारली.

राजांनी नजर वर केली. त्या अतुल पराक्रमी पुरुषाच्या डोळ्यांतले अश्रू पाहून सेनापतींची छाती फुटली. राजे ओरडले,

‘शंभूबाळ! हे काय केलंत ऽ ऽ’

राजे गद्गदून अश्रू ढाळीत होते. साऱ्यांचे हुंदके फुटत होते. अनाजी सांगत होते,

‘युवराजांच्या मागून शंभर स्वार गेलेत. कदाचित त्यांना युवराज मिळतील.’

एकदम वर पाहत राजांनी विचारले,

‘समर्थ भेटले नाहीत?’

‘युवराज परळीला गेले. तेव्हा समर्थ तिथं नव्हते.’

राजांची मान परत झुकली. राजाराम धावत महालात आले. त्यांचा चेहरा गोरामोरा झाला होता. सारी रडत असलेली पाहून ते जास्तच घाबरले. राजांच्या जवळ जात त्यांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आबासाहेब, दादामहाराज मोगलांना मिळाले?’

राजांनी राजारामांना एकदम मिठीत घेतले; आणि त्यांना उराशी कवटाळून ते अश्रू ढाळू लागले.

□

३०

सुतकातदेखील तंग नसेल, एवढे तंग वातावरण गडावर पसरले होते.

जिकडे तिकडे कुजबूज चालू होती. कोणी मोठ्याने काही बोलत नव्हते. राजे महालातून बाहेर पडले नव्हते. गडावर येणारी प्रत्येक बातमी राजे ऐकत होते; पण काही बोलत नव्हते. तीन दिवसांत बसल्या जागी राजांचे रूप पालटले. अश्रू सरले होते. नजर तीच होती, पण तीतले तेज कुठे तरी हरवले होते. त्या कोरड्या नेत्रांना नजर देणे कठीण जात होते.

येसाजी आणि शृंगारपूरला संभाजीराजांच्या तैनातीसाठी दिलेला विश्वनाथ हे गडावर येऊन दाखल झाले.

सायंकाळच्या वेळी राजे आपल्या महालात बसले होते. शेजारी अनाजी, बाळाजी होते. मोरोपंत महालात आले. राजांनी शुष्क आवाजात विचारले,

‘काय, मोरोपंत?’

‘येसाजी आणि विश्वनाथ आले आहेत.’

नि:श्वास सोडून राजे म्हणाले,

‘पाठवा त्यांना. आता काहीही कळलं, तरी ऐकायची तयारी आहे.’

येसाजी, विश्वनाथ महालात आले. काही न बोलता दोघे उभे राहिले. पाठोपाठ

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हंबीरराव आले. राजांनी विश्वनाथला विचारले,

'विश्वनाथ, काय झालं, ते सारं सांगा!'

विश्वनाथचा शब्द फुटत नव्हता. राजांनी विश्वासाने त्या साधुपुरुषाच्या हाती संभाजीराजांना दिले होते. विश्वनाथचा आवाज घोगरा बनला.

'महाराज, सांगायला माझ्याजवळ काही नाही. आम्ही परळीला गेलो; पण समर्थ तिथं नव्हते. ते अनुष्ठानासाठी बाहेर पडले होते. संभाजीराजे बेचैन दिसत होते. आपली परळीला जाण्याची आज्ञा जेव्हा शृंगारपुरी आली, तेव्हाच युवराज मला म्हणाले :

' 'परमेश्वर सारं मनासारखं घडवितो. चला, परळीला जाऊ.'

'तेव्हा माझ्या ध्यानी काही आलं नाही. समर्थ नाहीत, हे पाहताच युवराजांनी माहुलीला पर्वणी साधायला जायचा बेत काढला. आम्ही माहुलीला गेलो. बरोबर मोजके स्वार होते. माहुलीला जाताच राजांचा बेत जाहीर झाला. आम्हां सर्वांचे डोळे पुरते उघडले; पण आम्ही काही करू शकत नव्हतो. आम्ही मिनतवारी केली; पण राजांनी ऐकलं नाही. इखलासखान युवराजांना नेण्यासाठी आला होता. संभाजीराजे डोळ्यांदेखत मोगलांना मिळाले, आणि दिसेनासे झाले. माहुलीला पर्वणी साधतो, म्हणून निघालेल्या युवराजांच्या मनात असं काही असेल, असं स्वप्नातही वाटलं नव्हतं!'

राजे उद्वेगाने हसले. 'तुमचा दोष नाही, विश्वनाथ! भावनेच्या एका लहरीत अधोगतीची पर्वणी किती लौकर साधता येते, हे संभाजीनं दाखवून दिलं.'

विश्वनाथने सांगितले, 'महाराज, हे घडताच मी परळीला आलो. तिथून स्वार पाठवून दिले. येसाजी पाळतीवर होतेच. ते चटकन आले.'

राजांनी येसाजीकडे पाहिले.

'महाराज, मी माझ्या स्वारांनिशी युवराजांचा पाठलाग केला. पण युवराजांना न्यायला आलेली फौज चार-पाच हजारांची होती. अवघ्या शंभर स्वारांचा टिकाव लागणं कठीण. त्यासाठी तातडीनं माघारी आलो.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बरं केलंत, येसाजी! एकानं एक अविचार केलाच होता. तुम्ही फौजेवर तुटून पडला असतात, तर दुसरा अविचार घडला असता. चूक आमची आहे. आम्ही संभाजीच्या भरोशावर गाफील राहिलो. नजरबाजांची जाळी शृंगारपुराभोवती पेरली; आणि आमच्याच आज्ञेनं संभाजीला अवसर मिळाला. त्यांनी परळीहून माहुली जवळ केली. तिथं ठरल्याप्रमाणे मोगल आले. संभाजीनं हातोहात फसवलं! हा बेत फार जुना, पक्का ठरला असला पाहिजे.’

राजे हसले. ‘पण, हंबीरराव, संभाजीनं आपले बोल खरे केले. शृंगारपूर सोडताना ते म्हणाले होते, ‘आम्ही अशी करामत करून दाखवू, की आबासाहेब, तुम्हीदेखील चकित व्हाल!’ चकितच काय, आम्ही थक्क झालो!’

‘महाराज, मी पन्हाळ्याला फौज गोळा करतो.’ हंबीरराव त्वेषाने पुढे झाले. ‘दिलेरखानाची छावणी घोलखेडला आहे. ती सहज काबीज करता येईल.’

‘हं! हंबीरराव, छावणी काबीज करता येईल; पण हरवलेलं माणूस मिळवणं अधिक कठीण. दिलेरखानानं खासा डाव टाकला आहे. तो संभाजीराजांना फार जपेल. संभाजीराजांच्या स्वागताला पाच हजार स्वार येतात, ही का साधी गोष्ट आहे?’

‘आपण युवराजांना पत्र लिहिलं, तर....?’ अनाजींनी सुचविले.

‘ते एवढं आमचं मानीत असते, तर हे वर्तन घडलं असतं?’

‘पण युवराजांना....’

‘खामोश!’ राजे ओरडले. दुसऱ्याच क्षणी त्यांचा आवाज नरम आला. संताप उफाळला, की राजांचा आवाज घोगरा बने.

‘अनाजी! कोण युवराज? कसले? संभाजी मोगली मनसबदार बनतील. यापुढं ते आमच्या राज्यावर चालूनही येतील. मोगली मनसबदार आमच्या राज्याचे युवराज कसे बनतील? यापुढं संभाजीराजांचा उल्लेख ‘युवराज’ म्हणून करू नका. निदान आमच्यापुढं तरी तसं म्हणू नका!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे उभे राहिले. ते पाठमोरे झाले. पाठीवर मागे परतविलेल्या मुठी वळत होत्या.

'तुम्ही आता जा!'

मुजरे करून सारे मागल्या पावली निघून गेले.

महालात राजे एकटे उभे होते.

□

३१

एकदा वाईट बातम्या यायला सुरुवात झाली, की त्या पाठोपाठ येऊ लागतात. युवराज पळाले, मोगलांना मिळाले, या बातमीपाठोपाठ संभाजीराजे मोगली मनसबदार बनल्याची बातमी गडावर येऊन थडकली.

संभाजीराजांच्या आगमनामुळे दिलेरखानास खूप आनंद झाला. संभाजीराजे इखलासखानाबरोबर मोठ्या सन्मानाने करकंबला गेले. युवराजांच्या स्वागतासाठी खुद्द दिलेरखान तेथे आला होता. त्याने मोठ्या प्रेमाने संभाजीराजांचे स्वागत केले, बादशहाकडून आलेली सप्तहजारी संभाजीराजांना बहाल केली. दिलेरखानाने अनेक महिने रचलेले कारस्थान फळाला आले. अखेरीस मराठ्यांचा युवराज मोगली सप्तहजारी बनला! दिलेरखानाने एक हत्ती, अलंकार-वस्त्रे देऊन राजांचा नगारनौबतीत सन्मान केला.

माहुलीला मोगलांना मिळण्यासाठी जात असता संभाजीराजांनी राजांना निरोप सांगितला होता की, 'तुम्ही आता परत जा; आणि किल्लेदाराला आणि महाराजांना निरोप कळवा की- मी मोगली सेनेत गेलो आहे. मी जात आहे, तो दिल्लींद्राचं सैन्य अवगाहन करण्यास जात आहे. परत येईन, तो सह्याद्री जिंकण्यासाठीच!'

त्या निरोपाने राजांच्या मनाला एक मोठा तडा गेला. गडावर येणाऱ्या एकेका बातमीने महाराजांचे मन पोखरले जात होते. मनाचा दाह वाढत होता.

दोन प्रहरी गड विसावला होता. जगदीश्वरमंदिर आणि भवानीटोक यांच्या पठारावर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अश्वशाळेत मोतद्दार शांतपणे झोपले होते. पिलखान्यात ऐरावत उभ्या जागी डुलत होता. त्याच्या डुलण्याबरोबर पायांच्या साखळदंडांचा आवाज होत होता. इंद्र गवतावर पडून सुस्कारत होता. जमुना आपले कान फडकावीत ऐरावताकडे पाहत होती.

पागेतली घोडी शांतपणे उभी होती; अधूनमधून घास खात होती, फुरफुरत होती, शेपट्या फडकावीत माश्या उडवीत होती. घोड्यांच्या दाढेचा करकरणारा आवाज पागेत साद धरून वावरत होता. गड उन्हात नाहत होता. सकाळच्या थंडीने थंडावलेल्या गडाला ऊब चढत होती.

पागेतल्या घोड्यांचे कान अचानक टवकारले गेले. टपोरे डोळे कावरेबावरे बनले. भीतीची लव त्या तुकतुकीत अंगांवरून शहारत गेली. घोड्यांची फुरफुर वाढली. एक घोडे जोराने खिंकाळले. झोपलेले मोतद्दार जागे झाले. त्या आंबूस वासाने दरवळणाऱ्या पागेत बेचैन घोडी उभ्या जागी पाय नाचवीत होती. मोतद्दारांना काही समजेना. तोच त्यांच्या कानांवर आवाज आला. मोतद्दार बाहेर धावले. जगदीश्वराच्या टेकाडावर गजेंद्र मोठ्याने चीत्कारीत उभा होता. त्याची शेपटी ताठ झाली होती, कान कर्ण्यासारखे बनले होते. सोंड उंचावून तो वास घेत होता, ओरडत होता. मागून माहुतांचा आवाज उठत होता. ते दृश्य पाहत असलेल्या मोतद्दारांनी मागे पाहिले. पागेतून घोडी बाहेर पडत होती. खिंकाळत, लाथा झाडीत ती वाट फुटेल तिकडे धावत होती. पागेतल्या कुत्र्यांची शेपटी पायांत आली होती, कान पडले होते. उभ्या जागी ती कण्हत होती. एकदम त्यांनी मान वर केली. काही अंतर ती पळत गेली, आणि उभे राहून आकाशाकडे तोंड करून आर्त सुरात ओरडू लागली.

गडावर एकच धावपळ सुरू झाली. काय घडते आहे, हे कुणालाच कळत नव्हते. ऐरावत सुटल्याचे कळताच राजे कातळावर आले. गडावर उधळणारी घोडी, धावणारे हत्ती, भीतीने आडवीतिडवी धावणारी माणसे- गडावर एकच कल्लोळ माजला होता! आणि त्याच वेळी राजांना आपल्या पायांखालची जमीन हलत असल्याचा भास झाला.

राजांच्या बरोबर असलेले हंबीरराव, बाळाजी या मंडळींची तीच अवस्था झाली होती. राजे चकित झाले. आणि त्याच वेळी समोरच्या पेठेतून माणसे सैरावैरा धावू लागली. आवाज न येताही कुठे तरी ढगांची गुरगूर व्हावी, तसा भास होत होता. राजे मटकन कातळावर बसले. काही क्षण सारी पृथ्वी हलल्याचे जाणवत होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काही क्षण गेले; आणि परत सारे शांत झाले. धरणीकंपाच्या अनोळखी अनुभवाने भ्यालेली मने स्थिरावली. धावणारी जनावरे एकदम शांत उभी राहिली. घराघरांतून भांड्यांच्या उतरंडी कोसळल्या होत्या. देव्हाऱ्यांतले देव एकमेकांवर कोसळले होते. गड स्थिरस्थावर व्हायला घटका मोडली.

बाळाजी राजांना म्हणाले,

'महाराज, धरणीकंप झाला!'

राजे बाळाजींना म्हणाले,

'धरणीकंप! हां, बाळाजी. एवढंच व्हायचं शिल्लक राहिलं होतं!'

□

३२

संभाजीराजांच्या धक्क्यातून राजे पंधरा-वीस दिवसांत सावरले. त्यांनी संभाजीराजांचा विचार मनातून काढून टाकला. राजे सदरेवर येतात, कामकाजात लक्ष घालतात, हे पाहून गडावरील सर्वांना बरे वाटले. आदिलशाही मुलुखातून, मोगली मुलुखातून नेहमी बातम्या येत होत्या. त्यांचा विचार करण्यात राजे मग्न झाले होते.

एके दिवशी राजे सदरेवर आले; आणि त्यांनी आपला बेत सांगितला. ते मोरोपंतांना म्हणाले,

'मोरोपंत, तुम्ही विजापूर मुलुखात स्वारीला जा. दिलेरखान त्या भागात जाण्याआधीच आनंदराव आणि तुम्ही त्या भागात धुमाकूळ घाला. आम्ही आता पन्हाळ्याला जायचं ठरविलं आहे. हंबीरराव आणि आम्ही पन्हाळ्याला फौजेनिशी तयार राहू. आदिलशाही किंवा मोगलाई यांच्या हालचालींवर तिथून लक्ष देणं सोपं जाईल. संभाजीराजे मोगलांना मिळाल्यामुळं दिलेरखानाचं बळ वाढलं आहे. तो कोणती चाल करतो, हे बारीक नजरेनं पाहायला हवं.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या स्वारीची तयारी सुरू झाली. पन्हाळ्याच्या रोखाने राजांची अश्वपथके धावू लागली. मोरोपंतांनी आपली फौज गोळा केली. आनंदरावांच्यासह ते विजापूर मुलुखाकडे रवाना झाले. गड व गडाची शिबंदी अनाजींच्या नजरेखाली नेमण्यात आली. फडातून साऱ्या गडांना इशारतीचे खलिते रवाना झाले.

-आणि सकाळची कोवळी किरणे गडावर फाकली असता एक स्वार गडावर हजर झाला. अनाजींनी ती थैली घेतली. राजांना वर्दी गेली. अनाजी जेव्हा महाली आले, तेव्हा राजे बैठकीवर बसले होते. महालात सोयराबाई, राजाराम होते. नवीन काय बातमी आली आहे, ह्या चिंतेनं राजांच्या कपाळी सूक्ष्म आठी पडली. अनाजींचा प्रफुल्ल चेहरा पाहून त्यांना धीर आला. अनाजी म्हणाले,

'महाराज, शृंगारपुराहून थैली आली आहे. राजस्नुषा सौभाग्यसंपन्न येसूबाईसाहेब सुखरूपपणे प्रसूत होऊन कन्यारत्न झालं आहे!'

'काय सांगता?' म्हणत राजे उठले. त्यांनी पत्र वाचले. राजांच्या चेहऱ्यावर प्रथम आनंद प्रकटला. त्यांनी बोटातली हिऱ्याची अंगठी उतरून अनाजींच्या हाती दिली. देव्हाऱ्याजवळ जाऊन देवाला नमस्कार केला. राजे माघारी वळले, तेव्हा सोयराबाई महालाबाहेर जाण्याच्या तयारीत होत्या.

'राणीसाहेब, चाललात?'

'एवढी आनंदाची बातमी आली! देवांना साखर वाटायला हवी, जिलेबी करायला हवी.'

'हो! तेही खरंच.' राजे आनंदाने अनाजींना म्हणाले. 'अनाजी, ज्या स्वारानं ही थैली आणली, त्याला वस्त्र, मोहरा देऊन नावाजा. नौबत वाजवा. तोफांचे आवाज करा. काळजीमागून समाधान येतं, म्हणतात, ते काही खोटं नाही. आज आम्ही समाधान पावलो! आज मासाहेब हव्या होत्या.'

दुसऱ्याच क्षणी राजांचे मन खिन्न झाले. खाली पाहत स्वत:शीच पुटपुटल्यासारखे राजे बोलले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मासाहेब!! मासाहेब नाहीत, तेच बरं! त्या जिवाला हे सहन झालं नसतं.’

गडाची नौबत वाजली. टकमकबुरूज, भवानीटोक, महादरवाजा या ठिकाणच्या तोफांनी आवाज केले. देवांना साखर वाटली. जिलेबीचा नैवेद्य देवांना दाखवून साऱ्या गडावर जिलेबी वाटण्यात आली.

राजांचा पन्हाळ्याचा बेत पक्का झाला होता; पण या बातमीमुळे राजांनी आपला बेत थोडासा बदलला. सरळ पन्हाळ्याला न गाठता शृंगारपूरला जाऊन नंतर पन्हाळा गाठावा, असे त्यांनी ठरवले. सोयराबाईंना राजांचा बेत कळला, तेव्हा त्यांनी विचारले,

‘आपण शृंगारपूरला जाणार?’

‘हो! जायलाच हवं. आमच्या नातीला बघायला नको?’

‘एवढं झालं, तरी नातीचं कौतुक सरत नाही.’ सोयराबाई बोलून गेल्या.

‘संभाजीराजांनी केलं, म्हणून त्या नवजात अर्भकाचा, येसूचा काय दोष?’

‘तिची फूस असल्याखेरीज का हे झालं असेल! मला सांगू नका. कुणाच्या ताब्यात संभाजीराजे नसले, तरी येसूच्या ताब्यात ते नक्की आहेत.’

‘हं! एवढा संसार करून पुरुषाचं मन तुम्हांला कळलं नाही. राणीसाहेब, आमच्या सल्ल्यानं धाकट्या राणीसाहेब गडाखाली गेल्या नाहीत!’

सोयराबाईंना काही उत्तर सुचले नाही. त्याच संतापात त्या निघून गेल्या. राजांच्या हसण्याचा आवाज त्यांच्या कानांत रेंगाळत होता...

□

३३

पहाटेचे विरळ धुके अजून शृंगारपुरावर रेंगाळत होते. दाट झाडीने वेढलेल्या गावावर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

धरलेले धुक्याचे दाट वलय जात्याभोवती पडलेल्या पिठासारखे दिसत होते. शृंगारपूरच्या वाड्यावर जाग असूनही शांतता पसरलेली होती. एक स्वार गावात शिरला. राजे येत असल्याची वर्दी त्याने वाड्यात दिली; आणि क्षणात वाडा गडबजून उठला.

राजांच्या आघाडीची अश्वपथके वाड्यासमोर येऊन थबकली. थोड्याच वेळात राजे वाड्याच्या समोर आले. हंबीररावांनी घोड्यांची ओठाळी पकडली. राजे पायउतार झाले. राजांच्या स्वागतासाठी वाड्याच्या दारात पिलाजीराव शिर्के, कवी कलश, उमाजी पंडित उभे होते. राजांनी मुजऱ्याचा स्वीकार केला. पिलाजीरावांचा चेहरा चिंताग्रस्त दिसत होता.

'पिलाजीराव, येसू इथंच आहे?'

'जी.' राजांच्या बरोबर चालत असता पिलाजीरावांनी सांगितले, 'हे असं झालं, आणि येसूनं इथंच राहायचा हट्ट धरला.'

'पिलाजीराव, चिंता करू नका. नुसते पराक्रम करण्यासाठीच सारा जन्म नसतो. दुःखही त्याच तोलामोलानं सोसावं लागतं.'

राजे सदरेत आले. वर्दी आत पाठविली गेली. राजे एकटेच आत गेले. येसूबाईंच्या महाली समयांचा उजेड फाकला होता. राजे येणार, हे कळताच येसूबाईंच्या शेजारची सगळी आतल्या महालात गेली. राजे महालात आले. येसूबाईंनी राजांना नमस्कार केला.

'आबा ऽ' एवढा एकच उद्गार त्यांच्या मुखातून बाहेर पडला; आणि त्या रडू लागल्या.

राजे पुढे धावले. येसूबाईंना जवळ घेत राजे म्हणाले,

'हां, हां! पोरी, मुळीच रडायचं नाही. तुझी जबाबदारी आता फार मोठी आहे. तुला आता रडून चालायचं नाही. मी आहे ना! सारं ठीक होईल.'

येसूबाईंनी डोळे टिपले. राजांनी मुलीला पाहिले. सुवर्णमोहरांचा सतका केला. राजे बैठकीवर बसले. शेजारी येसूबाई बसल्या होत्या. राजांनी विचारले,

'येसू, तुला याची कल्पना होती?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

येसूबाई नकारार्थी मान हलवितील, असे राजांना वाटले. पण त्यांनी होकारार्थी मान हलविलेली पाहून मात्र राजे स्तिमित झाले.

‘तुला हे माहीत होतं?’

‘जी.’

‘आम्ही पन्हाळ्याहून आलो होतो, तेव्हा हे समजलं होतं?’

‘जी.’

‘आणि तू आम्हांला काही पत्ता लागू दिला नाहीस? येसू, तुझ्यात आणि सखूत मी कधी तरी अंतर दाखवलं होतं का?’

राजांच्या बोलांनी येसूबाईंचे मन कापत गेले. आपला हुंदका आवरीत त्या बोलल्या,

‘शपथ घातली....’ पुढे येसूबाईंना बोलवेना.

राजांनी नि:श्वास सोडला.

‘पोरी, कसलं शपथेचं बंधन घेतलंस? असल्या शपथा का पाळायच्या असतात? निदान अडवायचं तरी होतंस.’

‘ऐकलं नाही.’

‘हट्ट धरायचा होतास.’

‘ती माझी कुवत नव्हती.’

राजे भकास हसले.

‘हं! ती कुवत तुझी नाही, माझी नाही; मासाहेबांची नव्हती. एका माणसाची होती; पण

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ते माणूस तसंच निघून गेलं! कदाचित त्यालाच ती भ्याली असेल. येसू, असले बंध नाजूक हातांनीच सुटतात.'

येसूबाई राजांच्याकडे पाहत होत्या. पाच-सहा महिन्यांत माणसात केवढा बदल होतो, याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. थकल्या श्रमल्या राजांचे रूप त्या न्याहळीत होत्या. तेच तेजस्वी डोळे; पण त्यात केवढी रूक्षता! गाल आत गेल्यामुळे बाकदार नाक अधिक नजरेत भरत होते. एखादी सुरकुतीही रूपात केवढा बदल घडविते! पूर्वी कपाळ कसे भरीव, रुंद वाटायचे. शिवगंधाचीच सुरकुती त्यावर दिसायची. आता त्या कपाळावर सूक्ष्म आडव्या रेषा उमटू लागल्या होत्या. महाराजांचे स्तब्धपण येसूबाईंना जाणवत होते. त्या पुढे झाल्या. त्यांनी राजांचे पाय शिवले.

'आबासाहेब, पायांशपथ माझा ह्यात दोष नाही!'

राजे भानावर आले. त्यांनी पटकन येसूबाईच्या पाठीवर हात ठेवला.

'खरं आहे, पोरी! तो दोष तुझा नाही. आमचंच चुकलं. आमच्या ध्यानी आलं नाही. उगा तुला बोल लावला. दोष असलाच, तर तो आम्हां सर्वांच्या नशिबाचा आहे.'

राजे सदरेवर आले, तेव्हा त्यांची चर्या गंभीर दिसत होती. कसल्या तरी विचारात ते गढल्यासारखे दिसत होते. सदरेवर पिलाजीराव, हंबीरराव, कलश, उमाजी पंडित अदबीने उभे होते. सदरबैठकीवर बसत असता राजांची नजर सर्वांवरून फिरत होती.

'पिलाजीराव, तुम्ही असता असं घडेल, असं वाटलं नव्हतं.'

'लाजेनं मान खाली गेलीय्. महाराज!' पिलाजीराव उसळले. 'आम्ही साधी-भोळी, सरळ माणसं... शत्रूला सामोरे जाणारे, छाताडावर घाव घेणारे. शहाण्या माणसांचे चाळे आम्हांला कसे कळणार? तुमच्या हुकुमानं राजे परळीला गेले. आम्हांला ते खरं वाटलं.'

'आमच्या हुकुमानं ते परळीला गेले; न कळत आमचाच हातभार लागला. पण बेत परळीचा नव्हता. कट इथंच शिजला. इथंच तो चालता-बोलता झाला. कलश, तुम्हांलाही यातलं काही माहीत नसेलच!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कलशांनी उपरणे साफ केले.

‘महाराज, संभाजीराजे असं आततायी वर्तन करतील, असं मुळीच वाटलं नव्हतं.’

‘वाटलंच मला. दिलेरखानाशी संभाजी बोलणी करतात, हेही तुम्हांला ठाऊक नसेलच.’

कलशांनी ओठ आवळले.

‘महाराज, खोटं बोलण्यात काय अर्थ आहे? दिलेरखान आणि युवराज यांचा पत्रव्यवहार चालू होता. दिलेरखान युवराजांना आपल्याकडे बोलावीत होता. पण आम्ही तसं न करण्याबद्दल परोपरीनं युवराजांना सांगत होतो.’

‘हां! कलश, सारं आयुष्य राजकारणात गेलं. कुणाला हे सांगता? तुमचा कलशाभिषेक मात्र परिणामकारक ठरला खरा! राज्याचे युवराज राजे जरी बनले नाहीत, तरी मोगलांचे सप्तहजारी सरदार बनले.’

‘महाराज, यात कवी कलशांचा...’ उमाजी पंडित पगडी सावरीत बोलू लागले. त्यांची नजर राजांच्याकडे जाताच शब्द जेथल्या तेथे विरून गेले. संतप्त राजे उभे राहिले होते. त्यांची जळजळीत नजर उमाजी पंडितांच्यावर खिळली होती.

‘हंबीरराव!’ उमाजींकडे बोट दाखवीत राजे कडाडले, ‘यांची विद्वत्ता अधिक पाघळण्याआधी यांच्या मुसक्या आवळा! या दोघांना रायगडावर पाठवा. त्यांच्यावर सक्त नजर ठेवायला सांगा.’

‘महाराज...’ म्हणत उमाजी पंडित पुढे धावले. मागे सरत राजे ओरडले,

‘घेऊन जा यांना!... ब्राह्मण आहात, म्हणून गय केली... नाही तर घोड्यांच्या पायांखाली तुडवलं असतं!’

हंबीररावांच्या इशारतीबरोबर हशम धावले. कलश आणि उमाजी पंडित यांना जेरबंद करून सदरेवर नेण्यात आले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

□

३४

शृंगारपूरला बारसे साजरे झाले. सणासुदीच्या साऱ्या गोष्टी करूनही त्यांत उत्साह नव्हता. मुलीचे नाव 'भवानी' ठेवण्यात आले. बारसे झाल्यानंतर राजांनी पन्हाळ्याला जायचे ठरवले.

राजे सकाळच्या वेळी स्नान, पूजा आटोपून बसले होते. राजे एकटेच महाली होते. येसूबाई चिंतामग्न राजांच्याकडे पाहत दारी आहेत, हे बराच वेळ राजांच्या ध्यानी आले नाही. येसूबाई आत आल्या. त्यांच्या हाती दुधाचा पेला होता. येसूबाईंना पाहताच राजे म्हणाले,

'हे काय, येसू! खोली सोडून बाहेर कशाला आलीस?'

बैठकीवर राजांच्या समोर बसत, दुधाचा पेला ठेवीत येसूबाई खिन्न हसून म्हणाल्या,

'मला काही व्हायचं नाही.'

'हे बरं नाही, येसू! ज्याला संकटं नाहीत, असा माणूस या जगात नाही. ती येतात, तशी जातात. हे आततायी वर्तन बरं नाही. तू काळजी घ्यायला हवी. तुझ्या भरवशावर आमच्या साऱ्या आशा उभारल्या आहेत.'

येसूबाईंच्या डोळ्यांत खळकन पाणी आले.

'हां, पोरी! रडू नको. माझ्याकडे बघ. माझ्या डोळ्यांत पाणी आहे का? तुला तुझ्या एका संसाराची काळजी वाटते. मग आम्ही किती काळजी करावी? आम्ही लाखांचे पोशिंदे बनलो; पण आमचे युवराज शत्रूला मिळाले. आम्ही त्या लाखांसमोर कोणत्या तोंडानं जावं आणि सांगावं की, आमचे पुत्र आम्हांला संभाळता आले नाहीत? आपल्या वर्तनानं संभाजीराजांनी आमची नव्हे, राज्याची प्रतिष्ठा पणाला लावली. या कलंकातून वाचविण्याचं सामर्थ्य फक्त तुझं आहे. तुला डोळ्यांत पाणी आणायला अवसर नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

येसूबाईंनी अश्रू पुसले. त्या राजांच्याकडे पाहत म्हणाल्या,

‘मी काय करणार?’

‘येसू, अधिकारी माणसाला त्याच्या अधिकाराचा विसर पडणं यासारखी दुःखकारक गोष्ट नाही. तुझा अधिकार फार मोठा आहे. तो तू जाणायला हवा.’

‘मी काय करणार?’

‘अशी हताशपणे बोलू नको. संभाजीराजांची वृत्ती पाऱ्यासारखी. केव्हा कुठलं वळण घेतील, याचा नेम नाही. म्हणूनच ते आमच्या हाती टिकले नाहीत. त्यांना अविचारापासून माघारी वळविण्याचं सामर्थ्य आमचं नाही. औरंगजेब मोठा राजकारणी; केव्हा कोणती चाल करील, हे सांगणं कठीण. निवडुंगावर फेकलं गेलेलं फूल राकट हातांनी काढायला गेलं, तर दुखवल्याखेरीज राहणार नाही. त्याला नाजूक हातच हवेत. ते तुझेच आहेत.’

येसूबाई राजांच्याकडे थक्क होऊन पाहत होत्या.

‘पाहतेस काय अशी? तुझा अधिकार फार मोठा आहे. तुला तो अज्ञात असेल; पण आम्ही तो पुरा जाणतो. तू तो वापरायला हवा. संभाजीराजांची तू नुसती पत्नीच नाहीस; तू त्यांची सखी, सचिवही आहेस. तुझं रूप तुला कळत नाही. या रूपाची ओळख करून देण्याची वेळ आता आली आहे.’

येसूबाई लाजल्या.

‘लाजतेस कशाला? कोणत्याही स्त्रीला अभिमान वाटावा, असं नातं तू जोडलं आहेस. आम्हांला त्याचा आनंद आहे. संभाजीराजे तुझा सल्ला डावलणार नाहीत, याची आम्हांला खात्री आहे. आणखीन काही अनर्थ होण्याच्या आत शंभूबाळांना तू परत आणायला हवं. ते तुझं कर्तव्य आहे.’

‘कर्तव्य?’

‘हो!’ राजे निश्चयपूर्वक म्हणाले. ‘त्याची जाणीव करून देण्यासाठी आम्ही तुला एक

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मोठी भेट आणली आहे.'

येसूबाई आश्चर्याने राजांच्याकडे पाहत होत्या. राजांनी आपल्या खिशातून एक चपटी डबी काढली होती. राजांच्या चेहऱ्यावरचे स्मित लपले होते. ती डबी उघडून राजे एकाग्र नजरेने आतल्या वस्तूकडे पाहत होते. राजे एक पाऊल पुढे झाले; आणि ती डबी येसूबाईंच्या समोर धरली. डबीतील तेजस्वी नथीवर येसूबाईंची नजर जडली. ती नथ दाखवीत राजे सांगत होते,

'येसू, या नथीचा अधिकार तुझा. तू आमची थोरली सून. थोरल्या राणीसाहेबांना मासाहेबांनी ही दिली होती. ही भोसले कुलाची प्रतिष्ठा सांगणारी नथ थोरल्या राणीसाहेब असेपावेतो त्यांच्याकडे राहिली. हिचा अवमान होईल, असं वर्तन त्यांनी कधी केलं नाही. त्यांच्या पश्चात आम्ही ही नथ जपून ठेवली होती. कोणत्या तरी चांगल्या प्रसंगी तुझ्या हाती आम्ही ही सोपविणार होतो. ही घे. हिची प्रतिष्ठा राखणं आता तुझ्या हाती आहे.'

येसूबाईंनी ती डबी घेतली.

'येसू, ह्या नथीखाली एक छोटी पुडी आहे. तीत थोरल्या राणीसाहेबांची मंगळसूत्रं आहेत. दहन झाल्यानंतरदेखील ती तशीच सापडली, ती पुडी तुझ्या पूजेत नित्य असू दे. राणीसाहेबांच्या आठवणीसाठी ती जतन केली आहे. आज युवराजांच्या आठवणीने ती तुझ्या हाती देतो.'

येसूबाईंनी चटकन वाकून राजांचे पाय शिवले. येसूबाईंच्या पाठीवरून हात फिरवीत राजे म्हणाले,

'तू चिंता करू नको. मनात विकल्प आणू नको. शंभूबाळ आमचे आहेत. त्यांनी हवं ते केलं, म्हणून आम्ही कसे त्यांना टाकणार?'

राजांना बोलवेना. थरथरत्या हातांनी त्यांनी पेला गालिचावर ठेवला. आवंढा गिळला.

'येसू, कसं सांगू तुला? संभाजीराजे अवघ्या दीड-दोन वर्षांचे होते; आणि थोरल्या राणीसाहेब अचानक संसारातून निघून गेल्या! आम्ही ते दुःख सोसलं; आणि राणीसाहेबांचे दिवस संपताच आम्ही अफझलभेटीला निघून गेलो. उभं आयुष्य मासाहेबांच्या सहवासात

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गेलं. राज्याभिषेक सोहळा होताच मासाहेब आम्हांला सोडून गेल्या. आम्ही पोरके झालो. पण त्या दु;खावर आम्ही मात केली. महिन्याभरात आम्ही पेडगावस्वारीसाठी बाहेर गेलो. ही दोन्ही दुःखं मोठी होती. ती आम्हांला सोसता आली. पण हे दुःख... येसू! त्याखाली आम्ही पार चिरडून गेलो! उठण्याचं त्राण आमच्या अंगी राहिलं नाही.'

येसूबाईंच्या गालांवरून अश्रू ओघळत होते. राजांचे डोळे मिटले होते. राजांनी डोळे उघडले. नकळत राजे आपल्या तळहाताकडे पाहत होते. त्या तळहातावर नजर जाताच राजांचा जीव गुदमरला. मोती ओघळावेत, तसे त्या तळहातावर दोन अश्रू ठिबकले. त्या अश्रूंकडे पाहत राजे बोलत होते,

'आम्ही कर्नाटकमोहिमेला गेलो होतो. आमच्या एकाकी जीवनाचा, ह्या वणवणीचा कंटाळा आला असता आम्हांला श्रीशैलाचं दर्शन झालं. आम्ही तिथं आमचं शिरकमल देवाला वाहायला तयार झालो. ते घडलं असतं, तर किती बरं झालं असतं!....'

'आबासाहेब!' येसूबाई शहारत उद्गारल्या.

'आम्ही जगावं, असं वाटत असेल, तर तुला एवढं करावंच लागेल. आम्ही पन्हाळ्याला जातो. इथं आमच्या विश्वासाचे नजरबाज, शिबंदी ठेवून जातो. तू पाठवलेला निरोप दिलेरखानाच्या तळावर असलेल्या संभाजीराजांना सुरक्षित पोहोचेल. ही माणसं अशी आहेत, की जीव गमावतील; पण धोका पत्करणार नाहीत. करशील ना एवढं?'

'जी.' येसूबाई निर्धाराने म्हणाल्या.

राजांनी मायेचा हात येसूबाईंच्या पाठीवरून फिरवला. येसूबाईंनी विनंती केली,

'दूध संपवावं.'

राजांली हसत पेला उचलला, आणि ओठी लावला.

दुसऱ्या दिवशी राजे पन्हाळ्याला जायला निघाले. येसूबाईंचा निरोप घेण्यासाठी राजे महाली आले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कुठं आहे आमची भवानी? झोपलीय्?’

पाळण्याकडे जात येसूबाई म्हणाल्या, ‘जागी आहे.’

येसूबाईंनी भवानीला पाळण्यातून उचललेले पाहताच राजे बैठकीवर बसले. येसूबाईंना हसू लपविणे कठीण गेले. त्या जवळ येताच राजे म्हणाले,

‘थांब हं! ही आमची तलवार, कट्यार उतरतो.’

राजांनी दुशेल्यात खोवलेली कट्यार उतरली आणि येसूबाईंनी भवानीला दुपट्यासह राजांच्या मांडीवर ठेवले. तो चिमुकला जीव आपल्या मुठी आवळीत हात उंचावीत होता. त्याच्या नेत्रांची उघडझाप होत होती. राजे कौतुकाने नातीकडे बघत होते. भवानीने एक मोठी जांभई दिली. राजे मोकळेपणे हसले. येसूबाईंनी विचारले,

‘रायगडाला धरणीकंप झाला, म्हणे!’

भवानीवरची नजर न काढता राजे म्हणाले,

‘ही जन्माला आली ना! जेव्हा देव-देवता अवतार घेतात, तेव्हा आकाशवाणी होते, धरणी कंप पावते, असं पुराणं सांगतात.’

□

३५

राजे पन्हाळ्याला येऊन दाखल झाले. पन्हाळा भागात राजांची फौज गोळा झाली होती. सारे अधिकारी राजांना येऊन भेटत होते. गडकऱ्यांनी गडावर धान्याचा साठा करून ठेवला होता. गडाची मजबुती वाढविली होती. राजांचा कोकण भाग सुरक्षित होता. राजांनी कोकणातील किल्ल्यांवरील नामांकित तोफा पन्हाळ्यावर आणून ठेवल्या; एवढेच नव्हे, तर फिरंग्यांकडून नव्या तोफा विकत घेऊन पन्हाळ्याची मजबुती आणखीन वाढवून घेतली.

राजांच्या अनेक फौजा मोगलाईत व आदिलशाहीत धुमाकूळ घालीत होत्या. राजांनी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पन्हाळ्यावर अखंड चार महिने काढले. या कालावधीत राजांना अनेक विजयवार्ता ऐकायला मिळाल्या. मोरोपंत आपल्या फौजांनिशी गदग मुलुखातल्या कोप्पळला भिडले होते. मोरोपंतांनी हुसेनखान मियानाच्या मुलाला आपल्या फौजेत घेऊन त्याच्याकरवी कोप्पळच्या किल्लेदाराशी बोलणी सुरू केली होती, आणि अंत:स्थ राजकारण खेळून कोप्पळचा बळकट किल्ला स्वराज्यात सामील करून घेतला. किल्ल्यात पडलेल्या हुसेनखान मियानाची मोरोपंतांनी सुटका केली. त्या कृतज्ञतेने हुसेनखान आनंदाने राजांच्या नोकरीत सामील झाला. आनंदरावांनी बाळापूर काबीज केले, आणि विजापूरला भिडून विजापूरची वेस समजले जाणारे शहापूर लुटून फस्त केले. आनंदरावांनी आपल्या शौर्याने मोगलांच्या आधी विजापूरला मराठे भिडविले होते. राजांची एक फौज याच वेळी गुजरातेतील बलसाड भागात दमणकडे लूट करण्यात गुंतली होती. चौफेर चाललेल्या मोहिमेतील लुटीची रीघ रायगडच्या वाटेला लागली होती. औरंगजेबाचा मुलगा मुअज्जम दक्षिणेचा सुभेदार म्हणून औरंगाबादेला आला होता. राजांना शहाजाद्याचे काहीच महत्त्व वाटले नाही. ती बातमी ऐकून राजे म्हणाले,

‘शहाजाद्याचं आणि दिलेरचं वैर आहे. शहाजादा पटावर उतरला. आता कदाचित राजकारणाला खरा रंग चढेल.’

पन्हाळ्याची मजबुती पाहून निश्चिंत झालेले राजे रायगडला यायला निघाले. शृंगारपूर, रायगड भागात नजर टाकून परत पन्हाळ्याला येण्याचा राजांनी विचार केला होता. हंबीररावांच्या हाती फौज व पन्हाळा सोपवून राजांनी पन्हाळा सोडला. भर उन्हाळ्याच्या दिवसांत राजे रायगडी आले.

राजे रायगडी आले असता एके दिवशी अनाजींनी राजांना बातमी सांगितली,

‘महाराज, भूपाळगडाहून बातमी आली आहे... दिलेरखानानं भूपाळगडाकडे नजर वळविली आहे.’

‘किल्ल्याची हालहवाल?’

‘चिंतेचं कारण नाही. फिरंगोजी तिथं आहेत.’

राजांच्या चेहऱ्यावर समाधान प्रकटले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अनाजी, एवढ्याचसाठी मोक्याच्या गडांवर फिरंगोजींसारखी जाणती माणसं नेमावी लागतात. भूपाळगड बळकट किल्ला आहे; आणि त्याहून बळकट आमचे फिरंगोजी आहेत. दिलेरखानाला भूपाळगड मिळणं कठीण.’

सदरेतल्या बैठकीवर राजे बसले. त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच स्मित प्रकटले.

‘सह्याद्रीच काय, पण सह्याद्रीचा खडाही निखळणं केवढं कठीण आहे, हे आता संभाजीराजांना चांगलं कळेल!’

□ □ □

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भाग अकरावा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१

सोमवारचा दिवस. राजे सकाळच्या वेळी जगदीश्वराच्या दर्शनाला गेले होते. राजांनी देवदर्शन घेतले. मंदिराच्या पूर्वाभिमुख प्रवेशद्वारापाशी राजे उभे राहिले. समोर श्रीभवानीटोक नजरेत येत होते. राजांनी त्या दिशेला नमस्कार केला. राजांच्या बरोबर जेधे, अनाजी होते. राजे अनाजींना सांगत होते,

'अनाजी, यापुढं पावसाळा संपेपर्यंत आपल्याला मोठी हालचाल करावी लागेल, असं दिसत नाही. दिलेरखानानं भूपाळगडाला वेढा घातला असला, तरी तो फार काळ तिथं राहणार नाही. त्याची नजर विजापूरला आहे. तो विजापूरवर चालून जाईल. पावसाळा संपेपर्यंत तरी त्या लढाईचा निकाल लागणार नाही.'

'विजापूरकर दिलेरपुढं टिकतील?'

'आम्हांला शंका आहे. जे राज्य घरभेद्यांनी पोखरलेलं असतं, ते राज्य मामुली शत्रूपुढंही टिकत नाही; मग दिलेरखानासारख्या कडव्या पठाणाची गोष्ट सोडा.'

'एकदा आदिलशाहीची खोड मोडायलाच हवी.' जेधे बोलून गेले.

राजांनी जेध्यांकडे पाहिले.

'जेधे, आदिलशाही बुडणार नाही.'

'जी?'

'आम्ही म्हणालो, आदिलशाही बुडणार नाही. तसा रंग दिसला, तर आदिलशाही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आमच्याकडे धाव घेईल.’

‘मग आपण जायचं?’

‘अलबत! त्याच संधीची आपण वाट पाहत आहो. पन्हाळ्याला फौज गोळा केली आहे, ती कशासाठी? खरं पाहता, विजापूरकरांना ही अक्कल आधीच सुचायला हवी होती. दक्षिणेच्या पातशाह्यांची एकजूट कशीही करून टिकवायला हवी. आज ना उद्या औरंगजेब दक्षिणेत उतरणार, हे निश्चित. त्याला रोखू पाहणाऱ्या ह्या तीन शाह्या. त्या नामोहरम होऊन केव्हाही चालणार नाही. कुतुबशहांच्या हे ध्यानी आलं; पण आदिलशाहीला अजून प्रकाश दिसत नाही. तो दिसेल, तो सुदिन!’

सकाळी उन्हाने अंग तापत होते. त्या जाणिवेने राजे म्हणाले,

‘चला, वाड्यात जाऊ. सूर्य बराच वर आला.’

राजे बोलत बालेकिल्ल्यात आले. नगारखान्यावर भगवा ध्वज फडकत होता. राजांनी किंचित मान तुकवली. ते महादरवाजातून प्रवेश करते झाले. राजांना पाहताच बाळाजी सामोरे आले.

‘महाराज, फिरंगोजी नरसाळा आले आहेत.’

‘फिरंगोजी नरसाळा?’ महाराज दचकले. ‘कुठं आहेत? केव्हा आले?’

‘थोडा वेळ झाला. सदरेवर आहेत.’

राजांनी अनाजींकडे पाहिले. ‘चला, अनाजी! भूपाळगडाला वेढा असता फिरंगोजी कसे आले?’

राजे भरभर चालत होते. पाठोपाठ अनाजी, जेधे होते. राजे सदरेत आले. फिरंगोजी उभे राहिले. त्यांनी केलेल्या मुजऱ्याचा स्वीकार करून राजांनी विचारले,

‘फिरंगोजी, कुणाच्या जोखमीवर गड सोपवून आलात?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

फिरंगोजींचे पिकले कल्ले गालांवर थरारले. उतारवयाने आधीच पाणावलेली त्यांची नजर कातर बनली. फिरंगोजी धावले. त्यांनी राजांचे पाय धरले. तिकडे दुर्लक्ष करीत राजांनी विचारले,

'सांगा, फिरंगोजी! गड सोडून का आलात?'

'गड सोडावा लागला, महाराज!'

'मोगलांना गड दिलात?'

फिरंगोजींनी मान खाली घातली. राजे सुन्न होऊन फिरंगोजीकडे पाहत होते. राजे उफाळले.

'कुणाच्या हुकुमानं गड सोडलात?'

'युवराजांच्या आज्ञेनं!' फिरंगोजी बोलले.

'सांगा, फिरंगोजी, काय झालं?'

फिरंगोजींनी डोळे टिपले.

'काय सांगू, महाराज? दिलेरखान गडावर चालून आला. त्याच्या भीतीनं कसब्यातली गावोगावची माणसं आपल्या बायकांपोरांसहित गडाच्या आश्रयाला आली होती. गड मजबूत होता. गड लढविण्याची सर्व तयारी होती. दिलेरखानानं मोर्चे बांधले. त्याच्या तोफांना तसंच उत्तर किल्ल्यावरून मिळालं. लढाई निकराची चालली होती. आणि...'

'आणि काय झालं?'

'महाराज, आघाडीवर संभाजीराजे आले. युवराजांना पाहून सारं अवसान सरलं! युवराजांनी आज्ञा पाठविली : दरवाजा उघडावा! नाही तर शिरच्छेद करीन, सर्व लोक मारीन...'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आपला संताप आवरणे राजांना कठीण जात होते.

‘आणि म्हणून किल्ला दिलेरखानाच्या स्वाधीन केलात?’

‘जी!’

‘सांगा, फिरंगोजी, एकदा सारं सांगून टाका!’

‘युवराजांच्या हुकुमानुसार गड ताब्यात दिला. दिलेरखानानं दिल्या वचनाला बट्टा लावला. किल्ल्यात येताच आपल्या सातशे लोकांचे त्यानं हात तोडले. किल्ल्यात आश्रयाला आलेल्या बायकांपोरांची चीजवस्तू जप्त केली. तोफा डागून गड जमीनदोस्त केला!’

‘छान केलंत, फिरंगोजी! केवढा विश्वास होता तुमच्यावर! थोरल्या महाराजसाहेबांच्या वेळची तुम्ही जुनी माणसं, अनुभवी; आणि तुम्ही गड शत्रूहाती देऊन मोकळे झालात! काय केलंत हे!’

फिरंगोजींनी नजर वर केली. ते राजांना म्हणाले,

‘नाइलाज झाला, महाराज! चाकण भुईकोट किल्ला; शास्ताखानाबरोबर दोन महिने लढविला. तो भूपाळगड लढविणं काय कठीण होतं? सामोरे आले शंभूबाळ! त्यांच्यावर गोळा फेकण्याचं बळ कुठून येणार? राजे, गड दिला, आणि विठ्ठलपंतांबरोबर तडक आपल्या सामोरा आलो.’

‘आला नसतात, तरी बरं झालं असतं!’

दचकून फिरंगोजींनी राजांच्याकडे पाहिले.

‘महाराज...’

‘कोण आहे तिकडे?’ राजे ओरडले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

महालात भराभर ढालाईत धावले. फिरंगोजींच्याकडे बोट दाखवीत राजांनी आज्ञा केली,

'यांना जेरबंद करा! उद्या सकाळी सूर्योदयाबरोबर तोफेच्या तोंडी द्या!'

फिरंगोजी पुढे धावले. राजे मागे सरकत होते. फिरंगोजींनी विनवणी केली,

'महाराज, क्षमा!... माझी काही चूक नाही.'

फिरंगोजींची ती केविलवाणी मुद्रा पाहून राजांच्या डोळ्यांत अश्रू साकळले. कठोर मनाने राजे बोलले,

'फिरंगोजी, चूक तुमची नाही. चूक घडल्यावरच शिक्षा होते, हे कुणी सांगितलं? फिरंगोजी, चूक तुमच्या-आमच्या नशिबाची आहे! आतड्यांचा पीळ सुटत नाही; आणि राजकारण भावना जाणीत नाही. तुमचं अनुकरण चारचौघांनी केलं, तर स्वराज्याच्या वावड्या आकाशात भिरभिरायला फारसा वेळ लागायचा नाही. आपण माणसांशी इमानी नसतो, राज्याशी असतो, हे साऱ्यांना कळायला हवं... बघता काय? घेऊन जा यांना!'

राजे पाठमोरे उभे राहिले.

हुंदके देणाऱ्या फिरंगोजींना सदरेवरून नेण्यात आले. राजे वळले. अनाजी-बाळाजींचा भीतीने थरकाप झाला होता. बाळाजी धीर करून म्हणाले,

'महाराज!'

पण ते पुढ बोलायच्या आतच राजांनी आज्ञा केली,

'बाळाजी! साऱ्या गडांवर तातडीनं हुकूम पाठवा... मोगली मनसबदार बनून खुद्द संभू भोसला जरी गडावर आला, तरी तोफा डागण्यात कुचराई होऊ देऊ नका! कुचराई झाली, तर मुलाहिजा राखला जाणार नाही.'

❑

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

२

फिरंगोजी नरसाळ्यांना दिलेल्या शिक्षेने सारा गड थक्क झाला. पागेत, शिलेदारांत, ढालाइतांत कुजबूज सुरू झाली. फिरंगोजी नरसाळ्यांना राजे किती मानीत, हे साऱ्यांनी पाहिले होते. तेच फिरंगोजी उद्या तोफेच्या तोंडी जाणार, या कल्पनेने साऱ्यांची मने कातर बनली होती. राजसदरेचा फड अस्वस्थ होता.

राजांच्या महालात जाण्याचे कुणाला धैर्य नव्हते. राजे एकटेच महालात बसून होते. महालात सोयराबाई जाऊनही काही उपयोग झाला नव्हता. राजांनी जेवण घेतले नव्हते. 'घ्या' म्हणायचे सामर्थ्य कुणाच्या ठायी नव्हते. राजे महालात बसून होते. त्यांच्या डोळ्यांसमोरून फिरंगोजी हलत नव्हते. पळापळांनी वेळ सरत होती.

दोन प्रहर टळत आली होती. महालाबाहेर चाललेले बोलणे राजांच्या कानांवर पडले. राजांनी विचारले,

'कोण आहे?'

महादेव आत आला. त्याने सांगितले.

'अनाजीपंत आले आहेत.'

'पाठव.'

अनाजी महालात आले. त्यांनी वर्दी दिली,

'धाकट्या राणीसाहेब आल्या आहेत.'

'इथं?'

'जी!'

'केव्हा?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आत्ता हेच गडावर मेणा येताना दिसला.’

पुतळाबाई? आणि वर्दी न देता, तातडीने गडावर कशा आल्या?

अनाजी जसे आले, तसे महालाबाहेर गेले. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.

थोड्याच वेळात पुतळाबाईंनी महाली प्रवेश केला. राजांनी काळजीने विचारले,

‘राणीसाहेब, या वेळी बऱ्या आलात?’

‘चैन पडेना. यावं लागलं.’

‘ते बरं?’

‘फिरंगोजी काकांना तोफेच्या तोंडी द्यायची आज्ञा केलीत, म्हणे!’

एकदम राजांच्या सर्व ध्यानी आले.

‘हो.’

‘शिक्षा अमलात आणली जाणार?’

‘अमलात न येणाऱ्या शिक्षा आजवर आम्ही दिल्या नाहीत.’

‘असा काय गुन्हा घडला?’

राजे उद्वेगाने हसले. ते पुतळाबाईंच्याकडे पाहत होते. पुतळाबाईंच्या वेषावरून त्या तातडीने आलेल्या दिसत होत्या. रोजच्याच वापरातले लुगडे त्यांच्या अंगावर दिसत होते. अंगावर दागिने दिसत नव्हते. त्या साध्या वेषातही त्यांचे रूप पाहत राहावे, असे राजांना वाटत होते. सोयराबाई रूपसंपन्न होत्या. सौंदर्याच्या खुणा त्यांच्यांत सामावल्या होत्या. पुतळाबाई त्या मानाने सावळ्या; पण त्या सावळ्या रूपातही तेज होते. डोळे मोठे बोलके आणि सुंदर होते. त्या नजरेत एक वेगळीच हुकुमत प्रकटली होती. उंच मान मुळातल्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

उंच बांध्याला शोभा देत होती. प्रौढत्वातही ते रूप राजांच्या मनाला प्रसन्न करीत होते. राजांची नजर आपल्यावर खिळल्याचे पाहून पुतळाबाईंनी विचारले,

‘असा काय गुन्हा घडला?’

राजे त्या प्रश्नाने भानावर आले. क्षणभर सुखात रेंगाळलेले त्यांचे मन परत उद्विग्न झाले.

‘त्यापेक्षा कोणता गुन्हा घडला नाही. ते विचार ना!’

‘पण फिरंगोजींचा काय दोष? शंभूबाळ सामोरे आले...’

‘किती वेळा ते नाव घेणार आहात?... शंभूबाळ सामोरे आले, म्हणून का गड शत्रूच्या ताब्यात द्यायचा? फिरंगोजी अनुभवी. ही आपली माणसं. शत्रूला गड देऊन मोकळे झाले! त्यांना शिक्षा करण्याखेरीज आमच्या हाती काय आहे?’

‘याखेरीज दुसरी कसलीच का शिक्षा नाही?’

‘पुतळा! देशद्रोहाइतका दुसरा मोठा गुन्हा नाही. दुसरी कोणती शिक्षा देणं योग्य असतं, तर ती आम्ही फिरंगोजींना दिली नसती का?’

‘साऱ्यांना हीच शिक्षा दिली जाते का?’ पुतळाबाईंनी थंडपणे विचारले.

‘अलबत!’ राजे कठोर होऊन बोलले.

‘शंभूबाळ परत आले, तरी?’

राजे पुतळाबाईंच्याकडे ताठरलेल्या नजरेने पाहत राहिले. त्या कल्पनेनेही त्यांचा जीव घाबरा झाला.

‘पुतळा!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘तेच म्हणते मी! शंभूबाळांना ही शिक्षा दिली जाणार नसेल, तर विचार व्हावा. ही शिक्षा अमलात आणली गेली, आणि नंतर ती त्याच अपराधासाठी देता आली नाही, तर विनाकारण आयुष्यभर पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. तेवढंच सांगण्यासाठी मी गडावर आले होते.’

पुतळाबाई जशा आल्या, तशा निघून गेल्या. राजे बराच वेळ तसेच उभे होते. महालात एकटे आहोत, याची जाणीव त्यांना झाली. त्यांचे मन बेचैन होऊन उठले. त्यांनी हाक मारली.

महादेव आत आला.

‘जी?’

‘राणीसाहेब आल्या होत्या?’

‘जी.’

‘गेल्या?’

‘जी.’

‘बाहेर कोण आहे?’

‘अनाजी आहेत.’

‘पाठव त्यांना.’

अनाजी महाली आले. राजांनी विचारले,

‘अनाजी, राणीसाहेब गेल्या?’

‘जी, महाराज. गडाखाली जायला हवं, असं त्या म्हणाल्या.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे हसले. ‘ठीक आहे, अनाजी! साऱ्यांना मनं आहेत! साऱ्यांना काळजी आहे! आम्हांला पण तसंच मन आहे, यावर मात्र कोणाचा विश्वास नाही. जा तुम्ही.’

अनाजींनी धीर करून विचारले,

‘फिरंगोजींनी शिक्षा....’

अनाजींकडे न पाहता राजे म्हणाले, ‘अमलात आणली जाईल.’

कष्टी मनाने, झुकल्या मानेने अनाजी महालाबाहेर पडले.

□

३

गडावर रात्र उतरली. राजे पलंगावर जागेपणीच पडले होते. महालात मंद समयांचा उजेड होता. राजांना झोप येत नव्हती. मन बेचैन होते. पडल्या जागेवर राजे तळमळत होते. मध्यरात्रीनंतर केव्हा डोळा लागला, ते त्यांना कळले नाही.

भल्या पहाटेच्या सुमारास राजांना एकदम जाग आली. राजांना घाम आला होता. जीव गुदमरल्यासारखा वाटत होता. राजे उठले. राजांची जाग लागताच महादेव आत आले.

‘महादेव, जरा पाणी देतोस?’

‘जी.’

महादेवने पाण्याच्या सुरईतून पाणी घेतले. पेला राजांच्या हाती दिला. समोर धरलेल्या चांदीच्या तस्तात राजांनी चुळा टाकळ्या. त्या गार पाण्याने राजांना बरे वाटले. पाणी पिऊन राजांनी विचारले,

‘पहाट झाली का, रे?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी, नाही.’

‘ठीक आहे. जा तू.’

राजे परत कलते झाले. राजांचे विचार सैरावैरा धावत होते. त्यामुळे महालाची शांतता असह्य होत होती. नजरेसमोरून फिरंगोजी हलत नव्हते.

फिरंगोजी! स्वराज्याचा किल्लेदार. मासाहेबांच्या एका शब्दाखातर त्यानं चाकणचा किल्ला स्वराज्यात सामील केला. भगवे निशाण चाकणवर चढवले, तेव्हा राजे फिरंगोजींना म्हणाले होते,

‘फिरंगोजी! आम्हांला नुसता गड नको; गडाइतकी बळकट माणसंही हवीत. आम्हांला तुम्ही हवे.’

-आणि फिरंगोजी स्वराज्यात सामील झाले.

राजांनी कूस बदलली.

शास्ताखानाने चाकणला वेढा घातला. मोगली फौज एवढी मोठी; पण फिरंगोजींनी चाकणचा किल्ला दोन महिने भांडवला. शर्थीची लढत दिली. भुयारे खणून तट उडवावे लागले, तेव्हाच शास्ताखानाला विजय दिसला. खानाला सुद्धा फिरंगोजींचे कौतुक केल्यावाचून राहवले नाही. फिरंगोजींना खानाने वतन, मोलाची चाकरी देऊ केली; पण फिरंगोजी गेले नाहीत. स्वराज्याशी बेइमानी करणारी ती जात नव्हे!

राजांना चैन पडेना. राजे उठले, महालात येरझाऱ्या घालीत राहिले. राजे उत्तरेच्या खिडकीपाशी गेले. वाऱ्याचा मागमूसही नव्हता. सारे कसे बाहेरच्या काळोखासारखे शांत होते. गडाच्या दिवट्या त्या काळोखात भयाण वाटत होत्या. ते पाहणे सुद्धा राजांना नको वाटत होते. राजे माघारी वळले; पण विचार वळेनात.

फिरंगोजी! केवढा आधार वाटायचा! अडचणीची वेळ असली, संकटाचे दिवस असले, की फिरंगोजींची आठवण यायची. त्यांना गडाच्या रखवालीसाठी ठेवून संकटांना सामोरे जाताना केवढं बळ येई! आमच्या विजयानं म्हाताऱ्याचे ओठ हसायचे; आम्हांला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काटा टोचला, तरी डोळी पाणी यायचं.

राजांनी आवंढा गिळला.

काय केलं, फिरंगोजी! कसा विवेक ढळला?

राजे भरभर येरझाऱ्या घालीत होते. हात पाठीवर जखडले होते. पहाटेची पांढरी कड पूर्वक्षितिजावर धरली होती. गार वाऱ्याची एक झुळूक महालात शिरली. त्या झुळुकेने पडदे थरारले.

माया! कसली वेडी माया! त्या भरात केवढा मोठा गुन्हा करतो, याची जाणीव होऊ नये? म्हणे, समोर युवराज आले...! संभाजीराजे आले, आणि फिरंगोजी असले, म्हणून काय झालं? गुन्हा तो गुन्हाच! राजकारण भावना जाणीत नाही. फिरंगोजी...

उजाडू लागले होते. धरणी जागी होत होती. पक्ष्यांची चिवचिव वाढत होती. वारा अखंड वाहत होता...

माणसानं भावना जाणायची नाही, तर काय करायचं? शंभूबाळ गडाच्या सामोरे दिसले असतील, तेव्हा फिरंगोजींचं काय झालं असेल? पाठीचा घोडा करून ज्यांनी संभाजीराजांना बाळपणी खेळविलं, तो जीव त्याच पोरावर तोफेचा गोळा फेकील कसा? आपण असतो, तर ते जमलं असतं?

राजे भराभर पावले टाकीत खिडकीजवळ गेले. बाहेर प्रकाश फाकला होता. पूर्वक्षितिज उजळून निघाले होते. राजांची नजर टकमकटोकाकडे गेली; आणि त्यांच्या छातीत धस्स झाले!

टकमकटोकाकडे माणसे चालली होती. कोकणदिव्याकडे तोंड करून उभी असलेली पितळी तोफ नजरेत येत होती. राजांचे ओठ थरथरत होते. त्यांची नजर पूर्वक्षितिजावर खिळली.

आज सूर्य उगवला नाही, तर किती बरं होईल?

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कसली भीती वाटते?

राजकारण भावना जाणीत नाही; फक्त कर्तव्य जाणते, कर्तव्य!...

'शंभूबाळ हाती मिळाले, तर हीच शिक्षा दिली जाईल का?'

राजांनी घाम टिपला. श्वास जोराने सुरू झाला.

'ही शिक्षा दिली जाणार नसेल, तर विचार व्हावा. फिरंगोजींची शिक्षा अमलात आली आणि नंतर तीच शिक्षा त्याच अपराधासाठी दुसऱ्याला देता आली नाही, तर...

'तर... विनाकारण आयुष्यभर पश्चात्ताप करावा लागेल.'

'पुतळा!' राजे पुटपुटले. त्यांची नजर खिडकीबाहेर गेली. बाहेर चांगलाच उजेड फाकला होता. पूर्वक्षितिजाला रक्तिमा पसरला होता. राजांचे सारे अवसान सरले. ते धावत सुटले.

महालातून अनवाणी पावलांनी राजांना धावताना पाहून पाहरेकरी चकित झाले. राजे कातळ पार करून होळीचौकात आले. सूर्योदयाची वेळ नजीक आली होती. राजे बेभानपणे टकमकटोकाकडे धावत होते. राजे दारूखान्याच्या इमारतीपाशी आले. राजे हात उंचावीत बेभानपणे ओरडले,

'थांबा ऽ ऽ थांबा ऽ ऽ ऽ'

साऱ्यांची नजर राजांच्याकडे गेली. पूर्वक्षितिजाकडे सूर्योदयाची वाट पाहत उभे असलेले सारे राजांना पाहून चकित झाले. चकाकणाऱ्या पितळी तोफेच्या तोंडाला फिरंगोजी जखडलेले होते, फिरंगोजी शांतपणे उभे होते. हाती मशाल धरून मशालजी तोफेच्या मागे उभा होता. साऱ्यांची नजर राजांच्यावर खिळली होती. राजे त्या चिंचोळ्या वाटेवरून धावत आले. धापा टाकीत राजे तोफेच्या समोर आले. नजीक उभ्या राहिलेल्या ढालाइताच्या कमरेची कट्यार त्यांनी हाती घेतली. दात-ओठ आवळून कचाकच बंध तोडले. फिरंगोजी ते पाहत होते. आजवर त्या माणसांनी अनेक थोर दृश्ये पाहिली होती. पण समोरच्या दृश्याने त्यांच्या मनाचे बांध फुटले. राजांची ती धाप लागलेली मूर्ती रुंद

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

भरदार छातीची होणारी हालचाल, मानेवर विस्कटलेले केस, कपाळीचा डवरलेला घाम...

देवाचे रूप यापेक्षा काय वेगळे असते?

फिरंगोजींचे बंध तुटले, तसे राजे धापा टाकीत उभे राहिले. राजांची नजर त्या वयोवृद्ध, तपोवृद्ध, पितृतुल्य फिरंगोजींवर स्थिरावली- डोईची ती मराठमोळी पगडी, चेहऱ्यावर सुरकुत्यांची जाळी, अश्रूंनी डबडबलेली नजर, भावनाविवशतेने थरथरणारे कानांवरचे पांढरे कल्ले. फिरंगोजी पुढे येत म्हणाले,

'महाराज! कशाला धाव घेतलीसा? पिकलं पान कवा तरी गळून पडायचं. टकमकीवरून उडालं असतं, तरी जाताना आशीर्वादच दिला असता, न्हवं?'

त्या बोलांनी राजांचा संयम सुटला. गालांवरून अश्रू ओघळले. फिरंगोजींना मिठी मारीत राजे म्हणाले,

'फिरंगोजी! आम्ही काय करू...? काय करू...?'

□

४

राजांचे मन अखंड चिंतेत असतानाच अनेक बातम्या गडावर येऊन थडकत होत्या. राजांची पत्रे शृंगारपूरला रवाना होत होती. राजांच्या फौजा सर्व मुलुखात फिरत होत्या. आनंदरावांनी बाळापूर घेतल्याच्या बातमीने जसे राजांना समाधान वाटले, तसेच दिलेरखानाचा रोख विजापूरकडे वळल्याचे ऐकून त्यांचे मन बेचैन झाले.

उन्हाळा संपला; आणि पावसाला सुरुवात झाली. आकाश ढगांनी कुंदावले. काळ्या सावित्रीला पाणी चढले. सारी खोरी पावसाळी धुक्यात आणि अखंड पडणाऱ्या जलधारांत भिजू लागली. राजांचे मनही तसेच कुंदावले होते. प्रकृती ढासळत होती. कधी ताप, तर कधी खोकला. राजे या काळजीत असतानाच पावसाळा सरत आला. गडावर श्रावणाचे किरण फाकू लागले, कड्या-कपारींतून उगवलेल्या गवतावर रंगीबेरंगी फुले फाकू लागली. राजे सदरेवर येऊन बसू लागले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सायंकाळी राजे सदरेवर आले. मोरोपंतांनी सांगितले,

‘शृंगारपुराहून थैली आली आहे.’

‘काय आहे?’

‘शृंगारपूरची हवा मानवत नाही; तेव्हा राजस्नुषा येसूबाईसाहेब पन्हाळ्यावर जाणार आहेत. मेणे, शिबंदी पाठविण्याचा हुकूम आहे.’

‘येसू पन्हाळ्याला जाते?’ राजांचा चेहरा आनंदित झाला. त्यांनी आपल्या अंगावरची शाल भिरकावली.

‘अनाजी, मेणे-शिबंदी तातडीनं पाठवून द्या. पन्हाळ्याला पुढं खबर पाठवा. ‘आम्हांला ही बातमी ऐकून खूप समाधान वाटलं,’ असं कळवा.’

राजांना कशाचा आनंद झाला आहे, हे अनाजींना कळत नव्हते. त्या बातमीत असे काय होते, की राजांनी एवढा आनंद व्यक्त करावा?

अनाजींचा गोंधळ राजांच्या लक्षात आला. ते स्वत:ला सावरीत बोलले,

‘अनाजी, शृंगारपूरची हवा दमट. लहान भवानीला ती सोसवणारी नव्हे. पण येसूनं आमचं ऐकलं, त्याचंच समाधान वाटतं.’

राजांच्या उत्तराने अनाजींचे समाधान झाले नाही; पण त्यांनी अधिक न विचारता मान तुकविली. गडावर ती बातमी आली, आणि राजे बदलले. राजे कामकाजांत लक्ष घालू लागले. उघडीप पाहून राजे गडावर फिरू लागले.

राजांना जंजिऱ्याच्या बातम्या कळत होत्या. इंग्रजांचे मुंबईला वाढणारे महत्त्व राजांना जाणवत होते. त्यांनी दर्यासारंग दौलतखान व मायनाक भंडारी यांना बोलावून घेतले.

राजांनी आजवर सिद्दीचा पराभव करण्याचे अखंड प्रयत्न चालू ठेवले होते; पण सिद्दीचा पराभव होत नव्हता. सिद्दीला सदैव इंग्रज मुंबईहून साहाय्य करीत होते. त्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मदतीमुळे राजांचे स्वप्न साकार होत नव्हते. राजांना मुंबईचा व जंजिऱ्याचा हा संबंध तोडण्याचे ठरविले. मायनाक भंडारी हा खांदेरीचा राजांचा अधिकारी होता. राजांनी त्याला खांदेरीला तट बांधून घेण्याचा हुकूम केला. खांदेरी-उंदेरी तट, तोफा व फौज यांनी सज्ज ठेवण्याचा राजांनी निश्चय केला. दर्यासारंग दौलतखानाला या कामी मायनाक भंडारीला सर्व मदत व रक्षण करण्याची आज्ञा केली.

राजांनी खांदेरीची तटबंदी सुरू केली; आणि दिलेरखान विजापूरला भिडल्याची बातमी आली. विजापूरच्या मसूदचे डोळे उघडले. मोगली तडाख्यातून वाचविण्यास राजांच्या खेरीज दुसरे समर्थ कोण होते? मसूदने राजांना आदिलशाही वाचविण्याची विनंती केली. मसूदचा खलिता रायगडावर येऊन थडकला.

राजांनी मसूदची विनंती मान्य केली. त्यांनी सत्वर दहा हजारांची फौज विजापूररक्षणासाठी रवाना केली. खर्चासाठी मसूदला पैशाचा पुरवठा केला. आपल्या फौजेपाठोपाठ आपण जातीनिशी विजापूरला येत असल्याचे राजांनी कळविले.

उसंत न घेता राजांनी रायगड सोडला; आणि राजे पन्हाळ्याला आले. येसूबाई पन्हाळ्याला आल्या होत्या. येसूबाईंना भेटताच राजांनी विचारले,

‘येसू, काही खबर?’

‘अभय मिळालं, तर....’

‘संभाजीराजांना कसली भीती? भीती आम्हांला! त्यांना ‘निर्धास्त मनानं या,’ म्हणावं. आम्ही तो विचार आता करीत नाही. तुझ्यामुळं मी निश्चिंत आहे. जेव्हा तू पन्हाळ्याला आलीस, तेव्हाच आम्ही निश्चिंत झालो.’

येसूबाई राजांच्याकडे पाहत होत्या. राजे किती तरी थकल्यासारखे दिसत होते.

‘आबासाहेब, आपण मोहिमेला जाणार?’

‘हो. जायला हवं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आपली तब्येत ....नाही गेलं, तर चालणार नाही का?’

राजे स्वत:शीच हसले. ते म्हणाले,

‘म्हातारपणी सुखाची स्वप्नं धरीत असतानाच संभाजीराजे मोगलांना मिळाले. ते असते, तर त्यांना मोहिमेवर पाठविलं असतं. दैवाचे खेळ भारी विचित्र असतात, पोरी! बघ ना, आदिलशाही वाचविण्यासाठी बाप जातो, आणि ती बुडविण्यासाठी दुसऱ्या बाजूनं मुलगा येतो. यापेक्षा कैक वेळा मृत्यू बरा वाटतो!’

‘आबा!’

‘घाबरू नको, येसू! आम्ही ठीक आहो. घरच्या बसल्या जागेच्या चिंतेपेक्षा रणांगणाची हवाच आमची तब्येत सुधारील.’

राजांनी पन्हाळ्याला पुरा बंदोबस्त ठेवला, संभाजीराजे आश्रयाला आले, तर त्यांची बडदास्त ठेवण्याचे हुकूम किल्लेदारांना दिले; आणि आपली पंचवीस हजारांची फौज संगती घेऊन राजे विजापूररक्षणासाठी धावले.

□

५

राजे आपल्या फौजेसह विजापूर जवळ करीत होते. राजांना वाटेत मोरोपंतही आपल्या फौजेसह येऊन मिळाले. राजे विजापूरनजीक गेले. राजांनी पुढे पाठविलेली फौज दिलेरखानाशी लढा देत होती. राजे आल्याचे ऐकून मसूदला धीर आला. राजांनी विजापुरात जाऊन बादशहा सिकंदर आदिलशहाची भेट घेण्याचे ठरविले. तसे त्यांनी विजापूरचा वजीर मसूद याला कळविले. मसूदला राजांची मदत हवी होती. पण फौजेसह राजांना विजापुरात घेणे त्याला धोक्याचे वाटले. त्याने राजांना निरोप पाठविला :

‘आपल्या येण्यानं आम्हांला धीर आला आहे. आपल्याला भेटण्यात बादशहांना आनंदच वाटेल. आपण जरूर यावं; पण येताना पाचशेहून अधिक स्वार बरोबर न आणावेत, ही विनंती आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मसूदचा निरोप राजांच्या छावणीवर मिळाला. राजांनी विजापूरला जायचे ठरविले. पण मोरोपंत म्हणाले,

‘महाराजांनी परत विचार करावा.’

‘मोरोपंत, स्पष्ट बोला ना.’

‘महाराज, दिलेरच्या परचक्रामुळं मसूद काकुळतीला आला असला, तरी आजवर चालत आलेलं आपलं वैर तो विसरला आहे, याचा भरोसा नाही. दगा करायलाही तो मागं-पुढं पाहणार नाही. हा धोका न पत्करता ही मोहीम चालवावी, असा माझा नम्र सल्ला आहे.’

राजांना तो विचार पटला. त्यांनी भेटीचा बेत रद्द केला; आणि बादशहाला मदतीचे आश्वासन देऊन राजे मोहिमेकडे वळले. दिलेरखानाचा विजापूर घेण्याचा निश्चय होता. त्याच तयारीने तो विजापूरच्या तटाला भिडण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्यावर सरळ चालून जाण्यात राजांना अपार प्राणहानी दिसत होती. त्याखेरीज राजांना आणखीन एक भीती वाटत होती. दिलेरखानाजवळ एक हुकमी चाल होती. युवराज संभाजीराजे दिलेरच्या हाती होते. दिलेरने त्यांनाच आघाडीवर टाकले, तरी मराठी फौज लढेल; पण किती शर्थीने? राजांना तो धोका नको होता. त्यांनी निराळाच डाव खेळायचे ठरविले.

राजांना आपली फौज दिलेरची रसद तोडण्यास पाठविली. दिलेरखानाच्या पाठीमागे मोगलांच्या मुलुखात उतरून सर्वत्र फौजा पसरून दिलेरखानाला त्रस्त करावे, हा राजांचा बेत होता. तो अमलात आणण्यासाठी राजे पाचच दिवसांत विजापुराहून बाहेर पडले.

राजांची फौज भीमा नदी उतरून मोगलाईत घुसली. राजे मोगलाईचा मुलूख बेचिराख करीत चालले. आनंदराव माण, सांगोले या प्रांतावर चालून गेले. राजे स्वत: जालन्याच्या रोखाने जात होते. औरंगाबादेला दक्षिणेचा सुभेदार शहाजादा मुअज्जम होता. औरंगाबादेपासून नजीक असलेल्या जालन्यावर मराठी फौज तुटून पडली. जालना साफ लुटले गेले. मोगलाईतील चौफेर चढाईने शहाजादा त्रस्त झाला. त्याने दिलेरखानला सत्वर माघारी वळण्याचा लकडा लावला. चारही बाजूंनी दिलेरखानाला ओढ लागतच होती. शेवटी कंटाळून त्याने विजापूरचा वेढा उठविला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे जालन्याची लूट घेऊन माघारी येत होते, तोच नजरबाजांनी खबर आणली- वाटेत रणमस्तखान, आसफखान, जाबीतखान वगैरे मोगल सेनानी आपल्या आठ-दहा हजार फौजेनिशी वाट अडवून उभे होते. राजांच्या बरोबर अपार लूट होती. अखंड मोहिमेत फौज दमली होती. राजांचा गुप्तहेरप्रमुख पुढे झाला. राजांना त्याने सांगितले,

'महाराज, मोगलांची गाठ न पडता जाता यील.'

'ते कसं?'

'ती जिम्मेदारी माझी!'

बहिर्जी आपल्या नजरबाजांच्या बरोबर राजांना वाट दाखवीत होता. राजे फौजेसह जात होते. तीन दिवस शत्रू चुकवीत राजे लुटीसह पट्टागडावर पोहोचले. राजांनी बहिर्जीची वाहवा केली.

आधीच राजांची प्रकृती ठीक नव्हती. मोहिमेच्या शिणवट्याने ती अधिक थकली.

राजांनी मोरोपंतांना मोहिमेला पाठविले. बागलाण आणि खानदेश या भागांतील मोगली किल्ले जिंकण्याची कामगिरी घेऊन मोरोपंतांनी मोहिमेची धडक मारली. धरणगाव, चोपडा लुटीत मोरोपंत सुरतपर्यंतचा मुलूख मारून परत आले. राजांनी पंधरा दिवस गडावर मुक्काम केला, विश्रांती घेतली. ज्या गडाने दगदगीच्या, संकटाच्या वेळी राजांना विश्रांती मिळवून दिली, त्या पट्टागडाचे नाव राजांनी 'विश्रामगड' ठेविले.

राजे सर्व लूट घेऊन गडाकडे परत येत होते, त्या वेळी मोरोपंत मुलुखगिरी करीत होते. त्यांनी अहिवंत व नाहवा हे बागलाणातील किल्ले जिंकले, चौथाईचे करार केले. हणमंतगड काबीज केला. राजे लुटीसह गडावर परत आले. गडावर एक आनंदाची बातमी राजांची वाट पाहत होती-

संभाजीराजे मोगलांना सोडून पन्हाळ्यावर येऊन दाखल झाले होते.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

६

संभाजीराजे पन्हाळ्याला आल्याचे ऐकून राजांना समाधान वाटले. एका नामुश्कीतून वाचल्याचा आनंद साऱ्या गडाला झाला. संभाजीराजे परत आल्याचे ऐकून राजांना जे समाधान होते, त्याच्या शतपट त्यांची काळजी वाढली होती. दोन दिवस राजे विचारात होते. तिसऱ्या दिवशी राजांनी खास सदर भरवली. सदरेत फक्त हंबीरराव, अनाजी, मोरोपंत, बाळाजी आवजी, येसाजी, फिरंगोजी, पानसंबळ, हरजीराजे महाडीक एवढीच मंडळी होती. सदरेत अन्य कोणास न सोडण्याचा हुकूम झाला होता.

राजांनी सर्वांवरून आपली नजर फिरविली. काही क्षण स्तब्धतेने गेले. राजांनी अनाजींना विचारले,

‘अनाजी, आज ही बैठक का बोलावली, याची कल्पना असेलच.’

‘जी! नाही, महाराज!’

‘निदान अंदाज तरी?’

‘मला वाटतं, युवराजांच्या बाबतीत...’ अनाजी चाचरले.

‘तेच खरं, अनाजी, युवराज परत आपल्यांत आल्याचं ऐकून आम्हांला खूप आनंद झाला; पण त्याचबरोबर आमची काळजीही वाढली. तिच्यामुळं आम्ही दोन दिवस पुरे बेचैन आहो. युवराज आले; पण त्यांचा सिलसिला कसा सोडवायचा, याचा विचार व्हायला हवा. त्याचा निर्णय लावण्यासाठीच आज तुम्हांला बोलावलं आहे.’

सारे एकमेकांकडे पाहत होते. साऱ्यांच्याच मनांत तो विचार घोळत होता. साऱ्यांचे भाव निरखून राजे म्हणाले,

‘युवराज राज्य संभाळतील, असं वाटत नाही. कोणत्या क्षणी अविवेकी निर्णय करतील, याचा भरोसा नाही.’

हंबीरराव पुढे झाले. ते म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘क्षमा, महाराज!’

‘बोला, हंबीरराव. मोकळेपणानं बोला.’

‘महाराज, संभाजीराजे युवराज आहेत, थोरले आहेत. त्यांच्या अधिकाराबद्दल शंका घेणार?’

राजे खिन्नपणे हसले. एक तीव्र दुःखाची छटा त्यांच्या चेहऱ्यावर उमटली. ते म्हणाले,

‘हंबीरराव, तुम्ही आमचे सेनापती. तुमची निष्ठा आम्हांला कळते. पण अशीच भाबडी निष्ठा राहिली, तर एक ना एक दिवस ती अनर्थकारक ठरेल. राज्याला ती अपायकारक ठरल्याखेरीज राहणार नाही.’

‘काय चुकलं, महाराज?’

‘खूप चुकलं! तुम्ही फक्त आम्हांला पाहिलंत. त्यामुळं युवराज दिसले; आणि या गलतीत राज्य विसरून गेला. फिरंगोजींनी हीच चूक केली; आणि शेकडो इमानी माणसं आयुष्यातून उठली.’

‘युवराजांना संधी मिळाली, तर ते सुधारतीलही. आता त्यांना पश्चात्ताप झाला असेल.’ हंबीररावांनी तरफदारी केली.

‘ ‘असेल, होईल,’ याला काय अर्थ? हंबीरराव, विस्तवावर अजाणतेपणी बोट पडलं, तरी ते होरपळतंच. अजाणपण तिथं उपयोगी पडत नाही. आमचं एकट्याचंच जीवन असतं, तर आम्ही याचा विचारही केला नसता. पण एवढं मोठं राज्य.... त्याच्याशी जुगार कसा खेळायचा?’

‘युवराजांचा राज्यावर जन्मजात अधिकारच आहे. तो कोण डावलणार?’ हंबीररावांनी विचारले.

‘हंबीरराव, तुम्ही परत परत तीच गलती का करता?’ राजे उद्वेगाने म्हणाले. ‘तुम्ही राज्याचे सेनापती आहात; राजांचे नव्हे. राज्य कुणाचं, हंबीरराव? श्रींचं हे राज्य! वतनाची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मिरासदारी चालविण्याकरिता का आम्ही राजे झालो? भारतात हिंदूंचं राज्य नाहीसं झालं, म्हणून गागाभट्टांनी आम्हांला विनंती केली, त्या विनंतीनुसार आम्ही राज्याभिषेक करून घेतला. हे राज्य त्याच निष्ठेनं आमच्या मागे सुद्धा चालायला हवं.'

'हा विचार आज कशाला करायचा?' अनाजी म्हणाले.

'अनाजी, हा विचार आत्ताच व्हायला हवा. युवराजांच्या वर्तनानं आम्ही सावध झालो. जो विचार आजवर आमच्या मनात आला नव्हता, तो रात्रंदिवस आम्हांला छळीत आहे. अनाजी, ह्या राज्यापायी हजारोंनी आपले जीव आनंदानं सांडले आहेत. ते स्वप्न साकार व्हावं, म्हणून अनेक साधुसंतांनी देवाला आळविलं आहे. जिवाचा भरोसा कोण देणार? आम्ही आज आहो, उद्या नसू. एवढी मोठी जबाबदारी! तिचा विचार उघड्यावर टाकून चालणार नाही. आम्ही पन्हाळ्याला जायच्या आत आधी याचा निर्णय मिळायला हवा.'

'निर्णय आपण करायचा! आम्ही काय सांगणार?' मोरोपंत म्हणाले.

'वा, मोरोपंत! तुम्ही आमचे प्रधान; आणि तुम्ही हे बोलता? राज्याभिषेकापासून आम्ही सारे निर्णय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानंच केले ना?'

मोरोपंत उपरणे सावरीत म्हणाले,

'युवराज जेव्हा पन्हाळ्यावर आले, तेव्हा आमच्याही मनात विचार आले. नाकबूल करून चालणार नाही. युवराज एवढं राज्य जबाबदारीनं संभाळतील, असं आम्हांला वाटत नाही. पण असं जरी आम्हांला वाटत असलं, तरी आम्ही आपल्या आज्ञेबाहेर नाही. याचा निर्णय आपणच करावा, असं आम्हांला वाटतं. तेच अधिक योग्य होईल.'

राजे समाधानाने म्हणाले,

'आमची तुमच्याकडून हीच अपेक्षा होती. तुम्ही स्पष्टपणे आपले विचार सांगितलेत, याचं आम्हांला समाधान आहे. जिंजीला मिळविलेलं राज्य संभाजीराजांना द्यावं, आणि इथलं राज्य तुमच्या देखरेखीखाली राजारामांच्या हाती सोपवावं, असा आमचा विचार आहे.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या त्या निर्णयाने साऱ्यांना आनंद वाटला. साऱ्यांनी त्या बेताला मान्यता दिली. राजे खेदाने म्हणाले,

'काही नसता आम्ही करोड होनांचं राज्य उभं केलं, ते त्या राज्याची अशी शकलं करण्यासाठी? त्याचं शल्य आम्हांला फार आहे... जाऊ दे! आम्ही पन्हाळ्याला जातो. संभाजीराजे आमचं ऐकतील, असं वाटतं. त्यांची समजूत काढून माघारी आल्यावर सर्व निश्चित करू.'

थकलेले राजे बैठकीवरून उठले. साऱ्यांनी मुजरे केले. राजे मंद पावलांनी सदरेबाहेर जात होते.

□

७

थंडीच्या दिवसांत राजे आपल्या अश्वपथकांनिशी पन्हाळ्याची वाटचाल करीत होते. राजे पालखीतून जात होते. मागे-पुढे अश्वपथके चालत होती. राजांच्या आगमनाची वर्दी पुढे गेली होती.

दोन प्रहरच्या वेळी राजे आपल्या अश्वपथकांनिशी आले. दोन प्रहर असूनही गारवा जाणवत होता. पन्हाळ्याच्या पायथ्याशी राजे पालखीतून उतरले, आणि आपल्या घोड्यावर स्वार झाले. चारदरवाजापाशी येताच राजांचे घोडे आवरले गेले. सामोरे आलेल्यांच्यावरून त्यांची नजर फिरली. राजांनी किल्लेदारांना विचारले,

'संभाजीराजे कोठे आहेत?'

'वाड्यात आहेत, महाराज.'

त्या उत्तराने राजांचे साशंक मन स्थिरावले. राजे सज्जाकोठीकडे वळले. पुढे गेलेले हंबीरराव सज्जाकोठीजवळ उभे होते. सज्जाकोठीत प्रवेश करीत असता राजांनी हंबीररावांना विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हंबीरराव, तुमचे युवराज काय म्हणतात?’

‘महाराज, वय लहान. भावनेच्या भरात फार मोठी चूक केली, याचा त्यांना पश्चात्ताप होतो आहे.’

‘आणि आमची येसू, भवानी काय म्हणते?’

‘काळजीचं काही कारण नाही.’

‘खरंच, आता काळजीचं काही कारण उरलं नाही. तुम्ही वाड्यात जा. संभाजीराजांना सांगा... आम्ही येतो आहो, म्हणून.’

हंबीरराव गेले. राजे कपडे बदलून आले, तेव्हा सायंकाळच्या किरणांत गड उजळला होता. दाट झाडीतून तांबड्या जमिनीवर उतरलेली किरणे धूसर बनली होती. युवराजांच्या भेटीसाठी राजे पायीच निघाले.

राजे वाड्याच्या दाराशी आले; आणि त्यांची नजर आपल्या परिवारासह उभ्या असलेल्या संभाजीराजांच्याकडे गेली. संभाजीराजांनी पांढरा अंगरखा घातला होता. मस्तकी जिरेटोप होता. संभाजीराजे पुढे येऊन नेहमीप्रमाणे पाय शिवण्याऐवजी त्रिवार मुजरा करते झाले. त्या कृतीने राजे व्यथित झाले. नतमस्तक उभ्या असलेल्या संभाजीराजांना पाहून राजांनी आपले मन आवरले. ‘चला’ एवढेच बोलून राजांनी वाड्यात प्रवेश केला.

राजांच्या पाठोपाठ संभाजीराजे प्रथम चौकातून सदरेवर आले. राजे महालात आले. त्यांनी येसूबाईंची विचारपूस केली; आणि संभाजीराजांसह माडीवरच्या खास महालाकडे ते चालू लागले. माडीच्या सज्जातून गडाची हिरवी गर्द झाडी दिसत होती. सूर्य मावळला होता; आणि वाढणाऱ्या संध्याछायांत झाडीचा रंग गर्द बनत होता. गडावर हळुवार पावलांनी थंडी उतरत होती; पण राजांना त्याची जाणीव नव्हती. राजे एकदम वळले. त्यांची नजर सामोरे हात घेऊन उभे असलेल्या संभाजीराजांच्यावर खिळली.

‘संभाजीराजे, आम्ही मुलुखगिरीवरून परत आलो; आणि गडावर येताच तुम्ही आल्याचं समजलं. खूप आनंद झाला. मनावरचं दडपण नाहीसं झालं. उद्या संक्रांत ना! संक्रांतीच्या सुमारासच तुम्ही पर्वणी साधायला माहुलीला गेलात. आमच्याशी गोड न

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बोलता त्या वेळी आम्हांला विसरून आमच्याकडे पाठ फिरविलीत! पण एक वर्षानं का होईना, तुम्ही परत आलात, याचा आम्हांला आनंद आहे. आमची संक्रांत टळली. आमचं तोंड गोड केलंत!'

'आबासाहेब!'

'काय केलंत हे, संभाजीराजे? स्वकीयांच्यावर रागावून परकीयांचे पाय धरलेत?'

'आम्ही शरमिंदे आहोत.'

'काही सांगू नका. काही ऐकायचं त्राण आमच्यांत राहिलं नाही. वाढत्या यवनसत्तेला पायबंद बसावा, म्हणून हिंदवी स्वराज्याची आम्ही उभारणी केली; आणि खुद्द आमचे युवराज मोगलांना जाऊन मिळाले! आमच्या विरुद्ध चालून आले! सह्याद्री जिंकणं इतकं सोपं वाटलं? युवराज, जे हवं होतं, ते आम्हांला सांगायचं होतंत. ते आम्ही दिलं असतं.'

'नजरकैदेत?' संभाजीराजांनी धीराने विचारले.

राजांची नजर संभाजीराजांच्या नजरेला भिडली; पण संभाजीराजांची नजर झुकली नाही.

'नजरकैद! कशासाठी घडली, राजे? ती का आम्हांला हौस होती?'

'आम्हांलादेखील मोगलांना मिळण्याची हौस नव्हती!' संभाजीराजांनी सांगितले.

राजांना ते उत्तर येईल, असे वाटले नव्हते. ते संभाजीराजांच्याकडे पाहत राहिले. ती वैतागलेली संभाजीराजांची मूर्ती पाहून राजांचे मन हेलावले. ते म्हणाले,

'शंभूबाळ, सरळ विचार कधीच करता येत नाही का? आमच्या मनाची जाणीव थोडी तरी करून घ्या. चाळीस वर्षं हे राज्य आम्ही रेटतो आहोत. अनेक संकटं आजवर आमच्यावर आली; पण आम्ही त्यांना भ्यालो नाही, संकटांना सामोरे जाताना कधी डगमगलो नाही. अफझल, शास्ताखान आले. आग्ऱ्याच्या काळदाढेतून आम्ही तुमच्यासह पार पडलो. काळावरही मात करणारी आमची छाती, शंभूराजे! तुम्ही मोगलांना मिळून ती

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पार पोखरून टाकलीत! सारा धीर चेपून गेला. भवानीकृपेनं तुम्ही आलात. तुमच्या रूपानं परमेश्वर धावला, असं आमच्या चित्तात आलं.'

'याच जाणिवेनं आम्ही माघारी आलो. राज्यासाठी नाही, आपल्यासाठी आम्हांला यावं लागलं.'

'राजे!'

'हं! आम्ही राजे कुठले? युवराजपद गेलं. सुभेदारी गेली. शृंगारपुराहून परळीला जाण्याची आज्ञा आली. संन्यास तेवढा बाकी राहिला होता! जिथं शंभूबाळ म्हणून जगू शकलो नाही, तिथं राजे कुठले?'

राजांचे डोळे पाणावले, आवाज घोगरा बनला. संभाजीराजांना त्यांनी मिठीत घेतले.

'वेड्या पोरा! असं बोलू नको. तुझ्यापायी थोडं का दुःख सोसलं, ते परत तुझ्या बोलांनी वाढवतोस? शंभूबाळ, केव्हा, रे, कळणार तुला?'

अचानक घोड्याच्या खिंकाळण्याचा आवाज उठला. राजे मिठीतून दूर झाले. न कळत त्यांची पावले सज्जाकडे गेली. बाहेर पडलेल्या मंद चांदण्यात पांढरा शुभ्र घोडा उभा होता. उभ्या जागी खूर नाचवीत तो खिंकाळत होता. आपल्या डोळ्यांतले अश्रू टिपून त्या घोड्याकडे बोट दाखवीत राजे म्हणाले,

'पाहिलंस, शंभूबाळ? खाली मोती आला आहे. हे मुकं जनावर. केव्हा तरी पाठीवर फिरविलेल्या मायेच्या हाताची याला आठवण. आम्ही गडावर आल्याचा वास लागताच ठाणबंद असलेला हा मोती आपले बंध तोडून इथवर धावत आला. आणि ज्या हातांनी तुम्हांला लहानाचं मोठं केलं, त्या हातांना काहीच का यश नाही?'

संभाजीराजांनी सावकाश नजर उचलली. ते शांतपणे म्हणाले,

'आबासाहेब, माणसं जनावरांसारखी अल्पसंतुष्ट नसतात.'

राजांनी दचकून संभाजीराजांच्याकडे पाहिले. त्या बोलांनी राजांच्या मनाला असंख्य

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वेदना झाल्या. राजे कळवळले.

'खरंच, माणसं जनावरांसारखी अल्पसंतुष्ट असती, तर किती बरं झालं असतं!'

पण दुसऱ्याच क्षणी संभाजीराजांच्या वर रोखलेली नजर संकुचित झाली. संयमाने आवरलेला राग उफाळून आला.

'हे बोलण्याचं धाडस कोठून आणलंत? संभाजीराजे, मोगली मनसबीची धुंदी अद्याप डोळ्यांत रेंगाळते आहे, वाटतं? अल्पसंतुष्ट मन आम्ही जाणतो. तशा जीवनासाठीच हे राज्य उभारण्याचा खटाटोप आम्ही केला. पण तुम्ही अल्पसंतुष्ट केव्हापासून झालात?....

'जन्माला आलात; आणि दोन वर्षांतच मातृवियोग तुमच्या नशिबी लिहिला गेला. पण पोरकेपण तुमच्या नशिबी लिहिलं गेलं नव्हतं. सहस्र हातांनी उदंड माया करणारी माय.... मासाहेब तुम्हांला लाभल्या. त्यांच्या लाडांखाली तुम्ही लहानाचे मोठे झाला. आईनं केलेलं कौतुक फिकं पडावं, अशा कौतुकात तुम्ही वाढलात. संसारात सुलक्षणी, सालस, सौंदर्यसंपन्न अशा पत्नीची जोड तुम्हांला मिळाली. तुमच्या कर्तेपणाची जाणीव आम्हांला झाली; आणि आम्ही तुम्हांला राजकारणात गुंतविलं. युवराज म्हणून तुम्ही राजकारणात भाग घेऊ लागला, दरबारी आलेल्या फिरंगी वकिलांना भेटू लागला. त्याचा आम्हांला कोण आनंद वाटू लागला! परदरबारच्या वकिलांशी वाटाघाटी करताना कधी तुमच्या मनात आलं होतं, की तुम्ही केलेले निर्णय आम्ही फिरवू, म्हणून? मोहिमेवर तुम्ही जात होता, ते युवराज म्हणूनच ना? का शिलेदार म्हणून गेलात?'

राजांच्या बोलांनी संभाजीराजे भानावर आले. राजांचे शब्द तापल्या शिशासारखे त्यांच्या कानांवर पडत होते.

'अल्पसंतुष्टपणाच्या गोष्टी करता कशाला? ज्ञानदानासाठी केशव पंडितांसारखे विद्वान तुम्हांला भेटले होते. मासाहेबांचं छत्र तुम्हांला होतं. युवराजपदाची सत्ता तुमच्या हाती होती. मासाहेब गेल्या, तर विवेकाच्या अधीन होण्याऐवजी तुम्ही वाढत्या वयाच्या अधीन झाला! तुमचे शौक वाढू लागले, राजे! आम्हीही तरुण होतो. आमच्या समोर सुभेदाराची लावण्यवती सून आपल्या भाग्याचा निर्णय करून घेण्यासाठी उभी होती. बोलून चालून शत्रुघरची लेक. तिला आम्ही नाटकशाळेत टाकली असती, तर कुणी आम्हांला बोल लावला नसता. सूड म्हणून एखाद्या बारगिराची बटीक बनविली असती, तरी कुणी दोष

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दिला नसता. पण ते लावण्य पाहत असताना आमच्या विकारांवर आमच्या विवेकानं मात केली. कळायच्या आत आम्ही बोलून गेलो- 'आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या. तर आम्हीही असेच सुंदर निपजलो असतो!'

'एक वाक्य आम्ही उच्चारून गेलो; पण ते कळताच मासाहेब किल्ल्याच्या दरवाजाशी आमच्या स्वागताला उतरल्या! जन्माचं सार्थक होण्याचा तो क्षण होता. आणि तुम्ही.... आमच्या पोटी जन्म घेतलात ना? आणि माहेरवाशीण म्हणून आलेल्या एका ब्राह्मण मुलीवर बदनजर ठेवून मोकळे झालात!'

'आबासाहेब, आम्ही....'

'खामोश! संभाजीराजे, माणूस आपली कीव करण्यात भारी रमतो. खोटी कीव करून घेण्याची सवय जडली, की ती व्यसनापेक्षाही भयंकर बनते. एकदा उघड्या डोळ्यांनी स्वत:कडे बघा! ज्या गुन्ह्याचा मुलाहिजा आम्ही कधीही भर दरबारी राखला नाही, असा गुन्हा तुम्ही केलात! तुमच्या प्रेमापोटी आम्ही तो पाठीशी घातला. आम्हांला वाटलं की, तुम्ही त्या अनुभवानं शहाणे व्हाल, स्वत:ला सावरून घ्याल. पण ते भाग्य आमच्या नशिबी नव्हतं. तुमच्या बेलगाम वर्तनाला कधीच पायबंद बसले नाहीत.'

राजे क्षणभर थांबले,

'अनाजी, मोरोपंत या मंडळींवर तुमचा फार रोष. ज्या माणसांनी रोहिडेश्वराच्या शपथेपासून आजतागायत आम्हांला साथ दिली, अशी ती माणसं. आपल्या पराक्रमावर आणि कर्तृत्वावर त्यांनी राज्याचा पाया भक्कम केला. साल्हेर, मुल्हेर जिंकणारे, प्रतापगडासारखे गड उभारणारे, अडीअडचणीच्या वेळी रणांगणात धाव घेणारे मोरोपंत आठवा! उभ्या राज्याची धाराबंदी घडविणारे अनाजी पाहा! म्हणजे त्यांची किंमत कळेल. त्या माणसांचा युवराजपदाच्या मूर्ख घमेंडीत भर राजसदरेवर 'लुच्चे, लफंगे' म्हणून उपमर्द करण्यात तुम्ही मागे-पुढे पाहिलं नाहीत. आमच्या तोलामोलाची माणसं ती. तो अपमान आमचा आहे, हेही तुमच्या ध्यानी आलं नाही. ती माणसं जाणती, म्हणून त्यांनी तुमच्या नेणतेपणावर पांघरूण घातलं.

'स्वराज्याशी इमानी असणारी माणसं तुम्हांला जोडता आली नाहीत, मिळवता आली नाहीत. तुम्ही जोडलेली माणसं पाहा-कवी कलश आम्ही हयात असता तुम्हांला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

कलशाभिषेक करून मोकळे झाले! पराक्रमापेक्षा जारणमारणांत तुम्ही अधिक गुंतला. शौर्याच्या नशा बाळगणारे आम्ही; तुम्ही नाटकशाळांत आणि भांगेत गुंतून गेला. तुम्हांला संतुष्ट करणं परमेश्वरालाही जमेल, असं वाटत नाही!

‘कर्ता-सवरता मुलगा घरी असताना उभं राज्य मंत्रिमंडळाच्या स्वाधीन करून जाण्यात आम्हांला काय हौस होती? तसं करताना आमच्या मनाला कोण यातना झाल्या! याची कल्पना सुद्धा कधी तुम्ही मनात आणली नाही. आम्हांलाही ह्या गोष्टीचा छडा लावून घ्यायचा होता.’

संभाजीराजांनी राजांच्याकडे पाहिले. राजांच्या बोलण्याने ते सुन्न झाले होते.

‘पाहता काय? ...म्हणूनच शृंगारपूरचा सुभा पूर्ण मुखत्यारीनिशी तुमच्या स्वाधीन करून, मंत्रिमंडळाच्या हाती राज्य सोपवून, आम्ही राज्यापासून शेकडो कोस दूर गेलो. दीड वर्षानं माघारी आलो. आम्हांला जे दिसलं, त्यानं काळीज विदीर्ण झालं! एकाच वेळी मिळवल्याचा आनंद आणि गमावल्याचं दु:ख आम्हांला भोगावं लागलं. आमच्या माघारीदेखील त्याच जबाबदारीनं राज्य संभाळणारं मंत्रिमंडळ आमच्या समोर अभिमानानं उभं होतं. आणि शाक्ताच्या नादी लागून, सुभ्याकडे दुर्लक्ष करून, होमहवनानं विजय संपादन करू पाहणारे... कलशाभिषेकाचं स्वप्न मनात रंगवीत बसलेले... युवराज आम्ही पाहत होतो.’

‘आम्ही चुकलो!’ युवराज धीर करून बोलले.

राजे हात उडवीत म्हणाले, ‘चुकलात? केवढी चूक केलीत? आमची पाठ फिरली नाही, तोच तुम्ही दिलेरशी बोलणी सुरू केलीत; आणि जेव्हा आमच्या मनी-स्वप्नी नव्हतं, तेव्हा तुम्ही मोगलांना मिळालात, सप्तहजारी मोगली मनसबदार बनलात! ही तुमच्या संतुष्टपणाची कथा. ती आळवीत बसण्याचं मात्र आमच्या नशिबी आलं!’

संभाजीराजांचे अश्रू ओघळले. ते पाहून राजांचा संताप वाढला.

‘रडता कशाला? मोगली मनसबदार बनून केलेला पराक्रम आठवा! दिलेरखानाबरोबर तुम्ही स्वारीसाठी बाहेर पडलात, आमच्या भूपाळगडाला वेढा घातलात. फिरंगोजी नरसाळा....! बिचारा!! ज्यानं तुम्हांला आमच्या मायेच्या नजरेनं पाहिलं, त्यानं तुम्हांला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

समोर पाहताच तुमच्या शब्दाखातर भूपाळगड दिलेरच्या स्वाधीन केला. फिरंगोजी आमच्याकडे आले. आणि त्या द्रोहाबद्दल आम्ही त्यांना काय शिक्षा दिली. माहीत आहे? तोफेच्या तोंडी!'

'आबासाहेब! फिरंगोजी काकांना....'

'घाबरू नका! शिक्षा दिली, पण अमलात आणता आली नाही. हे हात दुबळे ठरले. फिरंगोजी फसले, त्यापेक्षा शतपटीनं जास्त अशा मायेत आम्ही फसलो! पण, शंभूबाळ, ते पातक फिरंगोजींचं नाही, तुमचं आहे! तुमच्या शब्दाखातर भूपाळगडाचे दरवाजे मोकळे झाले. आणि दिलेरखानानं किल्ल्यात प्रवेश करताच स्वराज्याशी इमानी असणाऱ्या सातशे लोकांचे हात तोडले; आणि ते तुम्ही उघड्या डोळ्यांनी पाहिलंत! गडाला आलेल्या प्रजेची चीजवस्तू त्यानं छिनावून घेतली. परिश्रमानं बांधलेला किल्ला इखलासखानाकडून त्यानं तोफांच्या भडिमारात जमीनदोस्त केला. हे पातक दिलेरखानाचं नाही, तुमचं आहे!'

राजे कावरेबावरे झाले. ते स्वत:शीच बोलल्यासारखे म्हणत होते,

'शंभूबाळ, आमच्या स्वराज्यउभारणीसाठी हजारो माउलींना आपल्या कपाळीचं कुंकू उतरावं लागलं; पण कुणी आम्हांला शाप दिला नाही. उलट, जाऊ तिथं आशीर्वादच मिळाले. आणि तुम्ही.... वयाची विशी ओलांडायच्या आत केवढा पर्वत रचलात! तिकोट्याला दिलेरनं राक्षसी नंगानाच घातला. अब्रूरक्षणासाठी आमच्या आयाबहिणींनी मुलांबाळांसकट विहिरीत उड्या मारल्या! सारा अथणी गाव गुलाम म्हणून विकायला निघालात!'

संभाजीराजांच्या अश्रूंना खळ नव्हता. डोळे पुशीत ते म्हणाले,

'त्यालाच विटून आम्ही परत आलो.'

'हं! तेवढी समजूत आमची राहती, तर किती बरं झालं असतं! कुणाला फसवता? तुम्ही ना जुलमाला कंटाळलात, ना आमची दया आली. औरंगजेबानं तुम्हांला कैद करण्याचा हुकूम दिला; ते तुम्हांला समजलं, आणि तुम्ही माघारी आलात. राजे, नशिबानं सुटलात! आम्ही सांगतो, त्यावर विश्वास ठेवा... हव्या त्याच्या हाती जा; पण त्या औरंगजेबाच्या हाती सापडू नका. जिवंत मरण तो तुम्हांला भोगायला लावील!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे संभाजींच्या जवळ गेले. त्यांच्या खांद्यावर आपला थरथरता हात ठेवीत म्हणाले,

‘शंभूबाळ,सावध व्हा! सहज जाता-जाता खेळ म्हणून बाणाच्या टोकानं उडविलेला कुंपणावरचा सरडा निवडुंगावर पडला, तर भीष्मांना शरपंजरी मृत्यू भोगावा लागला. जन्म आणि मृत्यू कुणाला टळलेत? राजे! आमच्या मायेच्या तराजूला पासंग असेल; पण आम्ही असं ऐकलंय् की, परमेश्वरदरबाराच्या तराजूला पासंग नाही. तुमचा शेवट कसा, याचा विचार जरी मनात आला, तरी आमच्या आतड्यांना पीळ पडतो. निदान त्या तराजूची भीती बाळगा!’

राजे पुरे थकले होते. संभाजीराजांच्या खांद्यावरचा हात ओघळला; आणि त्याच क्षणी संभाजीराजांनी राजांचे पाय धरले. त्या पावलांवर अश्रू ठिबकू लागले. संभाजीराजे सारे बळ एकवटून म्हणाले,

‘आम्ही क्षमा मागत नाही. आम्हांला हवी ती शिक्षा करा; आम्ही ती आनंदानं भोगू! कडेलोट, तोफेच्या तोंडी, हत्तीच्या पायी... हवं ते मरण सोसू. त्याच निर्धारानं आम्ही इथं आलो.’

‘कडेलोट! तोफेच्या तोंडी! हत्तीच्या पायी! शंभूबाळ, या मामुली शिक्षेवर आता तुमची सुटका होणं कठीण दिसतं. तुमच्या गुन्ह्याला एकच शिक्षा आहे; आणि ती भोगल्यावाचून तुमची सुटका होईल, असंही वाटत नाही... जातो. फार थकलोय् आम्ही...’

राजे जिन्याकडे जात होते. मागून आवाज आला,

‘असं अर्धवट बोलून जाऊ नका, आबासाहेब! आमची शिक्षा सांगा. केवढीही भयंकर शिक्षा असली, तरी ती आम्ही आनंदानं भोगू.’

राजे वळले. संभाजीराजांच्याकडे ते स्थिर नजरेने पाहत बोलले,

‘भोगाल? शंभूबाळ, तुम्हांला एकच शिक्षा आहे. आणि ती म्हणजे... आमचा मृत्यू!’

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

८

सज्जाकोठीच्या वरच्या महालात राजे उभे होते. त्यांची नजर सज्जातून दिसणाऱ्या पूर्वक्षितिजावर खिळली होती. सूर्य वर आला होता. अंगाला थंडीचा गारवा झोंबत होता. सज्जातून दिसणारा विस्तीर्ण मुलूख राजे पाहत होते; पण त्यांचे चित्त त्यात गुंतले नव्हते. राजे विचार करीत उभे होते. त्याच वेळी हंबीरराव महालात आले.

'महाराज, युवराज दर्शनाला आलेत.'

'ठीक आहे. त्यांना वर पाठवा...'

संभाजीराजे महालात आले. राजे सज्जाजवळ उभे होते. पायांची चाहूल लागताच राजे सावकाश वळले. त्यांची नजर संभाजीराजांच्यावर खिळली होती. संभाजीराजे नजीक आले. त्यांनी पाय शिवले.

राजे बैठकीवर बसले. युवराज नतमस्तक उभे होते. राजांनी विचारले,

'भवानी कशी आहे?'

'जी. बरी आहे.'

'युवराज, आता तुम्ही खरे प्रौढ झालात, बाप बनलात. जीवनातल्या अनुभवानंही तुम्हांला खूप शहाणपण आलं असेल... घाबरू नका! आज आम्ही तुम्हांला काही बोलणार नाही. आमचा मनस्ताप आमच्याबरोबर. आता दुसऱ्यांचा मनस्ताप वाढवणं ठीक नाही.'

संभाजीराजे एकदम पुढे झाले. त्यांनी राजांचे पाय शिवले. राजांनी पुढे होऊन संभाजीराजांना उठविले. त्यांना उराशी कवटाळून सामोरे बसवीत राजे म्हणाले,

'शंभूबाळ, ते अश्रू पुसा. तुमच्या डोळ्यांत ते शोभत नाहीत, आम्ही असताना तर मुळीच शोभत नाहीत. तुम्ही आता चिंता करू नका. आम्ही खूप विचार केला.'

राजे काही क्षण स्तब्ध होते; कसे सांगावे, याचा विचार करीत होते. चेहरा व्याकूळ

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बनला होता. आपल्या केसांवरून हात फिरवीत राजे बोलू लागले,

‘शंभूबाळ, मोठ्या कष्टानं आम्ही हे राज्य उभं केलं. या राज्यापायी हजारोंनी आपलं बलिदान केलं, अनेक संकटं भोगली. आज आमचं राज्य तुंगभद्रेपासून नर्मदेपर्यंत पसरलं आहे. एवढं मोठं राज्य पेलणं हे सामान्य काम नाही. त्याला फार मोठी कुवत हवी. पुढचे दिवसही भारी कष्टाचे आहेत. औरंगजेबानं जिझिया कर लादला आहे. त्याखाली हिंदू चेपले जात आहेत. औरंगजेब आता दक्षिणेत उतरल्याखेरीज राहणार नाही. आम्हांला हे सारं तडीला न्यायचं होतं. खूप मनसुबे होते. दिल्ली काबीज करून काशीविश्वेश्वराची स्थापना हा आमचा ध्यास होता. आता आमचे मनसुबे तुम्ही पुरे करा.’

‘आम्ही?’

‘होय, संभाजीराजे! आता आम्ही थकलो. आमचा भरोसा धरण्यात अर्थ नाही.’

‘आबासाहेब!’

‘ऐका, शंभूबाळ. घोडा धावतो, बेलगाम धावतो. त्याच्या पायांत बळ असतं, छातीत विश्वास असतो. पण हे कुठवर? त्याची छाती फुटत नाही, तोवरच. कोणत्या तरी प्रसंगात त्याची छाती फुटते; आणि त्यानंतर त्या घोड्याचा काही उपयोग नसतो. आमचं तसंच झालंय्. हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे आम्ही, दक्षिणेतील पातशाह्यांची एकजूट करू पाहणारे आम्ही आज आमच्याच हातानं राज्याची वाटणी करायला धजलो नसतो.’

‘कसली वाटणी?’ संभाजीराजे उद्गारले.

‘आमच्या राज्याची!’ राजे शांतपणे म्हणाले. ‘हजारोंची एकजूट करणारे आम्ही; पण आम्हांला आमच्याच घरी एकी टिकविता आली नाही. तुमच्यांत, मंत्रिमंडळात बेबनाव. तुमची मनं साफ नाहीत. थोरल्या राणीसाहेब.... तो एक निराळाच भाग आहे. त्यामुळं हे सारं ध्यानी घेऊन आम्ही हा निर्णय केला आहे. तुंगभद्रेपासून कावेरीपर्यंत एक जिंजीचं राज्य आहे. जिंजी-वेलोरसारख्या अनेक मजबूत गडांचा हा संपन्न मुलूख आहे. मोगली आक्रमणापासून दूर आहे. आक्रमण झालं, तरी ते थोपवायला कुतुबशाहीची ढाल आहे. राज्याचा विस्तार करायला खूप संधी आहे. असं हे जिंजीचं राज्य आम्ही तुम्हांला द्यायचं ठरवलं आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संभाजीराजे आश्चर्याने थक्क झाले. ते काही बोलणार, तोच राजे बोलू लागले,

'ऐका ! दुसरं राज्य तुंगभद्रेच्या अलीकडेपासून थेट गोदावरीपर्यंत. हे राज्य राजाराम मोठे होईपर्यंत प्रधानमंडळाच्या सल्ल्यानं राजारामांच्या सत्तेखाली राहील. ही वाटणी तुम्हां दोघांच्याही हिताची होईल.'

संभाजीराजे त्या बोलांनी कळवळले. ते म्हणाले,

'आबासाहेब, आपल्या पायांची आण घेऊन सांगतो, आम्हांला राज्याची वाटणी नको! राज्य अखंड राहू दे. ते हवं त्याच्या स्वाधीन करा. याउप्पर आम्ही आपल्याला त्रास देणार नाही. आपल्या पायांची जोड धरून, दूधभात खाऊन, आपल्या चरणांचं चिंतन करीत राहू. आमच्या शब्दांवर कुणी विश्वास ठेवला नाही. निदान तुम्ही तरी...'

राजे उदासपणे हसले.

'संभाजी, मला माहीत आहे, तुम्ही मनापासून बोलता. ह्यापूर्वीच हा विचार आला असता, तर किती बरं झालं असतं! आता आमचं मन थकलं. तुम्हां दोघांच्या हाती ही जबाबदारी सोपवून आम्ही उरला काळ ईशचिंतनात घालवू. त्यात तुमचं-आमचं कल्याण आहे.'

'आबासाहेब, आपण कधीच का क्षमा करणार नाही?' संभाजीराजांनी विचारले.

'क्षमा?' राजांनी संभाजीराजांच्या खांद्यांवर हात ठेवला. 'क्षमा करायलादेखील अधिकार लागतो. तेवढे मोठे आम्ही नाही. आम्ही सांगितलं, त्याचा विचार करा. आम्ही रायगडी जातो. राजारामांची मुंज, लग्न आटोपून परत येतो. त्यानंतर तुमच्या-आमच्या विचारानं सर्वतोपरी विचार करू. तुम्ही थोरले आहात. तुमच्या भरोशावर आम्ही निर्णय करणार आहोत. चला, येसूला भेटू. भवानीला पाहू.'

राजे उठले. संभाजीराजांच्यासह ते सज्जाकोठीतून वाड्याच्या दिशेने जात होते.

दोन दिवसांत राजांनी गड सोडायचे ठरवले. संभाजीराजांच्या जवळ जनार्दन नारायण, सोनाजी नाईक बंकी, बाबाजी ढमढेरे ही मंडळी राजांनी ठेवली. पन्हाळ्यावर संभाजीराजांची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सर्व व्यवस्था केली.

गड सोडण्याआधी राजे येसूबाईंना भेटण्यासाठी गेले. राजे जायला निघाले. राजे येसूबाईंना म्हणाले,

‘येसू! चिंता करू नको. सारं ठीक होईल. मी सांगितलेलं विसरू नको. यापुढं तू अधिकार गाजवायला शिकायला हवं. संभाजीराजांचा तोल सावरण्याचं सामर्थ्य फक्त तुझ्याच ठायी आहे.’

येसूबाई पाया पडल्या. राजांनी त्यांच्या पाठीवर हात ठेवला.

‘भवानीला जप.’

‘पुन्हा दर्शन केव्हा?’

‘ते कोण सांगणार? त्याच्या मनात असेल, तर लौकर भेट घडेल. आम्ही येतो.’

चारदरवाजाशी राजांनी संभाजीराजांचा निरोप घेतला. राजे पुढे जात होते. एकदम त्यांनी बसल्या घोड्यावरून मागे पाहिले. चारदरवाजाच्या बुरुजावरून भगवे निशाण फडकत होते. दरवाजाशी संभाजीराजे उभे होते.

□

९

भर दुपारच्या वेळी राजांचे पथक साताऱ्याकडे जात होते. राजे पालखीतून प्रवास करीत होते. राजांच्या मागे-पुढे दोन हजार धारकरी दौडत होते. भर उन्हाची वेळ असल्याने राजांनी अंगावरची शाल पायांशी ठेवली होती. थंडीच्या दिवसांची भर उन्हाची ऊब अंगाला सुखवीत होती. भोयांच्या एक चालीच्या पायांचा आवाज अखंड उठत होता. पालखी मंद हेलकावे घेत होती. पालखीच्या दांडीला लावलेल्या गोंड्याचा आधार राजांनी उजव्या हाताने घेतला होता. राजांना परळीचा डोंगर दिसू लागला. राजांनी हात जोडले. क्षणभर त्यांचे नेत्र मिटले. राजे परत आपल्या विचारात गढून गेले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अचानक पालखी थांबली. हंबीरराव दौडत पालखीजवळ आले. राजांनी विचारले,

‘पालखी का थांबली?’

‘थोड्याच अंतरावर कल्याणस्वामी दिसत आहेत, तेव्हा....’

‘पालखी उतरा.’ राजांनी आज्ञा केली.

पालखी उतरली गेली. राजे पायउतार झाले. राजांनी पाहिले. अश्वदळाला बगल देऊन कल्याणस्वामी इतर भक्तांबरोबर येत होते. राजे अनवाणी पायांनी तसेच सामोरे गेले. राजांनी कल्याणस्वामींना वंदन केले. आशीर्वाद देऊन कल्याणस्वामी म्हणाले,

‘राजे, आम्ही आपलीच वाट पाहत होतो.’

‘आमची वाट?’ राजे उद्गारले.

‘हो. आपण पन्हाळ्याला जाताना भेट होईल, असं समर्थांना वाटत होतं; पण आपल्याला तातडीनं जावं लागलं. आपण या वाटेनं येणार, हे कळताच समर्थांनी आम्हांला आज्ञा केली. जर आपल्याला सवड असेल, तर आपण वाकडी वाट करावी आणि समर्थांना भेटून जावं, अशी त्यांनी विनंती केली आहे. समर्थ आपणांस भेटण्यास उतावीळ आहेत.’

‘विनंती? समर्थ करतात? समर्थदर्शनासाठी वाकडी वाट करावी लागते?’

त्या निरोपाने राजांची उदासीनता आणखीन वाढली. ते कल्याणस्वामींना म्हणाले,

‘समर्थआज्ञा शिरसावंद्य! चलावं....’

राजे कल्याणस्वामींच्या बरोबर चालू लागले. पालखीतून वा घोड्यावरून येण्याची विनंती त्यांनी अमान्य केली. गडाच्या पायथ्याशी अश्वपथके थांबविली गेली. आपल्या निवडक माणसांनिशी राजे गड चढत होते. गडाच्या प्रथम दरवाजाशी राजांनी मुजरा स्वीकारला; आणि काही क्षणांतच गडाच्या परिसरात शंखनाद घुमला. राजे गडावर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आल्याची वर्दी दिली गेली.

राजे धीमी पावले टाकीत गड चढत होते. राजे परळीवर आले; आणि त्यांची नजर समोर स्थिरावली. राजांच्यापासून पंधरा-वीस पावलांवर समर्थ उभे होते. समर्थांना पाहताच राजांच्या सर्व भावना उचंबळून आल्या. उभ्या जागी त्यांचे नेत्र अश्रू ढाळू लागले. दोन्हा हातांत तोंड लपवून राजे उभे होते. सारे अंग हेलावत होते. राजांची अवस्था पाहून समर्थ पुढे धावले. राजांच्या पाठीवरून उजवा हात लपेटीत समर्थ म्हणाले,

'हां, शिवबा! संयम करा. चला. प्रभू रामचंद्रांच्या कृपेनं सारं ठीक होईल. चला.'

राजांच्यासह समर्थ आश्रमात आले. राजांच्या सांगाती आलेल्या सर्वांनी समर्थांचे दर्शन घेतले. राजे मृगाजिनावर बसले होते. राजे मान खाली घालून बसले होते. हळू हळू आश्रमाची गर्दी कमी झाली. फक्त राजे आणि समर्थ उरले. व्याघ्रासनावर बसून समर्थ राजांच्याकडे पाहत होते. समर्थांचा गंभीर स्वर उमटला,

'राजे, कशासाठी अश्रू ढाळलेत?'

राजांनी नजर वर केली. समर्थांचा उजवा हात कुबडीवर विसावला होता. हातात जपाची माळ होती. त्या शांत नजरेला राजांची नजर भिडली. नजर काढवेनाशी झाली. राजे म्हणाले,

'आता अश्रू ढाळण्याखेरीज आमच्या हाती काही उरलं नाही. पन्हाळ्याला जाताना आम्हांला का आपली आठवण झाली नाही? खूप वाटलं. पण कोणत्या तोंडानं आपल्यासमोर येणार? स्वराज्याची उभारणी करणारे आम्ही. आमचे युवराज मोगलांना मिळाले, हे कसं सांगणार?'

समर्थ हसले.

'आणि म्हणूनच आमच्या भेटीची टाळाटाळ केलीत? राजे, अशी कोणती गोष्ट आहे, की जी गुरूपासून लपविली जाते!'

'क्षमा, गुरुदेव! आम्हांला काही सुचत नाही, कळत नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शिवबा, आम्ही जाणतो. म्हणून कल्याणला वाटेत उभं केलं. तुमच्या दुःखाला आम्हीही जबाबदार नाही का?’

‘आपण?’ राजे उद्गारले.

‘हो! संभाजीराजे परळीवर आले, तेव्हा आम्ही इथं हजर असतो, तर युवराज कदाचित मोगलांना मिळालेही नसते. मग ती चूक आमची नाही?’

‘आपली कसली? नशिबात नव्हतं.’ राजे उदासपणे म्हणाले.

‘हो ना? मग हा शोक कसला?’

‘शोक! आमच्याबद्दल करीत नाही. पण एवढं मोठं राज्य उभं केलं. आज तुंगभद्रेपासून नर्मदेपर्यंत राज्याचा पसारा मांडला. लक्षावधी लोकांची जबाबदारी घेतली. हे अफाट राज्य कुणाच्या हाती सोपवायचं?’

‘पण युवराज आले ना परत? चुका साऱ्यांच्याच हातून होतात, राजे! त्या सावरून घ्यायला हव्यात.’

‘स्वामीजी, आम्हांला काही सुचत नाही. युवराज आले, हे खरं; पण त्यांच्यावर मंत्रिमंडळाचा विश्वास नाही. युवराज उद्या काय करतील, याचा भरोसा कुणी द्यायचा? धाकटे राजाराम लहान. युवराजांच्या कृतीनं आम्ही पार पोखरून गेलो! आमचा वैयक्तिक संसार असता, तर आम्ही हे दुःख सहन केलंही असतं. पण आम्ही हा मोठा संसार मांडला. रोहिडेश्वराच्या शपथेच्या वेळी आमच्या हाती काही नव्हतं. ते आज एवढं रूप प्राप्त झालं! आम्ही स्वराज्याचं रोपटं लावलं. त्याला जिवापाड जपलं. आज त्याचा महान वृक्ष झाला. त्या झाडावर कुऱ्हाड घालण्याचं काम आमच्या हाती आलं. त्यानं आमचा जीव तगमगतो.’

‘कसली कुऱ्हाड, राजे?’

राजांच्या नजरेत अश्रू गोळा झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘कसली कुऱ्हाड! या युवराजांच्या कृत्यामुळं आम्ही आमच्या राज्याची शकलं करायला आज ठाकलो. संभाजीराजांना जिंजीचं राज्य आणि राजारामांना वरचं राज्य द्यायचा निर्णय आम्ही केला. याचं दु:ख आम्हांला फार!’

समर्थांच्या चेहऱ्यावर स्मित प्रकटले. ते पाहून राजे क्षणात सावरले. समर्थ म्हणाले,

‘शेवटी तुम्हांलाही अहंकाराची बाधा झालीच ना?’

‘जी? अहंकार?’ राजे उद्गारले.

‘हो ना! तुम्ही राज्य उभं केलंत. तुम्ही पसारा मांडलात, तुमच्या कृपेखाली लक्षावधी जगतात. हा अहंकार नाही, तर काय? राजे, श्रींचं राज्य विसरलात? ज्या यातना तुम्ही भोगीत आहात, त्याचं कारण हा अहंकार आहे. तुम्हीच सांगत होता ना, की हे श्रींचं राज्य आहे, म्हणून? श्रींनी उभं केलेलं, श्रींच्या आशीर्वादानं विस्तार पावलेलं हे राज्य कुणाच्या हाती द्यायचं, हे श्री ठरवितील. ते कसं राखायचं, ही चिंता श्रींना. ती चिंता आपण कशाला करायची? आपण विवेक धरून कर्तव्य करीत राहायचं. त्यात सुख आहे, समाधान आहे.’

‘समाधान!’ राजे नि:श्वास सोडून म्हणाले, ‘ते तर आम्हांला केव्हाच पारखं झालं आहे. एवढी माणसं गोळा करूनही आम्ही एकटेच राहिलो. प्रपंच करूनही आमच्या सुखदु:खाचं वाटेकरी कोणी राहिलं नाही. वेड्या स्वप्नापाठीमागे धावणारी आमच्यासारखी माणसं तालवृक्षासारखी असतात. आकाशाला हात लावण्यासाठी धावत सुटायचं. आणि उंचावता-उंचावता एक क्षण असा येतो, की सारी गात्रं थकून जातात. तेव्हा ध्यानी येतं की, आकाश सुरुवातीला जेवढं उंच होतं, तेवढंच उंच आहे. त्या वेळी आठवण येते जन्मदात्या धरित्रीची. पण तीही तेवढीच दूर राहिलेली असते. तिथवर हात पोहोचू शकत नाहीत. सारंच जीवन अधांतरी बनून जातं!’

‘शिवबा!’

‘गुरुदेव! एवढ्या निष्ठेनं आम्ही जीवन जगलो, चांगल्या मनानं सारं केलं. असं असता हे दु:ख आमच्या नशिबी का आलं? काय पाप केलं होतं, म्हणून आम्ही हे भोगतो आहोत?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

रामदासस्वामींचा चेहरा व्यथित बनला.

'राजे, कसल्या मोहात गुरफटलात? माणूस जन्माला एकटाच येतो, आणि एकटाच जातो. त्याला अपवाद नाही. माणसाचं हेच खरं रूप आहे. त्यात व्याकूळ होण्यासारखं काय आहे? आणि नशिबी आलेल्या यातनांबद्दल म्हणत असाल, तर त्याचं उत्तर फार सोपं आहे. भगवान श्रीकृष्णांनी असं कोणतं पाप केलं होतं, की ज्यासाठी त्यांचा मृत्यू असा विदारक व्हावा? यादवकुल वाचविण्याची धडपड निष्फळ ठरून डोळ्यांदेखत सर्व कुलाचा संहार त्यांना का बघावा लागला! असह्य वेदनांशी झगडत एकाकी मृत्यू त्यांनी का सोसला? प्रभू रामचंद्रांचे अखेरचे दिवस आठवा. त्यांनी जलसमाधी का घेतली? भीष्माचार्यांची अखेर शरपंजरी का झाली? कोणती पापं त्यांनी केली होती?'

राजांनी वर पाहिले. समर्थांच्या बोलांनी एक नवे रूप ध्यानी येत होते. आत्मविश्वास जागा होत होता. समर्थ सांगत होते :

'राजे, या पृथ्वीतलावर जे थोर जीव जन्माला येतात, त्यांना यातनाच भोगाव्या लागतात. सामान्य जीवांसाठी पुण्याई खर्चणारे ते आत्मे न कळत सामान्यांच्या पापांचे धनी होतात. आपलं कार्य झालं, की ते थोर जीव इथंच आपले भोग संपवून निघून जातात. त्यांनी भोगलेल्या यातनेतच सामान्यांचं जीवन सफल बनत असतं.'

'या यातना भोगणं म्हणजेच का जीवन?'

'नाही, राजे! ह्या आत्म्यानं घेतलेलं शरीराचं आवरण जेवढं मिथ्या, तेवढ्याच या शरीराबरोबर आलेल्या यातनाही मिथ्या. आत्मस्वरूपाची ओळख झाली, की या यातनांचे बंध राहत नाहीत, सुखदुःखाचा विसर पडतो, आणि चिरंतन सुखात रममाण होतो.'

'तेवढं सामर्थ्य असतं, तर मग आम्ही असे हताश का झालो असतो?

'केल्यानें होत आहे । आधी केलेंचि पाहिजे!'

असं आम्हीच सांगितलं, ते का फुकटचं पांडित्य होतं? राजे, आम्ही तुम्हांला दासबोध दिला होता, तो अशा क्षणी उपयोगी पडावा, म्हणून. हा योग साधायला काही फारशी मोठी तपश्चर्या अथवा बळ साधावं लागतं, असं मुळीच नाही. ज्ञानसाधनेकरिता म्हणून

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तपश्चर्या लागते. पण मुळातच तुम्ही ज्ञानी आणि योगी आहात. परमेश्वर आनंदस्वरूपी आहे, याबद्दल कुणाचंही दुमत नाही. तो प्रकाश आहे, तिथं अंधकार नाही, हेही सर्वांना ठाऊक आहे. सामान्यांच्या जीवनातही असामान्य आनंदाचे क्षण स्पर्शून जातात. सामान्य जीव आलेला क्षण टिपून न घेता तसाच दुसऱ्या क्षणाच्या मागे धावतो. पण ज्ञानी माणूस परमेश्वररूपानं नटलेले हे क्षण जवळ बाळगतो. त्याला समाधीचा आनंद मिळायला किती अवधी लागणार? निजधनावरतीच बैठक टाकली, तर ते धन दृष्टीला पडणार केव्हा? ह्या वृत्तीलाच अज्ञान म्हणतात. राजे, परमेश्वराची अखंड होणारी कृपा आठवा. तुमचं जीवन सुखी व्हावं, समृद्ध व्हावं, म्हणून तो केवढी काळजी घेतो! भर उन्हातून प्रवास करीत असताना अंगावरून जाणारी गार वाऱ्याची झुळूक ही त्याचीच कृपा नाही का? अमावास्येच्या रात्रीही आकाशात चमकणारी लक्षावधी नक्षत्रं त्यानंच निर्माण केली. भर उन्हाळ्यात एखादा पळस आपल्या तांबड्या गोजिऱ्या फुलांनी बहरलेला दिसतो, आणि दृष्टी सुखावून जाते. एक क्षण जिवाला सुखवण्याकरिता परमेश्वर केवढे कष्ट घेतो! प्रत्येक क्षणामागे लपलेला परमेश्वरी हात फार थोड्यांच्या ध्यानी येतो. आलेल्या क्षणाचा विसर पडून वाटसरू तसाच पुढं निघून जातो. आयुष्यभर वाटचाल करूनही पावलागणिक परमेश्वरानं निर्माण केलेला हात माणसाच्या ध्यानी येत नाही. आत्म्याची ओळख त्याला पटत नाही.’

समर्थांच्या प्रत्येक बोलाने राजांच्या अंगावर रोमांच उठत होते. समाधान पावलेले मन तृप्ततेने उचंबळत होते. अतृप्त कान समर्थांचे बोल मनात साठवीत होते.

‘राजे, तुम्ही या खोट्या मोहात बद्ध होऊ नका. तुमचा योग भारी थोर आहे! जरा स्वस्वरूपाची ओळख करून घ्या. ती ओळख झाली, तर योग्यांनाही दुर्लभ असलेला आनंद आणि समाधान तुमच्यापासून फार दूर नाही. तुम्ही राज्याभिषेक करून घेतलात. राज्याभिषेकाची हौस तुम्हांला नव्हती. कदाचित राज्याभिषेकप्रसंगी तुम्हांला याचं काही कौतुक वाटलं नसेल. पण ज्या जिवावर तुम्ही उदंड प्रेम केलंत, तो जीव अत्यंत तृप्ततेनं, डोळ्यांत प्राण साठवून तो राज्याभिषेक पाहण्यात दंग होता. ही जाणीव तुम्हांला आनंद देत नव्हती काय? तो परमेश्वरी साक्षात्काराचा क्षण होता. अफझलखानाच्या भेटीला जात असताना परमेश्वरासमोर नतमस्तक होऊन, सारी चिंता त्याच्यावर सोपवून जेव्हा तुम्ही गाभाऱ्यातून उठला असाल, तेव्हा निर्भय बनलेलं तुमचं मनही त्या परमेश्वरी साक्षात्काराचीच खूण होती. शत्रुहाती असलेल्या किल्ल्यावर चढलेल्या भगव्या निशाणाचं जेव्हा प्रथम दर्शन घडलं असेल, तेव्हाचा क्षण आठवा. तो संपूर्ण आनंदाचाच नव्हता

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काय? असे किती क्षण होऊन गेले असतील, याची कधी मोजदाद केलीत?'

स्वत:शी तल्लीन होऊन बोलत असलेल्या समर्थांनी राजांच्याकडे पाहिले. समर्थांचे शब्द ओठांवरच राहिले. राजांच्या अवस्थेकडे ते चकित होऊन पाहत होते. राजांच्या चेहऱ्यावर पूर्ण समाधान दिसत होते. डोळे मिटलेले होते. मंद श्वास चालत होता. शरीराला जडत्व आले होते. कपाळी शिवगंध रेखाटलेली ती राजांची मूर्ती पाहत समर्थ तल्लीन झाले. त्यांच्या साऱ्या भावना उचंबळून आल्या. त्यांनी हाक मारली,

'शिवबा! राजे ऽ ऽ '

पण राजांची अवस्था तीच होती.

जेव्हा राजे भानावर आले, तेव्हा राजांनी नेत्र उघडले. राजे शांत दृष्टीने समर्थांकडे पाहत होते. समर्थांच्या नेत्रांतून अश्रू ओघळत होते. राजे उठले. समर्थांच्या नजीक जाऊन त्यांनी समर्थांच्या चरणांवर मस्तक टेकले. समर्थांनी प्रेमभराने राजांना उराशी कवटाळले. आपले अश्रू न पुसता समर्थ बोलत होते.

'राजे, आम्ही योगी! साधुत्व बाळगूनही असा योग साधत नाही. त्याला भारी कष्ट पडतात. आणि तुम्ही... जीवनातल्या सामान्य आनंदाची आठवण दिली, तर तो योग तुम्ही साधून जाता. समाधियोग तुम्हांला लाभतो! एवढं सामर्थ्य तुमच्या ठायी असता या खोट्या मोहाचं आवरण कशाला पांघरता? राजे आता अवधी फार थोडा, हे आम्हांला स्पष्ट दिसतं. आता फार काल हाती राहिला नाही. आत्मस्वरूपाची ओळख जेवढ्या लौकर करून घेता येईल, तेवढी लौकर ती करून घ्या. भवितव्याची चिंता मनी आणू नका. राजयोग साधलात; आता सिद्धयोगी व्हा! तेच तुमचं खरं रूप आहे.'

आपल्या रूपाच्या नव्या जाणिवेने राजे तृप्त झाले होते. त्यांच्या चेहऱ्यावर पूर्ण समाधान उमटले होते.

□

१०

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सरत्या थंडीच्या दिवसांतील सायंकाळ रायगडावर उतरली होती. गडावरच्या गंगासागराचा रंग दाट बनत होता; आणि त्याच वेळी महादरवाजाच्या नगाऱ्याचा आवाज गडावर घुमला. राजे रायगडावर आल्याची वर्दी साऱ्या गडाला मिळाली. गडावरचे भालाईत आपले कमरबंद आवळून नीट उभे राहिले.

वाड्याच्या अष्टकोनी महालात राजाराम कपडे करीत होते. अतिसर्दीमुळे त्यांचा चेहरा तांबडा बुंद झाला होता, डोळे पाणावलेले होते. नगाऱ्याचा आवाज ऐकताच त्यांनी मंचकावरचा टोप उचलला. गडबडीने डोक्यावर टोप चढवीत ते पुटपुटले,

'आबासाहेब आले सुद्धा!'

'युवराजमहाराज, बाहेर जाणार?' मनोहारीने विचारले.

रागाने मनोहारीकडे पाहत राजाराम म्हणाले,

'आईसाहेबांनी आम्हांला गडाखाली जायला मना केली आहे; दरवाजापर्यंत जायला नको म्हटलं नाही.'

'जा ना; पण ही फतू घालून जा. एवढी सर्दी झालीय्; अंगात तापही आहे. तेव्हा नुसत्या अंगरख्यावर...'

राजारामांनी मनोहारीकडे पाहिले. मनोहारी हातात निळ्या रंगाची रूदार फतू घेऊन उभी होती. हट्टाने राजाराम म्हणाले,

'फतूची गरज नाही. आम्ही एवढ्यात येतो.'

'जी, पाहा हं! राणीसाहेब महाराज रागावतील. मग माझी जिम्मेदारी नाही.'

न कळत राजाराम थांबले. त्यांनी मागे वळून पाहिले. हाती फतू घेऊन मनोहारी तशीच उभी होती. काही न बोलता मनोहारीजवळ येऊन ते पाठमोरे उभे राहिले. त्यांचे हात मागे वळले. मनोहारीने राजांच्या अंगात फतू चढविली; आणि मग एकदाही मागे न पाहता राजाराम दरवाजाकडे धावले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजाराम गडबडीने जात होते. नगारखान्याचे मुजरे घेऊन ते सरळ होळीचौकात आले, आणि त्यांना गडावर येणाऱ्या पालखीचे दर्शन झाले. राजांच्या पालखीसमवेत हंबीरराव, मोरोपंत, अनाजी ही मंडळी दिसत होती. पालखी होळीचौकात आली. राजांची नजर राजारामांच्यावर गेली. राजांच्या थकल्या चेहऱ्यावर हसू विलसले. पालखी खाली ठेविली गेली. राजे पायउतार झाले. राजारामांनी पुढे होऊन राजांचे पाय शिवले. राजारामांना जवळ घेत राजे म्हणाले,

‘बाळराजे, अंगात ज्वर असताना, एवढी सर्दी झाली असता बाहेर का आलात?’

राजारामांनी अनाजींकडे पाहिले. राजे हसले.

‘बाळराजे, पाचाडला अनाजी दिसताच आम्ही तुमच्या तब्येतीची चौकशी केली. त्यांनीहून सांगितलं नाही.’

‘आम्ही आपल्या दर्शनाला....’

‘ते खरं. पण आपली तबियत....’

‘जी. ते आपलं नेहमीचंच आहे.’ राजाराम कंटाळलेल्या सुरात म्हणाले.

‘म्हणून का तिकडे दुर्लक्ष करायचं? निदान आमच्यासाठी तरी तुम्ही तब्येतीची काळजी घ्यायला हवी. स्वत:ला जपायला हवं. होय ना?’

राजारामांनी मान डोलावली. त्यांच्या खांद्यावर हात ठेवीत राजे म्हणाले,

‘चला, आलाच आहात; आपण शिरकाईचं दर्शन घेऊ.’

देवदर्शन करून राजे वाड्यात आले. सदरेवरून सगळे माघारी वळले. राजारामांसह राजे महाली आले. महालात महादेव उभा होता.

‘महादेव, सर्व सामान आलं?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी.’

महादेवाच्या हाती राजांनी तलवार दिली. पाठोपाठ राजांनी आपला दुशेला, जिरेटोप उतरला. राजे बैठकीवर बसले. राजारामांना जवळ ओढीत राजे म्हणाले,

‘सांगा, बाळराजे! असे खामोश उभे राहू नका.’

राजाराम क्षणभर तसेच राहिले; आणि त्यांनी विचारले,

‘आबासाहेब, खांदेरी कुठं आहे, हो?’

‘का, बाळराजे?’ राजांनी आश्चर्याने विचारले.

‘खांदेरीची तटबंदी पुरी झाली, असं मोरोपंत म्हणत होते... तो किल्ला आहे?’

‘नाही, बाळराजे. ते बेट आहे; पण फार महत्त्वाचं... कंठ्यातला मध्यमणी असतो ना, तसं. फार चांगली बातमी सांगितलीत.’

‘मोरोपंतांनी सांगितलं नाही?’

‘अंहं! आमचे पेशवे आम्हांला सारंच एकदम सांगत नाहीत. अलीकडे ते आमच्या मनाला फार जपतात.’

‘दादामहाराज भेटले?’

‘हो ना, भेटले.’

‘मग त्यांना का आणलं नाही?’

‘तुमचे दादामहाराज भारी हट्टी आहेत. त्यांचाही आमच्यावर विश्वास नाही.’ विषय बदलीत राजे म्हणाले. ‘बाळराजे, एक काम करा. मोरोपंतांना, अनाजींना आम्ही सदरेवर येत असल्याचा निरोप पाठवा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजाराम महालाबाहेर गेले. राजे विचारमग्न होऊन बसले होते. अचानक राजांनी नजर वर केली. सोयराबाई येत होत्या. सोयराबाईंच्या मागून येणाऱ्या दासीने आच्छादलेले तबक राजांच्या समोर ठेवले. राजांनी विचारले,

'काय हे?'

'दूध, फराळाचं....'

'आम्हांला नको.' दासीला राजे म्हणाले, 'हे घेऊन जा.'

'दूध 'नको' म्हणू नये.' सोयराबाई म्हणाल्या.

'घेऊन जा.' राजांनी दासीला सांगितले.

दासी तबक घेऊन गेली. सोयराबाईंनी चिंतेच्या सुरात विचारले,

'आपली तब्येत...'

'ठीक आहे, राणीसाहेब. आमच्या तब्येतीची काही तक्रार नाही.'

राजे ज्या प्रश्नाला भीत होते, तोच सोयराबाईंनी विचारला.

'संभाजी भेटला? आता तरी शुद्धीवर आला?'

'कोण?'

'संभाजी!'

राजांनी सोयराबाईंच्याकडे पाहिले. गौर वर्णाच्या रूपसंपन्न सोयराबाईंच्या नजरेतला विजय राजांच्या नजरेबरोबर झुकला.

'राणीसाहेब, तेही माणूस आहेत. पश्चात्ताप होणं स्वाभाविक आहे. मनानं फार दुबळे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

बनलेत ते.’

‘एवढं करून सवरून दुबळे?’ सोयराबाईंनी कुत्सितपणे विचारले.

राजांची नजर उंचावली. व्यथित आवाजात ते बोलले,

‘धिटाईतच साऱ्या गोष्टी घडतात, असं थोडंच आहे? बहुधा अशा गोष्टी दुबळेपणातूनच घडतात.’

राजांचे रूप पाहून सोयराबाई स्वत:ला सावरीत म्हणाल्या,

‘आपण होता, म्हणूनच हे सारं सहन केलंत. दुसरा कोणी असता, तर...’

राजे बैठकीवरून उठत म्हणाले,

‘थांबा, राणीसाहेब, उगा आमच्या मायेचं कौतुक करू नका! आम्ही कुणाचे तरी ऋणी आहोत, आणि ते ऋण सव्याज फेडतो आहोत. बाकी काही नाही.’

‘आम्हांला कळलं नाही.’ सोयराबाई उद्गारल्या.

‘आम्हांला तरी कुठं कळलंय्?’ राजे हसले. ‘राणीसाहेब, तुम्ही थांबा. आम्ही सदरेवर जाऊन येतो.’

राजे सदरेवर गेले, तेव्हा अनाजी, मोरोपंत, बाळाजी ही मंडळी सदरेवर जमली होती. सदरेच्या समया प्रज्वलित झाल्या होत्या. राजे बैठकीवर बसले.

‘अनाजी, मोरोपंत, बसा. आपल्याला खूप बोलायचं आहे.’

राजांनी आज्ञा करताच मोरोपंत, अनाजी बसले. राजांची नजर दोघांवर खिळली होती. दोघांच्या मागे बाळाजी अदबीने उभे होते. राजांनी विचारले,

‘मोरोपंत, खांदेरीची तटबंदी पुरी झाली?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी.’

‘छान! मग आम्हांला ते का सांगितलं नाहीत?’

‘प्रवासाची दगदग झालेली. तेव्हा उद्या कानांवर....’

‘मोरोपंत, उलट, असल्या बातम्यांनी झालेली दगदग विसरली जाते, सारा शीण नाहीसा होतो.’

मोरोपंतांनी आवंढा गिळला. ते म्हणाले,

‘इंग्रजांशी लढताना थोडी हानी सोसावी लागली.’

मोरोपंतांच्या त्या बोलांनी राजे अस्वस्थ झाले. त्यांनी विचारले,

‘मायनाक भंडारी....?’

‘क्षेम आहे.’

‘आमचे दर्यासारंग दौलतखान....?’

‘तेही.’

‘मग?’

‘लढाईत काही माणसं आणि तरांडी गमवावी लागली.’

राजांनी निःश्वास सोडला.

‘मोल दिल्याखेरीज विजय मिळतच नसतो. या खांदेरीच्या तटबंदीसाठी आम्ही केवढे अधीर होतो, हे तुम्ही जाणता. सारं ऐकायला आम्ही उत्सुक आहो. सांगा....’

‘महाराज, आपल्याला माहीतच आहे, खांदेरीच्या तटबंदीसाठी नागावला सारं साहित्य

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गोळा केलं होतं. पुढील संकट जाणून बेटावरच्या मायनाक भंडारीला दीडशे माणसं आणि चार तोफा संरक्षणासाठी दिल्या होत्या. काम सुरू झालं, दीड हात भिंत चढली; आणि इंग्रजांची शिबाडं काम रोखण्यासाठी खांदेरीवर चालून आली. नागावावरून तटाचं साहित्य घेऊन आलेल्या आपल्या होड्यांना इंग्रज अधिकारी ह्यूजेसनं मना केलं. पण त्यांच्या धमकावण्यांना भीक न घालता काम जारी ठेवलं. इंग्रजांचा वाढता विरोध लक्षात येताच दौलतखानाला आरमार घेऊन पाठविला. दौलतखान पोहोचेपर्यंत ह्यूजेसच्या मदतीला मिचीन आपली शिबाडं घेऊन पोहोचला होता. मिचीनच्या शिबाडांनी बेटावर तोफा डागल्याचं पाहताच आमचं आरमार पुढं झालं. मोठी लढाई झाली. त्या लढाईत इंग्रजांचं एक शिबाड गेलं. त्याच्यावरील थार्प ठार झाला; चार इंग्रज कामी आले. शिवाय, खासा कोलसाहेब आणि कित्येक इंग्रज आमचे कैदी बनले.'

'वा! दौलतखानानं खूप पराक्रम केला! बोला.'

'खरं आहे, महाराज!' मोरोपंत म्हणाले. 'इंग्रजांकडे रिव्हेंज, खिजू, हत्यार यांसारखी मोठी गलबतं असताना, आपल्या लहान गलबतांनी त्यांना जेरीला आणलं. पण त्या पराजयानं इंग्रज भडकले. इंग्रज शर्थीनं लढत होते. त्याच शर्थीनं दौलतखान डाव खेळत होता. संधी साधून चाळीस-पन्नास गुराबा घेऊन दौलतखान खिजूवर चालून गेला; पण हल्ला फसला. आम्हांला माघार घ्यावी लागली. या लढाईत इंग्रजांच्या बंदुका फुटल्या. आपल्या तीन गुराबा बुडाल्या; इतरांची मोडतोड झाली; तीनशे लोक ठार झाले; शंभर जखमी झाले.'

त्या बातमीने राजे व्यथित झाले. मोरोपंत सांगत होते :

'पण या पराभवानं दौलतखान खचला नाही, की बेटावरचं कामही थांबलं नाही. समुद्रात लढाई चालू असता बेटावर तट उभारला जात होता. रसद पोहोचत होती. गोडं पाणी पोहोचलं नाही, तरी तान्हेले, उपाशी राहून काम पुरं केलं जात होतं. यातच इंग्रजांच्या मदतीला सिद्दी आपल्या आरमारासह आला. तो लढाईत उतरणार, असं दिसताच आम्ही पवित्रा बदलला.'

'काय केलंत?'

'इंग्रज बळानं ऐकत नाहीत, हे ध्यानी येताच राजापूरच्या वखारीला आमच्या सैन्यानं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वेढा दिला. सर्व माणसं नजरकैद करून वखारीवर पहारा बसवला.'

राजे कौतुकाने हसले. त्यांच्या आनंदाला सीमा राहिल्या नाहीत. उतावीळ होऊन

ते म्हणाले,

'बोला.'

'ती मात्रा बरोबर लागू पडली. इंग्रजांचे डोळे उघडले; आणि ते तहाला आले. खांदेरी-उंदेरी बेटांचा आपला हक्क त्यांनी मान्य केला. आम्ही इंग्रजांशी तह केला. सिद्दीला यापुढं कोणत्याही प्रकारे मदत करू नये, ही अट इंग्रजांनी मान्य केली आहे. खांदेरीचं काम पुरं झालं आहे. इंग्रज गलबतं माघारी फिरली आहेत. दौलतखान सिद्दी कासमच्या गलबतांवर नजर ठेवून त्याच भागात आहे. त्या मधल्या परिस्थितीत आपण गडावर नव्हता. जेव्हा होता, तेव्हा स्वस्थता नव्हती. त्यामुळं आपल्या परोक्ष हे निर्णय आम्हां दोघांना करावे लागले.'

'विजयापेक्षाही त्याचाच आनंद आम्हांला अधिक आहे, मोरोपंत!'

अनाजी-मोरोपंतांनी वर पाहिले. राजांच्या चेहऱ्यावर आनंद प्रकटला होता. ते भान विसरून बोलत होते,

'अनाजी, मोरोपंत, गेली वीस वर्षं आपण हा खेळ खेळतो आहो. आम्ही नसताही आमचे मनोरथ सिद्धीला नेण्याची तुमची कुवत आहे, हे आम्ही आज पाहतो. त्याचा आनंद आम्हांला का वाटू नये? खांदेरीची तटबंदी करून आमचा असाच एक मनोरथ तुम्ही साकार केलात. त्याचं समाधान फार मोठं आहे. गेली वीस वर्षं आम्ही जंजिरा घेण्याचा प्रयत्न करतो; पण ते जमत नाही. त्याचं कारण आम्ही शोधलं. मुंबई हे सिद्दीचं माहेर आहे. इंग्रजांकडून त्याला हरतऱ्हेचं साहाय्य होतं. इंग्रजांची लुडबुड नसती, तर जंजिरा केव्हाच हाती आला असता. त्याचमुळं जंजिरा आणि मुंबई यांच्या मार्गात एक अडसर आम्हांला हवा होता. खांदेरी जलदुर्गानं सजली, तरच ते शक्य होतं. राज्याभिषेकाच्या आधीपासूनच असलेलं हे आमचं ध्येय तुम्ही पुरं केलंत. खांदेरी-उंदेरीवर जेव्हा आमचं बस्तान बसेल, तेव्हा या इंग्रज-सिद्दींचा पराभव करणं फारसं कठीण जाणार नाही. त्या दृष्टीनं आता पावलं टाकायला हवीत.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी समाधानाने मोरोपंत-अनाजींना निरोप दिला. त्याच समाधानात ते आपल्या महालात आले. तेथे बावरलेल्या सोयराबाई होत्या. समोरच्या नक्षीदार कोनाड्याखाली बसून महादेव काही तरी गोळा करीत होता. राजांनी विचारले,

‘महादेव, काय करतोस?’

‘जी! दिवा फुटला; गोळा करतो.’

‘कसला दिवा?’ म्हणत राजांचे लक्ष मोकळ्या कोनाड्यावर स्थिर झाले. विषदीप तेथे दिसत नव्हता. सोयराबाईंनी सांगितले,

‘मी विषदीप पाहत होते. अचानक हातून सुटला...’

राजांची नजर भयभीत सोयराबाईंच्या वर खिळली. राजांच्या चेहऱ्यावर क्षणात हसू उमटले. ते मोठ्याने हसत म्हणाले,

‘राणीसाहेब, मग एवढं घाबरायला काय झालं? फुटला, तर फुटला; कदाचित त्याची आम्हांला गरज लागणार नसेल.’

राजांच्या अनपेक्षित उत्तराने सोयराबाई चकित झाल्या. त्यांच्याही चेहऱ्यावर हळू हळू हसू प्रकटले.

त्याच वेळी दीपाचे फुटके तुकडे घेऊन महादेव महालाबाहेर गेला होता.

❑

११

राजे गडावर येऊन दोन दिवस झाले. गडावर येताच राजांनी राज्यकारभारात लक्ष गुंतविले होते. राजांच्या भोवती अनाजी, मोरोपंत, हंबीरराव, येसाजी, बाळाजी चिटणीस, पानसंबळ ही माणसे दिसत होती. राजे सर्व तपशील नजरेखालून घालत असल्याने जामदारखाना, दप्तरखाना, इतर कचेऱ्या यांतून सदैव कारकुनांची धावपळ चाललेली दिसे.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजमहालात आणि राजसदरेवर अनेक वेळा मध्यरात्रीपर्यंत राजांच्या बैठका भरत होत्या. त्यांत खांदेरी-उंदेरी, कोकणपट्टी वगैरे मुलुखांच्या मोहिमांचा तपशील कळत होता.

सायंकाळी राजे देवदर्शन आटोपून वाड्यात आले; आणि त्यांना फिरंगोजी आल्याचे कळले. त्या बातमीने राजांना आनंद झाला. राजे आतुरतेने सदरेवर गेले. सदरेवर फिरंगोजी बाळाजींसह बोलत बसले होते. राजे येताच दोघे उठले. फिरंगोजींनी राजांना मुजरा केला. मुजऱ्याला वाकलेले फिरंगोजी उठायच्या आत राजे पुढे धावले. त्यांनी फिरंगोजींना मिठीत घेतले. त्या मिठीने म्हाताऱ्या फिरंगोजींचा जीव भरून आला, कंठ दाटला, कानाच्या पाळीपर्यंत आलेले पांढरे कल्ले थरारले.

'फिरंगोजी, आम्हांला तुमची आठवण सदैव होते. चला.'

राजांनी फिरंगोजींचा हात धरला; आणि ते आपल्या महालाकडे चालू लागले. राजे फिरंगोजींना घेऊन आपल्या बैठकीवर बसले. त्याच वेळी राजाराम आत आले. फिरंगोजींनी उठून मुजरा केला.

'बाळराजे, फिरंगोजी काकांच्या पाया पडलात?' राजांनी सुचविले.

राजाराम पुढे झाले; आणि फिरंगोजींच्या पाया पडण्यासाठी ते वाकले. फिरंगोजींनी त्यांना प्रेमाने जवळ घेतले.

त्याच वेळी महालात प्रवेश करणाऱ्या सोयराबाईंचे शब्द कानांवर आले,

'फिरंगोजीकाका, एकाला लाडावलंत. त्याचं काय झालं, हे बघितलंच. आता ह्यांचे फार लाड करू नका!'

फिरंगोजींनी दचकून वर पाहिले. राजारामांना बाजूला करून मुजरा करीत ते म्हणाले,

'राणीसाहेब, मुजरा...'

राजांनी सर्वांवरून नजर टाकली. सोयराबाई काही बोलायच्या आत राजे म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘फिरंगोजी आले आहेत. त्यांच्यासाठी दूध-फराळाची व्यवस्था करा.’

‘ते का सांगायला पाहिजे?’ म्हणत सोयराबाई वळाल्या. ती इशारत समजून राजारामही त्यांच्या मागोमाग महालाबाहेर गेले. फिरंगोजींनी विचारले,

‘युवराज भेटले?’

‘हो, भेटले.’

‘बरं झालं, देवानं बघितलं.’

‘बरं झालं, हे खरं.’ राजे मांडीवर थाप मारीत म्हणाले. ‘पण देवानं बघितलं, असं म्हणता येणार नाही. युवराज आम्हांला भेटले. त्यांना खूप पश्चात्ताप झाला आहे. पण हा टिकेल, तेव्हा खरं...’

‘वय लहान, यील समजूत.’

‘फिरंगोजी, राजकारणात वयाला अवधी नसतो; वेळेला किंमत असते.’

‘असं म्हणू नकासा, राजं! युवराजांस्नी मी चांगला वळखतो. किती केलं, तरी तेच थोरलं, गादीचं मालक.’

राजांनी चमकून फिरंगोजींच्याकडे पाहिले. एक सूक्ष्म चिंता त्यांच्या मनात तरळून गेली.

किंचित घोगऱ्या आवाजात ते म्हणाले,

‘फिरंगोजी, तुम्ही हे म्हणता? कोण गादीचा मालक? कसली गादी? ही गादी आमची नव्हे. ही गादी तुमच्यासारख्या इमानी माणसांची. तिची हवी तशी वासलात लावायला आम्ही मोकळे नाही, फिरंगोजी! तानाजी, बाजी, मुरारजी, रामजी अशा अनेक वीरांनी आत्मसमर्पणातून ही गादी घडविली. तिची आता फार फार काळजी वाटते. आपल्या पाठीमागे हे राज्य जबाबदार हातीच जायला हवं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

फिरंगोजी हसले. 'राजं, उगी वाडाचार कशाला लावता? असला इचार आत्ताच कशाला करायचा?'

'मृत्यूचा भरवसा देता येत नाही, फिरंगोजी. त्या क्षणाची कल्पना नसते. आम्ही एकटे असतो, तर कदाचित आम्ही विचारही केला नसता. पण युवराजांच्या वर्तनानं आम्ही फार सावध झालो. आमच्या जिवाची चैन उडाली...'

त्याच वेळी दारवाजातून तबक घेऊन दासी आली. पाठोपाठ राजारामही आले. फराळाची ताटे बैठकीवर ठेवण्यात आली.

राजांनी आग्रह करून फिरंगोजींना आपल्या समक्ष फराळ करायला लावला.

रात्री राजांचा महाल परत भरला. अनाजी, मोरोपंत, फिरंगोजी, हंबीरराव, येसाजी, बाळाजी ही मंडळी महालात हजर होती. राजांचे रूप अधिक गंभीर दिसत होते. राजे बैठकीवर बसले. सर्वांना बसण्याची आज्ञा झाली. राजांनी सर्वांवरून नजर फिरविली; आणि ते बोलू लागले,

'मोरोपंत, अनाजी, संभाजीराजे पन्हाळ्याला आल्याचं समजताच आम्ही पन्हाळ्याला गेलो. त्यांना भेटून इकडे आलो. पण इथं आल्यापासून, पन्हाळ्याला काय झालं, हे आम्ही तुम्हांला सांगितलं नाही. तुमच्या मनाला ती चिंता लागणं स्वाभाविक आहे.'

'राजांनी सर्व गोष्टी प्रधानांना सांगायला हव्यात, असा थोडाच दंडक आहे?' हंबीरराव मध्येच बोलले.

राजांनी त्यांना थांबण्याची इशारत दिली. ते हसले.

'हंबीरराव, तुम्ही आमचे सेनापती. असं उतावीळ होऊन कसं चालेल? आमचा राज्याभिषेक झाल्यापासून आम्ही आमचे सारे निर्णय तुमच्याच सल्ल्यानं केले; ते का? राजाचं रूप एकेरी नसतं. राजा, प्रधान, सेनापती असं त्रिदळाचं ते रूप असतं. प्रधानमंडळ आणि राजा एकमतानं गेले, तरच राज्याचं हित असतं.' राजे क्षणभर थांबले. 'जाऊ दे. आम्ही काय सांगत होतो? -हं! आम्ही संभाजीराजांना भेटलो. त्यांना खूप पश्चात्ताप झाला आहे. आम्हांला ते खूप बदलल्यासारखे वाटले. या अनुभवानं ते शहाणे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होतील, असा आमचा भरवसा आहे. त्यांना संधी मिळावी, असं आम्हांला वाटतं.’

राजे थांबले. सारे एकमेकांकडे नजर टाकीत होते. कोणी काही बोलत नव्हते. हंबीररावांनी धीर केला. ते म्हणाले,

’महाराज...’

‘बोला.’

‘साफ साफ बोलायचं झालं, तर...’

‘तसंच बोला. आमची आज्ञा समजा.’

हंबीररावांनी साऱ्यांच्यावरून नजर फिरविली. ते विश्वासाने म्हणाले,

‘युवराजांच्यावर कुणाचा भरवसा नसला, तरी आमचा आहे.’

हंबीररावांच्या त्या बोलांनी साऱ्यांच्या नजरा राजांकडे वळल्या. राजांच्या चेहऱ्यावर सदैव दिसणारे स्मित तसेच होते.

‘हंबीरराव, एकदा सरळ बोलायचं ठरविल्यावर असा आडमार्ग का स्वीकारता? तुम्हांला असं म्हणायचं आहे ना की, अनाजी-मोरोपंतांचा युवराजांवर विश्वास नाही?... विश्वास एवढा सोपा नाही. तो आपल्या वर्तनानं मिळवावा लागतो; त्याला फार जपावं लागतं. रोहिडेश्वराच्या शपथेच्या वेळी आमच्या हाती ना सत्ता होती, ना संपत्ती. एका विश्वासाखेरीज द्यायला आमच्या हाती दुसरं काही नव्हतं...’

राजांनी श्वास घेतला.

‘युवराजांचा पश्चात्ताप आम्ही वारंवार पाहिला आहे. बाप होऊनही त्यांचा विश्वास आम्हांला वाटत नाही. त्याचं आम्हांला भारी दु:ख आहे. युवराजांचे छंद, फंद, त्यांचा धर्मभोळेपणा, त्यांचा उतावीळ स्वभाव एवढंच आम्ही वारंवार पाहतो आहो. जिथं खुद्द आम्हांला त्यांचा भरवसा देता येत नाही, तिथं त्याबद्दल प्रधानमंडळाला का दोषी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

समजावं? तो दोष आम्ही त्यांना देत नाही.’

‘महाराज!’ अनाजींनी मान वर केली. ‘महाराज, आम्हांला त्यांचा विश्वास वाटत नाही, असं मुळीच नाही; पण युवराजांच्या मनातच आमच्याबद्दल विश्वास नाही... आमच्यावर म्हणण्यापेक्षा माझ्यावर. मीच बाजूला झालो, तर सारी अडचण दूर होईल.’

‘अनाजी!’ राजांच्या मुद्रेवर एक वेगळाच भाव प्रकटला. ‘युवराजांचा तुमच्यावरचा रोष आम्हांला जास्त कळतो. तुम्ही बाजूला होण्याचा हा प्रश्न नाही. आम्हांला निराळंच चित्र दिसत आहे. क्षणभर समजा... आम्ही बाजूला झालो; तर...’

‘महाराज...’ मोरोपंत भीतीने उद्गारले.

‘मर्त्य जीवाचा भरवसा करू नका, मोरोपंत! ज्यानं अनेक जीवांची जबाबदारी पत्करली आहे, त्यानं तर सदैव आपल्या मृत्यूचा विचार करावा. त्याच्या माघारी त्यानं उभं केलेलं कार्य थांबणार नाही, याची त्याला खात्री असायला हवी. आम्ही पन्हाळ्याला गेलो. युवराज आमचे लाडके. त्यांना पाहिलं, की आमचं भान हरपतं. त्यांचे अश्रू पाहून आमचा जीव कलकलला. त्याच्या पश्चात्तापानं आम्हांला खूप धीर आला. पण त्याच वेळी त्याच पन्हाळगडावरून आम्हांला वाचविण्यासाठी आमचं सोंग घेऊन मुद्दाम शत्रूच्या हाती लागणारा शिवा न्हावी आम्ही विसरलो नाही. रात्रभर अखंड वादळवाऱ्यातून, चिखलपावसातून ऊर फुटेपर्यंत आमची पालखी तोलीत, राखीत धावणारे सहाशे वीर आम्ही कसे विसरणार? घोडखिंडीत आमच्या जिवासाठी प्राणाची बाजी लावणारे बाजी प्रभू आमच्या डोळ्यांसमोर तरळत होते. आम्ही गडावर सुखरूपपणे पोहोचल्याच्या तोफेचे आवाज ऐकण्यासाठी त्यांचे प्राण उतावीळ झाले होते. तो आवाज ऐकूनच त्यांनी शस्त्र खाली ठेवलं. आता आम्हांला सुद्धा असाच विश्वासाचा आवाज ऐकू यावा, आमचं राज्य आमच्या माघारी सुद्धा निर्धास्त असल्याचं समजावं, असं फार वाटतं.’

‘आता राज्याची कसली काळजी?’ अनाजी अभिमानाने बोलले. ‘आपलं राज्य बळकट पायावर उभं आहे. तुंगभद्रेपासून नर्मदेपर्यंत त्याची सत्ता विस्तारली आहे. राज्याचं रक्षण करण्यासाठी लक्षावधी फौज उभी आहे. छत्रपतींच्या नावाचा दबदबा आज आदिलशाही-कुतुबशाहीत घुमतो आहे. महाराज, राज्याचा सचिव म्हणून सांगतो, आपण निश्चिंत असावं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अनाजींचा आत्मविश्वास साऱ्यांच्याच मुखांवर उमटला होता.

राजे अचानक मोठ्याने हसले, परत क्षणात गंभीर झाले.

'अनाजी, व्वा! तुम्ही राज्याचे सचिव. तुम्ही हे बोलावं! आमच्या राज्याभिषेकाबरोबरच हे अजाणपण सर्वांच्या मनांत रेंगाळत आहे. सारे निर्धास्त बनले आहेत. त्याचीच भीती आम्हांला फार वाटते. अनाजी, कुतुबशाही-आदिलशाही यांकडे आमचं लक्ष केव्हाच नव्हतं. आमचं लक्ष सदैव दिल्लीश्वरावर खिळलं होतं. त्याच्या फौजा आज औरंगाबादेला गोळा होत आहेत. संतप्त दिलेरखान सूड घ्यायला उतावीळ आहे. जोवर दिल्लीश्वराचं राज्य या भूमीत आहे, तोवर आमचं राज्य सुरक्षित समजू नका. केव्हा तरी आमची अखेरची लढाई या आलमगिराबरोबर होणार आहे. त्या निर्णायक लढाईतून जे राहील, ते खरं श्रींचं राज्य ठरेल. असं बेसावध राहू नका, अनाजी! '

क्षणभर राजांनी उसंत घेतली. राजांच्या बोलांनी सारे विचारमग्न झाले होते. गिर्दीवर टेकलेल्या राजांच्या बोटांची चाळवाचाळव झाली. बोटातल्या अंगठीतल्या हिऱ्याचे अंग क्षणभर झळाळले.

'पुढचा काळ एवढ्या शांततेचा मिळेल, असं वाटत नाही. ते जाणून आम्ही शंभूबाळांना आमच्या राज्याची वाटणी सुचविली. तुंगभद्रेचं राज्य त्यांनी करावं, वरचा मुलूख बाळराजांनी तुम्हां सर्वांच्या सल्ल्यानं संभाळावा, असं आम्ही सांगितलं.'

'महाराज...' फिरंगोजी म्हणाले.

'फिरंगोजी! राज्याची वाटणी करण्याची का आम्हांला हौस आहे! पण माणसं जनावरांसारखी अल्पसंतुष्ट नसतात. आम्ही राज्याची वाटणी सुचविली; पण तेही युवराजांना मान्य होईल, असं दिसत नाही. त्यांचं आजवरचं वर्तन आमच्या मनात गोंधळ उडवतं. तेव्हा शक्य तो लौकर बाळराजांची मुंज व लग्न आटोपून घ्यावं, असं आमच्या मनात आहे... मोरोपंत, तुमचा विचार काय आहे?'

'एवढी गडबड करण्यासारखी परिस्थिती आहे, असं वाटत नाही. बाळराजे अद्याप लहान आहेत.' मोरोपंत बोलले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बाळराजे लहान आहेत.’ राजे संथपणे बोलले. ‘आणि आता आम्ही फार मोठे झालो. आता थोडा अवधी आहे, असं आम्हांला सुचविलं आहे. बाळराजे लहान आहेत, ते प्रकृतीनं कमजोर आहेत, हे खरं. म्हणूनच तुम्हां दोघांच्या सल्ल्यानं ते जातील. आम्ही या प्रचंड खेळात आमचे सौंगडी हरवले, सल्लागार गमावले. तसं पाहिलं, तर आता आपल्या पाच-सहा जणांचीच जोड राहिली आहे. फार मोठी जोखीम, आणि फार थोडे हात!’

राजांचा आवाज एकदम भरून आला, आवाज कापरा बनला, क्षणभर डोळ्यांत पाणी तरळले.

‘मोरोपंत, अनाजी...’ राजांनी आवंढा गिळला. ते कष्टाने बोलत होते, ‘युवराज ज्या दिवशी... मोगलांना मिळाले, त्या दिवसापासून आम्हांला या जबाबदारीची भीती वाटते. सगळं असुरक्षित वाटतं...’

राजांचे ते घायाळ रूप पाहून साऱ्यांचीच मने भरून आली. न राहवून मोरोपंत म्हणाले,

‘महाराज, चिंता नसावी. आम्ही कोणत्याही प्रसंगात एक मनानंच उभे राहू. आपली आज्ञा तडीला नेण्यात आम्हांला धन्यता वाटेल. त्यात शंका...’

‘मोरोपंत, आमची आज्ञा तडीला न्याल, यात आम्हांला शंका वाटत नाही. आता आम्हांला आमची आज्ञा पाळणारे नको आहेत. आम्ही असू वा नसू. पण आमचे मनोरथ सिद्धीला नेणारे आम्हांला हवे आहेत. ती ताकद तुमची, अनाजींची, हंबीररावांची आहे. तिची ओळख लौकरात लौकर करून घ्या. फार वेळ राहिला नाही.’

राजे उठले.

‘आम्ही झोपतो.’

साऱ्यांनी राजांना मुजरा केला. महादेव आत आला. राजांनी चूळ भरली, देवाला नमस्कार केला; आणि राजे पलंगावर जाऊन झोपले. महादेव समया शांत करीत होता. एक सेवक दबल्या पावलांनी आत आला. राजांचे पाय तो रगडीत होता. पलंग करकरत होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निद्रा हळुवार पावलांनी राजांच्या डोळ्यांवर उतरत होती...

□

१२

पहाटे स्नानपूजा आटोपून, जगदीश्वराचे दर्शन घेऊन राजे परत वाड्यात आले, तेव्हा गडावर कोवळी उन्हे फाकली होती. राजे महालात आले. राजे बैठकीवर बसले, तोच राजाराम आत आले. राजांच्या पायांवर त्यांनी मस्तक ठेवले. प्रेमभराने त्यांना उठवीत राजांनी विचारले,

'आज स्नान केलंत, वाटतं?'

'जी.'

'सर्दी, ताप गेला?'

'जी. म्हणून तर आईसाहेबांनी परवानगी दिली.'

'छान! बाळराजे, तुमच्या प्रकृतीची आईसाहेब फार काळजी करतात, नाही?'

राजारामांनी मान डोलविली.

'ती थोडी कमी करायला हवी.'

'अं?'

'तुम्ही आता शंभूराजांच्या महाली राहता ना?' राजांनी विचारले.

'जी.'

'तुम्ही आता लहान नाही. तुम्ही दहा वर्षांचे झाला. आमच्या गुरूंनी प्रकृती निकोप

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राखण्याचा सोपा मार्ग आम्हांला सांगितला आहे. कोणता, माहीत आहे?’

राजारामांनी नकारार्थी मान हलविली.

‘अगदी सोपा आहे. त्यांनी सांगितलं... प्रकृती बरी नसेल, तर नित्य व्यवहार आणि अल्प आहार केल्यानं ती दुरुस्त होते.’

‘पण आईसाहेब आम्हांला...’

‘त्यांची माया उदंड आहे, पण अंधळी आहे. आमच्या मासाहेबही आमच्यावर माया करीत होत्या; पण त्यांची माया डोळस होती. तुमच्यासारख्या युवराजांना बदलणारं हवामान जर पेलेनासं झालं, तर राजकारणाचे वादळवारे कसे सोसणार?’

राजांनी एकदम राजारामांना जवळ ओढले. त्यांना मिठीत घेत ते म्हणाले,

‘बाळराजे, तुम्हांला फार मोठी जबाबदारी स्वीकारावी लागणार आहे, हे आम्हांला स्पष्ट दिसतं. तुम्ही आपल्या आईसाहेबांच्या लाडांत फारसे गुंतू नका.’

‘छान शिकवण चाललीय्!’

त्या शब्दाबरोबर दोघांनी मागे वळून पाहिले. दरवाजात सोयराबाई उभ्या होत्या. त्यांना पाहताच राजारामांच्या चेहऱ्यावर भीती प्रकटली. क्षणभर अवधान सुटलेले राजे बोलले,

‘आम्ही खरं तेच सांगत होतो. बाळराजे आता लहान नाहीत. त्यांच्यावर पुष्कळ जबाबदारी पडणार आहे. दुबळ्या तब्येतीला ती झेपणारही नाही.’

‘कसली जबाबदारी?’ सोयराबाईंनी आश्चर्याने विचारले.

‘राज्याची!’ राजे शांतपणे म्हणाले. ‘शंभूराजे पन्हाळ्याला. मग इथली जबाबदारी कोण स्वीकारणार?’

त्या शब्दांनी सोयराबाईंचे अंग मोहरून गेले. सारा रोष नाहीसा होऊन त्यांच्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चेहऱ्यावर आनंद प्रकटला. राजांचे शब्द त्यांच्या कानांवर पडत होते :

‘एवढंच नव्हे, तर आता तातडीनं आम्ही त्यांची मुंज आणि लग्न आटोपणार आहो. राज्याभिषेकाच्या वेळी ज्या अडचणी आम्हांला आल्या, त्या यांच्या मार्गात आता ठेवायच्या नाहीत. यांचे मार्ग सदैव निष्कंटक असायला हवेत.’

‘आमच्याही मनात हेच होतं. मग मुली पाहायला सांगायला हवं.’

‘सांगण्याची काही गरज नाही. आमच्या डोळ्यांसमोर बाळराजांना शोभेल, अशी मुलगी आहे.’ राजे शांतपणे म्हणाले.

‘कुठली?’

‘आमच्या प्रतापरावांची!’

‘कुडतोजी गुजरांची?’ सोयराबाईंना धक्का बसला.

‘का? प्रतापराव नेसरीच्या युद्धात कामी आल्यानंतर आम्ही त्यांच्या घरी समाचाराला गेलो होतो. सारं घर दुःखात बुडालं असता, ती अजाण पोर सदरेवर खेळत होती. तेव्हा दोन-अडीच वर्षांची ती मुलगी असावी. मुलगी रूपानं चांगली आहे. आम्ही तिला प्रेमानं मांडीवर घेतलं होतं. तेव्हाच हा विचार आमच्या मनात आला होता. काय बरं त्या मुलीचं नाव?...’ राजे क्षणभर विचारात पडले. ‘हां! आठवलं... जानकी. हो जानकीच!’

‘काय आठवण तरी!...’ सोयराबाई कौतुकाने म्हणाल्या.

‘त्याला कारणही तसंच आहे. आम्ही प्रतापरावांच्या मुलीला मांडीवर घेतलेलं पाहून कुणी तरी म्हणालं, ‘महाराज, अजाण पोर पोरकी झाली!’ तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता आम्ही बोलून गेलो, ‘आम्ही मांडीवर घेतलेलं पोर कधीही पोरकं होत नसतं.’ ’

‘पण त्यांचं घराणं...’

सोयराबाईंचे बोलणे पुरे होऊ शकले नाही. राजांची नजर त्यांच्यावर खिळली होती.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेब! कुणाचं घराणं? प्रतापरावांचं? त्यांचा दर्जा कोण ठरवणार! बलिदानातून आमचं राज्य उभं ठाकलं. राणीसाहेब, असल्या गोष्टी मनात आणू नका! मालुसरे, गुजर, कंक ही माणसं आमच्याच तोलामोलाची आहेत. आम्ही छत्रपती आहोत, अभिषिक्त राजे आहोत. आम्ही ज्यांच्याशी सोयरीक करू, ते आपोआप सप्तकुळीचेच बनतात. हे धर्मालाही मान्य आहे.’

‘मी अनाजींना माणसं पाठवायला सांगते.’

‘अनाजींना बोलावू?’ राजारामांनी न कळत विचारले.

क्षणात सारा महाल हसण्याने भरला. राजाराम दोघांच्या चेहऱ्यांकडे पाहत होते. त्यांच्या हसण्याचा अर्थ राजारामांना कळत नव्हता. हसू आवरीत राजे म्हणाले,

‘पाहा, बाळराजेदेखील लग्नाला केवढे उतावीळ आहेत, ते!’

राजारामांच्या ध्यानी आले. ते ओशाळले. आज्ञेची वाट न पाहता ते पळत बाहेर निघून गेले. सोयराबाई हसत म्हणाल्या,

‘युवराज लाजले! मी सांगते अनाजींना.’

‘सांगायला हवं. आता फार अवधी नाही. शक्य तो लौकर आम्हांला ही मुंज आणि लग्न उरकून घ्यायचं आहे.’

सोयराबाई जाण्यासाठी वळल्या; पण राजांनी हाक मारली,

‘राणीसाहेब, फिरंगोजी आहेतच. त्यांना पाठवायला सांगा. तेच जाऊन सोयरीक ठरवून येतील.’

सोयराबाई महालाबाहेर आल्या, तेव्हा त्यांच्या आनंदाला सीमा राहिल्या नव्हत्या.

□

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१३

गडावर लग्नाची गडबड चालू झाली. प्रतापरावांच्या गावी अनाजी, फिरंगोजी, हंबीरराव ही खास माणसे पाठविली गेली. लग्न ठरवून वऱ्हाडाला आवतण करून सारी मंडळी गडावर परतली. राजारामांच्या मुंजीसाठी पैठणला अनंतभट्ट कावळ्यांना निमंत्रणाची पालखी पाठविली गेली.

एके दिवशी अनाजींच्यासह सोयराबाई राजांच्या महाली आल्या. सोयराबाईंनी सांगितले,

‘अनाजींनी शास्त्र्यांकडून मुहूर्त काढून आणले आहेत.’

राजांनी अनाजींच्याकडे पाहिले.

‘अनाजी, नजीकचा मुहूर्त कोणता आहे?’

‘फाल्गुन वद्य दशमीचा मुहूर्त अत्यंत सुलक्षणी आहे, असं शास्त्री म्हणतात.’

‘मग तो निश्चित करा.’

‘ते कसं जमणार?’ सोयराबाई म्हणाल्या. ‘पंधरा-वीस दिवस तर हाती राहिले. एवढ्या लौकर सारी तयारी होईल?’

‘हो!’ राजे बोलून गेले.

‘हो, म्हणून थोडंच होतं?’ सोयराबाई चिंतेच्या सुरात म्हणाल्या. ‘विनाकारण सगळी गडबड उडेल. काही नीट व्हायचं नाही.’

राजे हसले.

‘अनाजी, राणीसाहेबांचा आमच्या राजेपणावर अद्याप विश्वास दिसत नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काही तरी बोलायचं.’ सोयराबाई हसू लपवीत बोलल्या.

‘काही तरीच कसं? आम्ही छत्रपती आहो. राजाच्या मनात आलं, आणि ते घडलं नाही, तर तो राजा कसला? राणीसाहेब, तुम्ही चिंता करू नका. दागदागिने घडवायला आमचे निष्णात सुवर्णकार बसतील. नागाप्पा शेट्टी साऱ्या मुलुखाची पेठ एका दिवसात गडावर आणील. साऱ्यांची निमंत्रणं अनाजी, बाळाजी पार पाडतील. लग्न अचानक ठरलं, म्हणून त्याच्या डौलात कमतरता पडणार नाही. ते लग्न छत्रपतींच्याच तोलामोलानं होईल.’

राजे बोलले; आणि सारे दळ हलले. मुंज, लग्न यांची तयारी गडावर जोरात सुरू झाली. सोनारसोप्याचे निष्णात सुवर्णकार दागिन्यांची जडणघडण करण्यात गुंतले. मोती, हिरे, माणके, पाचू वगैरे रत्ने रत्नभांडारातून बाहेर पडू लागली. नाना पेठांची जरी वस्त्रे वाड्यात येत होती.

गडावर येणारे शामियाने, राहुट्या, डेरे, यांची देखभाल चालली होती. गडाचे अठरा कारखाने लग्नाच्या तयारीत गुंतले होते. खास कपडे केलेले घोडेस्वार आपल्या सरदारांनिशी लग्नाचे निमंत्रण घेऊन चारही दिशांना दौडत होते. गडाचे रूप दररोज पालटत होते. गडाच्या मोकळ्या जागांवर शामियाने, डेरे, राहुट्या उभारल्या गेल्या; आणि पाचाडला वऱ्हाड आल्याची खबर गडावर आली. खुद्द राजे वऱ्हाडाच्या आदरोपचारासाठी गडाखाली उतरले. वऱ्हाडाची व्यवस्था लागलेली पाहून राजे गडावर यायला निघाले.

राजांची पालखी नाणेदरवाजाजवळ आली, तेव्हा गड उतरणाऱ्या मोरोपंताची गाठ पडली. मोरोपंत आपल्या इतमामानिशी उभे होते. राजांनी विचारले,

‘मोरोपंत, तातडीनं गड उतरलात?’

‘जी. अनंतभट्ट कावळे येताहेत.’

‘कुठं आहेत?’

‘रायगडवाडीवर विश्रांती घेत आहेत. त्यांच्या स्वागतासाठी...’

‘रायगडवाडीला विश्रांती घेत आहेत?’ राजांनी नजर वर टाकली. आकाशात

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मध्यान्हीचा सूर्य तळपत होता. राजांचा चेहरा प्रसन्न झाला. ते पुढे म्हणाले,

‘मोठा योगायोग! चला. कुलोपाध्यायांच्या स्वागताला आम्ही पण येतो.’

राजांची पालखी वळली. राजे रायगडवाडीला गेले. तेथे अनंतभट्टांचे स्वागत करून, आशीर्वाद घेऊन राजांनी त्यांना सन्मानाने मोरोपंतांबरोबर गडावर रवाना केले; आणि राजे रायगडवाडीच्या महालासमोर आले.

महालात उडालेली धावपळ राजांच्या ध्यानी येत नव्हती. महालाच्या प्रवेशद्वाराशी राजांची नजर जायला आणि दाराशी पुतळाबाई यायला एकच गाठ पडली. राजांची नजर पुतळाबाईंवर स्थिरावली.

पुतळाबाई अस्मानी रंगाचे वस्त्र नेसल्या होत्या. या वयातही एक सात्त्विक, स्वाभाविक लज्जा त्यांच्या चेहऱ्यावर प्रकटली होती. डोळ्यांतले भाव बोलके झाले होते. पुतळाबाई नजर चुकवीत म्हणाल्या,

‘बसावं ना!’

‘हो ना!’ राजे भानावर आले. ‘राणीसाहेब, आज आम्ही इथंच जेवणार.’

‘ते का सांगायला हवं?’

‘तसं नाही हं! ‘जेवतो’ म्हणून राहत्या घरी देखील जेवण मिळत नसतं.’ राजांनी क्षणात सावरले. ते गडबडीने म्हणाले, ‘आम्ही पाचाडला वऱ्हाडाच्या स्वागतासाठी उतरलो होतो.’

‘बाळराजांच्या लग्नाची तयारी जोरात सुरू झाली, वाटतं?’

‘फार दिवस राहिलेत कुठं?’

‘सांगितलं, तर कळणार.’

‘तेही खरंच.’ राजे बैठकीवर बसत म्हणाले. पुतळाबाई पुढे आल्या. राजांनी उतरलेला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

टोप त्यांनी हाती घेतला.

‘युवराज येणार ना?’ पुतळाबाईंनी विचारले.

‘येतील?’ राजांनी विचारले.

‘हे काय बोलणं?’ पुतळाबाई उद्गारल्या. ‘धाकट्या भावाचं लग्न; आणि ते येणार नाहीत?’

‘फार विश्वास दिसतो.’

‘फार नसेल, पण एवढा विश्वास आहे माझा.’

राजे पुतळाबाईंच्याकडे थक्क होऊन पाहत होते.

‘पुतळा, तुला माणसांची पारख आहे; पण माणसं धरून ठेवता आली नाहीत.’

पुतळाबाई मोकळेपणे हसल्या.

‘काय झालं?’राजांनी विचारले.

‘काही नाही. पुरुषांना ते कळायचं नाही.’

‘काय?’

‘आम्हां बायकांना काही कळत नसेल, पण आपलं माणूस त्या हातून सुटू देत नाहीत.’

‘साऱ्यांचाच अनुभव तसा नसतो.’

‘ते मला माहीत नाही; पण माझा आहे.’ पुतळाबाई विश्वासाने म्हणाल्या.

‘तेही खोटं!’ राजे हसले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘का?’

‘आठवतं? दक्षिणदिग्विजयानंतर आम्ही इथं आलो, ते आठवा. हा भरवसा असता, तर पायांत जोडे घालण्याची सक्ती केली नसती.’

पुतळाबाई मोकळेपणाने हसल्या. आश्चर्य करायची पाळी राजांच्या वर आली.

‘का? हसलात का?’

‘ते आपल्याला कळायचं नाही. ज्यांना जोड्यांची सोबत पुरते, त्यांना डावलणं फार कठीण असतं.’

राजे भारावून उठले. भावनाविवश होऊन ते बोलले,

‘पुतळा, हे मात्र अगदी खरं. त्याचा अनुभव आम्हांला प्रत्येक क्षणी येतो.’

राजांच्या नजरेला नजर देणे कठीण जात होते. पुतळाबाईंची नजर झुकली. राजांच्या पावलांवर त्यांची नजर स्थिरावली. पावले नजीक येत होती.

त्या दिवशी राजांना रायगडवाडीला जेवण घेतले. भोजन आटोपून राजे महाली आले. थोडी विश्रांती घेऊन राजे गडावर जाण्यासाठी उठले. पुतळाबाईंनी सांगितले,

‘मी गडावर येणार आहे.’

‘अं? केव्हा?’

‘उद्या येऊ?’ पुतळाबाईंनी विचारले.

‘तुम्हांला कोण अडवणार! पण निमंत्रण आहे का?’ राजांनी खोचकपणे विचारले.

‘आपल्याला आहे?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘काय?’ राजांची नजर एकदम वर झाली. हसणे विरले. ते ध्यानी येताच पुतळाबाई गडबडीने म्हणाल्या,

‘मुलाच्या लग्नात आईला निमंत्रण कसलं?’

‘हो, तेही खरंच... आम्ही येतो.’

राजे पाठमोरे झाले. तोच कानांवर शब्द आले,

‘थांबावं!’

राजे वळले. पुतळाबाईंचा चेहरा व्याकूळ बनला होता. राजांनी विचारले,

‘काय?’

‘हवं तर मी येत नाही गडावर.’

‘पुतळा!’ राजे उद्गारले.

कष्टाने अश्रू आवरीत पुतळाबाई म्हणाल्या,

‘इथं मनाला चैन पडत नाही. पायांची सारखी आठवण होते. लग्नात मिरविण्याची हौस नाही मला. पाय दिसतील, म्हणून...’

राजे पुढे झाले. त्यांनी पुतळाबाईंच्या खांद्यावर हात ठेवला. राजांचा शब्द कानांवर पडला,

‘पुतळा! वर बघ.’

पुतळाबाईंची अश्रूपूर्ण नजर उंचावली. त्या नजरेत बघत राजे बोलले,

‘तुम्ही येऊ नये, असं का आम्हांला वाटतं? आम्हांला आवडतं, ते हरवणं. हा तर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आमचा दैवदोष आहे! पण आमच्यासाठी तुम्ही अपमानित व्हावं, असं आम्हांला वाटत नाही.'

'या पायांसाठी हवं ते सोशीन मी!' हसत, डोळ्यांतले अश्रू पुशीत पुतळाबाई म्हणाल्या.

'ठीक आहे. आम्ही उद्या मेणा पाठवू.' एवढे बोलून राजे चटकन वळले आणि महालाबाहेर पडले.

भरभर जाणाऱ्या राजांची मंद चाल पुतळाबाईंच्याच ध्यानी येत होती.

दुसऱ्या दिवशी एक शाही मेणा गडाखाली उतरला.

□

१४

राजांच्या महालात राजे बाळाजी आवजींना पत्रांचे मजकूर सांगत होते.

त्याच वेळी अनाजी आत आले. राजांची नजर त्यांच्याकडे वळली.

'बोला, अनाजी! काय काम काढलंत?'

'काम नाही; पण निश्चलपुरींचा निरोप आहे.'

'कसला?'

'आज निश्चलपुरी होम करीत आहेत. तेव्हा येऊन जावं, अशी त्यांची इच्छा आहे.'

'कसला होम?'

'युवराजांचा व्रतबंध, विवाह होणार. तेव्हा सर्व सुखरूपपणे पार पडावं, म्हणून...'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘समजलो. ठीक आहे. आम्ही येऊ, म्हणून कळवा.’

अनाजी जागचे हलले नाहीत. त्यांची पावले घुटमळली.

‘अनाजी!’

‘जी, एक विनंती आहे.’

‘बोला.’

‘जर कवी कलश कैदेतून मोकळे झाले, तर निश्चलपुरींना त्यांची खूप मदत होईल.’

क्षणभर राजे विचारात पडले.

‘अनाजी, तुम्हांला असं वाटतं, तर जरूर त्यांना मोकळं करा. ते विद्वान आहेत, जाणते आहेत, पण विवेकशून्य आहेत. यापुढं त्या दोघांना कैदेत ठेवायची गरज नाही; पण त्यांना गडाखाली जाऊ देऊ नका. निश्चलपुरींच्या कार्यात ते गुंतले, तर आम्हांला समाधान आहे.’

अनाजींनी एकदम मुजरा केलेला पाहून राजांची नजर मागे वळली. बाळाजी गडबडीने उठून मुजरा करते झाले. महालात सोयराबाई येत होत्या. राजे बाळाजींना म्हणाले,

‘बाळाजी, आता पत्रं लिहून होतील, असं वाटत नाही. दोन प्रहरी पाहू.’

लेखनसाहित्य आवरून बाळाजी अनाजींसह महालाबाहेर गेले. सोयराबाई सामोऱ्या आल्या. त्यांच्या मागून आलेल्या दासींनी रेशमी आच्छादनाखाली झाकलेली चार तबके राजांच्या समोर गालिचावर ठेवली. राजे आश्चर्याने म्हणाले,

‘राणीसाहेब, लग्नाचा फराळ चालला असला, तरी प्रत्येक वस्तू आम्ही चाखायला हवी, असं थोडंच आहे? सकाळी आम्ही काही घेत नाही.’

सोयराबाईंनी हसत तबकावरील आच्छादने लागोपाठ उचलली. चारही तबकांत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निरनिराळे दागिने झगमगत होते. रत्नजडित गोठ, पाठल्या, तन्मणी, लफ्फा, नथ अशा अनेक दागिन्यांवरून राजांची नजर फिरत होती.

‘राणीसाहेब, आम्ही सांगितलं, ते खरं ना? आमचे सुवर्णकार तरबेज आहेत.’

‘अजून दागिने घडायचे आहेत.’

‘घडतील! आमच्या भांडारात विपुल रत्नं, सोनं, चांदी आहे, ते घडवायला कसबी कलाकार आहेत. तुमच्यासारख्या हौशी राणीसाहेब आहेत. मग कमतरता का? पण, राणीसाहेब, दागिने बेतानं करा. आपली सून आठ-नऊ वर्षांची. तिला हे सर्व पेलायला तर हवं.’

सोयराबाई त्या बोलण्याने खूश झाल्या. त्यांच्या सौंदर्याला एक वेगळीच धार चढली. इशारतीबरोबर दासी तबके घेऊन गेल्या. सोयराबाई सांगत होत्या.

‘एवढा जवळचा मुहूर्त काढलात. सारं पाहता-पाहता थकून जायला होतं.’

‘पाहून थकता; तर जे बिचारे रात्रंदिवस राबत आहेत, त्यांचं काय होत असेल?’

‘खरचं, बाई! अनाजींना तर एवढी उसंत नाही. काही सुचवलं, की हजर केलंच.’

‘राज्यउभारणीत खपलेली माणसं. लग्नात उणीव कशी राहू देतील?’

‘पण सकाळीच कुणाला पत्रं पाठवायची चालली होती?’

‘व्वा! तुम्हांला वाटतं की, तुम्ही तेवढ्या कामात, आम्ही मोकळे! असंच ना? ज्या साधुसंतांचे आशीर्वाद आम्हांला लाभले, त्यांना लग्नाची पत्रं पाठवायला नकोत?’

सोयराबाईंचे शंकासमाधान पुरे झाले नाही. त्यांनी विचारले,

‘आज गडाखाली मेणा गेला, असं ऐकलं.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो ना! धाकट्या राणीसाहेबांना काल आम्ही भेटलो. त्यांच्याकरिता मेणा पाठविला. तुम्हांलाही खूप मदत होईल.’

‘येऊ देत ना! अशा वेळी सर्वांनी यायचं नाही, तर केव्हा यायचं?’

‘तेच म्हणतोय् आम्ही. हे प्रसंग असे असतात, की शहाण्या माणसांनी ठरवलं, तर सारी कटुता या प्रसंगी नाहीशी करता येते. अशा सणावारांचा तोच फायदा असतो. म्हणून तर आम्ही आज मुद्दाम पन्हाळ्याला थैली पाठवणार आहो.’

‘पन्हाळ्याला?’ सोयराबाईंची नजर विस्फारली गेली.

‘हो! बाळराजांचं लग्न; आणि त्या लग्नाला येसू, भवानी आणि खुद्द युवराज नाहीत, हे कसं शक्य आहे?’

पाहता-पाहता सोयराबाईंचे रूप पालटले. नजरेत धूसर वर्तुळे प्रकटली. एरव्ही निर्व्याज दिसणारे डोळे तीक्ष्ण बनले. नाकाचा शेंडा, कानांच्या पाळ्या संतप्त झाल्या. त्यांनी अस्थिर आवाजात विचारले,

‘कोण, युवराज?’

‘राणीसाहेब!’

‘फार ऐकलं! हे लाड आम्हांला सोसायचे नाहीत.’ संतापाने थरथरत सोयराबाई उभ्या राहिल्या.

त्या बदलत्या रूपाने राजे सुन्न झाले.

‘राणीसाहेब, थोडं शांत...’

पण संतप्त सोयराबाईंनी राजांना बोलूच दिले नाही. त्या उफाळल्या.

‘मला काही सांगू नका. म्हणे, युवराज! भर सदरेवर आमचा अपमान झाला, तरी तो

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ऐकून घ्यायचा! कारण ते युवराज! ते व्यसनी बनले, तरी ते माफ! कारण ते युवराज ना!'

'राणीसाहेब!'

'हं! ब्राह्मण मुलीशी ते गैर वागले, तरी ते क्षम्य! त्या मुलीनं जीव दिला, तरी युवराजांना पाठीशी. जारणमारणात गुंतले, तरी डोळेझाक!'

'सोयरा...' राजे ओरडले. त्यांचे सारे अंग कंप पावत होते.

'फार ऐकलं मी!' तुच्छतेने राजांच्याकडे पाहत भान विसरत चाललेल्या सोयराबाई बोलल्या.

'काही सांगू नका. खुद्द आपल्या विरुद्ध बगावत करून, मोगली मनसबदार बनून येणारे जर राज्याचे युवराज असतील, तर राज्य आपलं ठरणार नाही; मोगली ठरेल...'

'जबान संभाळा, राणीसाहेब!' राजे घोगऱ्या आवाजात बोलू लागले. 'राजकारणातले धडे राणीवशातून आम्ही कधीही घेतले नाहीत. ते देण्याचा तुम्ही प्रयत्न करू नका. युवराजांच्या गैरवर्तनानं त्यांच्या युवराजपदाबद्दल शंका निर्माण झाली असली, तरी दैवयोगानं तेच बलवत्तर आहेत.'

'कसला दैवयोग?'

राजे हसले. 'राणीसाहेब, दैवयोगानं ते ज्येष्ठ पुत्र म्हणूनच जन्माला आलेत, हे आपण विसरू नका.'

त्या उत्तराने सोयराबाई निरुत्तर होतील, असे राजांना वाटले; पण सोयराबाईंचा आवाज थोडाही नरमला नाही. एक छद्मी स्मित त्यांच्या मुखावर विलसले. राजांच्या नजरेला नजर देत त्या म्हणाल्या,

'मी कशाला विसरू? अंधळ्या प्रेमापोटी आपल्याच ध्यानी येत नाही.'

'काय म्हणाला?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मी म्हणाले, अंधळ्या प्रेमापोटी आपल्याच ध्यानी येत नाही.’

‘बोला. थांबलात का?’

राजांच्याकडे पाहत सोयराबाई शांतपणे म्हणाल्या,

‘संभाजी थोरल्या बाईंचे मुलगे असतील; पण अभिषिक्त राणी मी आहे.’

‘म्हणून काय झालं? तोही दैवयोगच!’

‘तेच सांगतेय् मी! बाळराजे आमचे चिरंजीव आहेत. धर्मन्यायानं तेच युवराज आहेत!’

राजांचा कानांवर विश्वास बसत नव्हता. त्यांचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता. विजयाचे अहंकारी स्मित सोयराबाईंच्या चेहऱ्यावर उमटले होते. आपल्या शुष्क ओठांवरून जीभ फिरवीत राजे म्हणाले,

‘राणीसाहेब! फक्त राज्ञीपणच लक्षात ठेवलंत. उभ्या आयुष्यात एवढंच लक्षात राहिलं! आमचं ऐका. शंभूबाळांनी या लग्नाला येणं अत्यंत आवश्यक आहे.’

‘ठीक आहे. जाते मी.’ सोयराबाई संतापाने वळल्या.

‘कुठं निघालात?’

सोयराबाई थांबल्या. त्या शांतपणे म्हणाल्या,

‘अनाजींना सर्व थांबवायला सांगते.’

‘राणीसाहेब!’

‘बाळराजांच्या लग्नाला जर संभाजी येणार असेल, तर हे लग्न होणार नाही! बाळराजांना युवराजपद मिळणार नसेल, तर न मिळो. वडिलांनी टाकलं, म्हणून मला टाकता येणार नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्या बोलांनी राजांचा जीव पिळवटून गेला. संतापाची जागा उद्वेगानं घेतली.

‘राणीसाहेब, लग्नाची सारी तयारी झाली असता, हे लग्न थांबवू नका! युवराजपदाच्या भावी वादात छत्रपतींची प्रतिष्ठा गुंतवू नका! आम्ही एक विचार करतो, तेव्हा तुम्ही दुसरा करता. घरापेक्षा आम्ही राज्याची जबाबदारी थोर मानली. या लग्नाच्या निमित्तानं संभाजी येईल, त्याची समजूत काढता येईल, असं आम्हांला वाटलं. आम्हांला का त्याचं वर्तन कळत नाही? त्यासाठीच हा खटाटोप होता.’

‘कसला खटाटोप?’ सोयराबाई बोलल्या. ‘बाळराजांच्या लग्नात युवराज म्हणून संभाजीला मिरवायचं, आपल्याबरोबर साऱ्यांना त्याची करणी विसरायला लावायची, हेच ना?’

राजे हताश झाले.

‘ते तुमच्या ध्यानी यायचं नाही. संभाजी अविवेकी असेल; पण तो मनाचा भोळा, भावनेच्या आहारी जाणारा आहे. राणीसाहेब, त्यांना मायेनं चुचकारलंत, तर कदाचित ते राजारामांच्या हाती आपणहून राज्य देऊन, आनंदानं वनवासी होतील! तेवढा मनाचा मोठेपणा त्यांच्या जवळ निश्चितपणे आहे.’ बोलता-बोलता राजांचा आवाज रूक्ष बनला. ‘पण, राणीसाहेब, आम्ही सांगतो, त्यावर विश्वास ठेवा. संभाजी भोळे, भावनाविवश असतील; पण ते आमचे चिरंजीव आहेत. कच्च्या दोरखंडानं त्यांना जखडू पाहाल, तर एक ना एक दिवस ते तुम्हांला सुद्धा जड झाल्याखेरीज राहणार नाहीत!’

एक विलक्षण भीती सोयराबाईंच्या मनात तरळून गेली; पण दुसऱ्याच क्षणी स्वत:ला सावरून त्यांनी विचारले,

‘मग संभाजीराजे येणार नाहीत ना?’

‘काळजी करू नका. बाळराजांच्या लग्नाला संभाजीराजे येणार नाहीत... जा तुम्ही. आम्ही फार थकलो.’

विजयाचे स्मित घेऊन सोयराबाई महालाबाहेर आल्या. त्या सातमहालाकडे जात असता मनोहारी नजरेत आली. मनोहारीला हाक मारून त्यांनी सांगितले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘मनू, अशीच जा; आणि अनाजींना, मोरोपंतांना मी बोलावल्याचं सांग.’

सोयराबाई सातमहालाकडे जात होत्या. जागतेपणी अनेक स्वप्ने त्यांच्या डोळ्यांसमोर तरळत होती....

□

१५

सोयराबाई महालातून निघून गेल्या; पण राजे महालाबाहेर आले नाहीत. ते महालातच बसून होते. त्यांचा सारा उत्साह नाहीसा झाला होता. चिंतेची दाट छाया चेहऱ्यावर उमटली होती. वेळ सरत होता; पण राजांना त्याचे भान नव्हते.

राजांची नजर सहज वर गेली, आणि दारात उभ्या असलेल्या पुतळाबाईंच्यावर स्थिरावली. राजांनी विचारले,

‘केव्हा आलात!’

‘आत्ता हेच! आले, ते इकडे आले. तब्येत बरी नाही?’

‘का?’

‘या वेळी महाली भेट होईल, असं वाटलं नव्हतं.’

राजांच्या चेहऱ्यावर स्मित प्रकटले.

‘तुम्हांला माहीत नाही, वाटतं? राजांची तब्येत कधी बिघडत नसते, कारण ती बिघडली, तर इतरांना त्याचा फार त्रास होतो.’

‘मेणा पाठवला, म्हणून बाई रागावल्या?’

‘नाही. तुम्ही आलात खऱ्या; पण इथला साराच रागरंग पालटला आहे. फार सोसावं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लागेल.’

‘तेवढं बळ आहे मला.’ पुतळाबाई म्हणाल्या.

पुतळाबाईंच्या तोंडून अपेक्षित उत्तर येताच राजे हसले. राजे म्हणाले,

‘दारातच का उभ्या? या ना आत.’

‘अजून आत गेले नाही. एकदा हजेरी लावून येते.’

‘पाहा हं! हजेरी लावायला जाल, आणि चुकून हजेरीखालून याल!’

त्या बोलण्याने पुतळाबाई हसत वळल्या. पुतळाबाई सातमहालाकडे जात असता हाती तबक घेऊन गडबडीने जात असलेली मनोहारी त्यांना दिसली. पुतळाबाईंनी विचारले,

‘मनू, माझं सामान आलं?’

‘जी.’ मनोहारी म्हणाली. ‘विठीला लावायला सांगितलं आहे. आता इथंच राहणार ना?’

‘मनात तर तसंच आहे. थोरल्या बाई कुठं आहेत?’

‘मुदपाकखान्यात. तिकडेच निघाले होते.’

‘तू चल पुढं. मी आलेच.’

सातमहालातील आपल्या महालात जाऊन, सूचना देऊन पुतळाबाई मुदपाकखान्याकडे वळल्या.

मुदपाकखान्यात अनेक बायकांची वर्दळ चालू होती. जमिनीवर पसरलेल्या वस्त्रांवर अनेक फराळाचे पदार्थ लागले होते. समोरच्या सोप्यात चुलींची रांग लागली होती. खुद्द सोयराबाई चांदीच्या पाटावर बसल्या होत्या. पुतळाबाईंना पाहताच सोयराबाई बसल्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जागेवरून म्हणाल्या,

'धाकट्या बाई, केव्हा आलात?'

'नुकतीच आले.'

'आधी कळलं असंत, तर पायघड्या तरी घातल्या असत्या!'

'मला पायघड्या कशाला?'

'वा! असं कुठं झालंय्? आठ दिवसांवर लग्न आलं, पण तुमचा पत्ता नाही. निमंत्रणासाठी अडला होता, वाटतं?'

'तसं म्हणा!' पुतळाबाई म्हणाल्या.

'रागावू नका हं, बाई! एकटी म्हणून कुठं कुठं पाहणार? आता मला काळजी नाही. सारं तुमच्या हवाली करून मोकळी होईन मी.'

'जबाबदारी घ्यायला भ्याले असते, तर आलेच नसते.'

'ठरलं! ही उठले. निस्तरा सारं!' म्हणत सोयराबाई उठल्या. त्या बाहेर गेल्या आणि पुतळाबाई हसत चांदीच्या पाटावर बसल्या.

-आणि खरोखरच त्या दिवसापासून पुतळाबाईंनी सर्व आपल्या हाती घेतलं. साऱ्या अडी-अडचणींसाठी पुतळाबाईंना विचारले जात होते. सोनारसोपा, वस्त्रागार, मुदपाकखाना यांत पुतळाबाई गुंतून गेल्या. डोकं वर काढायला उसंत राहिली नाही.

राजारामांची मुंज थाटात पार पडली. त्या निमित्ताने राजांनी दानधर्म केला. राजारामांच्या विवाहाची मुहूर्तमेढ रोवली गेली. वाड्याच्या प्रथम चौकात वैभवसंपन्न मांडव उभा ठाकला. तो मुलीचा मांडव होता. त्याच्या वैभवात काही कमतरता राहू नये. अशी राजांची खास आज्ञा होती. सिंहासनसदरेच्या मागे मुलाचा मांडव उभारला होता.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गडावरच्या देवतांना निमंत्रणे दिली गेली. लग्नाचा दिवस जवळ येत होता. पाचाडहून वाजत-गाजत मुलीचे वऱ्हाड गडावर आले. होळीचौकात उभारलेल्या शामियान्यात शिरकाईच्या साक्षीने राजांनी वऱ्हाडाचे स्वागत केले; आणि वऱ्हाडाच्या मानकऱ्यांना रंगमहालात नेले. रंगमहाल जानवसघर बनला. गडावरच्या देवदेवतांना अभिषेक झाले. निश्चलपुरींचे होम झाले.

गडावर उभारलेले शामियाने, डेरे यांतून खाशी पाहुणे मंडळी उतरली होती. खासे कपडे घातलेली, पगडी-ढाल-तलवारींनिशी घोड्यावरून वर्दळ करणारी ती माणसे साऱ्यांचे लक्ष वेधून घेत होती.

भल्या पहाटेला चौघडा झडण्याआधीच सारा वाडा जागा झाला होता. पलित्यांच्या, दिवट्यांच्या, समयांच्या प्रकाशात दोन्ही मांडवांतून वर्दळ चालू झाली. पहाटेला चौघडा झडला. उगवत्या सूर्यकिरणांबरोबर सनईचे मंगल सूर वाड्यात पसरू लागले.

प्रत्येक दिवशी काही ना काही विधी होत होते. पाच-सहा दिवसांत सीमांतपूजन, ओले रुखवत, उष्टी हळद, वाङ्‌निश्चय हे कार्यक्रम पार पडले. मेजवान्या, नृत्यगायने यांत आलेली पाहुणे मंडळी गुंग झाली होती.

लग्नाचा दिवस उजाडला. सायंकाळी गौरीहराची पूजा आटोपून नवरी मुलगी मांडवात आली. पाहुणे, सरदार, मानकरी यांनी मांडव भरला होता. मंगल वाद्ये वाजत होती. चांदीच्या गंगाळात तरंगणारे घटिकापात्र मुहूर्त नजीक आल्याचे सांगत होते. नवरा मुलगा मांडवात आला. सर्वांच्या हाती अक्षता वाटण्यात आली; आणि मांडवातून मंगलाष्टकाचे सूर पसरू लागले. उंचावलेल्या शेकडो हातांनी वधूवरांवर अक्षता टाकून आशीर्वाद दिले. तुताऱ्यांचे, शिंगाचे आवाज गगनाला भिडले. राजारामांचे लग्न पार पडले.

तांदळाच्या लाह्या होमात पडू लागल्या. सप्तपदी झाल्यावर राजांनी आणि सोयराबाईंनी सुनमुख पाहिले. नवरानवरींच्या चांदीच्या पाटानजीक राजांचा पाट मांडला गेला. ऐरणीपात्रदानासाठी मुलीचे मामा उभे राहिले. झालीतले तेहतीस पिठांचे दिवे प्रज्वलित करण्यात आले. मामांनी ती झाल उचलली. नवरी, नवरदेव आणि राजे यांच्या मस्तकांवर ती झाल धरून ती राजांच्या हाती दिली. ब्राह्मण म्हणत होते...

झाल धरलेले राजांचे हात कंप पावत होते. ब्राह्मण सांगत होते, ते राजांना जाणवत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

होते.

‘या मुलीच्या निमित्तानं मागच्या बारा पिढ्या उद्धरून गेल्या. आता या विवाहानं पुढच्या बारा पिढ्या उद्धरतील. ही मुलगी आता तुमची आहे.’

ते ऐकत असताना राजांचे डोळे भरून आले. राजांचे मन बेचैन होऊन उठले. गडबडीने आपल्या हातांतली झाल ब्राह्मणांना दान करून, राजांनी मुलीच्या मामाला मिठी मारली. दोघांच्या नेत्रांतून अश्रू ओघळले. राजांचा कंठ दाटून आला. मिठीतून बाजूला होत राजे कष्टाने म्हणाले,

‘आज प्रतापराव हवे होते! व्याह्यांची भेट मनाजोगी घडली असती...’

राजांना पुढे बोलवेना. त्या प्रसंगाने सद्गदित झालेले, राजारामांच्या मागे हाती लिंबू लावलेली कट्यार घेऊन उभे असलेले हंबीरराव मोहिते पुढे झाले.

‘महाराज वरातीची तयारी झाली आहे.’

‘हो!’

वाड्याच्या बाहेर वरातीची पूर्ण तयारी झाली होती. वाड्यापासून जगदीश्वरापर्यंतची वाट दुतर्फा लावलेल्या टेंभ्यांच्या उजेडात प्रज्वलित झाली होती. होळीचौकात वरातीत भाग घेणारी, दागिन्यांनी सजवलेली घोडी उभी होती. पेठेच्या कमानीपाशी जिलेबीचा हत्ती डोलत होता. वाड्याच्या प्रवेशद्वारी सुलक्षणी सजवलेला घोडा उभा होता. नवरानवरी घोड्यावर बसली. शिंगे फुंकली गेली. वरातीचे घोडे होळीचौकात वाजत आले. इशारतीबरोबर वरातीच्या मागे-पुढे घोडी उभी राहिली. आघाडीचा हत्ती चालू लागला. पाठोपाठ सजलेली घोडी जात होती. हलगीच्या तालावर दांडपट्टा खेळला जात होता. तलवारीचे हात होत होते. वाजंत्रीवाल्याचे ताफे मंजुळ सुरांनी वातावरण भरत होते. मंद गतीने वरात चालली होती. वरातीमागून राजे, पाहुणे, सरदार चालले होते. पेठेतून जात असता नवरानवरींवरून सतका होत होता. मोहरा उधळल्या जात होत्या. देवदर्शन आटोपून वरात माघारी वाड्यावर आली. मुलीचा मांडव डाव्या हाती टाकून राजाराम मुलाच्या मांडवाकडे चालले होते. अंगावरच्या जरदी जरी शालूची गाठ मागुती चालणाऱ्या नवऱ्या मुलीच्या शालूला मारलेली होती. नवऱ्या मुलीचे वस्त्र सावरीत बरोबर दासी चालत होत्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नवरानवरी मुलाच्या मांडवासमोर आले.

मांडवात एकच गडबड उडाली. साऱ्या स्त्रिया नवरानवरीला पाहण्यासाठी दाटीवाटीने उभ्या होत्या. सुवासिनी पुढे झाल्या. नवरानवरीच्या पायांवर पाणी घालून, डोळ्यांना पाणी लावून त्यांनी दहीभाताचे गोळे ओवाळून टाकले. सुवासिनी मागे सरकल्या. नवरानवरीच्या मागे हंबीरराव कट्यार घेऊन उभे होते. त्यांच्याजवळ राजे उभे होते. त्यांची नजर नवरानवरीला ओवाळण्यासाठी येत असलेल्या पुतळाबाईंवर स्थिरावली. गुलाबी शालू नेसलेल्या पुतळाबाई सुवर्णतबक हाती घेऊन येत होत्या. तबकातल्या निरांजनांचा उजेड त्यांच्या प्रसन्न चेहऱ्यावर उमटला होता. जणू सारे समाधान उजळल्याचा भास राजांना झाला. नवरानवरीला टिळा लावण्यासाठी पुतळाबाईंनी कुंकवाच्या कोयरीत बोट घातले; आणि त्याच वेळी सोयराबाईंचा आवाज आला,

'बाई, थांबा! ओवाळू नका!'

नाजूक हसण्याने, कुजबुजण्याने भरलेला मांडवात एकदम शांतता पसरली. पुतळाबाईंनी दचकून मागे पाहिले. सोयराबाई येत होत्या. त्यांचा चेहरा फुलला होता. न कळत पुतळाबाईंनी विचारले,

'का?'

एक विचित्र स्मित सोयराबाईंच्या चेहऱ्यावर उमटले. संतप्त हाताने सोडलेला बाण जसा गुणगुणत यावा, तसे सोयराबाईंचे शब्द सर्वांच्या कानांवर पडले,

'अजून कूस उजवली नाही, बाई! नवरानवरी घरी येताहेत. तुम्ही ओवाळून कसं चालेल?'

निपुत्रिक! पुतळाबाईंची झुकलेली नजर वर झाली. सर्वत्र स्तब्धता पसरली. नवरानवरी मागे उभ्या असलेल्या राजांच्यावर पुतळाबाईंची घायाळ दृष्टी स्थिरावली. पुतळाबाईंची नजर कोरडी होती. तीतला भकासपणा राजांना जाणवत होता. राजांची नजर झुकली. पुतळाबाईंचे डोळे उभ्या जागी भरून आले. सोयराबाईंच्या शब्दांनी त्या भानावर आल्या.

'अशा बघत काय राहिला? नवरानवरी उभे आहेत. द्या ते तबक!'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

थरथरत्या हातांनी तबक सोयराबाईंच्या हाती देत असता त्या पुटपुटल्या,

‘आधी सांगितलं असतंत, तर...’

‘सांगणार केव्हा? पुढं पुढं करायची हौस तुम्हांला, लक्ष्मीपूजनाचं पाहून आले, तोवर तुम्ही तबक घेऊन उभ्या!’

‘बाई...!’ पुतळाबाई कळवळल्या.

‘एवढा मान होता, तर न बोलवता आलातच कशा?’

पुतळाबाईंनी गडबडीने सोयराबाईंच्या हाती तबक ठेवले. जमलेल्या स्त्रियांच्या गराड्यातून वाट काढीत त्या जाऊ लागल्या.

नवरानवरी मांडवात आली. साडे झाले, लक्ष्मीपूजन झाले; आणि नवरानवरीच्या शालूची गाठ सोडण्यात आली.

...पुतळाबाई परत तेथे दिसल्या नाहीत.

□

१६

गडावर रात्र वाढत होती. लग्न आटोपल्याचा शीण सर्वांच्या चेहऱ्यांवर प्रथमच उमटत होता. वाड्यातला प्रथम चौकातला मांडव मोकळा भासत होता. राजे महाली गेल्याचे कळल्यामुळे निर्धास्त झालेली खाशी सरदार मंडळी सदरेवर पान जुळवीत गप्पांत रंगली होती. सातमहालाच्या बाजूला सोयराबाईंच्या महालाची वर्दळ सोडली, तर बाकीचे महाल शांत भासत होते.

सारी कामे आटोपून मनोहारी पुतळाबाईंच्या महालावरून जात होती. तिची पावले थांबली. महालातून दासी बाहेर येत होती. मनोहारीने तिला काही तरी विचारले; आणि तिने महालात प्रवेश केला. चौकोनी तटांनी वेढलेल्या त्या महालजागेवर मध्यभागी पुतळाबाईंचा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

महाल होता. महालाच्या डाव्या सदरेवर अजूनही दिवट्या जळत होत्या. महालाच्या प्रथम सोप्यावर कोणी दिसत नव्हते. सोपा मोकळा होता. मनोहारी पायऱ्या चढून वर गेली. आतल्या महालात मंद उजेड होता. आत कोणी दिसत नव्हते. समईच्या एक-दोनच वाती पेटलेल्या होत्या. त्यामुळे उजेड मंदावला आहे, हे मनोहारीच्या ध्यानी आले. पुतळाबाई मागच्या स्वैपाकघरी असतील, अशा समजुतीने मनोहारीने आत प्रवेश केला. गालिचावरून पावले टाकीत मनोहारी पुरुष उंचीच्या समई जवळ गेली. अगदी वरच्या मोरपात्रात ठेवलेली दीपकाठी घेऊन तिने ती पेटविली; आणि एक एक ज्योत ती पेटवू लागली. महाल वाढत्या प्रकाशात उजळत होता. सर्व वाती पेटविल्यानंतर दुसरी समई पेटविण्याकरिता ती वळली. जागच्या जागी तिची पावले थांबली. आश्चर्यचकित होऊन ती पाहत होती. उत्तरेच्या बैठकीवर पुतळाबाई बसल्या होत्या. त्यांची नजर मनोहारीवर खिळली होती.

पुतळाबाईंच्या सावळ्या रूपात दिसणारा प्रसन्न भाव कुठे तरी लपला होता. सदैव बोलक्या असलेल्या नजरेत घायाळपणा उतरला होता. मांडवातून येते वेळी नेसलेला शालूच त्यांच्या अंगावर दिसत होता. पुतळाबाईंच्यावरची नजर हलत नव्हती.

'काय बघतेस, मनू?'

त्या शब्दांनी मनोहारीचे भान हरपले. उभ्या जागी तिला हुंदका फुटला; आणि ती पुतळाबाईंच्याकडे धावली. पुतळाबाईंच्या समोर बसून ती रडू लागली. तिच्या खांद्यावर हात ठेवीत पुतळाबाई म्हणाल्या,

'मनू, रडतेस? थोरल्या बाई मला बोलल्या, म्हणून? मनू , रडू नको. मला त्याची सवय झाली आहे. गडावर येतानाच हे ध्यानी आलं होतं; पण यावंच लागलं.'

बोलता-बोलता पुतळाबाईंचा कंठ दाटून आला. डोळ्यांत आलेले अश्रू थोपविण्याचा प्रयत्न करीत त्या कष्टाने सांगत होत्या,

'मनू, माझं मला वाईट वाटत नाही. खूप सहन केलंय् मी. पण हे त्यांच्यासमोर व्हायला नको होतं. माझा नसला, तरी निदान कुणासमोर बोलतोय्, याचा तरी विचार बाईंनी करायला हवा होता. वाईट वाटतं, ते त्याचंच... मनू, लक्ष्मीपूजन झालं?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मनोहारीने मान हलविली.

‘सारे झोपले?’

‘हो!’

पुतळाबाईंनी डोळे पुसले. त्यांनी हाक मारली,

‘मनू!’

‘जी?’ म्हणून मनोहारीने वर पाहिले. पुतळाबाईंच्या चेहऱ्यावर स्मित उमटले होते. गडबडीने मनोहारीने डोळे पुसले. धीर करून तिने विचारले,

‘जेवला?’

पुतळाबाईंनी नकारार्थी मान हलविली. मनोहारी गडबडीने उठली. तिला थांबवीत पुतळाबाई म्हणाल्या,

‘मनू, थांब! जेवणार नाही, म्हणून मी कळवलंय्.’

‘का?’

‘भूक नाही.’

‘खोटं! कशानं भूक गेली?’

पुतळाबाई हसल्या. त्या म्हणाल्या,

‘तू काळजी करू नको. उद्या गडाखाली जाईन, तेव्हा जेवेन मी.’

‘उद्या जाणार?’

‘जायलाच हवं! जवळ जवळ तशी आज्ञाच झाली आहे... आणि आता गडावर काही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घ्यावंसं वाटत नाही.’

मनोहारीच्या डोळ्यांत पुन्हा अश्रू गोळा झाल्याचे पाहताच पुतळाबाई म्हणाल्या,

‘खूप दमली असशील. झोप जा!’

मनोहारी कष्टाने उठली. पुतळाबाई समईकडे पाहत म्हणाल्या,

‘एवढ्या वाती पेटवल्यास? आता परत साऱ्या शांत केल्या पाहिजेत.’

‘मी करू?’

‘नको. दासी करील. जा तू.’

मनोहारी बाहेर गेली. पुतळाबाई कपडे बदलण्यासाठी आत निघाल्या, तोच मागे पावलांचा आवाज झाला. पुतळाबाईंनी मागे पाहिले, तो मनोहारी म्हणाली,

‘महाराज येताहेत.’

‘इकडे? या वेळी?’ पुतळाबाईंनी आश्चर्याने विचारले.

पदर सावरीत पुतळाबाई गडबडीने वळल्या; आणि त्याचवेळी मनोहारीच्या मागे उभ्या असलेल्या राजांच्यावर त्यांची नजर गेली. मनोहारी अदबीने बाजूला झाली. राजे आत आले. पुतळाबाईंच्याकडे पाहत ते म्हणाले,

‘आपण झोपला असाल, असं आम्हांला वाटलं.’

मनोहारी मागच्या पावलांनी बाहेर जात असता तिच्या कानांवर शब्द आले,

‘मनू, आज आम्ही इथंच राहू. आमच्या महाली वर्दी दे.’

‘जी.’ म्हणून मनोहारी गेली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे बैठकीकडे वळले. पुतळाबाई आश्चर्यचकित होऊन राजांच्याकडे पाहत होत्या. राजांच्या आगमनाबरोबर हिन्याचा मंद सुगंध महालात दरवळून गेला. राजे बैठकीवर बसले. त्यांची शोधक नजर पुतळाबाईंच्यावर खिळली होती. प्रज्वलित समईच्या शेजारी उभ्या असलेल्या पुतळाबाईंनी राजांना विचारले,

‘काय पाहता!’

‘दोन समया!’ राजे नजर न हलविता बोलले.

पुतळाबाई त्या बोलांनी संकोचल्या. त्यांनी विषय बदलला.

‘आपण खरचं का इथं राहणार?’

‘का?’

‘आज्ञा झाली असती, तर मी आले नसते का महाली?’

क्षणात राजांची चर्या गंभीर झाली. ते बोलून गेले,

‘पुतळा! ते बळ आता राहिलं नाही. मांडवात जो प्रकार झाला, तेव्हा आम्ही तुम्हांला सावरलं असतं, तर कदाचित...’

‘माझ्या मनात काही नाही...’

‘तेही कळतं! म्हणून तर आमचा जीव कासावीस होतो; आणि बेचैन होऊन आम्ही इथं येतो... ये, बैस! जेवली नाहीस ना?’

पुतळाबाई त्या शेवटच्या प्रश्नाने हसल्या. राजांच्या शेजारी बसत त्या म्हणाल्या,

‘भूक नव्हती.’

राजे पुतळाबाईंच्या हसण्यात सामील झाले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘असणार कशी? आम्ही सुद्धा दूध घेतलं नाही. अन्नानंच पोट भरतं, असं थोडंच आहे? आनंदानंच नव्हे, तर कैक वेळा अपमानानंही पोट भरून जातं!’

राजांनी बोलता-बोलता बैठकीवरील दोन गिर्द्या उचलल्या. आपल्या डाव्या बगलेखाली त्या गिर्द्या घेऊन राजे कलले. बैठकीवर त्यांनी पाय पसरले. राजे झोपलेले पाहून पुतळाबाईंनी परत विचारले,

‘खरंच इथं झोपणार?’

‘हो ना!’ राजे हसून म्हणाले. ‘मनोहारीला तसा निरोपही दिला आहे. आता तुम्हीच ‘जा’ म्हणालात, तर जाऊ.’

‘असं का मी म्हटलं? पण आपण इथं राहिलात, तर वाईट दिसेल, रिवाज मोडेल, अकारण चर्चा होईल.’

‘होऊ दे! त्याची चिंता करू नका. आता असल्या गोष्टींना फारशी किंमत द्यावी, असं वाटत नाही. काशी आम्हांला खूप शिकवून गेली. आता परत शिकण्याची इच्छा राहिलेली नाही. मन बेचैन आहे. आम्ही फार थकलोय्, पुतळा!’

राजांची सारी वृत्ती बदलली होती. असे थकलेले बोलणे पुतळाबाई प्रथमच ऐकत होत्या. राजांनी पुतळाबाईंचा हात हाती घेतला. त्या बळकट हाताचा सूक्ष्म नाजूकपणा त्यांना प्रथमच जाणवत होता. त्या पोलादी बोटांचा कंप त्या अनुभवीत होत्या. पुतळाबाईंच्या नजरेला नजर न देता राजांनी विचारले,

‘उद्या जाणार?’

‘जी.’

‘हं!’ राजांनी नि:श्वास सोडला.

‘आज्ञा झाली, तर राहीन!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'आम्ही तसं म्हणणार नाही. आमच्यासाठी खूप सोसलंत. आता ते करण्याची गरज नाही. तुम्ही जा. एकटेपणाची सवय आम्हांला खूप झालीय्.'

'महाराज!'

राजे खिन्नपणे हसले. पुतळाबाईंचा हात थोपटीत ते बोलू लागले,

'आम्ही प्रजेचे महाराज; तुमचे मुळीच नाही. आम्ही इथं आल्याचं आश्चर्य वाटलं ना? हा रायगडचा बालेकिल्ला पुरा झाला; आणि प्रथम आम्ही हा सातमहाल पाहिला. फार दुःख झालं! त्यात मोरोपंतांची किंवा हिरोजींची चूक नव्हती. ती चूक आमच्या दैवाची होती. आमच्या मनातून कधीही न सुटलेला आमचा आठवा महाल कुणालाही जाणवत नाही. या सातमहालाची आठवण झाली, तरी मन व्यथित होतं. त्यामुळं अनेक वेळा आम्ही या महालाला लागून असलेल्या मेणदरवाजाच्या मैदानावर बसत असू, अस्ताला जाणारा सूर्य पाहत असताना हरवलेलं शोधीत असू.'

राजांनी पुतळाबाईंच्याकडे नजर वळविली. त्यांच्या मुद्रेवर एक खिन्न स्मित उमटले.

'पुतळा, त्या जागेवरून हरवलेलं सारं दिसतं. तेथून पाचाडचा मासाहेबांचा वाडा दिसतो; तसंच, क्षितिजाला टेकण्याआधीच उत्तुंग पर्वतांनी रेखलेल्या दरीत अंतर्धान पावणारा आकाशातच नाहीसा होणारा सूर्यही. या रायगडावरून कधी क्षितिजाला टेकलेला सूर्य दिसतच नाही. तो जसा अचानक उगवतो, तसाच आकाशात असतानाच नाहीसा होतो... सईसारखा...'

'मला माहीत आहे!' पुतळाबाई कष्टाने अश्रू आवरीत म्हणाल्या.

नकारार्थी मान हलवीत राजे डोळे मिटून स्वतःशीच बोलल्यासारखे बोलत होते.

'फार थोडं माहीत आहे! आम्ही छत्रपती आहो. आम्ही सारं मिळवलं, असं सर्वांना वाटतं; पण ते खरं नाही. ते अर्धसत्य आहे. या चकाकणाऱ्या आयुष्याला एक फार मोठी काळोखी बाजू आहे, पुतळा! आपल्या आयुष्याच्या पन्नास वर्षांच्या आत स्वराज्याचं स्वप्न साकार करणारा हा शिवाजी एका बाजूनं फार अपयशी आहे, त्याचं यश फार मर्यादित आहे, हे कुणाला माहीत नाही. वयाच्या पंधराव्या वर्षी आम्ही स्वराज्याचं तोरण बांधलं.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्या दिवसापासून आम्ही आजतागायत नुसते त्या स्वप्नामागे धावलो. त्याचाच अखंड विचार केला. दुसरा विचार करायला आम्हांला उसंत मिळाली नाही. हा स्वराज्याचा डाव खेळत असता मासाहेबांच्या तोंडाहातांनी आमचा अष्टगुणी संसारपट सावरला होता, हे कधीच आमच्या ध्यानी आलं नाही.त्या असेपर्यंत पटावरील मोलाचे मोहरे गमावूनही पट चढाईचाच राहिला.'

राजांनी दीर्घ श्वास घेतला.

'आणि... जेव्हा ते स्वप्न हाती आल्याचा भास झाला, नेमका त्याच वेळी तो हात ढासळला; आणि त्याबरोबर आमचा संसारपटही!'

राजांच्या मिटल्या डोळ्यांच्या कडांतून अश्रू ओघळले. पुतळाबाईंच्या हातावरची त्यांची पकड वाढली. काही क्षणांची उसंत घेऊन राजे बोलू लागले,

'हं! स्वराज्याची उभारणी करणारे आम्ही! आमच्या डोळ्यांदेखत ढासळणारा तो पट आम्हांला सावरता आला नाही... उभ्या आयुष्यात ज्याची सवय नाही, ते एकदम साधावं तरी कसं?'

पुतळाबाईंना राजांचे बोलणे ऐकणे असह्य झाले. त्यांच्या तोंडून एक हुंदका बाहेर पडला. न कळत राजांच्या छातीवर त्यांनी मस्तक टेकले. त्या उद्गारल्या,

'असं बोलू नये...'

राजांचा हात पुतळाबाईंच्या केसांवरून फिरत होता. राजांनी डोळे उघडले नाहीत. मिटल्या डोळ्यांनी तो बोलतच राहिले:

'खोटं सांगत नाही, पुतळा! अर्ध्या डावावरून उठण्याचा हक्क बजावून सई गेली; आणि तो डाव तसाच अपुरा राहिला. राणीपदाखेरीज थोरल्या राणीसाहेबांना काही दिसतच नाही. आणि तू... तू आमच्याकडे देव म्हणून पाहतेस. आम्हांला सोबती मिळालाच नाही! पुतळा, देव जितेपणी दिसत नसतो!... शंभू... त्या पोरावर भारी प्रेम केलं. त्यांच्या डोळ्यांत सदैव मला सई दिसली. पण थोरल्यानं ते कधी जाणलं नाही, आमच्यावर विश्वास ठेवला नाही. यापेक्षा पराजय तो कोणता?

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्ही स्वराज्याचं तोरण बांधलं; पण दादोजींना आमच्या यशाची शंका आली. जन्मदात्या पित्याचं उदंड प्रेम समजूनही कधी त्यांची सेवा घडली नाही. संसारातली जोड निम्म्यावर तुटली. आणि ज्यांच्यावर राज्याची धुरा, तेच आमचे युवराज शत्रूला मिळाले! त्यांचा भरवसा कोण देणार? आणि राज्ञीपदाच्या गुंगीत भान हरपलेल्या आमच्या राणीसाहेब आम्ही जिवंत असता राजमातेची स्वप्नं पाहतात! यापेक्षा दुर्दैव ते कोणतं? आमच्या दुर्दैवाला सीमाच नाहीत... पुतळा! आपलं माणूस दिसत असून सुद्धा आम्हांला राखता येत नाही. पती असूनही त्या भोळ्या जीवाचा चार-चौघांत झालेला उघड अपमान आम्ही पाहतो. याचं दु:ख आम्हांला फार आहे. आमच्या जिवाची तगमग होते, पुतळा...’

पुतळाबाईंनी मान वर केली. राजांनी डोळे उघडले. पुतळाबाई डोळे पुशीत म्हणाल्या,

‘आपल्याला एवढं वाटतं, यात सारं मिळालं मला. माझी काळजी करू नये. सारं ठीक होईल. मी गेले, की सारे गैरसमज दूर होतील.’

राजे उदासपणे हसले.

‘पुतळा! तू भारी सरळ आहेस. तुला असं वाटणं स्वाभाविक आहे. पण निसर्ग तसा नाही. काही क्षणभरच धरणीकंप होतो; पण त्या क्षणांत माणसानं उभारलेले सारे इमले कायमचे कमजोर बनून जातात. त्यांचा भरवसा देता येत नाही. त्यांत वावरत असतानादेखील जीव घाबरतो. अशा वेळी जिवाला सोबत लागते दुसऱ्या जिवाची; कोसळणाऱ्या घराची नव्हे.’

राजांनी डोळे मिटले. मंद सुरात ते म्हणाले,

‘आम्हांला आता बोलवत नाही.’

गडबडीने उठत पुतळाबाई म्हणाल्या. ‘घरभरणीच्या दिवशी उपाशी राहू नये. मी दूध आणते. झोपू नये.’

राजांनी कष्टाने डोळे उघडले, उठलेल्या पुतळाबाईंच्याकडे पाहिले.

‘नशीब चुकवता येत नाही, पुतळा!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुतळाबाई गडबडीने निघून गेल्या. जेव्हा त्या चांदीच्या पेल्यातून दूध घेऊन आल्या, तेव्हा राजांना निद्रा लागली होती. दुधाचा पेला बाजूला ठेवून पुतळाबाईंनी शाल आणली, आणि ती राजांच्या अंगावर पांघरली. झोपेतच राजांनी कूस बदलली, आणि परत ते झोपी गेले.

पुतळाबाई वळल्या. समईच्या वाती त्या शांत करीत होत्या. महालात प्रकाश कमी होत होता. राजांना त्याची जाणीव नव्हती.

बाहेर काळोखी रात्र वाढत होती...

□

१७

सकाळची वेळ होती. क्षितिज सोडून सूर्य बराच वर आला होता. वाड्यातल्या प्रथम चौकातल्या मांडवात मुले खेळत होती. राजांच्या महाली राजे कपडे करून सदरेवर जाण्याच्या विचारात उभे असता पुतळाबाई महालात आल्या. पुतळाबाईंना पाहताच राजांच्या चेहऱ्यावर हसू विरले. राजांनी विचारले,

‘तयारी झाली?’

‘हो.’

राजांचे लक्ष आपल्या पलंगाकडे गेले. पलंगावर ठेवलेल्या शालीकडे बोट दाखवीत राजे म्हणाले,

‘आम्ही सकाळी येताना आपली शालही बरोबर घेऊन आलो.’

पुतळाबाई शाल उचलण्याकरता वळलेल्या पाहताच राजे बोलले,

‘ती शाल आमच्याजवळ राहू दे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

संथ पावले टाकीत राजे पलंगाकडे गेले. घडी न विसकटलेली आपली जरी कशिद्याने भरलेली शाल संदुकीतून काढून ती पुतळाबाईंच्या हाती देत राजांनी सांगितले,

‘ही आपल्याजवळ ठेवा.’

पुतळाबाईंनी शाल घेण्यासाठी हात पुढे केला. क्षणभर राजांचा हात रेंगाळल्याचा भास झाला.

‘जेव्हा सवड होईल, तेव्हा आम्ही रायगडवाडीला येऊ.’

पुतळाबाईंना काही बोलणे सुचत नव्हते. बघता-बघता त्यांचे डोळे भरून आले. राजांनी दिलेली शाल उराशी कवटाळून त्या गडबडीने निघून गेल्या. पुतळाबाई गेल्या, तरी राजे महालातच उभे होते. दरवाजातून आत येणाऱ्या अनाजींना पाहून राजे भानावर आले. अनाजींनी मुजरा केला.

‘काय आहे, अनाजी?’

‘निश्चलपुरी भेटीसाठी आले आहेत.’

‘ते बरं?’

अनाजींनी काही उत्तर दिले नाही.

‘चला. निश्चलपुरींचं दर्शन घेऊ. चला.’

सदरेवर निश्चलपुरी गोसावी त्यांच्यासाठी घातलेल्या मृगाजिनाच्या बैठकीवर बसले होते. राजे सदरेवर येताच ते उठले. राजांनी त्यांना वंदन केले. क्षेमकुशल झाल्यानंतर निश्चलपुरी म्हणाले,

‘राजे, फाल्गुन वद्य अमावास्या नजीक आली आहे.’

‘आम्ही समजलो नाही.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ही अमावास्या शुभ नाही. त्या दिवशी सूर्यग्रहण आहे. आपल्याला हा योग अत्यंत अनिष्ट आहे.’

‘मग?’

‘त्यासाठी ग्रहशांती, होमहवन करावं लागेल.’

‘जशी आज्ञा! ...अनाजी, गोसावींच्याकडून सर्व तपशील समजून घ्या. त्यांना जे लागेल, ते सर्व साहित्य पुरवा.’

निश्चलपुरी समाधानाने परतले. अनाजी विचारात पडलेले पाहताच राजांनी विचारले,

‘कसला विचार करता, अनाजी!’

‘जी, कसला नाही. मला वाटतं, देवांना अभिषेकही करावे लागतील.’

‘मग त्यात विचार कसला? अनाजी, दैवी लिहिलेलं टळत नसतं. येणाऱ्या संकटांची तीव्रता कमी करण्यासाठी ही साधना करायची असते. अनाजी, आम्ही महाली जाऊन येतो. नंतर आपण जगदीश्वराकडे जाऊन येऊ.’

‘जी.’

राजे महाली जात असता राजारामांची वाटेतच गाठ पडली. राजाराम राजांच्या पाया पडले. राजांनी राजारामांच्या पाठीवरून हात फिरवला; आणि काही न बोलता ते महाली गेले. महालात जाऊन राजांनी कपडे बदलले. जिरेटोप उचलीत असता मनोहारी आत आली. राजांची नजर वळताच तिने सांगितले,

‘राणीसाहेबांनी, महाली आहात का, याची चौकशी करायला पाठवलं...’

राजांच्या चेहऱ्यावर सूक्ष्म आठी पडली. ते म्हणाले,

‘आम्ही जगदीश्वराकडे जातो आहो, असं सांगा.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मनोहारी वळली. राजांनी आपला दुशेला कमरेला बांधला, जिरेटोप मस्तकावर चढविला. देव्हाऱ्यासमोर जाऊन देवीला वंदन करून राजे वळले. महालात आलेल्या सोयराबाईंना पाहून राजांची पावले जागच्या जागी खिळली.

'बाहेर निघालात?'

'हो, काही काम होतं?'

'लग्नाचं वऱ्हाड जायचं आहे. तेव्हा...'

'ते तुम्ही ठरवा.'

'अमावास्या झाली, की जावं, असं पुरोहित सांगत होते.'

'तसं करा.'

राजांच्या तुटक बोलांनी सोयराबाईंचा संताप वाढत होता. त्यांनी सहज सांगावे, असे सांगितले,

'धाकट्या बाईसाहेब गेल्या.'

'माहीत आहे.'

'मी 'राहा' म्हटलं.'

राजे नुसते हसले.

'रात्री महालीच होता, म्हणे!'

राजे काही बोलले नाहीत.

'खूप बोलणं झालं असेल.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘हो.’

सोयराबाईंनी राजांकडे पाहिले. राजांच्या चेहऱ्याकडे पाहवत नव्हते. चेहरा कठोर बनला होता, नजरेची धार वाढली होती. त्याने अस्वस्थ होऊन सोयराबाईंनी विचारले,

‘माझं काही चुकलं का?’

राजांनी सोयराबाईंकडे पाहिले. एक वेगळेच स्मित चेहऱ्यावर उमटले.

‘राणीसाहेब, फार उशीर झाला!’

‘काय?’

‘काही नाही! अनाजी वाट पाहत असतील. आम्ही जातो.’

राजे झरझर पावले टाकीत निघून गेले.

राजे सदरेवर आले, तेव्हा अनाजी, मोरोपंत, फिरंगोजी, पानसंबळ ही मंडळी हजर होती. मुजऱ्यांचा स्वीकार करून राजे म्हणाले,

‘फिरंगोजी, चला देवदर्शन करून येऊ.’

‘महाराज, सकाळी दर्शन झालं ना?’

‘हो. पण देवाला एकदाच गेलं पाहिजे, असं थोडंच आहे? मन बेचैन झालं, की नेहमीच आम्ही देवाकडे धाव घेतो.’

‘पण, महाराज, ऊन वाढतं आहे. उन्हाचा त्रास होईल.’

‘फिरंगोजी, वाढत्या उन्हाचा त्रास होतो आहे, म्हणूनच आम्ही देवदर्शनाला जातो आहो. ...चला! वेळ करू, तसं ऊन वाढेल.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांच्या पाठोपाठ सारे बाहेर पडले. राजे जगदीश्वराच्या कातळावर आले. राजांची नजर माघारी वळली. तेथून बामणवाड्याची वाट नजरेत येत होती. पेठेच्या इमारती दिसत होत्या. बालेकिल्ल्याचा नगारखाना नजर खिळवून ठेवत होता.

राजांनी मंदिरात प्रवेश केला. बेलफुलांनी सजलेल्या पिंडीसमोर राजे नतमस्तक झाले. राजे शांत मनाने प्रार्थना करीत होते. राजांनी प्रार्थना संपवली. राजे सर्वांसह मंदिराच्या पूर्वद्वारी आले. भवानीटोकाकडे नजर जाताच त्यांनी हात जोडले. तेथून दिसणाऱ्या पागेबाहेर उन्हात घोडी उभी होती. राजांनी मोरोपंतांना हाक मारली.

'मोरोपंत, उन्हं वाढली, तरी घोडी बाहेर का ठेवतात? कोवळ्या उन्हातूनच घोडी तबेल्यात जावीत. तशी ताकीद द्या.'

'जी.'

राजे परत देवळात आले. देवाच्या पाया पडून राजे वाड्याकडे जायला निघाले. अनाजी राजांच्याकडे पाहत होते. राजांनी विचारले,

'अनाजी, आपल्या फौजा सध्या कुठं आहेत?'

मोरोपंत पुढे झाले. ते म्हणाले, 'महाराज, माझी फौज नाशिक-त्र्यंबककडे आहे. हंबीरराव कऱ्हाड-पन्हाळ्याचा भाग पाहतात.'

'आज हंबीरराव आले नाहीत?'

'हंबीरराव सकाळीच काही कामासाठी पाचाडला उतरलेत; दोन प्रहरपर्यंत येऊ, असं म्हणाले.'

'अनाजी, ग्रहण केव्हा?'

'तीन दिवसांनी.' अनाजींनी सांगितले.

'अनाजी, सूर्यदेव म्हणजे साक्षात तेज; पण त्यालादेखील ग्रहण लागतं, नाही? मग

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सामान्यांची काय कथा? ...चला. जाऊ परत.’

राजे वाड्याकडे येत असता काही बोलत नव्हते. आपल्याच विचारात राजे पावले टाकीत होते.

□

१८

राजांना दोन प्रहरी निद्रा लागली नाही. दोन प्रहर टळत असता राजे पलंगावरून उठले. मुखमार्जन करून महाली येताच त्यांनी हाक मारली,

‘कोण आहे?’

‘जी?’ म्हणत पहाऱ्याला उभा असलेला महादजी पानसंबळ आत आला.

‘महादजी, असाच सदरेवर जा. फिरंगोजी जागे असतील, तर त्यांना बोलवून घे.’

राजे बैठकीवर बसले. क्षणाक्षणाला त्यांची नजर दरवाजाकडे जात होती. फिरंगोजी महालात आले. राजांना त्यांनी मुजरा केला.

‘महादजीनं झोपमोड तर केली नाही ना?’

‘जी, नाही. आता ह्या वयात झोप कुठली?’

‘त्याला वयच लागतं, असं नाही, फिरंगोजी. आमचंच पाहा ना... झोप येत नाही, काही सुचत नाही.’

‘एवढं लगीन झालं. तरास झाला असंल!’

‘असू दे! बसा... चैन पडेना, तेव्हा तुम्हांला बोलावून घेतलं.’ राजांनी महादजीला हाक मारली. महादजी आत येताच राजांनी सांगितले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महादजी, आमची बुद्धिबळं काढ, बघू... फिरंगोजी, आज बुद्धिबळं खेळू.’

राजांचा हस्तिदंती पट राजांच्या समोर ठेवला गेला. प्यादी पटावर चढली. फिरंगोजी हसत म्हणाले,

‘आता वय झालं, महाराज! चाल ध्यानात राहत नाही.’

‘मराठ्याला वय कधी थकवीत नाही, फिरंगोजी! परत भूपाळगड तुमच्या ताब्यात देणार आहोत आम्ही. ’ पटाकडे बोट दाखवीत राजे म्हणाले, ‘हं, करा सुरुवात.’

डाव सुरू झाला. राजांच्या मनात रंग भरत नव्हता; पण फिरंगोजी डावात पुरे गुंतले होते. फिरंगोजी भान विसरले. त्यांची पगडी गुडघ्यावर बसली होती. पांढऱ्या केसांतून बोटे फिरत होती. मिशीवर हात जात होता. राजांना फिरंगोजींचे रूप मोहवीत होते. डाव हळू हळू राजांच्या कबजात येत होता. ते समजल्याने फिरंगोजी बेचैन होऊन खेळत होते. खेळता-खेळता राजांनी शह दिला. फिरंगोजींचा टाळा वासला गेला. ते उद्गारले,

‘आयलाऽ! डाव लई इपरीत!’

त्या उद्गारासरशी राजांना हसू आवरणे कठीण गेले. हताश होऊन फिरंगोजी म्हणाले,

‘हरलो, धनी!’

‘फिरंगोजी, तुमची हार, तीच आमची हार! चालायचंच.’

राजांनी परत पट मांडायला सुरुवात केली; आणि फिरंगोजी शुद्धीवर आले. जीभ चावून गडबडीने त्यांनी पगडी डोक्यावर चढविली. शरमून ते म्हणाले,

‘महाराज, ध्यानात ऱ्हाइलंच न्हाई. डोईची पगडी कवा गुडघ्यावर आली, तेबी कळलं न्हाई! तुमी तरी सांगायचं.’

‘एवढे तल्लीन होऊन खेळता, म्हणून तर स्वराज्याचे डाव आम्हांला जिंकता येतात. नाही तर आमच्यासारख्या पटावरच्या राजांना कोण विचारतो?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी पट मांडला आणि महादजी महालात आला. राजांची नजर वळताच त्याने सांगितले,

‘प्रधानजी आलेत.’

‘पाठवा.’

मोरोपंत आत आले. त्यांच्या हातात थैली होती, चेहरा चिंतायुक्त होता. राजांनी विचारले,

‘काय आहे, मोरोपंत?’

‘औरंगाबादेहून बातमी आली आहे... मोगली फौजा औरंगाबादेच्या आसपास गोळा होत आहेत.’

‘मग त्यात नवीन काय? ती तर जुनीच बातमी आहे.’

‘एवढंच नव्हे, तर खुद्द आलमगीर दक्षिणेत उतरणार आहे. औरंगाबादेला ही बातमी येऊन थडकली आहे. बातमी विश्वासाची आहे.’

राजांनी पटावरचा राजा हाती घेतला. तो निरखीत असता राजांचा चेहरा उजळत होता. त्यांनी एकदम मोरोपंतांच्याकडे चेहरा वळवला.

‘मोरोपंत, फार महत्त्वाची बातमी आणलीत. खास सदरेवर अनाजी, हंबीरराव, प्रल्हादपंत आणि तुम्ही जमा, तोवर आम्ही सदरेवर येऊ. तसंच, आमच्या सैन्याचा, खजिन्याचा तपशीलही तयार ठेवा.’

मोरोपंत गेले. राजांनी हातातील राजा चंदनी पेटीत टाकला. फिरंगोजी राजांच्याकडे पाहत होते.

‘फिरंगोजी, हा पट आता आवरा. आता निराळा पट मांडावा लागणार आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आलमगीर म्हणजे? औरंगजेब येणार?’

‘का? भ्यालात?’

‘तुमी असल्यावर आमी कशाला भितो?’ फिरंगोजी आवेशाने मिशीवरून पालथी मूठ फिरवीत म्हणाले. ‘ह्यो म्हातारा बसल्या बैठकीला कंटाळतो; लढाईला न्हवं.’

‘चला, फिरंगोजी! आपल्याला सदरेवर जायचं आहे. फिरंगोजी, तुम्ही पुढं व्हा. आम्ही कपडे बदलून सदरेवर येऊ.’

राजे खाशा सदरेवर आले, तेव्हा संध्याकाळ होत आली होती. सदरेवर सारे जमा झाले होते. सदरेवर गालिचे पसरले होते. लोड, तक्क्ये, गाद्या यांच्यावर नरमीना पसरला होता. सदरेच्या चारही कोपऱ्यांतील समया प्रज्वलित झाल्या होत्या. राजे आपल्या उच्चासनावर जाऊन बसले. राजांनी आज खास कपडे केले होते. अंगात चिकनदोजीचा अंगरखा शोभत होता. पांढऱ्या कापडावरील निळी फुले उठून दिसत होती. अंगरख्याच्या आतली जरी फतू त्या तलम कापडातून नजरेत येत होती. कमरेला पिवळा कमरबंद आवळला होता. पायांत विजार होती आणि मस्तकी केशरी टोप विराजला होता. राजांच्या फिरत्या नजरेबरोबर मोत्यांचा तुरा आणि कानांतील पाणीदार मोती डुलत होते. राजांनी सर्वांवरून नजर टाकली.

‘मोरोपंत, सदरेबाहेर महादजी आणि हिरोजी यांना उभे करा.’

राजांची सूचना अमलात आणून मोरोपंत सदरेवर आले. राजांनी आज्ञा केली,

‘मोरोपंत, ती थैली!’

मोरोपंतांनी डिकदाणीतून ती थैली राजांच्या पुढे धरली. राजांनी आतले पत्र काढले, पत्रावरून नजर फिरविली. आपली दाढी कुरवाळीत राजे मागच्या लोडावर कलले.

‘अनाजी, हंबीरराव, आजचं पत्र समजलं?’

‘जी.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अनाजी, खासे आलमगीर आता दक्षिणेत उतरताहेत. हे खरं वाटत नाही, असंच ना?’

‘औरंगाबादेला मोगली फौजा गोळा होत आहेत, हे खरं. पण त्यासाठी औरंगजेब दक्षिणेत येईल, असं वाटत नाही.’

‘हा आमच्या सचिवांचा अंदाज, की प्रार्थना?’ राजांनी विचारले.

‘हा अंदाज आहे. उत्तरेत राजपुतांच्या बंडाचा उठाव होत असता आलमगीर दक्षिणेत येणं असंभाव्य वाटतं.’ अनाजींनी निर्धाराने उत्तर केले.

‘नाही, अनाजी. आलमगीर येणार, यात आम्हांला शंका नाही. शत्रूच्या राज्यातल्या बंडाच्या बातम्या नेहमीच अशा सुखावतात, आणि गाफील बनवायला कारणीभूत होतात.’

‘आलमगीर येईल?’ हंबीररावांनी परत विचारले.

‘निश्चित येईल! त्याला यावंच लागेल. एक ना एक दिवशी आलमगिराशी आमचा मुकाबला होणार, याची जाणीव आम्हांला बाळपणापासून होती. त्यासाठी तर आम्ही एवढी मेहनत घेतली. हंबीरराव, आमची फौज किती आहे?’

हंबीररावांनी अभिमानाने सांगितले,

‘राऊत एक लक्ष पाच हजार; शिलेदार पंचेचाळीस हजार; आणि हशम एक लाख. हा राखीव फौजेचा आकडा आहे.’

‘समजलं... आणि, अनाजी, आमचा खजिना काय म्हणतो?’

‘सुवर्णनाणी म्हणून गंबार, मोहरा, पुतळ्या आणि पातशाही होन एकवीस लक्ष भरतील. त्यांखेरीज साडे बारा खंडी सोनं, विपुल रत्नं भांडारात शिल्लक आहेत. एक कोटी चंद्रमे, पंचवीस लक्ष निशाणी होन आणि पंचवीस लक्ष येळुरी होन यांची निशाणी झाली आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'ठीक... मोरोपंत, आमचे गड?'

'एकंदर प्रथम पन्नास, एकशे अकरा आपण वसविलेले, आणि कर्नाटक प्रांतीचे एकोणऐंशी धरून दोनशे चाळीस.'

राजांना चेहऱ्यावरचा आनंद झाकता आला नाही.

'मोरोपंत, हे सारं गोळा केलं ना, ते याच क्षणासाठी. आम्ही वारंवार तुम्हांला सांगत असू की, झाल्या, त्या निर्णयक लढाया नव्हेत. आता होईल ती निर्णायक लढाई. तीतून राहील, ते श्रींचं राज्य!'

'हे जमलं, तर स्वर्गाला हात लागतील.' हंबीरराव बोलले.

'हंबीरराव, तुम्ही हे बोलता? आमचे सेनापती जरतारी भाषा करतात? हंबीरराव, हे होणार, यात शंका धरू नका. आम्हांला एक शेर आठवतो...

> 'खुदी को कर इतना बुलंद, के हर तहरीरके पहले
> खुदा बंदेसे खुद पुछे- बता तेरी रज़ा क्या है?'

-समजलं? ' राजांनी विचारले.

हंबीररावांनी नकारार्थी मान हलविली. राजे हसले.

'हंबीरराव, मोगली सेनेशी धडक देऊ पाहणाऱ्या आमच्या सेनापतींना त्यांची भाषा अवगत असायला हवी. या शेराचा अर्थ आहे : माणसानं स्वत:चीच उंची वाढवायला हवी. त्यानं एवढं मोठं व्हायला हवं की, संकट पाठवण्याआधी परमेश्वरानंच आपणहून विचारावं, 'तुला कोणतं संकट पाठवू?' '

राजांचे रूप, राजांचे बोलणे सारे बदलले होते. राजांच्या डोळ्यांत एक वेगळाच आत्मविश्वास प्रकटला होता. डाव्या हाताची मूठ कमरेवर ठेवून राजे बोलत होते :

'हे श्रींचं राज्य आहे. हे निर्माण करायची जबाबदारी आम्ही घेतली. ही जबाबदारी उचलीत असता श्रींच्या इच्छा पुऱ्या व्हायच्या असतील, तर आम्ही पण तेवढेच मोठे झालं

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पाहिजे, याची जाणीव बालपणापासून होती. आम्हांलाही वासना, विकार होते. त्यांवर आम्ही मात केली. का? कारण आम्हांला माहीत होतं... राज्य उभारणारा तो आहे. त्याचं राज्य पेलण्याचं सामर्थ्य आमच्यांत आणणं हे आमचं दुष्कर काम आहे. ज्या ज्या वेळी आमच्या समोर मोह उभा ठाकला, त्या त्या वेळी श्री आमची परीक्षा पाहतात, असंच आम्ही चित्तात आणलं. या श्रद्धेच्या जोरावर आम्ही प्रत्येक संकटातून, मोहातून पार पडलो. कार्य तडीला जाणं वा न जाणं हे माणसांच्या हाती नसतं. पण हाती घेतलेलं काम करीत असता त्या कामाला आपण योग्य आहो, याचा विश्वास माणसाला असायला हवा.

‘हे करीत असता आम्ही आमच्या वासना, आमचे वैयक्तिक रागलोभ, आमचा आनंद, आमचे अश्रू त्यात मिसळू दिले नाहीत. जीवन जगत असता आम्ही कधी चुकलो नाही, असं आमचं म्हणणं नाही. आम्ही चुकलो. त्या प्रसंगांची आठवणही आमच्या मनात सदैव सलते. चालणाऱ्या माणसाला केव्हा तरी एक-दोनदा पडावं लागतं, ठेचकळावं लागतं. तितकंच चुकांचं स्थान जीवनात आहे. आमच्या चुकाही तेवढ्याच आहेत. त्याचमुळं तत्त्वनिष्ठेच्या पडद्याखाली आम्ही चुका कुरवाळीत बसलो नाही.

‘समर्थ आम्हांला ‘राजयोगी’ म्हणतात, याचा अर्थ कदाचित हाच असावा.’

राजांची नजर अनाजींकडे वळली.

‘अनाजी, तुम्हांला राजपुतांच्या बंडाचा आधार वाटतो ना? पण ते बंड का घडतं आहे, याचा कधी विचार केलात? तुम्ही विचार केला नसेल; पण औरंगजेबानं नक्की केलेला आहे. आणि त्याचमुळं दक्षिणेत उतरायचा त्यानं निर्णय केलेला आहे.’

राजे थांबले. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर आश्चर्य दिसत होते.

‘आमचा बीमोड केल्याखेरीज औरंगजेबाला राजपुतांना कह्यात आणणं कठीण आहे. ज्या काळात आशेचा किरण दिसत नव्हता, त्या काळात केसरिया आणि जोहार करीत राजपूत पिढ्यान् पिढ्या लढले. आजही हे राजपूत मोगलांची निष्ठेनं सेवा करताहेत. पण धर्माभिमान असणाऱ्या या राजपुतांना जेव्हा विजयाचे मार्ग दिसू लागतील, तेव्हा ते मोगली तख्ताला एकनिष्ठ राहणार नाहीत. कदाचित त्यांच्यांत नवे राणा प्रताप जन्मू घातले असतील. त्याचमुळं राजपुतांचा असंतोष वाढत असेल.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी उसंत घेतली. 'उत्तरेत काय घडतं, हे जरा बारकाईनं पाहा. आज जाटांच्यामध्ये चलबिचल चालू आहे. पंजाबमध्ये शीखांचे आठवे गुरू तेजबहादूर यांचा वध झालेला आहे. पंजाबचं बळ वाढत आहे. आम्ही इथं रायगडावर जे करतो आहोत, त्याच्या ठिणग्या भारतवर्षात पसरल्या आहेत, हे सांगायला कोणा ज्योतिष्याची आज गरज नाही.'

राजे बैठकीवरून उठले. स्थिर आवाजात राजे बोलले,

'आलमगीर दक्षिणेत आलाच पाहिजे. आलमगीरला आम्ही आणि आम्हांला आलमगीर जेवढं ओळखतो, तेवढं आमचं मंत्रिमंडळही आम्हांला ओळखीत नसेल. त्यामुळं आम्ही आमच्या मनात आलमगिराविषयी कधी चीड, संताप यांची बाधा होऊ दिली नाही. आमची फार इच्छा आहे की, अशीरगडचा किल्ला पुन्हा एकदा जिंकावा, आणि अकबरानं उघडलेल्या त्या दक्षिण दरवाजाला कायमचं कुलूप ठोकून, परत उत्तरेचा दरवाजा तेथून आपल्याला मोकळा करावा.'

अशीरगडच्या नावाबरोबर साऱ्या सदरेवर नवचैतन्य पसरले. एक नवा विश्वास सर्वांच्या चेहऱ्यांवर उजळून निघाला.

'मोरोपंत, याचसाठी यापुढं आम्हांला या बातम्या कळायला हव्यात... औरंगाबादेच्या नव्हेत, उत्तरेच्या! आमचे नजरबाज आज उत्तरेत दूरवर जाऊ देत. मोरोपंत, हंबीरराव, तुम्ही रणांगणाचे जाणते. औरंगजेब दक्षिणेत उतरला, तर कसा उतरेल?'

क्षणभर मोरोपंतांनी विचार केला.

'मला वाटतं...'

'बोलाऽ ऽ' राजांनी आज्ञा केली.

'औरंगजेब प्रथम औरंगाबादेला येईल.'

'हं!'

'तिथं सैन्याची जुळवाजुळव करून तो पुणं गाठील.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे हसले. मोरोपंत त्या हसण्याने शरमले.

‘बरोबर आहे, मोरोपंत!’ राजे म्हणाले. ‘हा आजवरचा मोगली रिवाज आहे. याच मार्गानं शास्ताखान, मिर्झाराजे आले, गेले. पण हा मार्ग औरंगजेब पत्करील, असं वाटत नाही.’

‘मग दुसरा कोणता मार्ग?’ हंबीररावांनी विचारले.

‘पाहा ना! औरंगजेब काय करतो, ते पाहा. राजपुतांना जपणाऱ्या औरंगजेबानं काशीचं देऊळ फोडलं; आपल्या पेशकार-कचेरीतील हिंदूंना काढून टाकून त्या जागी मुसलमान नेमायला सुरुवात केली; आणि सर्व हिंदूंवर आणि मुसलमानेतरांवर जिझिया पट्टी लादली. हे धाडस कोठून आलं?’

‘याचा पश्चात्ताप औरंगजेबाला झाल्याखेरीज राहणार नाही.’ अनाजी म्हणाले.

‘चुकता आहात, अनाजी! हा देश मुसलमानांचा नव्हे. ते हा देश जिंकण्यासाठी इथं आले. एक अकबर सोडला, तर साऱ्या शहेनशहांनी याच मार्गानं पावलं टाकली. या देशात हिंदू बहुसंख्य आहेत, हे त्यांना कळत होतं; आणि त्याचमुळं तडजोडीनं ते राज्य करीत होते. या तडजोडीतूनच राजपूत, हिंदू घराणी उभी होती. ही चूक औरंगजेबाच्या ध्यानी आली. काबूल-कंदाहारचा तंटा इराणची सत्ता मान्य करून त्यानं मिटवला; आसामच्या सरहद्दीवरचं युद्ध आवरतं घेतलं; आणि आपली नजर त्यानं दक्षिणेस आमच्यावर वळवली. याचं कारण एकच आहे- या तडजोडीच्या राजकारणातूनच आमचा उदय झाला, हे त्यानं जाणलं आहे. त्याचा होरा आता कळतो आहे; आणि त्याचमुळं त्याचा मार्गही.’

‘तुळजापूर?’ हंबीरराव उद्गारले.

‘शाबास, हंबीरराव! सेनापती शोभलात खरे! हाच औरंगजेबाचा मार्ग आहे. औरंगजेब तुळजापूर, पंढरपूर, कोल्हापूर करीत राजापूर गाठील.’

‘पण फायदा काय?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘खूप! आमचं राज्य आणि कर्नाटक यांचे दोन तुकडे होतील. कर्नाटकाचं सारं राज्य निराधार बनेल. त्याचा रस्ता असा राहील, की राजकारणाच्या दृष्टीनं तो अत्यंत उपयुक्त ठरेल. मोठी लढाई होण्याआधी आमची परम दैवतं- तुळजापूर, पंढरपूर, शिखरशिंगणापूर, कोल्हापूर- भ्रष्टविली जातील. राजापूर गाठलं, की त्याला मदत करायला टपून बसलेले पोर्तुगीज आणि इंग्रज यांचा मार्ग मोकळा होईल. आमच्या धर्मराज्याचा पायाच नाहीसा करणारा एकुलता एक मार्ग आहे. राज्याभिषेक झाल्यानंतरही जर पंढरपूर, कोल्हापूर, तुळजापूर ही क्षेत्रं वाचविता आली नाहीत, तर आमच्या धर्मराज्याबद्दल निष्ठा कोण बाळगील!’

राजांनी उभे केलेले भयानक चित्र अनाजी-मोरोपंतांच्या डोळ्यांसमोर पसरले होते. घशाची कोरड जाणवत होती. राजे संथ आवाजात बोलत होते,

‘मार्गाचा जेव्हा आम्ही विचार करतो, तेव्हा गडकोटाच्या संदर्भात विचार करण्याची सवय आम्हांला लागली आहे. हा महत्त्वाचा विचार खरा; पण तो पुरेसा नाही. राजकारणात आजच्याइतकाच मागचा क्षण महत्त्वाचा असतो. दोन्ही जमेला धरले नाहीत, तर पुढचं कळेनासं होतं. लक्षावधींच्या फौजा घेऊन सोमनाथ फोडायला येणं यात नुसत्या लुटीचा वा देऊळ फोडण्याचा विचार नसतो. ज्या श्रद्धेच्या जोरावर लक्षावधी लोक प्राणार्पणाला तयार असतात, त्या श्रद्धेच्या भंगासाठी ती कृती घडते. आमचा श्रद्धाभंग करायचा असेल, तर आलमगीर युद्ध उभं करण्याआधीच आमची दैवतं भग्न करील.’

‘ते बघायला जगायचं कशाला?’ फिरंगोजी म्हणाले.

‘ते बघण्यासाठी नव्हे, ते न होऊ देण्यासाठी जगायला हवं. फार वर्षं आम्ही याचा विचार करतो आहो. आलमगीर आम्हांला येऊन भिडण्याआधीच त्याला गाठण्याचा आमचा बेत आहे. आलमगीरची पिछाडी उद्ध्वस्त करण्यासाठी दाभोळ बंदरातून गुजरातेत फौजा घुसवण्याची आमची इच्छा आहे. सुरतेला जाण्याचा आमचा हेतू लुटीबरोबरच गुजरातची भूमी पाहण्याचाही होता. युद्धाच्या दृष्टीनं त्या भूमीला फार अर्थ आहे; कारण आमचा सोमनाथ तिथं आहे. दक्षिणेत समोत्तिपेरुमलची मंदिरं उभारीत असता आमच्या नजरेसमोर सोमनाथ उभा होता. आलमगीरची सावली आमच्या दक्षिणेत उतरण्याआधीच त्याला गाठायला हवा. तो औरंगाबादेचा सुभेदार होता. त्याला हा मुलूख माहीत आहे. मिर्झाराजांपेक्षाही कुशाग्र बुद्धीचा, राजकारणपटू, थोर मुत्सद्दी आणि प्रखर सेनानी असं त्याचं रूप आहे. दिलेरखानाच्या सूडबुद्धीची त्याला जोड लाभणार आहे. असा आलमगीर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

इथं येण्याची वाट पाहत बसून कसं चालेल? नागाच्या नजरेनं अंदाज घेणारी त्याची नजर दक्षिणेवर पडण्याआधीच अशीरगडावर त्याला रोखून, गुजरातच्या भूमीवर त्याची धूळधाण उडविली पाहिजे. हे आपल्याला सहज जमेल... काय, हंबीरराव, मोरोपंत?'

'महाराज,नुसती आज्ञा करावी!'

'मोरोपंत, किती दिवस आज्ञेची वाट पाहणार?' दुसऱ्याच क्षणी राजांनी सावरले. 'मोरोपंत, इतके उतावीळ होऊ नका. सामना मोठा आहे. आपली फौज लढत असता इथं अखंड फौज गोळा करीत राहावं लागेल. आमच्या हाकेनुसार कुतुबशहा आणि आदिलशहा मदतीला यायला हवेत. ते जरूर येतील. तेवढा स्वार्थ त्यांना कळतो. आता आलमगीर उतरणार, हे निश्चित झालं आहे; आणि म्हणूनच उसंत घेऊन आता भागणार नाही.'

राजांची नजर अनाजी, मोरोपंत, हंबीरराव यांच्यावरून फिरली. राजांनी आज्ञा केली,

'अनाजी, हंबीरराव, मोरोपंत, तुम्ही उद्याच निघा... मोरोपंत, तुम्ही नाशिक-बागलाणात पसरलेल्या फौजा एकत्रित करा... अनाजी, तुम्ही कोकणपट्टी गाठा. ...हंबीरराव, तुम्ही कऱ्हाडला छावणी करून पन्हाळ्यापर्यंतच्या फौजा गोळा करा.'

तिघांनी मुजरे केले. राज्यांच्या नजरेत विजय सामावला होता.

'मोरोपंत, आमच्या साऱ्या गडावरील नामांकित तोफा खाली उतरू द्या. प्रत्येक किल्ल्यावरच्या शस्त्रागारातील बंदुका, तलवारी, भाले, पट्टे यांच्या याद्या करायला सांगा. देवदैवतांच्या समोर सेवेत गुंतलेले, ठिकठिकाणी पिलखान्यात झुलणारे आमचे हत्ती तोफांच्या गाड्यांसाठी वजवायला सांगा. अंबाऱ्या, हौदे, चौकडे, यांचा त्यांना सराव द्या. उष्ट्रखान्यातल्या उंटांना तोफेचं ओझं पेलू द्या. साहेबनौबतीचा, शिंगांचा, तुताऱ्यांचा आवाज त्यांच्या कानांवर पडू दे.'

बोलता-बोलता राजांची नजर बारीक झाली. 'हत्तींच्या साखळदंडांनी ओढलेले तोफांचे गाडे अशीरगडाच्या मैदानावर उभे ठाकलेले आम्हांला आजही दिसताहेत. त्यांच्या अग्निभडिमारात कंप पावणारी भूमी आम्हांला जाणवते आहे. हत्तीच्या चीत्कारांनी भरलेली, उंटांच्या ओरडण्यानं थरारणारी, घोड्यांच्या टापांनी विखुरली जाणारी अशीरगडाची भूमी आम्ही आज पाहतो अहो. तोफांच्या धुरांनी व्यापलेल्या मुलुखातून चारही वाटा पळणारी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मोगली फौज आजही आम्हांला स्पष्टपणे दिसते आहे. भयभीत शत्रूचा पाठलाग करणाऱ्या आमच्या वीरांच्या तोंडून जेव्हा 'हर हर महादेव' ची गर्जना होईल, तेव्हा सोमनाथच काय, पण काशीविश्वेश्वराच्या मंदिरातून ओंकाराचा ध्वनी प्रकटल्यावाचून राहणार नाही!'

राजे एकदम भावनाविवश झाले.

'गाफील राहायला उसंत नाही, मोरोपंत! ही लढाई फार मोलाची आहे. औरंगजेबाचा पराजय एवढाच हेतू तीमागे नाही. दिल्लीतख्त ताराज करून काशीविश्वेश्वराची स्थापना करण्याचं आमचं स्वप्न आहे. ते साकार करायला तुमचे हात आणि श्रींची इच्छा समर्थ आहे!'

फिरंगोजी थरथरत पुढे झाले. त्या म्हाताऱ्याच्या आधीच पाणावलेल्या डोळ्यांतून अश्रू निखळले होते. राजे म्हणाले,

'फिरंगोजी!'

'राजे, आज मासाहेब पायजे होत्या! दृष्ट काढली असती...'

राजे त्या बोलांनी गहिवरले.

'फिरंगोजी, दृष्ट काढण्यासाठी नको; पण खरंच वाटतं, आज मासाहेब हव्या होत्या...'

सदर उठली, तरी समयांच्या शेकडो वाती तशाच जळत होत्या.

□

१९

सकाळी अनाजी, मोरोपंत, हंबीरराव राजांचा निरोप घेण्यासाठी महाली आले. तिघांना पाहून राजांना आनंद झाला.

'अनाजी, साऱ्या गडकऱ्यांना आज्ञा लिहिल्या?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी. प्रत्येक गडावरील दारूगोळा आणि चांगल्या तोफा यांची यादी कळविण्यास सांगितली आहे. प्रल्हाद निराजी ती आपल्या नजरेखालून घालतील.’

‘ठीक... मोरोपंत, नाशिक-बागलाणची ठाणी पक्की करून तुम्ही माघारी या... अनाजी,कोकणपट्टीचा मुलूख पाहत असता दर्यासारंग दौलतखान आणि मायनाक भंडारी यांना जागरूक राहायला सांगा. या सगळ्या हालचाली अशा झाल्या पाहिजेत, की कुणाला याचा थांगपत्ता लागू नये. कुणाला आमच्या बेताचा अंदाज येता कामा नये.’ राजांची नजर हंबीररावांकडे वळली.

‘हंबीरराव, तुम्ही कऱ्हाड, पन्हाळा या भागांत छावणी करणार. हे करीत असता फौजभरतीसाठी जेवढे मिळतील, तेवढे लोक गोळा करा. आपली फौज जेवढी वाढवता येईल, तेवढी वाढवा. सारा मराठी माणूस एकत्रित करा.’

‘महाराज!’ हंबीरराव चाचरले.

‘बोलाऽ ऽ’

‘आणि युवराज?’

राजे क्षणभर उभे राहिले. पण राजांच्या प्रसन्न चेहऱ्यावरची रेषाही बदलली नाही.

‘हंबीरराव, अशा कामात आमचे युवराज कसे मागे राहतील? ही वेळच अशी की, जेव्हा साऱ्यांनी एक व्हायचं. युवराजांना वगळून आमचा बेत सिद्धीला जात नाही, हे आम्ही अनुभवलं आहे. युवराज जरूर येतील. किंबहुना, तेच आमच्या फौजेचं नेतृत्व करतील. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आमच्या मनात शंका नाही.’

तिघे मुजऱ्यांसाठी लवले. निरोप देताना राजे म्हणाले,

‘अनाजी, मोरोपंत, हंबीरराव, जे करायचं, ते जपून करा. सर्व व्यवस्था लावून तुम्ही परत या. आम्ही तुमची वाट पाहतो. हंबीरराव, जाताना फिरंगोजींना इकडं पाठवून द्या.’

तिघे गेले. एकमेकांशी बोलत असता एक दासी मधल्या चौकात आली; आणि तिने

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अनाजींना हाक मारली. अनाजी नजीक जाताच तिने निरोप सांगितला.

‘राणीसाहेबांनी बोलावलंय्!’

‘मला?’

‘जी.’

‘कुठं आहेत राणीसाहेब?’

‘दरूणी-महाली.’

‘ठीक. सदरेवरून येतोच, म्हणून सांग.’

थोड्या अंतरावर असलेल्या दोघांत अनाजी मिसळले. हंबीरराव बोलले,

‘राजे केवढे बदलतात, नाही?’

‘बदलतात, म्हणजे?’ अनाजींनी विचारले.

‘पाहा ना, काल-परवा चिंतेत असलेले महाराज ही बातमी आल्यापासून केवढे बदलले, ते! चिंतेचं नाव तरी चेहऱ्यावर आहे? आलमगीर येतो, असं समजलं असतं, तर कोणीही केवढ्या काळजीत पडला असता!’

‘हाच फरक त्यांच्यांत आणि आमच्यांत आहे.’ मोरोपंत बोलले. ‘असा धनी लाभला, हे तुमचं-आमचं भाग्य. राजांच्या संगती आपण थोडी का मुलूखगिरी केली? आम्ही पाहिलं, तेच राजांनी पाहिलं. पण दोन्हींत फरक केवढा?’

‘त्याचंच मला सदैव आश्चर्य वाटतं. कोणताही प्रसंग येवो, त्या क्षणी राजांचे सर्व तपशील तयार!’

‘त्या क्षणी नव्हे, त्याच्या आधीच तयार झालेला असतो.’ मोरोपंत सांगत होते. ‘ज्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

क्षणी मिर्झाराजांची चाल राजांनी पाहिली, त्याच क्षणी त्यांनी पराभव ओळखला. वज्रगड पडल्याची बातमी आली, आणि राजांनी तहाची बोलणी सुरू केली. आज खुद्द आलमगीर उतरतो आहे, हे समजताच राजांना विजय स्पष्ट दिसतो. याला फार अर्थ आहे! राजांचे बेत ऐकत असता पुढची भाकितं स्पष्ट दिसू लागतात.'

तिघे बोलत सदरेवर आले. राजांचा निरोप समजताच फिरंगोजी महाली जायला उठले. मोरोपंत म्हणाले,

'फिरंगोजी, आम्ही तिघे जातो आहोत. राजांना जपा!'

'म्हातारपण आलं, बाबांनो! आता राखणीचंच काम!' फिरंगोजी म्हणाले.

'असं म्हणू नका. राज्याचं धन सांभाळणं एवढी सोपी गोष्ट नाही.' मोरोपंतांनी सांगितले.

त्या बोलांनी सुखावलेले फिरंगोजी राजांच्या महालाकडे चालू लागले. राजे फिरंगोजींची वाट पाहत होते.

'फिरंगोजी, आलात? मी तुमचीच वाट पाहत होतो. या.'

फिरंगोजी सामोरे गेले. राजांनी त्यांचा हात धरून त्यांना बैठकीवर बसविले.

'फिरंगोजी, आमच्या मनात काय बेत आहेत, तुम्ही ऐकलंतच. आता फार मोठी जबाबदारी आहे.'

'ते काय कळत न्हाई? तुमचा बोल जमिनीवर पडणार न्हाई. ती जिम्मेदारी आमची.'

'ते माहीत आहे. तुम्ही, मोरोपंत, अनाजी, हंबीरराव, येसाजी असताना आम्हांला चिंता वाटत नाही. चिंता वाटते युवराजांची. रस्त्यावरची माणसं आपली करणारे आम्ही! आम्हांला आमचा शंभू आपला करता येत नाही!'

'युवराज तसे न्हाईत, धनी! मनानं लई चांगलं पोर आहे ते.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘ते खरं; पण ते आचरणात दिसायला हवं ना! फिरंगोजी, तुम्ही वयानं मोठे, अधिकारानंही. तुमच्यासमोर सांगायला लाज कसली? पण युवराजांनी आपल्या वर्तनानं साऱ्यांचा विश्वास गमावला आहे. मोगलांना मिळून तर त्यांनी कळसच केला! ते उद्या काय करतील, याचा विश्वास आम्हांलादेखील देता येत नाही. अनेक वेळा संभाजीला वगळून राजारामांना युवराज करावं, असं मनात येतं.’

‘महाराज!’

‘पाहिलंत? तुम्हांला सुद्धा ते पटत नाही. थोरला गादीचा मालक, ही कल्पना सुटत नाही. हेच युवराजांचं खरं बळ आहे. युवराज चांगले वागले, तर ते का आम्हांला नको आहे? युवराज या लढ्यात आमच्या बरोबर राहिले, त्यांनी पराक्रम गाजविला, तर मागचं सारं धुऊन जाईल. साऱ्यांची मनं मोकळी होतील. आपल्याच वर्तनानं संभाजी निराश झाला आहे. त्याला धीर देऊन कोणी तरी हे त्याला सांगायला हवं.’

फिरंगोजी आश्चर्याने राजांच्याकडे पाहत होते.

‘पाहता काय? फिरंगोजी, हे काम तुम्हीच करू शकाल. बाळपणापासून युवराज तुमच्या डोळ्यांसमोर वाढले. तुम्ही त्यांना वाढवलंत, खेळवलंत. तुमच्याबद्दल त्यांच्या मनात आदर आहे, हे आम्ही जाणतो. तुम्ही पन्हाळ्याला जा. त्यांना हे समजावून सांगा. मनात काही राग धरू नका, म्हणावं. ही नशिबानं चालून आलेली संधी त्यांना दवडू देऊ नका.’

फिरंगोजींच्या मिशा थरथरल्या. ते म्हणाले,

‘राजे, आजच निघतो मी. मी त्या लेकराला चांगलं वळखतो. तुमचा सांगावा ऐकला, तर त्या पोराचा बसला जीव आनंदानं भरून जाईल. काळजी करू नका, धनी!’

फिरंगोजींनी राजांना मुजरा केला. फिरंगोजी सदरेत आले, तेव्हा मोरोपंत, अनाजी, हंबीरराव सदरेवरच होते. त्यांचे बोलणे रंगात आले होते. फिरंगोजींना पाहताच बोलणे थांबले. बैठक उठली. हंबीरराव म्हणाले,

‘फिरंगोजी, आम्ही येतो. गडावर नजर राहू द्या.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

फिरंगोजी हसले. मिशीवरून पालथी मूठ फिरवीत ते तिघांकडे पाहत म्हणाले,

‘न्हाई, लेकांनो! मलाबी राजांनी कामगिरी सांगितलिया.’

तिघे थक्क झाले. मोरोपंतांनी विचारले,

‘कसली कामगिरी?’

‘तुम्हां पोराठोरांना सांगून त्याचा काय उपयोग?’ म्हणत म्हातारा हसत सदरेच्या पायऱ्या उतरू लागला. तिघांनी एकमेकांच्याकडे पाहिले. तिघांच्या चेहऱ्यांवर हसू उमटले होते. सदरेकडे येत असलेली दासी पाहून अनाजींचे हास्य विरले. त्यांनी गडबडीने मोरोपंतांचा, हंबीररावांचा निरोप घेतला.

दरूणी-महालात संतप्त सोयराबाई अनाजींची वाट पाहत उभ्या होत्या. अनाजी येताच त्या संताप आवरून बोलल्या,

‘अनाजी, आम्ही इथं वाट पाहत होतो.’

‘क्षमा असावी! पण राजांच्या महालात...’

‘ते समजलं. तुम्ही आजच जाणार, असं ऐकलं.’

‘जी. तसा हुकूम झाला आहे.’

सोयराबाई काही क्षण विचार करीत होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य विलसले. सारा नूर एकदम पालटला.

‘अनाजी, तुम्ही कामगिरीवरून शक्य तो लौकर या.’

‘जी.’

‘आता युवराजांची मुंज झाली, लग्नही पार पडलं. यापुढं त्यांची जबाबदारी फार मोठी.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तेव्हा तुम्ही लौकर येणं इष्ट आहे.’

अनाजींच्या चेहऱ्यावर उमटलेले स्मित सोयराबाईंच्या नजरेतून सुटले नाही. त्यांनी विचारले,

‘का, अनाजी, हसलात का?’

‘क्षमा असावी.’ अनाजी बोलले, ‘स्पष्ट बोललो, तर चालेल?’

‘बोला, अनाजी. आमचा तुमच्यावर विश्वास आहे.’ चिंतेच्या सुरात सोयराबाई बोलल्या.

‘सध्या युवराजांचा विचार मनात आणू नये.’ अनाजी म्हणाले.

‘बोलाऽ’ सोयराबाई चकित होऊन म्हणाल्या.

‘राणीसाहेब, खरं बोलायचं झालं, तर....’

‘बोलाऽ’

अनाजी नजर वळवीत म्हणाले, ‘संभाजीराजांच्या वर्तनामुळं राजांनी मर्जी खप्पा झाली आहे, हे खरं. छोट्या युवराजांना युवराजपदाचे अधिकार द्यावेत, हा त्यांचा विचार होता, हेही खरं...’

‘होता?’ सोयराबाई उद्गारल्या.

‘हो! फार तर आज आहेही. पण हाच विचार आता कायम राहील, असं वाटत नाही.’

‘कारण?’

‘कारण एकच... युवराजांच्यावरचं प्रेम. हा रोष कुठवर टिकेल? जोवर युवराज पुन्हा भेटत नाहीत, तोवरच ना? एकदा संभाजीराजे राजांना परत भेटले, की दिलजमाई व्हायला

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

किती वेळ? पाण्यात काठी मारून पाणी कधीही तुटत नाही, राणीसाहेब!’

‘आणि ही भेट झालीच नाही, तर...’

‘ते आता अशक्य आहे.’ अनाजी निश्चयाने बोलले. ‘राज्यावर परचक्र येत आहे, ही संधी युवराज निश्चितपणे घेतील. युवराजांच्या वर्तनानं राजे सारं विसरतील.’

‘आपला सल्ला काय?’

‘आम्ही पायांचे चाकर! यात सल्ला काय देणार? या घरच्या गोष्टी. त्या घरच्यांनीच सोडवावयाला हव्या. आपल्या मनातले विचार सध्या मागे टाकावेत. संकटकाळी युवराजपदाची ही गल्लत होऊ देऊ नये, राज्ञीपदावर तृप्त असावं, हा माझा सल्ला आहे.’

‘विजयाबरोबर तुम्हीही फिरलात?’

‘गैरसमज होतो, राणीसाहेब! आम्ही सदैव आपल्या पाठीशी उभे राहू. आपला अधिकार डावलण्याची आमची कुवत नाही; पण त्याचबरोबर राजांशी बेइमान होणं आम्हांला जमणार नाही. राजे असेतो साऱ्यांचं इमान त्याच पावलांना जखडलं आहे. त्यातून कोणाची सुटका होणार नाही.’

अनाजींनी मुजरा केला. तीन पावले तसेच माघारी जाऊन ते वळले.

सोयराबाई अनाजींचे बोल आठवत होत्या.

□

२०

अमावास्येचा दिवस नजीक येत होता. निश्चलपुरी, कवी कलश ग्रहशांतीचे पाठ करीत होते. होमहवनांसाठी, शांतीप्रीत्यर्थ बळी दिले जात होते. गडावरच्या सर्व देवांना अभिषेक चालू होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

ग्रहणाचा दिवस उजाडला. गडाचे वातावरण सकाळपासूनच ढगांनी कुंदावले होते. सूर्योदयाच्या वेळी राजे जगदीश्वराजवळ उभे होते. सूर्यदर्शन घडण्यासाठी राजांना काही वेळ थांबावे लागले. ढगांतून सूर्य वर आला; आणि राजांनी हात जोडले.

राजांच्या बरोबर प्रल्हाद निराजी, कुडाळचे सुभेदार राहुजी सोमनाथ ही मंडळी होती. प्रल्हाद निराजी म्हणाले,

'आज हवा भारी वाईट पडलीय्.'

'प्रल्हादपंत, निसर्गरूप भारी सूक्ष्म असतं. भावी घटनांची जाणीव तिथं लपलेली असते. त्या दिवशीचा धरणीकंप आठवतो? वातावरण केवढं चमत्कारिक बनलं होतं! चला.'

सूर्यदर्शन करून राजे माघारी वळले. चालता-चालता त्यांनी आज्ञा केली,

'प्रल्हादपंत, गडांना पत्रं रवाना झाली?'

'जी. आज जातील.'

'ठीक.'

'महाराज, काल पुरोहितांचा निरोप आला होता. सूर्यास्तापूर्वी पाच घटी पन्नास पळांनी स्पर्शकाल आहे; आणि सूर्यास्तापूर्वी दोन घटी पळांनी ग्रहण सुटणार आहे. कुशावर्तावर स्नानाची सोय केली आहे. दानधर्म तिथंच केला जाईल.'

राजांनी प्रल्हादपंतांकडे पाहिले. राजे क्षणभर थांबले.

'पंत, आकाशातल्या सूर्यग्रहणाची घटका माणसाला मोजता येते. पळांचा हिशेब मांडता येतो; पण खुद्द मानवाला त्याचा क्षण सांगता येत नाही ना? ...ठीक आहे, प्रल्हादपंत, आम्हांला जरा आधी वर्दी द्या. आम्ही स्नानाला वेळेवर बाहेर पडू. तसंच आतही कळवा.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'जी.'

ग्रहणकालाच्या आधी राजे सहकुटुंब सहपरिवार कुशावर्तावर आले. ग्रहणकाल सुरू होता-होताच सर्वांनी कुशावर्तात स्नाने केली. राणीवशाच्या स्नानासाठी खास आडोशाची जागा तयार करण्यात आली होती. राजे स्नान करून जप करू लागले. कुशावर्ताच्या पाण्यात उभे राहून जप करणाऱ्या ब्राह्मण मंडळींचा आवाज उठत होता. 'दे दान, सुटे गिरान' चा आवाज गडावर ऐकू येत होता.

अचानक वातावरणात धूसर अंधेरी झाली. कुठे तरी कुत्र्याच्या रडण्याचा आवाज उठला. राजे डोळे मिटून जपात मग्न झाले होते. ग्रहण सुटले. राजांचे परत स्नान झाले. अनिष्टनिवारणार्थ याचकांना नाना धान्ये, कपडे यांची दाने करण्यासाठी राजे पीतांबर नेसून कुशावर्ताच्या घाटावर उभे राहिले. शकुनार्थ राजांनी प्रथम काही धान्ये दिली; आणि राजांच्या आज्ञेने राजाराम दानांसाठी उभे राहिले. दाने आटोपून राजे सर्वांसह गडावर आले, तेव्हा काळोख वाढला होता.

□

२१

ग्रहणानंतर दोन दिवस उलटले. दोन प्रहरी राजे आपल्या महाली विश्रांती घेत होते. सोयराबाई महालात आल्या. राजांच्या पलंगाजवळ जाऊन त्या उभ्या राहिल्या. राजे त्यांच्याकडे पाहत होते. सोयराबाईंनी सांगितले,

'पाहुणे 'जातो' म्हणतात.'

'बरं, मग?'

'आठ-नहाणाची मेजवानी उद्या करावी, असं वाटतं.'

'जरूर करा.'

'पण आपण तर रात्री जेवत नाही. तेव्हा...'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आम्ही जेवू. त्याची काळजी करू नका. बाळराजांच्या लग्नाची मेजवानी. त्यात पाहुणे मंडळी संगती. आम्ही जरूर मेजवानीला येऊ.’

सोयराबाईंना समाधान झाले. महालातून त्यांचा पाय निघत नव्हता. त्यांनी विचारले,

‘मी जाऊ?’

‘आपल्याला कोण अडवणार आहे?’ राजे बोलले.

सोयराबाईंच्या कपाळी आठी पडली; पण राजांचे लक्ष तिकडे नव्हते. ते आपल्याच विचारात डोळे मिटून राहिले होते.

राजारामांच्या आठ-नहाणाच्या मेजवानीचा थाट अलौकिक होता. त्या ऐश्वर्यात कोठेही कमतरता दिसत नव्हती. मेजवानीला खास पन्नास ताट लागले होते. प्रत्येक ताटाभोवती सुबक रांगोळी काढली होती. दर दोन ताटांमध्ये चांदीची समई तेवत होती. पंक्तीच्या मध्यभागी दोन सुवर्णताटे मांडली होती. चांदीच्या पाटांनी सजलेली ती दोन पाने खाशा स्वाऱ्यांची आहेत, हे न सांगताही कळत होते. हजारी उदबत्त्यांचा घमघमाट सर्व सोप्यात दरवळत होता.

राजे पाहुण्यांसह मेजवानीच्या जागेकडे येत होते. राजांच्या बरोबर बाळराजे आणि मुलीचे मामा चालत होते. मागून सर्व मंडळी येत होती. चालता-चालता संधी साधून मुलीचे मामा म्हणाले,

‘महाराज, उद्या जायला आज्ञा व्हावी!’

‘गडबड कसली?’

‘गडबड नाही. पण घरची देवदेवकं करायला हवीत. ती करून आम्ही माघारी गडावर येऊ.’

राजांनी विचार केला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आता तुम्ही आमचे व्याही. नाही कसं म्हणणार? पण उद्या बुधवार आहे. उद्या जाऊ नका. गुरुवारी सकाळी गड सोडा.’

‘जशी आज्ञा!’

‘ही आज्ञा नव्हे, विनंती समजा.’

राजे सर्वांसह पंक्तीच्या जागी आले. राजारामांच्या पाटाकडे बोट दाखवीत राजे राजारामांना म्हणाले,

‘बसा, बाळराजे. आज खरा मान तुमचा. नवरदेव ना तुम्ही!’

राजांच्या बोलांनी सारे हसले. त्याचा आनंद घेत समाधानाने राजे पाटावर बसले. बाळराजांनी आपली जागा घेतली आणि राजांच्या उजव्या बाजूला येसाजी, राहुजी, घाटगे, कदम, सूर्याजी ही सरदार मंडळी बसली. गप्पांच्या सोबतीत पंगत रंगत होती. एकदम हास्यविनोद थांबला. सर्वांची नजर स्थिरावली.

शालू नेसलेल्या प्रतापरावांच्या कन्या जानकीबाई या मनोहारीच्या सोबतीने पंक्तीत आल्या. त्यांच्या हाती साखरभाताचे छोटे ताट होते. आठ वर्षांचे वय असूनही त्यांच्या चेहऱ्यावर लज्जा प्रकटली होती. मनोहारीच्या मदतीने शालू व हातांतील ताट सावरीत त्या राजांच्या समोर आल्या. मनोहारीने खूण केली. राजांनी कौतुकाने हात मागे घेतला. साखरभात वाढला गेला. सुनेकडे पाहत असता राजांचे मन आनंदले.

‘ही आमची लक्ष्मी, जानकी. हा सोहळा पाहायला आमचे सरनौबत हवे होते!’

क्षणभर पंक्तीत शांतता पसरली. राजांच्या ते ध्यानी आले. आपल्या भावना आवरीत ते गडबडीने म्हणाले,

‘मुली, आम्हांला वाढलंस, पण तुमच्या स्वारींना वाढ ना! नवरा रागावला, तर मारतो, हे माहीत नाही, वाटतं?’

सारी पंगत एकदम हसण्याने उचंबळली. त्या हसण्याने राजारामांच्या पुढे भात

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

वाढण्यासाठी वाकलेल्या जानकीबाईंच्या हातचे ताट सुटले; आणि सारा भात राजारामांच्या ताटात पडला. मनोहारीने गडबडीने ताट उचलून घेतले. पंक्तीत परत हसण्याची लाट उसळली. शेजारी बसलेल्या मामासाहेबांना राजे म्हणाले,

'पाहिलंत, मामासाहेब? आपली लेक आत्तापासूनच पंक्तिप्रपंच करू लागली. सासऱ्याला एवढासा भात, पण आपल्या नवऱ्याला पुरं ताट!'

हसत-बोलत साऱ्यांची जेवणे झाली. साऱ्यांची नजर राजांच्या आज्ञेकडे लागली होती. तस्त्याने राजांच्या पुढे तस्त धरले. राजांनी हात धुतले. युवराजांनी हात धुताच पंगत उठली. सोयराबाईंनी येऊन राजांच्या हाती विडा दिला. साऱ्यांना विडे दिले गेले. विडा चघळीत सर्वांशी बोलत राजे सदरेकडे चालू लागले.

बरीच रात्र होईपर्यंत राजे सदरेवर पाहुण्यांसह बोलत बसले होते.

□

२२

भल्या पहाटे राजांना जाग आली. सारे अंग घामेजले होते. घशाला कोरड पडली होती. अंग शहारत होते. राजे उठले. त्यांनी हाक मारली. सेवक धावले. चूळ भरून राजे परत अंथरुणावर पडले; पण झोप येईना. राजांनी परत हाक मारली. महादेव आत आला.

'महादेव!'

'जी?'

'उजाडलं का, रे?'

'जी, अजून नाही.'

'आज बरं वाटत नाही. वैद्यराज आलेत?'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी, पाहतो.’

‘बघ बरं.’

महादेव गेला. नित्याचे वैद्यराज सदरेवर आले होते. वैद्यराज महाली आले, तेव्हा उजाडू लागले होते. वैद्यांनी नाडी पाहिली.

‘वैद्यराज!’

‘थोडा ज्वर संभवतो.’

‘ठीक आहे.’ राजे पलंगावरून उठत म्हणाले. ‘ही दगदग झाली, की असंच होतं.’

‘विश्रांती घ्यावी.’ वैद्यराज म्हणाले,

‘ती आमच्या नशिबी लिहिलेली नाही. कदाचित त्याचमुळं राजे लोकांना प्रथम वैद्यराजांच्या समोर उभं राहण्याचा दंडक घातला असेल.’

‘मी मात्रा देतो.’

‘पाहू. कुठवर ज्वराची मजल जाते, ती.’

वैद्यराज जाताच राजांनी मुखमार्जन केले; पण स्नान केले नाही. देवाच्या पाया पडून राजे बैठकीवर आले. राजांचे दूध घेऊन मनोहारी महालात आली. राजे बैठकीवर शाल पांघरून घेऊन बसले होते. राजांनी आपले दूध घेतले. तबक उचलीत असता मनोहारीची पावले अडखळली.

‘थंडी वाजते?’

‘तशी फारशी नाही. पण जरा काटा भरतो. तुला नाही वाटत?’

मनोहारीने नकारार्थी मान हलविली. मनोहारी महालाबाहेर गेली. त्यानंतर राजाराम दर्शन

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

घेऊन गेले. बऱ्याच वेळाने सोयराबाई महाली आल्या. राजांची दृष्टी सोयराबाईंवर खिळली. त्या अस्वस्थ दिसत होत्या. राजांच्यावर त्यांची नजर स्थिरावली नव्हती. कोणत्या तरी काळजीने त्यांच्या मनात वादळ माजविल्यासारखे वाटत होते. त्यांनी गडबडीने विचारले,

'तब्येत बरी नाही?'

'कोण म्हणतं?'

त्या प्रश्नाने सोयराबाई दचकल्या. स्वत:ला सावरीत त्या म्हणाल्या,

'कोणी नाही; पण चेहरा सांगतो ना! तब्येत बरी असती, तर कोणी झोपून का राहिलं असतं?'

'राणीसाहेब, चेहऱ्यावर जाऊ नका हं! चेहरे फार फसवे असतात. आमची तब्येत बरी आहे. जा तुम्ही.'

सोयराबाई त्या बोलण्याने संतापल्या. संताप आवरीत त्या म्हणाल्या,

'जेव्हा तेव्हा तोडून बोलायचं! येऊ नये म्हटलं, तरी मनाला राहवत नाही.'

'तेही समजलं... आमची प्रकृती बरी नाही. वैद्यांनी आम्हांला विश्रांतीचा सल्ला दिला आहे. तुमची हरकत नसेल, तर थोडी विश्रांती घ्यावी म्हणतो.'

सोयराबाई निघून गेल्या. राजांनी सेवकाला बाळाजींना बोलवायला सांगितलं. बाळाजी लेखन-साहित्य घेऊन महाली आले. राजे बसल्या जागेवरून काही खास किल्लेदारांची पत्रे बाळाजींना सांगत होते. दोन पत्रे सांगून झाली. राजे उठले. पलंगावर झोपत ते म्हणाले,

'बाळाजी, आज बसवत नाही. आम्ही झोपून सांगतो.'

राजांनी कसेबसे एक पत्र पुरे केले; आणि ते आपणहून म्हणाले,

'पुरे, बाळाजी. उरलेली पत्रं याच नमुन्यानं लिहा. आता आम्हांला सांगवत नाही.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महाराज, वैद्यांना बोलावू?’

‘नको, सकाळीच त्यांनी तबियत पाहिली.’

बाळाजी गेले. राजांचा ज्वर चढतच होता. दोन प्रहरपर्यंत ती बातमी वाडाभर पसरली. वैद्यांनी मात्रा दिल्या. महालात साऱ्यांच्या येरझाऱ्या सुरू झाल्या. जानकीबाईंचे मामा राजांच्या समाचाराला आले. राजांनी विचारले,

‘उद्या जाणार ना? मी तसं सांगितलं आहे.’

‘आपल्याला बरं वाटलं, की...’

‘आमची काळजी करू नका. आताशा दगदग सोसत नाही. अशा ज्वराची सवय आहे आम्हांला. होईल कमी.’

राजांना ज्वर आलेला पाहताच सोयराबाईंनी तातडीने गंगाशास्त्र्यांना आणण्यासाठी पालखी पाठवली.

सायंकाळी ज्वर परत कमी झाला. साऱ्यांना बरे वाटले. राजेही उत्साहाने बोलू लागले. थोडा थकवा सोडला, तर राजांची तक्रार राहिली नव्हती. रात्री राजांना परत ज्वराचा भास झाला. पण राजांनी कुणाला सांगितले नाही.

गुरुवारी सकाळी राजांच्या नव्या सूनबाई जानकीबाई राजांचा निरोप घेण्यासाठी महाली आल्या. राजांना त्यांनी वाकून नमस्कार केला. राजांनी आपल्या आठ वर्षांच्या सूनबाईंना प्रेमाने जवळ घेतले.

‘सूनबाई! लौकर घरी या हं!’

न कळत जानकीबाईंनी मान डोलविली. राजे हसले. पाहुणे मंडळी राजांचा निरोप घ्यायला आली. राजे गडबडीने उठले. ते म्हणाले,

‘आमच्या सूनबाई माहेरी जाताहेत; आणि आम्ही महालीच कसा निरोप देणार? आम्ही

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चार पावलं येऊ.’

‘नको’ म्हणत असताही राजांनी ऐकले नाही. अंगाभोवती शाल लपेटून घेऊन राजे सर्वांबरोबर शिरकाईच्या देवळात आले. देवळात सर्वांना निरोपाचे विडे देण्यात आले. जानकीबाई मेण्यात बसल्या. बाकीचे मेणे चौकात आले. राजे देवळाच्या दारी उभे होते. वऱ्हाडाने निरोप घेतला; आणि मेणे गड उतरू लागले.

सर्वांबरोबर राजे वाड्याकडे येत होते. गडावर ऊन चढले होते. अचानक राजे थांबले. त्यांनी हिरोजींना खुणवले. हिरोजी धावला. राजांनी त्याच्या खांद्याचा आधार घेतला. राजांचा चेहरा घामेजलेला होता. डोळ्यांच्या कडा आरक्त बनल्या होत्या. राजे कष्टाने म्हणाले,

‘आम्हांला चक्कर येते!’

‘पालखी मागवू?’

राजांनी होकारार्थी मान हलवली. प्रल्हाद निराजी पुढे आले. दोघांच्या आधाराने राजे देवळाच्या कट्ट्याजवळ आले. राजे बसले.

येसाजी, घाटगे पुढे धावले होते. तातडीने पालखी आणली गेली. राजे पालखीतून वाड्यात आले. पालखीबरोबर वैद्यराज चालले होते. पालखीतून राजे हिरोजींच्या आधाराने उठले. आधार घेताच त्यांनी आपला पलंग गाठला. वैद्यराज नाडी पाहत होते. राजांच्या अंगात ज्वर भरत होता.

सोयराबाई तातडीने महाली आल्या. सारे अदबीने मागे सरले. पलंगाजवळ जात सोयराबाईंनी विचारले,

‘ज्वर आला?’

‘असं वैद्य म्हणतात.’

‘बाहेर जायची का गरज होती?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजे तशाही परिस्थितीत हसले. सर्वांवरून नजर फिरवीत राजे म्हणाले,

‘उगीच काळजी करता! ग्रहणाची दोन स्नानं झाली. लग्नाची दगदग. त्यामुळं ज्वर आला असेल. एक-दोन दिवसात कमी होईल. आता आम्हांला आजारी पडून परवडायचं नाही. मृत्यू सामोरा आला, तरी सांगू की, ‘आता आम्हांला सवड नाही.’ काळजी करू नका.’

राजांच्या बोलण्याने साऱ्यांची काळजी दूर झाली. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर समाधान प्रकटले. पण....

राजांचा तो तर्क खरा ठरला नाही. दिवसेंदिवस ज्वराचे प्रमाण वाढू लागले. पोटात काही राहीनासे झाले. घशाची कोरड वाढत होती. दिवसादिवसाला थकवा वाढत होता.

दोन-तीन दिवस यातच गेले. राजांचे वाढते आजारपण पाहून साऱ्या गडावर चिंतेचे वातावरण पसरले.

□

२३

दोन प्रहरी राजांचा ज्वर कमी होत होता. चार दिवसांच्या आजाराने राजांना खूप क्षीणता वाटत होती. हिरोजी फर्जंद राजांचे पाय रगडीत होता. महालात महादजी पानसंबळ, येसाजी माना खाली घालून बसून होते. वैद्यराज राजांच्या उशाशेजारी उभे होते. आतल्या दरवाजाने सोयराबाई आल्या. राजांनी त्यांना बोलावले होते. पलंगाजवळ येत त्यांनी विचारले,

‘काही घेणार का?’

नकारार्थी मान हलवीत राजे म्हणाले,

‘जे टिकत नाही, ते घेऊन काय फायदा? राणीसाहेब, आमची तब्येत बरी नाही. तुम्ही इथं बसत का नाही?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘सारखी तर असते! इथंच जर बसून राहिले, तर सगळं बघणार कोण?’

‘खरं आहे. तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. तुम्हांला आता बसून चालायचं नाही... बाळराजे कुठं आहेत?’

‘महाली असतील. त्यांनाही बरं नाही.’

‘काय होतं?’

‘सर्दी आहे.’

‘भेटतील संध्याकाळी.’

राजांनी सर्वांना खुणेने इशारा केला. सारे मागल्या पावली महाली गेले. सोयराबाई राजांच्याकडे पाहत होत्या. राजांना ठसका आला. सोयराबाईंनी गडबडीने पिकदाणी उचलली. राजांनी ‘नको’ म्हणून खुणवले. काही दीर्घ श्वास घेऊन राजे बोलू लागले,

‘आमची महत्त्वाची दोन कामं तेवढी कराल?’

‘जी.’

‘आजच्या आज पन्हाळ्याला स्वार पाठवा. आमची तबियत बरी नाही, म्हणून संभाजींना कळवा. तातडीनं त्यांना गडावर बोलवून घ्या.’

‘बरं!’

‘तसंच, गडाखाली धाकट्या राणीसाहेबांना निरोप पाठवून त्यांना पालखी पाठवा. एवढं ताबडतोब करा.’

‘बरं!’

‘राणीसाहेब, आम्हांला खूप बोलायचं आहे.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘वैद्यांनी ‘बोलू नये, विश्रांती घ्यावी,’ असं सांगितलं आहे. बरं वाटू लागल्यावर बोललं, तर नाही का चालणार?’

राजांनी सोयराबाईंच्याकडे रोखून पाहिले. सोयराबाईंची नजर पायांकडे वळली. राजे मंद हास्य करीत म्हणाले,

‘असं म्हणता? तसं करू. श्रींची इच्छा!’

महादेव आत आला. त्याने वर्दी दिली,

‘महाडचे गंगाशास्त्री आलेत.’

‘योग्य वेळी आले. पाठवा.’

सोयराबाईंनी विचारले,‘मी जाऊ?’

‘बरं.’ राजांनी संमती दिली.

सोयराबाई गेल्या. प्रल्हादपंत निराजींसह वैद्यराज महालात आले. त्यांनी राजांना मुजरा केला. राजे म्हणाले,

‘वैद्यराज, वैद्यांनी आशीर्वाद द्यावेत; पाया पडू नये. आपल्याला त्रास झाला.’

‘नाही, महाराज! सेवेइतका आनंद नाही.’

वैद्यराज उंच-पुरे होते. वयाची सत्तरी ओलांडूनही ते ताठ उभे होते. मस्तकी केशरी रुमाल बांधला होता. अंगात अंगरखा, पायी तलम धोतर, असा त्यांचा वेष होता. रुंद कपाळावर गंधाची मुद्रा होती. पिकल्या भिवया, मिशा आणि चेहऱ्यावर उठलेल्या रेषा वयाचा अंदाज सांगत होत्या. पिकल्या लिंबाची कांती शरीरावर विलसत होती. वैद्यराजांची शांत नजर राजांच्यावर स्थिरावली होती.

राजे म्हणाले, ‘वैद्यराज, या ना! पाहा, आमच्या प्रकृतीत काय बिघाड झालाय्, तो.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

एक पाऊलही पुढे न सरकता गंगा वैद्य म्हणाले. ‘ते पाहतो आहे.’

काही क्षण गंगा वैद्य तसेच उभे राहिले. आपल्या लांबसडक निमुळत्या बोटांचे हात त्यांनी एकमेकांच्यावर चोळले; आणि पुढे होऊन त्यांनी राजांचा हात हाती घेतला. मिटल्या डोळ्यांनी ते राजांची नाडी पाहू लागले. नाडी पाहून वैद्यराजांनी सांगितले,

‘औषध देतो.’

गंगाशास्त्र्यांनी राजांच्या वैद्यांना खुणावले. गंगाशास्त्र्यांच्या बरोबर वैद्य महालाबाहेर गेले. गंगाशास्त्री महालचौकात आले. आजूबाजूला कोणी नव्हते. गंगाशास्त्र्यांनी विचारले,

‘सांगा.’

‘अमावास्येला राजांनी कुशावर्तावर दोनदा स्नान केलं. त्यानंतर राजांची प्रकृती ठीक होती. वात-पित्त-कफांत काही बदल नव्हता. चैत्र शुद्ध चतुर्थीला युवराजांच्या आठ-नहाणाची मेजवानी झाली. रात्री राजे झोपले; पण पहाटे राजांना त्रास सुरू झाला. मी पाहिलं, तेव्हा अंगात ज्वर होता. मात्रा दिली. सायंकाळपर्यंत राजांचा ज्वर उतरला.’

‘राजांची लक्षणं?’

‘नाडी विषम भासली. डोळ्यांच्या कडा लाल झाल्या होत्या. कोरड होती.’

‘बरं! पुढं.’

‘सायंकाळी ज्वर उतरला. दुसऱ्या दिवशी म्हणजे चैत्र पंचमीला राजे पाहुण्यांना पोहोचवायला वाड्याबाहेर गेले. सायंकाळी किंचित अस्वस्थता वाटत होती. नाडी ठीक होती. पण राजांना मी विश्रांतीचा सल्ला दिला होता. वाड्याबाहेर चक्कर आली. मी गेलो, तेव्हा ज्वर भरला होता. पालखीतून राजे परत आले. त्या दिवसापासून ज्वर कमी-जास्त होतो आहे.’

‘प्रमाण?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘प्रमाण वाढतं आहे.’

गंगाशास्त्री वळलेले पाहताच वैद्यांनी विचारले,

‘आपलं निदान?’

‘ते आज सांगता येणं कठीण; पण बहुधा विषमज्वर असावा. ते निश्चित झालं, तर भीतीचं कारण आहे, असं वाटत नाही.’

राजांच्या महालासमोरच्या सोप्यावर वैद्यराजांची बैठक घातली गेली. गंगाशास्त्र्यांनी आपली औषधे शोधली. त्यांनी दिलेली मात्रा वैद्य सहाणेवर उगाळू लागले. ते पाहणाऱ्या येसाजीला राहवेना. साऱ्यांच्याच मनांतला प्रश्न त्याने विचारला.

शास्त्र्यांची नजर उंचावली. ‘माझ्या मते हा विषमज्वर आहे. हे कारण निश्चित झालं, तर उद्या रात्रीपर्यंत राजांना बरं वाटू लागेल. काळजीचं कारण आहे, असं मला वाटत नाही.’

वैद्यांच्या त्या शब्दांनी साऱ्यांना हायसे वाटले.

गंगाशास्त्र्यांनी देवाचे स्मरण करून राजांना मात्रा दिली.

□

२४

गंगाशास्त्र्यांनी खात्री देऊनही सोमवारी राजांच्या ज्वराचे प्रमाण तेच राहिले. उलटणाऱ्या प्रत्येक दिवसाबरोबर राजांचे रूप पालटत होते. क्षीणता वाढत होती. ज्वराचा चढउतार चालूच होता. राजांच्यावर नजर ठेवून दोन्ही वैद्य राजांच्या उशापायथ्याशी बसून होते. हिरोजी, येसाजी महादजी, प्रल्हाद निराजी, बाळाजी आवजी, राहुजी सोमनाथ ही नजीकची मंडळी अस्वस्थ मनाने महालात येरझाऱ्या घालीत होती.

रात्री महालात दिवे लागले. राजांनी पडल्या जागेवरून हात जोडले. राजाराम राजांना भेटून गेले. त्यानंतर सोयराबाई महालात आल्या. त्या नजीक येताच राजांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेब, धाकट्या राणीसाहेबांना मेणा पाठवला होता?’

‘हो ना!’ नजर चुकवीत सोयराबाई म्हणाल्या.

‘मग त्या का आल्या नाहीत?’

सोयराबाईंनी कसेबसे उत्तर दिले, ‘त्यांना बरं नाही. त्यांनाही ताप येतो, म्हणे!’

राजे पलंगाच्या कडेवरून हात फिरवीत होते. सोयराबाईंच्यावरची नजर न काढताच राजे बोलले,

‘शक्य आहे! समानधर्मी ना आम्ही!’

राजांनी डोळे मिटून घेतले. सोयराबाई निघून गेल्या. मनोहारी राजांचे पाय चेपीत होती.

गंगाशास्त्री राजवैद्यांसह महालसदरेवर आले. समया प्रज्वलित झाल्या होत्या. गंगाशास्त्री आल्याचे पाहून बैठकीवर बसलेले बाळाजी बाजूला झाले. काही न बोलता गंगाशास्त्री लोडाला टेकून बसले. गंगाशास्त्र्यांची विचारमग्न मुद्रा पाहून राजवैद्यांना काही बोलण्याचा धीर होत नव्हता. बसल्या जागेवरून बाळाजी दोघांच्या मुद्रांकडे पाहत होते. गंगाशास्त्र्यांनी एक दीर्घ नि:श्वास सोडला. समोरचा पानाचा डबा ओढून ते सुपारी कातरू लागले. त्यांची नजर वैद्यांच्याकडे गेली. गंगाशास्त्री म्हणाले,

‘बोला, वैद्यराज! काही तरी सांगा.’

‘काही सुचत नाही. ज्वर एव्हाना हटायला हवा होता.’

‘हवा होता; पण हटत नाही. असंच ना?’ गंगाशास्त्री म्हणाले. ‘त्याचंच कोडं मी उलगडतोय्. महाज्वरांकुशानं हवा तसला विषमज्वर कमी येतोच; पण इथं त्याचाही प्रभाव पडेनासा झाला आहे.’

‘मला वाटतं...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बोलाऽ’ गंगाशास्त्री म्हणाले.

‘मला वाटतं, नवज्वर तर नसेल?’

गंगाशास्त्री हसले.

‘शंका ठीक आहे; पण लक्षण काय? तापाची मुदत वाढली, म्हणून काही नवज्वर म्हणता येत नाही. नवज्वर असता, तर तो विषम राहिला नसता. नवज्वर जरी गृहीत धरला, तरी दिल्या मात्रांनी एव्हाना थोडा तरी बदल दिसला असता.’

साऱ्यांचे चेहरे परत चिंतामग्न झाले.

रात्री राजांना झोप लागली नाही. ते सारखे दचकून जागे होत होते.

रात्र पळापळाने पुढे सरकत होती. केव्हा उजाडेल, असे सर्वांना झाले होते.

एकादशीचा दिवस उजाडला; आणि त्याबरोबर राजांचा ज्वरही वाढला. ज्वराचे प्रमाण मध्यान्हीच्या सुमारास थोडे कमी झाले; पण दोन प्रहरी परत ज्वराने उचल केली. राजांच्या अंगाची काहिली होत होती. राजांच्या पोटात तर काही टिकत नव्हते. मात्रादेखील अत्यंत सावकाशपणे जिभेवर मुरवावी लागत होती.

दोन प्रहर टळल्यानंतर वैद्यराजांना मात्रा उगाळण्यास सांगून गंगाशास्त्री महालात गेले. महालात कोणी नव्हते. राजे स्वस्थ पडून होते. हळुवार पावलांनी शास्त्री पलंगाजवळ गेले. राजांचे डोळे उघडे होते.

‘वैद्यराज, आता कोणतं औषध?’

‘मात्रा घ्यावी लागेल.’

‘ठीक.’

शास्त्र्यांनी राजांची नाडी पाहिली .

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शास्त्रीबुवा! आम्हांला भुकेचं काही वाटत नाही. पण या चढणाऱ्या-उतरणाऱ्या ज्वराचा भारी त्रास होतो. अंगाची काहिली होते. ते सोसणं कठीण जातं. आताशा मनात असूनही बोलू नये, असं वाटतं.’ तेवढ्या बोलण्याने राजांना थकवा आला.

उसंत घेऊन त्यांनी विचारले,

‘शास्त्रीबुवा! आमचा ज्वर का हटत नाही?’

शास्त्रीबुवांनी राजांचा हात सोडला. त्यांची नजर राजांवर खिळली होती. राजांचा श्वास जड आणि उष्ण भासत होता. डोळे आरक्त बनले होते. शास्त्र्यांनी पलंगाच्या पायथ्याशी बसलेल्या मनोहारीकडे पाहिले. मनोहारी चटकन उठून बाहेर गेली. महालात कोणी नाही, याची खात्री करून शास्त्री म्हणाले,

‘महाराज, ज्ञानच नव्हे, तर वय आणि अनुभव यांच्या भरवशावर सांगतो. आजवर या गंगाशास्त्र्याच्या मात्रांनी, भस्मांनी अपयश घेतलं नाही. त्यापुढं कोणत्याही विषमज्वराचा जोर बारा घटकांपलीकडे टिकला नाही. पण याच वेळी या मात्रांना, या यशस्वी हातांना का गुण येऊ नये, ते कळत नाही. काही समजेनासं झालं आहे.’

भांबावलेल्या वैद्यांच्याकडे पाहून राजांनी विचारले,

‘शास्त्रीबुवा, तुम्हांला काय म्हणायचं आहे?’

वैद्यराजांची जीभ कोरड्या ओठांवरून फिरली.

‘महाराज...’

‘सांगा, वैद्यराज...’

‘आपण काही अभक्ष्यभक्षण तरी...’ गंगाशास्त्री बोलले.

राजांचे डोळे विस्फारले गेले. क्षणभर त्यांचे ओठ थरथरले. क्षणात त्यांची मुद्रा बेचैन झाली. त्यांनी विचारले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महालात कुणी आहे?’

‘जी, नाही.’

राजांनी एक सुटकेचा निश्वास सोडला. चेहऱ्यावर मंद स्मित प्रकटले.

‘तसं मानायचं काही कारण दिसत नाही. आणि जरी तसं असलं, तरी त्यात काही नवं नाही. हा अनुभव पूर्वीही आला होता.’

राजांच्या या शांत बोलण्याने वैद्यराज आश्चर्यचकित होऊन उद्गारले,

‘महाराज!’

‘चिंता करू नका, शास्त्रीबुवा... शास्त्रीबुवा एक आज्ञा केली, तर पाळाल?’

‘जी! जीवमोलानं आज्ञा पाळली जाईल.’

‘शपथ घ्या.’

‘गंगाशास्त्र्यांचा शब्द हीच शपथ समजावी.’ शास्त्री बोलले.

‘ठीक! आम्ही विश्वास धरतो.’ राजांची नजर शास्त्र्यांवर स्थिरावली. ‘ऐका तर. ही शंका अशीच मनात राहू द्या. हिचा उच्चार कुठंही करू नका. जन्म आणि मृत्यू परमेश्वराधीन. मृत्यू यायचाच झाला, तर तो त्याच्याच इच्छेनं येणार. मग जो जीव या मृत्यूला कारणीभूत होत असेल, तो ईश्वरदूतच नाही का? मग त्याचा राग आणि लोभ कुठला? तुम्हांला वाटतील, ते उपचार करा. त्याची इच्छा असेल, तर यातूनही आम्ही पार पडू. वाईट वाटून घेऊ नका.’

गंगाशास्त्री राजांच्या बोलण्याने सुन्न झाले. ते तसेच सदरेवर आले. महालसदरेवर वैद्यराज राजांची मात्रा उगाळीत बसले होते. तेथे दुसरे कोणी नव्हते. गंगाशास्त्री सरळ बैठकीवर बसले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

डोक्यावरचा रुमाल उतरून त्यांनी पांढऱ्या संजाबावरून हात फिरवायला सुरुवात केली. शास्त्र्यांच्या धारदार नाकाच्या शेंड्यावर घर्मबिंदू गोळा झाले होते. सारी बेचैनी चेहऱ्यावर प्रकटली होती. मात्रा उगाळणाऱ्या वैद्यराजांवर त्यांची नजर स्थिरावली. त्यांनी विचारले,

'काय करता?'

'ही मात्रा...'

'राजांचा आजाराचा कितवा दिवस?'

वैद्यराजांनी बोटे मोजली.

'सहा.'

'अरेरे!' शास्त्री कळवळले.

'काय झालं?' दचकून वैद्यांनी विचारले.

'काही नाही! आज एकादशी ना?'

'हो.'

'महाराजांना कधी उलटीचं औषध दिलंत?'

'उलटी?'

वैद्यराजांना काहीच कळत नव्हते. शास्त्री काही क्षण तसेच बसून होते. बोटांची चाळवाचाळव होत होती.

एकदम ते म्हणाले, 'ती मात्रा बाजूला ठेवा.'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘आँ?’ वैद्यराजांचा टाळा उघडला गेला.

‘तिचा आता उपयोग नाही. माझा बटवा लौकर घ्या.’

वैद्यराज गडबडीने उठले. शास्त्र्यांचा मखमली बटवा त्यांनी पुढे धरला.

गंगाधरशास्त्र्यांनी बटवा घेतला. त्याचे गोंडे ताणले. बटवा उघडला. बटव्यातून दोन चांदीच्या कुप्या बाहेर काढल्या; आणि ते उठले. आश्चर्यचकित झालेल्या वैद्यांनी उगाळलेल्या मात्रेकडे पाहिले, आणि विचारले,

‘ही मात्रा नको!’

शास्त्र्यांची जळजळीत नजर वैद्यांवर पडली.

‘एकदा सांगितलं ना? ती ठेवा बाजूला. आता तिचा उपयोग नाही. सुवर्ण आणि मौक्तिक यांखेरीज आता दुसरा आधार नाही.’

‘सुवर्ण... मौक्तिक... म्हणजे...’

‘बस करा! फाजील विचार करू नका. सांगतो, तेवढंच करीत चला. चला...’

शास्त्र्यांच्या पाठोपाठ वैद्यराज धावले. आपल्या मस्तकी रुमाल नाही, हेही शास्त्र्यांच्या ध्यानी आले नाही.

देवाचे नाव घेऊन शास्त्र्यांनी राजांना नवे औषध चालू केले.

□

२५

महालात शांतता पसरली होती. समईचा मंद प्रकाश महालात रेंगाळत होता. रात्र वाढत होती; पण राजांना झोप येत नव्हती. वाढत्या तापाची जाणीव राजांना होत होती. डोळे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

जडावले होते. अंग शहारत होते. मनाची बैचेनी सारखी वाढत होती. झोप येईल, तर फार बरे होईल, असे राजांना वाटत होते...

'स्वप्न पाहायचं झालं, तर माणसाला झोपावंच लागतं. मग स्वप्नाळू जीवाला झोपेची भीती का वाटावी? तसं पाहिलं, तर प्रत्येक माणूस आणि त्याचं आयुष्य म्हणजे अनेक स्वप्नांमागे केलेली धावपळच नाही का?

'श्रींचं राज्य उभारण्याचं आमचं स्वप्न! ते स्वप्न साकार झालेलं पाहण्यासाठी केलेली पन्नास वर्षांची धावपळ, अहोरात्र केलेलं चिंतन.

'स्वप्न! स्वप्नाचा भोग एकाकी असतो, असं म्हणतात. पण या जागतेपणी पाहिलेल्या स्वप्नासाठी किती जिवांची जखडण केली! हे एकच दिव्य स्वप्न किती लोकांनी पाहिलं! याच्या पाठीमागे लागून आम्हांला प्राणांहून प्रिय असणारे अनेक मोहरे रागलोभाच्या मर्यादा ओलांडून सामान्य विजयासाठी खर्ची घालावे लागले!

'तानाजीपेक्षा का आम्हांला कोंढाणा प्रिय होता?

'जे हरवलं, ते परत केव्हाच आपल्या हाती लागलं नाही. आणि इच्छित... ते मात्र नेमकं फार दूर गेलं.

'यालाच तर स्वप्न म्हणत नाहीत ना?

'वयाच्या अवघ्या पंधरा वर्षांच्या आत आम्ही स्वराज्याचं तोरण बांधलं. परदास्यातून या भूमीची सुटका व्हावी, या भूमीवर खऱ्याखुऱ्या अर्थानं श्रींचं राज्य नांदावं, या श्रद्धेनं आम्ही चालत राहिलो. स्वप्न मोठं होतं; पण ते साकार करण्यासाठी हाती काय होतं? एका श्रद्धेच्या आधारावर आम्ही बेगुमानपणे पावलं टाकीत होतो.

'विजयनगर-दौलताबादेची वैभवसंपन्न शक्तिशाली साम्राज्यं मोगली आक्रमणापुढं कशी कोलमडली, त्यांची वाताहत कशी झाली, हे का आम्हांला माहीत नव्हतं? आदिलशाहीच्या सामान्य रोषानंही थोरल्या महाराजसाहेबांची पुण्याची जहागीर कशी बेचिराख होते, हेही आम्ही पाहिलं होतं. दादोजींनी आम्हांला पदोपदी सावध केलं होतं. पण आमची मर्यादित शक्ती... अमर्याद निष्ठा आम्हांला खेचतच राहिली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘अनेक संकटांची धाड एकामागोमाग येत होती आणि ह्या स्वप्नानं पछाडलेले आम्हीच नव्हे, आमच्यासारखे हजारो जीव येणाऱ्या संकटात आनंदानं जोहार करीत होते.

‘स्वप्नाळू जीवाला जसं स्वप्न थांबवता येत नाही, तशीच ही कहाणी झाली.’

एक दीर्घ नि:श्वास राजांनी सोडला. विचाराने अस्वस्थ बनलेले राजांनी कूस बदलली; पण विचारांचे मोहोळ गुणगुणतच राहिले.

‘माणूस जाणूनबुजून संकटांना सामोरा का जात असावा? बाजी प्रभू, प्रतापराव, तानाजी, मुरारबाजी या माणसांना आपलं मरण दिसलं नसेल का? निष्ठांचा हाच का अर्थ? निष्ठेचा परमोच्च बिंदू म्हणजेच का मृत्यूला आव्हान? या जीवांची जगण्याची इच्छा संपलेली असते का? मरणाची पूजा करण्यातच त्यांचं भान हरपतं काय?

‘तसं असेल, तर ज्यांची जगण्याची इच्छा संपलेली आहे, जीवनाचं स्वारस्य नाहीसं झालेलं आहे, असे अनेक हताश, दुबळे जीव या धरतीवर जगताना दिसतात. मग ते का जगतात?’

राजांनी परत कूस बदलली; पण विचार बदलले नाहीत.

‘मृत्यूची भीती हेच त्याचं एकुलतं एक कारण! ज्यांना आपण कशासाठी जगतो, याचं उत्तर सापडलेलं नाही, ते मृत्यूच्याच भीतीनं जगणार. हताश, निराश जीव, जे मनानं पराभूत झालेले आहेत, ते कसलं बलिदान करणार? खचल्या जीवातून बलिदान उभं राहत नाही. ते प्रेम-व्यथेतूनच उद्भवतं.

‘मरणाला सामोरं जाण्याची शक्ती जीवनाच्या प्रेमातून उद्भवावी, याचं मात्र आश्चर्य वाटतं. केवढी अमर्याद निष्ठा!

‘अनेकांच्या वैयक्तिक निष्ठा आमच्यावर स्थिरावल्या होत्या. आमच्या हातून श्रींचं राज्य उभं राहिलं, हीच ती श्रद्धा! ती जिवंत ठेवण्यासाठी बाजी प्रभूनं घोडखिंड लढविली. शिवानं आनंदानं आमचं रूप स्वीकारलं. निष्ठेला मानापमान कळत नाही, जातपात समजत नाही. नाही तर मुरारबाजी, तानाजी, पांगेरे यांनी ते आव्हान स्वीकारलं नसतं.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘पण आमच्या कार्यात आम्हांला निश्चित यश मिळेल, याची खात्री त्यांना कुणी दिली होती?’

राजे त्या विचाराबरोबर स्वत:शीच हसले. त्या शंकेचे उत्तर सोपे होते. आत्मानुभवातूनच राजांनी ते जाणले होते. न कळत राजे त्या विचारात रमले.

‘श्रद्धांना पुरावा लागत नसतो. तिथं नुसतं हरवणं असतं.... आणि म्हणूनच श्रद्धेची ताकद अमर्याद असते, सागरासारखी!’

राजांच्या मनावर एक सुखविणारी लाट फुटली. पण त्यापाठोपाठ येणाऱ्या लाटा तेवढ्या सुखावह नव्हत्या; ना त्या थोपविण्याची ताकद त्यांच्या ठायी होती.

‘श्रद्धा! केवढी प्रचंड ताकद या दोन अक्षरांत सामावली आहे! लहान वय ध्यानी आलं नाही. अपुरी सत्ता जाणवली नाही. आमच्या मनात नव्हे, तर कुणाच्याच मनात याची शंका का आली नाही?

‘शक्यता कशाची नव्हती? आजार होते, अपघात होते, दगा होता. रणांगण तर सदैव उभं ठाकलेलं. एक संकट सरतं, तो दुसरं संकट उभं. दर विजयाची किंमत एका श्रद्धावंताच्या प्राणांनी मोजावी लागे. पण जीवनाचा अपुरा पट सदैव जाणवे. विजयाचं काय, पण पराजयालाही मागे टाकणारी ही श्रद्धा! हे वेडं स्वप्न कशाचाही विचार न करता सदैव पुढंच धावत होतं.

‘आमच्या वाढत्या सत्तेला पायबंद बसावा, म्हणून विजापूरदरबारी थोरल्या महाराजसाहेबांना बेड्या ठोकण्यात आल्या. त्यांचा जीव धोक्यात पडला. एक क्षण असा होता, की सारा पट उधळला जातो, की काय, अशी भीती वाटली. त्यासाठी आम्हांला गड सोडावे लागले. पण हे करीत असता श्रद्धा मात्र अभंगच राहिली. एवढंच कशाला? पूर्ण पराजय घेऊन प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेत जावं, तसे आम्ही आग्र्याला गेलो. क्षणभर आम्ही खचलो, पण अनाजी, मोरोपंत, तानाजी, प्रतापराव.... किती नावं घ्यावीत! यांपैकी कोणीच कसं खचलं नाही? पुरंधरच्या तहातून शिल्लक राहिलेलं राज्य सावरीत ही मंडळी धीरानं उभी राहिली. हे राज्य बुडणार, असं कुणालाच कसं वाटलं नाही? अनेक जय मिळाले, तसेच पराजयही स्वीकारावे लागले. पण कशानंच ती निष्ठा मात्र ढळली नाही.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'जय-पराजय या दोहोंचं नातं किती जवळचं! अर्थ केवढा मर्यादित! आग्र्याला जेव्हा कैद झाली, तेव्हा सारं संपल्याचा भास झाला. साऱ्या आशा क्षणभर का होईनात, पण नष्ट झाल्याचा भास झाला. आमच्या दु:खाला सीमा राहिल्या नाहीत.

'त्या झरणाऱ्या अश्रूंतूनच आम्हांला विजयाची वाट दिसू लागली. आम्ही संकटातून सुटलो, ते शहाणे होऊनच! सारा अहंकार नाहीसा झाला; आणि बैरागी होऊन आम्ही स्वगृही परत आलो.

'आम्हांस आमच्या राज्याभिषेकाचा क्षण आठवतो. परमोच्च यशाचा असा तो एक क्षण भासला. आमच्या रूपानं शेकडो वर्षांनी हिंदूंच्या हाती परत आत्मबल सापडलेला तो क्षण... हजार वर्षांत न घडलेला प्रसंग... आमचा वैदिक पद्धतीचा राज्याभिषेक! एक अलौकिक गोष्ट घडत होती. आमच्या राज्याभिषेकानं चकत्यांच्या बादशाहीला आम्ही जाहीर आव्हान देत होतो...

'मग आलमगीरची जिद्द संपल्याविना साऱ्यांनाच सार्थकता का वाटू लागली?

'सार्थकता! आमचा राज्याभिषेक झाला, आणि आमचे जाणते प्रधानमंडळ एका क्षणात निर्धास्त बनले. आलेल्या यशातला हिस्सा प्रत्येकाच्या नजरेसमोर तरळू लागला. नाही तर अनाजींनी एका पाकळीची मागणी का केली असती? स्वराज्याची उभारणी करीत असता घरादारावर पाणी सोडून, मृत्यूचं आव्हान स्वीकारून सदैव कार्यमग्न असणारी ही माणसं आमचा राज्याभिषेक होताच स्वार्थाकडे कशी झुकली! आमच्या युवराजांना सत्तेची लालसा सुटली. आमच्या राणीसाहेब राज्ञीपणात मश्गुल झाल्या. आणि आमचं प्रधानमंडळ आपलं बळ अजमावू लागलं.

'पराजयातही न खचणाऱ्या मनांना यशाच्या क्षणीच तडे जावेत! स्वातंत्र्यानंतर लोक भ्रष्ट होणार असतील, तर कुणासाठी हे राज्य?

'भव्य गोष्ट उराशी बाळगायची, आणि ती सिद्धीला पोहोचत असतानाच ती चल आहे, टिकणारी नाही, हे ध्यानी आलं, तर? यापेक्षा महत्त्वाकांक्षी माणसाचा दुसरा पराजय कोणता? शत्रू शत्रूच राहिले, विश्वासाला पात्र असणारे आम्हांला समजून घ्यायला कोते पडले, आणि रक्तानं वैर पत्करलं! हे सारं दिसत असता अपात्रांच्या हाती सारं सोपवून जायचं, आणि त्याग वाया घालवायचा? खुद्द खासा आलमगीर अखेरी लढण्यासाठी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दक्षिणेत उतरत असताना हे दृश्य पाहण्याचं आमच्या नशिबी यावं!’

राजांना घाम आल्याचा भास झाला. उशाला ठेवलेले तलम वस्त्र त्यांनी त्याच बेचैनीत शोधले. त्या वस्त्राने घाम टिपीत असताना मनोहारीचे शब्द कानांवर आले,

‘महाराज!’

राजे कष्टाने म्हणाले,

‘झोप तू.’

उचललेले पलंगाचे आच्छादन सोडण्यात आले; पण राजांच्या मनातला एक एक पडदा उचलला जातच होता....

‘आलमगीर! हिंदोस्तानचा बादशहा, प्रचंड सामर्थ्याचा धनी, तीक्ष्ण बुद्धीचा. नाही तर हे धाडस अन्य पुरुषाला जमलं नसतं. ज्या देशात बहुसंख्य हिंदू आहेत, त्यात त्यांच्या प्राणाहून प्रिय असणाऱ्या काशीविश्वेश्वरावर घाव घालणाऱ्याचं बळ केवढं अफाट! आलमगीरनं तर आता आपला पवित्रा उघड घेतला आहे. साऱ्या मुसलमानेतरांवर त्यानं जिझिया पट्टी लादली आहे; आणि हिंदोस्तानात उभं असलेलं एकुलतं एक हिंदू राज्य नष्ट करण्यासाठी आलमगीर दक्षिणेत उतरतो आहे. ही काय धर्मनिष्ठा?

‘धर्म आणि अधर्म ठरवायचा कुणी? धर्म म्हणजे ईश्वराशी समरस होण्यासाठी केलेलं आचरण. सत्य आणि न्याय यांच्या आधारानं केलेलं थोर चिंतन, मनन. आमच्या धर्मनिष्ठेचं रूप हेच आहे का?

‘आम्ही प्रतापगडच्या भवानीची स्थापना केली. सप्तकोटेश्वराचा जीर्णोद्धार केला. समोत्तिपेरुमलच्या जागी उभारलेल्या मशिदी पाडून मंदिरं बांधली. मुसलमानी धर्मात गेलेल्या आपल्या माणसांना हिंदू करून घेतलं. हीही धर्मनिष्ठाच ना? मग औरंगजेबानं वेगळं काय केलं? औरंगजेब मुसलमान आईबापांच्या पोटी जन्माला आला, म्हणून त्याला मुसलमानी धर्माची निष्ठा. आम्ही हिंदू म्हणून जन्माला आलो. त्याचसाठी हिंदुधर्माचा आम्हांला कळवळा! हाच का आमच्या धर्मनिष्ठेचा अर्थ?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्या विचाराने राजे कासावीस झाले. विचार असह्य होऊन त्यांची मान वळली. महालातल्या समईच्या मंद उजेडात देव्हाऱ्याची चांदीची महिरप राजांच्या नजरेत आली.

‘ते खरं नाही! आम्हां दोघांत फार फरक! हे मोगल ही भूमी पादाक्रांत करण्यासाठी इथं आले. इथं जेते म्हणून वावरले, वावरताहेत. त्यांना ही भूमी आपली अशी कधीच वाटली नाही. त्यांची मक्का, मदिना सदैव दूर राहिली. आम्ही मुसलमान म्हणून जरी जन्माला आलो असतो, तरी आज औरंगजेब जे करतो आहे, ते आम्ही खास केलं नसतं. औरंगजेब स्वत:ला ह्या भूमीचा पुत्र समजत नाही. तो स्वत:ला ह्या भूमीचा जेता मानतो. पण आम्ही ह्या भूमीचे पुत्र आहोत, ही आमची भावना कधीही सोडून गेली नसती. आमचं इमान ह्याच मातीशी जखडलं आहे. नाही तर दौलतखान आमचे दर्यासारंग बनलेच नसते. ही सार्थकता आम्हीच भोगू शकतो. पण तो भोग आमच्या नशिबी दिसत नाही.

‘सार्थकता! ती ठरवायची कुणी? तिची कसोटी काय? सीतेचं हरण होऊ नये, म्हणून जटायु शक्तिसर्वस्वानं लढून मृत्युमुखी पडला. तो सीतेला वाचवू शकला नाही, रावण विजयी ठरला, म्हणून जटायूचा जन्म वाया गेला, असं का समजायचं? ऐन तारुण्यात अभिमन्यू मारला गेला, म्हणून सुभद्रेचं वात्सल्य विफल झालं, असं का मानायचं? विवेक धरून हाती घेतलेलं काम अखेरपर्यंत करीत राहायचं, एवढंच माणसाच्या हाती असतं.

‘साधं कर्तव्यकर्म तरी कुठं नीट पार पडतं? आमच्या हाती शंभूला सोपवून सई गेली. आम्ही शंभूबाळाचे सारे लाड केले. मासाहेबांचाही मायेचा हात त्यांच्या पाठीवर होताच ना! पितृसहवासाला मुकलेले आम्ही; पण मासाहेबांनी आम्हांला कर्तृत्ववान बनवलं. संभाजी आईच्या प्रेमाला मुकला असेल. कदाचित शंभूबाळांना घडवायला आमचे हात अपुरे पडले असतील. पण ज्या चारित्र्यसंपन्न छत्राखाली आम्ही वाढलो, त्याच छत्राखाली शंभू मोठा झाला, हे तरी खरं? शिवाजीला दुसरा शिवाजी घडवता आला नाही, असं म्हणण्यापेक्षा मासाहेबांना दुसरा शिवाजी घडवता आला नाही, हेच अधिक खरं नाही का?’

मासाहेबांच्या, संभाजीराजांच्या आठवणींनी राजांचा जीव कासावीस झाला. बोटांची चाळवाचाळव झाली.

‘कर्तव्य हे कठोर असलं, तरी मन फार दुबळं असतं. दुबळ्या मनाला सारीच कर्तव्यं पेलतात, असं नाही. सईला दिलेल्या शब्दामुळं आम्हांला शंभूकडे कठोरतेनं पाहता आलं नाही; आणि याच कर्तव्यात मग्न असता आमच्या साध्या दर्शनाची इच्छा बाळगणाऱ्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

काशीला आम्ही भेटलो नाही. बदअंमल केला, म्हणून रांझ्याच्या पाटलाचे हात-पाय आम्ही तोडले; पण तोच गुन्हा केला असता, संभाजीला मात्र सोडून दिलं. शत्रूला मदत केली, म्हणून खंडोजी खोपड्यांना शासन केलं; आणि आमचे युवराज मोगलांना मिळाले, तरी त्यांना क्षमा केली. भावनेच्या भरात मोऱ्यांच्या मुलाचा केलेला वध जेवढा अक्षम्य, त्याहूनही शतपटीनं अक्षम्य असलेला गुन्हा आम्ही पुत्रप्रेमापोटी तर केला नाही?'

राजांनी डोळे उघडले. समईच्या जळणाऱ्या वातीवर त्यांचे लक्ष केंद्रित झाले. क्षणभर पुतळाबाई नजरेसमोरून तरळून गेल्या; पण क्षणभरच.

'दिसतं, तसं असतं कुठं? आम्ही मिरवीत असलेल्या राजेपणाचा खरा रंग पाहिलाय् कुणी? राजेपण सर्वांना दिसतं, पण त्याच्या वेदना केवढ्या भयानक! आमच्या मनाचे घाव सांगायचे कुणाला? आणि कसे?

'घाव! सई गेली; पण ती जखम तशीच राहिली. काशीचे नेत्र अखेरपर्यंत अतृप्तच राहिले. आम्ही असताही आमच्या डोळ्यांदेखत पुतळा आमच्या जोड्यांची सोबत करीत आयुष्य कंठते. आणि शंभू... ते तर आमचं कुलदैवत! त्यांनी आमचं मन कधीच जाणलं नाही!

'हिंदवी स्वराज्याच्या मागे धावत असता जे हातून निसटत होतं, त्याचा विचार कधीच कसा केला नाही? साध्या भोळ्या जीवांना आम्ही मृत्युंजय बनवलं. आमच्या शब्दासाठी त्या भाबड्या जीवांनी आपला जीव वारेमोल केला. त्यांचा त्याग केवढा मोठा! आमच्या शब्दाखेरीज दुसरं कोणतं मोल आम्ही त्यांना दिलं होतं? पण संभाजी! आमचे युवराज आमच्या सहवासात राहूनही कोरडेच राहिले. माणसं जनावरांसारखी अल्पसंतुष्ट नसतात! हं:! भोळ्या जीवांनाच श्रद्धेचा अर्थ कळतो का?

'आमच्या रक्तबंबाळ मनाची लक्तरं नजरेत येऊ नयेत, म्हणून आम्हांला हे सिंहासनाचं उच्चासन दिलं असावं!

राजांचा हात सहजपणे गळ्याशी गेला. बोटांना गळ्यातल्या कवड्यांच्या माळेचा स्पर्श झाला. कवड्यांवरून राजांची बोटे फिरत होती...

'युवराजांची आम्ही फार गय केली, असं साऱ्यांना वाटतं. राणीसाहेब तर सदैव बोल

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

लावतात. अनाजी-मोरोपंतांच्या मनांत असलेली भीती आम्हांला स्पष्ट दिसते. पण आपण फार नजीकचं पाहतो, हे त्यांच्या ध्यानी येत नाही; आणि आम्हांला फार दूरचं दिसतं, हा शाप आहे!

‘साऱ्यांच्याच मनांत युवराजांच्याबद्दल अविश्वास! युवराजांच्या मनात आमच्या मंत्रिमंडळाबद्दल तेढ! हा सिलसिला तुटणार कसा? कोणत्या पद्धतीनं? मंत्रिमंडळाला युवराजांचे दोष दिसतात; पण त्यांचं सामर्थ्य दिसत नाही. खुद्द आमचे सेनापती हंबीरराव! त्यांचा ओढा युवराजांच्याकडे आहे. फिरंगोजींसारखा वयोवृद्ध जाणता गडकरी युवराजांना पाहताच गड खाली करून मोकळा होतो. प्रसंग पडला, तर युवराजांना विरोध कोण करणार?

‘त्यांनाच दोष कशाला द्या? खुद्द आमचं काय झालं? विजापूरकरांच्या मदतीला गेलो असता मैदानावर उभा असलेला दिलेरखान आम्ही पाहिला. आमची फौज निश्चितपणे भारी होती. पुरंधरचा सूड उगवण्याची नामी संधी हाती आली असता आम्ही दिलेरखानवर का चालून गेलो नाही? दिलेरखानाच्या हाती आमच्या युवराजांचा शह होता, हेच कारण ना? दिलेरखानानं ऐन वेळी युवराजांचं प्यादं पुढं केलं असतं, तर आमची फौज त्यांच्यावर तुटून पडली असती? आमचं राजाचं बळ शिल्लक राहिलं असतं? तीच शंका आली ना?

‘हे श्रींचं राज्य! ती निष्ठा कुणालाच समजली नाही. साऱ्यांची निष्ठा मर्त्य शिवाजीवरच राहिली. शिवाजीचा वडील पुत्र म्हणून संभाजीच प्रिय वाटणार. शंभूबाळ! तुम्ही मोठे म्हणून जन्माला आलात; आणि त्या मोठेपणाच्या जोरावर सारं मिळवून मोकळे झालात. आणि आमच्याबरोबर राज्याची उभारणी करण्यात ज्यानं आयुष्य वेचलं, ते आमचं जाणतं मंत्रिमंडळ सारं गमावून बसलं!

‘संस्कारांपुढं होणारा बुद्धीचा पराजय असाच असतो, विदारक!’

राजांना तो विचार पेलेना. न कळत त्यांना ठसका लागला. मनोहारीने गडबडीने पाण्याचे पंचपात्र पुढे केले. कलते होऊन राजांनी दोन घोट घेतले. एक दीर्घ निःश्वास सोडून राजे निद्रेची वाट पाहू लागले. पण ती कुठंच नजरेत येत नव्हती.

‘मंत्रिमंडळाच्या आधारावर राणीसाहेब धाकट्या युवराजांचं राजेपण पाहतात. पण

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

तेवढ्या आधारावर ते दहा वर्षांचं कोवळं, अशक्त पोर नेतृत्व करू शकेल का? समोरचं संकट कसं साऱ्यांना दिसत नाही? आमच्या सरहद्दीवर उतरणारा औरंगजेब आम्ही पूर्वी पाहिला होता. तो शत्रू दारी उभा ठाकला असता आमचं बेभरवशाचं घर आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. जेव्हा अत्यंत एकोप्याची गरज होती, तेव्हाच हा कलि कसा साऱ्यांच्या मनांत अवतरला? नुसत्या मंत्रिमंडळाच्या आधारावर राजाराम सत्ताधारी कसा बनेल? सैन्याविना राजा होत नसतो, हे कसं कुणाच्या ध्यानी येत नाही? आम्ही हयात असता मोगली सरदार बनून आलेल्या संभाजीवर तोफ न डागणारे आमच्या माघारी त्याच्या विरुद्ध कसे लढतील? उलट, आम्ही जाताच संभाजीला प्रेमभरानं मुजराच करतील, उत्सवपूर्वक गडावर घेऊन येतील.'

राजांच्या डोळ्यांसमोर संभाजीराजे दिसत होते... मोती घोडा मागणारे, वाघाच्या शिकारीत जखमी झाले असताही बेदरकारपणे पाहणारे, हंबीरराव मोहित्यांना सेनापती करण्याचा सल्ला देणारे. त्या आठवणीबरोबर राजांच्या मनात समाधान तरळून गेले. किनाऱ्यावर फेसाळत येणारी लाट फुटावी, तसं...

'पण संभाजीला तरी या येणाऱ्या लढ्याला तोंड देता येईल का? कारभारासाठी त्याला प्रभावळीचा सुभा दिला, त्याचं काय झालं? नुसत्या देवदैवतांवरची श्रद्धा ते सामर्थ्य देईल? मंत्रिमंडळातले जुने आणि जाणते लोक बेदिल असताना, कारभारी असंतुष्ट असताना हा साहसी पोर धीमेपणानं सारी सूत्रं हाती घेऊन हा लढा लढेल? की राजपुतांप्रमाणे केसरिया करील? आलमगिराशी लढा देणं म्हणजे सागरात सेतू बांधण्यासारखं कठीण काम! त्या लढ्यासाठी शेकडो बाजींची, तानाजींची गरज भासेल. मोरोपंत, अनाजी, रघुनाथपंत यांसारखे मुत्सद्दी सदैव जवळ बाळगावे लागतील. पण ते करण्यासाठी निराशा पचवू शकणारं एक जातिवंत चिवट मन लागेल. तो धीमेपणा संभाजीला झेपेल का?'

न कळत राजांचा हात कपाळावरून फिरत होता. अंगातल्या ज्वरामुळे कपाळीच्या वाळलेल्या गंधाच्या खपल्या बोटांना जाणवत होत्या.

'दैवी काय लिहिलंय्, हे कोण सांगणार? नाही तर आठ दिवसांपूर्वी मोगली लढ्याचा विचार करणारे आम्ही आज आमच्या मनाची गुंतवण उकलीत राहिलो नसतो.

'शेवटी हाती फळ काय पडलं, यावरच कर्माचा अचूकपणा ठरणार ना? मग फळाची

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आशा सुटणार कशी?

‘आणि हिंदवी स्वराज्य हे काय माझ्या एकट्याच्या कर्माचं फळ होतं? हजारोंच्या कर्मांचं ते फळ! या कर्माच्या अचूकपणाची खात्री नव्हती, तर मग आव्हान का केलं? पारिजातकांच्या फुलांप्रमाणे मस्तकांचा सडा पडू दे, असं सांगण्याचा आम्हांला काय अधिकार होता? अखंड चाललेल्या होमात आहुती पडली होती; आणि त्याचं धनीपण आम्ही घेत होतो!

‘तो का जगण्याचा मोह होता?

‘आमच्या श्रद्धेच्या निरांजनात तुपाची कधीच वानवा पडली नाही; आणि तो दीप तेवत ठेवण्यासाठी मात्र आम्ही वातीसारखे जळतच राहिलो. असं जळत राहण्यापेक्षा फळाची आशा सोडून, फक्त कर्मच ध्यानी आणून अटीतटीनं अफझलसामना दिला असता, तर पुण्यलोक गाठून आम्ही केव्हाच मोकळे झालो असतो!’

त्या विचाराबरोबरच राजांचे नेत्र उघडले गेले. पलंगावरचे तलम रेशमी छत राजांच्या नजरेत येत होते. त्याला ना रंग होता, ना रूप. मंद प्रकाशात फक्त छताचे अस्तित्व जाणवत होते....

‘शेवटी जन्ममृत्यूचा फेरा चुकवणं आणि मोक्ष गाठणं हेच सगळ्या भक्तीचं, ज्ञानाचं, कार्याचं सार ना? हिंदवी राज्य पुरं होण्याआधीच आम्ही गेलो, तर हा आशेचा धागा तुटेल का? अपुरं कार्य पुरं करायला मग दुसरा जन्म तरी लाभेल? आणि तो जन्म कोणता असेल? घोड्याच्या पाठीवरून पायांखाली भूमी तुडवीत जाणाऱ्या विजयी वीराचा? की विस्कटलेला सगळा मांड पुन्हा जुळविण्यासाठी परत जन्मभर दगदग करणाऱ्या पुरुषाचा?

‘दर जन्मी आम्ही मांडीत यावं, आणि ते मांडण्याआधीच जीवन संपावं! ही मांडामांड स्थिर झालेली कधी दिसणार नाहीच का? हा जन्म जर विफल गेला असेल, तर आजवर बळी गेलेल्या शूरांचं काय झालं? त्याला जबाबदार कोण?

‘पण हे सारं करायचं आमच्याच वाट्याला का आलं? परमेश्वरानं ही जबाबदारी आमच्यावरच का टाकली? कोणतं सुकृत यामागे दडलं असेल? आमच्या रूपानं कुणाच्या आशा फलद्रूप होताहेत?

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘गेल्या क्षणाची आठवण राहत नाही; मग पूर्वजन्म आठवणार कसा?’

राजे एकदम हसले.

‘न आठवायला काय झालं?

‘सिसोदिया घराणं कुठलं? हे राजपूत घराणं दक्षिणेत का उतरलं? मोगली अत्याचारांना कंटाळून स्वाभिमान टिकवण्यासाठी आपणहून परागंदा झालेलं हे घराणं ना? एवढंच कशाला, देवगिरी-साम्राज्याच्या ढासळलेल्या हजारोंच्या आशा मासाहेबांच्या कडून वारसारूपानं आमच्याकडे आल्या नसतील ना? खुद्द थोरल्या महाराजसाहेबांनी असाच प्रयत्न केला होता. स्वतंत्र राज्याचं त्यांचंही स्वप्न होतंच. त्या पिढ्यान् पिढ्यांच्या इच्छा साकार करण्यासाठीच कदाचित आमचा जन्म झाला असेल.’

न कळत राजांचे स्मित विरले. राजांची बोटे थरथरणाऱ्या ओठांवर स्थिरावली.

‘केवढी मोठी जबाबदारी! ती पार पडली का? की ती पेलण्याला आम्ही कमकुवत ठरलो? जिवाची बेचैनी वाढते, ती याच विचारामुळं!

‘आम्ही एवढे बेचैन होतो; मग समर्थांच्या चित्ताची समता का ढळत नाही? आमच्या राज्याभिषेकाच्या आनंदानं बेहोश होणारे समर्थ... त्यांना आमचा पराजय दिसत नाही का? का मनात उठणारा हा कल्लोळ दाखवू न देणं यालाच ‘योग’ म्हणतात? समर्थ आम्हांला ‘श्रीमान योगी’ म्हणतात. मग हा योग आम्हांला का साधत नाही?

‘अवतारी पुरुषांना तरी हा योग कुठं साधला?

‘प्रभू रामचंद्रांचं राज्य तरी कुठं स्थिर होतं? भगवान श्रीकृष्णांनी शांततेसाठी स्थापलेली सुवर्णद्वारका शेवटी कुलक्षयालाच कारणीभूत झाली ना? मत्त यादव दिसत असतानाही श्रीकृष्णांना त्यांना सावरता आलं नाही. मर्यादापुरुषोत्तमांना सीतेच्या पातिव्रत्याची खात्री अयोध्यावासीयांना करून देता येऊ नये? अर्जुन-कर्णांचं नातं माहीत असताही दोहोंच्या मध्ये उभ्या असलेल्या प्रत्यक्ष परमेश्वराला- भगवान श्रीकृष्णाला- तो संहार थांबवता येऊ नये? हे का घडलं? दुष्टांचं दंडन करण्यासाठी, धर्मसंस्थापनेसाठी पुन्हा पुन्हा अवतार घ्यावा लागला? यातच अवतारकार्याची अपूर्णता सामावली नाही का?

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

'स्थिरता म्हणजेच का जीवन? बहुधा मन हे जन्मजातच अस्थिर असल्यानं स्थिरतेला इतकं महत्त्व आलं असावं. मग फुलाचं जीवन किती? त्या मानानं पाषाण फार स्थिर! म्हणून का ते जीवन खरं मानायचं?'

राजांच्या चेहऱ्यावर एक स्मित उमटले. क्षणभर अंगातल्या ज्वराचा, साऱ्या क्लेशांचा विसर पडला.

'जीवनाचा अर्थ कळणं केवढं अवघड! प्रत्येक जीव स्वत:ला उंचावण्याचा, वर चढविण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी त्याची सारी धडपड चाललेली असते. सर्वसामान्य व्यक्तींच्या जीवनापेक्षाही उच्चतर असं जीवन म्हणजेच दिव्य जीवन. ते साध्य होण्यासाठी जो अंदाज बांधलेला असतो, त्यालाच आपण ध्येय मानतो. ते गाठण्यासाठी सावधपणानं पावलं टाकीत जाणं एवढंच आपल्या हाती असतं. अशा चालण्यातून जीवनाचं महाकाव्य उभं राहत असतं; जीवनाचं रामायण, महाभारत रचलं जातं असतं. अशा जीवाला मृत्यूचं भय कसं वाटेल? जिवंतपणी जिथं आम्ही मरणाकडे हसत पाहिलं, तिथं अंतकाळी त्याची भीती वाटेल कशाला? आम्हांला मृत्यूचं भय मुळीच वाटत नाही. चिंता वाटते फक्त राज्याची! मनातून तो विचार मात्र हलत नाही, काही केल्या जात नाही.'

राजांचा हात गळ्याशी विसावला होता. गळ्यांतल्या कवड्यांच्या गार स्पर्शाबरोबर राजांना समर्थांची आठवण झाली. राजांच्या कानांत समर्थांचे बोल घुमत होते.

राजांच्या चेहऱ्यावरचे स्मित परत जागृत झाले.

'अज्ञानपणातदेखील मन केवढं रमतं! राज्याची चिंता कोण करणार? ते का आमचं राज्य आहे? ते श्रींचं राज्य! श्रींच्या इच्छेनं घडलेलं, साकार झालेलं, हजारोंच्या आत्मबलिदानातून उभं राहिलेलं हे राज्य. ते एका मर्त्य जीवाच्या जाण्यानं का अपुरं राहील? ते एवढं का क्षणभंगुर आहे? ते श्रींच्या नावाइतकंच उदंड आहे. मोगली आक्रमणाला ते जरूर उभं ठाकेल.

'आणि दुर्दैवानं तसं घडलं नाही, तरी तो पराजय मानायचं काय कारण? एक सामान्य माणूस निष्ठेनं उभा राहिला, तर अन्यायाविरुद्ध केवढी प्रचंड ताकद निर्माण करू शकतो, याचं आम्ही प्रतीक नाही का? राज्य परत उभं राहील वा संपेल, पण आम्ही दिलेला हा आत्मविश्वास- तो मात्र केव्हाच संपणार नाही. गरज भासली, तर या विश्वासातूनच शेकडो

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शिवाजी परत निर्माण होतील. शिवाजी मर्त्य असेल; पण हा विश्वास अमर आहे. तो वाढतच राहील. एवढं झालं, तरी आमचं जीवन कृतार्थच नाही का? जीवनाचं साफल्य आणखी काय असू शकतं?

'मृत्यूच्या क्षणीही, आपण मरतो, याची भीती न वाटणं, मन निर्भय होणं हाच अहंशून्य होण्याचा योगाचा भाग असेल का?

'ही शंका समर्थांनाच विचारायला हवी होती.

'समर्थ! श्रींची इच्छा आणि समर्थांचा आशीर्वाद लाभला असता, कोण चिंता करील? समर्थांचे सेवक कधी दुबळे असतात काय? त्यांच्या कृपेनं आम्ही सुखरूप राहिलो. त्यांच्याच आशीर्वादानं आम्ही सुखरूप होऊ.'

पलंगावरचे आच्छादन उचलले जात होते. राजांची नजर वळली. वैद्यराज, शास्त्री उभे होते. राजे जागे आहेत, हे पाहून शास्त्र्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी चिंतायुक्त आवाजात विचारले,

'महाराज, झोप आली नाही?'

राजे हसले. वैद्यांनी नाडी पाहावी, यासाठी हात उंचावीत ते म्हणाले,

'वैद्यराज, शांतपणे झोप यावी, म्हणूनच आम्ही जागत होतो.'

'जी?' वैद्यांनी न समजून विचारले.

'काही नाही!... अद्याप किती रात्र आहे?'

'जी, पहाट झाली.'

'असं! आता उजाडायला फारसा वेळ लागणार नाही.'

राजे आपल्या समाधानात झोपून होते.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांची नाडी पाहून वैद्यराज बाहेर जात होते. त्यांच्या चेहऱ्यावरची चिंता लपत नव्हती.

□

२६

गंगाशास्त्र्यांनी राजांचे औषध बदलले, हे साऱ्यांना समजायला वेळ लागला नाही. राजांचे वाढते आजारपण आणि गंगाशास्त्र्यांची गंभीर चर्या यांमुळे साऱ्यांची मने व्याकूळ बनली होती. साध्या तापाचे निमित्त एवढ्या थरापर्यंत जाईल, असे कुणालाही वाटले नव्हते. राजांची वाढती क्षीणता साऱ्यांच्या ध्यानी येत होती.

महालात पलंगाजवळच्या बैठकीवर सोयराबाई सदैव बसून होत्या. दरवाजानजीकच्या दुसऱ्या बैठकीवर हिरोजी, महादजी, घाटगे, बाळाजी ही मंडळी राजांच्यावर नजर ठेवून असत. मनोहारी, महादेव आणि केव्हा तरी महादजी आळीपाळीने राजांचे पाय चेपीत. पाय रगडण्याने राजांना बरे वाटे. दिवस कसाबसा सरे; पण रात्र फार मोठी वाटे.

रात्र संपली. महालात सकाळचा उजेड फाकला. समया शांत झाल्या होत्या. रात्रीच्या जागरणाने थकलेली माणसे महालाबाहेर गेली होती. सोयराबाई स्नानाला गेल्या होत्या. हिरोजी, घाटगे एवढीच माणसे राजांच्या शेजारी होती. मनोहारी स्नान आटोपून राजांच्या शेजारी आली. हिरोजी, घाटगे हलक्या पावली महालाबाहेर गेले. राजांनी मनोहारीला जवळ बोलावले.

‘मनू!’

‘जी?’

‘आम्ही आजारी पडल्यावर गडाखाली मेणा गेला होता?’

‘जी? मेणा?...’ मनोहारीने आश्चर्याने विचारले.

‘ठीक आहे.’ राजे समजले.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

त्याच वेळी गंगाशास्त्री आत आले. त्यांनी राजांची नाडी पाहिली. राजांना त्यांनी विचारले,

‘कसं वाटतं?’

‘आता काय वाटायचं?’ राजे म्हणाले. ‘ठीक आहे. ज्वराची सोबत आहेच. कधी तरी मस्तकशूळ उठतो, आणि...’

‘आणि काय, महाराज?’

‘आताशा बोलू नये, असं वाटतं- मनात असूनही. झोपून राहावं, असं वाटतं.’

शास्त्र्यांनी दीर्घ नि:श्वास सोडला.

दरवाजापर्यंत गेलेली मनोहारी परत आली. तिने राजांना निश्चलपुरी येत असल्याची खबर दिली. सर्वांच्या नजरा दरवाजाकडे खिळल्या. निश्चलपुरी महालात येत होते. साऱ्यांनी त्यांना उत्थापन दिले. निश्चलपुरी राजांच्या जवळ आले. त्यांनी राजांना तीर्थ दिले. तीर्थ प्राशन करून राजांनी हात जोडले. निश्चलपुरी म्हणाले,

‘राजे, आज उतारा करायला हवा.’

‘करा.’

निश्चलपुरी गेले.

वैद्यराज, शास्त्री सदरेकडे गेले; आणि स्नान आटोपून सोयराबाई महालात आल्या. त्यांच्या बरोबर आलेल्या राजारामांनी राजांचे पाय शिवले. राजांनी त्यांना खुणेने जवळ बसवून गेतले.

‘बाळराजे, स्नान-पूजा झाली?’

‘जी!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘बाळराजे, तुम्ही लहान आहात. आमची तब्येत बरी नाही. पण आम्ही सांगतो, ते लक्षात ठेवा. जी गोष्ट तुम्हांला आवडत नाही, पटत नाही, ती कधीही करू नका... खुद्द आम्ही सांगितली, तरी...’

बाळराजांनी मान डोलविली. थकलेल्या राजांनी डोळे मिटून घेतले. राजाराम केव्हा गेले, हेही त्यांना समजले नाही.

तिन्हीसांजेला निश्चलपुरी महालात आले. त्यांच्याबरोबर त्यांचे शिष्यही होते. त्यांनी राजांच्या वरून कोंबडी, लिंबू उतरवून घेतले. राजांना अंगारा लावून काही न बोलता, ते निघून गेले.

राजांचा ज्वर वाढतच होता. अंगाचा दाह होत होता. राजांनी येसाजीला जवळ बोलावले.

‘येसाजी!’

‘जी?’

‘आम्हांला झोप येत नाही. तू बोलत बसशील?’ राजे काही तरी आठवत होते. ‘येसाजी, अफझलवधाआधी आम्ही नेहमी आमच्या संगती एक चांदीची छोटी डबी बाळगत असू. आठवतं का?’

‘जी.’

‘अफझलवधानंतर तिचा पत्ताच लागला नाही. कुठं तरी हरवली!’

येसाजी ऐकत होता.

‘आम्हांला थोरल्या राणीसाहेबांनी ती दिली होती... सांगितलं, तर हसणार नाही?’

‘महाराज!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘थट्टा केली!... आम्ही स्वारीला निघालो होतो. दुपारची वेळ होती. नुकतंच जेवण झालं होतं. निरोप घ्यायला मासाहेबांच्याकडे जायच होतं. पान खाऊन कसं जाणार? तेव्हा राणीसाहेबांनी केलेला विडा डबीत घालून दिला.’

राजे क्षणभर थांबले. येसाजी राजांच्याकडे पाहत होता.

‘येसाजी, ती डबी हरवली; पण विडा मात्र तसाच तोंडात राहिला.’

बोलता-बोलता राजांना परत ग्लानी आली. त्याच गुंगीत राजे पडून राहिले.

मध्यरात्र उलटून गेली होती. वाड्यातले पहारे जागत होते. बाहेर आकाशात चांदणे उजळले होते. राजांच्या महालाबाहेर गंगाशास्त्री, राजवैद्य ही मंडळी झोपी गेली होती. दाराशी महादेव पहाऱ्यासाठी उभा होता. महालात समईचा मंद प्रकाश पसरला होता. राजांच्या पलंगाजवळ मनोहारी पलंगावर हात ठेवून झोपली गेली होती. पलंगाशेजारी सोयराबाई शाल पांघरून लोडाला टेकून झोपल्या होत्या. दारानजीक बैठकीवर हिरोजी, घाटगे ही मंडळी गुडघ्यांत माना घालून पेंगत होती. सर्वत्र शांतता वावरत होती.

‘मोरोपंत!मोरोपंत!!’

त्या हाकांनी शांततेचा भंग झाला. सारे खडबडून जागे झाले. क्षणभर कुठून आवाज आला, हेही कळेना.

राजांच्या पलंगावरून तो आवाज येत होता. तेथे धडपड वाढली होती. सारे पलंगाकडे धावले. राजे उठण्याचा प्रयत्न करत होते. डोळे विस्फारलेले होते. चेहरा उग्र वाटत होता. कुणी तरी समई उजळली. सारे राजांना आवरण्याचा प्रयत्न करीत होते. बाहेरचे गंगाशास्त्री आले. राजांचे भान हरपले होते. राजे बोलत होते...

‘मोरोपंत, सुरेख काम केलंत! पण एक कसर ठेवलीत, मोरोपंत! आमचा आठवा महाल कुठं आहे? त्याच्याविना हा रायगड फार अपुरा वाटतो... फार... अपुरा...’

राजांचे शब्द ओठांवरच विरत होते. हिरोजी राजांना हाक मारीत होता; पण राजे ती हाक ऐकत नव्हते. हळू हळू राजांचे अंग सैल पडले. राजांनी डोळे मिटून घेतले. वैद्यांनी

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

नाडी पाहिली. अंगात खूप ज्वर होता.

गंगाशास्त्र्यांच्या पाठोपाठ सारे महालाबाहेर आले. अद्याप साऱ्यांच्या अंगांत कापरा खेळत होता. गंगाशास्त्री एवढा वयोवृद्ध माणूस; पण तोही धोतराने डोळे टिपीत होता.

‘शास्त्रीबुवा! खरं सांगा... राजांची तब्येत...’

‘येसाजी, मला आता काही विचारू नका!’ गंगाशास्त्री नाक ओढत म्हणाले, ‘मी हरलोऽऽऽ! माझ्या औषधांना यश नाही. हे हात अपयशी ठरले! येसाजी, राजे संभ्रमावस्थेत जाऊ लागले...’

गंगाशास्त्र्यांचे बोल सर्वांना ऐकू गेले.

महालात दबलेले हुंदके उठत होते...

□

२७

गडावर दिवस आला होता. गडावर नित्याची वर्दळ चालू होती. एवढ्या माणसांचा राबता असूनही सारे व्यवहार कसे चूपचाप होत होते. वाड्यात कोणी कुठेही असले, तरी साऱ्यांचे लक्ष राजांच्या महालाकडे होते.

सोयराबाई खाजगी सदरेत उभ्या होत्या. बाळाजी, प्रल्हाद निराजी, जनार्दनपंत, हिरोजी फर्जंद, किल्लेदार सोमाजी बंकी ही मंडळी चिंताचूर मुद्रेने राणीसाहेबांच्या समोर उभी होती. सोयराबाईंनी आपले आरक्त डोळे पुसले आणि त्या म्हणाल्या,

‘कशानंच गुण येत नाही. स्वारीचं...’

सोयराबाईंना बोलवेना. जनार्दनपंत म्हणाले,

‘राणीसाहेब! धीर सोडून कसं चालेल? गंगाशास्त्र्यांसारखे धन्वंतरी राजांच्या सेवेत

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

गुंतलेत. जगदीश्वराच्या मंदिरात बाळाजींनी मृत्युंजयजपासाठी ब्राह्मण बसवलेत. निश्चलपुरी, कवी कलश अनिष्टनिवारणार्थ शतचंडी होम करताहेत. यांखेरीज नवस, अन्नदान चालूच आहे.’

‘मग गुण का येत नाही?’ सोयराबाई त्रस्त होऊन म्हणाल्या.

‘ते का आपल्या हाती आहे?’ जनार्दनपंत म्हणाले, ‘पण अशा वेळी आपणच धीर सोडलात, तर आम्ही कुणाकडे बघावं?’

सोयराबाईंनी नाक ओढले. सर्वांवरून नजर फिरविली.

‘स्वारींनी बाळराजांच्यावर सर्व कारभार टाकला आहे, हे तुम्ही जाणताच. ते लहान आहेत. तुम्हीच साऱ्यांनी त्यांना जपायला हवं. वेळ तर कसली! ह्याच वेळेला अनाजी, मोरोपंत, हंबीरराव सारे बाहेर...’

‘राणीसाहेबांनी मन कठोर करून सारी जबाबदारी घ्यायला हवी.’ बाळाजींनी सल्ला दिला.

‘ते आम्हांला कळतं. म्हणूनच आम्ही तुम्हांला गोळा केलं. पण आमच्या आज्ञा पाळल्या जातील का?’

‘राणीसाहेबांनी ती चिंता करू नये.’ बाळाजी बोलले, ‘आपली आज्ञा राजांची आज्ञा समजून आम्ही वागू.’

‘आमची हीच अपेक्षा होती... बाळाजी, आजपासून गडाचे दरवाजे बंद करून घ्या!’

‘जी?’ बाळाजी उद्गारले.

सोयराबाईंनी नजर वर केली. त्या निश्चयपूर्वक म्हणाल्या,

‘निश्चलपुरींनी इकडे बरं वाटेपर्यंत दरवाजे बंद करून घ्यायला सांगितलं आहे. खबरदारी म्हणून सुद्धा ते करायला हवं. आजाराची बातमी बाहेर गेली, तर हव्या त्या

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

अफवा उठतील. दरवाजे बंद करून घ्या.'

'जी!' बाळाजी उद्गारले.

'इकडे बरं वाटेपर्यंत सर्व कचेऱ्यांना, जामदारखान्याला मोहरा करा.'

'जी!' प्रल्हाद निराजी बोलले.

'गडाचे पहारे चोख ठेवा. आमच्या आज्ञेखेरीज गडाबाहेर कुणाला सोडू नका. तुम्ही सर्व एक विचाराने आमच्या आज्ञा तडीला न्या... आम्हांला महाली जायला हवं.'

सोयराबाईंना सर्वांनी मुजरे केले. सोयराबाई सदरेतून निघून गेल्या. सारेजण काही न बोलता पांगले. थोड्याच वेळात किल्लेदारांनी गडाचे दरवाजे बंद करण्याचे हुकूम दिले. सर्व कचेऱ्यांतील माणसे बाहेर निघत होती. दप्तरखाना, जवाहिरखाना यांना मोहरा लागत होत्या.

गडाचे दरवाजे बंद झाले. गडाच्या आतला माणूस बाहेर जाईनासा झाला. सारे कारकून, दप्तरदार ही मंडळी रिकामेपणी फिरू लागली; आणि गडावरच्या लोकांचा मनाचा ठाव सुटला. चिंताचूर मुद्रेने ती वाड्याभोवती रेंगाळू लागली. वाड्यातून बाहेर पडणारा प्रत्येक इसम वेढला जात होता. गडावर मध्यान्हीचा सूर्य घुटमळत होता.

राजांच्या महालात सारे गोळा झाले होते. राजांचा ज्वर कमी होत होता. पण मधून मधून राजे संभ्रमात जात होते. राजांना आवरावे लागत होते.

राजांनी डोळे उघडले; आणि त्यांची दृष्टी पलंगाशेजारी उभ्या असलेल्या सोयराबाईंच्यावर खिळली. राजे क्षीण आवाजात म्हणाले,

'पाणी ऽ ऽ'

गंगाशास्त्र्यांनी सुवर्णपंचपात्र हाती घेतले. राजांनी थोडे पाणी घेतले. राजे शांतपणे पडून राहिले. काही वेळाने राजांनी सोयराबाईंना खुणावले. सोयराबाई नजीक गेल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘राणीसाहेब, शंभूबाळ अजून का आले नाहीत?’

‘तेच तर कळत नाही. एव्हाना यायला हवे होते.’

राजांची नजर सोयराबाईंवर खिळली. त्या नजरेला नजर देण्याचे सोयराबाईंनी टाळले.

राजे हसले.

‘असं म्हणता? ...राणीसाहेब, आम्हांला एवढे का अजाण समजता? गडाखाली मेणा पाठवूनही धाकट्या राणीसाहेब येत नाहीत; आणि आम्ही आजारी असून शंभूबाळ आम्हांला भेटत नाहीत!’

‘मी का खोटं सांगते? हवं तर बाळाजींना...’

राजांची मुद्रा उग्र बनली.

‘बस करा! आधीच भांबावलेल्या माणसांना आणखीन संकटात टाकू नका. आई होऊनही कधी तुम्ही त्या पोराला ओळखलं नाहीत. आम्ही त्यांना पुरे ओळखतो. ते हवं ते करतील, पण त्यांचा आमच्यावर भारी जीव आहे. आम्ही आजारी आहो, हे नुसतं कळलं असतं, तरी पाखराचे पंख लावून ते गडावर हजर झाले असते... श्रींची इच्छा!’

सोयराबाईंनी संतापाने राजांच्याकडे पाठ वळविली.

‘राणीसाहेब!’

‘जी?’ म्हणून सोयराबाईंनी राजांच्याकडे पाहिले.

‘राणीसाहेब, या घटकेला तरी राग सोडा. फार शांतपणे तुम्हांला वागायला हवं. तुम्हांला रागलोभ ओलांडता आला असता, तर किती बरं झालं असतं!’

‘मी रागावले नाही.’ सोयराबाई म्हणाल्या.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

हात हलवीत राजे कष्टाने म्हणाले,

‘आता ह्या अवस्थेला त्याची आम्हांला मुळीच पर्वा नाही. रागावला काय, अथवा न रागावला काय, आम्ही तुमच्याचसाठी सांगत होतो. आज लक्षावधींची फौज आम्ही पदरी बाळगली, ती काय दिमाखाची हौस म्हणून नव्हे. आमच्या भांडारात करोडो होन आणि खंडोगणती सोनं गोळा केलं, ते का ऐश्वर्यलालसेनं? भावी संकट आम्हांला स्पष्ट दिसतं. त्या निकाली झुंजीसाठी सारा खटाटोप होता. ती ताकद ना संभाजीची, ना राजारामांची. एक अविवेकी, तर दुसरा अजाण. आणखीन एखादं वर्ष जरी मिळालं असतं, तरी सारे मनोरथ सिद्धीला गेले असते!’

पडत्या जागी राजांचे डोळे भरून आले, आवाज कंपित झाला.

‘काशीविश्वेश्वराची स्थापना करून आम्ही मोकळे झालो असतो... मग कुणाच्याही हाती राज्य सुरक्षित होतं. पण तेवढी उसंत नशिबी नव्हती. राणीसाहेब, नुसत्या स्वप्नात गुंग होऊन राहण्याचे दिवस राहिले नाहीत. राणीसाहेब! फार गडबड झाली... फार गडबड... झाली...’

राजांनी डोळे मिटून घेतले. डोळ्यांत आलेले अश्रू डोळ्यांच्या कडांतून निखळले. येसाजीने गडबडीने ते पुसले. त्याला हुंदका फुटला. त्या आवाजाने राजांनी डोळे उघडले. येसाजीचा हात थोपटीत राजे बोलले,

‘येसाजी, तू रडतोस? अरे, माजलेल्या हत्तीपुढं उडी घेणारा तू! तू रडतोस?’

येसाजी गडबडीने उठला; आपल्या शेल्याने तोंड झाकीत तो बाहेर गेला.

राजे शांतपणे पडून राहिले.

अचानक राजांची धडपड सुरू झाली. हिरोजी, घाटगे धावले. ते राजांना आवरण्याचा प्रयत्न करीत होते. राजे ओरडत होते :

‘अरे, लौकर तोफेचा आवाज द्या! आमचे बाजी तिथं जिवाची बाजी लावून लढताहेत... आवाज ऐकायला त्यांचा जीव अधीर झाला असेल, रे!... तानाजी गेला...?

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आम्हांला बोलावून... न भेटता... पाठ दाखवून गेला?... ही हिंमत!... जेरबंद करून आणा त्याला!... असली सीनाजोरी कुचलून काढू, म्हणावं!...'

राजे थकत होते. अनेकांनी सावरलेल्या अंगाचा तणावा कमी कमी होत होता. ओठ काही तरी पुटपुटत होते. हळू हळू राजे त्याच गुंगीत झोपी गेले.

ज्यांनी राजांचे बोल ऐकले, त्या सर्वांच्या कातरलेल्या मनांतून अश्रू झरत होते.

गडावर आता कुणाला जेवणाखाणाचे भान नव्हते. राजे वारंवार संभ्रमात जात होते. ज्वर वाढतच होता. जगदीश्वराच्या मंदिरात मृत्युंजयाच्या जपाला ब्राह्मण बसले होते. निश्चलपुरींचा शतचंडी होम धडधडत होता.

सायंकाळी राजे भानावर आले. राजांनी सर्वांना जवळ बोलावले. सर्वांवरून नजर फिरवून राजे म्हणाले,

'आता शोक करू नका. फार कालावधी आहे, असं आम्हांला वाटत नाही. जबाबदारीनं सर्व तडीला न्या. सारे एकविचारानं गेलात, तर साऱ्यांचंच कल्याण आहे.'

जनार्दनपंत गहिवरून म्हणाले,

'महाराज! आपण धीर सोडू नये.'

'जनार्दन! मृत्यूचं भय आम्हांस वाटत नाही. पण या अखेरच्या वेळी अधिक जाणती माणसं हवी होती. संभाजी, मोरोपंत, अनाजी, फिरंगोजी- नेमकी एवढीच माणसं कशी दूर राहिली? जनार्दन!'

'जी?'

'या मृत्यूइतकं काळवेळाचं भान दुसऱ्या कुणाला नसेल. बाजी प्रभू तोफेचा आवाज ऐकेपर्यंत लढले, ते याच्याच कृपेमुळं! आग्ऱ्याच्या प्रसंगातून आम्ही सुटलो, तीही याचीच कृपा आणि आज ध्यानी मनी नसता, कोणी भरवशाचं नजीक नसता ही वेळ त्यानं गाठली. त्याच्यासारखा खेळ्या हुडकून सापडायचा नाही!...'

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

राजांनी थोडे पाणी घेतले. राजांचा आवाज मंद असला, तरी स्पष्ट होता. राजांनी हाक मारली,

‘प्रल्हाद!’

प्रल्हाद पुढे आला.

‘प्रल्हाद, आम्ही आग्र्याहून सुटलो, तेव्हाची गोष्ट आहे. बैरागी बनून आम्ही फिरत होतो. निराजीपंत आमचे प्रमुख बैरागी होते. पाठीचा ससेमिरा चुकविण्यासाठी आम्ही काशीला गेलो. आमच्या परमदैवताच्या दर्शनानं आम्ही धन्य झालो. त्याच्या पुढं आम्ही बैरागीच असल्याचं कळून आलं. जवळची रत्नं देवाला वाहिली. खूप बळ मागितलं.’

राजे हसले. ‘भावनेच्या भरात देवाला रत्नं वाहिली खरी; पण पश्चात्ताप करायची वेळ आली. बैराग्यानं वाहिलेली ती अमूल्य रत्नं पाहून पुजाऱ्यांना शंका आली. निराजीपंतांनी त्याच दिवशी आम्हांला काशीबाहेर काढलं.’

राजांनी उसंत घेतली. राजांनी थकलेले नेत्र परत उघडले.

‘पंत, या राज्यासाठी आम्ही काय केलं नाही? याच्यासाठी जीवमोलाची माणसं गमावली. यशाबरोबरच पराजयही स्वीकारले. अपमान भोगले. हात बांधून अनवाणी पायांनी शरणागती स्वीकारली. राज्यासाठी मुलाला शत्रूघरी ओलीस ठेवला. कैदेत अडकलो. राज्याभिषेक सुद्धा करून घेतला. येईल त्या संकटाला, जबाबदारीला आम्ही मान तुकविली. या राज्यासाठी काही करायचं शिल्लक ठेवलं नाही. पंत, आम्ही भीक सुद्धा मागितली. आग्र्याहून सुटल्यानंतर बैरागी होऊन आम्ही फिरत होतो ना! मग बैरागी स्वैपाक कसे करणार? संशय येईल ना! दररोज भिक्षा मागत आम्ही येत होतो. पंत, राज्याभिषेक करून घेणं जेवढं अवघड, त्यापेक्षा अनोख्या घरासमोर ‘भिक्षा वाढा’ हे शब्द बोलणं महाकठीण! तेही आम्ही केलं.’

राजांनी कपाळावर हात फिरवीला. ते स्वत:शीच हसले.

‘पण, पंत, ही भिक्षा महागात पडली नाही; उलट, खूप फायदा झाला. त्या भिक्षेनं खूप शिकवलं, जीवनाच्या विराट रूपाचं दर्शन घडवलं. दारिद्र्याची दु:खं सांगितली.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

आमच्या विशाल भूमीचा परियच करून दिला. तो अनुभव घेत असता पुष्कळ पाहायला आणि ऐकायला मिळालं.' राजे काही क्षण डोळे मिटून थांबले. परत ते बोलू लागले,

'आम्ही काय सांगत होतो बरं? ....हां! आठवलं....

> कबिरा भरम न भजिया बहु बिधि धरिया भेख।
> साँई के परिचय बिना आंतर रहियो रेख।।

'या प्रवासात खूप ऐकलं. नेहमी धर्मशाळेत, देवळात मुक्काम पडायचे. गोसावी, बैरागी, फकीर असे अनेक साधुसंत भेटायचे. अनेक भजनं ऐकायला मिळायची. कबीर म्हणतात, 'पुष्कळ वेष धारण करूनही मनाचा भ्रम दूर झाला नाही. त्याची ओळख न पटल्यानं मनाचा भेद मात्र तसाच राहिला.' ...किती खरं आहे, नाही?'

राजांनी प्रल्हादकडे पाहिले.

'प्रल्हाद, आता फार झालं. आता भजन, कीर्तन सुरू करा. आता तेच आमच्या कानांवर पडू दे.'

'महाराज!' प्रल्हादने धीर केला.

'बोल.'

'समर्थांना कळलं, तर...'

राजांनी पडल्या जागेवरून हात जोडले. ते हसले.

'प्रल्हाद, खुळा का तू? समर्थांना का कळवावं लागतं? त्यांनी आम्हांला खूप सांगितलं होतं. ते म्हणाले होते... अंतर्मुख व्हा, आत्मरत व्हा!'

बोलता-बोलता राजे झोपले.

सारे तिथेच राहिले. प्रल्हाद निराजीने बाहेर जाऊन राजांची आज्ञा अमलात आणायला सांगितली. महालात समया पेटल्या. महालातून फिरविलेला कनोजी धुपाचा वास सर्वत्र

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दरवळत होता. बाहेर चंद्राचे चांदणे उजळले होते.

राजांच्या मुठी वळल्या जात असल्याचे ध्यानी येताच हिरोजी उठला. साऱ्यांना आता ती लक्षणे परिचित झाली होती. सर्वांच्या चेहऱ्यांवर भीती तरळली. राजांना साऱ्यांनी धरले. आणि खाडकन दरवाजे उघडावेत, तसे राजांचे डोळे उघडले.

'काशीला जाऊन आम्ही गंगा आणली, ती रामेश्वरला पोहोचवली नाही, तर तिला काय अर्थ? ...सई ऽ ऽ! अभिषेकाची तयारी झाली; आणि सई कुठं आहे? आमच्या थोरल्या राणीसाहेब कुठं आहेत? ऐन वेळेला ही माणसं जातात तरी कुठं?... त्यांना बोलवा... त्यांना...'

राजे हळू हळू स्वस्थ पडले. महालाबाहेरच्या सदरेत भजन चालू झाले होते. भजनाचे मंद सूर कानांवर येत होते...

'जय जय राम कृष्ण हा ऽ री ऽ जय जय ऽ ऽ'

त्या भजनाच्या सुरांनी राजे भानावर आले. मिटल्या डोळ्यांनी ते भजन ऐकत होते. टाळमृदंगांचा आवाज भजनाची गती वाढवीत होता. राजांच्या कानांत समर्थांचे बोल घुमत होते...

'राजे, आता अंतर्मुख व्हा, आत्मरत व्हा!...'

अनेक आवाज मनात उठत होते. तुकाराम, मौनी बुवा, याकुत बाबा- अनेक संतांचे चेहरे नजरेसमोर तरळत होते. समर्थांच्या मिठीत असता उदंड मायेने पाठीवरून फिरणारी त्यांची बोटे राजांना जाणवत होती. हातांतल्या चिपळ्या उंचावून बेभानपणे नाचणारे केशवस्वामी राजांना दिसत होते. केशवस्वामींच्या अभंगाचे शब्द राजांना आठवत होते...

'निजबोधें पिकलें शेत, वो
स्वानंदाच्या घुमऱ्या येत, वो
कैवल्याची राशी हे हेत, वो
गुरुकृपें केशव घेत, हो'

त्या गुंगीत राजांचा थकवा जात होता. मन शांत होत होते. थोड्या वेळाने राजे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

शांतपणे झोपी गेले.

□

२८

पहाटेच्या सुमारास राजांना जाग आली. कानांवर भजनाचे सूर पडत होते. महालात शांतता होती. पायांवरून फिरणाऱ्या हाताची जाणीव होताच राजांनी हाक मारली,

‘मनू!’

‘जी?’

‘काय करतेस?’

‘पाय रगडते, महाराज.’

‘जरा पाणी हवं.’

उशाशी उभ्या असलेल्या गंगाशास्त्र्यांनी पाणी दिले. राजांनी विचारले,

‘आज कोण वार?’

‘शनिवार.’

‘पौर्णिमा ना?’

‘जी.’

‘आम्ही आजारी पडून अकरा दिवस झाले. रुद्राचा आकडादेखील अकराच ना?’

‘जी.’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘शास्त्रीबुवा, आजचा दिवस चांगला दिसतो. आज खूप बरं वाटत आहे. शास्त्रीबुवा, आता तुम्ही विश्रांती घ्या. या वयाला जागरण झेपणारं नव्हे. कर्म करीत राहावं. फलाची अपेक्षा धरू नये. जेवढं करता येईल, तेवढं केलंत. तुम्ही विश्रांती घ्या.’

‘झोपलो होतो, महाराज! आता ह्या वयात झोप कुठली? आपल्याला पाहायला आलो, तोच आपण जागे झालात.’

दिवस उजाडला. शास्त्र्यांनी राजांना मात्रा दिली. राजांची नाडी पाहिली. राजांनी हसून विचारले,

‘कसली चिंता करता, शास्त्री? ढासळणारा बुरूज ठेपा देऊन टिकत नसतो. चांगला दिवस आहे आजचा. चिंतेचं कारण नाही.’

शास्त्र्यांना काही बोलवत नव्हते. राजांचे रूप ते न्याहळीत होते; शास्त्री एकदम बाजूला झाले. राजांनी पाहिले, तो सोयराबाई नजीक आल्या होत्या. सोयराबाईंनी काळजीच्या सुरात विचारले,

‘काही हवं का?’

‘नको! हवं ते मिळत नाही, हवे ते चेहरे दिसत नाहीत; आणि नको तेवढे...’

राजे पुढे काही बोलले नाहीत. सोयराबाई संतापाने वळल्या. शास्त्री महालाबाहेर आले. राजवैद्यांनी विचारले,

‘राजांची तब्येत कशी आहे?’

‘काय?’ शास्त्र्यांनी भानावर येऊन विचारले.

‘आज महाराजांस्नी बरं वाटतंय्!’ हिरोजी आशेने म्हणाला.

शास्त्र्यांनी दोघांकडे पाहिले. ते खिन्नपणे हसून म्हणाले,

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘दिसतं, तसं असतं, तर फार बरं झालं असतं!’

शास्त्र्यांच्या त्या बोलण्याने दोघेही चूपचाप झाले. हिरोजीच्या चेहऱ्यावर प्रकटलेली आशा लुप्त झाली. दाराशी आलेल्या मनोहारीने सांगितले,

‘महाराज बोलावताहेत.’

‘मला?’ शास्त्र्यांनी विचारले.

‘सगळ्यांना.’

राजांच्या भोवती सारे गोळा झाले होते. राजे काही तरी पुटपुटत होते. हिरोजीने हाक मारली,

‘महाराज!’

‘अं?’

राजांनी डोळे उघडले. सर्वांवरून नजर फिरविली. राजांना साऱ्यांची ओळख पटली. भयभीत नजरेने शेजारी उभ्या असलेल्या राजारामांना त्यांनी जवळ बोलाविले. कष्टाने त्यांच्या अंगावरून हात फिरवीत राजे म्हणाले,

‘बाळराजे, फार लहानपणी फार मोठी जबाबदारी तुमच्या शिरावर येते. ती पेलण्याला जगदंबा तुम्हांला बळ देईल! बाळराजे, माणसं सोसण्यातून मोठी होतात, हे कधी विसरू नका. सोसण्याला कंटाळू नका.’

राजांची नजर सर्वांवरून परत फिरली.

‘आता सारा शोक आवरा. तुम्ही चुकूर होऊ नका. हा तो मृत्युलोकच आहे. यामागे किती उत्पन्न झाले, तितके गेले. आता तुम्ही निर्मळ, सुखरूप बुद्धीने असणे. आता सारे बाहेर बसा. आम्ही श्रींचे स्मरण करतो. जा...’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सारे बाहेर गेले. राजांचे पाय दाबीत मनोहारी बसली होती. शेजारी हिरोजी उभा होता. गंगाशास्त्री राजांच्या पायांजवळ उभे होते. एकटक नजरेने ते राजांच्याकडे पाहत होते. राजांचे डोळे मिटले होते. श्वास जड चालू होता. राजांनी छातीवर हात घेतले होते. ओठ पुटपुटत होते. राजांनी हाक मारली,

‘मनू!’

‘जी?’

‘घाम आल्यासारखा वाटतो. जरा पुसतेस?’

मनोहारीने पंचा घेतला. राजांनी मानेच्या दिशेने खुणावले. राजांच्या मानेवरून पंचाचा हात पुसून घेत असता अचानक मनोहारीच्या मुखातून दुःखोद्गार बाहेर पडला. तिचा हात थांबला. हातचा पंचा गळून पडला.

‘काय झालं?’ राजांनी विचारले,

‘आपली कवड्यांची माळ...’

‘अं?’

‘तुटली!’

राजे क्षीण हसले.

‘जगदंबेनं आवरण घातलं होतं... काढून घेतलं.’

डोळ्यांतली टिपे सांडीत मनोहारी ओघळलेल्या कवड्या गोळा करीत असता राजांनी विचारले,

‘किती कवड्या तुटल्या, ग?’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘चार!’ हुंदका दाबीत मनोहारी म्हणाली.

‘चार ऽ ऽ -चार ना?...’ राजे हात उडवीत म्हणाले. ‘फार झालं, तर आम्ही चार घटकांचे सोबती...’

मनोहारीने राजांच्याकडे पाहिले. सारी भीती तिच्या मुखावर उमटली होती. ते दुःख असह्य होऊन मनोहारीने पलंगाच्या काठावर मस्तक टेकले. ती रडू लागली. राजांना ते हुंदके ऐकू येत होते. राजांनी कष्टाने हात उंचावला. मनोहारीच्या केसांवरून हात फिरवीत राजे बोलले,

‘मनू! रडतेस? आमच्यासाठी?’

राजांनी मनोहारीचा उजवा हात हाती घेतला. राजांच्या हाताची ओढ तिला जाणवत होती. मनोहारीचा हात सैल पडला. राजांनी मनोहारीचा पालथा हात आपल्या समोर धरला. एकाग्र चित्त करून ते तो हात पाहत होते. मनोहारीच्या बोटातल्या सईबाईंच्या प्रवाळाच्या अंगठीवर त्यांचे लक्ष खिळले होते.

राजांनी आपला डावा थरथरत हात त्या अंगठीवरून फिरविला.

‘रडू नको, मनू! मनात असूनही उभ्या आयुष्यात कुणाची गुंतवण आम्ही केली नाही, ते आम्हांला जमलंच नाही. न कळत मात्र तुझ्या जिवाची वृथा गुंतवण झाली, बघ! ती तशीच ठेवून आम्ही जातो... फार वाईट वाटतं!... शास्त्रीबुवा...’

गंगाशास्त्री जवळ गेले.

‘शास्त्रीबुवा, आता आम्हांला गंगोदक, तुलसीपत्र द्या. आमच्या कपाळी भस्म लावा.’

शास्त्री, हिरोजी, मनू या साऱ्यांच्याच मुखांतून एकाच वेळी हुंदका बाहेर पडला. डोळे पुशीत शास्त्री बाहेर पडले. त्यांनी गंगोदक, भस्म, तुलसीपत्र आणले. राजांनी गंगोदक घेतले. शास्त्र्यांनी भस्म लावले. राजांनी जिभेवर तुलसीपत्र घेऊन हात जोडले. पलंगाभोवती सारे गोळा झाले होते. राजांना महादेव दिसला.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘महादेव! तुझा पहारा आता उपयोगी पडायचा नाही, बाबा!’

महादेव रडत बाहेर धावला...

राजांच्या कानांवर भजनाचे सूर पडत होते. राजांचा ताबा परत उडू लागला होता. उघड्या डोळ्यांत निराळे तेज प्रकटू लागले होते...

‘...किती शांतपणे आलमगीर आमच्याकडे पाहत होता! तो काही बोलत नव्हता. बसल्या आसनावरून नुसता पाहत होता. दरबारी परिधान केलेल्या हिरव्या मखमलीचा रत्नखचित काबा त्याच्या अंगावर होता. मस्तकीच्या किमॉशवर लावलेल्या मोठ्या पिंपळपानातले तेजस्वी हिरे झगमगत होते. पण त्याहीपेक्षा त्याचे डोळे... केवढे शांत... अंत:करणाचा ठाव घेणारे! केवढा जबरदस्त विश्वास त्या नजरेत दडला होता.

‘नागाच्या नजरेतील दहशत आणि अंदाज त्या नजरेत सामावला होता... ती नजर अजून तशीच आहे... आयुष्यात फक्त दोघांनीच आमच्यावरची नजर ढळू दिली नाही- एक आलमगीर आणि दुसरा मृत्यू!’

राजांनी दीर्घ श्वास सोडला. साऱ्यांनी राजांना सावरले होते. राजे शांत होते. एकदम ते उफाळले.

‘खोटं! शंभू मोगलांना मिळाला... साफ खोटं!... स्वराज्याचा युवराज... छत्रपतींचा वारस, सईचा संभाजी... असं करणार नाही... खोटं ऽ ऽ खोटं ऽ ऽ’

राजांचा आवेश सरला. राजे शांतपणे पडून राहिले. वैद्य राजांची नाडी पाहत होते; पण राजांना त्याचे भान नव्हते.

बऱ्याच वेळाने राजे भानावर आले. त्यांनी कष्टाने डोळे उघडले. सारे धुरकट दिसत होते. पायांपाशी बसलेली मनोहारी खूप दूर बसल्यासारखी दिसत होती. राजांनी क्षीण हाक मारली,

‘मनू!’

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

‘जी?’

‘काय करतेस?’

‘पाय रगडते, महाराज!’

‘पाय रगडतेस?’ राजांनी आवंढा गिळला. ‘तू पाय रगडतेस, तर आम्हांला कळत का नाही?’

मनोहारीचे डोळे भीतीने विस्फारले गेले. थरथरणाऱ्या ओठांतून आवाज बाहेर पडू नये, म्हणून तिची कंपित बोटे ओठांवर स्थिरावली. तिने एकदम गंगाशास्त्र्यांच्याकडे पाहिले. राजांच्या पायांशी उभ्या असलेल्या गंगाशास्त्र्यांनी राजांच्या तळपायांना हात लावला; आणि क्षणात गंगाशास्त्र्यांचे अश्रू तळपायांना लागलेल्या हातांवर ठिबकले. पण राजांना त्यांचे भान नव्हते.

राजांच्या हाताची चाळवाचाळव झाली. सारे बळ एकवटून ते अखेरचे बोलले,

‘आम्ही एकटे राहिलो... फार एकटे राहिलो... फार एकटे राहिलो... सई ऽ ऽ’

□ □ □

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निशाणी

□

सांगाती

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

निशाणी

पहिला भाग

१५९४	शहाजीचा जन्म
१५९६	जिजाबाईचा जन्म
१६०३	शहाजी व जिजाबाई यांचा विवाह
१६०८	रामदासांचा जन्म
१६२९ जुलै २५	लखुजीरावांचा मृत्यू
१६३० फेब्रुवारी १९	शिवजन्म
१६३० ते १६३१	दुष्काळ
१६३० ते १६३२	शहाजहानचा बऱ्हाणपुरास मुक्काम
१६३०	मुरार जगदेवने पुणे जाळले.
१६३१ मार्च	मूर्तिजाची निजामशाहीवर स्थापना
१६३३ जून १७	निजामशाहीचा पराभव
१६३७	शिवाजीचे पुण्यात आगमन
१६३९	शहाजीला बंगळूरच्या जहागिरीची प्राप्ती
१६४०	मुधोजींना फलटण मिळाले.
१६४० मे १४	सईबाईचा लाल महाली विवाह
१६४१-४२ दरम्यान	बंगळूरला रवानगी
१६४४ सुमारास	मुधोजींनी शिवाजीविरुद्ध वर्तन केले.
१६४५ जानेवारी २८	रांझ्याच्या पाटलाचे हात-पाय तोडले.
१६४५ एप्रिल १५	रोहिडेश्वराची शपथ
१६४५	रोहिडा घेतला.
१६४६	तोरणा घेतला.
१६४७ मार्च	दादोजी कोंडदेव यांचा मृत्यू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

दुसरा भाग

१६४७	कोंढाणा घेतला.
१६४८ ऑक्टोबर	पुरंधरचा कबजा
१६४८ ऑक्टोबरनंतर	फत्तेखानाचा पराभव
१६४८ जुलै	शहाजीराजांना कैद
१६४९ मे १४	शहाजीराजांची मुक्तता
१६५० सुमारास	सखुबाईचा जन्म
१६५१-५२	बजाजीचे शुद्धीकरण
१६५५	सखुबाईचे लग्न
१६५६ जानेवारी १५	जावळी काबीज
१६५६ ऑगस्ट २७	चंद्ररावांच्या मुलांना ठार केले.
१६५६ सप्टेंबर	सुपे काबीज
१६५७ एप्रिल १५	पुतळाबाईशी विवाह
१६५७ एप्रिल ३०	जुन्नर मारिले.
१६५७ मे १४	संभाजीचा जन्म
१६५७ ऑक्टोबर २४	कल्याण-भिवंडी काबीज
१६५९ जून	अफझलखान विजापूरहून निघाला.
१६५९ जून १६	जेध्यांना फर्मान
१६५९ जुलै ११	राजे राजगडावरून प्रतापगडावर
१६५९ सप्टेंबर ५	सईबाईंचा मृत्यू

तिसरा भाग

१६५९ सप्टेंबर ३०	खान वाईला आला.
१६५९ ऑक्टोबर	कृष्णाजी भास्कर वकील पाठविला.
१६५९ नोव्हेंबर १०	खानाचा मृत्यू
१६५९ नोव्हेंबर २८	पन्हाळा काबीज
१६६० मार्च २	पन्हाळ्याचा वेढा
१६६० मे ९	शास्ताखान पुण्यात आला.
१६६० जुलै १२	पन्हाळ्याहून प्रयाण
१६६० जुलै १३	बाजी प्रभू देशपांडे यांचा मृत्यू
१६६१-६२ सुमारास	शहाजी व शिवाजी यांची भेट

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

चौथा भाग

१६६१ फेब्रुवारी २	उंबरखिंडीची लढाई
१६६१ मार्च	राजापूर लुटले.
१६६१ एप्रिल २९	शृंगारपूर काबीज
१६६१ मे	विजापूरशी सलोखा
१६६१ जुलै	प्रतापगडी भवानीची स्थापना
१६६३ एप्रिल ५	शास्ताखानावर छापा
१६६३ डिसेंबर	कोंढाण्याचा वेढा
१६६४ जानेवारी ६ ते १०	सुरतेची लूट
१६६४ जानेवारी २३	शहाजीराजांचा मृत्यू
१६६४ मे २८	कोंढाण्याचा वेढा उठला.
१६६४ ऑक्टोबर	बाजी घोरपडे यांचा मृत्यू
१६६४ नोव्हेंबर १५	सिंधुदुर्गाचा पाया घातला.
१६६५ जानेवारी ६	जिजाबाईंची सुवर्णतुला

पाचवा भाग

१६६५ जानेवारी १९	मिर्झाराजे बऱ्हाणपुरास येऊन पोहोचले.
१६६५ फेब्रुवारी १९	सावनूरची लूट
१६६५ फेब्रुवारी १०	मिर्झाराजे बऱ्हाणपुराहून औरंगाबादेस
१६६५ मार्च	राजे रायगडी आले.
१६६५ मार्च ३	मिर्झाराजे पुण्यात
१६६५ मार्च ७	जसवंतसिंग दिल्लीला निघाला.
१६६५ मार्च ३१	दिलेरखान पुरंधरच्या पायथ्याशी
१६६५ एप्रिल १४	रुद्रमाळ पडला.
१६६५ मे १८	रघुनाथपंतांना बोलणी करण्यासाठी पाठविले.
१६६५ जून ११	पुरंधरचा तह
१६६५ जून १४	कोंढाणा दिला.
१६६५ जून १७	संभाजीराजे मिर्झाराजांकडे ओलीस
१६६५ सप्टेंबर ३०	शिवाजीराजांना फर्मान
१६६५ डिसेंबर २४	आदिलशाही सेनेशी गाठ
१६६५ जानेवारी	मोगली सेनेचा प्रथम पराभव

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१६६५ जानेवारी ११ पन्हाळगडचा पराभव
१६६५ जानेवारी २२ शहाजहानचा मृत्यू
१६६६ मार्च ५ राजे आग्र्याला निघाले.
राजे औरंगाबाद मुक्कामी
१६६६ मे ११ राजे आग्रा शहराच्या नजीक
१६६६ मे १२ दरबार
१६६६ ऑगस्ट १६ पलायन
१६६६ सप्टेंबर २ रामसिंगाची मनसब रद्द झाली.
राजे राजगडावर आले.

सहावा भाग

१६६६ नोव्हेंबर २० संभाजीराजांसह राजे राजगडावर आले.
१६६७ मे रांगण्याचा वेढा मारून काढला.
१६६७ जुलै मिर्झाराजे जयसिंगांचा मृत्यू
१६६७ मार्च २७ नेताजी पालकराचे धर्मांतर
१६६७ एप्रिल ३ मोगलांशी तह
१६६७ एप्रिल ३ रघुनाथपंत व त्रिंबकपंत सुटले.
१६६७ ऑक्टोबर २७ संभाजीराजे शहाजाद्याच्या भेटीस गेले.
१६६७ नोव्हेंबर ९ बारदेशची स्वारी
१६६७ नोव्हेंबर २६ पोर्तुगीजांशी तह
१६६८ ऑक्टोबर गोव्यातील कट फसला.
१६६८ ऑक्टोबर १३ सप्तकोटेश्वरचा जीर्णोद्धार
१६६९ ऑगस्ट-सप्टेंबर औरंगजेबाने काशीचे देऊळ पाडले.
१६६९ नोव्हेंबर जंजिरा
१६७० फेब्रुवारी ४ कोंढाणा काबीज
१६७० फेब्रुवारी १४ राजारामाचा जन्म
१६७० मार्च ८ निळोपंतांनी पुरंधर घेतला.
१६७० मार्च १५ राजांनी कल्याण घेतले.
१६७० मे लोहगड घेतला.
१६७० जून हिंदोळा
१६७० जून १६ माहुली
१६७० जून २२ कर्नाळा

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१६७० जून २४	रोहिडा
१६७० ऑक्टोबर ४	सुरतेची दुसरी लूट
१६७० ऑक्टोबर १७	दिंडोरीची लढाई
१६७० नोव्हेंबर	राजे कारंजाला
१६७१ जानेवारी	संभाजीराजांना कारभार सांगितला.
१६७१ जून	दिलेरखानाने साल्हेरला वेढा घातला.
१६७२ जानेवारी १३	दिलेरखानाने पुणे लुटले.

सातवा भाग

१६७२ फेब्रुवारी	साल्हेर-मुल्हेर
१६७२ ऑगस्ट	समर्थांची भेट
१६७३ मार्च ६	पन्हाळा काबीज
१६७३ मार्च ९	प्रतापगड
१६७३ मार्च १६	पन्हाळा
१६७३ एप्रिल १५	उंबराणीची लढाई
१६७३ एप्रिल १६	प्रतापरावांनी हुबळी लुटली.
१६७३ मे २४	निकल्स-संभाजींची भेट
१६७३ जून ३	निकल्स-शिवाजींची भेट
१६७३ जुलै २७	सातारा काबीज
१६७३ ऑक्टोबर १३	पांडवगड
१६७३ डिसेंबर	गागाभट्टांना आणण्यासाठी नाशकाला पालखी रवाना

आठवा भाग

१६७३ डिसेंबर	राजे कारवारहून परत
१६७४ फेब्रुवारी २४	प्रतापरावांचा मृत्यू
१६७४ मार्च १९	काशीबाईचा मृत्यू
१६७४ एप्रिल ८	चिपळूणच्या छावणीची पाहणी
१६७४ मे ९	राजे रायगडला
१६७४ मे १९	राजे प्रतापगडला
१६७४ मे २९	राजांची मुंज

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१६७४ मे ३०	सोयराबाईंशी राजांचा समंत्रक विवाह
१६७४ जून ४	सुवर्णतुला
१६७४ जून ६	राज्याभिषेक
१६७४ जून १७	जिजाबाईंचा मृत्यू
१६७४ जुलै १५	बहादुरखान कोकलताशची छावणी लुटली.
१६७४ सप्टेंबर २४ राजांचा पुन्हा राज्याभिषेक

नववा भाग

१६७४ डिसेंबर १०	खानदेशची स्वारी
१६७५ फेब्रुवारी ४	संभाजीराजांची मुंज
१६७५ फेब्रुवारी २७	मोगल सैन्याने कल्याण-भिवंडी लुटली.
१६७५ मार्च ते जुलै २२ बहादुरखानाशी तहाचे बोलणे निष्फळ
१६७५ एप्रिल ४	फोंड्याला वेढा
१६७५ एप्रिल १७	सुरुंग लावून फोंडा उडविला.
१६७५ मे २१	कारवारचा मोठा भाग मराठ्यांच्या ताब्यात
१६७५ जून ११	रायगडास येताना राजांचा राजापुरास मुक्काम
१६७५ जुलै २२	बहादुरखानाचा वकील रायगडी आला.
१६७६जानेवारी-फेब्रुवारी शिवाजी सातान्यास येऊन आजारी पडले.
१६७६	रघुनाथपंत राजांकडे येतात.
१६७६ फेब्रुवारी १	पालीचा मजहर
१६७६ जून	राजे पन्हाळ्याहून रायगडास आले.
१६७६ जून १९	नेताजीचे शुद्धीकरण
१६७६ जून २०	अथणी लुटली.
१६७६ ऑगस्ट	मोरोपंत पेशवे यांचा जंजिऱ्यावर हल्ला
१६७६ ऑगस्ट ८	रामदास सज्जनगडावर राहावयास गेले.
१६७६ ऑक्टोबर ६	दसऱ्याच्या मुहूर्तावर कर्नाटकविजयासाठी प्रयाण

दहावा भाग

१६७६ नोव्हेंबर १	संभाजीराजे शृंगारपुरास जाऊन राहिले.
१६७७ जानेवारी	हुसेनखान मियानाचा पाडाव
१६७७ मार्च ४	कुतुबशहाची बेट (फाल्गुन शुद्ध १०)

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१६७७ एप्रिल १८	त्र्यंबकपंत डबीर शिवापुरास वारले.
१६७७ मे १३	जिंजी काबीज दोन दिवसांनंतर राजे जिंजीस गेले.
१६७७ जुलै ५	शेरखान आपला मुलूख तहाने शिवाजीराजांना देतो.
१६७७ जुलै १६	राजांचा मुक्काम तिरुमलवाड्यास
१६७७ जुलै २७	एकोजीराव पळून जातात. (१० दिवस)
१६७७ ऑगस्ट	शिवाजीराजे तोरगल प्रांती
१६७७ ऑगस्ट-सप्टेंबर	बहादुरखानास काढून दिलेरखानाची नेमणूक
१६७८ मार्च २३	संभाजीराजांचा कलशाभिषेक
१६७८ जून	गदग प्रांत काबीज करून राजे रायगडास परत
१६७८ डिसेंबर १३	संभाजीराजे दिलेरखानास मिळाले.
१६७८ जानेवारी	रायगडास भूमिकंप

अकरावा भाग

१६७९ जानेवारी २९	शृंगारपुरास भवानीचा जन्म
१६७९ फेब्रुवारी २५	शहाअलम औरंगाबादेला आला.
१६७९ मार्च ३	मोरोपंतांनी कोप्पळ घेतले.
१६७९ एप्रिल २	संभाजीने भूपाळगड घेतला.
१६७९ ऑक्टोबर	दिलेरखान विजापूरला आला.
१६७९ ऑक्टोबर ३०	शिवाजी सेलगुरला आदिलशहाच्या मदतीला
१६७९ नोव्हेंबर १५,-१८	शिवाजीची जालन्याची लूट रणमस्तखानाशी लढाई
१६७९ नोव्हेंबर २०	दिलेरखान अथणी लुटतो. संभाजी पळून जातो.
१६७९ नोव्हेंबर २२	शिवाजीराजे पट्ट्याला विश्रांतीसाठी
१६७९ नोव्हेंबर ३०	संभाजीराजे पन्हाळ्यावर
१६८० जानेवारी १३	शिवाजी-संभाजींची भेट
१६८० फेब्रुवारी ४	राजांचे सज्जनगडाहून रायगडाकडे प्रयाण
१६८० जानेवारी	खांदेरीची तटबंदी पूर्ण झाली. इंग्रजांशी तह
१६८० मार्च ७	राजाराम महाराजांची मुंज
१६८० मार्च १५	राजाराम महाराजांचे लग्न

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

१६८० मार्च २०	सूर्यग्रहण
१६८० एप्रिल ३	राजांचा मृत्यू

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

सांगाती

सभासद बखर	संपा. शं.ना. जोशी
सभासद बखर	संपा. का.ना. साने
सभासद बखर	संपा. वि. स. वाकसकर
९१ कलमी बखर	संपा. वि. स. वाकसकर
शककर्ते श्री शिव छत्रपति महाराज	चिटणीस
छत्रपति शिवाजीराजे यांची बखर	
शिवदिग्विजय	नंदुरबारकर-दांडेकर
चित्रगुप्तविरचित शिवाजीमहाराजांची बखर	का.ना.साने
शिवकालीन पत्रसारसंग्रह : भाग १ ते ३	शं.ना.जोशी
शिवाजी निबंधावली भाग १/२	केळकर- आपटे
शिवचरित्रप्रदीप	आपटे-दिवेकर
शिवभारत	परमानंद
परमानन्दकाव्यम्	
संपूर्ण भूषण	रा.गो.काटे
पेशव्यांची बखर	संपा. का.ना. साने
राज्याभिषेक-शकावली	
आज्ञापत्र	संपा. डॉ.व.दी.राव
आज्ञापत्र	संपा. ढेरे-जोशी
मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें	संपा. वि.का. राजवाडे
शिवचरित्र साहित्य (खंड १ ते ११)	
महाराष्ट्रेतिहासाचीं साधनें खंड २	संपा. वा.सी.बेंद्रे
शिवकालीन संपूर्ण शकावली	ग.ह. खरे
श्री शिवाजीप्रताप	पुरातनेतिहास प्रकाशक मंडळी, बडोदे
मराठेशाहींतील शिलालेख	संपा. मो.गं. दीक्षित
V.S. चे मार्मिक लेख	
ऐतिहासिक चरित्रें	

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मराठी साम्राज्याची छोटी बखर	संपा. ज.बा. मोडक
दत्तोपंत आपटे स्मारकग्रंथ	
दत्तोपंत आपटे लेखसंग्रह	जोशी-ओतुरकर
श्री शिवाजीमहाराजांचें राजा जयसिंगास पत्र	
रायगडाची जीवनकथा	शां. वि. आवळसकर
ऐतिहासिक आख्यायिका	ग. ह. खरे
मराठी रियासत (शहाजी)	गो. स. सरदेसाई
मराठी रियासत (शिवाजी)	गो. स. सरदेसाई
मराठी रियासत (संभाजी)	गो. स. सरदेसाई
मराठी रियासत (शाहू)	गो. स. सरदेसाई
मालोजीराजे आणि शहाजीमहाराज	वा. सी. बेंद्रे
विजापूर आदिलशाही घराण्याचा इतिहास भाग २	मोडक-वझे
विजयनगरच्या साम्राज्याचा इतिहास	मा. व्यं. लेले
तंजावरचे मराठी राजे	वि. स. वाकसकर
फलटण संस्थानचा इतिहास	पतके
मुधोळ संस्थानच्या घोरपडे-घराण्याचा इतिहास	द. वि. आपटे
जंजिरा संस्थानाचा इतिहास	बा. के. भोसले
सावंतवाडी संस्थानाचा इतिहास	वि. पु. पिंगुळकर
मराठ्यांचा आरमारी इतिहास	थत्ते
मराठी आरमार	द. ब. पारसनीस
कोकण इतिहासाची पार्श्वभूमि	त्र्यं. शं. शेजवलकर
महाराष्ट्राचा इतिहास	
कुतुबशाहीचा इतिहास	बा. प्र. मोडक
गोवळकोंड्याची कुतुबशाही	वा. सी. बेंद्रे
भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने	वि. दा. सावरकर
महान् बंडखोर	डेनिस किंकेड
छत्रपति शिवाजीमहाराज	दि. वि. काळे
पेशवेकालीन महाराष्ट्र	वा. कृ. भावे
छत्रपति शिवाजीमहाराज	कृ. अ. केळूसकर
छत्रपति संभाजीमहाराज	वा. सी. बेंद्रे

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुण्यश्लोक छत्रपति	बाळशास्त्री हरदास
श्रीशिवछत्रपति	त्र्यं. शं. शेजवलकर
राजाशिवछत्रपति भाग १-२	ब. मो. पुरंदरे
शहाजीराजे भोसले	र. वा. रामदास
शिवचरित्र वृत्तसंग्रह खंड १ ते ३	ग. ह. खरे
शिवचरित्र सा. खंड २ ते १३	द. वा. पोतदार
राणा जयसिंग आणि शिवाजीमहाराज	वा. सी. बेंद्रे
अफझलखानवध	वि. ल. भावे
श्रीशिवराज्याभिषेक	संपा. वा. सी. बेंद्रे
श्रीशिवराज्याभिषेककल्पतरु	संपा. आपटे- दीक्षित
श्रीशिवराज्याभिषेक	रवींद्रनाथ वा. रामदास
शिवविमोचन	वि. रा. नेने
शायिस्ताखानाची मोहीम	वि. ल. भावे
मराठे व इंग्रज	न. चिं. केळकर
मराठे व औरंगजेब	सेतुमाधवराव पगडी
निजाम-पेशवे संबंध	त्र्यं. शं. शेजवलकर
इतिहासाचा मागोवा	सेतुमाधवराव पगडी
मोगल आणि मराठे	सेतुमाधवराव पगडी
पोर्तुगेज-मराठे संबंध पां. स. पिसुर्लेकर	
मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष	म. गो. रानडे
हिंदवी स्वराज्य आणि मोगल	सेतुमाधवराव पगडी
मागोवा	नरहर कुरुंदकर
प्रतापगडचे युद्ध	ग. वा. मोडक
इतिहास-मंजिरी	द. वि. आपटे
पन्हाळगडचा वेढा	मुं. गो. गुळवणी
पंत, आम्ही निघालो	मुं. गो. गुळवणी
मराठी लोकसंस्कृतीचे उपासक	रा. चिं. ढेरे
महाराष्ट्राची धारातीर्थे भाग १/२	पं. महादेवशास्त्री जोशी
तीर्थरूप महाराष्ट्र	पं. महादेवशास्त्री जोशी
मराठी लोकांची संस्कृति	इरावती कर्वे
रायगडावरील शिवाजीमहाराजांच्या सिंहासनाची आणि इतर व्यवस्था	शं. ना. जोशी
श्री सरस्वती (छत्रपति विशेषांक)	

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

पुरुषार्थ (छत्रपति विशेषांक)	
राष्ट्रकेसरी (छत्रपति विशेषांक)	
त्रैमासिक अंक	
रायगड किल्ल्याचे वर्णन	गो. बा. जोशी
महाड शहराचा इतिहास	सुंदरभाई बुटाला
शिवतीर्थ रायगड	गो. नी. दांडेकर
महाराष्ट्राचे जलदुर्ग	र. वा. रामदास
महाराष्ट्रातील किल्ले	चिं. ग. गोगटे
सिंहगड	ग. ह. खरे
श्री सप्तकोटीश्वर	सूर्यराव देसाई
राजव्यवहारकोश	संपा. रा. गो. काटे
भारतीय संस्कृतिकोश : भाग १ ते ३	संपा. पं. महादेवशास्त्री जोशी
मध्ययुगीन चरित्रकोश	सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
ऐतिहसिक शब्दकोश	य. न. केळकर
उष:काल	ह. ना. आपटे
सूर्योदय	ह. ना. आपटे
गड आला, पण सिंह गेला	ह. ना. आपटे
सव्यसाची	शरच्चंद्र
‘स्वराज्याचा श्रीगणेशा’ ते ‘स्वराज्याचा कारभार’	नाथमाधव
आग्र्याहून सुटका	औंधकर
शिवसंभव	वासुदेवशास्त्री खरे
राजसंन्यास	रा. ग. गडकरी
ऐतिहासिक पोवाडे	य. न. केळकर
ऐतिहासिक पोवाडे	सयाजी साहित्यमाला
राजा शिवाजी खंड १	म. मो. कुंटे
एकनाथांची गाथा	
एकनाथी भागवत	
एकनाथ - वाङ्मय आणि कार्य	न. र. फाटक
समर्थांचीं दोन जुनीं चरित्रें	शं. श्री. देव
रामदास आणि रामदासी (अंक)	
रामदासांचे समग्र ग्रंथ	
श्रीसमर्थचरित्र	अळतेकर

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

मनाचे श्लोक	
दासबोध	
संतविजय ग्रंथ	
श्री तुकाराममहाराजांचे चरित्र	ल. रा. पांगारकर
तुकाराम - गाथा व चरित्र	पु. मं. लाड
तुकारामाचे संत-सांगाती	वा. सी. बेंद्रे
भावार्थरामायण	
महाभारत	
ज्ञानेश्वरी	
ज्ञानेश्वरी अंतरंग	रा. द. रानडे
ज्ञानेश्वर - वाङ्मय आणि कार्य	न. र. फाटक
सकलसंतगाथा	
मनुस्मृति	
सार्थ शाङ्र्गधरसंहिता	
चिकित्सा-प्रभाकर	
सार्थ योगरत्नाकर	
चरकसंहिता	
अष्टांगहृदय	वाग्भट
कौटिलीय अर्थशास्त्र	संपा. करंदीकर-हिंवरगांवकर
मिताक्षरा व्यवहाराध्याय	ज. म. गुर्जर
गजपरीक्षा	रा. स. गुप्ते
अश्वपरीक्षा	रा. स. गुप्ते
प्रभुरत्नमाला स. ग. मुजुमदार	
औरंगजेबनामा भाग १ ते ३ देवी प्रसादजी	
बुसातीनुस्सलातीन	
भूषण ग्रंथावली	संपा.- पं. मिश्रश्याम बिहारी
शुकदेव बिहारी	
स्वराज्यका प्रभात	पु. वा. गोवईकर
Shivaji the Great Vol. I, II, III, IV	Dr. Balkrishna
History of the Maharttas Vol. I	Grant Duff
Shivaji	Jadunath Sarkar

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

Shivaji's Visit to Aurangzib at Agra	Jadunath Sarkar
Shivaji the Great from Agra	Babasaheb Deshpande
House of Shivaji	Jadunath Sarkar
Jinjivas	V. L. Kale
Easy Stories from Indian History	
Historical Miscellany	
Shivaji Souvenir	Ed. G. S. Sardesai
Shivaji the Maratha	H. G. Rawlinson
Peshwa's Diaries	M. G. Ranade
A History of the Maratha People Vol. I, II, III	C. A. Kincaid
Letter Despatches and other State Peoples Vol. I, II, III	
Shivaji (A Study in Leadership)	Jadunath Sarkar
Storia-Do-Magore	N. Manucci (Translated by W. Irvine)
Masir-i-Alamgiri	Ed. Jadunath Sarkar
The English Factories in India	Sir Charles Fawcett
Foreign Biographies of Shivaji	S. N. Sen
Shivaji and his Times	Jadunath Sarkar
Shivaji, the Portrait of a Patriot	V. B. Kulkarni
The Grand Rebel	Denis Kincaid
The Life of Shivaji Maharaj	N. S. Takakhav
Aurangzeb's Reign	Jadunath Sarkar
Everyday Life in Ancient India	Sengupta
Fall of the Mughal Empire	Jadunath Sarkar
Travels in India : Vol. I & II	Tavernier Ed. V. Ball
Dagh Register : Vols. up to 1680	English Translation
The psychology of Woman Vol. I, II,	Helene Deutsch M D.

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

Chittakula-Karwar	M. A. Desai

☐

"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"



"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"



"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"



"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"



"******ebook converter DEMO - www.ebook-converter.com*******"

साप्ताहिक

साधना

संस्थापक
साने गुरुजी

शनिवार
१२ जून २०१०
मूल्य रु. १०/-

११ जून २०१०
साने गुरुजींचा
साठावा
स्मृतिदिन



''स्वराज्याच्या महान 'साधना'ने आपण मानव्य फुलवायचे आहे. संस्कृती समृद्ध करायची आहे. त्यासाठी अखंड 'साधना' हवी. जीवन अनेकांगी आहे. जीवनाच्या क्षेत्रात, सर्व व्यवहारांत आपण साधकाच्या वृत्तीनेच वागण्याची धडपड केली पाहिजे. मी चांगला होईन, अधिक चांगला होईन हा ध्यास घेणे, यालाच पुरुषार्थ म्हणतात.''

-साने गुरुजी

('साधना'च्या पहिल्या अंकातील संपादकीयातून, १५ ऑगस्ट १९४८.)



'साधना'च्या पहिल्या वर्धापनदिनाच्या मेळाव्यात साने गुरुजी, १५ ऑगस्ट १९४९, मुंबई.

साने गुरुजी : ६०व्या स्मृतिदिनी संस्मरण

स्थापण्या
समता शांती
ठेवुनी शुद्ध
साधनां ।
करिती साधना
त्यांना ठेवो
उत्स्फूर्त
साधना

साने गुरुजींना जाऊन आता साठ वर्षे म्हणजे साधारणपणे चार पिढ्यांचा काळ लोटला आहे, तरीही गुरुजींचे नाते आजच्या मुलामुलींशी टिकून आहे. जो मुलांचे मनोरंजन करतो, त्याचे नाते प्रभूशी जडेल असे गुरुजींनीच घोषित केले होते. तथापि नाते जडणारा तो प्रभू म्हणजे प्रत्येक नवी पिढी होय हे गेल्या सहा दशकांनी सिद्ध केले आहे. नव्या नव्या पिढीशी संभवणारे 'साप्ताहिक साधना'चे टिकाऊ नातेही गुरुजी-वचनाच्या या गर्भितार्थातच दडलेले आहे...

साने गुरुजींचा जन्म, जीवन आणि निर्वाण हे सर्व स्वातंत्र्यपूर्व काळाच्या व अवकाशाच्या परिघातीलच. व्यक्ती, समूह, संस्था, चळवळी, आंदोलने तथा एकूणच समाज या सर्वांची जडणघडण करणारी एक संस्कारसंहिता, एक मूल्यप्रणाली त्या कालखंडाच्या ऐतिहासिक वास्तवातच सक्रिय होती. निखालस अपूर्व व नव्या वसाहतकालीन प्रभावांनुसार नव्या प्रकारच्या सातत्यवाटा व बदलाच्या दिशा शोधण्याची, पत्करण्याची गरज होती. व्यक्ती, समाज यांना या नव्या आव्हानांनुसार सांस्कृतिक सातत्याच्या नव्या कल्पना, संकल्पना, विचार व कार्यक्षेत्रे धुंडाळण्याची आवश्यकता होती. त्याचप्रमाणे परिवर्तनाच्या नव्या दिशांची मूल्यात्मक अधिष्ठाने स्पष्ट वा उघड करण्याचीही निकड होती. साने गुरुजींचे जीवन व कार्य या दोन्ही प्रकारच्या ऐतिहासिक आव्हानांना जाणणारे व सामोरे जाणारे होते. सातत्य व बदल यांच्या कालोचित संहिता गुरुजींनी आपल्या आचारविचारांतून, लेखनातून, कार्यातून साकार केल्या. एकप्रकारे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सर्वंकष भारतीय प्रबोधनाच्या सत्त्वधारांनी साने गुरुजींना घडविले व दुसऱ्या प्रकारे गुरुजींनी त्या सत्त्वधारांना स्वत:चे नामरूपही दिले, असे म्हणता येईल.

इतिहासपुरुषाच्या कठीण व कठोर मागण्या भागविण्यासाठी गुरुजींजवळ काय होते? खरे तर, स्वत:चे असे अस्तित्वच त्यासाठी त्यांच्या ठायी होते. एक भावनाशील, कविहृदय त्यांच्याजवळ होते, अहोरात्र स्वत:शी अंत:कलह करणारी एक तुकारामीय आध्यात्मिक आच होती, प्रेमाच्या धर्माचे तत्त्वज्ञान होते, त्यागाचे व अपरिग्रहाचे व्रत होते, समाजासाठी, देशासाठी सर्वस्व झोकून देण्याची ध्येयवादी समर्पणबुद्धी होती, विलक्षण निर्भयता होती आणि मुख्य म्हणजे भावनेने ओथंबलेली, भावनांच्या शाईतून अखंडपणे लेखन करणारी लेखणी एका हातात होती; तर दुसऱ्या हातात अवतीभवतीची जळमटे, घाण निपटून काढणारी झाडूही होती. ही सर्व जन्मजात व अभ्याससाधित दैवी गुणवत्ता त्यांनी सांस्कृतिक सातत्याच्या व परिवर्तनाच्या नव्या महाकथनासाठी (Discourse) पणास लावली.

साने गुरुजींना नवी इतिहाससुसंगत मूल्यप्रणाली निर्माण करण्याची खरे तर गरजच पडली नाही. टिळकवादातून, गांधीवादातून, मार्क्सवादातून, समाजवादातून आणि टॉलस्टॉय-प्रणीत साहित्यशास्त्रातून त्यांना मूल्यकल्पना वेचता आल्या. रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर यांच्याही सारसबागेतून त्यांनी विचारतत्त्वांची फुले गोळा केली. इतिहासाचार्य राजवाडे, ईश्वरचंद्र विद्यासागर, शिवछत्रपती, गौतम बुद्ध, श्रीकृष्ण, विनोबा, महंमद पैगंबर, भगिनी निवेदिता, यांसारखी किती नावे सांगायची? गुरुजींचे रूपांतरित साहित्य त्यांच्या या वैश्विक विचारसंचयाची ओळख करून देते. आधुनिकांच्या बहुतेक सर्व मूल्यवान वैचारिक व वाङ्मयीन संहिता आत्मसात करून त्यांच्याच आधारे गुरुजींनी ऐतिहासिक नियतीने नेमून दिलेले सातत्य-बदलाचे आपले संभाषित सिद्ध केले, आपले तत्त्वज्ञान रचले.

१२ जून २०१०
वर्ष ६२ / अंक ४४

● संपादक :
नरेंद्र दाभोलकर

● कार्यकारी संपादक :
विनोद शिरसाठ

हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी ब्ल्यू बर्ड (इंडिया) लिमिटेड, पुणे ४ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, बॅ.गाडगीळ रस्ता, पुणे ४११०३०.** येथे प्रकाशित केले.

दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, (०२०) २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स : २४४५१७२४
E-mail : weeklysadhana@gmail.com web : www.weeklysadhana.com

वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/- साधना मीडिया सेंटर :- (०२०) २४४५९६३५

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

मुखपृष्ठ : गिरीश सहस्रबुद्धे : Mob. 9850150488

● सहयोगी संपादक मंडळ : **अभय टिळक** (अर्थकारण), **राजा शिरगुप्पे** (सामाजिक), **अवधूत परळकर** (सांस्कृतिक), **संजय भास्कर जोशी** (साहित्य)

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मराठी, संस्कृत, इंग्रजी इत्यादी भाषांतून उपलब्ध असलेले विचारधन परिशीलनपूर्वक आत्मसात करणे ही गोष्ट आपण समजतो तेवढी सोपी नक्कीच नाही. विशेषत: गुरुजींच्या फाटक्या जिण्यात, चळवळींच्या व कारावासाच्या धबडग्यात, प्रायश्चित्ताच्या आणि उपोषणांच्या चक्रनेमिक्रमात हे वैश्विक विचारधन मिळवणे, वाचणे, समजून घेणे, त्याचे लगेच मराठीत रूपांतर करणे हा एक प्रचंड प्रयास होता, अडथळ्यांची शर्यत होती. नुसता व्यासंग करणे शक्य असते, पण केलेल्या वाचनाचे-व्यासंगाचे इतरांसाठी, समाजासाठी कर्तव्यबुद्धीने मराठीकरण करणे ही गोष्ट म्हणजे व्रतांचे व्रत म्हटली पाहिजे. गुरुजींच्या या अनुवादनिर्मितीची आजची प्रस्तुतता काय हा प्रश्न महत्त्वाचा नाही. महत्त्वाचे हे आहे की, आपल्या कालावकाशाच्या ज्या ऐतिहासिक मागण्या होत्या, सातत्य व बदल यांच्या नव्या कालोचित आधारतत्त्वांना शोधणे व व्यक्त करणे ही जी त्या कालखंडाची साद होती, तिला साने गुरुजींनी सक्रिय विधायक प्रतिसाद दिला. सर्वस्व झोकून प्रतिसाद दिला. इतिहासपुरुषाच्या सादेला प्रतिसाद देण्याचा जो आदर्श गुरुजींनी निर्माण केला, त्याला आज, उद्या, परवा कायम प्रस्तुतता आहे, सार्वकालीन प्रस्तुतता आहे हे महत्त्वाचे होय.

भारतीय संस्कृतीच्या सातत्यमूल्यांचा शोध साने गुरुजींनी 'भारतीय-संस्कृती' या पुस्तकातून घेतला. आज या त्यांच्या संस्कृतिविचारासंबंधी मतभेद होऊ शकतील. याचे कारण संस्कृतिविचारांची प्रमाणके आज बदलली आहेत. गुरुजींच्या भारतीय संस्कृतिविवेकावर अभिजनदृष्टीचे सावट आहे, असेही कोणी म्हणू शकेल. पण याला महत्त्व नाही. साने गुरुजींना भारतीय संस्कृतीसंबंधी काहीएक शाश्वत सिद्धांतन करावयाचे नव्हते. त्यांना भारतीय संस्कृतीसंबंधी स्वकालीन कालपुरुषाशी संवाद करायचा होता. आपल्या संस्कृतीच्या सातत्याचे आधारभूत आयाम कोणते संभवतात आणि का, या प्रश्नाचा उलगडा करावयाचा होता. गुरुजींचा भारतीय संस्कृतिविवेक हा या संस्कृतीला प्रदीर्घ काळ टिकवून ठेवणाऱ्या व यापुढेही प्रदीर्घ काळ टिकवू शकणाऱ्या आधारतत्त्वांचा शोध व बोध होता, एक प्रकारची Discovery of Indian Culture होती. या ग्रंथरूपाने साने गुरुजींनी सातत्याच्या संदर्भातील आपले एक ऐतिहासिक कर्तव्य पार पाडण्याचा प्रयत्न केला, असेच म्हटले पाहिजे.

आधुनिक भारताच्या जडणघडणीतील परिवर्तनवादी मूल्याधार शोधण्याचेही इतिहासदत्त कार्य गुरुजींनी पार पाडले. या संदर्भात आयुष्याच्या अंतिम पर्वात त्यांनी पंढरपूरचे विठ्ठलमंदिर हरिजनांना खुले करण्यासाठी जे प्राणांतिक उपोषण केले आणि तेही म.गांधींच्या सूचनेला झिडकारून, ते उल्लेखनीय आहेच. गुरुजींनी आपल्या जीवनाच्या खानदेशपर्वात कामगार-शेतकऱ्यांची आंदोलने घडवून आणली, छोडो भारत चळवळीत गुप्तपणे कार्य केले हेही महत्त्वाचे.

तथापि गुरुजींचे परिवर्तनवादी मूल्यशोधन ठळकपणे त्यांच्या विपुल वाङ्मयनिर्मितीमधून साकार झाले. गुरुजींची प्रत्येक साहित्यकृती म्हणजे आधुनिक परिवर्तनवादी मूल्याचा आविष्कार आहे. त्यांची प्रत्येक स्वतंत्र व रूपांतरित साहित्यकृती एक नवा माणूस, नवे मानवीसंबंध, नवे मानवतावादी ध्येय प्रक्षेपित करणारी आहे. 'श्यामची आई' परिवर्तनवादी माणसासाठी एक अपरिवर्तनीय अशी निर्मिती होय आणि खरे तर, सांस्कृतिक सातत्याच्याही आधुनिक संदेशाची साद आहे.

गुरुजींच्या परिवर्तनशील प्रतिसादाचे माध्यम मुख्यत: साहित्य होते, भाषणे होती व साप्ताहिक साधना हेही होते. त्याला दोन बाजू होत्या : एक म्हणजे तत्कालीन रूढ, लोकप्रिय वाङ्मयीन परंपरा व कल्पना यांना गुरुजींनी सरळ नकार दिला आणि बोधवाङ्मयाचा, जीवनासाठी वाङ्मयाचा एक खळाळता प्रवाह निर्माण केला. साहित्य घडते ते घडविण्याच्या मूल्याने हीच त्यांची धारणा होती. तत्कालीन समाजाने गुरुजी-वाङ्मय स्वीकारले, ते केवळ त्यामागील जातिवंत कळवळ्यामुळेच नव्हे, तर त्यातून एक सर्वांगीण, सर्वस्पर्शी भावसंस्कृती तरलपणे अस्तित्वात होती म्हणून! साने गुरुजी वाङ्मयाच्या माध्यमातून एक चिरनूतन भावसंस्कृती निर्माण करते झाले. ही भावसंस्कृतीच खरे तर मनुष्यसमाजातील हरएक परिवर्तनवादी अजेंड्याची प्राणभूत घटक होय. अखेर माणूस भावसंस्कृतीत जगत असतो, हे खरेच आहे.

गुरुजींच्या भावसंस्कृतिप्रधान परिवर्तनवादाला मोठी मूल्यात्मक प्रतिष्ठा प्राप्त झाली, ती त्यांच्या प्राणार्पणाच्या निर्णयाने व कृतीने! गुरुजीप्रणीत भावमूल्यात एका व्यापक मानवतावादी अपराधी जाणिवेचा - guilty conscience चा - मौलिक घटक होता. त्यांच्या विचारात व वाङ्मयातच केवळ नव्हे, तर आचारातही तो होता. म्हणूनच आपल्या परंपरेने हरिजनांचा केलेला गुन्हा, अपराध मान्य करून त्याचे प्रायश्चित्त घेण्यासाठी त्यांनी पंढरपूरसाठी प्राणांतिक उपोषण केले. ही अपराधी भावना या भल्या माणसाने दीर्घ काळपर्यंत मनोमन वागवली, सहन केली.

गुरुजींच्या प्राणार्पणाच्या निर्णयामागे असेच एक दुखरे अपराधी मानस होते, असावे असे वाटते. ते म्हणजे म.गांधींच्या हत्येचा महापराध. ही अपराधी भावना केवळ एकवीस दिवसांच्या उपोषणाने शमली नाही. ती त्यांच्या देहमनाला पुढील सुमारे अठ्ठावीस महिने पोखरत राहिली. भावसंस्कृती, भावमूल्य आणि त्यांतील मानवतावादी अपराधी जाणीव यांची अपूर्व, धक्कादायक व शोकात्म परिणती म्हणजे गुरुजींचे प्राणार्पण!

गुरुजींच्या या उदात्त, कृतिप्रवण भावमूल्याला, भावसंस्कृतीला चिरंतन प्रस्तुतता आहे. डॉस्टोव्हस्कीने म्हटले आहे, "We all are guilty for all of us." गुरुजींच्या भावसंस्कृतीचा संदेशही हाच आहे. त्याला जरामरण कसले? गुरुजी खरे तर कवी होते. सेंट जॉन पर्स या कवीने म्हटले आहे, "It is enough for the poet to be the guilty conscience of his time."

जॉन पर्स हा नोबेल पारितोषिक-विजेता कवी होता. सच्च्या कवीने आपल्या काळाचे अपराधी मन जपावे, व्यक्त करावे, जिवंत राखावे, असे तो म्हणतो - साने गुरुजींनी मृत्यूच्या मार्गे आपल्या काळाचे अपराधी मन जगविले, जागविले असे म्हणता येईल.

आजउद्याच्या कालपुरुषाला अशा गुरुजीकडून अधिक काय हवे?

- रा. ग. जाधव

Mob. 9404227215

प्रभाकर पाध्ये

साने गुरुजींचे वाङ्मय

ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर पाध्ये यांचे 'तीन तपस्वी' हे पुस्तक १९४६ मध्ये प्रकाशित झाले, त्या पुस्तकात पाध्ये यांनी गोपाळ गणेश आगरकर, वामन मल्हार जोशी आणि साने गुरुजी या तिघांच्या व्यक्तित्वांचा व विचारांचा वेध घेतला आहे. गेल्या वर्षी पाध्ये यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने 'अगस्तीचे अंगण' हा गौरवग्रंथ (संपादक – विलास खोले व रेखा इनामदार-साने) प्रकाशित झाला आहे. 'तीन तपस्वी'मधील साने गुरुजींवरील दोन लेख (पुनरुक्ती टाळून) एकत्रित स्वरूपात, 'अगस्तीचे अंगण'मध्ये समाविष्ट केले आहेत. अगस्तीचे अंगणमधील तो लेख पुन:प्रकाशित करीत आहोत.

कोकणात माझे एक वृद्ध चुलते आहेत. पाऊणशे वर्षांच्या आयुष्यात एकाच ललित कृतीशी त्यांचा संबंध आला. ती म्हणजे साने गुरुजींची 'श्यामची आई!' मध्य हिंदुस्थानात एका सब-जज्जांच्या घरी मला एकच मराठी पुस्तक आढळले. त्याचे नाव 'श्यामची आई!' 'श्यामच्या आई'च्या आजवर नऊ-दहा आवृत्त्या निघाल्या आहेत.

या पुस्तकाच्या या अलौकिक लोकप्रियतेचे रहस्य काय आहे? लोकांना – सर्व प्रकारच्या, सर्व प्रकृतींच्या, सर्व प्रांतांच्या लोकांना – ही कृती इतकी हृदयंगम का वाटते? या आईच्या आठवणींत कोकणच्या संस्कृतीचे करुणरम्य चित्रण आहे; पण कोकणचे किंचित्‌दर्शनही झालेले नाही अशा लोकांवर या पुस्तकाची इतकी मोहिनी का? निव्वळ कलात्मकदृष्ट्या या पुस्तकात अनेक दोष आहेत आणि तरीही अनेक चोखंदळ टीकाकार ते आर्त अंत:करणाने वाचताना का आढळतात?

मला वाटते, याचे उत्तर एवढेच, की या पुस्तकात कलात्मक विश्वात्मकता असो वा नसो, त्यात एक अनपेक्षित भारतीयता आहे. गेल्या काही वर्षांत कोकणच्या मध्ययुगीन जीवनाचा जो ऱ्हास झाला; आधुनिक जीवनाच्या घणाखाली कोकणचे परंपरागत जीर्ण जीवन जे कोलमडू लागले त्याच्या या पुस्तकात आढळणाऱ्या भावनार्त चित्रणात वाचकाला आधुनिक हिंदुस्थानच्या सामाजिक ऱ्हासाचे थोडेसे दर्शन होते- आणि त्याचबरोबर हिंदुस्थानच्या आत्मिक सामर्थ्याचीही प्रतीती येते. श्यामच्या आईच्या भोवतालचे सारे वातावरण वादळले होते. आजूबाजूला इमारती कोसळत होत्या, जीवन उद्‌ध्वस्त होत होते; पण त्या साऱ्या विध्वंसनात ती माऊली आपल्या आत्मबलाच्या, अचल जीवनमूल्यांच्या, प्रेममय व्यक्तित्वाच्या जोरावर खंबीरपणे उभी होती. साम्राज्यशाहीच्या विदारक शोषणाने हिंदुस्थानच्या उज्ज्वल जीवनाचा ऱ्हास झाला, पण हिंदुस्थानचा चारित्र्यशील आत्मा नष्ट झाला नाही, भारतीय संस्कृतीची थोर मूल्ये नाहीशी झाली नाहीत. 'श्यामच्या आई'त याचा प्रतीकात्मक प्रत्यय येत नसेल काय?

श्यामच्या आईला खुद्द गुरुजींच्या जीवनात काय स्थान आहे, ते त्यांनी स्वत:च सांगितले आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत गुरुजी लिहितात, 'अनंत निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर लहानसा चंद्र मिरवतो, त्याप्रमाणे श्यामच्या कथांच्या पार्श्वभूमीवर मातृप्रेमाचा चंद्र मिरवत आहे.' या मातृप्रेमाने गुरुजींचे सारे जीवन रंगून निघाले आहे. सुगंधित झाले आहे. गुरुजींचे जीवन हा मातृप्रेमाचा (मातेचा आणि मातेबद्दलच्या प्रेमाचा) सुसंस्कृत आविष्कार आहे. श्यामच्या मुखाने गुरुजी म्हणतात, 'गड्यांनो, माझ्यात जे काही चांगले आहे ते माझ्या आईचे आहे. आई माझा गुरू, माझा कल्पतरू. तिने मला काय काय दिले! तिने मला काय दिले नाही? सारे काही दिले. प्रेमळपणाने बघावयास, प्रेमळपणे बोलावयास तिनेच मला शिकविले. मनुष्यांवरच नव्हे, तर गायीगुरांवर, फुलापाखरांवर, झाडामाडांवर, प्रेम करावयास तिनेच मला शिकविले. अत्यंत कष्ट होत असताही तोंडातून ब्र न काढता शक्य तो आपले काम उत्कृष्टपणे करीत राहणे हे मला तिनेच शिकविले. कोंड्याचा मांडा करून कसा खावा व दारिद्र्यातही सत्त्व न गमावता कसे राहावे हे तिनेच मला शिकवले. आईनेच माझ्या जीवनात अत्तर ओतले.''

भारतीयांच्या जीवनात मातेने जे अत्तर ओतलेले आहे याची जाणीव या पुस्तकाच्या वाचनाने तर होतेच; पण भारतीय संस्कृतीच्या अत्तराचा सुवासही त्याने दरवळू लागतो आणि वाचकाला एक नवी व्यापक दृष्टी प्राप्त होते. खुद्द गुरुजींना ही दिव्य दृष्टी किती उत्कटतेने लाभली असेल, याची सहज कल्पना येईल. आपली आई गेल्यावर गुरुजींनी आपले मातृप्रेम व्यापक केले आणि भारतमातेमध्ये आपल्या आईचे प्रेमळ, कर्तव्यतत्पर रूप ते पाहू लागले. मानवाचे प्राचीन पूर्वज हे मोठे कवी होते हे ओळखायला वेदांचे वाचन केले पाहिजे असे नाही. जन्मभूमीला मातृभूमी म्हणण्याचा संकेत ज्यांनी निर्माण केला ते नि:संशय कवी होते; मोठे उदात्त प्रकृतीचे कवी होते. गुरुजींनी आपल्या मातृभक्तीचा ओघ भारतमातेकडे वळविला. लहानपणी आईकडून ते प्रेमळपणा, त्याग, सेवाबुद्धी, वीरवृत्ती इत्यादी जे अमोल सद्‌गुण शिकले, त्यांचा आविष्कार आता एका विशाल मातृभक्तीत होऊ लागला. मातृभक्त साने अव्वल दर्जाचे राष्ट्रभक्त बनले.

मातेकडून घेतलेले सारे संस्कार सान्यांच्या राष्ट्रभक्तीत दिसतात. प्रेमळपणा आणि सत्त्वशीलता हे त्यांच्या जीवनपुष्पाचे रंग आणि सुगंध आहेत. ज्या उत्कट निरपेक्ष प्रेमाने त्यांच्या मातेने मथुरेसारख्या मोलकरणीचा परामर्श घेतला, त्याच उत्कट निरपेक्ष प्रेमाने ते हिंदुस्थानातल्या सर्व दलित वर्गांशी वर्तन ठेवीत असतात. मोऱ्या गाईवर त्यांच्या मातेची जी भक्ती होती तिचाच आविष्कार सान्यांच्या प्रेममय अहिंसावादात झालेला आहे. सावित्रीचे कठोर व्रत सान्यांच्या आईने जसे स्वत:च्या सौभाग्यासाठी आचरिले, तसेच त्यागाचे व्रत भारतमातेच्या सौभाग्यासाठी साने आचरीत आहेत. जे कष्ट त्या माऊलीने सत्त्वशीलतेने सोसले, तसेच कष्ट, तशीच आत्मकठोरता, तसाच आत्मत्याग साने गुरुजी भारतमातेच्या उद्धारासाठी करीत आहेत.

प्रेमळपणा हा साने गुरुजींच्या रक्तातच उतरला आहे. ते अतिशय भावनाशील पुरुष आहेत. त्यांच्या भावनाशीलतेचा अनुभव त्यांच्या वाङ्‌मयात वा वक्तृत्वात विशेषत: वक्तृत्वात अविरतपणे येत असतो. ते बोलू लागले म्हणजे क्षणार्धात भावनावेगात शिरतात आणि त्यांचा शांत, सौम्य, निरागस चेहरा एकदम बदलून जातो. ज्या चेहऱ्यावर क्षणापूर्वी निर्विकार शांती होती, तिथे एकाएकी भावनांचा प्रक्षुब्ध वन्ही पेटलेला दिसतो. ज्या नेत्रांत पारिजातकाच्या फुलांची प्रसन्नता होती, तेथे अग्निफुलांची दीप्ती दिसू लागते. आणि ज्या आवाजात निर्झराचे निर्मळ माधुर्य होते, तेथे तुफान सागराचे तांडव भासमान होते.

पण हे क्षणभरच. कारण क्षमाशील प्रेमळपणा हा सान्यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे; आणि म्हणूनच त्यांच्या वाङ्‌मयात, वक्तृत्वात आणि व्यवहारात प्रेमरसाचा वर्षाव होत असतो. भावनेच्या भरात ते एखाद्यावर तुटून पडतात; पण लगेच त्यांचा प्रेमात्मा जागृत होतो आणि 'माझा कोणावर टीका करण्याचा उद्देश नाही हो, टीका झाली असेल तर क्षमा करा' असे उद्‌गार ते अनुतापाच्या स्वरात काढतात. त्यांच्या वाङ्‌मयात अगर वक्तृत्वात शांत, सौम्य, प्रसन्न प्रेमळपणालाच आद्य स्थान असते. क्षमाशील, सात्त्विक, अनाग्रही वृत्तीचाच प्रत्यय अधिक येतो. आणि येथेच विशेषत: (त्यांचे वक्तृत्व ऐकत असताना) कै.वामनराव जोशांची एकसारखी आठवण येत असते. 'टु अंडरस्टँड ऑल इज टु फरगिव्ह ऑल' हे वामनरावांच्या जीवनाचे सूत्र होते. सान्यांचेही तसेच आहे. फरक असला तर एवढा की, 'टु अंडरस्टँड ऑल' हा वामनरावांचा आद्य प्रयत्न असे व त्यातून त्यांची क्षमाशीलता निर्माण होत असे, तर क्षमाशीलता ही सान्यांची प्रकृती असल्याने सर्व जाणून घेण्याकडे (विरोधकांच्या अडचणींची दखल घेण्याकडे) त्यांची वृत्ती धावते.

वामनराव जोशींप्रमाणेच साने गुरुजी हे सत्त्वशीलतेची मूर्ती आहेत. सार्वजनिक जीवनात शुचिता आणि सत्त्वशीलता यांची निष्ठा राखण्याची आगरकरांची परंपरा वामनरावांनी चालविली आणि वामनरावांची परंपरा आता साने गुरुजी चालवीत आहेत. या सत्त्वशील वृत्तीमुळेच साने गुरुजी क्वचित कठोर होऊ शकत असतील. आपल्या मुलांना वळण लागावे म्हणून त्यांची आई क्षणभर कठोर होत असे. त्याचीच ही आवृत्ती! ती कठोरता नव्हती, तर कर्तव्यपरायणता होती. कठोरता असलीच तर अखेरीस ती आत्मगतच होती. तिचा त्रास इतरांपेक्षा त्या माऊलीलाच अधिक झाला. या आत्मगत कठोरतेतच आत्मत्यागाचा जन्म झाला होता. या आत्मत्यागाच्या अग्निदिव्यास साने गुरुजी सदैव तयार असतात. या बाबतीत ते सेनापती बापटांचे सच्छिष्य शोभतात. त्यांच्या जीवनात असल्या कठोर आत्मत्यागाचे प्रसंग अनेकदा आले (किंवा त्यांनी ते ओढवून घेतले). त्यांचा आत्मत्याग म्हणजे आत्मार्पण, स्वत:चे प्राण पणाला लावण्याचा निर्धार. अमळनेरला एकदा टोलटॅक्स दूर करविण्यासाठी, व एकदा प्रताप मिलच्या मालकांनी 'लॉकअप' उठवावा म्हणून सान्यांनी प्राणार्पणाची घोषणा केली. पुढे एकदा काँग्रेसचे सभासद दोन लाख व्हावे म्हणून त्यांनी २१ दिवसांचा उपवास केला. १९४४ साली नाशिकच्या बंदीगृहात त्यांनी कम्युनिस्टांविरुद्ध अन्नसत्याग्रह केला. पण या सर्व प्रसंगांबद्दल एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, की ते प्रसंग म्हणजे त्यांच्या अखंड त्यागी जीवनाचे नुसते उद्रेक होत. क्रांती ही जशी उत्क्रांतीची एक उत्कट अवस्था असते, तसे सान्यांचे प्राणार्पण निश्चयाचे आहे. हे त्यांचे जीवन हा एक अखंड पेटलेला त्यागयज्ञच आहे, एक अखंड होम आहे. या यज्ञात, या होमात मनुष्याचे जीवन कणाकणांनी पेटून विशुद्ध होत जाते अशी त्यांची क्रियाशील श्रद्धा आहे. भारतीय पुराणांत अग्निदिव्याच्या अनेक कथा आढळतात. ती केवळ प्रतीके होत. पण गुरुजींसारख्यांच्या त्यागमय, अग्निमय जीवनानेच त्यांना अर्थ प्राप्त झाला आहे. गुरुजींना या अखंड अग्निदिव्याची स्फूर्ती त्यांच्या आईकडून मिळाली. या त्यागाग्नीच्या ज्वालांनी त्यांचे विद्यार्थिदशेतले जीवनही उजळलेले होते, हे 'श्याम' या पुस्तकावरूनही ध्यानात येते. विद्यार्थिदशेनंतरच्या अध्यापन-कालातही गुरुजी या त्यागमय जीवनानेच विशुद्ध होत होते, सत्त्वशील बनत होते. साने गुरुजी क्रांतिवादी आहेत. पण बाह्य जीवनातल्या क्रांतीअगोदर आंतरजीवनात क्रांती झाली पाहिजे अशी महात्मा

गांधींप्रमाणेच त्यांचीही निष्ठा आहे. महात्मा गांधी हे आजच्या युगातले एक महान क्रांतिकारक आहेत. पण आजच्या जगाचा हा महापुरुष आयुष्याच्या सुरुवातीस एक अगदी सामान्य माणूस होता. गांधीजींच्या विद्यार्थिदशेची कथा वाचताना जर कोणती गोष्ट प्रत्ययास येत असेल तर ती ही की, गांधीजी हे बहुतेक सर्व बाबतींत इतर समवयस्क मुलांपेक्षा कमी होते, पण त्यांची इच्छाशक्ती जबर होती. या इच्छाशक्तीस त्यांच्या मातेने सत्प्रवृत्त केले आणि या जोरावर गांधीजींनी आपल्या जीवनात विराट क्रांती केली. एका काळची अतिसामान्य व्यक्ती आज असामान्य झाली आणि दिवसेंदिवस हे माहात्म्य वाढत आहे, त्यांचे अंत:तेज विकास पावत आहे. साने गुरुजींचे अगदी असेच आहे.

साने गुरुजींनी स्वत:च्या जीवनात क्रांती केली, सत्त्वशीलता ओतली आणि नंतरच ते राष्ट्रीय अग्निदिव्यात शिरले. १९३१-३२ च्या कारावासात, नाशिकच्या बंदीगृहात, रोच नावाच्या जेलरने त्यांचे सत्त्वहरण करण्याचे अनेक प्रयत्न केले; पण त्यात त्याच्याच अध:पाताची अंतिम दशा झाली. साने गुरुजींच्या सत्त्वशीलतेच्या तेजाने नोकरशाहीच्या नेत्रास अंधत्व आले; एवढेच नव्हे तर कित्येक काँग्रेसभक्तांनाही ते तेज सहन होईनासे झाले. ज्यांची काँग्रेसभक्ती विशुद्ध देशप्रेमातून निर्माण न होता सत्ताभिलाषेतून निर्माण झाली होती अशा काही काँग्रेसश्रेष्ठींना (अधिकारग्रहणाच्या कालात) साने गुरुजींच्या तेजाचा उपद्रव वाटू लागला आणि आजसुद्धा ऑगस्ट-आंदोलनाचा उज्ज्वल आणि उदात्त पुरस्कार करणाऱ्या साने गुरुजींची काही काँग्रेस नेत्यांना अडचण वाटू लागली आहे; पण गुरुजींचा त्याला इलाज नाही. त्यांची काँग्रेसभक्ती सत्ताबाज राजकारणातून स्फुरलेली नाही. सत्ताभिलाषेने दूषित झालेल्या वातावरणात आपला जीव गुदमरतो असे ते स्वत:च म्हणतात. विशुद्ध, त्यागी, सत्त्वशील देशप्रेमातून त्यांची काँग्रेसभक्ती स्फुरलेली आहे. भारतमातेच्या उद्धारासाठी त्यांनी आपल्या जीवनाचे हवन आरंभिले आहे. या जीवनयज्ञातल्या अग्नीच्या स्फुल्लिंगांनी सत्ताबाज पुढाऱ्यांना चटके बसले, तर त्याला कोण काय करणार?

साने गुरुजींचे क्रांतिवादी जीवन त्यांच्या आंतरजीवनाशी सुसंगत असल्याने, त्यांच्या क्रांतिवादाची उभारणी त्यांच्या अंत:क्रांतीवर झालेली असल्याने, सत्तालोभासारख्या असंगत प्रेरणेने त्यांचा क्रांतिवाद स्फुरलेला नसल्याने, त्यांचे विचार आणि उच्चार यांत विसंगती नसते. किंबहुना मि.लुई फिशर यांनी गांधीजींच्या 'मोठ्याने विचार करण्या'बद्दल जे लिहून ठेवले आहे ते गुरुजींनाही लागू पडते. फिशर म्हणतात, 'पार्ट ऑफ द प्लेजर ऑफ इन्टिमेट इंटलेक्चुअल कॉन्टॅक्ट विथ गांधी इज दॅट, ही रिअली ओपन्स हिज माइंड अँड अलौज् द इन्टरव्हुअर्स टू सी हाउ द मशिन इनसाइड वर्कस् - ॲक्चुअली ही थिंकस अलाउड अँड द एन्टायर प्रोसेस इज फॉर द रेकॉर्ड.' साने गुरुजींच्या जाहीर व्याख्यानातसुद्धा हा अनुभव येतो. तोंडून अविरत वाग्धारा स्रवत असताना आतले विचारांचे यंत्र कसे चालले आहे, याचेच जणू आपल्याला दर्शन होत असते. अंतिम प्रामाणिकपणाचा हा परिणाम आहे.



'श्यामची आई' हे पुस्तक ज्याप्रमाणे गुरुजींनी अंत:करणात साठवलेल्या 'आईच्या बोलां'चा आविष्कार आहे, त्याप्रमाणे त्यांचे सारे वाङ्मय हे भारतमातेच्या सांस्कृतिक बोलांचा आविष्कार आहे. भारतीय संस्कृती आणि भारतीय वाङ्मय यांच्यावर साने गुरुजी यांची अपार निष्ठा आहे. गुरुजी जरी एम.ए. झाले असले आणि पाश्चात्त्य वाङ्मयाचे रससेवन जरी त्यांनी यथेच्छ केले असले तरी त्यांच्या वाङ्मयाचा वृक्ष भारतीय वाङ्मयाच्या जीवनरसावरच पोसलेला आणि प्रफुल्लित झालेला आढळेल. गुरुजींची संस्कृत वाङ्मयावरची भक्ती आणि त्या वाङ्मयाचा अभ्यास आश्चर्यकारक आहे. संस्कृत वाङ्मयाचे खरे कलात्मक रससेवन त्यांनी केले आहे. त्यांची वाणी आणि लेखणी प्राचीन साहित्याच्या सत्त्वाने आणि सौंदर्याने सिद्ध झालेली आहे. त्यांच्या वाङ्मयाचा विषय आणि रस संस्कृत साहित्याच्या अभिजात संदेशाने स्फुरलेला आहे असे म्हटले असता चालेल. म्हणूनच फार मोठी ललितप्रज्ञा नसूनही साने गुरुजींचे

वाङ्मय रसरंग झालेले आहे. सान्यांचे स्वतंत्र वाङ्मय (उदा. पुनर्जन्म, क्रांती वगैरे) त्यांच्या प्राचीन साहित्य अगर पौराणिक दंतकथा यांनी स्फुरलेल्या वाङ्मयाइतके (उदा. त्रिवेणी, आस्तिक, गोड गोष्टी) गुणसंपन्न वाटत नाही, याचे कारण हेच असावे. मराठी लेखनात संस्कृत (विशेषत: वैदिक व पौराणिक) वाङ्मयाचे सत्त्व ओतणारे साने गुरुजी हे आजचे एकमेव मराठी लेखक आहेत.

साने गुरुजी यांचे हे कार्य फार थोर आहे. आपल्या प्राचीन वाङ्मयाचे वैभव हिंदी विद्यार्थिवर्ग विसरत चालला आहे. हरिवंश, पांडवप्रताप, रामायण कथा, स्त्रीगीते, दंतकथा इत्यादी गोष्टींनी पूर्वीच्या विद्यार्थ्यांची अगदी बालवयातच प्राचीन साहित्याशी, दुरून का होईना, पण ओळख होत असे. परंतु अलीकडे (संस्कृतचे मूठभर प्रौढ विद्यार्थी सोडल्यास) विद्यार्थ्यांना प्राचीन वाङ्मयाची काही कल्पनाही असत नाही. प्राचीन वाङ्मयाबद्दलचा धार्मिक अभिनिवेश अर्थातच सोडा; पण त्या वाङ्मयात जे अपार काव्य भरून राहिले आहे ते विसरण्याचा भारतीयांना काय अधिकार आहे? पण पाश्चात्त्य विद्येच्या विपरीत उत्साहामुळे आमचा विद्यार्थिवर्ग (आणि वाचक-लेखकवर्ग) या काव्याला पारखा होत आहे. प्राचीन साहित्याबद्दलची ही अनास्था दूर करण्याचे कार्य साने गुरुजी आणि कालेलकर हे दोन लेखक करीत आहेत. अर्थात् साने आणि कालेलकर यांच्या प्रकृतीत फरक आहे. कालेलकर हे जातिवंत कवी आहेत. प्राचीन साहित्य आणि संस्कृती यांच्यात जे काव्य आहे त्यामुळे त्यांचे कविहृदय आकर्षित झाले असे वाटते. साने गुरुजीही हाडाचे कवी आहेत, पण काव्यापेक्षा प्राचीन साहित्य आणि संस्कृती यांतील सद्गुणांच्या आणि सद्भावांच्या सुवासानेच त्यांचे चित्त अधिक वेधून घेतले आहे. प्राचीन साहित्य आणि संस्कृती यांच्याइतकेच त्यांच्या भौगोलिक अधिष्ठानांबद्दल कालेलकरांना आकर्षण वाटते. प्राचीन भारतीयांनी हिंदुस्थानातल्या सर्व निसर्गसुंदर स्थानांभोवताली वाङ्मय आणि दंतकथा यांचे वलय निर्माण करून ठेवले आहे. कविप्रकृती कालेलकरांना हे वाङ्मय व या दंतकथा यांच्याइतकेच त्या स्थानांचेही आकर्षण वाटते. कालेलकरांचे निसर्गवेड असाधारण आहे. साने गुरुजींना निसर्गाचे वेड नसेल असे नाही. पण निसर्ग ही आपली माता आहे; मातेची थोरवी जाणायची असते, तिच्या सौंदर्याने वेडावून जायचे नसते. साने-कालेलकरांच्या दृष्टीतल्या या सूक्ष्म फरकामुळे त्यांच्या संस्कृतनिष्ठ वाङ्मयातही फरक पडला आहे. हा फरक जाणून घेण्यासाठी नर्मदेच्या सहस्रधारांची कथा घेऊ या. नर्मदेला स्वत:च्या सामर्थ्याचा गर्व झाला तेव्हा सहस्रार्जुनाने तिला आपले सहस्र बाहू पसरून अडवण्याचा प्रयत्न केला, त्या वेळी क्रुद्ध झालेली ती सामर्थ्यशाली शिवपुत्री नर्मदा त्याचे बाहू फोडून सहस्रधारांनी वाहू लागली. कालेलकरांना या कथेतल्या भव्य रूपाइतकेच महेश्वरजवळच्या सहस्रधारांचे आकर्षण वाटेल. साने गुरुजी बहुधा त्या शिवपुत्रीच्या सामर्थ्याचेच स्तवन करतील. यमुनेच्या पाण्यात गोपाळांनी हात धुतल्यावर जे शितकण पाण्यात पडत, ते खावयास स्वर्गातील देव (माशांच्या रूपाने) येत (श्यामची आई, पृ.५५) या हरिविजयातल्या कथेतील गोपाळांचे स्वातंत्र्यप्रेम गुरुजींना मोहिनी घालते; पण काकासाहेब कालेलकर त्या कथेतल्या काव्यमय कल्पनेवर खूष होऊन जातील. एकदा विश्वामित्र वसिष्ठांची कामधेनू बळजबरीने नेऊ लागले तेव्हा त्या कामधेनूने स्वत:च्या अंगच्या शक्तीतून हूण, यवन, बर्बर, म्लेंच्छ इत्यादींचे सैन्य निर्माण केले. या महाभारतातल्या कथेत साने गुरुजींना हिंदुस्थानच्या भावी विशाल राष्ट्रीयत्वाचा संदेश आढळतो, पण कालेलकर कामधेनूच्या ठिकाणी विराट शक्ती कल्पिणाऱ्या व्यासांच्या प्रतिभेनेच मोहून जातील असे वाटते. प्राचीन वाङ्मयातून अशी सद्गुणांची, सत्त्वाची, सद्भावांची, राष्ट्रीय सौभाग्याची स्फूर्ती घेण्याचे सामर्थ्य गुरुजींच्या ठिकाणी असल्यामुळे भारतीय साहित्यात आणि संस्कृतीत समतेचा उदात्त संदेश त्यांना आढळतो. भारतीय संस्कृती या समतेच्या, अद्वैताच्या संदेशाने सिद्ध झालेली आहे अशी त्यांची निष्ठा आहे, व ही त्यांची निष्ठा 'भारतीय संस्कृती' या त्यांच्या पुस्तकात प्रतिभापूर्ण पद्धतीने व्यक्त झाली आहे. या विशाल निष्ठेमुळेच त्यांना मृत्यूतही जीवन आढळते आणि प्राचीनातही अर्वाचीनाचा साक्षात्कार होतो. साने गुरुजींच्या अद्वैतवादात अर्वाचीन साम्यवाद आणि प्राचीन भारतीय मूल्ये यांचा सुंदर मिलाफ झालेला आहे. गुरुजींचे जीवन आणि वाङ्मय यांची जी आश्चर्यकारक मोहिनी राष्ट्रभर पसरलेली आहे त्याचे कारण हेच आहे. गुरुजींच्या क्रांतिकारक जीवनाबद्दल लोकांना कुतूहल वाटते आणि त्यातून त्यांची वाङ्मयीन लोकप्रियता निर्माण झालेली आहे, असे जे मानतात त्यांना या लोकप्रियतेचे रहस्यच समजलेले नाही. आधुनिक महाराष्ट्रीय वाचकांना नव्या जगातील ध्येये आणि जुन्या जगातील चिरंतन जीवनमूल्ये यांचा मिलाफ त्यांच्या वाङ्मयात आढळतो, म्हणूनच कलात्मकदृष्ट्या त्यात अनेक दोष असूनही ते त्यांचे भोक्ते बनलेले आहेत.

मृत्यूत जीवनाचा साक्षात्कार होणाऱ्या साने गुरुजींना आपल्या राष्ट्राच्या आजच्या विपन्नावस्थेत उज्ज्वल भवितव्याची चिन्हे आढळावीत यात नवल ते काय? या विशाल भवितव्याला साजेसेच राष्ट्राचे प्रयत्न असले पाहिजेत एवढाच त्यांचा आग्रह आहे. एकदा त्यांनी सांगितले होते, ''आपले राष्ट्र मोठे आहे; त्याचे प्रश्न मोठे, तसे त्याचे प्रयत्नही मोठे असले पाहिजेत. त्याची तपस्याही मोठी असली पाहिजे. आपले राष्ट्र मेथीच्या भाजीसारखे क्षणात उगवणारे, क्षणात सुकून जाणारे नाही. ते वटवृक्षासारखे भव्य आहे- त्याची मुळे पाताळाचा ठाव घेतात, शाखा स्वर्गाला हात घालतात.''

या विराट वटवृक्षाखाली तप करणारे साने गुरुजी हे एक थोर तपस्वी आहेत; किंवा असेही म्हणता येईल की साने गुरुजींचे जीवन हेच एखाद्या विशाल वटवृक्षासारखे आहे. हा वटवृक्ष महाराष्ट्रभर पसरलेला आहे आणि त्याच्या पारंब्या स्वतंत्र वृक्षाचे रूप धारण करून ठिकठिकाणी सेवेची छाया देत आहेत. भारतीय क्रांतीचे काही विहंग या वटवृक्षाच्या शाखांवर आश्रयास येत असतात. अंतराळात

भ्रमण करून ते स्वातंत्र्याच्या विशाल क्षितिजाचे दर्शन घेतात आणि त्या क्षितिजापलीकडे उड्डाण करण्याची सुखस्वप्ने अनुभवण्यासाठी आणि त्याकरिता स्फूर्ती घेण्यासाठी ते थोर वटवृक्षाकडे परत येतात. या वटवृक्षाला वंदन असो!

गेल्या एकदोन वर्षांत साने गुरुजींच्या वाङ्मयावर काही विशिष्ट प्रकृतीच्या टीकाकारांनी आक्षेपांची झोड उडवून दिली आहे. प्रा. श्री. के. क्षीरसागर आणि प्रो. ना. सी. फडके हे या टीकाकारांत प्रमुख आहेत. क्षीरसागर म्हणतात, ''साने गुरुजींची भाषा कोकणच्या विशिष्ट टापूतच बोलली जाणारी, महाराष्ट्राला दुर्बोध वाटणारी, मुद्दाम उबवलेली, उरबडवी बनविलेली, गबाळी आणि कित्येक ठिकाणी अशुद्ध आहे. त्यांच्या पुस्तकात दुबळेपणा, पुराणपूजन, पाल्हाळ, भोळसरपणा, रडवेपणा भरलेला आहे. त्यांचे विपुल वाङ्मय म्हणजे रडारड आणि पुनरुक्ती यांचा अजबखाना बनून राहिला आहे आणि त्यातही त्यांनी आपल्या वारकरी आणि भजनी पंथाचे इतके मिश्रण केले आहे की, कला व साधुता म्हणजे एक गुळचट व पोरकट प्रकार आहे असे वाटू लागते.'' प्रा. क्षीरसागर यांची ही टीका उत्साहाने उद्धृत करून प्रो. ना.सी. फडके यांनी 'श्यामच्या आई'बद्दल म्हटले आहे : ''खरं बोलावं, उपकार करावा, भूतदया बाळगावी या पलीकडे त्यात बोधही नाही आणि शैलीचं सौंदर्य तर तिळमात्रही नाही.'' आता, खरे बोलावे वगैरे जो अगदी प्राथमिक उपदेश 'श्यामच्या आई'त प्रो.फडक्यांना आढळला त्याची अत्यंत निकडीची गरज काही 'प्रथितयश' बनलेल्या व्यक्तींनाही आज महाराष्ट्रात आहे, हे अनेक प्रकरणी सिद्ध झालेले आहे; आणि शैलीच्या सौंदर्याबद्दल बोलायचे तर त्याबाबत फडक्यांशी कसलाही वाद न घालता 'श्यामची आई'मधले दोनतीन उतारेच मी पुढे मांडतो. त्यात शैलीचे सौंदर्य आहे किंवा नाही याचा निर्वाळा देण्यास महाराष्ट्रीय रसिक समर्थ आहेत. 'श्यामच्या आई'च्या पहिल्याच परिच्छेदात साने गुरुजी लिहितात,

''मोठेपणा याचा अर्थ जगातील काही व्यक्तींच्या ओठांवर आपले नाव काही काळ नाचणे, असा मी करीत नाही. हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांत असे प्रचंड व गगनचुंबी वृक्ष असतील की ज्यांची नावे जगाला माहीत नाहीत; रानावनांतील कानाकोपऱ्यांत असे एखादे रमणीय व सुगंधी फूल फुललेले असेल की ज्याचा पत्ता कोणास लागलेला नाही; समुद्राच्या पोटात अशी गोलबंद व पाणीदार मोतीं असतील की ज्यांची जगाला वार्ता नाही; पृथ्वीच्या पोटात ताऱ्यांसारखे तेजस्वी हिरे असतील, परंतु मानवजातीस त्यांचे अद्याप



दर्शन नाही; वर अनंत आकाशात असे अनंत तारे असतील की जे पल्लेदार दुर्बिणीतूनही अजून दिसले नाहीत.''(पृ.१)

हा आणखी एक उतारा पाहा –

''जीवनाला पाणी पाहिजे. पाण्याला शब्दच मुळी 'जीवन' हा आम्ही योजिला आहे. मला संस्कृत भाषेचा कधी कधी फार मोठेपणा वाटतो. पृथ्वीला, पाण्याला वगैरे जे शब्द आहेत त्यात केवढे काव्य आहे! पृथ्वीला 'क्षमा' हा शब्द ज्याने योजिला तो केवढा थोर कवी असेल! तसेच पाण्याला 'जीवन' हा शब्द लावला त्याचेही हृदय किती मोठे असेल!''(पृ.१४९-१५०)

आणखी हा पाहा –

''दूरचा नदीप्रवाह चांदीच्या प्रवाहासारखा दिसत होता. नदीला विश्रांती माहीतच नाही. सारखे वाहणे तिला माहीत. तिची प्रार्थना – कर्ममय प्रार्थना – सारखीच चोवीस तास सुरू असते. कर्म करीत असताना ती कधी गाणी गुणगुणते, कधी हसते खेळते; कधी गंभीर होते, कधी रागाने लाल होते. नदी म्हणजे एक सुंदर व गंभीर गूढ आहे.''(पृ.४१)

ज्यांना विद्वानांचाच अभिप्राय हवा असेल त्यांनाही तो देता येण्यासारखा आहे. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध टीकाकार प्रो.द.के. केळकर आपल्या 'श्यामच्या आई'वरील अभिप्रायात म्हणतात, ''आणि इतकी सहजसुंदर सुटसुटीत घरगुती भाषा! घरगुती प्रसंग हरिभाऊ आपट्यांच्यानंतर इतक्या तन्मयतेने रंगविलेले फारच विरळा. सान्यांची भाषा म्हणजे चरख्यावर कातविण्याकरिता पिंजलेला कापूस, शुभ्र सतेज हलका कापूस. कापसाच्या उडणाऱ्या म्हातारीवर केशवसुतांनी काव्य रचले आहे. सान्यांनीही आपल्या हलक्या फुलभाषेतून कमी काव्य खेळविले नाही. आपल्या काव्याची पत्री त्यांनी जनतेला वाहिली आहेच; पण पत्रीतील विखुरलेल्या काव्यापेक्षा श्यामच्या आईची स्मृतीच अधिक काव्यमय आहे.'' (साहित्यविहार, पृ.१०४) सान्यांच्या वाङ्मयातले काव्य न दिसता ज्यांना त्यातली नुसती पुनरुक्ती आणि अशुद्धता दिसते त्यांच्या डोळ्यांना विद्वेषाचा वडस झाला आहे असे अनुमान काढायला फारशी हरकत नाही.

साने गुरुजींचे वाङ्मय फक्त अर्धकच्च्या शाळकरी पोरांत वाचले जाते असाही गहजब त्यांच्यावर करण्यात आला आहे. साने गुरुजींचे वाङ्मय शाळकरी पोरांत विशेष प्रिय आहे या कारणासाठी ते जर निषिद्ध ठरवायचे असेल तर प्रो.फडक्यांचे वाङ्मय उल्लू कॉलेजिअन्समध्ये अधिक वाचले जाते म्हणून ते आचरट ठरवायला काय हरकत आहे? तसे ते ठरविणारे काही टीकेचे लाल आहेत, पण म्हणून काही त्यांच्या बडबडीकडे सुज्ञ लोक लक्ष देत नाहीत; पण साने गुरुजींचे वाङ्मय फक्त शाळकरी पोरांतच वाचले जाते ही गोष्ट खरी नव्हे. गुरुजींच्या वाचकांचा वर्ग याहून कितीतरी व्यापक आहे. ज्या खेड्यांत फडके-खांडेकर-माडखोलकरांची एक ओळही वाचली गेली नसेल त्या खेडेगावांत 'श्यामच्या आई'ची पारायणे होत असलेली दिसून येतील. गुरुजींच्या वाङ्मयाचे आकर्षण इतके व्यापक आहे याचे कारण अगदी उघड आहे. फडक्यांच्या वाङ्मयात ज्याप्रमाणे कॉलेजिअन तरुणतरुणींना आपल्या अंतरंगांतल्या आतुर प्रणयाच्या नखरेल छटा आढळतात, त्याप्रमाणे महाराष्ट्राच्या (केवळ शहरांतल्या नव्हे तर खेडेगावांतल्याही) हजारो तरुणांना आणि राष्ट्रभक्त जीवांना गुरुजींच्या वाङ्मयात आपल्या अंत:करणातील आशा-आकांक्षांचे, ध्येयस्वप्नांचे आणि कर्तृत्वबुद्धीचे दर्शन होते. विकासासाठी धडपडणाऱ्या राष्ट्राच्या आणि समाजाच्या भावनांना गुरुजींचे वाङ्मय व्यक्तता देते आणि म्हणूनच हजारो जीवांना त्या वाङ्मयात आपल्या अंत:करणाचे प्रतिबिंब आढळते. दुसरे असे की, सदाचार आणि सद्भाव यांचे जे सनातन आकर्षण सर्व सुसंस्कृत आणि निरोगी मनोवृत्तीच्या व्यक्तींना असते त्याचा पुरस्कार गुरुजींच्या वाङ्मयात जितक्या तळमळीने केलेला आढळतो तितका दुसऱ्या मराठी लेखकाच्या वाङ्मयात निदान आज तरी आढळत नाही.

साने गुरुजींच्या लोकप्रियतेचे आणखी एक कारण आहे. आजच्या आपल्या – विशेषत: पहिल्या महायुद्धोत्तर कालातल्या – नवशिक्षित मध्यमवर्गीय लेखकांची आपल्या समाजापासून फारकत झालेली आहे. त्यांचे विचार आणि वाङ्मय मराठी भाषेत प्रकट होत असले तरी त्यांचा जन्म लंडनच्या (किंवा मॉस्कोच्या) आसपास झालेला आहे असे म्हणण्यात फारशी अतिशयोक्ती नाही. महाराष्ट्रीय समाज आणि त्याचे आजचे लेखक यांच्यामध्ये आज एक कृत्रिम भिंत निर्माण झालेली आहे. या लोकांची भाषा समाजाला कळत नाही, त्यांचे वाङ्मय हृदयाला भिडत नाही, आणि त्यांचे विचार डोक्यात प्रकाश पाडू शकत नाहीत; निदान त्यांचे बोल ज्यांना समजू शकतात असे फार थोडे वाचक महाराष्ट्रात आहेत. साने गुरुजींनी आपली अशी अनुकंपनीय स्थिती करून घेतलेली नाही. त्यांच्या व्यक्तित्वाची वाढ भारतीय संस्कृतीत झालेली आहे आणि भारतीय संस्कृतीच्या उदात्त जीवनमूल्यांनी त्यांचे व्यक्तित्व उजळलेले आहे. या जीवनमूल्यांवर आधुनिक ज्ञानाचा प्रकाश पाडून त्यांची आवश्यक ती शुद्धी करण्यासाठी गुरुजींनी आपल्या उच्च शिक्षणाचा उपयोग करून घेतला आहे. आचार्य भागवत म्हणतात त्याप्रमाणे, 'त्यांच्या जीवनात प्राचीन शुद्ध परंपरा आणि आधुनिक नवीन प्रगतिकारक विचार यांची मोहक जुळणी झालेली आहे.' (पत्री – प्रस्तावना.) शिवाय, त्यांनी आपल्या जीवनाची समिधा राष्ट्रयज्ञाच्या धगधगत्या स्थंडिलात समर्पित केली असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयाचे पडसाद सर्वत्र उठतात आणि सर्वत्र ऐकू येतात.

गुरुजींच्या लोकप्रियतेवरून मी त्यांच्या वाङ्मयगुणांचा कलात्मक दर्जा ठरवीत आहे असे मात्र कोणी समजू नये. गोडसेभटजींचा 'माझा प्रवास' अगर लक्ष्मीबाई टिळक यांची 'स्मृतिचित्रे' यांची सर गुरुजींच्या वाङ्मयीन चित्रांना नाही, असेच क्षीरसागरांप्रमाणे माझेही मत आहे. किंबहुना मराठी वाङ्मयाच्या प्रथम श्रेणीत गुरुजींच्या वाङ्मयाचा समावेश करावा असाही आग्रह मी धरणार नाही. (माझ्या मते, कालेलकरांच्या भाषांतरित प्रवासवर्णनांचाही कलात्मक दर्जा कितीतरी उच्चतर ठरेल.) पण म्हणून गुरुजींचे एकंदर सारे

वाङ्मय म्हणजे गुळचट आणि पोरकट प्रकार आहे असे म्हणण्याचे विकृत धाडस मात्र मी करू शकत नाही. साने गुरुजींच्या वाङ्मयाचा दर्जा ठरविण्यापूर्वी त्याची व्यवस्थित वर्गवारी झाली पाहिजे. आणि त्यातले कोणते चांगले व कोणते वाईट याचा नीट तलास केला पाहिजे. असा तलास केल्यानंतर गुरुजींच्या प्रतिभेचे सामर्थ्य आणि दुर्बलत्व नीट ध्यानात येऊ शकेल. गुरुजींच्या वाङ्मयात त्यांच्या स्वतंत्र कृतींपेक्षा त्यांचे स्मृतिरूप वाङ्मय श्रेष्ठ वाटेल, आणि स्मृतिरूप वाङ्मयापेक्षा परस्फूर्त वाङ्मय अधिक सरस ठरेल. त्यांच्या 'पुनर्जन्म', 'क्रांती' यांसारख्या कादंबऱ्यांपेक्षा त्यांची 'श्यामची आई' सरस आहे, आणि त्यांच्या 'विश्राम'मधील कथांपेक्षा त्यांच्या 'गोड गोष्टी' आणि 'त्रिवेणी'मधल्या कथा सरस आहेत. 'गोड गोष्टी'चे पहिले तीनचार भाग आणि 'त्रिवेणी'मधल्या शबरी आणि दधीची ऋषी यांच्या कथा तर कलात्मक दृष्ट्या मराठी वाङ्मयात संस्मरणीय ठरतील. यावरून सहज ध्यानात येईल की, मौलिकता हा गुरुजींच्या प्रतिभेचा आद्य गुण नव्हे. कलात्मक रचना त्यांना नीटशी साधत नाही. त्यांची रचना ओबडधोबडपणा, पाल्हाळ आणि निरर्थक पुनरुक्ती इत्यादी दोषांनी ग्रासलेली आहे. आचार्य भागवतांनी म्हटल्याप्रमाणे, जीवनाचा-भावनांचा स्पर्श ओसरल्यावरही साने गुरुजींची शब्दांची टाकसाळ चालू राहते. पण रचनेचा सांगाडा तयार असला म्हणजे गुरुजी त्यावर नुसता काव्याचा साजच चढवू शकतात असे नव्हे तर त्यात नवा प्राणही ओतू शकतात. हा प्राण, हा जिवंतपणा पुष्कळदा भावविवश वाटतो. भावनावशता हा त्यांच्या वाङ्मयाचा एक ठळक दोष आहे, पण गुरुजींच्या वाङ्मयात काव्याचा अखंड निर्झर वाहत असतो व त्यामुळेच त्याला बरेचसे रमणीयत्व प्राप्त झाले आहे. साने गुरुजी हे हाडाचे कवी आहेत आणि संस्कृत वाङ्मयाच्या समरस अध्ययनामुळे त्यांच्या या काव्यवृत्तीवर अभिजात संस्कार झालेले आहेत. साने गुरुजींचे ललित वाङ्मयच नव्हे तर त्याचा युक्तिवादही पुष्कळदा काव्यमय होतो. कारण काव्यात्मता ही त्यांच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. ठाण्याच्या एका वाङ्मय-सप्ताहात, आपले वाङ्मय रडवे असते, अश्रूंनी ओथंबलेले असते या आरोपाला उत्तर देताना त्यांची हीच वृत्ती आविष्कृत झाली. ते म्हणाले, 'समाज-वृक्षाला सूर्यप्रकाशही लागतो आणि जलही लागते. मी जल देतो. ज्याच्यापाशी प्रकाश असेल त्याने प्रकाश द्यावा.' हा तर्कवाद नसून काव्य आहे हे उघड होय.

साने गुरुजींच्या वाङ्मयाची मला एवढी महती वाटते, याचे कारण मात्र निराळे आहे. गुरुजींच्या लेखणीने वाङ्मयातल्या एका दृष्टिआड होऊ पाहणाऱ्या तत्त्वाची तीव्र जाणीव करून दिली आहे. तुलनात्मक दृष्टीने पाहिले तर प्रतिभासामर्थ्याच्या मानाने गुरुजींनी संपादन केलेले वाङ्मयीन यश फार मोठे आहे. त्यांच्याहून श्रेष्ठ प्रतिभासामर्थ्य असलेल्या लेखकांना त्यांचे यश मिळविता आलेले नाही. गुरुजींच्या या यशाचे रहस्य काय आहे? या प्रश्नाचे एका शब्दांत उत्तर देता येते, ते म्हणजे निष्ठा. निष्ठेच्या - आत्यंतिक निष्ठेच्या - जोरावर साने गुरुजींनी आपल्या लेखनाला वाङ्मयीन दीप्ती प्राप्त करून दिली आहे. निष्ठा हा कलात्मक वृत्तीचा एक प्रमुख विशेष आहे. निष्ठावंत अंत:करणाला एखाद्या गोष्टीचे, एखाद्या विषयाचे वेड, निरपेक्ष वेड लागू शकते आणि एखाद्या विषयाचे निरपेक्ष वेड लागल्याशिवाय प्रतिभेला स्फुरण चढू शकत नाही. ही निष्ठा नसल्यामुळेच पुष्कळ लेखकांची प्रतिभा सुप्त, अर्धसुप्त राहिली आहे. १९२० नंतर महाराष्ट्रीय लेखकांत निष्ठा हा गुण अधिकाधिक लोप पावत चालला. कै. वामनराव जोशींच्या भाषेत बोलायचे म्हणजे, ''आपली अशी मन:स्थिती झाली आहे की, आपली कशावर विशेष उत्कट श्रद्धा नाही; निष्ठा नाही; नित्यत्वाने किंवा निश्चयाने आदरणीय किंवा पूज्य असे विशेष काही राहिले नाही; भूतकाळावर श्रद्धा नाही; भविष्यकाळावर विश्वास नाही; वर्तमानकालात समाधान नाही; निश्चित सिद्धांत नाहीत, निश्चित आकांक्षा व ध्येये नाहीत; निश्चित स्नेह किंवा द्वेष नाही; निश्चयाने मन आनंदविणारी किंवा दुखविणारी स्थळे किंवा कारणे नाहीत; निश्चयाने विशिष्ट लोकांना बळकट जोडणारी किंवा कायमची तोडणारी सत्कर्मे किंवा दुष्कर्मे नाहीत; तर सर्वत्र अनिश्चय, संशय, ढिलेपणा, गुळमुळीतपणा व चालढकल दिसत आहे.'' (विचार-सौंदर्य, पृ.१०-११) अशा प्रकारच्या आत्मप्रत्ययपूर्ण दृष्टीच्या अभावी महाकाव्ये निर्माण होऊ शकत नाहीत असे वामनरावांना प्रतिपादन करावयाचे आहे. पण मी म्हणतो, आत्मप्रत्ययाच्या अभावी कोणतीही महान ललितकृतीच निर्माण होणे अशक्य आहे. आगरकर-टिळकांच्या कालखंडात हा आत्मप्रत्यय होता म्हणूनच ह.ना. आपटे, देवल, खाडिलकर, परांजपे, अच्युतराव कोल्हटकर, सावरकर, गोविंद, केशवसुत, बालकवी, तांबे, वा.म. जोशींसारखे थोर लेखक निर्माण झाले. १९२० नंतरच्या गांधीयुगात निष्ठेला खरोखर फार मोठे आवाहन होते; पण आमचे अतिचिकित्सक महाराष्ट्रीय लेखक गांधीवादाशी फटकून वागण्यात धन्यता मानीत होते. रशियन साम्यवादाचे एक आकर्षण होते. त्याने निष्ठावंत क्रांतिकारकांची एक पिढी निर्माण केली. पण महाराष्ट्रीय लेखकांच्या अंत:करणात साम्यवादी आत्मप्रत्यय निर्माण होण्यापूर्वीच या वादाबद्दल संशयाचे वातावरण प्रसृत झाले. या वादाने निष्ठाशील वाङ्मय तर निर्माण केलेच नाही; पण उलट एक प्रकारचे विकृत पुरोगामित्व प्रचलित केले आणि ते गडकरी-बालकवींच्या वाङ्मयात जी शुद्ध सौंदर्यनिष्ठा आढळते तशा सौंदर्यनिष्ठेस मारक मात्र ठरले. १९३०-३१च्या आंदोलनानंतर ही निष्ठाशून्यतेची परिस्थिती बऱ्याच प्रमाणात बदलली आणि याचे बरेचसे श्रेय साने गुरुजींकडे जाते हे प्रांजलपणे कबूल करावयास हवे. या गांधीवादी उत्साहात वाङ्मयाच्या दृष्टीने भीतिप्रद असे काही नाही असे मला म्हणायचे नाही. साम्यवादी टीकामूल्यांप्रमाणे गांधीवादी टीकामूल्येही शुद्ध सौंदर्यनिष्ठेस मारक ठरू शकतील याची जाणीव मला आहे. पण निष्ठा हा वाङ्मयाचा एक महत्त्वाचा प्रेरक गुण आहे. या गुणाचा बराच लोप झाल्यामुळेच १९२० नंतरचे मराठी वाङ्मय, टिळक-आगरकरकालीन वाङ्मयापेक्षा कमी प्रतीचे झाले आहे असे माझे मत आहे. मराठी वाङ्मयाच्या पुनरुज्जीवनासाठी निष्ठाशीलतेस आवाहन झाले पाहिजे आणि ते कार्य साने गुरुजींच्या वाङ्मयाने केले, हेच माझ्या मते त्या वाङ्मयाचे खरे महत्कार्य आहे!

चैत्रा रेडकर

साने गुरुजींचा वैचारिक प्रवास

साने गुरुजींच्या बालपणाविषयी, त्यांच्या आई-वडिलांनी केलेल्या संस्कारांविषयी मोठ्या प्रमाणात लिहिले गेले आहे. 'श्याम'च्या आयुष्यातील अनेक प्रसंग हे मराठी भाषिकांच्या सामूहिक स्मृतीत कोरले गेले आहेत. नैतिक मूल्ये पाल्यांत रुजवण्यासाठी आई-वडिलांनी केलेले संस्कार एवढ्याच मर्यादित अर्थाने या प्रसंगांकडे न बघता एक व्यक्ती म्हणून व्यक्तिमत्त्वाचा पोत घडविणाऱ्या घटना या दृष्टीने त्यांकडे पाहिले असता साने गुरुजींचा एक विलक्षण प्रवास उलगडत जातो.

साने गुरुजींचा जन्म एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला कोकणात झाला; तेव्हा ब्रिटिश सत्ता भारतात पुरेशी रुजली होती. काँग्रेसची स्थापना होऊन दशकाहून अधिक काळ उलटला होता. लो. टिळकांचे राजकीय नेतृत्व अखिल भारतीय पातळीवर मान्य होऊ लागले होते. महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या परंपरेतील फुले, आगरकर, रानडे यांच्यासारखे अध्वर्यू अस्त पावले होते. साने गुरुजींच्या पिढीकडे ना पेशवाईच्या आठवणी होत्या; ना १८५७च्या लढ्याच्या कहाण्या! ना समाजसुधारणेच्या मुद्द्यावरून झालेल्या सार्वजनिक वादांचे संदर्भ होते, ना ब्रिटिश सत्तेच्या उद्दिष्टांविषयी भाबडा भ्रम होता. या पिढीने बालपणी अनुभवला तो वासाहतिक सत्तेच्या कारस्थानांना बळी पडून विभाजित होत चाललेला समाज; वारंवार पडलेल्या दुष्काळांमुळे अधिकाधिक विपन्नावस्थेत चाललेला तळागाळातील समाज आणि वसाहतवादाच्या हातांत हात घालून आलेल्या भांडवलशाहीमुळे समूळ बदलत चाललेले भारतीय समाजजीवन! २४ डिसेंबर १८९९ रोजी पालगड गावी पांडुरंग सदाशिव साने अर्थात् साने गुरुजींचा जन्म झाला, तेव्हा साने कुटुंब बदलत्या परिस्थितीतून पुढे आलेल्या वास्तवाला, परिस्थितीला सामोरे जात होते. नवी व्यवस्था, नवी मूल्ये आणि नव्या सामाजिक संरचना घेऊन आली होती. एकत्र कुटुंब पद्धती अस्त पावत चालली होती. व्यक्तिवादी धारणा समाजात रुजू लागल्या होत्या. शेतीतील खोतांचे अधिकार घटत चालले होते. मुंबई, अहमदाबाद, सोलापूर सारख्या ठिकाणी वेगाने सुरू झालेल्या औद्योगीकरणामुळे शहरांकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतरे होऊ लागली होती. गुरुजींचे आई-वडील 'यशोदाबाई' आणि 'सदाशिवराव' या सर्व बदलांना सामोरे जात असतानाच आपल्या मुलांवर सनातन मानवी मूल्यांचे संस्कार करण्यासाठी धडपडत होते.

साने कुटुंब हे वडवली गावचे खोत होते. साने गुरुजी म्हणजेच पंढरीचे वडील ही खोती सांभाळत होते. पंढरीच्या वडील भावंडांनी काही काळ तरी खोतीचे अधिकार गाजवणाऱ्या सान्यांच्या घरातील सुबत्ता अनुभवली होती. पंढरीच्या लहानपणीच घराची वाटणी झाल्यामुळे त्याच्या वाट्याला मात्र आई-वडिलांची आर्थिक ओढाताण, दारिद्र्य आणि असुरक्षितताच आली. शाळेची फी भरायला पैसे नाहीत; अंगावर धड कपडे नाहीत; किमान आवश्यक आरोग्यसेवाही उपलब्ध नाहीत; नातेवाईकांचा पुरेसा आधार नाही. त्यामुळे निर्माण झालेल्या असुरक्षिततेला सामोरे जातजात पंढरी मोठा झाला. पंढरीचा मोठा भाऊ गजानन याला शिक्षणासाठी काही काळ मामा आणि मावशी यांचा आर्थिक आधार तरी मिळाला; पंढरीच्या वाट्याला तेवढेही स्वास्थ्य आले नाही. वयाच्या बाराव्या-तेराव्या वर्षापासून शिक्षणासाठी

गेल्या २०० वर्षांतील महाराष्ट्रातील ६० बुद्धिवान, प्रतिभावान व कर्तबगार व्यक्तींच्या चरित्रग्रंथमाला संचाचा प्रकल्प श्री गंधर्ववेद प्रकाशनामार्फत सप्टेंबर महिन्यात पूर्ण होत आहे. त्या संचात साने गुरुजींच्या व्यक्तित्वाचा व विचारांचा वेध घेणारे पुस्तक लिहिले आहे, मुंबई येथील एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालय मुंबई येथील राज्यशास्त्र विभागाच्या प्रमुख श्रीमती चैत्रा रेडकर यांनी. त्या आगामी पुस्तकातील हे पहिले प्रकरण.

दारोदार भटकण्याची पाळी पंढरीवर आली. कधी मुंबईच्या मामाकडे, कधी पुण्याच्या मामाकडे तर कधी दापोलीच्या आत्याकडे राहणे हे पंढरीसाठी काही फारसे सुखावह नव्हते. लहान वयात आईपासून दूर राहावे लागल्याने भावनिक ओढाताण तर होतीच; त्याचबरोबर नातलगांकडे राहूनही शिक्षणाची हमी नव्हती. पुण्यातील मामाकडे राहताना त्यांचीही फी भरण्याची क्षमता नसल्याने इतर समवयस्क मुलांना शाळेत जाताना बघत राहावे लागत होते. दापोलीला आत्याकडे राहताना तिच्या श्रीमंतीचे दडपण तर होतेच; जोडीला 'बहिणीच्या सासरी मुलाला ठेवतोय' या विचाराने वडिलांकडून आत्याला दिल्या जाणाऱ्या मणभर तांदळाचा हिशेबही होता. यात भरीस भर म्हणजे नैतिक वर्तनासंबंधीच्या आई-वडिलांच्या अपेक्षांचे ओझेही प्रचंड होते. दुसऱ्याच्या घरात राहून आपला मुलगा वावगे तर वागणार नाही ना याचे फार दडपण पंढरीच्या आई-वडिलांवर होते. 'माझा मुलगा शिकून मोठा झाला नाही तरी चालेल पण चोर व्हायला नको' असे सांगून पंढरीच्या शिक्षणाची तजवीज करू इच्छिणाऱ्या शाळा तपासनीसाकडे पंढरीला पाठवायला नकार दिल्याची आठवण 'श्यामची आई' या पुस्तकात आहे. त्यावरून गरिबीला तोंड देताना किती तऱ्हेच्या भावनिक ताणांना साने कुटुंबीय तोंड देत होते त्याची कल्पना येते. आर्थिक ताणांमुळे वडील-मुलाच्या नात्यातही तणाव निर्माण होत होते. पुण्यातील प्लेगच्या साथीमुळे पंढरी जेव्हा पालगडला परतला तेव्हा हा शिक्षण सोडून पळून तर आला नसेल ना, अशी शंका वडिलांना वाटत राहिली आणि त्यांनी ती व्यक्तही केली. आपला मुलगा शिक्षण सोडून तर पळून आला नसेल ना, ही शंका आणि जोडीला शिक्षण-नोकरीशिवाय हा मुलगा आपला भार वाढवत आहे ही वडिलांनी व्यक्त केलेली भावना पंढरीच्या मनातील असुरक्षिततेची जाणीव वाढवत राहिली आणि तो घर सोडून निघून गेला. सगळे असूनही आपले कोणीही नाही, आपण एकटे आहोत या पंढरीच्या मनातील भावनेची पाळेमुळे लहानपणच्या या असुरक्षिततेत होती. 'श्यामच्या आई'ने 'श्याम'वर केलेल्या संस्कारांविषयी खूप लिहिले-बोलले गेले. गुरुजींच्या भावविवश स्वभावाच्या आठवणी अनेकांनी लिहिल्या. मात्र त्यांच्या मुळाशी असलेल्या या असुरक्षित बालपणाकडे क्वचितच लक्ष दिले गेले. बालपणातील ही असुरक्षिततेची भावना निव्वळ आर्थिक ताणातून आली असे नाही. आई-वडिलांनी घालून दिलेल्या उच्च आदर्शांचे पालन न करता आल्यामुळे स्वत:च्या अपुरेपणाची वारंवार होत असलेली जाणीव बोचणारी होती. लहानपणी केलेली चोरी आणि घर सोडून पळून जाण्याची घटना पंढरीला आपल्या प्रमादशीलतेची वारंवार जाणीव करून देत राहिली. पुण्यातील मामा कधी शाळेत नाव घालतील याची वाट बघत आलेल्या रिकामपणाला कंटाळून पंढरीने देवाच्या दक्षिणेतील दीड रुपया चोरला आणि तो मुंबईच्या मामाकडे पळून गेला. मुंबईच्या मामाने समजूत घालून पुन्हा त्याची पुण्याला रवानगी



केली. आश्रिताच्या जगण्याला कंटाळून पळून जाणे अणि काहीच पर्याय न गवसल्यामुळे पुन्हा तिथेच परतावे लागणे, यांत बारा–तेरा वर्षांच्या पंढरीने किती घुसमट सोसली असेल याची कल्पना येऊ शकते. चोरी, पळून जाणे यांसारख्या घटनांमुळे, ओढगस्तीच्या परिस्थितीमुळे, वडिलांच्या साशंक नजरेमुळे, एका नातलगाकडून दुसऱ्या नातलगाकडे मदतीची अपेक्षा घेऊन कराव्या लागलेल्या भ्रमंतीमुळे पंढरीचे बालपण प्रचंड तणावग्रस्ततेत गेले. त्यातच दारिद्र्यामुळे खंगलेल्या आईचा मृत्यू पंढरीच्या आयुष्यात कारुण्य भरून गेला. पंढरीच्या आईचा मृत्यू काही वृद्धापकाळामुळे झाला नव्हता. अवघ्या चाळिशीत मृत्युमुखी पडलेल्या यशोदाबाईंना दारिद्र्यामुळे वंचनेबरोबर मोठी मानहानी सोसावी लागली होती. घरावर जप्ती आल्याने घर सोडावे लागले होते. मोठ्या मुलावर तरुण वयात आलेली घराची जबाबदारी, एका मुलाचा आजारपणाने झालेला मृत्यू, धाकट्या दोघांची अपुरी शिक्षणे, अपयशाने कातावलेला–त्रासलेला पती या सर्वांचे प्रचंड ताण यशोदाबाईंवर होते. हे सर्व ताण सहन करत आणि नवऱ्यावर रुसून गेलेल्या मुलाची–पंढरीची आठवण काढत काढत त्यांचा मृत्यू झाला.

वडिलांवर रुसून घर सोडून पळून गेलो आणि आईच्या अंतिम दर्शनाला मुकलो ही भावना पंढरीच्या पदरी आयुष्यभराची हुरहूर आणि तणावग्रस्ततेत भर टाकून गेली. या तणावग्रस्त बालपणाचे अनेक अवशेष मोठेपणीही पंढरीच्या मनावर राहिले. स्वत:ला कणभरही दयामाया न दाखवण्याची वृत्ती, 'स्व'विषयी कमालीची असहिष्णुता, असंतुष्टता आणि अतिपरखडपणा ही साने गुरुजींच्या स्वभाववैशिष्ट्यांची बीजे लहानपणच्या असुरक्षित तणावग्रस्ततेत आणि भावनिक कुपोषणात होती. स्वत: जगावर प्रेम करणारी साने गुरुजींसारखी व्यक्ती स्वत:ला इतकी कमी का लेखते, इतकी संकोची, भिडस्त का राहते असे प्रश्न त्यांच्या सहकाऱ्यांना आणि मित्रांना वारंवार पडले. गुरुजींनी स्वत:ला बदलावे असेही त्यांनी गुरुजींना वारंवार सुचविले. मात्र गुरुजींच्या स्वत:विषयीच्या प्रतिमेने त्यांना ते बळ पुरविले नाही. स्वत:च्या अधुरेपणाविषयीच्या जाणिवेने त्यांचा ताबा काही सोडला नाही. साने गुरुजींच्या खाजगी पत्रव्यवहारात स्वत:ला कमी लेखण्याची वृत्ती वारंवार आढळते. ६ ऑक्टोबर १९४४ रोजी मधु लिमये यांना पाठवलेल्या एका पत्रात साने गुरुजी लिहितात, ''गोष्टीरूप गांधीजी म्हणून माझे एक पुस्तक बाबुरावांनी २ ऑक्टोबरला प्रसिद्ध केले... त्या पुस्तकाची प्रत येथे आली. परंतु ती कोणास दाखवावी असे मनास येईना. मी ती लपवून ठेवली. सारे हसतील, नावे ठेवतील असे वाटले. रद्दी पुस्तक! मला नाही रे नीट लिहिता येत. ना बुद्धी, ना विचार, ना नवीन जीवनमूल्ये, ना नवा दृष्टिकोन. काही नाही... माझे सारे लिखाण जाळावे असे मनात येते.'' अवघ्या महाराष्ट्रातील तरुणांना नवी ऊर्जा आणि चैतन्य देणारे गुरुजी स्वत:विषयी किती असहिष्णू आणि कठोर होते! स्वत:विषयीच्या असहिष्णुतेची आणि अतिपरखडपणाची मुळे लहानपणच्या नैतिक दडपणात, अभावग्रस्ततेत, नातलगांच्या साशंक नजरेत आणि या सर्वांतून आलेल्या असुरक्षिततेत होती. आई–वडिलांच्या संस्कारांनी जगावर प्रेम करायला शिकवले; मात्र तणावग्रस्त बालपणाने आत्मसन्मानासाठी आवश्यक ते भावनिक बळ पुरवले नाही. त्यामुळे स्वतःच्या अपूर्णतेची आणि अशुद्धतेची भावना कायम घर करून राहिली. ही अपूर्णता आणि अशुद्धता दूर करण्यासाठी 'स्व'चा संकोच करून इतरांसाठी जगण्याचा मार्गच पंढरीला अधिक श्रेयस्कर वाटला. त्यासाठी त्याग, सोशिकता, सेवाभाव या मूल्यांना त्यांच्या आयुष्यात कमालीचे महत्त्व प्राप्त झाले; किंबहुना या मूल्यांना अधिकाधिक आत्मसात करण्याच्या ध्यासातूनच पंढरी ते साने गुरुजी हा प्रवास पार पडला.

पंढरी ते साने गुरुजी या प्रवासाला दिशा देण्यात महात्मा गांधींच्या विचारांनी अत्यंत मूलभूत भूमिका बजावली. म.गांधींच्या विचारांशी साने गुरुजींचा परिचय महाविद्यालयीन जीवनात झाला. गांधी साहित्याचे गंभीर वाचन मात्र त्यांनी अमळनेरला प्रताप हायस्कूलमध्ये शिकताना केले. अमळनेरच्या छात्रालयात गांधीजींच्या 'यंग इंडिया'चे अंक येत असत. गुरुजी ते अंक बारकाईने वाचत असत आणि विद्यार्थ्यांसाठी त्यांतील महत्त्वाच्या गोष्टींवर खुणाही करून ठेवत. या काळात म. गांधीं 'यंग इंडिया'तून इतर समकालीन प्रवाहांनी उपस्थित केलेल्या अनेक महत्त्वाच्या प्रश्नांना उत्तरे देत असत. उदाहरणार्थ, १ जानेवारी १९२५च्या अंकात गांधीजींनी एम. एन. रॉय यांच्या 'बोल्शेविझम की शिस्त' या विषयावर वादसंवाद केला होता. ९ एप्रिल १९२५च्या अंकात क्रांतिकारकांच्या हिंसासमर्थनाचा प्रतिवाद केला होता. १४ जानेवारी १९२६च्या अंकात वायकोम सत्याग्रह आणि मंदिर प्रवेशाचा आग्रह धरला होता. ७ एप्रिल १९२७च्या अंकात राष्ट्र उभारणीसाठी आत्मशुद्धी, त्याग आणि नि:स्वार्थ वृत्तीचा आग्रह धरला होता. या काळात 'यंग इंडिया'मध्ये महादेवभाई देसाई, काका कालेलकर, मीराबेन, जे.सी. कुमारप्पा हेही सातत्याने लिहीत असत.

तुरुंगवास संपल्यानंतर विनोबांनी गुरुजींसाठी पूर्व–पश्चिम खानदेशाच्या सीमेवर नावरा–नावरी येथे आश्रम काढला. मात्र गुरुजी तेथे रमले नाहीत. कोणालाही न सांगता एक दिवस गुरुजी तेथून निघून गेले. गुरुजी विनोबांच्या कार्यात न रमण्यामागे कोणतेही विशिष्ट कारण ज्ञात नाही. आध्यात्मिक साधना करताना आपल्या मर्यादांची जाणीव हे जसे त्यामागचे कारण असू शकते, तसेच आत्मशुद्धीच्या प्रयोगातून समग्र परिवर्तन होण्याच्या शक्यतेविषयीची साशंकता हे देखील कारण असू शकते.

बारडोलीतील शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा वृत्तांत, ब्रिटिश करपद्धतीमुळे भारतातील दारिद्र्यवाढीचा कुमारप्पांचा अहवाल याच कालखंडात 'यंग इंडिया'त प्रसिद्ध झाला होता. हे सर्व साहित्य साने गुरुजींनी बारकाईने वाचल्याचे अनेक दाखले त्यांनी पुढे लिहिलेल्या गांधी चरित्रातून मिळतात. या वाचनातून सामाजिक समता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य यांसाठीचे लढे एकाच वेळी लढले पाहिजेत, ही गांधीजींची भूमिका साने गुरुजींना मनोमन पटली. गांधीजींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या लढ्याकडे गुरुजी स्वातंत्र्य आणि समतेसाठीचा संघर्ष म्हणून पाहू लागले; तर काँग्रेसची सर्वसमावेशकता त्यांना भारतीय राष्ट्रीयतेची पूर्वशर्त वाटू लागली. गांधीजी आणि काँग्रेसविषयी त्यांच्या मनात अतोनात आदर आणि अपेक्षा निर्माण झाल्या. नवनिर्माणाच्या त्यांच्या लढ्यात आपलाही हातभार लागावा या भावनेने गुरुजींनी एप्रिल १९३० मध्ये प्रताप हायस्कूलच्या नोकरीचा राजीनामा दिला. तेव्हापासून काँग्रेसच्या विविध लढ्यांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि कारावासही भोगला. त्याविषयीची सविस्तर चर्चा आपण पुढील प्रकरणात करणार आहोत. या तुरुंगवासांनी साने गुरुजींच्या वैचारिक जडणघडणीत मोलाची भूमिका बजावली; कारण कारावासातील काळात गुरुजींचा अनेक गांधीवादी नेते आणि कार्यकर्त्यांशी जवळून परिचय झाला. १९३०च्या त्रिचनापल्लीतील तुरुंगात आचार्य स.ज. भागवत, १९३२च्या धुळे येथील तुरुंगवासात आचार्य विनोबा भावे, १९४३च्या येरवड्यातील तुरुंगवासात आचार्य शं.दा. जावडेकर आदींचा निकटचा सहवास गुरुजींना लाभला आणि त्यांच्याशी गुरुजींचे दृढ असे ऋणानुबंधही जुळले गेले. आचार्य भागवतांच्या रूपाने गुरुजींना त्यांच्या साहित्यातील तेज आणि ऊर्जा ओळखणारा भाष्यकार मिळाला. साने गुरुजींच्या 'पत्री' या काव्यसंग्रहाला आचार्य भागवतांची प्रस्तावना आहे. गुरुजींच्या साहित्यातील सामर्थ्य दाखवणारे इतरही विपुल लेखन आचार्य भागवतांनी केले आहे. किंबहुना गुरुजींच्या हयातीत त्यांच्या लेखनाची ताकद कळलेल्या मोजक्या लोकांपैकी आचार्य भागवत हे एक होते. आचार्य विनोबा भावेही गुरुजींच्या सिद्धहस्त लेखणीचे सामर्थ्य ओळखून होते. विनोबांमुळे गुरुजींचे भारतीय संस्कृतीविषयीचे आकलन परिपक्व झाले तर आचार्य जावडेकरांच्या रूपाने साने गुरुजींना त्यांच्या गांधी-मार्क्स समन्वयाच्या प्रयत्नांना पुष्टी देणारा समविचारी अभ्यासक मिळाला. या दृष्टीने साने गुरुजींच्या वैचारिक जडणघडणीत त्यांचे सर्वच तुरुंगवास महत्त्वाचे ठरले. तुरुंगात भेटलेल्या या गांधीवादाच्या भाष्यकारांबरोबर झालेल्या संवाद व चर्चेतून गुरुजींचा गांधी तत्त्वज्ञानाविषयीचा दृष्टिकोन आकार घेत गेला. विनोबांचे स्थान हे या सर्वांत अधिक महत्त्वाचे आहे. शोषणमुक्त समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी गांधी विचारातील अवकाशाविषयीचे गुरुजींचे आकलन हे प्राय: विनोबांच्या माध्यमातूनच विकसित झाल्याचे दिसते.

गुरुजींचा विनोबांशी १९३२ मध्ये जवळून परिचय झाला. विनोबा तेव्हा आध्यात्मिक प्रयोगात गुंतलेले होते. दैनंदिन जगण्यात समत्व अनुभवण्यासाठी विविध आध्यात्मिक प्रयोग, सूतकताईतील प्रयोग, आहारशास्त्रातील प्रयोग या काळात विनोबा करत होते. आश्रमांच्या माध्यमातून समत्व वृत्तीचे नि:स्वार्थी कार्यकर्ते घडविणे हे त्या वेळी त्यांच्या जीवनाचे सूत्र होते. १९५१ नंतर भूदान चळवळीतून जमिनीच्या फेरवाटपासाठी भारतीय समाजजीवनात हस्तक्षेप करणाऱ्या विनोबांपेक्षा गुरुजींना भेटलेले 'साधक' विनोबा वेगळे होते. स्वातंत्र्यलढ्यात ते सहभागी झाले असले, तरी त्यांची ओळख राजकीय पुढाऱ्यापेक्षा आध्यात्मिक साधकाचीच होती. गुरुजींचा पिंडही आध्यात्मिक साधकाचा होता. त्यामुळे विनोबांशी त्यांचा ऋणानुबंध जुळला. १९३२च्या तुरुंगवासात विनोबांनी दिलेल्या गीतेवरील विवरणात्मक प्रवचनांना गुरुजींनी अक्षरश: - शब्दश: उतरवून घेतले.त्यामुळे पुढे 'गीताप्रवचने' प्रकाशित होऊ शकली. याच तुरुंगवासात विनोबांच्या प्रोत्साहनामुळे गुरुजींनी 'श्यामची आई' लिहून काढले. 'भारतीय संस्कृती' हा ग्रंथ लिहिण्यासाठी गुरुजींची वैचारिक बैठकही याच काळात विनोबांशी झालेल्या संवादातून तयार झाली. मात्र विनोबांबरोबर निर्माण झालेला जिव्हाळा गुरुजींना त्यांचा अनुयायी बनवू शकला नाही. तुरुंगवास संपल्यानंतर विनोबांनी गुरुजींसाठी पूर्व-पश्चिम खानदेशाच्या सीमेवर नावरा-नावरी येथे आश्रम काढला. मात्र गुरुजी तेथे रमले नाहीत. कोणालाही न सांगता एक दिवस गुरुजी तेथून निघून गेले. गुरुजी विनोबांच्या कार्यात न रमण्यामागे कोणतेही विशिष्ट कारण ज्ञात नाही. आध्यात्मिक साधना करताना आपल्या मर्यादांची जाणीव हे जसे त्यामागचे कारण असू शकते, तसेच आत्मशुद्धीच्या प्रयोगातून समग्र परिवर्तन होण्याच्या शक्यतेविषयीची साशंकता हे देखील कारण असू शकते. विशेषत: स्वातंत्र्यानंतर 'केवळ सदिच्छेने शोषण थांबत नाही' असे म्हणत गुरुजींनी ज्या प्रकारे सर्वोदयवाद्यांवर टीका केली होती,

ती लक्षात घेता आध्यात्मिक साधनेवर अतोनात भर देणाऱ्या आश्रम जीवनाविषयी गुरुजींच्या मनात शंका असू शकतात. गांधी-विनोबांचे आश्रम हे माणसाला निवृत्तिपथावर नेणारे खचितच नव्हते. नि:स्वार्थी-निर्मोही-समत्व बुद्धीच्या कार्यकर्त्यांना घडविणाऱ्या त्या कार्यशाळा होत्या. असे असले तरी विनोबांचे आश्रम आणि महात्मा गांधींचे आश्रम यांच्या स्वरूपात काही मूलभूत फरक होते. म.गांधींच्या निकटच्या अनुयायी मीराबेन यांनी त्यांच्या आत्मचरित्रात हा फरक अतिशय बारकाईने नोंदवला आहे. त्या लिहितात, ''गांधीजींचे आश्रम हे विविधतेने नटलेल्या भारताचीच छोटी प्रतिकृती असत. त्यात विविध प्रवृत्तींचे दीड-दोनशे लोक राहत असत. या लोकांत विविध जाति-धर्मांच्या स्त्रिया-पुरुष आणि लहान मुले, संन्यस्त वृत्तीचे साधक आणि संशयग्रस्त स्त्रिया सर्वच असत... या उलट विनोबांच्या आश्रमात शांतपणे, कडक शिस्तीने आणि मेहनतीने साधना करणाऱ्या मोजक्याच लोकांचा समावेश असे.'' गांधीजी आणि विनोबांच्या आश्रमांतील हा फरक लक्षात घेतला तर विनोबांचे साधकांचे शिस्तबद्ध आश्रम माणसांच्या भुकेल्या साने गुरुजींच्या वृत्तीला मानवणारे नव्हते असेच म्हणावे लागेल. शिवाय समत्व वृत्ती धारण करण्यात आयुष्य खर्ची घालताना सामाजिक-राजकीय हस्तक्षेपासाठीचा अवकाश कधी आणि कसा शोधणार हाही पेच गुरुजींना जाणवला असू शकतो. या संदर्भात गुरुजींनी १९४२च्या तुरुंगवासात लिहिलेली ' श्यामची पत्रे ' विशेष लक्षात घेण्यासारखी आहेत. गुरुजी या पत्रांमध्ये गांधीवादाची तीन तत्त्वे सांगतात. १. संपत्ती एका हाती न देणे, २. सत्ता एका हाती न देणे आणि ३. लोकांची एकाच ठिकाणी गर्दी होऊ न देणे. या तिन्ही तत्त्वांत विनोबांच्या एकादश व्रतातील अहिंसा-सत्य-ब्रह्मचर्य यांचा समावेश नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे. एकादश व्रतातील अस्तेय, अपरिग्रह यासारख्या तत्त्वांमध्ये गुरुजींनी मांडलेली तत्त्वे अनुस्यूत असली, तरी इतिहासाच्या त्या टप्प्यावर या तत्त्वांना विनोबा देत असलेला अग्रक्रम गुरुजींना मान्य नव्हता असे म्हणायला जागा आहे. शिवाय हिंसेच्या वापराबद्दलदेखील गुरुजींची भूमिका विनोबा किंवा इतर गांधीवाद्यांपेक्षा भिन्न होती. 'श्यामची पत्रे'मध्येच गुरुजी लिहितात, ''आम्ही हिंसेचे भक्त नसलो तरी हिंसा अपरिहार्य असेल तरच ती आम्ही करू. श्रीमंतांना, तुम्ही ट्रस्टी व्हा असे सांगता. कोणता श्रीमंत हे ऐकत आहे? या श्रीमंतांविरुद्ध आम्ही अहिंसक सत्याग्रह करून काय होणार? आमच्यावर गोळ्या घातल्या जाणार. आम्ही असे मरायला तयार नाही. उपासमारीने मरण. गोळीबाराने मरण. आमचे रोज मरणच आहे. ज्यामुळे मरण आहे त्याला नष्ट करायला आम्ही उभे राहू. हिंसा-अहिंसा आमच्यासमोर प्रश्न नाही. कोट्यवधी गरिबांची हाय हाय होत आहे. ही जी श्रमणाऱ्या लोकांची तीळ तीळ हिंसा होत आहे, ती थांबवण्यासाठी मूठभर लोकांची हिंसा करावीच लागली तर ती आम्ही करू...'' गुरुजींची हिंसेविषयीची ही भूमिका १९३६ ते १९५० या काळात त्यांनी केलेल्या विविध लेखनात कमी अधिक प्रमाणात मात्र आलेली आढळते. गुरुजींचा हा वैचारिक प्रवास लक्षात घेतला, तर विनोबांचा आश्रम सोडतानाची त्यांची मनोवस्था समजू शकते.

साने गुरुजींनी विनोबांचा आश्रम सोडला तरी विनोबांबरोबरचे त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध कायम राहिले. १९३६च्या फैजपूर काँग्रेसच्या तयारीसाठी गुरुजींनी प्रचंड मेहनत केली. त्या वेळी त्यांच्या प्रकृतीची काळजी विनोबा स्वत: जातीने घेत असत. प्रचारसभांत बोलून घसा बसलेल्या साने गुरुजींना विनोबा दररोज तूप-मीठ घातलेले पाणी स्वत: गरम करून देत असत. विनोबा आणि गुरुजींचे जिव्हाळ्याचे नाते स्पष्ट करणारी अनेक पत्रे दोघांनीही एकमेकांना लिहिलेली आहेत.१२ डिसेंबर १९४१च्या पत्रात विनोबा लिहितात, ''तुमची आमची हृदये एक आहेत. अनेक जन्मांचे आपण सोबती आहोत. कसलेही भेद-कल्पनेचे, काळाचे आणि स्थळाचे-आपणास अलग करू शकत नाहीत. मग भेटीची तळमळ कशाला? पण कधी कधी होते खरी. आणि हीच माझी मानवता. दुर्बळ पण सरळ; प्रेमळ आणि प्रांजळ...''

विनोबांचे गुरुजींविषयीचे हे ममत्व बिनशर्त होते. गुरुजींचा वैचारिक प्रवास स्वतंत्रपणे आणि समांतरपणे चालू झाल्यानंतरही विनोबांचा गुरुजींविषयीचा स्नेह कायम राहिला. गुरुजींची १९३८च्या आसपास कम्युनिस्टांशी जवळीक झाल्यानंतरदेखील विनोबांनी



म.गांधी आणि त्यांचे अनुयायी, वेगवेगळ्या वैचारिक छटांचे साम्यवादी, काँग्रेस समाजवादी, डॉ. आंबेडकर, सावरकर आणि हिंदुत्ववादी यांच्यातील वाद-संवादाने मराठी चर्चा विश्व ढवळून निघाले होते. साने गुरुजी या दशकाचे चिंतनशील साक्षीदार होते. त्यामुळे कोणताही एकच एक मतप्रवाह त्यांनी संपूर्णपणे कवटाळला नाही किंवा नाकारलाही नाही.

गुरुजींना ' काँग्रेस' पत्रामध्ये गीता प्रवचने छापण्याची परवानगी दिली होती. 'काँग्रेस' हे वर्तमानपत्र गुरुजींनी एप्रिल १९३८ पासून सुरू केले होते. ''काँग्रेस मायबाप। जाळील सर्व ताप'' असे या पत्राचे घोषवाक्य असले, तरी प्रांतिक स्तरावरील काँग्रेस सरकारच्या कामकाजावर बारकाईने लक्ष ठेवण्याचे काम गुरुजी या पत्रातून करत असत. या पत्राद्वारे कामगार आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारवर दबाव आणण्याच्या भूमिकेवर अनेक काँग्रेसजन नाराजही होते. असे असूनही विनोबांनी गुरुजींना 'गीता प्रवचने' छापण्याची परवानगी दिली. विनोबांच्या या प्रगाढ स्नेहाचा गुरुजींना विलक्षण संकोच वाटे. शिवाय वैचारिक अंतर कायम राखत वैयक्तिक पातळीवर स्नेह जपण्याचा ताणही येत असावा. कारण १९४०-४२ मध्ये विनोबांनी वारंवार लिहूनही गुरुजी फारसे विनोबांच्या भेटीला गेले नाहीत.

विनोबांच्या निकट सहवासात असूनही साने गुरुजींची 'आध्यात्मिक गांधीवादी' म्हणून जडणघडण का झाली नाही, हे समजण्यासाठी १९३० ते १९४० या काळातील महाराष्ट्रातील आणि व्यापक स्तरावर भारतातील वैचारिक वास्तव ध्यानात घ्यायला हवे. विविध मतप्रवाहांतील वाद-संवादातून निर्माण झालेल्या सळसळत्या ऊर्जेने हे दशक वैशिष्ट्यपूर्ण बनले होते. म.गांधी आणि त्यांचे अनुयायी, वेगवेगळ्या वैचारिक छटांचे साम्यवादी, काँग्रेस समाजवादी, डॉ. आंबेडकर, सावरकर आणि हिंदुत्ववादी यांच्यातील वाद-संवादाने मराठी चर्चाविश्व ढवळून निघाले होते. साने गुरुजी या दशकाचे चिंतनशील साक्षीदार होते. त्यामुळे कोणताही एकच एक मतप्रवाह त्यांनी संपूर्णपणे कवटाळला नाही किंवा नाकारलाही नाही. या विचारप्रवाहांनी उपस्थित केलेले जे प्रश्न आणि अधोरेखित केलेली जी मूल्ये त्यांना स्वीकारण्याजोगी वाटली, ती त्यांनी स्वीकारली आणि जी त्याज्य वाटली ती निर्भयतेने सोडून दिली. हे करताना आपले सहकारी आपल्याला काय म्हणतील याची अवास्तव भीती त्यांनी कधी बाळगली नाही. गुरुजींच्या विचारांतील हा खुलेपणा न पेलल्यानेच त्यांच्या समकालीनांनी 'एक विचारवंत' म्हणून गुरुजींची उपेक्षा केली. पुढे त्यांच्या अनुयायी चरित्रकारांनाही त्यांचा हा खुलेपणा पुरेसा उमजला नाही. त्यांना तो गुरुजींचा भाबडेपणा वाटला. वास्तविक साने गुरुजी भारतीय समाजातील अनेक प्रश्नांना एकाच वेळी सामोरे जाण्याच्या प्रयत्नांत होते. त्यासाठी त्यांना विविध विचारप्रवाहांमधून निर्माण होणारी ऊर्जा आवश्यक वाटत होती. त्याचबरोबर या प्रवाहांना सांधणारी यंत्रणा म्हणून त्यांना काँग्रेस महत्त्वाची वाटत होती. १९३०च्या दशकातील काँग्रेस ही भारतातील विविध विचारप्रवाहांना कवेत घेणारी संघटना होती. गांधीवादी, समाजवादी आणि कम्युनिस्ट, ब्राह्मणेतर चळवळीतील नेते-कार्यकर्ते आणि डॉ.हेडगेवारांसारखे हिंदुत्ववादी त्या वेळी काँग्रेसचे सदस्य होते. काँग्रेसविषयीची कम्युनिस्टांची भूमिका सतत बदलत गेली असली तरी १९३३च्या आसपास त्यांनी काँग्रेसशी मिळतेजुळते घेण्याची भूमिका स्वीकारली होती. ही भूमिका दुसऱ्या कम्युनिस्ट इंटरनॅशनलमधील लेनिन-एम.एन.रॉय यांच्या वादाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस-गांधी यांना प्रति-क्रांतिकारी ठरविण्याच्या भूमिकेच्या बरोबर उलटी भूमिका होती. युरोपात वाहू लागलेल्या दुसऱ्या महायुद्धाच्या आणि हिटलर उदयाच्या पार्श्वभूमीवर सातव्या कम्युनिस्ट इंटरनॅशनलने ही रणनीती आखली होती. महाराष्ट्रातील कम्युनिस्टांमध्येही काँग्रेसविषयी आणि एकूणच राष्ट्रीय चळवळीविषयी वाद होते. कॉ.श्रीपाद अमृत डांगे काँग्रेसबरोबर सहकार्याचा आग्रह धरत होते. १९३६ च्या आसपास तर ते महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीवर राहुरी (जि.अहमदनगर) भागातून निवडूनही गेले होते. कॉ.बी.टी. रणदिवे मात्र काँग्रेसपासून अलगाव राखण्याच्या भूमिकेचे आग्रही समर्थक होते. असे असले तरी राष्ट्रीय पातळीवर कम्युनिस्टांनी काँग्रेस समाजवाद्यांबरोबर 'संयुक्त मोर्चा' उघडण्याचा निर्णय घेतला होता. काँग्रेस समाजवाद्यांना कम्युनिस्टांचा प्रस्ताव स्वागतार्ह वाटला आणि जानेवारी १९३६ मध्ये जयप्रकाश नारायण यांनी मांडलेल्या ठरावानुसार काँग्रेस समाजवाद्यांनी कम्युनिस्टांना आपल्या संघटनेचे सदस्य करून घ्यायला सुरुवात केली. साने गुरुजींच्या राजकीय जाणिवा आणि भूमिकांवर या घडामोडींचा लक्षणीय प्रभाव पडला. गांधीवाद ते लोकशाही समाजवाद हा सानेगुरुजींचा वैचारिक प्रवास या प्रभावातूनच घडला. राजकीय व्यवहाराच्या पातळीवर कम्युनिस्टांशी जवळीक, त्यामुळे ओढवलेला काँग्रेसजनांचा रोष व पुढे उपेक्षा यांसारख्या गोष्टींनाही यामुळे साने गुरुजींना सामोरे जावे लागले. या सर्वांविषयी आपण पुढील प्रकरणांमधून माहिती घेणार आहोत. तद्पूर्वी साने गुरुजींना कम्युनिस्टांशी जवळीक का वाटली, हे समजून घ्यायला हवे.

काँग्रेसच्या सर्वसमावेशकतेविषयी साने गुरुजींच्या काही धारणा होत्या. काँग्रेसमधील बहुविध प्रवाह हे जरी त्यांना काँग्रेसचे वैभव वाटत असले तरी जो विचारसमूह राजकीयदृष्ट्या प्रबळ ठरतो, काँग्रेस त्याच्या दिशेला वळते याची त्यांना जाणीव होती. एका बाजूला फैजपूर काँग्रेससाठी गावोगाव फिरताना जाणवलेल्या गोरगरीब जनतेच्या काँग्रेसविषयीच्या अपेक्षा आणि दुसरीकडे काँग्रेस संघटनेवरील गुजराती-मारवाडी धनिकांची पकड या दोन्ही वास्तवांचा अनुभव गुरुजी एकाच वेळी घेत होते. मंगलदास गिरिधरदास, कस्तुरभाई लालभाई, अंबालाल साराभाई,

घनश्यामदास बिर्ला, जमनालाल बजाज हे उद्योजक-व्यापारी म.गांधींच्या विधायक कार्याला मोठ्या प्रमाणात निधी देणगीरूपाने देत असत. त्याचबरोबर कॉंग्रेसच्या ध्येयधोरणांना प्रभावित करण्याचेही त्यांचे प्रयत्न असत. म.गांधींनी निर्णय घेताना या लक्ष्मीपतींच्या देणग्यांचे कधीच दडपण घेतले नाही. निर्णय घेताना आपली स्वायत्तता गांधीजींनी कायम राखून ठेवली होती. असे असले तरी भारतातील भांडवलदारवर्ग गांधीजींकडे भारतात साम्यवादी क्रांती थोपवून धरणारी व्यक्ती म्हणून पहात होता ही वस्तुस्थिती होती. मुंबई प्रांतिक कॉंग्रेसचे स्वरूप तर या संदर्भात विशेष लक्षणीय होते.तिच्यात मराठी बुद्धिजीवींपेक्षा गुजराथी धनिकांचा प्रभाव अधिक होता. मुंबई प्रांतिक कॉंग्रेसमधील शंकरराव देवांसारखे मराठी प्रतिनिधी संघर्षापेक्षा समन्वयावर भर देणारे कर्मकांडवादी गांधीवादी होते. १९३०च्या दशकाच्या मध्यावर गांधीजी अणि कॉंग्रेसमधील वैचारिक अंतरही वाढत चालले होते. कॉंग्रेसमधील स्वराज्य पक्षाच्या गटाला गांधीजींनी पाठिंबा दिल्याने पं. नेहरू व सरदार पटेल नाराज होते. चरखा आणि खादीचा वापर, अस्पृश्यतेकडे पाहण्याचा धार्मिक-अध्यात्मिक दृष्टिकोन, कॉंग्रेस-समाजवाद्यांबरोबरील मतभेद इ. मुद्दे कॉंग्रेस आणि गांधीजींमधील वैचारिक अंतर वाढवत होते. याची परिणती म्हणून शेवटी म. गांधींनी ऑक्टोबर १९३४ मध्ये कॉंग्रेसचा राजीनामा दिला. या पार्श्वभूमीवर साने गुरुजींना कॉंग्रेसमध्ये श्रमजीवींचा आवाज बुलंद करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची निकड जाणवू लागली. त्यातूनच त्यांनी कॉ.वसंतराव भागवत, कॉ.नथूभाऊ पारोळेकर आदी साम्यवाद्यांच्या बरोबर खानदेशातील शेतकरी आणि कामगारांना संघटित करायला सुरुवात केली.

साम्यवाद्यांबरोबरील आणि पुढे समाजवाद्यांबरोबरील वैचारिक देवाणघेवाण आणि मार्क्सच्या वाचनामुळे गांधी विचारांतील काही कळीच्या मुद्द्यांवर गुरुजींनी पुनर्विचार सुरू केला. यापैकी विश्वस्ताच्या संकल्पनेविषयी त्यांच्या मनात विशेष साशंकता निर्माण झाली. प्रांतिक मंडळातील कॉंग्रेसचे कामगारविषयक धोरण, कूळकायदा करण्याविषयी चाललेली दिरंगाई पाहता कोणताही धनिक स्वत:च्या संपत्तीकडे अनासक्त वृत्तीने आणि निव्वळ विश्वस्त भावनेने पाहणार नाही, याची जाणीव त्यांना वारंवार होऊ लागली. त्यामुळे संपत्तीच्या पुनर्वाटपासाठी आणि श्रमिकांना त्यांचे न्याय्य हक्क मिळण्यासाठी श्रमिकांचे लढे उभे राहणे त्यांना गरजेचे वाटू लागले. याच सुमारास मध्यप्रांतातील कॉंग्रेस सरकारने कूळ कायदा मंजूर केला होता. मध्यप्रांतातील किसानसभा अत्यंत संघर्षशील आणि सक्रिय होत्या. गुरुजी त्यांच्या कार्याची दखल 'कॉंग्रेस' पत्रातून सातत्याने घेत असत. ४ जुलै १९३८च्या 'कॉंग्रेस'च्या संपादकीयमध्ये गुरुजी लिहितात, ''संयुक्त प्रांतात एवढा उत्साह का आहे? तेथे शेतकऱ्यांच्या दु:खांना, कामगारांच्या दु:खांना अधिक जिव्हाळ्याने सहानुभूती दाखवली जाते. संयुक्त प्रांतीय कॉंग्रेस कमिट्यांना समाजसत्तावादाचा थोडा वास आहे. हा सुवास सर्वत्र दरवळत जातो व संघटनेला मदत होते.'' याच अंकात कॉ.वसंतराव भागवतांचाही लेख आहे. ते लिहितात, ''कॉंग्रेसने आपल्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनास अनुसरून काही किरकोळ स्वरूपाच्या सवलती शेतकरी, कामकऱ्यास देऊ केल्या. त्याबरोबर आपल्या पिढीजात वतनदारीच्या व पिळवणुकीच्या कामास आळा बसणार या धास्तीने सावकार, जमीनदार, भांडवलदार वर्ग कॉंग्रेसच्या विरुद्ध काहूर करून उठला आहे. आज संयुक्त प्रांतात कानपूरचे भांडवलवाले व इतर जमीनदार यांनी एकजूट करून कॉंग्रेस मंत्रिमंडळाच्या लढाऊ कार्यक्रमावर जोराचा हल्ला चालवला आहे. त्यास कानपूरच्या कामगारांनी सार्वत्रिक संपाने चोख उत्तर दिले व त्यामागे सर्व जनता उभी राहिली. त्याचप्रमाणे कुळाच्या कायद्याबाबत संयुक्त प्रांतिक कॉंग्रेस कमिटीने सबंध प्रांतभर किसान परिषदा भरवून मंत्रिमंडळाचे हात बळकट केले. आज महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात या ठिकाणी अशाच स्वरूपाचा झगडा उभा राहणार आहे.''

या दोन्ही लेखांचा एकत्रित विचार केला तर प्रांतिक मंडळे स्थापन झाल्यानंतरची साने गुरुजींची मानसिकता स्पष्ट होते. एकीकडे राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी लढणारी आणि समाजातील विविध घटकांना जोडणारी कॉंग्रेस अधिकाधिक बळकट कशी होईल याचा विचार करत असतानाच दुसरीकडे जोपर्यंत कॉंग्रेस समाजातील शोषित वर्गांचे प्रश्न हाती घेत नाही, तोपर्यंत स्वातंत्र्याचा आग्रह अर्थहीन राहणार याचे स्पष्ट भान गुरुजींना होते. शिवाय केवळ सदसद्‌विवेक बुद्धीला आवाहन करून प्रस्थापित वर्ग शोषितांच्या हक्कांना मान्यता देणार नाही, याचीही जाणीव प्रांतिक मंडळाच्या अनुभवातून त्यांना होत होती. भारतीय समाजातील प्रस्थापित वर्गांना आणि त्यांच्या प्रभावाखाली चाललेल्या कॉंग्रेसला न्याय्य पायावर उभे करण्यासाठी श्रमिकांना संघटित करण्याची आत्यंतिक निकड गुरुजींना जाणवू लागली. त्यातूनच 'आध्यात्मिक गांधीवाद'शी त्यांनी फारकत घेतली. अर्थात् म्हणून ते साम्यवादाकडे झुकले, असे म्हणणे चुकीचे ठरेल. साम्यवादाविषयी गुरुजींचे काही मूलभूत आक्षेप होते. साम्यवाद्यांचे धर्माविषयीचे 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर' स्वरूपाचे प्रत्यक्षवादी आकलन गुरुजींना बौद्धिक अहंकाराचे लक्षण वाटत असे. धर्म आणि अध्यात्माच्या क्षेत्रात कोणतेही प्रयोग गंभीरपणे न करता त्याविषयी शेरेबाजी करणे गुरुजींना अमान्य होते. राष्ट्रवादाविषयीच्या साम्यवाद्यांच्या आकलनाबद्दलदेखील गुरुजींचे काही मूलभूत आक्षेप होते. हे वैचारिक मतभेद १९४०च्या आसपास अधिक ठळकपणे दृष्टिपथात येत गेले. त्यामागे साम्यवाद्यांच्या राजकीय डावपेचात होत गेलेले बदलच अधिक कारणीभूत ठरले. १९३९ च्या अखेरीला जयप्रकाश नारायण यांना सापडलेल्या साम्यवाद्यांच्या गुप्त कागदपत्रांतून 'संयुक्त मोर्चा'चा प्रयोग हा साम्यवाद्यांच्या डावपेचात्मक रणनीतीचा भाग होता हे उघड झाले. आपला वापर झाला, आपण फसवले गेलो हे ध्यानात आल्यावर कॉंग्रेस समाजवाद्यांनी साम्यवाद्यांना आपल्या संघटनेतून काढून टाकले. या टप्प्यावर दुसरे महायुद्ध सुरू झालेले होते. कॉंग्रेसने युद्धविरोधाची भूमिका घेतली होती. जून १९४० मध्ये रशियावर

जर्मनीचा हल्ला होईपर्यंत साम्यवादीही या युद्धाला 'साम्राज्यवादी युद्ध' म्हणत होते. रशियावर हल्ला झाल्यानंतर मात्र त्यांनी आपली भूमिका बदलली. दुसरे महायुद्ध हे 'लोकयुद्ध' आहे असे म्हणत त्यांनी युद्धाला पाठिंबा जाहीर केला. साने गुरुजींचा मात्र युद्धाला विरोध होता. या विरोधामागे प्रामुख्याने दोन कारणे होती. पहिले कारण म्हणजे भारतातील चाळीस कोटी लोकांना ब्रिटिश शासनाविरुद्ध अवाक्षरही उच्चारण्याचे स्वातंत्र्य नसताना दुसऱ्या महायुद्धाला 'लोकयुद्ध' म्हणणे त्यांना पूर्णपणे अमान्य होते. युद्ध समर्थन म्हणजे लोकांची शुद्ध फसवणूक आहे असे त्यांचे मत होते. दुसरे म्हणजे भारतीयांचे हित दुय्यम ठरवत रशियाच्या हितसंबंधांना केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेणे त्यांना सर्वस्वी गैर वाटत होते. यामागे राष्ट्रनिष्ठेची भूमिका तर होतीच पण त्याचबरोबर स्टॅलिन आणि ट्रॉट्स्की यांच्यातील वैचारिक मतभेदांचाही संदर्भ होता. रशियातील साम्यवादी क्रांती सांभाळायची की जगभरात क्रांतीला मदत करायची या वादात झालेली स्टॅलिनची सरशी पाहता रशियानिष्ठ भूमिका ही कोणत्याच अर्थाने गुरुजींना भारतीयांच्या हिताची वाटत नव्हती. स्टॅलिन ट्रॉट्स्की वादाविषयी गुरुजी लिहितात, ''ट्रॉट्स्की जगभर क्रांती व्हावी असे म्हणे, याचा अर्थ रशियातील क्रांतीचा प्रयोग सांभाळला जाऊ नये, असे नव्हता तो म्हणत; त्याचे म्हणणे एवढेच, की जोर कशावर द्यायचा? आपले लक्ष जगाकडे हवे; आणि देशातही जागतिक क्रांतीचे ध्येय सतत सर्वांच्या डोळ्यांसमोर राखले पाहिजे. देशातील कामगारांच्या हाती संपूर्ण सत्ता तोवर असली पाहिजे. संक्रमणावस्थेत जगात अन्यत्र कामगार सत्ता स्थापन झाली नाही तोपर्यंत रशियात कामगारांचीच सोव्हिएट्स हवीत. कामगारांच्याच हाती सूत्रे असावीत. म्हणजे रशियात कामगार–हुकुमशाही जगातील क्रांतीकडे सतत लक्ष ठेवील. परंतु स्टॅलिनला हे तितकेसे पटत नव्हते. स्टॅलिन स्वार्थी आहे, सत्तालोलुप आहे असे नाही; परंतु त्याला रशियातील प्रयोगाचा सांभाळ अधिक महत्त्वाचा वाटत आहे. परंतु एकदा तुम्ही सांभाळण्याची वृत्ती घेण्याचे झालेत की जहालपणा जातो; ध्येयवाद कमी होतो, तीव्रता कमी होते! तेच आज रशियात झाले आहे का? केवळ आपला प्रयोग सांभाळण्याच्या कामात रशिया रंगणार का? जगक्रांतीच्या ज्वाला त्याच्या हृदयाला नाही का पेटवणार?''

रशियातील साम्यवादाचे निर्णय त्यांच्या 'राष्ट्रीय' हिताला अनुसरून असताना भारतीय साम्यवाद्यांनी मात्र राष्ट्रवादाला 'बूर्ज्वा' विचारसरणी मानत रशियाधार्जिणी भूमिका घेणे म्हणूनच गुरुजींना चुकीचे वाटत होते. यातूनच गुरुजींनी संघटनात्मक पातळीवर साम्यवाद्यांशी पूर्णत: फारकत घेतली आणि १९४२च्या 'चले जाव' आंदोलनात स्वत:ला झोकून दिले. साम्यवाद्यांबरोबरची फारकत म्हणजे मार्क्सच्या विचारांना तिलांजली नव्हे, हे येथे आग्रहाने नमूद करायला हवे. मार्क्सच्या विचारातील मुक्तिदायी अवकाशाविषयी साने गुरुजींना शेवटपर्यंत आस्था होती, हे त्यांच्या स्वातंत्र्योत्तर काळातील लिखाणातून स्पष्टपणे दिसून येते. संघटनात्मक पातळीवरील साम्यवाद्यांबरोबर मतभेद आणि मार्क्सवादातील शोषणमुक्तीच्या

तत्त्वज्ञानाविषयी आस्था, गांधीवादातील समग्र परिवर्तनाच्या तत्त्वाविषयी बांधिलकी आणि संघटनात्मक पातळीवर काँग्रेसकडून होत असलेली उपेक्षा हे साने गुरुजींच्या आयुष्याच्या उत्तरार्धातील ताणाचे मुख्य स्रोत होते. सामाजिक शक्ती वेगाने जागृत होत होत्या. मात्र या जाग्या झालेल्या शक्तींना संघटित करण्यासाठी, दिशा देण्यासाठी आणि नवभारताच्या निर्मितीचा पाया समताधिष्ठित बनवण्यासाठी आवश्यक तो संरचनात्मक आधार काही गुरुजींना लाभत नव्हता. उठता बसता गांधीजींच्या नावाचा जप करणारी काँग्रेस समताकेंद्री बदलांसाठी आवश्यक पाऊले टाकताना अडखळत होती तर कम्युनिस्ट हे राष्ट्र-राज्याच्या वास्तवाशी नाळ तोडून बसले होते. समाजवादी राजकारणाचा तिसरा स्वतंत्र पर्याय काँग्रेसपासून वेगळे अस्तित्व शोधण्याच्या प्रक्रियेत होता. पक्षीय राजकारणातील हेवेदावे आणि डावपेच यांना तोंड देण्यासाठी किंवा पक्षसंघटनेला हाताशी धरून परिवर्तनाचे राजकारण करण्यासाठी आवश्यक ती मनोभूमिका गुरुजींपाशी नव्हती. हे त्यांना स्वत:लाही माहीत होते आणि तसे त्यांनी वेळोवेळी कबूलही केले होते. मात्र अशा प्रकारचे मूल्याधिष्ठित राजकारण करण्याची क्षमता असणाऱ्यांनाही गुरुजींची व्यापक दृष्टी उमजत नव्हती हे अधिक विदारक होते. राष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेत दलित-शोषित वर्गाला केंद्रस्थानी आणण्याची साने गुरुजींची तळमळ किंवा वंचित-शोषित-दलितांना एकत्र आणण्याचे साने गुरुजींचे प्रयत्न त्यांच्या समकालिनांच्या दृष्टीने प्रामाणिक होते, मात्र भाबडे होते. भूतदयावादी होते मात्र क्रांतिकारी नव्हते. धर्म, परंपरा, रीतिरिवाज, सणवार यांत रमलेले त्यांचे साहित्य बुद्धिवाद्यांच्या दृष्टीने रंजक होते मात्र विचारप्रवण नव्हते. त्यांची धर्मनिरपेक्षता बुद्धिवाद्यांप्रमाणे 'इहवादी' नव्हती तर केवळ सर्वधर्मसमभावाचा आग्रह धरणारी होती. साने गुरुजींचे व्यक्तिमत्त्व आणि विचारांविषयी प्रेम असणाऱ्यांनीही त्यांच्या विचारांकडे गंभीरपणे पाहिले नाही. २ जानेवारी १९४५ रोजी मधू लिमये यांना लिहिलेल्या पत्रात साने गुरुजी लिहितात, "...तुला, भाऊ फाटकला, नानासाहेबार्दीना, थोडक्यात बुद्धिप्रधान आणि चिकित्सक लोकांस, शास्त्रीय दृष्टिकोनाच्या लोकांस माझी पुस्तके हाती धरावी असे वाटणार नाही. आणि का वाटावे? मधू, तुला आनंद देईल असे पुस्तक नाही हो बाळ, मला लिहिता येणार! तुला माझा अभिमान वाटेल असे मला नाही लिहिता येणार. एकतर म्हणून तुमची मान खाली होऊ नये म्हणून मी लिहिणे सोडून दिले पाहिजे किंवा शास्त्रीय दृष्टीने, तुमची जी मानसशास्त्रे आहेत, बौद्धिक प्रक्रिया आहेत, स्वभावपरिपोष कसे करावे, खलत्व कसे रंगवावे, विरोध विकासवादी किंवा मार्क्सिस्ट विदारक दृष्टीने कसे पहावे, ते सारे शिकून मगच लिहावे... मधू, महाराष्ट्रातील बौद्धिक व शास्त्रीय कल्पनांच्या जगात वावरणाऱ्या व्यक्ती काही म्हणोत. ज्यांची जीवने साधी सरळ आहेत ते माझी पुस्तके हृदयाशी धरतात. आणि म्हणून ती क्षणात खपतात... याच पत्रात पुढे ते लिहितात, "क्रांतिकारकांना भावनांनी दुबळेपणा येतो म्हणून त्या निर्जीव केल्या पाहिजेत असे तुमच्या टेक्निकमध्ये असेल. त्याप्रमाणे तू करत असशील. परंतु मी बुद्धिशून्य व तर्कशून्य. मी भावनांच्या ओलाव्यावर जगतो. त्यासाठी भुकेलेला. मला लिहिताना तुला

ज्या काळात पाया हा भौतिक आणि इतर बाबी म्हणजे इमला असे यांत्रिकपणे पाहिले जात होते त्या काळात वैचारिकतेचा कोणताही बडेजाव न मांडता घेतलेल्या साने गुरुजींच्या प्रगल्भ भूमिकेकडे गंभीरपणे पाहणे आणि त्या भूमिका पेलणे भारतातील बुद्धिजीवी वर्गाला झेपले नाही ही वस्तुस्थिती आहे. भारतीय संस्कृतीतील उत्सवी परंपरा, चालीरीती, ओव्या-लोकगीते यांच्याशी हार्दिक संवाद करत आणि तरीही पुनरुज्जीवनवाद, मूलतत्त्ववाद किंवा जमातवादाच्या जाळ्यात न अडकता जपलेली गुरुजींची धार्मिकता जेवढी परंपरेतील सत्त्व जपणारी होती, तेवढीच नव्या विचारांना कवेत घेण्यासाठी आसुसलेली होती.

उचंबळून येणार नाही. कारण Theory, policy line माझ्याजवळ काय आहे?..." गुरुजींच्या पत्रातील ही वेदना केवळ व्यक्तिगत पातळीवरील उपेक्षेची सूचक नाही; तर स्वतंत्र भारतातील राजकारण ज्या वैचारिक कप्पेबंदपणात घोटाळत राहिले त्याची नांदी आहे. गांधीवाद्यांनी साधनशुचितेचा आग्रह धरत राजकारणाचे आध्यात्मिकीकरण करावे, सूत कातावे, शेळीचे दूध प्यावे. समाजवादी-मार्क्सवाद्यांनी बुद्धिप्रामाण्यवादी इहवादाचा आग्रह धरावा. भौतिकवादी दृष्टिकोनाची कास धरावी; तर हिंदुत्ववाद्यांनी धर्माचा कायमस्वरूपी एकाधिकार मिळाल्याच्या आविर्भावात धर्म आणि परंपरेचे राजकारण करावे. हा अलिखित नियम असताना आध्यात्मिकता जगत जगत तिच्या अतीत जाऊ पाहणारा, भौतिकवादाचे सामर्थ्य ओळखत परंपरेला कवेत घेऊ पाहणारा, धर्मश्रद्धेबद्दल आदर बाळगत जमातवादाला कडाडून विरोध करणारा साने गुरुजींसारखा कोणत्याच चौकटीत न मावणारा माणूस त्याच्या व्यामिश्रतेसह उमगणे कठीणच होते. त्यामुळेच कम्युनिस्टांच्या 'नादी' लागलेल्या साने गुरुजींचे काँग्रेसला वावडे झाले तर साने गुरुजींच्या लिखाणातील धर्म-धार्मिकतेचे काय करायचे याचा बुद्धीवाद्यांना पेच पडला.

चालीरीती, परंपरा इ. विषयीची साने गुरुजींची भूमिका 'इस्लामी संस्कृती' या त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झालेल्या पुस्तकात दिसते. ते लिहितात, "समाजाचा इतिहास बुद्धीपेक्षा रूढी व दंतकथा यांनी अधिक बनवला आहे. इतिहास पाहणाऱ्याने त्यांच्याकडे तुच्छतेने पाहता कामा नये. शास्त्रज्ञाला सोने किंवा खडू सारख्याच किमतीचे. विचाराच्या तत्त्वज्ञानाचा उच्च स्वरूपाचा अभ्यास जसा महत्त्वाचा, तद्वत अंधविश्वास, चालीरीती, भोळसट कल्पना, लोकरूढी, दंतकथा यांचा अभ्यासही महत्त्वाचा. याच पुस्तकात त्यांची संस्कृतीविषयीची भूमिकाही स्पष्टपणे मांडलेली

आहे. ते लिहितात, ''...संस्कृतीचा भौगोलिक व आर्थिक परिस्थितीशी फार निकट संबंध असतो. आपलाच हेका धरणारे अंध लोक काही म्हणोत, मनुष्य हा परिस्थितीचा प्राणी आहे, ही गोष्ट नाकारता येणार नाही. मनुष्य आणखीही काही अधिक असतो, परंतु परिस्थितीचाही तो असतो.''

साने गुरुजींची वरील दोन्ही विधाने वास्तविक पाहता नवमार्क्सवाद्यांच्या भूमिकेपेक्षा कुठे वेगळी आहेत? असे असले तरी ज्या काळात पाया हा भौतिक आणि इतर बाबी म्हणजे इमला असे यांत्रिकपणे पाहिले जात होते त्या काळात वैचारिकतेचा कोणताही बडेजाव न मांडता घेतलेल्या साने गुरुजींच्या प्रगल्भ भूमिकेकडे गंभीरपणे पाहणे आणि त्या भूमिका पेलणे भारतातील बुद्धिजीवी वर्गाला झेपले नाही ही वस्तुस्थिती आहे. भारतीय संस्कृतीतील उत्सवी परंपरा, चालीरीती, ओव्या-लोकगीते यांच्याशी हार्दिक संवाद करत आणि तरीही पुनरुज्जीवनवाद, मूलतत्त्ववाद किंवा जमातवादाच्या जाळ्यात न अडकता जपलेली गुरुजींची धार्मिकता जेवढी परंपरेतील सत्त्व जपणारी होती, तेवढीच नव्या विचारांना कवेत घेण्यासाठी आसुसलेली होती. 'भारतीय संस्कृती' या ग्रंथात साने गुरुजी लिहितात, ''श्रुतिस्मृतींच्या अभ्यासाइतकेच सृष्टिशास्त्राचे अध्ययन पवित्र आहे. सनातन धर्मातील ही थोर दृष्टी आपण पुन्हा उचलली पाहिजे. परमोच्च बौद्धिक विकासाची ज्वाळा पुन्हा पेटवली पाहिजे. भारतीय संस्कृती तरच पुन्हा नवतेजाने नटेल. आज संस्कृती रक्षणाच्या चळवळी होत आहेत. नवीन विचारांचे वारे येऊ नयेत म्हणून सनातनी नावाची मंडळी किल्ले कोट बांधू पाहत आहेत. परंतु हे संस्कृतिरक्षक नसून संस्कृतिभक्षक आहेत. भारतीय संस्कृतीचे मढे ते कवटाळू पाहत आहेत व आतील प्राण गुदमरवत आहेत. हे सनातनी नसून असनातनी आहेत. सनातन या शब्दाचा अर्थच काय? सनातनो नित्य नूतन:! जे नेहमी नवीन नवीन स्वरूपात प्रकट होईल तेच टिकेल...''

मानवी इतिहास आणि संस्कृतीविषयीच्या या प्रगल्भ भूमिकेतून परंपरा आणि नवता, सातत्य आणि परिवर्तन यांकडे गुरुजींनी कधीही द्वैती दृष्टीने पाहिले नाही. उलट त्यांतील द्वंद्वात्मकता सातत्याने अधोरेखित केली आणि म्हणूनच धर्माच्या नावे चाललेल्या राजकारणाचा धार्मिकतेशी कोणताही संबंध नाही हे ते ओळखू शकले. धर्माच्या नावे चाललेले राजकारण म्हणजे प्रस्थापित वर्गांनी आपले हितसंबंध पोसण्यासाठी चालवलेला खेळ आहे. अध्यात्मभाव, देवभक्ती किंवा धर्मप्रीती यांपैकी कशाशीही जमातवाद्यांचा काडीमात्र संबंध नसतो ही भूमिका साने गुरुजींनी सातत्याने घेतली. १९३७ मध्ये पुण्यात हिंदू-मुस्लिम दंगल झाली. प्रशासनाने सोन्या मारुतीच्या मंदिरात वाद्ये वाजवायला मनाई केली. या पार्श्वभूमीवर साने गुरुजींनी 'सोन्या मारुती' ही कादंबरी लिहिली. त्यात हिंदूंवर झालेल्या अन्यायाला दूर करण्यासाठी त्यांनी संघटित झाले पाहिजे असे मानणाऱ्या तरुणाला कथानायक जमातवादी राजकारणाचे स्वरूप उलगडून दाखवतो आणि काही मूलभूत प्रश्न उपस्थित करतो. प्रांतिक मंडळाच्या निवडणुकीत पुण्यातील जागा लढवताना कोणाला दंगलीचा फायदा झाला? धर्माच्या नावे संघटन करू पाहणारे दीन-दलितांच्या प्रश्नांविषयी बधीर का असतात? सनातनी धर्म जगवण्यासाठी वासाहतिक सत्तेचे लांगूलचालन करून गुलामगिरी का स्वीकारली जाते? काळाराम सत्याग्रहात ज्यांनी दलितांना मंदिर-प्रवेश नाकारला त्यांना सोन्या मारुतीसाठी परकीय सरकारपुढे सत्याग्रह करण्याचा काय अधिकार आहे? असे अनेक जळजळीत प्रश्न नायकाच्या माध्यमातून साने गुरुजींनी या कादंबरीत विचारले आहेत. हरिजनांना सहभागी करून न घेता काढलेली नाशिकच्या काळारामाची मिरवणूक हा सोहळा नसून ती रामरायाची तिरडी होती असे जळजळीत विधान साने गुरुजींनी या कादंबरीत केले आहे.

जमातवादी राजकारणाच्या मुळाशी असलेल्या आर्थिक हितसंबंधाविषयीचे साने गुरुजींचे आकलन किती प्रगल्भ होते याचे उत्तम उदाहरण 'श्यामची पत्रे' मध्ये मिळते. गुरुजी लिहितात, ''हिंदू-मुसलमानांची एकी ही सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न असलेल्या जमातींची एकी आहे. केवळ दोन जमातींमधील साम्य-विरोधांचा तराजू जोखून हा प्रश्न सुटणार नाही. ह्या दोन जमातींची एकी व्हायची असेल तर जातीयवादाचा फायदा घेऊन वर्गहित साधणाऱ्या पुढाऱ्यांचे स्थान समाजातून नष्ट झाले पाहिजे. ते स्थान समाजवादी क्रांतीशिवाय नष्ट होणे शक्य नाही. एकजिनसी संस्कृती निर्माण व्हायची असेल, तर एकजिनसी समाजव्यवस्था निर्माण झाली पाहिजे. जळगावच्या शेतकरी परिषदेला हजारो मुसलमान शेतकरी आले होते. हिंदू शेतकऱ्यांबरोबर असलेले त्यांचे आर्थिक एकजिनसी नाते त्यांना कळले पण काँगेसचा राष्ट्रवाद त्यांना कळत नाही. ह्याचा अर्थ मुसलमान शेतकरी जातीयवादी आहेत असा का तू करणार? पण काँग्रेसचा राष्ट्रवाद म्हणजे आपल्या आर्थिक झगड्याचे तत्त्वज्ञान आहे हे त्यांना कळत नाही, आणि नाहीही कळणार कदाचित; कारण काँग्रेसही बहुजन समाजाच्या आर्थिक प्रश्नांकडे इतक्या आत्मीयतेने कोठे पाहत आहे?''

भारतातील अनेक समस्यांच्या मुळाशी आर्थिक विषमता आणि दारिद्र्य आहे याची जाणीव साने गुरुजींना होती. आर्थिक विषमता दूर करण्यासाठी शासन जोपर्यंत जोरदार प्रयत्न करत नाही तोपर्यंत स्वातंत्र्य आणि लोकशाही निरर्थक आहे, हा आग्रह साने गुरुजींच्या स्वातंत्र्योत्तर लिखाणात दिसतो. राष्ट्रवादी जाणिवांना एकाच वेळी धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक-आर्थिक समता यांचे अधिष्ठान देणे हे साने गुरुजींच्या वैचारिक चारित्र्याचे गुणसूत्र होते. विविध भाषा, धर्म, परंपरा यांना परस्परांशी बांधत नव्या राष्ट्राच्या निर्मितीसाठी तर त्यांना ते आवश्यक वाटत होतेच; त्याचबरोबर सर्वसमावेशक आत्मौपम्य भारतीयत्वाचा साने गुरुजींच्या दृष्टीने तो आत्माही होता. एकमेकांच्या वेदनेशी आणि आनंदाशी आंतरिक बांधला गेलेला एकमय भारतीय समाज घडविण्यासाठी साने गुरुजींनी केलेल्या प्रयत्नांची माहिती आपण पुढील प्रकरणांतून घेणार आहोत.

– चैत्रा रेडकर

Mob. 9892507400

द. ना. धनागरे

अभिमत विद्यापीठे, संस्थाचालक आणि मुक्त विद्यापीठे : काही आक्षेपांचे निराकरण

खासगी शिक्षणसंस्था, कुठलेही अनुदान नसताना, लो.टिळक, आगरकरांनी काढल्या, तसेच म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील आणि महर्षी धोंडो केशव कर्वे यांनीही काढल्या; त्यांच्या संस्थांच्या लौकिकामुळे आणि त्यांच्या शैक्षणिक विश्वासार्हतेमुळे त्या संस्थांना कालांतराने शासकीय अनुदानेही मिळाली; पण त्यांनी कुणी पंचतारांकित दिसणाऱ्या इमारती (ज्यांतील ७० टक्के जागेचा कधी वापरच केला जात नाही), किंवा प्रासादिक भवने उभी केल्याचे दिसले नाही, किंवा दोनशे कोटी रुपये खर्चून स्टेडियम आपल्याच नावाने बांधल्याचे किंवा शंभर कोटी रकमेची अघोषित संपत्ती, त्यांच्या संस्थांवर धाड पडली असता सापडल्याचे ऐकिवात नाही. 'थोडे कमी दर्जाचे शिक्षण दिले किंवा थोडे गैरव्यवहार सर्वत्रच चालतात – तर काय होते', अशी बोटचेपेपणाची भूमिका त्यांनी कधी घेतली नाही, त्यांना घ्यावी लागली नाही. ही उदाहरणे म्हणजे 'पुराणातली वानगी आहेत', 'ती पुराणातच राहू द्या' असे कोणी सुचवू इच्छित असतील तर हरकत नाही, मग मी 'जुन्या काळात वावरणारा, कालबाह्य संस्कार आणि विचार उराशी बाळगणारा आहे,' अशी कोणी टीका केल्यास ती मी सहर्ष स्वीकारीन; मात्र, 'थोडासा भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि थोड्या कमी दर्जाच्या शिक्षणाला' मी कदापिही अधिमान्यता द्यायला तयार होणार नाही. ह्या तात्त्विक भूमिकेपायी मला माझ्या कौटुंबिक जीवनात जी किंमत मोजावी लागली, त्याचा तपशील इथे देऊन मी त्याचे भांडवल करू इच्छित नाही.

अभिमत विद्यापीठे आणि खासगी विनाअनुदानित व्यावसायिक शिक्षणसंस्थांवर 'कपिल सिब्बल, यूजीसी आणि अभिमत विद्यापीठे' (साधना, १३ फेब्रु. २०१०) ह्या माझ्या लेखातील 'काही टीकात्मक मुद्द्यांची दुसरी बाजू' (साप्ता. साधना, ८ मे २०१०) विस्तृतपणे श्री.मनोहर जांभेकर यांनी मांडली आहे. तसेच 'साधना'च्या ह्याच अंकात डॉ.प्रदीप कर्णिक यांनी मुक्त विद्यापीठावरील माझ्या लेखातील (साधना, २४ एप्रिल २०१०) काही त्रुटी दाखविल्या आहेत. ह्या दोघांचेही प्रथम आभार मानतो. त्यांचे माझ्या मांडणीबद्दल– म्हणजे माझ्या भूमिकेबद्दल– जे गैरसमज झालेत ते दूर करण्यासाठी आणि माझ्या 'साधना'मध्ये जानेवारी २००९ ते एप्रिल २०१० पर्यंत प्रसिद्ध झालेल्या एकूण लेखमालेचा उद्देश अधिक स्पष्ट करण्यासाठी हा लेखनप्रपंच.

'माझ्या लेखामध्ये मी फक्त खासगी शिक्षणसंस्था आणि अभिमत विद्यापीठांवरच टीका करतो; शासनपुरस्कृत विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील कारभाराबद्दल मी बोलत नाही' असा आक्षेप तेच घेऊ शकतील, ज्यांनी ही १६ लेखांची संपूर्ण लेखमाला वाचलेली नाही. केंद्रीय विद्यापीठे, त्यांतील कुलगुरूंच्या घाईघाईत केलेल्या नेमणुका, विद्यापीठांच्या कारभारातील शासनाचा अवास्तव हस्तक्षेप, प्राचार्यपदाचे अवमूल्यन, अभ्यासक्रमांची पुनर्रचना आणि मूल्यांकन पद्धतीचा फेरविचार, विद्यापीठांमधील अध्यासननिर्मितीबाबत शासनाच्या सुस्पष्ट धोरणाचा अभाव, उच्चशिक्षणाचे आंतरराष्ट्रीयी-करण, प्राध्यापकांचा संप, 'ब्रेन ड्रेन'चे 'ब्रेन गेन'मध्ये रूपांतर करण्यासाठी १४ नवी राष्ट्रीय विद्यापीठे स्थापन करण्याचा केंद्र सरकारचा घाट, अभियांत्रिकी शिक्षणाचा खेळखंडोबा, तसेच कुलगुरू निवडप्रक्रियेतील राज्यशासनाची हाराकिरी, मुक्त विद्यापीठे इत्यादी सर्वच विषयांवर मी लेख लिहिले आहेत, त्यामुळे फक्त अभिमत विद्यापीठे व खासगी शिक्षणसंस्थांवरच मी टीका करतो असे म्हणणे अन्याय करणारे आहे.

उच्च शिक्षण क्षेत्रातील सध्याचे वास्तव– विशेषत: महाराष्ट्र राज्यातील स्थिती, त्या क्षेत्रात १९५९ पासून अध्यापन, संशोधन आणि थोडेफार शैक्षणिक प्रशासनाचे काम करताना मला आलेले अनुभव आणि थोडे भाष्य असे एकत्रितपणे मांडण्याचा मी

गैरव्यवहार करणाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत आणण्याऐवजी त्याचे प्रच्छन्नपणे समर्थन करून, नियमांचा आग्रह धरणाऱ्याला गोळ्या घालण्याने समाजात चांगली मूल्ये आणि संस्कार जपणारी पिढी उच्च शिक्षणातून आपण कशी तयार करणार? वर पुन्हा समाजात अशा मूल्ये जपणाऱ्या व्यक्ती दिसत नाहीत, असा कांगावा करणे दांभिकपणाचे नाही का? आणि विश्वसनीय व्यक्ती फक्त नातेवाईकांमध्येच अभिमत विद्यापीठे व खासगी संस्थाचालकांना सापडतात, अन्यत्र नाही, यावर श्री.जांभेकरांचा तरी प्रामाणिक विश्वास आहे का?

लेखमालेद्वारा प्रयत्न केला आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला असे साधना साप्ताहिकाच्या संपादकांना वाटते, तसेच मलाही वाटते. माझ्या मुद्द्यांशी सर्वांनी सहमत व्हावे किंवा ते होतील, अशा भ्रमात मी, लेखमाला सुरू केली तेव्हाही नव्हतो आणि आज लेखमाला संपलेली असतानाही नाही, हे प्रथमच स्पष्ट करतो.

सर्व उच्चशिक्षणाची जबाबदारी शासनाने घ्यावी, असे माझे मत नाही. तसेच खाजगीकरणालाही माझा विरोध नाही. त्यामुळे माझ्या मांडणीचे १९८३-८४ च्या सुमारास स्वागत झाले असते आणि आज माझे म्हणणे कालबाह्य झाले आहे, हे मनोहर जांभेकरांचे म्हणणे योग्य नाही. जसे शासनपुरस्कृत विद्यापीठांत उच्चशिक्षण, संशोधन कसे चालले आहे, त्याचा दर्जा काय, हे पाहणे गरजेचे आहे; तसेच २६ वर्षांनंतर व्यावसायिक उच्च शिक्षणामध्ये विनाअनुदान तत्त्वांवर खाजगी संस्थाचालकांना अवसर दिल्यानंतर त्या प्रयोगामागील मूळ उद्देशांचे नेमके काय झालेय, ह्याची समीक्षा होणेही आवश्यक आहे. शासनाचे काय किंवा खाजगी शिक्षणसंस्थांचे काय, कोंबडे झाकून ठेवल्याने ते आरवण्याचे राहत नाही, किंवा पहाट होणे लांबणीवर पडत नाही!

१. 'खेड्यापाड्यांतून जन्माला आलेली स्वातंत्र्योत्तर काळातील तरुण पिढी अशिक्षित ठेवण्यामध्ये त्यांचे (म्हणजे मध्यम वर्गीयांचे विशेषत: राजकीय पक्षांचे) हितसंबंध गुंतले होते,' आता... 'खाजगी संस्थांना मोठ्या प्रमाणात इंजिनिअरिंग, मेडिकल महाविद्यालये काढण्यास फक्त परवानगी दिल्यावर पुष्कळांच्या पोटांत दुखू लागले- अंदाजपत्रकातून अनुदान दिले नसूनसुद्धा' ह्या श्री.जांभेकरांच्या विधानांमधून असे ध्वनित होते, की तळागाळातून, खेड्यापाड्यांतून आलेल्या तरुण-तरुणींना ह्या खासगी इंजिनिअरिंग, मेडिकल उच्च शिक्षणाचा सर्वाधिक लाभ मिळाला. वस्तुस्थिती मात्र तशी नाही. गेल्या पंचवीस वर्षांत अशा महाविद्यालयांमधून शिक्षण घेणाऱ्यांत तळागाळातले (उच्चशिक्षण घेणाऱ्या पहिल्या पिढीतले) ग्रामीण विद्यार्थी किती होते, निमशहरी, शहरी मध्यमवर्गीय कुटुंबातील पण महाराष्ट्रातील किती आणि परप्रांतीय धनदांडग्यांचे पाल्य किती होते, याची पाहणी करून कोणी आकडेवारी गोळा केली आहे किंवा नाही, हे माहिती नाही; पण या संदर्भात आदरणीय प्रा.एन.डी.पाटील (कार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था) यांची एक बोलकी प्रतिक्रिया इथे सांगण्यासारखी आहे. त्यांच्या संस्थेने कर्मवीर भाऊराव पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, सातारा येथे काढले. मी कुलगुरुपदावर (१९९५-२०००) असताना त्यांची भेट घेतली, तेव्हा 'रयत'ने 'मेडिकल' कॉलेजसुद्धा का काढले नाही?' या माझ्या प्रश्नावर ते म्हणाले, की 'खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक शिक्षणाची कॉलेजेस सुरू झाली म्हणजे त्याचा लाभ आपल्या महाराष्ट्रातील ग्रामीण, खेड्यापाड्यांतून येणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी अधिकाधिक घेतील' असे वाटले होते, मात्र अनुभव असा आहे की एकूण विद्यार्थी प्रवेशसंख्येत त्यांची टक्केवारी १०-१५ टक्क्यांच्या वर कधीच गेली नाही. त्याचा फायदा विशेषत: शहरी मध्यमवर्गीय आणि परप्रांतीय श्रीमंत विद्यार्थीच जास्त घेताहेत. त्यामुळे आमचा भ्रमनिरास झाला.' त्यानंतर 'मेडिकल' कॉलेज का काढले नाही? ह्या प्रश्नावर ते उत्तर देताना म्हणाले, 'एक विनाअनुदान इंजिनिअरिंग कॉलेज काढून आम्ही पाहिले. कुठून ह्या प्रयोगात आपण आलो असे झाले आहे! विनाअनुदानित महाविद्यालयात जे 'आर्थिक व्यवहार' चालतात, करावे लागतात ते रयत शिक्षण संस्थेला मानवणारे नाहीत; आमच्या लौकिकाला शोभणारे नाहीत.' प्रा.एन.डी.पाटील हे एक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि मुरलेले मुत्सद्दी राजकारणी आहेत. त्यांच्या म्हणण्यावर मी काही भाष्य करावे हा माझा अधिकार नाही. त्यांच्या उत्तरातून त्यांना काय म्हणायचे आहे, हे वाचकांच्या लक्षात येईलच.

२. विनाअनुदानित संस्था चालविण्यासाठी बँकेकडून कोट्यवधींचे कर्ज घ्यावे लागते, त्यासाठी व्यवस्थापनातील सर्व व्यक्तींचा वैयक्तिक व सामूहिक जामीन घेतला जातो. हे सांगताना श्री.जांभेकरांनी असे सूचित केले आहे, की 'माजी कुलगुरू लेखकांनी स्वत: चार-पाच कोटी रुपयांचे कर्ज घेऊन संस्था चालवलेली आहे का', तरच त्यांना खासगी संस्थांवर टीका करण्याचा अधिकार आहे. त्यांच्या प्रश्नावर माझे उत्तर नकारार्थीच आहे. मी आग्रा विद्यापीठ, कानपूर आय.आय.टी., पुणे विद्यापीठ, आय.सी.एस.एस.आर., नवी दिल्ली आणि शेवटी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ह्या सर्व केंद्र- राज्य शासनपुरस्कृत संस्थांमध्ये काम केले. त्यामुळे कर्ज काढून उच्च शिक्षणाचा धंदा सुरू करायला दुकान थाटावे याची गरज मला भासली नाही; पण कोल्हापुरातील पाच वर्षांत इंजिनिअरिंग, मेडिकल, फार्मसी, डेन्टल, बी.एड., एम.बी.ए., एलएलबी, आयुर्वेद, होमिओपॅथी ह्या विविध विद्याशाखांतील अनेक विनाअनुदानित कॉलेजेसशी माझा प्रशासक म्हणून संबंध आला. त्या संबंधातील माझे बरे-

वाईट अनुभव लिहीत बसणे इथे अप्रस्तुत होईल. मात्र अशा बऱ्याच संस्थांचे आर्थिक व्यवहार पारदर्शी नाहीत हे श्री.जांभेकरही मान्य करतील. कोणी जर चोरी करून पळून जाऊ लागला तर त्याला पकडणाऱ्या व्यक्तीला मदत करणे दूर राहिले; उलट 'तुझी वस्तू त्याने चोरलीय का', नाही तर 'तू गप्प बैस' असे म्हणण्याचा हा प्रकार आहे. गैरव्यवहार करणाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत आणण्याऐवजी त्याचे प्रच्छन्नपणे समर्थन करून, नियमांचा आग्रह धरणाऱ्याला गोळ्या घालण्याने समाजात चांगली मूल्ये आणि संस्कार जपणारी पिढी उच्च शिक्षणातून आपण कशी तयार करणार? वर पुन्हा समाजात अशा मूल्ये जपणाऱ्या व्यक्ती दिसत नाहीत, असा कांगावा करणे दांभिकपणाचे नाही का? आणि विश्वसनीय व्यक्ती फक्त नातेवाईकांमध्येच अभिमत विद्यापीठे व खासगी संस्थाचालकांना सापडतात, अन्यत्र नाही, यावर श्री.जांभेकरांचा तरी प्रामाणिक विश्वास आहे का?

३. शासनपुरस्कृत विद्यापीठांतील घोटाळ्यांकडे, त्यांच्या काही कुलगुरूंना गजाआड काही वर्षे काढावी लागलीत, मी दुर्लक्ष करीत नाही, त्याचे समर्थन तर दूरच राहो. पुण्यातील चिंचवड, हिंजवडी, चाकण, वाकड या भागात विकसित झालेल्या कार्पोरेट कंपन्यांमधून लागणाऱ्या कार्यकौशल्यात झपाट्याने बदल होत आहेत याची मला चांगली कल्पना आहे. माझे अगदी जवळचे आप्त-पुतण्या व भाचे (चारजण) तिथे नोकऱ्या करीत आहेत. त्यांपैकी काही खासगी विनाअनुदानित संस्थांमध्येच शिकलेत. पण त्यामुळे १. फक्त अशाच संस्थांमधून पदव्या मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना नव्या संधी, नोकऱ्या मिळतात; किंवा फक्त तेच विदेशात जाऊन नोकऱ्या करतात आणि २. म्हणून ते जिथे शिकले त्या संस्थांचे शैक्षणिक आणि आर्थिक व्यवहार संशयातीत आहेत असे निष्कर्ष काढणे तर्कसंगत होणार नाही. म्हणूनच माझी टीका निराधार व फोल आहे हेसुद्धा त्यावरून सिद्ध होत नाही.

ज्या यंत्रणेत मी काम केले, त्यातील उणिवांवर, दोषांवर किंवा गैरव्यवहारांवर मी पांघरूण कधी घातले नाही; त्यांचे समर्थन तर कधीच केले नाही. यूजीसीमधील भ्रष्टाचार, यूजीसीकडील थकित बिले मिळविण्यासाठी काही कमिशन रक्कम नेऊन द्यावी लागते आणि ही कामे करणारे अनेक दलाल दिल्लीत आहेत हे अनेक विद्यापीठांना माहिती आहे. ह्याबाबत उघडपणे मी नोव्हेंबर १९९६ साली झालेल्या कलकत्ता येथील कुलगुरू परिषदेत तत्कालीन यूजीसीच्या अध्यक्षा डॉ.अर्माइटी देसाई यांच्या उपस्थितीत आरोप केला होता. तो त्यांना नाकारता आला नाही.

४. पुण्यातील 'उच्चभ्रू, विचारवंत, यः क्रियावान् स पण्डितः' अशा कुठल्याच विशेषणांना मी पात्र नाही, याची मला कल्पना आहे; पण केवळ खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक उच्च शिक्षणाची संस्था सुरू केली म्हणजेच माणूस 'क्रियावान' असतो असे म्हणणेसुद्धा आपापल्या क्षेत्रात सचोटीने, प्रामाणिकपणे कार्यरत असणाऱ्या इतर अनेकांवर अन्याय करण्यासारखे होईल. काळाबरोबर माणसाने बदलले पाहिजे हे खरे, पण याचा अर्थ 'रनिंग विथ द हेअर अॅन्ड हंटिंग विथ द हाउंड' असा होत नाही. बदलत असताना काळाचे भानही आले आहे की नाही, हे पाहणेही महत्त्वाचे.

५. काही अभिमत विद्यापीठांत/खाजगी व्यावसायिक कॉलेजेसमध्ये मंजूर विद्यार्थिसंख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यावर फार टीका करणे अप्रस्तुत आहे, असे श्री.जांभेकरांना वाटते; पण ती चूक न सुधारता, पुढच्या वर्षी जेव्हा पुन्हा अधिक संख्येने विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातात, त्याला 'विद्यार्थी हिता'ची ढाल पुढे करून चालवलेली नफेखोरी नाही म्हणायचे, तर आणखी काय म्हणायचे? अधिक प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावी (विद्यार्थीहित लक्षात घेता) असा हायकोर्टाचा आदेश संस्थाचालक एकदा आणतील; पण पुन्हा पुन्हा असे प्रकार होऊ लागल्यावर विद्यापीठालाही त्या संस्थाचालकांना त्याच उच्च न्यायालयाच्या आदेशावरून प्रवेश रद्द करून विद्यार्थ्यांना त्यांची फी परत करायला लावावे लागले आणि धडा शिकवावा लागला होता, हे श्री.जांभेकरांना माहिती असेलच. यावरूनच एखाद्या कुलगुरूंना हटविण्यासाठी त्या विद्यापीठांत सतत चार वर्षे आंदोलने का होतात; ती चालू ठेवण्यात कोण पैसे गुंतवितो, ह्या प्रश्नांच्या उत्तरांची थोडीशी झलक श्री.जांभेकरांना मिळावी अशी आशा आहे.

६. ज्या संस्थांना राज्यशासन/केंद्रशासन अनुदान देत नाही त्यांच्यावर-सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे १. प्रवेशनियंत्रण समिती, आणि २. शुल्कनिर्धारण समिती ह्या दोन जाचक यंत्रणा खाजगी संस्थांवर लादल्या आहेत असे श्री.जांभेकरांचे म्हणणे. हे 'अडथळे' दूर करायला माझी काहीच हरकत नाही. त्यांना यूजीसी., एआयसीटीई., नॅक इत्यादी केंद्रीय नियामक संस्थांची मान्यता घेणेही अनिवार्य असू नये. त्यांनी त्यांचे अभ्यासक्रम राबवावेत, परीक्षा घ्याव्यात आणि विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे द्यावीत; पण त्यांना जर ह्या नियामक संस्थांची मान्यता हवी असेल, तर त्यांना काही किमान अटींची पूर्तता करावीच लागणार. 'मूलभूत सुविधा' आणि अभ्यासक्रम शिकवणारे प्राध्यापकांचे शिक्षण व अनुभव याबाबत 'पात्रतेच्या निकषात बसणारे' आहेत किंवा नाहीत एवढेच यूजीसी इत्यादींनी, किंवा संलग्नता देणाऱ्या विद्यापीठाने पाहावे हे श्री.जांभेकरांचे म्हणणेही पटण्यासारखे आहे; पण हे दोन निकष जर कटाक्षाने पाळायचे म्हटले, तर आज किती इंजिनिअरिंग, मेडिकल, एमबीए ह्यांसारखी व्यावसायिक दुकाने (महाविद्यालये) बंद करावी लागतील याची केवळ कल्पनाच केलेली बरी!

७. प्रत्येक महाविद्यालयाने 'किती फी घ्यावी' हे इंटरनेटवर ताबडतोब कळते आणि विद्यार्थी तक्रार करू शकतात हे म्हणणे तत्त्वतः बरोबर

आहे. प्रश्न आहे तो खासगी विनाअनुदानित महाविद्यालये 'प्रत्यक्षात किती फी घेतात' हा. विद्यार्थी-विद्यार्थिनी तक्रार करायला धजत नाहीत, कारण प्रात्यक्षिक परीक्षांचे अंतर्गत गुण त्या महाविद्यालयांच्या हातात असतात. तीच गोष्ट प्राध्यापकांना मिळणाऱ्या (दिल्या जाणाऱ्या) वेतनश्रेणीची आहे. विनाअनुदानित संस्थेला मान्यता घेताना त्यांतील सेवाशर्ती अनुदानित संस्थांमधील शासनाने मान्य केलेल्या सेवाशर्तीप्रमाणेच राहतील, अशी अट संस्थाचालकांनी मान्य केलेली असते. प्रत्यक्षात त्यांना काय वेतनश्रेणी दिली जाते (रेकॉर्डवर एक, हातांत वेगळीच) ह्याची नि:पक्ष चौकशी जर उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशासमोर 'इन कॅमेरा' केली, तर अनेक धक्कादायक तथ्ये बाहेर येतील. 'तुला आम्ही अन्नपाण्याला लावला हे विसरू नकोस', अशी प्राध्यापकांना दमदाटी करणाऱ्या संस्थाचालकांची संख्या कमी नाही! अशा बऱ्याच खाजगी संस्थांमध्ये अंतर्गत दहशतीचे वातावरण असावे, हे केवढे दुर्भाग्यपूर्ण आहे!

८. ज्या यंत्रणेत मी काम केले, त्यातील उणिवांवर, दोषांवर किंवा गैरव्यवहारांवर मी पांघरूण कधी घातले नाही; त्यांचे समर्थन तर कधीच केले नाही. यूजीसीमधील भ्रष्टाचार, यूजीसीकडील थकित बिले मिळविण्यासाठी काही कमिशन रक्कम नेऊन द्यावी लागते आणि ही कामे करणारे अनेक दलाल दिल्लीत आहेत हे अनेक विद्यापीठांना माहिती आहे. ह्याबाबत उघडपणे मी नोव्हेंबर १९९६ साली झालेल्या कलकत्ता येथील कुलगुरू परिषदेत तत्कालीन यूजीसीच्या अध्यक्षा डॉ.अर्माइटी देसाई यांच्या उपस्थितीत आरोप केला होता. तो त्यांना नाकारता आला नाही. मंत्रालयात जाऊन खाजगी संस्थाचालक त्यांची कामे कशी करवून घेतात, याबद्दल ह्याच साप्ताहिकाच्या सदरांतून मी अनेकदा लिहिले आहे. तरीही टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला पुढील तीन वर्षांसाठी मान्यता देणारे पत्र यूजीसीने दिल्यानंतरही त्याचा 'अभिमत विद्यापीठ दर्जा रद्द करण्यात येईल.' असा उल्लेख सुप्रीम कोर्टात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात एचआरडी मंत्रालयाने करणे सर्वथा गैर आहे, अशीच माझी भूमिका आहे; पण म्हणून टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये सर्व काही ठीकठाक आहे असे गृहीत धरणेही दिशाभूल करणारे होऊ शकेल!

९. खाजगी संस्था चालवताना काही आर्थिक ओढाताण होत असेलही; पण जो खर्च होतोय असे कागदोपत्री दाखविले जाते तो प्रत्यक्षात केला जातो की नाही हा खरा प्रश्न आहे. चार-पाच कोटींचे कर्ज काढून 'शिक्षणाचा व्यवसाय' करणाऱ्यांनी 'नफा' मिळवायला हरकत नाही, फक्त त्यांनी 'नफेखोरी' करू नये अशी अपेक्षा सुप्रीम कोर्टानेच व्यक्त केली आहे. गुंतवणूक जो करेल त्याने वाजवी नफा मिळवावा. त्याला हरकत नसावी, मात्र '८० टक्के खाजगी विनाअनुदानित संस्था फायद्यात चालत नाहीत' म्हणजे तोटा सहन करून त्या चालविल्या जात आहेत यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही. त्यांनी ती महाविद्यालये/अभिमत विद्यापीठे बंद करावीत. त्यांतील विद्यार्थी, प्राध्यापक, सेवकांचे काय करायचे ते मान्यता देणारे राज्य/केंद्र शासन, यूजीसी वगैरे पाहून घेतील. 'तुम्ही संस्था सुरू करा' असे त्यांच्या हातापाया पडून विनवण्या करायला त्यांचेकडे कोणी गेले नव्हते! एका विशिष्ट दराने नफा मिळणे थांबले म्हणून बजाज ऑटो, स्कूटर सारखे भव्य उद्योगधंदे, कारखाने एकाएकी बंद केले जातात आणि एवढेच नाही, तर त्यांच्या मालकांना नंतर खासदारकीही मिळते! यातून विनाअनुदानित 'तोट्यात चालणाऱ्या' महाविद्यालयांच्या संस्थाचालकांनी बोध घ्यावा! महाविद्यालयाच्या बँकखात्यात सव्वा कोटी रुपयांची शिल्लक दाखविली जात असताना तीन-चार महिने पगार दिले जात नाहीत; उलट शिल्लक रकमा शिक्षणबाह्य (उदा. सहकारी साखर कारखाना) कामांकडे वळविल्या गेल्याची उदाहरणे देता येतील. ती कदाचित श्री.जांभेकरांनाही माहिती असतीलच.

खासगी शिक्षणसंस्था, कुठलेही अनुदान नसताना, लो.टिळक, आगरकरांनी काढल्या, तसेच म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील आणि महर्षी धोंडो केशव कर्वे यांनीही काढल्या; त्यांच्या संस्थांच्या लौकिकामुळे आणि त्यांच्या शैक्षणिक विश्वासार्हतेमुळे त्या संस्थांना कालांतराने शासकीय अनुदानेही मिळाली; पण त्यांनी कुणी पंचतारांकित दिसणाऱ्या इमारती (ज्यांतील ७० टक्के जागेचा कधी वापरच केला जात नाही), किंवा प्रासादिक भवने उभी केल्याचे दिसले नाही, किंवा दोनशे कोटी रुपये खर्चून स्टेडियम आपल्याच नावाने बांधल्याचे किंवा शंभर कोटी रकमेची अघोषित संपत्ती त्यांच्या संस्थांवर धाड पडली असता सापडल्याचे ऐकिवात नाही. 'थोडे कमी दर्जाचे शिक्षण दिले किंवा थोडे गैरव्यवहार सर्वत्रच चालतात तर काय होते', अशी बोटचेपेपणाची भूमिका त्यांनी कधी घेतली नाही, त्यांना घ्यावी लागली नाही. ही उदाहरणे म्हणजे 'पुराणातली वानगी आहेत', 'ती पुराणातच राहू द्या' असे कोणी सुचवू इच्छित असतील तर हरकत नाही, मग मी 'जुन्या काळात वावरणारा, कालबाह्य संस्कार आणि विचार उराशी बाळगणारा आहे,' अशी कोणी टीका केल्यास ती मी सहर्ष स्वीकारीन; मात्र, 'थोडासा भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि थोड्या कमी दर्जाच्या शिक्षणाला' मी कदापिही अधिमान्यता द्यायला तयार होणार नाही. ह्या तात्त्विक भूमिकेपायी मला माझ्या कौटुंबिक जीवनात जी किंमत मोजावी लागली, त्याचा तपशील इथे देऊन मी त्याचे भांडवल करू इच्छित नाही.

आता थोडे मुक्त विद्यापीठांबाबत...

मुक्त विद्यापीठ, दूरशिक्षणावरील माझ्या लेखात आणि त्या आधीच्या काही लेखांत मी ऐकीव माहितीवर विसंबून राहिलो असा मुद्दा डॉ.प्रदीप कर्णिक यांनी प्रथम उपस्थित केला आहे. वाद-संवादमधील माझ्या ह्या प्रत्युत्तराच्या आरंभीच 'उच्च शिक्षणावरील माझ्या 'विद्येच्या प्रांगणात' ह्या सदरातील लेखमालेत मी 'वास्तव, अनुभव आणि भाष्य' यांचे मिश्रण वाचकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, हे स्पष्ट नमूद केले आहे. त्यात 'वास्तव' मांडताना मी वृत्तपत्रीय किंवा ऐकीव बातम्यांचा आधार घेतला हा डॉ.कर्णिकांचा पहिला आक्षेप आहे हे खरे आहे, मात्र त्यात काही गैर आहे असे मला वाटत नाही. तसेच त्यांनाही वाटू नये, कारण डॉ.सुधीर गव्हाणेंच्या आधी

पाच वर्षे कुलगुरुपदावर डॉ.राजन वेळूकर असताना त्यांच्या कारभाराच्या चिंधड्या उडविणाऱ्या कितीतरी बातम्या वर्तमानपत्रात आल्या होत्या, त्यांचा मी वापर का केला नाही? त्यावर मी गप्प का आहे, असा डॉ.कर्णिकांचा दुसरा महत्त्वाचा आक्षेप आहे. म्हणजे वृत्तपत्रीय बातम्या त्यांना वर्ज्य नाहीत.

१. 'जवळपास सर्वच पारंपरिक विद्यापीठांच्या ठिकाणी मुक्त विद्यापीठांचे उपकेंद्र/अभ्यासकेंद्रच आहे' ह्या माझ्या वाक्यातून 'त्या त्या विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रात वाय.सी.एम.ओ.यू.चे केंद्र आहे' हेच सांगण्याचा माझा हेतू होता. मुक्त विद्यापीठांचे उपकेंद्र/अभ्यासकेंद्र मुक्त विद्यापीठच चालविणार, ते पारंपरिक विद्यापीठ चालविणार नाही हे मला माहिती नाही आणि त्याबद्दल मी चुकीची माहिती देईन असे डॉ.कर्णिकांना वाटावे याचे आश्चर्य वाटते; पण तो माझ्या वाक्यरचनेचा दोष असू शकेल हे मी मान्य करतो. कोल्हापूर येथील वाय.सी.एम.ओ.यू.च्या उपकेंद्र/अभ्यासकेंद्राच्यासाठी काही वर्षे शिवाजी विद्यापीठानेच जागा दिली होती 'कुठल्या' महाविद्यालयाने नाही. त्या केंद्राचे काम जे अधिकारी पाहत होते ते कोणत्या तरी कॉलेजात शिकवीत होते. त्यांना मुक्त विद्यापीठाने पुरेसा कर्मचारीवर्ग दिला होता किंवा नाही, हे मी कधी पाहिले नाही. मात्र ते अधिकारी त्या केंद्रात बसून शिवाजी विद्यापीठाच्या विरोधात कारवाया करीत होते हे सर्वज्ञात होते. अखेरीस आम्हांला व्यवस्थापन परिषदेचा ठराव करून सदिच्छेपोटी दिलेली ती जागा मुक्त विद्यापीठाकडून रिकामी करून घ्यावी लागली!

२. मुक्त विद्यापीठांचा संस्थात्मक विकास सहजासहजी झाला नाही, उलट पूर्ण वेळ पुरेसा कर्मचारी वर्ग नेमून दिलेला नसतानासुद्धा जुजबी स्टाफच्या मदतीने रीजनल डायरेक्टर्सनी प्रयत्न केले म्हणून तो विकास झाला. पण ही 'अंदर की बात' मला माहिती असण्याचे कारणच नाही. दूरशिक्षणाची गरज आहे आणि मुक्त विद्यापीठाचा विस्तार झाला ह्या गोष्टी डॉ.कर्णिकसुद्धा मान्य करतातच. काही रिकामटेकडी माणसे नाशिकच्या कार्यालयात बसून 'झारीतल्या शुक्राचार्या'प्रमाणे अडथळे निर्माण करतात, निरर्थक सभा-बैठकांसाठी हिंडत राहतात त्यामुळे विभागीय उपकेंद्राचा म्हणावा तितका विकास झाला नाही हा तपशील डॉ.कर्णिकांनी लिहिला म्हणून आम्हांला, म्हणजे जे मुक्त विद्यापीठाशी संबंधित नाहीत, त्यांना, समजला.

३. 'सामान्य जनतेला असे वाटते...' हे संदिग्ध लेखन आहे व ते समाजशास्त्राच्या लेखकाने करू नये असे डॉ.कर्णिक सुचवितात. 'सामान्य जनता म्हणजे कोण?' असेही ते मला विचारतात. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाबाबत मीसुद्धा त्या 'सामान्य जनतेपैकी एक' आहे अशाच भूमिकेतून मी ते लिहिलेय. नाशिकचे मुक्त विद्यापीठ, किंवा देशातील सर्व मुक्त विद्यापीठे हा काही माझ्या संशोधनाचा, व्यासंगाचा विषय नाही. सर्वच मुक्त विद्यापीठांत आणि दूरशिक्षण उपक्रमांत नावे नोंदविणारांची गर्दी पारंपरिक बी.ए., बी.कॉम, एम.ए., एम.कॉम, फार तर बी.एड., बी.लिब्. अशाच कोर्सेसमध्येच सर्वाधिक असते. 'इग्नौ'त ती ७५ टक्के इतकी असते. नाशिकच्या मुक्त विद्यापीठात वास्तव वेगळे असेल तर ते डॉ.कर्णिकांनी सांगावे. ज्याला ते 'संदिग्ध लेखन' म्हणतात त्यामुळे मी वाचकांची दिशाभूल केली आहे का? उलट त्यांनी दिलेल्या अधिकच्या माहितीमुळे माझ्या मुद्द्यांना पुष्टीच मिळतेय असेच कोणत्याही वाचकाला वाटेल.

गुंतवणूक जो करेल त्याने वाजवी नफा मिळवावा. त्याला हरकत नसावी, मात्र '८० टक्के खाजगी विनाअनुदानित संस्था फायद्यात चालत नाहीत' म्हणजे तोटा सहन करून त्या चालविल्या जात आहेत यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही. त्यांनी ती महाविद्यालये/अभिमत विद्यापीठे बंद करावीत. त्यांतील विद्यार्थी, प्राध्यापक, सेवकांचे काय करायचे ते मान्यता देणारे राज्य/केंद्र शासन, यूजीसी वगैरे पाहून घेतील. 'तुम्ही संस्था सुरू करा' असे त्यांच्या हातापाया पडून विनवण्या करायला त्यांचेकडे कोणी गेले नव्हते!

४. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे प्रादेशिक केंद्रात 'इग्नौ'च्या सहकार्याने केलेल्या सोयीचा आणि चाणक्य मंडलाचा तसा संबंध नाही ह्या तांत्रिक फरकाची मला माहिती नव्हती. पण मुक्त विद्यापीठाचे काही अभ्यासवर्ग चाणक्य मंडलात घेतले जातात, ही माहिती तिथे शिकवायला जाणाऱ्या दोन प्राध्यापकांनीच मला दिली. त्या दोघांना चाणक्य मंडल, मुक्त विद्यापीठ प्रत्येक सत्राचे किती मानधन देत असे ते त्यांनी मला सांगितले, पण मुक्त विद्यापीठ चाणक्य मंडलाला किती मानधन देते हे त्यांना माहीत नव्हते. म्हणून मी 'तपशील कळू शकला नाही' असे लिहिले. त्यावर 'हा तपशील मी कोणाला विचारला होता?' अशी डॉ.कर्णिक यांनी माझी उलटतपासणी सुरू केली. मुक्त विद्यापीठाच्या संकेत स्थळावर ही माहिती नव्हती. त्या दोन प्राध्यापकांनाही माहीत नव्हते, मग मी फोन उचलून अविनाश धर्माधिकारींना सरळ मानधनाबद्दल विचारणे हे डॉ.कर्णिकांना अपेक्षित होते का? कुणाच्या भेटीला त्यांच्या घरी गेल्यावर तिथले गालिचे, फर्निचर पाहून 'काय हो, तुम्हांला पगार नेमका किती मिळतो?' असे विचारणे शिष्टाचाराला सोडून असते. चाणक्य मंडलाला कुलगुरू डॉ.वेळूकरांमुळे 'आयते घबाड मिळाले' हे कर्णिकांना माहीत असेल; मला कसे माहीत असणार? मुक्त विद्यापीठांवरील लेख लिहिण्याच्या चार-पाच दिवस आधी मी यासंबंधी माहिती काढण्याचा प्रयत्न केला. 'केव्हा केला?' त्याच्या वेळा मी लिहून ठेवल्या नाहीत. ती माहिती मी का देत नाही

असा डॉ.कर्णिकांनी प्रश्न मला विचारलाय. आता त्यांना त्या दोन प्राध्यापकांची नावे, पत्ते आणि मोबाईल क्रमांक हा सर्व तपशील इथे द्यायचा का?

५. 'एम.फिल. पदवीसाठी चार हजार विद्यार्थ्यांना मुक्त विद्यापीठाने प्रवेश दिला' हे विधान विद्यापीठावर अन्याय करणारे आहे असे त्यांचे म्हणणे. तसे प्रवेश करावे लागले ह्यासाठी डॉ.कर्णिक यूजीसीच्या नेट-सेट बाबतच्या अनिश्चित, व गोंधळात टाकणाऱ्या धोरणाला दोष देतात आणि ते बरोबर आहे. मी यूजीसीतील धोरणात्मक गलथानपणाचे समर्थन करीत नाही; पण मार्गदर्शक देणे ही विद्यापीठाची जबाबदारी आहे की नाही? त्याचा दोष तत्कालीन कुलगुरूंचा होता की संचालकांचा, हे विद्यापीठाबाहेरच्या लोकांना कसे कळेल? तसेच कुलगुरूंनी एम.फिल. अभ्यासक्रमासाठी पाठ्यपुस्तके निर्माण करू दिली नाहीत आणि आता 'आऊटसोर्सिंग' पद्धतीने पुस्तके लिहून घेण्याचा राजमार्गच खुला झाला आहे हे डॉ.कर्णिकच कबूल करतात. ह्यातून मी चुकीची माहिती दिली नाही, तर डॉ.कर्णिकांना माझ्यापेक्षा जास्त तपशील माहिती आहे/होता एवढेच म्हणता येईल.

६. श्री.राजन वेळूकर हे पाच वर्षे कुलगुरुपदावर असताना जे गैरव्यवहार मुक्त विद्यापीठात झाले, जो मनमानी कारभार झाला, सर्व संकेत/नियमांचे उल्लंघन करून दोन अपात्र व्यक्तींच्या ओ.एस.डी. म्हणून नेमणुका करण्यात आल्या, वेळूकरांनी मंत्रालय आणि राजभवनात जो लाळघोटेपणा करून कुलगुरुपद मिळविले, त्यावर मी माझ्या लेखात मौन का पाळावे, असा महत्त्वाचा प्रश्न डॉ.कर्णिकांनी उपस्थित केलाय. एक तर वेळूकर या व्यक्तीवर मी काही लिहावे, टीकेचा भडिमार करावा एवढी मोठी ती व्यक्ती नाही. त्यांची शैक्षणिक योग्यता/पात्रता काय आहे हे अनेकांना माहिती आहे. त्यावर मी भाष्य करावे इतके त्यांना महत्त्व देण्याचे कारण नाही. नाशिकच्या आणि मुंबईच्या वृत्तपत्रांत त्यांच्याबद्दल आणि मुक्त विद्यापीठाचे धिंडवडे काढणारे लेख/बातम्या आल्या असतीलही, पण तितक्या प्रमाणात त्या पुण्यातील वृत्तपत्रांतून आल्या नाहीत. मुख्य म्हणजे वेळूकरांबद्दल मी काही न लिहिल्याचे कारण हे, की जेव्हा 'त्यांची कीर्ती दिगंत पसरत होती', त्या वेळी मी माझ्या एका कौटुंबिक समस्येशी झुंज देत होतो. २००२ ते २००८ ह्या सहा वर्षांत माझी पत्नी असाध्य दुखण्याने ग्रस्त होती. दोन परिचारिकांच्या मदतीने तिच्या शुश्रूषेत माझी सहा वर्षे कशी गेली, हे मला कळले नाही. त्यामुळे त्या दरम्यान कुलगुरू वेळूकर आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाबद्दल वृत्तपत्रांत काही प्रसिद्ध झाले असेल तरीही त्यांची मी एवढी नोंद घेतली नाही. तशी माझी मन:स्थिती नव्हती. ऑगस्ट २००८ मध्ये माझ्या पत्नीचे दु:खद निधन झाले. श्री.वेळूकरांच्या अनेक कृष्णकृत्यांबद्दल मी ऐकले होते पण ऐकीव माहितीवर काही लिहिणेही डॉ.कर्णिकांना मान्य नाही! त्यामुळे मी काही लिहिले नाही हे एका अर्थाने बरेच झाले! माहितीच्या अधिकाराचा वापर करून वेळूकर किंवा मुक्त विद्यापीठाबाबत अर्ज करून माहिती मिळवणे मला महत्त्वाचे वाटले नाही. माझ्यापेक्षा डॉ.कर्णिकांना अधिक सखोल माहिती होती, तर त्यांनी लेख लिहून आधी या प्रश्नांना वाचा का फोडली नाही? असा प्रतिप्रश्न मला करता येईल, पण तो मी करणार नाही. जशा माझ्या काही वैयक्तिक समस्या/अडचणी होत्या, तशा त्यांच्याही काही असतील असे समजून त्यांना आपण झुकते माप द्यायला पाहिजे हीच माझी भावना आहे. वेळूकरांबद्दल मी का लिहिले नाही, याचे मी प्रामाणिक उत्तर वर दिले आहे. काहींना मी ती पळवाट शोधली असे वाटत असेल तर दुर्दैव म्हणायचे!

७. मुक्त विद्यापीठाला चांगले कुलगुरू लाभत नाहीत, कृषि-विद्याशाखा प्रमुख डॉ.गुंजाळांसारखे उत्तम संशोधक, शिक्षण व प्रशासक उपलब्ध असताना त्यांना कुलगुरू नेमणुकीत डावलले गेले; नव्या कुलगुरूंना मराठी भाषेची नीट जाण नाही; अपात्र व्यक्तींच्या नेमणुका मुक्त विद्यापीठात होतात; सर्वत्र पैशाचा खेळ आणि गणित सुरू आहे, हे तपशील वाचून मुक्त विद्यापीठे आणि दूरशिक्षण हा चिंतेचा विषय बनला आहे याबद्दल खात्री पटते. राज्य शासनाला म्हणजे मंत्र्यांना आणि उच्च शिक्षण खात्याच्या मुख्य सचिवांना विद्यापीठाची शैक्षणिक विश्वासार्हता जपणारे, स्वच्छ पारदर्शी कारभार करणारे आणि विद्यापीठांच्या स्वायत्ततेला शिरोधार्य मानणारे कुलगुरू नकोत. 'थोडेसे वाका' म्हटले तर 'सपशेल लोटांगण/दंडवत घालायला तयार असणारे लोक शासनाला हवेत!' म्हणूनच आपण सर्व समविचारी मंडळींनी एका व्यासपीठावर येऊन उच्च शिक्षणातील सर्व गैरव्यवहार, अपप्रवृत्तींना चव्हाट्यावर आणायला पाहिजे; तसेच धोरणात्मक आणि अभ्यासक्रमांच्या रचनेत कोणते बदल आवश्यक आहेत याचे व्यवहार्य असे पर्याय लोकांपुढे ठेवले पाहिजेत.

८. कोणाच्या तक्रारीमुळे का होईना, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील गेल्या १५ वर्षांतील कारभाराच्या चौकशीसाठी राजभवनाच्या आदेशानुसार चौकशी समिती नेमली गेली आहे आणि समितीने कामालाही सुरुवात केली आहे, हे सुचिन्ह आहे. माझ्या लेखात काही त्रुटी असतील, काही माहिती अपूर्ण असेल, पण कुणावर अन्याय करणारी चुकीची विधाने नक्कीच नाहीत. पण त्या त्रुटींमुळे का होईना, डॉ.प्रदीप कर्णिकांना विस्तृत प्रतिक्रिया लिहावीशी वाटली याचे निदान दोन-चार टक्के श्रेय तरी त्यांनी माझ्या लेखाला द्यायला हवे असे मला नम्रपणे सुचवावेसे वाटते. माझ्या लेखमालेवर वेळोवेळी प्रतिक्रिया देणाऱ्या/कळविणाऱ्या सर्व चोखंदळ वाचकांना मन:पूर्वक धन्यवाद.

द. ना. धनागरे
dhanagare.dn@gmail.com
बी/७, दिव्यकुंज अपार्टमेंट्स, १०७६, गोखले रोड,
मॉडेल कॉलनी पी.ओ., पुणे ४११०१६.
Mob. : 9823243752

(या विषयावरील 'वाद-संवाद' आता थांबवित आहोत - संपादक.)

प्रदीप कर्णिक

सामान्य कुवतीचे, बौद्धिक वकूब नसलेले, अशैक्षणिक कामांत कमालीचा रस असणारे, राजभवन वा मंत्रालय इथे लाळघोटेपणा करून त्यांच्या जिवावर विद्यापीठात राजकारण करणारे, दादागिरी करणारे, सामान्य-गरीब कर्मचाऱ्यांना नाडणारे, बदलीचे हत्यार उपसून उत्तमोत्तम व्यक्तींना कुजवत ठेवणारे, होयबांचा घोळका करून चहा-भजी खात इतरांचे चारित्र्यहनन करणारे, दीर्घ द्वेषी, कोर्टबाजीत धन्यता मानणारे, विद्यापीठाचा अमाप पैसा वकिलांवर उधळणारे अत्यंत सामान्य कुलगुरू ज्या विद्यापीठांना लाभतात त्यांची दशा काय वर्णावी?

मुक्त कुरण : कुणीही यावे चारा खाऊन जावे!

२४ एप्रिलच्या 'साधना' अंकात समाजशास्त्राचे अभ्यासक व कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.द.ना.धनागरे यांचा 'दूरशिक्षणाच्या बुरख्याआड मुक्त विद्यापीठांचा मनमानी कारभार' या शीर्षकाचा लेख 'विद्येच्या प्रांगणात' या सदरामध्ये प्रकाशित झाला आहे. प्रथम त्यांना धन्यवाद देतो!

डॉ.धनागरे हे त्यांच्या सदरातून तात्त्विक विवेचन करणारे लेखन करीत होते, त्यामुळे त्यांच्या लेखनातून अनेक प्रकारच्या अपेक्षा पूर्ण होत होत्या; परंतु अलीकडे त्यांचे लेखन ऐकीव माहितीवर विसंबलेले दिसून येते, त्यामुळे लेखाचा गाभा योग्य असला तरी त्याचे तात्त्विक महत्त्व कमालीचे कमी होते. प्रस्तुत अंकात प्रकाशित झालेला लेख (आणि काही त्यापूर्वीचेही लेख) अशाच ऐकीव माहितीवर आधारलेला आहे, त्यामुळे याचे महत्त्व कमी होऊ नये म्हणून हा पत्रप्रपंच!

सदर लेख 'इग्नौ' या विद्यापीठाच्या कारभाराच्या संदर्भात आणि विशेषत: त्या विद्यापीठाचे कुलगुरू राजशेखरन् पिल्लई यांच्या संदर्भात असला तरी, त्यायोगे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठ या दोन विद्यापीठांच्या कारभारावरही भाष्य केले आहे. मुळात देशभर मुक्त विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे यांचे प्रचंड 'पीक' आलेले असताना व त्यांचे कारभारही इतकेच गलिच्छ असताना, केवळ या तीन विद्यापीठांवरच बोलणे योग्य ठरत नाही. तसेच 'इग्नौ'च्या संदर्भात लिहिताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाबाबत जाताजाता भाष्य करण्याइतका तिथला गैरकारभार 'गौण' नाही. त्यावर स्वतंत्रपणे आणि रीतसर माहिती घेऊन लेख लिहायला हवा.

ऐकीव माहितीवर आधारित लेख असल्याने त्यात काही गफलतीही झाल्या आहेत. उदा...

''जवळपास सर्वच पारंपरिक विद्यापीठांच्या ठिकाणी मुक्त विद्यापीठाचे उपकेंद्र आणि अभ्यासकेंद्र असून...'' (पृ. १८) असे विधान त्यांनी केले आहे. कोणत्याही पारंपरिक विद्यापीठात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे उपकेंद्र वा अभ्यासकेंद्र नाही. अशी अभ्यासकेंद्रे राज्यातील विविध महाविद्यालयांत आहेत. विद्यापीठात नाहीत.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रादेशिक केंद्रांची ठिकाणे सांगून (शहरांची नावे सांगून) डॉ.धनागरे असे लिहितात की, ''त्यामुळे त्या विद्यापीठाचा संख्यात्मक विकास हा अपेक्षितच होता.'' (पृष्ठ १८) विद्यापीठाने केवळ प्रादेशिक केंद्रे स्थापन केली, पण तिथे पूर्ण वेळचे कर्मचारी दिले नाहीत. दोन-तीन कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने 'रीजनल डायरेक्टर' कसेबसे काम करून घेतात. रिकामी माणसे नाशिकच्या कार्यालयात फालतू सभा घे, सभेच्या नावाखाली हिंडत रहा, असे करत असतात आणि इथे प्रादेशिक कार्यालये, विशेषत: मुंबईचे कार्यालय भरडले जाते. तरीही विद्यार्थ्यांची नोंदणी, परीक्षा घेणे, इतर कामे ते उत्तम करतात म्हणून विकास होतो. डॉ.धनागरे म्हणतात तसा सहज होत नाही. कोणत्याही कुलगुरूला प्रादेशिक कार्यालयांचा, कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न सोडवावा असे आजपर्यंत वाटले नाही. तो सुटला तर विकास अधिक होईल.

''सामान्यपणे जनतेला असे वाटते...'' (पृष्ठ १८) असे जे धनागरे लिहितात, ती 'जनता' कोण? ते कृपया स्पष्ट करावे. इतके संदिग्ध लेखन समाजशास्त्राचा लेखक कसे करू शकतो? त्याच परिच्छेदात शेवटी ते लिहितात, ''वास्तव मात्र बरेच वेगळे आहे.'' ते नेमके काय आहे? ते मात्र सांगताना पुन्हा ऐकीव माहितीचा आधार ते घेतात.

पुण्याच्या Virtual Classroom आणि स्टुडिओचे त्यांनी जे अभ्यासकेंद्र म्हणून उदाहरण दिले आहे

ते मुळात चुकीचे आहे. ती पुण्याच्या प्रादेशिक केंद्रात इग्नौच्या सहकार्याने करण्यात आलेली सोय आहे. अविनाश धर्माधिकारी व त्यांच्या 'चाणक्य मंडला'च्या हातांत आयते घबाड ठेवणारे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ.राजन वेळूकर यांच्याविषयी मात्र डॉ.धनागरे चकार शब्दही काढीत नाहीत. मात्र 'तपशील कळू शकला नाही' असे लिहितात. हा तपशील त्यांनी कोणाला विचारला होता? कधी व केव्हा विचारला? ती माहिती मात्र ते देत नाहीत. ते का?

विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्राबाबत त्यांनी आणखी एक उदाहरण घेतले आहे, ते म्हणजे एम.फिल.चे. ''नाशिकच्या विद्यापीठाने एका झटक्यात एम.फिल ह्या संशोधनपर पदवीसाठी चार हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला होता.'' हे विधानही विद्यापीठावर अन्याय करणारे आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फिल. हा सेट/नेटला पर्याय म्हणून जाहीर केल्यावर अनेक विद्यापीठांनी असे शिक्षणक्रम (जे पूर्वीपासून तिथे होतेच, पण विद्यार्थी मात्र येत नव्हते) जोमाने पुढे आणले. सेट/नेटग्रस्त विद्यार्थ्यांनी मोठ्या आशेने तिथे धाव घेतली. पुढे आयोगाने आश्चर्य वाटावे इतकी आपली भूमिका बदलली. त्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नावाने त्यांनी काहीही लिहिले नाही. चूक विद्यापीठाची नसून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धोरणाची नाही काय?

याच एम.फिल.च्या अभ्यासक्रमाबाबत डॉ.धनागरे पुढे लिहितात, ''नोंदणी केलेल्या एम.फिल.च्या विद्यार्थ्यांना प्रबंध लिहावा लागतो, त्यासाठी मार्गदर्शक नेमण्याबाबत मात्र समाधानकारक सोय झाली नव्हती.'' मार्गदर्शक पीएच.डी पदवी प्राप्त असेल असे पाहूनच संचालकांनी आखणी केली होती. अभ्यासक्रमाचे निकष, मार्गदर्शक तत्त्वे आखली होती, परंतु तत्कालीन कुलगुरूंनीच या तत्त्वांना हरताळ फासला. नवीन केंद्रांना भेटी न देताच, मार्गदर्शक उपलब्ध नसतानाही मान्यता दिल्या, त्याला संचालकांचा नाईलाज होता. कुलगुरूंमुळे संचालकांवर अन्याय करणे योग्य नव्हे.

विद्यापीठाची पाठ्यपुस्तके, त्यांचे लेखन, दर्जा, पुण्याच्या लेखकांवर होत असलेला अन्याय या बाबतींतही डॉ.धनागरे यांना 'तक्रारी करता आल्या.' पण यात तसे तथ्य नाही. संपादक, लेखक, भाषिक संपादक, संपादक मंडळ, निर्मितिविभाग, मुद्रितशोधक या मोठ्या टीमवर अन्याय करणारी ही बाब आहे. देखणी छपाई, उत्कृष्ट रचना, मराठी भाषेत आलेले नवनवे विषय, पारिभाषिक शब्द इत्यादींमुळे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची पुस्तके उत्तमच ठरतात. (मात्र आता त्यांच्या सुधारित आवृत्त्या, नवीन माहितीची भर घालून काढायला हव्यात.) मात्र विद्यापीठाच्या धोरणाला फाटा देऊन तत्कालीन कुलगुरूंनी एम.फिल.साठी पुस्तकेच निर्माण करू दिली नाहीत. ती न देताच कोर्स सुरू केले. विद्यापीठाच्या धोरणाला बाधा आणणाऱ्या त्या कुलगुरूंची चौकशी व्हायला नको का? आता तर काय 'आऊटसोर्सिंग' ही नामीच युक्ती मिळाली आहे, पैसा कमवायला. त्याची नक्कीच चौकशी व्हायला हवी.

व्यावसायिक अभियांत्रिकी, व्यवस्थापन, विज्ञान यांबाबत डॉ.धनागरे दीर्घ टिप्पणी करतात, ती अगदी योग्यच आहे; मात्र कृषिबाबत त्यांचे विधान अन्याय करणारे आहे. कृषीचे प्रमुख डॉ.गुंजाळ हे अत्यंत उत्कृष्ट प्रशासक आहेत. त्यांनी तयार केलेले वाचन साहित्य, केंद्राच्या मान्यतेसाठी दर वर्षी केली जाणारी पाहणी, त्यात आढळून आलेल्या स्थितीनुसार केंद्रांना दिलेला दर्जा, ह्या पद्धती उत्तम तर आहेतच, पण इतर ज्ञानशाखांनी त्यांचा कित्ता गिरवायला हवा इतक्या त्या प्रशंसनीय आहेत. त्या शाखा सुस्त झाल्या आहेत. त्यांना जागं करायला हवं. हलवायला हवं. त्यावर डॉ.धनागरे का बोलत नाहीत?

डॉ.धनागरे जितकं 'इग्नौ'च्या राजशेखरन पिल्लई यांच्याबद्दल लिहितात, त्याच्या तुलनेत एक टक्कासुद्धा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पाच पाच वर्षांचा कालावधी पूर्ण केलेल्या कुलगुरूंबाबत लिहीत नाहीत. ते का? ते सोडून पाच महिने केवळ ज्यांनी प्रभारी कुलगुरू म्हणून कारभार पाहिला त्यांच्या बाबत मात्र लिहितात व तेही वर्तमानपत्री बातमीच्या हवाल्यावर. वर्तमानपत्रांचाच हवाला द्यायचा तर डॉ.गव्हाणेंच्या आधीचे कुलगुरू डॉ.वेळूकर यांच्या कारभारांच्या चिंधड्या उडवणाऱ्या किती बातम्या वर्तमानपत्रांत आल्या होत्या! दूरदर्शनवरही दिसल्या होत्या आणि कर्मचारी, संघटनांच्या पातळीवर 'काळिमा' लागण्याइतक्या नीच पातळीवर जाऊन धडकल्या होत्या. त्याबाबत डॉ.धनागरे का गप्प? वर्तमानपत्राचाच जर दाखला द्यायचा तर डॉ.गव्हाणे यांच्या कार्याचा गौरव करणारा लेख 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये आला होता. त्याचा डॉ.धनागरे का उपयोग करीत नाहीत? डॉ.गव्हाणे यांच्यावर बोट ठेवताना प्रकाश वाणी यांच्या तक्रारीचाही ते हवाला देतात, पण मुक्त विद्यापीठात पद नसताना, पात्रता नसताना श्री.वाणी यांना O.S.D. या पदावर आणले गेले व नंतर त्यांच्याकडे कुलसचिवांचा 'चार्ज' दिला गेला, याचा मात्र ते उल्लेखही करीत नाहीत; किंवा समाजकल्याण खात्यातर्फे त्यांची चौकशी चालू होती ती का व कशासाठी, याचाही धनागरेंना उल्लेख करावासा वाटला नाही. श्री.कोवळे असेच एक O.S.D. (व नंतर कुलसचिवांचा चार्ज घेणारे दुसरे गृहस्थ), त्यांना रातोरात विद्यापीठातून पोबारा करावा लागला. तो का? या पलायनाला कोणी साहाय्य केले? कोणाच्या ओळखीने हे दोन O.S.D. विद्यापीठात घुसले होते, याची ठोस माहिती डॉ.धनागरे यांना मिळू शकते. ऐकीव वा वृत्तपत्रीय बातम्यांवर अवलंबून राहण्याची त्यांना गरज भासणार नाही. माहितीच्या अधिकारातही डॉ.धनागरे माहिती मागू शकतात. असली माणसं तक्रारी करणार आणि राजभवन त्यांच्या तक्रारीवर वेळ व पैसा खर्च करणार. वा! अजब न्याय आहे!

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाबाबत वाईट वाटतं. तळागाळातल्या माणसांसाठी, स्त्रिया आणि शिक्षणव्यवस्थेतून बाहेर फेकल्या गेलेल्या माणसांसाठी हे विद्यापीठ निघालं तेव्हा महाराष्ट्रातल्या तमाम अनुदानित महाविद्यालयांनी, प्राध्यापक-ग्रंथपालांनी सहकार्याचा हात पुढे केला. मदत केली. जागा, वीज, प्राध्यापक सर्व काही अत्यंत अल्प दरात उपलब्ध केले. काही गोष्टी तर फुकट दिल्या. पुढे मात्र ही तत्त्वं साधारणत: मा.कुलगुरू अशोक प्रधान यांच्या कालखंडानंतर गुंडाळून ठेवून खाजगी संस्थांच्या घशात गेली. पैसा कमवणे हाच उद्देश झाला. जुने आहे तेच पुन्हा पुन्हा छापायचे

आणि विद्यार्थ्यांच्या गरजेचा फायदा उठवत पैसा गोळा करायचा. नवी पुस्तके, नवे अभ्यासक्रम अपवादानेच आले. आपली प्रशासकीय जबाबदारी संस्थांवर ढकलायची व विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांनी मजा मारायच्या असा खाक्या झाला. पेपर तपासायला जो कोणी येईल त्याला पकडायचे व त्याच्याकडून कसेबसे काम करून घ्यायचे. केंद्रांची तपासणी नाही, प्रत्येक अभ्यासक्रमासाठी किमान दोन ते तीन प्राध्यापक नेमायला हवेत, याचा त्यांना पत्ताच नाही. कामचलाऊ सेवानिवृत्त माणूस घ्यायचा किंवा कोणावर तरी पाच-सात हजारावर जबाबदारी द्यायची व विद्यापीठाचा पैसा वाचवायचा, असले सारे धोरण! प्रकुलगुरूच संस्था काढतो, तिथे इतरांचे काय? नवे अभ्यासक्रमच असे घ्यायचे की त्यात पुस्तके काढायला लागणार नाहीत किंवा काढायचीच झाली तर 'आऊटसोर्स'चा वापर करायचा. पूर्वी ६०-४० असे पैशाचे गणित होते. ६० टक्के रक्कम विद्यापीठाकडे यायला हवी, यासाठी विद्यापीठ दक्ष होते. आता हे प्रमाण ८०-२० किंवा ७०-३० झाले आहे. म्हणजे २० किंवा ३० टक्क्यांवर विद्यापीठ खूष असते. याची कोणी दखल घेणार आहे का? राजभवन याची चौकशी करणार आहे का?

हे सगळे का होते? कारण सामान्य कुवतीचे, बौद्धिक वकूब नसलेले, अशैक्षणिक कामांत कमालीचा रस असणारे, राजभवन वा मंत्रालय इथे लाळघोटेपणा करून त्यांच्या जिवावर विद्यापीठात राजकारण करणारे, दादागिरी करणारे, सामान्य-गरीब कर्मचाऱ्यांना नाडणारे, बदलीचे हत्यार उपसून उत्तमोत्तम व्यक्तींना कुजवत ठेवणारे, होयबांचा घोळका करून चहा-भजी खात इतरांचे चारित्र्यहनन करणारे, दीर्घ द्वेषी, कोर्टबाजीत धन्यता मानणारे, विद्यापीठाचा अमाप पैसा वकिलांवर उधळणारे अत्यंत सामान्य कुलगुरू ज्या विद्यापीठांना लाभतात त्यांची दशा काय वर्णावी? याचे एकच उदाहरण बोलके आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ.वेळूकर यांची विद्यापीठात रिक्षाचालकांशी बाचाबाची झाली तर त्यांनी लगेच सर्व रिक्षांना विद्यापीठात येण्यास बंदी केली. प्राध्यापक, विद्यार्थी, पालक विद्यापीठाच्या दारापासून हातांत बॅगा वगैरेंची ओझी वाहत पाच वर्षे चालत येत होती, पण एकाही महाभागाला असे वाटले नाही की, याला विरोध करावा. ज्यांचा विरोध होता त्यांनी विद्यापीठात येणे बंद केले; पण तिथल्या प्राध्यापक-कर्मचाऱ्यांना याचे काहीही वाटले नाही. ज्यांच्या द्वेषाने बदल्या केल्या, त्यांच्याबाबत सहकारी प्राध्यापकांना काहीही वाटले नाही. अशा 'मूक' समाजात दुसरे काय होऊ शकते? डॉ.द.ना.धनागरेंसारख्या विचारवंताला आपली लेखणी असल्या माणसांवर व्यर्थ खर्च करावी लागते. यातून निष्पन्न काय? पुन्हा राजकारण, द्वेष, राग, उट्टे काढणे, सुधारणा नाहीच. कारण सर्वच समाज थंड झालाय. आपण सर्वच जण भेकड झालो आहोत. हे सार काढायचे का? होय, हेच काढावे लागेल.

मराठी लोकभाषेत शिक्षण देणारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आता सहजपणे इंग्रजी शिक्षणक्रम आणते. राबवते. पैसा कमवते. कोणालाही याची लाज वाटत नाही. चाडही नाही. महाराष्ट्रात एक विद्यापीठ मराठी भाषेसाठी, मराठी भाषेत शिक्षण देण्यासाठी सुरू होते आणि २० व्या वर्षांतच त्या विद्यापीठाला मराठी बोलणारा, जाणणारा, लिहिता येणारा कुलगुरू मिळू नये? मराठी भाषेचा गळा काढून रडणाऱ्या पक्षांना, संघटनांना (कर्मचाऱ्यांच्या संघटनांमध्ये त्यांच्याच युनियन्स आहेत) याचे काहीही वाटू नये, याला काय म्हणावे?

कवडीचीही गरज नसताना प्रचंड मोठा दहा-बारा कोटीचा स्टुडिओ बांधला जातो. गेल्या १० वर्षांत या विभागाची निर्मिती काय? शून्य! चार-दोन वाचकांच्या पलीकडे वाचक नसताना प्रचंड मोठी ग्रंथालयाची आठ-दहा कोटींची इमारत बांधली जाते. पंचतारांकित हॉटेल असावे असे विश्रामगृह बांधले जाते. त्याच्या फर्निचरची बिले आपला सेवाकाळ संपायच्या आत चुकती केली. फर्निचर अजून यायचेच आहे. ही बांधकामे का, हे कळायला कोणी ज्योतिषी नकोय. असो. डॉ.धनागरे यांना धन्यवाद! एका महत्त्वाच्या विषयावर आपण लिहिलेत; पण वरील माहिती दिली असतीत तर अधिक बरे झाले असते. अर्थात, उपयोग काहीच झाला नसता म्हणा! राजरोसपणे व्यवहार सुरूच राहिले असते व राहतील.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात डॉ.भा.दि.फडके, इरगोंडा पाटील, सुनील कर्णिक, शरच्चंद्र बडोदेकर, अतुल पेठे, मुकुंद टाकसाळे यांच्यासारखी चांगली माणसे होती. त्यांनी केलेले योगदान आजही वाखाणले जाते. डॉ.रमेश वरखेडे, श्री.चंद्रकांत भोंजाळ, डॉ.शरणकुमार लिंबाळे, श्री.दादा मोरे यांच्यासारखे उत्तम लेखक विद्यापीठात कार्यरत आहेत, पण त्यांना अडगळीत टाकले जाते. डॉ.सूर्या गुंजाळ हे व्यक्तिमत्त्व तर फारच मोठे आहे. जागतिक बँकेने ग्लोबल ओपन फूड अँड ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी स्थापन केली. त्याच्या साऊथ एशिया विभागाचे विभागीय संचालक म्हणून डॉ.गुंजाळ यांची तीन वर्षासाठी निवड झाली होती. हैद्राबादला ते तीन वर्षे होते. डॉ.गुंजाळांसारख्या माणसाची कुलगुरू म्हणून मात्र निवड झाली नाही. त्याऐवजी प्राचार्य व्हायचीसुद्धा लायकी नसणारी माणसे डाव साधून गेली, त्याला काय म्हणावे? कुलगुरू जरी नाही तरी, कोणीही सूज्ञ माणूस अशा 'संपन्न', बुद्धिमान, हुषार माणसाला प्रकुलगुरू करेल की नाही? पण तसे करायला किमान शैक्षणिक बुद्धिमत्ता हवी ना? मुळात या विद्यापीठाला प्रकुलगुरू हवाच कशाला? तो असू नये अशी मागणी संघटनेने केली होती, पण दोन्ही पदांची 'अ'राजकीय सोय नाही तर कशी लागली असती? पुढे याच कुलगुरू व प्रकुलगुरू यांच्यातून विस्तव जाईनासा झाला, हेही विद्यापीठाने पाहिलेच आहे.

किती लिहावे? डॉ.धनागरे सर, एखादा ग्रंथ लिहिता येईल असे हे मुक्त कुरण आहे! कोणीही यावे चारा खाऊन जावे, अशी परिस्थिती! तेव्हा तूर्तास इथे थांबू या!

डॉ. प्रदीप कर्णिक
३०१, टॉवर नं. १, फ्लॉवर व्हॅली,
नारळीपाडा, ठाणे ४००६०१
Mob. : 9821299736

। म हा रा ष्ट्र । च रि त्र । ग्रं थ मा ला । सं च ।

महाराष्ट्र चरित्र-ग्रंथमाला (संच)

संपादक

अरुण टिकेकर / द० ना० धनागरे / प्र० ना० परांजपे

- एकूण चरित्रे ६१ + साक्षेपी संपादक श्री० अरुण टिकेकर यांच्या विवेचक प्रस्तावनेसह
- एकूण पृष्ठसंख्या ११,००० (डेमी)

- मूल्य : रुपये १०,०००/-
- प्रकाशनपूर्व सवलत मूल्य : रुपये ७,५०० + टपाल/कुरियर खर्च रुपये ५०० = एकूण रुपये ८०००/-

प्रकाशनपूर्व सवलत नोंदणी :
दिनांक १ मे २०१० ते १५ जुलै २०१०

भव्य प्रकाशन समारंभ : सप्टेंबर २०१०

- प्रकाशनपूर्व सवलत मूल्याची रक्कम आपण डिमांड ड्राफ्ट/ॲटपार धनादेश/रोख/मनिऑर्डर/ 'श्री गंधर्व-वेद प्रकाशन पुणे' या नावाने काढून, आमच्या प्रकाशन संस्थेकडे जमा करावी आणि आपल्या संचाची नोंदणी करावी.
- महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच आपल्याला दोन आकर्षक बॉक्समधून प्रकाशन समारंभानंतर आपण दिलेल्या पत्त्यावर पोस्टाद्वारे किंवा कुरियरद्वारे पाठवण्यात येईल.

संपर्क : श्री गंधर्व वेद प्रकाशन
१२८६ सदाशिव पेठ, चिमण्या गणपती जवळ,
पुणे- ४११ ०३० दूरध्वनी : २४४९३५०२
९८२३१९०७३४, ९४२२०८६०८४
Email : gandharv_ved@hotmail.com

गंधर्व-वेद प्रकाशन



महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्यानिमित्त एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकामधील बुद्धिमान, प्रतिभावान व कर्तबगार मराठी व्यक्तींचा चरित्र ग्रंथमाला संच प्रकल्प !!

चरित्रनायक । चरित्रकार

- जगन्नाथ शंकरशेठ । अमला नेवाळकर
- आचार्य बाळशास्त्री जांभेकर । व्ही० ए० पाटील
- दादोबा पांडुरंग तर्खडकर । अरुणा ढुमाषी
- भाऊ दाजी लाड । अ० प्र० जामखेडकर
- 'लोकहितवादी' गोपाळ हरी देशमुख । अरुण जोशी
- विष्णुबावा ब्रह्मचारी । न० म० जैन
- महात्मा जोतीबा फुले । उमेश बगाडे
- रामकृष्ण गोपाळ भांडारकर । बा० ल० मंजूळ
- महादेव मोरेश्वर कुंटे । पुष्पा लिमये
- शंकर पांडुरंग पंडित । अविनाश सहस्रबुद्धे
- न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे । अरुण टिकेकर
- अण्णासाहेब किर्लोस्कर । अर्चना ढेकणे
- विष्णुशास्त्री चिपळूणकर । छाया बकाणे
- न्यायमूर्ती काशिनाथ त्र्यंबक तेलंग । नरेंद्र चपळगावकर
- शंकर बाळकृष्ण दीक्षित । अशोक ठाकूर
- गोपाळ गणेश आगरकर । अविनाश कोल्हे
- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक । सदानंद मोरे
- पंडिता रमाबाई । मीरा कोसंबी
- महर्षी धोंडो केशव कर्वे । विलास खोले
- रमाबाई रानडे । माधवी कामत
- श्रीमंत सयाजीराव गायकवाड । दामोदर नेने
- शिवराम महादेव परांजपे । प्र० ना० परांजपे
- इतिहासाचार्य वि० का० राजवाडे । सुरेश देशपांडे
- 'रियासत'कार सरदेसाई । श० श्री० पुराणिक
- गोपाळ कृष्ण गोखले । अशोक मोडक
- साहित्यसम्राट न० चिं० केळकर । सुरेश जोशी
- नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर । तारा भवाळकर
- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे । सुहास कुलकर्णी
- छत्रपती शाहू महाराज । भा० ल० भोळे
- रँग्लर र० पु० परांजपे । अनंत देशमुख
- प्राध्यापक धर्मानंद कोसंबी । मो० गो० धडफळे
- गाडगेमहाराज । मुकुंद अनगळ

चरित्रनायक । चरित्रकार

- भारतरत्न डॉ० पां० वा० काणे । पद्माकर दादेगावकर
- लोकनायक माधव श्रीहरी अणे । द० ना० धनागरे
- सेनापती पांडुरंग महादेव बापट । यशवंत सुमंत
- गुलाबरावमहाराज । सच्चिदानंद शेवडे
- प्रा० रघुनाथ धोंडो कर्वे । ज० शं० आपटे
- स्वातंत्र्यवीर वि० दा० सावरकर । शं० ना० नवलगुंदकर
- ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर । मीना वैशंपायन
- डॉ० शंकर पुरुषोत्तम आघारकर । पंडित विद्यासागर
- प्रा० श्री० म० माटे । विमल भालेराव
- कर्मवीर भाऊराव पाटील । रमेश जाधव
- डॉ० बाबासाहेब आंबेडकर । किशोर गायकवाड
- आचार्य शं० द० जावडेकर । राजेश्वरी देशपांडे
- आचार्य विनोबा भावे । गणेश राऊत
- डॉ० विठ्ठलराव विखे-पाटील । अनिल शिंदे
- आचार्य प्र० के० अत्रे । विलास खोले
- डॉ० पंजाबराव देशमुख । नीतीन रिंढे
- कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे । वासंती दामले
- साने गुरुजी । चैत्रा रेडकर
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी । अरुंधती खंडकर
- डॉ० धनंजय रामचंद्र गाडगीळ । सुलभा ब्रह्मे
- उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर । भा० र० साबडे
- स्वामी रामानंदतीर्थ । सुभाषचंद्र वाघोलीकर
- इरावती कर्वे । रामचंद्र मुटाटकर
- गोळवलकर गुरुजी । मधू देवळेकर
- प्रा० डी० डी० कोसंबी । अशोक चौसाळकर
- तुकडोजीमहाराज । प्र० ल० गावडे
- दुर्गा भागवत । प्रतिभा रानडे
- बाबा आमटे । सुचित्रा घोगरे-काटकर
- यशवंतराव चव्हाण । विश्वास नाईकनवरे
- बाळशास्त्री हरदास । यशवंत पाठक
- पांडुरंगशास्त्री आठवले । राजेंद्र खेर
- नरहर कुरुंदकर । विनोद शिरसाठ

Mohan Thatte

महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथ विक्रेत्यांकडे 'महाराष्ट्र चरित्र ग्रंथमालेच्या' संचाची नोंदणी सुरू आहे!

साधना साप्ताहिक :
१२ जून २०१०

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र. एल-२/आर.एन.पी./पी.एन.सी.डब्ल्यू./डब्ल्यू-१७८/२००९-२०११
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं. ७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केटयार्ड पी.एस.ओ. सॉर्टिंग ऑफिसमधून

'साकेत'ची नवीन प्रकाशने

विद्यार्थी जीवनातील प्रश्न, अडचणी, संघर्ष आणि आनंद यावर प्रकाश टाकणारी कादंबरी.

परक्यापरी असा मी

सुनील मायी

किंमत १८०/-ट.ख.-२५ रु.

काजोळ ही एका संस्कारक्षम संवेदनशील बालमनाची उत्कट अभिव्यक्तीची कादंबरी.



काजोळ

बाबा भांड

चौथी आवृत्ती

किंमत १२५/-ट.ख.-२५ रु.

आजच्या समकालीन आघाडीच्या महत्त्वाच्या कादंबरीकाराची कादंबरी.



डाईच्या घरी डाई

जी. के. ऐनापुरे

किंमत १६०/-ट.ख.-२५ रु.

ग्रामीण जीवन, तेथील संघर्ष, दारिद्र्य आणि प्रश्न यांचा वेध घेणारा कथासंग्रह.



कागूद

गणेश आवटे

किंमत १३०/-ट.ख.-२५ रु.

साकेत प्रकाशन प्रा.लि.
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड, औरंगाबाद. ४३१ ००५
दूरध्वनी : (०२४०) २३३२६९२/९५, मो.९८२२४७८८९५.
info@saketpublication.com

पुणे शाखा : (रविवार बंद)
ऑफिस नं. ०२ 'ए' विंग, पहिला मजला, धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, ३७३ शनिवार पेठ, ठाकरसी कन्या शाळेजवळ, पाटे हाईट्स समोर पुणे-३०मो. ९४२२२२५४०७

साकेत ग्रंथवार्ता
मासिक नियमित वाचा.
वार्षिक वर्गणी-१००/-
त्रैवार्षिक वर्गणी-२००/-
पंचवार्षिक वर्गणी-३००/-

आपले नाव,पत्ता व इ-मेल ९८८१७४५६०५ वर SMS करून नवीन पुस्तकांची माहिती मोफत घरपोच मिळवा.